Parece assim que o cérebro dos conselheiros eleitos do povo está escravizado ao govêrno pois nem refletiram que num país onde os servidores do Estado não estão pagos em dia dos seus vencimentos, são um luxo na miséria estas diversões, festejando a morte com *Te-Deum*, iluminações, concertos musicais e foguetes.

Se *OBharat* tivesse registado a mesma coisa nas suas colunas, nao faltariam por ai fora patriotas que lhe atribuissem o tal "pendor anti portuguez" tao familiar ao outro Cunha que, quando se faz politico, vomita so' disparates no seu *Heraldo*.

Mas, quem da'-o que pode, nao esta' obrigado a mais.

ESTAMOS ENTENDIDOS...

Sob a epigrafe *Orçamento da India* le-se no nosso colega *O Heraldo* de ontem:

"Em resposta ao telegrama circular enviado aos governadores das nossas colonias, pedindo as suas opinioes sobre o equelibrio dos orgamentos coloniais, o sr. Carlos de Vasconcelos, ministro das Colonias, recebeu as seguintes respostas—do governador da India dizendo ser possivel a redugao de 100.000 rupias na parte relativa ao diploma colonial n° 38 que se refere ao funcionalismo. Propoe o mesmo governador a iliminagao de 3 conservadores judicias, a extingao de vara civel de Goa e extingao da Direcgao da Instrucgao, com cujas medidas assegura o equilibrio do orgamento daquela provincia."

A informagao transcrita e' do *Comercio do Porto*, o que nos garante a sua veracidade.

Ainda que nos ultimos tempos as informagoes que os leitores conhecem segundo as circunstancias do momento ou conveniencias da ocasiao, ora dissessem que o nosso deficit era pavoroso, ora afirmassem que a situagao do tesouro nao era tao precaria como se supunha, o que e' certo e' que era facto a existencia do deficit, assim como era certo que, pavoroso ou nao, esse deficit ia aumentando sempre ...

De forma que, governantes e governados, a todo o momento, se iam convencendo de que a hora do sacrificio soara para todos!

A informagao acima transcrita porem, deante do que, como viram foi [illegible]do ao ministro das colonias, [illegible] o novo ano, a grata [illegible]sse sacrificio se [illegible] cessando [illegible]go numa previsao lugubre, o proprio abismo. Agora? Esta' assegurado o ebuilibrio. Como? Com esse enorme sacrificio de governantes e governados? Felizmente, nao, porque o sacrificio se limita a muito pouco. Quere dizer, sao apenas sacrificados:

a) **3 CONSERVADORES JUDICIAIS**
b) **A VARA CIVEL DE GOA**
c) **A DIRECGAO DE INSTRUCGAO**

Entretanto se, de alguma forma nos fosse permitida uma opiniao sobre o *assegurado equilibrio*, no's talvez, poderiamos ainda mostrar que em vez de serem sacrificados em proi do citado equilibrio, os tres servigos acima apontados, bastava que, para o fim em vista, fossem sacrificadas, tao somente, 3 pessoas, abaixo indicadas:

a) *Dr. Amilcar Ribeiro*
b) *Dr. Taumaturgo Pereira*
c) *Luis de Menezes*

E, por nosso turno, assegurariamos positivamente, que o resultado seria o desejado...

Eis o que escreve o *Diario da Noite*.

Nao comentamos, porque ha coisas que dispensam, por completo, comentos odientos ou vingativos por sua demasiada clareza.

Mais um facto, pois, indicativo de como entre no's brota o servilismo!

RA'PIDOS COMENTA'RIOS

E' para meditar o que no jornal metropolitano *O Mundo* escreve o sr. Antonio Ribas de Avelar sobre a maneira como um certo juiz encarou a sua independencia e sobre o resultado das nassas sindicancias.

Leiam o seguinte:

Ouvi dizer que havia um juiz que se recusava a dar cumprimento a um acordao do Supremo Tribunal de Justiga. Achei extranho, mas fui averiguar e tenho de confessar que o caso e' verdadeiro. O Juiz e' independente nos seus julgamentos, mas, para que essa independencia lhe seja garantida necessaria se torna uma punigao imediata para quem abusa. E aquele juiz nao tem o direito de querer uma independencia, em nome da qual abusa, recusando-se a cumprir o que superiormente lhe e' ordenado. E, a proposito do procedimento do juiz, diz-se mal da justiga, como se ela tenha culpa desta excepgao.

As sindicancias no nosso pais so tem servido de fonte de receita para os sindicantes. Algumas nunca mais acabam. Ninguem e' punido quando se prova, nem quando se nao prova, embora seja sempre patente a justiga da sindicancia. Quando se prova, a prolitiquice abafa o caso e dai resulta que em outras se nao faz [illegible] porque as pessoas chamadas a [illegible] recusam a falar verdade, [illegible] que uns sejam filhos [illegible]ssim fica tudo [illegible] a men- [illegible]

भारत

मिति पौष शु० १३ शी शके १८४६

मिळालेल्या हक्कांस जपा !

आज १४ वर्षे होऊन गेलीं. पण त्या दिवसाची आठवण अजून बुझाली नाहीं व ती बुझणें शक्यहि नाहीं. हिंमतदार हिंदुस्थानाच्या पश्चिम सीमा रेषेवर 'सुखंचमे शयनंचमे' हा आप्पल पोटेपणाचा मंत्र जपीत नासिकाग्रीं दृष्टि रोखून पाश्चात्य सुधारणेशीं तन्मयता नव्हे, एकरूपता गांठण्यासाठीं टपून बसलेल्या आमच्या गोमांतकाच्या पूर्व क्षितीजावर एकाएकीं स्वराज्य सूर्याचा अनाहुतपणें अकल्पित उदय झाला.

निसर्गाचा नियंत्रित नियम असा आहे कीं, दर प्रभातीं रव्युदयापूर्वी उषःकाल प्राप्त होऊन तत्समयीं क्षितीजावर उषेचा आल्हाददायक उगम होतो. व त्या मागून सूर्यसारथी अरुण तीची जागा पटकावण्यास पुढें सरतो. हे सर्व प्रकार यथाशास्त्र घडून आल्यानंतरच प्रतापशाली प्रभाकर आपले सोनेरी किरणशलाक हलुदळु क्षितीजावर फेंकून सारी सृष्टी आनंदवून सोडतो. आदित्योदयाची वेळ झाली; यापुढें झोंपेंत निमग्न न होतां उठून आपापल्या नित्यनैमिक कृत्यांस सुरवात करा हें दाही दिशांस व जगांतील प्रत्येक प्राण्यांस सुचविण्यास्तव निसर्गाला देखील वरील परिपाठ पाळावा लागतो; पण आमच्या उदयोन्मुख गोमांतकांत स्वराज्य रविउदयास येईपर्यंत उपरिनिर्दिष्ट प्रकारांपैकीं एकहि दृश्य स्वरूपांत आला नाहीं. आधींच नृपनीतीला विचित्र स्वभावी वारांगनेची सार्थ उपमा दिलेली व तशांत पोर्तुगीज सरकारचें तर सारेंच विचित्र. सन १९१० च्या ५ आक्टोंबर रोजीं सर्वत्र, गोमांतकाला रिपब्लिकचे अधिकार दिले गेल्याचें, विद्युत्संदेशानें जाहीर होईपर्यंत अज्ञ व अप्रबुद्ध जनतेला तर सोडाच पण स्वतःस सुज्ञ व सुप्रबुद्ध ह्मणवून घेणाऱ्या वरिष्ट सरकारी कामदारांना देखील ह्या अवचित राज्य सूत्रकंपाचा मागमूस लागूं दिला गेला नव्हता. गोमांतकांतील जनतावर्ग स्वराज्याला हपापला होता ह्मणून नव्हे तर पोर्तुगीज सरकाराच्या कांहीं पडद्याआड गुपचुप घडले. त्या गुप्त खलबतांचा प्रभाव ह्याच नात्यानें आमच्या गोव्याला हे स्वराज्याचे हक्क दिले गेले होते हेंच ह्या प्रसंगाच्या अकल्पिततेचें कारण होय!

अशा रीतीनें आमच्या पूर्वजांची—किती जन्मींची कोण जाणे—सबळ पूर्वपुण्याई फळास आल्यावर अखिल गोमांतकीयांत व विशेषत: देशहिताकांक्षी तरुण पिढींत आनंद [illegible] जोरदार लाट उसळली इतरेजनाची गोष्ट न उल्लेखितां लिहावयाचें ह्मणजे स्वराज्य प्राप्तीच्या त्या अनुपम व अवर्णनीय उल्हासांत क्षणभर देहभान विसरून स्वतः आह्मीं पोर्तुगीज सरकारचा त्यांनीं दाखविलेल्या औदार्याबद्दल व दिलेल्या समतावादास सक्रीय सहानुभूतीबद्दल उदोउदो (व्हीव्ह, व्हीव्ह) केला व त्या आनंदाच्या उर्मीत नाचलोंहि. कां नाहीं नाचणार ? स्वज्ञातीभाई व स्ववर्गबंधू आर्यलंडांत जवळ जवळ दीडशें वर्षे स्वराज्यासाठीं तोफा, सैनिक, आरमार इत्यादि प्राणघातक शक्तीच्या भरपूर पुरवठ्याच्या जोरावर इंग्लंडशीं झगडत असतां, त्यांच्या मागणीकडे ढुंकून देखील बघण्याचा ब्रिटिश सरकारची तयारी नाहीं हें दृश्य धडधडीत डोळ्यापुढें दिसत असतां, अर्जे, विनंत्या, डेप्युटेशनें ह्या लोकसमाजाच्या प्रगतिकडील ओढीचे निदर्शक अशा प्रकाराची मुळींच वाट न बघतां, केवळ कर्तव्य ह्मणून आवतोनोमीचें गाठोडें रिपब्लिकनच्या फडक्यांत गुंडाळून आह्मां 'जिंतीवाच्या' व 'काळ्या युरोपियनाच्या' हातात हळूच देतानां पाहून कृपाळु पोर्तुगीज सरकारच्या न्यायदानाविषयीं कोणा 'मायेच्या पूता' च्या तोंडून प्रशंसोद्गार निघणार नाहींत व कोण मायेचा पूत त्यांना धन्यवाद देणार नाहीं ?

पण दयाळु पोर्तुगीज सरकारनें आपल्या प्रजाहितदक्ष (?) स्वभावानुसार गोमांतकाला दान दिलेल्या स्वराज्याचा उपयोग स्वोन्नति गांठण्यांत आह्माला झाला काय ? गोमांतकाच्या प्रजेतर्फेंचे असे निवडून कौन्सिलांत गेलेले सभासद आजपर्यंत कोणत्याहि महत्वाच्या बाबतींत सरकारच्या विरूद्ध जाण्यास, सद्सदविवेक बुद्धीस जागून, धजावले आहेत काय ? गोमांतकाच्या प्रगमनपर गतीवर गदा आणणाऱ्या कृत्यांबद्दल त्यांनीं आजपर्यंत निषेध प्रगट केला आहे काय ? गरिबांस पोटापाण्यास लावण्याचा तर सोडाच पण आहे त्या स्थितींत त्यास सुखी राखण्याचा—निदान त्यांस त्रास तरी न देण्याचा—एकादा ठराव त्यांनीं आजपर्यंतच्या आपल्या कौंसिलांतील कारकिर्दींत पास केला आहे कांय ? इतउत्तर आह्मीं असें विचारतों कीं, आपण कौन्सिलांत जाऊन लोकहिताचीं कोणकोणतीं कार्यें केलीं ह्याची ते जरा आह्मांस यादि देऊं शकतील काय ?

वरील सर्व प्रश्नांस उत्तर जेथें नकारात्मकच ठेवलेलें तेथें कोणी झालें तरी काय लिहील ! गरिबांचें हित ज्यांत बेधडक लाथाडलें जातें त्यास स्वराज्य ह्मणून त्या पवित्र शब्दास विटाळणें महापातक होय.

ज्या दिवशीं पोतुगाल सरकारनें गोमांतक 'रेपुब्लिक' केलें तो दिवस गोव्यांत अजून पाळला जात आहे. वास्तविक वाढदिवस ह्यासाठीं पाळले जातात कीं त्या दिवशीं प्रत्येकानें मी गेल्यावर्षी माझ्यांत कोण कोणती सुधारणा केली व त्याच्याहिपुढें ह्या वर्षी मी कसा व किती जावें हा विचार करावयाचा असतो. पण ५ आक्टोबर हा

शांतिसम्राट महात्म्याचा संदेश

अंतःकरणाचे डोळे उघडून अखिल आर्यावर्तांतील हिंदहितैषि जीव उत्साहातिरेकाच्या उत्सुकतेनें ज्या राष्ट्रीय महासभेची –भारत वर्षांतील लोकसत्तेच्या अनियंत्रित व अनिभिषिक्त राजसभेची–वाट पहात होते, ती तर हां हां ह्मणतां भरून व आपलें येत्या सालचा कार्यक्रम आंखण्याचें कार्य करून मोकळीसुद्धां झाली. ' पुनरागमनायच,ह्मणून हा राष्ट्रीय सभेच्या ह्या सालच्या बेळगांवच्या बैठकीच्या गणपती त्याच विघ्नेश्वराच्या कृपाप्रसादानें निर्विघ्नपणें उदकांत बुडविल्यावर बेळगांवकरांच्या अंगावरील जबाबदारी दूर झाली असेल पण ज्या कार्यासाठीं ही गणेशपूजनाची आटाहाटी त्यांस करणें प्राप्त झालें होतें तें प्रधान कर्तव्य तर जशाचें तसें पडून राहिलें आहे. एक चालू वहिवाटीची वार्षिक यात्रा ह्मणूनच जर कॉंग्रेसची बैठक प्रत्येक वर्षे अखेर विनचूक भरविली जात असती तर तिची आह्मांस राष्ट्रोन्नतीच्या बाबतींत कांहींच जरूर नव्हती व नाहींहि. पण ही महासभेची बैठक दरसाल भरविण्यांत वरील उद्देशाचा नामनिर्देशहि नसल्यानें ती समज चुकीची समजणें क्रमप्राप्त आहे. ह्याचा अर्थ अर्थातच असा होतो कीं, कांहीं तरी महत्वाचे पूर्ण राष्ट्रकार्य उरकण्याकरितांच ही राष्ट्रीय महासभेची बैठक भरविण्यांत राजकीय पुढाऱ्यांचा वेत होता. त्या दृष्टीनें विचार केल्यासहि कर्नाटकाची महासभा पुढील एका सबंध वर्षाचा मार्ग आंखून देण्यांत यशस्वी झाली असली तरी लोकपक्षाच्या अंगावर तीनें जबाबदारीची केवढी मोठी धोंड टाकली आहे ह्याचा आह्मी विचार करूं.

कलकत्त्यास पसार झालेल्या महात्मादास नेहरु पॅक्टवर पसंतीचा शिक्का मोर्तब ठोकून दुफळीच्या कडवट कचाट्यांतून तीनें पहिल्या प्रथम आपली मोकळीक करून घेतली. फेरवाल्या पक्षानें नाफेरवाल्यांच्या सुताच्या वर्गणीस मान्यता दिली व नाफेरवाल्यांनींहि उलट कॉंग्रेसच्या व तिनें स्वराज्य पक्षाचा कौन्सिल प्रवेश मान्य केला इतकेंच नव्हे तर विदेशी कपडा खेरीज करून इतर चारहि बहिष्कारांस जमिनीखालीं गाडण्यास–मग तें कांहीं विशिष्ट मुदतीपर्यंत असो–सक्रीय संमति देऊन आपल्या उज्वल राष्ट्राभिमानावर पक्षाभिमान त्यागाचा सोनेरी कळस चढविला. सूताची वर्गणी स्वराज्य पक्षानें नाफेरांच्या आग्रहास्तवच कबूल केली असें धरून क्षणभर चालल्यास असा प्रश्न उद्भवतो कीं नाखुषी दर्शविल्यास दुसऱ्याकडून काढवून पाठविलेली सुताची वर्गणी चालेल असें कलकत्त्याच्या तहनाम्यांत कां लिहिलें गेलें ? सूतानेंच स्वराज्य मिळेल असें जरी स्वराज्यवाद्यांची सदसद्विवेक बुद्धि त्यांस सांगत नसली तरी कौन्सिलांतून स्वराज्यप्राप्ति होईल ह्याची जिम्मेवारी हे फेरवाले स्वराजीष्ट होण्यास तयार आहेत काय ? कायदेभंगाचें निर्वाणीचें शस्त्र उपसल्याशिवाय स्वायत्ततेचे हक्क मिळणें नाहीं हें स्वराजीष्ट नाकबूल करूं शकतात काय ? नाहीं ना ? मग कौन्सिलें काबीज करून कांहींच फायदा होणें नाहीं. ह्या ठाम मतास चिकटलेल्या कट्टरानींच बेळगांवास महात्माजींच्या मनीषेपुढें मान वांकवून आपलें सर्वस्व स्वराज्यवाद्यांना केवळ महात्माजींची इच्छा ह्मणून लुटूं देण्यांत अधिक निमकहलालपणा दाखविला हें निःसंशय आहे.

झालें तें सुरेखच झालें असें ह्मणून ह्या पुढें प्रत्येकानें, महात्माजींनीं आपलें अधिष्टान इरेस घालून राष्ट्राकडे केलेली मागणी पुरवण्यास्तव जीवापाड झटलें पाहिजे. विजयानगरींतील दोंदिवसांच्या अधिवेशनांत राष्ट्रीय महासभेनें राष्ट्रापुढें पूर्ततेसाठीं एकच अग्रीम टांकला आहे व तोच महात्माजींची–शांतिसम्राट गांधीची–भारतवर्षांतील सर्व पक्षांकडे आग्रहाची मागणी होय. 'चरक्याचा प्रसार, हिन्दु मुसलमानांचें ऐक्य व अस्पृश्यता निवारण ' ह्या तिनहि महत्वाच्या बाबींचा प्रसार सबंध राष्ट्रांत होऊन स्वावलंबनाच्या व राष्ट्रीय ऐक्याच्या संघटित पायावरच महासभेच्या येत्या बैठकीनें आपल्या कार्याची इमारत उभी करावी हेंच कालच्या राष्ट्रीय महासभेनें एकमतानें प्रतिपादिलें व आज्ञापिलें आहे. निवडक शब्दांनीं आपलें वाचिवीरत्व प्रगट करण्याचे आवादानीचे दिवस आतां राहिले नसल्यानें आपापसांतील तुरळक भेदाभेद राष्ट्रकार्यार्थ विसरून सर्वांनीं राष्ट्रीय सभेच्या व महात्मा गांधीच्या 'चरका' छाप निशाणाखालीं एकत्र जमणें आज कालपरत्वें अगत्याचें होऊन गेलें आहे. चरक्यानेंच स्वराज्य मिळेल असा जर नाफेरवाल्यांचा निश्चय निर्णय असेल तर त्यांनीं ह्या एका सबंध वर्षांत चोहोंकडे चरक्याचा भरजोर प्रसार करून परदेशास दर वर्षी जाणाऱ्या ६० कोट रुपयांचा खो घालावा; व स्वराज्य वाद्यांनीं राष्ट्रसंघटनेच्या कामांत, त्यांस योग्य व साधेल ती मदत पुरवून दोघांनाहि ग्रासावयास टपून बसलेल्या शत्रूस एक मतानें व एक दिलानें जोराचा प्रतिकार करावा हीच अजात शत्रू शांतिसम्राटाची त्यांस आज्ञा आहे.

अभिप्रायार्थ माल व जाहिराती पाठवा.

जाहिराती–संग्रह

बाल-वाचन-मंदिर संस्थेच्या व्याख्यानमालेचा रिपोर्ट

ता. २३ । ११ रोजीं श्री. विष्णु सखाराम खांडेकर यांचें व्याख्यान झालें. समाजसेवा हा त्यांचा विषय होता. सभागृहांत श्रोतृवर्गाचा समुदाय बराच होता. व्याख्यानाला बरोबर ५॥ ला सुरवात झाली. ईशस्तवन वगैरे प्राथमिक गोष्टी उरकल्यावर श्री. कामत यानीं, आज महाराष्ट्रांतील एक प्रसिद्ध कवी, विनोदी लेखक व शिरोडें शाळेचे हेडमास्तर श्री. खांडेकर यांच्यासारख्या विद्वान व कसलेल्या वक्त्यांच्या व्याख्यान प्रसंगीं तशाच अधिकारी सभापतीची आवश्यकता आहे. तेव्हां आमचे विद्वान गृहस्थ प्रो. केणी यानीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी विनंति केली, व त्यास अनुमोदन दिलें गेल्यावर अध्यक्ष प्रो. केणी स्थानापन्न झाले. अध्यक्षस्थान स्वीकारतानां ते ह्मणाले कीं, या जागेला मीं बहुतेक नवशिका आहें. अनुभवामुळें माझ्याकडून काम योग्य प्रकारें होईल कीं नाहीं हा संशय आहे. तेव्हां माझ्याकडून जे कांहीं प्रमाद घडतील त्यांची माफी करावी. श्री. खांडेकर यांची ओळख श्री. कामत यानीं करून दिलीच आहे. शिवाय काल उपवक्ता या नात्यानें त्यानीं जें भाषण केलें त्यावरून त्यांच्या विद्वत्तापूर्ण वक्तृत्वाची थोडीशी चुणूक आपणांला लागलीच आहे व आतां त्यांचें बुद्धिवैभव प्रकट होणारच आहे, इतकें सांगून कार्यक्रमास सुरवात करण्याची त्यानीं सूचना केली. लगेच मुलांकडून स्वराज्याचें तोरण या नाटकाचा पहिला अंक करून दाखविल्यानंतर व्याख्यात्यानीं भाषणास सुरवात केली. ते ह्मणाले कीं, वक्त्याची ओळख असल्यावर प्रास्ताविक भाषणाची गरज नसते. मीं या प्रांतांत सर्वस्वी अपरिचित आहें. ओळख करून देतानां संस्थेच्या चालकानीं जी माझी स्तुती केली तिला मी लायक नाहीं स्वतःच्या करमणुकीकरितां मी लेखन व्यवहाय करीत असतों व टला ट जोडून थोडीशी कविताहि करितों. त्यावरून माझ्यापासून उच्च विचारसरणीची आपण अपेक्षा करूं नये. व्याख्यानमालेचें मी आमंत्रण स्वीकारलें तें गोव्यांची परिस्थिति पहावी, चार स्नेही मंडळी जोडावी व थोडें देऊन जास्तीची प्राप्ति करून घ्यावी या व्यवहारी धोरणानेंच स्वीकारलें होतें. आजचा व्याख्यानाचा विषय समाजसेवा हा आहे. या विषयाला भरपूर असें मला ज्ञान नाहीं. शिक्षक असल्यामुळें शिक्षण विषयक चर्चा माझ्याकडून चांगली झाली असती. परंतु समाजामध्यें जो विषय प्रचलित आहे त्याचें चर्वितचर्वण योग्य नव्हे. ह्मणून हा विषय घेऊन त्याचें शक्यतेप्रमाणें विवरण मी करणार आहें. कांहीं काळापूर्वी समाजसेवा हा प्रश्न प्रचलित नव्हता. आजच्या सारखी बंधयुक्त व आंचलेली स्थिति त्यावेळीं नव्हती. समाजसेवा याचा अर्थ समाजाची आपल्या हातून होणारी सेवा. समाजाकरितां करतां येणारी सेवा असा होय. समाजाचा अर्थ अतिशय व्यापक आहे. आपण सर्व एका ईश्वराचीं लेंकरें आहोंत असें मानलें – विश्वबंधुत्वाची कल्पना केली – तर सर्व " मानवी समाज " असा अर्थ होईल. धार्मिकदृष्ट्या हिंदु, खिस्ती, मुसलमान, बुद्ध असे निरनिराळे समाज होतील. यांचेहि प्रांतपरत्वें महाराष्ट्रीय समाज, बंगाली समाज असे भाग पडतील; शिवाय प्रार्थना समाज ब्रह्मसमाज, आर्यसमाज वगैरे विशिष्ट ध्येयानें एकत्र जमलेले लोक असाहि अर्थ करतां येईल. मी अखिल मानव समाज असा अर्थ करीत नाहीं. विश्वबंधुत्वाची कल्पना करणारा उच्चवातावरणीय साधु असला पाहिजे. कल्पना सोपी पण आचरणांत आणणें अवघड आहे. समाज शब्दाचा व्यवहारांतील संकुचित अर्थ करून एक प्रकारच्या हिताहितानें निगडीत झालेले लोक, असा अर्थ धरून अखिल हिंदी समाज हीच कल्पना गृहीत धरितों. मनुष्य ह्मणजे कळप करून रहाणारा प्राणी असा अर्थ एका शास्त्रज्ञानें ठरविला आहे. मनुष्य एकटा राहूं शकत नाहीं; तपीतापसी एकटे रहात असतात. एक तर त्यानीं हृदय मारलेलें असतें किंवा ते उच्चवातावरणांत तरी पोंचलेले असतात. दोन माणसें एकत्र असलीं तर शत्रुत्व सुद्धां विसरतील. मनुष्य हा स्नेहाचा भोक्ता आहे. प्रेम नसतें तर मनुष्यप्राणी जगला नसता. पतिपत्नी एकमेकांच्या प्रेमावरच जगतात. समाजरूपीसागर व्यक्तिरूपी बिंदूंचा बनलेला आहे. त्याचा अफाटपणा व खोली हीं सर्व त्या जलबिंदूंच्या संघटनावर अवलंबून असतात. प्रत्येक बिंदुनें पळता पाय काढला तर विस्तिर्ण सागरा ऐवजीं भयाण वाळवंट मात्र दिसेल. प्रत्येकानें स्वतःपुरताच विचार केला तर चांगलें नव्हे. प्रत्येकजण स्वार्थामागें लागेल तर मानवी सद्गुण जळून खाक होतील. समाजाविषयीं प्रेमबुद्धि व समाजहितततरता यांचा प्रत्येक व्यक्तींत अभाव असल्यास, समाजाचीहि सागराप्रमाणेंच स्थिति होईल. देशकार्य व समाजसेवा यांत अंतर नाहीं. देशबांधवांचें कार्य ह्मणजेच समाजकार्य. रॉबिन्सन क्रुसोप्रमाणें राहणें कुणालाहि आवडणार नाहीं. प्रत्येक विरक्त मनुष्य देखील समाजप्रीय असतो. आपण ज्या समाजाच्या उन्नतीचा फायदा घेत असतों त्याच्या उत्कर्षाकरितां झटणें अवश्य होय. परंतु दुर्दैवानें आमच्या हिंदु लोकांची समाजप्रीयता संकुचित धोरणाची व नाइलाजाची आहे. समाजामध्यें आपण राहतों; व सर्व व्यवहार करितों इतकेंच. समाजरूपी देवतीची खऱ्या भावनेनें पूजा करण्याचें बाळकडूच आपणाला नाहीं. आजच्या आमच्या अवनतीचीं कारणें अनेक असलीं तरी समाजसेवा प्रवृत्तीचा बहुतेक ठिकाणीं आढळणारा अभाव हेंच त्यांतील प्रमुख कारण आहे. थोडेसे समाजसेवक सोडले तर आमच्यांत समाजाची कल्पना नाहीं. मूर्तिपूजेप्रमाणेंच एकनिष्ठेनें समाजपूजा केली पाहिजे. हिंदुसमाज पूजेच्या बाबतींत मात्र नास्तिक आहेत. हिंदूंची ईश्वरावर श्रद्धा –आसक्ती आहे. पण समाजेश्वराविषयीं पूर्ण विरक्ती ! समाज व्यक्तींसाठीं व व्यक्ति स-

Pela verdade!

O *Bol. Of.*, n.° 3 da serie corrente publicou uma portaria, dissolvendo a Camara Municipal de Sanguem.

Essa portaria e' uma especie de "pano de amostra" para a gente orientar-se "a' priori" sobre o modo de ser de nossa administragao politica, como o leitor vai ver nas seguintes linhas explicativas, tragadas apenas para desfazer equivocos que por ventura ela provoque em volta da honestidade do signatario.

Diz a portaria que a Camara nao submeteu a' aprovagao do Governo o seu orgamento ordinario; mas ha' documentos comprobativos de ter-lhe sido ele enviado mais de tres vezes. O que o Governo fez e', sempre, devolve-lo, "determinando" ao municipio alteragoes nas receitas criadas, sem, todavia, ter-lhe indicado disposigao legal a que se socorrer nem tao pouco haver-lhe demonstrado a ilegalidade da criagao das mesmas receitas!

Refere se, em seguida, a portaria a' queima de papeis, livros e documentos a' falsificagao destes e ao desvio de dinheiro, envolvendo nesses actos toda a vereagao que afirma ter sido ouvida no inquerito, havido por tais causas. A verdade, porem, e' que nem o signatario como presidente nem o vice-presidente foram acusados na sua queixa por tal municipe, da queima ou de qualquer outro acto e muito menos ouvidos no inquerito referido!!

¿Teria, porventura, sido ordenado o inquerito para apurar apenas a acusagao, ouvindo so' o queixoso e suas testimunhas, sem audigao dos acusados e de sua defesa?

Vejo que laborei no mais crasso erro, quando julguei que os inqueritos eram para o descobrimento da verdade, ouvidos os acusadores e acusados.

A que chegamos?!

Acrescenta se, tambem, que se provou ter o tesoureiro aproveitado as receitas da Camara em proveito proprio e falsificado os documentos, mas nao se individualisam nem as mesmas eceitas nem se especificam os mes

r. ›s documentos!

m ˡinguem se queixa da queima dos

A · mentes, entrados na Camana

docu. 1918 ate' hoje; e, todavia, en-

desde e a vereagao dissolvida na sus-

volve. s ˡa fantastica queima...

pe igao c 'esaparecido o que nao exis-

Tera' a

tiu?

ıais a portaria que foi ne

Afirma a denar" a desligagao do

cessario "or ando e' certo que o pro-

tesoureiro, qu o desligou sem ouvir a

prio Governo " ma portaria sua pela

Camara," por u 'eado outro, ninguem

qual foi ate' nom atribuigoes legais?

sabendo com que nado tambem pelo

¿Teria sido orde mento" do Cofre

Governo o "senetea ·ude de que lei?

municipal? E em virt Governo estao

Pelo visto, para o e suas alineas

em vigor so' a Base 57 Base 22.a as

e se acham revogados a 'cgao 2a. do

suas alineas *a* e *b*. ou a st

mesmo Decreto!

Antes dessa portaria da dissolugao da Camara, esta representara ao Governo no dia 3 do corrente a situagao perplexa criada pela portaria n.° 817 da desligagao do tesoureiro, tendo na nota de 5 do corrente pintado o quadro fiel do estado das coisas municipais, nota em que se solicitara a nomeagao duma comissao composta de cidadaos extranhos a' politiquice local para fazer um inquerito aos actos da Camara e Administragao do Concelho. Na mesma nota pedia ate' a Camara a sua dissolugao no caso de nao ser atendida a sua petigao visto que se tornara insuportavel a atitude impertinente dos delegados do Governo.

A curiosa e *furiosa* portaria nao faz, porem, minima alusao a tudo isso.

Em suma: a queima de papeis, a falsificagao dos documentos, o inquerito de que a Camara nunca teve conhecimento oficial, a historia do orgamento, a desligagao do tesoureiro e outras coisas e loisas nao repres n tam senao uma pura mistificagao, resultado da politiquice local que encontrou esteio firme na protecgao de quem devia conservar-se alheio ao jogo maquiavelico das intrigas.

Mas *O Bharat* e' pequeno e o que o signatario tem a dizer sobre a politica municipal de Sanguem e' muito, o que fara' por meios constitucionais e competentes, mas ja', para que se conhega a verdade toda, nu'a e cru'a.

Subraia V. Dessai

MUITO GRAVE!

Recebemos a seguinte carta: "Ontem á noite (8-1-925) deu-se um caso bastante grave na aldêa Mardol deste concelho cujos habitantes presencêaram uma das mais tristes scenas de que foi autor um sargento de Policia de Pondá, de nome Silvestre Pereira o qual perpetrou barbaridades que só desacreditam a nossa Policia que é criada para manter ordem e não para causar desordem.

Esse sr. sargento depois de praticar escandalos e desordens nas casas de algumas bailaderas donde foi enfim enxotado entrando pelas 8 horas de noite no edificio do Templo de Xri Malsá de Mardol, agrediu por um motivo verdadeiramente fútil, o tesoureiro da referida mesa um cidadão altamente cotado neste meio e que gosa de simpatias gerais, ofendendo-o com palavras indecentes e injuriosas em presença de centenas de individuos que ai acorriam para lhe pedir que não praticasse tal acto. Mas o *brioso* sargento, ainda mais furioso, ameaçando-o de matar com tiros de pistola em punho e no meio de geral sossôbro prendeu aquele ilustre cidadão e o conduziu ao Posto de Mardol, acompanhado de praças armadas cobrindo-o durante o trajecto de enxovalhos e apodos infamantes!

O caso, porem, não parou aqui.

Sua Exa. depois de o deixar preso nesse Posto, amarrou-o com uma grossa corda de cairo. juntamente com um gatuno e mais um servente do proprio agredido, fazendo andar a todos tres, acompanhados de praças armadas, por todo o bazar de Mardol com o fim de vexá los perante os comerciantes e povo que tanto o estimam! Este espectaculo fazia crer que a Lei Marcial estava proclamada!

Não cessando o seu rancor ainda com este acto deshumano, o tal sargento levou-o arrastando naquele estado lá pela alta hora de noite, por algumas aldêas circunvizinhas, tais como Manguexa, Cundaim, Boma, etc. e deixou numa longiqua choupana no mato de Boma, ameaçando o ai, a cada momento, com o revolver.

Que é isto, sr. Director do *Bharat*? Estamos na Republica Portuguesa ou estamos na anarquia? Onde estamos?!

Este acontecimento tem causado geral indignação por todo o concelho de Pondá e ainda fóra dele. ¿Que idêa farão da nossa Policia centenas de mazanes estrangeiros do Templo de Xry Malsá?

¿E' como a Policia zela pela honra da nossa Republica!?"

(*Garantido*) De V...N.

N. da R.—Não comentamos. Esperamos, apenas, que os srs. Tenente-Coronel Craveiro Lopes e Comandante de Pondá que certamente, presam mais a justiça e a honra do glorioso exercito portuguez tomarão sobre o caso medidas energicas.

Convite

São convocados os srs. Municipes do Concelho de Sanguem para uma reunião nas casas dos srs. Sanvordencares em Sanvordem no dia 21 do corrente para ouvirem os vereadores da Câmara Municipal que se acha dissolvida, vereadores, que tambem ficam convidados e resolverem sobre a atitude a ser tomada perante a portaria da dissolução, segundo o que fôr apurado na mesma reunião.

Aos 11 de janeiro de 1925.

Govinda J. Porobo Dessai
Maruti Sinai Monercar
Gunó R. P. Dessai

पत्रव्यवहार

श्रीयुत सारस्वत यांचा जीवनार्थ कलह हा लेख वाचून व मीही एक 'रणसंग्राम' साप्ताहिकाचा वर्गणीदार असल्यानें रा. कोल्हटकर यांची लबाडी चव्हाट्यावर यावी असें वाटलें. तरी कृपा करून हें पत्र प्रसिद्ध कराल, अशी आशा आहे.

मीं रणसंग्राम साप्ताहिकाच्या सुरवातीच्या चार अकांनंतर वर्गणीदार झालों व दोन रुपये पाठविले तेहि व्ही पी. आल्यावरून. त्यानंतर लौकरच, रणसंग्राम साप्ताहिक वृत्तपत्र दैनिक झालें. व आह्मांस अंक येण्याचें बंद झालें. कांहीं दिवसांनंतर ह्मणजे तारीख २ आगष्ट १९२४ रोजीं चाबुकाचा पहिला अंक रा० अच्चुत बळवंत कोल्हटकर यांच्याच संपादकत्वाखालीं बाहेर पडला व त्यावर, रणसंग्रामच्या वर्गणीदारांचें नुकसान होऊं नये ह्मणून युगांतर किंवा चाबूक पाठवूं असें सदहू कोल्हटकर यांनीं जाहीर केलें त्याप्रमाणें मीं त्यांस चाबूक पाठविण्यास लिहिलें. त्याप्रमाणें चाबूक वृत्तपत्राचा दुसरा अंक पाठविला व त्यानंतर पासून तों आतागायत एकहि अंक पाठविला नसून वर्गणी मात्र गिळंकृत करण्याची फसवेगिरी या प्रतिष्ठित संपादकांनीं केली. मी कितीतरी पत्रें पाठविलीं, परंतु त्यानीं दाद दिली नाहीं.

त्याचप्रमाणें रा० केशव विष्णु भट हे राहणार, वाडातळें धारगळ यांनीं युगांतराची वर्गणी भरून त्याचे आश्रयदाते झाले, व नंतर त्यांस कांहीं अंक आले व नंतर तें युगांतर येण्याचेंच बंद झालें असें स्वतः त्यांनीं मला कळविलं होतें. व अजूनहि येत नाहीं.

रामचंद्र शंकर कुळकर्णी
धारगळ—गोवा.

दहा लाख रुपये देणारे काशीचे बाबू शिव प्रसाद गुप्त यांचे एक आत्मीय बा. गोकुल चंद गुप्त यानीं आपले मयतबंधु बा. मंगला प्रसाद यांच्या नावानें चाळीस हजार रुपये हिन्दी साहित्यसंमेलनाकडे दिलेले असून त्याचें व्याज बाराशें रुपये प्रत्येक वर्षी उत्तम ग्रंथ तयार होईल त्या ग्रंथकारास देण्याची व्यवस्था केली आहे. गेल्या सालीं हें बक्षीस जुन्या इतिहासाचे संशोधक रा. गौ. हि. ओझा यानीं लिहिलेल्या ' भारतीय प्राचीन लिपिमाला " या ग्रंथास दिलेलें आहे. या ग्रंथाची किंमत २५ रुपये असून ग्रंथकर्त्याच्या पुष्कळ वर्षांच्या परिश्रमाचें तें फळ आहे. असो. अशा प्रकारें हिन्दी भाषेच्या वाङ्मयाभिवृद्धीची खटपट त्यांच्याकडून चालू आहे.

हिन्दी भाषेमधील वाङ्मयाचें पहिलें स्थान अद्यापि बंगालला आहे असें जरी असलें तरी पण त्या खालोखाल हिन्दी वाङ्मयाचा नंबर लागेल यांत शंका नाहीं. शिवाय एक भाषा या दृष्टीनेंहि सर्वांचें लक्ष्य त्याच्याकडे लागलेलें आहे. याचें प्रत्यंतर पहावयाचें झाल्यास यंदांच्या चवदाव्या साहित्य संमेलनाकडे लक्ष्य दिल्यास कळून येईल. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष रा. नरदेव शर्मा हे मूळ महाराष्ट्रीय देशस्थ ब्राह्मण असून आतां आर्यसमाजिष्ट आहेत. तसेंच सभेचे अध्यक्ष रा. सप्रे हेहि महाराष्ट्रीय आहेत. या दोघानींहि हिन्दी वाङ्मयाभिवृद्धिकरतां फार परिश्रम केलेले आहेत.

एकंदरींत देशांतील सर्व लोकांचें लक्ष्य त्या भाषेकडे लागलेलें आहे. परंतु आपल्या गोमांतकांत मात्र बरीच अनास्था दिसून येते. हिंदी, बंगाली, गुजराथी व मराठी या भाषांचें परस्परांशीं इतकें साम्य आहे कीं थोड्या फार परिश्रमानें त्या वाङ्मयाचा आस्वाद आपणाला घेतां येईल. रा. न. चिं. केळकर यानीं 'पतिपत्नीप्रेम' या कादंबरीला प्रस्तावना लिहितानां असें ह्मटलें आहे कीं 'बहुतेक देशी भाषा परस्परानां इतक्या जवळ आहेत कीं, कोणत्याहि दुसऱ्या देशी भाषेचा अभ्यास कोणाहि हिंदी मनुष्यास एक वर्षांत चांगला करितां येईल. असली तर कानडीची गोष्ट वेगळी ठरेल पण हिंदी बंगाली, मराठी व गुजराथी ह्मणजे सुमारें तेरा चवदा कोटी लोकांच्या मिळून या चार भाषा परस्परानां इतक्या निकट आहेत कीं, त्यांतील कोणतीहि भाषा, तींतील ग्रंथांचें भाषांतर करण्या इतकी शिकण्यास एक वर्षाहून अधिक काळ लागणार नाहीं. आज बंगाली वाङ्मय बरेंच समृद्ध आहे. हिंदीहि जोराचे प्रयत्न करीत आहे. तेव्हां आपल्या लोकांनीं त्या भाषांचा अभ्यास करण्याकडे प्रवृत्ति वळवावी, अशी आह्मीं आग्रहाची सूचना करतों.

हिन्दुस्थानची आजची स्थिति फारसी आशाजनक नाहीं. निरनिराळया दिशानीं प्रयत्न होणें इष्ट आहे. तरच आपण इतर राष्ट्राशीं टक्कर देऊं शकूं ही गोष्ट पुष्कळ विद्वानांच्या लक्ष्यांत येऊन ते वाङ्मयद्वारा या गोष्टी आपल्या लोकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करीत आहेत. आपला देश कसा आहे, देशांत दारिद्र्य किती वास करीत आहे, शारीरिक दृष्ट्या आपण किती खालावलेलों आहों, आपलें शिक्षण कस आहे, आपल्यांतील सामाजिक चालीरीति कशा अनिष्ट आहेत व त्यायोगें आपला समाज कसा अधोगतीला गेला आहे ही स्थिति सुधारून आपल्या देशाची सर्वांगीण उन्नति होण्याला आपण काय केलें पाहिजे हें दाखविण्या करतां आज निरनिराळ्या विद्वानांनीं बरेचशे ग्रंथ प्रसिद्ध केलेले असून त्याद्वारें लोकजागृतीचें बरेंचशें कार्य होत आहे.

अशा उत्तम ग्रंथांपैकीं काशीमधील विद्वान ठाकूर शिवनंदसिंह यानीं लिहिलेला " देशदर्शन " या नावांचा हिंदीमधील ग्रंथ होय. हा ग्रंथ १९१७ मध्यें प्रसिद्ध झालेला असून महात्मा गांधीना अर्पण करण्यांत आला आहे. आजपर्यंत याच्या तीन आवृत्या प्रसिद्ध झालेल्या असून पुष्कळ विद्वानानीं त्यांची मुक्त कंठानें प्रशंसा केलेली आहे. ग्रंथ प्रसिद्ध होतांच गुजराथी मधील श्रेष्ठ मासिक विसमीसदी (विसावें शतक. आतां बंद आहे.) या मासिकाच्या संपादकानीं त्याचें साग्र व सचित्र भाषांतर आपल्या मासिकामधून चालू केलें होतें. तसेंच बंगालींतील श्रेष्ठ मासिक **भारतवर्ष** यानेंहि या ग्रंथाची प्रशंसा केली.

देशदर्शन हा ग्रंथ आपल्या लोकानीं वाचण्याजोगाच नव्हे तर अध्ययन करण्याजोगा आहे. लेखकानें निरनिराळ्या पन्नास साठ ग्रंथांचें अध्ययन करून हा ग्रंथ लिहिलेला आहे. हा ग्रंथ ह्मणजे हिंदुस्थान देशाचा चित्रपट होय. आपल्या देशाची स्थिति आज काय आहे हें कळून येण्याला या सारखे ग्रंथ आपण अवश्य वाचले पाहिजेत तेव्हांच आपणाला आपल्या देशाची खरी स्थिति कळून येईल. ज्यानां थोडी फार हिन्दी भाषा येत असेल त्यानीं मूळ ग्रंथ अवश्य वाचावा. ह्या ग्रंथाचें मराठी भाषांतर प्रसिद्ध होणार अशी जाहिरात दोन वर्षांमागें निघाली होती, परंतु अद्याप काहीं पुस्तक बाहेर आलें नाहीं. पुढेंमागें आल्यास निदान भाषांतर तरी अवश्य वाचावें अशी आह्मी शिफारस करतों.

आपल्या गोमांतकांतील जनतेपुढें त्यांतील काहीं भाग यावा अशी आमची इच्छा असल्यामुळें व तूर्त विवाहाचा हंगाम सुरू असल्यामुळें आह्मीं त्या ग्रंथांतील **विवाह संस्कार** हें प्रकरण भाषांतर करून पुढें मांडणार आहोंत. तेव्हां विवाह करूं इच्छिणाऱ्या तरुणानीं तरी हे लेख अवश्य वाचावेत अशी आग्रहाची परत सूचना करून भाषांतराकडे वळतों.

विवाह संस्कार

जगांतील कोणत्याहि देशामध्यें, कोणत्याहि धर्मामध्यें, कोणत्याहि जातीमध्यें विवाह संस्काराचें महत्व आर्यग्रंथांमध्यें जसें गंभीर व पवित्र दिसून येतें तसें दिसून येत नाहीं. आनी बेझंट

विवाहपद्धतीच्या संक्रमणाचा इतिहास फारच मनोरंजक व शिक्षादायक आहे. तो पाहूं जातां ही गोष्ठ सिद्ध होते कीं, मानव जातीच्या बाल्यावस्थेमध्यें कोणत्याच प्रकारची राजव्यवस्था अगर समाज व कुटुंबव्यवस्था नव्हती. स्त्री पुरुषांचा संबंध आणि माता पिता पुत्र इत्यादि नातीं मूलस्थितींमध्यें आज जशीं पशुपक्षांमध्यें आहेत तशीं अनियमीत होतीं. स्त्रीपुरुषांचा नियमीत संबंध राज्यव्यवस्था व सभ्यता यांच्या वाढीमुळें स्थिर झालेला आहे.

पुष्कळ देशांच्या इतिहासाकडे पाहिलें असतां असें दिसून येतें कीं, समाजाच्या प्रथम अवस्थेंमध्यें लोकांची प्रवृत्ति युद्धाकडे होती. विजयी लोक पराजित झालेल्या लोकांच्या स्त्रियानां कैद करून आणीत व ती आपली मालमत्ता असें समजत. कांहींजण त्यांच्याकडे विवाह करीत तर कांही त्याना दासींचे स्थान देत व कांहीं जण त्यानां विकीत असत. या स्त्रियानां कुटुंबांतील प्रधान पुरुषांच्या आधीनतेमध्यें रहावें लागे जसा जसा सभ्यतेचा विस्तार होऊं लागला तशी तशी दास्यत्वापासून स्त्रियांची मुक्तता होऊं लागली.

स्वाधीनतेमुळें स्त्रियांची योग्यता वाढूं लागली; त्यांच्याविषयीं प्रेमादर व अभिमान वाटूं लागला; स्वयंवराची चाल पुढें आली; हळुहळू विवाह संस्काराला धार्मिक विधीचें स्वरूप प्राप्त झालें व विवाह ह्मणजे एक आवश्यक संस्कार असें लोकांना वाटूं लागलें.

समाजशास्त्रवेत्ता स्पेन्सर यानें एका ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, " विवाहाचा उद्देश ह्मणजे त्यामुळें समाज व राष्ट्र यांची उत्कर्षावस्था चिरकाल रहावी व त्यामुळें भावी संततीचें व देशाचें कल्याण व्हावें हा होय. ज्या विवाहांमुळें या गोष्टी सिद्ध होत नाहींत ते विवाद केव्हांहि समाजाला हितकारक होणार नाहींत ". आरिस्टाटल ह्मणतो कीं, " स्त्रियांची उन्नति व अवनति यांवर राष्ट्राची उन्नति व अवनति अवलंबून आहे. ग्रीक लोक आपल्या स्त्रियांना केव्हांहि दासींप्रमाणें वागवीत नसत तर आपल्या राष्ट्रोन्नतीच्या कामामध्यें सहाय्यक असें समजून त्यांच्या मानसिक, शारीरिक, व आत्मिक उन्नतीमध्येंनेहमीं लक्ष देत व याच कारणामुळें ग्रीक लोकांनां बारबरियन जातीवर विजय मिळवितां आला.

इतिहासकार गिबन असें ह्मणतो कीं, रोमन राष्ट्र आपल्या स्त्रियांनां ग्रीक लोकांपेक्षां अधिक मान देत असे व याच कारणामुळें तें राष्ट्र अधिक बलवान होऊन ग्रीक लोकानां सुद्धां त्याच्यापुढें नमावें लागलें.

रोमसारख्या छोट्या राष्ट्रानें आपलें स्वामित्व सगळ्या जगावर स्थापन केलें. ज्याप्रमाणें रोमन राष्ट्राची उन्नति आश्चर्यजनक आहे त्याचप्रमाणें त्याची अवनतिहि अत्यंत हृदयद्रावक आहे. टसिन हा इतिहासकार ह्मणतो " रोमन जातीच्या उत्कर्षांचे वेळीं रोमन स्त्रियांमध्यें पातिव्रत्य, स्वावलंबन, स्वार्थत्याग धैर्य वगैरे जे अनेक सद्गुण दृष्टीस पडत होते ते सर्व त्यांच्या अवनतीच्या काळामध्यें नष्ट झालेले होते व चांगल्या गुणाच्या जागीं दुराचार अज्ञान कलह वगैरे दुर्गुणाचें साम्राज्य स्थापन झालेलें होतें. या कारणामुळेंच जर्मन जातीनें रोमन लोकांवर आपलें स्वामित्व स्थापन केलें. अरण्यांत रहाणाच्या-काळीं सुद्धां जर्मन लोकांची कुटुंब व्यवस्था फारच चांगली होती."

(महाभारतः—लढाई होण्यापूर्वी रोमन साम्राज्याप्रमाणेंच हिंदुस्थानामध्येंहि स्त्रियांची स्थिति अवनत होत चाललेली होती. याचीं उदाहरणें देणें झाल्यास खालील गोष्टींकडे लक्ष दिल्यास कळून येईल. १ कौमार्यांमध्यें गंगादेवीचे पुत्र विसर्जन २ आपले बंधु विचित्र वीर्य याच्या विवाहाकरतां काशी राजाच्या मुली अंबा, अंबिका व अंबालिका यांचें भिष्माकडून बलात्कारानें आणणें व त्यांचा अनादर ३ धीवराची कुमारी कन्या सत्यवतीशीं पराशर ऋषीचा संभोग, वेद व्यासाचा जन्म व पुढें राजकुलांत विवाह ४ कुंतीचें कौमार्यामध्यें कर्णाचा जन्म, त्याला नदीतिरावर टाकणें तसेंच ही गोष्ट गुप्त ठेवणें व राजकुलामध्यें विवाह करणें ५ द्रौपदीचें पांच पुरुषाकडे लग्न होणें इत्यादि गोष्टी राजांच्या व ऋषींच्या ह्मणजे मोठमोठ्या लोकांच्या आहेत. सामान्य प्रजेची स्थिति काय होती याची कल्पना वाचकांनींच करावी.)

हिंदुस्थानचा इतिहास पाहिल्याअंती अंगावर रोमाच उमे रहातात. या अभागी देशाची सुदशा व उन्नतीचे दिवस अतिप्राचीन भूतकालाच्या अंधेरी छायेमध्यें झांकून गेलेले आहेत. बाल विवाह व स्त्रियांच्या पराधीनतेची अशी अवनत दशा जगांतील सुधारलेल्या कोणत्याच राष्ट्रांमध्य नाहीं. आपला हिंदुस्थान देश आज बरींच वर्षे पारतंत्र्य त जखडलेला दृष्टीस पडत आहे. महाभारत युद्धामुळें हिंदुस्थानाला अवनतावस्था प्राप्त झालेली नाहीं तर भारत गारत झालेला होता. वरूनच महाभारत लढाई उत्पन्न झाली.

विवाह संशोधन व अन्य सामाजिक सुधारणेची दिशा याचा विचार करण्यापूर्वी आपणाला आज काल स्त्रियांची स्थिती काय आहे व ही केव्हांपासून सुरू झाली तसेंच प्राचीन व अर्वाचीन विवाह पद्धतिमध्यें कोणकोणते गुणदोष आहेत याचा विचार करणें अवश्य आहे. तेव्हां पुढील लेखांकांत वेदकालामध्यें विवाह पद्धति कशी होती याचा विचार करूं.

आतां शाब्दिक वाद पुरे !

'उत्तर गोग्रहणांतील एक वीर' अशा मथळ्याखालीं ता. २१ नव्हंबरच्या 'हिंदू'त श्री. श्रिनिवास दामोदर नायक यांचें माझ्या ता. ७ नव्हंबरच्या 'हिंदू'त प्रसिद्ध झालेलें 'मडगांवकरांस इशारा' या पत्राचें उत्तर वाचून कोणासहि त्यांच्या अगाध ज्ञानाबद्दल कींव आल्याशिवाय राहणार नाहीं.

वरील गृहस्थ मी माझें नांव प्रसिद्ध न केल्यामुळें माझा भ्याडपणा व्यक्त केला आहे असें ह्मणून मला बाळ उत्तराची उपमा देतात. त्यामुळें त्यांच्या अंगांत वसत असलेला अविचारीपणाचा गुण स्पष्ट दिसून येतो. मी माझें नांव स्पष्टपणें संपादक 'हिंदु' यांस कळवून माझा मुंबईचा व गोव्याचा पत्ता खुलासेवार लिहिला होता; व प्रसिद्ध करण्यास पाठविलेल्या पत्राची जबाबदारी मी माझ्यावर पूर्णपणें घेतली आहे, असें त्यांस माझ्या दोन्हीहि पत्रांत स्पष्ट कळविलें होतें. जर माझें नांव वरील लेखकास कळलें नाहीं तर माझ्या व माझ्या गांवच्या नावांवर त्यानीं कोणत्या आधारावर टीका केली, हें ते कृपा करून सांगतील काय?

ज्यावेळीं मत्छय पुरावर कौरव सैन्यानें स्वारी करून तेथील गाई हरण केल्या त्यावेळीं त्या राजधानींत एकहि यौद्धा नव्हता सर्व शहर हतबल स्त्रियानीं भरून गेलें होतें. अशा प्रसंगीं उत्तरासारखा अगदीं कोवळ्या वयाचा मुलगा शस्त्रविद्येंत अगदीं अपारंगत असतांसुद्धां पुढें सरला व एवढ्या मोठ्या कौरव सैन्यावर एका स्त्री सारथ्यानिशीं चाल करून गेला, हें त्यास भूषणास्पद नव्हे काय ? बाळ उत्तर जर कौरव सैन्यावर धावून गेला नसता, तर स्त्रैण वेश धारण करून राहणाऱ्या अर्जुनाला पराक्रम करण्याची संधि तरी मिळाली असती काय ? अर्जुनाच्या अंगांतलें स्त्रैण जाण्याचें व त्यांत वीर्यत्व उल्हसीत करण्याचें श्रेय शहाणे लोक उत्तरालाच देतात हें वरील लेखकास अजूनहि कळलें नाहीं काय ?

श्री. नायक यानीं मला उत्तर ठरवून आमच्या नोकरशाहीस कुरु करकाची उपमा दिली व आमच्या मडगांवकर बंधूंस स्त्रीया ठरविल्या. मला उत्तर ठरविल्याबद्दल वरील लेखकाचें किंचित सुद्धां मला वाईट वाटत नाहीं पण सर्व मडगांवकर बंधूनां त्यानीं अप्रत्यक्ष रीतीनें स्त्रियांची उपमा देऊन ते अगदीं हतवीर्य असल्याबद्दल जें विधान ठोकलें त्याची वाट काय ?

माझ्या लेखास उत्तर देण्याजोगी जर त्याची किंमत नव्हती तर त्यानीं अशीं खोटीं अविचारी पणाचीं विधानें ठोकण्याची तसदी तरी कां घेतली ? एक गोष्ठ खरी कीं जर असलें काम त्यानीं हातीं घेतलें नसतें तर माझ्या नावांवर अप्रत्यक्ष बिभत्स टीका करण्याची संधि मात्र त्यांनां केव्हांच मिळाली नसती व यामुळें त्यांच्या थोरपणांत विशेष महत्वाची भरहि पण केव्हांच पडली नसती.

श्री. नायकानीं दिलेली दुसरी एक लक्ष्मीधराची उपमा वाचून त्यांना नाटकाचा नाद बराच असावा असें वाटतें. न पेक्षां वाटेल ती असंबद्ध उपमा देण्याचें त्यांना कांहींच कारण नव्हतें. मी 'हिंदूस' पाठविलेल्या पत्रांत माझें नाव गांव पूर्ण असून तें संपादक 'हिंदू'नीं रा. नायक यानां दाखविलें असलें पाहिजे. न पेक्षां 'सावईवेरें व रवळनाथाचें कूळ' वगैरे बडबड करण्याची संधि त्यानां मिळाली नसती.

रा. नायक 'कायदेभंग करून अशी (मनाई हुकूम असलेली) मिरवणूक काढावी काय ?' असा जो सवाल करतात, त्यांस मी असें विचारतों कीं कायदेभंग करण्यास कोणी सांगितलें ? जर मडगांवकरांची तयारी मिरवणूक यशस्वी रीतीनें पार पाडण्याजोगी नव्हती तर त्यानीं उगीच अव्यापारेषु व्यापार तरी कां करावा ? ज्या महात्माजींच्या फोटोची मिरवणूक त्यानीं काढूं घातली ती त्यांच्या कोणत्या गुणाबद्दल हें ते जरा सांगतील काय ?

व्यावहारिक गरज नसतां लायसन मागून कायद्यांस रंग देणारे मडगांवकर कायदेभंग तरी कसे करणार ? त्यानीं फक्त लेक्चरें देऊन घसा कोरडा करावा व ब्रिटिश हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांपुढें आपल्या देशभक्तीची टिमकी वाजवावी एवढेंच त्यांस माहीत ! दुसरें काय ?

"मनुष्यास अत्यंत जिव्हाळयाचा जो धर्म त्याचा अमानुष छळ होत असतां ज्या प्रांतांत तो निमूटपणें सहन करण्यांत आला त्या देशांत सत्याग्रहाची अपेक्षा करणें ह्मणजे चालू परिस्थितीचें अज्ञान व्यक्त करणें होय."

वरील मथळयांत रा. नायक आपल्या पूर्वजांचे वंशज ह्मणून भित्रे असण्याचा आपला जन्मसिद्ध हक्क पस्थापित करतात. हें पाहून कोणासहि त्यांच्या कोत्या मनाबदल कींव आल्याशिवाय राहणार नाहीं. आमच्या पूर्वजांच्या त्या वेळच्या परिस्थितींत व आतांच्या परिस्थितींत जमिन अस्मानाचा फरक आहे. त्यावेळीं सर्वत्र पुंढाई माजल्यामुळें करील त्याचा कारभार व मारील त्याची तरवार हा कायदा लागू होता. खऱ्या न्यायासाठीं कुणाच्याहि तोंडाकडे पहाण्याची गोष्टच नव्हती. अशा दुर्धर प्रसंगीं आमच्या पूर्वजांच्या धैर्याची, शौर्याची, धार्मिक भक्तीची व सहनशीलतेची खरी परीक्षा झाली. कमकुवत मनाचे लोक जीव संभाळण्यासाठीं राज्यकर्त्यांस शरण गेले व ख्रिश्चन बनून राहिले. आणि आमचे पूर्वज अस्सल पट्टे असल्याकारणानें आपला धर्म इतक्याहि त्रासांतून पूर्णपणें सांभाळून राहिले. अशा वीर्यवंतांस रा. नायक भित्रे समजतात याबद्दल त्यांस काय ह्मणावें ?

त्या वेळच्या परिस्थितींत व आतांच्या परिस्थितींत आणखी एक फरक आहे. त्यावेळी इतर हिंदुस्थानसुद्धां धामधुमींत असल्यामुळें तेथील पुढाऱ्यांस इकडे येण्यास मुळींच सवड नव्हती. व याचसाठीं मडगांवसारख्या शहरांत व्याख्यानाचा मुळींच सुळसुळाट नव्हता. आतां मडगांवांत धार्मिक, राजकीय व सामाजिक बाबतींत, भले लांबलचक व्याख्यानें झोडणारे वक्ते उत्पन्न झाल्यामुळें आतां प्रत्येकास राजकीय हक्क पूर्ण समजत आहेत. सर्वांच्या अंगांत वीरश्री उत्पन्न करणारे, प्रत्येकास आपापले हक्क समजून देणारे लेखकहि आह्मांत पुष्कळ आहेत. गोव्यास आवतोनोमीय व रिपाब्लिकहि पण मिळालीं आहेत. इतक्या सर्व सोयी असतां कायदेभंग करावा काय, असा जो प्रश्न रा. नायक करतात तो किती विचित्र आहे ! मी त्यांस "कायदेभंग करण्यास मुळींच सांगत नाहीं कारण स्वतःचा हक्क सांभाळण्याची ज्यांस अक्कल नाहीं ते कायदेभंग काय करणार ?

'प्रस्तुतचे काळीं कराचीं ओझीं एक सारखीं लादलीं जात असतां त्याचा प्रतिकार करण्यापर्यंत ज्यांचा संतापाचा पारा चढत नाहीं या प्रांतांतील लोकांकडून मग ते मडगांव सारख्या शहरांतील असोत किंवा सावईवेऱ्यांसारख्यां खेड्यांतील असोत, सत्याग्रहाची अपेक्षा करणें ह्मणजे चालू परिस्थितीचें अज्ञान प्रगट करणें हें होय !'

वरील प्याऱ्यांत रा. नायकानीं चालू परिस्थितीबद्दल असलेलें स्वतःचें अज्ञान मात्र व्यक्त केलें आहे. वाटेल तसा कर लादून घेण्यास फक्त शहरवासी लोक मात्र तयार असतात. खेडेगांवचे लोक कधींहि आपल्या इच्छेबाहेर कर लादून घेत नाहींत. आज पर्यंत खेडेगावांवर लादलेले निरानिराळे कर किती पटीनें यशस्वी झाले ? दारूच्या माडावर चढविलेल्या कराबद्दल खेडेगावांतील सत्याग्रहामुळेंच सरकारास कच खात्री लागली. होडेकरांच्या वाढत्या कराचें काय झालें ? वेशीवर ठेवलेल्या सहा आण्याच्या करानें सत्तर महालांतील खेडवळांचा सत्याग्रह व्यक्त करून दाखविला ना ? व तो उठवणें सरकारास भाग पडलें ना ? सध्या फाल्गुन पोर्णिमेस चालणाऱ्या रोमटांस सुधारलेल्या शहरांत व महालांत लायसन लागतें. पण तेंच अत्यंत खेडवळांस लागू करण्याविषयीं पुष्कळदां हुकूम सुटले असतां सुद्धां खेडवळांच्या थेच्या थेचे लायसन न काढतां तुरुंगांत जातात पण लायसन काढीत नाहींत. या परता २ रा सत्याग्रह कोठें राहिला ? एक गोष्ट खरी कीं या सत्याग्रहांत व्याख्यानें देणारे व त्याबद्दल वर्तमानपत्रांतून कॉलमच्या कॉलम लिहून पाठविणारे पुढारी सध्या खेडेगावांत नाहींत. व ही गोष्ट जराशी गैरसोईची आहे. ही गैरसोय मडगावांतील सुधारलेले पुढारी आपल्या आगमनानें व हृदयंगम व्याख्यानानीं दूर करतील काय? अथवा रा. नायक हे असल्या पोकळ डौल पुढाऱ्यांस पाठवून व आपण स्वतः येऊन खेडेगांवचा सत्याग्रह पुरा करतील काय? असें केले तर मात्र माझें गाढ अज्ञान चटकन नाहींसें होईल.

रा. नायक मला ईश्वरानें बनविलेलें रवळनाथाचें कूळ ह्मणतात. होय. ईश्वर निर्मित रवळनाथाचें कूळ असल्यामुळेंच खेडवळ असून सुद्धां सत्याग्रहाचे विचार मला सुचले. आणि या शुक्राचार्यांच्या शिष्यांना राक्षसानें बनविल्यामुळें मडगांवसारख्या शहरांत असून सुद्धां व वारंवार ब्रिटिश पुढाऱ्यांचीं लेक्चरें ऐकूनसुद्धां त्यांस आपल्या हक्काची जाणीव अजून उत्पन्न होत नाहीं.

रा. नायक ह्मणतात कीं येथील प्रतिष्ठित अगर स्वतंत्र वृत्तीचे गृहस्थ राजिदोरींत व आदमिनिस्त्रासावांत एखाद्या निरोपा सरसे धावून जातात व गरज नसतां लवण्या नमण्याचे प्रयोग करितात. या बोलण्यानें रा. नायक सर्व श्रीमंतांस व प्रतिष्ठित गृहस्थांस विनाकारण घर बसल्या कां दुखवतात ? गरज नसतां राजिदोरींत व आदमिनिस्त्रासावांत धावून जाणारे व तेथें लवण्या नमण्याचें प्रयोग करणारे श्रीमंत व प्रतिष्ठित गृहस्थ रा. नायक यांचे मडगांवकर अनुयायी असावेत असें वाटतें. कारण गरज नसतां लवण्याचें नमण्याचें कृत्य त्यानीं आदमिनिस्त्रासावांत लायसन मागून स्पष्ट करून दाखविलें आहे. व हें कृत्य पुन्हा सर्व प्रतिष्ठित मनुष्यास लावून सर्व गोमांतकास काळिमा लावण्याचें धाडस माझें पत्र वाचलें असतांसुद्धां ते करितात याबद्दल फारच नवल वाटतें.

मी केलेल्या जाहीर विनंतीस आव्हानाचें स्वरूप देऊन त्यास उत्तर ह्मणून ते मला विचारतात कीं सदहू विद्यार्थ्यांनीं कोणती तरवार बहादुरीचीं कामें करून यश संपादन केलें आहे ह्मगुन त्यांस आह्मी मदतीस बोलवावें.

पण मी त्यांस असें विचारतों कीं कोणत्या युगांत कोणत्या वीरानीं विद्यार्थी दशेंत असतानां तरवार बहादुरी करून यश संपादन केलें आहे? तरवार बहादुरीची वेळ निघून गेली. सध्याचा काळ शांततेचा आहे. अशा वेळीं स्वतःच्या हक्कास प्रत्येक मनुष्यानें अवश्य जागलें पाहिजे. उगीच वाटेल तो प्रश्न वाटेल त्याला विचारून आपल्या अकलेचे तारे तोडण्याचें कारण तरी रा. नायकानां काय होतें ?

गामाच्या श्राद्धास नापसंती दर्शविणारी जाहीर सभा भरवून चळवळ करण्याविषयी रा. नायकानीं मला जो हुकूम केला त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. जाहीर सभा भरविणें व लांबलचक व्याख्यानें झोडणें यांत मडगांवकर पुढाऱ्याची जितकी प्रगति आहे तितकी इतर सर्व गोमांतकांत कुठेंच सांपडणार नाहीं. याच साठीं एवढ्या मोठ्या जबाबदारीचा कामगिरी माझ्यासारख्या अज्ञान विद्यार्थ्यांवर सोंपविण्याऐवजीं आमचे मडगांवकर पुढाऱ्यांनीं ती स्वतःच करून दाखविली असती, तर त्यांत लगी मजा होती मात्र सत्याग्रहाचा प्रसंग आल्यास त्यानीं आह्मां विद्यार्थी लोकानां अवश्य बोलवावें. ह्मणजे आह्मीं आमच्यासारख्या खेडवळ विद्यार्थी बंधूंबरोबर विमा कंपनीची पोलीसी उतरून त्याच्या मदतीस अवश्य धांवून जाऊं. खऱ्या धैर्याची परीक्षा सभा भरवण्यांत व लेक्चरें झोडण्यांत नसून सत्याग्रहांत असते. हें रा. नायक यांस ब्रिटिश हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांचीं लेक्चरें ऐकून सुद्धां अजून कळूं नये काय ?

रा. नायक यांस आपल्या तर्फेचा नायक करून जे वीर या वादांत लढतात त्यांस माझी एवढीच विनंति आहे कीं त्यानीं आपल्या शाब्दिक चातुर्यास व पोकळ व्याख्यानास आतां रजा द्यावी. अंगांत खऱ्या देशभक्तास साजणारी धमक असतां केवळ शाब्दिक वादाचें प्रस्थ न माजवतां व दुसऱ्याची उणी पाणी न करितां, आपलें चातुर्य व विद्वत्ता जर ते खऱ्या देशकार्यास लावतील तर मग आह्मीं सर्व विद्यार्थी त्यांचे दासानुदास होऊन राहूं यांत तिलप्राय शंका नाहीं.

रवळोबा विश्वासराव सरदेसाई

luz sobre as trevas em que o mencionado bissemanario pretende, com manifesta ma' fe', envolver a concessao feita pelo Governo ao *Sarasvat Bramana Samaj* desta vila. E' o que passo a fazer a seguir em rapidas linhas.

Antes de mais saiba a TERRA que o que o Governo concedeu ao *Samaj* e' o terreno e nao o edificio que foi comprado, ainda que neste contrato a instituiçao tenha sido objecto de atençois por parte de quem a beneficiou com a importante concessao do terreno, favor este pelo qual o *Samaj* se confessa sempre grato ao Governo.

Tenho a dizer ao mesmo jornal, em segundo lugar, que a concessao *nao foi feita ilegalmente*, como maliciosamente insinua, procurando, desta feita, criar em volta dum acto justo e legal uma atmosfera de descredito.

A concessao de que se trata e' tao legal que iguais tem sido feitas em Pangim e em Mapuça'.

Quanto a' historia de reversao, e' ela uma prova flagrante de quanto a TERRA odea os hindus e o seu despertar; porquanto, apesar de ser publico e notorio que se estao coalhando fundos para a construçao dum edificio apropriado para a referida instituiçao e que o mesmo terreno concedido se utilisa actualmente para exercicios gimnasticos da populaçao escolar do SAMAJ, — afirma menos escrupulosamente, baseada no tal "Correm", que "a concessao se distinava a fins bem diferentes"!

Querendo malquistar o SAMAJ com o generoso chefe da provincia que pelo seu atilado tino sabe, de resto, separar "o trigo do joio" nao se esquece a TERRA de supor que "as enstancias oficiais julgavam que se abusou da munificencia ... com actos subversivos!!!

Tanta maldade em tao poucas linhas so' podia brotar do bico da pena da genial TERRA!

Inda bem que o Governo a conhece melhor do que no's, nao lhe passando desapercebidos os seus processos politicos!

A mim nao me admirou, de resto que a TERRA procurasse pescar nas aguas turvas, aproveitando o incidente da festa do Gama, porque sei que o seu editor dera mostras de visivel descontentamento a quem, entusiasmado pela concessao e comovido pela gratidao, fora dar-lhe a sua grata nova. O ilustre jornalista dissera ate', entao, que o Governo nao devia ter-lhe concedido um terreno tao bom e tao no centro...

Depois de semilhantes precedentes, so' seria para estranhar que a TERRA se conservasse "calada" sem falar sobre supostos "actos subversivos" que ninguem sabe nem ela diz o que sejam.

Ja' que se referiu aqui a' concessao, nao vao estas desataviadas linhas registadas sem o agradecimento do SAMAJ ao Governo, mais uma vez repetido neste lugar, pela requintada generosidade com que animou a acçao patriotica da instituiçao

E creio que nao e' preciso por mais na carta...

Margao 15/1/925

De VExa. etc.
Quessoa Ananta Naique
Secretario do S. B. S.

ANUNCIOS

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do 1 ° oficio Redcar, á instancia do exequente Augusto Piedade Martins de Ambelim de Velim, cessionario dos primitivos exequentes João Antonio Fernandes, de Sernabatim e seu cessionario Vitorino Gregorio Constancio Coutinho vai á venda em hasta publica pela segunda vez á porta do Tribunal Judicial desta comarca no dia vinte e sete de Janeiro corrente pelas dez horas, pela metade do preço da sua avaliação, o predio rustico denominado "Butram roinim Soclem-mola" situado em Fatorpá com exclusão da terceira adiçao ou sejam primeira e segunda adições do mesmo predio que é cultivado de coqueiros, discrito na conservataria desta comarca sob o n ° 5135 afl. 124 do Livro B 16 e avaliado por 2500 rupias nos autos da carta precatoria vinda da comarca de Salsete e extraida dos autos de execução hipotecaria que o dito exequente Martins promove contra Joganata Sinai Quencró e sua mulher Maturabai Sinainim e outros, de Cuncolim. Quem o quizer arrematar compareça nos indicado dia, horas e local correndo por conta do arrematante as despezas da praça e a contribuição do registo por inteiro. Por este são citados nos termos e para os efeitos da lei, todos os credores inceitos dos ditos executados bem assim os co-proprietarios, ficam tambem igualmente citados os representantes dos credores falecidos Frederico Francisco Xavier Ligorio Raimundo Rebelo, Visnum Sinai Quirtonim e Madu Sinai urtonim, todos que foram de Margão, sendo o crédito do 1 ° na importancia de 1300 rupias o do 2 ° na de 20 rupias e finalmente o do 3 ° na de 200 rupias. E para ser publico se expediu este, Quepem, 13 de Janeiro de 1923

O escrivao de direito do 1° ofi.°
Babú V. Camotim Redcar
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo Juiz de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do segundo oficio Barreto vao ser vendidos em hasta judicial a' porta do tribunal situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a' estaçao de Sanvordem, no dia 27 do corrente mez a's 10 horas em segunda praça e pela metade do preço porque foram avaliados os seguintes bens. Direito a' terça parte do predio rustico denominado "Vadevo" de cultura de arroz, Predio rustico denominado "Madamodilsordo" da cultura de arroz, Predio rustico denominado "Diguivangana" da cultura de arroz. Predio rustico denominado "Calemnomosso Sordo" da cultura de arroz. e predio rustico denominado "Gorbata bagaeta" da cultura de coqueiros e outras arvores todos sitos em Gocoldem e discritos na conservatoria predial desta comarca respectivamente, sob os nos. 16658, 16659 16660, 16661 e 16662 afl. 170 v. ate' fl. 172 v. do Livro B 45 e avaliados tambem respectivamente por 55, 110, 120, 100 e 150 rupias. Penhorados nos autos civeis de execugao por custas que o Digno Agente do Ministerio Publico nesta comarca promove contra LocximaGauncarina, viuva de Janum Gauncar e outros de Gocoldem por apenso aos autos de inventario orfanologico procedido pelo falecimento do dito Zanum Gauncar. Sao por este citados todos os credores incertos dos ditos executados e os coproprietarios e quinhoeiros nos termos e para os fins da lei. A contribuiçao do registo por inteiro ficara a'cargo do arrematante. Para ser publico se expediu este,

Xeldem, 12 de Janeiro de 1925
O Escrivao de Direito do 2 ° oficio
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

PAGODE DE SRI MOLI CARJUNA DE MOLCORNEM

No dia 1 do seguinte mez de Fevereiro, pelas 16 horas, irá á praça a avença da receita do arecal Agora Murmuttem, para o periodo de nove anos desde 1925 a 1933, com as condições constantes do respectivo calculo, que estarão patentes no acto de arrematação no dito Pagode. Aos 21 de Janeiro de 1925. O escrivão da mesa *Ramacrisna Ananta Narcornim.* Visto. O presidente *Zaivanta Ganaxama Molcornencar*

VENDE-SE

Vende-se, em hasta, em globo ou em glebas.

Predio Silva-Batta em que existem 3 casas e 2 lojas, sito na séde do concelho de Quepem, no dia 25 de janeiro proximo pelas 11 horas, na residencia do sr. tabelião Salinho da Silva, reservando o signatario deste a quem pertence retirar da praça não lhe convindo o preço. O arrematante depositará no acto 10% do preço. Quepem 22 de Dezembro de 1924.

Jeronimo Francisco da Silva

अभिप्रायार्थ माल व जाहिराती पाठवा.

जाहिराती–संग्रह

या पुस्तकाचे वर्षांतून चार भाग प्रसिद्ध होत असून ज्यानीं आमच्या ऑफिसांत नांवें नोंदविलीं असतील त्यांना ते फुकट पाठविण्यांत येतात. अभिप्रायार्थ पाठविलेल्या मालावर विस्तृत अभिप्राय दिला जातो. जाहिराती मराठी, पोर्तुगीज व इंग्लिश या तिन्हीं भाषांतून प्रसिद्ध करण्याची व्यवस्था असून, त्यांचा दर पुढील प्रमाणें आहे. सिंगल कॉलमच्या दर ओळीस ४ आणे व डबल ओळीस ८ आणे पडतील.

पत्ता— एम. के. पे. गांवकर
पैंगीण–काणकोण–गोवा.

वर्तमानसार

--गामाच्या श्राद्धोत्सवासंबंधीं मडगांवच्या 'हिंदु' पत्रावरहि खटला भरण्यांत आला आहे! कुटिल कुळकर्ण्यांप्रमाणेंच 'तो अद्वितीय प्राणी' मरणोत्तर सुद्धां हिंदूनां छळीत असल्याचें पाहून आश्चर्य वाटण्याऐवजीं हंसूं येतें!

--गामोत्सवासंबंधीं खुद्द पोर्तुगालांत जिकडे तिकडे तटस्थपणाच स्वीकारण्यांत आला होता, असें तथील पत्रांवरुन समजतें!

—अपरिहार्य कारणांमुळें या खेपेला पुरवणी प्रसिद्ध करणें शक्य झालें नाहीं.

—'भारत' व 'हिंदु' या पत्रांसंबंधीं पिकत असलेल्या भलभलत्या कंड्यांवर लोकांनीं विश्वास ठेवूं नये अशी आमची लोकांना सूचना आहे.

—डॉ० जाइम मोराइस यांची नेमणूक आंगोलच्या हाय कमिशनचे जागीं झाली असून, त्यांच्या ऐवजीं येथें जुवांव कामोयेंझस हे येतील.

—फाझेंदाचे मुख्याधिकारी तिनोकु, पब्लिक वर्कस खात्याचे मुख्य मेंदोंस व डॉ० जाइम मोराईस हे लवकरच पोर्तुगालला रवाना होणार आहेत.

समाज सुधारणा

लेखांक २ रा.

हिंदु दांपत्याचा संबंध एक ईश्वरीय कार्य मानलें जात आहे. सृष्टिकर्त्यानें पत्नीला त्याच करतां उत्पन्न केलेलें आहे असा नवऱ्याचा पूर्ण विश्वास आहे. हिंदु बायकांचा असा विश्वास आहे कीं, पति एक असतो, एकच वेळ लग्न करतां येतें व पतिपत्नीचें नातें अनेक जन्मपर्यंत स्थिर झालेलें असतें.

हिंदु विवाहसंबंध ईश्वरप्रणीत आहे. तो अचल व धर्माच्या सांखळीनें बांधलेला आहे. हा संबंध इहलोक व परलोक या दोन्हीं करतां आहे.

हिंदु दांपत्याचा संबंध सांसारिक नाहीं परंतु धार्मिक आहे. हिन्दु आपण आपल्या पितृऋणांतून मुक्त होण्याकरतांच विवाह करीत आहे, केवळ विषय वासना तृप्त होण्याकरतां हिंदुलोक विवाह करींत नसतात. पशूप्रमाणें मन मानेल तसा संभोग करणें हा त्यांचा धर्म नाहीं; तर त्याकरतां नियमहि केलेले असतात. त्या नियमाप्रमाणें जिवन कालामध्यें थोडेच दिवस विषयभोगा करतां प्राप्त होत असतात. व हेहि दुसऱ्या कोणत्याच उद्देशानें नाहीं तर केवळ धर्माची आज्ञा पालन करण्या करतां असतात.

हिन्दु विवाहाचा असा उद्देश आहे कीं, दोन योग्य आत्म्यांना एका संपूर्णावस्थेमध्यें आणण्याकरतां त्यांची जोड घालून द्यावी. त्यामुळें व्यक्तीचें सुख तथा स्वास्थ्य वाढून त्या द्वारा मनुष्यमात्राची सामाजिक उन्नति व्हावी.

हिन्दुविवाह संस्काराचें स्वरूप अतिशय गंभीर आहे. विवाह करतेवेळीं आपण ईश्वराला साक्षी ठेऊन जन्मभर पर्यंत पवित्र भावानें रहाण्याविषयीं प्रतिज्ञा करीत असतों. सामाजिकदृष्ट्या याचा अभिप्राय असा आहे कीं, स्त्रीपुरुषांत भेदभाव नसतो तर तनमनधन सर्व आपण एकमेकानां अर्पण करीत असतों. वेदामध्यें पुरुषाला " आज्य तोऽग्ययः " अर्थात गरम, उत्साहप्रद तचेंच उष्णता उत्पन्न करणाऱ्या सूर्याची उपमा दिलेली आहे व स्त्रीला " विरस्मय " ह्मणजे प्रकाश देणारी तसेंच प्रेमाचें केंद्र असें ह्मटलेलें आहे.

प्रजापतीनें प्राण व रथी यांच्या द्वारा सृष्टीची रचना केली. तसेंच दोन पवित्र आत्मे एक झाल्यामुळें मानव प्राण्यांची स्थिति व वृद्धि होत असते. खऱ्या प्रेमाच्या पवित्र विवाहसंस्कारामुळें मनुष्यमात्रानां पुष्कळ फायदे होऊन समाजाचें अतिशय कल्याण होतें.

समज्जन्तु विश्वेदेवा समापो हृदयानि नौ
सं मातरिश्वा संघाता समदेष्ट्री ददातु नौ ॥

ह्मणजे– आंह्मीं दोघेंहि या विद्वानाच्या समोर प्रतिज्ञा करतों कीं, आमचें हृदय दोन प्रकारच्या जलांप्रमाणें मिळून जावो. जीवना करतां जसा प्राणवायु, सृष्टी करतां जसा सृष्टीकर्ता, उपदेशका करतां जसे श्रोत्रगण त्याप्रमाणें आह्मीं पतिपत्नी एकमेकानां प्रीय होऊं.

सिनीवालि पृथुष्टके या देवा नामासि स्वसा ।
जुषस्वं हव्य माहुतं प्रतांदेवी दिदिड्ढि ॥ यजुर्वेद ३४–१०

ह्मणजे– कुमारीनों तुम्हीं ब्रह्मचर्य व्रताचें पूर्णपण पालन करुन उत्तम प्रकारच्या विद्या शिकून आपल्या इच्छेप्रमाणें व आपल्या परीक्षेनें आपणा करतां उत्तम प्रकारचा वर शोधून काढा व त्याच्या बरोबर आनंदपूर्वक गृहस्थाश्रमांत प्रवेश करुन उत्तम प्रजा उत्पन्न करा.

ब्रह्मचर्येण कन्या ऽ युवानं विन्दते पतिम् ।
अनड्वान ब्रह्मचर्येणाश्वो घास जिगीषति ॥ अथर्ववेद ११–१८

ह्मणजे– ब्रह्मचर्याश्रमांतून कन्येनें पूर्ण विद्याभ्यास केल्यानंतर तारुण्यामध्यें तरुण पुरुषाला आपला पति करावा तसेंच पुरुषानेंहि सुशील व धर्मरत्या पत्नीबरोबर विवाह करून एकमेकांच्या सुखदुःखाम यें सहाय्यकारी व्हावें; कारण पशूना सुद्धां पूर्ण तारुण्य प्राप्त होईपर्यंत जर मुनिनियमांमध्यें ठेवलें तर ते अत्यंत बलवान होऊन निर्बल जीवाना पराजित करूं शकतात.

वैदिककालामध्यें ज्यावेळीं भारताची विद्वता पूर्णावस्थेला पोंचलेली होती त्यावेळीं उपनिषद न्याय व दर्शनशास्त्र वगैरे उच्च प्रकारचें वाङ्मय तयार होत होतें. ज्याकाळीं धर्मशास्त्र व वैदिकमंत्रांची रचना तयार होत होती, ज्या काळीं हिन्दुस्थानचो आत्मविद्या पूर्णावस्थेला पोंचलेली होती त्या काळीं स्त्रिया पुरुषांची बरोबरी करीत असत. त्या काळीं स्त्रीपुरुषांमध्यें समानतेचा व्यवहार होता. स्त्रीपुरुषांचे सामाजिक व आत्मिक संबध बरोबरीचे होते.

इतिहासावरून असें अनुमान करतां येतें कीं वैदिककाळीं आजच्या सारखी स्त्रियांची अधोगति नव्हती. आज स्त्रियानां आपण शुद्राप्रमाणें वागवून मानसिक व आत्मिक उन्नतीला पारखें करून सोडलेलें आहे. ज्या स्त्रियानीं वेदमंत्राची रचना केली त्यानां आज ते मंत्र ऐकण्याचा सुद्धां अधिकार नाहीं. ही अत्यंत शरमेची गोष्ट होय. आज आमच्या बहिणीनां व मुलीनां आमच्या मातानीं रचलेले वेदमंत्र ऐकण्यास न मिळणें यासारखी लाजिरवाणी गोष्ट दुसरी नाहीं.

आजच्याकाळीं स्त्रियानां मानसिक व आत्मिक उन्नतीला पारखें करून ठेवलें जात आहे. त्यानां मौजिबंधनाचा अधिकार नाहीं. त्यांचे सर्व धार्मिक अधिकार काढून घेतलेले आहेत.

हारित आपल्या धर्मशास्त्रामध्यें ह्मणतो " स्त्रियांचे दोन प्रकार आहेत. ब्रह्मवादिनी व सद्योवधु हे होत. ह्यापैकीं ब्रह्मवादिनी स्त्रियानां उपनयन, अग्नीबंधन, वेदाध्ययन व स्वतःच्याच घरांत भिक्षा ही कर्में करतां येतात. सद्योवधु स्त्रियानां असा विधि नाहीं. यावरून असें ह्मणतां येतें कीं, स्त्रियांचा धार्मिक संस्कार पुरुषाप्रमाणें होणें इष्ट आहे

आनी बेझंट आपल्या \`` ke up India पान ५५ यांत ह्मणतात: " पूर्वकालीं मुलींचा उपनयनसंस्कार करीत असत, त्यानां वेदाध्ययन करण्याचा अधिकार होता व त्या गायत्रीमंत्राचाहि जप करीत असत. बाप किंवा चुलता अगर मुलीच्या भावाला त्यानां विद्या शिकविण्याचा अधिकार असे इतरानां हा अधिकार नव्हता.

कन्याऽप्येवं पालनीया शिक्षणीया नियत्नतः

याचा अर्थ असाआहे कीं, मुलींना मुलाप्रमाणेंच पालन करून शिक्षण दिलें पाहिजे.

आनी बेझंट वरील पुस्तकांत ह्मणतातः वैदिककालामध्यें स्त्रियावर विवाह करण्याबद्दल सक्ति नव्हती तर त्या आपल्या मानसिक व आत्मिक बलाप्रमाणें बालब्रह्मचारिणी रहात असत व मोक्षाच्या प्राप्ती करतां सन्यास घेऊन ब्रह्मज्ञान मिळवीत असत.

बाल ब्रह्मचारिणी ' सुलभा ' ब्रह्मज्ञानावर वादविवाद करतानां राजर्षि जनकाना सांगते " माझा जन्म क्षत्रिय कुलांत झालेला आहे. मला माझ्या आवडीप्रमाणें किंवा गुणाप्रमाण योग्य पति मिळाला नाहीं या वरून मी पवित्र भावानें मोक्षप्राप्ति करतां सन्यास घेतलेला आहे.

याप्रमाणेंच गार्गी व अनेक ब्रह्मचारिणी स्त्रियानीं जन्मभर विवाह न केल्याबद्दलचीं अनेक उदाहरणें आहेत. त्यांना त्या काळच्या पद्धतीप्रमाणें पितृसंपत्तीना भाग व धार्मिक शिक्षण मिळालेलें होतें. पवित्र भावनेचा संचार त्याच्यांत झाल्यामुळें आपल्या देशाच्या तसेंच आपल्या बहिणबांधवांच्या कल्याणाकरतां सर्वस्व अर्पण केलेलें होतें. वैदिक कालामध्यें विवाहसंस्काराचा असा उदात्त आदर्श मिळत आहे कीं, तो पाहून भारतीय प्राचीन सभ्यता तसेंच स्त्रियांविषयींचा आदर याचें अनुमान करतां येतें. भारतीय स्त्रियानां तो काळ अत्यंत अनुकूल होता. त्या स्वातंत्र्यतापूर्वक साहित्य व विज्ञान यांचा अभ्यास करीत. वेदांचा अभ्यास तसेंच ब्रह्मविद्या यामध्यें त्या निपूण असत. राजनीतीची त्यानां माहिती होती. व पुरुषसुद्धां त्यांच्याकडे वेळीं अवेळीं सल्ला घेत. एकंदरींत त्या काळीं स्त्रियानां पुरुषांप्रमाणेंच कोणतेंहि काम करण्याची हरकत नव्हती. पुरुषप्रमाणेंच सर्व अधिकार स्त्रियानाहि होते हें खालील उदाहरणावरून दिसून येईल.

१ बालब्रह्मचारिणी गार्गी इनें याज्ञवल्क्य ऋषीकडे सर्व शास्त्रांमध्ये वाद केलेला होता. आपल्या उच्च शिक्षणानें व गंभीर ज्ञानानें राजसभेमध्यें याज्ञवल्क्य ऋषींना निरूत्तर करून घालवून दिलेलें होतें.

२ मैत्रेयीनें गृहस्थाश्रमातूंन निघाल्यावर मानसिक व धार्मिक योग्यतेवर विचार करुन आपल्या पतीला आपणाला ब्रह्मज्ञानाचा उपदेश देण्याबद्दल विनंति केली व ती तिच्या पतीला मान्य होऊन त्याप्रमाणें तें ज्ञान तिला मिळालें गेलें.

३ महाराणी कैकयी रणक्षेत्रामध्यें जाऊन लढत होती.

४ गांधारी राजसत्तेत जेथें राजकीय विषयांचा खल होत होता तेथें जाऊन त्या विषयावर आपलें मत देत होती. लढाईत न पडण्याबद्दल तीनें अनेक वेळां दुर्योधनाला सांगितलेलें होतें.

अशीं पुष्कळच उदाहरणें देतां येतील. परंतु आजची स्थिति निराळी आहे. आज आमच्या आया बहिणीनां राजकीय विषयांवर विचार करण्याला मिळत आहे काय ? आपल्या मुलांच्या नैतिक चुका पाहून आज किती मातांकडून त्याना उपदेश मिळत आहे ? आपण मोठ्या अभिमानानें असें सागत आहों कीं, स्त्रियांचा राजनीतीकडे संबंध काय ? परंतु ही खरोखर लज्जास्पद गोष्ट आहे.

स्त्रिया कितीहि पतिव्रता, स्वार्थत्यागी असल्या तरी पण पुरुषसमाजामध्यें त्यानां मान नाहीं आपण कोणत्याहि कामामध्यें त्यांचा सल्ला घेण्यास इच्छित नाहींत कारण त्यांच्याबद्दल आपणाला आदर नाहीं. त्या जन्मतांच अज्ञानी असतात असें नाहीं तर आपण त्याना शिक्षण न देतां अज्ञानांत ठेवलेलें आहे.

महाराणी कुंतीनें आपल्या पुत्रानां लढाईवर जातेवेळीं सांगितलें कीं, " क्षत्रिय माता केवळ रणांगणामध्यें युद्ध करण्याकरतांच पुत्रानां जन्म देत असतात, या करतां जाऊन युद्ध करा " एकटी कुंतीच त्या काळीं अशा प्रकारची नव्हती तर कुंतीसारख्या अनेक स्त्रिया त्या काळीं होत्या.

कुंती अशा प्रकारची वीर माता, द्रौपदी अशा प्रकारची वीर पत्नी, उत्तरा अशा प्रकारची वीर बहीण व शिखंडी अशा प्रकारची वीर कन्या होती. आपण लक्षांत ठेवलें पाहिजे तें हें कीं, शिखंडीनें पुरुषवेष धारण करून महाभारतामध्यें मोठमोठ्या-वीरांकडे लढाई केलेली होती. दोन गोष्टींचा एकमेकाकडे परस्पर संबंध आहे तो हा:–

१ स्त्रियांचें शिक्षण त्यांची मानसिक व धार्मिक व शारीरिक उन्नति. २ त्या जातीची उन्नतावस्था. त्या काळीं आपल्या हिन्दुस्थानामध्यें अशा प्रकारच्या योग्य माता होत्या व त्या वीर व देशाभिमानी पुत्र उत्पन्न करीत. परंतु आतां बाल अज्ञानी माताकडून भिरू व देशाचा अभिमान न बाळगणारे पुत्र उत्पन्न होत आहेत. कारण व कार्य. कारण सुधारून कार्य नीट करणें सर्वस्वी आमच्या हातांत आहे. प्राचीनकाळीं आपल्या देशांत स्त्रियाबद्दल किती आदर होता हें मनुस्मृतींतील खालील श्लोकार्थावरून कळून येईल.

" जेथें स्त्रियांचा सत्कार होतो तेथें देवता वास करीत असतात व जेथें स्त्रियानां मान नाहीं तेथें सर्व क्रीया निष्फळ होतात. "

" ज्या घरांमध्यें स्त्रियांना दुःख प्राप्त होतें तें घर लवकरच नष्ट होईल व ज्या घरांमध्यें त्यानां सुख मिळतें तें घर आनंदानें नांदत राहील. "

असो. एकंदींत वेदकालामध्यें विवाहसंस्कार व स्त्रियांची स्थिति कशी होती याचें दिग्दर्शन केलेंच आहे. आतां पुढच्या लेखांकांत आजच्या काळीं विवाह संस्काराची अधोगति कशी झाली आहे त्याचें दिग्दर्शन करूं.

ECOS & CRITICA

O CASO DO DR. DEHTINHO

Duma carta de Pangim:—

"O assunto desta semana e' a carta do sr. dr. Dentinho Junior, professor diplomado do Liceu Central desta cidade, publicada no jornal *Noticias* de Algarve e transcrita e comentada pelo *Heraldo* de 24 do corrente.

A carta contem afirmagoes tam precipitadas e falsas que elas vao ferir todo o goez ilustrado na sua honra e dignidade. O seu autor que e' um dos "dois diplomados" entre todos os professores liceais da India e de outras colonias portuguesas, qualifica de "asilos de inuteis para todo e qualquer genero de trabalho" todos os estabelecimentos de instrugao, incluindo a Escola Medica! O ilustre literato diz, entre outras coisas, que ca' na India nao ha' unico professor primario que saiba falar e escrever a's direitas o portuguez, generalisando imprudentemente esta sua afirmagao a todos os professores do L. Central e doutras escolas secundarias! E' edificante, nao acha?

Tanto o corpo docente como discente do Liceu Central estao em ebuligao. A confidencia feita por S. Exia. a um jornal publicado num canto de Portugal, veio a' luz e a sua situagao causa compaixao! S. Exa falou a um seu amigo do Algarve como quem fala a seus confidentes, encerrando-se no gabinete, cousas que ate a parede pode comunicar.

E' de notar que homens como Dentinho e outros que sabem *muito* pouco do portuguez, e' que acham "pretuguez," (e' o que sua exa chama na aula ao portuguez falado pelos naturais daqui) o portuguez daqui mesmo falado correcta e correntemente.

Que a pronuncia do portuguez falado entre no's difere da dos portugueses, ninguem nega, porque ela e' o resultado de diversas condigoes dum pais, variadas as quais varia tambem. Mas escrever mal, falar fo'ra das regras gramaticais, isto e' que nao se explica. Claro esta', pode haver aqui quem nao saiba falar bem o portuguez Mas daqui ninguem va' dizer que na India nao ha unica pessoa que saiba escrever e falar o portuguez duma maneira correta e corrente, pois isso seria um agravo a's faculdades intelectuais dum povo que e' reputado inteligente."

Parece que o doutor ainda nao *visetou* manicomios nem *bibeu cha' a casa* dalgum professor primario, secundario ou superior da India.

E' su'mente para lamentar.

De resto a prosa do sr. Dentinho e' significativa e dela iremos tratando aos poucos.

Gralha e' gralha e pavao e' pavao!

PORQUE?

O sr. Atmarama X, Palondicar, professor proviso'rio do Liceu Municipal de Margao foi exonerado do seu lugar.

Desejava o *Bharat* saber os ponderosos e poderosos motivos que determinaram a mesma exoneragao, se eles nao constituirem *segredo* do Estado. De resto, nao acreditamos no que se esta'a propalar a' boca piquena a proposito da mesma exoneragao...

AGRADECENDO

Dum nosso amigo:

"Um abrago de solidariedade ao amgo. pelo contratempo que acaba de bater a' porta do *Bharat*. Bem sei que e' uma crise de...purificagao, que so' vai fazer bem ao jornal, como sucedeu durante tantas crises por que ele tem passado.

Nao sabe o que disse Gandhi no seu discurso presidencial em Belgao? Pois vou recordar lhe "A represssao e' para os povos o que o fogo e' para o oiro—purifica."

Cartas de igual teor, o *Bharat* as esta' recebendo todos os dias, desde que foi processado, o que representa prova irrefragavel de quanto ele e' estimado, apesar de sua modestia.

Rendidos agradecimentos, caros amigos!

ESCREVEM-NOS:

"Sabido de todos e' que o falecido Deao Almeida, de saudosissima memoria confiou, ao morrer, a administragao dos seus vastos bens, e por uma licença regia, ao cabido de Se' Primacial de Goa nao com outro fim sen o de perpetuar a sua obra, tao digna de louvores, impondo-lhe deveres e obrigagoes para serem fielmente cumpridos.

Ora, acontece que por estes dias tem se levantado entre os mandu cares do dito Deao grande celeuma por falta do cumprimento de legados e distribuigoes referentes a estes, como por exemplo: 1° distribuigao de panos que sobretudo neste ano tem sido bastante arbitraria.; 2° Dotes que conforme o testamento sao em numero de 10 sendo a cada um 70 serafins ou 8:10:8 sao actualmente pagos em 40 serafins ou 4:5:4; acresce a isto que por estes ultimos anos os dotes distribuidos nao vao para alem de 5 quando parece que a soma destinada de 200 serafins, deveria ser distribuida pelos casamentos que houvesse anualmente. — Ao terminar estas breves linhas acrescentaremos um facto curioso que se deu por estes dias: um certo pobre tendo requerido ao Cabido para suas urgentes necessidades uma esmola foi concedida esta (10 rps.), mas quando se apresentou a recebe la, qual nao teria sido o seu espanto quando o mui digno encarregado para apresentar o seu maximo zelo de bom e fino administrador apresentou uma divida passada em presenga do Con. Gracias que, por estes dias esteve ca', divida que era do tempo de gripe (1918) que de resto tinha s do perdoada pelo entao administrador Con. Justiniano a este como tambem aos outros manducares na igualdade de circunstancias.

Por estes e varios outros motivos, ouve se dizer, que a freguesia na maioria seus manducares, vai dirigir uma representagao ao Governador Geral nao pedindo regalias para si mas apenas o estrito cumprimento dos legados.

PRORRGANDO

Informam nos que o sr. Governador Geral prorrogou ate' o fim de Fevereiro p. seguinte o praso para pagamento de primeiras duas prestagoes de obrigagoes do tipo A. (C. C R)

ANUNCIO

Pelo Juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1° oficio Redcar a requerimento de Roque Piedade Pinto, de Assolnâ, correm éditos de trinta dias a contar da segunda publicação deste no Boletim Oficial citando as executadas Locximibai, mulher de Datarama Vitola Sinai Volvoctar e Moturabai mulher de Gopala Vitola Sinai Volvotcar, de Cuncolim, ora ausentes em Narsobavadi do territorio Britanico, para renovação da instancia dos autos civeis de execução hipotecaria que o dito Roque Piedade Pinto, como cessionario de Luciano Xavier Dias, de Sarzorá move ás ditas citandas e outros. E para ser publico se expediu este. Quepem 22 de Janeiro de 1925.

O escrivão de Direito
Babú V. Camotim Redcar
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

आजचें पोर्तुगीज सदर

अग्रलेख:—

म० गांधी व गोमांतकस्थ हिंदु; हिंदु व सरकारी नोकऱ्या; नोकऱ्या व युरोपियन.

लेख दुसरा:—

ह्मापसेंचें आ बेपोक व हिंदु; समजुतीचा घोंटाळा.

स्फुट व इतर विषय:—

प्रो० दें तीन्जुं प्र ण; प्रो० पाणंदीकरांचा राजीनामा; भारतमित्रांचे संदेश इ० इ० इ०

–बडोदें सरकारनें २२००० हजार रुपयांची देणगी बडोदा संस्कृत लायब्ररीस दिली.

–सुबत्तेच्या दिवसांत हिंदुस्थानांत १ कोट टन गहूं पिकतो आणि इतका गहूं पिकला ह्मणजे परदेशांत अदमासें १० लक्ष टन गहूं निर्गत होतो.

–डेक्कन सभेच्या विद्यमानें न्या. मू. रानडे यांची पुण्यतिथी ता १६ जानेवारी रोजीं पुणें येथें साजरी करण्यांत आली.

वर्तमानसार

–सरकारच्या रोषास पात्र झालेल्या सांगे मुनिसिपालटीनें स्वसमर्थनार्थ एक पुस्तक प्रसिद्ध केलें असून, सरकारास त्यांत सडेतोड उत्तर दिलें आहे! या मुनिसिपालटीसंबंधानें आह्मांस बरेंच लिहावयाचें आहे.

—दो० सुब्राय वि. प्रभु देसाई यानींहि एक 'फोल्येत' प्रसिद्ध केली असून, तींत मिनासंबंधानें सरकारची कान उपटणी केली आहे.

—ह्मापशें येथें वैश्य समाजातर्फे उभारण्यांत येणाऱ्या "वैश्य भुवना"चा पाया वैश्य समाजोपाध्यायांकडून गल्या चार रोजांत घालण्यांत आला.

—'दिरेक्सांव द इंस्त्रुसांव' खातें रद्द करण्यांत आलें असून, प्रस्तुतच्या दिरोक्ताराची नेमणूक 'शिक्षणाचा नवीन' मसुदा तयार करण्याचे कामीं करण्यांत आली आहे.

—आवदीतोरीच्या नोकर वर्गाचीहि छाटाछाटी करण्यांत आली आहे.

—प्रो० कोत कुझानीं वकिलीची परीक्षा दिल्याचें वर्तमान प्रसिद्ध झालें आहे!

—'विवाह' विषयाचा ३ रा लेखांक येत्या अंकीं प्रसिद्ध होईल.

—'भारता'च्या खटल्यासंबंधानें ठिकठिकाणाहून स्फूर्तिदायक संदेश येत आहेत. संदेशकरांचा भारत अत्यंताभारी आहे.

—बार्देस प्रांताचे लेजिज्लातीव्ह कौन्सिलचे नवे प्रतिनिधि दो० जयराम खलप हे ता. ५ जानेवारीच्या कौन्सिलच्या पहिल्या बैठकीस हजर राहून परत ह्मापशास येतानां त्यांचें बारदेशकरांनीं थाटाचें स्वागत केलें. बँडच्या व गर्नालच्या आवाजांत त्यांची मिरवणूक काढून ज्ञानप्रसारक मंडळीच्या दिवाणखान्यांत त्यांस हारतुरे देऊन त्यांचा सन्मान केला. शहरांतील सर्व मराठी शाळांतील मुलांस त्यानीं खाऊकरितां लाडू वगैरे वांटले होते.

—'भारत' व 'हिंदु' हीं साप्ताहिकें सरकारनें बंद केल्याची जी एक पुण्याच्या स्वराज्यांत बातमी प्रसिद्ध झाली आहे, ती निराधार असल्याची गोष्ट सिद्ध करण्यास दुसरा पुरावा नको!

—गोव्यांतील बिनसरकारी मराठी शाळांत ब्रिटिश हिंदुस्थानांतील शिक्षकांकडून शिक्षण दिलें जातें, या गोष्टीबद्दल सरकारांत भलभलतीं खलबतें चालू आहेत असें कळतें!

—येत्या अंकापासून श्री. सारस्वताची कोंकणी भाषेवरील लेखमाला सुरू होईल.

—प्रो. देंतींज्यु यांचें आक्षपार्ह पत्र खासगी स्वरूपाचें होतें व तें केवळ नजरचुकीनें प्रसिद्धीस आलें, असा प्रोन्हींसकर्त्यांनीं 'मल्लीनाथी' शास्त्रार्थ लढविला आहे! आणखीं कोणकोणते नवीन शास्त्रार्थ निघतात ते पाहूं! या ताज्या प्रकरणांमुळें गामप्रकरण थंडावत चाललेलें आहे, ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट होय!

—येथील प्रोकुरादोर जेराल दो. रोश दिनिज यांची मकाव येथें झालेली नेमणूक रद्द होऊन ते येथेंच आपल्या हुद्यावर स्थिर होतील अशी बोलवा आहे.

—मुंबईच्या आंग्लो-लुजितानांनेंहि गामोत्सवाविषयीं व्यक्त केलेल्या तटस्थपणाबद्दल आपली नापसंति प्रदर्शित केली आहे! पण यांच्या नापसंतीची पर्वा करतो कोण?

ANUNCIOS

O *Bharat*, ano 9° n° 44 de 29 de Janeiro de 1925
Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida
Numero avulso 1 tanga

Pelo juizo de direito da Comarca de Quepém e cartorio do Escrivão do 2° oficio que este assina correm editos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2° do artigo 197 do Cod. da Proc. Civ. citando os interessados Gunum e marido Hori Jeganata Seil, residentes em parte incerta de Carvar do territorio Inglez, para assistirem a todos os termos do inventario orfanologico requerido por obito de Bissó Naique, por outro nome Bissó Naique Delencar, morador que foi de Delem, de Canacona, sendo inventariante Putú Narana Folo, de Mudcuda de Canacona e deduzirem querendo nele os seus direitos sem prejuize de seu devido e regular andamento. E para ser publico se expediu este.

Xeldem da Comarca deQuepém, 10 de Janeiro de 1925.

O Escrivao de Direito do 2° oficio
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo Juizo de Direito da comarca de Quepém e cartorio do escrivão do 1° oficio Redcar, á requerimento da inventariante Etermina Enriques que é a mãe administradora da sua filha menor Maria Antonieta Eronia Anastásia das Dores Fernandes, aquem foi autorisada a venda em hasta publica por deliberação do respectivo conselho da familia e ouvido o Sr. Dr. Curador dos Orfãos, vai á venda em hasta pública pela segunda vez, á porta do tribunal judicial desta comarca no dia tres do Fevereiro proximo pelas 10 horas, pela metade do preço da sua avaliação, a metade da metade do predio denominado Queloxiachi nomoxi" que fica ao nascente com metade sul do terreno que fica ao nascente denominado Soncreachem mola de cultura de coqueiros, arroz jaqueiros e outras arvores, sito em Cola de Cabo de Rama, discrito na conservatoria desta comarca sob o n° 5495 afl-146 do livro B. 17, avaliada por 1.250 rupias, nos autos da carta precatoria vinda a este juizo e extraida dos autos de inventario orfanologico aqui se procedeu no Juizo de Direito da Comarca de Salsete, por obito de Faustino AleluiaFernandes que foi de Cavelossim, sendo inventariante a sua viuva dita Etermina Henriques. Quem a quizer comprar compareça nos indicados dia, horas e local correndo por conta do arrematante as despesas da praça e a contribuição de registo por inteiro. Por este são citados nos termos e para os efeitos da lei todos os credores incertos, coproprietarios e outos quaisquer preferentes E para ser publico se expediu este

Quepem 17 de Janeiro de 1925

O escrivao de direito do 1° oficio
Babú V. Camotim Redcar
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

व्यंजक पत्र पोर्तुगालच्या एका कोंपऱ्यांतील साप्ताहिकांत प्रसिद्ध झाल्याचें पणजींत प्रसिद्ध झाल्यापासून सर्वत्र असंतोषाच्या व त्वेषाच्या लाटा उसळावयास लागल्या आहेत. ‘ निरुपयोगी लोकांचीं वसतीस्थानें ’ अशा नांवानें येथील शिक्षणसंस्थानां संबोधण्याचें पत्र–लेखकानें धाडस केलें असून गांवठी पोर्तुगीज वाक्प्रचाराचे कांहीं नमुने दार मासलेहि त्यानीं आपल्या त्या पत्रांत संग्रहीत केले आहेत. प्रारंभापासून अखेरपर्यंत पत्रांत खोडसाळपणा ओतप्रत भरलेला असून, तो पाहून कोणालाहि लेखकाची कींव च ये ई ल ! उपरोक्त ‘ प्रतिभासंपन्न ’ पत्रापासून मारामारीपर्यंत बेतल्याची बोलवा आहे ! नवीनच आलेले पणजी–पाठशाळेचे प्रो. जुझे देंतीज्यु हे त्या पत्राचे युरोपियन कर्ते असून, सध्या गोमांतकांतील एच्चयावत् सुशिक्षित मिस्तीस व नेटीव्ह वर्ग त्यांच्या विरुद्ध चिथरून गेला आहे ! सदहू प्रोफेसर साहेब चे विचार आह्माला पसंत नाहींत, हें जरी खरें असलें तरी कांहीं युरोपियनांच्या मनांत येथील फिरंगाळलेल्या लोकांच्या विद्वता व पात्रता या गोष्टीं संबंधानें कोणती भावना वसत असते, हें कळून येण्याचें एक उत्कृष्ट साधन या दृष्टीनें त्या विचारांचें ‘कौतुक’ केल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं. कावळ्यांनीं कितीहि काळजीपूर्वक मोरांच्या पिसांत आपला कृष्ण देह वेष्टीला, तरी त्यांना मोराची संज्ञा मिळणें कसें दुरापास्त असतें, याचा ‘ अर्ध्या बाटलीनें पाकले बनलेल्या कंट्री साहेबांनीं अवश्यमेव विचार करावा, अशी आंमची त्यांना सूचना आहे.

आश्रयदात्यांस विनंतिः—‘ भारता ’-विरुद्ध भरण्यांत आलेल्या नवीन खटल्याचें स्वरूप पूर्वीच्या खटल्यांच्या मानानें पुष्कळ भिन्न असल्यानें बचावाच्या साधन सामुग्रीसाठीं बऱ्याच पैशांचा धूर निघण्याचा संभव आहे. ‘भारता’ची सांपत्तिक स्थिति मोठीशी समाधानकारक नसली तरी, स्वसंरक्षणाचा बोजा तो आश्रयदात्यांवर–अंशत: कां होइना लादण्यास तयार नाहीं. पडेल ती झंज शांतपणानें सहन करून, प्राप्तस्थितींतून तो यशस्वी रीतीनें मुक्त होण्याची धडपड करीलच. मात्र वर्गणीदारानीं आपापली वर्गणी ताबडतोब चुकती करण्याची तसदी घेतली पाहिजे नुसती वर्गणीचीच फेड झाली, तरी ‘भारता’ला प्राप्त संकटाशीं दोन हात करण्यास जोराचें स्फुरण येणार आहे. आश्रयदात्यांनीं केवळ खटल्यासाठीं ह्मणून पदरमोड करावी अशी आमची बिलकूल इच्छा नाहीं. त्यांकडून नुसती बाकी असलेली वर्गणीच आली कीं, आह्मीं आमचा बचाव करण्यास शकूं. तेव्हां सर्व आश्रयदात्यानीं आपापली वर्गणी पाठवून प्रस्तुत संकटांत ‘भारता’ला सहाय्य पुरवावें, अशी आमची त्यांस आग्रहाची विनंति आहे.

एक विलक्षण कारखाना

संध्याकाळची वेळ. रिकामा बसून वेळ जाईना ह्मणून सहज बाहेर फिरण्यासाठीं निघालों. गिरगांव रस्ता मागें टाकून भुलेश्वर बाजूकडे जात असतांना वाटेंत एका ठिकाणीं मोटार गाड्यांची बरीचशी गर्दी दिसली. काय आहे ह्मणून कुतूहलपूर्वक मी पहावयास लागलों तों बरेचसे खादी पोशाख केलेले लोक जातानां दिसले, कांहीं मोटारगाड्यांतून, कांहीं साध्या गाडींतून तर कांहीं पायीं येत होते अशी सर्व गर्दी पाहून या ठिकाणीं कांहीं तरी मोठा समारंभ असावा असा मी तर्क केला. वर पहातों तों भव्य अक्षरांनीं लिहिलेली एक पाटी दिसली. त्यावर “ देशभक्त व पुढारी बनविण्याचा कारखाना ” असे शब्द ठळकपणें नजरेस पडले. ते शब्द वाचतांच मी आश्चर्यानें थक्क झालों. आजपर्यंत मी पुष्कळ कारखान्यांचीं नांवें ऐकलीं होतीं. पण “पुढारी व देशभक्त बनविण्याचा” एखादा कारखाना असेल अशी या वेळपर्यंत माझी कल्पना नव्हती. शेवटीं काय होईल तें होवो हा कारखाना एकदां नजरेखालीं घालावाच असा विचार करून मी त्या कारखान्यापाशीं जाण्यास निघालों परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, इतर ठिकाणाप्रमाणें या देशभक्तीच्या कारखान्यांत जाण्यास सुद्धां मज्जाव होता. दारावरच एक नखशिखांत खादीचा पोशाख केलेला हाडकुळा इसम “स्वयंसेवक” नाम धारण करून द्वारपालाचें काम करीत होता. डोळ्यास अमेरिकन फ्रेमचा चष्मा आहे, तोंडांतून परदेशी सिगारेटचा धूर बाहेर पडत आहे व बाहेरील खादीच्या झग्या आड आपली खचलेली छाती छपविण्याच्या हेतूनें घातलेला विदेशी गंजिफ्राक स्पष्टपणें दिसत आहे, अशा थाटांत असलेल्या ह्या देशभक्ताजवळ नम्रपणें मी आंत जाण्याविषयीं परवानगी मागितली.पण त्या महात्म्यानें माझ्याकडे नीट पाहिलें देखील नाहीं. माझ्याविषयीं धिःक्कार प्रदर्शित करण्याच्या हेतूनें त्यानें फक्त आपल्या सिगारेटचें थोटूक लांब भिरकावून दिलें व नाकातोंडांतून धूर काढीत आपली खचलेली छाती पुढें करण्याचा आविर्भाव केला.पहिल्या सपाट्यास या देशभक्तास एक धक्का मारून आंत शिरकाव करून घ्यावा असें माझ्या मनांत आलें. पण लगेच “ अनत्याचार ” तत्वाची मला आठवण होऊन मी त्या क्षुद्र हेतूपासून परावृत्त झालों. त्या देशभक्ताच्या हृदयास द्रव यावा व आपण ह्याच्याचपैकीं एक आहों असें त्याला वाटावें या हेतूनें मी खिशांतून म० गांधी, शौकतअल्ली, महंमदअल्ली इत्यादि पुढाऱ्यांच्या तसबिरा त्याला दाखविल्या. तरी त्या देशभक्ताचें हृदय जरा सुद्धां द्रवलें नाहीं. शेवटीं पंचम जार्ज बादशहाचें चित्र असलेला एक रुप्याचा मुखवटा त्याला दाखविताच तो खूष होऊन इकडे तिकडे पहात त्यानें तो खिशांत टाकला व मला आंत जाण्यास परवानगी दिली. देशभक्तीच्या द्वारांत जाताना सुद्धां जवळ पैसा पाहिजे, हें तत्व त्या दिवशीं मला कळलें. असो. “येन केन प्रकारेण” आंत प्रवेश तर करून घेतला.

आंत जाऊन पहातों तों एक भव्य व विस्तीर्ण दिवाणखाना दृष्टीस पडला. तो अत्यंत मोहक पद्धतीनें शृंगारला होता भिंतीवर जागोजाग दादाभाई नौरोजी, मेथा, गोखले, टिळक आदिकरून भूतकालीन व महात्मा गांधी, मौलाना महंमदअल्ली शौकतअल्लीसह हिंदुस्थानांतील सरसकट विद्यमान मौलवी, मौलाना आणि उलेमा व इतर कित्येक पुढाऱ्यांच्या तसबिरा टांगलेल्या होत्या. हिंदुस्थानांतील एक महत्वाचा पुढारी असा राहिला नव्हता कीं ज्याची तसबीर भिंतीवर नव्हती. प्रत्येक तसबिरीच्या खालीं अशींच मोहक वचनें निरनिराळ्या रंगांत छापलेलीं होतीं. “ स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे ” “ स्वराज्याची तहान सुराज्यानें भागत नाहीं ” अशीं आणखीं कित्येक वचनें निरनिराळ्या भाषांतून होतीं. उर्दू भाषेंत छापलेल्या बहुतेक वचनांत स्वराज्याच्या तहानेपेक्षां खिलाफतेची तहानच जास्त दिसत होती. या वचनांत देखील “हराम” “हलाल” “कुरबान” या शद्बांची रेलचेल होती. खालीं जमिनीवर सर्वत्र शुभ्र खादी पसरण्यांत आली होती. तात्पर्य अशा रीतीनें त्या दिवाणखान्यांतील सर्व वातावरण देशभक्तीच्या पवित्र विचारांनीं सर्वत्र भरलेलें होतें अशा त्या पवित्र वातावरणांत मी कांहीं वेळ उभा आहें इतक्यांत एक शुभ्र खादी परिधान केलेला, दाढी बरीचशी वाढविलेला, डोळे खोल गेलेला असा एक फिकट दिसणारा इसम आंत आला. या एवढ्या विस्तीर्ण दालनांत याच्याशिवाय दुसरा कोणीच नाहीं हें पाहून हाच या कारखान्याचा मालक असावा असा माझा ग्रह झाला व तो खराच होता. त्या गृहस्थानें अत्यंत नम्रपणें मला विचारलें कीं; “ आपणांस पुढारी व्हावयाचें आहे कीं देशभक्त बनावयाचें आहे ” हा प्रश्न ऐकताच मी अगदीं भांबावून गेलों. “ पुढारी ” व “ देशभक्त ” हे शब्द अत्यंत मोहक आहेत आणि असा कोण प्राणी आहे कीं ज्याला अनायासें देशभक्त व पुढारीपण नको. पण देशभक्त बनावयाचें ह्मणजे त्याला तसाच अतुल स्वार्थत्याग लागतो, हाल अपेष्टा सोसाव्या लागतात; प्रसंगीं प्राणासहि मुकावें लागतें अशी माझी आजपर्यंतची प्रामाणिक कल्पना होती. पण ती खोटी आहे असें अनुभवांतीं मला कळून आलें. मला गोंधळलेला पहातांच तो पुण्यपुरुष हंसून ह्मणाला, “ काय असे अगदीं गोंधळून गेलां, लक्षांत ठेवा हा कारखाना आहे व यांत वाटेल तसला कच्चा माल असला तरी आमच्याकडे असलेल्या विवक्षित यंत्रांत त्याला घातला कीं तो एकदम पक्का झालाच असें समजा. बोला देशभक्त व्हावयाचें असेल तर ह्या यांत्रिक कारखान्याकडे रवाना करतों. पुढारी व्हावयाचें असेल तर नेमस्त, जहाल, असहकारवादी कोणत्या पक्षाचें व्हावयाचें तें सांगा ह्मणजे त्याप्रमाणें व्यवस्था करतों.” मी हें सर्व ऐकून अगदीं थक्क झालों व घाबरलों देखील. मला यंत्रांची नेहमींच मोठी भिति वाटत असे. न जाणों यानें एकाद्या यंत्रांत मला घातलें व मृत्युलोकांत देशभक्त बनण्याऐवजीं मी जर का एकदम स्वर्गलोकांतला देवभक्त बनलों तर. हा विचार मनांत येतांच मी देशभक्त व पुढारी होण्याचें दोन्हीहि टाळलें व त्या महात्म्यास ह्मटलें, “ महाराज, दुर्दैवानें आपल्या ह्या अलौकिक यंत्राचें सहाय्य घेऊन देशभक्त व पुढारी बनण्याला मला तूर्त धैर्य व इच्छा नाहीं, पण आज अनायासें आपल्या कारखान्याचें व आपलें दर्शन झालेंच आहे. करिता आपल्या त्या दिव्य यंत्रांचें अद्भुत सामर्थ्य पाहण्याचा माझा विचार आहे. करितां आपण तों कृपा करून पूर्ण करा. ”

माझ्या तोंडून हे शब्द ऐकतांच कारखान्याचा मालक हंसला व ‘ माझ्या पाठीमागून या तर ’ असें सांगून त्यानें मला दुसऱ्या एका दालनांत नेलें. या दालनांत पहातों तों जिकडे तिकडे खादीचे ढीग पडले होते. अनेक शिंपी “ सिंगर सोइंग मशीनवर ” जोरानें काम करीत होते. खादीच्या टोप्या, खादीच्या कफनीवजा पैरणी, खादीचे कोट, खादीच्या पाटलोणी अधांतरीं दोऱ्यांवर इतस्ततः लोंबत होत्या. अनेक देशभक्त होऊं पहाणारे लोक या ठिकाणीं उभे होते. मध्यभागीं एक मोठें यंत्र होतें. त्याकडे बोट दाखवून कारखान्याचे मालक मला ह्मणाले, “ हें आमचें सर्वांत मोठें व महत्वाचें यंत्र. बाहेरून कच्चा माल आला कीं आह्माला प्रथम या यंत्रांत घालावा लागतो. देशभक्त बनावयाचें असलें तर प्रथम या यंत्राचा आश्रय केलाच पाहिजे कपड्यांवांचून सर्व कांहीं फुकट आहे. कपडे श्रीमंत मनुष्य बनवितात. कपड्यानेंच मनुष्य खरा सभ्य व “ रिफाईन्ड ” दिसतो, कपड्यामुळेंच मनुष्याची योग्यता समाजात वाढते व कपड्यानेंच देशभक्त व पुढारी बनतां येतें. डोकीवर खादी टोपी व आंगावर खादी असली ह्मणजे मग देशभक्त बनावयाला मुळींच अवकाश लागणार नाहीं. हें यंत्र हल्लींच नवें बनविलें; पूर्वीचें एक यंत्र होतें पण तें आतां बंद करावें लागलें आहे. तें मग तुह्मांला दाखवीन ” इतकें बोलून त्यानें यंत्राची कामगिरी दाखविण्यासाठीं जवळच्या कच्च्या मालापैकीं एक जणाला उचलून यंत्रांत टाकलें. या इसमाच्या डोकीला एक जरीचा फेटा, आंगांत एक परदेशी काळा कोट वगैरे पोशाख होता त्यामुळें तो देशभक्त असा मुळींच वाटत नसे. पण यंत्रांत टाकल्याबरोबर थोड्याच अवकाशांत त्याचा असा कांहीं बनाव झाला कीं तो चटकन् एक मोठा देशभक्त दिसूं लागला. डोकीस स्वच्छ खादीची टोपी, आंगांत एक खादीची पैरण व एक खादी पंचा यानें तो देशभक्तांत अग्रगण्य दिसूं लागला.

(अपूर्ण)

ECOS& CRITICA

UM COMPROMETIMENTO SERIO

A *India Portuguesa*, de Margao pretende, a seu modo, defender se das *baboseiras* e *insultos* que, em um momento de irreflexao e mau humor atirou, fera e iracunda, a's faces *dalguns hindu's que perante a comemoração do centenario assumiram*, no entender dela, *uma atitude subversiva.*

E', absolutamente, oca senao louca a defesa da *India* que se escuda numa argumentagao esteril, cheia dum palavreado desconexo, por quanto nao foi capaz de provar sequere uma so' de tantas acusagoes, petulante e levianamente, assacadas aos mesmos hindu's. E na impossibilidade de se livrar, airosa e decorosamente, do circulo de ferro em que ela propria se apertou, talvez mal aconselhada, a folha do Partido Indiano, vencida e desesperada, chama ao director do *Bharat* um desequilibrado, dizendo que lhe causa mais compaixao do que irritagao!

E' certo que na materia de insultos e baboseiras nao ha' na *India* quem leve a palma ao ilustre chefe do Partido Indiano, o qual, porem, pode estar certo que, cedo ou tarde, tera' que arrepender-se, politicamente, da falsa suspeigao que tentou criar em volta da pacifica e ordeira classe hindu'.

E' que ha agravos que se nao esquecem facilmente, sobretudo, feitos por quem tem a estricta obrigagao de pensar maduramente e obrar serenamente.

¿Ignora, porventura, a *India* que nao deve fazer a outrem o que nao quere que outros lhe fagam?

"A TERRA"

Completou ja' oito anos da sua publicagao este intemerato bissemanario de Margao, que, pelos relevantissimos servigos que, com verdadeiros sacrificios e incontestavel abnegagao esta' prestando ao Paiz, merece especial mengao.

Em certos assuntos, a atitude de A TERRA *se* nao conforma com a nossa, o que, porem, nao e' motivo suficiente nem racional para lhe negarmos o valor e a sinceridade do patriotismo com que, em geral, toma ela conta de todos os problemas de interesse publico.

Numa palavra: o jornal A TERRA sabe viver decentemente, fulminando erros e verberando desatinos, causticando imoralidades e golpeando inconveniencias, o que e' raro nesta terra em que, sob a capa da politica, se cultiva so' o comodo egoismo.

Longa dura e perene ventura!

LEGADOS E DELEGADOS!

Escrevem nos:

"Em breves linhas na edigao passada, apresentamos como corriam as coisas referentes a' administragao dos legados do falecido Deao Almeida, na parte que dizem respeito aos manducares. Agora voltando ao ponto nos referiremos tao somente ao encarregado do mesmo cabido. Pela administragao dos bens o cabido, como consta do testamento, tem de premi: 400 xerafins, soma esta que nos consta esta' elevada sem autorisagao nem escrupulo nenhum a 400 rps. pagando alem disso ao encarregado 30 rps. mensais e 6 candis de bate e 180 cocos ao ano, entidade esta que o testamento nao reconhece absolutamente, reconhecendo apenas a do jardineiro e mocadao que continuam nos seus respectivos postos desde a antiguidade. A isto acresce o subsidio de 2 rps. diarias e 10 rps como para viagem que recebe o conego administrador, quando esta' ca' para qualquer diligencia.

Ai esta' a aplicagao que tem o dinheiro que pertence ao cumprimento estricto dos legados.

Em abono da verdade, devemos dizer que o tal pobre a quem nos referimos na edigao passada recebeu de esmola 5 rps. tendo abatido as outras 5 em satisfagao do pagamento da divida de 1918!"

A caridade deixa de ser caridade quando ela se comistura com o egoismo!

ENGANA-SE...

Supoe o nosso presado colega de *A Terra* que a concessao do terreno, feita pelo Governo ao *Sarasvat Braman Samaj*, de Margao e' ilegal. Pelo menos, da' mostras de se nao ter convencido da legalidade da mesma concessao. Chamamos, porisso, a atengao do referido bissemanario para o art. 123 do Regime de Concessao em vigor, aprovado por decreto n.º 3602 e que diz:

> "O Governador Geral podera', quando o julgue conveniente conceder gratuitamente terreno em bairros a esse fim destinados, para construgao de pequenas casas de habitagao para os necesitados, quando estes comprovem a sua pobresa, e 'bem assim para edificios destinados a' beneficencia ou outros fins de utilidade publica'."

¿Nao acha a *A Terra* que se engana...?

A'S CINZAS!

Reduziram se a's cinzas e nada duas tendas que se tinham levantado nos suburbios da mina do *Devandongor*, de Rivona. Destinavam se elas a'residencia do sr. Director de Agrimensura e de Minas e da sua comitiva.

Foi o fogo que devorou, segundo informam; e como o accidente se deu ao pe' da referida mina, recea-se que seja atribuida a destruigao ao respectivo manifestante que deve ter tido ai perto deposito de qualquer explosivo.

¿Nao conhecem a historia da mina de Pale? Pois, entao, e' escusado por mais cartas na mesa.

Preciso e' ver, agora, que fogosa atitude vai assumir o sr. Bernardo da Costa no *fogoso* assunto da Mina do *Devandongor*. Naturalmente Sua Exa. vai propor ao Governo uma multa de 6 contos ao tal manifestante.

O fogo causou ao Estado prejuisos no valor de tres a quatro mil rupias.

¿Que fogoso zelo?!

वर्तमानसार

—कळविण्यास अत्यंत वाईट वाटतें कीं, शिरवडें येथील श्री. मंगेश कृष्ण गुडे हे गेल्या माघ शु॥ ५ मी रोजीं रात्रौ रक्ताच्या झटक्यानें (congesto cerébral) कैलासवासी झाले! श्री. गुडे हे चांगल्या संपन्न स्थितींत असून शिरवडें येथें आणि इतरत्रहि त्यांचें वजन फार चांगलें होतें. हे विद्याव्यासंगी असून वेदांत विषयांत त्यांची फार चांगली गति होती. आपलें सरकारी काम संभाळूनहि राहिलेल्या वेळीं ते त्याच विषयाचें अध्ययन करीत असत. वेदांत विषयाच्या चर्चेकरितांच एक वेदांती संन्याशी कित्येक वर्षांपासून अखेरपर्यंत त्यानीं आपल्या घरीं ठेवून घेतले होते. परवां वेदांताचा व्यासंग चालू असतांनाच त्यांच्यावर रक्ताचा पहिला हल्ला झाला; आणि तन्निवारणार्थ केलेले सर्व प्रयत्न निष्फळ होऊन अवघ्या दोनच तासांत त्यांचें देहावसान झालें!! श्री. गुडे यांच्या या आकस्मिक मरणानें त्यांचे दत्तक चिरंजीव (पुतणे) श्री. व्यंकटेश मंगेश गुडे आणि बंधु श्री. गोपाळ कृष्ण गुडे यांच्यावर मोठाच दुःखद प्रसंग ओढवला आहे. पण परमेश्वरी सत्तेपुढें उपाय नाहीं या तत्वावर लक्ष्य देऊन पूर्ण विवेकानें ते आपल्या मनाचें शांतवन करून घेतील अशी आशा आहे. कै० गुडे यांच्या आत्म्यास परमेश्वर शांति देवो.

—इतर विषयांच्या गर्दीमुळें या अंकांत आरोपीत लेखाचें भाषांतर प्रसिद्ध करणें शक्य झालें नाहीं.

—येत्या अंकांत नवें वर्ष, नवें संकट हा एका नवीन विचारांच्या व नव्या जोमाच्या लेखकाच्या तडफदार लेखणींतून उतरलेला लेख प्रसिद्ध होईल.

—मौज साप्ताहिकाच्या मार्फत 'मौजच मौज' या नांवाचें एक नवीन मासिक लवकरच निघणार आहे.

—रिवण येथें तेथील एका मिनाच्या खाणी शेजारीं उभारलेल्या आग्रीमेंसूर खात्याच्या दोन तंबूंस आग लागून जवळ जवळ ३–४ हजारांचें नुकसान झालें. 'आंधळा दळतो व कुत्रें पीठ खातें.'!

—गोव्यांत जिकडे तिकडे देवीची सांथ जोरांत आहे.

—जास्ती कर भरणाऱ्या जमीनदारांच्या विरोधामुळें मुरगांव मुनिसिपालटीला अधिकार सूत्रें खालीं ठेवावीं लागलीं.

—सांगें येथील अंतस्थ धुसपूस जोरांत आहे.

—दुसरीकडे प्रसिद्ध झालेल्या डी. एम. नाडकर्णी यांच्या जाहिरातीकडे गरजूनीं अवश्य लक्ष पुरवावें, अशी सूचना आहे.

—राजा बहादुर नारायण लालजी यानीं सांगलीच्या मारवाडी बोर्डिंगास ५००० रुपयांची देणगी देण्याची केली आहे.

—प्रो० देंतीज्जुं प्रकरणांत आणखीं दोघां युरोपियनांसहि चोप बसला होता, अशी वंदता आहे!

आजचें पोर्तुगीज सदर

अग्रलेखः—

हिंदूंची चळवळ व त्यांच्या शत्रूंची वळवळ; बंड ह्मणजे काय?

लेख दुसराः—

प्रोफेसर देंतींञ्जू प्रकरण.

स्फुट व इतर विषयः—

सरकारी तंबूंची होळी; दियांव प्रकरण; 'तेन्ह' व सा. ब्रा. समाज; इ० इ० इ०

समाज सुधारणा

विवाह

लेखांक ३ रा.

विवाह संस्काराची अधोगति

त्या उन्नत अशा वैदिक कालामधून आपला भारत देश अत्यंत अवनत काला मध्यें प्रवेश करूं लागला. या काळीं अज्ञानानें आपला पगडा हिंदुस्थानभर बसवून जिकडे तिकडे अज्ञानांधःकारांत पसरून टाकला. नाना प्रकारच्या अडचणी उपस्थित होऊन भारताला गारत करूं लागल्या. स्त्रियांचा आदरसत्कार व स्वतंत्रता यांत कमतरता पडूं लागली. अज्ञानामुळें पुरुषांनीं स्त्रियांचे अधिकार काढून घेण्यास सुरवात केली. त्यांना गुरांसारखें वागविण्यांत येऊं लागलें व त्यांनां धार्मिक, मानसिक, आत्मिक अशा उन्नतीला पारखें करून टाकलें. पवित्र संस्कार 'यतो पवित गायत्री,' वेदपाठ इत्यादि सर्व चांगले मार्ग त्यांना बंद झाले. वेदमंत्राचे अर्थ बदलण्यांत येऊं लागले. नवेनवे ग्रंथ तयार होऊं लागले. मनुस्मृति. सारख्या ग्रंथांत नव्या श्लोकांची घुसडाघुसड होऊं लागली व बालविवाहाची अत्यंत वाईट चाल प्रचारांत आली.

वेदामध्यें स्त्रियांनां आपला वर स्वतः निवडण्याचा अधिकार दिलेला आहे. प्राचीन इतिहास व स्वयंवराची चाल यामुळें वरील गोष्टीला पुष्टी मिळत आहे. सीता, दमयंती, रुक्मिणी, द्रौपदी वगैरे पुष्कळांचे विवाह स्वयंवराच्या चालीनेंच झालेले होते. याशिवाय हिंदुस्थानच्या पद्दतीच्या काळांत संयोगीतेचा विवाह पृथ्वीराजाबरोबर स्वयंवराच्या चालीनेंच झालेला होता ज्या वेळीं कन्येची शारीरिक व मानसिक उन्नति होई व विवेक शक्तीप्रमाणें आपल्या गुणकर्म स्वभावानुसार वर शोधून काढण्याची पात्रता त्यांच्या अंगांत येई, त्याच वेळीं स्वयंवर करीत.

त्रिरांद्वर्षी द्वयेत्कन्यां ह्यां द्वादश वार्षिकीम। त्र्यष्ट वर्षोऽष्ट वर्षा धर्मे सीदती सत्वरः॥

मनूच्या वरील श्लोकाप्रमाणें ३० वर्षांचा नवरा व बारा वर्षांची नवरी, तसेंच २४ वर्षांचा नवरा, आठ वर्षांची नवरी यांचा विवाह करावा असें होतें. परंतु या श्लोका विषयीं मि. आनी बेझंट ह्मणतात कीं, 'एकाच झऱ्या मधून गोड व खारट असें दोन प्रकारचें पाणी केव्हांहि निघत नसतें. यावरून भगवान मनूच्या हातून वरील श्लोक लिहिला जाणें शक्य नाहीं, याबद्दल मला पूर्ण खात्री आहे. धूर्त लोक आपलें कार्य सिद्ध होण्याकरतां श्लोकांची फेरबदल करतात त्याप्रमाणें दुसऱ्या कोणी तरी हा श्लोक घुसडून दिलेला आहे.

बौद्धायनानीं सर्वां आधीं विवाह कालाच्या मर्यादेला शिथील करण्याचा यत्न केला. खालील श्लोकाचा अर्थ त्यांनीं असा केला आहे कीं,

त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कुमार्य्यां तुंमती सती। ऊद्धात्तु कालादेत स्माद्विन्देत सदृशं पतिम्॥ मनु ॥ ९।९०

अर्थात 'कन्या रजस्वला झाल्यानंतर तीन वर्षेंपर्यंत वाट पहावी. जर त्याचे माता पिता तोंपर्यंत तिचा विवाह करून न देतील तर ती स्वतःचा विवाह करण्यामध्यें स्वतंत्र आहे.' हें लिहिते वेळीं त्यानें असेंहि लिहिलें आहे कीं, 'ती कन्या ब्रह्मचारिणी अगर नग्निका असली पाहिजे. बौद्धायनांच्या मताप्रमाणें कन्या जर सोळा अगर याहून ज्यास्ती वयाची असली व पुरुषाशीं संसर्ग करतां येण्यासारखी असेल तर तिला नग्निका असें ह्मणावें.' सत्यव्रत व शौनिक यानींहि हाच अर्थ केलेला आहे.

सातव्या शतकांत निर्माण झालेल्या अमरकोशांत 'नग्निका' याचा अर्थ 'अनागतार्तवा' ह्मणजे जिला रजोदर्शन झालेलें नाहीं ती, असा केलेला आहे. यावरून तिचें वय बारा वर्षांवर आलें व बारा वर्षांच्या कन्येला 'नग्निका' असें समजूं लागले व त्याप्रमाणें त्याच्या आधारार्थ निरनिराळे श्लोक तयार होऊं लागले.

प्राप्ते द्वादशे वर्षेयः कन्या न प्रयच्छति॥ मासि मासि रजस्तस्या पिता पिबति शोणिनाम॥ यमस्मृति

जर बारा वर्षांची कुमारी लग्न न होतां घरांत राहिली तर तिच्या बापानें तिचें रक्त प्याल्यासारखें होतें.

माता चैव पिता चैव ज्येष्टो भ्राता तथैवच॥ त्रयस्ते नरकं यान्ति दृष्टवा कन्या रजस्वलाम्॥ संवतस्मृति

घरांत जर कन्या रजस्वला झालेली पाहिली तर आईबाप व थोरला भाऊ हीं तिघेंहि नरकामध्यें जातात. आठ वर्षांच्या कन्येला गौरी, नऊ वर्षांच्या कन्येलाहि गौरी व दहाव्या वर्षी तिला कन्या असें ह्मणतात. दहानंतर ती रजस्वला या नावांला पात्र होते.

'संवर्त संहिता' ॥६६॥

उद्वहेदष्ट वर्षामेव धर्मो न हीयत ॥८७॥ अ ९ दक्षस्मृति

आठ वर्षांच्या कन्येचा विवाह करावा. यांत धर्माचें कांहीं नुकसान नाहीं.

विवाह प्रशस्त कालमाह सप्रति ॥३॥ निर्णयसिंधु

विवाहाचा उत्तम काल सात वर्षांचा आहे व हा काल गर्भ धरलेल्या दिवसापासून मोजला गेला पाहिजे. अर्थात ६ वर्षें ३ महिनें हाच विवाहाचा उत्तम काल असें निर्णयसिंधु कारांच्या मतानें होतें.

असो. स्मृतीची संख्या अठरा असें धरतात. परंतु प्रचलित स्मृतीची संख्या फारच अधिक आहे. यांतील पुष्कळशा ग्रंथांत त्या कालच्या आवश्यकतेनुसार मुलींच्या विवाह कालाची मर्यादा कमी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. दुर्भाग्यामुळें ज्या काळीं हिंदु धर्माला अवनत स्वरूप प्राप्त होत होतें. व देशांत अज्ञानाचा व अराजकतेचा उद्भव झालेला होता. त्या काळीं या स्मृतीची रचना झाली. आतां आपणाला बालविवाहासारखी वाईट चाल कां प्रचारांत आली व या वाईट चालीकडे स्मृतिकारांची बाजू कां झुकली गेली हें पाहिलें पाहिजे. कारण कोणतीहि चाल त्या त्या परिस्थितीप्रमाणें प्रचारांत आलेली असते. व त्याप्रमाणें त्याच्या आधारार्थ ग्रंथहि तयार होत असतात.

आनीं बेझंट बाईनीं आपल्या Wake up India या ग्रंथांत ही चाल प्रचारांत येण्याला खालील तीन प्रधान कारणें दिलेलीं आहेत.

१ महाभारत लढाई व देशांत आपआपसांतील झगडा.

२ हिंदुस्थानाबाहेरील रानटी लोकांचे हल्ले व त्यांनां बऱ्याच वेळां विजय प्राप्त होणें.

३ स्त्रियांविषयींचा आदर कमी होणें व त्यांचे मानसिक व आत्मिक अधिकार काढून घेणें.

वरील तीनहि कारणें बहुतेक सर्वस्वी खरीं आहेत. देशांमध्यें जेव्हां अज्ञानाचें साम्राज पसरलें गेलें, लहान लहान जमीनदार आपणाला जेव्हां राजे समजूं लागून आपआपसांत झगडूं लागले, आपल्या जीवनाची व मालमत्तेची ज्या वेळीं लोकाना सुरक्षितता वाटेनाशी झाली, त्यावेळीं ही बालविवाहाची चाल प्रचारांत आली. लोकांना असें वाटूं लागलें कीं, लहान लहान मुलींचा विवाह करून देऊन त्यांनां एक संरक्षक उत्पन्न करावा कारण कदाचित् बापाचा देह जर लढाईंत पडला गेला तर त्याच्या मागें मुलीचा भार तिच्या नवऱ्यावर पडावा.

आपल्या हिंदुस्थानांतील लोकांची अशी समजूत आहे कीं, ते कोणतीहि गोष्ट धर्माच्या अंगांत समाविष्ट झाल्याखेरीज तिचा अंगिकार करण्यांस तयार होणार नाहींत. अधर्म करण्यापेक्षां मरण स्वीकारतील आणि याच कारणामुळें ह्या बालविवाहाच्या चालीबद्दल धार्मिक ग्रंथांत बरेच श्लोक मिळविले गेले व हळुहळू त्याचा परिणाम जनतेवर होऊन वेदकालांतील विवाह संस्काराचा उच्च आदर्श लोकांनां पारखा झाला. व नवीन ग्रंथांतील विवाहाबद्दलचे उपदेश हेच आपले पुरातन धर्मसंस्कार आहेत, असें त्यांनां वाटूं लागलें. मुलींच्या विवाह मर्यादेबरोबर मुलांचीहि लग्नमर्यादा कमी होऊं लागली. व अशा रीतीनें ब्रह्मचर्याचा नाश होऊं लागला. या नव्या धर्मशास्त्रानें आमच्या मातृशक्तीची अधोगति करून टाकली. वैदिक कालांतील विवाहाची चाल नष्ट भ्रष्ट होऊन आपली ही पुण्यमय व पवित्र भारतभूमि अपवित्र झाली. या नव्या धर्मशास्त्रांच्या प्रचारानें वैदिक कालांतील २४, २१, व १७ वर्षांच्या विवाहाची मर्यादा पौराणिक कालांत १२, १०, ८, व ६ यांवर येऊन ठेपली.

स्त्रियांची अधोगति खालील पांच कारणामुळें झालेली आहे.

१ स्त्रियांचें अविवाहीत रहाणें वर्ज्य केल्यामुळें.

२ त्यांचे मानसिक व आत्मिक अधिकार काढून घेतल्यामुळें.

३ प्रत्येक आईबापांच्या मनावर आपल्या मुलीचा विवाह बाल्यावस्थेमध्येंच झाला पाहिजे. नसल्यास नरक वगैरेचें कृत्रिम भय व खोट्या समजूतींचा पगडा धर्म ग्रंथ व उपदेश यांच्याद्वारा बसविला गेल्यामुळें.

४ आपल्या स्वार्थाकरतां मध्येंच नवेनवे श्लोक रचून ते घुसडून दिल्यामुळें.

५ निंदासूचक शूद्रादि शब्दांचा प्रयोग स्त्रियांकरतां केला गेल्यामुळें.

त्या नंतर अधोगतीला आरंभ झाला. जीवन शक्तीचा लोप झाला. प्राचीन कालांतील विदुषी स्त्रिया अधोगतीच्या खाणींत जाऊन पडल्या. आमच्या विवाह संस्काराची चाल आमच्या सभ्यतेला एक लज्यास्पद व निंद्यनीय कार्य होऊन राहिली. हिंदुस्थानांमध्यें बालविवाहाची चाल प्रचलित झाली आज आमच्या या भारत देशामध्यें बालपत्नींची संख्या एक कोटीहून ज्यास्त आहे. यांत कित्येक अशा आहेत, कीं त्यानीं अद्याप आपल्या आईचें दूध पिणेंसुधां बंद केलेलें नाहीं. व त्यांचें वय थोडक्या महिन्यावर आहे. हिंदुस्थानांतील विवाह मर्यादा व बालविधवा यांची कल्पना खालील आंकड्या वरून अवश्य कळून येईल.

वयोमर्यादा		बालपत्नी	बालविधवा
०-१	वर्षें	१३,२१२	१,०१४
१-२	,,	१७,७५३	८५६
२-३	,,	४९,७८७	१,८०७
३-४	,,	८७,५०८	४,७५३
४-५	,,	१,३४१०५	९,२७३
५-१०	,,	२२,१९७७८	९४,२७०
१०-१५	,,	६५,५५४२४	२२३,०४२

या निंद्यनीय व अनिष्ट विवाहाच्या चालीचा निश्चित परिणाम हिंदुस्थानामध्यें विधवांच्या संख्येचें अधिक प्रमाण होय. इंग्लंड व जर्मनी या दोनहि देशांत विवाहित स्त्रियांची जी संख्या आहे त्या पेक्षां आपल्या भारतामध्यें विधवांची संख्या अधिक आहे. १९११ चा सेन्सर रिपोर्ट पाहिला असतां असें दिसून येतें कीं, आपल्या देशांत विधवांची संख्या २ कोटी ६४ लक्ष २१ हजार ६४२ आहे.

स्त्रियांची विवाह मर्यादा कमी झाल्यामुळें पुरुषांच्या विवाह मर्यादेचें मान कमी होऊं लागलें व ज्यांची जशी इच्छा असेल त्याप्रमाणें विवाहाची चाल तो प्रचारांत आणूं लागला. अत्यंत आश्चर्याची गोष्ट ही कीं, आज विसाव्या शतकांतील कित्येक शिकलेले लोक सुद्धां प्राचीन वैज्ञानिक चाल सोडून ही निंद्यनीय व प्रकृतीविरुद्ध चालीचा स्वीकार करीत आहेत. या बालविवाहाच्या पद्धतीमुळें आमचा समाज अधोगतीला पोंचलेला आहे. करतां पुढच्या लेखांकांत या बद्दलचा विचार करूं.

मालाला मागणी येत आहे. पण ती पडली फारच थोडी. पण आतां नवीन स्वराजिष्ट महाराष्ट्रीय कदाचित पुनः हळुहळू याच मालाची मागणी करतील असें वाटतें. पाहूं आतां काय होतें तें. " याच दालनांतील दुसऱ्या एका कपाटांत कांहीं औषधी कुप्या होत्या. त्या मी सहज पाहूं लागलों तों एकावर " शिवराळभाषामृत " " ग्रामकेसरीछापचूर्ण" " मर्कटचेष्टावलेह "" विषलेखनीसंजीवनी " " कुचेष्टापाक " " बुद्धिवादकुठार " इत्यादि भपकेदार नावें होतीं. या औषधांकडे मी सकौतुक नजरेनें पहात असतां मालक त्याचे मला एकएक गुण समजावून सांगत होता. तो ह्मणाला, ' पुढारी ', विशेषतः जहाल पुढारी बनविण्यच्या कामीं या औषधांचा फार उपयोग आहे. हें ' शिवराळभाषामृत ' थोडेंसे पाण्यांतून घेतलें कीं वाटेल तसलें वेडेंवांकडें वक्तृत्व करण्याची शक्ति आंगीं येते व मग कांहीं दिवसांनी पुढारी बनतां येतें. या अमृताच्याच जोडीला हें चूर्ण आहे. वास्तविक खऱ्या देशभक्ताला व पुढाऱ्याला केसरी गर्जनाच पाहिजे पण अशानां नेहमीं सांपळयांत ठेवण्यांत येत असल्यामुळें पुष्कळ लोकांनीं आमच्याकडे इच्छा प्रदर्शित केल्यामुळें आह्मीं हें नवीन चूर्ण बनविलें आहे. याचीहि गर्जना कमी नसते व विशेषतः वायाबापड्यांना भिवविण्यास हेंच साधन बरें असतें पण तें कोठपर्यंत तर कोणी तसाच भेटून पाठीवर दांडा मारिला नाहीं तों पर्यंत. बाकीच्या या औषधाच्या कुप्या देखील वक्तृत्वाच्या व लेखनाच्या कामीं फार उपयोगी आहेत. या दालनांत आणखी कांहीं पाहण्यासारखें राहिलें नाहीं ह्मणून आह्मीं तिसऱ्या दालनांत गेलों.

या दालनांत याच कारखान्यांत तयार झालेल्या बऱ्याचशा नव्या जुन्या दे० भ० ची व पुढाऱ्यांची गर्दी जमली होती. त्यांच्याकडे स्वाभिमानपुरस्सर पहात मालक मला ह्मणाला ' पहा ही सर्व मंडळी या कारखान्यांतून बाहेर पडलेली आहे. या कारखान्यात येण्यापूर्वी या प्रत्येकाची स्थिति अतिशय हलाखीची असे. कोणी भिकारटाकार पगारावर मास्तरकी करीत, कोणी कोर्टांतून उगीच इकडे तिकडे येरझारा घालीत व संध्याकाळीं हात हालवित परत येत, कोणी आपआपल्या नुकत्याच उघडलेल्या दवाखान्यतून रोग्यांची वाट पहात शुद्ध माशा मारीत असत. अशा कोणत्या ना कोणत्या निरुद्योगी धंद्यांत ही मंडळी गढून गेलेली असे. परंतु पूर्वपुण्याईमुळें या कारखान्यांत चालून आल्याबरोबर त्यांची सर्व नवलाई आतां पालटली आहे. या वकीलसाहेबांची आज हजारों रुपयांची प्रक्टीस आहे, व अशीलांची गांठ घेण्यास देखील त्यांनां अतांशी फुरसत मिळत नाहीं. या डाक्टरसाहेबांचेंहि तसेंच. हा मास्तर आतां मोठा वर्तमानपत्रकार झाला आहे. असे एक ना दोन अनेक फायदे आमच्या या कारखान्यांपासून आहेत "

मालक एवढे शद्ब बोलतात तोंच ती सर्व देशभक्त मंडळी उठली. कांहीं सहज भेटण्यासाठीं ह्मणून आलेले जुने इरसाल देशभक्त निघून गेले. पण नवीनच बनलेल्या देशभक्तांची एक फेरतपासणी मालकाच्या मनांतून करावयाची होती. त्यांपैकीं कित्येकांत अद्याप प्रामाणिकपणा, नैतिक सदाचरण, ऋजुता, गरीबीची आवड, मुग्धपणा इत्यादि दुर्गुण होते ते एका फुंकणीसरसे घालवून त्यांत भोंदूपणा, लबाडी, आढ्यता, श्रीमंतीची हांव, पोकळ डौल, वाचाळता इत्यादि सद्गुण एका भात्यावाटे घालून झाल्यावर ते देशभक्त व पुढारी विजयोत्फुल्ल मुद्रेनें आपआपल्या गाड्यांतून चालते झाले व कांहीं फी न घेतां तो कारखाना मला फुकट दाखविल्याबद्दल मालकाचे मनःपूर्वक आभार मानून मीहि घरीं परतलों.

गोमंतकी भाषा

गोमंतकी भाषेला गोवी, गोवेंगिरी, हेंगाडी अशीं नांवें असून कोंकणी असेंहि ह्मणण्याचा परिपाठ आहे. गोमंतक हा देश प्राचीन कालापासून प्रख्यात आहे. परशुराम क्षेत्राची ही सीमा आहे असा आधार सांपडतो. " गौ ह्मणजे बाण, मा ह्मणजे मान आणि अंत ह्मणजे शेवट, ह्या तीन संस्कृत शब्दांचा मिळून हा शब्द साधित झाला असल्यामुळें परशुरामानें मारलेल्या बाणाची ज्या ठिकाणीं सीमा होते तें स्थल, असा त्याचा अर्थ होतो." कोणी कोणी ह्याला गोमांतक असें ह्मणतात, परंतु मांचे ठिकाणीं मं योजणें प्रशस्त असें पणजी येथें कांहीं वर्षांमागें "गोमंतक" नांवाचें साप्ताहिक पत्र निघत असे त्याच्या पहिल्या अंकांतील निराकरणावरून सिद्ध होतें. भारत वर्षीय कोषांत देखील " गोमंतक " असें आढळतें.

सह्याद्रीच्या पश्चिमेकडील अरुंद पट्टीस कोंकण असें ह्मणतात. ह्याला कुक्कोण किंवा कुकण, अरिअक, अपरांत [पश्चिम टोकावरील देश]. शूर्पारक (सुपाऱ्याचा देश) अशाहि संज्ञा आहेत. कोंकणाचे उत्तर आणि दक्षिण असे दोन विभाग झाले आहेत, त्यांतील दक्षिण प्रदेशांत गोमंतकाचा समावेश होतो. " गोमंतदेश मध्य कोंकण ॥षोडस योजनें विस्तीर्णं ॥" असा कोंकणाख्यानांत उल्लेख आहे. प्राचीनकाळीं सप्तकोंकण ह्या नावानें जे सात भाग ओळखण्यांत येत असत त्यांमध्यें " गोवराष्ट्र " (गोवा किंवा गोवें) आणि कोंकण (रत्नागिरी आणि ठाणें हे जिल्हे) असा भेद दिसून येतो. एका त्रैमासिकात " कर्नाट किंवा कानडी प्रदेशाचा वरचा भाग खास कोंकण ह्या नावानें ओळखला जातो. ह्या कोंकणाची दक्षिण सीमा गंगावळी नदी व उत्तरसीमा सोपाऱ्याजवळचीं वैतरणी नदी होय" अशीहि माहिती उपलब्ध होते.

कितीएकांच्या मतें गोव्यांत कानडी राजांची सत्ता स्थापन झाली त्यावेळीं गोवेंकरास कोंकणे व त्यांच्या भाषेला कोंकणी असें ह्मणण्याचा प्रघात पडला व हाच प्रघात पुढें ख्रिस्ती लोकांत रूढ होऊन सरकार दरबारांत गोमंतकी भाषेला कोंकणी(Concani- Concanim ही चूक असें ठरलें आहे) भाषा ही कायमची सनद मिळाली.

सन १९१० सालांत सांवतवाडी संस्थानांत Elementary Concani Grammar ह्या नांवानें कोंकणी भाषेच्या व्याकरणाचीं मूलतत्वें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांतील प्रस्तावनेंत The most notable varieties of Concani are असें लिहून कोंकणीचे फार प्रसिद्ध असे चार भेद दाखवून दिले आहेत ते:— कुडाळी किंवा मालवणी (सांवतवाडी संस्थान आणि वेंगुर्लें व मालवण ह्या दोन तालुक्यांमध्यें बोलण्यांत येणारी भाषा), गोमंतकी (गोवेंकरांची बोली), कारवारी (कारवारच्या शेणवी आणि शेणवीपैकीं = शणयपैकीं = ब्राह्मणांची बोली) आणि मंगळुरी (दक्षिण कानड्यांतील ख्रिस्ती लोकांची बोली) तात्पर्य, गोमंतकी भाषा ही कोंकणीचा एक भेद असें वरील पुस्तकांत दर्शविलें आहे.

भाषाकोविदांच्या मतें गोमंतकी आणि कोंकणी ह्या निरनिराळ्या आहेत. पुरातन कालीं ह्या भूतलावर ज्या छप्पन्न मानवी भाषा प्रचलित होत्या त्यांत गोमंतकी आणि कोंकणी ह्यांचा भिन्नत्वानेंच समावेश होतो. गुंजीकरांचें सरस्वती मंडळ, जोशांचें प्रौढबोध व्याकरण, पावग्यांचें भारतीय साम्राज्य, राजवाड्यांची ज्ञानेश्वरी वगैरे उपयुक्त पुस्तकें चाळून पाहिल्यास गोमंतकी भाषा ही कोंकणी असें ह्मणण्यास मुळींच आधार नाहीं. अस्सल कोंकणी भाषेचा मासला " करमणूक " साप्ताहिकाच्या जुन्या फायलींत मीं एकदां पाहिला होता व त्याचा उताराहि घेतला होता, तो १९२३ सालांतील १९ जुलैच्या सांखळींतील महापुरांत विसावा घेत पडला. कदाचित ख्रिस्ती लोक अधिक्यानें गोमंतकी भाषा ही कोंकणी भाषेचा एक भेद आहे अशी फुशारकी मारीत असतील, परंतु "गोमंतकी अपभ्रंशांत कांहीं किरिस्तांवी धर्म पुस्तकें व चार पांच व्याकरणें झालीं आहेत" हा राजवाड्यांच्या ज्ञानेश्वरींतील शेरा पाहिल्याबरोबर ख्रिस्त्यांनीं शिक्का मोर्तब दिलेली कोंकणी ही खास कोकणांतील अस्सल कोंकणी नसून गोमंतकी भाषेचें अपभ्रष्ट स्वरूप होय अशी त्याच्या शब्दोच्चारावरून खातरी होते. मासल्यादाखल ख्रिस्त्यांच्या कोंकणींतील एक उतारा देतों:—

" तूं सांगतिय तेंच खोरें. आंव नोकोंया मुकार तूं कितें कितें दाकोयशी तें, गोडिये फातराक रोगोत आसा मुण्ण दाकौन खोरो."

वरील मजकुराचा गोमंतकींत अर्थः— तूं सांगता तेंच खरं. हांव नकळ ह्या मुखार तूं कितें कितें दाखयशी तें, घडिये फातराक रगत आसा ह्मणून दाखौन खरो.

मराठींत भाषांतर

तूं सांगतोस तें खरें. मी नकळें ह्यापुढें तूं काय काय दाखविशील तें, कदाचित दगडाला (फत्थराला) रक्त आहे ह्मणून दाखवून खरा-

ख्रिस्त्यांच्या कोंकणी भाषेंतील पुस्तकांत कांहीं सस्कृत शद्ब परिणति होऊन येतात. उदाहरणार्थः ओस्तोरियो [स्त्रिया], पोमोंणें (प्रमाणें), वोर्तोता (वर्ततो ह्मणजे होतो किंवा ठरतो ह्या अर्थी), चोतुरकायेन (चतुराईनें), सुरोपाचो (स्वरूपाचा), मोत (मति], सोन्तोस [संतोष], मोर्दें (मध्यें) शेकीं (शेखीं ह्म० शेवटीं).

कितीएक ख्रिस्ती ख चे जागीं ह किंवा फ ची योजना शद्बार्थाप्रमाणें करीत असतात, उदाहरणार्थः हा (खा), फोरें (खरें) इ० माझ्या मतें ह्यांत नवल नाहीं. भिन्नभिन्न जातीच्या अशिक्षित लोकांत हे फरक दृष्टोत्पत्तीस येतात. गुजराथी लोकांत चटईला सादडी ह्मणण्याऐवजीं अशिक्षित हादडी ह्मणतात. तसेंच ळ चे जागीं र चा उपयोग करतात असा अनुभव आहे.

गोमंतकी भाषेची रचना केव्हां आणि कशी झाली ह्याचा अद्यापि पक्का निर्णय झालेला नाहीं असें माझें ठाम मत आहे. हें मत लोकमताला बाधक नाहीं. कोणी ह्मणतात ही स्वतंत्र भाषा [Lingua autonoma] कितीएकांच्या मतें ही पोटभाषा (Dialecto) हा वादग्रस्त प्रश्न आहे. आजचा विषय गोमंतकी आणि कोंकणी ह्यांच्यामध्ये छत्तिसाचा आंकडा असावा असें सप्रमाण दाखविण्याचा प्रयत्न आहे. सांप्रत गोमांतकी भाषा ही अठरा धान्याचें कडबोळें बनली आहे ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्या भाषेंत शुद्ध गोमांतकी शद्बांशिवाय संस्कृत, मराठी, कानडी, गुजराथी, पोर्तुगीज, इंग्रजी इत्याद्यनेक भाषांमधील शब्दभांडार कमजास्त प्रमाणानें परिणत स्वरूपानें संग्रहित झालें आहे. ह्याचें शतमान काढलें नसलें तथापि गोमंतकीय मराठी परिणत आणि विपरिणत शब्दाची निदान तीन चतुर्थांश संख्या आढळून येईल.

मासल्याकरितां कांहीं शद्ब पुढे देण्यांत येत आहेत:

शुद्ध गोमंतकी

पांचवे (पाचवें—पाच ह्यावरून—हिरवें) हळदुवे किंवा हळदुवें (हळद यावरून— पिवळें)

तुतया — हातोडी.	हांदुरली—रांजणवाडी
अपुरवाय—लाड	भुती—शिदोरी
होंकल—नवरी	हुलुक—पिसू
रोईण—वारुळ	सूर—ताडी
जळार—भुरकूट	आळणो—विझणा

मराठी परिणत ह्मणजे विकृत शद्ब

झंगाट—जगांट	वल्हें—होलें
सनई—सेनाय	बोगण—भगुणं
कलथा—कायलातो	अस्वल—वांस्वेल
बोका—बुक्लो	ढेंकूण—भिकूण
शपथ—सपूत	वाळा—वाळेरूं
बांदें—बेंदल, बेंदुलीं	ऐरण—हरण
दायाद—दायजी	

जुन्या मराठींतून

वर्कुल (वोरकली)— सोनें कसायाचा पाषाण

आपै—बोलाव	वच—जा
मुद्री (मुद्रा)—	आंगठी
हडप— (हडपू)	पेटी. गोमांतकींत

न्हाव्याच्या धोकटीस लागू झाला.

सात्न—केरसुणी	अनवाळें—सोवळें

दुसऱ्या लेखांकांत अन्य कांहीं भाषांमधील शद्बांचा मासला दिला जाईल.

डि. फं. ४ आणे.

सारस्वत.

ECOS & CRITICA

AGRADECENDO

O nosso presado colega de A EPOCA regista nas suas colunas a proposito do novo processo crime, instaurado contra o BHARAT, o seguinte:

" Este colega e' mais uma vez chamado a' barra de justiça.

O M. P. de Quepem instaurou contra ele processo crime. A' palavra escrita, pelo visto, ainda nao conquistou a liberdade.

Aguardamos o desfecho.

No entanto escusamos de significar que conta com a nossa solidariedade "

Muito pinhorado, o *Bharat* agradece-lhe os bons desejos.

A TRIBUNA

Entrou no 5 ° ano de publicaçao este nosso colega de Calangute

Apesar de governamental, *A Tribuna* nao deixa de expressar-se, a's vezes, desassombradamente em assuntos de vital interesse ao Paiz.

Boa saude e muita prosperidade !

ESCREVEM-NOS...

" Na ediçao passada dissemos que o cabido alem de ter um conego administrador mantinha ca' um encarregado pago afo'ra das 400 rupias, alia's 400 xerafins instituidos pelo testamento pela gerencia. Trataremos por ora da pessoa desse encarregado.

Importa ou nao um crime disviar um funcionario publio para um servigo diverso do que foi nomeado ?

Sucede assim com esse encarregado que e' funcionario publico nomeado por portaria do Governo, cujo numero acaso nao nos ocorre, fazendo parte do mesmo Cobido da Se de Goa como *portu -maça* com ordenado de 15 Rps. ao mez, mas que ja' vai para mais de 2 anos que esse funcionario esta' ca' legal ou ilegalmente. Consta-nos porem que la' na Se' tem seu sustituto pago a 10 Rps.

Nao e' de invejar a sorte do bem aventurado ? Para isso e' que sao as portarias do Governo ? Voltaremos."

DANDO VOLTAS...

Referindo-se ao caso do sr. dr. Dentinho Junior, o *Ultramar* insurge se, veementemente, contra o sistema da reparaçao de honra ofendida pela força do *musculo*.

A indignaçao do *capacho governamental* assemelha-se muito a's lagrimas de crocodilo e instila so' hipocrisia, como toda a obra da *gente ultramarina* que se distingue pela arte de mostrar o que nao sente e de sentir o que nao mostra, para maior gloria... estomacal.

¿ Supoe, por ventura, o *Ultramar* que o publico anda ja' esquecido de proesas quixotescas do valentao do sr. Roberto Bruto da Costa contra o magrito director do *Diario da Noite*?

O Ultramar nao conhece ao dito sr. Roberto ?

E' seu secretario da Redaçao e comerciante de sapatos...

INCURAVEL...

A Provincia tem palavras duras aos *Jovens hindus* por causa da justificaçao de sua abstençao na festa do Gama.

Pelo visto, a folha do sr. Pereira Batalha se nao acha, ainda, curada do mal cronico que, de ha muito, vem sofrendo: o de bordar consideraçoes sobre os assuntos que nao estuda, nem ao de leve.

Aprenda o quimbundo, sr. Batalha, que ha' de ser um jornalista de se lhe tirar o chapeu.

COSTA E ...BASTA...

A proposito da nossa local *A's cinzas...* referente a's tendas do Estado queimadas nm Rivona, dizem-nos que as mesmas tendas eram *usadas e gosadas* pelo pessoal da Companhia das minas *Portuguese India Mining SyndicateLtd*, cujos socios sao, alem dum estrangeiro, um sobrinho e um genro do sr. Bernardino da Costa, director de minas, que nunca utilisou das mesmas tendas... para si.

Agora e' que se compreende o silencio do dito sr. Costa em volta da queima das mesmas tendas.

Mas quem diabo havia de multar ao genro ?

Fosse o manifestante um seu inimigo pessoal e veriam, entao, como o sr. zeloso director de minas dangaria com um archote na mao para arras as casas dos seus inimigos politicos e pessoais... com suspeitas.

E' de Margao e Costa e isto basta..

DE LUCTO

A Imprensa Portuguesa esta' de lucto pelo prematuro falecimento dos seus gloriosos membros *Antonio Sardinha* e *Anibal Soares*, jornalistas de alto valor inteletual e moral.

ANUNCIO

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Redcar, á instancia do exequente Augusto Piedade Martins de Ambelim de Velim, cessionario dos primitivos exequentes João Antonio Fernandes de Sernabatim e seu cessionario Vitorino Gregorio Constancio Coutinho, de Cuncolim, vai a venda em hasta publica pela terceira vez, á porta do Tribunal Judicial desta comarca, situado em Xeldem, ao lado da estrada que de Quepem se dirige á Curchorem, no dia 17 do corrente mez pelas dez horas, por qualquer preço, o predio rustico denominado "Butram roinim Soclem-molo" situado em Fatorpá com exclusão da terceira adição ou sejam primeira e segunda adições do mesmo predio que é cultivado de coqueiros, discrito na conservatoria predial desta comarca sob o n° 5135 a fl 124 do Livro B 16 e avaliado por 2500 rupias nos autos da carta precatoria vinda da comarca de Salcete e extraida dos autos de execução hipotecaria que o dito exequente Martins promove contro Jeganata Sinai Quencró e sua mulher Maturabai Sinainim e outros de Cuncolim. Quem o quizer comprar compareça nos indicados dia horas e local correndo por conta do arrematante as despezas da praça e a contribuição do registo por inteiro. Por este são citados nos termos e para os efeitos da lei, todos os credores incertos dos ditos executados bem assim os co-proprietarios, ficam tambem igualmente citados os representantes dos credores falecidos Frederico Francisco Xavier Ligorio Raimundo Rebelo Visnum Sinai Quirtonim e Madu Sinai Quirtonim, todos que foram de Margão, sendo o credito do 1 ° na importancia de 1300 rupias o do 2 ° na de 520 rupias e finalmente o do 3 ° na de 200 rupias. E para ser publico se expediu este. Quepem, 2 de Fevereiro de 1925.

O Escrivão do 2 ° oficio encarregado do 1 °

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito

A. A. de Brito e Nascimento

भा र त

मिति माघ व० ४ थी शके १८४६

आमचें राष्ट्रीयत्व

सुप्रसिद्ध पोर्तुगीज ' पायोनिअर ' वास्को डी गामाच्या चतुःशतसांवत्सरिक श्राद्धोत्सवांत तरुण गोमांतकीयांच्या सात्त्विक स्वाभिमानानें स्वीकारलेल्या औदासिन्यानें, व हिंदु पत्रांनीं— विशेषतः भारतानें —गामोत्सवावर पुकारलेल्या बहिष्कारानें खवळून जाऊन सुडबुद्धीनें त्यांवर अराजकता, बंड ह्या सारखे अश्लील व अश्लाघ्य आरोप लादण्यास अहमहमिकेनें सरसावणाऱ्या लोकविशिष्टांत हल्लीं हल्लींपर्यंत फिरंगी अगर फिरंगाळलेले बाटगे पत्रकर्तेच प्रामुख्यानें झळकत असत. पण मध्येंच अगांतुकीं उपस्थित झालेल्या ' देंतींन्यु प्रकरणानें ' पूर्वील देखावा बदलून फिरंगी पत्रकारांच्या रिकाम्या जागेवर बॅ. राव हे एक हिंदु सुशिक्षित सद्गृहस्थ उभे झाले आहेत. पण जीच्या ' प्रोव्हिंस ' पत्रांत उपरिनिर्दिष्ट लेखकांचें Politica Hindu हिंदु राजकारण, ह्या सदराखालीं एक ' वस्तुस्थिति विवेचक ' लिखाण प्रसिद्ध केलें गेलें असून ह्या त्यांच्या लेखांतील मूळपासून शेवटपर्यंतचे एकंदर मुद्दे असमर्थनीय व अप्रासंगिक तर आहेतच; पण ज्याची पोळी त्याची टाळी वाजवून ' अर्थस्य पुरुषो दासः 'चें आणखी एक उदाहरण गोमांतकापुढें टांकण्याच्या निमकहलाल बुद्धीनेंच बॅ रावांनीं हा अव्यापारेषु व्यापार आरंभिला आहे असेंच आमच्या प्रमाणें प्रत्येकास वाटेल ह्यांत शंका नाहीं. व्यक्तिशः बॅ राव कितीहि विद्वान असोत, हिंदु अगर खिस्ती ह्यापैकीं कोणत्याहि संस्कृतीचे ते अभिमानी असोत, किंवा न्यायमूर्तींच्या पवित्र सिंहासनावर त्यांचें अधिष्ठान असो, त्यांनीं आह्मांवर व समाजावर निष्कारण केलेल्या मिथ्यारोपांची हटकून हजेरी व सडकून समाचार घेण्याचें टाळणें अशक्य असल्यानुळें आजच्या पोर्तुगीज अग्रलेखांत ' त्यांनीं उगारलेला टोला उलट त्यांच्यावरच हाणण्याचें ' कर्तव्य आह्मीं बजावलें आहे. मठग्रामस्थ व्यवसाय बंधूंनींहि शेवटच्या अंकांत त्यांचा चांगलाच कान पिरगळला आहे; पण कांहीं विवक्षित परिस्थितीमुळें बॅ. रावांच्या ज्या अत्यंत महत्त्वाच्या मुद्यांचें खंडन करणें त्यांस साधलें नाहीं त्यावरच बॅ. रावांची चोख झडती आज आह्मीं घेणार आहोत.

कांहीं हिंदु पत्रांवर हवी तशी व लागेल तितकी लाथाळी झाडल्यावर ' हिंदु राजकारण ' ह्या लिखाणांत बॅ. राव झणतात:— गामाच्या राष्ट्रीय उत्सवाला विरोध

ख्मान समाजाला जरा प्रेमानें वागविण्यांत येतें तें कां ! याचें उत्तर एकच. तें ह्मणजे असें कीं, अल्पबल पक्षाला आपल्या हाताखालीं घालावयाचें व स्वतःचे फायद्याकरितां, बहुबल पक्षावर कुरघोडी करावयाची. पोर्तुगालच्या दुसऱ्या दो. झ्युवांवनें हेंच केलें आणि फ्रान्सच्या कांहीं राजांनीं अकराव्या शतकांत फ्युडस सीस्टीमचा (fendalismo) नायनाट करण्याकरितां, सद्देशीय लोकपक्षाची बाजू comunas सारख्या चळवळींत उघड उघड धरून, याच राजकीय डावपेंचाची पुनरावृत्ति केली. सधर्मीय असले तरी सवर्ण नसल्यानें नेटिव ख्रिस्त्यांचें दिवसें दिवस प्रस्थापित होत असलेलें वर्चस्व, सरकारला कमी करावयाचें होतें, निदान त्याला खळ तरी घालावयाचा होता. कारण, त्या समाजाचें वजन आणखी वाढूं दिल्यास आपल्या बेफाम इच्छेला व आकांक्षेला खुद्द त्याच्याचकडून एकादे वेळीं आळा पडणार; हें भय गव्हर्नरसारख्यानां जाणवलें व ख्रिस्तेतर अर्धी जनता आपल्या ताब्यांत आणल्यास आपला हेतु साध्य होईल या एकाच स्वार्थप्रेरीत बुद्धीनें, हिंदूंवर हा वेळपर्यंत सहानुभूतीची पाखर घालण्यांत आली. राजकारणी दृष्टीचा चष्मा डोळ्यांवर चढविला ह्मणजे साध्या दृष्टीला न दिसणाऱ्या गोष्टी या अशा ढळढळीत दिसतात.

पण चालू साल उगवण्याचे सुमारास चढलेला सहानुभूतीचा पारा एकदम खालीं उतरला. पुढें केव्हां तरी जी गोष्ट घडणें अपरिहार्य होतें, ती गोष्ट आजच घडली व गामाचें श्राद्ध या गोष्टीला निमित्त लाभलें. जगांत प्रचलित असलेल्या राजकारणाचे दृष्टीनें, हिंदु वर्तमानपत्रांनीं, श्राद्धोत्सवांत स्वीकारिलेलें धोरण जरा उतावीळीचें अतएव अविचाराचें झालें, हें खुद्द हिंदूच कबूल करतील. आतां स्वाभिमान, बाणेदारपणा इत्यादि त्या धोरणांत दिसून आलेल्या वृत्तींचें, कोणीहि झाला तरी कौतुकच करील यांत शंका नाहीं. पण, आपल्या हातांत कोणत्याच रीतीची सत्ता नाहीं, तोंपर्यंत सरकारशीं धडाडीचें वर्तन–मग तें कितीहि न्यायाला, नीतीला धरून असो–ठेवून चालण्यासारखें नाहीं. येथें स्वराज्यासारखा कांहींसा गोंधळ असला तरी ब्रिटिश इंडियेंतील जनतेंत आणि येथील हिंदुसमाजांत सत्तेच्या बाबतींत महदंतर आहे. प्रत्येक लहान सहान बाबींत, हिंदूंच्या विरुद्ध उठणारा ख्रिश्चन समाज तेथें नाही; हिंदूंच्या हितसंबंधास राजदरबारांत शक्य तर विरोध करणारा हडेलहप्पी वर्ग तेथें नाहीं; गोमंतकाला स्वातंत्र्य पाहिजे असें हिंदूंनीं ह्मणतांच, आह्मीं पोर्तुगीज सत्तेच्या खालींच रहाणार असें ओरडून सांगणारे लोक तेथें नाहींत. ध्येयाच्या बाबतींत, भिन्न धर्म व भिन्न संस्कृति तेथें एकजीव झाल्या आहेत; येथें त्यांच्यात विळ्या भोपळ्याचा संबंध दृष्टीस पडतो. थोडक्यांत सांगावयाचें तर, तेथील स्थिति येथें असती तर, गामाच्या श्राद्धासारख्या उत्सवांत नुसतें ताटस्थच कां, तर प्रतिकार देखील करणें शक्य व न्याय्य झालें असतें.

श्राद्धोत्सवावर हिंदु पत्रांनीं केलेली टीका ह्मणजे, हिंदुसमाजाच्या विचारांचा, त्याच्या भावनाचा, त्याच्या आकांक्षांचा आरसा होता, याबद्दल मतभेद नाहीं. कारण, उभ्या हिंदुसमाजांत एकहि इसम असा आढळणार नाहीं, कीं ज्यानें आपल्या हृदयाच्या गाभ्यातूंन, या समारंभाविरुद्ध, उद्वेगाचे प्रतिकारपूर्ण शब्द काढले नसतील. खुद्द गामाबद्दल ज्यांना सहानुभूतीचा लेश नाहीं त्यांना त्याच्या पुण्य तिथीबद्दल [!] तरी सहानुभूति कशी असणार ! तात्पर्य, हिंदूंना श्राद्धाचा तिटकारा होता; गामाचा तिटकारा होता, आणि हें विकत श्राद्ध वाढणाऱ्या बेअकली लोकांचाहि तिटकारा होता. हें जरी खरें असलें तरी, आपल्या फायद्यावर दृष्टि ठेवून हिंदु वर्तमानपत्रकर्त्यांनीं, श्राद्धाच्या ऐन गडबडींत मौन वृत्तिच स्वीकारावयास पाहिजे होती. कारण, मौनवृत्ति हाच राजकारणांत कित्येक वेळां एक डावपेच ठरतो. गामाच्या कार्याची खरीखुरी ओळख जनतेला करून द्यावयाचीच तर ती श्राद्धाच्या गडबडीनंतर करून देणें शहाणपणाचें ठरलें असतें. कारण, नंतर तिला केवळ ऐतिहासिक स्वरूप प्राप्त झालें असतें; व लोकांत स्वत्व जाग्रति करावयाची, अन्यायाचा तिटकारा उत्पन्न करावयाचा, हा हेतुहि साध्य झाला असता. व दुसऱ्या बाजूनें, राजकीय मैदानावर सरकारच्या सहाय्यानें आपलें ठाणेंहि मांडणें हिंदूना सुलभ झालें असतें. असो. झाल्या गेल्या गोष्टीबद्दल आम्ही हिंदु वर्तमानपत्रकर्त्यांनां दूषण देतों असें मुळींच नाहीं कारण, त्यानीं आपल्या पत्रांतून केलेली चळवळ नीतीला तर धरून आहेच, पण शिवाय, न्यायालाहि धरून आहे. मग त्यांना दूषण कोण देणार ? इतकेंच कीं, आपलें धोरण राखून बाणेदारपणा व स्वाभिमान यांच्या बरोबरच त्यांना दूर दृष्टिहि दाखवितां आली असती, एवढेंच आह्मांस वाटतें. असो. आतां लेखांतील मूळ मुद्याकडे वळूं.

हिंदुसमाजाला मांडीवर घेऊन बसणाऱ्या सरकारनें, भूत अंगांत संचरल्याप्रमाणें त्याला एकदम दूर लोटून दिल्यासारखें केलें आहे, हें सर्वांना कळून चुकलें आहे. सरकारास झालेली ही पिशाच्च बाधा हिंदूना नुकतीच भोंवण्यास सुरवात झाली आहे. मडगांवच्या लिसेंवांतील एका हिंदु प्रोफेसराला जागेवरून कमी करण्यांत आलें, कोणत्याच हिंदूंच्या सरकारी नेमणुकीला आपली मंजुरी मिळणार नाहीं, असें गव्हर्नरांसारखे बडे अधिकारी बोलूं लागले आहेत, आणि एकंदर विद्यार्थ्यांच्या परीक्षा ज्यास्त कडक रीतीनें घेण्यांत याव्या ह्मणून तशा अर्थाचे गुप्त संदेशहि येथील उच्च विद्यालयांतील अध्यापकानां गेले असत्याची वदंता आहे. आणि ती बहुतांशी खरी असण्याचाहि संभव आहे. या एवढ्या खलबताचें कारण काय तर हिन्दूंनीं श्राद्धांत पिंड दिले नाहींत व आपल्या पोटांतल्या कांहीं गोष्टी निशंक रीतीनें ओटांत आणून सोडल्या एवढी एक गोष्ट ज्या हेतूनें सरकारनें हिन्दूंना संतुष्ट ठेवण्याचा प्रयत्न केला होता, त्या हेतूवर विरझण पडण्यास कारणीभूत झाली. वाटेल तेव्हां, मिळेल त्या गोष्टींत, हिदूंची आपणास साह्य होईल, ही आशा गेल्या श्राद्धांत हिन्दूंनीं स्वीकारलेल्या ताटस्थामुळें व वर्तमानपत्रानीं केलेल्या कडक टीकेमुळें समूळ नाहींसी झाली. इतकेंच नव्हे तर, आपल्या वेळगामी व फसवणुकीच्या राज्यकारभाराला आज ना उद्यां खिळ घालण्याचा प्रयत्न तर असोच पण पोर्तुगीज सत्तेविरूद्ध तीव्र असंतोष जर कोणांत उत्पन्न होण्याचा संभव असेल तर तो हिन्दूंतच, हें सरकारी बड्या धेंडांनां कळून चुकलें. सर्कशींत निरनिराळे खेळ करवून पैसे मिळविण्याकरितां बाळगिलेला सिंह, मालकावर उडी घेण्याचे बेतांत असला ह्मणजे त्या मालकाची जशी स्थिति होते तशाच स्थितींत नोकरशाहीला आणवून सोडण्याची सुरवात प्रच्छन्न व उघड रीतीनें झाली. पाहिजे तेव्हां साथ करण्यास उपयोगी पडतील या हेतूनें जवळ केलेले हिन्दु निराळ्याच चळवळीला साथ करितात व निराळाच स्वर काढतात हें, श्राद्धापूर्वी जरी कळण्यास सुरवात झाली असली तरी उघड रीतीनें श्राद्धाच्या गडबडींतच सरकारला कळून चुकलें. मग, फायदा नसलेली वस्तु आपल्याजवळ कोण ठेवणार ? प्रत्यक्ष फायदा तर असोच, पण हिन्दु आपणास पोर्तुगीज राष्ट्रजन ह्मणण्यास केव्हांच तयार नाहींत, पोर्तुगीज संस्कृतीची सफेती आपल्या समाजमंदिराला देण्यास ते तयार नाहींत, आणि पोर्तुगालच्या राजकारणाकडे एरवीं यांचे डोळे लागावयाचे तेहि बंडखोर (?) हिन्दुस्थानाकडे लागलेले. सबब, कोणीहि पोर्तुगीज, हिंदुबद्दल साशंक राहिला तर त्यांत राज्यकर्त्यांच्या स्वभाववैशिष्ट्याला विरूद्ध असें कांहीं नाहीं. श्राद्धांत भाग न घेण्यांत हिन्दूंनीं राजद्रोह केला ह्मणून जर त्यांचेवर वक्रदृष्टि होते तर, श्राद्धोत्सवाची कल्पना नापसंत ह्मणून Diario de Noite च्या निशाचर संपादकानां दोष कांहीं नाहीं, फाजेंदाचे मुख्याधिकारी Tinoco यानीं उत्सवाच्या निरर्थक चळवळींत भाग न घेतल्याबद्दल, त्यांना राष्ट्रद्रोही असें कोणीहि ह्मटलेलें नाहीं, व पोर्तुगालांत खुद्द गामाच्या वंशजानींच पंक्तिभेद केला असतां, त्यानां पोर्तुगीज सत्ता उन्मळून काढावयाची आहे, असें तेथील अथवा येथील कोणत्याच वृत्तपत्रकारानीं ह्मटलेलें आढळत नाहीं, हें कां ! यावरून, एवढेंच निष्पन्न होतें कीं, ज्या गोष्टी हिन्दु पुढें मागें करतील त्यांच्याकडे त्यांचा स्वाभाविक कल आहे असें सरकार समजतें, त्या गोष्टीचा संबंध गामोत्सवाशीं अधिकाऱ्यानीं जुळवून आणला आणि एवढ्याच मुळें त्यानां हिन्दु राजद्रोही दिसूं लागला.

पण, हिन्दूंचें संकट दुहेरी आहे. सरकारापासून उपस्थित झालेलें एक, आणि ख्रिस्ती समाजाकडून हिंदुसमाजाबद्दल निंद्य विधानें केलीं जातात हें दुसरें. हें दुसरें संकट पहिल्याचें पूरक आहे. आपल्या विषारी विचारांची दुर्बिण व सूक्ष्मदर्शक यंत्र सरकारच्या डोळ्यापुढें धरून, कित्येक नेटिव ख्रिश्चनानीं हिन्दूंच्या अस्पष्ट आकांक्षा स्पष्ट करून दाखविल्या व अत्यल्प दोष भयंकर करून दाखविले या बद्दल एका परीनें आपण त्यांचे आभार मानले पाहिजेत. राष्ट्रीय चळवळीचें खरें रहस्य कळल्याशिवाय ख्रिस्त्यांकडून हिन्दूंना हे असेच तडाखे बसणार 'नहि संध्या विजानाति गुर्वी प्रसव वेदनाम' हेंच खरें.

हिंदूंच्या बाबतींत आतां सरकारकडून गुप्त रीतीचें धोरण ह्मणजे मानल्यास संकट मानल्यास संकट नव्हे, अशी स्थिति आहे. आजचा रागरंग असाच टिकेल असें मुळीच नाहीं. कारण एक तर, या गव्हर्नरानां आपल्या या जागेचा ताम्रपट कोणीहि लिहून दिलेला नाहीं. दुसरें असें कीं, हिन्दूना सरकारी जागा मिळत नाहीं असें घटकाभर धरून चालल्यास, त्याना राजकारणांत ऐन महत्व मिळणार नाहीं असें नाहीं. हें महत्व हिन्दु समाजांतील पोर्तुगीज भाषेच्या सार्वत्रिक प्रसारावरच बहुतांशीं अवलंबून आहे. सरकारचें काय किंवा ख्रिस्तीसमाजाचें काय मतपरिवर्तन, एका पोर्तुगीज भाषेच्या जोरावर सक्तीनें करतां येईल ह्मणून, आपण आपल्या समाजाची योग्यता राजकारणाचे दृष्टीनें वाढविली पाहिजे. प्रस्तुत आलेले संकट ह्मणजे भावी संकट परंपरेचें तें एक पूर्वचिन्ह होय. वर सांगितल्याप्रमाणें व शक्य तर मोठ्या हुद्याच्या जागा काबिज करून, राजकारणांत आपला दर्जा वाढविला ह्मणजे, हिन्दूना, पोर्तुगालशीं पूर्ण स्वराज्याची व झाल्यास स्वातंत्र्याची मागणी करावयाची आहे. राजकारणांतील लढ्या झगड्यास केव्हांच प्रारंभ होईल ह्मणून, पुढें उद्भवणाऱ्या संकटास तोंड देण्याची तयारी त्यानीं एव्हांपासूनच करणें इष्ट आहे. सध्य: आपल्या येथें चाललेले राजकारण ह्मणजे राजकारण नव्हे. ऐन ग्यानबाची मेख दूरच राहिलेली आहे. तिला ख्रिस्त्यानीं काय किंवा हिंदूनीं काय कोणीच हात घातलेला नाहीं. गव्हर्नराना पाहिजे तसें चालावयाचें व फार तर अहो रूपं अहो ध्वनि: असलें वर्तन ठेवावयाचें यापलीकडे आपलें राजकारण गेलेलें नाहीं.

असो. ओढवलेलें संकट नवीन असलें तरी तें ह्मणण्यासारखें संकट नाहीं. स्वतःच्या योग्यतेचा पाया भरीव केला ह्मणजे कितीहि मोठ्या संकटाचें वादळ आपल्या यशोमंदिरास कांहींहि करूं शकणार नाहीं.

---

do a verdade, dissipando-se as nuvens de confusao que o orgao da ... "gamela" fizera pairar, aqui e acola', no espirito publico.

Ca' tem os leitores um bom exem. plo de como nem sempre a' guerra civil e' incivil...

A proposito. ¿Como e' que a gente "ultramarina" poude praticar as estomacais arbitrariedades com que se enlameou, emporcalhando, tambem, o prestigio do Hospicio?

B' facil a resposta. B' que ela, a tal gente soube ardilosamente intrujar o sr. sr. Jaime de Morais que para seus fins politicos sempre a protegeu escandolosamente. O sr. cidadao Morais e' assim. Quando dispensa protecçao a alguem, nao ha' obstaculos que o intibiem. Nem obstaculos legais nem dificuldades morais. E' nisso que consiste todo o seu tino governativo, de que o sr. Bras da Costa e outros tiraram o milhor partido possivel em proveito dos seus *nunca assaz* satisfeitos estomagos!

Estava morta e enterrada a politiquice estomacal dos ultramarinos. Foi preciso, porem, que o sr. dr. Jaime de Morais fosse despachado para ca' como governador para a ressuscitar.

Mas, como a Historia cuja justiga e' imparcial, implacavel e intemerata dira', aos posteros o que foi a desastrada governagao de quem esta' prestes a deixar nos em breve, quedemonos aqui, em boa paz.

ESTIMAMOS

O sr. dr. Constancio Roque da Costa, monarquico ferrenho que, por signal, nao consentiu que se desse sequere um viva a' Republica, na manifestagao que alguns amigos seus lhe promoveram neste concelho de Quepem, ha' anos, facto que se acha constatado no arquivo do *Bharat*, como iamos dizendo, o sr. dr. Roque da Costa passou ao sr. dr. Jaime de Morais um atestado donde consta que este senhor e' o milhor governador que a India viu.

E' caso para dizer: "similes simili bus congregantur."

Se o sr. Roque da Costa representa uma garrafa de vinho velho com ro'tulo velho, o sr. Morais e' *avatar* do mesmo liquido mas com rotulo novo, isto e', ambos sao *vinho velho*.

Se nao que diga a perseguigao a cintosa que o sr. Morais promoveu a' imprensa indiana, o ataque ao jornalista Liberio Pereira, o "Caso Can vorem," a politiquice recente de Sanguem etc. etc., o que se conforma muito bem com a modalidade de ser da *ominosa* que a *luminosa* diluiu ...

B' como se explica a origem do panegirico tecido pelo sr. Costa ao sr. Morais. Estimamos.

BRAVO!

Nao nos surpreendeu mas indignou deveres a atitude do sr. dr. Jaime de Morais de, a' forga do seu absolutismo policial, ter querido intervir num as sunto afecto ao poder judicial.

A politiquice sempre foi ma' conselheira. Ela longe de acreditar o seu autor, avilta-o no conceito publico.

Referimo-nos a' eutrega forgada do cofre municipal de Sanguem. Ele estava "seneteado" abusivamente, a buso sobre que corre um processo crime na Comarca de Quepem. Era claro, portanto, que a entrega nao podia ser efectuada sem que a justiga tivesse cumprido diligencias necessarias.

Mas a politiquice! Quantas vitimas ela nao faz?!

O que em toda essa miseria e pouca vergonha de Sanguem nos encheu de entusiasmo, e' a firme, patriotica e desassombrada atitude do sr. *S. V. Dessai* que soube honrar o seu ilustre nome e dos eleitores que guindaram a' presidencia da Camara Municipal que tanto deu que fazer ao sr. dr. Jaime de Morais.

A redacgao do *Bharat*, mesmo con tra vontade do seu director, parente do sr. Dessai, sauda daqui na pessoa deste um preclaro cidadao que com o seu acrisolado patriotismo e coragem a toda a prova, dignificou a sua Patria.

NOVIDADE!

Nos jornais da ultima mala, vem inserta a seguinte novidade:

"Vai ser presente ao Conselho Legislativo do Estado da India o projecto de uma nova Carta Organica da provincia. O fim principal deste projecto e' reduzir as direcgoes gerais, de forma a concentrar "em tres repartigoes os diversos servigos, distribuidos por varias secretarias. As repartigoes que vierem a criar-se, serao assim denominadas: Administragao Civil e Politica, Finangas e Fomento.

Daqui ha nada temos, portanto mais uma "novidade organica."

¿Mas resultarao algumas vantagens praticas ao orgamento da Provincia?

¿Sera' a tal remodelagao capaz de matar de vez o DEFICIT que nos atormenta deixando a' fome o esfarrapado funcionario?

Ignoramo-lo. E' bom, por isso, que nos conservemos de bragos crusados, e com *bucho* apertado, antes que a novidade nao nos prove a sua eficacia E' prudente....

UMA FATALIDADE

"O proprietario da tona de passagem do rio da Talpona ralhou com dez mulheres do povo que pretendiam passar para outra banda do mesmo rio. A indisposigao do marinheiro levou... as a que elas se afoutassem a ganhar o ponto desejado a vau: mas a fatalidade fez que das dez referidas mulheres, seis morressem submergidas no aludido rio, ficando salvas as restantes quatro por uma verdadei ra maravilha!

B' pena que o marinheiro estivesse indisposto e fosse causa indirecta do lamentavel desastre.E" o que nos informam.

No numero seguinte publicaremos a brilhante crónica do sr. *Crispin*.

ADMINISTRACAO DO CONCELHO DE QUEPEM

EDITAL

O advogado Mariano da Piedade Rebelo, administrador do Concelho de Quepem

Faço sáber e mando, a bem da ordem publica, que durante os dias do proximo carnaval se cumpra o seguinte:

1.° São expressamente proibidas as máscaras ou scenas alusivas que ofendam a moral publica, quaisquer entidades oficiais ou particulares ou quaisquer religião;

2° Os que queiram organisar danças, toque, brincos ou cortejos solicitarão desta administração, nos termos da Portaria Provincial n° 473 de 20 de dezembro de 1899, a competente licença que será registada na respectiva regedoria, devendo ser indicado no requerimento tanto o numero, nomes e residencia dos requerentes, como os trajes ou custumes que pretendem usar, e comprovando-se são vacinados ou passodas de variola;

3° Não haverá brincos nas povoações, onde houver variola numa área de raio de um kilometro do local infectado;

4° Não é permitido atirar nas ruas ou ás janelas quaisquer objectos que possam incomodar, ferir ou molestar o publico ou deteriorar a propriedade dos cidadãos;

5.° Os que transgredirem as disposições do presente edital serão presos como desobedientes aos mandados da autoridade.

E para constar se mandou publicar este edital no Boletim Oficial e nos jornais deste concelho e outros de igual teor serão afixados nos lugares de estilo.

Quepem 12 de Fevereiro de 1925.

O administrador do Concelho

Mariano da Pidyade Rebelo

ANUNCIOS

O *Bharat*, ano 9 ° n ° 47 de 19 de Fevereiro de 1925

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida

Numero avulso uma tanga.

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivao do 2 ° oficio, correm editos de triuta dias, a contar da 2a publicagao deste no Boletim Oficial, citando os interessa-dos Gunem, casada com Hari Soil, maiores, residentes em parte incerta de Mazali do territorio Britanico, para assistirem a todos os termos ate final do inventario orfanologico a que se procede neste juizo por obito da sua mae e sogra Ambica Naique, que foi de Delem, de Canacona, sendo invetari ante e cabega de casal Purso' Xaba' Naique, da mesma e deduzirem os seus direitos no mesmo inventario sem prejuiso do seu regular andamento.

E para ser publico se expediu este. Quepem, 11 de fevereiro de 1925,

O Escrivao do 2 ° oficio encarregado do 1 °

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito

A. A. de Brito e Nascimento

—आयुर्वर्धनाच्या प्रयोगाकरितां मथुरा अयोध्या वगैरे भागांतून माकडें जर्मनींत नेलीं जात आहेत.

—येत्या मार्च महिन्याच्या पहिल्या तारखेपासून पोर्तुगीज हद्दींतील ब्रिटिश तार ऑफिसें पोर्तुगीज सरकारच्या ताब्यांत येतील.

—पोर्तुगालच्या "गाजेत दास कोलोनीयस" पत्राचा वास्को डी गामाच्या स्मारकार्थ एक खास अंक निघावयाचा होता.

—तळपणच्या नदींत होडीकराच्या बेमुर्वतखोर वर्तनानें ६ बायका बुडून मेल्या! सरकारच्या कामदारांनीं या गोष्टीची विशेष चौकशी करणें योग्य आहे.

—कुंभारवाडा येथें एक ब्रह्मचारी आले असून, त्यांच्या दर्शनार्थ हजारों लोकांच्या उड्या पडत आहेत, असें एक वाचक कळवितात.

—मुंबईच्या विविध-वृत्ताची लोकप्रीयता दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे.

—येत्या मार्च महिन्यापासून भारताची नवी योजना अमलांत यावयाची आहे.

—पोर्तुगाल येथें गामाचें श्राद्ध वाढ्यांत आलें खरें, पण त्याला येथील उत्सवाप्रमाणें 'भव्य' स्वरूप प्राप्त झालें नव्हतें, असें ह्मणण्यास सबळ पुरावा आहे.

मदिरालयें कशीं असावीं?

आमच्या मडगावांत जीं मदिरालयें स्थापन झालेलीं आहेत, त्यांत अर्धी अधिक मदिरालयें शास्त्रोक्त पद्धतीनें बांधलीं नसल्यामुळें, प्रतिष्ठित दारुबाजांस मोठी गैरसोय होत आहे.

हलक्या प्रतीच्या दारुबाजांस पुढील दारानें राजरोसपणें व्यवहार करतां येतो, पण खानदानीच्या घराण्यांतील प्रतिष्ठित दारुबाजांना, जनलज्जेची चाड असल्यामुळें हलक्या प्रतीच्या दारुड्याप्रमाणें दारूचा संसार उघडपणें मांडतां येत नसतो. त्यांना गावांतल्या गुत्यांस जर मागिलदार असलें, तर तिथें जाऊन आपली सोय करतां येते. पण तशी सोय नसल्यास, गावांपासून दूर अंतरावरच्या लोकरहदारी नसलेल्या गुत्यांवर जावें लागतें. प्रतिष्ठित दारूबाज दूरच्या गुत्यांवर गेल्यामुळें गावांतील गुत्तेवाल्यांस अतोनात नुकसान होत असतें. हलक दारूबाज आपल्या रोजच्या मिळकतीप्रमाणें उन्माद चढण्यासाठीं ह्मणूनच — साहेब पितात ह्मणून नव्हे! हलक्या प्रतीची दारू माडी ताडी पिऊन आपली मानिषा भागवितात. शिवाय त्यांना लोकापवादाची भीति नसल्यामुळें मोठमोठ्यानें ओरड करून मारवाडी बाटाघाटीनें आणखी थोडी फुकट मागून घेण्यास ते कधींच चुकत नसतात. असलें वर्तन प्रतिष्ठित दारूबाजांचें नसतें, त्यांना एक सर्वसाक्षी सर्वेश्वर सोडून—लोक आपणास पहतील ही भीति सारखी सर्पदंश करीत असल्यामुळें, ते चोराप्रमाणें आड वाटेनें खांच-खळग्यांतून, पायखान्यातून, पायखान्याच्या नरकांतून भली थोरली पृथ्वी प्रदक्षिणा घेत मागील दारांतून गुत्यांत प्रवेश करतात.

गुत्यांतहि कोणी आपणांस पाहील ही भीति असल्यामुळें, साहेबबहादूरांनीं जी दारू घेण्याची आज्ञा केली, किंवा ज्या दारूची त्यांनीं प्रशंसा केली, ती दारू घेऊन ते आल्या वाटेनें घाईघाईनें परत जातात. असल्या गिन्हाइकांस पिलेल्या दारूची फाजील जरी किंमत सांगितली तरी त्याबद्दल मुळींच चकार न काढतां सांगितलेली किंमत देऊन ते चालते होतात.

शिवाय प्रतिष्ठित दारूबाजांची ओळख गुत्तेवाल्यांस अडचणींच्या प्रसंगीं होत असते!

ह्या चोरून दारू पिण्याविषयीं एक प्रतिष्ठित दारूबाज आपल्या छातीला हात लावून असें सांगत आहे कीं,— मी दारू पिऊन बेहोष स्थितींत घरीं जातां जातां पाणीच्या डबक्यांत पडलेलों लोकांनीं आपणांस पाहिलें असेल! — बडबडतांना पाहिलें असेल! — फार तर काय — बेहोष स्थितींत आपल्याचसारखा प्राणी मानून डुकरांनीं माझ्यावर बैठक मारलेली लोकांनीं पाहिली असेल! — पण दारू पितांना मात्र आजपर्यंत एका गुत्तेवाल्याशिवाय, मनुष्यांनीं काय, पण ब्रह्मदेवानें सुद्धां मला पाहिलें नाहीं! ही प्रतिष्ठित दारूबाजाची अभिमानोक्ति फोल आहे असें कसें ह्मणतां येईल?!

कोणत्याहि कलालानें मदिरालय थाटण्यास जागा घेतांना विचार करून घ्यावी. भर रहदारींत जागा घेण्याचा विचार केल्यास गुत्याच्या मागीलदारीं येण्यास प्रतिष्ठितांस वाट आहे कीं नाहीं ह्याचा पूर्वी अवश्य विचार करावा.

गुत्यांच्या मागीलदारीं येण्याची वाट, केर टांकण्याची जागा, पायखानें, पाणी सांचून झालेली घाण, जेवून टांकलेल्या पत्रावळी, अशा सजावटीनें मंडित झालेल्या जागेमधून गेली असल्यास, फार चांगलें होईल! कारण त्या ठिकाणीं जीवंत मनुष्य फिरकण्याची भीति नसल्यामुळें प्रतिष्ठितांस या वाटेंत वावरण्यास चांगलें फावतें! मागीलदाराशिवाय गुत्यास बाजूस एक खिडकीहि असल्यास तो गुत्ता उत्तम, अगदीं —राजलक्षणी असें ह्मणण्यास कोणतीच हरकत नाहीं!...

प्रतिष्ठित पांतस्थ परदेशी पाहुण्यांस जाण्याच्या निकडीमुळें त्या स्वर्गीय रस्त्यावरून मागील दारांतून गुत्यांत प्रवेश करण्यास वेळ नसल्यामुळें त्यांना खिडकीचा आश्रय धरावा लागतो. एखादेवेळीं ह्या खिडकीचा उपयोग गांवच्या प्रतिष्ठितांसहि होत असतो.

—गडकरीचेला.

आजचें पोर्तुगीज सदर

अग्रलेख:—

'आ प्रोव्हींस' पत्राची कारवाई; पक्षांधतेचा कडेलोट; स्वरूपाविष्करण.

स्फुट विषय:—

माझोडैंच्या 'इंदिये'चे तारे व व्हास्कोडीगामा; व्हास्कोडीगामा व हिंदु राजकारण; हिंदु राजकारण व प्राचीप्रभा; प्रमेला भारताचें उत्तर; सांगें मुनिसिपालटी व सु. वि. देसाई; 'स्वराज्या'चा नवीन मसुदा; इ. इ.

साभार स्वीकार

श्री शिवाजी:— वर्तमानपत्रकाराच्या धंद्याला दिवसेंदिवस 'पोट भरण्याचा'व 'पोटभर झगडण्याचा धंदा, असें स्वरूप येत चाललें आहे. पण श्री. दामोदर सांवळाराम यंदे ह्यांच्या संपादकत्वाखालीं सुरू झालेलें आणि ऐक्य व संघशक्ति ह्या घटकद्वयांस अधिकाधिक ताकदवान बनविण्याकरितां वाहिलेलें हें नवीन साप्ताहिक —आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या अंकावरून पहातां— त्या मोहास बळी पडणार नाहीं अशी आशा प्रदर्शित करण्यास बरीच जागा आहे. संपादकीय सदर तडफदार तर असतेंच पण त्यांत एक प्रकारचा जिवंतपणा असतो हाच श्रीशिवाजीचा' विशेष होय. चिरायु होवो. वा. व. ३ रु. पत्ता— श्रीशिवाजी, ३८८ गिरगांव रोड मुंबई नं. २

भंडारी विजय:— हें मासिक भंडारी ज्ञातीच्या उन्नतीप्रीत्यर्थ श्री. आ. न. दुर्वे ह्यांच्या संपादकत्वाखालीं आज जवळ जवळ ५ वर्षे निघत असतें. लेख बरे असतात. वा. व. २ रु. पत्ता भंडारी विजय कचेरी ७३ उमरवाडी, मुंबई.

तेलगू समाचार:— कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें बंद पडलेलें हें मासिक पुनः सुरू झालें असून श्री. शं. सा. परशा हे त्याचे संपादक आहेत. विशेषत: ऐतिहासिक माहिती देणारे लेख ह्यांत प्रसिद्ध होत असतात. संसार व सुधारणा ह्या सदराखालीं त्यांत श्री. कृ. वि उपलप ह्यांची एक लेखमाला सुरू झाली असून ती वाचनीय आहे. वा. व. ३ रुपये. पत्ता— व्य. तेलगू समाचार, ६७ कामाठी पुरा बाजार रोड, भायखळा, मुंबई.

बायको हरवली:— ह्या छोट्या पुस्तकांत आमच्या समाजाची विभक्त कुटुंब पद्धतीची वाढती इच्छा व मुंबईसारख्या अफाट शहरांत राहणाऱ्या नवतरुण आणि तरुणी ह्यांच्या प्रत्यहीं चाललेले चोंचले ह्या दोनहि विघातक प्रकारांचें चित्र श्री. श्रीमंताचे दोस्त, ह्यांनीं हुबेहुब चित्रित केलें आहे. लेखकाच्या लेखणीचा ओघ अविरत वहात राहिल्यामुळें पुस्तक सर्व दृष्टीनीं वाचनीय झालें आहे. किं. २ आणे. पत्ता— किरात प्रेस, वेंगुर्लें.

सूचना

'नवें वर्ष, नवें संकट' हा गेल्या अंकांतील लेख 'सौमित्र' या लेखकाचा असून त्यांतील सर्वच विधानें भारताला कशीं मान्य नाहींत, हें आमचें धोरण ज्यांना अवगत आहे, त्यांना विशेष विशद करून सांगण्याचें कारण नाहीं. सं. भारत.

लेखणीचे कटाक्ष

" तिजोरीची तूट भरून निघण्यासाठीं नोकरशाहीच्या पगाराची खची करणें जरूर असून, या खच्चीला सुरुवात गव्हर्नर साहेबांच्या पगारापासून झाली पाहिजे " असें एका नामदारानें सुचविलें. यां सूचनेनें नामदार गव्हर्नर साहेबांचें मस्तक-तापून त्यांच्या तोंडावाटे क्रोधाग्नीच्या ज्वाळा निघाल्या. सर्वांगाची लाही झाली. आपाद मस्तक थरारलें. धरणीकंप होतो कीं काय असा क्षणभर भास झाला.

×

ही क्रांतिकारक स्थिति थोडक्यांतच स्थिरावली. गव्हर्नर साहेब शुद्धीवर आले. व त्यांनीं नोकरशाहीच्या पोटावर पाय देणाऱ्या त्या वेड्या कोन्सिलरास आपल्या खासगी खर्चाचें टिपण अवलोकनार्थ पाचारण केलें. व या पाचारण विधींत त्या सूचनेचा अंत्यविधी उरकण्यांत आला

❋

आमचे गव्हर्नर साहेब धूर्त मुत्सद्दी आहेत कीं नाहींत ? स्वतःच्या पोटाला चिमटा न घेतां, तिजोरीची हलाखी घालवून बुद्धीची चलाखी व्यक्त करण्याची त्यांची कला और आहे कीं नाहीं ? या त्यांच्या ' और ' कले मुळेंच तिजोरीची १५ लाखांची तूट 'करांच्या' एका मात्रेनें चुटदिशीं भरून येणार आहे !

×

हें तूटभरपाईचें शतकृत्य आटोपतांच लाट साहेबांची स्वारी निजधामास जाणार आहे. पोर्तुगालची आर्थिक स्थितिहि समाधानकारक नाहीं. तेथील सरकारनें या विलक्षण प्राण्याची सदहू स्थिति सुधारण्याचे कामीं योजना केल्यास, काम फत्तें होणार आहे. तूटीचें नांव काढण्याची कोणाहि प्राज्ञा होणार नाहीं. सर्व राजकारण आनंदाच्या लहरींत विरून जाईल.

×

' खिसा राखून राजकारणाचा शिसा ' हलविण्याचें हें नूतन शास्त्र उजेडांत आणल्याबद्दल सर्व जग गव्हर्नरसाहेबांच्या भजनीं लागेल यांत शंका नाहीं. जगभर त्यांचे सोनेरी पुतळे उभारण्यांत येणें सर्वथैव योग्य आहे. जगांतील ' पहिला मुत्सद्दी ' ही पदवी त्यानांच शोभत असल्यानें, वरील मानांवर त्याचाच हक्क आहे, हें कोण नाकबूल करील ?

❋

मडगांवच्या ' आ तेन्ह ' पत्रानें हिंदु समाजावर मनसोक्त तोंडसुख घेतलें. त्याची नाना विशेषणांनीं निर्भत्सना केली.वापरूं नये ती शद्बयोजना वापरली. विष्णुबाब धेंपे व दादा वैद्य हे खेरीज करून इतर सर्व हिंदु एकजात अराजक आहेत, असा आपला अभिप्राय त्या पत्रानें ठोकून दिला.

×

पण हिंदुसमाजानें काय केलें?' आ तेन्ह ' पत्रानें वाहिलेल्या लाखोलींची कशा रीतीनें संभावना केली ! अपमानाचा सूड कसा उगवून घेतला ? त्या वात्रट पत्राची वात्रट विधानें धिक्कारून कोणत्या मार्गानें हिंदुसमाजानें स्वाभिमान व्यक्त केला ?

+

हिंदु पत्रानीं निषेधपर लेख लिहिले. पोर्तुगीज व मराठी भाषेंत आपली तीव्र नापसंती दर्शविली व निषेधपर चळवळीच्या नाटकाचें भरतवाक्य गाण्यांत आलें ! सर्वत्र शुकशुकाट ! सर्वत्र सामसुम !

×

अशा या 'नेभळट' व एकांगी उपायानें बेभान ' आ तेन्ह ' शुद्धीवर येईल, असें हिंदुसमाजाला वाटत आहे काय ? तसें वाटत असल्यास तो चुकत आहे, असेंच कष्टानें म्हणावें लागत आहे.

❋

' आ तेन्ह ' पत्राला वठणीवर आणण्यासाठीं जालीम मात्रेच्या वळशांची जरूरी आहे. आपल्या वात्रटपणाचा पश्चाताप जेणेंकरून होईल, त्या अखेरच्या पण खात्रीच्या उपायांचा अवलंब झाल्यासच 'आ तेन्ह' पत्राचे डोळे उघडणार आहेत, या गोष्टीकडे डोळेझांक उपयोगाची नाहीं.

×

प्रस्तुतचा मनु जाग्रतीचा आहे. घेरण्याचा नाहीं, हें प्रत्येकानें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. दुसऱ्यांच्या लाथा सहन करण्याचा काळ मागें राहिला. गाल पुढें करण्याची ख्रिस्ती रीति मातीमोल ठरली असून, तिचा फोलपणा सर्वत्र प्रस्थापित झाला आहे. अशा प्रसंगीं स्वत्व संरक्षणार्थ समरांगणात उभें रहाणें, हे हिंदुसमाजाचें पवित्र कर्तव्य आहे, हें विसरतां कामा नये. भारती.

—अमेरिकेंत विमानांच्या चर्मपिशव्यांसाठीं पांच लाख गुरांचा संहार करण्यांत आला !

—पर्वतावरील चैत्रपोर्णिमेचा उत्सव येत्या शनिवारीं पार पडेल.

—रिवण येथें घडलेल्या एका चोरीला सगुण रूप प्राप्त व्यावयास लागल्याचें एक वातमीदार कळवितात. विष्णवे नमः !

—श्रीपाद शे. नाडकर्णी हे लिसेवाच्या ७ व्या वर्षाच्या परीक्षेंत पहिले आल्याबद्दल त्यांना पहिलें बक्षीस मिळणार आहे. या सन्मानाबद्दल आम्हीं नाडकर्णी यांचें अभिनंदन करितों.

—म्हापशें येथें 'स्वातंत्र्य' या नावांचें एक साप्ताहिक प्रसिद्ध होणार आहे, असें लोक बोलतात.

—ज० गोमेस दा कोस्त हेहि आपली येथील कामगिरी संपवून पोर्तुगालला चालते झाले.

—येत्या अंकापासून मुंबईचीं वातमीपत्रें प्रसिद्ध होतील. त्यांत ब्रिटिश राजकारणाची निर्भिड चर्चा झालेली वाचकांस आढळून येईल.

—जिकडे तिकडे ग्रीपीसारख्या सांथीचा उद्भव झालेला असून, बरींच कुटुंबें आजारीं पडलीं आहेत.

O Bharat, ano 9º, nº 4, 17 de Abril de 1924.

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.

Anuncios :

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do 1º oficio Redcar, vao a praça para venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada nacioual que de Quepem se dirige a estação de Sanvordem no dia 29 do corrente mez de Abril ás 10 horas pelo maior lanço que se oferecer acima do seu valor os seguintes bens:— 18 maos e 25 arrateis de jagra compacta ou dura, mas nao seca e 157 mãos e 25 arrateis de jagra menos compacta sendo que o preço da referida jagra se acha regluado a razão de 4 rupias a mão e a qual tendo sido depositada nos autos crimes de querela que o Ministerio Publico nesta comarca e o queixoso particular Crisna Porobo Bembró de Quepem moveu a Sorvotema Mortu Sinai Monercar de Curpem e outros em poder de Esvonta Vitol Porobo Dessay de Rivona, foi por este requerida a venda em hasta publica da mesma jagra por não ser de facil conservação, tendo sido deferido esse pedido. O arrematante pagará as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. O que para ser publico se expediu este.

Xeldem 12 de Abril de 1924

O escrivão de direito do 2º oficio encarregado do de 1º

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito

A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivao do 2º oficio Barreto, vao ser vendidos em hasta judicial a porta do tribunal judicial, situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirije a estagao de Sanvordem, no dia 29 do corredte mez a's 10 horas e pelo prego superior ao da avaliagao os seguintes bens:- Direito a 4.a parta do predio rustico denominado "Bórichemmola" sito em Barcem da cultura de arroz: Direito a' quarta parte do predio rustico denominado "Mad...tulemxeta" sito na dita da cultura de arroz, Direito a quarta parte do predio rustico denominado "Gorbata" sito na dita, da cultura de coqueiros e outras arvores fructiferas e Direito a quarta parte do predio rustico da varzea denominado "Nondonavoli" sito na dita da cultura de arroz, todos descritos na conservatoria predial desta comarca respectivamente sob os nº.s 16593, 16594, 16595 e 16596 a fl. 137 v. te 139 v. do Livro B 45 e avaliados tambem respectivamente por 250, 150 220, e 325 rupias. Penhorados nos autos civis de execugac por custas que o Digno Agente do Ministerio Publico nesta comarca promove contra Malcuma Gancarina viuva de Panglo, Gaocar de Barcem e outros por apenso aos autos de inventario orfanolo'gico a que se procedeu pelo falecimento do dito Panglo' Gaocar.

Sao por este citados todos os credores incertos dos ditos executados Malcuma e outros e os co-proprietarios e quinhoeiros nos termos e para os fins da lei. A contribiugao por inteiro ficara' a cargo do arrematante Para ser publico se expediu este.

Xeldem 1 de Abril de 1924.

O escrivao de Direito

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito

A. A. de Brito Nascimento

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1º. oficio Redcar, vai à praça para venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada Nacional que de Quepem se dirije á estação de Sanvordem no dia 29 do corrente mez ás dez horas pelo maior lanço que se oferecer o direito a quatro quintos do predio 'Urbano" situado no bairro Zambaulim da aldeia Rivona avaliado por 100 rupias: e o direito á metade do predio denominado "Bondoy" namoc anny aforamento da cultura de arroz tem terreno inculto situado em Rivona avaliado por 120 rupias, descritos respectivamente por inteiro na conservatoria destacomarca sob os nos. 13351 e 6471 e penhorados nos autos civeis de execução que Tucobá Ananta Porobo Dessai de Rivona move a Rucminim Quenina vulgo Bicú, viuva de

ce'u da India, o ce'u deste bergo verdadeiro das civilizaçoes.

Nao se devem olvidar destes herois milenarios que num sonho todo tecido de amor da Patria, do heroismo, da abnegaçao viveram aqueles tempos em que Prestes Joao dominava a India e as mentes alucinadas e prenhes de cobiça dos mandoes da Europa.

Aqui se escreveram o *Mahabharata*, o *Ramaiana*, de quem o Emilio Burnouf faz a seguinte apreciaçao:

"Este livro e' provavelmente o mais belo que tem saido da mao dos homens ...Ver-se-ha' que houve homens que pensaram melhor do que no's e que traçaram o caminho da salvaçao" O primoroso poema de Nala e Damaianty causou enlevo aos orientalis tas de renome como Carriere, Schlegiel, Lobedanz etc. E no's so' de nome e de lombada conhecemos estes livros sagrados.

Como ainda nao esta' publicada a lista dos livros dos liceus pedimos ao sr. Director dos S. da I. se deseja que o seu nome seja lembrado e deseja ter alguma gratidao dos indios s. excia. que por ocasiao dos exames foi tam guerreado nao diremos que o foi sem razao, para instar com os poderes constituidos se e' que s. excia. nao tem poder para isso, para de futuro, se ensinar a historia desta grande terra da India.

Tera' entao quem o aplauda!

SERA' VERDADE?

O que nos consta, se tiver foros de verdadeiro, e' um atropelo a' lei medonho.

Informam-nos que o Director da Escola Normal nao aceitara' este ano os requerimentos dos candidatos ao exame de 3° ano na 2.a epoca; com que basse na lei?

Nao o sabemos; ao que se supoe e' a falta de gratificaçoes. A lei taxativamente preceitua que e' concedida uma 2.a epoca aos alunos do liceu, escola normal, Instituto Comercial etc. E nao ser a mesma concedida e' uma grande atrapalhaçao tida em consideraçao a grande razzia que houve. De 24 alunos so' passaram 4.

Ou somem todos ou haja moralidade.

Chamamos a atençao do Director que superintende estes serviços.

RESTABELECENDO ...

Foi assinado no dia 30 de Março um decreto que restabelece em todas as colonias as respectivas cartas organicas, com as modificaçoes julgadas necessarias.

¿Que alteraçoes serao estas? Reduçao da maioria dos vogais eleitos? Expulsao da demasiada superintendencia do Governo Central, da acçao legislativa e executiva das mesmas colonias?

Nada se sabe nem ha' elementos donde se possa obter qualquer informe fidedigno.

Mas o que for, soara'!

भा र त

मि. चैत्र व० ५ मी गुरुवार १८४६

विद्यार्थ्यांचें राजकारण

[लेखांक ३ रा]

गोमांतकांतील विद्यार्थ्यांच्या राजकारणांत कोणकोणत्या गोष्टींचा समावेश करणें इष्ट आहे, हें या लेखांकांत पाहूं. विद्यार्थ्यांनीं राजकारणांत लक्ष घालणें ह्मणजे राजकीय प्रश्नांच्या झगड्यांत चढाईचें धोरणच केवळ नव्हे तर त्या प्रश्नांत प्रत्यक्षरीत्या भाग घेणें नव्हे, हें पुन्हां एकदां सांगणें इष्ट आहे. जें कांहीं करावयाचें तें योग्य वेळीं राजकारणाचेद्वारा देशहित साधावयाचें आहे यावर दृष्टि ठेवून पूर्व तयारी ह्मणून केलें पाहिजे.

कोणत्याहि रोगाचें योग्य निदान व्हावयाला वैद्य लोकांना ज्या शरीराचे भागावर त्या रोगाचें ठाणें वसलें असेल, त्या भागाचें पूर्ण ज्ञान असणें अत्यावश्यक होय. हीच गोष्ट राष्ट्रालाहि लागू करून चालण्यास हरकत नाहीं. देशाची राजकीय व्यवस्था ही एका शरीर रचनेप्रमाणें आहे, असें धरून चालल्यास, त्या राजकीय व्यवस्थेंत उद्भवणाऱ्या कोणत्याहि रोगांवर औषधाचा प्रयोग करण्यापूर्वीं त्या व्यवस्थेची पूर्ण माहिती करून घेणें फार जरूरीचें आहे. इतकें कीं, ती माहिती मिळविण्यापूर्वीं औषधोपचार करणें वेडेपणाचें ठरेल. याकरितां, गोमांतकाच्या राजकीय क्लेशाचा उपशम करणें असल्यास विद्यार्थ्यांनीं त्याच्या राजकीय घटनेचें काळजीपूर्वक अध्ययन केलें पाहिजे. या अध्ययनाचा जोर तुलनात्मक पद्धतिवर विशेष ठेविल्यास जास्त चांगलें, हें सांगणें नकोच. यापुढील पायरी, ह्मणजे, राजकीय व्यवस्थेची किंचित् देखील माहिती नसलेल्या आपल्या बांधवानां आपल्या राजकीय घटना पत्रांतील (carta orga'nica) मुख्य मुख्य कलमांचें ज्ञान करून देणें, ही होय. अमुक एक कलम स्वराज्यांत समावत असलेल्या आपल्या हक्कांचे विरुद्ध आहे याची जाणीव झाल्याशिवाय सर्व साधारण जनतेला त्या कामाचा इनकार करण्याची बुध्दि होणें शक्य नाहीं. कोणत्याहि आवश्यक गोष्टीच्या अभावाची जाणीव झाल्याशिवाय त्या गोष्टीच्या सिध्यर्थ मनुष्याचे प्रयत्न खर्ची पडत नसतात. हें लक्षांत आणून अशिक्षित लोकांच्या राजकीय ज्ञानानभिज्ञ लोकांच्या डोळ्यांसमोर स्वराज्याचा मळकट आरसा वेळोवेळीं ठेविला पाहिजे. व त्यावरील डागांची त्यानां माहिती करून दिली पाहिजे. या कार्याबरोबरच दुसरें, पण अत्यंत महत्वाचें कार्य विद्यार्थी वर्गानें आपल्या शिरावर घेतलें पाहिजे. हिंदुमतदार संघास त्याच्या कर्तव्याची जाणीव करून देणें हें तें कार्य होय. स्वराज्याचें खरें स्वरूप जास्त उत्तम तऱ्हेनें जर कुठें दृष्टींस पडणें शक्य असेल तर ते मताधिकारांत होय. **मताधिकारांत वी जरूरपीनें देशाचें स्वराज्य सर्वत्र सांठविलेलें असतें.** या मताधिकाराची राजभाषेच्या ज्ञानाचे अभावीं येथून तेथून सर्वंच हिंदूंना, अंमल बजावणी करतां येत नाहीं. हें जन्मसिद्ध हक्कांविरुद्ध व दुःखदायक तर खरेंच; पण मताधिकाराला लायक असून तो हस्तगत न करणारे व हस्तगत केला असल्यास त्याचा योग्य प्रसंगीं उपयोग न घेणारे लोक बऱ्याच प्रमाणावर आपल्यांत असावे, हें त्याहिपेक्षां दुःखदायक होय. हा अज्ञानजन्य प्रकार दूर करण्यास तरुण हिंदु विद्यार्थ्यांला फारसे श्रम पडणार नाहींत. ओळखीच्या मंडळींशीं प्रसंगानुसार बोलणें काढून तिच्या मनावर मताधिकाराच्या व मतदानाच्या फायद्याचा प्रकाश पाडल्यास बरेंच कार्य होण्यासारखें आहे. पण यापूर्वीं वयाची आडकाठी नसल्यास, प्रत्येक विद्यार्थ्यानें आपलें नांव नोंदवून मताधिकार मिळविणें इष्ट आहे. समजा, उद्यां पोर्तुगालच्या पार्लमेंटांत गोमांतकाला असलेल्या हक्काच्या दोन जागांपैकीं एकेकरितां हिंदूनीं आपला एक उमेदवार उभा केला. आजपर्यंत गेलेले प्रतिनिधी खिश्चनच असल्यामुळें, एक जागा हिंदूंना देणें, खिश्चन समाजाला आपल्या रूढ हक्कांवर गदा आणल्यासारखें होणार आहे. हें आजपर्यंतच्या इतिहासावर नजर फिरविल्यास सांगण्याची जरूरी नाहीं. तेव्हां हिंदु प्रतिनिधी निवडून देण्याच्या आपल्या युक्त आकांक्षेला त्या समाजाकडून विरोध होणार हें उघडच आहे. पोर्तुगीज भाषेच्या अज्ञानामुळें मताधिकारास मुकलेल्या हिंदुसमाजास, ही बिकट परिस्थिति अशीच चालू राहिल्यास, वरील विरोधांतून वाट काढणें शक्य नाहीं. पण पुढें मागें समाज पुढाऱ्याच्या प्रयत्नानें ही स्थिति नाहींशी होणार असें धरून चालल्यास देखील मताधिकार व मतदान यांचे संबंधीं अशीच अनावस्था चालू राहिल्यास हिंदु जनतेच्या गरजा व गाऱ्हाणीं मुख्य कायदे मंडळांत पोंहचणें शक्य नाहीं. व अशा रीतीनें, त्याचें राजकीय अस्तित्व असून नसून सारखेंच होणार आहे. याकरीतां, येथील तरुण विद्यार्थी वर्गानें, नवीन मतदार संघ तयार करणें व असलेल्यास त्याच्यापुढील कार्याची ओळख करून देणें, फार अगत्याचें आहे. या मार्गाचा हिंदु विद्यार्थ्यांनीं एकदांच अवलंब केल्यास, राजकारणांत थोडक्याच काळाचे आंत, हिंदु समाजाला अनुकूल क्रांति घडवून आणतां येणार आहे.

सर्वच गोष्टी कांहीं विद्यार्थ्यांना करतां येण्यासारख्या नाहींत, ही गोष्ट आह्मांस ठाऊक आहे. आणि ह्मणूनच शक्यतेच्या आटोक्यांत असलेल्या कांहीं थोड्या गोष्टी आम्हीं वर सांगितल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या हितसंबंधाशीं जास्त निकट रीतीनें वास करणारे असे दुसरे कांहीं प्रश्न विद्यार्थी वर्गानें सोडविण्यापेक्षां समाज पुढाऱ्यानींच सोडविणें सध्याचे परिस्थितींत इष्ट आहे. मराठी शिक्षणाचा प्राथमिक शिक्षण संस्थांत व दुय्यम शिक्षण संस्थांत प्रवेश, हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाचें वरील संस्थांतून सक्तीचें शिक्षण वगैरे प्रश्न पुढारी वर्गानें सोडविण्यासारखे आहेत. लिसेव व० संस्थांतून एकंदर जगाचा इतिहास शिकवितात, हें खरें. पण लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ह्मटली ह्मणजे, शिक्षण खात्यानें मंजूर केलेल्या जगाच्या इतिहास ग्रथांत हिंदुस्थान, चीन वगैरे प्राचीनतम देशाचा इतिहास वगळलेला आहे. हा प्रकार शोचनीय होय. ज्या राष्ट्राचा इतिहास त्याच्या संस्कृति प्राचीनत्वामुळें उभ्या जगांतील एकंदर सुधारलेलीं राष्ट्रें मोठ्या आस्थेनें शिकत आहेत. त्या राष्ट्राला–हिंदुस्थानाला त्याचा स्वतःचा इतिहास असावा कीं नसावा या बद्दल विद्यार्थ्याला, शिकत असलेल्या पुस्तकावरून शंका यावी; ही गोष्ट फार दुःखदायक होय. हा प्रकार होतां होईतों लवकर बंद करण्याविषयीं झटणें, हें गोमांतकाच्या पुढारी वर्गाचें एक पवित्र कर्तव्य होय. इतकें सांगून व विद्यार्थ्यांचे राजकाणासंबंधीं फिरून केव्हां तरी विचार करण्याचें अभिवचन देऊन, ही लहानशी लेखमाला पुरी करूं.

स्फुट विचार

भविष्यकाळः— अमलवैचित्र्याची बाब खेरीज करून, गोमांतक प्रांत व हिंदुस्थान या उभय देशांत विशेष महत्वाचा फरक असा कोणताच नाहीं, हें कोणीहि कबूल करील. जी संस्कृति हिंदुस्थान देशाचें जीवन होऊन बसली आहे, त्याच संस्कृतीचा पगडा, परदेशी सुधारणेनें हुच बनलेले कांहीं खिस्ती खेरीज करून, गोमांतकावरहि बसलेला दिसून येतो. गोमांतकाला हिंदुस्थानाविषयीं आपलेपणा वाटत असतो तर हिंदुस्थानला गोमांतक हा आपल्या देहाचाच एक भाग आहे, असें वाटत असतें. ज्या इतिहासानें हिंदुस्थान देशांतील लोकांची मनें विविध भावनांनीं उचंबळतात, त्याच इतिहासानें गोमांतकीय जनतेचींहि मनें चलविचल होतात. तात्पर्य, अमलभिन्नतेचा मुख्य प्रश्न व भाषावैचित्र्य व स्थानिक भेदाभेद या गौण पण अनिवार्य बाबींकडे दुर्लक्ष केलें, तर हिंदुस्थान व गोमांतक या उभय देशांच्या अंतःरचनेंत दुसऱ्या कोणत्याच प्रकारचा भेद आढळून येणार नाहीं. एकाच संस्कृतीच्या या दोन्ही देशांत अथवा एकाच मोठ्या देशाच्या या दोन्ही भागांत पुढें मागें एकाच जातीची राज्यसत्ता ठाणें देऊन बसेल यांत संशय नाहीं.

आह्मी व आमचे शेजारीः— आमचा व आमच्या शेजाऱ्यांचा राजकीय भविष्य

हिंदुस्थानचें राजकारण

मि. हॉर्निमन यांस परत हिंदुस्थानांत येण्यास बंदी करणारा निर्बंध काढून टाकण्यांत यावा किंवा सरकारास त्यानीं कांहीं गुन्हा केला आहे असें वाटत असल्यास त्या गुन्ह्याची शाबिती योग्य रीतीनें कोर्टांत होऊन त्यांना बचाव करण्याची संधी देण्यांत यावी, अशा अर्थाचा ठराव लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्लींत राष्ट्राच्या प्रतिनिधींच्या मंडळांत कांहीं दिवसांपूर्वी पसार झाल्यानंतर, थोड्याच दिवसांनीं त्याच स्वरूपाचा एक ठरावँ स्वराज्यपक्षाच्या सभासदानीं मुंबईच्या कायदेमंडळांत आणला होता या ठरावावर वादविवाद होऊन अखेरीस तो सरकारी मताधिक्यानें नापास झाला. ह्या वादविवाद व त्याचा निकाल वाचल्यावर स्वराज्य व स्वतंत्र पक्षांच्या ह्या अपेशाचें खापर 'ब्राह्मणेतर' जागांच्या प्रतिनिधींच्या कपाळावर कां फोडण्यांत येतें, हें सहज ध्यान्यांत येईल. हा ठराव पुढें आणण्यापूर्वी तो पास होईल ही खात्री करण्याची काळजी मि. नरिमान ह्यानीं घेतली होती; वर उल्लेख केलेले सद्गृहस्थ ऐनवेळीं दगा देतील अशी शंकासुद्धां कोणास आली नाहीं. दुर्दैवानें किंवा (सरकारीदृष्टीनें) सुदैवानें सर्वांचीच अपेक्षा चूक ठरली व हॉर्निमनच्या बाबतीं तरी माणसुकीला लाज आणणारा हा अन्याय दूर करण्याची संधी मिळाली असतांहि तिचा फायदा घेण्याचें कांहीं व्यक्तींनीं नाकारलें. बिचाऱ्या हॉर्निमननीं ह्यांचा असा कोणता अन्याय केला होता कीं ह्या सद्गृहस्थानीं आपल्या मतांचा एवढा अक्षम्य दुरुपयोग निलाजरेपणानें करावा? शुद्ध जातिद्वेषानें आपल्या प्रतिस्पर्ध्यांस हाणून पाडण्यासाठीं ह्यांनीं सरकारची तळी उचलून धरल्यास, कदाचित, कोणास आश्चर्य वाटावयास नको; पण ज्यानीं जन्मभर सामाजिक व राजकीय पतितांचें संरक्षण करण्याचा प्रयत्न केला व ह्या अक्षम्य अपराधाबद्दल ज्यांना आज स्वताच्या समाजांत बहिष्कृत व पतित व्हावें लागलें अशा माणसाला अन्यायानें वागविण्यास ह्या सभासदांनीं मदत केल्याबद्दल प्रत्येक विचारी माणसास नुसतें आश्चर्यच नव्हे पण लाज वाटली पाहिजे.

खुद्द सरकारला आपल्या कृत्याचें समर्थन करणें किती जड गेलें ह्याची दोन्ही मंडळांतील सरकारी पक्षाच्या पुढाऱ्यांचीं भाषणें वाचून चांगलीच कल्पना करितां येईल त्यांचीं भाषणें ह्मणजे सरकारी बेजबाबदारीची व त्याच्या मागें असलेल्या बेकायदेशीरपणाची कबूली आहे. ज्या कामचलाऊ कायद्यासाठीं हॉर्निमनना हद्दपार करण्यांत आलें तो कायदा आज अस्तित्वांत नाहीं हें कबूल करतानां गृहमंत्री सर मॉरीस हेवर्ड हे पासपोर्ट—ॲक्टकडे बोट दाखवितात; पासपोर्टचे नियम सर्व साम्राज्यांस लागू आहेत व हे अनादिकालापासून चालत आलेले नियम हॉर्निमनला हिंदुस्थानासाठीं पासपोर्ट देण्याच्या आड येतात, असें गृहमंत्र्याचें ह्मणणें आहे. आज अस्तित्वांत असलेले पासपोर्टचे नियम पूर्वीपेक्षां बऱ्याच सौम्य स्वरूपाचे आहेत व ह्या नियमांत भयंकर असें कांहींच नाहीं, हें पहिल्यांदांच सांगून टाकलेलें बरें. मुख्य प्रश्न आहे तो ह्या नियमांच्या भाष्याचा; त्यांच्या लवचिकपणाचा फायदा घेऊन सरकारला आपल्या फायद्याकडे लक्ष्य देऊन तो साधण्यासाठीं भाष्य करणें अर्थातच कठीण नाहीं. ह्या नियमाखालीं कोणत्याहि व प्रत्येक माणसास राजकीय चळवळी 'भयंकर' व ह्मणून undesirable ठरवून त्याच्या एका देशांतून दुसऱ्या देशांत जा ये करण्याच्या स्वातंत्र्यास आळा घालतां येईल. हें 'अनडिझायरेबल' लोक कोण असतात, हें सुद्धां पोलिसांनीं ठरवावयाचें असतें. हें ठरविण्यांत ह्या देशाच्या नफ्यातोट्याचा, हिताहिताचा प्रश्नच निघत नाहीं. तसें नसतें तर हिंदुस्थानचें मीठ खाऊन वर दुसऱ्या देशांत त्याच्या संस्कृतीची धर्माची व राजकारणाची बदनामी करण्याचा ज्यानीं आपला धंदा केला आहे अशा माणसांना ह्यापूर्वीच 'अनडिझायरेबल ठरविण्यांत आलें असतें. हॉर्निमनच्या गैरहजिरींचा क्षुद्र फायदा घेऊन ह्या सरकारी सभासदांनीं व हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या प्रतिनिधीनीं त्यांच्या नैतिक आयुष्यावर वाटेल ती टीका केलेली आहे. विशेषतः मुंबईच्या गृहमंत्र्यानीं ह्या बाबतींत पोलीस रिपोर्ट वाचून दाखवून आपला अनुदारपणा प्रकट केला आहे. हॉर्निमन साहेब हे हिंदुस्थानांतील इंग्रज समाजांत एवढे अप्रिय कां झाले होते, हें समजणें फारसें अवघड नाहीं, ही एकच गोष्ट त्या समाजाच्या घटकांबद्दल योग्य कल्पना आणून देतें पण ज्याला ह्मणून इंग्लडांतील इंग्रज समाजाविषयीं खरी माहिती आहे त्याला निदान वरील विधान खरें समजल्यास हिंदुस्थानांतील इंग्रज समाज व इंग्लंडांतील इंग्रज समाज ह्या दोन वस्तूंत कांहींच साम्य दिसणार नाहीं, हें कबूल करणें भाग आहे. इकडील समाज नैतिक दृष्टीनें निर्दोष व देवदूतांनीं बनविलेला असला तरी इंग्लंडांतील इंग्रज समाज (आयरिश सुद्धां धरून) मानवी आहे. त्यांत सर्व जगास अभिमान वाटण्यासारखीं रत्नें आहेत; कुत्र्याचें आयुष्य कंठण्याचें कर्मठपण कुचकामी व खऱ्या सुधारणेच्या आड येणाऱ्या ध्येयांना मान नमविण्याचें त्यांनीं हजारदां नाकारलें आहे; व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्वासाठीं वाटेल ते हाल सहन करण्याचें प्रसंगीं मरण्याचें सुद्धां त्यांनीं पत्करलें आहे. हॉर्निमनना सरकारी आश्रयानें व खर्चानें इंग्लडांत पोंचविल्यावर कांहीं दिवसांनीं त्यानीं लिहिलेले 'अमृतसर व आमचें हिंदुस्थानसंबंधी कर्तव्य' हें पुस्तक त्या वेळीं 'किशर अनाविन' ह्या प्रख्यात इंग्लिश कंपनीनें प्रसिद्ध केलें. हॉर्निमन विरुद्ध लोकमत जर एवढें तीव्र होतें तर हें पुस्तक छापून प्रसिद्ध करण्याचें धाडस कोणीहि दाखविलें नसतें. तेव्हां हिंदुस्थानांतील इंग्रज समाजानें हॉर्निमनसंबंधीं दिलेला निकाल सर मॉरास हेवर्ड यांच्या नीतिशास्त्रावरील व्याख्यानाएवढाच अढळ व शेवटचा समजला पाहिजे.

शेवटीं हॉर्निमनसंबंधींचें आमचें कर्तव्यः— हॉर्निमनसारखा माणूस फक्त मुंबईइलाख्यांतील लोकांचीच मालमत्ता नाहीं, हॉर्निमनवर सबंध मनुष्य जातीचा हक्क आहे व गोमांतक ह्याला अपवाद नाहीं. हॉर्निमनाविषयीं आह्माला आज जें प्रेम वाटत आहे त्याच्या मुळाशीं हुशार वर्तमानपत्रकार ह्मणून दाखविलेली त्यांची कर्तबगारी खात्रीनें नाहीं, कोणताहि भाडोत्री लेखक व संपादक त्यांच्या लेखांपेक्षां जहाल व उत्तम लेख लिहील, त्यांच्या लोकप्रियतेचें खरें कारण ह्या मोठ्या हृदयाच्या इंग्रजाची वीरवृत्ति. ह्याच्या गुणाची खरी किंमत कायदेमंडळांतील इंग्रजांचीं भाषणें वाचून करतां येईल. ज्या देशानें त्याला कांहीं दिवस पोसलें त्या देशाची इमानानें (एका कायस्थ कवीनें ज्या इमानाला 'कायस्थांचें रक्त इमानी' ह्मटलें आहे तें हें इमान) नोकरी करण्यांत जेवढी कृतज्ञता दाखविली तेवढेंच सत्याविषयींचें आपलें प्रेम प्रगट केलें. हिंदुस्थानाला आज इंग्रजांत अनेक मित्र मोजतां येतील. त्यानींहि ह्या अभागी देशाबद्दल व त्या देशांतल्या लोकांबद्दल प्रेम व मैत्री दाखविली आहे, पण त्यांपैकीं एकासुद्धां सत्याची एवढी जबर किंमत द्यावी लागली नाहीं. मुंबईचे माजी गव्हर्नर सर जॉर्ज लॉइड ह्यांच्या सारख्या छोट्या अधिकाऱ्याचा दांत असल्यामुळें हॉर्निमनला हाल अपेष्टा भोगाव्या लागल्या किंवा लागत आहेत असें ह्मणणें धाष्ट्यांचें होईल. खरी स्थिति अशी आहे कीं मि. हॉर्निमन हे निधड्या छातीचे होते; जुलुमाचा व अन्यायाचा प्रतिकार करतांना हे मागेंपुढें पहात नसत. व हा प्रतिकारसुद्धां ते अशा रीतीनें करीत कीं ती रीत ध्यानांत घेतली ह्मणजे त्यांच्या सध्याच्या विपत्तीचें आश्चर्य वाटावयास नको. शिवीगाळ (ह्या शब्दाच्या उत्कृष्ट अर्थानें करण्यात त्यांचा एवढा हातखंडा होता कीं, महात्मा गांधीना त्यांना त्याच्या वाग्गुणांबद्दल master of invectives (मास्टर ऑफ इन्व्हेकीटव्हस्] असें सर्टीफिकेट द्यावें लागलें. ह्या गुणाबद्दल हॉर्निमनच्या कित्येक पूर्वजांना हद्दपार व्हावें लागलें व डीन स्विफ्टप्रमाणें कित्येकांचीं माथींसुद्धां फिरलीं. आह्मी ह्यांचे आज कौतुकच करावें. आमच्यापैकीं कितीजण ह्या दिव्यांतून बाहेर पडतील? अशा माणसांचा नैतिक ऱ्हास झालेला असतो ह्या ह्मणण्यात सुद्धां अतिशयोक्ति नाहीं. कां होऊं नये? आमच्या—प्रत्येक मानवी समाजाच्या— नीतीच्या कल्पना एवढ्या जाचक व जुलमी असतात कीं, त्या कल्पनाखालीं सुखानें रहाणें फक्त मानसिक दुबळ्यानांच शक्य होतें; ह्या कल्पनाप्रमाणें फक्त ढोंगी लोकच 'नीतिमान' समजले जातात. हॉर्निमननें जर नीतिशास्त्राचे नियम मोडले असले तर शेलेपासून ओस्कार वाईल्डपर्यंत ते सर्वांनीच मोडले आहेत, मग परक्या जमिनींत कुजत असलेली त्यांचीं हाडें इंग्लडांत आतां आणून त्यांचा गौरव करण्याचा खटाटोप कां करतां? जिथें असें करणें शक्य नसतें तिथें थॉमसकुकच्या एजन्सीच्या मदतीनें फ्रान्स, इटली, ग्रीस, ह्या देशांत यात्रा कां करतां? त्यांची रक्षा विश्रांति घेत असलेल्या पवित्र ठिकाणीं जाऊन [आमच्या उद्धट पदघातानें ती तुडवून] ह्या माणसांबद्दलचा तुह्मांला वाटणारा आदर प्रदर्शित करावासा कां वाटतो? थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे हॉर्निमन ह्या परंपरेला अपवाद नाहींत. आजची परिस्थिति ध्यानांत घेतां (सोशियालिष्ट मंत्रिमंडळ अस्तित्वांत असतांना) हा प्रकार चालावा याबद्दल निराशा वाटल्याखेरीज रहात नाहीं. आजच्या मंत्रीमंडळांत प्रमुख असलेले कांहीं गृहस्थ एकाकाळीं अशा जुलुमाचे कट्टे शत्रू समजले जात असत, 'फेबियन' सोसायटीचे सभासद असतां. ह्यांनीं अराजक समजल्या जाणाऱ्या आज प्रख्यात नाटककार,टीकाकार,अर्थशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञ समजल्या जाणाऱ्या ॲनी बिझांट, जॉर्ज बर्नार्ड शॉ वगैरे बौद्धिक आयुष्यांत विख्यात झालेल्या, व्यक्तींबरोबर खांद्यास खांदा लावून काम केलेल्या त्या पंडिताचें (आतां) लॉर्ड ऑलिव्हिअर, सिडनेवेब ह्यांचे आवाज गप्प कां? मुत्सद्यांच्या नव्या भूमिकेंत हे सुद्धां पूर्वींचे दिवस विसरले काय? —कोणी सांगावें? साम्राज्य द्रोहाबद्दल मरण्याची शिक्षा झालेले लोक जिथें थोड्याच दिवसांत देशभक्त समजले जाऊन उजळमाथ्यानें राजसूत्रें हालवितात व जुन्या आठवणी विसरून जाऊन जुन्या मित्रांच्या गळ्यांस दांत लावण्यास मागें पुढें पहात नाहींत; जिथें राजद्रोही लेखनाबद्दल चौकशी चाललेला माणूस 'सर' होऊन त्याच्या देशाच्या जेत्यांचीं पेन्शनें जन्म भर खातो; जिथें एकादी स्पेरांझा (प्रख्यात लेडी वाइल्ड, ओस्कार वाईल्डची आई) सारखी पोर निनावी लेख लिहून सर्व आयर्लंडास डब्लीन किल्ला उडवून देण्याला आव्हान करते व सर्व जगास हालवून सोडल्यावर पुन्हा त्याच किल्ल्यांत नाचण्यासाठीं नटून जाते, तिथें, कोणी सांगावें ह्यातारा सिडने वब आपला पिंसनेंझ (चष्मा) उडवून देऊन जगापुढें खऱ्या मुत्सद्यांच्या नव्या भूमिकेंत उभा रहाणार नाहीं? आणि कोणी सांगावें, ब्रिटिश न्यायदेवतेचा दरवाजा न दमतां कित्येक वर्षे ठोकीत असलेल्या त्या गरीब हॉर्निमनला लवकरच कोणीतरी तो दरवाजा उघडणार नाहीं?

कालाला कोणत्याहि अतर्क्य गोष्टी खऱ्या करून दाखवावयाच्या असोत, आह्मीं आमचें कर्तव्य बजावलें पाहिजे. हॉर्निमनसारख्या मित्रांचा आमच्यावर हक्क आहे व तो आह्मीं मान्य केला पाहिजे. ज्या जुलुमाबद्दल आह्मीं निषेध करीत आहों। तो जुलूम आह्मी अशक्य केला पाहिजे. बहुसंख्यांकांची अल्पसंख्यांकांच्या न्याय हक्काची अनास्था आपण अशक्य केली पाहिजे. न्यायाचा व सत्याचा आवाज बुझविण्याचें पाप आपण करणार नाहीं ह्याची काळजी घेण्याचें आपण आपलें कर्तव्य केलें पाहिजे. असें केल्यानेंच हॉर्निमनसारख्याचें ऋण आपण फेडलें असें होईल व वाल्ट व्हिटमनसारख्या महाकवींचे तळमळणारे आत्मे शांत होतील.

संजय मुं.

Zambaulim por apenso aos de acção do processo especial do Decreto de 28 de Março de 1905 que o dito Tucobá moveu a referida Rucmiuim para pagamento da quantia de 346:08:02 proviniente do capital, júros, penas e custas liquidados nos referidos autos de acção e de custas e selos acrescidos da execução. O arrematante pagará a contribuição de registo por inteiro e as despêzas da praça alem do preço da mesma dentro de tres dias Por este são citados quaisquer credores e co-proprietarios. O que para ser publico se espediu este.

Xeldem 8 de Abril de 1924

O escrivão do 2 ° oficio encarregado de 1 °

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito,

A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio. Barreto, vão ser vendidos em hasta publica, á porta do tribunal judicial desta comarca, situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a estação de Sanvordem no dia 29 do corrente mez ás 10 horas, pela terceira vez e pelo preço que a praça der os seguintes bens 1/24 do predio rustico denominado "Gclicodilsordo" sito em Colomba e 1/24 do predio rustico denominado "Choudalem ou Choudavisvé" sito na dita ambos da cultura de arroz, descritos na conservatória predial desta comarca respectivamente sob os nos. 12.459 12.460 a f 56 e 57 do livro B. 35 e avaliados em 40 e 30 rupias respectivamente. penhoranos nos autos civeis de execução por custas que o Digno Agente do Ministerio Publico nesta comarca promove contra Xeuntú e seu marido Arjuna Gãocar de Molcopona de Molcornem, por apenso aos autos de inventario orfanologico a que se procedeu por obito de Seguna Velipo que foi de Colomba. São por este citados todos os credores incertos dos ditos executados e os co-proprietarios e quinhoeiros nos termos e para os fins da lei ficando a contribuição do registo por inteiro a cargo do arrematante. E para ser publico se expediu este. Xeldem 11 de April de 1924.

O Escrivao de Direito do 2 ° oficio.

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito,

A. A. de Brito e Nascimento

reito a esperar qualquer coisa milhor mais solida, e assim nao esperavamos que largando os seus compatricios nas ruas de Lisboa viesse com os seus "ecos" do nacionalismo indiano a pregar nas colunas do "Heraldo" a sua erudiçao de lombada e ocidentalisaçao de espavento aos povos de Goa que estao fartos de ouvir os "intelectuais da parada," os avançados da curiosa falange de que o sr. dr. Constancio faz parte. Nao senhor, seria mais proveitoso que o sr. dr., frente a frente, com os seus com-patricics trabalhasse por convence-los dos erros do nacionalismo ou discutindo ver-se derrotado com toda 'a sua bagagem scientifico-literaria.

Avancemos um pouco mais.

Fala-nos o impagavel "ocidentalizado" do "regionalismo" de Aquilino Ribeiro e diz que "ha' hoje em dia uma tendencia para ir mais longe do que o nacionalismo e e' a aproximaçao dos povos psicologicamente afins.

Ignoravamos que o sr. dr. Mascarenhas fazia tao pouca ideia do *nacionalismo* e *regionalismo*. Indubitavelmente no's os goezes somos psicologicamente afins dos povos da India e nesta força no's indo-portugueses de hoje havemos de fazer forçosamente parte com as nossas *regioes, casacas* e *fraks*, da grande naçao indiana. E nao seremos no's ocidentalizados que havemos de parar a onda do progresso que esta' agitando a India.

E' a historia com suas admiraveis liçoes!

Mas o sr. dr. nao para aqui a sua gana de querer a' força ocidentalisar tudo e todos. Arranja la' uma pirueta e flagela a "carkisaçao" e as penitencias e as vestes dos povos da India!

Faz pouca ideia dos jesuns a que se entregaram os luminares da religiao e das sciencias, os martires do patriotismo e outros que num fim elevado nao enchem o bandulho para tirar baforadas como certos magarefes que gostam palitar e falar das iguarias ocidentais que na mo'r parte constituem um veneno.

Nao prossigamos mais, o "eco" do sr. dr. esta' infeliz e da' margem a consideraçoes varias que paramos so' porque ncs mete lastima e do' em presença de tanta ocidentalizaçao balofa.

Para deante e' bom que seja mais comedido, estude bem os assuntos que se referem ao grande movimento duma Patria que ensinou ao mundo em todos os campos da actividade desde tempos imemoriais. E creia que este e' um conselho em seu proprio beneficio. O sr. dr. Mascarenhas com toda a sua ocidentalisaçao e' apenas um "ocidentalisado" e nunca sera' "ocidental" e isto, nao e' por querer dos indios, mas sim dos proprios europeus.

¿Nestas circunstancias qual e' o caminho que uma pessoa que presa ser, tem a seguir.

E' milhor macaqueiar ou ser o que.

L. A. J.

भा र त

सि. चैत्र व० १३ शी गुरुवार १८४६

हिंदु नागरिक

व

पोर्तुगीज सरकार

लोकसत्तेची स्थापना ह्मणजे मानवी हक्कांचा विजय असें आज सारें जग मानीत आलें आहे व अमेरिका आणि फ्रान्स यांनीं तसें दाखवूनहि दिलें आहे. परंतु लोकशाहीचें अत्यंत विचित्र आणि हिडीस स्वरूप कोठें दिसत असेल तर तें एका गोव्यांतच होय. परकी लोकांनीं साऱ्या हिंदु लोकानां रानटी ह्मणून संबोधिलें आहे. व गोव्याचे लोक तर ब्रिटिश हिंदुस्थानच्या दृष्टीनें सुद्धां मागसलेले आहेत. तेव्हां जगाच्या मानानें ते किती मागसलेले व अवनत असतील तें एक कल्पनेनेंच जाणलें पाहिजे. व इतका सारा मागसलेपणा रिपब्लिकच्या अमदानींत आढळून यावा हें एक जगांतलें आठवें आश्चर्यच होय.

कालाच्या लाटेबरोबर पोर्तुगालांत रिपब्लिक झालें व त्याच कालाच्या करणीनें गोव्यांत आवतोनोमी प्रगटली. याचा अर्थ मानवी हक्कांचीं जाणीव झाल्यामुळें व्यक्तिस्वातंत्र्य देण्यांत आलें असें मात्र मुळींच नव्हे, व ह्मणूनच रिपब्लिकच्या लोकशाहींत देखील मागील जुलुमाचे व अन्यायाचे वण पुसून गेले नाहींत. हिंदुजनतेवर आजच्या रिपब्लिकन पोर्तुगीजांच्या बापजाद्यानीं चारशें वर्षें पर्यंत जी सैतानी धर्मांधतेची तरवार अखंड चालविली होती, त्यामुळें हिंदुधर्म व हिंदुलोक घायाळ होऊन गेले होते. त्या जखमा आज मितीला सुद्धां गोव्यांत दिसत आहेत ह्मणूनच रिपब्लिकच्या मलमपट्टीचा त्यावर फारसा उपयोग झाला नाहीं. पण रिपब्लिक हें खरें खुरें आस्ते आस्ते जखम बरें करणारें मलम आहे हें जाणून त्याचा योग्य उपयोग शिल्लक राहिलेल्या ३ तीन लाख हिंदूनीं केल्यास त्यांनां सुखाचे दिवस खास येतील अशा आशेनें हा लेख लिहिण्यांत येत आहे.

आह्मां हिंदूंची संस्कृति धर्म व भाषा यांचा नायनाट करण्याचा प्रयत्न पोर्तुगीजांकडून कसा कसा केला गेला याचा इतिहास फारच बोधप्रद असल्यानें, त्याचें चर्वित चर्वण होईल तितकें थोडें आहे-

सोळाव्या शतकांत पोर्तुगीज लोकांनीं गोवें प्रांत तरवारीच्या जोरावर जिंकून घेतला खरा परंतु त्यावेळीं त्यांस मराठयांच्या मदतीनें गोमांतकस्थ हिंदु लोकांकडून हांकून लाविलें जाण्याची फार भीति होती. पोर्तुगीजांची इच्छा तर आपलीं पाळें मुळें या देशांत दृढ करण्याची होतें; तेव्हां त्यानीं असा विचार केला कीं आपणास जर या देशांत कायमचें राहावयाचें असेल तर या लोकांचा धर्म, भाषा व संस्कृति बदलून त्यांच्यावर आपला धर्म, आपली भाषा व आपली संस्कृति लादली पाहिजे; परंतु हें कृत्य फार कठीण होतें. हिंदु लोकांच्या समवेत जेव्हां त्यांनीं सारा कोंकण प्रांत प्रत्यक्ष फिरून पाहिला, तेव्हां त्यांनां असें आढळून आलें कीं, हिंदूंचा जमाव प्रचंड व धर्मश्रद्धा निःसीम आहे. शेकड्यानीं मोजतां येण्याजोगीं भव्य देवालयें व लाख लाख वस्तीनीं भरलेल्या जमावाच्या जत्रा पाहून त्या परकी देशाहून आलेल्या युरोपियनांचीं मनें थक्क झालीं. या साऱ्या हिंदूचें धार्मिक स्वातंत्र्य तरवारीच्या जोरावर नष्ट करून व त्यांनां बाटवून ख्रिश्चन केल्याशिवाय आपली येथें धडगत नाहीं असें त्यांना स्पष्ट दिसून आलें आणि इतिहास आपल्याला स्पष्टपणें असें सांगतो कीं सोळाव्या शतकांत क्रूरपणाची कमाल झाली. हिंदूंना हिंदोळून टाकण्यांत आलें व धर्म श्रद्धेचीं धडगत नाहींसी झाली; हिंदु देवळानीं धुळीचे दिवे खाल्ले व त्याच जागीं क्रॉसाच्या मुगुटानें मढविलेलीं ख्रिस्ती देवळें दृश्यमान होऊं लागला आजच्या दडपलेल्या दृष्टीला देखील हिंदु देवांच्या उरावर नाचत असलेली ख्रिस्ती देवळें चारी दिशेला असंख्य दिसत आहेत. जगताच्या पाठीवर धर्मांच्या बाबतींत जुलुमी ह्मणून मुसलमानाची कीर्ति आहे. परंतु सोळाव्या शतकांतील पोर्तुगीजानीं आपल्या जुलुमी वर्तनानें मुसलमानावरहि कडी केली. सोळाव्या शतकांतील कोंकणपट्टींत घडत असलेलें हें दृश्य अपूर्व होतें. हिंदु लोकांचा भोळेपणा देखील या काळीं परागतीला पोंचला होता. ख्रिस्त्यानीं घरावर गाईच्या अथवा डुकराच्या मांसाचा गोळा टांकला कीं घर बाटलें. विहिरींत भात किंवा पाव टाकला कीं सारे हिंदु बाटले. क्रॉसच्या पाण्याचा स्पर्श झाला कीं हिंदुत्व नष्ट झाले. अशा प्रकारच्या भोळ्या समजुतीनें पोर्तुगिजांच्या राज्य दृढिकरणाच्या प्रयत्नाला अप्रत्यक्ष मदतच केली गेली. ज्यांचा भोळेपणा या पेक्षां कमी होता असल्या क्षुल्लक व वरच्या कारणांनो ज्यांचें अढळ हिंदुत्व नष्ट होत नव्हतें त्यांनां तरवारीच्या धारेचें व मालमत्ता जप्तीचें भय घालण्यांत आलें. व मालमत्ता पाहिजे तर ख्रिस्ती व्हावें नाहींतर धर्म बचावून पळून जावें याशिवाय हिंदूना तरणोपाय उरला नव्हता. सारे हिंदु धर्मी हवालदील झाले. त्राता कोणीच उरला नाहीं. अशा वेळीं कित्येक आपला आवडता प्राणप्रिय धर्म टाकून देऊन ख्रिस्ताच्या नावावर विकं लागले व ज्या तेजस्वी लोकानां 'स्वधर्मे निधनं श्रेय' वाटलें, ते परागंदा होऊन रत्नागिरी कारवार, कोचीन कडे जाऊन राहिले. अशा रीतीनें सोळाव्या शतकांत पोर्तुगीजाच्या ताब्यांतील मुलखांत हिंदु शिरस्त्राण व हिंदुकळस दिसेनासे झाले आणि पोर्तुगिजांच्या सद्दीचा जोर साऱ्या ख्रिस्ती राष्टांत बलवत्तर आहे असें ठरलें, पण सद्दीच्या जोराला तरी मर्यादा असते. पाद्रयाच्या जुलमाला त्यांच्या देशबंधू कडून आळा बसला व कांहीं वर्षांनीं येथील वातावरण बेंच निवळलें जुलमाचा जोर जिरून गेला. परागंदा झालेले लोक आस्ते आस्ते परत येऊ लागले व नवीन काबिजादींत जुन्या काबिजादींतील देवस्थानाची स्थापना झाली तरीपण स्वत्वाची जाज्वल्य ज्योत जी कमी झाली ती अजूनहि चांगल्या रीतानें प्रज्वलित झाली नाहीं.

नुसतें धर्मस्वातंत्र्यच हिरावून घेऊन पोर्तुगीज स्वस्थ बसले नाहींत. कारण ते फार धूर्त होते धर्म नष्ट झाला तर स्वदेशाभिमान व स्वभाषाभिमान नष्ट होत नाहीं हें त्यानां पक्कें ठाऊक होतें. आजसुद्धां अर्धे जपान धर्मानें ख्रिस्ती असले तरी 'निपोन' ह्मट ल्याबरोबर अभिमानानें ज्यांच्या वृत्ति उचंबळत नाहींत असा एकहि जपानी आढळणार नाहीं. पोर्तुगीज लोक-त्या वेळचे पोर्तुगीज लोक ही तत्वें पूर्णपणें जाणत होते ह्मणून त्यांचा दुसरा हल्ला येथील भाषेवर झाला. त्याच्या अनिष्ट परिणामांची चर्चा येत्या अंकीं करूं.

स्फुट विचार

अत्याचार:—ह्मापसेंच्या पोलीस ऑफिसरानीं दोघां परदेशस्थ निरपराधी गृहस्थांवर आपल्या हडेलहप्पी जुलमाचें शस्त्र चालविल्याचें प्रसिद्ध झालें आहे. पराक्रमी पोलीसांचें हें पहिलेंच शतकृत्य आहे, अशांतला प्रकार नाहीं. किंबहुना सदरील कृत्यासारख्या कृत्यांना जन्म देण्यासाठीच आपला जन्म आहे, अशी त्या खात्याची समजूत झाल्यासारखी वाटते! कांहीं ठिकाणचे पोलीस लोक वगळले, तर इतर सर्व ठिकाणच्या त्या लोकांत जुलमाच्या बाबतींत एकसूत्रीपणाच आढळून येत असतो. जुलुम निस्तरण्यासाठीं अवतरलेल्या खात्यानेंच आपल्या जुलमी कारभारानें निरपराधी व असहाय्य लोकांवर जुलमाची नंगी तरवार चालवावी, याचें परकीयांना आश्चर्य वाटेल; परंतु ज्यांना येथील अंतस्थ कारभाराची 'अंदरकी बात' अवगत आहे, त्यांना त्यांत विशेष नवलाई आढळून येणार नाहीं!

तिजोरीची तूट: — भरदिवसा चालविलेल्या लुटीच्या कारभारामुळें, तिजोरीला तुटीचें भगदाड पडलें. हें भरून निघण्यासाठीं सरकारनें करभारानें लोकांची रेवडी उडविली. परंतु पथ्य सांभाळण्याचे बाबतींत पूर्ण डोळेझांक केली गेल्यावरून, करभाराचा जालीम उपाय अखेर निरुपयोगीच ठरूं पहात आहे.! लूट बंद झाल्याखेरीज तूट बंद कशी होईल? लुटीला वाट दाखविल्याशिवाय, तुटीला आपली वाट सुधरण्याची केव्हाच इच्छा होणार नाहीं, हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे. लुटीची विल्हेवाट लावल्यानंतर, मग पुढच्या सर्व गोष्टी. जंगलची सुधारणा, नवीन काबिजादींतील लोकाची आरोग्य सुधारणा, शेतकी सुधारणा इत्यादि सुधारणानीं गोव्याची सांपत्तिक स्थिति भरभराटेल. पण केव्हां? ज्यावेळीं लुटीच्या कारभाराला कायमचा आळा पडेल तेव्हांच. जोंपर्यंत लुटीचें कारण आपला नंगा नाच नाचत राहील, तोंपर्यंत तुटीचें कार्य नष्टप्राय होइल, अशी आशा करणें ह्मणजे थंड पाण्याच्या अखंड धारेनें पेटलेला अग्नि प्रदित करण्याची वेडी महत्वाकांक्षा बाळगण्यासारखेंच होय. तात्पर्य तुटीचा संबंध लुटीशीं संलग्न असल्यानें लूट मेल्याशिवाय तूट मरणार नाहीं, हें उघड आहे.

—नेरूल येथील एक कुटुंब ख्रिस्ती देवळांत प्रार्थनेसाठीं गेल्याची सवड साधून चोरांनीं सुमारें एक हजार रुपयांचा माल लांबविला. पोलीसांचा ऐदीपणा. दुसरें काय?

असें पुटपुटून स्वतःचें समाधान करावें लागलें. बैठकीस स्त्रिया हजर असतानां निदान ह्या शब्दाचा उपयोग करण्यांत येऊं नये असें प्रतिपादण्यांत तरुण (मेहतांचें नक्की वय मला माहीत नाहीं, पण तरुण ह्या शब्दाचा व्यापक अर्थ आहे. त्या अर्थानें व श्री. मेहता हे दिसण्यांत आनंदी व ओंठांवर नेहमी निर्दोष, जवळ जवळ बालीश हास्य असलेले असे दिसतात, म्हणून ह्या शब्दाचा उपयोग क्षम्यच ठरेल) मेहतांनीं दाखविलेल्या स्त्री–दाक्षिण्याबद्दल व कित्येकदां रुक्ष वाटणार वादविवाद कमी कंठाळवाणा वाटण्यास मदत केल्याबद्दल कोणीहि त्यांचें कौतुक व अभिनंदनच करील. पण त्यांची तक्रार मात्र खरोखरच अकारण होती. हें कोणासहि कबूल करावें लागेल.

दुर्दैवानें ह्या दुसऱ्या प्रसंगाविषयीं मात्र तसें म्हणतां येणार नाहीं. ब्रिटिश पार्लमेन्ट मध्यें असले अनुचित व अभिरुचीला वाईट दिसणारे प्रसंग वारवार घडत नाहींत. व क्वचित प्रसंगीं घडल्यास त्याबद्दल सर्वांसच वाईट वाटतें. पार्लमेन्टरी वादविवादाचे व सभ्यपणाचे नियम एवढे कडक असतात व ते कोणत्याहि परिस्थितींत मोडले जाऊं नयेत ह्याबद्दल एवढी काळजी घेण्यांत येते कीं भांडणाच्या गर्तींत स्वतःस किंवा त्यांस विसरल्यास गुन्हेगार सभासदास जब्बर दंड द्यावा लागतो. कांहीं दिवसांपूर्वी कित्येक स्कॉटिश सभासदांना कडक व अनुचित भाषा वापरल्याबद्दल त्या मंडळांत बसण्याची बंदी करण्यांत आली होती. त्यानंतर एका मजूर पक्षाच्या सभासदानें दुसऱ्या एका सभासदावर हात टाकला होता, त्यालाही अर्थात योग्य ती शिक्षा करण्यांत आली होती. शारीरिक आडदांडपणाचें (Ruffianism) अशा ठिकाणीं केलेलें प्रदर्शन सुसंस्कृत माणसांस नेहमीच अनुचित वाटणार. शारीरिक किंवा मानसिक स्वरूपाचा आडदांडपणा आजच्या सार्वजनिक आयुष्यांत व राजकारणांत (इटलीकडे पहा) नाहींसा झालेला नसला किंवा त्याच्या मुळाशीं कोणताहि सदहेतु असला तरी त्याला उत्तेजन देणें योग्य होणार नाहीं. ज्या माणसांना वेळीं प्रसंगीं स्वतःच्या मनोवृत्तींवर ताबा ठेवतां येत नाहीं व स्वतःच्या जबाबदारीची जाणीव रहात नाहीं, अशानां असल्या प्रातिनिधिक स्वरूपाच्या संस्थांत बसण्याचा हक्कच नाहीं, मग ते लोक कायद्यानें प्रस्थापित झालेल्या एखाद्या राज्य पद्धतीचे प्रतिनिधि असोत किंवा बेकायदेशीरपणाकडे व असनदशीरपणाकडे कल असलेल्या लोकांचे प्रतिनिधि असोत.

ब्रिटिश पार्लमेन्टांतील वरील सभासदांचें उदाहरण आमच्या 'पार्लमेन्टांत'– दिल्लीच्या ॲसेंब्लींत व प्रांतिक कौन्सिलांत–गिरविल्यास काय देखावे दिसतील ह्याची कल्पना करा. मुंबई कौन्सिलांतील पुण्याचे श्री. गुंजाळ हे उद्यां एकाद्या गुरगुरणाऱ्या 'मौलाना'स चीड येण्यासारखें भाषण करतील व मग गुंजाळा सारख्या काफिरानां एकजात कापून काढण्यास आधार दाखविणारे 'फतवे' निघतील. (खुद्द म. गांधी 'काफिर' ठरतात असें सिद्ध करण्याचा एक प्रयत्न क्रॉनिकल पत्राच्या विद्वान संपादकांनीं कुराणांतले आधार दाखवून त्या पत्राच्या ता. १२ च्या मुख्य लेखांत खोडून काढला आहे) ॲसेंब्लीमध्यें ले. क. गिडने [ॲंग्लो–इंडियन वगैरे ज्ञातीचे प्रतिनिधि] श्री विठ्ठल भाई पटेलाची पिंगळी दाढी हलवून, बॅ. साहेब इंग्लंडांत असतांना ते स्वसंरक्षणाची (बॉक्सिंग सारखी) उपयोगी कला शिकले नाहींत ह्याबद्दल त्यांना पश्चाताप करावयास लावतील. अशा गोष्टी घडणें अशक्य आहे असें समजूं नका. मोठ्या शहरांतील कॉर्पोरेशन पासून थेट दिल्लीच्या कौन्सिल ऑफ स्टेट पर्यंतच्या सर्व संस्थांत पार्लमेन्टचें अनुकरण करण्यांत येत आहे. हें अनुकरण निर्दोष व पूर्ण कसें होईल ह्याकडे सर्वांचें लक्ष लागलेलें असतें व त्या दिशेनें त्यांचें प्रयत्नहि चाललेले असतात. बोलण्यांत चालण्यांत, हालण्यांत, एकंदर सर्व गोष्टी पार्लमेन्टरी कसास लागल्या पाहिजेत. एका सभासदानें दुसऱ्या सभासदाविषयीं बोलतानां सन्माननीय समासद अमुक किंवा माझे मित्र सन्माननीय सभासद तमुक हे ठराविक शब्द वापरले पाहिजेत; त्याच्या प्रत्येक वाक्याची सुरवात 'सर' ह्या शब्दानें झाली पाहिजे; दररोजच्या व्यवहारांत ज्या गोष्टी पांच दहा शब्दांत सांगतां येतील त्या सांगण्यास त्यांच्या तिप्पट शब्दांचा उपयोग केला पाहिजे. पार्लमेन्टरी भाषा वापरण्यास किंवा 'पार्लमेन्टरी रीति रिवाज पाळण्यास कोणीहि माणूस हरकत घेणार नाहीं. पण पार्लमेन्टरी कपडे वापरण्यास हिंदी देहांना विशोभित दिसणारे, व्यक्तीची अभिरुचि ध्यानांत न घेणारे असे कपडे आपल्या खांद्यावर टांगण्यास हरकत घेणें योग्य होईल. उद्यां जर जपानीं झगे 'पार्लमेन्टरी' ठरविले व ते घालून कौन्सिलांत व ॲसेंब्लींत बसण्याची सूचनावजा विनंति त्या त्या मंडळांच्या सभासदांस केली गेली तर सध्या खादीचे साधे व सोईस्कर कपडे वापरणाऱ्या 'स्वराजिष्टां'चें त्याला काय उत्तर मिळेल ? श्री. दास, नेहरू व स्वराज्य पक्षाचे दुसरे पुढारी आपली खादी, महाराष्ट्र–सांप्रदायाचे श्री. केळकर आपल्या निळ्या खादीचा व लठ्ठ सुती बटणें असलेला कोट, श्री. भोपटकर आपली भगवी टोपी टाकून देऊन, हे 'पार्लमेन्टरी' झगे घालतील, ही कल्पना जेवढी विचित्र आहे तेवढीच अशक्य आहे. ह्या गृहस्थांची कायदे मंडळांतील वर्तणूक पहाण्याची ज्यांना संधी मिळाली आहे अशांनाच फक्त त्यांनीं त्या ठिकाणीं दाखविलेली तीव्र बुद्धिमत्ता, वादविवादांत कौशल्य, औदार्य, सभ्यपणा वगैरे गुणांनीं त्यांच्या शत्रूंच्या अपेक्षा व तर्क कसे खोटे ठरविले, ह्याची कल्पना येईल. ह्या माणसांच्या मतांचा व त्यांनीं केलेल्या कामाचा प्रश्न अप्रस्तुत आहे. पण हे लोक केव्हांहीं चांगले 'पार्लमेंन्टरीयन' ठरतील हें निर्विवाद आहे. विलायती 'मॉर्नींग' किंवा 'इव्हीनिंग' ड्रेसांत आपले निर्जिव व निस्तेज अवयव लपेटून, दास्यवृत्तीचें लाजिरवाणें प्रदर्शन करणाऱ्या हिंदी प्रतिनिधींपेक्षां हे मूर्तिभंजक स्वराजिष्ट कोणत्या बाबतींत कनिष्ट 'पार्लमेंन्टरीयन' ठरतील हें त्यांचे निंदक दाखवून देतील काय ?

तरीपण, कौन्सिलांत ह्या 'पार्लमेंन्टरी आडदांडपणाचा प्रसंग आल्यास काय करावयाचें ? माझ्या मतें ह्या प्रश्नास एकच उत्तर आहे. व मी तें नम्रपणानें सूचवितों. शारीरिक आडदांडपणा आपण निर्बल केला पाहिजे सभ्य माणसाच्या अंगावर हात टाकणाऱ्या आडदांडाचे हात एकदां आपल्या अंगावर पडल्यावर पुन्हा ते उचलले जाणार नाहींत असा यशस्वी प्रतिकार आह्मीं केला पाहिजे स्वसंरक्षणाची कला आपण शिकली पाहिजे. आपण आपलें पुरुषत्व अशा रीतीनें प्रगट केलें पाहिजे कीं, आडदांडम्याडानां आपले हात व जिभ अयोग्य रीतीनें वापरण्यास छातीच होऊं नये. द्रोणाचार्यांप्रमाणें आह्मांसहि उत्कृष्ट ब्राह्मणाचें व क्षात्र्याचें केंद्र स्वताच बनविलें पाहिजे.

प्रा. संघ व रजिस्त सिव्हील

प्रागतिक संघाच्या जनन, मरण, विवाहादि नोंदणी सुधारणा कमिटीस आपल्या लोकमान्य वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्याप्रमाणें, मला कांहीं सुचलेल्या अडचणी आपल्या पत्रांत प्रसिद्ध कराल व सदरील कमिटीस विचार विनिमयास जागा द्याल अशी आशा आहे. पैकीं पहिली अडचण विवाहाच्या नोंदणींत दिसून येते ती हीच कीं, विवाह होण्यास १५ दिवसपूर्वी येदिताल प्रसिद्ध करण्यास लागतात व हे पंधरा दिवस झाल्यानंतर मग विवाहाची नोंद होणार. ही अडचण अनेक तऱ्हांनीं आह्मां हिंदूंस बाधक होते. विशेषत: मुहूर्त त्या १५ दिवसानंतर मिळालाच पाहिजे, नसल्यास आमच्या धर्माप्रमाणें विवाह होणें शक्य नाहीं. म्हणून हीं येदितालांची घातक होणारी कायद्याची अडचण दूर करण्यास वरील प्रागतिक संघाच्या कमिटीनें सुधारणा घडवून आणावी. विवाहास त्या येदितालांची गरज कशाला ? ते येदिताल नसतांना नोंद करण्यानें काय होतें ? यापूर्वी प्रत्येक गांवच्या रेजिदोर याजकडे ही नोंद करण्याचें काम होतें त्यावेळीं कोठें ह्या येदितालांची कायद्यानें अमंलबजावणी होती व त्यावेळच्या नोंदणी काय बेकायदेशीर होत्या? ह्या येदितालांच्याच सुळसुळाटानें रेजिस्त सिव्हीलाच्या नोंदणीस फारच पैसे भरावे लागतात. व ह्याच अडचणीमुळें लोक ब्रिटिश हिंदुस्थानांत जाऊन विवाहाचें कार्य ऊरकून घेतात. आह्मीं हिंदुलोक नव्हे पोर्तुगीज हिंदुस्थानांतील सारीच प्रजा नोकरशाहीनें केलेले नवे निरनिराळे कर मुकाट्यानें सहन करतों यावरून नोकरशाही आह्मीं सांपत्तिक दृष्टीनें फार सुखी आहोंत असें समजतें. तरी सदरील येदितालांची गरजच नसावी अशा विषयींचें बिल कायदे कौंन्सिलांत आणण्याची खटपट करून तें पास करून घेण्याची चळवळ करावी व यन्य तो प्रागतिक संघ असें म्हणून घेण्यास चुकूं नये. अशा प्रकारचें काम केल्यानें संघास सभासदांचें बळहि मिळेल. वरील येदितालांमुळेंच विवाह नोंदणीस खर्च अधिक येतो तरी ते काढूनच टाकण्याची खटपट करावी किंवा ते येदिताल नुसत्या साध्या फोलीवर तरी करावे म्हणजे जनतेच्या पैशांचा चुराडा न होतां प्रजा थोड्या सुखानें तरी आपला उदर निर्वाह करील.

रघुनाथ शंकर कुळकर्णी.
मुक्काम धारगळ–गोवा.

वर्तमानसार

—येथील जजांची बदली मडगांव येथें होणार असून, मडगांवच्या न्यायाधिशांची रवानगी आफ्रिकेंत होईल, असें कळतें.

—शेतकी खात्याची नवी संघटना अमलांत येणार असून, या संघटनेनुरूप तीन नवे 'केळकर' आणण्यांत येतील. उपरिनिर्दीष्ट संघटनेनुरूप एकंदर गोमांतकाचे तीन भाग करण्यांत आले असून, तिसवाडी, बार्देस व पेडणें यांचा पहिल्या भागांत, फोंडें, सांखळी सत्तर प्रांत व उत्तर सांगें यांचा दुसऱ्या व सासष्टी, मुर्गाव, केपें काणकोण व दक्षिण–सांगें यांचा तिसऱ्या भागांत समावेश करण्यांत आला आहे.

—डॉ० रुद्रीग रुद्रीगीस, माकाव येथील गव्हर्नर यांस पोर्तुगीज हिंदुस्थानचे प्रांताधिपति नेमण्यांत येईल असें म्हणतात.

—(बाळकृष्ण मार्तंड चौंडे यांजकडून) ह० भ० प० दामोदरबुवा रिसबूड हे आज १२–१५ वर्षें गोवर्धन संस्थेसाठीं अथवा तिच्या गोरक्षण ज्ञानप्रसारक संघशाखेसाठीं मदत मिळविण्याचें काम प्रचारक या नात्यानें करीत असत. परंतु गेल्या १ । १॥ वर्षापासून संस्थेशीं त्याचा प्रचारक या नात्याचा असलेला संबंध सुटला आहे. सबब गोवर्धन संस्थेसाठीं त्याचेकडे कोणी परभारें मदत दिल्यास संस्था त्याजबद्दल जबाबदार नाहीं. सांप्रदायिक कार्यासाठींहि माझा त्यांचा संबंध जाणून कोणी मदत देऊं नये.

—गल्या महिन्याच्या ३ तारखेपासून म० गांधींनीं 'यंग इंडीया' व 'नवजीवन' या पत्रांचें संपादकत्व आपणाकडे घेतलें.

—येत्या वर्षाच्या मार्च महिन्यापासून मद्रास इलाख्यांत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा अमलांत येणार आहे.

—गेल्या रविवारीं गोवा हिंदु मंडळाची एक समेट सभा म्हापसें येथें भरावयाची होती.

—से. मासकारेंजस नावांच्या एका डॉक्टरानें हिंदं संस्कृतिविरुद्ध आपल्या अकलेचे तारे तोडले असून पाश्चिमात्य सुधारणेची महति गाइली आहे. भारताच्या पोर्तुगीज भागांत त्याच्या भ्रमाचा भोपळा फोडण्यांत आला आहे.

—बनावट नोटी तयार केल्याबद्दल अबदूल अली नावांच्या एका मुसलमानास मुंबई येथे तीन वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्यांत आली.

खऱ्याची दुनिया) अगोदर हें सर्व वाचा विश्वास ठेवा (आहे काय पाहूं
सत्य मानाल तर सुख पावाल आणि अशक्ततेपासून मुक्त व्हाल

१००० रुपये बक्षीस

सर्वतोमुखीं जाहलेला जगमान्य

थोडक्या खर्चासाठीं व्यर्थ क्षिणता राखूं नका.	सुवर्णकांत पाक	धिक्कार कराल तर क्षिणता राखून ठेवाल

याचे सेवनापासून तमाम धातुजन्य विकार, इंद्रियास आलेलें शिथिलत्व व नपुंसकत्व स्वन्पावस्था व लघवींतून धातु जाणें, वीर्याचा पातळपणा व रेगट असल्यानें संतती होण्यास निरुपयोगी होणारा थकवा, अभ्यासास कंटाळा, मेंदूचे अशक्ततेपासून स्मरणशक्ति कमी होणें; पाय ओढणें; कमर दुखणें; पाठीस ओढ लागणें, व सर्व प्रकारचा पर्मा व सर्व प्रकारची गरमी रसायनापासून झालेले विकार लघवीची हातापायाची व तळव्याची जळजळ, पित्तापासून उरांत जळगें, डोळयांस अंधारी येणें झोप न येणें, संतती न जगणें, वारंवार गर्भपात, तांबडी व पांढरी धुपणी; विटाळ शूळ वगैरे स्त्रिपुरुषाचे रोग जाऊन कडकडीत भूक लागते व शौच्यास साफ होते वीर्याची वृद्धि होऊन वीर्य घट्ट होतें, व पुरुषत्वास जोर येतो, वीर्य स्तंभन होऊन कामोत्पत्ति होते, व संतति होण्यास साह्यकर होतें. अशा तऱ्हेचा अवर्णनीय व कायमचा धातुपौष्टिक व त्यासंबंधीं रोगनाशक खात्रीचा, शर्यतीचा अल्पमोली व बहुगुणी पाक बनविलेला आहे. शरीरसंपत्तीची व रतिसुखाची इच्छा असणारांनीं एक वेळ मागवून अनुभव घेतल्यानें समाधान होईल.

या पाकांत महत्प्रयासानें संपादन केलेले अमोल्य व वेंचक वनस्पति, शतपुष्पा पिंशावल्ली, शालीमकंद, जपारूंद, शालीमलीकंद, आश्वकंद, जेष्ठकंद, मधुकंद, मुसळीकंद, सेवरीकंद, द्वितारवचाकंद, कवचबीज, समुद्रशोकाचे बीज, शतबीज, सागबीज, विजयीबीज, वाळबीज, चिकण्याचें पंचांग, शमीरत्र, जायपत्री, मदनमस्त, रतनपुरुष, कमरकस, काथिल्यागोंद, पंजाबामिश्री, शालामामिश्री सफेतामिश्री, तालींमखाना; बीजबंद, हरणखोरी, मोंगलीबेदाणा, मर्दानीलकडी, शतावरी सकर्मिगज, वडाचें दूध वाकीरीमाता गाखेरू रानभेंडीमूळ, आमृतसत्व, इसबगोळ आवळकाठी सिलाजीत येणेंप्रमाणें जिनसांत धातुपौष्टीक गुण नाहीं ह्मणून सिद्ध करून देणारास हजार (१०००) रुपये बक्षीस देऊं ! सकाळीं दोन तोळयाची वडी व रात्री जेवणानंतर २ तोळयांची वडी खाऊन वर साधारण तापविलेलें गाईचें दूध प्यावें. पथ्य नाहीं. वर्ज्य नाहीं एकवीस दिवस पुरणाऱ्या या पाकाचा ८४ तोळे डबीची किंमत येत्या चैत्र पर्यंत सवलतीची किंमत ५। रुपये व्हीं, पी. खर्च निराळा.

पत्ता— वैद्य बी. एस. इनामदार, मिरज

किष्णु रामचंद्र केणी यांचें दुकान

जुना बाजार—मडगांव.

स्थापना १८५०

सचोटीबद्दल प्रसिद्ध असलेल्या या अत्यंत जुन्या दुकानांत सर्व तऱ्हेच्या मालाचा भरीव स्टॉक असतो. निरनिराळ्या जातीच्या शाई, रंग, सिमीट, व्हेर्नीज, आबोक, हरतऱ्हेचें लोखंडी सामान (खिळे, करवती वगैरे) नाना रीतीचे जस्ताचे व तांब्याचे पत्रे व इतर सर्व संसारोपयोगी वस्तू सदर दुकानांत माफक दरानें विकल्या जातात.

दर एक, माल चोख, व्यवहार रोख

अनुभवानें खात्री करून घ्या !

ESTABELECIMENTO COMERCIAL

DE

Visnum Ramachondra Quenim

FUNDADO EM 1850

MERCADO VELHO–MARGAO

CONTA já mais de 73 anos de fundação o sobredito estabelecimento comercial. E' portauto um dos mais antigos da vila de Margão, mantendo relações com as mais afamadas firmas comerciaes e industriais da Europa e da America, paizes donde, em regra, importa todas as qualidades de tintas, aboc, oleos, verniz, linhança, cimento, gis etc. toda a sorte de artigos de ferro, como pregos, aldraves, cadeados, bisagras, parafusos, canos de ferro etc. especialidades de pastas de zinco lisas e concavas e as de cobre.

NO REFERIDO estabelecimento vendem-se tambem artigos alimenticios da primeira necessidade e todas outras mercadorias de que se acha bem provido.

BEM SERVIR O FRECUEZ E' O SEU LEMA

Experimentem que sempre lhes será proveitosa a experiencia !

रबरस्टँप मॅ. कंपनी

आमच्या कारखान्यांत नावांच्या पाट्या, नाटकाचे पडदे, पत्र्याचीं कायम टिकणारीं क्यालेंडरें, सर्व प्रकारचे सुंदर रबरी शिक्के, लाखेवर उठविण्याच्या मोहरा, ब्लॉक्स, रबर स्टंपची शाई, रबरी टाइपाच्या पेट्या, डेटर्स नंबर्स, व फोटोच्या फ्रेमी, वगैरे तयार करून ,मिळतील.


प्रो. धारणकर पेन्टर, मडगांव–गोवा.

गोमांतकांतील गुऱ्हाळाचा हंगाम

यशस्वी व फायदेशीर करण्यास 1

किर्लोस्कर किसान चरक

उपयोगांत आणा. रचना साधी व मजबूत. रसाचें भरपूर प्रमाण मिळतें चालविण्यास बैलांची फक्त एक जोडी पुरते. काम मनाजोगतें होण्याजोगा



सुटे भाग हवे तेव्हां मिळण्या सारखे. किंमत अवघी रुपये २०० शवाय व्यापाऱ्यांस भरपूर क मिशन.

माहिती मागवा

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड

किर्लोस्करवाडी

M. S. M. R.

जि. सातारा.

sam os homens; mas as obras ca' fi-cam.

LAMENTAVELMENTE LAMENTAVEL

A proposito do nosso suelto *Beija mao* vem o *Diario*, nosso considerada colega, num tom de quem justifica os actos da Direcgao, observando-nos o seguinte:

"E' mais que certo, porem, que o que a Direcgao fez, fe-lo no interesse dos proprios professores. Os processos de aposentagao desses funcionarios tendo de ser instruidos com certidoes de cada posse de cada lugar. — compreenda se bem — so' ha conveniencia em que os autos dessas posses sejam lavrados na Repartigao Central para os interessados obterem as competentes copias sem dificuldade, ao contrario do que sucedia quando as posses eram tomadas perante as delegacias locais".

Sendo esta a intengao da Direcgao, o que deveras folgamos registar, fica justificada a posse dos professores, ultimamente nomeados pela primeira—; fica outrosim justificada a posse dos que sendo ja' professores, foram transferidos de um lugar para outro, e isto la' por causa de "cada posse de cada lugar." O que, porem, as explicagoes do "Diario" nao legitimam e' o facto de terem sido arrastados a' Direcgao para tomar posse dos seus lugares os professores que ja' a haviam tomado dos mesmos seus logares ha muitos anos e onde ainda continuam gragas a Deus.

Para no's o caso e' destes e foi a sorte deles que nos levou a escrever-mos o suelto em questao, como facilmente se depreende da leitura do mesmo.

Emquanto alguem nao nos esclarega sobre o ponto, a nossa *ignorancia* continuara' lamentavelmente *lamentavel.*

Sim, custa a acreditar que aquilo de "de cada posse de cada lugar" autorise a Direcgao a obrigar os professores a tomarem posse em 1924 dos lugares que vem exercendo desde 18 e tanto ou dos diferentes lugares por que passaram desde o inicio da carreira ate' ao presente.

SALVE', RAPAZES

E' com imenso jubilo que recebemos o artigo "Agora no's" que um numeroso grupo de estudantes nos enviou. Nao sao so' academicos hindus veemse ai nomes de cristaos tambem e destes em grande numero por acaso nomes que—contra vontade expressa dos seus portadores — nao tornamos publicos, porque entendemos que 'a gente nova e' vedado figurar na politica embora seja obrigatorio meditar e estudar a politica.

O artigo vai no outro logar — firmado—"Um grupo de academicos"— a quem o "Bharat" agradece penhorado num forte abrago unindo todos, hindu's e cristaos, da mesma forma como unidos vieram bater a sua mo-

भा र त

मि. आषाढ शु० ९ मी शके १८४६

लॉटरींचा खेळ होतो पण गोव्याचा जीव जातो !

मोनार्कीच्या ह्यातींत जे रिपब्लिकन पक्षाचे हृदयस्पर्शी व मनोवेधक कार्यक्रम झळकत असत त्यांत 'लॉटरींचा उच्छेद' हें समाजहितंवधक तत्व ठळक अक्षरानीं लिहिलेलें आढळून येत असे. "मोनार्की नामोहरम होऊन पोर्तुगालची सत्ता आमच्या हातीं येतांच, लॉटरीचें समूळ उच्चाटण केल्याशिवाय आह्मीं कदापि रहाणार नाहींत," असें जेव्हां तेव्हां रिपब्लकन पक्ष जोरदार व देशाभिमानप्रेरित वक्तृत्व करीत असे!

सुदैवानें अनेक अनीतीनीं पोखरलेला मोनार्कीचा जुनाट वृक्ष रिपब्लिकन चळवळीच्या झंझावातानें मूळासकट उपटून पडला व त्य जागीं प्रजासत्ताक राज्यपद्धतीचें बीं रुजून त्याचें आतां झाड सुद्धां बनलें आहे; पण लॉटरींचा उच्छेद झालेला दिसून येण्याऐवजीं उलट लॉटरींकडून मात्र अजाण लोकांच्या संपत्तीवर वरवंटा फिरविण्याचें निंद्य व क्रूर कार्य मोनार्कींतल्या पेक्षांहि जास्त घडाडीनें चालू आहे, असें दृष्टोत्पत्तीस येऊन रिपब्लिकन लोकांच्या तत्वभ्रष्टतेची कींव केल्याशिवाय रहावत नाहीं.

पोर्तुगालच्या लॉटरींचा प्रश्न दृष्टिआड केला व येथल्याच लॉटरींकडे नजर वळविली तर डोळ्यांपुढें कोणतें दृश्य उभें रहातें? मोनार्कीच्या अमदानींत ज्या 'ओसपीस' व 'सांत काज' अशा दोनच लॉटरी मनमुराद धिंगाणा घालीत होत्या, त्यांत आणखी डॉ० जाइम द मोराइस यांच्या कुमार्गी धोरणानें 'आजील' लॉटरीच्या बजबजपुरीची यथेच्छ भर पडली आहे. येथें बजबजपुरी हा शब्द कां वापरला गेला आहे हें आजच्या वर्तमानसारांतील यद्विषयक मजकुरावरून वाचकानीं ताडलेंच असल. असो.

Salve', rapazes!

AVESTRUZES PATRICIOS

Temos visto com muita frequencia anuncios genuinamente portuguezes de Portugal com rotulos em ingles. Assim la' se ve "Lisbon Wine" "Minho Wine" "O Porto Wine" Que isto fizessem os vinhateiros portugueses da India—va' que va. Mas que o fagam os productores do vinho portugues de Portugal — e' realmente curioso.

Chamamos para o caso a atengao do sr. Pereira Batalho, esperando que pela mao do seu Artur, lhes de, aos seus *avestruzes patricios*, uma boa sova.

—पोर्तुगालांत नवीन प्रधानमंडळ अधिकारारूढ झालें !

परंतु रिपब्लिकन लोकांच्या तत्वभ्रष्टतेच्या जीवनानें फोफावू पहाणारा हा लॉटरीचा विषारी वृक्ष असाच विस्तारेल किंवा लोकाश्रयाच्या खताचे अभावीं तो अल्पावधींतच मरकुंडीस येईल? एकंदर परिस्थितीची छाननी केली असतां, या प्रश्नाचा दुसराच भाग सत्य सृष्टींत उतरेल असा विचार मनांत येऊन समाधान वाटतें.

कसें तें पाहूं. ' सांतकाज ', ' ओसपीस ' व 'आजील' या तिन्ही संस्थांचीं येत्या आगष्ट महिन्यांत होणाऱ्या आवर्तुराचीं ' कावतेलें ' पांच लक्षांवर आहेत. आणि गोमांतकाची लोकसंख्या पांच लक्ष आहे असें कल्पिलें व प्रत्येक पांच व्यक्तींच्या कुटुंबानें एक ' कावतेल ' —संबंध पांच कावतेलांच्या सोडतीची गोष्टच सोडा— विकत घेतलें असें ग्रहित धरलें तर पांच लक्ष ' कावतेलांपकीं ' एक लक्ष ' कावतेलां' चा काय तो खप संबंध गोव्यांत होईल, असें मानतां येईल. हें 'मानणें' सुद्धां— सर्व साधारण गरिबी लक्ष्यांत आणिली असतां तसेंच सर्वच लोक कांहीं ' कावतेल 'चे भक्त नाहींत, हें ध्यानांत बाळगिलें असतां — बऱ्याच अतिशयोक्तीचें आहे. या अतिशयोक्तीकडे दुर्लक्ष करून, गोव्यांतला ' कावतेलां'चा खप एक लक्षच आहे, अशी कल्पना केली, तर बाकीच्या चार लक्ष ' कावतेलांचा ' खप गोव्याबाहेरील प्रदेशांत होत असला पाहिजे, हें उघड आहे. हा प्रदेश ह्मणजे अर्थात इंग्रजी हिंदुस्थान हा होय.

' कावतेलें ' विकल्याबद्दल मुंबईच्या खंडाळवाला नामक गृहस्थाला २५ रु. दंड केला गेल्याची बातमी नुकतीच भारतांत प्रसिद्ध झाली आहे. या प्रकारावरून ' सोडती' ला उजळ माथ्यानें व मन मानेल त्या रीतीनें हैदोस घालण्यास यापुढें इंग्रजी हिंदुस्थानांत वाव मिळणें शक्य नाहीं, हें सिद्ध होतें. अशा स्थितींत चार लक्ष ' कावतेलांची ' काय गत होईल, हें उघड दिसून येतच आहे.

इंग्रजींत लॉटरीना मज्जाव झाला ह्मणजे त्यांचें कार्यक्षेत्र गोव्यापुरतेंच शिल्लक राहतें. आणि गोव्यांत तर एक लक्षापेक्षां जास्ती कावतेलें खपण्याची आशा नाहीं. अशा चमत्कारिक प्रसंगी एक तर लॉटरींची संख्या कमी करणें भाग पडेल न पेक्षां कावतेलांच्या संख्येला बरीच मर्यादा घालावी लागेल. तात्पर्य कोणत्याहि रीतीनें कां होईना आज फोफावूं पहाणारा लॉटरींचा वृक्ष उद्यां रोडावलेला—न मेला तर —दिसून येईल. बाकी परोपकाराचें पुण्य जोडण्यासाठीं ह्मणून जन्मलेल्या या संस्थांकडून जनतेच्या निढळच्या घामाच्या पैशांचा चक्काचूर निरनिराळ्या मजागमजा मारण्यांत होत असल्यानें, भविष्यकाळीं तरी लॉटरींच्या नाड्या आंखडतील हें चित्र मन:पटलावर नाचूं लागून, लॉटरींच्या अगाध लीलांनीं त्रस्त झालेल्या जीवास त्यांतल्या त्यांत थोडा तरी आनंद मानण्यास जागा राहील. या परिस्थितींच्या फायद्यानें रिपब्लिकन पक्षास लागलेला तत्वभ्रष्टतेचा डाग मात्र केव्हांहि धुवून जाणार नाहीं, यांत शंका नाहीं.

विचार. लहरी

लहर ११ वी.

मागच्या लहरीमध्यें आपण प्राचीन काळीं जे थोर महात्मे होऊन गेले त्यांची ईश्वरत्वाबरल मतें काय होतीं याचें दिग्दर्शन केलेंच आहे. आतां आधुनिक काळामध्ये उत्पन्न झालेले थोर पुरुष व त्यांनीं काढलेले पंथ यांचीं मतें काय आहेत त्यांचें थोडेंसें दिग्दर्शन करून हा विषय पुरा करूं.

\+ \+ \+

पाश्चात्यांचें या देशांत आगमन होण्यापूर्वीं आपल्या देशांत धर्मसंबंधीं बरीच [illegible] नास्था माजलेली होती. तत्पूर्वी ठिकठिकाणीं संत मंडळी निर्माण होऊन त्यानीं धर्माच्या उज्वलतेचें कार्य बरेंच केलेले होतें. [illegible] हिंदुस्थानांत कबीर, तुळसीदास सारखे [illegible] सेच महाराष्टामध्यें तुकाराम, रामदास, ज्ञानेश्वर, नामदेव वगैरे संतमंडळीनीं धर्माच्या नावांवर सांचलेला मळ झाडून हें कार्य [illegible] रेंच सुलभ करून सोडलेलें होते.

\+ \+ \+

इतकें जरी झालें तरी पण शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार नसल्यानें त्यांचीं उदात्त [illegible] खालपर्यंत उतरलीं गेलीं नाहींत. एकों[illegible] साव्या शतकांत धर्माला अत्यंत किळस[illegible] स्वरूप प्राप्त झालेलें होतें. मूर्तिपूजेचें [illegible] फार माजून मूर्ति ह्याच देव आहेत ह्या [illegible] ल्पनेनें त्यांस नरमेधाचे नैवेद्य देणें, त्या[illegible] पुढें पशूंचे बळी देणें, भक्तानीं आप[illegible] इजा करून घेणें वगैरेसारखे प्रकार स[illegible] चालू होते. ह्यानंतर मिशनरी लोकांचें [illegible] आगमन झालें. त्यानीं आपल्या धर्माचा [illegible] सार करण्या करतां मूर्तिपूजेच्या नावां[illegible] होत असलेला अन्याय लोकांच्या डोळ्यां[illegible] ठेऊन हिंदुधर्म हा अत्यंत हीन धर्म [illegible] या धर्मात आपल्या धर्मासारखीं उच्च [illegible] नाहींत. यांचे देव ह्मणजे दगड, धोंडे, [illegible] पशु, पक्षी वगैरे होत, असें सांगून आ[illegible] धर्माच्या प्रसाराचें कार्य आरंभिलें.

\+ \+ \+

आरंभीं पुष्कळ लोकानां हें खरें [illegible] त्यानीं हिंदुधर्माचा त्याग करून खिस्ती [illegible] स्वीकारला. बंगाल्यांत याला जंगी स्वरूप [illegible] झालें. शेंकडो लोक परधर्मांत जाऊं [illegible] ही स्थिती अशीच चालू राहिल्यास [illegible] परिणाम वाईट होईल, असा प्रश्न पुढें [illegible] राहिला; परंतु ही स्थिती बदलली गेली. [illegible] वेळीं बंगालमध्यें एक थोर महात्मा [illegible] आला. तो राजा राममोहनराय हा होय. [illegible] हिंदुधर्म ग्रंथांचें परिशीलन करून वेद [illegible] उपनिषदें यांतील उच्च तत्वें लोकांच्या [illegible] ळ्यांपुढें मांडली व यांतील तत्वांवर [illegible] समाज या नव्या पंथांची इ. स. १[illegible] च्या सुमारास स्थापना केली. ह्या [illegible] मदार उपनिषदांतील तत्वांवर असल[illegible] पंथ आपणाला हिंदुधर्मातील एक [illegible] ह्मणवून घेण्याला तयार नाहीं.

\+ \+ \+

महाराष्टांतहि थोड्या फार प्रमाणांत [illegible]

स्वराज्यप्राप्तीकरितां व सविनय कायदेभंगाची आवश्यक प्राथमिक तयारी ह्मणून ठरविलेल्या कार्य क्रमाचा एक महत्वाचा भाग आहे. तो पुरा करण्यांत सध्या होत असलेली हेळसांड थांबविण्यासाठीं कॉंग्रेसच्या कार्यकारी संस्थांचा सभासद असलेल्या प्रत्येक व्यक्तीनें दररोज अर्धा तास कमींतकमी १० तोळे वजनाचें सूत काढून प्रत्येक महिन्याच्या १५ व्या तारखेस तें खादीबोर्डाच्या चिटणीसाकडे रवाना करण्यांत यावें. हा नियम मोडला गेल्यास तो मोडणाऱ्या व्यक्तीनें आपल्या सभासदत्वाची जागा रिकामी केली असें समजून ती नेहमीच्या रीतीनें भरण्यांत यावी. (२) कॉंग्रेसच्या कार्यकारी मंडळाचे चिटणीस व दुसरे सभासद कॉंग्रेसच्या योग्य अधिकाऱ्यानीं त्यांना दिलेले हुकूम पाळीत नसल्याच्या तक्रारी येत असल्यामुळें हे हुकूम अमान्य केले गेल्यास ते अमान्य करणाऱ्या व्यक्तीनें आपल्या अधिकाराची जागा रिकामी केली असें समजलें जाऊन ती नेहमीच्या रीतीनें भरण्यांत यावी. (३) कॉंग्रेसच्या कार्यकारी मंडळाच्या वेगवेगळ्या अधिकाराच्या जागांच्या निवडणुकींच्या प्रसंगीं मतदारानीं, कॉंग्रेस ध्येय (creed) व कॉंग्रेसनें पास केलेलें बहिष्कारपंचक धरून एकंदर सर्व ठरावांवर विश्वास असलेले व त्या बरहुकूम स्वतःचें आचरण ठेवणारे असे लोक निवडावेत; जे निवडलेले सभासद आपलें वर्तन तसें ठेवणार नाहींत त्यानीं आपल्या जागा रिकाम्या कराव्या व त्या नवीन निवडणुकीनें भरल्या जाव्या. (४) मि. अर्नेस्ट डे ह्याचा गोपिनाथ शहानें केलेल्या खुनाबद्दल दिलगिरी दर्शवून मृताच्या आत्म्यास दुखवट्याचा निरोप पाठविण्यांत यावा; व ह्या खुनाच्या मुळाशीं दिशाभूल झालेलें स्वदेशप्रेम असलें तरी सुद्धां प्रस्तुतच्या व राजकीय स्वरूपाच्या दुसऱ्या खुनाचा तीव्र निषेध करण्यांत येऊन अशा प्रकारच्या कृत्यानीं स्वराज्य प्राप्तीस अडथळा होतो व तो कॉंग्रेसच्या अनत्याच्यारी सहकाराच्या तत्वाविरूद्ध आहे हें मत नमूद करण्यांत यावें. ह्या अर्थाचे हे ठराव आपल्या पत्रांत प्रसिद्ध केले असून त्या सोबत त्यानीं अगदीं स्पष्ट शद्बांत एकंदर परिस्थितीचा ऊहापोह केलेला आहे. आपण आज कोठें आहोंत हें समजून घेण्यासाठीं जे प्रश्न उपस्थित करणें स्वराज्यपक्षास अप्रस्तुत किंवा अंतःकलह वाढविणारे वाटतात ते प्रश्न मोकळ्या मनानें विचारांत घेऊन त्यांवर वादविवाद करणें गांधीना जरूरींचें वाटतें. ते ह्मणतातः—

"मला कांहीं तरी अद्भुत गोष्टी घडवून आणतां येतील, राष्ट्राला त्याचे पूर्वींच निश्चित ठरलेलें ध्येय साधून देतां येईल अशी कित्येकांची कल्पना आहे. माझ्या सुदैवानें मी अशा भ्रामक समजुतीस जागा देत नाहीं मी एक क्षुद्र शिपायी आहे असें मात्र मी ह्मणतों. जर वाचक मला हंसणार नाहींत तर मला नेहमीच्या अटीवर एखादा कार्यक्षम सेनापति होतां येतें हें सांगण्यास मला हरकत वाटत नाहीं. मला आज्ञाधारक, स्वतःवर व आपल्या सेनापतीवर विश्वास असणारे, दिलेले हुकूम पाळणारे असे शिपायी पाहिजेत. लढाईचा माझा बेत उघड व अतिशय निश्चित असा आहे. स्पष्टपणें घातलेल्या अटी पाळल्यावर यश मिळण्याची निश्चिती देतां येईल. परंतु ह्या अटी कबूल केल्यावर त्या स्वतःच्या आचरणानें पार न पाडणारे, व न जाणो, त्यावर विश्वासहि नसणारे असे शिपाई सांपडल्यास त्या विचाऱ्या सेनापतीनें काय करावयाचें ? हे ठराव शिपायांच्या योग्यायोग्यतेची परीक्षा घेण्यासाठीं योजण्यांत आले आहेत.

मी १९२० सालीं जेथें होतों तेथें आजहि आहें. उलट गेल्या कांहीं वर्षांत त्यांवर (त्या वेळच्या कार्यक्रमावर) असलेली माझी श्रद्धा वृद्धिंगत झालेली आहे. जर मला (शिपायी ह्मणून) ठेवणाऱ्यांचा त्यावर (माझ्या कार्यक्रमावर) माझ्या एवढाच विश्वास असेल तर शरीरानें व मनानें मी त्यांचाच आहें. दुसऱ्या अटीवर मी नाखूष आहे ह्मणून नव्हें, तर मी निरुपयोगी ठरेन ह्मणून मला नोकरीस राहतां येत नाहीं. जर एखाद्या (रंगरूटाच्या) जाहिरातींत तांबड्या केसाचा, ३५ वर्षे वयाचा, ६ फूट व ६ इंच उंची असलेला माणूस पाहिजे असल्याचें कळविलें असूनहि केस पिकलेल्या ५५ वर्षे वयाच्या, दांत पडलेल्या व प्रकृति ढांसळलेल्या माणसानें अर्ज केला तर तें कसें दिसेल ?

परंतु (प्रस्तुतच्या बाबतींत) शिपायांची स्पृहणीय स्थिति अशी आहे कीं, त्यांना आपला सेनापति निवडून देतां येतो.

ऑ. इं. कॉं. कमिटीचे सभासद स्वतःशीं व देशाशीं असलेल्या त्यांच्या कर्तव्यास जागले व माझें ह्मणणें चूक आहे असें त्यांना आढळून आलें तर त्यांनीं माझी गय करूं नये.........आपल्या जन्मभूमीचें व ह्मणून सगळ्या मनुष्य जातींचें ऋण आपणापैकीं प्रत्येक जणास देणें आहे. ज्याक्षणीं ह्या ऋणाची फेड होण्याचें बंद होईल त्याच क्षणीं ऋणकऱ्याची हकालपट्टी केली पाहिजे. पूर्वींची नोकरी कितीहि उज्वल असली तरी आज नवीन नेमणुका करतानां तिचा विचार करण्यांत येऊं नये. एकादि दुसऱ्या किंवा शंभर माणसाची पर्वा करण्यासाठीं देशाचा बली देतां कामा नये. उलट देशाच्या हितासाठीं ह्या माणसाचा बली देणें योग्य होय. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या सभासदांना त्याच्यापुढें असलेल्या ह्या प्रश्नाचा निकाल एकनिष्टेनें, निःपक्षपातानें व खोट्या विकारांचें किंवा कल्पनाचें वर्चस्व होऊं न देतां करावा असें मी त्यांना पाचारण करतों. मी एखादी गोष्ट सांगतों ह्मणजे ती बरोबर आहे असें समजण्याचें कारण नाहीं. त्यांनीं आपणास योग्य वाटेल असा निकाल दिला पाहिजे.

म. गांधींच्या लेखांतील हा उतारा व काल्च्या 'यंग इंडिया'तील ऑ. इं. कॉं. कमिटीच्या सभासदानां उद्देशून लिहिलेल्या लेखांत आपल्या ठरावांसंबंधीं त्यांनीं केलेलें स्पष्टिकरण वाचल्यावर हे ठराव ह्या वेळीं पुढें कां माडण्यांत येत आहेत हें समजणें कठीण नाहीं. स्वराज्यपक्षानें ह्या ठरावांविरुद्ध आणलेल्या आक्षेपापैकीं मुख्य आक्षेप हा आहे कीं, म. गांधीचे ठराव ऑ. इं. कॉं. कमिटीनें मान्य केल्यास कॉंग्रेस कार्यासाठीं मंडळांत स्वराज्यपक्षाचा शिरकाव होऊं शकणार नाहीं. आपल्या पक्षाचें कॉंग्रेस कार्यकारी मंडळांतून उच्चाटन होणें त्यांना साफ नापसंत आहे. राष्ट्रीय सभा ही प्रातिनिधिक संस्था आहेच. त्या संस्थेच्या जागा विशिष्ट पक्षानें स्वतांकडे ठेवून दुसऱ्या पक्षांना बाहेर घालवून देणें हा जुलूम आहे असें ते ह्मणतात. म. गांधींनीं ह्या आक्षेपास पूर्वींच उत्तर दिलें आहे हें ते नाकबूल करीत नाहींत. स्वराज्य पक्षाला किंवा दुसऱ्या कोणालाहि असलेले कॉंग्रेसच्या कार्यकारी मंडळांच्या सभासदत्वाचे हक्क त्यांच्यापासून हिसकावून घ्यावयाचे नाहींत. त्यानां फक्त राष्ट्राच्या हिताकडे लक्ष देऊन कॉंग्रेसनें ठरविलेला कार्यक्रम जोमानें व शक्य तेवढ्या लौकर पार पाडावयास पाहिजे. जोंपर्यंत कॉंग्रेस अधिकार सूत्रें हातांत असलेल्या व्यक्तींचा कॉंग्रेसच्या कार्यक्रमावर विश्वास नाहीं; व तो असला तरी तो कार्यक्रम पुरा करण्यासाठीं एकनिष्ठपणानें काम करण्याची त्यांची तयारी नाहीं तोंपर्यंत स्वराज्य प्राप्तीसाठीं योग्य प्रयत्नच केले जाणार नाहीं असें ते प्रतिपादन करतात. कॉंग्रेसमध्यें उत्पन्न झालेल्या ह्या दोन पक्षांचा—बहिष्कार पंचकास गौण महत्व देणारे स्वराजिस्ट व नाफेरवाले 'कट्टर' वेगवेगळा कार्यक्रम परस्पर विरोधी असल्यानें त्या दोघानीं एकत्र राहून कोणतेंहि कार्य सुसंघटितपणानें होणें शक्य नाहीं. कायदेमंडळांतून आपलें कार्य करण्यास स्वराज्यपक्षास पूर्ण मोकळीक आहे परंतु ज्या कार्यक्रमावर त्यांचा विश्वास नाहीं तो कार्यक्रम पार पाडण्यासाठींच स्थापन केलेल्या मंडळांच्या कामांत त्याचा हात नसणें सर्वांच्याच दृष्टीनें आवश्यक आहे, असें त्यांचें मत आहे. अशा परिस्थितींत हे ठराव ऑ. इं. कॉ. कमिटीच्या पुढें मांडून कॉंग्रेसचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठीं योजावयाचे कांहीं उपाय गांधींना सुचवावयाचे आहेत. त्यांच्या सूचना स्वीकारणें किंवा न स्वीकारणें त्या कमिटीच्या मर्जीवर अवलंबून आहे. त्या स्वीकारल्या गेल्यास गांधी राष्ट्राच्या नेतृत्वाचें काम करण्यास तयार आहेत व न स्वीकारल्या गेल्यास अर्थातच त्यांचें कांहींच ह्मणणें नाहीं. ऑ. इं. कॉ. कमिटीचा एक सभासद ह्मणून वाटेल तो ठराव पुढें आणण्याचा गांधींस बाकीच्या सभासदांप्रमाणें हक्क आहे. त्या हक्काचा त्यानीं उपयोग केल्यास आज त्यांच्यावर करण्यांत येत असलेला गहजब कां करण्यांत यावा हें समजणें कठीण आहे. गांधींनीं सुचविलेले फेरफार अमलांत आल्यास स्वराज्यपक्षाच्या लोकांस कॉंग्रेस—अधिकाराच्या जागा सोडाव्या लागतील हें खरें आहे पण त्यांच्या बरोबरच नाफेरपक्षांतील पुष्कळांना जे म. गांधींच्या अटी पाळणार नाहींत, ह्मणजे कॉंग्रेस कार्यक्रमाच्या प्रगतीचें चाक ढकलण्यास खांदा लावणार नाहींत अशा ढोंगी लोकांनाहि त्या जागा सोडून द्याव्या लागतील, हें आपण विसरतां कामा नये. म. गांधींची मागणी अत्यंत सरळ व न्याय्य आहे. ती मागणी मान्य करा असा त्यांचा मुळीच आग्रह नाहीं. त्यानीं एक विशिष्ट योजना तयार केली आहे व ती सुद्धां जुनीच असून फक्त नवीन स्वरूपांत आज मांडलेली आहे. राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें राष्ट्राच्या प्रतिनिधीनीं तिला मान्यता द्यावी अशी गांधींची त्यांना विनंति आहे. गांधींनी आपली बाजू पुढें मांडलेली आहे. ह्यांत अंतःकलहाचें, कॉंग्रेसमध्यें पडणाऱ्या फुटीचें ध्येय कुठें आहे ? गांधींचे ठराव पास झाल्यास कॉंग्रेसच्या तळांत तट पडण्याच्या किंवा पाडण्याच्या धमक्यांत कितीसा जोर आहे ? म. गांधींना आपापसांतील युद्ध मुळींच पसंत नाहीं, व त्याच्या बर्तींत असला युद्ध प्रसंग ओढवणारहि नाहीं, हें आज सुद्धां स्पष्टपणें दिसत आहे. म. गांधी अशा प्रकारच्या युद्धांत भाग घेण्याचें नाकारतील—त्यांनी ह्या पूर्वी तसें करण्याचें नाकारलेंहि आहे. भांडण होण्यास दोन प्रतिस्पर्धी असावे लागतात, ही साधी गोष्ट स्वराज्य पक्षास माहीत असावयास पाहिजे.

ऑ. इं. कॉं. कमिटीच्या बैठकींतील वादविवादाच्या फलनिष्पत्तीसंबंधीं पुढील आठवड्यांत लिहिण्याचें वाचकांस अभिवचन देऊन ह्या ओळी पुऱ्या करण्यापूर्वी कालच आलेल्या असोशिएटेड प्रेसच्या जादा तारेंतील मजकुराचा उल्लेख ह्या प्रसंगी करणें अप्रस्तुत होणार नाहीं. ह्या तारेंतील बातमी खरी असल्यास म० गांधींचे पहिले तीन ठराव (ठराव २ व ३ हे पहिल्या ठरावांतीलं मजकूर पूर्ण करतात ह्मणून त्यांना त्या ठरावापासून वेगळें व स्वतंत्र असें अस्तित्वच नाहीं) नियम बाह्य — ultra vires — ठरविण्याचा प्रयत्न ह्या प्रसंगीं करण्यांत येणार आहे. हे ठराव पास होऊन अमलांत आल्यास त्यांत नमूद केलेल्या कॉंग्रेसच्या बहिष्कार विषयक अटी पाळणाऱ्यांसच ऑ. इं. कॉं. कमिटीचे सभासद होतां येणार आहे. परंतु कॉंग्रेस घटनेच्या नियम १ प्रमाणें कॉंग्रेसच्या माजी अध्यक्षानां (त्यानीं कॉंग्रेसचें ध्येय मान्य केल्यावर) ह्या सभासदत्वाचा हक्क पोंचतो. तेव्हा ह्या दोन परस्परविरोधी गोष्टींचा मेळ घालणें कॉंग्रेसच्या घटनेंत सुधारणा केल्यावेरीज अशक्य आहे; व ह्मणून या मुद्दयांवर नियम बाह्यतेचा प्रश्न उत्पन्न होऊन त्यावर निकाल देण्याची विनंति अध्यक्षानां करण्यांत येईल अशी कित्येकांची अपेक्षा आहे. अर्थातच असल्या नाजूक व बिकट प्रश्नावर मत देणें श्री. श्रीनिवास अय्यंगार (मद्रास सरकारचे माजी ॲडव्होकेट जनरल) सारख्या कॉन्स्टिट्यूशनललॉची बारीक माहिती असलेल्या माणसासच शक्यआहे. म० गांधींनें ह्या कायद्याच्या ह्या अडचणीकडे कसें पाहिलें नाहीं ह्याचें खरोखर आश्चर्य वाटतें ? पण ह्या संबंधीं निश्चित काय ठरतें हें अजून पहावयाचें आहे.

Felicitamo-lo.

IDEA HONESTA ...

Descrevendo as festas celebradas no dia 2 do corrente no Recolhimento da N. Senhora da Serra, que e' uma instituigao mantida pela Santa Casa de Misercordia, diz *O Heraldo* o seguinte:

"A seguir, foi servido um magnifico *lunch* volante com servigos profusos e a deliciosa orquestra dos irmaos Miranda abriu uma *matine'e* dangando..se animadamente ate' as 18 horas" E sabe-se pelo relato de outro diario *Heraldo*, que a esta *matine'e* assistiram mais de **700** pessoas e dangando-se num entusiasmo louco."

A Santa Casa de Misercordia de Goa coalha dinheiro em nome dos pobres, para os pobres; porisso a idea que a Pia Mesa teve de esbanja-lo numa *matine'e* foi-hao-de concordar-uma ide'a...honesta!

ALEGRE TERRA!

Consta dos jornais da Capital que no dia 2 deste, pelas festas da inaugurugao do novo edificio do Recolhimento da N. S. da Serra, o governo concedeu tolerancia do ponto aos funcionarios que fossem irmaos da Santa Casa e aos seus *convidados*. Sublinhamos a palavra convidados para que os nossos leitores nao deixem de reflectir na latitude do termo. Resultado: no dia 2, dia de festejos, na Capital da India Portuguesa, sede do Governo, quase todas as repartigoes publicas, institutos de ensino etc., estiveram positivamente...a's moscas.

Felizmente a nossa pobresa e' crassa e o nosso espirito de filantropia quase tolhido por essa pobresa. Fosse na Ame'rica, um governo, com a orientagao do nosso, so' tinha um caminho: ... declarar *tolerancia do ponto* durante os 366 dias, 66 por causa dos bisextos!

Alegre terra!

E' DE COERENCIA

Numa aberta de bom senso o Governo da Metropole aumentou, por decreto, o numero de horas obrigatorias, do lecionamento nos Liceus, de 12 horas que eram para 14 horas semanais! O ideal seria acabar de vez com a imoralidade do *excesso de horas*; mas assim, o que se fez, ja' e' um alivio, devemos confessar.

Consta a um Diario da capital que o mesmo decreto foi tornado extensivo para as colonias, mas nao nos consta ainda que no Liceu Central de Nova-Goa ja ele tenha sido posto em execugao. Porque seria? Inconvenientes de ordem pedagogica cremos que nao existem, pois ainda estamos no comego do ano lectivo.

Era bom, pois, que ainda com alguns prejuizos, so' pensarem em aliviar a sorte do pobrezinho.

Aqui o pobrezinho e' o tesouro da Colonia.

Sim, e' preciso que os competentes pelo menos ponham no caso a mesma solicitude que os distinguiu quando foi de 4.500 pelo trabalho dos exames! E' de coerencia.

GRANDES IDEAS

No seu memoravel artigo *Por linhas tortas ... A Provincia* pretendendo demonstrar a inviabilidade de Goa ter a sua vida independente escreve o seguinte:

"E porque? Porque a nossa India sem recursos economicos que lhe permitam sequer o titulo de uma nagao nao pode subsistir desagregada de qualquer Estado."

E logo acrescenta, dirigindo-se aos jornais hindu's:

"Querem um governo proprio uma independencia quase absoluta? Justifiquem pelos seus actos"...e observa" mas que essa independencia ... seja o reflexo da do Brasil onde predomina o espirito portugues."

Portanto, para o sr. Pereira Batalha a *nossa India* nao pode ser independente porque lhe faltam as condigoes economicas, mas, entretanto para o mesmo sr. P. Batalha a *nossa India* pode ser independente como o Brasil. Porventura, o sr. P. Batalha anda na ingenua persuasao de que o Brasil e' independente sem recursos economicos que o justifiquem? Nao ha' duvida que as ideas do sr. P. Batalha sobre a independencia e a economia sao positivamente *grandes ideas*.

ISTO CONSOLA

Apraz-nos registar que foi bem acolhida a idea da edigao portuguesa do *Bharat*, edigao cujo numero de assinantes, a regular pelo numero dos pedidos que a Empresa esta' recebendo, promete ser bastante animador.

E' caso para dizer: "isto consola."

BANDO PRECATORIO?

Na semana que findou, 200 e tantos alunos das Escolas Primarias de Nova-Goa, foram ao Palacio de Idalcão, acompanhados de seus professores, pedir ao sr. Governador Geral a instalação das suas escolas no edificio onde, ao presente, funciona o Quartel General.

Diz-se por aí que *ás creanças nada se nega.* Sucede, porem, que, no caso, os *bebés* pedem, nada mais nada menos, do que *um edificio*, que, de certo, na maioria, não conhecem nem siquer de fachada! Pedissem umas arrobas de bôlos, podia o sr. dr. Jaime de Morais proporcionar-lhes um alegrão mêsmo á custa do tesouro; mas *um edificio*?!

O que nos consolou no emtanto é que os professores tivessem conduzido esse singular bando precatorio. E' grande coisa que o cidadão portugues desde pequeno aprenda *a pedir* se é que o destinam *a subir*.

भा र त

मि. आषाढ शु० ३० शा शके १८४६

कामोंईसचें श्राद्ध!

गेल्या महिन्याच्या १० तारखेस, पोर्तुगालच्या बहुतेक एकंदर शहरांतून लुईस द कामोंईस यांचा चतुर्थ शतसांवत्सरिक स्मृति दिन साजरा करण्यांत आला. हजारों कोसावर, साता समुद्रांचे पलीकडे असलेल्या एका चिमकुल्या राष्टांत, चार शतकांपूर्वी होऊन गेलेले हे कामोंईस कोण याची ओळख विशेषें करून आपल्या तरुण पिढीस करून देणें म्हणजे, कधीं काळीं आकाशांत येणारा धूमकेतु दाखविण्याकरितां, हातांतली मशाल वर करण्यासारखेंच होय. कारण, स्वेच्छेनें नसलें तरी परेच्छेच्या चाबुकास भिऊन, कामोंईसच्या चरित्राची व त्यांच्या लुझियडची पारायणें न केलेला हिंदु विद्यार्थी हल्लींच्या काळांत तरी गोमांतकांत विरळा! पण करावयाचीं पारायणें कोणत्या दृष्टीनें आपल्याकडून झालीं तर त्यांत आपली म्हणण्यासारखी हानि नाहीं, हें सदर कवींच्या श्राद्धाच्या निमित्तानें पहाण्याचें आज योजिलें आहे.

ग्रीक व रोमन कला आणि विद्या यांच्या पुनरुजीवनाचा एक काल मध्ययुगांत (Idade media) होऊन गेला. या काळाला इतिहासांत पुनरुजीवन—काल (renascenca) असें नांव आहे. कामोंईस हे या कालांत होऊन गेलेले एक पोर्तुगीज कवि होत. ते लुझियडस या काव्याचे जनक आहेत. हें वीररस प्रधान असें एक राष्टीय काव्य आहे. यांत कवीनें पोर्तुगीज लोकांच्या राष्टीय गुणाचें विस्तारशः वर्णन केलेलें आहे. या काव्यग्रंथाशिवाय कामोंईसनीं लिहिलेलें इतर कांहीं वाङ्मय हयात आहे. पण, त्यांनां केवळ पोर्तुगालांतच नव्हे तर इतर परतंत्र देशांत देखील मिळणारा मान नुसत्या वरील ग्रंथामुळेंच होय. त्यानीं लिहिलेलें इतर वाङ्मय म्हटलें म्हणजे 'सेल्युकस राजा' या नावांचें एक नाटक, 'फिलोदेम', 'पोर्तुगीज हिंदुस्थानांतील घोडचूका' (desparates da India) कांहीं पोवाडे व हें हाय. या खेरीज त्यानीं लिहिलेली दोन सुनीतें (sonetos) जगत्प्रसिद्ध आहेत. श्रेष्ट दर्जाचे एक कवि इतकें सिद्ध करण्यास त्यांची हीं दोन लघुकाव्येंच बरउ आहेत हें खरें. पण, त्यामुळें पोर्तुगीज राष्टाचें शौर्य, त्याचें धाडस, त्याची महत्वाकांक्षा त्याची धर्मश्रद्धा, त्याची सत्यप्रीति (!) वगैरे गुणांचा तितकासा प्रसार झाला नसता. शक्य तितका हा प्रसार व्हावा आणि जगांत पोर्तुगीज लोकांची व ख्रिस्ती धर्माची धवल ध्वजा कीर्तीच्या गगनांत इतरांहून उंच फडकत रहावी या भल्याबुऱ्या हेतूनें कामोंईसनीं आपल्या व्यक्तिगत विचारांचें आणि आकांक्षांचें मंथन करून लुझियडसचें रत्न जगाला बहाल केलें. हें रत्न म्हणजे, देशाभिमानाची, राष्टीयत्वाची आणि स्वातंत्र्याची पाझळती ज्योत सदैव तेवत ठेऊन सुखसमृद्धि देणारें एक अमृत असें पोर्तुगीज रक्ताच्या किंवा पोर्तुगीज म्हणवून घेणाऱ्या इसमास खुशाल वाटो; गोमांतकाला तर तें जलाल कालकूटच ठरणार, असें चारशें वर्षांचा इतिहास आम्हां हिंदुकडे बोट दाखवून सांगतो. त्याकडे लक्ष न देऊन चालण्यासारखें नाही.

असो. एकदां देव आणि दैत्य या दोघानीं मिळून समुद्रमंथन करून चवदा रत्नें बाहेर काढलीं. या चवदा रत्नाचे वाटणींत, शेषानें टाकिलेल्या विषाचा भाग पदरात घेण्यास कोणीच तयार होईना. त्यावेळीं, श्री शंकरानें पुढें येऊन त्याचा अंगिकार केला. हें पुराणांतरीं प्रसिद्धच आहे. त्या प्राशित विषाच्या दाहाचा उपशम होण्यास, शंकरानां रामाचा जप चालू ठेवणें भाग पडलें. सांगण्याचें तात्पर्य एवढेंच कीं, जी गोष्ट विषाचे बाबतींत शंकरानीं केली तीच तत्वतः आपणास यापुढें तरी लुझियडसच्या बाबतींत केली पाहिजे. याचा अर्थ असा कीं आम्हीं आमचा राम सांभाळून मग इतर कामें केलीं पाहिजेत.

पोर्तुगीज लोकानीं कामोंईसचा केलेला गौरव रास्त आहे याबद्दल आमचा मुळींच वाद नाहीं. तेच कां? त्यांचे ऐवजीं दुसरे कोणीहि असते तरी पोर्तुगीजानीं जें आज केलें तेंच त्यानींहि केलें असतें कारण एक राष्टीय ग्रंथ या दृष्टीनें लुझियडची योग्यताच तशी आहे; ती नाकबूल करून चालणार नाहीं. पण एकाचें राष्टीयत्व तेंच दुसऱ्याचें असा कांहीं कोठें नेम नाहीं. विशिष्ट देशांतील लोकांच्या राष्टीय भावना उद्दीपित व्हाव्या म्हणून त्या देशांतील कवीनें आपल्या काव्यांत ज्या खऱ्या खोट्या गोष्टींचा उल्लेख केलेला असेल त्याच गोष्टी दुसऱ्या एका देशाचे राष्टीय हानीस कारणीभूत होऊं शकतील. दुसरें असें कीं, इतरांचे दोष चव्हाट्यावर आणून आपला गौरव करून घेणाऱ्या व्यक्ति प्राचीन काळापासून जगांत आहेत; आणि या प्रकारच्या लोकांतील एक मनुष्य अचूक कवि झाल्यास आणि त्यांतलेल्यांत आपल्या राष्टीय गुणाचें प्रदर्शन जगापुढें मांडण्याच्या दुर्दैवानें त्याला स्फूर्ति झाल्यास तो आपल्या स्वाभाविक गुणाचा आरोप राष्टावर करून इतर देशांची नालस्ती केल्या शिवाय रहाणार नाहीं हें तर्कसिद्ध आहे. हीच गोष्ट कामोंईसच्या लुझियडसच्या बाबतींत घडली. आपल्या स्वभावाच्या मध्यबिंदूकडून कामोंईसनें नकळत लुझियडसच्या रूपानें राष्टाचें म्हणून बंडुळ काढलेलें आहे. त्याच्या या काव्याचा आम्हां हिंदूंस दोन दृष्टींनीं विचार करण्याजोगा आहे. या काव्याच्या पठणानें हिंदूंच्या हृदयावर नकळत कोणते परिणाम होणें शक्य आहेत हें ध्यानांत ठेऊन त्याचा विचार करणें हा पहिला प्रकार. आणि तिन्हाइतांचे

प्राथमिक शिक्षण

(ले० उपेंद्र शे० तळावलीकर)

ले० नं ३.

कोणत्याहि जिवंत समाजांत राष्ट्रीय भावना व स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित करण्यास शिक्षण संस्था अत्यंत उपयोगी होत. समाजांत राष्ट्रीयत्व तयार करणें किंवा त्याचा लोप करणें झाल्यास ह्याच संस्था सारख्याच उपयोगी पडतात. आज आमच्यांतून राष्ट्रीयत्वाचा केलेला नाश व सुखानें गुलामगिरीस तयार केलेलीं आमचीं नेभळीं बाहूलीं ह्याच शिक्षण संस्थांतून दिल्या गेलेल्या शिक्षणाचीं दृश्य फळें होत. हाच क्रम उलटा फिरवून खरा राष्ट्रीय विकास करायाचा असेल तर आपणास ह्याच संस्थांच्याद्वारें तो शक्य आहे. प्रो. हरबर्ट स्पेन्सर ह्मणतात: "स्वातंत्र्याची वाढ ह्मणजेच प्रगति व हें शिकवणारें शिक्षण ह्मणजे राष्ट्रीय शिक्षण होय. खरें शिक्षण हेंच कीं ज्या शिक्षणानें मनुष्य प्रकृतीस बळी न पडतां प्रकृतीवर आपली हुकमत चालवून स्वतःच्या व समाजाच्या स्वातंत्र्यासाठीं आत्मसमर्पण करण्यास तयार बनतो." स्वतंत्र राष्ट्रांत ज्याचा शिक्षणक्रम आज सर्वमान्य ठरला गेला अशा अधिकारी प्रोफेसर साहेबांचे वर दर्शित विचार आज आह्मांला मनन करण्यालायक नव्हेत काय ? दुर्दैवानें आह्माला आजवर जें शिक्षण मिळत गेलें तें अगदी ह्या तत्वाच्या विरुद्ध होय. स्वातंत्र्याचा उदय होण्याऐवजीं लोप झाला, प्रगति न होतां अवनति आली व प्रकृतीवर हुकमत चालविण्याचें बाजूस राहून आह्मीं तीचे गुलाम मात्र बनत गेलों; ह्याचसाठीं आह्मांला आज जें शिक्षण पाहिजें आहे तें 'गुलाम' प्रसवणारें नको असून स्वातंत्र्याची, राष्ट्रीयत्वाची महत्वाकांक्षा उद्दीपित करणारें हवें आहे आणि ह्मणूनच वेळींच आमच्या प्राथमिक शिक्षणांत आमुलाग्र योग्य ते फेरफार न करणें आत्मघातकी ठरेल.

तरुण मुलांचें शिक्षण परकियांच्या ताब्यांत असणें, त्यावर परकी वर्चस्वाची घनदाट छाया पडणें, त्यांत परकीय संस्कृतीची भेसळ असणें, परकीय आचार विचारांचा व परकीय ध्येयांचा बरचष्मा असणें ह्मणजे समाजांतील राष्टीय भावनांचा नाश करणें होय. असल्या शिक्षणानें राष्टीय विकास तर दूरच राहो पण माणूसपणा तरी धड राहील कीं नाहीं याची शंकाच आहे. आमच्या मुलांचें शिक्षण आमच्याच हातांत असलें पाहिजे, आमच्या शिक्षणाची घडण हिंदी संस्कृतीनें घडणें जरूर आहे, शाळांतून मुलांनां शिकविण्यांत येणारीं पुस्तकें हिंदमातेच्या सुपुत्रांच्या चरित्रानींच मढविलेलीं असणें अगत्याचें आहे. हिंदी नकाशा, हिंदी इतिहास, हिंदी रीतिभाती, हिंदी आचार विचार अतएव हिंदी संस्कृतीनें ओतप्रत भरलेलें शिक्षण आह्मांला अत्योपयोगी आहे. इतकेंच केवळ नव्हे तर ह्या सर्व संस्थांचें चालकत्व हिंदी 'नावानें नव्हे तर संस्कृतीनें हिंदी" अशाच गुरूंच्या हातांत असणें अगत्याचें आहे परकीय संवयीं, परकीय रीतिभाती व परकीय संस्कृति या सर्वांचें संमिश्रित विष परकीय भाषेच्या नळींतून आमच्या तोंडांत कोंबलें जातें व परकीय नीतिमत्तेच्या मोरचुदाची पुडी खिरवून परकीय मोठेपणाच्या पोवाड्यांचा काढा अनुपानादाखल आमच्या घशांत ओतला जातो. अशा परिस्थितींत आमच्या राष्ट्रीय भावना नष्ट होऊन प्राप्त गुलामगिरींत जर आह्मीं सुख मानूं लागलों तर त्यांत नवल काय ?

आमच्या प्राथमिक शिक्षणांतच आमच्या राष्ट्रीय भावनांची अभिवृद्धि झाली पाहिजे. गोमांतकाला पोर्तुगीज राष्टाचा गुलाम बनावयाचा नसून समान हक्कदार वारस बनायाचें आहे. गोमांतकाला पोर्तुगालचें शेंबडें मूल बनावयाचें नसून तेजस्वी स्वरूपांत स्वतःची उन्नति करून घ्यावयाची आहे. त्याला दुसऱ्याच्या ध्येय सिद्धीसाठीं झिजायाचें नसून स्वतःचें ध्येय गांठायाचें आहे. गोमांतकाला परकीय संस्कृतींत वितळून जायाचें नसून स्वतःची उच संस्कृति पुन्हा संपादन करायाची आहे, त्याला नुसते प्रतिध्वनीं नको असून मोहक आणि मधुर आवाज काढायाचा आहे.परकीय राष्ट पुरुषाच्या गुणाचें अनुकरण करण्यास जरी तो तयार असला तरी त्याला त्यांचा गुणवर्णन कणारा भाट बनावयाचा नसून स्वतःचे राष्ट पुरुष निर्माण करायाचे आहेत. परकीय भाषा वाङ्मय, इतिहास, शास्त्र, कलाकौशल्य व्यापार या सर्वांची माहिती जरी त्याला अत्यावश्य असली तरी त्याला स्वत- परकीय राष्ट्रांत समरस व्हावयाचें नसून स्वतः परकी बनायाचें नाहीं. गोमांतकाला वेळ प्रसंगीं पोर्तुगालला मदत करण्यालायक स्वतंत्र गोमांतकच बनायाचें आहे व ज्या योगानें असला स्वाभिमानी, स्वावलंबी स्वतंत्र गोमांतक बनला जाईल असलेंच शिक्षण आज गोमांतक मागत आहे.

आमच्या शिक्षण संस्थांतून ज्या राष्ट पुरुषांचे गोडवे आज आमच्या विद्यार्थ्यांपुढें गाईले जातात, ज्या सत्पुरुषांना भजण्याविषयीं त्यांना अत्याग्रहपूर्वक उपदेशिलें जातें ज्या थोर व्यक्तींचें अनुकरण करण्यासाठीं त्यांपुढें कित्ते ठेवले जातात, ज्या संस्कृतीचे पोवाडे गाण्यास त्यांवर प्रसंगीं जुल्महि केला जातो ते सर्व आमचे कोण याचा विचार करणें आज आपणास क्रमप्राप्त आहे. ज्यानीं आमच्या स्वातंत्र्याचा नाश केला, ज्यानीं आमच्या धर्माची पायमल्ली करून आमच्या संस्कृतीचा नाश करण्यास सर्व शक्ति खर्च केली, आमच्या राष्टीयत्वाची होळी पेटवून ४०० वर्षे न समजणाऱ्या पारतंत्र्याच्या शृंखला आमच्या पायांत चढविल्या त्यांचेच भाट बनण्याचें शिक्षण आम्हाला दिले जावें आणि तें आम्हीं आनंदानें गृहण करावें हें आमच्या मृतावस्थेचें लक्षण नव्हे तर दुसरें काय ? आह्माला ज्यांचे भाट बनण्याचा हक्क आहे असे आमचे कोणीच महात्में नाहींत काय ? पितृभक्त श्री राम प्रभू–गीता प्रसारक श्री कृष्ण, धर्म प्रवर्तक राजाधर्म, सत्यवचनी हरिश्चंद्र, सत्वशील नळराजा, विदेही जनक, दानशूर कर्ण, सर्व जगाला बंधु प्रेम शिकविणारे भरत लक्ष्मण, कविसम्राट व्यास वाल्मिक, सर्व महाराष्टास पारतंत्र्याच्या खोल गर्तेंतून स्वपराक्रमानें वर काढणारे परम प्रतापी श्री छत्रपति शिवाजी महाराज, वीरमणी तानाजी, बाजी, बक्षीबहाद्दर जिवबा, संतशिरोमणी रामदास, तुकाराम, धर्ममार्तंड श्री मत् शंकराचार्य, मुत्सदी नाना फडणवीस, पतिव्रता सीता, द्रौपदी या सारखी हजारों स्त्री पुरुष रत्नें आमची हिंदमाता प्रसवली,ज्यांच्या गुणांचे भाट आज यचावत जिवानीं बनावें असे थोर महात्मे आह्माला आहेत, ज्यांच्या गुणसमुच्चयांतील एखादा गुणच आह्माला श्रेष्टपद देऊं शकेल. मग हें सर्व सोडून आमच्या समोर ह्या परकियांचे पोवाडे कां ? काय बरदर्शित नररत्नांस हिंदमाता विसरली कीं त्यांच्या अंगांत कांहीं गुणच नव्हते. उत्तम राज्य व्यवस्था असली ह्मणजे " रामराज्य " ह्मणण्याचा प्रघांत आहे तो काय प्रभू रामानां राज्यशकट हांकतां येत नव्हता ह्मणून ? गीतेचीं भाषांतर सर्व प्रमुख राष्ट्रानीं मोठ्या प्रयत्नानीं लाखो रुपये खर्चून करून घेतलीं तीं काय त्यांत कोल्हा कुत्र्याच्या गमतीच्या गोष्टी आहेत ह्मणून. दहा वीस राष्टानीं वर्षभर खपून केले. त्या तहनाम्याची किंमत एका रद्दी चिटोऱ्या इतकीहि नसते पण राजा हरिश्चंद्र आपण स्वप्नांत दिलेलें वचन पाळणारा = राजा = होता तो अनुकरणीय नव्हे ? मोंगलांच्या एका जहागिरदाराचा मुलगा जवळ पैसा, शस्त्र नसतांहि अशिक्षित मावळ्यांच्या साह्यानें मराठेशाही स्थापणारा निघाला तो नरवीर टाकाऊच काय ? नाना फडणवीस असे तों आपली डाळ पुण्यांत खपणें शक्य नाहीं ह्मणून इंग्लिश हात जोडून स्वस्थ बसले ते काय तो मुत्सद्दी नसून मूर्ख होता ह्मणून? सकाळीं लग्न तर दुपारीं काडीमोड व रात्री तिसऱ्याचाच स्वीकार करण्यास मोकळ्या राहणाऱ्या बायांचें चारित्र्य पतिव्रता सीता द्रौपदीला लाजवील काय ? असल्या ह्या सुचरित विभूतींनें अनुकरणीय शिक्षण सोडून आम्हीं परकीय संस्कृतींचें सुसंस्कृत बनूं पहाणें ह्मणजे विष पिऊन अमरत्वाची इच्छा धरणें नव्हे काय ?

आज आह्मांला जें प्राथमिक शिक्षण पाहिजे आहे तें सर्व तऱ्हेनें हिंदी संस्कृतीनेंयुक्त असेंच असणें अगत्याचें आहे. आमची भाषा, वाङ्मय, इतिहास, शास्त्र, नीति, कलाकौशल्य, व्यापार व आमच्या राष्टपुरुषांची चरित्रें या सर्वांचें ज्ञान ज्या शिक्षणानें मिळून आह्मांला आपलेपणा ओळखतां येईल तेंच शिक्षण, तेंच शिकवणारीं पुस्तकें व तेंच समजावून देणारे गुरुजी आह्मांला आमच्या प्राथमिक शिक्षणासाटीं जरूर आहेत. मोठेपणीं जगांतील इतर सर्व गोष्टी शिकण्यास आह्माला भरपूर फुरसत आहे व त्यावेळीं तें शिकूं नये असें ह्मणणें मूर्खपणाचें होईल

हिंदी संस्कृतीचे धडे देऊन आमचें स्वाभिमानशून्यत्व घालवून देणाऱ्या, आमच्या खऱ्या राष्ट्रीय भावना तयार करून स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित करणाऱ्या प्राथमिक शिक्षणाच्या शाळा गांवोगांव स्थापन झाल्याशिवाय आह्मी घसा पडेतों जरी 'व्हीवा रेपुब्लोक'चा शंखनाद केला तरी तो निरुपयोगीच ठरेल. असल्या शाळा स्थापन करण्यास आर्थिक मदत मिळविणें कसें सुलभ पडेल ह्या बद्दलचें विवेचन स्थलाभावास्तव पुढील खेपेवर ठेवणें क्रम प्राप्त आहे.

चळवळींची यशस्विता

(ले० २ रा.)

आपल्या देशांत सुरू असलेल्या चळवळींचें वास्तव स्वरूप काय आहे आणि कोणत्या लोक परिस्थितीमुळें तें आहे याचा विचार गेल्या लेखांकांत केला. अक्रिय वाचाळता, आपसांतील दुभाव, मत्सरीपणा इत्यादि दुर्गुणानीं समाजाची आंतरिक स्थिति नादानपणाची बनली असून, तो स्वातंत्र्याचें शिखर गांठण्याऐवजीं खालीं खालीं कसा घसरत आहे हें मागील प्रकरणावरून वाचकाचे ध्यानीं येईल. आजहि त्याच विषयीं पण जरा दुसऱ्या दृष्टीनें लिहावयाचें आहे. ह्मणजे 'चळवळ, या शब्दाचा हेतु विपर्यास आणखीं कोणत्या प्रकारानें होत असतो हें सांगावयाचें.

आपला समाज दिवसें दिवस इतका बहकलेला दिसतो कीं, जें केले पाहिजे तें एकीचकडे राहून भलत्याच प्रकारांचें थैमान समाजांत चालू आहे. आपलेपणाची पूर्ण जाणीव उत्पन्न होऊन प्रत्येक व्यक्तिमात्रात स्वाभिमान जागृत होणें हें पहिलें कार्य होय. मी कोण, करीत आहें तें काय, व मला केलें पाहिजे काय याचें ज्ञान साधारणपणें होणें जरूर आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं या बाबतींत अधिकाधिक औदासिन्यच दिसत आहे. स्वाभिमानशून्यता आणि परानुकरणलालसा हीं त्याचीं दोन दृश्यें होत.

आपले लोक सुधारले, त्यांच्यांत विशेष प्रकारची जागृति होऊं लागून त्यांचें पाऊल सर्व गोष्टींत पुढें पडत आहे, अशी पुष्कळांची समजूत झालेली दिसते. पण माझ्या

(पुरवणी पहा)

—आठवड्यांत एकदां प्रसिद्ध होणारें नागपूरचें 'रणसंग्राम' पत्र चालू महिन्याच्या २२ तारखेपासून दैनिक होणार आहे.

—सेलाद फोली व तिकिटा भरलेल्या १९ पेट्या पोर्तुगालहून पणजीला आल्या आहेत. पोस्टकार्डाची 'बात' नाहीं !

—मडगांवच्या ऑसपीसच्या नोकरशाहीची खच्ची करण्यांत येणार असल्याची बोलवा आहे.

—माकावच्या सरकारनें हद्दपार केलेले तेथील लिसेवचे प्रो. आनिबल दियस यांस बडतर्फ करण्यांत आलें.

Agora, como o homem de Magnier, o Director diz: *" Ja que existo devo trabalhar.* E ai tem o pais o rico trabalhinho !

E' SO' ASSIM

Afirma o sr. Sertorio Lobo, no seu interessante trabalho " O Comercio Portugues na India " que vem publicando no " Diario " que a India Ingleza importou de Portugal, vinhos da marca PORTO em 1920, 2 mil galoes: em 1921, 4 mil galoes, e em 1922, 2 mil galoes. Afirma tambem o sr. Lobo que, na importagao de vinhos generosos, com exclusao do Porto, Portugal concorreu com 1500 galoes em 1922. Nao nos diz o ilustre autor qual foi esta importagao em 1920--1921, dados estes que seria de alto valor conhecer.

E destes dados conclue o sr. Lobo que a procura dos vinhos portugueses na India Ingleza *vai aumentando consideravelmente de ano para ano.*

Nao nos parece ser isto assim mesmo diante dos numeros que o sr Lobo fornece, a nao ser que chegue a demonstrar que a importagao no trienio de 1920--1922 foi maior do que no trienio imediatamente anterior, ou, pelo menos, que nos mostre que a entrada de vinho de marca Porto de vinhos generosos portugueses no ano de 1922 foi superior a dos anos de 1920 e 1921. Teria havido em 1922 algum motivo de força maior a determinar a baixa na importagao ? Era bom que o inteligente autor procurasse saber. E" so' assim que a conclusao sera' legitima

FORTE COMO SEMPRE

Uma cassandra' disfarçada sob as letras J. V., anuncia no *Heraldo* o fim do nacionalismo indiano. Eis as palavras primarias do seu *dies irae*:

So" um espirito extremamente optimista como o de Mahatma' Ghandi se pode recusar a convencer-se de que todo o edificio do movimento nacionalista indiano ruiu ao sopro leve do Congresso de Ahamadabad; quatro longos anos de luta tenaz se frustraram em uma triste desilusao; o sonho de um *Dominion Self Government* se esvaiu nas espirais fumarentas de perenes discussoes e conferencias sobre programas e meios de se atingir o Swaraj.

E sabem os leitores do *Bharat* o que levou a nossa cassandra a soltar esse canto tam prolongadamente sentido? Foi o seguinte.

" As quatro resolugoes do Gandhi aparentemente propostas com o fim de restabelecer a sua posigao de dictador do congresso, foram rejeitadas.

Ora verifica-se disto de que o sr. J. V. *levantou* derrota do nacionalismo indiano num facto nao existente. Pois as propostas do Gandhi nao foram rejeitadas: antes pelo contrario foram aprovadas, mas com emendas e isto porque o Gandhi, apesar de contar com a maioria, procurou evitar dissidencias no congresso indiano. Ve, pois, que o Nacionalismo continua forte como sempre ?

भा र त

मि. आषाढ शु॰ ८ मी शके १८४६

शुभस्य शीघ्रम्.

निर्भेळ स्वराज्य अर्थात् पूर्ण स्वातंत्र्य हेंच आमच्या राजकीय चळवळीचें अंतीम ध्येय असून, या तेजस्वी ध्येयाचा किल्ला हस्तगत करण्यासाठीं शक्तिसर्वस्व वेचणें, हेंच गोमांतकांतील प्रत्येक देशाभिमानी नागरिकाचें पवित्रतम कर्तव्य होय. परंतु दुर्दैवाची गोष्ट कीं, या राजकीय मोक्ष साध्य करून देणाऱ्या कर्तव्याची जागृति जितक्या तीव्रतेनें आमच्या समाजांत पसरावयास पाहिजे होती, तितक्या तीव्रतेनें प्रसृत होत नाहीं !

हा अनिष्ट प्रकार चोहोंकडे बोकाळण्याचें मुख्य व एकच कारण ह्मटलें ह्मणजे परकी लोकांचें राजशासन हें होय. आज ४००।४२५ वर्षे गोमांतकांतल्या जनतेला पोर्तुगीज राजशासन संस्थेनें जें शिक्षण दिलें त्याचा सगळा हा नैसर्गिक परिणाम आहे. इतिहास, वाचन पुस्तकें, अर्थशास्त्र वगैरे हीं केवळ परदास्याच्या भावनेनेंच घडविलीं आहेत आणि त्यांतहि दुःखाची गोष्ट ही कीं, हें नामुष्कीचें काम पोर्तुगिजानीं गोमांतकीयांतीलच कांहीं स्वार्थपरायण व देशाभिमानशुन्य व्यक्तींकडून उरकून घेतलें आहे. इतक्या कालावधींत हें विष पिऊन पिऊन सुशिक्षणाचा तोरा मिरवणारा बहुतेक सगळा वर्ग जवळ जवळ शत्रुस्थानीं अधिष्ठित झाला असून, मायदेशाशीं निमकहराम होणें हाच आतां या वर्गाचा उदरंभरणाचा धंदा होऊन बसला आहे.

पोर्तुगीज राजशासन संस्थेनें हा जो शिक्षणैक विषवृक्ष लावून ठेवला आहे, त्याचीं पाळेंमुळें फार खोल गेलीं आहेत. हा विषवृक्ष उन्मळून पाडल्याशिवाय, राजकीय वातावरणांत दृश्यमान होणारे निराशेचे काळेकुट्ट ढग वितळणें अशक्य होय.

गोमांतकांतील पुष्कळ सुशिक्षितांच्या मनांत आपल्या देशाचें कल्याण व्हावें असें खरोखरच असेल व त्यासाठीं ते प्रयत्नहि करीत असतील; परंतु त्यांना यशाचा एक अणुसुद्धां प्राप्त झाला नाहीं, हें मात्र निर्विवाद होय. याचें कारण हेंच कीं, आपल्या ऐश्वर्याला व सुखसोयीला धक्का न लागतां स्वराज्यसुंदरीनें माळ घालावी, असें त्यांना वाटत असलें पाहिजे. व स्वार्थाचा वास त्यांच्या चळवळींत आहे ह्मणूनच या चळवळींचा उपयोग राजशासन संस्थेचीं हृदयें नरम होण्यांत न होतां, उलट ती अधिक बळकट होण्यात मात्र झाल्यास त्यांत नवल तें कोणतें ? पोटांतलें पाणीहि न हलवितां, आपल्या सुखसोयी यत्किंचितहि कमी न करतां आणि आपल्या स्वार्थपरायणतेला काडीचाहि धक्का न लावतां स्वराज्य मिळविण्याचा कोणीहि चंग बांधल्यास, परकी राजशासनसंस्थेच्या पोलादी भिंतीवर या मिजासखोराचें डोकें आपटून, तें रक्तबंबाळ मात्र होईल, हें उघड आहे.

गोमांतकीय तिजोरीच्या कुरणांत मनसोक्त चरण्यास सोकावलेले प्रोव्हींसकारासारखे कांहीं उपटसूंभ गोमांतक निर्भेळ स्वराज्याला अपात्र आहे असा टाहो फोडीत असतात; परंतु या त्यांच्या कोल्हेकुईंत कसा ' राम ' नाहीं, हें भारतानें सिद्ध केलेंच आहे. असें जरी असलें तरी प्रोव्हींसकार व त्यांचे इतर जातभाई स्वराज्य कल्पनेचें बीज निष्फळदायक होण्याप्रीत्यर्थ निदान गुप्तपणें तरी जिवापाड प्रयत्न करण्यास मागें पुढें पहाणार नाहींत.

स्वराज्य प्राप्तीच्या ध्येयाआड येणारें हें कंटकमय कुंपण नष्ट झाल्याखेरीज प्रस्तुत राजशासनाच मरण जवळ येणार नाहीं, यांत संशय नाहीं. ' तुह्मी पशुत्वाच्या सर्व भावना सोडून व मनुष्यत्वाचे स अधिकार मिळवून स्वतः स्वतंत्र व्हा ह्मणजे तुमचें राष्ट्र तुमच्या बरोबर सहजच स्वतंत्र होईल ' ही म॰ गांधीची असहकार योगाच्या संहितेंतली मुख्य ऋचा सतत दृष्टीसमोर ठेवून, तदनुसार आमच्या हातून शुद्धाचरणाचें कार्य घडून आल्यास, प्रोव्हींसकाराचेच नव्हे तर इतर राजमान्य राजेश्री महाशयांचेहि स्वराज्यघातकी प्रयत्न फोल ठरतील, हें निर्विवाद होय.

असो. स्वराज्याचे गोडवे गावे तितके थोडेच आहेत. परकी राजशासनेमुळें कष्टमय बनत चाललेलें जीवित दुःखविमुक्त होण्यास स्वराज्याची स्थापना हा एकच व सर्वमान्य उपाय आहे. हरेक खात्यांत माजलेली बेबंदशाही गतप्राण केवळ स्वराज्यस्थापनेनेंच होणार आहे. स्वराज्याशिवाय इतर उपाय नुसते ' धरमधके ' बसविणारे, आहेत, हें राजकीय मोक्षाच्या जिवंत तळमळीनें विव्हळणाऱ्या देशहितचिंतकानीं ध्यानांत धरावें, असा आमचा त्यांस प्रेमाचा सल्ला आहे.

तात्पर्य, स्वराज्याचे उत्तुंग गिरीशिखर चढण्यास कंबर कसून आह्मीं तयार असलें पाहिजे. पडेल ती त्रासपरंपरा सहज लीलेनें सहन करण्यास लागणारें मनोधैर्य आमच्यांत वृद्धि पावलें पाहिजे. ध्येयाची ध्वजा हस्तगत होईपर्यंत, नाउमेद न होता प्रयत्नाची गाडी खंबीरतेनें हांकिली पाहिजे. तरच गोमांतक राजकीय मोक्ष साध्य करूं शकेल व पूर्व वैभवानें विभुषित होऊन जगासमोर चमकूं लागेल.

—अंगोरा सरकारनें खिलाफतीचें समूळ उच्चाटन करून तिचा मागमूस बुडविण्याचा प्रयत्न चालविला आहे. अशा स्थितींत हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या तिचीं परत प्राण प्रतिष्ठा करण्याच्या विचाराला मूर्तस्वरूप कसें प्राप्त होईल हा एक प्रश्नच आहे.

श्रीगोमाता विजयते

गोमांतकांत गोरक्षणाबरोबर गोरक्षण ज्ञानप्रसारक संघाचीहि आवश्यकता आहे

सृष्टि नियमच असा आहे कीं, पहिल्यानें बीं, नंतर झाड व त्यानंतर फूल व फळ. ह्याला कांहीं अपवादहि आहेत. कांहीं झाडांच्या ढांग्या लावल्यानेंच त्यांचे वृक्ष होतात. पण त्यालाहि पालवी फुटे पर्यंत पाणी वगैरे घालावें लागतेंच. गोरक्षणाच्या बाबतींत आपल्या गोमांतकाची स्थिति वरील प्रमाणेंच आहे. येथें गोरक्षण संस्था स्थापन करण्यांत आली; परंतु ती अद्याप जीव धरून आहे कीं नाहीं हेंहि समजत नाहीं ! आपल्या शेजारच्या महाराष्ट्राकडे पाहिल्यास आज त्यांची मजल राष्ट्रीय सभेबरोबरच अखिल भारतीय गोपरिषद भरविण्यापर्यंत यावी व ज्या महाराष्ट्राची राजकीय बाब खेरीज करून गोमांतक हा एक घटकावयव, ज्या महाराष्ट्राच्या घंटारवानें अफाट हिंदुस्थानच्या कानठाळ्या बसतात, त्याच्याच शेजारीं अगदीं जवळ असलेल्या आपल्या प्रांतावर त्याचा कांहींच परिणाम होऊं नये ही मोठ्या दुःखाची गोष्ट नाहीं असें कोण ह्मणेल ? यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं. कारण, आपला पायाच चुकीचा असला पाहिजे. गोरक्षणाबद्दल आपल्या लोकांत अद्याप व्हावी तशी जागृतीच झालेली नाहीं. गोमांतकांत राजरोस होणारा गोवध प्रत्येकाला दिसतो व प्रत्येक हिंदूच्या अंगावर शहारेहि येतात. परंतु, फारादिवसांच्या सवईमुळें, व त्यांच्यांत जाणीव नसल्यामुळें त्यांना त्याबद्दल कांहीं वाटत नाहींसें झालें आहे. मांसहारी लोक हातांत सांगडी घेऊन जातांना आपण नाहीं कां पहात ? पण सवईमुळें आपणांस त्याचें कांहींच वाटत नाहीं ! तीच स्थिति गोवधाच्या बाबतींतहि दिसून येते ! प्रत्येक हिंदुमात्राला आपल्या धर्माचा पूर्ण अभिमान आहे. प्रत्येकाला माहीत आहे कीं, आपल्या धर्माचा आधारस्तंभ पूज्य गोमाता आहे. ह्मणूनच प्राचीन कालापासून तिला आमच्या धर्मांत अग्रस्थान दिलेलें आहे. व हल्लींहि आर्थिक दृष्टीनें तिचें महत्व प्रत्येकाला समजतें आहे पण ह्मण आहे ना ? समजतें पण उमजत नाहीं ! तीच स्थिति आमची ! सर्व समजतें पण प्रतिकार कसा करावा हें समजत नाहीं. आगीची ठिणगी कां असेना ? पण ती सर्वांत आहे. फक्त राख फुंकून बाजूला केली पाहिजे. पण करणारा पाहिजे ना ! तें काम सुशिक्षित पुढाऱ्यांचें आहे. पण तेहि ह्या विषयाकडे द्यावें तितकें लक्ष देत नाहींत! कोणत्याहि गोष्टीचा प्रतिकार करावयाचा किंवा तिला प्रतिबंध घालावयाचा ह्मणजे समाजांत एकी लागते. एकी आपोआप होत नाहीं. ती व्हावयाची ह्मणजे एकमेकांचे विचार परस्परानां समजले पाहिजेत. ते समजण्याचें साधन ह्मणजे हल्लींचे परिस्थितींत वर्तमानपत्रें होत. पण त्यांच्या कडूनहि व्हावा तसा प्रयत्न होत नाहीं, असें मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें. प्रयत्न अग-

जेटी मराठी शिक्षण संस्था

मार्मुगांव- हार्बर

सालाबादप्रमाणें यंदांहि वरील संस्थेमार्फत चालू असलेल्या शाळेंतील विद्यार्थ्यांची परीक्षा व बक्षीस समारंभ मोठ्या थाटानें पार पडला हें कळविण्यास अत्यानंद वाटतो. वरील समारंभ गेल्या डिसेंबर मध्यंच व्हावयाचा परंतु, येथें त्याच वेळी प्लेगोबाचें आगमन झाल्यामुळें तो येंन्याच उशीरां भर पावसाळ्यांत करावा लागला. त्यामुळें मुलांचें जवळ जवळ सहा महिन्याचें नुकसानच झालें असें ह्मणावयास हरकत नाहीं. त्याला अ म चा नाइलाज आहे. अस्तु.

परीक्षेकारितां मुद्दाम मडगांव येथील आमचे सन्मान्य मित्र श्रीयुत रा. रा. दत्तात्रय व्यंकटेश पै यांना बोलावण्यांत आलें होतें, परंतु कांहीं अपीरहार्य अडचणींमुळें त्यांचें येणें न झाल्यामुळें आयत्यावेळीं मडगांव येथील नवीन मराठी शाळेचे हेडमास्तर श्रीयुत रा. रा. निळकंठ विठ्ठल दळवी यानां विनंति करण्यांत आली. त्यानींहि आमच्या विनंतीचा प्रेमपूर्वक स्वीकार करुन ते ठरलेल्या वेळीं येथें हजर झाले याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

परीक्षेला सुरवात ता० ११ माहे जुलई रोजीं होऊन ता० १३ रोजीं सायंकाळीं बक्षीस समारंभ झाला. समारंभाकरितां संस्थेचे सर्व मेंबर, विद्यार्थ्यांचे पालक व येथील इतर सभ्य गृहस्थ यांसहि बोलावण्यांत आलें होतें.

नियोजित अध्यक्ष श्रीयुत रा. दत्ताराम विष्णु शेट कांदे हे येतांच मुलामुलींकडून सुस्वर पद्यांत पहिल्यानें ईशस्तवन व मग अध्यक्षांचें स्वागत करण्यांत आलें. नंतर शाळामास्तर श्रीयुत. रा. रा. शिवराम द. पई यांनीं स्वत: रचलेला ‘ स्वराज्याचें तोरण ’ या नांवांचा प्रयोग मुलांकडून करविण्यांत आला. तो अगदीं उत्कृष्ट वठला. प्रयोग लहानच पण परिणामकारक असल्यामुळें सर्व सभाजन तटस्थ राहून पहात होते. सर्व मुलांनीं आपापलीं कामें अत्युत्तम करून दाखविलीं. याबद्दल शाळामास्तर खरोखरच स्तुतीस पात्र आहेत. प्रयोग पूर्ण होतांच संस्थेचे सेक्रेटरी यांनीं योग्य शब्दात परीक्षकांचा सर्वांना परिचय करुन दिल्यावर त्यानीं परीक्षेचा निकाल वाचून दाखविला. शाळेंतील एकंदर विद्यार्थ्यांची नोंद ७२ असून परीक्षेला बसलेल्या मुलांची संख्या ५५ होती. त्यांतील ४८ विद्यार्थी उत्तम रीतीनें पास झाले. पास झालेल्या मुलांचें प्रमाण शेकडा ७६ पडत असल्यामुळें परीक्षकांनीं शाळेचे मास्तर यांचें अं:तकरण पूर्वक अभिनंदन करून पास झालेल्या विद्यार्थ्यांस दाखले दिले. नंतर अध्यक्ष यांनीं विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर असा कळकळीचा उपदेश करून पास झालेल्या विद्यार्थ्यांना स्वतः आपल्या खर्चानें बक्षिसें वाटलीं. नंतर वे. शा. सं. श्रीधर नारायण जोशी यानींहि मुलांस उपदेश करून आशीर्वाद दिल्या:नंतर परीक्षक यांचें समयास अनुसरून चटकदार व परिणामकारक असें भाषण झालें. पुन: गोभक्त गोविंद वि. बरवे यांनीं त्यानां गोरक्षणाबद्दल दोन शब्द बोलण्याची विनंति केल्यावरून त्यांच्या विद्वत्तेला साजेल असें त्यांचें भाषण झाल्यावर बर्वे यानींहि त्यांचे आभार मानून लहानसें भाषण केलें. नंतर इतर वक्त्यांचींहि भाषणें होऊन संस्थेच्या वतीनें शाळामास्तर यांनीं परीक्षक, अध्यक्ष व सभाजन यांचे आभार मानल्यानंतर मुलांमुलींस लाडू वाटण्यांत आले. अशा रीतीनें यंदाचा समारंभहि उत्कृष्ट रीतीनें पार पडला.

जेटी–मोर्मुगांव हार्बर, ता. १८–७–९२४

शांताराम काशीनाथ दणाईत
सेक्रेटरी
जेटी मराठी शिक्षण संस्था

Anuncios

O Bharat, ano 9°, n° 18
24 de Julho de 1924.

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do 2 oficio que este assina, correm editos de 30 dias, contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2° do art. 197 do Cod. do Proc. Civ. citando todos e quaisquer herdeiros de Baem Durbatcarina, de Calem, ora falecida, para na segunda audiencia posterior ao praso de editos, deduzirem querendo a sua habilitaçao, nos termos e para os fins do § 1° do art 691 do citado Codigo, visto que existem no referido cartorio algumas joias apreendidas no processo crime de corpo de delicto instaurado a' queixa digo queixa da dita Baem, pelo Digno Agente do Ministerio Publico nesta comarca, contra Xencora Vamona Patel da dita estando este arquivado. Declara-se que as audiencias deste se fazem em todas as terças e sextas-feiras as dez horas. no tribunal deste juizo situado em Xeldem, ao lado de estrada Nacional que de Quepem se dirige a Curchorem nao sendo feriados porque neste caso tem lugar nos dias imediatos quando os nao sejam tambem ou nao estejam compreendidos nas ferias Para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de Quepem, oito de Junho de 1924.

O Escrivao de Direito
Aires Manuel Barreto
Verifiquei. O Juiz de Direito
A A.. de Brito e Nascimento

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivao do 2° oficio, Barreto, vae ser vendido em hasta publica, a' porta do tribunal judicial desta comarca, situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a estaçao de Sanvordem, no dia 29 do corrente mez, as 10 horas, em terceira praça e por qualquer preço o seguinte predio. Direito a sexta parte do predio rustico denominado "Gauntona Velpanvaddo ou Gauntona Aforamento, sito em Sigao, da cultura de arroz, coqueros e outras arvores, discrito na conservatoria predial desta comarca sob o n° 9566 a fl 196 v. do Livro B 27 avaliado por 500 rupias. Penhorado nos autos civeis da execuçao por custas que o M. P. nesta comarca promove contra Baiu Naique por outro nome Baem conhecido tambem por Gopica' viuva de Bico NunomNaique deSigao e outros por apenso aos autos de inventario orfanologico aque se procedeu por obito do dito Bico' Nunom Naique. Sao por este citados todos os credores incertos dos ditos executados Baiu e outros e os co-proprietarios e quinhoeiros nos termos e para os fins da lei. A contribuiçao de registo por inteiro ficara' a cargo do arrematante.

E para ser publico se expediu este. Xeldem, 16 de Julho de 1924.

O Escrivao de Direito do 2° oficio.
Aires Manuel Barreto
Verfiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de direito da comarca de Quepem, e cartorio do escrivão do 1° oficio Redcar, vai a praça, para venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem, na estrada nacional que de Quepem se dirige a estação de Sanvordem no dia 8 do proximo mez de Agosto ás dez horas, pelo maior lanço que se oferecer acima de avaliação o predio denominado " GORBATA " da cultura de coqueiros e outras arvores tendo algumas casas de manducares sito na aldeia Cacorá, avaliado por 1:230 rupias discrito na conservatorio desta comarca sob o n° 1469 e penhorado nos autos civis de execução hipotecaria que João Baptista Gomes residente em Cusmane move a Bicú Venctexa Sinai Sunctancar, solteiro de Cacorá para pagamento do capital de 800 rupias, juros penas e custas da execução. O arrematante pagará a contribuição de registo por inteiro e as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaisquer credores incertos e coproprietarios. O que para ser publico se expediu este
Xeldem 11 de Julho de 1924.

O escrivão de Direito
Babu V. Camotim Redcar
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

BELA AGITACAO

Vai uma bela agitação na imprensa da capital acerca da escolha de um ritio accessivel e edificio apropriado para a instalação das Escolas primarias. Ha choque de opiniões; agitam se ideas; surgem pontos de vista novos, imprevistos.... enfim faz-se qualquer coisa de util e orientador para o publico e para o governo.

Estimamos que assim seja e que assim continue a ser em torno de todos os assuntos de interesse publico. Em vez de ocupar colunas e colunas de periodicos a descrever *corbeilhe* imaginarios e *chas elegantes* que os pedantes regularmente servem a' sua propria vaidade, entrando so'mente neles os convidados como figuras decorativas, —vale a pena que o jornalista concentre a sua atenção em tratar de assuntos que,se nao rendem favores, garantem a certeza de um dever cumprido. Apoiado, ilustres colegas!

MAS...

Em virtude de um aviso expedido pela Direcção de Fazenda consta-nos que estiveram na Capital muitos funcionarios de Moçambique para levantar o ordenado correspondente a um periodo de muitos meses que anda atrazado. Ate' aqui, nada de notavel. Mas consta-nos tambem que o sr. Director so' visava os titulos daqueles que la' aparecessem antes das 13 horas ,recambiando os que viessem mais tarde embora dentro das horas de serviço.

Assim por causa de um simples visto que se poem num triz, muitos pobres de Cristo vindo de longe tiveram que passar noite em Pangim curtindo incomodos e gastando dinheiro. Ao menos fosse dada sciencia da resolução do Director por meio de um anuncio ou edital! Nada disso. Que concepção tera' o sr. Plinio Tinoco daquilo que se chama conveniencia publica? Estara' ele na persuasao de que ela e' qualquer coisa que facilmente se esvai perante a conveniencia de s. excia?!

Se a nossa autonomia nao fosse uma autonomia de via reduzida, no's gostariamos ver como o sr. Plinio Tinoco se explicava. Mas...

O BHARAT

A edição portuguesa do nosso jornal que pensavamos publicar desde este mez fica reservada para quando recebermos papel especial e outro material necessario que requisitamos para Bombaim e que ainda nao chegou.

Nada se perde com a demora, cremos.

ERRATA

Na nossa edição de ultima semana no suelto *Rico trabalhinho* saiu por escapo de revisao: *agora como o homem de Magnier o Director diz:* quando o que devia ser e': agora, como o homem de Wagner, o director diz:

भारत

मि. आषाढ कृ० ३० शा शके १८४६

महात्मा गांधी व राष्ट्रीय सभा

जनीं भक्ति नाहीं मनीं भाव नाहीं
मला मुक्ति ना बुद्धि कांहींच नाहीं ।
कृपाळूपणें राज्य रंकासि यामें
समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें ॥

सतराव्या शतकांत स्वातंत्र्य संपादनार्थ दिसून येत असलेली जनतेंतील वेफिकिरी व विषयलोलुपता पाहून समर्थ रामदास स्वामीनीं दीनवाणीनें काढिलेले वरील उद्गार आणि गेल्या ऑल इंडिया कांग्रेस कमिटीच्या बैठकीच्या प्रसंगीं आपल्या अनुयायांचें मनोदौर्बल्य पाहून अश्रुपरिपूरीत नेत्रांनीं "माझा पराभव व फजती झाली" असे महात्मा गांधीनीं काढिलेले उद्गार यांत अनेक दृष्टीनीं एक प्रकारचें साम्य आहे. वास्तविक या बैठकींत मताधिक्य महात्माजींच्या बाजूचें होतें पण असल्या शाब्दिक मताधिक्यांत विजय मानून खूष होणारा तो महात्मा नव्हता. आपला कार्यक्रम बहुतेक प्रतिनिधींनां पसंत नाहीं व आपल्या बाजूनें मत देणारे लोक ढोंगीपणानें भरलेले व निव्वळ आपल्या मुरवतीखातर हात वर करणारे आहेत हें त्यांच्या लक्षांत आलें. व ह्मणूनच स्वराज्यध्येय संपादनासाठीं जरूर त्या स्वार्थत्यागाच्या ताजव्यांत तोलून पहातां आपलें वजन कमी भरलें असें मोकळेपणानें त्यानीं कबूल केलें व डोळयांत अश्रु आणून "मी पुढारी पणाची धुरा आतां खालीं ठेवतों" असे दुःखोद्गार काढले.

हरहर! ज्या महात्म्याची कीर्ति आज सान्या जगभर दुमदुमत आहे; ज्याच्या तत्वज्ञानासाठीं आज सारें जग तहानलेलें आहे; ज्याचें चरित्र लिहिण्यासाठीं रोमन रोलंड सारखे पाश्चात्य तत्वज्ञानीं आपल्या लेखण्या घेऊन पुढें सरसावले; ज्याची व ज्याच्या चरक्याची एका काळीं जगास कर्दनकाळसा भासणारा जर्मन काइसर देखील मोठ्या कौतुकपूर्वक चौकशी करीत आहे, त्या महात्म्याला आज स्वदेशांत अश्रु गाळण्याचे प्रसंग यावे हा दैवदुर्विलास नव्हे तर काय ?

पण यांतच महात्माजींचें सारें वैशिष्ट्य आहे. महात्माजींचा पराभव झाला व तो त्यांनीं स्वतः कबूल केला या एकाच गोष्टीनें स्वराजिस्टांना — विशेषतः महाराष्ट्रीय— पुत्रप्रासिइतका आनंद झाला आहे. मूर्खपणा दुसरें काय? हिमालयाच्या उत्तुंग शिखरापर्यंत कोणासहि जाऊन पोंहचतां येत नाहीं यांत त्या शिखराचा जो पराभव तोच महात्माजींचा झाला. 'बोलणें फोल झालें डोलणें वायां गेलें' असे उद्गार तुकाराम महाराजांसारख्या. महात्म्यांनींच काढावे आणि यांतच त्यांचें खरें वैशिष्ट्य आहे. इतर मंबाजीबावांना त्याचें काय?

महात्मा गांधींना जरी आपला पराभव झाला असें वाटलें तरी ते ह्मणजे आतां आपला कार्यक्रम पार बदलून कौंन्सिलनिवडणुकीसाठीं उमे रहाणार आहेत व लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्लींत अगर कौंन्सिल ऑफस्टेट मध्यें टक्कर मारण्याच्या हेतूनें एकादें पासपोर्ट अगर सोसायटी बिलासारखें लुटपुटीचें बिल आणून सरकारशीं सामना देण्याच्या विचारांत आहेत. अशातला भाग नाहीं. कौंन्सिलवाल्या स्वराजिष्टांना कौंन्सिलें लखलाभ होवोत. महात्माजींचा आपल्या विधायक कार्यक्रमावरील विश्वास अद्याप अढळ आहे व बहिष्कारपंचकावरील त्यांची श्रद्धा पूर्ववत आहे. राष्ट्राला त्यांचें असिधाराव्रत पाळतां आलें नाहीं तर त्याचें नशीब. स्वतः महात्माजींचा बाणा इतका आहे कीं, आपल्याला सहा अनुयायी मिळाले तरी पुरे. तेवढ्यावरच आपण लढाई मारणार. महात्माजींचा हा निश्चयी बाणा पाहिला ह्मणजे मुद्राराक्षसांतील चाणाक्याची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं. तुझे सगळे अनुयायी तुला सोडून गेले असें त्याला सांगतांच 'एका केवलमेव साधननिधि सेनाशतेभ्योऽधिका । नंदोन्मूलनदृष्टवीर्य महिमा बुद्धीस्तु मा गान्मम ।' असे वीर्यशाली उद्गार त्यानें काढले. महात्माजींची ही अनत्याचार असहकारबुद्धि जोंपर्यंत त्यांना सोडून गेली नाहीं तोंपर्यंत इतर शालुसोबती पुढाऱ्यांचें अगर अनुयायांचें पोतें रिकामें होवो वा भरो त्याची त्यानां काय पर्वा ? प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये । बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धि सा पार्थ सात्विकी । अशी स्थितप्रज्ञाची सात्विक बुद्धि महात्माजींच्या ठायीं असल्यामुळें असल्या सात्विक बुद्धीनें ठाम ठरविलेल्या असहकारितेच्या कार्यक्रमांत अणुरेणुमात्र बदल करावयाचा नाहीं असें त्यांना वाटल्यास नवल तें काय?

पण आतां महात्माजी आणि राष्ट्रीय सभा यांची भवितव्यता काय ? असा प्रश्न कोणाच्याहि डोळ्यापुढें उभा राहिल्यावांचून रहाणार नाहीं. पराभवानें कच न खातां महात्माजींनीं असें जाहीर केलें आहे कीं, बहिष्कारपंचकाचा ठराव आपण बेळगांवच्या कांग्रेसमध्यें पुनः मांडणार तोंपर्यंत आपल्या नाफेरवाल्या अनुयायांनीं खादीचा प्रसार करावा. प्रत्येक सभासदानें रोज अर्धा तास तरी सूत कांतून महिन्यास २००० यार्ड सूत खादी बोर्डाकडे पाठवावें. बेळगांव कांग्रेसमध्यें आपल्या कार्यक्रमास मान्यता मिळाली नाहीं तर आपण कांग्रेसमधून बाहेर पडून स्वतंत्र संस्थेमार्फत कार्य चालवूं असें महात्माजींचें ह्मणणें आहे व तें कोणासहि सर्वस्वी पटणारें आहे. विनाकारण हात वर करून मात्र आपल्याला मताधिक्य मिळविण्याचा प्रयत्न आपल्या अनुयायांनीं करूं नये अशी त्यांनीं स्पष्ट सूचना केली आहे व ती त्यांच्या निर्मळ अंतःकरणाची साक्ष होय.

स्वराजिस्टांचा यावर नेहमींचा अव्यवहार्यतेचा शिक्का आहे. या वादासंबंधानें नेहमींचेच ठराविक मुद्दे पुढें आणले जात आहेत. या संबंधाची चर्चा अनेक वेळां झाली असल्यामुळें त्याचें चर्वितचर्वण करण्यांत आतां कांहींच अर्थ नाही. या सर्व आक्षेपकांना महात्माजीनीं एकच उत्तर दिलें आहे आणि तें हें कीं "मला बुद्धिवानाची जरूरी नाहीं" कांग्रेसच्या कार्यकारी मंडळांत व्यापारी, कारागिर व शेतकरी यांचा भरणा व्हावा अशी त्यांची इच्छा आहे. बौद्धिक धंदे करणाऱ्यांनीं बाहेर राहून या नव्या मंडळीना साह्य करणें जरूर आहे. बुद्धीनें आतां दुय्यम दर्जा पत्करला पाहिजे. महात्माजांचें हें मत सकृद्दर्शनीं चमत्कारिक वाटेल पण त्यांतच स्वराज्यप्राप्तीची किल्ली आहे. स्वराज्य मिळाल्यावर तें चालविण्यासाठीं बुद्धिमानाची गरज लागेल. पण स्वराज्यप्राप्तीच्या झगड्यांत बुद्धिमान पंगु ठरून सामान्य लोकांच्याच भरतीचा जास्त उपयोग होतो. शिवाजीनें स्वराज्य कमाविलें. तें विजापूरच्या दरबारांत बसणाऱ्या खानदानीं सरदारांच्या अगर मुत्सद्यांच्या बलावर नसून लंगोट्या मावळ्या आणि हेटकऱ्यांच्या बलावर होय. माझिनीच्या सैन्यांतहि सामान्य लोकांचाच भरणा जास्त होता. स्वराज्यप्राप्ति धकाधकीचे मासले तात्विक वादविवादानें पार पडत नसतात. आज नुसत्या खादीनें अगर कौंसिलानें स्वराज्य प्राप्ति होणें निवळ अशक्य आहे. कायदेभंगानेंच स्वराज्य जवळ येईल. व हें साध्य करण्यासाठीं जरूर तें वातावरण उत्पन्न करण्याच्या हेतूनें महात्माजी हिंदु—मुसलमान ऐक्य, खादी आणि अस्पृश्यता या तीन कार्यक्रमावर आता भर देणार आहेत.

पुष्कळांच्या मतें येत्या कॉंग्रेसमध्यें महात्माजींचा पराभव होऊन त्यांना कॉंग्रेस सोडून जाणें भाग पडेल. स्वतः महात्माजींना या संबंधानें मुळींच फिकीर वाटत नाहीं व आम्हाला तर असें होईल तर फार आनंद वाटेल. महात्मा गांधींनीं आपलें असहकारितेचें शस्त्र हिंदी जनतेपुढें ठेवल्यापासून तोंडपाटिलकी करणाऱ्या सुखांगी पुढाऱ्यांच्या जीवाची धांदल उडून गेली. हें असिधाराव्रत असून ते बुद्धिमानासाठीं नसून तीस कोट सामान्य प्रजेसाठीं आहे. सरकारी संस्थांत अडकून रहाणाऱ्या या बुद्धिमानाची संख्या फार तर हजारांनीं भरेल पण इतर कोट्यावधि जनतेनें कोणता मार्ग अनुसरावा? या सर्वांना असहकारितेचें व्रत चालविणें शक्य आहे आणि यांच्यावरच महात्माजींची खरी मदार अहे. बुद्धि आणि श्रद्धा यांच्यामधील हा झगडा आहे. कांग्रेसमधील अधिकाऱ्यांच्या जागाठीं भांडत न रहातां कांग्रेसबाहेर पडून खेड्या-

तलेल्या या आप्पा शास्त्री साठे वैद्य, मुंबई यांच्या संपादकत्वाखालीं आज ११ वर्षे पासून नियमित रीतीनें प्रसिद्ध होत असलेल्या मासिकाची आह्मांस आरोग्यदायक भेट होऊं लागल्यास आज बरेच महिने लोटले. दरम्यान त्याच्या उपयुक्ततेची जाणीव करून घेण्यास आह्मांस बराच अवसर मिळाला. आमच्या संग्रहीं असलेल्या अंकांच्या एकंदर धोरणावरून प्रस्तुत मासिक, आर्यवैद्यकाची थोरवी प्रस्थापित करण्यासाठीं व्यवहाररीत्या अविश्रांत परिश्रम करीत आहे, असेंच आमचें मत बनलें. वैद्य लोकानीं तर आयुष्य आरोग्यमय करण्यास मदत करणाऱ्या 'आयुर्वेद' मासिकाचे वर्गणीदार होऊन आपल्या ज्ञानांत व धनांत भर घालण्याची संधि व्यर्थ दवडूं नये, अशी आमची शिफारस आहे. व. १ रु. १० आणे.

स्वदेशः— पुणें येथें प्रकाशित होत असलेल्या या साप्ताहिकाचे संपादक मराठी वाचकांस परिचित असलेले श्री. र. शिंनिवकर हे असून, त्यांतील लेख निर्भिड, स्वातंत्र्योत्तेजक व स्वदेशाभिमानाची भावना उद्दीपित करणारे असेच असतात. प्रत्येक अंकासोबत कोणा ना कोणा देशभक्ताचा फोटो वाटण्यांत येत असतो, हा या पत्राचा विशेष आहे. वा. व. ३ रु. १३ आणे.

वर्तमानसार

—पणजीच्या पाठशाळेचे नवीन अध्यापक देंतींज्यु झुनियर हे येत्या महिन्यांत गोव्यांत पोंचतील.

—म्हापशेंच्या मुनिसिपालटीनें मासळीची विक्री तोलून व्हावी अशा अर्थाचा ठराव पास केला असून तो येत्या आगष्ट पासून अमलांत येणार आहे. अशाच तऱ्हेचा ठराव पणजी मुनिसिपालटीनेंहि 'फिरून' चालविण्याचा 'यत्न' केला आहे.

—कुंभारजुवेच्या नदीवर पूल बांधण्यासाटीं २५०००० रुपये निराळे काढून ठेवण्यांत आले आहेत, असें निमसरकाररीत्या जाहीर झालें आहे.

—जपान व अमेरिका यांच्यांत हल्लीं बरीच धुसफूस चालली असून सर्व जगाचे विशेषतः आशियाटिकाचे डोळे त्या धुसफुसीकडे लागून आहेत. धुसफुसीचें कारण सर्व आशियाटिकां बरोबर जपान्यांनाहि अमेरिकेंत कायमचीं घरेंदारें करून रहाण्यास बंदी करण्यांत आली हें होय 'वसुधैव कुटुंबकं' या तत्वाचे गोडवे गाणाऱ्या अमेरिकेचें उपरिनिर्दिष्ट आचरण निंद्य नव्हे काय ?

—डिचोली येथील यंदांचा सप्ताहोत्सव मोठ्या थाटानें पार पडला. उत्सवांत म. गांधीच्या फोटोची मिरवणूक काढण्यांत आली होती. लोकांची तर उत्साहाला गर्दी उसळली होती असें तेथील एक उत्साही नागरिक कळवितात.

—सांखळीचे पंढरी कामत व असोळडेंचे विनायक शेळडेंकर हे उभयतांहि लिसेव मुनिसिपालच्या शिक्षकांच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले. या दोघां तरुणापैकीं पहिल्याची नेमणूक मडगांवच्या लिसेवांत होईल असें वाटतें.

—आमचे प्रांतबंधु भालचंद्र शेणवी शिरवईकर यांनीं लिजबोअ युनिव्हर्सिटीचीं चार वर्षे पुरीं केलीं असून आणखीं एका वर्षानें ते बॅरिस्टरचा कोर्स संपवितील.

—येत्या आक्टोबर महिन्यापासून म्हापसें येथें 'बार्देस' या नांवाच्या पोर्तुगीज पत्राचा पुनर्जन्म होणार असल्याची बातमी त्रिवून पत्रानें दिली आहे.

—शांबा सखाराम शेणवी पिसुर्लेकर यांस शेतकी पतपेढयांचा मुख्य कारकून [guarda-livros) नेमण्यांत आलें आहे. ही नेमणूक करारवजा आहे.

—पणजीच्या कस्टमखात्यांत येत्या आगस्ट महिन्याच्या १८, १९ व २० तारखांस अनेक बिनमालकी वस्तूंचा लिलांव पुकारला जाणार आहे.

—मुंबईच्या नवीन कोंसूलसाहेबांना येथील माजी जज्ज मानुयेल क्वाद्रुस (हल्लीं दमणचे जज्ज) यानीं एक टीपार्टी दिली.

—मासळी तोलून विकण्याच्या नवीन पद्धती बद्दल नापसंती दर्शविण्यासाठीं मासळी विकणारे लोक संप पुकारणार आहेत, अशी दाट वदंता आहे.

—सांवर्डेचे आव्हेलीन नेरोना यांच्या कारखान्यांत तयार होणारे पाव निर्दोष असल्याची खात्री – सुब्राय वि. प्रभू देसाई यानी त्यांस दिलेल्या सर्टिफिकेटावरून – पटून येते.

—मडगांवच्या दैवज्ञ समाजांत सोन्यारुप्याचे स्वतंत्र दागिने विकणाऱ्या त्यांच्याच ज्ञातिबांधवांच्या दुकानांविरुद्ध काहूर माजून राहिलें आहे !

—पणजीच्या पाठशाळेसाठीं नवीन इमारत उभारण्यांत येईल. या कार्याप्रीत्यर्थ ० हजार रुपये खर्च केले जातील.

—गोवा मुल्कीखात्याचे माजी डायरेक्टर आल्फ्रेद रुद्रीगीस यानां बडतर्फ करण्यांत येईल अशी पोर्तुगालची बातमी आहे.

—म्हापसेंच्या पाठशाळेंत कलाकौशल्य व गायन यांचें शिक्षण देण्याचा नवीन उपक्रम केला असून तो स्तुत्य आहे.

—पोर्तुगालचें पुष्कळसें रुपें पार्लमेंटची मंजुरी नसतानां इंग्लंडमध्यें पोंचतें केल्याबद्दल तेथील प्रधान मंडळाविरुद्ध वर्तमानपत्रांतून जोराची टीका होत आहे.

—डॉ. टागोर हे चीन वगैरे देशांमध्यें हिंडून हिंदुस्थानात परत आले.

—दे. चित्तरंजन दास हे लवकरच विलायतला जाणार असल्याची वदंता आहे.

—म. गांधींनीं बेळगांव येथील यंदांच्या कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा स्वीकार करण्याबद्दल आपली नापसंती व्यक्त केली आहे. व त्यानीं सदर जागेबद्दल देवी सरोजिनी नायडू व डॉ. अनसारी यांचीं नावें सुचविलीं आहेत.

आजहि पुरवणी कां नाहीं ?

भारत-संपादकाच्या आजारामुळें गेल्या अंकाची पुरवणी प्रसिद्ध झाली नाहीं. तसेंच ते अजूनहि साफ तापमुक्त न झाल्यानें याहि अंकाची पुरवणी छापण्याचें काम तहकूब ठेवावें लागलें. याबद्दल आमचे आश्रयदाते भारतावर रागावणार नाहींत, अशी आशा आहे.

मनेजर भारत

ANUNCIOS

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivao do 2° oficio que este assina, correm editos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos do § 2° do art. 197 do Codigo do Processo Civil, citando a Suzagi Esvonta Sinai Odarcar marido da Parvoti Sinainim de Oddar e ora ausente em parte incerta de Bombaim para assistir a todos os termos ate final do inveutario orfanologico a que se procede p r obito de Anandibai Odorcar qne foi de Oddar, sendo inventarianta e cabeça de casal Utoma Pandurongs Sinai Odorcar da mesma, deduzir, querendo, nele os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento

E p ra ser publico se expediu este Xeldem, 3. de Julho de 1924

O Escrivao de Direito do 2° oficio
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de direito da comarca de Quepem, e cartorio do escrivão do 1° oficio Redcar, vai a praça, para venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem, na estrada nacional que de Quepem se dirige á estação de Sanvordem no dia 8 do proximo mez de Agosto ás dez horas, pelo maior lanço que se oferecer acima de avaliação o predio denominado " GORBATA " da cultura de coqueiros e outras arvores tendo algumas casas de manducares sito na aldeia Cacorá, avaliado por 1:230 rupias, discrito na conservatorio desta comarca sob o n° 1469 e penhorado nos autos civis de execução hipotecaria que João Baptista Gomes residente em Cusmane move a Bicú Venctexa Sinai Sunctancar, solteiro de Cacorá para pagamento do capital de 800 rupias, juros penas e custas da execução. O arrematante pagará a contribuição de registo por inteiro e as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaisquer credores incertos e coproprietarios. O que para ser publico se expediu este Xeldem 11 de Julho de 1924.

O escrivão de Direito
Babu V. Camotim Redcar
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

que e', hao de concordar, coisa bem diferente da India. Quanto aos restantes, eles sao personalidades e de distaque, sabemos no's. Sao alem disso pessoas dignas e serias e sobretudo coerentes. E mal lhes iria aceitar a gloria de representar uma terra que, apezar de ser sua terra natal, nunca lhes mereceu interesse.

O *Bharat* concorda que a India tal vez pudesse ser milhor representada, em parte pelo menos Mas as tais *personalidades*...virgula. Lamentos pela sorte do tesouro da India? Perdao, sr. Spinola. Se tem paciencia e amor a esta terra, que e' sua e nossa, em pregue a sua inteligencia e actividade e consiga reduzir a's justas proporgoes os ordenados dos chefes de servigo da India, desta pobre India, que ganham mais do que os ministros no Japao.

MAIS ALTO!

Na Loja *Orion*, de Poona houve uma reuniao de magons, seguida de um banquete a que presidiu o Governador de Bombaim, Sir Leslie Willson revestido de insignias de Grao Mestre. A *Provincia* que faz *chic* em alardear a sua *mogonaria*, da' a noticia da reuniao com um grande luxo de abreviaturas e reticencias, alias escusadas e termina por enviar as suas *afectuosas saudagoes*..."a todos os Oobr ... da Loja...*Orion*."

Mais alto, mais alto, querida *Provincia*. *Orion* fica em Poona, das colossais Gattes e e' preciso que a sua fraca voz, embora sincera, la' chegue

A INCOERENCIA!

Niranjan Pal e' um mogo bengal estudante de medicina em Londres. Ha dois anos, o joven Pal escreveu uma pega teatral sobre um motivo indiano denominada "The Goddess" que mereceu a distincgao de ser representada num teatro da metropole inglesa. Agora o Pal foi alem:—escreveu uma come'dia em ingles' sobre homens e mulheres inglezes. A comedia intitula-se "The Magic Crystal" e que foi acolhida com entusiasmo pelo primeiro director de teatro a quem foi apresentada em Londres, facto este que, na opiniao de um jornalista inglez, representa em si um titulo de honra para quem quer, quanto mais a um indio com pouco mais de 3 anos de contacto com a vida ingleza.

A Inglaterra ja' tinha um musico indiano. Agora conta no activo de seus valores um escritor teatral. Quanto mais tera' a India a dar ao Ocidente mesmo no mundo de arte?

E os indios que tem homens aos centos a auxiliar a Europa na sua marcha civilisadora...a sofrer a tutela do extrangeiro na sua propria casa! A incoerencia!

E' INEVITAVEL

E' quasi averiguado que de um dia para outro chega a India uma determinagao superior da Metropole fixando o valor oficial da rupia em 400 reis.

Embora esta medida nao resolva convenientemente a situagao financeira desta colonia terrivelmente agravada pela lei de equiparagao, ja representa ela um alivio, um piqueno folego da crise em que se vive. O remedio s' vira' quando os estadistas portuguezes tomando verdadeiramente o pulso a's condigoes do nosso tesouro, reduzirem pelo menos de 50 % os ordenados dos chefes dos servigos que, ao presente ganham, gragas ao disparate de equiparagao, tanto ou mais do que os chefes de servigos no grande Imperio de Japao! O remedio tambem vira' quando acabarem com os actuais vencimentos e gratificagoes dos outros funcionarios de nomeagao ministerial, fixando-lhes um ordenado justo e razoavel. So' assim. Alias a bancarrota ...e' inevitavel.

QUAL A SOLUCAO?

Na magistral conferencia que o sr. Menezes Braganga fez na Liga Pro Colonias em Lisboa, refere se o ilustre conferente, tratando do Caminho de Ferro de Mormugao, a' enormidade de encargos que essa linha representa, e acrescenta:

"Diz se agora que a titulo de compressao de despezas se quer encabegar o pesado encargo da garantia de juro no orgamento da India. Ora a India, se querem que viva, precisa de resolver alguns importantes problemas que interessam o seu fomento economico. Doutro lado requere um periodo de repouso para se refazer do esforgo financeiro que lhe impos um orgamento deficitario.

"Atirar lhe por sobre os ombros" a carga de juro do caminho de ferro, e' esmaga la. E' o mesmo que deixar cair a lousa sobre o seu tumulo para nunca mais a India se erguer do sono das coisas mortas,,.

E' a pura verdade o que o sr. Menezes Braganga preve'. O encargo de juro do Caminho de Ferro e' tremendo tanto que as nossas possibilidades financeiras e economicas estao bem longe de o aguentar mesmo depois de tal *periodo de repouso* que s. exia parece preconisar. Ha um meio a tentar qual e' o desenvolvimento do porto de Mormugao. Antes de langar mao deste recurso no's temos, porem, de contar com dois adversarios temiveis pela frente:— a "morosidade confrangedora da administragao portugueza e a ma vontade invencivel da administragao ingleza na outra India.

Qual a solugao, pois?

ERRATA

No suelto *Mas*... da nossa ultima edigao em vez de "levantar o ordenado correspondente a um periodo de muitos mezes que anda atrazado,, lei a-se "levantar o ordenado correspondente a um mes de muitos que anda atrazado,,.

Alem deste escapo de revisao, ha, como sempre, muitos outros de facil emenda.

भारत

मि. श्रावण शु॰ ७ मी शके १८४६

आसरा धरा !

सर टामस मनरो यानें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, "कोणत्याहि राष्ट्राच्या स्वाभिमानविषयक भावनांचा नाश होतो, तो राष्ट्रांतील एकमुखी सत्ताधाऱ्यांच्या जुलुमी सत्तेपासून होत नसून परकीय सत्तेखालच्या गुलामगिरीमुळें होत असतो. राष्ट्रीय अथवा आपलेपणाची अशी कोणतीहि विशिष्ट भावना एकाद्या राष्ट्राजवळ उरली नाहीं, ह्मणजे वैयक्तिक अथवा सार्वजनिकरीत्या स्तुत्य अशा कोणत्याहि गुणाचा परिपोष तेथें होत नाहीं. कारण आपलेपणाची भावना हीं राष्ट्रीय सद्गुणाची खाण आहे. हीच मूळ भावना नष्ट झाली, ह्मणजे विशिष्ट राष्ट्रीयत्वहि नाहींसें होऊन त्या बरोबर व्यक्तींचेंहि विशिष्टत्व लोपतें."

सर टामस मनरो यांची वरील विचार सरणी गोमांतकाला हुबेहुब व अक्षरश: कशी लागू पडते, हें, गोमांतकाचा इतिहास ज्यांना ऐकूनसुद्धां माहीत आहे, त्यानां विशेष विशद करून सांगण्याचें कारण नाहीं. एकमुखी सत्तेचें बोजड जूं गोमांतकाच्या मानेवर बराच काळ लटकत होतें. एकमुखी सत्तेचा नंगा नाच बराच काळ येथें एक सारखा चालू होता. इतकेंच नव्हे, तर त्या राक्षसीच्या सैतानी लीलांनीं जनतेला त्रस्त करून सोडलें होतें, हें इतिहास सिद्ध आहे.

परंतु या एकमुखी सत्तेची जागा परकीय सत्तेनें बळकावतांच, जी घोर आपत्ति एकमुखी सत्ता आह्मावर कोसळवूं धजली नाहीं, तीच दुष्ट आपत्ति परसत्ता गोमांतकावर आपला करडा अंमल गाजवूं शकली; व मनरोच्या सिद्धांताप्रमाणें त्या परकीय सत्तेखालच्या गुलामगिरीमुळें, राष्ट्रीय अशी कोणतीहि विशिष्ट भावना गोमांतकाजवळ उरली नाहीं, असा पावलो पावलीं प्रत्यय येत असून अंत:करण दु:खानें व्यग्र होतें.

आजपर्यंत गोमांतकावर आमच्या सत्ताधाऱ्यांचे खंडोगणती अत्याचार घडले असतील अनेक राज्यकर्त्यांनी अनेक कुमार्गांनीं आह्मांस छळिलें असेल; 'नको हें जीवित व नको हा संसार' अशा तऱ्हेचे दु:खोद्गार काढण्याचे कितीतरी कठीण प्रसंग गतस्वराज्याच्या एकमुखी व अनियंत्रित सत्तेनें गोमांतकावर ओढविले असतील; पण ज्या या दुर्धर स्थितीला आमचें राष्ट्रीयत्व नष्ट करण्याची छातीच झाली नाहीं, तीच अवघ्या ४०० वर्षांच्या परकीय सत्तेला झाली, यावरून परकीय सत्तेचें विष किती जलाल आहे, याची खात्री कोणासहि सहज पटेल, यांत संशय नाहीं.

गोमांतकाला जडलेला हा रोग फार भयंकर आहे. या रोगाच्या मुळावरच कुऱ्हाड घालणारा कोणी महात्मा अवतरल्याखेरीज, आह्मांला राजकीय सौख्याचे दिवस लाभणें अशक्य होय. केवळ बाह्योपचार करून तात्पुरता थंडावा आणणाऱ्या भिषग्वर्यांच्या उपचारानें आतां काम भागण्यासारखें नसून शस्त्रवैद्यांच्या तीक्ष्ण शस्त्राचा अवलंब

कुशल व धैर्यवान आश्विनीकुमारच निपजला पाहिजे. जितक्या लवकर व यशस्वी रीतीनें हा शस्त्रप्रयोग होईल, तितक्या लवकर व यशस्वी रीतीनें आमच्यांत स्वाभिमान, पौरुष आणि स्वावलंबन या गुणत्रयीचा पुनर्जन्म होणार आहे, हें उघड आहे.

एकदां का ही गुणत्रयी आमच्या अंत:करणांत उदय पावूं लागली- त्याचक्षणीं स्वराज्यप्राप्तीचा मार्ग धिमेपणानें चोखाळण्याची पात्रता आमच्यांत सहजच उद्भुत होणार आहे- वाटेल त्या आपत्ति भोगण्याची आणि प्रसंगीं सर्वस्वावर पाणी सोडण्याची आमची तयारी तेव्हांच होणार आहे.

सारांश, परकीय सत्तेची भूतबाधा टाळण्यास उपरोक्त गुणत्रयीचें साधन प्राप्त करून घेतलें पाहिजे व या प्राप्तीसाठीं आह्मीं गोमांतकावर खरेखुरें प्रेम केलें पाहिजे. या खऱ्या व नि:स्सीम प्रेमाच्या पायावरच स्वराज्याची टोलेजंग इमारत उभारलेली असते, हें विसरतां कामा नये.

स्वराज्य ! ज्या व्यक्तीच्या अंत:करणांत स्वाभिमानाचा एकादा तरी किरण शिल्लक राहिला आहे, त्या व्यक्तीला स्वराज्याच्या विचाराच्या नुसत्या वाऱ्यानेंहि एकदम भरून येईल ! स्वराज्य हा शब्द चित्तांत उभा रहाण्याबरोबर ज्याचें हृदय भरून वहात नाहीं, असा मायेचा पूत कोणी असेल का ? स्वराज्य प्राप्तीसाठीं गतकालीं लोकांनी न भोगलेलें असें दु:ख कोणतें आहे ? स्वप्नसृष्टींतील दृश्य मूर्त स्वरूपांत उतरविण्यासाठीं त्यांनीं सहन केले नाहींत, असे हाल तरी कोणते ?

परकीय सत्ता आतां पुरे झाली. तिचे गोडवे गावून गावून आमचे घसे कोरडे पडण्याच्या बेतांत आले. आतां गतवैभव प्राप्त करून घेण्याच्या मार्गाला लागल्याखेरीज अन्य तरणोपाय नाहीं. ह्मणुन गोमांतकीय तरुणानो, आपल्या कंबरा कसा व परमेश्वरावर अढळ निष्ठा ठेऊन सनदशीर मार्गानें स्वराज्याचा किल्ला गांठण्यास स्वाभिमान, पौरुष व स्वावलंबन या गुणत्रयींचा आसरा धरा

—पेद्रोजु दा लिम या जनरलांची नेमणूक येथील गव्हर्नरचे जागीं होण्याचा संभव आहे.

—कायतान द आमोरीं यांची ओब्रस पुब्लिकस् खात्याच्या दिरेक्तोराच्य जागीं फिरून नेमणूक होईल, असें दिसतें.

—'गाजेत दास कोलोनियस' व 'रव्हीस्त पोर्तुगेज दार्के व दालें मार अशीं दोन मासिकें लिस्बोअ येथें प्रसिद्ध व्हावयास लागलीं आहेत.

भारत

munhas muito conhecidas.

Nao se sabe bem se se trata dum interesse particular ou publico e por isso mantemos sobre o assunto a necessaria reserva.

PARA MATUTAR...

O aumento de impostos e' a consequencia forçada do crescimento de encargos, creados pela metropole, encargos de que culpado nao e' o governo provincial — diz-se.

Pergunta-se porem:—

¿Nao devia o governador da Provincia representar perante os seus superiores hierarquicos o verdadeiro *estado* do bancarrotado tesouro do Estado e conseguir o afrouxamento da furia criadora dos mesmos encargos?

Nao se diga que aquilo importaria *revolta*; nao; porquanto tem se visto o governo local empregar, varias vezes, a sua influencia para revogar disposiçaes ministeriais, como se presenciou, ainda a pouco, tratrando-se do jogo dos decretos, referente ao CASO DR. QUADROS.

E, se o governador, depois de suas justas consideraçoes, nao fosse atendido, dimitir se hia para nao ligar o seu nome ao tao detestavel aumento.

Mas "nem tudo o que luz e' ouro" ...que nem sempre pode ser desprezado, sobretudo, quando a rupia equivalha em cambio a 9$400 reis.

E, depois, a vida e' de dois dias...

पत्रव्यवहार

रा. रा. भारत कर्ते यांस

वि. खालील आशयाचें पत्र आजरोजीं "हिंदु" पत्राच्या संपादकांस पाठविलें आहे त्याचि पत्रांत प्रसिद्ध होणें अगत्याचें असल्यानें तशी विनंति आपल्यापाशीं करीत आहे. कळावें हे विनंती.

व्यंकटेश वि. राव सरदेसाई

रा. रा. संपादक 'हिंदु' यांस

वि. वि. आपल्या पत्राच्या ता. ३ मिनहूच्या अंकांत करवाढीसंबंधाच्या कौंसिलच्या बैठकीस मी कां गैरहजर राहिलों या बद्दलच्या माझ्या "आत्मसमर्थना"वर आपण टीका केली आहे. ती संबंधी माझें म्हणणें मी थोडक्यांत कळवतों.

१ माझ्यावर होणाऱ्या 'टीकेचा भडिमार टाळण्याच्या उद्देशानें' मी 'भारत' पत्रातून खुलासा केला असें आपलें म्हणणें आहे. वास्तविक प्रकार तसा नाहीं. मी 'बुद्धिपुरस्सर' गैरहजर राहिलों हा जो गैरसमज, तो दूर करून 'खरा प्रकार काय तो कळवावा, येवढाच माझा उद्देश होता व तो मी माझ्या पत्रांत दिलेला आहे. गैरहजर राहण्यांत माझा उद्देश अमुकच आहे ही जी आपली स्वतःची कल्पना, तिची जबाबदारी माझ्यावर नाहीं.

२ माझी गैरहजिरी असमर्थनीय ठरवण्याकरतां आपण मला असे प्रश्न केले आहेतः—

"प्रागतिक संघाचें कार्य आपणास कौंसिल मार्फतच साध्य करून घ्यावयाचें आहे हें आपणास माहित नाहीं काय ? आणि जर असें असलें 'तर' प्रागतिक संघाच्या कार्यापेक्षां कौंसिलांतील कार्य अधिक महत्वाचें ठरत नाहीं काय? 'तर मग' अधिक महत्वाचें कार्य सोडून कमी महत्वाचें कार्य अंगिकारण्यांत कोणता शहाणपणा रहातो ?"

पण तसें मुळींच नाहीं. प्रागतिक संघाचें कार्य कायदें त्याच्या घटनेंत नमूद केलें आहे. व त्यांत कौंसिलाचा उल्लेख मुळींच नाहीं. आणि माझ्या समजुतीप्रमाणें त्या कार्याचा संबंध सरकारपेक्षां लोकांशींच अधिक पोंहचतो. प्रागतिक संघाच्या कार्यापेक्षां कौंसिलांतील कार्य अधिक महत्वाचें नव्हे. संघाचें कार्य कायमच्या स्वरूपाचें व कौंसिलांतील कार्य दोन दिवसाचें. प्रा. संघाच्या कार्याविषयीं स्वतः अज्ञान प्रगट करून त्याचा दोष दुसऱ्यावर लादणें यांत कोणता शहाणपणा राहतो ?

३ आपला पुढील प्रश्न असा आहेः— 'पण ते (मी) हजर असते तर गव्हर्नर साहेबांना आपल्या जादा मताचा उपयोग करावा लागून जकात वाढीची जबाबदारी जी एकट्या त्यांच्यावर पडली असती ती मात्र त्यांनीं (मी) गैरहजर राहून विनाकारण आपल्यावर ओढून घेतल्या सारखी झाली हें खोटें काय ?

अलबत खोटें. मी हजर असतों तरी जकात वाढीची जबाबदारी एकट्या गव्हर्नर साहेबांवर पडली नसती. तर वाढीला अनुकूल मत देणाऱ्या ९ सभासदांवर पडली असती. आणि गैरहजर राहिल्यानें जर ती जबाबदारी माझ्यावर येते, तर हजर राहून मतें देणाऱ्या वरील नऊही सभासदांना आपण दोषमुक्त समजतां असें सिद्ध होतें. असें मानणें हेंही पण खोटेंच आहे

जबाबदारी जर 'विनाकारण' तर ती ओढून घेतली असें कसें निष्पन्न होतें ?

४ या पेक्षां 'कौंसिलांत हजर राहून मतदेण्याचें मनोधैर्य आपणास (मला) झालें नाहीं असें सांगून आपला 'नेहमींचा सरळपणा' आणखी एकदां लोकांच्या नजरेस आणून दिला असता तर 'अधिक बरें झालें असतें,' असें आपलें म्हणणें आहे.

एकून 'अधिक बरें' करण्याऐवजीं मी 'कमी बरें' केलें येवढेंच आपलें म्हणणें आहे असें दिसतें. पण मनोधैर्याच्या अभावाशीं याची संगती जुळत नाहीं हें आपल्याला सांगणें मला अवश्य दिसतें.

माझ्यांत नेहमींचा सरळपणा आहे हें आपल्यास कबूल आहे त्या अर्थी सरळपणानें दिलेला माझा खुलासा आपण मान्य करणें भाग आहे. तें सोडून देऊन उलट माझ्या वर्तनाचा आपल्या स्वतःच्या पूर्व ग्रहदूषित दृष्टीनें विपर्यास करून तन्मूलक गैरवाजवी टीका करणें हें सरळपणाचें नाहींच; पण प्रामाणिकपणाचेंही नाहीं हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे.

पणजी कळावें ही विनंति.

ता. ४।२।२८ आ.

व्यंकटेश वि. राव सरदेसाई.

आनंदाची गोष्ट

ता० ५ रोजीं म० गांधी सुटले अशी बातमी आली आहे.

—प्रागतिक संघाच्या प्रसिद्ध झालेल्या प्रतिज्ञा लेखांत बदल झाल्याची तक्रार उपेंद्र शे. तळावलीकर यानीं केली असून 'गुंतागुंतीचें राजकारण नसल्यास' त्याचा खुलासा व्हावा, असें ते आम्हांस लिहितात.

—रामचंद्र व्यंकटेश नाईक यांचे प्रागतिक संघासंबंधीचे टीकात्मक लेख आमच्या दप्तरी रुजू आहेत. त्यांना सवडीप्रमाणें प्रसिद्धी देण्यांत येईल.

भारत

गुरुवार माघ शु० ३ या १८४५

जबाबदार कोण ?

करवाढीसंबंधानें अनेकांचीं अनेक मतें प्रसिद्ध झालीं असून, त्यांपैकीं पुष्कळशीं जनतेला हितकारक आहेत, तर कांहीं सरकारच्या कृतीचें समर्थन करणारींहि आहेत. मतवैचित्र्याच्या दृष्टीनें हा मतमतांचा 'गलबला' वास्तविक असला तरी अनावश्यक खर्चाच्या कलमांची छाटणी करण्याचा पायाशुद्ध प्रयत्न न करतां, एकदम करवाढीचें शस्त्र उगारल्याबद्दल सरकारचें हें अरेरावी धोरण समर्थनीय ठरत नाहीं.

'खर्चवाढीला तोंड देण्याला करवाढीशिवाय दुसरें साधनच नव्हतें; अर्थात करवाढीबद्दल सरकार दोषी मानलें जाणें सर्वथैव अन्यायाचें होय.' अशी सरकारचें लांगुलचालन करणारांची विचार सरणी आहे. पण ही विचारसरणी एखाद्या ढिसूळ पायावर उभारलेल्या अल्पवयी इमारतीप्रमाणें टिकाऊ नसल्यानें परिणामकारक होऊं शकत नाहीं. कसें तें पहा.

खर्चांत मनस्वी वाढ कां झाली? तर, प्रांतिक सरकारचे खर्चांत छाटाछाट करणारे ठराव वरिष्ठ सरकारनें धाब्यावर बसवून, उलट नवीन नवीन खातीं व भलते सलते हुद्दे निर्माण करण्याचा आततायीपणा केला म्हणून. परंतु डॉ० मोराइसनें जर वेळोवेळीं वरिष्ठ सरकारच्या खर्चोत्पादक चुका अमलांत न येण्याविषयीं अटोकाट प्रयत्न केला असता, तर ज्या खर्चवाढीमुळें करवाढीचें समर्थन करण्यांत येत आहे, ती खर्चवाढच मुळीं घडून आली नसती, हें उघड आहे.

डॉ० मोराइसनें स्वतः तर प्रांतिक तिजोरीची निकृष्टावस्था वरिष्ठांच्या नजरेंत आणली नाहींच; उलट कौंसेल्य लेजिस्लातीव्हाच्या लोकपक्षीय मेंबरांनीं जेव्हां वसाहत प्रधानाच्या दिवाळखोर धोरणाचा निषेध प्रदर्शित करण्याची आपली कडेकोट तयारी दाखविली, तेव्हां त्यानां गव्हर्नर साहेबांकडून 'तुमचा तो निषेध बंडखोरपणा निदर्शविणारा असल्यानें बेकायदेशीर आहे' अशी सूचना वजा धमकी देण्यांत आली, हें आमचे वाचक अजून विसरले नसतील !

शिवाय, आपल्या ठरावास जें वरिष्ठ सरकार केराची टोपली दाखविण्याची तत्परता दाखवितें, त्या सरकारच्या हाताखालीं केवळ लठ्ठ पगारी लालसेनें, डॉ० मोराइसनें बिनबोभाट काम करीत कां रहावें, हें हि समजणें कठीण नाहीं! असो.

प्रागतिक संघाची परिषद

अध्यक्षांच्या भाषणाचा सारांश

असो. तर ही जी आपण प्रगति करूं पहातों ती सर्वांगीण व प्राधान्येंकरून राजकीय असें आपण म्हटलेलें आहे. सर्वांगीण म्हटलें कीं, त्यांत राजकीय अंगहि आलेंच, पण अंगांचा विशेषें करून उल्लेख करण्याचें कारण म्हटलें म्हणजे त्या अंगात स्वभावतःच असलेलें महत्व हें होय. या महत्वानुसार प्रागतिक संघाच्या कार्यक्रमांत त्याला कितपत प्राधान्य यावयाचें याचा विचार या परिषदेंत ठरावाच्या रूपानें आपण करालच. म्हणून त्या संबधानें विशेष स्वरूपाचें विवेचन न करितां प्रगतीच्या सर्वांगीण स्वरूपाविषयींच मी दोन शब्द सांगतों. सर्वांगीण या शब्दानें अनेक अंगांचा बोध होतो. हीं अंगें कोणचीं? तर ज्याच्या प्रगतीविषयीं आपण विचार करितों त्या समाजाचीं. समाज हाच एक अंग ऊर्फ शरीर [Organismo] असें मानलें तर, हीं अंगें म्हणजे त्या एका अंगाचीं उपांगें म्हणतां येतील. अंगें असोत अगर उपांगें असोत, समाज त्यांच्या योगानें बनलेला आहे; समाजाच्या समाजपणाला तीं कारणीभूत आहेत हें उघड होय. हीं अंगें म्हटलीं म्हणजे धर्म, भाषा, पूर्वपरंपरा, आचारविचार, कलाकौशल्य इत्यादि हीं होत. धर्माला अनुसरून तत्वज्ञान, भाषेस अनुसरून वाङ्मय व एकंदरींत शास्त्रें व विद्या, पूर्वपरंपरेस अनुसरून इतिहास, आचारविचारांस अनुसरून सामाजिक व कौटुंबिक संस्था व कलाकौशल्यास अनुसरून धंदे व व्यापार असे भेद, पोटभेद निर्माण होतात. याशिवाय सर्वसाधारण स्वरूपाचीं राजकीय, आर्थिक इत्यादि अंगेंहि आहेत, या सर्व अंगानीं समाजाची प्रगति घडवून आणण्याची आकांक्षा आपण बाळगित आहोंत.

तात्पर्य, खर्चवाढीची जबाबदारी वरिष्ठ सरकारपेक्षां प्रांतिक सरकारच्याच डोक्यावर जास्ती प्रमाणानें आदळते. अर्थात् करवाढीची तरफदारी करण्यास जे शब्दशूर पुढें सरसावत आहेत, त्यांच्यांत 'राम' नाहीं हें ओघानेंच सिद्ध होतें.

ज्या प्रमाणें खर्चवाढीला येथील सरकारच कारणीभूत झालें, त्याच प्रमाणें करवाढीलाहि तेंच झालें आहे, हें डोळ्यांआड करणें सत्याच्या दृष्टीनें कधींहि योग्य होणार नाहीं, हें सरकारपक्षीयानीं पूर्ण ध्यान्यांत धरलेलें बरें. हातांतल्या कांकणाची शोभा डोळ्यांत भरून देण्यास आरसा डोळेच बस आहेत. त्याला दुसऱ्या कशाचीहि गरज लागत नाहीं.

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivao do 2 ° oficio Barreto, vao ser vendidos em hasta publica, a' porta do tribunal do juizo, situado em Xeldem, ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a estaçao de Sanvordem, no dia 12 do seguinte mez de Fevereiro a's 10 horas, em segunda praça e pela metade do preço porque foram avaliadas os seguintes bens:- 1/8 do predio Madugal vangına, sito em Cumbari; 1 24 do predio Zorimolapoiquim, sito na dita; 1/4o do predio Deulacodil sordo, sito na dita e 1/40 do predio Careasordo sito na dita, todos da cultura de arroz, e discritos na conservatoria predial desta comarca respectivamente s b os n.°s 16502, 16503, 16504 e 16505 a fl 92 te 93 v. do Livro B 45 e avaliados tambem respectivamente por 50, 20, 15 e 10 rupias. Penhorados nos autos civeis de execuçao por custas que o Digno Agente do Ministerio Publico nesta Comarca promove contra Maluga Cacodcarina de Viliena. Sao por este citados todos os credores incertos da dita executada e os co proprietarios e quinhoeiros nos termos e para fins da lei. A contribuiçao do registo por inteiro ficara' a cargo do arrematante. E para ser publico se expediu este.

Xeldem, 26 de Janeiro de 1924.

O Escrivao de Direito do 2.° oficio
Aires Manuel Barreto

Verifiquei, 7

O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

estado cataleptico, o parecer dalguns medicos romanos julgou-o morto; mas o jornalista VIVO considerado MORTO pela medicina italiana deu sinais de sua existencia rial, justamente ao fechar-se o caixao MORTUARIO!

Como foi isso? Como um *vivo* teve que passar um quarto de hora... da *morte* pela catalepsia que entao surgiu?

Cada um explica-lo-ha, a seu modo, geito e conceito. Quanto a no's, atribuimos o singular fenomeno ao capricho da sorte, porquanto desta dependem ainda os mais triviais actos e factos da vida humana.

A sorte transforma a verdade clarividente numa mentira refinada e vice-versa. E' a "sorte" ou "tempo" que em ultima analise, regula o movimento da nossa vida. Quando ela ou ele e' favoravel, ainda as mais criminosas mentiras sao bem sucedidas; mas quando ela ou ele e'desfavoravel,ainda a mais pura verdade e' mal sucedida. Os homens representam, apenas, um efeito natural e logico da unica causa principal que e' a sorte ou tempo.

Eis as consideraçoes que nos acudem a' caneta, a proposito do sensacional caso do "morto-vivo".

NO EDEN CINEMA

Sob a presidencia do sr. Xamba' Rau Dessai realisou-se neste Cinema de Pangim uma grande reuniao com assistencia duma filha do MAHATMA' GANDHI.

Os reunidos, no numero dos quais se contavam muitos membros da comunidade cristã, exteriorisaram o seu indiscritivel jubilo pela libertaçao do MAHATMA'.

A reuniao fora promovida pelos dirigentes da "Sociedade de protecçao ao gado" de Britona.

Igual manifestaçao houve a tambem no Templo de Maha-Locximim da mesma cidade e em diferentes outros pontos de Goa.

O HOMEM POI...

E Deus dispoi. O governo inglez estava decidido, mas sem razao plausivel, a nao por em libernade o "Mahatma', sem completar o periodo de seis anos; mas Deus dispos as coisas de tal maneira que Gandhi foi tirado da prisao, antes de se perfazer aquele praso.

E' que nao esta' nada nas maos do homem, por mais perfeito que seja, tudo dependendo de Deus, criador da *sorte* ou *tempo*.

A RESPONSABILIDADE...

A responsabilidade do aumento de impostos nao pertence ao governo provincial nem ao metropolitano Ela toca, em peso, a no's proprios que existimos por mal dos nossos pecados.

Se o povo do Estado da India nao existisse, nao existiria — garantimo lo sob palavra de honrra do M. de La Palisse—imposto algum e muito menos o seu aumento, cuja responsabilidade diriva, portanto, da nossa existencia.

Como acabar, pois com o imposto?

A resposta: acabando com a nossa existencia.

भारत

गुरुवार माघ शु० ९ मी शके १८४५

राहाणी बदला
आणि
जकात चुकवा

कायदेकोन्सिलांत जकातीच्या करांत वाढकरण्याचें बिल पास झाल्यापासून, एक दोन खेरीज करून इतर सर्व वर्तमानपत्रें निषेधपर लेखांनीं लोकजागृतीचें कार्य करीत आहेत. जकात वाढली, जकात वाढली, या अंतःकरणास हालवून सोडणाऱ्या शब्दांनीं गोमांतक प्रांताचा कोनाकोंपरा हालवून सोडला जात आहे. हा व इतर नवे लादलेले कर आजच्या स्थितींत आह्मांस असह्य आहेत, असें लोकपक्षातर्फेचें सांगणें आहे. गोमांतकीय जनता गरीब असून, तिच्यांत वाढीस लागलेले हे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कर भरण्याचें त्राण राहिलेलें नाहीं असा ह्या सर्व ह्मणण्याचा सारांश काढतां येईल.

आह्मी गोमांतकीय लोक फार गरीब आहोंत. ही गोष्ट 'दोन आणि दोन चार' इतकीच खरी आहे. थोडा प्रामाणिकपणा बाळगिला, तर सरकारसुद्धां आमची गरिबी कबूल करील. परंतु गणितशास्त्राच्या आधारानें आह्मीं गरीब ठरलों ह्मणून प्रत्यक्ष व्यवहारांत थोडेच गरीब ठरतों. शास्त्र वेगळें आणि व्यवहार वेगळा. या दोहोंत रात्र आणि दिवस किंवा जमीन आणि आकाश यांच्या इतकेंच अंतर आहे हें, खालील विवेचनावरून दिसून येईल.

गोमांतकांतील जनतेचें माणशीं उत्पन्न पाहिलें तर तें तीस रुपयांपेक्षां खालींच असल्याचें दिसून येईल. शेतकीच्या एका पुरातन धंद्याशिवाय दुसरा कोणताहि महत्वाचा असा उत्पादक धंदा येथें नाहीं ह्मटल्यास चालेल. शेतीच्या उत्पन्नाशिवाय दुसरी एखादी द्रव्याची भर आमच्या प्रांतांत पडत असली तर ती परमुलखांत जाऊन नोकरीचाकरीच्या क्वचित् व्यापाराच्या धंद्यानें हजारों रुपये मिळवून परत येथें येणाऱ्या मुंबईकर किंवा आफ्रिकान या नावांनें ओळखल्या जाणाऱ्या लोकांच्या कमाईची. येथील लोकवस्तीच्या मानानें त्या मिळकतींत ह्मणण्यासारखें तारतम्य नसलें तरी येथील संपत्तींत त्या योगानें बरीच महत्वाची भर पडत असते; आणि ती जमेस घेतली तरी देखील दर माणसीं पस्तीस रुपयांहून ज्यास्ती उत्पन्न वाट्यास येणार नाहीं. तेव्हां माणसीं पस्तीस रुपयांचें उत्पन्न असणें हें अत्यंत गरिबीचें निदर्शक नाहीं असें कोण ह्मणेल ? अर्थात आह्मीं गरीब आहोंत, इतकेंच नव्हे तर गरीबाहून गरीब आहोंत हें शास्त्र सिद्ध झालें.

अशा रीतीनें शास्त्रसिद्ध ठरत असलेली आमची गरिबी व्यवहारांत दिसून येत असते काय ? नाहीं ! व्यवहारांत आह्मी दिवसेंदिवस श्रीमंत होत चाललों आहोंत, हेंच वरवर पाहणाऱ्याला दिसून येईल. गेल्या वीस वर्षांत आमच्या राहणींत जो विलक्षण फरक पडला आहे त्याचा लक्षपूर्वक विचार केल्यास आमच्या ह्मणण्याची सत्यता पटेल. पूर्वींचीं तीं आमचीं लहान लहान, नीट नेटकीं घरें जाऊन त्या जागीं मंगळुरी कौलें घातलेलें, इंड्या झुंबरें टांगलेले, रंगरोगण वेलबुट्टींनें सुशोभित केलेले टोलेजंग वाडे ठिकठिकाणीं उभारलेले पाहून आमचा प्रांत गरीब आहे असें कोण ह्मणावयास धजेल ? आमच्या बाजारांतील कापडाच्या दुकानांतून सांठविलेल्या लाखों रुपयांचा उंची उंची, नव्या नव्या फ्याशनचा कापडमाल, तसेंच कांचसामान, रंगीबेरंगी फेशनेबल माल कुठल्या गिऱ्हाइकाची वाट पहात आहे ? प्रत्यहीं संख्येनें वाढत चाललेलीं सोडावाटरचीं, चहाचीं, देशी परदेशी दारूचीं दुकानें यांस कारण कोण ? शेतीचा धंदा सोडून शिवण्याचीं यंत्रें घेऊन बसलेले हजारों शिंपी आह्माला काय भासवितात ? लाखो रुपयांची धूळ उडविणाऱ्या शेंकडों मोटारी, हजारों घोड्यांच्या गाड्या, हजारों सायकली कोणतें दृश्य दाखवीत आहेत ? पायांतील वहाणा जाऊन बूट पायमोजे आले, साधें शहापुरी धोतर जाऊन मलमली धोतरजोडे आले आणि आतां तर त्यांच्या जागीं पाटलोणी आल्या; साध्या कपड्यांचे अंगरखे जाऊन रेशमी, लोंकरी, तलम सुताच्या कपड्यांचे कोट, खमीसें, ज्याकीटें आलीं; टिकाऊ व स्वस्थ साधे रुमाल जाऊन जरीकांठी, जरी बुटीचे रुमाल आले, रेशमी फेंटे आले, पुणेरी पागोटीं आलीं, इंगेरियन तुर्की, इटालियन इ. परदेशी भरजरी मुसलमानी व नाटकी फ्याशनच्या टोप्या आल्या आणि आतां हळूच युरोपियन चेपीं येत चाललीं; थंडी, वारा, पाऊस यांच्या निवाऱ्यासाठीं लोंकरीचे लांब कोट आले, साध्या छत्र्यांच्या जागीं रेशमी कपड्यांच्या चित्रविचित्र मुठीच्या महाग छत्र्या त्यांच्या जोडीस नकशीदार मुठीच्या छड्या आल्या; खिशांत, हातांत तऱ्हेवार घड्याळें, त्यांस तऱ्हेतऱ्हेचे छडे, लोंबकळूं लागले; साध्या व फुकट मिळणाऱ्या लेखण्या जाऊन पांच दहा रुपयांचीं पेनें आलीं; समयांच्या जागीं चिमण्या, ग्लोबाचे दिवे, ग्यासचे दिवे दिसूं लागले; शेंदोनशें रुपयांत साजरीं होणारीं लग्नकार्यें हजारों रुपयांत होईनाशीं झालीं; मेवाजिन्नसांत, दारूकामांत, वस्त्रें-दागिन्यांत आणि इतर अनेक अनावश्यक गोष्टींत शेंकडो रुपयांची उधळपट्टी होत आहे, पैसा मातीमोल होऊन बसला आहे, मद्यपान जुगार इत्यादि व्यसनाची अतोनात वाढ झाली आहे, चैनी, छानछोकी, नटवेपणा, नाजुकपणा यांस ऊत येऊन त्यांतच भूषण वाटत आहे; नाचण्याच्या पिठाची विनगुळाची खीर खाऊन संतुष्ट व शरीरानें बळकट असणारे गोरगरीब चहापाणी, दारूबाजी यांत धन्यता मानीत आहेत हें कशाचें लक्षण आहे ? गरिबीचें कीं श्रीमंतीचें ? !

या सर्व व्यवहारावरून आह्मीं श्रीमंत बनत चाललों आहोंत असें सरकारास वाटूं लागणें संभवनीय नाहीं काय ? अलबत वाटलेंच पाहिजे. तर मग जकातीसारखे कर सरकारनें वाढविले तर त्यास आह्मी कोणत्या तोंडानें हरकत घेणार ? आतां त्यास एकच मार्ग आहे व तो हा कीं, पूर्वींची ती आमची साधी राहणी स्वीकारून वाढलेल्या गरजांस मूठमातीं देणें हाच होय. साधी राहणी ह्मणजे रहावयास स्वच्छ, नीटनेटकें व टुमदार घर, खावयास साधें व पौष्टिक अन्न आणि वापरावयास स्वच्छ, नीटनेटका व साधा पोषाख असीच असावयाची. प्रसंगोपात् अनेक वस्तूची गरज भासली किंवा खरोखरीनें लागली तर त्यांत आवश्यक अनावश्यक, बऱ्या वाईट ओळखण्याची तारतम्यता दाखवून वागणें भाग आहे. अशा रीतीनें आह्मीं वागलो तर आमचा संसार सुखासमाधानाचा होऊन सरकारास वठणीस आणण्यास समर्थ होऊं.

आमचें सरकार युरोपियन आहे. त्याची व त्या सारख्या बनलेल्या खिस्ती लोकांची नजर पाश्चात्य संस्कृतीवर खिळणें साहजिक आहे. तीस अनुसरून ते लोक येथील सर्व व्यवहार पाहतात. त्याचा परिणाम आज ते व आह्मी भोगीत आहोंत. त्यांची चूक दाखविण्यासाठीं आह्मीं आमच्या हिंदी संस्कृतीस धरूनच चालणें आवश्यक आहे. साधी राहणी व उच्च विचारसरणी हें एक आर्यांचें बहुमोलाचें तत्व आहे. त्या तत्वाचा पुरस्कार कृतीनें करण्यावरच आमच्या प्रांताचें व पर्यायानें अखिल हिंदुस्थानचें भवितव्य अवलंबून आहे.

स्फुट विचार

येथें व तेथें:— योग्य कर्णधाराच्या अभावीं ज्याप्रमाणें गोमांतकाचें तारूं, सांपत्तिक अधोगतीच्या खवळलेल्या समुद्रांत हेलकावे खात आहे, त्याजप्रमाणें पोर्तुगालच्या राष्ट्रनौकेचीहि शोचनीय स्थिति झाली आहे. येथें व तेथें अशा प्रकारची घोर आपत्ति ओढवण्याचें मुख्य कारण ह्मणजे आदा न पहातां खर्च करण्याची प्रवृत्ति हें होय. या प्रवृत्तिला जोंपर्यंत कायमचा आळा घातला जाणार नाहीं, तोंपर्यंत सांपत्तिक स्थितीची बिघडलेली घडी नीट बसेल याची आशाच नको ! असो. सांप्रत अधिकारारूढ असलेलें पोर्तुगीज प्रधान मंडळ तीजोरीची स्थिति सुधारण्याच्या कामांत गढून गेलें असून, छाटाछाटीचे नवीन नवीन कायदे करण्यांत मारे 'गुंग' होऊन गेलें आहे !

लेला नाहीं व आजपर्यंतचें व्य० मं० आपमतलबी निघाल्यामुळें त्यांच्याकडून संस्थेच्या ध्येयाचा दरकार बाळगला गेला नाहीं. व्य० मं० नें सदोदीत असें ध्यान्यांत वागवावयाला पाहिजे कीं, प्रत्येक मेंबरनें आपापला मताधिकार या मंडळाच्या स्वाधीन केला. त्यांत संस्था एक हस्तें सुसंघटीतपणें चालावी एवढाच त्याचा शुद्ध व पवित्र हेतु असतो. परंतु हें मंडळ, मेंबरच्या विश्वासाचा दुरुपयोग करतें त्या वेळीं आपापलें मत परत घेण्यास व तीनें केलेल्या कामाचा हिशेब मागण्यास पूर्ण अधिकार असतो. हें सर्व खरें असलें तरी स्वतः नेमून दिलेल्या व्यवस्थापक मंडळानें आपल्या अपेक्षेप्रमाणें कार्य बजाविलें आहे कीं काय हें बरोबर ग्राह्य करण्याची शक्ती सर्वांनांच सारखी असते असें नाही आणि याचाच फायदा सत्ताधारी मंडळ घेत असतें. उपरोक्त व्यवस्थापक मंडळानें याचाच अवलंब केला आहे. त्यामुळें त्यानींच लाविलेल्या दिव्यांत असें दिसून येतें कीं, ' परस्परमं समरपयामी ' या पलीकडे त्यानीं कांहींच कार्य केलेलें नाहीं. बरें आंतल्या संस्थेच्या कामाची व्यवस्था बघावी तर हिशेब प्रकरणीं काय दिसलें याचा मागें उल्लेख केलाच आहे. दुसऱ्या कमिट्या नेमून त्याच्या हस्तें काम केलें ह्मणावें तर त्या कमिट्यांपैकीं कांहीं दिवंगत झालेल्या दिसतात व जीव धरून राहिलेल्यांचा, संस्थेशीं दगलबाजी करून ' कोण कुणाचा ' असें ह्मणण्याचा इरादा दिसतो. या शिवाय एक दोन कमिट्याचें संस्थेशीं प्रामाणिकपणें वागण्याचें धोरण दिसलें. पण १९२१ सालापासून अंथरूणाला खिळलेल्या असून त्या अजून उठलेल्याच नाहींत व उठण्याचें चिन्हहि दिसत नाही!

(पुढील अंकीं पूर्ण)

वासुदेव विठ्ठल प्रभू देसाई
१०४ हनुमान बिल्डिंग नं. ७
लॅमिंग्टोन रोड, मुंबई.

tos que cheirarao talvez aos *pontos escritos* escolares.

Enquanto conversamos, ao longo da meza do trabalho ia grande baru lho; fazia-se a autopsia dum artigo um cortava o com o bisturi feito de pena, outro como que a pensar a feri da aberta pelo camarada, chegava-lhe umas ideas, cu dei la' mais que? Encantou nos isto, e curiosos aportamo nos ate' la' tomamos assento a com partilhar o prazer desta faina bendita.

Este magno sinedrio era constitui do dos srs. Antonio de Noronha Rodrigues, figurino de autentica elegancia, rapaz que escreveu ja' para os jornais, sendo actualmente um dos colaboradores da "Provincia" e que agora sôbre *Direito*...da' lições aos advogados feitos a' pressa, Alvaro de Sta. Rita Va's, simbolo de escritor caneta presa na cabeleira grisalha, fato branco manchado de *tinta de impressao*, um rato que vive nos montes de livros da Biblioteca Nacional. Joaquim Antonio da Rosa, uma estatua representando uma grande fenomenal cabeça colocado sobre o pedestal dum corpo gentil, olhar fais cante como a sua prosa vibraete, mistura de travessura, poesia, bondade...e dizem que mestre Antonio Aguiar de Quadros, um talento portentoso, poliglota manejando a pena com a destreza dum atleta, muito conhecido ou melhor parente de Valtaire, Shekeaspeare, Racine, Kant, etc.

So' estes? Tao poucos?...

Oh! nao! Eram muitos; se de todos nao falei e' porque, a tarde transmudara o seu *travesti* de cores mistas, infinitas, de camisa escura, em camisa de dormir, e eles recolheram-se aos seus penates e eu nao pode fixar na minha carteira as notos, os tragos especiais que os caracterizam...

...Mas nem tanto ao mar. Estavamos ja cangados e felizmente apareceu alguem a rua ... era um camarada que vinha. Mas como ca' dentro isto cheirasse a' Siao, ele convidou-nos a entrar na Babilonia de luzes electricos...gemebundas, logo envergamos os nossos chapeus, ageitamos uma lampada, bengala, companheira nocturna e estavamos fo'ra.

Reconhecemos o chefe da geraçao nova, escritor de pena elegante, orador de verbo fluente, inteligencia formosa, um que ja arrimou muitas vezes as colunas dos nossos jornais—era o quintanista de medicina, sr. Cordato de Noronha.

Trocados os prime'ros cumprimentos, seguimos pela Avenida; o mar rumoreja, a brisa soltava as trangas das palmeiras, dir-se hia elas aprontavam-se para um sarau das ninfas do Mandovi...

Seguimos, seguimos, ate' por fim a's doze badaladas do relogio da Camara, separamo-nos e no's ja haviamos cumprido a nossa missao.

Sim, com a natureza assim a sorrir; ideas e planos a bailar nos na nossa mente, despreocupada no espaço vago desenhando-se novos e vastos horisohtes, em verdade eramos, por momentos embora, cavalheiros vagueando ... A CONQUISTA DE FUTURO.

D. Joao de Sentinela

भारत

गुरुवार माघ व० १५ मा शके १८४५

स्वार्थत्यागी व्हा !

स्वार्थत्याग ही अत्यंत मौल्यवान वस्तु आहे. हजारांत एखाद्याच्याच हृदयाच्या ठिकाणीं ही विराजमान झालेली दिसेल. ही वस्तु ज्याला सांभाळावयाची असेल, त्यानें सगळें ऐश्वर्य, वैभव आणि सुख ह्या गोष्टी त्याला मोबदला ह्मणून द्याव्या लागतील. क्षुद्र विषयांच्या ठिकाणी प्रीति ठेवून स्वार्थत्यागी बनू पाहणें कधींहि शक्य नाहीं. स्वतःची प्रतिष्ठा वाढविणें, ज्यास्ती संपत्तीची हाव धरणें, ऐश्वर्यवान बनू पहाणें, नानाप्रकारचें वैभव संपादन करणें वगैरे गोष्टींची मनुष्याला फार आवड असते इतकेंच नव्हें तर हीं सुखें भोगण्याचा स्वतःचा जन्मसिद्ध हक्क असल्याचें तो प्रतिपादन करतो. हा जन्मसिद्ध हक्क गमावणें त्याला महासंकट वाटतें. आणि हीं सुखें संपादन करित असताना, ह्मणजे आपला स्वार्थ साधित असताना तो नष्टुर अशा प्रकारचा आसुरी वृत्तीचाहि उपयोग करण्यास मागें पुढे पहात नाहीं. तेव्हां स्वार्थासारख्या अत्यंत मोहक वस्तूंचा त्याग करण्यास त्यास मरण प्रायं दुःख व्हावें यांत आश्चर्य नाहीं ! मनुष्यांची प्रवृत्तिच जर विषय सुखांकडे, तर त्यानें त्या बद्दलची खटपट तरी कां करूं नये ? पण जिवंत राहून चैनच भोगावी इतक्याकरितां जर मनुष्यजन्माची योजना असती तर तसें ह्मणतां आलें असतें. मनुष्याला आत्मानात्म विचार आणि ज्ञान ह्या देणग्या परमेशाकडून मिळाल्या आहेत, त्या कांहीं तरी अधीक चांगलें करून दाखविण्या करितां. तें अधिक चांगलें तें कोणतें ह्मणाल तर उत्कृष्ट रीतीनें-जगणें. हें साध्य त्याला समाजांत राहूनच साधलें पाहिजे. एकेकटी मनुष्य व्यक्ति आपल्या मनोविकारांवर व शरीरबळावर आपलें साध्य साधूं पाहील तर तें त्याला अशक्य होऊन जाईल. कारण कीं, त्याची शरीर रचनाच मुळीं नाजूक आहे. केवळ जिवंत रहाणें हेंच मनुष्येतर प्राण्यांचें अंतिम असल्या कारणानें त्यांच्या इंद्रियांचीं कर्में अधिक उन्नत स्वरूपाचीं ह्मणून मात्र त्यानां तें शक्य आहे. पण ही उणीव, त्याला परमेश्वरानें जी बुद्धि ह्मणूनअद्भुतम देणगी दिली आहे, त्याच्या योगानें तो भरून काढतो आणि सगळ्या पाशवी सृष्टीवर आपलें वर्चस्व स्थापन करूं शकतो. ह्या बुद्धीचा उपयोग एकेकटें न राहतां संघशक्तीनें रहाण्यांतच मनुष्यानें करावा असाहि परमेश्वराचा हेतु असल्याचें कळतें.

मनुष्य स्वतःचेंच हीत शोधूं लागला तर त्याला समाजांत रहातां येणार नाहीं उलट तोच समाजाच्या हिता करतां खटपट करूं लागला तर त्याचेंही हित झाल्या शिवाय रहाणार नाहीं. तेव्हां ज्याच्या योगे करून स्वतःचें आणि समाजाचें हित सा धेल तेंच त्यानें करावें हें सर्वांत उत्तम होय समाजाचें हित साधण्याकरतां त्याला आपल्या इच्छेचें थोडें नियमन करावें लागेल. आणि परमेश्वरानें मनुष्याच्या बुद्धीच्या ठिकाणी सदसद्विचार शक्तीची जी योजना केली आहे ती केवळ मनुष्याला आपल्या इच्छेचें नियमन करतां यावें ह्मणूनच. इच्छेचें नियमन झाल्यावर मनुष्याचें कर्म नियत होऊन तें समाजाच्या अतिमाला विघातक कधींच होत नाहीं. तात्पर्य इच्छेचें नियमन ह्मणजेच स्वार्थत्याग. शरीरयात्रा सुरळीत चालण्याकरितां ह्याना ज्या ज्या आवश्यक गोष्टी कराव्या लागतात त्यांना स्वार्थ ह्मणतां येत नाहीं. पण ज्यास्त आशाखोर बनून इच्छास्वातंत्र्याचा फाजील उपयोग करून, जास्त संपत्ती, जास्त ऐश्वर्य संपादन करूं इच्छिणें याला च स्वार्थ ह्मणतां येईल. या स्वार्थाचा त्याग ज्याला करितां आला तोच लोकसेवा करण्यास पात्र झाला असें समजावें. नाहींतर लोकसेवेचा बुरखा पांघरून, चेहऱ्याला स्वार्थत्यागाचा गुलाल फांसून ढोंगी लोकसेवक बनलेले पुष्कळ पहाण्यांत येतात. अशा प्रकारचीं दुष्ट माणसें जन्मास आलीं नसतीं तर सगळें जग आज आनंदांत डुलत राहिलें असतें.

आज आमच्या हिंदुस्थानांत शेंकडो पक्ष आहेत; आणि प्रत्येक पक्षांत शेंकडो लोकसेवक आहेत. पण लोकसेवा हा शुद्ध हेतु मनांत धरून प्रवृत्त झालेले अगदींच थोडे आहेत. विद्वान ह्मणवून घेण्याकरतां, प्रतिष्ठी बनण्याकरितां, जबाबदारीच्या चिंध्या उडवून पैसे उकळण्याकरतां, मानाच्या जागा उचलण्याकरतां, ज्यांनीं लोकसेवेचें व्रत चलविलेलें असतें, अशाच प्रकारचे लोकसेवक पावलो पावलीं आढळतात. कितीही करड्या नजरेचा परकी अंमल पुरवला, पण हे अशा प्रकारचे आपले स्वदेशीय गळेकापू लोकसेवक नकोत. आह्मांला अशा प्रकारचे लोकसेवक पाहिजे आहेत कीं, जे स्वतःवरची जबाबदारी ओळखून, स्वतःचा अधिकार आणून, परिस्थितीकडे लक्ष देऊन, लोकमत ध्यानांत आणून मोठ्या कौशल्यानें प्रत्येक कृत्य आचरतील. लोकसेवेचें निमित्त करून पुढें सरसावलेले लोकसेवक अंतस्थ हेतू साध्य होईपर्यंत पूर्ण प्रामाणिक असल्याचें दाखवितात, पण एकदां बड्या अधिकाऱ्यांच्या हातांत हात मिळाल्यावर, ज्यांना भोळ्या बापड्या जनतेनें अत्यंत प्रेमानें मस्तकावर धारण केलें होतें. तेच लोकसेवक त्याच जनतेच्या मस्तकावर लाथा हाणण्यांत मागें पुढें पहात नाहींत. अशा प्रकारचा अनुभव आम्हा गोमांतकीयांस आलेलाच आहे. हिंदुस्थान मागें राहण्यास जे जे दुर्गुण कारणीभूत झाले त्यापैकींच हा एक आहे. किती दिवसपर्यंत अशा प्रकारच्या दुर्गुणांचे पाढे वाचित बसावें ! हिंदुस्थाना, तुझें नष्टचर्य संपविण्याचे दिवस अजून आले नाहींत काय ?

भारतीय विरानों ! स्वार्थत्यागी व्हा व हिंदुस्थानास लागलेला पारतंत्र्याचा कलंक धुवून काढा. प्रत्येक आपापल्या कार्याकडे दृष्टी ठेवून चालायाला लागलां तर हिंदुस्थानाला आपला स्वार्थ कधींच साधता येणार नाहीं. कितीही विशाल बुद्धीचे असलां, अपरंपार संपत्ती मिळविली, नाना प्रकारचें वैभव संपादन केलें, तरीपण जोंपर्यंत त्याचा उपयोग देशकार्याकडे झाला नाहीं, जोंपर्यंत तुह्माकडून निर्मळ देशभक्तीचें निशाण रोवलें गेलें नाहीं, तोंपर्यंत तुमचें सगळें ऐश्वर्य व्यर्थ होय.

स्फुट विचार

गोवा हिंदु वि. सहाय्यक संघः— या पणजी येथील संस्थेचा तिसरा वाढदिवस समारंभ "कॉलेज नासियोनाल" च्या दिवाणखान्यांत गेल्या ७ तारखेस इस्कोलांच प्रिमारेचाचे सब इन्सपेक्टर प्रो. रामचंद्र शंकर नाईक यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. सभेस बरीच उत्साही मंडळी हजर होती. आरंभी संघाचे सेक्रेटरी श्री. शिवा फटू पै आंगले यांनीं संघाचा दोन वर्षांचा रिपोर्ट सभेस सादर केला त्यावरून संघाच्या ताब्यांत तूर्त ७०० रुपयांची रक्कम असून ती डॉ० आ. गो. बोरकर यांच्यामार्फत ६ टक्के व्याजानें दिली असल्याचें कळतें. सभेंत श्री रामचंद्र ना. लवंदे ना. व्यं. देसाई श्री. उपेंद्र शे. तळावलीकर व श्री. शांबाराव सरदेसाई यांनीं समयोचित भाषणें झालीं. ठिकठिकाणीं अस्तित्वांत असलेल्या मराठी शाळांतील शिक्षण एकसुत्री करणें, नवीन शाळा स्थापन करणें, गरीब हिंदु विद्यार्थ्यांस पणजींत किंवा इतर ठिकाणच्या लिसेवांतील शिक्षण घेण्यास योग्य मदत करणें, हीं कामें संघानें तूर्त हातीं घ्यावीं असें ठरविण्यांत येऊन त्याबद्दल योग्य ते प्रयत्न व संघाचे नियमावली तयार करण्यास श्री. उपेंद्र शे. तळावलीकर, प्रो. रामचंद्र श्री. पै व डॉ० त्रिविक्रम का. येलेंकर ह्या तीन गृहस्थांचें कमिशन निवडण्यांत आलें. शेवटीं अध्यक्षांचें समारोपा दाखल महत्वाचें भाषण होऊन संघाचे सेक्रेटरी यांनीं सर्वांचे आभार मानले व सभेचें काम संपविण्यांत आलें.

हिंदु विद्यार्थी सहाय्यक संघः— दोन वर्षांमागें पणजी येथें स्थापन झालेल्या हिंदु विद्यार्थी सहाय्यक संघाच्या तिसऱ्या वाढदिवस समारंभाची बातमी या अंकांत दिली आहे. ती वाचून संस्थेच्या कार्याविषयीं बरीच आस्था उत्पन्न झाल्याशिवाय राहत नाहीं. संस्थेचें ध्येय सिद्धीस जाण्यास "सर्वारंभास्तंडुला प्रस्थ मूलः" या न्यायानें द्रव्याची मदत होणें आवश्यक आहे. त्यासाठीं संस्थेनें काय तजवीज केली आहे तें समजत नाहीं. तरी पण तिच्या कार्यकारी मंडळास एवढीच सूचना करावीसी वाटते कीं, निवळ रामदासी बाण्या

रकम अजूनपर्यंत तिकडे रवाना झालेली नाही. सध्या गरज नाहीं ह्मणून पाठवूं नये असाच अर्थ होतो. असल्या अकलेच्या कांदेबटाट्यानें बजबजलेलें डोकें अंथरलेल्या इसमाचें नांव ' नव्या काळांत ' प्रसिद्ध करण्याचें कां टाळण्यांत आलें आहे हें समजत नाहीं. याचें समाधानकारक उत्तर व्य० मंडळ देईल काय ? भूक लागली असतां अन्न मिळालें नाहीं, अगर तार आला असतां औषधोपचार झाला नाहीं तर मग पोट भरल्यावर आणि ताप गेल्यावर हे उपचार व्य० मंडळ करणार की काय ? एकदां निकडीची गरज नीभावली ह्मणजे, नंतर पाच पक्वान्नें अगर सुवर्णमात्रा याची किंमत मातीमोल होते व गरजेच्या वेळीं कवडीची किंमत लाखाची होते हें साधें तत्वहि दिड शहाण्यांनीं भरले ल्या व्य० मंडळाच्या डोक्यांत येऊं नये ! मग कमाल आहे हाणावयाची !

संस्थेच्या ध्येयाची आणि आरंभिलेल्या कार्याची प्रस्तुत व्य० मंडळानें अशीं नासधुस मांडली आहे हें संस्थेच्या सर्व मेंबराना व हितचिंतकाना स्पष्ट दिसावें व प्रस्तुत व्यवस्थापक मंडळाकडून झपाट्यानें होत असलेला संस्थेचा अधःपात टळावा आणि असे सांवळे गोंधळ पुनः न होऊं देतां संस्था धवल तेजानें उदयास यावी या साठीं इतकेंच लिहावें लागलें.

पुढें कवकरच भरणाऱ्या असाधारण सभमध्यें याचा पूर्ण विचार होऊन ' गावा हिंदु असोसियेशन ' ही संस्था योग्य व सभ्य (संभावित नव्हे) गृहस्थांच्या हातांत जावी अशी इच्छा बाळगतों. शेवटीं आम्हाला इतकेंच सांगावयाचें आहे कीं, बाळंतिणीला सुइणीला कांहीं लपवून ठेवितां येत नाहीं त्याच प्रमाणें संस्थेच्या कार्यकारी मंडळानें, आपण काय केलें याचा खोटा रिपोर्ट न देतां खरा खुरा साद्यंत व सविस्तर रिपोर्ट प्रसिद्ध केला पाहिजे. नाहीं तर बाळंतिणीची दुर्दशा तशीच संस्थेची होणार यांत संशय नाहीं.

इतकी तसदी दिल्यावद्दल, व्य० मंडळानें रिपोर्ट द्वारें एकाच व्यक्तीबद्दल दोन दोनदां आभार मानण्याच्या घालून दिलेल्या पद्धती बरहुकूम आह्मी व्यवस्थापक मंडळीचे दुसऱ्यान्दा आभार मानतों.

वासुदेव विठ्ठल प्रभू देसाई
१०४ हनुमान बिल्डिंग नं. ७
लॅमिंग्टोन रोड, मुंबई.

Anuncios

श्री नागेश कांदिवडे

या देवस्थानचे सर्व महाजन यांस नम्र विनंति करण्यांत येते कीं, सर्व महाजनांस आणि भक्तांस विनंति पत्रें पाठविण्यांत आलीं आहेत, तीं बहुतेक टपालांतून व कांहीं खासगी माणसांकडून पाठविलेलीं आहेत, टपालच्या गहाळीमुळें किंवा अन्य कारणानें तीं पोहोचलीं नसतील, त्यांनी आपला पत्ता सुवाच्य अक्षरांनीं लिहून कळवावा, आणि शक्य ती वर्गणी पाठवण्यांत यावी. तसेंच यंदाच्या चैत्र पौर्णिमेच्या उत्साहास अवश्य यावेंच. यंदा देवालयांचा रिपोर्ट छापावयाचा आहे. त्यांत सर्व महाजनाची नांवें व वर्गणीचा आंकडा येणार आहे.

मेज मं अध्यक्ष व आ. न. सेवक
व्यंकटेश रामचंद्र नाईक.

Pela Escola Normal

As linhas que eu mandei ao *Bharat* na semana passada — produziram o seu efeito—nem outra coisa podia se esperar do ilustre professor que dirije aquele estabelecimento do ensino—Se errar e' dos homens, emendar os erros e' so' dos grandes homens.

As linhas produziram o seu efeito—dizia eu – e e' verdade. Ja' foi banida do programa a ginastica diaria, voltando, cremos, a ser uma vez por semana como manda o regulamento.

Nao e' so' isto, porem. Ha' na Escola Normal mais coisas a endireitar e como estamos com a mao na massa e contamos com a boa vontade do seu ilustre director, vamos apontar mais infracçao regulamentar. Uma e' a seguinte:

Manda o regulamento que cada aluno faça um exercicio metodologico a semana, devendo a escolha deste aluno proceder-se pelo sistema de escalonamento. O que, porem, se ve hoje e' uma prática, alem de antipedagogica, bastante dura. Cada semana sao escolhidas duas alunas, somente alunas, que sao encarregadas destes exercicios, nao uma vez a semana, mas sim durante todos os 7 dias da semana.

O outro representa um mal que e' ja' cronico nos nossos estabelecimentos do ensino, mas que nem porisso deixa de ser um mal e grave. — Estatue o regulamento da Escola que o horario uma vez estabelecido nao deve ser alterado no decurso do ano lectivo. O que entretanto se viu e' uma inesperada mudança no horario, que, a boca pequena se dizia, ter sido manipulada para servir os comodos ou interesses de um professor. Este facto foi levado ao conhecimento do ilustre Director dos Serviços do Ensino.

Agora, nesta altura, ocorre-me comunicar aos ilustres leitores que, enquanto o sr. Dr. Carmo dos Reis, vai atendendo com paixao que nele e' natural pelo bom andamento do ensino ao seu cargo, os alunos, discipulos de s. excia, vão, segundo oiço, dirigir ao *BHARAT* uma carta colectiva, dizendo ser falto do fundamento o que eu vim revelar nas paginas deste jornal. Nao acredito.

Mas a ser verdade, deixe-me dizer. Bravo rapazes! Admiro, e admirando presto culto ao seu caracter e independencia, mas uma coisa lhes digo em tempo, que com tam boas prendas, nao os quero para educadores dos meus filhos. Sim, as verdades foram feitas para se dizer! Duras? que importa? mas verdadeiras.

Nao ha' duvida que a aboliçao dos exames, que e' uma aspiraçao peda gogica do momento que atravessa mos, la' pelos centros avançados do ensino, e' uma grande aspiraçao porque so' ela pode salvar a dignidade de uma raça, educando-a desde os bancos escolares...

Arlequim Verde

N. B. Acabadas estas linhas ve em dizer-me que os rapazes pediram, rogaram ao sr. Dr. Carmo dos Reis para que continuasse a ginastica e porisso, creio, que disistiram da carta colectiva. Mas, va' tudo isto dito sem comentos.... A. V.

भारत

गुरुवार माघ व० ९ मी शके १८४५

करांची परंपरा

लेखांक १ ला.

सर्व प्राण्यांत मानवप्राणी हा बुद्धिविशेष असल्यानें त्यांच्यांत जीवनार्थकलहासाठीं परस्पर अहमहमिका सुरू झाली असल्यास नवल नाहीं. आरंभींच त्यांच्यामध्यें कोणतीहि नियामक संस्था नसणें शक्य असल्यानें त्या अहमहमिकेचें पर्यवसान द्वेष, मत्सर, चुरस इत्यादिकांच्या योगानें 'बळी तो कानपिळी' या तत्वाच्या आचरणांत होऊन त्याचा अतिरेक झाला. किंव त्याचीं वाईट फळें दिसावयास लागलीं तेव्हांच गरीब दुबळ्यांच्या रक्षणांसाठीं राजसंस्थेची गरज भासली असली पाहिजे.

राजसंस्थेच्या उगमाचा शोध अशा रीतीनें लावला तर ती लोकांसाठीं व लोकांनीच घडवून आणलेली एक संस्था आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आह्मां आर्यांचें पुरातन वाङ्मय ज्यांत सांठवलें गेलें आहे आणि ज्यांस जगांतील आद्यिग्रंथ असें सार्थ ह्मणण्यांत येतें त्या वेदांतसुद्धां आमच्या ह्मणण्यांस आधारादाखल होणारीं पुष्कळ अवतरणें सांपडतील.

राज्यसंस्था राजसत्ताक असो किंवा प्रजासत्ताक असो किंवा निर्भेळ लोकसत्ताक असो, ती सुरळीत व सुव्यवस्थित रीतीनें चालविण्यास 'सर्वारंभा स्तंडुला प्रस्थमूलः' या न्यायानें द्रव्याची आवश्यकता आहे व हें द्रव्य, ज्यांच्या हितासाठीं ती निर्माण झाली आहे, त्या लोकांकडून करांच्या रूपानें जमविणें भाग आहे. फार पुरातन काळीं ह्मणजे सुराज्य ह्मणून पुराणांतरीं ज्याची ख्याति आहे, त्या श्रीरामराज्याच्या काळीं प्रजेकडून वसूल करण्यांत येणारा कर केवळ उत्पन्नाचा एक षष्टांश भाग असे. या एका कराशिवाय दुसऱ्या कोणत्याहि जातीचा कर प्रजेला द्यावा लागत नसून प्रजेच्या रक्षणाची सर्व प्रकारची जबाबदारी राजसंस्थेवर पडत असे व ती पाळणें हें एक आपलें नैतिक व धार्मिक कर्तव्य आहे असें राजेलोक आणि सर्व लहान मोठे अधिकारी समजत असत. हिंदुधर्मशास्त्र ग्रंथांतून राजा व प्रजा यां मधील जे संबंध व व्यवहार सांगितले आहेत त्यांवरून आमचें ह्मणणें पटल्याशिवाय राहणार नाहीं.

पुराण काळावरील नजर काढून ती मध्यकालीन इतिहासावर [ज्यांत ग्रामसंस्था सारख्या केवळ लोकमतानुवर्ती संस्थांचा जन्म झाल्याचें दिसून येतें] फिरविली तर असें दिसून येतें कीं, प्रत्येक गांवच्या लागवड जमिनीचा सारा त्या त्या ग्रामसंस्थांमार्फत वसूल केला जात असून, त्या वसुलांतून ठरावीक रकम सरकारांत भरली जात असे. यालाच सरकार देणें या नांवानें ओळखत असून जमिनीच्या साह्यास महसूल असें ह्मणत असत. हा महसूल आणि सरकार देणें यांत वरचेवर बदल होत नसे व ही पद्धति सासष्ट, बार्देस आणि तिसवाडी या भागांत अद्यापपर्यंत चालू आहे. परभारें मिळणाऱ्या या सरकार देण्याच्या उत्पन्नांतून सरकारला वसुलीप्रीत्यर्थ ह्मणून कोणताहि खर्च करण्याचें प्रयोजन नव्हतें व आतांहि नाहीं; यामुळें येणारें उत्पन्न फक्त राज्यकारभार व राज्यसुधारणा करण्याकरितां खर्च करण्यास मुबलक वाव मिळे.

स्फुट विचार

गोवा गोरक्षण संस्थाः— गोरक्षणासारख्या पवित्र कार्यास सर्वस्वी वाहून घेतलेली एक संस्था आमच्या गोमांतक प्रांतांत असावयास पाहिजे होती. तिची उणीव डिचोली येथें स्थापन झालेल्या वरील संस्थेनें भरून काढिली आहे. फार प्राचीन काळापासून आर्यलोकांस गोरक्षणाचें महत्व ठाऊक असल्यामुळें गोमातेला पुष्कळ पवित्र मानून तिची एखाद्या देवतेप्रमाणें पूजा अर्चा करण्याची चाल हिंदुधर्मानें घालून दिली आहे. आर्यांचीं पुराणें व इतिहास यांतून गोमातेचे प्राण वांचविण्यासाठीं स्वतःचे प्राण धोक्यांत किंबहुना खर्ची लावणारे अनेक शूर पुरुष आढळतील. मुसलमान व खिस्ती लोक या देशांत आपली सत्ता गाजवूं लागल्यापासून हजारों गोमातांचा संहार मांसभक्षणासाठीं होऊं लागला. त्याचे दुष्परिणाम ह्मणजे शेतकीचें मुख्य साधन जीं गुरें यांचा तुटवडा पडून, दुध दुभत्याच्या कमताईमुळें तर लहान थोरांच्या मृत्यु संख्येंत मनस्वी भर पडत चालली, हे होत. आणि ते आम्हां हिंदु लोकांसच नव्हे तर परधर्मी अशा खिस्ती लोकांस देखील जाणवूं लागले. येथील खिस्ती लोक सुद्धां या गोष्टीस अपवाद राहिले नाहींत. सरकार व खिस्ती लोक यांच्या नेतृत्वाखालीं चालणाऱ्या कांग्रेस प्रोव्हिंसियालच्या शेवटच्या बैठकींत गोरक्षणाचा ठराव एकमतानें पास झाला हें एक त्याचें उदाहरण आहे. अशा रीतीनें गोरक्षणाचें तत्व सर्वांस पटत चाललें असलें तरी "हिंसको कुतः दया" या वचनाप्रमाणें गोमांसहारी लोकांकडून तें सर्वस्वी कृतींत उतरणें शक्य नाहीं. आह्मीं हिंदु लोकानींच त्या साठीं जोराची चळवळ केली पाहिजे. याच दृष्टीनें कवळें येथ गेल्या डिसेंबरांत भरलेल्या प्रागतिक संघाच्या परिषदेनें गोरक्षणाचा ठराव पास करून आपली कळकळ दाखविली आहे. या चळवळीचा आरंभ वरील संस्थेनें कसा केला आहे तो गेल्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या तिच्या विनंतिपत्रकांवरून समजून येईल. त्या पत्रांत, व्यवस्थापकांनीं केलेल्या विनंतीस मान देऊन प्रत्येक हिंदु गृहस्थ गोरक्षणासाठीं यथानुशक्ति द्रव्य सहाय्य करील तर संस्थेच्या कार्यास इष्ट फळें लवकरच दिसावयास लागतील श्रीमंत हिंदु लोक व वर्षाचे कांहीं हजारो रुपये खर्च करणारी हिंदु देवस्थानें यानीं आपली मेहरनजर गोमातांकडे वळविल्याशिवाय राहूं नये अशी आमची सूचना आहे.

रेजिस्त सिव्हिल कमिटीः— प्रागतिक संघाच्या पहिल्या परिषदेंत निवडलेल्या वरील कमिटीच्या दोघां सभासदांकडून, आमच्या ता. १७ जानेवारीच्या अंकावर जी जाहीर सूचना प्रसिद्ध झाली होती तींत विनंति केल्याप्रमाणें अद्याप रेजिस्त सिव्हिलच्या कायद्यांत कोणत्या सुधारणा होणें हिंदुधर्मीयांच्या दृष्टीनें योग्य आहेत, त्यांच्या याद्या डॉ० साखरदांडे यांकडे कोणाकडूनहि पाठविल्या गेल्या नाहींत. हें वाचून आह्माप्रमाणें आमच्या वाचकांसहि खेद वाटल्यावांचून राहणार नाहीं हिंदु समाजांत, रेजिस्त सिव्हिलच्या कायद्याचा अभ्यास केलेलीं, त्या खात्यांत काम केलेलीं किंवा निदान नोंदणीच्या वेळीं येणाऱ्या अडचणींशीं प्रसंगापुरतें तोंड दिलेलीं माणसें कमी आहेत असें नाहीं. त्या सर्वांनीं आपापल्या अनुभवाचा फायदा रेजिस्त सिव्हिल कमिटीस करून दिल्यास कमिटीचें काम बरेंच सोपें पडेल. हें जाणून तर पुन्हां एकदां प्रयत्न करून पाहण्यासाठीं उक्त कमिटीनें सूचना पाठवावयाची मुदत येत्या ३० आब्रीलपर्यंत वाढवून फिरून विनंति केली असून ती आमच्या आजच्या अंकावर प्रसिद्ध झाली आहे. विनंतीखालीं सह्या असणाऱ्या गृहस्थांशिवाय दो. भास्कर म. बोरकर, वे. अंतोंयो शा. धुपकर, दो. सखाराम सूर्यराव सरदेसाई, प्रो. नारायण अनंत शे. बांदोडकर व श्री. भास्कर रु. नाईक प्रतापराव सरदेसाई वगैरे गृहस्थांचाहि समावेश त्या कमिटींत होत असल्यामुळें कायदा, धर्मशास्त्र व प्रत्यक्ष व्यवहार या तिहींची सांगड घालून, येणाऱ्या अडचणी निवारण्याचे मार्ग सूचविले जातील याबद्दल शंका नाहीं. परतु केलेल्या विनंतीस मान देऊन त्या कायद्या संबंधीचे आपापले विचार प्रगट करणें योग्य व श्रेयस्कर आहे. आह्माकडे कोणी पत्रव्यवहार केल्यास आह्मी आनंदानें प्रसिद्ध करूं.

दोन मुलाखतीः— येथील जकात वाढीच्या कायद्यांप्रमाणें आयात दारूवरील जकातींत बरीच वाढ झाली असल्यामुळें पोर्तुगालच्या दारूच्या व्यापाऱ्यांचें धाबें दणाणलें असून, त्याविरुद्ध तक्रार करण्यासाठीं लिझ्बोअ येथील व्यापारी असोसियनचे अध्यक्ष, वसाहतीच्या प्रधानांची मुलाखत घेण्यास गेले होते असें कळतें. त्याचप्रमाणें गव्हर्नरसाहेब व लोकनियुक्त सभासद यांच्यामध्यें त्या कायद्यानुळें आलेली तेढ आणि येथील व्या. असोसियनच्या तक्रारी काय आहेत त्याहि प-

साडेतीनशें नायकिणी प्रत्यहीं देवापुढें नाचगाणें करीत असत.

× + ×

देवालय उंच अशा ५६ खांबावर उभारलेलें होतें. या खांबाना रत्नजडीत पेहराव केलेला असे. प्रत्येक खांबावर त्या त्या राजाचें नांव होतें. गर्भागारांत उत्तम प्रकारचे सुवासिक धूप जळत असत. जवळ तिजोरी होती, व तींत देवाचें असंख्य जवाहीर भरलेलें असे. इ. स. १०२५ जानेवारी ३० रोजीं महंमुदाची स्वारी झाली. पन्नास हजार हिंदु कापले गेले. ! मूर्ति फोडली गेली !! मंदिराचा नाश झाला !!! अशा प्रकारें सर्व कांहीं व्हावयाचें तें होऊन गेलें व महंमूद ३० लाख दिनार घेऊन खुशाल स्वदेशीं गेला व आपण कांहीं तरी चमत्कार होऊन त्यांस परभारें शासन होईल या आशेनें स्वस्थ बसलों.

× * +

हें एकच उदाहरण पुरें आहे. पाहिजे तर आणखीं देतां येतील. सोमनाथाचें देवस्थान जागृत होतें; हजारों ब्राह्मण मंत्र जाणणारे होते; ऊर्जा चालतेली होती; असें असतां काय झालें ? उलट मुसलमानाचे पाय पक्के रोवून देशाला परतंत्रता आली ! बरें तें असो. आपल्या गोमंतकाचा इतिहास काय सांगतो ? जुन्या काबिजादींतील मूर्ति पोर्तुगीज लोकांच्या भयानें नव्या काबिजादींत कां गेल्या ? त्यावेळीं मूर्ति स्वस्थ बसून कां राहिल्या ? सामर्थ्याचा उपयोग करण्याचा तो प्रसंग खचित नव्हता काय ? मग कां केला गेला नाहीं ? याचें उत्तर कोण देईल काय ?

* × *

एकंदरीत देवस्थानची ऊर्जा चांगली केली गेली तरच देशाची उन्नति होईल हा प्रश्न लंगडा आहे. देवस्थानें हीं ईश्वराच्या मार्गाकडे लक्ष जाण्याची साधनें आहेत त्याकरितां मानवी प्राण्यामधील ईश्वरांश उन्नत होईल, अशीच तजवीज त्या मधून झाली पाहिजे. अगदीं भोळसट कल्पनांचा प्रसार करण्याचा काळ नाहीं. आपण अधोगतीला कां गेलों त्याचीं अनेक कारणें आहेत; देवाकडे त्याचा दोष नाहीं. जसे लोक तसे त्यांचे देव हेंच खरें. पुढील दोन प्रश्नांचा विचार पुढील लहरींमध्यें करूं.

के. भारती.

जाहीर विनंति

प्रा० संघाच्या कवळें येथील परिषदेच्या अधिवेशनांत निवडलेल्या रेजीस्त सिव्हील कमिटीचे सभासद या नात्यानें, भारत पत्राच्या ता. १० जानेवारीच्या अंकांत आमच्यांतील वे० पणशीकर व श्री. कामत यांनीं एक जाहीर सूचना दिली होती. तींत विनंति केल्याप्रमाणें, रेजिस्त सिव्हीलच्या कायद्यामुळें आम्हां हिंदु लोकांस नोंदणीच्या वेळीं कोणकोणत्या अडचणी येत असतात, त्यांत कोणकोणते फेरफार करणें इष्ट आहे वगैरे संबंधाच्या सूचना प्रा० सं० चे सेक्रेटरी डा. साखरदांडे यांकडे अद्याप आल्या नाहींत. त्या वेळीं दिलेली मुदत कमी असल्यानें ती येत्या ३० आब्रील पर्यंत वाढविली आहे. त्या मुदतींत ज्यांस कोणास सूचना करावयाच्या असतील त्यांनीं भारत-केपें, हिंदु-मडगांव, प्राची-प्रभा-फोंडा इ. पत्रांतून कराव्या. स्वतःचें नांव प्रसिद्ध व्हावयास नको असेल तर पत्रकारास तसें कळवावें. या प्रसिद्धीकरणानें टीका प्रतिटीका होऊन विचार विनिमयास अवसर मिळेल. खाजगी रीतीनें पत्रव्यवहार करण्यास मोकळीक आहेच. तरी कोणताहि पक्षभेद आडवा येऊं न देतां सर्वांकडून विचार व्हावा अशी नम्र विनंति आहे.

पणजी प्रा० सं० ची कमिटी.
माघ शु० १५ मा शके १८४५
बुधवार ता० २०-२-१९२४
रे. सि. क. तर्फे सर्वांचे नम्र सेवक
दत्तात्रेय तुकाराम शास्त्री पणशीकर
रामचंद्र वामन नाईक करंडे
सखाराम राया धुमे
विश्वनाथ शिवराम शिरवईकर
जनार्दन विष्णु कामत

Anuncios

A arrematação das avenças de despezas de Templo de SRI SANTERI de Xeldem da festividade de Zatrá terá lugar no dia 2 do segniote mez de Março no local das suas sessoes. Aos 24 de fevereiro de 1924 O escrivão do Pagode. *Raugi Rau Valaulicar*
Visto *T. B. Gaunço Dessai*

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio de escrivao do 2° oficio, Barreito, vao ser vendidos em hasta publica a' porta do tribunal judicial, sitaado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a estaçao de Sanvordem, no dia 11 do seguinte mez de Março, a's 10 horas, e pelo preço superior ao da avaliaçao os seguintes bens: 1/24 do predio rustico denominado "Golicodil sordo" sito em Colomba e 1/24 do predio rustico denominado "Choudalem ou Chouda visve" sito em Colomba, ambos da cultura de arroz, descritos na conservatcria predial desta comarca respectivamente sob os n.os 12459 e 12460 af. 56 v. 57 de Livro B. 35 e avaliado tambem respectivamente por 40 e 30 rupias. Penhorados nos autos civeis de execuçao por custas que o Ministerio Publico nesta comarca promove contra Xeuntu e seu marido Arjuna Gaocar, de Molpona de Molcornem, por apenso nos autos de inventario orfonologico a que se procedeu por obito de Seguna Velipo que foi de Colomba. Sao por este citados todos os credores incertos dos ditos executado e os co proprietarios e quinhoeiros nos termos e para os fins de lei. A' contribuiçao do registo por inteiro ficara' a cargo do arrematante. E para ser publico se expediu este Xeldem 16 de Fevereiro de 1924
O Escrivao de Direito do 2°. oficio
Aires Manuel Barreto
Verifiquei, 7
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

ESCOLA NORMAL

A proposito duns informes sobre os trabalhos escolares desse importante estabelecimento de ensino, hoje sob a direcgao interina do Bacharel sr. dr. Diogo do Carmo Reis, publicou o *Bharat* numa das suas edigoes passadas uma carta de um seu correspondente que naturalmente por engano das informaçoes que colheu, foi menos justo nos factos apontados e nos comentarios que aditou.

A verdade e', porem, que o regime da Escola Normal sob a direcgao do actual director interino tem sofrido importantes e beneficas modificaçoes, graças ao incansavel esforço empregado por esse director em melhorar esse ensino quer solicitando superiormente medidas para esse fim, quer trabalhando por sua vez, fora das horas escolares em manifacturar material de ensino novo e introduzir sistemas novos, vigentes na escola, como a *escola maternal* cujo esboço ja' esta' feito.

Quanto a' educaçao fisica que e' um dos pontos a que tem prestado mais atençao, a sua solicitude tem sido extrema em promover o desenvolvimento fisico nao so' em exercicios ginasticos mas em jogos escolares que muito prendem e atraem a atençao dos estudantes tendo langado as bases para uma *Associaçao de amigos de crianças*.

A pratica metodologica dos alunos normalistas tem sido tambem cuidada, organisando de acordo com o professor da pedagogia e os professores das escolas anexas e com os alunos mestres, horas e periodos proprios, de maneira a essa praticaser possivelmente a mais intensiva e constante, o que se tornava dificil por causa do numero de alunos mestres comparado com o das escolas anexas que sao so' duas.

O numero de horas de trabalho para o aluno e' d'ordinario de 5 sendo uma vez por semana nos dias em que haja pratica metodologica, de 7 1/2 horas o maximo, ainda assim pedagogicamente intervalado.

Projectando a Direcgao dos Serviços da Instrugao promover uma exposiçao inter-escolar e nesta ocasiao jogos e exercicios fisicos, a pratica da educaçao fisica carecia de ser mais intensiva, e neste sentido os exercicios fisicos tiveram de ser mais constantes, isto e', todos os dias para os rapazes, e so' duas vezes para as meninas, e organisadas quanto a hora, de acordo e segundo as conveniencias sobre tudo dos rapazes, que de tarde, geralmente, frequentam o Instituto Comercial ou dao liçoes particulares.

Consta-nos que os rapazes da Escola Normal convencidos das vantagens da educaçao fisica que se praticava, apezar de saberem que a festa interescolar ficava adiada, foram pedir ao mesmo director para continuar com os exercicios fisicos que faziam.

Ao sr. dr. Carmo Reis, temos pois so' a agradecer em nome do paiz. os beneficios que desse seu trabalho devem resultar para a nossa academia e para o nosso professorado, eis o que nos escrevem.

भारत

गुरुवार फा॰ शु॰ १ दा शके १८४५

करांची परंपरा

लेखांक २ रा.

चारशें वर्षांआधीं " आफोंस द आल्बुकेर्क " यानें प्रसिद्ध चांचा " तिमोजी नाईक " याच्या मदतीनें गोवा बेट हस्तगत करून घेतल्यानंतर, तेथील प्रजेशीं करार केला होता कीं, मागें होऊन गेलेले मुसलमान वगैरे राजे लोकांकडून जो कर वसूल करीत असत त्यांत किंचितहि फेरबदल न करितां पूर्वीप्रमाणेंच प्रजेचे सर्व हितसंबंध राखण्यांत येतील. त्या नंतर साष्टी व बार्देश हे महाल जिंकून घेतल्यावरहि त्याच कराराची पुनरावृत्ति करण्यांत आली; इतकेंच नव्हे तर चालू असलेल्या करांतून दरसाल आपणास स्वामित्वादाखल फक्त सहा लक्ष असर्फ्यां सोन्याच्या नाण्यांत [अपेली] देण्याच्या करारानें तिमोजी नाईकांस आल्बुकेर्कानें ते दोनहि महाल सोंपवून दिले होते. हा करार पोर्तुगीजानीं किती वर्षें पाळला हें समजाण्यांस साधन नाहीं. तरी पण आपलें बस्तान येथें नीट बसलेलें पाहून आणि या पुढें तिमोजीनाईकांसारख्या दोस्ताचें सहाय घेण्याची गरज लागणार नाहीं हें ध्यानांत आणून सदरील करारावर विरजण घालण्यांत आलें असावें व ते उभय महाल आपल्या खास ताब्यांत घेतले असावेत.

मुसलमान बादशाहीच्या जुलमास कंटाळून जाऊन, त्यांतून मुक्त होण्यास आपल्या मदतीची अपेक्षा येथील लोक करीत आहेत असें आपणाप्रमाणेंच चांचेगिरी करावयास दर्यांतून फिरत असलेल्या आ. दे आल्बुकेर्कास भासवून त्या करवीं मुसलमानी अंमल झुगारून लावण्याचें महत्कृत्य तिमोजीनें केलें खरें; पण त्यांत त्याचा स्वतःचा स्वार्थ साधावयाचा होता व तो त्यानें वरील करारानें तात्पुरता साध्य करून घेतलाहि होता. परंतु युरोपियन लोक सातां समुद्रांपलीकडून आलेले ! ते थोडेच तिमोजीनां बधतात ! त्याणी कसली तरी सबब पुढें आणून तिमोजीच्या हातावर तुरी दिलीच. असो.

यापुढें अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत सोंधेकर महाराज, सावंतवाडीकर वगैरे कडां केलेल्या तहान्वयें पोर्तुगीजानीं बरेच महाल आपल्या राज्यास जोडले. त्या तहांत देखील नवीन कोणतेच कर लादणार नसून असलेल्यांतहि वाढ करण्यांत येणार नाहीं अशीं अभिवचनें देण्यांत आलीं होती; तीं त्यानीं कितपत पाळलीं आहेत हें आज आम्हां भोंवतीं घिरट्या घालीत असलेल्या नानाविध करांवरून कोणाच्याहि लक्षांत येईल. पूर्वीचे कर कायम आहेत. त्यां शिवाय जकातीचा कर, अबकारीचा कर, देहम प्रेदिआलचा कर, सेलाद कागदाच्या व टिकिटांच्या रूपानें पडणारा कर, वारसी हक्कांचा कर, जमीन खरेदी वरील कर, वगैरे प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष करांचें पेंव फुटतच आहे व तें आणखी किती काळ पर्यंत एक सारखें चालू राहील हें आज कोणी सांगावें ?

पूर्वीचे राज्यकर्ते एखाद्या करांतूनच आपल्या राज्याचा खर्च भागवीत. त्या काळीं जकाती सारखे कर नव्हते असें नाहीं. पण ते इतके क्षुल्लक होते कीं, त्यांचा परिणाम लोकांच्या आवश्यक पदार्थांवर कधींहि होत नसे. मुसलमान राजे हिंदु प्रजेकडून जिजिया या नावांचा कर वसूल करीत. त्यांत द्रव्योत्पादनापेक्षां परधर्मियांचा छळ करणें हाच मुख्य हेतु असावा असें वाटतें. त्याकाळीं वरचेवर होणाऱ्या लढाया प्रजेच्या स्वास्थ्यास बाधक होत असल्या तरी शांततेच्या काळांत लोक पुष्कळ सुखी असत. हिंदुस्थानांत पिकत असलेलें धान्य परदेशीं जाणें शक्य नसल्यानें आवर्षण दुष्काळ असल्या नैसर्गिक प्रसंगाशिवाय येथील लोकानीं अर्धपोटीं; उपाशीं, राहण्याचा प्रसंग नसे. अन्ना नतर लागणारा कापड वगैरे हरेक जिनसांची पैदास देशांतल्या देशांत होत असल्यामुळें पैसा बाहेर जाण्यास मार्ग नव्हता. राज्यकारभार हिंदी लोकांकडूनच होत असल्यामुळें हल्लीं प्रमाणें खर्चहि ज्यास्तीं येत नसे. राजसेवा करणें हें आपलें एक कर्तव्य आहे असें मानणारे त्या वेळचे कामदार लोक साध्या राहणीनें वागणारे असल्यानें, आणि देशांत सुबत्ता नांदत असल्यानें कमी वेतनावर संतुष्ट असत. सरकारी खजिन्यांतील पैसा आपल्या खिशांत आणण्यासाठीं ते हल्लीं प्रमाणें कोणत्याहि वाममार्गाचा अवलंब करीत नसत. अशा रीतीनें राज्यकारभार सुरळीत चालूं लागला, जमे पेक्षां खर्च ज्यास्ती होईनासा झाला, प्रजा व राजा यांमध्यें पीतापुत्रांप्रमाणें प्रेमसंबंध राहून प्रजेचीं दुःखें तींच आपलीं दुःखें, प्रजेचें सुख तेंच आपलें सुख असें राजेलोक मानूं लागले ह्मणजे नवेनवे कर बसवून प्रजेला हैराण करून सोडण्याचें महपातक घडणेंच संभवनीय नव्हतें. सध्याच्या राज्यकर्त्यांनीं साराच उलटा अनुभव आणून दिला ! वर्षानुवर्षे जमेपुढें खर्चाचा आंकडा, त्याची तोडमिळवणी करण्यास नव्या करांचा बोजा, तो वसूल करण्यास नवीं खातीं निर्माण करणें, पुन्हा त्या खात्यांचा खर्च, तो भागविण्यास पुन्हा नवे कर, रुपयांचे रेंस व रेंसाचे रुपये करण्यास कामदारांची भरती व त्यांचा पगारखर्च अशी एकसारखी करांची परंपरा लागून राहिल्यामुळें आजची ही दुःख स्थिति ओढवली आहे. ती घालविण्यास अनावश्यक खातीं, अनावश्यक कामदार कमी करणें, राहिलेल्यांच्या पगारांत छाटाछाट करणें, रेपुब्लिकच्या मैमता तत्वास लागलेली काजळाचा डाग जो ख्रिस्ती धर्माचा संबंध त्याशी फारकत करणें वगैरे उपचार होणें जरूर असून त्यांची तरतूद होण्यावरच आमची भवितव्यता अवलंबून आहे.

स्फुट विचार

'दक्षिणी सारस्वत' :— उपयुक्त माहितीनें भरलेला असा सदरील नावांचा एक उत्कृष्ट लेख **विविधज्ञानविस्तारा**च्या शेवटच्या अंकांत प्रो॰ धर्मानंद कोसंबी यानीं लिहिला असून, त्याच्या वाचनानें गोमांतकीय सारस्वतांच्या सत्तेला खग्रास ग्रहण लागण्यास जीं कारणें सावनीभूत झालीं त्यांची मीमांसा करण्यास सोपें पडतें. आपसांतील फाटाफूट व ऐषआरामाच्या संवयी या प्रमुख दोन कारणांमुळें पोर्तुगीज लोकांचा त्या वेळीं पराभव करण्याचें सामर्थ्य गोव्यांतील सारस्वतांत सपशेल लुप्त झालें होतें, असा त्या महत्वाच्या लेखाचा निष्कर्ष निघतो. एरवीं तरी कोणत्याहि राष्ट्राच्या स्वातंत्र्यनष्टतेचा इतिहास अवलोकन केल्यास, त्याच कारणांचा प्रभाव जेथें तेथें चमकलेला आढळून येतो. हिंदुस्थानचें स्वातंत्र्य कशामुळें नष्ट झालें ? फाटाफूट व ऐषआरामांमुळें. रोमन राष्ट्राचें स्वातंत्र्य कशामुळें परकयांच्या विशाळ व अक्राळविक्राळ उदरांत 'गडप' झालें ? फाटाफूट व ऐषआरामामुळेंच. अर्थात् फाटाफूट व ऐषआराम हीं कोणत्याहि लोकांचें स्वातंत्र्य गिळंकृत करणारीं निसर्गदत्तच कारणें आहेत, असें विधान केल्यास त्याला अतिशयोक्तीचा दोष लागेल असें वाटत नाहीं.

घ्यावयाचा बोध:— प्रो. कोसंबी यानीं माहितीनें परिपूर्ण भरलेल्या आपल्या त्या वाचनीय लेखांत सारस्वत सत्ता ऱ्हासाचीं जीं मूळ कारणें पुढें केलीं आहेत तीं जरी सार्वत्रिक स्वरूपाचीं आहेत, तरी सारस्वतांच्या उद्धारार्थ सारस्वतांनीं त्यांपासून योग्य तो बोध घेतला पाहिजे. सदरील लेखांत कथन केलेल्या मनोरंजक गोष्टींनीं केवळ मनोरंजन करून घेऊन, लेखकाच्या ऐतिहासिक माहितीची किंवा त्याच्या लेखन कुशलतेची नुसती तारीफ करून भागावयाचें नाहीं. तर ज्या दुर्गुणामुळें आमचा स्वातंत्र्य रवि अस्तंगत झाला त्या दुर्गुणाचा आतां तरी उच्छेद करण्याच्या प्रयत्नास लागून, गतवैभव पुन्हा प्राप्त करून घेण्यास पुढें सरसावलें पाहिजे. नष्ट झालेल्या भावना उद्दीपित करण्यासाठींच इतिहासाची एक सारखी ओरड चालू असते. हीच 'ओरड' प्रो॰ धर्मानंदजींच्या वाणींतून अप्रत्यक्ष कां होईना ?—कर्णरंध्रांत येऊन आदळते. फाटाफुटीचो कायमची ताटातूट करणें व ऐषआरामांच्या संवयींपासून अलिप्त होण्याचा कसून प्रयत्न करणें, ही द्वयीं शिकवण अंगीं भिनवून घेतल्यासच त्या 'ओरडी'चा योग्य बोध घेतल्यासारखें होईल. नुसती कोरडी सहानुभूति कोणाचीहि मति गुंग करील पण गेलेली वैभवसंपत्ति त्यामुळें गति बदलण्यास धजेल असें कोणीहि समंजस व्यक्ती खास मानणार नाहीं !

संस्थेचें अंग आहे याबद्दल दुमत असणें शक्य नाहीं.

आतां परस्पर सहाय्यक पतपेढीसंबंधीं विचार करूं. परस्पर सहाय्यक पतपेढीचा विषय आतां 'दंतकथा' राहिली नसून गो. हिं. अ. च्या प्रयत्नामुळें ही पतपेढी ' धि गोवा हिंदु परस्पर साहाय्यक पतपेढी ' या नांवानें आ त्याची बातमी रा. देसाई यांच्या कानावर हतक्यांत येऊन ठणठणीत आदळलीच अ सेल. रा. देसाई ह्मणतात त्याप्रमाणें वरील पतपेढी विभाग काढून रजिस्टर केली असल्याकारणानें तिच्यावर गो. हिं. अ. ची कायद्यानें मालकी राहणार नाहीं हें आह्मांस समजतें. केवळ मालकीसाठींच भांडण्यांस गो. हिं. अ. चा उदय झालेला नाहीं. ही संस्था कार्य करण्यासाठीं जन्मास आली आहे. संस्थेच्या सभासदांसाठीं व पर्यायानें गोमांतकांतील हिंदूंसाठीं ही पतपेढी गो. हिं. अ. नें निर्माण केली आहे. व पतपेढीचे समासद फार करून गो. हिं. अ. चेच सभासद होणार असल्यामुळें पतपेढीनें काम चांगलें करून दाखविणें म्हणजे गो. हिं. अ. चा हेतु पूर्ण होणार आहे. हेतु साध्य करून घेण्याचीच संस्थेची इच्छा आहे व हीच खरी इच्छा आहे असें आम्हांला वाटतें. (अपूर्ण)

पुंडलीक वामन घोटींग
कॉंट्रक्टर बिल्डींग नं. २ गिरगांव मुंबई
श्रीधर नरसिंह प्रभू
४० तारा बिल्डींग बदामवाडी गि. मुंबई.

वर्तमानसार

—ज० गोमीस द कोस्ताची मिलिटरी घटना पोर्तुगाल सरकारनें पास केल्याची वर्दता आहे.

—डॉ० मिनारी हे खिस्ती धर्माचे अभिमानी तर आहेतच, शिवाय खिस्ती नाचाचीहि त्यांना आवड असल्याचें कलंगुटच्या ' त्रिबून ' पत्रानें आनंदपूर्वक जाहीर केलें आहे.

—कोमिसांव दे मिस्योरीमेंताचे आद्य संस्थापक सि. मारांव्हियस हे लवकरच आपल्या कामावर रुजू होतील, असें कळतें.

—पणजीचा धका वाढविण्यांत येणार आहे.

—येत्या एप्रील महिन्याच्या २८ तारखेला 'साद' तारवाचा जाहीर लिलांव होणार असल्याबद्दलच्या जाहिराती मुंबई, मद्रास, कलकत्ता इ० ठिकाणच्या मुख्य मुख्य पत्रांत प्रसिद्ध करण्यांत आल्या आहेत.

—प्रिमैर व सेगुंद ग्रावाच्या [प्राथमिक शिक्षण] खासगी शाळांतील मुलांच्या परीक्षेस मजाव केला गेल्यामुळें २३० विद्यार्थ्यांचे अर्ज नामंजूर झाले !

—येथील मुनिसिपालटीचे कर चुकते करण्यास एक महिन्याची नवीन मुदत दिली आहे.

—दो० जुवांव फोंतीस यांस येथील कोर्टांत सरकारी वकील नेमण्यांत आलें आहे.

आत्मशुद्धीचा मार्ग

भारताच्या ४७ व्या अंकांत ' आत्मशुद्धीचा मार्ग ' या मथळ्याखालीं आलेला मजकूर वाचून ज्या दोन गृहस्थां बद्दल उल्लेख आला आहे ते गृहस्थ माझ्या पूर्ण परिचयाचे असल्यामुळें मला ह्या संबंधामुळें फार फार आनंद झाला व या बाबतींत कांहीं जरूर असलेला खुलासा मी त्या जवळ मागितला व आलेलें उत्तर वाचून त्यांच्या कर्तबगारी बद्दल अभिमान अधिक वृद्धिंगत झाला.

मुरारी का. शिरोडकर यांनीं अनेक बिकट परिस्थितीशीं झगडून आपला शिक्षणाचा मार्ग आक्रमण केला असून पुढील आयुष्यक्रमहि ते तितक्याच उज्वलतेनें आंखीत आहेत. सध्या घडून आलेल्या विवाहाबद्दल सर्व श्रेय त्यानांच देणें भाग पडतें. व याचें कारण उघडच आहे. ज्या त्यांच्या भगिनीचा विवाह त्यांनीं घडवून आणला तो आणला नसता तर त्याबद्दल त्यांना कोणीहि दूषण दिलें नसतें. परंतु त्याचा मनाचा जोर फार बळकट असल्यामुळें त्यांना ही गोष्ट मुळींच सहन होइना. आपणच कल्पना करा कीं इतक्या प्रौढ वयांत आलेल्या आपल्या भगिनीस वर शोधून काढणें, तिचा त्याला सम्मति मिळविणें, आपल्या वडील व बरोबरीच्या घरांतील इतर मंडळीच्या मनावर अनुकूल परिणाम घडवून आणणें वगैरे गोष्टी किती बिकट होत्या! याची कल्पना साधारण वाचकांस येणार नाहीं. फक्त त्या समाजांतील होतकरू माणसांना व त्या समाजांत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींनांच माहीत आहे.

त्यांनीं इतर कामांप्रमाणेंच या लग्नाच्या बाबतींतहि दाखवलेला धार्मिकपणा व कायदेशीरपणा हे अनुकरणीय होत. त्यांचा आशावादीपणा असा प्रखर होता कीं ही गोष्ट त्यांच्या मनानें घेतल्यावर त्यांनीं हिंदु धर्माचा जरूरी पुरता अभ्यास करून हिंदु धर्मास लागणाऱ्या कायद्यांचा चांगला परिचय करून घेतला व या कामीं त्यांनां पुण्याचे दे. भ. हरी भाऊ फाटक यांनीं मनापासून उत्तेजन देऊन वे. शा. सं. पटवर्धन शास्त्री, अध्यापक स्वावलंबन शाळा यांची गांठ पाडून दिली व धार्मिक बाबींचा पूर्ण पाठिंबा मिळाल्यावर कायदेशीर गोष्टी लक्षांत घेऊन त्यांनीं आपलें कार्य कोणत्याहि गोष्टीची उणीव पडूं न देतां पार पाडून नेतलें. दुसऱ्या बाजूनीं त्याचें वर संशोधनाचें काम चालूच होतें. सर्वांपेक्षां हें काम अधिक बिकट होतें. परंतु गायक समाजाची त्यांनां पूर्ण माहिती असल्यावरून त्यांनीं ही गोष्ट आपल्या विचाराशीं ज्यांचीं मतें बहुतांशीं जुळतीं आहेत अशा गृहस्थानां सवाल टाकून पाहिला व शेवटीं अवेडें येथील अनंत जयाजी आवडे यानां त्यांनीं आपली बाजु पूर्णपणें समजावून सांगितली आणि त्यांनाहि आपल्या बाणेदारपणास साजेल अशा प्रकारची मान्यता दिली. रा. आवडे यानां महात्मा गांधी यांच्या नवजीवन मधील त्यांनीं खालील उतारा वाचून दाखविला असावा:—

[महात्मा गांधींच्या मराठी-नवजीवन ता. १२-९-२१ यांतील उतारा.]

" या लेखांतून बारीसाल येथील पतित भगिनी संबंधानें मला लिहावयाचें आहे तेथें पतित भगिनी संबंधानें पाहिलेलें दृश्य मी केव्हांहि विसरणार नाहीं. ....खरा प्रकार प्रत्यक्ष पाहूनच बरोबर समजत असतो. त्यांच्याशीं बोलत असतांना सगळा वेळ मी दर शरमेनें मेल्याप्रमाणें झालों होतों. पुरुष वर्ग स्त्रियांच्या बाबतींत करीत असलेल्या अपराधांचें माप त्या वेळीं मी घेत होतों. अशा प्रकारच्या ह्या भगिनींचें पतन इरादापूर्वक त्यांच्या कडूनच होत नसतें त्यांचें पतन पुरुषांमुळेंच होत असतें. स्वतःची विषय लालसा पुरी करून घेण्यासाठीं पुरुष वर्गानें स्त्री जातीवर अनंत प्रकारचे अत्याचार करून ठेवले आहेत. ज्यानां संधी मिळेल त्यांनीं अशा पतित भगिनींनां धैर्याचा हात देऊन वर काढलें पाहिजे. जेव्हां जेव्हां त्या भगिनींच्या भेटीचें दृश्य माझ्या दृष्टी समोर खडें राहतें तेव्हां मी स्वतःला विचारीत असतों कीं, त्या प्रत्यक्ष माझ्याच मुली किंवा भगिनी असत्या तर ? असत्या तर काय ? आहेतच; त्यांनां वर काढणें हें माझें व हरेक पुरुषाचें कर्तव्य आहे

या कार्यावरून ह्या समाजाच्या सर्व आडकाठ्या दूर झाल्या असून त्यांना कोणत्याहि बाजूनीं कुरकुर करण्यास जागा राहत नाहीं. तरी सर्वांनां माझी अशी विनंति आहे कीं त्यांच्या पासून उत्तम धडा घेऊन आपापल्या कामास लागावें व कांहीं वर्षांनतर हा समाज नष्टताच कीं काय असें जगाला भासवण्याचा प्रयत्न करावा.

पणजी हितचिंतक

* * * मुरारी का. शिरोडकर यांनीं बजावलेल्या अत्युच्च कामगिरीबद्दल भारतानें त्यांचें अभिनंदन केलेंच आहे. इतर समाजाचीं मनें न दुखवितां स्त्रोन्नतीचा मार्ग कसा आक्रमितां येतो, याचा सक्रीय धडा शिरोडकरांनीं आपल्या समाज बांधवांस घालून दिल्याबद्दल ते त्यांचे सदैव ऋणी राहतील अशी आम्हांस खात्री वाटते. सं० भारत

डोंगरी येथील ह० भ० प० मुकुंदराजानीं गुरु-शिष्य-स्वामींच्या स्वार्थ रचून गायलेल्या कविता.

श्री मद्वैष्णव गुरु-शिष्य-स्वामीवंदन

श्लोक [प्राकृत]

श्री मद्वैष्णव सद्गुरू यतिवर श्री इंदिराकांत कीं ।
तच्छिष्यामृत सिंधुचंद्र कमलानाथ प्रतापी निकी ।
भक्ति ज्ञान विरागपूर्ण गुरुनी शिष्यानु कंपी सदा ।
वंदोनी विनयें तदीय चरणां जोडूं करी सर्वदा ॥१॥

श्री इंदिराकांत तीर्थस्वामी वर्णन.

पद. (ताल झंपा.)

नमो इंदिराकांत गुरु शांत मूर्ते ॥
शरण सकलाह आम्ही कीं तुम्हांतें ॥ धृ० ॥
मूर्ती बहु साजिरी कांत हेमापरी ।
वस्त्र भरजरी शिरीं वेष्टिलेंसे । उर्ध्वपुंड्राची ती भाळिं
शोभा किती नेत्र कमलापरि शोभती तें ॥ नमो० ॥ १ ॥
भ्रकुटी धनुवापरी नासिका गोजिरी आड निवारी सत्य
दोन्ही । शुभ्र आरक्त दाडीम बीजापरी दंतपंक्तिहे तशी
वदनिं दिसते ॥ नमो० ॥ २ ॥
वर्तुळाकृति वरा कंठी गौर तो शंख जणूं शुभ्रतो दिव्य भासे ।
छातिं अंगावरी माळ रुळते उरीं अस्खलित वैखरी
बोध देते ॥ नमो० ॥ ३ ॥
दीर्घ बाहू पहा शत्रु वधुनी सहा जाळिनी ते महापाप अनुचें ।
अभय वर देऊनि ज्ञान ही बोधुनी चिद्घनानंद वैकुंठदाते
॥ न० ॥ ४ ॥
देह मी हें नुरो प्रेम हरिचें भरो । चित्तिं कधीं न स्फुरो विषयवृत्ति ॥ कृष्णसुत दत्तदासाचि विनयाचिही मागणी हीं
ह्मणी मान्य तू तें ॥ नमो० ॥ ५ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु.

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivao do 2 ° oficio que este assina, correm editos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2 ° do art go 197 do Codigo do Processo Civil, citando a Madeva Esvonta Sinai Sansgueri, marido da interessada Tulxi, de Cumbarjua e ora ousente em parte incerta do territorio britanico, para assistir a todos os termos ate final do inventario orfanologico a que se procede por obito de Anandibai Odarcar, que foi de Oder deste Concelho, sendo inventariante e cabeça de casal Madeva Suriagi Sinai Odarcar, da dita e deduzir querendo nele os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento. E para ser publico se expediu este, Xeldem da Comarca de Quepem, 5 de Fevereiro de 1924.

O escrivao de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Camara Municipal de Quepem

A Ex.ma Camara Municipal deste concelho manda anunciar que no dia 23 de Março proximo seguinte, pelas 10 horas, terá lugar na estação ferro viaria de Curchorem a arrematação, em hasta publica, da renda proveniente do imposto da taxa de oito tangas por cada tone de capacidade não inferior a uma tonelada que entrar ou sair com mercadoria de qualquer ponto marginal dos rios que banham este concelho á exepção do Porto de Betul, pelo restante tempo do corrente ano — Outrosim se faz publico que na sessão ordinaria de 24 do referido mez de Março, proceder-se-há á arrematação do aludido imposto de tones, relativamente ao Porto de Betul.

As respectivas condições estarão patentes no acto da praça.

Quepem, 26 de Fevereiro de 1924.

O secretario da Camara Municipal,
Visvonata Rudraji S. Sirvoicar

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivao do 2 °, oficio, correm editos de 30 dias, contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2 ° do art. 197 do Cod. do Proc. Civ., citando a Xencora Govinda Senevi Paliecar, morador em Codiabaga de Karvar, parte incerta do tenrritorio britanico, para 10 dias posteriores a citaçao e findo o praso de editos, vir pagar no cartorio do escrivao que este assina, a quantia de quatro rupias duas tangas e cinco reis e meio, de custas liquidadas no traslado dos autos de execuçao por custas instaurada pelo Digno Agente do Ministerio Publico nesta comarca, contra Subodra' Porbina, viuva, de Loliem, por apenso aos autos do inventario orfanologico a que se procedeu por obito de Nilcenta Balcrisna Porobo Gauncar, que foi da dita e na qual o citando e' ora exequente cessionario, ou nomear no mesmo praso bens suficientes a penhora, sob pena de ser devolvido o direito ao exequente o mesmo Magistrado do Ministerio Publico e seguir a execuçao os seus ulteriores. Para ser publico se espediu este, Quepem 16 de Fevereiro de 1924.

O escrivao de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

विचार-लहरी

लहर–आठवी.

आतां आपण दुसऱ्या मुद्याकडे वळूं. बातमीदार ह्मणतात कीं, पाश्चात्य शिक्षणामुळें लोकांचा देवा-धर्मावरील विश्वास उडालेला आहे. हें त्यांचें ह्मणणें कितपत खरें आहे व कांहीं अंशीं खरें असल्यास त्यास कारणें काय आहेत तें आपण पाहूं.

* * *

प्रथमतः आपण देवाकडे वळूं. हा विषय अत्यंत महत्वाचा असल्यामुळेंच लेखांपुढें विस्तारानें मांडण्याचें आम्ही योजिलें आहे, तरी पूर्वींच्या काळीं ईश्वराबद्दल काय कल्पना होती; त्यानंतर त्याला काय स्वरूप प्राप्त झालें; तसेंच अधिकारी व्यक्तींचीं मतें काय आहेत; धर्मग्रंथ काय ह्मणतात; तें पाहूं.

× × ×

आह्मा आर्य लोकांचें मूळ निवासस्थान हिंदुस्थानांत नसून वेदकालापूर्वी त्यांचें आगमन येथें झालें, असें विद्वानांचें बहुमत आहे. येथें आल्यानंतरच त्यांनी वेदाची रचना केली. व हेच आर्यांचे पहिले धर्मग्रंथ होत. यांचा काळ अदमासें इ० स० पूर्वी ३००० वर्षें हा होय. येथें वाचकांना स्पष्ट सांगणें भाग आहे, तें हें कीं, बौद्धकालापूर्वींच्या इतिहासाच्या काल गणनेसंबंधी पुष्कळ मतभेद आहेत [illegible] भारत युद्धाचा काल इ. स० पूर्वी १२५० गणतात. तर चिं. वि. वैद्यांसारखे इतिहासज्ञ तो काल इ. सन पूर्वी ३१०० ढकलतात. परंतु आह्मांस यावेळीं तरी या मुद्याशीं कांहींच कर्तव्य नसल्यावरून त्याचा ऊहापोह करण्याची आमची इच्छा नाहीं.

* * *

प्रथमतः आपण वेदांकडे वळूं. ऋग्वेदांतील मुख्य देवता ह्मणजे इंद्र, वरुण, अग्नि, सोम वगैरे होत. सर्वांत मुख्य पद इंद्राकडे होतें. ही देवता बलाढ्य आहे अशी कल्पना होती; व त्यामुळें संकटाचे वेळीं तिचा धांवा करीत. इंद्र हा असुरांचा नाश करून वेळोवेळीं पृथ्वीवर पर्जन्य पाडतो, व त्याच्यामुळें पृथ्वीवर धनधान्याची समृद्धि होते, असा त्यावेळीं समज होता. व याबद्दल त्याची स्तुतिपर अनेक सूक्तें आहेत. त्या देवतेचें स्वरूपहि फारच मोठें कल्पीत, तो फार बलाढ्य देव आहे. त्याचा पराक्रम फार मोठा आहे. तो ऐश्वर्यांत श्रेष्ठ आहे. जगांतील सर्व ऐश्वर्याचा मालक आहे. तो अमर्याद आहे. आकाशाला तो आपल्या डोक्यानें आधार देतो. वगैरे वगैरे पुष्कळ सूक्तें या देवतेच्या स्तुतिपर आहेत यावरून सिद्ध होतें.

× + ×

त्या नंतरची देवता वरुण ही होय. ह्या देवतेच्या अंगीं शारीरिक गुणांपेक्षां नैतिक गुण अधिक वास करीत असतात; अशी कल्पना होती. ती आकाशाची देवता आहे, असें ते मानीत. “निष्कलंक शक्तीचा राजा वरुण आकाशांत गृहांत आहे, तो सूर्याचे किरण आपल्या ताब्यांत ठेवून, हे किरण तो पृथ्वीवर पाठवितो, व त्यामुळें आमच्या जीवनाचें रक्षण होतें.” या सूक्तावरून त्याच्या शक्तीची कल्पना येईल. त्याच्या स्वरूपाचें वर्णन असें आहे कीं, त्याला हात पाय वगैरे सर्व अवयव आहेत, तो वाहनांतून फिरतो, व खाणें, पिणें, वगैरे क्रिया करतो. त्याचा चेहरा अग्निसारखा आहे. ही देवता दयेचा सागर आहे, असें त्यावेळीं मानीत. “हे राजा वरुण हजारो जडीबुटी तुझ्या आहेत. तुझी दया आहे त्यापेक्षां अधिक होवो. आम्हांला पापांपासून दूर ठेव. व आमच्याकडून जीं पापें झालेलीं आहेत, त्यांपासून आमची मुक्तता कर.” या सूक्तावरून कळून येईलच.

* * *

यानतर अग्निदेवतेकडे वळूं. होमांत व इतर ठिकाणीं प्रत्यहीं मनुष्याचा संबंध येत असल्यामुळें या देवतेचें विशेष महत्व मानीत. या देवतेचें नांव तिच्या मूळ भौतिक स्वरूपाचें नांव एकच असल्यामुळें त्याच्या स्वरूपाच्या वर्णनांत मनुष्यत्व थोडें दिसतें. याला गृहपति असेंहि नांव दिलेलें आढळतें. आमच्याप्रमाणेंच इराणी लोकांतहि ह्या देवतेला अतिशय महत्व आहे. हे लोक आह्मां आर्यांचे अत्यंत निकटचे बंधु आहेत. ते आपल्या अग्यारींतील अग्नि केव्हांहि विझूं देत नाहींत.

× × ×

यानंतर बाकीच्या देवता होत. विष्णु या देवतेला आज जें महत्व आहे; तें महत्व ऋग्वेदकालीं नव्हतें. त्याकालीं ह्या देवतेचें स्थान बरेंच खालीं होतें. बाबू रमेशचंद्र दत्त आपल्या प्राचीन भारत ह्या ग्रंथांत ह्मणतातः पौराणिक कालांत अर्थात् येशू खिस्तानंतर ह्या देवतेला प्रधान पद मिळालें.

\+ × +

या सर्व विवेचनावरून प्रकृति पूजाच त्याकालीं जास्त प्रचारांत होती हें कळून येईलच. कर्मयोगी देशभक्त लाला लजपतराय, आपल्या “भारत वर्षका इतिहास” ह्या पुस्तकांत ह्मणतातः– वेदामध्यें एक ईश्वराची पूजा आहे. इतर निराळ्या ज्या कांहीं देवता आहेत त्या सर्व एका परमेश्वराचींच भिन्नभिन्न रूपें आहेत. वेदांमध्यें वाद विवाद नाहीं; फक्त प्रार्थना विधी आहेत. वेदांत मूर्तिपूजा नाहीं शिवाय मूर्तींचीं मंदिरें असल्याचाहि पुरावा नाहीं.

× * ×

यावरून वेदकालीं ईश्वराविषयीं काय कल्पना होती, हें वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच. आतां आपण उपनिषदांकडे वळूं. उपनिषदांचा काळ हा, भारतीय तत्वज्ञानाच्या इतिहासांत अत्यंत महत्वाचा काल होय. याच कालांत अत्यंत उच्च असें तत्वज्ञान जगापुढें आलें. उपनिषदांत ईश्वराविषयींच्या कल्पना फारच उदात्त आहेत. इतक्या उदात्त कल्पना कोणत्याहि धर्माच्या ग्रंथांत नाहींत; असा आरोप केल्यास अस्थानीं होणार नाहीं. उपनिषदांची पुष्कळ युरोपियन पंडीत मुक्तकंठानें प्रशंसा करीत आहेत. या ग्रंथांत तक्या कांहीं उच्च कल्पना आहेत कीं, पुढें मागें सर्व जग ह्याच कल्पनांवर विश्वास ठेवणार यांत शंका नाहीं.

* * *

एकंदर उपनिषदें १४ आहेत, त्यांचीं नांवें:- बृहदारण्यक उपनिषद, छांदोग्य उपनिषद, तैतिरीय उपनिषद, ऐतरेय उपनिषद, कौषीतकी उपनिषद, केन उपनिषद, कठ उपनिषद, ईश, श्वेताश्वेतर, माडुक्य, महा नारायण, प्रश्नोपनिषद, मैत्रायणीयोपनिषद व मुंडक, हीं होत. यांचा काळ निश्चित नाहीं. यांतील कांहींचा काळ बऱ्याच नंतरचा आहे. तरीपण यांत एकसूत्रता आहे. आतां आपण या ग्रंथांत ईश्वराचें स्वरूप कसें सांगितलें आहे तें पाहूं

\+ + +

या विश्वाचें कारण काय? हा प्रश्न जेव्हां आमच्या ऋषींच्या ध्यानांत आला, तेव्हां ते ध्यान करीत बसले.

ते ध्यान योगानुगता अपश्यन्देवात्मशक्तिं स्वगुणैर्निगूढाम्।
यः कारणानि निखिलानि तानि कालात्मयुक्तान्यधितिष्ठत्येकः॥
श्वेताश्वेतर–१, २.

‘मग ऋषी ध्यान करीत बसले असतां देवरूप जो आत्मा त्याचीं सर्व जीं बाहेरून दिसणारीं कार्यें त्याच्या आंत लपून राहिलेली शक्ती दृष्टीस पडली, आणि काल व जीवात्मा यासहीत जीं कारणें आपापला व्यापार करीत आहेत. त्यावरील अधिष्ठाता ह्मणजे त्यांस व्यवस्थेंत ठेवणारा तो आहे असें त्यांनीं पाहिलें. मग ते ह्मणालेः,

स्वभावमेके कवयो वदंति काल तथाऽन्ये परिमुह्य मानाः।
दैवस्यैष महिमा तु लोके येनेदं भ्राम्यते ब्रह्मचक्रम्॥
श्वेताश्वेतर ६-१

“मूढ होत्सते कांहीं पंडीत स्वभाव हें कारण असें समजतात. परंतु हें ब्रह्मचक्र सतत भ्रमण करीत आहे; तें देवाच्या महिम्यानें” अर्थात् हें विश्व कोणातरी एका श्रेष्ठ शक्तीच्या आधारानें चालतें असा त्यांनीं सिद्धांत ठरवून, त्याचें ज्ञान कसें होईल ह्याचा विचार ते करूं लागले.

\+ × +

मग हाहि मार्ग त्यांना सांपडला.

न चक्षुषा गृह्यते नापि वाचा नान्यैर्देवैस्तपसा कर्मणा वा,
ज्ञान प्रसादेन विशुद्धसत्त्व स्ततस्तु तं पश्यते निष्कलं ध्यायमानः॥
मुंडकोपनिषद ३-१-८

“चक्षूच्या योगें परमेश्वराचें ज्ञान होत नाहीं; वाणीच्या योगें नाहीं, दुसऱ्या इंद्रियांच्या योगें नाहीं, तपाच्या किंवा कर्मांच्या योगें नाहीं. परंतु अंतर्यामी ज्ञान निर्मल झालें ह्मणजे प्रपंचापासून उत्पन्न होणारे जे मळीन संस्कार त्यापासून आत्मा मुक्त झाला, आणि रज व तम या पापजनक गुणांचा निरास होऊन केवळ सत्वगुण अथवा सात्विक भाव हृद यांत उदित झाला ह्मणजे मनुष्य ध्यान करावयास लागला असतां, सर्व प्रकारें परिपूर्ण असा जो परमेश्वर त्याला पाहातो.”

\+ * +

नंतर त्यांनीं त्याचें अस्तित्व कठें कोठें आहे याचा शोध चालविला:

सर्वतः पाणिपाद तत्सर्वतोऽक्षि शिरोमुखम्।
सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति॥ श्वेताश्वेतर—३-१६

विश्वामध्यें ब्रह्मस्वरूपी परमेश्वराने हात पाय चोहींकडे आहेत; त्याचे डोळे मस्तक, मुख हीं चोहींकडे आहेत. त्याचे कर्ण चोहींकडे आहेत. तो सर्वांस व्यापून राहिला आहे.

* × *

अशा परमेश्वराची प्राप्ती करून घेण्याचा मार्गहि उपनिषदांत सांगितला आहे.

अस्तीत्येवोपलब्धव्य स्तत्त्वभावेन चोभयोः।
अस्तीत्येवोपलब्धस्य तत्त्वभाव प्रसीदति॥
कठ—२-६-२३

तो आहे हा जो साहजिक अंतःकरणाचा प्रत्यय त्याच्यायोगें त्याची प्राप्ती करून घ्यावी. ह्या प्रत्ययाच्या योगें दोघांचें ह्मणजे जीवात्मा आणि परमात्मा यांचें स्वरूप कळतें. तो आहे अशाच मनाच्या प्रत्ययानें तो प्राप्त झाला ह्मणजे त्याचें खरें स्वरूप स्पष्ट अनुभवास येतें.

\+ * +

या सर्व विवेचनावरून उपनिषदांमध्यें किती गंभीर व उदात्त विचार भरलेले आहेत, तें कळून येईल. शिवाय यांत आणखी विशेष तें हें कीं, ह्या काळीं अशा तत्वज्ञानाच्या ऊहापोहांत ब्राह्मणच तेवढे भाग घेत असें नसून क्षत्रिय, शुद्र व स्त्रियाहि असत. गार्गी या प्रसिद्ध विदुषीनें याज्ञवल्क्यांना ह्या जगाच्या उत्पत्तीविषयीं इतके प्रश्न केले आहेत कीं, शेवटीं याज्ञवल्क्यांना असें सांगणें भाग झालें:- गार्गी इतके विचार करूं नकोस. नाहींतर हें ज्ञान तुझ्या डोक्यांत न सांपडल्यामुळें तें फुटेल; देवताविषयीं कोणीहि फार खोल प्रश्न करूं नयेत. फार फार विचारण्याचें सोडून दे.” यावरून त्या काळीं सर्व लोकांत या तत्वज्ञानाची चर्चा कशी चालत होती, हें कळून येईलच. असो. आतां या उपनिषद तत्वज्ञानाचा परिणाम शेवटीं काय झाला, व नंतर भगवद्गीतेसारखा जगन्मान्य ग्रंथ निर्माण होऊन, त्यानें कशी क्रांति केली, त्याचा विचार पुढील लहरीमध्यें करूं.

क. भारती.

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivao do 2 ° oficio que este assina, correm editos de 3o dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2 ° do artigo 197 do Codigo do Processo Civil, citando a Madeva Esvonta Sinai Sansgueri, marido da interessada Tulxi, de Cumbarjua e ora ousente em parte incerta do territorio britanico, para assistir a todos os termos ate final do inventario orfanologico a que se procede por obito de Anandibai Odarcar, que foi de Oder deste Concelho, sendo inventariante e cabeça de casal Mádeva Suriagi Sinai Odarcar, da dita e deduzir querendo nele os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento. E para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de Quepem, 5 de Fevereiro de 1924.

O escrivao de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivao do 2 ° oficio, correm editos de 30 dias, contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2 ° do art. 197 do Cod. do Proc. Civ., citando a Xencora Govinda Senevi Palliecar, morador em Codiabaga de Karvar, parte incerta do territorio britanico, para 10 dias posteriores a citaçao e findo o praso de editos, vir pagar no cartorio do escrivao que esta assina, a quantia de quatro rupias, duas tangas e cinco reis e meio, de custas liquidadas no traslado dos autos de execuçao por custas instaurada pelo Digno Agente do Ministerio Publico nesta comarca, contra Subodra Porbina, viuva, de Loliem, por apenso aos autos do inventario orfanologico a que se procedeu por obito de Nilcanta Balcrisna Porobo Gauncar, que foi da dita e na qual o citando é ora exequente cessionario, ou nomear no mesmo praso bens suficientes a penhora, sob pena de ser devolvido o direito ao exequente o mesmo Magistrado do Ministerio Publico e seguir a execuçao os seus ulteriores. Para ser publico se espediu este. Quepem 18 de Fevereiro de 1924.

O escrivao de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

कांहीं व्यक्तींचीं नावें सुचवितों: पोर्तुगीज लोक ज्यांच्या कीर्तीचा हेवा करतात ते आगोस्तिन्य लोरेंस व आबाद फारीय यां शिवाय फ्रांसिस्क लुइस गोमीस, बेनेदित फारीय इत्यादि हे होत. आपल्या निष्कलंक अकलुषा संरक्षणाकरितां आपल्या उज्वल देशभक्तीच्या उद्धारार्थ आणि आपल्या समाजाचा भविष्यत्काळ निर्वेधपणें गांठण्याकरीतां, आपल्यापुढें जो आज महत्वाचा प्रश्न येऊन पडला आहे तो हा कीं, आपल्यास ज्या युरोपियन संस्कृतीनें बंदे गुलाम करून बनविलें, किंवा ' एस दे केइरोज' याच्या शब्दाप्रमाणें परावलंबी करून सोडलें, त्या संस्कृतीशीं विरोध करणें हें आपलें अवश्य आणि पवित्र कर्तव्य होय. हा विरोध सुकर होण्याकरितां. होईल तितक्या त्वरेनें आपण संघशक्ती निर्माण केली पाहिजे आणि त्या संघशक्तीसाठीं, आपलें बुद्धिसर्वस्व आणि आत्मिक बल एकवटलें पाहिजे.

उपसंहारः— तेच विद्यार्थीद्वय आपल्या लेखाचा उपसंहार पुढील प्रमाणें करितातः " युरोप मध्यें जेथें जेथें बेलगामी क्रांतीचा नंगा नाच चालू आहे तेथें तेथें पंडित वर्गानीं प्रतिकाराची आरोळी ठोकण्यास कमी केलें नाहीं. लेबोंदा उदेत, चार्ल्स माडरस सारख्या पंडितानीं, पूर्वपरंपरा हीच समाज धारणेचा पाया असल्यावरून त्याचा [illegible] पूर्वपरंपरेस सोडून करणें अतिशय धोक्याचें असल्याचें पूर्ण विचारांतीं आणि सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे. यावरून पाहतां, आमच्या गोमांतकांतील लोकांत तूर्त जो राष्ट्रीय भावनाचा अभाव दिसतो तो काढून टाकण्याची उपाय योजना आपण आपल्या पूर्वपरंपरेंतच शोधली पाहिजे. आमच्या गोमांतकांतील शिशु वर्गाच्या शिक्षणाची जबाबदारी ज्यांच्या वाट्यास आलेली आहे, त्यानीं सद्गुण आणि आत्मिक बल याच्या पायावर युरोपियन संस्कृतीशीं विरोध सुचवून, त्या संस्कृतीनें आमच्या वाढविलेल्या गरजांस मूठमाती देणें हें त्यांचें पवित्र कर्तव्य आहे. ही गोष्ट यशस्वी होण्यास त्यानीं जनतेला आपल्या देशाचें ऐतिहासिक शिक्षण दिलें पाहिजे हा इतिहास १५१० साला नंतरचा नसून त्याच्या पुष्कळ वर्षां पूर्वींचा असून तोच सत्य आणि शुद्ध असा होय. गोमांतकांतील लोकांमध्यें राष्ट्रीय भावनाचा आणि तत्सदृश सद्गुणांचा अभाव असण्याचें मुख्य कारण आपल्या लोकांत हिंदुस्थानच्या इतिहासाविषयीं वसत असलेलें अज्ञान हें असून, त्या इतिहासाचा आणि हिंदुस्थानांतील भाषांचा अभ्यास हे आपल्या लिसेवाच्या शिक्षणक्रमांतील अवश्य विषय व्हावेत. गत शतकांत होऊन गेलेल्या ' मिचेल' नावांच्या सुप्रसिद्ध इतिहासकारानें आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासास आणि ग्रंथ संचीत मनुष्य जातीचा अरुणोदय आणि सुधारणेची जननी असें म्हटलें आहे. त्या इतिहासाचा आणि ज्ञानाचा अभ्यास, आपल्यामधील राष्ट्रीय सद्गुणांचा आणि भावनांचा विकास होण्याकरितां, अवश्य व्हावा अशी आमच्या देशबांधवांस सूचना आहे. या अभ्यासाबरोबरच, आधीं मुख्यतः इंडियन होण्या करिता, आणि जगामध्य पूर्व काळीं आपला जो उच्च दर्जा होता, तो दर्जा पुनरपि प्राप्त करून घेण्यासाठीं, आमच्या सुशील पूर्वजाचे धार्मिक आचार आमच्या परंपरा आणि चालीरीति यांचाहि अभ्यास व्हावा, अशी आमची प्रेमळ सूचना आहे- या जोरदार व हृदयस्पर्शी विचारांचा परिणाम येथील 'सुधारलेल्या' ख्रिस्ती जनतेवर होईल काय ?

करवाढीची तात्विक मीमांसा

(ले० रामचंद्र व्यंकटेश नाईक)

आज जो विषय पुढें ठेवून मी दोन शब्द लिहिण्याचें योजिलें आहे, तो विषय म्हटला म्हणजे नुकत्याच झालेल्या करवाढी संबंधींचा होय. या विषयावर प्रत्येक देशभक्त वर्तमानपत्रकारानें, राज्यव्यवहाराचा विचार करणाऱ्या प्रत्येक राजकारणी पुरुषानें, सामाजिक दृष्ट्या विचार करणाऱ्या कैक समाज शास्त्रज्ञानीं, व्यापार उदिमाच्या चष्म्यानें पहाणाऱ्या अनेक शेटशेटजीनीं व आर्थिक दृष्टीनें राज्यव्यवहार निरीक्षिणाऱ्या बहुतेक अर्थशास्त्रज्ञानीं, आपापल्यापरी, खाजगी व सार्वजनिक रीतीनें, लिहिणें, वाचणें, बोलणें, निषध करणें, प्रतिपादणें, टीका करणें, वगैरे वगैरे सर्व कांहीं गोष्टी आज तागायत होऊन गेल्या असल्या कारणानें, करवाढीचा हा विषय सरसकट सर्व सज्ञान पुर्तुगीज नागरिकांच्या पूर्ण माहितगारीचा झालेला आहे. तसेंच, करवाढीची त्यांच्यावर नैतिक जबाबदारी येते त्यांच्यावर जनतेकडून दोषारोप होणें व उलट पक्षीं, बादशहानें, बुंदसे गेलेल्या अक्कल पुनर्संपादनार्थ केलेल्या प्रयत्नांच्या धोरणावर, आत्मसमर्थनें, आत्मसमर्थनांचीं आत्मसमर्थनें, यांची यातायात चालू आहे. एका वर्तमानपत्रकारानें तर या करवाढीच्या मुलभूत कारणाच्या सागरांत दडी-बुडी मारून देखिल त्याच्या बुडाशीं कोण -काय आहे याचा आत्मसाक्षात्कार करून घेत त्याचें जाहीर पुकारून, अंधेरनगरींतील न्यायाधिशानें, अनेक पूर्व कारणपरंपरांस अनुसरून केलेल्या चोर सोडून संन्याशास सुळीं देण्याच्या न्यायाच्या धोरणावरची करवाढविषयक म्हणून कांहीं अधोगमनीं कार्याकारण परंपराहि त्या आपल्या पत्र द्वारा पुढें दडपून दिली आहे ! तेव्हां या विषयावर ज्या ज्या बाजूंनी विचार झाला आहे त्यावर आणखी कांहीं तरी लिहून चर्वितचर्वणाचा दोष माथीं न येण्याच्या इराद्यानें, आज मी तो विषय केवळ नजरे पुढें ठेवून, कांहीं विचार भारताच्या वाचकांपुढें मांडण्याचें योजिलें आहे.

मडगांवहून मुंबईला आगगाडीनें जातां येतें व प्रत्येक उतारूच्या तिकिटाची किंमत आठ रुपये चौदा आणे आहे, इतक्याच या माहितीनुरूप आठ रुपये चौदा आण्याचें तिकीट विकत घेऊन मडगांवच्या स्टेशनांत उभ्या राहिलेल्या गाडींत जाऊन केवळ बसला म्हणजे तो उतारू मुंबईस पोंहोंचेलच असें जसें खात्रीलायक सांगतां येत नाहीं, म्हणजे आपल्या नियोजित स्थळीं पोंहचण्यास अमूकच गाडींत बसलें पाहिजे, अमूक तमूक जंक्शन स्टेशनवर गाडी बदलली पाहिजे, याहि गोष्टी जाणून करणें अत्यावश्यक होय; तद्वत, प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या नावानें गुडी उभारिली व अत्युच्च अशा तत्वत्रयीचा तिच्या कपाळावर डाग दिला म्हणजेच केवळ ज्या हेतूनें प्रजासत्ताक राजपद्धति प्रस्थापित झालेली आहे तो हेतु साधेलच असें कधींच सांगतां येणार नाहीं. प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या पवित्र अंतिमाप्रत पोंहचण्यास, अलीकडील सुधारक ब्राह्मणाच्या खांद्यावरील यज्ञोपवितवत् त्या गुडी व्यतिरिक्त, आणखी कैक गोष्टींची प्राधान्यैंकरून अत्यावश्यकता असते. करितां त्याचा थोडा विचार करूं.

आज पावेतोंच्या सर्वसामान्य समाज शास्त्राच्या अनुभवाचा विचार केला असतां असें सांगतां येतें कीं, प्रत्येक सुशिक्षित समाजाची प्रत्येक बाबतींत एका अमूक तमूक पल्याप्रत पोंहचलेली स्वहितावलोकन दृष्टि आंखिलेली असते व ही त्याची लाभा लोभ दृष्टि आपल्या स्वतःच्याच स्वार्थावर कधींच विरोधी अशी असत नसते. एका समाजाचा स्वार्थ, आपल्या समाजाच्या आकांक्षाहून भिन्न असलेल्या दुसऱ्या समाजाच्या स्वार्थाशीं विरोधी असूं शकतो; पण, कोणताहि समाज किंवा तदंतर्गत व्यक्ति, आपल्याच हितस्वार्थावर विरोधी असल्याची साक्ष इतिहासाकडून मिळणें शक्य नाहीं. तेव्हां, हाच सिद्धांत राजकीय व्यवहाराशीं जोडून असें म्हणतां येतें कीं, कोणत्याहि समाजानें चालविलेला आपलाच राज्यव्यवहार आपल्याच हितस्वार्थावर विरोधी अर्थात आपल्यासच क्लेशकारक असा कधींच असत नाहीं.

हा सिद्धांत लक्षांत घेऊन गोव्यांत सध्या प्रचलित असलेल्या प्रजासत्ताक राज्यव्यवहाराचा यथार्थ पाहिला असतां असा प्रश्न उद्भवतो कीं, जर आपणच चालविलेला राज्यव्यवहार आपल्याच हिताशीं विरोधात्मक अर्थात् आपल्यासच दुःखकारक असा असूं शकत नाहीं, व जर गोव्यांत चालतो तो राज्यव्यवहार प्रजासत्ताक होय, म्हणजे आपणेंच चालविलेला आपलाच राज्यव्यवहार होय; तर मग, करवाढीसारखे आपल्यासच अत्यंत दुःखकारक असे कायदे होऊन आपल्याच राजकीय आकांक्षांची पायमल्ली होते व आपल्यासच दुःख कां भोगावें लागतें ?

पण, या प्रश्नाचें उत्तर फार सोपें आहे गुणाकार पडताळून पाहिला म्हणजे त्यांत चूक असल्यास जशी ती सहज बाहेर निघते, तसें प्रजासत्ताक राज्यपद्धति ज्या तत्वानीं निगडित झालेली आहे या तत्वांशीं प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या नावावर चालू असलेली परिस्थिति पडताळली कीं, वरील प्रश्नाचें उत्तर सहज मिळतें. व त्याच प्रश्नाच्या उत्तरार्थ थोडा ऊहापोह करणें हा आजच्या या लेख लेखनाचा मुख्य उद्देश होय. तेव्हां, अनेकविध राज्यपद्धति गोव्यांत चालू असलेल्या प्रजासत्ताक राजपद्धतीच्या आधारभूत तत्वांचा आधीं विचार करूं.

प्रजासत्ताक राज्यपद्धति अमलांत येण्याच्या मुळाशी असा एक राजकीय सिद्धांत आहे कीं, एखादा मनुष्य इतर मनुष्यांहून प्रबल असला म्हणजे, तो प्रबल मनुष्य, आपल्या इच्छेस येईल त्या प्रमाणें, इतर दुर्बल मनुष्याकडून पाहिजे तें हिरावून घेईल. हें तत्व प्राणिमात्राच्या नैसर्गिक स्वभाव धर्मानुसार प्रस्थापित झालेलें आहे. करितां जें तत्व एका मनुष्यास लागू तेंच तत्व समसुखदुःखानीं निगडित असलेल्या अनेक मनुष्यांसहि लागू आहे. अर्थात, कोणतीहि राजकीय सत्ता, इतर समाजाहून तुलनात्मक दृष्ट्या लहान समाज ऊर्फ कंपूच्या हातांत राहली असतां, तो लहान समाज ऊर्फ कंपू, आपल्या व्यतिरिक्त राहिलेल्या इतर समाजाकडून, आपल्या इच्छांनुसार पाहिजे तें हिरावून किंवा करून घेईल, किंवा आपल्या सुखसोईनुसार पाहिजे तें त्या इतर राहिलेल्या, अधिक संख्यांक पण राजकीय सत्तेस प्रत्यक्ष रीतीनें मुकलेल्या समाजावर लादून टाकील. अशा परिस्थितींत हा बिन सत्ताधारी समाज अल्प संख्यांक सत्ताधारी समाजाचा अधिकाधिक गुलाम बनून दिवसें दिवस अधिकाधिक दुःखी होईल. हें दुश्चिन्ह कैक वर्षांच्या अनुभवाअंती ओळखलें जाऊन वरील राजकीय तत्वाचा बहुसंख्यांक बिनसत्ताधारी समाजाकडून पुरस्कार होऊन, ती राजकीय सत्ता, सरसकट सर्व सामान्य जनतेकडून आपल्या हातीं घेण्यांत आली, म्हणजेच प्रजासत्ताक राज्यपद्धति प्रस्थापित झाली.

या मिळत्या राजकीय तत्वास जगांतील सर्व देशांच्या राजकीय इतिहासाचा पूर्ण पाठींबा आहे. यावरून त्या तत्वानुसार गोव्यांतील प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा थोडा विचार करूं; म्हणजे करवाढीसारखे जाचक कायदे, आपणच चालविलेली आपली राज्यपद्धति कशी प्रसवते, हें कोडें सहज उलगडलें जाईल.

—रगजी व मुरगांव या दोन्ही ठिकाणी प्लेगचे उन्दीर अजूनहि आढळतात.

"O sr. Presidente (em aparte):—
Ainda bem, ainda bem!

O sr. P. A. de Sousa (continuando) dizem que a manga *Pairi* e' comparavel a' nossa *Afonsa*. E' uma heresia..."

Offenbach que toque, a todo o vagar, a sua musica dedicada a' Gra duqueza de Golrostein! ..

A que vem pois o aparte da Presidencia? O que ela esperava do sr. Souza era uma objurgatoria medonha e feroz contra os jornais mas o' decepgao crudelissima, o sr. Sousa falou da heresia do*Pairi* e da *Afonsa*!...

Neste assalto, imprevisto, o sr. Jaime de Morais, deu uma queda que deve ter-lhe molestado gravemente ... Nossos melhores votos para que nao caia noutra igual...

Arlequim Verde

Ecos & Critica

O CUMULO

O Conselho Legislativo deste Estado escolheu por 12 votos o sr. Roberto Bruto da Costa, advogado feito a pressa, para representar a India no Congresso Colonial em Lisboa.

Felizmente nao depende do nosso Legislativo conceder ao sr. Roberto o premio Nobel; alias tinhamos mais essa para completar o ridiculo em que tudo aqui se vai afogando.

O NOSSO FUTURO...

A *Terra* de Margao, no seu artigo *Acintes* manifestou-se sobre o futuro da India, depois de varias consideragoes a proposito do "Gandhismo, jovens hindu's, Reagindo....etc. etc. etc. o que por ora nao vem ao caso.

Da referida manifestagao se conclui que o independente bissemanario nao deseja, de maneira alguma, que a India dos nossos avoengos venham a ser—no futuro, e' claro—uma dependencia da Peninsula Hindustanica, admitindo apenas ou India livre cu ingressada na metropole portuguesa.

E' louvavel o patriotico desejo da destemida folha marganense.

Simplesmente, resta saber se o futuro que e' tao caprichoso como a sorte grande do Hospicio, lho vingara'.

O BHARAT

Nao se publicara' o proximo nu'mero do nosso jornal, visto o seu pessoal que trabalhou regularmente durante todo o ano, desejar gosar, legit'mamente, do descanso anual por poucos dias.

Merece descango quem trabalha.

FALTA DE ESPACO

Por falta de espago, somos impelidos a reservar para o proximo numero muitos assuntos da importancia, nomeadamente, os comentos em volta do occidentalismo mal entendido dalguns dos nossos irmaos cristaos que pelos modos, fascinados pelo seu resplendor de...pechis-beque, nao veem um palmo diante do nariz.

UM LINDO TRABALHO

Recebemos e agradecemos um lindo livrinho, publicado pela Comissao de Melhoramentos, intitulado "Porto de Mormugao."

O trabalho contem lindas fotogravuras do Porto de Mormugao' Cais ponte de Ferro, Palace Hotel etc. com iuformagoes u'teis sobre o importante porto.

UM SUPLEMENTO

O *Bharat* publicou um suplemento em portuguez e marata, verberando o lamentavel atendado, perpetrado no seio do C. Legislativo, na pessoa do sr. Joao de Figueiredo.

A falta de espago nao nos permitiu a sua insergao na presente edigao, pelo que pedimoc desculpa aos nossos leitores.

A PROVINCIA

Este jornal..."branco" volta a "batalhar" contra o "Bharat." la' porque este teve a ousadia de pintar o futuro ... "preto" da India que os da "Provincia" entendem ser seu pasto.

Esta' bem que nao desejamos priva-los do delicioso sonho que os embala...

De resto, o que tem de ser ha' de ser e nao e' a "Provincia" que ha' de modifica-lo. Nao parece?

चुकीची दुरुस्ती

रा. रा. संपादक 'भारत' यांसः-

'प्रागतिक संघाच्या' नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या नव्या घटनेंतील नियम १९ मध्यें

"......स्वागत कमिटी निवडली जाऊन तिच्या सल्ल्यानें परिषदेसंबंधाच्या सर्व कांहीं गोष्टी कार्यकारी मंडळाकडून ठरविण्यांत याव्या"

या ऐवजीं

"......स्वागत कमिटी निवडली जाऊन तिनें परिषदेसंबंधाच्या सर्व कांहीं गोष्टी कार्यकारी मंडळाच्या सल्ल्यानें ठरवाव्या"

अशी दुरुस्ती झाली पाहिजे.

परिषदेंत चर्चेकरितां मांडलेल्या मसुद्यांत हें कलम नसून तें मागाहून चर्चेअंतीं घातलें गेलें आहे. त्याची त्याच वेळीं घाइघाईनें घेतलेली नोट पेनसिलीनें पुसट स्वरूपांत घेतली गेल्यानें ही चूक घडून आली असून ती आतांच निदर्शनास आणली गेल्यानें जरा उशिरां प्रसिद्ध होत आहे.

ज्या ज्या गृहस्थांनां घटनेच्या प्रती यापूर्वींच वांटल्या गेल्या असतील त्यांनीं त्यांनीं आपापल्या प्रतींत ही दुरुस्ती करण्याची मेहरबानी करावी. इतर प्रतींत ती करण्यांत येत आहे.

कळावें ही विनंति.

आपला

शांबा कृ. सू. सरदेसाई

सेक्रेटरी प्रा. सं. परिषद

भारत

मि. फा॰ व॰ ७ मी गुरुवार १८४५

शिमगा

आपणाला आपल्या देशाकरितां चालू परिस्थितीस रक्त सांडण्याचें कारण नाहीं. आपण जर कशाचा त्याग केला पाहिजे तर तो पैशाचा होय.

भारत सेवक--गोखले.

विसाव्या शतकांतील ऋषींच्या वंशजानों, तुह्मीं जर आपल्या खऱ्या आत्म्यास ओळखण्यास तयार नसाल; श्रुतीची जर तुह्मांला गुमान नसेल आणि असें असूनहि प्राचीन काळीं हिंवाळ्या करितां केलेले कपडे, जर आजच्या भर उन्हाळ्यांत आह्मीं वापरूं असा आग्रह धराल, तर तुह्मांला तुमच्या पूर्वजांची शपथ आहे. तुमची स्थिति तूर्त काय आहे हें मेहरबानीनें लक्ष्यांत आणा.

स्वामी–राम

मूळ उत्पत्ति

आर्यांचें मूळ निवासस्थान उत्तर ध्रुवाकडील प्रदेश होय. तेथील कालमान निराळें होतें. सहा महिने रात्र व सहा महिनें दिवस होत असे. सूर्य दर्शनाचा लाभ त्यांस सहा महिने पर्यंत न झाल्यानें त्यांचे ते दिवस अत्यंत त्रासांत जात. व त्यांना ह्या रात्री केव्हां एकदां संपून सूर्यप्रकाशाचें दर्शन झाल्यास पुरे, असें होई. या रात्रीचा त्यांना किती भय वाटत असे हें अथर्व वेदांतील खालील मंत्रावरून कळून येईलः 'ह्या काळ्या कुट्ट रात्री आह्मी पार पाडूं असें कर, भद्रे असें कर' अशा प्रार्थना ते करीत असत. ह्या दीर्घ रात्री जेव्हां एकदां संपून सूर्य दर्शन होई, तेव्हां त्यांच्या आनंदाला पारावार रहात नसे. व या आनंदाप्रीत्यर्थ, घरांतील होमकुंडांत नवीन अग्नीनें आराधन करून, गांवांबाहेरहि मोठा थोरला ढीग पेटवून ते आपला आनंद प्रगट करीत. त्या काळीं त्यांचेकडे वाद्यें नव्हतीं; वरून त्या ऐवजीं मोठ्यानें आरोळ्या ठोकीत.

त्या काळच्या परिस्थितीप्रमाणें हें कदाचित योग्य होतें, परंतु ती परिस्थिति निघून गेली. उत्तर ध्रुवाकडील वसाहत रहाण्यास निरुपयोगी ठरून गेल्यामुळें त्यांनीं नवीन वसाहती स्थापन केल्या, परंतु मूळ चाल थोडी फार कायम राहिली.

आजचें स्वरूप

कसें आहे हें आह्मीं सांगण्याचें कारण नाहीं आजची परिस्थिति निराळी आहे, सूर्य प्रकाश सदोदीत आहे. होळी पेटाविण्याचें कारण नाहीं. असें असतां ती चाल प्रचारांत आहे इतकेंच नव्हे तर त्या दिवसांत बिभत्स शब्दांनां ऊत येतो. परमेश्वरानें या दिवसांत पाहिजे तसें निंद्य आचरण करण्यांस परवानगी दिलेली आहे, असें समजलें जातें. तर कित्येक ठिकाणीं सुशिक्षित ह्मणविणारी मंडळी नाटकें करणें, सुंवारी वाजविणें, कलावंतिणीचा नाच करणें, त्यांचे बरोबर स्वतः नाचणें, रंग उधळणें, अनीतीला प्रोत्साहन देणें वगैरे कामें करीत असतात. कित्येक ठिकाणीं या कामाप्रीत्यर्थ शेंकडो, तर जांबावली सारख्या ठिकाणीं हजारों (७।८ हजार रुपयांचा तरी नाश होतो) रुपये खर्च होतात. अशा उत्सवांचा आपल्या समाजाला कांहींच फायदा नाहीं, असा सूर अलीकडे कांहीं विचारी तरुणांच्या डोक्यांतून निघत आहे. हें खरोखर देशाच्या भाग्योदयाचें सुचिन्ह होय. परंतु यावर

जुन्या मंडळीचा आक्षेप

असा आहे कीं, शेंकडो वर्षें आपले पूर्वज हा सण साजरा करीत आहेत, असें असतां जर तो आतां बंद केला, तर आमच्यावर ईश्वराचा कोप होणार नाहीं काय ? तसेंच आह्मीं या दिवसांत जें अन्नछत्र घालतों त्या योगानें गरीब लोकांचें कल्याण होतें. हें अन्नदानाचें पुण्य कां घालवावें ? याला

आमचें उत्तर

असें आहे कीं, अन्नदानाचें पुण्य उत्तम आहे परंतु तें केव्हां ? भुकेलेल्यानांच अन्नदान करूं तेव्हां. उलट केवळ आळसामुळें श्रम न करितां जे फुकट खाऊ समाजावर पोसणारे आहेत, त्यानां अन्नदान करणें, म्हणजे संभावित भिकाऱ्यांची संख्या वाढविणें होय. या दानाचा असा विपरीत अर्थ झाल्यामुळेंच हिंदुस्थानांत भिकाऱ्यांची संख्या २०।२२ लाख झाली आहे, व हे समाजावर भारभूत होऊन राहिले आहेत. दुसरा मुद्दा म्हणजे ईश्वराविषयांचा होय. या बद्दल आमचें असें सांगणें आहे कीं, आपण जे मूर्ति म्हणजेच देव असें समजतां, तें सोडून द्या. मूर्ति ह्या ईश्वराकडे लक्ष्य लावण्याचीं साधनें आहेत. मूर्ति जर देव असत्या, तर १२५१ सालांत बनारसमध्यें शहाबुद्दीन घोरीनें एकाच दिवसांत एक हजार मूर्तींचा विध्वंस केला नसता. पठाण मूर्तींच्या अंगावरील दागिनें चोरूं शकले नसते. ह्याचा पूर्ण विचार करा. देव या शब्दाची व्याख्या काय आहे ? अनीतीच्या कार्यांनीं जर देव प्रसन्न होतात, तर मग ते देव कसले ? हा सर्व आपल्या भोळेपणाचा परिणाम आहे. तो सोडून द्या, व परिस्थितीप्रमाणें वागा. त्याचप्रमाणें

तरुण मंडळीचा आक्षेप

असा आहे कीं, वर्षभर काम करणाऱ्या लोकांना, वर्षाकांठीं कांहीं थोडे दिवस तरी करमणूक पाहिजे. हे आठ दिवस मौजेने घालविण्यानें पुढील सालीं काम करण्यास उत्तेजन येतें. शिवाय आज युरोपांत सुद्धां कार्निव्हालचा सण आहे. तसेंच आमचेच बांधव जे खिश्चन, ते सुद्धां हा सण 'तीन दिवस मोठ्या आनंदानें पाळतात. मग आह्मींच तो कां साजरा करूं नये ? याला

आमचें उत्तर

असें आहे कीं, युरोपांतील परिस्थिति निराळी आहे. ते लोक नुसता कार्निव्हालचा सण सा-

सूचना

भारतः- शिमग्याच्या सणानिमित्त चालाबादप्रमाणें भारताचा येता 'अंक प्रसिद्ध होणार नाहीं. चैत्र महिन्यांतील प्रथमांक नवीन स्वरूपांत निघेल, अशी खात्री वाटावयास लागली असून सचित्र स्पेशल अंकहि कमी अधिक मुदतींत प्रकाशित करण्याचा सुयोग जुळून येईल, अशी सबळ आशा आहे. स्वकर्तव्य योग्य रीतीनें बजावण्याचे कामीं भारत शिकस्तीचे प्रयत्न करीत आहेच. आश्रयदात्यानींहि आपली जबाबदारी ओळखून, ती स्वयंस्फूर्तीनें पार पाडण्यास झटल्यास, उभयतांसहि हितावह होणार आहे, हें निराळें सांगण्याचें कारणच नाहीं.

वर्तमानसार

—प्रिमैर ग्राव व सेगुंदग्रावच्या परीक्षांचे दिवस कित्येक ठिकाणीं अजूनहि ठरविण्यांत आले नसल्यानें जिकडे तिकडे गोंधळ माजून राहिला आहे.

—यंदां ठिकठिकाणच्या सरकारी व बिन सरकारी शिक्षण खात्यांनील नापास मुलांचें प्रमाण मनस्वी वाढल्यामुळें, लोकांत असंतोष पसरला आहे.

—येथील कोर्टतील एका स्वार्थी व लांचलुचपतीस सोकावलेल्या कामगाराविरुद्ध वरिष्ठ सरकारांत तक्रार अर्ज गुदरण्यांत आला आहे.

—प्रागतिक संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा येत्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेस पणजी येथें भरणार असून, गोवा हिंदु-मंडळाची 'समेट सभा' म्हापसे येथें लवकरच जमणार आहे.

EM LEGITIMA DEFESA

O

A Terra de 19 do mês passado faz sob a epigrafe *Acintes* uma serie de acusações estultas e mal fundadas contra os indús de Goa em especial e os da India toda em geral.

E' tam insultoso este artigo quam estipida é a tatica do seu autor que lembrando-se á má hora de enegrecer as páginas do seu jornal inseriu nas colunas de honra umas afirmações que bem claro deixam transparecer o nivel do seu tacanho espirito que traido pela hipocrisia que há tanto contivera, á custa dum esforço sobrenatural, o ódio e rancor com que via a classe hindú, arrebentou-se afinal vomitando lavas talvez mais quentes e intoleraveis que as que desmancharam em poucos momentos os mais solidos edificios do cubiçoso Japão.

Bem diz um proverbio.

Duvidar é mais filosofico que dicidir e o sr. director da *Terra* não esquecendo esta maxima inicia a sua fantastica prosa digna de se regista nos anais de História (se realmente o sr. Bernadino Teotcnio da Costa delinquiu não sabemos mas ...) por umas duvidas sobre o facto de que após um longo enredo de frases ofensivas á classe hindú tira umas conclu-sões tambem fantasticas.

Ora não nos dirá sua exa. que se vê pouco ao facto do caso de Sanquelim, como o confessa, a razão por que se ousou dirigir palavras duras sem base nem fundamento, tentando malparar o elemento hindú ainda ante os metropolitanos que êle sempre presou?

E' bem possivel que se tenha referido varias vezes ás individualidades de S. Francisco Xavier e D. João de Castro; mas isto não seja para sua exa. construir a seu belo prazer castelos em traços negros.

Pois confessamos e confessaremos sempre, que, se as figuras de Castro e de Xavier são-nos odiosas sob certos pontos não nos são tambem menos veneradas sob outros.

* * *

Os hindús de Goa não são como os de outrora. A letargia antiga já não os paraliza hoje. Aquelas peias monarquicas, que os embaraçavam em grande parte, e as perseguições inquisitoriais, não enchem senão capitulos de Historia. Agora, veem-se êles no pleno regime republicano, o seu doce sonho há tanto desejado, numa era de redempção que lhes garante a sua liberdade, igualdade e fraternidade em toda a esfera da acção e emfim num periodo ... que livre, de côres, castas ou qualquer dos preconceitos similhantes inocula a vida a quem tiver merecimentos proprios e condena á morte quem os não tiver.

O pobre camponês das Novas Conquistas, farto de aturar opressões e cansado de satisfazer a ambição de certos interesseiros infatigaveis desta nossa malograda terra, que se gabam hoje, em grande parte, de seus *senhores*, cedendo á natural luz de civilização abre os seus olhos todo embasbacado, e concio dos abusos e caprichos dos seus batcarás que há tanto ignorantemente nutrira, expõe aos poucos ao governo a sua dolorosa situação, agravada cada dia pelos inconvenientes de administração, o que provoca a ira dos nossos...supostos patriotas, desfeita em insultos e injurias analogas ás que aparecem no artigo *Acintes*.

E o jornal que é a voz do povo a que compete mais que ninguem esta sacrossanta missão de ventilar problemas tam delicados, deve ter um talho fixo e imparcial presando, acima de tudo, o interesse colectivo e não o desprezando por umas conveniencias fazendo do jornal um instrumento da sua ambição tam sómente para salvar directa ou indirectamente a responsabilidade dos seus irmãos e amigos.

Não é isso verdade, sr. director da *Terra*?

Não acha ridiculo que um bom jornalista faça papel duma mulher preversa?

Não se lembra de que sua excia., tempos, atraz censurava tanto o papel do sr. Prazeres da Costa, como representante da Nação e que mudou-se duma forma tam engenhosa cantando como virtudes o que pouco antes, criticava como defeitos?

E incrimina a *Terra* os inocentes hindús, dizendo que increpam o deputado, porque não os brindou com empregos públicos!

Os hindús nunca mendigaram ao sr. Prazeres da Costa, empregos publicos, antes pelo contrário, censuraram e censurarão sempre o seu capricho de arruinar a India de que se arvora protector, criando cada vez novos encargos para anichar seus amigos e parentes.

E não é muito para estranhar que estejamos a sofrer as suas consequencias cada dia mais agravantes, pois que a base de tudo isto é a malefica bicha de hipocrisia da parte dos nossos patriotas que, cegos pelas conveniencias e interesses particulares, longe de apoiar a franqueza dos seus irmãos em declarar o que sentem, andam a interpretar mal ainda as suas mais justas aspirações.

Não prossiguiremos mais nas nossas considerações sobre o artigo em questão, pois quanto mais se analiza mais nos convencemos do mesquinho intuito do seu autor que não tem outro fim senão fazer dos inocentes hindús intrumento da diabolica inspiração da sua pena, semeando assim rixas e odios na classe hindú que jamais esquecerá a sua gratidão de cedo ter-lhe tirado as vendas mas o único alvitre que quizera apresentar a sua excia. ao terminar era que escusse desta forma conseguir qualquer dos seus obscuros fins, proprios dum jornalista de tal quilate, pelo menos enquanto os nossos governantes europeus nos acolham á sua sombra desapaixonada, defendendo, mais uma vez o repetimos, directa ou indirectamente sob a capa altruista os seus irmãos ou amigos á custa do sacrificio duma classe inteira...

Sanguem, 5—4—24

UM JOVEN HINDU

Camara Municiqal de Quepem

ANUNCIO

Anuncia-se que será novamente levada em hasta publica, na sessão ordinaaia de 14 do corrente, pelas 13 horas, a renda do imposto de tonas de capacidade não inferior a uma tonelada que entrarem ou salrem com mercadorias pelo porto de Betul. As respectivas condições estarão patentes no acto da praça.

Quepem, 1 de Abril de 1924

O secretario da Camara Munical,

Visvonata Rudraji S. Sirvoi. car.

भारत

सि. चैत्र शु० ६ ष्टी गुरुवार १८४६

विद्यार्थीचें राजकारण

[लेखांक १ ला.]

केसरीचे विद्वान संपादक श्री. केळकर यानीं आपल्या एका निबंधांत ह्मटल्याप्रमाणें मन अथवा मनु यांतील कांहीं तरी बदलतें खरें; एरवीं मानवी सृष्टींत प्रत्यहीं होणारे फेरफार घडून येते ना. जगांतील घडामोडींच्या जनकद्वयीपैकीं ज्यास्त प्रभावशाली कोण ठरतो, मनूचा ओघ मनप्रवाहा बरहुकूम जातो, कीं मनूच्या चलत्स्वभाव जाळ्यांत मन गुरफटून बसतें, वगैरे वादग्रस्त पण महत्वाचे प्रश्न बाजूस ठेविल्यांस सूत्रधार नटीचें हें जोडपें किंवा या जोडप्यांकीं कोणी तरी स्वतंत्र रीतीनें नाचत असतें, इतकें मात्र खरें. विजापूरच्या अदिलखानाच्या ताब्यांत असलेल्या गोमांतकाचें, पोर्तुगीज राजवटीखालीं चार शतकांच्या दीर्घकालीन निद्रेमुळें, आज जे एवढें अंर्तबाह्य रूपांतर झालेलें आहे तें पाहिलें ह्मणजे तिऱ्हाईत मनुष्यांचें मन सखेदाश्चर्यानें मूढ झाल्याशिवाय रहात नाहीं. १९२० सालीं नागपूरच्या कॉंग्रेसनें असहकारितेचें उघड उघड शिंग फुंकलें व त्या दिवसापासून या चळवळीचें एक प्रमुख अंग जें कौन्सिल बहिष्कार, त्यावर लोकांचा विशेष कटाक्ष होऊं लागला; पण थोडक्याच काळांत काय झालें? दिल्लीच्या कॉंग्रेसनें राष्ट्राला कौन्सिल प्रवेशास संमति दिली. तीन वर्षांपूर्वीचें लोकमताचें वादळ, या थोडक्याच काळानंतर उलटें वाहूं लागलें व कौन्सिल बहिष्काराच्या पुरस्कर्त्यांचें रूपांतर कौन्सिल प्रवेशाच्या पुरस्कर्त्यांत झालें; याची साक्ष ब्रिटिश इंडियेंत झालेल्या कौन्सिलच्या व इतर निवडणुकांवरून उत्तम पटण्यासारखी आहे.

जीव सृष्टींत होणारे हे फेरफार, शब्द सृष्टींतहि आपला प्रभाव गाजवितात, हें लक्षांत धरलें पाहिजे. इतर वाङ्मयें सोडून दिल्यास, मराठी वाङ्मयांतील कित्येक शब्द पूर्वीपेक्षां सध्या जास्त अर्थबोधक व अतिव्याप्त होऊन बसलेले आहेत. 'स्वराज्य' 'असहकारिता' हे शब्द सध्या किती अर्थपूर्ण बनलेले आहेत हें सर्वांनाच ठाऊक असेल. फेरवाले, नाफेरवाले वगैरे साध्या दर्जाचे शब्द देखील राजकीय वाङ्मयाचें भावि इतिहासांत बरेंच उच्च स्थान पटकावतील असें वाटतें. या शब्दांना इतकें महत्व येण्याचें कारण काय हें उघडच आहे. राजकीय जीवनाशीं निगडित असलेल्या कित्येक उलाढालींचा व चळवळींचा बोध या सुटसुटीत शब्दानींच आपणांस करून दि-

वघड आहे; हें वरील विवेचनावरून वाचकांस समजून येणार आहे. जी गोष्ट हिंदूंना प्रिय आहे ती गोष्ट खिस्त्यांना तिटकारा उत्पन्न करते- हिंदूंना महात्मा गांधीचीं तत्वें आदरणीय वाटतात तर तींच खिस्त्यांना त्याज्य वाटतात. हिंदु लोकमान्यांना चहातात तर खिस्ती त्यां विरूद्ध यथेच्छ तोंडसुख घेण्यास कचरत नाहींत. हिंदूंना हिंदुस्थानांतून इंग्रजांची उचलबांगडी झालेली पहाण्याची तीव्र इच्छा आहे तर खिस्त्यांचा हेतु तो देश इंग्रजांच्याच पकडींत कायमचा असावा, असा आहे. तात्पर्य एकाला जें पाहिजे आहे तें दुसऱ्याला नको आहे. अशा स्थितींत हिंदु व खिस्ती या उभय वर्गाचें ऐक्य कसें घडून येईल? दोघांच्याहि देशकार्याला एकदेशीपणा कसा प्राप्त होईल? उभय जाती एकमेकांच्या गळ्यांत गळे घालून गोमांतक देश स्वतंत्र होण्याप्रीत्यर्थ कसे झटतील? या सर्व प्रश्नाचीं उत्तरें नकारार्थींच येतील, यांत संशय नाहीं.

पुढें काय? :— आमच्यामतें यापुढें हिंदु राजकारणांत उपरोक्त हिंदु द्वेष्ट्यांचा उपयोग करून घेण्याचा प्रयत्न करणें निवळ कालाचा अपव्यय करण्यासारखें आहे. फिरंगाळलेल्या खिस्त्यांचा आम्हाला तादृश्य उपयोग तर होणार नाहींच; उलट त्यांच्या बदसल्ल्यानें आमच्या ध्येयावर अपयशाचा हल्ला येण्याचा [illegible] संभव आहे: निदान त्यांचा दृष्टिकोन पार बदलेपर्यंत, आम्हीं त्यांच्यापासून जितके दूर राहूं तितके लवकर ध्येय गांठण्यास शकूं, असें झटल्यास हरकत नाहीं. पुढें काय? या प्रश्नाचें उत्तर यापेक्षां जास्त स्पष्टतेनें नमूद करण्याचें कारण नाहीं. हिंदूनीं सत्व राखून स्वातंत्र्य मिळविण्याच्या खटपटीस खिस्त्यांच्या मदतीची फारशी आशा न बाळगतां, आतांपासूनच लागलें पाहिजे. त्यांचें भ्रम निरसन होऊन ते आम्हांस मिळत असल्यास, त्यांस कंवटाळण्यास आम्हीं एका पायानें तयार असलें पाहिजे. पण भ्रम निरसनार्थ त्यांच्या मागें लुडबुडण्यांत यापुढें बिलकूल अर्थ नाहीं, असेंच आम्हांस 'आ तेन्ह' पत्र शिकवीत आहे. या शिकवणीचा फायदा घेण्यास आमचे हिंदुबांधव दुर्लक्ष करणार नाहींत, अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे.

—येत्या मे महिन्यांत लिजबोअ येथें भरणाऱ्या वसाहत परिषदेला नेमण्यांत आलेल्या येथील प्रतिनिधींच्या प्रवास खर्चाला वरिष्ठ सरकार मंजुरी देत नसल्याची अफवा उठली आहे.

—प्राथमिक शिक्षणाच्या परीक्षेस बसलेल्या मुलांचें नापास प्रमाण वाढतच आहे? अशानें इंग्रजी शिक्षणाकडे लोकांचा कल वळणार नाहीं ना?

—दो॰ जुंवांव फोंतीस यानीं आपल्या हुद्याचा चार्ज घेतला. फोंतीस हे येथील देलेगाद (सरकारी वकील) नेमले गेले आहेत.

हिंदु संस्कृति

जगांतील कोणत्याहि लोकांपेक्षां चालीरीतींच्या साधेपणांत हिंदूंसच पहिलें स्थान मिळेल ह्या विषयीं दोन मतें असूं शकणार नाहीत. परंतु ज्याप्रमाणें कोणताहि समाज एकाच परिस्थितींत कायम न रहातां त्याचीं स्थित्यंतरें होत जातात, त्याचप्रमाणें हिंदुसमाजांतहि असली स्थित्यंतरें होत जातात, यांत संशय नाहीं.

कांहीं स्थित्यंतरें अशीं आहेत कीं तीं अन्योन्य संबंधी असतात, ह्मणजे मेजावर (टेबलावर) लिहावयाचें झाल्यास खुर्चीचीच आवश्यकता असते. खुर्चीचें काम पाटावर बसून होत नसतें. कांकीं, असल्या गोष्टी व्यवहारानेंच उपयुक्त ठरल्या ह्मणजे त्यांचा फायदा घेण्याकडे लोकांची सहज प्रवृत्ति होते. उदाहरणार्थ, पायगाडीवर बसावयाचें झाल्यास, दोनहि हात, हात–दांडी पकडण्यांत गुंतल्यामुळें, ऐन दुपारीं उन्हापासून रक्षण करण्यासाठीं डोक्यावर मोठ्या घेराची युरोपियन टोपी (chapeu) ठेवण्यास तो प्रसंगच सांगतो. व अशा प्रसंगीं उन्हाचा त्रास चुकविण्याचें थोडया खर्चांत मिळणारें अन्य साधन उपलब्ध होईपर्यंत युरोपियन टोपीचाच उपयोग केल्यास तें काम युरोपियन संस्कृति उचलल्याचें चिन्ह ह्मणून त्याज्य ठरेल काय?

कदापि नाहीं, असेंच कोणीहि व्यवहारज्ञ पुरुष ह्मणेल, व, उलट पक्षीं असेंहि ह्मणेल कीं, धोतर नेसून पायगाडीवर बसल्यानें धोतराचा पदर पाय–फिरकीस अडकून किंवा फिरत्या चाकास गुरफटून होणारी अनवस्था चुकविण्याकरितां इजार वापरावी. पाय–फिरकी गिरकावण्याचें काम बुटासारखें, वहाणा–जोडयांकडून सफाईदार होत नसूनहि, कधीं कधीं धोक्याचें असतें. हीच स्थिति आगगाडी, मोटारगाडया यांसहि लागू पडेल. ह्या वाहनाचा फायदा घेताना बूट इजार ज्यास्त सोईचीं ठरतात. शिवाय विशेषत: ह्या वाहनाच्या वाढत्या वाहतुकमुळें रस्ते धुळीनें इतके खराब होतात कीं पांच, पंचवीस पावलें चालून गेल्यास धुळीनें पाय लपेटून जातात. ते सफाई (decencia) व आरोग्य यांस खरोखरच बाधक झाल्या खेरीज राहत नाहींत. ह्मणून त्या उष्ण कटिबंधांतील प्रदेशांत येणाऱ्या घामांवर रस्त्यावरील धुळीचें आवरण पायावर बिलगून रोमरध्रांत न शिरण्यासाठीं स्वत:च्या आरोग्यास जपणाऱ्यानें अवश्यमेव बूट घालावे, असे सांगण्यास बडा जंतुशास्त्रज्ञ पाहिजे असें नाहीं. प्लेग जंतूनें विखारलेल्या पिसवांपासून रक्षण करण्यासाठीं पाय आच्छादावे असें डाक्टरांचेंच सांगणे आहे- ह्मणजे रोग परदेशी त्यावर उपायहि परदेशीच!

वर सांगितलेली हकीगत, सध्या इकडे वहिवाटलेल्या वाहनाची असून, तूर्त येथे प्रचारांत नसली तरी, ज्यांचा काल अगदीं समीप आला आहे अशीं विमानें एकदां इकडे संचार करूं लागल्यानंतर तीं, उच्च वातावरणांतील इतक्या थंड हवेंत जाणें संभवनीय आहे कीं, त्यांतून परिभ्रमण करणाऱ्यास, थंडी व सोसाट्याचा वारा यांच्या निवारणार्थ आपादमस्तक आच्छादन करण्यास बूट इजारीची गरज भासेल.

ह्या खेरीज अशी एक महत्वाची बाजू लक्ष्यांत घेतली पाहिजे कीं, मिलिटरी लोकांत बूट, इजार टोपी इत्यादि पोषाख (उनिफोर्म) अमूकच प्रकारचा असावा अशी सक्ती आहे व अशाच प्रकारचे विशिष्ट युरोपी पद्धतीचे पोषाख आमचे टपाल–तार खातें, आलफांत खातें यांत पूर्णपणें शिरले आहेत. गोव्यांत अगोदरच मिलतारी खात्यांत उच्च दर्जाचा हुद्दा मिळविण्यास हिंदूंस कोण प्रयास! अशा वेळीं "धोतरें–वहाणा वापरूनच तीं तीं कामे करूं" असें हिंदु ह्मणूं लागल, तर सध्या होत असलेला मज्जाव ज्यास्त तीव्र होऊन "पहा, हे हिंदु शिस्त सुधां मानीत नाहींत. ह्मणून असल्या हुद्द्यांस अपात्र होत' असें हिंदु–द्वेष्ट ह्मणूं लागतील ह्याची काय वाट?

यावरून, युरोपी पोषाखावर एकदम बहिष्कार घालण्याचा ताठा दाखविण्यापेक्षां योग्य वेळीं वांकून परिस्थितीचा पूर निघून जातांच पुन्हां ताठ राहण्यांत खरी हिंदु संस्कृति कायम राखिल्याचे श्रेय हिंदूंस मिळेल यांत संशय नाहीं.

आतां बूट वापरल्यानें परंपरेनें गोरक्षणांशीं संबंध येत असेल, तर जाड कपडा, रबर ह्यासारख्या जिनसांचा बूट करण्याकडे उपयोग केल्यास ते वहाणा–जोडयापेक्षां पवित्र ह्मणूनच स्वच्छता व स्वस्तता यांच्या दृष्टीनें ग्राह्य ठरतील ज्याप्रमाणे पूर्ण स्वदेशी खादीपासून आटपशीर इंग्रजी कोट तयार करितां येतो, त्याचप्रमाणें निर्दोष अशा पदार्थानें बूट बनविण्याची कला निघाल्यास बरें होईल.

तात्पर्य हेंच कीं क्रमप्राप्त झालेल्या साधनाकडे दुर्लक्ष केल्यास व्यवहारांत गैरसोय होईल, असे मांगण्याचा हेतु असून त्यांत हिंदु पोषाखाची टर चालली अशी कल्पना सुधां करणे उचित नव्हे. वास्तविक पाहतां "हिंदूंचा पोषाख" असें खरोखर नांव देतां येण्यासारखा आज पोषाखच नाहीं झटल्यास चालेल. मुसलमानाच्या अमलापासून कित्येक शतकें मुसलमानी पद्धत पोषाखांत शिरली. पण पोषाकाची बाब इतक्या बाह्य स्वरूपाची आहे कीं, त्यापासून हिंदु संस्कृति नष्ट झाली असें कधींहि ह्मणतां येणार नाहीं, व मुसलमानी पद्धतीचा पोषाख सोडून आज हिंदूंची प्रवृत्ति युरोपी पोषाकाकडे झाल्यास असें पूर्णपणें सिद्ध होतें कीं, आपली संस्कृति कायम ठेवूनच हिंदु परिस्थितिनुरूप आपल्या चालीरीतींचे धोरण ठेवितात.

ज. घ. म.

" गोमांतक अंक "

भारताचा स्पेशल अंक प्रसिद्ध करण्याचा आमचा विचार आह्मी आमच्या प्रेमळ वाचकांस मागें जाहीर केलाच आहे. हा अंक पुस्तक रूपानें आश्रयदात्यांची भेट देणार असून, त्यांत कसलेल्या गोमांतकीय लेखकांचे गोमांतकाची परिपूर्ण माहिती करुन देणाऱ्या अनेक उपयुक्त लेखांचा संग्रह होईल. शिवाय आमच्यांतील नामांकित लेखकांच व लोकादरणीय संस्थांचे फोटोहि वाचकांस सदर्हू अंकांत पहाण्यास मिळतील. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे, गोमांतकांतील व गोमांतकाबाहेरील लोकांस गोमांतकाचा पूर्ण परिचय होण्यास जी जी माहिती ग्रथीत करणें आह्मांस आवश्यक वाटेल ती ती माहिती आह्मीं प्रस्तुत अंकांत केंद्रीभूत करणार असून, अंतरंगाप्रमाणेंच त्याचें बाह्यांगहि अत्यंत मोहक बनविण्याचा आमचा मानस आहे. व गोमांतक विषयक माहितीलाच स्पेशल अंकांत प्रमुख स्थान मिळणार असल्यानें त्याला "गोमांतक अंक" असें सार्थ नांव देण्यांत येत आहे.

भारताच्या 'गोमांतक अंक'साठीं लेख व फोटोचे ब्लोक मिळवून देण्याचीं अनेक मित्रानीं आश्वासनें दिलीं असून तीं ते पूर्णपणें पाळतील, अशी खात्री आहे. भारत कचेरी शिवाय मडगांवचे उत्साही व मार्मिक लेखक काशीनाथ दामोदर नाईक (के. भारती) हे गोमांतकांत व मुंबईचे भारतसेवक मुरारी कामत शिरोडकर हे मुंबईत उपरोक्त गोष्टींविषयीं खटपट करीत असून त्यांस सर्वत्र प्रोत्साहनच मिळत आहे.

एकंदरींत आमचा 'गोमांतक अंक, सर्व दृष्टीनीं संग्राह्य होईल, अशाच प्रकारची योजना आह्माकडून करण्यांत येत आहे व तिला आमच्या मित्रांकडून निरपेक्ष पाठिंबा मिळत आहे, हें कळविण्यास आह्मांस आनंद वाटतो.

सं. भारत.

जाहीर विनंति

गांव वाडी, महाल फोंडा–गोवा, येथील श्री लक्ष्मीनारायणाचें फार पुरातन देवालय अगदीं मोडकळीस आल्यामुळें, त्या गांवचे सर्व रहिवाशी एकत्र जमून त्याचा जीर्णोद्धार करविण्याचें ठरविलें, परंतु हें काम बऱ्याच खर्चाचें असल्यावरून, सार्वजनिक मदतीशिवाय तडीस जाणें शक्य नाहीं, ह्मणून सर्व हिंदु बांधवांस या कामास अंशत: तरी हातभार लाऊन जिर्णोद्धाराचें श्रेय घेण्याची विनंति करून, त्याप्रमाणें वर्गणी गोळा करण्यास सुरवात केली आहे.

ज्या सद्गृहस्थांनीं उदार मनानें वर्गणीचा आंकडा घालून अशा सत्कृत्याचें श्रेय घेण्याची इच्छा व्यक्त केली आहे, त्यांनीं ती मदत रकमेच्याद्वारें रा. सीताराम लाडकोबा नाईक प्रतापराव सरदसाई, किंवा रा. पांडुरंग शंकर शेणवीं रामाणी, राहणार पणजी, अथवा वरील गांवच्या कांहीं होतकरू गृहस्थांनीं बाहेरगावीं वर्गणी गोळा करण्याचें काम पतकरले आहे, त्याकडे ती देऊन पावती घेण्याची कृपा करावी, अशी नम्र विनंति आहे. जिर्णोद्धाराच्या कामास गेल्या महाशिवरात्रीच्या दिवशीं सुरवात करण्यांत आली असून पोंचलेल्या रकमेचा आंकडा मदत करणाऱ्या सदगृहस्थांच्या नावांसह प्रसिद्ध केला जाईल. त्याचप्रमाणें खर्चाचा हिशोबहि तपशीलवार प्रसिद्ध होईल.

वाडी–फोंडा, ता. २४ मार्च १९२४

वरील गावातर्फें सर्वांचे नम्र सेवक

विठोजी दु. ना. प्रतापराव सरदेसाई
रुद्राजी भा. ना. प्रतापराव सरदेसाई
भास्कर गोविंद शेणवीं रामाणी
रामचंद्र घन:शाम शेणवीं रामाणी
जगन्नाथ नारायण शेणवीं धुमे
पोतो राम गांवकार

भाषाशास्त्र ! भाषाशास्त्र !

केवळ मुलांसाठा !

ज्या कोणास आपल्या मुलाबाळानीं व्याकरणाचे नियम सहज रीतीनें, नाचत बागडत व हांसत खिदळत शिकावे अशी इच्छा असेल त्यानीं त्यांच्या हातीं रा॰ व्यंकटेश अनंत नार्वेकर यानीं अत्यंत कुशलतेनें केवळ मुलांसाठी रचलेलें

कविताबद्ध मराठी व्याकरण

द्यावें. एकदां पाठ झालेले नियम स्मृतिपटलावरून कधींच न ढळण्यासारखी मोहकता त्यांत ओतप्रत भरलेली असून, सदहू पुस्तका विषयीं तज्ञांचे उत्तमोत्तम अभिप्राय मिळाले आहेत.

किंमत—ग्लेज प्रत साडेपांच आणे. रफ प्रत साडेचार आणे. ट. ख. निराळा


पत्ताः— भारत ऑफिस—केपें-गोवा.

गोमांतकांतील गुऱ्हाळाचा हंगाम

यशस्वी व फायदेशीर करण्यास

किर्लोस्कर किसान चरक

उपयोगांत आणा रचना साधी व मजबूत. रसाचें भरपूर प्रमाण मिळतें चालविण्यास बैलांची फक्त एक जोडी पुरते. काम मनाजोगतें होण्याजोगा



सुटे भाग हवे तेव्हां मिळण्यासारखे. किंमत अवघी रुपये २०० शिवाय व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन.

माहिती मागवा

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड

किर्लोस्करवाडी

M. S. M. R.

जि. सातारा.

दोन लाखांचें दहा लाख

भांडवल वाढविलें !

सन १९२२–२३ सालीं कंपनीनें आपल्या भागिदारांस शेंकडा ९ टक्के डिव्हिडंड देण्याचें ठरविलें

शेअर विक्रीसाठीं गांवोगांवीं मेहनती, विश्वासू व हुषार

एजंटस पाहिजेत

एजन्सीचे नियम, प्रॉस्पेक्टस, अर्जाचे नमुने व इतर माहिती साठीं खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा.

ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड.
पो. ओगलेवाडी (औंध स्टेट)
जि. सातारा

एस. पी. ओगले अँड कंपनी
मॅनेजिंग एजंटस

RODOLFO RODRIGUES



HERBOLARIO E DROGUISTA

Possue segredos eficazes sobre varias doenças consideradas dificeis de cura.

Cura febres palustres e outras de mau caracter com o inofensivo emprego dos medicamentos aiurvedicos. 3

Pode ser procurado a toda a hora nas suas FARMACIA INDIANA e DROGARIA POPULAR, estabelecidas em Amonã, de Quepém.

सरकारांतून रजिष्टर झालेले

२७००० एजंटांकडून विक्री होणें हें सर्वांत उत्तम औषधाचें प्रमाण होय.

सुधासिन्धु

हें पाण्यांत टाकून घेतल्यानें कफ, खोकला, पटकी, दम, शूल, संग्रहणी, अतिसार, मुलांचे हिरवे पिंवळे जुलाब, उलटी करणें, दूध टाकणें इत्यादि रोगांस एकाच मात्रेंत गुण दाखवितें. बाटलीस ८ आणे व पो. ख. १ ते २ पर्यंत ७ आणे

दद्रुगजकेसरी

गजकर्णास मुळांपासून घालविणारें औषध १ बाटलीस ४ आणे. एक डझन घेणाऱ्यांस २। रुपयांत घर बसल्या देऊं.

बालसुधा

अशक्त व रोगी मुलांना धष्टपुष्ट व निकोप करणें असेल तर आमचें हें स्वादिष्ट औषध द्यावें. बाटलीस १२ आणे पोष्ट खर्च ८ आणे.

क्याटलाग फुकट पाठऊं. 4

आमचीं औषधी सर्व औषधें विकणाराजवळ मिळतील.

पत्ता—सुखसंचारक कंपनी, मथुरा.

IGNORANICA...

A "Provincia" reproduzindo nas suas lindas colunas um noticiario d"O Ultramar", referente a uma festa realisáda na vila de Margao, sob a moadomia dum gauncar hindu' de nome Gudo' julga que o "Bharat", possuido de raiva por tal acto, arrancara' o "Xendi".

[illegible] folha europea ignora a procedencia [illegible] referida mordomia como nao conhece o aludido Gudo'. Dai o supor que o acto do hindu Gudo' nos provocara' ira.

Santa ignorancia a d"A Provincia" que so' sabe ventilar magistralmente assuntos que desconhece absolutamente!

[M]as quem manda tocar rebecao sapateiro? Quem manda talhar fato ao ferreiro?

Nao pega, pois, a gracinha da "formosa.

INFORMAÇOES A' IMPRENSA
N.° 1

O Governo da India, por interme'dio da Direcçao dos Serviços Agricolas, Florestais e Pecua'rios continua a empregar a sua atençao no estudo do emprego de ma'quinas agricolas economicas e de preço relativamente baixo, que permitem a' Agricultura da Colo'nia fazer, dentro da medida do possivel, face a' deficiencia de mao d'obra.

Independentemente da encomenda de material feit[illegible] Alemanha e das experiencias ja' realizadas com determinados instrumentos e alfaias que tiveram largo aplauso dos agricultores pela Direcçao dos Serviços Agricolas, Florestais e Pecua'rios acabam de ser encomendadas algumas ma'quinas agricolas de urgente necessidade, tais como debulhadores, aparelhos de lavoura mecanica, etc que serao imediatamente ensaiados. Os resultados obtidos, que se espera sejam satisfato'rios, serao, logo que possivel, comunicados aos interessados, e sobre eles serao feitas demonstraçoes publicas nos principais centros agricolas do Estado.

Faz se tambem publico, para conhecimento dos interessados que por todo o corrente mes ou nos principios de Abril, sera' destribuido gratuitamente aos agricultores da Colo'nia o Relato'rio do Tecnico Agricola Correio Afonso sobre o Comercio e Industria dos Produtos do Coqueiro. Todos os que desejam possuir um exemplar deste Relato'rio, que sera' ilustrado com gravuras elucidativas, deverao solicita-lo desta Direcçao.

Tambem se comunica que a Direcçao dos serviços Agricolas esta' envidando os melhores esforços para que a publicaçao dos numeros do Boletim do Fomento referentes aos anos de 1922-1923 se faça dentro do mais curto praso de tempo possivel.

Direcçao dos Serviços Agricolas, Florestais e Pecua'rios em Nova-Goa. 2 de Março de 1924.

O Engenheiro Agronomo Director
(a) *F. C. Correio Mendes*

भा र त

मि. चैत्र शु० १३ शी गुरुवार १८४६

विद्यार्थ्यांचें राजकारण

[लेखांक २ रा]

राजकीय शिक्षणाच्या अंगभूत भागांपैकीं राजकारण हा एक मूल्य भाग होय.

—लो० टिळक.

गेल्या लेखांत राजकारणाचें महत्व व त्याची आपल्या गोमांतकांत उडालेली दैना या दोन गोष्टींचा थोडासा विचार केला. आपलें राजकीय दौर्बल्य दूर होण्यास ह्मणजे एकंदर सुधारणांच्या केंद्रीभूत ज्या राजकीय सुधारणा त्या हस्तगत होण्यास व हस्तगत झाल्या असल्यास (नांवा पुरत्या स्वराज्य प्रार्सीमुळें त्या आपणास मिळालेल्या आहेत, असें कित्येक समजतात पण ती चूक आहे. आपणास मिळालेलें स्वराज्य जल नसून मृगजल कसें आहे, हें आपल्या राजकीय घटनेची छाननी करून एका स्वतंत्र लेखांत आह्मीं सवडीनुसार दाखविणार आहोंत.) त्यांचा उपयोग करण्यास एकंदर [illegible]ीय समाजानें काय केलें पाहिजे या[illegible]चा थोडासा विचार प्रस्तुत लेखांत कर्तव्य आहे.

देशभक्ति, स्वार्थत्याग वगैरे गुणांची व राजकारणांत पडलेल्यांची फारकत कशी झाली हें आपण गेल्या लेखांत पाहिलेंच आहे. जुनाट झालेल्या वृक्षाला पाहिजे तसें वळण देणें अशक्य असतें. हाच न्याय सध्या राजकारणांत पडलेल्या आपल्या पुढाऱ्यांनाहि लागू करून चालण्यास हरकत नाहीं. आनुवंशिक संस्काराचा ह्मणा, आनुषंगिक संस्काराचा ह्मणा, अथवा दुसऱ्या कित्येक गोष्टींचा ह्मणा आपल्या समाजावर ह्मणजे ज्यांचे द्वारा समाज राजकारणांत आपलें अंग घालतो त्यांचेवर इतका अनिष्ट परिणाम घडलेला आहे, कीं, त्या परिणामांचीं फळें आपल्या राजकीय पुढारीवर्गांचे पिढीच्या हयातींत नाहींशीं होणें शक्य नाहीं. कारण त्या पुढारी वर्गाला राजकारणांत पडणें ह्मणजे स्वहित साधणें नसून स्वदेशहित साधणें होय, वगैरे उपदेश कोण करणार ? व एकादे वेळीं तो कोणी केल्यास देखील “ स्वभावो दुरतिक्रम: ” या न्यायानें त्यांचा सार्वजनिक उच्च किंवा नीच स्वभाव कसा बदलणार ? हाहि एक प्रश्नच आहे. एतावता, राजकीय शाखेंत अनुकूल क्रांति घडवून आणणें असल्यास गोमांतकानें दुसऱ्याच एका मार्गाकडे धांव घेतली पाहिजे. विद्यार्थी वर्गानें इतर देशांचा राजकीय इतिहास डोळ्यांपुढें ठेऊन व राजकारणाचें महत्व व त्यांत समावत असलेली देशभक्तीची कल्पना लक्षांत आणून राजकारणाच्या बीजारोपणाला स्वतःची मनोभूमिका तयार करणें हाच तो मार्ग होय.

कोणत्याहि राष्ट्राच्या भावी उन्नति अवनतीची जबाबदारी त्या राष्ट्रांतील तरुण विद्यार्थी पिढीवर अवलंबून असते, हें तत्व इतिहासानें अगदीं सिद्ध करून दाखविलेंआहे. विद्यार्थ्यांनीं कित्येक राष्ट्राच्या इतिहासास नवीन वळण लाविलेलें आहे. राष्ट्रांच्या आयुष्यांत कित्येक प्रसंग अशा प्रकारचे असतात, कीं, त्यांच्यामुळें त्या राष्टाचे इतिहासास मिळालेलें वळण अधोगामी असतें, पण विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय चळवळीची गोष्ट तशी नसते. त्यांच्या चळवळीचा उद्भव राष्ट्राच्या विकट प्रसंगीं झालेला असतो. व या प्रसंगाशीं टक्कर देऊन सदैव राष्ट्राला प्रगतिपर व उर्ध्वगामी बनविणें अशा चळवळींना शक्य असतें. आस्ट्रियाच्या जुलुमाला कंटाळलेल्या इटलीला स्वतंत्र होण्यास कार्बोनरी सारख्या संस्था किती उपयोगी पडल्या हें सर्वांस ठाउकच असेल. तुर्कस्थानची पूर्वींची जुलमी राजसत्ता नाहींशी होऊन तिचे जागीं थोडक्याच कालापूर्वीं प्रस्थापित झालेल्या लोकसत्ताक राज्यपद्धतीच्या प्रभावानें केमालपाशा सारखा लोकप्रिय पुढारी त्या देशाचा अध्यक्ष होण्यास तरुण तुर्कांची चळवळ फार फार कारणीभूत झाली. हा इतिहास अगदीं ताजा आहे, नुकताच घडलेला आहे. तेव्हां, यावरून एवढें सिद्ध झालें कीं, देशावरील राजकीय स्वरूपाचीं आपत्ति [illegible]र होण्यास विद्यार्थ्यांच्या उसळत्या रक्ताची [illegible]र आवश्यकता असते व राष्ट्रां या संसारांत [illegible] उणें पडल्यास विद्यार्थ्यांनीं त्या बद्दल [illegible] खबरदारी घेणें हें त्यांचें एक राष्ट्रीय क[illegible]य होय.

विद्यार्थीदशेच्या शेवटच्या कालांत [illegible] विद्यार्थ्यांची मनोभूमिका कोणत्याहि भावी बऱ्या अगर वाईट कार्याच्या अनुरोधानें तयार होत असते. विश्वहिताच्या कल्पनेच्या वातावरणांत पोंहचलेल्या कांहीं विद्यार्थ्यांची वृति “ वसुधैव कुटुंबकम ” अशी बनते. आपल्या देशाचे हिताहितसंबंधास ज्यानीं आपल्या विचारांत वाव दिला अशा दुसऱ्या कित्येकांच्या मनावर “ जन पदा[illegible]मं त्यजेत ” हें चाणाक्याचें राजनीतितत्व [illegible]णतें. दुसरे कित्येक अशा प्रकारचे बनतात कीं “ ग्रामार्थे कुटुंबं त्यजेत ” हें त[illegible] त्यानां पटतें. ही झाली आमच्या शेजारच्या महाराष्ट्राची गोष्ट. आपल्या इकडे बहुत[illegible]रून अशाच प्रकारचे विद्यार्थी आढळून [illegible]तात कीं, त्यांना जग हें स्वतःकरितां असते मनुष्यापासून जगास मिळणाऱ्या आत्यंति[illegible] हितावर दृष्टि ठेऊन सांगण्याचें झाल्यास, निरनिराळे उच्च नीच वर्ग विद्यार्थ्यांच्या मनावर घडलेल्या परिणामाचें फल होय, [illegible] विसरतां कामा नये. ज्या विचारांचा पगडा तरुणाच्या मनावर विद्यार्थी दशेंत बसतो त्याच विचारांचे दास त्यांना जन्म[illegible] व्हावें लागतें. या करतां राजकारणांत-

ज्याचे हितसंबंधांत लवकरच आपणास पडावें लागेल, हें लक्षांत ठेऊन त्या दृष्टीनें एव्हां पासूनच हातपाय हालविणें अगत्याचें आहे. कारण, राजकारण हा देशसेवेच्या वर्तुळांतील मध्यबिंदु होय व हा मध्यबिंदु हस्तगत करण्यास पाहिजे असलेल्या पूर्वतयारीला विद्यार्थ्यानीं कौटुंबिक प्रदेशांत पाऊल टाकण्यापूर्वीच लागलें पाहिजे.

पण राजकीय प्रश्नाच्या रुक्ष वातावरणांत लक्ष घातल्यानें विद्यार्थ्यांच्या त्या दशेंतील मुख्य ध्येयाला कांहीं धक्का बसतो कीं नाहीं हें प्रथम पाहिलें पाहिजे. विद्यार्जनाकडे दुर्लक्ष करून राजकारणांतच नव्हे, तर कोणत्याच बाबतींत लक्ष घालणें त्यांच्या भावी हिताच्या दृष्टीनें अनिष्टच होणार हें उघड आहे. त्यांतून, आजच कांहीं आपणावर आणीबाणीची अशी आकस्मिक परिस्थिति ओढवलेली नाहीं. गोमांतकाच्या डोक्यावर गिरक्या घेणारें संकट आजकालचें नाहीं. कांहीं वर्षांचें नाहीं; तें कित्येक शतकांपासूनचें आहे. यामुळें त्याला या संकटाची तितकीशी पर्वा वाटत नाहीं. सध्यःचें गोमांतकावर ओढवलेलें दुःख आनुवंशिक आहे. मग प्रस्तुतच्या तरुण पिढीला गोमांतकाचें धुरीणत्व प्राप्त होईपर्यंत हें आपलें राजकीय दौर्बल्य आणखी थोडा काळ असेंच चालू रहाणें अपरिहार्य होय. या सर्व गोष्टी जर खऱ्या, तर राजकारणाची घोरपड विद्यार्थ्यांच्या गळ्यांत कां ह्मणून ? नेमलेल्या वेळीं हें कार्य त्यांना कांहीं सुटावयाचें नाही, मग त्यां बद्दल त्यांना एव्हांच विनाकारण त्रास कां ? वगैरे प्रश्न सहजच उद्भवतात, व त्याचें समाधान केल्याशिवाय पुढें जाणें शक्य नाहीं. पण त्या पूर्वीं राजकारणाकडे लक्ष पुरवणें (राजकारणांत प्रत्यक्ष भाग घेणें नव्हे हें लक्षांत ठेविलें पाहिजे) ह्मणजे विद्यार्थ्यांनीं काय करणें कोणत्या दिशेनें काम करणें हें पाहूं. ह्मणजे वरील प्रश्नाचा आपोआपच उलगडा होईल.

राजकारणांत लक्ष घालणें ह्मणजे राजकारणांत प्रत्यक्ष भाग न घेतां पुढेंमागें आपणास राजकारणाचीं सूत्रें घ्यावीं लागतील हें लक्षांत ठेऊन त्या दृष्टीनें प्रयत्न करणें होय. हे फिरून सांगणें इष्ट आहे. लो. टिळक, म. गांधी,गोखले वगैरे पुढाऱ्यानीं राजकारणांत लक्ष घातलें होतें, पण तें त्यांत भाग घेऊन. विद्यार्थ्यांस असें करणें शक्य व इष्टहि नाहीं. शत्रुशीं केव्हा तरी दोन हात होतील अशी खूणगांठ बांधून एकादा शिपाई शस्त्रास्त्राच्या निकट सहवासांत राहून शूरत्व आणण्याचें ज्याप्रमाणें प्रयत्न करतो, त्याच प्रमाणें देशहिताच्या समरांगणावर आपणास यावें लागेल इतकें लक्षांत ठेऊन राजकारणाची तरवार आपण एव्हांपासून पेलण्यास व इतरांना पेलविण्यास शिकविलें पाहिजे. असल्या स्वरूपाची पूर्व तयारी आपणास जेथें तेथें दृष्टीस पडते. कोणताहि नवा खेळ लोकांपुढें आणण्याचें झाल्यास, नाटक मंडळी प्रथम [illegible]कित्येक दिवसपासून कोणत्या दिशेनें पूर्वतयारी करते, हें कोणास ठाऊक नाहीं ? आ-

ma agradavel á vista...Em Dudsagor aquela magnificencia e linda cascata cujas aguas assemelham a fios grossos de leite que acorrem por entre os meandros das rochas, e agradavel scenario que dai se divisa! ... E' sublime! E' encantador! O comboio especial, segundo dizia o programa, parou em Majorda, ai S. Exias almoçaram... Apos o almoço o comboio continuou a sua marcha interrompida...e a's10 horas chegou a Mormugao. Aqui esperavam-no na *gare* toda a colonia inglesa...Feitos os cumprimentos de estilo embarcaram na lancha *Patria*...

O que S. Exias viram

Entraram na lancha *Patria*, estava atapetada, adamascada oleada de fresco,por sinal oleada na noite anterior a' luz de um *Kitson*; como veem nestas circunstancias o cheiro acre e irritante devia sufocar-lhes e por consequencia deixar S. Exias constipados, e' isso o que sucedeu Ate se o seu rico fato de viagem se borrifou!.. Viram S. Exias. a cor amarelo-berrante das chamines das lanchas, os *chauffeurs* agaloados de ... pano escurol ... Os tripulantes comprometidos nos seus fatos de *Kaki*... Nuvens de poeira que lhes deram uma formidavel laringite... Viram o Palacio de Cabo embalado, pelo isocrono marulhar das ondas do oceano Indico e pela alfombra verdejante das copadas palmeiras de Goa... A maxima anarquia dentro das paredes do palacio...Os *lunches*, os *jantares*,os *teas* corroboraram a opiniao do *Diario* "que a democracia estabeleceu entre no's uma vida simples e barata..."dia! Sim um dia antes, apenas um! Os auto moveis que trazem atras as duas letras caracteristicas G. G. circundavam, agoidados, febricitantes a verterem suor por todos os poros, por todas as arterias desta insolita capital da India Portuguesa ... Rodopiavam numa velocidade tao vertiginosa que se a nossa policia fosse como devia ser e nao como e' os teria levado ate o Quartel do C. da Policia ... Se eles transgrediam o codigo das posturas!...

E por isto se ve, se pode calcular em que poderia dar toda essa seria de jantares, almoços e chas; num verdadeiro...desastre...! ... Nao digam que nao houve tempo. Nao digam que nao houve dinheiro. Nao, tudo isso houve: Sabia-se ha mais de um mes que S. Exias. vinham, por isso tinhamos que por as nossas coisas em devidos termos...nao quiseram nao souberam essa e' que e' a verdade...*A* verdade e' uma força; a mais energica das forças...Nao esta' no poder humano impor-lhe obediencia ou silencio. Nenhum dispotismo, por mais tirano que seja obtera' abafar a expressao de uma verdade... Dinheiro! Sim, nao o ha para se pagar aos funcionarios desta pobre terra, mas ha-o e a rodas para que a honra e o decoro nacional nao sofram queda por minima que seja...Nem a India se nega a que lhe substraiam dos cofres umas rupias... Impoe-senos a nos este dever...Exige-se que nos sacrifiquemos e disto nao arredamos pe; ja se levantaram de cofre segundo consta 60.000 rupias!... Nao chamamos a quantia, exorbitante, nao ... Mas de-se-lhe o devido uso...Gaste-se como se deve.... Alias a India pedira', exigira' contas, destino que se lhe deu...E com razao.

Viram tambem S. Exias a galeria dos Vice-Reis que se ostenta prenhe de poeira e de traça nas Salas do historico palacio de Hidal-Khan. Viram o imundo casarao que tem o pompeso nome de *Hospital Central*...Viram os *belos cavalos* que nos custaram olhos de cara, coiro e cabelo...melhormente nutridos do que homens ... Viram ar[illegible]

se ergueram por todo o percurso...

Ainda mais viram, a lancha que os trouxe de Verem as 7 e meia de noite sem uma minuscula lamparina! Sim tudo isto viram com tudo isto grandemente, fartamente se divertiram... e no dia 17 as 11 horas de noite regresaram para a sua Presidencia.

O que S. Exias nao viram

Nao viram, o *deficit* pavoroso que esta' a calcar-nos, nao viram o exercito formidavel, enorme, descomunal de funcionarios que nao recebe seu soldo ha mais de dois meses . . .Nao vieram os projectos assombrosos de S. Exia. o sr. J, de Morais que nunca traduziram realiade palpavel, evidente. Nao viram a incompetencia que campeia imfrene em todos os ramos da actividade publica. . .Mandando um carpinteiro realizar o mister dum alparqueiro, um agricultor, de cultor de letras um advogado, de ornamentador de porticos triunfaes e de pistas. . .

Foi pena. . Nao viram a mais singular coisa, a mais surpreendente, a mais tipica desta terra... Em nenhuma outra parte podem ter ensejo de assistir a um espectaculo tam edificante, tam esplendoroso...Foi realmente pena que a S. Exias. nao tivessem apresentado essass belezas de mais frondosa hortaliça que se tem dado admirar em todo o globo terraquio. Iriam assim com ainda melhores impressoes, deixariam isto constatado nos seus *Block Notes* e os secretarios nos seus *Kodaks*. . . Iriam apresentar a civilizaçao inglesa esse nosso genuino a vango, esse avanço que a nenhum pais do mundo foi dado ter . . . Veriam isto! O! que bela oportunidade se perdeu, se desperdiçou . . . Francamente foi pena. . .

[illegible] um pedido

Ilustres hospedes! Nao leveis a mal a nossa pobreza, pois ela nao e' vilesa. *Nao repareis* (como diz o *Diario*) senhores esta pobresa franciscana que vos impuseram os que governam a nau do Estado que ha muito faz agua. . .Foi unicamente por isso. . .No's fizemos o que estava ao nosso alcance..O resto e' com eles. Gastamos o que nao podiamos gastar. Porem se nao puderam satisfazer as exigencias da vossa visita a culpa nao e' nossa. *Nao repareis* e de tudo o que achastes incorrecto vos dedimos as necessarias desculpas. . .

Boa viagem lhes pesejamos do fundo do coraçao. . .

Pangim, 30=3=920

Alma Velha

भारत

गुरुवार चैत्र व० ४ थी १८४५

प्रागतिक संघाचें कार्य.

कोणत्याहि सार्वजनिक संस्थेचा इतिहास पहा, तिच्या सुरवातीला अडचणी ह्या ठेवलेल्याच, परंतु चिकाटीचीं माणसें असलीं ह्मणजे तीं आपापले गैरसमज व मतभेद बाजूस सारून त्या अडचणीस तोंड देऊन पुढील कार्यास नव्या दमानें पुढें येतात. शुद्ध हेतु धरून काम करणारीं माणसें असलीं ह्मणजे त्यांच्यासंबंधीं, कितीहि जरी गैरसमज प्रस्थापित केले तरी ते लवकरच नाहींसे होऊन त्यांच्या कार्याविषयीं बहुजनसमाजाची सहानुभूति द्विगुणित होते. प्रागतिकसंघासारख्या मुख्यत्वें करून राजकीय उन्नतीसाठीं स्थापन केलेल्या संस्थेविषयीं गैरसमज उत्पन्न झाल्यास नवल तें काय ? ज्या ठिकाणीं बहुजनसमाज स्वतंत्र बाण्यानें वावरण्यास शिकलेला नाहीं, किंबहुना ज्याचें विचारस्वातंत्र्य, कोणत्याहि कारणामुळें ह्मणा, कांहीं विशेष व्यक्तींच्या स्वाधीन आहे, अशा ठिकाणी नानातऱ्हेचे गैरसमज, जाणून बुजून अर्थविपर्यास व हेतु विपर्यास हे व्हावयाचेच. तशात कार्य करण्याचा पहिला जोम मंदावला ह्मणजे गप्पीदास लोकाना चांगलेंच फावतें. परंतु सुदैवानें असें ह्मणण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं कीं प्रागतिक संघाचें कांहीं जणांच्या ह्मणण्य प्रमाणें पेंड खात पडलेलें घोडें आतां पुढें दामटण्यांत येत असून, ताज्या दमानें तें पुढील मुक्कामास जात आहे. गेल्या २४ तारखेस मडगांव येथें भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या व इतर सल्लागार मंडळीच्या बैठकींत असें ठरलें कीं, येत्या मे महिन्याच्या ५। ६ तारखेस फोंडें महालांत प्रागतिक परिषद भरविण्यांत यावी. स्थळ मग पाहून ठरविण्यांत येणार असून सर्व सभासदांना निमंत्रण पत्रिका जाणार आहेत. परिषदेंत चर्चेस येणाऱ्या विषयांपैकीं संघाच्या घटनेची पुनःरचना, कार्यकारी मंडळाची निवडणूक व राजकीय निवडणूकींतील मताधिकार हे होत. हा शेवटचा विषय फारच महत्वाचा आहे. गोमांतकांतील अर्धी प्रजा हिंदु असून बहुतेक साक्षर अशी आहे. परंतु पुष्कळजणाना पोर्तुगीज माहीत नसून मराठी भाषा अवगत आहे. अशानां मतदार होण्याचा जो पूर्वी हक्क होता तो अलीकडील कायद्यांतून हद्दपार केला आहे, व त्यासंबंधीं यत्किंचित्‌हि चळवळ आमच्या पार्लमेंटांत प्रतिनिधींकडून झालेली नाहीं ही गोष्ट सर्वांच्याच माहितीची आहे. आमच्या लेजिस्लेतीव कौंसिलचे मेंबर ना. दो. व्यंकटेशराव देसाई यांनीं या संबंधीं कौंसिलांत ठराव आणून तो इकडे पासहि करून घेतला. पण त्याची अंमलबजावणी करण्याचा अधिकार वरिष्ट सरकारकडे असल्यामुळें तेथपर्यंत आमच्या विनंतीची दाद लावण्याविषयीं सनदशीर चळवळ करण्याचें प्रागतिक संघानें आपल्या शिरावर घेतलें आहे.

प्रागतिक संघाचा जन्म फोंडें महालांत झाला व तेथेंच प्रागतिक परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचा योगायोग जुळून येत आहे हें त्या प्रांताचें महा भाग्यच होय.

संघाचा हेतु लक्षांत आणून जर संघाच्या सभासदांनीं आणखी सभासद मिळवून दिले व अशा प्रकारें येथील सुशिक्षित वर्गाची सहानुभूति मनःवडे वळविली तर पुष्कळच कार्य होण्यासारखं आहे प्रागतिक संघ ही एक राजकीय शक्ति आहे व ह्या शक्तीचा योग्य उपयोग करून घेणें हें येथील सुशिक्षित वर्गाचें कर्तव्य आहे. ही शक्ति लहानसहान नसून पुढें मागें गोमांतकांतील हिंदूंच्या राजकारणांत तिला बरेंच महत्व येणार आहे असें मागच्या दोन निवडणुकींत संघानें भाग घेतला त्यावरून जनतेच्या नजरेस आलेंच आहे. प्रत्यक्ष फळ असें एकदम हातीं येईल असें आजच कोणासहि सांगतां येणार नाहीं, परंतु शुद्ध हेतु पूर्वक फळाशा न धरतां—कर्तव्यकर्म करणें प्रत्येकाच्या हातचें आहे हें विशेष सांगणें नकोच.

टिळक पंचांगाचा विजय.

सत्याच्या बाजूकडे मनुष्याच्या मनोवृत्तींचा कल अनुभवाच्या कसोटीनें वळत असतो. या बद्दलची खात्री खालील प्रत्यक्ष उदाहरणावरून चांगलीच पडणार आहे.

वे. शा. सं. वासुदेव लक्ष्मण शास्त्री पणशीकर यांचे चिरंजीवांचा ह्मणजे वे. शा. सं. देव शास्त्री ऊर्फ बाळाभाऊ पणशीकर यांचा विवाह टिळक पंचांगाप्रमाणें फाल्गुन कृ० ४ मंगळवारीं दिवसा १९ घटकांचे सुमुहुर्तावर, येथील सोमयागी दीक्षीत वे. दत्तात्रेय रामचंद्र किंजवडेकर यांचे मुलीशीं मोठ्या थाटानें पार पडला. सदर लग्न समारंभाला पालें येथील वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध वे. शा. स. नारायण केशव भट्ट पित्रे, त्याचप्रमाणें सावंतवाडी येथील वे. शा. सं. जनार्दन भट्ट ऊर्फ तात्या शास्त्री होरे वगैरे विद्वान मंडळींनी ही ह्या झालेल्या विजयांत भाग घेतला होता.

थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे टिळक पंचांग थोर थोर विद्वान मंडळीस उत्तरोत्तर गनापासून अनुकरणीय वाटूं लागलें. यावरून त्या पंचांगाच्या शुद्धतेबद्दल या विद्वान मंडळीस खात्री वाटूं लागली. असें स्पष्ट ह्मणण्यास हरकत नाहीं. या सत्य पक्षपातित्वाबद्दल वे. शा. सं. वासुदेव शास्त्री पणशीकर व वे. शा. स. बाळाभाऊ यांचें आणि त्या प्रमाणेंच वर लिहिलेल्या निमंत्रित विद्वज्जनांचें आह्मी अभिनंदन करितों.

नारायण अनंत नाईक [illegible]

—ता. १-४-२३ रोजीं मडगांवच्या "बालचमू" संस्थेनें हनुमान जयंतीचा उत्सव साजरा केला. या प्रसंगीं भरलेल्या सभेचें अध्यक्षस्थान पुंडलीक वा. विजिनकर यांनीं मंडित केलें होतें प्रो. दत्ता वै यांचें 'हिंदु तरुणापुढील एक प्रश्न' या विषयावर मुख्य भाषण होऊन, उपवक्ते भिकाजी उसो नारवेंकर, बा. अ. बाळे. श्री. दा. नाईक, गो. स. देसाई व नी. वि. दळवी यांनीहि [illegible]

राष्ट्रीय शिक्षण

ले. मुक्त

उपजिविकेचें साधन या दृष्टीनेंहि शिक्षणाचा व भाषेचा विचार केला तर पाश्चात्य राष्ट्रांत असें दिसून येतें कीं, तेथें हजारों लोकांशिवाय आहेत. तीं राष्ट्रं गोवा प्रांतासारखीं परावलंबी नाहींत. राज्यकर्ते भिन्न वर्णाचे व भाषेचे नाहींत. तेथें उत्पादक धंदे व निर्गत व्यापार प्रचंडपणें चालतो, तेथें कच्चा पदार्थ या दृष्टीनें इथेंची सुद्धां उपयोग केला जातो. अशा राष्ट्रांत काम, धंदा, रोजगार अगर नोकरी मिळण्याची अडचण पडूं नये त्या राष्ट्राची ती स्थिति, मग उत्पादक धंदेच नाहींत. कच्चा पदार्थ भरपूर असून कारखाने उभारण्याला कायद्यानें मज्जाव होतो आणि बहुतेक गोष्टींसाठीं परक्यांवर अवलंबून रहावें लागतें अशा देशांत भाषेचें क्षेत्र कितीहि प्रचंड असलें तरी परभाषा शिक्षणक्रमानें कितीशी प्रगति होणार ? राष्ट्राच्या दृष्टीनें कोणत्याहि एका परकी भाषेचा दर्जा दुसऱ्या परकी भाषे इतकाच असतो. तेव्हां पोर्तुगीज काय किंवा इंग्लीश काय दोघीही परकी व बहिष्कृतीवहिणी आहेत. राष्ट्राच्या दृष्टीनें त्या भाषा समान दर्जाच्या दिसत असल्या तरी ज्ञानचक्षूला त्यांत फरक दिसून येतो आणि या दृष्टीनें मात्र गोवा प्रांताला नुसती इंग्रजी भाषेचाच नव्हे तर सर्व भाषांचा उपयोग आहे..पण तो उदरंभरणाचें साधन अगर नोकरी सुलभपणें मिळण्याचें साधन म्हणून मात्र नव्हे तर त्या त्या भाषांत असलेलीं उच्च व आवश्यक तत्वें आपलीशीं करून त्या योगें राष्ट्रीय उन्नति साधतां यावी म्हणून आहे. नुसत्या इंग्रजीला महत्व दिल्यानें तीच्या चौफेर गुणामुळें जगाचे नागरिकत्वाचे हक्क मिळण्याचें राजूला राहून 'जगाचे गुलाम' म्हणून मात्र आमच्या कपाळावर कायमचा शिक्का बसेल !

इंग्रजी शिक्षणाचे परिणाम किती खोल वर गेले आहेत याचें ताजें उदाहरण पाहिजे असल्यास लॉ. जॉर्ज हे इंग्लंडचे प्राथम मिनिष्टर (मुख्य प्रधान) असतानां त्यानें पार्लमेंटांत हिंदुस्थानाविषयीं उच्चारलेल्या शब्दांकडे लक्ष्य द्यावें. तेतिस कोटी जनसंख्येवर फक्त थाराशें इंग्रज लोक सत्ता गाजवितात ! आणि अमेरिका त्याची तारीफ करते कीं, मेंढराची इतकी मोठी संख्या वळविणें तितक्या मेंढपालानां सुद्धां शक्य नाहीं ! मुठभर परक्या लोकांनीं इतक्या जनसमुहावर सत्ता गाजवावी हें जगांत एकच उदाहरण नव्हे काय ! इंग्रजी शिक्षण जर वाघिणीचें दूध आहे तर तीचें आकंठपान करणारे मनुष्य कोटींतील प्राणी अजापुत्रांसारख्या जनावरांपेक्षांहि कमकुवत कां व्हावे ? फक्त पोर्तुगीजच्या नांवानें रडणारे आहेत त्यानांही एक प्रश्न आहे कीं, पोर्तुगीज शिक्षणक्रमाच्या योगयांत शिरणाऱ्या विद्यार्थ्यांची स्थिति योग्यापार झाल्यावर अजापुत्राप्रमाणें नेभळट होते तर इंग्रजी शिक्षणक्रमापार पडलेल्या विद्यार्थ्यांची काय अवस्था होत असावी ? तेव्हां त्या भाषेंत रामच नाहीं असें म्हणणें भाग आहे.

(चालू)

गोवा-हिंदुधर्म परिषद

पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें कवळें–फोंडें येथें, उभारलेल्या नूतन श्री शंकराचार्यांच्या मंदिरासमोरील भव्य मंडपांत ता. २२।२३ गुरुवार रोजीं हिंदुधर्म परिषदेचें प्रथमाधिवेशन मोठ्या थाटानें पार पडलें. सभेस सर्व वर्णाचा श्रोतृसमाज हजर असून ब्राह्मण ब्राह्मणेतरांचीहि अगदीं गर्दी झाली होती.

प्रारंभीं मुलांचीं ईशस्तवनपर गायन झाल्यानंतर वे. शा. सं. रघुनाथ शास्त्रीं धर्माधिकारी यांनीं सर्वांचें सुस्वागत करून आपलें प्रास्ताविक भाषण केलें. त्यांत त्यांनीं हिंदुधर्म महती व चातुर्वर्ण्यव्यवस्थेचें अप्रतिम श्रेष्ठत्व दाखवून प्रस्तुत परिषदेचें महत्व किती आहे याचें सर्वांस दिग्दर्शन केलें. नंतर दादावैद्य यांनीं सभेचें अध्यक्षस्थान श्री. साबकार, वोरी यांनीं स्वीकारावें अशी सूचना मांडली. तीस बांदोडकर यांनीं सभेतर्फे अनुमोदन देतांच टाळ्यांच्या गजरांत अध्यक्ष स्थानापन्न झाले. अध्यक्षांनीं वैद्यांना उपाध्यक्षांचे जागीं व प्रोदत्ता पै यांना सेक्रेटरींच्या जागीं निवडल्या. नंतर सभेच्या कामास सुरवात झाली. सभेंत सेक्रेटरी यांनीं पहिला ठराव मांडिला तो असा:– रजिस्तसिवील कायद्यानें हिंदुधर्मास येणारा विरोध टाळण्याची खटपट करून त्यावद्दल सुधारणा करवून घ्यावी. या ठरावावर बरींच अनुकूल भाषणें होऊन त्याच्या बजावणीसाठीं वैद्य, मराठे व ना. अ. ना. पाटणकर यांची एक कमेटी नेमण्यांत आली. दुसरा ठराव, ब्राह्मणेतरांचे येथें धार्मिक कृत्यें चालविण्यास त्या प्रकारच्या ग्रंथांची वाण असल्यानें, ते तयार करण्यास वे० पणशीकर, धूपकर वगैरेंची एक कमेटी नेमण्यांत यावी याबद्दलचा होता. यावर वे. अनंत य० शास्त्री धूपकर माशेल, यांनीं चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर सोमपत्तिक भाषण करून हा ठराव सर्वानुमतें पास झाला. तिसरा ठराव असा होता कीं, हल्लीं डिचोली येथील जज्ज सिंब्रागांस पेरैर हे हिंदूंच्या कायद्याबद्दल ग्रंथ लिहीत आहेत तरी त्यांत योग्य तीं कलमें घालण्यासाठीं कायदा व धर्मशास्त्र यास अनुसरून योजना व्हावी. यावरही बरींच अनुकूल भाषणें होऊन हाही ठराव सर्वानुमतें मंजूर झाला. व याबद्दल एक विद्वान गृहस्थांचें मंडळ नेमण्यांत आलें. या नंतरचा चवथा ठराव असा होता कीं. गोमांतकांत चालवेल्या धर्मकार्यास पाठिंबा देऊन संकेश्वर मार्फत चाललेल्या कृत पाठशाळेंा जास्त दृढिकरण आंणणें. इत्यादि. या ठरावावर .दादावैद्यांच्या सूचनेनें ना. अ. ना. पाटणकर यांनीं भाषण केलें. ते म्हणाले, आर्य लोक उत्तर ध्रुवावरून प्राचीन काळीं हिंदुस्थानांत आले. तेव्हां त्यांनीं या चातुर्वर्ण्यव्यवस्था अमलांत आणिल्या. आमचे पूर्वज आणि ग्रंथ हे आमच्या धर्माचे, आमच्या संस्कृतीचे उत्तम पुरावे होत. यांवरून होण्याऱ्या ज्ञानांतच आमचें वैशिष्ट्य आहे. या ग्रंथांचें साग्र अध्ययन होण्यासाठीं संस्कृत शाळांची अत्यंत गरज आहे. प्राचीन संस्कृतीवर नजर ठेऊन चातुर्वर्ण्यव्यवस्थे भरभक्कम करून, सुव्यवस्थित स्वरूप देऊन समाजांत एकतानता नांदविणें इष्ट आहे. यांच सह पूर्व संस्कृतीचें पुनरुज्जीवन आम्हीं केलें पाहिजे. यावर अनेक अनुकूल भाषणें होऊन हाही ठराव सर्वानुमतें पास होऊन एक कार्यकारी कमेटीच नेमण्यांत आली. या नंतर इतर किरकोळ प्रश्नासंबंधीं थोडीबहून चर्चा होऊन अध्यक्षांनीं समयोचित असा समारोप केला. नंतर आभारप्रदर्शनादि कामें झाल्यानंतर सभा बरखास्त झाली. याप्रमाणें हें हिंदुधर्म परिषदेचें प्रथमाधिवेशन मोठ्या थाटानें समाप्त झालें.

खास बातमीदार

ANUNCIOS

Pelo juizo de direito da comarca de *Quepem* e cartorio do escrivão do 1 ° oficio Redcar, à instancia do exequente Roguvir Sinay Cacodcar morador em Curchorem, correm editos de trinta dias a contar da 2.ª publicação deste no Boletim Oficial, citando o executado Visvambora Vitol Sinay Cacodcar de Cacorá ora ausente na India Ingleza em parte incerta, para renovação da instancia dos autos civeis dexecução hipotecaria que o dito exequente prom ve contra o citado e outros da dita de Cacorá- E para ser publico se expediu este. Xeldem 8 de Janeiro de 1923

O escrivão de Direito do 1 ° oficio

Babu V. Camotim Redcar

Verifiquei
O Juiz de direito.

A. de Meireles

Pelo juizo de direito da Comarca de Salcete e cartorio do escrivão do 1 ° oficio correm editos de 30 dias a contar do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos da §2 ° do artigo 197 do Codigo do Processo Civil, citando o interessado Carlos Fernandes, marido da interessada Avelina Dias, de Ponsulem de Canacona e ora ausente em Belgão, territorio britanico, em parte incerta para querendo assistir a todos os termos ate final do inventario orfanologico aque se procede nesse juizo por obito de Florin. Miranda que foi de Cuncolim sendo inventariante e cabeça de casal Vitorino Dias da mesma de Cuncolim, e neles deduzir seus direitos sem prejuizo do seu regular andamento. O que para ser publico se expediu este Xeldem 30 de Agosto de 1922:

O escrivão de direito do 1 ° of.

Manuel Jose Sebastião Lobo

1 O Juiz de Direito,

Abel Joaquim de Meireles.

da uma representaço ao sr. Ministro das Colonias, pedindo abolição imediata dalguns dos impostos que oprimem o cidadão indoportuguez, sobretudo o *Imposto Capital* que esmaga a cabeça do emigrante.

Esperamos — faz sempre bem á saude dos oprimidos a esperança — que o dito Ministro atenda á suplica da União Goana, suplica que tambem é nossa.

S. N. Bhopatcar

No mesmo espirito em que se inspirou o artigo do sr. S N Bhopatcar, nosso ilustrado correligionario, residente em Bombaim, recebemos tambem alguns escritos dos nossos amigos de Goa, escritos que deixamos de publicar por desnecessarios, visto ser demasiado conhecido o ditado "ao bom entendedor, basta so' meia palavra.

Para a historia...

Ha' 200 anos atraz, muitos indus foram forçados na India Britanica, quere pela astucia dos missionarios protestantes e catolicos, quere pela força da espada mourisca, a abraçar a religiao crista.

De ha um mez para ca', porem, o vento de conversoes vai tomando nova direcçao, abalando, sobremaneira, as comunidades crista e mussulmana que promoveram ate' reunioes ...

Do's milhares de conversos cristaos e mouros retornaram as suas religioes, sugeitando se as penitencias determinadas pelo induismo continuando o' ... a receber ainda no seu seio outros tantos, diariamente.

E' o *Suami Sradhanand*, sectario e admirador do *Mahatma* Gandhi que tem tomado sob seus hombros o nobre panel de purificar muito conversa cristão e mouro.

¿Que diraõ a isto os que por ocasiao da ultima Exposição do Corpo de Santo Xavier, registavam nas colunas dos seus jornais e em letras gordais o *avultado numero de dezenas dos convertidos em catolicismo?*

Sem ... desejavamos saber...

Saucarismo

Chamamos a atenção do elemento ilustrado do Paiz para o nosso artigo desta epigrafe, para que se ... activamente e dum modo proveitoso sobre aquele mal que esta' infelicitando, a olhos vistos a populaçao das Novas Conquistas. Para nada lhes valerao quaisquer medidas de fomento sem que antes se extermine ali o *saucarismo* detestavel.

E tenham a certeza de que prestaremos toda a sorte de apoio a quem tomar a peito o exterminio do mesmo mal.

Para o n-o imediato

Tivemos de retirar muita materia composta para a seguinte ediçao do nosso jornal por falta de espaço nesta.

O que nao se pode remediar, remediado fica, ensina-nos a sabedoria popular.

Pela Russia

O que se passa na Russia no tocante a' Egreja confrange-nos a alma.

¿Oi nossos antepassados nao terao sofrido a mesma dor, quando os portugueses destruiram os seus *pagodes?*

भारत

गुरुवार चैत्र शु० ११ शी १८४५

पतित परावर्तनें.

करंबळी, चिवेल, देवस वगैरे ठिकाणीं नावानें खिस्ती पण आचरणानें निवळ हिंदु असे 'गावडे' या संज्ञेनें ओळखले जाणारे हजारों लोक आहेत. या लोकांस खिस्ती म्हटलेलें खपत नाहीं व खिस्त्याचें बहुतेक ... त्यानां पचत नाहींत.

तुळशीपूजन, श्राद्धकर्म, इत्यादि विधि ते राजरोसपणे आचरतात. हिंदु देवादिकाना श्रद्धापूर्वक भजतात. हिंदूंत रूढ असलेल्या समजूती ह्या त्यांच्यांत आढळून येतात. ... मनानें हिंदु पण ... सोंगानें खिस्ती, अशी त्या गावडे लोकांची खरी स्थिति आहे.

उपरोक्त गावडे लोकांस शुद्ध करून हिंदुधर्मांत विधियुक्त घेण्याची आवश्यकता आम्हीं अनेक वेळा याच जागीं भासविली आहे, परंतु त्याचा हवा तितका उपयोग झालेला नाहीं, ही दुर्दैवाची गोष्ट होय.

स्वामी श्रद्धानंदजीनीं बाटलेल्या हजारों हिंदु लोकांना पुनीत करून, हिंदुधर्माच्या ... कांत मनस्वी भर घातली आहे. स्वामीजींच्या या उदाहरणानें तरी पतित गावडे लोकांच्या परावर्तनाच्या शुद्ध चळवळीस प्रोत्साहन मिळेल, अशी आमची समजूत आहे. व म्हणूनच येथील हिंदुधर्माभिमान्यांस आमची विनति आहे कीं, त्यानीं काळजीपूर्वक हा पतितपरावर्तनाचा प्रश्न हातांत घेऊन यशस्वी रीतीनें सोडवावा व हिंदुधर्माचें तेज सर्वत्र फांकवावें.

जागेचे अभावी प्रस्तुत विषयावर आज या पेक्षां जास्ती लिहिणें शक्य नाहीं.

जाहीर विनंति.

कृ. मा. न. वि. वि. माझें प्राथमिक कर्तव्य या दृष्टीनें जनतेला उद्देशून आपणाकडे प्रसिद्धीकरतां हें वार्षिक विनंति पत्र पाठविण्याचें धाडस करितो.

सत्याभिमानी महाशय हो ! आपण खऱ्या खोट्याचा निवाडा करून खऱ्या गोष्टीच स्वीकार करणारे आहांत या बद्दल आम्हा ... खात्री वाटते. रस्त्यावरील खांचखळगे बुजवून व दिशाभूल करणारे त्याचे फांटे मोडून टाकून तो रस्ता चांगला सुखावहाचा केला असतांही "आह्मी आपले वाडवडिलांनीं मळविलेल्या जुन्या व मोडक्या मार्गानेंच जाणार ! असें म्हणणें याला अंधानुकरण म्हणतात व तें अशा ... शोभतें. परंतु त्यानां ... मागून मार्गाला आणणें हें आ... सदसदविवेकबुद्धीचें आद्य कर्तव्य आहे. म्हणजे पंचांग चुकलें व ठिकठ पंचांग महत्वादिकांच्या प्र-

राष्ट्रीय शिक्षण

ले. मुक्त

पोर्तुगीजच्या योगानें आमच्यांत कनिष्ट प्रतीचें परावर्तन झालें. म्हणून तिच्यावर कटाक्ष आहेच पण त्यांतल्यात्यांत इंग्रजीमुळें जीवंत प्रेतें बनलीं नाहीं म्हणून समाधान मानायला नको का ? असलेलें झोपडें नकोसें असलें तरी दुसरी व्यवस्था होण्याच्या अगोदर ती झोपडी पाडा, असें कसें म्हणतां येईल ? प्रचलित काल हा हातचें सोडून 'दुसऱ्याचें तें बरें' असें म्हणण्याचा नसून स्वतःची उन्नति स्वतः प्रत्यक्ष कशी करून घेतां येईल हें पाहण्याचा आहे सांप्रत जगांत, राष्ट्राराष्ट्रांतून शिक्षणाचा नवीन पद्धति अस्तित्वांत येत असून त्या योगें आपापली प्रगति करून घेत आहेत. असें असतां वितंडवाद माजविणें आह्माला इष्ट नाहीं.

कित्येकानां असें वाटतें कीं, शिक्षणाचे शिखर म्हणजे स्वदेशभक्ती हें आहे. परंतु तुर्त इतकेंच सांगणें आहे कीं, ज्ञान हेंच शिक्षणाचें शिखर आहे. ज्यानां पूर्ण ज्ञान झालें आहे त्यानां आपपर, स्वदेश, परदेश, बरे वाईट, शत्रुत्व मित्रत्व हे भेदच नाहींसे झालेले असतात व ते अगाधीं सादात्म्य पावलेले असतात. मी कोण व माझें कर्तव्य काय असें जाणण्याची शक्ति येई पर्यंत जें शिक्षण होतें, तेथपर्यंत ज्ञानमंदिराच्या मध्यतरीची ती एक पायरी असें म्हणतां येईल. श्री शिवाजी महाराजाच्या मावळा मंडळानें शिक्षणाचें कितीसें शिखर गांठलें होतें या एक गोष्टीचा विचार केला म्हणजे सत्यासत्यतेचा तात्डतोब निर्णय लागल्यांशिवाय राहत नाहीं.

गोवा प्रांताच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीचें पूर्ण निरीक्षण करून शिक्षणांत योग्य, नवीन व उपयुक्त पुनर्घटना करणें व त्याचप्रमाणें एथलें शिक्षण कोणत्या पद्धतीवर व कोणत्या तत्वांनें दिलें जावें यांचा विचार होणें आवश्यक झालें आहे. शिक्षणाचें ध्येय ज्ञान म्हणून मागें सांगितलेंच आहे, त्याचप्रमाणें यांतील तत्व काय हें ठरलें म्हणजे

शिक्षण देण्याची पद्धत कोणती असावी हे समजण्यास विशेष कठीण जाणार नाहीं. धार्मिक दृष्टीनें याचा विचार केला तर असें दिसून येतें कीं आयुर्वेदशास्त्राचा व धार्मिक आचाराचा बराच संयोग झाला आहे. प्राणायाम एक धार्मिक बाबत आहे असें कोणी समजत असत परंतु तो शरिराला आरोग्यशक्तिमूलक आहे हें अनुभवांती सिद्ध झालें आहे. सगांत सगळीकडे हेंच दिसून येतें Sound mind in somed body [अविकृत मेंदू मजबूत शरीरांत) असें इंग्लीश लोक समजतात आणि आमच्या शास्त्रकारानीं 'शरीर माद्यं खलु धर्म साधनम् ' हा सिद्धांत पूर्वींच बांधून ठेवलेला आहे. कसलेंही काम हातीं घ्यावयाला अगोदर प्रकृति स्वस्थ असावें लागतें. तेव्हां जरी शिक्षणाचें ध्येय ज्ञान तरीच त्याचें तत्व 'आरोग्य' हें ठरतें. कोणत्याही राष्ट्राकडे नजर दिली तर याच तत्वानुरूपिक शिक्षणक्रम अगर पद्धती ठरविलेल्या दिसून येताल. प्राचीनकाळीं मुलाना गुरूच्या घरीं विद्याभ्यासाकरितां ठेवीत असत आणि हे गुरू बहुदा अरण्यात राहात असत यावरून त्यानींहि याच तत्वाचा अनुवाद केला असावा असें म्हणण्यास हरकत नाहीं. या तत्वाची कारण ... व त्याचीं साधनें एक ... म्हणजे शिक्षण पद्धतीचें कोडें ... आणि राष्ट्राची प्रगति होते. शरीराची ताकद कायम राखण्यास आरोग्य, स्वास्थ्य व भरपूर अन्नवस्त्र यांची पहिल्याप्रथम जरूरी भासते. आरोग्यासाठीं औषधाची आवश्यकता असल्यानें त्या व जूनें प्रयत्न होतो सार्वजनिक व खाजगी अडचणी नाहींशा झाल्यावर स्वास्थ्य मिळतें. आणि ... घर शेती इत्यादि साधनें आर्थिक ... असल्याशिवाय अन्नवस्त्राची ददात मिटत नाहीं. एवढें झालें तरी त्या परिस्थिति कायम राखण्यासाठीं सामाजिक व राजकीय घटना अस्तित्वांत आणाव्या लागतात. त्या घटना योग्य अशी परिस्थितीनुरूप फेरफार करिता यावे म्हणून स्वातंत्र्याची आवश्यकता असते. तेव्हां शरीर व अन्नवस्त्र मिळविण्याकरितां आरंभापासून ... शिक्षणक्रमात विद्यार्थ्यांची ... पद्धत ... राहण्याची पहिली व्यवस्था होणें अत्यावश्यक आहे. विद्यार्थी हे राष्ट्राचे घटक आहेत. ते अशा तऱ्हेनें योग्य तयार झाले म्हणजे राष्ट्राची उन्नति कल्याण त्याचे व्यक्तिशः प्रयत्न ... झाले म्हणजे राष्ट्राचीच उन्नति झाली असें म्हटलें पाहिजे. ज्ञानाची उणीव भरून काढण्यासाठीं मुलांनी परदेशांत पाठविले पाहिजेत. आज गोवा प्रांतात मोठमोठे असूनही अर्थशास्त्राची तत्वें माहीत नसल्यानें तें निरुपयोगी झाले आहे. त्याचाही योग्य उपयोग होईल. अशा तऱ्हेनें कारण परंपरा साध्य होण्याचे प्रयत्न होत गेले म्हणजे पूर्वेस 'भारतोदय' झाल्याबद्दल पाश्चात्य कोंबडे जरी आरवले नाहींत तरी भारतोदयाचे कोवळ किरण अखिल जग

त्यक्ष अनुभवाने ... परीक्षा मिळतें हैं. आपणांस कबूल आहेच. तरी हें सर्व लक्षांत आणून सांगली संमेलनाच्या ठरावानुसार केलेल्या कणग्रंथावरून वर्तविलेलें शके १८४५ चें शुद्ध पंचांग उदार मनानें स्वतः स्वीकारून अन्य ... जनदार आणि इतर अज्ञजनास मार्गदर्शक व्हाल अशी आशा आहे. असें करण्यांत आपलें सत्यपक्षपातित्व व्यक्त होऊन शुद्ध पंचांग प्रचाराच्या द्वारा यथाकाली धार्मिक कृत्यें घडविण्यांत सहाय्य केल्याचें श्रेय आपणास मिळणार आहे. योग्य ते करावें. क. कृ. लो. अ. ही वि.

दत्तात्रेय तुकाराम पणशीकर.

न्यता वाटते. सिद्धांत कौमुदिकर्ते भट्टोजी दीक्षीत व अमरकोश टीकाकार महेश्वरबाबा सुखटणकर हे सारस्वतच होत. इंग्रजी अमलानंतरचें पहिले हिंदु डॉक्टर भाऊदाजी लाड हेही सारस्वतच होत. डॉ. भांडारकर या सारस्वतांची विद्वत्ता, ग्रंथवाचन सतत प्रयत्न वगैरे गोष्टी कोणास ठाऊक नाहींत. कै. शंकर पांडुरंग पंडित यांचा वेदार्थ यत्न अथर्व वेद वगैरेविषयक ग्रंथ त्यांच्या वडिलांस ते पोकळीच्या बागेंत काम करीत असताना सांगावी लागली ! या आमच्या बांधवांची कामगिरी पाहून आनंद वाढतो, पण अशा थोर होणारांमध्यें सारस्वतांचा अभाव कां असावा ? आमच्यांतले डॉ. भांडारकर व चंदावरकरादि इतर दोन व्यक्ती यांच्या शिवाय इतरांचें नांव कां पुढें येऊं नये ! याचें कारण त्या लोकांत ज्या प्रकारची महत्त्वाकांक्षा आहे तशी आमच्यांत नाहीं. त्यांच्यांत असलेला दुसरा मोठा गुण म्हणजे चिकाटी हा होय. या चिकाटीच्या जोरावरच त्यांनीं उपरोक्त संस्था भरभराटीस आणल्या आहेत. आम्ही सुस्थितींत असल्यामुळें आम्हीं आळशी बनलों व आमच्याकडून कार्य कांहीच होत नाहीं. खेड्यांतल्या एका भटाचा मुलगा दिवाण होतो हें कशाचें फळ ? आमच्या पेक्षां त्यांच्यांत असलेला आणखी एक गुण म्हणजे 'प्रसंगानुसार वागणें' हा होय. जितकी आपली प्राप्ती आहे तींत ते आनंदानें राहूं शकतात, पण आमच्या लोकाना कितीहि प्राप्ति असो तिच्या पेक्षां अधिक खर्च हा आपला व्हावयाचाच. प्रो. गोखले, कर्वे इत्यादिकांच्या संस्था बिनघोर चालल्या आहेत पण त्यांत आमचे सारस्वत कितीसें साह्य करितात याची चौकशी करूंच नये ! आमच्या ओळखीचीं श्रीमंत सारस्वतांचीं घराणीं पुष्कळ आहेत पण त्यांच्याकडे वर्गणी मागावयास जाणाराचा अनुभव आम्हांस माहीत आहे ! तर हा प्रकार कमी करून आमच्या सारस्वतबंधूनीं सार्वजनिक कार्यार्थ आपली पिशवी मोकळी सोडली पाहिजे.

धार्मिक दृष्टीनेंही आम्ही म्हणजे एकंदर हिंदु बरेच अवनत आहोंत. आमचा हिंदुधर्म प्राचीन आर्यधर्माचें अपत्य होय. त्याचें मूळ स्वरूप अत्यंत शुद्ध होतें. भगवान श्री कृष्णानीं "स्त्रियोवैश्यास्तथः शूद्रास्तेपियांति परांगति" असें सांगितलें आहे. त्यावरून धर्माचें ज्ञान सर्वांनींच मिळवावें असा त्यांचा उद्देश दिसतो. अर्थात् तें धर्मज्ञान ज्या वेदांत आहे ते वेद वाचण्याचा व समजून घेण्याचा अधिकार सर्वांसच आहे. मग हा जो भेदाभेद जिकडे तिकडे वाढला आहे तो कोणी उपस्थित केला ? तो आमच्या कर्मठ लोकांनींच उत्पन्न करून पसरविला. भगवतांच्या आदेशें आपलें धर्मज्ञान सर्व जगास द्या असा असून हीं उदात्त तत्वें जीं लोपली होतीं तीं सर्व जगास उघडीं करून देण्याचें अत्यंत पवित्र कार्य स्वामी विवेकानंदादिकांनीं केलें आहे. त्यांच्या कार्यास कितपत यश आलें हें सर्वांस माहीत असल्यानें त्या बाबतींत विशेष कांहीं सांगण्याचें कारण नाहीं. असो. शेवटीं, सारस्वतादि सर्व देश बांधवांस माझी अशी विनंति आहे कीं, पूर्वजांच्या अभिमानाखालीं दडपून न जातां शेतकरी, अस्पृश्य वगैरे सर्व हीन दीन बांधवांसाठीं तन मन धन अर्पण करणें हेंच खरें सारस्वतत्व व खरें ब्रामण्य आहे मीही आपलाच असल्यानें मलाही ही गोष्ट अर्थातच लागू आहे." अशा आशयाचें अध्यक्षांचे अत्यंत कळकळीचें भाषण झाल्यावर श्री. पुंडलीक वामन विर्जिनकर यानीं अध्यक्ष व इतर सर्वांचे आभार मानले व हारतुरे वांटण्यांत आल्यावर समारंभ समाप्त झाला.

आपला,

बातमीदार.

ANUNCIOS

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do segundo oficio Barreto, vai ser vendido em hasta publica á porta do tribunal Judicial situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige á estação de Sanvordem no dia 27 do seguinte mez de Abril ás 13 horas, pela primeira vez e pelo preço do seu valor o predio rustico denominado Govindagali, sito em Loliem da cultura de arroz, descrito na conservatoria predial desta comarca sob o n.° 14761 a f. 6 v. do Livro B. 41 do valor de 600 rupias e penhorado nos autos civies de execução hipotecaria que Caetano Agostinho Fernandes, de Loliem como pae administrador do seu filho menor Lourenço Fernandes, promove contra Rosa Fernandes viuva de Manuel Maria Fernandes, de Loliem e outros como pertencente aos ditos executados, correndo por conta do arrematante a contribuição do registo por inteiro e as despesas de praça. São por este citados quaisquer credores incertos dos ditos executados e os co proprietarios para deduzir os seus direitos nos termos e para os fins de lei. E para ser publico se expediu este,

Xeldem, 24 de Março de 1923.

O escrivão de direito do 2.°
Aires Manuel Barreto

Verifiquei
1 O Juiz de Direito,
ABEL JOAQUIM DE MEIRELES.

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1.° oficio Redcar, à instancia do exequente ReguvirSinaiCurchodcar morador em Curchorem, correm editos de trinta dias a contar da 2.a publicação deste no Boletim Oficial, citando o executado Visvambora Vitol Sinay Cacodcar de Cacorá ora ausente na India Ingleza em parte incerta, para renovação da instancia dos autos civeis de execução hipotecaria que o dito exequente promove contra o citado e outros da dita de Cacora-E para ser publico se expediu este. Xeldem 8 de Janeiro de 1923.

O escrivão de Direito do 1.° oficio
Babu V. Camotim Redcar

Verifiquei. 2
O Juiz de direito.
A. de Meireles

naus que vinham da India, e depois de uma tormenta veiu toda a armada a perder-se na costa da França. De França passou D. Manuel a corte de Madrid a dar conta do Naufragio da armada, e voltou a Portugal, onde poucos dias depois da chegada, faleceu em 17 de Julho de 1628."

Ora, ve-se deste trecho do proprio sr. Fragoso, que o tal D. Manuel de Menezes saiu da India em 1627, (se ele na India naquele ano esteve), e chegou a Portugal apos uma infeliz viagem; e puocos dias depois da sua chegada veiu a falecer em 18-7-1628.

Vamos a ver agora, quando e como ele chegou a oferecer a tal espada a Sivaji.

A' pagina 17 do seu opusculo diz o sr. Fragoso e o que e' corroborado pela historia, que Sivaji nasceu em Maio de 1627.

Ora, visto que naquelas epocas uma viagem da India para Portugal levava quasi um ano, e' claro que D. Manuel deve ter saido da India (se ele na India esteve) um pouco antes de nascimento de Sivaji. E como o dito portuguez veiu a falecer apos a sua chegada para Portugal, e' tambem claro que ele nao tornou a voltar a India.

Entao, com que fundamento quere o sr. Fragoso levar-nos a crer que o referido D. Manuel *ofereceu a espada a Sivaji e este a recebeu "das maos daquele no grande castelo erigido no alto da colina em Virar?"*

Sera' o *espirito* de D. Manuel que tera' vindo a India e fixado a sua residencia no Castelo de Virar, a onde Sivaji foi visita-lo e recebeu a espada? Se nao e' isto, entao, a logica e' *uma batata.*

Sa' Manta

UMA ARBITRARIEDADE

O sr. Pereira, administrador de Ponda' houve por bem abrir uma *brecha* no Còdigo das comunidades para nela aninhar um seu afilhado, como se diz.

Referimo nos á nomeação do presidente da junta administrativa da Comunidade de Siroda, a qual Sua Exi fez recair, contra o espirito da lei e praxe, em um individuo que não reune requesitos para tanto. E' que o dito sr. administrador, protetando os maiores interessados, teve a maneira de entregar a presidencia referida a um menor interessado.

Inda bem que os outros vogais protestaram contra essa arbitrariedade, resignando os seus lugares e mostrando que nas suas veias corria um sangue nobre e digno.

Esperamos que o sr. Governador Geral intervirà no caso e fara justiça a quem assistir.

भारत

गुरुवार वैशाख शु० ४ थी १८४५

शेतकी खतें व जनता.

जगाच्या प्रगतींत शेतकीला किती महत्व आहे, हें आज कोणास नव्यानें सांगावयास पाहिजे असें नाहीं. एकंदर व्यापारी घडामोडींकडे सूक्ष्म लक्ष पुरविलें असतां दिसून येईल कीं, तिचा सर्व पाया शेतकीवर उभारला गेला आहे. अशा या महत्वाच्या विषया संबंधी जनतेंत हरेक तऱ्हेची माहिती देऊन, तिला शेतकींत वाकबगार बनविण्याचा प्रयत्न करणें, हें कार्य अर्थात् अत्यंत उपयुक्त आहे, यांत संशय नाहीं.

आमच्या शेतकी खात्यानें वेळोवेळीं मदर्हू प्रकारची माहिती लोकाना पुरविण्याचा नवीनच उपक्रम केलेला आहे. तो स्तुत्य नाहीं असें कोण ह्मणेल ?

परंतु जनता जोंपर्यंत ८० टक्के लिहायाला वाचायाला शिकविली गेली नाहीं तोंपर्यंत त्यांतील अशिक्षित अशा शेतकरी वर्गाला या पासून काय फायदा मिळणार आहे? तऱ्हेतऱ्हेचे प्रयोग करून अनुभव पाहण्यास सरकारचे हजारों रुपये खर्च होत असतील परंतु त्यांचें ज्ञान कामकरी अगर शेतकरी वर्गास होण्यास त्यांच्या डोळ्यांदेखत ते प्रयोग झाले पाहिजेत. पारोडें क्यानलवर वळें येथें असलेच प्रयोग होत असतात असें सरकारी भाषणांतून व लेखांतून वाचल्याचें आठवतें. पण इकडे त्यांचा कांहींच बोलबाला नाहीं. खुद्द पारोडेच्या रहिवाश्यांस या संबंधींची माहिती विचारल्यास तेहि कानावर हात ठेवितात; ह्मणजे त्यानाहि या बाबतींत, वर्तमानपत्रीय किंवा सरकारी गाजावाज्याशिवाय, कसलीच तऱ्हेची खरी माहिती नाहीं. यापुढें त्या जागेंत प्रत्यक्ष जाऊन माहिती मिळविण्याचें आह्मीं योजिलें आहे. तूर्त शेतकी खात्यास किंवा त्याच्या तज्ञ कामदारांस एवढीच सूचना करावीशी वाटते, ती ही कीं, असले प्रयोग पाहण्यास तुह्मीं निवडलेल्या जागेंत लोक येत नसतील तर लोक जमतील तेथेंच तुमचे प्रयोग चालू करून दाखविणें भाग आहे. पारोडें क्यानलवर निवडलेली जागा योग्य ठिकाणीं ह्मणजे लोकवस्तीपासून दूर आहे तर पारोडेच्या बाजारांत चर्चं समोरील जमिनी निवडून तुमचे ते प्रयोग तेथें सुरू करा. दर रविवारीं आसपासच्या गावांतून शेंकडों लोक तेथें सहज जमत असतात. केवळ कौतुकपूर्ण दृष्टीनें तुमचे प्रयोग पाहण्यास आणि तुम्ही देणार ती माहिती ऐकून घेण्यास लोक मागें घेणार नाहींत.

स्फुट विचार

प्रागतिक संघः—दुसरीकडे आह्मीं पाटणकरांचें पत्र प्रसिद्ध केलें आहे. त्यांत त्यांनीं दाखविलेला उत्साह इतर स्वाभिमान्यानीं प्रगट करून, संघास मदत पुरविण्यास तें पुढें सरसावले असते, तर बरीच कार्यनिष्पत्ति झाली असती. पण उदरंभरणाशिवाय राहिलेला वेळ आह्मांस करमणूकीसच अपुरा होत असल्यानें, देशाची काळजी आह्मीं कां वहावी ? आमच्या डोक्यावर पोर्तुगीज सत्तेचा ब्रह्मराक्षस बसो किंवा इंग्रजी राजकारणाचा खवीस बागडो आमची झोंपमोड न झाली ह्मणजे मिळविली. काय ही आमची अनुकंपनीय स्थिति!!!

वास्कोदिगमाः—वास्कोदिगामाची वदमाषगिरी ज्यानां ठाऊक आहे, त्याना आह्मीं पोर्तुगीज भागांत त्या संबधीं लिहिलेल्या मजकुरानें हायसें वाटावें, यांत आश्चर्य नाहीं. अंतीम ध्येयाची छत्राछपत्र करण्याचा हा काळ खास नव्हे. पोर्तुगीज सत्तेला आम्हीं मनापासून कंटाळलों असून, ती सत्ता नष्ट होऊन, आमचें राज्य आम्हांस मिळालें पहिजे, या हेतूची जाणीव न डगमगतां पोर्तुगेजानां पटवून देणें आमचें पवित्रतम कर्तव्य आहे व तें यथायोग्य रीतीनें बजावण्यास भारत कांहींच कसूर करणार नाहीं.

वर्तमानसार.

—वेंगुर्लें येथें 'वसुंधरा' नावांचें मासिक निघणार असून त्याचा प्रथमांक लवकरच प्रसिद्ध होणार असल्याचें हिंदकुमार, संपादक 'वसुंधरा' टिळक पेठ, वेंगुर्लें हे कळवितात.

—मुंबईचे प्रसिद्ध गुडस् क्लर्क शांताराम का० दणाईत यानीं आपल्या मुलांच्या व्रतबंधप्रसंगीं वेश्यांच्या नाचगाण्यास आळा घातल्याचें भारत वाचकांस माहीत आहेच. त्यांच्या व इतर सुशिक्षितांच्या कृतीचें अनुकरण सर्वत्र होण्याचा रंग दिसतो, असें दुसरीकडे प्रसिद्ध केलेल्या 'अपूर्व समारंभाच्या' वाचनानें विधान करण्यास हरकत नाहीं.

—बाणावली, साष्टी येथें 'श्री कात्यायनी बाणेश्वर विद्यालय' या नावांची एक शाळा गेल्या ३ महिन्यांपासून उघडण्यांत आली असून तींत प्रस्तुत २५ मुलें शिक्षणाचा लाभ घेत आहेत. संस्थापकांची संख्या दहा असून, तींत ५ सारस्वत व ५ दैवज्ञ आहेत. गरीब मुलांस फुकट शिकविण्यांत येतें. गावांतील अवश्य फायदा घ्यावा, असें शंभू शेणवी केंकरे हे कळवितात. संस्थेला दीर्घायुष्य चिंतितों.

—येत्या अंकीं सारस्वत ब्रा. समाजाच्या व्याख्यानमालेची शिल्लक राहिलेली हकीकत देण्यास सुरुवात होईल. इतर विषयांच्या गर्दीमुळें या अंकीं सदरहू हकीकत चालू ठेवणें अशक्य झाल्याबद्दल दिलगीर आहों.

अपूर्व समारंभ.

[खास बातमीदाराकडून]

चैत्र शु० २ या सोमवारीं काकोडें येथील रघुनाथ शे. काकोडकर यांचे येथें त्यांच्या मुलाचा मुंजीसमारंभ झाला. आनंदाची गोष्ट ही कीं, समारंभांत वेश्यांवर पूर्ण बहिष्कार घातला होता. तथापि गाण्याची न्यूनता भासूं नये ह्मणुन श्री संस्थान मंगेश येथील ह. भ. परायण बाळूबुवा यांस मुद्दाम पाचारण करून आणलें होतें. मुंजीचा सुमुहूर्त साधून घेतल्यावर यजमानानीं जमलेल्या मंडळीस समारंभास अनुरूप अशा विषयांची चर्चा झाल्यास ती बरीच फायदेशीर होणारी आहे तरी तसा प्रयत्न करून आभारांत ठेवावें अशी विनंति केली. नंतर प्रो. बा. बा. सांवर्डेकर यानीं मुंजीसारख्या परम पवित्र संस्कारानिमित्त होणाऱ्या या समारंभास वेश्यांच्या नाचगाण्याचा विटाळ होऊं दिला नाहीं याबद्दल यजमानाचें अभिनंदन करून, समारंभास लहानशा सभेचें रूप देऊन तीचें अध्यक्षस्थान सुब्राय वि. देसाई यानीं स्वीकारावें व जनार्दन वि. कामत यानीं व्रतबंध संस्कार, ब्रह्मचर्य, विद्याभ्यास, सदाचार वगैरे विषयांवर चार शब्द सांगावे अशी सूचना केली. या सूचनेस प्रो शिवराम शेणगिरी यानीं दुजोरा दिल्यावर, टाळ्यांच्या गजरांत देसाई यानीं अध्यक्षस्थान स्वीकारिलें आणि ह्मणालेः—आज समाजाची परिस्थिति बरीच कष्टमय झाली आहे. पूर्वींचे चैनीनें वागण्याचे दिवस आज नाहींत, लग्नमुंजीसारख्या समारंभांत अनावश्यक रूढींस फांटा दिला पाहिजे आणि तसा कोणी प्रयत्न करीत असेल तर त्याचें अनुकरण करण्यांतच आपलें व समाजाचें हित आहे. लोकनिंदेची मातब्बरी नैतिक बाबींपुरती राखवी. दुष्ट व घातक रूढी मोडल्या तर लोकनिंदा सोसावी लागली तरी हरकत नाहीं. या दृष्टीनें प्रस्तुत समारंभाचें महत्व फार आहे. नवीन तऱ्हेनें परंतु पवित्रपणा राखून समारंभ साजरा करण्याचें नीतिधैर्य दाखविल्याबद्दल काकोडकर यांचे आभार मानणें रास्त आहे व ते सर्वांचे वतीनें मानणें मी माझें कर्तव्य समजतों. आमचे मि. सांवर्डेकर यानीं सुचविल्याप्रमाणें मि. जनार्दन कामत यांस आपलें भाषण करण्याविषयीं विनंति करितों.' नंतर रा. कामत हे बोलावयास उठून ह्मणालेः—"आजचा समारंभ नांवाप्रमाणेंच खरा शुद्ध पवित्र आहे. कारण त्यांत पापी नजरेनें पाहण्यासारखें कांहीं नाहीं. पवित्र समारंभांत पवित्र विषयांचीच चर्चा होणें इष्ट आहे. आजच्या पवित्रतेंत भर घालण्याइतका मी अधिकारी नाहीं. तरी पण केवळ विषयप्रवेश या दृष्टीनें सांगणार ते शब्द गोड करुन घेऊन उपयोगांत आणावे. आजकाल आर्यज्ञान ही सर्व जगावर ज्ञात आहे ब्राह्मण, क्षत्रीय आणि वैश्य या त्रवर्णिक आर्यानां उपन-

नारायण अनत नाईक ... यांनीं ... छापून प्रसिद्ध केलें.

भारतास–

कविः—'लक्ष्मीरमण', हरंवळ.
चाल–वाजिव रे वाळा

मंगल दिन उगवे ॥ अजि पाहें ॥ मन्मोद न नमीं मावे ॥धृ०॥
देखियली सुदशा ॥ निर्दोषा ॥ तव. पुरली मम आशा ॥१॥
ती बहु दिवसांची ॥ अंतरिंची ॥ अतितर उत्कट साची ॥२॥
तुजवरि प्रेमेंण ॥ पुत्रसमा ॥ भारत गालोत्तमा ॥३॥
अनृत वच नसती ॥ किंवा ती ॥ नोहे रे अयुक्ती ॥४॥
आली लहर मना ॥ अवरेना ॥ करें रे नव गुण गाना ॥५॥
गोमांतकवासी ॥ दूहिंसी ॥ जागृत करण्या झटशी ॥६॥
जन्तुनि, बोलांही ॥ ज्यां नाहीं ॥ मोल मत्य निर्भिडही ॥७॥
करिशी बोध साचा ॥ कळकळीचा ॥ राष्ट्र-समाजोन्नतिचा ॥८॥
ओळख पटवीशी ॥ सकलांसी ॥ कर्तव्याची कथिशी ॥ ९ ॥
बधुनीतीची ॥ त्यागाची ॥ तेंवि संघशक्तीची ॥१०॥
महति, आचरया ॥ कर्तव्या ॥ जन्म सार्थक कराया ॥११॥
तूं गोविंदाचा ॥ जनकाचा ॥ वंद्य देशभक्ताचा ॥१२॥
असशी जिव्हाळा ॥ गुणि बाळा ॥ ठाऊक हें सकलांला ॥१३॥
तनु मन धन वाहे ॥ तव ठायीं ॥ तुजविण ना प्रिय कांहीं ॥१४॥
त्यलागीं जाणिं या ॥ झणुनीयां ॥ संकटासि देइनियां ॥१५॥
टक्कर भयरहिता ॥ कृति उंचता ॥ जना लोककार्यरता ॥१६॥
करुनि साधिताहे ॥ उत्साहें । त्वसं गेपन पाहें ॥१७॥
तव प्रारब्ध बळें ॥ झणुनि मिळे ॥ जनक तुझा ऐसा रे ॥१८॥
चिरायुषी होई ॥ तूं बाहीं ॥ स्वजनासमान पाहीं ॥१९॥
पाळें अखंड व्रता ॥ अंगिकृता ॥ संपदीं जनप्रियता ॥२०॥
अभिनव कुतूहला ॥ स्पद लीला ॥ त्या दावीं खजनाला ॥२१॥
गुणवंता बाळा ॥ उन्नतिला ॥ नव ल गा चढात कळा ॥२२॥
गोमांतक प्रांतीं ॥ सत्कीर्ती ॥ गाज रे तव सतती ॥२३॥
सज्जन 'धन्य पहा ॥ 'भारत हा' ॥ वदुनि करोत गौरवा ॥२४॥
या शुभ समयासी ॥ प्रभुपाशीं ॥ नम्र याचना ऐशी ॥२५॥
'लक्ष्मीरमण' ची ॥ तव, साची ॥ कल्याणेच्छु जनाची ॥२६॥

ता. ७।४।९२३.

भारतोत्थापन.

भा–ला लागे नितां स्वहस्त पुसनी जे तव दुःखें अहा '!!
'र–त्नांचाचि प्रदेश जो ह्मणुनि का वाचविला तो रडा ।'
'त–त्प्राचीन अहा ! कुठें लपुनियां अजी वसे वैभव ?।'
'ह–! कां भारत पुज्य देव स्थले आजी अहा दानव ?।'
'भा–झी ही कृति, मीच सर्व तुमचें केलें असे हीन हो ।'
'रा–खा मान मदीय यास्तव तुम्हीं नेतृत्व या आज हो।'
'दे–शातें करणार तो हित (?) असें बोलोनि वादि असे।'
'श–त्रूंच्या रणगर्जनेविण तुझें यां काय केलें असे ? -'
['है–वान.परि यांस एकच असे हो ध्यावंतेचें पिसें']

* * *

हो सज्ज थोपटुनि दंड तूं 'भारता' रे।
हे ण.ह्याम अतले जन क्षुद्र सारे।
सामान्य लोक चकवूनि जे स्व थल धू।
नेते ह्मणूनि मिरवीति तयांस धोधूं ॥१॥

वाडी–फोंडा.
१-४-२३

अज्ञातवासी.

NUNCIOS

Pelo juiz de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do segundo oficio Barrero, vai ser vendido em hasta publica á porta do tribunal Judicial situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a estação de Sanvordem nodia 27 do seguinte mez de Abril ás 13 horas, pela primeira vez e pelo preço do seu valor o predio rustico denominado Govindsgali, sito em Loliem, da cultura de arroz, descrito na conservatoria predial desta comarca sob o n.º 14761 a f. 16 v. do Livro B. 41 do valor de 600 rupias e penhorado nos autos civies de execução hipotecaria que Caetano Agostinho Fernandes, de Loliem como pae administrador de seu filho menor Lourenço Fernandes, promove contra Rosa Fernandes viuva de Manuel Maria Fernandes, de Loliem e outros como pertencente aos ditos executados, correndo por conta do arrematante a contribuição do registo por inteiro e as despesas de praça. São por este citados quaisquer credores incertos dos ditos executados e os co proprietarios para deduzirem os seus direitos nos termos e para os fins de lei E para ser publico se expediu este.

Xeldem, 24 de Março de 1923.

O escrivão de direito do 2.º
Aires Manuel Barreto
Verifiquei
1 O Juiz de Direito,
APEL JOAQUIM DE MEIRELE

Aviso

Fabrica da Igreja de Tilamola

No dia 7 do seguinte mes de Maio pelas 10 horas vão ser arrematados no adro da dita Egreja, as varzeas, palmares, e casas de negocio pertencentes a dita Fabrica para um triemo. As condições estarão patentes na casa dos pro... da dita Fabrica. Os pretendentes compareçam no local com a fiança i... conteudo por ... da arrematante ... e outras despezas de arrematação.

Tilamola, 16 4 923

O escrivão
Teodozio Pereira

Disse alguem no *Pigmeu*: basta que se nos mande um bilhete-postal. Tem êste toda a rázão ... Um bilhete postal é dêmais ... Podem mandar até multado que o nosso Estado paga de bom grado a multa...

Porêm não se brinca com estas coisas. Se o tempo e a paciencia me forem propicios voltarei mais de espaço a esse assunto que tem um interesse vital para todos nós.

Por hoje paremos...

Alma Velha

Ecos e Critica

S. Exia. passeia...

S. Exia. o sr. dr. Lucio dos Santos, director da Educação e do Ensino neste Estado, quere vêr, como é natural que veja, a sua esfera de acção.

Apenas chegou falaram-lhe de Valpoi, um ponto pitoresco de Gôa, um ponto cheio de belesa, donde se desfructam panoramas soberbos que só os tropicos podem proporcionar. Pronto ... s exia. decide-se, e, logo, a primeira oportunidade, aproveitando dos exames do 2 °. grau, vai a Valpoi, em serviço oficial. Não vai só. O ponto é pitorêsco. Leva a sua exma. esposa, consigo leva tambem o prof. Basso Marques. O Estado gastou no passeio de S. Exia. 90 rupias e, não gastou mal, gastou mesmo muito bem. Os aluuos a examinar em todo o Cóncelho de Satari eram 5, o que dá a insignificancia de 18 rupias por aluno.

S. Exia. passeia e passeia com geito. Se assim passeiar não tarda que nos mande todos ... passeiar tambem, mas .. no fundo do abismo...!

Jenardana U. C. Couto'

E' o primeiro hindú e o primeiro aluno do Liceu Central de Nova-Goa que obteve no exame do 7 °. ano (curso de sciencias) a elevada e distinta classificação de 19 valores.

Entusiasmou-nos imenso a distinção do sr. Counto' por duplo motivo. Primeiramente, porque ela indica que os hindús podem estar ao par dos cristãos quere no campo de sciencias quere no de letras; e segundo, porque ela patentêa que no Liceu Central Afonsó de Albuquerque vai desaparecendo, por completo, a tendenciá classista que tanto deu que falar, lá nos tempos idos.

O sr. Countó honrou a classe hindú com a sua classificação conquistada pelo poder do seu preveligiado talento.

Bastá êste único motivo para o *Bharat* o felicitar calorosamente.

Prof. R. X. Naique

Até que, finalmente, este distinto membro da comunidade de hindú foi nomeado professor da Escola Normal.

O sr. Naique é ornamento da nossa classe, tendo colhido louros na carreira que abraçou pelas prodigiosas faculdades de sua invulgar inteligencia.

Honra lhe seja e a nós tambem que pertencemos á classe a que o distinto professor está ligado pelos indissoluveis laços de amor e dedicação.

Dr. Venctexa Dessai

Defendeu a tese do curso de Farmacia e obteve a elevada classificação de 18 volores o sr. dr. Venctexa Dessai, outro ornamento da classe hindu que o estima pelas brilhaetes qualidades que o exornam.

Ao popular e estimado representante das N. Conquistas no Concelho Legislativo apresentamos os nossos cumprimentos por mais este seu triunfo que dará, certamente, realce ao seu já acreditado nome

PRAGATIC SANGH

Por circumstancias de forç maior foi adiado para o fim do proximo mez de Maio o 1 °. Congresso do *Pragatic Sangh*

Expediente

São avisados os nossos assinantes para saldarem com urgencia os seus debitos por via postal.

प्रागतिक संघ.

येत्या ५ व ६ तारखेस ठरविण्यांत आलेल्या या संघाच्या बैठकी त्याच महिन्याच्या अखेर भरविण्यांत येतील, असें सध्या अधिकारारूढ असलेल्या प्रेसिडेंटकडून कळविण्यांत येत आहे.

भारत

गुरुवार वैशाख शु० १० मी १८४५

काटकसर व सरकार.

गोवा सरकारच्या तिजोरीस तुटीच्या संमधानें पछाडून त्यानें जनतेची कशी दुर्दशा करून टाकली आहे हें आज रस्त्यांवरील पोरांटोरांस सुद्धां ठाऊक झालें आहे. या अकाळ विक्राळ संमधाच्या लीलांनीं नोकरशाहीची कशी हबेलंडी उडाली आहे, हें कोणास माहीत नाहीं ? तिजोरीच्या तुटीमुळें लोक हवालदील बनले आहेत खुद सरकार भयंकर कचाटींत सांपडलें आहे व गोमांतकाचें एकंदर वातावरण अशांततेच्या वणव्यानें भडकलेलें आहे इत्यादि गोष्टी न जाणणारा एकहि नागरिक गोव्यांत असेल, असें भारतास तरी निशान वाटत नाहीं.

अशा या अनुकंपनीय स्थितीचा आद्य जनक जो उपरोक्त समंध त्याला गाडण्याची मंत्रयोजना सध्या सरकार दरबारांतून चालू आहे, हें ऐकून कोणास समाधान वाटणार नाहीं ? गेल्या आठवड्यांतील सरकारी ग्याझेटवर अनेक अनावश्यक जागे कमी करण्याविषयीं हुकूम सुटले असून ते लवकरच अमलांत येतील, असा रंग दिसत आहे. व या धोरणाचाच अवलंब सरास सुरू केला गेल्यास तुटीच्या संमधाच्या हैदोसास कायमचा आळा बसेल यांत बिलकूल सशय नाहीं.

अर्थात् सरकारनें स्वीकारलेलें सांप्रतचें छाटाछाटीचीं धोरण भारतास मान्य आहे, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्याला त्या बाबतींत सरकारशीं सहकारिता करण्यास पराकाष्टेचें उत्तेजन येत आहे. भारत सरकारचा मित्र नाहीं, हें खरें. परंतु सरकारकडून एखादेवेळीं उपयुक्त कामगिरी होत असून, तीज मुळें जनतेचे क्लेश दूर होत असल्यास, भारत सरकारचें, आपल्या कट्ट्या शत्रूचें, अभिनंदन करण्यास मागें पुढें पहात नाहीं. असो.

तात्पर्य काय कीं, सरकारच्या काटकसरीच्या धोरणास भारताचा पूर्ण पाठिंबा असून या कामीं तें पूर्ण यशस्वी व्हावें अशीच भारताची इच्छा आहे ती परमेश्वर पूर्ण करो !

— प्रो. दत्ता व्यंकटेश पै हे दोतोर नोगेंज यांच्या "उस इंदूस द गोअ इ आ रेपुब्लिक' या ग्रंथाचें भाषांतर करीत असून, तें एक दोन आठवड्यांत छपणार आहे.

सा. ब्रा. समाज, मडगांव

श्री. सामंत यांचें व्याख्यान.

पोर्तुगीज व ब्रिटिश राज्यकारभाराची तुलना करणें कठीण आहे. कारण त्यांत राज्यक्षेत्राच्या आकारमानाची साम्यता नाहीं. परंतु आमचें सरकार ज्या प्रमाणें या टीचभर टापूला 'इस्तादु दा इंदीय' असें मोठें व्यापक नांव देऊन राज्यकारभार करीत असतें त्याप्रमाणेंच आपणही घटकाभर करूं. पोर्तुगीज राज्यकारभार सोळाव्या व इंग्लीश राज्यकारभार १८ व्या शतकांत सुरू झाला. तत्पूर्वी दोन्हीं राष्ट्रांचा राज्यविस्तार यूरोपाबाहेर पसरला नव्हता. इंग्लिश लोक हिंदुस्थानांत १६ व्या शतकाच्या अखेरीस आले.त्यावेळीं इंग्लडांत इलिझाबेथ राणी राज्यावर असून प्रोटेस्टंट पथांचें प्राबल्य झालें होतें. बेकनसारखे तत्वज्ञ मिल्टनसारखे कवि, शेक्सपीयरसारखे नाटककार त्यावेळीं इंग्लडांत झाले होते. इंग्लिश लोकांची इच्छा आपला व्यापार वाढावा अशी होती. राज्यविस्तारास त्यांनीं गौणस्थान दिलें होतें तरी तो व्हावा असें त्याना वाटतच होतें. पोर्तुगीज लोकांची इच्छा जगावर ख्रिस्ताच्या आज्ञांचा प्रसार करावयाची होती. त्यामुळें, या धोरणानें पूर्वी बाबरनें राज्यकारभार केला. त्या धोरणानें इंग्रजांनीं आपला कारभार चालविला. त्यांनीं धार्मिक व सामाजिक बाबतींत लोकांचीं मनें राखिलीं. पोर्तुगीज लोकांनीं अफगाणाप्रमाणें आपला धर्म व संस्कृति एथील लोकांवर लादण्याकरितां अनन्वित जुलूम केले. इंग्लिश लोक हिंदुस्थानांत आले.त्यावेळीं मराठी,मोंगल वगैरे अनेक लहानमोठीं राज्यें होतीं. पण त्या सर्वांस नियामक असें एखादें राज्य किंवा राज्यसंस्था नव्हती.बाबर १६व्या शतकाच्या सुरवातीस झाला व त्यानें हिंदुस्थानांत साम्राज्य स्थापन केलें.त्यापूर्वी पावशतक पोर्तुगेज लोक आपलें साम्राज्य स्थापण्याचा प्रयत्न करीत होते. पण या प्रयत्नांच्या मुळाशी धर्मभावना असल्यानें त्यानां यश आलें नाहीं. मोंगलांना हिंदु लोकांची संस्कृति व धर्म यांबद्दल आदरभाव होता तर पोर्तुगेजानां ती अगदीं कमी प्रतीची वाटे. वास्को दि गामानें आरब लोकांशीं झालेल्या झगड्याचा सूड कालिकत येथील माणसें पकडून नेऊन घेतला खरा. पण या कृत्यानें आपण आपलें भावी यश घालवून देत आहें. हें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं. आफोंस द आल्बुकेर्क यास ज्या तिमाजी नाईकानें साह्य केलें त्याच्या हयातींत येथें विजापुरचें राज्य होतें. आदिलशाहीच्या त्रासानें लोक अगदीं कंटाळून गेले होते. त्या जुलमांतून आपल्या धर्मबांधवानां सोडवतां आल्यास पहावें याच हेतूनें तिमाजी नाईकानें आल्बुकेर्कास गोवें घेण्याची सल्ला दिली !

इ. सनापूर्वी ४·थ्या शतकापासून द

माझा आंगोलचा प्रवास.

पत्र न. २

माझ्या पोरबंदरहून पाठविलेल्या पहिल्या पत्रांत हलगर्जीपणामुळें चुकुन राहिलेली पहिली गोष्ट ह्मणजे माझ्या अनेक मित्रांचे आभार मानण्याची. ज्यांणीं ज्यांणीं माझा प्रवास सुखकर होण्यासाठीं हस्तें पर हस्तें मदत केली, मी सुखरूप परत यावें ह्मणून सदिच्छा प्रगट करून माझा गौरवहि केला, त्या सर्वांचे विशेषतः मडगांवच्या सा. ब्रा. समाजाचे कृतज्ञता पूर्वक आभार मानणें हें माझें कर्तव्य होतें. व तें माझ्या हातून न घडल्याबद्दल दिलगिरी प्रदर्शीत केल्याशिवाय राहवत नाहीं. वस्तविक पाहतां मुंबईहूनच आभार प्रदर्शक पत्र लिहून प्रसिद्ध करण्यास पाठवावयाचें. आतां सर्व मित्रमंडळीकडे क्षमेचीच याचना करणें भाग आहे. व त्यानंतर या पत्रांत तरी सर्वांचे आभार मानून आंगोलास कांहीं वर्षें राहूं जाणाऱ्या या नम्र मित्रावर पूर्वीप्रमाणेंच प्रेमदृष्टी ठेवण्याविषयीं विनंति करितो.

गेल्या २२ तारखेस सायंकाळीं पोरबंदरहून आमची बोट सुटून आमच्या खऱ्या परदेशगमनास आरंभ झाला. बोटींतील आहारासंबंधीं मला जी भीति होती ती निरर्थक ठरली. त्या भीतीनेंच बोटींत असताना स्वतंत्र रितीनें आहार करण्याचा बेत केला होता. परंतु ऐन वेळीं बोटीचें तिकीट मिळण्याची मारामार झाल्यामुळें पणजीस निघण्यापूर्वी मुंबईस कंपनीच्या हेडक्लार्कास एक व नंतर सरकारी एजंटास दुसरी अशा दोन तारा देऊन टिकिटाची तजवीज करावी लागली. या गडबडींत इतरांबरोबर मलाहि जेवणखाणासह टिकीट काढण्यांत आलें. मी पूर्वी सूचना दिली होती. परंतु तिचा उपयोग झाला नाहीं आमच्या जमाखर्चीखात्याची हेळसांड आह्मांस भोंवली. असो. आयत्यावेळीं टिकीट मिळविण्याच्या कामीं मुंबईचे स्वज्ञातीय रा. अ. भांडारी यांची बरीच मदत झाली. त्याबद्दल त्यांचेहि आभार मानणें रास्त आहे. मडगांवचे श्री. बोंद्री नाईक यांणीं आपल्या मुंबईच्या ओळखीच्या गृहस्थांस मला मदत करण्यास तारेनें कळविलें होतें त्याचाहि महत्वाचा उपयोग झाला. त्यांच्या उपकाराचें ओझें माझ्यावर आहेच. असो. माझी मुख्य भीति होती ती ही कीं, बोटींतील आहारांचा वास नावीन्यामुळें माझ्यानें घेववणार नाहीं. पण काय सांगूं? कोणत्याहि पदार्थांत मसालाच नव्हे तर साधी मीठ मिर्ची सुद्धां वापरीत नाहींत. कोणतीहि शाकभाजी फक्त उकडून आणून मेजावर ठेवितात. व त्या सोबत एका शिशींत मीठाची पूड, दुसरींत मोहऱ्यांची [मांसवा] पूड व तिसरींत विनाग्र भरून ठेविलेली असते. पाहिजे त्याणें त्यांचा उपयोग करावा. पण बहुत करुन उतारूंपैकीं क्वचित् त्यांचा उपयोग करीत असतो. मी अजून टेबलावर गेलों नाहीं. माझें जेवण खोलींतच मागून घेत असतों. कोणताहि वास येण्याची भीति नसली तरी, रोज तीन खेप नुसते उकडलेले पदार्थ पोटांत जात नाहींत. येणें करून आहार जरा कमीच खपतो. जेवणांस येणारे पदार्थ क्याबीज, बटाटे, दुध्या भोपळा, केळीं, डब्याचें तूप, ओटो मील, (दुध साखरेंतून) लिंबु (उकडलेला) ब्रेड, मासळी एखादें लोणचें वगैरे वगैरे. जेवणानंतर पोपई वगैरे फळफळावळ आणि पेरू, मार्वलींग वगैरेंची मिठाई खावयास देतात. मेजावर आणलेली तळलेली मासळीं पोर्तुगालच्या एका जातीच्या तेलानें तळलेली असल्यानें व मुळांतच ती गोव्यांतील मासळीसारखी रुचकर नसल्यानें माझ्यानें खाववत नाहीं. दुधाच्या जेवणांत तर मी साखर घातलेला दुधभात, साधा बटाटे भात व सोबत केळीं, लेत्री वगैरे मागून घेत असतों. पिण्यास बर्फ घातलेलें पाणी वरचेवर मिळतें. या शिवाय अनेक तऱ्हेचे अंड्याचे पदार्थ, दोन तीन नमून्याचें मांस असतें पण मी ते पदार्थ माझ्या जेवणाबरोबर न आणण्याची सक्त ताकीद दिली आहे. नुसतें शाकाहारावर वर्षाची वर्षें सहज प्रवास करण्यास कोणतीच हरकत नाहीं. असें आजपर्यंच्या अनुभवानें ह्मणण्यास हरकत नाहीं. आतां जेवणास येणाऱ्या पदार्थांत थोडा तरी तिखट आंबटपणा यावयास पाहिजे होता. पण तीहि अडचण माझ्या गुजराथी मित्राच्या दयेनें कसी तरी निभावते. मी पहिल्या पत्रांत लिहिलेंच आहे कीं, माझ्या खोलींत एक मुसलमान, एक पार्शी व एक गुजराथी असे तिघे प्रवासी आहेत. ते मला फार ममतेनें वागवितात. हिंदी प्रवाशाना जेवण देण्याकरितां कंपनीनें गुजराथी आचारी बोटीवर ठेविला आहे त्याकडून ते आपलें जेवण मजवरोबर जेवण्यासाठीं मुद्दाम खोलींतच आणवितात. आपल्या जेवणांतील आवडतील ते पदार्थ घेण्यास मला फार फार आग्रह करितात. व मीहि मोठ्या खुषीनें घेत असतों. त्यांचीं तीं लोणचीं, भाज्या, चटण्या वगैरे फार खमंग असल्यानें कोणतीच न्यूनता भासत नाहीं. मीहि त्याकडूनच आहार मागविण्यासाठीं बरीच खटपट केली पण वेळेस तीन रुपये ज्यास्ती भरावे लागत असल्यामुळें निरुपाय झाला. त्यांतल्या त्यांत गुर्जर बंधूनीं तोड काढली कीं, माझ्या जेवणास येणारे पदार्थ कांहीं कांहीं ज्यास्त प्रमाणानें मागावे ह्मणजे भागेल. आचाऱ्याचीहि हरकत न आल्यामुळें त्या बाबतींत सर्व ठीक चाललें आहे. मी दोनचार दिवसांपर्यंत आरोग्यानें बरा व हुशार होतो. पण पांचव्या दिवशीं अकस्मात अर्धशिशीनें बेजार होऊन पडलों. दुसरे दिवशीं जुलाब "फ्रुट साल्ट" घेतला, किनीन घेतलें तरी गुण नाहीं. ह्मणून गुर्जर स्वयंपाक्यास लागतील ते पैसे देतो, जिलब्या तयार करून देशील काय? असा प्रश्न केला पण साधन नसल्यामुळें नकारार्थी उत्तर मिळालें. अर्धशिशीचा आणि जिलब्यांचा संबंध काय आहे हें आपल्या वाचकांस ठाऊक नसेल परंतु मी खात्रीपूर्वक सांगूं शकतों कीं, अर्धशिशी झाल्यावर अर्ध रत्तल ताज्या जिलब्या खाल्या तर हटकून गुण येतो. असा माझा व मी सांगितल्यामुळें बहुतेकांचा अनुभव आहे. वीस पंचवीस रोगी या रुचकर औषधानें बरे झाले आहेत. असो. मी आतां गुजराथी मित्रानें दिलेल्या नामी बुटीनें त्या विकारापासून बरा आहें. प्रवासांतील ऐषआराम तर विचारूंच नये. रात्रीचे खिस्ती जोडप्यांचे नाच वरचेवर होत असतात. बोटींत खेळ नाच, गाणें, वजावणें यांची सोय उत्तम आहे. हार्मोनियम, पत्ते, टेनिस, फुटबॉल यांपैकीं मैदानीचे, व्यायामाचे वगैरे कोणतेही प्रकार येथें चालू असतात. आंगवाप समुद्र तर अगदीं शांत होता. रोज सकाळीं श्रीविष्णुसहस्र नामावळीचा पाठ करीत असतों. आज सकाळींच ९ वाजतां मोंबास बंदर गांठलें. शहर पाहण्यास पाहिजे. वरून पुढील मजकूर दुसऱ्या पत्रांत देईन, माझ्यानावीं व Repartiç^ão de Agrimensura. Loanda. या पत्यावर एक अंक पाठवावा. लोभ असावा ही विनंति.

मोंबास बंदर—ता. २-३-२३

आ. उपी बाबली कामत

A ultima hora

O Bharat processado ?

Consta que o *Bharat* vai ser processado por causa do seu artigo *Matas, matas...*

E' o quinto processo que o nosso director vai aguentar.

Mas voltaremos ao assunto de nossas matas...

नवीन खटला ?

जंगलखात्यासंबंधीं लिहिलेल्या मजकुरामुळें भारतावर खटला भरण्यांत येणार असल्याची बंदता पसरली आहे. ईश्वर करो आणि हें शुभवर्तमान खरें ठरो !

---

um dever, porque o sr. dr. Rau durante a sua permanencia nêsta comarca não fez mal a ninguem, isto é, não torceu o *espirito* de lei, quere para favorecer uns, quere para incomodar outros.

E isto nem sempre acontece

Colegio Almeida

Eis o resultado dos exames dos alunos dêste colegio de Pondá que prestaram as suas provas em Margão:

1.a classe

Quessova Raugi Dubaxi	10	v.
Madeva Crisna Abixequi	13	"
Rajarama Gongador Quencro'	11	"
Zoivonta Caliana Coplesvorcar	10	"
Jeganata Datara Borcar	12	"
Xencor Purxotoma Maencar	11	"
Visnum Narana Maencar	11	"
Vinaeca Xembu Borcar	10	"
Ramachondra Gonoba' Sinay	10	"
Norohori Bascor Sunctancar	12	"
Norohori Camnem Gaeca	13	"
Sripada Esvonta Borcar	15	"
Siurama Vitol Verencar	11	"
Visnum Esvonta Usgaocar	10	"
Achuta Panduronga Dessai	12	"

2.a classe

Ananda Tara Ramnatcar	11	"
Quessova Narcinva Galcar	10	"
Balchondra Jenardona Usgaocar	10	"
Caxinata Locximona Singbal	12	"
Pondorinata Atmarama Borcar	14	"
Zoivonta Atmarama Borcar	11	"
Visnum Caxinata Sincro'	13	"
Visvonata Naraina Borcar	12	"
Sripada Esvonta Curchodcar	10	"
Xamba Mangues Pilgaocar	10	"

Adiados 2 (dois)

3.a classe

Mablesvar Suria Rau Sar Dessa	10	"
Pundolica Venctexa Camotim	11	"

Adiados 2 (dois)

Este resultado é sobremaneira honroso ao referido colegio cujo papel importante na propaganda de instrução por ninguem que prese a verdade pode ser posto na dúvida.

Muito estimaremos que o Colegio *Antonio José d' Almeida* vá trilhando, firme e insensivel á critica malevola que por ventura procure mas inutilmente tropeçar-lhe o caminho a sua senda que felizmente se prima pelos actos e não pela *verborrea*...

Nossas felicitações aos que, com sacrificios, estão substentando a honra e o prestigio duma tão útil instituição como o é o Colégio Almeida cujas prosperidades almejamos *ab imo pectore*.

भारत

गुरुवार वैशाख व० ३ या १८४५

पतित परावर्तन.

मागें एकदां भारतानें स्वामी विवेकानंदजीच्या लेखांचा भरभक्कम आधार दाखवून गोमांतकांतील बाटविले गेलेल्या 'गावडे' लोकांस परत हिंदुधर्मांत घेण्याची कसलीच आडकाठी नसावी असी इच्छा प्रदर्शित केली होती. नंतर स्वामी श्रद्धानंदजीच्या शुद्धीचळवळीकडे वाचकांचें लक्ष वळवून, गावड्यांच्या परिवर्तनाचा प्रश्न शक्य तितक्या जलदगतीनें व यशस्वी रीतीनें सोडविण्याची भारतानें धर्माधिकाऱ्यांस विनंति केली पण उपरोक्त कार्यार्थ कोणीहि पुढें सरसावल्याचें अजून आमच्या ऐकिवांत नाहीं.

ही गोष्ट अर्थात समाधानकारक नाहीं. गावडे लोकांची इतकीच इच्छा आहे कीं, हिंदुधर्मांत शिरकाव झाल्यावर त्यांस कोणत्याहि हिंदु देवालयांत जाण्यास प्रत्यवाय असूं नये. हिंदूवर्ण पैकीं देवालयासंबंधीं जितके अधिकार शुद्र जातीस दिले जात आहेत, तितकेच त्यांस मिळाले म्हणजे परावर्तनापासून ते आपणास धन्य मानून घेणार आहेत. रोटी किंवा बेटी व्यवहाराला ते सध्या विशेष महत्व देत नाहींत. कारण, त्यांची संख्या बरीच मोठी असल्यानें त्या बाबतींत त्याना कसल्याच अडचणींशीं झगडावें लागणार नाहीं. मात्र जबरीनें लादलेल्या ख्रिस्तीधर्माकडे आपखुषीनें पाठ फिरविली म्हणजे हिंदुदेवाना राजरोस रीतीनें मजूर्यांची त्यांस अढळ सवलत मिळाली पाहिजे.

गावडे लोकांची इच्छा अर्थात् सुलभ रीतीनें पुरविण्यासारखी आहे. कां कीं, धर्म व राजकारण या उभय गोष्टींकडे लक्ष देऊन तिला विरोध करण्याचा मूढपणा कोणीहि आचरील असें सहसा वाटत नाहीं.

अशा स्थितींत गावडे लोकांच्या परावर्तनार्थ न झटणें म्हणजे पाप नव्हे काय?

स्फुट विचार.

शोचनिय मृत्यू: — भारत संपादकाचे पूर्वाश्रमांतील वडील विठ्ठल फट्टू प्रभू देसाई यांस सांवर्डे येथें गेल्या सोमवारीं देवाज्ञा झाली, हें कळविण्यास फार वाईट वाटतें. इश्वरी इच्छेपुढें वैद्यकीचें तेज कसें फिकें पडतें हें त्यांच्या आजारसमयीं स्पष्ट-तऱ्हेनें दिसून आलें! गोव्याच्या औषधानीं विशेष गुण दिसून न आल्यामुळें, आजाऱ्यास मिरज, पुणें, मुंबई इ. ठिकाणीं नेऊन औषधोपचार करण्यांत आले. खुद्द डॉ. गणपुले यांच्याहि मानसोपशास्त्राचा आजाऱ्यावर प्रयोग करून पहाण्यांत आला, पण त्याचा काडीचाहि उपयोग न होतां ज्यानीं भारतकारांस जन्म देऊन त्यांच्यांत स्वदेश व स्वबांधव यां विषयीं निर्भेळ प्रेम उत्पन्न केलें, ते त्यांचे तीर्थरूप त्यांस व इतर कुटुंबांतील माणसांस ऐहिक दुःखसागरांत लोटून अक्षय शांतिसौख्य उपभोगण्यास गेले! साध्वी मातोश्रीच्या दुःखाची तर कल्पनाच करणें अशक्य आहे. तिच्या खडतर तपश्चर्येस यश न आल्यानें तिच्या मनाची कशी केविलवाणी स्थिति झाली असेल हें वर्णन करण्यास मानवी लेखणी सर्वस्व असमर्थ आहे. असो. सध्या परमपूज्य मृताच्या आत्म्यास शांति लाभो इतकें इच्छून, लेखणी आटोपती घेतों.

जंगलखातें: — जंगलखात्याविरुद्ध लिहिलेल्या मजकुरामुळें भारतावर खटला भरण्यांत येणार असून पुष्कळ गमतीच्या गोष्टी तें खुलें प्रसवण्याचा संभव आहे.. ज्यांच्या साठीं आम्हीं उपरोक्त माहिती प्रसिद्ध केली होती त्यांजकडून भारताला इरतऱ्हेचें सहाय्य मिळणें रास्त आहे. ओढूं पहात असलेल्या आपत्तीनें भारताला त्याच्या अढळपरमेश्वर निष्ठेमुळें काडीचीसुद्धां भीति वाटत नाहीं. कारण जनताजनार्दनाची सेवा निष्कंटक नाहीं. याची पूर्ण जाणीव होऊनच त्यानें तें व्रत स्वीकारलेलें आहे. असें जरी असलें तरी अंगीकृत कार्यांत यशप्राप्ती होण्यासाठीं त्याला पाठिंबा मिळणें जरूर आहे. व तो मिळेल अशी आम्हांस खात्री आहे.

आलमेद कॉलेजः — फोंड येथील ही शिक्षण संस्था दिवसेंदिवस नांवारुपास चढत असलेली पाहून आम्हांस समाधान वाटतें. सध्येनें मडगांव येथें परीक्षेसाठीं पाठविलेल्या विद्यार्थ्यांचे यंदाचें प्रमाण साधारण मोठें असतांहि, ४ खेरीज करून एकंदर मुलें लिसेवाच्या निरनिराळ्या वर्गपरीक्षेंत उत्तीर्ण झालीं, हें आमच्या वरील विधानाची साक्ष पटविण्यास पुरेसें आहे. निरपेक्ष चिकाटीला कोणती गोष्ट शक्य नाहीं? आणि आलमेद कॉलेजला तर तिचें निस्सीम पाठबळ आहे. असो. संस्थेचा असाच अभ्युदय होऊन, याहिपेक्षां तिच्या हातून विशेष महत्वाची कामगिरी पार पडो, अशी आमची परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

वर्तमानसार

— गोवा विद्याप्रसारक मंडळातर्फे कसबा फोंडा येथें चालू असलेल्या शाळांतील मुलांची वार्षिक परीक्षा गेल्या माहेच्या १८ व १९ तारखेस प्रो. नारायण अनंत शेट बांदोडकर, डायरेक्टर आलमेद कॉलेज, गजानन पांडुरंग दाते व प्रो. शिदबा सरदेसाई ह्यांकडून घेण्यांत आल्या. परीक्षेस अजमासें ३० मुलें बसलीं होतीं. तीं सर्व पास झालीं. नंतर १९ तारखेस संध्याकाळीं ५ वाजतां बक्षीस समारंभ आत्माराम शंकर शेट वेरेंकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. सभेस कांहीं विद्यार्थ्यांची भाषणें झाल्यावर अध्यक्षानीं मुलांस चार उपदेशपर गोष्टी व शिक्षणाचें महत्व सांगितलें. पहिल्या वर्गांत आलेल्या विद्यार्थ्यांस बक्षिसें व बाकीच्यांस खाऊ वगैरे देऊन सभा बरखास्त झाली.

— ह्यांपसें येथें एक सार्वजनिक मोफत हॉस्पिटल साठीं इमारत बांधण्याचें काम

s do que homens ... viram ar-
... नारायण ... नारायण अनत नाईक ...

तेव्हां, त्यांची प्रत्येक कामाच्या वेळीं तन्मय झालेली वृत्ति वगैरेच्या योगें करून गडकऱ्यांच्या नाटकांचें स्वारस्य उकलतां येतें. गडकऱ्यांचें ऱ्हद्गत कोल्हटकर स्वच्छ कळवितात.

वंदन-एकूण मंडळींत श्री. कोल्हटकर तरी महत्वाचे आहेत!

कंदन-'प्रोज' नटभूषणामुळें, संगीत मंडळीला कसं महत्व येईल! बरं गडकऱ्यांच्या नाटकांचे प्रयोग चांगले वठतात ह्मणून कंपनीला त्याचं महत्व देतां येत नाहीं. कारण, आरशांत सुंदर चेहऱ्याचें प्रतिबिंब सुंदर दिसलंच पाहिजे. आरसा चांगला आहे ह्मणून चेहरा सुंदर दिसतो. असें म्हणणें शुद्ध वेडेपणाचें आहे.

वंदन-तुह्मीसुद्धां चुकलांत. अस्वच्छ आरशांत कितीही सुंदरा असूं द्या, सुंदर दिसेल काय! कधींच नाहीं.

कंदन-म्हणजे! कुरूप दिसेल काय? नाहीं. आरसा अस्वच्छ असल्यामुळें सौंदर्याला बाध येणें शक्यच नाहीं. पण छान मान दिसणार नाहीं.

वंदन-पण आरसा स्वच्छ असल्यावर स्वच्छपणा हा गुण तरी नाकबूल करतां येणार नाहीं!

कंदन-त्यांत मोठेंसें काय! ज्यांत स्वच्छ प्रतिबींब पडेल त्यालाच आपण उपयोगांत आणतों, व मग आरसाही संज्ञा देतों. साखर गोड असल्यावरच साखर ह्मणतों. त्याप्रमाणें मागून उत्तम पारा, पुढून स्वच्छ अशा प्रकारच्या आरशालाच आरसा ह्मणण्यांत येतें.

वंदन-या वरून कै. गडकऱ्यांची नाटकें स्वतः उत्तम ह्मणूनच या मंडळीचीं बरीं वठतात असें ह्मणावें!!

वंदन-हो हो, यांत काय संशय. संविधानक ऱ्हदयंगम, भाषा चुरचुरीत आणि ऱ्हदयस्पर्शी, विनोद उच्च प्रकारचा आणि जिथें तिथें रसयुक्त, तेव्हां तीं नाटकें बरीं वठल्यास नवल तें काय? त्यांनीं काहीं पी क्युलीआरिटी असल्याचें मला दिसून आलें नाहीं.

वदन-मला नाहीं बुवा आपलें हें मन मान्य. भाववंधन नाटकांत श्री. मंगेशकर यांचें लतिकेचें काम पाहण्यास रखें आहे. पुण्यप्रभाव नाटकांत श्री. कोल्हापुरेचें वसुंधरेचें काम पाहून कोणीही कौतुक करील आणि श्री. कोल्हटकर तर घनश्याम आणि वृंदावनचीं कामें फार सुरेख उठवतात. सुधाकरचें कामही वाखाणण्यासारखें आहे.

कंदन—आता अगदीं खरेंतें बोललां. लतिकेचें काम त्यांचें पहाण्यासारखें आहे खरें, पण त्यांचें सिंधूचें काम उत्तरार्धात अगदींच फिकें पडतें. तसेंच कालींदीचें त्यांचें काम खरोखर नाटककारांच्या हेतूला पोषक असें असत नाहीं. इतकेंच खरें कीं, त्याना फक्त लतिकेसारख्या अल्लड पोरींचींच कामें चांगलीं साधतांत. आपले श्री. कोल्हापुरे हे रामलालचें काम अगदींच नाहून टाकतात. वसुंधरेच्या कामाचे वेळीं मात्र त्यांचें कौतुक करावें. राहिले श्री. कोल्हटकर. त्यांच्याकडे मात्र फारसा दोष आढळत नाहीं. प्रत्येक वेळीं ते आपलें सर्वस्व वेंचून आपलीं कामें योग्य प्रकारें पार पाडतात.

वंदनः—पण आपण बहुतेक कोल्हापुरचे श्री. दिनकरराव यांच्याकडे भरपूर लक्ष न दिल्यामुळें त्यांची कोणत्या प्रकारची कोटी आहे हें समजलें नाहीं. ते तरी आपणास आवडले ना?

कंदन—अहो, खरं बोलायाला गेलों तर आपणास खरोखर खरं वाटणार नाहीं आपण गडकऱ्यांचीं नाटकें वाचलीं असालच. गडकऱ्यांचा विनोद चांगला खुलून दिसायाला स्वतः शहाणपणाची त्यांत भर घालण्याची गरज आहे काय? मुळींच नाहीं. श्री. दिनकरराव हे प्रत्येक वेळीं फाजीलगिरी लढवतात व त्याच्या योगें करून गडकऱ्यांचा विनोद हिडीस वाटतो. या मंडळीनीं एक घोडचूक आपल्या लक्षांत आली नाहीं. ही मंडळी भाववंधन, पुण्यप्रभाव वगैरे नाटकें करतांना त्यांतले ऐन ऐन प्रसंग गाळतात, व महेश्वर इंदुविंदूचे, नुपूर कंकण किंकिणीचे प्रसंग अक्षरही न चुकुं देतां फाजील खुलवून लोकांसमोर आणतात. जसें कांहीं नाटक पाहाण्यास आलेले लोक कामाण्णाच आहेत.

वंदन—आपली ही खरमरीत टीका ऐकून कुणालाच बरें वाटणार नाहीं. निदान येथील मंडळीच्या नादीं लागलेल्या कांहीं कांहीं मंडळीला तरी हे बोल टाकाऊ वाटतील.

कंदन—मला जसें वाटलें त्याप्रमाणें मी आपल्याला कळविलें. बडी मंडळी करते ह्मणून आह्मीं केलें पाहिजे अशांतला ही भाग नाहीं. श्री मंगेशकर हे त्या त्या कामाचे वेळीं बाहेरून निरनिराळ्या प्रकारें रंगविलेले दिसतात. पण आंतून मात्र रंगलेले दिसत नाहींत श्री. कोल्हापुरे पुरुषाचीं कामें करण्याकरितां सजविलेले असतात. पण पुरुषासारखे सजलेले मात्र दिसत नाहींत. तेव्हां अशा प्रकारचे ठळक दोष उघड दिसत असतांना कबूल न करणें ह्मणजे मोठी चूक होय.

केशव यशवंत भोंचे.

साभार स्वीकार,

प्रमोद (मासिक):—हें उपयुक्त मासिक मालवण, रत्नागिरी जिल्हा, येथें प्रसिद्ध होत असून, त्यांतील लेख वाचनीय असतात हें आमच्या वाचकांस ठाऊक आहेच. या मासिकाचें पहिलें वर्ष संपून नुकताच त्याचा प्रवेश दुसऱ्या वर्षांत झाला आहे. द्वितीय वर्षाचा प्रथमांक खास स्वरूपांत निघाला असून तो अंतरंग व बहिरंग या दोन्ही दृष्टींनीं फारच सुंदर व ऱ्हदयंगम वठला आहे. या वरून प्रमोदाचे विद्वान संपादक विठ्ठल कृष्ण नेरूरकर यांची चिकाटी, साहित्य प्रेम व लोकहिततत्परता हे अनुकरणीय गुण कोणाच्या हि निदर्शनास आल्याखेरीज रहात नाहींत. प्रमोद चिरायु होवो, अशीच आमची इच्छा आहे.

धर्मशिक्षण (पुस्तक):—स्वधर्म-पुस्तक मालेपैकीं विद्यानिधि सिद्धेश्वर शा. चित्राव यानीं लिहिलेलें हें चिमुकलें पुस्तक नावांप्रमाणेंच कार्य करणारें असून, त्यांतील विषय मुलांच्या धार्मिक उन्नतीस अत्यंत पोषक होणारे आहेत. हिंदुधर्माच्या चहात्यांनीं या पुस्तक मालेस उदार आश्रय देणें हें त्यांचें पवित्र कर्तव्य आहे व तें ते निरपेक्षपणें बजावतील अशी आमची खात्री आहे. स्वधर्मकार्यालय, पुणें येथें अवघ्या दोन आण्यांस हें पुस्तक मिळतें.

पंचांगः—म्यानेजर निर्णय सागर, मुंबई व नारायण अनंत नाईक पाटणकर, सांगें यांकडून आलेलीं पंचांगें उपयुक्त असून, त्यांचा लाभ गोमांतकीय जनता घेईल, अशी आशा आहे.

---

selho, seria da nossa parte ingratidão classificada a não consignação do nosso *muitoobrigado* nas colunas do *Bharat*.

Sim, sinhor!

O nosso colega de *Luz d'Oriente* de Pondá, referindo se a uma local do *Bharat* afirma que da parte do sr. Administrador daquele concelho não houve *arbitrariedade* na nomeação dos membros da junta administrativa da comunidade de Sirodá: o que houve é o proposito de evitar conflitos e desavenças no seio daquela corporação.

O colega é visinho da mesma administração e portanto a sua *nota* deve ser verdadeira.

Como explica, porêm, a *Luz d'Oriente* a circunstancia *dum proposito de evitar conflitos ter sido bai* dos mesmos conflitos que mais tarde se liquidaram?

Por Deus, não nos deixe na escuridão. Derrame-nos a luz...

Sim, senhor, desejamo-la simplesmente a titulo de curiosidade.

Punia-Prabhau

Com o altruista fim de socorrer uma escola e um gabinete da iniciativa public , a mocidade hindú de Assolnã vai promover alí na noite do sabado seguinte o sobredito drama do festejado dramaturgo Gadkeri.

E' nobre o fim, alevántado o sacrificio e digno de apoio o esforço da referida mocidade.

Auxiliem-na, pois!

Recordando

Há dias escreveu o *Bharat* um artigo sobre o *caucarismo* que, sem freio, está oprimindo o Povodalgumas das aldêas das Novas Conquistas.

Que tem feito o Governo no sentido de coibir o mesmo mal que se assignala pelo importante papel que desempenha na formação de tantas *revoltas* que os poderes constituidos tiveram de debelar com grandes sacrificios de tesouro publico.

O gigante só se amachuca só se estilhaça facilmente, no estado embrionario. Depois decrescido, oferece mil dificuldades que nem sempre se superam.

Em Sanguem

Os eleitores de Sanguêm pretendem levar ás urnas os nomes dos srs. Subraia V. Dessai, presidente, Sripada Rau Valaulicar e Visvambora Sinai Sanvordencar, vereadores para a constituição da Camara Municipal daquele concelho.

A' escolha desta lista presidiu, segundo nos informam, o acordo do preponderante grupo local

Como quere que seja, desejamos que o acto eleitoral es

भारत

गुरुवार वैशाख व० ५० मी १८४५

गोव्याचें नष्टचर्य !

कोणत्याहि एका संख्येंत एखादी रक्कम मिळविली व तीच त्या संख्येंतून वजा केली तर त्या संख्येच्या किंमतींत बदल होत नसतो. उदाहरणार्थ ८ ही संख्या घ्या या संख्येंत ४ मिळवून ४ वजा केल्यास आठाचे आठच रहातात. हा गणीतशास्त्राचा सोप्यांतला अगदीं सोपा सिद्धान्त आहे. व तो आत्म्यांच्या अमरत्वाप्रमाणें अचल आहे.

गणीतशास्त्र व अर्थशास्त्र हीं उभय शास्त्रें परस्परसहाय्यक आहेत. तीं एकमेकांवर अलोट प्रेम करतात, हें सर्व जगाला माहीत आहे. परंतु गोमांतक एका कोन्यांत खिचपत पडला असल्या कारणानें येथील राजकर्त्यांस ती जगजाहीर गोष्ट अजून समजलेली नाहीं, असें म्हणण्यास भरपूर पुरावा आहे.

निरनिराळ्या खात्यांतील नोकर कमी करण्याचे हुकूम सुटले असून, त्यामुळें तिजोरीस लागलेल्या तुटीचा संबंध गाडला जाण्याचा संभव आहे असें आम्ही ने त्याच्या मागील अंकीं एक विधान केलें होतें. परंतु ज्या शाइनें तें भविष्य कागदावर मांडलें गेलें, ती शाई अजून ओलीच असतांना, असें उघडकीस आलें आहे कीं गव्हर्नर साहेबांच्या मोटारखर्चापैकीं नुसत्या गाजोलीनास दर साल तेः हजार रुपये खर्च केले जातात ! दुसरीहि एक गोष्ट उजेडांत आली आहे कीं, मुंबई इलाख्याचे गव्हर्नरसाहेब येथें येऊन गेल्याबद्दल, आमच्या तिजोरीस छत्तीस हजारांचा सुर्देड भगदा लागणार आहे !

अशा रीतीनें उधळपट्टीचें घोडें स्वैरगतीनें तिजोरीवर चरावयास लागल्यास नोकरशाहीच्या क्षुल्लक छाटाछाटीपासून होणारी बचत कशी जीव धरून राहील ? अर्थात गणीतशास्त्रापासून अर्थशास्त्रास वळजवरीनें व सारासार विचार न पाहतां जगावाहेरील मूर्खपणानें दुरावण्याचा प्रयत्न झाल्यास, तिजोरीच्या बोडक्यावर थैमान घालणाऱ्या समंधाच्या लीला कशा बंद होतील ? असो.

तात्पर्य गोमांतकाचें नष्टचर्य अजून संपलें नाहीं, हेंच खरें. स्वतःचें हित म्हणजे देशाचें हित अशा दुष्ट भावनेनें राज्यकर्त्यांच्या मनांत कायमचा आसरा धरला असल्यानें; कशाहि रीतीनें प्रगतिपथ आक्रमिणें गोमांतकाला अशक्य झालेलें आहे. जोंपर्यंत या दुष्ट भावनेपासून राज्यकर्त्यांचीं मनें मोकळीं हो ... स्थितींत कसलेंहि अंतर पडेल असें वाटत नाहीं. उलट दिवसेंदिवस वाईट स्थितीतच आम्हांस खिचपत पडावें लागणार हें उघड आहे. हें एकंदर दृश्य पाहून 'ये काळ कसा विपरीत अहा' असे कोदंडी उद्गार ज्याच्या त्याच्या तोंडांतून निघत असलेले ऐकूं आल्यास नवल तें कोणतें ?

वर्तमानसार

— मडगांवचे भिकाजी उर्फ नार्वेकर हे प्रेक्षकमारख्या' टोपण गृहस्थाशीं पत्रव्यवहार चालूकरण्यास इच्छित नाहींत, असें कळवितात.

—गावडे लोकांच्या परावर्तनासंबंधीं धर्माधिकाऱ्यांकडून काळजीपूर्वक विचार होईल, असें दिसतें.

— प्रो. कृष्ण दत्तात्रय बोरकर हे फोंडें येथें सत्यवादि नावाचें मासिक सुरू करणार असल्याचें कळतें.

—नवीन काबिजादींत कित्येक ठिकाणी मलाग्रहाला सुरुवात होईल, अशी दाट वदंता पसरली आहे. का?

—पूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणें म्हार्दोळ येथील आचार्यरत्न स्वामी पूर्णाश्रम यांच्या अध्यक्षतेखालीं फार थाटानें पार पडला, या प्रसंगी अध्यक्षांशिवाय नारायण अनंत पाटणकर यांचें व्याख्यान झालें. गतसालाप्रमाणें पुराण, लघुरुद्र वगैरे विधीहि यथासांग पार पडले, असें आमचे तेथील बातमीदार कळवितात.

विवाह मीमांसा.

ले. नं ९

कन्यारूपी रत्न जडवण्यास कोंदण कशा प्रकारचें असलें पाहिजे, या बद्दल विचार करण्याचा मुख्यत्वें करून उद्देश आहे. त्यांतूनही 'कन्या विक्रय' आणि 'बाल विवाह' या दोन मुद्यांचा उपाय नात्यानें प्रस्तुत लेखामध्यें समावेश केला आहे. पैकीं पहिला मुद्दा; द्रव्याचा मोबदला घेऊनही वृद्धास कन्या देतात, म्हणजे उकिरड्याच्या ढीगावर नाजूक फुलझाडाचें रोपटें लावल्या प्रमाणें करतात, ही अमानुषपणाची परमावधी दर्शविण्यासाठीं आहे. व कन्येच्या विवाहानुरूप वयोमर्यादेसंबंधीं पुष्कळ लोक गैरसमजूत करून घेऊन मुलींचीं कवळ्या वयांत लग्नें करतात आणि संसाराचें अवजड जूं त्यांच्या मानेवर लादतात. इतकेंच नाहीं तर आपण केलें किंवा करतों तें शास्त्रसंमत आहे, हें दाखविण्यासाठीं 'अष्टवर्षाभवेत्कन्या', अशासारखीं वचनें पुढें मांडून आपल्या पक्षाचें मंडन करण्यास कचरत देखील नाहीत हा हास्यास्पद यत्न ते विनादिकत करतात. हें दर्शविण्यासाठीं दुसरा मुद्दा आहे.

मुलींच्या बाल्यावस्थेबद्दल विचार करण्याचें आणखी दुसरें एक कारण आहे. विवाहानंतर पति पत्नि या उभयतांना आनंदानें संसारसुख अनुभवण्यास मिळालें तर सर्वच व्यवहार मनुष्याच्या इच्छेप्रमाणें घडत नाहींत. काळाची गति सदासर्वदा एकसारखी नसल्यामुळें विपरीत समय येण्याचाही संभव असतो. व त्यापुढें त्यांच्या आकस्मिक कष्टमय स्थितींत आयुष्य कंठणें पुरुषांपेक्षां स्त्री जातीला किती जड जात असतें, याचा अनुभव सर्वांना येत असेलच. असें असून बाल वयांत ज्यांच्या भाग्यांवर कडकडून वज्राघात झाला अशा अनाथ बालिका आपल्या देशांत कितीतरी आढळतात. त्याचें कारण काय असावें बरें! काय असेल तर 'बाल विवाहाची रूढी', हें होय. कारण काळांत न येणारी संभवनीय आपत्ति आंज मुद्दाम बोलावून आणण्यासारखा हा प्रकार आहे. व या रूढीला पुष्टि आणूं पाहणारे धर्मशास्त्राभिमानी(?) कित्येक वेदो नारायण(!) अनाथ भर्तृहीन बालिकांच्या शापालाअधिक पात्र आहेत.

ओघानें प्राप्त झालें म्हणून थोडें विषयांतर करणें भाग पडलें वाचकांनीं माफी करावी. कन्यार्पणाच्या स्थळ निवडीत अप्रयोजकपणा व्हावयाचा होऊन शिवाय कालनिर्णयांत होतो. इतकाच याचा हेतु आणावयाचा. आतां आपल्या प्रधान विषयाकडे वळूंया. आपलीप्रिय कन्या उत्तमस्थळीं पडावी असें बहुतेक सर्वांना वाटत असतें आणि प्रत्येकजण आपापल्यापरी त्यास्थळाची परीक्षा करून पसंती ठरवतो.

संपत्ति, थोरपणा किंवा प्रतिष्टितपणा या विषयांकडे मनुष्याचा निसर्गतःच ओढ असतो. अर्थांत ते संपादन करण्याकडे त्याची दृष्टी ठरलेली असते. निदान हे विषय अनुकूल असतील अशा ठिकाणीं कन्याविवाहेच्छु मनुष्याला संबंध जोडण्याची हांव उत्पन्न होते. अमुक राव बहाद्दरांचे व्याही आहेत हो ! फार उत्कृष्ट स्थळ योजिलें मुलीला !! थोर घराण्याशीं सोयरीक जुळली. इ. इ. सुजीच्या मोठेपणानें तो फुगून जातो. व अशा दृष्टीनें स्थळ पाहणारे संपत्तीच्या दिखाऊ तेजानें दिपतात. आणि हेंच स्थळ उत्तमोत्तम अशी त्यांच्या मनाची ठाम समजूत होऊन जाते. पण कालांतरानें कांहींसें झाल्यावर या भ्रमाच्या भोंपळ्यांची खरी किंमत उघड दर्शन आल्याविना रहात नाहीं.

एकाद्यानें एकाद्या श्रीमंत घरंदाज गृहस्थाशीं त्याच्या मुलास जामात करून सोयरीक जोडली. मुलगा चांगला. बी. ए एम ए. सारखी परीक्षा पास झालेला पदवीधर दरमहा चारपांचशें रुपये मिळवणारा बडा पगारदार आहे. फारच पसंत झाला. सब कांहीं ठीक. पण हा भ्रमाचा भोपळा किती दिवस टिकाव धरणार ? लवकरच तो ढांसळतो. कारण शेवटीं कटुतर अनुभव येत येण्याचीं उदाहरणें आहेत.

कोणाचे सासरीं व माहेराशीं नीट जुळत नाहीं. तर कोणी वर्षानुवर्ष घरीं (गृहिणीस) 'धव्यावर काळें म्हणतात तसें

नारायण अनत नाइक पोतरकर यांनीहि छापलें ...

बैल इतकी उंच आहेत कीं, अनव्या गो मांतकांत त्या जातीचीं सां डणें कठीण. येथेंहि फक्त गोवेकरांकरितांच निराळें ओस्पिताल आहे. हवा जवळ जवळ सिरजे सारखीच आहे. दुपारचा फार उष्मा होत असून संध्याकाळ होतां होतां थंड वाटूं लागतें. येथें या प्रांतापुरतीच रेलवे आहे. येथून दर बुधवारीं आणि शनिवारीं गाड्या सुटतात. येथें पौंडला दहा रुपये पडतात. प्रत्येक प्रांतांत निरनिराळया पौंडाच्या नोटा चालू आहेत. सर्व शहर फिरून झाल्यावर रात्रौ ८ वाजतां रा. कुडवडकराच्या चिन्हाडीं जेवण घेतलें. व आह्मी सिनेमाला जाऊन आलों. या नंतर बोटीवर चढणार आहें. आमची बोट उद्यां सकाळीं निघून चार दिवसांनीं 'बोयरा' बंदर करणार आहे. बोट कांठानेंच जाणार असल्यानें भीति वाळगण्याचें कारण नाहीं.

मजबरोबर आलेले खिस्ती सोबती माझ्याशीं मिळून मिसळून वागण्यास कचरतात. उघडच आहे, ते लोक युरोपियन पद्धतीनें वागणारे असल्यामुळें आपणास युरेशियन असें मानून घेतात. परंतु चमत्कार हा कीं, गोरे युरोपियन याना ढुंकून सुद्धां पाहत नाहींत. आणि त्याचें उट्टें हे आह्मां हिंदु लोकांवर काढून घेऊन समाधान मानतात त्याना हिंदूशीं बोलण्यास चालण्यास गैरशिस्त वाटतें. माझ्याशीं कोणता ना कोणता व्यवहार येत असल्यामुळें निरुपायानें ते माझ्या खोलींत येऊन बसतात. आपण हिंदूशीं व्यवहार ठेवितों याबद्दल त्यानां बरीच लाज वाटत असल्याचें दिसतें. ती झांकण्यास ह्मणजे तिचें कारणच नाहींसें करण्यास मी डोईस रुमाल बांधू नये या साठीं एकसारखें माझ्यामागें त्यांचें तुणतुणें चाललें आहे. मी तर कुठेंहि गेलों तरी मस्तक हिंदी ठेवावें असा निश्चय केला आहे. जेव्हां जेव्हां मी रुमाल बांधून त्यांच्या नजरेस पडतों तेव्हां ते माझ्यापासून दूर दूर राहतात. तरीहि पण हळूच, पुढें तूं आंगोलास पोंचल्यावर असाच रुमाल बांधणार काय ? रुमाल बांधण्यांतच तुमचें हिंदुत्व आहे काय ? असला हट्ट परदेशांत परक्या लोकस्थितींत चालवणें इष्ट होईल काय ? तिकडच्या लोकानां हा रुमालाचा नवीन प्रकार पाहून हसूं येईल, तिकडचीं मुलें हुर्यो हुर्यो करीत तुमच्या पाठीस लागतील वगैरे प्रश्न करून भंडावून सोडण्यास कमी करीत नाहींत. त्यांच्या त्या प्रश्नानां माझें उत्तर एकच असतें तें हें कीं, मी हिंदु आहें याची साक्ष माझा रुमालच पटवील. बोटींत असणारे युरोपियन मग ते इंग्लिश असोत, पोर्तुगीज असोत, किंवां इतर कांहीं देशचे असोत. माझ्याशीं बऱ्याच सलगीनें वागतात. माझा पोषाख हिंदी असला काय, युरोपियन असला काय त्यानां सारखेंच. मात्र तो स्वच्छ व नीट नेटका असला ह्मणजे झालें; त्यांच्याबरोबर पत्ते वगैरे खेळण्यास मी त्यांच्याच इच्छेनें सामील होत असतों.

मी मांसाहार करीत नाहीं ह्मणून आंगोलास पोंचल्यानंतर मला पकडून, माझ्या तोंडांत मांसाचे तुकडे कोंबणार अशी मीति घालतात. मीहि उगी रहात नाहीं याची मी तुमच्या समजाप्रमाणें नेभळा नसून तुह्मांस पुरून उरण्या इतकें अवसान माझ्यांत आहे. आंगोल कांहीं तुम्हांस विकलें नाहीं. तेथें माझे बरेच ओळखीचे आहेत. माझ्या वाटेस जाल तर उलट तुमचीच फजिती होईल वगैरे सडेतोड उत्तरें देऊन खजील करीत असतों. एकंदरींत मी माझ्या मूळच्या जोमानेंच वागत आहें. परमेश्वर त्याचप्रमाणें वागण्यास मला अवसान देवो. कळावें ही विनति.

दार-सलाम आपला.
५।३।१९२३ ऊरी बाबली कामत.

श्रीदत्तगुरुवे नमः

श्रीमंत रा. रा. शांताराम नारायण दाभोळकर ह्या विद्याप्रिय सद्गृहस्थानीं गोमांतकांतील गौडसारस्वत ब्रह्मवृंदांच्या हितासाठीं, चालू संवत्सरांतील अक्षय्य तृतियेच्या सुमुहुर्तानें येथील श्री दत्तवाडींत वेदपाठशाळा सुरू ठेविली असून, अध्यापकाचे जागीं तज्ज्ञ शास्त्र्याची योजना केली आहे. अध्यापकाला विद्यार्थ्यांवर चांगल्या प्रकारें लक्ष पुरवितां यावें ह्मणून त्यांची संख्या कमालपक्षां वीस ठरविण्यांत आली, कारण, उत्तमप्रतीचें शिक्षण मिळण्यास खोगीरभरती कामाची नाहीं. तूर्त ही शाळा एक वर्ष चालू राहील पुढील व्यवस्था विद्यार्थ्यांच्या तरतरीवर अवलंबून आहे. सांप्रत सहा विद्यार्थ्यांचा भरणा झाला. वेदविद्येचें महत्व ध्यानांत आणून सारस्वत बंधूनीं ह्या शाळेपासून फायदा करून घ्यावा अशी शिफारस आहे. शिक्षणाबद्दल फी द्यावी लागणार नाहीं.

सांखळी, शके १८४५
वैशाख शुद्ध ५
कोमस वांचा अध्यक्ष.
व्यंकटेश वासू शे. शेटिये

विकणें आहे,

सेरावली, साष्टी येथें माजागाळ नावांचें शेत त्यांच्या बांदांसह विकण्याचें आहे. येत्या मे महिन्याच्या १५ तारीखपर्यंत सि. जुजे मानुयेल फालैरु [मडगांवच्या इगर्जीजवळ] यांकडे यासंबंधीं चौकशी करावी.

अग्रलेखाच्या मथळ्यांत कांहीं अंकांत 'गोव्याचें' ऐवजीं 'गाव्याचें' असें छापलें गेलें आहे.

जाहीर विनंति

गेल्या आक्टोबरमहिन्यांत ठरविल्याप्रमाणें सारस्वत विद्यालयामाजीं विद्यार्थी संघ ता० १५ मे १९२३ रोजीं संध्याकाळीं ५ (वाजतां) स्थापन करण्याचें ठरलें आहे, तरी सारस्वत विद्यालयांतील सवंगाजी विद्यार्थ्यांनीं या प्रसंगीं हजर राहून आपल्या या पवि कार्यास हातभार लावावा अशी त्यांस विनंति आहे.

ह्मापसें-गोवा आपला
ता २३।४।२३ सेक्रेटरी.

Ecos e Critica

Balonati Samaj

O sr. prof. Shesapá, proprietario da companhia acrobatica que se encontrava nesta cassabé ofereceu a receita do seu ultimo espectaculo ao *Balonati Samaj* daqui.

Devido aos esforços dos srs. Manguexa S. Bendó, Xencor S. Bendó e activos membros e voluntarios do mesmo *Samaj*, o referido espectaculo foi muito concorrido. O sr. Visvonata S. Bobó, diligente oficial de diligencias do juizo e Sarvotama Sinai Monercar de Sanguem trabalharam, tambem, muito para que o espectaculo tivesse o milhor exito.

Registamos este facto com verdadeiro jubilo.

Repetindo

Referimo-nos, outro dia, ao banditismo dum certo tipo de Molem,de Canvorem. ¿A autoridade administrativa tomou já providencias sobre o assunto?

Desejava-mos sabe-lo, a bem dos interesses publicos.

Caso Jegabai

Oportanamente e com da dos na mão, entraremos na apreciação deste *magno* caso que está sendo bastante explorado.

Os que bebem de fino nas regiões... florestais afirmam, porem, que a guerra que se tem levantado ao Jegabai que da concessão so sofre perdas, tem por fim conseguir que certos tipos possam,dispor, rescindido o tal contrato, das matas concedidas como coisa propria sempre em detrimento do Estado.

Jegabai é ladrão? Pode ser. Cremos, porem, que ele tem cem anos de perdão, porque o seu contrato contribui para roubar muito outro ladrão, mais perigoso do que êle...

Perguntas

Os proléssores são fazedores de futuros cidadãos, esperança do bem estar da Patria tendo, portanto, eles, a sacrosanta obrigação de incutirem nos seus alunos os sentimentos de sacrificio pelo Paiz. E' o que toda a gente entende.

¿ Entenderão, tambem, da da mesma forma, os ilustres membros da classe docente do Liceu Centrsl Afonso de Albuquerque?

¿ Serão eles capazes de solicitar redução aos seus chorudos vancimentos, condoidos da triste sorte do nosso tesouro que está percorrendo o caminho de bancarrota?

Queriamos sabe lo sempre.

भारत

गुरुवार जेष्ट शु. २ या. १८४४

गोव्यांतील गोरक्षण.

'गोव्यांत गोरक्षणाची गोष्ट बोलणें देखील असंभाव्य आहे. कारण रायबंदर सारख्या हम रस्त्यावर लोक एकसारखे येत जात असतां त्यांस उघड दृष्टीस पडत असलेली दररोज ८।१० गुरांची हत्या 'तेथें होऊं नये व एका बाजूला व्हावी' ह्मणून तेथील कांहीं हिंदूंनीं काम्रमंडळीची आणि सरकारची विनवणी केलेली देखील जेथें कस्पटासमान मानून मुद्दाम ती हत्या प्रसिद्ध ठिकाणावरच चालू ठेवण्यांत येते. आणि विनवणी करणारे चुरमुरे खात मूग गिळतात, त्या प्रांतांत गोरक्षणाचें नांव घेऊन काय उपयोग हें उघड दिसत आहेच. कारण कोणतीहि गोष्ट तडीस नेण्या सारखी अंतःकरणवृत्ति ज्या समाजांत शंभरांतून एकाहि व्यक्तींचे अंगीं शिल्लक नाहीं त्या समाजांत ती गोष्ट उच्चारणें हेंच लज्जास्पद किंवा निर्लज्जास्पद ह्मटलें पाहिजे. हें अक्षरशः खरें आहे. एकदांच नव्हे पण त्रिवार सत्य आहे. तथापि निबिड अंधकारांत किंवा पूर्ण नरकनगरींत फार काळ वास करणाऱ्या प्राण्यालाहि प्रकाशाची व सुगंधाची आठवण आल्यावांचून राहत नाहीं व ती आल्याबरोबर त्यांच्या मुखांतून, आपले इष्ट विषय अथवा इष्ट परिस्थिती प्राप्त होण्याचे उगाच निघाल्याशिवाय राहत नाहींत. ह्या न्यायानें हा लेख लिहिणाराची लेखणी आज उद्युक्त झालेली आहे.

अंधार कोठडींत जन्मठेपीची शिक्षा भोगणाऱ्या कैद्याला आपण मुक्त होऊन प्रकाशांत स्वैरसंचार करण्याचे विचार सुचणें लज्जास्पद असलें तरी अपरिहार्यहि असलेंच पाहिजे! त्याच न्यायाचा हा आमचा लेख आहे. हा लेख पाहणारे सर्व जरी या अंधारकोठडीच्या भिंतीचे निर्जीव दगड असले, त्यांतून एक देखील सजीव आणि सारासार विचार संपन्न प्राणी न राला, ह्मणजे ह्या लेखाचा उपयोग होण्याचा कांहींसुद्धां संभव नाहीं हें जरी व्यवहारदृष्ट्या खरें असलें, तरी सुद्धां, अंधारकोठडींतील कैदी त्या दगडांशीं व त्या भिंतीवर त्यानें कल्पिलेल्या मानवी मित्रांशीं तो आपलें मनोगत उघड उघड बोलल्यावांचून राहूं शकत नाहीं, ही गोष्ट देखील व्यवहारिक असली पाहिजे. तसाच हा आमचा लेख आहे. ही ह्या लेखाची प्रस्तावना झाली.

गोव्यांत गोरक्षण शक्य आहे काय? ज्या गोव्यांतील अर्ध्यापेक्षां अधिक लोकसंख्या खिस्ती आहे ह्मणजे अहोरात्र गोमांसावर हापापलेली आहे, गोमांसावांचून मनुष्य जगतच नाहीं, निरोगी रहातच नाहीं, बलवान व काटकसरी असतच नाहीं, अशा दृढ समजुतीची आहे; इतकेंच नाहीं पण हीच लोकसंख्या सरकारी अमलदारी चालविणारी आहे आणि याहिपेक्षां अधिक दुःखाची गोष्ट ह्मणजे उत्तरोत्तर आपले हिंदु जे जे सुशिक्षित होतात ते ते त्यांच्या अनुकरणातच शाहाणपणा आहे असें समजत आहेत आणि त्यांच्या विचारसरणीशीं असणारा हिंदूंचा विरोधभाव एकेका बाबतींत कमी करुन, आपली त्यांच्याशीं बरोबरी करण्याला मनोभावानें झटत आहेत, अशा प्रांतांत गोरक्षण शक्य होईल काय?

होईल! आह्मांला वाटतें खास होईल! कशानें होईल? कसें होईल? एकंदर हिंदूंला आज गोरक्षण इष्ट वाटत आहे ना? ते कांहीं गोहत्येला मदत करीत नाहींत ना? अहो पण हिंदुसमाजांत जीव तो कितपत आहे? त्यांची मदत आणि त्यांचा विरोध खिस्ती समाजाचे खिसगणतींत असता तर असें कशाला होतें? उगीच हिंदुसमाज ह्मणून नांव मिरवण्याचा मूर्खपणा या बाबतींत कामाचा नाहीं. गोव्यांतील हिंदुसमाज हा खिस्ती समाजाला अनिष्ट अशी एकहि गोष्ट करूं शकणारा नाहीं. मनांत असो किंवा नसो पण तो खिस्ती समाजाला प्रत्येक बाबतींत साह्यच करणारा आहे असेंच प्रत्येक ठिकाणीं दिसून येईल. भोक्ता आणि भोग्य ह्यांचा जो एकमेकांशीं संबंध असतो तोच संबंध खिस्ती समाज आणि हिंदुसमाज यांचा एकमेकांशीं आहे. खिस्ती समाजाला जी गोष्ट हवी असेल ती गोष्ट नाहीं करण्याचें सामर्थ्य हिंदुसमाजांत बिलकूल नाहीं, काल नव्हतें, आज नाहीं व उद्यांहि पण तें येण्याचें चिन्ह दिसत नाहीं. ह्मणून 'हिंदुसमाज' हीं पांच अक्षरें या बाबतींत उ. उच्चारतांच कामा नयेत. त्याच्याशिवाय काय कल्पना असली तर निघूं द्या.'

'ठीक आहे. तुह्मांला गोव्यांत समाज या दृष्टीनें खिस्ती अनुकरणच सर्वत्र दिसतें तर समाज हीं अक्षरें बाजूस ठेऊन व्यक्ति यां दृष्टीनें विचार करून एक कल्पना दृष्टीस पडते ती समोर मांडून पसंत पडते का पाहूं—गोव्यांतील गोहत्या बंद व्हावी आणि गोरक्षण घडावें असें वाटणाऱ्या कांहीं व्यक्ति तरी इकडे आहेतच कीं नाहीं? पुरे. कांहीं व्यक्ति त्या मनाच्या आहेत ह्याच बीजभूत समजा. बीं मिळालें ह्मणजे त्याची लागवड करून त्याला अंकूर येतील, झाडें तयार होतील व त्यापासून यथाकाळीं फळनिष्पत्ति भरपूर होईल अशी आशा करण्यास आधार असतो. अर्थात गोव्यातील गोहत्या बंद व्हावी असें ज्या कोणा गरीब, मध्यम, व श्रीमंत अशा व्यक्तींना वाटत असेल त्यानीं आपापल्या शक्तिपुरता चारी बाजूंनीं प्रयत्न चालविणेचें जर मनावर घेतलें तरें बरेंच काम भागण्याजोगी व आज नाहीं उद्यां तरी यशस्कर होण्याजोगी एक कल्पना आहे. ती एथें उघड करून तुह्मांला कितपत पसंत पडते तीं पाहातों.'

'थांबा, तुह्मीं जी कल्पना [illegible] ती मग सांगा. पण पूर्वी मला थोडेंसें आ संबंधांत बोलावयाचें आहे, तें ऐकून घ्या. आजकाल गोहत्या होऊं नये अशा मताचीं जीं कांहीं माणसें आहेत त्यांची फसवणूक चालली आहे ती आधीं लक्षांत घ्या. ही फसवणूक ह्मणजे गोव्यांत जे कसाई गुरें विकावयास आणतात त्यांच्यापासून गुरें विकत घेऊन, मी आज अमुक गाई किंवा अमुक पाडी मरणार होती तीं वांचावली, असें समाधान मानणारे भोळे मनुष्यांची होय! ह्या बिचाऱ्याना वाटत असतें कीं, कसाई मारावयास नेणार होता ती गाई वांचविण्याकरतां मी दुप्पट किंवा दीड पट रुपये दिले आणि त्या गाईचा जीव मी वांचविला, हें मी पुण्य केलें, स्वार्थत्याग केला. परंतु त्याचा परिणाम काय झाला? कसाई याला दुप्पट रुपये मिळतांच त्या रुपयांच्या दोन गाई त्यानें आणखी खरेदी करून मारावयास आणल्या! दीड पट रुपये दिल्यास एक गाई व एक पाडी अशीं दोन जनावरें खरेदी करून खाटकानीं आणून दिलीं! अर्थात् बिचाऱ्या पुण्येच्छु भोळ्या मनुष्यानें एक गाय वांचविण्यास दिलेल्या रुपयांनीं दोन गोहत्यांची तयारी घडली! अर्थात यांत पुण्य किती व शहाणपणाचा भाग किती याचा विचार करा. अर्थात कसायांस जास्ती द्रव्य देऊन गोरक्षण करणें या सारखा वेडेपणा व पाप दुसरें नाहीं. ही गोष्ट ध्यानांत ठेवून पुढें मग जर दुसरी योग्य कल्पना असली तर ती समोर ठेवणें योग्य. एथपर्यंत झालेल्या ऊहापोहावरून सिद्धांत असा होतो कीं, कसायांस गाई विकतच मिळूं नयेत असा बंदोबस्त झाल्याशिवाय गोरक्षण होणें ह्मणजे गोहत्या बंद होणें शक्य नाहीं. पण जेथें वरचेवर दुष्काळ पडून खलःच्या पोटचीं मुलें विकत देण्याची पाळी प्रत्येक वर्षी कोठें ना कोठें तरी येतच असते. तेथें तेथें गुरें फार अल्प किंमतीला कसाई खरेदी करितात आणि तीं गोव्यांत आणून विकतात. ह्याला आमच्या सारख्या क्षुद्र माणसांचे हातून उपयुक्त असा कोणता उपाय होणार? ही गोष्ट खुद्द सरकारनेंच कायदा करून [गोहत्या बंदी] केली तर मात्र होणें शक्य आहे. पण खुद्द सरकारच गोभक्षक आहे तें गोरक्षक कायदे कां करील? अर्थात ही हि कल्पना फोल!!

परंतु आमचे विचारतरंग, आमचें मनोराज्य इतक्यावरच थांबून स्वस्थ बसणारें नाहीं. त्याची गती अव्याहत आहे. ह्या मनोराज्याला वेगळाच एक मार्ग सुचतो आहे. ह्या मार्गानें खटपट करावी ह्मणून गोरक्षणेच्छु श्रीमंत, मध्यम व गरीब अशा हिंदु व्यक्ति जर मनापासून प्रयत्न करतील तर, गोहत्येला निदान गोव्यांतील गोहत्येला एकदम नाहीं पण हळु

पत्रव्यवहार.

श्री. भारतकर्ते यांस. वि. वि

प्राचीप्रभेच्या गेल्या दोन तारखेच्या अंकांत " क. ल. श. ,, या सहीनें एक पत्र प्रसिद्ध झालें असून, त्यासाठीं प्रभेची अर्धी अधिक जागा खर्ची पडली आहे. पत्रलेखकानें भारतपत्राच्या १५३ च्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या, विरोधीच्या " मद्यपान आणि मद्यदान ,, या लेखावर आपल्या मतें सडकून पण आवास्तव टीका केली आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, एवढ्या अगडबंब पत्रांत तत्वनिष्टेपेक्षां व्यक्तिनिष्टेवरच अधिक जोर दिलेला दिसून येतो. त्या भरांत विरोधीचे वाभाडे काढण्यास व वरचेवर दुगाण्या झाडण्यास त्यानीं कमी केलें नाहीं. हें पाहून " शेवं कोपेन पूरयेत,, या म्हणीची सत्यता पटावयास लागते.

श्री. घैंपे यानीं आपल्या लग्नमुंजीच्या समारंभांत हजारों रुपयांचा अनावश्यक खर्च केला तो वांचवून जनतेस काटकसरीचें सक्रीय उदाहरण घालून द्यावयास पाहिजे होतें तें न दिल्याबद्दल खेद प्रदर्शित करून समारंभास जमलेल्या ख्रिस्ती पाहुण्यास दारू अर्पण केल्याबद्दल तीव्र संताप व निषेध विरोधीनें आपल्या लेखांत प्रगट केले होते. व त्याबरोबर, मद्यदानाची गणना महापातकांत होत असल्यावरून त्याबद्दल योग्य प्रायश्चितपूर्वक पूनित होण्याची सूचन श्रीमंतांस, सविनय देण्यांत आली असा त्याचें उघड दिसत असतां प्रभेंतील कलश, विरोधीच्या पदरांत व्यक्तिद्वेषानें ; मत्सरानें, श्रीमंतांच्या नालस्तीचें माप घालूं पाहतात यास काय म्हणावें ? किंवा " कावीळ झालेल्यांस सर्व कांहीं पिवळें दिसतें' असें म्हणतात तेंच खरें !! विरोधी अथवा कलश यांच्या भाषामिज्ञतेचें शास्त्रीय परीक्षण बाजूस ठेवून मुख्य मुद्यांकडेच वळूं.

विरोधीच्या लेखांतील वरील मुद्यांस उत्तर देताना कलश म्हणतात कीं, 'पाहुणचारादाखल दारू देणें हा शिष्टाचार श्री. घैंप्यानीं पाळला हें योग्यच केलें व तो न पाळला असता तर ते दोषी ठरले असते, कारण अतिथीला किंवा आमंत्रितांला जें प्रिय असेल, किंवा जें त्यांचें भक्ष असेल तें तें त्याला देणें हाच गृहस्थाश्रमाचा धर्म असून त्यांत दोष नाहीं तर उलट पुण्य आहे. यास आधार काय तर पुराणांतरीं अतिथींना, अपवित्र असें जे नरमांस, तेंहि त्यांच्या मागणीमुळें अर्पण केल्याचीं उदाहरणें आहेत. इ. इ.

केवळ श्रीमंतांवरील दोष धुवून काढण्यासाठींच जर कलश महाराज कलम घेऊन पुढें सरसावले असतील तर त्याचा हात कोण धरील ? आणि श्रीमंतानीं केलेल्या धर्मद्रोहीत व आसुरी पाहुणचाराचें मंडन करण्याचा जर त्यांचा शुद्ध उद्देश असेल तर तो फार घातक आहे. असल्या समाजहितविघातक तत्वाच्या नरडीस प्रसूतकाला नख लावण्याचा अधिकार कोणाहि पौरात्य संस्कृतीच्या अभिमान्यास असलाच पाहिजे. व तो मद्यपान निषेधावर लिहिल्याशिवाय एकहि अंक सुना जाऊं न देणारे प्रभेचे संपादक आपल्या संपादकीय अभिप्रायांत गजावतील असें वाटून तो अंक उलटा सुलटा केला. पण काय ? जेथें जावें तेथें विकृति आणि खर. कदाचित् दुसऱ्या अंकास राहिले असतील ; नाहीं तर ते आपल्या ब्रिदास जागले नाहींत असें होईल. आणि श्रीमंतांच्या नावांखालीं दडून दिलेल्या शिष्टाचाराचा आणि पौराणिक पाहुणचारांचा प्रसार सांसर्गिक रोगाप्रमाणें झाल्यास हिंदु लोक अतिथी सत्कारासाठीं दारूचा, गोसुकर मांसाचा फन्ना उडवितील, इतकेंच नव्हे तर राजा श्रीयाळ आणि सती चांगुणा यांच्याप्रमाणें पोटच्या एकुलत्या एका मुलालासुद्धां मारून त्याचें मांस पाहुण्यानां शिजवून घालूं लागतील.

मग एका आफ्रिकन रानटी जातींत ज्याप्रमाणें स्वत:ची बायको पाहुण्याच्या सेवेस पाठविण्याची चाल आहे ; तिचाहि शिरकाव समाजांत होण्यास उशीर लागणार नाहीं. कारण पुढें मागें त्या जातीचे आफ्रिकन लोक मोठे हुद्देदार होऊन इकडे येणार नाहींत म्हणून कोणी सांगावें ? असो.

अतिथीसत्कार करणें हें पुण्य आहे व तें मिळवणें हा सर्वांचा हक्क आहे. मात्र पौराणिक अतिथीच्या आग्रहासाठीं व अतिथी सत्काराची पूर्णता करण्यासाठीं श्रीयाळ राजास आणि चांगुणा राणीस अतिथीच्या पंक्तीस बसून स्वताच्या मुलाचें मांस खाण्याचा प्रसंग आला तसले म्हणजे मद्यपी पाहुण्या बरोबर मद्य पिण्याचे गो भक्षक पाहुण्या बरोबर गो मांस खाण्याचे कुप्रसंग वरचेवर येतील त्यास कबूल होणें हें हि कर्तव्यासाठीं एक कर्तव्य होऊन तें शिष्टसंमत होण्यास विलंब लागणार नाहीं. प्रभेंतील कलश या बाबतींत पुढाकार घेतील यांत संशय नाहीं त्याना आपल्या घरीं येणाऱ्या गोमांसभक्षक पाहुण्यसाठीं, वर्षाचेकांठीं, गोठ्यांतील एक दोन गोऱ्यांचा आणि दोन चार कालवडीचा बळी घेण्याचे सुमंगल प्रसंग येत असतील. त्याशिवाय त्यांच्या मनास शांति कसी मिळेल. जनतेनें या आसुरी पाहुणचाराचें स्वागत कसें करावें याचा विचार केला पाहिजे. भारत आणि प्रभा यांचे हजारों वाचक स्वकर्तव्यास जागतील अशी आशा आहे..

असल्या दुष्ट चालींचें समूळ उच्चाटण व्हावें अशी आमची परमेश्वराजवळ सदैव मागणी राहील. क. आभारांत ठेवावें ही वि.

काकोडें. १०—५—२३

एक वाचक

— प्रस्तुत विषयावर विरोधीचा लेख आला आहे. तो सवडीनुसार प्रसिद्ध होईल.

सं. भारत

आव्हान

(गज़ल)

कृतीच्या थोर कार्याला । करा जा आज तरुणानो ।
कृतीविण गोड बोलांला । विचारिल कोण ? सांगा हो ।
जगांतिल जीवजीवांच्या । तुह्मीं रक्तावरी जगलां ।
तयां चे क्लेश निरवाया । जगीं तुह्मीं अहां आलां ।
तयांचें सैाख्य तें तुमचें । तयांचें दु:ख तें तुमचें ।
तरी असतां पहा दु:खीं । कसे त्यां सोडितां तुम्हीं !
स्वत:चा स्वार्थ विसरा हो । जनीं मग दृष्टि फिरवाहो ।
'तुह्मीं 'आम्हीं' अशा भेदा । अजी लाथाड्नी द्याहो ।
करी करवाल सूडाचे । चला घ्या शत्रु घेराया ।
स्वत:च्या हक्क प्राप्त्यर्थ । रणीं बरवें पतन येणें ।
स्फूर्तिचें गीत गाईन । धीराचें छत्र वाहीन ।
रणीं तुह्मांपुढें राहून । तुह्मां वेष आणीन ।
नसोनी श्वान तुम्हीं हो । अहां छावेच सिंव्हांचे ।
परी विसरुन स्वस्वरूपा । पळाया लागलां साचे ।
लागा पूर्व यश गाना । स्मरा हो पुण्य कृत्यानां ।
यशाची काय ती पर्वा ! खरें मिळणार तें आह्मां ।
करा निर्धार झणि आतां । पुढें व्हा धैर्यमेरुसे :
पहा ती मातृभू दु:खें । कशी कष्टे अंहा दैवा ॥

मडगांव–गोवा। अज्ञातवासी.

---

lectual do ilustre morto.

Ha' pouco, Chandavarker, quando presidente duma Conferencia de Kervar, estivera de passagem em Goa onde foi alvo das mais entusiasticas provas de aprego e simpatia por parte da classe hindu'.

Os leitores do *Bharat* devem estar lembrados de tudo isso e mais dos brilhantes discursos proferidos pelo ex-juiz da Relagao de Bombaim em Canacona e no salao do *Sarasvat-Samaj* de Margao.

Morreu Chandavarker mas nao para morrer: para viver eternamente na memo'ria dos posteros que vultos como ele nao morrem.

Paz a sua alma!

Matas, matas...

Ha' muita coisa por fazer nas matas nacionais para evitar prejuizos que elas constantemente sofrem.

Em primeiro lugar, o papel de *vigilancia* tem de ser confiado a um pessoal que sobre ser consciencioso e corajoso seja escrupuloso e refractario,a' ... *alma coisa.* E para que, nao va' suceder como acontece em Ambaulim donde se transporta, clandestinamente e em grande escala, madeira para diferentes pontos de concelho de Salcete, dando-se a mesma circunstancia com o carvao ... vegetal – torna-se necessario que o respectivo pessoal seja reforgado.

Mas voltaremos.

O Heraldo

Foi processado este nosso presado colega da capital. O processo e' um contra-tempo mas e' um contra-tempo...feliz

O *Bharat* nao lamenta pois o acontecimento: felicita o ilustre confrade pela *sorte-grande* – tres vezes *grande* que o M. P. lhe proporcionou.

Novidades

Chegam-nos novidades sensacionais de Pangim sobre que guardamos reserva por algum tempo porque a pressa nem sempre e' *boa conselheira*

Podem, porem, estar certos que o *Bharat* nao deixara' de a elas se referir, logo que seja senhor dos esclarecimentos solicitados sobre o assunto.

Uma necessidade

E' necessario que os projectos destinados a discussao nas sessoes do Conselho Legislativo sejam distribuidos pelos jornais, como ha' pouco frisou o *O Heraldo*, para que a imprensa possa dizer sobre eles o que se lhe oferecer para o bem do Paiz.

O *Bharat* secunda o pedido do referido colega.

Seremos atendidos?

Dnian-Mandir

Como estava anunciado, realisou-se o 6° aniversario da fundagao da sobredita instituigao de Assolna, no dia 21 do corrente.

O *Bharat* agradece o convite para a mesma solenidade.

भारत

गुरुवार जेष्ट शु. ८ मी. १८४४

उठा ! जागे व्हा !

कालाच्या चक्रगतीप्रमाणें देशांतील लोकांनी सत्ता आणि धर्म यांच्यांत क्रांती घडावयाची ती घडणारच. कोणत्या तरी एका राष्ट्राच्या सत्तेखालीं दुसऱ्या राष्ट्रानें रहावयाचें. एकानें दुसऱ्याला जिंकून स्वसत्तेखालीं आणावयाचें. अशा घडामोडी जगांत नेहमीं चालत असतात, परंतु हो ईल तें होईल म्हणून भवितव्यतेकडे बोट दाखवितां कामा नये. प्राप्त झालेल्या आपत्तीतून स्वसत्ता व स्वधर्म यांचें शक्य त्या प्रकारें संरक्षण करून देशाची इभ्रत कायम राखणें प्रत्येक रहिवाशाचें कर्तव्य आहे. आमच्या शूर पूर्वजांनीं समशेरींच्या धारांखालीं स्वतांच्या गर्दना घुसडून पराक्रमांसाच्या नद्या यासाठींच वाहविल्या आहेत.

सांप्रत काळीं देखील तसाच कठीण प्रसंग असल्यानें आपण आमच्या पूर्वजांचें परिस्थितीनुसार अनुकरण करणें जरूर आहे. आणि या पूर्वीच तें केलें असतें तर आमचा देश जुलमी राज्यकर्त्यांच्या अमलांतून केव्हांच स्वतंत्र झाला असता. परंतु हें अनुमान "आतेला मिशा आल्या असल्या तर तिचा काका झाला असता" या सदरांत गणलें जातें! अशी स्थिति महाराष्ट्रांत निदान गोव्यांत तरी खचित आहे. कारण आमच्या शूर पूर्वजांचा अभिमान आमच्यांत आहे कुठें ?

हिंदुसमाजाची आजची येकी व दुःस्थिति आणि आमचेवर राज्य चालवणाऱ्या राज्यकार्य धुरंधरांची राज्यपद्धति या गोष्टी लक्षांत घेतां आह्मांस मेंढरांची उपमा योजिली गेल्यास तिला आह्मी अगदींच अपात्र ठरतों असें नाहीं !

गोव्यांत पोर्तुगीज लोकांचा अमल सुरू झाल्यापासून तों आजपर्यंत त्यानीं काय कार्य केलें आहे ? कदाचित् कांहीं केलें असलें तरी पोर्तुगीजांनीं गोमांतकांत जी दिवाळखोरी चालविली व आतां चालवीत आहेत त्या मानानें तें करणें कांहींच नाहीं. अर्थात गरीब रयतेच्या जिवावर ही दिवाळखोरी त्यानीं चालविली असून ती गोमांतकस्थांच्या चळवळींत कांहीं जीव नाहीं, तिला सघन लोकांचें पाठबळ नाहीं म्हणून चालली आहे. वास्तविक सधन, बुद्धिवान, विद्वान, मुत्सद्दी लोकांचा भरणा या ठिकाणीं कमी आहे असें मुळींच नाहीं. परंतु बहुतेकांनीं चळवळीच्या बाबतींत संन्यस्त वृत्ति धारण केल्यानें सगळें असून नसल्याप्रमाणेंच आहे.

'राज्यव्यवस्थेसाठीं नेमलेल्या कामदारांची वेतनें नियमित चालण्याकरतां सरकारानें रयतेकडून करभार घेणें म्हणजे नव्हे. तो घेतला पाहिजे हें खरें. पण त्यालाहि मर्यादा म्हणून आहे. 'ऊंस गोड लागला म्हणून मूळासकट खाण्यांत शहाणपणा नाहीं !

अनेक अव्यवहार्य रीतीनें पैसे उकळले जातात. आणि त्यांचा सद्व्यय आमचें पोर्तुगीज सरकार तितक्याच मुत्सद्दीपणानें करतें. एखादा कामदार कामावर असतां त्यास मिळणाऱ्या पगाराच्या दीड किंवा दोन पटीनें, तो रिकामा होऊन घरीं विठ्ठल विठ्ठल म्हणत बसल्यावर त्याला पेन्शन! हें सरकारी औदार्य अचाट तर खरेंच पण या मांजराच्या खेळण्यानें उंदरांचा जीव जातो !

कर बसवून त्याचा खर्च करण्यांच्या चतुराईबद्दल पोट दाबून हंसूं येतें व ते कर सालोसाल फारीक करण्याचें प्राण हलाल होऊं लागलेल्या प्रजेंत दिवसेंदिवस नाहीं यामुळें तिच्या पोटास चिमटा बसतो याचें दुःख वाटतें. त्याची भिती वाटत नाहीं, अशा निबडक धनकनकसंपन्नाची गोष्ट निराळी पण इतरांनीं हे सगळे माकड खेळ पाहून स्वस्थ असावें. ही त्याहूनहि दुःखाची गोष्ट आहे.

यावरून सगळी गोमांतकस्थ मंडळी या कामीं चळवळ करीत नसल्यानें नालायक आहे, असें म्हणणें नाहीं. गोव्यांत चळवळ आहे. पण लेख लिहिणें आणि व्याख्यानें देणें या पलीकडे त्या चळवळीचें क्षेत्र अजूनपर्यंत गेलें नाहीं. म्हणजे तितका जोमदारपणाच आमच्यांत नाहीं. आणि थोडीबहुत हालचाल करूं लागलेल्या पुढाऱ्यांच तोंडघशीं पाडणार. म्हणून सर्व स्वदेशबंधुभगिनींना आग्रहाची विनंति आहे कीं: —

उठा ! जागे व्हा !!

स्फुट विचार.

वैदिक पाठशाळा: —श्री संस्थानदत्तवाडी सांखळी येथें, मुंबईचे प्रसिद्ध गृहस्थ श्री. शांताराम नारायण दाभोळकर यानीं सदरील नावांची पाठशाळा स्थापन केल्याचें वर्तमान, त्या संस्थानच्या कोमिसांव मंडळीचे अध्यक्ष श्री. व्यं. वा. शेटये यांच्या, गेल्याच्या मागील अंकांत प्रसिद्ध झालेल्या पत्रावरून आमच्या वाचकांस समजून आलेंच आहे. सांप्रतच्या राष्ट्रीय व धार्मिक जागृतीच्या काळांत वेद विद्यासारख्या श्रेष्ठतर विद्येस गोमांतकियानीं पारखें राहावें हें न आवडून श्री. दाभोळकरानीं श्री दत्तगुरू सानिध्यांत वैदिक शिक्षणाचा उपक्रम केला याबद्दल ते स्तुतीस पात्र असून सर्व गोमांतकवासियांतर्फे त्यांचे आभार मानणें आमचें कर्तव्य आहे. चालकांच्या अपेक्षेप्रमाणें विद्यार्थ्यांची कमाल संख्या भरण्यास उशीर लागणार नाहीं असा आह्मांस भरंवसा आहे. परंतु "भरंवशाची ह्मैस कधीं कधीं वांझ ठरते" असाहि जगाचा अनुभव आहे हीहि गोष्ट कांहीं खोटी नाहीं.

आमचें कर्तव्य: —बी कितीहि चांगलें असलें तरी तें खडकावर पडल्यास रुजत नाहीं. असा अनुभव श्री. दाभोळकरांस न येतां त्यांस या कार्यांत अधिकाधिक सात्विक हुरूप येईल असा प्रयत्न आह्मांकडून होणें इष्ट आहे. समाजाचे धर्मगुरु व देवस्थान कमिट्या यानीं या कामीं पुढाकार घेणें हें त्यांचें पहिलें कर्तव्य होय. देवस्थानचे पुढारी, मठाधिकारी, पुरोहित, हरीदास, पुराणिक वगैरे वर्गास आपापलीं कामें योग्य रीतीनें चालविण्यासाठीं वैदिक शिक्षण मिळणें आवश्यक आहे; व तें घेण्याबद्दल त्या वर्गावर, समाज, धर्मगुरु आणि देवस्थानकमिट्या यांकडून जर सक्ती करण्यांत आली तर ती न्याय्यच ठरेल. त्या वर्गाला आजपर्यंत आयत्या पीठावर रेघा ओढण्याची खोड लागली आहे ती घालवून त्यांच्या पवित्र कर्तव्याची जाणीव करून देणें व तो कर्तव्यरत होण्यासाठीं शक्य ते प्रयत्न करणें आमचें कर्तव्य आहे.

झीज सोसा: —कोणतेंहि कर्तव्य बजावण्याचें काम कांहीं सुखासुखी होत नसतें त्यासाठीं पुढारी म्हणविणाऱ्यानीं बरीच झीज सोसण्यास तयार झालें पाहिजे. सुदैवानें श्री. दाभोळकरांनीं स्थापन केलेल्या पाठशाळेंतील विद्यार्थ्यांची संख्या भरण्याचा सुयोग आला तर नवीन विद्यार्थ्यांची सोय लावून देण्यासाठीं नवीन नवीन शिक्षकांची योजना करावी लागेल यांत संशय नाहीं. नवीन शिक्षक म्हणजे त्यांबरोबर शेंकडों रुपयांचा खर्च आलाच. त्याची तरतूद सर्व तऱ्हेच्या हिंदु धार्मिक संस्थांकडून झाल्यास तो प्रश्न सुटणें कठीण नाहीं. देवस्थानातून होणारा चैनीचा व डामडौलाचा अनावश्यक खर्च कमी केला व त्या बचतींतून धार्मिक शिक्षणास मदत केली तर पर्यायानें देवस्थानचीच बहुमोलाची कामगिरी बजाविल्यासारखें होईल, कारण आज ज्या वर्गाच्या मध्यस्थीनें आमचीं सर्व धार्मिक कृत्यें होत असतात तो वर्ग या बाबतींत बराच मागसलेला आहे. त्यांचें अज्ञान नष्ट होऊन वेदविद्येचा प्रकाश त्यांच्या ऱ्हदयांत पडला म्हणजे सर्व समाजाला आज ना उद्यां त्याचा फायदा मिळून धार्मिक बाबींत आमचें पाऊल खरेंच पुढें पडेल.

— असोळणें येथील "श्री वेताल प्रासादिक ज्ञान मंदिर,, या संस्थेतर्फे चालत असलेल्या शाळेंतील मुलांच्या परीक्षा चालू माहेच्या १६ तारखेस घेण्यांत आल्या. श्री. राम अनंत प्रभू शिंडे, राम अनंत शेणवी नावेलकर व यशवंत गोविंद कामत यांचें परीक्षकमंडळ नेमण्यांत आलें होतें. पहिल्या दुसऱ्या व तिसऱ्या इयत्तेंतील अनुक्रमें ६, २ व ५ मुलें पास झालीं. ता. १७ रोजीं 'ज्ञान मंदिर' कार्यालयांत वयोवृद्ध श्री. पुंडलीक पै काणें यांच्या हस्तें बक्षिसें वांटण्यांत आलीं, असें कळतें.

नवीन मराठी शाळा, मडगांव.

मडगांव एथील नवीन मराठी शाळेची परीक्षा गेल्याच्या मागील अंकांत प्रसिद्ध झाल्याप्रमाणें शनिवार रोजीं सुरू न होतां अपरिहार्य अडचणीमुळें मंगळवारीं सकाळ पासून सुरू होऊन शुक्रवारीं दुपारीं पूर्ण झाली. शुक्रवारीं रात्रौ ७ वाजता बक्षीस समारंभ श्री. जांबोटकर यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. श्री. गोपाळ व्यंकटेश पाणंदीकर पेन्शनर डे. ए. इन्स्पेक्टर मुंबई याकडून एथील कामदार गृहस्थ श्री. शंभू आत्माराम पै पाणंदीकर यांच्या मार्फत आलेला जरीचा खण वरच्या वर्गांत पहिला नंबर आलेली मुलगी कु. केसराबाई विष्णु धुमटकर हीस बक्षीस देण्यांत आला. एथील शिक्षणाभिमानी व्यापारी गृहस्थ रा. भिकाजी उसो शेट नारवेंकर यांचीं किर्लोस्कर खबर, बाल सुमित्र माला, बालोद्यान हीं नियतकालीकें वर्षभर नावानें चालू राहण्याचीं बक्षिसें पांचव्या चौथ्या व तिसऱ्या यत्तेंत पहिला नंबर आलेल्या कु. पुरुषोत्तम दामोदर दलाल, कु नारायण विठ्ठल देसाई व कु. केसराबाई विष्णु धुमटकर या विद्यार्थ्यांना अनुक्रमें मिळालीं. रा. पुंडलीक लक्ष्मण कामत कुंडईकर आदिपरांति दस आल्फादिगस कुळें यांचें कन्यावाचन माला हें बक्षीस वरच्या वर्गांत नंबर वर मिळविलेली असून वय लहान असलेली मुलगी कु. मोगाराई रामचंद्र पै रायतुरकर हीस मिळालें. चौथ्या यत्तेंत इतिहास विषयांत पहिला नंबर आलेला विद्यार्थी कु. वासुदेव यशवंत नायक यास रा. श्रीनिवास दामोदर नायक यांचें श्रीकृष्ण चरित्र [रा. वैद्यकृत] हें बक्षीस मिळालें. नंतर रात्र बरीच झाल्यानें वार्काच्यापास झालेल्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या दिवशीं देण्यांत येतील असें जाहीर करण्यांत आलें. रा. जांबोटकर व रा पुंडलीक वा. विर्जिनकर यांचीं समयोचित भाषणें झालीं. (त्यांचा सारांश पुढील पत्रांत पाठवीन.) नंतर रा. विर्जिनकर यांनीं शाळेस हरएक प्रकारें साह्य करणाऱ्या सद्गृहस्थांचे व परीक्षकांचें शाळेच्या वतीनें आभार मानले. पुढें फुलें वगैरे वांटण्यांत येऊन समारंभ पूर्ण झाला.

शनिवारीं ३ वाजतां रा. पुं वा. विर्जिनकर यांच्या अध्यक्षतेखालीं पास झालेल्या जुन्या व नव्या विद्यार्थ्यांचें संमेलन भरलें. रा. अध्यक्ष महाराजांनीं मुलांचें ईश्वर विषयक कर्तव्य या विषयावर मुलांस उपदेश केला. नंतर पास झालेल्या सर्व मुलांस अध्यक्षांच्या हस्तें बक्षिसें वांटण्यांत आलीं. नंतर मुलांचे कॉफी पान झाल्यावर समारंभ पूर्ण करण्यांत आला. "क्ष"

गोमांतक सेवक मंडळ.

—मडगांव येथें या नांवाची एक संस्था स्थापन होणार असून तिचे अध्यक्ष स्वामी पूर्णाश्रम हे होणार आहेत, असें तेथील एक बातमीदार कळवितात.

जाहीर विनंति.

जेटी--मराठी शाळा, मार्मु. हार्बर.

सप्रेम न. वि. वि. वरील शाळेच्या मुलांची वार्षिक परीक्षा व बक्षिससमारंभाचा दिवस गेल्या डिसेंबर महिन्यांत ठरविण्यांत आला होता. परंतु कांहीं अपरिहार्य कारणानें त्यावेळीं तो न झाल्यामुळें येत्या जून महिन्यांत ता. २२ ते २४ पर्यंत ठरविण्यांत आला आहे. परीक्षक श्री. गणपत दत्तात्रय वायचळ, प्रेसि. नामदेव तरुण संघ हुबळी व श्री. नारायण द. पई रायकर शाळामास्तर जांबावली हे असून बक्षीससमारंभ ता. २४ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां प्रो. दत्ताराम गो. कामत यांचे हस्तें होणार आहे. तरी वरील शाळेचे मेंबर व मुलांचे पालक यांनीं आपल्या मित्रमंडळीसह सदर प्रसंगीं येऊन उत्सव साजरा करावा अशी आग्रहाची विनंति आहे.

आ. न.

मार्मुगांव हार्बर
ता. २० मे स. १९२३

शांताराम काशिनाथ दणाईत.
सेक्रे. जेटी-मराठी शाळा.

ANUNCIOS

इंग्लिश मराठी स्कूल, रेल्वे स्टेशन मडगांव

स्थापना १९१८

या शाळेंतील इंग्रजीचे नवीन वर्ग दरसाल प्रमाणें ता ६ जून १९२३ पासून सुरू होतील.

शिक्षण मातृभाषेंत भाषांतर पद्धतीनें देऊन वरच्या वर्गांत इंग्रजी, संस्कृत परशियन, मॅथमॅटिकस, हे विषय ब्रिटिश हायस्कुलाच्या धर्तीवर शिकविले जातात.

विद्यार्थ्यांत शिस्त, आज्ञाधारकपणा उत्पन्न करण्याचा प्रयत्न करून शारीरिक, नैतिक शिक्षण दिलें जातें.

शाळेंत दिलें जाणारें शिक्षण समक्ष पाहाण्याबद्दल पालकांस सूचना आहे. करितां पालक आपल्या मुलांस या शाळेचा फायदा करून देतील अशी उमेद आहे.

मडगांव
११।५।१९२३ 1 T. B. Tirodkar

Liga da Propaganda DE Instrução em Gôa

Colégio Antònio José de Almeida

Reabrir-se-ha este Colegio em 7 de Junho próximo seguinte leccionamento gratuito de português desde 1.º grau até 3 a classe dos Liceus, de inglés com primeiras 5 classes e de marata com primeiras 4 classes.

As propinas de matricula e encerramento serão as mesmas do ano findo.

Haverá internato para hindús, e tambem para cristãos quando os alunos se inscreverem em numero pelo menos de 10.

Para mais informações dirijam-se ao secretario do Colégio.

Secretaria da Liga em Pondá, 15 de Maio de 1923

O Secretário da Liga, 3
Sitarama Quercár

आल्मेद कॉलेज

सालाबाद प्रमाणें गोवा विद्याप्रसारक मंडळाचें 'आल्मेद कॉलेज, येत्या जूनच्या ७ तारखेस उघडण्यांत येईल. त्याच दिवशीं 'विद्यार्थी भोजन वसति गृहहि' सुरू होईल, पालकांनीं आपल्या मुलांस लवकर पाठविण्याचें करावें.

पोर्तुगेज प्रिमेर ग्राव पासून लिसेवच्या ३ ऱ्या क्लासा पर्यंत; इंग्रजी ३ इयत्ता व मराठी ४ इयत्ता इतके वर्ग सुरू होतील.

फोंडा, १५ मे १९२३

सी. वी. केरकर
सेक्रेटरी

estatutos.

ASTIGO 20.° — O directorio sera escolhido por aclamaçao ou eligido por maioria absoluta de votos dos so'-cios presentes, quere missionarios quere benemeritos, em qualquer reuniao que para o mesmo fim por designada.

Unico. Na eleiçao do directorio observar-se-hao as disposições de lei geral.

Capitulo IV

Receita

ARTIGO 21 ° — A receita da Missao provem:

1 ° De quaisquer donativos ou ofertas, livros de encargo, livros e outos objectos.

2 ° De importancias pecuniarias pagas pelos socios benemeritos.

Capitulo V

Penalidades

ARTIGO 22 ° — Perdem o direito de socio:

1 ° Os que causarem escandalos ou perturbarem a regular marcha de Missao.

2 ° Os que desobedecerem ao preceituado nos presentes estatutos quando a desobediencia seja manifestamente prejudicial a consecuçao dos fins da Missao.

ARTIGO 23 ° — O socio que tiver perdido a sua qualidade, podera' readquiri-la, quando se mostre reabilitado.

ARTIGO 24 ° — O socio readmitido e', em tudo, igual aos outros socios, gosando das mesmas regalias que eles.

ARTIGO 24 ° — A reabilitaçao do socio consiste em demonstrar, por actos pratices, que se arrependeu da falta cometida.

Aqui esta' uma associação que, traduzida em facto, concorreria, altamente, para que o nosso Povo, especulado pela prepotencia do egoismo, marchaisse para a sua verdadeira revindicação.

Ecos & Critic

Magia...

O mundo actual está repleto de magicos, isto é, das criaturas que do branco fazem preto, do direito esquerdo, do vivo morto, como se viu há pouco no circo do Shesapá que deu seus espectaculos na casabé.

A magia consiste, em fazer duma verdade, autentica mentira.

E outra coisa não fazemos, dominados por um complexo de circunstancias que são outras tantas mentiras convencionais.

O mundo

O mundo é magico e quem quizer viver neste mundo magico, magico tem de ser tambem. Senão sera' considerado, segundo o tal mundo, o pior dos seres humanos, o pior dos bandidos, finalmente

E dezem que o homem actual é culto....

Patriotas

Consta-nos que o sr. Alfredo Rodrigues levantou do erario publico a titulo da sua passagem e dos *seus ausentes*, uma soma importante de dinheiro

¿Que grande moralista não é o sr. Rodrigues que levantou dinheiro para a passagem dos ... *ausentes*?

E os amigos desse senhor levantam campanhas contra o sr Jaime de Morais, em vez de primeiro, tomar conta dos escandalos dos seus *correligionarios*.

¿Que grande politiquice?

Matas, matas...

Por motivos supervenientes não foi possivel tratar deste assunto no presente n °.

Mas a promessa será cumprida e com ... juros.

भार त

गुरुवार जेष्ट कृ. १ श. १८४४

बळी तो कान पिळी.

हें जुनें तत्व मानव जातीच्या जन्म कालीं समाजांत जितकें स्वैर संचरत होतें, तितकेंच मानव जातीच्या सध्याच्या ऐन तारुण्यांतहि आपला हुकेलदृष्पी धिंगाण घालण्याचें काम बजावीत आहे. पूर्वीच्यां व आतांच्या माणसांत सुधारणेच्या मानानें जितकें अंतर आहे, तितकेंच अंतर शिरोभागीं उल्लेखिलेल्या तत्वाच्या जुन्या व नव्या अमलबजावणींत दिसून येतें. हा उत्क्रांतिशास्त्राला धरून असलेला फरक वजा केल्यास, 'बळी तो कान पिळी' या जुन्या पुराण्या सिद्धांताला कसलाच बाध येऊं शकत नाहीं.

ही अति परिचयाची विचारसरणी आज लेखणींतून उतरण्याचें कारण, आज कित्येक वर्षांपासून नवीन काबिजादींतल्या कांहीं गावांत बड्या माणसांकडून अशिक्षित व अनाथ माणसांवर चालत असलेला जुलूम, हें होय. राजकीय वातावरणांत अनेक स्थित्यंतरें घडून आलीं, किती तरी गव्हर्नर आले व किती तरी गव्हर्नर गेले, शुद्ध अनियंत्रीत राज्यपद्धतीचीं शकलें होऊन नवीन प्रजासत्ताक राज्यव्यवस्था प्रस्थापिली गेली, पण जुना जुलूम चालू आहे तो आहेच.

हा जुलूम कसा नष्ट होईल याचा प्रत्येक स्वातंत्र्याभिमान्यनें विचार केला पाहिजे. गुलामापेक्षांहि वाईट रीतीनें वागविण्यांत येणाऱ्या मानवी प्राण्यांस दुःखांत चांच पडत ठेवणें बड्यांच्या फायद्याच्या दृष्टीनें योग्य असलें तरी कायद्याच्या दृष्टीनें खास वाजवी नाहीं जनतेचे कैवारी म्हणवून घेणाऱ्या प्रत्येक देशभक्ताचें पहिलें कर्तव्य सदरील लोकांस दुःखमुक्त करणें हें होय. यामुळें बड्या लोकांकडून बराच छल सोसावा लागेल, परंतु त्याची पर्वा करतां कामा नये.

'बळी तो कान पिळी' या आसुरी तत्वाला कसून विरोध होणें सर्वतोपरी अगत्याचें आहे. हें काम अत्यंत कठीण पण जरूरीचें आहे. आमच्यांतील सात्विक व धैर्यशाली तरुणानीं नवीन काबिजादींतील गुलामगिरी झुगारून देण्याप्रित्यर्थ अविश्रांत सनदशीर प्रयत्न केले पाहिजेत. अत्याचाराचें रक्तशोषक स्वरूप सुद्धां त्या प्रयत्नांना शिवूं न देण्याची काळजीपूर्वक खबरदारी घेतली पाहिजे. असो.

तात्पर्य, जुलुमाच्या तावडींत सांपडलेल्या लोकांना दुःखमुक्त करणें ही सांप्रतची महत्वाची कामगिरी आहे. तीजकडे दुर्लक्ष न होईल अशी आशा केल्यास, अगदींच 'अरण्य रुदनवत्' होईल असें आम्हांस वाटत नाहीं.

स्फुट विचार

बळी तो कान पिळीः—जुन्या काबिजादींतल्या अनेक ख्रिस्ती गृहस्थानीं नवीन काबिजादींत जमिनी कमविल्या आहेत. त्यांचा पूर्वेतिहास पाहिल्यास अंगावर शहारे आल्याखेरीज रहात नाहींत. कित्येक जमिनी तर त्यानीं एक पैहि न खर्चितां आपल्या घशाखालीं उतरविल्या आहेत इतकेंहि असून मूळच्या जमिनदारांस योग्य रीतीनें वागविलें जात नाहीं तें नाहींच. जुन्या काळच्या गुलामा पेक्षांहि 'मुकदम' लोक त्याना ज्यास्त वाईट रीतीनें वागवितात. पण इतकेंहि असून सदरील 'आपल्या बिळांत नागोबा' होऊन बसलेले 'भाटकार' हिंदू लोकांविरुद्ध भलभलते आरोप करण्यास कचरत नाहींत !

मनु पालटत आहेः—पण आतां उपरोक्त स्थितींत बदल होत असून, गुलामगिरीस कं टाळलेल्या लोकांचे डोळे उघडाययास लागले आहेत. ही स्थिति समाधानकारक असून भावी सुखाची निदर्शक आहे. मात्र त्यामुळें बडे लोकांचीं मनें संतापानें तडफडत असून, रागाच्या भरांत ते काहींच काय करीत सुटले आहेत. 'हिरका ठिसह सारूं मिळण्यास' सोकावलेल्या लोकांची मनःस्थिति तशी झाली नसती, तर आश्चर्यच होतें.

जुने डावपेंचः—एखाद्या मूळच्या जमिनदाराच्या घरास मुद्दाम आग लावून खटला भरावयाचा. त्यांत खोट्या साक्षिदारांच्या साह्यानें इतरांचा समावेश करून त्यांस पळतां भुई थोडी करावयाची व शेवटीं त्यांच्या जमिनी आपल्या घशाखालीं उतरावयाच्या त्यांतल्या त्यांत दुःखित लोकांस मदत करण्यास कोणीहि पुढें सरसावल्यास, त्यासहि खटल्याच्या जा... ओढावयाचें ही आमच्या बडे लो... 'ठिकाणें' मिळविण्याची शक्कल असे. ... शक्कलीचा आतांहि उपयोग कर... त्यांच्याकडून प्रयत्न होत आहे, हें ... बडे लोकांच्या या धोरणाचा किळस ... पण हे जुने डावपेंच सर्वांच्या परि... झाले असल्यानें, त्यांस भीक घाल... लोकांची संख्या दिवसेंदिवस कमी ... चालली आहे, याची पक्की खूणगां... बांधलेली बरी अशी आमच्या वर्ग्यां... चना आहे.

अपूर्व समारंभ.

कुंभारजुवें येथील 'श्री शारदा ...लयाची वार्षिक परीक्षा ता. ११... रोजीं श्री. स्ना. रा. गजानन ल. रेवे... ए. डे. इन्पेक्टर, जिल्हा रत्नागिरी, ...चंद्र शंकर नाईक प्रोफेसर, नोमाल... शांता सुखटणकर एम ए. यांचेकडू... ण्यांत आली. ता. १३।५।२३ ... रोजीं बक्षिस समारंभ साजरा ... झाला. समारंभास परीक्षकांशिवाय ... गखात्याचे मुख्य डायरेक्टर डॉ. ... दे सांतुस आपल्या मंडळीसह हजर ... पणजी मुनिसिपालटीचे अध्यक्ष का... आस्पुल्कुयेत दे मिनेझीस, पोर्तुगीज ... मिक शाळांचे इन्स्पेक्टर आलिस ... लिसेवाचे प्रोफेसर डॉ. बेनेदित गोमि... बेनाद वास्तु मार्किस, प्रो. भवानी... सुखटणकर व आणखी बरीच विद्वा... डळी हजर होती. समारंभास सुरवात... ण्यापूर्वीं मुलांनीं ईशस्तवनपर गाणीं ... णून दाखविलीं. अध्यक्षांच्या जागीं ... लुसीयु दे सांतुस यांस नेमण्यांत आले... तर प्रो. रामचंद्र शं. नाईक यांनीं ... चा रिझल्ट वाचून दाखविला. पास ... लेल्या मुलाना अध्यक्षांकडून बक्षिसें ... ण्यांत आलीं. समारंभाच्या मंडपांत ... जागीं मुलांनीं केलेल्या वस्तूंचें प्रदर्श... घडण्यांत आलें होतें. त्यांत चरक्या... काढलेलें सूत, त्याच तऱ्हेच्या सुताचे ... लेले टुवाले व आणखी पुष्कळ ... पाहण्यासारख्या होत्या. प्रदर्शनाच्या ... जवळ बाजूस १५।१६ चरक्यांची एक ... होती. अध्यक्षांनीं मुद्दाम आपल्या... मुलांकडून त्या चरक्यांवरून सूत ... घेऊन पोर्तुगीज भाषेंत सांगितलें कीं, ... शाळेच्या मुलांकडून होत असलेल्या ... पाहून फार समाधान वाटलें. व त्या... स्तूंचें मोठें कौतुक करून या शाळेचें ... दाहरण सर्व सरकारी शाळांनीं घ्यावें ... कृय आपण शिक्षणखात्याचे मुख्य ... रेक्टर या नात्यानें अमलांत आ... लावीन असें सांगून आपल्या ... संपले. शाळेचा रिपोर्ट वाचून दाखवि... आल्यानंतर कापितांव आस्पुल्कुयेत ... नेझिस, प्रो. बेनेदीत गोमिस, प्रो. भ... ंकर सुखटणकर व गजानन लक्ष्मण ... श. ए. डे. इन्स्पेक्टर जिल्हा रत्न... यांचीं भाषणें झालीं. नंतर शेवटीं ... ईश्वराचे, अध्यक्षांचे व सर्व आलेल्या ... ळीचे आभार मानले. अशाप्रकारें ... ह समारंभ मोठ्या थाटानें पार पडला...

एक प्रेक्ष...

नाहीं. मग त्यांच्या गरजा भागविण्याकडे दुर्लक्ष होणें साहजिक आहे. याचा अनुभव आम्हां गोवेंकराना आहेच. याच्या उलट इंग्लिश वसाहतींत हिंदी लोकांच्या गरजा सरकारकडून भागविल्या जात असत. म्हणूनच हिंदी लोकांची वस्ती कायम होण्यास मदत झाली. आतांशा व र्णमत्सरानें हिंदी लोकांची वाढती प्रगति व संख्या पाहून युरोपियन लोकांच्या पांढऱ्या कपाळास तिडीक उठत आहे हें खरें पण पूर्वी त्यांस सवलतीच मिळत असत. या बाबतींत पोर्तुगीजांना अद्याप वरेंच शिकावयाचें आहे बाकी आम्हीं गोव्यांतील हिंदु येथें आलों व व्यापार उदीम वगैरेच्या निमित्तानें वस्ती करून राहिलों तर आम्हीं पोर्तुगीज रिपब्लिकचे अवयव 'छुले' असल्यामुळें त्यांची आम च्यावर मेहर नजर राहील. येथें हिंदूंची वस्ती नाहींच म्हटलें तरी चालेल एकटे काय ते रायकर दिसतात व त्यांनीं अंतर बाह्य युरोपियन राहणी स्वीकारली आहे. यांच्या मागणीप्रमाणें त्यांस हे भाग असेल. कारण हिंदु म्हणून घेण्यास व त्याप्रमाणें वागण्यास 'पाहिजे जातीचें' तें त्यांच्यांत कमी आहे. पोर्तुगीज लोक आणि आमचे वाटगे ख्रिस्ती लोक हिंदुकडां तिरप्या नजरेनें पाहतात यांत नवल नाहीं. ते गुण त्यांच्या हाडीमांसीं खिळलेले आहेत. त्यांवर उत्तम तोडगा म्हणजे आपले आचार विचार, आहार पोषाख, रीति भाती शक्य त्या मानानें आचरण्यांत आणून दाखविणें हा होय. नाहीं तर 'न हिंदुर्नयवना' असीच गत व्हावयाची. मला इकडे आमच्या ख्रिस्ती बांधवाच्या ओळखी झाल्या. ते लोक कौतुकपूर्ण नजरेनें मला सलामी देऊन सत्कार करितात. कोणत्याही सरकारी कचेरींत गेलों तर माझ्या ओवल्यांपूर्वी माझें काम उरकून मी मोकळा होतों. मजबरोबर फिरावयास येण्यास रा. रायकरांस पुरेसा वेळ मिळत नाहीं. व मलाहि अडचण भासत नाहीं. शहर भव्य असलें तरी रस्त्यांची आंखणी व एकंदर शहररचना चांगल्या धर्तीवर असल्यामुळें एक दोन दिवसांत सर्व माहिती मिळूं शकते. त्यांतल्या त्यांत सर्व व्यवहार पोर्तुगीज भाषेंत चालत असल्यानें विचारपूस करण्याचें साधन जवळ असतें.

येथील गोवेंकर ख्रिस्ती लोक वागतानां सभ्यता दाखवितात हें खरें पण त्यांच्या मनांतून हे हिंदु लोक असेच या देशांत यावयास लागले तर मद्यमांसादि सेवनानें व युरोपियन संस्कृतीच्या राहणीनें भुलून ख्रिस्ती होऊन जातील, निदान आचारानें तरी आपल्या बरोबरीचे होतील, या आशेनें त्यांस गुदगुल्या होत असल्याचें स्पष्ट दिसतें.

इकडे नारिंगें, द्राक्षं, पेरू, केळीं या प्रकारचीं फळें पुष्कळ मिळतात, आंबे, फणस तर नाहींतच. नारळीचें झाडें नाहींत पण नारळ दुसरीकडून आणतात. त्यांस ... जवळ जवळ आठदहा आणे प

इतात सरकारकडून पुष्कळ जमीन या त्यानें मिळण्यासारखी आहे. असी जमिन घेऊन झाडें लावणें, घरें बांधणें, जनावरें पाळणें इत्यादि धंदे येथें महत्वाचे आहेत. मात्र इकडे राहणी फार महाग आहे.

पूर्वी इकडे नाणें पौंडानीं होतें तें ए थील मुख्य कमिशनर सि. ग्रीत कामाश यांच्या सूचना रिपोर्टावरून इस्कुदानीं (रैसानीं) केल्यास सात आठ महिने झाले कामदार लोकांचा पगार पूर्वी पौंडानीं ठरविला होता तो आतां अर्धा पौंडानीं व अर्धा रोजच्या रैसाच्या चढउतारा प्रमाणें इस्कुदानीं देण्यांत येतो.

बाजारांत कोणतीहि वस्तु घ्यावयास गेलों तर पौंड किंवा इस्कुद यांशिवाय बोलतच नाहींत. हिंदु लोकांना उपयोगी अशा वस्तु हा. चिंच, आमसोलें, कोकम हिंग वगैरे जिन्नस इकडे मिळणें कठीण. ब्रिटिश आफ्रिकेंत हिंदूंची वस्ती पुष्कळ

असल्यानें त्यांस लागणाऱ्या सर्व वस्तु मिळूं शकतात व त्यामुळें राहणी स्वस्त असते. येथें शाकभाजी मिळण्यास हरकत नाहीं. मी या दिवसांत रायकर यांच्या संनीध राहून मिर्चीचें लोणचें, गालंब्याची कोशिंबीर, वांग्याचें भरीत वगैरे आमच्या कडील जिन्नस करून खात असून लिंबाच्या रसांत तयार केलेलें मिर्चीचें लोणचें थोडें त्याजसाठीं व थोडें मजसाठीं करणार आहें.

आमचा पुढचा प्रवास आमच्या 'नाव्हेगासांव पोर्तुगेझ' कंपनीच्या लौरेंस मार्क्स बोटीनें होणार असून ती बोट येथून अजमासें २३ तारखेस निघणार आहे. आणि पुढील महिन्याच्या ४।५ तारखेस-इष्ट स्थळीं (आंगोळास) पोंचणार असा अंदाज आहे. कळावें ही विनंति.

लौरेंस मार्क्स ता. १९।३।२३

उपी बाबली कामत.

ANUNCIOS

Liga da Propaganda da Instrução em Goa

Colègio António José de Almeida

Reabrir-se-ha este Colegio em 7 de Junho próximo seguinte leccionamento gratuito de português desde 1.° grau até 3 a classe dos Liceus, de inglés com primeiras 3 classes e de marata com primeiras 4 classes.

As propinas de matricula e encerramento serão as mesmas do ano findo.

Haverá internato para hindús, e tambem para cristãos quando os alunos se inscreverem em numero pelo menos de 10.

Para mais informações dirijam-se ao secretario do Colégio.

Secretaria da Liga em Pondá, 15 de Maio de 1923

O Secretário da Liga, 3

Sitarama Quercár

2a. Epoca

A superior craveira do nosso Parlamento, concedeu aos nossos estudantes do ensino secundario e superior a 2.a Epoca. E' louvavel, esta' na altura do credito das lusitanas leis.

Nao querendo entrar em apreciaçoes de outra ordem deteremos so' na questao de propinas.

Sao 25000 reis que se paga para nossas magras bolsas o chorando da massa faz calor medonho,..E' deshumano o que se faz! ... Rectifiquem aquilo que alia's nao anda para a frente...

Alma Velha

Acto eleitoral

Repetiu-se em Sanguem o acto eleitoral dos seus vereadores municipais, tendo, começado no domingo 3 e terminado na terça, 5 do corrente.

A animaçao que dominou durante o acto, era digna de nota. Agradou-nos imenso o divertido esforço interpretativo de leis eleitorais. Tivemos mesmo o ensejo de conhecer certos homens na sua verdadeira estructura moral.

Notamos ai a existencia de dois partidos politicos. Se um se esforgava por conseguir so' a maioria, o forte doutro cifrava-se em procurar introduzir no acto qualquer nulidade,desejo que nao conseguiu...

Os victoriosos que logo foram proclamados nos termos legais sao:

Para vereadores efectivos

Subraia Vitola Porobo Dessai
Visvambora Sinai Sanvordencar
Sripada Rau Valaulicar

Para vereadores suplentes

Srinivassa Sinai Cossombo'
Sadassiva Sanvlo' Baticar
Caxinata Xamba' Salelicar

O partido de *nulidade* ficou derrotado; mas disseram-nos que nao esta' *desanimado*, porque o Dessai, antigo secretario municipal dali tem-lhe prometido anular a eleiçao efectuada,pela sua influencia nos tribunais competentes.

Nao acreditamos o boato que reputamos ser alguma *trica* porque conhecemos a seriedade dos noscos tribunais onde so'se faz a justiça.

Influenciar tribunais. Isto nem lembraria ao diabo!!!

Durante todo o acto eleitoral, o sr. administrador do concelho procedeu com uma honradez tal que muito o dignifica.

Matas, matas....

Temos a' mao informaçoes completas sobre os predios *Tolem e Chudiem* que se relacionam muito com o assunto de matas que provocou a irritaçao do sr. Silvicultor Miranda.

Iremos, agora, conversando, aos poucos.

De vagar se vai ao longe.

DECLARAÇAO

Eu abaixo assinado, Atmarama Govinda Borcar, residente em Pangim, declaro, para os fins convenientes e na qualidade de vice-presidente em exercicio da associação *Pragatic Sanga*, que esta associação não tem ligação com o jornal *Bharat* que se publica em Quepem, sob a direcção do sr. Govinda Pundlica Hegdó Dessai, nem o mesmo jornal representa orgão dessa associação.

Nova Goa, 2 de Junho de 1923.

Atmarama Govinda Borcar

Publicando esta declaração, cumpre-nos agradecer ao seu simpatico autor o expontaneo favor de ter livrado muita gente do equivoco de estar pensando que o *Bharat* fôsse orgão do *Sanga* ou que este tivesse quaisquer relações com aquele.

O Bharat não é orgão de ninguem: é apenas representante dos oprimidos de todas as classes sociais de que se compõe a India Portuguesa.

O sr. dr. Borcar, ornamento da nossa classe preston-nos pois, com a sua declaração, um serviço que tornamos, ainda a agradecer-lhe.

इकडे लक्ष द्या

जळो हा शिष्टाचार आणि अतिथी सत्कार [ले॰विरोधी]. विद्यावर्धक मंडळी' डिचोली (ले॰ वामन नारायण पालेकर),श्री॰ सावंत मास्तर याचें व्याख्यान, सांगें. गुरगांव–शिक्षण संघ,इ. लेख व पत्रें क्रमशः प्रसिद्ध होतील. रात्र थोडी व सोंगें फारअशी आमची अवस्था झाली आहे. निदान आहे त्याच आश्रयदात्यांची सगळी वर्गणी आली असती तर भारत दुप्पट करतां आला असता. पण .. म भारत

—सांगें येथें गेल्या रविवारीं मुनिसिपाल निवडणुका निर्विघ्नपणें पार पडून, सुब्राय वि देसाई, विश्वांभर शे. सांवर्डेकर व श्रीपादराव वाळवलीकर हे नागरिक निवडून आले व नेहमीप्रमाणें बहुमताचा विजय झाला.

—आमच्या गाफरच्या टिकिटांना दर दीडपटीनें वाढविल्यामुळें लोकांत असंतोष माजला आहे.

—मुलुकी कर चुकते करण्यासाठीं लोकांकडून नवीन मुदत मागण्यांत आली आहे. मागणी न्याय्य आहे.

—जंगल प्रकरणाविषयीं नवीन माहिती मिळाली आहे.

—मडगांव येथें एक हिंदु शिक्षकाचें कॉलेज चालू महिन्या १५ तारखेपासून उघडण्यांत येणार आहे.

भारत

गुरुवार जेष्ठ ९ कृ. सं. १८४४

पतितोद्धार व लोकमत.

या अत्यंत महत्वाच्या विषयाकडे दिवसेंदिवस जनतेचें जास्त लक्ष वेधावयास लागलेलें पाहून भारतास फार समाधान होत आहे. आमच्या इच्छेप्रमाणें पतितोद्धाराच्या चळवळीचें पाऊल पुढें पडल्यास धार्मिक व राजकीय दृष्टया अखिल हिंदु समाजाचें वजन बरेंच वाढणार असून 'जेंतीयु' हें कर्णकटोर व अपमानास्पद विशेषण कायमचें लुप्त होण्यास कालावधी लागणार नाहीं.

स्वामी पूर्णाश्रम महाराजांनीं या संबंधीं काळजीपूर्वक विचार केलेला दिसतो. त्यांचें काय मत आहे हें समजण्यासाठीं त्यांचे विचार त्यांच्याच शब्दांनीं वाचकांसमोर ठेविले आहेत. दुसरेहि तज्ज्ञ गृहस्थ परावर्तनाबद्दल आपापलें मत प्रगट करतील अशी आशा आहे. स्वामी महाराज लिहितात:—

भारतांममध्यें संपादकांनीं गावडे ख्रिश्चन यानां पतित परावर्तनाचे आधारान्वयें पुनित करून पुनश्च हिंदुधर्मांत घेण्यांसंबंधीं आपले विचार थोड्या बहू अंशानें प्रगट केले आहेत. या शरीरानें या विषयावर सांगोपांग विचार केला नसला तरी गोमांतकांत पाऊल टाकल्यापासून हे विचार मनांत एक सारखे घोळत आहेत यांत शंका नाहीं. परंतु त्या विचारांना मूर्त स्वरूप येण्यास सर्वानुमतें याचा बराच खल होणें अवश्य आहे असें आम्हांस वाटतें. कारण हा प्रश्न बराच नाजूक असून गंभीर, उदात्त स्वरूपाचा व बराच भानगडीचा असला तरी अत्यंतावश्यक तेचा व झालेल्या नुकसान भरपाइचा आहे इकडे दुर्लक्ष करून चालावयाचे नाहीं. तसेंच सांगोपांग पूर्ण विचार केल्याशिवाय एकदम चाल करणेंही कांहीं विशेष फायद्याचें होणार नाहीं. ज्या हिंदूंच्या पवित्र देवालयांत हिंदु जातींतील कोणत्याही अस्पृश्य व्यक्तीस मनांत प्रेमा-भक्ती ओथंबत असतांही नुसतें डुंकून सुद्धां पहाणें शक्य नाहीं त्याच ठिकाणीं आमच्या गावडे ख्रिस्तांव बंधूना प्रसाद घेण्यास कांहीं अंशीं तरी रस्ता खुला आहेसें दिसतें. यावरून ही जाती हिंदूंच्या तिरस्काराला पात्र झालेली नाहीं असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. तथापि हे लोक विशेषेंकरून अशिक्षित असल्यामुळें परंपरागत चालत आलेला धर्म सुरक्षितरीत्या सोडून देण्यास तयार होतील असें आम्हांस वाटत नाहीं. त्यांच्या जनन मरण समयीं पाद्रिबुवांचे कडून होणारा विधि व बापतिस्मा वगैरे अजिबात झुगारण्या इतकी त्यांच्या मनाची तयारी असेल किंवा ती एका क्षणांत करितां येईल इतकें हें कार्य सोपें आहेसें दिसत नाहीं. खाद्यपेय पदार्थांच्या दृष्टीनें त्यांचे खाणें व राहणें अस्सल स्वाभिमानीं हिंदूंचे वरताण करणारे आहे यांत संशय नाहीं हिंदूंच्या देवस्थानाचे ठायीं यांची निःसीम भक्ती अथवा भाव व त्यांना सर्वांचे आधीं प्रसाद रूपें पावणारा देव यांतील रहस्य काय असावें? याचा विचार करितां त्यांची परंपरागत श्रद्धा हेंच एक ठराविक कारण आहे. यापेक्षां दुसरें कोणतें असूं शकेल? ख्रिश्चन धर्म व त्याचीं तत्वें त्याचप्रमाणें हिंदुधर्म तत्वें आणि आचार या दोन धर्मांची तुलना करून ते आमच्या देवस्थानांचे कडे वळलेले नसून पूर्व परंपरायुक्त मनानेंच ते ओढले गेले आहेत यावरून त्यांचे धर्मगुरु पाद्री जे त्यांना धर्मोपदेश करीत आहेत त्यांचा ठसा त्यांचे मनावर कायमचा उमटलेला नसेल असें आमच्यानें एकदम म्हणवत नाहीं. ज्यावेळीं हे लोक आमच्या देवस्थानांत प्रसाद घेण्यास येतात त्यावेळीं तांदूळ, नारळ, सुपारी, इत्यादि फलपुष्पें व दक्षणा देऊन पुजाऱ्यांना संतुष्ट करून सोडतातच व पुजारी ही ते ग्रहण करण्यास मागेंपुढें ज्या अर्थी पाहात नाहींत त्या अर्थी त्याना पुनित करून हिंदुधर्मांत घेतल्यावर त्यांचे सर्व संस्कार विधी इतर कुणबी वगैरेप्रमाणें झाल्यास त्याबद्दलचा मोबदला भटांस घेण्यास मुळींच हरकत नाहीं. व या शरीरास ते ही गोष्ट नाकारतील असें वाटतही नाहीं. त्याचप्रमाणें चौकावर त्यांना येऊं देण्यास देवस्थानांतील महाजन मंडळीही कांहीं आक्षेप घेणार नाहीं असें आम्हांस वाटतें. हल्लीं जसा त्यांचा रोटीबेटी व्यवहार चाललेला आहे तसा पुढेंही चालेलच. विचाराचा प्रश्न आहे तो त्यांनीं हिंदुधर्मांत येणें हें अंतःकरणपूर्वक मान्य करण्याचा व त्यांनां तें युक्तीनें मान्य करण्यास लावण्याचा आहे. गोमांतकांतील आचार्य धर्मगुरु हा प्रश्न जर मनावर घेतील तर त्यास महत्वाचा रंग येऊन ते आपला आगंतुक धर्म सोडून मूळच्या पवित्र हिंदुधर्मांत येऊन आनंदानें गुंग होतील. पण आणि परंतु हें सर्वत्र ठिकाणीं नडतें व तीं नड आमच्या या प्रकरणांतही उभी रहावयाचीच. अशा नडी व अडथळे पहात बसलों तर आपले हातून कोणतेंच एक महत्वाचें कार्य घडून येणें शक्य नाहीं. करितां आमच्यामतें वरील अडचणीच्या प्रश्नाकरितां गोमांतकांतील तज्ञ मंडळींची एक जाहीर सभा भरवून या विषयावर सणसणीत चर्चा व्हावी व योग्य तो ठराव पास करावा व त्याप्रमाणें लगेच कार्यास लागावें.

इतका कांहीं बिचाऱ्या पुरुषानां बोंचत आहे कीं, स्त्रियानां शिक्षण देणं ह्मणजे स्वतःचं स्वातंत्र्यच गमावणं असं त्यानां वाटतं. स्त्रियांनां स्वातंत्र्य! छट! बुडेल! अधर्म होईल! बेताळ पुरुषांनो! आपल्या धर्माला, नीतीला स्मरून सांगा. आपण आपल्या स्वातंत्र्याचा उपयोग किती दुष्टपणानें करीत आलों आहोंत! मौज मारावी पुरुषानें चैन भोगावी पुरुषानें, आणि स्त्रिनें मात्र पतीला देव समजून सगळे अपराध निमुटपणें सोसून पदरांत घालील तें मान्य करावं. अनृतं साहसं माया वगैरे गुण ह्मणजे त्यांचे जातीचेच ह्या निर्दय पुरुषांनीं कधीं काळीं त्यानां मेंदु असल्याचं पाहिलं असेल काय? नाहीं. चांगल्या योग्य शिक्षणाच्या द्वारें बुद्धीचा विकास झाल्यानंतर मन सुसंस्कृत बनतं व तें तसें बनल्यावर सात्विक गुण त्याच्या ठिकाणीं वास करतात. तदनंतर अनृतं साहसं वगैरे गुणहि टिकणेंच शक्य नाहीं. बायकांच्या संबंधीं आह्मीं पुरुषांनीं जे काहीं सिद्धांत करून ठेविले आहेत, ते इतके कांहीं प्रखर आहेत कीं, त्या सिद्धांताच्या भणभणीत उजेडांत बिचाऱ्या स्त्रियांचे डोळे दिपून जावून झांकले गेल्यामुळें हे लबाड पुरुष त्यांच्या स्वातंत्र्याची मनमुराद लूट करीत आहेत. मुलगी झाली कीं, तोंड वांकडं. कां, तर कन्यादान देताना मुलाच्या इस्टेटीला धक्का पोंचणार! अमुक एक वय झालं कीं, घातली वेड्या वांकड्यांच्या पदरांत. तिच्या प्रकृतीकडे वगैरे साफ पहावयाचें नाहीं. आज परिस्थिति आह्मांला स्वच्छ कळवीत आहे कीं ज्या ज्या मुलीं अशक्त आणि रोगग्रस्त आहेत त्याना लग्न केल्याशिवायच ठेवाव्या. कारण कीं, त्यांच्यापासून होणारी संतति अगदींच लुली पांगळी व अल्पायुषी निपजते.

केशवराव:—आपण अगदींच बहकत चाललां. मुलीला लग्न केल्याशिवाय ठेवलं तर घडगत आहे का? कदाचित् पाऊल वांकडं पडलं तर मग आईबापानीं काय विष खावं?

मी:—केशवराव, स्त्रियांचं वांकडं पाऊल आपणाला एवढें जाचक कां बरं वाटतं? स्त्रियांच्या अब्रूची चाड आह्मां पुरुषानां एवढीं कां बरं? मला तर आपणास निश्चयपूर्वक एवढं सांगतां येईल कीं, पुरुषांच्या वांकड्या नजरेमुळंच बिचाऱ्या स्त्रियांचं पाऊल वांकडं पडत असतं. नादान पुरुषांच्या लबाड मोहाला बळी पडून आजपर्यंत किती तरी स्त्रियांनां आत्महत्या कराव्या लागल्या आहेत! पुरुषांच्या आजपर्यंतच्या बेजबाबदार वर्तणुकीकडे भरपूर लक्ष द्याल तर त्यांच्या ह्या अन्यायांच्या कोटींचा अंत्यकाळचं भरला आहे, असं वाटेल. ज्या पुरुषानें लग्न करून घेतलं नाहीं, त्यानें केवढाही धांगडधिंगा घातला तर त्याला क्षम्य. बायको मेल्यानंतर पुरुष एकपत्नीवृत राखण्याकरतां दुसरं लग्न करीत नसतो. पण ह्याला एकपत्नि वृताच्या दहद्यामागें किती तरी परस्त्रियांचें गळे कापलेले पहाण्यांत येतें! इतकंही असून मान्य. कां तर पुरुषांची जात सदांच सोंवळी!! अहो, हा अन्याय चालला आहे! आह्मीं पुरुषांनीं स्वातंत्र्याचा दुरुपयोग करावा आणि स्त्रियानां पारतंत्र्यांत खिचपत पाडावं हा कुठला न्याय? ज्याना स्वातंत्र्याचा उत्तम उपयोग करतां आला नाहीं, त्यानीं स्त्रियांनीं अमुकच करावें आणि अमुकच करूं नये वगैरे गोष्टी सांगणं अन्यायाचं—नव्हे अधिकारापलीकडचं होईल. ह्मणून ह्मणतों कीं, त्याना योग्य शिक्षण द्या ह्मणजे त्या आपलं सर्व कांहीं आपणच करतील.

केशवराव:—आतां आपलं म्हणणं मला चांगलं पटलं. पण स्त्रिशिक्षणाच्या वगैरे गोष्टी पुष्कळशा सुशिक्षितांवर अवलंबून आहेत. आजचे सुशिक्षित म्हणविणारे सरकारी बड्या नोकराचे मागं लागलेले त्यानां सुद्धां सरकारची मर्जी संभाळून सामाजिक कर्तव्यें पार पाडतां येतात. राजकीय बाबतींत त्यानां मन घालतां येत नाहीं याचें कारण स्वार्थाला मुकूनही गोव्या समाजांतील वडेपणाला फांटा द्यावा लागतो. कांहीं कांहीं सामाजिक गोष्टी सुधारणें समाजांतील पुष्कळशा व्यक्तींवर अवलंबून असतं. एकाच व्यक्तीला तें साधणं अशक्य असतं. पण पुष्कळ अशा गोष्टी आहेत कीं त्या एकट्यालाच दुसऱ्यावर अवलंबून न राहतां करतां येतात. प्रत्येक व्यक्ति स्वतःवरची जबाबदारी उत्तम प्रकारें संभाळील तर समष्टिचं केवढं तरी कार्य होईल. खरं ना?

मी:—अहो जिथं साध्या साध्या गोष्टी घडून येणं शक्य नाहीं, तिथं राजकीय काय आणि सामाजिक काय? आपण आतां अगदीं एक साधा प्रश्न घेऊं. आमचीं लग्नकार्यें. लग्न कार्याच्या वेळीं व्यर्थ अतोनात पैसा खर्च करतों नवीन नवीन चालीरीति अमलांत आणतों. सगळं सगळं करतों पण ऐन गोष्टीकडे मात्र एकाचेंही लक्ष नव्हे. नवरा आणि बायको. नवऱ्याला बायको मिळते आणि बायकोला नवरा मिळतो. पण ह्या नवऱ्या बायकोचा संबंध किती महत्वाचा आहे ह्याचें महत्व कुणालाच कळूं नये ही लाजिरवाणी गोष्ट नव्हे काय? आतां इतकं खरं कीं बायकोला सौभाग्याचं सुख लाभलं कीं तिनें सुखाचेंच सौभाग्य मानून राहिलें पाहिजे. नवऱ्याची गोष्ट तशी नव्हे. आवडली तर विचारीला सुखाचे दिवस. नाहीं तर तिनें सारा जन्म दुःखांतच काढला पाहिजे. एखाद्या बड्या श्रीमंताच्या घरीं बिचाऱ्या मुलीचा सुखाचा जन्म का असेना, तिला नवऱ्यापासून जन्माचें सुख मिळेल ह्मणूनही सांगतां येत नाहीं. कारण श्रीमंत नवऱ्याचे चाळे भारी विलक्षण असतात. तेव्हां नवऱ्या बायकोचा संबंध जुळवितानां फार फार काळजी घेतली पाहिजे. इतकेंच नव्हे तर लग्नाच्या वेळीं सुद्धां त्यांच्या मनावर अशा प्रकारचा परिणाम झाला पाहिजे कीं, त्यानीं एकमेकांला कधींच विसरूं नये.

केशवराव:—मिस्टर, मी तुह्मांला आणखी एका गोष्टीबद्दल आपलं मत विचारणार आहें. आमच्या गोव्यांत मराठी शिक्षणाविषयीं एवढं औदासिन्य कां पसरलं आहे?

मी:—मला वाटतं आपलं बोलणं आतां बंद केलेलं बरं. पणजीचं बंदर अगदीं जवळ येत चाललं आहे. आणखी अशा बोलण्यानीं तरी काय निष्पन्न होण्या सारखं आहे? मी तुह्मांला सांगूं, आह्मांला इथं एका संस्थेची गरज आहे. ती संस्था फार प्रामाणिक माणसांची असली पाहिजे. त्या संस्थेचं कार्यकारी मंडळ स्वार्थत्यागी सुशिक्षितानं असलं पाहिजे. या संस्थेचं ध्येय राजकीय बाबतींला न शिवतां फक्त सामाजिक गोष्टींचाच ऊहापोह करणें हें असलं पाहिजे. संस्थेनें वार्षिक सभा बोलवावी. व सभेंत ज्या प्रकारचे ठराव पास होतील त्यांस अनुसरून समाजाचें वर्तन असलं पाहिजे. तूर्त गोव्यांतील हिंदु लोकांपुढें भारतकारांनीं आणलेला पतितोद्धाराचा प्रश्न फार फार महत्वाचा आहे. एखादें मिशन येथें स्थापून हिंदु होऊं इच्छित असलेल्या ख्रिश्चनांनां हिंदु करून सोडावें. जर ते आज मिशनची स्थापन करण्यास तयार असतील तर माझें नांव मी पहिल्या झपाट्या मरशीं मेंबरच्या यादींत प्रसिद्ध करीन. भारतकार आजवर्यंत शक्तिनुसार प्रयत्न करीत आले आहेत. माझें तर असं मन आहे कीं, त्यानीं पुढें सरून एखादं मिशन स्थापन करण्याची तजवीज करावी. आमच्या ख्रिश्चन बांधवांचा आमच्यावर रोष होईल, पण त्याची बिलकूल पर्वा न करतां आपणांस योग्य वाटत असलेलं कार्य बेलाशक हातीं घ्यावें. एका न्यायाधिशानें वाटवणीच्या वेळीं केलेल्या हालांची कथा प्रसिद्ध केली आहे. हें पुस्तक हातीं न देण्याचा ख्रिश्चन लोकांनीं सडकून प्रयत्न चालविला आहे. हें कशाचें द्योतक?

श्रीपाद दत्ताराम केंकरे.

—आमचे सन्माननीय मित्र डॉ॰ आत्माराम गो. बोरकर यानीं प्रागतिक संघाचा भारताशीं कसलाच संबंध नसल्याचें जाहीर केलें आहे.

dade tivesse todos os elementos a fim de formar sobre o tal pleito o seu juizo possivelmente exacto. A exposição que como se vê, não é nenhum memorial nem nenhum requerimento, foi naturalmenre em forma da carta, que outra coisa não podia ser.

Pergunta-se; o jornalista que na qualidade de milhor informador e na melhor de suas intenções de bem servir á justiça dos oprimidos fez a referida carta expositoria, transgrediu a lei de sêlos?

Há quem entenda que sim. Terá êle razão?

Respondam-nos que tambem diremos, mas no fim, sobre o engraçado assunto, o que se nos oferecer.

Heraldo

Este importante diario de Pangim fez 14 anos de sua publicação em 21 do mez p. f., o que representa um facto, digno de especial registo nesta terra em que o jornalismo não é, condignamente, favorecido pelo apoio publico.

Ao seu inteligente e activo director sr. dr. Antonio Maria da Cunha que ao *Heraldo* tem dado a sua melhor seiva, enviamos as nossas calorosas felicitações pelo progresso do seu diario.

Agradecendo

Ao sr. Presidente da Camara Municipal das Ilhas agradecemos o convite para assistir aos festejos da inauguração dos retratos dos aviadores srs. Sacadura Cabral e Gago Coutinho, festejos que terão lugar no dia 17 do corrente com uma longa serie de conferencias por alguns filhos distintos desta terra.

Matas, matas...

O sr Administrador do Concelho de Quepem saberá informar-nos o destino que se deu a 80 aguieiros e 6 traves, apreendidos no oiteiro Palitico de Molcornem?

Dizem-nos que o referido producto apreendido foi servido para *esqueletar* uma casinha que o sr. Mariano Rebelo possue em Benaulim.

A ser verdade o que por ai se diz com insistencia, lamentamos a degradação a que *isso* chegou, arrependidos de que a nossa precipitação nos levou, há dias, a dizermos aqui, na persuasão de que o *zelo* administrativo redundava em proveito do Estado...

¡E que destino quererão dar agora aos troncos apreendidos há pouco em Bali e transportados para esta séde!

भारत

गुरुवार जेष्ठ कृ. १ दा.. १८४५

तरुणांनो उठा !

लहानानीं मोठ्यांचे जुलूम निमूटपणें सहन करावे हा त्यांचा निसर्गसिद्ध धर्मच आहे असें समजलें जातें. या नियमाचा अनितिपणा लुप्त करणें खुद्द रिपब्लिकसारख्या उदार धोरणी ह्मणून डंका वाजवून घेणाऱ्या राज्यपद्धतीला सुद्धां शक्य नाहीं. असें अनेक कारणांवरून वाटावयास लागत आहे.

अनाथ लोकांचा पक्ष स्विकारून, बड्या लोकांचीं कृष्ण कारस्थानें उघडकीस आणणारानें आपलें मनःस्वास्थ्य धोक्यांत घातलें पाहिजे. जणूं काय अनाथ ह्मणजे नागरिकच नव्हत. त्याना मतःस्वातंत्र्य नाहीं. त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायांचा प्रतिकार करण्यांचा त्यांना हक्क नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यांना सुख पाहिजे असल्यास त्यानीं बडे लोक किंवा त्यांच्या हाताखालचे 'मुकदम' जें जें मागतील तें तें त्यानां नम्रतापूर्वक नजर केलें पाहिजे.

'बळी तो कान पिळीं' या लेखांत आम्हीं नवीन कात्रिजादींत बड्यांकडून आचरल्या जाणाऱ्या अत्याचाराचे यथासांग वर्णन केलेंच आहे. आतां इतकेंच सांगावयाचें कीं, बड्या विरुद्ध चळवळ करणाऱ्या सात्विक वृत्तीच्या लोकांस यश येणें आमच्या पोर्तुगीज कायद्याच्या दृष्टीनें जवळ जवळ अशक्यच आहे, निदान अशक्यच कर ण्य'चा बड्यांकडून प्रयत्न होत असतो, हें निर्विवाद आहे.

अशी जरी सांप्रतची परिस्थिति आहे तरी सत्याचा विजय होण्यासाठीं सत्यप्रीय व अनाथ प्रेमी तरुणानीं आटोकाट प्रयत्न वेंचणें जरूर आहे. बड्यांच्या डुरकारणीनें धैर्यविहीत न होतां अनाथांचें म्हणणें मुद्देसुद सरकार दरबारांत मांडण्याचे कामीं हयगय करतां कामा नये. तात्पर्य, बड्यांनीं लहानानां गिळंकृत करणें हा बड्यांचा धर्मच उर्फ हक्क मानण्याचा जो परिपाठ पडून गेला आहे, तो बदलण्याप्रीत्यर्थ आमच्या धैर्यवान तरुणानीं आपल्या कंबरा बांधिल्या पाहिजेत.

आज पर्यंत निःस्वार्थ सहाय्य नसल्यानें निरपेक्ष पाठिंब्याच्या अभावानें अनेक अनाथ कुटुंबें बड्यांच्या पोटांत जिरून गेलीं आहेत. अनेक लोक आपल्या पिढीजाद जमिनजुमल्यास कायमचे मुकले आहेत. व अनेक गांव ओस पडले आहेत. हें दृश्य अत्यंत भेसूर असून, ज्यांच्यांत माणूसपणाचा थोडा तरी गंध आहे; त्याना फार लाजिरवाणें आहे.

म्हणून तरुणांनो, पुढें या व अनाथ लोकांच्या अंतःकरणांत बड्यांच्या त्रास मुळें बड्यांच्या अवन्वित छलांमुळें होत असलेली कालवाकालव शमवण्याचा प्रयत्न करा. यानेंच तुम्हांला मनःशांति लाभेल, याच कृत्यानें तुमचें जिवित पुण्यप्रद होऊन तुम्हांला अक्षय सुखाची प्राप्ति होईल. वेळ फार आणीबाणीचा आहे. या समयीं जर तुह्मांकडून तुमच्या कर्तव्याची हेळसांड होईल तर तुमचें अंतःकरण तुम्हांला दोष दिल्याखेरीज स्वास्थ रहाणार नाहीं. तेव्हां तरुणांनो, उठा ! आणि केवळ आत्मिक बळाच्या तरवारीनें अनाथांचें संरक्षण करण्यास पुढें सरसा !

—मळकर्णें येथील प्रसिद्ध जमिनदार व देशहितचिंतक रा. घनःश्याम सांव मळकर्णेकर यांस देवाज्ञा झाल्याचे कळविण्यास फार वाईट वाटतें. ईश्वर मृताच्या आत्म्यास शांति देवो.

—सांखळी येथील वामनराव शंभू व्रोरकर हे यंदा मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजची शेवटची M. B. B. S. ची परिक्षा पास झाले. परमेश्वर डॉक्टर व्रोरकर ह्यांनां रुग्णजन सेवा करण्यांस दीर्घायुष्य देवो.

Ao sr. Governador Geral

Chamamos a atenção de Sua Excia. para o caso de Canvorem que não é para dispresar, ainda que se refira aos pequenos.

Duma simples questão de propriedade pretende-se fazer uma questão não se sabe de que natureza.

Mas os oprimidos tem fé nas leis da República e no seu digno representante nesta Provincia.

Do caso trataremos, mais de espaço, para que o publico imparcial faça tambem dele um

Uma bufala

Dez cavalheiros ilustres foram a uma terra onde reinava uma carestia medonha. 9 dos referidos, apesar de veementos protestos do decimo, comeram as suas *alparcas*, tendo, com o lapso do tempo, voltado todos para a sua terra natal.

O *protestante*, então, solicitou do *Suami* a excomunhão dos 9 pelo seu acto irreligioso. Mas os 9 acusados tais reviravoltas puzeram em acção que o julgamento deu em resultado a excomunhão do proprio *protestante*, único que tinha razão.

Há muita moralidade de se

जळो हे शिष्टाचार.

आणि

अतिथी सत्कार.

[ले. विरोधी.]

भारतकर्ते महाराज, प्राचीप्रभेच्या २ मेच्या अंकांत, कृ. ल. श या सहीनें, प्रसिद्ध झालेलें पत्र आपल्या वाचनांत आलें असलेंच पाहिजे. नाहीं ? तें वाचून तुम्हीं काय ताडलें ? त्यांत श्री. धेंपे यानीं आपल्या येथील लग्नमुंजी समारंभांत केलेल्या अवाढव्य व अनावश्यक खर्चांचा आणि मद्यदानाचा पुरस्कार भरपूर भरला आहे. हेंच कीं नाहीं ? तसें नसतें तर मात्र नवलाची गोष्ट झाली असती ! कारण आमचीं लग्नमुंजीचीं कार्यें आणि दारूसंबंधीचे सर्व व्यवहार ह्मणजे उपज, विक्री, दान व पान कलशामार्फतच व्हावयाचे. तेव्हां कलशाना या विषयावर लिहिण्यास बराच अधिकार आहे.

सदरील पत्रांत लेखकानें माझ्या १५ मार्चच्या भारतांत प्रसिद्ध झालेल्या 'मद्यपान आणि मद्यदान' या लेखांतील विधानें खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे. पत्राच्या आरंभींच ते ह्मणतात कीं, 'विरोधीच्या लेखांतील सान्या मजकुरांत, श्री. धेंपे यांच्याशीं असलेला विरोध तट्ट फुगून वर आला आहे.' हें त्याचें ह्मणणें माझ्या शुद्ध हेतूंचा विपर्यास करणारें अतएव खोडसाळ आहे. विरोधींचा जन्म श्री. धेंप्यासारख्या सात्विक व कुलीन व्यक्तींवर तोंडसुख घेण्यासाठीं किंवा त्यांच्या तोंडपुंजेपणा करण्यासाठीं झाला नाहीं. आज जवळ जवळ दोन वर्षेंपर्यंत तो भारताच्या वाचकांना पूर्ण परिचयाचा झाला आहे. परकी संस्कृतीच्या दडपणांत सांपडून नाना तऱ्हेच्या व्यसनानीं गुरफटून जाऊन, हीन दीन झालेला हिंदुसमाज कोणत्या उपायांनीं पुनः जाग्यावर येईल आणि कार्टक, मितव्ययी व सुसंघटीत होईल याबद्दल वरचेवर विचारविनिमय व्हावा ह्मणूनच तो भारतांत चार शब्द लिहीत आहे. तो करीत असलेलीं विधानें दुसऱ्यानें खोडून काढल्यास त्याला विषाद वाटणार नाहीं व वाटतही नाहीं. असें असतां क. ल. शां सारख्यांनीं व्यक्तिद्वेषाचें बीज पेरून त्याच्या लेखाची चकाकी पुसून काढण्याचा प्रयत्न केला तर त्याला वाईट वाटणार नाहीं. तो त्याची सदैव कीवच करीत राहील. त्यानें स्वाच्या ध्येयाच्या आड येणारीं कृत्यें, मग तीं श्रीमंतांकडून घडोत अथवा गरिबांकडून घडोत, चव्हाट्यावर आणून त्यांचा तीव्र निषेध केला पाहिजे त्यांत खासगी मत्सराचें नांव सुद्धां नाहीं व नसेल हें क.ल. शानीं समजून असावें. आतां प्राचीप्रभेच्या शुद्ध व निर्मल प्रकाशांत क.ल.शांचा उदय झाला आहे तो केवळ श्री. धेंप्यांच्या

वर क. ल. श, श्रीमंतांच्या मद्यदानाचा पुरस्कार करूं पाहतील तर त्यांचीच फस- गत झाल्याशिवाय राहणार नाहीं. असलीं उच्च दातृत्वाचीं तत्वें प्रतिपादन करून क.ल.शांना काय साधावयाचें आहे समजत नाहीं. त्यानां स्वतःला दाते व्हाव- याचें आहे कीं, अतिथी व्हावयाचें आहे हें त्यानीं उघडरित्या सांगावें ह्मणजे त्यांचें बींग बाहेर पडेल.

कसेंही असो. दारू हें एक जलाल विष आहे याबद्दल दुमत असणें शक्य नाही. असलें विष श्रीमंत धेंड्यासारखे धर्मनिष्ट लोक घेणार नाहींतच. त्याचप्र- माणें अतिथीसत्काराचें पुण्य पदरांत पडावें ह्मणून पाहुण्यानां दारू पाजतील हेंहि संभवत नाहीं. केवळ शिष्टाचाराचें जुनें वळण त्याणीं गिरविलें, हें मात्र खरें आहे.तरीपण मद्यदांन करणें हें मद्यपानाइतकेंच पापप्रद आहे याची जाणीव त्यांस झाली तर ते लटक्या इभ्रतीच्या नादीं न लागतां श्रीस्वामी कमलानाथतीर्थ यांकडून योग्य प्रायश्चित घेतील यांत संशय नाहीं.ते आह्मांला पूज्य आहे. त्यांच्याविषयीं आमच्या मनांत पूर्ण आदर आहे हें क.ल. शांनीं समजून असावें.त्याना पाहिजेतर श्रीमंतांबरोबर त्यानीं श्रीस्वामीमहाराजांपर्यंत जाण्याची तकलीफ घ्यावी ह्मणजे. त्यांच्या व आमच्या ह्मणण्याचा खराखुर उलगडा स्वतः त्यानां पाहावयास मिळेल

असल्या विषयांची चर्चा जितकी अधिक होईल तितकी हवीच आहे. क.ल.शानीं आपलें पत्र लिहून अणि आपल्या नेहमींच्या मद्यपाननिषेधक धोरणास विरुद्ध असा मजकूर असतांहि प्राचीप्रभेच्या संपादकानीं तें प्रसिद्ध करून त्या कार्यास बरीच मदत केली याबद्दल त्या उभयतांचे आभार मांनून तसेंच मद्यपान आणि मद्यदान हा माझा लेख प्रसिद्ध केल्यामुळें भारतास श्रीमंताच्या आश्रयास मुकावें लागलें याबद्दल दिलगिरी प्रदर्शीत करून सर्वांची रजा घेतों

महत्वाची सूचना.

भारताच्या ता. ३१ मे च्यां अंकात 'बळी तो कान पिळी' या सदराखालीं जो मजकूर आला आहे, तो वाचुन व या अत्यंत महत्वाच्या विषयाकडे आपलें लक्ष गेलेलें पाहून फारं आनंद झाला. खरोखर आपण वर्णन केल्याप्रमाणें प्रकार नवीन काविजादीमध्यें तूर्त पुष्कळशा ठिकाणीं आढळून येत असतात. मात्र अशा प्रकारें एखाद्या बड्या जमिनदाराच्या (भाटकाराच्या] तावडींत सांपडलेल्या दुर्दैवी इसमाची सुटका होण्यासारखे प्रयत्न कोठेंही व कधींही झालेले निदान आमच्या तरी ऐकिवांत नाहींत. बड्या लोकाच्या कैचींत सांपडलेल्या इसमाला द्रव्यसहाय्य वगैरे मिळत जावून त्याची सुटका होण्यासारखी व्यवस्था लागण्यास– अर्थात् न्यायाची बाजू सांभाळून- इकडे एखादी संस्था स्थापन होणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें अडचणीमध्यें सांपडलेल्या अशा हतभाग्य व्यक्तीला सुदैवानें सरकारी काम मोफत होण्याचा हक्क प्राप्त होत असल्यास (Assistercia judiciaria ॰ च्या २१–७–१८९९ च्या कायद्याप्रमाणें)त्यांचीही माहिती त्याला अवश्य मिळत जाऊन पुढील व्यवस्था विनचूक लागली पाहिजे. हें काम तर केवळ निरपेक्ष सहानुभूतीवर अवलंबून आहे. कुमारिकांचे शाप या पुस्तकाचे कर्ते रा. टाकरे यांचे प्रस्तुत महाराष्ट्रामध्यें हुड्यांच्या- अमानुष चाली विरुद्ध जारीचे प्रयत्न सुरू आहेत असें समजतें. इतकेंच नव्हे. तर त्यांच्या विशिष्ट प्रयत्नामुळें तिकडे बराच कार्यभाग झाला आहे असें ऐकिवांत आहे. तशाच प्रकारचे प्रयत्न या बाबतींत होणें अत्यंत जरूरीचें होतें. परंतु जोपर्यंत तशी परिस्थिति इकडे अजून प्राप्त झाली नाहीं तों पर्यंत एकादी संस्था काढूनच अशीं लोकहिताचीं कामें उरकून घेणें क्रमप्राप्त आहे असें आम्हांस वाटतें. अशा प्रकारची संस्था स्थापन होऊन जर तिजकडून गरीब रयतेला न्याय मिळण्यासाठीं मदत होण्याजोगी साधनें उपलब्ध झालीं तर पुष्कळच काम होईल. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे प्रागतिक संघासारख्या संस्थेंतून सुद्धां हें कार्य बिनबोभाट चालू करतां येईल मात्र सदर संस्थेच्या नियमावलीमध्यें अशा कांहीं कलमाचा समावेश झाला पाहिजे.

परिचीत,

विनंति.

आह्मीं असोळणेंकर मंडळी समस्थ देश बांधवांस कळवितों कीं आह्मीं शाळेच्या इमारती करीतां फंडार्थी गेल्या १९ तारखेस संगीत पुण्य प्रभाव नाटकाचा प्रयोग करण्याचें ठरवून सर्व तयारी करून टिकीटें विक्रीस रवाना केलीं पण काहीं अकल्पित अडचणीपरत्वें नाटक बंद ठेवणें भाग झालें पण ज्यांकडे तिकिटें विक्रीचें काम दिलें त्यांतील एक दोघानीं लोकानां कांहीतरी थापा देऊन तिकिटींची आलेली रकम येथ चालत असलेल्या वे प्रा. ज्ञान मंदिर नामक संस्थेकडे ओढण्याचा उपद्याप चालविण्याचें भारत पत्रावरून समजतें तरी संस्थेचा आणि नाटकाचा अर्थाअर्थी संबंध नसून शाळा इमारत फंड हा गांवचे दहाजणाचे हक्काचा आहे व ज्ञान मंदीर संस्था ही स्वतंत्र उमेदवाराचे हक्काची आहे, करितां ज्यानी नाटकाची तिकिटें उदार मनानें विकत घेऊन आह्मांस आभरी केलें त्यानीं आपआपली रकम परत घेणें. मान्य नसेल त्यानीं ती आह्मां दहाजणाकडे पाठवणेची व्यवस्था करावी हे विनंती.

जनार्दन प्रभू चोडणेंकर.
विठ्ठल कृष्ण पै वेर्णेकर.
जैवंत ह्माळ्ळ पै काणे.
नारायण गणेश शे. नावेलकर
सोनु बाबुराय कामत.
कृष्ण अनंत पै काणे.
त्रिविक्रम येशवंत पै काणे.
उपेंद्र रघुनाथ शेणवी नावेलकर
रामचंद्र पै काणे.

Errata- Na secção " Ecos & Critica " imprimiu-se "bufala"

सामंत यांचें व्याख्यान

गेल्या ता. २१ ५ २३ सोमवार रोजीं कुंभारजुवें येथील " श्री शारदा विद्यालयाचे " मुख्याध्यापक श्री. सामंत यांनीं येथील श्रीपांडुरंग ग्रंथ संग्रहालयास भेट देऊन चांगलें समाधान व्यक्त केलें. त्याच रात्रीं येथील " श्री विठ्ठल सेवक मंडळ " संस्थेच्या भव्य हालांत प्रचंड लोक समूहामुळें त्यांचें संस्थापकांची आवश्यकता विषयावर सुश्राव्य व कळकळीचें असें व्याख्यान झालें.

ते ह्मणाले. मला आज भाषण करण्यास आमचे मित्र पाटणकर यांनीं विनंति केली. पण मी फार तर मुलांसारख्यांस कांहीं बोध सांगण्याइतकाच योग्यतेचा आहें. तरी पण माझ्या स्वानुभवानें थोडक्यांत सांगतों कीं, गोव्यांत आज शिक्षणसंस्था वांचनालयें वगैरे चळवळी बऱ्याच झाल्या, व कांहीं थोडक्यांतच नाहीं झाल्या. पण अशानें निराश होण्यास नको. हे सर्व प्रयत्न असल्यानें त्यांचें फल खास मिळणारच. उदासीन न होतां येईल या बिकट परिस्थितीस तोंड देऊन अव्याहत उद्योग चालविल्यास गोमांतकचा उदयकाळ फारसा दूर नाहीं कोणत्याही कार्यास विघ्नें येणें ह्मणजेच त्या कार्याची प्रगति होते हें ध्यानांत ठेवा. अपमान घडल्याशिवाय मान मिळविण्याची ईर्षा येत नाहीं. याबद्दल अनेक उदाहरणें आहेत. रामशास्त्री प्रभूणे हे पूर्वी राम्या होते. राम्याचा रामशास्त्री होण्यास श्रीमंतांनीं त्याला बोललेले ह्रदयस्पर्शी शब्दच कारण झाले. ह्मणून संस्थाकार्यास विशेष विघ्नं करणारांचे आपण आभारच मानावे. पण कार्य मात्र ईश्वर निष्ठेनें केलें पाहिजे. संस्थेचा आपण एक दास आहें. ही भावना नित्य जागृत असली पाहिजे समता ऐक्यता; बंधुता हे गुण तर संस्थाचालकांत अत्यंत अवश्य पाहिजे आहेत. अहंभाव तर असतांच नये. आपण संकटकाळीं ईश्वराची आराधना करितों आणि चांगल्या कामीं मात्र कर्तेपणा आपल्याकडे घेतो हें अनुचित नव्हे काय ? जर वाईटाचा परिहार ईश्वरानें केला पाहिजे तर बऱ्याची जबाबदारी तरी आम्हांस कशी पोचते ? तात्पर्य समाजांतील प्रत्येक इसमानें बऱ्यावाईटाचा भार जनताजनार्दनावर टाकून जनसेवा केली पाहिजे. म्हणजेच त्यांत त्याला यश, कीर्ती वगैरे आपोआप मिळतात. एकाच्या पायास कांटा लागला कीं दुसऱ्याच्या नेत्रांतून अश्रू वाहिले पाहिजेत. समाजांत एवढी एकतानता पाहिजे. तरच सार्वजनीक कामें यशस्वी होतात हें लक्षांत घेऊन आपण कार्य करण्यास लागा. ह्मणजे आजपर्यंत आपलें कार्य एथवर पोंचलें तसेंच पुढें हि वर्धमान होऊन गोमांतकांत भूषणभूत अशीच आपली संस्था चमकूं लागेल अशी मला आशा आहे. आधीं कोणतींहीं कार्यें लाहानच असतात. मग तीं मोठ्या स्वरूपांत आलेलीं आहेत असाच सर्वत्र अनुभव आहे. याबद्दल अमेरिकेच्या वाशिंगटन संस्थेची हीच स्थिति होती. आधीं एका बागेंत तिचा जन्म झाला; तीच आतां सर्व जगांत प्रमुख होऊन बसली आहे. अस्तु. तात्पर्य चिकाटीनें कार्य चालविल्यास लहानांकडूनही मोठमोठीं कार्यें उभारलीं जातात. या साठीं नैराश्य वृत्ती सोडून आपल्या संस्थेची वाढ होण्यास अगत्य यत्न करा. आपणास ईश्वर त्यांत खात्रीनें यश देईल. अशी आशा प्रगट करून व आपल्या संस्थेचें कल्याण चिंतून मी आपली सविनय रजा घेतों

भारत

गुरुवार जेष्ट कृ. ७ मा १८४५

चहाच्या पेल्यांतील वादळ ?

" भारतकार बोलशेविक मताचा प्रसार करणारे असून ते बंडखोर आहेत ते युरोपियन लोकांचे शत्रू आहेत. ते गांधीचे अनुयायी आहेत. एवंच ते अराजनिष्ट असून रिपब्लिक सरकारचे हुकूम मानले जाऊं नयेत, अशी भावना जनांत उत्पन्न करणारे आहेत." अशा अनेक तऱ्हेचे गैरसमज सरकारी वातावरणांत आज अनेक दिवसपर्यंत पसरलेले होते. इतक्यांत येथील कांवरें नामक एका गावांतील जमिनीच्या तंट्यासंबंधीं गैरसमजांमुळेंच कांहीं भयंकर भानगडी उत्पन्न झाल्या व विनाकारण अनेक गरीब बापड्या लोकानां अमानुप छळ सोसावा लागला. क्षुल्लक जमिनीच्या तंट्याला बंडाचें स्वरूप येतें कीं काय असा भास व्हावयाव लागला. व त्या भासमान बंडाच्या मुळाशीं आमच्या संपादकांचा संबंध कायमचा जोडला जातो कीं काय, असें सुद्धां वाटावयास लागलें !

जमिनीचा तंटा तो काय व बंड तें काय. पण गैरसमजामुळें क्षुल्लक गोष्टींना भयंकर स्वरूप आलें हें खास ! कांवरें येथील जनता कांहीं दिवस विनाकारण त्रास पावली, हें पुन्हां पुन्हां आमच्या मनांत येऊन आमचें अंतःकरण शतशः विदिर्ण होत आहे. जे लोक उपरोक्त गैरसमज उत्पन्न करण्यास कारणीभूत झाले असतील, त्यानां त्या अनाथ लोकांचे शाप बाधल्याशिवाय खास रहाणार नाहींत.

सध्या हें प्रकरण पोलीस खात्याच्या मुख्य ऑफिसरांकडे गेलें असून, त्याचा निकाल कायदेशीरच होईल असें भविष्य वर्तादयाला जागा आहे. पहावें काय होतें तें !

वाचकांस–

आजचा अंक निम्मा निघण्याचें कारण वाचकांनीं ताडलेंच असेल. कांवरें प्रकरणामुळें आमच्या संपादकांवर आलेल्या लटक्या काहुरामुळें त्यानां बरेच दिवस पणजी येथें मुकाम करावा लागला. तेथून ते कालच परत आले. आजच्या अंकांतील कमीपणा अर्थात् येत्या अंकांत भरून निघेल.

Aos srs. leitores

Em volta do nosso modesto director que aliás está afastado do contacto das ambições de toda a ordem, criou-se uma atmosfera de suspeições a proposito dumas coisas que se passaram em Canvorem. Teve êle porisso, de estar alguns dias em Pangim donde se volcou hontem. E' o motivo da reducção das paginas da presente edição. O proximo numero preencherá o que falta ao presente.

A Redacção

गोव्यांतील क्रिस्ती गावडे हिंदु होतील काय ?

गोव्यांतील क्रिस्ती गांवडे हिंदु होण्यास तयार आहेत. व कांहीं लोक त्यांस तसे करण्याची चळवळ करीत आहेत किंवा करणार आहेत असें गोव्यांतच कोठेंसें बोलणें नुकतेंच ऐकण्यांत आलें. म्हणून हा लेख लिहावासा वाटला. सुज्ञ लोक याचा विचार करतील अशी आशा आहे.

प्रश्नः१ क्रिस्ती गांवडे हिंदु होण्यांस तयार आहेच हें कशावरून कोणी ठरविलें आहे ? त्यांच्या वस्तींची गोव्यांत अनेक ठिकाणें आहेत. त्या त्या ठिकाणीं जाऊन त्या सर्वांची नाहीं, तर सर्व पुढा-ऱ्यांची तरी गांठ घेऊन ते हिंदुत्वाकरितां काय काय करण्यास तयार आहेत ? स्वार्थत्याग व कष्ट सोसावे लागतील तर ते कितपत सोसतील ? त्यानीं वरवर कदाचित् होय म्हटलें तरी भरवंसा, तें 'होय' परिणामापर्यंत टिकेल असा कोणी मिळविलेला आहे ?

प्रश्न २ वरील प्रमाणें त्यांच्याबाजूची सर्व तयारी पक्की सिद्ध झाल्यानंतर गोव्यांतला हिंदुसमाज त्यांनां कितपत जवळ घेण्यास तयार आहे? याच प्रकरणामुळें हिंदुहिंदूंत मतभेद होणार नाहीं व रणें माजणार नाहींत याचा भरवंसा कोणी कशावरून मिळविला आहे? गावड्यांस हिंदु केल्यावर मूळचे हिंदु गावडे व हिंदु शूद्र, वैश, क्षत्रिय आणि ब्राह्मण त्यांच्या पाशीं कितपत व्यवहार चालू करतील ?व जितका करतील तितका त्यानां पुरे असें त्यांनीं बोलून ठरविलेलें आहे कीं काय? असेल तर कोणापाशीं व कधीं ?

प्रश्न ३ —वरील दोनी पक्षांमध्यें निश्चित करार ठरून एकीची तयारी झाली असतांही पुढची गोष्ट म्हटली म्हणजे, बाकीचा क्रिस्तीसमाज हा प्रकर निमुटपणें मान्य करून आतां आहे इतका तरी शांत राहील काय ? जर त्या समाजाला हा प्रकार अपमानास्पद किंवा अप्रिय वाटून त्यांच्या मनाचा क्षोभ झाला व त्यांनी ह्याबद्दल हिंदुसमाजाशी व्यक्तिशः कींवा समाजात, बारीक मोठा विरोध पदोपदीं दाखविण्याचा मनुष्यस्वभाव प्रगट केला तर त्यांचा प्रतिकार करण्याचा किंवा सत्याग्रहानें सहन करण्यांचा हिंदुसमाजानें निश्चय केलेला आहे कीं काय! व तो कधीं कोठें ठरलेला आहे ? त्याची तयारी कितपत झालेली आहे आणि ती टिकण्याचा भरवंसा कोणता ?

प्रश्न ४- ही तयारी असली तरी आजचा हिंदुसमाज व क्रिस्तीसमाज यांची संख्या, अधिकार, संपत्ति, कर्तबगारी, वजनदार व संघशक्ती [मतैक्य] इत्यादि अनेक शक्तीगुणांनीं तुलना काय आहे ? म्हणून ह्या सामन्याचा परिणाम होय होईल अशा अंदाज कोणी ठरविला आहे ?

प्रश्न ५ "सरकार रिपब्लिक आहे. तें क्रिस्तीधर्माचा पक्ष मुळींच धरीत नाहीं" ह्याच भरवंशावर जर वरील चळवळ आरंभावयाची असेल तर, रिपब्लिक नागरिकत्वाचे हक्क कायद्यानें प्राप्त होण्यास योग्य असे तरी आज येथील प्रजेला उपभोगावयास मिळतात काय ? प्रस्तुत हिंदु व क्रिस्ती समाजांत दाखण्यासारखी दुही नाहीं. अशा स्थितींतही सरकार दोघांलाही न जुमानतां मनःपूत कारभार करीत आहे मग दोघांत लट्टा लट्टी सुरू झाल्यावर तो कारभार कोठें पोंचेल ! व कसा होईल ! शिपाय रिपब्लिक होऊन एक तप होत आलें तरी क्रिस्तीभिक्षुकांचीं वर्तनें सरकारी तिजोरींतून असतांही चालू आहेत. यावरून क्रिस्तीधर्माविषयीं सरकार उदासीन हें म्हणणेंनुस्तें शाब्दिकच असें ठरतें कीं नाहीं?

याप्रमाणें पांच प्रश्नाचा उलगडा झाल्याशिवाय गावडे हिंदु होण्याची चळवळ आणि ती आपल्या ह्या गोंव्यांतील लोकानीं, मनांत आणणें व जनांत बोलणें, कितपत योग्य होईल याचा उमेदवारांनी चांगला विचार करावा इतकीच या लेखानें त्यांनां विनंती आहे.

विद्यावर्धक मंडळ डिचोली.

वरील नावांची संस्था १ जानेवारी १९०३ सालीं स्थापन होऊन आज ११ वर्षें शिक्षण दानाचें पवित्र आणि लोकोपयोगी कार्य करीत आहे. हेंच कार्य मोठ्या जोमानें प्रगतीपर करावें, म्हणून कार्यकारी मंडळीनें जे प्रयत्न चालविले त्यांस चांगलें यश येऊन खालील प्रमाणें मदत मिळाली.

प्रथम श्रीयुतः—दुंडाप्पा ईश्वराप्पा गाढवी या सद्गृहस्थानीं संस्थेसाठीं ६।७ हजार रुपये खर्चून प्रशस्त अशी इमारत बांधून दिल्याकारणानें जागेच्या गैरसोईची मोठी अडचण दूर झाली. दुसरी गोष्ट कायम फंडाची. या फंडास बलवंत संगीत नाटक मंडळीकडून आपला 'एकच प्याला' खेळ पणजी मुक्कामीं मार्च ता. १६ रोजीं देण्यांत आल्यामुळें खर्च वजा करतां संस्थेस ९ शें रुपये मिळाले तसेंच मुंबई मुक्कामीं 'ललीतकलादर्श संगीत नाटक मंडळी'नें आपला सं० शारदा खेळ दिल्याकारणानें खर्च वजा जातां संस्थेस १२ शें रुपये मिळाले. शिवाय खालील सद्गृहस्थानीं फंडास उदार अंतःकरणानें मदत केली त्यांचीं नांवें–

रा. शिवलिंगाप्पा बसलींगाप्पा पालेंकर. पणजी २०१
,, नारायण अ. शेटये सावईकर ,, १०५
शेट मथरादास लक्ष्मीदास. ,, १०१
रा. दुंडाप्पा ईश्वराप्पा गाढवी. ,, १०१
,, जनो राम रेडकर ,, ७५
शेट रावजी पेराज ,, ५१
रा. नरसिंह ग. शे. सावईकर सावई ५१
मे. हाजी हबीब वरींद, पणजी ४१
रा. रावजी दत्तु महात्मे. ,, ३१
,, गोमा बाळकृष्ण प्रभू झांट्ये. ,, ३१
श्रीमती वै. सौ. सीताबाई रामकृष्ण हरी भांडारी. ,, ३१
शेट हरीजीवनदास मकनदास आणि कंपनी. ,, २५
मे० इब्राइम हाजी आमद. ,, २५
,, रहिमान हुसेन. ,, २५
,, अबदुलकादर मुल्ला सरफ अल्ली पणजी २५
,, इस्मायल हाजी हबीब. ,, २५
रा. नरसिंह मर्तु भांडारी, मंगळूर २५
,, श्रीपाद पुं. शे. सावईकर, सावई. २५
,, जगन्नाथ पां. शेटये आसगांवकर. पणजी. २५
,, दत्ताराम नारायण माईणकर ,, २५
,, नरसिंह ना. पै अस्नोडकर ,, २५
,, मंजीनाथ पद्मनाभ शेणई व अनंत विठ्ठल वाळगे. ,, २१
,, गणेश सीताराम खटखटे. ,, २१
श्री. सीताबाई वर्दे वालावलीकर मुंबई. २५
रा. विनायक आ. कारापूरकर ,, २५
,, मोरेश्वर हरी महात्मे- ,, २५
,, सोनबाराव देसाई- वेरें. २०
,, बाळकृष्ण हरी ना. साळगांवकर. पणजी. १५
,, शेट दामोदर रावजी. ,, १५
मे. उमर करीम. ,, ११
रा. पांडुरंग सगूण धोंड सावईकर ,, ११
,, गोपाळ ना. भांडारी. कुंभारजुवें. ११
,, आत्माराम कृ. साहाकारी, मयडें ११
शेट मथरादास जाधवजी. पणजी. ५
रा. शंकर हरी झांटयेप्रभू ,, ५
,, नारायण रा. नाईक साळगांवकर. ५
,, देशपांडे ब्रदर्स. ,, ५
शेट भगवान मानाजी मारवाडी. ,, ५
रा. श्रीपाद हरी केंकरे, मुंबई. ५
,, श्रीधर यशवंत पालेकर. ,, ५
,, कृष्णाजी पांडुरंग चोरकर. ,, ५
,, एम. एच. कारापूरकर. ,, ५
,, टी. पी. चोडणकर. ,, ५
,, सुखटणकर. ,, ५
,, मसुरेकर. ,, ५

आणि नाटकाच्या तिकिटा न घेतां पैसे देऊन मदत केली त्यांचे व शेवटीं संस्थेचें कार्य सिद्धीस नेण्यासाठीं आस्थापूर्वक मदत करून ज्यानीं ज्यानीं सहाय्य पुरविलें त्या 'बलवंत संगीत नाटक मंडळीचें' 'ललीतकलादर्श संगीत नाटक मंडळीचे' पणजीच्या व्यापारी मंडळीचे आणि मुंबईच्या शिक्षण प्रेमी लोकांचे व मौज सोडून अंग मेहनत दिल्याबद्दल श्री.वि. आ कारापूरकर आणि इतर स्वयंसेवक मंडळीचे तसेंच संस्थेची हकिकत प्रसिद्ध करून सहाय केल्याबद्दल क्रानीकल, लोकमान्य, नवाकाळ,सुदर्शन,मौज. आणि भारत पत्र कर्त्यांचे पुन्हां समयवाच्छेदें करून आभार मानीत आहे.

संस्थेचा चिटणीस
वामन नारायण पालेकर.

नच अशी लोकहिताचा काम उरकून ...
... आहे असें आम्हांस वाटतें ...

Critica" imprimiu-se "bufala"

manda e portanto nao deve entregar se ao luxo dos trabalhos Agronomicos. Nao e' isso? Se a nossa magra bolsa nao tolera que se compre uma lasca de presunto e uma metade de queijo flamengo, nao devemos no's prescindir-nos dele...e contentarmo-nos com a manteiga? Nao e' isto concludente e verosimil, ou a lo'gica nao e ... um quiabo e a hermeneutica um figo?...

—— x ——

(Posterior)

Entupido

Ficou o sr. Joao de Figueiredo ¡As suas propostas antes de irem a aprovagao do Conselho Legislativo levaram um medonho rombo. Mas nao deve intimidar-se o *joven conselheiro*...

Jovens nunca se intimidam, circula-lhes pelas veias o ardente e apaixonado sangue da mocidade. Nao deve receiar. *Para a frente*... e' que todos lhe devem dizer.

Se cada um nao quere que se meta consigo, nao ha maneira de comprimir as despesas. Alia's que diga a Imprensa o que ele deve fazer. Tracehe o programa... Entao veremos. A nossa imprensa tem o grande defeito de achincalhar pessoas, a modo de um Rei de Tunis de Eça de Queiroz, ataca-o, zurze-lhe no costado uma valente sova e...cala-se, guarda de Conrado o prudente silencio...

Interessantes

Teem sido por estes dias as sessoes do Conselho Legislativo. Ventilava-se naquele dia a questao dos funcionarios de administragoes dos Concelhos se deviam ser pagos pelo Estado ou pelas Camaras. Surgiam alvitres de ambos os lados

O sr. Sales de Andrade, o sr. Joao de Figueiredo falaram e foram de opiniao que as Camaras nao deviam pagar, mas sim, o Estado. Por outro lado levantava-se o sr. Plinio Tinoco, a quem a Presidencia secundava dizia que as Camaras e' que deviam pagar.

A questao azedou-se. De ambos os lados combatia-se valentemente. Va'rios apartes se cruzavam. A folhas tantas o sr. presidente escamado vocifera—"*Eu nao pago.*" Ao que o sr Sales de Andrade, retruca. "*V. Excia. nao e' o Estado. Estado somos no's e no's e' que havemos de pagar.*—"

Ha' confusao na sala. Tudo inquieta-se ... E assim tudo inquietando-se inquietam ainda mais o tesouro que esta' defraudado...

Alhos com Bogalhos

Disse a *presidencia*, referindo-se ao caso da Navegagao Fluvial. A questao era se este importante servigo, que nas maos do Estado tem dado uma bo'ta e bem grande bo'ta, devia ser adjudicada a uma empresa particular ou devia continuar a ser gerida pelo Estado.

Todos vogais natos foram pela ultima e mais um eleito "que pelo nome nao se perde" e doutro lado os vogais eleitos restantes. Como e' de crer a opiniao dos natos vingou, a destes ficou prejudicada.

Dum lado ergueram-se os alhos e doutro os bogalhos, diz o Diario com pilheria" mas houve um que nao soube se era alho ou bogalho, ficou ai duro como pedra ... era ... era ... quem todos sabem...

E assim perdeu-se uma boa ocasiao de endireitar estes servigos que vao a' matroca...

(Corresp)

Protecgao ao gado

Considerando que o quinto Congresso Provincial da India Portuguesa, reunido na capital deste estado em Fevereiro ultimo sob a presidencia do ilustre homem publico, sr. dr. Antonio Maria da Cunha, reconhecendo a necessidade de dar solugao ao importante problema da protecgao aos animais votou por aclamagao as conclusoes respeitantes a' criagao de uma associagao protectora de animaes efetivagao das leis e posturas que punem os maus tratos dados aos animais e apoio a toda a propaganda tendente a restringir o abatimento do gado vacum.

Considerando que nesta adiantada hora da civilizagao era muito sentida nesta provincia a falta de uma associagao protectora de animaes, falta que felizmente vae, agora, ser suprida por iniciativa do Congresso Provincial;

Considerando que o Co'digo das Posturas de todas as camaras municipais contem disposigoes claras e expressas referentes ao tratamento de animaes designando as multas que se deve aplicar aos transgressores;

Considerando, porem, que taes desposigoes teem sido, ao que parece, letra morta porquanto as entidades que por lei sao obrigadas a velar pela rigorosa observancia das referidas disposigoes nao se importam, por ignorancia outras por desleixo de tornalas efe'tivas;

Considerando que e' bastante sensata e significativa a resolugao tomada pelo Congresso e que consiste em apoiar toda a propaganda tendente a restringir o abatimento do gado vacum, porquanto esta resolugao, attentas as razoes que a originaram e que sao de ordem moral, concorrera' poderosamente, para se estreitar as relagoes entre os cristaos e os hindus goezes cuja uniao e absolutamente in dispensavel para o progresso material e moral desta terra;

Considerando que e' absolutamente justo e conveniente que todas as associagoes e corporagoes existentes nesta terra concorram com seu contingente para secundar a obra do Congresso;

Proponho:

1.°

Que se expresse na acta a inteira satisfagao desta Camara pelo bom exito do quinto Congresso Provincial.

2.°

Que esta camara dispense a' associagao protectora de animais que se vai criar o apoio compativel com os seus recursos.

3.°

Que se publiquem editais transcrevendo-se neles as disposigoes de Co'digo das posturas municipais em vigor respeitantes ao tratamento de animaes dando-se ao zelador as necessarias instrugoes para se tornarem efectivas as referidas disposigoes;

4.°

Que se convidem os individuos de rol infra para se apresentarem nesta sala no dia 29 do corrente mez afim de se resolver sobre a propaganda a fazer no sentido de se conseguir a restricgao do abatimento do gado vacum: Sturama Santba' Sinay Cundoicar, Cagy Cutbodino Haidar, Rogunata Ananta Bandari, e Gopala Crisna Gude.

5.°

Que se envie uma copia da presente acta a Comissao de estudos do 6.° Congresso Provincial e outra ao sr. Antonio Maria da Cunha.

Bascora P. Rau Sar Dessay

Ecos & Critica

A verdade ..

Supõe muita gênte que não vê dois dedos adiante do seu nariz que a intriga petulante pode enterrar a verdade.

Redondamente se engana essa gente que o poder da verda de é superior a todos os poderes dêste mundo.

E' a razão porque o *Bharat*, ama a verdade, adora-a, despresando a intriga petulante, nascida dos fins inconfessaveis.

E a verdade é que o progresso da classe hindú é devido aos europeus que a têm protegido contra a intriga petulante de certa casta dos nativos *di cá*

E a verdade é que os europeus não obrigando nem fomentando castismos, tem procurado e procuram animar a classe hindú para a grandiosa obra de seu levantamento.

E a verdade é, finalmente, que se não fossem os europeus, a classe hindú não seria o que é, pois ficaria reduzida a condição dos *mundcares* da referida *certa casta dos nativos di cá*.

O Bharat que sabe *de cor e salteado* tudo isso, ¿pode ser inimigo dos europeus, protectores de sua classe?

Mas o egoismo gera a intriga e esta a mentira.

E da mentira o *Bharat* nunca fez caso-sabem-no todos que o conhecem.

Pontos nos i i ...

Não é em Benaulim mas sim em *Benamola* que o sr. Mariano Rebelo fez uso do producto apreendido para a sua *loja*. Em Benamola que fica neste concelho, o sr. administrador tem um prédio e é natural que sua excelencia, durante a sua estada neste concelho trabalhe pelo fomento da propriedade da sua juridiscção administrativa. Não lhe queremos mal por isso.

E' que o sr. Mariano é amigo do *Bharat* e êste não quere *rebelar* contra ele...

A intriga...

Urdiram contra o director do *Bharat* a intriga de que êle era *bolchevista, sedicioso e revolucionario*, a proposito do caso de Canvorem.

Houve até empenhos fortes para que nas regiões oficiais circulassem, em tropel, terriveis malentendidos e à volta da modesta pessôa do nosso director.

O tempo, porém, tudo esclarecerá, irradiará luz em jorros sobre êste tão delicado assunto.

Frise-se, entretanto, que o *Bharat* nunca tramou nem trama na sombra, o que sente, regista, sem ambages, nas suas colunas, sem se preocupar do que, a seu respeito, governantes e governados, digam.

Há nas colecções do *Bharat*, elementos que provem ser o seu director aquela *trindade*?

Que provem os governantes e os governados que acataremos o castigo que nos infligirem...

Antes disso, é injusto que se façam juisos temerários...

Saibam...

O Bharat nunca solicitou do Poder graça especial ao seu director ou á sua gente. Ele não é palaciano; nunca mendigou sorriso protector dos governantes

O seu passado corrobora plenamente, que por causa de qualques graça, o *Bharat* nunca fez o uso de graxa ao mesmo Poder cujos bons actos louva e cujos maus actos verbera...

Se são capazes, desmintam-nos as afirmações que acabamos de avançar.

Estrada

O sr. dr. Jaime de Morais quando, há mezes, esteve de visita a êste concelho, prometera que antes do inverno, estaria reparada a estrada que da séde se dirige a Sanvordem.

Mas a estrada continua na mesma, como a promessa de Sua Excia, promessa que está absorvendo, a potes, a fria agua do humido inverno. . .

Alvitre

O caso de Canvorem força o *Bharat* a solicitar do Govêrno que nas Novas Conquistas a escolha d administradores concelhios incida nos europeus, como o sr Pomba que em Satari é adorado por todo o Povo que lhe chama *pai*

E' que, quando em tais funcções sejam investidos nativos com interesses ligados aos concelhos de suas nomeações, criam-se *politiquice, bolchevismo, revoltas, sediçoes* etc. o que cumpre evitar por causa do socego publico

Convem que o Governo Provincial acepte o nosso alvitre para o bem publico, alvitre que lhe indicâmos, ainda, numa carta, dirigida, há pouco.

Caso de Canvorem

Vai, breve, aparecer um folheto sobre este magno caso.

Será nele relatado tudo o que se passou em sua volta.

तपासावयास जाल तर इतकी, कांहीं घाण कोंडलेली दिसेल कीं, आणखी कांहीं वर्षांनीं ती उपसून टाकणें अशक्य होईल. हिंदुसमाज वैभवशाली झाला पाहिजे तर आजपासूनच खटपटीला लागलें पाहिजे. तरच पुढच्या पिढीला वैभवाचें शिखर गांठणें सोपें जाईल. आणि आजची आमची जबाबदारी आम्हीं विसरलों तर कदाचित् हिंदुसमाज नामशेष होण्याची ही पाळी येईल आजपर्यंत झोंपेचें सुख घेतलें तें पुरें नाहीं कां झालें ? श्रीमंत रंग मूर्तींनां चांगला रंग बहार आपल्या रंगमहालांत उडवूं द्या. आमचें आजचें कर्तव्य ह्मणजे पोटापाण्याचा वगैरे प्रश्न मागें ठेवून देशकार्याकरतां पुढें सरसावणें हें होय. पोटापाण्याचा प्रश्न प्रथम सोडवून मग देशाच्या गोष्टींत मन घालूं असें ह्मणणें खऱ्या सुशिक्षिताला कधींच भूषणावह होणार नाहीं. खरा सुशिक्षित कोण ? निरनिराळ्य खात्यांतील शिक्षण संपादन करून त्य शिक्षणाचा उपयोग स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्याकडे करणारा, आपलें सारें आयुष्य पैसे कमावण्यांत खर्च करणारा आणि सरकारची हाजीहांजी करून स्वतःचें वैभव वाढवूं इच्छिणारा माणूस खऱ्या सुशिक्षितांत केव्हांच गणला जाणार नाहीं. आजच्या परिस्थितीनुरूप जीं जीं सामाजिक धार्मिक वगैरे कर्तव्यें स्वतःला प्राप्त झालीं आहेत तीं स्वशक्तीनुसार जो बजावित राहील त्यालाच सुशिक्षित ह्मणतां येईल. एखादा बडा नोकर, श्रीमंत व्यापारी, हुशार वकील, लाखो रुपयांची इस्टेट असणारा वगैरेपैकीं एखाद्या निःस्वार्थ बुद्धीनें काम करणाऱ्या लहानशा देशसेवकापेक्षां कमी महत्वाचाच गणला जाईल. स्वःताची तुंबडी भरवून घेण्यापलीकडे यांच्या हातून कांहींच होत नाहीं.

आपल्या ब्रिटिश हिंदुस्थानाकडे पहा. ज्याला जें जें करावेंसें वाटलें त्यानें तें तें उचललें. कै. लो. टिळकांनीं सरकारी मदतीची अपेक्षा न करितां राजकारण चालविलें. उलट जर त्यांच्या मनांतून पैसाच कमावण्याकडे आपल्या सर्वत्रांचा उपयोग करावा असें घेतलें असतें तर ते आज कोट्याधीश होऊन गेले असते. कै. गोखल्याना सरकारला न दुखवितां आपलें ध्येय गांठावें असें वाटलें. महात्मा गांधीजीनीं दोन्हीहीं करून पाहिलीं. कै. आगरकर यानीं धार्मिक वेड्या समजूती घालविण्याचें मनावर घेतलें. स्वामी विवेकानंदजीनीं आर्यधर्म जगभर पसरविण्याकरीतां कंबर बांधली. श्री. कर्वे आज एक फार नाजूक पण महत्वाचें असें स्त्रियाबद्दलचें काम चालवित आहेत. एकूण जो तो कांहींना कांहीं करीत असल्याचें आम्हीं पहात आहों. पोर्तुगीज सरकारच्यामुळें जरी तें आज आम्हांस आमच्यापासून निराळें असें भासत आहे. तरी पण अशी एक वेळ येईल कीं, आम्हांला त्यांच्यापासून निराळेच ह्मणवितां येणार नाहीं. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून जाऊं तर फार फलहितकारक गोष्ट होईल.

तरुणानों ! आपल्या देशाला धर्माला विसरूं नका. आपल्या देशाचा उद्धार आपणांसच करावयाचा आहे. इतर लोक जे येथें आहेत तें स्वःतचें कल्याण करण्याकरीतां. आम्हीं जागे झालेले त्यांना कधींच आवडणार नाहीं. आपलें वर्चस्व आम्हां लोकांवर चालविलेलें त्यांना आवडतें, आपल्या देशाचा अभिमान ते जितका बाळगतात तितकाच आम्ही आपल्या देशाचा बाळगला पाहिजे. आपल्या राष्ट्रीयत्वाबद्दल त्याना जितका आदर आहे. तितकाच आम्हाला आमच्या राष्ट्रीयत्वाबद्दल असला पाहिजे त्यानां परतंत्रता जाचते आणि आम्हाला सुखाची वाटते ! तेव्हां जबाबदार तरुणानों, आजपर्यंत झालें तें झालें. पुढें तरी कार्याला लागा.

स्फुट विचार

कांवरें प्रकरणः— हें प्रकरण काय आहे, याची पूर्ण कल्पना आमच्या वाचकांस करून देण्याची आमची मनीषा होती; परंतु स्थलसंकोच्यामुळें आमची इच्छा आम्हांस दाबून ठेवावी लागत आहे. तरीपण इतकें सांगितल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं कीं, एका बड्या जमिनदाराच्या लहानशा तंट्यासभोंवतीं गैरसमजांचा धुमाकूळ उठून त्याचें पर्यवसान, भारतकार व त्यांचे लोक हे बंडखोर, बोलशेविस्त व क्रांतिकारक आहेत. असें समजण्यापर्यंत झालें. थोडक्यांत निभावलें व सत्याच, विजय झाला. नाहीं तर क्षुल्लक चुकीचा भयंकर परिणाम झाला असता ! असो. पकडून नेलेले सगळे 'बंडखोर' — बाया, मुलें व ह्मातारे— यांस सोडण्यांत येऊन, सर्वत्र शांतता प्रस्थापिण्यांत आली. हें प्रकरण स्वतंत्र पुस्तक रूपानें लवकरच उजेडांत येणार असल्यानें त्याविषयीं जास्ती लिहिण्याचें कारण नाहीं.

प्रागतिक संघः— या संघाची जाहीर करण्यांत आलेली कांग्रेस आतां तावडतोब पार पडणें हें संघाभिमान्याचें आद्य कर्तव्य होय. संघाविषयीं आधींच अनेक गैरसमज पसरलेले आहेत. त्यांत परिषदेचा योग जमून न आल्यास आणखी नवीत गैरसमाजांची भर पडणार आहे. तेव्हां संघाचे सर्वाधिकारी वेळांत वेळ काढून परिषद भरवतील अशी आम्हांस उमेद आहे.

नवीन रहस्येंः— आमचें राजकीय वातावरण नवीन रहस्यांनीं ओतप्रत भरलें आहे. त्याची यथासांग चर्चा भारतांत करण्याचा आमचा मनोदय आहे. या रहस्यांवरून आमची आवतोनोमी आम्हा हिंदूस कशी नुकसानकारक होत आहे, हें वाचकांस समजून येईल. सध्या इतकेंच सांगितलें ह्मणजे पुरे कीं, एका विशिष्ट जातीच्या लोकाचें कोंसेल्य लेजिस्लातीव्हांत वजन पडत असल्यानें, हिंदूंच्या हितसंबंधावर गदा घालण्यात येत असते !

मुरगांव—शिक्षण-संघ.

सभेचें काम संपल्यावर सेक्रेटरीनीं केलेल्या सुचनांचा विचार करण्याकरितां लगेच एक खासगी सभा भरविण्यांत आली. संस्थेच्या अडचणीं दूर करण्यास व शाळेमध्यें आवश्यक अशा नवीन सुधारणांचा उपक्रम करण्यास कोणकोणते उपाय केले पाहिजेत हा प्रश्न श्रीयुत शशिधर नारायण घासें व शांताराम का. दणाईत यांनीं पुढें आणला व नंतर बरीच वाटाघाट झाल्यावर श्रीयुत गणपत राव पु. धुमटकर (मुंबई), श्रीयुत माधवराव पाठगांवकर व श्री. मंगेशराव का रापूरकर यांनी सभेपुढें मांडलेले एकंदर ४ ठराव पास आहे.

ह्या नंतर जमाखर्चाच्या वह्या सभेपुढें सादर करण्यांत आल्या व सभासदानी त्यांची तपासणी केल्यावर हिशेब चोख राखल्याबद्दल सर्वांनीं पसंती दर्शविली.

संस्थेच्या स्थापनेपासून आज तागायत ज्य कमिटीनें उत्साहानें व कार्यक्षमतेनें संस्थेचें पाऊल पुढें होण्याबद्दल अविश्रांत श्रम केले होते तिनें संस्थेस नवीन व अनुभशीर माणसांची कमिटी लाभावी ह्मणून आपला राजिनामा दिला व तो सभेंत मंजूर करण्यांत आला. विशेषें करून कमिटीचे उत्साही सेक्रेटरी श्री. सरदेसाई यांच्या राजनाम्या बद्दल संस्थेला फार वाईट वाटलें पण संस्थेल नव्या जोमाचा व उत्साहाचा सेक्रेटरी मिळाल्या मुळे त्यांना थोडेंसें समाधान वाटलें. नवीन कमिटींत खालील सद्गृहस्थ आहेत:—

श्री. मंगेशराव मुर्डेश्वर अध्यक्ष.
,, शशिधर नारायण घासें उपाध्यक्ष.
,, मंगेश आत्माराम लाड सेक्रेटरी.
,, जगन्नाथ बाळकृष्ण शेट्ये उपसेक्रेटरी
,, गणपत जटाराम शे. मेथा खजीनदार.

शेवटीं आभार प्रदर्शन वगैरे होऊन सभा बरखास्त झाली.

मागील अंकावरून समात.

—अखेर 'देजिम' चुकतें करण्यास सप्टेंबर अखेर पर्यंत मुदत देण्यांत आली.

—दो. व्यंकटेश देसाई हे गैरहजर असल्यामुळें त्याचे ऐवजीं दो. सुब्राय वि. देसाई हे कांसेल्य लेजिस्लातीव्हाच्या बैठकांस हजर रहात आहेत.

—पाऊस कमी पडत असल्यावरून, शेतकऱ्यांची मनें त्रस्त झालीं आहेत.

—गेल्याच्या मागील आठवड्यांत साकादूर काब्राल व गागु कुतीनु यांच्या तसबिरींचा पणजी मुनिसिपाल हालांत अनावरण विधी यशस्वी रीतीनें पार पडला.

—श्रीमती गोकुळाबाई तळावलीकरीण या गोमांतकीय बाईनें एक श्रीसिद्धारूढ महाराजांचें कवितावद्ध चरित्र लिहिलें असून तें लवकरच छापून प्रसिद्ध होणार आहे.

—कांवरे प्रकरण थंडावत चाललें असून सरकारी दरबारांत सत्याचा प्रकाश पडत चालला आहे.

धर्मशाळा सांवर्डे.

थोड्या दिवसांपूर्वीं भारतामध्यें धर्मशाळेसंबंधीं जाहीर विनंतिपत्रक प्रसिद्ध केलेलें वाचकानीं अवलोकन केलें असेलच तथापि त्यांत विशेष उलगडा केला गेला नसल्यानें तो आम्हीं या खेपेला थोडासा करण्याचें योजिलें आहे.

जनतेच्या अंगवळणी पडलेलें मग तें कोणतेंही कार्य असो, निमित्त मात्र कोणीतरी जीव पुढारी झाल्याबरोबर तें फलीभुत होण्यास उशीर लागत नाहीं असा विशेषतः अनुभव आहे. गोमांतकांतील प्रसिद्ध देवालयांशेजारीं ज्याप्रमाणें सोईसकर अशा अगरशाळा बांधिल्या गेल्या आहेत त्याप्रमाणें प्रवासी जनांच्या सोईकरितां सांवर्डे [कुडचडें] हार्बर (मुरगांव) वगैरे सारख्या मुद्यांच्या, महत्वाच्या ठिकाणीं आजपर्यंत धर्मशाळा कां बांधिली गेली नाहीं ? याबद्दल राहून सखेदाश्चर्य वाटते. पणजी, मडगांव, रायतूर, दुरभाट, इत्यादि ठिकाणी सुद्धां उतारूंच्या सोईकरितां आजपर्यंत अल्प प्रमाणांतही कांहीं व्यवस्था झालेली दिसत नाहीं-याबद्दल गोमांतकीय जनतेचें यापुढें तरी इकडे लक्ष वेधावें असें आमचें प्रामाणिक मत आहे.

ख्रिश्चन धर्मानुयायी लोकांमध्यें खाण्यापिण्याचा कोणताही निर्बंध नसल्यमुळें त्यांचें धर्मशाळेवांचून विशेष अडत नाहीं असें दिसतें, व हें एक वरील बाजूकडे त्यांचें लक्ष न वेधण्याचें सबळ कारण आहे. हिंदूंची संस्कृति, आचार, विचार, किरिस्तांव लोकांहून अत्यंत भिन्न असले तरी संसर्ग योगें आम्हां हिंदूनाही-कशीतरी वेळ भागवून नेण्याची चटक लागल्यास त्यांत विशेष आश्चर्य मानण्यासारखें असें कांहीं नाहीं. तथापि अलिकडे तरुण वर्गाचा दृष्टिकोन आमच्या सनातन आर्य धर्माकडे झुकूं लागला आहेसें दिसतें व त्यामुळें आमच्या हिंदवासीयांच्या उणिवा शक्य त्या भरून काढाण्यात तत्प्रीत्यर्थ ते कंबर बांधित आहेत. असें असतां अशा जरूरीच्या व अत्यंत महत्वाच्या कार्याकडे त्यांचे लक्ष कां वेधूं नये ? याबद्दल या शरिरानें विचार केला असतां परधर्मीयांचा संसर्गच एक यांचें मुळाशीं कारण आहे व त्यामुळें गोमांतकाचें लक्ष आजपर्यंत अशा धर्मकार्यांकडे वळलें नसावें असें वाटतें. परंतु जर करितां आम्हीं स्वीकारलेलें तूर्तचें हें धर्मकार्य निर्विघ्न पार पडलें तर पुढें अशा सार्वजनिक हिताच्या कार्याकडे श्रीमान, गरीब, व मध्यमवर्ग—सर्वांचेच एक सारखें लक्ष वेधलें जाणें अशक्य नाहीं.

मडगांव येथील सारस्वत ब्राम्हण समाज, म्हापसें येथील सारस्वत विद्यालय, कुंभारजुवें येथील शारदा विद्यापीठ वगैरे संस्था नांवारूपास येण्यास त्यांची चिकाटी, संस्थेचा अभिमान, सतत परिश्रम, स्वार्थत्याग, व व्यापक ध्येय हींच

श्रीसरस्वती विद्यालय-वेलींग

या विद्यालयाची पष्ठम वार्षिक परीक्षा, गोमांतकीय मराठी शिक्षक संघातर्फे, श्री. ग. दाधर प्रभाकर काकतकर, शिक्षक, मोफत मराठी शाळा-डापसें, श्री. गोविंद दत्तात्रेय हिळवे, शिक्षक, नवीन मराठी शाळा-मडगांव व श्री नी. दळवी, या तिघांच्या परीक्षक मंडळानें ता. २१।२२ मे १९२३ रोजीं घेतली. परीक्षणांतीं लागलेल्या परिणामावरून या शाळेच्या लोकोपयुक्त शिक्षण पद्धतीची चांगलीच साक्ष पटते. याप्रमाणें अर्धतपपर्यंत खरोखरच स्वार्थत्यागपूर्वक केलेल्या ग्रामशिक्षणसेवेबद्दल या शाळेचे मुख्याध्यापक, श्री. पांडुरंग विष्णु मडकईकर, या होतकरू लोकसेवाव्रती तरुण गृहस्थांचें अभिनंदन करणें हें सर्वांचें कर्तव्य आहे.

वातमीदार.

देशभक्तानां इषारा.

('नगाऱ्याच्या घाईपुढें तुणतुण्याचें कायी' हें व्यवहारांतलें अर्थपूर्ण सत्य पुष्कळांच्या अनुभवास उतरत असतें. मोठमोठ्या देशभक्तांचे, गोमांतकाच्या बजेटांत, काटकसर करण्याविषयींचे शास्त्रीय शोध चालले असतानां, माझ्यासारख्या अननुभवी बालकानें एखादा अचूक उपाय सुचविला तरी तिकडे कोणाचें लक्ष जाणार ?)

गीति

मोठेंच भाग्य वाटे गोव्याचें, उमजलां तुह्मीं आज।
दारिद्र्यपंक्ति कैसा रुतुनी बैसे स्वदेश तो साच ॥१॥
स्वार्थापायीं अजवरि होतां तुह्मीं विसरलां स्वदेशा हो!।
परि ईशकृपें आजी पुरतो, गमतें, स्वदेश सुखलाहो ॥२॥
अंमलदार निरर्थक वडे वडे पोषुनीच बहुसाल।
उधळुनि फस्तचि केलें गोवा भांडार तें आजीकाल ॥३॥
कर पुढती लादुनियां गरिब प्रजेवरि तये तुह्मीं पिडिलें।
आतां तेंहि नसे मुळीं, होतें जें सर्व तें तुम्हीं खडिलें ॥४॥
डोळे बरे उघडले, बघतां पाडावया बचत खर्चीं।
कापुनि मान सहजची गरिब अशा कामदार लोकांची ॥५॥
होईल काय अशानें? मुर्खपणा हा कशास पांघरतां।
ह्या बचतीनें होइल काय? वदा सांडितां कशा नरता? ॥६॥
हांकलुनी लावा त्या ऑफिसियालां हजारवाल्यांनां।
ज्यांची गरज नसे मुळीं येथें अह्मां, तयां रजा द्या नां ॥७॥
ते पोर्तुगेज, त्यानां आहे त्यांचाच पोर्तुगाल तिथें।
पोषावया समर्थचि परि गोव्याविण अम्हांस कोण दुजें? ॥८॥
सांगेसुस परि तयीं नेलें शोषूनि आमुचें रक्त।
हाडांचाचि जणूं सांगाडा शिल्लक असे पहा फक्त ॥९॥
पुरवा लक्ष इथें, तुह्मि गरिब जनांच्या नका जिवा घेऊं।
अधिक उण्याची करुनीं मज ऐशा बालका क्षमा--॥१०॥

मार्मगोवा, २५।५।२३

नम्र
अज्ञातवासी.

(असोळणेच्या ज्ञानमंदीर संस्थेच्या गेल्या वाढदिवस प्रसंगीं गाण्यांत आलेल्या कविता.)

ईशस्तवन.

झपताल

नमन प्रभुवर पदा मंगला सौख्यदा ॥ हरित जें तापदा कुमति अघ आपदा ॥धृ०॥ सु मन सुम वाहुनी। भक्तिदीप दावुनी। सत्य संकल्पुनी। पूजितों सु वर दा ॥१॥ सत्पथीं लावुनी। दैन्य परिहारुनी। करुनि सुदिनो दया तोषवीं सर्वदा ॥२॥

दादरा.

बघुनि सकल बुधजनास हर्ष होत बहुमनास ॥
उत्सुक किति होइ अहा! स्वागता करावयास ॥धृ.॥
विद्वज्जन समूह नमूं! सत्कार्यी सतत रमूं ॥
प्राशुनि बोधामृत करुं, ज्ञानमंदिरीं निवास ॥१॥
सन्मार्गा आक्रमुनी। सद्यश मिळवूं सुजनीं ॥
निश्चय हा मनि करुनी, शटुं धरुनी धैर्य ध्यास ॥२॥

रामकृष्ण अनत प्रभु, गि० असोळणें

rario sao um rombo nas arcas doEstado.

Nao sao o roubo so' a's arcas do Estado, mas tambem...a's caixas do estudantes, porquanto o curso da Escola Normal e' de tres anos e com a fusao terao de gastar cinco anos alem das cadeiras especiais! Objectar-se-ha que esta fusao proporcionara' solida preparagao. Se assim, recomendaremos a Universidade de Sorbone onde sera' mais rigida. Nao ha' que sair daqui, a nao ser que sejam Prazeres Muda-Costas que a maneira dum cao algando pernas sobre o Liceu Nacional fez dele Central,exclusivamente para anichar ali autenticos ignorantes...mijando assim uma porgao de impostos! Ninguem nos contestara' —

E depois o ensino liceal e' de caracter generico, ministrando nogoes gerais que habilitam para o exercicio de varios ramos da actividade humana sejam por exemplo medicina. advogacia, jornalismo, burocratas, etc mas nunca especializam em uma e determinada materia, o que briga,absolutamente com o espirito da Escola Normal cujo fim e' especializar em uma e determinada fungao — a importante fungao de educadores.

E para o cumulo a diferenga entre a atmosfera da Escola Normal e do Liceu Central e' grande. No Liceu existem "corpos que se corrompem em vida"; ha barris humanos que depois das 2 de tarde transformam-se em sifoes a vomitaram terriveis hemorragias bocais; existem sonambulos que dos *Stores* da visinha India, acordaram no "Liceu Albuquerque". Ha emfim toda a fauna zoologica. Toda.

Posto isto, permitiremos asfixiar-se naquela atmosfera deleteria,os futuros educadores de quem depende vicejar ainda a felecidade desta terra?

Nao! Nao pode ser.E em toda a superficie do globo sublunar, antes de mais, a vista dos que presidem os destinos duma nagao, vao para a instrugao e educugao, sendo a prova irrefutavel disto o que acaba de vir a lume deste Massolini da Italia, desta grande forga politica, regeneradora da Espanha, *La Trazza* que diz: *Espana no morrira*', porque cre, sabe e diz no seu manifesto:

"Os *tracistas*, no desejo de cimentar os fundamentos da patria, declaram o oficio de mestre-escola como o de maior dignidade e consideragao."

Meditem! Meditem! Meditem! E retrog radem enquanto e' tempo!...

Alma Velha

O Caso de Canvorem

Apareceu ja o folheto sobre este caso. Vende-se na Tipografia do *Bharat*. Cada exemplar custa duas tangas, sendo o producto da vendagem destinado a socorrer os Velipos da dita aldêa.

Vende-se, tambem, em Margão na Drogaria do sr. P. V. Virgincar.

Ecos & Critica

Dr. M. G. Camotim

Este simpatico joven da classe hindú acaba de obter a alta classificaçao de 18 valores na tése que brilhantemente defendeu, há já duas semanas, concluindo o curso de medicina.

Conhecemos o sr. dr Mucunda Camotim e, porisso, podemos afirmar que o belo rapaz a uma inteligencia sólida e fecunda alia uma decidida vocação para a profissão que abraçou.

Alem disso, o sr. dr. Camotim é dotado de sentimentos nobres e fidalgos que o fazem dele um ente adoravel.

Ao distinto esculapio, nossas calorosas felicitações.

Gandhismo...

O director do *Bharat* é tido como *gandhista*. Nem ocultamos esta nossa qualidade.

Mas ¿que significa ser *gandista*? ¿Ser *sedicioso, revolucionario* ou *bolshevista*?

Nada disso. Antes pelo contrario. Ser *gandista* é ser sofredor, nao violento e numa palavra, martir. O *gandhismo* é inimigo *nato* de tudo o que seja violento, de tudo o que seja mau e de tudo o que vá de encontro ao pacifico goso de legitimos direitos naturais.

¿Que mal há, portanto, no facto de ser o modesto director do *Bharat* admirador dos humanitarios principios de *Mahatmà Gandhi*?

Uma verdade...

A classe hindú sempre teve inimigos e dos piores ¿Quem são eles? Ninguem os aponta a dedo e todavia todos os conhecem...

E' claro que os hindus tem de se precaver contra os ataques disfarçados daqueles seus inimigos.

Como? Estando, sempre, de boas relação com os europeus nobres e com a *politica de atração*.

E'o que a experiencia, colhida das factos concretos aconselha...E é uma verdade.

Um defeito...

O maior defeito do *Bharat* é de ser demasiado franco. Ele nãoconhece a maquiavelica arte de iludir a gente com opiniões que está longe de professar.

Cà em nossa casa diz se, sem circunloquios nem radeios, o que se sente...

Faz mal...

Consta-nos que o sr. Mariano Rebelo arranjou ou está arranjando documentos para provar que não fez uso do producto apreendido para a sua

---

भारत.

गुरुवार जेष्ट शु. ७ मी १८४५

स्फुट विचार

काटकसरः—तिजोरीस जडलेली तुटीची व्यथा परिहार करण्याप्रीत्यर्थ कौंसिलर–डाक्टरांकडून हरतऱ्हेचे उपाय सुचविले जातात व विशेष बोभाटा न होतां ते पासहि होत असतात ही किंचित् समाधानाची गोष्ट होय. 'किंचित् समाधानाची' ह्मणण्याचें कारण हेंच कीं, सदरीत उपाय रोगोत्पादक मुख्य कारणांवर घाव घालणारे नसून, त्यांचा रोख केवळ बाह्य स्थितींत कृत्रिम फरक घडविण्याकडेसच दिसतो. नकारघंट्यापेक्षां ही स्थिति चांगली. इतकेंच. पण रोग हटविण्याला रोगाचें मूळ खुरडून टाकण्याचा प्रयत्न जोंपर्यंत होणार नाहीं ह्मणजे लट्ठ लट्ठ पगारांच्या मान्यानें 'मरकुंडीस' आलेलें बजेट जोंपर्यंत दुःखविमुक्त करण्याचा सद्हेतू डाक्टरांकडून उपाययोजनेचा उपक्रम होणार नाहीं तोंपर्यंत इतर किरकोळ उपाय किरकोळच ठरतील. केशवपनानें कलेवराचा भार थोडाच कमी होणार आहे !

सत्तेचे गुलामः—'मुंडकार' हे 'भाटकार' लोकांच्या सत्तेचे गुलाम आहेत असा आजपर्यंत इतर लोकांचा समज होता. पण या समजांत बदल करण्याचा समय ठेपला आहे. भाटकारांकडून मुंडकारांना योग्य न्याय न मिळाल्यास मुंडकार भाटकारांची पर्वा बाळगतील, असें आतां वाटत नाहीं. 'जशास तसें' या तत्वाचा हा परिणाम असूं शकेल. एकंदरीत चालता

---

loja de Benamola.

Faz mal, sobretudo, depois de saber que ninguem toma conta de seus actos ... maus.

Uma Fabrica...

Referimo-nos á Fabrica de Telhas e Tijolos de Moirá cujos administradores são os srs. Francisco Coutinho e Cia.

Esta Fabrica tem trinta e tres anos de existencia. Ha' melhores apreciações sobre a excelencia do seu producto. O seu directorio é constituido dos mais importantes cavalheiros que honram a India.

Os seus ditos administradores srs. F. Coutinho e Cia reunem a uma inconcussa probidade um patriotismo a toda a prova.

¿Que mais é preciso para o progresso da referida Fabrica?

Certos estamos, porisso, que o Publico prestará todo o seu apoio à Fabrica de Telhas e Tijolos de Moirá, aumentando o numero de sua, inscrições.

काळ हा सत्तेच्या गुलामाचा नसून, गुलामाच्या सत्तेचा आहे, [illegible] पहात आहे, असें विधान करण्यास बरींच सबळ कारणें आहेत. असो. चोख आचरण ठेवणाऱ्या भाटकारानीं ह्या होत्र असलेल्या पालटानें डगमगण्याचें बिलकूल कारण नाहीं.

गोरक्षण...—फोंडें मुनिसिपालटीचे सुप्रसिद्ध मेंबर भास्करराव देसाई यांनीं गोरक्षणार्थ चालविलेली खटपट अत्यंत प्रशंसनीय आहे, हें कोणीहि कबूल करील. गोरक्षणाचें पुण्यप्रद व पवित्र कार्य नेटानें चालविणें किती अगत्याचें आहे,याचें भारतांत अनेकदां विवेचन आलें आहे. खुद्द अमेरिकेसारख्या ख्रिश्चन राष्ट्रांत गोरक्षणाच्या चळवळीचें महत्व लोकानां पटावयास लागलें असून, यद्विषयी तेथें परिषदा भरावयास लागल्या आहेत. अशा स्थितींत गोमाता ज्यांचें परमपूज्य दैवत आहे, अशा हिंदूनां स्वस्थ बसणें कोणत्याहि सबबीनें योग्य नाहीं. असो. भास्कररावानीं चालविलेल्या गोरक्षणाच्या पायाशुद्ध चळवळीबद्दल आह्मीं त्यांचें साभार अभिनंदन करितों.

बोटी व...खोटीः—सरकारापाशीं कसलीहि व्यवस्था सोंपविली गेली तर तिचा परिणाम जनतेला सुखदायक होत नाहीं. असा अनुभव आहे. सरकारी बोटींची व्यवस्था पहाना ! लोकांची खोटी ही अचूक ठेवलेलीच. जनतेची अशी खोटी होऊं नये ह्मणून ती व्यवस्था एखाद्या योग्य इसमाच्या स्वाधीन केली जावी येतदर्थ ले. कौन्सिलांत लोकपक्षीय पुढाऱ्यानीं आपली शर्थ वेंचली. पण त्याचा कांहींच परिणाम न होतां, नेहमींप्रमाणेंच या पुढेंहि बोटींवर सरकारचीच दरबारी व्यवस्था चालू रहाणार आहे !

नागपूर–सत्याग्रहः—नागपुरांत सांप्रत जोराचा सत्याग्रह चाललेला असून, त्याला ठिकठिकाणच्या स्वयंसेवक पथकांचें पूर्ण पाठबळ मिळत आहे. सरकारचेंहि धरपकडीचें रकड अस्त्र सरांस सुरू असून, नागपुरचे तुरुंग कैदी लोकांनीं भरून गेले आहेत. सरकारी दडपशाही जोरानें उसळी घेत असतांहि, लोकांचा उत्साह वाढतच आहे. भावी दुःस्थितीचीं स्पष्ट स्वप्नें पडत असूनहि, केवळ राष्ट्राचा मान राखण्यासाठीं देशभक्त लोक नेटानें सत्याग्रहांत भाग घेत आहेत. आणि येथें ? येथें सर्व कांहीं 'औरच' आहे. कातडी व पोतडी संभाळून 'देशभक्तांनीं' लंब्या लंब्या बाता झोकाव्यात, 'मार्मिक' टीका खरडाव्यात व प्रत्यक्ष एखाद्यावर संकट आलें कीं, सरकारी सत्तेच्या पांढऱ्या पातळांत डोकीं खुपसावीत !

कानाडोळा करूं नकाः—भारताचें आठवें वर्ष सुरू होऊन चार महिने लोटले. दरम्यान वर्गणी पाठवून देण्याविषयीं आश्रयदात्यानां अनेक सूचना देण्यांत आल्या. कचेरींतून पत्रांवर पत्रें लिहिण्यांत

पचांगाविषयीं दोन शब्द

[ले० वा० आ० देशप्रभू]

आजपर्यंत पाहूं गेलें असतां, पंचांगाचे खरे दोन पक्ष अस्तित्वांत असलेले दृष्टीस प डतात. एक निर्णयसागराचा व दुसरा लोकमान्याचा. अर्थात या दोनही पंचांगाचें जर सूक्ष्म रीतीनें निरीक्षण केलें तर त्यांत नवें पंचांग शुद्ध ठरेल. हें सांगावयास नको. कारण आजपर्यंत जे अनुभव नवीन पचांगांतून दृष्टोत्पत्तीस आले तसे निर्णय सागरच्या पंचागांचे दृष्टोत्पत्तीस आलें नाहींत उदाहरणार्थ, ग्रहणाचा दाखला घ्या! लोकमान्य टिळकांच्या पंचागावर जर १५ मिनिटांनीं ग्रहण लागतें तर निर्णय सागराच्या पंचागावर तेंच ग्रहण बऱ्याच उशिरां लागतें, हें शेवटच्या ग्रहणावरून लोकांच्या नजरेस येऊन चुकलेंच असेल. तेव्हां आतां ह्या दाखल्यावरून पाहातां खरें खोटें याचा निर्णय करणें निर्णयाकडेसच सोपवणें जास्त शोभेल. एकंदरींत पाहातां अजून पर्यंत जें हें थोतांड माजून राहिलेलें आहे. हें निव्वळ धर्माचें व हिंदू समाजाचें दुर्दैव होय यांत शंका नाहीं.

आमच्या मतें दोन पक्षांपैकीं बहुतेक जास्त इसम सर्वसाधारण पाहूं गेलें असतां धर्माविषयीं कळकळ बाळगणारेच आढळतील. आणि यावरून खरें नीं खोटें जितपत आम्हांस कळतें तितपतच त्यांना ही कळलें पाहिजे. पण आज जिकडे तिकडे पाहिलें तर हाणमारीचे वज्जे. कोणी टिळक पक्षपाती म्हणतात कीं, खरें खोटें न पाहतां हे आपले वृद्ध शास्त्रीबुवा किंवा पंडित आपलें जुनें तेंच सोनें म्हणून जुन्या पंचागासच चिकटून राहतात.तर त्यावर प्रतिपक्षाचे उत्तर असें निघतें कीं, "ह्या नूतनप्रिय मनुष्यांस कांहीं नूतनत्व प्राप्त झालें म्हणजे लागले नवें तें खरें म्हणायाला." याप्रमाणें दोनही पक्षांकडून एकमेकांस उत्तरें प्रत्युत्तरें चोख मिळतात पण ह्या मुळेंच आमच्या अधोगतीस प्रारंभ झाला हें कोणाच्याही लक्षांत आल्या वांचून राहाणार नाहीं.

यावरून वर सांगितल्याप्रमाणें जर खऱ्या खोट्याविषयीं निर्णय करण्याची आकलन शक्ती त्यांच्यांत आहे, तर जें हें आज थोतांड माजून राहिलें आहे ह्याचें कारण आमच्यामतें एका पक्षाचा व्यक्ती विषयक अभिमान तर दुसऱ्या पक्षाकडील व्यक्तिविषयक मत्सर हेंच होय. कारण आज सर्व साधारण पाहूं गेलें असतां खऱ्या दृष्टीबद्दल वाद करण्याची जरूरच नाहीं-खरें तें त्रिभुवनात खोटें व्हावयाचें नाहीं त्यांत गणितशास्त्राविषयीं तर बोलणें नकोच; तें त्रिकालाबाधित सत्य. यावरून मात्र ज्योतिषशास्त्रांतील, गणित ठाम खरें अशी कोणी समजूत करून घेऊं नये.कारण हें गणित तारे, नक्षत्रें यावरून ठरविलेलें असतें अर्थात ४०० वर्षां अगोदर बांधलेला कोण त्याही एका ग्रहाविषयीं अथवा एका नक्षत्राविषयीं सिद्धांतआजनिरुपयोगीच ठरेल.उदाहरणार्थ:—मकर सक्रांत. मकर सक्रांत म्हणजे मकर राशींत सूर्यप्रवेश करतो तो दिवस खरें पाहिलें असतां त्या दिवसास संक्रात म्हणण्यापेक्षां उदगयन म्हटलेलेंच शोभेल. कारण सूर्य मकर राशींत संक्रमण झाल्या नंतर गणेश दैवज्ञाच्या पद्धतीस अनुसरून ७२ दिवसांनीं ग्रहलाघवी पंचागांतील सूर्याचें संक्रमण होतें. अर्थात २२ दिवस उत्तरायणांतच सूर्य असतो. इतकेंच नव्हे तर पहिल्या प्रथम दैवज्ञाच्या ग्रहालाघवादी पंचांगांत आरंभस्थानी अश्विनी,भरणी, नक्षत्राच्या अथवा मेष वृशभादी राशींच्या घटमालेचा पहिला लोटा संपात बिंदुपासून २२। अंशावर बांधिला आहे. ह्यामुळें त्यां पंचागांतील महिने, अधिक मास,संक्रांती ही केव्हां केव्हां भिन्न असणारच,आतांच्या ग्रहलाघवांत ही चूक भरून काढली असेल किंवा नाहीं हें माहीत नाहीं. पण कसें ही जरी असलें तरी ज्योतिष शास्त्राचे सिद्धांत रामबाण खरे असें मुळींच मानतां येणार नाहींत. त्यांत ज्या सिद्धांतावरून शतकें निघून गेलीं असतील तर ते प्रमाणास घेणें दुराग्रही मंडळीचेंच कर्तव्य असून सर्वथैव चुकीचेंच होत.

हल्लीं असा एक शोध लागला आहे कीं, ही आपली सूर्य मालिका कधीं कधीं दुसऱ्या अती प्रचंड पण आम्हांस न दिसणाऱ्या अशा शौरी नामक तारकपुंजांकडून ओढिली जाते. तेव्हां हा सूर्य सगळेच्यासगळें आपलें लटांबर घेऊन एका विशिष्ट जागेकडे जातो हें सर्वश्रुत आहेच. तेव्हां अशा वेळीं केलेलें ग्रहलाघव किती फोल ठरेल याचा विचार सुज्ञानींच करावा. यावरून हा असा प्रकार जर ह्या चारशें वर्षांत घडला असेल तर शेवज्ञाच्या गणितास बरीच अशुद्धता आली असावी. असें म्हणणें वावगें होणार नाहीं. व म्हणूनच जो आज नव्या व जुन्या पंचांगांत फेर झालेला दृष्टीस पडतो त्याचें हें एक सबळ कारण होय असें आमचें मत आहे. यावरून दैवज्ञाचें ग्रहलाघव चुकीचें नसून खगोलांत झालेल्या फेरफारामुळेंच त्यांच्या गणितास भ्रष्टता आली असावी असें अनुमान करण्यास बरीच जागा आहे. अर्थात त्याच्या ग्रहलाघवावरून जीं पंचांगें बाहेर पडतात तीं निःसंशय अशुद्ध होत हें आमच्या सारख्या निर्णयसागरी पंचांगास कवटाळून बसलेल्या व्यक्तींनांही समजतें. पण प्रश्न राहिला व्यक्तीवर म्हणजे खऱ्याखोट्याकडे दृष्टी न देतां फक्त लोकमान्याचें पंचांग म्हणूनच तें शुद्ध असा लोकांस मानस होऊन जो तो टिळक सांप्रदायी. "हें पंचाग शुद्ध आहे हेंच पंचांग उपयोगांत आणावें व याच्याच वरचे मुहूर्त खरे." इ० जी ओरड करितात त्याच्या उलट जे टिळकांचे सांप्रदायी नाहींत ते "टिळकांचें पंचांग खोटें तें अशुद्ध' इ० बोलतात व हें त्याचें बोलणें वावगें होणार नाहीं असें वकृतदर्शनीं वाटल्यावांचून राहात नाहीं. कारण गणिताचा प्रश्न जर सांप्रदायांत विराजमान होऊं लागला तर प्रत्येकांच्या सांप्रदायांनीं आपापल्या गुरूंची आपापल्यापरी स्तुति करणें हेंच योग्य दिसतें व असाच प्रकार सांप्रत पंचांगासंबंधीं चालू आहे. व असाच खोटा सांप्रदाय व्यभिचार टाकून देइतावत चालू राहाणार असें दिसतें. ही मोठी खेदाची गोष्ट होय.

नवीन करणग्रंथ तरी अजून कां बाहेर पडत नाहीं ?

—सांखळी येथील 'सन्मित्र समाज' संस्थेनें गेल्या ता. १ जून [illegible] तेथील विद्याप्रिय सद्गृहस्थांच्या उदार आश्रयाखालीं दोन शिक्षकांची एक मराठी शाळा स्थापन केली असून तींत तूर्त ५० विद्यार्थी आहेत. या शाळेंत कांहीं नादार विद्यार्थी येण्याची व्यवस्था केली असून त्यानां पुस्तकें सुद्धां समाज आपल्या खर्चानें देणार आहे. याच समाजानें आज एक तपपर्यंत येथें एक मोफत वाचनालय चालविलेलें असून त्यांचा व या शाळेचा उपयोग ज्ञानार्जनाकडे होत आहे. परमेश्वर ही संस्था चिरायु करो व तीनें आरंभिलेलीं कार्यें यशस्वी होवोत !

—लिंकलन येथें एक बाई १०७ वर्षांचें आयुष्य उपभोगल्यावर परलोकवासी झाली.

que pode até passar sem creado, apesar de ser, alem de senhor e todo-o-poderoso das Novas Conquistas, incluindo o Condado de ... Canvorem, negociante, jornalista, advogado, ex-conselheiro ..., deturpador da verdade criador do *bolshevismo* etc. e tc etc.

Mas veja o leitor em que sentido foi feito o telegrama que fez perder tramontana ao divertido cronista *ultramarino* do C. L:

Ao Sr. Secretario Conselho Legislativo Nova-Goa

Vogal Conselho Sr. Subraia Dessai ordena-me comunicar VExia devidos efeitos inabilidade assistir sessão hoje motivo incomodos.

Palondicar

Secretario particular

Que mal ha nisso? Que mal...? Outro oficio, *sôr Brotero* que a sua *copiosa* capacidade não cabe, ainda, no *poligono* profissional em que ora se assental.. Sim?...

Para meditar...

Não há duvida que a classe hindú não est á devidamente preparada para independentemente se livrar dos ataques de seus inimigos disfarçados que ..dos conhecem mas que ninguem os aponta a dêdo...

Só os europeus é que, liberais e justos, como o são, de ordinario, podem salva-la como o tem feito sempre.

E é uma verdade incontestavel, porque se basêa em factos tambem incontestaveis.

Intrigas...

Parece que vivemos numa *era nova* de intrigas. Em toda a parte, intrigas por uma pa velha.

Mas; Que pretenderão os seus intrigantes autores?

Deturpar a verdade? Comprometer pessoas inocentes?

Nunca o conseguirão, tenham certesa, enquanto cá viverem os nobres, liberais e justiceiros europeus!

A Tribuna

A este importante jornal, mui acreditado orgao do grand Popular de Bardez agradecemos em nome dos oprimidos de Canvorem, a justiça que expontaneamente acaba de fazer-lhes, apreciando o folheto de *B. Velipo* que completara' a historia do sensacional caso, narrando a questao de propriedade que o motivou, com largas consideraçoes explicativas sobre o *primismo do nativismo.*

A *O Heraldo* e a "*Terra*, os *Velipos* agradecem, tambem, as boas intençoes.

भारत

गुरुवार जेष्ट शु. १४ शी १८४५

भगवंताचें अधिष्टान.

पाश्चात राष्ट्रांचें वैभव, सामर्थ्य आणि ऐश्वर्य हीं अवलोकन केलीं ह्मणजे कोणाहि हिंदी मनुष्यास आपला देश त्यांच्याच प्रमाणें वैभवशाली आणि सामर्थ्यवान व्हावा असें वाटणें साहजिकच आहे. राष्ट्र समर्थ असल्यावरच राष्ट्राला वैभव प्राप्त करून घेतां येतें. आणि राष्ट्राला वैभव प्राप्त झाल्यानंतरच राष्ट्र समर्थ राखतां येतें. पण या गोष्टी राष्ट्र स्वतंत्र झाल्यानंतरच्या आहेत. पाश्चात राष्ट्रें स्वतंत्र झालीं ह्मणूनच त्यानां आपलें वैभव आणि सामर्थ्य वाढविणें शक्य झालें. हिंदी लोक पारतंत्र्यांत खितपत पडलेले आहेत. त्यांचें राष्ट्र स्वतंत्र केव्हां होईल आणि तें स्वतंत्र होण्याकरतां त्यानां काय काय करावयाचें आहे हा आज त्यांच्या समोर प्रश्न आहे. स्वतंत्र होतील तेव्हांच मग आपलें राष्ट्र ते सामर्थ्यवान आणि वैभवशाली करून सोडतील. सध्या गोऱ्यांस मिळालेलें नावांचें स्वातंत्र्यहि उपयोगाचें नाहीं. ज्या राष्ट्रास स्वातंत्र्याचें सुख लाभून हि सुखाचें स्वातंत्र्य नाहीं, त्या राष्ट्राची गणना स्वतंत्र राष्ट्रांत करतां येईल काय? आह्मीं आज ताळतंत्र नसलेलें स्वातंत्र्य उपभोगीत आहोंत. 'करील त्याचा कारभार आणि मारील त्याची तरवार' अशा प्रकारचा अनुभव आह्मां दैवहीन स्वतंत्र नागरिकानां येत आहे! इकडच्या कांहीं वेमुर्वतखोर लोकांची दांडगाई पाहिली ह्मणजे स्वतंत्र्याची मर्यादाच कळत नाहीं! इकडच्या बेजबाबदार आणि आशाळभूत नामदारांचीं कृत्यें पाहिलीं ह्मणजे स्वातंत्र्याचा अर्थच समजत नाहीं! नाम धारण करण्याच्या पूर्वी हे सरकारला चांगला हात दाखवितील असें वाटतें. आणि नंतर! विचाऱ्या लोकाना ना मदार [मुख्य आधार] होऊन जातें. कोणत्याहि विकट परिस्थितीच्या वेळीं आमचा सगळा आधार हे. पण स्वतःचा खाजगी फायदा होत असल्यास गरीब जनतेला तोंडघशीं पाडण्यास ते सहसा कचरत नसतात. आज पहा. अगडबंब दगारवाढ, जबरदस्त कर लादणें वगैरे ह्यांच्या अनुमतीशिवाय होणें शक्य आहे काय? पुष्कळशा लोकांनीं अर्ध्यापोटीं रहावें आणि ठळक मंडळीनें त्यांचा बिचाऱ्यांचा पैसा घेऊन चैन उडवावी! अशा प्रकारच्या अन्यायाच्या गोष्टी ह्यांच्या मदतीशिवाय होत असतील काय? आमचे नामदार असल्या गोष्टीस अनुमोदन देतात ह्मणजे काय? स्वतंत्र जनतेचे हे प्रतिनिधी जनतेच्या स्वातंत्र्याला मान खालीं घालविण्यास कां लावतात? यावरून यांनां स्वातंत्र्याची योग्यता समजत नाहीं कीं, स्वातंत्र्याची गरज नाहीं? अशा प्रकारें स्वातंत्र्याची इभ्रत घालविणारे प्रतिनिधी ज्या राष्ट्रांत सुखानें नांदतात तें राष्ट्र स्वतंत्र कसलें? आह्मांला खऱ्या खुऱ्या स्वातंत्र्याची गरज आहे. आणि हें स्वातंत्र्य योग्य मोबदला दिल्याशिवायहि मिळणें केव्हांच शक्य नाहीं. जें राष्ट्र स्वतंत्र नाहीं तें मृतराष्ट्रच होय. मृतराष्ट्रांतील कोणत्याहि उत्तम प्रकारच्या गोष्टी केव्हांहि कमी दर्जाच्या ठरतात. आमची गिर्वाण भाषा आमचें तत्वज्ञान, आमची साधी आणि सरळ रहाणी पण उच्च प्रकारची विचारसरणी, आमचा सनातन धर्म वगैरेंचा आज योग्य आदर राखला जातो काय? नाहीं. कारण ह्या सगळ्या गोष्टी जीत लोकांच्या. नाहीं तर, जेते लोक पहा! त्यांचा वर्ण सुरेख. त्यांचा समाज पुढारलेला. त्यांचा धर्म अद्वितीय. त्यांची संस्कृति अप्रतीम. त्यांचें सगळें कांहीं दुसऱ्या कुणालाच बरोबरी न करतां येण्यासारखें. हिंदुस्थानांतील कोणत्याहि उत्तम प्रकारच्या वस्तुबद्दल ते कसें वेडेंवाकडें मत देत असतात! अजून ते अभिमानपूर्वक असें सांगतात कीं, जगांत त्याचा अवतार इतर राष्ट्रांवर राज्य करण्याकरतां! सत्तेच्या बळावर ते आज कांहींहि बरळत असले तरी तें आज त्यानां शोभत आहे. आतां एवढें खरें कीं, पाश्चात राष्ट्रें हीं जिवंत राष्ट्रें आहेत, ह्मणूनच सगळ्या जगावर त्यांची सत्ता चालत आहे.

राष्ट्रांत नांदणारी एकी हा राष्ट्राचा जीव होय. ती एकी मग कोणत्याहि भावनेच्या बळावर उभारलेली असो. पाश्चात लोकांच्या राष्ट्रीय भावनेविषयीं जितका आदरभाव आहे तितका त्यांचा देवाधर्माविषयीं सुद्धां नाहीं. त्यांची धार्मिक भावना इतकी कांहीं नाजूक असते कीं, ते पाहिजे तेव्हां पाहिजे त्या धार्मिक पंथांत घुसत असतात. आज थिआसोफी तर उद्यां ॲंडलॉ. आज कॅथलीक तर उद्यां प्रॉटेस्टंट. आज कँटचा अनुयायी तर उद्यां त्या बर्यंड निशेचा हे त्यांचे फरक तत्ववादाकरतां नसून समाजांतील रागरंग पाहून विशेषता संपादण्याकरतां. पण त्यांची राष्ट्रीय भावना मात्र फार तीव्र आणि जोरदार असते राष्ट्रीय भावनेच्या बळावरच त्यांची आज एकी नांदत आहे. हिंदुस्थानांतील लोकांची राष्ट्रीय भावना मात्र अगदींच कमी दर्जाची आहे. राष्ट्राचें दिल हिंदूंकडून मनोभावानें संभाळलें जात नाहीं आपल्या देशांत उत्पन्न होणाऱ्या वस्तूंवरच आपल्या गरजा भागवून घेणें आह्मांला समजत नाहीं. आपल्या कांहीं विशिष्ट चालीरीति किंवा देशांतील पद्धति कायम राखणें आपल्या हातून होत नाहीं. प्रत्येक राष्ट्राला स्वतःचा ह्मणून एक निराळा राष्ट्रधर्म असतो. त्या राष्ट्रधर्मानुसार राष्ट्राला आपलें आचरण ठेवावें लागतें. तसें आचरण न ठेवलें तर राष्ट्रांत जोम रहात नाहीं. आणि राष्ट्रांत जोम नसल्यावर पाहिजे त्यानें येऊन पाहिजे तें लुटावें. आज पहा. इंग्लंड, अमेरिका, चीन, जपान वगैरे राष्ट्रें आह्मांला निरर्थक वस्तु देऊन, आह्मांकडून अलोट पैसा नेत आहेत. हें आह्मीं जागत असतांहि आमच्यानें त्या वस्तूंचा मोह सोडवत नाहीं. लहान मुलांकरितां खेळणीं पाठवून हिंदुस्थानांतून ते लाखो पैसा नेत आहेत, नाना प्रकारच्या फेशनेबल वस्तु पाठवून इंग्लंड अमेरिका वगैरे कोट्यावधी पैसे लुटीत आहेत. कॅनेडा, आस्ट्रालीया वगैरे वसाहतींच्या ठिकाणीं हिदी लोकानां ते अगदीं वाईट रीतीनें वागवितात. कोणत्याच प्रकारचे हक्क देण्यास तयार नाहींत. पण आपलें वर्तन त्यांच्याकडे पहा. आपण त्यांच्या वस्तु फार फार उत्सुकतेनें घेतों. अमुक जातीच्या कपड्याचा पोषाख वापरणें सभ्यपणाचें. अमुक अमुक वस्तु नित्य अंगावर राखणें मोठेपणाचें. पण आमचा सभ्यपणा आणि मोठेपणा मँचेस्टरवाल्यांवरच अवलंबून आहे. उद्यां जर ते कपडे वगैरे पाठविण्याचें बंद करतील तर मग आमचा सभ्यपणा आणि मोठेपणा कांबळींत जाऊन दडून बसेल. महात्मा गांधीजीनी निरर्थक गोष्टींकरतां खर्च होऊन परदेशांत जाणारा पैसा इथेंच रहावा ह्मणून शिकस्त करून पाहिली, पण व्यर्थ! हें राष्ट्रधर्माच्या दृष्टीनें झालें. पण साधारण व्यवहारीक न्याय पहायाला गेलों तर ते जसे नजरनें आमच्याकडे पहातात त्याचप्रमाणें आम्ही त्यांच्याशीं वागायाला नको काय? पण आमचें अडतें इथेंच. आमच्यांत एकी नाहीं. आम्हीं सगळी लाज सोडलेली. नाहींतर पाश्चात् लोकांकडे पहा! ते लोक मनाचे इतके खंबीर कीं, त्यांची स्वतःची कितीही वाईट वस्तु असू दे. ती तीच विकत घेऊन जास्ती सुधारण्याच्या खटपटीस लागतील. आमचें तसें नाहीं. आह्मांला खादी फार नाजूक आणि बारीक पाहिजे आहे. हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या वस्तु जर स्वस्त आणि देखण्या असतील तरच आम्हीं विकत घेऊं! हिंदुस्थानांत तयार होणारा जाडाभरडा कपडा जर आम्हीं आज वापरूं तरच आम्हाला तो खपल्यानंतर जास्ती चागला तयार करून वापरावयास मिळेल. हिंदुस्थानांत उत्पन्न होणाऱ्या वस्तूंवरच आम्हीहि निर्वाह करण्याचें जर आम्हीं ठरवूं तरच नवीन नवीन चांगल्या चांगल्या वस्तु येथें निर्माण होतील. न समजल्या मुळेंच हें आमचें असें झालें. असें जर तुम्हांला आज कळून चुकलें आहे तर पुढें तरी शहाणपणानें वागा. हिंदी लोकानां! तुमच्या राष्ट्रानें उच्च स्थान पटकावावें असें तुम्हांला वाटत आहेना? तुम्हांला स्वातंत्र्याच्या सुखांत डुलत रहावें असें वाटतें ना? मोठ्या मोठ्या पुढारलेल्या राष्ट्रांशीं बरोबरीनें रहावें अ

—मुंबईचे सुप्रसिद्ध विद्याप्रिय, श्री शांतारम नारायण दाभोळकर ह्यानीं, गेल्या अक्षय तृतियेच्या सुमूहुर्तावर, सांखळी येथील श्रीदत्तवाडींत स्थापन केलेली वेदपाठशाळा अवघी २० दिवस चालून, सध्या शिक्षकाच्या आभावीं बंद आहे.

—शिक्षणखात्यांत नवीन कामदारांची भर घालण्यांत आली आहे.

—डॉ. बोरकर (आत्माराम गोविंद) यांची पणजीच्या आरोग्यखात्याचे सुब-देलेगाद् या जागीं नेमणूक होणार आहे.

—कोलेजु नासियोनाल ही पणजीची संस्था सुरू झाली असून तिच्या मुख्याध्यापकाचें काम प्रो. रा. श्री. पै हे करीत आहेत. या संस्थेंत भालचंद्र सरदेसाई, यशवंत कामत, उपेंद्र कामत इ. तरुण, शिक्षकाचें कार्य उत्तमं रीतीनें पार पाडीत आहेत.

साभार स्वीकार.

शांतिनिकेतन माला [पुस्तक]:— कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांच्या अमोलिक तत्वांचा फैलाव करण्याच्या उदात्त हेतूनें ही माला सुरू झाली आहे. मालेचें. पहिलें पुस्तक वाचनीय असून संग्राह्य आहे. प्रो. शांतिनिकेतन माला, पुणें, येथें हें पुस्तक मिळेल.

रिपोर्ट:—धी गोवा हिंदु आसोसिएशन या मुंबईतील आमच्या बंधूंनीं स्थापन केलेल्या नामांकित संस्थेचा रिपोर्ट आह्मांस भेटीदाखल आला आहे. त्यावरून या संस्थेची भरभराट होत आहे, असें दिसून फार समाधान वाटतें.

ANUNCIOS

E, todavia, tudo está na mesma: lama, cavoucos, pedregulhos e charcos.

Os conselheiros estão ocupados na acalorada discussão de varios projectos de criações e extincções. O erario publico acusa um *deficit* medonho.

Pelos modos, já não há maneira de se concertarem as referidas movimentadas estradas abandonadas ao *Deus dará*, como não há maneira de se pôr em ordem *este lindo jardim á beira-mar plantado* onde se vê implantado o regime de desordem...politica e financeira.

Causa lastima *ver* e *crer* tudo isso, a caminho duma autentica desorganização...

O Anglo-Lusitano

Entrou no 38.° ano este nosso presado colega de Bombaim que está prestando relevantes serviços aos milhares de nossos patricios que mourejam na India Britanica, não dedicando menos cuidado aos palpitantes interesses da India Portuguesa.

Por este feliz evento, ao brilhante colega nossas calorosas felicitações.

Hospicio e caridade

Do Hospicio só devia dimanar caridade. Parece que para isso ele foi instituido.

Pelo que porem, a gente está observando, de certo tempo para cá, persuade-se ela de que o Hospicio foi fundado para, quem puder, tirar o melhor partido das suas finanças em proveito proprio sob diferentes aspectos...morais.

Hospicio já não significa caridade: Hospicio quere dizer um antro donde só brota politiquice ignobil, campanhas pessoais, insultos mutuos, *dize tu direi eu* das visinhas rabugentas...

Não há duvida que há gente que sabe tirar lucros em seu prol ainda das côdias do pão dos desgraçados...

Ter-se-há implantado *bolshevismo* no Hospicio?

Comandos militares

No "Diz-se" do *Diario da Noite* lêmos que iam ser restabelecidos comandos militares em Sanguem e Canacona. Não seria mau se neste conselho de Quepem fosse igualmente estabelecida a mesma especie de comando, se é que recairão sempre as nomeações de administradores em individuos pertencentes á classe do *primismo* do *nativismo*, esse mesmo que foi capaz de engendrar *bolshevismos*, *sedições* e *revoltas* em Canvorem.

Primismo do nativismo? Preferimos tudo a êste perigoso mal. E parece-nos que toda a gente de bem há de estar connosco neste particular assunto.

Tanto mais que foi o *primismo* do *nativismo* que provocou *o 21de Setembro*; foi ele que incomodou a gente indefesa de Molcornem; foi ele que implantou a escravatura nas Novas Conquistas; foi ele finalmente, que inoculou o *virús* demandista nos antigos hindús.

O caso de Canvorem é a prova mais recente de toda a gente de bem se revolucionar contra o detestavel *primismo* do *nativismo*, criador do bolshevismo, tecedor de intrigas e propalador das mais abjectas mentiras.

A Cesar...

O Bharat dá cabida nas suas colunas a todas as opiniões, ainda que com elas se não conforme, excepto as que não vem firmadas. Estas pertencem ao seu corpo redactorial.

भा र त

गुरुवार आषाढ, शु. ६ शके १८४४

आमच्या शिक्षणाची दैना

गोमांतकांत सद्या मजुरवर्गाचा तुटवडा फारच झालेला आहे. या तुटवड्याचें कारण शिक्षण हें आहे असें आपलें ठाम मत बनवून सार्वजनिक शिक्षणाला विरोध अर्थात्च निष्क्रीय किंवा नुसता वाचिक करणारी कांहीं मंडळी अजूनहि आहे. त्यांचें म्हणणें साफ खोटें आहे असें नाहीं. पण त्यांच्या मतांत एक मोठी चूकहि आहे. सूर्य उगवण्यापूर्वी नेहमीच कोंबडा आरवलेला पाहून सूर्योदय हें कुक्कटरवाचेंच कार्य आहे अशी एकाद्या, कार्य कारण भावाची नीट छाननी करतां येत नसलेल्या म्हातारीनें समजूत करुन घेतली तर तिला फारसा दोष देतां यावयाचा नाहीं. तद्वतच मजूरवर्गाच्या कमतराईच्या मूळाशीं शिक्षण प्रसार असल्याची ज्यांची समजूत आहे त्यांनांहि फारसा दोष देतां येणार नाहीं. कारण त्यांची अशी समजूत होण्यास आमचें सद्याचें शिक्षणच कारणीभूत झालें आहे यांत शंका नाहीं.

'सद्याचें शिक्षण' व या शब्दाचा खरा अर्थ यांत जमीन अस्मानाचा फरक आहे ही एक गोष्ट लक्ष्यांत घेतली पाहिजे. शिक्षण विरोधकांच्या मतांत एक चूक आहे असें आम्हीं ह्मटलें ती चूकहि हा फरक लक्ष्यात न घेतल्यामुळेंच उदभवणारी आहे अर्थात्च निरपेक्ष अर्थानें योजलेल्या शिक्षणाविरुद्ध कोणीहि असूं शकणार नाहींत. कारण त्याच्याशिवाय व्यक्तीला किंवा राष्ट्राला काय सद्गती लाभावयाचीच नाहीं. ही गोष्ट आज सिद्धांत स्वरूपाला पोंचलेली आहे.

शिक्षण या विषयाची चर्चा सांगोपांग करण्याची गोमांतकांत किती हि गरज असली तरी अ ति [illegible]की सवड नाहीं. सबब या विषयांत जे सिद्धांत ठाम झालेले आहेत ते घेऊनच त्याच्याशीं आमच्या शिक्षणाची तुलना करण्याचें व तेंहि थोडक्यांत योजिले आहे. सर्व शिक्षणाचा मुख्य हेतु हा आहे कीं, तें ज्यानें कमावलें त्याला आपलीं ऐहिक व पारलौकिक कर्तव्यें उत्तम प्रकारें पार पाडतां आलीं पाहिजेत. व्यवहारांत त्याला "लाथ मारीन तेथें पाणी काढीन" अशी धमक आली पाहिजे. पण इतक्यानें ह्मणजे आपला व आपल्या गोतावळ्याचा चरितार्थ उत्तम रीतीनें चालवतां आल्यानें मात्र भागावयाचें नाहीं. तर सद्याच्या कालांत ज्यानां उच्च भावना ह्मणतात त्या—उदाहरणार्थ स्वदेशप्रिति परोपकार इ.—त्याच्या अंतःकरणांत उदीत झाल्या पाहिजेत. पण खऱ्या सुशिक्षिताचें लक्षण इतक्यानेंही संपत नाहीं. तर 'नित्य व्यवहारांत निरुपयोगी किंवा अनावश्यक भासणाऱ्या पण अंततर [illegible] संतोष देणाऱ्या अशा काव्य, शास्त्रें, अध्यात्म इ. विषय यांचाहि सतत अभ्यास ठेवण्याची त्याला तीव्र जिज्ञासा असली पाहिजे. सरस्वतीची सेवा निरपेक्षच असावी. तिच्यापासून फायदा काय? असा प्रश्नहि मनांत उभा राहूं नये. पण आह्मीं ही गोष्ट इतक्या आग्रहानें सांगूं इच्छित नाहीं. आमचें ह्मणणें इतकेंच कीं, कदाचित भाग ह्मणून सरस्वतीची सापेक्ष सेवा आपण करावीच पण त्याबरोबरच निरपेक्ष सेवा करण्याचाहि निदिध्यास लागून रहावा. सरस्वतीला निवळ उदरंभरण करण्यास लावून तिची शुद्ध विटंबना करूं नये.

वर दिलेला शिक्षणाचा हेतु व सुशिक्षितांचें लक्षण हीं मान्य असणाऱ्यांनीं आतां आमच्या शिक्षणाकडे—विशेषतः दुय्यम शिक्षणाकडे नजर द्यावी. ह्मणजे त्याची कशी दैनावस्था झाली आहे हें त्यानां सहज दिसून येईल.

—येत्या आषाढी एकादशीस कुंकळी येथें होणाऱ्या भजनी सप्ताहास सर्व भाविकांनी हजर राहावें अशी उत्सवाचे सेक्रेटरी रा. राणू विष्णुदास केणी हे विनंती करितात.

—मुरगांव–हार्बर येथील जेठी मराठी शाळेंतील बक्षिस समारंभाची हकीगत येत्या अंकीं सविस्तर प्रसिद्ध होईल.

—सांगें व काणकोण येथें पुनश्च कोमांद मिलितार प्रस्थापन होणार आहेत असें म्हणतात.

आश्रयदात्यांस—गेल्या अंकापासून व्ही. पी. करण्यास सुरवात केली आहे. स्वीकार करून आभारांत ठेवावें, अशी विनंति आहे.

म. भारत.

स्फुट विचार

ओस्पिसेंतील खेळखंडोबाः—जुगाराचें स्वरूप असलेला एक व्यवसाय अनेक लोकांच्या अंगीं भिनवण्याचा सफळ प्रयत्न करणाऱ्या दोन संस्था आमच्या या गोव्यांत आज बऱ्याच भरभराटीला आलेल्या आहेत. या दोन संस्था ह्मणजे ओस्पिस व मिजरीकोर्द या होत. या दोन्ही पुर्तुगेज शब्दांचा अर्थ 'दया' असा असून त्यांच्या नावांप्रमाणेंच त्यांच्याकडून कार्य व्हावें अशी मूळ संस्थापकांची अर्थात्च इच्छा होती. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, त्या दोन्ही संस्थाकडून गरिबांवर दया करण्याचें पुण्य कार्य होणें तर दूरच राहून उलट अनेक आशाळभूत गरिबांस अधिक गरीब करण्याचें पापकर्म मात्र त्यांच्याकडून अप्रतिहतपणें चाललें आहे. परंतु यांच्याहीपेक्षां विशेष उद्वेगकारक गोष्ट ह्मटली म्हणजे कुंपणानेंच शेत खाण्याची होय. मिजेरकोर्दीच्या अनेक कमिट्यांवर अनेक वेळीं सिंदिकाशी झाल्याचें सर्वांस माहित आहेत. आणि आतां ओस्पिसेचे अध्यक्ष सिं. ब्राज व एक माजी कारकून सिं. बान्देत शाव्हियर यांनीं ४०|५० हजारांवर डल्ला मारल्याचें एकमेकांवर जाहीर आरोप करूं लागले आहेत. यावरून असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं कीं, या दोघांनींही ओस्पिसेला चांगलाच हात दाखवला असला पाहिजे. ही गरीबांची दया कीं आत्मारामावर कृपा! गरिबांनो, तुम्हीं आशेच्या नादीं लागून सोरतीच्या रूपानें कोणाचें घर भरतां याचा विचार करा व नंतर सोरती काढा!

गोव्यांतील पोर्तुगेज पत्रेंः—प्रजेच्या हितसंबंधाचें रक्षण करणें, लोकमत तयार करणें व तें सरकारच्या कानावर घालून राज्यकारभारांत इष्ट फरक घडवून आणणें अशा त्रिविध रूपाचें कार्य बजावण्याकरितां राजकीय वृत्त पत्रांचा जन्म असतो. पण आमच्या प्रांतांतील राजकीय चर्चेस वाहून घेतल्याची प्रौढी मारणाऱ्याहि कित्येक पत्रांतून त्यांच्या संपादकांच्या अगर हितसंबंधीं यांच्या खाजगी गोष्टींचीहि चर्चा राजरोसपणें चाललेली पाहून असे उद्गार सहजच निघतात कीं हीं पत्रें नसतीं तर आमचें काय बिघडलें असतें! आणि खरोखरच, एखाद्या मुलीचें लग्न झालें तर तिचें bem prendada filha. एखादा सोमाजी गोमाजी मेला तर त्याचें, a sua lacuna e' impreenchivel एखाद्यानें परीक्षा दिली व पास झाला तर त्याचें inteligentissimo इत्यादि अगदीं कायम ठशाच्या शब्दांनीं अभिनंदन करण्यापलीकडे आणि फार तर रूटरचे टेलिग्राम, सरकारची सरोस वकिली व एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या प्रसिद्धीस आणणारीं वृत्तपत्रें नसलीं तर वाईट तें काय? परंतु उच्च ध्येयशुन्य लोकांकडून योग्य प्रकारच्या वृत्तपत्रांची अपेक्षा तरी काय करावी?

मनानीं परिपूर्ण भरलेलीं होतीं त्यामुळें त्या ठिकाणीं कोणीहि अविकासित जीव गेला कीं तें ईश्वरीसामर्थ्य, वैचि यें, व निस्तब्धता, अवलोकन करून कांहीं वेळ तरी तो स्वच्छ प्रकाशमय अशा वातावरणांत जाऊन विश्रांति पावून नव्या ताज्या दमानें पुन्हां आपलें प्राप्त कर्तव्य पार पाडण्यास उत्सुक असें सामर्थ्य घेऊन येत असे. याचा अनुभव इकडच्या पर्वतांतील सप्तशृंग [,वणी] भीमाशंकर, ओंकारेश्वर, व हिमालयांतील, केदार, बद्रिकाश्रम, अमरनाथ, मुक्तिनाथ, रेवाळेश्वर इत्यादि क्षेत्रीं अजूनही कोणी प्रत्यक्ष जाऊन अनुभव घेतल्यास त्यांस साक्ष पटेल, अशा विविक्तस्थानीं साधकांचें मनोन्मन होण्यास बरीच मदत होते व विषयी पुरुषांचें विषयांपासून चित्त हटूंन ईश्वराकडे वळण्यास जें मूळ वैराग्य पाहिजे तें उत्पन्न होण्याचा बराच संभव असतो हा एक फायदा. पूर्व कालामध्यें अशा अनुपमेय ठिकाणी विशेषें करून महात्मे लोक राहत असतात त्यांचा परिचय होऊन आपलें चित्तावरचें अविद्येचें पटल दूर होत असे हा दुसरा फायदा. पायीं प्रवास केल्यानें निरनिराळ्या देशांतील निरनिराळ्या परिस्थितीचे अनुभव प्राप्त होऊन मनुष्य उदात्त बनतो. ठिकठिकाणच्या ब्रह्मवृंदाच्या गांठी होऊन तत्वचिंतनास बरीच मदत मिळते. कधीं उत्तम सुग्रास भोजन तर कधीं कोरडी भाकरी अशा रीतीनें जशी वेळ पडेल त्या प्रमाणें वागण्याची सवय आणि शैली उत्पन्न होते. मानापमानाचें गोवें। अवघें गुंडूनी ठेवावें–इत्यादि संतवाणी केवळ शब्दपांडित्यापुरतीच उपयोगांत आणून त्या वाणीचा जो शाप घ्यावयाचा तो उलट या तीर्थयात्रेमुळें सहजच तिचा साक्षात्कार होतो. अतिताभ्यागताचे कष्ट प्रत्यक्षावलोकनानें माहीत झाल्यामुळें दयेचें महत्व जें भूतांचें पालनत्याची योग्य साक्ष पटते. शिवाय तीर्थावरील स्नान, दान व संतसमागम या योगें चित्त पावन होऊन ही तीर्थवासी मंडळी गृहस्थ असतील तर सच्चे गृहस्थ, ब्रह्मचारी असतील तर खरे ब्रह्मोपासक, व संन्यासी असतील तर ज्ञानपरिपाक योग्य शांतचित्त, उदारमनस्क सर्वद्वंद्वविनिर्मुक्त, संगत्यागी, हर्षशोकविरहित–व सत्योपदेशक बनून आनंदीं निमग्न होत्साते परिव्रत स्थितींत इतस्ततः निर्वैर भ्रमण करूं शकतात इत्यादि तिसरा फायदा. तीर्थयात्रेच्या मिषानें आपल्या भारताचें [जन्मभूमीचें] राष्ट्रीयदृष्ट्या सहजच निरीक्षण होतें. हा चैाथा फायदा इत्यादि जे थोडक्यात फायदे सांगितले त्यावरून भारताचे तज्ञ वाचक यांतील मर्म सहज ध्यानीं घेतील. यापेक्षां तीर्थयात्रेचें महत्व पुष्कळच आहे त्याचे वर्णन या लहानशा लेखांत साग्र करणें शक्य नाहीं.

तूर्त अग्नि-थादि साधनें उपलब्ध झाल्यामुळें तें पूर्वीचें महत्व जाऊन आतां रेल्वे व तीर्थीचे पंडे [पुजारी] यांची मात्र पोळी पिकली आहे. तूर्तच्या परिस्थितींतील केवळ सूक्ष्म दृष्टीनें देश निरिक्षण करणें हाच जर फिरण्याचा हेतू असेल, तर उत्तमच. परंतु जर करितां मूळची धार्मिक दृष्टी असेल तर व्यवस्थित विचाराच्या मनुष्याशिवाय केवळ भावड्या भोळ्यालोकांचे पदरांत धर्माधक्याशिवाय विशेष कांहीं पडेल असें आम्हांस वाटत नाहीं. तथापि थोडेसें मनाचें समाधान होणें शक्य आहे. आचार धर्मामध्यें परिस्थितीचे अनुसार थोडा बदल झाला तरी मूळच्या रम्य तत्वाचें रक्षण करणें हें धर्मवान लोकांचें कर्तव्य आहे. धर्माचें रक्षण आपण केलें तर तोही आपलें रक्षण करील. या न्यायानें आपण आपल्या धर्माचा अभिमान धरिला पाहिजे. व खोटें जें तें सोडून खरें घेतलें पाहिजे. निदान सत्याकरितां आपण झीज सोसिली पाहिजे. प्रसंगीं प्राणही खर्ची घालणें अवश्य झाल्यास तयार असलें पाहिजे. नेम, धर्म, सदाचार, तप, ज्ञान, यज्ञ, जप दान, इत्यादीचें रक्षण केलें पाहिजे. असें असतां गोमांतकांतील कांहीं धर्माभिमानी लोक जे अनेक प्रवासाचें व खर्चाचे त्रास सोसून श्रीभागिरथीसारखें पवित्र शुद्ध गंगोदक आणण्याकरितां श्री क्षेत्र हरिद्वार, प्रयाग, काशी, इत्यादि ठिकाणीं जातात त्यांचें तें पावन तीर्थोदक कॉलेम [कुळें] येथें रस्त्यावर फेकलें जातें अशी पुष्कळ यात्रेकरूंची तक्रार आहे. कांहीं यात्रेकरूंची इच्छा तें गंगोदक श्री रामेश्वर क्षेत्रीं अर्पण करण्याची असते प्रयागाहून श्री गंगाजीचें जल भरून श्री रामेश्वर क्षेत्रीं तें अर्पण केल्याशिवाय ती काशीयात्रा संपूर्ण होत नाहीं. अशी भाविक लोकांची साधारण समजूत आहे. व ही तक्रार धर्मदृष्ट्या महत्वाची असून इकडे सरकारनें दुर्लक्ष केल्यास पुढे मागें या गोष्टींस जास्ती महत्व येण्याचा संभव आहे. यामुळें भक्तजनांचे हृदय शतशः विदीर्ण होतें. इकडे गोमांतकांतील पुढाऱ्यांचें वेळींच लक्ष वेधावें अशी आमची नम्र विनंति आहे श्री भागिरथीचे उदकामध्यें 'जें उदक गंगोत्री, प्रयाग, हरिद्वार, अथवा हृशीकेश, वगैरे ठिकाणाहून भरलें जातें' त्यांत विषारी जंतू मुळींच असूं शकत नाहींत. याबद्दल आमची खात्री आहे. शिवाय जंतू शास्त्राचा हा वाढत जाणारा खेळखंडोबा जर करितां आमच्या धर्मावर हल्ला करूं लागला तर त्याचा अतिरेक तावडतोब बंद केला जाणें अवश्य आहे. कारण अशा रीतीनें फाजिल जीवितासक्ति वाढून पती पत्निला, आई पोटचे मुलाला, मुलगा आईला सुद्धां प्रसंगीं उपयोगी पडणार नाहीं. मग हें जीवित म्हणजे पशूपेक्षां ही अत्यंत कमी दर्जाचें ठरेल व गोव्याच्या हद्दींत येतानां कपडे जसे वाफवितात त्याप्रमाणें मनुष्यालाही वाफरून काढणें या जंतू शास्त्रामुळें एकादेवेळीं–भागयेण्याचा संभव आहे म्हणजे कुळयाचे स्टेशनावर एक खुळ्यांचेच बंड होऊन हास्यास्पद होणार नाहीं काय?

पूर्णाश्रम.

Na liça ... ate morrer

Um singelo preito ...

Nao ha' muito que um apo's outro seguiram a longingua viagem tres homens que em vida usaram o nome de Caraciolo de Sa', F. Jose' da Gama Botelho e Bra's Antonio de Sa'. Este facto, que ao principio nos parece nao ter importancia, encerra todavia uma grande Verdade. Estes tres que tombaram, quais robles frondosos eram tres pilares sobre que se assentava o edificio suntuoso da Jurisprudencia no Concelho de Bardez. Conicidencia singular: Todos tres ja' entrados em anos, todos tres advogados, todos tres exercendo a advogacia como uma mera distraçao espiritual.

Caraciolo de Sa', homem probo, honesto, bom. Caracter diamantino. De vasto saber, de grande experiencia da vida.

Em todas as situaçoes que ocupou em todos os cargos que durante longos anos exerceu, sempre a sua honestidade brilhou e brilhara' eterna... Nos ultimos tempos da sua vida, vergado pelo peso dos anos, foi eleito, por consenso unanime do povo, para o lugar do seu representante no C. do Governo. Aqui a sua figura aparece um tanto nimbada.

E' que a velhice ataca mais as rugas do espirito que as do rosto. E' que por mais fecunndas e peregrinas que sejam as faculdades intelectuais de um homem sempre que ele chega ao extremo da sua carreira na terra, elas se tornam esmorecidas, frageis...

F. J. de Gama Botelho, inteligente, afa'vel no trato, de um porte encantador, foi nos tempos da sua mocidade uma figura que se impunha, uma individualidade marcante. Exerceu, com comprovada competencia, va'rias comissoes de serviço. Foi igualmente vogal eleito do C. do Governo pelas Comunidades...

E ha' dias o espirito de Bra's Antonio de Sa' acaba de imergir na misteriosa obscuridade infinita, onde a inteligencia do homem surge por um momento, scintila numa palpitaçao luminosa e desaparece, oculta-se para sempre...

Terra pequena como e' esta, mas nao houve ninguem que o desconhecesse. Os reverberos do seu talento, as irradiçoes do seu espirito, a vivacidade e a elegancia da sua pena reboaram pelos quatro cantos do paiz...

Era uma autoridade incontestavel e incontestada nos assuntos juridicos... Sempre o seu conselho foi acatado, foi recto, foi justo.

E o prantear sincero de todos que presamos de ser indo-portugues e' sem duvida *"a anarquia da dor protestando contra o despotismo da morte"*

So' o irremediavel da morte nos faz sentir o desaparecimento, a falta, de certas figuras mesma daquelas que voluntariamente se exilaram ou apagaram em vida, como sucedera a estes ingentes vultos nos ultimos anos da sua vida.

E perante estes curpos enrigelados pela morte todo o indo-portugues e em especial o povo bardezano, deve jurar, guardar bem oculto, e impereci-vel no sacrario da sua grande alma o nome destes mortos.

E no's nao pretendendo traçar-lhes as biografias, para o qual falta-nos por absoluto a competencia, rabiscamos estas toscas linhas so'mente com o intuito de render as suas memorias o nosso mais sincero e modesto tributo...

Alirio

भा र त

गुरुवार आषाढ, शु. १३ शी १८४५

आमचें कर्तव्य.

लेखांक १

—ज्याची वर्तमान स्थिति अत्यंत खेदजनक आहे, आणि ज्याचें नजिकचें भविष्य आशाजनक नाहीं, अशा प्रकारचा जगामध्यें फक्त आपलाच देश आहे. ह्मणून आपल्या देशांतील तरुणांनीं आपल्या मातृभूमीकरतां, कोणत्याही देशांतील तरुणापेक्षां विशेष स्वार्थत्याग केला पाहिजे.

—प. वा. नामदार गोखले.

जगामधील सर्व राष्ट्रांमध्यें पुढें पुढें येण्याची धडपड चाललेली आहे. पाश्चात्य लोक आपला देश व समाज यांविषयींचीं कर्तव्यें योग्य रीतीनें बजावीत असून, आपल्या देशाचें स्वातंत्र्य कायम राखण्याकरितां, स्वार्थत्यागपूर्वक अविश्रांत काम करीत आहेत. अमेरिकेंतील निग्रो लोकसुद्धां योग्य कर्तव्य करून जगांत पुढें येत आहेत.

आमचे ब्रिटिश हिंदुस्थानांतील बांधव, ज्यांशीं आमचे संबंध बहुतेक बाबतींत निगडीत झालेले आहेत ते-जारीनें स्वार्थत्यागपूर्वक आपलें कर्तव्य बजावीत असून आपल्या देशाला उन्नतावस्थेप्रत नेत आहेत. हजारों लोकांनीं आपल्या घरादारांवर तिलांजली देऊन देशकार्यार्थ वाहून घेतलें आहे. तसेंच किती तरी तरुणांनीं समाजसेवा संस्था काढून तनमनधन तत्कार्यार्थ अर्पण केलेलें दिसत आहे, आणि यामुळेंच, त्यांचा भविष्यकाल उज्वल होण्याचा फार संभव आहे, यांत बिलकूल शंका नाहीं.

पण, आपला गोमांतक देश फार कालापासून पारतंत्र्यांत अडकल्यामुळें लोकांना स्वकर्तव्याचा विसर पडत चाललेला आहे. त्यांत आपला हिंदुसमाज तर अत्यंत अवनत स्थितींत आहे. पूर्वजांनीं मिळवून ठेविलेल्या इस्टेटीवर खाऊन पिऊन स्वस्थ चैनमारावी, एकादी नोकरी किंवा धंदा करून पोट भरावें, यापेक्षां आपल्या देशाकरितां करावयाचें कांहीं तरी श्रेष्ट कर्तव्य आहे, ही भावनाच नष्ट झालेली आहे. आह्मां हिंदु लोकांच्या आंगीं स्वाभिमान नाहीं, स्वार्थत्याग करण्याची इच्छा नाहीं, देशाकरितां, तसेंच समाजाकरितां वाहून घेण्याची तयारी नाहीं, यामुळें चार चौघांनीं मिळून चालविलेली व मतभेद नसलेली अशी संस्था दिसत नाहीं. जिकडे पाहावें तिकडे पक्षभेद, मतभेद दृष्टीस पडतात. प्रस्तुत कालीं खऱ्या लोकोपयुक्त अशा संस्थानां देणग्या देण्याची लोकांची प्रवृत्ति नसून, त्यांजकडून अपात्रीं व क्वचित् कुपात्रींही दान होत आहे. बोलक्या माणसांचा सुकाळ झाला आहे, परंतु कर्तृत्ववान माणसें नाहींतच असें ह्मटल्यास अतिशयोक्ती होणार नाहीं. एखादी संस्था काढून थोडे दिवस होतात न होतात तोंच सभासदांचा उत्साह मावळूं लागतो. कांहीं संस्थांमध्यें तीव्र मतभेदास सुरुवात होऊन सर्वच बाजार आटोपतो.

स्वामी विवेकानंदांनीं एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, कोणत्याही देशाची किती उन्नति झाली आहे हें पहाण्यास त्या देशांमधील लोकांनीं चालविलेल्या दैनिक वर्तमानपत्रांची संख्या पाहावी. ह्या दृष्टीनें पाहूं गेल्यास आह्मां हिंदु लोकांचें एकसुद्धां दैनिक वर्तमानपत्र नाहीं, यावरून आह्मीं हिंदु लोक किती अवनत स्थितीमध्यें आहों, याची कल्पना होईल.

त्यांतल्या त्यांत थोडी आनंदाची गोष्ट ही कीं, हिंदुस्थानांतील-विशेषतः महाराष्ट्रांतील चळवळीचा परिणाम आह्मां गोमांतकीय हिंदु लोकांवर झाल्यानें, आपणही आपल्या देशाकरितां कांहीं तरी केलें पाहिजे. याची जाणीव आह्मांमध्यें होऊं लागली आहे, आणि त्याप्रमाणें कांहीं संस्था निघून आपलें कर्तव्य बजावीत आहेत, परंतु हें काम इतकें रेंगाळत व अल्प प्रमाणांत चाललें आहे कीं, त्यावरूनही आमच्या निकृष्टावस्थेची बरोबर कल्पना येईल.

अशा वेळीं पाश्चात्य लोक तसेच हिंदुस्थानांतील लोक आपल्या देशाकरितां कसा स्वार्थत्याग करीत आहेत; त्यांचे समाजसेवेचे प्रयत्न कमकसे होत आहेत, तिकडील लोकांत उपयुक्त संस्थांनां देणग्या देण्याची प्रवृत्ति कशी आहे, एकंदरींत ते लोक आपल्या देशाच्या उन्नतीकरितां, कसकसे प्रयत्न करीत आहेत, त्यांचीं उदाहरणें आपल्या डोळ्यांसमोर आणून त्याचें पुनःपुन्हां मनन केल्यास, आपल्या कार्यास विशेष चालन मिळून, त्याला एक प्रकारचा जोर येईल म्हणून अशा प्रकारची माहिती देऊन आपण आपल्या ह्या प्रिय गोमांतकाकरितां, काय केलें पाहिजे, याचें थोडें दिग्दर्शन या लेखांत करण्याचें योजिलें आहे. उदाहरणें जरी बहूतेक वाचकांच्या वाचण्यांत आलेलीं असलीं तरी वारंवार आपल्या दृष्टीसमोर आल्यास, त्यापासून तोटा न होतां उलट फायदाच होईल.

देशसेवा करण्यास सरसावलेल्या प्रत्येक माणसाच्या अंगीं जरूर असणारे गुण ह्मटले म्हणजे, जाज्वल्य देशाभिमान, स्वार्थत्याग, लोकोत्तर कर्तव्य निष्ठा, समाजसेवाविषयक प्रेम, आणि शिस्त हे होत. आपल्या देशाकरितां काय वाटेल तें करूं, पण देशकार्यापासून च्युत होणार नाहीं, ही भावना जागृत असली पाहिजे.

पाश्चात्य लोकांत असे गुण असल्यामुळेंच, तीं राष्ट्रें स्वतःचीं राज्यें चालवून, शिवाय दुसऱ्यांवरही राज्यें करीत आहेत. देशाकरितां होणारा त्यांचा स्वार्थत्याग लोकोत्तर असल्यानें हे लोक आपल्या सर्वस्वावर पाणी सोडतील, परंतु स्वातंत्र्य गमावणार नाहींत. तसेंच समाजसेवेचें त्यांचें प्रेम अलोट आहे. प्रत्येक राष्ट्रामध्यें भूतदयाप्रेरित कामें त्यांनीं केलेलीं आहेत. त्यांची कर्तव्य-निष्ठा जाज्वल्य आहे. अशा प्रकारचीं उदाहरणें निरंतर डोळयांपुढें ठेवूनच, आपण कामास लागलें पाहिजे; ह्मणजेच आपला देश उच्च पदाला पोंहोंचणार आहे.

प्रथमतः पाश्चात्य देशांत, देशाकरितां व समाजाकरितां कसकसे प्रयत्न होत आहेत हें पाहूं! या बाबतींत सुप्रसिद्ध लेखक सेंट निहालसिंग यांचें 'युद्ध आणि ब्रिटिश जातीची लायकी' या विषयावरील लेख वाचनीय आहेत. महा-युद्धांत जय मिळविण्याकरितां, इंग्लंडमधील, मजुरांपासून श्रीमंतांपर्यंत सर्व लोकांनीं आपली चैन वगैरे सोडून देऊन, आपल्या देशाचें स्वातंत्र्य कायम राखण्याकरितां कमालीचा स्वार्थत्याग केला. युद्धास सुरुवात झाल्याबरोबर मताभिलाषी बायांनीं फर्मान काढून आपली चळवळ बंद ठेवली. कारण कीं, या अंतस्थ चळवळीपासून सरकारला त्रास पोहोंचून, युद्धकार्यांत कमतरता पडूं नये. कांहीं बायांनी तर सरकारास जरूर ती मदतही केली. राष्ट्रकार्याकरितां आपले स्वार्थी आचारविचार बाजूस ठेवून सर्वस्व अर्पण करणाऱ्या या लोकांपासून आपण पुष्कळ शिकण्यासारखें आहे.

सेंट निहालसिंग ह्मणतात:—मी या बाबतींत प्रत्यक्ष पाहिलेलें उदाहरण देत आहें. एक मनुष्य बायस्कोप खेळांत विदूषकाचें काम करीत असे. त्याचें मूळचें नांव इव्हांस असें असून हास्यरसोत्पादक कामें फारच उत्कृष्ट करीत असल्यानें लोक त्याला 'पिवळ' असें विनोदानें ह्मणत. युद्धापूर्वी याचीं कामें मीं पुष्कळ वेळां पाहिलीं आहेत. पुढें युद्ध सुरू झाल्यानंतर कांहीं महिन्यांनीं मी त्याचा खेळ पाहण्याकरितां गेलों असतां, त्याच्या शरीराकडे पाहून मला फार आश्चर्य वाटलें. त्याचें शरीर पूर्वीप्रमाणें अशक्त नसून, फारच पुष्ट झालेलें होतें. त्यास विचारतां त्यानें सांगितलें कीं, आपण प्रस्तुत लष्करमध्यें शिरलेलों असून, आपल्याला लष्करी कारकूनाची जागा मिळालेली आहे. खेळ संपल्यावर त्यानें व्याख्यान दिलें, त्यांत

शद्वांनीं बोलावयचें हाटलें म्हणजे "सबसे जीव प्यारा" या न्यायानें जवळच्या उंचवट्यावर असलेल्या घरांत मिळेल त्यांनीं एकदाचा आपापल्या मंडळीसह शिरकाव करून जीव तेवढा बचावला. हें महापुराचें पाणी रात्रौ साडेनऊ वाजेपर्यंत चढत राहून पुढें उतरत गेलें. अशा तऱ्हेच्या भयंकर माहापूर सन १८४७ सालीं येऊन त्यामुळें अशीच भयंकर नुकसानी झाली होती. त्यानंतर १९०० सालीं दुसरा पूर आला होता. पण यापासून नुकसानीचें प्रमाण यापेक्षां कमी होतें. आमचा हा प्रांत इतका दैववान[?] आहे कीं, टोळकांत्या,बंडें, व माहापूर हे नेहमीं चालू असावयाचेच. टोळकांतीतून कुठें जरा डोकें वर काढतों तों आला बंडाचा छापा! यांतून जरा वर पाहातों तों आला सर्व बाजूनीं बुडविणारा महापुराचा छापा! अशी स्थिति नेहमीं इकडच्या लोकांना प्राप्त होत असते. आमच्या गांवच्या इतिहासांत या रात्रीचा उल्लेख भीषण स्वरुपाचा होईल यांत संशय नाहीं. कोण तो त्या रात्रीचा भयंकर प्रसंग! जेथें तेथें आरडाओरड, गलबल आणि मध्यंतरीं घरें पडत असल्याचा तो हृदयद्रावक आवाज ऐकून छाती एकदम धस्स होऊन त्याबरोबर शक्तीचा ऱ्हास होई. असो. याप्रमाणें सारी रात्र अशा भयंकर स्थितींत गेली कीं, केव्हां एकदां उजाडतें असें लोकांना झालें. एकंदर २२५ घरें 'नद्यारतृप्यन्तु' होऊन आज गरीब दुबळे लोक, राहण्यास हातभर जागा, खाण्यास मूठभर अन्न व नेसावयास एखादा पंचा या सर्वांस अशा ऐन पावसाळ्यांत अंतरले आहेत. येथील श्री मुरलीधराच्या देवळानजीक असलेल्या अवघ्या घरांत कितीतरी कुटुंबें आश्रयाला येऊन राहिलेलीं आहेत. हा देखावा पाहतांच यात्रेकरूंची आठवण होऊन निराश्रित मंडळीची फार फार दया येते. येथील श्री दत्तवाडींत सर्व भागांत पाणी भरून श्रीदत्तमहाराजांची मूर्ती सुद्धां पाण्यांतच बुडालेली होती. श्रीचें एकंदर सामान, वस्त्रें वगैरेची नासाडी होऊन देउळाजवळच्या दोन अग्रशाळांचे भाग या पाण्याच्या पुरानें मोडलेले आहेत, देवळाचे सध्याचे कोमिसांव मंडळाचे अध्यक्ष श्री व्यंकटेश बाबू शेणवीं शेटये यानीं अविश्रांत मेहनत घेऊन देऊळ स्वच्छ करवून श्रीच्या सर्व वस्तु नीटनेटक्या करण्यास सुरवात केली आहे. हें त्यांस भूषणावह आहे यांत शंका नाहीं. हा भयंकर प्रलय दिवसा सुरु झाल्यामुळें प्राणहानि मात्र बिलकूल झाली नांहीं, हें एक दुःखांत सुख झालें पाहिजे. अशा तऱ्हेचे आणखी जलप्रलय पुढील गांवांत झालेले ऐकतो. नाणूस उस्गांवांत, वाळपई, गांजें, बळवई, धामसें, खडकी, साळ, इब्रामपूर, राण्याचा जुवा, भोमय, वागुर्बें, वगैरे पोर्तुगीज अमलांत शिवाय मणेरीं, बांदा, भेडूस, परमे, साटेली वगैरे, वाडी संस्थानांत अशाच तऱ्हेचे जलप्रलय झाल्याचें समजतें. पण तिकडच्यासुद्धा गांवांत विशेष कोठें प्राणहानी झाल्याचें ऐकिवांत नाहीं. अतिवृष्टी, अनावृष्टी हे दोन्ही प्रकार ईश्वरी क्षोभामुळें होत असतात, असें पोथ्यापुराणांत सांपडतें. येथील सिं. आदमिनिस्त्रादोर व वाळपई येथील कोमांदांत मिलितार ह्यांनीं फार परिश्रम घेऊन लोकांना मदत केली. हें त्यांना व त्यांच्या अधिकाराला फार शोभलें. काल रोजीं ना. गव्हर्नर साहेब, फाजेंदाचे व कष्टम खात्याचे मुख्य अधिकारी, शिवाय वाळपई येथील कोमांदांत मिलितार ह्या सर्वांनीं येथें पुरामुळें झालेल्या चिखलांत स्वतः फिरून गरीब दुबळ्या लोकांचीं मोडलेलीं घरें व त्याची दैनावस्था पाहून त्यांना मदत करण्याचें पूर्ण आश्वासन दिलें आहे. असो. गोव्यांतील सर्व तऱ्हेच्या लोकोपयोगी संस्थांनीं, भूतदयेनें प्रेरित झालेल्या सद्गृहस्थानीं, दयाळू व्यापारी मंडळांनीं व इतर ज्यांना ज्यांना म्हणून हस्तें परहस्तें मदत करतां येण्याजोगी आहे त्या सर्वांनीं यथाशक्ति खालील पत्यावर मदत पाठवून 'महायात्रा केल्याचें पुण्य' पदरीं घ्यावें अशी नम्र विनंति आहे.

आपले न. सेवक.

डॉ. वामन शंभू बोरकर.

विनायक अनंत खोलकर.

दत्तात्रय पांडुरंग चिमुलकर.

विशेष सूचनाः--

मदतीची पोंच भारत पत्रांत प्रसिद्ध केली जाईल.

—मडगांव येथें उद्यां संध्याकाळीं गोमांतकसेवा मंडळ नावांची नवीन संस्था स्थापण्यासाठीं श्री स्वामी पूर्णाश्रम महाराज यांच्या अध्यक्षतेखालीं तेथील नवीन मराटी शाळेच्या दिवाण खान्यांत सायंकाळीं ७॥ वाजतां सार्वजनिक सभा भरणार आहे.

—सांगें मुनिसिपालटीच्या अध्यक्षांनीं तेथील तालुक्यांतील लोकांची येत्या ३० तारखेस एक सभा बोलावली असून, सदहू सभेंत महापुरानें अनाथ बनलेल्या गोमांतकीय लोकांस मदत पुरविण्याचा विचार होईल. स्तुत्य.

अनाथांस मदत.

—सांखळी व इतर गांवच्या पुरामुळें निराश्रित बनलेल्या लोकांस मदत करण्याकरितां भारत ऑफिसनें फंड उभारला आहे ज्या कोणास या सत्कार्यास मदत करावयाची आहे त्यांनीं ती येथें पोंचवावी, म्हणजे ती लगेच योग्य इसमाकडे पोंचवली जाईल. ही वेळ अशी आहे कीं, सर्व मतभेद, धर्मभेद जातिभेद बाजूस सारून एकमतानें व सढळ हातानें मदत करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. तेव्हां सर्व लोकांस आमची कळकळीची अशी विनंति आहे कीं, शक्य तितक्या लवकर आमच्याकडे अगर दुसऱ्या कोणाकडे अधिकांत अधिक रक्कम पोंचती करावी.

भारत ऑफिस———रु. १०

जेटी–मराठी शाळा.

मार्मुगांव–हार्बर

[खास बातमीदाराकडून]

कळविण्यास आनंद वाटतो कीं, वरील शाळेच्या मुलांची वार्षिक परीक्षा व बक्षिससमारंभ ता. २८ जून १९२३ रोजीं संध्याकाळीं ४ वाजतां मोठ्या थाटानें पार पडला. मुलांची परीक्षा घेण्याकरितां हुबळीहून श्री नामदेव तरूण संघाचे अध्यक्ष श्री. रा गणपतराव दत्तात्रय बायचळ व जांबावलीच्या शाळेचे मास्तर रा. नारायण दत्तात्रय पै रायकर यानां बोलावण्यांत आलें होतें. त्यानीं ता. २२-२३ रोजीं परीक्षा घेतली.

सदरहू समारंभास अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल प्रो. दत्तात्रेय गोविंद कामत यांस आगाऊ विनंति करण्यांत आली होती. परंतु कांहीं आकस्मिक अडचणीमुळें ठरलेल्या वेळीं त्यानां हजर राहतां न आल्यामुळें त्यानीं पाठविलेलें पत्र सेक्रे. रा. काशिनाथ दणाईत यांनीं वाचून दाखविलें. तें येणेंप्रमाणें.

'सा. न. वि वि. जेटी मराठी शाळेच्या बक्षिससमारंभास अध्यक्ष या नात्यानें हजर रहाण्याची आपली आमंत्रण-पत्रिका पोंचली. मला हा बहुमान दिल्याबद्दल आपला व इतर शाळेच्या चालक मंडळींचा मी फार फार आभारी आहें माझ्या अंगांत कांहींच पात्रता नसतां मला अध्यक्ष निवडण्याची आपली व इतर सदगृहस्थांची इच्छा, हें एक माझ्यावरील आपल्या सर्वांच्या प्रेमाचें द्योतकच आहे असें मी समजतों. मी अध्यक्षपद स्वीकारण्यास लायक नसतांही आपल्या सर्वांच्या प्रेमाचा अनादर होऊं नये, म्हणून मला आपल्या समारंभास हजर रहाण्याची बहुत इच्छा होती. परंतु, एका आकस्मिक कामामुळें मला उद्यां पणजीस गेलेंच पाहिजे. ह्या कामाची सत्यता पटविण्यासाठीं समक्ष भेटींत मी आपणास पणजीहून आलेलें पत्र दाखविलेंच आहे. वरील कारणामुळें मला बक्षिससमारंभास हजर राहून भाग घेतां येत नाहीं म्हणून अतिशय वाईट वाटतें. या साठीं आपण व इतर सदगृहस्थ मला क्षमा करतील अशी आशा आहे. अन्नदानाइतकेंच विद्यादानाचें पुण्य आहे. हें सत्कार्य आपल्यासारख्या देशभक्तांनीं हातीं घेतल्याबद्दल आपलें व इतर चालक मंडळीचे जितकें कौतुक व अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे. व असल्या सत्कार्यास सर्वांनीं मदत करावी हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. जेटी सारख्या शाळेंत आज ८०

पुढें चालू

· ANUNCIO ·

Pelo juizo de direito da comarca de Quepem, e cartorio do escrivao do 1 ° oficio Redcar, vao a* praça para venda em hasta publica a' porta do tribunal judicial desta comarca, situado em Xeldem, na estrada nacional que de Quepem se dirige a estaçao de Sanvordem, no dia 14 do proximo mex de Agosto a's 12 horas, pelo maior lanço que se oferecer o predio rustico denominado Ormonem da cul. de coqueiros, e outras arvores, situado na aldeaQuitol,avaliado por 115:00:00; Tres quartas partes do predio rustico denominado sorodio, da cultura de arroz, sito em Quitol, avaliado por 25o rupias; -Tres quartas partes do predio rustico denominado Gormanda, da cultura de coqueiros e outras arvores, sito na dita, avaliado por 150 rupias.- Predio rustico denominado Conquimola da cultura de arroz, sito em Quepem e Pady, avaliado por 250 rupias.- Quarta parte do predio rustico denominado Data madem, da cultura de coqueiros, eoutras arvores, sito em Quitol, avaliado por 50 rupias;- Quarta parte do predio denominado Tambechem, da cultura de coqueiros, sito em Quitol, avaliado por 100 rupias;- Quarta parte do predio denominado Vangana carecodecho codvo' da cultura de arroz, sito em Quitol, avaliado por 100 rupias;-Quarta parte do predio denominado Ambadechovolo, da cultura de coqueiros,e outras arvores sito em Quitol, avaliado por 25 rupias;- e um trinta e dois avos do predio denominado Vangana paupele, da cultura de arroz, sito em Quedem e Pady, avaliado por 120 rupias, discritos respetivamente por inteiro na conservatoria desta comarca, sob os nos 10.444, 10445, 10.446, 10.447, 10.450 10.451, 10.452, 10.453 e 10,457 e penhorados nos autos civeis de execuçao hipotecaria, que Francisco Gabriel Paixao Mascarenhas de Velim, como cessionario do exequente Padre Jose' Amancio dos Martires e Va's, do mesmo lugar, move a Esso' Naique de Quitol, e outra de Murcuda de Canacona, para pagamento da quantia de 1.250 rupias, da copia de 1,500 rupias, com os juros vencidos e vincendos e de custas e selos acrescidos da execuçao. O arrematante pagara' a contribuiçao de registo por inteiro e as despesas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Pos este sao citados quaisquer credores incertos dos ditos executados e os co-proprietarios nos termos e para os efeitos de lei, ficando tambem citados os representantes do credor falecido dito Padre Jose' Amancio dos Martires que tinha o seu credito contra os ditos executados na importancia de 250 rupias. 1

Xeldem, 13 de Julho de 1923

O escrivao de Direito do 1 ° oficio
Babu' V. Camotim Redcar

Verifiquei

O juiz de Direito, 2 ° substituto
Luis Jose' de Sousa

भा र त

गुरुवार आषाढ, कृ. ५ मी १८४५

आमचें कर्तव्य.

लेखांक २ रा. [पूर्वार्ध.]

ब्रिटिश हिंदुस्थानामध्येंही आपल्या देशाविषयीं कळकळ उत्पन्न होऊन, तेथें पुष्कळशा संस्था निघून ते लोक आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावीत आहेत. पुष्कळ लोकांनीं आपल्या मोठ्या उत्पन्न वर लाथ मारून, देशाला पूर्वींचें वैभव प्राप्त व्हावें, इतर राष्ट्रांच्या मालिकेंत आपल्या हिंदुस्थान देशास स्थान मिळावें, देशांतील लोकांची भरभराट होऊन, आपसांतील वैमनस्यें नष्ट व्हावीं; याकरीतां आपणाला कायमचें वाहून घेतलें आहे. त्यामुळेंच त्यांचा भविष्य काल उज्वल होण्याचीं पूर्व चिन्हें दिसत आहेत; अशांचींही कांहीं उदाहरणें आपल्या लोकांसमोर असणें जरूर आहे, ह्मणून त्यांपैकीं कांहीं देण्यांत येत आहेत.

देशाला वैभवशाली करण्याकरितां ज्या कांहीं संस्था निघाल्या त्यांत राष्ट्रीय सभेला प्रथम स्थान द्यावें लागेल. ती संस्था मूळ सतरा लोकांनीं स्थापिली; त्यांत मुंबई इलाख्यांतील फक्त तिघे जण होते. ते रा. सा. मंडलीक, का. त्रि. तेलंग व दादाभाई नवरोजी हे होत. सभेची पहिली बैठक पुण्यास भरविण्याचें ठरविलें होतें; परंतु पुण्यास आकास्मिकपणें कॉलरा सुरू झाल्यानें, मुंबईस बैठक भरवावी लागली. ही पहिली बैठक ता. २८-१२-१८८५ रोजीं गोकुळदास तेजपाळ संस्कृत कॉलेजच्या दिवाणखान्यांत उमेशचंद्र बानर्जी यांचे अध्यक्षतेखालीं भरली. त्यावेळीं फक्त ७५ प्रतिनिधि होते; ही संख्या दुसऱ्या वर्षी वाढून ४३४ झाली; नंतर पुढें प्रत्येक वर्षी ही संख्या वाढतच जाऊं लागल्यानें आतां प्रतिनिधींची संख्या नियमित करणें भाग झालें आहे. आज जरी संस्थेंत दोन तीन पक्ष झालेले असले तरी हिंदुस्थानांतील एकंदर लोकांना या संस्थेविषयीं फार अभिमान वाटत आहे. स्वराज्य प्राप्त्यर्थ हिंदुस्थानानें केलेल्या प्रयत्नामध्यें या संस्थेचें नांव अजरामर राहील यांत शंका नाहीं.

दुसरी संस्था ह्मणजे प०वा०नामदार गोखले यांचा भारत सेवक समाज हा होय. आपल्या देशाकरितां सर्वस्वावर पाणी सोडणारे तरुण ज्यावेळीं आपल्या राष्ट्रांत तयार होतील, तेव्हांच कांहीं तरी देशकार्य होणार आहे, असें त्यानां पूर्णपणें कळून आल्यावरून, त्यांनीं ही संस्था स्थापन केली परंतु देशाच्या दुर्दैवामुळेंच त्यानां फार थोडें आयुष्य लाभलें, नाहींतर या संस्थेची आजच्या पेक्षां जास्त भरभराट झालेली दिसून आली असती. गोखल्यांची देशप्रीति जाज्वल्य होती; देशाकरितां त्यांनीं अविश्रांत श्रम केल्यामुळेंच त्यांना अकालीं मरण आलें. त्यांच्या सारखे देशभक्त ज्या देशांत जन्माला येतात, तो देश खरोखर भाग्यवान होय! गोखले व त्यांची संस्था या विषयीं अत्यंत आदर वाटतो. गोखल्यांची शिकवण अत्यंत उच्च दर्जाची होती. हिंदुस्थानांतील सामान्य जनता सुशिक्षित झाल्याशिवाय स्वराज्याचा पाया मजबूत होणार नाहीं हा त्यांचा अढळ सिद्धांत असल्यानें लोकशिक्षणाचें कार्य आंगावर घेऊन, त्याची वाढ व्हावी ह्मणून त्यांनीं अविश्रांत परिश्रम केले. शिक्षण सार्वत्रिक झाल्याखेरीज समाज स्वराज्यास लायक होणार नाहीं ह्मणून त्यानीं सक्तीच्या शिक्षणासारखीं बिलें कौन्सिलपुढें आणलीं होतीं. तात्पर्य थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे राष्ट्राची कुवत, राष्ट्राची इभ्रत सर्व बाजूनीं वाढली पाहिजे व त्याकरतांच सामान्य जनतेला शिक्षण देऊन समंजस करून त्यांचे ठिकाणीं स्वाभिमान उत्पन्न केला पाहिजे, ह्मणजे स्वातंत्र्याची खरी तळमळ उत्पन्न होईल. या शिकवणुकीप्रमाणें भारत-सेवक-समाज वागत आहे. संस्थेचे प्रस्तुतचे अध्यक्ष नामदार शास्त्री यांनीं आपल्या मोठ्या नोकरीवर तिलांजली देऊन या संस्थेला वाहून घेतलें असून, त्यानीं पुष्कळ महत्वाचीं कामें केलीं आहेत. आज ते केनिया वसाहतींतील हिंदी लोकांच्या वतीनें काम करण्यास इंग्लंडमध्यें गेले आहेत.

ह्या संस्थेचे उपाध्यक्ष श्री. देवधर यांनीं मोपला बंडाच्या वेळीं मलबारांत केलेलें काम लक्षांत घेण्यासारखें आहे. त्यानीं लाखों रुपयांचा फंड जमा करून मलबारची पुनर्घटना केली. हजारों निराश्रित कुटुंबानां अन्नपाण्याची मदत केली ! हें भारत सेवक समाजानें केलेलें काम लक्षांत घेऊन, तेथील लोकांनीं ४ ००० हजार रुपयांचा फंड जमवून त्या फंडास देवधर रिलीफ फंड असें नांव दिलें आहे. यावरून तेथील कामाची कल्पना आपल्यास येईल. याशिवाय या संस्थेच्या शाखा नागपूर, अलाहाबाद, मद्रास इत्यादि ठिकाणीं पसरलेल्या असून, पंडीत हृदयनाथ कुंझरू, शिवस्वामी अय्यर यांसारखे देशभक्त या संस्थेच्या द्वारा कार्य करीत आहेत, आणि हें सर्व काम उगाच गाजावाजा न करतां होत आहे. अशा या संस्थेची योग्यता काय आहे हें कळून येण्याकरतां, ता. २० जून १९२३ चा दैनिक ज्ञानप्रकाश अवश्य वाचावा. ह्मणजे या लोकांच्या विधायक कामगिरीची कल्पना होईल, व आपल्या गोमांतकांत मवाळ ह्मणजे देशबुडवे, सरकारची हांजी हांजी करणारे लोक असें समजले जातें. तें किती अस्थानीं आहे तें लक्षांत येईल. सामान्य जनता नेहमीं भावनाप्रधान असते. दूरवर विचारांचा तिच्या ठिकाणीं प्रादुर्भाव झालेला नसतो; ह्मणून त्यानीं या लोकांनीं चालविलेलें ज्ञानप्रकाश पत्र वाचावें अशी कळकळीची विनंति करतों. नामदार गोखले कैलासवासी झाल्यास आज ९ वर्षे होऊन गेलीं आहेत, पण त्यांची संस्था त्यांच्या शिकवणुकीप्रमाणें काम करीत आहे.

या नंतर लो. टिळकांची होमरूल लीग ही घेऊं. या संस्थेपेक्षां स्वतः लोकमान्यानीं केलेलें काम लक्षांत घेण्यासारखें आहे. त्यांचा स्वार्थत्याग, धाडस, बुद्धिमत्ता, देशाविषयीं तळमळ वगैरे गुण घेण्यासारखे आहेत. त्यांनीं केलेल्या अविश्रांत परिश्रमामुळेंच सामान्य जनतेंत स्वराज्याची कल्पना पसरली गेली. स्वराज्य मिळाल्याशिवाय हिंदुस्थानचें कल्याण होणार नाहीं. असा त्यांचा सिद्धांत होता. त्यांनीं केसरी पत्रद्वारें केलेली जागृति दांडगी आहे. आपल्या गोमांतकीय हिंदु जनतेंत या पत्रामुळेंच जागृति उत्पन्न झाली आहे, हें त्या पत्राचा गोमांतकीय लोकांमध्यें जो खप आहे, त्यावरून सहज लक्षांत येईल.

महात्मा गांधीजी यांनीं देशाकरितां फारच परिश्रम केले आहेत. त्यांनीं सत्याग्रहाश्रमद्वारें शिकविलेला मार्ग दिसण्यांत फार सोपा, पण आचरण्यांस फार कठीण असा असल्यामुळें सामान्य लोकांच्या आचरण्यांत शक्य झालें नाहीं. त्यांचा स्वार्थत्याग, सत्यनिष्ठा, साधुत्व वगैरे गुण घेण्यासारखे आहेत. ते महात्मा आहेत यांत बिलकूल शंका नाहीं. परंतु, लोकांच्या आंगीं ते सांगतील त्या प्रमाणें वागण्याची तयारी नसल्यामुळें, आज त्या चळवळीचा फायदा झालेला दिसत नाहीं.

प. वा. माधवराव रानडे, दादाभाई नौरोजी आणि फेरोजशाह मेथा यांनीं केलेलीं देशसेवेचीं कामें इतिहासांत अमर राहतील.

तसेंच स्वामी श्रद्धानंद (पूर्वाश्रमीचे लाला मुनशीराम) यांनीं आपली हजारों रुपये उत्पन्नाची जमिन आर्यसमाजास अर्पण करून स्वीकारलेलें देशसेवा व्रत, पंडीत मालवीय यांचीं कौन्सिलमधील कामें लाला लजपतराय यांनीं अमेरिकेमध्यें केलेली जागृति, चॅ. दास यांनीं हजारों रुपयांच्या प्राप्तीवर दिलेली तिलांजली, वगैरे उदाहरणें अनुकरणीय आहेत. अशा लोकांच्या कर्तव्यनिष्ठेमुळेंच हिंदुस्थानचा भविष्यकाल अत्यंत उज्वल होण्याचा संभव आहे, यांत कांहींच शंका नाहीं.

यापुढें शिक्षणसंस्थांकडे वळूं. हिंदुस्थानामध्यें ज्या शिक्षणसंस्था आहेत, त्यांत हिंदु युनिव्हर्सिटी, डेक्कन एज्युकेशन सोसायटी व महिला विश्वविद्यालय ह्या प्रमुख होत. हिंदु युनिव्हर्सिटी ही पंडीत मालवीय, सर सुंदरलाल व ॲनि बिझंट वगैरेंच्या प्रयत्नामुळेंच स्थापन झाली

जेटी-मराठी शाळा.

मोर्मुगांव-हार्बर

[खास बातमीदाराकडून]

जेटी सारख्या शाळेंत आज ८० मुलें शिकतात ह्या सारखी आनंदाची व आमच्या भावी कालाचें सुचिन्ह दर्शविणारी दुसरी कोणतीच गोष्ट नाहीं. ह्या ८० मुलांस सध्या शिक्षण एकाच मास्तराकडून होत आहे असें कळतें. परंतु हें शिक्षण पद्धतशीर व फायदेशीर होण्यास आणखी एका शिक्षकाची तरी जरूर आवश्यकता आहे. पैशाच्या अभावामुळें जर दुसरा मास्तर ठेवण्याची शाळेची अंतःस्थिति नसली, तरी पण सर्वांनीं एकजुटीनें जर ह्या कामास मदत केली तर एकच नव्हे, तर दोन मास्तर सहज ठेवतां येतील अशी मला पूर्ण खात्री आहे. आजपासून शाळेच्या मेंबरांत माझें नांव घालावें, अशी माझी आपणापाशीं मागणी आहे. शक्तिनुसार माझ्यानें होईल तितकी मदत मी करीन. मला जरी ह्या समारंभास हजर राहतां येत नसलें तरी पण, माझें मन तेथेंच आहे हें लक्ष्यांत ठेवावें. मी ६ वर्षें प्रोफेसरचें काम केल्यामुळें मुलांस शिकविण्यांत व तीं चांगलीं शिकलेलीं पहाण्यांत किती आनंद होतो, याचा मला पूर्ण अनुभव आहे. मुलांस खाऊसाटीं २ रु. जात आहेत. या प्रेमानें पाठविलेल्या क्षुल्लक देणगीचा स्वीकार करून मला आभारांत ठेवावें. उत्तरोत्तर आपल्या शाळेची भरभराट होऊन त्यांतून शिकून तयार झालेलीं मुलें उद्यां आमच्या मातृभूमीची सेवा करण्यांस तयार होवोत, अशी परमेश्वरापाशीं विनवणी करून आपली सर्वांची आणखी एक वेळ क्षमा मागतों. क. कृ. लो. अ. ही. वि:-

अशींच आणखीही दोन पत्रें शाळेच्या अभिष्ट चिंतनपर कुंभारजुवा शारदा विद्यालयाचे हेडमास्तर श्री. गणेश शिवराम सामंत व श्री. नारायण भास्कर नाईक, संपादक 'भारतमित्र' रिवण-गोवा, यांजकडून आलेलीं वाचून दाखविण्यांत आलीं.

नंतर शाळा मास्तर श्री. शिवराम दत्तात्रय पई यांनीं सभा बोलावण्याचें कारण सांगून मुलांकडून आपण शिकविलेलीं संभाषणें करविलीं. व ईशस्तुतिपर स्वकृत पदें मुलांकडून पेटीच्या सुरावर हाणवून घेतलीं. नंतर श्री. शां. का. दणाईत यांनीं नियोजित अध्यक्ष जर आजच्या प्रसंगीं हजर असते तर त्यांनीं शाळेंतील अभ्यासक्रमाविषयीं व शिकविण्याच्या पद्धतीविषयीं आपला स्वानुभव सांगून कांहीं योग्य सुधारणा दर्शविल्या असत्या. असें सांगून आजच्या बक्षिस समारंभाकरितां श्री. मुकुंद कामत तारकर यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी विनंती केली. त्यास सर्वांनीं अनुमती दिल्यावर टाळ्यांच्या गजरांत अध्यक्ष स्थानापन्न झाले. मुलांकडून अध्यक्षांस व सभाजनांस अनुलक्षून कांहीं पदें हाणविण्यांत आलीं. व मुलांकडून अध्यक्षांस मुद्दाम तयार केलेला पुष्पहार अर्पण करण्यांत आला.

ANUNCIOS

COMUNIDADE DA PROVINCIA DE BALY

Nos dïas 19 e 20 do segninte mez de Agosto as 11 horas nas casas das sessões da comunidade da mesma, serão levadas à praça as avenças de receita para o trienio de 1924 a 1926 e as de despesa do segninte ano de 1924.

O escrivão da com.de
Ramacrisna Vencu Sinai Rego

2

Pelo *Juizo* de dereito da comarca de Quepèm e cartorio do escrivão do 1° oficio Redcar, vai á praça para venda em hasta publica a porta do tribunal judicial desta comarca situado em *Xeldem* na estrada nacional que de Quepem se dirige a estação de Savordem no dia 3 do proximo mez do Agosto ás 13 horas pelo maior lanço que se oferecer o predio rustico denominado Taripantevoril xir" da culture de coqueiros, jaquiras e outros arvores sito em Muguli, discrto na conservatoria desta comarca sob o n° 16273 e penhorado nos autos de execução por custas que o Ministerio Public nesta comarca move a Crispino Fernandes de Muguli de Sanguem por apenso aos de policia correcional que contra ele promoveu o dito Magistrado para pagamento da quantia de 88: 10: 11 proveniente de custas e selos liquidvos nos referidos autos de policia e de custas e selos acrscindos da execução e vai à praça pela sgunda vez e por metade do seu valor ou seja 150 rupias. O arrematante pagará a contribuição de registo por inteiro e as despozas da praça alem do preço da mesma dentro de tres dias Por estes são citados quaisquer credores incertos e co-proprietarios. O que para ser publico se expediu este. Xldem 24 do Julho de 1922.

Escrivão de Direito
Babu V. Camotim Redcar

Verifiquei
O Juiz do Direito 1° Substituto
João Baptista Gomes

3

Pelo Juiz de Direito da Comrca de Quepem e cartorio do escrivão do segundo oficio, Barreto, correm editos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos do 82° i do art. 197 do Codigo do Processo Civil. citando o interessado Miguel João Fernandes viuvo de Cotombi e ora ausente em parte incerta de Bombaim por si e como pai administrador dos seus filhos menores impuberes Ana Maria Fernandes, Simão Fernandes e Inacio Fernandes todos solteiros

Para assistir a todos os termos ate final dos autos de inventario orfanologico a que se procede por obito de de Ana Piedade Roberto que foi de Cotombi, sendo inventariante o regedor de Cotumbi, Utoma Pandu ronga Gaunço e nelos daduzir que rendo os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento.

E para ser publico se expediu este.

Xeldem de Quepem' 23 Junho de 1923

O escrivão de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito 1° Substituto
João Baptista Gomes

4

Xencor Ramachondra Sinai Narcorny, ou Xencora Ramachondra Sinai Narconim, estudante da Universidade de Lisbôa e ora domicilíado e residente na mesma, pretendendo mudar o seu nome para Xencor Ramachondra Senai Nadkarnì, pelo qual deseja ser conhecido, convida a quaisquer interessados para deduzirem, nos termos do n° 3° do artigo 178 do Codigo do Registo Civil e no praso maximo de trinta dias a oposição que tiverem.

Quepem, 28 de junho de 1923

O procurador
Ramachondra Ladu' Sinai Narcorny.

5

---

fins do mez de maio último.

Escrevemos estas linhas a pedido dos socios que desejam ver aclarada a sua situação.

Sobre o segredo...

Não nos chegam, ainda, esclarecimentos complementares sobre o caso de passagem do sr. Alfredo Rodrigues. E' o motivo, por que demoram os nossos comentos sobre o mesmo assunto para o qual chamamos a atenção dos interessados.

Sobre o "segrado" do sr. Alfredo pretendemos erigir o edificio da verdade e só desta.

Coisas & Loisas

Para Karachi ...

Na renuiao dos Paços Municipais o sr. Roberto Bruto da Costa lembrou a conveniencia de ir uma Comissao a Karachi para cumprimentar os aviadores em nome da India Portuguesa. Exoelente idea.

Mas para que ela seja completa — lembramos que um dos vogais da Comissao deve ser o sr. Bruto da Costa que ja' la' esteve para seus negocios e como caixeiro viajante da firma Rodrigues Alvares Ltda.

Forcas vivas

O sr. Roberto Bruto da Costa foi escolhido para representar *as forças vivas do pais*. Esta' certo. Depois de adv. prov. de Timor, conselheiro do Governo, vogal do Tribunal do Contencioso e Contas, Secretario da Redacçao do *O Ultramar*, correspondente do mesmo jornal em Nova-Goa, Presidente da Associaçao Comercial, representante geral da firma Rodrigues Alvares Ltda, so' lhe faltava esta= representar as forças vivas do pais!! Oh! o felizardo. E mais felizardo ainda o pais que o viu nascer e o cria!

Catequisando...

No *sagradoc oraçao* do Hospicio de Margao ha' um *santo* capelao. E ... *honrado* tambem; porque nao faz caso da honra alhea, porque reputa igual a sua de que dispoe, *austeramente*.

Tao honrado e' esse capelao que espatifou a fraca honra duma mulherao 'paria', *catequisando-a*, carinhosamente.

Dizem-nos que o mesmo inclito varao, o santo capelao, foi o primeiro a falar mal do casamento do ex-padre Leao que defendeu o seu amoroso coraçao.

Ao ilustre *catequisador* capeleo, o nosso sincero preito de admiraçao.

Alcoolismo

O Governo faz bem, fomentando aberturas de tavernas, como na Vila Nova de Curchodem, porque no fim de contas e' na bebedeira que reside a felecidade.

Todos os bebados sabem que o alcool traz alegria e esta e' a *chave* da dita felecidade.

E' facil, portanto, a conquista da felecidade. E' entregar-se a gente de *corpo e alma* a'bebedeira, o que e' facil, dada a generosidade do nosso Governo neste assunto alcoolico...

Sorte ..

Por ora pode dizer-se que vai raiar a nossa cara terra, a aurora prospera de felecidade financeira. E' que com o decidido corte de grossas raizes da arvore do funcionalismo, o erario publico podera deliciar a dogura do saboroso fruto do *superavit*; pois que esta' comprovado e experimentado que se pode aliviar ou antes reduzir o peso do cadaver, cortando-se-lhe a este cabelos que sao justamente partes mais pesadas.

A locomoçao de que o ente humano e' capaz e' o resultado da arte dos que sabem manejar a navalha. Se nao fosse este instrumento cortante ver-se-hiam muitos sobrecarregados de cabelos que os impossibilitariam de dar sequere um passo a frente...

Portanto, com corte que se projeta dos *cabelos* do nosso *eterno cadaver* que e' o cofre publico, vai ficar este *aliviado...*

Bolshevismo

Bolshevismo e' a invençao dum *bruto* que por causa do *fruto* do *producto* dum antepassado *astuto* imaginou vinganças belicas no seu revolto so *bestuno* ...

Aqui esta' como o patriotismo para a gente bruta nao sinifica, outra coisa que o egoismo.

Convite

Os abaixo assinados tem a honra de convidar o publico desta Cassabe' para uma sessao solene que se vai celebrar, em honra dos gloriosos aviadores Gago Coutinho e Sacadura Cabral, na escola primaria desta localidade, pelas 16 horas do dia 12 de Agosto corrente.

Escola mixta de Quepem, 6 de Agosto de 1923.

Luis Jose' de Sousa
Delegado local
Visvonata Siurama Sirvoicar
Professor regente
Xec Usman
Aluno da 5.a classe

Xencor Ramachondra Sinay Narcorny, ou Xencora Ramachondra Sinai Narcornim, estudante da Universidade de Lisboa e ora domiciliado e residente na mesma, pretendendo mudar o seu nome para *Xencora Ramachondra Senai Nadkarni*, pelo qual deseja ser conhecido, convida a quaisquer interessados para deduzirem, nos termos do n.° 3° do artigo 178 do Co'digo do Registo Civil e no praso maximo de trinta dias a oposiçao que tiverem.

Quepem, 28 de Julho de 1923.

O procurador
Ramachondra Ladù Sinay Narcorny

— ऑलिंपससंबंधानें तेव्ह व उलचामार यांचा तंगडा चालूच आहे.

—नागपूरचा सत्याग्रह अजूनहि जोरांत आहे.

भारत

गुरुवार आषाढ, कृ. १२ शी १८४५

आमच कर्तव्य.

लेखांक २ रा. [उत्तरार्ध]

प्रो. कर्वे यांचा स्वार्थत्याग फार दांडगा आहे. अगदीं विश्रांति न घेतां, ते या संस्थेकरितां परिश्रम करीत आहेत. पुष्कळशा तरुणांनीं व स्त्रीयांनीं या संस्थेकरितां आजन्म वाहून घेतलें आहे. आज महिला विद्यापीठ व तिच्या शाखा मिळून ७०० विद्यार्थिनी शिकत आहेत. या विद्यापीठाचा मुख्या उद्देश स्त्रीयानां योग्य असें शिक्षण मातृभाषेंतूनच देणें हा आहे. आपल्या गोमांतकामध्येंही एक कन्या शाळा निवण्याचें घाटत आहे. अशा संस्थेची आमच्या गोमांतकाला फार जरूर आहे. तरी या कन्याशाळेला मूर्त स्वरूप आणून देण्यांकरितां, सर्व लोकांनीं मदत करावी अशी कळकळीची प्रार्थना आहे.

समाज सेवेविषयीं आमचे ब्रिटिश हिंदुस्थानांतले बांधव सतत प्रयत्न करीत आहेतच. सेवासदन, सोशल सर्व्हिसलीग वगैरे संस्था समाजसेवेचें काम उत्कृष्ट रीतीनें बजावीत आहेत. सेवा सदन ही संस्था श्री. गोपाळ कृष्ण देवधर व श्री. रमाबाई रानडे यांच्या नेतृत्वाखालीं चालत असून, संस्थेचें कार्य जोरांत आहे. स्त्रियांना मिडवाइफ नर्स, कशीदा, शिक्षण इत्यादि विषयांचें शिक्षण देऊन, कार्यक्षम करण्याकरितां संस्था प्रयत्न करीत आहे. या कामी तीला बरेंच यश येत चाललें आहे, असें संस्थेच्या टिकटिकाणीं ज्या शाखा स्थापन झाल्याचें दिसतें; त्यावरून सहज लक्षांत येईल. अशा संस्थेची एक शाखा गोमांतकांत असणें जरूर आहे.

याचप्रमाणें मुंबईतील सोशल सर्व्हिस लीग ही संस्था श्री. नारायण मल्हार जोशी यांच्या नेतृत्वाखालीं चालत असून, श्री. सहस्त्रबुद्धे, श्री. चित्रे यांसारख्या समाजसेवकांनीं आपणास त्या संस्थेकरितां वाहून घेतलें आहे. या संस्थेनें मुंबईतील परळ वगैरे ठिकाणीं मजुरांकरितां पुष्कळच कामें केलेलीं आहेत. शिवाय संस्थेची सविस्तर पणें लोकांस माहिती कळण्याकरितां व समाजसेवेविषयीं जनतेच्या मनाची प्रवृत्ति होण्याकरितां समाजसेवक नांवाचें मासिकही चालविलें आहे. शिवाय वारंवार हस्तपत्रकें, लघुपुस्तकें प्रसिद्ध करून समाज जागृति करीत आहेत.

असो. हिंदुस्थानांतील दानधर्म करण्याविषयीं पुढें असलेली प्रमुख जात म्हणजे पारसी लोक हे होत. ह्या लोकांनीं मुंबई किंवा अन्य स्थळीं दानधर्मविषयक कृत्यें केलेलीं वर्णनीय आहेत. या पारसी समाजाची संख्या थोडी असूनही, त्यानीं एकट्या मुंबई शहरामध्येंच लहान मोठ्या अशा १११ संस्था चालविलेल्या आहेत. मे. नवरोजी माणिकजी वाडिया या उदारधी पुरुषानें १ कोट रुपये धर्मादायाकडे दिले आहेत. आज या वाडिया चारिटी फंडांतून हजारों लोकांना धर्म, जाति वगैरे कांहीं भेदभाव लक्षांत न घेतां मदत होते. मे. टाटा यांनीं रिसर्च इन्स्टूटकरितां ३० लक्ष रु. दिले आहेत. शिवाय या जातींतील लोकांनीं अनेक इस्पितळें शाळा, दवाखाने वगैरे चालविले आहेत. या जातींतील श्रीमंत लोकच तेवढे सार्वजनिक कार्याला मदत करितात असें नसून, मध्यम स्थितींतील लोकही आपल्या शक्तींनुसार दानधर्म करीत असतात. पारशी लोकांनीं चालविलेल्या दैनिक पत्रांतून अशा लोकांच्या देणग्यांची पोंच आलेली नेहमीं दिसते.

मुंबईतील भाटे वगैरे लोकांनींही पुष्कळ संस्थांना मदत केलेली आहे. शेट प्रेमचंद रायचंद यांनीं २ लक्ष कलकत्ता विश्वविद्यालय, २ लक्ष मुंबई विश्वविद्यालयाच्या लॉयब्ररीकरितां, २ लक्ष रु. म्युनिसिपालटीकडे क्लॉक टॉवर बांधण्याकरितां दिले आहेत. गोकुळदास तेजपाल यांनीं हास्पिटल करीतां १॥ लाख व इतर कामांकरितां ७ लाख रुपये दिले आहेत.

सारस्वत ज्ञातींतील लोकांनींही बरींच कामें केलेलीं आहेत. सारस्वत विद्यार्थी सहाय्यक मंडळी, सारस्वत दीनवत्सल संघ, वगैरे संस्थांचीं कामें अभिमानास्पद आहेत. श्रीमंत दाभोळकर या धनिक गृहस्थांनीं पुष्कळ संस्थांना देणग्या दिलेल्या असून, त्यांचा दान प्रवाह अखंड चालू आहे. दाभोळकर स्कॉलरशिप पुष्कळांना मदत करीत असून, गोमांतकांतील म्हापशांचें सारस्वत विद्यालय हें त्यांच्याच मदतीचें फळ होय. मडगांव येथील सारस्वत ब्राह्मण समाज या संस्थेच्या इमारत फंडाला ५०० रुपयांची मदत केली असून, गोमांतकांतील आणखी कांहीं संस्थांनाही साह्य केलें आहे. महापुरानें अनाथ बनलेल्या लोकांस श्रीमंतानीं नुकतीच दोन हजार रुपयांची उदार मदत पुरविली असून, खुद्द भारत फंडास पन्नास रुपयांचें निरपेक्ष सहाय्य केलें आहे. अशा प्रकारें गोमांतकाविषयीं आपलें प्रेम त्यांनीं व्यक्त केलें आहे.

आतां, हिंदुस्थानांतील बांधवांनीं इतर धार्मिक गोष्टींसारख्या बाबतींत केलेल्या कार्याकडे वळूं. धार्मिक बाबतींत रामकृष्ण मिशननें अमेरिकेंत केलेलें काम, आर्य समाजाचें शुद्धिकार्य, हिंदुमिशनरी सोसायटीचें पतित परावर्तन कार्य, वगैरे कार्यें योग्य प्रकारें चाललीं आहेत. ज्ञानार्जनाकरितां ठिकठिकाणीं लॉयब्रऱ्या वगैरे काढलेल्या असून, त्यांपासून पुष्कळ लोकांना विद्येची आवड उत्पन्न होत आहे.

डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर, रा. ब. शंकर पांडुरंग पंडित, डॉ राजेंद्रलाल

जाहीर विनंति

॥ दया धर्म का मूल है । मरण मूल
॥ अभिमान । तुलसि दयान छां-
॥ ढिये । जवलग गटमो प्रान ॥

नुकत्याच झालेल्या भयंकर जलप्रळयानें गोमांतकांतील कांहीं गांवचे गांव नदिस्तृप्यंतु होऊन हजारों लोक निराश्रित झाले आहेत. हें गोमांतकांतील बंधु भगिनींना अवगतच आहे. या आकस्मिक प्रसंगाचा देखावा तर राहोच. परंतु नुसती कपल्ना ही असह्य होते. दुःखाचा विचार प्रत्यक्ष दुःख भोगण्यापेक्षांही तीव्र भासतो, हा अनुभव सर्वत्रांस या कर्मभूमीवर येत आहेच. अशा तऱ्हेच्या त्या हृदयद्रावक संकटांत गोमांतकांतील आमचे कांहीं बंधु सांपडले असतां असा कोण पाषाण हृदयी आहे कीं, त्यांस सुखानें झोंप येऊं शकेल ? करितां बंधुनो, गार्हस्थ्य धर्मानुसार आपलें पवित्र प्राप्त कर्तव्य बजावून ईश्वराचे कृपेस पात्र व्हा ! देहबुद्धिमध्यें गुरफटून, अहिंसा, सत्यवचन, सर्वभूतानुकंपाशम, यथाशक्तिदान हा जो तुमचा आश्रमधर्म त्याकडे दुर्लक्ष करून आत्मनाश करून घेऊं नका. 'रामकिचिडिया राम रखे' असें हृदयांत समजून उदार चरित होत्साते—परस्परं भावयंतः या नात्यानें उदास विचारें या सत्कार्यास आपले शक्तिनुसार 'पत्रं पुष्पं फलं तोयं' अल्प प्रमाणानें कां होईना परंतु मदत करा. उत्तम व्यवहारें धन जोडून सत्कार्यी व्यय करण्यास हटूं नका. परोपकार बुद्धि हीच धर्मप्रेम उत्पन्न होण्यास कारणीभूत आहे. पशू पक्षी झाडें वगैरे सर्व जीवासक्तीनें बद्ध आहेत. परंतु—'जीताहै जो मरचुका इन्सानके लिये' जो दुसऱ्याचे उपयोगी पडतो तोच खरा जगतो, तोच मनुष्य या संज्ञेस पात्र आहे असें समजावें. सारांश, प्रत्येकानें (एक पैशापासून जितकी शक्ति असेल) अवश्य या कार्यास रोख मदत करून आपलें, आपल्या कुटुंबाचें, देशाचें नांव राखून आम्हांस आभारांत ठेवावें.

पूर्णाश्रम

श्रीधर मुकुंद सांवर्डेकर.
व्यंकटेश फोंडू कुडचडकर.
महादेव मंगेश शिंवेकर.
रामचंद्र लाडोबा ना. सांवर्डेकर.
सुत्राव विठ्ठल प्रभु देसाई.

COMUNIDADE DE PIRLA

No dia 22 do seguinte mez de Agosto ás 10 horas nas casas das sessões da mesmo comunidade, serão levadas à praça as avenças de receita para o trienio de 1924 a 1926 e as de despesa do seguinte ano de 1924.

Aos 31 de Julho de 1973.
O escrivão da com.de
Ramacrisna Vencú Sinay Rego' 1

ANUNCIO

Pelo juizo de direito da comarca de Quepem, e cartorio do escrivao do 1 ° oficio Redcar, vao a' praça para venda em hasta publica a' porta do tribunal judicial desta comarca, situado em Xeldem, na estrada nacional que de Quepem se dirige a estaçao de Sanvordem, no dia 14 do proximo mex de Agosto a's 12 horas, pelo maior lanço que se oferecer o predio rustico denominado Ormonem da cultura de coqueiros, e outras arvores, situado na aldeaQuitol,avaliado por 115:00:00! Tres quartas partes do predio rustico denominado sorodio, de cultura de arroz, sito em Quitol, avaliado por 250 rupias; -Tres quartas partes do predio rustico denominado Gormanda, da cultura de coqueiros e outras arvores, sito na dita, avaliado por 150 rupias,- Predio rustico denominado Conquimola da cultura de arroz, sito em Quepem e Pady, avaliado por 250 rupias,- Quarta parte do predio rustico denominado Data madem, da cultura de coqueiros, eoutras arvores, sito em Quitol, avaliado por 50 rupias;- Quarta parte do predio denominado Tambechem, da cultura de coqueiros, sito em Quitol, avaliado por 100 rupias;- Quarta parte do predio denominado Vangana carecodecho codvo' da cultura de arroz, sito em Quitol, avaliado por 100 rupias;-Quarta parte do predio denominado Ambadechovolo, da cultura de coqueiros,e outras arvores,sito em Quitol, avaliado por 25 rupias;- e um trinta e dois avos do predio denominado Vangana paupele da cultura de arroz, sito em Quedem e Pady, avaliado por 120 rupias, discritos respetivamente por inteiro na conservatoria desta comarca, sob os nos 10.444, 10445, 10.446, 10.447, 10.450 10.451, 10.452, 10.453 e 10,457 e penhorados nos autos civeis de execuçao hipotecaria, que Francisco Gabriel Paixao Mascarenhas de Velm como cessionario do exequente Padre Jose' Amancio dos Martires e Va's, do mesmo lugar, move a Esso' Naique de Quitol, e outra de Murcuda de Canacona, para pagamento da quantia de 1.250 rupias, da copia de 1,5?0 rupias, com os juros vencidos e vincendos e de custas e selos adrescidos da execuçao. O arrematante pagara ca ontribuiçao de registo por inteiro e as despesas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Pos este sao citados quaisquer credores incertos dos ditos executados e os co-proprietarios nos termos e para os efeitos de lei, ficando tambem citados os representantes do credor falecido dito Padre Jose' Amancio dos Martires que tinha o seu credito contra os ditos executados na importancia de 250 rupias. 2

Xeldem, 13 de Julho de 1923
O escrivao de Direito do 1 ° oficio
Babu' V. Camotim Redcar
Verifiquei
O juiz de Direito, 2 ° substituto
Luis Jose de Sousa

Pelo Juiz de Direito da Comrca de Quepem e cartorio do escrivão do segundo oficio, Barreto, correm editos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos do 82 ° i do art. 197 do Codigo do Processo Civil citando o interessado Miguel João Fernandes viuvo de Cotombi e ora ausente em parte incerta de Bombaim por si e como pai administrador dos seus filhos menores impuberes Ana Maria Fernandes, Simão Fernandes e Inacio Fernandes todos solteiros para assistir a todos os termos ate final dos autos de inventario orfanologico a que se procede por obito de Ana Piedade Roberto que foi de Cotombi, sendo inventariante o regedor de Cotombi, Utoma Pandu ronga Gaunço e neles daduzir que rendo os seus direitos sem prejuizo do seu devido eregular andamento. E para ser publico se expediu este.

Xeldem de Quepem, 23 Junho de 1923
O escrivão de Direito
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Dirieto 1,o Substituto 6
João Baptista Gomes

CCMUNIDADE DE CANVOREM

No dia 21 do seguinte mez de Agosto às 10 horas, nas casas das suas sessões da dita comunid de, serão levadas á praça as avenças da receita para o trienio de 1924 a 1926 e as de depsesa do seguinte ano de 1924.

Aos 31 de Julho de 1923.
O escrivãoda com.de
Ramacrisna Vencu Sinai Rego 4

Ecos & Critica

Dr. M. T. Gomes

Foi eleito Presidente da Republica Portuguesa êste afamado portugues de lei cujo triunfo foi entusiasticamente festejado por todo o Povo Portuguez daquem é dalem-mar.

A Sua Ex.cia desejamos um bom e feliz governo.

Capitão Costa Alves

Seguiu para Portugal êste brioso militar e nobre portuguez, tendo, á sua despedida, sido alvo duma ruidosa e cordeal manifestação de simpatia por parte dos principais membros do *Pragatica Sanga*, residentes na capital que é onde ela teve lugar.

Nem mais digna nem mais justa a homenagem presta la ao sr. Capitão Costa Alves, o quai, durante a sua permanencia nesta colonia manteve sempre uma conducta digna dum republicano autentico, honrando sobremaneira, alêm de sua estimada pessoa, a nobre raça a que pertence.

Desejamos a Sua Ex.cia uma boa e feliz viagem!

Honra lhes seja!

A subscrição aos sinistrados atingiu na vila de Margão uma cifra superior a 130c rupias das quais 550 foram já destribuidas pelos necessitados, reservando-se o resto e o mais que se apurar, para a ocasião da constr. ção de casas.

Muito se afadigaram na ardua tarefa de reunir subsidio ás vitimas, alêm dos cavalheiros que mencionamos no penultimo número do *Bharat*, os srs. Sadecar, P. Suquercar, Ananta Quensova Naique e Caxinata Damodar Naique, importantes negociantes da mesma vila.

A proposito da subscrição, toma o *Bharat* a liberdade de significar, para os devidos efeitos, ao seu colega da *Terra* que não é verdade que os negociantes extrangeiros tenham concorrido para ela, apenas, com uma ou duas rupias, pois na propria relação que publica, encontrará negociantes extrangeiros cuja maioria tem subscrito importancias á altura de seus meios.

Antes de mais, justiça a quem de direito.

Agradecendo

Muito penhorado, o *Bharat* agradece ao importante ricaço e generoso fidalgo de Bombaim sr. Shantaram Naraena Dabholcar, o donativo de 50 rupias que lhe acaba de fazer.

De há muito que o sr. Dabholcar é conhecido no nosso meio pelo seu nunca acabar d. obras caritativas, podendo dizer-se, sem receio de desmentido que em semelhantes assuntos, não há quem lhe leve a primazia na classe dos *saraswatas*, por enquanto.

E' um facto; e contra factos não há argumentos nos quais, de resto, nem convem tocar, para que as nossas considerações sejam interpretadas como producto de lisonjas que sempre detestamos

Partido Indiano

Está para breve a publicação do orgão desta agremeação, segundo nos informam alguns dos seus marechais.

भा र त

गुरुवार श्रावण, शु० ४ थी १८४५

आमचें कर्तव्य.

लेखांक २ रा.

हम कौन थे क्या हो गये है और क्या
होगे अभी. आ ओ, विचा आज मिलकर
ये समस्यायें सभी.

——मैथिली शरण गुप्त

आपल्या गोमांतकीय हिंदु समाजाकडे पाहिल्यास तो अवनतावस्थेंत आहे, हें कोणासही कबूल करावें लागेल. याविषयीं उल्लेख आह्मीं प्रथमतः केलेला आहेच. पोर्तुगीज अमलाखालीं झालेल्या धर्मक्रांतीमुळें, लोकाना आपल्या जिवीतत्वाच्या अस्तित्वाची सुद्धां शंका येऊन, कांहींनीं पर प्रांताची वाट धरली. कांहींनीं धर्मावर व ईश्वरावर श्रद्धा ठेऊन आलेल्या संकटास तोंड देऊन, हिंदु धर्म व हिंदु देवता यांचें गोमांतकामध्यें संरक्षण केलें, याबद्दल आह्मीं आपल्या पूर्वजांचा फार अभिमान बाळगिला पाहिजे, व आभार मानले पाहिजेत. त्यावेळीं जर त्यांनीं धन दौलतीच्या आशेनें, धर्मत्याग केला असता, तर आज सर्वच गोमांतक प्रांत ख्रिश्चन झालेलाच दिसला असता. व आज जसे हे ख्रिश्चन लोक हिंदु संस्कृति, हिंदु आचार विचार, हिंदु तत्वज्ञान यांना पारखे झाले आहेत; तसेच आम्हीही झालों असतों, यांत शंका नाहीं. त्यावेळीं आलेल्या संकटामुळें व योग्य शिक्षणाच्या अभावीं आपला हिंदु समाज कर्तव्यशून्य झालेला आहे. आपणांला जगांतील इतर समाजासारखें पुढें आलें पाहिजे, ही भावना जरी मनांत असली तरी पण राजकीय परिस्थिति अनुकूल नव्हल्यामुळें उच्च भावनेचा लोप होत चालला होता. इतक्यांत प्रजासत्ताक राज्य पद्धति सुरु झाल्यानें सर्व परिस्थिति बदलली, व समतेचा कायदा लागू झाला. ह्या वेळींच महाराष्ट्रांतील चळवळींचा आपल्या समाजावर परिणाम होऊन आपले धर्म बांधव आपल्या देशाची सेवा ज्या प्रकारें बजावित आहेत, त्या प्रकारें आपणही कांहीं हालचाल केली पाहिजे याची जाणीव उत्पन्न होऊं लागली; परंतु संकट परंपरेंत सांपडल्यामुळें आमच्या समाजाला कर्तव्यमूढतेची ग्लानि आलेली आहे. ही कर्तव्यशून्यतेच्या रूपानें सर्वास दिसत आहे. परंतु यापुढें ही स्थिति बदलण्याकरितां आपण शक्य ते प्रयत्न केले पाहिजेत. तसेंच आपल्या समाजामध्यें काय दोष आहेत, ते कसे सुधारले पाहिजेत, वगैरे प्रश्न डोळ्यांपुढें आणून त्याचा विचार केला पाहिजे; तरच आमचा निभाव लागेल, नाहींतर इतर देश पुढें जाऊन, आम्हीं मात्र पुष्कळ मागें राहूं.

आपल्या गोमांतकांत देशहित भावनेनें प्रेरित होऊन ज्या संस्था काम करीत आहेत, त्या हाताच्या बोटानें मोजण्यासारख्याच दिसतात! हें असें कां व्हावें? आपल्या आंगीं असे कोणते दुर्गुण आहेत कीं, त्यामुळें अशा संस्था उदयास येत नाहींत. याचा प्रथम विचार केला पाहिजे.

पहिला दुर्गुण ह्मणजे स्वार्थत्यागाचा अभाव होय. स्वार्थत्याग ही भावना उच्च आहे. या भावनेनें प्रेरित झाल्याशिवाय कोणतीही मोठीं कामें पार पडत नसतात. बौद्ध धर्माचा इतिहास उदाहरणासाठीं घ्या. या धर्माचा प्रसार सर्व धर्मापेक्षां जास्त होण्यास, त्या धर्माच्या प्रसारकांचा स्वार्थत्याग होय. स्वतः गौतमबुद्ध राजपुत्र होता. जगांत वैराग्याला मुख्य कारण दुःख असतें, पण बुद्धाला कोणत्याच प्रकारचें दुःख नसून, उलट विलासाचीं सर्व साधनें त्याच्या बापानें त्याच्याकरितां तयार केली होतीं. पण त्या सर्व विलास–वस्तूंवर, प्रत्यक्ष बायकोवर, इतकेंच नव्हे तर नुकत्याच जन्मलेल्या एकुलत्या एका पुत्रावर सुद्धा लाथ मारून, मोक्षधर्माचा शोध लावण्याकरितां व जगांतील दुःखें शक्य तितकीं कमी करण्याकरितां, अखिल मानव जातीला कर्म मार्गाचा योग्य उपदेश करून निर्वाणाची प्राप्ती करून देण्याकरितां, सर्वसंगपरित्यागपूर्वक अरण्याची वाट धरली, व नवा धर्म स्थापन करून जगावर शक्य तितके उपकार करून ठेविले. तसेंच सम्राट अशोक याचा मुलगा महिंद्र व मुलगी संघमित्रा याना आपण एका सम्राटाचीं अपत्यें असतांही सर्वस्वाचा त्याग करून धर्मोपदेशकाचें व्रत स्वीकारून धर्मप्रसारार्थ सिलोनचा मार्ग धरला! अशा स्वार्थत्यागी स्त्री-पुरुषांची वाढ त्या धर्मांत झाल्यामुळेंच त्या धर्माची महति वाढून तो धर्म जगांतील बहुतेक सर्व देशांत पसरला; व त्यानें जगाची शक्य ती सुधारणा केली.

हल्लींच्या ऐतिहासिक काळांतील महाराणा प्रतापसिंह, शिवाजी महाराज वगैरे देशभक्त राज पुरुषांची कामगिरी सर्वश्रुतच आहे. शिवाजी महाराजांना एकाद्या बादशहाची सुभेदारी मिळून, चैनीनें दिवस घालवितां आले असते. परंतु आपल्या देशाकरितां काय वाटेल तें करूं, वाटेल तितके कष्ट सोसूं, ही स्वार्थत्यागाची उच्च भावना त्यांच्या ठायीं जागृत असल्यामुळेंच महाराष्ट्रांतील लोकांना स्वातंत्र्य मिळालें. पुढेंही अशीच भावना टिकली असती तर आजचा इतिहास कांहीं निराळा झाला असता. असो.

गोमांतकीय बंधूनो, हीं उदाहरणें आपल्या डोळ्यासमोर आहेतच. इतकेंच नव्हे तर आपण वर्तमान पत्रांमधून ब्रिटिश हिंदुस्थानांतील हकिकती वाचीतच आहों. दास बाबू सारख्यांनीं आपल्या महिन्याच्या हजारों रुपये उत्पन्नावर लाथ मारिली वगैरे वगैरे आपण वाचतों, परंतु यांपैकीं शतांश सहस्रांश तरी आपण आचरणांत आणतों काय? आपल्या समाजामध्यें असें एक तरी स्वार्थत्यागाचें उदाहरण दाखवितां येईल काय? याबद्दल आपणांला खरोखर लज्जा वाटली पाहिजे. आज आपण संस्था चालविण्याकरितां लागणाऱ्या पैशांचा सुद्धां साधारणपणें स्वार्थत्याग करण्यास तयार असत नाहीं. अमुक झालें पाहिजे वगैरे घरीं बसून पुष्कळ गोष्टी सांगतील. परंतु पैशांचा प्रश्न आल्याबरोबर पुष्कळशा सबबी उभ्या करतील! गोमांतकीय बंधूनो! आजपर्यंत ज्यांनीं ज्यांनीं आपल्या देशाकरितां स्वार्थत्याग केला, त्यांच्या पुढें ह्या सबबी नव्हत्या काय? परंतु त्यांनीं याकडे लक्ष न देतां आपल्या उद्दिष्ट कार्याकडे लक्ष दिलें, व त्यामुळेंच अशा लोकांच्या हातून देशोन्नतीचें कार्य घडून आलें. आज आपल्या समाजामध्यें बोलणारे पुष्कळ आहेत, परंतु करणारे अगदींच कमी. अशा लोकांनीं पुष्कळ बोलण्यापेक्षां कांहीं तरी करून दाखविल्यास आपल्या मातृभूमीची सेवा केल्यासारखें होईल. स्वार्थत्याग केल्याशिवाय कांहींही घडणें शक्य नाहीं. हें लक्षांत आणुन या पुढें कामास लागलें पाहिजे.

आमच्यांतील दुसरा दुर्गुण ह्मणजे परिस्थितीप्रमाणें दान देण्याची प्रवृत्ति नसणें अगर अपात्रीं दान देणें हा होय. आपल्याकडे पुष्कळ संस्था निघाल्या, परंतु टिकल्या मात्र नाहींत. याचें कारण इतर दुर्गुणांबरोबरच लोकांच्या आंगीं अशा संस्थानां मदत देण्याची जाणीव नाहीं हें होय. संस्था स्थापन होते वेळीं पुष्कळ सभासद होतील, परंतु महिन्या दोन महिन्यांत त्यांचा हा उत्साह मावळूं लागतो. महिन्याची ४ आणे वर्गणी सुद्धां देण्याचें यांच्या जीवावर येतें. आपले लोक अनेक निरुपयोगी व चैनीच्या कामांत पैसा खर्च करतील, परंतु एकाद्या सार्वजनिक कार्याकरितां एक पैसा सुद्धां देण्यास तयार होणार नाहींत. गोमांतकांतील हिंदु लोक अगदींच गरीब आहेत, त्यांना धर्मदायाकरितां पैसा खर्च करण्याचें सामर्थ्य नाहीं असें नसून, आपल्या लोकांत अशा लोकोपयोगी कार्याकडे पैसा खर्च करण्याची असावी तितकी प्रवृत्तीच नाहीं हें होय. आपले लोक, स्वतःची श्रीमती दर्शविण्याकरतां, लग्नमुंजीच्या वेळीं पाण्यासारखा पैसा खर्च करतील किंवा देवस्थानांतल्या उत्सवाची संख्या अधिक हो

शुद्ध निरयन पंचांग.

(ले० नारायण अ. ना. पाटणकर.)

हेल्लीं पंचाग हा विषय जो तो प्रतिपादण्यांस पुढें सरसावत आहे.. व पंचांगांत दुही माजल्यानें या विषयावर पाहिजे तें मत ठुसहून देण्यास आयतेंच फावलें आहे. ही सामान्यांची गोष्ट झाली. पण पहावें तों सुज्ञ ह्मणविणारे लोकहि कांहीं एक विचार न करितां अज्ञांचेंच अनुकरण करीत आहेत. गेल्या ता. १२-७-२३ च्या भारतांत श्री. वा. आ. देशप्रभू यांनीं एक दोन शब्द ह्मणून पंचांग विषयक कांहींसें लिहिलें आहे. पण सध्याच्या पंचांग विषयक नव्या जुन्या मतानुयांस निष्पन्न होण्याजोगें त्यांत कांहींच आढळत नाहीं. तर उलट 'सूर्यमाला शौरी पुंजाकडे जात असल्यानें पंचांगांत फरक आला.' इत्यादि अनेक चुकीचीं विधानें मात्र पुढें केलीं आहेत. व अज्ञानें भलताच गैरसमज उत्पन्न होण्याचा संभव आहे. शंभर वर्षांत फार तर सूर्य मालेची ३-४ विकला गती अनुभवास येईल. मग हजारों वर्षांनींही विश्वांतील गतीचा किंचित् फरक येईल असा आम्हां भूगोलवासी जनांस, सध्या नव्या जुन्या पचांगांत येत असलेल्या फरकाहून, तों अगदींच अल्प व पंचांगाशीं त्याचा कांहीं संबंध नाहीं. या फरकाचें कारण ह्मणजे ग्रहलाघवानंतर वीज संस्कार न करणें, अयनांश चुकीची प्रवृत्ति, ग्रहांच्या शरभोगीय अस्पष्टतेची गणीत सारिणी, आरंभ स्थानाची अशुद्धता इत्यादि होय. अर्थात सध्या या गोष्टींची शक्य ती सुधारणा व चुकीची दुरुस्ती करण्याचा नवीन पंचांगांत यत्न केल्यानेंच हा फरक येतो. व तो वास्तविकच आहे. पण मजा ही कीं, ग्रहलाघवास २११ वर्षांनीं विश्वनाथ दैवज्ञांनीं संस्कार केला, सूर्य सिद्धांत ब्रम्हगुप्त वगैरेनीं कालपरत्वें फरक केलाच पाहिजे असें कंठरवानें सांगितलें असतां, जुन्या पंचांगांतील ग्रहास्तोदय, युतिग्रहणें इत्यादींस महत्वाचें अंतर येत असतां, आमचे जुने लोक अंधपरंपरेस चिकटून बसले आहेत. ह्याला काय ह्मणावें? आमचे पंचांगकर्ते तर सांगली संमेलनांत पूर्णपणें मान्यता देतात व घरीं येऊन पुन्हां ग्रहलाघवी पंचांगें काढून आपला स्वार्थसाधूपणा प्रगट करून जनतेस घोटाळ्यांत पाडतात. आणि आकाशांत शुक्र दिसत नसतांहि लग्नें लावून पुनः आपलें धर्मपांडित्य दाखविण्यास कमी करीणार नाहींत. चंद्राच्या विक्षेदवृत्तिय चलनानें ग्रहलाघवकालीन तिथींहून सध्या फरक येऊन १२ अंश चालण्यास चंद्रास परममान ६७ घटी व लघुमान ५० घटी येतें. ही दृक्गणितानें सिद्ध होणारी गोष्ट सुद्धां निर्विकार मनानें न पाहतां, आपला पूर्वकालीन 'बाणवृद्धिरसक्षय' सुटला ह्मणून कांहीं रडगाणें गात आहेत. केतकरांस हीच तिथी पद्धति संमत असून त्यांचा विरोध केवळ आरंभस्थानासंबंधानें असून तो इकडच्यांच्या गांवीं नाहीं. रेवतीच्या योग्य ताऱ्यांपैकीं, झीटा' तारे शिवाय एकही निःशर नसल्यानें हींच आरंभस्थानीं घेणें योग्य आहे. व त्याचप्रमाणें नवीन ऊर्फ 'टिळक पंचांगांत' शुद्ध व सूक्ष्म पद्धतीप्रमाणें १८ अयनांश येत असल्यानें संक्रमणें नक्षत्र प्रवेश व अधिकमास यांत फरक येतोसा वाटतो. वाटतो ह्मणण्याचें कारण कीं, जुन्या पंचांगाची चूक सांचतां सांचतां एवढी आल्यानें तींत योग्य सुधारणा करण्याचा यत्न श्री. नाईक एम. ए. कोल्हटकर, आगाशे, पटवर्धन प्रभृतीनीं केला. व तोच कोणाहि पाश्चात्य पौर्वात्य ज्योतिषाचा अभ्यास केलेल्या तज्ञ माणसास योग्य वाटल्यावांचून रहाणार नाहीं. पण जनतेंतील कांहीं इसमांस अद्याप हें कळूं नये. व आकाशांत सूर्यसंक्रमणानें यंदा श्रावणच अधिकमास प्रत्यक्ष सिद्ध होत असतां पंढरपूर वगैरे भागांतील जुन्या पद्धतीस चिकटून राहिलेल्यांच्याच परंपरेस बळी पडून आषाढी एकादशी अधिक श्रावणांत करावी यापरती धार्मिक अवनती ती कोणती?

"दृश्यते तेन पक्षेण कुर्यातिथ्यादि निर्णयम" —वसिष्ट संहिता.

ह्मणजे आकाशांत येणाऱ्या दृग् गणितानुभवावरून तिथ्यादि निर्णय करावा. याप्रमाणें हजारों प्रमाणें देतां येतील. पण लक्षांत कोण घेतो? जर ग्रहलाघवाची निःस्तत; खरी आहे व पंचांगांत इष्ट ती सुधारणा अत्यावश्यक आहे तर मग अनेक ज्योतिषांनीं तयार केलेल्या या शुद्ध पंचांगास विरोध कां? अर्थातच दुराग्रह हेंच यावरून सिद्ध होतें. तात्पर्य, शास्त्रीय तत्व दृष्ट्या नीट विचार केल्यास जर आह्मांस शुद्ध पंचांन हवें आहे तर तें 'टिळक पंचांगाहून' निराळें होणार नाहीं. 'सिद्धेस्तै' इत्यादि ग्रहलाघवीय वाक्यांनीच वेध सिद्ध तिथी घेणें योग्य ठरतें. मग तिथींत फरक आला ह्मणून आकाशानुभवाविरुद्द तिथी मानून धर्मकृत्यें करणें शास्त्रबाह्य नव्हे काय? 'टिळक पंचांग' हें 'चंद्रार्कौ यथ साक्षिणौ' ह्मणजे दृक्प्रत्य सिद्ध आहे. येथें जुन्याची कोणतीच लटपट चालणें शक्य नाहीं. आतां अंधाभिमान धरणार त्याला कोण काय करील? ग्रहणास तासासव्वातासाचें ढळढळीत अंतर आलें असतां पुन्हां आमचें जुनेंच खरें ह्मणणें किती शहाणपणाचें आहे याचा विचार वाचकांनीच करावा. व निदान सूज्ञ ह्मणविणारांनीं पण शुद्ध पंचांगास अनुसरून सध्याच्या पंचांगी सांवाळ्या गोंधळास थोडा तर आळा घालावा, हेंच त्यांस भूषणावह होय. पुष्कळ जुनीं पंचांगें ग्रहलाघवावरूनच तयार केल्यानें त्यांचें बहुमत अर्थातच निरुपयोगी आहे. आज कै० केरोपंत नाना छत्र्यांपासून चाललेल्या पंचांग चळवळीचें हें दृश्य फल असल्यानें 'एकोचंद्रस्तमोहंति' या तत्वाप्रमाणें हें एकच पंचांग दृग्गणितानुभवसिद्ध आहे. म्हणूनच 'सत्यमेव जयते' प्रमाणें हें पंचांग आपली विजयध्वजा सर्वत्र फडकावील, यांत शंका नाहीं. अतां हटवादामुळें कांहीं दिवस गोंधळ माजून सामान्य लोकांची धांदल होणार खरी पण त्यास निरुपाय आहे. परंतु ज्यानां ज्योतिःशास्त्र तत्व समजलें त्यानीं पण विरोध सोसूनहि हें तत्व प्रचारांत आणलेंच पाहिजे. व असा इतिहासहि आहे.

वरील विवेचनावरून 'शुद्ध पचांगच वापरणें योग्य कां आहे, हें चाणाक्ष वाचक ताडतीलच. विशेष खुलासा खाजगींत अथवा जाहीरपणें जिज्ञासूंस देतां येईल. आज एवढ्यावरच वाचकांची रजा घेऊं.

—गोव्यांतील ता. १९ जुलईच्या महापुरांत अतिशय माती वाहून येण्याचें कारण असें समजतें कीं, अतिवृष्टीमुळें सत्तर प्रांतांतील कांहीं मोठमोठ्या डोंगराचे लहान मोठे भाग ढासळून जावून हा मृत्तिका संचय झालेला आहे. या डोंगराच्या अपघातांत कांहीं माणसें दगावल्याचेंहि समजतें.

—" लोलयें येथील श्री निरंकार देवालयाच्या नवीन कोंमिसांव मंडळीची निवडणूक होऊन आज चार महिने होत आले. परंतु जुन्या कोंमिसावांनें आपला चार्ज त्याच्या स्वाधीन अजून केलेला नाहीं. त्यामुळें देवालयाच्या कारभारास व्यत्यय येत असून संस्थानास अनेक रीतीनें नुकसान सहन करावें लागत आहे. सरकारनें इकडे लक्ष पुरवून, कायद्यावरहुकून नवीन कोंमिसावांकडे चार्ज येण्याविषयीं योग्य ते हुकूम फर्मावावे, अशी विनंति 'एक महाजन' करतात

ANUNCIOS

A arrematação ordinaria anual das avenças de despeza das comunidades de Quitol, Naqueri e Cuedém do ano de 1924, terá logar nos dias 21, 22 e 23 do corrente, pelas 12 horas, respetivamente, nos logares das suas sessões

Aos 4 de agosto de 1923

O escrivão ajudante

Manguexa Naiqui 1

tunamente a orientação do novo e bem impresso hebdomadario, desejamcs-lhe . no entrestanto, longa dura e perene prosperidades, *ab-imo pietroe*

Pro sinistrados

O sr. Shantaram C. Danaito, ativo empregado da Companhia de Caminho de Ferro de Mormugão mandou á nossa disposição a importancia de :7 rupias e 8 tangas, destinada aos sinistrados das inundações, importancia que representa o fundo angariado pelos habitantes daquele Porto.

O sr. Danaito torna-se merecedor de nossos elogios pelo altruista movimento promovido a favor dos perseguidos da sorte. Honra-lhe seja, porisso!

Consultorio

Abriu-o em Margão o sr. dr. Mucunda Govinda Camotim, distinto médico hindú, formado, há pouco, na nossa Escola Médica.

Pragtica Sanga

Está para breve a realização do 1 ° Congresso des'a agremeação politica hindù, congresso em que serão tratados vários assuntos de intéresse geral.

Antes tarde do que nunca!

A Verdade

Reapareceu êste semanario de Mapuçá sob a editoria do sr. adv. Zoirama Xete Colopo.

Representa, como nos informam, orgão dum dos partidos de Bardez.

Muita vida e muita prosperidade.

Boletim do Fomento

Recebemos e agradecemos um grosso e lindo volume do *Boletim do fomento* que abrange quatro numeros do ano 3°. da interessante publicaçao encetada pela Direcçao dos Serviços Agricolas, Florestais e Pecuarios

O livro recebido contem informações utilissimas ao desenvolvimento agricola do Paiz, informaçoes que, se fossem vulgarisadas na classe dos agricultores por meio de experiencias praticas, explicadas na lingua do Paiz, unica que o geral deles esta' habilitado a compreender, concorreriam para a felicidade desta terra que gosa da fama de ser essencialmente agricola.

E', pois, valioso o trabalho, digno de ser possuido por todos aqueles que zelam pelos interesses agricolas desta terra.

भा र त

गुरुवार श्रावण, शु० ११ शी १८४५

जनसेवा हीच ईश्वर सेवा.

—लाखों हमारे दीन दुःखी बंधु भूखों मर रहे,
पर हम व्यसनमें डूबकर कितना अपव्यय कर रहे.
क्या देश वत्सलता यही है? क्या यही सत्कार्य है?
क्या लक्ष जीवनका यही है? क्या यही औदार्य है?
दे कर उन्हे साहाय भरसक सब विपती व्यथा हरो.
निज दुःखसेही दुसरोंको दुःखका अनुभव करो.

बाबू मैथिली शरण गुप्त.
भारत भारती.

ईश्वरानें निर्माण केलेल्या सृष्टीमध्यें आज जें दुःखाचें साम्राज्य पसरलेलें दिसत आहे, त्यांत परम दयाघन प्रभूचा कांहींच दोष नसून, त्याच्या नियमाचें आपण योग्य रीतीनें पालन करण्यास विसरतों, त्याचेंच हें फळ होय. आपण जर योग्य नियमाप्रमाणें वागलों असतों, तर सर्व जगतामध्यें सुखसमाधान नांदलें असतें.

जगामध्यें मानव जातीची अशी होत असलेली दुर्दशा पाहून, उदार अंतःकरणाच्या महात्म्यांना लोकसेवेचें अवलंबन करावें लागतें, व ते अशा चुकलेल्या लोकांना मार्गावर आणण्याची खटपट करीत असतात.

सेवा हा पवित्र धर्म आहे. दुःखी लोकांना मदत करणें, संकटग्रस्तांना हात देणें, दुष्काळानें पिडलेल्यांना अन्नदान करणें, जलप्रलयानें सर्वस्वी निराधार झालेल्या लोकांना सर्व तऱ्हेची मदत करणें, अज्ञानानें मार्ग चुकलेल्यांना उपदेश करून मार्गावर आणणें, या सारखें पवित्र कर्तव्य दुसरें नाहीं. मात्र हें स्वतःच्या इच्छेनें व निरपेक्ष बुद्धीनें झालें पाहिजे. ईश्वरानें आपणाला मानव जातींत जो जन्म दिला आहे, त्यांत त्याचा उद्देश, आम्ही स्वतः खाऊन पिऊन स्वतःच्या मुलांबाळाचा सांभाळ करावा, एवढाच फक्त नसून, आमचे बांधव जे दुःखांत, संकटांत आहेत, त्यांना शक्य ती मदत करण्याकरितांच दिलेला आहे. जगामध्यें शांतता नांदून मानव जातीचें कल्याण व्हावें, अशी इच्छा बाळगणाऱ्या प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य ह्मणजे अशीं दुःखें शक्य तों कमी करण्याचा सतत प्रयत्न करणेंच होय. आपल्या बांधवांची सेवा करणें हेंच खरें माणुसकीचें लक्षण होय.

सेवा करण्याचे मुख्य दोन मार्ग आहेत. पहिला उच्च कोटींतील मार्ग म्हणजे स्वतःला या कार्यार्थ वाहून घेऊन, तत्प्रीत्यर्थ आपला देहसुद्धां खर्ची घालणें हा होय. दुसरा म्हणजे स्वतः संसार करीत असतांनाच आपल्याकडून शक्य त्या तऱ्हेनें व शक्य त्या द्वारानें सेवा करणें हा होय.

सेवेची कल्पना जुनी आहे. आमच्या हिंदुस्थानामध्यें त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणें घातलीं गेलेलीं कितीतरी धर्मशाळा व अन्नसत्रें दृष्टीस पडतात! आज जरी त्यांचा दुरुपयोग होत असला, तरी पण ज्या काळीं तीं निर्माण झालीं, त्यावेळीं त्यांची अत्यंत गरज होती यांत शंका नाहीं. शिवाय हिंदुस्थानांत बौद्ध धर्माचा उदय झाल्यानंतर भूतदयेला जास्त चालन मिळालें होतें. इ० सन ४०० मध्यें सुप्रसिद्ध चिनी प्रवासी फाहियान हा हिंदुस्थानांत आला होता. त्यानें आपल्या प्रवास वर्णनांत लिहून ठेविलें आहे कीं, 'या देशांतील मोठमोठ्या लोकांनीं गरीब लोकांकरितां रोग चिकित्सालयें काढलेलीं असून, त्यांमधून पुष्कळ गरीब लोकांना राहाण्याची सोय होते. तेथें त्यांना सर्व मदत फुकट केली जात असून, रोगमुक्त झाल्याबरोबर त्यांना आपापल्या घरीं पाठविलें जातें' यावरून त्यावेळींही आजच्या प्रमाणेंच जनसेवेचे प्रयत्न होत असत. सम्राट अशोक यानें बुद्ध धर्माचा स्वीकार केल्या नंतर पुष्कळ जनसेवेचीं कृत्यें केलीं. निरनिराळ्या रोग्यांकरितां इतकेंच नव्हे तर रोगी जनावरांकरितांही चिकित्सालयें बांधलेलीं होतीं. या शिवाय ठिकठिकाणीं धर्मशाळा, विहिरी, तलाव बांधून लोकांना ज्ञानाचा उपदेश देण्याकरितां आपले आदेशही खडकांवर खोदविले आहेत.

प्रत्येक धर्मातील मुख्य सिद्धांत ह्मणजे मनुष्य हा ईश्वराचा अंश आहे, हा होय. यावरून मनुष्य जातीची सेवा करणें ह्मणजेच ईश्वराची सेवा करणें होय. लोकसेवा हीच खरी ईश्वराराधना होय. भगवान बुद्ध तरी हेंच सांगतात. प्रसेनजित राजाला धर्मबोध करतेवेळीं भगवान बुद्ध ह्मणतात:— आपल्या गात्रांचा किंवा इंद्रियांचा उत्तम प्रकारें निग्रह करा. सन्मार्गाचा अवलंब करा. इतरांच्या हक्काची पायमल्ली करून स्वोत्कर्ष करण्याची हांव धरूं नका. जे दुःखी आणि दुर्बल विपन्न स्थितींत असतील त्यांच्या या दुर्बल स्थितीचें परिवर्तन करण्यास झटा व प्रेम संपादा. यावरून त्याचा सर्व भार जनसेवेवर होता असें दिसतें. आपले साधुवर्य तुकाराम महाराज यांनींही 'जे कां रंजले गांजले, त्यांसी ह्मणे जो आपुले, तोचि साधु ओळखावा, देव तेथेंचि जाणावा' या अभंगामध्येंसुद्धां ईश्वराची खरी सेवा ह्मणजेच जनसेवा हें चांगल्या रीतीनें सिद्ध केलें आहे.

पाश्चात्य लोकांत समाजसेवेचे प्रयत्न फार दांडगे आहेत. जगांतील कोणत्याही भागावर दुष्काळ अगर जलप्रळयासारख्या आपत्तीनें गांजलेले जे लोक असतील त्यानां मदत करण्याची त्यांची तावडतोब तयारी असते. कोट्यावधी रुपये ते लोक या कामीं खर्च करितात, इतकेंच नव्हे तर अशा कामीं खर्च करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे असें ते लोक समजतात. युद्धाच्या सुरवातीलाच जर्मन लोकांचा हल्ला बेलजम देशावर झाला. त्यामुळें बेलजम देश अगदीं उजाड होऊन, हजारों कुटुंबें निराश्रित झालीं, लाखों मुलें उघडीं पडून पोटापाण्याची सुद्धां व्यवस्था होण्याची पंचाईत झाली. अशा वेळीं अमेरिकन लोकांनीं त्या लोकांच्या मदती करतां धांव घेऊन, बोटींच्या बोटी भरून खाण्याचे पदार्थ व कपडेलत्ते पाठवून दिले, व त्या लोकांचें संरक्षण केलें. या प्रमाणेंच त्या लोकांचा दानधर्मात्मक प्रयत्न सदोदीत चालूच असतो. फादर दामियन व कुमारी नायटिंगेल या दोघांचे परिश्रम इतिहासांत अमर राहातील. फादर दामियन यानें स्वतः आपला सगळा जन्म रक्तपितीनें सडलेल्या लोकांची सेवा करण्यांत घालविला. रक्तपितीसारखा भयंकर रोग कीं ज्याचें नाव काढल्यास सुद्धां आंगावर शहारे येतात! त्या रोग्यांची सेवा करण्यांतच आपलें सगळें आयुष्य खर्च केलें. अखेरीस त्यास तो रोग होऊन त्याला स्वतःच्या प्राणाचा बळी द्यावा लागला! या प्रमाणेंच अशा प्रकारें कार्य करणाऱ्या युरोपमध्यें पुष्कळ संस्था चालू आहेत.

हिंदुस्थानांत मोपल्या बंडानें सगळा मलबार प्रांत उध्वस्त करून टाकला, व हजारों कुटुंबानां निराश्रित केलें. त्या वेळीं भारत सेवक समाज, पुणें, या संस्थेनें फार उपयुक्त कार्य केलें. लाखो रुपयांचा फंड गोळा करून त्या लोकांस मदत केली. याच प्रकारें या प्रसंगीं आर्य समाजानेंही महत्वाचें कार्य केलें आहे. बंगाल मधील दुष्काळाच्या वेळीं, सर प्रफुल्लचंद्र राय यांनीं ठिकठिकाणीं भिक्षांदेहीं करून वर्गणी जमा केली व अशा लोकांना मदत केली. या शिवाय सेवासदन, सोशल सर्विस लीग, सेवा समिति, रामकृष्ण सेवाश्रम वगैरे संस्था उत्तम प्रकारें जनसेवा करीत आहेत.

प्रस्तुत, गोमांतकामध्यें सांखळी, वळवई वगैरे इतर ठिकाणीं जलप्रळय होऊन जो कहर उडाला आहे तो दैवी आहे, यांत शंका नाहीं. यांत मानवांचा कांहीं दोष नसून, या गोष्टी ईश्वराधीन असतात. अशा वेळीं आपलें कर्तव्य ह्मणजे अशा दुःखी व निराश्रित लोकांना शक्य त्या तऱ्हेची

मि. शेक उस्मान	१–
रा. अनंत पुनाजी साटम	१–०
कॅप्टन शेक कासम (सावरमती)	२–०
सावरमती बोटीवरील स्टाफ.	६–२
रा. महादेव गंगाराम कदम	१–४
Mr. H. Frnandes	१–०
रा. दत्तात्रय विष्णु कांदे	१–०
Mr. Casmiro Luis.	१–०
श्री. रंगनाथ रा. सुभोळकर.	०–८
,, गोविंद सोयरू कामत	१–०
Mr F. V. De Sousa	०–८
,, विष्णु तुळाजी कवठणकर.	०–८
,, H. D. Kamath.	१–०
" Capt. Ponanj M. Husseu	१–०
	२७–६
किरकोळ	२
[पुढें चालू]	२७ ८

जेटी--मराठी शाळा.

मोर्मुगांव–हार्बर.

[खास बातमीदाराकडून]

प्रत्येकानें या पुण्यकारक सार्वजनिक कार्यास हस्तेंपरहस्तें यथाशक्ती कांहीं तरी मासिक मदत करून संस्थेला उर्जितावस्था आणावी व विद्यादानाचें पुण्य संपादन करावें अशी कळकळीची प्रार्थना आहे.

या शाळेंत एकंदर मुलें, इयत्ता इन्फंट पासून इयत्ता ४ थी पर्यंत ८० पासून परीक्षेकरितां ७७ मुलांचीं नांवें नोंदण्यांत आलीं. त्यांपैकीं परीक्षेचे वेळीं १९ गैरहजर असून ५८ मुलें परीक्षेस बसलीं. त्यांतून ५३ पास झालीं. हें शाळामास्तर श्री. शिवराम द. पै यांस भूषणावह आहे.

मी सेक्रेटरी निवडून आल्यानंतर माझी जबाबदारी ओळखून शक्य तितकें नुकसान सोसूनही २॥ वर्षें शाळा चालविली. व पुढेंही चालविण्याची माझी तयारी होती. परंतु, नेहमीं असल्या जागीं एकच मनुष्य राहिल्यास लोकानाही कंटाळा येतो. व उत्साही होतकरू माणसांस पुढें येण्यास सवड मिळत नाहीं. याकरितां कोणी उत्साही तरूण पुढें आल्यास मी माझा चार्ज आनंदानें त्याजकडे देण्यास तयार आहें. कोणत्याही कारणानें कां असेना, शाळेची भरभराट व्हावी एवढीच माझी मनापासून इच्छा आहे.

शेवटीं मी पुनः एकदां येथें जमलेल्या मंडळीस अशी नम्रपणाची विनंति करितों कीं, वरील शाळेचा रिपोर्ट मी आपणास वाचून दाखविला. त्यावरून आपणास त्यांतील अडचणीही समजल्याच. तरी शाळेचा उत्कर्ष होतो आहे त्यापेक्षां जास्त कसा होईल, या विषयाचा खल करावा. व एकाच इसमावर कामाचा व जबाबदारीचा बोजा न पडावा म्हणून कार्यकारी मंडळ नेमावें अशी सूचना करून मी आपली रजा घेतों.

या प्रमाणें रिपोर्ट वाचन झाल्यानंतर अध्यक्षांनीं तेथें जमलेल्या मंडळीस मुलांना उपदेशपर दोन शब्द सांगण्याबद्दल विनंति केल्यावरून रा. गणपत दत्तात्रय वायचळ यांनीं विद्यार्थ्यांचें व गुरूंचें कर्तव्यकर्म आणि विद्यार्थ्यांची योग्यता या विषयावर लहानसेंच पण चटकदार भाषण केलें. तसेंच, श्री. मुकुंदराव सरदेसाइ, से. मुरगांव शिक्षण संघ व नांवाअलीचे शाळामास्तर श्री. नारायण दत्तात्रय पई रायकर यांचीं मुलांस व सभाजनांस अनुलक्षून भाषणें झालीं. नंतर पास झालेल्या मुलांस अध्यक्षांचे हस्तें बक्षिसें देण्यांत येऊन अध्यक्षांनीं खालील आशयाचें भाषण केलें. ते म्हणाले,:—

आजच्या या काळांत आमच्या गोमांतकांत गांवोगांवीं खेड्या पाड्यांतून अनेक तऱ्हेच्या फंडांच्या आधारें संस्था स्थापन करून शिक्षण दिलें जात आहे, हें ह्या देशाच्या उन्नतीचें लक्षण होय. जेटी हा एक लहानसा गांव असतां या ठिकाणीं शाळा असून त्यांत ८० मुलें असणें हें आमच्या काळांतील शिक्षणा विषयीं गोडी असल्याचें दर्शक होय. शाळेची जागा अगदींच आकुंचित आहे; त्या प्रमाणें ८० मुलांचें शिक्षण एकाच शिक्षकाकडून होणें अशक्यच आहे. या दोन मोठ्या अडचणी आपल्या नजरेस आल्याचें सांगून व त्या दूर होण्याचें कारण पैशाचा अभाव असल्याचें सांगून सर्वांस त्यांनीं खासगी द्वेष भेदभाव बाजूस ठेऊन केवळ कार्याची महती लक्षांत आणून शक्यनुसार मदत करण्याविषयीं फार कळकळीची विनंति केली. दोन वर्षें झालीं. लोकांकडून योग्य मदत न मिळाल्यामुळें संस्थेचे सेक्रेटरी श्री. शां का. दणाईत यांनीं उदार अंतःकरणानें झालेली, नुकसानी सोसून व इतर मेहनत घेऊन संस्था कशीबशी जिवंत राखून शिक्षणाविषयीं असलेली आपली सहानभूती प्रगट केली, याबद्दल त्यांचें फार कौतुक केलें. व या पुढें संस्थेस कार्यकारी मंडळाची जरूर असल्याचें सांगून मुष्टीफंड सुरू करण्याबद्दल विनंति केली. व शेवटीं शाळेची एकंदर व्यवस्था त्याचप्रमाणें शिक्षणक्रम आपणांस आवडल्याचें दर्शवून व परीक्षेंत बक्षिसें मिळालेल्या मुलांचें अभिनंदन करून आपलें भाषण संपविलें.

नंतर सेक्रेटरी यांनीं योग्य शब्दांत सर्वांचे आभार मानल्यावर मुलानां खाऊ देण्यांत येऊन अध्यक्षांस व सभाजनांस हार व तुरे, वाटण्यांत आले. अशा रीतीनें हा समारंभ उत्कृष्ट रीतीनें पार पडला.

—राष्ट्रीय मुमुक्षु, अडपई– यांचे लेख येत्या अंकापासून प्रसिद्ध होतील. तसेंच प्रो. दत्तात्रय व्यं० पै यांच्या पोर्तुगीज भाषा प्रवेशावर येत्या भारतांत आमचा अभिप्राय येईल.

—मडगांच्या "आ तेन्ह'पत्र'वर भरण्यांत आलेल्या क्रिमिनाल खटल्यांची संख्या १४ वर गेली आहे!

—म्हापशाच्या माध्यमिक शाळेचे प्रो० वासुदेव शं. बोडके यांची दुसरीकडे नेमणूक झाल्यावरून त्यांच्या तेथील शिष्यवृंदानें प्रोफेसर साहेबांचा सन्मान केला.

ram os srs. Alferes Vilar e Condorceth Pereira, autoridades de Sanguem para que a inundação aqui havida não semeasse desolação nas povoações marginais do rio daquela localidade.

Registando estes informes com verdadeiro desvanecimento, ás referidas autoridades dirigimos daqui um sincero e comovido *muito obrigado*, em nome dos acudidos.

Um milagre...

Não há duvida que o nosso Pais é *essencialmente* catolico. E porque ele é muito catolico é abençoado por Jesus Cristo, este *Deus-Homem* que fez o milagre da multiplicação de pãis.

Se Jesus Cristo operou *in vita* aquele milagre que os evangelhos registam com uma divina religiosidade, cá entre nós Ele está, *post mortem*, operando outro prodigio de alto valor multiplicativo.

E' o miraculoso caso da multiplicação de jornais do Paiz. Se não, vejam: tinhamos primeiro o *primeiro* diario *O Heraldo*; dele surgiram mais tres: *Heraldo*, *O Comercio* e *O Diario da Noite*; possuiamos um só bissemanario *O Ultramar* de cujo seio brotou *A Terra*; havia uma só *A India Portuguesa*, mas desde a recente data existe mais uma sem *A*.

¿Não é esta multiplicação de jornais devida á tendencia miraculosa do Senhor Cristo?

Nova formula...

Sugere-nos um nosso leitor que adoptemos a formula "é, mais que certo" para circular a quatro ventos boatos de toda a sorte e *corte*: verdadeiramente verdadeiros, provavelmente verdadeiros, e, tambem, *falsamente* verdadeiros...

E'. sem duvida, original a formula, ainda que, uma vez, tenha sido usada pelo *papagaio* disntrucção primaria.

E' *mais que certo* que a dita formula é original para, sem peias nem barreiras, divulgar originalidades originalmente originais.

E baseados na mesma formula podemos dizer, sem ofensa da moral publica nem choque...ao senso comum:

E' *mais que certo* que o sr. Roberto Bruto da Costa vai ser nomeado administrador das comunidades de Salcete.

E' *mais que certo* que o sr. Borges Vas pediu a exoneração do seu lugar de administrador das comunidades das ilhas.

E' *mais que certo*, porisso que se diz, diz-se consta, corre fala-se, rumoreja-se, é boato, comenta-se á boca cheia, que o sr. Gomes Pereira vai ocupar a vaga do sr. Vas.

E' *mais que certo*...mas basta porque *è mais que certo* que tais boatos divertem muito cavalheiros do feitio daquele taful que comprara o tal papagaio em troca do dinheiro que reservara para enfeitar com um lindo par de botas os seus não menos lindos pés...

Caturrice...

Não deixa de ter graça a caturrice do sr. *Ze Rufo*, velho sectario do Partido Indiano.

Rialmente, sentia-se grande falta de quem puzesse a mocidade actual, buliçosa e divertida, ao facto da historia antiga dos que hoje supõe trazer a Republica nos seus insaciaveis estomagos...

Kordo' Pascu'

E' realmente bastante moralisador o conto d *Kordo' Pascu'* relatado na *India Portuguesa* pelo sr. Zebedeu, sicologista de alto valor moral.

Simplesmente, é pena que muito papalvo caia ainda nas ardilosas rédes, tecidas por tipos da laia do dito *Kordó*...

Fiquem, pois, sabendo que o actual *Brotero* corresponde, sem tirar nem pôr, ao antigo *Kordo'* que Deus haja na sua santa gloria...

गोंदा–गोरक्षक संस्था.

—ता. १७-८-१९२३ रोजीं पणजीच्या श्री महालक्ष्मीच्या देवालयांत तेथील हिंदू नागरिकांची सभा भरून वरील नावांची संस्था स्थापण्यांत आली. रामचंद्र नारायण लवंदे यांच्या सूचनेनें लोकप्रिय रामचंद्र पां. वैद्य यांनीं सभेचें अध्यक्षस्थान मंडीत केलें होतें. प्रसंगास अनुसरून, अध्यक्षांशिवाय दो० शांताराम साखरदांडे, उपेंद्र कामत तळावलीकर, शिवा पटू पै आंगले इत्यादि गृहस्थांची भाषणें झाल्यावर पुढील व्यवस्थेसाठीं श्रीनिवास शे. धेंपे, रामचंद्र पांडुरंग वैद्य, मथुरादास लखमीदास गुर्जर, रामचंद्र नारायण प्रभू लंवदे, बायलो मरणो नाईक व नानू तारकर पेडणेंकर या नागरिकांचें एक कमिशन नेमण्यांत आलें.संस्थेची नियमावलि तयार करण्यासाठींहि शांबा राव सरदेसाई, शिवा पटू पै आंगले, विठ्ठल स. सुंगठाणकर, विठ्ठल ना. पानवेलकर व व्यंकटेश सूर्यराव देसाई या नागरिकांची दुसरी कमेटी, नेमण्यांत आल्यावर प्रस्तुत संस्थेचे 'आत्मा' नाना सगुण नाईक चोपडेंकर यानीं भिक्षेच्या रुपानें जमविलेली १५ रुपयांची रक्कम मथुरादास ल० गुर्जर यांच्या पेढीवर व्याजानें ठेवण्याचें ठरून, समारोप व आभारप्रदर्शनादि विधी होऊन सभा बरखास्त झाली.

— महापुरानें अनाथ बनलेल्या लोकांच्या मदतीसाठीं फंड गोळा करण्याचें काम जोरांत आहे.

भारत

गुरुवार श्रावण, व० ४ थी १८४५

श्रीकृष्ण–चरित्र.

—यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानम धर्मस्य तदात्मानं सृजाम्यहंम् ॥ १ ॥ —गीता.

श्रावण वद्य ८ मी ह्या दिवशीं एका थोर महात्म्यांचा जन्म झाला आहे. आपल्या हिंदुस्थानांतील बहुजनसमाजाच्या समजुतीनें हा ईश्वराचाच अवतार झाला, असा विश्वास अद्याप दृढ आहे. हिंदुस्थानांतील असा एकही गांव नाहीं कीं, तेथें श्रीकृष्णाची पूजा होत नाहिं. श्रीकृष्णाच्या मूर्तींचीं हजारों मंदिरें असून, त्यांमधून त्याची पूजा अर्चा अखंड चालू आहे.

थोर पुरुष—ज्यानां सामान्य जनता ईश्वराचे अवतार समजते, 'असे महात्मे—योग्य परिस्थितींत जन्मास येतात, किंवा ती परिस्थितीच अशा पुरुषानां जन्म देते. आणि असे महात्मे विशिष्ठ परिस्थितींत उत्पन्न झाल्यानेंच मानव जातीचें कल्याण झालेलें आहे. जेव्हां जेव्हां धर्माला ग्लानी येते, लोक आपल्या कर्तव्यापासून पराङ्मुख होतात. धर्माचें शुद्ध स्वरूप जाऊन त्यास विकृतावस्था प्राप्त होते. तेव्हां तेव्हां असे थोर पुरुष उत्पन्न होऊन, आपल्या उपदेशानें अगर अन्य मार्गानें लोकांना मार्गावर आणीत असतात. खिस्त पूर्व सहाव्या शतकापूर्वीं हिंदू धर्माला असेंच विकृत स्वरूप प्राप्त झालें होतें. धर्म ह्मणजे अरण्यांत जाऊन देह दंडन करणें असें कांहीं लोकांना वाटत होतें; तर कांहींची यज्ञ याग केले असतानांच मोक्ष मिळण्याचा संभव आहे, अशी भ्रामक समजूत प्रचलित असल्यानें, यज्ञ यागाचें प्राबल्य वाढून निरपराधी प्राण्यांचा वध होत होता. अशा वेळीं गौतम बुद्धांचा जन्म झाला. त्यांनीं आपल्या दिव्य उपदेशानें व शुद्धाचरणानें ही स्थिति बदलून टाकली. अरण्यांत जाऊन देह दंडन करणें यांत मोक्ष नसून, लोकांचें कल्याण करणें, स्वतःचे वर्तन अत्यंत शुद्ध ठेवणें, व दुसऱ्याचें मनानें सुद्धां वाईट न चिंतिणें यांतच खरा मोक्ष आहे. या मताचा त्यांनीं प्रसार केला. त्यांच्या स्वतःच्या स्वार्थत्यागाचा व शुद्ध वर्तनाचा लोकांच्या मनावर इतका पगडा बसला कीं, मोठमोठे विद्वान् त्यांच्या मताला जाऊन मिळाले. लोकांत भिक्षुसंघाविषयीं अत्यंत पूज्यबुद्धी उत्पन्न होऊन, ह्या संघांत शिरलेल्या लोकांच्या निर्वाहाची तजवीज जनतेनें केली. पुष्कळ राजांनीं अशा भिक्षूंना रहाण्यासाठीं मोठमोठे विहार म्हणजे मठ बांधून दिले. परंतु कांहीं काळानें हीही परिस्थिति बदलली. भिक्षुसंघांत प्रवेश झाल्यानंतर कोणत्याच प्रकारची पंचाईत नसल्यानें आळशी लोकांचा ह्या संघांत भरण्यानें भरणा होऊं लागला! अरण्यांतील हे विहार. शहरांप्रमाणें गजबजून गेले. आळसामागून अनीतीचा प्रसार आपोआप होत असतो. तदनुसार भिक्षुसंघांत अनीतीचीं कर्में होऊं लागलीं व ह्या धर्मालाही विकृतावस्था प्राप्त झाली. अशा वेळीं आद्य शंकराचार्यांचा जन्म झाला. व त्यानीं थोड्याच काळांत सर्व हिंदुस्थान देश प. त ब्राम्हणं धर्मात धर्मी केला! सारांश, उन्नति काय अथवा अवनति काय प्रत्येक राष्ट्र, समाज व धर्म यांनाही प्राप्त होत असते; प्रकृतीचा हा नियमच आहे. जें चाक उंच गेलें तें खालीं आलेंच पाहिजे; व खालीं आलेलें चाक पुन्हां वर गेलें पाहिजे. श्रीकृष्णाच्या वेळीं अशीच परिस्थिति उत्पन्न झालेली होती. त्यावेळीं आर्यदेश अत्यंत भरभराटींत होता. महा-भारत-काळीं हिंदुस्थानच्या उन्नतीचा कळस झालेला होता. देशांत समृद्धि असल्याकारणानें राजे वगैरे मोठ्या लोकांत विलासीपणा शिरला होता; व ते मदांध झाले होते. प्रत्यक्ष कंसानें आपल्या बापाला औरंगजेबाप्रमाणें कैदेंत टाकून, सिंहासन बळकाविलें होतें. साधारण लोकसमाज संसार सोडून संन्यास मार्ग स्वीकारणें हेंच फक्त आयुष्यांतलें मुख्य कर्तव्य असें समजत होता. अशा आणीबाणीच्या वेळीं खऱ्या कर्ममार्गाचा उपदेश करणारा कोणीतरी महात्मा पाहिजे होता. संसारांत राहून निष्काम कर्म करणें हाच मोक्ष होय. श्वासोश्वास करणें हें सुद्धां कर्म करणेंच असल्यानें, अरण्यांत गेलों तरी कर्म सुटणें शक्य नाहीं. याकरितां, संसारांत राहूनच मोक्षपद मिळवितां येतें. या मार्गाचा उपदेश करण्यासारखी परिस्थिति उत्पन्न झाली होती; आणि अशा परिस्थितींतच श्रीकृष्णाचा जन्म झाला.

श्रीकृष्ण हे ईश्वराचे अवतार आहेत; असें बहुजन समाज मानीत आहे, आणि याच कारणामुळें त्यांची ठिकठिकाणीं पूजा होत असते. बहुजन समाजामध्यें श्रीकृष्णाविषयीं काय कल्पना आहे? बाळपणामध्यें दहींदुध चोरून खाणारा, गोपींशीं व्यभिचार करणारा, तारुण्यामध्यें हजारों बायकांशीं लग्न करणारा, युद्ध करण्याच्या तयारींत नसतांना कपटानें द्रोणादिकांचा वध करणारा, इत्यादि समजुती प्रचलित आहेत. एका बाजूला ईश्वराचें अवतारत्व व दुसऱ्या बाजूला या अशा कल्पना: यांवरून काय सिद्ध होतें? ईश्वरचरित्र असें असूं शकेल काय? आपल्या लोकांना असें वाटतें कीं, संस्कृत भाषेमध्यें जे जें कांहीं लिहिलेलें आहे, तें खोटें असण्याचा संभव नाहीं. त्यांत कांहीं शंका काढणें म्हणजे महत्पाप करणें होय. परंतु ही भावना ठीक नाहीं. ईश्वर चरित्रावर असे आरोप ठेवणें म्हणजे त्याचें ईश्वरत्व नाहींसें करणें होय. यासंबंधी साहित्यसम्राट बाबू बंकिमचंद्र

श्रीमंत दाभोळकर

श्रीमंत दाभोळकरांस दिलेली "चंदनाची उपमा अन्यथा होणार नाहीं अशी माझी मनोदेवता साक्ष देते. ते धार्मिक असल्यामुळें आपल्या सारस्वत बंधूंच्या मुलानां वेदविद्येचा संस्कार व्हावा अशी त्यांची इच्छा प्रबल झाली. श्री दत्तवाडी हें स्थान वेदपाठशाळा स्थापन करण्यास यथायोग्य वाटल्यावरून यंदाच्या अक्षय्य तृतीयेच्या सुमुहूर्तानें तशी व्यवस्था करण्याचा त्यांचा विचार ठरला. 'अधिकस्य अधिकं फलं' ह्या दृष्टीनें वेदविद्येचा गोव्यांतील सारस्वत समुहास सुलभपणें फायदा घेणयस ही एक सवलत दिली. पर प्रत्ययनेय बुद्धीचा आश्रय करून किंवा ईरेस चढून ह्या कार्यास ते उद्युक्त झाले नाहींत. प्रस्तुतच या शाळेस कायमचें स्वरूप न देतां ती एक वर्षापुरती असावी असें दूरवर विचारांतीं निश्चित केलें.

अक्षय्य तृतीयेचा सुमुहूर्त साधण्यास विद्वान शिक्षकाची योजना करण्याची तजवीज चालली असतां सांखळी तालुक्यांतील सूर्ले येथें राहणारे वेदमूर्ति गदाधर शास्त्री यांनीं अध्यापकाची जागा स्वतःला मिळावी या हेतूनें श्रीमंत दाभोळकर ह्यांची पूर्व दिवशीं मुलाखत घेतली. बोलाविलें नसतांही ते आपण होऊन चालत आले. तरी मंगेशच्या वेदपाठशाळेची खोटी करून स्वतःच्या शाळेवर त्यांची नेमणूक करण्यास दाभोळकरांनीं माघार घेतला. गदाधर शास्त्री हे त्या वेळीं मंगेशच्या वेदपाठशाळेचे शिक्षक होते. तेथून त्यांची उचलबांगडी करून सांखळींतील शाळेवर स्थापना केली हा दोषारोप पदरांत घेण्यास दाभोळकर तयार नव्हते, गदाधर शास्त्री नव्हते. तरी अक्षय्य तृतीयेचा मुहूर्त अवश्य साधलाच असता. हें ते शास्त्रीबुवा कबूल करतील.

दाभोळकरांचा निर्धार पाहून 'मंगेशची शाळा थोड्या दिवसांनीं बंद पडणार, तेथील संबंध सोडून दिला, पुढील व्यवस्था बघून घेईन, ठरविलेल्या मासिक पगारांत पांच रुपयांची मात्र वाढ करवी अशी गदाधर शास्त्र्यांनीं प्रार्थना केली. संबंध सोडून दिला असें निश्चयात्मक उत्तर ऐकून व विद्वत्तेवर लक्ष देऊन शास्त्रीबुवांस दाभोळकरांनीं रुकार दिला, अर्थात गदाधरांनीं एक वर्षाची कबुलायत दिली व अक्षय्य तृतीया मितीस सारस्वत वेदपाठशाळा सुरू झाली.

थोडे दिवस लोटले तोंच 'मंगेशच्या शाळेच्या चालकांनीं आणखी पांच रुपये जास्त देऊं केले असून त्यांशीं स्वतःला वितुष्ट पाडतां येत नाहीं' अशी गदाधरांची सबब पुढें करून एक वर्षाची दाभोळकरांशीं केलेली कबुलायत परत घेतली. दाभोळकरांनींही कोणत्याच प्रकारची हरकत न घेतां गदाधरांच्या खुषीस अनुसरून त्यांनां कायमची रजा दिली. हेंच कारण श्री दत्तवाडींतील वेदपाठशाळा अवघे वीस दिवस चालून तज्ञ शिक्षकांचे अभावीं कांहीं दिवस बंद पडण्यास झालें. शाळा बंद राहिली ह्याचें श्रेय गदाधरशास्त्र्यांकडे आहे. तेच ह्या श्रेयाचे अधिकारी होत.

स्वतः मंगेशच्या शाळेवर काम करून सांखळींतील शाळेवर फडके ह्या आडनावांच्या शास्त्र्याची सोय करून द्यावी अशा गदाधरशास्त्र्यांचा बेत होता, हें त्यांचें कारस्थान डळमळलें, कारण शास्त्र्याची शाळेवर योजना करण्याचा हक्क दाभोळकरांचा होता, शिवाय नुसती नावांची शाळा चालवावयाची नसून विद्यार्थ्यांना यथान्याय शिक्षण मिळावें असा त्यांचा मनोदय होता. अल्प काळ शाळा बंद असलेली पत्करली, पण कसलेलाच शास्त्री ठेवायचा असा त्यांचा करारी स्वभाव, तदनुरूप त्यांना यश प्राप्त झालें व मनीषा पौर्णिमेच्या सुमुहुर्तानें [व्यासपूजेच्या] पूर्ण झाली.

ह्या शाळेवर देखरेख ठेवण्याचा मान माझ्या वांट्यास आला, ह्या बद्दल श्रीमंतांचा मी आभारी आहें. एवढाच माझा ह्या शाळेशीं संबंध आहे. वरील विवरणांत गदाधरांवर मिथ्याभिशाप बिलकूल नाहीं. गदाधरांच्या अंगीं सरळपणा, नियमितपणा आणि सत्यप्रीति ह्या त्रयीची योग्यता ओळखण्याची पात्रता असती तर त्यांची विद्वत्ता विशेष खुलली असती.

डि० फंड ४ आणे.

गणेश सदाशिव शिरोडकर.

चुकीची दुरुस्ती:—गेल्या अंकांतील श्रीमंत दाभोळकर या लेखांतील श्रीमत्, धीमत् व विद्वन् या तीन शब्दावर नजर चुकीमुळें अनुस्वार घातला गेला आहे. तो वाचूं नये.

rermos conservar em tróca da liquidação moral, consequencia do egoismo vergonhoso que não é raro encontrar-se neste ambicioso mundo de Satanaz...

Duelo? *Partir a cara*?

São palavras de infundir terror, mas ...aos medrosos.

Mas, porque é que o sr. Roberto Bruto da Costa não há de experimentar a sua denodada bravura com os srs. Luiz de Minezes, Libério Pereira ou José Ignacio de Loiola?

E olhe que são esgrimistas a valer os referidos jornalistas!

Contra "A Terra"

Foram instaurados, *por enquanto*, contra este bissemanario de Margão 18 processos crimes, correspondendo tres processos a cada uma das letras que entram na formação do seu titulo *A-T-e-r-r-a*.

¿Que darão em resultado esses 18 processos?

N a d a — respònde-nos um

Boto, cá da vizinhança, profeta de nome, renome e cognome, por quanto, diz êle, *nada* resta tirados *noves fora* do numero 18.

Nada que faça deslustrar o prestigio jornalistico d*A Terra* —está bem de se vêr.

Ao sr. Mariano Rebelo

O cargo de administrador concelhio de Quepem é o *lugar do erro* ou é erro aceitar tal lugar?

Se uns afirmam a primeira alternativa, outros confirmam a segunda, e ninguem infirmando nenhuma delas.

Como, porem, os apreciadores do assunto em questão são incompetentes, porque nunca *cantaram* nem *cacarejaram* do *poleiro* da referida administração, desejavamos saber sobre a importante materia a autorisada opinião do sr. Mariano Rebelo para sciencia nossa ... e consciencia de Sua Ex.cia...

भारत

गुरुवार श्रावण, व० ११ शके १८४५

श्रीकृष्ण-चरित्र.

[उत्तरार्ध.]

यानंतर श्रीकृष्णाचें महत्त्वाचें काम म्हणजे कंसवध हें होय. आपणांस प्रतिस्पर्धी तयार झाले असून, ते गोकुळांत छपून आहेत, असें कळून कंसानें त्यांचा नाश करण्याचें योजिलें. धनुर्मुख व मल्लयुद्ध पाहाण्यासाठीं म्हणून, अक्रूरास पाठवून श्रीकृष्ण व बलराम यांना मथुरेंत आणिलें. श्रीकृष्णाला मारण्याकरितां मोठमोठ्या मल्लांना आगाऊ सूचना देऊन ठेविल्याच होत्या; व शिवाय मस्त हत्ती आंगावर सोडून चिरडून मारण्याची तजवीजही करून ठेवली होतीच. मथुरेंत पाऊल टाकतांच कंसाच्या रंगाऱ्याच्या दुकानांत जाऊन, कृष्णानें त्याजकडे वस्त्रें मागितलीं; ती मागणी त्यानें झिडकारून लावल्याकारणानें, कृष्णानें लगेच त्यास यमसदनास पाठविलें. पुढें हें प्रकरण विकोपास जाऊन श्रीकृष्णानें चाणूर मुष्टिक यासारख्या मल्लाना त्याच गतीस पाठविलें. नंतर सिंहासनावरून ओढून काढून कंसाचाही वध केला! व त्याचा पिता उग्रसेन यास गादीवर बसविलें. या वेळीं मथुरेचें राज्यपद श्रीकृष्णानें स्वीकारावयाचें, कारण कंसवधामुळें सर्व राज्य त्याचेंच झालें होतें, आणि स्वतः उग्रसेन ही त्यास राज्यपद स्वीकारण्यास आग्रह करीत होता, तरी त्यानें त्याचा स्वीकार केला नाहीं. यावरून इतक्या लहानपणीं सुद्धां त्याच्या आंगीं किती थोर गुण वास करीत होते, याची कल्पना होते.

पुढें रामकृष्णानीं काशीकर सांदिपनी ऋषीं यांजवळ उज्जनीस राहून, ६४ दिवसात सर्व वेदांचें सांग शिक्षण घेऊन, शिवाय अस्त्रविद्येचेंही शिक्षण घेतलें, असें वर्णन पुराणांत आहे. इतक्या थोड्या मुदतींत सर्व विद्येचें सांग शिक्षण मिळविणें अत्यंत कठीण आहे. श्रीकृष्ण हा शस्त्रास्त्रविद्येप्रमाणें वेदविद्येंत सुद्धा पारंगत असल्याचें राजसूय यज्ञाचे वेळीं भीष्माकडून सिद्ध झालेलें आहे. शिशुपाळनें श्रीकृष्णास अग्रपूजेचा मान देण्याविषयीं हरकत घेतली, त्या वेळीं भीष्मानें स्पष्ट सांगितलें कीं, श्रीकृष्णापेक्षां अधिक विद्वान व सर्व विद्यांत निपुण असा मानव लोकांत दुसरा नाहीं. या विषयीं बकिमचंद्र म्हणतातः श्रीकृष्णानें १० वर्षें तप केलें असें महाभारतांत लिहिलें आहे, यावरून त्यानें सर्व विद्या शिकण्यांत बराच काळ घालविला होता असें दिसतें.

मगध देशाचा राजा जरासंध् यानें आपल्या दोन मुली कंसास दिल्या होत्या, त्यांच्या मनांत पतिवधामुळें रामकृष्णांविषयीं द्वेषाग्नि धुमसत होता. त्यांनीं आपल्या बापाजवळ जाऊन श्रीकृष्णाचें पारिपत्य करण्याविषयीं सांगितलें. त्यावेळीं जरासंधानें आपल्या मांडलिकांसह येऊन मथुरेस वेढा दिला. परंतु रामकृष्णांनीं मोठ्या शौर्यानें त्याला तोंड दिल्याकारणानें, त्याचें कांहींच चालेनासें होऊन, तो परत गेला, पण त्यानें पुन्हां मथुरेवर स्वारी करण्याची तयारी केली. मथुरेची एकाच वेढ्यामुळें आधींच पुष्कळ खराबी झाली होती, व पुन्हां आणखी हा वेढा पडून फारच नाश होणार, त्याकरितां यादवांनीं असें ठरविलें कीं, ज्या अर्थीं जरासंधाचा सगळा राग रामकृष्णांवर आहे, त्या अर्थीं त्यांनींच कांहीं काळ दक्षिणेंत जाऊन राहावें. त्याप्रमाणें रामकृष्ण दक्षिणेंत आले. वाटेंत श्री परशुराम त्यांना भेटले. त्यांना श्रीकृष्णानें नम्र शब्दांनीं विचारलें: आपण जमदग्निपुत्र भार्गव राम आहां. आपण सर्व ऋषींमध्यें श्रेष्ठ असून, क्षत्रिय कुळांचाअनेक वेळां नायनाट करून टाकला आहे, आपण एका बाणानें समुद्र मागें हटवून, शूर्पारक नांवाचें नगर वसविलें आहे, व सह्याद्रीचे पश्चिमेस एक मोठा देशच निर्माण केला आहे. तुम्हीं महासमर्थ आहां. तेव्हां अशा संकटसमयीं आम्हांस योग्य ती सल्ला देऊन आमचें रक्षण करा. या विनंतीप्रमाणें परशुरामानें गोमंत पर्वतावर राहाण्याची सल्ला दिल्याकारणानें ते तेथें जाऊन राहिले. तेथेंहि जरासंधानें त्यांची पाठ पुरविली; पण त्याचें कांहीं न चालतां रामकृष्णांनीं त्याचा पराभव केला.

गोमंत पर्वताचें जें वर्णन हरिवंशामध्यें आलेलें आहे. त्यावरून रामकृष्णांच्या चरण स्पर्शानें ही आपली गोमांतक भूमी पुनित झाली आहे असें दिसतें. या वर्णनांत गोमंत पर्वतावरचे जलौघ, धबधबे, निरनिराळ्या प्रकारचीं कमलें, सृष्टीची सुंदरता इत्यादि जें वर्णन आहे तें आपल्या गोमांतकाला लागू पडतें. या वर्णनांत आलेलीं जलौघ कमलें गोकुळ अष्टमीचे दिवशीं श्रीकृष्णास वाहून त्याची पूजा करणें हें मोठें पुण्य आहे, असें अद्याप गोमांतकांतील पुष्कळ भाविक लोक मानीत असतात. ह्या पर्वतावर बलरामानें यथेच्छ सुरापान केल्याचें वर्णन हरिवंशांत आहे! यावरून ही मद्यपान विषयक सुधारणा! गोमांतकांत प्राचीन काळापासूनच पूर्णावस्थेस पोंहोचल्याचें कळून एक प्रकारचें सखेदाश्चर्य वाटतें.

श्रीकृष्णाचें लग्न रुक्मिणीशीं झालें, त्यावेळीं त्याचें वय २५ वर्षांचें व रुक्मिणीचें १८ वर्षांचें होतें. शिवाय त्यानें आणखी ७ स्त्रियांशीं व नरकासुराच्या बंदी शाळेंतील सोडवून आणलेल्य १६१०० स्त्रियांशीं लग्न केलें होतें. असें पुराणांत वर्णन आहे. पुराण संशोधक श्री. चिंतामणराव वैद्य, हे नरकासुराच्या बंदी शाळेंतील १६१०० स्त्रियांना फाटा देतात. साहित्य सम्राट बंकिमचंद्र व लाला लजपतराय हे रुक्मिणी शिवाय दुसऱ्या स्त्रियांचें अस्तित्वच मानीत नाहींत. बंकिमचंद्रांनीं आपल्या श्रीकृष्ण चरित्रामध्यें, अनेक स्त्रियांशीं लग्न केल्याच्या आरोपाचें सविस्तर खंडन केलेलें आहे. त्याचें विवेचन स्वतंत्र लेखामध्यें करूं. त्यावेळीं एकापेक्षां जास्त स्त्रिया करण्याची चाल होती; परंतु श्रीकृष्णासारखा जितेंद्रिय पुरुष अनेक बायका करील असें संभवत नाहीं.

श्रीकृष्णानें पांडवांना वेळोवेळीं सहाय्य केलें. अर्जुन हा तर त्याचा प्रिय शिष्य होता भीमाकडून त्यानें जरासंधाचा वध करविला. जरासंधाचें सैनबळ फार मोठें असल्यानें युक्तीनेंच त्याचा वध करून त्याच्या बंदींत असलेल्या ८६ राजांना बंधमुक्त केलें; व त्याच्या मुलाला गादीवर बसविलें. यानंतरचा श्रीकृष्णाचा उद्देश धर्मराजाला हस्तांत धरून धर्मराज्य स्थापन करण्याचा होता त्यामुळेंच त्यानें धर्मराजाला राजसूय यज्ञ करण्याची सल्ला दिली होती. श्रीकृष्णाच्या आज्ञेप्रमाणें धर्मराजानें तयारी केली. मोठमोठे राजे, महाराजे, विद्वान् ब्राह्मण सर्व येऊन दाखल झाले. निरनिराळीं कामें निरनिराळ्या व्यक्तींनीं वांटून घेतलीं. श्रीकृष्णाकडे ब्राह्मणांचे पांय धुण्याचें काम होतें. यावरून त्यावेळचे ब्राह्मण किती श्रेष्ठ होते, याची कल्पना होईल! त्यावेळीं पहिली पूजा कोणाची करावी? याविषयीं धर्मराजास पंचाईत पडली; त्यांनीं हा प्रश्न भीष्मांना केला. भीष्मांनीं सांगितलें कीं, मनुष्य लोकांमध्यें श्रीकृष्णासारखा बलवान व वेद वेदांग जाणणारा कोणीच नाहीं. दान, दक्षता, श्रवण, शौर्य, कीर्ति, बुद्धि, विनय. या सर्व गुणांचा संग्रह त्याचे ठायीं आहे, म्हणून त्याचीच पहिली पूजा करावी. त्या सभेंत शिशुपाळही होता. तो मूळपासून श्रीकृष्णाचा द्वेष्टा असल्यानें त्याला ही गोष्ट पटली नाहीं. त्यानें अग्रपूजेस हरकत घेतली व श्रीकृष्णाची फार नालस्ती केली; यावरून भांडण उपस्थित होऊन, श्रीकृष्णानें त्याचा वध केला.

त्यानंतर जगप्रसिद्ध कुरुक्षेत्राची लढाई होण्याची वेळ आली. धृतराष्ट्राला आपल्या मुलांचा पराभव होणार अशी भीति वाटत होती. शिवाय **यतोकृष्णस्ततोजयः** हें त्याला माहीत होतें; म्हणून त्यानें शिष्टाई करण्यासाठीं संजयाला धर्मराजाकडे पाठविलें. धर्मराजाच्या दरबारांत संजयानें भाषण केलें. त्यांत त्यानें सांगितलें कीं, युद्ध करणें हा अधर्म आहे, व ज्या अर्थीं आपण युद्ध करण्यास प्रवृत्त झालां आहां, त्या अर्थीं आपण अधर्मी आहां. संसारांतील यावत् सुख क्षणिक आहे. जो ह्या सुखाच्या मार्गी लागला; त्यानें धर्म गमावलाच म्हणून समजावें. यापेक्षां भीक मागून पोट भरणें चांगलें! युद्धांमध्यें अनेक प्रकारचीं पापें करावीं लागतात, तेव्हां, राजा, तूं हा नाद सोडून दे—" यावर धर्म राजानें उत्तर दिलें कीं, धर्माधर्माची माहिती माझ्यापेक्षां

आहे. जी गोष्ट पोर्तुगालांत निरुपद्रवी समजली गेली तीच गोष्ट येथील सरकारच्या प्रतिनिधींनां सरकारच्या कांवेच्या अब्रूचीं शकलें करणारी वाटावी, या पोरकटपणाबद्दलच निषेध व्यक्त केल्यानें आह्मांवर नवीन खटला भरण्यांत आला आहे!

आमचें धोरणः— पण 'खटल्याचा जंतु' भारताच्या पूर्ण अंगवळणीं पडला असल्यानें, त्याला स्वताच्या नव्या खटल्याची पर्वा वाटत नाहीं. अर्थात् त्यानें स्वीकारलेल्या धोरणांत बिलकूल बदल होणार नाहीं. हें आम्ही स्पष्टपणें येथें जाहीर करतों. लोकहितविषयक गोष्टींची चर्चा आजपर्यंत ज्या स्वतंत्र बाण्यानें करीत आलों आहोत, त्या बाण्यांत, खटल्यांनां भिऊन, आम्हीं कोणताच 'फरक' करणार नाहीं, हें सरकार पक्षीय लोकांनीं पूर्ण ध्यानांत ठेवावें.

वर्तमानसार.

— "गोमांतकांत जिकडे तिकडे अति वृष्टीच्या महापुराने मोठी नुकसानी होऊन जो प्रसंग ओढवला त्या बद्दल कनवाळू लोकांनीं अनाथ लोकांना यथाशक्ती मदत करावी म्हणून जो फंड ऊभारिला व जी रक्कम गोळा झाली ती सरकारी अधिकाऱ्यांच्या हवालीं केली गेली. याचा कसा काय विनियोग झाला हे समजून घेण्याची कांहीं जिज्ञासूंना इच्छा झालेली आहे. कारण, मुंबईसही आतां कळकळीनें फंड गोळा करीत आहेत. त्याचा हेतु व गोव्यांतील मोठमोठ्या शहरांतून ज्यांनीं ज्यांनीं उदार बुद्धीनें तुटीच्या प्रपच्यांतून ईश्वरी इच्छेनुरूप आपत्तीत सांपडलेल्या गरीब लोकांना अल्प स्वल्प मदत केली त्या सर्वांचा उद्देश त्या रकमेचा विनियोग सत्कार्यीं व्हावा असाच असणार.तथांत भ्रष्टशाचें कूळ ह्मणून तो पैसा प्रजेने सरकारी अधिकाऱ्यांच्या हवाली केला त्याचा त्यांनीं कोणकोणत्या गांवीं, कोणकोणत्या रीतीनें, कसा विनियोग केला, आणि फंड जमला किती, शिल्लक किती, इ० गोष्टींचा खुलासा अधिकारी कृपाळूपणानें करतील काय ? न पेक्षां दयाळू सरकारनें लोकांच्या सोईसाठीं कंट्रोल बसवले आणि तांदूळ आणले. पण त्यांत दलाली होऊन प्रजेची गैर सोयती गैर सोयच झाली. तशी गोष्ट ह्या निधनतेत मनाच्या तळमळीनें उभारलेल्या फंडाची न होवो म्हणजे झाले. असें एक 'समाजहितेच्छू' लिहितात.

— ता. १७-८-२३ रोजीं इकडील व्यापाऱ्यांनीं मुरगांव शिक्षण संघाचे शाळेची तपासणी करून मुलांच्या शिस्तीनें खूष होऊन रा. दत्ताराम ना. माईणकर यांनीं मुलांस ८० स्वदेशी टोप्या बक्षिस दिल्या. व मुलीस पुस्तकें, कोरे कागद दिले. सदर टोप्या घालून या वर्षी सप्ताहाचे दिवशीं मुलांचा भजनी मेळा काढण्याची इच्छा त्यांनीं दर्शविल्यावरून ता. १८-८-२३ रोजीं मोठ्या थाटानें तो काढला गेला. या सत्कृत्यानें रा. माईणकर यांनीं मुलांस स्वदेशीचा धडा धार्मिक मेळ्याचे भक्कम पायावर घालून दिला. आमचे व्यापारी शिक्षण संघाबद्दल अशीच कळकळ वरचेवर प्रदर्शीत करतील अशी उमेद आहे. असें वास्कोडीगामा—येथील मंगेश आत्माराम लाड, चिटणीस मुरगांव शिक्षण संघ— हे लिहितात.

—कोमुनीदादीच्या नोकरांना पेन्शन देणें योग्य नव्हे, अशा अर्थाचा एक ठराव सरकारी ग्याझेटवर प्रसिद्ध झाला आहे.

——बलवंत संगीत मंडळीच्या निमंत्रणावरून दो. व्यंकटेश देसाई व दो. बाळकृष्ण सालसदाडे हे गेल्या रोजांत बेळगांवला गेले होते.

—राष्ट्रीय मुमुक्षूचे लेख, वामन अवतार हा निबंध व इतर पत्रव्यवहाराचा सारांश सवडीप्रमाणें प्रसिद्ध होईल.

——नवीन कर लादण्यांत येणार असून त्याविषयीं सरकारी दरबारांत गुप्त खलबत चालू असल्याची बोलवा आहे.

——मडगांवच्या 'आ तेन्द' पत्राविरुद्ध १८ खटले चालू आहेत.

—गोमांतकीय पोर्तुगीज साहित्यसेवक सिं. फ्रेदेरीक द आयाल हे ख्रिस्तवासी झाले.

——मलेरीया तापाची सांथ जिकडे तिकडे सुरू असून, पावसाची कमतरता भासत आहे.

—येथील माझी जज्ज दो० मानुयेल कवाहुस यांची पणजीच्या क्रिमिनल कोर्टांत बदली झाल्याची वंदता आहे.

——भारत संपादकापाशीं कांवेरें प्रकरणामुळें एका 'फलाण्यानें' द्वंद्व युद्ध खेळण्याची इच्छा प्रदर्शीत केल्याचें वर्तमान 'आ तेन्द' पत्रानें प्रसिद्ध केलें आहे.

——जनार्दन उपेंद्र खंवटे हे सरकारच्या खर्चानें उच्च शिक्षण घेण्यासाठीं पोर्तुगालला रवाना झाले. पणजीच्या पाठशाळेंत खंवटे यांनीं आपल्या बुद्धिमत्तेची साक्ष पटविली असल्यामुळें, पोर्तुगालांतही ते शिक्षणांत यशस्वी होतील, अशी आम्हांस खात्री आहे. त्यांचा प्रवास सुखकर होवो, असें इच्छितों

ANUNCIOS

A arremaração das avenças da receita trienal e despeza anual da comunidade de Curnçrem, as avenças da receita e despeza anual da comunida de de Cacorá e as avenças da despesa anual da comunidade de Assolda Chic-Xelvona, Cotombi e Xelvona terão lugar nes dias respectivamente em 22, 26, 25, 28, 27 e 29 do corrente mez pelas 10 horas no lugar das suas sessões da dita comunidade.

Aos 5 de Setembro de 1923
O escrivão
Ujoma Pandurunga Sinay Odarcar

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Redcar correm editos de 30 dias a contar da segunda publicaçao deste citando a Salim on Thomaz Lazarus, residente em Curchodem e ora ausente em Madrasth territorio britanico em parte incerta, para, no praso de dez dias findos, os referidos trinta dias pagar no sobre-dito cartorio a quatia de 32 05,-06, proveniente de custas e selos liquidados no requerimento autuado de Francisco Crispino Dantas da mesma de Curchodem pedindo despejo da casa do citando ou dentro do mesmo praso nomear bens suficientes a penhora para o pagamento do pedido e de custas, selos acrecentados á execuçao sob pena de não o fazendo sera' nomeançã devolvida ao exequente Ministerio Publico,prosseguindo-se a execução seus termos a revelia O que para ser publico se expediu este Xeldem 21 de Junho de 1623

O Escrivão de Direito do 1 ° oficio

Babu V Camotim Redcar

Verifiquei

O 1 ° Substituto do Juiz de Direito
Joao Baptista Gomes

de inteligencia, actividade e nobresa em prol dos oprimidos por cujos interesses está habituado a sacrificar-se.

Ao bondoso advogodo, nossas calorosas felicitações.

A O Heraldo

A' Administração deste diario prevenimos que não recebemos a sua permuta, desde alguns dias.

Coisas & Loisas

Egoismo

Nao sabemos o motivo por que certa raça de malditos se revolta contra o egoismo dalguns *patriotas* que sob multiplos aspectos do patriotismo *berrante, errante* e *penetrante,* nao tratam senao de procurar *manter-se.*

E', porem, segundo o nosso modo de ver, sem justificaçao tal revoluçao contra a evoluçao estomacal, porque o egoismo é o alicerce do suntuoso edificio do patriotismo que, em ultima analise, representa a soma dos egoismos.

Sejamos, pois, antes de mais, egoistas!

Impostos

E, igualmente, injustificada a berrata que se levanta contra a ja' elevada elevaçao de Impostos...Constamos que o fisco, farto de explorar tudo do dominio da *materia,* pretende ja' intrometer-se no campo de *alma*...

Faz muito bem, porque *isto* importa dar *vida* a tanto imposto, imposto tao somente sobre coisas materiais.

E', pois, enorme o nosso jubilo pela *vitaçao* dos impostos...

Os processos crimes...

Sempre recebemos, de bragos abertos, os processos crimes que contra o *Bharat* foram instaurados, porque temos notado que eles o animam para o bom desempenho de sua missao jornalistica. Sao como que injecçoes de *digamina,* soprando vida aos desfalecidos, aos desanimados, aqueles a quem o desandar da nossa maquina administrativa traz *modorra.*

E' o nosso modo de pensar.

भारत

गुरुवार भाद्रपद शु० ३ या १८४५

वामनावतार

वामनावतार हा अवतारमालिकेंतील पांचवा अवतार होय. पहिल्या पासून दहाव्या पर्यंत प्रत्येक अवतारांचा इतिहास पुराण रूपानें उपलब्ध आहे. त्यांत वामनावताराचा इतिहास भागवतांत फार मनोरंजक रूपानें लिहिला गेला आहे. कित्येक आधुनिक विद्वानानीं या इतिहासास ऊर्फ पुराणास कल्पित कादंबरीच्या सदरांत लोटून देऊन त्यांचा दर्जा कमी करण्याचा प्रयत्न केला आहे! तरी पण जरा लालसायुक्त अंतःकरणानें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां या पुराणांतही पुष्कळशा गोष्ठी, खुद्द इतिहासाप्रमाणेंच, मानवी व्यवहारास व समाजोन्नतीस उत्तम मार्गदर्शक असतात, असें आढळून येतें. कादंबरीही जरी झाली तरी ती तत्कालीन समाजस्थिति व लोकव्यवहाराचें चित्र मनोरंजक भाषेंत दाखविणारी असते. इतिहासकारांनीं आपला इतिहास लोकांस रुक्ष वाटूं नये, या हेतूनें त्याच्या इतिहासांतील-पृथक-पृथक-प्रत्यक्षाप्रत्यक्ष गोष्ठी मनोरंजक भाषेंत लिहिल्या जाण्याचा प्रघात घातला असावा. त्यापैकींच हीं कादंबरी सदरांत लोटलीं गेलेलीं पुराणें होत. या पुराणांत पुष्कळसा तत्कालीन इतिहास मनोरंजक भाषेंत व रूपकरूपानें सांगितलेला असून त्यांत समाजोन्नतीचें मार्गदिग्दर्शन केलेलें असतें. अशा पुराणामध्यें वामनावताराच्या इतिहासाची गणना आहे. त्यांतील रूपकाचा उलगडा केल्यास त्यावासून फार बोध घेण्याजोगा आहे.

दैत्यवंशीय भगवद्भक्त प्रल्हाद याचा नातू व विरोचनाचा पुत्र बलीराजा यानें आपल्या सकल गुण संपन्नतेच्या जोरावर देवांस पावलो पावलीं मान खालीं घालाव यास लावून त्यांचें सर्व वैभव हरण करून घेतलें. ही स्थिति देवांस फार असह्य व अनिष्ट वाटून गतवैभव परत संपादण्याप्रीत्यर्थ त्यांनीं चळवळ चालविली. शेवटीं सभा, परिषदा वगैरे भरवून असें ठरविलें कीं, श्री विष्णूनें वामनावतार घेऊन म्हणजे ठेंगू बटूचें सोंग घेऊन—बलीराजानें चालविलेल्या सर्वजित यज्ञसमारंभास जावें व तेथें राजापाशीं तीन पावलें भूमिभिक्षा मागावी.

ठरावाप्रमाणें श्रीविष्णूनें वामन बटूचें सोंग घेतलें, व बलीराज्यांतील यज्ञ मंडपांत थेट प्रवेश करून बलीराजाची भेट घेतली. ब्राह्मणांस पाहातांच राजाने शिष्टाचाराप्रमाणें बटूचें सुस्वागत केलें. नंतर वामन बटूनें, आधींच ठरलेली, तीन पावलें भिक्षा मागितली व बलीराजानेंहि आपल्या व्रतास अनुसरून भिक्षेप्रीत्यर्थ पाणी सोडलें व तीन पावलें जमीन पाहिजे, तेथें मोजून घेण्यात बटूस सांगितलें. इतक्यांत, वामन बटूनें एकाएकीं, विश्वस्वरूप घेऊन दोन पावलांत ब्रह्मांड व्यापिलें, व तिसऱ्या पावलासाठीं जागा बलीराजापाशीं मागितली अशा वेळीं तिसऱ्या पावलांस ब्रह्मांडांत कोठेंच स्वमालकीची जागा राहिली नाहीं, असें पाहून राजानें आपलें मस्तक वामन बटूपुढें लवविलें; तेव्हां तिसऱ्या पावलाप्रीत्यर्थ बटूनें बलीराजाच्या मस्तकावर पाय देऊन राजास पाताळांत लोटून दिलें. अशा रीतीनें देवानीं आपलें गतवैभव परत संपादन केलें. असा हा पुराणांतील वामनावताराचा इतिहास आहे.

आमच्यामतें हें तत्कालीन इतिहासाचें रूपक रूपांत केलेलें दिग्दर्शन होय. तेव्हां जरा तारतम्य ज्ञानाच्या दृष्टीनें पाहिल्यास, आमच्या आजकालच्या परिस्थितीस सुद्धा, या रूपक रूपानें लिहिलेल्या इतिहासापासून पुष्कळसा बोध घेण्यासारखा आहे.

आजकाल आमची स्थिती वर वर्णन केलेल्या देवां सारखीच झालेली आहे. पाश्चात्य राष्ट्रांनीं भौतिक शास्त्र व प्रकृति मार्ग यांच्या जोरावर आमचें सर्व वैभव हरण केलेलें आहे. अशा स्थितींत वामनावतारापासून तीन पावलांत देवानीं असें आपलें गतवैभव परत संपादन केलें, तशाच रीतीनें आज आम्हींही केलें पाहिजे. तरी या कार्यास वामनावताराचा इतिहास बराच मार्गदर्शक होऊं शकेल. तेव्हां वामनबटू व तीन पावलें याचा आधीं विचार करूं.

वामनावतार म्हणजे कीर्तनकार सांगतात त्या प्रमाणें एक सुंदर, गलजार व ठेंगू बटू नसून लीनता व साधी राहाणी असा त्या रूपकाचा उलगडा करतां येईल. देवांनीं आपल्या ऐशआरामाच्या निद्रेंत आपलें वैभव ऊर्फ स्वातंत्र्य नष्ट झालें असें पाहून लीनता व साधी राहाणी स्वीकारली. लीनतेशिवाय बाहुबलाच्या जोरावर सुद्धां गतवैभव परत संपादितां येतें पण दैत्य इतके प्रबल झाले होते कीं, बाहुबलाचा उपयोग करणें देवांस तत्कालीन परिस्थित्यनुसार शक्य नव्हतें. यावरून देवांस वामनावताराचीच आवश्यकता भासली.

असीच—देवांच्या तत्कालीन स्थिति साखीच—आजकाल आमचीही स्थिति झालेली आहे. त्यावरूनही आम्हांसही वामनावतार घेतला पाहिजे. म्हणजे लीनता व साध्या राहाणीचें व्रत स्वीकारिलें पाहिजे. सारांश जेत्या देशाप्रमाणें जीत देशांचीही उन्नति करून घेऊन गतवैभव परत संपादन करण्याचें अवश्यास बरील 'व्रत' हें गणेश पूजन होय. असा पहिला बोध वामनावतारापासून घेतां येतो.

पुढें बटूनें बलीराज्यांत विश्वस्वरूप घेतलें व तीन पावलांत देवांनीं आपलें गतवैभव परत संपादिलें असें रूपक आहे.

येथे तीन पावलें याचा अर्थ 'एक यार्ड' नसून तीन कार्यें होत असा उलगडा घेतां येईल. व विश्वस्वरूप घेतलें याचा उलगडा—हीं तीन कार्यें फार व्यापक स्वरूपांत चालविलीं— सार्वत्रिक स्वरूपांत आचरिलीं गेलीं— असा करितां येईल. तेव्हां गतवैभव परत संपादनार्थ देवांनी लीनता व साधी राहाणी याच्या पायावर तीन कार्यें फार व्यापक स्वरूपांत चालविलीं— असा वामनावताराच्या इतिहासाच्या रूपकाचा उलगडा होतो. तेव्हां हीं तीन कार्यें कोणतीं याचा पुढें विचार करूं.

रूपकाच्या उलगड्यासाठीं आधीं तिसरें पाऊल म्हणजे तिसरें कार्य घेऊं. या कार्याच्याद्वारें देवांनीं राजास पाताळांत लटून दिलें म्हणजे राजास पदभ्रष्ट केलें असें रूपक आहे. तेव्हां पदभ्रष्ट केलें म्हणजे राजकीय सुधारणेच्या द्वारा देवांनीं स्वराज्य स्वातंत्र्य मिळविलें असा त्याचा थोडक्यांत स्पष्टार्थ आहे.

आंतां राहातां राहिला पहिल्या दोन पावलांचा म्हणजे दोन कार्यांचा विचार हीं दोन कार्यें अशा रीतीनें बजावली गेली कीं तीं तिसऱ्या कार्यास फार पोषक अशीं होतीं. तेव्हां राजकीय सुधारणेस ऊर्फ स्वराज्य संपादनार्थ कोणचीं दोन कार्यें सहाय्यभूत होतात, हें पाहिलें पाहिजे.

इतिहासांत जें घ्यावयाचें असतें तें त्यांतील "कारण" व 'तत्व' होय. कार्य घ्यावयाचें नसतें. कारण तत्वें व कारणें सम परिस्थितीत एक सामान्य असतात. कार्यें त्यात्या निरनिराळ्या परिस्थित्यनुरूप घडलेलीं असतात. शिवाजी महाराजानें एकीच्या जोरावर स्वराज्य संपादिलें या इतिहासापासून एकी हें तत्व घ्यावयाचें असतें व त्या तत्वाप्रीत्यर्थ जें कार्य करावयाचें असतें तें त्यात्या विवक्षित परिस्थितीवर अवलंबून असतें असो.

सारांश, देवानीं पहिलीं दोन कार्यें तिसऱ्या कार्यास म्हणजे स्वातंत्र्य संपादनाच्या कार्यास पोषक अशींच आचरलीं इतकाच येथें बोध घेणें भाग आहे; कारण तत्कालीन देवांच्या व आज आमच्या गतवैभवाच्या वस्तुस्थितींत जरी साम्य असलें तरी पण देवांच्या तत्कालीन परिस्थितीसारखी मात्र आजकाल आमची परिस्थिति नाहीं; यावरून तिसऱ्या कार्यास पोषक अशीं पहिलीं दोन कार्यें देवांकडून अनुकूल आचरलीं गेलीं याचा ऊहापोह करितां तीं, आमची सद्यस्थिति व कालदेश वर्तमानानुसारच, ठरविणें भाग आहे.

तेव्हां या दृष्टीनें पाहिलें असतां आमच्या गतवैभवाच्या पुनर्प्राप्तीसाठीं आम्हीं लीनता व साधी राहाणी याच्या पायावर व फार व्यापक स्वरूपांत अचरिलेलीं पहिलीं दोन कार्यें याच्या जोरावर राजकीय सुधारणा ऊर्फ स्वराज्य संपादन हें जें तिसरें कार्य तें शिस्तीनें व समंजसपणानें पुढें टाकिलें पाहिजे—असा बोध वामनावतार इतिहासापासून मिळतो.

याच कार्यपरंपरेनें आपल्या अंगांत

तो साधणें हेंच प्रत्येकांच्या जीविताचें सर्वस्व होऊन बसेल आणि तो साधण्याकरितां मासा ज्याप्रमाणें उदकाकरितां तळमळत असतो त्याप्रमाणें तळमळत राहील, तेव्हांच कोणत्या ना कोणत्या तरी साधनाची आवश्यकता भासूं लागेल. आणि अशाच वेळीं त्याला खऱ्या खऱ्या योजकाचें ह्मणणें पटेल. आणि मग तो कोणतेंहि शस्त्र हातीं घेण्यास मागें पुढें पहाणार नाहीं. अर्जुनाला त्या वेळीं तीव्र तळमळ लागलेली, श्रीकृष्णावर दृढ विश्वास, श्रीकृष्णासारखे उपदेशक हजर, कौरवांचा नाश झाल्यानें अन्यायाचें अनीतीचें न होतां उलट नीतीला पोषक, तेव्हां मग सर्व कांहीं उत्कृष्ट प्रकारच्या गोष्टी जुळून आल्यावर अर्जुनानें युद्ध करून विजय संपादन केला यात आश्चर्य तें कसलें ? नाहीं तर आमच्या हिंदुस्थानच्या लोकांकडे पहा ! जनता पारतंत्र्यास कंटाळलेली, स्वातंत्र्याकरितां धडपड करणें अन्यायाचें अनीतीचें तर नव्हेच. महात्मा गांधीजीसारखे उपदेष्टे तयार; पण लोकानां तीव्र तळमळ मात्र नाहीं ! ह्मणून महात्माजी जें कांहीं सांगतात तें त्यानां रुचत नाहीं नव्हे पचेल ह्मणुन खात्रीहि नाहीं. मग विजयाचा प्रश्न तर दूरच राहिला त्यांत आश्चर्य कसलें ? कै० टिळकांनंतर महात्माजींसारखे निःस्वार्थ आणि निःक्षपात बुद्धीचे योजक पूर्वपुण्यें करुन लाभलेले त्याच्यावर भरपूर विश्वास ठेवून एकदिलानें कार्य चालविण्याचें सोडून सगळा घोटाळाच करून सोडलेला आहे. आमचे मवाळ दादाजी तर सरकारच्या सोनेरी शृंखलानी जखडलेले. ते काय करूं शकतील आणि काय नाहीं हें कळलेलंच आहे. द्रोणाचार्यांनी वगैरे ज्या लोभाला बळी पडून कौरवाची बाजू उचलली त्याच लोभाला बळी पडून आज मवाळ लोक सरकारचे इच्छेविरुद्ध वर्तन करूं इच्छित नाहींत. मवाळपणात कांहीं तरी तथ्य आहे, तर त्यानीं आज आपलें सर्वस्व वेंचून मीठावरचा कर बंद करण्यास सरकारास भाग पाडावें. असो.

गोव्यांतील आमच्या हिंदु तरुण पिढीच्या समोरहि एक अत्यंत महत्वाचा 'नोकरशाही कीं लोकशाही' हा प्रश्न येणें संभवनीय आहे. तेव्हां त्याच्यावद्दल थोडा बहुत विचार करुन अल्प स्वल्प सेवा करण्याचें योजिलें आहे. ज्या राज्यव्यवस्थेमध्यें नोकर लोकच कारभारी असतात तीला नोकरशाही ह्मणण्यात येंते. जनतेच्या संमतीनें तीच्याच अधिकाराखालीं चालले त्या राज्यपद्धतीला लोकशाही ह्मणतात. सध्याची आमचा-शाही लोकशाहीचा बुरखा पांघुरलेली नोकरशाही होय. ह्या नोकर लोकानां तुह्मी कोण याची चांगली ओळख करून देऊन लोकसत्तेच्या खालीं वागण्याची संवय लावून त्याच्या नोकरशाहीपणातून शीरजोरी कमी करणें हेंच आमचें सध्याचें कर्तव्य आहे. वंडखोरपणा न स्वीकारतां हें आह्माला करावयाचें आहे. [illegible] राज्यपद्धति [illegible] मग नोकरशाही तेंथ शिल्लक कशी राहिली या प्रश्नाचें उत्तर फार गुंतागुंतीचें आहे. त्यांचा विचार पुढील अंकीं करूं.

ANUNCIOS

Pelo juiz de direito de comarca de Quepem e cartorio do escrivao do 1 ° officio Redcar vai a praga para a venda em hasta publica a porta do tribunal judicial desta comarca situada em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige a estaçao de Sanvordem no dia 25 do proximo mez de Setembro as 13 horas pelo maior lanço que se oferecer a primeira adiçao do predio denominado "Aforamento da cultura de coqueiros e ouiras arvores avaliada por 1.000:00:00 Segunda adiçao do predio denominado "Aforamento da cultura de coqueiros e outras arvores avaliada hor 500:00:00 Terceira adiçao do predio denominado Aforamento da cultura de coqueiros e outras arvores avaliada por 500:00:00 Quarta adiçao do predio denominado Aforamento da cultura de coqueiros e outras arvores avaliada por 1.200:00:00 e quinta adiçao do predio denominado Aforamento da cultura de coqueiros e outras arvores avaliada por 400:00:00 todos situados em Mulem e discritos respectivamente na conservatoria desta comarca sob os nos 5901, 5902, 5903, 5904 e 5905 e penhorados nos autos civeis de execuçao hipotecaria que Damum Hirba Sinay Narcornim Sanvordencar de Sanvordem como cessionario do exequente Quessova Voicunta Naique vulgo Ecnat de Paroda' como pai administrador d sua filha menor Dotem move a Ula por outro nome Irabay ou Locximim Quenina, viuva de Xanum Fotu' Quenim vulgo Bombi de Sanvordem e outros de Assolna e Baly para pagamento da quantia de 300 rupias juros penas e custas da execuçao. O arrematante pagara' a contribuiçao do registo por inteiro e as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Por este sao citados quaisquer credores incertos e co-proprietarios, bem assim os representantes do credor falecido Fotu Quenim que foi de Paroda' e que tem a seu favor uma hipoteca no livro C um da copia nova a fl.s 148 sob o n.° 1659 a segurança da quantia de 600 rupias registada em 20 de Dezembro de 1887 achando-se cedida desta quantia a importancia de 200 rupias pelo dito Fotu a favor de Sonum Venctexa Camotim de Ponchovady e pelo dito Sonum a favor de Quessova Voicunta Naique de Paroda' e os representantes do usufructuario Gopala Visvonata Naique Dalal de Margao para deduzirem os seus direitos nos termos e para os fins de lei.

Xeldem, 24 de Agosto de 1923.

O escrivao de Direito

Babú V. Camotim Redcar

Verifiquei

O juiz de Direito 2 ° substituto

Luis José de Sousa

Pelo juizo de direito da comarca do Quepem e cartorio do escrivão de 1 ° oficio Redcar correm editos de 30 dias a contar da segunda publicaçao deste citando a Salim on Thomaz Lazarus, residente em Curchodem e ora ausente em Madras-th territorio britanico em parte incerta, para, no praso de dez dias findos os referidos trinta dias pagar no sobre-dito cart orio a quantia de 32 05, 06 proveniente de custas e selos liquidados no requerimento autuado de Francisco Crispino Da Costa da mesma de Curcho [illegible] pedido despejo da casa d citado ou dentro do mesmo praso nomear bens suficientes a penhora para o pagamento do pedido e de custas, selos acrecentados da execuçao sob pena de não o fazendo sera' nomeação devolvida ao exequente Ministerio Publico prosseguindo-se a execução seus termos a revelia O que para ser publico se expediu este Xeldem 21 de Junho de 1623

O Escrivão de Direito do 1 ° oficio

Babu V Camotim Redcar

Verifiquei

O 1 ° Substituto do Juiz de Direito

Joao Baptista Gomes

lidades, postas em taboletas frescas pelas maos destas criancinhas, no edificio desta casa de educagao secundaria e de pasmo e de horror, puz-me a cogitar se a educagao.

Aperfeigoa o monstro humano
Retrocedendo ao seu covil.

O' maes! O' paes! E' tempo de pensardes nos vossos filhos, alia's o vosso silencio, a vossa indiferença fara' como fez e,

Faz do bimano o quadrumano
E do quadrupede o reptil

E' fartar...

"... limitar-se-ha o director deste jornal a generalizagoes sobre os acontecimentos que se desenrolarem nos grandes centros das civilizagoes mundiaes"

(*O Heralo* de 11 de Agosto de 1923)

E' com este *requiescat in pace* que o primeiro diario das colo'nias portuguesas vem fechar o ciclo das lustrosas, das luzentes campanhas contra a actual governagao.

Isto e' o que se chama o efeito da estagao invernosa!

Va' la', isso e' que tem piada!

Pois que duvida! Ja' que de tanto bater, de tanto barafustar, de tanto vociferar, aqueles senhores do Olimpo Governamental nem se abalam nem se mechem, antes ficam ai mudos como Budas de porcelana, bem arranjada e' esta 'partida de...privar-lhes o fogo da vista dos seus artigos feitos de lavas do Etna!

Mas os Ze'-esfolados, mas os Ze's-Paga-Tudo ?

Paciencia! Tambem o Redentor se fez rogado; e, se calhar, da mesma maneira surgira'...o Messias!...

Adeus

Macei de ve'ras.

Bom. Vou-me raspando, para voltar breve. E, la' me esperam dois orgáos do *unico* partido indiano.

Qual deles preferir?

Positivamente, irrefutavelmente *India Portuguesa*...de Chibial

El Rajanios

Rua de "Opiniao Publica"
Nova-Goa, ultimo dia de Agosto de 1923.

———o———

Ecos & Critica

Reparando ...

A chamada *Hindu-Sobá* de Mapuçá dedicou uma manifestação de simpatia e gratidão ao sr. dr. Alpoim, presidente da Relação de Nova-Goa.

Não queremos nenhum mal ao dito sr. Presidente nem á patriotica *Hindú-Sobá*. Desejamos, apenas, saber o *qualitativo* e *quantitativo* dos importantes serviços prestados pelo dr. Alpoim e recebidos pela digna *Soba*.

Cá fica um reparo inofensivo.

Justiça

Num processo de transgressão, um réu de Canacona foi condenado ao pagamento de multas e custas para cuja cobrança se instaurou a competente execução. Nesta o mesmo réu nomeou á penhora bens pertencentes a um terceiro, o qual, no decurso da execução, dormiu o *sono* dos *santos* por causa de sua ignorancia ... forense.

Cumpridas as formalidades, tais bens do terceiro foram vendidos em hasta publica por um preço superior ao valor da dita execução, sendo o excesso levantado pelo dito réu...

E nesta *operaçao judicial*, por causa da culpa do Pedro, foi castigado o João — ás barbas e com o auxilio da justiça.

Cá está como a justiça ordinaria proteje, sem querer nem saber, a requintada malvadez de certos litigantes da má fé.

A justiça humana é quase sempre a *expressao* do caso da aludida operação.

E' que o homem não é tão perfeito como Deus...

भारत

गुरुवार भाद्रपद शु० १० मी १८४५

धंद्यांची आवश्यकता.

गोमांतकांत आमच्या सुशिक्षित तरुणांचा कल सरकारी नोकरीकडे राहत असल्यानें औद्यौगिक उन्नतीच्या दृष्टीनें आम्ही फार मागसलेलों आहोंत, याविषयीं दुमत असणें शक्य नाही. नोकरीच्या 'आळशी' साधनानें पोटाचें कसेंबसें साध्य गांठणें विनभांडवलानें नफेचा धंदा करण्यासारखें सुलभ असल्यानें शारीरिक त्रास सहन करण्यास अगर बुद्धीला ताण देण्यास कोणीहि पुढें सरसावत नाहीं. जिकडे तिकडे नोकरीच्या भिकार चर्चेशिवाय चकार शब्द बहुदा ऐकूं येत नाहीं! याच मुख्य कारणामुळें जितक्या तेजस्वी रीतीनें स्वाभिमानाची जागृति आमच्यांत व्हावयास पाहिजे होती तितक्या प्रखरतेनें होत नसल्यास त्यांत नवल नाहीं! असो.

उपरिनिर्दिष्ट परिस्थिति बदलण्यास आमच्यांत उद्योग धंद्यांची वाढ झाली पाहिजे, हें उघड आहे. आजला बहुतेक ठिकाणी हातमाग सुरूं आहेत, तथापि त्यांतून तयार होणारा माल लोकांस पुरेसा मुबलक निघत नाहीं. एकादी गिरणी स्थापन झाल्यास, देशांतल्या देशांत मालाचा खप होऊन, बाहेरगांवीं सुद्धां पाठवितां येईल व गरीब मजूर लोकांची पोटाची एक सोयहि होईल.

आपल्या संसारांत आपण प्रत्येकास अवश्य लागणाऱ्या वस्तु, तसेंच कागद, पेन्सिली, आगकाडी, कांच वगैरे जिन्नस आम्हांस बाहेरूनच आणावे लागतात. आजपर्यंत कमजास्त पैसे देऊन आम्हास सर्व माल बिनबोभाट मिळतो हें खरें, परंतु आमच्या देशांतच कारखाने काढून सर्व जनसमुहास घरच्या घरीं माल मिळत जाईल व पुष्कळ लोक पोटासाठीं बाहेरगांवीं जाण्याचें बंद करतील अशी व्यवस्था मात्र कोणी करीत नाहीं! परंतु इतकी खटाटोप करावी कोणी? आमच्या देशांतच कारखाने व धंदे काढण्याची सुबुद्धि जोंपर्यंत आमच्या लोकांस होत नाहीं, तोंपर्यंत हा देश अशाच स्थितींत रहाणार हें खचीत! कित्येकांना धंदे काढण्याची इच्छा असते, परंतु त्यानां अनुभव नसल्यामुळें ते धंद्यांत सपशेल फसतात. बरें, अनुभवी, हुशार व हातकरू इसम पुढें सरसावले तर त्यांस भांडवलाच्या अभावीं धनिक लोकांकडून प्रोत्साहन मिळत नाहीं. एकूण चणे व दांत हीं दोन्हीं एकत्र केव्हांही नसतात. कागद, कांच, तेलें, आगकाडी, साखर, कौलें, विटा व साबण यांची गोमांतकांत आज किती जरूरी आहे बरें?

देशांतील उद्योग धंद्यांची वाढ होण्यास मुख्यतः सरकारचें सहाय्य लागतें. इंग्लंड, जर्मनी, फ्रांस, वगैरे पाश्चात्य राष्ट्रांनें व जपान अमेरिकेनें कशा काय सोई करून ठेविल्या आहेत व त्यांच्या मालाचा खप प्रत्येक राष्ट्रांत कसा फैलावत आहे, हें सर्वश्रुतच आहे. ब्रिटिश हिंदुस्थानापेक्षां पोर्तुगीज हिंदुस्थानांत जास्त सवलती दिल्या जातात व उद्योग धंद्याची वाढ व्हावी एतदर्थ चांगले कायदेही करून ठेविले आहेत. अशी स्थिति प्राप्त झाली असतां देशांत एकही जोमदार धंदा निघत नाहीं! परस्पर सहाय्यकारी भांडवल जमवून, आमचे व्यापारी किंवा धनिक लोक एकाद दुसरा नमूनेदार धंदा काढतील म्हणावें तर त्या बाबतींत पूर्ण निराशा!

ब्रिटिश हिंदुस्थांनांत धंदे काढण्यासाठीं लोकांनीं जशा धंदेविषयक बँका Industrial Banks] स्थापन केल्या आहेत, तशाच पद्धतीवर आमच्या चिमुकल्या देशांत, चिमुकल्या भांडवलावर, एकच बँक स्थापन झाली तर लोकांना तिचा किती फायदा होईल बरें! बँक--काढणारा व अधिकार सूत्रें चालविणारा त्या कामांत बराच निष्णात् असावा लागतो. नाहींतर आज बँक स्थापन केली, व उद्यां त्याचें दिवाळें निघालें म्हणजे लोकांचा विश्वास पार उडून जाईल व पुनरपि, आपल्या पैशाचा असाच व्यय होईल म्हणून बहूजनसमाज अशा बँकेपासून अथवा कोणत्याहि धंद्यापासून कायमचा अलग राहील. बँकेसाठीं खटपट करणाऱ्या इसमानें वेळींच सावध राहून कळकळीनें अंगमेहनत घेतल्यास यश आलेंच पाहिजे. तरी धनिक लोक स्वार्थ साधून, परमार्थ साधण्याचें पुण्य श्रेय संपादन करतील अशी आशा आहे.

—श्रीपाद गोविंद हेदे (शिरवडेंवासी) यानीं लिहिलेलें कर्मरहस्य भारत प्रेसांत छापून तयार होत आहे.

--या व गेल्या आठवड्यांत गोव्यांत पाऊस फार झाला.

– पणजीच्या हायकोर्टाचे मुख्य जज्ज दो० आलपोंयीं यांची बदली मोसांबीक [आफ्रिका] येथें झाल्यामुळें, ते येत्या आठवड्यांत तेथें रवाना होतील. न्यायमूर्तींनां म्हापशेंच्या हिंदुसभानामक संस्थेनें मानपत्र अर्पण करून, त्यांचा गौरव केला! दोतोरांच्या कोणत्या देशकार्याबद्दल मानपत्राचा उपक्रम झाला हें पुष्कळांस अजून 'गूढच' आहे!!!

–मडगांवच्या सरस्वती सेवक मंडळाकडून मुकुंद शेणवी शेळडेकर यानीं लिहिलेला पोर्तुगालचा इतिहास छापण्यास लवकरच सुरुवात होईल, असें कळतें.

—डॉ० मुकूंद गोविंद कामत यांची कुंपेचे देलेगाद द साउदी या जागीं नेमणूक होईल, असें म्हणतात.

—काणकोणचे नारायण विष्णु नगर्सेकर हे आल्फांत खात्याचे सेगुंद ओफिसियाल झाले.

कीं नोकरशाही वगैरे सारख्या विलक्षण गोष्टी बद्दलचा विचार करण्याचे भरीस न पडतां एक सारखा जबरदस्त पगाराचे जागे पटकावण्याकडे गुंतलेला, नवीन नवीन खात्यांची रचना करून त्यांत घुसून घेण्यांत चूर झालेला असतानां, जे हिंदु नुकेच पुढें वर डोळे काढूं लागले आहेत त्यांच्याच गळयांत देशकार्याचें लोढणें घालूं पहातां तें कां ? सुशिक्षित, इलस्त्राद, पुढारलेला मानलेल्या समाजानें आज लोकसत्तात्मक राज्यपद्धतीचें ध्येय विसरुन नोकरीच्या रूपानें स्वतःची तुंबडी भरून घ्यावी आणि मागसलेल्या हिंदु समाजानें अर्ध्या वांट्या करितां धडपड करण्यांचें सोडून लोककल्याणाचीं ओझीं उचलावीं ? अशा प्रकारचे प्रश्न निघणें आज हिंदु समाजाची परिस्थितीकडे लक्ष दिलें असतां, संभवनीय आहे असें वाटतें खरे. पण भविष्यकाळाकडे लक्ष दिलें म्हणजे, जगांतील पारतंत्र्यांत खितपत पडलेलीं राष्ट्रें आज स्वातंत्र्याकरितां कशी धडपडत आहेत हें पाहिले म्हणजे, आपापल्या स्वार्थाकडे नजर देऊन राष्ट्राच्या हिताकडे दुर्लक्ष करणें अप्रशस्त वाटतें. जपानचें राष्ट्र पहा. त्यानें आपली सुधारणा सर्व बाजूनीं केल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. जपानचा डोळा हिंदुस्थानावर असणें शक्य आहे. कदाचित त्याच्याशीं सामना करण्याचाहि प्रसंग येईल ! आपलें राष्ट्र असेंच मागसलेलें राहूं दिलें तर जबरदस्त ऋणाखालींहि दडपलें जाईल. आमच्या राष्ट्राचें पुढें कसें काय याचा विचार केल्यास राष्ट्राचें दारीद्र्य दिवसें दिवस वाढून देशाला दैन्यदशा प्राप्त होईल. आह्याला प्रथम आमचें डळमळीत स्वातंत्र्य स्थिर करावयाचें आहे. आणि तें स्थिर झाल्यानंतर मग समाजशास्त्राच्या प्रत्येक अंगाचा प्रश्न हातीं घ्यावयाचा आहे. आणि इतकेंहि करून मोठमोठ्या राष्ट्रांची बरोबरी करण्यांकरतां ज्या ज्या गोष्टींची गरज लागेल त्या त्या प्राप्त करून घ्यावयाच्या आहेत. हातावर पोट भरणाऱ्या गरीबानें जगत शेटीची बरोबरी करण्याचें मनांत आणलें तर आह्मी त्याला मूर्ख म्हणूं काय ? बाबा हें दुर्घट काम आहे. तेव्हां तूं हातीं न घेतलेलें बरें. असें म्हणणें सुधां शहाणपणाचें होईल काय? नाहींच. रंकाचा राव होणें अशक्य तरी आहे का ? नाहींच. काम मात्र जबरदस्त मेहनतीचें असून त्याला कालावधीचीहि गरज आहे. आज आमचें राष्ट्र अगदींच मागसलेल्या राष्ट्रांपैकीं आहे आणि तें आह्माला मोठमोठ्या वैभवशाली व सामर्थ्यवान राष्ट्राच्या तोंडाशीं तोंड देईल इतक्या दर्जाला न्यावयाचें आहे. वाऱ्याची मोटबांधणें जसें अशक्य त्याचप्रमाणें आमचें राष्ट्र त्यांच्या राष्ट्राची बरोबरी करील' म्हणून मानणेंहि अशक्य.अशा प्रकारची ठाम समजूत करून स्वस्थ बसणारे कित्येक आहेत. यांच्या मतें दुःखाची बाधा तिळमात्रहि न होतां आह्मांस बसल्या जागेवर त्यांनीं स्वातंत्र्याचा गड्डा आणून आमच्या स्वाधीन करावा ! राष्ट्राला पारतंत्र्याचे वाईट दिवस आले ते कोणत्या कारणामुळें ह्याचा नीट विचार करून तें कारण शोधून काढलें पाहिजे. पुढें राष्ट्र स्वतंत्र होण्यास कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे हेंहि पाहिलें पाहिजे. हें काम आजच्या तरुण पिढीचें आहे. कित्येक अशा मताचे आहेत कीं आज हिंदूनीं नोकरशाहींत शिरून पुष्कळशा जागा बळकावाव्या आणि मग ह्या सगळ्या गोष्टीचा विचार करावा. पण नोकरशाहींतल्या नोकराला स्वतंत्रपणें वावरतां येईल काय ? आमच्या ब्रिटिश हिंदुस्थानांतल्या बड्याबड्या नोकरांकडून हिंदुस्थानला कोणत्या प्रकारची मदत मिळालेली आपण पहातों ! आज कै० टिळक, गांधीजी वगैरे मोठमोठ्या पुढाऱ्यांचें नोकरशाहीबद्दल काय मत आहे ? आज ते सरकारापासून अलग राहूनच कांहीं तरी करूं पहातात. आह्मींहि त्यांच्याच प्रमाणें वागलें पाहिजे. म्हणून मी म्हणतों कीं आमच्या तरुण पिढीपैकीं सुख वस्तु तरुणांनीं आमची मोडकी तोडकी लोकशाहीच नीट करण्याकडेच प्रवृत्त व्हावें, आणि अर्ध्या वांट्याचें सुख आपल्या दुसऱ्या तरुण बंधूंना घेऊं द्यावें. त्याच्या योगें करून आपलें नोकरशाहीतहि वजन राहून इकडे देशकार्याचे ढीगाचेढीग एकत्र होऊन भरपूर तयारी होईल. ' सामाजिक सुधारणा ' करण्याचें नोकरशाहींतील तरुणानीं अंगिकारावें आणि राजकीय सुधारणा नोकरशाहीवर बहिष्कार टाकणाऱ्यानीं पत्करावें राहतां राहिला ख्रिश्चन वर्ग. हा वर्ग स्वतःचें पाहून घेईल किंवा ऐन वेळ येतांच मग त्याच्या बद्दलहि विचार करतां येईल.

ANUNCIOS

Pelo juiz de direito de comarca de Quepem e cartorio do escrivao do 1° oficio Redcar vai a praga para a venda em hasta publica a porta do tribunal judicial desta comarca situada em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige a estagao de Sanvordem no dia 25 do proximo mez de Setembro as 13 horas pelo maior lanço que se oferecer a primeira adigao do predio denominado "Aforamento da cultura de coqueiros e ouiras arvores avaliada por 1.000:00:00 Segunda adigao do predio denominado "Aforamento da cultura de coqueiros e outras arvores avaliada hor 500:00:00 Terceira adigao do predio denominado Aforamento da cultura de coqueiros e outras arvores avaliada por 500:00:00 Quarta adigao do predio denominado Aforamento da cultura de coqueiros e outras arvores avaliada por1.200;00:00 e quinta adigao do predio denominado Aforamento da cultura de coqueiros e outras arvores avaliada por 400:00:00 todos situados em Mulem e discritos respretivamente na conservatoria desta comarca sob os no's 5901, 5902, 5903, 5904 e 5905 e penhorados nos autos civeis de execugao hipotecaria que Damum Hirba'Sinay Narcornim Sanvordencar de Sanvordem como cessionario do exequente Quessova Volcunta Naique vulgo Ecnat de Paroda' como pai administrador da sua filha menor Dotem move a Ula por outro nome Irabay ou Locximim Quenima, viuva de Xanum Fotu' Quénim vulgo Bombi de Sanvordem e outros de Assolna e Baly para pagamento da quantia de 300 rupias juros penas e custas da execugao. O arrematante pagara' a contribuigao do registo por inteiro e as despezas da praga alem do prego da mesma dentro de tres dias. Por este sao citados quaisquer credores incertos e co proprietarios,bem assim os representantes do credor falecido Fotu Quenim que foi de Paroda' e que tem a seu favor uma hipoteca no livro C um da copia nova a fl.s 148 sob o n.° 1659 a segurança da quantia de 600 rupias registada em 20 de Dezembro de 1887 achando-se cedida desta quantia a importancia de 200 rupias pelo dito Fotu a favor de Sonum Venctexa Camotim de Ponchovady e pelo dito Sonum a favor de Quessova Voicunta Naique de Paroda' e os representantes do usufructuario Gopala Visvonata Naique Dalal de Margao para deduzirem os seus direitos nos termos e para os fins de lei.

Xeldem, 24 de Agosto de 1923.

O escrivao de Direito

Babú V. Camotim Redcar

Verifiquei

O juiz de Direito 2° substituto

Luìs José de Sousa

Ecos & Critica

Bubonica

Informam-nos que com precedencia do aparecimento de ratos mortos, deram se alguns casos fatais da peste bubonica na vila de Marg.o, cujos habitantes estão, porisso, bastante alarmados.

Certos estamos de que o govern terá sempre nessa ocasiã critica o conceito expresso na seguinte maxima:

Salvs populi, suprema lex est...

Sub inspector-primario

Em volta da nomeaçao do sr. Ramachondra Xencora Naique para o cargo de sub inspector de instrução primaria temse levantado um *sarrilho* de comentos, tendentes á demonstração da *ilegalidade* da mesma nomeação.

Nos, porem, lêmos pelo bre

viario do sr. Lucio Santos pela simples razão de que o *Bharat* reputa o digno Director dos Serviços de instrução profudo conhecedor da legislação que regula as funcções do seu importante cargo.

Achamos, portanto, muito bem feita a colocação do sr. Naique para o aludido lugar de sub-inspector, salvo o devido respeito pela opinião contraria.

Uma reclamacao

Consta-nos que está parada na Procuradoria da Republica uma reclamação, há tempo dirigida ao Governo por alguns escrivãis de comunidades contra a desagregação destas, deixando em situação indefinida e aflitiva os interessados.

Somos contra a demora no aviamento de petições da natureza daquela de que se trata e, porisso, pedimos a quem competir a sua rapida solução.

भारत

गुरुवार भाद्रपद व० २ या १८४५

लोकशिक्षण

भारताच्या चालू सालच्या २४ व्या अंकाच्या अग्रलेखांत खरी पात्रता आंगांत आणून मिळविलेले स्वराज्य तें खरें स्वराज्य होय; न पेक्षां मुद्दाम गळ्यांत बांधिलेलें स्वराज्य —autonomia— ह्मणजे कोंबड्यास उकिरड्यांत मिळालेलें रत्न होय, असें विधान आम्हीं केलें होतें, व वामनावताराचा इतिहास पुढें ठेवून खरें स्वराज्य ऊर्फ राजकीय स्वातंत्र्य हें तिसरें कार्य किंवा अंतिम ध्येय असें कल्पून या तिसऱ्या कार्यास परिपोषक अशीं पहिलीं दोन कार्यें कोणतीं असावीं, याचा विचार करण्याचें आश्वासिलें होतें; तरी त्यांतील पहिल्या कार्याचा, आमच्या आजकालच्या परिस्थित्यनुसार, विचार करण्याचें आज आम्हीं योजिलें आहे.

स्वराज्य उपभोगण्याची पात्रता आंगांत आणणें ऊर्फ राजकीय सुधारणा करणें यांत जगांतील सर्व सुधारणांचा अंतर्भाव होतो. मुमुक्षूंचे सायुज्यता मुक्तीप्रीत्यर्थ निवृत्ति मार्गीय प्रयत्न वगळल्यास इतर धार्मिक प्रयत्न सुद्धां या राजकीय सुधारणेंत समावेशितां येतील. तरीपण प्रवृत्तिमार्गाच्या दृष्टीनें, ढोबळ विचाराअंतीं, कालदेश वर्तमानानुसार, लीनता व साध्या राहाणीच्या जोरावर व आजकाल या राजकीय स्वातंत्र्याच्या सिंहासनावर विराजमान झालेल्या देशांचा कित्ता पुढें ठेवून ज्या गोष्टींची, खऱ्या स्वराज्य उपभोगाच्या पात्रतेस अत्यंत प्रामुख्यानें आत्यंतिक गरज आहे, तीचीच आज आह्मांस विचार करण्याची आवश्यकता आहे. तेव्हां या दृष्टीनें विचार केल्यास अगदीं गणेश पूजनादाखल लोकशिक्षणाकडे सहज दृष्टि वळते.

लोकशिक्षण हा शब्द फार व्यापक स्वरूपाचा आहे. सामान्य लेखकाच्या लेखणीपासून तों तहत अगदीं पहिल्या दर्जाच्या लेखकांच्या लेखणीपर्यंत, प्रत्येक लेखणी, "लोकशिक्षण" याविषयावर आपले विचार प्रसवली नाहीं, असें क्वचितच आढळून येईल. हवेंत फेंकलेल्या दगडास परत जमिनीवर येऊन आपटण्यास गुरुत्वाकर्षणाची जितकी गरज लागते; किंवा मध्यस्थिति दर्शविणाऱ्या भाषेंत बोलावयाचें झाल्यास ज्याप्रमाणें पाठशाळेंतील सरसकट विद्यार्थ्यांस वार्षिक परीक्षेंत पास होण्यास शिफारस पत्रांची जितकी गरज लागते तितकीच एकाद्या व्यक्तीस, समाजास किंवा राष्ट्रास स्वोन्नतीच्या बाबतींत लोक शिक्षणाची गरज लागते: याच कारणानें लोकशिक्षण या विषयास लेखक वर्गात फार लोक प्रियता प्राप्त होऊन त्या विषयावर या वर्गाकडून पुष्कळसें वाङ्मय खरडलें गेलें आहे. व ह्मणूनच आम्हीं या लोकशिक्षणाच्या आवश्यकतेविषयीं लिहून चार्वितचर्वणाच्या दोषास पात्र होऊं इच्छित नाहीं; मात्र या लोकशिक्षणाच्या दिशेंत कोणत्या भागाची उणीव आम्हांस आहे इतकेंच दाखविणार आहों.

लोकशिक्षण या विषयाचे तीन भाग करितां येतील. यांतील पहिल्या भागांत प्राथमिक शिक्षणाचा अंतर्भाव होतो. या शिक्षणाप्रीत्यर्थ सरकाराकडून राजभाषेकरितां व जनतेकडून आपल्या मातृभाषेकरितां, अगदीं पूर्ण स्वरूपांत जरी नसले तरीपण गरज भागविण्यापुरते तरी, प्रयत्न चालू आहेत. लोकशिक्षणाच्या दुसऱ्या भागांत वरिष्ट किंवा दुय्यम शिक्षणाचा अंतर्भाव होतो. हें शिक्षण घेण्याचे, वाखाणण्याजोगे प्रयत्न ख्रिश्चन समाजाकडून झालेले आहेत; तरीपण हिंदुसमाजाचे हे डोळे हळुहळू उघडत चालले आहेत. लोकशिक्षणाची तिसरी पायरी म्हटली ह्मणजे राजकीय शिक्षण ही होय. स्वराज्य उपभोगाच्या पात्रतेच्या बाबतींत प्राथमिक शिक्षण किंवा दुय्यम शिक्षण हें साधन होय. व राजकीय शिक्षण हें साध्य होय.

या लोकशिक्षणाच्या तिसऱ्या भागादाखल म्हणजे लोकशिक्षणाच्या साध्यादाखल गोष्टींत अगदींच प्रयत्न झालेले नाहींत असें ह्मणतां येईल. या शिक्षणाच्याद्वारा सामान्य जनतेस आपल्या राजकीय हक्कांची ओळख पटविण्याचें असतें. वरिष्ट दर्जाच्या लोकांस किंवा दुय्यम शिक्षण घेतलेल्या लोकांस राजकीय शिक्षणांतर्गत नागरिकत्वाचे हक्क कोणते व ते कशाशीं खातात हें पुस्तकी ज्ञानावरून किंवा परदेशांतील आपल्या अवलोकनावरून समजलेलें असतें; परंतु सामान्य जनतेस वरील साधनद्वयांच्या अभावीं, नागरिकत्व ह्मणजे काय चीज आहे, हें समजलेलें नसतें. स्वराज्य उपभोगाच्या पात्रतेच्या बाबतींत आपले नागरिकत्वाचे हक्क सामान्य जनतेस शिकविले जाणें ही गोष्ट अत्यंत महत्वाची होय. व याच शिक्षणास आह्मीं राजकीय शिक्षण असें म्हणतों.

स्वराज्याचा गाडा चांगल्या रीतीनें चालला जाण्यास ज्या अनेक गोष्टींची आवश्यकता आहे त्यांत पहिली गोष्ट ह्मटली म्हणजे जीविताचें व मालमत्तेचें सुरक्षितत्व ही होय. हें सुरक्षितत्व चांगल्या रीतीनें नांदलें जाण्यास सामान्य जनतेस राजकीय शिक्षणाच्याद्वारा नागरिकत्व ह्मणजे काय आहे; सनदशीर प्रयत्न किंवा चळवळ ह्मणजे कसी असते; अधिकाऱ्यांच्या स्वैर वृत्तीस सदनशीर उपायांनी कसा आळा घालितां येतो; सरकाराकडून झालेली चूक राज्यनियमानुसार निःशस्त्रप्रतिकारानें कशी दुरुस्त करून घेतां येते; कौन्सिलांत निवडले जाऊं इच्छिणाऱ्या उमेदवारांच्या भूलथापांस कसें बिनचूक ओळखावें; आपल्या नातेवाइकांस सरकारी नोकरी मिळवून देण्याकरितां कौन्सिलांत स्वीकारिलेल्या कौन्सिलरांच्या होयबा वृत्तीस कशी तंबी द्यावी; इत्यादि अनेक गोष्टी, ज्या स्वराज्याच्या पात्रतेस अत्यंत अवश्यक होत, त्या थोड्या बहूत प्रमाणानें शिकविल्या गेल्या पाहिजेत.

या सामान्य जनतेच्या राजकीय शिक्षणापासून स्वराज्याच्या पात्रतेप्रीत्यर्थ अनेक फायदे होण्याजोगे आहेत. येथें उदाहरणादाखल मताधिकाराचा हक्क घेऊं. नागरिकत्वाच्या अनेक हक्कांपैकीं हा हक्क फार महत्वाचा आहे. हा सामान्य जनतेस योग्य रीतीनें ओळखितां आल्यास, निवडून दिलेल्या आपल्या प्रतिनिधींच्या आंगांत, कान्सिलांत गेल्यानंतर दिनमाळुम शिरणाऱ्या आपलपोटेपणास, पक्षपातीपणास व अधिकारी वर्गाची स्वोदर भरणाऱ्या मनतामने प्रीत्यर्थ हांजी-हांजी करण्याच्या स्वभावास खीळ पडण्याचा फार संभव आहे. त्याचप्रमाणें आपलाच हितकर्ता अशा एखाद्या सवर्गी महत्वाकांक्षी देपुताद निवडला जाण्याच्या कामीं मतदारांस बोकडांप्रमाणें "है है" हांकून आवदीतोगींत किंवा सरकारी आरोग्य खात्यांत एकादी नोकरी पटकावूं इच्छिणाऱ्या उल्लूंच्या भूलथापांस किंवा 'इंस्तितूत कोमेर्सियाल' न पेक्षां "मेडिकल स्कूल" मध्यें एकाद् दुसरी प्रोफेसरची जागा बळकावूं पाहाणाऱ्या धूर्तांच्या गारुडी डावपेंचांस, बराच आळा बसेल. असे हे डावपेंच, आपल्या पवित्र मताधिकाराच्या अंमलबजावणीच्या बाबतींत, योग्य रीतीनें ओळखितां येण्याची आजच्या परिस्थित्यनुरूप फार आवश्यकता आहे. उलट बाजूनें पाहिल्यास असें दिसून येतें कीं, सामान्य जनतेंत खऱ्या नागरिकत्वाच्या हक्कांविषयीं अज्ञान पसरलेलें असल्यास त्यापासून फार अनर्थ ओढवतात! बंडांसारखे प्रकार घडतात!! व त्यामुळें सार्वजनिक शांतता बिघडते व जिविताचें व मालमत्तेचें सुरक्षितत्व हें जें राज्यव्यवस्थेचें एक अंतिम ध्येय त्यास धक्का पोंहोंचतो.

ज्या देशांत सामान्य जनतेस आपल्या राजकीय हक्कांची जाणीव उत्तम रीतीनें पटविलेली गेली असते, त्या देशांत स्वराज्य उपभोगाच्या पात्रतेची पहिली पायरी उत्तम रीतीनें बसली गेलेली असते असें ह्मणतां येईल. एतदर्थ स्वराज्यास—खऱ्या आवतोनोमीस——जर आह्मांस पात्र व्हावयाचें असेल तर लोकशिक्षणांतर्गत जें सामान्यजनतेचें राजकीय शिक्षण तें योग्य रीतीनें त्या जनतेस दिलें पाहिजे, व हीच स्वराज्याच्या खऱ्या पात्रतेची पहिली पायरी होय. स्वराज्याच्या पात्रतेच्या दुसऱ्या पायरीचा विचार पुढें करूं.

—मडगांवचे जमीनदार रघुनाथ फट्ट नाईक यांच्या रिवण येथील 'ठिकाणां'तील ५०० वर नारळांची चोरी झाल्याचें कळतें! रिवणसारख्या भरवस्तीच्या गांवांत उपरोक्त लांच्छनीय प्रकार झाल्याचें कळून फार वाईट वाटतें.

प्रत्येक गोष्ट बोलतानां तिचा आधीं विचार कर. अज्ञानी व अदूरदर्शी लोक आधीं बोलतात व नंतर त्याचा विचार करतात. म्हणून अशा लोकांस समाजांत पावलोपावलीं ठेंचा लागतात. आपल्या जिव्हेला आधीं पाहिजे तशी चुरचुरण्यास मोकळी सोडून मग पश्चात्ताप पावण्यापेक्षां आधींच तिला दूरवर विचाराची वेसण घालून आवरणें फार शहाणपणाचें होय.

९ बाबारे, हीहि गोष्ट लक्षांत ठेव कीं सर्व बोलण्यांत खोटें बोलणें फार वाईट आहे. तें आपल्या नावास काळिमा लावणारें, सभ्यतेचा नायनाट करणारें, सद्वंशाचें नांव बुडविणारें व नीतीपासून पराङ्मुख करणारें आहे. खोटें भाषण चोरांनां दुराचारांत सुद्धां खपत नाहीं. व मग तुला ज्या समाजांत मिसळून वागावयाचें आहे त्याचा प्रश्नच नको.

१० तुझ्या मित्रांस तुझ्या स्वतःच्याच तंत्रानें वागविण्याचें शहाणपण कर व जर यदाकदाचित् तुझ्या खऱ्या हितचिंतक मित्रांचा प्रश्न बाजूसच ठेविला, तरी पण दुसऱ्याच्या तंत्रानें वागूं नकोस. तुझें काम दुसऱ्यांवर कधींच विश्वासूं नकोस. 'स्वावलंबन ही कामधेनु आहे.'

११ वक्तशीरपणा हाहि गुण फार उपयोगी आहे. थोर लोक सदोदीत आपल्या कामांत वक्तशीर असतात. किंवा त्यांच्या थोरवीचा बराचसा अंश त्यांच्या वक्तशीरपणावरच अवलंबून असतो. म्हणून मी तुला प्रत्येक गोष्ट अगदीं नेमक्या वेळीं करण्याविषयीं शिफारस करितें.

१२ आपल्या आहारांत फारच नियमितपणा राखिला पाहिजे. तो चांगला असला पाहिजे. मित आहारी असणें फारच उत्तम. अधाशीपणाचे फार वाईट परिणाम घडत असतात. तुझा आहार इतका बेताबेताचा असावा कीं, जेणें करून तुझ्या मेंदूस यत्किंचितहि बाधा पोहोंचूं नये.

१३ ज्या प्रमाणें आरोग्यसंरक्षणास मित आहारीपणा जितका आवश्यक आहे, तितकाच व्यायामहि उपयोगी आहे. अमुक एक वेळ नेमून त्यावेळीं अगदीं नियमितपणानें व्यायाम करीत जा. तसें केल्यानें तुझ्या अभ्यासानंतर कदाचित् तुझ्यांत उद्भवणारा आळस-मंदी-जाऊन त्याच्या ऐवजीं तुझ्यांत तरतरी येईल, मन उत्साहित राहील, स्नायूंची शक्ति वाढेल व तुझ्या शारीरिक बलाबरोबर तुझ्या मानसिक शक्तीचाहि विकास होईल. त्याच प्रमाणें दररोज संध्याकाळीं मोकळ्या हवेंत सहल करण्यास जा. या वेळीं तुझ्या अवलोकनांत जी जी वस्तु येईल, त्या त्या वस्तूंचें सदोदीत सूक्ष्म रीतीनें निरीक्षण कर; कारण या जगांतल्या प्रत्येक वस्तूपासून तुला पुष्कळसें शिकावयास मिळेल.

१४ तुझ्या पोषाखांत सदा नीटनेटकेपणा, सभ्यपणा व निर्मळपणा राख.

१५ सदोदीत आनंदित व तृप्त अस. कारण 'कुत्रा व त्याची पडछाया' या गोष्टीची तुला आठवण आहे ना? बाबारे, आनंदाचें पर्यवसान मात्र दुसऱ्यास लागून बोलण्यांत होऊं देऊं नकोस. कारण वाईट शब्दानीं झालेल्या जखमा तरवारीच्या जखमाहूनहि फार भयंकर असतात व त्या क्वचितच बऱ्या होतात!

१६ प्रिय वसंत, कसल्याच गोष्टींत आरंभशूरपणा करूं नकोस व आपण होऊन कोणत्याहि गोष्टींत तुझें मत ठोकून देऊं नकोस. ज्या ज्या समाजांत जशा जशा तरेचें तुझें वजन असेल, त्या त्या मानानें तुझें मत मागें पुढें देण्याचें शहाणपण कर व असें जर तूं न करशील तर तूंच बोलून तुलाच ऐकण्याचा प्रसंग तुझ्यावर येईल.

१७ वादविवादांत किंवा कोणत्याहि ठिकाणी जर एखादें सुंदर वाक्य किंवा दृष्टांत तूं ऐकिलास तर लागलीच तुझ्या स्मरणवहीत त्याचें टिपण करून ठेव. ही संवय तुझ्या वक्तृत्वशक्तीस फारच सहाय्यकारक होईल.

१८ शपथ किंवा अभद्र भाषण तुझ्या तोंडून सहसा ऐकूं येतां कामा नये. दुसऱ्याच्या तोंडून अशी दुरुक्ति ऐकूं आल्यास तूं त्याचा लागलाच निषेध कर. अशा रीतीनें अभद्र किंवा फटकळ भाषण कधींच न करण्याची तुला संवय लागेल.

१९ प्रत्येक समाजांत मोठ्या शांतपणानें, शहाणपणानें सभ्यतेनें व मोठ्या नम्रतेनें वाग. "समाज" या शब्दाचा अर्थ मी "पुष्कळशा लोकांचा भरणा" असा एथें करीत नाहीं. समाजांत पुष्कळसे सुशिक्षित, दुरदर्शी, सभ्य, आपल्या बांधवांची सदोदीत कळकळ बाळगिणारे व बंधुजनोन्नतीसाठीं तन-मन-धनानें झटणारे असेच महात्मे असावे लागतात. अशा महात्म्यांस व त्यांच्या अनुयायांस "समाज" या शब्दानें मी संबोधिलेलें आहे. तेव्हां अशा समाजाकडे तुझें डोकें सदासर्वकाळ ठेंगणेंच असूंदे.

२० सदोदीत चांगल्या गोष्टी आचरण्यांत तुझा वेळ घाल. मनुष्याची इतिकर्तव्यता आपल्या देशबांधवांस हस्तें परहस्तें उपयोगी पडण्यांतच आहे. बाबारे, तुझ्या मातृ-पितृ वर्गाचा मोठेपणा तूं जाणतच असशील. व तूं जर तुझा देह योग्य वेळीं लोकोपयोगार्थ वाहाण्यास आतां-याच वयांत शिकलास तरच तूं तुझ्या परोपकारी कुलास पुढें भूषणास्पद होशील. असो.

प्रिय वसंत-हें उपदेशपर पत्र तुझी मावशी तुझ्यापुढें ठेवीत आहे, याचा कसा काय, तूं या चिमुकल्या वयांत उपयोग करितोस तें अनुभवांतीं पाहून पुढें, यांत संक्षिप्त रूपानें वर्णिलेल्या प्रत्येक विषयावर एक एक स्वतंत्र विवेचनात्मक, पत्र मी तुला लिहिणार आहें. कळावें, हे आशीर्वाद.

मडगांव
२०।७।१९००
तुझी हितचिंतिका.
गोपिकाबाई.

A Patria

Vai sair a luz de publicidade neste mes uma revista intitulada "A PATRIA" que alguns academicos da Capital tencionam publicar, colaborando, ai, nao so' os novos, as senhoras indo--portuguesas, mas a te velhos que tenham uma alma joven...

Vao para ela e para os seus inciadores, os nossos sinceros desejos para que ela tenha toda a'sorte de prosperidades.

Socio.

O Sr. Pandurongą Sacarama Sinai Pissurlencar, foi por unanimidade eleito associado provincial na ssssao da classe das letras da Academia das Sciencias de Lisboa, primeira corporaçao scientifica de Portugal, em 28 de Junho ultimo.

Ao ilusfre professor e advogado, nossas felicitaçoes.

Inexplicavel

No processo, recentemente, instaurado contra o *Bharat* por causa do seu artigo *Inexplicavel* entende o sr. dr. Delegado que fizemos nele *insinuaçoes de perfidia* contra o seu colega da comarca de Salsete e a Relaçao de Nova-Goa.

Perfidia? Nao sabemos que *coisa* seja esta, como, cremos, o nao sabera o proprio digno magistrado, que, segundo as informaçoes que a seu respei to temos, e' o simbolo de honradez e rectidao, auriolado duma bondada impecavel.

Julgamos, porisso, que o emprego de tal expressao e' o *sangue* dos ossos do oficio do Meritissimo Agente do M. P. nesta comarca

Agradecendo

Ao nosso presado colega da *India Portugueza*, intemerato orgao do *Partido Indiano* agradecemos a amabilidade de expressoes animadoras que se dignou dirigir ao nosso modesto jornal, a proposito do processo crime contra ele instaurado por causa do artigo *Inexplicavel*.

NOTA OFICIOSA

O professor do ensino normal primario, actualmente sub-inspector, foi nomeado na qualidade de professor primario que e', nos termos do artigo 1° do decreto de 23 de maio de 1907, que aprova o Regulamento de instruçao primaria portuguesa, marata e guzarate, no Estado da India, incluindo na "instruçao primaria" o ensino normal primario (art°s 176° e 177° do citado Regulamento).

Nao se da o caso da incompatibilidade legal, como ficou, estabelecido na Por. Prov. n° 523, de 17 de Agosto ultimo.

Nao ha incompatibilidade de serviço.

Direcçao dos serviços de Instruçao, em Nova-Goa, 22 de Setembr de 1923.

Lucio dos Santos

भारत

गुरुवार भाद्रपद व० ९ मी १८४५

जुना इतिहास

'स्वराज्य हाच माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तें मी मिळविणारच.'

लो. टिळक.

'आपणास अनेक हक्क नको असून एकच हक्क पाहिजे आहे व तो ह्मणजे स्वातंत्र्य, दास्यमुक्तता'

-इटालियन दे. माझीनी.

वरील उद्गार आपल्या राजकीय जीवनाच्या महत्वाचे प्रसंगीं, दोवां राष्ट्र विभूतीनीं काढलेले आहेत. त्या उद्गारांत झळकणारा झळझळीत स्वदेशाभिमान, राष्ट्रीय भावनेचा त्यांत खेंचून भरलेला जोर व प्रतिबींबीत झालेली स्वदेशाविषयीं तळमळ ह्या इतक्याच गोष्टी लक्षांत घेतल्यास त्या वेळीं त्यांचा देश कोणत्या परिस्थितींत होता व त्यांची योग्यता काय होती, ह्याची कल्पना करणें फारसें कठीण जाणार नाहीं. आतां, पहिल्या व्यक्तीची इच्छा फलद्रूप झाली नाहीं, तर दुसरीच्या नशिबीं ती तशी झालेली पहाण्याचें भाग्य आलें, ही गोष्ट वेगळी. राष्ट्रीयत्वांत, स्वदेशाभिमानाचे ओलाव्यानें, वरील लोकोत्तर पुरुष कसे तादात्म्य बनले होते, हें जाणणें हा मुख्य मुद्दा होय.

पण, अंधारांत चांचपडत रहाणाऱ्या जगाला त्यांत तसेंच राहूं द्यावें असा ईश्वरी संकेत असल्यामुळें ह्मणा, अगर "राज्य स्थापनेचा जो नर तोचि जाणावा ईश्वरी अवतार' ही उक्ति स्वातंत्र्याची संस्थापना करण्याबद्दल झटणाऱ्या देशभक्तांकडे लागू करून चालल्यास, ईश्वरी अवताराचें विरळत्व अपरिहार्य असल्यामुळें ह्मणा, जगांतल्या सर्वच राष्ट्रानां मानवी स्वरूपांत अवतीर्ण झालेल्या ह्या अवतारानां, जन्म देण्याचा मान मिळतोच अशी कांहीं गोष्ट नाहीं. उलट तो मान वांट्यास न आलेलीं अशीं दुर्दैवी राष्ट्रेंच जगांत फार! बरें, ज्यांच्या वांट्यास तः आलेला आहे त्यानां तरी वरील प्रकारचीं नररत्नें सरास मिळालेलीं आहेत, असेंहि नाहीं. परंतु ही, एकादे वेळीं, देशोद्धार करण्याला फारच थोड्या अवतारी पुरुषांची गरज वस्त असते, ह्या नियमाची अमलबजावणीहि असूं शकेल. आस्ट्रियाच्या पारतंत्र्याखालीं गाय बनलेल्या इटालीपाशीं माझीनी, ग्यारीबाल्डी पुष्कळ नव्हते किंवा १८ व्या शतकांत, राजकारणाची बिघडलेली घडी नीट बसवून, भुकंपामुळें नामशेष झालेल्या लिस्बन शहरापासून, तों थेट शतकीचा पाठ देऊन तिची योग्य संभावना करणारे मार्केज द पोंबाल पोर्तुगालला उभ्या सात शतकांत एकच एक लाभले. भूतकालाकडे न वळतां आधुनिक कालाकडे बोट दाखवून सांगण्याचें झाल्यास बहुधा तोच प्रकार दृष्टीस पडतो. फळावर दृष्टि ठेऊन थोर लोकांस विशेषणें द्यावयाचीं झाल्यास, रशियाची भावी आशा लेनीन, त्या अफाट देशांत एकच होय, किंवा लो॰ टिळक, म. गांधी, यांच्या सारख्या दैविक विभूती सगळ्या हिंदुस्थानांत विशिष्ट शतकांच्या दरम्यानच निपजत असतात. असो. सांगण्याचें तात्पर्य एवढेंच कीं, असल्या व्यक्तींकडे पाहून देशाच्या हिताची कल्पना करतानां त्यांच्या संख्येकडे पहाणें वेडगळपणाचें ठरेल.

आतां, कित्येक राष्ट्र नौका उत्तम नावाड्याचे अभावीं बिकट संकटांत सांपडलेल्या आहेत; तर दुसऱ्या कित्येक कुशल कर्णधारांचे सहाय्यानें, प्रतिकूळ गोष्टींशीं टक्कर देऊन व भौतिक सुधारणेचा मार्ग चोखाळित आहेत; ह्या दोन परस्पर विरोधी गोष्टीना कारणेंही पण तशीच असणार. न पेक्षां राष्ट्राराष्ट्रांशीं द्विधा भाव ठेवणाऱ्या, परमेश्वराकडे आपण दोषीच ह्मणून बोट दाखविणें अपरिहार्य होऊन बसलें असतें. तीं कारणें, राष्ट्राच्या अंतर्गत घडामोडींत होत असतात. तेव्हां प्रतिपाद्य विषयाची योग्य कल्पना होण्याकरितां त्यांचा जरा विचार करून मग आपल्या गांमांतकाचा प्रश्न हातीं घेऊं.

कोठेंहि झालें तरी, जीत राष्ट्र व जेत्य राष्ट्र अनुक्रमें गुलाम बनण्यांत चुरस ही आढळतेच. मात्र ह्या गुलाम राष्ट्राला आत्मज्ञान झालें असलें पाहिजे. हें उघड आहे. ही चुरस एकदम उद्भवते, अशी कांहीं गोष्ट नाहीं. युरोपियन राष्ट्रांचे उदार पंजांत, स्वतः होऊन आनंदानें पडलेल्या कित्येक देशांच्या सहानुभूतिदर्शक उष्णतेच्या पाऱ्याचें मान, शून्याखालीं बरेच अंशाला पोहोंचलेलें, आजला दृष्टीस पडत आहे. त्यावरून आमच्या वरील विधानाची सत्यता पटण्यासारखी आहे परकीय राज्यकर्त्यानां जीत देश पाहिजे असतात. ते कांहीं त्यांच्या सुधारणेचें निरासक्त श्रेय पदरांत घ्यावें, ह्या उच्च हेतूनें नसतें. तर जीत राष्ट्रांतील संपत्तीचा होईल त्या तऱ्हेनें आपल्या देशाकडे उपयोग करून, त्यांच्या तोंडांतील घांस स्वतः हिरावून घ्यावा, ह्या आप्पलपोट्या वृत्तीचाच अवलंब, एकंदर विजयी राष्ट्रांनीं नसलां तरी बऱ्याच जणांनीं केलेला असतो. हें राजकारणाची ढोबळ माहिती असलेला साधारण मनुष्य देखील सांगूं शकेल. तेव्हां सहजच होतें काय कीं, राष्ट्रांतील जनता पडलेली ही चूक होईल तितकी भरून काढण्याकरितां व पुढें तिला बळी न पडण्याकरितां विजयी राष्ट्राकडे विशिष्ट हक्कांची मागणी करूं लागते. ही मागणी लक्षांत घेतली गेल्यास आपल्या देशाच्या राज्यकारभाराच्या गाड्यावर चढण्याची, व फारच झालें तर चाबकाला फक्त हात लावण्याची संधी, तिला मिळण्यासारखी असते. जसजशी तिला आपल्या नैसर्गिक हक्काची व योग्यतेची जाणीव होऊं लागते, तसतशी अग पुढें जाऊन ती, तो गाडा चालू रहाण्याकरितां चाबकाचे फटकारे ओढण्यापुरते कांहीं हक्क आपणास मिळावे, ह्या खटपटीस लागते. ही तिची आकांक्षा पूर्ण झाल्यास राज्यकारभारांत राज्यकर्त्यांचे बरोबरीनें जरी नसलें तरी तिला बरेंच महत्व मिळूं लागतें. देशाचें उत्पन्न व खर्च यांची विभागणी वासलात वगैरे महत्वाच्या बाबतींत तिला हक्कानें पण राज्यकर्त्यांच्या मतानुकूल्यानें पाहिजे त्या गोष्टी करतां येऊं लागतात. याहि, पुढें जाऊन आपल्या लायकतेची साक्ष राजकर्त्यांनां पटवून ती जबाबदार राज्यपद्धतीची याचना करूं लागते. ह्या नंतर, शेवटची पायरी ह्मणजे पूर्ण स्वराज्य! ह्या पायऱ्यांवरून, अडथळ्याशिवाय तिला चढतां येतें असें नाहीं. ती गोष्ट राज्यकर्त्यांच्या स्वभावावर अवलंबून असते. कित्येक जेत्य राष्ट्रें, स्वातंत्र्य समता, व बंधुत्व, या त्रयीला स्वतःच्या स्वार्थापेक्षां ज्यास्त महत्व देऊन, तिचा उपयोग जीत राष्ट्राच्या सुधारणेकडे करण्याचें औदार्य दाखवितात; तर दुसरीं कित्येक—अशांचाच भरणा जगांत फार स्वराज्यासारखी अमुल्य देणगी देण्याचें तर असोच, पण स्वतःच्या कुत्सित कृत्यांवर साधी टीका ह्मणजे काय, पण ती देखील निर्भयपणें करतां येऊं नये, ह्या हीन हेतूनें मुद्रण स्वातंत्र्यावर देखील आपल्या बळजबरीची कुऱ्हाड एका हातानें चालवीत दुसऱ्या हातानें स्वातंत्र्य, समता व बंधुत्व हे आधुनिक सुधारणा—मालेचे मणी ओढतात. अशाच वेळीं, राष्ट्रांत अस्वस्थतेचें बीं पेरलें जातें; व त्याला स्वतःची चैन चालू राहण्याकरितां राज्यकर्त्यांनीं लादलेल्या निरनिराळ्या असह्य करांमुळें कोंब फुटूं लागतात. न्यायदानाचे बाबतींत, आपले देशबंधु व सर्वसाधारण लोक यांच्याशीं होणाऱ्या तीव्र भेदामुळें, जनतेच्या नैसर्गिक हक्कावर गदा येऊं लागते. व दुसऱ्या बाजूनें अस्वस्थतेचें रोपटें फोफावूं लागतें. स्वदेशाभिमान, राष्ट्रीयत्व यांच्या तीव्र भावनेच्या जागृतेची वेळ ही अशी असते. असल्यास अशाच वेळीं, लो. टिळक, म. गांधी, किंवा आपल्या देशजातेच्या स्वातंत्र्यासाठीं जवळ जवळ २॥ महिने अन्न वर्ज करून त्या उपवासाचें पारणें स्वतःच्या मरणानें फेडणारे आयरीश देशभक्त कार्डचे मेयर, अवतीर्ण, होण्याची शक्यता आहे. देशाभिमान, राष्ट्रीयत्व, प्रचंड स्वार्थत्याग, वगैरे राष्ट्रीय गुण समुच्चयाच्या बोटांवर मोजतां येण्याजोग्या ह्या पुतळ्यानां, काय काय शक्य असतें, हें जगाचा इतिहास मुक्तस्वानें सांगण्यास आपलपोटेपणा खास करणार नाहीं.

असो. वर सांगितलेल्या परिस्थितींत राष्ट्र असलें ह्मणजे राष्ट्रोद्धारक राष्ट्रवीर निपजतातच असा कांहीं नियम नाहीं.

–आपण अनघे सुपंथ धरू-आपलें ज्या मार्गानें हित होईल तो मार्ग आक्रमू. यांत तुकाराममहाराजांनी एकमेकांच्या सहाय्यानें सुपंथच धरूंया असें स्पष्ठ ह्मटलेलें आहे. यावरून तुकोबारायांचा सुपंथच धरण्याविषयीं कसा आग्रह होता हें दिसून येईल. कारण , ज्याप्रमाणें एकमेकांच्या सहाय्यानें सुपंथ धरतां येईल त्याचप्रमाणें कुपंथ ही धरतां येईल. परोपकारी उद्योग करतां येईल तसेंच परोपकारी उद्योगही चालवितां येईल. म्हणूनच तुकोबारायांनी अवघे धरूं सुपंथ असें स्पष्टपणें ह्मटलें आहे. यावरून मनुष्यानें- एकमेकांच्या सहाय्यानें सदोदित सुपंथच आक्रमण केला पाहिजे—सदोदित चांगलींच कृत्यें केलीं पहिजेत असें स्पष्टपणें दिसून येईल.

वरील विवेचनावरून ' मनुष्याचीं जीं कांहीं कर्तव्यें आहेत त्यांपैकीं एकमेकाना सहाय करणें मनुष्याच्या अंगीं फाजील स्वार्थाचा अभाव असणें, व एमेकांच्या सहाय्यानें सत्पंथच धरणें, हीं तीन कर्तव्यें होत असें स्पष्टपणें दिसून येतें.

आज गोमांतकवासियांच्या अंगांत वरील तीन गुणापैकीं किती गुण आहेत असा जर आपणास कोणीं प्रश्न केला तर त्याला आपण काय बरें उत्तर देऊं? गोमांतकीय बंधूंनो, आपण काय बरें उत्तर द्याल? उठा !जग पुढें जात आहे. झोपेंतून जागे व्हा; व एकमेकांत फार अंतर पडावयाच्या पूर्वींच त्यांच्या मागोमाग—साधल्यास पुढे —चला; व ही भविष्यकालाची शर्यत लागलेली आहे त्यांत भविष्यकाळीं यशस्वी व्हा.

चोराच्या उलट्या बोंबा.

सन्मान्य संपादक 'भारत' यांस स.वि वि.–आपल्या लोकप्रिय भारताच्या ता. १७ ९-२३ च्या अंकांतील रा. सगुण विठ्ठल नाईक मडगांवकर यांच्या रिवण येथील भाटांत नारळांची चोरी झाल्या बद्दलचें वर्तमान वाचून सखेदाश्चर्य वाटलें. सदर नाईक व अवघेच मुंडकारी यां शिवाय ही चोरी झाल्यासबंधींचें खात्रीचें वर्तमान सबंध रिवणांत अद्याप कोणाल ही समजलें नाहीं फक्त नाईक मजकूर व त्याचे निवडक मुंडकारी यांकडूनच नारळासंबंधींची बोंब उठली होती. सन्मान्य भारतकार, आपल्या अंकांत ती चोरी भर वस्तीच्या गांवांत झाली असेंही आहे; परंतु रा०सगुण नाईक सांगतात त्यामुळें गांवच्या नदीपलीकडील ती जागा लोकवस्तीपासून मैल दीडमैलाच्या अंतरावर आमोलें बाजूकडे ,,आहे. रा० नाईक बोलतात त्यातऱ्हेचा प्रसंग रिवणांत कधींही घडलेला नाहीं. रा०सगुण नाईकापेक्षां रिवणांत किती तरी जास्त उत्पन्नदार भाटकार आहेत व तें असले प्रसंग कधींही घडूं देत नसतात. कारण असले प्रसंग होणें हें रिवणच्या प्रत्येक भाटकाराला नुकसानकारकच आहे. वास्तव फक्त नाईक मजकूर व त्याचे काहीं मुंडकारी यांचें हें कसलें तरी कारस्थान आहे असा सबंध रिवणांत बभ्रा झालेला आहे.

केवळ खरी गोष्ट उघडकीस यावी या चसाठीं ह्या चार ओळीं प्रसिद्ध करून ' भारताची ' अमोलिक जागा अडविण्याचा हा प्रयत्न करावा लागला या बद्दल दिलगिरी वाटते.

एक वातमीदार.

ANUNCIOS

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Redcar, vai á praça para venda em hasta publica á porta do tribunal desta comarca situado em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige a estação de Sanvordem no dia 6 de Outubro proximo pelas treze horas, pelo maior lanço que se oferecer aprimeira adição do predio denominado Aforamento da cultura de coqueiros e outras avores; segunda adição do predio denominado Aforamento da cultura de coqueiros e outras arvores; terceira adiçao do predio denominado Aforamento da cultura de coqueiros e outras arvores; quarta adição do predio denominado Aforamento da cultura coqueiros e outras avores; e quinta adição do predio denominado Aforamento da cultura de coqueiros e outras arvores; todos situados em Mulem e discritos respectivamente na Consevatoria desta comarca sob os numeros 5901, 5902, 5903 5904,e 5905 e penhorados nos autos civeis de execução hipotecaria que Damúm Hirbá Sinai Narcornim Sanvordencar de Savordem como cessionarios do exequente Quessoa Voicunta Naique vulgo Ecnat de Parodá como pai administradora da sua filha menor Datem move a Ulá por outro nome Irabay ou Locximim Quenina viuva de Xanum Fotú Quenim vulgo Bombi de Sanvordem e outros de Assolnã e Baly para pagamento da quantia de trezentas rupias jùros penas e custas da execução, e vão a praça pela segunda vez e por metade do seu valor ou sejam 500 rupias, 250 rupias, 600 rupias e 200 rupias respectivamente. O arrematante pagará a contribuição do registo por inteiro e as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Por este sao citados quaisquer credores incertos e co-proprietsrios, bem como os representantes do credor falecido Fotu Quenim que foi de Parodà e que tem a seu favor uma hipoteca no livro C. um da còpea nova a folhas cento quarenta e oito sob o numero seissentos cinquenta e nove á segurança da quantia de seis centas rupias registada em vinte de Dezembro de mil oitocentos oitenta e sete achando-se cedida desta quantia a importancia de 100 rupias pelo dito Fotu a favor de Sonum Venctexa Camotim de Poncho vadi e pelo dito Sonum a favor do Quessoa Venctexa Naique de Parodá e os representantes do usufrutuario Gopal Voicunta Naique •Dalal da Margao para exigirem os seus direitos nos termos e para os fins da lei. O que para ser publico se expediu este. Xeldem 27 de Setembro de 1923.

O escrivão de Direito
BABÙ V CAMOTIM REDCAR
Verifiquei
O Juiz de Direito 2 ° Subto
Luis José de Souza

o prazer de apreciar, quando há pouco, estivemos em Margão no seu *Atelier*.

Muito louvavel

Escreve-nos o advogado sr. Sriranga Talaulicar de Talaulim de Ponda que pela administração daquele concelho foram tomadas energicas providencias contra a taverna que funcionava ao lado da Escola Primaria Oficial de Durbate, intimando o proprietario da mesma a remove-la para outra parte, e providenciando, no entanto, sobre a manutenção da ordem e tranquilidade no local.

Com sincero jubilo registamos este facto, porque nos dizem que o sr. Eduardo Pereira, digno administrador do referido concelho, é pronto e expedito em atender quaisquer solicitações justas e legais.

Explicando

O artigo de fundo de hoje é da lavra do nosso correspondente especial de Sanguem, encarregado pelo *Bharat* do minuncioso estudo do ássunto florestal.

O sr. *Camilo*—é o seudonimo do nosso referido amavel correspondente--comunica-nos que o seu artigo representa o resultado das impressões que trocou com o sr. Rosario Coutinho, prestimoso empregado da Administração do concelho de Sanguem.

A proposito: ¿ o governo saberá tirar proveito da sciencia florestal do sr. Coutinho ?

Belesa.. poetica

Informam-nos que um empregado da Administração deste concelho apresentou a filantropica e nobre disposição de, por causa duma divida de *cinco tangas* penhorar um predio do valor de *cinco mil rupias*!

Felicitamos o Concelho todo e mais o sr. Administrador por um tao desinteressado empregado seu.

Que Deus lhe dê longa dura, para viver à fartura e com uma cabeleira madura... eis os nossos votos com mãos em postura, sendo verdadeira a tal bravura ..

Uma profecia

Um astrologo de Belgão profetisa entre outras coisas que Portugal será teatro de grandes acontecimentos politicos durante os sete mezes seguintes !

O mesmo senhor faz estribar a sua profecia no aparecimento da *corõa solar* que há dias pôz em dança a crendice popular.

A ver vamos...

विचार-लहरी.

साहित्य सम्राट बाबू बंकिमचंद्र, भारत कलंक या आपल्या लेखांत ह्मणतात, हिंदुस्थाननें इंग्लिशाचें फार उपकारी राहिलें पाहिजे. कारण, हे लोक आह्मांला नवें नवें शिक्षण देत असून, जें आह्मीं कधीं पाहिलें किंवा ऐकिलें नाहीं त्याचेंही ज्ञान आह्मांस करून देत आहेत. तसेंच ज्या मार्गानें आह्मीं कधीं गेलोंही नाहीं, त्या मार्गानें आम्हीं कोणत्या प्रकारें जावें ह्याचीही शिकवण आह्मांस त्यांजकडून मिळत आहे. या व इतर ज्या ज्या वस्तु त्यांजकडून आह्मांस प्राप्त झाल्या आहेत, त्यांपैकीं मुख्यतः दोन आहेत. पहिली स्वातंत्र्यप्रियता व दुसरी एकराष्ट्रीयत्व.

* * *

बंकिम बाबूंचें ह्मणणें अक्षरशः खरें आहे. हिंदुस्थानच्या इतिहासांत याचें प्रत्यंतर दिसून येईल. राष्ट्रीयत्वाकरितां एक झाल्याचीं उदाहरणें आपणात नाहींतच. हिंदुस्थान हजारों वर्षें पारतंत्र्यांत कां, याचें एकच उत्तर सर्वमान्य होईल तें हेंच कीं, **आपसांतील फाटाफूट.** आपल्या लोकांच्या आंगीं हा दुर्गुण आज हजारों वर्षें अगदीं खिळून राहिलेला आहे; आणि त्याचेच दुष्परिणाम आज आपण भोगीत आहों. पृथ्वीराजाचें उदाहरण काय सिद्ध करतें ? आपसांतील फुटीचा फायदा घेऊनच शहाबुद्दीन घोरीनें पृथ्वीराजाला पादाक्रांत केलें, जोंपर्यंत एकी होती, तोंपर्यंत त्याला पराजय पावून परत जावें लागत होतें, परंतु, एकी बिघडतांच त्या फुटीचा फायदा त्याला भरपूर मिळाला.

* * *

मराठ्यांच्या इतिहासाकडे दृष्टि फेंकल्यास शिवाजीच्या वेळीं जरा राष्ट्रीयत्वाची भावना जागृत झालेली होती. "मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा" या मंत्राचा जप चाललेला होता. परंतु दुर्दैवी हिंदुस्थानाकडून हा जप योग्य रीतीनें जपला गेला नाहीं. मराठे सर्व एक ह्या भावनेचा उदय त्यांच्यांत झालेला होता; तरी पण शिवाजीनंतरच्या राजकारणी पुरुषांकडून एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेची जनतेंत वाढ होण्याविषयीं व्हावे तितके प्रयत्न झाले नाहींत. उलट जातिद्वेषामुळें परस्पर द्वेषाचें पर्यवसान राष्ट्र नाशांत झालें. त्या काळच्या इतिहासाकडे दृष्टि फेंकल्यास शिवाजीविरुद्ध मोंगलातर्फे लढणारांनही पुष्कळसे मराठेच होते ! हेंच दिसून येईल. शिवाजीच्या मंत्राचा जप न जपल्यानेंच मुसलमानाचे पाय हिंदुस्थानांत पक्के रुतले. परंतु हिंदुस्थानला हजारों वर्षांपासून ज्या भावनेची कल्पनासुद्धां नव्हती त्याला एकटा शिवाजी तरी काय करणार ?

* * *

शिंदे, होळकर, भोसले हे एका राज्याचे आधारभूत सरदार. पण शिंदे व भोसले यांना जेव्हां इंग्रजांशीं लढण्याचा प्रसंग आला, तेव्हां होळकराना आपणांत सामील करून घेण्यांत त्यांनीं प्रयत्नाची पराकाष्ठा केली ! परंतु होळकर, लढाईच्या मौजा पहात स्वस्थ बसला ! ! पुढें दुसऱ्याच वर्षी होळकरांवर तसाच प्रसंग येतांच त्यानें सर्व मराठे सरदारांस पत्रें लिहून आपणांला साहाय्य करण्याविषयीं विनंति केली. या वेळीं त्याला परकीयांचें पारिपत्य करण्यास आपण सर्वांनीं एक झालें पाहिजे अशी बुद्धि आठवली ! ही बुद्धि त्याला जर आदल्या वर्षीच आठवती तर त्याच्यावर हा प्रसंगच आला नसता. या सर्व सरदारांनीं मनांत आणलें असतें तर त्याच वेळीं इंग्रजानां परत जावें लागलें असतें. असें इतिहास सांगतो. परंतु एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचें पीकच मुळीं हिंदुस्थानांत येत नाहीं, त्याला ते तरी काय करणार ?

* * *

रजपूत लोक हे स्वातंत्र्यप्रीय खरे. परंतु त्यांच्यांतही राष्ट्रीयत्वाची भावना नव्हती. स्वतःच्या लहानशा राज्याकरितां प्राण देण्यास तयार. अशा या लोकांनीं मनांत आणलें असतें तर मुसलमानाना तेव्हांच परत जावें लागलें असतें. किती तरी शूर रजपूत मुसलमानाच्या दरबारीं आपला सिंहपणा विसरून मेंढरूपणा स्वीकारून बसलेले होते. मराठ्याच्या विरुद्ध मुसलमानाना तर त्यानीं वेळोवेळीं मदत केलीच, परंतु मराठ्यांची व इंग्रजांची लढाई लागल्यावेळीं सुद्धां हे भराभर इंग्रजानां जाऊन मिळाले. राष्ट्रीय भावनेच्या बाबतींत हिंदुस्थानचा इतिहास अगदीं कोरा करकरीत, हेंच खरें.

× × ×

सारांश काय. आपसांतील फुटीचा सुपरिणाम दुसऱ्यांला देण्याला आम्ही सदैव तयार. मुसलमानांनीं यावें, रजपुतानां हाताशीं धरून रजपुतांवरच स्वाऱ्या कराव्या. व त्याना पारतंत्र्यांत घालावें; असें हें हजारों वर्षांपासून चाललें आहे. इंग्लिशांनीं हिंदुस्थान जिंकलें तें हिंदुस्थानच्याच बळावर. इकडे येतानां त्यांनीं अक्कल मात्र भरपूर बरोबर आणली होती. त्या अकलेच्या बळावर आमच्याच लोकांच्या हातून आह्मांला परतंत्र केलें, व आज देखील ही स्थिति आहे.

× × ×

तेंच इंग्लंडच्या इतिहासाकडे पहा. आपापसांत कितीहि तंटे मतभेद असले तरी राष्ट्राकरितां ते सर्व एक. आपसांतील दुहीचा फायदा इतरानां देण्यास ते केव्हांहि तयार होणार नाहींत, आणि ह्मणूनच ते स्वातंत्र्य उपभोगीत आहेत. इलिझाबेत राणीच्या वेळीं स्पेननें आपलें अजिंक्य आरमार इंग्लंडवर स्वारी करण्याकरितां पाठविलें. त्या वेळीं इंग्लंडमध्यें आपसांत पुष्कळ मतभेद होते. क्याथॉलिक व प्रॉटेस्टंट या लोकांमध्यें इतकी दुफळी होती कीं, वेळ मिळेल तेव्हां एकमेकांच्या खूनसमाचार घ्यायाला तयार होते. परंतु वरील स्वारीचा पुकारा होतांच जुना व नवा धर्मभेद पार जाऊन, आपण सर्वजण राष्ट्राकरितां एक आहोंत, ही भावना जागृत झाली. आणि त्याप्रमाणें त्यानीं त्या अजिंक्य आरमाराची वाताहात करून टाकली. अगदीं अलीकडेसुद्धां महायुद्धापूर्वी मताभिलाषी बायांनीं मतदानाच्या हक्कांकरितां किती भयंकर चळवळ आरंभिली होती ? दंगे, खून, जाळपोळ, मारामाऱ्या इत्यादि प्रकारांनीं राष्ट्राला सळो का पळो करून सोडलें होतें; परंतु महायुद्धाला सुरवात झाल्याबरोबर सर्व चळवळी बंद होऊन उलट राष्ट्राला मदत करण्यास तयार झाल्या. या अशा वागणुकीमुळेंच त्यांच्या राज्यावर सूर्य मावळत नाहीं यांत नवल काय ?

× × ×

सारांश काय ? हजारों वर्षांपासून जे दुर्गुण आमच्यांत खिळलेले आहेत ते अद्याप तसेच आहेत, कांहीं थोडा फेरफार झाला असेल; परंतु समाधानकारक स्थिति अद्याप आलेली नाहीं. हिंदु-मुसलमान सारख्या वेगवेगळ्या धर्माच्या लोकांची गोष्ट सोडाच, पण एकाच हिंदु धर्मातल्या लोकांची काय स्थिति आहे ? कोठें ब्राह्मणेतरांवर अन्याय चालला आहे. महारादि अस्पृश्य वर्गास दूर करतां करतां आज ते परधर्मात जात आहेत. अशी शोचनीय स्थिति जिकडे तिकडे सुरू आहे. महात्मा गांधींचें निशाण फडकतांच "हिंदु-मुसलमानकी जय" सुरू झाला ! हिंदु-मुसलमानातील दुही मिटून ऐक्य झाल्यासारखें वाटलें. देशात राष्ट्रीयत्वाचें पीक भरपूर आल्याबद्दल कांहीं लोकानां समाधान वाटलें. हिंदुस्थान देश एक वर्षाच्या आंत स्वराज्य मिळविणार असें खुद्द महात्माजीनीं ठासून सांगितलें. परंतु ही मुदत टळली ! वेगळी एकीचा फायदा कसा मिळणार ? आतां तर स्वामी श्रद्धानंदानीं धर्मशुद्धीची चळवळ हातांत घेतल्याबरोबर मौलवीनींहि त्याविरुद्ध चळवळ आरंभिली आहे. या धर्मयुद्धांत राष्ट्रीय भावनेचा लोप होणार, यांत कांहींच शंका नाहीं; कारण हिंदुस्थानची भूमीच तशी आहे.

* * *

परमपूज्य थोर पुरुष कै० ना. गोखले ह्मणत, " हिंदुस्थानच्या कोणत्याही प्रश्नाच्या बाबतींत प्रजाजनानीं आपण आर्यमातेचे पुत्र आहोंत या भावनेला अग्रस्थान दिलें पाहिजे. जातिविषयक किंवा धर्मविषयक भेदानां बिलकूल अवसर देतां कामा नये." हेंच खरें आहे. जोंपर्यंत राष्ट्रीयत्वाच्या भावनेखालीं सर्व भेदानां मूठमाती मिळणार नाहीं, तोंपर्यंत स्वराज्याची आशा करणें व्यर्थ आहे. अरब लोकांनीं स्वाऱ्या करून संपत्ति नेली, तशीच इंग्रजांनींहि संपत्ति पुष्कळ नेली, व देशांत भिकारपणा वाढविला, परंतु कांहीं अमूल्य वस्तूंचा अहेर हिंदुस्थानाला केला. आसेतुहिमाचलपर्यंत

दृ आहे. कोणत्याहि प्रतिकूल परिस्थितिला व अडचणीला न जुमानितां आपला टिकाव धरून वर्तमान वर करून ज्या संस्थेनें प्रगतीचा पंथ आक्रमण केला तिच्या भावी भावना फलद्रूप होतील हें उघड आहे. संस्थेचे चालक गोमांतकांतील सर्व प्रकारच्या सार्वजनिक कार्यांत तत्पर असल्याचा अनुभव सर्वांना आहे च. तरी जनता त्यांची ही इच्छा पूर्ण केल्याशिवाय रहाणार नाहीं. संस्थेस उत्तम लोकाश्रय मिळो व तिच्या लोकोपयोगी कार्याची उत्तरोत्तर भरभराट होवो असें मनापासून इच्छितों.

अनाथ व स्मशानः-महापुरानें अनाथ बनलेल्या लोकांसाठीं इतर ठिकाणच्या उदार व परोपकारी गृहस्थांप्रमाणेंच मडगांवकर बंधूनीहि फंड गोळा करून, त्याचा कांहीं भाग फोंडेंच्या मामलेदारामार्फत अनाथांच्या उपयोगीं लावल्याचें वर्तमान आमच्या वाचकांस अवगत आहेच. फंडाची शिल्लक व मोठी रक्कम फंड कमेटीनें त्या त्या गांवच्या पुढाऱ्यांच्या सल्ल्यानें आपद्ग्रस्तानां घरें बांधण्याच्या प्रसंगीं मदत करण्याच्या इरायानें राखून ठेविली आहे, हेंहि बहुतेकांस माहीत असेल. परंतु मडगांवचे आमचे बातमीदार कळवितात कीं, तेथील 'दहाजण, मंडळीनें मदरील रक्कम तेथें बांधण्यांत येणाऱ्या स्मशानास खर्चली जावी, असा आग्रह धरला होता; पण फंड कमेटीनें त्याला अनुमोदन दिलें नाहीं. आमच्या मतें कमेटीनें स्वीकारलेलें धोरण सर्वथैव योग्य आहे. कां कीं, अनाथांच्या पैशांवर स्मशानाचा हक्क कोणत्याच रीतीनें पोंचत नाहीं. शिवाय मडगांवकर बंधूंनीं मनावर घेतल्यास चुटकी सरशी स्मशानाचें काम पार पडणार असल्यानें, कमेटीच्या ठरावानें 'दहाजण, मंडळी नाखूष न होतां, इतर रीतीनें आपल्या परोपकारी हेतूस मूर्त स्वरूप आणण्याचा दिलदारपणा दाखवील, अशी आम्हांस खात्री आहे.

जाहिर विनंति

सत्यसंकल्पाचा दाता भगवान ॥
सर्व करी पूर्ण मनोरथ ॥

"सारस्वत ब्राह्मण समाज-"मडगांव ही संस्था आतां सगळ्यांच्या परिचयाची झाली आहे. एकंदर जनतेंत ज्ञानाचा प्रसार व्हावा. तिच्यांत धर्माभिमान आणि राष्ट्राभिमान जागृत होऊन, कार्यक्षमता वाढावी व तिला पूर्ववैभव प्राप्त व्हावें, या दिशेनें संस्थेचे प्रयत्न चालू आहेत. संस्था पोर्तुगिज सरकारांत रजिष्टर झाली असून तिला विशेष स्थायीकपणा येण्यास आतां इमारतीची जरूर आहे.

गोवा सरकारानें संस्थेचें कार्य जाणुन शहरांतील मध्यभागीं एक प्रशस्त जागा मोफत दिली आहे; व तिच्यावर एकावाजूस असलेली जुनी सरकारी इमारतही संस्थेनें खरेदी केली आहे, पण येकंदर जागेवर नवीन इमारत बांधल्याशिवाय वाचनालय, विद्यालय व व्याख्यानमाला इत्यादि संस्थेच्या वाढत जाणाऱ्या कार्याचा आटोप होणार नाहीं. जुनी इमारत विकत घेण्यास व इतर कामीं आजपर्यंत किती खर्च झाला, याचा तपशील सोबत दिलेल्या खर्ड्यावरून सर्वांच्या ध्यानांत येईल, संस्थेचें कार्य व महत्व जाणून ज्यानीं ज्यानीं मदत केली, त्या सर्वांचे या ठिकाणीं जाहीर आभार मानणें आमचें कर्तव्य होय. विशेषत: गंधर्व व बलवंत नाटक मंडळी व श्रीमंत् दाभोळकर या गोमांतका बाहेरील मंडळींनी दिलेली मदत विनमोल आहे. संस्थेच्या कार्यास आतां पर्यंत सर्व बांधवांनीं प्रोत्साहन दिलें असून, त्यामुळेंच एक पाऊल पुढें टाकण्याचा चालकांनां उत्साह आला आहे. चालकांची उमेद लोकाश्रयावर अवलंबून असल्यामुळें आमच्या विनंतीस मान देऊन संस्थेच्या इमारतीस फंड मिळवून देण्याच्या कामीं सर्व बंधूंकडून हस्तें परहस्तें आम्हांस मदत होईल असा पूर्ण भरंवसा बाळगितों. (सह्या)

सारस्वत ब्राह्मण समाज-मडगांव, गोवा

इमारत फंडाचा हिशोब

जमा

८९१८- नक्त शिल्लक

ता. २८।४।१९२२ रोजीं, मुंबईच गंधर्व नाटक मंडळीच्या खेळाचें उत्पन्न देणग्यां धुधां आलें तें..... १९१८।

त्यांत खर्च वजा—

नाटक मंडळीस दिले ..	६५०	
फुलें वगैरें	११८≡	
वसूल येणें राहिलें	६६८	
	७२७८≡	७२७८≡

७८०। नक्त शिल्लक

ता. ८।२।१९२३ रोजीं पणजीस बलवंत संगीत मंडळीच्या खेळाचें उत्पन्न देणग्याद्वारां आलें तें...... २०१९॥=

त्यांत खर्च वजा—

नाटक मंडळीस दिले	१०२८	
मंडल करितां खर्च	५५८	
तेल, जाहिराती, खुर्च्यां भाडें वगैरे	६१	
बूट	२२।=	
	२३९।=	२३९।=

५००	श्रीमंत रा. रा. शांताराम नारायण दाभोळकर, मुंबई		
५०१	रा. रा. विष्णु रामचंद्र नाईक,	मडगांव	
५०१	,, ,, पांडुरंग विष्णु नाईक	,,	
३०१	,, ,, पंढरीनाथ वासुदेव हेगडे	,,	
२५१	,, ,, दामोदर वासुदेव नाईक	,,	
२५१	,, ,, सगुण विठ्ठल नाईक	,,	
१६२॥	,, ,, शिवराम जिवतराम मेहता व	,,	
	,, ,, नागेश वासुदेव सडेकर	,,	अर्धे हप्ता
१५५	,, ,, केशव कृष्ण नाईक	,,	
१५५	,, रामनाथ नारायण वाळे	,,	
१५१	,, ,, यशवंत सुर्यराव सरदेसाई	,,	
१०१	,, ,, दत्ता गिरी कारे	,,	
१०१	,, ,, केशव अनंत नाईक	,,	
१०१	,, ,, सदानंद पुंडलीक नाईक	,,	
१०१	,, ,, सदाशिव वासुदेव केंकरे	,,	
१०१	,, ,, गोविंद सकाराम पै पाणंदीकर	,,	२/३ हप्ता
४५५	,, ,, काशिनाथ दामोदर, मुंबई या पेढीमार्फत रा सदाशिव सी. दाभोळकर व रा. काशिनाथ वा. केंकरे यांनीं दिवाळीच्या वेळीं जमविलेले		
३५।	व्याज व हुंडावळ		
१॥।≡	सिंयोर व्हिदैर दे काल निनेजिस सेक्रेतारिउ दे आद्मिनिस्त्रा. सांव यांनीं आपल्या इतुर्नेलाचे परत दिले		
५५९७८			

खर्च

४८९६८ घर खरेदी, सरकारांत जागा डिपोझिट व इतर कामें यांजकरितां

७०१ आजरोजीं शिल्लक

सा. ब्रा. समाज-कचेरी मडगांव ता. ५।१०।२३ } काशिनाथ दामोदर नायक-खजिनदार
नागेश वासुदेव सडेकर-सेक्रेटरी

COMUNIDADE DA PROVINCIA DE BALY

No dia 17 do corrente mez as 11 horas serão novemente praciadas as restantes avenças de receita trienal e despeza anual da dita comunidade, nas casas das sessões, com alteração do respectivo preço, em seguida será aberto o novendio para oferecimento de semanas. Aos 8 de Outubro de 1923

O escrivao de Comudes,— *Ramacrisna Vencu S. Regõ*

ministraçao das Comunidades do concelho das Ilhas, pretendendo-se, por esta forma, perpetuar a gloriosa memoria de quem, em vida, nao fez outra coisa se nao proteger a pobresa desvalida e servir a Patria, sujeitando-se a mil perseguiçoes, ora dimanadas do absolutismo governamental, ora do catolicismo fanatico.

O Pe. Alvares esteve em Avedem deste concelho, quando a mesma localidade fora invadida pelo colera, levando socorros de toda a sorte aos pestiferados. O catolicismo *di ca*, porem, guerreou-o, formidavelmente ainda nesta sua santa missao !

E' disnecessario dizer que nos agradou sobremaneira a alevantada idea da perpetuaçao da memoria do Pe. Alvares, sob a forma duma estatua, eregida, mesmo defronte da Igreja cujos sectarios trabalharam, mas sem exito, para lhe perturbar em vida, o socego de alma.

Cremos, porem, que para o diante, ao menos, os seus inimigos nao irao incomoda-lo no seu profundo e eterno sono!

Mas trataremos, mais de espaço, dos episodios da atribulada vida do *pai dos pobres.*

Meditem !

Acçao produz reacçao. A acçao hostil que o catolicismo exerceu contra o Pe. Alvares, teve por consequencia natural e legitima, a reacçao sistematica dos amigos do ilustre morto, que vai ter uma estatua de marmore, mesmo defronte da Igreja das Ilhas como se disse.

E' isto muito significativo e....e educativo.

Em Sanguem

Sobre a politica camararia de Sanguem temos muito a dizer no *Bharat.*

No entretanto registe-se que foi muito feia e revoltante a acçao de certos *patriotaças* com respeito ao cumprimento de certos *compromissos*... indignos.

Nada se perdera' com a demora.

श्रीविठ्ठलाची प्रार्थना

[देवा विठूराया! मी खालील अभंगानें तुझी प्रार्थना केल्यास, "सुंदर तें ध्यान, उभा विटेवरी०" या अभंगानें हल्लीं नवरात्र जिकडे तिकडे तुला आळवणाऱ्या तुझ्या भक्तवृंदाचा माझ्यावर रोष तर नाहींना होणार?]

नको विठूराया । राहूं विटेवरी ।
हृदय मंदिरीं । राहा माझ्या ॥
नको कटेवर । ठेवूं देवा कर ।
परी माथ्यावर । ठेव माझ्या ॥
फेंक तुळशीमाळ । परी माझी घाल ।
प्रेमाश्रूंची माळ । गळीं तुझ्या ॥
सोड पीतांबर । तुज नेसवीन ।
तंतू मी विणून । हृदयाचे ॥
नको तीं कुंडलें । माझें भक्तिगान ।
तुझे स्वद् श्रवण । करीतील ॥
फेंक तो कौस्तुभ । भक्त शिरोमणी ।
स्वकंठीं मीं येवोनी । मिठी मारीं ॥१

विनायक

विचार-लहरी

(लहर २ री)

दसऱ्याचा सण बहुतेक सर्व हिंदुस्थानांत मोठ्या थाटानें साजरा होणार. मोठमोठ्या हिंदु संस्थानिकांच्या संस्थानांत विशेषतः म्हैसूर व बडोदा वगैरे संस्थानांत होत असलेल्या सणाचा समारंभ पाहाण्यासारखा असतो. पुरातन कालीं श्रीरामचंद्रानें याच सुमुहूर्तावर रावणावर स्वारी करून यश मिळविलें आहे आणि त्याच कारणामुळें शूर रजपूत व मराठे वगैरे राजेलोक याच सुमुहूर्तानें शत्रूंवर लढाई करून जात असत. हिंदूंनीं मुख्य मानलेल्या साडेतीन मुहूर्तांत दसऱ्याचा सण येतो. यावरून या सणाचें महत्व लक्षांत येईल.

* * *

रजपुतांत आहेरिया— दसऱ्याचा सण— अत्यंत पूज्य मानतात. या दिवशीं आपल्या तलवारीला एखाद्या तरी क्रूर जनावराचा बळी दिलाच पाहिजे, अशी समजूत त्या वेळीं होती, व त्या समजुतीप्रमाणें ते या दिवशीं अत्यंत क्रूर अशा हिंस्र जनावरांची शिकार करीत असत. परंतु हिंदुस्थानांत क्षात्रवृत्तीचा लोप झाल्याकारणानें ह्या हिंस्र जनावरांची जागा गरीब बिचाऱ्या बकऱ्या कोंबड्यांना मिळाली व त्यांवर शस्त्र चालवून क्षात्रवृत्ती दाखविणें हिंदुस्थानच्या लोकांना शूरत्व वाटूं लागलें. अवनतीचीं चिन्हेंच तशीं आहेत.

× × ×

हिंदुस्थानच्या लोकांच्या आंगीं कांहीं एक दुर्गुण आहे कीं, प्रत्येक गोष्ट मग ती चांगली असो कीं वाईट असो, ती देवा धर्माच्या माथीं मारावी. एकाद दुसऱ्या संस्कृत धार्मिक ग्रंथांत एक दोन श्लोक दडपून द्यावे म्हणजे त्याला स्थायिक रूप येतें व ते धर्माधार होऊन बसतात! आमचे लोकही इतके खंबीर बनले आहेत कीं, हजारों वर्षांपूर्वी तयार केलेला रूढीचा अंगरखा आजसुद्धां जशाचा तसा उपयोगांत आणीत आहेत! तो सोडण्याला तयार नाहींतच; परंतु दुरुस्त सुद्धां करायाला तयार नाहींत!

× × ×

याच रूढीप्रमाणें दसऱ्याच्या सणाच्या वेळीं कित्येक ठिकाणीं गरीब व निरुपद्रवी अशा जनावरांचा वध करण्यांत येत आहे, ब्रिटिश हिंदुस्थानांत कित्येक प्राणिरक्षक संस्थांकडून हा प्रकार बंद करण्यांत येत आहे, तरकित्येक ठिकाणीं हें काम अबाधित चालू आहे. थोडासा विचार केल्यास धर्माच्या नांवाखालीं अशा गरीब पशु वगैरेंचा वध करणें अत्यंत गैर आहे. जगांतील कोणताही धर्म घेतला तरी त्यांतील सारभूत तत्व भूतदया हेंच दिसेल. हिंदुधर्मांतही ह्याच तत्वाचा साधुसंतांनीं [illegible]रानें प्रसार केला आहे. असें जरी असलें तरीपण एके काळीं हिंदुस्थानांत यज्ञयागाची प्रवृत्ति बरीच होती; असें आपणांस इतिहासावरून कळून येतें. यज्ञयाग केल्यानें पुढील मोक्षाची तयारी अत्यंत सुलभ होते, असें मत प्रचलित असल्याकारणानें, मोठमोठे राजे लोक मुद्दाम यज्ञयाग करीत असत. परंतु कोणत्याहि चालीचा अतिरेक तीच चाल नाहींशी होण्यास कारणीभूत होतो, हें आपल्या ध्यानांत येतें काय?

\+ × ×

याच कारणामुळें त्या वेळीं आपल्या आर्यभूमींत एक अत्यंत थोर व भूतदयेचा केवळ पुतळाच असा पुरुष उत्पन्न झाला. क्षत्रिय जातींत जन्माला येऊन, या जातींत स्वभावतःच जी हिंसेकडे प्रवृत्ति असते ती याच्यांत मुळींच नव्हती. ब्रह्मदेवानें त्याच्या देहाची घडण करते वेळीं भूतदयेच्या तत्वाचें जास्त मिश्रण केलें असावें. कारण त्यावेळीं त्याची अत्यंत आवश्यकता होती. त्यानें थोडक्याच कालांत मोठी क्रांति घडवून आणली. एके वेळीं राजा बिंबीसार यांच्या येथें मोठा यज्ञ चाललेला होता. गरीब बिचारे पशु यज्ञांत बळी देण्याकरितां आणले होते. अशा समयीं तेथें भगवान बुद्धांचें आगमन झालें व तो प्रकार पाहून त्याचें अंतःकरण कळवळलें! त्यांनीं त्या ब्राह्मणांनां प्रश्न केला कीं, एकाद्या जनावराचा प्राण गेला असतां, त्यास परत प्राणदान देण्याची योग्यता आपणांत आहे काय? नसल्यास आपणांस त्या गरीब बिचाऱ्यांचा प्राण हरण करण्याचा अधिकार कसा पोहोंचतो? दुसरें, सृष्टीच्या नियमांत जर एकाएकीं फरक होऊन, जर बकऱ्यानां मनुष्य यज्ञ करण्यांचें सामर्थ्य प्राप्त झालें, तर त्या वेळीं आपणांस काय वाटेल? त्या वेळीं आपली जी स्थिति होईल तीच स्थिति त्यांची प्रस्तुत होत नाहीं अशी आपली कल्पना आहे काय? पशुवधामुळें जर पुण्य प्राप्त होतें, तर पशुमध्यें श्रेष्ठ अशा त्यांच्या राजाचा बळी कां देत नाहीं? बौद्ध धर्मानें अहिंसेच्या तत्वाचा जोरानें पुरस्कार केला, व हिंसा बंद होण्याकरितां, त्या धर्माला सम्राट अशोक या सारख्या राजांच्या तलवारींचीही मदत मिळाली. अशोकानें स्वतः आपल्या एथें नित्य भोजनाकरितां होत असलेला पशुवध बंद केला, असें त्यानें खोदून ठेविलेल्या शिलालेखावरून कळतें. एका शिलालेखांत तो म्हणतो. 'देवाच्या प्रिय राजाच्या भोजनाकरितां नित्य हजारों जीव मारले जात होते. परंतु हा लेख खोदते वेळीं फक्त दोन पक्षी व एक हरण असे तीनच जीव मारले जात आहेत. भविष्य काळीं तेही मारले जाणार नाहींत". अशोकानेंच भूतदयाविषयक पुष्कळ कामें केलीं आहेत, त्यानें मनुष्य जातीचेंच नव्हे तर इतर पशुपक्ष्यादिक प्राण्यांचेंही कल्याण करण्याचे प्रयत्न केले.

\+ + +

अहिंसा तत्वाचा पुरस्कार जरी बौद्ध धर्मानें केला, तरीपण मानवी मनांत जोपर्यंत आसुरीप्रवृत्ति वसत आहे, तोंपर्यंत हिंसा बंद होणें शक्य नाहीं. याविषयीं प्रत्यक्ष उदाहरण त्याच धर्माचें घ्यावें. आज त्या धर्माचे क्रोडो अनुयायी हिंसेच्या बाबतींत कोणत्याही धर्माला हार जाणार नाहींत! हें जरी खरें असलें तरी पण धर्माच्या नांवाखालीं असलीं क्रूर कृत्यें चालू होणेंही रास्त नाहीं. अशा कृत्यामुळें धार्मिक तत्वांची उज्वलता नाहींशी होते.

\+ + +

आमच्या गोमांतकांत दसऱ्याचा सण कित्येक देवस्थानांतून अशाच प्रकारें साजरा केला जाणार आहे. मानवी प्राण्यांचा सण होतो, परंतु गरीब बिचाऱ्या प्राण्यांचा जीव जातो! मानवी अंतःकरणें किती कठोर असतात, याची गरीब पशूंना काय कल्पना होणार? अशीं क्रूर कृत्यें मोक्षानंद प्राप्त होण्याकरेतां स्थापिलेल्या देवालयांमधून व्हावीं, या पेक्षां अत्यंत शोचनीय अशी दुसरी कोणती गोष्ट आहे? पशुवधामुळें जर मोक्ष साधत असेल, तर पशूंपेक्षां शेंकडो पटीनें श्रेष्ठ अशा मनुष्ययज्ञानें तो कां साधणार नाहीं? साधत असल्यास स्वतःच्याच प्राणाचाच बळी ते कां देत नाहींत? दुसऱ्याच्या प्राणांची किंमत स्वतःच्या प्राणाच्या किंमतीइतकी वाटत नाहीं काय?

* * *

खेदाची गोष्ट ही कीं, कित्येक वैष्णव पंथाच्या देवालयांतूनही हीच कृति आढळते. वैष्णव धर्माचीं तत्वें अत्यंत उदार व उच्च आहेत. सर्व भूतांच्या ठायीं समभाव, दया व प्रेमळपणा हीं ज्या धर्माचीं तत्वें त्याच पंथाच्या देवालयांमधून बकऱ्या कोंबड्यांचा वध व्हावा, या पेक्षां आश्चर्याची गोष्ट कोणती आहे? या पंथाचे धर्मगुरुही अशा कामीं लक्ष देत नाहींत. उभ्या भारतांत, उभे ठिके अशा सारख्या सुधारणा आपल्या देवालयांतून सुरू करणाऱ्या धर्मगुरूंनीं अशा भूतदयामूलक सुधारणा सुरू करून प्रचार करण्याचें मनांत आणलें असतें, तर धर्माच्या तत्वाचा प्रसार जास्त झाला असता. परंतु आपले लोक फळाच्या आशेकरितां भांडावयाचें सोडून, केवळ साली करतां भांडत आहेत हेंच खरें.

× × ×

कित्येकांस अशा सुधारणा करण्याच्या सूचना केल्यास त्या लोकांस देवाचा आपमानरूप राग होईल अशी भीति वाटते. परंतु भित्याचें बिलकुल कारण नाहीं. कारण आपल्या देवानां राग मुळींच येत नाहीं. धर्मच्छळामुळें ज्या पोर्तुगीज लोकांनीं आमच्या ज्या देवानां नको नको करून सोडलें व ज्यानां पळतां पळतां पुरे वाट होऊन दुसऱ्या लोकांचा आश्रय करावा लागला! ते देव आजदिनपर्यंत [illegible]

जीव व भक्त पडले जेते. मग देवाची मात्रा काय लागू पडणार ? तोंड हरिदासाकडे केलें तरी त्याला आपले दोन कान मात्र त्याच्या दोन बाजूस बसलेल्या भक्तिणी, संतिणी, साळकाया, माळकायांकडे टवकारून रहावें लागतें. एकीकडे हरिदासबुवाचें रडणें व दुसरीकडे वायकामुलांचें ओरडणें त्याला शांतचित्तानें श्रवण करावें लागतें. ह्यावेळीं त्याची सहनशक्तीची खरोखर तारीफ करण्यासारखी असते. नवरंगांत कोळलेली हरिदासबोवांची कहाणी, लहान मुलांच्या कोमल कंठांतून निघालेलीं रडगाणीं व स्त्रिसमुदायाच्या तापसांत चाललेलीं गाऱ्हाणीं, इतकीं सर्व एकाच वेळीं त्याला श्रवणांत घ्यावीं लागतात. घरच्या कुटुंबाच्या आरडाओरडींत बेभान व त्रस्त होणाऱ्या नवरदेवानां जबरदस्त देवापासून सहनशक्तीचा फार मोठा धडा घेण्या सारखा आहे ! सरासरी ४ तास त्याला ह्या स्थितींत कंठावे लागतात ! पहिल्या दिवशींच्या जागरणामुळें व आरडाओरडीनें दुसऱ्या रात्रीं बिचाऱ्याचा स्वभाव पिरपिरा होऊन ज्याच्या त्याच्यावर त्यानें कोसळावयाचें परंतु तसें मुळींच होत नसतें. पुढें आठही रात्री पहिल्याच शांतपणानें व सहनशीलतेनें तो काढीत असतो. कदाचित् फार कालापासून त्याला ही संवय लागल्यामुळें त्याचें त्याला कांहींच वाटेनासें झालें असेल, कोणी सांगावें ? देवाच्या जागीं दुसरा कोणी जीव असता तर, असे त्रास भोगण्यापेक्षां मरण बरें म्हणून त्यानें जाऊन त्याचवेळीं तळींत जीव दिला असता. तरी त्याचें नशीब, दिवसाचा १०–१२ तास त्याला झोंप मिळते, नाहीं तर हात धुवून त्याच्या पाठीस लागलेल्या भक्तांनीं, पहाटे सांगड, दिवसा मिरवणूक अशा सारखीं एखादीं नवीं कुलंगडीं उपस्थित करून त्याला दिवसाचें सुद्धा निजूं द्यावयाचें नाहीं असें म्हटलें असतें तर तेंही शक्य होतें. श्रांत झालेल्या हरिदासाचें कीर्तन (!) संपतें तों त्याला, आतां तरी आपली सुटका होणार म्हणून आनंद वाटत असेल. परंतु त्याचे तापत्रय अजून संपलेले नसतात. वाजंत्र्यांच्या गडगडाटात आपल्या तोंडाला त्यानें आरती ओंवाळून घ्याव्या लागतात. एका अर्थी पाहूं जाता ही एवढीच देवावर भक्तांची कृपा दिसते. कारण विजयी वीराला आरती ओंवाळावयाची तर मग ४ तास पर्यंत सगळ्या लोकांवर सहनशीलपणानें विजय मिळविलेल्या देवाला का ओंवाळूं नये ? हें बरेंच रास्त दिसतें. परंतु देवाच्या सहनशक्तीची कसोटी कसास लावण्यास हट्टास पेटलेल्या भक्तांनां इतक्यानेंही कींव येत नाहीं. आरती ओंवाळतानां ते त्याला इतका हलवितात, खालींवर करतात कीं त्यावेळीं तरी त्वेषानें त्यानें आपले जखडलेले पाश तडातड तोडून मखर हलविणाऱ्या पुजाऱ्याच्या थोबाडींत चार लगावल्याशिवाय गत्यंतरच नसतें. पण ह्यावेळीं साक्षात् सहनशील देवताच त्याच्या अंगांत संचरत असतें व एकदांचें मखर हलविणें बंद होतें. झालें का ? छे ! अजून मुदंग्याचें पंच, पंच, व कलावंतिणीचें गाणें आहेच कीं ! तें झाल्याशिवाय व पंचलाव तोंडांत घातल्याशिवाय मंडळी घरीं जाते कशी ? भटानें ताट हातांत घेतलें कीं बायकामुलांत जो एक हलकल्लोळ सुरू होतो त्याच्या योगानें देवासहीत देऊळ तडातड फुटून कुठें तरी उधळल्याशिवाय खास रहात नाहीं, असें खात्रीलायक वाटूं लागतें व एकदांचा जीव घेऊन पळालो तर बरें होईल असें वाटतें. बिचाऱ्या देवाची ह्या वेळीं स्थिति काय होत असेल बरें ? ह्या धाडींतून भटजीबुवा सुखरूपपणें निभावले तर सुमारें २-३ चे अजमासास हा उत्सव संपत असतो. पण पुन्हां आहेच कीं उद्यां.

पत्रव्यवहार

रा. रा. संपादक "भारत" यांस-

वि. वि.– भारताच्या २७ व्या अंकात, 'चोरांच्या उलट्या बोंबा' या सदराखालीं एका बातमीदारानें दिलेली "बातम्या" वाचून फार हंसूं आलें. "रा. सगूण नाईक सांगतात......"असा कायसा आरोप" बात' वाला रा. नाईक मजकुरांवर करितो; पण त्याणीं काय सांगितलें याचें बातमीदाराच्या पत्रांत कांहींच स्पष्टीकरण नाहीं. रिवण येथील रा. सगूण नाईक यांच्या ठिकाणात चोरी झाली व तीची त्याणी योग्य ठिकाणी चौकशी चालविलेली आहे असे कळतें. या चोरीची बातमी "उत्तराभारत व भारतांत प्रसिद्ध झालेली आहे. परंतु इतक्याच कारणावरून "बातमीदार"खुद्द मालकासच गुन्हेगार ठरविण्याचा प्रयत्न करूं पाहात आहे. रा. नाईक व त्यांचे मुंडकारी यांचें हें कारस्थान आहे...... असेंही बातमीदार लिहितो व रिवणांत सर्वत्र या कारस्थानाचा "बभ्रा"झाल्याचें सांगतो ! तरीपण रा. नाईक स्वतःचाच नारळ स्वतःलांबवून व चौकशी करितां वेळीं अवेळी झीज सोसतो या खुळ्या समजुतीचा बभ्रा करण्यास रिवण गांव कांहीं सगळाच दुधखुळ्या मंडळीनें भरलेला नाहीं. तेथें समजस मंडळी अद्याप आहे. ती बेभ्रवाल्यांची योग्य वेळीं कानउघाडणी करितीलच. रा. सगूणनाईकांपेक्षा मोठे भाटकार रिवणांत आहेत. व अशा चोरांचा बंदोबस्त करण्यास ते समर्थ आहेत, असें बातमीदार लिहितो; यावरून रिवणांत चोरी शक्य नाहीं, असें ध्वनीत करितो; पण त्या लिहिण्यांत कांहीं राम नाहीं, कारण रिवणकाराहून मोठे भाटकार पुष्कळ ठिकाणीं आहेत पण तेथें तेथें सुद्धां चोऱ्या होतातच व पोलीसखात्याचा गरज लागतेच. व रिवणगांव या बाबतींत कांहीं, आजपासूनचा इतिहास पाहता अपवाद राहिलेला नाहीं.

बाकी बातमीदार चोरी झाली नाहीं असें छातीठोक सांगतो याचेंच फार आश्चर्य वाटतें. कारण चोरीची गोष्ट कमी अधिक प्रमाणांत तिघांना ठाऊक असते एक चोरी केलेल्याला. दुसरी ज्याची झाली आहे त्याला. व तिसरी अंतरज्ञान्याला. परंतु प्रस्तुत बातमीदार तर ज्याची चोरी झाली तो इसम नव्हे व अंतरज्ञान आज शक्य नाहीं. असो.

तसदी बद्दल माफी असावी.दे.वि. आ.

सूटर.

* * प्रस्तुत स्थानिक विषयाच्या दोन्हींहि बाजू लोकांसमोर मांडण्यांत आल्यावरून या पुढें त्यासंबंधीं कसल्याहि पत्रव्यवहारास भारतांत जागा मिळणार नाहीं.

सं. भारत.

ANUNCIOS

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1.° officio Redcar. correm editos de 30 dias, a contar do dia da segunda publicação do respectivo annuncio, citando a interessada Gonem e seu marido Hori Touló moradar em Mazali do territorio britanico em parte incerta, para assistirem a todos os termos até final do inventario orfanologico que se procede por obito de Xabá Naique Delecar que foi de Delem, em que é inventariante e cabeça de casal Monjú Pursò Naique Delecar, do mesmo lugar, sem prejuizo do seu regular andamento. O que para ser publico se expediu este.

Xeldem, 12 de de Setembro de 1923 —

O escrivão de direito,
Babu V. Camotim Redcar

Verifiquei.—

O juizo de direito, 1.° substituto,

Baptista Gomes.

जाहीर विनंति

श्री सरस्वतीसेवक मंडळ मडगांव या मंडळाकडून श्रीदामोदर विद्याभुवनांत ता० १९।२०।२१ आक्टोबर रोजीं साजरा होणारा सातवा श्रीसरस्वत्युत्सव आणि श्रीदामोदर वाचनमंदिराचा सहावा वाढदिवस समारंभ या दोन उत्सवांनिमित्त जी प्रतिवार्षिक सुप्रसिद्ध वक्त्यांकडून व्याख्यानमाला सुरू व्हावयाची ती मडगांवीं आकस्मिक उद्भवलेल्या प्रेगच्या गडबडीमुळें तहकूब करण्यांत येत असून वरील दिवशीं सायंकाळीं सात वाजता हरिकीर्तन, भजन, आरत्या, प्रसादादि होऊन फक्त धार्मिक कार्यक्रम साजरा होईल. तरी सर्वत्रांनीं उपस्थित वेळीं आपल्या मित्रमंडळीसह हजर राहून हा समारंभ सुशोभित करावा अशी सविनय विनंति आहे.

आ. न.
बाळकृष्ण पु. कामत
गोविंद ना. केणी
नारायण व्यं. कापडी
दामोदर व्यं. घोडे
उत्सव कमेटी.

Ora, tais vereadores deferriam, favoravelmente, ha dias, umas pretençoes do secretario municipal suspenso, em obediencia a um *compromisso* que se diz terem feito com os protectores do referido secretario, afastado por *conveniencia de serviço*. E note-se que os mesmos vereadores aceitaram, segundo consta, o mesmo compromisso subjugados pelo *terror* que lhes infundiu o ameaçador boato de que seria anulada a sua eleiçao, caso nao fizessem o que fizeram na questao do aludido secretario!!!

O tal *compromisso* patentea claramente, evidentemente que os pôbres homens nao tiveram confiança na integridade dos nosses tribunais e que *per fas—per nefas* ardiam em desejo de arvorar-se em representantes populares e refastelar-se, comodamente, nas cadeiras *senatoriais*!...

¿ Que epiteto merece essa gente que para render culto ao seu egoismo aceitou um *compromisso* que a fez desçer a' categoria de *varredores*?

¿ Que beneficios pode o concelho de Sanguem esperar duma gente tao irresponsavel, egoista e sofrega de *mando*?

Desgraçado do *Bharat* que tao depressa, fiel a' sua orientaçao, tem a desventura de se referir, tao rudemente, tao acremente, a' vergonhosa atitude de quem supunha ser util aos interesses municipais do concelho de Sanguem!

Inda bem que o Presidente efectivo nao ligou o seu nome ao escandalo cometido pelos *varredores* em exercicio! Inda bem!

Mas, ainda que esta ultima circunstancia represente um oasis no arenoso deserto de desanimo, a impressao que em no's ficou da "burridade dos salamalequeiros varredores" que aceitaram o "compromisso" que os matou politicamente, e' que o concelho de Sanguem esta' ainda muito 'verde' como o diria Freitas Ribeiro, para manter com prestigio uma instituiçao tao independente, tao digna e tao nobre como a camara municipal-verdadeiro governo do Povo pelo Povo e para o Povo.

Por hoje, tanto basta.

Para o proximo numero

Por termos recebido, depois de este n° pronto, o artigo *Repclindo*, do sr. Crisnarao G. Quenim, dedicado a' *Terra*, tivemos de reserva-lo para o n° seguinte.

COMUNIDADE DE CACORA"

No dia 2 do seguinte mez de novembro irao de novo a praça as restantes avenças da receita e despeza da comunidade de Cacorá com aumento e diminuiçao deliberada pela junta administrativa no dia 2 do seguinte mez de novembro pelas 15 horas no local das suas sessoes.

Cacorá 24 de outubro de 1923

O escrivao da Comd.

Utoma Pandurunga Sinai Odarcar

स्फुट विचार

आवतोनोमीः—सातां दिवसांच्या भाग ल्या भुकेलेल्या भिकाऱ्याच्या अंगावर श्रीमंताच्या द्वारांतील कलीयुगीन द्वारपाळ जो कुत्रा तो एकाएकीं गुरगुरून अंगावर आला असतां भीक नको पण कुत्रा आवर अशी जशी स्थिति त्या भडंग भिकेकऱ्याची होते, तशीच तंतोतंत स्थिति आज, पोर्तुगेज लोकांनीं आम्हांस दान दिलेल्या व आम्हीं आनंदानें प्रतिग्रहित केलेल्या आवतोनोमीच्या बाबतींत, आम्हां गोमांतकस्थ प्रजेची झालेली आहे! स्वराज्याची तहान सुराज्यानें—परराज्यानें भागत नाहीं हें राजकीय सूत्र कंठरवानें प्रतिपादणाऱ्या दे. दादाभाईना व स्वराज्योपभोगाच्या बाबतींत आपल्या देशबांधवांच्या आगांत पात्रता आणण्याच्या काजीं तन–मन–धनानें क्लिष्ट तपें पर्यंत वावरलेल्या राज्यकारण विशारद लोयोल बंधूंना स्वराज्य नको, परराज्यच पत्करलें असें म्हणण्यापर्यंत पाळी आणणाऱ्या देशद्रोह्यांचा किती त्वेष आला असेल याची कल्पना करणें फारसें सुलभ नाहीं.

योग्य संभावनाः—संतवर्य तुकाराम महाराजांनीं, अनीति मार्गानें जे लोक वागतात त्यानां उद्देशून 'थुंका त्यांच्या तोंडावरी' असें आपल्या अभंगवाणीनें प्रबोधिलें आहे, परंतु तेच तुकाराम महाराज आज असते तर जेथें अनीतिमानाच्या तोंडावर थुंकण्यास त्यांणीं विबोधिलें आहे तेथेंच स्वराज्य नको परराज्यच पत्करलें असें उद्वेगानें ह्मणण्याची पाळी येईपर्यंत अप्पलपोटेपणा प्रीत्यर्थ देशहितकार्य पायीं तुडविणाऱ्या काळतोंड्यांच्याही तोंडावर थू थू थुंकण्याप्रीत्यर्थ आग्रहानें उपदेशिल्याशिवाय ते कधींच राहते ना.

तरुणोपायः—झाली गोष्ट होऊन गेली. तीजविषयीं खिन्न होऊन स्वस्थ बसण्यांत मात्र शहाणपणा नाहीं. पण झालेल्या चुकीस उपाय नाहीं असें मात्र मुळींच नाहीं, कारण एखादा मनुष्य कितीहि मरणोन्मुख झाला तरी त्या मरणोन्मुखत्वाचीं, योग्य उपायाअंतीं. कारणें नाहींशी केलीं कीं, तोच मनुष्य पुनः ताजा तवांना बनतो. तद्वत, देशहित बुडव्यांच्या आपमतलवी राज्यकारणाचा रोग निर्मूलन झाला किंवा केला कीं, देशहित हनाच्या पायीं अधोमुख झालेली तीच आपली मायभूमि पुनः उन्नतीच्या स्वैर शिखरावर विराजमान होऊं शकते. ज्या लोयोल बंधूनीं गोव्याच्या पोपुलार पक्षास जन्म दिला व वाढविला त्याच राज्यकार्यविशारद देशहितकर्त्यांच्या कुलांत जन्मलेल्या व त्याच आपल्या पित्या चुलत्याच्या अनेक राजकारणांत व देशहित कर्तृत्वांत, पुत्र पुतणेपणाची घडिघडी आठवण देणाऱ्या, त्याचप्रमाणे त्याच आपल्या पित्या चुलत्याकडून राजकीय सूत्रांची अभिमंत्रिल्या गेलेल्या व कैक वर्षे स्वतः मंत्रिल्या गेलेल्या पुढारु पदावर प्रस्तुत काळीं विराजित असलेल्या इंदिय पोर्तुगेज वर्तमानपत्रकारांना, आपल्या मायभूमीस जडलेल्या या राजकीय रोगाचें, कीं ज्याच्या असह्य वेदनामुळें, स्वराज्य नको, परराज्यच पतकरलें असें ह्मणण्यापर्यंत त्यांच्यावर पाळी आली, त्या रोगाचें विमोचन करण्याचें, त्याच्या पित्या चुलत्याच्या वर्तणूक प्रसंगीं स्वतःच्या थोर कामगिरीचा इतिहास लक्षांत घेतां त्याना फारसें दुस्तर दोर्घट असें मुळींच वाटत नाहीं.

शारदानवरात्र

(ले. श्री. अज्ञातवासी वाडी–फोंडा)

गेल्या अंकांत कबूल केल्याप्रमाणें, आज, ह्या देवांच्या भक्तजनाची स्थिति विशद करण्याची इच्छा आहे. गेल्या लेखानें चवताळलेल्या भक्तजनाच्या रागांत आजच्या लेखांकांतलें तेल पडलें ह्मणजे त्यांचा राग ज्यास्तच पेट घेईल, ते मला काय शिक्षा ठोठावतील याचा अंदाज कांहीं करवत नाहीं. विशेषें करून वायकांच्या तोंडाला लागणें तर मला अगदींच असाध्य आहे. सर्वत्र विजयी झालेले गु. प. वा. राम गणेश गडकरी सुद्धां ह्यांच्या पुढें हतबुद्ध होऊन 'काय करावें' अशा संकटांत ते पडले आहेत. मग माझी पामराची काय पाड? असो.

नवरात्रांत देवळांनीं खचून भरत असलेल्या भक्तजनाचे ४ भाग पाडतां येतील कांहीं भक्त असे असतात कीं, ते केवळ हरिदासबोवांच्या निरुपण शैलीचीच ख्याती ऐकून फक्त तेवढें कीर्तन ऐकावयास आलेले असतात. कीर्तनाशिवाय वास्तविक आणखी कशाचीही त्यानां जरूरी नसते. ते मखरांतल्या देवाचे दर्शनास किंवा त्या देवाचे आश्रित देवतांचे दर्शनास आलेले नसतात. त्यांचा जीव त्या कीर्तनश्रवणांकरतां तळमळत असतो. कीर्तन ऐकून त्या प्रमाणें वागण्याची त्यांची तयारी असते. असें सांगण्याचा माझा इरादा नाहीं. त्यांचें एरवीं आचरण कसेंही असो, त्यांशीं आमचें कांहीं कर्तव्य नाहीं. पण इतकें खरें कीं, जमत असलेल्या एकंदर जनसमुहांत हा एवढाच वर्ग काय तो निरुपद्रवी व शांत असतो. आणि ह्या वर्गांत विशेषतः ह्मातार्‍या माणसांचा समावेश होतो. देवळांत जमणाऱ्या १००–१२५ लोकांत असे लोक १२–१६ च असतील. ह्यांचें लक्ष सारखें हरिदासबोवांकडे वेधलेलें असतें. त्यानां इकडे तिकडे गडबड झालेली सहन होत नसते. बायकामुलानां थोपवून धरण्यास ते आपली सर्व शक्ति खर्चतात. परंतु त्या ह्मातार्‍या माणसांकडे कोणीही पहात नाहीं, जो तो आपल्याच चळवळींत दंग असतो शेवटीं निरुपाय झाल्यानें त्या हलकल्लोळांत जें काय पेईल येईल, तितक्यावरच आपली श्रवणतृष्णा भागवावी लागते. बिचाऱ्याच्या पोक्त विचाराकडे, तारुण्याच्या उन्मळीनें धुंद झालेले अविवेकी तरुण, पाहण्याच्या भरीस केव्हां पडतील तें त्यानांच ठाऊक. दुर्दैव बिचाऱ्यांचें!

दुसरा वर्ग असा असतो कीं, [हाष्टोत्तीची माफी असावी] तो केवळ सरवळींत बसलेल्या तरुण व कोमल स्त्रियांचें नखशिखांत निरीक्षण करण्याकरतां आलेला असतो. त्यांची नजर देवाकडे नसते, हरिदासबोवांकडे नसते- लोकांकडे नसते ती केवळ त्या स्त्रियांवर खिळलेली असते. कोणा तरी एखादी स्त्रीची नजर आपल्या नजरेशीं केव्हां भिडेल व आपण गालांतल्या गालांत केव्हां स्मित करून तिला हंसवीन असें त्यानां झालेलें असतें. ही मंडळी २५–३० च्या वयाची असावयाची व यांचाच भरणा ज्यास्त आपल्याकडे बाकी लोकांचें लक्ष वेधावें ह्मणून चांगला चांगला उंची पोषाख, भरजरी तांबडे, जावळे रुमाल वगैरेंनीं शृंगारलेली असते. सगळ्यांचीच दृष्टि दूषीत असते असें मी ह्मणत नाहीं. ह्यांत सुद्धा २ वर्ग पाडतां येतील. एक सौंदर्यप्रेमी माणसांचा व दुसरा कुटील लोकांचा. सौंदर्यप्रेमी नजर बायकावर खिळते पण ते तिकडे केवळ ईश्वरकृत विशुद्ध सौंदर्य ह्या पवित्र भावनेनें पाहत असतात. ह्याशिवाय त्यांत दुसरें कांहीं नसतें. परंतु ह्याच्या उलट कुजक्या दृष्टीचे लोक असतात. त्यानां सौंदर्याची व कशाचीच चाड नसते. यांचे विचार अतिशय हीन बनलेले असतात. एकंदरीत ते फार उल्लु बनलेले असतात. असो.

तिसरा वर्ग असा असतो कीं, तो केवळ मखरांची शोभा पाहण्याकरितां, कलावंतीणीचे नाच गाणें ऐकण्याकरितां आलेला असतो. कीर्तन वगैरे केव्हां एकदां संपून गोफ विणतानां पाहवाला मिळेल व गाणें ऐकायला येईल, याची सारखी वाट पहात असतो. हाही वर्ग तरुण मंडळीचा असतो पण ह्याची कोटी जरा खालची असते. त्याचें मन आणखी कशांतही रमत नसतें. कीर्तन सुरू असतां पुनः पुनः बाहेर जाणारी मंडळी ह्याच वर्गांतली असते, कीर्तनाच्या वेळींच गपाष्टकात वेळ दवडणारी मंडळीही पण हीच. वर सांगितलेल्या दुसऱ्या वर्गांतल्या मंडळीचें ह्या मंडळीशीं पुष्कळ साम्य असतें.

आतां राहिला चवथा वर्ग. ह्या वर्गांतल्या माणसांचे वयोमान पाहूं गेल्यास त्यांत लहानापासून ह्मातार्‍यांपर्यंत माणसें येतात. ही मंडळी देवळांत कां आली असते, हे त्यांचें त्यानांच समजत नसतें. मग आह्मांस तरी कोठून समजावें. कांहीं

खऱ्या दिशेची रेखा आंखलेल्यांवर श ब्दांचा भडिमार होतो, द्वेषभाव वाढत जातो, अशा प्रसंगीं सत्यावर हवाला ठेवावा.

'लहानपण दे गा देवा । मुंगी साखरेचा रवा ॥

हें तुकोबारायांचें तत्व अंगांत बाणलेलें असावें. आपण जगांतील एक यःकश्चित प्राणि आहें ही समजूत असावी. 'जनामधि थोरें म्हणुनि घ्यावें' म्हणून नम्रतेचें कातडें पांघरूं नये. स्वतःचा तिखटपणा मोडूं नये. काल, देश वर्तमान पाहून तिखटपणाचा उपयोग करावा. ह्याच तिखटपणाला पोर्तुगीजमध्यें Energia असें म्हणतात. बलवंतांशीं स्पर्धा करूं नये. प्रत्येक गोष्टींत क्षुल्लद्दीपणानें पाऊल टाकल्यापासून 'अजात शत्रु' बनतां येतें, अशी किती एकांची समजूत असते. परंतु बहुतेक प्रसंगीं तोंडघशीं पडण्याचा संभव असतो सरळपणा हा सर्वांत उत्तम. कावेबाजपणानें यशाचा वांटा कमी. 'मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदयेतु हलाहलम्' हा मार्ग त्याज्य आहे. रॉयल रीडर नंबर तीनच्या शेवटच्या धड्यांत मृदु बोला असा उपदेश आहे. परंतु मृदु बोलून चिमटा घेणें असें मात्र नव्हे. ' जे सर्वांनां खूष करण्याचा प्रयत्न करतात, ते कोणालाही खूष करूं शकत नाहींत, असें वरील पुस्तकाच्या अखेरच्या पाठाचे शेवटीं आहे. सोन्याचे दिवस घालविण्यास न सांपडलेले पत्करले, परंतु कोल्ह्याच्या तत्वांचा अंगिकार करूं नये.

वादविवादाच्या गोष्टींत एके ठिकाणीं म्हटलें आहे.

'कोणी कोणाशीं प्रतिपक्ष करीत असतांना तिऱ्हाइतपणें त्यांच्या त्या वादविवादाकडे पाहणारास पुढें दिल्याप्रमाणें कित्येक व्यंगें आढळून येत असतातः म्हणजे १–वादांतील मुद्द्यांविषयीं परस्परां चा गैरसमज २–प्रधान गोष्ट सोडून अप्रधान गोष्टींचा व्यर्थ खल. ३–वादविषयक गोष्टीविषयीं प्रतिपक्षाच्या केवळ दुष्टहेतूची कल्पना. ४–सत्यनिर्णय.पेक्षां एकेक बनलेले स्वकीय आग्रह स्थापन करण्याचाच काय तो मोठा प्रयत्न. ५-केवळ एकदेशीय विचार करण्याची आवड. हीं व्यंगें आम्हीं पुष्कळ वादविवादांत पाहिलीं आहेत व ऐकिलीं आहेत.याचें स्वरूप व परिणाम आम्हास पूर्णपणें कळून चुकले आहेत. एखाद्याच्या वर्तनाविषयीं पुरताच विचार न करितां त्याजबद्दल विनाकारण वाईट ग्रह बाळगूं नये.,,

जगांत कसें वागावें यद्विषयीं भिन्न लोकांचीं भिन्न मतें आहेत, तीं तीं मतें उचलणें हा प्रत्येकाच्या आवडीचा विषय असतो, तथापि सत्य हेंचि परब्रह्म,एवढें मात्र कोणी विसरतां कामा नये, हेंच माझें मत. डि०पं०४ आणे

सारस्वत

हिंदुसभेच्या चालकांचा आचरटपणा.

भारत ता. २०।९।२३ च्या अंकांत म्हापसें येथील हिंदुसभेनें दो. आल्पोयींयास मानपत्र दिल्याचें वाचून उद्वेग व आश्चर्य वाटतें प्रत्यक्ष म्हापसें येथें राहणाऱ्या हिंदुसभेच्या सभासदांस मानपत्रासंबंधीं पणजी येथील 'प्रेराल्दु' वर्तमानपत्रांतील बातमी वाचीपर्यंत कांहींही जाणीव नव्हती, यावरून मानपत्राचा उपद्व्याप करणारा कपू कोण याचा सहजच उलगडा होतो.

दो. आल्पोयीं हे चांगले न्यायाधीश असतील किंवा आपल्या माजी कारकीर्दीच्या हाताखालील एका गृहस्थाच्या मुलास व भ्याच लठ्ठ पगाराची जागाही दिली असेल; पण त्याचा फायदा म्हापसें येथील हिंदु सभेला काय आहे ?

स्वतः मानापन्न झालेल्यांनीं हरएक तऱ्हानीं समाजाचे उतराई होणें; हेंच त्यांना योग्य होतें. ती गोष्ट बाजूला सारून या अहंमन्य दीड शहाण्या कुटाळांनीं हिंदुसभेच्या व्यापक नावांखालीं साहेबबहादुरास मानपत्र अर्पण केलें, त्याबद्दल बऱ्याच हिंदु लोकांस वाईट वाटत आहे.

ही सर्व उठाठेव एका प्रसिद्ध माणसानें पडद्यामागें राहून केली आहे. त्यांना समाजांत, दैवयोगानें' पगारी एजंट नेमण्याचें कारण न पडतां एक होयबा-नव्हे चुकलों–ज्यास सारासार विचार करण्याची बुद्ध असूनही वेडें कोंकरूं बनलेले एक गृहस्थ मिळाले आहेत. आणि पडद्यामागें राहिलेली व्यक्ति ज्या तालावर नाचवील त्या तालावर हें वेडें कोंकरूं उड्या मारीत आहे.''संयुक्त गौड सारस्वत परिषद्' ज्या व्यक्तीनें आटोकाट परिश्रम करून बराच तीव्र मतभेद असतांही यशस्वी करून दाखविली, त्याच व्यक्तीला थोड क्याच वर्षांनीं अंगांत बुद्धीची धमक असतांही पडद्यामागील दिवाभीतास ती विकून टाकण्याची पाळी यावी, याचें आश्चर्य वाटून हंसावें कीं रडावें हेंच समजत नाहीं.

कोणतीही संस्था स्थापन होतेवेळीं तिचें कांहीं तरी ध्येय ठरत असतें, त्याप्रमाणें हिंदुसभेचेही ठरलें असलें पाहिजे. मानपत्र देण्यास गेलेल्या प्रतिनिधींना खालील प्रश्नांचीं उत्तरें देण्याबद्दल आव्हाहन करून आजच्यापुरती आपली रजा घेतों.

१. हिंदुसभा स्थापन करतेवेळीं तिचें ठरलेलें ध्येय जाहीर करावें.

२. हिंदुसभेनें साहेब बहादुरांस मानपत्र देण्यासाठीं आपणांस निवडलें होतें काय ? व ती सभा कधीं भरली होती ?

३. सभा भरली असल्यास म्हापसें येथील सभासदांस निमंत्रण होतें काय ?

४. साहेब बहादुरांच्या कोणत्या समाजोपयोगी किंवा लोकोपयोगी कार्यास लुब्ध होऊन आपण मानपत्र दिलें ?

समाज सुधारणा हितेच्छु.

ANUNCIOS

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Redcar vão a praça para venda em hásta publica á porta do tribunal judicial desta comarca situada êm Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige a estaçao Sanvordem no dia 9 do proximo mez de Novembro as 12 horas pelo maior lanço que se oferecer o direito aquatro quintos do predio 'Urbano' situado no bairo Zambaulim da aldeia Rivona avaliado por 100 rupias, e o direito a metade do predio denominado " Bondoi namoc anny aforamento da cultura de arroz e tem terreno inculto, situado em Rivona avaliado por 120 rupias,discritos respectivamente porinteiro na conservatoria desta comarca sob os n °s 13351 e6 471 e penhorados nos autos civeis de execução que Tucobá Ananta Porobo Dessai de Rivona move a Rueminim Quenina vulgo Bicu viuva de Zambaulim apensos aos de acçao do processo especial do Decreto de 28 de Março de 1805 que o dito Tucobá moveu a referida Rueminim para pagamento da quantia de 346 rupias 8 tg. 2 reis proveniente do capital, juros penas e custas liquidados nos referidos autos da acção e de custas e selos acrescidos da execução. O arrematante pagará a contribuição de registo por inteiro e as despezas da praça, alem do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaesquer credores incertos e coproprietarios O que para ser publico se expediu este. Xeldem 16 de Outubro de 19.3.

O escrivão de direito
Babu V. Camotim Redcar
Verifiquei
O Juiz de Direito 1 ° substo.
Baptista Gomes

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do 1 ° oficio Redcar. correm editos de 3 dias, a contar do dia da segunda publicaçao do respectivo anuncio, citando a interessada Gonem e seu marido Hari Toulô moradar em Mazali do territorio britanico em parte incerta, para assistirem a todos os termos até final do inventario orfanologicoa que se procede por obito de Xabá Naique Delecar que foi de Delem, em que é inventariante e cabeça de casal Monjú Porsô Naique Delecar, do mesmo lugar, sem prejuizo do seu regular andamento. O que para ser publico se expediu este.

Xeldem, 12 de de Setembro de 1923 —

O escrivão de direito ,
Babu V. Camotim Redcar

Verifiquei.—
O juizo de direito, 1 ° substituto,
Baptista Gomes

Ecos & Critica

NOVO JUIZ

Tomou posse de seu elevado cargo o novo juiz sr. dr Abilio de Nascimento que nás informam ser um magistrado integro e activo, nobre e bondoso.

A Sua Excia o *Bharat* sauda com entusiasmo, fazendo votos para que a sua acção seja proficua á comarca, como é de esperar.

A CESAR...

Apraz-nos registar que o sr advogado João Baptista Gomes, durante o tempo em que esteve exercendo as funcções do 1° substituto de juiz de direito desta comarca, procedeu irrepreensivelmente, mantendo intacto o prestigio da cadeira ocupada e aumentando o brilho da reputação do seu nome. Honra-lhe seja porisso

A Cesar...

NO FIM...

Lemos as *faiscas* do sr. Cris narao G. Quenim, vimos as *incompatibilidades insensatas* d" *A Terra* e saboreamos, tambem, o *movimento anticato lico* da *Tribuna*.

Mas, como nao tivemos, ainda, o prazer de *digerir* o *pomo de discordia*, atirado imprudentemente no *cesto* de colunas d'*O Heraldo* pelo sr. Pe. Campos, prometemos pro nunciar-nos sobre o assunto *no fim* da feira, á maneira dum juiz de *direito* que nas suas sentenças desfaz o *esquerdo* das acusações, contestações alegações e outras noções da demanda litigiosa.

Claro que a promessa se verificará, se nos ajudar o *engenho e a arte*.

DR. TAUMATURGO PEREIRA

Registamos com verdadeiro desvanecimento o filantrofico acto deste integro magistrado que, num rasgo de generosidade, pagou de sua algibeira multa imposta a um transgressor necessitado.

E" raro encontrarem-se irmanadas numa so" pessoa justiça e filantropia, qualidades que dignificam o sr. dr. Pereira.

GOMES DA COSTA

Este brioso general, honra da milicia lusitana e gloria da naçao portuguesa acaba de se encontrar entre nós, tendo sido recebido pela fina *elite* da nossa sociedade, com alvoroço.

Dando boas vindas a Sua Excia, desejamos que o sr Gomes da Costa consiga felicitar esta terra, militarmente, dismilitarisando o excesso militar.

युद्धोत्तर जर्मनी.

(कलकत्ता हायकोर्टाचे जज सर आसुतोष चौधरी हे सध्या विलायतेंत प्रवास करीत आहेत. सध्या ते इंग्लंडमधून जर्मनींत गेले आहेत. जर्मनींत मिळविलेली सर्व माहिती त्यांनीं बंगाली मासिकांतून प्रसिद्ध केली आहे. प्रस्तुत लेख ५।६ महिन्यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या 'वसुमतीच्या' अंकांतील लेखाचें भाषांतर आहे.)

सर आसुतोष चौधरी ह्मणतात:- विसाव्या शतकांतील कुरुक्षेत्रांमध्यें प्राय:सगळ्या युरोप खंडाविरुद्ध तोंड देऊन जर्मनीनें आपली धडाडी दाखविली; परंतु त्यात जर्मनीस यश आलें नाहीं. तेव्हां पराजयानंतर जर्मनीची स्थिति काय आहे, तें कळण्याची इच्छा कोणालाही होणें स्वाभाविक आहे; आणि याच उद्देशानें मी जर्मनींत गेलों होतों.

जर्मनींतील एकंदर गांवची परिस्थिति बाजारदर, व इतर पदार्थांचे दर यांचें निरीक्षण केल्यास जर्मनीची आर्थिक अवस्था चांगली नाहीं असें दिसून येतें. Exchanje मध्यें जर्मन मार्कसचा भाव फारच उतरला आहे. परंतु मार्कसचा भाव जरी उतरला असला तरी इतर बाबतींत जर्मनीची अवस्था फारच चांगली आहे- कोणत्याच बाबतींत जर्मन देश परावलंबी नाहीं. देशांतील एकंदर लोकाना प्रतिदिवशीं ज्या ज्या वस्तूंची आवश्यकता लागते, त्या त्या सर्व वस्तु जर्मनीमध्येंच तयार होत असतात. माझी अशी समजूत आहे कीं, स्वावलंबनाच्या बाबतींत जर्मनी इतका देश, कोणताच पूर्णत्व मिळालेला असा आढळणार नाहीं. सगळ्या प्रकारचा भाजीपाला व धान्य यांची मुबलक निपज जर्मनींत होतेच. हिंदुस्थानांमध्यें दर चौरस विघ्यांत जितकी निपज होते, त्याच्या चौपट निपज जर्मनींत तितक्याच जमिनींत होते. जर्मनींत तयार होत नाहीं अशी कोणतीच वस्तु मला आढळून आली नाहीं. जर्मनींतले लोक फार उद्योगी आणि परिश्रमी आहेत.

महायुद्धानंतर सर्व युरोप खंडांतीलच व्यापार मंदावलेला आहे. जिकडे तिकडे बेकार मजूर दृष्टीस पडत आहेत. वर्तमान पत्रांतून याचा ऊहापोह होत आहेच, शिवाय ही स्थिति प्रत्यक्ष मी पाहिलेलीही आहे. इंग्लंडमध्यें अशा लोकांची संख्या १५ लाख आहे. परंतु फारच आश्चर्याची गोष्ट ही कीं, व्यापाराची मंदावलेली स्थिति मार्कसचा उतरलेला भाव, असें असतांही जर्मनीमध्यें फक्त ११ हजारच रिकामे मजूर आहेत. पुष्कळ लोकांचें असें अनुमान आहे कीं, युद्धापूर्वी जर्मन व्यापाराची जी उन्नति होती ती आज नाहीं. परंतु हें अनुमान खरें नाहीं. उद्योगशील व परिश्रमी जर्मन लोक स्वस्थ बसणारे नाहींत. याचें प्रत्यक्ष उदाहरण ह्मणजेच एवढ्या मोठ्या विशाल साम्राज्यामध्यें ११ हजारच मजूर रिकामे असणें हें होय.

जर्मनीमध्यें कारखान्यांची संख्या पुष्कळ आहे. प्राय: प्रत्येक कारखाना जोरांत चालतो. एक सुद्धां प्रसिद्ध कारखाना बंद झालेला नाहीं. मजूर व कारागीर आपापल्या कामांत दंग आहेत. त्या लोकांची मजुरीही त्याना वेळेवर मिळते. मजुरांची स्थिति जर्मनींमध्यें हलाखीची नाहीं मध्यम वर्गांतील लोकांची स्थिति मात्र फार हलाखीची आहे. तसेंच शास्त्रीय शोधक व प्रोफेसर हे लोक आपला जीवन निर्वाह फारच विपन्नावस्थेंत काढीत आहेत. ज्यांनीं ज्यांनीं पूर्वीपासून बचत करून पैसा ब्यांकेमध्यें ठेविला होता; त्यांची स्थिति मार्कांचा भाव एकदम खालीं गेल्यामुळें फारच कठीण झालेली आहे. परंतु बारीक निरीक्षण केल्याअंतीं मला असें आढळून आलें कीं, हेही लोक अशा स्थितींतही आपलें कर्तव्य करीत आहेत.

जर्मनींतल्या रेलवेच्या व्यवस्थेसंबंधानें या पूर्वी आपण पुष्कळ वाचलेलें आहे. या वेळीं स्वत:लाच अनुभव मिळाला. हिंदुस्थानांतल्या रेलवे कंपन्यांनीं युद्धानंतर आपलें भाडें फारच वाढविलेलें आहे. परंतु सोईचा मात्र अगदीं अभाव आहे. या पेक्षां जर्मनींमध्यें रेलवेचे दर फारच सोईचे आहेत. एका प्रांतामधून दुसऱ्या प्रांतामध्यें जाण्यास रेलवेचें भाडें ३ शिलींग ह्मणजे २। रुपये पडतें. युद्धामुळें गाड्यांची संख्या थोडी कमी झालेली असली तरी पण रेलवे लायनीवर गाड्यांची रहदारी पुष्कळ चालू आहे. ट्रामवेची व्यवस्थाही अशीच आहे. ६ मार्कांपासून १० मार्कांपर्यंत भाडें द्यावें लागतें. आतां ह्या ३० मार्कांनां हिंदुस्थानांत एका पैशाचीहि किंमत नाहीं. पुष्कळ मोठमोठ्या लोकांकडे ऊहापोह केल्याअंतीं व जर्मनींतील वर्तमानपत्रांची स्थिति पाहून मला असें आढळून आलें कीं, भूतपूर्व कैसर द्वितीय विल्यम किंवा त्याचें वंशज जर्मनींतील राज्यपदावर येणें शक्य नाहीं. महायुद्धासंबंधानेंही पुष्कळ लोकांकडे माझें बोलणें झालें, त्यांत त्यांनीं आपलाच अन्याय कबूल केला आहे. युद्धापूर्वी त्यांनीं आपल्या राष्ट्राची बरीच उन्नति करून घेतली होती; परंतु आज ते इतरांपेक्षां थोडे मागें आहेत. युद्धामुळें देशाची जी हानि झालेली आहे ती भरून काढण्याचा त्यांचा दृढ संकल्प आहे.

पुष्कळ लोकांचें असें अनुमान आहे कीं, इंग्लिश लोकांबद्दल जर्मन लोकांचें मन चांगलें नाहीं. परंतु हा समज चुकीचा आहे. या बद्दलही पुष्कळांकडे मी ऊहापोह केलेला आहे. त्यावेळीं त्यांनीं अंत:करणपूर्वक असें सांगितलें आहे कीं, 'इंग्लिशांकडे आमची शत्रुता नाहीं. युद्धकाळीं व युद्धानंतर इंग्लिश सैनिकांनीं आमच्यांशीं फार चांगली वर्तणूक केली आहे.' मात्र फ्रेंच लोकांबद्दल त्यांचें मत चांगलें नाहीं. त्यांच्याविषयीं जर्मन लोकांच्या मनांत पूज्यभाव नाहीं; त्यांच्याबद्दल ते तिरस्कार व्यक्त करीत असतात. ते सांगतात कीं, फ्रेंच लोक आमच्याकडे चांगल्या रीतीनें वागले नाहींत व आज सुद्धां त्यांची वर्तणुक चांगली नाहीं.

महायुद्धानंतरसुद्धां जर्मनींतील शिक्षणसंस्था triste toutins पूर्वीप्रमाणेंच चालत आहेत. आर्थिक अवस्था चांगली नसूनही त्यांची विद्याचर्चा व विद्यालयाची व्यवस्था यामध्यें कांहींच अंतर आलेलें नाहीं. साधारण व वैज्ञानिक शिक्षणाचीही दिवसें दिवस उन्नतीच होत आहे. अध्यापक लोक अर्धपोटीं राहून सुद्धां अंत:करणपूर्वक शिक्षण कार्य करीत आहेत. हें पाहून हिंदुस्थानांतील अल्पाहारी ब्रह्मचर्यव्रत प्राचीन ऋषींची आठवण होते. या लोकांचा आहार अगदीं साधा असतो. मांसाचें नांव सुद्धां नाहीं. कोठें सणावाराचे वेळीं मांस मिळालें तर फार. इतकेंच नव्हे; तर अन्नवस्त्राचे दारुण कष्ट सोसूनही ते ऋषितुल्य जर्मन प्रोफेसरही अत्यंत परिश्रमपूर्वक वैज्ञानिक शोधांचे आविष्करण करीत आहेत. व देशांतील सर्व साधारण लोकांना सुद्धां ज्ञानदान देण्याचें पवित्र कर्तव्य ते आनंदानें करीत आहेत. ते सांगतात कीं, जगामध्यें वैज्ञानिक बाबतींत जर्मन राष्ट्र पुढें होतें, व आजही तें स्थान परत आम्हींच पटकावणार आहों.

क्रुपच्या कारखान्यांत निरनिराळीं अस्त्रें तयार होतात हें पुष्कळांस माहीत आहेच. त्याशिवाय त्या कारखान्यामधून शेतीला उपयोगी अशीं अनेक आऊतें तयार होत असतात. त्याशिवाय प्रत्येक वर्षी ३०० एंजिनें Locomotive तयार होत असतात. सध्याच त्यांनीं मुंबई-बडोदा रेलवेला ५० एंजिनें विकलीं आहेत. त्या कारखान्यामध्यें सरासरीनें प्रतिदिवशीं एक एंजिन तयार होतें. क्रुपचा कारखाना ह्मणजे एक एंजिन तयार होते ह्मणून नव्हे तर अनेक दृष्टीनें एक प्रचंड खातेंच आहे. नुसत्या कारखान्यानेंच साडेचार मैल जागा व्यापिलेली आहे. हा कारखाना ह्मणजे एक प्रचंड शहरच आहे. Factory व कारखान्याशिवाय त्या कारखान्याच्या ताब्यांत ६ मैल जागा आहे. कारखान्यांतील कारागीर व मजूर लोकांकरितां उत्तम हवाशीर घरें बांधिलीं आहेत. त्याशिवाय भोजनालयें, हास्पिटलें, व्यायामशाळा, मुलांमुलींच्या खेळाकरितां क्रीडांगणें या सर्व सोयी तेथें केलेल्या आहेत. कारखान्यामधील वृद्ध पेनशनर लोकांकरितां सुद्धां उत्तम हवाशीर घरें बांधून त्यांच्या राहाण्याची व्यवस्था उत्तम केलेली आहे. प्रत्येकाकरितां तीन तीन खोल्या देण्यांत येतात. या जरी लहान असल्या तरी पण मजबूत व हवाशीर असाव्यात तशा आहेत.

क्रुप कारखान्यापेक्षांही प्रचंड असे कारखाने जर्मनीमध्यें असून, त्यांत सध्या तीन तीनशें चारचारशें वैज्ञानिक व इंजिनियर काम करित आहेत. तेथें नित्योपयोगी

—सांगें मुनिसिपालटीचे माजी अध्यक्ष उसों गोविंद देसाई यांच्या पत्नी निवर्तल्याचें दुःखदायक वर्तमान कळविण्यास फार वाईट वाटतें.

—चालू माहेच्या २८ तारखेस पणजी येथें एका मिलिटरी परेडचा समारंभ होणार असून, त्या वेळीं गोव्याच्या फौजेची पहाणी गोमीस द कोस्त हे करणार आहेत.

—फोंडेंच्या आल्मेद कॉलेजसाठीं स्वतंत्र इमारतीची व्यवस्था करण्याचें घाटत आहे.

—येत्या अंकांत पोंच व अभिप्राय प्रसिद्ध होतील.

—मेर्से येथें मुंबईहून आलेला एक माणूस प्लेगनें वारला-

—पणजी मुनिसिपालटीनें १५५०५ रुपयांला गोमांस विक्रयाचा मक्ता दिला! एवढ्या मोठ्या प्रमाणानें जेथें गोसंहार होतो, तेथें शेतकी संवर्धन कसें होईल?

—प्लेगच्या उंदिरांचें प्रमाण सांवडें येथें कमी झालें आहे; पण मडगांव व मुरगांव येथें सदरील प्रमाणांत विशेषसा फरक झाल्याचें आढळून येत नाहीं.

—प्लेग परिहारार्थ येथें भजनी आठवडा सुरू केला होता.

—केवळ पक्षद्वेषास बळी पडून, सांगें मुनिसिपालटीनें एका गरीब व्यापारास दंड केल्याची वदंता आहे! विशेष माहितीसाठीं आमचा प्रतिनिधी पाठविण्यांत आला आहे.

—येथील नवीन जज्जानीं आपला हुद्याचा चार्ज घेतला.

—मिरज येथील अमेरिकन मिशन क्षयरोग्यांसाठीं स्वतंत्र व आधुनिक तऱ्हेची व्यवस्था करण्याच्या विचारांत असून, एक मेडिकल कॉलेजहि तेथें स्थापण्याचा त्याचा मानस आहे.

—पारतीदु इंदियानाचे अग्रेसर लोयोल यांची मडगांवच्या पाठशाळेच्या प्रोफेसरच्या जागीं झालेली नेमणूक रद्द करण्यांत आली!

—मडगांव येथें गेल्या आठवड्यांत एक माणूस प्लेगनें वारल्याची खबर आहे.

—म. गांधी हे येत्या डिसेंबर महिन्यांत बंधमुक्त होतील, असें लाहोरच्या नेशनपत्रानें भविष्य वर्तविलें आहे.

—पणजीच्या उ येराल्दांत कांपूस नावांच्या एका पाद्रीनें हिंदुधर्माविरुद्ध भलते सलते आरोप करण्याचें पाप आचरिलें होतें. त्याच्या 'क्षालनार्थ' कृष्णराव जे. केणी यानीं 'फाइस्क' नावांचीं स्वतंत्र पत्रें प्रसिद्ध करण्याचा धूम सपाटा चालविला असून शिरोडेचे गोपाळ कृष्ण गुडे यांनीं तर भारतांतील आपल्या लेखमालेनें पाद्री साहेबांस अगदीं भंडावून सोडलें आहे!

—पणजीच्या मुनिसिपालटीनें केनीया प्रकरणाविषयीं आपला निषेध व्यक्त करण्यासाठीं ब्रिटिश मालावर बहिष्कार पुकारला आहे व हें कृत्य बेकायदेशीर आहे, असें 'आ प्रोव्हींसिय' पत्रांत प्रसिद्ध झालें आहे.

—मजूर लोकांचें पगारी प्रमाण ठरविण्यासाठीं साळगांव-बार्देश येथें जोराची चळवळ चालू असून, ठिकठिकाणांहून त्या चळवळीस दुजोरा मिळत आहे.

—मडगांवच्या जुगारी जगाच्या कांहीं रहिवाशांच्या लीला चालू असतां एका डॉ. साहेबांची नजर तिकडे पोंहचली व पत्ते पकडले गेले. जुगाऱ्यांची दाणादाण उडून ते बेपत्ता झाले, अशी बोलवा आहे.

—त्रिबून पत्रांतहि 'फाइस्कां'संबंधीं लांबलचक लेख प्रसिद्ध झाला आहे. सर्वांचें म्हणणें संपल्यावर, भारत त्यावर आपला अभिप्राय व्यक्त करील.

वि. सू.—रा. भगवंत शे. बोरकर यांचा आमच्य शीं कसल्याच तऱ्हेचा संबंध नाहीं.

मराठीवांचून—

रविबिंबाविण पश्चिम दिग्मुख लाल जरी झालें,
तारांवांचुनि आकाशीं जरी चंद्रिकाहि खेळे,
पुष्पाविण उद्यान जरी तें रम्य बहू असलें,
गंधावांचुन पुष्प जरी तें जाईचें झालें;
पक्षांवांचुनि वनराजी वा ओढ्यांविण रानें,
गानावांचुनि निर्झर वा तीं हरिणाविण कुरणें,
पुरुषार्थाविण पुरुष जसा तो, गृह नसतां दीप;
रूपविहिना कामिनी जरी नव यौवन प्राप्त;
फार काय मी सांगूं रसिका! काया प्राणाविण—
तसा मराठीवीण भिकारी गोमांतक हा जाण!

ता. १७।१०।२३

श्रीधरसुत नायक
मुंबई.

UMA QUEIXA

Um cavalheiro proprietario de S. Tome Cansaulim, conta-nos o seguinte:

Que um visinho dele tem um pleito com a comunidade dali contra a qual ele deduziu uma acçao de esbulho violento.

Que em virtude da mesma acçao foi judicialmente e nos termos de lei mantido o autor na posse da propriedade questionada.

Que o dito visinho, nao obstante estar exercendo a referida posse por mandato judicial, e' perturbado nos seus actos possessorios pela acçao policial de Mormugao

E no final da sua epistola, o correspondente que se chama *Franco Liberal* deseja saber sobre o assunto a nossa opiniao que la' vai em poucas palavras.

Custa-nos acreditar, em primeiro lugar, que a policia de Mormugao tenha intervindo numa questao de propriedade que e' aquela de que se trata.

Se, porem, e' verdade o que o sr. *Franco-Liberal* nos relata, declaramos, *em segundo lugar*, que somos contra a tal intervençao que o proprio Regulamento do Corpo de policia de Goa nao admite.

Em toda a parte do mundo civilisado, a esfera de acçao policial se circunscreve a" manutensao de ordem. A policia de Goa, a exepçao do caso de S. Tome, nao nos consta tambem que tenha ultrapassado de proposito a meta de suas atribuições regulamentares.

Melhor informados voltaremos pois ao assunto.

LOUVANDO...

Escapou-nos mencionar que alem do presidente efectivo, nao ligou o seu nome a' deliberaçao do municipio de Sanguem, referente ao caso Dessai, o vereador substituto sr. Sadassiva Porobo Batcar que nela se assinou vencido.

E' claro portanto' que na acçao critica do nosso artigo que *impressionou tristemente* nao fica abrangido o sr. Batcar nem outros que, como eleciosos do prestigio do Municipio e da honra do Concelho de Sanguem, nao se solidarisaram com a *traficancia* que se chamou *compromisso*... que comprometeu so' os comprometentes so'fregos do mando e amigos de... politiquice.

—पोर्तुगालाच्या प्रधानमंडळानें राजीनामा दिल्याची बातमी आहे.

—येत्या अंकीं शिरवडेंवासी यांचा 'विचित्र तारे' हा लेख प्रसिद्ध होऊन. शैमित्र यांच्या लेखांसहि खुलासेवार स्थळ मिळेल.

—पेडणें येथील महत्वाच्या सरकारी जमिनी पणजीचे प्रसिद्ध नागरिक पुंडलीक अनंत केंणी यानीं जाहीर लिलांवांत खरेदी केल्या.

—पोंच व अभिप्राय पुढील अंकीं.

विचार-लहरी

लहर ३ री

आधुनिक काळांत हिंदु धर्माची ध्वजा युरोपखंडांत फडकविणारे वीर स्वामी विवेकानंद यांनीं एका ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, कोणत्याहि देशाची अगर राष्ट्राची उन्नति अजमाविणें झाल्यास, त्यांतील लोकांनीं चालविलेल्या दैनिक वर्तमानपत्रांची संख्या पाहावी. विचारा अंतीं स्वामीजीचें म्हणणें खरें आहे, असें दिसून येतें.

× × × ×

खरेपणीं पाहावयाचाच असल्यास स्वामींच्या वाक्याचा थर्मामिटर आपल्या गोमांतकीय हिंदु समाजाला लावून पाहावा; म्हणजे याची प्रचीति येईल. गोव्यांत खिश्चन प्रजेच्या इतकीच हिंदूंची लोकसंख्या असून, साक्षरतेचें प्रमाणही किंचित् त्यांच्यापेक्षां जास्त आढळेल असें असतां, संबंध गोमांतकांत एकाशिवाय वर्तमानपत्र असूं नये, ह्यावरून काय सिद्ध होतें? आमच्या समाजाच्या अवनतीचें हें चिन्ह नाहीं काय? तेंच खिश्चन समाजाकडे पाहा? त्यांनीं कितीतरी वर्तमानपत्रें,—साप्ताहिकें, अर्ध साप्ताहिकें दैनिकें—वगैरे चालविलेलीं असून, आपली बाजू लोकांपुढें मांडून आपलें कार्य करून घेत नाहींत काय?

* * *

सामयिक साहित्य– वर्तमानपत्रें अगर मासिकें– हीं आजच्या काळांत समाजाच्या जिवंतपणाचीं लक्षणें समजलीं जातात. कोणतेंही राष्ट्र किती उच्च स्थितींत आहे, त्याचा दर्जा काय आहे, हें त्या लोकांनीं चालविलेल्या वर्तमान पत्रांवरून सिद्ध होतें? युरोप खंडांत आज या सामयिक साहित्याला फार मान आहे. प्रत्येक मनुष्य श्रीमंतांपासून मजुरांपर्यंत सुद्धां सकाळीं वर्तमान पत्र वाचणें हें आपलें पहिलें कर्तव्य असें समजतो; व तें वर्तमानपत्र दुसऱ्याकडून मागून आणून न वाचतां स्वताच्या पैशानें विकत घेऊन वाचीत असतो. तेथें वर्तमानपत्रकाराचा दर्जा फार श्रेष्ठ समजला जातो. रिव्हयुऑफ रिव्हयुज या मासिकाचे संपादक मि. स्टेड यांचीं मतें राजकारणांत सुद्धां अमेरिकेचे प्रेसिडेंट व रशियाचे झार वगैरे घेत असत, असें म्हणतात. तसेंच इंग्लंडमधील टाइम्स पत्र यांतील लेखांनाही राजकारणांत बरेंच महत्व असतें.

* * *

अशा दैनिक पत्रांना तिकडे वर्गणीदारही पण तसेच पुष्कळ असतात. कांहीं वर्षांमागें इंग्लंडच्या लोकांना, पारिस व अमेरिका येथील वर्तमानपत्रांच्या वर्गणीदारांची संख्या पाहून फार हेवा वाटत असे. परंतु ही स्थिति लॉर्ड नार्थ क्लिफ् ह्या धाडशी पुरुषानें बदलून टाकली! आज यांच्या डेली मेल या पत्राचा खप दैनिक १८ लाख प्रतींचा असून, त्याच्या प्रती तीन शहरांमध्यें निघत असतात. (लंडन, म्यांचेस्टर व पारीस.) या पत्राचें सविस्तर वर्णन देणें येथें शक्य नाहीं. ह्या पत्राला वर्षाकाठीं १॥ ते २॥ कोटि रुपयांचा कागद व ६० हजार रुपयांची शाई लागत असते. त्यामुळें १९०६ सालापासून स्वतः कागद तयार करण्याचा कारखाना त्या पत्रानें काढला आहे. तसेंच टॉइम्स व डेली टेलिग्राफ यां सारखीं दैनिक पत्रेंही तेथें निघत आहेत लंडन टॉइम्सच्या दैनिक १ लक्ष ८० हजारच प्रती निघत असतात, तरी त्यांतील लेखांना फार महत्व दिलें जातें. या पत्राच्या अंकांच्या फायली बांधून पुस्तकालयांमध्यें ठेवलेल्या आढळतात. यावरून त्याची किंमत कळून येते.

* * *

अमेरिकेंतही हीच स्थिति आहे. तेथें वर्तमानपत्रें व मासिकें मिळून २५ हजार प्रसिद्ध होत आहेत. पैकीं दैनिक वर्तमान पत्रांचीच संख्या २॥ हजार आहे. एकट्या शिकागो शहरांत ४० दैनिकें निघत असतात. न्युयार्क हेरल्ड या पत्राची एक आवृत्ति पारीसमध्यें निघत असून तिची दैनिक संख्याही १५ लाखांवर आहे. Literary Digest या पत्राच्याही १५ लाखांवर प्रती निघतात. इंग्लंडप्रमाणें अमेरिकेंतही प्रत्येक मनुष्य दैनिक वर्तमानपत्र वाचणें हें आपलें पहिलें कर्तव्य समजतो व साधारण ऐपतदार ४ तरी दैनिकें विकत घेत असतो. पारीसमध्यें वर्तमानपत्रांची तीच स्थिति आहे. टॉइम्स व जर्नल या वर्तमानपत्रांच्या वर्गणीदारांची संख्या १५ लाखांवर आहे.

× * ×

वर्तमान पत्राच्या धंद्याला युरोपांत फार महत्व आहे. मोठमोठे राजकारणी पुरुष राजकारणांत त्या पत्रकर्त्यांचें मत घेत असतात, व ते पत्रकर्तेही त्या त्या विषयांचा अभ्यास फार दांडगा करीत असतात. तसेंच जगाच्या कोना कोपऱ्यांत सुद्धां काय झालें आहे, याची माहिती ते आपल्या वाचकांना पुरवीत असतात. इतकेंच नव्हे तर कोणत्याहि आकस्मिक संकटाचे वेळीं, त्या स्थितीची यथायोग्य माहिती आपल्या वाचकांना देऊन, त्या संकटाच्या निवारणार्थ फंड वगैरे जमविण्याची त्यांनी तेव्हांच तयारी असते. इंग्लंडमधील डेली टेलिग्राफ या पत्रानें दक्षिण आफ्रिकेंतल्या लढाईच्या वेळीं ४० लक्ष रु. जमवून, अनाथ विधवांना पाठवून दिले. महायुद्धांत जर्मनीच्या आकस्मिक हल्ल्यांमुळें लाखों पोरें व बायका अनाथ झालीं! त्यावेळीं अमेरिकेंतील लाटेररी डायजस्ट या वर्तमान पत्रकारानें संबंध एक आगबोट भरून खाद्य पदार्थ पाठवून दिले. यावरून या वर्तमान पत्रकर्त्याची कामगिरी लक्ष्यांत येईल.

* * *

हिंदुस्थानांत बंगाल जरा पुढें आहे. बंगाली भाषेमध्यें हितवादि, वसुमति यां सारखीं दैनिक पत्रें असून, वर्गणीदारांची संख्याही २०।२५ हजारांपर्यंत आहे. मासिक पुस्तकांमध्यें तर बंगाल बराच पुढें आहे. प्रवासी, भारतवर्ष, वसुमति यांसारखीं प्रत्येक अंकांत १००।१५० चित्रें व वर्षाकाठीं १८००।२००० पृष्ठांचीं मासिकें प्रसिद्ध होत असून त्यांची वर्गणीही रण ६–६॥ रुपये असते. मजकुराबद्दल शिफारशीची गरजच नाहीं. मोठमोठे साहित्यसेवक, कादंबरीकार वगैरे सदोदित या मासिकांत लिहीत असतात. "मनोरंजनाचा" मनोरंजकपणा व विविधज्ञान विस्ताराचा भारदस्तपणा हीं दोनही अंगें एकवटलेलीं अशीं बंगाली मासिकें वाचावयाला मिळतात. बंगालनें देशी साहित्यामध्यें मोठी क्रांति करून टाकली आहे.

* * *

महाराष्ट्रामध्यें हिंदी व्यंकटेश समाचार या पत्राच्याच १० हजार दैनिक प्रती निघतात, असें १९१५च्या सरकारी रिपोर्टावरून कळतें. मराठीमध्यें अखंड चाललेलें असें ज्ञानप्रकाश दैनिक होय. बाकीचीं आज आहेत उद्यां नाहींत. ज्ञानप्रकाश पत्र विशिष्ट पक्षाचें असलें तरी पण त्यांतील विचार सर्वांनाच वाचनीय आहेत. केसरीची वर्गणीदारसंख्या मात्र मोठी असावी. सध्यां ३०–३२ हजारपर्यंत प्रती निघत आहेत असें कळतें. १९१५ सालच्या सरकारी रिपोर्टांत १५ हजारांचा उल्लेख आहे. या वर्तमानपत्रानें महाराष्ट्रांत बरीच क्रांति केली आहे. मासिक पुस्तकांमध्यें चित्रविधज्ञानविस्तार या ज्येष्ठ व श्रेष्ठ मासिकाचा उल्लेख करणें योग्य आहे. यांतील लेख वाङ्मयाची संपत्ति असेच असतां यास हजारही वर्गणीदार असूं नये हें आम्हा महाराष्ट्रीयांना लांच्छनास्पद आहे. मनोरंजनानें मात्र या बाबतींत बरीच आघाडी मारली होती, परंतु मित्रांच्या अकाल मृत्यूचा परिणाम त्या मासिकावर झाला असें म्हणतात. दुर्दैव दुसरें काय?!

× × ×

आमच्या गोमांतकांत हिंदुसमाज या बाबतींत अगदीं उदासीन आहे. २॥ लाख लोक वस्तींत अर्धे मराठी वर्तमानपत्र चालू असणें ही स्थिति काय दर्शविते? अशानें आपला समाज पुढें जाईल काय? चालू युगांत वर्तमानपत्रें हींच लोकशिक्षणाचीं प्रमुख अंगें आहेत; त्याविषयीं आमची इतकी अनावस्था? ह्या विसाव्या शतकांत ह्या कोपऱ्याचा संबंध त्या कोपऱ्याशीं निगडित झालेला आहे. चार दोन शतकांपूर्वीची गोष्ट वेगळी होती. आज जगानांत झालेल्या भूकंपाचा परिणाम थोडक्याच काळांत सबंध जगावर होऊं शकतो; अशा काळींही आपल्या समाजानें या बाबतींत इतकी अनावस्था दाखवावी या सारखी लांच्छनास्पद अशी दुसरी गोष्ट आहे काय?

\+ × +

दुसरें उदाहरण घ्या. हिंदुधर्मावर.

तत्वाची जाणीव ख्रिस्ती सासवांस हिंदुसुनाच्यां 'फाइस्कानीं' हं वो, असें इच्छितों.

उपदेशामृतः—मडगांवच्या समाज-सेवा-संघ नामक एका संस्थेनें तेथील दारूबाज व जुवेबाज मंडळीस उपदेशामृताचा 'पहिला घोट' दिला असून, मंडळीला आणखीहि कित्येक घोंट पाजण्यांत येतील, असें 'घोंटा'च्या एकंदर धोरणावरून अनुमान बांधण्यास हरकत नाहीं. 'संघाचा' हा उपक्रम स्तुत्य असून, त्याला शक्य तितकी मदत पुरविण्यास मडगांवची तरुण पिढी पुढें सरसावेल, अशी आम्हांस उमेद आहे. उपदेशामृताचा पवित्र हेतु यशस्वी होवो, असें अंतःकरणपूर्वक इच्छितों.

वर्तमानसार

—कांवरें प्रकरणासंबंधीं आह्मांविरुद्ध भरण्यांत आलेल्या पहिल्या खटल्याची सुनावणी चालू माहेच्या २१ तारखेस होणार आहे.

—कृष्ण शेणवीं भोवे यांनीं आपला फार्मसीचा कोर्स यशस्वी रीतीनें पुरा केल्याबद्दल आह्मीं त्यांचें अभिनंदन करितों.

—श्रीमंत विष्णु धेंपे यांच्या छातीवर 'आप्तखुरीस' झळकावयास लागल्याबद्दल त्यांनें ख्रिस्ती पत्रांकडून अभिनंदन करण्यांत येत आहे.

—ब्रिटिश हिंदुस्थानांत निवडणुकांची धामधूम सुरू आहे.

—मडगांवांत प्लेगचे उंदीर पडतच आहेत. दारूबाजी व जुवेबाजी हे दोन पाजी प्रकार बंद झाल्याखेरीज, प्लेगोबा आपलें ठाणें कायमचें उठविण्यास राजी नाहीं, अशी कित्येक धर्माभिमान्याची ठाम समजी आहे.

—येत्या जानेवारीपासून मडगांवांत एक मराठी साप्ताहिक प्रसिद्ध व्हावयास लागणार आहे.

—कलकत्ता येथें दे० दासबाबूनीं 'पुरोगामी' नावांचें इंग्रजी दैनिक सुरू केलें आहे.

—मुंबई मुनिसिपालटीनें केनीया प्रकरणाबद्दल निषेध व्यक्त करण्यासाठीं ब्रिटिश मालावर बहिष्कार घालण्याचा ठराव पास केला! यालाच ह्मणतात नोकरशाहीच्या नाकावर मिरीं वांटणें!

—मौ० महंमद अल्ली यांस ठिकठिकाणच्या मुनिसिपालट्यांकडून मानपत्रें देण्यांत येत आहेत.

—पहिलें 'फाइस्क' डॉ० बोरकर यांच्या खर्चानें निघालें. दुसऱ्याला पेडणेच्या रावराजेसाहेबांनीं मदत केली व तिसऱ्याच्या प्रकाशनाला श्रीमंत धेंपे यानीं पदरमोड सोसली.

—रिपब्लिकचे नवे प्रेसिडेंट गोमीस हे लवकरच दौऱ्यावर निघणार आहेत.

वरील सर्व वचनांतून राजास उद्देशून जें सांगितलें आहे तें, आजकालच्या मानाप्रमाणें लोकसमाजानें सरकारच्या मदतीनें करावयाचें आहे, हें खरें असलें तरी समाजांतील सर्वच स्त्रीपुरुष कांहीं पुढें येणें शक्य नाहीं. याचा विचार समाजहितेच्छू व सुशिक्षित तरुणांनींच करणें आवश्यक आहे. आज ह्या व इतर अनेक व्यसनांच्या तावडींत सांपडलेला हिंदुसमाज जर मुक्त झाला नाहीं तर अनेक दृष्टीनीं त्याची खुंटलेली उन्नति, दिवसें दिवस अधिकाधिक खुंटत राहील; आणि मग त्याचा अधःपात झालेला आह्मालाच दिसावयास लागेल. कोणताहि रोग चांगला होण्यास वैद्यलोक ज्याप्रमाणें, वमनविरेचन करणें अगत्याचें समजून आधीं त्यावर इलाज करितात आणि नंतर रोगमुक्त होण्यास किंवा शक्ती येण्यास मात्रा रसायनादिकांचा प्रयोग करीतात, त्याचप्रमाणें आमच्या समाजाची उन्नति केवळ त्याच्या व्यसनमुक्ततेवर अवलंबून आहे. जोंपर्यंत आम्हीं या अनेक, अनिष्ट व्यसनाच्या जाळयांत गुरफटून, गुदमरून जात आहोंत तोंपर्यंत, सभा, व्याख्यानें, समाज, संस्था निवडणुका वगैरे सारख्या रोगहारक व शक्तीवर्धक उपायांचा काडीमात्र उपयोग होणार नाहीं. त्यास व्यसनमुक्तता हाच उपाय आहे. तो स्वतःच्या जोरावर व प्रसंगीं वयोवृद्ध व सूज्ञ लोकांचें आणि सरकारी अधिकाऱ्यांचें सहाय घेऊन, अमलांत आणणें तरुणांचें कर्तव्य आहे. तें कर्तव्य त्यांनीं बजावलें तर या व्यसना बरोबर पसरूं पाहणाऱ्या दारिद्र्य, चौर्य, पशुता इ. अनेक दुष्ट व समाजहितविघातक वृत्तींचा नाश होऊन हजार वर्षांचा शीलवंत व भाग्यवंत गोमांतक आज पुन्हां दिसूं लागेल या पवित्र कार्यास आरंभ करावयचा तो जुगाऱ्यांचें मन वळविण्यापासून झाला पाहिजे. व त्यासाठीं जगांतील सनातन व श्रेष्ट असा ग्रंथ जो ऋग्वेद, त्यांतील एक वाक्य त्याच्या हिंदी व मराठी अर्थासह देऊन हा विषय आटोपता घेऊं.

"अक्षैर्मा दीव्यः कृषिमित्कृषस्व ॥"
"वित्ते रमस्व वहु मन्यमानः ॥ ऋ ॥
॥ जुआ न खेळो, कृषिकार्य कीजे ॥
॥ धनेश होंगे यह धारि लीजे ॥
॥ जुआ बुरा है कृषिहि भली है ॥
॥ यही सदासे सुखकी गली है ॥१॥

जुगार खेळूं नकोस; निश्चयानें शेती कर व यांत मिळणारा थोडा फायदाहि बहूत समजून समाधानानें रहा.

—विनोदराव, राजाध्यक्ष, शिवदास, के भारती, विरोधी, इत्यादी प्रेमळ व भारताभिमानी लेखकांचे लेख आमच्या दप्तरांत रुजू असून, त्यांचा शक्य त्या प्रमाणें तावडतोब उपयोग केला जाईल.

– काले-जत्रांना सुरुवात झाली !

—भारताचा खटला रंगांत आहे.

– येथें रहाणारे मोसांबिक येथील सरकारी नोकरांचा पगार चुकता करण्यासाठीं तेथील सरकारनें एक हजार पौंड पाठविले आहेत.

– लिसेव मुनिसिपालच्या प्रोफेसरांच्या परीक्षेंत एकसुद्धां उमेदवार पास झाला नाहीं ! खुद्द परीक्षक तरी पास झाले असते का ?

स्फुट विचार

सत्यमेव जयतेः—'कांवरें प्रकरणा' संबंधीं भारतकारांविरुद्ध भरण्यांत आलेल्या दोन खटल्यांपैकीं पहिल्या खटल्याच्या सुनावणेस गेल्या २१ तारखेस सुरुवात होऊन, निकाल दुसऱ्या दिवशीं वाचण्यांत आला. त्यांत आमचे संपादक दोषमुक्त झाले, हें कळविण्यास समाधान वाटतें. जनताजनार्दनाच्या सेवकांवर हरतऱ्हेची संकटपरंपरा कोसळत असते. क्षुद्र बुद्धीच्या अदूरदृष्टि निंदकांकडून त्यांच्याविरुद्ध नासक्या फुसक्या कल्पित दोषारोपांचा मारा सतत चालू असतो. इतकेंच नव्हे, तर खुद्द त्यांच्याच हितासाठीं उपरोक्त सेवक तन, मन धनादिकांच्या विनियोगानें सर्वस्वाचा आत्मयज्ञ करितात, ते सुद्धां एखादवेळीं कुटाळांच्या चाळयांस बळी पडून कर्तव्य पराङ्मुख होत असतात. असें जरी असलें, तरी देशदासांनीं भीतां कामा नये; कां कीं, सर्व जरी उलटलें तरी परमेश्वर कधींच उलटत नसतो, या अढळ निष्ठेनें कार्य करीत असलेल्या लोकांवर ईश्वराची नेहमींच कृपादृष्टि असते, याची त्यांनीं पूर्ण खात्री बाळगावी.

टपालखातें:—'भारतानें' प्रसिद्ध केलेल्या 'टपालखात्याच्या' मजकुरावरून सरकारी अधिकाऱ्यांनीं चौकशी चालविली असून, तीजपासून कांहीं तरी उपयुक्त कार्य निपत्ति होईल असा रंग दिसतो. प्रस्तुत प्रकरणांत आह्मांस उपलब्ध असलेली माहिती सरकारास पुरविण्याचा आम्हीं सपाटा चालविलेला असून, प्रसिद्ध झालेल्या मज्कुराची सर्व तऱ्हेची हमी आम्हीं आमच्या शिरावर घेतली आहे. टपालखात्यासंबंधीं कोणतीहि कागाळी सरकारच्या कानावर घालण्याची इच्छा असणारांनीं खात्रीलायक पुराव्यासह आह्मांस लिहिल्यास त्याचा योग्य उपयोग करण्यांत येईल. 'करील तो कारभार' या 'अंधेरी' तत्वाचा वास–घाण म्हणा पाहिजे तर–टपालाला लागल्यास, कपाळदुखीची व्यथा सर्वत्र पसरेल, यांत शंका नाहीं. तेव्हां वेळींच सावध झालेलें बरें नव्हे काय ?

ठीक झालें !:—अखेर ६० टक्के पेन्शनचा संबंध गाढण्यांत येत असून सरकारी बजेट चालू नाण्यांत ह्मणजे रुपयांनीं ठरविण्याचा यशस्वी प्रयत्न होत आहे. या दोनहि सुधारणा अमलांत येऊन बराच काळ लोटला पाहिजे होता. परंतु 'लुटीनंतर नाकेबंदी, या रोगाची आमच्या खर्चाळू सरकारास बाधा झाली असल्यानें गोष्ट अगदीं निकरावर येतांच, वरील सुबुद्धि त्याला आठवली, हें नसे कांहीं कमी समाधानकारक नाहीं असो. उशिरां कां होईना, पण सरकारच्या मठ्ठ डोक्यांत खऱ्या वस्तुस्थितीचा लख्ख प्रकाश पडण्यास प्रारंभ झाल्याचें पाहून, आमचा आशावादीपणा उलट खावयाला बघत

नांहि शिरूं दिलें नाहीं !

" पायघोळ झगा घालून फिरूं प हाणाऱ्या, व बाजारांत व सिनागोग च्या मुख्य मुख्य खुर्च्यांवरून आणि मेजवानीच्या मुख्य मुख्य बसकेवरून प्रणिपात करून घेणें आवडणाऱ्या ज्यु देव कायदे पंडितांपासून तुम्हीं आपलें रक्षण करा.

"मोठ्या प्रार्थना भासवून जे विधवांचीं घरें ग्रासीत आहेत, ते हे मोठी शिक्षा मिळवितील." (खरें आहे. विधवाच नव्हे, तर सधवांचें सौभाग्य व कुमारिकांचें ही अदृश्य रिता कौमार्य भ्रष्टकरून वरवर भोंदू संन्यास मिरवून ऐन प्रसंगीं मना केलेला विवाह करून घेऊन, हिंदूच्या चाली रीतींना दोष देणाऱ्यांस पारितोषिक कसें मिळेल ?) .

याच लेखास त्यानें एक ता. क. जो डिलें असून, त्यांत त्यानें ह्मटलें आहे कीं, 'जात असतां सहज इंदिय पोर्तुगेजीचर [India portugueza.] एका बुद्धिवान् व विद्वान पाद्रिभटानें आपल्या लेखावर लिहिलेला आक्षेपार्ह लेख वाचिला. अखेरच्या वेळीं मुद्दाम लिहिलेल्यांत ज्या दोन गोष्टींचा उलगडा केला [खरें आहे. विधवाच नव्हे, तर सधवांचें सौभाग्य व कुमारिकांचें ही कौमार्य अदृश्यपणें भ्रष्ट करून वरवर भोंदू संन्यास (पाद्रीच्या) मिरवून क्वचित् प्रसंगीं मनाई असलेला विवाहही करून घेणाऱ्या व हिंदूंच्या चाली रीतींना दोष देणाऱ्यांना पारितोषक [Eeremias] कसें मिळेल ? त्याना शिक्षा ही ठेविलेलीच असणार.] पाहिजे, त्यापेक्षां विशेष कांहीं लिहितां येत नाहीं. जेव्हां मी ह्मटलें कीं, पूर्वेकडील प्राचीन प्रदेश देवचारांच्या धार्मिक कृत्यांस वाहिलेले होते, तेव्हां मी फक्त आवेशाच्या भरानें, दो नोरोन्ह्य यांच्या ग्रथांत सादर केलेलें तेथो लोगाचें मतच पुन: नमूद केलें. आणि जे अत्युत्कृष्ट ह्मणून धर्म मी ओळखतों, त्यांपैकींच जो एक हिंदुधर्म आहे असें मी समजतों, त्या हिंदुधर्माविषयीं मी माझें मत व्यक्त केलें नव्हतें. कदाचित् माझें विचार प्रदर्शन नीट झालें नसेल व तेथेंवरून असत्यास धरून असलेल्या एका व्याख्येस जागा राहिली असेल, ह्मणून मी दुसऱ्यांदा माझ्या लेखाचें वाचन केलें; तरी सुद्धां माझी त्याविषयीं कांहींच खात्री होईना. मला वाटतें कीं, पूर्वापार संदर्भावरून "देवचारांच्या धार्मिक कृत्यांस वाहिलेल्या" या शब्दांचा अर्थ स्पष्ट आहे. आतां, तेवोलोजी ह्मणजे दैविक वस्तूंचें व देवाचें शास्त्र आहे, याविषयीं मात्र भेद पाहिला पाहिजे. स्थूल (सामान्य) व सूक्ष्म [लाक्षणिक] अशा अर्थीं शास्त्र आहे. तेवोलोजी ह्मणजे सूक्ष्म अर्थीं देवाचें शास्त्र (किंवा देवज्ञान) आहे. याच्या उलट सगळे जे कोणी खिस्त भक्तीच्या सूत्राचा (प्रश्नोत्तरवाली-शास्त्र) ग्रंथ जाणतात, ते तेवोलोगुस [देवज्ञानी] झाले असते. तथापि सगळे हे जे उपदेशक व्यास पिठावरून टाहो फोडून सालंकार पांडित्य करितात व पुष्कळदां दुसऱ्यांचा (उष्टा) धर्मोपदेश कथन करीतात, ते सगळेच देवज्ञानी (तेवोलोगुस] नव्हेत !"

सिं. आंद्राद यांना हिंदुधर्म ह्मणजे जगांतील उत्कृष्ठ धर्मांपैकीं एक धर्म दिसावा व तोच पा. कांपूस यांना अधर्म दिसावा हें कशाचें लक्षण बरें ! काविळ झालेल्यास सगळेंच पिवळें दिसतें, तशांतीलच हाहि प्रकार आहे. सिं. आंद्राद यांची दृष्टी 'कुपमंडूक वत्' नसून ती व्यापक झाली; व ह्मणूनच स्वामी विवेकानंदानें व त्यामुळें जगानें ठरविलेलें हिंदुधर्माचें श्रेष्ठत्व त्यांना दिसलें. तें श्रेष्ठत्व 'कुपमंडूकवत्' दृष्टी असलेल्या व माझें पोमकें तान्हें तेंच सोनें मानणाऱ्या पाद्रीस कसें कळून येईल ? सिं. आंद्राद प्रभृति व्यापक दृष्टी झाल्यानें आपण मूळचे कोण हें समजून उमजून चूकले ती व्यापक दृष्टी नसल्यानें पाद्रींस आपण मूळचे कोण, आपल्या पूर्वजांची काय स्थिति झाली, आतां आपण कोण, आपला देश कोणता, आपली भाषा कोणती, आपले देशबांधव कोण, आपला मूळचा धर्म कोणता, त्या धर्माविषयीं आज जग काय ह्मणतें, आपण स्वीकारलेला धर्म कोणाचा आहे, ज्यांचा तो धर्म आहे, ते त्याविषयीं कसे वागतात, आपणास कसें लेखितात इत्यादिकांचा समज उमज झाला नाहीं. व कोंडे ते कोरडेच राहिले आहेत आणि ह्मणूनच अनिष्ट प्रकार त्यांकडून घडतो. आपल्या पोसकयाच्या डोळयांतील मुसळ न बघतां, आपल्या मूळच्या मायधर्मांतील कुसळ पाहूं लागले आहेत व ह्मणूनच 'जशास तसें' या न्यायानें फाईस्कांच्या द्वारें तें मुसळ थी. केणी हे त्यांना दाखवूं लागले आहेत. असो. याविषयीं ज्यास्त विचार पुढें सवडीनुसार करितां येईल. व सि. आंद्राद यांच्या वरील विचारांवर पा. कांपूस यांनीं धर्मांधतेनें वेढेष होऊन कशी आग पाखडली आहे व आपल्या अकलेचे काणखी तारे कसे तोडिले आहेत तें पुढील लेखांकांत दाखविण्यांत येईल.

ता. क. कंसांतील व अवतरण चिन्ह व्यतिरिक्त विचार माझे आहेत.

शिरवडेंवासी—एस् एच्

--देपुताद व सेनादोर यांच्या नवीन निवडणुका होण्याचा संभव आहे.

--येत्या जानेवारी महिन्यापासून भारत नवीन टैपांत प्रसिद्ध होणार आहे.

—कांहीं काणकोणकरानां सध्याचे मामलेदार पाहिजे आहेत व कांहींना युरोपियन मामलेदार पाहिजे आहेत. परंतु बहुमत कोणत्या बाजूला आहे, हें समजून घेण्या करितां भारतानें आपला प्रतिनिधी पाठविला आहे.

ANUNCIOS

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 2.° oficio, Barreto, correm editos de 30 dias a contar do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos da § 20 do art 197 do Cod. do Proc. Civ. citando os interessados Crisnabai e seu marido Govinda Rau Sidorcar, maiores, ausentes em parte incerta de Bombaim para assistirem a todos os termos ate final do inventario orfanologico a que se procede por obito de Mucunda Subraia Sinai, natural e domiciliado que foi de Palolem sendo inventariante e cabeça de casal Nilconta Trimboca Sinai da mesma e uele deduzirem querendo os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento E para ser publico se expediu este.

Xeldem da Comarca de Quepem, 14 de Outubro de 1923

O Escrivão de direito do 2.° oficio

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direto, 1.° Substituto,

Baptista Gomes

Pelo juizo de Dereito da comarda de Quepem e cartorio do escrivão do 1.° oficio Redcar, correm editos de 30 dias a contar do dia da segunda publicação deste, citando a Miguel Xavier d'Aguiar de Avedem, residente em Sernabatim e ora ausente em Bombaim, em parte ncerta para assistir a todos ose termos atè final do inventario orfanologico a que se procede por obito de Amalina Fernandes que foi de Avedem, sem prejuizo do seu regular andamento. O que para ser publico se expediu este. Xeldem 4 de outubro de 1923.

O escrivão de Direito 2

Babu V. Camotim Relcar

Verifiquei

O Juiz de Direito 1.° Substituto.

Baptista Gomes

---

to sequer em por termo a' pole'mica, retirando-se da discussao.

A coesao da familia goesa e' o sonho dourado que de ha' muito acalentamos no nosso intimo. Compreendemos perfeitamente quanto importa que cristaos e hindus, de maos dadas, respeitando-se mutuamente procurem realizar esse ideal.

Mas entendemos tambem que nao responder ao repto que um padre catolico dirigiu aos hindus fazendo arremetidas injustificadas contra as suas crenças seria uma pusilanimidade verdadeira que nao e' pusilanimidade o nao se deixarem os hindus arrebanhar indo votar em massa, nas eleições politicas, a favor de certos "manipansos" fabricantes de comodos nichos para seus apaniguados.

E, ao terminar, diremos aos que movidos dos mais louvaveis intuitos, desejam o termo dessa "controversia religiosa" que a unica soluçao digna e' a indicada pela nobre atitude dum espirito profundamente justo e um coraçao inteiramente dedicado a' India como e" o Rev. Andrews.

Querem que termine a controversia? - Que os que a provocaram se arrependam e publicamente manifestem o seu arrependimento.

V

A janela....

A vacuidade obtusa das novidades sensacionais deixaram-me mudo e quedo ... Hoje, porem, ha vacas para o açougue, nao bem nedias e gorduchas, mas, como de sempre, enfezadas e raquiticas que o talho de Betim, cotidianamente abate a's tardes!

Pomposamente, ufanosamente, o Bol. Ofi. publica o Diploma Legislativo. de n° 54. Em 9 artigos e outras tantas elucidaçoes esse diploma encerra umas novidades sensacionais que so' sao admitiveis em pleno seculo das luzes, em que nao ha' nada obscuro ou escuro, tudo e' claro como agua chilra! ...

Vamos por partes. Ate' os primeiros cinco artigos tratam desenvolvimente do pagamento aos funcionarios em rupias. E' esta uma antiga aspiraçao da India Portuguesa, e' este o seu mais antigo anseio, que ve agora efectivado Queira Deus que nao fique so" no... papel... Porem transposto o 5° art., le-se o seguinte; E' facultado aos funcionarios aposentados ou desligados... *apresentarem-se a junta extraordinaria,... a fim de esta julgar da sua capacidade* !!!

Julgo eu que nem todos os pontos de admiraçao dos caixotins da tipografia do [illegible] bastariam para dar a idea precisa. hilariante e comica que isto faz! E' mesmo que ver o sol a' meia noite ou estrelas ao meio dia !...

Entao, carissimos e ilustrissimos conselheiros que pontificais do cimo das suas catedras, que so' aquecem, com o calor esbraseante dos seus assentos, entao, que diacho de coisa e' esta? Trazem-se os pobres entravados, incapazes, malucos a' baila e se lhes da' uma *douche* de elixir da vida e se os poe direitos como fusos!...

E' a invençao do dr. Crile em fo'co Mas qual de vo's sois o operador, qual e' esta a junta estraordina'ria! ...

Oh! sapientissimos conselheiros do supremo Conselho, os *olhos da vossa real benequidade pende no chao* e ...vede o efeito co'mico que VExias estao a fazer! Da' vontade de transformar as tripas em assucar... Eu sei que mais?...

Alerquim Verde

नोबल परितोषक

ता. २४।९।२३ च्या 'हिंदु मिशनरी' वर्तमानपत्रामध्यें नोबल परितोषक या विषयीं माहिती प्रसिद्ध झालेली आहे. त्यांत 'या संस्थेतर्फे प्रतिवर्षी एक सुमारें ८ हजार पौंडाचें ह्मणजे १ लक्ष २० हजार रुपयांचें बक्षिस द्यावयाची रीत असून त्याची पात्रता ह्मणजे त्या वर्षीत मनुष्यजातीच्या उन्नतिप्रीत्यर्थ मोठें कार्य करणें ही होय. या उद्देशानुरूप पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, इंद्रियविज्ञान, किंवा वैद्यशास्त्र, वाङ्मय व शांतिप्रचार या पांच विषयांत अत्युत्तम काम करणारांस सालोसालीं हीं बक्षिसें देत असतात. या लिहिण्यावरून प्रत्येक वर्षी एकच बक्षिस १ लक्ष २० हजाराचें या पांचापैकीं कोणत्या तरी एका विषयांत संपूर्णता मिळविणाऱ्यास मिळतें, असा संदर्भ निघतो. पुष्कळांचा समज असाच आहे व माझाही पण असाच समज होता. परंतु, कांहीं दिवसांमागें बाबु रामानंद चटोपाध्याय याच्या 'प्रवासी' नामक बंगाली मासिकाच्या जुन्या फायली चाळीत असतां कविसम्राट टागोर यानां ज्या वर्षी [१९१३ सालीं] हें नोबल प्राइज मिळालें, त्या वेळीं बाबु अ. होम यानीं लिहिलेला लेख वाचण्यांत आला. त्यांतील माहिती खालीं देत आहों.

स्वीडन देशांतील आल्फ्रेड बर्नार्ड नोबल यानीं डायनामीट या साध्या बंदुकीच्या दारूच्या आठपट अशा स्फोटक द्रव्याचा शोध लावून त्यावर पुष्कळ संपत्ति मिळविली, व अंतकाळीं, (१८९६ सालीं) त्यानीं आपल्या ट्रस्टीच्या हातांत २ कोटी ६२ लक्ष ५० हजार रुपये देऊन त्या रकमेच्या व्याजांतून दरवर्षी पांच बक्षिसें प्रत्येकीं एक लक्ष २० हजारचें अशीं वांटण्याचें ठरविलें. हीं बक्षिसें जगाच्या कल्याणाकरितां ज्याचें कार्य श्रेष्ठ होईल अशा पांच विषयांत देत असतात. ते विषय पदार्थविज्ञान [फिजिक], रसायनशास्त्र, इंद्रियविज्ञान किंवा वैद्यशास्त्र, वाङ्मय व शांतताप्रचार हे होत केव्हां एकाच विषयांत दोघानां बक्षिसें द्यावीं लागल्यास ठरलेल्या बक्षिसांची रक्कम दोघानां देण्यांत येते. यांत स्त्रीपुरुष हा भेदभाव नाहीं. कोणालाही हीं बक्षिसें मिळवितां येतात. वाङ्मयाविषयीं मात्र असा नियम आहे कीं, मूळ पुस्तक जगांतील कोणत्याही भाषेंत प्रसिद्ध झाल्यास हरकत नाहीं. मात्र त्याचा अनुवाद युरोपांतील कोणत्याही एका भाषेंत झालेला असावा. स्वीडनमधील आकाडेमी आफ लीटरेचर या साहित्य परिषदेकडे साहित्यांतील बक्षिसें निवडण्याचें कार्य असतें. आल्फ्रेड नोबेल हे १८९६ मध्यें वारले. त्यानंतर पांच वर्षानीं ह्मणजे १९०१ सालापासून हीं बक्षिसें देण्यास सुरवात झाली. तेव्हांपासून ज्या ज्या साहित्य सेवकानां हीं बक्षिसें मिळालीं त्यांचीं नांवें खालीं दिलेलीं आहेत.

१९०१ Sully Prudhomme सुली प्रुदोमे. या फ्रेंच कवीचा काव्यसंग्रह फ्रेंच साहित्यांत अतिशय श्रेष्ठ प्रतीचा आहे. जन्म १८३९ मृत्यु १९०३.

१९०२ Theodore Mommsen थीओडोर मोमसेन. इतिहासज्ञानां या लेखकाचें नांव माहीत आहेच. यानीं लिहिलेला 'रोम साम्राज्याचा इतिहास' जगांत एक श्रेष्ठ इतिहास असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. पांडित्य व कवित्व यांचा एकत्रपणा केवळ याच इतिहासांत दिसून येतो. जन्म १८१९ मृत्यु १९०३.

१९०३ Bjohrnsterne Bjohrnson बोर्नस्टोन बोर्नसेन. हे नार्वेयेथील ग्रंथकार, श्रेष्ठ कवी, नाट्यकार व कादंबरीकार होत. शिवाय लहान लहान गोष्टी लिहिण्यांत याचा हातखंडा असे. तसेंच यांचें अभिनयामध्येंही बरेंच नैपुण्य होतें. आपल्या आयुष्यांतील बरींच वर्षे यांनीं नार्वें मधील नाट्यशाळेंत अध्यक्षपदावर घालविलीं. असाधारण बुद्धिमत्तेमुळें यानीं राजकीय क्षेत्रांत सुद्धां बरेंच नांव मिळविलें यानीं रचलेलें राष्ट्रगीत 'ला मार्सेयर' या फ्रेंच राष्ट्रगीतासारखें अपूर्व आहे. जन्म १८३२ मृत्यु १९१०

१९०४ Fredric Mistral फ्रडरिक मिस्ट्राल व जोसे एकगारे Jose Echegaray मिस्ट्राल यांची जन्मभूमि फ्रांसमधील Provence देश. यानीं त्या देशांतील प्रादेशिक भाषेंतील साहित्याच्या पुनर्जीवनाकरतां एक काव्यग्रंथ लिहिला. या ग्रंथाच्या अपूर्व रचनेमुळेंच मिस्ट्रालचें नांव सर्वतोमुखी झालें. या शिवाय त्यानें गोष्टी व कादंबऱ्या लिहून प्रोवेन्सल साहित्याचें स्थान उच्चत्वास नेलें. जन्म १८३०

एकगारे हा स्पेनमधील श्रेष्ठ नाटककार जन्म १९३२

१९०५ Henryk Sinkiewiez हेनरीक शिंकिविच. हे जातीनें पोल असून यानीं कुओभाडिसे-या नावांनीं एक जगविख्यात कादंबरी लिहिली. जन्म १८४६.

१९०६ Giosue Carducci ग्रियासुये कार्दुची. हे इटालींतील कवि व पंडीत. यांच्या 'बयतान' कवितांनीं इटालियन साहित्यक्षेत्रांत अतिशय उच्चस्थान पटकावलें आहे. जन्म १८३६ मृत्यु १९०७.

१९०७ Rudiard Kipling रुडियार्ड किपलिंग. जातीनें इंग्लिश. जन्म मुंबई. इंग्लंडचा लोकप्रिय कवि. ब्रिटिश इंपेरीयलिझम अथवा साम्राज्यवादाचा मुख्य पुरस्कर्ता. जन्म १८६५.

१९०८ Rudolf Euken रुदोल्फ येउकेन. जातीनें जर्मन, याच्या साहित्य व दर्शन या विषयाचा प्रसार [illegible] धर्म करणारा युरोपमध्यें दुसरा मिळेल कीं काय शंका आहे. हे जेना विश्वविद्यालयांतील दर्शन शास्त्राचे अध्यापक आहेत, याची लिहिलेल्या पुस्तकांची युरोपमधी[illegible] यांनीं [illegible] पुष्कळ

भाषांतु भाषांतरें झालेलीं आहेत.

१९०९ Selma Lagerlof सेलमा लेजरलाफ स्त्री. स्वीडनमधील असाधारण प्रतिभासंपन्न श्रेष्ठ कादंबरीकर्ती. जन्म १८५८

१९१० Paul Heyse पाऊल हेअसी. जर्मन कादंबरीकार व जर्मन साहित्यामध्यें लहान लहान चटकदार गोष्टी लिहिणारा.

१९११ Maurice Mauterlinek मारिस मेटरलींक. जातीनें बेल्जन नाट्यकार व दार्शनिक आधुनिक युरोपखंडामध्यें ह्या ग्रंथकाराचें स्थान सर्वोच्चावर आहे. दार्शनिक निबंध लिहिण्यांत ह्यांचा हातखंडा आहे. जन्म १८६२

१९१२ Gerhart Hauptman जेरहार्ट हाप्टम्यान. आधुनिक जर्मनींतील श्रेष्ठ नाटककार. युरोपखंडांतील एकंदर समाजाचें अंतरंग यानीं नाटकांत दाखविलें. हे स्वीडनमधील विख्यात ग्रंथकार व नाटककार इब्सेन यांचे शिष्य. जन्म १८६२

१९१३ कविसम्राट रविंद्रनाथ टागोर यांच्या गीतांजलि काव्याच्या प्रती थोड्याच मुदतींत युरोपमध्यें लक्षावधी खपल्या.

यंदा साहित्यांतील बक्षिस बंगालमधील बाबू शरतचंद्र चटर्जी यानां मिळण्याचा बराच संभव आहे, असें पोर्तुगीज दैनिकांमधून प्रसिद्ध झालेलें आहे. बाबू शरतचंद्र हे बंगाली भाषेंतील श्रेष्ठ कादंबरीकार आहेत. त्यानें बंगाली भाषेंत २५-३० लहानमोठ्या कादंबऱ्या लिहिलेल्या असून त्यांतील कांहींचीं हिंदी वगैरे भाषेंत भाषांतरें झालेलीं आहेत. यंदा त्यानां कलकत्ता विश्वविद्यालयाचें जगत्तारिणी हें सुवर्णपदक मिळालेलें आहे. हें पदक सर आशुतोष मुकर्जी यानीं आपल्या आईच्या नावानें ठेविलें असून बंगाली भाषेंतील श्रेष्ठ साहित्यसेवकाना यथाक्रम देण्यांत येणारं आहे. गेल्या सालीं कविसम्राट रविंद्रनाथ टागोर यानां तें मिळालें होतें. यंदाचें साहित्यविषयक नोबल प्राइज यानां मिळाल्यास बंगाली भाषेबरोबरच हिंदुस्थानचें नांव उज्वल होईल यांत शंका नाहीं. ईश्वर करो आणि या भारतभूमीचें नांव पूर्वीप्रमाणेंच उज्वल होवो.

के. भारती.

साहित्यबक्षिसाचा निकाल होऊन तें W. B. Yeats या आयरिश कवीला देण्यांत आलें.

सं. भारत.

स्वीकार व सत्कार

मौजेचा दिवाळी अंक.

हा एक मौजेचा क्रांतिकारक चमत्कार आहे. अश्रुतपूर्व चढाओढीनें मौज आपल्या वाचकांची फौज मोटार गतीनें वाढवीत असल्याचें पाहून कोणत्या साहित्य भक्ताला मौजेचें चोज वाटणार नाहीं. मौजेच्या बळकट चिकाटीच्या खटपटीनें कसलीहि निराशा लटपट कांपून चटचट पावलांनीं आल्या वाटेनें नीट पोबारा करील, यांत शंका नाहीं.

शाबास, गद्रे, शाबास तुमच्या मौजेची!

इस्लामी धर्म, सातारा, तरुण भंडारी, उदय, इत्यादि नियतकालिकांचा आभार स्वीकार करितों.

शेंडी.

[लेखक—शिवदास, पणजी]

जगांत कांहीं व्यक्ति, समाज, देश असे असतात कीं, दुसऱ्या व्यक्तीची, समाजाची, राष्ट्राची उन्नति होत असलेली पाहिली कीं, मत्सरानें त्यांचे 'डोळे फुटायाला' लागतात प्रत्यक्ष भाऊ सुद्धां भावाचा उत्कर्ष पाहून, असुयेनें प्रेरित होऊन, स्वतः नुकसान सोसून आपल्या सहोदराचा प्रगतिमार्ग खुंटविण्याचा पयत्न करीत असतो. स्वतःच्या क्षुल्लक फायद्यासाठीं तरत्याला मारून व चढत्याला पाडून राक्षसी आनंद भोगणारे राक्षसीमहत्वाकांक्षी, स्वार्थांध व्यक्ति किंवा समाज जर कुणाला पहावयाचे असतील, तर आमच्या गोमांतकांत तावडतोव दिसतील.

सन १९१० सालीं उगवलेल्या शेंडे नक्षत्रानें अन्यायी पोर्तुगीज राजसत्तेचा बळी पाडून, 'स्वतंत्र स्वराज्याची'स्थापना केली व आपल्या शेंडीभाईंच्या उन्नतीचा प्रभातकाल सुरू केला. तेव्हांपासून शेंडी पकडली गेल्यामुळें हतवीर्य झालेल्या हिंदुसमाजानें शेंडी झाडून, प्रगतिपथ आक्रमिण्यास सुरवात केल्यामुळें, चारशें वर्षांमागें भाकरीच्या तुकड्यासाठीं शेंडी गहाण ठेऊन त्यावर 'सुखाचा संसार' करणाऱ्या व स्वतःच्याच भाईबंदांची शेंडी हवी तशी हालवून त्यांस सदोदीत गुलामगिरींत गाडण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या लांडेभाईंचा, शेंडी सुटून स्वतंत्र झालेल्या शेंडीवाल्यांचा दिवसेंदिवस होणारा उत्कर्ष पाहून जळफळाट उडाला यांत नवल तें कसलें ?

चारशें वर्षांमागील पोर्तुगीजांच्या धर्मसमीक्षण सभेच्या बाटाबाटीला 'हातावैल्या पोटाचे' गरीब शूद्र लोक बळी पडले. मुख्यत्वें करून खालच्या मजूर वर्गाची, अशिक्षित शूद्र समाजाची धर्मावर अंधश्रद्धा असते. यामुळें नेटानें धांवणाऱ्या चेंडूस जरासा अडथळा झाला, म्हणजे तो जसा आल्या दिशेवर तुटून पडतो त्या प्रमाणें त्यावेळचे अडाणी शूद्र लोक सां फ्रांसिस्काच्या 'पिंजरीचो बुको' करणाऱ्या मिलाग्रींस बळी पडून, धर्मान्तर करून आपल्या पूर्वींच्या आर्य, सनातन, धर्मावर तुटून पडले. व अनधिकारी व्यक्तींच्या हातांत थोडीशी सत्ता आली म्हणजे तो जसा श्रेष्ठ, सज्जन व्यक्तींना त्राहि: भगवान करून सोडतो त्या प्रमाणें त्यानीं हिंदु लोकांची, त्यांच्या घरादारांची, धर्माची, देवालयाची खिति करून सोडिली. त्याच लांडेभाईंचे सध्या मोकाट पसरलेले नेटीव खिश्चन हे वंशज होत व परिस्थितीशीं झगडून स्वत्व राखून राहिलेल्या श्रेष्ठांचे आतां हळुहळू डोकावूं लागलेले हिंदु हे वंशज होत.

जगाच्या व्यवहारांत आपणांस असें दिसून येतें कीं, आपल्या कळपांतून बदकाचें पिलूं आपल्या जातिधर्माप्रमाणें पाण्यांत पोहणीस पडलें म्हणजे त्याच्या सहवासांतील कोंबडीच्या पिलांचा आश्चर्यानें व भीतीनें सारखा किलबिलाट सुरू होतो. या जगाच्या संसारांतील पक्षांच्या उदाहरणाप्रमाणें, असामान्य बुद्धिमत्तेच्या जोरावर प्रतिरोधी परिस्थितीशीं टक्कर देऊन शेंडीवाल्यांची शेंडी प्रत्येक ऑफिसमध्यें झळकूं लागलेली दिसतांच, विनशेंड्या कोंबड्याच्या द्वेषानें व मत्सरानें अंगाचा तीळपापड उडाला आहे. यांचीं प्रत्यक्ष उदाहरणें म्हणजे प्रोफेसरकीच्या जागांसाठीं चाललेले झगडे हीं होत.

पणजीच्या लिसेव सेंत्रालमध्यें प्रत्येक वर्षांच्या आरंभीं कामचलाऊ प्रोफेसरांसाठीं एक दुकुमेंताल कोंकुर्स उघडत असतो. यंदा या जागांसाठीं दोन हिंदु उमेदवार उभे राहीले होते, परंतु सत्ताधारी लांडेभाईंच्या शेंडी द्वेषामुळें लायकी असतानां सुद्धां १० जागांपैकीं एकही जागा वरील हिंदूंस मिळाली नाहीं, पण कायद्याची कडक मनाई असतानां (कोणत्याही मिलिटरी मनुष्यास सरकारी नोकरीवर तीन महिन्यापेक्षां जास्ती मुदतीस नेमतां येत नाहीं) व ती तीन महिन्याची नेमणूक लायक इसम न मिळाल्यास करावी. असें असतां सध्या तीन मिलिटरी आफीसर्स आज ७ महिने काम चालवीत आहेत. मिलिटरी व इतर सरकारी नोकर यांची भरती केली. व एका कमलायक मनुष्याची, प्रो. मेसियस गोमीस या इंग्लिश भाषेच्या खास प्रोफेसरास फ्रेंच भाषेचे तास देऊन भरती करून घेतली. कां ? तर सत्ता हातीं असल्यामुळें पाहिजे त्या व्यक्तीला कारभारांत योग्य ढवळाढवळ करून, लायक मनुष्यास मागें सारून अंदाधुंदीचा दरबार चालवितां येतो म्हणून !

दुसरें उदाहरण म्हापसें व मडगांव येथील खालीं झालेल्या प्रोफेसरकीच्या २ जागांकरितां उघडलेला कोंकुर्स, हें होय. यांतहि वरील दोन उमेदवारांतील एक उमेदवार परीक्षेस बसला. निरनिराळ्या तीन विषयांमध्यें यानें एकट्यानेंच उत्तम परीक्षा दिली, पण निकाल जाहीर होऊन सर्व नापास ठरले. लायकाला मागें सारून नालायकास पास केलें असतें तर अन्यायाचा अतिरेक झाला असता. [असेंहि झालें असतें पण परीक्षकामध्यें थोडीशी सत्याची चाड बाळगिणारे दोन गोरे होते.] त्यापेक्षां कडक निकाल लावला हें चांगलें.

पण न्याय देवता ही गोष्ट विलक्षण वाटते. आज तीन वर्षें वरील तीन उमेदवारापैकीं २ नेटीव उमेदवार त्याच जाग्यांवर काम करीत आहेत व तिसरा हिंदू उमेदवार गतवर्षी लिसेव सेंत्रालांत ७ व्या वर्षांच्या विद्यार्थांस उत्तम प्रकारें शिकवीत होता. तेच इसम २० पैकीं ६ सुद्धां मार्क न मिळाल्यामुळें नालायक ठरतात. नालायक तर तीन वर्षें त्यानीं काय शिक्षण दिलें. या प्रश्नाचा उलगडा कोणी करील काय ? याचें कारण, मला असें वाटतें कीं, एक शेंडी; एक शेंडीवाला प्रोफेसर झाला असता व ही गोष्ट त्यांना नको. पण ! शेजे वाईनें कोंबडें झांकलें म्हणून उजाडावयाचें थोडेंच रहाणार आहे. ठांसलेली दारू जशी दुप्पट नेटानें उसळते तशी ही शेंडीवाल्यांची कांहीं कालानें सर्वसंचारी होऊन बिन शेंड्यांचे डोकीवर खाशीनें मिरवणार !

ANUNCIOS

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2 ° oficio que este assina correm editos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos do § 2 ° do art- 197 do Cod. do Proc Civ. citando os articulados Baguem e seu marido Xencora Babagi Naique Gauncar vulgo Biungi moradores em Redi, parte incerta da India Britanica, para uma habilitação activa deduzida por Gunam Govinda Xete Dessai e mulher Xantabai de Cuncolim contra os citandos e outros por apenso aos autos do inventario orfanologico que Dotu Utoma Rauto de Assoldá presta por obito de Essó Rauto que foi da dita e pela qual pretendem os mesmos Gunam e mulher habilitar a Mogá Sauntina, casada com Pursó Panduronga Saunto por outro nome Purxotoma Saunto, moradores em Karwar da India Ingleza como uma das herdeiras do seu avó Govinda Rauto e os mésmos articulantes como representantes daquela Moga na qualidade de cessionarios que sao, e para no praso de tres audiencias posteriores á acusação da citação que ha de ser na 2a. findo o praso de editos contestarem querendo a mesma habilitação As audiencias deste juizo se fazem em todas as terças ou sextas-feiras ou nos dias imediatos quando aqueles forem feriados ou estejam compreendidos nas fereas nao o sendo tambem estes no tribuual judicial situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a Curchodem ás doze horas. Para ser publico se expediu este.

Xeldem da Comarca de Quepem, 13 de Novembro de 1923

O escrivão de Direito
Alves Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
A. A de Brito e Nascimento

Pelo juizo de Dereito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Redcar, correm editos de 30 dias a contar do dia da segunda publicação deste, citando a Miguel Xavier d'Aguiar de Avedem, residente em Sernabatim e ora auente em Bomabim, em parte ncerta para assistir a todos ose termos até final do inventario orfanologico á que se procede por obito de Amalina Fernandes que foi de Avedem, sem prejuizo do seu regular andamento. O que para ser publico se expediu este. Xeldem 4 de outubro de 1923.

O escrivão de Direito 2
Babu V. Camotim Redcar
Verifiquei
O Juiz de Direito 1 ° Substituto.
Baptista Gomes

(2 vez)

divertia-nos, tambem, imenso pelo seu fino acrobatismo de saber *puxar sardinha a' braza.*

Um medico que assistiu ao estertor de suas agonias afirma-nos que a morte do *nunca assaz chorado* infeliz foi originada pelo *babismo*, agravado pelo *salamismo* e outros *ismos* que muito se relacionam com a conhecida enfermidade que se chama *egoismo*.

Paz a' alma do extincto e socego aos seus afamados director e secretario!

Em Dabal

Um consideravel numero dos habitantes hindus da aldeia Dabal do concelho de Sanguem esteve na nossa Redacçao, queixando-se nos de que estao, desde muito, sendo victimas da devastaçao dos porcos as suas culturas de bananeiras, batatas e outras congeneres.

Conhecemos a aldeia Dabal e sabemos que os seus primitivos habitantes vivem, apenas, da agricultura a que se entregam de corpo e alma.

Ora, o porco sem ser montez e' um serio e constante perigo a' agricultura a despeito das tais sebes que cedem a' menor registencia do seu INVULNERAVEL focinho.

A' resoluçao do sr. Comandante da Policia de Sanguem oferecemos o presente assunto, na certeza de que Sua Excia, pelo seu criterio justo e recto se dignara' de cortar o mal de raiz.

वर्तमानसार

—भारतसंपादकांवर आणखी एक नवीन खटला उभारण्यांत आला असून, जुन्या ह्मणजे ५ व्या खटल्याची सुनावणी लवकरच होणार आहे.

—सांगें तालुक्यांतील जंगल खात्यांत गडबड उडाल्याची बोलवा आहे. काय असेल तें समजेलच.

—डॉ० लंवदे यांचा नारोटी येथें सन्मान करण्यांत आल्याबद्दल, डॉक्टरसाहेबांचें आम्हीं अभिनंदन करितों.

—मडगावांतील प्लेगच्या उंदरांचें प्रमाण आतां कमी आहे.

—ऐनवेळीं पावसानें दगा दिल्याबद्दल शेतकरी वर्ग अगदीं त्रासून गेला आहे.

—येथील जुने जज्ज दो. मानुयेल दे काद्रुस यांची नेमणूक दमण येथें झाली आहे.

—ग्रामसंस्थांच्या परीक्षेस सर्व तालुक्यांतील मुलकी खात्यांत देणें नसल्याबद्दल पुरावा मागितला जात असे. या पुढें उमेदवाराच्या तालुक्याच्या मुलकी खात्याचेंच 'सेर्तीदांव' दाखविलें ह्मणजे काम भागेल, असें सरकारी बोलेतीवर प्रसिद्ध झालें आहे.

—सरकारी नोकरांचे सहा सहा महिन्याचे पगार थकले असून, या पुढें बंकांतून एक रैसहि त्यांना दिला जाणार नाहीं, असें प्रसिद्ध झालें आहे. सरकारी दिवाळें वाजलें!

भारत

गुरुवार मार्गशीर्ष, शु० ६ शी १८४५

प्रागतिक संघाची परिषद.

प्रागतिक संघाच्या या परिषदेपुढें कोणकोणते विषय चर्चेस येण्यासारखे आहेत त्याचें विवेचन आज आह्मी करणार आहों. प्रागतिक संघाची स्थापना होऊन आज जवळ जवळ अडीच वर्षें झालीं; परंतु अद्याप तिची कायम ह्मणण्यासारखी घटना झालेली नाहीं. जी कांहीं आहे ती, केवळ कामचलाऊ स्वरूपाची अशीच आहे. येत्या परिषदेंत बहुमतानें तीच जर पास झाली तर मग तिला कायम समजण्यांत येईल. त्याचप्रमाणें संघाचें ध्येय काय असावें या बद्दलची चर्चा याच परिषदेंत होऊन नंतर त्या ध्येयास पोषाक अशा साधनांचाहि विचार होणार आहे. आमच्या मतें परिषदेचें अंतिम ध्येय आजच ठरवितां येण्यासारखें नाहीं. तरीपण हिंदुसमाजाची राजकीय सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक वगैरे सर्व बाजूनीं उन्नति होऊन तो इतर ख्रिस्ती, मुसलमान, पार्शी समाजाच्या खांद्यास खांदा लावून, पोर्तुगीज रेपुब्लिकच्या निशाणाखालीं, पूर्ण स्वयंसत्ताक राज्यपद्धतीचा उपभोग घेण्यास पात्र होईल. ऐवढ्यापुरतें, सध्यातरी असलें पाहिजे हें विचाराअंती कोणासहि दिसून येईल. ध्येय ठरलें ह्मणजे त्या ध्येयाजवळ नेणाऱ्या साधनाची गरज आहे. अशीं साधनें पुष्कळ असतील, परंतु त्या सर्वांत शिक्षणाला अग्रस्थान दिलें पाहिजे. सध्या आमचा समाज घेत असलेलें प्राथमिक शिक्षण मराठी भाषेंतून असल्यामुळें कांहीं अंशीं पद्धतशीर नसतें. कारण त्या बाबतींत होत असलेले प्रयत्न खासगी स्वरूपाचे असतात. वरून त्या शिक्षणाचा एकमेकांशीं मेळ बसावा तसा बसत नाहीं. त्या पुढील शिक्षण सर्वस्वी परकी अशा पोर्तुगीज भाषेंत मिळत असल्यामुळें तें, अपुरें, तुटपुंजें व लहानपणींच विद्यार्थ्यांची बुद्धि खुरडून टाकणारे असतें. ह्मणून गांवोगांव प्राथमिक शिक्षणाच्या मराठी शाळा सरकारी आश्रयानें स्थापन झाल्या पाहिजेत. सध्याचे गव्हर्नरसाहेबानीं शिक्षणासंबंधीचें बिल कायदेमंडळांत आणलें होतें, त्यावेळीं त्यांत मराठी शाळांची तरतूद करण्यांत यावी ह्मणून, हिंदुसमाजाकडून जी चळवळ झाली तीस मान देऊन त्यांत कांहीं मराठी शाळांचा अंतर्भाव करण्यांत आल्यानंतर मग बिल पास झालें व वरिष्ठ सरकारच्या मंजुरीसाठीं पोर्तुगालला रवाना झालें, तें अद्याप तेथेंच भिजत पडलें आहे. तेव्हां त्या शाळा किती असाव्या, कोठें स्थापन व्हाव्या, त्यांत देण्यांत येईल तें शिक्षण कोणत्या धर्तीवर असावें यांचा विचार परिषदेनेंच केला पाहिजे. शिवाय मराठी भाषेची व्याप्ति प्राथमिक शिक्षणा पुरतीच न रहातां तिला लिसेव सेंत्राल, नोर्माल स्कूल, इंस्तितुत कोमेर्सियाल, या दुय्यम शिक्षणाच्या शाळांतूनहि देशी भाषेच्या नात्यानें हक्काचें आसन मिळविण्याची आणि आज मराठी भाषाभिज्ञांस जो निवडणुकीचा हक्क नाहीं तोहि मिळवून घेण्याची तजवीज परिषदेनेंच करणें प्राप्त आहे.

मराठी भाषा ही आह्मां अर्ध्याअधिक लोकसंख्येनें असलेल्या हिंदूंची मातृभाषा आहे. आमचें धार्मिक वगैरे सर्व प्रकारचें वाङ्मय त्या भाषेंत भरून राहिलें आहे. खासगी व्यवहारांत आमची बोली कोंकणी अशी दिसते असली तरी ती मराठीचेंच एक प्राकृत व जुनें स्वरूप आहे शिवाय मराठी भाषा बोलणाऱ्या दोन कोटी लोकांशीं आमचें धार्मिक, राजकीय, औद्योगिक, शैक्षणिक वगैरे संबंध निगडित झालेले आहेत. व ते केव्हांहि तोडतां येणें शक्य नाहीं हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. मातृभाषेंत मिळालेलें शिक्षण आईच्या दुधासारखें असून, परभाषेंत, मिळालेलें शिक्षण दाईच्या दुधाच्या देखील किंमतीचें नसून स्वत्वाची हानि करणारें आहे. कोणतेंहि सुधारलेलें राष्ट्र परदेशी भाषेंतून, आपल्या मुलानां शिक्षण देण्यास कबूल होणार नाहीं. पराधीनतेमुळें आह्मीं आजवर हेळसांड केली, त्याचा वचपा भरून काढण्यांस आजच्या या स्वतंत्रतेच्या, स्वयंनिर्णयाच्या काळांत आह्मास राजरोस मुभा आहे. शेजारच्या इंग्रजी हिंदुस्थानांतील प्राथमिक शिक्षण, त्या त्या प्रांतांत चालू असलेल्या देशी भाषांतूनच देण्यांत येत असतें. इतकेंच नव्हे तर, तेथील तज्ञांच्या मागणीवरून युनिव्हर्सिट्यांतून देखील देशी भाषांचा अधिकारानें प्रवेश झाला आहे या सर्व विवेचनावरून मराठी भाषेंतून शिक्षण मिळविण्यांस आम्हीं किती जोरदार व संघटित चळवळ केली पाहिजे हें दिसून येईल व हा प्रश्न सोडविणें प्रा० संघानें हातीं घेणें किती अगत्याचें आहे हेंहि कळून येईल.

मराठी शाळांच्या नावांवर सरकार आज हजारो रुपये खर्च करीत असतें याबद्दल वाद नाहीं; परंतु उपयोगाच्या दृष्टीनें त्या शाळा वांझोट्याच ठरल्या आहेत. याचें कारण राजदरबारांत त्या भाषेला मान नाहीं हें होय. आपण रेजिस्त सिव्हिलखात्यांत गेलों तर मराठी सही घालतां येत असून सुधां निरक्षरतेचा छाप कपाळावर मारून घ्यावा लागून आपल्या तर्फे तिसरा साक्षीदार, पोर्तुगीज सही जाणणारा, बोलवावा लागतो. कोणत्याही निवडणुकांच्या प्रसंगीं उमेदवार प्रतिनिधीच्या गुणावगुणाचें माप काढण्याचें ज्ञान असतानां आमच्यांतील बऱ्याच विचारी लोकांनां मतदारीस मुकावें लागतें. तावेलियावांच्या कचेरींत गेलों व मराठी सहीची ओळख पटवून मागितली तर केवळ तावेलियांव मराठी भाषेंत किंवा लिपींत अनभिज्ञ ह्मणून बरोबर दोघे साक्षीदार न्यावे लागून शिवाय तिप्पट फीचा भुर्दंड भरावा लागतो. ही आमच्या भाषेची दैना, होईल तितक्या लवकर संपली नाहीं तर आमची उन्नति होणें कदापिहि शक्य नाहीं हें समजून आह्मीं आमचें पाऊल उचललें पाहिजे.

मराठी भाषाभिज्ञांस निवडणुकांत भाग घेतां येत नसल्यानें आमचें राजकीय बळ किती खच्ची झालें आहे व त्यामुळें कायदेमंडळांतील लोकनियुक्त सभासद आणि सेनेट सभा व पार्लमेंटसभा यांत आमच्या तर्फे जाणारे प्रतिनिधी आह्मांकडे किती दुर्लक्ष करतात याची जाणीव फारच थोड्यांना असेल. आमच्या गरजा भागवून घेण्यास आधीं आमचें राजकीय बळ जो मतदारवर्ग; त्याची वाढ होण्यास मराठी भाषाभिज्ञास मताधिकार मिळवून घेतला पाहिजे. कायदेमंडळाचे सभासद ना. व्यंकटेशराव सरदेसाई यानीं मागें एक बिल आणून पास करून घेतलें होतें. तेंहि पोर्तुगालला जाऊन घोरत पडलें आहे. त्यास हालवून जागें करण्यास परिषदेपुढेंच तो प्रश्न आणून सोडविला पाहिजे.

शिक्षण व मतदारी यांच्या बरोबरीनेंच गोरक्षण हाहि एक विषय हिंदूंच्या जिव्हाळ्याचा आहे. व तो हातीं घेऊन तडीस लावणें यांतच हिंदुसमाजाचा धर्माभिमान दिसून येणार आहे. फक्त गोमांतकापुरतेंच पाहिलें तर वर्षाच्या कांठीं ५० ६० हजार गुरांचा कसायांकडून संहार होत असतो. यांत हिंदु जनतेच्या धर्मभावना दुखवल्या जातील, लोक दुधदुभत्यास महाग होतील किंवा गुरांवांचून शेती पडीत राहील, ही कल्पना गोमांसास चटावलेल्या ख्रिस्ती समाजांतील कांहीं पाश्चातलेल्या गृहस्थांच्या आणि सरकारच्या लक्ष्यांत सुद्धां येत नाहीं. हें आमचें दुर्दैव तर खरेंच पण, त्याहीपेक्षां आमची मूकवृत्तीच बहुतांशीं कारण झाली आहे. कोंग्रेस प्रोव्हिंसिआलच्या शेंवटल्या बैठकींत गोरक्षणावर लांबलचक ठराव पास झाला असला तरी, तो आचरणांत आणण्याइतकें महत्व सरकार व ख्रिस्ती लोक आम्हांस देत नाहींत. हें लक्षांत आणून परिषदेपुढेंच हाहि प्रश्न यावयास पाहिजे.

प्रागतिक संघानें किंवा प्रागतिक संघाच्या सभासदानीं निवडणुकांत भाग घेणें अत्यावश्यक आहे. आज कायदेमंडळ, सेनेट सभा, पार्लमेंट सभा, यांत आमच्या वतीनें झगडणारे सभासद, आम्हीं निवडणुकांत भाग घेतल्याशिवाय, मिळणार नाहींत. आणि जर करितां प्रागतिक संघाच्या तर्फेनें जाणाऱ्या, आमच्या मागण्यांचा उच्चार, आचार व पुरस्कार त्या त्या लोकसंस्थांतून झाला पाहिजे तर प्रागतिक संघानें ह्मणजे संघाच्या सभासदानीं निवडणुकांत सामील होऊन आपणास मदत करतील अशा उमेदवारांसच निवडून दिलें पाहिजे. आतां स्थानिक ह्मणजे जुंत लोकालें व मुनिसिपालिड्या यांच्या

लेकांचीं कृष्णकृत्यें अशींच चालूं दिलीं तर आपला समाज हल्लीं पेक्षांहि ज्यास्त अधोगतीला गेल्याशिवाय रहाणार नाहीं. त्यांचीं कृत्यें वेळींच चवाठ्या वर आणलीं पाहिजेत. ह्मा करतां तरुण बंधूनो आपला समाज आपला देश यांच्या उन्नतीकरतां आपण हें कार्य हातीं घेणें जरूर आहे. ज्या समाजांत आपण जन्माला आलों त्या समाजाची सेवा करणें हेंच 'आमचें कर्तव्य' होय. ह्या करतां समाजसेवा विषयक संस्था काढून त्या द्वारा प्रयत्न करण्याविषयीं आपणास कळकळीची विनंति आहे. प्रथमत: आपणास या व्यसनीं मंडळीकडून बराच त्रास होण्याचा संभव आहे; परंतु सोन्याची परीक्षा मुशींत घातल्याशिवाय होत नाहीं. हें आपणास माहीत आहेच. तेंव्हां तरुण बांधवानो—

फिर अपनेको याद करो
उठो अलौकिक भाव भरो
तुमको उसे सुनाना है
सबको यह बतलाना है
हुयेंनहीं तुम मरनेको
आये हो कुछ करनेको

भारत सेवक

ANUNCIOS

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2° oficio que este assina correm editos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos do § 2° do art. 197 do Cod. do Proc Civ. citando os articulados Baguem e seu marido Xencora Babagi Naique Gauncâr vulgo Biungi moradores em Redi, par te incerta da India Britanica, para uma habilitação activa deduzida por Gunam Govinda Xete Dessai e mulher Xantabai de Cuncolim contra os citandos e outros por apenso aos autos do inventario orfanologico que Dotu Utoma Rauto de Assoldá presta por obito de Essó Rauto que foi da dita e pela qual pretendem os mesmos Gunam e mulher habilitar a Mogá Sauntina, casada com Pursó Panduronga Saunto por outro nome Purxotoma Saunto, moradores em Karwar da India Ingleza como uma das herdeiras do seu avó Govinda Rauto e os mésmos articulantes como representantes daquela Moga na qualidade de cessionarios que sao, e para no praso de tres audiencias posteriores á acusação da citação que ha de ser na 2a. findo o praso de editos contestarem querendo a mesma habilitação. As audiencias deste juizo se fazem em todas as terças ou sextas-feiras ou nos dias imediatos quando aqueles forem feriados ou estejam compreendidos nas fereas nao o sendo tambem estes no tribuual judicial situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a Curchcdem ás doze horas. Para ser publico se expediu este.

Xeldem da Comarcã de Quepem, 23 de Novembro de 1923

O escrivão de Direito
Aires Manuel Barreto 1
2 vez) Verifiquei
O Juiz de Direito
A. A de Brito e Nascimento

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2° oficio, vão ser vendidos em hasta judicial á porta do tribunal do juizo situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a Curchorem, no dia 11 do seguinte mez de Janeiro, ás 13 horas e pelo preço superior ao da avaliação, os seguintes bens: — Direito a ⅙ da 1.a adição do predio Cungelem vangana, compreendendo varzea, palmar e oiteiro, si to em Quepem e direito a ⅙ do predio Benó, da cultura de coqueiros, sito em Cusmane, discritos na Conservatoria do registo predial desta comarca sob n.os 439 a 440 respectivamente e avaliados cada um em 300 rupias, penhorados nos autos de execução de sentença que José Francisco Fernandes de Margao, como cessionario de Tertuliano Exaltação de Santa Cruz Rebelo de Vernã promove no juizo de Salsete contra Visuum Sinai Contoco e mulher residentes em Aquem Sao por este citados todos os credores incertos dos ditos executados, os herdeiros do credor inscrito falecido José Caitano de Faria de Vernã a cujo favor se acham registadas duas hipotecas, sendo uma de 1250 rupias do capital constante da inscriçao n° 626 a fl. 195 do livro C 3 e outra de 207 : 04 : 08 de juros constantes da inscriçao n° 717 a fl 295 do livro C 3, os comproprietarios e quinhoeiros para assistirem e deduzirem os seus direitos nos termos de lei. A contribuiçao de registo por inteiro e as despezas de praça correrao a cargo do arrematante. Para ser publico se expediu este Quepem, 5 de Dezembro de 1923.

O escrivao de direito
Aires Manuel Barreto 2
Verifiquei
O Juizo de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escvivao do 1° ofo. Redcar, vao a praga para venda em hasta publica a' porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem ao lado de estrada nacional que de Quepém se dirige a estaçao de Sanvordem no dia 21 do corrente mez as treze horas, pela segunda vez e por metade do seu valor, os seguintes moveis: Um par de sapatos do vaior de 12 tangas; Um dito de meias do valor de 2 tangas, dois cocos verdes descasoados do valor de 6 reis; Um lenço branco do valor de 9 reis; Uma lata vazia do valor de 9 reis; Uma escova do valor de 6 tangas; Uma faca do valor de 2 tangas; Tres caixas de papel vazias, um carril de linho e um pedaço de renda sem valor; e tres pudvins de borda de seda do valor de 5 : 14 : 0) todos aqueles objectos pertencentes a' queixosa Lucia Va's natural de Karwar e residente em Curchodem, nos autos crimes de querela que o Ministerio Publico nesta comarca promoveu contra Mamod Kan e outros. O arrematante pagara' as despezas da praga alem do prego da mesma dentro de tres dias. O que para ser publico se expediu este. Xeldem 5 de Dezembro de 1923.

O escrivao de direito
Babu V. Camotim Redcar 3
Verifiquei
O juiz ds Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de Direito da cowarca de Quepem e cartorio do escrivao do 1° oficio Redcar vao a praga para a venda em hasta publica a' porta do tribunal judicial desta comarca situada em Xeldem na estrada Nacional que de Quepem se dirige a estaçao de Sanvordem no dia 21 do corrente mez a's 13 horas pela 2a. vez e por metade do seu valor os seguintes bens. 1/18 do predio rustico denominado "Ossolasordo" ou Osselasordo da cultura de arroz avaliado por 75 rupias. 1/13 do predio rustico denominado "Sordo Fondiem" da cultura da arroz avaliado por 100 rupias. 1/18 do predio rustico denominado "Sordo Chindiem ou Chudiem da cultura de arroz avaliado por 200 rupias. 1/18 do predio rustico denominado "Xir," da cultura de eoqueiros avaliado por 75 rupias. 1/18 do predio rustico denominado "Vagredeulacodil" da cultnra de coqueiros avaliado por 100 rupias, 1/18 do predio rustico denominado Porlento Sordo da cultura de arroz avaliado por 75 rupias. 1/18 do predio rustico denomico Golicodil Sordo da cultura de arroz avaliado por 100 rupias, todos situados em Colomba e discritos respectivamente por inteiro na Conservatoria desta comarca sob os nos. 12451. 12452, 12453, 12455, 12456, 12458 e 12459. e penhorados nos autos de execuçao por castas que o Ministerio Publico nesta comarca move a Gopica' Velpina viuva de Fondo Velipo e seus filhos de Cazolsai de Golomba por apenso aos de inventario orfanologico procedido por obito de Fondo' Velipo que foi de Colomba para pagamento da quantia de 81 rupias 12 tangas provinente de custas e selos liquidados nos referidos autos de inventario orfanologico e de custas e selos acressidos da execugao. O arrematante pagara' a contribuigao de registo por inteiro e as despezas da praça alem do prego da mesma dentro de 3 dias. Por este sao citados quaisquer credores incertos e co-proprietarios. O que para ser publico se expediu este. Xeldem 5 de Dezembro de 1923.

O escrivao de Direito
Babu V. Camotim Redcar
Verifiquei 4
O Juiz de Direico
A. A. de Brito e Nascimento

Para ele chamamos a misercordiosa atençao dos nossos correligionarios, na plena certesa de que o secundarao entusiasticamente, concorrendo, desta feita, para, a breve trecho, traduzir em facto a louvavel idea do sr. dr. Va's.

Os hindu's tem, pois, ocasiao de corroborar, mais uma vez, que a caridade e' a indiscutivel carateristica de sua modalidade de ser.

Os passageiros, peregrinos de Goa que vao fazer a sua devoçao em PANDARPUR, NARSOBAVADI, CAXI, etc. no seu regresso para as suas casas sao por determinaçao superior, deixados em observaçao por 24 horas no Posto Sanitario de Colem, para se evitar que sejam portadores dos germens da peste e da colera no nosso territorio. E' uma medida sanitaria que visa a defender o nosso pais de invasoes dessas terriveis pestilencias, e da qual, portanto, se nao pode prescindir a bem da saude e da segurança publicas.

Ora, nota-se da parte destes peregrinos uma grande repugnancia a irem descançar nos pavilhoes quarentenarios do Estado que ficam situados no oiteiro visinho desta localidade, repugnancia que ate' certo ponto se afigura muito natural, dada a situaçao e condiçoes dos referidos pavilhoes. A isto acresce que a maioria deles, sendo muito velhos e nao podendo para la' subir, caem por terra muitas vezes, desmaiados, quer seja por motivo da sua velhice, que por fraqueza organica proveniente de jejuns e fome, o que profundamente mágoa o espirito do signatario como medico inspector e encarregado desse serviço, que se ve na completa impossibilidade de lhes dar a devida acomodaçao, mais acessivel e comada.

Em vista desta circunstancia, que e' muito para ponderar e que nao pode deixar de calar no espirito de todos e mormente no da ilustrada classe hindu em prol daqueles seus irmaos, e tanto para humanizar o serviço sanitario a seu cargo, como a bem publico o signatario pensou em construir uma casa decente para acomodaçao dos referidos peregrinos, em um sitio bom e saudavel desta localidade para que tenham em Colem uma casa propria, sua, higienica e asseiada com agua proxima e com todos os possiveis confortos para o seu descanço apo's as inclemencias da peregrinaçao.

O que e'?

Dizem uns que Jesus Cristo e' *homem* e afirmam outros que *Ele* e' Deus. ¿Quem tem razao?

Se Jesus e' homem, nao se lhes podem atribuir milagres, pela simples razao de que o homem nao os pode fazer.

Se *Ele* e' Deus, nao pode igualmente ser considerado como autor de *milagres*, porque tudo o que emana da ESSENCIA DIVINA e' perfeitamente *natural*, ainda que *inexplicavel* para a inteligencia humana, sempre imperfeita.

O que e', portanto, Jesus Cristo?

E' uma pergunta que se formula para se saber o que ha' de verdadeiro na PESSOA ENDEUSADA de Cristo.

Sobre queda coice ...

O "Diario da Noite" publicou na sua ediçao de 17 a seguinte informaçao:

"Informam-nos da Arcada de que vao ser revistas as Cartas Organicas das nossas provincias ultramarinas, a fim de lhe serem introduzidas profundas alteraçoes, pois que o sr. ministro das colonias esta' na disposiçao de acabar com a autonomia administrativa e financeira daquelas colonias que nao sejam regidas por altos comissariados em vista dessa autonomia nao ter dado o resultado que se esperava tendo contribuido, antes, em grande parte, para a dificil situaçao financeira em que a maioria delas se encontram."

¿Com que, entao, querem acabar com a autonomia por esta ter causado a nossa bancarrota financeira?

Apoiado, sr. Ministro das Colo'nias! Bravo!!

E a supor a gente que a politica "centralisadora e absoluta" fosse o mau sucesso da autonomia.

Fazem bem em tirar-nos a autonomia, porque as suas eleiçoes muita seiva nos comia.

Oh! Que linda poesia!

Adeus, o' legislativa mania!

Um manifesto

O sr. dr. Borcar, encarregado da Direcçao dos trabalhos do Congresso do "Pragatica Sanga" acaba de publicar um manifesto em marata, justificando o passado do "Sanga".

Supomos que com o referido manifesto, nao havera' mais lugar para mal entendidos e ressentimentos.

Ninguem deseja ver-se "encarapitado" no "Sanga" para carregar de dinheiro a sua algibeira ou encher de gloria o seu nome.

¿Ha' quem disto duvide?

Que tome conta da Direcçao do "Sanga" e encargo de felicitar a Patria, que outra coisa nao pensou nunca fazer o seu actual corpo dirigente.

Saibam no todos.

— सारस्वत विद्यालयाच्या शारदोत्सव प्रसंगीं मुलांमुलींनीं केलेल्या संवादांतील हुशारी पाहून विशेषत: चरक्यावर बारीक सूत काढण्यांतील त्यांची प्रगति पाहून मडगांवचे सुप्रसिद्ध सद्गृहस्थ भिकाजी-पंत नारवेंकर यानीं मुलांस पारितोषक म्हणून २५ रु. सेक्रेटरीकडे दिले.

—सदाशिव शे. सुंकटणकर यांस मुरगांवचे मुलकी खात्याचे मुख्याधिकारी नेमण्यांत आलें आहे.

—प्रागतिक संघाच्या परिषदेस निदान २ हजार तरी सभासद जमतील असा अंदाज आहे. परिषदेविषयीं लोकसमुदांत उत्साह वाढत असून ती सर्व तऱ्हेनें यशस्वी होईल अशीं सुचिन्हें दिसत आहेत.

भारत

गुरुवार मार्गशीर्ष शु० १२ शी, १८४५

प्रागतिक संघाची परिषद.

जाहीर पत्रक

आम्हीं आमच्या नं. ३६ च्या अंकांत भाकित केल्याप्रमाणें प्रागतिक संघाच्या परिषदेचें हरएक कामकाज पाहण्यास कार्यकारी कमिटीनें निवडलेले मुखत्यार डॉ० आत्माराम गोविंद बोरकर यांकडून आलें आहे. आम्हांप्रमाणेंच तें इतर सद्गृहस्थांसहि रवाना होणार यांत शंका नाहीं. या पत्रकांत संघ स्थापन झाल्यापासूनची सर्व माहिती थोडक्यांत पण खुलासेवार दिली आहे. ती वाचून, संघाबद्दल व त्यानें होऊं घातलेल्या परिषदेबद्दल आमच्या समाजांत कोणत्याहि मतभेदाला वाव मिळणार नाहीं, अशी आम्हांला खात्री वाटते. केवळ संघानें आरंभिलेलें कार्य यशस्वी व्हावें, परिषदेच्या निमित्तानें संघाची छाप सरकार व इतर समाज यांवर पडावी, या सदिच्छेची छाया या पत्रकांत स्पष्ट उमटलेली दिसते. हें पत्रक प्रसिद्ध करून डॉ० साहेबांनीं दाखविलेलें धोरण संघाचा पाया अधिकाधिक बळकट होण्यास कारणीभूत होइल, असेंच आम्हांप्रमाणेंच संघाच्या सर्व हितचिंतकांना वाटल्यास नवल नाहीं.

पुढील कर्तव्य

कार्यकारी कमिटीचे मुखत्यार या नात्यानें संघाचे उपाध्यक्ष डॉ० बोरकर यानीं उक्त जाहीर पत्रकाच्या द्वारें संघाबद्दलचा खुलासा केलाच आहे. आतां संघाचे सभासद होऊन परिषद यशस्वी करण्याची जबाबदारी सर्व हिंदु समाजावर ओघानेंच आली आहे. जगांत चाललेल्या निरनिराळ्या चळवळींचीं वर्तमानें नित्यश: आमच्या वाचनांत येत असून सुद्धां आम्हीं मात्र मृतावस्थेंतच पडून राहणें संभवनीय नाहीं. क्षणोक्षणीं काळ बदलत आहे. त्याप्रमाणें " न बदलाल तर मरून जाल " या श्री विवेकानंदाच्या उक्तीची आठवण ठेवून, आम्हांसहि शक्त्यनुसार हातपाय हालविल्याशिवाय गत्यंतर नाहीं. मोनार्कींत वारा उलट दिशेनें वाहत होता आतां या रेपुब्लिकांत योग्य दिशेनें वाहत आहे. याचा फायदा घेण्यास यापूर्वींच खटपट करावयास पाहिजे होती; तरी पण एव्हांच जागें होऊन कार्याला लागणें श्रेयस्कर आहे व संघामार्फत भरणारी परिषद त्यास योग्य स्थळ आहे. हें जाणून आमच्या समाजांतील सर्व लहान थोर सुविचारी गृहस्थ कोणत्याहि खासगी मतभेदांस, पक्षभेदांस थारा न देतां, कार्यकारी कमिटीनें आरंभिलेल्या या परिषदेच्या कार्यास हातभार लावण्याचें आपलें "पुढील कर्तव्य" बजावतील अशी आम्हीं आशा बाळगितों.

स्वागत कमिटी

संघाची परिषद फोंडें महालांत भरावयाची असल्यामुळें, स्वागतकमिटींत त्याच महालांतील गृहस्थांची निवड झाली आहे. या कमिटीच्या मागून स्वयंसेवकांची भरती व्हावयाची तीहि तेथेंच होण्यास अडचण नसली तरी आमच्या तरुणवर्गास स्वयंसेवेचें बाळकडूं मिळावें यासाठीं इतर महालांतील तरुणांसहि स्वयंसेवक होण्याची परवानगी असणें इष्ट आहे, असें आम्हांस वाटतें. स्वयंसेवक या नात्यानें परिषदेचें कामकाज जातीनें पाहण्यास मिळून त्या कार्यांतील थोडीतरी कामगिरी अंगावर घेण्याची स्फूर्ति तरुणमंडळींत दिसली तर ती आम्हांस हवी आहे कारण आज स्वयंप्रेरित बुद्धीनें स्वयंसेवा व्रतास वाहून घेणारी पिढीच पुढें पुढारी होण्यास लायक होणार आहे. हा दूरदर्शीपणा परिषदेच्या स्वागतकमिटीकडून दाखविला जाईल यांत संशय नाहीं. परंतु आम्ही आमचें कर्तव्य म्हणून त्या दृष्टीनें विचार करण्याची सूचना करतों.

विद्यार्थी वर्ग

स्वागत कमिटीस सूचना केल्यानंतर विद्यार्थी वर्गाकडेहि वळणें रास्त आहे. या वर्गांत श्रीगणेशाचें अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा देखील समावेश होत असला तरी, स्वयंसेवक होण्याची लायकी मडगांव, म्हापसें व पणजी येथील लिसेवांतील दुय्यम व नोर्माल, इं. कुमेर्सियाल व मेडिकल स्कूल यांतील उच्च शिक्षण घेत असलेल्या प्रौढ विद्यार्थ्यांतच विशेष असूं शकेल. या वर्गानें स्वयंसेवक होण्याची कामगिरी पतकरल्यास सोन्याहून पिवळें होणार आहे. त्यानीं मनावर घेतल्यास त्यांच्या पालकांकडूनहि त्यानां या समाजहितवर्धक कामांत हरकत येणार नाहीं. म्हणून त्यांनाहि या गोष्टीचा विचार करण्याची आग्रहपूर्वक सूचना देऊन ठेवितों. विद्यार्थी वर्गाशिवाय गांवोगांव स्वयंसेवक होण्यास लायक असे तरुण पुष्कळ असतील व आहेत हें आम्हीं जाणून आहों. त्यानींहि या वेळीं अहमहमिकेनें पुढें येऊन स्वयंसेवकांच्या यादींत स्वत:स नोंदून घेऊन संघास मिळतील तितके सभासद मिळविण्याची आद्य कामगिरी व त्यांच्या बरोबर परिषदेस हजर राहून सर्व कामांत स्वागत कमिटीस मदत करण्याची वगैरे हरेक कामगिरी पार पाडून संघाला जोरकस व स्थीर करण्याचें श्रेय घ्यावें आणि जगाला आपल्या जीवंतपणाची साक्ष पटवावी.

—प्रत्येक रुपयाची किं. सात हजार सातशें रेस झाली आहे. यावरून पोर्तुगालच्या संपत्तिक अधोगतीची कल्पना पूर्णपणें करण्यास येईं पडेल!

परिषदेपुढें चर्चेकरितां आणावयाच्या ठरावांची यादी सर्वांच्या माहितीकरितां खालीं देत आहों. या यादींत कोणतेही नवीन ठराव समाविष्ट व्हावे असें ज्यांना वाटेल, त्यांनीं त्या संबंधाचा पत्रव्यवहार शक्य तितक्या पूर्वाभधींत आम्हांकडे करावा अशी विनंति आहे.

पणजी—बुधवार
ता. १९-१२-९२३

आत्माराम गोविंद बोरकर
उपाध्यक्ष प्रा० सं०

यादी

१ रेपुब्लिकचें अभिनंदन. २ संघाची कायम संघटना. ३ मध्यवर्ती मंडळाची निवडणूक. ४ कार्यकारी मंडळाची नेमणूक ५ मुख्य ऑफिसाची जागा व ऑफिस खर्च यांची तजवीज ६ देशभाषेंत शिक्षणाच्या तत्वाचा पुरस्कार ७ चालू मराठी शिक्षणाचें सर्व संमत स्वरूप व प्रसार यांची तजवीज ८ देशी भाषेंत लेखन वाचन जाणणारांस मताधिकार ९ देशभाषा शिक्षणांस सरकारी उत्तेजन. १० राजसत्तेच्या धर्मविषयक तटस्थतेचा पुरस्कार. ११ सरकारी तिजोरींतून ख्रिस्तीधर्माला मिळणाऱ्या तनख्याचा निषेध १२ सांप्रदायिक शिक्षणाच्या उत्तेजनाचा निषेध. १६ 'कॉंग्रेस प्रोविंसियाल'ला पाठिंबा १४ रजिस्त सिविलच्या कायद्यांतील हिंदुधर्मविरोधक कलमांच्या दुरुस्तीचें दिग्दर्शन १५ गोरक्षण १६ नवीन काबिजादीतर्फे कोन्सिलांत जावयाच्या प्रतिनिधींची संख्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार वाढविण्याची मागणी.

प्रागतिक संघाची परिषद

निमंत्रण पत्रिका

वरील परिषदेचें पहिलें अधिवेशन येत्या ता. २९ डिसेंबर पासून तीन दिवस श्रीस्थळ कवळें येथें भरविण्यांत येईल.

प्रागतिक संघ ही संस्था गोमंतकांतील सर्व हिंदूंकरितां आहे व म्हणून सर्वांनींच ती यशस्वी करण्याकरितां झटलें पाहिजे ही गोष्ट न विसरतां,

आणि नियमांप्रमाणें वस्तुतः संघाच्या आजवर झालेल्या सभासदांचाच समावेश तींत व्हावा हें जरी खरें असलें, तरी त्या नियमांची घटना अद्यून कायम स्वरूप पावली नसून हें स्वरूप तिला परिषदेंत मिळावयाचें आहे त्या अर्थी,

सर्वानुमतें अगर बहुमतानें परिषदेंत जी योजना ठरेल ती मान्य करण्याच्या अटीवर कोणाही हिंदू बांधवांनां तींत भाग घेऊं द्यायला हरकत होणार नाहीं ही गोष्ट लक्षीं घेऊन,

सर्व हिंदू बांधवानीं [चालू अगर भावी] सभासदाच्या नात्यानें परिषदेंत भाग घ्यावा अगर प्रेक्षकाच्या नात्यानें हजर रहावें अशी आमची सर्वांना सप्रेम विनंति आहे.

सर्वांचे नम्र सेवक

कवळें—गुरुवार
ता. १९-१२-९२३

भास्कर रुद्राजी नाईक प्रतापराव सरदेसाई
सीताराम विश्वंभर केरकर
शांताराम धर्माजी डांगी
कल्याण गणेश तळवडकर

सेक्रेटरीज्.

सूचना:— ज्यांना आपल्या राहण्याची व जेवणाची सोय स्वागत कमिटीमार्फत करून घ्यावयाची असेल, त्यांनीं कमींत कमी ४ दिवस आधीं सेक्रेटरींस कळविण्याची मेहरबानी करावी.

स्वागत कमेटी

अध्यक्ष

श्रीयुत दुलबा सदाशिव नाईक प्रतापराव मुख्य सरदेसाई

उपाध्यक्ष

श्रीयुत रामचंद्र पांडुरंग वैद्य

सभासद

श्रीयुत माधव मलबा सूर्यराव सरदेसाई	श्रीयुत रुद्राजी नाईक प्रतापराव सरदेसाई
,, दोतोर कृष्ण शेणवीं मयेंकर	,, दत्तारास गो० नाईक प्रतापराव सरदेसाई
,, दत्ताराम फक्रो शेणवीं प्रियोळकर	,, राघोबा श्रीरंग शेणवीं तळावलीकर
,, रामचंद्र वामन नायक करंडे	,, आत्माराम शंकर वेरेंकर
,, अनंत जीवोत्तम कामत	,, गोपाळ श्रीधर वोरकर
,, विठ्ठल रामकृष्ण गुडे	,, नीळकंठ शंकर गुडे
,, श्रीधर केशव कामत	,, पांडुरंग उपेंद्र कामत
,, शाणू व्यंकटेश भरणे	,, दत्तात्रय रामचंद्र पावसे
,, कृष्ण दत्ताराम वोरकर	,, पद्माकर रामकृष्ण सावईकर
,, पुरुषात्तम भिकवा खंडेपारकर	,, राम अनंत वखले
,, रामचंद्र नारायण आमोणकर	,, रामकृष्ण अनंत भांडारी

स्वयंसेवक

मुख्याधिकारी

डॉ० बाळकृष्ण दत्ताराम साखरदांडे

मदतनीस
रा. जनार्दन विष्णु कामत
,, रघुनाथ अनंत भांडारी
,, बाळकृष्ण वा. सांवर्डेकर

[स्वयंसेवकांची नोंद होण्यास सुरवात झाली आहे. तरी ज्यांना ज्यांनां स्वयंसेवक या नात्यानें परिषदेंत काम करण्याचें असेल त्यांनीं त्यांनीं सेक्रेटरींनां तसें कळवून नोंद करवून घ्यावी. या बाबतींत विद्यालयीन तरुण पिढीच्या इच्छेला विशेषेंकरून मान देण्यांत येईल.]

ANUNCIOS

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio, vão ser vendidos em hasta judicial á porta do tribunal do juizo situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a Curchorem, no dia 11 do seguinte mez de Janeiro, ás 13 horas e pelo preço superior ao da avaliação, os seguintes bens: — Direito a 1/6 da 1.a adição do predio Cungelem vangana, compreendendo varzea, palmar e citeiro, sito em Quepem e direito a 1/6 do predio Benó, da cultura de coqueiros, sito em Cusmane, discritos na Conservatoria do registo predial desta comarca sob n.os 439 a 440 respectivamente e avaliados cada um em 300 rupias, penhorados nos autos de execução de sentença que José Francisco Fernandes de Margao, como cessionario de Tertuliano Exaltação de Santa Cruz Rebelo de Vernã cromove no juizo de Salsete Sontra Visuum Sinai Contoco p mulher residentes em Aquem Sao por este citados todos os credores incertos dos ditos executados, os herdeiros do credor inscrito falecido José Caitano de Faria de Vernã a cujo favor se acham registadas duas hipotecas, sendo uma de 1250 rupias do capital constante da inscriçao n ° 626 a fl. 195 do livro C 3 e outra de 207 : 04 : 08 de juros constantes da inscriçao n ° 717 a fl 295 do livro C 3, os comproprietarios e quinhoeiros para assistirem e deduzirem os seus direitos nos termos de lei. A contribuiçao de registo por inteiro e as despezas de praça correrao a cargo do arrematante. Para ser publico se expediu este. Quepem, 5 de Dezembro de 1923.

O escrivao de direito
Aires Mauuel Barreto 2

2 vez) Verifiquei
O Juizo de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do 1 ° oficio Redcar, correm editos de 30 dias a contar do dia da segunda publicaçao d e s t e, citando a Rada' Porbina conhecida tambem por Gonga viuva de Ramacusta Gopal Porobo Dessai de Pedem de Loliem e Rucminim e seu marido Crisna Rogunata Boto vulgo Essobachari, residentes em Portogale de Poinguinim e o menos impubere Deodata Ramacrisna Porobo Dessai na pessoa da sua mae dita Rada" para no praso de 10 dias findos os referidos 30 dias pagarem no sobredito cartorio a quantia de 93 : 01 : 02 1/2 sendo a Rada' 46 : 08 : 07 1/4 e cada um dos outros a quantia de 23 : 04 : 03 5/8 proveniente de custas e selos liquidados nos autos de inventario orfanologico procedido por obito do dito Ramacusta ou dentro do mesmo praso nomearem bens suficientes a penhora para o pagamento do pedido e de custas e selos acrescidos da execuçao sob pena de nao o fazendo ser a nomeaçao devolvida ao exequente Ministerio Publico proseguindo se a' execuçao seus termos a' ravelia. O que para ser publico se expediu este. Xeldem 3 de Dezembro de 1923.

O escrivao de direito
Bubu V. Camotim Redcar 3

Verifiquei
O juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do Escrivao do 2 ° oficio. vao ser vendidos em hasta judicial, a' porta do Tribunal do juizo situado em Xeldem ao lado da estrada nacional que de Quepem se dirige a Curchodem, no dia 8 do proximo mez de Janeiro as 12 horas e pelo preço superior ao da avaliaçao, os seguintes bens :- 1/8 do predio " Madiegalvangana " , 1/24 do predio " Zorimola poiquim ", 1/40 do predio " Deulacodil sordo " e 1/40 do predio " Careasordo '. todos sitos em Cumbary de Sanguem da cultura de arroz discritos na conservatosia do registo predial desta comarca sob os n ° 16502, 16503 16504 e 16505 a fl. 92 te' fl. 93 V„ do livro B 45 e avaliados em 50, 20, 15 e 10 rupias respectivamente. Penhorados nos autos civeis de execuçao por custas que Dioguot Agente do Ministerio Publico nesta promove contra Maluga Cacodcarina de Viliena. Sao por este citados todos os credores incertos da dita executada e os comproprietario e quinhoeiros nos termos e para os fins de lei. A contribuiçao de registo por inteiro ficara' a cargo do arrematante Para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de Quepem, 30 de Novembro de 1923

O escrivao de Direito
Airez Manuel Barreto
Verifiquei 4
O Juiz de Direico
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivao do 2 ° oficio, vao ser vendidos em hasta judicial, á porta do tribunal do juizo situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a Curchodem no dia 8 do proximo mez de Janeiro, as 12 horas e pelo preço superior ao da avaliaçao, os seguintes bens:– Palmar e varzia ' Bonvorichem med c" da cultura de coqueiros e arroz, varzea " Matiem medoc" Varzia " Pate vaigonacodil sordo" ambos da cultura de arroz, Palmar e várzea " Butorantil sordo " da cultura de coqueiros e arroz, Predio " Bandocvalo' da cultura de arroz e predio " Canetemxevota" da cultura de ariqueiras e coqueiros, todos sitos em Molcornum, dicritos na Conservatoria predial desta comarca, respectivamente, sob os n ° s 1634, 1635 1636, 1640, 7065 e 7066 e avaliados, tambem respectivamente, em 370, 90, 380, 1000, 380 e 360 rupias. Penhorados nos autos civeis de execução por custas que o Digno Agente do Ministerio Publico nesta comarca promove contra Janqui Gauncarina, viuva, de Molcornem e outros, por apenso aos autos de iuventario orfanologico prestado por obito de Zoinum Bodco Gauncar e mulher que foram da dita. Sao por este citados todos os credores incertos dos ditos executados e os comproprietarios, nos termos e para os fins de lei. A contribuiçao de registo por inteiro ficarà a cargo do arrematante. Para ser publico se expediu este Xeldem da Comarca de Quepem 30 de Novembro de 1923.

O escrivão de Direito
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

एक पत्र

रायचंदर येथील सदानंद मुद्रणालयानें 'जाहीर सवाल नामक एका पत्रास जन्म दिला असून कवळेंच्या प्रागतिक परिषदेविषयीं लोकांत गैरसमज उत्पन्न करण्याचा 'अव्यापारेषु व्यापार' केला आहे. सवाच्या जाहीर पत्रकांतला सवालांस समर्पक उत्तर असल्यानें, समंजस हिंदु त्याकडे दुर्लक्ष करतील, हें लिहिण्याचें कारण नाहीं.

बातमीदार

empregadas, como o foram, para, apenas, fazer sobressair a diversidade de criterios numa mesma Nação. Terminou o seu belo discurso, pedindo absolvição do re'u.

Findos os debates, o sr. dr. Juiz perguntou ao reu se queria dizer mais alguma coisa em sua defesa, ao que o nosso director respondeu negativamente.

Foi, depois, interrompida a audiencia por espaço de dez minutos, decorridos os quais, foi lida a sentença absolvitoria do nosso director, sentença que por ser uma peça juridica de alto valor e em que o seu imparcial autor revela um conhecimento perfeito da materia contro-vertida, merece ser trasladada para as colunas do "Bharat" para a sciencia dos nossos leitores, o que faremos no n.° seguinte.

Concluida a leitura da sentença, o sr. dr. Juiz com a nobresa que o caracterisa, aconselhou o nosso director em poucas mas sinceras palavras, a fixar bem aquela parte do discurso do sr. dr. Delegado, em que este se refere ao dever da imprensa.

O nosso director foi muito cumprimentado pela sua absolvição não so' no tribunal que, apesar de ser feriado o dia do julgamento, era razoave'mente concorrido mas ainda na sua residencia.

E por esta forma fez-se, mais uma vez, justiça ao "Bharat" que nasceu e vive com sacrificios, tão somente para defender os intersses patrils.

Pragatica Sanga

Promete tudo que as sessões do Congresso deste "Sanga" hão de ser muito concorridas, sobretudo, porque algumas criaturas para quem o patriotismo significa a barriga pretenderam a' ma' hora brincar com ele. propalando a quatro ventos os mais desencontrados boatos, estribados na comoda irresponsabilidade de "constanos, informam-nos, comunicam-nos, dizem-nos" etc. e tal.

Felizmente, o meio em que nos agitamos e' muito acanhado e portanto de molde a se conhecerem uns aos outros magnificamente. Não e' porisso, para admirar que tenha produzido resultado contra producente a estupida e impolitica atitude dum limitadissimo numero duns "dissidentes" ou antes "descolos" que dominados pelo orgulho do dinheiro ou do poder burocratico sonham ludibriar a classe hindu', ja' integrada no "Sanga".

Baldado empenho, amiguinhos, que a classe hindu' nem a força da espada de "Danaides" quere sair do seu "Sanga".

E olhem que a sua campanha poupou-nos ate' a maçada de manifestos! Vem males para o bem.

—येथील कोर्टांतील मुख्य कारकून बाबू वामन कामत रेडकर यांच्या सात्विक व पतिनिष्ठ गृहिणीचें गेल्या सोमवारीं रात्रौ देहावसान झाल्याचें कळविण्यास अत्यंत वाईट वाटतें.

भारत

गुरुवार मार्गशीर्ष व० ४ थी, १८४५

प्रागतिक संघाची परिषद यशस्वी करा !

पोर्तुगीज हिंदुस्थानांतील सर्व हिंदूंच्या हितासाठीं स्थापन झालेल्या प्रागतिक संघामार्फत भरविण्यांत येणाऱ्या वरील परिषदेचें १ लें अधिवेशन, येत्या २९।३० व ३१ या तारखांस, श्री स्थळ कवळें येथें भरणार आहे, ही गोष्ट सर्वांना माहीत होऊन चुकलीच असेल. संघाच्या कार्यकारी मंडळाचे मुखत्यार डॉ० बोरकर, यांनीं प्रसिद्ध केलेलें माहितीपत्रक, परिषदेसाठीं स्थापन झालेल्या स्वागत कमिटीनें पाठविलेलें आमंत्रणपत्रक आणि आमच्या शेवटच्या अंकाबरोबर निघालेलें पुरवणीपत्रक, यांच्या वाचनानें प्रागतिक संघ, त्या मार्फत भरणारी परिषद आणि परिषदेचें कार्य यांविषयीं आजकाल सर्वत्र पूज्यबुद्धि वाटत असून, डॉ० बोरकर, देसाई वगैरे मंडळीनें कांहीं ठिकाणीं जाहीर व खासगी रीतीनें आमंत्रणें देण्यास दौरा काढल्यामुळें त्यांत अधिकाधिक भर पडतच आहे. आजकाल जिकडे तिकडे संघाची परिषद हा एक बोलण्याचा विषयच होऊन बसला आहे. समाजांत देशहितासंबंधीचे, समाजहितासंबंधीचे विचार प्रसृत होणें, समाजांत वसत असलेल्या दैन्याचा चटका बसून तें नाहींसें करण्याची तळमळ प्रत्येक अंतःकरणांत उत्पन्न होणें हें कधींहि झालें तरी इष्टच आहे. परंतु, हे वाढीस लागलेले विचार जागच्याजागीं नष्ट होऊं न देतां ते, वरीलसारख्या परिषदांतून विनिमयपूर्वक उच्चारून दाखविले पाहिजेत. अशा रीतीनें विचारांचें पर्यवसान उच्चारांत होऊं लागलें तर ते विचार आचारांत आणण्यास सुलभ झाल्याशिवाय राहत नाहीं. व या कामीं समाजांतील सर्व शक्ती हळू हळू एकवटूं लागतात हें थोड्याशा इतिहासावलोकनानें कळून येईल.

आमच्या हिंदुसमाजांत देशहिताच्या कामीं लावण्यासारख्या सर्व तऱ्हेच्या शक्ती आहेत, हें कोणासहि नाकबूल करतां यावयाचें नाहीं. संख्येनें जास्ती असलेल्या आमच्यांतील जमिनदार वर्गाची शक्ती, प्रत्येक शहरांतून, खेडेगांवांतून दिसणारी आमच्यांतील व्यापारी वर्गाची शक्ती, जुन्या अथवा नव्या शिक्षणानें मंडीत असलेल्या आमच्यांतील सुशिक्षित वर्गाची शक्ती, ठिकठिकाणच्या व निरनिराळ्या सरकारी खात्यांतून काम करणारी आमच्यांतील नोकर वर्गाची शक्ती आणि शेवटीं रानोमाळ व खेडोपाडीं पसरलेल्या आमच्यांतील शेतकरी वर्गाची शक्ती, एका केंद्रांत आणतां आल्यास तिच्या जोरावर समाजाचें केवढें मोठें कार्य होण्यासारखें आहे, याची कल्पना प्रत्येक सुशिक्षित अंतःकरणांत उदीत होत होती. मात्र ती व्यवहारांत आणून तिचा अनुभव घेण्यास आजच्यासारखी संधि आली नव्हती; ती प्रागतिक संघामुळें म्हणा अथवा उदार अशा लोकसत्ताक राज्यपद्धतींत देखील अद्यापिहि दिसत असलेल्या विषमतेमुळें म्हणा, आज आम्हास सुदैवानें प्राप्त झाली आहे. तिचा फायदा घेण्याचा अपूर्व उत्साह जिकडे तिकडे दिसावयास लागला असून, त्यामुळें, समाजांतील सर्व विचारी व देशहिताविषयीं तळमळणाऱ्या दूरदर्शी लोकांचें लक्ष परिषदेकडे लागलें आहे. म्हणूनच, आपल्या आगमनानें व धनबुद्धिबलानें परिषद यशस्वी रीतीनें पार पाडण्याचा सात्विक निश्चय त्यांच्या विमल मुखावर प्रामुख्यानें झळकूं लागला आहे. हें सुचिन्ह नाहीं असें कोण म्हणूं शकेल. ?

परिषदेच्या अधिवेशनाला मुक्रर केलेलें स्थळ अनेक दृष्टीनीं महत्वाचें आहे. ज्या उच्च व उपयुक्त ध्येयावर नजर ठेवून परिषद भरविण्यांत येत आहे, तें अल्पावकाशांत साध्य करून घेण्यास समाजांतील धनिकांची धनशक्ती, बुद्धिवंतांची बुद्धिशक्ती व बलवंतांची बलशक्ती एकमेकांशीं निगडीत झाल्या पाहिजेत, हें आम्ही वर सांगितलेंच आहे. त्या सर्व शक्ती जिच्याठायीं पूर्णपणें भरून राहिल्या आहेत, आणि म्हणून जिला आदिशक्ती या नामाभिधानानें संबोधण्यांत येतें, त्या श्री जगज्जननी शांतादुर्गा देवीचें तें मूर्तरूपानें वसण्याचें स्थान आहे. तिच्या चरणकमलांच्या आश्रयानें भरणाऱ्या ह्या परिषदेस कोणतीच कमतरता न भासतां ती सर्व बाजूनीं यशस्वी होऊन, तिच्या हातून होणारी कोणतीहि चळवळ सिद्धीसच पावेल अशी आमच्याप्रमाणेंच बहुतेकांची खात्री होऊन बसली पाहिजे.

हिंदुबांधवहो, प्रागतिक संघाची परिषद तुम्हांसाठींच भरत आहे. तुमचे विचार एकत्रित करुन, त्यांपासून निष्पन्न होणाऱ्या तुमच्या गरजा भागविण्याची खटपट करणें हेंच तिचें उद्दिष्ट आहे. तुमच्या अंतकरणांत खळबळ उडवीत असलेल्या देशहितकारक विचारांस चालन मिळावें यासाठीं परिषदेपुढें कोणकोणते विषय चर्चेस येणार आहेत यांचें दिग्दर्शन संघाच्या उपाध्यक्षांकडून झालेलें आमच्या गेल्या अंकांतील पुरवणीपत्रकांत आलेंच आहे. आपण सुज्ञ व विचारवंत आहांत, आपल्या मनास देशहिताची तळमळ लागलेली आहे, कळकळीनें प्रयत्न करण्याची आपली तयारी आहे, हें सर्व दिसत असतां, आपण स्वतः जातीनें परिषदेस येऊन, मनांतील विचार उच्चारून दाखवून ते आचारांत आणण्याची शिकस्त करणार नाहींत काय? समाजांत दिसत असलेल्या सर्व तऱ्हेच्या शक्ती सुषुप्तावस्थेंत आहेत, त्यांना जागृत करून समाजकार्याच्या गाड्यास जोडण्याचें श्रेय तुम्ही घेणार नाहींत काय! समाजांत वावरत असलेलें नैराश्य आणी हाडींमांसीं खिळून राहिलेली मूकवृत्ति व सरकारांत चालू असलेली विषमता घालवून देण्यास परिषदेला तुम्ही कांहींच मदत करणार नाहींत काय! देश व समाज यांच्या हितसंबंधांचा प्रश्न आला कीं त्यावेळीं आपसांतील चुरस, मत्सर, वैमनस्य, मानापमान इ० विसरून जाण्याइतकी मनाची उदारता हिंदुसमाजांत अद्यापिहि शिल्लक आहे हें आपल्या उदाहरणानें दाखवून देणार नाहींत काय? कोणत्याहि सार्वजनिक संस्था चालविण्याची अक्कल या रानटी (gentios) हिंदुसमाजांत नाहीं, असें म्हणून आम्हाला पदोपदीं व हरघडी हिणविण्यांत येत असतें त्याचा फोलपणा, तुमच्या कर्तबगारीनें जगाच्या निदर्शनास आणण्याची तजवीज करणार नाहींत काय? बोला, बोला, हें सर्व करण्यास तुम्हाला परिषदेला येणेंच प्राप्त आहे. तुमच्या आगमनानें परिषदेच्या चालकांस उत्तेजन मिळेल, त्यांचा उत्साह दुणावेल, पुढील कार्य जोरानें करण्यास अधिकाधिक 'हुरूप येईल हें विसरूं नका. परिषदेचें सर्व काम बहुमतानें चालेल याविषयीं संशय घेऊं नका. हिंदुस्थानांतील सर्व विचारांचे, सर्व वर्गांचे सर्व जातींचे गृहस्थ परिषदेंत सामील व्हावे व यामुळें तींत कोणतेंच वैगुण राहूं नये अशीच चालकांची सदिच्छा आहे. विषयनियामक मंडळ निवडण्यापासून तें दुसऱ्या अधिवेशनास स्थळ पसंत करण्यापर्यंत जें काम परिषदेंत चालेल, त्यांत तुमच्या विचारांचा प्रामाणीकपणा, समतोलपणा, सत्यनिष्ठा, कार्याविषयीं अढळ विश्वास दिसून आला तर सर्व मतमतांतरांचें पर्यवसान इष्ट ध्येय जवळ होण्याकडेच होईल ही जाणीव जागृत ठेवा. निराशावादास फांटा देउन आशावादीपणा बाळगा. आपल्या सुविचारांचें, स्वत्वाभिमानाचें, तत्वनिष्ठेचें आणि कर्तृत्वशक्तीचें गांठोडें बरोबर घेऊन परिषदेला या. या परिषदेमुळें हिंदुसमाजाचें स्वरूप पूर्वीप्रमाणें उज्वल दिसावयास लागावें, पो० हिंदुस्थानांतील हिंदुसमाज, ही एक जागृत शक्ती आहे, तिच्याकडे यापुढें दुर्लक्ष करुन चालावयाचे नाहीं, असें इतर समाजानां व सरकारी अधिकाऱ्यानां वाटावें, यासाठीं स्वार्थत्यागपूर्वक लागेल ती कामगिरी करा व हिंदुसमाजाच्या जिवंतपणाची साक्ष सर्वजगाला पटवा. ता. २९ ३० व ३१ डिसेंबर १९२३ हे दिवस पो. हिंदुस्थानांतील हिंदुसमाजाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरानीं लिहून ठेवण्यासारखी भरीव कामगिरी परिषदेच्या हातून होईलच होईल.

सुशिक्षित म्हणविणाऱ्यांनी त्यांचें पोशाखाच्या बाबतींत सर्वथैव अनुकरण केल्यानें पाश्चात्य संस्कृति सर्वथैव स्वीकारलेल्या. आपल्या ख्रिश्चन बांधवांचा असा गैर समज होत आहे कीं, हे सुशिक्षित-अर्थात् शिक्षण घेऊन बाहेर पडलेले ज्याअर्थी आमच्या पोशाखाचें अनुकरण करीत आहेत, त्या अर्थी आमच्याच चालीरीति खऱ्या आहेत." हा गैर समज दूर करण्याकरितां आपल्याला आपल्या चालीरीतींचा अंगीकार करून सुशिक्षण हें पोशाखावर अवलंबून नसून, अंगच्या गुणांवर असतें, इतकेंच नव्हे, तर पाश्चात्य संस्कृतिपेक्षांही आपली संस्कृति अत्यंत उच्च आहे हें सिद्ध करून दाखविलें पाहिजे.

× * ×

आपला समाज नुकताच या चालींकडे वळत आहे, तोंच या चाली आपणांस कशा अनावश्यक आहेत, हें दाखवेण्याचें आपलें कर्तव्य आहे. आपली संस्कृति उच्च आहे, साधी आहे, ती सोडून ज्यांना पथाशनचा मोह आवरत नाहीं, त्यांनीं स्वामी विवेकानंदांनीं म्हटल्याप्रमाणें निदान डोकें तरी हिंदी ठेवावें.

के. भारती.

वर्तमानसार

—नवीन प्रधान मंडळाची स्थापना झाली असून, अजून पोर्तुगालच्या अंतस्थितीस स्वस्था प्राप्त झालेली नाहीं.

—गेल्या २४ तारेखस भारताविरुद्ध चालू असलेल्या खटल्यांपैकीं एका खटल्याची सुनावणी होऊन, आमचे संपादक निर्दोषी ठरले, हें कळविण्यास समाधान वाटतें. सत्यमेव् जयते!

—प्रागतिक परिषदेविरुद्ध कांहीं विघ्नसंतोषी लोकानीं कोल्हेकुई सुरु केली आहे. संघाच्या जाहीर पत्रकांत प्रांजळ व मनमोकळेपणानें सर्व आक्षेपांचा सविस्तर खुलासा केला गेला असतांहि उपरनिर्दिष्ट ओरड चालू आहे. यावरून परिषदेच्या हित शत्रूंला काय महत्व द्यावयाचें तें देशहितप्रेमी हिंदुबांधव देतीलच.

—१४ तारखेच्या सरकारी ग्याझेटवर बार्देस मुनिसिपालटीच्या करांची नोंद प्रसिद्ध झाली आहे

ANUNCIOS

Pelo juizo de Direito da Comarca deQuepem e cartoriodo escrivao do 1 ° oficio Redcar, correm éditos de 30 dias a contar do dia da 2.a publicação deste, citando o réu Ramachondra Naraen Bhoto Aptê, viuvo sargento militar de State Satará e residente em Budgão do territorio britanico em parte incerta, para no praso de 19 dias findos os referidos 30 dias pagar no sobredito cartorio a quantia de 167:14:09 e meia provenients de custas e selos liquidados nos autos crimes de querela que lhe moveu o Ministerio Publico nesta comarca pelo crime de furto, ou dentro do mesmo praso nomear bens suficientes á penhora para o pagamento do pedido e de custas e selos acrescidos da execução sob pena de nao o fazendo ser a nomeação devolvida ao exequente MinisterioPublico prosseguindo se a execução seus termos a revelia. O que para ser publico se expediu este.

Xeldem 12 de Dezembro de 1925.

O escrivao de direito
Babu V. Camotim Redcar

Verifiquei 1 vez)
O Juizo de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de direito pa comarca de Quepem e carterio do escrivao do 1 ° oficio Redcar, correm editos de 30 dias a contar do dia da segunda publicagao deste, citando a Rada' Porbina conhecida tambem por Gonga viuva de Ramacusta Gopal Porobo Dessai de Pedem de Loliem e Rucminim e seu marido Crisna Rogunata Boto vulgo Essobachari, residentes em Portogale de Poinguinim e o menos impubere Deodata Ramacrisna Porobo Dessai na pessoa da sua mae dita Rada" para no praso de 10 dias findos os referidos 30 dias pagarem no sobredito cartorio a quantia de 93 : 01 : 02 1/2 sendo a Rada' 46 : 08 : 07 1/4 e cada um dos outros a quantia de 23 : 04 : 03 5/8 proveniente de custas e selos liquidados nos autos de inventario orfanologico procedido por obito do dito Ramacusta ou dentro do mesmo praso nomearem bens suficientes a penhora para o pagamento do pedido e de custas e selos acrescidos da execugao sob pena de nao o fazendo ser a nomeaçao devolvida ao exequente Ministerio Publico proseguindo se a' execugao seus termos a' ravelia. O que para ser publico se expediu este. Xeldem 3 de Dezembro de 1923.

O escrivao de direito
Babu V. Camotim Redcar 2

Verifiquei 2 vez)
O juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do Escrivao do 2 ° oficio, vao ser vendidos em hasta judicial, a' porta do Tribunal do juizo situado em Xeldem ao lado da estrada nacional que de Quepem se dirige a Curchodem, no dia 8 do proximo mez de Janeiro as 12 horas e pelo prego superior ao da avaliagao, os seguintes bens :- 1/8 do predio " Madiegalvangana ", 1/24 do predio " Zorimola poiquim ", 1/40 do predio " Deulacodil sordo " e 1/40 do predio " Careasordo ", todos sitos em Cumbary de Sanguem da cultura de arroz discritos na conservatoria do registo predial desta comarca sob os n ° 16502 16503 16504 e 16505 a fl. 92 te' fl. 93 V„ do livro B 45 e avaliados em 50, 20, 15 e 10 rupias respectivamente. Penhorados nos autos civeis de execugao por custas que Diognot, Agente do Ministerio Publico nesta promove contra Maluga Cacodcarina de Viliena. Sao por este citados todos os credores incertos da dita executada e os comproprietario e quinhoeiros nos termos e para os fins de lei. A contribuigao de registo por inteiro ficará a cargo do arrematante Para ser publico se expediu este. Xeldem da Comarea de Quepem, 30 de Novembro de 1923

O escrivao de Direito
Airez Manuel Barreto

Verifiquei 2 vez)
O Juiz de Direico 3
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivao do 2 ° oficio, vao ser vendidos em hista judicial, á porta do tribunal do juizo situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a Curchodem no dia 8 de proximo mez de Janeiro, as 12 horas e pelo preço superior ao da avaliaçao, os seguintes beus:- Palmar e varzia ' Bonvorichem med c" da cultura de coqueiros e arroz, varzea " Matiem medoc" Varzia " Pate vaigonacodil sordo" ambos da cultura de arroz, Palmar e várzea " Butorantil s rdo " da cultura de coqueiros e arroz, Predio " Bandocvalo' da cultura de arroz e predio " Canetemxevota" da cultura de ariqueiras e coqueiros, todos sitos em Molcornam, discritos na Conservatoria predial desta comarca, respectivasmente, sob os n ° s 1634, 1635 1636, 1640, 7065 e 7066 e avaliados, tambem respectivamente, em 370, 90, 380, 1000, 380 e 360 rupias. Penhorados nos autos civeis de execução por custas que o Digno Agente do Ministerio Publico nesta comarca promove contra Janqui Gauncari: a. viuva, de Molcornem e outros, por apenso aos autos de inventario órfanologico prestado por obito de Zinum Bodco Gauncar e mulher que foram da dita. Sao por este citados todos os credores incertos dos ditos executados e os comproprietarios, nos termos e para os fins de lei. A contribuiçao de registo por inteiro ficará a cargo do arrematante. Para ser publico se expediu este Xeldem da Comarca de Quepem 30 de Novembro de 1923.

O escrivão de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei 2 vez)
O Juiz de Direito 4
A. A. de Brito e Nascimento

Ecos & Critica

No Eden...

Muitas vezes, os mais ocultos intentos sao justamente os mais claros. E' um paradoxo.

E precisamente nesse paradoxo se alicergou o edificio da reuniao do dia 30 promovida pela aristocracia demagogica de maos dados a' democracia aristocratica.

A seu modo, os seus promotores pretenderam ocultar os seus fins interesseiros; mas foram desde logo descobertos. E sabe-se que eles tendem a demonstrar que os hindu's de "Maha Soba, Maha' Mandol" ou coisa que valha sao amigos do sr. Prazeres de Costa, criador de "nichos" e outros bichos que roem o melhor fruto do organento!

Esta' bem! Prossigam na sua do'da tarefa de cevar odios na classe hindu' que conseguirao ver coroados os seus insanos trabalhos...de sapa sob capa de patriotas dos...quatro costados,

Politica

Com grande jubilo deixou a presidencia do Directorio Provisorio do *Pragatica Sanga* o nosso director que naquela sua qualidade desempenhou um papel absólutamente passivo.

A presidencia era para ele um fardo demasiado pesado pelo simples motivo de nao ser muito forte na sciencia politica que e' bastante complicada, sobretudo para um ingenuo e rude como ele que nao sabe a arte de ocultar o que sente nem a de sentir o que convem ocultar nos bastidores

Esta', pois, livre duma enorme responsabilidade politica como se tivessem tirado de sobre os seus fracos ombros um peso de cem arrobas.

Sim, o nosso director deixou a presidencia do "Sanga" para como seu soldado ra o poder trabalhar por traduzir em facto o alevantado ideal que o anima, porque convence-se de que o Directorio novo so' agira' em prol dos beneficios do Paiz que e'-nos tao querido.

Consignamos, porisso, aqui o nosso sincero agradecimento aos que nos conseguiram a carta de alforria politica.

Ja viram?

O "Pragatica Sanga" pela boca autorisada do seu Congresso provou exuberantemente que a classe hindu', na sua maioria, esta' a seu lado e que nessa maioria figuram precisamente os representantes das suas forças vi v.

Para que serviu, pois, a *FITA* do Eden Cinema que alguns aristocraticos, instigados p e l o s burocraticos prazeristas fizeram desenrolar para o entretenimento publico, nao nos dirao?

Nao haveria outra maneira de agradecer comendas e lugares de professores li eais, bem como de solicitar novos?

Ja' viram o que tudo isso e' ?

भारत

गुरुवार मार्गशीर्ष व० ११ शी, १८४५

प्रागतिक संघाची परिषद

गेल्या अंकांत 'प्रागतिक संघाची परिषद यशस्वी करा' अशी अखिल गोमांतकीय हिंदुजनतारूपी जनार्दनाची भारतानें करुणा भाकून ता० २९-३०-३१ डिसेंबर १९२३ हे दिवस पो. हिंदुस्थानांतील हिंदुसमाजाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरानीं लिहून ठेवण्यासारखी भरीव कामगिरी परिषदेच्या हातून होईलच होईल असें भविष्य वर्तविलें होतें. हें भविष्य श्री शांतादुर्गेच्या कृपाप्रसादानें तंतोतंत घडून आलें हें आजच्या पुरवणींत दिलेल्या परिषदेच्या त्रोटक हकीकतीवरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल.

"प्रागतिक संघ" ही संस्था ता० ३० जानेवारी सन १९२१ रोजीं फोंडें येथें भरलेल्या ठिकठिकाणच्या हिंदुसमाजाच्या प्रतिनिधींच्या सभेच्या ठरावानुसार स्थापन झाली असतां व तिचें ध्येय सामान्यतः एकंदर पोर्तुगेज हिंदुस्थानची व विशेषत त्यांतील हिंदुसमाजाची सर्व दिशानीं व मुख्यत्वें करून राजकीय दिशेनें सनदशीर मार्गांनीं प्रगति घडवून आणणें हें असतां, संघ हा मूठभर स्वार्थी लोकांनीं केवळ आपल्या स्वार्थासाठीं निर्माण केलेला एक मवाळ 'कंपू' असून त्याचा हेतू हिंदूंच्या नावानें राजकारणांत व सरकारी दरबारांत उदर भरणासाठीं ह्मणा, नहीं तर व्यक्तिमहत्व वाढविण्यासाठीं ह्मणा मिळेल तेव्हां हैदोस घालणें, हें त्याचें ध्येय आहे, असा धडधडीत आरोप कित्येक निंदकांकडून संघाच्या कार्यकारी मंडळाविरुद्ध करण्यांत येत असे. परिषदेनें एकवाक्यतेनें संघचालकांचें कौतुक करून आणि त्यांच्या विषयीं आपली कृतज्ञता व विश्वास प्रगट करून त्या विषारी आरोपाचा फोलपणा जगासमोर आणण्याचें श्रेय घेतलें; ही फार समाधानाची गोष्ट होय.

इतर ठरावांबरोबर पुष्कळ वादविवादानंतर संघाची घटनाहि परिषदेनें पास केल्यानें, संघांत आतां संघशक्तीचें नवें तेज चमकूं लागलें असून नवीन कार्यकारी मंडळास जनतेच्या विश्वासाचा भरभक्कम पाठिंबा मिळाला आहे. कार्यकारी मंडळीचे सर्व सभासद आपापली जबाबदारी पूर्णपणें ओळखणारे असल्यानें, या बाबी विशेष होतील. कदाचित् कित्येपार्टीच्याचा योग्य उपयोग ते राजकार कांनां आदरेतींत मुद्दां हुद्दे पटकावांदिवाय इतर देशहितविषयक गोष्टींत वतां येतील. या वरून अखिल हिंदुजनतेचे हित करतील असें म्हणण्यास आम्हांस कसलीच शंका वाटत नाहीं.

परिषदेंत पास झालेल्या ठरावांस मूर्त स्वरूप आणण्यासाठीं झटणें, हें कार्यकारी मंडळाचें मुख्य कर्तव्य होय, हें सांगण्याचें कारण नाहीं. हें पवित्र पण अवघड कर्तव्य लोकांच्या विश्वासास साजेशाच रीतीनें आचरणयाच्या मार्गास कार्यकारी मंडळीनें आतां विलंब न लावतां लागलें पाहिजे.

आम्हांस पूर्ण खात्री आहे कीं, जी धडाडी, जी चिकाटी व जो निःपेक्षपणा परिषद यशस्वी होण्याच्या कामीं संघचालकांनीं उपयोगिला, तीच धडाडी, तीच चिकाटी व तोच निरपेक्षपणा उपरिनिर्दिष्ट कर्तव्य पार पाडण्याचे कामीं खर्च केला गेल्यास, परिषदेनें पास केलेले ठराव तर मूर्त सृष्टींत उतरतीलच; शिवाय संघाशीं फटकून वागणाऱ्या अल्प संख्यांक लोकांस संघाशीं सहकार्य करण्याशिवाय दुसरा मार्गच शिल्लक राहाणार नाहीं. असो.

शेवटीं प्रागतिक संघाची उत्तरोत्तर भरभराट व्हावी अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना करून ज्या हिंदूंनीं त्याच्या प्रथम परिषदेंत हजर राहून संघाविषयीं आपली निष्ठा प्रगट केली त्यांचे सद्गदित अंतःकरणानें आभार मानून आजचा हा लेख येथेंच आटोपता घेतों.

स्फुट विचार

एक पत्रकः—प्रागतिक संघाची परिषद भरण्यापूर्वी गेल्या ३० तारखेला पणजीच्या सिनेमांत सभा बोलावून जें एक जाहीर पत्रक प्रसिद्ध झालें, त्यावर अनेकांच्या सह्या झळकत होत्या. त्यांपैकीं बहुतेक नकली होत्या, असें आतां खात्रीपूर्वक ह्मणण्यास हरकत नाहीं कां कीं, त्या 'सहीवाल्यां'पैकीं जे गृहस्थ प्रागतिक संघाचे सभासदत्व पत्करून कवळेंच्या सभेस हजर होते, त्यांनीं आपणहून त्या सुंदर व ऐक्यवर्धक पत्रकाच्या गांवचेच नव्हत, असें स्पष्ट सिद्ध केलें आहे. सिनेमांत 'फिल्मस' नकली गोष्टींची नकल करून प्रेक्षकांनीं अक्कल गुंग करतात, हें ठीकच आहे. पण या खोट्या 'मायेचा' आधार घेऊन खोट्या सह्यांनीं अखिल हिंदु महासभेचा पाया घातला गेला तर तो मजबूत होईल काय, याचा विचार अखिल हिंदु जनतेनें करावा, अशी आमची विनंती आहे.

एकी कीं बेकी?:—अखिल हिंदु महा सभेनें ऊर्फ मंडळानें एकीच्या नावानें जी बेकी करण्याचें श्रेय संपादन केलें आहे, त्यामुळें तिच्या चालकांचें कल्याण होईल. त्यांतील कित्येक लिहितात दित करें सावेल हें मात्र समजणें कठीण आहे. एकीच्या नांवानें बेकी करणारे श्रीमंत व सज्जन लोक. याचा खुलासा करतील काय?

वर्तमानसार

—कवळें येथील परिषदेंत वर्तमानपत्रांच्या वतीनें दळवी, तिरोडकर, प्रियोळकर, कामत, केरकर, नाईक इत्यादि गृहस्थ सभेचा रिपोर्ट घेत होते.

—पणजीच्या ३० तारखेच्या अखिल हिंदु महासभेंत अनेक चमत्कारिक गोष्टी घडून आल्या. प्रोफेसर सिनारी, श्रीमंत लोलीकर, दोतोर घांटकर इत्यादिकांचीं जोरदार भाषणें झालीं. मध्यंतरीं दिग्वांनीं दगा देऊन सभागृहांत काळोखाचे ढग पसरविले. घांटकर साहेबांनीं अखिल हिंदु महासभा ही प्रागतिक संघाची लहान बहीण आहे असें सांगितलें. शुभ्र पोशाख वापरणारे प्रो० काळे यांनीं सभेचा समारोप केला. समेटवादी रवळू शेट खलप यांनीं समेटाविषयीं पुढें टांकलेला प्रश्न टाळ्यांच्या गजरांत 'छिन्नभिन्न' केला गेला. नवीन पत्र काढण्याचाहि ठराव पास झाला. डॉ. सिनारी साहेबांचे किमान रेगीव जास्त हजर होते. येरच्या मंडळींला चहा पाजला गेल्यामुळें सभेची बरीच कडक चहा झाली. एकंदरींत सिनेमा गृहांतील ही सभा सिनेमाप्रमाणेंच प्रेक्षणीय झाली, असें आमचे तेथील बातमीदार कळवितात.

हितोपदेश कीं द्वेषाचे बोल?

[लेः— शिवराव. पणजी.]

"भिन्नरुचिर्हि लोकः"

असें सांगतात कीं, मुमुक्षु योगाभ्यास करूं लागला ह्मणजे, बद्धावस्थेंतून बुद्धावस्थेंत ह्मणजे स्थितप्रज्ञावस्थेंत पोंचण्यापूर्वी तपाच्या योग्यतेप्रमाणें त्यास मध्यंतरी अष्टसिद्धि प्राप्त होत जातात. कमकुवत मनाचा योगी जर ह्या सिद्धींचा, योगाभ्यास सोडून, स्वार्थाकडे उपयोग करूं लागला तर हळुहळु पुण्यक्षय होत जाऊन त्यास अंतीं नरकामध्यें जावें लागतें. याप्रमाणें प्रत्येक मनुष्याला—कर्मयोग्याला—चवाल्या २१ व्या वर्षी मत व शिक्षा प्राप्त होत असतात. या अस्त्रांचा, या सिद्धींचा, मताचा दुसऱ्यावर मात करण्यात व शिक्षावर फक्त पिळ देण्यांत जर तो उपयोग करूं लागला तर कर्मयोगापासून च्युत होऊन याची फार हलाखी होते.

आपल्या या गोव्यांत सध्या एक काल चालू आहे; मोनार्कीतून रिपब्लिक गुलामगिरीतून स्वातंत्र्यांत, पुराणतून सुधारणेंत, व सिध्या आयुष्यांतून राहाणींत, एकदम क्रांति होऊन गोव्याचा प्रजा सध्या येऊन पोंचली आहे. जुने लोक अनिश्चित (सध्याच्या लोकांच्या मतानें) यांत १५ ते ३० च्या दरम्यान

अमिमानी संस्कृतज्ञ मोक्षमुल्लर यानीं सुद्धां दिलेली आहे. पाश्चात्य लोकांत तंटे–बखेडे होत नाहींत असें नाहीं. मानवी स्वभाव अद्याप तसा बनलेला नाहीं. त्यांच्यांतही मतभेद पक्षभेद आहे तच. परंतु ते व्यक्तीकरितां उपन्न झालेले नसून तत्वाकरितां उत्पन्न झालेले आहेत. आणि ह्मणूनच आपल्या राष्ट्रावर कोणतेंही संकट आल्यास त्यावेळीं हे सर्व मतभेद बाजूस सारून "आपण सर्व एक देशबांधव आहों.' या भावनेनें ते राष्ट्राला मदत करण्यास तयार होत असतात.

* * *

प्रो.सरकार "वर्तमान जगत् खंड ३ इंग्लंड" यांत ह्मणतात:– महायुद्ध पुकारलें जतांच आर्यलंडचा तंटा तात्पुरता मिटला. [Unionist Natio nalest Labour Sartr Concervativo saclicae] यानीं आपापले सर्व मतभेद बाजूला सारून राष्ट्रास एकोप्यानें मदत करण्याची तयारी केली. आस्ट्रेलिया न्यूझीलंड, कानडा वगैरे वसाहतींत साम्राज्याला मदत करण्याची तयारीं होत आहे. घरांत तंटे कितीही असूं द्या. शत्रूच्या विरुद्ध सर्व एक. इंग्रज साम्राज्य या ऐक्य शक्ती मुळेंच बलवान होऊन लढाईस तयार झालें आहे.

\+ × +

आम्हीं गोमांतक वासियांनीं हा गुण सर्वथैव घेण्यासारख्या योग्यतेचा नाहीं काय? व्यक्तिव्यक्तींची भांडणें मुद्दाम संस्थेंत आणून येन केन प्रकारेण संस्था मोडण्यास आपण सर्वथैव तयार! कोणत्याही प्रकारें व्यक्तीचें महत्व प्रस्थापित झालें पाहिजे. त्याकरितां देशाचें कितीही नुकसान झालें तरी हरकत नाहीं. ही राष्ट्रघातकी भावना आपल्या लोकांच्या रोमंरोमांत भिनून गेली आहे.

* * *

ब्रिटिश हिंदुस्थान आमच्यापेक्षां पुष्कळ पुढें असला तरी काहीं अंशीं हीच स्थिति मुंबई कार्पोरेशननें गोवध प्रतिबंधक ठराव करतांच उलेमानीं निषेध प्रदर्शक सभा केल्या! डॉ. मुंजे यांनीं हिंदुधर्मसंरक्षण कार्य हातांत घेतांच कलकत्याच्या मुसलमानानीं चिडून जाऊन डॉ॰ मुंजे यांना राष्ट्रीय सभेंतून हाकून लावण्याचा ठराव पास केला. ही स्थिति काय दर्शविते? तरी पण या गोष्टी मुसलमान बंधूडूनच घडतात हें लक्ष्यांत घेण्यासारखें आहे.

के. भारती.

मदिरादेवी

[विनोदी लेख]

(लेः-"गडकरी चेला" मडगांव)

हे मदिरादेवी, तुझी लज्जत, ती मनमोही चव मी एका तोंडानें किती म्हणून वर्णूं! तुझा सुवासिक ओटो दिलबहार! अहाहा!! मदिरा दारू! हृदयंगम काव्य! उगाच नाहीं, तो संजीविनी विद्याशोधक शुक्राचार्य तुझ्या नादीं लागला! धन्य तुझी! तूं मला गटारांतील घाणींत सुद्धां लोळतांना स्वर्गसुख भासविलेंस! लोखंडाचे चणे सुद्धां न खातां तूं वाटेवरून गिरक्या घेत चालतांना ब्रम्हानंदीं टाळी लावलीस! सर्व शिव्यांची नामावळी पाठ करतांना तुझ्याच कृपेमुळें तोंडावर रसवंती प्रमाणें नाचूं लागली! आनंद! सदानंद! ब्रम्हानंद!!! तूं सनातन आहेस, तरी तुला जरा प्राप्त झालेली नाहीं! एखाद्या तरुणीच्या गालांवरील गुलाबी रंगाप्रमाणें तुझी तांबूस प्रभा बाटल्यांतून फांकत आहे! हे देवी मी तुझा दास आहें! मजवर अनुग्रह कर! तूं वृद्धा असूनही नवबाळा आहेस! हे देवी तुझ्या कृपाप्रसादाच्या द्योतक समजलेल्या खुणा ह्या शरिरावर आरोहण होऊं देत! पोट पाटीस चिकटूंदे! हाडांच्या काड्या व पोटाचा नगारा होऊंदे! हे देवी ह्या भर तारुण्यांत जिवंत असतां देहावर प्रेतकळा नाचूं दे! तूं ग्लासांनीं प्रसन्न होत नसल्यामुळें मी बाटल्यांच्या बाटल्या तोंडाला लावून महापूजा करीत आहें! हा माझा भक्तिभाव मनांत जाणून मला दिवसभर ब्रम्हानंदांत मग्न कर! ह्या स्वार्थी, पापी जगाचा मला विटाळ नको। हे देवी हेंच मला मागणें दे! हा भक्त तुझा गरीब आहे। तरी तुझी होईल तितकी पुजा केली! त्यांत काहीं न्यून केलें नाहीं! घरदार विकलें! इस्टेट गहाण टाकली! फार तर काय? गृहिणीचे दागीनें सुद्धां, तुझ्या प्रसाद सिध्यर्थ अर्धमेल्यास गुत्तेवाल्यास खावविले! आरशाप्रमाणें घर स्वच्छ झाल्यामुळें तूं मला रोगांच्या भीतिपासून मुक्त केलेंस! हे देवी इतक्यानेंच काहीं भागलें नाहीं। मी तुझ्या कृपेनें बिनभाड्याच्या खोलींत राहिलों! दगडफोडण्याचा व संडास साफ करण्याचा केवळ तुझ्या कृपेमुळेंच समारंभ झाला! तूं सरस्वती आहेस! लक्ष्मी आहेस! तूं नारळाची आई करटी सुद्धां आहेस! बाटला बाई आहेस! गिन्हाद आहेस! (दारू घेतल्याबरोबर सर्व जग गिरक्या खात आहे असें भासतें म्हणून "गिन्हाद हें नांव एका प्रसिद्ध मद्यप्यानें दारूला दिले आहे!) तूं ओटो दिलबहार मागें टाकलास! तूं कितीतरी लोकांवर उपकार केले आहेस. पण हे स्वार्थसाधू कृतघ्न लोक जाणत नाहींत! तूं गिन्हाद हा नवा शब्द उत्पन्न करून मदिरा प्रेमी लोकांवर उपकार केले आहेस! तुझ्या ओटोदिलबहारवर तुझ्याच अनुग्रहामुळें बडीशेप, वेलडोडे, हे रामबाण शोध लावतां आले! तारुण्यांतली तांबूसप्रभा तूंच एकवटून डोळ्यांत सांठविलीस! देवी माझ्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या! परंतु माझें तुझ्याजवळ एकच– फक्त एकच मागणें आहे. तें हें कीं– तुझ्या सर्व भक्तानीं माझ्या सारखी लाज सोडली नाहीं. ते मागच्या दारांत येऊन घेतात. किंवा कोणाजवळून आणून घेतात! तेव्हां कृपा करून तूं ही लज्जा त्यांच्या मनांतून काढून टाक! आणखी एक शेवटची मागणी. विज्यापुरच्या कलेक्टरानें जशी दारू घरोघर विकण्याची सोय केली, तशी इकडे कर! म्हणजे मला चढली असतांही घेतां येईल! देवी! देवी!! अनुग्रह कर! ही मी बाटली तोंडास लाविली आहे! एक हातांत व दुसरी खिशांत आहे! वश हो! गिन्हाद! गिन्हाद!!

mitiu fazer render os nao adeptos a' forga da espada por uma razao muito simples; se assim fosse seria forgoso aceitar ainda uma mal idealisada religiao cujos sectarios soubessem manejar bem as espadas e perseguir os outros com carnificina e devastagao !

Naò ha duvida que as formas a ritos das religioes variam segundo o meio, tempo e nivel da civilisagao e por essa diversidade ninguem tem direito a, ofendendo, desprezal.os porque e' um assunto relativo a' puraza da sua consciencia e DEos, a ponto de chegar a sugerir que a sua religiao merece ser protegida pelo Estado. Sugestao para que ? Para calar o deferente hindu que esquecendo seu direito deixou de reagir contra a nao execugao da lei da separagao da Igreja e do Estado e quando este, contribuindo paralelamente ficou, mudo e quedo ?

Estejam quietos. Pois afirmovos a vo's que o hindu nunca acordara' do profundo sono do indiferentismo !

Aquelas assergoes gratuitas proviram do amor de Deus e da religiao simultaneamente ? Nao nos parece porque nesse caso seriam eles os primeiros a contribuir as suas instituigoes religiosos a' par de outras Hindus etc. deixando de gritar por essa lei, aliviando desta maneira o enorme encargo do padroado sob cujo peso se curva a espinha dorsal do tesouro publico

Nao se explica qual foi o ideal da primitiva revelagao e qual e'o da moderna revelagao que se diz datar dos ensinamentos de Jesus Cristo; os que elogiam so" este inconscientemente, nao so'formam um libelo acusatorio contra os seus avoengos nao convertidos a' fe' do Cristo para expulsalos do Ce'u, mas tambem contra os da era primitiva inclusive os ancestraes do lado materno de Jesus Cristo como ignorantes da revelagao da saivagao, o que de resto Jesus Cristo nao permitiria; portanto era logico que se respeitassem a primitiva revelagao manifestada em prol da humanidade inteira sem exclusoes.

Parece-nos a no's que esses avoengos lastimarao a ingratidao da sua geragao !

Nem se diga que a religiao hindu por adoptar idolatria e politeismo foi objecto de desprezo !

Ela tem muitas razoes para tomar aquela medida, razoes que serao expostas oportunamente; por ora so' basta dizer que a religiao hindu ensina a atingir áquela inconcebivel idea deDEos pela idolatria

Mas qual e' o ideal puro duma religiao sublime ?

Pelo meu fraco modo de pensar, a religiao convem ser difinida assim:-- *Re ligare* =ligar de novo.

A religiao Hindu explica-o assim: O espito humano alias dimanado do supremo espirito divino disligeuse como o grao de sal que se separou do mar.Convem que seja religado desfazendo o egoismo interesseiro e livrando-o de paixoes. Eis a necessidade de religiao que estabelega preceitos para alcangar o Supremo Pae.

Mas como religa—lo ? e qual o meio ?

Na religiao espiritual a fe' age como um nexo para unil—o asseme lha—lo a Ele— Creador omnipotente meditando—o em tudo e por tudo.

E' esse o puro ideal de todas as sublimes religioes; aquela e' religiao sublime que perfaz este puro ideal, seja de quem for, porquanto nao ha razao para dizer que esta e" verdadeira e aquela e' falsa.

Todos Santos Hindu's reconheceram a Ele a ponto de cada um chegar a exprimir instinctivamente " Eu sou Deus".

Diz—se que tambem Jesus Cristo embora com outras palavras disse "Eu com o meu pai sou unico".

Porque entao tantas agressoes com mil dessabores?

Pena e' que o estravagante critico fique iludido ao primeiro golpe da vista confundindo com os variaveis ritos a invariavel religiao.

S. M. S. Sanvordencar.

भारत

गुरुवार पौष शु० ४ थी, १८४९

हिंदु व राजकारण

सामाजिकदृष्टया हिंदु समाजांत अनेक पक्ष व पंथ आहेत ही सामान्य गोष्ट जरी बाकीच्या समाजांस परिचित होती तरी राजकारणाचे बाबतींत सर्व हिंदु एक आहेत अशीच त्यांची समजूत असे. 'असे' म्हणण्याचें कारण हेंच कीं, प्रागतिक संघ, हिंदुसभा, व गोवा हिंदु मंडळ या संस्था जन्मास येतांच उपरोक्त समजुतीचा शेवट झाला.

वास्तविक सर्व हिंदु लोक एक दृष्टीनें, एक विचारानें व एक धोरणानें राजकारणांत वावरत असत, अशांतला प्रकार नव्हता. विशेषत: निवडणुकीच्या बाबतींत जो तो आपापल्या सोयीप्रमाणें मताधिकाराचा उपयोग करीत असे. नोकर वर्ग आपल्या धन्याची मर्जी संपादण्यासाठीं झटे तर मध्यम स्थितींतील लोक बहुतकरून श्रीमंत लोकांच्या ओंजळीनें मताधिकाराचें पाणी पिण्यास सोकावलेले दिसत. कोणी सरकारच्या हितीं आपला मताधिकार गाजवीत असे तर कोणी खिस्ती लोकपक्षीय पुढाऱ्यांना स्वमत अर्पण्यांत धन्यता मानून घेत असे. एवंच मतदानासंबंधीं, सर्व हिंदुसमाजाचे प्रयत्न केव्हांच एकदेशीय होत नसत.

अशी जरी वस्तुस्थिति होती तरी राजकारणांत सर्व हिंदु एक आहेत, असाच खिस्ती व युरोपियन लोकांचा समज बनलेला होता. व या समजानुरूप निवडणुकीच्या संबंधांत तें हिंदु लोकांचा योग्य मान राखण्यासाठीं आपापल्यापरी अनेक रीतींनें झटत असत. आणि या माना मुळें हिंदु लोकांना मान वर काढून निवडणुकींत भाग घेण्यास सांपडे.

प्रागतिक संघ स्थापन होऊन हिंदु समाजांत ऐक्य वसत आहे, हिंदु लोक हे केवळ परप्रकाशित नसून ते स्वयंप्रकाशित आहेत, या गोष्टीची जाणीव इतर समाजांस करून देण्याचें श्रेय सदरील संस्थेच्या सभासदांनीं संपादन केलें व ऐक्यामुळें हिंदु समाजाविषयीं त्यांच्यांत वसत असलेल्या पुज्य बुद्धींत विशेष भर घातली, यांत संशय नाहीं.

प्रागतिक संघानें बजावलेल्या या महत्वाच्या कामगिरीकडे व त्याहूनहि जास्त महत्वाच्या अशा संघाच्या ध्येयाकडे दृष्टि वळवून, त्याच्याशीं फटकून वागणाऱ्या इतर हिंदुबांधवानींहि प्रस्तुत संस्थेंत आपला शिरकाव करून घेतला असता, तर आज जो हिंदूंच्या बेकीतिकीचा नगारा जिकडे तिकडे घडाडत आहे, तो घडाडला नसता, हें उघड आहे. या नगाऱ्याच्या घाईपुढें हिंदूंच्या मानमान्यतेच्या तुणतुण्याकडे कोण लक्ष देईल ?

ह्याच दृष्टीनें हिंदुसभा व गोवा हिंदुमंडळ या संस्थांचें अस्तित्व पक्षभेद निदर्शक असल्यावरून हिंदुसमाजास तें कल्याणकारक होईल असें आम्हांस वाटत नाहीं. या नवीन संस्था स्थापून मतभेदाचें उघड प्रदर्शन करण्याच्या ऐवजीं, त्या त्या संस्थापकानीं प्रागतिक संघांतच आपला प्रवेश करून त्याचीं मुख्य सूत्रें आपल्या हातांत घेण्याची मुत्सद्दीगिरी दाखविली असती, तर हिंदुसमाजाचीं जीं आज तीन शकलें झालेलीं दिसून येतात, तीं दिसून न येतां, उलट हिंदुसमाजांतील एकीचा लौकिक विशेष दृढ तर झाला असता, या विषयीं दुमत असणें शक्य नाहीं.

म्हणून ३ जूनपासून हिंदुसभा व गोवा हिंदुमंडळ या उभय संस्थांच्या चालकांस आमची अशी विनंति आहे कीं, सर्व मतभेद बाजूस सारून त्यानीं प्रागतिक संघांत त्या दोन्ही संस्थास अंतरभूत करून घेण्याचा प्रयत्न करावा. हें युग बहुमताचें आहे. बहुमताचा कांटा ज्या बाजूस वळेल त्या बाजूकडच्या लोकांकडे राजकारणाचीं सूत्रें जातील. हिंदुसभा व गो. हिं. मंडळ यांच्या बाजूनें बहुमत वहात असेल तर संघाचें चालकत्व त्यांच्या कडेसच येईल. असें जर आहे तर निरनिराळ्या संस्थांस जन्म देऊन हिंदूंच्या संघशक्तीचा दुही माजविण्याचें कामीं दुरुपयोग होणें राजकारणाच्या दृष्टीनें क्षम्य होईल काय ?

स्फुट विचार

कर वाढ:—गेल्या महिन्याच्या २७ तारखेला जी कोंसेल्य लेजिस्लातीव्हाची बैठक भरली होती, तींत नवीन करांचें बिल सरकार पक्षाकडून पुढें करण्यांत आलें. हें बिल जनतेला गांजवून सोडणारें असल्यानें त्याला, बैठकीस हजर असलेले दोन लोकपक्षीय मेंबर खेरीज करून, प्रजेच्या इतर सर्व प्रतिनिधींनीं कसून विरोध केला. परंतु बहुमतानें सरकार पक्षाची कास धरल्यानें, करवाढीचा तो त्रासजनक ठराव अखेर पास होऊन, करांची वाढ होऊं नये असें इच्छिणारांची आस कोठेंच्या कोठेंच 'दवली' गेली !

लोकपक्षाचें तेज:—लोकपक्षाच्या आशेवर दडपण पडलें खरें, पण त्याचें तेज मळलें नाहीं. उलट त्यानें व्यक्त केलेल्या खंबीरपणामुळें तें जास्तच चमकलें. त्या दैदिप्यमान तेजानें सरकारी डोळे दीपून गेले असले पाहिंजेत, अशी आमची खात्री आहे. सगळेच लोकपक्षीय मेंबर कांहीं सरकारी मेहरनजरेनें कर्तव्यशून्य बनणारे नाहींत; त्यांना आपल्या प्रिय देशाची व कीर्तीची चाड आहे; आपल्यावर जनतेनें संपविलेल्या जबाबदारीचें महत्व त्यांना पूर्ण कळून आलेलें आहे, इत्यादि गोष्टींनीं लोकपक्षीयानीं सरकारला राजरोस विरोध करून, सिद्ध केलें, ही आनंदाची गोष्ट होय. व याबद्दल भारत त्यांचें कौतुक करीत आहे.

सरकारी गोंधळ:—करवाढीच्या त्या बैठकींतून स्वस्थान त्याग करून, लोकपक्षीयानीं नवीन करांला कोणत्याच रीतीनें पाठिंबा दिलेला नसून उलट पाठ दाखविली. त्या वेळीं ज्या रीतीनें करांना विरोध करणें शक्य होतें, त्या तऱ्हेनें तो केला गेला. यावरून असें समजावयाचें नव्हतें कीं, लोकपक्षीयानीं कौंसिलची कायमचीच रजा घेतली ! परंतु सरकारनें आपला तसा समज करून घेतलेला आहे, असें दिसतें. नाहींतर लोकपक्षीयांना फांटा देऊन नवीन करांचा कांटा जास्तच दृढतर होण्यासाठीं कांहीं मिंधे दुय्यम मेंबरांच्या 'धांवत्या' मदतीनें पुढील बैठका कशातरी साजऱ्या करण्याचें लोकहितभंजक काम सरकारनें केलें नसतें. !

लोकांचें कर्तव्य:—आपल्या प्याद्यांच्या सहाय्यानें सरकारनें लोकपक्षावर तर मात केलीच व डाव जिंकला, ही गोष्ट उघड झालीच. परंतु यामुळें जनतेनें स्वस्थ राहतां कामा नये. प्रागतिक संघ, हिंदुसभा, गोवा हिंदुमंडळ, पारतीदु पोपुलार, पारतीदु इंदियान व इतर सर्व लोकपक्षीय संस्थांनीं आपापसांतले भेद विसरून करवाढीच्या या धांवत्या गाडीस खीळ घालण्याप्रीत्यर्थ एक समयावच्छेदें झटलें पाहिजे. आपलें अस्तित्व निवडणुकांसाठींच नसून करवाढीसारख्या सरकारी आततायी धोरणासहि मज्जाव करण्यासाठीं आहे, असें उपरोक्त संस्थांच्या चालकांनीं निर्भिडपणें व सक्रीय सिद्ध करून दाखविलें पाहिजे. गोमांतकीय प्रजा ही 'पेजखाऊ' असली, तरी आत्मसंरक्षणासाठीं आवश्यक असलेलें तेज तिच्यांत मुरत आहे, याचीही ओळख सरकारला पटवून दिली पाहिजे.

—रायबंदर येथील श्रीशारदावाचनमंदिराचा १० वा वाढदिवस गेल्या १ ल्या तारखेला थाटानें पार पडला. उत्सवास प्रो० रामचंद्र शंकर नाईक, प्रो० रामचंद्र श्रीधर पै वेर्नेकर, विठ्ठल पु. ना. पनवेलकर, डॉ० आत्माराम बोरकर, नामदार देसाई, डॉ० साखरदांडे, प्रो० कृष्णाजी केणी, महादेव काकुले, इ० मंडळीं हजर होती, असें तेथील आमचे बातमीदार लिहितात.

देव, श्रीएकनाथ, श्रीरामदास व श्रीतुकाराम ह्या महाराष्ट्र साधु पंचायतनाचे गुणानुवाद गाऊन पांच आरत्या कल्पिल्या आहेत. श्री गीतावळींत एकतीस सुरेख गीतें असून त्यांतील बहुतेक कैवल्यपुरनिवासिनी श्री शांतादुर्गा देवीस समर्पण केलीं आहेत, भक्तिरस अवश्य तेवढा आहे.

भगवदभक्त प्रल्हादानें भक्तीचे नऊ प्रकार कथन केले आहेत व समर्थ रामदास स्वामींनीं भक्तीचीं लक्षणें विस्तृत केलीं आहेत. ह्या नवविधा भक्तींतील द्वीतीय भक्ति "कीर्तन" ह्या सदरांत दोनही पुस्तकांची गणना करितों.

व्यवहारांत कोणी कोणी संतांना देवाखालीं दुसरा नंबर देत असतात. माझ्या एका बहुश्रुत मित्राच्या मतें देवापेक्षां संतांचा महिमा अतर्क्य आहे. ते दिसण्यांत मनुष्य असतात, पण साक्षात् ईश्वराचे अंश होत. चित्ताची शुद्धि करून तें ईश्वराकडे वळविण्याचें अद्‌भुत सामर्थ्य संतांत वास्तव्य करितें,

"साधु दिसताती वेगळाले।
परी ते स्वस्वरूपीं मिळाले।
अवघे मिळोनि एकचि झाले।
देहातीत वस्तु॥"

ह्या समर्थोक्तीप्रमाणें सर्व संत एक रूपच आहेत. लौकिक दृष्टीनें संत मालिकेंत तुकोबारायांना कोणी अग्रगण्य मानितात तर कोणी ज्ञानेश्वर महाराजांना अग्रेसरत्वाचा मान देतात. कसेंही असो सर्व साधूंनीं मनुष्यप्राण्याला ईश्वरप्राप्तीचा सुलभ उपाय भक्तिमार्ग हा रेखाटून दिलेला आहे.

रामकृष्णासंबंधानें किंवा राधाकृष्णासंबंधानें कितीएक विद्वानांचे मतभेद आहेत. यद्विषयीं श्री रामकृष्ण परमहंस ह्मणतात:— "कृष्ण व राधा हीं अवतारी माणसें होतीं, याच्यावर कोणाची श्रद्धा असो वा नसो. ईश्वरी अवतारांवर कोणाचा विश्वास असेल कोणाचा नसेल..." आणखी एका ग्रंथांत वेदव्यासांचें वचन आहे, तें असें:—"राम हा पूर्णावतार व श्रीकृष्ण हा पूर्णतमावतार."

सदरहू ग्रंथकार ह्मणतात कीं, "जीवाला नरदेह प्राप्त झाला ह्मणजे त्यानें मुक्त होईपर्यंत कसें वर्तन करावें हें श्री रामावतार धारण करून परमेश्वरानें दाखवून दिलें आहे, व पुढें मुक्त झाल्यावर त्यानें कसें वर्तन करावें हें श्री कृष्णावतार धारण करून परमेश्वरानें दाखविलें आहे."

रामकृष्णादिकांनीं किंवा भक्ती ज्ञान, आणि वैराग्य ह्या तीनही ऐश्वर्यांनीं संपन्न अशा भगवद्भक्तांनीं जे जे चमत्कार करून दाखविले आहेत यद्विषयीं आणखी एक ग्रंथकार ह्मणतात कीं, "नामदेवाचा नैवेद्य पाषाणरूपी देवांनीं कसा खाल्ला? पाषाणाचे ठिकाणीं चेतनधर्म खाणेंपिणें इत्यादिक कधीहि संभवत नाहीं, तर आमचें एकदें म्हणणें आहे कीं, ईश्वर हा कर्तुम, अकर्तुम् शक्तः म्हणजे पाहिजेल ती गोष्ट करण्याला, नकरण्याला आणि कोणतीही गोष्ट उलट करण्याला समर्थ आहे. व ह्मणूनच परमेश्वरामे रामचंद्र अवतारी शिळेची स्त्री करणें समुद्रावर पाषाणमय सेतु बांधणें व वानरांकडून राक्षसांचें हनन तसेंच नृसिंह अवतारीं स्तंभांतून जनन व ब्रह्मदेवाचे सर्व वर संभाळून हिरण्यकशिपूचें विदारण व याच प्रमाणें कृष्णावतारीं जन्मून पुरते दहा दिवस झाले नाहींत तोंच पूतना नामक राक्षसीचें प्राण हरण व गोवर्धनो द्धारण केलें. मग त्या सर्व व्यापक ईश्वरास पाषाणमय मूर्तींच्या द्वारें संभाषण, नैवेद्यभक्षण किंवा दुग्धप्राशन ह्या गोष्टी काय अशक्य आहेत?"

भगवान गोपाळकृष्णानें गोवर्धनपर्वत उचलून धरिला, ह्याचें सत्यत्व मयूर कवींच्या खालील भक्तिपर केकेंत स्पष्ट दिसून येण्याजोगें आहे:

व्रजावन करावया वसविलें न खाग्रीं धरा॥
सलील तैं मंदराख्यति नगस्व पृष्ठीं धरा॥
वराह तनु घेउनी उचलिला रदाग्रें धरा॥
सुदुर्धर तुम्हां कसा पतित हा नकां उद्धरा

अर्थ सोपा आहे. 'नायकवीर कवींचा असें ज्यांना एके ठिकाणीं म्हटलेलें आहे ते रामोपासक 'दास मोर' अयथार्थ विधान करितील असें म्हणतां येत नाहीं. 'असता जरि भूमिवरी सुरगुरु तरि तोहि मान वांकविता, असा गौरव होण्याचा ज्या कवीच्या अधिकार तो श्रीकृष्णानें गोवर्धन पर्वत उचलून धरिला असें कबूल करण्यास कचरत नाहीं. पर्वत उचलून धरणें हें मानवीशक्ती पलीकडचें आहे

गोप, गोपी, गोपाल, गोकुल ह्यांचाही तात्विक दृष्ट्या पंडितांनीं अर्थ केला, आहे, इतकेंच नव्हे, रासक्रीडेचें देखील अध्यात्मिक स्वरूप प्रकट केलें आहे.

आश्विन वद्य अमावास्या "या दिवशीं भगवान श्री विष्णूनीं लक्ष्मीस आणि सर्व देवांस बलीच्या कारागृहांतून मुक्त केलें, यामुळें सर्व देवांनीं क्लेशमुक्त होऊन क्षीर सागरांत शयन केलें व लक्ष्मी कमलामध्यें जाऊन निजली." हेंच लक्ष्मी पूजनाचें कारण होय. अशा आनंदी आनंदांत 'आदिशक्ती महामाया सच्चिदानंद रूपिणी' श्री शांतादुर्गा देवीच्या उपासकांना श्री गीतावलीचा लाभ व्हावा ही समाधानकारक गोष्ट होय.

पुस्तक प्रकाशनाप्रीत्यर्थ इतकी ही झीज सोसून निरपेक्ष बुद्धीनें चालविलेली संतांची आणि ईश्वराची सेवा कवि आणि प्रकाशक ह्यांना सुखप्रद आणि यशप्रद होऊन उभयतां सर्वांच्या कृपा प्रसादास पात्र होवोत. शुभंभवतु.

डि० फं० ४ आणे   सारस्वत

ANUNCIOS

Pelo juizo de direito da comarda de Quepem e cartorio do escrivao do 1 ° oficio Redcar, vae a praça para a venda em hasta publica a porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem ao lado de estrada nacional que de Quepem se dirige a estaçao de Sanvordem no dia 15 do proximo mez de Janeiro pelas 10 horas, pela 3.a vez e pelo prego que a praça der os seguintes moveis. Um par de sapatos, Um dito de meias, dois cocos verdes pescascados, Um lengo branco, Uma lata vazia, Uma escova, Uma faca, Tres caixas de papel, um carril de linho e um pedaço de renda e tres pudvins de borda de seda, todos aqueles objectos pertencentes a queixosa Lucia Va's, natural de Karvar e residente em Curchorem, nos autos crimes de querela que o Ministerio Publico nesta comarca promoveu contra Mamod Kan e outros. O arrematante pagara' as despezas da praça alem do preço da mesma dentro de 3 dias. E para ser publico se expediu este. Xeldem 22 de Dezembro de 1923.

O escrivao de direito
Babu V. Camotim Redcar

Verifiquei
O juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do 1 ° oficio Redcar, vao a praça para venda em hasta publica a porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige a estaçao de Sanvordem no dia 15 do proximo mez de Janeiro as 10 horas pela 3.a vez e pelo prego que a praça der os seguintes predios. Um dezoito avos do predio orustico denminado Ossela Sordo ou dOxelasordo a cultura de arroz um dezoitavos do predio rustico denominado Sordo Fondiem da cultura de arroz, um dezoito avos do predio rustico denominado Sordo Chindiem ou Chudiem da cultura de arroz, um dezoito avos do predio rustico denominado Xir da cultura de coqueiros; Uu dezoito avos do predio rustico denominado Vagrideulacodil da cultura de coqueiros, um dezoito avos do predio rustico denominado Porlento sordo da cultura de arroz e um dezoito avos do predio rustico denoninado Golicodil sorda da cultnra de arroz todos situados em Colomba e discritos respectivamente por inteiro na Conservatoria desta comarca sob os n.os 12451, 12452, 12453, 12455, 12456, 12458, 12459 e. e penhorados nos autos de execuçao por custas que o Ministerio Publico nesta comarca move a Gopica Velpina, vuiva de Pondo' Velipo e seus filhos de Cazolsai de Colomba, por apenso aos de inventario orfanologico procedido por obito de Pondo' Velipo que foi de Colomba para pagamento da quantia de 11:12:1/2 proveniente de custas e selos liquidados nos referidos autos de inventario orfonologico e de custas e selos acrescidos da execuçao. O arrematante pagara' a contribuiçao de registo por inteiro e as despezas da praga alem do preço da mesma dentro de tres dias. Por este sao citados quaisquer credores incertos e co-proprietarios. Xeldem 22 de Dezembro de 1923.

O escrivao de Direito
Airez Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direico
A. A. de Brito e Nascimento

PRIMEIRO CONGRESSO

DO

PRAGATICA SANGA

FOI UM TESTIMUNHO SOBERBAMENTE ELOQUENTE DE QUANTO VALE A COMUNIDADE HINDU NO CAMPO POLITICO E SOCIAL DA INDIA PORTUGUESA

Um desmentido formal ao enredo de intrigas, malevolamente, propaladas.

Quem estivesse em Quecula' no dia 29 do mez que fechou o ano de 1923, nao podia deixar de se extasiar numa alegria delirante e num entusiasmo enternecedor e profundamente comoventel

A alma do hindu' que se sente estremecida e emocinante pelas razoes de ordem va'ria no concelho de Ponda' tinha nesse dia atingido o mais alto grau de sua expansibilidade.

A noite vinha descendo; os congressistas aqui chegados na manha iam ao local de *duas colunas* para fazer recepgao do Presidente do Congresso.

Uma lancha especial saiu de Pangim a's 14 horas trazendo alem do sr. presidente e os congressistas daqui, os de Ribandar,Velha cidade de Goa,Cumbarjua,Cundaim eMarcaim e alcangou a doca de Durbate a's 17.30, onde uma comissao delegada da comissao de recepgao recebeu o Sr. Presidente no meio da salva de 9 morteiros. Alguns automo'veis e muitos carros numa corrida doida transportaram os congressistas ao local de duas colunas, sendo o sr. Presidente o ultimo a chegar ao dito local.

No meio de vivas a' Republica, Patria, India, Sua Ex.cia o Sr.Governador Geral e outras entidades e ao Presidente do Congresso, o cortejo poz-se em marcha ao som da musica. Desde a chegada da lancha a Durbate ate' ao recolhimento do Sr. Presidente ao local da residencia, os voluntarios que, em geral, eram os estudantes, sob o comando do seu capitao Dr. Balcrisna Sacardando', executaram um servigo a contento de todos.

No dia imediato, 30 a's 9 horas comegaram os trabalhos do Congresso. A assistencia era enorme, brilhando tambem nela os srs. Administrador do Concelho Eduardo Pereira, o Juiz Municipal Dr. V. Figueiredo, Gomes Pereira, Roncon, e outros.

As 10.30, chegou o principe de Sundem, sendo recebido a' porta do *mandap* pelo Admiuistrador do concelho ao som do Hino Nacional e entre os vivas da assistencia.

Terminada a saudagao o sr. R. N. Karande, versado nos *shatras*, recitou alguns versos em sanscrito pedindo bengao da deusa Xanta-Durga.

Em seguida, o presidente da comissao da recepgao sr. Dulba' Sadassiva Naique Primeiro Sar Dessai, encarregou o vice-presidente da dita comissao, Sr. Ramachondra Panduranga Vaidia, de ler o seu discurso que foi atentamente ouvido pela assistencia que o aplaudiu delirantemente em alguns dos seus pontos que literalmente traduziam o sentir geral.

Acabada a leitura do precioso documento que e' o discurso do sr. presidente, o sr. Xamba Crisna Suria Rau Sar Dessai propoz para a presidencia do Congresso, o conselheiro sr. Fotu' Sinai Quenero',proposta que foi secundada pelos srs. Roulu Xete Colopo, presidente do Hindu' Sabha' e Giu Folo Dessai, chefe' do Partido Popular de Quepem.

Tomou entao palavra o sr.Presidente do Congresso que pausadamente leu o seu discurso, que delineia a futura obra do *Pragatica Sanga*. Sao em seguida lidos mais de cem telegramas de diferentes pontos do pais de varios cavalheiros e associagoes e Bibliotecas, apoiando a patriotica obra do Congresso e dando plena adesao a todas as deliberagoes que o mesmo aprovar, tendo so' o sr. Lingu' Dolvi e Raiu Rego' telegrafado em seu nome e no dos seus amigos' protestando conta *a reuniao* do *Pragatica Sanga* !

Nestas alturas, o vice-presidente da Direcgao do Pragatica Sanga, dr. Atmarama Covinda Borcar, saudou a Republica Portuguesa na pessoa do sr. Administrador do concelho produzindo por esta ocasiao um substancioso discurso em portuguez.

O sr. Xamba' C. Suria' Rau Sar Dessai propos a'Assembleia a nomeagao da comissao de estudos, proposta que foi muito descutida na parte que dizia respeito a forma da sua constituigao tendo-se resolvido que os delegados de cada concelho aqui presentes deviam escolher quatro membros e tendo-se assim procedido foi nomeada a referida comissao de que, alem dos membros delegados dos conselhos, era composta dos srs. Presidentes do Congresso e da comissao de Recepgao e membros da Direcgao.

Assim terminou a primeira sessao do dia 30, tendo-se designado a sessao da reuniao da comissao de estudos para 15 horas.

Interim, tratou-se do assunto de conciliagao sobre que falaremos mais de espago.

Precisamente a' hora disignada, 15 horas do dia 30 reuniu-se a comissao de estudos sob a presidencia do presidente do Congresso e comegou a discutir a constituigao que e' o diploma fundamental do *Pragatica Sanga*. Esta sessao durou 3 horas em que a discussao sobre alguns artigos se fez viva e prolongadamente.

As 9 horas reuniu-se em sessao, a Assemblea do *Pragatica Sanga* sendo apresentadas, discutidas e aprovadas algumas mogoes. Feito isto, o abalisado jurisconsulto, Dr. Gomes Pereira que ate' entao acompanhara mesmo como um espectador, todos os trabalhos do Congresso, proferiu um emocionante discurso dizendo que levava a mais grata recordagao deste Congresso, quere pela ordem como correram os seus trabalhos, quere pela forma correcta como as mogoes foram aprovadas mesmo depois duma discussao mais ou menos acalorada. Ao encerrar a sessao que foi a ultima do dia 30,foram dados vivas a Republica, ao Dr. Gomes Pereira, e aos Srs. Administrador do Concelho e Juiz Municipal, designando-se a renniao da comissao de estudos as 9 horas do dia 31, a fim de continuar os seus trabalhos.

No dia 31 pelas 9 horas continuou a trabalhar a comissao de estudos que difiniu a lei organica do "Sanga bem como apreciou varias mogoes de interesse publico.

Pelas 16 horas abriu-se a ultima sessao do Congresso. Foi interrompida por espago de meia hora para se tomarem fotografias aos congressistas. Recomegada, depois de acalorada discussao, foram eleitos unanimemente um Directorio do "Sanga", composto de 14 membros e uma Comissao Central de 48 ditos.

Foram ainda aprovadas varias deliberagoes de interesse publico, tendo terminado o Congresso, um pouco depois de findar o ano velho ou um pouco antes de comegar o novo, com a indiscritivel satisfagao dos sinceros amigos do Sanga que tambem o sao do Paiz justificando por completo a multipla epigrafe do resumo da resumidissima descrigao que nos mandou o nosso representante sr. Datarama Govinda Camotim, ilustre membro da Comunidade hindu'.

E neste momento em que o completo exito do "Sanga" nos comove,sobremaneira, soltamos da nossa alma com o mais acrisolado dos entusiasmos o seguinte viva:

VIVA O PRAGATICA SANGA !

que costuma usar nas suas predicas:

— Filhal quando eu falo da Tribuna sagrada nao e' a ti que me dirijo e'...e'...a outros.

Entao, como o sermao do padre, e' so' a outros que se diz que se deve respeitar a crença alheia e nao se deve avançar para se por ousadamente na ofensiva?

O catolicismo nao carece da defesa bastando-lhe apenas para viver ar e luz exatamente como uma planta silvestre que Deus criou na floresta. Se assim e', ele deve ser dos tais que tambem se nao ofendem com cousa nenhuma deste mundo — tal qual um anacoreta.

Nestas condiçoes, para que tanto fosforo queimado, tanto papel desperdiçado e tanta tinta entornada? E' so para defender "o catolico que se diz ilustrado"? Ora sendo assim, nao era mais conveniente lavar essa roupa suja dentro da casa em vez de a trazer para a praça? Ou teria o catolicismo o calcanhar de Aquiles?

Queira Deus que va' isto sem perigo nem heresias. *V. Senior*

Ecos & Critica

Progresso

A India Portugueza esta' em franco progresso, desde que teve a dita de se ver governada pelo eminente estadista que e' o sr. dr. Jaime de Morais. Nao ha' nisto nenhum exagero. Senao vejam:

E' ou nao e' verdade que, no governo de Sua Excia, progrediu o *deficit*?

E' ou nao e' verdade que, durante a sua administraçao, progrediu o imposto?

E' ou nao e' verdade que, sob o seu dominio, progrediu a decadencia das Novas Conquistas?

E' ou nao e' verdade que, devido a a sua acçao governativa, progrediu o atraso dos vencimentos dos funcionarios?

E' ou nao e' verdade, finalmente, que na governaçao do sr. dr. Morais progrediu a empresa do *ULTRAMAR* orgao do "salamismo estomacal"?

Sim, sim, sim, *sim* e sim!

O paiz progrediu, pois, cinco vezes, durante quasi cinco anos do governo do sr. dr. Jaime de Morais.

E' pouco? Esperem que terao mais se quizerem.

Em todo o caso, pelo que fez, Sua Excia criou juz, pelo menos, a um monumento marmoreo ao lado dos de Vasco da Gama, Albuquerque e outros estadistas que engrandeceram este trexo de Malabar...

Fraternidade jornalistica

O corpulento e robusto secretario do *Ultramar*—rei da situaçao—lembrou-se de ir, num desses dias do *terral*, ao encontro do magro e fraco director do *Diario da Noite*—rei da oposiçao.

¿Para que era esse encontro que nao chegou a efectivar-se entre dois, membros do jornalismo luso-indiano?

Ninguem o diz, mas todos o sabem' O encontro era para a forga *bruta* impor scilencio a' *luz* racional.

¿Foi bom o que se passou? Que diga o Paiz que se queixa da imperfeiçao autonomica e da *subujice* dos *amanuenses* do Terreiro do Pagol

E viva a *Fraternidade*!!

Patriotismo ...

O nosso presado colega da *India Portugueza*, orgao do grande Partido Indiano dedica, no seu n.° 15 de 10 do corrente, um bom espaço para por em foco as *brilhantes* qualidades da gente *ultramarina*, a mesma que a' forga de bajulaçoes e do *Salam tipi camente oriental* esta' enchendo o seu papo dos bocadinhos de apa com que lhes atira a' cara o sr. dr. Jaime de Morais e o Paiz dos impostos com que ele o esmaga.

Quanto a no's, a *India Portugueza* gastou, inutilmente, a cera ... com ruins defuntos, pois nao ha no Paiz, quem ignore as manhas e mais as *sanhas* dos tais do *apoio* que so' faz honra aos srs. dr. Jaime de Morais e Caitano de Figueiredo, incluindo os grandes homens que o sao os srs. POLIBIO MASCARENHAS e PEDRO ANTONIO COELHO cujo patriotismo vai ser registado na historia com letras de oiro!

E' verdade. De sobejo sao conhecidos os "ultramarinos" e portanto nao ha' quem os compre...por maiores atrativos de que se revista o anurcio.

जाहीर सूचना

प्रागतिक संघाच्या कवळें येथें भरलेल्या पहिल्या परिषदेंत, "रेजिस्त सिव्हीलच्या कायद्यांत, हिंदूंच्या धार्मिक अडचणी लक्षांत घेऊन कोणकोणते फेरफार होणें आवश्यक आहेत, याचा रिपोर्ट करून तो संघाच्या कार्यकारी मंडळाकडे सादर करण्यासाठीं जी एक कमिटी नेमली गेली आहे, त्या कमिटीतर्फे व त्या कमिटीचे नम्र सभासद या नात्यानें जाहीर करण्याची परवानगी घेतों कीं, वरील कायद्यामुळें येणाऱ्या अडचणी व त्या निवारण्यास काय काय फेरफार होणें इष्ट आहे यासंबंधीं विचार करून त्यांची यादी येथील कार्यकारी मंडळाचे एक सन्मान्य सभासद डॉ० बाळकृष्ण दत्ताराम साखरदांडे यांकडे येत्या ३० तारीखपर्यंत लिहून पाठवावी अशी सर्व हिंदु बांधवानां आमची आग्रहाची विनंति आहे. कमिटीच्या पहिल्या बैठकींत त्यांचा विचार होईल.

पणजी पौष शु० ५ मी शके १८४५

ता. ११-१-१९२४ स. नम्र

दत्तात्रेय तुकाराम पणशीकर

जनार्दन विष्णू कामत

—अखेर कौंसेल्य कोलोनियालाला सिं. प्राजेरीस द कोस्त हेच निवडून आले.

—करवाढीविरुद्ध निषेध व्यक्त करण्यासाठीं म्हापसें येथें एक प्रचंड सभा भरणार आहे.

भारत

गुरुवार पौष शु० १२ शी, १८४५

करांचा कहर !

सांप्रतचे प्रांताधिकारी डॉ० जाइम द मोराईस हे हुशार मुत्सद्दी आहेत यांत संशय नाहीं. मुत्सद्दीगिरीचे हरतऱ्हेचे डावपेंच लढवून, 'हम करे सो कायदा' या तत्त्वाची ध्वजा फडकवण्याचें अत्यंत कठीण काम ते सहज लीलेनें करूं शकतात. विरोधी लोकमताचा धुव्वा उडवून स्वमताच्या जोरावर लोकपक्षावर कशी मात करावी ही 'राजकारणी' कला कोणाऱ्हि अवगत करून घेणें असेल तर त्यानें या कामीं डॉ० मोराईस यांचें पादवंदन करून त्यांचें शिष्यत्व पत्करावें, अशी आमची शिफारस आहे.

'नवीन करांचा बोजा सहन करण्याइतकी जनतेंत ताकत राहिलेली नाहीं. वाढत्या महर्गतेच्या प्रखरतेनें ती अगदीं 'गोगलगाय' बनलेली आहे. तेव्हां अनावश्यक खर्चाची छाटाछाट आधीं करा व या उपायानें जर तिजोरीची तूट भरून निघणें अशक्य असेल तर मग नवीन करांचा कहर उडवून द्या.' ही लोकपक्षाची मागणी लाथाडून, नवीन करवाढीचें घोडें पुढें दामटण्यांत गव्हर्नर साहेबांनीं व्यक्त केलेली मुत्सद्दीगिरी उपरोक्त विधानाला पुष्टि देत नाहीं काय? असो.

सध्या तिजोरीला तुटीच्या मंदवानें ग्रासिलें आहे, यांत शंका नाहीं. पण या संबंधाचा प्रवेश सुलभ रीतीनें होण्यास पगारवाढीच्या वेळीं सरकारनें दाखविलेला पराक्रमी आवेशच मुख्यत्वें कारणीभूत झाला, असा समंजस लोकांचा समज आहे. इटालियन, फ्रेंच, इंग्लिश व इतर राष्ट्रें आपापल्या नोकरशाहीचें व तिच्या वेतनाचें प्रमाण बेतांत आणण्याप्रीत्यर्थ सटत असतानांच, आमच्या सरकारनें तिकडे मुद्दाम कानाडोळा करून आपल्या हस्तकांच्या पगारवाढीस सढळ हातानें हातभार लावला! व या फाजील औदार्यामुळेंच गोमांतकाची आर्थिक स्थिति एकदम खालावली, हें आतां पोरांटोरांस सुद्धां माहीत झालें आहे.

आमची अशी प्रामाणिक समजूत आहे कीं, अगदीं अखेर दिसून आलेला तेजस्वी बाणा या पूर्वीच जर लोक प्रतिनिधींकडून दाखविला गेला असता तर, जी आपत्ति आम्हांवर सांप्रत कोसळलेली आहे, ती समूळ जरी नव्हे तरी बऱ्याच प्रमाणानें टळली असती. पण आतां काय? "काकीला मिशा असत्या तर काका म्हटलें असतें," यथांतलाच हा प्रकार आहे. सध्या आमच्या तिजोरीला चार लाख रुपयांची वाण आहे. ही उणीव भरून काढण्यास दो० सालीस द आंद्राद—लेजिस्लातीव्ह कौन्सिलांतील एक लोक प्रतिनिधी—यानीं एक उत्तम कल्पना सरकारच्या नजरेसमोर आणिली होती; परंतु नवीन कर लादण्याच्या घिसाडघाईंत त्या कल्पनेचा गर्भावस्थेंतच अंत झाला!

दो. आंद्राद याची कल्पना कृतींत उतरविण्याचा सरकाराकडून प्रयत्न झाला असता तर चार लाखांची भरपाई होऊन, शिवाय २७ हजार रुपये शिलकींत जमा करण्याची सुस्थिति तिजोरीला प्राप्त झाली असती. सालीस द आंद्राद यानां नवीन उत्पन्नाच्या बाजु खालीं दर्शविल्याप्रमाणें दाखविल्या होत्या.

१—मिलिटरी खात्यांत जनरल गोमीस द कोस्त यानीं जाहीर केलेली बचत..................८०००० रु.

२-नोकरशाहीच्या पगारांवर लादण्यांत आलेल्या पांच टक्के कराचें उत्पन्न ....१२५००० रु

३-कोमिसांव द मिल्योरामेंताची खर्च वजा जातां राहत असलेली जमा ....१३२००० रु.

४—लोटरींवर लादण्यांत येणाऱ्या करांचें किमान उत्पन्न.....४०००० रु.

५—कायदा नं० ५० नें होणारी बचत(नोकरशाहीची छाटाछाट)५०००० मिळून जमा ४२७०००

सालीस द आंद्रादची ही कल्पना अमलांत आली असती तर नवीन करांमुळें उत्पन्न झालेला लोकक्षोभ टळला असता! असो.

करांच्या कहरानें श्रीमंत लोकांचें जीवन कष्टतर होईल असें नाहीं. गरीब लोकहि विशेषसे त्रास पावतील असाहि प्रकार नाहीं. पण राष्ट्राचें खरें जीवन असा जो मध्यम वर्ग त्याचे मात्र हाल कुत्रा सुद्धां खाणार नाहीं. असा दुष्ट प्रसंग डॉ. जाइम द मोराईस यांच्या प्रभाव-शाली कारकिर्दींत मध्यम वर्गावर आलेला असून, त्याचीं कटुतर फळें लवकरच दृष्टोत्पत्तीस येतील. मध्यम वर्गाच्या नाड्या आंवळलेल्या पहाण्याचे 'सुदैव' प्रांताधिकाऱ्यांना लवकरच लाभेल, अशीं चिन्हें दिसून येतात.

तात्पर्य, करांचा कहर हा विशेषत: मध्यम वर्गाला काळाच्या पोटांत दडपणारा असल्यानें, त्यानें खडबडून जागें व्हावें, अशी आमची इशारत आहे.

—श्रीमद्इंदिराकांत तीर्थ यति स्वामीमहाराज हे आपले शिष्य श्रीमद्कमलानाथ तीर्थयती स्वामी महाराज यांच्या समवेत संचारार्थ निघाले असून उभय यतिवर्यांचा ठिकठिकाणीं फार उत्साहपूर्वक सन्मान करण्यांत येत आहे.

—म्हदियन देथें वे. शा. संपत शांत नरसिंह झाले यानीं लुप्त विद्येचा पुन: प्रसार करण्याचा उपक्रम केल्याचें एक वाचक कळवितात.

मुद्दाम उभारलेल्या कमानींमधून जात-जात हलुहळू ही मिरवणुक ९॥ वाजतां मंटपाजवळ दाखल होतांच; अध्यक्ष व त्यांबरोबर आलेली मंडळी श्रीशांताई-देवीचें पुण्यप्रद दर्शन घेण्यास देवळांत जाण्यास गेली. दर्शन घेऊन आल्यानंतर सर्व मंडळींना मंटपांत व्यवस्थीत रीतीनें बसविण्यांत आल्यावर श्री. शांताराम वजी सरदेसाई यानीं स्वागत मंडळातर्फे अध्यक्ष, संघाचे सभासद, व प्रेक्षक मंडळीचें सुस्वागत करून, आज सर्व मंडळी श्रमुन, दमून आली आहे व रात्रहि फार झाली आहे, तेव्हां परिषदेच्या कामास उद्यां ९॥ वाजतां सुरवात होईल, असें जाहीर केलें.

जीं मुलें इकडची काडी तिकडे करण्यास कधींहि शिकलीं नाहींत त्या सुखवस्तु गृहस्थांच्या मुलांस काम करितांना पाहून कोणा सद्‌हृदय मनुष्यास राष्ट्रकार्याची स्फूर्ति होणार नाही? या आनंदाच्या भरांत त्यांचें अभिनंदन केल्याशिवाय कोण राहील?

दुसऱ्या दिवशीं स्वागताध्यक्षांचें भाषण झालें. त्याचा सारांश खालीं दिला जात आहे:-

आजच्या परिषदेच्या या शुभमंगल प्रसंगीं आमच्या विनंतीस मान देऊन, आपण येथें येऊन या प्रागतिक संघाच्या परिषद कार्यांत भाग घेत आहांत याबद्दल आपणा सर्वांचें, या फोंडा महालाच्या वतीनें मी अंतःकरणपूर्वक स्वागत करीत आहें. प्रागतिक संघाचा उगम फोंडा महालांतच झाला आहे व इतर अनेक दृष्टींनींहि या महालाचें महत्व फार आहे. आमच्या सर्वांच्या परमप्रीय व सेव्य कुलदेवतांचें मूर्त वास्तव्य याच महालांत असून, पूज्यवर श्री स्वामी गौडपादाचार्य यांच्या मठाचीहि स्थापना याच स्थळीं झालेली आहे. श्री छत्रपति शिवाजी महाराजांच्या अमदानींत व त्यांचे पुत्र श्री छत्रपति संभाजी महाराज यांच्या अमदानींतहि हा प्रांत त्यांच्या राज्यांत मोडत असून येथेंच त्यांच्या प्रांताधिकाऱ्यांचें ठाणें होतें. हल्लीं सौंधा संस्थानाधिपतीचें वास्तव्य याच प्रांतांत आहे. या प्रांतांतील डोंगर, नद्या सरोवरें इत्यादिकांनीं त्यास सर्व गोमांतकांत सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीनेंही अग्रस्थान मिळालें आहे. अशा ह्या स्थानांत स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांच्या अभिवृद्धीकरितां झालेल्या या परिषदेबद्दल सर्वांनाच आपलेपणा वाटत आहे ही संतोषाची गोष्ट आहे. आपलें स्वागत अनेक अडचणीमुळें आमच्याकडून व्हावें तसें झालें नाहीं तरी, त्याविषयीं आपण क्षमा कराल अशी आशा आहे. असो.

आज आपल्या गोमांतकांत शैक्षणिक, धार्मिक व राजकीय ध्येय पुढें ठेवून कार्य करणाऱ्या पुष्कळ संस्था आहेत. पण त्यांचें एकीकरण नसल्याकारणानें त्यांच्या कार्यास सांधिक शक्ती नाहीं; म्हणून त्या सर्व संस्थांचें एकीकरणानें केंद्रीभूतत्व करणें व हिंदु समाजाचें राजकीय वजन वाढविणें या उद्देशानें प्रागतिक संघ स्थापन झाला आहे. हें आपणांस विदीत आहेच. हें संघाचें उच्चतर ध्येय निश्चित करण्याचें सामर्थ्य संघांत आहे व तद्दर्शक गुण समाजांत असलेले दृग्गोचर होत आहेत म्हणून संघाचा उत्साह दुणावत आहे. प्रागतिक संघाचें सर्व धोरण या परिषदेंत ठरावयाचें असल्यामुळें, तिचें सर्व कार्य समतोल बुद्धीनें व मोकळेपणानेंच चालावें अशी मी संघाच्या सर्व सभासदानां नम्रपणें सूचना करीत आहें. संघातील कार्यकर्ती मंडळी जुनी असेल ती जाईल व त्यांच्या जागीं दुसरी नवी येईल. तरी पण आपल्या संघाच्या ध्येयाचें स्टेशन गांठण्याची दृष्टि अखंडपणें पुढें ठेवून दिलीच पाहिजे. आज आम्हां हिंदूंची इच्छा शिक्षण, राजकारण इत्यादि बाबतींत पुढें गेलेल्या इतर समाजांच्या बरोबर खांद्यास खांदा भिडवून जाण्याची असणारच व आहेहि. त्या इच्छेस अनुसरून ज्या चळवळी केल्या जात आहेत किंवा जाणार आहेत त्या सर्व समाजाच्या अभिवृद्धीस, उन्नतीस कारण होतील अशी पूर्ण खात्री आहे. प्रागतिक संघ हा सर्व हिंदूंच्या, व सर्वांच्या उन्नतीप्रीत्यर्थ जन्मला आहे; अशा प्रकारचें जें धोरण जाहीर करण्यांत आलें आहे तें उदारपणाचें निदर्शक असून त्या कार्यास सर्वांनींच हातभार लावून, तें कार्य सुकर करावें असा त्याचा हेतु आहे. यास अनुसरून कायावाचामनानें प्रत्येक सभासदानें संघाच्या कार्यास झटणें हें त्याचें आद्य कर्तव्य आहे. हें कर्तव्य केल्यानेंच प्रागतिक संघाविषयीं सर्वांस भरवंसा वाटणार आहे. आपणास आपल्या कार्यांत विरोध करणारेहि कांहीं लोक उत्पन्न होतील व तें एका अर्थी बरेंच होईल; कारण, विरोध करणारा संनिध असला म्हणजे आपण तितके अधिक सावध होऊन कार्य तत्परताहि तितकी अधिक आंगांत उत्पन्न होईल. ज्या प्रागतिक संघाच्या नावानें एवढा हा गोमांतक प्रांत दणाणून सोडला व ज्यांच्यामुळें ही संघाची आयतीच जाहिरात झाली त्यांचे उपकार आपण विसरतां कामा नये. झोंपेंत स्वस्थ घोरत पडलेल्या हिंदु समाजासहि तीव्र फेंक बसली आहे. न्या रानडे यांच्या म्हणण्याप्रमाणें "वादविवाद माजणें हें समाजाच्या जीवंतपणाचें लक्षण" मानलें तर आज ज्याच्या त्याच्या तोंडी एकच विषय खळबळत असल्याचें पाहून, समाजांत जागृतीचें पहिलें कार्य करण्याचें श्रेय संघाच्या पदरांत पडलें असें म्हणावयास हरकत नाहीं. आजच्या परिषदेंत जें ठरलें जाईल त्यास सतत चिकटून राहून संघाच्या नियमानुसार वागण्याची नैतिक व व्यवहारिक जबाबदारी पतकरणें यांतच संघावरील आपलें प्रेम व निष्ठा दिसून येणार आहे. " राहिलां जरी एक त्रुटी। तरी मग काय विचारितां बळकटी॥ हें वचन सतत दृष्टीसमोर ठेवलें पाहिजे.

संघाशीं तत्वतः कोणीही विरुद्ध नाहीं. क्षुल्लक मतभेद दिसत असला तरी कार्याची धडाडी व प्रेमाची भावना दिसतांच तो नाहींसा होईल असा मला विश्वास आहे. असो. आपणा सर्वांचें स्वागत करण्याचीं सुसंधी लाभल्याबद्दल मला धन्यता वाटते. आपणा सर्वांचें आदरातिथ्य आम्हाकडून होत आहे तें आपणा सर्वांच्या योग्यतेला साजेलसेंच असेल हें कांहीं सांगवत नाही. तरी कार्याकडे दृष्टी देऊन त्याकडे आपण दुर्लक्ष कराल व थोर मनानें होईल ती सेवा गोड करून घ्याल अशी आशा बाळगून मी आपली रजा घेतों.

ANUNCIOS

quem, em carne e osso, vai tomar satisfagoes a um seu colega! I

E' o sinal dos tempos !!

E' o Patriotismo da Barrigal A verdade e' esta

E negam apio a' Causa dos Conselheiros VENCIDOS que e' a Causa do Pais, porque estes foram consultar o sr. J. I. de Loiola ! ! !

Onde estamos no's? Que terra e esta? Que gente e' esta?

Cervantes

Jogo e Policia

Jogou-se nos *Zatra's* de Ponchovadi, Fatorpa' e Guddo', tendo havido como de costume' pouco ganho e muitas perdas, devido aos manejos do *any More* da ultima Exposigao do Santo.

Em Ponchovadi, entao, os jogadores investiram, como consta, contra os proprios agentes policiais, assunto sobre que correm as competentes averiguagoes!

Naturalmente os soldados que estavam em Fatorpa' e Guddo' para impedir o jogo nao tiveram coragem para bulir com os senhores batoteiros. E' para lamentar!

AO DE LEVE

Falava-se muito das suas valentias, embora ninguem citasse dele uma façanha autentica com testemunhas de vista. Era volumoso, e dai concluiam que era forte; era gâbarola; muita gente acreditava que ele tivesse nos musculus tanta força como na lingua. Contava ele que duma vez matàra um boi com um soco, e num dia em que passava rente a um acampamento de ciganos, armados de cacetes e espingardas, como percebesse que lhe faziam troça, desatou aos pontapés a toda aquela malta pregando com o mais atrevido no alto duma azinheira que estava longe dali uns poucos de metros.

Os que melhor o conheciam, mofavam das suas farroncas; mas não faltava quem acreditasse nas proezas de Ferrabraz, intrepido até ao sacrificio da vida, sem lhe bulir um cabelo. Ora sucedeu um dia, vindo com a familia a caminho do arraial, numa aldeia de visinhança, alguem o preveniu de que se preparava uma emboscada, lá adeante, num cotovêlo da estrada antes de chegar á ribeira. E vai ele então, muito volumoso, palido como se todo o sangue lhe refluisse ao coração os cabelos em pè, como se visse diante de si a guela escancarada dum leão com fome, apalpa-se como quem procura alguma coisa, e batendo no hombro da companheira:

— Vão lá andando, vão lá andando, que eu não me demo-

प्रागतिक संघाची परिषद

अध्यक्षांच्या भाषणाचा सारांश

सामन्यतः पोर्तुगीज हिंदुस्थानची व विशेषतः त्यांतील हिंदुसमाजाची सर्वांगीणच प्राध्यान्येंकरून राजकीय प्रगति सनदशीर मार्गानें घडवून आणणें हें, आपण आपल्या प्रागतिक संघाचें ध्येय ठरविलेलें आहे. ध्येयावर जितका प्रकाश पडावा तितकें चांगलेच; म्हणून त्याविषयींचा ऊहापोह माझ्या दृष्टीनें करण्याची मी परवानगी घेतों.

या ध्येयावरून दिसून येईल कीं, आम्ही आमचें कार्यक्षेत्र हिंदुस्थानांतील पोर्तुगीज अमलाखालील प्रदेशापुरतेंच आंखलेलें आहे. एवढ्या लहानशा प्रदेशाचीच प्रगति आम्हीं कां इच्छावी, सबंध हिंदुस्थानची किंबहुना सगळ्या जगाचीच प्रगति कां इच्छू नये असा त्यावर आक्षेप येऊं शकेल.

यास आमचें असें उत्तर आहे कीं, आम्हीं आंखलेल्या क्षेत्राबाहेरची प्रगति आम्हालां नको आहे असें नाहीं. परंतु, जेवढ्या कार्यक्षेत्रांत आपल्या कर्तव्यशक्तीचा परिणाम करितां येईल असें आम्हांस वाटतें, तेवढेंच कार्यक्षेत्र आम्हांला निवडावयाचें आहे. त्याहून मोठें क्षेत्र आम्हीं घेऊं तर आमची कर्तृत्वशक्ती परिणामकारक न होतां दुर्बल अर्थात कार्यकर्तृत्वाला असमर्थ अशी मात्र होईल.

ठरीव इयत्तेची सामर्थ्यमर्यादा अमली म्हणजे तिला पुरसेंच कार्यक्षेत्र निवडणें भाग आहे. सगळ्या जगाच्या मानानें प

---

ro; esqueceram-me os charutos.

Não voltou, está bem de ver e no ontro dia, quando lhe contaram o sucedido, ameaçou o céu e a terra, espumando como um javali ferido.

— Se lá estivesse, rachava-os.

E pregou tamanho murro no cinzeiro de barro, que o fez em bocadinhos.

Brito Camacho

होतां आपली कर्तृत्वशक्ती अत्यंत क्षुल्लक ठरेल, एखाद्या अफाट सरोवरांतील पाण्याच्या पृष्ठभागावर कांहीं तेलाचे थेंब जर आपण टाकले तर एवढ्यां जलाशयांत त्यांचा पत्तासुद्धां लागणार नाहीं. पण तेच थेंब पेलाभर पाण्यांत टाकले असतां त्यांचा नजरेंत भरण्या सारखा थर त्या पाण्यावर दिसेल.

अमुक एक रकम सगळ्याजगांतील मानवजातीकरितां म्हणून आपण काढली तर प्रत्येकाच्या वांट्याला तिचा इतका क्षुल्लक भाग येईल कीं, तो त्यानें कोणतेंहि कार्य करूं शकणार नाहीं. पण तीच रकम लहानशा क्षेत्रांत आपण योजल्यास त्यांतील प्रत्येकाच्या अन्नवस्त्राला पुरेशी ती होईल. तात्पर्य कोणत्याहि कर्तृत्वशक्तीचें क्षेत्र जितकें मोठें तितकी तिची परिणामकारकता कमी व क्षेत्र जितकें लहान तितकी परिणामकारकता विशेष, ही गोष्ट लक्षांत घेतली असतां आम्ही आंखलेल्या क्षेत्रमर्यादेविषयीं मुळींच आश्चर्य वाटावयाला नको आहे.

पण ही गोष्ट केवळ प्रादेशिक क्षेत्राविषयीं झाली. सामाजिक क्षेत्राविषयीं पाहतां एवढ्या लहान प्रदेशांतल्याच कां होईना, अनेक समाजांपैकीं हिंदु समाजापुरतेंच कार्यक्षेत्र आपण आंखलेलें आहे. यावरून इतर समाजांची प्रगति आपल्याला नको आहे असें नाहीं. तर, ज्याप्रमाणें प्रादेशिक क्षेत्राविषयीं बोलतानां आपण आपल्या कर्तृत्वशक्तीच्या परिणामाचा (quantidade) विचार केला, त्याप्रमाणें सामाजिक क्षेत्राविषयीं बोलतानां त्याच कर्तृत्व शक्तीच्या स्वरुपाचा [qualidade] विचार आपल्याला केला पाहिजे. तो करण्याकरितां आधीं समाजासंबंधानें आमचें ध्येय जें प्रगति त्या संबंधानें थोडेसें विवेचन करूं.

प्रगति [progresso] या शब्दाचा अर्थ पुढें जाणें असा आहे. केवळ पुढें जाणें म्हटल्यानें दिशेचा बोध होत नाहीं. ठरीव काळीं ठरीव ठिकाणीं जो मनुष्य उभा असतो, त्याचें तें ठिकाण म्हणजे एक बिंदु असें आपण गृहीत धरल्यास त्या बिंदुपासून त्याला कोणत्याहि दिशेनें जातां येईल. पण सगळ्याच दिशांनीं जाण्याच्या क्रियेला पुढें जाणें म्हणत नसतात. मागें येणें, आडवें जाणें, तिरकस जाणें, असे अनेक संज्ञाभेद दिशापरत्वें आपण करीत असतों. आणि बुद्धिबळाच्या खेळाची ज्यानां माहिती असेल, त्यानां हे सर्व संज्ञाभेद एकसमयावच्छेदें करून कसे वापरण्यांत येतात हें सहज कळेल. असो. तर या प्रमाणें पाहूं गेलों असतां "पुढें जाणें" असें आपण कोणत्या दिशेला अनुलक्षून म्हणतों? तर मुळीं निघतांच ज्या दिशेच्या रोखानें येऊन आतांच्या स्थळापर्यंत येऊन पोहोचलेले असतों, त्याच दिशेला त्याहून भीन्न दिशा धरली असतां तिला दिशाभूल किंवा भुलीनें उर्फ चुकीची दिशा असें म्हणावें लागेल.

(पुढें चालू)

भारत

गुरुवार पौष व० ३ या १८४९.

महात्मा गांधी

गेल्या थोड्या दिवसांमागें महात्माजींची प्रकृति एकाएकीं बिघडून त्यांना शस्त्रप्रयोग करून घ्यावा लागला व केवळ परमेश्वराच्या अगाध लीलेनें व स्वतःच्या तेजस्वी पुण्याईनें, ते मृत्यूच्या दाढेंतून अव्यंग मुक्त झाले. अशा आनंदाच्या प्रसंगीं त्यांच्या दैवी योग्यतेची थोडीशी आठवण केल्यास—व तीहि योग्यतेच्याच व्यक्तीच्या शब्दांत—वाचकांस आनंद होईल, अशी आमची खात्री आहे.

दैवी संपत्तीनें युक्त असा गृहस्थ हिंदुस्थानांत आहे. त्याला महात्मा गांधी असें म्हणतात. हिंदुस्थानांतील मनुष्यरूपी अफाट समुद्रांतून हें नररत्न पृष्ठभागावर आलें आहे. एकंदर जगांतील एक पंचमांश भाग हिंदुस्थानांत आहे. हा लेख ज्या वेळीं लिहिण्यांत आला त्यावेळीं महात्मा गांधी कमरेभोंवतीं एक खादीचें लहानसें वस्त्र गुंडाळून या एकाच वस्त्रानिशीं सार्‍या देशभर संचार करीत असत. आज हिंदुस्थानची स्थिति अशी आहे कीं, प्रत्येकानें केवळ लज्जारक्षणापुरतें वस्त्र वापरावयाचें म्हटलें तर कापडाची एक चिंधीहि अधिक अथवा शिल्लक म्हणून उरावयाची नाहीं. अशा स्थितींत याहून अधिक वस्त्र वापरणें म्हणजे आपल्या येगर इकाहून. अधिक भाग भागण्यासारखे असून तसें करणें चोरी होय, असें गांधी म्हणतात. भणंग, भिकारी, मजूर इत्यादि लोकांकरतां राखून ठेवलेल्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांतून गांधी प्रवास करतात आणि गरिबांतल्या गरिबाचें अन्न ते खातात.

गांधी यांजविरुद्ध अनेकांनीं अनेक प्रकारें आपलीं वाक्सुमनें उधळलीं आहेत. जगाच्या चालू रहाटगाडग्याशीं जे पक्के जखडले गेले आहेत, त्यांना गांधी हें एक कोडें होऊन बसलें आहे. विशेषतः अट्टल दारूबाजांना त्यांचें नांवसुद्धां खपावयाचें नाहीं. त्यांजवर अशा प्रकारें अगदीं तुटून पडणारे लोकहि त्यांची मनःपूर्वकता, त्यांची दानत, आणि त्यांचें कर्तृत्व यांजबद्दल शंका घेत नाहींत. अशा प्रकारच्या लोकांना गांधी यांची मूर्ति दैवीशक्तीसारखी दिसत नसून त्यांना ती सैतानी कृतीसारखी वाटते. गांधी यांस परमेश्वरानें घडविलें नसून सैतानानें घडविलें आहे, असें म्हणणारे लोक पुष्कळ आहेत आणि याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेवर गांधी तुटून पडतात हेंच होय. गांधी यां-

आमचा देवधर्मावरचा विश्वास कमी कमी होत चालला असून योग्य विश्वासाच्या अभावीं देवस्थानची ऊर्जा योग्य रीतीनें होत नसल्यामुळें पूर्वींसारखे चमत्कार होत नाहींत. हें विधान करण्याचें कारण असें कीं, उपरोक्त देवस्थानांत होत असलेले वरील प्रकारचे चमत्कार गेल्या ३०-४० वर्षांपासून बंद होत आले असून गांवांतील बहुतेक तरुण मंडळीचा या गोष्टींवर मुळींच विश्वास नव्हता. आणि कदाचित् खालील प्रसंग घडून आला नसता तर हा विश्वास पुनः उत्पन्न झाला असता कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं.

ह्या गांवांतील एक गृहस्थ कायदे कौन्सिलचे माजी लोकपक्षीय मेंबर व सांगें मुनिसिपालटीचे सध्याचे अध्यक्ष दो. सुभ्राव विठ्ठल प्रभु देसाई, हे ह्या बाबतींत फार उदासीन असत आणि अशा विषयांवर त्यांचा विश्वासही नसे, असें मानण्यास कारण आहे. परंतु सुमारें गेल्या एक महिन्यापूर्वीं प्रवासांत असतांना अवचित त्यांची व कुंभारजुवें येथील वेदशास्त्र संपन्न शांत नरसिंह महाले यांची गांठ पडली व सहज धार्मिक विषयांवर व मंत्रशास्त्रासंबंधानें बोलणें निघालें असतां श्री. महाले यांनीं प्रत्यक्ष श्री. देसाई यांच्या बाबतींत कांहीं अशा गोष्टी सांगितल्या कीं, त्यांवरून त्यांस फार आश्चर्य वाटलें. व हें ज्ञान ... त्यांची पद्धति काय असावी ... जून घेण्याची त्यांस माहजिकच जिज्ञासा उत्पन्न झाली. व त्यांच्याकडे कांहीं अदभूत शक्ती आहे कीं काय म्हणून पृच्छा केली असतां श्री. महाले यांनीं थोडक्याच वेळांत जिज्ञासा पूर्ण केली व ती त्यांस तावडतोब पटली. कारण श्री. महाले यांनीं ज्या गोष्टी त्यांस सांगितल्या होत्या त्या कोणत्याहि अद्भूत शक्तीवरून नसून त्यांनीं महत्प्रयासानें व पुष्कळ वर्षें गोंव्याबाहेर राहून केरळीय (मलबार) ज्योतिष व मंत्रशास्त्राचा जो पूर्ण अभ्यास केला त्यामुळें त्यांस ह्या सर्व गोष्टी सहज सांगतां आल्या. इतकेंच नव्हे तर श्री. देसाई यांच्या म्हणजे या गांवांतील पुष्कळशा जुन्याकाळीं होत असलेल्या व तूर्त विश्वासाच्या अभावामुळें बंद पडलेल्या चमत्कारांची माहिती सांगून ह्या देवस्थानाकडे दुर्लक्ष झाल्यामुळें गेल्या २०-२५ वर्षांपासून गांवची फार वाईट स्थिति झाली असल्याचें सांगितलें. व हें सांगताना त्यांनीं शास्त्रांतील भरपूर पुरावे दिले. आणि वस्तुस्थिति बरोबर तशीच असल्यामुळें श्री. देसाई यांनाही तें तंतोतंत पटलें. गावांत प्रसिद्ध असलेल्या परंतु तूर्त आविष्ट न होणाऱ्या एका देवतेचें नांव सांगून आपण स्वतःच्या विद्येच्या जोरानें आजपर्यंतचें मालीन्य दूर करून पुनरूपी त्या देवतेस आवाहन करूं शकतों असेंही त्यांनीं सांगितलें. याचा परिणाम असा झाला कीं, श्री. देसाई यांनीं मनांवर घेऊन त्यांस गेल्या तीन दिवसांपूर्वीं इकडे आणलें व गावांतील सर्व लोकांच्या मतानें खरें काय आहे तें निष्पन्न होण्यासाठीं या बाबतींत योग्य ते उपाय करण्यास सांगितलें. व श्री. महाले यांनीं गेल्या दोन दिवसांत कृत्रिमादिक दोष निवृत्तीसाठीं केरळीय शास्त्रीय पद्धतीनें सुदर्शनधीव आदिकरून व मंत्रशास्त्राचा योग्य उपयोग करून आज ४० वर्षेंपर्यंत बंद असलेला अवसर (अंगांत येणें) आणून दाखविला. आणि विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, ही देवता ज्या मनुष्याच्या अंगांत संचरली तो या अशा विषयांला एकदम थोतांड समजणाऱ्यांपैकींच होय. या देवतेच्या संचारामुळें आजपर्यंत नाहींसा झालेला लोकांचा विश्वास पुनः उत्पन्न झाला असून गांवांतील देवस्थानची ऊर्जा योग्य प्रकारें ठेवून यापुढें त्यावर मालीन्य येणार नाहीं अशी वेदशास्त्र संपन्न महाले यांच्या मताप्रमाणें व्यवस्था करण्यांत आली आहे. आलेला अवसर व त्यांनीं सांगितलेल्या गोष्टी म्हणजे एक अद्वितीय चमत्कार असून तो घडवून आणण्याऱ्या विद्येचा म्हणजे मंत्रशास्त्राचा आमच्या देशांत पूर्ण प्रसार एकेकाळीं होता व त्या वेळीं लोकांचा शास्त्रावर पूर्ण विश्वास व धर्मावर पक्की श्रद्धा असल्यामुळें कोणत्याहि संकटाच्या वेळीं आमचे पूर्वज ह्या शास्त्राचा उपयोग करून घेत असत. व त्यामुळें आजच्यापेक्षां त्यांस कमी विपत्ति भोगाव्या लागत असत, यांत शंका नाहीं.

ऋषीवन, ता. १४।१।२४ — एक बातमीदार.

ANUNCIOS

morte vibrada, de sua vida desequilibrada de estudante. E, para nao prolongar o seu martirio, dorme.

Dorme, com todas as visoes tetricas das *chamadas* possiveis e imaginarias enquanto a rima dos livros lhe canta:

Dorme que eu velo sedutora imagem

Grata miragem, que no ermo vi

... ...

... ...

Dorme qeurida que eu descanto aqui

E assim passa a noite. Rompe o sol na crista dos montes.

O mestre escola, ai o espera nas aulas. E os livros continuam a cantar unicamente:

Dorme que eu velo...

E ele, como bom recente ginasta desata as suas vozes: "*Sentido! Ordinario marche!*"

E ao transpor o limiar da porta da Escola Normal, a taboleta berrante lhe envia um sorriso catita que transporta ao joven mestre escolar para a catedra de alguma escola primaria mas os livros lhe cortam esse *doce e ledo engano* de alma dizendo:

Dorme que eu velo...

E entrado na aula e chamado a liçao o professor encontra o branco como...um lirio virgem!...

E ao cabo da liçao ja' nao sao os livros, e' o mestre que traçando um "branco e', branco e' ... galinha o poel..." clama: *Dorme que eu velo!...*

*

Ora aqui esta' o martirio dum aluno da Escola Normal.

Nao queremos dizer com isto que o ensino de ginastica se deve por de parte! Oh! nao! Simplesmente dizemos que o mesmo ensino e' uma das mais eficientes medidas que nos ultimos tempos, tem sido tomada, na educaçao indo portuguesa! Mas o seu programa tem de ser moderado, limitado, porque as materias que se estudam na Escola Normal sao reverendas!

O numero das faltas para os exercicios metodologicos e' uma regateaçao unica—3 faltas! Estas tres faltas suceptiveis de inutilizar o aluno dentro de 3 semanas, quando um mez e meio de ausencia em outras disciplinas o nao fazem mal, e' uma desafinaçao a que o integro director da Escola Normal, pode e deve atender tanto mais que o Dec, de 23 de Julho de 1894 no art. 24 preceitua:

Sao considerados feriados.

"Os dias destinados aos exercicios "praticos de metodologia nas escolas "primarias de Pangim, os quais sao "lectivos tao somente para os alunos-"mestres da Escola Normal, respecti-"vamente escalados nos termos deste "regl......."

Pois bem. No's ate' aqui temos e continuaremos a ter a certeza de o sr. dr. Carmo Reis, vem falado para com suas maos possantes aliadas a' uma inteligencia lucida, atirar esta terra para a senda do Progresso. Unica coisa lhe pedimos — a sua esclarecida atençao para o que viemos de apontar, para que os alunos da Escola Normal futuros educadores, saibam e tenham respostas aquela pregunta que alguem deixou feita em "A Provincia"!

Para que teria feito Deus...Carmo Reis?

Arlequim Verde

आमचें स्वराज्य

(लेः—राजाध्यक्ष)

आमच्या पोर्तुगीज राज्यकर्त्यांनीं १९१९ सालीं आपल्या "पोर्तुगीज" इंडियेंतील लोकांस स्वराज्यदान दिल्याचें जाहीर केलें. ह्या स्वराज्यदेवीचें नुसतें नांवच ऐकल्यावरोवर लोक आनंदानें अगदीं हुरळून गेले. ह्या देवीचें आगमन आमच्या राज्यांत घडेल व ती प्रसन्न होऊन, सर्वांस समान हक्क प्राप्त होतील व सर्वत्र आबादानी होईल, ह्या व अशा आनंदकारक विचारांनीं प्रत्येकाचें अंतःकरण हृदय फोडून बाहेर पडतें कीं काय, असें वाटत होतें. तिला स्वागतपूर्वक आणण्यासाठीं समोर लोकांचे थवेच्याथवे जमून आपणांमधील एकेक शहाणा माणूस "आपला प्रतिनिधी" म्हणून निवडून देऊं लागले; पण निवडणुकीसाठीं जे "स्वतंत्र" मतदार म्हणून आले होते, त्यांना स्वतंत्र मन होतें कोठें? प्रत्येक जण आपलें स्वतःचें डोकें ठेऊन दुसऱ्याचें घेऊन आलेला होता. "घेऊन" म्हणण्यापेक्षां त्यांच्यावर तीं लादलेलीं होतीं असें म्हटल्यास अधिक सयुक्तिक होईल, असें वाटतें. त्यांच्यांतीलच कांहीं प्रमुख मंडळी, एखादा बड्या अंमलदाराचें अगर तशाच प्रकारच्या कोणातरी एका माणसाचें डोकें घेऊन, आपलें म्हणून लोकांवर बसवूं लागली; अशा प्रकारें एकेका माणसावर, दोघां तिघांची सत्ती होऊन, दोन दोन तीन तीन डोकीं बसूं लागलीं. सर्वत्र गोंधळ माजून राहिला व लोक गांगरून गेले.

थोड्याचीं डोक्यांबरोबर अंतःकरणेंहि गेलीं होतीं व थोड्यांचीं डोकींच जाऊन अजून अंतःकरणें शिल्लक राहिलीं होतीं. यांची स्थिति तर फारच केविलवाणी होऊन गेली. एकजण "माझें" मत म्हणून हातांत एक कागद घेऊन 'उर्ना'कडे जाऊं लागला, तेव्हां आंतून त्याचें अंतःकरण त्याला सांगूं लागलें. अरे! हा तूं धडधडीत खोटेपणा करीत आहेस, हें तूं पातक जोडीत आहेस, हें मत तुझें नव्हे!— तेव्हां त्याच्यावर असलेलीं डोकीं वरून गर्जना करूं लागलीं, अरे! तूं आमचा विश्वासघात करणार काय? त्याची मुद्रा कावरीबावरी झाली. तो भांबाऊन जाऊन इकडे तिकडे पाहूं लागला. त्याचें दुर्दैव अजून संपलें नव्हतें, त्या प्रमुख मंडळींतील लोक-अगर एक बडा पाटलोणवाला—तेथें होतेच ते डोळे वटारून त्याच्याकडे पहात आपापल्याकडे बोट दाखऊं लागले, तेव्हां तो मतदार अधिकच भेदावून जाऊन एकदांचा तो कागद 'उर्ना'मध्यें घालून, दूर पळून जाऊन निढळाचा घाम पुशीत म्हणूं लागला, हे देवा! माझें विचार करण्याचें डोकें गेलें म्हणून कांहीं हरकत नाहीं. पण मी या आपत्तींतून "धड" सलामत बाहेर पडलों, ही तुझी केवढी कृपा बरें! अशीच सर्वांची स्थिति झाली. [प्रत्येक नियमास अपवाद हा असतोच, तेव्हां ह्यालाहि एखादा अपवाद असू शकेल.] गणेश पुजनास फुटका नारळ म्हणतात तो हाच. प्रत्येक जण देहांत प्रधान जें शीर तेंच गमाऊन बसला.

एकदांचा हा मतदारांचा फार्स संपला. कांहीं मंडळी लोकांना मोठमोठीं वचनें देत. तुम्हांला स्वराज्यदेवी आणून भेटवितों बरें का! असें सांगत व आपापसामध्यें मोठमोठीं मनोराज्यें करीत मोठ्या आढ्यतेन कौन्सिलमध्यें जात असलेली दृष्टीस पडूं लागली. चौकशी अंतीं, हे लोकांनीं निवडलेले प्रतिनिधी "नामदार" ही पदवी घेऊन, स्वराज्यदेवीस आणण्यासाठीं जात आहेत, असें कळून आलें.

ही नामदार मंडळी कौंसिलांत जाऊन पोंहचली; तेथें यांना काय दिसलें? "स्वराज्यदेवी सरकारच्या हुकमतींत असलेली व गव्हर्नर सारख्यांचा तिच्या भोंवतीं गराडा पडलेला दिसून आला व गव्हर्नरच्या हातांतूनहि कसलासा खुळखूळ असा कर्णमधूर आवाज निघत होता. छिद्रान्वेषी लोक हळूच आपापसामध्यें तें 'वहा' नामदारासाठीं 'आमीश' म्हणून बोट दाखवूं लागले.

नामदारांनीं काय केलें? —हें भारत वाचकांस येत्या अंकीं कळून येईल.

—प्रो० सिनारी व त्यांचे वयोवृद्ध वडील यानीं दो० आलपोई याच्या आत्म्यास मुक्ति मिळावी या इच्छेनें रायबंदरच्या ख्रिस्ती देवळांत वादनयुक्त 'मीस' गाण्याचा समारंभ साजरा केला! कृतज्ञतेची शिकस्त झाली! पण ख्रिस्तवासी आलपोई हे नास्तिक होते याची गुणगुण एदरील पितापुत्रांच्या कानीं गेली नव्हती काय? एखाद्या ख्रिस्त्याच्या आत्म्यास मुक्ति मिळवूण देण्याचा रामबाण मार्ग हिंदु धर्मात नव्हता काय! दिशाभुल, दुसरें काय!

—गेल्या मंगळवारीं जांबावली येथील श्रीदामोदर मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांचा बक्षीस समारंभ अत्यंत यशस्वी रीतीनें पार पडला. या समारंभाचें अध्यक्षस्थान हेगडे देसाई यानीं स्वीकारलें होतें. समयास अनुसरून वे. शा. सं. केशव भट व गोविंद भट सावयकर, शि. द. पै, हेडमास्तर जेटी शाळा, ये. वि. मांजरेंकर, कोठंबशाळा व ना. द. पै. जांबावलिशाळा यांची कळकळीचीं भाषणें झालीं. परीक्षेस बसलेल्या २७ मुलांपैकीं २४ पास झालीं, हें मास्टर व पालक या उभयतांसहि भूषणास्पद होय. समारंभानंतर भारतकारांचें प्रवचन झालें.

—अरवलें येथें मारीयु मिरांद नावांचा विद्यार्थी सृष्टिसौंदर्य अवलोकीत असतां अपघातानें मरण पावला!

भारत

गुरुवार पौष व० १० मी १८४५

उठा! जागे व्हा!!

करांचें उत्पन्न वाढत्या प्रमाणावर असूनहि करवाढीच्या धांवत्या गाड्याला खीळ पडूं नये हें जितकें आश्चर्याचें आहे तितकेंच चमत्काराचें, त्या करवाढीचा एखादा महत्वाचा भाग, जनतेच्या सुखाचीं साधनें जीं नवे रस्ते, जुन्यांची दुरुस्ती, नवीन पूल, शेती सुधारणा, नवीन शाळा वगैरे वगैरे, यांप्रीत्यर्थ उपयोगिला न जावा, हेंहि आहे.

१९१३ ते १९२३ या १० वर्षांतील गोमांतकाच्या सांपत्तिक स्थितीचें निरीक्षण केल्यास असें आढळून येतें कीं, या अवधींत उत्पन्न वाढत असतांहि खर्च प्रमाणाबाहेर वाढत गेला असल्यानें, प्रत्येक वर्षी तूटदर्शक आंकडा कमी अधिक मानानें फुगतच गेलेला आहे. हा तूटदर्शक आंकडा कधीं ४ लाख तर कधीं ६ लाख व कित्येक वेळीं १२ लाख पर्यंत पोंचलेला दृष्टीस पडतो. उत्पन्नापेक्षां खर्च जास्त झाला म्हणजे तुटीची आपत्ति टळणें अशक्य होय. व या अशक्यतेच्या पुष्टिकरणार्थ स्मिथ किंवा मिल्ल अशासारख्या अर्थशास्त्रज्ञांचीं अर्थपूर्ण व अधिकारी वचनें पुढें करण्याचें कारण नाहीं, इतकी ती गोष्ट सोपी आहे. असो.

१९१३ सालापूर्वी सुमारें सात लक्ष रुपयांचा विनियोग निवळ मुरगांवच्या आगगाडीचे रस्ते बांधण्याचे कामीं व्यय करण्यांत आलेल्या रकमेचें व्याज, सांदेकर राजे व इतर देसाई वतनदार यांस देण्यांत येत असलेलें वतन पेन्शनर व वैठे लोकांचा पगार इत्यादि कामीं केला जात असतांहि, सरकारी तिजोरी तुटीच्या धक्क्यानें हादरत नसे. किंवा जनता करवाढीच्या ब्रम्हघोटाळ्यांत सांपडलेली दिसत नसे. इतकेंच नव्हे, तर उपरोक्त खर्चाचीं कार्यें सुरळितपणें पार पडत असूनहि, पूल व कालव्या सारखीं लोक सुधारणेचीं कामें व्यवस्थितपणें तडीस नेण्यास फुरसत मिळत असे.

'हें असें कां व्हावें?' या प्रश्नाचें उत्तर शोधण्यास अर्थशास्त्राच्या चोपड्यांत डोकें खुपसण्याचें कारण नाहीं. बुद्धीस ताण व मनाला शीण देण्याचेंहि बिलकूल प्रयोजन नाहीं. हंतरुणाचा व्याप लक्ष्यांत न आणतां मनसोक्त पाय पसरण्याचें पाप आचरलेल्या एखाद्या अदूरदर्शी व्यक्तीच्या स्थितीचें चित्र मनःपटलावर कल्पिलें म्हणजे आपोआप 'हें असें कां व्हावें?' या प्रश्नाचें उत्तर जिभेवर नाचावयाला लागतें.

देणारें लांकुड तसें त्याच्या स्वैरगतीला प्रतिबंधनं करिते तसें, आमच्या प्रगतीला ते ते अप्रागतिक समाज बाधकच होण्याचा संभव आहे. म्हणून आमची जी प्रगति आम्ही करून घेऊं, ती जर आम्हाला पचनीं पडाव याची असेल तर आमच्याच प्रमाणें देशांतील इतर समाजांच्याहि प्रगतीची इच्छा आम्हाला केलीच पाहिजे. मात्र परिस्थितीभेदामुळें आम्हाला त्याकामीं प्रत्यक्ष भाग घेतां येणार नाही. ही गोष्ट निराळी. अनेक समाजांच्या योगानें अनेकविध बनलेल्या आमच्या हिंदुस्थाना सारख्या देशाची प्रगति शास्त्रबद्ध अनेक रेषात्मकच असणार. या सर्व रेषा मुळांत जरी भिन्न भिन्न बिंदूपासून निघत असल्या, तरी शेवटीं त्या एकाच केंद्रांत मिळतील. कांही थेट केंद्रांत पोंहोंचल्यावर इतरांशीं संयोग पावतील व कांहीं प्रथम इतरांशीं संयोग पावून मग त्यांच्या केंद्रांत जाऊन मिळतील. mar le [illegible]च्या सुधारणेविषयीं संस्कृतीची पारी ज्यामानानें दुसरीच्या जवळ असेल व तिशीं समानत्व पावण्याच्या इच्छेनें आपली गति उर्फ प्रगति तिला ज्या मानानें जलद करितां येईल त्या मानानें या गोष्टी साध्य होतील. पण कांहीं झालें तरी जसजशा केंद्राच्या रोखानें त्या रेषा पुढें पुढें जातील तसतशा इतरांशीं da Esलेल्या त्यांचा दूरीभाव कमी [illegible] होत जाईल. आणि या प्रकारची म्हणजे इतरांशीं उत्तरोत्तर होत जाणाऱ्या सान्निध्याची जाणीव, आपल्या संबधानें पडावयाचें झाल्यास, आपल्याला जितकी जितकी जास्त होत जाईल तितके तितके आपण पुढें जात आहों, खरोखरी प्रगतीच्या मार्गानें जात आहोंत ही गोष्टहि आपल्याला पटून येईल. (अपूर्ण)

OFICINA DE ENCADERNAÇAO 5

Executam-se nesta oficina, mediante modica remuneraçao, todos o trabalhos de encadernaçao. Entendam-se com

Subraia Sinai Assoldencar

Assolda-Quepem

TERRENOS A VENDA
NAO PERCAM OPORTUNIDADE

Vendem-se terrenos sitos perto da Estação do Caminho de ferro, em Sanvordem, para fabricações das c sas e instalações das mercadorias etc.

Trate-se pessoalmente com o signatario deste perto da Estação de Vasco da Gama, e qual é o procurador do proprietario sr. Francisco Cesar de Sousa, filho do sr. Thomar Cezar de Souza.

Menino Manuel Simões

पत्रव्यवहार

गेल्या डिसेंबर महिन्याच्या २७ तारखेच्या कायदे कौन्सिलच्या बैठकींत करवाढीसंबंधाचें बिल सरकारकडून सादर करण्यांत आलें असतां या बिलाविरुद्ध ठराव लोकनियुक्त सभासदांकडून मांडण्यांत आला; पण दुर्दैवानें या सभासदांपैकीं एकानें या बैठकीस हजर राहतां न आल्यानें आणि दुसऱ्या दोघांस सरकारच्या बक्षींत राहण्याची दुर्बुद्धि सुचल्यानें वरील ठराव ८ विरुद्ध ९ मतानीं नामंजूर झाला, ही गोष्ट आतां पोर्तुगीज हिंदुस्थानच्या कानाकोंपऱ्यांत सुद्धां राहणाऱ्या लोकांस कळलीच आहे त्या दिवसापासून पराभूत झालेले बाणेदार लोकनियुक्त सभासद व सरकार यांच्यांत लढा उत्पन्न झाला असून, त्या सभासदानीं तूर्त कौन्सिलास रामराम ठोकून एका जाहीरनाम्याद्वारें पोर्तुगीज हिंदुस्थानच्या जनतेपुढें सर्व वस्तुस्थिति मांडली आहे; इतकेंच नव्हे तर पोर्तुगाल येथें वसाहत मंत्र्यास तार करून न्याय मागितला आहे

अशा या महत्वाच्या व नाजूक प्रसंगीं जनतेनें स्वस्थ हात पायरून बसावयाचें काय ? या लढ्यांत लोकमत कोणत्या बाजूस आहे तें स्पष्टपणें व्यक्त व्हावयास नको काय ? सरकारच्या बक्षींत शिरलेल्या लोकनियुक्त सभासदांच्या गैरवर्तनाचा तीव्र निषेध करून वकीलच्या बाणेदार सभासदानां पूर्ण पाठिंबा देणें इष्ट व आवश्यक नाहीं काय ? नुकत्याच कवळें येथें भरलेल्या प्रागतिक संघाच्या परिषदेंत संघाच्या द्विवार्षिक कारभारासाठीं नवीन कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें आहे. राजकीय प्रगति हा संघाचा प्रधान हेतु आहे. आणि वर सांगितलेला लढा हा तर राजकीय बाबींतला एक महत्वाचा भाग आहे. अशा वेळीं प्रागतिक संघाच्या कार्यकारी मंडळानें जाहीर रीतीनें आपलें मत व्यक्त केलें पाहिजे हें सांगावयास नकोच. देशाच्या हितासाठीं, हिंदुसमाजाच्या अभ्युन्नतीसाठीं आणि प्रागतिक संघाच्या इभ्रतीसाठीं संघाचें कार्यकारी मंडळ हें आपलें कर्तव्य बजावण्याच्या कामीं मुळींच कसूर करणार नाहीं अशी आशा आहे.

फोंडा आ.

ता. २२।१।२४ देशहितवादी

—प्रागतिक संघाची घटना छापिली असून, या चिमुकल्या पुस्तकाच्या मलपृष्ठावर कार्यकारी व मध्यवर्ति मंडळाच्या मेंबरांचीं नांवें प्रसिद्ध झालीं आहेत.

—म्हापसें मुनिसिपालटीनें वाढविलेल्या करविरुद्ध तेथील लोकांनीं गव्हर्नराची भेट घेतली होती; परंतु तिचा कांहींच उपयोग झाला नाहीं !

—येथील कोर्टांत जांबावलीच्या खटल्याचा निकाल देवाच्या हितीं लागला.

देणारें लांकुड तसें … सलेली पूर्वतयारी सार्वत्रिक प्रतिबंधन क… चीच असली पाहिजे, असें नाहीं. … खासगी स्वरूपाखालीं ती होण्यासारखी आहे. व ती तशीच ह्मणजे खासगी अर्थात विस्कळीत स्वरूपाची असणें एकंदर परिस्थितीवरून इष्ट आहे. यामुळें, प्रत्येक विद्यार्थ्याच्या ज्यास्त शक्यते या आटोक्यांत ती येऊन बसते, हें विसरतां कामा नये.

दुसरें असें आहे कीं, एकंदर जगाचा आस्थापूर्वक अभ्यास करणाऱ्या तरुण विद्यार्थ्यानें आपल्या देशाच्या राजकीय इतिहासाचें व वर्तमानकालाचें शक्य तें ज्ञान उत्साहानें व कळकळीनें संपादन करणें, त्या तरुणाला पुढें मागें आपल्या राज्यकर्त्यांच्या राजवटींत पाऊल ठेवावें लागेल ह्मणूनच केवळ नव्हे तर विद्यार्थी हा एक जिज्ञासू शोधक व संग्राहक आहे, या दृष्टीनें देखील आवश्यक होय. "ज्याला आपल्या … पहावयाचें नाहीं तो भविष्य … निराशच असणार." हा सि… कालाकडे लावून बोलावयाचें … झाल्यास असें ह्मणतां येईल, कीं "ज्याला आपल्या वर्तमानकालाबद्दल कळकळ नाहीं त्याला भविष्यकालाबद्दलहि ती थोडीच असणार, हें तत्व अगदीं खरें आहे. या करिता विद्यार्थ्यांनीं वर्तमानकालाबद्दल आस्था … विली पाहिजे. राजकारणाचे बाबतींत … र्थांनीं प्रत्यक्ष कार्य असें काय करावें तें पुढल्या लेखांत सांगूं.

स्फुट विचार

सारस्वत ब्राह्मण समाज.— या लोक… ीय संस्थेचा बारावा वार्षिक समारंभ मोठ्या … नें पार पडला. समारंभाचें अध्यक्ष … स्थान मुंबई येथें रहाणोर. आमचे प्रांतबंधु रा. गणपतराव लाड यांनीं मंडीत केलें होतें … भाषण सुविचार परिप्लुत व मननीय … लें. त्यांनीं केलेल्या भाषणाचा प्रत्येक … ियानें अवश्य विचार करावा अशी कळकळीची विनंति आहे. दुसऱ्या … पासून व्याख्यानमाला चालू झाली. व … दिवसपर्यंत या ज्ञानसत्राचा लाभ आपल्या … मिळाला. यंदां गोमंतकाबाहेरील वक्ते चौघे ठरलें होते. परंतु ऐन वेळीं रा. आपटे व रा. गुंजाळ यांना हजर रहातां आलें नाहीं. तरीं पण रा. आपटे यांनीं आपला विषय लिहून पाठविला असल्यानें त्यांच्या विचाराचा लाभ आपल्या लोकांना मिळाला असेंच ह्मटलें पाहिजे. रा. दामोदर विश्वनाथ गोले यांचें व्याख्यान तडफदार झालें. त्यांनी आपल्या व्याख्यानांत नवयुगाचा प्रारंभ झाल्याबद्दल सांगून त्याची रुपरेखाहि सांगितली या नवयुगाचा उदय आपल्या गोमंतकांत व्हावा अगर जो थोडा बहुत झालेला आहे त्याचा जास्त विकास व्हावा अशी इच्छा बाळगणाऱ्यांनी त्यांच्या भाषणाचा अवश्य विचार करावा.

OFICINA D…

Executam– tante modica trabalhos de … dam – se com …

पुढें चालू:—त्या दिवसाचे अध्यक्ष रा. … सामंत यानीं तर आपल्या भाषणांत … कली. नवयुगाचा जरी उदय झालेला असला तरी पण याचा फायदा केवळ स्वस्थ बसून मिळणार नाहीं. तर आपण तो प्राप्त करून घेण्यासाठीं अहोरात्र श्रम केले पाहिजेत. स्वार्थावर तिलांजली दिली पाहिजे, तेव्हांच त्याचा फायदा आपणास मिळणार आहे, असें अत्यंत रसाळ वाणीनें सांगितलें. हे त्यांचे विचार खरोखर ग्रहणीय आहेत. आपल्या गोमांतकांत काम करणाऱ्या लोकांची अत्यंत उणीव आहे. ही उणीव जेव्हां भरून येईल तेव्हांच कांहीं तरी देशाची उन्नति घडून येईल यांत शंका नाहीं. या नंतर रा. वामन मल्हार जोशी या विद्वान प्रोफेसरांचें 'मृतांशीं संभाषण' या विषयावरील भाषण त्यांच्या नेहमीच्या विवेचन पद्धतीप्रमाणेंच झालें. व्याख्यात्यानीं या विषयावरील पाश्चात्यांचे चाललेले शोध, व त्यांवरील शंका निवेदन करून अद्याप तरी या विषयाचा शास्त्रीय दृष्ट्या पूर्ण असा शोध लागलेला नाहीं असें सांगितलें. व सामान्य जनतेला या विषयापासून कांहींच फायदा नाहीं असें आपलें स्पष्ट मत दिलें. गोमांतकीय वक्त्यांपैकीं रा. आंगले यांचें 'मराठी भाषा व गोमांतक' रा. पाटकर यांचें 'जोतीष शास्त्र' व नामदार देसाई यांचें 'संपत्ति की हलाखी' या विषयांवर झालें. हा विषय अवकाशी बद्दल असल्यानें व व्याख्यात्यानीं आंकडे शास्त्रसिद्ध प्रतिपादन केल्यामुळें अत्यंत चांगला वठला. या भाषणाचा गोवा व भारताच्या पोर्तुगीज भागांत लवकरच प्रसिद्ध होईल.

आर्थिक स्थिति :— एकंदरींत कार्यक्रम उत्तम रीतीनें पार पडला यांत शंका नाहीं. संस्थेचा रिपोर्ट 'हिंदू' वर प्रसिद्ध झाला आहे. यावरून पहातां आर्थिक बाबतींतली उणीव अद्याप दूर झालेली नाहीं, असें दिसून येतें. या बद्दल आह्मीं चालकांनां हा दोष देत नसून खरोखर दोष गोमांतकीय जनतेचा आहे. आपल्या लोकांच्या दातृत्वाचा ओघ अद्याप वळलेला नाहीं, सार्वजनिक संस्थानां वर्षाकाठीं पांच रुपये सुद्धां अर्पण करण्याची बुद्धि आपल्या लोकांना होत नाहीं, हें खरोखर देशाचें दुर्दैव होय. एखाद्या संस्थेच्या मेंबरांनी फार आर्जव करून संस्थेचा मेंबर होण्याबद्दल एखाद्याला विनंति करावी, व त्यानें केवळ त्या ग्रहस्थाच्या आर्जवाखातर मेंबर होऊन एक दोन महिन्याच्या आंतच वर्गणीचा हात आंखडता घ्यावा ही स्थिति आज गोमांतकांत प्रत्येक संस्थेची आहे. तेंच आपण जर एखाद्या सोन्या ह्मसोबाचें देवालय उभारूं तर त्याला हजारों रुपयाच्या देणग्या देण्याला लोक सदैव तयार. मग त्यापासून देशाचा फायदा न होतां, उलट तोटा झाला तरी हरकत नाहीं. अमेरिकेंत बऱ्याच वर्षांमागें अशीच स्थिति होती. एकादा मुलबाळ नसेलला श्रीमंत मनुष्य आपली श्रीमंती मरते … च्या गावातील चर्चला अ… नाहीं … पहातां ती स्थिति सर्व … येथील कोर्टांत जांबावलें … दानाचा ओघ … निकाल देवाच्या हितीं लागला … याकडे वळत आहे. कारण अशा संस्थानां दान करणें ह्मणजेच लोककल्याण करणें असेंच त्यानां वाटतें; आणि त्याचमुळें तो देश आज सर्व जगांत उच्च स्थान पटकावित आहे. परंतु गोमांतकांत आज मितीला तरी अशी परिस्थिति नसून उलट सार्वजनिक संस्थानां आपलें जीवन अत्यंत गरीब स्थितींत काढावें लागत आहे. आणि इतकी प्रतिकुल परिस्थिति असताना सुद्धां वरील संस्थेचे चालक आपलें कार्य नेटानें व उत्साहानें पार पाडीत आहेत. यांत कांहींच शंका नाहीं. गोमांतकाच्या इतिहासांत या संस्थेला बरेंच उच्च दर्जाचें स्थान मिळेल, असें आह्माला वाटतें.

इमारत फंडः— संस्थेच्या चालकांनीं हातांत घेतलेल्या महत्वाच्या कामापैकीं मुख्य काम ह्मणजे इमारत फंड हा होय. चालकांच्या मनांत पुढील सालचा समारंभ संस्थेच्या नवीन व स्वतःच्या इमारतींत साजरा करण्याचें आहे असें कळतें, व आजपर्यंतच्या चालकांच्या कार्यावरून पहातां ही गोष्ट मूर्त स्वरूपांत येईल यांत कांहीं शंका नाहीं. गोमांतकांत अशीं पुष्कळ उदाहरणें दाखवितां येतील कीं, उत्साहाच्या भरांत हजारो रुपयांचे घातलेले आंकडे शेवटीं कागदावरच राहावयाचे व त्याचप्रमाणें याहि संस्थेच्या सभासदांनीं घातलेले आंकडे कागदावरच रहातील असें पुष्कळांनीं भाकीत ठरविलेलें होतें, व त्याचप्रमाणें कुचेष्टाहि करण्यास प्रारंभ केला होता. परंतु हीं सर्व भाकितें फोल ठरून शेवटीं संस्थेला शहराच्या मध्यभागीं जागा मिळाली याबद्दल आह्मांला फार आनंद वाटतो. संस्थेची इमारत कमिटी फंड जमविण्याकरीतां बहुतेक सर्व गोमांतकांत फिरणार असें कळतें. तरी सर्व गोमांतकीय बंधूनीं या संस्थेस मदत करावी अशी आमची शिफारस आहे.

मराठी शाळा:— दुसरें कार्य ह्मणजे मडगांव शहरीं आज एकहि मराठी शिक्षणाची शाळा व्यवस्थित नाहीं. चालकांना ही उणीव आज बरेच दिवस भासत आहे. ह्मापसें येथील 'सारस्वत विद्यालय' या लोकप्रिय संस्थेच्या धर्तीवर एक नमूनेदार शाळा चालवून दाखवावी असें चालकांच्या मनांत असल्याबद्दल कळतें. अपरिहार्य कारणांमुळें अद्याप असा योग जुळून आलेला नव्हता. यंदाच्या वर्षी या कार्याला विशेष चालन देण्याचें चालकांनीं योजिल्याबद्दल समजतें. तरी याविषयीं नेट धरून एक उत्तम अशी मराठी शाळा चालवून, गांवांतील ही उणीव दूर करावी अशी आमची या संस्थेच्या चालकांना विनंति आहे. अशा कार्यांना पैशाचें भरपूर पाठबळ पाहिजे, करितां गोमांतकांतील सर्व देशबांधव या संस्थेला सढळ हातानें मदत करितील अशी आमची पूर्ण खात्री आहे.

—येथील तिजोरीला १५ लाख रुपयांची तूट पडली आहे, ती डॉ॰ मोराइसच्या 'वैभवशाली' धोरणानें लवकरच भरून निघणार आहे, असें एका सरकारपक्षीय पत्रानें जाहीर … आहे.

लॉटरी !

[लि:—गडकरी चेला.]

जुगाराचीं जीं कांहीं प्रतिष्ठित साधनें गणलीं जातात, त्यांत लॉटरी – सोडत हेंहि पण त्यांत मोडत असतें ! जुगारांत दुदू तोप १ पैशालाहि करतां येतो, पण ह्या जुगाराला सबंध १ रु. पणाला लावून ६ दिवसपर्यंत नशिबाची परीक्षा करावी लागते ! व ७ व्या दिवशीं नशिबाचा लिफाफा फोडला जातो ! ह्या प्रतिष्ठित जुगारानें, समाजावर आपले हातपाय अगदीं मोकाट सोडलेले आहेत ! लहानापासून थोरांपर्यंत, रंकापासून रावापर्यंत ह्याला सर्व लोक सारखे प्रीय आहेत ! दुपारच्या जेवणाची हेळसांड करून सोडत घेणारे जसे आज दृष्टीस पडतात; तसेच गरीब कुळाकडून पै न् पै जबरदस्तीनें वसूल करून घेणारे श्रीमंत लोकहि ह्याचे प्रिय भक्त आहेत !

आमचे शिनुमामा ह्यांना लॉटरी काढण्याचा विशेष नाद ! ते लॉटरीचे इतके प्रिय भक्त कीं, मुलांची शाळेची फी सुध्दां देण्यास टाळाटाळ करीत ! परंतु नेमानें अचूक महिन्याकाठीं ५० रुपये लॉटरीला जायचे !

त्यांचे ते निमकहराम (५०) रुपये लॉटरी संस्थेंत आरोग्य संपादनार्थ जात; ते सगळे सपशेल तिथेंच ठाणें देत ! एखादे वेळीं चुकून यांच्या पदरीं ३ रु… पडत ! पण ही पर्वणी …

शिनुमा… एम.

… च्या ल… त नसे ! पण तीन रुपये … त्याचें स… तांच, सर्व काके मामे ३ रु… यांचा आनंद सोहळा साजरा करण्यास … मत ! पदरांत पडले ३ रुपये, पण पदरांत आणखीं ५ रु॰ ह्या सोहळ्याला खर्चीं पडत ! मामांना ३ रुपये आल्याची बात प्लेगाच्या धडक्या सारखी पसरून, ब्राह्मणीच्या मालकाच्या सहीची ८ रुपये बिलाची … मामांचे हातीं पडत अ…

मामाच नशीब उलटें सुलटें … लांच्या खात … तरी काय ? … नशीब मामाचें ! तीन रुपये … अस्सल रामगुण हाताचे ! अ… लोक वदंता पसरली ! मामाच्या … गुण आहे ह्मणून, प्रत्येक … सोडतीला, मामाच्या घरीं घेऊन येऊन मामाला सोडत उचलून देण्याला … असत ! मामा आपल्या हातांत … नसल्याबद्दल जीव तोडून सांगत, पण बोलणें कोणीहि मनांवर घेत नसे ! … च्या लग्नातील बावग्याप्रमाणें, मामाकून वैद्य बुवा बनवून, त्यांच्याकडून … चलून घेत असत ! ही वार्ता सर्व … मामाचे घरीं लोकांची अष्टौप्रहर … लागली! शिनुमामाचें घर 'लॉटरी' … गेलें ! मामांना एकसारखें २५ … डत उचलून देण्याचें काम … गलें ! त्यांचीहि कीर्ति चोहोंकडे …

Conselho Amigo

Escreve nos um nosso amigo que "na comarca de Quepem tem se constituido uma quadrilha com o perigoso intuito de macular reputaçoes alheas por meio de falsos processos crimes Surge, como que por encanto, um queixoso, presta suas declaraçoes e o ferece o rol de testemunhas que depoe *por ver* factos que nunca viram mas que sobre eles sao industriadas a bom martelar. Tanto o queixoso como as testimunhas e mais os seus conselheiros pertencem a' mesma quadrilha que esta' exercendo o seu nefasto papel nesta comarca, ha' mais de algum tempo, o que naturalmente faz que aqui ninguem se julgue seguro na sua casa, por nao saber o momento em que sera' indiciado e metido em contra dança de recursos e trapalhada."

O nosso solicito amigo nao nos da nenhuma novidade. *Ha* muito que sabiamos o que nos relata e, se sobre o assunto nao soltamos ainda pio e porque, pretendemos, detalhadamente, biografar a quadrilha a que o nosso correspondente se refere.

Fique, entretanto, registada a informaçao para o conhecimento dos competentes para, querendo, como se diria na linguagem forense, estarem de atalaia para que, indirectamente, a acçao da justiça nao contribua para o prejuiso do inocente.

Os srs. drs. Garcez Palha, Santos Vas e Seabra tinham acabado com as malditas quadrilhas que entao se organisavam por baixos sentimentos de odio, inveja, cobiça e vingança, quadrilhas que erradamente supunhamos extinctas para sempre.

Como se ve, enganamo-nos redondamente. E' que das negras cinsas das quadrilhas esmagadas, tem renascido uma nova, quiça mais perigosa do que aquelas que tentaram semear terror nos incautos inocentes, em tempos que la' foram.

Quanto a no's, anima-nos a convicçao de que a verdade nunca sera' esmigalhada, conquanto cansada por malentendidos. A historia da comarca corrobora plenamente o que acabamos de avançar.

E aconselhamos, por ultimo, as *vitimas* a que tenham paciencia,devendo regular os seus actos segundo os ditames de sa consciencia e rigorosa moral.

E' um conselho amigo.

NO NUMERO SEGUINTE

Sensacional artigo de **UM BARDEZANO** sobre "Apos a abertura da Lotaria de Mapuça'."

CONVITE

Tendo algumas comunidades das Ilhas interposto recurso do Diploma Legislativo n. 89, de 5 de junho p. f, que creou nesta Colonia as Caixas de Credito Rural como concurso obrigatorio das comunidades e tornando se necessario e urgente solicitar dos Poderes Publicos outras providencias, os abaixo assinados tomam a liberdade de convidar os exmos procuradores das comunidades de Goa a se reunirem em Nova-Goa nos Paços Municipais das Ilhas, no dia 15 do corrente, as 15 horas, a fim de deliberarem sobre este e outros assuntos, o que acharem mais conveniente para os interesses das mesmas corporações.

Divar, 4 de Agosto de 1924

Os procuradores das comunidades

Teofilo Caetano Va's
(de Navelim)
Domingos João F. Silveira
(de Goltim e Naroa')
Caetano Maria Milton Fernandes
(de Malar)

E' MUITO NATURAL

Um jornal da Metropole, fazendo o relato do acto da posse do novo titular das colo'nias, diz que o sr. Bulhao Pato pensa em restringir as atribuiçoes dos governos das colonias. Nao nos parece que a reportagem do periodico em questao seja veridica, pois, a ser assim, nao se entende que o mesmo sr. B. Pato tenha escrito para a Gazeta das Colonias que "sem autonomia todos os governos sao forçosamente maus." Teria s. excia. mudado da opiniao a's primeiras vertigens do poder?

Agora quanto ao sr. Cerveira de Albuquerque, nao admira que este senhor haja afirmado que a crise grave das colonias e' devida a' excessiva autonomia de que disfrutam. E' muito natural que s. excia tenha saudades dos bons tempos.

NAO HAVERA'?

A "India Portuguesa" do brilhante jornalista sr. J. I. de Loiola, no seu editorial de 3 de Agosto, em que encara com elevaçao e profundo crite'rio a situaçao politica em Portugal pinta o seguinte quadro:

'Em Portugal, circula em abundancia o oiro estrangeiro. A propaganda comunista e bolchevista corre desenfreada em todo o pais, captando o elemento operario. As organisaçoes sindicalistas, que ha tres anos atraz contavam 30.000 associados e que presentemente devem ser pelo menos o duplo de filiados, trabalham afanosamente no seu sinistro objectivo."

E perante esta calamidade iminente os politicos em Portugal, jogam a 'ministerios". Nao havera' por ventura em Portugal alguem com noçao pelo menos sumaria da situaçao do seu pais sob o ponto de vista internacional?

भा र त

मि. श्रावण शु० १५ मा शके १८४६

हातच्या कांकणाला आरसा कशाला ?

पोर्तुगालचें राजकीय वातावरण अस्वस्थतेच्या निराशाजनक ढगांनीं कसें ओतप्रत भरून गेलें आहे, याचें भेसूर पण यथार्थ चित्र आजच्या एका स्फुटांत चित्रित केल्याचें वाचकांच्या अवलोकनांत येईलच हें चित्र उठावदार बनविण्याच्या हेतूनें, त्याला अतिशयोक्तीचा भडक रंग दिलेला नाहीं. होतां होईतों प्रतिमेच्या साध्या रंगांतच खऱ्या वस्तुस्थितीची पडच्छाया जिज्ञासु प्रेक्षकाच्या दृष्टिक्षेपांत उतरावी, असेंच धोरण, तें चित्र रेखाटण्याचे कामीं, स्वीकारण्यांत आलें आहे, हें नमूद केलेल बरें.

पण आम्हीं कितीहि उघड्या अंतःकरणानें नागडें सत्य जगासमोर आणिलें तरी तें, जगाच्या नैसर्गिक त्रिविधतेमुळें, सर्वमान्य होईलच, याची निर्विवाद खात्री कोण देऊं शकेल ? त्या नागड्या सत्याशीं बागडण्याचा मोह एकाद्या चिकित्सक शंकेखोरास आवरतां येईलच, असें कुणी ह्मणावें ? 'अरे, हे परकीय सत्तेचे हस्तक पोर्तुगालराष्ट्राविषयीं लोकांत अप्रीति फैलावण्याच्या पक्षपाती हेतूनें सत्याचा अपलाप करणार नाहींतच, असें मानण्यास कोणता भक्कम व लोकमान्य आधार आहे ?' अशीहि पृच्छा करणारा कोणी श्रीयुत पुढें सरसावणार नाहींच, असें कसें समजावें ?

केवळ या अश्रद्धाळू चिकित्सकांसाठीं उपरोक्त स्फुटांत केलेल्या विवेचनाच्या पुष्टिकरणार्थ पुढील विचार या जागीं संग्रहित करण्यांत येत आहेत. महायुद्धाच्या ऐनभरांत फ्रेंच रणभूमीवर समशेर गाजविलेल्या एका पोर्तुगीज योद्धयाच्याच तोंडांतून, खुद्द पोर्तुगीज रिपब्लिकच्या अध्यक्षांसमोरच, निघालेले ते उद्गार असल्यानें, पक्षपातापणासून ते अलिप्त आहेत, हें उघड आहे. उपरिनिर्दिष्ट रणगाजी गोमांतकाला अपरिचित नसून, त्यांच्या स्पष्टवक्तेपणाची अल्पशी जाणीव येथील जनतेला आहे. जनरल गोमीस द कोस्तांला न ओळखणारा इसम पो. हिंदुस्थानांत विरळाच, अशी आमची कल्पना आहे.

ज० गोमीस दा कोस्तांच्या मतें, पोर्तुगीज राष्ट्राची स्थिति अतिशय चिंताजनक आहे. ज्या श्रेष्ठतम गुणानीं पोर्तुगाल देश एकेकाळीं एकंदर जगाच्या स्तुतीचा विषय बनला होता, तोच भाग्यवान देश आज स्वार्थसाधु लोकांच्या मानभावी बोलण्यानीं व कसाबाच्या करणीनीं सांपत्तिक व नैतिक आपत्तीच्या खोल गर्तेंत खिचपत पडलेला आहे. ज्या त्याची नजर स्वताच्या पोटावर खिळली असल्यानें, देशाच्या अवनतीकडे दृष्टि वळविण्यास कोणालाहि फुरसत नाहीं. ज्या दुर्धर रोगानें स्वदेशाला अधोगतीच्या अंथरुणाला खिळवून टाकलें आहे, त्याच भयंकर रोगाच्या जंतूनीं वसाहतींचेंहि वातावरण दूषित झालें आहे- जिकडे जावें तिकडे, स्वार्थी नराधमाचा निनादच कानीं पडत असतो. कित्येक लोकानीं तर राष्ट्राच हितसंबंध निर्दयपणें पायांखालीं तुडवून, आपापल्या जन्माचें दारिद्र्य कायमचें फिटलें आहे. गरिबांच्या हृदयविदारक दुःस्थितीचा बिलकूल विचार न करितां थोर समजले जाणारे कांहीं शिरजोर चोर राजरोसपणें देशाचे लचके तोडीत आहेत. तात्पर्य, देशाच्या खऱ्याखुऱ्या परिस्थितीचें ज्ञान झालें ह्मणजे कोणाचाहि जीव मट्यास न येणें अगदीं अपरिहार्य होय. संपत्ति व नीति या द्दयींनें पोर्तुगीज राष्ट्राला दूर लोटलेंच आहे. शिवाय शांतता देवीच्या कोपालाहि तें आज कित्येक वर्षांपासून पात्र झालें आहे. सर्वांत दुःखाची गोष्ट ही कीं, परराष्ट्रांत सुद्धां पोर्तुगालचा उल्लेख उघड उघड तुच्छतापूर्वक करण्यांत येत असतो.

ज० **गोमीस दा कोस्ताचे** हे वेंवीपासून निघालेले उद्गार – व तेहि रिपब्लिकच्या अध्यक्षांच्या तोंडावर – खोटे ठरविण्याची प्राज्ञा कोणालाहि अजून झाली नाहीं. अर्थात् जातिवंत चिकित्सकालासुद्धां त्याचे ते स्पष्ट बोल फोल ह्मणण्याची छाती होणार नाहीं, असें आह्मांला वाटतें. आतां, राष्ट्रसुधारणार्थ प्रदर्शित केलेले ज० **कोस्तांचे** अल्प विचार नमूद करून या अप्रिय पण पथ्यकर विषयाची रजा घेऊं. ते ह्मणतातः–

" राष्ट्रासाठीं युरोपांत व आफ्रिकेंत आम्हीं अनेकदां अनेक तऱ्हेची संकटपरंपरा सहन केली असल्यामुळें, राज्यशकट सुरळित रीतीनें चालविण्याची राज्यसूत्रधारांना सूचना करणें हा आमचा हक्कच आहे. नोकरशाहींत बोकाळलेल्या स्वार्थावर तावडतोब गदा प्रहारून तिला स्वार्थविरहित उच्चासनावर आरूढ केलें पाहिजे. अनधिकारी तोंडपुजे लोकांपासून राज्यव्यवस्था अलिप्त ठेविली जाऊन, देशहितप्रेमी लोकांच्याच हवालीं तिला करणें जरूर आहे. ' सरकारी नोकरी म्हणजे स्वार्थ साधण्याचें एक महत्वाचें अंग आहे ' अशी कोती कल्पना ज्यांच्या डोक्यांत नाचत आहे अशांचा वास सुद्धां – घाणच म्हणाना – नोकरशाहीच्या कार्यक्षेत्राला लागतां कामा नये. एवंच जे लोक सांप्रतच्या सांपत्तिक व नैतिक अधोगतीचा नायनाट करून, पोर्तुगाल देशाच्या लौकिकांत भर घालतील व प्रगतीला आवश्यक अशा शांततादेवीचें अढळ साम्राज्य तेथें प्रस्थापित करतील, त्याच नागरिकांच्या हातांत राज्याची धुरा स्वाधीन करणें आमचें पवित्रतम कर्तव्य होय."

ओडवायर विरुद्ध नायर

---*---

ब्रिटिश न्याय व ब्रॅटिशांचा न्याय

ब्रिटिश न्याय व त्या निःपक्षपाती न्यायाची ब्रिटिशानीं चालविलेली परंपरा ह्याविषयीं आह्मांस बरेंचसें सांगण्यांत येतें. ब्रिटिश राष्ट्राला (किंवा त्या राष्ट्राच्या बऱ्याच मोठ्या भागाला) ह्या महत्वाच्या संस्थे-विषयीं अभिमान वाटणें व त्या अभिमानाचें प्रदर्शन त्यानीं हिंदी लोकांसारख्या जीतराष्ट्राच्या लोकांपुढें करणें स्वाभाविक आहे. पण ब्रिटिश न्याय आपणास सांगण्यांत येतो, तेवढा व आपण त्याला परमेश्वरी न्याय ह्मणतों तसा [अर्थातच परमेश्वराच्या न्याय-मंदिराच्या व त्यांत अधिष्ठित झालेल्या व्यक्तीच्या अंतरानें उत्पन्न होणारा फरक वजा केल्यावरच] खरोखरीच निःपक्षपाती आहे काय ? ह्या प्रश्नाचें उत्तर देण्याची गरज असल्यास--व ती आहे असें व्यक्तिशः मला वाटत नाहीं– आपणांस फार दूर जावयास नको. इंग्लंडच्या इतिहासांत व हिंदुस्थान इंग्रजी अंमलाखालीं आल्यापासूनच्या दिवसापासून लिहिल्या गेलेल्या ह्या देशाच्या इतिहासांतील प्रत्येक पानांत, आपणांस तें वाचतां येईल. परंतु ह्या पानांत ज्या अन्यायांची कहाणी सांगितलेली आहे व ज्या अमानुष जुलुमांनीं गोऱ्या इभ्रतीवर काळेकुट्ट डाग पाडलेले आहेत त्यांच्या मुळाशीं ब्रिटिश न्यायाच्या उच्च कल्पना नसून ब्रिटिश साम्राज्यतृष्णा होती. ब्रिटिश न्याय व ब्रिटिश साम्राज्यवाद ह्या दोन गोष्टी अगदीं निराळ्या आहेत. दुर्दैवानें, हा फरक ब्रिटिशांच्या टीकाकारांस दिसत नाहीं व ह्मणून ते मानवी हृदयांत नेहमींच अस्तित्व असलेल्या एका सत्याचा ब्रिटिशानीं स्थापलेल्या एका पद्धतींत समावेश करतात. वास्तविक खरी स्थिति अशी आहे कीं, प्रत्येकवेळीं जेव्हां जेव्हां दुसरीं राष्ट्रें ब्रिटिशांच्या ह्या पद्धतीला बळी पाडलीं जातात तेव्हां तेव्हां ह्या सत्यांत उगम असलेल्या ब्रिटिश न्यायाचा बारीक आवाज ऐकूं येत असतो. अल्पसंख्यांक नेहमींच बरोबर असतात ह्या सूत्राची सत्यता आपणास तेव्हां पटून येते. ब्रिटिश जुलूमांतील, ब्रिटिशानीं स्थापन केलेल्या संस्थांतील क्षुद्रपणा, ढोंगीपणा व अन्याय वेळोवेळीं कोणी सिद्ध केला? ज्या वेळीं, किपलींग सारख्या कवीच्या बुद्धीससुद्धां 'इंपिरिॲलिझम'नें भर घालून त्याला त्या ध्येयाचें ढोलके बडवावयास लावलें, ज्या वेळीं ब्रिटिश रक्तांत असलेले जातिद्वेषासारखे दिपारी विकार जागृत होऊन खुद्द किपलींगलासुद्धां ते आवरण्यासाठीं ईश्वराची प्रार्थना करावी लागली; ज्यावेळीं, इंग्लिश चर्चचें रूपांतर रंगरुट जमविणाऱ्या संस्थेंत झालें व खिश्चन पाद्र्यानीं आपल्या पवित्र आसनांचा दुरुपयोग केला, त्यावेळीं बहुजनसमाजाच्या छळाची पर्वा न करतां एकंदर प्रकारास कोणी हरकत घेतली ? मूठभर ब्रिटिशानीं, स्वदेशद्रोही, भ्याड नास्तिक ह्या व दुसऱ्या उत्कृष्ट विशेषणांनीं गौरव करून ज्यांना गोळ्या घालून कुत्र्यासारखें मारण्यांत व तुरुंगांत कुजत टाकण्यांत आलें असे थोडेसे शूर लोक ब्रिटिशन्यायाचे खरे प्रतिनिधी होते.

ओडवायर विरुद्ध नायर

ओढवीयर विरुद्ध नायर प्रकरणांतसुद्धां आपणांस हेंच—ब्रिटिश इंपिरिॲलिझमच्या सोयीसाठींच स्थापन झालेल्या न्यायसंस्थांना ब्रिटिशन्यायाच्या प्रातिनिधिक संस्था समजण्यांत केली जाणारी चूक—दिसून येईल. ओडवायर वि. नायर प्रकरण्याची हकिकत थोडक्यांत अशी आहे.

मद्रास हायकोर्टाचे माजी मुख्य न्यायाधिश व व्हाइसरॉयांच्या कॅबिनेटचे सभासद सर शंकरन नायर ह्यांनीं दोन वर्षांपूर्वी हिंदुस्थानसरकारच्या सूचनेवरून व त्या सरकारनें पुरविलेल्या सामुग्रींचा उपयोग करून गांधी व अनार्की ह्या नावांचें म. गांधीच्या असहकारितेवर प्रतिकुल टीका करणारें चोपडें प्रसिद्ध केलें. ह्या चोपड्यांत त्यानीं १९१९ च्या अमृतसर कत्तलीसंबंधीं लिहितानां पंजाबांत लढाईसाठीं रिक्रूट भरती करण्यांत जे अत्याचार करण्यांत आले ते त्या वेळच्या लेफ्टनेंट गव्हर्नरच्या संमतीनें करण्यांत आले, असें विधान केलें होतें —होतें ह्मणण्याचें कारण असें कीं, त्या चोपड्याच्या नंतरच्या प्रतींत हा मजकूर गाळण्यांत आला. ह्या विधानाबद्दल ओडवायरनें नायरवर अब्रूनुकसानीचा खटला भरला व ह्या खटल्याचें काम पांच एक आठवडे चालून लंडन हायकोर्टांत तो ज्युरीनें ११ विरुद्ध १ मतानीं 'दोषी' असें मत दिल्यावर निकालांत काढण्यांत आला. ओडवायरला ५०० पौंड नुकसान भरपाई व खर्च मिळाला व नायरला एकंदर खर्च जवळ जवळ १५००० पौंड आला. ह्या खटल्यांतील साक्षीदारांच्या तोंडून पंजाबांतील अत्याचारांचें, जबरदस्तीनें केलेली रिक्रूट भरती, लष्करी कायद्याखालीं केलेल्या शिक्षा, बाजार पेठेंत फटके मारणें, निरुपद्रवी खेड्यांवर हवेंतून फेंकलेलें बॉंब, डायरनें उघडलेला कसाईखाना, ह्या व दुसऱ्या हजारो गोष्टींचें वर्णन पुन्हां एकदां ऐकूं आलें. ज्युरीस खटला समजावून देतानां जस्टिस मि. मॅकार्डा ह्यानीं, न्याय पद्धतीच्या साध्या नियमाचें उद्धटपणानें उल्लंघन करून, 'ब्रिगेडीअर—जनरल डायरची वर्तणूक बरोबर होती व त्याला केलेली शिक्षा अन्याय्य होती असें विधान केलें. ह्या व दुसऱ्या obite dict: इंडिया ऑफिस हिंदुस्थानसरकारनें नेमलेली कमिटी कमांडर–इन–चीफ व आर्मीकौन्सिल ह्या सर्वांनीं डायरच्या वर्तनासंबंधीं दिलेल्या निकालाविरुद्ध असल्यामुळें त्याकडे सर्वांचेंच लक्ष्य वेधलें. ह्या प्रश्नावर अर्थातच हिंदुस्थानच्या वैऱ्यांनीं व बुडत असलेलें 'ब्रिटिश राज्य' वांचविणाऱ्या त्या डायर–ओडवायर–चेम्स फोर्ड प्रभृति वीरांच्या चहात्यानीं 'टोरी' पत्रांतून आपला आनंद व्यक्त केला; व एवढ्यावर त्याचें समाधान न होतां ओडवायरनें कांहीं दिवसांपूर्वी 'लंडनटाईम्स' पत्रांतून 'पंजाब प्रकरणा'संबंधीं पत्रलेखन चालविलें होतें व परवां पार्लमेंटात क. येट यानीं डायरसंबंधीं पूर्वी देण्यांत आलेला निकाल ज. मॅकार्डीच्या कैफियतीच्या आधारावर बदलण्याची सूचना आणण्याची परवानगी मागितली होती; पण मि. मॅकडोनाल्डनी ती देण्याचें नाकारलें. ज़ास्त मुत्सदी लोकांनीं गोष्टी ह्या थरास आल्याबद्दल [मी खटल्याच्या निकालासंबंधीं व तो निकाल ज्या परिस्थितींत देण्यांत आला त्या संबंधीं लिहीत आहें] त्यामुळें हिंदुस्थानांत वाईट परिणाम होतील ह्या भीतीनें, साम्राज्याच्या हिताकडे लक्ष्य देऊन निषेध प्रदर्शित केला. क्वचित प्रसंगीं एच. जी वेल्ससारख्या फारच थोड्या व्यक्तींनीं व पत्रानीं ह्या प्रकरणांतील अन्यायासंबंधी आपली निराशा व उद्वेग स्पष्ट व जोरदार शब्दांत व्यक्त केला. लेबर—सोशियालीस्ट सभासद मि. लॅन्सबरी ह्यानीं मॅकार्डीला अधिकारावरून दूर करण्याची सूचना पार्लमेंटांत आणली परंतु मुख्य प्रधान मि. रम्से मॅक्डोनाल्ड ह्यांनी, ती स्वीकारण्याच्या आड येणाऱ्या कायद्याच्या अडचणी दाखवून देऊन, औपचारिक व तात्विक शब्दानीं त्यांची बोळवण केली, व मि. लॅन्सबरीचेहि ह्या उत्तरानें समाधान होऊन त्यानीं आपली सूचना परत घेतली. हिंदुस्थानांत ह्या खटल्याच्या निकालासंबंधीं मतैक्यच होतें. तो ऐकून येथें कोणालाच आश्चर्य वाटलें नाहीं. वर्णभेदाचा जुलूम जाणवण्याची ही पहिलीच खेप नव्हती.

ब्रिटिश न्याय विरुद्ध ब्रिटिश हितसंबंध

ह्या विषयावर इंग्लंडांत जी टीका करण्यांत आली ती न्याय्यानाय्यच्या मुद्यावर करण्यांत आली नाहीं. आपल्या टीकेंत ह्या दुर्दैवी निकालानें हिंदुस्थानांतील आमच्या हिताला धक्का पोहोंचणार आहे. हें कारण, मुख्य प्रधानापासून 'नेशन' पत्रापर्यंत सर्वांनीं कदाचित् मि. वेल्सखेरीज — पुढें केलेलें आहे. त्यांच्यामतें अब्रूनुकसानी शाबीत करण्यांत आली असेल परंतु खटल्याच पहिल्या प्रतीचें महत्व ध्यानांत घेऊन ज. मॅकार्डीनीं मूळपासून जो पक्षपातीपणा दाखविला तो दाखवायाचा नव्हता. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे प्रत्येक व्यवहारी इंग्रज तो माथेफिरु असल्याखेरीज ह्या प्रश्नाकडे साम्राज्याच्या व स्वताच्या हिताच्या दृष्टीनें पहातो. त्याला ब्रिटिश न्यायाची काडीचीसुद्धां पर्वा वाटत नाहीं. फक्त ब्रिटीशहितसंबंध कायम राखण्यासाठीं त्याला ब्रिटिश न्यायाचा वेळीं अवेळीं उल्लेख करण्याची जरूरी वाटते, एवढेंच.

ओडवायर विरुद्ध नायर निकालाचें आव्हान

जालीयनवाला बागेच्या भिंतीच्या आंत असहाय्य स्थितींत असलेल्या जमावावर मशीनगनचे १६५० फैल झाडून ३७९ लोकांची कतल व शेकडों लोकानां (बायका पोरें सुद्धां धरून) जखमी करणाऱ्या डायरला निर्दोषी ठरवणारी न्यायदेवता ब्रिटिश न्यायदेवता अ. शकणार नाहीं; — ब्रिटिश इंपिरिॲलिझमनें तिला ह्या पूर्वींच पदच्युत केलेलें आहे. अमृतसर हा शब्द ब्रिटिश साम्राज्याच्या लज्जेचें चिन्ह होऊन बसलेला आहे. व दुसऱ्या जातींची कत्तल करण्याचा दैवी हक्क आपणास मिळालेला नाहीं, हें ॲंग्लो–सेक्सन्ना केव्हां कळणार? ह्या अमेरिकन 'नेशन'च्या ह्मणण्यांत व सवालांत असलेलें एका परकी व त्रयस्थ राष्ट्राचें मत ब्रिटिश न्यायाच्या दुर्दैवानें खरें आहे. ओडवायर वि. नायर निकालानें हें मत खरें ठरवून तें कायम केलें नाहीं — त्यानें आपणांस नवीन असें कांहींच शिकविलें नाहीं. त्या 'बंडखोर' टिळकांस जो अनुभव आला तो आज त्या बिचाऱ्या नायरास, ब्रिटिशसत्तेच्या एक हितचिंतकास आला आहे व तो घेण्यासाठीं—नाखुषीनें कां होइना—त्या दक्षिणेंतल्या हुशार वकिलास पंधराहजार पौंड किंमत द्यावी लागली. ही जब्बर रक्कम मोजल्यावर, ही दंडाची रक्कम पोंचती केल्यावर, आज त्याला असहकाराच्या तत्वाला मान नमवावी लागली ! ह्या देशास सर शंकरनच्या अनुभवाचा फायदा घ्यावयाचा असल्यास त्यानें जुन्या आशावादाचा मोह सोडून म. गांधीचा नवा आशावाद स्वीकारला पाहिजे; ब्रिटिश इंपिरिॲलिझमनें वाढविलेल्या विषवृक्षाचा नायनाट करून टाकण्याचें आव्हान, परमेश्वराखातरतरी त्यानें आज उचललें पाहिजे.

संजय.

वर्तमानसार

—तेनेंत पेद्रू आंतोनियु कुयेल्यु यांची तात्पुर्ती नेमणूक काणकोण येथें झाली आहे.

—श्री. मंगेश देवस्थानच्या नव्या कारभार मंडळाची नेमणूक पुढील प्रमाणें करण्यांत आली आहे: रघुवीर ल. शे. संजगिरी (अध्यक्ष), गणशेणवीं वागळे (खजीनदार), रावजी वि. शेडुभार्षी (मुखत्यार) व गणेश वा. शे. गुडे ऊर्फ अनंत गुडे (चिटणीस). सदरील ग्रहस्थांच्या दुय्यमच्या जागीं अनुक्रमें रामचंद्र मं. शे. अडवळपालकर, भास्कर गो. शे. वागळे, लाडोबा अनंत सिवेस्कर व शांबा वि. शेणवीं सिंगबाळ यांची नेमणूक झाली आहे.

--श्री बाणेश्वर कात्यायनी विद्यालय, बाणावली, या संस्थेतर्फें ता. ८ रोजीं कै० ना० जगन्नाथ शंकर शेट यांच्या पुण्य तीथीचा उत्सव साजरा करण्यांत आला. उत्सवाचे अध्यक्ष पारोडेचे ज्ञना विष्णु कामत यां कडून शेटजींच्या तसबिरीचा अनावरणविधी उरकण्यांत आला. अध्यक्षांशिवाय समयास अनुसरून प्रो० दत्ता पै, भिकू शेट नार्वेकर, मडगांवच्या दामोदर विद्यालयाचे हेडमास्तर राऊत, रवळू शेट कारेकर, विर्जिनकर इत्यादि गृहस्थांचीं भाषणें झालीं.

--पणजी, ह्मापसें व फोंडें येथील मासळीविक्या लोकांचा संप अजून जोरांतच आहे. या तिन्ही ठिकाणच्या लोकानां मासळी पुरविण्याचा मक्ता कांहीं मच्छमारी लोकानीं सरकारापाशीं मागितला असल्याची दाट वदंता आहे.

--एकंदर जगांतील क्विनाइनची पैदास दहा लक्ष पौंड असून यापैकीं शेंकडा ९० टक्के क्विनाइन फक्त जावा बेटांत उत्पन्न होतें.

RODOLFO RODRIGUES



HERBOLARIO E DROGUISTA

Possue segredos eficazes sobre varias doenças consideradas dificeis de cura.

Cura febres palustres e outras de mau caracter com o inofensivo emprego dos medicamentos aiurvedicos.

Pode ser procurado a toda a hora nas suas FARMACIA INDIANA e DROCARIA POPULAR estabelecida em Amonā, de Quepem

ESTABELECIMENTO COMERCIAL
DE
Visnum Ramachondra Quenim

FUNDADO EM 1850

MERCADO VELHO-MARGAO

CONTA já mais de 73 anos de fundação o sobredito estabelecimento comercial. E' portanto um dos mais antigos da vila de Margão, mantendo relações com as mais afamadas firmas comerciaes e industriais da Europa e da America, paizes donde, em regra, importa todas as qualidades de tintas, aboc, oleos, verniz, linhança, cimento, gis etc. toda a sorte de artigos de ferro, como pregos, aldraves, cadeados, bisagras, parafusos, canos de ferro etc. especialidades de pastas de zinco lisas e concavas e as de cobre.

NO REFERIDO estabelecimento vendem-se tambem artigos alimenticios da primeira necessidade e todas outras mercadorias de que se acha bem provido.

BEM SERVIR O FRECUEZ E' O SEU LEMA

Experimentem que sempre lhes será proveitosa a experiencia !

रबरस्टँप मॅ. कंपनी

आमच्या कारखान्यांत नावांच्या पाट्या, नाटकाचे पडदे, पत्र्याची कायम टिकणारीं क्यालेंडरें, सर्व प्रकारचे सुंदर रबरी शिक्के, लाखेवर उठविण्याच्या मोहरा, ब्लॉक्स, रबर स्टंपची शाई, रबरी टाइपाच्या पेट्या, डेटर्स नंबर्स, व फोटोच्या फ्रेमी, वगैरे तयार करून मिळतील.

प्रो. धारणकर पेन्टर, मडगांव-गोवा.

विष्णु रामचंद्र केणी यांचें दुकान

जुना बाजार—मडगांव.

स्थापना १८५०

सचोटीबद्दल प्रसिद्ध असलेल्या या अत्यंत जुन्या दुकानांत सर्व तऱ्हेच्या मालाचा भरीव स्टॉक असतो. निरनिराळ्या जातीच्या शाई, रंग, सिमीट, व्हेर्नीज, आबोक, हरतऱ्हेचें लोखंडी सामान (खिळे, करवती वगैरे) नाना रीतीचे जस्ताचे व तांब्याचे पत्रे व इतर सर्व संसारोपयोगी वस्तू सदर दुकानांत माफक दरानें विकल्या जातात.

दर एक, माल चोख, व्यवहार रोख

अनुभवानें खात्री करून घ्या !

किर्लोस्कर लोखंडी नांगर

यंदाच्या मोसमांत किर्लोस्कर नांगरच आपल्या शेतावर वापरण्याचा निश्चय करून ते मोसमाच्या सुरवातीलाच मागवून ठेवा.

माल उत्कृष्ठ !! किंमत माफक !!

किर्लोस्कर बंधु लिमिटेड.

पो. किर्लोस्करवाडी (जि. सातारा सं. औंध)

चोहोंकडे हेच पसंत

डॉ० सुखटणकर यांचा

खंडाद्रक

DYSPEPSIA

अग्निमांद्य, आम्लपित्त, जीर्णज्वर, घाम, लाळ फार येणें, लवकी वारंवार होणें, लिव्हरचे उदरस्थ विकार वगैरे बरे होऊन भूक चांगली लागते. दूध व जडान्न पचतें. रोज शौचास साफ होतें. किं० दीड रुपया. पोष्ट व प्याकिंग खर्च निराळा.

श्री मांगिरीष कार्यालय
(उभादांडा) वेंगुर्लें, जिल्हा रत्नागिरी

ECOS & CRITICA

A' ESPERA

Os diarios da capital publicam os nomes dos estudantes e professores que constituem os corpos gerentes da "Associagao dos estudantes do L. C. de Nova—Goa."

Sao ao todo 18 as entidades que vao administrar a Associagac. Nao sao muitas, porque podiam ser ainda mais. E no's ca' ficamcs a' espera de uma proposta do governo criando um imposto de 5% sobre a receita das comunidades, mazanias e outras instituigoes para com o seu producto pagar os corpos gerentes da Associagao, atendendo aos *imensos sivigos* que ela e' destinada a prestar ao pais.

VIBRIAO DE DISCORDIA

O sr. P. G. vem denunciando no "Heraldo" que em Bardes vai ser installada uma serraria mecanica por uma empreza onde os socios so' seram tirados entre os emigrantes. E la' vai ele dissertando sobre as rivalidades e mais coisas porque os proprietarios nao sao admitidos pa a accionistas.

Ora, sr. P. G., uma empresa de exploragao industrial tem sempre os extatutos que os emprezarios elaborarem de acordo e dentro da legislagao respectiva, portanto no's cutros pcu co temos que ver no caso.

Agora a exclusao dos que nao sejam emigrantes, ca' para no's e' bem pensada. A emigragao, ja' disse alguem milhora o goes fisica e moralmente, e' uma sociedade formada por este elemento exclusivamente talvez que nos traz um novo impulso para a luta para a frente. O nosso *batcara'* metido ai, quem nos diz que nao sera' um vibriao de discordia? Ha' tantos exemplos de falencia por causa de divergencia de educagao e temperamento entre so'cios!

NA HORA DECISIVA ...

Juvenal, escrevendo para o *Heraldo*, manifesta o seu aprego pelos esforgos gastos pela Direcgao do Asilo de Mapuga' para o sucesso de sua lotaria, sem se esquecer tambem dos outros colaboradores que na *hora dicisiva* trabalharam rudemente durante 15 dias precedentes a' extracgao da mesma lotaria para que ela nao fracassasse. Nao para aqui Juvenal.

Da Concelhos de prudencia a Direcgao do As lo e termina marcando a' mesma e aos seus leaes colaboradores uma norma de conducta que resume nas seguintes palavras:—*paulatim sed permiter* o que traduzido para portugues equivale a devagar se vai longe.

E' mais uma opiniao sincera a reforgar a doutrina expendida por este jornal no seu artigo " As lotarias" publicado 15 dias antes da extracgao da lotaria do Asilo. Emfim ... vao nos dando razao.

UMA CARTA

Recebemos do sr. O * * * a seguinte carta que gostosamente publicamos:

...Sr, Hegdo' Dessai

O *suelto* que o *Bharat* publicou na sua edigao da semana finda sobre M. Braganga e os Liceus Municipais nao tem razao de ser, porquanto aquele distinto jornalista em parte alguma e em tempo algum apoiou a creagao dos mesmos Liceus.

E' verdade que o *Bharat* firma as suas consideragoes sobre uma critica de *A Terra* que no caso, fez apenas *prosa ligeira*, como facil ha de lhe ser tirar a limpo estudando "o corpo de delicto" que e' o artigo do M. Braganga a que o jornal de Margao se refere.

Na certeza de que o *Bharat* vai inserir esta, no seu proximo numero, dando assim, mais uma vez, a prova de colocar acima de tudo a verdade agradego lhe desde ja' o favor da publicagao.

De V...

15—8—824 O * * *

———

Desde o principio combatemos sinceramente o obstrucionismo numa questão de tão grande magnitude, como agora acusamos tambem com sinceridade os que pensam fazer grandes coisas sem ter bases fortes. As nossas considerações portanto não visam de forma alguma a combater o Hospital do Assilo e a Lotaria, mas sim os *parvenus* e ávidos de gloriolas que sem terem o alcance suficiente dos seus actos comprometem a honra do Concelho, merecedor de milhor sorte. E tão natural é este nosso receio que lá estão a confirma lo os alicerces que o sr. dr. Ribeiro lançou para um Hospital magnificente que pretende construir, sem ainda coalhar dinheiro necessario para a sua construcção e muito menos para a sua futura manutenção.

Na antiguidade Erostrato queimou o magestoso templo de Diana em Efeso só para se tornar celebre. ¿Estará o sr. dr F. Bibeiro resolvido a passar para a historia com a *vastidão* dos planos ruinosos como o Erostrato do Asilo de Mapuçá? Triste celebridade.

UM BARDEZANO

Bardez, Agosto de 1924.

भा र त

मि. श्रावण कृ॰ ७ मी शके १८४६

श्रीकृष्णजयंति

श्रावण वद्य अष्टमी हा दिवस हिंदुस्थानांतील स॰ वर्गाच्या लोकांकडून आनंदानें पाळण्यांत येतो. या दिवशीं आपल्या भारतवर्षांत एक थोर विभूति जन्मास येऊन तिनें आपल्या देशांत विशिष्ट प्रकारची क्रांति करून आपल्या देशाचें कोटकल्याण केलें. ही विभूति श्रीकृष्ण भगवान होय. श्रीकृष्णासारख्या थोर विभूति जन्मास येण्यास तशाच प्रकारची परिस्थिति कारण असते व या परिस्थितीला योग्य वळण देण्याचें कार्य अशा महात्म्याकडून झाल्या कारणानें त्याचें अत्यंत आदरबुद्धीनें यथाकालीं स्मरण करणेंहि अत्यंत आवश्यक असतें.

आपल्या हिंदुस्थानांतील लोक या विभूतीबद्दल अद्यापं तर या प्रकारची आदरबुद्धि बाळगीत आहेत. अष्टमीचा सण सगळ्या हिंदुस्थानभर पाळून अ ज आपण त्या महात्म्याची जन्मतिथी साजरी करीत आहों. श्रीकृष्णाचें आयुष्य ज्या ठिकाणीं गेलें तीं ठिकाणें आज तीर्थासारखीं पवित्र गणलीं जात आहेत. मथुरा, वृंदावन, गोकुळ या ठिकाणीं लाखो यात्रेकरू आपलें तन, मन, श्रीकृष्णाच्या भक्तीला अर्पण करीत असतात तर इतर ठिकाणीं त्याच्या मूर्तीचें पूजन आदरयुक्त बुद्धीनें चालू असतें.

या दिवसाचा शास्त्रोक्त धार्मिक विधी ह्मणजे सगळा दिवस उपोषित राहून मध्यरात्रीच्या सुमारास श्रीकृष्णाच्या मूर्तीचें पूजन करावयाचें व पूजनोत्तर थोडासा सुंठवडा घ्यायाचा. पूजेला आणलेली मूर्ति मृत्तिकेची असल्यास तिचें जलांत विसर्जन करून दुसरे दिवशीं भोजन करावयाचें असा असतो. आजहि हा सण आपल्या गोमांतकांत अशाच रीतीनें साजरा होत आहे, मात्र सुंठवड्याची जागा गोड पदार्थांनीं घेतलेली आहे. ऐतिहासिक दृष्ट्या पाहूं गेल्यास श्रीकृष्णाच्या मूर्तीचें पूजन फार प्राचीन काळापासून सुरु होतें. इ. स. पूर्वी ३०० वर्षें चंद्रगुप्त सम्राटाच्या अमदानींत मेगस्थानीस ह्या नावांचा एक वकील आला होता. तो आपल्या भारत प्रवास वर्णनांत ह्मणतो: "असें ऐकण्यांत येतें कीं, हीराक्लीस (हरीकुलेस अर्थात कृष्ण) हिंदुस्थानांतच जन्मास आलेला होता. कांहीं लोक तो बाहेरुन आला असावा असें ह्मणतात. ह्या हीराक्लीसची सुरसेनी Sourasenoi लोक आदर बुद्धीनें पूजा करीत असतात. सुरसेनी ही भारतीय जातिआहे. याची मथुरा Methora व कृष्णापूर Kleisobora नावांचीं दोन शहरें आहेत, यमुना या नावांची एक नदी या देशांतून वहात असते, यावरून बऱ्याच पूर्वीपासून आपले लोक श्रीकृष्णाचें पूजन करीत आहेत, हें दिसून येईलच.

ज्या अर्थीं हिंदुस्थानांतील सर्व लोक हजारो वर्षांपासून अत्यंत आदरबुद्धीनें पूजन करीत असतात त्या अर्थीं त्या महात्म्याकडून तशीच कांहीं तरी महत्वाची कामगिरी झाली असली पाहिजे. तेव्हां त्या महात्म्यानें आपल्या देशाचा असा कोणता फायदा केला कीं आह्मीं त्याचें पूजन करावें, याचा थोडासा विचार करूं.

अर्थात् आपल्याला श्रीकृष्ण पूर्वकालिन परिस्थितीकडे वळणें जरूरीचें आहे. आर्य लोक जेव्हां हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांचा धर्म कर्मप्रधान होता हा स॰ सृष्टि चमत्कार पाहून त्यानां अचंबा वाटला व ते आपापल्या कल्पने प्रमाणें त्या त्या वस्तूंच्या देवता करूं लागले. या वेळीं त्यांचे देव ह्मणजे इंद्र, वरुण, सोम, अग्नि हे होत. या देवतांच्या स्तुतिपर ते अनेक सुक्तें रचीत व त्यांच्याप्रीत्यर्थ यज्ञहि करीत. त्यावेळीं यज्ञाचेंच प्राबल्य होतें. ऐहिक वस्तूंविषयीं अर्थात संसाराविषयीं त्याच्यांत फारच आसक्ति होती. ते यावेळीं आपल्या देवतांकडे सुंदर अशा स्त्रिया, वीर पुत्र, घोडे, वगैरे मागत व आपणास स्वर्गाचें सुख मिळण्याबद्दल प्रार्थना करीत. हा त्यांचा धर्म कर्मप्रधान होता. परंतु कांहीं कालानें हें स्वरूप बदललें गेलें. कर्माची जागा ज्ञानानें घेतली. ज्ञान हेंच श्रेष्ठ असें त्यानां वाटूं लागलें. ह्याच काळांत उपनिषदें निर्माण झालीं व त्या तत्वज्ञानाचा पगडा त्यांच्यावर हळूहळू त्यांवर बसत चालला. पूर्वी जे आर्य लोक आपल्या देवतांपाशीं निरनिराळ्या वस्तु मागत तेच आतां त्यानां अशा वस्तूंची याचना करणें ह्मणजेच मनाची दुर्बलता असें वाटूं लागलें. ऐहिक वस्तूंपासून जितकें लांब रहावेल तितका मोक्षाचा मार्ग जवळ करणें होय, असें त्यांना आतां वाटूं लागलें व अर्थातच त्यानीं तपाकरतां अरण्याचा मार्ग धरिला. थोर लोकांचें अनुकरण अर्थातच साधारण लोकांकडून होत असतें व त्या प्रमाणें समाजांतील हजारों लोक या मार्गाचा अंगिकार करूं लागले. समाजाची अशी स्थिति होणें ह्मणजेच अवनति होणें होय. समाज हा केव्हांहि एका टोकाला जातां उपयोगी नाहीं. नेहमी मध्य बिंदूवर राहिला पाहिजे. ह्मणून ज्या ज्या वेळीं अशी स्थित्यंतरें घडतात त्या त्या वेळीं श्रीकृष्णासारख्य थोर विभूति जन्मास येऊन लोकानां मार्गावर आणण्याचें कार्य करीत असतात. आणि याच उद्देशानें

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत !
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्

"हे भारता, जेव्हां जेव्हां धर्माला ग्लानि होऊन अधर्माचें प्राबल्य माजतें त्या त्या वेळीं मी आपण स्वतःच जन्म (अवतार) घेत असतों, असें भगवद्गीतेंत सांगितलें आहे. आपणाला अवतार कां घ्यावा ला

जाणार नाहींत. पण आह्मीं त्यांच्या मदतीसाठीं भिक्षां—देही करणें लाजिरवाणें आहे. आमच्या राजकीय भवितव्यतेसाठीं त्यांच्या मर्जीवर अवलंबून राहिल्यास आह्मीं आमच्या नामर्दपणाची कबूली दिल्यासारखें होईल. ठराव,अर्ज व विनंत्या करून स्वराज्य मिळविण्याचा मार्ग राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमाचा एक भाग राहिलेला नाहीं. लो. टिळकानीं व म. गांधीनीं कॉंग्रेसचा नवीन कार्यक्रम सात्विक अडवणूकीच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या व मजबूतीच्या अभेद्य पायावर उभारलेला आहे;—त्यांत दास्य–वृत्तीला परावलंबनाला जागा नाहीं. कोणत्याहि राष्ट्राला—मग तें कितीहि बलाढ्य असो—दुसऱ्या एखाद्या राष्ट्राला नेहमींच दास्यांत ठेवणें अशक्य आहे, हें इतिहासानें पुन्हां पुन्हां सिद्ध केलेलें आहे. अमेरिकेसारख्या वसाहतीनें व आयर्लंडनें मिळवलेलें स्वातंत्र्य हीं अलिकडचीं दोन ठळक उदाहरणें ह्या सत्याचा अबाधितपणा सिद्ध करीत आहेत.

आपल्या प्रतिस्पर्ध्याबरोबर लढतांना त्याला चीत करण्यासाठीं त्याचींच शस्त्रें वापरावींत—ह्मणजे, शस्त्रांच्या निवडा निवडींत दुसऱ्या गोष्टींकडे लक्ष्य न होतां ज्या शस्त्रांनीं आपणास यश मिळवितां येईल अशींच शस्त्रें आपण उचललीं पाहिजेत, ह्या उपदेशांत बरेंचसें तथ्य आहे. ह्या उपदेशांतील तत्वावर जोर देऊन असें प्रतिपादण्यांत येतें कीं, प्रसिद्धि हें एक उपयुक्त शस्त्र आहे. व त्याचा फायदा हिंदी नोकरशाही ब्रिटिश सरकार व त्याचे बगलबच्चे आज घेत आहेत. आपण त्यांचा हा डाव यशस्वी होऊं देणें हितावह नाहीं, आपण खऱ्या गोष्टी पुढें मांडून सध्या होत असलेली जगाची दिशाभूल टाळली पाहिजे. हें प्रतिपादन चूक आहे असें कोणीच ह्मणणें नाहीं. परंतु परदेशी लोकमतवाद उचलून धरणारे आमचे मित्र ह्या गोष्टीं गृहित धरतात व त्यांच्यावर ते पूर्णपणें अवलंबून राहतात त्या गोष्टी मात्र दुर्दैवानें त्याना वाटतात तशा नाहींत. कांहीं विशिष्ट प्रकारच्या स्वार्थी (व कदाचित् दुष्ट] लोकांनीं जगास फसवण्याचा क्रम चालवलेला आहे. अशी त्यांची प्रामाणिक समजूत आहे. मी ह्मणतों, हें साफ खोटें आहे. जें जग ह्या रीतीनें फसलें जातें त्या जगाचा उद्देशच मुळीं संशयास्पद आहे; त्यानां दुसऱ्या कोणी फसवण्याची गरज नाहीं. ते स्वतःच्या इच्छेनें फसले जात आहेत. किंवा आपण फसले जात आहोंत असा बहाणा करीत आहेत. जणूंकाय इंग्रजांचा ह्या देशांत शिरकाव झाल्यापासूनच सबंध मनुष्यजातीची उत्पत्ति झाली व त्यापूर्वी हिंदुस्थानाला इतिहासच नव्हता ! जणूं काय, हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर (तुलनात्मक दृष्टीनें वानटो पोर्तुगीज यांचे पोंचण्यापूर्वीं मलबारांत किंवा त्याच्या आसपासच्या भागांत सबंध जगाला हेवा वाटणारी समृद्धता, शांतता, राज्यपद्धति नव्हती व झामोरीनच्या राज्यांतील एकंदर स्थिति आजच्या पेक्षां हजारोपटीनें चांगली होती असें सिद्ध करणारा व आज जो तपासल्यास आपणांस त्या वेळच्या वैभवाचें चित्र डोळ्यापुढें आणून देऊन एकादा निश्वास सोडावयास लावील असा पोर्तुगीझ इतिहासकारांच्या हकीकतींत पोर्तुगीजांच्या आश्रयानें राहिलेल्या एकाद्या सेंट झेवियर सारख्या माणसाच्या पत्रव्यवहारांत नव्हे तर कोरीयासारख्या माणसाच्या हकीकतींत सांपडणारा, सर्व पुरावा बनावट आहे ! परंतु एकवेळ असें धरून चालेल कीं, इंग्लंडांतील राज्यपद्धति एकादी जुलमी ‘ऑलीगार्की’ नसून पूर्ण प्रातिनिधिक आहे व तेथील लोकमताचा भाग हिंदी नोकरशाहीच्या मायावीपणास बळी पडलेला आहे, तरीसुद्धां त्याच्या त्या नास्तिक, आपलपोट्या व अशक्त लोकांच्या वाईट मतांशीं आपणास काय करावयाचें आहे ? सत्य स्वयं–सिद्ध असतें; तें तुमच्या दाराकडे तुमच्या शोधासाठीं येणार नाहीं; सह्याद्री पर्वत एक वेळ इंग्रज राजवराप्यांतील एकाद्या पाहुण्यांस भेटण्यासाठीं मुंबईच्या बंदरांत येईल, पण जगांतलीं सर्व राजघराणी–अर्थातच महायुद्धाच्या खाईतून वांचलेली युरोपीय राजघराणीं– एकत्र होऊन ह्या पुरातन भूमींत लपलेलें सत्य शोधण्यासाठीं आलीं तरी तें सत्य एक तसूभरहि टाळण्याची तसदी घेणार नाहीं, असें माझें मत आहे तेव्हां ह्या सत्याकडे डोळेझांक करणाऱ्या लोकांपुढें आह्मीं आमचा गुडघा मोडणें स्वाभिमानास धरून आहे काय ? आणि आज आमच्या सर्व चळवळींचें अंतिम ध्येय स्वराज्य आहे, व स्वराज्य ह्या शब्दाला कांहीं अर्थ असल्यास तो:— ज्या राजकीय, सामाजिक वगैरे रचनेंत स्वाभिमान व सत्य पायाखालीं तुडविलें जाणार नाहीं अशी रचना–राजकीय व्यवस्था हाच असूं शकेल !

इंग्रजलोकांच्या सत्य–प्रीतीवर विश्वास असणाऱ्या लोकांचा काय अनुभव आहे ? तिथें पूर्वीं जाऊन आलेल्या डेप्युटेशनच्या सभासदांचा अनुभव वगळल्यासहि, हिंदी स्वातंत्र्याची मागणी करण्यासाठीं सध्या इंग्लंडांत असलेल्या मिसेस बिझांट, शास्त्री प्रभृति लोकांना पूर्वीपेक्षां वेगळा अनुभव आलेला नाहीं. त्यांचा व्याख्यानांचा दौरा यशस्वी झालेला आहे लोक त्यांचें ह्मणणं मोठ्या आस्थेनें ऐकून घेतात, त्यांच्या वक्तृत्वाची तारीफ करतात व कांहीं वर्तमानपत्रें कित्येक वेळां त्यांच्या भाषणाचा अक्षरशः रिपोर्ट देतात, पण आतां पर्यंत त्यांच्या स्वराज्याच्या योजनेकडे किंवा रॉयल कमिशनच्या मागणीकडे कोणीहि ज्यास्त लक्ष देत नाहीं. कांहीं दिवसापूर्वीं नेक नामदार शास्त्री ह्यानीं मँचेस्टर गार्डीयन पत्रांतून आपल्या डेप्युटेशनचें कार्य निष्फळ ठरल्याचें कबूल केलें आहे. हिंदुस्थानांत घास्ती करण्यासारखी स्थिति उत्पन्न झालेली नाहीं हें आपल्या हिंदी नोकरांचें आश्वासन ब्रिटिश जनतेला समाधानकारक वाटणें व नवीन (व धूर्त) मजूर सरकारनें हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित न करून आपल्या सुरक्षिततेकडे लक्ष्य देणें नैसर्गिक आहे. ने. ना. शास्त्र्यांचें नैराश्य (अजीर्ण सारख्या] शारीरिक किंवा मानसिक अस्वास्थ्यामुळें उत्पन्न झालेलें नाहीं, हें इंग्लिश पत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या लेखांवरून व पार्लमेंटांतील हिंदुस्थानविषयक होणाऱ्या वादविवादाची हकीगत वाचून ध्यानांत येईल. शास्त्री किंवा बिझांट सारख्या व्यक्ति हिंदुस्थानाचे प्रतिनिधी ह्मणून इंग्लंडांत गेलेल्या नसल्या व ह्मणूनच त्यांच्या आशा–निराशा बद्दल आह्मांस आनंद किंवा दुःख वाटण्याचें कारण नसावें, तरी सुद्धां कोणासहि त्यांची कींव वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. ब्रिटिश लोकमताच्या अनुकुलतेवर हिंदुस्थानास न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न अपूर्व आहे. व त्यांतून दुसरें कांहीं निष्पन्न झालें नसलें तरी त्यानें इंग्रजी लोकमताच्या जोरावर आम्हांस स्वराज्य प्राप्त होईल हा भ्रम कायमचा दूर केल्यास तो फुकट गेला नाहीं, असें ह्मणतां येईल

आतां ज्या सुशिक्षित लोकमताच्या नैतिक दुजोऱ्याचा आपणास खरोखर उपयोग असें लोकमत हिंदुस्थानाच्या बाजूनें आहे; त्याला हिंदुस्थानांतील परिस्थिति समजुन घेण्यास मुळींच अडचण पडत नाहीं, एवढेंच नव्हे, तर यांची माहिती आमच्या कल्पनेबाहेर अचूक असते. त्यांची मतें इंग्लिश पत्रांच्या हिंदुस्थानांतील खास बातमीदाराच्या हकीकतीवरून बनविलेली नसून इतिहासाच्या ज्ञानावरून व दुसऱ्या उपलब्ध साधनांवरून तीं बनविलेली असतात. एकाद्या जर्मन किंवा आयरीश पत्राची म० गांधीच्या राजकारणावरील मतें वाचलीं ह्मणजे खरोखरच आश्चर्य वाटतें. म० गांधीची ह्या देशांत व बाहेर एवढी नालस्ती करण्यांत येते कीं त्यांच्या संबंधीं एकहि खरी गोष्ट युरोपखंडाच्या एकाद्या कोपऱ्यांत माहीत असणें कोणासहि अशक्यच वाटेल. एकंदरींत जगांतील सर्वच माणसें वर्तमानपत्रांतील मजकूर गिळण्याएवढी भोळीं नसतात; अर्थातच , अपवाद ह्मणून एकादा दुसरा भोळा नसलेला माणूस हातांस मिळतील तेवढीं वर्तमानपत्रें फस्त करीत असल्याचें आपण केव्हांकेव्हां पहातों. माझ्या ओळखीचा एक गृहस्थ सबंध दिवसांत त्याच त्याच बातम्या ५ पासून १० पर्यंत वेगवेगळ्या पत्रांत वाचीत असल्याचें मी स्वतः डोळ्यानीं पाहिलेलें आहे. एवढ्या प्रचंड अभ्यासानें त्याच्या त्या अद्भुत मेंदूवर मुळींच परिणाम झालेला नाहीं. ज्या दिवशीं त्याला पुरेशीं वर्तमानपत्रें मिळणार नाहींत त्या दिवशीं हा इसम क्षुब्ध व भुकेलेल्या वाघाप्रमाणें येरझारा घालीत असतो आणि — मला सांगण्यास लाज वाटते—याची ही कींविलवाणी स्थिति पाहून कींव येत असताहि फक्त शारीरिक हल्ल्याच्या भीतीमुळें मला खिशांत लपविलेलें पत्र बाहेर काढण्याची आतांपर्यंत छातीच झालेली नाहीं. ह्या गृहस्थाला मी ‘ पेपर मॅनिआक् ’ (paper maniec) ह्या नावानें ओळखतों व त्याला त्याच्या आवडत्या व्यवसायांत समाधिस्थ झालेला पाहिला ह्मणजे मला जीवाचा कंटाळा यऊं लागून— पण हें सर्व अप्रस्तुत आहे—त्यांच्या जन्मभूमींत गांधीजी संबंधीं दिसून येणारें अज्ञान तुह्माला लाखोशें कोसावर दूर असलेल्या एकाद्या ठिकाणीं आढळणार नाहीं. ह्यावरून एवढेंच सिद्ध होतें कीं, सत्य सूर्याच्या किरणांप्रमाणेंच सर्वव्यापी आहे व त्याची गति थांबविणें अशक्य आहे. लोकमत तयार करणें सूर्यप्रकाश तयार करण्याएवढेंच अशक्य आहे. कारण सूर्यप्रकाश नेहमींच तयार असतो. या नार्वेजियन नाट्याचार्यांच्या पुन्हां पुन्हां उच्चार होत असलेल्या वाक्यांत थोडासा फरक करून सांगावयाचें ह्मणजे लोकमत तुमचें दार ठोठावित आहे.

Anuncios

dia, onerando o tesouro desta Colonia. Os prestimos de S. Excia. podiam ser aproveitados no Ministerio das Colonias, ate' a sua colocagao difinitiva como inspector de 1.a classe, categoria a que o sr. Batalha pertence.

Sim. Podia S. Excia servir a' Nagao, trabalhando no referido Ministerio, sem se preocupar com a defesa da governagao do sr. dr. Jaime de Morais que, felizmente, dispoe de turibularios mais adextrados do que o director de *A Provincia*.

Mais vale ganhar trabalhando do que flanando nas ruas e becos da capital.

MAIS UMA CARTA

La' vai mais uma carta que recebemos de Bardes.

...Sr. Director:

Na interessante carta de um Bardezano publicada no seu considerado jornal, vejo que no dia da extracgao da Lotaria do Asilo de Mapuga, viam se nada menos de 40.000 cautelas que ficaram sem ser vendidas. E' o que *se viu*. Ha', porem, muito mais que ha de *se ver* aos poucos.

Assim eu sei que a Direcgao do Asilo enviou na 1.a semana de Julho ultimo 5.000 cautelas ao sr. dr. Bernardo Sousa para Honkong. Teriam estas cautelas chegado ao destino em tempo para serem vendidas. E assim perante a ameaga do fracasso, quantos mais disparates teria feito a Direcgao?!

E', pois, cedo, muito cedo, para deitar calculos

Com a publicagao, muito obrigado.

Bardez, 23—8—824. De V...

V. S.

N. da R. — O *Bharat* nao publicara' mais escritos sobre a Lotaria do Asilo, assunto que acha suficientimente discutido, exgotado pela *acusacao* Ficam, comtudo, ressalvados os direitos da defesa para as paginas do nosso jornal.

ATE' LOGO, POIS

Lemos com verdadeira surpreza a entrevista que o sr. Roberto Bruto da Costa concedeu a "Associated Press" em Bombaim do seu regresso de Portugal.

As palavras do sr. Costa, se pela sua levianidade revelam nele um entusiasmo facil, estam bem longe de demonstrar em quem as proferiu as qualidades de prudencia e criterio que fazem os verdadeiros representantes do povo. O sr. Costa na entrevista falou *um pouco de mais*. Porem como as afirmagoes de s. excia. sao de caracter serio, contamos tratar das mesmas com mais vagar.

Ate' logo, pois.

DEPOIS DE COMIDOS

Um Aldonense faz um comunicado ao *O Heraldo* de 20 do corrente em que transcreve trechos da correspondencia trocada entre o adv. Fermino da Rocha e o adv. Pascoal Joao Gomes, desde 5 de Outubro de 1923 ate' 1 de Julho de 1924 acerca "de um cano no muro de uma viuva de Aldona."

Sao bocados de cartas e cartoes em que os dois advogados tratam-se por primos e colegas. Sao mesmo boca dos interessantes, sobretudo aquele em que o adv. Rocha pede ao adv Gomes para "depois de comidos" comegar a inspecgao. Mas deixemos tudo isto. O curioso para no's e' o N. B. da carta que diz o seguinte: Quem escreve estas linhas vive num aposento pobre, obscuro e possuindo apenas uma cama rota, uma obra do Ano Cristao e um bofete sobre o qual se acha um Crucifixo e ao pe' deste um tinteiro e uma pena", E as cartas e os cartoes que surripiou aos dois advogados onde e' que os guarda? Valia a pena saber.

AUTENTICAS RAPOSAS!

O Boletim Oficial de 19 do corrente publica portarias de exoneragao dos professores Luis e Silva Rosa, aquele do Liceu de Mapuga' e este do Liceu de Margao. O motivo e' o facto de nao terem sido classificados, no concurso para professor ultimamente realizado.

O *Bharat*, embora lamentando a sorte dos "sacrificados," apoia sinceramente a orientagao do Governo neste assunto. Um professor sem necessaria autoridade que vem do saber nao se admite. E uma "pane" no concurso equivale a uma serie brecha nessa "autoridade".

Mas, sr. dr. Jaime de Morais! VExa. comegou por onde devia terminar. Entao o que e' mau para o prestigio dos Liceus Municipais pode ser toleravel para o prestigio do Liceu Central? E note bem, que no caso do Central nao se trata de simples "pane".

Sao "autenticas raposas"!

AUXILIANDO O GOVERNO

Consta-nos que tem tido extraordinaria procura uns cadernos de desenho que se vendem na Livraria Coelho. A procura e' quase exclusivamente confinada aos alunos do Liceu Central que compram os tais cadernos por 2 rupias cada de preferencia a outros de material identico e perfeitamente serviveis para o fim e que custam apenas 10 tangas.

O editor dos cadernos que tam excepcional acolhimento tem logrado entre os alunos do liceu e' o sr. Altino Coelho. Agora muito para louvar seria se o sr. Dr. Jaime de Morais procurasse desencantar o autor dos mesmos para galardoa-lo como e' de justiga. Nao sabemos porque esses *valores* "pedagogicos" gostam da sombra!

Como quem auxilia o governo na descuberta do grande homem, aprasnos declarar aqui que os celebres cadernos parecem ter sido da Imprensa Nacional.

Expediente

Não se publicará o proximo número do nosso jornal por causa da festividade de Ganes.

गणेशचतुर्थीच्यासणा निमित्त भारताचा येत्या गुरुवारचा अंक प्रसिद्ध होणार नाही.

म. भारत

भा र त

मि. श्रावण कृ० १३ शी शके १८४६

सोनारानेंच कान टोंचले !

मदिरापानाविरुद्ध लेख लिहून भारतानें किती तरी पानें खर्ची घातलीं आहेत. दारूचा मादक व मारकपणा लोकनिदर्शनास आगण्याची संधि भारतानें कधींहि व्यर्थ दवडलेली नाहीं, हें साभिमानपूर्वक नमूद करण्यास त्याला समाधान वाटतें.

पण भारत हें एक हिंदु पत्र आहे.व हिंदु पत्रांत दारूवर कोरडे ओढलेले लेख झळकावेत, हें साहजिकच आहे. दारूच्या अनीतिवर्धक व्यसनाला आळा घालण्याची नैतिक कामगिरी हिंदु पत्रानीं करूं नये तर करावी तरी कोणी ? अर्थात दारूविरुद्ध हल्ले चढविण्याचें कर्तव्य भारतानें वेळोवेळीं पाळलें, ह्मणून तो कांहीं लोकोपकाराचा ऋणको बनतो, अशांतला प्रकार बिलकूल नाहीं.

एकाद्या ख्रिस्ती पत्रासंबंधानें मात्र तसें ह्मणतां येत नाहीं. कारण ख्रिस्ती धर्मांत खाद्यपेयांचा फारसा विचार केल्याचें आढळून येत नाहीं. मनुष्यानें गिळेल तें खावें व घोटेल तें प्यावें, असाच ख्रिस्ती धर्माचा परिपाठ असावा, असे वाटतें. नाहीं तर बेतशीर दारू पिणें काहीं वाईट न हीं, अशी विचारसरणीं त्यांच्यांत रूढ झाली नसती.

उपरोक्त दृष्टीनें विचार केल्यास, मडगांवच्या 'इंदिय पोर्तुगेज' पत्रानें दारूविरुद्ध प्रसिद्ध केलेल्या एका मार्मिक लेखाचें महत्व उच्च प्रतीचें ठरतें. या लेखाचा सारांश वाचकानां प्रस्तुत विवेचनाच्या शेवटीं पहावयास मिळेल व त्याच्या वाचनानें आमचें ह्मणणें किती सार्थ आहे, याचीहि सत्यता त्यांना सहज पटेल.

सोन्याची चोरी, गुरुपत्नीकडे पाप दृष्टीनें पाहणें, विद्वान व तपस्वी पुरुषाचा खून करणें आणि दारू पिणें हीं चार महापातकें आमच्या धर्मशास्त्रांत सांगितलीं असून यांचा संसर्ग ह्मणजे सहवास करणें, हें पांचवें महापातक सांगितलें आहे. यावरून एकादा हिंदु मनुष्य स्वतः दारू पीत नसला तरी जोंपर्यंत त्याचे देशबांधव दारूच्या चिळसवाण्या व घाणेरड्या नरकांत लोळत आहेत, तोंपर्यंत त्यांच्या सहवासाचें महापातक सर्वांना लागणारच, हें उघड आहे. अशा स्थितींत सर्वसाधारणपणें आज मितीस हिंदु लोक महपातकी आहेत, असें छातीठोक विधान केल्यास तें धाष्टर्याचें ठरेल काय ? अर्थात नाहीं. असो.

'इंदिय पोर्तुगेज' पत्रकर्त्यांनीं आपल्या लेखांत सुचविलेल्या उपायांचा अवलंब तावडतोब झाला पाहिजे. गोमांतकास लागलेला दारूच्या महापातकाचा डाग धुवून काढण्याप्रीत्यर्थ गोमांतकीय जनतेनें आपल्या प्रयत्नाची शिकस्त केली पाहिजे.देशभक्तानीं देशभक्तीच्या वायफळ गप्पा मारून दुनिया झुलवीत बसण्यापेक्षां स्वतःच्या हातून घडणाऱ्या या दारूच्या संसर्गाचें महापातक टाळण्याचा कसून प्रयत्न केल्यास स्वतःचा व स्वतःच्या राष्टाचा उद्धार केल्याचें श्रेय त्यांना मिळवितां येणार नाहीं काय ?

पिढ्यानपिढ्या अट्टल दारूबाज बनलेले युरोपियन लोकदेखील आतां शुद्धीवर येत चालले आहेत. अमेरिकेनें या बाबतींत युरोप खंडास चांगलीच अक्कल शिकविली आहे. अशा वेळीं आमच्या देशभक्तानीं मद्यपाननिषेधाकडे डोळेझांक करणें ह्मणजे धर्माच्या व नीतीच्या दृष्टीनें मोठें पाप करणें होय, हें सांगावयास पाहिजे असें नाहीं

'इंदिय पोर्तुगेज'कार ह्मणतातः—

सगळीकडे दारूच्या गुत्यांचें प्रमाण भयंकर रीतीनें वाढत आहे. प्रत्येक दश-पावलांगणिक एका तरी गुत्त्यानें आपलें ठाणें दिलेलें दिसून आल्याखेरीज रहात नाहीं; व दुःखाची गोष्ट कीं, प्रत्येक गुत्ता मद्यपि लोकानीं चिकार भरलेलाच आढळून येतो. गुत्तेवाले तर डोळ्यांदेखत गब्बर होत चालले आहेत. रात्र होण्याच्या समयाला एकाद्या गावांत प्रवेश करा. प्रत्येक गुत्याशेजारीं तुह्माला लोकांचे थव्याचे थवे जमलेले आढळून येतील. कित्येक जुव्वेबाजींत तर कित्येक दारुबाजींत मारे गुंतून गेले आहेत, असेंच दृश्य तुमच्या नजरेला दिसून येईल. मजूर लोक कामावरून परत येतानां निदान 'प्रातीचा अर्धा वांटा' तरी दारूर्पण करीत असतात. प्रत्येक गांवच्या दारुड्यांची संख्या पाहिली ह्मणजे छाती भीतीनें दडपून जाते. इवल्याशा टापूंत दारूच्या गुत्त्यांचा एवढा मोटा प्रसार असणें हें अत्यंत निंद्य व लाजिरवाणें होय. दारूचें व्यसन आपला पगडा सर्व जातींच्या, पंथांच्या व वयाच्या व्यक्तींवर बसवूं लागलें असून, त्याची वाढ गजगतीनें होऊं लागली आहे. पुरुष, स्त्रिया व मुलें या सर्वांनीं मदिरादेवीची एकनिष्ठतेनें आराधना आरंभिली आहे. हा प्रकार खरोखर फार भयंकर होय !

दारूच्या व्यसनरूपी अधोगतीची जी लाट चोहोंकडून उसळत आहे, तिला तावडतोब आळा पडणें जरूर आहे. या व्यसनाच्या रोगावर योग्य मात्रेचे वळसे. दे दुर्दैवी जमिनदारांच्या हातांत आहे. दुरेला देण्यांत येत असलेल्या नारळीच्या झाडांची संख्या संपुष्टांत आणणें आमच्या ठिकाणदारांस अशक्य आहे काय ? तसेंच एकाद्या गांवच्या प्रतिष्टित लोकानीं परोपकार बुद्धीनें

या मासिकास मराठी साहित्यभक्तानीं आश्रय देणें, हें त्याचे कर्तव्यच होय, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

निवेदन (पुस्तक):— प्रो० धर्मानंद कोसंबी यांचें हें आत्मचरित्र असून, तें अनेक दृष्टीनीं वाचण्यालायक आहे. 'भारता'चा व निवेदनाचा' निकट संबंध असल्यानें, निवेदनाचें विस्तृत विवेचन करण्याचा आमचा विचार आहे; व याच दृष्टीनें 'निवेदन' आह्मीं छापावयास घेतलें आहे अर्थात 'निवेदनांतील' आमचा अभिप्राय क्रमशः प्रसिद्ध होईल, हें उघड आहे. तोंपर्यंत वाचकानीं वाट पहावी, अशी आमची त्यांस विनंति आहे.

प्रश्न–गुच्छः— (पुस्तक):–– हें शालोपयोगी पुस्तक प्राथमिक शाळांतील चौथ्या इयत्तेकरितां वळगांवचे म्यु० मुलांच्या मराठी शाळेचे अ० मास्तर पांडुरंग रामचंद्र चांडक यानीं परिश्रमपूर्वक तयार केलें असून, यांत ग्रंथित केलेली माहिती विद्यार्थ्यांना फारच उपयुक्त आहे. किं. ४ आणे. शिक्षणाप्रेमानीं लोकानीं प्रस्तुत पुस्तकाचा अवश्य फायदा घ्यावा, अशी आमची शिफारस आहे.

गीतावीजदर्शनीचित्र :— हें चित्र रा. वि. केतकर, केसरी आफीस पुणें, यानीं प्रसिद्ध केलें असून, त्याची रचना अत्यंत मनोहर व मार्मिक अशीच झाली आहे. योगेश्वर कृष्ण परमात्मा, धनुर्धर पार्थ, कर्मयोगाचार्य लो० टिळक, श्रीसमर्थ रामदास व श्रीशिवाजी महाराज या पंच महात्मतके समरसी करणाऱ्या पांच महात्म्याचें दर्शन या सदरहू चित्रांत होतेंच. शिवाय गीतेचें द्विदल बीज जें बुद्धि–योग व लोकसंग्रह, याचीहि जाणीव प्रेक्षकाच्या मनांत पूर्णपणें बाणते, 'मामनुस्मर युद्धच' हा उपदेशहि चित्रांत कोरला गेला असल्यानें, प्रत्येकाला स्वकर्तव्याची जागृति होण्याचें प्रस्तुत चित्र ह्मणजे एक महत्वाचें साधनच आहे, असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. 'पहिलें तें हरिकथा निरूपण' व 'दुसरें तें राजकारण' याहि समर्थांच्या दिव्य वाणीनें 'गीता–बीज दर्शन–चित्रा'च्या मोहकतेंत व मार्मिकतेंत विशेषच भर घातली आहे. किंमत दोन आणे.

— 'आह्मी लवकरच पोलिसांविरुध्द क्रांतिकारक चळवळ सुरू करणार असून, त्यांत जे सरकारला आमच्या विरुद्ध मदत करतील त्यानां आह्मीं आमचे शत्रु मानू' अशीं पत्रकें कलकत्यास क्रांतिकारकानीं सर्वत्र फडकाविलीं आहेत!

—मलबारांतील निराश्रित लोकांकरितां मद्रास सरकारनें ५१५० रु. मंजूर केले आहेत.

—अमेरिकेंत गेल्या सालांत १० हजार खून झाले! पाश्चात्य सुधारणेचें हेंच का गोड फळ?

–चीनमध्यें आलेल्या महापुरामुळें ५०००० लोक मत्युमुखीं पडले व १कोटी ५० लक्ष लोक निराश्रित झाले!

––महापुराचें संकट अद्याप पुरें ओसरलें नाहीं तोंच मलबारांत महामारीची साथ सुरू झाली आहे!

वर्तमानसार

—सांखळीचे पंढरी कामत यांची मडगांवच्या पाठशालेंत शिक्षकाच्या जागीं नेमणूक झाल्याबद्दल आह्मी त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करितों.

—प्रो० रामचंद्र श्रीधर पै यांचीं बदली ह्मापशेंच्या पाठशाळेंत झाली आहे.

—मुंबईच्या एका पार्शिणबाईनें एकदम ३ मुलांस जन्म दिला असून, या ३ मुलांपैकीं १ मुलगी आहे.

—गोव्यांत जिकडे तिकडे पटकीचा उद्भव झाल्याचें सरकारी आरोग्यखात्यानें जाहीर केलें आहे.

—येत्या महिन्याच्या पहिल्या तारखेपासून १, ५, १०, २०, ५०, १०० व ५०० रुपयांच्या नवीन नोटा प्रचारांत येणार असून, त्यांबरोबर जुन्याहि चालू रहातील. ४ व ८ आण्याच्या नवीन नोटाहि लवकरच प्रचारांत येतील. जुन्या नोटा प्रचारांतून काढण्याच्यावेळीं पूर्व सूचना देण्यांत येईल, असें 'बांकु नासियोनाल उलत्रामारीनु' या संस्थेनें जाहीर केलें आहे.

—दे० भ. लाला लजपतराय हे सांप्रत तुर्कस्थानांत प्रवास करीत असून कांहीं दिवस इजिप्तमध्यें राहून ता० १७ सप्टेंबरच्या सुमारास ते मुंबईस येतील, असे समजतें.

––मलबारांत अतिवृष्टीनें पुनः नद्यांना पूर येऊं लागले आहेत! दिल्ली येथेंहि याच कारणामुळें एक घर कोसळून सहा माणसें मत्यु मुखीं पडलीं!

––जितूर (हैदराबाद) येथें कांहीं दिवसांपूर्वीं विठोबाची दिंडी निघालीं असतां मुसलमानानीं दिंडींत घुसून बराच धुमाकूळ मांडला. हिंदुसमाज बराच मोठा असतांहि, सर्वजण आपापल्या घरीं पळून गेले!

—ता० २९।७।२४ ला दिल्ली येथें भरदिवसा आकाशांत चमकत असलेला एक तारा दिसला!

—अखिल भारतीय प्राच्यविद्या संशोधक परिषदेचें तिसरें अधिवेशन यंदा मद्रास युनिव्हर्सिटीतर्फे भरणार आहे.

—बिट्रोण येथील 'धका' अगदीं मोडकळीस आला असून, त्याची दुरुस्ति करण्याचे कामीं दिरंगाई झाल्यास अपघात होण्याचा संभव आहे. 'आंधळें दळतें व कुत्रें पिठ खातें'!

––तुर्की पार्लमेंटनें बहुपत्नीक पद्धती विरुध्द कायदा पास केला आहे.

––असोळणेच्या वेताळ प्रासादिक विद्यालया मार्फत एक २४ तासांचा सप्ताह करण्यांत आला होता. तो मिरवणूकीसह उत्तम रीतीनें पार पडल्याचें वर्तमान सदरहू विद्यालयाचे हेडमास्तर भा. भा सरदेसाई, हे कळवितात.

—ब्रिटिश हिंदुस्थानांत १९२३ सालीं एकंदर ५६५४५ विपारी सर्प मारले जाऊन, या कामीं ८१७ रुपये खर्च आला. विपारी सर्पाच्या दंशानें एकंदर १९९९० माणसें मत्युमुखीं पडलीं क्रूर व हिंस्त्र जनावरांपैकीं २३९११ चा नाश करण्यांत येऊन शिकारी लोकांना १६५ ३९७ रुपये बक्षिसादाखल वाटण्यांत आले. क्रूर जनावरांच्या भक्षस्थानीं त्याच वर्षी एकंदर ३३०५ माणसें पडलीं !!!

—बाँबे क्रोनिकल पत्राची सांपात्तिक स्थिती अत्यंत कष्टतर झाली असून तें पत्र जयकर प्रभृति मंडळी स्वराज्यपक्षासाठीं घेणार असल्याची वदंता

केसरीकारांस थोडा खुलासा

लेखांक नं. २

गोव्यांतील हिंदु जनतेचा खिस्त्यांशीं असलेला राजकीय द्वय संबंध दाखवितांना ब्रिटिश हिंदुस्थानांतील मुसलमानांचा, तेथील हिंदूंशीं असलेला द्वेषमूलक संबंध, केसरीकारांनीं पुढें केला होता; पण केसरीकारांची ती राजकीय तुलना, येथील परिस्थितीच्या दृष्टीनें कितपत सार्थ आहे, हें मी पहिल्या लेखांत दाखविलेंच आहे. व आज त्यांच्या दुसऱ्या राजकीय द्वैताविषयीं लिहायाचें आहे.

केसरीकार ह्मणतात कीं, ब्रिटिश हिंदुस्थानांत, हिंदु शासित व इंग्रज शास्ते, असें जसें द्वैत आहे, तसेंच गोव्यांत पोर्तुगिज शास्ते व हिंदु शासित अशा स्वरूपाचें द्वैत आहे. या केसरीकारांच्या ह्मणण्याचा विचार केवळ तात्विकदृष्टया करावयाचा नसून वस्तुस्थितीच्या दृष्टीनें करावयाचा आहे. बाकी, राजकीय नात्याच्या दृष्टीनें पाहिल्यास, गोव्याच्या दुर्दैवानें ह्मणा अगर अन्य कोणत्याहि कारणामुळें ह्मणा, पोर्तुगिजांकडून गोवें काबीज झालें आहे व अर्थात पोर्तुगिज शास्ते व हिंदु शासित होत, हें नातें कोणासहि नाकबूल करतां यावयाचें नाहीं. एकदां पडलेलें नातें, कैक बाबतींत, तसल्याच दर्जाच्या विरुद्ध प्रयत्नाशिवाय पुसून जात नाहीं. ह्मणजे, जितांकडून काबीज केलेलें राज्य जेत्यांकडून परत हिसकावल्याशिवाय जित—जेतेपणाचें पहिलें नातें पुसलें जात नाहीं. ही नात्याची दृष्टि झाली. पण केसरीकारांचें वरील ह्मणणें या जित—जेतेपणाच्या तात्विक अर्थाच्या दृष्टीनें सोडावयाचें नसून, त्यांचें तें ह्मणणें वस्तुस्थितीच्याच दृष्टीनें पहावयाचें आहे. कारण, बापाची दुसरी बायको ही पहिल्या बायकोच्या मुलांची सावत्र आई होय; इतक्याच या नात्यावरून त्या सावत्र आईंत व पहिल्या बायकोच्या मुलांत सवतीमत्सर हा चाललाच पाहिजे असें सांगतां येणार नाहीं नहून ही सावत्र आई व पहिल्या बायकोचीं मुलें हीं खुद्द आईपुत्रांप्रमाणें वागत असूं शकतील. सारांश, केवळ नात्यावरूनच ज्याप्रमाणें त्या नात्याच्या तात्विक अर्थाप्रमाणें वस्तुस्थिति आहे असें जसें सांगतां येत नाहीं, तर तें वागणें पहावयास ती ती परिस्थिति पहावयाची असते, तद्वत्, पोर्तुगिज व हिंदु यांच्या मधील जित—जेतृत्वाचेंच नातें, प्रजेचें काढण्याच्या बाबतींत पहावयाचें नसून, तें नातें कसें काय चालतें हेंच मुख्यत्वेंकरून पाहून सिद्धांत बांधावयाचे असतात.

दुसरी अशी गोष्ट आहे कीं, केसरीकार ज्या वरून येथील हिंदु—पोर्तुगीजांचें नातें दाखवितांना तेथील हिंदु–इंग्रजाचें नातें दाखवितात; व ज्या वरून वस्तुस्थितीच्याहि दृष्टीनें पाहिल्यास हिंदु व इंग्रज यांत जित–जेतेपणाचें द्वैत आहे, त्यावरून येथील हिंदु—पोर्तुगीजांतहि जित—जेतेपणाचें व तेंहि इंग्रजांसारखें तणावमूलक नातें आहे असें केसरीकारांचें स्पष्ट ह्मणणें आहे, असें दिसतें.

ब्रिटिश हिंदुस्थानांतील हिंदु–इंग्रजांत, जित–जेतेपणाचें नातें तत्वशः तर आहेच पण व्यवहारदृष्टयाहि आहे. व ह्मणूनच इंग्रज लोकांकडून, आपण जेते आहोंत या सबबीवर मोठमोठ्या पगारांच्या जागा आपणास राखून ठेवणें; इंडियन झाला कीं, अमुक पगार व त्याच नोकरीवर इंग्रज असला तर कितीतरी अधिक पगार देणें; मिलिटरी खात्यांतील जबाबदारीच्या जाग्यांवर, इंडियनांची लायकी असतांहि, कमी लायकीचा इंग्रजच त्या जागेवर नेमणें; कैक खात्यांतल्या कैक जागा गोऱ्यांसच ह्मणून राखून ठेवणें; गोऱ्यांचीच ह्मणून वसती निराळी करून इंडियनांस तेथें वसती करण्यास मज्जाव करणें; केवळ गोऱ्या लोकांकरितांच ह्मणून निराळींच व आपल्याच लोकांचीं कोर्टें स्थापणें; एवंच, पावलोपावलीं आपल्या जितपणाची उदासीन जाणीव होऊन हिंदी लोकांचें अंतःकरण दुखलें जाण्यासारखें वर्तन, राजकीय व सामाजिक व्यवहारांतहि, इंग्रजांकडून, आपण जेते आहोंत या नात्यावर, होत आहे व असेंच इंग्रजांसारखें वर्तन पोर्तुगीजांचेंहि येथील इंडियनाकडे होत असावें या भ्रामक कल्पनेवरून केसरीकारांकडून " इंग्रज शास्ते व हिंदू शासित या द्वैता ऐवजीं हिंदू शासित व पोर्तुगिज शास्ते अशा स्वरूपाचें द्वैत (गोव्यांत आहे) " असे उद्गार केसरीपत्राच्या द्वारा निघाले.

पण येथील वस्तुस्थिति तशी नाहीं. इंग्रजांसारखा जेतेपणाचा मान येथील पोर्तुगीजांसहि आहे. पण त्याचा द्वैतभावमूलक परिणाम व्यवहारशः मुळींच होत नसून, नागरिकत्वाच्या हक्काच्या बाबतींत व त्या हक्काच्या अमलबजावणीच्या व्यवहारांत, हिंदु–पोर्तुगिजांत अद्वैत आहे. तसेंच येथें सरकारी नोकऱ्यांच्या पगाराच्या बाबतींत मुळींच भेदभाव नाहीं. मिलिटरी खात्यांत पोर्तुगीजां इतकेंच सरसकट सर्व इंडियनानाही मुक्तद्वार आहे. येथील कोणत्याहि सरकारी खात्यांत अशी एक सुद्धां आजकाल जागा नाहीं, कीं ती गोऱ्यांकरितांच ह्मणून राखून ठेवण्यांत आली आहे. येथें क्यांटोनमेंटची व सवत्या कोर्टांची तर पद्धति मुळींच नाहीं. सारांश, केसरीकार ह्मणतात त्या बाबतींत आह्मीं समदुःखी नाहीं, एवढेंच माझें ह्मणणें आहे.

हें माझें ह्मणणें ढोबळ मानानेंहि पहाण्यास स्पष्ट दिसण्याजोगें आहे. ज्याप्रमाणें हातच्या कांकणास आरसे नकोत त्याचप्रमाणें माझ्या ह्मणण्याचें सत्यत्व पहाण्यास दूर जावयास नको. येथील मोठमोठ्या सरकारी अधिकाऱ्यांच्या जाग्यांवर नजर फेंकली असतां; किंवा, डॉ कायतान गोंसालव्हीस सारख्या प्रिव्ही कौन्सिलच्या इंडियन जजांस गव्हर्नर जनरलची जागा स्वीकारण्यास पोर्तुगाल सरकारहून निमंत्रण आल्याचें

ECOS & CRITICA

O MAIOR MAL

O nosso considerado colega *India Portugueza* na edigao de 19 de agosto publica um momentoso artigo subordinado a' epigrafe "Guerra para Alcool," que encerra verdades nuas e cruas' contendo igualmente sugestois novas contra o combate ao Alcoolismo que têm sido a constante e quase a principal preocupagao nossa, desde a fundagao deste modesto periodico, aterrados como vivemos perante este maior mal social, mal que cada dia vai crescendo, dada a incuria do Governo, o que e', ate' certo ponto explicavel, nao havendo, porem, coisa alguma que explique nem justifique a indiferenga dos filhos da terra diante do polvo medonho que vai minando descaroavelmente toda a nossa vida social, moral e economica.

Sim, as medidas que a *India Portuguesa* aconselha sao eficazes e sao viaveis, pois a sua execugao depende apenas da nossa vontade, da classe ilustrada do pais que e', ao mesmo tempo, a classe de proprietarios, a unica que sofre os precalgos do alcoolismo perdendo o pouco que recebe das rendas de distilagao com o resultado do alcoolismo: o aumento do salario e insuficiencia do trabalho do operario de quem depende para a exploragao de suas terras.

Sao medidas [illegible] alcance. Abracemo-las, pois. Esperar pelo Estado !? E' uma tolice. Nao sabemos mesmo se e' contrasenso. O Estado, coitado, uma terra *economicamente pobre* tem que pagar os chefes do servigo a 1200 rupias mensais e o trabalho dos exames aos professores a 15 rupias ao dia! Donde ha de vir o dinhiro?

¿E que direito temos no's de exigir tudo, esperar tudo de uma administragao extranha?

HISTORIA OU HISTORIAS?

"Na India ja' se trabalha entusiasticamente para que a comemoragao do 4° centenario da morte de Vasco da Gama se realise com o esplendor que ele deve atingir. Os descendentes dos portugueses, os que ali conservam com maior carinho os sentimentos de amor respeito e gratidao pela velha metropole e se honram de pertencer a uma nagao que assombrou o mundo com o esplendor dos seus feitos imortais, estao empenhados em dar a' realisagao do centenario o maior brilho e calor para que ela em tudo seja digna do grande vulto, cujos servigos prestados a' humanidade se vao celebrar."

(Do *Diario de Noticias*)

AINDA O ASILO

Veiu-nos a' mao mais uma carta, mas esta em defesa da Direcgao, que folgamos publicar:

...Sr. Director.

Os que clamam contra a lotaria do Asilo e a sua Direcgao cremos que nao conhecem ou pretendem nao conhecer o plano e as intengoes dos ilustres homens a cujo cargo estao os interesses do Assilo.

Ainda e' cedo fazer um juiso seguro sobre pessoas e factos. A primitiva tentativa se nao foi um sucesso por ai alem, tambem seria injustiga classifica-la de um fracasso. Mas deixemos o tempo falar. E entretanto cumpre-nos tornar publico, para se avaliar da competencia da Direcgao, que o seu dedicado presidente vai, segudo se diz, langar o ano seguinte um plano de 500.000 cautelas e com o apoio do grande politico indiano Joseph Baptista, vende-lo todo em Bombaim.

O que diram a isto os opositores da Direcgao ?

Com a publicagao

Mapuga' 5.9°924 — De V... J. P. M.

Nao ha duvida que o sr. J. P. M mostra se homem de crengas facais Agora-no's lembramos ao Asilo um plano de 5.000 000 de cautelas e o nome do Gandhi para o apoiar. E estava o Asilo com dinheiro que nem ...milho. Aqui os patricios, nos planos sao um alho pelo que vemos.

E NO'S...

E' pena que a estengao do *Bharat* nao nos permita transcrever na integra o monumental discurso sobre a "Democracia" proferido pelo Governador de Bombaim por ocasiao da "Investidura do Grau" na Universidade de Bombaim, realisada ha pouco. E' um trabahlo de alto valor, cuja leitura recomendamos aos filhos de Goa para que neles se crie um orgulho hoje algo arrefecido: — *o orgulho de ser indio*.

Entretanto ai vai um trecho cuja importancia para no's e' incalculavel.

"A India sobreviveu a tantas transformagoes, ao choque de tantas civilizagoes estrangeiras e tomou e transmitiu para o seu uso muito do que havia de melhor nelas. Inpende-vos fazer que a vossa patria tenha futuro igual ao passado, desde que ela se adopte a novas ideias sem sacrificar a sua identidade e individualidade historicas"

Foram estas as palavras, entre outras, que sir Welson dirigiu aos novos. E no's aqui a exaltarmos "o poder de assimilagao" do sistema colonial portugues e a pormo-nos de cocoras diante dos tais "assimilados"!

—पेडणेचे रावराजे आत्माराम वासुदेव देशप्रभु यानीं पौत्रप्राप्ति झाल्याबद्दल पुष्कळ दानधर्म केल्याचें नमूद करण्यास **भारताला** फार आनंद होत आहे.

—दुसरीकडे ' बांकु नासियोनाल उलत्रामारीनु ' या बंकेची जाहिरात प्रसिद्ध केली आहे. तिकडे वाचकांनीं लक्ष्य पुरवावें.

—शेवियट सरकारची शिक्षणपद्धति पाहण्याकरितां लंडनच्या पार्लमेंटचे वीस मजूर सभासद रशियाला गेले आहेत.

——

भा र त

भाद्रपद शु० १३ शी १८४६

मूळालाच आधीं कीड लागली आहे !

स्वराज्याची व्याख्या थोडक्याच शब्दांत द्यावयाची झाल्यास "आपलें राज्य आपण चालविणें " अशी देतां येईल. १९१० सालांत पोर्तुगीज विचारक्रांतीला पोर्तुगालांत तोंड फुटलें आणि त्याच्या ध्वनीदाखल म्हणून पोर्तुगालच्या इतर वसाहतींबरोबर गोमांतकालाहि स्वराज्य बहाल करण्यांत आलें. या अनपेक्षीत स्वराज्यदानाची मीमांसा करणें फारशें कठीण नाहीं. भूतकालीन इतिहासाला बहुधा अवगत नसलेला हा स्वराज्यदानाचा प्रकार, गोमांतकाला प्रथम आनंददायक तर वाटलाच; पण याहिपेक्षां जास्त आनंद, पोर्तुगालसारखें कनवाळू राष्ट्र आपणांस लाभलें, या विचारानें त्याला झाला असला पाहिजे. धर्मयुद्धांची (guerras relijiosas) संधि साधून गिल्येर्म दे ओरॉंजच्या नेतृत्वाखालीं, आपल्या स्वातंत्र्याप्रीत्यर्थ स्पेन फौजेविरुद्ध लढणाऱ्या हॉलंडला आपल्या शिपायांच्या रक्ताच्या भारोभार वजनानें, स्वातंत्र्य विकत घ्यावें लागलें; अमेरिकेंतील संयुक्त संस्थानाचाच इतिहास पाहिला तरी त्यानाहि आपल्या राजकीय मोक्षाकरितां तरवार उपसावी लागली व स्वातंत्र्योद्धारक होमांत थोड्या फार रक्ताची आहुति द्यावी लागली. इटलींतहि हाच प्रकार घडून आला. एकंदरींत पाहूं जातां आपण होऊन तर असोच पण मागणीची तांत गळ्यास लागली असतांना देखील परतंत्र देशानां स्वराज्य किंवा स्वातंत्र्य दिलेलें इतिहासांत बहुधा आढळून येत नाहीं. व इतर कोणत्याहि नसल्या तरी या बाबतींत इतिहास बराच कंजूष आहे. असो. याप्रमाणें, राष्ट्रांची मनोरचना असतांना पोर्तुगालच तेवढा वरील नियमाला अपवाद होणें हें त्या राष्ट्राचा मागील इतिहास पाहिल्यास, आश्चर्यच वाटतें कारण पोर्तुगाल झालें तरी एक युरोपियनच राष्ट्र होय. पण गोमांतकाला मिळालेले हक्क लेखाचे आरंभीं दिलेल्या व्याख्येला उतरतात किंवा कसें बखुद्द पोर्तुगीज राष्ट्र शेवटल्या म्हणजे १९१० राज्यक्रांतीच्या वेळीं कोणत्या परिस्थितींत होतें तें पाहिलें म्हणजे वरील आश्चर्याला जागा रहात नाहीं व पोर्तुगीजांच्या ओदार्याबद्दलचे ओटाशीं आलेले उद्गार आपोआपच विरून जातात. कोणतीहि दुर्लभ गोष्ट अनायासें किंवा प्रयत्नानें प्राप्त झाली असतां त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या आनंदांत आपल्या हाताखालच्या मनुष्यांना भाग देऊं देणें हा मनुष्य स्वभाव आहे. गरीब आईनें आपल्या मुलाला सगळी भाकरी दिली तर त्या आनंदाचे भरांत तें मूल दारांत बसलेल्या आपल्या मोती कुत्र्याला देऊं शकतें. स्वराज्य दानाचें बाबतींत पोर्तुगालांतहि हीच गोष्ट घडून आली. एक तर फारां दिवसाचे बेतडीत जाऊन प्रजासत्ताक राज्यपद्धति स्थापन झाल्यामुळें या पद्धतीचे पुरस्कर्ते स्तिमीत झाले असले पाहिजेत. उत्साहाच्या या पहिल्या भरांत शक्य तर आपल्या एकंदर कॉलनींना स्वराज्य देऊन टाकणें व ज्या पद्धतीचा कांटा आपणास इतका असह्य वाटला तो त्यांच्याहि मार्गांतून काढून टाकावा हा विचार प्रजासत्ताक–वाद्यांचे मनांत आला. पण आपली शेंडी सुटून आपण मोकळे झालों म्हणून आपल्या हातांत असलेली दुसऱ्याची शेंडी साफ सोडून द्यावी हें त्यांना पसंत नव्हतें. कारण तसें झाल्यास, युरोपांत पोर्तुगालचें उरलें सुरलें शेंहि महत्व सोडून देण्याची पाळी यावयाची. बरें, कांहींच न द्यावें तर कॉलनींची कुरकुर आज ना उद्यां सुरू होणारच मग स्वराज्य म्हणून त्यांना कांहीं किरकोळ राजकीय हक्क आजच दिल्यास एकदांची भावी कटकट तरी टळेल. शिवाय, औदार्याची टिमकी वाजते आणि कॉलनींकडून दुवा मिळतो तो निराळाच ! अशा विचारानें नव्या सताधारी मंडळानें गोमांतकालाहि स्वराज्याच्या नावांखालीं कांहीं राजकीय हक्क दिले. हे हक्क अपुरे आहेत व पोर्तुगालचा धनीपणा, व हात कारभारांत कायम रहातोच तो काढून टाका असें पोर्तुगालला त्या वेळीं सांगणें गोमांतकाला शक्यच नव्हतें. कारण, स्वराज्याचा पल्ला कोठवर पोंहचतो याचीच मुळीं जर त्याला कल्पना नव्हती व अनपेक्षीत रीतीनें मिळालेला स्वराज्याचा व्यवहार फार झाला असें मानण्यापर्यंत जर त्याची तयारी तर मिळालेलें स्वराज्याचें हाडूक चघळीत बसण्यापलीकडे त्याच्या हातून फारशें कांहीं झालें नाहीं. यांत त्या काळाला योग्य असेंच झालें.

पण कांहीं वेळानें, गोमांतकाला झालेल्या आनंदाची पहिली लाट ओसरली व मिळालें आहे त्या मानानें अजून मिळविण्याचें पुष्कळ राहिलें आहे असें येथील राजकारणी पुरुषांना वाटूं लागलें. हे विचार म्हणजे गोमांतकांत अकस्मात उत्पन्न झाले असें नाहीं. त्याला बऱ्याच गोष्टी कारणीभूत झाल्या. आपल्या ब्रिटिश हिंदुस्थानला नुकतेच कुठें कांहीं हक्क इंग्रज सरकारनें दिले आहेत. या सुधारणांच्या हक्कानें झालें तरी तेथील लोकांची असंतुष्टता कांडीभर देखील कमी झालेली नाहीं. हें सर्वास ठाऊकच आहे. परंतु तेथील अपुऱ्या राजकीय हक्कांची येथील स्वराज्यांतर्गत हक्कांची गोष्ट बेरीज मात्र सारखीच ! जी गोष्ट 'सर्टिफिकेशनच्या जोरावर तेथील व्हाईसरॉय करूं शकतो, तीच गोष्ट येथील गव्हर्नर आपल्या

वर्तमानसार

—सार्वजनिक संस्थांसाठीं असो वा अन्य कारणासाठीं असो सरकारच्या परवानगीशिवाय लॉटरी काढणें हा इं. पी. को. कलम २९४ अ प्रमाणें गुन्हा आहे, असा सरकारचा सर्रास हुकूम झाला आहे.

—गुरांना बाहेर देशीं पाठविण्यास परवानगी देण्याचा हुकूम रद्द केल्याबद्दल जोधपुरच्या महाराजांचें अभिनंदन होत आहे.

—हैसूरमध्यें सूतिकागृहें व शिशुसंगोपनगृहें स्थापन करण्याकरितां हैसूरचे माजी दिवाण कै० सरदार कांतराज यांनीं १२०००० रुपये आपल्या इस्टेटींतून देण्यांत यावे अशी व्यवस्था केली आहे.

—मंडाले येथें ता. १६ आगष्ट रोजीं पोलीस व यु.. अट्टना नांवच्या पुढाऱ्यांची मिरवणूक काढणारे यांत दंगा होऊन एक पोलीस व एक धर्मगुरु ठार होऊन १२ पोलीसांना जखमा झाल्या आहेत.

—त्रावणकोर संस्थानच्या कायदेकौंसिलनें आपल्या संस्थानांतील प्राथमिक शाळांत सूत काढणें हा सक्तीचा विषय ठेवण्यांत यावा हा ठराव पास केला. व त्यास सरकारची संमति मिळाली.

—कधीं न थांबणरी अशी एक गाडी ब्रिटिश साम्राज्य प्रदर्शनांत मांडिली आहे. तिचे दीड मैलाचे एकेरी व पाऊण मैलाचे दुहेरी रूळ असून तिचा दरताशीं२ ४ मैलपर्यंत वेग आहे. हिला ड्रायव्हर, कंडक्टर, निशाणवाले व ब्रेकवाले यांची मुळींच गरज नाहीं.

—असोळणें येथील "श्री वेताळ प्रासादिक ज्ञानमंदीर" या संस्थेच्या विद्यमानें राणु कामत यांच्या घरांत भाद्रपद शु० ५ मी बुधवारीं संध्याकाळचे ५॥ वाजतां श्री गणपतीसमोर शिवा फटू पै आंगले यांचें "सुखदुःखमीमांसा" या विषयावर प्रवचन झालें. प्रवचनास असोळणें येथील स्त्रीपुरुष वर्ग बराच जमला होता.

—ता २४ आगष्टरोजी "श्रीशिवतत्वप्रसारकसंघातर्फे डिचोली (गोवे) येथें शांबाजी सूर्यराव सरदेसाई यांच्या अध्यक्षतेखाली वे. शा. सं. रामचंद्र नाईक करंडे शास्त्री यांचें "गोमांतकीय तरुणांचीं कर्तव्यें" याविषयाव व्याख्यान झालें. व्याख्यानांत त्यांनी हिंदुख्रिश्चन दुहीचा व हिंदुसणांत धर्माच्या नांवाखालीं प्रचलित असणाऱ्या चालीरीतींचा निषेध करून पतितपरावर्तन अस्पर्शवर्गाची सुधारणा वगैरे कामें हातीं घ्यावीं असें तरुणांना उपदेशिलें. याशिवाय शिवाजीचीं तत्वें व हिंदुसंस्कृति यांची चांगली मीमांसा अध्यक्षांनी केली.

COMUNIDADE DO TOROFO BALY

Irão á praça as avenças de despeza anual do ano de 1925, das comunidades de Adnen e Baly, e as de receita trienal do trienio de 1925 a 1927 e despeza anual do ano de 1925 da Comúnidade de Fatorpá nos dias 21, 22 e 25 do corrente mez, ás 13 horas, respectivamente nos logáres das suas sessões.

Aos 8 de Setembro de 1914

O escrivão da Comunidade do torofo Baly

Sacarama Xabagy Sinai

ANUNCIOS

O Bharat, ano 9º nº 24 de 11 deSetembro de 1924.

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetido.

Numero avulso 1 tanga

Sociedade Patriotica dos Baldios das Novas Conquistas

Sendo necessario proceder-se aos serviços de desbaste e limpeza dos terrenos DAPO DECHEM-MOLA, VALINTULO-SORÔD e COSTI, pertencentes á mesma Sociedade, a fim de os trazer á cultura regular, a Direcção convida os pretendentes a esses serviços e á compra da lenha resultante, a dirigirem as suas propostas por escrito ao secretario da mesma, o signatario deste, no praso de 15 dias.

As condições ficam patentes na secretaria da Direcção,

Aceitam-se tambem propostas, e no mesmo praso, para a compra do coco da Sociedade.

Nova-Goa, 27 de Agosto de 1924

O Secretario da Direcção

Francisco Sales d'Abreu

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1º oficio Redcar, a requerimento de Balcrisna Manju Naique Gauncar por si e como pai administrador do seu filho menor, impubere, Caxinata, de Agonda actualmente residente em Colem correm éditos de trinta dias á contar da 2.a publicação deste citando os actuais possuidores dos predios hipotecados Gongadora Balopá S. Dessai e mulher Locximim Balopá Saunto Dessaí, Balopá Sadassiva Saunto Dessai por si e como pai administrador dos seus filhos menores puberes Guiridora Balopá Saunto Dessai, Emuna Sitarama Balopá Saunto Dessai, Gonopoti Bálopá Saunto Dessai, e os menores puberes Xantá Balopá Saunto Dessai e Maturá por si e na pessoa do seu pai dito Balopá, assim como Xabú Naique marido da dita Maturá, todos residentes em Karvar, India Inglesa, em parte incerta para no praso de dez dias, findos os éditos pagarem conjuntamente com os outros ao dito exequente Balcrisna Monjú Naique Gauncar, cessionario de Sadassiva Raiá Naique Dessai, de Agonda a importancia de 250 rupias com disconto de um quinto de um terço da responsabilidade do devedor falecido Monjú Esso Naique, pai do exequente Balcrisna com todos os respectivos juros vencidos e não prescritos em dobro segundo o estipulado no auto de conciliação datado de 12 de Setembro de 1905 bem como os vincendos e pena convencional de uma rupia diaria desde a 1a. citação até a real solução de tudo o que for devido alem de custas do processo sob pena de a execução seguir seus termos com penhora dos bens sobre que foi registada a hipoteca. E para ser publico se expediu este. Quepêm 26 de Agosto de 1924.

O escrivão de Direito

Babá V. Camotim Redcar

Verifiquei a exatidão

O Juiz de Direito

A. A. de Brito e Nascimento

Camara Municipal de Quepem

De ordem da Exma Camara Municipal deste concelho, se faz publico que na sessão ordinaria de 13 de Outubro proximo seguinte e sessões imediatas, serão arrematadas, em hasta publica, pelas 13 horas as avenças de receita e despesa do municipio, relativas ao ano civil de 1925, tais como, assentada de vendilhões do concelho á exepção de Curchorem e Cacorá, passagens de Assoldá, Cotombi e Betul, carros extranhos, imposto de feiras, carnes verdes, coima, exportação de lenha, madeira etc. por via terrestre ou fluvial, imposto de tonas, de capacidade não inferior a uma tonelada que entrarem ou sairem com mercadoria pelo porto de Betul e bem assim o serviço de iluminação publica da cassabé.

Faz-se mais publico que nos dias 12 e 19 do dito mez de Outubro terá lugar na estação ferro-viaria de Curchorem pelas 10 horas, a adjudicação de placas para o serviço do transporte de bagagem dos passageiros das lanchas e da estação ferro viaria daquela localidade bem assim de passagens de Sanvordem, Capxem e Xelvona. de coima e asentada de vendilhões de Curchorem, Cacorá e Odar, do imposto de tonas de capacidade não inferior a uma tonelada que entrarem ou sairem com mercadoria de qualquer ponto marginal dos rios que banham este concelho lá exepção do porto de Betul e bem assim o serviço de iluminação pública em Curchorem.

Declara-se mais que a Camara reserva o direito de não ulmar a arrematação do imposto de tonas nas condições acima ditas quando o preço oferecido na praça não fôr vantajoso ao Municipio.

As condições de arrematação estarão patentes no acto da praça,

Secretaria da Camara Municipal em Quepem, 8 de Setembro de 1924.

O Secretario da Camara,

Visvonata Rudragi S. Sirvoiccr.

ECOS & CRITICA

O BATALHA SERVE ...

"A Provincia", comentando o telegrama de *Reuter* sobre o ultimo movimento revolucionario, havido em Lisboa, diz: "Mais uma vez fica confirmado que as revolugoes ja' nao sao possiveis na Republica."

E no's, ingenuos, a vivermos na doce ilusao de que, tarde ou cedo, haveria mais uma "danga" em Portugal. Fez bem "A Provincia" em tirar-nos do engano. Nao ha duvida, o Batalha serve para alguma coisa.

ANTES DE MAIS

Como quem mete enfim o dedo na chaga escreve para "O Seculo" de Lisboa o sr. A. Spinola o que segue:

"Como se sabe, as moedas correntes no Oriente sao a pataca em Macau e Timor, e a rupia na India. Quando o seu valor comercial andava abaixo do par, os governos locais fixaram-lhes valores oficiais, para a confecgao dos seus orgamentos em re'is continentais e pagamento dos seus funcionarios em moeda local, evitando, assim, a estes ultimos uma situagao financeira atro's. Hoje o valor comercial da rupia e da pataca, devido a factores que nao vem ao caso discutir, atingiu proporgoes inconcebiveis. Certos funcionarios podem num quadrienio, transferindo as suas economias para a metropole, chegar a adquirir predios,impoe se, por isso, no proximo e extremo Oriente, a elaboragao de orgamentos em moeda local, a redugao de certas concesias e extingao de outras."

E' o que o sr. Spinola devia ter dito a mais tempo. E' o que agora convem que o sr. Spinola repita todas vezes que possivel for. E' o que cumpre a todos filhos da Goa, residentes no extrangeiro, dizer e repetir todos os dias, e muitas vezes ao dia.

As cantilenas de fomento agricola; do desenvolvimento de instrucgao; da introdugao de industrias piquenas e grandes; das obras de engenharia civil e hidraulica;das caixas do credito...... tudo nao passa do canto de sereia ......belo para adornecer a oposigao para que o trabalho de viceras nao seja perturbado. Aqui para o pais andar para a frente e' preciso, antes de mais, moralisar o orgamento.

A PROPOSITO

Le se no relato do julgamento do cap. Filomena da Camara o seguinte: O sr. Raul Esteves: "Embora tenha conversado com alguns camaradas meus sobre o assunto sempre cumpri com o meu dever."

Que diga agora o maior linguista de Portugal Candido de Figueiredo se a frase do sr. Raul Esteves esta' exacta:

Eis o que ele diz;a expressao "cumprir com o meu dever" perdoaria so' ao meu sapateiro.

QUOD NATURA...

O sr. Pereira Batalha esta' muito *inconsolável*, desde que viu que, ao cabo de *tres* dias de festa, o "Ganes **era precipitado ao mar."**

Decididamente, o director de "A Provincia,' incapaz de aprofundar o seu espirito superficial na filsofia da pratica que o traz constrangido, pretende, a seu modo, dar ligoes de "respeito' a' classe hindu'.

¿Com que, entao, importa um "sacrilegio da mancha do pecado" a precipitagao do Ganes ao mar?

Engana se, caro sr. Batalha, quando tal supoe. A concepgao religiosa hindu' nao e' tao "fraca e superficial" que oferega margem a' critica a quem quere sobretudo, aos criticos faceis da laia do sr. Batalha.

Fique, pois, o jornalista europeu sabendo duma vez para sempre, que o Ganes e' "precipitado ao mar," depois de privar de "divindade" o barro de que e' feita a sua imagem.

O que se precipita ao mar nao e' portanto, o Ganes, mas sim o barro, ao qual e' indiferente a companhia dos residuos que os *bonguis* "processional e diariamente langam nos mesmos sitios.'

E, depois, Deus existe em toda a parte; consequentemente nao pode deixar de existir tambem nos tais residuos.

Mas ¿porque diabo o sr. Batalha ha de meter o seu rubicundo nariz nos residuos dos *bonguis*, em lugar de estudar bem o assunto que pretende criticar?

"Quod natura dedit, nemo potest negare!"

E' ESPANTOSO

Chegaram ate' no's os ecos de uma scena nada edificante havida no nosso Liceu Central entre um aluno do 6° ano das letras e o respetivo professor de portuguez.

Dizem que o agressor foi o aluno B' espantoso! E deste facto espantoso apura se que cinco anos nao sao bastantes para o nosso Liceu educar um aluno. Como se apura tambem que e' ja' tempo de na escolha dos professores nos nossos institutos do mesmo, adoptar se uma norma mais severa, mais escrupulosa para que no corpo discente nao tenhamos gente que, devido ao seu *calcanhar de Aquiles*, de logar aos ataques dos alunos.

Urge implantar nas nossas Escolas a disciplina cuja base principal e' o prestigio dos que ministram o mesmo e este prestigio vem da competencia e vem duma vida modelar.

SINAL DE ABERTA

O sr.Dr.CaetanoGracias,escrevendo para,"A Provincia „ sobre a oportunidade de se comemorar aqui na India o 4° centenario natalicio de Luiz de Camoes. frisa o seguinte:

Podemo nos considerar felizes com esta ocasiao que so' se repitira' daqui a um seculo e entao, nem se pode assegurar que, os que existirem, poberao ter a ventura de " considerar, como nacional essa festa comemorativa de Camoes," se a quizerem fazer. „

Seria para estimar que o sr. Dr. Gracias com a autoridade que possue puzesse mais claro o pensamento que sintetisam as palavras do seu artigo por no's marcadas. Este e' o dever de todo o bom patriota e ele tem a vantagem de valer por um sinal de aberta para as geragces que chegam pautarem cautelosamente a sua linha de ac5ao futura. Para que mais palavras?

भा र त

भाद्रपद व० ६ शी १८४६

एक उपदेशपर गोष्ट

पोर्तुगीज वसाहतींची हीनदीन स्थिति होण्याचें मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे त्यांची व्यवस्था पहाण्यासाठीं नेमण्यांत येणाऱ्या सुभेदारांची परमावधीची स्वार्थपरायणता, हें होय. वसाहतींच्या उत्कर्षापेक्षां ह्या अमलदारांना स्वोत्कर्षच जास्त फायद्याचा वाटत असल्यानें, लोकहितापेक्षां त्यांचा स्वहिताकडे जास्त ओढा होत असल्यास त्यांत आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. १४ वर्षांच्या रिपब्लकच्या कारकीर्दींत वसाहतींची राज्यसूत्रें ज्या ज्या गव्हर्नरांच्या हातांत दिलीं गेलीं, त्या त्या अधिकाऱ्यांनीं वसाहतींवर 'लाथा' मारून आपल्या घरचीं भांडीं मुबलक 'पाण्यानें' भरलीं, हेंच इतिहास कंठरवानें जगाला सांगत आहे.

बाकीच्या वसाहतींकडे दुर्लक्ष करून, नुसता गोमांतकापुरताच विचार केला तरीसुद्धां वरील ह्मणण्याचें सत्यत्व सहज पटण्यासारखें आहे. आवांपर्यंत येथें जितके गव्हर्नर आले, तितक्यानींहि आपला 'प्रपंच' साधून गोमांतकाला निवळ 'परमार्था'चा ऐसपैस प्रदेश दाखविण्याचें कामींच शक्तिसर्वस्व खर्च केल्याचें आढळून येतें. 'फोडा व झोडा, या स्वार्थी तत्वाच्या बिनदिक्कत पुरस्कारानें येथील जनतेंत फूट पाडून प्रांताधिपतीनीं लूट जमविण्यासाठीं कशीकशी कारवाई केली, हें आज जगप्रसिद्ध आहे. निंद्य व घातकी कृतींना साळसूदपणाचें पूट देण्यांत उपरोक्त अमलदार कसे निष्णात आहेत, हेंहि करवाढीचा इतिहास, 'पिग्मेव' पत्राची व त्याच्या छापखान्याची करुण कहाणी, डोईपट्टीची कर्मकथा इत्यादिकांवरून लोकांना माहित झालेंच आहे.

पोर्तुगीज पार्लमेंटांत एका सभासदानें वसाहतींत चालू असलेल्या या बेबंदशाहीचा प्रश्न चर्चेसाठीं नुकताच उकरून काढला होता. आपल्या विधानाचें यथार्थत्व श्रोत्यांच्या मनांत पूर्ण बिंबविण्यासाटीं ठिकठिकाणच्या वसाहतींतील गव्हर्नरांनीं अधिकाराच्या जोरावर पैदा केलेल्या रुपयांच्या आंकड्यांचा पाढाहि त्यानीं **वाचला होता.** यावरून आमच्या डॉ० मोराइसनीं सहा सात लाख रुपयांची गांठ करून 'स्वकष्टार्जित' नांवला राजकीय परिस्थितीच्या अस्थिरतेची कसलीहि [illegible] नये ह्मणून तिला पोर्तुगालची सरळ वाट दाखविण्यानें बुद्धिकौशल्य व्यक्त केलें आहे!

तात्पर्य, स्वार्थपरायणतेच्या असाध्य रोगानें पाश्चात्य वसाहतींचा एकंदर [illegible] पछाडल्यानें व याच रोगानें ग्रासलेल्या नरपुंगवांपैकीं कांहीच्या हातांत वसाहतींचीं राज्यसूत्रें देण्यांत येत असल्यानें, वसाहतींची भरभराट होण्याऐवजीं अवनतिच होत असते, हें उघड आहे. वाचकांना युरोपियन स्वार्थपरायणतेची नीट कल्पना व्हावी, या हेतूनें खालील मनोरंजक व उपदेशपर गोष्ट दिली आहे. ही गोष्ट साधी असली तरी तिच्यांतून ध्वनित होत असलेल्या उच्चतम तत्वांमुळें, हृत्पटलावर खोदून ठेवण्यासारखी तिची योग्यता आहे, हें कोणीहि कबूल करील. व ह्मणूनच ती आह्मीं या जागीं देत आहों:-

चार मक्षिका एकत्र जमून, त्यानीं एक संघ स्थापन केला होता. संघाल्या मंडळींत एकनेकाचें परस्परांवर अतोनात प्रेम असे. एकमेकांविषयीं वसत असलेल्या त्यांच्या प्रेमाला रामलक्ष्मणाच्या प्रेमाची उपमा कोणीहि मोठ्या आनंदानें सहज व बिनशिफारसीनें दिली असती.

एकदां हा मक्षिकासंघ भक्ष्य शोधनार्थ 'दौऱ्या'वर निघाला. संघांतील एका मक्षिकेनें मेवामिठाईच्या एका भर रस्त्यावरील भव्य दुकानांत प्रवेश केला व ती लौगच एका पेढ्यावर बसून त्याची रुचि चाखावयास लागली; परंतु त्या बाजारी पेढ्यांच्या पोटांत खऱ्या व निर्मळ जिनसांऐवजीं खोटे व विषारी जिनसच अधिक प्रमाणानें कोंबले गेले असल्यानें, बिचारी मधुमक्षिका अत्यंत दुःखद विव्हळण्यांत, त्या विषारी पदार्थांच्या संयोगानें, क्षणार्धात गतप्राण झाली.!

हा अनिष्ट प्रकार पाहून बाकीच्या मंडळींचे धाबें दणाणलें असल्यास नवल नाहीं; व मयत मैत्रिणीसारखी आपली स्थिति होऊं नये ह्मणून पेढ्यासारख्या दूध साखरीच्या पदार्थांवर त्यानीं —राहिलेल्या तीन मक्षिकानीं —तीव्र बहिष्कार पुकारला व निवळ नुसत्या पावांवरच निर्वाह करण्याचें त्यानीं आपसांत एकमतानें ठरविलें. या ठरावानंतर त्यांचा पूर्ववत उदरंभरणार्थ "दौरा' सुरू झाला. !

तिघांपैकीं एकीनें पावावर ताव मारण्यास सुरवात केली. परंतु दुःखाची गोष्ट कीं, पहिल्या सोबतीणीप्रमाणेंच तिचीहि अनुकंपनीय स्थिति झाली ! कारण पावांतहि चुन्यासारख्या विषारी द्रव्याचा बेमालूम समावेश करण्यांत आला होता.

केवळ " निर्जल " पदार्थाच्या सेवनानें आपणांपैकीं दोघां सोबतीणीस वयाच्या ऐन उमरींत व उमेदींत या जगाचा अकाली त्याग करण्याचें नशिबीं आलेलें पाहून, अजून देहांत जीव धरून राहिलेल्या बाकीच्या दोघां मैत्रणीनीं 'निर्जल' अन्नाशीं असहकारिता करण्याचा नेम केला व केवळ [illegible] व [illegible] उपजीविका करण्याचें ठरवून त्यानीं आपलें पुढील मार्गाक्रमण चालू केलें.

कांहीं 'हवाखोरी' केल्यानंतर त्यांना एक [illegible] —अर्थात चहाचे

टतेंच आहे. "उद्धरे दात्मनात्मानं" ह्मणजे 'आपला उद्धार आपणच केला पाहिजे.' दुसरें—तुमची सर्वांची इच्छा असेल तर तसाच एक सोन्यारुप्याचा जंगी कारखाना काढा; पण आपापसांत कलहाग्नि पेटवूं नका ! ह्रीं सभा भरवून केलें काय, तर कांहीं नाहीं; मात्र इतकेंच केलें कीं, तुमच्या अंगांत पाणी नाहीं, असें लोकांच्या नजरेस आणलें. एका बांधवापासून सर्व सासष्ट प्रांतीय वैश्य समाज हतवीर्य झाला, असा लोकांचा समज करून दिला. तेव्हां आह्मी बहुतेकानीं एकधंदी न राहतां अनेक व्यवसायी बनण्यासाठीं अविश्रांत झटलें पाहिजे.

पुंडलीक य. सिगांवकर, दैवज्ञ

आणखीं बातम्या

—गोपाळ यशवंत नाईक खंवटे, पहिले सार्जंट यांस सरकारनें 'तांबडा क्रोस' नावांचें पदक अर्पण केलें आहे.

— आंगोलच्या आल्त कोमिसारियाचे जागीं अखेर रेगु शाव्हीस यांचीच नेमणूक झाली.

— मोरोक्को यथील लढाईंत स्पेनच विजय होत असून बंडखोर शत्रूंचे बरेच लोक ठार झाले.

— दक्षिण हिंदुस्थानांतून महापुरामुळें निराश्रित झालेले शेतकरी वर्गांतील सुमारें १५०० लोक परदेशांत मजुरी करण्याकरितां गेले.

—पणजीच्या 'आ प्रोव्हींस' पत्रानें गणपतीची मूर्ति पाण्यांत बुडविण्याच्या पद्धतीबद्दल नापसंति व्यक्त केली आहे ! अर्ध्या हळकुंडानें पिवळे झालेले काय लिहितील व काय न लिहितील याचा नेम नाहीं!

—मैज पत्रांत एक 'वशिकरणा' संबंधीं बीभत्स जाहिरात प्रसिध्द झाल्यामुळें, सदरहू पत्राविरुद्ध सरकारनें खटला भरला आहे. आमच्या 'आ प्रोव्हिंस' पत्रांतील तर खुद्द लेखन बीभत्स असतात; पण त्याकडे पोर्तुगीज सरकारचें लक्ष जात नाहीं, हे आश्चर्य नव्हे काय ?

—मरहूम पाद्रीं आलव्हारीसच्या स्मारकासाठीं फंड गोळा करण्यांत येत आहे.

लक्ष्यांत ठेवा

येत्या नवीन सालापासून भारत आठ पृष्ठांचा निघेल.

साभार स्वीकार

महाराष्ट्र साहित्यः— महाराष्ट्रांतील सु-प्रसिद्ध मराठी साहित्य सेवक सखाराम गोविंद विरकुड, बी. ए. यानीं हें मासिक चालविण्याची बिकट जबाबदारी स्वीकारल्यापासून 'महाराष्ट्र साहित्यांत' अनेक महत्वाच्या सुधारणा घडून येऊं लागल्या आहेत. आपल्या मासिकाच्या दोन्हीं अंगाचा अंतरंग व बाह्यांग—मोहकपणा वाढविण्याप्रीत्यर्थ श्रीयुत विरकुड यानीं व्यक्त केलेला स्वार्थत्याग त्यांच्या एकनिष्ट वाङ्मयप्रेमाचें द्योतक आहे. मराठी भाषेला सखारामपंतासारखे साहित्य कर्मवीर लाभल्यामुळेंच, तिच्या सौंदर्याचा विकास पूर्णतेचा तेजस्वी मार्ग आक्रमण करीत आहे. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे विरकुडांच्या विद्वतेला शुद्ध स्वार्थत्यागाची सर्वांनीं कोड करण्यासारखी जोड मिळाली असल्यानें, महाराष्ट्र-साहित्याचा दर्जा अत्युच्च कोटींत प्रवेश करीत आहे व यामुळें तें लोकादरास सर्वथैव पात्र आहे. मासिकाला दीर्घायुष्य इच्छितों.

केवळ ध्येयासाठीं !:—The woman who did या नावांची एक सामाजिक कादंबरी इंग्रजींत प्रसिद्ध आहे. 'केवळ ध्येयासाठीं !, हें या कादंबरीचें रूपांतर असून तें महाराष्ट्र-साहित्याच्या धाडसी संपादकानीं प्रकाशित केलें आहे. सौ. इंदिराबाई सहस्रबुद्धे या सुप्रसिद्ध मराठी लेखिकेच्या मनोहर लेखनशैलीचें उपरोक्त रूपांतर हें आवडतें अपत्य असल्यानें, प्रस्तुत पुस्तकानें मराठी भाषेतील उच्च दर्ज्याच्या कादंबरींत अमोलिक भर पडली आहे, असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. किं. १॥ रु. मिळण्याचें ठिकाणः— प्रकाशक महाराष्ट्र साहित्य, आंबेवाडी, गिरगांव, मुंबई.

ANUNCIOS

O Bharat, ano 9 ° n ° 24 de 11 de Setembro de 1924

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetido.

Numero avulso 1 tanga

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Redcar, a requerimento de Balcrisna Manju Naque Gauncar por si e como pai administrador do seu filho menor impubere, Caxinata, de Agonda actualmente residente em Colem correm éditos de trinta dias á contar da 2.a publicação deste citando os actuais possuidores dos predios hipotecados Gongadora Balopá S. Dessai e mulher Locximim Balopá Saunto Dessai, Balopá Sadassiva Saunto Dessai por si e como pai administrador dos seus filhos menores puberes Guiridora Balopá Saunto Dessai, Emuna Sitarama Balopá Saunto Dessai, Genopoti Balopá Saunto Dessai, e os menores puberes Xantá Balopá Saunto Dessai e Maturá por si e na pessoa do seu pai dito Balopá, assim como Xabú Naique marido da dita Maturá, todos residentes em Karvar, India Inglesa, em parte incerta para no praso de dez dias, findos os éditos pagarem conjuntamente com os outros ao dito exequente Balcrisna Monjú Naique Gauncar, cessionario de Sadassiva Raiá Naique Dessai, de Agonda a importancia de 250 rupias com disconto de um quinto de um terço da responsabilidade do devedor falecido Monjú Esso Naique, pai do exequente Balcrisna com todos os respectivos juros vencidos e não prescritos em dobro segundo o estipulado no auto de conciliação datado de 12 de Setembro de 1905 bem como os vincendos e pena convencional de uma rupia diaria desde a 1a. citação é a real solução de tudo o que for devido alem de custas do processo sob pena de a execução seguir seus termos com penhora dos bens sobre que foi registada a hipoteca. E para ser publico se expediu este. Quepêm 26 de Agosto de 1924.

O escrivão de Direito
Babú V. Camotim Rebcar

Verifiquei a exatidão
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

ECOS & CRITICA

FEZ BEM...

O sr. A. Spinola, filho desta terra, hoje em Lisboa, num artigo sob a epigrafe "Terras de Goa" alardea na "Capital" que a Sta. Casa de Misericordia de Goa dilatou bastante a sua acçao e que ja "socorre milhares de pessoas". Fez bem o sr. Spinola de nos elucidar sobre este ponto importante. No's ate' hoje so' sabiamos que a Sta. Casa com as suas 13 lotarias ao ano, expilava os pobres com os seus planos de 100 a 150 mil cautelas que valem por outros tantos tentaculos a sugarem o *sangue* principalmente do mais necessitado.

JUSTIFICA-SE

Num artigo, que e' um exemplar de polemica jornalistica, digno de ser imitado entre no's, faz o sr. dr. Antonio de Miranda, no "Heraldo" de 14 deste algumas consideraçoes sobre as afirmaçoes contidas no artigo ja' celebre "Reagindo — ..." dos srs. Desiderio Frias e Lucio Miranda.

Diz o dr. que nao e' justo e razoavel que se contemple a obra de Afonso de Albuquerque sem se atender a's circunstancias de tempo e de espaço.

E' esta muito boa verdade. E' esta a norma da critica historica. E graças a' mesma norma ha de verificar o ilustre dr. que o criterio dos autores do "Reagindo..." justifica-se tendo em atençao a's "circunstancias de tempo e de espaço" em que eles se agitam.

SINCERO E GRANDE...

Vai uma grande, monumental celeuma na imprensa imparcial da India Inglesa (ai, como em todos os paizes dominados, imparcial e' a imprensa afecta aos dominadores) — porque da parte dos leaders de todas as correntes politicas se nota um manifesto empenho de uniao em volta do "swaraj".

Ate' hoje a mesma imprensa imparcial lamentava sinceramente — curiosa sinceridade — de que divergencias politicas da India retardassem a sua marcha para o Self Government." Agora e' o que se ve. Nao ha duvida que e' sincero e grande o amor dos Ocidentais e ocidentalisados pelo bem estar da India.

UMA BELA PARTIDA

Duma carta que recebemos:

"Como V. sabe, o sr. dr. Jaime de Morais num oficio de 1920 mandou dizer para Portugal que para fazer funcionar a maquina do Credito Rural era necessario "arriscar" capitaes sejam dos Estados, das Comunidades, das confrarias, das mazanias, das instituiçoes de caridade e dos contribuintes.

Sendo assim, pergunto eu, como e' que se explica que o sr. Caitano de Figueiredo, amigo, como poucos, do seu dinheiro, aceitou e aceita as Caixas sem uma palavra de critica, sem um gesto de protesto" ......

O autor da carta nao deve esquecer-se de que o sr. Caitano nao recebe liçoes de prudencia, e,porisso, ja' meteu no Credito um genro para receber dum lado o que "arrisca" doutro. E deixem estar que o sr. Caitano jogou uma bela partida.

LUZES OU VOTOS?

Estamos a ver, com uma curiosidade de cada dia crescente, o sr. presidente da comissao encarregada de elaborar o projecto do novo Co'digo das Comunidades, chamar a fazer parte da mesma como seus vogais. mais e mais individuos.O que pretendera' o sr. presidente? "Luzes ou votos? Se sao luzes va' que va' que todo o homem tem sempre a sua centelha. Mas se "votos" permitimo-nos observar a s. excia mesmo para lhe evitar magadas. que nos trabalhos da comissao nada valem os "votos" por varias razoes e mais porque lhe foi permitido arranjar sem mais......os votos que quizesse.

ASSIM, NAO

O aluno do 6 º ano do Liceu Central, que ha dias discutira, segundo nos consta, a competencia pedagogica de um dos seus mestres foi expulso por 2 anos.

Esta' castigado o discolo. O que porem nao esta' ainda e' atacado o "foco" que torna possiveis os discolos.

Dissemos ja' e repitiremos sempre: a indisciplina que nestes ultimos anos vem lavrando no Liceu Central e que por uma natural consequencia, ameaça subverter tarde ou cedo a nossa vida colectiva, somente pode ser combatida colocando no professorado homens com o "prestigio que vem do saber e de uma vida modelar."

Castigar um garoto? E' satisfazer a ira de certos e faze-los mais iracundos. A Escola nao e' porem uma Caserna. Venham os bons mestres, logo surgirao como por encanto os bons discipulos. Assim, nao.

O COQUEIRO

Remetido pela Direcção dos Serviços Agricolas, Florestais e Pecúarios do nosso Estado, recebemos êste valioso trabalho da brilhante lavra do Tecnico Agricola sr. Pedro Corrêa Afonso, bacharel em agricultura.

O *Coqueiro* representa um estudo completo de tudo o que se encontra escrito sobre a nossa palmeira, sendo certo que o seu inteligente autor tem desenvolvido toda a sua paciencia em valorisar o mesmo estudo com a sua utilissima experiencia.

Numa palavra, o *Coqueiro* constitui uma especie de *missal* do proprietario, que arde em desejos de cuidar a valer do seu palmar.

Muito obrigados pela gentileza da oferta.

भारत

भाद्रपद कृ० १२ शी शके १८४६

सामुच्चयिक जबाबदारी

ज्ञानकोशमंडळामार्फत जें नुकतेंच 'विद्या सेवक' नावांचें मासिक पुस्तक प्रसिद्ध व्हावयास लागलें आहे, त्याच्या प्रथमांकांत डॉ० श्रीधर व्यंकटेश केतकर यांचा 'राजकीय चळवळी आणि वाङ्मय वृद्धि' या मथळ्याखालीं एक लहानसा पण अनुभवसिद्ध लेख अंतर्भूत झाला आहे. या लेखांत लेखक लिहितात: —

"लोकसत्ताक राज्य चालविणें ही अत्यंत कठिण गोष्ट आहे. आणि या गोष्टीची जाणीव जितकी जास्त होईल तितकी चांगली. लोकसत्ताक राज्यपद्धतीचें काठिण्य समजावून घ्यावयाचें तें लोकसत्ताक राज्य चुकविण्याकरितां म्हणून नव्हे तर तदनुरूप तयारी करण्याकरिता तें काठिण्य लक्ष्यांत घेतलें पाहिजे. सर्व लोकांनां आपली सामुच्चयिक जबाबदारी कळली तरच लोकराज्य यशस्वी तऱ्हेनें चालणार. सामुच्चयिक जबाबदारी समाजांतील फक्त सुशिक्षित वर्गास समजली व अशिक्षित वर्गास समजली नाहीं तरी चालेल असें म्हणून चालणार नाहीं. प्रतिनिधिवर्ग सुशिक्षितांतून निवतो हें खरें. तथापि प्रतिनिधि हा बहुधा सामान्य जनतेंत असलेल्या बऱ्यावाइट कल्पनांची आणि मताची री ओढणारा बनतो. आपल्या प्रागतिक कल्पनेनें जर आपलीं मतें कमी होत जातील असें वाटलें तर तो आपल्या प्रागतिक कल्पना उच्चारीत देखील नाहीं, तर प्रागतिक कल्पनानुसार काम करणें त्यास कोठून होणार?"

डॉ० केतकरांची ही उपयुक्त शिकवण हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांनी सदैव लक्षांत वागविली पाहिजे. पण त्यांच्याहि पेक्षां जास्त गोमांतकीय नेत्यांनीं त्यांच्या विचारांचें मनन करणें योग्य आहे. कारण जर हिंदुस्थानांत अजून पूर्ण लोकशाहीचा दिवस उगवलेला नसून तेथील जनता सुधारणा कायद्याच्या अंधुक प्रकाशांत चांचपडतच आहे, तर गोमांतकीय नागरिकांनां प्रजासत्ताक राज्यपद्धति सवगीची बनली आहे.

येत्या महिन्याच्या पांच तारखेला पो० रिपब्लिकचा चौदावा वाढदिवस साजरा होणार आहे. या चवदा वर्षांच्या दीर्घ कालांत पोर्तुगीज लोकसत्ताक राज्यपद्धति राष्ट्रहितकारक व लोकोन्नकारक झाली असें मानतां येईल काय ? जो पवित्रतम व उच्चतम हेतु जुन्या पुराण्या व मरणालायक मोनार्कीची शकलें होण्यास मदत व्हावी म्हणून, त्यां वेळच्या रिपब्लिकन पुढाऱ्यांनीं जनसमुहासमोर व्यक्त केला होता, तो हेतु इतक्या अवधींत अंशमात्र तरी सिद्धीस गेला काय ?

या दोन्हीहि प्रश्नांचीं उत्तर नकारार्थींच देणें भाग आहे. प्रजासत्ताक ऊर्फ लोकसत्ताक राज्यपद्धतीमुळें उपरोक्त फायदे पदरांत तर पडले नाहींतच, उलट प्रजेच्या दुःखांत पूर्वीं पेक्षांहि जास्त भर पडली ! करवाढ, सार्वजनिक स्वास्थ्यभंग, तिजोरीची हलाखी हीं वैं अशाच प्रकारचीं अनेक संकटें एकामागून एक राष्ट्रावर कोसळावयास लागलीं व लोकांवर आम्हाला "रिपब्लिकची भीक नको पण संकटपरंपरेच्या कुत्र्याला आंवरा" असें वदा कोरडा पडेपर्यंत ऊर वडविण्यांची वेळ पाळी आली !!!

'सर्व लोकांना आपली सामुच्चयिक जबाबदारी कळली तरच लोकराज्य यशस्वी तऱ्हेनें चालणार' या शिकवणीच्या पूर्ण अभावामुळेंच पोर्तुगीज प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा कारभार येथून तेथून अनागोंदी स्वरूपाचा होऊन बसला आहे. सामुच्चायिक जबाबदारी समाजांतील अशिक्षित वर्गास करून देण्याप्रीत्यर्थ सुशिक्षित वर्गाकडून तेव्हापासून तों आजपर्यंत, बुद्धिपुरस्सर हेळसांड होत असल्यामुळेंच, लोकराज्याचीं मधुर फळें चाखण्याचें भाग्य आम्हांस अजून लाभत नाहीं. व सामुच्चायिक जबाबदारी समाजांतील अशिक्षित वर्गास करून न देण्याचा निवृत्ति मार्ग यापुढेंहि अबाधितपणें चोखाळला गेल्यास, लोकसत्ताक राज्याचा प्रपंच 'नेटका' होण्याची आशा बाळगणें म्हणजे रेड्याच्या दूधापासून तहान शमन करण्याची हांव बाळगण्यासारखी मूर्खपणाची गोष्ट होय.

पोर्तुगालच्या पार्लमेंटांत व गोमांतकाच्या कौंसिलात, त्या त्या प्रतिनिधींकडून जें घरसोडीचें वर्तन घडून येत आहे, ह्याचें कारण 'प्रतिनिधि हा बहुधा सामान्य जनतेंत असलेल्या बऱ्यावाईट कल्पनाची आणि मतांची री ओढणारा बनला आहे' हेंच होय. व सामान्य जनतेला सामुच्चायिक जबाबदारी कशाशीं खातात, याचें अस्पष्टसुद्धां ज्ञान नसल्यानें, तेथें व येथें, लोकसत्तेच्या नांवाखालीं एकसारखा सांवळा गोंधळ चालू आहे.

वरील रोगावर रामबाण उपाय म्हटला म्हणजे सामान्य जनतेंत—जिच्यांत अशिक्षित लोकांचाच भरणा विशेष असतो—सामुच्चयिक जबाबदारी उत्पन्न करणें होय. जितक्या लवकर या लोकराज्य यशस्वी करणाऱ्या गुरुकिल्लीचा निकट परिचय सामान्य जनतेला होईल, तितक्या लवकर आमची प्रजासत्ताक राज्यपद्धति दोषविमुक्त होणार आहे, हें अर्थात उघड आहे.

येत्या आठवड्यांत आमच्या प्रांतांत ठिकठिकाणीं श्रीसरस्वती देवीची सार्वजनिक आराधना करण्यांत येईल. हा योग साधून सुशिक्षित लोकांनीं अशिक्षित लोकांत सामुच्चयिक जबाबदारीचें अत्यावश्यक शिक्षण देण्याचा उपक्रम केल्यास, सर्व देशहितचिंतक

साभार स्वीकार

बाल–सन्मार्ग–दीपिका:–मुलांचा धार्मिक व स्वात्विक भावनेला पोषक असें हें पुस्तक **वासुदेव जनार्दन सिद्धये** यानीं रचलें असून तें अनंत वासुदेव मराठे, किरात प्रेस, वेंगुर्ले यानीं प्रसिद्ध केलें आहे. पुस्तकाचे दोन भाग करण्यांत आले असून, एकांत प्रातःस्मरण, स्नानासंबंधीं श्लोक वगैरे सूर्याचे, द्वादश नमस्कार इ० विषय व दुसऱ्यांत पंचांग पहाण व ज्योतिषाची सामान्य माहिती वगैरे दिली आहे. एकंदरींत प्रस्तुत पुस्तकामुळें धार्मिक शिक्षणाला उपयुक्त मदत होणार आहे. किंमत पोष्टेजसह ४॥ आणे. मिळण्याचें ठिकाण, किरात प्रेस, वेंगुर्लें.

पुरुषार्थ (मासिक) :– वैदिक धर्म प्रसारासाठीं जे कित्येक देशहितप्रेमी व धर्मनिष्ट लेखक व वक्ते सांप्रत अविश्रांत झटत आहेत, त्यांत पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर यानां बरेंच उच्च स्थान देणें सर्व दृष्टीनीं योग्य आहे. **वैदिकधर्म** नावाचें हिंदी मासिक जें आज सतत पांच वर्षे वैदिक धर्माची निरपेक्ष सेवा बजावीत असलें आहे, तें केवळ **सातवळेकरांच्या** श्रद्धायुक्त चिकाटीचें गोड फळ होय, हें कोणीहि कबूल करील. औंध [सातारा] येथील स्वाध्यायमंडळाचे ते अध्यक्ष असून याच मंडळामार्फत सदरील वैदिकधर्म मासिक प्रसिद्ध होत असतें. मराठी वाचकांसहि आपल्या कर्तृत्व शक्तीचा फायदा मिळावा, या एकाच हेतूनें उपरोक्त मंडळानें **पुरुषार्थ** नावाचें मराठी मासिक सुरू केलें असून, या मासिकाचेहि संपादक **सातवळेकर** हेच आहेत. इतकें सांगितलें म्हणजे प्रस्तुत मासिकाची उपयुक्तता वाचकांना सहज पटेल.

किर्लोस्कर खबर (मासिक):– उद्योग उत्साह व आत्मोन्नति यांचें हें मासिक आहे. चार वर्षांच्या अल्प कारकीर्दींत सदरहू मासिकाच्या वर्गणीदाराची वाढ हजारानीं होत आहे, ही एकच गोष्ट त्याचा उच्च दर्जा पटविण्यास पुरेशी आहे. **श्री. शं. वा. किर्लोस्कर व ना० ह० आपटे** या लेखकद्वयांच्या प्रयत्नानें ' खबर ' दिवसें दिवस जास्तच लोकप्रिय होत चालल्याचें पाहून, उपरोक्त लेखक बहाद्दरांचें कुतुहलपूर्वक अभिनंदन केल्याशिवाय कोण राहील ?

विद्यासेवक (मासिक):– प्रस्तुत मासिकचा प्रथम वर्षाचा प्रथमांक प्रसिद्ध झाला असून त्याची रचना फार सरस अशीच झाली आहे. महाराष्ट्रांतील विद्वान व कसलेल्या लेखकांच्या सहकारितेत ' विद्यासेवका' चा उगम झाला असल्यानें, त्याचा अल्पावधींतच बोलबाला होईल, अशी आम्हास पूर्ण खात्री आहे. ' विद्यासेवक ' चिरायु होवो, असें अंतःकरणपूर्वक इच्छितों.

महाराष्ट्र–सारस्वत (त्रैमासिक):– महाराष्ट्र सारस्वत हें सारस्वत ज्ञातींतील एक होतकरू गृहस्थ श्रीयुत **गणपतराव विश्वनाथ लाड** यांच्या परिश्रमाचें मूर्तिमंत द्योतक होय. गोमांतकीय सारस्वत प्रस्तुत त्रैमासिकास प्रोत्साहन देऊन, त्याचें कोड पुरवितील, अशी आशा आहे.

ANUNCIOS

ऐका !

तुमची प्रकृति निःसत्व झाली अहे काय ?
तुमचे स्नायू अशक्त झाले आहेत काय ?
तुमची स्मरणशक्ति कमकुवत झाली आहे काय ?
तुम्ही नुकतेच आजारांतून उठलां आहांत काय ?
तुमचें काळीज दुर्बळ झालें आहे काय ?

तर मग

कोल डालोज घ्या !

गोव्यांतील सर्व फार्मसींत तुम्हाला हें औषध स्वस्त भावांत विकत मिळेल.

RODOLFO RODRIGUES



HERBOLARIO E DROGUISTA

Possue segredos eficazes sobre varias doenças consideradas dificeis de cura.

Cura febres palustres e outras de mau caracter com o inofensivo emprego dos medicamentos aiurvedicos.

Pode ser procurado a toda a hora nas suas FARMACIA INDIANA e DROGARIA POPULAR estabelecida em Amonā, de Quepem

विक्रीस तयार

आमच्याजवळ लहान मोठीं " सोडा-वॅाटरचीं" मशिनें ऑईल इंजिनें लावून चालविण्याचीं, तशींच देशी व विलायती गाजांची वगैरे वगैरे मशिनें मिळूं शकतील.

गरजूनीं खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

पत्ता: – दत्ता बाबय नाईक गोल्तकर.
पणजी–गोवा.

VENDE-SE

O predio Silvabata em tres adições, situado em Cusmane na séde do concelho. Vende se todo ou em adições; quem quizer compra-lo, fale a

Jeronimo Francisco da Silva
e na redacção do BHARAT

COMUNIDADE DE AVEDEM, SIRVOI, XELDEM CHAIFI E ODAR

Serão arrematadas as avenças da despesa anual do ano de 1925, das Comunidades de Avedem, Sirvoi, Xeldem, Chaifi e Odar nos dias 29 do corrente mez de Setembro e 1, 2, 3 e 4 do mez de Outubro proximo seguinte pelas 16 horas, respectivamente, nos lugares das suas sessões. Aos 18 de Setembro de 1924.

O escrivão
Ramacrisna Ananta Narcornim

डॉ० मुकुंद गोविंद कामत यांचा
दवाखाना
वास्कोडिगामा

COMUNIDADE DE MOLCORNEM

Serão arrematadas as avenças da receita trienal do trienio de 1925 a 1927 e de depesa anual de 1925 da Comunidade de Molcornem, no dia 4 de setembro corrente, ás 15 horas no lugar das suas sessões. Aos 18 de setembro de 1924.

O escrivão
Ramacrisna Ananta Narcornim

PAGODE DE XRY CHAMUNDESVORY DE SIRVOY

No dia 6 de outubro p. seguinte ás 16 horas no templo do referido Pagode irão á praça as avenças da receita para o trienio de 1925 a 1927 e as da despesa para o año de 1925 pelo preço do respectivo calculo. Os concorrentes deverão comparecer no local do Pagode no referido dia e horas, onde serão presentes os calculos com as respectivas condições.

Aos 24 de Setembro de 1924
O escrivão da meza
Naraina Xembú Sinai Sirvoicar

Visto
O presidente suplente em exercicio
Quessoca Sinai Sirvoicar

CONSULTORIO
DE
MUCUNDA C. CAMOTIM
médico–cirurgião
VASCO DA GAMA

ECOS & CRITICA

NATURAL E LOGICO

Concluindo o seu artigo *Em Busca da Religiao*, o sr. Heraclito Gomes escreve o seguinte:

"Nao esqueçamos neste caso o que se costuma dizer, que muitos sao os caminhos que para la' se dirigem. Mas que longo e tortuoso, santo Deus esse que a Alemanha projectou?! Vai a Roma atrave's da China o da nossa bela mas inditosa India?!"

Longo e tortuoso? E' natural que lho pareça, sr. Heraclito Gomes, a V. Exia. que ja' esta' velho e cançado. Mas, de resto, e' o unico caminho na tural e logico para a Roma. Se nao fossem as religioes e as filosofias do Oriente a Roma nao existeria. — carissimo Doutor.

TUDO PASSA...

Le se no *Heraldo*: "E' em nome da sciencia - essa siencia manca que nem sabe explicar como apareceu a' superficia da terra o primeiro plasma vivo nem qual foi o processo da formaçao do mesmo que se pretende reduzir a cisco o dogma catolico: E em nome da sciencia - essa sciencia impotente que com toda a sua prosapia nao pode até hoje criar nem se quer um atomo de materia que se faz essa tentativa de revolta contra tudo o que esteja fo'ra de algada da observaçao dos sentidos"

Isto diz o sr. Francisco de Couto.

Procuramos saber, por uma curiosidade, quem era esse sr. Couto que acha a sciencia "manca e impotente" Disseram-nos ser alguem que perdera' dois entes queridos. Estava explicada a sua fe', quasi fanatica. Disseram nos ainda que nao se dera ele a maçada de estudar as sciencias, nem mesmo aquelas que os nossos liceus ministram Estava explicado o seu horror a's sciencias. Disseram-nos enfim que o sr. Couto vivia em Calangute e continua ainda viuvo. Estava explicado o seu entusiasmo pelas aguas dos Pirineus. Agora, sr. Couto, o seu caso e' facil: nao va' para Pirineus. Case-se e va' ate' a cidade e veja que tudo lhe passa, ate' a mania de fazer artigos!

SEM COMENTOS

Um *Patmarcar* de Betul, de nome *Inacinho Leitao* comunica-nos o seguinte:

"Pretende se, sr. Director, criar um novo imposto municipal sobre as mercadorias transportadas a este porto de Betul por meio de *patmarins*, dizendo-se que a receita do imposto sera' revertida a favor dos cofres das Camaras de Quepem e Salcete, em partes iguais!

Ha'vinte anos atraz havia aqui mais de trinta *patmarins* cujo numero acha-se, actualmente, reduzido a 5 ou 6. Se nisto, o polvo do novo imposto dirigir os seus tentaculos para a actividade comercial do *pouco que resta*, claro e' que o comercio abandona lo-ha' para transportar as suas mercadorias por outros portos e a alfandega de Betul sera' votada a's moscas!

E', rialmente, divertido que sem atentar nas consequencias, as duas referidas Camaras se entretenham em apanhar, cada uma, a sua metade!!!

O patriotismo nesta terra e' um *ai que lhe deu!*"

Sem comentos.

AINDA BEM!

Alfredo Pimenta denunciando o espanofilismo que alastra em Portugal a proposito do artigo sobre a batalha de Aljubarrota de Antonio Sergio, escreve, entre outras coisas, o seguinte:

"Nao cairao na orbita intelectual moral, economica è politica as geraçoes de hoje. Mas pouco a pouco, de geraçao para geraçao a nossa individualidade, o nosso caracter ir-se hao atenuando, diluindo, acinzentado— e confundindo com a vida espanhola"

E' o que se deu tambem na India Nos primeiros tempos, nao se sentiu o mal. Depois ele era manifesto. O que vale e' que nem tudo foi se *atenuando, diluindo, acizentando*; mas isto deve-se, nao tanto a' nossa resistencia; mas a' resistencia formidavel da civilizaçao indiana cujas marcas sao indeleveis mesmo porque foram gravadas durante milenios de uma acçao firme e persistente.

Ainda bem!

AQUI...

Alfredo Pimenta, continuando, diz ainda o seguinte, acerca do espanofilismo.

"Os salamaleques a que estamo assistindo ha uns anos para ca e que se trocam espanhoes e alguns portugueses sao salamaleques portugueses e salamaleques espanhoes, mas quem bem os analizar depois de os separar reconhece que os salamalaques di ca' sao os salamaleques de quem se *sente distinguido* e *os salamalaques de la'* sao os salamaleques de quem distingue."

"Por muito amistosa e cordial que seja a linguagem de la', ela tem sempre o ar paternal, protector, do dono de casa..."

Agora, leitor amigo, veja se *ha 4 seculos para ca'* nao se da' coisa identica entre no's e os portuguezes. Em Portugal houve um patriota capaz de meter o dedo na chaga. *Aqui*...

---

peu, por sua intercedencia, *junto das autoridades* evitou!

E desculpe-nos o leitor esta longa explicação do *favor* do sr. Batalha que, coitado, continua sendo *vitima eterna* da ingratidão dos proprios por ele favorecidos!

Quem diz o que quere, ouve o que não quere!

Opórtunamente, se publicará um folheto, narrando, tim tim por tim tim, o caso de Canvorem e outras *belesas* das Novas Conquistas—diga-se sempre, antes de se pôr fecho á *inexgotavel* torneira dos *favores* do sr. Batalha.

भारत

आश्वीन शु० ४ थी शके १८४६

देवी सरस्वती व लोकजागृति

राजकीय बाब खेरीज करून, इतर सर्व बाबतींत गोवाप्रांत हा महाराष्ट्राशीं किती संलग्न किंबहुना निकटवर्ती आहे, याची जाणीव गोमांतकांतील जनतेप्रमाणेंच ब्रिटिश हिंदुस्थानांतील बंधूंसहि दिवसेंदिवस ज्यास्त प्रमाणानें होत आहे, हें सुचिन्ह नव्हे असें कोण ह्मणेल? पण या जाणीवेच्या मुळाशीं जी एका प्रकारची उदात्तभावना —धार्मिक बंधनाची समरसता —आहे ती मात्र नवीन नसून परधर्मी राज्यकर्त्यांच्या प्रभावामुळें जी जागीव कांहीं काळ लुप्तप्राय अथवा मलिनावस्थेंत होती तिचा मळ जाऊन ती प्रज्वलित होऊं पहात आहे. ती मलिनता ज्याच्या परिश्रमामुळें व स्वाभिमानामुळें साफ झाली ते स्तुतीस पात्र आहेतच; पण गोव्यंतील निवडक संस्था व होतकरू तरुण पिढीचेहि प्रयत्न या कामीं सहाय्यभूत झाले, यांत संदेह नाहीं.

स्वदेश किंवा स्वधर्म कार्यांत मोठमोठ्या धुरंधरानाहि सामान्य जनतेच्या सहानुभूतीची अपेक्षा करावी लागलेली आहे, हें इतिहास सांगतो. सामान्य जनता भावनाप्रधान असल्यामुळें धार्मिक भावनेंत प्रत्यक्ष समुच्चयसंबंध जितका अल्प परिश्रमानें व थोड्या अवधींत होऊं शकतो तितका बुद्धिसामर्थ्यानें होऊं शकत नाहीं, याची पूर्ण जाणीव लो. टिळकानां होती व या जाणीवेचें मूर्त स्वरूप ह्मणजे महाराष्ट्रांतील श्रीगणपत्युत्सव व श्रीशिवजयंत्युत्सव हे होत. महाराष्ट्रांतच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरहि सार्वजनिक गणेशोत्सवाची कल्पना पसंत होऊन हिंदुसमाजांत जी धर्मभावनेची —कर्तव्यकर्मप्रवृति —जागृति त्याला मनुष्यमात्राच्या उत्सवप्रियतेबरोबरच सामान्यतः भावनाप्रधानताहि कारणीभूत झालेली आहे.

गणेशोत्सवासंबंधानें लिहितांनां रा. न. चि. केळकर "लोकमान्य टिळकाच्या चरित्रांत" पुढील प्रमाणें लिहितात: "एकाच राष्ट्रीय भावनेचीं अनेक अंगें असूं शकतात. देशभाषेची सुधारणा व वृद्धि, स्वकीयांच्या इतिहासाचें संशोधन, जुन्या साधुसंताच्या परंपरेची उपासना, ऐतिहासिक थोर पुरुषांचें चरित्रवर्णन, तेजस्वी भावनांचे काव्यद्वारा निवेदन, परंपरागत यात्रा, उत्सव संमेलनें यांची अभिवृद्धि वगैरेच्या द्वारानें राष्ट्रीय किंवा उपराष्ट्रीय बुद्धि व भावना प्रगट व दृढहि होते व वरील सर्व उद्योगाचा परिणाम राजकीय स्वरूपाची राष्ट्रीय भावना जागृत करण्याकडे होतो."

यावरून राष्ट्रीय भावना उद्दीपित करण्याचीं जीं अनेक अंगें आहेत, त्यांपैकीं ज्या साधनांचा आह्मांस सत्वर उपयोग व्हावयाचा आहे त्यांचा आह्मीं त्वरित अवलंब करणें इष्ट होय. आपल्या गोमांतकांत आतांच कोठें राष्टभावनावृक्षाचें बीजारोपण सुरू आहे. त्याला यापुढें पालवी फुटून तो वृक्ष बनण्याविषयीं त्याची योग्यप्रकारें जोपासना केली पाहिजे. ही जोपासना करतानां सुसंस्कृत तरुणानीं आपली जबाबदारी ओळखून बहुजनसमाज कार्यक्षम होण्याकडे लक्ष पुरवणें युक्त आहे. जागोजाग सार्वजनिक उत्सव सुरू करणें त्यांच्या द्वारा व्याख्यानें, प्रवचनें, संमेलनें, प्रदर्शनें इत्यादियोगें समाज प्रगमनशील बनविणें आज फार अगत्याचें आहे.

या दृष्टीनें विचार करितां गोमांतकांत हल्लीं बऱ्याच ठिकाणीं सार्वजनिक रीत्या जे श्री सरस्वत्युत्सव साजरे होतात, ह्याच उत्सवांचा उपक्रम खेड्यापाड्यांतूनहि दोऊं देऊन व आपला समाज जो धार्मिक, राजकीय व सामाजिक वगैरे बाबतींत किंकर्तव्यमूढ झाला आहे, त्याच्या डोळ्यांत वेळींच चांगलें अंजन घालून स्वकर्तव्यरत बनविणें हें पुढाऱ्यांचें आद्य कर्तव्य होय. आणि अशा प्रकारानें एकदां हिंदूंची संघटना वृद्धि पावूं लागली ह्मणजे कोणत्याहि सार्वजनिक कार्याची माहिती व प्रसार, त्याची साधकबाधक चर्चा, मार्गांत येणाऱ्या अडचणींचा प्रतिकार वगैरे अल्पसायासानें होऊन गोमांतकस्थ हिंदु समाजांतहि "राम" आहे, हें सर्वांच्या निदर्शनास येईल.

एकविसाव्या शतकाचे आरंभीं मडगांव येथें वै. रामचंद्र नाईक यांचे अग्रशाळेंत श्री सरस्वत्युत्सव साजरा करण्याची टूम काढली. ज्ञानाची अधिष्ठात्री देवता श्रीसरस्वती असल्याकारणानें या उत्सवाची लहान विद्यार्थ्यापासून तों प्रौढ विद्यार्थ्यांपर्यंत सहज आवड आहे. तिची पूजा अर्चाहि सर्वांना सारखीच वंद्य असल्यामुळें या उत्सवांत लहान थोर सर्व मंडळी भाग घेत. रात्रौ पुराण हरिकीर्तन वगैरे झाल्यावर विद्यादेवीचा प्रसाद घेऊन मंडळी आपापल्या घराकडे आनंदानें परत येत.

गोमांतकाचा नवयुगांत प्रवेश झाल्याबरोबर या उत्सवाच्या अंतरंगांत नवीन रचना करावी अशी मडगांवच्या होतकरू तरुणांत इच्छा उत्पन्न झाली. सदिच्छेस परमात्म्याचें सहाय्य असतें असें ह्मणतात त्याप्रमाणें मडगांवांत "श्री दामोदर भुवन" निर्माण झालें. व १९१५ सालचे अखेरीस मडगांवच्या होतकरू तरुणांनीं वरील उत्सवासाठीं नवीन फंड उभारला. त्याला व्याख्यानमालेची जोड देऊन उत्सव लोकप्रिय करण्यासाठीं "श्री सरस्वती सेवकमंडळ" या नांवाची संस्था स्थापन केली आणि १९१६ पासून आपल्या देवळेश्वरलांत श्री दामोदर विद्याभुवनांत महाराष्ट्रांतील प्रसिद्ध वक्त्यांच्या सांनिध्यांत हा उत्सव आज आठ व-

कांतण्यास शिकविलें जातें. शाळेंतून धार्मिक शिक्षण देण्यांत येतें पण तें विशिष्ट धर्माच्या किंवा पंथाच्या दृष्टीनें देण्यांत येत नाहीं. धर्मातील उत्कृष्ट भाग, नीतिसूत्रें, भगवद्गीता, रामायण वगैरे ग्रंथांतील वीरांची व दुसऱ्या देशाभिमानी स्त्रीपुरुषांची चरित्रें शिकविण्यांत येतात. ह्या व विज्ञान (गृह–विज्ञान धरून) इतिहास, गणित, संस्कृत या विषयांशिवाय शिवण व कलाकुसरीचें काम, चित्रकला ह्यांचेंहि शिक्षण देण्यांत येतें. व्यायामाकडे लक्ष्य पुरविलें जातें. विशेष महत्वाची गोष्ट ह्मणजे ज्ञातिविषयक किंवा दुसरा कोणताहि भेदाभेद शाळेंत मानला जात नाहीं विद्यार्थीनींतील आपापसांतलि सामाजिक प्रेम संबंध अबाधित राहील अशी काळजी घेण्यांत आलेली आहे व सध्या चार 'अस्पृश्य' मुलें शाळेंत शिकत आहेत. वागण्यांत उचनीच हे भेद राहणार नाहींत असें वातावरण उत्पन्न करण्याचा व आकुंचितपणाच्या जातीभेदाच्या विषापासून विद्यार्थीनींना अलिप्त राखण्याचा हेतूंत प्रयत्न करण्यांत कोणत्याच प्रकारची कसूर होत नाहीं. प्रत्येक विषय त्या विषयाचें चांगलें अध्ययन केलेल्या शिक्षक किंवा शिक्षकिणीकडून शिकविण्यांत येतो. प्रिन्सिपॉल खेरीज करून शिक्षक वर्गाची संख्या १४ आहे.

शाळेंतील हजिरी खालील प्रमाणें आहे:–

१९२१	—	१४८
१९२२	—	३७०
१९२३	—	२५७
१९२४	—	१५०

शेवटचा आंकडा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. १९२२ मध्यें असलेली विद्यार्थीनींची संख्या कमी होण्याचें कारण शहरांतील मुलींस शाळेची जागा पूर्वीच्या जागेपेक्षां कमी सोयीस्कर वाटते, हें होय.

दोन तीन आठवड्यांपूर्वी म. गांधीच्या अध्यक्षतेखालीं पार पडलेल्या तृतीय वार्षिक समारंभाच्या प्रसंगीं शाळेचा वार्षिक अहवाल श्री. तुळसकर ह्यानीं वाचून दाखविला. शाळेच्या कामागिरीचा उल्लेख करतानां त्यांनी शाळेच्या प्रस्तुतच्या गरजा काय आहेत हें सांगितलें. शाळेची पहिली व मुख्य अडचण पैशाच्या टंचाईची आहे. शाळेचा वार्षिक खर्च जवळजवळ १८००० रु. वास्तविक फारच कमी असतांहि त्यांतून निभावण्याकरितां कायम फंडाची जरूरी वाटत आहे. श्री. तुळसकरांना शाळेची अजूनहि पुष्कळ सुधारणा करावयाची आहे. शाळेची युनिव्हर्सिटी बनविण्याची त्यांची महत्वाकांक्षा आहे त्यच्या सारख्या उत्साही व हुषार स्त्रीच्या बाबतींत ती पूर्ण होणें मुळींच अशक्य नाहीं. पण नुसत्या उत्कृष्ट योजना किंवा आकांक्षा पार पाडण्यासाटीं वाटेल तो स्वार्थत्याग करण्यास पुरेशीं माणसें तयार असलीं तरी, त्या यशस्वी होण्यास पैशाची उणीव भासते. राष्ट्राच्या सुदैवानें उच्च प्रकारची बुद्धिमत्ता असलेलीं कार्यक्षम माणसें आज पुष्कळ मिळतील. परंतु पैशासारख्या मुख्य साधनाच्या अभावीं त्यांच्या कर्तबगारीचा, संघटणा करण्याच्या शक्तिचा व्हावयास पाहिजे तेवढा उपयोग होत नाहीं. आज क्षुल्लक किंवा मुळींच महत्व नसलेल्या गोष्टींत देवळें, मशिदी, प्रार्थनामंदिर, मेलेल्या माणसांची अर्थहीन स्मारकें ह्यांत – लाखों रुपये खर्चेले जात असतां, पैशाच्या अडचणामुळें राष्ट्रीय शिक्षणासारख्या महत्वाच्या गोष्टीची हेळसांड होत आहे ! हिंदुस्थानांतील निरुपयोगी आळशी श्रीमंत वर्गानें केलेल्या खासगी संपत्तीच्या तऱ्हाच्या दुरुपयोगाचा दुसरा कोणता सबळ पुरावा असू शकेल. !

फॅशन

(लेः– श्रीपाद ज. देसाई.)

लेखांक २ रा-

फॅशनच्या फांसाचें आह्मीं चित्रित करीत असलेलें हें चित्र ह्मणजे काव्याभ्यासी कवींनीं कल्पनेच्या कुंचलीनें चितारलेला चित्रपट नसून सौंदर्यपूर्ण सृष्टींत सदासर्वदा दृष्टोत्पत्तीस येणारें एक अप्रिय सत्य आहे.

कोणत्याहि काळांत सत्य हें कठोरच असतें; पण सत्याची किंमत त्याच्या अंगीं उदभूत असलेल्या कठोरतेवरून मोजावयाची नसून त्याला असलेल्या परमशक्ति–परमेश्वराच्या पवित्र पाठबळावरून पाहण्याची असते.

सत्यपूरीची वाट लोकनिंदेच्या अणकुचीदार कांट्याखुट्यानीं भरलेल्या कांटेरी कुंपणांतून व जनापवादाच्या भयंकर दऱ्या डोंगराच्या दरडींतून जात असते. गुलाबाला कांटे असतात, केतकी कुसुमाभोवतीं कराल कृष्णसर्पाचें वेंटाळें असतें; पण कांट्यांची पर्वा न करतां गुलाब खुडण्यांत व कृष्णसर्पाच्या दाढेंत दडलेल्या जहरी विषाची डर न बाळगतां केतकीपुष्पाचें हरण करण्यांत शहाण्यांचें शहाणपण असतें. असो !

फॅशनची गणना नुसती रोगांतच करण्याजोगी असती तरीहि तिचा परिणाम आज आमच्या समाजाला भोंवत आहे तितका कदाचित् भोंवलाहि नसता; परंतु आपल्या जाळ्यांत अडकलेल्या प्रत्येक पातकी पुरुषाला, अब्रूसकट अवनीतलाला तिलांजलीनें तर्पण करण्यास भाग पाडणाऱ्या दुसऱ्या दोन कलियुगाच्या कारट्यांचाहि–दुर्व्यसनी व वेड्यांचाहि–या फसवणूकींत समावेश होतो हें कबूल करणें कोणत्याहि निर्भिड निबंधकारास अगदीं अनिवार्य आहे.

दुर्व्यसन ह्मटलें कीं आपला गाजीपणा प्रत्येक पाजी प्राण्यांवर यथार्थ गाजविणाऱ्या ३ बाजी आपल्या डोळ्यांपुढें चटकन् उभ्या रहातात. जुवेबाजी, रंडीबाजी व दारूबाजी ह्यांपैकीं पहिली जी जुवेबाजी तिचा व ह्या फॅशनचा परस्पर संबंध असा जरी कांहींच नसला तरी सांसर्ग दोषानें त्या जुवेबाजीचा एक महत्वाचा गुण – आमच्या दृष्टीनें दुर्गुणच – ह्या फॅशनबाजीमध्यें अगदीं तंतोतंत उतरलेला आहे. एकाद्या 'ड्रेस पडलेला जातीचा जुवेबाज आपल्या खिशास खासा चट्टा बसला आहे, असें दिसतांच ज्याप्रमाणें आपण अट्टल खेळगडी ह्मणून इतकीं वर्षें खपून व अलोट पैशाचें दान देऊन संपादलेलें नांव [?] एवढ्याचशा बाबीनें पार पळून जाईल ह्मणून आपल्या बोटांतली आंगठी -- हा वेळपर्यंत हातांत हयात असली तर -- नाहींतर नेसलेलें धोतरहि काढून देण्यास लोकलज्जेची क्षीति न बाळगतां स्वार्थत्यागाचा [?] अमोलिक धडा जनतारूपी जनार्दनास घालून देतो; त्याचप्रमाणें एकादा फॅशनखोर प्राणीहि रीत्या झालेल्या पैशांच्या पिशवीचें प्रदर्शन चार चौघांत होऊं नये ह्मणून आपल्या बदचालीचें प्रमाण बेहद्द वाढवीत असतो. इत्यादि गोष्टी जरी खऱ्या असल्या तरीहि त्या दोघांमध्यें फरक नाहीं असें मात्र नाहीं. जुगाराचें भीषण भूत जुवेबाजाच्या अंगांत अड्याच्या आवारांत असेपर्यंतच संचरत असतें पण हें फॅशनचें भूत मात्र एकाद्याच्या अंगांत तिन्ही त्रिकाळ संचरत असलेलें आमच्या पहाण्यांत वरचेवर येतें ! जुवेबाज जीवास स्वतःची बेअब्रू चवाट्यावर मांडली गेली तरी त्याची पर्वा नसते तर फॅशमला चटावलेला प्राणी स्वतःच्या अब्रूचें प्रमाण वाढतें रहावें -- निदान उतरतें असू नये -- ह्मणून खर्चाच्या कुरकुरीच्या बाबतींत काढता पाय घेत असतो. जुवेबाज जीवास काळ्या डगलेवाल्या सरकारच्या शिपायांच्या कठोर अंतःकरणाचें भय असतें तर चैनीस छोकावलेला नादान नरपशू पाहिजे तेव्हां स्वतःच्या डोक्यावर लाल टोपी चढवून धोक्याचा बावटा Danger signal दाखविण्यास दीड पायांवर तयार असल्यामुळें त्यास भय असें त्रिभुवनांत कोणाचेंच उरत नसतें !

जाहीर विनंति

कृ. सा. न. वि. विः—

सालाबादप्रमाणें येत्या विजया दशमीपासून तीन दिवसपर्यंत [ता.७–८–९ आक्टोंबर रोजीं] श्री दामोदर विद्याभुवनांत श्री सरस्वतीसेवकमंडळाकडून आठवा श्री सरस्वत्युत्सव पुराण हरिकीर्तन इत्यादियोगें साजरा होऊन [ता. ९ रोजीं] श्री दामोदरवाचनमंदिराचा सातवा वाढदिवस समारंभ, रिपोर्ट वाचन वगैरे होणार आहे. उत्सवाचे व्याख्यानमालेंत भाग घेण्यासाटीं पुण्यामुंबईहून श्रीयुत रावबहादुर विनायकराव नारायण जोवकर बी. ए; रिटायर्ड डेप्युटी कलेक्टर; श्रीयुत दत्तात्रय आत्माराम ऊर्फ दादासाहेब फाटक, बी. ए. एल. एल. बी. हायकोर्ट वकील; श्रीयुत दामोदर सांवळाराम यंदे, ग्रंथप्रसारक मंडळीचे मालक वगैरे महाराष्ट्रीय विद्वान मंडळी येणार आहे. त्यांच्या विविध विषयांचे ज्ञानाचा फायदा अवश्य आपल्या स्नेही मंडळीसह घेऊन संस्थेस आभागांत ठेवण्याबद्दल नम्र विनंति आहे.

वि. सूचनाः– व्याख्यानमालेस दररोज रात्रौ ७ वाजतां स्टॅं. टा. व पुराण कीर्तनास १०॥ वाजतां सुरुवात होईल. सभेचा प्रत्येक दिवसाचा कार्यक्रम श्री दामोदर विद्याभुवनांत जाहीर केला जाईल.

स. नम्र.

दामोदर श्री. नाईक दलाल
रामनाथ वि. पै रायतुरकर
दत्तु पुरुषोत्तम केणी
अनंत विश्वनाथ सांवारी
वैकुंठ विष्णु शे. कारे
यशवंत वि. पै रायतुरकर

---

mos que desgraçadamente são impotentes para reagir contra essa onda de coscuvelhice e rotina que ali domina, por mais intenso que seja o desejo que cs anima de imprimir uma nova orientação áquela monstruosa repartição tornando-a um elemento valioso de auxilio aos governos locais coloniais, tão indispensavel e util no actual sistema de administração do Ultramar portugues."

E apesar disto, o sr. Roberto ficou com aguas na bôca quando viu a Mãe—Patria "a ponto de desatar a cantar *Roberiaceamente* o 'O' ai ó Linda"!?

ERA UM ALIVIO

O *Diario da Noite* discrevendo a crise financeira do Estado diz que o "mal é conhecido e um mal conhecido, isto é, convenientemente diagnosticado vale por meio curado" e acrescenta:

"Entretanto .. Sim, não se fêz saber ainda que tinha chegado a hora de administrados e administradores nao se furtarem a sacrificios."

Referíndo-se aos administrados, o *Diario* é de opinião que o contribuinte vê-se cativo de uma vida quasi impossivel" e que á sua custá "foram criadas novas fontes de receita, garantindo ao Estado recursos que, se não são fartos, incontestavelmente são consideraveis."

Ora, numa terra, onde a vida do contribuinte é *quase impossivel*, mas onde, á custa do mesmo contribuinte, foram criados ao Estado recursos *consideraveis*, embora não fartos, cremos que os administrados já fizeram os sacrificios que podiam e deviam.

A quem se há de, pois, exigir os tais sacrificios? Aos administradores? Mas observa o *Diario da Noite* que para o funcionalismo bem e mal pago, essa vida se tornou um permanente desespero."

Quem quer dirá nesta altura que o mal embora conhecido, é de natureza incuravel. Não é assim todavia.

E quem nos diz é o proprio *Diario* confessando que há funcionarios *bem pagos* e *mal pagos*. Efectivamente. Se em vez de termos muitos funcionarios *bem pagos* uns e *mal pagos* outros, tivessemos poucos *devidamente pagos*, o mal estaria curado, se não o mal dos *administrados*, pelo menos o mal dos *administradores!* Era um alivio sempre.

Uma carta

...Sr. Director de O *Bharat*:

A *Terra* na sua ediçao, nº 702, de 24 do corrente, no seu artigo da epigrafe *Administraçoes* justamente pretende, entre outras causas, que se deslindem as responsabilidades do acusado administrador das comunidades das Ilhas e acha "que um inconcebivel favoritismo pode manter na sua situaçao depois de estar chambado a' ignorancia de tanto escandalo que dele se conta e foi relatado por um periodico considerado *orgao governamental*.

Muitos aplausos merece esse desejo dá *Terra* que na sua sagrada missao do orgao da imprensa reclama castigo se ha' culpas ou delitos no intuito nobre de salvar a honra do Estado e do funcionalismo.

Mas por mau destino desta terra tais sindicancias nao dao resultado nenhum e o governo quase sempre nem se importa de punir os funcionarios que forem acusados dos factos ainda graves, pois que saltam dai empenhos que atabafam tudo; eis a conviçao que este estado de cousas produz em muitos tendo, por isso, um destes recorrido ha' mais de um ano ao juizo da vara crime da comarca das Ilhas, onde ao presente dizem que correm activamente os termos dum processo crime contra o referido administrador das comunidades das Ilhas.

Nao consta, porem, nada com relaçao ao processo crime instaurado contra o escrivao da mesma administraçao, Diogenes Noronha, e conjuntamente contra o defunto Administrador Jose' Maria de Sa', paocesso este que alia's teve o seu inicio no mesmo juizo muito antes daquele.

Por decoro do funcionalismo convinha que tambem se activassem os termos do processo que se promove contra o referido Noronha que igualmente e' acusado de factos graves gravissimos, vergonhosos e ate' escandolosos.

A Opiniao Publica aguarda ansiosamente o veredictum de Justiça condenando-os se houver culpabilidade e absolvendo-os no caso da sua inocencia.

Em qualquer dos dois casos as justas exigencias da Sociedade ficam satisfeitas, quer no caso de condenaçao pois que assim de futuro havera' moralidade na administraçao publica, quer no de absolviçao; e neste ultimo caso ficara' condenada a infamia dos que se queixam perante as autoridades na insania de perseguir os arguidos, levando factos ao conhecimento do Ministerio Publico.

Com a publicaçao destas linhas no seu indipendente jornal muito obsequiara' a um

Nova-Goa, 28/9, 1924

Leitor assiduo

भारत

आश्विन शु० १२ शी शके १८४६

उत्सवांचें रहस्य.

आमच्या गोमांतकाचा गेला आठवडा मोठा धामधुमीचा गेला. चौदा विद्यांची अधिष्ठात्री देवी जी सरस्वती तिचा पूजनोत्सव व्याख्यानमालांची जोड देऊन गोमांतकांतील कित्येक शहरांत मोठ्या आनंदानें व उत्साहानें साजरा केला गेला. कित्येक ठिकाणीं परगावचे वक्ते आणवून तर कित्येक सुसंपन्न ठिकाणीं महाराष्ट्रांतील नावलेले व्याख्याते आणवून व्याख्यानमालेचा कार्यक्रम उरकून घेतला गेला. प्रगमनशील गोमांतकानें शारदा देवीचा साजरा केलेला हा उत्सव व प्रसिद्ध वक्त्यांच्या कर्ण मधुर वाणीनें त्यास आणलेली शोभा पाहून कोणत्या गोमांतकाभिमान्याचें हृदय आनंदानें उचंबळून येणार नाहीं? कोणत्या गोमांतकीयाचें मन आनंद सागरांत यथेच्छ रमणें जाणार नाहीं?

प्रथम दर्शनीं आमच्या मनाची अशीच स्थिति झाली. पण विचारशक्तीस थोडेंसें चलन देतांच, विवेकबुद्धीचा चष्मा डोळ्यांवर चढवतांच आम्हाला एक निराळाच प्रकार दृष्टीस पडूं लागला. सरस्वत्युत्सव सुखासमाधानानें साजरे झाले खरे पण त्या उत्सवाच्या अंतरांत दडलेलें गहन गूढ सामान्य जनतेनें उकलण्याचा प्रयत्न केला किंवा नाहीं, निदान तिच्या नजरेची धारकाई उत्सवांत दृष्टोत्पत्तीस आली किंवा नाहीं, हें समजण्याला मार्ग नाहीं. ह्या गहन गुढांतील गौप्य काय आहे हें पाहूं.

विचारी वाचकहो! आमच्या शहाण्या पूर्वजांनीं उत्सवाची जी ही चाल आमच्या समाजांत रूढ करून सोडिली त्यांत त्यांचा अंतिम हेतु किती पवित्र होता, त्याचे धोरण किती समजसपणाचें होतें हें तुम्हांला सांगितलें पाहिजे काय?

आमच्या पूर्वजांच्या सर्वच कृत्यांवर मूर्खपणाचा शेरा ठोकणारे कांहीं बेजबाबदार पुरुष आम्हांत नाहींत असें नाहीं. पण त्यांचें मत सोडून दिलें तर इतर सर्वसाधारण विचारी वर्गाचें ही समारंभाची व उत्सवाची चाल पाडण्यांत आमच्या पूर्वजांचा कांहींतरी शुद्धच हेतु होता, ह्याविषयीं दुमत होणें शक्य नाहीं. तो त्यांचा निराळा हेतु, तें त्यांचें अंतिम साध्य, तें त्यांचें गहन गौप्य काय होतें ह्या प्रश्नाचें उत्तर पाहिजे असल्यास लोकमान्यांनीं पुण्यास सुरू केले ल्या शिवजयंत्युत्सव व गणपत्युत्सवांकडे जरा आपली दृष्टिक्षेप करावी लागेल. पुण्यास

लोकमान्य टिळकांचा जो मूळ हेतु होता तोच आमच्या ह्या उत्सवांच्या बुडाशीं असला पाहिजे.

उत्सव साजरे करण्यांत आमच्या वाडवडिलांचा हेतु धार्मिक बंधनाचें विस्मरण जनतेला होऊं नये व ती नेहमी धर्मरत रहावी, असा होता. धार्मिक बंधनें हीं सामाजिक स्थैर्याला अत्यावश्यक अशीं साधनें असल्यानें, त्यांचा तो उद्देश स्वाभाविकच होता यांत संशय नाहीं. उत्सव म्हटला कीं तेथें उत्साह हा असतोच. या उत्साहाचा फायदा घेऊन टिळकांनीं उत्सवांना सार्वजनिक स्वरूप देण्याचें श्रेय संपादन केलें व परिस्थित्यनुसार त्याचा उपरोक्त गोष्टींशिवाय राजकीय चळवळींतहि उपयोग होईल, अशी व्यवस्था राखिली. आमच्या जुन्या उत्सवांत राजकारणापेक्षां धर्मदृष्टीच जास्त डोकावीत होती तर टिळककालापासून त्यांतील धर्मदृष्टीची जागा राजकारणानें व्यापिली गेली. व 'प्रपंच नेटका' झाल्याखेरीज 'परमार्थाचा विवेक' साध्य होणें दुरापास्त असल्यानें, उत्सवांनां प्राप्त झालेलें हें नवीन प्रापंचिक स्वरूप योग्यच होतें व आहे, हें उघड आहे.

कोणत्याहि राजकीय चळवळीच्या यशस्वितेची इमारत एकीच्या बळकट पायावर उभारली जाते. एकी ही राजकारणाच्या यशाची गुरुकिल्ली आहे. ज्या राजकारणांत एकी लयाला जाते, तें मुळीं राजकारणच नव्हे. शरीरांतील आत्मा निघाल्यानंतर ज्या प्रमाणें तें कुजून जाण्याचा नैसर्गिक धर्म स्वीकारतें तद्वत राजकारणाला एकीची फारकत झाली कीं, त्याला मृत्यूची वाट पाहिल्याशिवाय गत्यंतरच रहात नसतें!

'मतमतांचा गलबला' मोडून समाजांत ऐक्यवर्धनाचा प्रयत्न करणें, हा अर्थात नव्या उत्सवांच्या मुळाशीं प्रधान हेतु खेळत आहे. राष्ट्रैक्यासाठीं असल्या सार्वजनिक उत्सव प्रसंगीं तरी बेकीची तेढ लुप्तप्राय होऊन एकीची मेढ उभारली जावी व पारतंत्र्याच्या होमकुंडांत ज्या हिंदवासीयांवर अंतःकरणें जाळून खाक करण्याचा दुर्धर प्रसंग प्राप्त झाला आहे, त्या दुःखितांचीं त्यांतून मुक्तता व्हावी, असें कोणाला वाटणार नाहीं?

राजकीय स्वरूपाच्या उत्सवांचें प्रमुख ध्येय अर्थात ऐक्यवर्धन हें होय. व या ऐक्यवर्धनाच्या पोटांतच सामुदायिक जबाबदारीचें सुपरिणामी तत्व आश्रय धरून राहिलें असल्यानें, ऐक्याबरोबरच सामुदायिक जबाबदारीच्या प्रसाराचेंहि कार्य उत्सवांमुळें सहजच्या घडून येतें. उत्सवाचें खरें रहस्य हेंच असल्यानें आम्हीं गेल्याच्या मागील अंकांत याच दिशेनें व्याख्यानमालांची कार्य केला आंखिली जावी, अशी ठिकठिकाणच्या उत्सव चालकांस विनंति केली होती. तिचा कितपत उपयोग झाला हें अजून स्पष्ट रीतीनें कळून येण्याचा मार्ग नसल्यानें गोमांतकीय उत्सवांसंबंधीं आमचें निःपक्षपाती मत आतांच प्रगट करणें अर्थात अप्रस्तुत

चावूकः— (साप्ताहिक) :— अच्युत बळवंत कोल्हटकर यांच्या चवदार लेखनपाकाचा आस्वाद चाखला नाहीं, असा एखादा मराठी वाचक असेल, असें आम्हांस वाटत नाहीं. अच्युतरावांच्या राजकीय धोरणाविषयीं अनेक मतभेद असूं शकतील. पण ते मराठीभाषेंतील एक कसलेले सु-प्रसिद्ध लेखक आहेत, या गोष्टींत मात्र दुमत असणें शक्य नाहीं. 'संदेशा'पासून त्यांनीं सुरू केलेली चित्ताल्हादक मथळे देण्याची चाल 'चाबका'तहि स्पष्टपणें दृगोचर होत असून, 'संदेशां'तील विनोदाची छटाहि या त्यांच्या नूतन पत्रांत उमटलेली आढळून येते. वैभवाग्रीं बैस किंवा। सत्तेच्या बैस शिखरीं ॥ काय पर्वा तुझी मातें। असे चाबूक मस्करीं॥" या 'चाबका'च्या मुखपृष्ठावर खोदलेल्या कवितेवरून 'चाबका'चें धोरण किती निर्भिड व बाणेदार आहे, हें सहज कळून येतें. कमस्सल व भोंदू 'दे० म०'वर 'खुसखुशीत तडाखे' देण्यासाठीं 'चाबूक' चिरायु होवो, असें इच्छितों.

इस्लाम विजय(मासिक):— दक्षिण महाराष्ट्रीय मुसलमानाचें प्रस्तुत मासिक जातीय मासिक असून मे० आमीन हसन खतीब हे त्याचे संपादक आहेत. 'सामाजिक, नैतिक, ऐतिहासिक, औद्योगिक व धार्मिक या बाबतींत इस्लाम समाजोन्नति करणें' हें 'विजया'चें ध्येय आहे. संपादक आपल्या 'परिचय' लेखांत लिहितातः— धार्मिक बाबतींत आज आमच्या इस्लाम समाजाची गळचेपी होत आहे. चोहोंकडून वृत्तपत्रकारांचा व मासिककाराचा टीकेचा भडिमार सुरू आहे. स्वामी श्रद्धानंदजींचें पाचरुण घेतलेले शुद्धी रामजींनीं इस्लाम समाजास नेस्तनाबूद करणेचा चंग बांधला आहे...... हिंदुत्वासाठीं शिर हातांत घेऊन इस्लामिकांची कंबरटी मोडण्याच्या इराद्यानें बाहेर पडलेल्यानों सांभाळा ! आज तुमचा स्वरूप समाचार घेण्यासाठीं 'विजय' अवतीर्ण होत आहे" या विचार मासिकेवरून 'विजया'च्या कार्याची रूपरेखा काय असेल, याची स्पष्ट कल्पना वाचकांस होईलच. वा. व. ट. ह. स. ३। रु. पत्ताः— कऱ्हाड पेठ गुरुवार घ. नं. ३०७

उद्योग वृक्ष (पुस्तक):— कांचेवर नक्षी कोरण्याची कला ज्यानां अवगत करून घेणें असेल, त्यांनीं हा द्वादश शाखांचा उद्योग वृक्ष आपापल्या मनोभूमीवर लावून, त्यांतील अनुभविक शिकवणीची नक्षी मेंदूवर कोरावी, अशी आमची शिफारस आहे. केवळ उद्योगप्रिय व विद्याव्यासंगी लोकांसाठींच या पुस्तकाची रचना केली असून त्याची किंमत अवघी ६ आणे आहे. मिळण्याचें ठिकाणः एच. पी. नायक, मुंबई.

—ग्रँडड्यूक सायरिल यांनीं झारची पदवी स्वीकारून रशियाच्या गादीवर आरूढ झाल्याचे जाहीर केलें.

ANUNCIOS

O Bharat, ano 9° n° 28 de 9 de outubro de 1924
Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.
Numero avulso 1 tanga

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do primeiro oficio Redcar á instancia do exequente Datatria Sadassiva Boto Dessai de Xeldem, vão ser vendidas em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca no dia 24 do Outubro proximo pelas 10 horas, pelo preço de avaliação tres quintas partes do predio palmar e arecal denominado "Rasambó", cultivado de coqueiros e arequeiras, situado em Molcornem, discrito na Conservatória do Registo Predial desta comarca sob o n° 1275 e avaliadas por 1550 rupias, nos autos de execução hipotecaria promovida pelo dito exequente contra Naraina Chondru Porobo Velguencar e Rucminim viuva de Rama Chondrú Porobo Velguencar, de Molcornem. Quem quizer arrematar compareça nos indicados dia, horas e local, correndo por conta do arrematante as despesas da praça e a contribuição de registo por inteiro Por este são citados todos os credores incertos bem como os co-proprietarios nos termos e para os fins da lei, assim como ficam citados os representantes do credor falecido Diogo Caitano Rodrigues, de Molcornem, que tem a seu favor uma hipoteca registada para segurança da quantia de 250 rupias. E para ser publico se expediu este.

Quepem, 26 de Setembro de 1924.

O Escrivão de Direito do 1° oficio

Babú V. Camotim Redcar

Verifiquei a exatidão

O Juiz de Direito

A. A. de Brito e Nascimento



BEM PREGA...

B' indiscutivel que entre o papel do *Bharat* e' o papel da *A Provincia* este e' preferivel a'quele, dada a sua superioridade, nao sendo para admirar, por isso, que os que sofrem de himorroidas dem muito consumo a' *A Provincia*. O sr. Pereira Batalha afirmando que o papel do *Bharat* nao lhe convinha a ele como hemorroida rio disse bem, disse uma verdade. Mas a nossa administragao mandou por certo a edigao de 18 de Setembro ao sr. Batalha para que este a pudesse ler em casa evitando-lhe assim o incomodo de ir procura-la pelas casas dos amigos. B o sr. Batalha paga a gentilesa com palavroes dos frequentadores dos...becos. Bem prega ...

AGORA, SIM

Acerca dos processos contra *O Heraldo* ultimamente decididos em primeira instancia, no Tribunal das Ilhas havia o sr. dr. Renato Gongalves Pereira, representante do M. P. naquele tribunal, publicado uma brochura sob o titulo de "Embates judiciais". Bom ou mau o trabalho do sr. dr. Pereira mereceu ser impresso por conta do governo — passando a ser consequentemente o verbo oficial no caso. E quando se diz oficial, para o criterio do maior numero, equivale a dizer: infalivel, intangivel, verdadeiro, autentico, imorredouro...

Isto, porem, era tudo para o criterio vulgar. Para no's os "Embates Judiciais" estavam mancos, faltavam o comesinho bom senso e a corriqueira boa norma que a critica exige:—a opiniao da defesa. E' nestas circunstancias que sai agora a' luz da publicidade um folheto denominado "Uma Autopsia" em que o sr. dr. J. Araujo Mascarenhas advogado do *O Heraldo* no processo publica a sua oragao de defesa precedida de umas palavras de justificagao—estas e aquela a'altura dos valiosos creditos literarios e profissionais do autor. Agora, sim, que a critica pode trabalhar a' vontade.

NAO PODE NEM DEVE CONTINUAR...

Na ultima semana de setembro o Banco N. Ultramarino fez ao paiz o favor de dar a demonstragao pratica de seu valor entre no's. Publicou um aviso suspendendo os emprestimos sobre letras e joias bem assim a renovagao das letras depois de vencidas e logo se viu a aflicgao, o susto, um verdadeiro sossobro que o mesmo aviso determinou. Positivamente ninguem parecia estar seguro. Perante esta atitude do Banco pediu a Associagao Comercial—pediu o governo—pediu a propria Gerencia da Filial ... emfim todos, cada um de seu lado e cada um ao seu *santo* pediu para amainar as iras do Jehova que no caso e' o governador do Banco em Lisboa, e Jehova compadeceu-se desta infelis e pobresinha India — ate' aqui muito bem. Jehova esta' comnosco ou milhor por no's. Mas amanha, se, de novo, exacerbar-se, o que sera' de no's? Vemos, pois, que apezar da nossa atitude tam humilhante tudo continua como dantes. Se o Banco nao esta ameagador, esta' pelo menos capaz de ameagas.

Nestas circunstancias nao seria milhor a Associagao Comercial, o governo, todos no's convergirmos os nossos esforgos em obter qualquer coisa mais eficaz e duradoura, como por exemplo, uma agencia de um ou tro Banco nacional ou extrangeiro? A situagao da colo'nia em relagao ao Banco Ultramarino e' de tal natureza que nao pode nem deve continuar um momento sequer!

E' o que nos escreve um economista pratico.

HA MALES...

O agente do M. P. em Salcete instaurou mais um processo contra o nosso ilustre colega *A Terra*, de Margao. Solidarizando-nos absolutamente com aquele fogoso bi semanario, nao devemos deixar de frizar neste momento, que este processo, como os outros que servem para elevar o colega no conceito geral, conceito de que uma meia duzia de **pedantes** o quiz privar, uma vez, no *mais alto corpo representativo* da provincia. Ha males...

ASILO DE MAPUÇA'

Recebemos a seguinte carta:

...Sr. Redactor

Na *Tribuna* de 13 de Setembro p findo li uma correspondencia firmada por "Um socio de Asilo" em resposta ao jornal *A Verdade* e depois de va'rias preguntas conclue por dizer o mesmo socio:

AONDE ESTAO PARADAS AS CONTAS DA RECITA EM PROL DAS VITIMAS DE DIU REALISADA NO QUARTEL DA VILA?

Lembro-me de ter assistido a'quela recita no quartel de Mapuga e entao o sr. dr. F. Ribeiro nao foi so' a *alm.* daquilo, mas a verdadeira *alma mater* da recita, pois ele era director, tesoureiro, vendedor de bilhetes e ate' ... .actor.

Constou-me mais que ele mandara umas centenas de rupias. mas as **CONTAS**—ja' passam quasi quatro anos—nao vieram ao publico, ate' agora, e dizia-se que tinham sido apuradas quase **TRES MIL RUPIAS!**

Parece-me, porisso, que varios jornais deram rebate antecipado com o fim de evitar manigancias nas contas da Lotaria do Asilo, o que nao cremos o governo e o publico de Barde nao hao de consentir nenhumas irregularidades.

Embora passem mais de dois mezes, estamos certos que serao publicadas as contas, sem perda de tempo, pois todos estao anciosos por ve-las, em todas as suas fases, e fazer idea de tanto dinheiro apurado em prol dos pobres do Asilo.

Pela publicagao desta muito agradece o

Pernem, outubro de 1924

De V... S. V.

ठिकठिकाणचे श्रीसरस्वत्युत्सव

मडगांवच्या श्रीसरस्वती सेवकाचा आठवा श्रीसरस्वत्युत्सव

श्रीदामोदर वाचनमंदिराचा सातवा वाढदिवस समारंभ

प्रसिद्ध झाल्या प्रमाणें ता. ७ अक्टोबर मंगळवार रोजीं सकाळीं १० वाजता श्रीदामोदर विद्याभुवनांत देवी सरस्वतीच्या मृण्मूर्तीची प्रतिस्थापना करण्यांत आली. महाराष्ट्रीय पाहुणेमंडळींच्या स्वागतार्थ द. पां. नाईक दलाल व गुरुदास पु. कारे हे मडगांवहून कोलेम स्टेशनपर्यंत गेले. तीन वाजतां मेलगाडी तिकडे पोंह्चतांच रा. ब. विनायक ना. खोपकर बी. ए., माजी डेपुटी कलेक्टर पुणें, शेट दामोदर सांवळाराम यंदे, ग्रंथ संपादक व प्रकाशक मंडळीचे मालक, नरहर रघुनाथ फाटक बी. ए संपादक 'इंदुप्रकाश', नारायण विनायक भोंडे, बी. ए. एल. एल. बी, कृष्णाजी नारायण आठल्ये, माजी संपादक केरळकोकिळ, दत्तात्रय गो. सडेकर, संपादक 'लोकमित्र, कृष्णराव सखाराम मसुरेकर, अकौंटंट सिटी मुनिसिपालटी पुणें, वगैरे मंडळींचें स्वागत करून, त्यांस उपहार, चहाकाफी, पानसुपारी वगैरे देण्यांत आली. सांवर्डें स्टेशनवरहि तेथील स्थानिक मंडळींनीं पाहुण्यांची ओळख करून घेतल्यावर स. वि. प्रभु देसाई यानीं सर्वांस चहा फराळ दिला. मडगांव स्टेशनवर पांच वाजतां गाडी, पोंह्चतांच शहरवासी प्रमुख मंडळी, स. से. मंडळाचे सभासद, बालचमूचे स्वयंसेवक वगैरेनीं सर्वांचें स्वागत करून एकमेकांच्या ओळखी झाल्यावर, पाहुण्यानां हार तुरे पान सुपारी अर्पण करण्यांत आली. नंतर दोन घोड्याच्या गाडीमधून शहरांतील मुख्य रस्त्यांतून थाटानी मिरवणूक निघाली. ती सहा वाजतां श्री दामोदर विद्याभुवनांत पोंह्चतांच चौघुड्याचे सुस्वर निनादांत व फटाक्यांचे कडकडाटांत पाहुण्यानीं श्री सरस्वतीचें दर्शन घेतलें. व नंतर दलाल यांचे वाड्यांत जेथें पाहुणे मंडळीनां उतरण्यासाठीं व्यवस्था केली होती तिकडे सर्व मंडळी गेली. तेथें पाहुणेमंडळीसह शेंकडो मंडळीला टीपार्टी देण्यांत आली.

दिवस पहिला.

ठरल्याप्रमाणें सभेला ७॥ वाजतां सुरुवात झाली. प्रथमतः द. पां. ना. दलाल यांनीं "या कुंदेंदु तुषार हार धवला" या श्लोकानें श्रीसरस्वतीची स्तुति करून पाहुणे मंडळी, श्रोतृजन वगैरे मंडळींचें अभिनंदन करतांनां त्यानीं सरस्वतीसेवक मंडळानें आज आठ वर्षेपर्यंत व्याख्यान मालेच्या द्वारें लोक जागृतीचें कार्य अव्याहत कसें चालविलें आहे व यामुळें महाराष्ट्र व गोमांतक यां मधील स्नेहसंवर्धनाचें कार्य किती चोल होत आहे याचें थोडक्यांत दिग्दर्शन करून या उत्सवाचें सर्वत्र अनुकरण होत आहे याबद्दल समाधान व्यक्त केलें. नंतर आजपर्यंत महाराष्ट्रीय विद्वान मंडळींनीं स. से. मंडळाच्या निमंत्रणाचा आदर करून उत्सवास हजर राहून आपल्या विविधज्ञानाचा फायदा गोमांतकास कसकसा दिला याचा थोडक्यांत उपसंहार केला. ते ह्मणाले: प्रो. शिवरामपंत परांजपे यांनीं असें सांगितलें कीं, श्रीसरस्वतीची उत्पत्ति ब्रह्मदेवापासून आहे, तसेंच हिंवाळ्यापासून श्रीसरस्वती नदीचा उगम व याच सरस्वती नदीतीरावर सारस्वताचार्यांनीं भयंकर दुष्काळांतहि वेदविद्येचें संगोपन करून आपली जगंतकीर्ति करून घेतली, त्याच आचार्यांचे वंशज तुह्मी गौडसारस्वत ब्राह्मण आहांत व तुमच्याकडून हा श्रीसरस्वतीचा उत्सव होत आहे हें तुह्मांस भूषणास्पद आहे. श्रीशांतादुर्गा तुमचें कुलदैवत असल्यामुळें तुह्मीं सभेंत शांतता राखतां हेंहि उचित आहे. सी. के. दामले यांनीं निरनिराळ्या कालांतील आर्यांच्या संस्कृतीचा जोमदारपणा कसा जाज्वल्य होता याचें दिग्दर्शन करून त्या संस्कृतीची सर्वांनीं जोपासना करणें अत्यावश्यक आहे असें सांगितलें. रा. ब. चिं. वैद्य यांनीं 'या कुंदेंदु तुषार हार धवला' या श्लोकाचा अर्थ आपल्या विद्वताप्रचुर भाषणानें सर्वांना समजावून देऊन या उत्सवाबद्दल आदर व्यक्त केला. गंगाधरराव देशपांडे यांनीं सरस्वत्युत्सवाचे बद्दल आनंद व्यक्त करून लोकमान्यांच्या गुणवर्णनपर व बोधप्रद विवेचन करून गोमांतकांत असे लोकोत्तर कार्यकर्ते निर्माण होवोत अशी आशा व्यक्त केली. ह. भ. प. पांगारकर यांनीं ॐकारापासून श्री सरस्वतीची उत्पत्ति असून तिची आराधना व पूजन केल्यामुळें जसें प्रापंचिक सुख अनुभवण्यास मिळतें, त्याचप्रमाणें तिच्या चिंतनानें— कारण ती आदिमाता जगजननी असल्यामुळें—मोक्षपदाची प्राप्ति होण्यास सुलभ पडतें, असें विषद करून सांगितलें. कृ. शि. परांजपे यांनीं इंक्विजिशनच्या भयंकर कालांतहि ज्यांनी स्वधर्मसंरक्षणासाठीं आपल्या जीविताची पर्वा न करितां इतिहासांत आपलें नांव अजरामर करून ठेवलें, त्या गोमांतकीय पूर्वजांचा गौरव करून यापुढें गोमांतकास सुखाचे दिवस लाभतील अशी आशा प्रगट केली. वे० श्री. व्यं. पुणतांबेकर यांनीं गोमांतकांतील माडाचें ह्मणजे कल्पवृक्षाचें उदाहरण देऊन माडासारखा खंबीरपणा, ताठपणा आपल्या आंगांत आणून गोमांतकीय जनतेनें आपली उन्नति करून घ्यावी असा कळकळीचा उपदेश केला. नरसिंह चिं. केळकर यांनीं हिंदुस्थानदेश जसा एक आणि अभंग राहणार त्याचप्रमाणें गोमांतकहि एकच आणि अभंग राहण्याबद्दल गोमांतकवासियांनीं खटपट करून आपली प्रगति करून घ्यावी असें सांगितलें. त्याचप्रमाणें जोशी, सडेकर, गिंडे, कानविंदे, मसुरेकर वगैरेनीं आपापल्या निरनिराळ्या विषयावरील भाषणानीं लोकशिक्षणांत बरीच भर घातल्याचें सांगून महाराष्ट्रीय विद्वान या उत्सवास येण्यास —आपल्या प्रवासाचे दगदगीकडे दुर्लक्ष करून व अमोल्य वेळ खर्च करून — सदैव तत्पर असतात याबद्दल संतोष व्यक्त केला व वरील पाहुणेमंडळीची योग्य शब्दांनीं सर्वांस ओळख करून दिली. नंतर उत्सवाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल रा. ब. खोपकर यांस गौरवयुक्त शब्दानीं विनंति केली. तिला द. गो. सडेकर यांनीं व दा. व्यं. पै रायतुरकर यांनीं अनुमोदन देतांच रा. ब. खोपकर यांनीं अध्यक्षस्थान मंडित केलें. द. गो. सडेकर यानीं यंदांचे उत्सवासाठीं स्वखर्चानें छापून आणलेल्या सरस्वतीच्या स्तुतिपर कविता ह्मणून दाखविल्यावर त्याच्या प्रति सर्वत्रांस वाटण्यांत आल्या. अध्यक्षांनीं 'सरस्वतीचें अधिवान' अथवा 'सरस्वतीची वाङ्मयविषयक माहिती या विषयावर अनेक ऐतिहासिक दाखल्यांनीं युक्त व विद्वताप्रचुर असें लिहून आणलेलें भाषण फाटक बी. ए. यांनीं वाचून दाखविलें. त्यांतील हृदयंगम माहिती, पौर्वात्य व पाश्चिमात्य वाङ्मयाची तुलना, ग्रीक, रोमन, जर्मन वगैरे राष्ट्रांतील वाङ्मयाची वाढ, संस्कृत भाषेचें अग्रेसरत्व वगैरे भाग वाचनीय व मननीय असे आहेत. तें भाषण समग्र छापलें जाणार असल्यामुळें त्याची त्रोटक माहिती करून अर्धवटपणाचा दोष पदरीं घेणें अयोग्य ह्मणून जास्त विस्तार करीत नाहीं. शेवटीं अध्यक्षांनीं मंडळाचे आभार मानून उत्सवाबद्दल भूति प्रगट केली. नंतर वकील ना. वि. भोंडे, दा. सां. यंदे, न. र. फाटक, कृ. ना. आठल्ये वगैरेचीं समयास अनुसरून भाषणें झालीं. रात्रै आरत्या प्रसाद वगैरे होऊन पहिल्या दिवसाचें काम संपलें.

दिवस दुसरा.

या दिवशीं श्रीदामोदर विद्याभुवन सभाजनानीं गच्च भरून गेलें होतें. प्रथमतः दलाल यांनी निरनिराळ्या गृहस्थांकडून व संस्थांकडून सहानुभूतिपर आलेल्या पत्रांचा व तारांचा नामनिर्देश केल्यानंतर न. र. फाटक, 'इंदुप्रकाश' चे संपादक यानीं 'वाङ्मय आणि वृत्तपत्रें' या विषयावर अनेक माहितीनें भरलेलें व सर्वांगसुंदर असें भाषण केलें. नंतर ना. वि. भोंडे याचें 'धर्म आणि आधिभौतिक शास्त्रें' या शास्त्रीय विषयावर विद्वत्ताप्रचुर व्याख्यान झालें. दा. व्यं. पै रायतुरकर यांचें 'हिंदूंची सरस्वती सेवा' या विषयावर भाषण होऊन आजच्या काळांत गोमांतकीय हिंदूनीं हरेक तऱ्हेच्या शिक्षणांत आघाडी मारून आपणच आपली कशी उन्नति करून घेतली पाहिजे याबद्दल उत्कृष्ट विवेचन केलें. नंतर कृष्णाजी ना. आठल्ये यांचें 'शारदा अंबेचें मूलस्थान' या विषयावर ऐतिहासिक माहितीचें व विनोदपरिप्लुत असे भाषण झालें. या प्रसंगीं सभागृहांत महाराष्ट्र भाषा चित्रमयुराच्या विनोदी भाषणाबद्दल कौतुक केलें जात होतें. नंतर बराच वेळ झाल्यामुळें यंदे यांचें व्याख्यान दुसऱ्या दिवशीं ठेवण्यांत येऊन रात्रीचा कार्यक्रम ह्मणजे पुराण हरिकीर्तन वगैरे साजरा झाला.

दिवस तिसरा.

या दिवशीं प्रथमतः गोमांतकीय देवालयें

—असनोडें येथील शिक्षणोत्तेजक समाजतर्फे यंदां श्री सरस्वत्युत्सव मोठ्या थाटानें पार पडला. उत्सवाला एक हजार पेक्षां जास्ती मंडळी जमली होती. भजन, पुराण, आरत्या, कीर्तन या धार्मिककृत्यां बरोबरच व्याख्यानांचाहि कार्यक्रम पार पाडण्यांत आला. ह. भ. परायण के. रा. पत्की याचें गोराकुंभाराच्या चरित्रावर फारच उत्तम कीर्तन होऊन अनेक गृहस्थांचीं अनेक विषयांवर अनेक व्याख्यानें झाली. ज. ल. सामंत हे 'ऐक्यावर' बोलले; हेडमास्तर सु. वि. राव यानी मराठी भाषेच्या प्रगतीची छाननी केली; कन्हाडकर यानीं दामाजीपंताच्या चरित्रांतील रहस्य श्रोत्याच्या मनावर बिंबविलें. एकंदरीत समाजाचे अध्यक्ष बाळकृष्ण रावजी मुळगांवकर व हेडमास्तर राव याच्या परिश्रमामुळें उत्सव फारच बहारीचा पठला, असें शंकर गोविंद मुळगांवकर हे कळवितात.

—परीस येथील एका सिनेमास आग लागून २० मनुष्यें मेलीं व २० जखमी झालीं असून २५ बेपत्ता झालीं !

—पॅलेस्टाईन येथें गेलेल्या हिंदी मुसलमानाच्या शिष्टमंडळीनें केमालपाशा यांना खलीफा होण्याची विनंति करण्याचें ठरविल आहे.

—ता. १ अक्टोबर पासून जर्मनींतून येणाऱ्या किंवा इतर राष्ट्रांतून येणाऱ्या जर्मनी मालावर फ्रान्सनें २६ टक्के जकात बसविल आहे.

—तुर्कस्थानचे माजी खलीफा अबदुल मजीदखान यांस बाहेरून अनेक देणग्या मिळून त्यांची सांपत्तिक स्थिति सुधारली आहे ह्मणून अंगोरा सरकारनें त्यांची खासगी इस्टेट विकून टाकण्याचें ठरविलें आहे.

—नागपूर येथें एक मजूरसंघ स्थापन करण्यांत आला आहे.

निशाचरांच्या मनांत वावरणाऱ्या निंद्य विचारांनांच लोक विलक्षणतेचा व लज्जाहिनतेचा दोष देत असतात.

ह्या आमच्या खुल्या दिलाच्या खुलाशाबद्दल' कित्येक स्वयंमन्य सुशिक्षित आह्मांस समर्थांचीं मूर्ख लक्षणें पहाण्याची शिफारस करतील अशी शंका वाटते. आणि ह्मणूनच आह्मीं त्यांस पुन्हां बजावून सोडतों कीं, तीं मूर्खलक्षणें आह्मीं त्यांच्या पूर्वींच वाचून टांकली आहेत; व जेव्हां त्यांत आमचें प्रतिबिंब आह्मांस निर्दोष दिसलें तेव्हांच आम्ही हा विषय हातांत घेतला आहे हें त्यानीं विसरूं नये.

बाजीत्रयींतील दुसरी जी व्यभिचारबाजी तिचा ह्या फॅशनबाजीशीं परस्पर संबंध इतका निगडित झाला आहे, फॅशनबाजी ह्या व्यभिचारबाजींत इतकी एकजीव होऊन राहिली आहे, कीं ह्या दोन्ही बाजी परस्परांपासून अलग करण्याचा प्रयत्न करणें तेल मिश्रित उदकांतून तेल निराळें काढण्याचा प्रयत्न करण्याइतकेंच वेडगळपणाचें ठरेल. एखादा व्यभिचारबाजीच्या विंवट कर्मांतत लोळत पडलेला महिषीचा प्राणपति फॅशनच्या नानारंगी रागरंगांत दंग झालेला आढळणें हा कदाचित् अपवादात्मक नियम असणें शोधाअंतीं शक्य होईल; पण फॅशनच्या फुसलावणीचा सच्चा सेवक जाणून बुजून व्यभिचारबाजीचा मार्ग आक्रमित असतां आपणच स्वतःस धन्यवाद देऊन जिवाची जोगवण जागीत असतो, ह्या नियमाला अपवाद असणें कोणत्याहि काळांत शक्य असणार नाहीं. खुलत्या दुनियेच्या ह्या चलत्या काळांत तर त्या एकमेकांचें एकमेकांशिवाय चालतच नाहीं ह्मटल्यास चालेल. कारण ही फॅशन आम्हां काळ्या लोकांच्या काळ्या रंगाबरोबरच कृष्णकृत्यांवरहि पांघरुण घालण्यास विशेष उपयोगी पडत असूनहि व्यभिचाराची हलकट हौस भागविण्यास हवी तितकी मदत देण्यास एका पायांवर तयार असते. ह्मणूनच तिच्या उदार आश्रयाखालीं राहिल्याशिवाय कोणताहि व्यभिचारी नरपशु निर्भय असूं शकत नाहीं. याच साठीं आकाशांतील देवबापाच्या पृथ्वीवरील लाडक्या पुत्रानीं हिंदुस्थानास भेट देऊन त्यांतील गांवढळ लोकांला सुधारावें व इतर राष्ट्रांच्या तोडीचेंच हिंदुस्थान हें एक राष्ट्र करावें असा जेव्हां पोक्त विचार केला, तेव्हां त्यानीं ' रिक्त हस्तेन न गंतव्यम ' ह्मणून ही नारळाची आई आपापल्या तराजूस वहिवाटलेल्या हातांत सरसावली व ती आपली भेट ह्मणून आमच्या समोर ठेवली; पण आमच्या दुर्दैवानें तराजूच्या ऐवजीं राजसत्ता जेव्हां त्यांच्या हातांत गेली, तेव्हां तीच–त्यांनीं नजर केलेली नारळाची आई आमच्या हातांत घेणें आह्मांस भाग झालें. व मजा ही कीं आज आमच्या समाजांत व्यभिचारबाजी हेंटाळिली जाते पण त्याच वेळीं फॅशन वरचे आरोप फेटाळण्याचीहि आमच्या समाजाची तयारी असते. व्यभिचारी मनुष्याला उजळ माथ्यानें आमच्यांत दिवसाढवळ्या वावरण्याची दिक्कत वाटत असते ह्मणून तो हुरळलेला हरामखोर रात्रीं बे रात्रीं बाहेर फिरून निशाचराचा नक्षा उतरीत असतो. पण एकाद्या फॅशनच्या भुलथापांस भुरकटलेला जीव मात्र बिनदिक्कत म्युनिसिपालटीचे रस्ते दिवसा उजेडीं मोठ्या दिमाखानें तुडवीत असतो. व्यभिचारबाजीला मर्यादा असते, ती मर्यादा ओलांडणें मनांत असलें तरी शक्यतेच्या सीमेपलीकडे जातें पण ही फॅशनबाजी अशी एक चीज आहे कीं, जितकी जितकी ती वाढविण्याचा मनुष्य प्रयत्न करीत असतो तितकी तितकी ती ह्या अमर्याद जगांत वाढतच जाते.

———

भारताची भालाफेंक

फेंकणार–निःपक्षपाती

आह्मां हिंदी जनतेचा जींत अजून प्रवेश झालेला नाहीं, ती एक राजकीय बाब वगळली तर इतर सामाजिक, नैतिक, शैक्षणिक, व औद्योगिक इत्यादि सर्व ज्ञानसंवर्धक बाबतींत आमचें हिंदीस्थान आज इतर राष्ट्रांबरोबर झुंज घेण्यास कुस्तीच्या आखाड्यांत उतरूं शकतें; इतकेंच नव्हे, तर पाश्चात्यांचा पाडाव करून आपली विजय दुंदुभि साऱ्या जगताला ऐकवूं शकतें, हें त्यानें आज कित्येक वर्षेंपर्यंत सोदाहरण सिद्ध केलें आहे. आतां नुसती शैक्षणिक बाबच घेतली तर आमचें हिंदी लोकांचें श्रेष्टत्व अलम दुनियेला माहीत व कबूल झालेलें आमच्या दृष्टीस पडेल. रॅ. परांजपे ह्यांनीं रँगलरच्या परीक्षेत सर्व जगांत पहिला नंबर मिळविला आहे. प्रॉ. जगदीशचंद्र बोस हे तर जगांतील पहिले व अत्यंत श्रेष्टप्रतीचे तत्ववेत्ते आहेत. डॉ० रवींद्रनाथ टागोर ह्यानीं स्वतःच्या कवित्वशक्तीच्या जोरावर पॉएट लॅरेट ऑफ ॲशिया [आशियाचे राजकवी] ही बहुमानदर्शक पदवी व नॉबेल प्राइझ संपादन केलें आहे. वरिष्ठ कायदे कौन्सिलांतील हिंदी मेंबर्सच्या वाक्पटुतेची वाखाणणी खुद्द इंग्लंडांतील आंग्लवृत्त पत्रांनीं "एकाद्या जातीच्या कसलेल्या युरोपियन वक्त्यालाहि लाजविणारी" ह्या शब्द समुच्चयानें केली आहे. फार कशाला ? ज्या परीक्षेत आह्मां काळ्या वसाहतवाल्यांचा शिरकावहि होणें एका वेळेस अगदीं अशक्य होतें, आणि यदाकदाचित् जबर सुदैवें प्रवेश झालाच तर जींत यश मिळविण्याच्या अंधुक कल्पनेलाहि वाव देणें जेथें ' मूर्खपणाचें प्रदर्शन ' ठरत असे, त्याच Indian civil service आय. सी. यसच्या परीक्षेत रंगाभिमानाच्या सर्वभक्षक शत्रूशीं हांसत खेळत टक्कर देऊन बंगालचे रतनकुमार नेहरू हे तरुण पहिले व मुंबईचे व्ही. डी. केरकर हे तरुण तिसरे उभे राहिले आहेत. हिंदी ह्मटला कीं, ' अज्ञानाचा मूर्तिमंत अवतार ' असा त्यांवर आरोप करणाऱ्या अक्कलवंतानीं (?) हा भेदाभेद लक्षांत ठेवणें अगत्याचें होतें. "मूर्खस्यनास्त्यौषधम्"

\+ * +

पण एवढ्यावरूनच आह्मीं हिन्दवासी यांनीं फुशारून जाण्याचें कांहींच कारण नाहीं. हिंद देशाला स्वतःवर पिंवळा रंग चढवून घ्यायाला बुद्धिमत्तेचें हें अर्धें हळकुंड पुरेसें नाहीं. पाश्चात्य राष्ट्रांत–वृथाभिमान सोडून दिला तर – आणखी कित्येक गुण आह्मांला असे मिळतील कीं त्याचा स्वांतरी समावेश करून घेतल्याशिवाय आमच्या हिंद देशाला इतर राष्ट्रांच्या तोडीचें राष्ट्र ह्मणून मोठ्या मानानें मिरवतां येणार नाहीं. एक काळ असा होता कीं,ज्यावेळीं हे सर्व गुण–ज्यामुळें सध्या परराष्ट्रांना विशिष्टत्व प्राप्त झालें आहे–आमच्या आर्यावर्तांत स्वैर संचार करीत होते, त्यावेळीं ही हिंदभूमि सुवर्णभूमि ह्या नामाभिधानानें त्यावेळच्या सर्व जगाच चित्त आपणाकडे लोहचुंबकाप्रमाणें वेधून घेत होती; व त्याच वेळीं आह्मा आर्यांच्या आर्यत्वाचा प्रभाव अलम अवनीवर प्रकाशमान होत होता. पण 'चक्रनेमिक्रमेण' तो काळ आतां पार उलटून गेला आहे. व तीच सुवर्णभूमि आज भिकारभूमि ह्या नावानें संबोधिली जाण्याचा संभव वाटत आहे. अशा आणीबाणीच्या वेळीं प्रतिभाशाली भारत वर्षानें पराष्ट्रांच्या नसांनसांतून वहाणारे "स्वार्थत्याग, स्वदेशप्रेम, स्वाभिमान, उद्योगप्रियता, एकीची आवड, चिकाटी, धैर्य, इत्यादि महत्वाचे गुण आपल्या अंगांत उतरविण्याची कसून खटपट केली पाहिजे. त्या चीजांचें महत्व आजकालच्या जगांत इतकें श्रेष्ठ मानिलें जात आहे कीं केव्हां केव्हां स्वार्थसाधु विद्वत्तेचें तेजहि त्यांच्यापुढें फिकें पडत असतें. बरोबरच आहे; कारण विद्या संपादन करण्याचा मुख्य उद्देश हेच गुण अंगीं बाणविण्याचा असतो. जें साध्य साधण्याकरितां साधनें संपादन करावयाचीं असतात तें साध्य सोडून देऊन साधनांचा दुरुपयोग करणें व त्यांतच मोठेपणा मानणें ' देवा सोडूनियां देऊळ भजती ' ह्याप्रमाणेंच मूर्खपणाचें होय. विद्यार्जनाच्या बाबतींत आमच्यांतील हिन्दी विद्यार्थी आंग्लभाषेसारख्या सर्वस्वीं परकी मायेंतहि पाश्चात्यांपुढें आघाडी मारण्यांत जरी पुरे प्रवीण असले तरी जोंपर्यंत त्यांना स्वार्थ साधनांतच आपलें अंतिम साध्य गुरफटलेलें दिसत आहे, जोंपर्यंत त्यांना परीक्षेत पास होऊन 'डिग्री' कमाविणें हेंच आपल्या बुद्धिमत्तेचें इतिकर्तव्य वाटत आहे तोंपर्यंत त्यांच्यांकडून उन्नति मार्गदर्शनाची हिन्दभूमीनें आशा धरण सहारा वाळवंटांतील मृगजळानें एखाद्या तृषाव्यथित पांथस्थानें स्वतःची तहान भागविण्याइतकेंच फलदायक ठरेल, असें आह्मांस वाटतें. न जाणां " पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना ".

\+ + +

होय नाही ह्मणतां ह्मणतां दिल्ली येथें भरविण्यांत आलेली हिंदु–मुसलमान ऐक्य परिषद राम–रहिमाच्या दयेनें व महात्माजींच्या तीव्र तपोबलानें विनतक्रार पार पडली ह्याबद्दल तेथें जमून ऐक्यवर्धनासाठीं जिवापाड झटलेल्या सर्वपक्षीय पुढाऱ्यांचे आह्मीं आभार मानणें अगदीं अवश्य आहे. महात्माजींच्या २१ दिवसांच्या खडतर प्रायोपवेशनामुळें ही सभा उठाउठी भरविणें जरी मौलाना महमंद अल्ली, श्रद्धानंद स्वामिजी, इत्यादिकांस भाग झालें होतें तरी ह्या परिषदेनें आपलें एकी उभारण्याचें काम इतकें उत्कृष्ट बजावलें आहे कीं, त्याबद्दल कन्याकुमारीच्या खोल दरीपासून हिमालयाच्या गगनभेदी सुळक्यापर्यंतच्या अखिल हिंद जनतेला अत्यानंदाचें भरतें येईल ह्यांत मुळींच शंका नाहीं. ही सभा भरतेवेळीं कित्येकांच्या मनांत दोन्हीं धर्मांची एकी करण्याकरतां भरलेली ही परिषद स्वतःच बेकीचें एक अत्युत्कृष्ट उदाहरण ठरतें कीं काय असे वेडेपणाचे विचार आले होते; नाहीं असे नाहीं; पण ह्या परिषदेनें दोन्हीं संस्कृतींची तोंडमिळवणी करून पसार केलेले ठराव पहातांच अशा वेड्या लोकांची बरीच कानउघाडणी झाली हें कबूल करणें अगदी अनिर्वाह्य आहे. ह्या ऐक्य परिषदेस हिंदीस्थानातील हिंदुधर्माचे स्वामी श्रद्धानंद व पंडित मालवीय, मुसलमान धर्माचे मौलवी साहेब व खिश्चन धर्माचे रव्हरंड मॅट्रोपालीटन हे धर्माधिकारी व इतर सर्व धर्माचे प्रमुख पुढारी हजर होते. ह्या परिषदेंत गोवधाविषयीं व वाधांविषयीं जे ठराव पसार झाले आहेत त्यानीं संस्कृति संकराचें काम इतकें हुबेहुब पार पाडलें आहे कीं महाराष्ट्रांतील एका प्रमुख वृत्तपत्रानें आपल्या खास बातमीदाराकडून लवचिक लेखणीच्या लकबींत जरी त्यांतील एका ठरावाबद्दल चिकित्सक बुद्धीनें नापसंती दर्शविण्याचें काम जरी शिताफीनें उरकून घेतलें आहे तरी त्याबद्दल त्याच्या पदरांत एकलकोंडेपणाचा आरोप टांकण्यास व दोन्हीं संस्कृतींच्या पुढाऱ्यांस धन्यवाद देण्यास आमच्यांतील हाडाचे हिंदु कधींच मागेंपुढें पाहणार नाहींत. तिरङ्याचा रंग तीन दिवस तरी एकसारखा रहात असेल पण आह्मां महाराष्ट्रीयांच्या ह्या पुढाऱ्यांची तयारी दिवसाख ती नदां टोपी बदलण्यापर्यंत पोहोंचली आहे हें आह्मास भूषणावह कीं दूषणावह हें ठरविणें आह्मीं सर्वस्वी भारताच्या वाचकांवरच सोंपवितों. " ते के न जानी महे ".

———

—मुंबईचे सुप्रसिद्ध व्यापारी सर करीम भाई इब्राहीम हे गेल्याच्या मागील शुक्रवारीं मरण पावले. ते प्रख्यात दानशूर होते.

—राष्ट्रसंघाच्या असेंब्लीनें जिनीव्हा येथें ठरविण्यांत आलेला शस्त्रसंन्याससंबंधाचा करारनामा मंजूर केला.

—लंडनमध्ये सुरू असलेल्या धर्मपरिषदेंत बुद्धधर्माचें वर्चस्व या विषयावर डॉ. सिलड्डा यांचें व्याख्यान झालें.

...दारी हजर होते. हा परिषदें... ...नेव-
...आर
...करार्च काम
आहे की ...

ठरावाबद्दल
... दर्शविण्याचें
... उरकून घेतलें ... आहे
...काडेप-

... व्यापारी सर करीम
...या मागील शुक्रवारी
... दानशूर होते.
...नें जिनीव्हा येथें
मुकुंद गोविंद ...राष्ट्रसंघाच्या क-
दकास ...लेल्या धर्मारि-
वास्को ... विषयावर ... डॉ.
...के.

Vox Populi! Vox Dei!!

Foi imponente e magestoso o comicio que, penultimo domingo, realisou-se no adro da Igreja de Tilamola.

Viam se reunidos mais de duzentos catolicos para protestar *una voce* contra o Decreto Patriarcal desta Diocese que estabeleceu confusao nos limites das duas freguesias de Quepem e Tilamola, privando esta entre outras moradias dispersas, de um bairro importante que lhe pertenceu desde a erecgao de sua Igreja.

Predominava no comicio o elemento da classe proletaria. Todos os reunidos exteriorisaram o seu firme proposito de, ordeira e respeitosamente, conseguir nao so' a revogagao do mencionado decreto que manifestamente vai de encontro com os direitos adquiridos e irrefutavelmente definidos da freguesia de Tilamola, mas tambem a restituigao de algumas casas e terrenos que tendo sempre figurado nela sao, gragas a' bondade de seus vigarios e passividade indolente dos seus paroquianos, esbulhados pelos chefes eclesiasticos da Igreja de Quepem. Os assistentes do comicio que se mostraram desgostosos pela estudada indiferenga a que nas regioes superiores foram votadas as representagoes em que se solicitava a revogagao imediata do Decreto que os traz sossobrados, patentearam tambem a sua resolugao colectiva de abandonar a igreja, caso se nao respeite o seu direito adquirido.

Falaram muitos cavalheiros. Estava-se a redigir, finalmente, a acta do comicio. Foi quando surgiu no local da reuniao o sr. Vigario da Igreja de Tilamola e depois de se informar das resolugoes tomadas ali disse que Sua Excia o Sr. Patriarca tinha dado seguimento a's reclamagoes pendentes e que estas estavam a ser estudadas por estes dias pelo sr. Administrador do Concelho e pediu a todos, em tom que sobremaneira nos impressionou suspensao dos trabalhos posteriores do comicio" prometendo-lhes exercer a sua jurisdigao como dantes.

Concluiu se, porem, a acta mas em obediencia ao pedido do sr. Vigario os assistentes resolveram usar dela em tempo oportuno, tendo se dissolvido em seguida o comicio que pela forma pacifica e ordeira como decorreram os seus trabalhos, so' honra os seus promotores a quem agradecemos o convite com que nos distinguiram.

O *Bharat* interessa se politica, juridica e canonicamente pela causa de Tilamola, porque e' justa e se refere a mais de 2 mil habitantes, considerados como sem valor porque sao, na generalidade, analfabetos.

E, depois, o jornal e' para defender justas causas populares. Diga se de passagem que a julgar pelo que aqui se ouve, o Decreto que provocou tantos protestos, e' fruto autentico do trabalho pretencioso de um e outro Vigario de Quepem que, assustados pela transferencia do tribunal, e mais pela consequente tendencia dos seus paroquianos para se estabelecerem em volta do tribunal e noutros logares da freguesia de Tilamola, desde 1912 andaram atarefados em insinuar aos seus, ja' estabelecidos, para requererem ao Sr. Patriarca, pedindo a sua agregagao a' freguezia de Quepem, prometendo-lhes da sua parte apoio possivel com informagoes menos verdadeiras para conseguir o fim almejado contra os limites da freguesia de Tilamola, legalmente estabelecidos pela Port. Provincial n° 178 de 16 de Margo de 1881 e publicada no Bol. Ofi n°. 30 de 17 do dito mez e ano, de harmonia com autoridade eclesiastica e depois de ouvida uma comissao nomeada por ambas as autoridades civil e eclesiastica composta dos saudosos Francisco Augusto de Barbosa Carvalho e Sousa, Administrador do Concelho de Quepem, Joao Manuel Pacheco e Pe. Joao Salvador Gracias nomeados pelo Governo e Pe. Domingos Salvador Marinho da Silva, Dezembargador, Vara de Salcete e Pe. Constancio Filipe Dias, Paroco de Racholestes dois nomeados pelo saudoso Bispo de Teja — comissao, que ouviu o respectivo Vigario de Quepem e lhe atendeu as suas reclamagoes, como consta do respectivo auto sobre que se baseou a dita Portaria Provincial de 1881, sendo, portanto, descabidas e injustas as novas pretengoes dos Vigarios de Quepem, em prejuiso grave da freguesia de Tilamola.

"Eadniavalkia" comina a quem casar por poligamia sem motivo justificado com a pena da perda de um tergo dos seus bens a favor do Estado.

Ora, segundo a concepgao juridica hindu sendo o fim do matrimonio e' de ter a prole mascul na, a quem compete manter a casa e celebrar certas cerimonias religiosas, e porque esta sua necessidade fica suprida com o instituto de adopgao ¿nao seria de boa logica eliminar aquele artigo 8° do projecto, por nao ser ditado por necessidades imperiosas?

E, quando mesmo queiram manter e por uma outra razao, ja' expendida pelo ilustre autor do projecto qual a de "o instituto de adopgao nem sempre ser possivel, porque depende do consentimento dos pais do adoptando", — para manter o direito da mulher, entendemos dever dar-lhe a seguinte redacgao.

Art. 8° — "E' permitida a poligamia com consentimento das primeiras mulheres manifestado no acto do Registo Civil do casamento, pessoalmente ou por procuragao especial unicamente na absoluta falta do filho varao tendo a mulher do anterior leito trinta anos completos e tendo menor idade passados dez anos depois da ultima gestagao."

Do contrario, segundo a doutrina substen a la no projecto excluindo a mulher dum lado do direito a' meiagao como tambem a' legitima, doutro lado expondo-a a' merce do marido nos casos de poligamias, sera' a sua condenagao certa para passar a vida de escrava, das epocas barbaras.

G. C. Guldó

भारत

आश्विन व० १० मीं शके १८४६

मुनिसिपल निवडणुका

आकाशांत अभ्रें जमूं लागलीं, गडगडाट सुरू झाला आणि मधून मधून वीजा चमकूं लागल्या ह्मणजे आतां पाऊस पडणार असें निश्चित मानण्यास हरकत नसते. हाच न्याय मुनिसिपाल निवडणुकांस लागू केला तर येथील बहुतेक वर्तमानपत्रांतून निवडणुकांसंबंधीं येणारीं वर्तमानें व विचार मुनिसिपाल व इतर निवडणुका अगदीं जवळ गास आहेत, असें धरून चालण्यास प्रत्यवाय नाहीं. सरकारी बुलेतींवर निवडणुकासंबंधींची गव्हर्नरसाहेबाची पोर्तारी (फर्मान) कधीं प्रसिद्ध होईल ती होवो, त्यापूर्वी त्या बाबतींत विचार प्रगट करणें आमचें कर्तव्य आहे व तें मुनिसिपालटीच्या सभासदांच्या निवडणुकांपुरतें आज आह्मीं बजावणार आहों.

मोनार्कीत जवळ जवळ एकोणिसाव्या शतकाचें उत्तरार्ध लागण्याच्या सुमारास पोर्तुगालमध्यें राज्यकारभारांत क्रांति होऊन 'घटनात्मक सनद' Carta Constitucional या नावांचा कायदा करण्यांत आला व तो पोर्तुगालबरोबरच त्याच्या हाताखालील वसाहतींसहि लागू करण्यांत आला. या सनदेनें वसाहतींतील रहिवाशी या नात्यानें साम्राज्याच्या मुख्य राजधानींत ह्मणजे लिज्बोअ शहरांत असणाऱ्या पार्लमेंटांत प्रतिनिधि पाठविण्याचे व सासष्टी, तिसवाडी व बार्देश येथें लोकनियुक्त मुनिसिपालट्या स्थापन करण्याचे हक्क इतर वसाहतींबरोबर आह्मांस मिळाले. नवीन काबिजादींत मुनिसिपालट्या स्थापन करण्याचा हक्क मिळाला नाहीं तरी महालाचे आदमिनिस्त्रादोर अध्यक्ष व सरकारानें निवडलेले दोघे सभासद अशा तिघां जणांचें एक मुनिसिपालमंडळ (comissao municipal) नेमून त्यांच्या हातून मुनिसिपाल कारभार सरकार चालवीत असे. पुढें एका निवडणुकीच्या प्रसंगीं दोन पक्ष उद्भवून सरकारनें एक बाजू घेतल्यामुळें गोळीबारापर्यंत पाळी आली व तींत कांहीं जणास नाहक बळी पडावें लागलें. तेंव्हापासून मुनिपालटींच्या निवडणुकांत बरीच शिथिलता येऊन निवडणुका ह्मणजे सरकारी खेळ आहे असा लोकांचा ग्रह होऊन बसला. याला कायद्याचीहि जोड कारणीभूत झाली हें निराळें सांगावयास नको.

सन १९१० चा पांच अक्टोबर हा दिवस उजाडला व मोनार्कीच्या जागीं रेपुब्लिकची स्थापना झाली. त्यावेळीं जी नवीन घटना झाली व तीस अनुसरून जो निवडणुकीचा नवा कायदा अस्तित्वांत आला त्या कायद्याप्रमाणें पार्लमेंटांत प्रतिनिधि पाठविणें व नवीन काबिजादींतील मुनिसिपालट्या लोकनियुक्त असणें हे हक्क येथील जनतेला मिळाले. पुढें अंतर्गत कारभाराचे हक्क, मग ते तुटपुंजे असोत, मध्यवर्ती सरकाराकडून बहाल करण्यांत आले तों पासून कायदेमंडळांतील अर्धे अधिक लोकनियुक्त सभासद निवडणें, नव्या काबिजादींतील मुनिसिपालमंडळांच्या जागीं लोकनियुक्त मुनिसिपालट्या स्थापणें, सर्व ठिकाणीं प्रत्येक गावांत किंवा गांवांच्या गटांत लोकनियुक्त स्थानिक मंडळें (जुंत लोकालें) स्थापणें वगैरे विशेष हक्क मिळाले. इतक्या अवधींत निवडणुकीच्या कायद्यांत बराच फेरफार होऊन पोर्तुगीज भाषेशिवाय इतर भाषा जाणणाऱ्यांसहि दिलेला मतदानाचा हक्क शेंवटल्या खेपेस काढून घेण्यांत आला. यामुळें फक्त मराठी भाषा जाणणारांच्या बाबतींत झालेला अक्षम्य अन्याय ना. व्यंकटेशराव देसाई यानीं एका प्रसंगीं कायदे कौंसिलांत मांडून सदरील कायद्यांत सुधारणा करण्याचें बिल पुढें आणलें होतें. तें येथें बिनहरकत पास झालें खरें पण वरिष्ठ मंजुरीसाठीं मध्यवर्ती सरकारांत गेल्यास वर्ष दीड वर्ष होत आलें, तरी अद्याप त्याची कांहींच बरी वाईट वासलात लागली नाहीं. असो. सध्या होणार होणार ह्मणून गाजत असलेल्या निवडणुका पोर्तुगीज भाषानिशांकडूनच होतील असें आजतरी धरून वागणें भाग आहे.

लोकसत्ताक राज्यपद्धतीच्या आणि अंतर्गत राजकारभाराच्या सनदेच्या आजपर्यंतच्या कालांत ज्या ज्या मुनिसिपालिट्यांचा कारभार लोकनियुक्त सभासदाकडून झाला त्यांच्याकडून लोकहिताचीं अशीं कोणतीं कामें झालीं हें पाहूं गेलें तर त्या बाबतींत पृच्छकाची निराशाच होणार आहे. आधीं आमच्या लोकांत मुनिसिपालिटींतील खुर्ची अडविणें ह्मणजे एक मानाची जागा मिळविणें आणि त्यांतहि अध्यक्ष होणें ह्मणजे जन्माचें सार्थक होणें या पलीकडे असणाऱ्या बहुमोलाच्या जबाबदारीची जाणीव नसते. व ती असली तर मुनिसिपालिट्यांत भरलेल्या हक्काचा सदुपयोग त्यांच्या हातून होऊन जनतेला बरेच नांव घेण्यासारखे फायदे मिळवून देतां आले असते. निवडणुकांपुरतेंच या सभासदांचें नांव लोकांना माहीत होत असतें. निवडणूक होऊन आलें नांव सभासदांच्या पटांत दाखल झालें ह्मणजे हे लोक कृतकृत्य होऊन केवळ हजेरीपुरतेच मुनिसिपल कचेरींत हजर होत असतात. मुनिसिपालिटी ह्मणजे काय, जनतेचा व तिचा तसेंच सरकारचा व तिचा काय संबंध आहे, तिच्या मार्फत जनतेच्या हिताचीं कार्यें होण्यासारखीं कोणतीं आहेत, अस्तित्वांत असलेल्या मुनिसिपाल कायद्यांतील कोणते कलमें कोणते अधिकार देत आहेत, कोणते का-

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2° oficio que este assina correm éditos de 30 dias, contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2° do art. 197 do Cod. do Proc. Civ. citando Babagi Deuli e Butó Essú Deuli, solteiros de Maina e ora ausentes em parte incerta do territorio Ingles, para em dez dias posteriores ao praso de editos, pagarem a Ramacrisna Ananta Narcornim, residente em Cusmane, a quantia de quatrocéntas e cinquenta rupias de que os citandos e outros se constituiram devedores solidarios de Babnó Vamona Sirvoicar, da dita de Cusmane, por escritura publica de 2 de Março de 1911 das notas do tabelião desta comarca Dolvi, tendo sido essa importancia no inventario prestado por obito do dito Babnó, aplicada a sua viuva Muctabai Sirvoicar e por esta cedida ao referido Narcornim, seus juros vencidos e registados como credito distincto desde 2 de Março de 1918 até igual data de 1923, os posteriores e os vincendos a razão de dez rupias por cada cento ao ano, pena de rupia diaria desde a citação até o integral pagamento de tudo quanto é devido, custas e mais responsabilidades constantes da citada escritura, sob pena de seguir a execução instaurada contra os ditos citandos e outros pelo nomeado Narcornim os ulteriores com penhora dos bens sobre que foi registada a hipoteca. Para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de Quepem, 9 de Outubro de 1924

O Escrivão de Direito
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

मणुकीसाठीं लिहिला असो; तो वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाला असल्यास, त्या दृष्टीनें वृत्तपत्रांचा वाङ्मयाभिवृद्धीस उपयोग होतोच होतो. तात्पर्य आपणांकडील वृत्तपत्रकार वाङ्मयाभिवृद्धीस पोषक असें वाङ्मय निर्माण करतील अशी मी आशा बाळगतों. यामुळें आपल्या इकडील राजकीय परिस्थितीची माहिती आमच्या तिकडे देतां येईल. ज्याप्रमाणें अर्वाचीन महाराष्ट्राचें गुरुत्व आरंभीं वर्णन केल्याप्रमाणें सारस्वत मंडळीकडेच आहे, त्याचप्रमाणें सारस्वतांचें मूलस्थान जें गोमांतक तें महाराष्ट्राला राजकीय, सामाजिक व धार्मिक बाबतींत गुरु होईल. शंकराचार्य, रामानुजाचार्य ही समुद्रपट्टीजवळच्याच प्रदेशांत जन्म पावून जगाचें गुरुत्व पावले ! त्याप्रमाणच या प्रिय गोमांतकांत लोकोत्तर वृत्तपत्रकार जन्मास यावा, अशी देवी सरस्वतीपाशीं माझी प्रार्थना आहे."

वर्तमानसार

—वेरें, फोंडा येथील अनंत विद्यालयांत श्री सरस्वत्युत्सव मोठ्या थाटानें साजरा झाला. विद्यार्थ्यांच्या सहामाही परीक्षा घेण्यांत आल्यावर कृष्णराव सामंत यांचें 'मुलांचें ध्येय' या विषयावर व्याख्यान झालें. वैकुंठ द. राव सरदेसाई यांचे अध्यक्षतेखाल लक्ष्मण श्री. राव सरदेसाई यांचेंहि 'मुलांचें शिक्षण' या विषयावर भाषण झालें. शिवाय कीर्तन, पुराण, मिरवणूक वगैरे कार्यक्रम वहारीनें पार पडला.

—डिचोलीच्या विद्यावर्धक मंडळाचा शारदोत्सव यशस्वी रीतीनें पार पडला. धार्मिक कार्यक्रमाप्रमाणेंच व्याख्यानमालाहि निर्विघ्नपणें तडीस गेली. यशवंत सूर्यराव देसाई यांचें रामराव मु. सरदेसाई यांच्या अध्यक्षतेखालीं 'पोर्तुगीज राजनीति' या विषयावर व्याख्यान होऊन अध्यक्ष व व्याख्याते यांखेरीज याच विषयावर विठ्ठलराव देसाई या मराठी गृहस्थांचें उपवक्त्या नात्यानें भाषण झालें. वे० शा० सं० रामचंद्र नाईक करंडे यानीं 'जुन्या उत्सवाचें स्वरूप' हा विषय उत्तम रीतीनें प्रतिपादन केला. उत्सवाच्या तिसऱ्या दिवशीं रिपोर्ट वाचन होऊन मंडळाच्या सेक्रेटरींची फेर निवडणूक झाली व त्याजागीं वा. ना. पालेकर हे नेमले गेले. संस्थेतर्फे मुंबईंत काम करण्यासाठीं रामराव मु. देसाई, अध्यक्ष, विठ्ठल सीताराम म्हांबरे, खजिनदार, व मधुकर हरि कारापूरकर, चिटणीस, या ग्रहस्थांची योजना करण्यांत आली.

—गेल्या नागपंचमीच्या सुमुहूर्तावर स्थापन झालेल्या पणजी येथील नवीन मराठी विद्यालयाचा प्रथम वार्षिक श्री शारदोत्सव एकसारखा ५ दिवस चालू होता. शिवा फटू पैआंगले यांचें प्रो० रामचंद्र शंकर नायक यांच्या अध्यक्षतेखालीं 'मुलांचें कर्तव्य' या विषयावर व्याख्यान झालें. सदर्हू शाळेसाठी कपड्यांचे व्यापारी घर्मा शेट कळंगूटकर यानीं आपल्या घराची माडी मोफत दिल्याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत.

जाहीर विनंति

भारत बंधु भगिनींनो, आपल्या गोमांतकांत अर्धी अधिक संख्या परधर्मियांची असल्यामुळें येथें गोरक्षण करतां येणार नाहीं असेंच बहुतेकाचें मत आहे. परंतु, जरी गोवधाच्या दृष्टीनें येथें गोरक्षण संस्था चालणें शक्य नसलें तरी, आईचें दूध मिळत नसलेल्या गरीब मुलांनां दूध फुकट मिळावें, जातिभेद न ठेवतां सर्वांस शुद्ध दुधाचा पुरवठा व्हावा व शेतीला चांगले बैल मिळावे या दृष्टीनें येथें गोवर्धन संस्था काढतां येण्यासारखी आहे, असें मला वाटल्यावरून कांहीं तरी पायाशुद्ध प्रयत्न करावा या हेतूनें मी ठाणें गोरक्षण ज्ञानप्रसारक संघाचें स्वयंसेवकत्व पत्करून समाजांत जागृति करण्यांकरितां पहिला प्रयत्न ह्मणून गोरक्षणांत संस्थेमार्फत जाहिरात देऊन व निबंधानां बक्षिसें ठेऊन 'हिंदुस्थानांत दिवसें दिवस होणारा गोधनाचा ऱ्हास व त्यापासून भोगावे लागणारे दुष्परिणाम व हिंदुधर्मांत गोमातेला अग्रस्थान देण्याचें कारण व तिचा उपयोग' असे दोन निबंध विजयादशमीची मुदत ठरून मागविले. निबंध बरेच आलेले आहेत त्यांतील उत्तम ठरलेले निबंध छापून पोस्टखर्चहि न घेतां अगदीं फुकट वांटावयाचे आहेत व पहिल्या निबंधाचें पोर्तुगीज भाषांतर करून तें आमच्या ख्रिस्ती बांधवांस फुकट वांटावयाचें आहे. अशा तऱ्हेनें गोरक्षण विषयक वाङ्मय अगदीं फुकट वांटावयाचें ह्मणजे किती धाडसाचें व खर्चाचे काम आहे हें आपणास सांगितलें पाहिजे असें नाहीं. आपलें सहाय्य मिळालें तरच तें तडीस जाणार आहे. तरी कार्याचें महत्व जाणून आपण आपल्या शक्तीप्रमाणे शक्य ती मदत खालील पत्त्यावर करावी अशी आपणांस सविनय प्रार्थना आहे.

मार्मुगांव–हार्बर ता. १८।१०।२४

गोविंद विनायक बरवे, स्वयंसेवक

ठाणें गोर० ज्ञानप्रसा० संघ

As avenças da receita e despesa anual. da comunidade de Cacorá irão á praça no dia 30 do corrente pelas 15 horas, no local das suas sessões. Aos 21 de Outubro de 1924

O escrivão da comunidade

Utoma P. Sindi Odarcar

ANUNCIOS

O Bharat, ano 9° n° 30 de 23de outubro de 1924

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.

Numero avulso 1 tanga

Pelo Juizo de Direiro da Comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2° oficio correm éditos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anúncio, nos termos do § 2° do artigo 197 do Cod. do Proc. Civ, citando Quensoa Moturem Zambaulicar, de Zambaulim, de Rivona e ora ausente em parte incerta da India Inglesa, para em dez dias posteriores ao referido praso de éditos, pagar á mesa administrativa do Pagode de Sri Deus Damodar de Zambaulim a quantia de seiscentas quarenta e quatro rupias, tres tangas e cinco reis e dezasete vinte e dois avos, proveniente de custas liquidadas a favor do mesmo Pagode nos autos de justificação de mera posse por este instaurada contra incertos e em que o dito citando e outros contestaram e para haver as quais foi instaurada a competente execução, alem de custas desta, ou nomear no mesmo praso bens suficientes á penhora para pagamento da mencionada importancia e o mais que acrescer, sob pena de ser devolvido este direito á dita exequente a mesa administrativa e seguir a execução os ulteriores. Para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de Quepem, 29 de Setembro de 1924.

O Escrivão de Direito

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito

A. A. de Brito e Nascimento

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2° oficio correm éditos de 30 dias, contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2° do art. 197 do Cod. do Proc Civ. citando Purxotoma Vitula Gonsai Ordas e mulher Loeximim, de Amonã e ora ausente em parte incerta de Belgaum do territorio Britanico, para uma habilitação activa deduzida por João Fernandes e mulher Sebastiana Fernandes de Mulem, de Parodá, por apenso aos autos de execução hipotecaria instaurada contra aqueles por Agostinho Fernandes, da dita de Mulem e pela qual pretendem os mesmos João e mulher habilitarem-se como unicos e universais herdeiros do seu filho o referido Agostinho e partes legitimas para com eles prosseguir nos ulteriores da referida execução, e para na 2a audiencia posterior ao praso de editos verem acusadas as citações e no praso de 3 audiencias imediatas contestarem querendo a mesma habilitação seguindo esta os ulteriores Declara-se que as audiencias deste juizo se fazem em todas as terças e sextas feiras nao sendo feriados porque neste caso se fazem nos dias imediatos não sendo tambem estes ou quando não estejam compreendidas nas ferias, no tribunal judicial situado em Xeldem ao lado da estrada nacional que de Quepem se dirige a Curchorem, por dez horas, para ser publico se expediu este. Xeldem da comarca de Quepem, 2 de outubro de 1924

O Escrivão de Direito

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito

A. A. de Brito e Nascimento

cultam por todos os meios a opiniao e o sentir geral para que nao fique nada a desejar.

A evoluçao social, como a biologica obedece a certas leis e que nao pode ser operada por um triz.

Ninguem preconisa a imutabilidade das leis, mas o que se quer e' que a sua reforma obedeça ao criterio seguido em todas as naçoes, o de aquilatar o grau de civilisaçao dos respectivos povos, para que a reforma em objecto nao va' desorganisar os seus institutos.

Na promulgaçao do Decreto de 1880, pelo modo como se ve seguir ai os principios diametralmente opostos aos usos e costumes de 1853 parece que nao obedeceu ao criterio sociologico, respeito aos direitos e sucessao das mulheres aos bens dos pais e maridos mas ao unico ideal de nivelamento das sociedades heterogeneas, inspirado nos chamados principios de justiça e equidade.

Objectar-se-ha talvez que o regime imposto pelo decreto de 16 de Dezembro de 1880 foi accito pela classe hindu', sem queixumes e entrou ja' nos seus habitos durante o periodo de quasi meio se'culo e por isso nao ha' necessidade de se retroceder.

Este argumento nao nos parece ser de grande importancia, porquanto quem conhece a psicologia da sociedade indiana e principalmente a dos hindus ha de concordar perfeitamente que os indianos nunca se impacientam por acolher as medidas por mais drasticas que sejam, uma vez que sejam elas dimanadas do Governo, custe o o que custar.

Nao se segue dai que o povo se julga feliz com a tal medida.

O regime matrimonial seguido actualmente entre os hindus e' o de comunhao por a lei declarar que "na falta de qualquer acordo ou conven. ' entende-se que o casamento e' segundo o regime de comunhao" de outros tipos como o de sim. munhao dos adquiridos, o de açao de bens, e o dotal, fixados a nossa legislaçao comum deixando ao arbitrio dos contraentes escolher qualquer destes ou ainda o misto de todos ou alguns deles ou o de afastar-se de todos completamente.

E se o hindu' esta' familiarisado com o regime matrimonial imposto pelo decreto de 1880, isto e', o constante na nossa legislaçao comum, como se explica a sua aversao por outros tipos alem do de comunhao ?

Porque e' que os hindu's nao aceitam indiferentemente, qualquer forma do casamento como os nossos irmaos cristaos apesar de seu contacto de seculos com esta classe ?

Nao se conclue dai que o hindu longe de estar familiarisado aos regimes matrimoniais indicados na legislaçao comum e impostos pelo Cit. Dec. de 1880, entra nos seus habitos inconscientemente uma das suas formas, a da comunhao ?

O paragrafo unico dart 12° e o art. 13° do projecto nestas condiçoes tem ainda a vantagem de activar entre os hindu's os contratos antenupcianes ate aqui nao acomodados a' sua indole e assim paulatinamente familiarisar-se a outras formas do matrimonio para saborear as suas delicias a' maneira dos nossos irmaos cristaos.

G. C. Guddó

ECOS & CRITICA

TANTAS VEZES O CANTARO...

Por determinaçao do Governo Geral esta'-se a proceder ao exame dos papeis e outros documentos, referentes a' gestao dos negocios municipais de Sanguem, sendo verificado, tambem o respectivo cofre municipal.

Um veriador da edilidade do referido concelho que pelo nome nao perca e que foi pelo *Bharat* estigmatisado com o igniminioso ferrete de *varredor* deixou, de criminosa e inconsciencioso combinaçao com os da sua baixa grei, desorganisados a administraçao e o serviço da Camara Municipal de Sanguem, cujos interesses prejudicou por varios modos aproveitando de todas as ocasioes em que, na ausencia do presidente efectivo, assumiu temporariamente as funcçoes deste.

Agora e' que vai desvendar se o misterio do *empenho* que o mesmo *varredor* traidor desenvolveu para se nao anular a lista em que figurava aceitando ate' contra vontade expressa dos seus colegas da veriaçao, condiçoes vergonhosas e infamantes.

Bajulou, intrigou, mendigou, choramingou e pedinchou para ter ingresso na Camara e alcançado o *triunfo*, começou, desde lago, a exercer a sua perniciosa acçao contra municipes desprotegidos e os proprios seus colegas e subordinados.

La' diz, porem, o ditado: *tantas vezes o cantaro vai a' fonte ate que la' fica.*

Sim. Vai se descerrar o veu e nao tardara' que sejam descobertos os criminosos, tanto da veriaçao presente como das transactas.

O *Bharat* fulminara' todos, sem do' nem piedade, mas com a consciencia na mao, porque se trata dum assunto que se relaciona como prestigio das instituiçoes municipais das Novas Conquistas!

Politiquice interesseira e egoista e coisa que sempre verberamos com a veemencia de que somos capazes, a bem do Paiz!

TAREFA BALDADA...

O engraçado director de *A Provincia*, todas as vezes que queira referir se ao *Bharat* serve-se da expressao o *do Rabicho*, com o proposito de procurar incomodar nos.

E', porem, tarefa baldada a do *homesinho arturisado*. Conhecendo se o autro donde tal *porcaria* brota, nao ha motivos para quem quere, julgar-se atingido. Nunca o coqueiro produziu ananazes!

E quem da' o que pode nao esta' obrigado a mais!

QUEM TORTO...

A Provincia referindo se a uma afirmaçao, referente a' civilisaçao hindu', feita no *Bharat* por um seu colaborador, diz coisas e loisas proprias de quem ignora a Historia e esta' afeito a fechar olhos a' evidencia.

Quem torto nasceu nunca se endireita...

VARRENDO...

Consta nos que a Camara de Sanguem pediu, telegraficamente, ao sr. Presidente da Republica, a conservaçao do sr. dr. Jaime de Morais no governo desta colonia.

Nem era de esperar outra coisa, da da ingerencia acrobatica do tal *varredor* no referido corpo administrativo, ora alvo de inqueritos, balanços e coisas semilhantes!

Ha' quem diga ate' que o tal telegrama seja um habil expediente para atabafar o movimento oficial que se esta' desenvolvendo em volta do mesmo corpo ... apodrecido

ESPEREM!...

O que se passa em redor do caso de Tilamola merece uma critica larga sobretudo pelo papel vergonhoso que o sr. Pe. Vigario de Quepem esta' desempenhado, de maos dadas a um jesuita de ruins propositos.

Esperem que la' iremos conversar!

CONGRESSO NACIONAL INDIANO

No proximo mez de Dezembro reune-se em Belgao o Congresso Nacional Indiano. Muitos hindus de Goa pretendem assistir a's suas sessoes que prometem revestir-se dum brilho desusado.

O preço de bilhete para expectadores e' de 3o rupias. Muitos filhos de Goa reclamaram contra esta exorbitancia. E pela marcha qua esta' se guindo a reclamaçao e' de esperar que se reduza ao razoavel o mesmo preço.

UM ENIGMA...DECIFRADO

O sr. J. da S. C. da *India Portuguesa*, na sua *Cronica Alegre*, descreve, com o seu fino estilo humoristico, um Timoteo.

Nao sabemos se os nossos leitores conhecem um tipo da laia do *modelo* do referido cronista. Vejam la': *Branco e', galinha o poe*. Quem sera' ?

Pedimos, porem, aos nossos leitores a *graça* de nao confundirem o *sujeito* a ser descoberto com o tal inclito varao que poz em conflagraçao toda uma povoaçao, toda uma aldea de Canvorem.

Olhem que e' uma prevençao que convem ser tomada em atençao !

JAGRA OU BACALHAU?

Diz-se por ai que um funcionario graudo vai sofrer um processo por ter descaminhado aos direitos alfandegarios tres comendas da Ordem de Cristo

Nao sabemos o que ha' de verdade neste *diz se*, mas a verificar-se o boato, muita gente sensata ha de embora tardiamente, perceber o alcance do gesto que o sr. Sales de Andrade teve, renunciando uma comenda igual. E' verdade. Numa terra onde as merces honorificas sao consideradas como qualquer mercadoria, mais vale nao as aceitar do que recebe las embrulhadas no despacho de importaçao como se fosse jagra de cana, ou postas de bacalhau.

वर्तमानसार

—येथें रहाणाऱ्या मुंसबीच्या पेन्शनरांच्या मागील पगाराची फेड करण्यासाठीं तेथील सरकारनें १॥ हजार पौंड येथील सरकारच्या हवालीं केले आहेत.

—गोव्यातर्फे निवडले गेलेले पोर्तुगीज पार्लमेंटचे सेनादोर डॉ॰ कोंस्तांतीनु सांतुस हे गोमांतकांत कांहीं दिवस राहून लिजबोअला परत गेले. त्यांच्या हातून श्रीमंत धेंपे यांनीं 'आस खुरीसा'चें दान घतलें. प्राजेरीस कोस्ताच्या अनुयांयाची कांही दिवस चंगळ उडाली होती.

—पोर्तुगालचें राजकीय वातावरण खळबळीनें भरलेलेंच आहे.

—श्री. सी. आर. दास यानीं खालील तार मॅक्डोनॉल्ड ह्यांना पाठविली आहे :— आह्मीं आपलें अभिष्ट चिंतितों. मजूर पक्षाचा जय झाला तरच खरी प्रगति आणि जगांतील शांतता ह्याबद्दल चळवळ करणाऱ्यांचा जय झाल्यासारखें होणार आहे.

—'अकाली' पत्राचे संपादक सरदार स्वारसिंग ह्यानां राजद्रोहाकरितां पकडलें आहे.

— प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें व इतर कांहीं कारणांमुळें लाला लजपतरांयांनीं पंजाब कॉंग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदाचा राजीनाम दिला आहे. हा राजीनामा कार्यकारी मंडळीपुढें ठेवण्यांत आला तेव्हां वार्षिक निवडणुकीकरितां लवकरच भरणाऱ्या प्रांतिक कांग्रस कमिटीच्या सर्व साधारण सभेपुढें तो ठेवण्याचें ठरलें. दिल्लीच्या ऐक्य परिषदेहून परत आल्यापासून लाला लजपतराय ह्यांना तार येत होता, परंतु त्यानां आतां तार येत नाहीं. तथापि खोकला त्यांना त्रास देतच असून त्यांना पुरशी झोंप लागत नाहीं.

—साष्टी ता. कांग्रेस कमिटीच्या विद्यमानें रविवार ता. २६ ते बुधवार ता. २९ पर्यंत दिपवाळीनिमित्त स्वयंसेवक खादी विक्री करणार असून स्त्रियांकरितां 'कोईबतुरी' पातळें मिळण्याची व्यवस्था केली आहे, असें सक्रटरी कळवितात.

—यापुढें सरकारी नोकरांस 'कार्देश एकोनोमिक' पोस्ताल' मधून 'तित्ल' दाखवून रुपये मिळण्याची व्यवस्था कली आहे. 'तित्ला'च्या रकमेचें ८० टक्के मिळतील. मात्र शेंकडा ७ टक्के प्रमाणें व्याज द्यावें लागेल.

—सध्याच्या गव्हर्नरांची आणखीं पांच वर्षे येथील मुदत वाढविण्यांत यावी अशा अर्थाची तार पोर्तुगाल सरकारला सांगें मुनिसिपालटीनें केली आहे ! 'विनाशकाले विपरीत बुद्धि' ह्मणतात ती यालाच ! !

स्फुट विचार

नवलविशेष तें काय आहे?:– मडगांवच्या मामलेदार साहेबानीं महात्माजींच्या छायाचित्र मिरवणूकीस केलेली हुकूमबंदी व त्यामुळें मडगांवकर मंडळीच्या अपुपम उत्साहावर पडलेल्या नैराश्याचें विरजण हा आजकाल सर्व सुविचारी व स्वाभिमानी पुरुषांची सारासार विचार शक्ति लोहचुंबकाप्रमाणें आपल्याकडे आकर्षण करून घेणारा एक विषय होऊन बसला आहे. मडगांवकर मंडळीच्या मिरवणूकीच्या कार्यक्रमावर आलेली ही हुकुमबंदीची धाड ह्मणजे अखिल गोमांतकाच्या सौजन्यपूर्ण स्वाभिमानावर कुठारप्रहारच होय. ह्या विषयावर विचार विनिमय करूं लागतांच प्रत्येक विचारवंताच्या डोळ्यांपुढें ब्रिटीश हिंदुस्थानचें दृश्य उभें रहातें व त्याची विचारशक्ति गोमांतक व ब्रिटीश हिंदुस्थान ह्यांची तुलना करण्यांतच गुंग होऊन जाते. पारतंत्र्याच्या काळ्याकुट्ट काळोखांत खिचपत पडलेल्या हिंदुस्थानाला देशद्रोही गणल्या जाणाऱ्या पुढाऱ्यांची खासगी सभा भरविण्यांस अडथळा केला जात नाहीं; दोन जन्म ठेपेची शिक्षा भोगीत सरकारचा पाहुणचार घेत असतां अधिकारी वर्गाकडून बंडखोर ह्या अपमानास्पद संज्ञेनें संबोधिल्या जाणाऱ्या व. विनायकराव सावरकरांची जाहीर मिरवणूक काढण्यास अधिकाऱ्यांची अरेरावी आडकाठी आड येऊं शकत नाहीं. पण स्वातंत्र्य, समता, व बंधुभाव ह्या सारख्या दृढतर आसन त्रयीवर अधिष्टित (?) झालेल्या लोकसत्ताक राज्यपद्धतिरूपी तेजोनिधि तरणीच्या कोमल किरणांचा मृदुल उउपभोग घेत असणाऱ्या आमच्या स्वतंत्र गोमातकाला मात्र अखिल धर्मीयांच्या ऐक्यदिन समारंभा दिवशीं महात्माजीच्या छायाचित्राची मिरवणूक काढून त्या वरील आलेलें प्रेम व्यक्त करण्यास हुकुमबंदीच्या भयानक भूतानें भेसडावावें व त्याचें कित्येकांस सखेदाश्चर्य वाटावें, यात नवल विशेष तें काय आहे ?

"वरहि वरायास पाहिजे समज":- पण त्यानीं जर ह्या विषयावर विचार करतांना आपली तात्विक दृष्टि जरा दूरवर फेंकिली असती तर त्यांस काय दिसलें असतें? केसरीचे सन्मान्य संपादक तात्यासाहेब केळकर ह्यानीं मागें मडगावांस आलेवेळीं गोमांतकीय स्वराज्याविषयीं बोलतांना त्यास दिलेली भाकरीची उपमा वरील लोकांच्या स्मरणांतून इतक्यांतच गेली असेल असें आह्मीं कसें अनुमान करावें ? कष्टाशिवाय गोमांतकास मिळालेली ही स्वायत्ततेची भाकरी कीं जी करिता आयर्लंडला आज १५० वर्षें रक्ताच्या नद्या वाहवाव्या लागल्या व ब्रिटीश हिंदुस्थानाला आज ४० वर्षें घामाच्या धारा गाळाव्या लागत आहेत. गोमांतकीयांस ती कोणत्या बाजूनें आधीं खावी ह्याविषयीं भुरळ पडली असल्यास आश्चर्य कोणतें ? पराक्रमाशिवाय मिळालेल्या बक्षिसाचें उट्टें अन्यायाशिवाय मरणानें काढलें जाणें ही तर आजकालची चाणाक्ष नीतीच होय! मग त्या पवित्रतम स्वायत्ततेचा उपयोग हक्कानें आमच्या सद्सद्विवेक बुद्धीच्या कलाकडे करून घेण्यांत आह्मांस आत्मविश्वास राहूं नये ह्याचा दोष कोणाच्या पदरीं बांधावयाचा ? अधिकार पदावर आरूढ झालेल्या मामलेदार बहाद्दरांच्या कीं मिरवणूकीचा कार्यक्रम बाईनें आंखणाऱ्या देशभक्तांच्या ?

व्यर्थ खटाटोपः— सत्तेचा मद कांहीं औरच असतो, ह्या गोष्टीची पुरी जाणीव मडगांवकर मिरवणूकवाल्या मंडळीस असतां त्यांनीं 'मज वे' ह्मणून मामलेदार साहेबांचा हुकूम मागून त्याकरितां त्या साहेब बहाद्दरांच्या पायांच्या धुळींवर आपलें मस्तक कां नमवावें ? व त्यांची कड घेऊन कांहीं कांनीं ब्रिटिश हिंदुस्थानच्या नोकरशाहीशीं आमच्या गोमांतकाच्या अधिकारी वर्गाची तुलना कां करावी ? स्वातंत्र्यावर घाला घालणाऱ्या ह्या सरकारी कृत्यांवर कडक टीका करून जनतेचें मत स्पष्ट करून न सांगतां त्यांनीं मुखदुर्बळता कां स्वीकारावी ? स्वतंत्र गोमांतकांतील सडेतोड वृत्तीच्या लोकांनांहि सरकारपक्षाच्या रोषाची भीति दिसावी ह्यावरून काय बरें निदर्शनास येतें ? ह्या त्यांच्या मतावरून असें सिद्ध होतें कीं, रिपब्लीक गोमांतकाच्या विचारशक्तीला जें वाटतें, स्वतंत्रतेचा उपभोग घेणाऱ्या गोमांतकीयांना जो आपला राखून ठेवलेला हक्क आहे असें वाटतें, तें त्याला आचरणांत आणणें शक्य वाटत नाहीं, नव्हे बोलूनहि दाखवितां येत नाहीं ! मग गोमांतकीय प्रजाजनानीं स्वदेश स्वातंत्र्याचे गोडवे गाण्यांत गुंगून जाणें हें मूर्खपणाचें कृत्य ठरविणें अर्थातच क्रमप्राप्त आहे.

ढळढळीत वैधव्य बरें !:— दोन वर्षांपूर्वीं पणजीच्या एका लिसेवांतील विद्यार्थ्यानें गांधी टोपी घातल्याबद्दल ऑट ऑफस्कूल (शाळेच्या बाहेर जाण्याची) जी भोगलेली शिक्षा व त्यामुळें पुढें झालेली भयंकर गडबड इतक्यांतच कोणत्या विचारी मनुष्याच्या स्मरणातून बुजून जाणें शक्य आहे ? त्यावेळीं विद्यार्थी वर्गानें सत्ता व मत्ता ह्या दोन्हीहि बाबतींत त्यांच्यापेक्षां फारच पुढें गेलेल्या प्रोफेसर वर्गावर मात करून आत्मिक बलाचा व दृढनिश्चयाचा जो लोकोत्तर धडा घालून दिला त्याचें तरी बीज काय ? ब्रिटीश हिंदुस्थानातील अधिकारी वर्ग जो प्रजेच्या तंत्राबाहेर होतां होईल तो जात नाहीं ह्याचें कारण काय? तेथील नोकरशाही कांहीं इतकी उदार नाहीं कीं लोककल्याणाकरितां तीनें स्वतःचा मानभावीपणा सोडावा; पण ती मागच्या ठेंचीची पूर्णपणें याद राखून आपला पुढील मार्ग आंखत असते. तो अधिकारी वर्ग जर जित देशाच्या प्रजेची कल्याणाची काळजी करण्याइतका कनवाळू असता तर नागपूरास झालेल्या राष्ट्रीय निशाणाच्या झगड्यांत असाधुसाधुनाजयेत्, ह्या महात्माजींच्या परमोच्च तत्वाचा पुरस्कार करणाऱ्या सत्याग्रहांवर उगारलेलें दडपशाहीचें शस्त्र शेवटीं त्या आत्मदानाकरतां सरसावलेल्या महाराष्ट्र वीरांच्याच पायांशीं ठेवून हिरमुसल्या तोंडानें 'क्षमस्व क्षमस्व' ह्मणण्याचा आत्मघातकी प्रसंग त्यांच्यावर केव्हांच आला नसता. ह्या सर्वांचा इत्यर्थ असाच कीं, ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रजेला आपले हक्क आत्मदानाच्या बळावर सक्तीनें बजावतां येतात. आणि ह्मणून राजतंत्रिक शासन पद्धतींत वागूनहि त्यांना स्वतःचे माणुसकीचे हक्क मिळण्यास प्रत्यवाय येत नाहीं; पण आमच्या गोमांतकीय प्रजाजनानां मिळालेले अधिकार हक्कानें चालवितां येत नाहींत ते नाहींच पण आमच्या राखून ठेवलेल्या हक्कांस प्रतिबंध कां? असा प्रश्नहि निर्भिडपणें अधिकारी वर्गास विचारतां येत नाहीं! हा गोमांतका ! अशा वेळीं मिळमिळीत सौभाग्यापेक्षां ढळढळीत वैधव्य बरें, असे शब्द तुझ्या तोंडांतून आल्यास नवल तें काय ?

बंगालांतील दडपशाही:– आपणाला एखाद्या महत्वाच्या कागदाची जरूरी असली ह्मणजे आपण त्या करिता सारें घर धुंडाळतों व शेवटीं बिनबोभाट कोपऱ्यांतील केराकडे किंवा टोपलींतील (waste paper basket) रद्दीकडे धांव घेतो, व केव्हां केव्हां त्या रद्दींत तो कागद मिळतोहि हें सर्व जाणतातच. स्वराज्य पक्षानें प्रांतिक कौन्सिलांत चोहींकडून अडवणूक केल्यानें बंगाल सरकारला स्वराज्यपक्षाचा चक्रव्युह भेदून स्वतःस पळवाट शोधून काढण्याकरितां मागील निरुपयोगी ठरलेली कायदेकानूची रद्दी वितकणें भाग पडल व त्यांत त्याला १८१८ सालच्या तिसऱ्या रेग्युलेशन ॲक्टचें मिळालेलें शस्त्र ह्या गराड्यातून मुक्त होण्यास त्यांना शक्त असें वाटलें. ह्या कायद्याचा टेकू मिळतांच हिंदुस्थानचे व्हाइसराय लॉर्ड रेडिंग साहेबानीं आपल्या जादा अधिकारावर एक ऑर्डिनन्स काढून बंगाल सरकारला ह्या अत्याचारास तोंड देण्याचे जादा अधिकार देऊन टाकीले. बंगाल मधील लोकांत क्रांतिकारक चळवळ जोरानें प्रसार पावत असल्याचा संशय येऊन व्हाइसरायानीं तन्निवारणार्थ बंगाल सरकारास अर्पण केलेल्या ह्या जादा अधिकाराचा प्रयोग मात्र श्री. बोस (कॉर्पोरेशन चे चीफ ऑफिसर) श्री. रॉय (कॉंग्रेस कमेटीचे चिटणीस) श्री. मित्र आदिकरून २७ स्वराज्यपक्षाच्या सभासदांवर करण्यांत येऊन स्वराज्यपक्षाचें कार्य ह्मणजेच "क्रांतिकारकांची जोरानें चाललेली चळवळ" असें सिद्ध केलें. गेल्याचा–निदान सकृत दर्शनीं तरी–संशय येतो. जन्मेजयाच्या सर्पयज्ञांत तक्षकाची आहुति होणार पडावी ह्मणून 'इंद्राय तक्षकाय स्वाहा' ह्मणण्याची पाळी तेथें हजर असलेल्या मुनीवर येऊन टपली होती असें ह्मणतात; पण बंगाल सरकारनें दडपशाहीच्या सत्रास स्वराज्य पक्षाच्या सभासदांच्या आहुति मिळाव्या ह्मणूनच क्रांतिकारक चळवळीचें थोंगडें स्वराज्य पक्षाच्या गळ्यांत अडकविलें जात असल्याचा संशय येतो. कदाचित् उद्यांच्या क्रांतिकारकांवर ह्या शस्त्राचा काय परिणाम होईल ह्याच अनुमान काढण्याकरिताच ही कायद्याची कुठार स्वराज्यपक्षाच्या वाढत्या वृक्षावर चालवून पहाण्याचा त्यांचा हा उपक्रम असेल. कांहींहि असो ! बंगालमध्यें सुरू केलेली ही दडपशाही 'विनाशकाले विपरीत बुद्धी'चें एक उदाहरण न ठरो ह्मणजे झालें ! स्थलसंकोचास्तव ह्या विषयावर आमचं विवरणात्मक विचार पुढील खेपेस राखून ठेवणें आह्मांस भाग आहे !

गोवेंकर बंधु भगिनींस विनंति

राष्ट्रीय शिक्षण देण्यासाठीं १८ मार्च १९२१ रोजीं नालवग येथें 'लोकमान्य शिक्षण संस्था' स्थापन करण्यांत आली. गेलीं तीन वर्षें शिक्षणदानाचें पवित्र कार्य संस्था करीत आली आहे. आमची संस्था केवळ लोकाश्रयावरच चालणारी आहे. संस्थेला निधि मिळविण्यासाठीं संस्थेचे प्रचारक श्री. कमलाकांत गोविंद दलाल हे येत्या दिवाळींत गोवें प्रांत फिरण्याकरितां येणार आहेत. तरी गोवेंप्रांतस्थ उदार बंधु–भगिनींनीं त्यांस यथाशक्ति मदत करावी अशी संस्थेतर्फे आमची सर्वांस विनंति आहे. संस्थेसंबंधीं सर्व माहिती श्री. दलाल यांचेकडील हस्तपत्रकांत पहावयास मिळेल.

लोकमान्य शिक्षण संस्था	श्रीपाद सदाशिव महाजन
नालवग,	'वाङ्मयय विशारद' टि. म.
तारीख	विद्यापीठ
२२-१०-१९२४	मुख्याध्यापक

—गेल्या ता. १४ रोजीं डिचोली येथील विद्यावर्धक मंडळाच्या श्री ता ा द् मराठी शाळेचा बक्षिस समारंभ, सांखळी मुनिसिपालटीचे लोकप्रिय अध्यक्ष डॉ० सखारामराव यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला.

—डिचोलीच्या हिंदु–युनियन क्लबाचे मेंबर व युरोपियन या उभयतां मध्यें एक फुटबॉलचा सामना होऊन त्यांत हिंदूंना जय मिळाला. हिंदूंचा हा विजय कित्येक हिंदु द्वेष्ट्यांस असह्य झाला!

—मुंबईतील एका धनिक व्यापाऱ्यानें डिचोलीच्या विद्यावर्धक मंडळास १०१ रुपयांची देणगी दिली.

—सध्याचे गव्हर्नर डॉ० जाइम द मोराइस हे "स्वस्थानाप्रत" निघण्याची तयारी करीत आहेत, असें एक बातमीदार कळवितात.

—येथील लक्ष्मीपूजनोत्सव मोठ्या थाटानें पार पडला. पुराण, कीर्तनाशिवाय प्रवचनेंहि झालीं.

—तेनेंत कोरोनेल शाव्हीस यांची आंगोलचे आलतकोमिसार या जागीं नेमणूक झाली आहे.

आमचा धर्म हेंच सांगतो कीं, ईश्वर हा सर्व भूतांतरात्मा असून, तो अव्यक्त, अनंत शाश्वत, अव्यय, विष्णु असा आहे. भगवद्गीतेंतहि "ना जायते म्रीयते वा कदाचिन नाभभूत्वा भरिता वा न भूम अजोनित्य पुराणं, नहन्यते हन्यमानेशरीरे" असें आत्म्याचें वर्णन केलें आहे. हें वर्णन भौतिकशास्त्रज्ञांनीं शोधून काढलेल्या एकच एक अशा इलेक्ट्रान या अत्यंत सूक्ष्मतर मूलतत्वासहि लागू पडतें. कारण हा इलेक्ट्रॉन अव्यक्त, शाश्वत इत्यादि गुण युक्तच आहे. तरी पण शास्त्रज्ञहि असें ह्मणत आहेत कीं, या इलेक्टॉनचे सर्व गुण अद्याप समजले नाहींत व पुढेंहि समजले जातील असेंहि वाटत नाहीं. याप्रमाणें हा इलेक्ट्रोन नेति नेति अशा स्वरूपाचा झाला. अशा प्रकारें जरी शास्त्रज्ञांनीं शोध लावले आहेत, तरी पण हा इलेक्ट्रॉन अशा स्वरूपाचा कां व्हावा, हें जगच निरनिराळ्या वस्तूंच्या संयोगासून किंवा इलेक्ट्रॉन या मूलतत्वापासून उत्पन्न कां व्हावें, याचें कारण त्यांनां सांगतां येत नाहीं व पुढेंहि सांगतां येणें शक्य नाहीं. त्यांच्या गतीची मर्यादा एका विशिष्ट बिंदुपर्यंतच आहे. बर्लीनमध्यें मागें एकदां मनुष्य जिवंत करण्याचा प्रयत्न करण्यांत आला. त्याच्या प्रयत्नाला यश येणें केव्हांच शक्य नव्हतें. कारण ते विद्युत्च्या योगानें मृत मनुष्यांत हालचाल उत्पन्न करतील, पण त्यांत आत्मा किंवा जाणीव शक्ति कोठून घालूं शकतील, हा एक प्रश्न आहे व त्याचा निकाल लागणारहि नाहीं. शास्त्रज्ञांनां कोणतीहि नवीन गोष्ट उत्पन्न करितां येत नाहीं. सर ऑलिव्हर लॉज हे प्रख्यात शास्त्रज्ञ सजीव व निर्जिव यांत भेद मानीत नाहींत. कारण सजीव पदार्थाप्रमाणें निर्जिवालासुद्धां विश्रांतीची गरज आहे. तात्पर्य या सर्व शास्त्रीय शोधांसहि अगम्य शोध असा या सर्वांच्या पलिकडे कर्ता करविता असा कोणी एक निराळाच आहे; तो शोध ल्यासाठीं आमचे प्राचीन आर्यऋषी सुद्धां प्रय न करते झाले. पण ज्या जगाच्या आदिस्थानाचा अद्याप शोध लागला नाहीं व पुढेंहि लागणार नाहीं, त्या आदितत्वाकडे जाण्याविषयीं प्रयत्न करण्यांत पहिला मान आमच्या आर्यऋषींचा आहे, व आदिभौतिक शास्त्रांत प्रगति करण्याचें श्रेय पाश्चिमात्य लोकांनां आहे. तरी आतां आह्मी आदिभौतिक शास्त्रें व अध्यात्मिक शास्त्रें हीं दोन्हीहि आत्मगत करुन वाढविलीं पाहिजेत. त्या शिवाय तरणोपाय नाहीं.

सद्यःस्थिति व त्यापासून बोध

रा. ब. खोपकर यांचे अध्यक्षतेखालीं दुसरे दिवशीं वरील विषयावर बोलण्यापूर्वी पुण्याचे कृष्णराव सखाराम मसुरेकर यांनीं आलेल्या पाहुण्याची ओळख करून देऊन झाल्यावर ते ह्मणालेः– गोपाळराव देवधर हे मलबारकडे जातांना मिशनसह इकडे येणार होते; त्यांजबरोबर नटराजन व यशोदाबाई भट ह्माहि येणार होत्या. पण कांहीं अडचणीमुळें येणें झालें नाहीं, त्यास नाईलाज आहे. तशा अर्थाचें त्यांचें मला पत्रहि आलें आहे. या श्रीसरस्वत्युत्सवाचे व्याख्यान मालेसंबंधानें मला आतां आपल्या मंडळीस एक प्रेमाची सूचना करावीशी वाटते व ती ही कीं, आतांपर्यंतचा संस्थेचा कार्याचा वृत्तांत पुस्तक रूपानें प्रसिद्ध करावा. कोणीहि स्नेही मनुष्य इकडे येणारे असतात. त्यांस आमचे जवळ माहिती देण्यास असलें लेखी साधन असल्यास ठीक होतें. हेच आमचे मित्र दा. शेट यंदे व खोपकर यांनीं या प्रांतांत येण्यापूर्वी संस्थेविषयीं माझ्याजवळ माहिती मागितली तेव्हां माझी फारच धांदल उडाली, कारण माझ्या जवळ लेखी साधनें फारशीं नव्हतीं; तरी इकडे तिकडे शोधून त्यांस उपलब्ध झालेले कागद पत्र पाठविले. त्याप्रमाणें आपल्या उत्सवांच्या दिवसांच्या सुमारास तिकडील मंडळीस फार फार कामें असल्यानें वक्ते जमविण्यास फारफार अडचण पडते; तरी महाराष्टीय व गोमांतकीय मंडळीच्या सल्ल्यानें या व्याख्यानमाला ठरविल्यास उभयपक्षीं सुखदायक होईल. यंदां महात्मा गांधींच्या उपवास व्रतामुळें, भरलेल्या ऐक्य परिषदेस खाडिलकर वगैरे मंडळी दिल्लीस गेल्यानें इकडे येण्यास कोणीच मिळेना. तरी या येथें हजर असलेल्या पंचायतनानें ती उणीव भरून काढिली या बद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच होणार आहेत. सद्यःस्थितीचें निरीक्षण केल्यास राष्ट्राराष्ट्रांत, समाजासमाजांत झगडे हे थोडे फार नेहमीं चालू असतातच. पण झगडे किंवा वाद हे सिव्हीलच ह्मणजे विधायक असावे, क्रिमिनल ह्मणजे विध्वंसक असूं नयेत. अशाच प्रकारें आपणांत चालू असणारे वाद हे सिव्हिलच असावे अशी माझी नम्रपणें प्रार्थना आहे. प्रत्येक ठिकाणीं दुही ही असतेच. पण निश्चयाचें बळ तुका ह्मणे तेंची फळ, या न्यायानें प्रयत्न करून, भेदभाव सारून, ध्येय ठरवा, व नंतर ध्येय साध्य करण्याचे मार्ग ठरवा. पण आपशांत भांडून ध्येयाचाच नाश करूं नका. मी आज ३५ वर्षें समाज सेवा करीत आहें. ती करीत असतां मला पुष्कळ बरे वाईट अनुभव आले. सत्कार्याला शेवटीं यश येतेंच येतें; मग तें लहान असो किंवा मोठें असो. मीं पांचशें रुपयांपासून हजारों रुपयांपर्यंत कामें केलीं आहेत; पण तीं सद्धेतुपूर्वक आरंभिलेलीं असल्यानें त्यांत यश आलें. कोणतेंहि कार्य तुह्मीं सद्धेतुपूर्वक आरंभा, त्यांत तुह्माला यश येईलच येईल.

आपणास सुदैवानें रिपब्लिक राज्य पद्धतीचा लाभ झाला आहे. त्याचा फायदा भरपूर घ्या. आमच्या तिकडील असहकारितावादी, स्वराज्य पक्षीय इत्यादि पक्षभेद तुमच्यांत नाहींत, हें एक उत्तम चिन्हच आहे. लोकानीं आपल्या मतानीं निवडलेल्या प्रतिनिधींच्या द्वारें चाललेलें जें राज्य तें लोकसत्ताक राज्य होय. तर तुह्मीं कोणत्याहि क्षुद्र फायद्यांकडे लक्ष देऊन मतदान देऊं नका. रयतेच्या हिताचीं कामें करील अशा लायक माणसालाच मतें द्या; त्याला मतेंच देऊन प्रतिनिधी केला असल्यानें त्यानें काय कामगिरी केली याची वारंवार तपासणी करा. आह्मी महाराष्टीयानीं तुमचें अनुकरण करावें, अशीच कृति करा. सर्वांचे हित होण्याकरितां ऐक्यानें राहाण्याची बुद्धि ही श्री सरस्वती देवी देवो अशी प्रार्थना करून मी आपली रजा घेतों.

गोरक्षण

केपें येथील 'बालोन्नति समाजा'तर्फे श्री सरस्वत्युत्सवांत ता. ६ रोजीं वरील विषयावर नारायण अ. ना. पाटणकर यांचें जें व्याख्यान झालें, त्याचा सारांश पुढील प्रमाणें आहे.

व्याख्याते ह्मणालेः– 'गोरक्षण' हा शब्द हिंदूंना नवीन तर नाहींच, पण तो इतका परिचयाचा आहे कीं, या शब्दाबरोबरच त्यानां गाईचा पवित्रपणा, तिचें पूज्यत्व व पाश्चात्यांची तिच्याबद्दल हिडीस कल्पना इत्यादि बरे वाईट विचार एकदम डोळ्यांसमोर राहतात. वैदिक कालापासून गाईबद्दल आमच्यांत पूज्यभाव आहेच. तर मग आतां 'गोरक्षणा'बद्दल चर्चा कां पाहिजे? असा प्रश्न साहजिक उत्पन्न होतो; पण याचें उत्तर फारस कठिण नाहीं. हल्लीच्या काळीं गाईबद्दल इतकी अनास्था व हृदयद्रावक स्थिति माजली आहे कीं, तिचें वर्णनहि आह्मांस करितां येणें कठीण आहे. व ही शोचनीय स्थिति दूर होऊन गाईबद्दल सदयवृत्ति उत्पन्न व्हावी हाच हेतु सद्यःकालीन 'गोरक्षण' च्या चर्चेच्या मुळाशीं असतो.

वैदिक कालीं गाईबद्दल फारच पूज्यबुद्धि होती हें प्रसिद्ध आहे. निघंटामध्यें 'गौः, ग्माः, ज्माः, क्षोणीः' इत्यादि पृथ्वीच्या नावांत 'गौ' (गाई) हेंच नांव अग्रीं दिलें आहे. रामकृष्णादि अवतार घेण्यासाठीं, पृथ्वी गाईच्या रूपानें विष्णूस शरण गली होती हेंहि प्रसिद्धच आहे. 'आयं गौः पृश्निरक्रमीदसदन्मातरं पुरः' ही ऋग्वेदोक्ति बरीच जुनी आहे. पुढें पुराणांतरीं तर गाईबद्दल —

'अग्रे ब्रह्मा गले विष्णुः पृष्ठे रुद्रः प्रजापतिः'

अशी दृढ श्रद्धा वाढत गेली व गोदान हें सर्वांत मुख्य दान गणलें गेलें. 'गोप्रसव' शांतीचें महत्व प्रचारांत आलें. प्राचीन काळीं अनेक धनाढ्य क्षत्रिय सहस्त्रशः गाई स्वर्णशृंगभूषित अशा दान देत. या बद्दल ठिकठिकाणीं उल्लेख आढळतात. प्रसिद्ध सूर्यवंशीय दिलिप राजा संतानप्रीत्यर्थ आपल्या वसिष्ट गुरूच्या धेनूची सेवा सामान्य माणसाप्रमाणें अहर्निश करीत असे. एका वेळीं तो धेनूच्या रक्षणार्थ प्रत्यक्ष प्राणाची आहुती देण्यास तयार झाला. रघुवंशांत कालिदासांनी

'अथ प्रजानामधिपः प्रभाते जाया
प्रतिग्रहित गंधमाल्याम ॥
वनाय पीत प्रतिबद्धवत्स यशोधनो
धेनुमृषेर्मुमोच ॥१॥

या प्रमाणें गाईच्या शुश्रुषेविषयीं राजाची दिनचर्या सांगितली आहे. इत्यादि इतिहास पहातां भारतीय आर्यांची गाईसंबंधीं पूज्य भावना किती होती तें कळून येतें. तर मग आतांच गोधनाची इतकी बेपर्वा कां झाली? शरीर हें सर्व कार्यास साधन असून त्यास पोषक असे दूध वगैरे पदार्थ हीच्याच पासून मिळतात, हें प्रत्यक्ष दिसतेंच. दूध हें इहलोकचें अमृत आहे असें महाभारतांत वर्णन आहे. पण गाईबद्दल पूज्यबुद्धि जाऊन युक्त उपयुक्ताबुद्धि आली व तिचा परिणाम सध्या गाईच्या नाशार्थे व कृषीकर्माच्या अवनतींत झाला आहे.

पाश्चात्य राष्टांनां तिच्या बद्दल कांहींच पूज्य भावना नाहीं. व त्याच दृष्टीनें आमचेहि डोळे सध्या दिपून गेल्यानें आमची मुळची स्वतंत्र बुद्धि लोपली व प्रत्येकाचे घरीं या भरतखंडांत एकतरी गाय यज्ञासाठीं, दुधासाठीं किंवा पवित्रतेकरितां असत होती, याचा आतां मागमूस नसून कसाईखान्यांत मात्र प्रत्यहीं हजारों गाई दिसतात ही अनुकंपनीय स्थिति नव्हे काय? जर पूर्व स्थिति मिळवून गाईची दैना वांचवावयाची असल तर, पारतंत्र्यांत राहूनहि गोरक्षण करितां येईल. मात्र स्वसंस्कृतीचा अभिमान पाहिजे. विद्वान असतील त्यानीं उपयुक्तता वादानें कां होईना, पण पाश्चात संस्कृतीच्या अभिमान्याना गाईचें महत्व पटवून द्यावें. जे कौन्सिलर असतील त्यांनी कौन्सिलांत 'गोरक्षण' बिल आणून त्या दिशेनें प्रयत्न करावा. व प्रत्येकनें गोमातेबद्दल प्रतिकुल व उदासीन भावना असणारांचें मन गोडीगुलाबीनें वळवून "गोरक्षण" हे शब्द सार्थ होतील असें करावें. शक्य असल त्यानी गोरक्षण संस्था काढाव्यात, या बद्दल व्याख्यानें द्यावीं, लेख लिहावेत. व निदान एका गाईचें तरी प्रत्येक आर्यपुत्रानें पालन पोषण केल्यास भौतिक व अध्यात्मिक अशीं उभय फलें मिळून शेंकडो कामधेनु कामनापरिपूर्तेसाठीं पालनकर्त्यांचें कल्याण इच्छितील, यांत शंका नाही.

—सांगें येथील मुनिसिपालटीच्या अनवस्थेचा वर्णनपर पत्रव्यवहार आह्मांकडे आला असून, त्याचा उपयोग भारत सवडीनुसार करणार आहेच. आतां इतकेंच सांगितलें ह्मणजे पुरे आहे कीं, सरकारी हुकुमान्वयें सदर 'कामा'च्या कागदपत्रांची तपासणी चालू असून, तिजोरीच्याहि किल्ल्या सरकारी तपासकांपाशीं गेल्या आहेत!

—सालाबादप्रमाणें यंदांहि "श्री सरस्वती विद्यालय" बोरी–फोंडा या संस्थेमार्फत श्री शारदोत्सव मोठ्या थाटानें पार पडला.

—सत्योन्नति समाज, वाणावली, श्रीपांडुरंग प्रासादिक विद्याभुवन, पणजी व दैवज्ञ समाज, ह्मापसें या संस्थांकडून लक्ष्मीपूजनोत्सवासाठीं आलेल्या निमंत्रणपत्रिकांबद्दल 'भारत' त्यांचा आभारी आहे. श्रीशांतादुर्गा वाचनमंदिराच्या १३ व्या वाढदिवसोत्सवाच्या आमंत्रणाबद्दलहि आह्मी आभार व्यक्त करितों.

O *Bharat* pensa, ainda, enviar para la' o seu *reporter* especial para *de visu* estudar o assunto e auscultar de perto a opiniao publica.

O CASO DE TILAMOLA

A noticia do comicio de Tilamola, como os leitores devem estar lembrados, nao saiu publicado no *Bharat* que circulou, logo depois da realisagao do mesmo. E' que o sr. Vigario da quela freguesia nos pedira que nenhuma referencia no jornal fizessemos sobre este malfadado assunto.

O sr. Vigario de Quepem, porem, entendeu, de combinagao com o seu *ai-Jesus*, o tal jesuita de figados podres, dever fazer espalhafato do caso nas regioes oficiais, fazendo cavalo de batalha da natural e lo'gica assistencia do nosso director ao mesmo comicio.

Eis a razao, por que saimos da nossa reserva e publicamos a noticia do comicio no numero subsequente e agora nao largaremos da mao o assunto, sem que justiga inteira se faga aos lesados.

Sim; nao descangaremos, sem que as autoridades eclesiasticas competentes defiram o justo pedido dos paroquianos da fregnesia de Tilamola. Podem disto estar certos todos aqueles que procuram pescar nas aguas turvas que correm em volta do caso que iremos elucidando.

E olhem que a demora em nada e' prejudicial!

BENGALA EM ... GALA!

O governo britanico de Bengala cangado de empregar todas as medidas gerais de repressao para apagar a *scentelha* de revolugao que ai ferve sob forma de associagoes secretas, tem-se munido, agora, de poderes especiais de *terror* para *refrescar* o fogo da mesma agitagao.

Pelos modos, aquele governo pretende apagar fogo com...fogo, represar agua com...agua e liquidar dispauterios com...dispauterios!

¿Conseguira', desta maneira, o fim politico que tem em mira?

Nao tardara' que o tempo no-lo diga, a breve trecho.

VICE-REI E O SEU SEQUITO

O finado Bruto da Costa deixou escrito um excelente livro historico sobre Goa. Neste livro, encontra-se registado um sinificativo capitulo sobre o "Vice rei e o seu sequito" cuja leitura recomendamos ao sr. dr. Jaime de Morais. E' um presente que fazemos a Sua Excia, "presente" dum "passado" que se confunde com o "presente". De mais a mais, a dadiva se relaciona com um ascendente da queles que o turibularam, incensaram e apoteusaram para conseguir o poleiro do Hospicio e satisfagao de suas algibeiras...Ei lo:

"O governador ou vice-rei era nomeado de tres em tres anos, com poderes absolutos dum autocrata; e o seu antecessor, ao passar-lhe o bastao dirigia um curto discurso dando instrugoes do modo como se devia haver tanto com os indios como com os portugueses, aos quais, dizia, e' mister pela sua arrogancia ter a redea tesa.

O seu vencimento eram 30 mil cruzados (rupias) por ano, mas em regra, no fim de tres anos, cada um se recolhia levando consigo um milhao, o que incomodava muito aos portuguezes e a outra gente da India que, a este proposito, contavam que havia um pobre a' porta duma igreja com as pernas cheias de chagas, nas quais pousavam as moscas em tal quantidade, que fazia grande compaixao, pelo que outro homem se chegou a ele e julgando que lhe aliviava, enxotou todas as moscas com o que o pobre paciente se agastou muito, dizendo que as moscas que ele enxotava ja' estavam fartas e o nao picavam, mas as que viessem de novo, famintas, o picariam muito mais: "Assim, acrescentavam eles, acontece com os vice-reis porque os fartos se vao embora, e vem os famintos."

Vivia o governador com luxo deslumbrante, e quando queria sair do palacio, fazia na vespera correr pregao, que trazia ao pe' do palacio todos os que tinham cavalo, montados nestes, ricamente vestidos, chegando o seu numero nao raras vezes a 300 para 400.

Tanto Pyrard como Diogo de Couto pintam com cores as mais feias a luxuria do geral dos governadores e a desmoralisagao escandalosa que ela trazia, porque nao se respeitava nem as condigoes nem as qualidades das pessoas a quem se ia desonrar.

Nao costumava o vice-rei ir a' casa alguma particular, e nas festividades ocupava o lugar a' direita do arcebispo.

Era contagioso o exemplo dos vice reis de acumular riquezas e de levar uma vida de devassidao, e raro seria encontrar um funcionario publico com limpeza de maos, e dai veiu o dizer-se que "fez a sua India" o magistrado que, vindo do reino, ajuntasse dinheiros por meios ilicitos.

Era epoca da mais franca corrupgao e imoralidade; e Afonso d'Albuquerque fora propeta quando, ao saber que lhe fora nomeado por sucessor um dos que, pelas suas malversagoes, fizera ele recolher ao reino, disse aos seus companheiros:

Apo's de no's virao outros que ganharao muito dinheiro nesta terra, onde no's tanto trabalhamos."

AJUSTANDO CONTAS...

¿Que fez a gente *ultramarina* no governo do sr. Morais?

A gente *ultramarina* entrou na graga do sr. dr. Jaime de Morais nao so' para rechear as suas algibeiras, mas tambem para exercer represalias, contra os seus adversarios.

Assim, no celebre caso de Canvorem que deixou redondamente en'alado o sr. Morais, a tal gente obrigou-o a expedir para la' uma forga de cem soldados por causa duma simples questao de propriedade, tendo talado desumanamente um canavial do volor de tres mil rupias por meio duma chicana que astutamente engendraram!

Pretenderam ainda expatriar o nosso director, procurando faser dele um *bolshevista*, um revolucionario!

Gente *ultramarina*! Nao conhece senao o estomago e mais o odio!!!

PARTIDO POPOLAR DE QUEPEM

A fim de se difinir a sua atitude nas proximas eleições de vogais do Conselho Legislativo o Partido Popular dêste concelho vai reunir-se no dia 15 do corrente pelas 16 horas no salão da Camara Municipal da sede, para o que se solicita assistencia de todos os correligionarios do referido agrupamento politico.

Aos 4 de Novembro de 1924

PELO CHEFE

Ananta Raiú Sirvoicar
Abilio de C. Souza
Rama B Gaunço Dessai

भारत

कार्तिक शु० १० मी शके १८४६

मुनिसिपल निवडणुका

पोर्तुगेज हिंदुस्थानांतील मुनिसिपालट्यां-कडून मागील एकमुखी अथवा प्रस्तुतच्या बहुमुखी राजसत्तेंत, लोकहितास जपून वागण्याविषयीं आजपर्यंत कसा चुकारपणा झाला त्याचें दिग्दर्शन गेल्याच्या मागील अंकांत केलेंच आहे. यापुढें तरी जनतेनें सावध राहून मुनिसिपल निवडणुकांचे वेळीं योग्य खबरदारी घेणें किती आवश्यक आहे व ती घेण्यास काय करणें शक्य आहे तसेंच मुनिसिपालटीच्या सभासदत्वासाठीं पुढें येणाऱ्या उमेदवारांना आपण निवडून आलों तर आपल्या हातून काय काय होण्यासारखें आहे याचें विवेचन करूं.

प्रथमत: पोर्तुगाल सरकारनें आह्मांस वसाहत या नात्यानें, अंतर्गत कारभार चालविण्याचा हक्क बहाल करण्याची जी सनद दिली, तींत मुनिसिपालट्या व जुंत लोकालें स्थापन करण्याविषयींचा हेतु दाखविला आहे तो विचारांत घेणें जरूर आहे. उक्त कायद्यांतील ४२ नंबरच्या कलमांत (Base n° 42) खालील प्रमाणें मजकूर आढळतो.

"जनतेला वसाहतींतील वरिष्ठ लोकनियुक्त संस्थाशीं सहकारित्व करण्याचें ज्ञान मिळावें, स्थानिक व्यवहारांत एकसूत्रीपणा राहावा व पांढरपेशा वर्गापासून इतर अनेक वर्गांचे हितसंबंध संरक्षण करतां येऊन त्यांची प्रगति करतां यावी. यासाठीं सर्व वसाहतींतील मुनिसिपल व लोकल संस्था उर्जितावस्थेस येण्याविषयीं पाहणें आहे."

या कलमांतील मजकूर वरवर पाहिला तरी देखील मुनिसिपालट्या व जुंत लोकालें यानां आपल्या वसाहतींतील वरिष्ठ लोकनियुक्त संस्था म्हणजे डिस्ट्रीक्ट कौन्सिलें, कायदे कौन्सिल व एक्झेकुतीव्ह कौन्सिल यांच्या कारभारावर दाब ठेवण्याचें सामर्थ्य किती दिलें गेलें आहे हें दिसून येईल. व यासाठींच तर त्यांची फार गरज आहे. नाहींतर जुने कर वसूल करावे, चालू खर्चांची भरपाई करावी, नवे खर्च अंगावर आले किंवा ओढवून घेतले तर नवीन करांच्या मान्यानें जनतेला पिळून काढून त्यांची तोंडमिळवणी करावी हींच जर या महालानिहाय दर गावांत स्थापन केलेल्या संस्थाचीं कामें असतीं तर त्या लोकनियुक्त करण्याचें सरकारासहि गरज नव्हती. ब्रिटिश हिंदुस्थानांतील आमचे देशबंधु या संस्थानां "स्थानिक स्वराज्य" या विशेष नामानें संबोधीत असतात आणि या संस्थाच्या मार्फतीनें अनेक लोकहितकारक कार्यें करीत असतात. तेथील लोकांनां अद्याप कुठें लोकनियुक्त अध्यक्ष कुठें लोकनियुक्त सभासदांचें संख्याधिक्य मिळण्याचा योग आला नाहीं; तरी, मिळेल त्यांतच आपलें बुद्धिसर्वस्व व शक्तिसर्वस्व खर्चून त्याचा उपयोग लोकहिताकडे व अधिक हक्क मिळविण्याकडे करण्याची ते जीवापाडे खटपट करीत आहेत. आणि आह्मी असलेल्या हक्कांकडे दुर्लक्ष करून दिवसेंदिवस अपात्रतेचा छाप मारून घेत आहों, यास कोण काय करणार? मुनिसिपालटीच्या किंवा जुंत लोकालाच्या सभासदत्वाची उमेदवारी करूं इच्छिणारांनीं आह्मीं वर दिलेल्या कलमाची ओळख करून घेऊन, मुनिसिपालट्यांत किंवा जुंत लोकालांत शिरून आपण काय करून दाखविणार याची माहिती मतदारांना करून दिली पाहिजे. नाहींतर मतदारानीं त्यांस त्याकामीं आधींच भाग पाडून त्यांच्या भावी कामगिरीचें वर्णन त्यांच्याच तोंडून काढून घेतलें पाहिजे. उमेदवार होऊं इच्छिणारांपैकीं फार थोड्यांनादेखील वरील कलमाची माहिती असेल कीं नाहीं याची शंकाच आहे. मुनिसिपालट्यांना स्वतःचा असा कारभार असतोच व तो व्यवस्थेशीर आणि लोकानां त्रासदायक होणार नाहीं, अशा रीतीनें चालवून दाखविणें यांत देखील बरेंच भूषण आहे. या कामांत तरबेज असून शिवाय विश्वासू व जनतेची पर्वा असणाऱ्या उमेदवारांचीच निवड होणें या कामीं इष्ट आहे. परंतु एकंदर जनता निदान आपल्या महालांतील जनता व सरकार यांमधील अनेक तऱ्हेच्या संबंधाकडे लक्ष पुरवून, प्रसंगीं त्यासंबधींचें आपलें स्पष्ट मत कळवून मुनिसिपालट्या म्हणजे स्थानिक लोकमत दर्शक संस्था होत, अशी त्यांची असलेली कीर्ति कायम राखण्यांसहि कारणीभूत होण्यासारखे गुण त्यांच्यांत असलेच पाहिजेत. सरकारी लहान मोठ्या, नव्या जुन्या कायद्यांचें ज्ञान, शेतकी, व्यापारादी समाजास आवश्यक असलेल्या धंद्याचें ज्ञान पापभीरुपणा, सचोटी, निर्भिडता, निःपक्षपातीपणा इत्यादि गुणाचा समुच्चय त्यांच्या ठिकाणीं असणें प्राप्त आहे. या गुणाशिवाय त्यांचें वजन सरकार, सरकारी अधिकारी, मु० खात्यांतील कामदार व जनता यांवर पडावयास पाहिजे तितकें पडणार नाहीं. जनतेंत मिळून मिसळून वागणें व जनतेच्या सुखदुःखांशीं समरस होणें हे अमुल्य गुण चार आठ दिवसांत मिळवितां येण्यासारखे नाहींत. त्यांची सिद्धि होण्यास बराच काळपर्यंत अभ्यास करणें भाग आहे. सध्याच्या काळांत ते अगदीं लुप्त झाल्यासारखे दिसतात. मुनिसिपल सभासद होऊं इच्छिणारांनीं आधीं या दोन गुणामुळेंच जनतेला आपली ओळख पटवून दिली पाहिजे. नुसतें मान मान्यतेच्या घराण्यांत जन्मास आलों, श्रीमंती थाटानें लोकांस भूल पाडिली किंवा वकील, डाक्टर सारख्या पदव्यानीं भूषित झालों, म्हणून मुनिसिपल खुर्ची अडविण्याची पात्रता आप-

ह्या शब्दाचा उपयोग लॉर्ड लिटन साहेबांना मात्र हिंदी लोकांचा गतगोष्टीबद्दल व माफी प्रकरणाविषयींहि सूड उगविण्यांत होणार आहे. क्रांतिकारक चळवळीस उत्तेजन देण्याच्या आरोपाखालीं पकडल्या जाणाऱ्या आरोपींचा तिघां न्यायनिपूण [नीति निपूण] कमिशनरांच्या देखरेखेखालीं होणार असून त्यांतील दोघे अनुभविक न्यायनिष्ठूर नेमले जाणार आहेत. आतां नेमण्यास घातलेले हे न्यायनिपूण न्यायाधिश इंग्लंडचा व आयर्लंडचा राजा पहिला चार्लस (Charles) ह्यानें स्वतःच्या इच्छेआड येणाऱ्या अपराध्यानां शिक्षा देण्याकरितां सुरू केलेल्या न्यायकचेरींतील न्यायाधिशाच्या पद्धतीवरच ' हो ' स ' हो ' देणारे निवडले जातात कीं काय तें पहावें; पण तोंपर्यंत बंगाल सरकार त्रें साप साप असें जाणून बुजून तोंडानें ह्मणत दोरी बडविण्याचें काम व पकडलेल्या विन अपराधी आरोपींस विन भाड्याच्या कोठडींत कोंबून ठेवण्याचा कार्यक्रम मात्र आंखीव मार्गानें चालूच रहाणार !

अविवेकः परमापदां पदम्:– क्रांतिकारकांच्या अनर्थावह चळवळींस बंगाल सरकाराच्या ह्या जादा अधिकाराच्या अनाठायीं उपयोगानें आळा बसेल असें आह्मांसच नव्हे पण सरकारच्या प्रत्येक बऱ्या वाईट कृत्याचें समर्थन करणाऱ्या कित्येक कसलेल्या आंग्लो इंडियनांसहि वाटत नाहीं. आज कित्येक वर्षे संशय – खात्रीलायक संशय – येत असूनहि देशाच्या शांततेस प्रतिबंध करणाऱ्या ह्या क्रांतिकारकांच्या उलाढालीचा सुगावा सुद्धां सुव्यवस्थेबद्दल नांवाजलेल्या ब्रिटिश अमलांतील डोळ्यांत तेल घालून वावरणाऱ्या पोलीसांस व हिंदुस्थानच्या उत्पन्नावर पोसून गलेलठ्ठ झालेल्या सी. आय. डी. खात्यांतील हुशार कामगारांनां अद्यापपर्यंत लागत नाहीं ह्या वरून हे चळवळे लोक कितीं अंगचोर आहेत व सरकारी अधिकाऱ्यांच्या हातावर तुरी देण्यांत किती वाकबगार आहेत हें सिद्ध होतच आहे व तें व्हाइसराय साहेबानांहि कबूल आहे, असें त्याच्याच पत्रकावरून वाटतें मग बंगाल सरकारनें सध्या आरंभिलेल्या धरपकडीचा जरब त्या लबाड क्रांतिकारकांवर कसा बसूं शकेल ? बंगाल सरकारच्या ह्या दडपशाही सत्राच्या बागुलबुवाला भिऊन जाण्याला तीं कांहीं अज्ञान बालकें नाहीत ! अतएव व्हाइसराय साहेबांचें हें कृत्य चुकीचें अर्थात् विपरीत परिणाम घडवून आणणारें ठरेल ! व त्याचा लोकसमाजावर घडणारा परिणाम हिंदी राष्ट्राला व परंपरेनें नोकरशाहीलाच भोगावा लागणार आहे. सत्ताधिकाऱ्यांच्या जादा अधिकारांच्या भस्मांतून निर्माण झालेला हा छोटेशाहीचा भस्मासूर पुढें मागें जन्मदात्या जनकावरच उलटून त्याच्याच मस्तकावर हात ठेवण्यास प्रवृत्त होणें व तेव्हां मात्र त्या भोळ्या सांबानें श्री विष्णूच्या मदतीची अपेक्षा करणें हे पुराणकालीन दृश्य प्रत्यक्ष अनुभवून पहाण्याचा हे जादा अधिकार उपयोगांत आणण्यांत तर व्हाइसराय साहेबांचा हेतु नाहीं ना ? पण व्हाइसराय साहेबांनी बंगाल सरकारास दिलेले जादा अधिकार फक्त ' टिकाऊ उपाय अमलांत आणण्या करितांच ' दिले आहेत. मग बंगाल सरकारास ही उभारलेली दडपशाही क्रांतिकारकांच्या काल्पनिक चळवळीवर कायमचें दडपण घालील असें वाटतें काय ? कायदे मनुष्यांचे जन्मतःच मिळणार स्वाभाविक हक्क आंखून देण्याकरितां केलेले असतात; मनुष्यें कायदे अमलांत आणण्याकरितांच उत्पन्न होत नाहींत. हें सर्व साधारण तत्व सुद्धां न समजण्याइतकें बंगाल सरकार दूधखुळें आहे काय? कीं ते टिकाऊ उपाय अमलांत आणले जाण्याची ' योग्य वेळ ' अजून येऊन ठेपली नाहीं ? आह्मास तर ह्या बाबतींत व्हाइसराय साहेबांच्या अंगावरील जबाबदारीच्या खबरदारीचा (precaution of responsibility) संशय येतो. कांहींहि असो. बंगाल सरकारची ही एकतंत्री राज्यव्यवस्था ब्रिटिश सरकारच्या महत्वपूर्ण तत्वाला – शांतता व सुव्यवस्था peace and order ह्यांना – बाध आणील हें निःसंशय आहे.

ANUNCIOS

TEMPLO DE CHONDRES VOR BUTNAT DE POR VOTO DE PARODA'

No dia 12 de novembro corrente, pelas 11 horas no lugar das sessões da mazania do dito pagode, serão arrematados em hasta publica, pelo maior lanço que fôr oferecido, os predios rusticos consistentes em cultura de arroz e coqueiros, sendo os de arroz por tempo de tres anos e os de coqueiros pelo tempo de nove anos. As condições estarão patentes no mesmo local com a meza gerente. Os arrematantes terão que adientar uma prestação da renda do inteiro ano, para o qual fôr ulmado o lanço dentro de tres dias.

Porvoto, 1 de novembro de 1924.

O escrivão
Crisna S. Rauto Dessai
Visto o presidente
R. B. G. Dessay

Pelo Juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do primeiro oficio Redcar correm editos de trinta dias a contar da segunda publicação deste no Boletim Oficial, citando o agravado Rodolfo Bartolemeu Noronha, de Cuncolim, ora ausente em Bombaim em parte incerta para no praso de dez dias findo o de'ditos pagar ao requerente João Rebelo, da dita de Cuncolim, a quantia de sessenta e tres rupias, seis tangas e nove reis, proveniente das custas liquidadas a favor do dito Rebelo, num agravo civil em que foi agravante o dito João Rebelo e agravado o citado Noronha, bem assim pagar as custas e selos acrescidos e por acrescer ou em igual praso de dez dias vir nomear bens á penhora sob pena de a execução seguir os seus termos á revelia. E para ser publico se expediu este.

Quepem, 30 de outubro de 1924

O escrivão de Direito do 1 º oficio.
Bubú V. Camotim Redcar
Verifiquei a exactidão
O Juiz de Direito,
A. A. de Brito e Nascimento

ECOS & CRITICA

DE VAGAR ...

Dos grandes tudo e' grande...ainda o disparate. Uma senhora hindu' de nobre estirpe requereu, segundo nos consta, divorcio com o seu marido na comarca de Salcete, acusando-o de factos que facilmente se nao acreditam.

Para no's, o tal divorcio, partindo donde parte, representa uma mancha negra no prestigio da mulher hindu' que disfrutou sempre a justa e gloriosa fama de estar habituada a considerar o seu marido como Deus, a despeito de seus erros e defeitos, prestigio que com a pretengao da referida senhora de nobre estirpe ficara' deveras abalado.

Na historia casta de mulheres hindu's temos exemplos de verdadeiro heroismo e duma abnegagao sem limites. ¿Que dirao agora os admiradores de castidade da mulher hindu', vendo que uma delas, oriunda, de mais a mais, duma familia reputada nobilissima, promoveu divorcio com o seu *senhor*, com a alma de sua alma? Simplesmente triste.

Nao e', porisso, de admirar que o acto da mesma senhora de nobre estirpe tenha produzido uma impressao desagradavel em todos os hindu's e ainda nos verdadeiros cristaos que dele tiveram conhecimento. Por inumeras cartas que estamos recebendo de todos os pontos do Paiz, podemos afirmar aqui, sem receio de desmentido, que a *novidade* fez lavrar uma pofunda indignagao em todas as cabegas que sabem pensar e em todos os peitos que sabem sentir.

O *Bharat* bem pouco se importaria com tal acto que, a' primeira vista, se afigura mais pessoal do que social; mas, como ele se persuade de que o mesmo acto nao pode deixar de produzir consequencias mais funestas a' sociedade do que a' pessoa, encontra-se na dura necessidade de abrange-lo no ambito de sua critica jornalistica.

Para o *Bharat*, o divorcio requeri do constitui, pois, um assunto para analise e critica, o que ira' fazendo em seus numeros sucessivos, procurando, deste modo, satisfazer ao mesmo tempo a uma justa exigencia da Opiniao Hindu'.

E' claro que tanto a analise como a critica do sensacional assunto, revestir se hao dum criterio impessoal, portanto,estructuralmente doutrinario'

Apressamo-nos a definir a nossa atitude no presente divorcio requerido pela dita senhora de nobre estirpe, para evitar equivocos...tendenciosos.

E, depois, de vagar se vai ao longe.

UM AVISO AMIGAVEL

O *Ultramar* de Margao, jornal que foi do finado Bruto da Costa, autor do livro *Goa* donde trasladamos para o nosso jornal o seu capitulo = *Vice rei e o seu sequito* = defende a *outrance* ao seu protector sr. dr. Jaime de Morais, inventando argumentos de se lhes tirar o chapeu, argumentos que pesam dez mil arrobas no prato da balanga estomacal ..., emblema sem piterno da politiquice daquela folha cuja atitude, porisso, nao estranhou a ninguem.

¿Mas, entao, em que ficou a *virtude*, igualmente vetusta, daquele bi se manario, de voltar costas ao *sol poente*, depois de preenchido o seu estomago e persuadido de que o mesmo *sol* nao pode proporcionar-lhe mais benesses? Contestar-se ha.

Essa contestagao, estribada em dados historicos nao procede, porem, no caso presente; visto que o *Ultramar* nao contando com a protecgao escandalosa do *sol nascente* e nao querendo perder a vatanjosa amisade do sr dr. .. orais, a qual a gente ultramarina deseja, ainda, explorar em Portugal onde, tambem, pretende a seu modo ter *costas quentes*, como iamos dizendo, o *Ultramar* continua turibulando, incensando e apoteusando o sr. dr. Morais, arvorando-se em orgao de Sua Excia e...do *Salam tipicamente oriental.*

Um paiz onde ha aventureiros da laia dos politiqueiros *ultramarinos* nao prospera:retrcgrada,recua e avilta

Aos que ardem em desejos de ver progredida a nossa Patria, impende o dever de trabalharem pela estirpagao daquela politiquice abominavel e abjecta.

E' um aviso amigavel.

AOS COMPETENTES

Temos tribunais judiciais, administragoes concelhiais e comandos de policia. A lei regula e define atribuigoes de cada uma destas autoridades judiciais, administrativas e policiais.

Assim, o poder judicial conhece e decide assuntos atinentes a' propriedade e a' cobranga de dividas; o poder administrativo exerce funcgoes administrativas; e o poder policial mantem a ordem publica. A esfera de acgao de cada poder e', legalmente, distincta e diversa da dos outros.

Infelizmente, porem, nem sempre se respeita tudo isso na pratica, tendo havido casos de verdadeiros abusos do poder como ainda os ha.

Ora, esses abusos redundam em prejuiso dos cidadaos, periclitando-lhes os direitos que a Constituigao da Republica lhes confere.

Para o leitor fazer uma idea nitida do que acabamos de dizer, iremos exemplificando a tese com informes positivos, mas oportunamente.

No entretanto esperamos que, excepgao feita do poder judicial que — honra lhe seja — nao ultrapassa a meta de suas funcgoes, os restantes dois *poderes*, o administrativo e o policial difinirao bem as suas atribuigoes nunca arrogando para si as que pertengam ao referido poder judicial, como sucede em algumas partes em detrimento da lei e da seguranga pessoal e *predial.*

Faga cada um o que a lei lhe manda, nao procurando intrometer se nos assuntos em que e' defeso meter o dedo. E' nisto que reside o segredo da ordem publica e da tranquilidade geral.

मुनिसिपल निवडणुका

साधारण लिहिण्या वाचण्यापुरतें राजभाषेचें ज्ञान असलें ह्मणून कायद्यांचीं मर्मे समजत नसतात. त्या साठीं त्या भाषेचें उत्तम ज्ञान असणें जरूर आहे. सरकारी अवकृपेमुळें नवीन काबिजादींत पोर्तुगीज प्राथमिक शिक्षणाची-सुद्धां असावी तशी सोय नाहीं. मग उत्तम भाषाभिज्ञ लोकांना कसें होतां येईल? जुन्या काबिजादींत जरी थोडी बहुत सोय असली तरी देखील ती अपुरीच आहे. परंतु या भागांतील शिक्षण विषयक जबाबदारी उचलण्यास लायक अशा ग्रामसंस्था, देवस्थानें वगैरे सारख्या संस्था आहेत. त्या सर्व खिस्ती लोकांच्या हातांत असल्या मुळें देशी भाषेस उत्तेजन देण्याचें राहोच, राजभाषेचें ज्ञान लोकांना करून देण्याचें काम सुद्धां त्यांकडून सारखें होत नाहीं. या मुळें पोर्तुगीज भाषेच्या ज्ञानांत तोहि भाग मागसलेला आहे तो आहेच. आगतस्वागतादाखल चार शब्द बोलणें, देण्याघेण्यासंबंधीं चार शब्द लिहिणें, पोर्तुगीज, ल्याटीन या भाषांतून असलेलीं खिस्ती प्रार्थना गीतें ह्मणणें आणि हातांत एखादें पोर्तुगीज भाषेंत प्रसिद्ध होणारें वर्तमानपत्र घेऊन तें उलटून सुलटून वाचून त्यांतील जनन मरणाच्या, विवाहसंबंधाच्या आणि श्राद्ध तिथीनिमित्त इगर्जींतून मीस दिल्याच्या हकीकती वाचून त्या अज्ञ लोकांस सांगणें, हें कांहीं भाषाज्ञानाचें लक्षण नव्हे. असो. सरकारी कायदे देशी भाषेंत तयार करून जनतेस त्यांचें ज्ञान करून देणें हें मुनिसिपालट्यांचें एक कर्तव्य आहे हें थोड्याशा विचाराअंती कळून येईल.

सरकार, पोर्तुगीज भाषेशिवाय इतर भाषांस अराष्ट्रीय समजत असल्यामुळें, देशी भाषांस प्रोत्साहन देणें ह्मणजे आपणावर अराष्ट्रीयत्वाचा छाप मारून घेऊन सरकारी रोषास पात्र होण्याची भीति कोणासहि होण्याचा संभव आहे. परंतु त्यांत ह्मणण्या सारखें तथ्य नाहीं. कारण, एक तर सरकार देशी भाषेची आपल्या राज्यकारभारात मदत हवी आहे ह्मणून बराच काळपासून थोड्या मराठीच्या शाळा स्वतःच्या खर्चानें चालवीत असतें; त्यांतील शिक्षणक्रम लोकांची जिज्ञासा भागविण्यास निखालस उपयोगी नसल्यानें त्या असून नसून सारख्याच झाल्या आहेत ही गोष्ट वेगळी. आणि दुसरें, आपल्या कायद्यांचें ज्ञान लोकांना सुलभ तऱ्हेनें व्हावें ह्मणून त्यांचीं भाषांतरें सरकारनें मराठींतून प्रसिद्ध केलेलीं आढळून येतात. हल्लीं या पद्धतींत खंड पडलेला दिसत असला तरी वैद्यकीय खात्यांचीं रोगनिवारक माहिती दिलेलीं पत्रकें, जंगल व जमीन मोजणीखात्याच्या जाहिराती, मराठींतून स्वतंत्र व सरकारी बुलेतींवर प्रसिद्ध झालेल्या अद्यापहि दिसतात. त्याचेंच अनुकरण मुनिसिपालट्यांनीं केलें व सरकारला पूर्वींचेंच धोरण कायम राखण्यांस कायदेशीर रीतीनें चेतविलें अथवा भाग पाडिलें तर त्यांत वावगें तें काय होईल? देशी भाषा ही जन्म भाषा असल्यानें तिला प्रोत्साहन देऊन तिच्या मध्यस्थीनें सर्व तऱ्हेची माहिती करून देणें हें जनतेला सुलभ व थोड्या खर्चानें होईल. शिवाय तो तिचा हक्क आहे. आणि हा बजावण्यास मुनिसिपालट्यांसारख्या, लोकसत्ताक राज्यांतील लोकनियुक्त संस्थांनीं पुढें येऊं नये तर कोणी यावें. येथील सरकार नांवाला हिंदुस्थान सरकार ह्मणवीत असलें तरी त्याचा कारभार परदेशी लोकांच्या व परदेशी लोकांत मुरलेल्या बाटग्या लोकांच्या तंत्रानेंच चालत असतो. त्यामुळें देशी परिस्थितीकडे पाहण्याचें कोणासहि अगत्य नसतें. आमच्या मुनिसिपालट्यांनीं, विशेषतः देशी परिस्थिति ओळखण्याचें सामर्थ्य निदान जाणीव असलेल्या नवीन काबिजादींतील मुनिसिपालट्यांनीं, एकीनें किंवा संगनमतानें, सरकारी दृष्टीपुढें आमच्या गरजा नेऊन ठेवल्या तर त्यांवरून आपली नजर काढून त्यांची हेटाळणी करण्याचें कारण सरकारास लागणार नाहीं. याची ओळख मुन्सिपल सभासद होऊं इच्छिणाऱ्यांनीं ठेवावी.

आजचें पोर्तुगीज सदर

अग्रलेखः—

व्हास्कु दा गाम व भारत; गामाचा पोर्तुगालनें स्तुतिपाठ गाणें योग्य असलें, तरी गोमांतकांतील जित लोक आपल्या पुरातन शत्रूची स्मरण धूळ मस्तकीं धारण करतील, असें संभवत नाहीं.

लेख दुसरा.

पणजीची पाठशाळा व मर्दानी खेळ; या विषयाचें सोपपत्तिक विवेचन.

स्फुट विचारः—

एक बटस्फोटाचा खटला व त्याविषयीं लोकमत; राजकारणापेक्षां पोटकारणाकडे जास्ती कल कोणाचा आहे?; पोलीस व इतर अधिकाऱ्यांचें कार्यक्षेत्र.

बालोन्नति समाज, केपें.

(चवथा वाढदिवस)

येत्या १८ ता. रोजीं संध्याकाळीं ७ वाजतां उपरोक्त समाजाच्या दिवाणखान्यांत संस्थेचा चवथा वाढदिवस समारंभ साजरा होणार असून त्या प्रसंगीं अनेक विषयावर अनेक वक्त्यांचीं भाषणें होतील. शिक्षणाभिमानी लोकांनां सदरहू समारंभास हजर राहण्याविषयीं नम्र विनंति आहे.

ता. ९ माहे नव्हेंबर सन १९२४.

सेक्रेटरी

श्रीपाद नी. भेंडे

चीच कडी व बोलाचाच भात करीत स्वराज्य पक्षाशीं विनाकारण भांडत बसलेला नाफेरवाल्यांचा पडदानशीन कार्यक्रमास कंटाळून महात्माजीहि कॉंग्रेसचीं द्वारें सर्व पक्षीय प्रतिनिधींस खुलीं ठेवणार आहेत. कॉंग्रेस ह्मणजे खादी सभा बनविण्याची महात्माजीची हांव आतां पार वितळून गेली असून स्वराज्य पक्षानेंहि ह्यापुढें त्यांच्याशीं उद्दामपणानें वागून स्वतःच्या शहाणपणाचा टेंभा मिरविण्याचें सोडून दिलें आहे. आज जवळ जवळ सोळा वर्षांच्या एकलकोंडेपणानें वागून विलायतेत स्वतःस अवहेलनेस पात्र करून घेतल्याचा विझंट मावशीला पश्चाताप होत असून शुद्धता मिळविण्याकरितां तीनें राष्ट्रीय सभेचे पाय धरण्याचें निश्चित केलें आहे. एकूण हिंदुस्थानांतील सर्व पक्षांचे पुढारी आतां एकीस हपापले असून बेळगांव कॉंग्रेसमध्यें एकी घडवून आणण्याचा कसून प्रयत्न प्रत्येकाकडून होणार आहे. गोमांतक हा हिंदुस्थानाचाच एक छोटासा भाग असून हिंदुस्थानाच्या राजकीय उन्नतीवरच गोमांतकाची ही उन्नति अवलंबून आहे, हें तत्व आतां बहुतेकास पटत आल्यानें त्यानांहि ह्या राष्ट्रीय सभेविषयीं साहजिकच आपलेपणा वाटत आहे. ह्या सर्व गोष्टींवरून येत्या कॉंग्रेसमध्यें राष्ट्राभिमानापुढें फाजील पक्षाभिमान फिका पडून अखिल हिंदुस्थानाची एकी होईल असें अनुमान निघत आहे. पहावें ! घोडा मैदान जवळच आहे !

व्हास्कु दा गांम :– येत्या डिसेंबर महिन्याच्या २४ तारखेला या नररत्नानें पोर्तुगाल राष्ट्रावर केलेल्या अनंत उपकारांचें ऋण फेडण्याच्या सदिच्छेनें मोठा राष्ट्रीय उत्सव साजरा करण्याचें ठरलें असून तन्निमित्त सरकाररीत्या एक लट्ट कमिशनहि नेमलें गेलें आहे. व्हास्कु दा गामानें पोर्तुगाल देशाची कीर्ति वाढविली असेल; त्यानीं आपल्या पराक्रमी बांधवांची स्वपराक्रमानें पोळी पिकविली असेल; आपल्या मनगटाच्या जोरावर पोर्तुगालची संपत्ति फुगविली असेल; व या सर्व गोष्टीमुळें ज्यांच्यासाटीं त्यानीं आपला बहुमोल जीव धोक्यांत घातला व प्रसंगीं प्राणाचीहि पर्वा न बाळगितां मरेपर्यंत झिजला, त्या सर्वांनीं व्हास्कु दा गामाचे गोडवे गावेत व त्यांच्या अमित उपकाराचें ऋण फेडण्यास प्रवृत्त व्हावें, हें योग्यच आहे. पण आमच्यासारख्या जित लोकानीं कीं, ज्यांचें स्वातंत्र्य उपरोक्त परकीय वीराकडून निर्दयपणें लुबाडलें गेलें, ज्यांच्या पवित्र धर्मांची व धर्मग्रंथांची राखरांगोळी केली गेली व, शेवटीं, ज्यांची न्यायसिद्ध स्थावरजंगम मिळकत हरामपणें चिरडली गेली, त्यांनीं होऊं घातलेल्या गामाच्या श्राद्धोत्सवांत भाग घेतलेला कोणत्या स्वाभिमानी गोमांतकीयास सयुक्तिक वाटेल ? ह्मणून गोमांतकीय स्वाभिमानी हिंदु व हिंदेतर जनता सदरहू उत्सवांत भाग घेतील, असें आह्मांस वाटत नाहीं. भारत तर गामाचा उघड उघड द्वेष्टाच ठरला असल्यानें, त्याच्या उत्सवापासून तो दोन पावलें मागेंच रखडेल, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

वृथा वल्गनाः– कोंसेल्य लेजिस्लातीव्हाच्या एका बैठकींत मावळत्या गव्हर्नर साहेबानीं आपल्या कारकीर्दीचा तोंडहिशेब देतानां असें दडपून दिलें कीं, त्यांच्या अमदानींत उधळपट्टीनें हलाख बनलेल्या गोमांतकीय तिजोरीच्या बजेटांत कित्येक लाखांची भर घातली गेली. नुसत्या फुशारकीशिवाय या विधानांत दुसरा कोणताच अर्थ भरलेला नाहीं, हें सिद्ध करण्यास बुद्धीला ताण देण्याचें कारण नाहीं. असह्य करवृद्धि व नोकरशाहीच्या पगाराची भयंकर ओढाताण, या त्यांच्या अमदानींतील स्मृतिपटलावरून कधींहि पुसून न जाणाऱ्या दोन प्रसंगांची थोडीशी आठवण केली कीं पुरे. ह्मणे कित्येक लाखांची भर घातली गेली ! या वृथा वल्गनेची लटकी व नाटकी आढ्यता मिरवितांना मोराइस साहेब खास भ्रमितचित्त झाले असले पाहिजेत. असें नसतें तर, त्यांच्या 'तोंडांतून गोमांतकीय तिजोरीच्या बजेटांत कित्येक लाखांची भर घातली गेली' या सपशेल असत्य विधानांऐवजीं 'माझ्या तिजोरींत कित्येक लाखांची भर घातली गेली' असे सत्य व सरळ उद्गार निघाले असते. पण येथील सत्तेच्या पोळ्यांतील मध अप्रतिबंधपणें आणखी पांच वर्षें लुटण्यास मिळावा या दिशेनें लढविलेले सर्व डावपेंच लुले पडून, अखेर गोव्याला शेवटचा राम राम ठोकल्याशिवाय गत्यंतर नाहीं, अशी खात्री झाल्यावर कोणत्या स्वार्थसाधु अमलदाराचीबुद्धि स्थानभ्रष्ट झाल्याखेरीज राहील? व अशीच स्थिति मावळत्या प्रांताधिकाऱ्यांची झाल्यानें वरील तऱ्हेची वृथा व वमनतुल्य वल्गना त्यांच्याकडून केली गेली, तर त्यांत विशेषसें आश्चर्य नाहीं !

ANUNCIOS

Pelo Juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do primeiro oficie Redcar correm editos de trinta dias a contar da segunda publicação deste no Boletim Oficial, citando o agravado Rodolfo Bartolemeu Noronha, de Cuncolim, ora ausente em Bombaim em parte incerta para no praso de dez dias findo o de'ditos pagar ao requerente João Rebelo, da dita de Cuncolim, a quantia de sessenta e tres rupias, seis tangas e nove reis proveniente das custas liquidadas a favor do dito Rebelo num agravo civil em que foi agravante o dito João Rebelo e agravado o citado Noronha' bem assim pagar as custas e selos acrescidos e por acrescer ou em igual praso de dez dias vir nomear bens á penhora sob pena de a execução seguir os seus termos á revelia. E para ser publico se expediu este.

Quepem, 30 de outubro de 1924

O escrivão de Direito do 1 o oficio.

Bubú V. Camotim Redcar

Verifiquei a exactidão

O Juiz de Direito,

A. A. de Brito e Nascimento

रिंगणी सरवत

(SYRUP SOLANUM COMPOUND)

रिंगणी, अडुळसा, डोरींमुळ, पिंपळी, जेष्टमध इ. वनस्पतींपासून हें सरवत वनविलें आहे. हें घेण्यास गोड आहे. जुनाट खोकला, दमा व श्वास यांवर हें अत्यंत गुणकारी आहे. फुफ्फुसाच्या कोणत्याहि विकारांत याचा चांगला उपयोग होतो. छातींत दुखणें, कफांतून रक्त पडणें, क्षयांतील खोकला-ढास लागणें, फुफ्फुस दाह, श्वासनलिकादाह, मुलांचा डांग्याखोकला, आंकडी इ० विकारांवर हें गुणकारी आहे. यानें चिकट कफ पातळ होऊन तो त्रासाशिवाय बाहेर पडतो. आठ औंस (२० तोळे) बाटलीस किंमत ३॥ रुपये ट. ख. निराळा.

अडुळसा सरवत— (SYRUP ADHAT TODAVASAKA) हें सरवत अडुळशाचे ताज्या पानापासून वनविलें आहे. कमी जोराचा व साधा खोकला, दमा पडणें, येणें, जवरदस्त सर्दी इ० विकारांवर हें गुणकारी आहे. चार औंस बा. १ रुपया.

इतर औषधांचे माहिती करितां क्यॅटलाग मागवा.
आमचेकडे सर्व प्रकारचीं आयुर्वेदिक औषधें मिळतात.

धी इंडियन मेडिकल फार्मसी, बुधवार पेठ, पुणें शहर.

व्होदीन

जुनाट संधिवात, मस्तक शूळ, कपाळ दुखणें या व्याधींवर उत्तम फ्रेंच औषध 'व्होदीन'च्या १|२ वड्यांनीं खात्रीनें गुण येतो. तसेंच थंडी वाजणें, इंफ्लुयंझा, संधीज्वर (टायफड) व साधारणपणें सर्व जंतुत्पादक तापांवर या औषधाचा फारच उपयोग होतो. २० वड्या असलेल्या बाटलीची किंमत फक्त दहा आणे.

मिळण्याचीं ठिकाणें

पणजी— द्रोगारी–फार्मसी आझावेद. द्रोगारी आर्यन. | फार्मसी गास्पार आलेमांव, फोंडें. | हिंदु फार्मसी, पणजी.

लुझो इंदियान दवाखाना, पणजी

रंगभूमि मासिकांतून प्रसिद्ध झालेले
कै० राम गणेश गडकरी यांचे

विनोदी लेख

कांहींवरी विनोद, नाटक कसें लिहावें, नाटकाची उत्पत्ति वगैरे विषय आले आहेत, किं. १२ आणे.

महाराष्ट्रीय नट

सुंदर २५ फोटोसह महाराष्ट्रांत पूर्वीं होऊन गेलेले व हल्लीं रंगभूमीवर काम करीत असलेल्या नटांचीं संपूर्ण चरित्रें किंमत दहा आणे.

महाराष्ट्रीय नाटककार

सुंदर १५ फोटोसह महाराष्ट्र नाट्यकलेचा संपूर्ण इतिहास समजण्यास हें पुस्तक उपयोगी आहे. किं. दहा आणे.

तिन्ही पुस्तकें एकदम घेणाऱ्यास व्ही. पी. सह दोन रुपये.

पुस्तकें— किर्लोस्कर संगीत मंडळी, सोलापूर,
किंवा— म्यानेजर किर्लोस्कर बुकडेपो, १९९ कसवा, पुणें शहर. १२–२

विष्णु रामचंद्र केणी यांचें दुकान

जुना बाजार—मडगांव.

स्थापना १८५०

सचोटीबद्दल प्रसिद्ध असलेल्या या अत्यंत जुन्या दुकानांत सर्व तऱ्हेच्या मालाचा भरीव स्टॉक असतो. निरनिराळ्या जातीच्या शाई, रंग, सिमेंट, व्हेर्नीज, आत्रोक, हरतऱ्हेचें लोखंडी सामान (खिळे, करवती वगैरे) नाना रीतीचे जस्ताचे व तांब्याचे पत्रे व इतर सर्व संसारोपयोगी वस्तू सदर दुकानांत माफक दरानें विकल्या जातात.

दर एक, माल चोख, व्यवहार रोख

अनुभवानें खात्री करून घ्या !

डॉ० सुखठणकर यांचा

कंडाद्रक

DYSPEPSIA

अग्निमांद्य, आम्लपित्त, जीर्णज्वर, वाम, लाळ फार येणें, लघवी वारंवार होणें, लिव्हरचे उदरस्थ विकार वगैरे बरे होऊन भूक चांगली लागते. दूध व जडान्न पचतें. रोज शौचास साफ होतें. किं० दीड रुपया. पोष्ट व प्यांकिंग खर्च निराळा.

श्री मांगिरीष कार्यालय
(उभादांडा) वेंगुर्लें, जिल्हा रत्नागिरी

ESTABELECIMENTO COMERCIAL

DE

Visnum Ramachondra Quenim

FUNDADO EM 1850

MERCADO VELHO–MARGAO

CONTA já mais de 73 anos de fundação o sobredito estabelecimento comercial. E' portanto um dos mais antigos da vila de Margão, mantendo relações com as mais afamadas firmas comerciaes e industriais da Europa e da America, paizes donde, em regra, importa todas as qualidades de tintas, aboc, oleos, verniz, linhança, cimento, gis etc. toda a sorte de artigos de ferro, como pregos, aldraves, cadeados, bisagras, parafusos, canos de ferro etc. especialidades de pastas de zinco lisas e concavas e as de cobre.

NO REFERIDO estabelecimento vendem–se tambem artigos alimenticios da primeira necessidade e todas outras mercadorias de que se acha bem provido.

BEM SERVIR O FRECUEZ E' O SEU LEMA

Experimentem que sempre lhes será proveitosa a experiencia !

tissimos e que sao pagos?

Em que fica a competencia, o brio, a dignidade dos mesmos professores?

Muito mais teriamos a dizer mas em ocasioes solenes e graves o silencio e' de oiro!...

TRES VEZES TRES...

Pelas festas do centenario da *morte do imortal* Vasco da Gama O *Ultramar* anuncia:

3 alvoradas *com musica*

3 *içares* de bandeira

3 *arriares* de bandeira

Deixem estar que e' tres demais para uma festa *so'*.

SURPREENDENTE!...

No programa dos festejos, lemos entre outros, os dois seguintes numeros:

n ° 2 — Lançamento da pedra fundamental da estatua de Vasco da Gama na rotunda de Gaspar Dias.

n ° 1 (do dia 24) — Colocaçao da insignia do almirante na estatua de V. da Gama.

Aqui temos a observar um facto surpreendente— vai-se colocar insignias numa estatua que ... nao existe ...., senao em pedra fundamental !

O MAIS CURIOSO...

No programa dos festejos, o interessante, aquilo que vai deixar o povo e o governo embasbacados por toda a vida e seis meses, e' o final do n ° 3 do dia 25. Neste dia temos alem de varias coisas o seguinte: — *Encerramento da festa*. Valia a pena saber em que consiste isto de *encerramento* e em que parte a coisa vai ter lugar.

Ca' por no's e' isto a que no's desejariamos assistir e para nao perdermos tres dias, e de gala, em Pangim gostariamos que a festa começasse por tal *encerramento*, que naturalmente, deve ser coisa de espantar.

EM SUMA...

O programa dos festejos e' um documento que convem ser arquivado. Ele demonstra a nossa decadencia. Demonstra tambem a nossa falta de coerencia. Demonstra ainda que ja' estamos suficientemente deslavados para nao hesitar ate' a mentira (alia's ninguem se lembraria do monumento.) Demonstra finalmente que, alem de perdermos tudo, perdemos ainda a unica coisa que ajuda um povo a morrer com arte — a Alegria.

Nao ha' duvida, e' o desabar.

TELEGRAFO

Ha' sete ou mais dias, nao funciona devidamente o telegrafo portuguez em Margao. Aterradora incompetencia! Tambem tudo fica sanado aderindo a *banquetes*.

Se tudo isto e' uma pagodeira!

(*A Terra*)

DIVORCIO ENTRE HINDU'S

Tem provocado alarme na classe hindu' a acçao de divorcio proposta por uma senhora rica da mesma classe. Esta dividiu-se em duas parcialidades, sendo a maior aquela que entende que o exemplo vindo de pessoas da categoria elevada mais rapidamente sera' imitado, sem respeito pelos seus Usos e Costumes, produzindo

Um manifesto

AOS HONRADOS ELEITORES DAS NOVAS CONQUISTAS

Impresso numa tipografia de Pondá, o sr. N. A. Bandorcar distribuiu o seguinte manifesto:

Concidadaos, sabeis de certo que na democracia e' grande o poder do eleitor, e maior ainda a responsabilidade de condignamente exerce-lo !

O direito de voto e' mais sagrado e inviolavel dos direitos do cidadao e porisso mesmo lhe cabe desempenha lo, na mais ampla liberdade, na mais absoluta isençao, livre de toda e qualquer pressao externa, incoerente com os rectos dictames da consciencia!

Concidaos, unicamente, confiado na integridade de vosso belo e nobre caracter ouso levar a's urnas, na proxima eleiçao de 7 de Dezembro para vogal do Conselha Legislativo pelas Novas Conquistas o meu obscuro nome, na certeza de que tereis um maximo empenho no triunfo que tambem sera' o vosso e conseguintemente o de forças vivas, elemento pensante e independente das Novas Conquistas.

Concidados, as vossas Novas Conquistas tem varias revindiçoes legitimas a fazer, tem varias benfeitorias a reclamar e exigir, tem varios direitos ate' hoje injusta e indevidamente postergados a difinir!

E para lançar mao desta obra nada facil e geralmente nada grata aos governos, bem vedes que me nao presta a chancela de qualquer partido ou facçao que necessariamente me dificultaria a independencia de acçao com receios, alias futeis, de quaisquer prejuisos para os seus fins privativos.

E' por isso que me coloco no campo neutro extra-partidario, por ser o unico que no caso vos cuvem sem quebra de quaisquer compromissos com vosso partido se por acaso, tiverdes, e tambem me convem a mim para com de sassombro procurar agir.

Briosos concidadaos, vedes portanto que nao represento facçao, cor ou casta, mas sim proponho me a apresentar, no maximo rigor de palavra as forças vivas e independentes das Novas Conquistas ate' hoje ingloriamente descuradas, apesar de dignas de melhor sorte.

Avante, pois, cidadaos eleitores, com mao na consciencia e com a mais ampla liberdade de voto para provar aos que vos consideram joguetes nas maos dos caciques, que sois senhores absolutos do vosso voto e capazes de reclamar direitos postergados vossos e de tantos irmaos vossos.

Ponda', 28 de Novembro ce 1924.

Naraina Ananta Bandorcar

nefastos efeitos de indisciplina na sociedade familiar, em que a mulher manteve sempre respeito pelo maioral e pelo marido. Os jornais hindu's referem-se largamente ao caso que e' o primeiro nessa classe.

(*A Terra*)

भारत

मार्गशीर्ष शु० ९ मी शके १८४६

अराजकता कां उद्भवते ?

आह्मा पो. हिंदुस्थानांतील स्वातंत्र्योपभोगी जनतेच्या कांहीं न्याय्य आकांक्षांनां सनदशीर असतांहि अप्रयोजकतेच्या नांवाखालीं दडपून टांकण्याचा नीतिबाह्य प्रयत्न करणाऱ्या नोकरशाहीला काय, किंवा शेजारच्या ब्रिटिश अंमलांत वावरणाऱ्या आमच्या सुशिक्षित देशबांधवांना 'दे नाहींतर बघ उभारला ' ह्या प्रकारची सर्रास दंडुकेशाही सुरू करून पुढें पाऊल टाकण्यास कायद्याच्या कलमानीं प्रतिबंध करीत आपल्या अनियंत्रित नियंत्रणाखालीं डांबून ठेवण्यास्तव जिवापाड झटून प्रजेस ' सत्तेपुढें शहाणपण नाहीं ' ह्या सारखे उद्वेगजनक उद्गार काढण्यास लावणाऱ्या अधिकारी वर्गाला काय, लोकगंगेचा प्रगतिपर प्रवाह आपल्या अगदीं विरुद्ध दिशेस चालल्याची पुरेपूर जाणीव असते; नाहीं असें ह्मणतां यावयाचें नाहीं. तरीहि पण नैसर्गिक नियमानें आपल्या क्रियेस जनतेकडून अवश्यमेव होणाऱ्या प्रतिक्रियेचा प्रतिकार प्रबुद्धतेची मिजास मारीत करतांना त्यांच्या वाचचळलेल्या जिवाच्या अदूर दृष्टीचा परिणाम ह्मणून ह्मणा वा एखाद्या कडव्या जळूप्रमाणें जनतेच्या अंगातील नवचैतन्यपूरीत रक्ताचा थेंबान् थेंब शोषून तीला निःसत्व करण्याकडे असलेल्या मानसिक प्रवृत्तीच्या जोमाचें प्रत्यंतर ह्मणून ह्मणा, त्यांच्या हातून एखाद्या मतिभ्रष्ठ माथेफिरूकडूनहि जीं घडण्याचा सहसा संभव नसतो अशीं कृत्यें पाशवी शक्तीच्या व कधीं कधीं तोंडपाटिलकीच्यो बळावर हमदिवसा बेदरकार पार पाडिलीं जातात.

आह्मां काळ्या लोकांच्या हाडोहाडांत मुरलेला रानवटपणा मोडून आह्मांस दिने दिने सुधारीत हिंदुस्थान हें एक दुनियेंतील इतर सुधारलेल्या राष्ट्राच्या तोडीचें राष्ट्र बनवावें एवढ्यासाठींच आमची कींव येऊन आमचा उद्धार करण्याकरतांच ह्या गोऱ्या कातडीच्या माणसांना आकाशांतील बापानें स्वयंप्रेरणेनें आह्मांवर रवाना केलें आहे असें आमच्यांतील कांहीं शहाण्यांचें ठाम मत आहे; पण ब्रिटिश व पोर्तुगीज सरकारच्या अनुक्रमें लंडन व लिस्बन येथील गोऱ्या दिवाणखान्यांतून [white hall] हलविल्या जाणाऱ्या राज्यसूत्रांच्या लहरी मुळें आमच्या सुखदुःखांचा व गरजांचा निःपक्षपातानें विचार करून आह्मांवर दैवांच्या प्रतिकुलतेमुळें वेळोवेळ कोसळणाऱ्या सुलतानशाही संकटांचा प्रतिकार करावा व स्थिति काल वैचित्र्यानें आह्मांस भासणाऱ्या गरजा भागवून अडीअडचणींतून आमची सशास्त्र सोडवणूक करावी एतदर्थं ज्यांचीं आह्मांवर नेमणूक होते त्या आमच्या देशाच्या उत्पन्नावर माजून पोळ बनलेल्या ह्या नोकरशाही उलट आमच्यावरच नसता अरेरावी अधिकार गाजवून सोटा उगारतांना पाहून आमच्यांतील ह्या 'जाणत्या' मंडळीच्या बुद्धिवादाचा फोलपणा पटून येतो; व वरील दृश्य सत्य सृष्टींत उतरलेलें दृष्टीस पडतांच कोणाहि विचारी पुरुषाच्या चित्तवृत्ति उचंबळून येऊन त्यास ह्या निमक हरामांचा तिन्ही त्रिकाल तिरस्कारच करावा, असें वाटूं लागतें.

श्वेत दिपवासी कुंपणी सरकारनें हिंदुस्थान व पोर्तुगीझानीं गोमांतक, तरवारीच्या जोरावर जिंकिलें असेल, तेथील प्रजा त्यांची जित व ते जेते असूं शकतील पण जोंपर्यंत जनतारूपी जनार्दनाचें मन त्यानीं जिंकिलें नाहीं, जोंपर्यंत लोकसमाजाच्या विचारशक्तीवर आपल्या दयाशीलतेची व लायखीची छाप बसवून त्यानीं तिला लंगडीं करून सोडलें नाहीं; तोंपर्यंत आपला तोंड दाबून बुक्क्यांचा मार प्रगमनशील प्रजेनें सहन करावा, व त्याविरूद्ध एक चकार शब्दहि न उच्चारतां उलट त्यांची लोकक्षोभविषयक बेफिकीरी बेहद्द चोकाळूं द्यावी असें त्यांचें त्यांनांच ह्मणतां येत नाहीं. ' ना विष्णुः पृथ्विवी पतिः ' हें श्रुतीतील वाक्य खरें असेल पण नीति सोडून जरा एक पाऊल पुढें मागें होतांच त्या महाविष्णूच्या छातीवरहि लाथ बसते हें प्रत्येकानें ध्यानांत वागवून चालणें इष्ट असतें हें निर्विवाद आहे.

' रयतची अबादानी हेंच आमचें सुख ' ह्या १८५७ सालच्या राणीसरकारच्या जाहीरनाम्यांतील प्रथमतत्वास हरताळ फांसणारीं व आमचें राज्य तुमच्यासाठीं, ह्या राज्यकर्त्यां इंग्रजांच्या ब्रीदवाक्यास धडधडीत डोळ्यांदेखत दिवसाढवळ्या विरोध करणारीं कांहीं कठोर कृत्यें जेव्हां ह्या ब्रिटिश अमलांतील अधिकार स्थानापन्न वर्गाकडून समजुन सवरून घडतात किंवा घडविलीं जातात. तेव्हां धडेतोड वृत्तीच्या जहालांची तर सोडाच पण सरकारच्या पायांशीं श्वानवृत्ति स्वीकारून लांगुन चालन करणाऱ्या मुर्दाड मवाळांचीहि मनें अधिकाऱ्यांविरूद्ध अर्थातच विनसाळून जातात व जनतेच्या स्वाभिमानाला पायाखालीं तुडविणाऱ्या ह्या सरकारी बेसनदेशीर कृत्याचा प्रतिकार मानवी स्वभावानुसार जनतेंतील कांहीं अप्रबुद्ध व अविचारी लोकसमुदायांकडून अराजकतेच्या मूर्ख व मवाली कुमकटानां पाठिंबा देऊन केला जातो. ही गोष्ट त्रिवार सत्य आहे व तीच्यापासून प्रत्येक राजकर्त्यां मंडळांनीं योग्य तो बोध घेतलाच पाहिजे. बंगालसरकारनें व्हाइसराय साहेबांच्या वटहुकूमाचा आश्रय घेऊन आज महिना सवा महिनाभर जो दडपशाहीचा धुमाकूळ माजविला आहे व सारा बंगाल प्रांत थरारून सोडण्याचा जो उपक्रम चालविला आहे त्या-

करावी लागेल. शहरांत जीवनकलह व रहाणी इतकी त्रासांची कां व्हावी व शहर व खेडेगांव यांत जमीन अस्मानाचा फरक कां पडावा या प्रश्नास उत्तर 'आर्थिक उत्क्रांति' (Economic evolution) या शद्बांत देतां येईल. ही उत्क्रांति हळुहळु आपोआप आम्हास नकळत दिवसें दिवस होत आहे व ती थांबवणें अगर चालू करणें हें आमच्या इच्छेच्या मर्यादेपलीकडचें आहे. सांगावयाचें तात्पर्य हेंच कीं या आर्थिक उत्क्रांतीचा परिणाम सामाजिक रहाणीवर दिवसेंदिवस होत आहे. ही सामाजिक क्रांति कशी होत आहे तें नीट समजाऊन घेणें आणि योग्य कालीं त्याचा फायदा घेण्यासाठीं तयारींत रहाणें याचाच अर्थ 'सोशालिझम' आहे. 'सोशालिझम'च्या व्याख्या अनेकानीं अनेक केल्या आहेत. त्या सर्व समाजाच्या अगर राष्ट्राच्या वेगवेगळ्या परिस्थितीच्या अंगावरून रचलेल्या आहेत. त्या पैकीं औद्योगिक दृष्ट्या वरील व्याख्या 'लंडन फेबियन सोसायटीचे' विल्यम क्लार्क यांनीं केली आहे. (See Fabian Essays in Socialism P. 62). हिंदुस्थानच्या अगर महाराष्ट्राच्या औद्योगिक बाबतींतली परिस्थिति डोळ्यांपुढें धरून या क्रांतीचा थोडासा विचार करण्याचें या लेखमालेंत योजिलें आहे.

'क्रांति' अगर 'सोसियालिझम' या शद्बानीं बऱ्याच जणाची फसवणूक होत असते. सामाजिक क्रांति घडवून आणूं पहाणारा 'सोशालिस्ट' ह्मणजे एक भयंकर मायेफिरू माणूस अशी अज्ञ जनतेची समजूत सोशालिझमच्या शत्रूंनीं केली आहे पण ही समजूत साफ खोटी आहे. 'क्रांति' अगर 'सोशालिझम' या दोन्ही गोष्टींत भयंकर असें कांहींच नाहीं. क्रांति ही रोज हळुहळू घडून येत असते निर्जन प्रदेशांत देखील रोज नवा नवा निघणारा रेल्वेचा फाटा ही क्रांति घडवीत असतो. नित्य नवीं नवीं निघणारीं व निव्वळ हस्तकौशल्याचे धंदे मागें टाकणारीं यंत्रें या क्रांतीस कारणीभूत होतात. रोज नवनव्या निघणाऱ्या भांडवलवाल्यांच्या 'जॉइंट स्टॉक कंपन्या' या क्रांतीस मदत करीत असतात. नित्य बाजारभावांत व निरखांत होणारे फरक या क्रांतीचे लक्षण समजाऊन सांगत असतात व नित्य नवनवे निघणारे यांत्रिक शोध या क्रांतीचें मूळ कारण असतात. तात्पर्य या व इतर कारणानीं समाजांत व राष्ट्रांत नकळत हळुहळू क्रांति होत जाते. क्रांति ह्मणजे फ्रेंच राजक्रांति नव्हे, क्रांति ह्मणजे मजूरांचे दंगे नव्हत, क्रांति ह्मणजे गुप्त कट अगर गुप्त मंडळ्या नव्हत, अगर अराजकांचे अत्याचार ह्मणजे देखील क्रांति नव्हे. क्रांति होत असतांना प्रतिक्रियेमुळें केव्हां केव्हां उत्पन्न होणाऱ्या लोकक्षोभाचीं हीं बाह्य स्वरूपें आहेत. पण ही खरी क्रांति नव्हे. बी ज्रापासून अंकुर, अंकुरापासून झाड, झाडापासून फूल आणि फूलापासून फळ हा जो सृष्टीचा नकळत होणारा, गुणविकास तोच नियम राष्ट्रसंवर्धनाच्या कार्मी देखील लागू पडतो.

"क्रांति" या विषयासंबंधीं हें विवरण झालें. आतां आपण "सोशालिझम" ह्या शद्बांकडे वळूं. सोशालिझम ह्मणजे काय याच्याबद्दल इंग्लिश, फ्रेंच आणि जर्मन अशा पुष्कळ लेखकांनीं निरनिराळ्या व्याख्या केल्या आहेत. परंतु त्यांपैकीं जॅनेट याची व्याख्या आपल्या प्रस्तुतच्या स्थितीला विशेष जुळण्यासारखी आहे. जॅनेट ह्मणतो, जगांत कोणी अतिशय श्रीमंत असतात आणि कोणी फार गरीब असतात. हा जो संपत्तीच्या संबंधानें फरक असतो तो मोडून टाकणें इष्ट आहे, व ज्यांच्यापाशीं अतिशय संपत्ति असते त्यांच्यापासून त्यांतील कांहीं भाग घेऊन ज्यांना पोटाला देखील पुरेसें मिळत नाहीं त्यांना तो देऊन सर्व लोकांमध्यें एक प्रकारची समता उत्पन्न करणें जरूरीचें आहे. व या गोष्टी घडवून आणण्यासारखे राष्ट्रांत कांहीं तरी फायदे असावे.

वरील विचारसरणी ऐकून 'सोशालिझम'च्या तत्वांची फारशी ओळख नसलेल्या आपल्याकडील मंडळीस हा एक मोठा अनर्थपात वाटेल व हीं तत्वें मनुष्याच्या नैसर्गिक हक्कांवर गदा आणणारीं आहेत असा त्यांचा साहजिक ग्रह होईल. पण ही समजूत चुकीची आहे. सोशालिझमचीं तत्वें निरनिराळ्या स्वरूपांत हिंदुस्थान देशांत देखील प्राचीन काळापासून होतीं. व त्या दृष्टीनें 'सोशालिझम'कडे पाहिलें तर आह्मां हिंदवासीयांनां तीं अपरिचित वाटण्याचें कारण नाहीं. प्राचीनकाळीं भरतखंडांत ज्यावेळीं एकतंत्री राज्यपद्धति होती त्यावेळीं धर्मन्यायानें वागणारे आमचे राजे लोक परकीय शत्रूंपासून जिंकून आणलेल्या अगणित संपत्तीनें खजिने अपरंपार भरून गेले ह्मणजे एखाद्या यज्ञप्रसंगीं ते सर्व प्रजेच्या सुखासाठीं एकवार लुटीत असत, इतके कीं त्यापायीं ते स्वतःहि भिकारी बनत. रघुराजाकडे अशाच एका प्रसंगीं कौत्समुनी दक्षिणेसाठीं गेला असतां त्यावेळीं सुवर्णपात्राऐवजीं सर्व कोश रिता झाल्यामुळें रघुराजानें मातीचीं भांडीं पूजेसाठीं उपयोगांत आणलेलीं त्यानें पाहिलीं. असें उदात्त वर्णन कालिदास कवीनीं रघुवंशांत केलें आहे. राजेलोकांची ही स्थिति झाली. पण सामान्य माणसांना सुद्धां गार्हस्थ्यधर्मांत अतिथ अभ्यागतांचें पालन करणें हा धर्म सांगितलेला होता. हिंदुधर्म शास्त्रानुसार प्रत्येक गृहस्थाला पंचमहायज्ञ विहित होते व त्यांत अतिथिसंतर्पण हा एक भाग सांगितलेला असे. व अतिथींनां, देवांना, पितरांना योग्य हविर्भाग दिल्यावर शेषाच आपण खावें अशी मर्यादा होती. "भुञ्जते ते त्वघंपापा ये पंचहात्मकारणात्" हा गीतेंतला श्लोक प्रसिद्धच आहे. अद्यापि हिंदु लोकांच्या दान पद्धतीवरून आपल्या आनंदाच्या प्रसंगीं गरीब लोकांनाहि आपल्या आनंदांत वांटेकरी करावें ही सात्विक भावना आढळून येते. वास्तविक आमची ही दानपद्धति व "सोशालिझम" याच्या मूलतत्वांत कांहीं फरक नाहीं. फरक एवढाच कीं आमच्या दानपद्धतीमुळें आळसाला व लुचेगिरीला उत्तेजन मिळतें व "सोशालिझम"च्या तत्वाप्रमाणें कोणालाहि आळशी व निरुद्योगी रहातां येऊं नये. आळशाला भुकेनें मरण्याचीच शिक्षा सोशालिझम सांगतो मग तो भणंग असो किंवा हजारों गरिबांच्या मानां मुरगाळून लोडाशीं माशा मारीत बसणारा धनाढ्य लक्ष्मीपुत्र असो.

सोशालिझमच्या तत्वांची ही वरील सामान्य रूपरेखा कळली ह्मणजे कोणालाहि ह्याबद्दल बचकण्याचें कारण राहणार नाहीं संपत्तीचे दोन प्रकार असतात. एक स्वतःच्या श्रमावर निढळाच्या घामानें मिळविलेली संपत्ति. व दुसरी निव्वळ भांडवलाच्या सहाय्यावर हजारों मजुरांच्या श्रमावर मिळविलेली संपत्ति. पहिल्या प्रकारच्या संपत्तीच्या व्यक्तिविशिष्ट मालकीबद्दल वाद नाहीं. पण दुसऱ्या प्रकाराबद्दल मात्र वाद उपस्थित होतो. जोंपर्यंत मजूरवर्ग अशिक्षित व अडाणी असतो तोंपर्यंत भांडवलवाल्यांचे चाळे खपून जातात परंतु आमच्या श्रमाशिवाय शेटजीला मोटारगाड्या उडवावयाला मिळत नाहींत या भावनेनें एकदां मजूरवर्गाच्या अंतःकरणांत प्रवेश केला कीं मग मात्र ते नैसर्गिक हक्कांसाठीं भांडूं लागतात. व आपणास होणाऱ्या अपरिमित नफ्याचा थोडाफार अंश नाखुशीनें भांडवलवाल्यास मजुरांच्या हातावर ठेवावा लागतो. पण आतां यासंबंधानें जास्त चर्चा न करतां "सोशालिझम"चीं तत्वें समाजांत रुजण्यास कोणती औद्योगिक परिस्थिति कारण होते त्याचा आपण पुढील लेखांकांत विचार करूं.

ECOS & CRITICA

CONSULTAS ...

Lê-se no *Diario da Noite:*

"Há já algum tempo que leio no seu jornal — a comissão começou em tantos de tal; que a comissão findou em tantos de tal; que a comissão continua desde tantos de tal; que a comissão, finalmente, há de acabar em tantos de tal.

Realmente, estou intrincado, e não sei de que se trata nem sei o que significa *comissão*. O que será? De que se tratará?

Seu
M. D.

N. da R.

Nós não sabemos de que que re tratar o nosso consulente. Menos ainda sabemos de que comissão se trata. Não sabemos tambem a que se refere. Entretanto para lhe responder á consulta, em vista do manuscrito de um novo dicionario que temos para nosso uso, só podemos dizer que, considerando o vocabulo em si:

Comissao e' — missao de COMER."

Está exacta a resposta, porque não é nenhuma admiração que a Com-*missão* seja a *missão* de comer.

Todos nós vivemos para comer que é a nossa missão, assim na Metropole como nas Colónias, assim em serviço activo como em serviço passivo.

Criou Deus em primeiro lugar o *pote*—vocabulo que deu origem á palavra concanim — *pota* e, depois, a Com *missão* para o homem poder exercer a missão de comer, isto é, encher o tal vaso de seis canadas—cada qual na medida de seus esforços.

Sigamos, pois, a filosofia do sabio sapateiro de Braga—de *todos comermos*.

Moralidade? E' um ar que lhe deu!

AINDA E' TEMPO

Do mesmo *Diario:*

Sr. Redactor

Consta, pelo *Heraldo*, que o sr. Ministro das Colónias sugeriu a extinção da Direcção da Instrução e o Conselho Legislativo por ela opinou com uma maioria de 4 votos, se não estou em erro.

Afirmam tambem ali ao mesmo tempo que rangem os fios naturalmente para embargar a mesma extinção, o que será com certeza, tempo perdido.

Agora se há alguem que queira conseguir a manutenção da Direcção, o meio seguro e infalivel é anichar na mesma Direcção um parente do sr. C. de Figueiredo ou meter no seu *estado maior* uma ... *cunha* de "justa influencia".

E' o que há muito se devia ter feito; mas ainda é tempo...

De V.
Cicrano

O *Cicrano* tem razão. Aqui entre nós, a conservação ou extincção de qualquer serviço depende da circunstancia de haver ou não afilhados da *politica reinante* a serem nêle anichados.

A conservação é o premio dos que adulam o poder; a extinção é o castigo dos que o guerrêam.

E não é para admirar que os vencedores sejam premiados e os vencidos castigados!

AINDA O DIVORCIO

O divorcio litigioso de que o *Bharat* se fez eco continua tambem sendo comentado nos jornais maratas da India Britanica que o fulminam

Nem outra coisa era de esperar, dada a *novidade nova* que o primeiro e excepcional caso encerra, desprestigiando a mulher hindú na sua tradicional e védica castidade.

Mas de vagar se vai ao longe

PARA O Nº IMEDIATO

Tivemos de reservar por falta de espaço matéria já composta incluindo anuncios. A falta de espaço tem sido a nossa maior preocupação. Mas...não há remedio!

आजचें पोर्तुगीज सदर

अग्रलेख:—

व्हास्को डी गामा व त्याच्या आगमनानें गोव्यावर ओढवलेली अनर्थपरंपरा; या अनर्थ परंपरेचें संकलित विवेचन.

स्फुट लेख:—

" कोमिसांव " शब्दाची व्युत्पत्ति; सत्तेच्या गुलामांची कारवाई; घटस्फोट व परदेशीय लोकमत इ. इ. इ.

भारत

मार्गशीर्ष व० ७ मी शके १८४६

तरुण गोमांतक व वेळगांवची राष्ट्रीय सभा

त्याचें कारण मग कांहींहि असो, पण एवढी गोष्ट अगदीं निर्विवाद खरी व अनुपेक्षणीय असल्याबद्दल कोणीहि सुबुद्ध व समंजस विवेचक खात्रीपूर्वक ग्वाहि देऊं शकेल किंवा शकतो कीं आमच्या गोमांतकाला जी सध्या पुरेपूर वेधून बसली आहे त्या विपद्पूर्ण व कष्टमय परिस्थितीचा विचार एखाद्याच्या मनांत वावरूं लागतांच शेजारच्या ब्रिटिश अमलतील प्रजेच्या दुःखद स्थितीचें चित्र डोळ्यांपुढें अचूक येऊन उभें रहातें. ह्या प्रकारच्या निराशाजनक नष्टचर्यांत काळ कंठण्याची अघोर आपत्ति आम्हांवर अचानक रीतीनें कां कोसळावी व आमच्या अदूर दृष्टीच्या आपलपोटेपणाच्या व मानमतराबासाठीं किंवा सैतानी स्वार्थाच्या पूर्ततेसाठीं हपापून आंधळी बनलेल्या अंतःकरण प्रवृत्तीच्या अविचारानें आपणावर आपण होऊन ओढून घेतलेल्या ह्या निकृष्टावस्थेची आह्मांतून झटपट हलाकपट्टी कशी करावी, हे दोन्हीं महत्वपूर्ण प्रश्न जितके जितके आह्मीं विचारांत घेण्याचा प्रयत्न करावा; तितकी तितकी त्या चित्रपटावर दृष्टि अधिकाधिकच खिळून रहाते. इंग्रजींत अशी एक ह्मण आहे कीं, समान संकटाच्यायोगें परकेपणानें एकमेकाशीं वागणारे सुद्धां एकमेकांचे लंगोटी मित्र बनतात, adversity makes strange bedfellows; व ह्याच ह्मणीची सत्यता आह्मांस ह्या बाबतींत निर्विवाद प्रत्यास येते. तें कसें तें पाहूं:—

वास्तविक शब्दार्थावरच लक्ष ठेवल्यास आमच्या गोमांतकाला ' आवतोनोमी ' चे हक्क मिळाले आहेत खरे पण ही वरवरची दृष्टी काढून ती जरा आंत फेंकतांच तेथील प्रकार मात्र कांहीं ' औरच ' असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. ज्या सुराज्यासाठीं स्वराज्याची जरूरी भासते तें सुराज्य तर आह्मास हे स्वराज्याचे हक्क दान दिले गेल्यापासून राहिलें दूरच; पण निरनिराळ्या सदराखालील वरिष्ट नोकरशाहीच्या खर्चाचा नव्हे नव्हे त्या उधळपट्टीच्या व ह्या सर्वांची भर करण्याकरितां जनतेवर लादल्या जाणाऱ्या असह्य करांच्या ओझ्याखालीं मात्र गोमांतकीय लोकपक्ष उलटा चिरडून व भरडून निघत आहे. हा १९१० सालपासूनचा गोमांतकाचा जमाखर्चाचा आढावा काढल्यास उघड उघड दिसून येण्याजोगें आहे. कायद्याची बाब अशा रीतीनें मागेंच राहून तिजोरीला तूट ती तूटच व वर मरणाऱ्याला लाथाडण्याला कर्जांचा शिरजोर बोजा व व्याजाचा दामदुप्पट दर अंगावर रहातोच. खरी वस्तुस्थिति पाहूं गेल्यास असें आढळून येतें कीं गोमांतकीय तरुण पिढीला ती आवतोनोमीची भीक नको पण ही वेगवेगळ्या ठिकाणी गोमांतकाच्या गंगाजळीला लागलेली व दिवसेंदिवस शुक्लेंदु प्रमाणें वाढतच चाललेली गळती थांबवा असें झालें आहे. आवतोनोमीच्या नावांखालीं ह्या प्रकारचा हवा तसा पिंगा, घागडधिंगा व नंगा नाच घालावयाला मिळत असतां त्या सत्ताधारी वर्गाला आणखी कशाचीच जरूरी भासत नाहीं हें उघड आहे. अशी कष्टमय व केविलवाणी स्थिति उत्पन्न होण्यास कारण काय ह्याचा आतां विचार करूं !

वास्तविक आमच्या गोमांतकांत हिंदु व ख्रिश्चन असे दोनच धर्म मुख्यतः आहेत. हे दोनच धर्म अनुसरणारी जनता संस्कृतिविभिन्न असली तरी एकाच हवेंत, देशांत, परिस्थितींत, शिकवणूकींत व सत्तेच्या अमलांत वाढत असते आणि ह्मणूनच त्यांतील कोणत्याहि एका समाजास जें राष्ट्रावरील अगर आपल्या चिमुकल्या प्रांतावरील संकट वाटतें तेंच दुसऱ्यासहि तसेंच भासावें; एकास ज्या आपल्या सार्वजनिक दृष्ट्या राजकारणांतील अडचणी व यथा कालोद्भव गरजा भासतात त्या दुसऱ्यासहि तशाच व तितक्याच महत्वाच्या वाटाव्यात. पण अंदर की बात अशी आहे कीं तिच्या परिचयानें ह्या सर्व वरवरच्या व निसर्ग निर्मित समजुती फोल व निरर्थक ठरतात. ख्रिश्चन समाजास गोमांतकांत ख्रिस्ती धर्माचा व आचारविचारांचा जोरदार व भरभक्कम पायावर प्रसार होऊन त्याच्या योगें हिंदूंच्या वेदकालापासून चालत आलेल्या सनातन धर्मावर निष्कारण घाला पडलेला हवा असतो. व त्यांना ख्रिस्ती धर्माच्या प्रगति व प्रसारापेक्षां हिंदुधर्माच्या आपत्तिक व असहाय्य स्थितीनेंच अधिक आनंद होतो. ह्या आपल्या उदात्त (?) हेतूच्या पूर्ततेस्तव ह्मणा किंवा जाणीवेसाठीं ह्मणा ते हिंदुधर्माचा व पर्यायानें सनातन धर्माचा अभिमान बाळगणाऱ्या सर्व हिंदूंचा द्वेश करण्यांतच ते आपल्या जिवाची सार्थकता मानीत असतात. आणि अत्यंत आश्चर्याची गोष्ट अशी कीं आह्मा हिंदुंतीलच कांहीं धर्मभ्रष्ट व धर्मलंड नररत्नें त्यांस हस्तें परहस्तें सहाय्य करून आपल्याच पवित्र धर्मावर चढाई करितात. ह्या सर्वांचा परिणाम कधीं कधीं —नव्हे बहुधाच— असा होतो कीं हिंदु समाजाच्या देशहिताकांक्षी दृष्टीस जें गोमांतकाचें हित वाटतें, ज्या गोष्टींत त्यास गोव्याची राजकीय उन्नति वाटेल तीच गोव्याची अवनति — अर्थातच अनहित — असल्याचा ख्रिश्चन समाज आपला समज करून घेतो व तदनुषंगानें त्यांच्या हातून ' नाहीं

देण्यास तयार होते आणि आतां आह्मीं त्यांचे वंशज गामाच्या औरस व अनौरस वंशजानां खुष करण्याकरितां शेंडी काढून तें दृश्य त्यांच्या नजरेस पडावें ह्मणून डोक्यावर फिरंगी टोप चढ़वीत आहों. शेंडीस चाट देऊन फिरंगी टोप चढविणाऱ्यानीं गामाच्या मरणाचा आनंद प्रदर्शित करण्यास आपलें स्वत्व गमावलें किंवा खिशांतील रुपये खर्चीं घातले ह्मणून नवल नाहीं. नवल तें हेंच कीं, इतकेंहि करून फिरून आह्मी हिंदीपणाची आणि हिंदुपणाची बढाई मारणार ती मारणारच.

गामाचा श्राद्धदिनानिमित्त आंखलेला कार्यक्रम पाहिला तर त्यामुळें सरकारी तिजोरीस, मुनिसिपल गंगाजळीस व इतर देवस्थान वगैरेंच्या ठेवीस बराच धक्का बसणार आहे सार्वजनिक व खासगी होणाऱ्या या खर्चास जवळ जवळ ४० ते ५० हजार रुपये लागतील असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानचा पैसा कसा हरण करून नेतां येईल याचा कयास बांधण्यासाठीं जलमार्ग संशोधनाचें धाडस करणाऱ्या व शेवटीं मथुरेच्या कंसासुरादिहि खालीं पाहण्यास लावण्यासारखीं आणि जंगली जनावरांच्याहि अंगावर शहारे येतील अशीं दुष्ट कृत्यें एकसारखीं चालू ठेवीत असतां हिंदुस्थानांतच आपला अंतःकरणशून्य देह ठेवणाऱ्या गामाच्या मरणाचा आनंदोत्सव करण्यास चाळीस पन्नास हजारांची रकम खर्चीं पडली तर त्यांत विषाद मानण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थान त्यांतल्या त्यांत पोर्तुगीज हिंदुस्थान नित्याचेंच भिकारी आहे. भिकारी स्थतींत सण साजरे करण्याची त्याला जन्माचीच संवय आहे. त्याच्यावर राज्य करणाऱ्या फिरंगी फिदाल्गांची फोल्ग मारण्याची वृति त्याला ठाऊक आहे, मग अर्धालाख रुपयांची रकम ती काय? गामासारख्या महनीय फिरंग्यानें आपला बहुमोलाचा देह ज्या भूमीवर ठेविल त्या भूमीस ती काय जास्ती वाटेल? कधींच वाटणार नाहीं. आपण जर एखादा नाग मारिला तर त्याची यथाविधी स्मशानयात्रा, उत्तर कार्य पार पाडून वरती नागबळी देखील करतों ती काय ह्मणून? तर मारलेला साप जरी आपला शत्रू असला तरी त्याला मुक्ती मिळावी हाच आपला हेतु असतो. तोच हेतु आपण गामाच्या श्राद्धदिनाचे वेळीं बाळगिला पाहिजे. पुराणातील धुंडा राक्षसीची गोष्ट कोणाला माहीत नाहीं. ती गांवांत येऊन लहान अर्भकानां पकडून खात असे, तेव्हां गांवच्या लोकांनीं तीचें मर्म जाणून गुह्येंद्रियाचा मोठ्यानें उच्चार केला व तीला जाळून मारिलें. तो तिच्या मरणाचा आनंद प्रतिवर्षी होळीच्या निमित्तानें प्रदर्शित करतोंच कीं नाहीं !! त्यांतलाच हा प्रकार आहे. मग त्याला कोणी सुयेर ह्मणोत, कीं सुतक ह्मणोत आह्मीं त्याला आनंदच ह्मणणार. गामाच्या मरणानें आमच्या पूर्वजांस आनंदच झाला असला पाहिजे, अशी जर अटकळ केली तर चारशें वर्षांनीं तोच आनंद उत्साहपूर्वक प्रदर्शित करण्यास आह्मास कोणाची भीति आहे? गामाला हिंदुस्थानच्या सफरीवर पाठविणारे पोर्तुगालचे राजे पहिले दों मानुयेल यांची गादी व त्यांचा मुकुट दुसऱ्या दों मानुयेल बादशहांच्या कारकीर्दींत लोकसत्तेनें वितळवून टांकला. मग गामाच्या दुष्कृत्यांचा अभिमान वागवून आपल्या लोकसत्तेच्या इभ्रतीस कलंक लावणारा पोर्तुगेज कोण पुढें येणार आहे? गामाचीं दुष्कृत्यें इतिहासांत नमूद असल्यानें तीं जगजाहीर आहेत. येथील लिसेव सेंत्रालचे प्रो. सिं. इजीप्सी सौझ यांस तीं अज्ञात असलीं ह्मणून कांहीं जग बोळयानें दूध पीत नाहीं. जगाला गामाची ओळख भरपूर आहे मग फिरंग्यानांच ती कशी असणार नाहीं? मोनार्कींतील फिरंगी गेले आतां सर्व रेपुब्लिकन बनले मग गामाचीं दुष्कृत्यें चांगलीं ह्मणण्याचें मोनार्कींतील पातक कोणता पोर्तुगेज करील? आह्मी सर्व लोकसत्तेचे चाहाते गामाच्या जुलमाचा निषेधच करणार.

वर्तमानसार

—यंदांच्या लेजिस्लेतीव्ह कौन्सिलच्या निवडणुकींत प्रचंड बहुमतानें निवडून आलेले "प्रागतिक संघा"चे उमदवार रा. सखाराम सदाशीव देसाई व रा. बाबू शिवराम प्रभू देसाई यांनां त्यांच्या कांहीं मित्रमंडळीमाफत गेल्या ता. १५-१२-२४ रविवारीं संध्याकाळीं चहापार्टी देण्यांत आली.

—एम्. कं. प्र. गांवकर, पैंगीण, गोवा यानीं जाहिराती-संग्रह नांवांची पुस्तक माला प्रसिद्ध करण्याचें ठरविलें असून, प्रत्येक वर्षाला संग्रहाचे चार भाग निघतील. संग्रहांत निरनिराळ्या व खात्रीच्या जाहिराती प्रसिद्ध होतील. गोव्यांमध्यें हा अशा प्रकारचा पहिलाच उपक्रम होय.

—महात्माजींचा मुक्काम सध्या अहमदाबादेस असून, ते येत्या शनिवारीं सकाळीं बेळगांवास येतील.

—महात्माजींचीं तत्वें रशियाच्या बाल्शेविझमला जुळतीं झाल्यास रशिया त्यांस हवी तशी मदत देणार आहे.

—दे० दास ह्यांनीं आतां बाह्य चळवळींचा संन्यास घेण्याचें ठरविलें असून खेड्यापाड्यांत संघटनेच्या व जागृतीच्या दृष्टीनें ते स्वतःस वाहून घेणार आहेत.

—राष्ट्रीय सभेची पुढील वर्षाची बैठक कानपुरास बोलावण्याचें तेथील कॉं. कमिटीनें ठरविलें आहे.

—१९२२ सालीं अमेरिकेंत एकंदर लग्नें ११२९०४५ होऊन डायव्हर्सची संख्या १६८८१५ भरली. गेल्या सालीं तेथील लग्नांची संख्या १२२३८२५ भरून काडीमोडीचा पारा १६५१३९ पर्यंत चढला. हीच का सुधारलेल्या राष्ट्रांची प्रगति?

—येत्या २० तारखेस कॉं. कँपांत नाफेरवाल्यांची परिषद भरणार असून त्यांत कट्टरांचें हृद्गत महात्मा गांधी समजावून देणार आहेत.

—गरीब लोकांची राष्ट्रीय सभा पहाण्याची सोय व्हावी ह्मणून कांग्रेसच्या कार्यकारी मंडळानें कर्नाटकांतील प्रत्येक जिल्ह्याचे १५ अस्पृश्य व १५ शेतकरी कामकऱ्यांची सभेंत मोफत सोडण्याची व्यवस्था केली आहे.

—मुंबईच्या 'विनोद' साप्ताहिकानें हायकोर्टाकडे केलेल्या अपिलाचा गेल्याच्या मागील बुधवारीं निकाल झाला. मुद्रक साहेबांनीं माफी मागून आपली सुटका करून घेतली; पण संपादक साहेब माफी मागण्यास कबूल न झाल्यामुळें त्याच्या दंडाची रक्कम ५०० रुपये ठरविण्यांत आली!

—गेल्या नवीन काबिजादीतर्फे झालेल्या मेंबरांच्या निवडणुकींत दो० सखाराम देसाई यांस १२८७, दो० बाबू देसाई यांस १३३८, कुंडईकर ह्यांस २८७, नाईक यांस ३०८, व नारायण बांदोडकर यांस ८१ मतें मिळालीं. यशस्वी उमेदवारांस प्रागतिक संघाचा पाठिंबा होता.

—ता. १४ डिसेंबर १९२४ रोजीं पोंब्रुर्पे येथील 'श्रीरवळनाथ विद्याभुवन' शाळेंतील मुलांची तपासणी, ह्मापसें येथील सारस्वत विद्यालयाचे हेडमास्तर रा. नारायण लक्ष्मण रेगे व मास्तर रा. केशवराव यानीं केली असून यानांच त्या शाळेचे तपासनीस (Inspector) नेमण्यांत आलें आहे असें त्या भुवनाचे व्यवस्थापक दामोदर विठ्ठल प्रभू हे कळवितात.

—एम. कं. शिरोडकर, श्रीपाद जगन्नाथ देसाई, जना विष्णु कामत व वा. वि. प्रभू देसाई हे भारताचे प्रतिनिधि या नात्यानें बेळगावच्या कांग्रेस व इतर सभांना हजर रहाणार आहेत.

—गामोत्सवाप्रीत्यर्थ जबरीनें पैसे उकळण्यांत येत असल्याचा बोभाटा आहे.

—प्रचलित विषयांच्या गर्दीमुळें कंपोझ झालेले पत्रव्यवहार येत्या अंकीं ठेवावे लागले.

derado responsavel por culpas dos tais municipios ou dos tais hindús com cujos gestos e com cujas atitudes ele nunca se conformou?

Não, certamente.

¿A que vem nestas condições as observações da *Terra* ao *Bharat*, feitas no seu artigo *Aos irmãos Hindús*, da sua edição de 20 do corrente?

*

O *Bharat* não sabe ocultar o que sente; e o que disse sobre o Gama representa a mais fiel expressão do seu sentimento. Nunca pretendeu desorientar o público com heresias historicas: pintou o diabo tal como é, sem omissão de detalhes.

Foi injusto? Foi impolitico? Não. Foi apenas inexoravel, como o é toda a verdade que não admite circunloquios nem ambages, inventados pelas *mentiras convencionais* ... que fizeram do Gama o que nunca foi.

*

¿Hà o maximo empenho em que os hindús tomem parte nos festejos do Gama?

Tal empenho é ofensivo da dignidade e brios tradicionais dos hindús, porque nunca as vitimas podem entusiasmar-se com as festas dos seus verdugos.

E o Vasco da Gama foi o verdugo dos hindús!

ECOS & CRITICA

PROGRAMAS

Le-se no *Heraldo*:

"Esta' entrando pelas nossas portas dentro uma tal avalanche de programas que nem um mez inteiro seria suficiente para os publicar todos. E como o director do *Heraldo* faz parte da comissao de propaganda, vai de lhe mandar quanto der na gana aos preopinantes, que supoem eles, tem obrigaçao de os publicar!

A propaganda nao e' de programas e o *Heraldo* tem cumprido o seu dever como pode e sabe.

Querem publicados os programas? Ha' dinheiro para foguetes e bandeirolas? Pois os tipos e o prelo, a tinta e o papel, tudo isso tambem custa dinheiro e nao se consegue de borla Ora adeus!"

O *Diario da Noite* adita a local do *Heraldo* com o seguinte:

Ainda que nao façamos parte da comissao de propaganda, mas nao se destinando o nosso jornal ao negocio de anuncios sem embargo das suas minguadas dimensoes, teremos muito prazer em publicar gratuitamente os programas das festas do centenario na India, que nos forem enviados, dispensando-nos para os efeitos da propaganda, de transcrever o que os outros jornais pablicam sobre o paradeiro dos ossos de Vasco da Gama. Em letra de forma, ainda que os tipos e o prelo se gastem e haja consumo de papel e tinta, fique sempre constatado como o centenario foi celebrado em cada um dos recantos de Goa, mesmo na *hora grave* ... que atravessamos.

Ca' tem os leitores duas especies do patriotismo, O *Heraldo* da' mais a preço e valia aos seus tipos e prelo, papel e tinta, do que aos programas dos festejos do Gama que o ... adora; o *Diario*, perante os mesmos programas, assume uma atitude completa e diametralmente oposta.

Pelos modos, o *Heraldo* presa mais a negociaçao do que a comemoraçao!

Que adoravel adorador do Gama!

LOUCURA!

No seu artigo *Loucura!*, da ediçao de 20 do corrente, entre outras coisas, a *Terra* escreve o seguinte:

"Nao e' so' o Militarismo um Minotauro. A Magistratura toma as proporçoes dum Elefante Branco E o peor e' que venerandos desembargadores e corregedores e catititas bacharelinhos — *nativos* — se nao cansam de clamar que lhes nao bastam as somas que arrecadam, por um trabalho que nao e' exaustivo, e numa terra em que ninguem vive como *lords* ou como os possuidores de dolares".

Um paiz em que no funcionalismo elevado predomina o criterio egoista de *Cada um para si*... na hora grave que atravessamos, nunca pode ser feliz: sempre tera' que arcar com o terrivel *deficit* que ora o traz acabrunhado.

O referido funcionalismo tem de zelar pelos seus interesses pessoais mas, antes de mais, impende lhe o dever de proteger os patrios, porque a Patria leva preferencia a' pessoa, a felicidade desta e o corolario da felicidade daquela.

E' verdade. E' loucura pedir mais quando o erario esta' pobre e exausto, com um *deficit* a atormenta lo.

Sim. E' loucura e sinecura.

Tenhamos, pois, juizo na hora grave que atravessamos,

BALDADA EMPRESA!

Pelo que nos consta, houve em Margao verdadeira pressao nos hindu's, quere para que estes concoressem com suas subscriçoes para os festejos comemorativos do Gama, quere para que eles se mostrassem entusiasmados com os mesmos!

O director do Liceu Municipal da mesma vila excedeu a todos em tudo. Lançou ele mao de todos os expedientes—ate' de ameaças—para que os estudantes hindus, seus dependentes tomassem parte no cortejo de *Zamorim*, para representar o papel do qual escolheu com visivel proposito de ferir o sentimento hindu', um aluno hindu'! Foi um Zamorim a' força de pau!!

O hindu' e' hostil aos festejos do Vasco da Gama, porque este so' lhe deve agravos e ofensas; mas a hostilidade do hindu' ao seudo argonau a nao quere dizer, de maneira alguma, que a comunidade hindu' seja inimiga dos europeus liberais e magnanimos.

Promovam, por exemplo, uma festa ao sr. dr. Antonio Jose' da Almeida e vejam depois com que expontaneidade os hindu's se agregam a ela.

Nao procurem, pois, malquistar os hindus com os bons europeus de quem sao amigos. E se eles se nao dao bem com o Gama, e' porque, como se disse, este foi o seu verdugo.

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem, e cartorio do escrivao do 2° oficio Barreto vao ser vendidos em hasta judicial, a' porta do tribunal situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a estaçao de Sanvordem no dia 9 do seguinte mez de Janeiro, a's 10 horas, e pelo preço superior ao da avaliaçao os seguintes bens: Direito a' terça parte do predio rustico denominado Vadivo da cultura de arroz; Predio rustico denominado Madamodilsordo da cultura de arroz; Predio rustico denominado Diguivangana da cultura de arroz Predio rustico denominado Calemno mosso sordo da cultura de arroz e predio rustico denominado Gorbata bagaita da cultura de coqueiros e outras arvores, todos sitos em Gocoldem e discritos na conservatoria predial desta comarca respectivamente sob os n°s 16658, 16659, 16660, 16661 e 16662 a fl. 170 v. ate' fl. 172 v, do livro B 45 e avaliados tambem respectivamente por, 55. 110, 120, 100 e 150 rupias. Penhorados nos autos cives de execuçao por custas que o Digno Agente do Ministerio Publico nesta comarca promove contra Locuma Gaocarina viuva de Janum Gaucar e outros de Gocoldem por apenso aos autos de inventario orfanologico procedido pelo falecimento do dito Janum Gaocar, Sao por este citados todos os credores incertos dos ditos executados e os co-proprietarios e quinhoeiros nos termos e para os fins de lei. A contribuiçao de registo por inteiro ficara' a cargo do arrematante. Para ser publico se expediu este.

Xeldem, 12 de Dezembro de 1924.

O Escrivao de Direito do 2° oficio

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito

A. A. de Brito e Nascimento

आजचें पोर्तुगीज सदर

अग्रलेखः—

गामाचा आठवडा; गामाची निंद्य कृति; गामाच्या शोधांत राम नाहीं; मडगांवच्या 'आ तेम्ह' पत्राची चुकीची विचारसरणी; सदहू पत्रास भारताचें सडेतोड उत्तर; गाम हा हिंदूंचा मांग होता.

लेख दुसराः—

गामानें हिंदुस्थानचा जलमार्ग शोधून काढला नाहीं.

स्फुट विचारः—

देशप्रीति कां द्रव्यप्रीति ?; गाम व मठग्राम; बडया नोकरशाहीचा लठ्ठ पोटाभिमान इ. इ. इ.

वर्तमानसार

—कलकत्त्याचा स्वराज्यसप्ताह पुरा झाला असून, दे० दासांची ३ लाखांची मागणी तेथील जनतेनें पुरी केली असून आतां देशबंधु स्वयंसेवक गोळा करणार आहेत.

—कॅांग्रेसच्या प्रतिनिधींना सूत काढण्यासाठीं म्हणून विजयानगरांत १५० चरके ठेवण्यांत आले असून त्यांवर निघालेलें सूत महात्मांजींस अर्पण केलें जाणार आहे.

—गेल्या ता. २२ रोजीं बेळगांव मुनिसिपालटीतर्फे महात्मा गांधींना मानपत्र देण्याचा समारंभ उरकून घेतला गेला.

—बेळगांव येथें भरणाऱ्या अखिल भारतीय गोरक्षण परिषदेंत प्रतिनिधि या नात्यानें रायबंदरचे रा. रामचंद्र नारायण प्र. लंवदे हे हजर रहाणार आहेत.

—मोरातोरीची मुदत येत्या महिन्यांच्या १५ तारीखपर्यंत वाढविली असून, दहा टक्के जादा दंडाचें बेअकली कलम रद्द करण्यांत आलें.

—गोमांतकीय सरकारी शिक्षणखातें कानू टांकण्यांत आल्यानें तिजोरीला २० हजार रुपयांची बचत झाली. आवदीतोरीचीहि नोकरशाही बरीच संपुष्टांत आणण्यांत आली आहे.

—भारताचे प्रतिनिधि बेळगांव कांग्रेसला हजर रहाण्यासाठीं काल संध्याकाळीं रवाना झाले.

—"गेल्या मंगळवारीं मडगांव येथें थाटाची मिरवणूक निघाली. लिसेवाकडून थेट टपाल खात्यासमोरील मैदानावर मिरवणूक आल्यावर तेथें गामाच्या नावानें स्तंभ उभारण्यास पाया बसविला. त्याखालीं सेमिनारींतील पाद्रीनें या श्राद्धासंबंधींची माहिती देणारे लेख लिहिलेले कागद एका कुझासह पुरण्यांत आले. मिरवणुकींत दळवी मास्तर आपल्या शाळेंतील इतर मास्तरांस घेऊन मुलांमुलींसह आघाडीवर होते इतर सरकारी शाळेंतील विद्यार्थ्यांत ८।१० काय ते विद्यार्थी होते. ते प्रोफेसरांच्या धाकानें आलेले होते यांत संशय नाहीं. सर्व खात्यांतील कामदार, मुनिसिपाल सभासद व आस्पोंस वगैरेचे सभासद कामदारांसह हजर होते. हिंदु कामदार कांहीं वरिष्ठांस खूष करण्यासाठीं व कांहीं पुढें पुढें येण्यासाठीं सामील झालेले दिसत होते. प्रो. व्यंकटेश नाईक यांशिवाय इतर हिंदु उदासीन असलेले दिसत होते. अधिकारी व इतर मंडळी दारांत गेली म्हणून कांहींनीं रुपया दोन रुपये वर्गणी दिली. त्यांत खुशीपेक्षां सक्तीची खुशीच दिसली. प्रो. पांणदीकर यांनीं आपण वर्गणी देत नाहीं असें चक्क लिहून दिलें असें म्हणतात. व तें खरें असल्यास त्यांचें अभिनंदन करणें योग्य आहे. या मिरवणुकीच्या मध्यभागीं राजसिंहासनाप्रमाणें सजविलेल्या मोटारीवर मध्यें झामोरीन राजा, उजव्या बाजूस दिवाणजी, डाव्या बाजूस चंवरी वारणारा हुजऱ्या व समोर किंचित डावीकडे सरदारी थाटांत गामा, असा जिवंत देखावा केला होता. मोटारी भोंवती ८।८ स्त्रियांचीं हिंदु पोषाखांत पण बूट घालून सोंगें हात धरून उभीं होतीं. राजाचें सोंग घेण्याचा मान कुंकळ्ळीच्या गावड आडनावांच्या मराठी विद्यार्थ्यास (लिसेवाच्या) मिळाला होता तुरळक तुरळक घरांच्या समोरील बाजूस दिव्यांची रोषनाई होती. पण मधोमध असणारा अंधःकार गामाच्या कृष्ण कृत्यांची आठवण करून देत होता. अ.ो. दळवी मास्तरानीं खूप मिळविली."

बातमीदार

लींहि कार्यकारी मंडळाकडून व ठिकठिकाणच्या महाल कमिट्यांकडून त्या दिशेनें प्रयत्न होतील व त्यास सर्वांचें साह्य मिळेल असा आह्मांस भरंवसा आहे.

गामोत्सवी सप्ताह :— गोमांतकांतील हिंदु व ख्रिश्चन ह्या दोनहि बहुसंख्याक शातींचे परस्पर संबंध कोणत्या प्रकारचे आहेत व आह्मांस मिळालेल्या आवतोनोमीच्या कायदेशीर हक्कांचे अंतःस्वरूप वरचा नयन मनोहर व नाममोहक पडदा बाजूला सारून किती हिडीस व उद्वेगजनक आहे, हें आह्मीं स्पष्ट शद्बांनीं मागें लिहिलेंच आहे. ह्याचें प्रत्यक्षास प्रमाण पाहिजे असल्यास चालू आठवड्यांत संबंध गोमांतकांत धागडधिंगा व हैदोसहुल्ला ह्या दुकलीच्या धुमधडाक्याच्या धामधुमींत वास्को डी गामाच्या पिंड प्रदानाप्रीत्यर्थ होणाऱ्या श्राद्ध तीर्थीत तें मिळू शकेल. हा उत्सवसमारंभ गोमांतकांतील मुख्य मुख्य शहरांत तर 'विजेच्या दिवाबत्तींच्या' सहाय्यानें 'अकलेच्या दिवट्या पेटवून' व 'मारान फोगा'च्या कडकडांत आपल्या पूर्वजांचा पाठीचा धर्मच्छलानें काढलेला 'मारून फोग' विसरून उसळत्या उत्साहातिरेकानें साजरा केला जात आहे; पण ह्या 'पुण्याच्या पर्वणीला' इतरेजनांची चुकामूक होऊं नये ह्मणूनच कीं काय, सरकाररीत्या 'अशा प्रकारचे श्राद्धोत्सव समारंभ खेड्यांतील व खेडे व ज्या शहरांतील लोकांनीं राजी खुषीनें पार पाडून न्यायी(?)व क्षमाशील(?) पोर्तुगीज सरकारास दुवा द्यावा व लोकसमाजाची आपखुषीनें ह्या पवित्र [?] उत्सवांत भाग घेण्याची तयारी नसल्यास त्या त्या गांवांतील रजिदोर [पाटील] साहेबांनीं त्यांस मनगटाच्या जोरावर झालें तरी समारंभांत भाग घेण्यास भाग पाडावें, असे हुकूम चोहींकडे सुटले आहेत. हें वाचतांच कोणाच्याहि डोळ्यांपुढें सकृत्‌दर्शनीं असा प्रश्न उभा राहणें शक्य व रास्त आहे कीं हें राज्य कोणाचें? सरकारचें कीं प्रजेचें?

गामाला पिंड कीं हिंदुत्वाची धिंड :— मात्र ह्या बाबतींत आह्मीं पोर्तुगीज सरकारास दोष देण्यास मुळींच तयार नाहींत. वरील गोष्ट जरी शब्दशः खरी असली तरी ह्या बाबतींत दोष द्यावयाचा तो आम्हां धर्मलंड हिंदूंनाच दिला गेला पाहिजे हें आमचें ठाम मत आहे. आमच्यांतीलच कांहीं विशिष्ट शिष्ट (?) बांधवांची गोष्ट सोडून दिली तर असें आढळून येईल कीं, जगांतील कोणत्याहि भागांवर कां होईना, प्रत्येक जण आपल्या हातांतील अवशिष्ट अधिकाराचा उपयोग केव्हांहि लोकमताची व लोकसहानुभूतीची ओढ आपणाकडे व आपल्या इष्ट आकांक्षेकडे, मग ती राजकीय असो, सामाजिक असो, अगर धार्मिक असो—ओढून घेण्याच्याच जय्यत तयारींत असतो. चोरें आपल्याच बाजूला मावी ओढून घेतें ही गोष्ट जरी तथ्यांश व सत्यांशपूर्ण असली तरी मावीनें तरी त्याच्याच बाजूनें कां आपलें घोडें दामटावें? व दसेंहि पाहूं गेल्यास आमचा हिंदुसमाज इतका निर्जीव व नामर्द बनला आहे असें ह्मणणें प्रासंगिक व सत्यास धरून होईल काय? जर आम्ही हिंदुसमाजानुगामी इतके निर्जीव झालेलों नाहीं, जर मर्दपणाची निसर्गनिर्मित धमक आमच्या छातींत आहे तर आम्हीं आमच्या ख्रिस्ती बांधवांच्या, जेणेंकरून आमच्या व भावी पिढींच्या धार्मिक भावना जिरून व विरून जाण्यास मदत होते त्या आसुरी लालसेच्या मनीषेपुढें षंढाप्रमाणें मान कां वाकवावी? हिंदुशास्त्रांतील धर्मतत्वांवर व भद्भगवद्गीतेसारख्या श्रीशप्रणित ग्रंथावर जर आमचा दृढ व अढळ विश्वास आहे, 'स्वधर्मे निधनंश्रेय: परधर्मो भयावहः, यांसारख्या दैवी तत्वांतरीं जर आम्हीं समरस झालों आहों तर अशा रीतीनें आमच्या हिंदुधर्मावर होणारा कुठार प्रहार आम्हीं हाडांच्या हिंदूनीं मुकाट्यानें सहन कां करावा? **धर्मासाठीं मरा, जग गुणानुवादें भरा.**

आह्मांला कशाचें विशेष दुःख होतें :— गोमांतकाच्या गंगाजळीच्या औदार्यावर व बळावर पोसले जात असतां अहंमन्यतेच्या नसत्या फुशारक्या मारणाऱ्या गोमांतकीय नोकरशाहीनें ह्या समारंभोत्सवाखातर हवेतसे पैसे उधळले तर त्यांत आश्चर्य नाहीं. कारण त्यायोगें त्यांच्या खिशास कांहीं चट्टा बसत नाहीं. व तिजोरीच्या पेढीवर तुळसीपत्र टांकीत व आपल्या साऱ्या विवेकबुद्धीचें खोबरें झाल्यावर श्राद्धकर्मानिमित्त पाद्रींनां गूळ खोबरें वांटीत, गामाभक्तीचें हवें तसें प्रदर्शन मांडण्यांस त्यांस मुळींच हरकत नाहीं. सरकारची 'हांजी हांजी करण्यांत पुरा प्रवीण बनलेला 'बगलच्या' वर्ग अधिकारीवर्गाची प्रीति व कृपा संपादन करण्यासाठीं व मान अगर नाम मिळविण्याकरितां पैसा पाण्यासारखा खर्च करण्यांत केव्हांहि दीडपायांवर तयार असतो, कारण त्यांतच तो आपणास मोक्ष प्राप्ति झाल्याचा साक्षात्कार पाहूं शकतो. वास्तव उपरिनिर्दिष्ट दोनहि वर्गानीं 'अहो रूपं महो ध्वनि:' करण्याचे कितीहि जरी नवीन उपाय अंमलांत आणले तरी त्यांस सामुदायिक किंवा सामुच्चयिक ह्यां पैकीं कोणतेंच रूप येऊं शकत नाहीं. आणि ह्मणूनच त्यांच्या कोणत्याहि कृत्याची आह्मीं मुळीं पर्वाच करीत नसल्यानें त्याचा आह्मांस विधीनिषेधहि नाहीं. पण त्याच बरोबर आह्मांस आश्चर्य व अत्यंत वाईट वाटतें तें ह्याचेंच कीं आपली सदसद्विवेक बुद्धि सरकारास विकून त्याचे सर्वस्वी गुलाम झालेले वरील दोन्ही वर्ग खेरीज करून तिसरा जो म्युनिसिपालट्या, लोकलबॉर्डें इत्यादि स्वतंत्र संस्थांचा मिळून बनलेला वर्ग तोहि ह्या गामावरील भक्ति दर्शविणाऱ्या प्रदर्शनांत भाग घेत आहे असें ऐकिवांत हल्लीं येऊं लागलें आहे. वास्तविक ह्या स्वतंत्र सदराखालीं मोडणाऱ्या संस्थांस अमुकच करा व अमुकच नका करूं असें सांगण्याचा सरकारास कोणत्याच तऱ्हेचा हक्क पोंचत नाहीं. पण ह्या 'मज घे, ह्मणून अंगावर पडणाऱ्यांस त्यानें तरी काय करावें? या विषयीं अधिक लिहायाला गेलों तर हे सुशिक्षित (?) व शहाणे (?) लोक उलट आह्मांवरच खेसकून ह्मणायाचे: 'अहो! एकदां आह्मांला तुह्मीं निवडून दिलेंत ना? आतां तुमचें काय राहिलें! आह्मांला हवें तसें वागण्यास आह्मीं मुखत्यार आहोंत!' एतदर्थ आम्हीं आपली लेखणी आंखडूनच घेतों. पण जातां जातां त्यांनां एवढेंच सुचवून ठेवितों कीं 'आपल्या वडील धाऱ्या माणसांस मूर्खांत काढणाऱ्या शहाण्या अक्कलवंतानों, आपण काय करणार तें करा, पण सावधगिरी एवढीच ठेवा कीं तुमचें उदाहरण गिरविण्यास आजच्या विद्यार्थी वर्गांतून निघणारे उद्यांचे तरुण तयार होणार आहेत. त्यांनां वाईट वळण देऊन पित्र क्षोभ डोक्यावर घेऊं नका! 'विद्यार्थी वर्ग हीच राष्ट्राची खरी संपत्ति होय.'

मडगांवचें पत्र

मडगांव येथें गामोत्सवासाठीं कित्येक अधिकाऱ्यांनीं व्यापारी व इतर लोकांवर जबरी चालवून, खुषी नसतांनां त्यांनां सदरहू उत्सवाप्रीत्यर्थ वर्गणी भरण्यास भाग पाडिलें! हा 'जबरीचा रामराम' घेण्यांत येथील पाठशाळेचे मुख्याध्यापक सि. रिबैर यानीं प्रमुखत्व पटकावलें होतें. बहुतेक हिंदु लोक व शिक्षण संस्थांतील हिंदु विद्यार्थी यानीं अधिकारी वर्गाच्या रोषाची पर्वा न करतां, उपरोक्त उत्सवांत भाग घेतला नव्हता. ता २३ रोजीं 'जामोरीन'च्या सोंगाची मिरवणूक काढण्यांत आली होती. केवळ हिंदूनां चिडविण्यासाठीं, जामोरीन व मिलिंद यांच्या सोंगांकरितां मुद्दाम हिंदु विद्यार्थ्यांची निवड करण्यांत आली होती परंतु मिलिंदच्या पार्टानें ऐन वेळीं आपला स्वाभिमान जागृत केला. या स्वाभिमानाचें पारितोषिक त्याला परीक्षेच्या वेळीं त्याच्या शिक्षकांकडून दिलें जाईल, अशी वदंता आहे. सविस्तर माहिती येत्या अंकीं.

बातमीदार

म्हापसेंचें पत्र

म्हापसें येथील लिसेव मुनिसिपालमध्यें ता. १९।१२ रोजीं गामाचें श्राद्ध पाळण्यांत आलें. शाळागृहांत मुलांच्या हस्तकौशल्याचें प्रदर्शन भरविलें होतें. तसेंच सोडावाटरच्या बाटल्यांचा जंगी स्टॉक व दारूच्या बाटल्या व कोपेंहि तेथें दिसत होतीं. श्राद्धानिमत्त दारूचें तीर्थ विद्यार्थ्यांस पाजलें कीं काय कळत नाहीं. शाळेंत उत्सव सुद्धां दारूशिवाय पार पडत नाहीं हीऔर गोष्ट आहे. रात्रो निघालेल्या मिरवणुकींत, महात्मा गांधी, लो० टिळक वगैरेंच्या नावांचाच जयघोष ऐकू येत होता. बिचारा व्हास्को या जयघोषांत कुठें विरून गेला असावा बरें? वाहवा विद्यार्थी!

शाळागृहांत गांधी टोपी न वापरतां ती बाहेर वापरावी अशा मताचे प्रो. सिनारी हे पंदांच्या कॉंग्रेसला बेळगांव येथें जाणार असून त्या प्रीत्यर्थ त्यानीं खादीचे कपडे शिवायला दिले आहेत अशी बोलवा आहे. मताप्रमाणें वागण्यांत भूषण आहे.

बातमीदार.

पत्रव्यवहार

रा. रा. भारतकर्ते यांसः—

'हिंदु' पत्रांतील रा. केणी यांच्या व्याख्यानाचा गोषवारा वाचून मी जें पत्र प्रसिद्ध केलें त्याचा हेतु त्यांच्यावर घसरून पडून 'एनकेन प्रकरेण' आपल्या नावाचें व लेखांचें 'टामटूम' केलें जावें हा नसून योग्य माहितीच्या अभावीं त्यानीं बेजबाबदारपणें केलेलीं विधानें कशीं चुकीचीं आहेत एवढेंच मला दाखवावयाचें होतें. टीका करण्याचीच जर मला आवड भागवून घ्यावयाची असती तर दुसरे अनेक महत्वाचे विषय होते. स्वतःच्या नांवाचें ढोलकें पिटायला केण्यांसारख्या अप्रसिद्ध व्यक्तीची मुळींच जरुरी नव्हती. पण स्वतःच्या मोठेपणाचा फाजील अभिमान बाळगणाऱ्या लोकांनां हें उमजावें कसें? 'एवढें लिहिलें आहे तरी काय' ह्मणून व्याख्यानाचा गोषवारा वाचण्याकरितां वळलेली कुतूहलपूर्ण दृष्टी आढ्यतेनें भरलेली नसून ती सकौतुकच होती. गोमांतकासारख्या एका बाजूला पडलेल्या प्रांतांतील मराठ्यांच्या प्रत्येक प्रगतीपर चळवळीकडे गोमांतकाच्या बाहेरील मराठा याच दृष्टीनें नेहमीं पहात असतो. 'तुच्छता' 'हेटाळणी' किंवा 'आढ्यता' याचा लवलेशहि त्यांत आढळणार नाहीं. आपल्या डोळ्यांवरचा दूषित चष्मा फेंकून देऊन जर नीट पाहिलें असतें तर केण्यांनांहि ही गोष्ट दिसली असती. पण 'रवींद्रनाथ आपले गुरुदेव आहेत आणि त्यांच्याविषयीं आपण लेख लिहिले आहेत एवढें सांगावयाला इतक्या पाल्हाळाची जरूरी नव्हती, असलें कुत्सित वाक्य लिहून त्यानां कृतकृत्य तरी कसें होतां आलें असतें! मॉडर्न रिव्ह्यु व विश्वभारती बुलेटन वाचणाऱ्या या गृहस्थानां शांतिनिकेतनचा प्रत्येक विद्यार्थी व सभासद आपल्या लेखांत किंवा व्याख्यानांत रवींद्रनाथांनां 'रवींद्रनाथ' या नांवानें न संबोधतां 'गुरुदेव' याच आदरार्थी नांवानें नेहमीं संबोधीत असतो ही साधी गोष्टसुद्धां कळली नाहीं. पण तसें कळलें असतें तर लेखकावर त्याच्या नांवाचा व लेखांचा गाजावाजा करण्याचा आरोप तरी कसा लादतां आला असता! रा. केणी ह्मणतात 'माहिती अपुरी आहे तर ती त्यानीं पुरी करावयाची होती.' अगदीं बरोबर! पण त्यासाठीं तो काल व तें स्थळ नव्हतें. कोणत्याहि विषयावरील आक्षेपक पत्रें चुकीची दुरुस्ती करण्याकरितांच फक्त लिहिलेलीं असतात. माझ्या पत्राचा हेतु हाच होता. रा. केण्यांना मात्र मी 'शब्दाचें अवडंबर माजवून, 'पराचा कावळा' किंवा राईचा पर्वत करण्याचे वृथा श्रम घेतले आहेत' असें वाटलें. नाइलाज आहे! माझें कर्तव्य मी केलें. रा. केण्यांनीं पाहिजे तर आणखी कुठल्या तरी वर्तमानपत्राकडे धाव मारावी व दोन-चार रकाने लेख खरडून आपल्या बेजबाबदार विधानांचें भरपूर समर्थन करावें. प्रस्तुत लेखकावर कुत्सित टीकेचे शिंतोडे अजून भरपूर उडवावयास मिळाले नसल्यास अनमन न करतां तेहि उडविण्याची हौस जरूर भागवून घ्यावी. आह्मी मात्र

लेखणी आवरती घेणें लेखकास शहाणपणाचें वाटत आहे.

मुंजीसमारंभांत आलेल्या बऱ्याच हिंदु पाहुण्यांस (एकंदर नव्हे) गांवच्या एका हिंदुगृहस्थाच्या घरीं नेऊन दारू ' पाजण्यांत आली व तो खर्च कामत महाशयानीं खुषीनें नसला तरी केवळ भीडेखातर केला हें जगजाहीर आहे. त्याच्याहि पूर्वी ह्मणजे मुलाचें दत्तक विधान कायदेशीर करितानां या असल्या पाहुणचारास आरंभ झाला होता; तो या मुंजीसमारंभानें पूर्ण झाला. इतकेंच. या उपर भटजीमहाराज, पुराव्याच पाहिजे असेल तर तो आपल्या अंतःकरणांतच सांपडेल. एखादा तिर्थेहि मिळाला नाहीं तर आपल्या आमंत्रणास मान देऊन आलेल्या पण दारूबाज नसलेल्या प्रत्येक पाहुण्यास विशेषेंकरून सोयसंबंधीच्या पाहुण्यास विचारून याचा खुलासा करून घ्यावा. आपणास मद्यपानाची चीड असणें स्वाभाविक आहे. फक्त बड्या पाहुण्यांची मनःशांति व्हावी, त्यांतहि कांहीं आपले यजमान आहेत, त्यांचा घुस्सा आपणावर होऊं नये, यासाठीं आपण हा मद्यदानाचा प्रसंग ओढवून घेतला असला पाहिजे. या पुढें सुदैवानें लग्नसमारंभाचा सुयोग आल्यास तसल्या भीडमर्यादेस बळी पडूं नका. बऱ्याच घराण्याशीं आपलें पुरोहितकीचें नातें आहे त्यांच्याशीं संबंध ठेवितानां मद्यपाननिषेधाचीं तत्वें जागृत ठेवूनच सर्व व्यवहार राखावा अशी आपणास लेखकाची नम्र विनंति आहे.

लेखक 'विरोधी' या टोपण नावानें भारतांत कधींकधीं आपलें अस्तित्व दाखवित आहे. जुवेबाजी, रंडीबाजी, दारूबाजी, चैनबाजी, वगैरे समाजास हतबल करून टांकणाऱ्या निंद्य व्यसनाशीं त्याचा हटकून विरोध आहे. आपणासारख्या वैदिकाच्या हातून मद्यदानाचें पातक घडलें, त्याचा उग्र वास आल्यामुळें त्यास घटकाभर गुंगी आली असेल पण त्याहून शतपट ज्यास्ती गुंगी आपणास या समारंभाचे यजमान या नात्यानें आली ह्मणावयाची. निदान आपण आपल्या आव्हानांतील शब्दांनीं तसें सिद्ध करून आमचें काम बरेंच हलकें केलें-नव्हे शिल्लक ठेविलेंच नाहीं या बद्दल आपले आभार मानून रजा घेतों.

मार्गशीर्ष व. ५मी १८४६

ANUNCIOS

dinheiro no cofre publico, a ponto deste ficar abarrotado, porque e' que estao por ai a trabalhar pela extingao dalgumas repartigoes como a repartigao de Instrugao, Auditoria etc. e pela reducgao do pessoal doutras?

Se ha tantos laques de rupias ¿porque tanto empenho em por-se em pratica a' ultima hora o tal famoso *Plano governativo* que ora surge como Messias Salvador?

Pelos modos estamos em um periodo da mais trascendental politica do ... JADU'.

UM ENIGMA

Escreve o *Diario da Noite* de 29 de Dezembro, sob a epigrafe *Finis Laus Deo* o seguinte:

"Enquanto subia ao ar o ultimo *morteiro* dos festejos do 4° centenario da morte de Dom Vasco da Gama foi ontem distribuido um SUPLEMENTO ao *Boletim Oficial* publicando o telegrama que da India, ao iniciar se a comemoragao, foi dirigido para Metropole saudando na pessoa do Ministro das Colonias, sr. Carlos de Vasconcelos a Patria Portuguesa!...

A fim de perdurar o nome do inclito navagador foi determinada a reconstituigao do *Instituto Vasco da Gama*, como consta do referido suplemento; e para ligar o mesmo glorioso nome a uma louvavel iniciativa da Comunidade mussulmana, foi concedido um subsidio a's ESCOLAS DE HINDUSTANI "Anjuman—Islam, da Casabe' de Ponda' e "Anjuman Nerul Islam desta Cidade."

E' para no's um verdadeiro enigma o que la' esta' escrito.

¿Que tem o Gama com a lingua *Hindustani*?

¿O subsidio a ser dado a's escolas da mesma lingua representara' uma recompensa aos descendentes dos correligionarios do piloto que *descobriu o caminho maritimo a' India* de que o Gama tirou o melhor partido?

¿Ou constituira' o mesmo subsidio uma especie de indenisagao aos mouros, por perdas e danos, inflingidos aos seus ascendentes pela descoberta do Gama? Que sera'?

Nada podemos conjecturar, pelo simples motivo de nao haver ca' em casa ninguem que beba de fino nas regioes etereas do Supremo Poder.

O que o *Diario* noticiou, sera' para no's um enigma, enquanto alguma alma caridosa nao nos decifrar-lhe o segredo.

DEMANDA E CHICANA

Na *Terra* de 27 de Dezemcro lemos o seguinte:

"O *Anglo-Lusitano* publicou um certo nu'mero de casos dando uma carga de cavalaria nos advogados-*apaches*.

Mas, para que os seus reparos fossem completos, era forgoso que reconhecesse que o juiz nao esta' la' no seu lugar para sancionar o que seja agravo de alheios direitos, e que lhe cumpre apurar a verdade com a sua assistencia efectiva, especialmente em todas as questoes em que a parte contraria nao e' chamada, como nos arrestos e nas tais questoes de posses esbulhadas a que se refere *Anglo*.

Nas comarcas em que o juiz inste as testemunhas que veem de bico feito para provar as alegagoes ao requerente, e as aperte, ficara descoberta a chicana, traindo-se, contradizendo-se as testemunhas falsas, e nao podem consumar-se os abusos que aquele colega menciona ou pelo menos, nao serao em tao grande escala, e sera' louvavel que assim procedam da mesma maneira como e' louvavel a orientagao dos agentes do M. P. que quando reconhegam que as testemunhas de acusagao nao depoem a verdade, requerem a sua prisao e quando se convengam da inocencia do re'u, sao os primeiros a reclamar a sua absolvigao.

E' do nosso conhecimento que um delegado do procurador da Republica, a's vezes, poe em pratica uma orientagao lavada do preconceito de que a missao do M. P. e' acusar sempre ainda quando no intimo se convenga de que o re'u esta' inocente."

Temos muito a dizer sobre o mal da *Demanda* que entre no's campea infrene, por culpa de... muitos, sobretudo, de testemunhas reconhecidamente falsas e por desleixo daqueles que tem o dever de as corrigir.

Onde ha demanda, ha chicana e esta tem cavado ruina de familias inteiras e inocentes!

Mas a exemplificagao formara' milhor a conviccao. Iremos a' ela, pois.

MENSAGENS

O representante do *Bharat* entrevistou-se em Belgaum com Mahatma' Gandhi, Lala' Lajpatrai, Devi Sarojini Naidu', Malvia e T. Prakasham.

As mensagens que os eminentes patriotas mandaram a Goa e ao *Bharat* por intermedio do representante deste serao publicadas nas colunas do nosso jornal, na primeira oportunidade.

Vera' por elas o leitor que os grandes vultos do visinho territorio nao se desinteressam do bem estar deste "lindo jardim a' beiramar plantado",

XENCORA R. NADKARNI

Registamos com maior entusiasmo que este nosso distinto com-patricio, filho do sr. Ramochondra L. Senai Nadcornim, digno recebedor da fazenda deste concelho, foi eleito Director de Instrugao da Associagao Academica do Instituto Superior de Comercio de Lisboa para o ano de 1924-1925.

A eleigao do talentoso academico demonstra claramente quao querido ele e' no seio dos seus colegas europeus.

Felicitamo-lo, porisso, cordialmente

UMA VERDADEIRA POLITICA

"A riquesa e a sciencia sem trabalho tornam-se inuteis no campo do patriotismo. So' os trabalhadores e' que dai em diante gosarao do respeito eis o que o *Mahatma' Gandhi* pensa.

वर्तमानसार.

—गोमांतकांतील प्रत्येक भागांत चालू असलेल्या गामोत्सवाप्रमाणें काणकोणातील सरकारी ऑफिसांची जागा जी चावडी, इथेंहि हा उत्सव साजरा झाला. या उत्सवाप्रीत्यर्थ आदमिनिस्त्रासावांकडे दिवसभर वाजंत्र्यांचा कडकडाट व संध्याकाळचे सात वाजण्यांच्या सुमारास दिव्यांची रोषणाई व खोजन्यांचा आणि फटाक्यांचा गडगडाट व कडकडाट झाला! चावडीच्या प्रवेशद्वारापासून थेट कार्तेलपर्यंत व तेथून आदमिनिस्त्रासावांपर्यंत व हजामांच्या वाड्यापर्यंत, रस्त्यांच्या बाजूनीं दिपावली लाविल्या होत्या. ही सर्व कामगिरी करून घेण्याचा भार येथील कांहीं हिंदूंनीं आपल्या शिरावर घेतला होता. ते जणूं काय हें कृत्य आपलें आद्य कर्तव्यच समजून ते बजावण्यांत निमग्न झाले होते व एक सारखे कामकऱ्यांना अमुक करा तमुक करा असे हुकूम सोडीत होते. कामकरी लोकांत कांहीं 'शेंडीवाले' होते हें लक्षात ठेवण्यासारखें आहे. कांहीं वेळानें म्हणजे साधारण आठांच्या सुमारास प्रत्येक लांब काठीच्या टोंकाशीं पेटवून लाविलेले सुमारें १५–१६ रंगी कागदी कंदील कांहीं हिंदु खिश्चनांनीं घेतलेला एक मेळा आदमिनिस्त्रासावांकडून वाजंत्र्याच्या वाद्यांत व गामाच्या जयघोशांत चावडीच्या प्रवेशद्वाराकडे येऊन ठेपला. हे कंदील येथील एका हिंदु गृहस्थानें स्वखर्चानें तयार करविले होते असें म्हणतात हा गृहस्थ त्या कंदिलांच्या उजेडाच्या तेजावर भूलोकावरील क्षुल्लकशा भागांत चालू असलेला गामोत्सव त्या गामाला दाखवित होता असें भासत होतें. पण त्याचवेळीं स्वर्गांत नांदत असलेल्या हिंदुस्थानांतील परमपूज्य थोर पुरुषांच्या डोळ्यांतून अश्रु गळले असतील हें त्या गृहस्थास कळलें नसेल! नंतर तिथें तो मेळा दोन मिनीटें थांबून त्यांतील एक प्रमुख खिश्चन पुढील प्रमाणें जयघोषाच्या रूपानें ओरडला: व्हिवा वास्को द गाम, व्हिवा आदमिनिस्त्रादोर द कानाकोन, व्हिवा पोव्हु द कानाकोन. हें वरळणें झाल्यावर मेळा परतला. ह्यावेळीं ह्या मेळ्यांतील हिंदूंचीं तोंडें कां मिटून राहिलीं होतीं कुणास ठाऊक! एकानेंहि महात्मा गांधीचा जयजयकार किंवा हिंदुस्थानांतील हिंदु थोर पुरुषांच्या नांवांचा जयघोष करवला नाहीं. जो तो हिंदु हर्षानें खुलून गेला होता. सर्वांच्या मुखांवर हास्य विलसत होतें. ह्या उत्सवास, चावडीपासून दूरच्या अंतरावरून म्हणजे नगर्सें, पाळोळें वगैरे ठिकाणाहून कांहीं हिंदु गृहस्थ ह्या रात्रीचे वेळेस हजर होते! ह्याप्रमाणें तो मेळा चावडीवरील मुख्य रस्त्यावर फिरून आल्यावर शेवटीं सुमारें साडेआठ नऊ वाजण्याच्या सुमारास हा उत्सव बंद करण्यांत आला. गामोत्सवाप्रीत्यर्थ साजरी करण्यांत आलेली दिपावली म्हणजे आम्हां हिंदूंच्या हिंदुत्वाची प्रत्यक्ष टवाळी होत असते हें आमच्या लोकांनां कसें समजत नाहीं? अशी पृच्छा काणकोणचे राजाराम पं. कुडचडकर हे करतात.

—श्री संस्थान माशेल येथील यंदां मालनी पौर्णिमेचा उत्सव (शनिवारीं पौर्णिमा किंचित् असल्यामुळें) शुक्रवारीं करण्याचें ठरविलें आहे.

—गामोत्सवाविरुद्ध गोमांतकांतील हिंदु पत्रांनीं चालविलेली चळवळ हिंदु पुढाऱ्यांना मान्य नसून तीजविरुद्ध त्यानीं सरकारपक्षाकडे निषेध प्रगट केल्याची वातमी आहे. खरे खोटें राम जाणे.

—फोंडें येथील आल्मेद कॉलेजचे प्रिन्सिपाल प्रो. नारायण अनंत बांदोडकर हे एक 'स्वतंत्र प्रजासत्तावादी' नावांचा पक्ष स्थापन करण्याच्या विचारांत आहेत.

—प्रचलित विषयांच्या गर्दीमुळें प्रसिद्ध न झालेला पत्रव्यवहार यत्या अंकीं यतील.

—लखनौ येथें भरलेली यंदांची प्रागतिक परिषद व बेळगांव येथे भरलेल्या सर्व परिषदा यशस्वी रीतीनें पार पडल्या.

—गामदिन स्मारकाप्रीत्यर्थ फोंडें व पणजी येथील हिंदुस्थानीं भाषा शिकविण्यांत यत असलेल्या दोन शाळांना मदत करण्याचें सरकारनें ठरविलें आहे!

—सांगें येथील मुनिसिपालटीच्या ट्रेजररवर सरकारची अवकृपा झाल्याचें कळतें!

—पणजी, मडगांव व म्हापसें येथील कोंसेन्हातोरियस दु रेजिस्त प्रेदियाल त्या त्या कोमार्कांच्या देलेगादांकडे देण्यांत येणार असून कोंसेन्हादोरांच्या जागा खालीं करण्यांत येणार आहेत, अशी पोर्तुगालहून वातमी आली आहे.

एक पत्र

सन्मान्य संपादक 'भारत' यांसः–

सप्रेम नमस्कार विनंति विशेष—मठग्राम येथें अलिकडे प्रसिद्ध होत असलेल्या 'हिंदु पत्रांत मराठी शिक्षणासंबंधानें कांहीं स्फूट सूचना प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांत सरकारी मराठी शाळांत मराठी ट्रेनिंग कालेजांत [नोर्मल स्कुलांत]पास झालेल्या शिक्षकांची योजना करण्याविषयीं एक सूचना आहे. सूचना फार नामी आहे. मात्र या मराठी ट्रेनिंग कॉलेजांत संस्कृताचा कोर्स असला पाहिजे असें वाटतें. कारण संस्कृताची थोडी तरी माहिती असल्याशिवाय मराठीचें ज्ञान चांगलें होत नाहीं, अशी माझी समजूत आहे. तिचा 'हिंदु' कर्ते विचार करतील अशी आशा आहे. कळावें. पत्रकर्ते महाराज, तसदीबद्दल माफी असावी. हे विनंति.

आपला एक जुना मित्र. L. P.

आजचें पोर्तुगीज सदर

अग्रलेखः–

गामोत्सवानंतर; जनतेनें गामोत्सवांत भाग घेतला नाहीं; नोकर शाहीचा नकली हैदोस; गामोत्सवासंबंधीं हिंदी लोकमत.

स्फुट विचार

कांग्रेसचा आठवडा व गामाचा आठवडा आणि कांग्रेसपासून शिकण्याचा धडा; हिंदूचें उपकारकर्त्यांशीं धोरण; गामाचें स्मारक; पोर्तुगेज न्याय लोकानां खाय; इ. इ. इ.

ANUNCIOS

O *Bharat*, ano 9° n° 40 de I de Janeiro de 1925

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida

Numero avulso 1 tanga

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem, e cartorio do escrivao do 2° oficio Barreto vao ser vendidos em hasta judicial, a' porta do tribunal situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a estaçao de Sanvordem no dia 9 do seguinte mez de Janeiro, a's 10 horas, e pelo prego superior ao da avaliaçao os seguintes bens: Direito a' terça parte do predio rustico denominado Vadivo da cultura de arroz; Predio rustico denominado Madamodilsordo da cultura de arroz; Predio rustico denominado Diguivangana da cultura de arroz Predio rustico denominado Calemnomosso sordo da cultura de arroz e predio rustico denominado Gorbata bagaita da cultura de coqueiros e outras arvores, todos sitos em Gocoldem e discritos na conservatoria predial desta comarca respectivamente sob os n°s 16658, 16659, 16660, 16661 e 16662 a fl. 170 v. ate' fl. 172 v, do livro B 45 e avaliados tambem respectivamente por, 55, 110, 120, 100 e 150 rupias. Penhorados nos autos civeis de execuçao por custas que o Digno Agente do Ministerio Publico nesta comarca promove contra Locuma Gaocarina viuva de Janum Gaucar e outros de Gocoldem por apenso aos autos de inventario orfanologico procedido pelo falecimento do dito Janum Gaocar, Sao por este citados todos os credores incertos dos ditos executados e os co-proprietarios e quinhoeiros nos termos e para os fins de lei. A contribuiçao de registo por inteiro ficara' a cargo do arrematante. Para ser publico se expediu este.

Xeldem, 12 de Dezembro de 1924.

O Escrivao de Direito do 2° oficio

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito

A. A. de Brito e Nascimento

Vende-se, em hasta, em globo ou em glebas.

Predio Silva-Batta em que existem 3 casas e 2 lojas, sito na séde do concelho de Quepem, no dia 25 de janeiro proximo pelas 11 horas, na residencia do sr. tabelião Salinho da Silva, reservando o signatario deste a quem pertence retirar da praça não lhe convindo o preço. O arrematante depositará no acto 10% do preço Quepem 22 de Dezembro de 1924.

Jeronimo Francisco da Silva

मडगांव येथील गामोत्सव

[आमच्या प्रतिनिधीकडून]

अखेर कार्यक्रमांत ठरल्याप्रमाणें इतके दिवस गाजत असलेला हा उत्सव ता. २३, २४, २५ रोजीं गाजरा करण्यांत आला. समारंभ साजरा करण्याकरितां नेमलेल्या मंडळांत सरकारी अधिकाऱ्यांशिवाय ' तेन्द ' पत्राचे संपादक होते. मडगांव हें व्यापारी हालचालीचें शहर असल्यामुळें कोणत्याहि सार्वजनिक वर्गणीची धाड पहिल्यांनदा व्यापाऱ्यांवर येते , त्याचप्रमाणें ह्याहि मंडळानें गावांत पुष्कळशा; जमिनदार खिस्ती वर्ग असतानां आपला;मोर्चा व्यापाऱ्यांवरच वळविला. सरकारी रोषास पात्र होऊं नये ह्मणून कित्येकानीं खुषी नसतांहि वर्गणी दिली. कित्येकानीं वर्गणी देतानां ज्या गामानें पुष्कळशीं क्रूर कृत्यें केलीं त्याच्या उत्सवांविषयीं आपली नापसंति दर्शविली. व्यापारी वर्गाकडून बरीच मदत मिळेल अशी मंडळाला आशा होती, परंतु जिकडे तिकडे विरोध दिसतांच त्यांस आश्चर्य वाटलें. हा विरोध हिंदु व्यापाऱ्यांकडूनच होत होता. ज्या गामानें विलायती सुधारणा इकडे आणून सोडली, ज्या गामानें आपणां सर्व लोकानां मुसलमानाच्या जाचांतून सोडविलें, खिस्ती धर्मासारखा उदात्त तत्वांचा धर्म ज्या गामामुळें आपल्याला लाभला त्या गामाचा उदो उदो करण्याचें सोडून हे हिंदु लोक विरोध कां करतात, ह्या बद्दलचें त्यांस आश्चर्य वाटत होतें. कित्येक ठिकाणीं विरोध असतांहि सरकारी अधिकारामुळें त्यांस वर्गणी मिळाली ...ेक ठिकाणीं अधिकाराचा दाव दाखती वसूल करण्यांत आली व ह्या अधिकाराचा दाव विशेषतः कमिटींतील एका हिंदु अधिकाऱ्याकडून झाला असें ह्मणतात.

ता. २३ च्या पहाटेस वाजंत्र्यांच्या आवाजानें व ब्यांडवादनानें शहरच्या लोकांस जागें करून गामाचा श्राद्धाचा दिवस उजाडल्याची आठवण दिली. सकाळच्या शांत व गुलाबी झोंपेच्या वेळीं हें वादन लोकांस आल्हाददायकच वाटलें. त्यानंतर लिसेव, इस्कोल प्रिमारिय ह्या सरकारी शिक्षणसंस्थांतील विद्यार्थ्यांची मिरवणूक थेट कार्तेलपर्यंत जाऊन तेथें सरकारी बावट्याचा आरोहणविधि पार पाडण्यांत आला. लिसेवांत हिंदु विद्यार्थी बरेच असतानां नुसते २–३ च हिंदु मिरवणुकींत दिसत होते. संध्याकाळीं झामोरीनच्या मोठ्या मिरवणुकीला ४ वाजतां प्रारंभ झाला. सर्व नोकरशाहीनें मिरवणुकींत भाग घेतलेला असून शिवाय ओस्पीसचे कामगार व रुग्णपरिचारिका हजर होत्या. हिंदु नोकरशाहींतले शेर ' बाब ' झळकत होते.

मिरवणुकीच्या आघाडीस रा. नीलकंठ विठ्ठल दळवी हे आपलीं कांहीं शेलकीं मुलें घेऊन हजर होते. बहुतेक मराठी शाळानां मिरवणुकीला आमंत्रण होतें पण एका दळव्याशिवाय ह्या महत्कृत्यांत भाग घेण्याइतके ते नशिबवान नव्हते ! तिरोडकर नांवांचे कोल्हापुरी मास्तर आपलीं दोनतीन मुलें घेऊन दंळव्यास पुरवणीवजा सहाय्य करीत होते. त्यामागें युनियन हायस्कुल व क्याथोलिक इन्स्टीटयूटचे विद्यार्थी असून त्यानंतर लिसेवचे व प्राथमिक शाळांचे विद्यार्थी रांगेनें उभे होते. तथापि दोनाहि इंग्रजी शाळांतील हिंदु विद्यार्थ्यांपैकीं एकाहि मिरवणुकीला हजर नव्हता, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. लिसेवच्या विद्यार्थ्यांपैकीं अगदीं थोडे हिंदु प्रोफेसरांच्या धाकामुळें व पुढील नोतांवर दृष्टि देऊन हजर होते. बहुतेक हिंदुजनता तटस्थ असतां ' नवीन मराठी शाळेचे ' मुख्याध्यपक रा. दळवी ह्यानीं उत्सवांत भाग घेऊन आपलें नाविन्य लोकानां दाखवून दिलें. दळवी मास्तरांप्रमाणेंच इतर पुष्कळानां आमंत्रणें होतीं, पण तीं केवळ गामाचें श्राद्ध सार्वजनिकरीत्या वाढलें गेलें अशी टिमकी वाजविण्यास मिळावी ह्या उद्देशानें त्यानीं केली होती. ही साधी गोष्टसुद्धां 'मडगांवचें पोलिटिक्स ' जाणणाऱ्या दळव्यांच्या लक्षांत आली नाहीं आणि ह्याप्रमाणे नेहमीं मराठीशाहीची व स्वाभिमानाची प्रौढी मिरवणाऱ्या दळव्यांचा बेगडी स्वाभिमान ह्यावेळीं दिसून आला.

कोल्हापुरी मास्तर तिरोडकर ह्यांनीं आपली एक लहानशी चार पांच मुलांची शाळ मडगांवांत आहे हें दाखविण्याची ही संधी दवडली नाहीं. ह्या प्रसंगानें तरी भातखाऊ तिरोडकर पेजखाऊ गोवेंकरांकडून स्वाभिमानाचा धडा शिकतील अशी आह्मांस आशा आहे. गोवेंकरांकडून पाणी अजमावण्याची संधी त्यांनां कांहीं दिवसांमागें आली होती व कांहीं पेजखाऊ गोवेंकर मध्यें न पडते तर तें पाणी त्यांनां तेव्हांच कळून चुकलें असतें.

मिरवणुकींत झामोरीनची भूमिका गावड नांवाच्या एका ४–५ वर्षे लिसेवांत रखडणाऱ्या हिंदु विद्यार्थ्यानें घेतली होती. वट काभर आपल्यास झामोरीनसारखा मोठा राजा होण्यास मिळेल व आपण जीं इतकीं वर्षे पाठशाळेंत रखडत आहें, त्यांतून सुटण्यालाहि हा एक उपाय होईल, अशा दुहेरी आशेनें आपल्या स्वाभिमानाला त्यांनीं तिलांजली देऊन वास्को डी गामाला गुडघे मोडून आपल्यासमोर बसवून घेतलें. प्रधानजीची भूमिका भिसे नांवाच्या एका विद्यार्थ्याला देण्याची केली होती, परंतु स्वाभिमान जागृत असल्यामुळें शेवटीं तें काम एका खिश्चन विद्यार्थ्याला करावें लागलें.

एका मोडक्या मोटारीवर सिंहासन रचण्यांत आलें असून त्यावर झामोरीन जुन्या पद्धतीप्रमाणें बसला होता त्याच्यापुढें गामा गुडघे टेंकून उभा होता. मोटारीच्या दोन्हीं बाजूंस व पुढें वारयोषितांच्या वेशांत खिस्ती मुली चालत होत्या. ह्याप्रमाणें मिरवणूक चालली असून कांहीं भोयांकडून मोटार ढकलण्यांत येत होती. टपालखात्याच्या पुढें पोंचल्यावर नवीन उभारण्यांत येणाऱ्या गामाच्या पुतळ्याचा पाया बसविण्याचा समारंभ झाला. ह्यानंतर मिरवणूक म्युनिसिपल गृहाकडे गेली व तेथें सरकारी बावटा उतरविण्याचा समारंभ झाल्यानंतर मंडळी आंत गेली आणि तेथें अध्यक्षांचें गामाचें गुणगानपर भाषण झालें. आकाशांतल्या बापाची भेट करवणाऱ्या व पाश्चात्य संस्कृतीची हिंदुस्थानांत पेरणी करणाऱ्या नामांकित गामाची स्तुति करण्यांत आली आणि गामाच्याच कृपाछत्राखालीं गोवें अबाधित राहो अशी प्रार्थना करून मायभूमीच्या (Portugal) गजरांत समारंभ बरखास्त झाला.

ह्या नंतरचा कार्यक्रम ह्मणजे दीपोत्सव सारें शहर प्रकाशित व्हावें ह्याबद्दल दवंडी पेटण्यांत आली होती पण आश्चर्याची गोष्ट ती ही कीं, कांहीं खिस्ती दुकानें व घरें सोडून दिलीं असतां कोणीं एकहि बत्ती लावली नाहीं. सारा नवा व जुना बाजार नेहमीं प्रमाणेंच शांत असून गामाच्या फेस्ताबद्दल कोणतीच चर्चा तेथें भासत नव्हती.

उत्सवाचा पहिला दिवस ह्याप्रमाणें पार पडला व दुसऱ्या दोन्ही दिवशीं कांहीं फेरफारानें असाच कार्यक्रम अमलांत आणला जाऊन गामाचा येथील चतुर्थ शतसांवत्सरिक उत्सव संपला.

साभार स्वीकार

विविध–वृत्तः— या नावांचें एक नवीन साप्ताहिक मुंबईंत प्रसिद्ध व्हावयास लागलें असून त्यांत येत असलेल्या अनेकविध लोकोपयुक्त महत्वाच्या माहितीमुळें तें लवकरच जनताजनार्दनाच्या प्रेमादरास पात्र होईल, अशी आह्मांस खात्री वाटते. अगदीं निःपक्षपातीपणानें प्रचलित राजकीय विषयांची चर्चा करण्याचें प्रस्तुत साप्ताहिकानें स्वीकारलेलें धोरण आदरणीय नाहीं असें कोण ह्मणेल ? 'विविध-वृत्त' विविध रुचीच्या लोकांत विविध तऱ्हेची माहिती विविध रीतीनें पसरवून, मराठी साप्ताहिकांत विविध क्रांति घडवून आणील, असें प्रसिद्ध झालेल्या त्याच्या अंकांवरून भविष्य वर्तविल्यास बिलकूल अतिशयोक्ति होणार नाहीं. 'विविध वृत्ता'चे संपादक रा. रामचंद्र काशिनाथ तटणीस हे नामांकित विद्वान असून वृत्ताची वार्षिक वर्गणी अवघी ३ रु. (आगाऊ) आहे. पत्ताः— म्यानेजर ' विविध –वृत्त, मुंबई नं. २.

स्थानिक–स्वराज्यः— पुणें येथील प्रसिद्ध वकील रावबहादूर ल. ज. आपटे यांच्या नेतृत्वाखालीं प्रस्तुत साप्ताहिक प्रसिद्ध होत असून, त्यांत स्थानिक स्वराज्यविषयक अर्थात मुनिसिपालट्यांसंबंधीं हरतऱ्हेची लोकशिक्षणाला अत्यंतोपयोगी अशीच माहिती संकलित केलेली असते. मुनिसिपालट्यांचा पूर्ण परिचय करून घेण्याची ज्यांची इच्छा असेल, त्यानीं सदर्हू पत्राचा वर्गणीदार व्हावें, अशी आमची शिफारस आहे. वा. व. रु. २. पत्ता— घर नं. ३३५, सदाशिव पेठ पुणें.

महिषासुरमथनः– राष्ट्रवैभव काव्यमालेचें प्रस्तुत पुष्प हें पांचवें असून, त्याच्या मधुर सुवासानें रसिकांचें अंतःकरण तल्लीन झाल्याखेरीज खास रहाणार नाहीं. कवि वसंतविहारानीं आपल्या या शाहिरी कवनांत शिवशाहीच्या ऐन उमेदींतील घडलेल्या एका महत्वाच्या प्रसंगाचें–अफझुलखानाचें प्राणहरण व त्याच्या प्रचंड सैन्याचा पराजय– वर्णन गायलें असून, त्याच्या श्रवणानें किंवा वाचनानें चित्त-वृत्ति स्वराज्य भावनेनें प्रफुल्लित होते. साहित्यसेवक रा. स. गो. विरकुड यांचा ' अल्प प्रस्ताव ' पुष्पाची रमणीयता वाढविण्यास बराच कारणीभूत झाला आहे, हें नमूद केल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं. किं. २ आ. पत्ताः—आंबेवाडी, गिरगांव, मुंबई.

महाराष्ट्र डायरीः— पुणें अनाथ विद्यार्थी गृहाचे सेक्रेटरी रा. वि. गं. केतकर यानीं अत्यंत कुशलतेनें तयार केलेल्या या डायरींत मनुष्यमात्रास हरघडी लागणारी माहिती संग्रहित केली गेली आहे. खर्च वजा जातां डायरीचें एकंदर उत्पन्न अनाथ गृहास अर्पण केलें जाणार असल्यानें, सर्व देशभक्तांनीं व शिक्षणप्रेमी लोकांनीं या महाराष्ट्र डायरीचाच उपयोग करावा, अशी आमची शिफारस आहे.

वार्षिक भेटः— अनाथ विद्यार्थी गृह, पुणें, याची १९२५ सालची भेट ह्मणून त्याच्या सन्माननीय सेक्रेटरींकडून आह्मांस एक कॅलेंडर आलें आहे. या कॅलेंडरांत दिलेल्या गृहविषयक अनेक उपयुक्त माहितींत व अनेक रंगी फोटोंतहि रा. वि. गं. केतकर यांचा मार्मिकपणा व्यक्त होतो. केतकरांसारखे कार्यवाहक अनाथ विद्यार्थी गृहास लाभले असल्यामुळें, त्याचा दिवसें दिवस उत्कर्ष होत असल्यास नवल नाहीं. केतकर व त्यांचे निग्रही अनुयायी यांस त्यांच्या अंगीकृत कार्यांत असेंच धवल यश मिळत जावो, असें आह्मीं अंतःकरणपूर्वक इच्छितों.

महाराष्ट्र–आदर्श–पंचांगः— गोमांतकांत 'आल्मानाक द पारेदी' या नावांचें एक पोर्तुगीज कॅलेंडर प्रसिद्ध होत असतें. 'आदर्श–पंचांग' या रा. का. श्री. नायक यांच्या कृतीची उभारणी उपरोक्त 'आलमानाका'च्या पायावरच झाली आहे, निदान त्यापासून कर्त्यानां आदर्श पंचांगाची कल्पना सुचली असावी असें वाटतें. कसेंहि असलें तरी रा. नायकांचा आदर्श–पंचांगाचा उपक्रम सर्व दृष्टीनीं स्तुतीस पात्र आहे. पंचांगांत 'थोड्या जागेंत पुष्कळ माहिती ' एकवटण्यांत कर्त्यानें व्यक्त केलेलें बुद्धिकौशल्य वाखाणण्यासारखें आहे. पंचांगांच्या चोहोंबाजूनीं झळकत असलेल्या चार महापुरुषांच्या फोटोनीं तर पंचांगाची मोहकता बरीच मोहविली आहे. किं. २॥ आणे

वर्ष–प्रबोधः— सन १९२५ वर्ष व्यक्तिमात्राला व राष्ट्राला कसें जाईल, हें समजून घेण्याची ज्यांनां इच्छा असेल त्यानीं हें ज्योतिर्विद रामनारायण, यांनीं काळजीपूर्वक व शास्त्रोक्त रीतीनें तयार केलेलें पुस्तक संग्रहीं ठेवावें. पुस्तक भविष्य-विषयक असल्यानें त्यावर आतांच अभिप्राय देतां येत नाहीं. किं. ८ आणे. पत्ताः— व्यवस्थापक वर्ष–प्रबोध ऑफिस दादर मुंबई १४

केसरीकारांस थोडा खुलासा

लेखांक १ ला.

मडगांव येथे प्रसिद्ध होणाऱ्या एका मराठी साप्ताहिक–हिंदु–वर्तमानपत्रावर अभिप्राय देतानां केसरीकारानीं आपल्या ता. २९ एप्रिलच्या अंकांत ह्मटलें आहे:–

गोमांतकांत हिंदु–मुसलमान ह्या द्वैता ऐवजीं हिंदु व रोमन क्याथोलिक खिस्ती हें द्वैत आहे. इंग्रज शास्ते व हिंदु शासित या द्वैताऐवजीं पोर्तुगिज शास्ते व हिंदु शासित या स्वरूपाचें द्वैत आहे. आणि इंग्रजी व मराठी या भाषांच्या झगड्या ऐवजीं पोर्तुगिज आणि मराठी यांत झगडा लागून राहिला आहे ”

या केसरीकारांनीं तुलनात्मकरीत्या लिहिलेल्या दोन द्वैतांचा व एका झगड्याचा विचार आजच्या या लेखमालेंत करावयाचा आहे.

वास्तविक केसरीकारांसारख्या अधिकारपूर्ण वर्तमानपत्रकारांच्या लेखणींतून, असल्या साध्या विषयासंबंधानें निघालेले विचार सूत्रवत् असतात; तेव्हां माझ्यासारख्या, लेखन व्यवसायांत व राजकीय व्यवहाराच्या बावतींत अगदीं अपुऱ्या इयत्तेंत असणाऱ्या एका व्यक्तीनें त्यांच्या त्या लेखणींतून अवतरलेल्या विषयावर कांहींहि टीकात्मक लिहिणें हा मोठा प्रमाद होय, असें दुसऱ्या कोणासहि सकृतदर्शनीं वाटण्याचा संभव आहे. तथापि, प्रश्न ज्यावरून गोव्यासंबंधीचा आहे व गोव्यांतील मी एक नागरिक या नात्यानें ह्मणा किंवा अन्य कोणत्याहि कारणामुळें ह्मणा, मला केसरीकारांच्या द्वैत द्वयाचा व लागून राहिलेल्या येथील एका झगड्याचा, तात्विक जरी नसला, तरी व्यवहारिकरीत्या, निदान, प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम अधिक दिसण्याजोगा असल्यावरून, व केसरीकार हे गोव्याच्या राजकीय दुर्गाबाहेर असल्या कारणानें व मी त्या दुर्गाच्या आंत असल्यामुळें, तसेंच, तात्विक किंवा काल्पनिक पुष्कळशा ज्ञानापेक्षां थोडासा अनुभविक ज्ञानोत्पादक खुलासा अधिक आहे असल्यावरून, दोन शब्द, केवळ खुलासा दाखल ह्मणून, लिहिण्याचा मी आज विचार केला आहे. तेव्हां, प्रथमतः केसरीकार ह्मणतात त्या “ हिंदु व रोमन क्याथोलिक खिस्ती ” यांच्या मधील व्दैताचा विचार करूं.

प्रथमारंभीं असें सांगितलें पाहिजे कीं, केसरीकार ज्या द्वैताविषयीं लिहितात तें राजकीय द्वैत होय. धार्मिक नव्हे व सामाजिकहि नव्हे. कारण हे दोनहि समाज आपापल्या सामाजिक व धार्मिक व्यवहाराच्या बावतींत अगदीं पृथक पृथक असल्यावरून त्यांचा एकमेकांशीं त्या त्या विवक्षित व्यवहारांत अर्थाअर्थीं थोडाच संबंध असतो. तरी संबंध काय तो येऊन जाऊन राजकीय व्यवहाराचा. तेव्हां या राजकीय व्यवहारांत हिंदूचा व खिस्त्यांचा, केसरीकार ह्मणतात त्याप्रमाणें, कितीसा व्दैतभाव आहे तें पाहूं.

माझ्या मतें राजकीय दृष्ट्या हा व्दैतभाव हिंदु–खिस्त्यांत, विचारांत घेण्याजोगा असा, वर्तमानकाळीं मुळींच नाहीं. ब्रिटिश हिंदुस्थांनांतील हिंदूंच्या दृष्टीनें तेथील मुसलमान लोक राजकीय व्यवहाराच्या बावतींत हिंदूंच्या पुष्कळ आड येतात असें तेथील वर्तमानपत्रांवरून समजतें. तशी गोष्ट येथें मुळींच नाहीं. उलटपक्षीं, येथें सर्व हिंदु व खिस्ती समाज एकमेकांच्या हातांत हात घालून सर्वसामान्य राजकीय व्यवहारांच्या बावतींत व्यवहारत असतात. किंवा तसें व्यवहारणें त्यांस स्थानिक राजकीय परिस्थित्यनुसार भाग पडलेलें असतें.

तसेंच येथें राजकीय व्यवहार ह्मणजे विशेषेंकरून नूतन हक्क संपादण्याचा व प्राप्त झालेल्याच्या अंमलबजावणीचा होय. तेव्हां या दृष्टीनें पाहिल्यास येथें हिंदु–खिस्त्यांत राजकीय दृष्ट्या द्वैतभाव मुळींच नाहीं. व नवीन हक्क संपादण्याच्या कार्यांत व प्राप्त झालेल्यांच्या अमलबजावणीच्या व्यवहारांत खिस्ती समाजानें आपलपोटेपणानें, ब्रिटिश हिंदुस्थानांतल्या मुसलमानांसारख्या सवत्यासुभ्या प्रीत्यर्थ कधींच नाव घेण्याजोगा उघड प्रयत्न केलेला नाहीं, कीं त्यापासून हिंदूंच्या राजकीय प्रगतीच्या गाड्यास खीळ पडली. व कदाचित गुप्त प्रयत्न करून एकाद दुसरी क्षुल्लकसुद्धां गोष्ट संपादिल्याचा विश्वसनीय दाखला नाहीं, कीं केसरीकारांस त्यास ‘हिंदू खिस्त्यांचें द्वैत’ असें, सार्थ रीत्या जरी नसलें, तरी निदान ओढून ताणून तरी संबोधितां येईल.

येथील मुनिसिपालट्या घ्या, लोकल बोर्डें घ्या व इतर सर्व तऱ्हेच्या प्रातिनिधिक निवडणुका घ्या. या सर्व बावतींत ‘हिंदु–खिस्त्यांचें द्वैत’ ह्मणण्या जोगी कसलीच गोष्ट घडलेली नाहीं. येथें प्रोव्हींशियल कॉंग्रेस आहे. तींत जरी आज थोडेंसें खिस्त्यांचें प्राबल्य आहे तरी तें, खिस्ती त्यांत अधिक भाग घेतात ह्मणून होय. तरी सुद्धां हिंदूनीं त्यांत अधिकाधिक भाग घ्यावा असा त्या संस्थेच्या खिस्ती पुढाऱ्यांचा प्रयत्न असतो. व केवळ हिंदूंच्याच सामाजिक व धार्मिक महत्वाकांक्षा पूर्ण व्हाव्या या हेतूनें तसे ठराव पास करून कृतींत आणण्याची शक्य तेवढी जबाबदारी खिस्ती समाजानें घेतल्याचीं पुष्कळशीं उदाहरणें प्रोव्हींशियल कॉंग्रेसच्या इतिहासांतून दाखवितां येतील.

केवळ पक्षभेदांस द्वैत असें नांव देतां येणार नाहीं. हिंदु खिस्त्यांत पक्षभेद आहे, पण तो राजकीय दृष्ट्या पडलेला नसून सामाजिक किंवा धार्मिक दृष्ट्या पडलेला आहे व राजकीय दृष्ट्याहि जरी पक्ष भेद असला तरी त्यांत द्वैत मुळींच नाहीं. एकवाक्यता आहे. ध्येय एक आहे.

हिंदु खिस्त्यांच्या आजच्या पक्षभेदास द्वैत हें नांव जरी बाह्यदृष्ट्या अप्रासंगिक असलें तरी हे दोनहि समाज सगळ्याच बावतींत अगदीं गुण्यागोविंदानें वागतात असें मात्र माझें ह्मणणें नाहीं. प्रश्न राजकीय द्वैताचा आहे. व केसरीकार ह्मणतात त्याप्रमाणें हा प्रश्न, ब्रिटिश हिंदुस्थानांतल्या हिंदुमुसलमानाचें द्वैत पुढें ठेऊनच सोडवावयाचा आहे; कारण, हिंदु खिस्त्यांमधील सामाजिक व धार्मिक द्वैतभाव हा केसरीकारांनां, ब्रिटिश हिंदुस्थानांतल्या हिंदुमुसलमानाच्या राजकीयद्वैतास पुढें करून उल्लेखणें मुळींच शक्य नाहीं. व तसें जर असेल तर अशीं द्वैतें पावलो पावलीं दाखवितां येतील. त्यांत हिंदुविरुद्ध मुसलमान किंवा हिंदुविरुद्ध खिस्ती अशा विशिष्ट स्वरूपाच्या अमुकच दुकलींच्या उल्लेखाची गरज नव्हती. एवंच या राजकीय सर्व सामान्य व्यवहाराच्या बावतींत हिंदु खिस्त्यांत आज ब्रिटिश हिंदुस्थानांतल्या हिंदमुसलमानासारखा द्वैतभाव नाहीं एवढेंच माझें ह्मणणें आहे. बाकी खिस्ती समाज हा धार्मिक व सामाजिक दृष्ट्या हिंदुसमाजापासून पृथक आहेच व प्रत्येकाचे आपापल्यापरी स्वसमाजाच्या प्रगतीप्रीत्यर्थ पृथक – पृथक प्रयत्न चालू आहेतच. तरी ते हिंदुखिस्त्यांतचसे काय, तर, तसे प्रयत्न हिंदु—हिंदूंतहि पक्षभेदामुळें निरनिराळ्या स्वरूपांत चालू आहेत. तरी मुद्दा एवढाच कीं, ब्रिटिश हिंदुस्थानांत मुसलमान लोक भलताच आपलपोटा प्रश्न उपस्थित करून हिंदूंच्या राजकीय आकांक्षांच्या जसे आड येतात, तसा येथील खिस्ती समाज हिंदूंच्या आड येत नाहीं किंवा त्यांस येणें आज शक्य नाहीं; कारण, सरसकट सर्व राजकीय व्यवहाराच्या बावतींत गोव्यांत हिंदूंस खिस्त्यांना सोडून किंवा खिस्त्यांस हिंदूंना सोडून चालून आपलें राजकीय गाडें, वर्तमानकाळच्या हिंदूंच्या व खिस्त्यांच्या सर्वसामान्य राजकीय ध्येयाच्या दृष्टीनें सुरळीत रीत्या प्रगतिपथावरून चालविणें शक्य नाहीं.

सारांश केसरीकार जे हिंदु–खिस्त्यांच्या द्वैताविषयीं हिंदुमुसलमानाच्या द्वैतास पुढें करून लिहितात तसें राजकीय द्वैत येथील दोनहि समाजांत आज मुळींच नाहीं. व तें उपस्थित होणें सद्यः परिस्थितीच्या दृष्टीनें शक्यहि नाहीं व श्रेयस्करहि नाहीं.

स्पष्टवक्ता

लिहिण्याचें कारणच नाहीं. तो प्रत्येक सासुरवासिनीनें मनन करण्यासारखाच आहे.

भगवद्भजन माला:–लक्ष्मण काशीनाथ नाईक खडे ऊर्फ फाल्गुन यानीं ही माला गुंफण्याचा उपक्रम केला असून, मालेचीं दोन सुमनें आह्मांस कर्त्यानें भेटीदाखल पाठविलीं आहेत. बहुतेक पदें नवीन चालींवर रचण्याची लेखकानें खबरदारी घेतली असल्यानें, तीं नवीन रुचीच्या भगवद्भक्तास आवडतील असें ह्मणण्यास हरकत नाहीं. भगवद्भक्तानीं फाल्गुनकृत सुमनाचा एकंदा तरी सुवास घ्यावा, अशी आमची शिफारस ... ह्मणा.

वर्तमानसार

—मिरत येथील हिंदुमंदीर अपवित्र केल्याबद्दल तेथील १३ मुसलमानानां ७ वर्षें सक्तमजुरीची शिक्षा देण्यांत आली.

—दावणगेरी येथें दोन तोंडे असलेलें एक मूल जन्मास येऊन, तें चार तासानीं मेलें.

—लाहोर येथील हिंदु रहिवाश्यांनीं हिंदूच्या सार्वजनिक विहिरींवर अस्पृश्य मानलेल्या वर्गानां पाणी भरूं देण्यास संमति दिली. इतकेंच नव्हे, तर चांभार जातींतील एका गृहस्थाकडून एका विहिरींतील पाणी काढविलें व त्यावेळीं तयें जमलेल्या हिंदूनीं ‘ हिंदुधर्मकी जय ’ ‘ वैदिक धर्मकी जय ’ असा गजर केला.

—पोर्तुगालचे कांही मुत्सद्दी व वर्तमानपत्रकार आंगोलला भेट देणार आहेत.

—स्वीडनमध्यें ३६ वर्षें झोपलेली एक स्त्री जागी झाली. कुंभकर्णी झोंप म्हणायाची !

—पारीसहून हालंडला विमानमधून एक ...यतीचा घोडा पाठविण्यांत आला!

—१७ वर्षे वयाखालील मुलांनीं शरीराची पूर्ण वाढ झाल्याचा दाखला मिळविल्याशिवाय, फुटबॉल खेळूं नये असा तुर्कस्थानच्या शिक्षणमन्त्र्यांनीं हुकूम काढिला आहे.

—रशियामध्यें बोल्शेव्हिझमला मोठी भरती आली आहे.

—अमेरिकन शास्त्रज्ञ डॉ. रावर्ट यांनीं एक पांच फूट लांबीचा व अर्धाफूट व्यासाचा एक बाण तयार केला असून तो आकाशांत सोडणार आहेत. अदमासें १० मैल आकाशांत वर जाईल, असें तज्ज्ञ ह्मणतात.

—इंग्लंडचे मुख्य प्रधान मि. रॅम्से मॅकडोनाल्ड यांनीं हिंदी गृहस्थांच्या शिष्टमंडळाला मुलाखत देऊन हिंदी राजकीय सुधारणांविषयीं त्यांशीं वाटाघाट केली.

—अमेरिकन वकील इंम्रीस यांचा ... हद्दींत खून झाल्यामुळें तेहरान सरकारनें ... कायदा पुकारला आहे.

—अबिसिनियाचा अत्यंत लोकप्रिय व पराक्रमी बादशाहा मरहूम थिओडर याचा मुकुट १८६८ सालीं ब्रिटिशनें जिंकलेल्या लढाईंत ब्रिटिश फौजनें नेला होता. तो मुकुट पचम जॉर्ज बादशहानीं, अबिसिनियांच्या बेगमसाहेबांस देण्याकरतां, अबिसिनियाचे राजपुत्र शहाजादे हासटाफारी यांजकडे ते इंग्लंडांत डेप्युटेशन आल्यावेळीं दिला.

—इटालियन सरकारनें वर्तमानपत्रांची सक्तदाबी करणारा कायदा अमलांत आणला आहे. हा कायदा मुसोलीनीचाच वरदपुत्र असेल काय ?

—मडगांव येथें कित्येक ठिकाणीं तापाची सांथ उद्भवल्याची बातमी आहे.

—पणजीं येथें प्रसिद्ध होत असलेल्या इस्ताद दा इंदीय साप्ताहिकाचें संपादकत्व तेवदोरु मिरांद यानीं सोडलें असल्याचें ... राल्दला कळलें आहे.

—तारकेश्वर येथील सत्याग्रहार्थ ... सवाअकरांशें सत्याग्रहींना शिक्षा झाल्या.

—अतिवृष्टीमुळें त्रावणकोर, म्हैसूर, मलबार व कोचीन या प्रदेशांतील सुमारें ... घरें वाहून गेलीं व ११० वर माणसें मरण पावलीं.

— ‘ प्रेदियाल ’ कर चुकता करण्याची मुदत न वाढविली गेल्यानें कायतारांच्या ... गांची पोळी पिकेल, असें पणजीच्या ... यारियु दा नोइतीचें ह्मणणें आहे !

ह्मातारपणांतील विपत्ति

किर्लोस्कर खबर; अंक ६३ वर्ष ५

वृद्धापकालची सर्वांत मोठी विपत्ति ह्मणजे दारिद्र्य होय. ज्यावेळीं अंगांतील बहुतेक जोम निघून गेला आहे, सर्व गात्रें गलित झालीं आहेत आणि दशेंद्रियांनां विश्रांतीची जरूर आहे; त्यावेळीं उदरनिर्वाहाकरितां कांहींतरी धंदा करण्याचा प्रसंग मनुष्यावर यावा आणि पोटभर अन्न व आंगभर कपडा कसा मिळेल याची विवंचना मनामागें लागावी, यापेक्षां मोठ्यांत मोठें दुर्दैव दुसरें कोणतें ह्मणतां येईल !

तारुण्यांत संपत्ति असणें किती घातुक आहे. याचें विवेचन मागें एकदां केलेंच आहे. आजच्या लेखांत ह्मातारपणीच्या विपत्तीचें स्वरूप सकारण रेखाटावयाचें आहे.

तारुण्यांत मनुष्याजवळ संपत्ति असणें धोक्याचें असलें तरी, तो कांहीं त्याचा दोष ह्मणतां येणार नाही. हो, पूर्वजानें मिळविलेली संपत्ति हस्तगत झाल्यास ती टाकून फकीर थोडेंच बनावयाचें आहे. परंतु ह्मातारपणांतील दारिद्र्याचें कारण मात्र मनुष्याचें ऐन तारुण्यांत घडलेलें अविचारी वर्तनच ह्मणतां येईल. केवळ दुर्दैवानें ह्मातारपणीं गरीबी येण्याचीं उदाहरणें फारच थोडीं घडतात.

स्वभावतः ह्मातारपण कांहीं फारसें स्पृहणीय नाहीं. बाल्यांत आनंद, विद्यार्थीदशेंत हौस, तारुण्यांत धमक, मनुष्याचें अंगीं येत असते. त्या त्या वयांत येणारीं दुखें त्यामुळें फारशीं असह्य होत नाहींत. ह्मातारपणाचें मात्र तसें कांहीं नाहीं. कालागतीनें सर्वच गोष्टी कमी होत गेल्यामुळें जीर्णवस्त्राप्रमाणेंच ह्मातारपणहि अगदीं नाजूक व टाकाऊ झालेलें असतें. अशा वाईट स्थितींत आणखी गरीबीची भर पडल्यावर तें ह्मातारपण किती त्याज्य व उपहासास्पद होत असेल, याची कल्पना करावी. दुसरी गोष्ट, अनुभवानें प्राप्त झालेला शहाणपणा अमलांत आणण्यास सवड नसल्यामुळें, जगाच्या उपहासास मुकाट्यानें प्राप्त व्हावें लागतें.

ह्मातारपणी मनुष्याची अब्रू वाचविणारें व त्यास सुख देणारें खरें व मुख्य साधन ह्मणजे पैसाच होय. यावेळीं प्रेमाचीं माणसें जवळ असूनहि फारसा उपयोग होत नाहीं. कारण, त्याच्या दारिद्र्यावस्थेला तीं कसा आळा घालणार ! उलट, त्यांचें दुःखहि त्याच्या वाढत्या दुःखांत भरच घालणार.

किती तरी ह्मातारीं माणसें तारुण्यांत संग्रह न केल्यामुळें दुःखग्रस्त होऊन दीनपणें हिंडत असतात. ऐन तारुण्यांत त्यांनीं पुष्कळ पैसा मिळविलेला असतो; परंतु त्या वेळीं बेगुमानपणें खर्च करीत सुटल्यामुळें पुढें विपत्ति येते व ती वयाबरोबरच दृढ होत जाते. याकरितां मनुष्यानें वेळींच सावधगिरी ठेविली पाहिजे.

—पुण्याचें 'भाला' पत्र पुनरेव सुरू झालें.

उत्तरास प्रत्युत्तर

श्रीयुत भारतकर्ते यांस वि. वि.

आपल्या ता. २३।४।२५ च्या अंकांत श्री. सामंत यानीं माझ्या जाहीर विनंतीस जें उत्तर दिलें आहे, तें सत्यास सोडून आहे. 'कोणी उपवक्ते उठले नाहींत. त्या अर्थीं कोणास काव्याची गोडी नाहीं असें दिसतें' असेंच त्यानीं ह्मटलें होतें. व अमुक अमुक ह्मटलें असें ते आतां सांगतात तें निव्वळ खोटें आहे. श्री. सामंत यांजवर नसतीं विधानें लादून त्यांवर टीका करण्याचें मला कोणतेंच कारण नव्हतें.

श्री. सामंत यानीं प्राचीन कवींच्या कार्याचा उल्लेख करून आधुनिक कवींना दुबळे व रडगाणें गाणारे ह्मणून आपली टीका करण्याची हौस फेडून घेतली. वास्तविक त्यावेळीं कार्याचा प्रश्नच नव्हता व 'काव्याची' तुलना काव्य या दृष्टीनें करण्याचें अशक्य' वाटणाऱ्या श्री. सामंतानीं आधुनिक कवींवर टीका करण्याचा बेजबाबदारपणा करण्याची गरज नव्हती.

तसेंच ' अर्वाचीन कवींना एकाद्या मासिकांतल्या टीका लेखाची भीति कां वाटावी ! असला दुबळेपणा दाखविणारे कवि काय कामाचे ' ? असें ते ह्मणतात परंतु टीकेला भिऊन काव्य करण्याचें सोडून दिलेल्या कवींचें एकतरी ते उदाहरण देतील काय ? उलट आपल्या काव्यासाठीं तुरुंगवासहि भोगावा लागल्यास तो पत्करण्यास आधुनिक कवि माघार घेणार नाहींत या बाबतींत तात्यासाहेब सावरकर यांचें उदाहरण प्रसिद्ध आहेच. श्री. सामंतांसारखे बेजबाबदार टीकाकार भेटल्यास अर्वाचीन काय पण प्राचीन कविहि त्यांस भिऊन आपलीं कवनें स्वर्गांतून खालीं उतरून रातोरात पळवून नेतील ! बाकी गोमांतकांत आपल्या लेखाची जबाबदारी दुसऱ्यावर टाकून मोकळे होणारे लेखक मात्र नाहींत असें नाहीं.

आपल्या ह्मणण्याच्या समर्थनार्थ श्री. सामंत हे ' हिंदू ' च्या रिपोर्टचा आधार घेत आहेत, परंतु 'हिंदू'तील रिपोर्टच अपुरे आहेत. व्याख्यानमालेंतील सविस्तर भाषणें विशेषतः श्री. सामंत याचें भाषण व त्यानां मिळालेलीं उत्तरें ' हिंदू ' मध्यें येतीं तर श्री. सामंत यांजवर टीका करण्याचा प्रसंगच येताना

"आदल्या दिवशीं मी अध्यक्ष असतों व प्रो. मायदेव वक्ते असते तर मीही त्यांना गेखठोक जबाब दिला असता" अशी श्री. सामंत शेखी मिरवितात; परंतु तथ्यांश नसलेली व बेजबाबदार टीका करण्याची खोड जडलेल्या श्री. सामंतांना प्रो. मायदेव यांनीं जें सडेतोड उत्तर दिलें तें श्रोतृवर्ग विसरणें शक्य नाहीं. कारण व्याख्यान आटोपतांच, श्री. सामंत सारख्या टीकाकारांस प्रो. मायदेव यांसारखेच अध्यक्ष लाभले पाहिजेत" असे ज्याच्या त्याच्या तोंडून उद्गार ऐकू येत होते.

यावरून वाचकांच्या लक्षांत येईलच कीं टीकाकाराच्या "स्वयामारूढ" पदाचा दुरुपयोग करणारे श्री. सामंत यांखेरीज तेथें कोणीच नव्हते. आ.

जयराम भिकाजी राऊत.

वर्तमानसार

—टर्किश टेलिफोन खात्यांतील मुसलमानेतर स्त्री नोकरांना सरकारी व लष्करी गुप्त बातम्या विश्वासघातानें फोडल्याबद्दल, कामावरून काढण्यांत आलें.

—आपणास विरोध करणारांना देहांत शासन व हद्दपारी या दोन प्रकारच्या शिक्षा दिल्या जाणार असल्याचें इटाली सरकारनें जाहीर केलें आहे.

—हिमालयाच्या प्रदेशांत शिकार करण्याच्या उद्देशानें दोन अमेरिकन गृहस्थ न्यूयार्कहून निघाले आहेत.

—जर्मन मालावरील जकात वसूल करण्याचा १९१९ चा कायदा तहकूब करण्यासंबंधींचा मि. चर्चिल यांचा ठराव पार्लमेंटमध्यें पास झाला.

—बांबे प्रेसिडेन्सी पोस्टल व आर. एम्. एस. कॉन्फरन्सची पांचवी बैठक बडोदें येथें गेल्या ११ तारखेस भरली होती. अदमासें दीडशें प्रतिनिधी हजर होते.

—दि. ब. विजयराघवाचारियर यांचें मद्रास येथें 'इंग्लंडांतील लोकस्थिति' या विषयावर एक व्याख्यान झालें. त्यांत त्यांनीं सांगितलें कीं, इंग्लंडांत ५० लाख तरुण मुली अविवाहीत स्थितींत दिवस कंठीत आहेत !

—बडोदें संस्थानांतील वाचनालयांची परिषद गणदेवी येथें ता. १२।१३ एप्रील रोजीं बडोद्याचे दिवाण सरमनुभाई मेथा यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडली.

—रंगून येथें २ लाख रुपये भांडवलावर एक कंपनी निघाली असून ती बर्मा क्रॉनिकल नांवाचें एक दैनिक पत्र काढणार असून ब्रह्मदेशांतील हिंदी लोकांचें हित संरक्षण हें त्या पत्राचें धोरण आहे.

—दरभंग्याच्या महाराजांनीं सनातन धर्ममंडळाच्या शास्त्रीय शाखेस २५ हजार रुपयांची मदत दिली.

—मुंबईतील प्रसिद्ध शिल्पकार फडके यांचीं मेणाचीं चित्रें साम्राज्य प्रदर्शनांत मांडण्यासाठीं विलायतेला पाठवून देण्यांत आलीं आहेत.

—श्री स्वामी विवेकानंद यांचे बंधु डॉ० भूपेंद्रनाथ दत्त यांस बर्लिनहून हिंदुस्थानांत येण्याची परवानगी मिळाली आहे.

—गेल्या चैत्र शु० १४ शी रोजीं श्री. सौंदेकर राजे यांच्या दोन कुमारींना आमांशाच्या विकारानें देवाज्ञा झाली, ही दुःखकारक बातमी येथें देण्यास फार वाईट वाटतें. एकदम दोन अपत्यांचा मृत्यु अवघ्या तास दोन तासांच्या अंतरानें घडलेला पहावें लागणें ही दुर्दैवाची सीमाच होय ! महाराज व राणीसाहेब यांच्यावरील या प्रसंगांत, त्यांचें सांत्वन होणें कठीणच. तथापि आपल्या दुःखांत सर्व हिंदुबांधव वांटेकरी आहेत हें लक्षांत आणून त्यांनीं आपल्या मनाचें थोडेंसें समाधान करून घेण्याचा प्रयत्न करण्याशिवाय अन्य मार्गच शिल्लक नाहीं परमेश्वर मृतांच्या आत्म्यांस शांति देवो.

—गेल्या ता. ३ एप्रील रोजीं श्री. सखाराम हरी गोलतकर, 'भंडारी ज्ञातीचे एक इतिहासकार' यांचें 'भंडारी ज्ञातीची पूर्वपीठिका' या विषयावर श्रीं० पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर यांच्या अध्यक्षतेखालीं नवीन गोवें येथील श्री पांडुरंग प्रा. विद्याभुवनांत व्याख्यान झालें.

—श्री. डॉ. आत्माराम गो. बोरकर व श्री. महादेव श्री. भोबे काकुले यांस, त्यांना Cavaleiro da Ordem de Cristo ही पदवी देण्यांत आल्याबद्दल व प्रो. पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर यांस त्यांची 'इंदितूत व्हास्कु द गाम' या संस्थेंत सभासद ह्मणून नेमणूक आल्याबद्दल, पणजी येथील भंडारी समाजाकडून त्यांच्या रात्रीच्या शाळेच्या इमारतींत, गेल्या ता. १२ एप्रील रोजीं डॉ. बाळकृष्ण सखाराम साखरदांडे यांच्या अध्यक्षतेखालीं चहापार्टी देण्यांत आली.

—मडगांवचे स्थानिक पक्षभेद मोडून ऐक्य करण्याचें घाटत असून चर्चेस घ्याव याच्या अटीचें टांचण रा. बाबुराव पै पाळंदीकर यांनीं तयार केलें आहे व तें लवकरच दहा जणांच्या बैठकींत विचारास येणार आहे, असें कळतें.

—आंबोड येथील श्री. पुरुषोत्तम राम शे. कुवेलकर हे लिसेच्या ७ व्या वर्गाच्या 'शास्त्र' शाखेंत १६ मार्कांनीं पास होऊन, गणित विषयांतील यंदाचें बक्षिसहि मिळविल्याबद्दल आह्मीं त्यांचें अभिनंदन करतों.

—केपें कोमार्काचे तरुण देलेगाद मि. फोंतीश हे क्षयाच्या विकारानें बेंगळूर येथें ख्रिस्तवासी झाले. नेमणुकीनंतर अवघे तीनच महिने त्यानीं आपल्या जागेचा उपभोग घेतला होता ! वाईट झालें !

—पणजी येथें प्लेगचे उंदीर जास्ती प्रमाणानें पडावयास लागले असून, लोकांचीं मनें अस्वस्थ झालीं आहेत.

—यंदा फोंडेंच्या आल्मैद कॉलेजांतून खालीलप्रमाणें विद्यार्थी परीक्षांस: —

	बसले	व पास झाले
लिसेव – ३ री क्लास	३	३
" २ री "	२२	१६
" १ ली "	१०	१०
सेगूंद ग्राव	८	८
प्रिमैर ग्राव	९	९
इंग्रजी [तीन यत्ता]	१६	१३
मराठी [तीन यत्ता]	३४	२८
एकंदर	१०२	८७

—'बिब्लिओतेक नासियोनाल द नोव्हगोअ' या सरकारी लायब्ररीच्या नावांचें रूपांतर 'बिब्लियोतेक नासियोनाल व्हास्कु द गामा' या नवीन विशेषनामांत करण्यांत आलें आहे.

—डॉ० इजिनी द सौज यानीं पणजीच्या पाठशाळेच्या मुख्याध्यापकाचा चार्ज घेतला.

—वेंगुर्लेचे डॉ० गोदीन हे येत्या मे महिन्यांच्या २२ तारखेला रायबंदरच्या सांता काज मिजेरकोर्दिच्या हॉस्पिटालांत येणार असून लगेच दुसऱ्या दिवशीं तपासणी व ओपरेशनांस सुरवात होईल. गरजूंनीं त्या महिन्याच्या १० तारीख पर्यंत उपरोक्त हॉस्पिटलांत नावें नोंदून ठेवलीं पाहिजेत.

—सिं० मारीयानु मार्तीस यांचा पो० हिंदुस्थानचे गव्हर्नर नेमणूंत येईल, असें पोर्तुगालच्या ताज्या बातमीवरून निष्कर्ष काढण्यास जागा आहे.

O BHARAT

Cada um no seu oficio

A dar-se fé a constantes reclamações e queixas que estamos a receber contra a *especial* feição em que hoje se destaca a acção *executiva* de nossa policia, afigura-se nos que esta instituição, tão colorosamente apoiada por nós, vai, dia a dia, concitando contra si uma má vontade geral.

Supunhamos, sempre, que á organisação policial presidira *apenas*, o bom desejo da manutenção de ordem publica. Julgavamos que a criação da policia fôra filha da necessidade de garantir a ordem publica. Numa palavra, a corporação policial representava para nós um poderoso auxiliar para cada cidadão poder disfrutar as delicias duma paz segura, livre do *virus* perturbador e do *insticto* irriquieto, males que enfermam em maior ou menor gráu, segundo o coeficiente civilisador, todas as sociedades humanas.

Pois é verdade. Pelo clamor que se está levantando—e com uma insistencia cada vez mais crescente—parece que a nossa policia tende a sair da espera das atribuições que o seu regulamento lhe conferiu, dando lugar a verdadeiros *conflitos de autoridades*.

E não admira que isto suceda, desde o momento em que as autorídades policiais se julguem *autorisadas* a interferir nas questões de propriedades, nas relaçôes conjugais de marido e mulher, na cobrança de dividas particulares e noutras que pela sua natureza juridica são de molde a ser ventiladas só no fôro administrativo ou judicial.

Francamente, pelo estado *autoritario* em que actualmente se encontra a policia, não podemos apoia-la. Ou que a sua acção se limite aos *fins taxátivamente* designados no Regulamento do Corpo de Policia, ou que deixe de existir. De duas uma. Não ha meio termo.

E dizemo-lo, porque, como a policia, estamos habituados a respeitar tambem os tribunais judiciais e administrativos com cujas atribuições não se quere que ela contenda, tanto por causa da integridade juridica dos codigos como por causa da integridade fisica dos devedores insolventes.

Chacun dans son metièr, eis o que se deseja e nada mais.

Abra, pois, o Governo um inquerito sobre *a acção executiva* da policia e apure o que ha de *novo* no seio dela. E, se se convencer de que o clamor público é justificado, indique-lhe o caminho que já sabe.

Cada um no seu oficio. Não vá o médico interpretar codigos nem o advogado confeccionar sinapismos de...mostarda.

ECOS E CRITICA

REGEDORES

Não sabemos porque subsiste a entidade *regedor*, depois que se lhe tirou das mãos o registo civil e se lhe suprimiram as atribuições de manutenção de ordem pública nas aldêas

Sim, o regedor, com a organisação do Registo Civil e do Corpo da Policia, não passa duma entidade decorativa, destinada apenas a *cumprir* intimações, de borla, gastando *do seu* o papel.

¿Nestas condições, não seria melhor extinguir-se a mesma *autoridade*?

Se, porêm, entenderem conserva-la, tratem, ao menos de remunerar os seus serviços condignamente.

Dinheiro é o melhor incentivo para a gente trabalhar e agitar-se Aqueles felizes tempos em que o homem animal se afadigava *ad honorem* em prol dos seus semilhantes, sem distincção do *teu* e *meu* pertencem só a Historia e não voltam, pelo adiantado da civilisação em que *deliramos*...

UMA CARTA

Bombaim, 28 de Abril de 925

Exmo Sr. Redactor de
O Bharat

Pelo sr Consul Geral foi-me entregue um numero do jornal de V.Exa. N°. 4, de 23 do corrente mês em que se fazem acusações a este Consulado, acusações que a ele e a mim muito desgostaram.

Feitas imediatas diligencias, verificou-se que o empregado encarregado da cobrança procedera sempre honestamente.

Foi, pois, V.Exa. iludido na sua bôa fè. O queixoso nunca reclamou perante o sr. Consul ou perante mim e por outro lado tambem não me consta que tivesse reclamado na Secretaria Geral do Governo de Goa onde todos os documentos consulares são reconhecidos pelo Exmo. Secretario Geral.

Diz o jornal de V.Exa. que não são fornecidos recibos ás partes.

Posso garantir a V.Exa que isto é redondamente falso Todos os actos consulares são acompanhados do sélo correspondente á quantia arrecadada e do competente recibo exara o de carimbo ao lado do sêlo indicando alêm da quantia o numero da tabela consular aplicavel e o numero do lançamento no livro de emolumentos. Só não são passados recibos das quantias de compensação pessoal pagas pelos interessados nos termos do n°. 116 e do artigo 60. da tabela pelo serviço extraordinario e de passaportes.

Portanto se algum documento aparecer ai sem as estampilhas respectivas e sem o competente recibo, esse documento pode considerar se falso. Alude V. Exa. expressamente a reconhecimentos de assinaturas das autoridades inglesas, os quais constituem a maioria dos actos praticados neste Consulado Geral com efeito em Goa. Com e eito a tabela consular estipula quantias altas para reconhecimentos e outros actos, e estas quantias foram, pelo Decreto N°. 9:497, elevadas ao dobro.

Desta maneira qualquer reconhecimento em procuração custa 4$50 ou quinze rupias, ao cambio fixo de 0$30 por rupia e qualquer outro reconhecimento ou legalisação varia entre 2$70 (Rs. 9/-) e 3$60 (Rs. 12/-).

Confesso que é uma quantia elevada mas não está nas atribuições deste Consulado alterar o que por lei foi decretado.

Posso garantir a V.Exa. que neste Consulado se procede com correcção e que o sr. Consul Geral tem procurado atenuar quanto possivel, dentro da lei os rigores desta.

Não há desleixo neste Consulado, pode V.Exa estar certo. Tanto o sr. Consul como eu não abandonamos a chancelaria, exercendo a mais rigorosa fiscalisação e toda a cobrança de emolumentos consulares sempre se fez dentro dos limites da lei.

Como V.Exa. deseja enviar aqui um representante seu, o sr. Consul com muito prazer o receberá e lhe dará todas as facilidades para o apuramento da verdade.

Com toda a consideração sou,

De V ...

Antonio Pedro J. Fernandes

VICE-CONSUL

N. da R. — O *Bharat* com a sua local **Desleixo?** nunca teve em vista incomodar quem quere. Recebeu queixas contra o Consulado e delas se fez éco na melhor das intenções pelo interesse público que é a sua missão.

A carta do sr. Vice Consul—carta que muito lhe agradecemos, esclarece, porêm, o assunto muito satisfatoriamente para nós que até desistimos de mandar para lá o nosso representante.

Entretanto prometemos dar cabida nas colunas do *Bharat* qualquer *réplica* que, porventura, os queixosos pretendam, com provas concretas, fazer ás considerações da mesma carta.

E ponto, por enquanto.

आश्रयदात्यांस—

ठिकठिकाणच्या वर्गणीदारांच्या पावत्या व्ही. पी. नें रवाना केल्या आहेत. ते त्या सोडवून घेऊन, भारताच्या लोकहितकार्यास नेहमींप्रमाणेंच उत्साहानें मदत करतील अशी उमेद आहे. वर्गणी न वाढवितां भारतांत करण्यांत आलेल्या नवीन सुधारणांमुळें आह्मास बरीच पदरमोड सोसावी लागली असून, भारतमित्रानीं या प्रसंगीं भारतास मदत केल्यास यादि पेक्षां महत्वाच्या सुधारणा घडवून आणण्यास आह्मास हुरूप येणार आहे. म० भारत

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

वैशाख शु० १४ शी शके १८४७

हिंदु-संघटना व गोमांतक

लेखांक २ रा.

आर्यांची अस्सल अवलाद, असें स्वतःस ह्मणवून घेणारे लोक स्वधर्मास, स्वसंस्कृतीस किंवा अधिक स्पष्टपणें लिहावयाचें ह्मणजे स्वत्वभावनांस कसे पारखे झालें आहेत व ह्या लोकांची ही पतितावस्था, हें अधःपतन पहातां " श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज "– " राणा प्रतापसिंहाचे रजपूत " ह्या अभिनंदनीय उपनावांनीं आजच्या नावांच्या हिंदूंचा गैारव करणें विचारी विवेचकास कसें जड जात आहे ह्याचें विस्तृत विवेचन गेल्या खेपेस आपण करून चुकलोंच आहों. आतां आह्मांपुढें असलेला प्रश्न, ह्या केविलवाण्या व करुणास्पद स्थितींतून आमची सुटका करून घेण्यास कोणता खात्रीलायक व फायदेशीर उपाय योजणें सोईस्कर आहे एवढेंच पहावयाचें आहे. देशभक्त लालाजींची योजनाहि ह्या लेखमालेंत उद्देशिलेली प्रतिपाद्य योजना असल्यानें आपणास आतां तिच्याकडें वळणें भाग आहे; पण तत्पूर्वी

ज्या दर्दावर दवा

योजण्याकरितां आह्मीं सरसावलों आहों तो रोग कोणत्या प्रकारचा आहे ह्याची थोडीशी कल्पना येण्यासाठीं वाचकांच्या परवानगीनें ओढवलेल्या आपत्तीचें थोडेसें शद्बचित्र रेखाटण्याचा प्रयत्न केल्यास अप्रस्तुततेचा आरोप आह्मांवर येणार नाहीं अशी आह्मांस आशा आहे.

आमच्या मतें जगांत आजपर्यंत असा कोणताहि धर्म झालेला नाहीं किंवा आजच्या दिवशीं अस्तित्वांत नाहीं कीं जो उच्च विचारांच्या, उदात्तभावनांच्या, उदार विचारसरणीच्या व नियमबद्ध पुरोगामीत्वाच्या बाबतींत आमच्या सनातन धर्मांची बरोबरी करूं शकेल. जगांतील इतर कोणत्याहि धर्मापेक्षां आमचा हिंदुधर्म व इतर कोणत्याहि संस्कृतिपेक्षां आमची हिंदवी संस्कृति

अधिक जुनी व अधिक गुणी

आहे हें सत्यवक्ते विधर्मीयहि बिनहरकत कबूल करतील. कवि, महाकवींच्या अतर्क्य कल्पना शक्तीसहि ज्याचा आज तागायत पत्ता लागलेला नाहीं; आणि ह्या पुढें तरी त्यांना तो लागेल कीं नाहीं ह्या बद्दल वानवाच आहे त्या वेदकालापासून आजपर्यंत विधर्मीयांचे जुलुमी तडाखे व कठोर कुठार प्रहार सोसूनहि ह्या वैदिक धर्मानें चालू स्थितींत आपलें सर्व श्रेष्ठत्व कायम राखिलें आहे, इतकेंच नव्हे तर घणाच्या घावानीं देवपण मिळविलेल्या सुवर्णाप्रमाणें तें अधिकाधिक उज्वलतर केलेलें आहे. एवढीच गोष्ट हिंदु धर्माचें व हिंदवी संस्कृतीचें 'वैशिष्ट्य' पटविण्यास पुरेसी आहे, असें आह्मांस वाटतें आमचा हिंदुधर्म उच्च विचारांनीं पूरीत, उदात्त तत्वानीं परिप्लुत, उज्वल आचारानीं परिवेष्टित, ' नियम बद्धतेनें निगडीत, व उदार अंतकरणाचा असा एक धर्म आहे ही गोष्ट पाश्चात्य तत्वशास्त्रज्ञानींहि कबूल केलेली आहे. हिंदवी संस्कृतीचें अनुपमेयत्व तर बिशप व्हाईटनें अवघ्या तीनच महिन्यापूर्वीं मान्य केलें आहे. हिंदी धर्माचें श्रेष्ठत्व व हिंदवी संस्कृतीचें वैशिष्ट्य अमेरिकेसारख्या आधिभौतिक शास्त्रांत पारंगत व कट्टर स्वधर्माभिमानी राष्ट्राच्या प्रत्ययास आणून स्वामी विवेकानंदानें तेथील लोकास हिंदु धर्माच्या व हिंदवीसंस्कृतीच्या भजनीं लाविलें आणि हिंदु मिशनरी सोसायट्यांची तेथें स्थापना करून आणि तद्वारा शुद्धीकरणाची चळवळ चालवून विधर्मीयांच्या त्या बालेकिल्ल्यांत सनातन धर्माची व

हिंदवी संस्कृतीची ध्वजा

यावच्चंद्र दिवा करौ फडफडत ठेवली ह्या गोष्टीवरून आमच्या हिंदु धर्माची व हिंदवी संस्कृतीची उदार वृत्ति साधार सिद्ध होते. ज्याची महति अवर्णनीय व योग्यता अनुपम्य असल्याचें अमेरिकेसारख्या राष्ट्रानें व बिशपव्हाईटनेंहि मोकळ्या कंठानें काहींहि आडपडदा न ठेवितां कबूल केलं आहे, त्या हिंदु धर्माचें व हिंदवी संस्कृतीचें नियमबद्ध व उदार धोरण सिद्ध करण्यास आणखीं एखादें उदाहरण देण्याची जरुरी असेल असें आह्मांस वाटत नाहीं.

हिंदु धर्म व हिंदवी संस्कृति हीं दोन्हीहि इतकीं उज्ज्वल, इतकीं उदात्त व इतकीं उदार, इतकीं विशाल, इतकीं उच्च व इतकीं उत्कृष्ट ही गोष्ट जशी खरी आहे तशीच तो धर्म व ती संस्कृति आज दिवसा ह्या जगांत एक थट्टेचा विषय होऊन बसला आहे हीहि खरी आहे. विधर्मीयांकडून त्याची अवहेलना कितीहि मोठ्या प्रमाणांत होवो त्याची आह्मांस मोठीशी पर्वा नाहींच. आह्मांस अत्यंत खेद होतो तो ह्याचा कीं त्यांच

पवित्र व पुण्यमय धर्मांत

जन्मास आलेले व त्यांतीलच नियमबद्ध आचारांत वाढलेले आमचे कांहीं (अति) शहाणे धर्मबंधू त्याच्याकडे व हिंदवी संस्कृतीकडे पाहून नाकें मुरडावयास लागले आहेत. देखत भुल्या पाश्चात्य संस्कृतीच्या दिखाऊ सैांदर्यास भुललेले व ह्या लोकांतील आचार विचारांच्या स्वैरतेला भाळलेले हे बहकलेले तरुण स्वतःस 'शहाणपणाचे मक्तेदार; समजत असतात, व त्या शहाणपणाच्या भरांत 'काय तुमचा धर्म, काय तुमची संस्कृति, काय तुमच्या भावना, काय तुमचे आचारविचार, साराच रानटीपणा, सारेंच भिकार' असें ते बरळूं लागतात. खिस्ती धर्मांतील स्वैरवाळें व

पाश्चात्य संस्कृतींतील चवचाल चाळे

पाहून ह्मांना कसेंसेंच वाटूं लागतें. व आपल्या धर्मांत अशा स्वछंदीपणाला मुळींच वाव नसलेला ध्यानांत येतां 'भिकार' 'रानटी' अशा शेलक्या शब्दांचे शेला पागोटें वाहून स्वधर्माची संभावना करण्यास ते कमी करीत नाहींत. एकंदरींत सांगावयाचें ह्मणजे स्वधर्म व स्वसंस्कृति, त्या वर्गांतील तरुणांस मुळींच आवडत नाहीं.

हिंदु धर्माच्या पुरोगामीत्वास हा वर्ग जितका प्रतिबंधक झालेला आहे तितकाच दुसरा एक वर्ग त्याच्या प्रगतीस प्रतिरोध करण्यास टपलेला आढळून येतो. उपरिनिर्दिष्ट वर्ग ह्मणजे कट्टर जुनेरी मंडळीचा वर्ग होय. पाश्चात्य संस्कृतीस भाळलेली तरुण मंडळी ज्याप्रमाणें 'नवें तितकें हवें' हा हट्टाग्रह घेऊन बसते त्याचप्रमाणें हा वर्ग जुनें तितकें सोनें हा दांतीं धरलेला अत्याग्रह सोडण्यास मुळींच तयार नसतो. ह्या दोन्ही वर्गांच्या तावडींत सांपडलेल्या हिंदु धर्माची अवस्था मात्र

दोन कजाग बायकांच्या

दादल्यासारखी करुणास्पद झालेली आहे. ह्या दोन्ही वर्गांचा दुराग्रह आजच्या आमच्या पतितावस्थेस बऱ्याच प्रमाणांत कारणीभूत झालेला आहे. आणि ह्या अधोगामी वृत्तीपासून जर त्याची—हिंदु समाजाची—मोकळीक करावयाची असेल तर वरील दोन्ही वर्गास सुसंमत असा एखादा मार्ग शोधून काढणें अवश्य आहे हें कोणीहि सांगूं शकेल. आमच्या मतें हिंदु संघटनेचा मार्ग ह्या दोन्ही आक्षेपकांचें निरसन करण्यास उपयोगी पडेल. आधींच उपरोक्त दोन्ही वर्गांच्या ओढाताणीखालीं हिंदु समाजाची इमारत आंतल्या बाजूनें कोरून कोरम झालेली आहे आणि तशांत विधर्मीयानीं आमच्या समाजांतील

नरपुंगवानीं चालविलेली लूट

हिंदु धर्माच्या वाढीची खची करीत आहे. आमच्या समाजांतील बाटून मुसलमान झालेल्यांची लोकसंख्या सुमारें पांच कोटी असून खिस्ती मिशनऱ्यानीं आजपर्यंत एक कोट हिंदु लोकांना बाटवून खिश्चन केल्याचें प्रसिद्ध झालें आहे. हनम-निजामी नावांच्या एका मौलवीनें तर एक कोट हिंदूंना मुसलमान धर्माची दीक्षा देण्याची प्रतिज्ञा केली आहे. व आगाखान नावांच्या एका गुजराथेंतील मुसलमानानें " आपण दहावा कलंकी अवतार असून

हिंदु लोकांच्या उद्धारार्थ

अवतरलों आहे " अशी तेथील अज्ञ व अशिक्षित लोकांत अफवा पसरून दिला आहे. अरब लोकांचा देव अल्ला आणि मुसलमानांचा चंद्रमा ह्या दोघांचा मिळून ह्या लोकांनीं ॐ सारखा एक खोटा ॐ तयार केला असून हिंदूना बाटविण्याचें काम त्यानीं जारीनें सुरू केलें आहे. 'मुसलमांनी जग' ह्या एक मदंमदी मासिकानें प्रसिद्ध केलेल्या माहितीवरून पहातां एका महिन्यांत ह्या लोकांनीं काश्मिरांत ५०० हिंदु बाटविले असून महाराष्ट्रांत १५० हिंदूंना स्वधर्मदीक्षा दिली आहे. एका महिन्याच्या अवधींत मुसलमानानीं बाटविलेल्या हिंदूंचे वरील आंकडे पहातां, मुसलमानांच्या गमजा अशाच चालूं दिल्यास थोड्याच वर्षांत जगांतील हा हिंदुधर्म नामशेष होऊन जाईल असेंच आह्मांस वाटतें व वरील विवेचनाचा तर्कशुद्ध अभ्यास करणाऱ्या वाचकांसहि आह्माप्रमाणेंच वाटेल ह्यांत शंका नाहीं. पुढच्या लेखाकांत गोमांतकांत हिंदुसंघटनेची आवश्यकता कां आहे, यांचा विचार करूं.

पिंतुसचें बंड

सन १७८७ त गोव्यांतील कांहीं नेटीव पाद्र्यांच्या प्रमुखत्वाखालीं स्वतंत्र स्वराज्य स्थापण्याच्या इराद्यानें खिस्ती लोकांनीं बंड केलें.युरोपियनाचा समूळ उच्छेद करावा. असा बंडवाल्यांचा हेतु होता. परंतु हा बेत बंडाचा स्फोट होण्याच्या अगोदर प्रसिद्ध झाला. त्यामुळें बंडवाल्यांची फार हानि झाली. ४७ प्रमुख बंडवाले पकडण्यांत आले. त्यांची रीतीप्रमाणें चौकशी होऊन त्यांतल्या ३३ असामीस फांशीची शिक्षा सांगण्यांत आली.मांडवी नदीच्या किनाऱ्यावर, सध्या जेथें कस्टमची कचेरी आहे तेथें सुळीं देण्याची जागा होती. तेथें आणण्यापूर्वीच त्याचे हात छाटून टाकिले होते. बाकी राहिलेलीं कबंधें घोड्याच्या शेपटीस बांधून आंदीत नदीच्या किनाऱ्यावर आणून उभीं केल्यावर एकेकाला फांशीं चढविण्यांत आलें. हा कार्यभाग उरकल्यानंतर बाकी राहिलेल्या १४ बंडवाल्यांस लिस्बन येथील सां जुलियांव द बान्र नावांच्या इमारतींत कैद भोगण्याकरिता पोर्तुगालास रवाना केलें.ह्या बंडास इतिहासांत पिंतुसचें बंड असें नांव आहे.

आजचें पोर्तुगीज सदर

अग्रलेखः—

पोलीस लोकांचें अधिकारातिक्रमण.

स्फुट विचारः—

रजिदोरांची अनावश्यकता; भारत व मुंबईचे पोर्तुगीज कोंसूल; बाताल्यांचे तत्वज्ञान; तिळामळावरील दंगा.

लेख शेवटचा

इंदिय पोर्तुगीज व भारत यांच्यामधील धार्मिक वाद.

म० गांधीचे विचार

अद्याप चिन्ह दिसत नाहीं.

दक्षिणेंत मला देण्यांत आलेल्या पुष्कळशा मानपत्रांपैकीं एकांत खालील अर्थपूर्ण वाक्य आहे:–

"जरी आपण बारडोलीस आमची गति थांबविली असली तरी लवकरच आपण आपल्या नेतृत्वाखालीं आह्मांला रणांगणांत न्याल ही आशा आम्हीं मनांत बाळगीत आहोंत; तेथें ह्या स्वराज्याच्या झगड्यांत आपापसांतील कलह मिटवून सामुदायिक सविनय कायदेभंगाच्या पवित्र व उज्वल शस्त्रानें आह्मीं लढूं. ह्या शस्त्राशिवाय ज्यांचें साम्राज्य ह्मणजे नुसती निर्दय लुबाडणूक आहे अशा एका नाखुष व अधाशी राष्ट्राच्या हातून स्वराज्य मिळविणें जवळ जवळ अशक्य आहे."

ह्या वाक्यांत बारडोलीच्या ठरावानें केलेली थोडीशी निराशा दिसून येत आहे. त्यावेळीं पुष्कळांना वाटलें व अजूनहि वाटत आहे कीं, बारडोलीचा ठराव राजकारणांतील पहिल्या प्रतीची घोडचूक असून त्यामुळें राजकीय पुढारीपणाची माझी नालायकी दिसून आली हें मला माहीत आहे; परंतु माझ्यामतें बारडोली ठरावाच्याद्वारें मी राष्ट्राची मोठीच सेवा केली आहे. मी त्यावेळीं तारतम्याचा अभाव दाखविला नसून बरीचशी राजकीय दूरदृष्टी दाखविली असेंच ह्या ठरावानें दाखवून दिलें आहे. त्यानंतर आह्मीं शिकलेले धडे शिकण्यासारखे असेच होते. त्यावेळीं जर आपण सुलभ विजय मिळविला असता तर आपणांस त्याची भारी किंमत द्यावी लागली असती व ब्रिटिश साम्राज्यसत्ता नवीन जोमानें मजबूत झाली असती. ह्याचा अर्थ सद्यःच ती पुरेशी मजबूत नाहीं असा मात्र नाहीं. परंतु त्यावेळची मजबुती जास्त परिणामकारक झाली असती.

टीकाकार ह्मणतील कीं, हें सर्व समर्थन शक्यतेवर अवलंबून केलेलें आहे. आणि तें तसें आहेहि. परंतु मला शक्यता जवळ जवळ सत्यताच वाटते. तें कसेंहि असलें तरी फार दूर नसलेल्या एकाद्या दिवशीं युद्ध एक मोठी शक्यता होऊन बसेल अशी आशा बाळगण्यास बारडोलीच्या ठरावानें मला समर्थ केलें आहे. ह्यापुढें आरंभावयाचें युद्ध अगदीं निर्णायक असेंच असलें पाहिजे. पण मला हेंहि मोकळ्या मनानें कबूल केलें पाहिजे कीं, सामुदायिक सविनय कायदेभंगाचा प्रसंग लवकरच येईल अशा प्रकारची आशा करण्यासारखें हिंदुस्थानच्या क्षितिजावर मला कांहींच दिसत नाहीं. अशा प्रकारच्या झगड्यांत सुसंघटीतपणें भाग घेण्यास पुरेसे कार्यकर्ते नाहींत हें एक कारण आहे. आतांपर्यंत ह्या दिशेनें आपण दाखविलेल्या कर्तबगारीपेक्षां, जनतेशीं जास्त निकट संबंध ठेवण्याची कर्तबगारी आपण दाखविली पाहिजे. जनतेची सेवा व त्यांचें सुखदुःख ह्यांत एकजीव होणाऱ्या आतांपर्यंत आम्ही दाखविलेल्या इच्छेपेक्षां जास्त प्रबल, अंतःकरणपूर्वक व अखंडित अशी इच्छा आमच्यांत उद्भवली पाहिजे. जनतेला शांततामय उपायांनीं यशस्वी रीतीनें विजय मिळवून देण्याची आपली अपेक्षा असल्यास आपणांस तीचीं सुखदुःखें समजून घेऊन तीच्याशीं एकजीव झालें पाहिजे. खरोखर, आपण त्या पायरीला येऊन पोंचल्यावर सामुदायिक सविनय कायदेभंग निष्कारण ठरेल. परंतु अशा प्रकारचा आत्मविश्वास आपल्यांत असला पाहिजे. माझ्यांत निदान आज हा आत्मविश्वास नाहीं. ह्या क्षणांस सामुदायिक सविनय कायदेभंगाचा प्रयत्न केल्यास त्याचा अंत बेशिस्त व पृथक पृथक अत्याचारांत होऊन ते उद्भवताक्षणींच मोडून टाकण्यांत येतील परंतु सामुदायिक सविनय कायदेभंगांत, हिंसा व हिंसेला अनुकूलता ह्यांचा समावेश होत नाहीं. पूर्ण संयमनाचें शांततामय वातावरण उत्पन्न करण्यासाठीं निःसंशय चरख्याची योजना करण्यांत आलेली आहे. उच्च प्रकारच्या समाजसेवेचें तें एक चिन्ह आहे. जनतेला राष्ट्रसेवकांशीं निगडीत करणारें तें एक बंधन आहे. आतांपर्यंत जगानें न पाहिलेल्या अंतःकरणपूर्वक सहकारितेचें तें एक पूर्वचिन्ह आहे. जर चरखा अयशस्वी ठरला तर काळ्याकुट्ट निराशेचा व उपासमारीचा प्रसंग जनतेवर येईल. चरखा व त्यानीं साध्य होणाऱ्या गोष्टी ह्या खेरीज दुसरी कोणतींहि साधनें जनतेला थोड्याशा अवधींत आपल्या पायांवर उभें राहण्यास समर्थ करणार नाहींत. त्याच्या प्रगतीनें कोणताच विरोध होत नाहीं त्यांत अहिंसा अवतरली आहे. जनतेच्या दारिद्र्याला तो स्वाभिमानाची जोड करून देतो; कारण दारिद्र्याच्या कित्येक दुःखांचें त्याच्यामुळें शमन होतें. चरखा प्रगति करीत आहे परंतु ती आपणास पाहिजे एवढी मात्र नाहीं. – ती देशांतून परदेशी कापडाचें उच्चाटण करण्याएवढीहि नाहीं.

पण आपण निराश होण्याचें कारण नाहीं चरखा कित्येक वादळांत सांपडेल व शेवटीं सुरक्षितपणें त्यांतून बाहेर निघेल. व ज्या अर्थी हिंदी स्वातंत्र्ययुद्धांत उपयोगांत आणण्यासाठीं सत्य व अहिंसा ह्या खेरीज दुसरी कोणतींच आयुधें माझ्याजवळ नाहींत त्या अर्थी मला त्यावरच भार टाकला पाहिजे. ह्मणून, सामुदायिक सविनय कायदेभंग सध्या पूर्णपणें अशक्य असला तरी वैयक्तिक सविनय कायदेभंग केव्हाहि शक्य असाच आहे. परंतु ती वेळ अझूनहि आलेली नाहीं. आमच्यावर प्रहार करण्याची धमकी देणारे पुष्कळ काळेकुट्ट ढग क्षितिजावर दिसत आहेत कोण कितपत कर्तबगारीचा माणूस आहे हें समजून घ्यावयास, चरखा, अस्पृश्यता निवारण व हिंदु–मुसलमान ऐक्य ह्यांत पूर्णपणें विश्वास असलेल्या माणसांचा विश्वास अझून कसोटीस लागावयाचा आहे.

४५० वर्षांपूर्वींचा हिंदुस्थान

अथनेशीयस् निकीटीन् नांवाच्या एक रशियांतील रहिवाशी १४७० च्या सुमारास दक्षिणच्या बाजूस गोवळकोंड्याकडे व्यापार करण्याच्या निमित्तानें आला होता. त्यानें आपल्या प्रवासाच्या माहितीचें टांचण करून ठेविलें होतें. तें टांचण कारमाझीन नावांच्या एका रशियन गृहस्थाला ट्री लोस्क सर्गेव्हिक येथील देवालयांत [Monastery] सांपडलें. रशियन देवालयें शिक्षणाचीं केंद्रस्थानें असल्यामुळें प्रवासाबद्दलच्या माहितीनीं टांचणें तेथील पाद्री लोक जपून ठेवीत व याप्रमाणें काउंट विलोस्की, त्यावेळचे रशियन लिगेशनचे चिटणीस यानीं हें टांचण सेंट जेम्स या नांवाच्या देवालयाच्या गाभाऱ्यांत ठेविलें होतें तेथून हें मनोरंजक बोधप्रद व बरीच माहिती पुरवून देणारें टांचण सेंटसोफिया नोव्हगारोड या देवालयांत आणिलें व यांतील कांहीं माहिती सन १८२१ त "सोफियन् क्रोनिकल" नावांच्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली.

तो रशियांतून हिंदुस्थानास येण्यास १४६८ त निघाला व १४७४ त तो परत रशियांत येऊन दाखल झाला. पण त्याचा माहीतदार असें सांगतो कीं तो 'सालमोलेन्स' नावांच्या शहरांत पोंहोचण्यापूर्वीच वारला. त्यानें निघण्यापूर्वी आपणास करण्यास पाहिजेत ते विधी केले व तो देवाची प्रार्थना करीत करीत बोरी (Boris) ग्लेब (Gleb) या शहरावरून व्होलगा नदीच्या बाजूनें कास्पीयन् समुद्राकडे आला. नंतर बेकीन (Bekin) ओलांडून बुखाऱ्यास व बुखाऱ्यावरून इराणच्या पश्चिम व दक्षिण भाग ओलांडून हिंदुस्थानकडे आला. तो लिहितो:–

"पुष्कळ दिवस आले व पुष्कळ गेले. पण मला ते कोणते दिवस होते तें कांहीं माहीत नव्हतें. ते नाताळचे दिवस होते. काय ते बुधवार, शुक्रवार होते तेंहि माहीत नव्हतें. पण मला बरेच दिवस उपवास काढावे लागले. माझ्याजवळ कांहींच पुस्तकें नव्हतीं. कारण तीं सर्व लटारूनीं आमच्यावर हल्ला केला, त्यावेळीं पळवून नेलीं. वाटेंत मला लुबाडल्यामुळें रशियांत जाण्यास माझ्याकडे कांहींच नव्हतें, ह्मणून मला हिंदुस्थानांत येणें भाग पडलें. निघाल्या दिवसापासून दीड महिन्यानें मी एकदां मुंबईच्या दक्षिणेस, पोर्तुगीजांच्या ताब्यांत असलेल्या चौल नावांच्या एका भरभराटीच्या बंदरीं आलों. मी घोड्यांचा व्यापार करीत असें. या एकंदर प्रवासांत मला १०० रुबल खर्च आला. नंतर मी विरार मुक्कामीं माझा व्यापार [घोडे वगैरे] बऱ्याच नफ्यानें विकून टाकला. इकडील लोक उघडे बोडके, उघड्या छातीचे, डोक्यावर लांब केंस असलेले व ढेर पोटाचे आहेत. इकडील मुलें वयांत येईपर्यंत नागवींच असतात. मला पाहून हीं आश्चर्यचकीत होऊन व घाबरून पळून जात. त्यानां पाहून मी सुद्धां आश्चर्यचकीत होत असें.

देवाच्या कृपेनें मी एकदां जुन्नर मुक्कामी आलों. हें एक निसर्गताच सुंदर शहर असून तें एका खडकाळ बेटावर वसलें आहे. या शहरचे रस्ते इतके कांहीं अरुंद आहेत कीं एका वेळेस फक्त एकाच माणसास त्यावरून जातां येतें. दुसऱ्यास जाण्यास त्रास होतात व यामुळें मुख्य टेंकडीवर जाण्यास एक दिवस लागतो. येथील पाहुण्यास वागविण्याच्या पद्धति निराळ्या आहेत. मी या शहरांत असतां माझ्यावर एक प्रसंग आला. या शहरच्या सुलतानास मी मुसलमान नाहीं असें कळलें तेव्हां त्यानें माझा घोडा व कांहीं चिजवस्त जप्त केली व मला बोलवून नेऊन सांगितलें कीं, 'जर तूं मुसलमान होशील तर तुला तुझा घोडा मिळून त्यावर तुला १००० सोन्याचीं नाणीं मिळतील, व जर तू मुसलमान होणार नाहीस तर तुझा घोडा तुला मिळणार नाहीं व तुला दहा हजार सोन्यांचीं नाणीं दंड ह्मणून द्यावीं लागतील, पण माझ्या देवानें खोरासन गृहस्थाचें रूप धारण करून सुलतानाची समजूत घातली व माझ्या मालमत्तेसह माझी सुटका केली.

नंतर मी विरारला आलों. इकडे घोडे रेशीम इत्यादि मालाचा व्यापार बऱ्याच प्रमाणांत चालतो. इकडच्या बायका कसबिणी, डाकिणी, चोर व फसव्या असतात. त्या आपल्या नवऱ्यांना विष देऊन ठार मारण्यास मागें पुढें पाहत नाहींत. इकडचे राजे रजवाडे सर्व खोरेशियन आहेत. हिंदु लोक उघड्या पायांनीं पण फार जलद चालतात. ते उघडे असून त्यांच्या एका हातांत ढाल व दुसऱ्या हातांत तलवार असते. त्यांचे शिपाई धनुष्यबाणानीं सज्ज झालेले असतात. लढाईंत हत्तीचा उपयोग बऱ्याच प्रमाणांत होतो. पायदळ पुढें, नंतर घोडेस्वार व मागून हत्ती अशी सैन्याची रचना असते. हत्तींच्या सुळ्यांस सुमारें १०६ पौंड वजनाचे कोयते बांधतात. व त्यांना पोलादी वस्त्रांनीं सज्ज करतात. हत्तीच्या पाठीवरील अंबारींत बंदुका व बाणांनीं सज्ज झालेले बारा योद्धे बसतात.

इकडे राजेरजवाडे ज्या प्रमाणांत विलास भोगतात, त्याचप्रमाणें गरीब लोक हाल सोसतात. इकडील राजेरजवाडे फिरण्यास जातांना रुप्याच्या पालखींत बसून जातात. त्यांच्या बरोबर पंचशें घोडेस्वार, तीनशें पायदळ, चौऱ्या व निशाणें घेतलेले सेवक व दहा गवई एवढा परिवार असतो. सुलतानाची स्वारी आपल्या बायकोवर्तमान शिकारीला निघाली ह्मणजे त्यांजबरोबर १० हजार घोडेस्वार, ५० हजार पायदळ, गिलिटानें मढविलेलीं चिलखतें घातलेले दोनशें हत्ती, १०० शिंगी, १०० कलावंतीणी, १०० सोनेरी कापडें घातलेले ३०० घोडे, १०० माकडें व १०० उपपत्न्या येवढा लवाजमा बरोबर असतो. इकडच्या शहराची तटबंदी बरी आहे. मी प

O BHARAT

Pela Instrucção Primaria

Terminaram, êste ano, os exames da Instrucção Primaria sem nenhumas *solenidades de maior* e parece-nos que reinou muita alegria entre os aprovados.

Não vale a pena regosijarmo-nos com esta historia de mais *aprovações* e *distincções* e deixar passar sem uns ligeiros reparos que ao nosso espirito oferecem estas normas de *fazerem* os exames.

Presenciamos varias vezes e nos diferentes juris tivemos ocasião de ver que o critério tomado não era uno, mas antes variava de juri para juri, de examinadores para examinadores e até de examinandos para examinandos no mesmo juri, na mesma turma e no mesmo dia, de modo que não se podia formar uma idêa clara do resul tado final dos candidatos.

Doutro lado os alunos colhidos no meio do ano com a revira-volta da mudança dos programas e dos livros foram surpreendidos e tiveram de *galgar* todas as materias do *ex programa* de afogadilho não tendo tempo de assimilar um pouco de varias disciplinas que estu daram á ultima hora.

Via-se que os examinandos como maquinas respondiam ás variadas preguntas e não faziam idêa daquilo. E o resultado foi o de centenas de alunos que passaram, estarem ignonantes e mal preparados para os futuros prosseguimentos dos seus cursos.

¿A quem se deve tudo isto? Com certeza ás nossas inovações rapidas e mal pensadas durante o ano letivo que impedem aos professores de guiar os alunos por um caminho recto de forma a dar-lhes noções seguras e quase completas duma disciplina a ser ensinada

O mal está nos nossos reformadores que introduzem *novidades* e *surprezas* sem terem em vista o fim a alcançar, imaginando que dentro de pouco tempo pode-se fazer andar de cabeça para os pés cu vice versa uma directriz tomada durante anos.

Uma reforma a introduzir tem de ser serena e ponderadamente estudada vendo sempre o seu resultado pratico num pais. Nenhuma reforma por mais bem intencionada que ela seja poderá atingir a sua desejada meta se tiverem em vista como novidade e não o objectivo a alcançar.

Entendiamos, porisso, que o sr. inspector desde já tomasse umas certas normas e regras para o seguinte ano lectivo e marcasse dentro do programa um criterio para ser seguido pelos professores durante o ano e de forma alguma exposto a ser alterado até o *terminus* do ano escolar, embora houvesse quaisquer mudanças nas repartições do Estado devido a mil e um caprichos da nossa publica governação.

E para isto entendiamos no nosso fraco modo de pensar, que seria milhor seguir o criterio adoptado nas escolas inglezas de exames escritos sob determinadas materias leccionadas durante o ano. Desta feita, haveria um juizo único nos julgadores e sob um mesmo prisma poderiam os alunos ser apurados. Mas não pára aqui; os juris devem ser constituidos de pessoas idoneas e extranhas ao professorado.

Outras modificações a serem introduzidas é de classificações por valores e não como se tem feito até agora, pois variando de diversas maneiras o aproveitamento dos alunos è lamentavel e até injusto que haja só mente duas classificações: *aprovação* e *distinção* que de forma alguma podem satisfazer os di versos graus que é necessario estabelecer entre os candidatos.

A classificação por valores seria melhor, como se faz nos Liceus e na Escola Médica, havendo assim uma verdadeira escala entre os candidatos.

Estas considerações sugeridas, parece-nos, que não poderão satisfazer as diversas correntes e opiniões e clamores que surgem na época dos exames havendo espectaculos tristes de *pedidos* e *favores*, de *vinganças* e *ódios* de parte a parte e uma confusão lamentavel que nasce em diferentes juris e conselhos na classificação dos exames.

Do que falta de tecnica e diversas lacunas que por ventura haja, esperamos o devido suprimento da parte do ilustre inspector que vendo bem as coisas unificará,—julgamos isto—tudo desde já e tomará uma certa norma a ser adoptada no ensino e esta de maneira nenhuma a ser alterada até os exames finais.

ALFA-BETA

ECOS E CRITICA

CONSULADO PORTUGUES

Dum cavalheiro de Curtorim recebemos uma carta que, referindo-se á nossa local *Desleixo?* borda as seguintes considerações:

"*O Bharat* classifica, em tom interrogativo e duvidoso, de *desleixo* o que se passa no Consulado Portuguez de Bombaim. Mas *aquilo* e' mais do que desleixo — uma coisa incompreensivel, tratando se sobre tudo de passaportes.

No *assunto* deste serviço, so' a assignatura do Consul custa uma *bagatela* de 17 rps. 11 tgs. 06 reis. Quem queira ir a Macau, e' despachado para a Secretaria do Gover no Inglez ou coisa que valha, para requerer nao sei que assignatura de nao sei tambem que *entidade*, as signatura que, com a meia duzia de palavras banais custa outra *bagatela* de 15 rps. Exige se esta ultima assignatura no passaporte a pretex to de, quem vai para Macau, ter de desembarcar em *Hon Kong*.

Para se fazer o total do custo do passaporte, temos de tomar na linha de conta alem do custo de docu mentos que nao sao *poucos*, o que se paga na nossa Secretaria Geral — 6 rps. e 3.000 reis que se nao es tou em erro vem a ser 8 rps. e tanto. Temos, portanto

Rps.	tgs.	reis	
17	11	06	(assinatura do Consul)
15	00	00	(dita da dita *entidade*)
14	00	00	(da nossa Secretaria)
46	11	06	

¿Nao e' *muito* para quem, desprovido de meios, vai buscar pao no extrangeiro?

¿O Consulado dignar se ha' de explicar o que ha em volta de todo esse *embroglio?*"

N. da R. – *O Bharat* que deseja seja respeitado o prestigio do Consulado de Portugal em Bombaim, espera que este derramará a necessaria luz, por forma que se dissipem as trevas que em sua volta se encastelam naturalmenté, por quaisquer malentendidos.

PARA OUTROS ...

Com a epigrafe de *Empregomania* o jornal — *A Terra*, de Margão diz entre outras verdades, duras e nuas, a seguinte:

"A êste assunto (*Empregomania*) tambên houve alusão no Congresso Provincial. Mas da parte de que n? Dos austéros Catões que desfrutam lugares publicos, se sentem engrandecidos com as suas vantagens.

O que é curioso é que esses Catões sejam precisamente os melros de bico amarelo que se esforçam pela *criação* de empregos *para os seus* e batalham pela situação prívilegiada no funcionalismo, como o sr. Teodoro Miranda, em prejuiso do pais e do bom senso."

Não há dúvida que os tão oportunos quão justos comentos do independente colega *fotografam* a moral dos patriotas *di cá*, pondo-lhes á mostra a careca. Nunca lhe dôa a ... caneta.

A proposito ocorre-nos um conto dum *Padre degenerado*, muito em voga no Povo.

Era uma vez um padre que tinha como criada de servir uma moça forte e bonita, que, de quando em quando, não deixava de prestar, tambem, ao seu religioso amo o *serviço* de lhe acalmar o *nervosismo car-*

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

वैशाख व० ७ मी शके १८४७

हिंदु–संघटना व गोमांतक

लेखांक ३ रा.

ब्रिटिश हिंदुस्थानांत हिंदुसंघटनेची किती आवश्यकता आहे याचें निरूपण भारताच्या गेल्या दोन लेखांकांत केलें गेलेंच आहे. तसल्याच तऱ्हेची एखादी संस्था गोमांतकांतहि उत्पन्न होणें हिंदुधर्म संगोपनाच्या दृष्टीनें योग्य आहे कीं काय याचा आज विचार करावयाचा आहे.

वास्तविक पहातां हिंदीस्थानांत मुसलमानी धर्मवेडानें तयार केलेल्या हिंदुधर्म विघातक अत्याचारयुक्त परिस्थितीला खासें व सक्रीय उत्तर ह्मणून हिंदुधर्म संघटनेची कल्पना

" जशास तसें "

या न्यायानें अमलांत यावी, हें योग्यच आहे. पण गोमांतकीय धार्मिक वातावरण उपरोक्त स्थित्यंतरापासून अलिप्त असतां व मुसलमानी किंवा ख्रिस्ती धर्मवेडाच्या व्रणाचे घाव येथील हिंदुधर्मीय जनतेस सहन करण्याचें कांहींच कारण नसतां, केवळ अनुकार वृत्तीनें, ब्रिटिश हिंदुस्थानांतील धर्मबंधूंची नक्कल करण्यास पुढें सरसावणें सारासार विचारशक्तीस पटण्यासारखें नाहीं, असा कित्येकांकडून आक्षेप येण्याचा संभव आहे. व वस्तुस्थितीच्या अंतरात्म्यांत एकतानता न पावलेल्या भोळ्या भावड्या भाविक वाचकास उपरिनिर्दिष्ट आक्षेप सकृत्‌दर्शनीं चक शकणार नाहींच, असेंहि आमच्यानें ह्मणवत नाहीं. परंतु वस्तुस्थितीशीं एकजीव झालेल्या जिवापुढें प्रस्तुत आक्षेपाची डाळ शिजणें सर्वतोपरी अशक्य आहे, हें सहज कोणाच्याहि ध्यानांत येईल. अल्प संख्यांक मुसलमानाच्या निर्बळ धर्मवेडाचा प्रश्न दृष्टिआड केला व नुसता बहुसंख्यांक ख्रिस्तांवांच्या सबळ धार्मिक 'डावपेंचां'चा विचार केला, तर असें दिसून येईल कीं, परम शक्तिमान परिस्थितीच्या पकडींत पक्कें पकडलें गेल्यानें जरी ख्रिस्ती धर्मवेडाची राख झाल्याचा भास भासत आहे, तरी सवड मिळतांच तें वेड आपल्या अंतरांत धुमसत असलेल्या अग्नीच्या आंचेची तीव्र जाणीव येथील हिंदुधर्मीयांस करून दिल्याखेरीज रहात नाहीं. उदाहरणार्थ गेल्या जुन्या गोव्यांतील सेंट झेवियरच्या

शवप्रदर्शनोत्सवांत

ख्रिस्ती धर्मवेड वेडानें धुंद झालें होतें. आकाशांतील बाप्पाच्या कळपांतील मेंढरांची संख्या वाढविण्याचा आटोकाट प्रयत्न झाला होता. निर्जीव ख्रिस्ती धर्म भावनांना चेतनेनें प्रफुल्लित करण्यासाठीं निर्जीव शवाच्या प्रदर्शनानिमित्त निलाजरेपणानें फायदा घेण्यास कांहीं पाद्र्यांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं. आणि दुःखाची गोष्ट ही कीं,

" ठोशास ठोसा "

लगावणारी कसलीच विरोधक शक्ति आड न आल्यानें कांहीं अज्ञ लोकांस ख्रिस्ती धर्मांत ओढण्याचा त्यांचा हेतु निष्कंटकपणें तडीसहि गेला.

अर्थात्, निवळ धर्मप्रसारासाठीं ह्मणून जरी येथें एखादी ख्रिस्ती संस्था स्थापन झालेली नजरेस येत नाहीं, तरी 'फेस्तां' सारख्या पर्वणींत परधर्मीय पामरांस पावन करून आपल्या आवडत्या येशूच्या

" पवित्र धर्मांत "

पचविण्याची संधि क्रिरिस्तांव पदभ्रष्ट करीत नाहींत, असा अनुभव आहे. 'फेस्तांशिवायहि इतर प्रसंगीं भिक्षापात्र अवलंबणाऱ्या असहाय्य अनाथांस अप्रतिम अट्टाहासानें आपल्या आकाशांतील बाप्पाच्या सैन्यांत साळसूदपणें सामील करण्याचे योग ख्रिस्ती बांधव वायां दवडीत नाहींत.

या वरून, अल्प प्रमाणांत कां होईना–पण ख्रिस्तीधर्मप्रसाराचें कार्य रिपब्लिकच्या झंजावातानें झिंगटलें नसून वेळ मिळेल तेव्हा तें प्रसरण पावत असतें, हें आमच्या वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल. ख्रिस्ती धर्मप्रसाराच्या या प्रसारक शक्तीला यापुढें आळा न पडेल तर हिंदुधर्मीयांचा बहुसंख्यांक बुरूज बहुश्रुतांच्या बडबडीकडे लक्ष्य न देतां पार ढांसळून पडेल, हें निर्विवाद आहे. व

" थेंबे थेंबे तळें सांचे "

या न्यायानें ख्रिस्ती धर्मीयांचें तळें सांचून हिंदु धर्मरूपी नदाचें पाणी पायांखालीं पोंचविण्याच्या पापाचे अधिकारी मात्र हिंदुधर्मीय लोक होणार आहेत. एवंच हिंदु संघटनेची जरूरी हिंदीस्थानांतच नसून गोमांतकांतहि तिची आवश्यकता कशी आहे, हें उघडपणें सिद्ध होतें

क्षणभर असें समजूं कीं, क्रिरिस्तांवांनीं आपल्या धर्मप्रसाराच्या शस्त्रांचा न्यास केला आहे व यापुढें ते वाटावाटीच्या वजवज पुरीपासून बाजूला बसतील. असें जरी असलें तरी 'संघटनेची' आवश्यकता नष्ट होत नाहीं. एके काळीं ख्रिस्ती धर्मवेडाच्या तर्कटी तुफानांत सांपडलेली पण परावर्तनासाठीं हिंदुधर्मीयांच्या सहानुभूतीच्या काडीच्यासुद्धा आधारार्थ तळमळणारी हजारो गावडे मंडळी आजला गोमांतकांत दृष्टोत्तीस येते. या मंडळींचें वर्णन भारतांत अनेकदां आलेंच आहे. दुसऱ्या काहीं कारणासाठीं नसलें तरी निदान उपरोक्त लोकांची परत स्वधर्मांत येण्याची सदिच्छा संपूर्ण करण्यासाठीं संघटनेच्या संस्थापनेची मुहुर्तमेढ मर्द ख्रिस्त्यांची बिलकूल पर्वा न करतां लाविली पाहिजे. अतो आमचे धर्माभिमानी हिंदुलोक या गोष्टीचा विशेष आस्थेनें विचार करतील अशी आशा बाळगून लांबलेली ही लेखमाला आज संपवितों.

———

स्फुट विचार

पोलीसखातें : — सार्वजनिक स्वास्थ्याचा भंग होऊन राष्ट्रीय प्रगतीचा मार्ग कंटकमय बनूं नये, ह्या हेतूच्या पायावर पोलीसखात्याच्या इमारतीची उभारणी झाली आहे, हें आज कोणास नव्यानें सांगण्याची कांहीं गरज नाहीं. कोठेंहि झालें तरी सार्वजनिक संरक्षणाच्या आंखीव क्षेत्रावलीकडे पोलीसखात्याच्या कर्तबगारीला जाण्याला वाव ठेवलेला नसतो. भांडखोर लोकांच्या भांडखोरकृतीनें निरुपद्रवी नागरिकांच्या नानाविध व्यवसायांला उपसर्ग पोंहचूं नये, हेंच ध्येयहि आमच्या येथील पोलीसखात्याच्या जनकस्थानीं आहे. निदान पोलीस लोकांच्या कार्यक्षेत्राचें ज्या कायद्यांत सविस्तर वर्णन आलें आहे, त्यावरून तरी कोणाचाहि उपरिनिर्दिष्ट समज साहजिक होतो. आम्हीहि त्या कायद्याचें यथामति अध्ययन केलेलें आहे. व ह्याच अध्ययनाच्या जोरावर असें स्पष्ट सांगूं शकतों कीं, पोलीसखात्याला सार्वजनिक संरक्षणाशीं निगडीत असलेल्या बाबींखेरीज अन्य कसल्याहि गोष्टींत ढवळाढवळ करण्याची कायद्यानें पूर्ण मनाई केली आहे.

तत्व व तपशील :— पोलीसखात्याला कायद्याचें तत्व कबूल आहे पण तपशिलाकडे त्याची डोळेझांक होत असते, अशा अर्थाच्या अनेक तक्रारी आम्हांकडे येऊं लागल्या व अजूनहि येत आहेत. 'अमूक ठिकाणच्या फलाण्या पोलीस अंमलदारानें आमच्या पिढीजाद वहिवाटीच्या जमिनीच्या हक्कांत अधिकारी चंचूप्रवेश करून त्यांवर मुसळप्रहार केला;' 'तमूक तालुक्यांतील तेने तीनें तीन तप उपभोगीत असलेल्या आमच्या जमीन–हक्कावर तरवार उगारली;' 'माझ्या मुलीच्या व जांवयांच्या भानगडींत पोलीसांनीं लुडबूड केली;' 'माझे रुपये पोलीसांनीं बुडविले.' इ. इ. या तक्रारी पाठविणारे गृहस्थ आमच्या परिचयाचे असल्यानें, त्यानीं पुरविलेल्या माहितीवर आमचा विश्वास न बसणें अशक्य होतें. अर्थात् सार्वजनिक हिताकडे दृष्टि पुरवून भारतांत त्यांचा चर्चात्मक ऊहापोह करणें आह्मांस साहजिकच भाग पडलें.

पोलीसांचें धोरण:– गेल्या अंकाच्या पोर्तुगीज अग्रलेखांत आह्मीं त्या एकंदर तक्रारींचा सर्वसाधारणरीत्या विचार करून, पोलीसखात्याच्या अधिकारातिक्रमणापासून जनतेंत असंतोषाचा वणवा कसा पेट घेऊं पहात आहे, याचें वर्णन केलें. सूत्ररूपानें लोकांच्या कागाळ्यांची माहिती सरकाराला करून दिली. व शेवटीं, तक्रारींचा खरेखोटेपणा पडताळण्यासाठीं सरकारमार्फत एक चौकशी–कमिटी नेमण्यांत येऊन, त्याच्या सूचनेनुरूप लोकांस न्याय मिळावा, अशी इच्छा प्रदर्शित केली गेली. पण कमिटीचा प्रश्न तर बाजूलाच राहिला. उलट तो लेख लिहिल्याबद्दल आमच्या संपादकांस वरिष्ट हुकुमान्वयें येथील पोलीस अधिकाऱ्यांसमोर लेखाचें 'स्पष्टिकरण' करण्यासाठीं जावें लागलें.

जबाबदाऱ्याची जबानी: — येथील पोलीस खात्यांत घेतल्या गेलेल्या जबानींत आमच्या संपादकानें 'आरोपित' लेखाची जबाबदारी तर स्वीकारलीच; शिवाय तो लेख लिहिण्यास जीं कारणें कारणीभूत झालीं त्यांचा एकंदर पाढा वाचला. त्यांत ठिकठिकाणच्या तक्रारींचा विस्तृत उल्लेख करण्यांस ते विसरले नाहींत. इतकेंच नव्हे, तर आरोपित लेखांतील मुद्यांच्या पुष्टिकरणार्थ नवीन माहितीहि पोलीसखात्याला पुरविण्याचें त्यांनीं कबूल केलें आहे. यावरून आह्मीं आमचें कर्तव्य यथामति बजाविण्यांत कसी कसूर केली नाहीं, हें वाचकांस दिसून येईलच. आतां तक्रारवाल्यानीं आपल्या तक्रारींची दाद लावून घेण्यासाठीं धैर्यानें पुढें आलें पाहिजे. 'ज्याच्यावर आलें आहे तो बघून घेईल, आह्मां आमची झोंबमोड करून कां घ्या' अशा तऱ्हेची आळशी विचारसरणीस थारा न देतां, खरोखरच जर पोलीसांकडून अधिकारातिक्रमण होत आहे, तर त्याला कायमचा आळा पडण्यासाठीं, तक्रारवाले आपल्या एकंदर आयुधांनिशीं 'भारता'ला मदत करण्यास सरसावतील अशी आह्मांस सबळ खात्री आहे.

म. कमिटीची सभा:— ठरविल्याप्रमाणें गेल्या शनिवारीं (ता. ९) रोजीं मडगांव येथें सारस्वत ब्रा. समाजाच्या क्वार्टेल समोरील इमारतींत सासष्टी महालांतील प्रागतिक संघाच्या सभासदांची सभा महालकमिटीचे अध्यक्ष श्री. वामन राम कामत यांच्या अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आली. अध्यक्षांनीं सभा बोलावण्याचा हेतु थोडक्यांत सांगितल्यावर प्रा. संघाच्या दुसऱ्या परिषदेची पूर्व तयारी ह्मणून ठिकठिकाणीं फिरून नवीन सभासद मिळविण्याविषयीं एक कमिटी नेमण्यांत आली. जागच्या जागीं बऱ्याच गृहस्थानीं सभासदत्वाचे फार्म भरून दिले. व नंतर सभेचें काम संपविण्यांत आलें. इतक्या लवकर तरी आमचे सासष्टीकर बंधू जागे झाले हें सुचिन्हच ह्मणायाचें. संघाची पहिली परिषद होऊन १६–१७ महिनें होत आले तरी अद्याप बऱ्याच महालांतून महालकमिट्या निवडावयाच्या असून नवीन सभासद मिळविण्याचें मुख्य व पहिलें कार्य रेंगाळत चाललें आहे. यापुढें तरी संघाचे ठिकठिकाणचे अभिमानी आणि म. मंडळाचे सभासद जागे होऊन वरील कार्यास आरंभ करतील व सासष्टीकर बंधूंकडून दुसऱ्या परिषदेचें अधिवेशन पहिल्यापेक्षा अधिक जोमानें झोपाव उत्साहानें हातभार लावितील अशी आह्मांस आशा आहे.

पांच तारा आहेत, त्याची आकृति गाडीच्या चक्राप्रमाणें वर्तुलाकार आहे. त्या वर्तुलांतून ग्रह गेला ह्मणजे रोहिणीशकटभेद होतो. शके १८४७ श्रावण कृष्ण ८ मी बुधवार या दिवशीं उत्तर रात्रीं चार वाजतां, आश्विन कृष्ण ४ थीं मंगळवार या दिवशीं रात्रीं ९ वाजतां, कार्तिक कृ॥ २ सोमवार या दिवशीं उत्तर रात्रीं तीन वाजतां पौष्य शुक्ल १३ शी रविवार या दिवशीं रात्रीं आठ वाजतां चंद्र रोहिणीशकटभेद करतांना दृष्टीस पडेल. चंद्र–रोहिणीशकटभेद फल:– अवर्षण पडेल, तृषेनें लोक पीडित होतील. सांथीमुळें हजारो लोक मृत्युमुखीं पडतील, जनावरांचा नाश होईल, नास्तिकपणा फैलावेल, दंगेधोपे मारामाऱ्या होतील, कोठें अनावृष्टीनें व कोठें अतिवृष्टीनें दुष्काळ पडेल, धान्याची महर्गता वाढेल. हीं फळें भरत खंडांत निरनिराळ्या प्रांतीं कमी जास्त मानानें सहा सात वर्षें मिळत गेलीं व पुढें शके १८४८ अखेर पर्यंत मिळणार आहेत" ह्मणजे क्षय संवत्सर गुदरलें कीं आमचें नष्टचर्य संपलें. संवत्सरांच्या नांवांप्रमाणें मिळालेल्या फळांचा अनुभव सर्वांस आहेच ह्या वर्षफलाच्या वाचनानें घाबरून जाण्यांत अर्थ नाहीं, 'पडतां जड भारी ॥ दासीं आठवावा हरी ॥" त्याच पंचागात पर्जन्याचा खुलासा केलेला आहे, तो:

"पर्जन्यमान"

"या वर्षी पर्जन्यमान बरें आहे. पिकाचें मान चार आण्यापासून दहा आण्या पर्यंत आहे. वारा पश्चिमेकडील भयंकर सुटल्यानें जमलेले मेघ विस्कळीत होऊन कोठें अतिवृष्टि व कोठें अनावृष्टि होईल. रोहिणी वादळें जोरांत सुटतील. विजेची भीति फार आहे. मृग=पश्चिमेचा वारा सुटेल. हवेंत फरक होईल. ब्रह्मदेश व कोंकण इकडे पाऊस पडेल. अर्द्रा=तृतीय चतुर्थ चरण साधारण पडतील. रोगट हवा होईल. पुनर्वसु=द्वितीय व चतुर्थ चरण चांगला पडेल. कांहीं भागांत पेरे होतील. पुष्प=हवा चांगली राहील. नद्यांस पूर येतील. पाऊस उत्तम पडेल. सर्वत्र पेरे होतील. आश्लेषा=खंड वृष्टीनें पाऊस पडेल. दक्षिणेकडील भागांत अतिवृष्टि होईल. मघा=प्रथम व तृतीय चरण साधारण पडतील. पिकांस रोग उत्पन्न होईल. पूर्वा=कांहीं भागांत पिकें वाळावयास लागतील. चारी चरण साधारण आहेत. उत्तरा=या नक्षत्राचा चोहींकडे सर्व साधारण पडेल. हस्त=याचा पाऊस खंड वृष्टीनें पडेल. पिकें सुधारतील. पश्चिमेकडील भागांत मत्स्यवृष्टि होईल. चित्रा=या नक्षत्राचा पाऊस कमी प्रमाणांत पडेल. वारा फार सुटेल. या वर्षी ऊंस, तंबाकू, हळद, मिरची, हुलगी, भुइमूग या धान्यांची खराबी होईल. ज्वारी, बाजरी, शाळू, कापूस, हरभरा, मूग, उडीद, हीं धान्यें बरीं येतील. इतर धान्यें साधारण येतील."

. . हे सर्व उतारे श्री. उद्धव विष्णु रुईकर ह्यांच्या कोल्हापुरी पंचागांतून घेतले आहेत. ज्यांच्याकडे हीं पंचांगें नसतील त्यांना भविष्य वाचनीय होईल. ज्यांच्याकडे असतील त्यांना हा विषय नवीन नाहीं हें उघडच आहे. जे कधीं पंचागाकडे ढुंकून देखील बघत नसतील त्यांना हा मजकूर टाकाऊ वाटणार.

आर्य ज्योतिषाच्या आधारानें सगळेच ज्योतिषी बिनचूक भविष्य वर्तवितात असें नाहीं. मनुष्य ज्याप्रमाणें ग्रहदशेच्या फेऱ्यांत सांपडतो. त्याप्रमाणें राष्ट्रेंहि ग्रहदशेचे परिणाम भोगित असतात. प्रत्येक व्यक्तीचें भविष्य वर्तविण्यास जन्मकालादिकांचा उपयोग होतो. वर राष्ट्रांच्या भवितव्यास त्यांच्या राशि ठरवून व्यवहार चालत असतो. ज्योतिषाचें भविष्य बिनचूक असेल तर मनुष्यास सावधगिरी बाळगितां येते. खिस्ती धर्मांत ज्योतिषाला बहिष्कार आहे.

"आकाश मंडळांत जे अनेक ग्रह आहेत त्यांचे शुभाशुभ परिणाम मनुष्य, जीवजंतु, पशु, पक्षी, झाडें, वनस्पति, वृक्ष इत्यादि प्रत्येक वस्तूंवर होत असतात हें तत्त्व पाश्चिमात्य व पौर्वात्य तत्वशोधकांस व ज्योतिषांस मान्य आहे......आतां नवग्रहांचे पृथ्वीवरील प्राणीमात्रांवर शुभाशुभ परिणाम कां होतात याचें तात्विक रीतीनें सप्रमाण विवेचन केलेलं फारसें आढळण्यांत येत नाहीं, तथापि ज्योतिष ग्रंथांत मनुष्यावर ग्रहाचे जे शुभाशुभ परिणाम कथन केले आहेत त्याप्रमाणें अनुभव बऱ्याच अंशानें येत असतो."

पंचांग प्रवर्तन कमिटीच्या शुद्ध निरयन पंचांगात (टिळक पंचांगांत) यंदांच्या संवत्सर प्रतिपदेचे दिवशीं चंद्रदर्शनाचा योग दाखवून दिलेला असतां दृक्प्रत्ययास तसें आलें नाहीं; अर्थात् भविष्य बरोबर उतरलें नाहीं. शुद्ध पंचांगाचा निर्णय खरा कीं अशुद्धाचा खरा?

सारस्वत

—गेल्या ४ तारखेस वार्के येथें श्री. रा. नारायण नाईक यांच्या येथें वसंतोत्सव साजरा करण्यांत आला. त्यादिवशीं श्री. नाईक यांनीं आपल्या दिवाणखान्यांत स्वतः तयार केलेल्या आरास मंदिरांत, स्वतः चित्रित केलेली मुरलीधराची तसबीर ठेवून, ती वसंतोद्यानांतील नाना प्रकारच्या पुष्पांनीं सुशोभित करून, तिची षोडशोपचारें नवविधा भक्तिपूर्वक पूजाअर्चा केली. गांवांतील बहुतेक स्त्रीपुरुष या उत्सव प्रसंगीं हजर होते. सायंकाळीं ५।६ च्या सुमारास स्वतः नाईक यांनीं गीतेवर यथामति पुराण सांगून, तें आटोपल्यावर यथामति कीर्तन केलें. तदनंतर वार्केच्या ग्रामसंस्थेचे लेखक श्री. हेदे यांनीं, लोकाग्रहास्तव, प्रासंगिक विषयावर आपले थोडक्यांत विचार प्रदर्शित केले. इ. श्री वल्लभ हेगडे हे कळवितात.

—पोलीस लोकांच्या अधिकारातिक्रमणा संबंधानें लिहिलेल्या गेल्या अंकाच्या लेखांतील मुद्यांची चौकशी चालू असून, आमच्या संपादकांची पोलीस खात्याकडून जबानी घेण्यांत आली.

जाहिरात....!

रा. रा. भारतकर्ते यांस.

कृ. सा. न. वि. वि. आपल्या ता. ३०-४-२५ च्या अंकांत रा. राऊत ह्यांचें माझ्या पत्राला उत्तर प्रसिद्ध झालें आहे. मूळ विषयासंबंधानें, माझ्या मागील पत्रांत मी एकंदर खुलासा करून मला आणखी कांहीं लिहावयाचें नाहीं असें स्पष्ट सांगितलें होतें. परंतु, आतां ज्या अर्थी रा. राऊत ह्यानीं मूळ विषयाशीं संबंध नसलेल्या कांहीं गोष्टी आपल्या उत्तरांत येऊं दिल्या आहेत, त्या अर्थी आपल्याला हें पत्र प्रसिद्ध करविण्याची तसदी देणें मला पुन्हा भाग झालें आहे.

आपल्या उत्तरांत रा. राऊत हे सलामीलाच असें सांगतात कीं माझें उत्तर धरल्याला धरून नसून मी माझें शब्दशः दिलेलें वाक्य हें निव्वळ खोटें आहे. वास्तविक, असें बिनदिक्कत ह्मणणाराला उत्तराचा मान देणें हें स्वाभिमानाला कष्टप्रद आहे. परंतु रा. राऊत ह्यांना कदाचित तेवढीच वाट मोकळी वाटून त्यांनीं तिचा आश्रय केला असेल अशा समजुतीनें मी हें उत्तर लिहीत आहें. मूळ भाषणासंबंधानें मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, कोणत्याहि सार्वजनिक भाषणांत श्रोते किंवा व्याख्याते ह्यांना अनुलक्षून बोलतानां योजलेले औपचारिक शब्द मीं नेहमीं काळजीपूर्वक व पूर्ण तोलूनच वापरलेले आहेत. व त्यांत मी कोणाला कधींच दुखविलेलें नाहीं. ह्याविरुद्ध रा. राऊत हे असें सांगतात कीं माझ्यावर नसतीं विधानें लादून टीका करण्याचें त्यांना कांहींच कारण नव्हतें. नसेल, परंतु हीहि गोष्ट खरी कीं तसें कांहींतरी कोणा एकाकडून घडल्यावांचून त्यांची व माझी वर्तमानपत्रांतून जाहिरात कशी झाली असती?

असो. हे वैयक्तिक प्रश्न बाजूला ठेवून मुख्य विषयाकडे वळूं.

१ रा. राऊत ह्यांचें पहिलें विधान असें आहे कीं "त्यावेळीं कार्याचा प्रश्नच नव्हता. व काव्याची तुलना काव्य ह्या दृष्टीनें करण्याचें अशक्य वाटणाऱ्या श्री. सामंतांनीं आधुनिक कवींवर टीका करण्याचा बेजबाबदारपणा करण्याचें कारण नव्हतें." आतां खरें पाहिलें असतां, कार्याचा प्रश्न कसा आला हें रा. राऊत ह्यांना माझ्या भाषणांतच स्पष्ट दिसून आलें असतें. प्राचीन कवि हे केवळ संत होते व त्यांची कविता ही सारी निवृत्तिपर होती असें जें व्याख्यात्यानीं प्राचीन कवींना व त्यांच्या काव्याला उद्देशून ह्मटलें होतें, त्यामुळें त्या काव्याच्या कार्याचा विचार करणें क्रमप्राप्त होतें. प्राचीन कवितेवरील हे आरोप नवीन नाहींत किंवा त्यांचें निराकरणहि नवीन नाहीं. ह्या विषयावर मराठी भाषेंत पुष्कळच चर्चा होऊन गेलेली आहे. अर्थात रा. राऊत ह्यांनीं एवढें बुजून जाण्याचें कारणच कळत नाहीं. प्राचीन कवि हे केवळ विरक्त, संत, टाळकुटे नसून समाजसुधारक होते व त्यांच्या काव्यानें समाजसुधारणेचें मोठेंच कार्य झालेलें आहे. आणि त्यांचे समाजसुधारणेचे विचार तुकाराम, रामदासादि कवींच्या काव्यांतून भरपूर आढळून येतात; त्यांची कविता केवळ भाषांतरित नव्हे; त्याचप्रमाणें तिला केवळ निवृत्तिपर ह्मणणाऱ्यांनीं तिच्या प्रवृत्तिपर कार्याचा विचार केलेला नसतो हें दाखविणें भाग असल्यावरून मला त्या काव्याच्या कार्याचा उल्लेख करणें आवश्यक होतें. ह्यालाच रा. राऊत हे 'बेजबाबदारपणा' असें नांव देत असतील तर त्यांची जबाबदारपणाची श्री अजून भागलेली नाहीं असें दिसतें.

तसेंच अर्वाचीन कवींवर मी केवळ हेंसेखातर टीका केली असा जो त्यांनीं माझ्यावर आरोप केला आहे तोहि निष्कारण आहे. अर्वाचीन कवींच्या ठिकाणीं जें वैगुण्य दिसून येतें ते अर्थात जेव्हां त्यांची प्राचीन कवींबरोबर तुलना करण्यांत येते तेव्हांच दिसून येतें. केवळ अर्वाचीन कविता हाच विषय घेऊन जर कोणी त्यांतील माधुरी दाखवील तर त्यावेळीं मतभेदाला व टीकेला जागा उत्पन्न होणार नाहीं. परंतु, त्याऐवजीं ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, रामदास, तुकाराम मोरोपंत, वामन ह्यांच्या पंक्तीला, एवढेंच नव्हे तर कांहीं बाबतींत त्यांच्याहून वर 'घुबड' 'दागिने मागणाऱ्या प्रियेस' [ह्या दोन्हीं कविता व्याख्यात्यानीं वाचिल्या होत्या] असलीं कवनें करणाऱ्या कवींना बसवियाची जेव्हां तयारी दिसून येते, तेव्हांच वादाचा व टीकेचा प्रसंग, चर्चेत भाग घेण्याची जबाबदारी ज्यावर लादली असेल, त्यावर येतो. ह्या टीकेचा संबंध व्याख्यात्याच्या सुश्राव्यतेकडे कांहींच नाहीं. प्रो. मायदेव ह्यांचें व्याख्यान मनोरम झालें ह्याबद्दल मी तेव्हांच कबुली दिली होती. परंतु, त्यावरून प्राचीन व अर्वाचीन कवींमधील न्यूनाधिक्य दाखविणें गैर कां हें कळत नाहीं. त्याचप्रमाणें, तेवढ्यावरून, अर्वाचीन कविता प्राचीनाहून सरस किंवा बरोबरीची कशी ठरते हेंहि कळत नाहीं. प्राचीन कवितेच्या आधारें प्रो. मायदेव ह्यानीं आपलें व्याख्यान सजविलें असतें तर तें निरस झालें असतें काय? माझ्या मतें तें त्याहून सरस व उपयुक्तहि झालें असतें. अर्वाचीनापेक्षां प्राचीन कवितेचा व्यासंग वाढला पाहिजे व तिच्यांतील काव्य व विचार ह्यांची ओळख नवीन दृष्टीनें करून देण्याची कामगिरी प्रो॰ मायदेवासारख्या अर्वाचीन रसिक विद्वानानीं अंगिकारली पाहिजे; त्याऐवजीं, 'घुबड' किंवा 'दागिने मागणाऱ्या प्रियेस' अशा कवनांतील माधुरी दाखविण्यानें खऱ्या रसिकतेचा व विद्वतेचा समाजांत फैलाव होणार नाहीं, अशी माझी प्रामाणिक समजूत आहे. व ती श्री. राऊत ह्यानीं मला उद्देशून योजिलेल्या बेजबाबदार, खोडकर इत्यादि विशेषणानीं फारशी बदललेली नाहीं.

२. अर्वाचीन कवींना टीकेची भीति कां

"प्रत्यक्षं ज्योतिषं शास्त्रं चंद्रार्कौ यत्र साक्षिणौ"

या सूर्यसिद्धांतोक्तीनुसार फलज्योतिः शास्त्राचा, आर्यांच्या बृहत्पाराशर्यादि ग्रंथांपासून, पाश्चिमात्यांच्या दिनवर्षपद्धतीपर्यंत विविध मतें व ग्रंथाधार विचारांत घेऊन तात्विक पद्धतीनें व भौतिक शास्त्रानुसार अनुभव घेणें असल्यास समक्ष किंवा पत्रद्वारें कळवा. पुढीलप्रमाणें सर्व कामें शुद्ध व सूक्ष्म पद्धतीनें केलीं जातात.

वर्ग १ ला, आजन्मफलवर्णनाची मोठी पत्रिका रु. १० ते २५
व० २ रा, भावचलित गणिताची मध्यम प० रु. १०
व० ३ रा, सायन व निरयन मताची प० रु. ५
व० ४ था, शुद्ध व सूक्ष्म निरयन प० रु. ३
व० ५ वा, सर्व साधारण दशांतर्दशांची प० रु. २
व० ६ वा, साधी स्पष्टग्रहादिक प० रु. १ व जन्मटिपण ८ आणे.

शिवाय वर्षमासफळें, प्रश्न, मुहूर्त, पत्रिका पाहणें वगैरे कामें सप्रमाण व सोपपत्तिक अशीं आधुनिक कालास पटण्याजोगीं टाइमशीर करून देऊं. फलज्योतिषाच्या आस्थेवाइकांनीं अनुभव घेऊन खात्री करावी.

पत्ताः— नारायण अनंत नाईक पाटणकर मालक "ज्योतिष कार्यालय आणि श्री पांडुरंग–ग्रंथ–संग्रहालय" मु० पो० सांगें प्रांत गोवा.

अस्सल काश्मिरी कोकशास्त्र

(काश्मिरचे महाराज शंभूसिंह यांचे दिवाण पंडित कोके यांच्या चरित्रासह)

या ग्रंथांत ७२ प्रकरणें दिलीं असून त्यांत ११२ चित्रांचा समावेश केला आहे. स्त्री पुरुष संबंधाची सविस्तर माहिती त्यांत सूक्ष्म रूपानें ग्रंथित झाली असून, स्त्रियांच्या तसेंच पुरुषांच्या भेदांचें वर्गीकरण फार मार्मिक रीतीनें करण्यांत आलें आहे. स्त्री पुरुषांचे रोग व ते सहज रीतीनें सुधारण्याचें खात्रीचे औषधोपचार, यांचाहि प्रस्तुत कोकशास्त्रांत ऊहापोह केला गेला असल्यानें पुस्तकाचें महत्व फारच वाढलें आहे. नपूंसकत्व पार लयास जाऊन त्याची जागा पौरुष्यानें व्यापिली जावी, असें ज्यांस वाटत असेल त्यानीं तर सदरहू पुस्तक एकदां तरी वाचावेंच. जुनाट व्याधींवर रामबाण उपाय या एकाच पुस्तकांत पहावयास मिळतात. मनोवांच्छित संतती संबंधानेंहि या दुर्मिळ पुस्तकांत महत्वपूर्ण माहिती सग्रहित करण्यांत आली आहे. मूळ संस्कृत ग्रंथाचें आह्मीं मराठींत रूपांतर केलें असून भरपूर टीकात्मक व अनुभविक माहितीहि आह्मीं या मराठी कोकशास्त्रांत संकलित केली आहे. प्रत्येक वर्षीं सदरहू पुस्तकाच्या ५६ हजारांवर प्रति खपत असतात, ही एकच गोष्ट या जुन्या व दुर्मिळ पुस्तकाचें श्रेष्ठत्व सिद्ध करण्यास पुरेसी आहे. किंमत ट. हं. सह ४ रुपये. खालील पत्त्यावर पुस्तकें मागवावींतः—

International Publishing Company
INTERNATIONAL BUILDINGS
LUDHIANA PUNJAB

विष्णु रामचंद्र केणी यांचें दुकान

जुना बाजार—मडगांव.

स्थापना १८५०

सचोटीबद्दल प्रसिद्ध असलेल्या या अत्यंत जुन्या दुकानांत सर्व तऱ्हेच्या मालाचा भरीव स्टॉक असतो. निरनिराळ्या जातीच्या शाई, रंग, सिमीट, व्हेनीज, आवोक, हरतऱ्हेचें लोखंडी सामान (खिळे, करवती वगैरे) नाना रीतीचे जस्ताचे व तांब्याचे पत्रे व इतर सर्व संसारोपयोगी वस्तू सदर दुकानांत माफक दरानें विकल्या जातात.

दर एक, माल चोख, व्यवहार रोख

अनुभवानें खात्री करून घ्या !

॥ श्रीग्रहरूपिणेनमः ॥

जन्मकुंडली अगर नक्की जन्मवेळ पाठविली असतां साऱ्या आयुष्यांतील महत्वाच्या गोष्टींचें विवेचन व हयातीपर्यंतचें स्थूल भविष्य आणि ५ वर्षांचें निरनिराळें प्रत्येक वर्षांत घडणाऱ्या महत्वाच्या गोष्टीचें व भाग्योदय काल व अनिष्ट कालाचें भविष्य वर्तविलेली पत्रिका ६॥ रुपयांच्या व्ही. पी. नें पाठवूं. दशा स्पष्ट केलेलें जन्म टिपण ८ आणे.

रामचंद्र लक्ष्मण प्रभु गांवकर.
मु. लोलियें पो० काणकोण–गोवा.

श्री शांतादुर्गा मोटार सर्व्हीस

सांवर्डें—गोवा-

आठ मनुष्यांना मनमोकळेपणानें बसण्यासारखें हें उत्तम मेकरचे मोटार प्रवासूंच्या इच्छेप्रमाणें खालीं नमूद केलेल्या ठिकाणीं स्पेशल भाड्यानें जाईल. अपघाताची मुळींच भीति नाहीं.

सांवर्डेंहून (स्पेशल)	सांगें	किं.	३	रुपये
	कुसमण	,,	४	रु.
	मडगांव	,,	९	रु.
	जांबावली	,,	८	रु.
	काणकोण	,,	२५	रु.
	कुडाळ	,,	१८	रु.
	मुरगांव	,,	२५	रु.

एक तासाच्या अंतराने त्याच मोटारनें परत यावयाचें असेल, तर जाण्याच्या भाड्याची निमी किंमत द्यावी लागेल. नुसती सहल करण्यास दरतासीं ६ रु. भाडें पडेल.

आगगाडीच्या उतारू व प्रवासू लोकांची सोय होण्यासाठीं सांवर्डेंहून सांगें येथें दर असामीस ६ आणे भाडें असून केपें येथें ८ आणे आहे.

सांवर्डेंहून सांगें व केपें व या दोन्ही ठिकाणांहून सांवर्डें येथें आमची मोटार सर्व्हीस नियमितपणें चालू असते.

मालक
जी. आर. नाडकर्णी

कोल दालोझ

हें पौष्टिक औषध अत्यंत शक्तिवर्धक असून, त्याच्या सेवनानें कोणत्याहि आजारामुळें प्राप्त झालेला थकवा अथवा गलितपणा अवघ्या आठ दिवसांत समूळ नाहींसा होतो. गोमांतकभर त्याचा झपाट्यानें प्रसार होत असून, तें कोणत्याहि औषधालयांत विकत मिळतें.

O BHARAT

PELA INSTRUÇAO

E' grande o número de aprovados nos ultimos exames de complementar e crêmos que exceptuando uns poucos, todos hão-de querer matricular-se nos liceus a fim de engrossar a sua bagagem scientifico—literaria.

Mas, infelizmente, os alunos que tiveram a bôa sorte de passar os exames de complementar, estamos absolutamente certos, sómente irão aquentar os bancos dos liceus, pois foram aprovados sem a preparação suficiente para compreender as disciplinas aí ministradas.

Eles não tem a culpa disso. Durante o ano escolar viram e passaram por diversas fieiras e multiplos projectos e o complementar em vez de ser o terreno propicio—como antes era — para a preparação dos seus futuros estudos, foi antes um capricho da parte da nossa administração pública que a seu bel—prazer e sem atingir o fim mudou as normas duma maneira simplesmente desoladora e espantosa.

Os alunos que forem agora estudar as classes do liceu estarão aí a penar e muitos deles, coitadinhos, terão de abandonar. Talvez no primeiro ano como quasi sempre sucede será tolerada a passagem, mas isto em vez de os favorecer causará prejuisos nos anos seguintes.

Ao depois clamarão que a culpa não foi sua, mas sim dos professores que deixaram passar. Não se lembrarão de que fizeram mil e uma promessas de estudar bem no ano seguinte; de que o motivo da ignorancia não foi deles...mas sim dos professores que não ensinaram na da no complementar, etc, etc...

E a maré de cidadãos com cerebros ôcos e mal disciplinados só há-de engrossar a falange prejudicando desta feita o aproveitamento das diversas faculdades de inteligencia e de bom trabalho.

Não se pode duvidar que o complementar bem ensinado e estudado facilita muito os estudos nos liceus e quem tiver bases boas não sentirá dificuldades em transitar as classes liceais. E o mesmo pode-se dizer doutro lado: quem vai bem preparado num ano ou num curso lá prossegue nos estudos sem obstaculos de maior monta.

E' verdade que nós não podemos de cerce cortar o mal de raiz e numa penada remover tudo, mas devagar seria bem evitar maiores males

E para isto entendiamos no nosso modesto modo de vêr que os alunos de complementar fossem submetidos a uma especie de exames de admissao. Isto não só facilitaria os alunos, futuros estudantes do liceu, e até obrigaria os professores do liceu a terem maiores responsabilidades e mais esforços em melhorar a *obra aprovada* nos exames de admissão.

Há para notar que no seio do Conselho Legislativo, em tempo, a proposta dos exames de admissao á primeira classe do liceu foi aventada e viu-se que era viavel e oportuna.

Não nos parece, portanto, que o alvitre apresentado seja tardio de mais para ser tomado em linha de conta e fazendo-se isto não haverá razões para vivermos no campo de *gaffes* e disparates.

Alêm disso os alunos escolhidos hão-de trabalhar com mais consciencia e scientes de que foram para aí por direito de escolha empregarão todos os esforços para vencer outras dificuldades.

Se o exposto for tomado em linha de conta, tanto os alunos como os professores sentir-se-hão muito aliviados, principalmente os professores, a quem são abribuidas muitas culpas quase sempre sem razões plausiveis.

Esperamos, portanto, da parte dos dirigentes algumas medidas urgentes e rapidas.

ALFA-BETA

CARA'TER GERAL DO GANDHISMO

III

Charká e Kadi

No nosso ultimo artigo ja' estudamos os caracteres fundamentais do satiagraha que radicalmente o diferenciam de outros movimentos que na forma se parecem com ele. No presente vamos encarar o problema de charka' e kadi sob diversos pontos de vista que ele nos pode oferecer.

Kadi e', como todos sabem, o tecido de algodao, do linho fiado a mao no charca' e preparado no tear. O tecido de kadi, ao presente, e' um pouco grosso. Mas isso ja' nao era um se'culo antes, quando os ingleses ainda nao tinham consolidado o seu dominio no territorio indiano. Deixando a' parte o brilhante periodo de civilisaçao da India, periodo em que este paiz vestia-se de sedas enquanto quasi todas as naçoes europeias vejetavam numa barbarie medonha, pouco antes da dominaçao inglesa, produziam-se aqui tecidos de seda e de algodao que levavam a palma aos mais finos tecidos feitos em Manchister. Mas esse estado florescente da industria textil ja' nao continuou mais; pois os inglezes querendo favorecer o seu paiz, carregaram na com fortes impostos e mesmo chegaram a proibir a extracçao do fio duma determinada delicadeza. E para o cu'mulo da injustiça cortaram maos a um grande numero de teceloes que fiavam o linho extremamente fino passando o algodao atravez dum furo a's unhas dos seus polegares. Milhares de indianos que viviam dessa arte nao podiam outra cousa, morriam a' fome. Por isso que pela influencia de hereditariedade so' eram ha'beis na sua arte a cujo aperfeiçoamento tinham dedicado toda a sua vida, e devido a isto mal sabiam outra maneira de ganhar o seu pao cotidiano. E assim os teares nativos foram substituidos pelas tecelanias a vapor dirigidas pelos ingleses.

A India e' um paiz productor do algodao e contudo ela importa anualmente tecidos extrangeiros no valor de milhoes de rupias. A dominaçao extrangeira matou cruelmente todas as industrias nacionais e com a morte delas entrou a pobresa em todas as cabanas das classes proletarios que constituem a quasi totalidade da populaçao da India. Cada ano que vem leva-nos para o extrangeiro e principalmente para a Inglaterra crores de rupias. E desde mais dum se'culo essa drenagem e' continua, cada vez mais crescente. Imaginem um paiz donde constantemente saem correntes da sua riqueza, e como esse tributo pago, desde muito tempo baixa a uma miseria lamentavel a maior parte da sua populaçao: e depois o comparem com a India, naçao donde outrora se elevavam fumos de ouro e digam depois se ha qualquer diferença entre eles no tocante ao seu depauperamento Hoje a India e' um pais pauperrimo, o mais desgraçado no mundo sem outro igual. A causa disto e' a dominaçao extrangeira que longe de fomentar novas industrias, arrasou as existentes com a manifesta vontade de deformar um povo inteiro de torna-lo incapaz de por si viver independentemente dentro de recursos nacionais que ele tem a's suas maos. Tal e' em resumo a histo'ria da industria de tecidos.

Posto o que acima esta' dito voltemos ao ponto do nosso assunto.

* * *

Gandhi quer que todo o indio sem distinçao do seu estado financeiro, de idade e de sexo dedique uma parte do seu dia, uma hora por exemplo a' fiaçao de linho no charca'. E para ser geral e obrigatoria esta condiçao de cuja execuçao depende a conquista do *Swaraj*, o ultimo Congresso Nacional de Belgaum extinguiu a primitiva subscriçao anual de quatro tangas e aprovou como condiçao essencial para a inscriçao de socios a entrega duma determinada quantidade de linho fiado no charka'. A primeira vista, isto de subscriçao de linho parece pueril e mesmo exquesito. Mas se nos dermos ao trabalho de aprofundar bem o problema, veremos um sinificado admiravel e vasto no movimento de charka', que foi unico capaz de criar em todos os coraçoes espalhados em cantos e recantos da India o espirito nacional. Antes de Gandhi nao houve na India unico movimento que fosse vibrar as cordas de coraçoes indianos, e em que todos os indios desde leaders ate' trabalhadores e lavradores ignorantes tivessem desempenhado o papel da regenenaçao pa'tria. Kadi e' o intermedio entre camadas baixas da populaçao indiana e o patriotismo personificado em grandes hamens como Das, Lajpatrai, Gandhi e outros. O charca' criou em todas as almas a consciencia de que delas depende o ressurgir da naçao: de que para salvar a India das garras do jugo extrangeiro, ha' necessidade imperiosa de cada um sacrificar uma parte dos seus variados inte-interesses e prestar o seu contigente, embora modesto, a' causa da patria. Essa consciencia da responsabilidade e do dever, que como particulas vivas duma massa organica que e' a India, nos impomos, vale muito mais que o Swaraj ;o charca' oferece a toda e qualquer pessoa a rara ocasiao de ser util a seu paiz e de o serivr com minimo sacrificio. A politica indiana desde o culto de charka' tem tomado um caracter serio e duplo. A reconstituiçao interna do paiz e a politica propriamente dita ou antes a luta po-

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

वैशाख व० १४ शी शके १८४७

पोर्तुगीजांच्या पापांचे पुरावे

साम्राज्यविस्ताराच्या अमर्याद लालसेला बळी पडून गोमांतक–स्वातंत्र्याचा बळी पोर्तुगीज लोकांनीं किती निष्ठुरपणें घेतला, हें आज कोणाला नव्यानें निवेदन करण्याचें कारण नाहीं. कां कीं, त्या अमर्याद व ह्मणूनच अफाट व अनियंत्रित लालसेचे दुष्ट परिणाम आजहि आह्मांला–जराशा सौम्य स्वरूपांत कां होईना ! — भोगावे लागत आहेत. ‘बळी तो कान पिळी’ या अनुभवसिद्ध ह्मणींतून ध्वनित होणाऱ्या नात्यानें व न्यायानें व्हास्कोडिगामाच्या गौरवर्णीय वंशजांनीं गोमांतक–स्वातंत्र्याच्या घांसानें आपली साम्राज्य विस्ताराची राक्षसी भूक शमवून घेतली.

पण दुसऱ्यांचे देश स्वदेशाच्या सीमांत सामील करून घेऊन नुसत्या साम्राज्यविस्तारानें ते ‘ नरवीर ’ संतुष्ट झाले नाहींत. त्यांच्या अंगांत वसत असलेल्या अतुल शौर्याला साम्राज्यविस्ताराचा विशाळ व ऐसपैस प्रदेश अपुरा वाटूं लागला. विदेशीय लोकांचें बळजबरीनें स्वातंत्र्यच बळकावून स्वस्थ बसण्यांत त्यांना समाधान वाटेनासें झालें. ‘ परराज्यें स्वसत्तेच्या अमलाखालीं खेचलीं गेलीं तर त्यांतील जित लोकांना फार तर राजकीय मोक्षाची प्राप्ति करून दिल्याचें श्रेय मिळेल, पण त्यांना धार्मिक मुक्ति त्यामुळें थोडीच साध्य होणार आहे. ही उणीव भरून काढण्याच्या कामीं शक्तिसर्वस्व वेंचणें हें अर्थात् आपलें पवित्रतम कर्तव्य आहे ’ असें त्या पोर्तुगीज नरवीरांच्या शौर्याला वाटावयास लागून त्यानें आपला मोर्चा केवळ परोपकार बुद्धीनें गोमांतकस्थ जित लोकांच्या आर्यधर्माकडे वळविला. व हेंच धार्मिक क्षेत्र जास्त पसंत असल्याचें त्यानें सहस्त्रशः पराक्रमानीं पृथ्वीला पटवू नहि दिलें.

पोर्तुगीजांचे हे पराक्रम ह्मणजे पापांचे पर्वत होत– संतापानें अंगाची लाहीलाही करणारे व मानव जातीस काळिमा फासणारे ते क्रूर कृत्यांचे डोंगर होत. या अघोर पापांचें यथासांग वर्णन करण्यास आमची वेडीवांकडी लेखणी धजत नाहीं. परंतु आमच्या उपरिनिर्दिष्ट विधानांस पुष्टि मिळावी व गेल्या अग्रलेखांत ज्या खिस्ती धर्मवेडाचा आह्मीं ओझरता उल्लेख केला आहे, त्याच्या पुराव्याचें माप खिस्ती धर्मप्रसारकांच्या पदरास बांधलें जावें, अशा दुहेरी हेतूनें पुरातन पोर्तुगीजांच्या पापांची पुरावे पंचविशी खालीं दिली आहे. आमचे प्रिय वाचक ती लक्षपूर्वक वाचून त्यांतील तात्पर्य आपल्या स्मरण वहींत टिपून ठेवतील, अशी खात्री आहे.

१५४० त गोवा किंवा तिसवाडी बेट येथील सर्व हिंदु देवालयें जमिनदोस्त करण्यांत आलीं.

” ४२ त प्रसिद्ध सां फ्रांसिस्क (सेंट झेवियर) हा जेजुईट लोकांस बरोबर घेऊन गोव्यांस आला.

” ४५ त गोवा बेटावरील जमिनदोस्त केलेल्या देवालयांच्या संपत्तीचा येशूच्या पलटणीला अहेर करण्यांत आहे.

”४६ त हिंदूनीं मूर्तिपूजा, उत्सव व ब्राह्मणानीं उपासना न करण्याबद्दल फर्माविण्यांत आलें.

” ४८ त बाटविण्यांचा कारखाना सुरू झाला.

” ५८ त हिंदूंस सरकारी कामें देऊं न येत असा ठराव झाला.

” ५९ त बाटविलेल्या हिंदु बायांस व बालिकांस पूर्वाश्रमांतील संपत्तीवर हक्क असावा असा हुकूम सुटला.

” ६० त धर्मसमीक्षण सभेचा (इंकिजेशन) अमल सुरू झाला– ‘फिरंगाणांतील ब्राह्मण रहिवाशांनीं एका महिन्याच्या आंत आपला जमीन-जुमला विकून हद्दपार व्हावें. नाहींतर त्यांस आमरण गुलामगिरींत राहावें लागेल. आणि त्याची संपत्ति सरकार बळकावील ’ असा हुकूम झाला. सिंहलद्विपचे बुद्धधर्मी रहिवासी तीन लक्ष रुपये देण्यास कबूल झाले असतांहि दो. कोंस्तातीन ब्रागास यानें गौतमबुद्धाचा दांत समुद्रांत फेंकून दिला.

” ६१ त येशूच्या पलटणीस भिऊन गोव्यांच्या आसमंतातचीं बेटें ओस पडलीं.

” ६७ त सासष्ट प्रांतांतील २४० हिंदूचीं देवालयें एका दिवसांत पाडून टाकिलीं— ग्रामसंस्थांचे कुळकर्णी व इतर कामगार हिंदु नसावे, आणि हिंदु रयतेपेक्षां खिस्ती रयतेचा जास्त आदर व्हावा असें फर्माविण्यांत आलें.

” ६९ त सासष्ट व बारदेश प्रांतांतील जमिनदोस्त केलेल्या देवालयांची संपत्ति खिस्ती चर्चां [देवळें] स्वाधीन केली.

” ७२ त सासष्ट प्रांतांतील ३०० देवालयें व मशिदी जमिनदोस्त करून दाखविलेल्या पराक्रमाबद्दल कुडतर गांवच्या देवालयाच्या शेतजमिनी दियोग फेर्नांद यास बक्षिस दिल्या.

” ७५ त गोव्यांत राहणाऱ्या हिंदूंची जमिन सरकारानें बळकाविली.

१६०२ त लुटून मिळालेली संपत्ति पोर्तुगालास रवाना झाली.

” ३० त सासष्ट प्रांतांत हिंदूंनीं वस्ती करूं नये व ग्रामसंस्थावरील आपला हक्क सोडावा असा हुकूम झाला.

” ३६ त ‘ बाटविण्याच्या भयानें ब्राह्मण व इतर हिंदु परकी राज्यांत गेले असतील त्यानीं निर्भयपणें पूर्वस्थानीं येऊन रहावें. त्यास कोणताच त्रास बाधणार नाहीं.’ अशा अर्थाचें सरकारांतून आश्वासन मिळालें.

” ८१ त बालक जन्मोत्सव व लग्नकार्योत्सव बंद करण्यांत आले

७०६ त शेंडीपट्टीचा कर सुरू झाला.

” १५ त हिंदूनीं ‘एवांज्येलय’चीं खिस्ती पुराणें ऐकण्यास हजर राहावें असा येशूच्या पलटणीनें हट्ट धरला.

” ३२ त पोर्तुगीज भाषा बोलावयास येत नसल्याच्या अपराधावरून पुष्कळ गांवकऱ्यांस कैद भोगावी लागली.

” ४५ त पोर्तुगीज भाषा न कळणाऱ्यांस दांपत्यसौख्याची बंदी करण्यांत आली.

१७४८ त ग्रामसंस्थानीं खिस्ती उत्सवाच्या खर्चाची वर्गणी द्यावी असा आर्चबिशपनें घाट घातला. परंतु व्हाइसराय या उद्देशाच्या विरुद्ध झाल्यामुळें तें प्रकरण थंडावलें.

” ५४ त फोंडें प्रांत व इतर नव्या काबिजादी, येथील हिंदु लोकांस सद्धर्माचरण करून राहण्याबद्दल हुकूमनामा प्रसिद्ध झाला

” ५९ त जेजुईट लोकांचा विध्वंस; येशूच्या पलटणीचा उच्छेद

१८१२ त इंकिजिसांवांची बंदी.

स्फुट विचार

श्री. नाथमाधवांचें गोमांतकांत आगमनः– सुप्रसिद्ध कादंबरीकार व महाराष्ट्र वाङ्मयपटांगणांतील एक अतुलनीय विजयी वीर श्री. नाथ माधव हे गोमांतकांत सहा दिवसांमागें आले आहेत. श्री. नाथमाधवांचें नांव आमच्या गोमांतकाला कांहीं अपरिचित नाहीं, किंवा अधिक स्पष्टपणें लिहावयाचें झाल्यास असें ह्मणतां येईल कीं गोमांतकस्थ हिंदूंच्या जीभेवर आपलें अधिष्ठान अबाधित राखण्यांत त्यांनीं श्री. हरि भाऊ आपट्यांच्याहि पुढें मजल मारली आहे. प्रांताचा, देशाचा अगर राष्ट्राचा फार मोठा व अनुपेक्षणीय भाग, असा जो खालचा ह्मणजे अपंडितांचा व अल्प शिक्षितांचा वर्ग, त्यांच्यांत आत्मविश्वतेची भावना प्रसृत करणें, आकाशास गवसणी घालण्याच्या इतर भलभलत्या भानगडींची भगभग सोसण्यापेक्षां अधिक जरूरीचें, तांतडीचें व महत्वाचें असतें. व त्याच दृष्टीनें श्री. नाथमाधवांच्या कादंबऱ्यांना व परंपरेनें त्यांना फार महत्व आहे. पण तूर्त आह्मांस जें लिहावयाचें आहे तें त्यांच्या कर्तबगारीविषयीं नसून गोमांतकीय हिंदु समाजाच्या ‘ फाजील एकलकोंडेपणा ’ विषयीं त्यांनीं प्रगट केलेल्या एका शंकेविषयीं होय.

श्री. नाथमाधवांची शंकाः— श्री. नाथमाधवांची ही शंका कांहीं नवीन नाहीं. कीं तीला इतकें महत्व प्राप्त व्हावें. गोमांतकास स्वराज्य–समता, स्वातंत्र्य व बंधुभाव ह्यांचा पुरस्कार करणारें स्वराज्य–मिळालें असतांहि येथील हिंदु वर्गाची सदोदित व दिसरात रडारड कां ? ह्या गोमांतकाच्या बाहेरील विद्वानांकडून विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांच्या कुलकथेइतकीच उपरिनिर्दिष्ट शंकाहि फार पुरातन व अतिपरिचयाची झाली आहे. श्री. तात्यासाहेब केळकर येथें येतात व आह्मांला असा टोमणा मारतात कीं “तुह्मांस स्वराज्य मिळालें आहे पण तें तुह्मांस चालवायाला येत नाहीं ह्यांत कोणाचा अन्याय ? तुह्मांस भाकरी मिळाली आहे पण ती कोणत्या बाजूनें खावी, डावीकडून कीं उजवीकडून, हें तुह्मांस समजत नाहीं त्याला आमचा काय इलाज ?”. गेल्या सोमवारीं श्री. द. मं. पै यांच्या अध्यक्षतेखालीं त्यास पानसुपारी देण्याचा समारंभ दैवज्ञ ब्राह्मण समाज उरकून घेत असतां श्री. नाथमाधवांनीं ही शंका प्रदर्शित केली. ते ह्मणाले ‘गोमांतकीय हिंदु समाज खिस्तीसमाजाशीं सहकारिता करीत नाहीं असा माझा अंदाज आहे, पण हें कां तें मात्र मला समजत नाहीं.

हें उदाहरण सोडून दाखवाः— नाथमाधवांच्या ह्या शंकेला आह्मीं इतकें महत्व देतों तें ती ‘ नाथमाधवां’ची ह्मणून नसून गोमांतक व महाराष्ट्र हीं दोन नसून एकच आहेत ’ हें जनतेच्या मनांत ठसविण्याचें श्रेय घेण्याचा त्यांचा मानस आहे ह्मणून होय. गोमांतकाची लोकशाही ज्या दोन विभागांत विभागली गेली आहे, त्या ह्या दोन विभागांचें–हिंदूचें व खिस्त्यांचें–कांहीं विशिष्ट बाबतींपुरतें तरी ऐक्य व्हावें ह्या गोष्टीस विरोध असा कोणाचाच नाहीं. स्वराज्याच्या नौकेंत बसलेल्या ह्या दोन समाजांनीं उलट सुलट बाजूनीं वल्हवण्यास सुरवात केल्यास ही नौका इष्ट स्थळीं तर पोंचणार नाहींच; पण उलट परिस्थितीच्या लाटाच्या असह्य तडाख्याखालीं त्या नौकेला व तिच्याबरोबर ह्या दोन्हीं नावाड्यांना जलसमाधी मिळेल ह्याविषयींहि कोणाच्या मनांत संशय नाहीं. गोमांतकाबाहेरील महाराष्ट्रीयांच्या मदतीची गोवेंकर हिंदु अपेक्षा करतात खरे पण त्यांची ती क्रिया केवळ नाइलाज ह्मणून त्यांच्या हातून घडत असते. श्री नाथमाधवांचा उपदेश आह्मांस कळतो पण तो उपदेश शक्यतेच्या कोटींत यावा कसा ? हाच आज मुख्य व महत्वाचा प्रश्न आहे. व त्या प्रश्नाचें बिनतोड उत्तर देण्याची ताकद किंवा हिंमत ज्याच्या अंगीं नसेल त्यानीं खिस्त्यांच्या सहकारितेचा प्रश्नच काढूं नये असें आह्मांस वाटतें. आह्मास सर्व समजतें पण उमजत मात्र नाहीं. व श्री. नाथमाधवांसारख्या सूज्ञ चालक व्यक्ति कीं ज्यांच्याकडून हें कठीण गणित आह्मीं सोडवून मागतों – त्या गोष्टीचो आह्मास उमजहि पाडीत नाहींत. गणित कठीण आहे, हें आह्मीं जाणतों व “प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेलहि गळे” हेंहि आम्हास तोंडपाठ येतें. आम्हांस जें कांहीं कठीण जातें–नव्हे अशक्य वाटतें तें तें गणित सोडविण्याची रीत होय. तुमच्यानें होत असेल तर ती रीत आह्मास सांगा. पण तसें कांहींच न सांगतां अनावश्यक चर्चेनें व्यर्थ कालक्षेप कां करतां ? असा आमचा श्री. नाथमाधवांस सवाल आहे.

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

वैशाख व० १४ शी शके १८४७

पोर्तुगीजांच्या पापांचे पुरावे

साम्राज्यविस्ताराच्या अमर्याद लालसेला बळी पडून गोमांतक–स्वातंत्र्याचा बळी पोर्तुगीज लोकांनीं किती निष्ठुरपणें घेतला, हें आज कोणाला नव्यानें निवेदन करण्याचें कारण नाहीं. कां कीं, त्या अमर्याद व ह्मणूनच अफाट व अनियंत्रित लालसेचे दुष्ट परिणाम आजहि आह्मांला–जराशा सौम्य स्वरूपांत कां होईना ! — भोगावे लागत आहेत. 'बळी तो कान पिळी' या अनुभवसिद्ध ह्मणींतून ध्वनित होणाऱ्या नात्यानें व न्यायानें व्हास्कोडिगामाच्या गौरवर्णीय वंशजांनीं गोमांतक – स्वातंत्र्याच्या घांसानें आपली साम्राज्य विस्ताराची राक्षसी भूक शमवून घेतली.

पण दुसऱ्यांचे देश स्वदेशाच्या सीमांत सामील करून घेऊन नुसत्या साम्राज्यविस्तारानें ते 'नरवीर' संतुष्ट झाले नाहींत. त्यांच्या अंगांत वसत असलेल्या अतुल शौर्याला साम्राज्यविस्ताराचा विशाळ व ऐसपैस प्रदेश अपुरा वाटूं लागला. विदेशीय लोकांचें बळजबरीनें स्वातंत्र्यच बळकावून स्वस्थ बसण्यांत त्यांना समाधान वाटेनासें झालें. 'परराज्यें स्वसत्तेच्या अमलाखालीं खेचलीं गेलीं तर त्यांतील जित लोकांना फार तर राजकीय मोक्षाची प्राप्ति करून दिल्याचें श्रेय मिळेल, पण त्यांना धार्मिक मुक्ति त्यामुळें थोडीच साध्य होणार आहे. ही उणीव भरून काढण्याच्या कामीं शक्तिसर्वस्व वेंचणें हें अर्थात् आपलें पवित्रतम कर्तव्य आहे' असें त्या पोर्तुगीज नरवीरांच्या शौर्याला वाटावयास लागून त्यानें आपला मोर्चा केवळ परोपकार बुद्धीनें गोमांतकस्थ जित लोकांच्या आर्यधर्माकडे वळविला. व हेंच धार्मिक क्षेत्र जास्त पसंत असल्याचें त्यानें सहस्रशः पराक्रमानीं पृथ्वीला पटवून दिलें.

पोर्तुगीजांचे हे पराक्रम ह्मणजे पापांचे पर्वत होत– संतापानें अंगाची लाहीलाही करणारे व मानव जातीस काळिमा फांसणारे ते क्रूर कृत्यांचे डोंगर होत. या अघोर पापांचें यथासांग वर्णन करण्यास आमची वेडीवांकडी लेखणी धजत नाहीं. परंतु आमच्या उपरिनिर्दिष्ट विधानांस पुष्टि मिळावी व गेल्या अग्रलेखांत ज्या खिस्ती धर्मवेडाचा आह्मीं ओझरता उल्लेख केला आहे, त्याच्या पुराव्याचें माप खिस्ती धर्मप्रसारकांच्या पदरास बांधलें जावें, अशा दुहेरी हेतूनें पुरातन पोर्तुगीजांच्या पापांची पुरावे पंचविशी खालीं दिली आहे. आमचे प्रिय वाचक ती लक्षपूर्वक वाचून त्यांतील तात्पर्य आपल्या स्मरण वहींत टिपून ठेवतील, अशी खात्री आहे.

१५४० त गोवा किंवा तिसवाडी बेट येथील सर्व हिंदु देवालयें जमिनदोस्त करण्यांत आलीं.

" ४२ त प्रसिद्ध सां फ्रांसिस्क (सेंट झेवियर) हा जेजुईट लोकांस बरोबर घेऊन गोव्यांस आला.

" ४५ त गोवा बेटावरील जमिनदोस्त केलेल्या देवालयांच्या संपत्तीचा येशूच्या पलटणीला अहेर करण्यांत आहे.

"४६ त हिंदूनीं मूर्तिपूजा, उत्सव व ब्राह्मणानीं उपासना न करण्याबद्दल फर्मावि‍ण्यांत आलें.

" ४८ त बाटविण्यांचा कारखाना सुरू झाला.

" ५८ त हिंदूंस सरकारी कामें देऊं न येत असा ठराव झाला.

" ५९ त बाटविलेल्या हिंदु बायांस व बालिकांस पूर्वाश्रमांतील संपत्तीवर हक्क असावा असा हुकूम सुटला.

" ६० त धर्मसमीक्षण सभेचा (इंकिजेशन) अमल सुरू झाला– 'फिरंगाणांतील ब्राह्मण रहिवाशांनीं एका महिन्याच्या आंत आपला जमीन जुमला विकून हद्दपार व्हावें. नाहींतर त्यांस आमरण गुलामगिरींत राहावें लागेल. आणि त्याची संपत्ति सरकार बळकावील' असा हुकूम झाला; सिंव्हलद्विपचे बुद्धधर्मी रहिवासी तीन लक्ष रुपये देण्यास कबूल झाले असतांहि दो. कोंस्तांतीन ब्रागास यानें गौतमबुद्धाचा दांत समुद्रांत फेंकून दिला.

" ६१ त येशूच्या पलटणीस भिऊन गोव्यांच्या आसमंतातचीं बेटें ओस पडलीं.

" ६७ त सासष्ट प्रांतातील २४० हिंदूचीं देवालयें एका दिवसांत पाडून टाकिलीं— ग्रामसंस्थांचे कुळकर्णी व इतर कामगार हिंदु नसावे, आणि हिंदु रयतेपेक्षां खिस्ती रयतेचा जास्त आदर व्हावा असें फर्मावि‍ण्यांत आलें.

" ६९ त सासष्ट व बारदेश प्रांतांतील जमिनदोस्त केलेल्या देवालयांची संपत्ति खिस्ती चर्चां [देवळें] स्वाधीन केली.

" ७२ त सासष्ट प्रांतांतील ३०० देवालयें व मशिदी जमिनदोस्त करून दाखविलेल्या पराक्रमाबद्दल कुडतर गांवच्या देवालयाच्या शेतजमिनी दियोग फेर्नांद यास बक्षिस दिल्या.

" ७५ त गोव्यांत राहणाऱ्या हिंदूंची जमिन सरकारानें बळकाविली.

१६०२ त लुटून मिळालेली संपत्ति पोर्तुगालास रवाना झाली.

" ३० त सासष्ट प्रांतांत हिंदूंनीं वस्ती करूं नये व ग्रामसंस्थावरील आपला हक्क सोडावा असा हुकूम झाला.

" ३६ त 'बाटविण्याच्या भयानें ब्राह्मण व इतर हिंदु परकी राज्यांत गेले असतील त्यानीं निर्भयपणें पूर्वस्थानीं येऊन रहावें. त्यास कोणताच त्रास बाधणार नाहीं.' अशा अर्थाचें सरकारांतून आश्वासन मिळालें.

" ८१ त बालक जन्मोत्सव व लग्नकार्योत्सव बंद करण्यांत आले

७०६ त शेंडीपट्टीचा कर सुरू झाला.

" १५ त हिंदूनीं 'एवांज्येलय'चीं खिस्ती पुराणें ऐकण्यास हजर राहावें असा येशूच्या पलटणीनें हट्ट धरला.

" ३२ त पोर्तुगीज भाषा बोलावयास येत नसल्याच्या अपराधावरून पुष्कळ गांवकऱ्यांस कैद भोगावी लागली.

" ४५ त पोर्तुगीज भाषा न कळणाऱ्यांस दांपत्यसौख्याची बंदी करण्यांत आली.

१७४८ त ग्रामसंस्थानीं खिस्ती उत्सवाच्या खर्चाची वर्गणी द्यावी असा आर्चबिशपनें घाट घातला. परंतु व्हाइसराय या उद्देशाच्या विरुद्ध झाल्यामुळें तें प्रकरण थंडावलें.

" ५४ त फोंडें प्रांत व इतर नव्या काबिजादी, येथील हिंदु लोकांस सद्धर्माचरण करून राहण्याबद्दल हुकूमनामा प्रसिद्ध झाला

" ५९ त जेजुईट लोकांचा विध्वंस; येशूच्या पलटणीचा उच्छेद

१८१२ त इंकिजिसांवांची बंदी.

स्फुट विचार

श्री. नाथमाधवांचें गोमांतकांत आगमन:– सुप्रसिद्ध कादंबरीकार व महाराष्ट्र वाङ्मयपटांगणांतील एक अतुलनीय विजयी वीर श्री. नाथ माधव हे गोमांतकांत सहा दिवसांमागें आले आहेत. श्री. नाथमाधवांचें नांव आमच्या गोमांतकाला कांहीं अपरिचित नाहीं, किंवा अधिक स्पष्टपणें लिहावयाचें झाल्यास असें ह्मणतां येईल कीं गोमांतकस्थ हिंदूंच्या जीभेवर आपलें अधिष्ठान अबाधित राखण्यांत त्यांनीं श्री. हरिभाऊ आपट्यांच्याहि पुढें मजल मारली आहे. प्रांताचा, देशाचा अगर राष्ट्राचा फार मोठा व अनुपेक्षणीय भाग, असा जो खालचा ह्मणजे अपंडितांचा व अल्प शिक्षिताचा वर्ग, त्यांच्यांत आत्मप्रियतेची भावना प्रसूत करणें, आकाशास गवसणी घालण्याच्या इतर भलभलत्या भानगडींची भगभग सोसण्यापेक्षां अधिक जरूरीचें, तांतडीचें व महत्वाचें असतें. व त्याच दृष्टीनें श्री. नाथमाधवांच्या कादंबऱ्यांना व परंपरेनें त्यांना फार महत्व आहे. पण तूर्त आह्मांस जें लिहावयाचें आहे तें त्यांच्या कर्तबगारीविषयीं नसून गोमांतकीय हिंदु समाजाच्या 'फाजील एकलकोंडेपणा' विषयीं त्यांनीं प्रगट केलेल्या एका शंकेविषयीं होय.

श्री. नाथमाधवांची शंका:— श्री. नाथमाधवांची ही शंका कांहीं नवीन नाहीं. कीं तीला इतकें महत्व प्राप्त व्हावें. गोमांतकास स्वराज्य–समता, स्वातंत्र्य व बंधुभाव ह्याचा पुरस्कार करणारें स्वराज्य–मिळालें असतांहि येथील हिंदु वर्गाची सदोदित व दिवसरात रडारड कां? ह्या गोमांतकाच्या बाहेरील विद्वानांकडून विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांच्या कुलकथेइतकीच उपरिनिर्दिष्ट शंकाहि फार पुरातन व अतिपरिचयाची झाली आहे. श्री. तात्यासाहेब केळकर येथें येतात व आह्मांला असा टोमणा मारतात कीं "तुह्मांस स्वराज्य मिळालें आहे पण तें तुह्मांस चालवायाला येत नाहीं ह्यांत कोणाचा अन्याय? तुह्मांस भाकरी मिळाली आहे पण ती कोणत्या बाजूनें खावी, डावीकडून कीं उजवीकडून, हें तुह्मांस समजत नाहीं त्याला आमचा काय इलाज?". गेल्या सोमवारीं श्री. द. अं. ... यांच्या अध्यक्षतेखालीं त्यास पानसुपारी देण्याचा समारंभ दैवज्ञ ब्राह्मण समाज उरकून घेत असतां श्री. नाथमाधवांनीं ही शंका प्रदर्शित केली. ते ह्मणाले 'गोमांतकीय हिंदु समाज खिस्तीसमाजाशीं सहकारिता करीत नाहीं असा माझा अंदाज आहे, पण हें कां तें मात्र मला समजत नाहीं.

हें उदाहरण सोडून दाखवा:— नाथमाधवांच्या ह्या शंकेला आह्मीं इतकें महत्व देतों तें ती 'नाथमाधवां'ची ह्मणून नव्हे. 'गोमांतक व महाराष्ट्र हीं दोन नसून एकच आहेत' हें जनतेच्या मनांत ठसविण्याचें श्रेय घेण्याचा त्यांचा मानस आहे ह्मणून होय. गोमांतकाची लोकशाही ज्या दोन विभागांत विभागली गेली आहे, त्या ह्या दोन विभागांचें–हिंदूचें व खिस्त्यांचें–कांहीं विशिष्ट बाबतींपुरतें तरी ऐक्य व्हावें ह्या गोष्टीस विरोध असा कोणाचाच नाहीं. स्वराज्याच्या नौकेंत बसलेल्या ह्या दोन समाजांनीं उलट सुलट बाजूनीं वल्हवण्यास सुरवात केल्यास ही नौका इष्ट स्थळीं तर पोंचणार नाहींच; पण उलट परिस्थितीच्या लाटांच्या असह्य तडाख्याखालीं त्या नौकेला व तिच्याबरोबर ह्या दोन्हीं नावाड्यांना जलसमाधी मिळेल ह्याविषयींहि कोणाच्या मनांत संशय नाहीं. गोमांतकाबाहेरील महाराष्ट्रीयांच्या मदतीची गोवेंकर हिंदु अपेक्षा करतात खरे पण त्यांची ती क्रिया केवळ नाइलाज ह्मणून त्यांच्या हातून घडत असते. श्री नाथमाधवांचा उपदेश आह्मांस कळतो पण तो उपदेश शक्यतेच्या कोटींत यावा कसा? हाच आज मुख्य व महत्वाचा प्रश्न आहे. व त्या प्रश्नाचें बिनतोड उत्तर देण्याची ताकद किंवा हिंमत ज्याच्या अंगीं नसेल त्यानीं खिस्त्यांच्या सहकारितेचा प्रश्नच काढूं नये असें आह्मांस वाटतें. आह्मास सर्व समजतें पण उमजत मात्र नाहीं. व श्री. नाथमाधवांसारख्या सूज्ञ चालक व्यक्ति कीं ज्यांच्याकडून हें कठीण गणित आह्मीं सोडवून मागतों – त्या गोष्टीची आह्मास उमजहि पाडीत नाहींत. गणित कठीण आहे, हें आह्मीं जाणतों व "प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेलहि गळे" हेंहि आम्हास तोंडपाठ येतें. आम्हांस जें कांहीं कठीण जातें–नव्हे अशक्य वाटतें तें तें गणित सोडविण्याची रीत होय. तुमच्यानें होत असेल तर ती रीत आह्मास सांगा. पण तसें कांहींच न सांगतां अनावश्यक चर्चेनें व्यर्थ कालक्षेप कां करतां? असा आमचा श्री. नाथमाधवांस सवाल आहे.

म० गांधींचे लेख

संख्या विरुद्ध कर्तबगारी

(समर्थन करण्यासाठीं लिहिलेल्या लेखां पैकीं ह्या एका लेखांत हिंदी राष्ट्रीय महासभेनें गेल्या वर्षीं पास केलेल्या सुताच्या वर्गणीच्या टीकाकारांना म. गांधीनीं उत्तर दिलें आहे. मॉ. रोलँदसारख्या माणसांनीं त्यांना ' लघुसंख्यांकांतील एक ' कां ह्मटलें आहे ह्याचें समाधानकारक उत्तर आपणांस त्यांच्या ह्या लेखांत मिळेल. म. गांधींचे विचार आपली छोटी कुऱ्हाड पाजळणाऱ्या पक्षांच पुढाऱ्याचे विचार नसून अभेद्य पायावर सबंध समाजाची सुसंघटित सुधारणा करण्यासाठीं आपलें आयुष्य वहाण्यास बाहेर पडलेल्या एका महात्माचे विचार आहेत. All or nothing या सूत्राचा ध्वनि गांधींजीच्या लेखांत येत असल्यासहि आश्चर्य नाहीं. आमच्या ह्या शतकानें उत्पन्न केलेल्या अव्यवस्थेंत, निराशावादांत व कोलाहलांत म. गांधीसारख्या एखाद्या 'लघुसंख्यांका'खेरीज दुसऱ्या कोणाची बुद्धि स्थिर राहूं शकेल? कोणाच्या वाणींतून अखंडीत स्फूर्ति वाहत राहील ? आमच्या युगानें गांधींजीचा संदेश समजावून घेतला नाहीं तर दुसरें युग व जग तो समजावून घेईल. आजच्या पिढीनें त्यांच्या पवित्र मस्तकावर कांटेरी मुकूट ठेवला तर अजून काळाच्या उदरांत असलेल्या दुसऱ्या पिढ्या आपल्या पूर्वजांनीं केलेली चूक सुधारतील. परंतु म. गांधींना त्याची काय पर्वा आहे ? त्यांच्या वाचेंत, विचारांत, कृतींत ते आपलें कार्य उतरीत आहेत. म. गांधींसारखीं माणसें प्रप्रवाहांत वहात जाणारीं नसून प्रवाहाला आपल्या मार्गानीं नेणारीं अशींच असतात: मॉ. रोलँदनीसुद्धां आपल्या निबंधांत हेंच दाखवून दिलें आहे. भाषांतरकर्ता)

कॉंग्रेस सभासदांच्या संख्येविषयीं औदासिन्याचीं चिन्हें ह्या क्षणास दिसत आहेत. आज असलेल्या सभासदांएवढे थोडे सभासद ह्यापूर्वी कधींच नव्हते. अशा प्रकारची तक्रार आहे. सध्यासारखीच वर्गणीची अट पूर्वी असतांहि आज त्याला कमी मान्यता मिळती तर ही तक्रार सयुक्तिक ठरली असती. सभासदांच्या संख्येवरूनच कॉंग्रेसचें वजन मापावयाचें असल्यासहि ती सयुक्तिक ठरली असती. कॉंग्रेसचें वजन ठरविण्यासाठीं कोणतें माप उपयोगांत आणावयाचें ह्यासंबंधीं निःसंशय मतभेद होईल. संख्येचा विचार न करतां फक्त कर्तबगारीलाच सर्वांत जास्त महत्व मी देतों; हिंदुस्थानांतील परिस्थितींत तर तसें करणें मला जास्त आवश्यक वाटतें. संशय, मतभेद, परस्परविरोधी आकांक्षा, अंधश्रद्धा, भीति, अविश्वास व यासारख्या भावना अस्तित्वांत असतां नुसत्या संख्याबलांत सुरक्षितपणा तर नहींच पण त्यांत संकट मात्र असण्याचा संभव आहे. गेल्या चार वर्षांत संख्याबलानें आपणास कित्येक प्रसंगीं अस्वस्थ करून सोडलें, हें कोणास माहीत नाहीं ? कडक शिस्तीखालीं, एकाच मुखानें जेव्हां त्यांचें कार्य चालतें तेव्हांच संख्येचा प्रभाव जाणवूं लागतो. जेव्हां प्रत्येकजण आपणांस वाटेल त्या मार्गानें जाऊं लागतो किंवा कोणत्या मार्गानें जावयाचें हें त्याला समजत नाहीं तेव्हां मात्र ह्या संख्या स्वतःचा नाश करून घेतात.

जोंपर्यंत आपण एकी, अनुकपणा बुद्धिपुरस्सर सहकारिता, मदत करण्याची बुद्धि ह्यांचा अभाव दाखवीत आहांत तोंपर्यंत आपली संख्या थोडी असण्यांतच सुरक्षितपणा आहे, ह्याबद्दल माझी खात्री झाली आहे. एकशें दुर्व्यसनीं पुत्रांपेक्षां एकच सदाचरणीं पुत्र असलेला बरा. पांच पांडव एकशें कौरवानां पुरून उरण्यासारखे होते. थोड्याशा लोकांच्या परंतु शिस्त असलेल्या सैन्यानें अगणित संख्येच्या परंतु शिस्तीचा अभाव असलेल्या जमावांस हजारदां उधळून लावलें आहे. कॉंग्रेसच्या अटी पूर्णपणें पाळणाऱ्या थोड्याशा सभासदांसहि आपल्या कार्याचा चांगलाच हिशोब देतां येईल; परंतु कॉंग्रेसच्या पटावर एक लक्ष नामधारी सभासद असले तरी त्यांची किंमत त्या पटाच्या किंमती एवढीहि ठरणार नाहीं. सध्या पटावर नांवें असलेले लोक समाधानकारक आहेत. किंवा पूर्वी पटावर असलेल्यापेक्षां ते जास्त समाधानकारक आहेत असें मी एक क्षणभरसुद्धा सुचवीत नाहीं हें आपणास वर्षाखेरीस पहावयास मिळेल.

मला जोर द्यावयाचा आहे तो ह्या गोष्टीवर कीं, आपणास काय पाहिजे हें आपणास समजलें पाहिजे. चरख्याच्या उत्कृष्ट उपयुक्ततेवर आपला विश्वास आहे काय ? तर मग आपण संख्येनें थोडे किंवा जास्त असलों तरी तो प्रचारांत आणला पाहिजे. स्वराज्य संपादन करण्यासाठीं अस्पृश्यतेचा डाग धुवून काढण्याच्या आवश्यकतेवर आपला विश्वास आहे काय ? तर मग आपल्यावर हल्ला करण्यांत आला तरी आपण हार जातां कामा नये. स्वराज्य प्राप्तीसाठीं हिंदुमुसलमानांचें ऐक्य अत्यंत आवश्यक आहे असें आपणास वाटतें काय ? तर मग ते घडवून आणण्यासाठीं स्वार्थत्याग करण्यास आपण तयार असलें पाहिजे. खोट्या गोष्टीनीं आपलें समाधान होतां कामा नये. आपणास खरें नाणें पाहिजे किंवा तें मिळत नसल्यास मुळीं कोणतेंच नाणें नको.

परंतु ह्या गोष्टी ह्मणजे राजकारण नव्हे ह्या सर्वांत सरकारशीं करावयाच्या युद्धाचा समावेश होत नाहीं असें कांहीं मित्र ह्मणतात त्याला माझें उत्तर असें आहे कीं, ह्या सर्व गोष्टी घडवून आणल्याखेरीज आपणाला सरकारशीं यशस्वी रीतीनें लढतांच येणार नाहीं. परंतु स्वराज्य मिळविल्याखेरीज ह्यापैकीं एकहि गोष्ट घडवून आणणें आपणांस शक्य होणार नाहीं असे दुसरे कित्येक सांगतात. त्यालाहि माझें हेंच उत्तर आहे कीं, सरकारी निष्काळजीपणास किंवा विरोधास, मग तो उघड असो किंवा गुप्त रीतीनें चालविलेला असो न जुमानतां ह्या गोष्टी घडवून आणण्यास आवश्यक असलेली शक्ति आपणांस कमाविली पाहिजे. ह्या गोष्टी घडवून आणल्यास सबंध नसली तरी अर्धी लढाई आपण जिंकली असें मला वाटेल. मग स्वराजिष्टांच्या कार्यक्रमाचें कसें होणार ? असें ते विचारतात. आपल्या शक्तिवर्धनाबरोबरच तो कार्यक्रम चालू राहिला पाहिजे. स्वराजिष्टांचा पक्ष हा कॉंग्रेसचा एक खराखुरा विभाग आहे. ते कर्तृत्ववान आहेत, ते नेहमींच जागृत आहेत. नवीन उत्पन्न होणाऱ्या परिस्थितीच्या गरजांकडे लक्ष देऊन ते आपलें धोरण आंखतील. ज्यानां त्या प्रकारची कर्तृत्वशक्ति आहे त्यांना तो कार्यक्रमहि पार पाडतां येईल पण आंतून करावयाच्या कार्याचें त्यांना विस्मरण होतां कामा नये. बारा हजार, नव्हे दोन हजार स्त्री–पुरुषांना विधायक कार्यक्रम पार पाडण्यासाठीं जोमानें काम करावयास लावतां आल्यास, आजच्या परिस्थितीचें स्वरूप तावडतोब बदललेलें दिसून येईल. कार्यकर्त्या माणसांची शूर, प्रामाणिक, स्वार्थत्यागी, स्वावलंबनी स्वतःवर व स्वतःच्या कार्यावर विश्वास असलेल्या माणसांची शोचनीय उणीव मी काढलेल्या दौऱ्यांत मला दिसून आली. पीक खरोखरीच भरपूर आहे पण तें कापण्याचे श्रम घेणारे मात्र थोडे आहेत.

श्री. श्रिनिवास अय्यंगर व मी मद्रास मध्यें भरलेल्या एका सभेस हजर राहिलों होतों. लोक उत्साहानें स्फुरत होते दुसऱ्या एका सभेंत वक्तशीर राहण्यासाठीं आह्माला गाडींतून जावयाचें होतें, परंतु माझ्या चहात्यानीं कार्यक्रमांत नसलेल्या एका रस्त्यांतून माझी मिरवणूक काढण्याचा आग्रह चालविला. वेळेचा अभाव असल्यामुळें तसें न करण्याची श्री. अय्यंगरांनीं याचना केली, मी सुद्धां तीच याचना केली. त्यानीं माझ्या प्रकृतीकडे लक्ष देण्याची याचना केली. त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. आह्मांस त्यानीं गाडींत बसविलेंच – बळजबरीनें त्यानीं तसें केलें हें मीं सांगितलेंच पाहिजे काय ? परंतु मी कायदा स्वतःच्या हातांत घेऊन गाडींतून जाण्याचें नाकारलें व गाडींतून सरळ खालीं उतरून, वाटल्यास शारीरिक जबरदस्तीनें उचलून नेण्यांस त्याना आव्हान केलें. येथें बहुसंख्येंत असणाऱ्या धोक्याचें एक दृश्य उदाहरण आहे. अशा प्रकारचे हजारों अनुभव मला देतां येतील. लोकांचा उद्देश चांगला असतो पण ते अज्ञानी व अविचारी असतात. चांगला हेतु असलेल्या किती माता आपल्या बालकानां अफू देऊन मृत्यूच्या स्वाधीन करीत असतात ?

ह्या क्षणास आपणाला उत्तेजीत भावनांची गरज नसून शांतपणानें करावयाच्या विधायक कार्याची गरज आहे. परंतु तें आपल्या शक्तीबाहेरचें नाहीं. तें करावयास बराच वेळ लागण्याचीहि गरज नाहीं. आपल्या प्रगतीला अडथळा होतो तो अनियमितपणाच्या हातानें काम केल्याखेरीज नुसती शाब्दिक संमति देणें त्रासदायक होतें. मला फक्त कर्तबगारीची रचना करावयाची आहे. ह्मणून बैठक बोलाविण्याची सूचना त्यांच्याकडून मिळाल्याखेरीज ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीला त्रास देण्याचें मला नाकारलें पाहिजे. उपयुक्त कार्य करण्यासाठीं सध्याचा कार्यक्रम आंखण्यांत आलेला आहे. जोंपर्यंत तो पुरा झालेला नाहीं तोंपर्यंत तो पुरा करण्यासाठीं आपला सर्व आत्मा त्याच्या किंवा तिच्या कार्यांत घालण्याचा सल्ला कॉंग्रेस कार्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस देणेंच माझ्या हातांत आहे. तसें केल्यास, शक्य असल्यास वर्षाखेरीस, उपयुक्त कर्तबगारीच्या स्त्री–पुरुषांचा संकलित जमाव आपणाला मिळवतां येईल. मग संख्येच्या दृष्टीनें तो कितीहि लहान असला तरी हरकत नाहीं.

माशेलची मराठी शाळा.

महाशाल हा गांव माहीत नाहीं असा इसम या गोमांतकांत मिळणें अशक्य आहे. जी भूमि महेश्वरशास्त्री सुखठणकर सारख्या विद्वानानीं दणाणून सोडली होती, आर्यवैद्यकींत प्रसिद्ध पावली होती. सुशिक्षितपणांत नांवजली होती, त्याच भूमींत आज पाहूं गेल्यास दुहीचें साम्राज्य, द्वेषांची बंडें, आपापसांत कलह अशा रूपांतरांत दिसूं लागलेली आहे. ही होत चाललेली अवनति पाहून इतर लोक या गांवास माशेल ह्मणण्याच्या ऐवजीं आस्वेल ह्मणत आहेत. येथील समग्र इतिहास नमूद करूं गेल्यास या पत्राचे कांहीं अंक भरावे लागतील.

या गावांत दर वर्षाच्या काठीं १७ शाळा निर्माण होतात व १८ परलोकवासी होतात. परंतु एकाहि शाळेचा स्थायिकपणा टिकलेला दिसत नाहीं. या परिस्थितीकडे लक्ष देऊन गेल्या दोन वर्षांत एक शाळा—श्री मल्लीनाथ विद्यालय—या नावाची श्री. कृष्ण शंकर शास्त्री सुखठणकर यानीं अपूर्व परिश्रम घेऊन स्थापन केली व या संस्थेचा स्थायिकपणा टिकावा ह्मणून मदतीच्या रूपानें सुमारें सातशें रुपये फंड गोळा केला आहे हें त्यांस भूषणास्पद होय. या विद्यालयाचा परीक्षा समारंभ ता० ९ मे ला होऊन ता० १० मे ला बक्षिस समारंभ झाला. दोन विद्यार्थी खेरीज करून बाकी सर्व विद्यार्थी पास झाले. हें या संस्थेचे मास्तर रा. कांबळी यांस भूषणास्पद आहे. बक्षिस समारंभाचें अध्यक्षस्थान पणजीचे रा. रा. अनंत वासुदेव प्रभू मोये ह्यानीं स्वीकारलें होतें. सरतेंत रा. व्यंकटेश रामचंद्र नाईक करंडे, रा. वसंतराव खोलकर, न्यायशास्त्री भवानी शंकर शास्त्री सुखठणकर आणि अध्यक्ष मोये यांचीं समयोचित भाषणें झालीं.

न्यायशास्त्री सुखठणकर यांनीं आपल्या विद्वत्ताप्रचूर गोड, साध्या अशा भाषणांत

O BHARAT

AS NOSSAS MATAS

Não padece duvida que as nossas matas representam uma verdadeira riquésa nacional. Tanto os governantes como os governados estão convencidos de que as matas de Gôa não constituem *qualquer coisa* que se despresa. Todos, finalmente, vêm nêlas um *elemento natural* de grande valor.

Podemos apresentar mil e um artigos de jornais tanto locais como metropolitanos, corroborando a exelente fama que as nossas matas vem disfrutando, desde tempos imemoriais; da mesma forma estamos habilitados a citar outros tantos documentos oficiais, exaltando-lhes a importancia. Se as opiniões se dividem no tocante a varios outros assuntos que se subordinam ao bem estar do nosso Paiz, élas se unificam e se harmonizam, tratando-se de matas.

Infelizmente, porêm, esse assunto em que se admira uma admiravel uniformidade e harmonia de vistas, acha-se relegado ao secundario plano, é despresado, sem dó nem piedade, e longe de concorrer para abrandar o incomodo rigor das dificuldades financeiras em que o Paiz se atormenta, torna-se pelo contrario, só, uma especie de *logradouro comum* dos ambiciosos para quem o patriotismo nasce e morre num incomensuravel e elastico *vaso* que se chama barriga!

Esses tais ambiciosos de vistas curtas mas de barrigas cujas dimensões se não medem estão reduzindo á miseria as nossas matas de que fazem, mercê da invencionice de ardis incriveis, degrau forte e seguro para pularem no *sobrado* do engrandecimento pessoal?

Verdade é que se tem multiplicado nos últimos tempos o pessoal burocratico, encarregado de cuidar dos interesses das matas nacionais; mas doutro lado, tambem é verdade que vai crescendo, de dia para dia, o número de *meios* de as desperdiçarem...

Numa palavra, o que se verifica, insofismavelmente, é que, apesar de se ter reconhecido a incontestavel importancia das matas, tanto entre os governantes como entre os governados, uns e outros não tem, todavia, procurado desenvolver, devidamente, os seus esforços de molde a tirar-se da referida riquesa natural o maximo partido possivel. Se o elemento oficial não activa a valer a sua energia para a livrar da desmedida voracidade dos tais ambiciosos, os nossos *patriotas* acolhem-nos a êstes com uma indiferença que chega a ser criminosa.

E', pois, facto incontroverso que todos nós, tanto os governantes como os governados, somos igualmente responsaveis da lamentavel situação em que ora se encontram as nossas matas.

Esse estado de coisas não pode nem deve continuar sob pena de se desvalorisar de vez uma *matéria*, que sendo cuidadosamente explorada, poderia remediar o mal economico que nos está entorpecendo o progresso, e duma forma que causa lastima.

Vem estas considerações a proposito de constantes queixas que estamos recebendo, narrando *destroços* e relatando *cortes* clandestinos que se dão nas matas, sobretudo, de *Sidha*, ou por falta da *rigorosa* fiscalisação por parte do elemento oficial ou pela *forte* ambição dos que estão acostumados a locupletar-se á custa do que de todos é.

¿Será isto, *porque não é de ninguem o que de todos é?*

Convem que se esclareça já a situação ambigua. Nada de *molesas*, nada de indiferentismos.

PONTOS NOS i i . . .

Do sr. Vice-Consul de Portugal em Bombaim recebemos a seguinte carta:

... Sr. Redactor do BHARAT

Apezar do meu estado de espirito, pelo duro golpe que acabo de sofrer, nao quero demorar a devida resposta ao que um *cavalheiro* de Curtorim diz no jornal de V.Exa., de 14 do corrente.

Nao se trata de uma acusagao *concreta* e *clara*, visto que o *cavalheiro* nao teve a coragem de declarar o seu nome, supondo talvez que me seria dificil descobri-lo. Felizmente a escrita deste Consulado esta' bem montada. E assim facil me foi verificar que o caso se refere a um estudante de Curtorim, que, em 9 de abril ultimo, a este Consulado Geral veiu solicitar o visto em passaporte do Governo de Goa.

Junto envio a V.Exa. a declaragao feita nao so' pelo empregado Braganga, a cargo de quem esta' a arrecadagao dos emolumentos, mas pelo outro empregado, Varela, que a tudo assistiu.

Nao quero fazer um juiso temerario, mas quasi ia jurar que o estudante ajuntou ao emolumento pago nesta Chancelaria (sete rupias dez tangas e oito reis), quaisquer despesas extraordinarias feitas fo'ra desta Chancelaria.

Por outro lado, qualquer pessoa de bom senso, ao ler a informagao do *cavalheiro* de Curtorim, descobre logo que ela e' sem base, para nao lhe dar outro qualificativo.

Com efeito, que culpa tem o Consulado de que em Goa exijam 14 rupias pelo passaporte? Que culpa tem de que o *Passport Office* ingles de Bombaim (que nao e' uma entidade misteriosa), exija 15 rupias pelo seu visto?

Este Consulado responde pelas Rs. 7:10:08 pagas pelo estudante Joao Paulo. Se este apresentou ao pai uma conta de Rs, 17:11:06, ele que o explique.

De resto, ha um poderoso argumento para estes casos: as quantias cobradas por este Consulado Geral tem o seu recibo langado no respectivo documento. Porque nao reclamou na ocasiao? Tanto eu como o sr. Consul Geral estamos sempre prontos a receber quem quer que seja que venha reclamar.

E' verdade que ele quiz, nao reclamar, mas agradecer. E tinha que agradecer, pois que vindo a este Consulado solicitar a pratica dum acto fora das horas oficiais, ele deveria pagar mais a verba do N°. 116 da tabela.

Nao poude agradecer pessoalmente ao sr. Consul Geral, mas "agradeceu-lhe" agora alterando a cifra de quanto pagou, e querendo tornar este Consulado responsavel pelas quantias pagas na Secretaria de Goa e no Passport Office ingles de Bombaim ...

A explicagao do "embroglio", solicitada pelo "cavalheiro" de Curtorim, e' esta:

Qualquer pessoa munida de passaporte do Governo de Goa para Portugal e colonias, que deseje embarcar em Bombaim, com transbordo em portos ingleses, tera' de visar o mesmo passaporte no "Passport Office" ingles de Bombaim, o qual so' concede esse visto depois do visto deste Consulado Geral.

Com toda a consideragao.

De V...

Antonio Pedro J. Fernandes

VICE-CONSUL

*

Eis a declaração a que a mesma carta se refere:

Tendo me o sr. Vice Consul de Portugal em Bombaim apresentado o N°. 7 do *Bharat*, de 14 de Maio, em que um cavalheiro de Curtorim se queixa de que pelo visto em passaporte para Macau foi cobrada neste Consulado a quantia de Rs. 17:11:06, eu abaixo assinado, empregado incumbido da cobranga de emolumentos, venho declarar o seguinte:

1) Que esse visto so' pode referir-se a Joao Paulo do Sagrado de Jesus Platinho Piedade Pacheco e Silva, de 22 anos de idade, solteiro, estudante, natural de Curtorim, que se dirigia a Macau com passaporte do Governo Geral de Goa, N°. 214, de 6 de Abril de 1925.

2) Que o dito Joao Paulo se apresentou neste Consulado, no dia 9 de abril ja' depois das horas do expediente desta Secretaria, acompanhado dum seu amigo, que nem eu nem o empregado Francisco Paulino Varela, que a tudo assistiu, conhecemos.

3) Que o dito Joao Paulo foi informado de que, tendo de desembarcar em Hong-Kong, teria de solicitar do "Passport Office", de Bombaim o visto no seu passaporte, aconselhando-lhe eu e o empregado Varela que fosse a'quela repartigao inglesa e explicasse que ele, Joao Paulo ia apenas em transito por Hong Kong, pois, talvez, por isso tivesse de pagar 1 rupia, em vez das 15 rupias exigidas pelo Governo ingles.

4) Que, pelo visto no seu passaporte, Joao Paulo apenas pagou a quantia de Esc. 2$30 ou sejam Rs. 7:10:08 como consta do livro de receita de emulumentos consulares sob o N°. 2610.

5) Que ao referido Joao Paulo foi dito que por ser estudante o sr. Consul o isentava de pagamento de qualquer outra quantia a este Consulado apezar de o visto ser passado fo'ra das horas do expediente e apesar de assin:

भारत

जनसेवा ही ईश्वरसेवा।
ह्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

ज्येष्ट शु० ६ ष्टी शके १८४७

आधीं शूर बना !

ज्या वेळीं गोमांतकदेश स्वातंत्र्यसौख्याच्या अत्युच शिखरावर विलसत होता, त्यावेळीं त्यांतील मर्दलोकांस 'भीति' हा पदार्थ कशाशीं खातात, हें ठाऊक नव्हतें. 'पोटासाठीं जगावें, जगोनि अवघ्यास मारावें, मारतां मारतां घ्यावें पोटराज्य' अशा सारखीं प्रस्तुत कालांत पोटतिडकीनें शिकविलीं व आचरलीं जात असलेली तत्वें त्या जुनाट काळच्या अघळपघळ मुत्सद्यास अवगत नसल्यानें, ते येऊन जाऊन काय तो 'देशासाठीं मरावें, मरोनीं अवघ्यास मारावें, मारतां मारतां घ्यावें किंवा रक्षावें राज्य आपुलें' हाच भोळा भावडा मंत्र जपत व त्यांतील तत्वें कृतींत उतरविण्याचा राजरोस प्रयत्न करीत असत. देशसंरक्षणासाठीं प्राणसुद्धां अर्पण करण्याची त्यांची ही संवय पारतंत्र्याच्या पूर्वकालांत कांहींशी टिकली; पण परधर्मीयांच्या अत्याचारांचा मुसळधार पाऊस जेव्हां एकसारखा पडूं लागून जिकडे तिकडे रक्ताच्या नद्या वाहूं लागल्या तेव्हां मात्र त्यांचा धैर्यमेरु हादरूं लागला व त्यांच्या शौर्याचें पाणी पाणी होऊं लागलें. तें इतकें कीं, आज, ४०० वर्षांच्या पारतंत्र्यानें, आमच्या शूर पूर्वजांच्या अंगीं खेळत असलेल्या शौर्याची जागा त्यांच्या वंशजांच्या देहांत भीतीनें व्यापिली आहे.

शौर्याचें ठाणें भीतीनें बळकावल्यानंतर, देशाचें रूपांतर पोटांत झालें असल्यास नवल नाहीं. देश ह्मणजेच काय तें सर्वस्व, असें आमच्या स्वतंत्र पूर्वजांस वाटत असे; पण आतां पारतंत्र्याच्या घाणेरड्या नरकांत खिचपत पडलेल्या त्यांच्याच पूर्वजांस 'पोटा' शिवाय अन्य कांहींच दिसूं नये, ह्यांत आश्चर्य तें कोणतें ?

परसत्तेपासून आह्मांस कधींच भरून न येणारें कोणतेंहि नुकसान झालें असेल, तर हेंच– शौर्य हानि– होय. 'बुद्धि असली ह्मणजे भांडवल नको' असें जें ह्मणतात तें खोटें नाहीं. बुद्धीच्या तरतरीच्या जोरावर भांडवलाची उणीव सहज भरून निघते. तसेंच शौर्याखेरीज सर्व संपत्तीची जरी माती झाली असती, तरी एकाच शौर्याच्या आधारावर सर्व गतवैभव हां हां ह्मणतां पुन्हा प्राप्त करून घेतां आलें असतें. तात्पर्य, शौर्यहानि हीच परसत्तेनें आह्मांवर ओढवलेली मोठ्यांतली मोठी आपत्ति होय.

शौर्याभावामुळें –अथवा दुसऱ्या शब्दांनीं सांगावयाचें ह्मणजे – अंगीं मुरलेल्या भीतीच्या प्रभावामुळें आह्मीं आज इतके स्वाभिमानशुन्य बनलों आहांत कीं, दोरीच्या सापानेंसुद्धां आमची सहज हवेलंडी उडूं लागते; आमच्या मानाची मान कापली गेली तरी आमची मान वर होत नाहीं; एक गाल रंगविला गेला, तर लगेच दुसरा पुढें करण्याची आमची जय्यत तयारी. 'पाखलेकू तंटेकू कोंण जातारे' ही घेडगुजरी ह्मण प्रचारांत येण्याचेंहि कारण, आह्मांस वाटतें, आमचा इतिहासप्रसिद्ध भ्याडपणा, हेंच प्रामुख्यानें होय.

आज लेखणीचा ओघ ह्या दिशेनें वाहण्याचें कारण ह्मणजे नोकरशाहीचें धोरण व जनतेचें कर्तव्यविस्मरण, हें होय. नोकरशाहीकडून कितीहि अदूरदर्शित्वाचें आततायी आचरण आचरलें जावो, जनता त्याचें पारिपत्य करण्यास केव्हांच पुढें सरसावत नाहीं. उलट 'कांहीं झालें तरी ते सरकारी अधिकारी, त्यांच्याशीं विरोध करून कसें भागेल ?' अशा तऱ्हेच्या भ्याड विचारसरणीनें आमचे शहाणे लोक मूग गिळून स्वस्थ बसलेले आढळून येतात. यदाकदाचित् एखाद दुसऱ्यानें स्वाभिमानाची चुणूक दाखविण्याचा प्रयत्न केलाच, तर ताबडतोब त्याचे पाय मोडून त्यास गलित धैर्य बनविण्यास ही शहाण्यांची पलटण एका पायानें तयार होत असते. एवंच, आधींच आमच्यात स्वाभिमानास जपणारी मंडळी कमी व तीहि त्या 'दूरदर्शी', 'पोक्त' व "प्रतिष्ठित' लोकांच्या तावडींत सांपडलेली !

सांगें, फोंडें व काणकोण ह्या तिन्ही तालुक्यांत पोलीसशाहीकडून अनेक तऱ्हेचीं अनन्वित कृत्यें घडून आलीं. घरंदाज लोकांचा विनाकारण अपमान करण्यात आला. ज्या विषयाची चर्चा केवळ न्यायकोर्टांतच व्हावयाची, त्यांची हजेरी पोलीस खात्यात विनहरकत व विनमूर्वत घेण्याचा परिपाठ पडूं लागला. पण सामुदायिक विरोधाचें नाव नाहीं. उलट एखादे वेळीं सरकारनें आपण होऊनच अनधिकारी पोलीस अधिकाऱ्यांस वठणीवर आणण्याचा प्रयत्न केलाच तर लगेच त्याविरुद्ध नापसंती दर्शविण्यास सांगें येथील शहाण्यांप्रमाणें, धूर्त मंडळी 'दंड' ठोकून पुढें यावयाची !

परसत्तेनें आमच्या रक्तात भिनविलेला भ्याडपणा हाच ह्या करुणजन्य स्थितीचा आद्यजनक होय. जोंपर्यंत हा भ्याडपणा आह्माला सोडणार नाहीं, जोंपर्यंत अत्याचारास तोंड देण्यास, आमचें तोंड उघडलें जाणार नाहीं व जोंपर्यंत गतशौर्याच्या इमारतीचा पाया खोदण्यास आमचे पाय पुढें पडणार नाहींत तोंपर्यंत कसल्याहि अत्याचार स रोखठोकउत्तर देण्यांस आह्मी कदापि शकणार नाहीं हें उघड आहे. शौर्याशिवाय स्वराज्य संपादनाची सदिच्छा व्यर्थ होय. स्वराज्याची प्राप्ति शौर्याच्याच सहाय्यानें होणार आहे. शौर्य हेंच आमच्या सर्व चळवळींचें जीवन बनलें पाहिजे. ज्या चळवळींत शौर्य नाहीं, ज्या धडपडींत शौर्याचा आत्मा वावरत नाहीं व ज्या हालचालींत धैर्याचें नांव नाहीं, ती चळवळ, ती धडपड व ती हालचाल निवळ मढ्याप्रमाणें आहे. तीजपासून कांहींच अर्थ निष्पन्न होत नाहीं, हें उघड आहे.

तेव्हां आह्मीं गोमांतकीय सर्व चळवळ्या लोकांस अशी नम्र विनंति करतों कीं, त्यांनीं गेलेलें स्वराज्य पुन्हां मिळविण्याच्या प्रयत्ना आधीं शौर्यधैर्यादि गुणांचा फैलाव करण्याचा कसोशीनें प्रयत्न करावा. शौर्याखेरीज सर्व चळवळी मृतवत् होय, हें त्यांनीं पक्कें लक्षांत ठेवावें.

स्फुट विचार

पक्षांधतेचा कळसः— सांगें येथील पोलीस अधिकाऱ्याच्या हडेलहप्पी कारभारामुळें तेथील बहुजन समाजाचीं मनें असंतोषाच्या वणव्यानें होरपळून गेलीं होतीं. ह्या परिस्थितीची जाणीव वरिष्ठ अधिकाऱ्यांस करून दिली गेल्यामुळें असो, अगर दुसऱ्या कांहीं कारणानें असो, त्या पोलीस कमांडरची बदली वाळपई येथें होऊन लोकांना जरा 'हायसें' वाटलें. परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, अशा अप्रिय झालेल्या लोकहितविघातक अधिकाऱ्याच्या गमनप्रसंगीं केवळ पक्षांधतेस बळी पडून, कांहीं बेजबादार इसमानीं त्यांच्या गौरवार अतिप्रसंगानें आपल हंसें करून घेतलें. जनांची असोच, पण मनाची तरी लाज बाळगून असें गैरशिस्त वर्तन त्या पक्षांध लोकांनीं करावयास नको होतें व तें त्यांनीं केलें नसतें तर त्यांच्यावर आकाश कोसळलें असतें, अशांतलाहि प्रकार नव्हता. पण 'जित्याची खोड मेल्याखेरीज कशी जाईल' ? कदापिच नाहीं, हें तेथील पाटणकर ज्योतिषी सुद्धां आकाशांतील ताऱ्यांच्या गतीकडेहि नजर न देतां सहज सांगूं शकतील, असें आह्मांस वाटतें.

चुकीचें धोरणः— सांग्यावरील ज्या मिरजोपी गृहस्थानीं सारासार विचारशक्तीला पक्षांधतेच्या दडपणाखालीं एकाएकीं चेंगरून, अप्रिय अधिकाऱ्याचा गौरव केला, त्यांची लोकहिताची कल्पना अपूर्वच असली पाहिजे त्यांच्या पक्षाचें हित ह्मणजे लोकहित, अशाच समजानें त्यांच्या अल्पक्षेत्री व आकुंचित मनावर पगडा बसविला असला पाहिजे लोकांचे रुपये बुडोत किंवा लोकांचे हरतऱ्हेचे हाल होवोत, त्यांचें त्यांस कांहींच नाहीं त्यांच्या खिशास चट्टा व पाठीस रट्टा न बसला ह्मणजे झालें त्या लोकांचें. हें धोरण अर्थात चुकीचें आहे. व तें ताबडतोब बदलण्याचा त्यांकडून प्रयत्न न झाल्यास त्यांना पश्चातापावें लागेल, असा स्पष्ट इशारा दिल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं. 'भारता'ला सांग्यावरील पक्षांत शिरावयाचें कारण नाहीं व तो नेहमीच स्थानिक पक्षभेदापासून अलिप्तच असतो. ह्याची ग्वाहि खुद्द तेथीलच लोक देतील. पण जेव्हां पक्षांधतेचें पर्यवसान बहुजनसमाजास अप्रिय झालेल्या अधिकाऱ्यांचा अवास्तव गौरव करण्यापर्यंत होतें, तेव्हां दिशाभूल झालेल्या त्या पक्षांध लोकांस 'युक्तीच्या चार गोष्टी' सांगण्याचा, आह्मांस अधिकार प्राप्त होतो हें कोणीहि निःपक्षपाती माणूस कबूल करील. लोकहिताखेरीज 'भारता'ला अन्य पक्ष नाहीं व हें जो कोणी खरें न मानील तो मात्र पक्षपाताचें पाप करतो असें आह्मीं निष्पाप अंतःकरणानें ह्मणूं.

—पोलीस खात्यावर बहिष्कार पुकारण्याचा कांहींकानीं निश्चय केला आहे, असें ह्मणतात.

जंगलखातेंः — आमच्या सरकारी रानांत आज कित्येक वर्षांपासून निरंकूशपणें चालू असलेल्या नासधुसीच्या नंग्या नाचाकडे कोणी नजर दिली तर त्याची नजर फिरल्याशिवाय रहाणार नाहीं. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, जों जों जंगल संरक्षकांची संख्या जंगलखात्याकडून जास्त जास्त वाढविली जाते, तों तों ह्या निसर्गदत्त संपत्तीची वाढ होण्याऐवजीं उलट तिची माती माती होत असल्याचें भीषण दृश्य मात्र छाती दडपून टांकीत असतें ! ह्या 'जंगली' कारभार जीवाचें रान करून सरकारकडून बंद पाडण्याचा प्रयत्न न झाल्यास रानांचा 'जीव' जाण्यास फारसा कालावधि लागणार नाहीं, हें उघड आहे. तेव्हा सरकारापाशीं आमची अशी विनंति आहे कीं, त्यानें जंगलखातें जंगलापासून फार दूर अशा पणजी शहरात न ठेवतां जेथून जंगलात चालत असलेल्या हैदोसास ताबडतोब आळा घालता येईल अशा एखाद्या जंगलानजीक जाग्यावर ठेवावें. जंगल संरक्षकांच्या हालचालीची व तपासणीची कसोशीनें 'उलट तपासणी' करण्याची पद्धत अमलांत आणावी. रानांतील लांकडाच्या चोऱ्या मोठ्या शहाणपणानें हुडकून काढून, चोरांना कडक शिक्षा ठोठावण्यास कचरूं नये. एवंच 'घरच्या भेद्यां'चा 'भेद' करून 'बाहेरच्या उचल्यां'ची उचलबांगडी करण्याचा पद्धतशीर प्रयत्न झाल्याखेरीज सरकारी जंगलांत ज्या नासधुसीच्या अकाळविक्राळ संबंधाचा स्वैर धुडगूस आज एकसारखा चालू आहे, तो संबंध कायमचा गाडला जाणें सर्वतोपरी अशक्य आहे, हें सरकारनें विसरतां कामा नये.

मुंबईचा पो. कोंसुलः— मुंबईच्या पोर्तुगीज कोंसुलऑफिसविरुद्ध आमच्याकडे अनेक तक्रारी आल्यामुळें आह्मीं त्यांचा खुलासेवार उल्लेख भारतांत केला होता. आजच्या अंकांतहि खुद्द मुंबईहून याच विषयावर लिहून आलेला मराठी मजकूर प्रसिद्ध करण्यांत आला आहे. शिवाय पोर्तुगीज सदरांत कोंसुलऑफिसकडून स्वसमर्थनार्थ आलेलें पत्रहि छापण्यांत आलें असून वादि व प्रतिवादि या उभय पक्षकारांच्या

शिकविण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाहीं.

कॅांसुलच्या कायदेशीर फीविरुद्ध कोणालाहि आक्षेप घेतां यावयाचा नाहीं; कागदपत्रावर व पासपोर्टावर सही मिळविण्याची फी कितीहि जब्बर असली तरी ती दिलीच पाहिजे; परंतु ही फी ठराविक पाहिजे; कॅांसुलच्या लहरीप्रमाणें वाटेल ती फी वसूल करण्याची सवलत त्याला असतां नये. पो. कॅांसुल व इतर राष्टांचें कॅांसुल ह्यांच्या वर्तणुकींत ही तफावत. दिसून येते. पोर्तुगीज कॅांसुलच्या कामाची पद्धत व फीचें प्रमाण अनियंत्रित आहे, त्याला कायदेशीर नियमन व बंधन पाहिजे.

ब्रिटिश हिंदी लोकांकडूनहि अयोग्य व बेकायदेशीर आर्थिक फायदा घेण्यास पोर्तुगीज कॅांसुल व त्याचें ऑफिस मागें पुढें पहात नाहींत. अर्थातच हा प्रकार ब्रिटिश हिंदी सरकारच्या नजरेस आल्यास किंवा आणल्यास ब्रिटिश-हिंदी प्रजाजनानां नेहमींच लुबाडणें कॅांसुलला अशक्य होईल. ब्रिटिश हिंदी प्रजाजनांचा कॅांसुलशीं संबंध पासपोर्टवर त्याचा 'व्हिसा' मिळविण्यापुरता असतो. युरोपांतील बहुतेक सर्व राष्ट्रांनीं 'व्हिसा' देण्याचें बंद केलें आहे व आंतरराष्ट्रीय व्यवहाराच्या नियमांप्रमाणें ह्या राष्ट्रांच्या प्रजाजनांसहि ब्रिटिश 'व्हिसा' घेण्याची जरूरी राहिली नाहीं. पोर्तुगाल मात्र दुसऱ्या थोड्याशा राष्ट्रांबरोबर ह्या व्यवस्थेला अपवाद आहे. आतां ही 'व्हिसाफी' reciprocal basis वर ठरविलेली आहे. (ह्यालाच retaliatary bil ह्मणतात.) पूर्वी पोर्तुगीज प्रजाजनांना सातएक रुपये फी द्यावी लागत असे; परंतु पोर्तुगीज सरकार त्यावेळीं सुद्धां ब्रिटिश प्रजाजनांकडून १५ रुपये फी घेत असल्यामुळें ब्रिटिश सरकारनें (लंडनच्या फॉरीन ऑफिसनें) ब्रिटिश फीचें प्रमाण वाढविलें. अशा स्थितींतहि राजकीय शिष्टाचाराचे [etiquette चे] नियम वाऱ्यावर फेंकून देऊन आपला खासगी फायदा करण्याची युक्ति कॅांसुलनें आपल्या मेंदूंतून काढली. सुमारें ३–४ महिन्यापूर्वी कॅांसुलनें असा नियम केला कीं, पोर्तुगीज इस्ट आफ्रिकेच्या वसाहतींत प्रवेश करण्यासाठीं आवश्यक असलेला 'व्हिसा' मिळविण्यासाठीं आफ्रिकेची बोट येथून सुटण्यापूर्वी तीन दिवस अर्ज केल्यासच १५ रु. १० आ. ८ पै. ची फी घेण्यांत येईल. ह्या 'व्हिसा'चा अर्ज दोन दिवस पूर्वी केल्यास रु. २०–१० ची फी वसूल करण्यांत येईल; व एकच दिवसांत 'व्हिसा' मिळविण्यांस रु. २५–१०–८ ची रक्कम द्यावी लागेल. ठराविक फीवरील ही अनुक्रमें ५ व १० रुपयांची फी 'लेट फी' समजली जाईल. ह्या रकमाबद्दल कॅांसुल रसिटी देत नाहीं. ह्यावरून त्या कॅांसुलेटच्या तिजोरींत जमा होत नाहींत, हें स्पष्ट दिसून येतें. तुमच्याजवळून पोर्तुगीज व्हिसाबद्दल रु. २५–१०–८ ची फी वसूल करण्यांत येते पण तुह्मांला देण्यांत येत असलेल्या रसिटीवर फक्त रु. १५–१०–८ च्या रकमेची पोंच असते. प्रत्येक पंधरवड्यास येथून जाणाऱ्या सुटणाऱ्या बोटीनें जाणाऱ्या कित्येक माणसांना 'लेट फी'चा हा भुर्दंड भरावा लागतो. कायदेशीर व ठराविक रु. १५–१०–८ च्या 'व्हिसाफी' वर एकपैहि मागण्याचा कॅांसुलला हक्क नाहीं. ब्रिटिश प्रजाजनांकडून वसूल करण्यांत येत असलेली लेट फी मुंबई सरकारच्या पासपोर्ट ऑफिसनें पोर्तुगीज प्रजाजनांवर लादलेली नाहीं.

पोर्तुगीज कॅांसुलच्या ह्या कृत्यास आळा घालणें फारसें कठीण नाहीं. परंतु ह्या बाबतींत सुद्धां लक्ष घालण्यास कोणी तयार नाहीं. पोर्तुगीज वसाहतींत जाणाऱ्या ब्रिटिश प्रजाजनांची बहुसंख्या काठीयावाड गुजराथ ह्या प्रांतांतील निरक्षर लोकांची असते, व ते आपले पासपोर्ट मुंबईतील पासपोर्ट दलालांकडून मिळवितात ह्या पासपोर्ट दलालांना स्वतःच्या खिशांतून 'लेटफी' द्यावी लागत नसल्यामुळें ते सुद्धां ह्या बाबतींत उदासीन असतात. कॅांसुलच्या ऑफिसशीं नेहमीं संबंध येत असल्यामुळें त्या मोठ्या माणसाची इतराजी त्यांना जाचक होते व अर्थातच त्यांचें वैर संपादन करण्याची ह्या क्षुद्र पोटभरू मध्यस्थांना छाती होत नाहीं.

लेटफीचा प्रश्न पोर्तुगीज सरकारनें हातीं घेतला पाहिजे, पोर्तुगालच्या राष्ट्रीय इभ्रतीवर हा डाग आहे. पोर्तुगीज कॅांसुल व्यक्तिशः कसाहि माणूस असला तरी तो व त्याचें ऑफिस ह्यांची जबाबदारी पोर्तुगीज रिपब्लिकच्या सरकारावर आहे. कॅांसुल त्याचा ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रतिनिधि आहे. कॅांसुलसारखा बडा व जबाबदार अधिकारी व आपल्या तागडीला बांकडा झोका देणारा वाणिज्यवृत्तीचा माणूस ह्यांतील फरक स्वतंत्र रिपब्लिकनें पाहिला पाहिजे. परक्या इंग्रजांच्या प्रदेशात पोर्तुगीज सरकारचें नांव खराब होत आहे. सार्वजनिक अधिकाराच्या वर्तणूकीचें पावित्र्य [purity of public officer] कॅांसुलच्या वर्तणूकींत कोठें आहे ?

चंद्रदर्शनाची चूक कीं दृष्टचाची भूल ?

"प्राज्ञैरतः स्याद् गणितेन गम्यः" ॥
सि॰ शिरोमणि, गोला ०१–८

कोणत्याहि शास्त्रासंबंधीं किंवा मुद्द्यांसंबंधीं विधान करणें असल्यास तें साधकबाधक प्रमाणांचा पूर्ण विचार करूनच केलें पाहिजे. न पेक्षां आपल्या गैरसमजानें इतरे जनांत सत्य वस्तुबद्दल अवस्त्वारोप पसरला जातो आणि याचा दोष तो पसरविणारावर आल्यावांचून रहात नाहीं. ज्योतिषशास्त्रासारख्या जबाबदार विषयांत तर फार जपून लिहिलें पाहिजे. पण हल्लीं पहावें तों, जो तो आपला शुद्धाशुद्ध पंचांग वादाचा फायदा घेऊन या विषयावर, तज्ज्ञतेचा आव आणून, आपली लेखणी बिनहरकत चालवीत असतो ! येथें जातीचाच पाहिजे. गोल वृत्तें, परिघ, खस्थ पदार्थांचे संबंध, कक्षा, सूर्यमाला, आकर्षण इत्याद्यनेक यथार्थ ज्ञान असल्यासच यांत प्रवेश होतो. हाच वरील श्रीमद्भास्कराचार्योक्तीचा मथितार्थ आहे.

हे विचार सुचण्याचें कारण ह्मणजे गेल्या ता. १४ गुरुवारच्या 'भारतां'त 'सारस्वत' या सहीनें 'भविष्य' या सदराखालीं प्रसिद्ध झालेल्या लेखांत असें एक विधान लेखकानें केलें आहे "प. प्र. कमेटीच्या" शु. नि. पचांगांत [टिळक पंचांग] यंदाच्या चैत्र शु. १ दा. रोजीं 'चद्रदर्शन' लिहिलें असतां तें झालें नाहीं, अर्थात् शुद्ध पंचागाचें भविष्य खोटें;" असें भासविण्याचें एक अप्रस्तुत विधान केलें असल्यानें ज्योतिर्गणितानभिज्ञ लोकांचा गैरसमज होऊं नये एतदर्थ येथें थोडक्यांत विवेचन करावें लागतें.

शुद्ध निरयन पंचांग प्रसिद्ध होऊं लागल्यास बरींच वर्षें झालीं. ग्रहणें, ग्रहयुती, अस्तोदय, क्रांति वगैरे शेंकडो दृक प्रत्ययांत तें शुद्धतेच्या कसोटीस उतरलें व सध्याहि ग्रहराश्यंतरींत अंश इत्यादि प्रकारानीं त्याची सूक्ष्म दृक् प्रत्ययता सिद्ध करितां येते हें सर्व महशूर असतांनां 'सारस्वतांस' त्या रोजीं चंद्राचें अदर्शन झाल्यानें टि. पंचांग अशुद्ध कसें होतें हें आह्मांस समजत नाहीं. वरील विधान करण्याचे आधीं, खस्थ पदार्थांचीं दर्शनें अभ्रें, स्थल, द्रष्ट्यांचीं ह्मणजे पहाणाऱ्याची कमिअधिक दृष्टि, क्रांति, क्रांतितेज, वगैरे खगोलीय अडचणीच्या कारणानीं कधीं कधीं वेळेवर होत नसतात; (यामुळें चंद्रदर्शन हें शुद्धाशुद्ध पंचांग निर्णयाचें साधन आहें असें कधींहि ह्मणतां यावयाचें नाहीं) हें त्यानीं ध्यानीं आणावयास हवें होतें शिवाय चंद्रदर्शनाची वस्तुस्थिति कशी आहे हें पुढील भागावरून वाचकांचे ध्यानीं येईल.

"प्रतिपदेरोजीं चंद्रदर्शन" हे शब्द कांहींसे चमत्कारिक वाटले तरी, हें टिळक पंचांगांतच नव्हे तर ग्रहलाघवी पंचांगांतहि अनेकवेळां होतें. पण चंद्रदर्शन हें सूर्योदयीं प्रतिपदा असते ह्मणून 'प्रतिपदेंत होतें' ह्मणायाचें एवढेंच. वास्तविक द्वितियेच्या आरंभावाचून तें कधींहि संभवत नाहीं. ग्रहलाघवीय यंदाच्या पंचागांतहि वैशाख शु १दा आषाढ शु. १ दा, आश्विन शु १ दा. इत्यादि रोजीं 'चंद्रदर्शन' लिहिलेंच आहे. या वेळीं द्वितिया भरपूर असल्यानें चंद्र चागला पहाण्यास मिळेल व शु॰ नि॰ पंचागात गेली वर्षप्रतिपदा संपूत अस्ता आधीं थोडीच द्वितिया लागल्यानें तो अगदींच थोडावेळ पहाण्यास मिळावयाचा इतकेंच काय तें. ह्मणून तो दिसला नाहीं, असें ह्मणण्याआधीं आपणच कसा चुकलों तें पाहिलें पाहिजे. अमवास्येरोजीं सूर्यचंद्र ३६० अंशांत ह्मणजे शून्यांतरांत असतात. तिथी ह्मणजे सूर्यापासून चंद्राचें १२ अंश अंतर होय. इतकें अंतर चालण्यास चंद्रास सुमारें ६० घटिका लागतात. सूर्यापासून १३ व्या अंशांत चंद्र गेला ह्मणजे द्वितिया लागते. (इत्यादि साग्र विवेचन पाहिजे असल्यास, पुणें येथील "ज्योतिर्भूषण" मासिकांत "पंचाग वादाचें रहस्य व ऐक्याची दिशा" या मथळ्याखालीं आलेला आमचा लेख अवश्य पहावा) सूर्यापासून अमुक अंश अंतर ग्रह गेला ह्मणजे तो प्रकाशूं लागतो, या बद्दलची संख्या मांगणाऱ्या मानास ज्योतिषांत "कालांश" असें ह्मणतात. हे कालांश चंद्राचे १२, व शुक्राचे ८ वगैरे आहेत. (भास्करा नग भुवो गुण चंद्रा॰" इत्यादि "ग्रहलाघव अस्तोदयाधिकार" श्लो॰ ११ पहा.) पण हल्लीं सूक्ष्म वेधानें चंद्राचे ११ कालांश येतात. ["कालांशमितं दिनांहि लोपस्य॰" इत्यादि "करणकल्पलता" नवीन करणग्रंथ लोपदर्शनाधिकार श्लो॰ ३ पहा.] अर्थात सूर्यापासून इतके अंश अंतर झालें ह्मणजे चंद्र दिसूं लागतो. यंदा नवीन पंचांगाप्रमाणें ती प्रतिपदा बुधवारी २९ घटिका २१ पळें आहे. ह्मणजे, यावेळीं प्रतिपदा संपली. याचा अर्थ चंद्राचें अंतर १२ अंश संपलें; व द्वितिया लागली. या रोजीं दिनमान ३० घटिका २५ पळें आहे. यावरून सूर्यास्ता आधीं सुमारें ५६ पळें [२२ मिनिटें] द्वितिया लागली. आणि चंद्राचे कालांश तर ११ असल्यानें आधीं सुमारें ५ घटिका चंद्र प्रकाशित व्हावयाचा. व द्वितियेचा आरंभहि असल्यानें सूर्यास्तीं "चंद्रदर्शन" होणें साहजिकच आहे. व तें तें लिहिलें यांत वावगें तें काय ? या रोजीं सूर्यास्त ६ तास ५० मिनिटांवर आहे. ह्मणून यावेळी क्षितिजावर पश्चिम गोलार्धांत पाहिल्यास "सारस्वतांसहि" फार थोडावेळ चंद्र दिसणार असता आतां दुसऱ्या रोजी चंद्र आजच्याहून चांगला दिसेल हें खरें, पण येथें तो चांगला कधीं दिसेल हा प्रश्न नसून द्वितिया तिथींत लौकरांत लौकर चंद्रदर्शन पूर्वार्धात कधीं दिसेल हेंच पहावयाचें आहे. द्वितियारंभीं चंद्रदर्शन करणें पुण्यप्रद असल्यानें, हा योग याच वेळीं असल्यानें पंचागांत लिहिलेलें शास्त्रशुद्ध आणि शुद्ध पंचांगदृष्ट्या आवश्यकच होय. अनेक अडचणींनीं चंद्रदर्शन प्रत्यक्ष दिसण्याचें कधीं कधीं साधत नाहीं. ही जाणीव असल्यानेंच शास्त्रकारांनीं "मदनरत्ना"सारख्या श्रेष्ठ ग्रंथांत सूर्यास्तीं द्वितिया असली व ती पूर्वार्धाची असली ह्मणजे चंद्रदर्शनोद्भव कर्म, बालेन्दुव्रत वगैरे अवश्य करावें, प्रत्यक्ष चंद्रमंडल दर्शन होवो अथवा न होवो" इत्यादि मार्ग सांगितले आहेत. "विष्णुधर्मोत्तर" ग्रंथांत तर "दिनावसाने देवेश उदयेन्दा निशाकरं" इत्यादि सांगितलें असून "जयसिंह कल्पद्रुमानें" "दिनावसाने चंद्रदर्शन काले" इत्यादि वाक्यांनीं अगदीं थोड्या द्वितियेंतहि अस्तमानीं चंद्रदर्शन करावें असें सुचविलें आहे. अस्तु.

या रोजीं तो संध्याकाळीं सूर्यापासून सुमारें १३ अंश होता. (अंश हा सुमारें सव्वा वितीचा आकाश प्रदेश व्यापितो;) तेव्हां हें अंश तुरीय यंत्रानें पाहिल्यास कित्या मानाची योग्य कल्पना केल्यास चंद्राचे ११ अंशहि आदर्शनाची मेघा गेल्यानें दोन अंश दृश्य स्थिति मिळते आणि खगोलाचें गति अंशास ४ मिनिटें असल्यानें सूर्यास्ता

LIGA DA PROPAGANDA DE INSTRUCÇÃO EM GOA

COLEGIO ANTONIO JOSE DE ALMEIDA

Reabrir-se-ha este Colégio em 15 de junho proximo seguinte com leccionamento gratuito de portuguès desde 1°. grau até 3a. classe dos Liceus, de ingles, com primeiras 3 classes e de marata com primeiras 4 classes.

As propinas de matricula e encerramento serão as mesmas do ano findo.

Haverá internato para hindús, e tambem para cristãos quando os alunos se inscreverem em numero pelo menos de 10

Para mais informações dirijam-se ao secretario do Colégio

Secretario da Liga em Pondá, 1 de Maio de 1925.

O Secretário da Liga,
Sitarama Quercar

(Gratuito)

O BHARAT

A BANDALHEIRA

Foi publicada, na folha oficial, uma portaria dividindo o país em 4 zonas agricolas.

Lá haviam sido criadas, ainda não há muito, tres zonas e agora temos mais uma, naturalmente por se ter verificado que, se esta terra continuava sem producção agricola, era por falta de mais *uma zona*.

Incontestavelmente, o sr. dr. Jaime de Morais, durante todo o tempo, que aqui esteve governando, utilisou a sua inteligencia e argucia para sacar coiro e cabelo ao contribuinte a penas com o intuito de encher a boca dos seus turibularios e dos filhos, netos e ainda dos genros presentes e futuros dos mesmos. Nós tivemos governadores cuja acção foi uma verdadeira desgraça para esta terra mas nunca, em tempo algum, a .. ..assumiu os foros de norma de governar como nos cinco anos que se fecharam no abril ultimo.

¿Quem será o *bonito* em cujo proveito, em nome do fomento desta esfolada e mísera terra se criou a quarta zona?

Está claro que não ha de ser dificil procura-lo. Ha de encontrar-se bem perto, muito perto dos panigiristas de s. exia. que felizmente são poucos e todos demais conhecidos.

E o curioso é que estes senhores, os autenticos delapidadores do tesouro nacional, verdadeiros traficantes da honra e dinheiro do povo, estes amorais que não hesitam perante sem vergonha alguma, são os primeiros a proclamar em toda a parte, nos congressos, nos comicios, na imprensa, o seu amor a esta terra, o seu interesse pelo seu progresso e bem estar.

Ah! falsarios! mil vezes honesto e airoso seria declarar alto e claro: "*Senhores! Nós estamos cá berrando em troca dum osso. Satisfaçam a nossa fome e dos nossos. E iremos nós em paz!*

Não andamos a fantasiar. O paiz é muito pequeno e sem esforço em meio minuto, pode se fazer a lista destes *salvadores da patria*.

Oh! o asco que tudo isto nos causa! A que desceu esta terra que vivera, pobre embora, mas sempre honrada! Em toda a parte se trafica. Em cada canto vê-se erguido um balcão de compra e venda.—Não se rega teia Paga-se a grande, porque o dinheiro é do tolo. Vende-se muito porque a mercadoria – a dignidade—está em leilão.

Nunca se esqueçam, porem, que a bandalheira é como cancro—mata o bandalho. E o dia da derrocada não tarda!

ECOS E CRITICA

UM EXILADO

Entre os *exilados voluntarios* que levou o ultimo paquete para a Africa Oriental lemos com magua o nome do sr Alvaro de Santa Rita Vás.

Conhecemos o sr. Vás pelos seus interessantes e valiosos trabalhos literarios e outros de propaganda de coisas da India publicados em varios almanaques importantes do Brasil e de Portugal, e de quando em vez, nos jornais do pais como *Heraldo* etc ..

E' sem duvida um autentico valor que, com a saida do sr. Vás, perde esta desgraçada terra.

Mas que fazer? Se por parte dos nossos dirigentes ha empenho manifesto e cego de pretender fazer disto feudo dos *avelares, cotacruzes*, dos *administradores advogados pela Universidade de Quepem* e outros especimens mais ou menos curiosos? !

N. B. *avelares cotacruzes*, seja com inicial minuscula.

P... QUE FALAM...

Na semana passada no recinto da Navegação Fluvial, em Pangim, houve uma scena violenta de pugilato entre o professor Benjamim Mendonça e um individuo conhecido por João Franco, tendo este ultimo saido *bem pisado* da contenda que felizmente não foi mais longe, graças á oportuna intervenção do sr. Castelo Branco, digno Fiscal da Navegação.

Nós que, por acaso, passavamos por ai, procuramos saber do motivo do conflito e ouvimos que o dito João Franco é uma figura bastante perigosa sob a capa de sua ingenuidade e que, alem de um oficio curioso exerce tambem um outro, igualmente curioso, qual é de intrigar com os europeus os indigenas que o homem não olha bem. Constou-nos tambem que a presente sova foi motivada pelo facto de o sejeito ter ido insuflar nos ouvidos do sr. Pereira Batalha que o prof Mendonça falava mal dele Batalha e de outros europeus. Constou nos ainda que o prof. Mendonça não extende mão ao Franco vai para 7 anos e que não é esta a primeira tosa que o homem apanha—por causa do seu feitio intrigante e reles ...

Sabiamos que não havia cidades *sem porcos*, mas que eles falassem...e fossem ouvidos!!...

NAO HA FUMO ...

De uma carta de Pangim:

"Corre que vai ser arquivado um processo que organisado pelo comando de policia desta cidade, foi a pouco remetido ao tribunal judicial a fim de ter o seu devido andamento. O processo diz respeito ao celebre caso de desordem na igreja da capital no dia de Pascoa."

Este boato ... ..."

Pedimos disculpas ao nosso correspondente por não podermos reproduzir as consideraçoes que faz na carta, baseando-se num diz-se embora admitamos como certo o ditado de *não há fumo sem fogo!*

MAIS UMA CONQUISTA ? !

Em volta das lanchas velhas adquiridas pelo estado para o serviço da Navegação Fluvial, vai um ruido mais ou menos identico ao que houve por ocasião da *conquista diplomatica* do sr. Pereira Batalha ... ... do telegrafo ingles.

Faz falta o sr Jaime de Morais. Estivesse o *grande colonial* e já esta hora tinhamos uma aleluia entoada, do alto da presidencia do mais alto corpo representativo do país.

Alem da conquista do telegrafo velho do inglez, temos agora a conquista das lanchas velhas, tambem do inglez. Aqui está quanto vale saber conquistar!

EM TODO O CASO ...

De Bicholim, onde era juiz de direito substituto o sr. Irenio de Almeida foi a Damão engrossar as fileiras dos *administradores advogados pela Universidade de Quepem*!

Nós não discutimos esta escolha como não discutimos a de tantos outros feita em identicas ou piores condições. E' a ordem do dia e ... ... acabou-se. O que temos é pena de que ao sr. Irenio tenham obrigado a ser *magistrado judicial* para em fim ir dar em *magistrado administrativo*. Em todo o caso felicitamos o sr. Irenio. Mór por mór.................

AUTENTICOS CANECOS !

"Sabe que mais, recebi convite de um F.... a uma reunião no dia ... Não conheço o homem, mas sempre lá vou que e para *admirar de perto o convidante.*"

Estas palavras foram, ha pouco ouvidas da boca de um alto funcionario europeu à cerca do convite que um filho da terra lhe dirigiu sem sequer o conhecer.

Não se trata de um caso raro. Disparates destes fazem-se todos os dias.

Nós bem sabemos que na opinião de certos (e deles é a maioria) o europeu é como a orquestra da banda municipal de Margão ou o sexteto dos irmãos Miranda — dá brilho a festa. Mas semelhante maneira de ver não justifica o procedimento que é de um *autentico caneco*! Um indio que tem orgulho de o ser, não deve nem pode, nem ha de proceder assim.

Em fim este penedo—civili-

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्यांविण दुसरा धर्म न टावा ॥

ज्येष्ट शु० १२ शी शके १८४७

शारीरिक संपत्ति वाढवा !

परसत्तेच्या प्रवाहांत जित लोकांचे शौर्य धैर्यादि गुण वाहून गेले ह्मणजे त्यांच्या परावलंबी व परोपजीवी देहांत निलाजऱ्या नेभळटपणाचा स्वैर संचार कसा होत असतो, याचें दिग्दर्शन आह्मीं गेल्या अंकीं केलेंच आहे. गुलामगिरींत गुटमळण्याच्या सतत संवयीनें, 'परक्यांच्या ताटाखालचीं मांजरें' बनण्यास त्यानां मनाची किंवा जनाची लाज वाटेनाशी होते. परक्यांची 'हांजी हांजी' करण्यांत अर्ध्याधिक आयुष्याची इतिश्री झाली तरी पर्वा नाहीं, पण कशाहि रीतीनें स्वतःची व स्वतःच्या पोराबाळांची दुपारची वेळ निभावली ह्मणजे मिळविली ! उठतां लत्तांचा व बसतां बुक्क्यांचा मनमुराद प्रसाद सेवावा लागला तरी 'कूच फिकीर नहीं', पण एकदांचा पोटाचा प्रश्न कसा बसा सुटला ह्मणजे जित लोकांना विष्णुपद पादाक्रांत केल्याचा स्वर्गीय आनंद वाटत असतो. एतावता परसत्तेनें जित लोकांचीं डोकीं पोटाकडे इतकीं डोकावून पहात असतात कीं, अखेर तीं पोटांतच 'गडप' होत असतात.

परसत्तेच्या तीक्ष्ण तरवारीनें जित लोकांचीं डोकीं स्थानभ्रष्ट झाल्यावर, अशा बिनडोक्यांच्या धडांत स्वाभिमानाची तेजस्वी भावना कशी जीवंत राहूं शकेल ? त्यांचें जीवितसर्वस्व निवळ आगगाडीसारखें बनलेलें असतें. ज्याप्रमाणें आगगाडी 'कशासाठीं, पोटासाठीं' असें बोंबलत ठरींव रुळांवरून भटकत असते, त्याचप्रमाणें उदरंभरणाच्या आंखीव रस्त्यावरून परसत्तेच्या प्रभावशाली पराक्रमानें पंगु झालेले पामर आपली धिंडका मिरवीत असतात. शौर्य धैर्यादि गुणांची वाखाणणी तर दूरच असो, परंतु नुसते ते शब्द चांचरण्याससुद्धां त्यांच्या गचाळ जिभेला छाती होत नसते. दुसऱ्यांच्या दुष्ट दराऱ्यानें जितांचा देशाभिमान दुरावतो, हें सिद्ध करण्यास आणखी कसला पुरावा पाहिजे ? असो.

परसत्तेचा क्षयी पगडा ज्या दूरदर्शी देशबांधवांवर आर्य पूर्वजांच्या थोर पुण्याईनें पूर्णपणें अजून बसलेला नाहीं व ह्मणूनच ज्यांच्या डोक्यांतील मेंदू अजून शाबूत आहे, त्याचें पवित्रतम कर्तव्य अर्थात आपल्या गरीब बांधवावर दया करण्याचें आहे. परसत्तेनें परलोकाला पाठविलेला स्वाभिमान परत तेथून खेंचून आणून स्वबांधवांच्या देहांत प्रविष्ट करण्याचे कामीं त्यानीं आपलें रक्त आटविलें पाहिजे. त्यांच्यांतील शौर्यधैर्यादि गतगुणांचा जीर्णोद्धार होणें अवश्य आहे. स्वराज्य संपादनाच्या सदिच्छेची आग त्यांच्या अंतःकरणांत पेटवून परसत्तेनें त्यांच्यांत उत्पन्न केलेला भ्याडपणा नष्ट केला पाहिजे क्षय रोग्याला ज्याप्रमाणें मरणाची कल्पना शिवत नाहीं, त्याचप्रमाणें परसत्तेनें झिंगलेल्या जिताला अधोगतीची कल्पना शिवत नसते. ह्मणून त्यांच्या डोळ्यांत चांगलें अंजन घालावें लागेल, हें त्यांनीं विसरतां कामा नये.

परसत्तेनें अजून अंध न बनलेल्या डोळसांचें पहिले कर्तव्य हें आहे कीं, त्यानीं जित पाप्यांचें पितरी देह व्यायामद्वारा रुबाबदार व सशक्त केले पाहिजेत. कारण मनाची दुर्बलता ही शारीरिक अवनतीपासूनच बहुतकरून उत्पन्न होत असते. दुसऱ्या शब्दानीं सांगावयाचें झाल्यास असें ह्मणतां येईल कीं, ती शारीरिक अधोगतीचेंच अपत्य होय. एकदां देहांत शक्ति मुसमुसूं लागली ह्मणजे आपोआपच मनांत शौर्यधैर्यादिसारख्या पराक्रमी भावना उद्दीपित होऊं लागतील, निदान त्या उद्दीपित करण्याचें कार्य सुकर होईल. गतवैभव फिरून हस्तगत करण्याचें अचूक साधन ह्मणजे शारीरिक संपत्ति वाढविणें हें होय. व या साधनाचा उपयोग करताना जेते लोकांनीं कसलीच भीति बाळगण्याचें कारण नाहीं, ही त्यांतल्यांत्यांत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. खुद्द रिपब्लिकन सरकारनें असा एक कायदा पास केलेला आहे कीं, प्रत्येक सरकारी किंवा बिन सरकारी शिक्षण संस्थेंत व्यायामाचें शिक्षण दिलें गेलेंच पाहिजे. ज्या संस्थेंत हें शिक्षण दिलें न जाईल, ती संस्था बंद करण्याची खबरदारी सरकारनें घेतली आहे. यावरून सरकारी धोरण शरीर बळवृद्धीला कसें पोषकच आहे, हें वाचकांस समजून येईल.

'आधीं शूर बना' अशी इशारत आह्मीं आमच्या जितबंधूस गेल्या अंकीं दिली होती. आतां 'शारीरिक संपत्ति वाढवा' असा सल्ला आह्मीं त्यांस देत आहों. धडधाकड शरीराशिवाय शूरत्वाच्या वल्गना व्यर्थ होत. शूरत्व गाजविण्याला आधीं शरीरांत 'राम' असला पाहिजे. तात्पर्य, परसत्तेच्या नरकांतून मुक्त होण्यासाठीं शूर बनलें पाहिजे व शूरत्वाची भावना प्रज्वलित होण्यास शरीर पुष्ट असलें पाहिजे. तेव्हां 'शारीरिक संपत्ति वाढवा' या आमच्या विज्ञापक सल्ल्याकडे जित लोक कानाडोळा करणार नाहींत, अशी आह्मांस पूर्ण खात्री आहे.

—आंगोल व इतर आफ्रिकेंतील पोर्तुगेज वसाहतींत जर्मन लोकांची वस्ती दिवसेंदिवस वृद्धिंगत पावत असल्यानें, आपल्या त्या वसाहती जर्मनाच्या ताब्यांत जातील, अशी भीति पोर्तुगीज लोकांना वाटूं लागली आहे.

स्फुट विचार

क्षत्रिय भंडारी समाजः— कर्तव्यशून्यतेच्या करुणाजन्य कर्दमांतून कणखर कर्मयोगाच्या कसोटीनें उन्नतिपद आक्रमित असलेल्या या समाजाचें कोण कौतुक करणार नाहीं ? स्वोन्नतीची इमारत परनिंदेच्या पायावर उभारण्याची अदूरदर्शी उठाठेव केली गेल्यास, इष्ट हेतु तर साध्य होत नाहींच, उलट प्रगतिपथावर मात्र कलहाचे कांटे पसरले जाऊन तो मार्ग अनुल्लंघनीय बनतो ही अनुभविक व्यवहारांतील शहाणी शिकवण क्षत्रिय भंडारी समाजाच्या अंगीं पूर्णपणें बिंबल्याचें पाहून वर आह्मांस फार आनंद होत आहे. राष्ट्रपुरुषाचे सगळे अवयव सारख्याच सलोख्यानें सुदृढ बनल्याखेरीज तो स्वराज्य संपादनाला योग्य होईल असें बहकणारा इसम निव्वळ माथेफिरू असला पाहिजे. ह्मणूनच गोमांतकांतील सर्व सुशिक्षित वर्ग, कोणताहि जातिभेद किंवा पक्षभेद मनांत न आणतां, आपल्या अशिक्षित बांधवांना कर्तव्यतत्पर बनविण्याचे कामीं मदत पुरविण्यास नेहमींच पुढें सरसावत असतो. अशिक्षितांचा अशिक्षितपणा पार विलयास जाऊन, स्वराज्यप्रीत्यर्थ त्यांचा उपयुक्त उपयोग व्हावा, हेंच ध्येय सुशिक्षितांच्या नजरेसमोर नित्य असतें, असें ह्मटल्यास वस्तुस्थितीच्या विपर्यासाचें पातक लागण्याची भीति नाहीं. तात्पर्य हेंच कीं, क्षत्रिय भंडारी समाजानें, इतर कोणाहि समाजाचीं मनें न दुखवितां, स्वोन्नतीप्रीत्यर्थ सुरू केलेल्या चळवळीला सर्व सुशिक्षितांचें पाठबळच आहे.

पणजीची परिषद :— पणजी शहरांतील 'एडन' सिनेमागृहांत जी गेल्या दिवसांमागें क्षत्रिय भंडारी लोकांची सभा भरली होती व जे ठराव तींत पसार झाले, ती सभा व ते ठराव, या दोन्हीं गोष्टींबद्दल भारताला पूर्ण सहानुभूति वाटत आहे, हें मागील मजकुरावरून स्पष्ट होत आहे. भंडारी क्षत्रियांत कर्तव्य जागृतीचा सूर्य सदोदित उगवता राहून, त्यांची सर्वांगीण सुधारणा व्हावी, याच सदिच्छेनें भारताकडून त्यांच्या चळवळीला सहाय्य पुरविलें जाईल, हें उघड आहे. व हें आमचें आश्वासन उधारीवर राहूं नये ह्मणून आजच्याच अंकीं दुसऱ्या स्थळीं क्षत्रिय भंडारी समाजाविषयीं त्यांच्यांतीलच एका सु–संस्कृत पुढाऱ्याचे मननीय विचार—जे एका व्याख्यानांत प्रदर्शित केले गेले होते ते दिले आहेत. भंडारी लोकांकडून, विशेषतः जे आपलें जीवित सर्वस्व दारूच्याच धंद्यानें जिवविण्यास जिवापाड जागत आहेत त्यांकडून तरी उपरिनिर्दिष्ट विचारांचा विचारपूर्वक विचार होईल, अशी आम्हांस आशा आहे. दारूच्या गलिच्छ धंद्यांत सपशेल लुप्त होऊं पहाणारें भंडाऱ्यांचें क्षत्रियत्व, त्यांच्या पुढारी वर्गाच्या पुण्यमय प्रयत्नांनीं पुनरेव पवित्र पुनरुज्जीवनाचा पंथ पटकावील, अशी ही आह्मांस उमेद आहे.

शपथेचें महत्वः—प्रत्येक सरकारी अधिकाऱ्याला, मग तो कोणत्याहि राष्ट्राचा असो, राजनिष्ठेची शपथ घ्यावी लागते. 'मी माझा अधिकार प्रमाणिकपणें बजावून, ज्यायोगें राष्ट्राची इभ्रत वाढेल, त्याच धोरणानें वागेन' अशा अर्थाची भाषासरणी त्या शपथेंत थोड्याफार फेरफारानें दर्शित केलेली आढळून येत असते. एकदां एखादा नागरिक एखाद्या राष्ट्राशीं उपरिनिर्दिष्ट शपथेसारख्या शपथेनें बद्ध झाला ह्मणजे शपथेला बाध येईल असें आंतून किंवा बाहेरून वर्तन करण्याची त्याला बंदी होत असते. राज्यक्रांतिसारखे मोठमोठे प्रसंग जरीं राष्ट्रावर ओढवले तरी खरे तत्वनिष्ठ लोक प्रसंगानुरूप पगडी न फिरवितां आपल्या शपथेला काळजीपूर्वक जागत असतात, हें जर्मनीचे नवे अध्यक्ष मार्शल हिंडेनबुर्ग ह्यांनीं आपल्या तेजस्वी बर्तनानें सिद्ध करून दाखविलें आहे. कैसरच्या परवानगीशिवाय त्यानीं रिपब्लिकचें अध्यक्षत्व स्वीकारलें नाहीं, या गोष्टीमुळें त्यांचा जाज्वल तत्वनिष्टपणा व्यक्त होतो. गोमांतकीय पब्लिक वर्कस खात्यांत काब्राल नावांचे एक मोनार्की पक्षाचे मार्गें अधिकारी होते. ह्या अधिकाऱ्याला जेव्हां ५ अक्टोबरच्या राज्यक्रांतीनंतर रिपब्लिक गव्हर्नरांसमोर नवी शपथ घेण्याचा प्रसंग आला, तेव्हां त्यानें केवळ पूर्वीच्या शपथेला बाध न येण्यासाठीं आपल्या अधिकारावरच तिलांजली दिली व गोमांतकांतून पाय काढला. शपथेचें महत्व समजणारे तत्वनिष्ट लोक कोठेंहि झालें तरी दुर्मिळच असतात, कारण शपथा घेण्यापेक्षां त्या मोडणेंच जास्त 'सोपें' व 'सोईस्कर' असतें.

पोर्तुगालचें वातावरण :— बंडाळीची ढगें वितळून 'थंडाई' झाल्यासारखा भास होत असला, तरी पोर्तुगालचें राजकीय वातावरण अजून शांत झालेलें नाहीं, असें तेथून आलेल्या खासगी पत्रांवरून अनुमान करण्यास हरकत नाहीं. बंडाच्या प्रमुख पुढाऱ्यांची उचलबांगडी झाली खरी, परंतु 'फिरून यत्न करून' पहाण्याची त्यांच्या दांडग्या अनुयायांची दांडगी इच्छा दाबण्यास सरकार सध्या तरी समर्थ नसल्यानें नवीन बंडाळी केव्हां उपस्थित होईल याचा नेम नाहीं, असेंच तीं पत्रें ह्मणतात. प्रजासत्ताक पद्धतीला पंधरा पावसाळे पुरे होत आले, पण राज्यक्रांतीच्या गडबडींत कोठें दडून बसलेली शांतता पुन्हा स्थानापन्न होत नाहीं, हें देशाचें दुर्दैव नव्हे काय ? ज्या राष्ट्राच्या अंतःकरणांत शांतता व शिस्त शिरत नाहींत, त्या राष्ट्रांतील लोक सुधारणेचें शिखर गांठण्यास कसे शक्य होतील ? पोर्तुगाल देश अधोगतीच्या गर्तेत लोळत असण्याचें खरें कारणहि अर्थात् हेंच–शांतता व शिस्त यांचा पूर्ण अभाव होय, यांत बिलकूल संशय नाहीं.

—नवे गव्हर्नर येथें येण्याच्या तयारीनें पोर्तुगालहून निघाल्याचें समजतें.

ज्ञानप्रकाशाची आवश्यकता

[लेः— कै० द. ज. बोरकर.]

पारतंत्र्यरूपी निबिड अंधःकारांतून स्वोन्नतीचा पुढील मार्ग काढावयाचा असला तर आपणांस ज्ञानदीप अवश्य जवळ करणें भाग आहे. ज्ञानदीपाच्या प्रकाशापासून आपण जितके लांब राहूं तितकी त्या मार्गांत वक्रता जास्त भासावयाची. होकायंत्राचा आश्रय न करितां समुद्रपर्यटण करूं पाहणाऱ्या नावाड्याच्या पदरीं मूर्खपणाचा जेवढा वांटा येण्याचा संभव, तितकाच किंबहुना त्याहूनहि जास्त वांटा ज्ञानाच्या अभावीं आपण पारतंत्र्यसागर सहज तरून जाऊं अशी घमेंड बाळगणाऱ्या विचारशून्य लोकांच्या पदरीं येणार हें निःसंदेह आहे. ज्ञानदीपाच्या प्रकाशाविना आपण पारतंत्र्याचा कांहीं नव्हे बराच प्रदेश मागें टाकला आहे. तेव्हां अशाच थाटानें पुढें आपणांस जाणें केवळ अशक्य आहे असें नाहीं असा तर्क एखाद्या भोळ्या डोक्यांतून उतरणें असंभवनीय नाहीं. पण त्याचें निराकरण करण्यास जास्त यातायात नको. इतिहास ग्रंथाचें थोडेंसें श्रवणहि ह्या तर्काचें समूळ उत्पाटन करण्यास पुरेसें होईल. शिवाय पदोपदीं येणारा अनुभव लक्षांत घेतला तर डोकें ताळ्यावर आणण्यास उशीर लागणार नाहींसें वाटतें. पारतंत्र्याची खडकाळ चढण आपण चढूं लागलों त्यावेळां आह्मी किती जण होतों, आपली स्थिति कशी होती आणखी प्रस्तुत आपण किती आहों, व आपली स्थिति काय आहे हें ढोबळ दृष्टीनें पाहिलें तरी अज्ञानापासून आपण किती लवकर दूर गेलें पाहिजे हें तात्काळ लक्षांत येईल. कदाचित् आह्मीं निघालों त्या वेळेच्यासारखे जरी आजला शाबूत असतों तरी पण आपणास तशा अज्ञानजन्य स्थितीचा तिरस्कारच करणें श्रेयस्कर होतें. कारण कीं, ' ज्ञानाविण जी जी कळा ती ती जाणावी अवकळा ' असें ह्मटलेलें आहे. तेव्हां आपणांस अवकळेची बाधा न होऊं देण्याबद्दल तरी खबरदारी घेणें भाग आहे.

पारतंत्र्याचा तिरस्कार येत नाहीं, असा कोणताच प्राणी नाहीं. त्यांत आणखी मनुष्य प्राणी हा तर पारतंत्र्याचा पक्का द्वेष्टा आहे. विचार करण्याचें मुख्य इंद्रिय जें मन तें इतर प्राण्यापेक्षां मनुष्यांत विशेष प्रमाणानें विकसित झालेलें असतें. ह्मणून पारतंत्र्यजन्य दुःख त्यास विशेष जाचक होतें. आणखी त्या मानानें पारतंत्र्यापासून मुक्तता करून घेण्याबद्दल त्याचे प्रयत्नहि जास्त नेटानें चाललेले असतात. पारतंत्र्य विमोचनार्थ प्रयत्न झटले ह्मणजे स्वातंत्र्य संपादनाची खटपट असें निराळें सांगण्याची गरज नाहीं. विचार करण्याची शक्ति ज्यास आहे त्यास पारतंत्र्याचा तिटकारा असलाच पाहिजे. न्यायदेवतेपुढें अवकळेचा खेळ निर्बंधपणें चालणें अशक्य आहे.

आपण मनुष्यें आहों, आह्मांस पारतंत्र्याचा कंटाळा आला आहे. स्वातंत्र्य हवेसें वाटतें. तर तत्प्रीत्यर्थ प्रयत्न केले पाहिजेत. अंधःकार नाहींसा करावयाचा असला ह्मणजे दीप प्रज्वलीत करितो. त्याचप्रमाणें पारतंत्र्याचा काळाकुट्ट काळोख नाहींसा करण्याकरितां ज्ञानदीप त्वरित पेटविले पाहिजेत. आपल्या सभोंवतीं ज्या खळबळी चाललेल्या आहेत त्यांच्याकडे अमळ पाहिलें तर आह्मीं वर सांगितलें त्याची सत्यता लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. प्रकाशाची तीव्रता जितकी जास्त त्या मानानें अंधःकाराची बाधा कमी आणखी ज्ञानप्रसार जितका जास्त तितका पारतंत्र्याचा ताप कमी. अर्थात् स्वातंत्र्येच्छु माणसानीं ज्ञानप्रसारार्थ यथाशक्ति प्रयत्न केले पाहिजेत, ह्यांत वाद नाहींच. आपले इतर देशबंधु ह्या बाबतींत किती खटपट करीत आहेत हें लक्षांत घेतलें तर ह्या बाबतींत आपल्या प्रांतानें स्वीकारलेली तटस्थवृत्ति ह्मणजे जवळ जवळ मृत्यूची आराधनाच होय असें ह्मणणें भाग आहे. आपल्या प्रांतानें असें जें वर ह्मटलें आहे, त्यांत ख्रिस्ती लोकांचा समावेश होत नाहीं. हें स्पष्ट सांगणें अवश्य आहे. राजा कालस्य कारणम् ह्या न्यायानें प्रस्तुत ख्रिस्ती लोकांचें ठीक चाललें आहे. त्यांच्या संबंधानें काळजी बाळगण्याचें कारण नाहीं. विपन्नावस्था चालली आहे ती ख्रिस्ती खेरीज इतर हिंदी लोकांची. आणखी उन्नत्यर्थ प्रयत्न पाहिजे आहेत ते ह्याच निराश्रित लोकांकरितां. प्रजापालनाचा मक्ता ज्यांच्याकडे यदृच्छेनें आला आहे तें सरकार ह्या बाजूकडे पहात नाहीं. स्पष्ट भाषेंत सांगावयाचें असल्यास मुद्दाम उपेक्षाच करितें असें ह्मणण्यास नड नाहीं. राजकीय बाबतींत प्रभुत्व पटकाविलेल्या सरकारची ही गत, तर धार्मिक बाबतींत स्वामीत्व बळकावून बसलेल्या समाजाची बुद्धि त्याहून विपरित. अंतस्थ क्षुद्र कलहांची काथ्याकूट करण्यांत संस्थेच्या शाळा व ज्ञातिवर्गाकडून मिळालेला पैसा त्याचा धूर करण्यांत हे सदोदित दंग. सारांश हिंदुसमाजाची विपन्नावस्था घालविण्याचा मुख्य उपाय जो ज्ञानप्रसार तो करण्याची ताकद किंवा पात्रता उपलब्ध न झाल्यामुळें मोठी खेदजनक स्थिति प्रस्तुत दृग्गोचर होत आहे. ही स्थिति घालविण्यास काय करणें अवश्य आहे, हें जरूर पाहिलें पाहिजे — आपल्या समाजांत विद्याप्रसार करावयाचा ह्मटला ह्मणजे मुख्य अडचण काय ती पैशाची. कोठेंहि झालें तरी हीच अडचण पहिल्यानें उद्भवावयाची. तशांत हिंदुस्थानासारख्या पारतंत्र्यमग्न अतएव कंगाल देशांत ही अडचण मोठ्या प्रमाणानें दिसावयाची. तशा स्थितींतून मार्ग काढावयाचा ह्मटला ह्मणजे कोणा एका विशिष्ट व्यक्तिवर त्याचा भार सर्वस्वी न लादतां सार्वजनिक तिजोरीवर तो खर्च झाला पाहिजे सार्वजनिक तिजोरी ह्मणजे पहिली सरकारची, दुसरी धर्मगुरूंची आणि तिसरी देवालयें किंवा तत्सदृश्य इतर संस्था ह्यांची. सरकार व धर्माध्यक्ष यांची विल्हेवाट वर लागलीच आहे. राहतां राहिली ती देवालयाची तिजोरी. तिचा उपयोग ह्या प्रकरणांत करून घेतां येण्यासारखा आहे कीं काय हें पाहिलें पाहिजे. जर देवालयांची संपत्ति अर्थात् सार्वजनिक पैसा इतर कामांत खर्च करणें शक्य आहे तर शिक्षण दानासारख्या पुण्यकारक कृत्यांत तो खर्च कां होऊं नये? किंवा तसें करणें आह्मास अशक्य कां वाटावें? याची शहानिशा झाली पाहिजे. सरकारी तिजोरीवर आमची सत्ता नाहीं. सुधारलेल्या राज्यांत तसा अधिकार प्रजेस असतो व आपल्या सरकारच्या कायद्याच्या पुस्तकांत तो अधिकार प्रजाजनास असल्याचें स्पष्टपणें नमूद झालें आहे. परंतु व्यवहारांत मात्र तो बजाविण्याचें श्रेय आपणास लाभत नाहीं. ह्मणून तो असून नसून सारखाच आहे. अर्थात तो अधिकार आपणांस नाही ह्मणणें कायद्याच्या दृष्टीनें कसेंहि असलें तरी व्यवहारास व नीतीस सोडून नाहीं. धर्मगुरूंच्या तिजोरीची तर गोष्टच बोलावयास नको. सार्वजनिक लोकाकडून मिळालेल्या वर्गणीनें जरी तिची भरपाई झाली आहे तरी सार्वजनिक हितार्थ तिजकडून कधींतरी कांहीं मिळेल, हे जवळ जवळ असंभवनीय आहे. कां? ह्याचें उत्तर सांगतां येईल. पण तसें करणें प्रस्तुत उचित नसल्यामुळें तत्संबंधीं मौन स्वीकारणें बरेंसें वाटतें. सारांश धर्माध्यक्ष ह्या बाबतींत असून नसून सारखेच आहेत. आशेचा बारीक तंतु दिसतो तो देवालयांच्या तिजोऱ्यांचा. आणखी महाजन मंडळी हें काम मनावर घेईल तर तें सहज साध्य होईल असा भरंवसा आहे. लोकशिक्षणासारखीं सार्वजनिक कामें करणें हें देवालयें व इतर तत्सम संस्था ह्यांचें कर्तव्य आहे असा कायद्यांत स्पष्ट उल्लेख आहे. सरकारचीहि अशीच इच्छा आहे हें ' बेनेफिसेंस ' सारख्या शिक्षणप्रीत्यर्थ बसविलेल्या करानीं चांगलें व्यक्त होतें. आपल्या शेजारच्या ख्रिस्ती समाजांतील यद्विषयक चालीरीतींकडे पाहिलें तर त्या आह्मी ह्मणतों तशाच आहेत असें दिसून येईल. एखादें ख्रिस्ती देवालय उदाहरणार्थ घेतलें तर त्याच्या उत्पन्नाच्या मानानें एक दोन किंवा अधिक शाळा त्या संस्थेच्या खर्चांतून चालतात. उत्पन्नाच्या बाबतींत एखादें देवालय कितीहि गरीब असलें तरी ' दौत्रिन, कांतु ' ह्मणजे आपल्या पद्धतीप्रमाणें बोलावयाचें झाल्यास आन्हिक ब्रह्मकर्म, स्तोत्रें इत्यादि शिक्षण मिळण्याची सोय तेथें अवश्य असावयाची. त्या कामाकरितां निराळा पगारी शिक्षक ठेवण्याची सोय नसल्यास देवाचा जो कोणी पुजारी असेल त्यानें तें काम करावयाचें असतें. देवालयाची सांपत्तिक स्थिति चांगली असेल तर वरील प्रकारच्या शाळा असून शिवाय मुलांमुलींच्या शाळा असतात. ह्या सगळ्या शाळांवर देवालयाच्या मुख्याधिकाऱ्याची देखरेख असते. सरकारचा त्यांत हात नसतो. तरी पण तीं सगळीं व्यवस्थित रीतीनें चालतात. खर्चाच्या बाबतींत गांवच्या ग्रामसंस्थांकडून यथाशक्ति सहाय्य होत असतें. अशाप्रकारें आपल्या समाजांत शिक्षणप्रसार करीत असल्यामुळें ख्रिस्ती समाजाची स्थिति चांगली झाली आहे. आपल्या हिंदुसमाजानें ह्या बाबतींत ख्रिस्ती समाजाचें अनुकरण करणें हितावह नाहीं काय? इतक्या दीर्घकालांत सान्निध्याचा फायदा आह्मीं घेऊं नये काय? इतर निंद्य बाबतींत त्या समाजाचें अंधभक्तीचें अनुकरण करणाऱ्या हिंदुसमाजानें शिक्षणप्रसारासारख्या पुण्यप्रद मार्गांत मात्र त्यांचें अनुकरण कां करूं नये हें समजणें भारी कठीण आहे हिंदीसमाजांत शिक्षणप्रसाराची किती आवश्यकता आहे, हें डोळे उघडून पहाणारास सहज दिसण्यासारखें आहे डोळे असून पहावयाचें नाहीं असा निश्चय आमच्या पुढारू मंडळानें केला असेल तर मात्र गोष्ट निराळी. बाकी आपल्या धर्मबांधवांची किंवा ज्या कोणा पुढारी ह्मणविणाऱ्याच्या मनास येत असेल त्यानें वर सुचविलेल्या मार्गानें खटपट केल्यास थोडें बहुत यश येईल असा पूर्ण भरंवसा आहे. सुशिक्षणाभावानें हिंदुसमाजाची फार दैना करून सोडली आहे. अर्थात तद्विरुद्ध प्रयत्न पाहिजे आहेत ते विराटस्वरूपी, हें खरें तथापि अल्पप्रमाणानें परंतु नेटानें काम चालू झाल्यास कांहीं कालानें पूर्ण यशप्राप्ति होईल, यांत संदेह नाहीं. ' जेवीन तर तुपाशीं, नाहीं तर उपाशीं ' हा न्याय व्यक्तिविषयक व्यवहारांत देखील जर सदैव अमलांत येणें दुरापास्त, तर राष्ट्रीय प्रकरणांत तो कधींच अमलांत येणें शक्य नाहीं. हें विसरतां कामा नये ह्मणून चालू स्थितींत निराश न होतां भावी कालावर लक्ष देऊन आपल्या कर्तव्यास आरंभ करावा. ह्यांत थोरपणा आहे. महत्पुण्य आहे. ब्राह्मण ह्मणविणाऱ्याचें तें एक आवश्यक कर्तव्य आहे. ब्राह्मण्यास आधारभूत मानलेले जे षट्कर्माधिकार त्यांतील शिक्षणप्रसार हा एक होय. तो शक्त्यनुसार — अंशतः तरी — बजावणें हें खरें ब्राह्मण्य होय. कर्तव्यास कसूर करून ब्राह्मण्याचा पवित्रपणा मिरविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. नाटकांच्या रंगभूमीवर क्षणमात्र मिरविलेला बेगडी राजेपणा, किंवा भजनी सप्ताहाच्या रंगलींत गुंग होऊन अंगांत आणलेलें साधुत्वाचें कृत्रिम वारें ह्यांत आणि वरील क्रियाशून्य ब्राह्मण्यांत आजच्या कालांत कोणीहि अंतर मानीत नाहीं.

—"म्हापशें येथें ज्ञानप्रसारक मंडळाच्या कार्यालयांत ता. २४।५।२५ रोजीं सभा भरवून "ज्ञानप्रसारक संघ" स्थापण्यांत आला. रा. सीताराम मणेरकर यांनीं संघाचे उद्देश सांगून रा. तुकाराम कर्पे यांनीं नियम वाचून दाखविल्यावर ते पास करण्यांत आले. नंतर वरील शाळेंतील शिक्षक गदाधर प्रभाकर काकतकर यांचें सुमारें १॥–२ तास सुश्राव्य व्याख्यान झाल्यावर सभेचें काम संपलें" असें एक वर्गणीदार कळवितात.

O BHARAT

O NOSSO "PARTIDO"

A mais grave enfermidade que roi a nossa sociedade é o medo de opinião. Inventam se os mais astutos estratagemas para se ocultar o que se sente, com o medo de que se incorra ou no desagado do governo ou no do povo. São raros os que se atrevem a ser claros, explicitos e desassombrados na sua exposição opinativa, atinente ou á politica governamental ou á politica popular. Procura se, em regra, por artes de berliques e berloques, estar bem com o governo e não estar mal com o povo.

¿Adopta o governo alguma medida que não está de harmonia com os mais legitimos interesses do povo?

Não ha, entre os governamentais, quem analise essa medida oficial *comme il feaut*, dissuadindo o governo do seu precipitado passo.

¿Insurge-se, pelo contrario, o povo contra uma providencia governamental de alto valor patriotico sem procurar aquilatar-lhe a importancia?

Não ha, da mesma forma, entre os populares, quem se mostre suficientemente corajoso para demonstrar em linguagem clara a sem—razão do clamor popular.

Do que resulta defenderem *á outrance* os governamentais o governo e os oposicionistas deste o povo: os governamentais adoram com fé cega e fanatica o seu *deus* que é o governo e os populares incensam, incondicionalmente, o seu santo de casa que é o povo.

Em resumo: tanto os governamentais como os populares se abstem de, calculadamente, ser claros nas suas opiniões, com o medo de que a franquesa lhes esmoreça a simpatia dos seus adorados.

Precisamente, é o medo de opinião que tem sido e continua sendo a causa principal se não unica de haver excessos numa e noutra banda da politica do Paiz. No exterminio desses excessos ou antes no seu equilibrio é que reside a salvação da nossa politica equilibrio que só poderá provir da franquesa opinativa.

Bem sabemos que o povo costuma apodar de *engraxador* quem tente substentar algum acto governativo, assim como que o govêrno odêa quem se afoite a opôr-lhe resistencia.

A verdade, porem, é que *in medio stat virtus*; e, porisso, incumbe ao governamental o imprescindivel dever de, dada a ocasião, criticar o governo sem fazer caso dos prejuizos que da sua desassombrada atitude lhe possam advir e toca ao populiar a sacrosanta obrigação de levantar a venda de sobre os olhos do povo, sem, igualmente, fazer caso de que, com este seu procedimento, incorra no desagrado popular.

Do exposto ressalta nitido que para a felicidade de todos nós convem, antes de tudo, que o ferrenho governamental seja, mais que tudo, patriota como patriota tem que ser o popular, votando cada um ao ostracismo as suas conveniencias ...oficiais. ou politico - partidarias

Atacar o governo com olhos fechados *sem distinguir o bem do mal* é tão perigoso como defende-lo, da mesma forma como o é atacar e defender as chamadas regalias populares sem criterio justo e imparcial e, por tanto, patriotico.

O *Bharat* segue, invariavelmente, esta norma: ele não pertence nem ao governo nem ao povo, ou antes êle é tanto do governo como do povo, isto é, do Paiz cujo progresso é a sua unica preocupação. Noutras palavras quere isto dizer que o *Bharat* é uma especie de *sole agency* de todas as transacções politicas que dêem em resultado o bem do Paiz que estremecemos.

Eis a nossa resposta á pergunta que em carta registada nos dirigiu *Um Patriota*, desejoso de saber em que agrupamento está militando o nosso jornal.

Sim, o *Bharat* está batalhando no único partido que se chama do *Bem patriotico*.

Desfazendo petas . . .

Ha de tudo na nossa India. A par dos campos agricolas duma fertilidade exuberante, existem tambem *campos* religiosos e literarios duma erudiçao verdadeiramente pasmosa.

Um deles e' o sr. Pe. A. L. Campos. Sua reverencia que tem feito de *O Heraldo* um *campo* para *plantar* toda a sorte de opinioes, nunca se esquiva a exaltar o catolicismo e depreciar *pari passu* o hinduismo que lhe e' adverso.

O sr. Campos e', numa palavra, um agricultor catolico dos mais distinctos sendo, porisso, a nosso ver, digno da *millior* comenda de Cristo.

Sua reverencia, como agricultor distincto que e', sabe igualmente, tirar proveito em prol da sua *cultura* dos elementos da Natureza. E assim, o sr. A. L. Campos lançou no seu *campo* — em *O Heraldo* de 5 do corrente mez de junho, ao cair das primeiras chuvas, a seguinte *semente* de ... discordia:

"Nao e', pois, sem mais profunda e dolorosa impressao que vemos so' na India britanica levantarem-se a cada passo orfanatos, catecumenatos, asilos, escolas, colegios de educaçao accessiveis a's classes mais disfavorecidas sem distincçao de cor, de casta ou de religiao, dirigidas por corporaçoes religiosas dum e outro sexo, enquanto que na nossa India, temos apenas raras escolas primarias ou antes simulacros de escolas, sem mobilia, sem livros, regidas por professores mesquinhamente retribuidos (por 19 rupias ao mez); temos a educaçao e instruçao da mulher completamente abandonada; temos finalmente provincias inteiras como as Novas Conquistas *tao barbaras, tao rudes, tao ignorantes*, como quando dominadas pelos raja's e bounsolo's servindo apenas de *valha-couto de salteadores* que trazem em continuo sobressalto as *pacificas* (!) e *laboriosas* (!) povoaçoes das Velhas Conquistas,"

Por felicidade nossa, o ilustre *servo do Senhor* fala so' da India, porque *a conhece*, como bem o afirma no referido diari em que vem publicado o seu artigo, subordinando ao titulo de — O PROBLEMA DAS MISSOIS DO ULTRAMAR.

¿Que diz o leitor a' prosa catolica da catolica pena do sr. Campos?

Admiravel, nao e' verdade?

Pois, sim, senhores. A catolica prosa do catolico Campos e' admiravel, nao pelas verdades que ela nao contem nenhuma, mas pelos deslatados mentiras que encerra.

Pois que! ¿Sao *barbaras* as Novas Conquistas que, conservando o seu hinduismo do tempo dos raja's e bounsulo's, forneceram a diversos estabelecimentos de instruçao publica jovens que se distinguiram neles pela sua inteligencia e trabalho? ¿Sao *rudes* e *ignorantes* elas que deram e dao ao Estado os melhores empregados? Constituem, finalmente, as mesmas terras "valha couto de salteadores que trazem em constante sobressalto as pacificas e laboriosas povoaçoes das Velhas Conquistas," elas que abrigam no seu seio dezenas e dezenas de instituiçoes de propaganda educativa e instructiva da iniciativa particular?

Evidentemente, o sr. Campos nem *de vista* conhece as N. Conquistas. Se as conhecesse, nao avançaria, certamente, o que levianamente afirmou ...no auge de histerismo...catolico.

¿Nao conhece sua reverencia a historia das "conquistas prediais," emprendidas nas Novas Conquistas pelos *batcara's* das Velhas, empresas em que esses *influentes* puzeram em jogo toda a casta de *chicanas, falsos crimes de fogo posto* e outras barbaridades que o mais feroz espirito de banditismo e' incapaz de arquitectar?

Fique, pois, o sr. Campos sabendo duma vez para sempre: foram as Velhas Conquistas nas pessoas dos seus "catolicos batcar's" que trouxeram e trazem em "continuo sobressalto as pacificas e laboriosas povoaçoes das N. Conquistas" e nao o contrario. Se se der ao incomodo de prescrutar o que ha de verdade nas "conquistas prediais" de Maem, Ponchovadi, Valvona, Cotarli, Curdi, Netorlim, Canvorem, Molcornem e de varias outras partes das N. Conquistas, — promovidas pelos "batcara's" das Velhas, terá o padre elementos seguros para, arrependido, pernitenciar-se do pecado cometido e convencer-se de que as Novas Conquistas sao, sim, valhacouto, mas dos "salteadores" das Velhas Conquistas.

E como a bom entendedor "meia palavra" e' bastante, parece-nos que o que dissemos deve ser mais que suficiente para o sr. Campos por freio a sua ma' lingua. Se, porem, sua reverencia quizer ouvir mais "belesas" das N. Conquistas e' so pedir-nos por bocca que sempre lhe estaremos a's ordens.

O BHARAT

Terça feira ultima, o nosso director prestou no juizo de direito desta comarca declaraçoes no processo crime motivado pelo artigo SECULOS DEPOIS...

Hegdo' Dessai assumiu a responsabilidade do artigo incriminado, o que de resto, e' desnecessario dizer aqui.

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा॥

मिति ज्येष्ट वद्य ५ मी शके १८४७

एका पाद्र्याचें भरमसाट तर्कट

गोमांतकीय पाद्रीवर्गांतील एक पाद्री, पा. आ. एल कांपूस यांची लेखक या नात्यानें पुष्कळांस माहिती असेल. आपल्या ख्रिस्ती धर्माचा बडेजाव वागविणें, त्याची महति सांगणें व इतर धर्म विशेषतः हिंदु धर्म आणि तदनुयायांस वरचेवर तुच्छ लेखून त्यांची नालस्ती करणें हा विषय त्याच्या फार आवडीचा असून त्या निमित्तानें येथील अनेक पोर्तुगीज पत्रांतून निरनिराळ्या मथळ्याखालीं ते लिहीत असतात. मथळ्यांतील शब्द निरनिराळे असले तरी विषय प्रतिपादन एकाच स्वरूपाचें असतें. गेल्या दोन वर्षांपूर्वी हिंदुधर्मासंबंधीं त्यांनीं केलेलीं कुत्सित विधानें आणि त्यांबद्दल पणजी येथील प्रो कृष्णराव गणपत केणी यानीं त्याचा "फाईस्क" नांवाची पत्रमालिका प्रसिद्ध करून घेतलेला खरपूस समाचार पोर्तुगीज व मराठी वांचकांच्या आठवणींतून गेला नसावा. परंतु पाद्री कांपूस हे इतके चिवट व निगरगट्ट आहेत कीं, तोंडावर चपराक बसली तरी ते आपलें पवित्र ख्रिस्तीधर्मप्रसाराच्या सात्विक नावांखालीं हिंदु र्म व हिंदुसमाज यांवर तोंडसुख घेण्याचें तामसी कार्य लेखणीच्याद्वारें करीतच आहेत. गेल्या ५ तारखेचा "उ येराल्द"चा अंक उघडला आणि त्यांच्या खास सहीनें प्रसिद्ध झालेला लेख वाचला तर आमच्या ह्मणण्याची साक्ष सहज पटेल.

त्या लेखांत इंग्रजी हिंदुस्थानांत व फ्रेंच हिंदुस्थानांत निरनिराळ्या युरोपियन, अमेरिकन ख्रिस्ती मिशनामार्फत चाललेल्या लोकहितकारक व ख्रिस्ती धर्मप्रसारक कामगिरीचें वर्णन करून पा. कांपूस पुढें ह्मणतातः– "अशा तऱ्हेचा उपक्रम दुर्दैवानें पोर्तुगीज हिंदुस्थानांत दिसत नाहीं, येथें कोठें मोडक्या तुटक्या व १९ रुपये पगाराच्या शिक्षकानीं चालविलेल्या शाळा [फाद्रीकानीं चालविलेल्या] दिसत असल्या तरी त्या फार अपुऱ्या आहेत. नवीन काबिजादींतील एकूणएक महालांत तर पूर्वी भोंसले वगैरेंच्या काळीं जो रानटीपणा, खुनशीपणा, लुटारूपणा वगैरे दुर्गुण दिसत होते ते अद्यापहि त्याच स्थितींत आहेत व त्यामुळें सुखांत व शांतीत वावरणाऱ्या जुन्या काबिजादीस त्यांचा उपसर्ग होत असतो. इ.'

पा. कांपूस यांच्या लेखांतील सारांशरूपानें वर दिलेला उतारा पाहिला तर सकृतदर्शनीं त्यांत ख्रिस्ती धर्माची महति व हिंदुधर्माची निंदा असेल असें कोणास सहसा वाटणार नाहीं, आणि ह्मणूनच त्यांच्या लेखावरील शुभ्र पडदा बाजूस सारून गर्भितार्थ उघड करून दाखविणें आह्मांस भाग आहे.

आज **गोवा** या नावांनें ओळखला जाणारा हिंदुस्थान देशाचा भूभाग पोर्तुगीज साम्राज्याच्या ताब्यांत असला तरी त्याचे जुनी काबिजाद व नवी काबिजाद असे साधारणतः दोन विभाग मानण्यांत येतात. तिसवाडी, साश्टी व बारदेश हे तीन महाल जुन्या काबिजादींत व इतर सर्व महाल नव्या काबिजादींत मोडत आहेत. हे विभाग मानण्याचें कारण त्यांच्या नांवावरूनन समजू येतें. सन १५१० त गोवा या नावांनें ओळखण्यांत येणारा तिसवाडी महाल पोर्तुगीजांच्या ताब्यांत पूर्णपणें गेल्यावर कांहीं वर्षानीं साश्टी व बारदेश महाल त्यानीं आपल्या राज्यास जोडले थोडें स्थिरस्थावर झाल्यावर ह्मणजे आतां आपलें बस्तान नीट बसलें असें वाटूं लागल्यावर सोबतच्या पोतडींतील धर्मप्रसाराचें कार्य करण्यास पोर्तुगीजानीं सुरवात केली. धर्मप्रसाराचें पवित्र कार्य करितानां पोर्तुगीजानीं जीं जीं कृष्ण कृत्यें केलीं त्यांस इतिहासांत तोड नाहीं व यामुळेंच जगांत त्यांची फार मोठी बदनामी झाली व अद्यापहि तो कलंक धुवून जाण्याइतकें सत्कृत्य त्यांच्या हातून घडलें नाहीं आणि पुढें कधींकाळीं घडेल असें ह्मणवत नाहीं. पोर्तुगीजांनीं धर्मप्रसारार्थ जो अनन्वित जुलूम केला त्यास बळी पडून अनेक हिंदु कुटुंबें ख्रिस्ती झालीं; कांहींनीं देशत्याग केला व कांहींनीं इहलोक सोडून परलोकाची वाट धरली. देशत्याग केलेलीं कांहीं हिंदु कुटुंबें आज नवीन काबिजाद ह्मणतात त्या परमुलखांत येऊन राहिलेलीं, तो मुलुख सुमारें दोनशें वर्षांनंतर पोर्तुगीजांच्या ताब्यांत गेला तरी तेथेंच कालक्रमणा करीत आहेत.

बाटाबाटीची धामधूम ओसरल्यानंतर व्यापार उद्योगाच्या निमित्तानें कांहीं हिंदुलोक जुन्या काबिजादींत जाऊन राहिले तरी तेथील बहुजन समाज ख्रिस्त्यांचाच आहे हें विसरतां येत नाहीं. त्याचप्रमाणें नव्या काबिजादींत नोकरी, शेती वगैरेंच्या निमित्तानें स्थायिक झालेलीं ख्रिस्ती कुटुंबें दिसत असलीं किंवा दुष्काळ रोगांच्या सांथी यामुळें गांजलेल्यांस फुसलाऊन अथवा लालूच दाखवून पाद्री लोक व त्यांचे अनुयायी त्यांत भर घालीत असले तरी येथील बहुजन समाज हिंदूंचाच आहे हें डोळ्याआड करतां येणार नाहीं. तात्पर्य जुनी काबिजाद ह्मणजे ख्रिस्ती समाज, ख्रिस्ती धर्म व ख्रिस्ती संस्कृति यांचें स्थान आणि नवी काबिजाद ह्मणजे हिंदु समाज, हिंदु धर्म व हिन्दी संस्कृति यांचें स्थान, असें अनुमान काढण्यास प्रत्यवाय नाहीं. याच अनुमानावर भर देऊन नवीन काबिजादीवर असलेला हिन्दुधर्मीयांचा कमी अधिक ताबा काढून घेण्यास ख्रिस्ती समाजांतील बरेच लेखक बहाद्दर आजकाल टपलेले आहेत. मार्जोडें येथें प्रसिद्ध होणारें "आ इंदिय पोर्तुगेज"या पत्राचे कर्ते तर त्यांत अग्रेसर असून नवीन काबिजादीची सुधारणा होण्यास तेथें ठिकठिकाणीं लहानग्या चर्चे capelanias स्थापून त्यांवरील पाद्रींच्या हातांत लोकशिक्षणाचें व इतर हरेक सुधारणांचें कार्य सरकारनें सोंपविलें पाहिजे असें त्यांचें ह्मणणें आहे. वरील लेखन बहाद्दरांपैकींच पा. कांपूस हे एक आहेत हें फिरफिरून सांगण्याची गरज नाहीं. त्यानीं नवीन काबिजादीसंबंधी केलेलें वरील विधान हिन्दु समाजासच लागू असून रानटीपणा, खुनशीपणा, लुटारूपणा सारखे आरोप लादण्यांतहि त्यांचा "आ इंदिय पोर्तुगीजकारां"सारखाच निंद्य व स्वार्थी हेतु आहे हें कोणीहि सांगू शकेल.

नवीन काबिजादींची नाडी न धरतां पा. कांपूसनें केलेलें हें निदान सरकारी बातावरणांत दुमदुमत राहिलें तर पुढेंमागें याच वैद्यबुवांकडे नवीन काबिजादीच्या रोगमुक्ततेसाठीं धांव घेणें अपरिहार्य आहे. अशा रीतीनें घरबसल्या चिकित्सा करण्याची सुसंधि प्राप्त झाली तर हे वैद्यराज पाद्रीबुवा हटकून रामबाण उपाय सांगतील कीं, नवीन काबिजादीची वरील रोगांपासून मुक्तता व्हावी आणि तीजपासून जुन्या काबिजादीस उपसर्ग पोंचूं नये असें वाटत असेल तर तेथें ख्रिस्ती धर्मप्रसार करा. ख्रिस्ती धर्माचा नवीन काबिजादीनें स्वीकार केला कीं वरील रोगांचें क्षणांत निर्मूलन होईल वगैरे वगैरे. हे सर्व विचार त्यांच्या पेशास साजेसे असतील! नाहीं कोणी ह्मणावें ? परंतु नवीन काबिजादीपासून जुन्या काबिजादीस उपसर्ग पोंचतो या त्यांच्या ह्मणण्यास आधार कोणता हेंच मात्र समजत नाहीं.

डोंगरी प्रदेशानीं व्यापलेल्या नवीन काबिजादी सरकारच्या विषम धोरणामुळें ह्मणा किंवा हेळसांडीमुळें ह्मणा देशी शिक्षणाचा निदान सरकारमार्फत चालत असलेल्या फिरंगी शिक्षणाचा प्रसार झाला नाहीं ह्मणून खालच्या जातींत जो अडाणीपणा दिसून येतो, त्याचा फायदा जुन्या काबिजादींतील बड्या बड्या ख्रिस्ती भाटकारानीं पुरेपूर घेऊन, तेथील मोठमोठ्या सुपीक जमिनी आपल्या घशाखालीं उतरविल्या आहेत. त्या सर्व प्रकरणाचा इतिहास देऊं गेलों तर तो एक स्वतंत्र ग्रंथच होईल. येथील हायकोर्टाचे सरन्यायाधीश दो. नोंरोंन्य यानीं आपल्या "आ रेपुब्लिक आणि गोमांतकस्थ हिंदु"या पुस्तकांत ज्याप्रमाणें मागील काळीं पाद्रींनीं केलेलीं कृष्णकृत्यें उघडकीस आणलीं आहेत, त्याचप्रमाणें वरील बड्या भाटकारांचीं बडीं कृष्णकृत्यें चव्हाट्यावर आणावीं लागतील पण तीं दिसण्यांत खासगी स्वरूपाचीं वाटत असल्यामुळें इतक्यांत देण्याचा उतावळीपणा आह्मीं सध्या करीत नाहीं. जुन्या काबिजादींतील ख्रिस्ती लोक नव्या काबिजादींत शिरून तेथील लोकांस त्यानीं कसें धुळीस मिळविलें, कोर्टांत न्यायकोर्टांत जाण्यास कसें भाग पाडलें, खोटे आरोप त्यांवर लादून त्यांस कोणकोणत्या आपत्तींत लोटून दिलें याची माहिती जर पा. कांपूस व त्यांचे सहकारी यांस हवी असेल तर त्यानीं मर्ये, पंचवाडी, शेळवण, कोठार्लीं, कुडीं, नेत्रावळी, कांवरें, मळकर्णें वगैरे सारख्या जुन्या काबिजादींतील बड्या भाटकरांच्या ताब्यांत असलेल्या जमिनींच्या गावीं दौरा काढून अवश्य ती माहिती घ्यावी ह्मणजे त्यांचे हे सहधर्मचारी नवीन काबिजादीवर टोळधाडीप्रमाणें कसे आदळले आहेत व अद्याप कसा हल्ला करीत आहेत हें समजून येईल. जुन्या काबिजादींतील कालसांव घालणाऱ्या, तोंडानें फुडेनापुर मालक्रीयाद देफि रंगी अपशब्द उच्चारणाऱ्या व मंचिलांत बसून आपल्याच धर्मांच्या नवीन काबिजादींतील आदमिनिस्त्रादोरांकडे येरझारा घालून गरीब हिंदु लोकांस कैद करण्यास लावण्याची ताकद असणाऱ्या ख्रिस्ती भाटकारांचें नवीन काबिजाद ह्मणजे एक खरोखरीच चरावयाचें कुरण होतें. आतांशा कुठें त्यांची डाळ शिजेनाशी झाली आहे ह्मणून आतां तेच लोक लुटारूपणाचा, खुनशीपणाचा छाप नवीन काबिजादीच्या कपाळीं मारून आपण भोळे साव होऊं पहात आहेत. त्याचा खरेपणा समक्ष व अप्रत्यक्ष येऊन पहाण्याचें आणि नवीन काबिजादीचा उपसर्ग जुन्यास होतो कां जुन्या काबिजादीचा उपसर्ग नवीनास होतो याचा खराखुरा ख्रिस्तदेवास स्मरून निकाल देण्याचें आव्हान पा. कांपूस व त्यांचे समव्यवसायी सहाकारी यांस केल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं.

"सोनारानेंच कान टोंचले"

ब्रिटिश हिंदुस्थानांतील परदास्य–विमोचनार्थ सुरू असलेल्या चळवळीला वेळीं अवेळीं नाकें मुरडणाऱ्या शिष्ट लोकांचे कान पिरगळण्यास त्यांच्यांतीलच एखादा प्रतिष्ठित अनुयायी पुढें आला पाहिजे होता, अशी आमची फार दिवसांपासून इच्छा होती. सुदैवानें ही जुनी इच्छा एका [illegible] लेखकानें 'उ येराल्दांत' लेख लिहून तृप्त केली आहे, हें येथें नमूद करण्यास फार समाधान वाटतें. 'जुवाव सार्तोर' असें त्या लेखकाचें नांव असून, त्यानें शेजारच्या चळवळीवर गोमांतकाचा राजकीय मोक्ष कसा अवलंबून आहे याचें थोडक्यांत पण यथासांग वर्णन केलें आहे. शेजारच्या मुलखांत चालत असलेल्या चळवळीच्या सूर्याचीं किरणें येथपर्यंत फांकल्यानें, अज्ञानाच्या निबिड अंधःकारांत चोरत पडलेली गोमांतकस्थ जनता आळेपिळे देऊन कशी उठत आहे, ह्याचीहि मुद्देसूद चर्चा सदर्हू लेखकानें अत्यंत निर्भिडपणें केली आहे.

——

म० गांधींचे लेख

रयतेचीं दुःखें

माझ्या बंगाल्यांतील दौऱ्याची जसजशी प्रगति होत आहे तसतशी मला मिळणारीं मानपत्रें जास्तजास्त व्यवहारिक स्वरूपाचीं होत आहेत. माझी व माझ्या कार्याची स्तुति त्यांत असण्याऐवजीं तीं बोधप्रद व महत्वाच्या माहितीनें भरलेलीं अशीं होत चाललीं आहेत. तिपेरा रयत संघाचें मानपत्र अशाच प्रकारचें होतें. त्यांत हीं अर्थपूर्ण वाक्यें होतीं.

'तिपेरांतील रयत–अर्धपोटी, अर्धनग्न, रोगी व अशिक्षित असलेली रयत–सर्वांत ज्यास्त दुःखी आहे हें आह्मांला आपणास सांगावयाचें आहे. आह्मीं लोकांस लागणाऱ्या धान्याची लागवड करणारे आहोंत व ह्मणून आमच्याकडे सदय दृष्टीनें पहाण्यांत आलें पाहिजे, परंतु आमच्या बाबतींत प्रत्येक दृष्टीनें सर्वांत जास्त निष्काळजीपणा दाखविण्यांत येतो. आह्मीं जवळ जवळ शेंकडा नव्वद लोकांचे प्रतिनिधि आहोंत, ह्मणजे तिपेरा ह्मणजे रयत असें खरोखरीच ह्मणतां येईल, आह्मांला फक्त सहा महिने शेतकीचें काम असतें व ह्या मुदतींत आह्मीं रात्रंदिवस काम करीत असतों, परंतु बाकीच्या सहा महिन्यांत पोट भरण्याचा कोणताच उद्योग नसल्यामुळें आमची उपासमार होत असते. धान्याचा लहान व नेहमीच अपुरा असलेला पुरवठा संपून गेल्यावर अन्नसामुग्री विकत घेण्यास आमच्या जवळ पैसे असत नाहींत व मग आह्मांला व्याजबट्टा करणाऱ्या लोकांचा आश्रय करावा लागतो; आह्मांला मदत करण्यास गावांत 'रायफिसेन' पद्धतीच्या पेढ्या (युरोपांतील कित्येक भागांत, विशेषतः फ्रान्ससारख्या देशांत असलेल्या व सहकारी तत्वावर चालविलेल्या खेड्यांतील पेढ्या) येथें नसल्यामुळें हे आमच्याकडून पैशाच्या किंवा धान्याच्या रूपानें जब्बर व्याज वसूल करतात. ह्याचा परिणाम असा होतो कीं, कर्ज फिटवतां न आल्यामुळें आपल्या जमिनी ह्या लोकांस व धान्याच्या पैदाशींत संबंध नसलेल्या व फक्त पैसे मिळविण्यासाठींच येथें असलेल्या मध्यस्थांस विकाव्या लागतात. ह्यामुळें आह्मीं स्वतःची जमिन व हक्क नसलेले मजूर बनतों व बायकापोरांसह उपासानें मरतों. आमच्या ह्या हालाच्या दृश्यानें आपलें हृदय कळवळेल. आमच्या जमिनींत ताग मिळतो हें खरें आहे. त्याची किंमत तो पिकविणाऱ्यानें ठरवावयाची असा नियम आहे. परंतु कोणत्यातरी चमत्कारिक कारणामुळें तागाची किंमत ठरविणें परकी व्यापाऱ्यांच्या व मध्यस्थांच्या पूर्णपणें हातांत असतें व त्यामुळें त्याच्या पैदासीला देणाऱ्या खर्चाचीसुद्धां पुरेशी भरपाई होणार नाहीं अशा किंमतीनें आमचें पीक आह्मांला विकावें लागतें."

"ह्या जमिनीवर आह्मीं दस्त भरतों त्या जमिनीवरील झाड तोडण्यास आह्मांला मोकळीक नसते; व पिण्याच्या पाण्याच्या अभावानें आमचीं मुलेंमाणसें व आह्मीं तहानेनें मरत असलों तरी विहिरी खोदण्याची परवानगी आह्मांला मिळत नाहीं. चरखा चालविण्याचें शिक्षण न मिळाल्यामुळें तो घरगुती धंदा होऊन बसलेला नाहीं. व त्यामुळें शेतांतील काम नसलेल्या बेरोजगार माणसांना तो फिरविण्याची सोय राहिलेली नाहीं. ह्या गोष्टीकडे आपण कृपा करून कॅांग्रेसकार्य करणाऱ्यांचें लक्ष्य वेधावें. दिवाणी कज्ज्यांच्यापायीं आह्मां रयतेचा नाश होत आहे. सध्याची जमिनधारा पद्धति, रयतेला नाडून त्यांनां स्थानभ्रष्ट करण्यासाठीं व मोठ्या श्रीमंत लोकानां रयतेला कज्ज्याच्या पेंचांत आणण्यास समर्थ करण्यांसाठीं अस्तित्वांत आणलेली आहे."

"तिपेराच्या रयतेला मदत करण्यासाठीं शक्य ते सर्व प्रयत्न करण्याची विनंति, त्यांच्यातर्फें आपणास आह्मीं करीत आहोंत. आपल्या उदात्त उदाहरणानें समवृत्तीच्या कित्येक माणसांना तें गिरविण्याची प्रेरणा झालेली आहे व फार दूर नसलेल्या काळीं खरी मदत मिळेल अशी आशा आह्मांला वाटत आहे."

सुरवातीचीं व शेवटचीं निरुपयोगी विशेषणें असलेलीं नेहमींच्या पद्धतीचीं वाक्येंच फक्त [ह्या मानपत्राच्या मजकूरांतून] मी गाळलीं आहेत, हें आश्वासन वाचकांस मला दिलें पाहिजे. वरील विधानांत अतिशयोक्ति आहे असें मानण्याची माझी तयारी आहे. परंतु एकंदरींत त्यांच्या दृष्टीनें रयतेची स्थिति योग्य रीतीनें त्यांत मांडलेली आहे असें ह्मटल्याखेरीज मला रहावत नाहीं. ह्या विधानांतील अत्यंत महत्वाचा भाग सहा महिन्यांच्या बेरोजगारी संबंधीचा आहे. आपल्या अतिशय लहान शेतांत बरेच लोक सहा महिने मेहनत करतात व बाकीच्या सहा महिन्यांत आपल्या गावांपासून दूर असलेल्या कारखान्यांत मजुरी करतात. त्यांच्या दुःखकहाणींतील पहिली जागा साहजिकच ही बेरोजगारी अडवून बसते. हें तीक्ष्ण बुद्धिच्या वाचकांच्या नजरेस येईलच. त्यांत उल्लेख केलेल्या दुसऱ्या विपत्तीचें मुख्यतः हेंच कारण आहे. सबंध वर्षभर चालणारें असें काम घरच्याघरींच मिळाल्यास पैसे उसने देणाऱ्या माणसांकडे धांव घेण्याची पाळी त्यांच्यावर येणार नाहीं. जर त्यांना कांहीं पैसे सांठवितां आले तर दुसऱ्या लोकांनीं सांगितलेल्या दरानीं तागाचीं पिकें विकण्याची पाळी त्यांच्यावर येणार नाहीं. सहा महिने उद्योग धंद्यांत घालविल्यास त्यांच्या आयुष्यांत क्रांति घडून आलीच पाहिजे.

पण आपणांस सूत कांतता येत नाहीं असें ते ह्मणतात. ही गोष्ट लक्षांत घेण्यास कॅांग्रेस कार्य करणाऱ्या माणसांस मी सांगावें अशी त्यांची इच्छा आहे. कॅांग्रेसचें कार्य करणाऱ्यांच्या मनावर चरख्यावरील माझा विश्वास व तो यशस्वी करण्याची दृढ इच्छा बिंबवितां आल्यास मला धन्यता वाटेल. अर्थांतच, लोकांचे प्रतिनिधि ह्मणून त्यनीं लोकांत मिसळून चरख्याचा संदेश त्यांच्याकडे पोंचविला पाहिजे. हा संदेश त्यांच्याकडे पोचविण्यांत व त्यांना सूत कांतण्यास लावण्यांत त्यांच्याविषयींच्या बऱ्याच गोष्टींचें त्यांना आपोआप ज्ञान होईल व त्यांच्या सुखदुःखांत वाटेकरी होतां येईल. पिकांवर जशी टोळधाड उतरते तसें कॅांग्रेसचें कार्य करणाऱ्यानां खेड्यांवर उतरता येणार नाहीं. परंतु जनतेच्या गरजा समजावून घेऊन त्यांची स्थिति सुधारण्यास मदत करण्यासाठीं प्रेमभावनामय संदेशवाहक ह्मणून यांनीं त्यांच्याकडे गेलें पाहिजे. चरख्याचा प्रसार करण्यासाठीं तेथें घेऱ्यावर तसें करण्याऐवजीं दुसरी कोणती तरी मदत करणें त्यानां आवश्यक वाटल्यास मला मुळींच आश्चर्य किंवा अस्वस्थता वाटणार नाहीं. त्यानीं खेड्यांत जाऊन तेथें सेवक बनून राहिलें पाहिजे. खेड्यांत जाऊन काम करणें आवश्यक आहे असें मला भेटलेला प्रत्येक माणूस सांगतो, पण फार थोडे हें काम खरोखरीच करतात. कार्य करण्यासाठीं खेड्यांत जाणाऱ्यांपैकीं बहुसंख्यांक लोकांना चरखा सेवेचें योग्य साधन असल्याचें आढळून येतें. परंतु खेड्यांची संख्या सात लाख, आहे व खेड्यांत खरे कार्य चालविणारे सातशें लोक सबंध हिंदुस्थानांत नसतील. रयतेचें हें मानपत्र ह्मणजे आह्मांला दिलेला दोष व आठवण करून देणारी एक गोष्ट आहे. खेड्यांत काम करणाऱ्या माणसाची पुरेशी संख्या जमविल्यावर स्वराज्याचा विचार करण्याची वेळ येऊन ठेपेल.

अद्भुत चमत्कार

ब्रह्मदेशांत पाच वर्षांपेक्षांहि लहान असें 'टुन झिनी' ह्या नांवाचें एक मूल आहे. त्याला जेव्हां व्यासपीठावर बसविण्यांत येतें. तेव्हां त्याच्या मध्यें असलेल्या अद्भुत शक्ति स्फुरं लागतात ! तो तास तास, दीड दीड तासपर्यंत व्याख्यानें देत असतो. गेल्या १८ 'मे'ला धार्मिक, नैतिक व सामाजिक कायदे पाळण्याविषयीं त्यानें श्रोतृवृंदाला कळकळीचा उपदेश केला आणि बुद्धधर्माचीं तत्वेंहि त्यानें जोरदार भाषेंत पटवून दिलीं. पाली भाषेंतील एक हस्तलिखित ताडपत्र त्यास वाचावयास दिलें असतां त्यानें तें तात्काल वाचून दाखविलें. अशींच दुसरींहि ताडपत्रें त्यास वाचावयास दिलीं असतां त्यचाहि अर्थ त्यानें ब्रह्मी लोकांना अगदीं साध्या आणि सोप्या शब्दांत–कोणत्याहि प्रकारचा कृत्रिमपणा न आणतां–विशद करून दाखविला ! परमेश्वराची कृपा अगाध आहे! हा चमत्कार पाहून वयाच्या पांचव्या वर्षींच श्री आद्यशंकराचार्यांना वेदशास्त्रें मुखोद्गत येत असत असें जें ह्मणतात, तें खोटें आहे असें ह्मणण्याची कोणाची छाती आहे ?

सरकारी वर्तमानपत्र

BOLETIM OFICIAL.

वरील नावांचें सरकारी वर्तमानपत्र [ज्यास इंग्रजींत सरकारी ग्याझेट ह्मणतात] सन १८३७ ह्या वर्षी प्रसिद्ध होऊं लागलें. तें पहिल्यानें साप्ताहिक होतें. सन १८४१ पर्यंत तें तसेंच प्रसिद्ध होत होतें. १८४२ वर्षाच्या पहिल्या पांच महिन्यांत तें द्विसाप्ताहिक झालें. पुढें पहिल्याप्रमाणेंच ह्मणजे साप्ताहिक चालू राहिलें. १८८० आगष्ट महिन्याच्या १२ मितीच्या हुकुमान्वयें त्रिसाप्ताहिक व्हावें असें ठरलें. १८८२ पासून १८८७ पर्यंत दैनिक झालें. पुढें १८८८ पासून १८९७ पर्यंत त्रिसाप्ताहिक झालें. आणि १८९८ पासून आज तागायत द्विसाप्ताहिक आहे. १८३७ पासून १८७८ पर्यंत Boletim do Governo असें त्याचें नांव होतें. तें १८७९ सालीं बदलण्यांत येऊन त्यास प्रस्तुतचें Boletim oficial हें नांव देण्यांत आलें. ह्या दोन्हीं नावापूर्वी Cronica constitucional ह्या नावांचें सरकारी पत्र कांहीं काळ चाललें होतें. पहिल्या पहिल्यानें ह्या पत्रांत सरकारी कामदारांची हालहवाली शिवाय ठिकठिकाणच्या धारा, परदेशांतील महत्वाच्या बातम्या, इंग्रजी हिंदुस्थानांतील खबरा, परदेशीय प्रसिद्ध वर्तमानपत्रांतील महत्वाच्या लेखांचीं भाषांतरें, शास्त्रीय माहिती इत्यादि लेख सरकारमार्फत प्रसिद्ध होत असत. शिवाय जुन्या फिरंगी दप्तरांतील कागदपत्र समयविशेषीं छापून येत. जाहिरातीला शेवटचें पृष्ठ मुकर केलें होतें. ह्याखेरीज विशेष महत्वाचा पत्रव्यवहार पुरवणीच्या रूपानें प्रसिद्ध होत असे. आतां तें धोरण साफ बदलण्यांत आलें आहे. कामदार व इतर सरकारी हालहवाल व जाहिराती याखेरीज कोणतीच माहिती प्रसिद्ध होत नाहीं पूर्वी मुखपृष्ठावर तीन ओळीचा मराठी शेरा होता, तोही १८८९ पासून काढून टाकला.

गोळीबार !

अलवार संस्थानच्या हुकूमाविरुद्ध निषेध करण्यांत आल्यावरून, सदरहू संस्थानांतील नामचीणा गावांत गोळीबार करण्यांत आला. हा गोळीबार एकसारखा ४० मिनिटें चालू होता. संस्थानिकाचा घुस्सा इतक्या परमावधीला पोंचला होता कीं, त्यानीं सबंध गावच्या गावांला आग लावण्याचा हुकूम फर्माविला व बायका मुलांच्या आरोळ्यानीं वातावरण दुमदुमून गेलें असतांहि अशा असहाय्य जीवाचा मर्द शिपाई गड्यांनीं निर्दयपणें जीव घेण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं. सहाशें प्रेतें नदींत फेंकण्यांत येऊन, यांनीं पुरलेल्या प्रेतांची तर गणतीच नाहीं. या अमानुष कृत्यांचा संस्थानिकाना जाब द्यावा लागतो किंवा नदींत फेंकल्या गेलेल्या प्रेतांप्रमाणें हें सर्व प्रकरण 'थंड' पडतें, याकडे सर्वांचे डोळे खिळून राहिले आहेत. या विसाव्या शतकांत वरील सारखे भयंकर प्रकार दिवसा ढवळ्या घडून येणें, हें देशाचें खास दुर्दैव होय.

O BHARAT

O "NOSSO FEITIO"

Os leitores devem estar lembrados de que o Congresso Provincial da India Portuguesa aprovára uma moção de protecção ao gado *vacum*, conscio, naturalmente, de que com a mesma moção muito teriam a lucrar a agricultura e a saude pública.

¿Trabalhou, porêm, o Congresso para converter em facto a sua bem pensada e unanimemente aprovada deliberação de protecção ao referido gado?

Crêmos que não, porquanto tanto as vacas como os bois e tanto os bezerros como os novilhos, tudo continua a merecer ao elemento amigo da carne de vaca o mesmo despreso e a mesma indiferença que antes.

O congresso não foi, portanto, capaz de opôr forte ou fraca barreira ao abatimento das rezes daquele gado, mortandade que vai crescendo, a passos agigantados, sem obstaculos de especie alguma.

Se a deliberação do Congresso se não atreve a *rasgar* o dominio do papel, tambem a resolução municipal de Pondá [os leitores lembram-se, certamente, da identica deliberação, tomada pela municipalidade de Antruz] se não empenhou em afrouxar a sua *constituição papirica*, traduzindo se em um facto *concreto* e *palpavel*!

Não nos espantou nem nos admirou a inatividade do Congresso e Municipio referidos, a nós que estamos habituados a vêr, entre nós, reuniões e comicios liquidados em nomeações de comissões, comissões em aprovações de moções e moções em inutilisações ...

Quem ha que ignore esta nossa *feição... politica* ? Todos sabem que, quando se trata de fazer aqui *alma coisa*, procede-se da seguinte maneira:

Publica-se antes de mais em tipo grosso e letras garrafais, uma convocatoria espaventosa nos jornais locais anunciando e convidando o publico para um comicio, afim de se tratar do assunto que *emocina*; realisa se depois, em dia, hora e local convencionados o anunciado comicio; neste comicio em que os reunidos nadam nos Mandovis da mais fluente eloquencia, aprovam-se as mais *sensacionais* moções e, para sua execução, nomêam-se as mais brilhantes comissões; e finalmente, estas comissões, depois de ligeiras agitações, somem se nas mais profundas regiões do incognito.

A isso se resume o nosso patriotismo, a isso, tambem, se limita a manifestação de nossa indignação, determinada por qualquer medida governamental do nosso desagrado A isso e a isso, unica e puramente.

Como veêm não é, pois, de espantar nem de admirar o passivismo inactivo e indolente do nosso Congresso e da nossa edilidade de Pondá, quanto á protecção do gado *vacum*: êle é lógico e bem lógico, *dada a virtude* de as nossas moções serem destinadas para inglez vêr.

E, todavia, urge que tratemos de efectivar a protecção ao mencionado gado cuja importancia agricola e sanitaria é desnecessario exaltar, sabido que na India o boi constitui o substentaculo de agricultura e a vaca representa um factor essencial para a saude publica.

Basta, porisso, de moções, deliberações e resoluções, senhores, que moções, deliberações e resoluções no papel não possuem o condão de remediar um mal tão crónico como o *gosto* da carne de *boi*.

Só um esforço sincero, sinceramente patriotico e patrioticamente resistente é que será capaz de *tirar* a faca mortifera de sobre a débil e desprotegida nuca da inocente vaca, que os hindús a adoram como a *Mãi do Universo*.

A PROPOSITO

Se o govêrno se lembrasse de nomear uma comissão de pessoas de cultura e dotes de critica, observação e independencia necessarias para proceder a um inquerito minucioso pelas nossas aldêas, verificaria sem esforço que na India Portugueza, apezar de paz aparente e apezar de factores cívis e morais, a desordem não é rara, os crimes existem e de varia ordem, e a segurança de propriedade e de pessoa nem sempre é respeitada.

Ninguem contesta que a estatistica dos tribunais e policia nos fornece meios para aquilatar o estado criminal de um pais. Aqui, porem, se as estatisticas não mentem, elas estão bem longe de mostrar aos olhos do estudioso toda a verdade.

Nós temos boas leis, nós temos excelentes regulamentos. Nós temos juizes inflexiveis e policia rigorosa; mas de um rigor que não exclui prudencia. Temos tudo isso; mas falta nos o essencial: justiça ao alcance de todos ou pelo menos de maior numero e justiça rapida

A febre de criar receitas que fizessem de um tesouro exausto por desbaratado,— levou ao governo a encarecer aquilo que sempre e em toda a parte, ao lado da instrucção, procura-se ministrar mais em conta possivel—a justiça. Depois as nossas leis processuais com o intuito, de certo, honesto, de darem toda a latitude á defesa, crearam um estado de cousas positivamente grave, que não pode continuar por mais tempo: fizeram a marcha de cousas nos tribunais tão demoradas, tão propicias para a *chicana* dos indinheirados que, a quem não tem dinheiro e vagares que só abastados usufruem, só lhe resta um recurso: ceder os seus direitos, gramar os agravos e continuar a sofrer a sua sorte, deixando o rico, o poderoso ou ousado — a tripudiar a grande na sua fortuna e na sua honra.

E querem a prova real e flagrante? Aí está o caso de Bardez que no outro lugar vai narrado.

Faz já mais de um ano que o discolo exerce as suas façanhas numa aldêa vasta e populosa de um concelho dos mais importantes como o de Bardez. Insulta, calunia, assalta, ameaça, provoca desordens e conflitos... e tudo calado.

Ha provas. O procedimento atrabiliario por repetido e quase sistematico já é do dominio público. Ninguem o ignora Não obstante—ninguem reage.

Foi preciso que o *agente perigoso* ferisse o sentimento religioso da população, atacando um sacerdote catolico, que fosse bulir com o poderoso da localidade — um padre para surgir a primeira queixa ás estações competentes. Não fosse isto, estamos certos que a *fera continuaria ao largo*.

Ora isto não pode nem deve continuar assim E' preciso que os pobres, os humildes, os desherdados de sorte saibam que a justiça é para todos, ricos e pobres, e para tanto é urgente que o governo dê uma demonstração evidente, insofismavel do seu interesse pela sorte dos piquenos, tornando a justiça, em casos especiais pelo menos—ordem publica, segurança individual etc — mais rapida e mais accessivel aos pobres.

E enquanto este dia não chegue, pedimos ás autoridades judiciais, administrativas e policiais para que sejam possivelmente rigorosas e expeditas na repressão de ofensas sobretudo as que sendo de ordem pública afectem o bem estar dos habitantes pobres e sofredores desta terra.

CALEM-SE, SENHORES !

A India Portuguesa de Majordá e o sr. Pe. A. L. Campos desejam que, custe o que custar, as Novas Conquistas se convertam, em peso, a catolicismo, porque, na opinião dêles, reside *nisso* a salvação delas.

Os reverendos apologistas de *catolisação* das Novas Conquistas perdem, porem, o seu tempo e o seu latim, que *é outro* o regime que nos governa—regime que não é nada favoravel, antes pelo contrario, adverso ao jesuitico desiderato de *suas reverencias*.

Calem-se, pois, por amor de Deus e deixem-nos em paz !

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

मिति ज्येष्ट वद्य १२ शी शके १८४७

परदेशगमन कां करावें ?

' नव खंड पृथ्वी व दहावें खंड काशी ' अशी जी एक ह्मण आमच्यांत प्रचलित आहे, तीजवरून आमच्या पूर्वजांच्या मनांत परदेशगमनाविषयीं पूर्वकालीं पसरलेल्या तिटकाऱ्याचें भीषण स्वरूप स्पष्टपणें उघड होतें. काशीच्या वेशीपलीकडे–या दहाव्या खंडाच्या सीमेपार–पृथ्वीचा कोणताच भाग अस्तित्वांत असणें शक्य नाहीं, ही कल्पना फैलावण्यांत लोकांनीं स्वदेशत्याग करूं नये, असाच आमच्या पूर्वज्यांचा हेतु असला पाहिजे. ' दशखंडी ' हिंदुस्थानाच्याच पोटांत सर्व जग मावलें आहे, अशी जर त्यांची पक्की समजूत बनली असती, तर परदेशगमनाच्या पापक्षालनार्थ ठरविण्यांत आलेले अनेक प्रायश्चित्तविधि त्यांकडून खास निश्चित केले गेले नसते पेशवाईच्या सुवर्ण–युगांत दोन ब्राह्मण वकील विलायतेला पाठविण्यांत आले होते व सुवर्ण धातूच्या जननेंद्रीयांतून त्यांचा स्वकीयांकडून 'पुनर्जन्म'हि करण्यांत आला होता. या गोष्टीवरूनहि हिंदुस्थानाबाहेरील देशांची माहिती असतांहि उपरिनिर्दिष्ट ह्मण प्रचारांत पडण्यास केवळ परदेशगमनाविषयीं पूर्वजांच्या अंतःकरणांत वसत असलेला तिटकाराच कारणीभूत झाला असावा, हें उघड होतें.

सुवर्णभूमि, सुधारणेचें माहेर, सुसंस्कृतीचा खजीना, असा ज्या देशाचा लौकिक दिगंत गाजत होता, त्या देशाला अर्थात् परकीयांच्या मेहरनजरेची बिलकूल गरज न व्हती. स्वतःच्या घरांत परांच्या मऊ गादीवर श्रीमंती थाटानें लोळून खाण्याइतकी सुबलक संपत्ति नांदू लागली असतां कोणता प्राणी स्वसुखावर पाणी सोडण्याचा पढतमूर्खपणा करून दुसऱ्यांच्या घरचे उंबरठे झिजवील ? सुवर्णाच्या धुरानें ज्याचें वातावरण एकेकाळीं चकाकत होतें,सर्व तऱ्हेच्या विद्येंत व कलांत ज्यानें अग्रस्थान पटाकावलें होतें व ज्याची संस्कृति इतरांस साश्चर्य अनुकरणाचा विषय होऊन बसली होती, त्या हिंदुस्थान देशाला त्याकाळीं परदेशगमनाची आवश्यकता वाटली नसली, उलट तें पापमयच दिसलें, तर त्यांत नवल तें कोणतें !

पण आतां ते भाग्याचे दिवस नाहींत. सध्या आह्मीं परसत्तेच्या काळ्याकुट्ट रात्रींत चांचपडत असून गमावलेलें वैभव फिरून हस्तगत करण्यासाठीं धडपडत आहोंत. परदास्याचें प्राणघातक जूं झुगारून देण्याची जी वापाड खटपट करण्याच्या बेतांत आमचीं चित्त व वित्त नित्य गुंतून जात असून, आमच्या मानगुटीवर बैठक मारून बसलेल्या परसत्तेच्या 'संबंधाची' मान कशी मुरगळतां येईल या चिंतेनें आमचीं मनें सध्या जळत आहेत. तात्पर्य सांप्रतकाळीं आह्मीं सर्व बाजूनीं दुःखसागरांत बुडालों असून, त्यांतून सुखाचें पैलतीर कसें गांठतां येईल, या एकाच विवंचनेंत काळ कंठीत आहोंत. अर्थात सुखाच्या सुकाळांत जें परदेशगमन त्याज्य होतें, त्याच आपद्धर्माची कास आह्मांस आज धरावी लागत असल्यास कोणतेंच आश्चर्य नाहीं. मनुष्य हा परिस्थितीचा दास असला पाहिजे. स याची परिस्थिति आह्मांला परदेशगमनाच्या मार्गाकडे बोट करून तो रस्ता सुधारण्याचा हुकूम देत आहे. ही आज्ञा मानलीच पाहिजे. नपेक्षां परिस्थितीच्या कठोर दडपणानें आह्मीं पार चेंगरून गेल्याशिवाय रहाणार नाहींत, हें सिद्ध करण्यास मेंदूला विचार भ्र णांत गिरक्या मारण्यास लावण्याचें कारण नाहीं.

गेलेली सत्ता फिरून प्राप्त होण्यासाठीं ज्या अनेक दिव्यांतून आह्मांस उतरणें भाग आहे, त्यांत परदेशग-नाचा प्रामुख्यानें समावेश होतो, यांत संशय नाहीं. मात्र हें परदेशगमन, सध्या या सदराखालीं जी पोटार्थी चळवळ चालू आहे, त्याहून भिन्न असलें पाहिजे. ज्या परदेशगमनाचें पर्यवसान बरिष्टरी किंवा एखादी मोठ्या हुद्याची नोकरी कमावण्यांत होतें, तें स्वार्थी परदेशगमन आह्मांस नको आहे. ह्या परदेशगमनानें फार तर परिमित पोटांचा प्रश्न सुटेल, क्वचित कुटुंबें सुखांत नांदतील व मानमान्यतेची मजा लुटतील. पण आह्मांस जें परदेशगमन आमची परिस्थिति सुचवीत आहे, तें अशा प्रकारचें आहे कीं त्यायोगें सबंध राष्ट्राच्या पोटाचा प्रश्न मोकळा होणार आहे. राष्ट्राचा जोम वाढवून परसत्तेच्या दणकट शृंखला पटापट तोडण्यास जें परदेशगमन आमच्यात शक्ति निर्माण करील, तेंच परार्थी व स्वदेशोद्धारक परदेशगमन आह्मास हवें आहे, हें उघड होय.

अवनतीच्या दुर्धर रोगानें गेडावलेलें जपान, परदेशगमनाच्या दिव्यौषधीनेंच रोगमुक्त होऊन, प्रगतीचें अत्युच्च शिखर गाठण्यास शकलें. जपानचा जो जगभर बोलबाला झाला तो केवळ त्यानें अवलंबिलेल्या परदेशगमनामुळेंच, हें इतिहासज्ञांस सगण्याची गरज नाहीं. सध्या आह्मांत चालू असलेल्या परदेशगमनासारखा जपानी परदेशगमनाचा स्वार्थपरायणतेंतच शेवट झाला असता, तर युरोप व अमेरिका या सर्वप्रकारच्या सुधारणानीं विभूषित झालेल्या राष्ट्राची आश्चर्यचकित दृष्टि स्वतःकडे खेंचण्यास जपान देश कदापिच समर्थ होतो ना. रुसासारख्या प्रचंड धेंडाची रग जिरविण्याची शक्ति जपाननें परदेशगमनानेंच प्राप्त करून घेतली, याविषयीं दुमत असणें संभवनीय नाहीं. असो.

आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून हेंच सिद्ध होतें कीं, परदेशगमनाशिवाय सांप्रतच्या परसत्तात्मक आपत्तींतून मुक्त होण्यास आह्मांस दुसरा तरुणोपाय नाहीं. गोमांतकास परदेशगमन पाहिजे आहे. मात्र तें जपानी तऱ्हेचें असलें पाहिजे. सध्या आमच्यांत रूढ होऊं पहात असलेल्या पोटार्थी समुद्रोल्लंघनासारखें नको आहे. पोटार्थी परदेशगमन परसत्तेची नांगी मोडण्यास समर्थ नसतें. परसत्तेनें मालविलेली स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित होण्यास व गतवैभवाच्या प्राप्तीनें पुन्हा सालंकृत होण्यास, जपानी परदेशगमनाच्या ओंजळीनेंच गोमांतकीय परदेशगमनानें पाणी प्यालें पाहिजे, हें फिरफिरून बजावण्याचें कारण नाहीं.

स्फुट विचार

सरकारी नोकऱ्याः—नोकरींच्या शिडेनें ब्रजेटाचा माळा गांठला ह्मणजे तेथून अधिकाराच्या बंदुकीनें परसत्तेची मृगया करण्यास बरें पडेल, अशी जी कित्येक देशहितेच्छूंची कल्पना आहे ती कल्पनाच आहे दास्य सोपानानें स्वातंत्र्याचा मजला पादाक्रांत करण्याचा प्रयत्न करणें किंवा हव्यास बाळगणें ह्मणजे जलाल सेवनानें अमरत्व संपादन करण्याचा प्राणघातकी मूर्खपणा करण्यासारखेंच होय, हें ज्याची बुद्धि ठिकाणावर आहे, त्यास बजावण्याचें कारण नाहीं. नोकरीपेशा परवशतेच्या लोखंडी शृंखलेचे दुवे सैल करण्याऐवजीं उलट स्वाभिमानीवृत्तीच्या नष्टतेनें कसा घट्ट खिळवितो, याची जाणीव आतां फिरंगाळलेल्या अहिंदूंसहि होऊं लागली आहे. व ह्यांची ही शासनाची इमारत फारा दिवसांच्या जुन्या अनुभवाच्या चैाथऱ्यावर उभारली गेली असल्यानें, तिचा सुदृढपणा कोणालाहि सहज रीतीनें पटण्यासारखा आहे. अर्थात् स्वतंत्रतेच्या या धामधुमीच्या 'मोसमांत' सरकारी नोकरींची तरफदारी करण्यांत मुत्सद्दिगिरी तर बिलकूल व्यक्त होत नाहींच उलट शहाणपणाचें व दूरदर्शित्वाचें दिवाळें वाजल्याचें मात्र सिद्ध होतें.

आग्रहाची सूचनाः— खुद्द स्वतंत्र राष्टांत सुद्धां दास्यवृत्तीला महत्व नसतें. ' उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ट नोकरी' अशी जी ह्मण पुरातनकालापासून आमच्यांत प्रचलित आहे, ती तर नोकरीचें ही नत्व स्पष्टपणें जगाला जाहीर करीत आहे. नोकरीनें परावलंबीपणा व भ्याडपणा वाढून स्वत्वभावना खिळखिळी होत असते. हा समज अर्थात आजचाच नसून तो फार जुन्या काळापासून आमच्यांत वावरत आहे. 'कोणाचा होऊं नये चाकर' हीहि ह्मण वरील समजास पुष्टीच देत आहे. यावरून नोकरीपेशा आंजरण्यांत व आवडीनें गोंजरण्यांत राष्ट्राचें कितपत हित होईल, हें उघड उघड दिसतच आहे. तेव्हां नोकऱ्यांकडे झुकूं पहात असलेली आमच्या तरुणांची शिक्षणभूषित मनोवृत्ति खेंचून मागें वळविण्याऐवजीं ती उल्लसित करणाऱ्या आडरानांत शिरणें केव्हांहि समर्थनीय होणार नाहीं. खासगी रीतीनें पाहिजे त्यानें पाहिजे तो पेशा 'पोटासाठीं' पत्करावा. पण त्या पेशाची राष्ट्रोद्धाराच्या नांवानें टिमकी वाजविण्याचें पाप आचरूं नये, अशी 'नोकराळलेल्या' देशहितेच्छूंस आमची आग्रहाची सूचना आहे.

अलवारचा गोळीबारः— या गोळीबाराची त्रोटक माहिती आह्मीं गेल्या अंकीं आमच्या वाचकांस पुरविली होतीच. आतां ती माहिती सपशेल खोटी असल्याच्या 'संस्थानीं' तारा जिकडे तिकडे पसरूं लागल्या आहेत ! परंतु त्यांत सत्यतेचा भाग किती असेल व असत्यतेचें प्रमाण किती निवेल, हें ' सरकारी लंडावाचें ' गुह्य उलगडण्याची ज्यांस संवय आहे, ते सहज रीतीनें सांगू शकतील. एखाद्या जिवंत माणसाला सरकारी डॉक्टरानें मयतांच्या कोटींत ढकलले तर त्यानें 'मेलेंच' पाहिजे, अशी नेहमीच सरकार बाजूची स्थिति असल्यानें अलवार सरकारनें प्रसिद्ध केलेल्या तारांत सत्याचा अंश किती असेल, ह्याची कल्पना करण्यास गोमांतकांतून बाहेर पाय काढण्याची जरूरी नाहीं !

"येरे माझ्या मागल्या":— ' प्राझेरीस द कोस्तानीं एंव केलें, त्यंव केलें' अशा अर्थाच्या बातम्यांना ज्या अर्थी गेल्या महिन्यांपासून ऊत येऊं लागला आहे त्या अर्थी पार्लमेंटाच्या निवडणुकींचा मोसम जवळ येत चालला आहे, हें निश्चित होतें. इतकेंच नव्हे, तर त्या निवडणुकींत कोस्तमजकुरांची देपुताद किंवा सेनदोर ह्मणून पुन्हां निवडून येण्याची इच्छा आहे, असेंहि सिद्ध होतें. परंतु या खेपेसहि त्यांची निवडून येण्याच्या हेतूची डाळ मतदारांच्या आंधणांत शिजेल, असें आह्मांस वाटत नाहीं. निदान ती शिजू न देण्याची खटपट एव्हांपासूनच सुरू झाल्याचें मानण्यास दुसरीकडे प्रसिद्ध झालेल्या बातमीवरून जागा आहे. कसेंहि असो, कोस्तांची निवडणूक गोमांतकाला आजपर्यंत नुकसानदायकच झाली असल्यानें यापुढें तरी तसा प्रकार घडून न येण्यासाठीं, पार्लमेंटांतून त्यांचीं कायमची हकालपट्टी करण्यास निर्वैकारी व निःपक्षपाती देशबांधवांचे एक जुटीनें प्रयत्न झाले पाहिजेत, हें उघड आहे.

—रा. अर्जुन पांडुरंग पाळणे यांचा क्षत्रिय भंडारी समाजाविषयींचा पत्रव्यवहार येत्या अंकीं प्रसिद्ध होईल.

—पोर्तुगीज सरकारनें आणलेल्या नवीन 'सेकंड हॅंड' गोटी बेतींच्या किनाऱ्यावर पावसी हवा भक्षण करीत आहेत. पावसाळ्याच्या थंड हवेनें त्यांची प्रकृति सुधरेल, असें तज्ज्ञ डॉक्टरांचें ठाम मत आहे !

—सांगें येथील काम्राचे सेक्रेटरी आत्माराम देसाई हे आपल्या अधिकाराला रामराम ठोकण्याच्या तयारींत आहेत.

समजुतीचा घोटाळा

लेखांक १ ला.

भारताच्या १४ मेच्या अंकांत 'भविष्य' ह्या सदराखालीं जो माझा लेख प्रसिद्ध झाला, त्यांत "पंचांग प्रवर्तक कमिटीच्या शुद्ध निरयन पंचांगांत [टिळक पंचांगांत] यंदांच्या संवत्सर प्रतिपदेचे दिवशीं चंद्र दर्शनाचा योग दाखवून दिलेला असतां दृक प्रत्ययास तसें आलें नाहीं; अर्थात भविष्य बरोबर उतरलें नाहीं. शुद्ध पंचांगाचा निर्णय खरा कीं अशुद्धाचा खरा ?" अशा ओळी जातां जातां खरडून गेलों. ह्यावर श्रीयुत अनंत नारायण नायक पाटणकर ह्यांचा सदर पत्राच्या २८ मेच्या अंकांत आक्षेप उभा राहिला. ते ह्मणतात:— "ता. १४ गुरुवारच्या भारतांत 'सारस्वत' ह्या सहीनें 'भविष्य' या सदराखालीं प्रसिद्ध झालेल्या लेखांत असें एक विधान लेखकानें केलें आहे: 'पं. प्र. कमेटीच्या शु. नि. पंचांगांत (टिळक पंचांग) यंदांच्या चैत्र शु १ दा. रोजीं 'चंद्रदर्शन' लिहिलें असतां तें झालें नाहीं, अर्थात शुद्ध पंचांगाचें भविष्य खोटें,' असें भासविण्याचें एक अप्रस्तुत विधान केलें असल्यानें ज्योतिर्गणितानभिज्ञ लोकांचा गैर समज होऊं नये एतदर्थ येथें थोडक्यांत विवेचन करावें लागतें." एका नाण्याला पुढला मागचा भाग असतो त्या प्रमाणें दोनहि बाजू मीं येथें सादर केल्या आहेत.

\+ \+ \+

पंचांग ह्मणजे पांच अंगें (पंच+अंग). वनस्पति विद्येंत वृक्षाच्या फूल, फळ, साल, पान आणि मूळ ह्या पांच अंगांना पंचांग ह्मणतात, भक्तिविषयांत जप, होम, पूजा, तर्पण आणि विप्रभोजन ह्या पांचांना पंचांग अशी संज्ञा आहे. नमस्कार विशेषीं हस्त, शीर्ष [शीर], वाणी, दृष्टि व जानु (गुडघे) ह्यांचा पंचांगांत समावेश होतो आणि ज्योतिष शास्त्रांत तिथि, वार, नक्षत्र, योग आणि करण हीं कालाचीं पांच अंगें ज्यांत आढळतात त्यास सामान्यता पंचांग असें ह्मणतात. "निरनिराळीं जीं वर्षें गणतात त्या प्रत्येक वर्षांतील प्रत्येक तिथि वगैरे समजण्याकरितां पंचांग नावाचें पत्रक तयार केलेलें असतें. अशा प्रकारचें पत्रक तयार करण्याची रीत केव्हां पासून सुरू झाली हें निश्चित रीतीनें समजलें असतें तर त्यापासून एका महत्वाच्या प्रश्नाचा उलगडा झाला असता. पण आह्मी आज पर्यंत जो शोध केला त्यावरून शक १४७६ साला पर्यंतच काय तो शोध लागला आहे. या सालचें पंचाग आमच्या एका मित्राजवळ आहे. सांप्रत पंचांग ह्मणुन जें प्रसिद्ध आहे त्यांत जितकी माहिती मिळते तितकी या पंचांगांत नाहीं; तरी ...... पांच अंगें यांत आसल्याचें दिसून येतें" असें एक पंचांगकर्ता ह्मणतो. हा उतारा आहे.

× \+ ×

पंचांगें अनेक प्रकारचीं ऐकण्यांत येतात. जसें: रैवतक पक्षाचें पंचांग, केतकी पंचांग सायन पंचांग इ० इ०. मिशनरी लोकांचें ज्ञानोदय पंचांग ह्या नांवानें मी ओळखतों. बहुतेक पंचांगें ग्रह लाघवादि ग्रंथांच्या आधारें तयार होत असतात. 'संप्रति खलु भरत खंडे जोतिर्विद: सर्वे ग्रहलाघवादि ग्रंथानुसारेण पंचांगानि रचयति' कोणी कोणी इंग्लंडांतील नॉटिकल आलमानाक Almanac Na'utico चेंहि सहाय्य घेतलें जातें असें सांगतात. "सायन गणना ह्मणजे आरंभस्थानीं संपात (क्रांतिवृत्त व विषुववृत ह्यांचा छेदन बिंदु) घेऊन ग्रहस्थिति मोजावयाची रीति, आणि निरयन गणना ह्मणजे संपात रेवती योग तारेवर आला त्या सुमारास त्या तारेपासून ग्रहस्थिति मोजण्याचा प्रघात."

\+ × \+

ग्रहलाघव ग्रंथावरून दृक्प्रत्यय बरोबर येत नाहीं ह्मणून कांहीं वर्षांमागें विद्वान ज्योतिषांच्या बहुमतानें निर्णय लागून पंचांग प्रवर्तक कमिटीच्या द्वारें करण नावाचा ग्रंथ तयार झाला. ग्रहलाघव ग्रंथाचा कर्ता गणेश दैवज्ञ होय. दैवज्ञ ह्मणजे उत्तम जोशी असें मीं कोठेंसें वाचलें आहे. सुवर्णकार कोणत्या आधारानें स्वतःला दैवज्ञ ह्मणवून घेतात हें सांगण्यास मी असमर्थ आहें. ग्रहलाघव ग्रंथाचें गणित स्थूल मानाचें असलें. उदाहरणार्थ "१५॥×७। असा गुणाकार करावयाचा आहे अशी कल्पना करा; वस्तुतः यांचा गुणाकार ११२।= इतका येतो. परंतु वरचे आणे सोडून दिले असतां १५ व ७ याचा गुणाकार १०५ येतो. वरचे आणे सोडून दिल्यामुळें जो गुणाकार आला तें जुन्या पंचांगांतील स्थूलमान व आणे सुद्धां जो गुणाकार आला तें सूक्ष्ममान असें समजावें. जुन्या पंचांगाचें गणित अशाच स्थूल मानानें केलेलें असतें. यामुळें सध्या त्यात बराच फरक पडूं लागला आहे." त्यायोगें उभय ग्रंथांच्या गणितामध्यें सुमारें १५ पासून २० घटिका पर्यंत फरक येतो ह्मणे.

\+ \+ \+

टिळक पंचांगावर अनेक विद्वानांची भक्ति बसलेली आहे. गोमंतकांत ह्याचा झपाट्यानें प्रसार झालेला दिसत नाहीं. किती एकांची दृष्टि स्वस्तपणाकडे असून अर्ध्या आण्याच्या पंचांगानेंहि गरज भागवितात असें अनुभवास आलें आहे. गोव्यांत बहुधा निर्णयसागरचेंच पंचांग चालू आहे. असें ह्मणावें लागतें. सन १९२० च्या फेब्रुवारींतील १५, १६ १७ तारखांस सांगली येथें जें तिसरें संमेलन झालें त्यावेळीं संमेलनाचे अध्यक्ष श्रीयुत श्री. कृ. कोल्हटकर यांनीं असे उद्गार काढिले: "एकजण एकादशी आज करितो तर दुसरा उद्यां करितो. कोणती एकादशी खरी याबद्दल साशंक असणारा पण खरी एकादशी चुकूं नये ह्मणून खबरदारी घेणारा धार्मिक मनुष्य तर दोन्ही एकादशा पाळून दोन उपवास करितो. ह्या दशी मात्र बिचाऱ्यास एकत्र साजरी करावयास मिळते. यंदां दोन पंचांगांच्या आषाढी एकादशीमध्यें एक महिन्यांचें अंतर असल्यामुळें आजपर्यंत एकाच दिवशीं एकाच भक्तिभावानें प्रेरित होऊन पंढरीच्या वारकऱ्यांचा जो प्रचंड संघ भगवन्नामाचा गजर करीत आपल्या पताकांसह एकाच दिशेकडे धांवत जात असे तो यंदा दुभंग होण्याचा संभव आहे; व तसें होणें ही एक राष्टीय आपत्ति होय. भिन्न भिन्न पंचांगांचे भिन्न भिन्न पाडवे झाल्याचा आपणास अनुभव आलाच आहे."

× × ×

शुद्ध पंचांग तयार करण्याची कल्पना वीस २०) वर्षांपलीकडची असावी. पहिलें संमेलन सन १९०४ किंवा १९०५ च्या सुमारास मुंबई येथे श्रीमच्छंकराचार्यांच्या नेतृत्वाखालीं भरलें असावें व दुसरें सुमारें १९१७ त पुणें येथें लो. बाळ गंगाधर टिळक यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडलें असें मिळालेल्या माहितीवरून अनुमान काढतां येतें. "सायन व ग्रहलाघवीय पंचागांच्या संक्रातींत २३ दिवसांचा फरक असतो व केरोपंती व ग्रहलाघवीय संक्रांतींत ४ दिवसांचा असतो, अर्थात या भिन्न भिन्न पंचांगांच्या अभिमान्याकडून होणारीं धार्मिक कृत्यें भिन्न भिन्न दिवशी होतात."

\+ \+ \+

फार वर्षांपासून इकडे गणपत कृष्णाजींच्या छापखान्यांत छापलेल्या पंचांगास महत्व देत असत. सावनूरचें पंचांग कोणीं कोणी मागवून आणतात. तें स्मार्त, वैष्णव व भागवत धर्मनिर्णयांवरून तयार केलेलें असतें. गतवर्षीं कोरगांव (गोवा) येथें पित्रे शास्त्र्यांनीं एक तयार केलें होतें, हेंच गोव्यांत पहिलें पंचांग असावें. लोकाश्रयाच्या अभावामुळें यंदां तें दुर्लभ झालें की काय नकळे. त्यांतील काल कवळें, मंगेश, सांखळी, पणजी, पेडणें, कपिलेश्वरी वगैरे ठिकाणीं बरोबर अनुभवास येईल असें ह्मटलें होतें. पित्रे शास्त्री हें नाव प्रसिद्ध असून सांखळींतहि पित्रे आहेत, हे ज्योतिषांत वगैरे तज्ज्ञ आहेत. यंदां कोल्हापुरी पंचांग पाहाण्याचा योग आला. ह्यांतील रोहिणी नक्षत्राचा पर्जन्य योग बरोबर उतरला. ग्रहलाघवीय पंचांगाच्या गणिताधारें आज तारीख ७ जून रोजीं मृगनक्षत्र सुरू झालें. शुद्धपंचांगाच्या निर्णयाप्रमाणें ३ जूनला मृगशीर्ष नक्षत्र चालू झालें. माझ्या गावांत काल पर्यंत वादळी पावसानें त्रास दिला. जूनच्या पांच [५] तारखेस तर बराच थयथयाट केला. आज ७ तारखेस उघाडी आहे. शेजारच्या वेदान्त केसरींच्या निर्णयाबरहुकूम पांच तारखेस पाऊस नसणार ह्या भरंवशानें जे लोक राहिले होते त्यांचे कितीएक बेत ढांसळून वेदान्त केसरीवरील भरंवसा उडाला. माझ्या मते पर्जन्ययोगांवर विश्वास ठेवणें गैर आहे. पर्जन्य योग हीं मनुष्याच्या हातची गोष्ट नव्हे. ती एक सावधगिरीची आगाऊ सूचना आहे. आजचा हा घोटाळ्याचा पहिला लेखांक समाप्त करितों.

———

वर्तमानसार

—पार्लमेंटच्या निवडणुकीचे दिवस जवळ आल्यामुळें वेळींच सावध होऊन पुढील धोरण ठरविण्याकरितां, पेडणें महालांतील धारगळ, तुयें, वजरी वगैरे गावांतील प्रमुख मतदारांची सभा चालू महिन्याच्या दहा तारखेस, आराबो येथील हिंदु समाजाचे तरुण पुढारी श्रीयुत गोविंद मंगेश भेंडे यांच्या घरीं भरून, सर्वानुमतें सिं. प्राजेरीस द कोस्त निवडणुकीकरित उभे राहिल्यास त्यांस मळींच मतें देऊं नयेत, उलट विरोध करावा असें ठरविण्यांत आलें. कारण, तूर्त झालेल्या करवाढीस सिं. कोस्ताचें आर्थिकदृष्ट्या राष्ट्रास खच्ची करणारें आजपर्यंतचें पार्लमेंटांतील स्वार्थी धोरणच कारणीभूत आहे, याबद्दल सर्वांची पुरी खात्री पटली हें होय, असें नी. व्ही. नाईक हे कळवितात.

—फ्रान्समधील वर्तमानपत्राच्या एका संपादकास एका बाईनें वेडाच्या भरांत गोळी घालून ठार केलें.

—बंगलोरच्या मुनिसिपालटीनें, मुनिसिपालटींत स्त्री सभासद नेमण्याबद्दल ठराव पास केला आहे.

—ता. ४।५ जुलै रोजीं बार्शी येथें श्री. नरसिंह चिंतामण केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं चांभार ढोर परिषद भरणार आहे.

—ता. ३० मे रोजीं काणकोण (गोवा) येथें श्री. भुतोजी रंगो नाईक गांवकर यांच्या अध्यक्षतेखालीं सभा होऊन कै. शांबा जेन देसाई यांच्या आकस्मिक निधनाबद्दल दुखवट्याचा ठराव पास करण्यांत आला, असें कळतें.

— "ता २९ मे १९२४च्या भारतांत संस्थेस ललितकला दर्शक मंडळीनें मदतोप्रीत्यर्थ दिलेल्या नाटकप्रयोगाच्या उत्पन्नाच्या येणाऱ्या रकमेसंबधीं व जमलेल्या रकमेच्या व्यवस्थेसंबधीं मी माझ्या स्वतःच्या सहीनें सेक्रेटरींजवळ खुलासा विचारला होता. या प्रयोगाचीं तिकीटें विकत घेऊन ज्यांनीं संस्थेस मदत केली त्यांना संस्था सार्वजनिक असल्यानें तो खुलासा करणे न्याय्य असें माझें मत आहे. संस्थेतर्फे झालेल्या ह्या प्रयोगाच्या उत्पन्नाचा हिशेब पाहिजे त्यानें येऊन पहावा. आपण त्यास तो दाखवूं अशी सवलत देणारे सेक्रेटरी साहेब हा खुलासा करण्यास कचरतात असें ह्मणणें धाडसाचें होईल. ह्मणून एकवार वेळांतवेळ काढून सार्वजनिक मदतीनें जमलेल्या उत्पन्नाचा खुलासा करणें संस्थेच्या उत्कर्षाचें एक मुख्य अंग असल्याचें लक्षीं घेऊन त्यांनीं माझी पुन्हां करीत असलेली ही नम्र विनंति अव्हेरूं नये" अशी उपेंद्र शे. तळावलीकर पणजी, हे तेथील मुष्टिफंड संस्थेच्या सेक्रेटरीं पाशीं मागणी करीत आहेत. ही मागणी न्याय्य आहे, हें आह्मांप्रमाणेंच कोणीहि कबूल करील.

— एका होडीवाल्याच्या हलगर्जीपणामुळें, हातांत असलेला राकेल तेलाचा दिवा फतेमारीच्या शिडावर पडून, सुमारें १५–२० फतेमारी व ८० -९० लहानग्या मच्छमारी होडया अग्निनारायणाच्या भक्षस्थानीं पडल्या. फतेमारी व होडया शिवोलीच्या किनाऱ्यावर उभ्या करण्यांत आल्या होत्या. दोन लाखांवर नुकसानी झाल्याची बोलवा आहे. ईश्वरीक्षोभ ह्मणावयाचा!

— ग्वाल्हेर संस्थानचे अधिपति अलिजाबहाद्दर सर माधवराव शिंदे हे पारीस येथें दिवंगत झाले. हे सत्रीच्या सुप्रसिद्ध राण्याचे जामात होते. ईश्वर मृताच्या आत्म्यांस शांति देवो !

O BHARAT

O PADROÃDO

No jornal — *A Provincia* escreveu o sr. Menezes Bragança, estrela de primeira grandeza a scintilar no céu literario e politico da India Portuguesa um monumental artigo intitulado—*Sem equivocos*. Nesse seu lindo artigo, o festejado escritor aborda com uma proficiencia sem par a eterna questão do Padroado, provando, magnificamente, como esta vetusta instituição não tem, absolutamente, razão de continuar — ás expensas do Estado, sobretudo.

O *Bharat* sempre se pronunciou contra o Padroado cuja existencia *decorativa* se não casa com a excelencia dos principios retintamente republicanos em que se alicerça a Constituição da Nação Portuguesa.

Não admira, portanto, que nos tenha agradado de-veras a brilhante prosa do sr. Bragança, repleta da lógica insofismável e argumentos irrespondiveis.

O mais forte alicerce em que se ergue o edificio da manutenção do Padroado é o seguinte:

"E' de toda a justiça respeitar a acçao social que o catolicismo exerceu quer nesta terra, quere no Oriente todo, dando a Portugal esse predominio politico que de outra maneira seria talvez dificil de conquistar. Ai esta' a Historia a explicar quanto o catolicismo auxiliou na acçao civilisadora e no alargamento da influencia politica da naçao portuguesa."

Veja, agora, o leitor como o ilustre director do antigo *O Debate* que tamanha falta faz no jornalismo luso-indiano aniquila, pulverisa e reduz á terra, cinzas e nada o colossal, o gigantesco, o suntuoso edificio do Padroado, construido p e l o s seus fervorosos apologistas com as pedras historicas do *catolicismo* e com o cimento do tambem-historico *predominio politico*. Leia, pois, o seguinte:

Que ma' inspiraçao foi esta de importunar a Historia?

¿Se foram os milicianos do catolicismo que conquistaram a Portugal o predominio politico que aos seus grandes Capitaes seria dificil conquistar, para que foram essas terriveis provisoes que a deputaçao da Companhia de Jesus arrancou ao governador Francisco Barreto, proibindo o exercicio de culto induista, excluindo os indus dos empregos publicos, permitindo que os orfaos de pai fossem arrancados a' mae para serem baptisados?

¿Que proporçoes pifias teria essa obra proselitica, se nao fossem os alvara's de D. Antao de Noronha, expulsando os naturais das suas terras, proibindo os hindu's de serem escrivaes de aldeia e vedando a herança paterna aos filhos que se nao fizessem cristaos? Eu quisera que os senhores defensores da religiao me dissessem se os dezasset mil convertidos so' nas Ilhas de Goa, durante os tres anos do governo de D. Constantino de Bragança foram fruto milagreiro da Companhia de Jesus ou se foram resultado da provisao daquele vice-rei mandando expulsar os hindus desta religiao.

¿Porque nao faz hoje o clero nem dezassete crista.s por ano neste concelho?

Nao suponha que me inspira isto o tal principio anti religioso. Sao Francisco Xavier, na sua primeira carta a D. Joao III, pede lhe que mande para India um vice-rei revestido de autoridade necessaria para que possa prover a' salvaçao da alma. E recomenda lhe o celebre Vigario Geral Miguel Va's, que voltaria pouco depois de Lisboa com aquelas provisoes famosas que mandava derrubar pagodes, desterrar os indus, proibir o culto non-cristao etc. — provisoes contra as quais reagiu o espirito justiceiro de D. Joao de Castro, que nao era ateu nem maçon. Noutra carta, dirigida a' Companhia, nao lhe oculta o desejo de ir ao Japao, porque...*a propaganda da religiao de J e s u s Cristo ai se pode realizar com mais exito do que em qualquer regiao da India*. Isto viu ele, quando andava neste vale de mentiras, e ainda os agiografos o nao tinham dotado de glossolalia, que em mais duma das suas cartas, desmente, ao afirmar que teve de aprender a lingua dos naturais para os catequizar ou de se valer dos que conheciam a sua lingua como interpretes.

Ora o que nos ensina a Histo'ria e' isto:— que foi necesaria a coacçao do braço secular para arrebanhar almas para a Igreja. O que el nos aponta sao proezas, como os de Diogo Fernandes *o do Forte* — vandalismo da Fe' que despovoaram as terras da conquista, fugindo os seus habitantes para os dominios visinhos, decaindo o comercio, fechando se as fabricas, como Tana, com proveito dos ingleses e definhando a agricultura, como em Salcete. Que fazem os vice reis Conde do Redondo e Joao de Saldanha da Gama, e o Ve'dor da Fazenda Simao Botelho? Em suma o que nos explica aquela mestra severa e' que a fradaria, longe de "alargar a influencia de Portugal" saqueando e tiranizando "ad majorem Dei gloriam," foi a coveira do dominio portuguez no Oriente.

Depois de tudo isso, perguntamos, finalmente:

Em que fica a tão apregoada utilidade politica da conservação do Podroado, tornado, completamente, incapaz — por *molestia grave* e *incuravel*—para prestigiar a soberania portuguesa nas terras onde êle exerce a sua acção?

Fica, evidentemente, no *tinteiro* do fanatismo religioso dos catolicos indigenas em quem pelos modos predomina mais o catolicismo do que o nacionalismo e republicanismo.

Padroado! A sua eliminação não irá incomodar a tranquila digestão da Nação — tenham disto todos a mais firme convicção!

ECOS E CRITICA

A VERDADE

No artigo—*Sem equivoços*—a que nos referimos noutro lugar, no lugar de honra, lê-se, tambem, o seguinte:

"Nem a assimilação dos costumes portuguezes, tão assignalada neste retalho foi efeito do Evangelho. Há missões catolicas por toda essa India, como em Mangalor com que temos afinidades etnicas e linguisticas. E ninguem aí vê qualquer coisa que se pareça com assimilação. Esta é obra exclusiva do espirito portuguez, generoso e comunicativo."

Não hã dúvida que a assimilação dos costumes portugueses não foi efeito do Evangelho; mas não é, tambem, em absoluto, verdade ser a mesma assimilação *obra exclusiva do espirito portuguez, generoso e comunicativo*.

O *fenomeno* da assimilação dos costumes dos dominadores nos dominados é o resultado lógico e inevitavel da influencia da *dominacão* e nem sempre é *obra exclusiva* do espirito *generoso e comunicativo* dos dominadores.

Quando no Indostão preponderava o dominio mussulmano, ia se aí acentuando nos dominados hindús a assimilação dos costumes maometanos, como actualmente, sucede aos subditos britanicos do mesmo territorio, os quais se vão, aos poucos, *inglesando*, ainda que em pequena escala.

E ninguem dirá que *aquilo* tenha sido *obra exclusiva do espirito generoso e comunicativo* dos dominadores mussulmanos ou *isto* seja *obra exclusiva do espirito generoso e comunicativo* dos dominantes ingleses.

Amicos Plato, sed magis amica veritas...

UMA PERGUNTA

Pergunta-nos um *Leitor* porque motivo desperdiçamos tamanho espaço de *O Bharat* para *abaixar a grimpa* ao tal *João Franco*.

E' facil a resposta. E é que aqueles nossos *sueltos* se não destinam únicamente á exclusiva pessôa do *Franco*. No ambito critico dêles ficam compreendidos quantos com o mesmo *Franco* se identificam, o que, de resto, se depreende, claramente, do nosso *éco conclusivo*, respeitante ao tal assunto.

Pessoalmente, o sr. J o ã o Franco Borges e Sá ou quem é não nos é simpatico nem antipatico, é — nós completamente indiferente. A campanha que *O Bharat* moveu não é, portanto, só á unica pessoa dele mas sim á *instituição* a que êle pertence.

E, a proposito, fique o *Leitor* sabendo—e duma vez para sempre — que no programa do *Bharat* não figura nenhum *número*—de entreter a *politiquice de campanario*.

DR. L. V. DE SOUSA

Está de lucto a imprensa lu

भा र त

'जनसेवा ही ईश्वरसेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा॥

मिति आषाढ शु० ४ थी शके १८४७

आमचीं देवालयें

पानगलच्या राजेसाहेबांस त्यांच्या ६१ व्या वाढदिवसाप्रीत्यर्थ विजयापट्टणच्या रहिवाश्यांकडून एक मेजवानी देण्यांत आली. त्या वेळीं त्यांस अर्पण करण्यांत आलेल्या मानपत्रास उत्तर देतानां राजेसाहेबानीं 'तिरुपति देवस्थानच्या उत्पन्नांतून १० लाख रुपयांची शिल्लक राहते, तींतून बनारस युनिव्हर्सिटीच्या धर्तीवर 'श्री व्यंकटेश युनिव्हर्सिटी' स्थापन करण्याचा आपला हेतु व्यक्त केला. यावरून देवालयांच्या संपत्तीच्या विनियोगासंबंधानें ब्रिटिशहिंदुस्थानांतील जनतेचा कल कोणत्या दिशेनें वहात आहे, याची स्पष्ट कल्पना आमच्या वाचकांस होईल.

तिरुपति देवस्थानासारखीं गोमांतकांत लाखो उत्पन्नाचीं देवालयें नाहींत हें आम्हाला कबूल आहे. परंतु ज्यांचें उत्पन्न कित्येक हजारांवर आहे, अशीं कांहीं देवस्थानें आमच्यांत झळकत नाहींत, असें नाहीं. ह्या सर्व देवालयांच्या महाजनमंडळीनें मनांत आणल्यास, एखादी नांव घेण्यासारखी शिक्षणसंस्था अस्तित्वांत येण्यास अगदींच जड जाईल, अशांतला प्रकार नाहीं. पण वस्तुस्थिति इतकी चमत्कारिक होऊन बसली आहे कीं, एखाद्या देवालयाच्या 'बेकार उर्फ बैठ्या' उत्पन्नाचा व्यय शिक्षणप्रसारार्थ केला जावा, अशी एखाद्यानें शुद्ध हेतुपुरस्सर सूचना पुढें मांडल्यास, त्या देवालयाच्या मालक व चालक मंडळीकडून ही सूचना हृदयाशीं कवटाळिली जाईलच, याची खात्री देववत नाहीं.

गेल्या दहा बारा वर्षामागें आमच्या देवालयांच्या स्थितीचें चित्र रेखाटून भारतमित्र कै० दत्ताराम जगन्नाथ बोरकर यानीं एक लेख लिहिला होता. इतकीं वर्षें लोटलीं, तरी बोरकरानीं चित्रित केलेल्या चित्राच्या स्वरूपांत बदल झाला आहे, असें छातीठोक विधान करण्यास कोणी धजेलसें वाटत नाहीं. आपल्या त्या विचारपरिप्लुत लेखांत कै. बोरकरांनीं खालील मजकूर लिहिलेला आढळून येतोः–

"........... ....

आपलीं देवालयें ह्मटलीं ह्मणजे येथून तेथून अगदीं अजबखाने बनलीं आहेत. कोणतेंहि देवालय घेतलें तरी तेथें आज आपणाला विलक्षण प्रकार दिसतो! नाटकी मिजाशीचा लटका आव, कापट्यपूर्ण पूजा, एकतानवृत्तीचा भंग करणारीं विकट कारणें, ढोंगी भक्तमंडळ, अंध श्रद्धावान लोकांपासून युक्तीप्रयुक्तीनें पैसे उकळणारे पंडे–भटोबा, दुर्व्यसनी व आळशी लोकांस मनमुराद मिळणारा खुराक, वास्तव्यस्थानीं केलेल्या पातकांचें क्षालन करण्याकरितां जमलेला अनाथ युवतिजन व जुलमी पडदपोशीच्या जाचांतून मुक्त होऊन देवदर्शनाच्या मिषानें स्वातंत्र्योपभोग घेऊं पहाणाऱ्या बाया, हींच काय तीं थेट काशीपासून अगदीं रामेश्वरापर्यंत एकंदर क्षेत्रांत पुष्कळ पाहावयास मिळतात. ह्या शिवाय इतरत्र दुर्लभ असा आणखी एक प्रकार आपल्या इकडे आहे. तो धर्मसंरक्षणाच्या निमित्तानें चाललेला विश्वयोषितांचा बडेजाव हा होय. — निराकार विश्वेश्वर लहानशा प्रस्तरमय मूर्तींत संभवला आहे, अशी मनाची खात्री करून घेणें हेंच मुळीं विलक्षण. परंतु कांहीं भोळ्या भाविकांची इतक्यानेंहि तृप्ति होत नसून 'अवसर काढून' प्रत्यक्ष दर्शन घेण्यापर्यंत मजल पोंचली आहे. कदाचित हीं कामें शास्त्रसंमत, रूढिसंमत अ॒ शकतील. किंबहुना साकारभक्तीचा अवलंब करून विरूद्ध पक्षीयांच्या सप्रमाण मान्यापासून बचावहि होऊं शकेल. परंतु एखाद्या शूर राष्ट्रास कपटानें पादाक्रांत करून त्याच्यावर साम्राज्य सुख अनुभवणाऱ्या राजास प्रजेपासून मिळणाऱ्या जुलमाच्या रामरामासारखी परमेश्वराची दांभिक पूजा करून नरकाचें साधन करणें उचित आहे काय, असा प्रश्न आला असतां काय उत्तर देतां येण्यासारखें आहे, याचा अजमास आह्मास होत नाहीं. 'सकल राजोपचारार्थें अक्षता' ह्मणून तांदळाचे दोन दाणे फेकून दिल्यानें महंमुदासारख्याच्या पदरांत टाकलेलें ऐश्वर्य आह्मास परत मिळणें शक्य नाहीं, हें जितकें उघड आहे तितकेंच असल्या लटक्या थापानीं सर्वसाक्षी परमेश्वर फसणार नाहीं हें निर्विवाद आहे.––साकार पूजा ग्राह्य मानली तरी तिला तूर्तांची ताबुदी मिजास कशाला हवी? परमेश्वराच्या आराधनेंत राजैश्वर्याची अपेक्षा असते काय? आणि ती असती तर कट्टे भगवद्भक्त ह्मणून गाजलेले प्राचीन ऋषि किंवा अर्वाचीन तुकारामादि कवि, 'तुझ्या सेवेंत अनेक विघ्नें उत्पन्न करणारी जी संपत्ति ती परमेश्वरा! आह्मास नको' अशी विपरित प्रार्थना मोठ्या कळवळ्यानें जगदीशापाशीं कां करते? रुप्याच्या दिवट्या व सोन्याचे दंड वगैरे चिन्हें धारण केल्यानें परमेश्वर प्राप्ति होण्यासारखी असती तर आमच्या प्राक्कालिन ऋषीस निष्कांचन वृत्तींत किंबहुना सकलसुखविवर्जित स्थितींत आयुष्य घालविण्याचें कारणच राहिलें नसतें. हरप्रयत्नानें वर्गण्या जमवून एखादें देवालय स्थापलें असतें, आणखी आसमतात्भागीं देवाच्या जागृतावस्थेची खुणा मानलेलीं एक दोन सुंदर घरें उभारून दिलीं असतीं तर काम बिनतोड होऊन फुकाचें महाजनत्व पदरीं पडून वर कारभाऱ्याचें पद चालविण्याचा हक्क जन्माचा लाभला नसता काय?

संपत्तीच्या थाटानें परमेश्वरास आळवूं पाहणाऱ्यांपैकीं कोणाच्याच हातास आंजवर यश आले नाहीं, याचीं उदाहरणें आपल्या पुराण ग्रंथांत पुष्कळ आहेत. 'गुळखोबरें विलोकुनि भलत्याहि जनास, बाळक वळतो तसा परमेश्वर वळता तर दुर्योधनानें श्रीकृष्णास आपल्या आटोक्यांत आणून आदिपर्वांतच भारतग्रंथाची इतिश्री करून सोडली असती. पण इतकें लांब कशाला. तुकारामासारखा एकादा भगवद्भक्त देखील संपत्तीच्या मोहांत सांपडत नाहीं. मग विश्वपालकाला संपत्तीनें आळवूं पाहणें किंवा, त्याची थोरवी जाहीर करण्यास भव्य कागदी मंडप उभारणें, हें किती शहाणपणाचें काम आहे!

देवालयांच्या संस्था निर्माण करून तेथें संपत्ति जमवून ठेवण्यांत आपल्या प्रबुद्ध पूर्वज्यांचा हेतु मोठा उदात्त असला पाहिजे. केवळ परमेश्वराचें ध्यान करण्यासाठीं एकादी निवाऱ्याची जागा असावी एवढ्या उघड दिसणाऱ्या उद्देशानेंच या संस्थांची स्थापना झाली नसावी हें खास आहे. लहानशा पर्णकुटींत 'एकस्तपो' अशा स्थितींत करावयाचें ईश्वर भजन सध्याच्या कलियुगांत बहुजनसमाजानें करण्याइतकें सवंग कसें होईल? आपल्या समकालिन लोकांहून बुद्धिवर्चस्वांत जे अग्रगण्य ठरले ते आपले धोरणी पूर्वज ह्या महत्वाच्या बाबतींत मात्र इतके भोळसट झाले असतील हें संभवत नाहीं. ऋषीवरानीं दाखविलेला मोक्षमार्ग साध्य करण्यास त्यांच्या साधनमार्गाविरुद्ध वर्तन करण्यास त्यानीं आह्मास भाग पाडलें असेल अशी कल्पना करवत नाहीं. तर मग ऐश्वर्ययुक्त संस्था निर्माण करण्यांत पूर्वजांचा काय हेतु असेल, असा प्रश्न साहजिक उद्भवतो.

आंग्लदेशांतील ब्राह्मण, अर्थात ख्रिस्ती धर्माधिकारी मिशनरी लोक धर्मप्रसाराच्या कामीं अनेक युक्त्या योजित असतात हें बहुतेकांस ठाऊक असेलच. मोठ्या भव्य इमारती, मंजुळ व मनमोहक वाद्यें, रसाळ व्याख्यानें, सुस्वर गायन करणाऱ्या बाया, बायबलचीं तिखटमीठ लावून सांगितलेलीं पुराणें, इत्यादि प्रकार मोठ्या मेहनतीनें चालवित असतात. दानधर्माचें स्वरूपहि दिसून येतें. अनाथ लोकांस अन्नदान, गरीब लोकांत शिक्षणप्रसार, रुग्णजनांस औषधोपचार अशा रूपानें वगैरे वगैरे. आपल्यांतील धार्मिक संस्थांशीं या वरील युरोपी संस्थांचें साम्य आहे! बाह्यतः असें दिसत नाहीं काय कीं दोन्ही अगदीं सारख्याच असतात? इमारतींच्या स्वरूपांत थोडासा भेद दिसला, तरी भव्यतेंत कांहीं फरक नसतो. पुराणें, व्याख्यानाच्या ऐवजीं कीर्तनें व गायनवादनाच्या सोई ह्या तर आपल्यांत आहेत. किंबहुना आपल्या लोकांत ह्या शेवटच्या सोईचा जितका फडाका आहे तितका इतरत्र असेल असें वाटत नाहीं. राहतां राहिल्या त्या इतर सोई. तसल्या आपल्यांत नाहींत असें नाहीं, पण आहेत त्या बऱ्याच नासल्या आहेत. त्यांच्या मूळच्या हेतूस फाजील अंधपरंपरेची कीड लागलेली आहे. हेतुविपर्यास झाला आहे. ह्मणून परिणाम वैफल्य दिसूं लागले आहेत परमेश्वराच्या आराधनेंत देह तापविणाऱ्या ब्राह्मणास किंवा वेदाध्ययनांत विद्यार्थ्यांस पंचपक्वानाचें भोजन घालावयाचा पवित्र हेतु लोपून आशी भटोबांस पुरखला झोडायाची संधी सांपडली आहे. संस्थापकांचा उद्दिष्ट हेतु एका बाजूस राहून भलतेच ढंग चालू झाले आहेत. गांभिर्य नष्ट होऊन इष्किबाजी वाढली आहे. सत्पात्रदानाच्या महतीचा सगळ्यांसच विसर पडला आहे. संगीत नाटकें आणखीं रंगीत कागदी मंडप हेच पुण्यसंपादनाचे राजमार्ग झाले आहेत. ज्या ठिकाणीं गीर्वाण वाणीचा मंजुळ घोष कानांत पडावा त्या देवालया भोंवतालच्या अग्रशाळांतून बुल्बुलबाजांचे कर्णकठोर ध्वनि निघत आहेत. एकंदरींत रिकामटेकड्या व व्यसनीं लोकांस एकवटतां यावें इतक्यासाठीं देवालयाच्या संस्था अस्तित्वांत आल्या आहेत कीं काय, असा देखील संशय येतो.

धर्मकृत्यांत व्यय व्हावा एतदर्थ प्रयत्न करून जमविलेली संपत्ति, ना देवास ना धर्मास, अशा दारुकामाच्या आरोळींत, विषमपरिणामी नाचतमाशांत, क्षुद्र कलहोत्पत्तींत आणि रिकामटेकड्या व परान्नभुक मंडळीच्या उदरंभरणांत खर्च व्हावी या परती लजास्पद दुसरी कोणतीच गोष्ट नसेल. आह्मां निगरगट्ट, मंदबुद्धि, निर्लज्य, व अरसिक लोकांस या धार्मिक पैशाच्या पापभागी अपव्ययाबद्दल कांहींच वाटत नसलें तथापि अत्यंत पवित्र अशा हिंदुधर्माच्या उन्नत धर्मदानास ही गोष्ट खरोखर कालिमा लावणारी आहे. परधर्मी लोकांस हिंदुधर्माची टर उडविण्यास सवड देणाऱ्या लंगड्या बाजूंत ही प्रमुख आहे. 'आपलें नासें आणि जगाचें हंसें' ह्मणतात, तें कांहीं खोटें नव्हे.

लक्ष्मी ही कलियुगांतली एक प्रकारची शक्ति आहे. तिच्या योगानें हवें तें साध्य करून घेतां येतें. पण त्याला ज्ञानाची अपेक्षा असते. अज्ञानाला तीच अनर्थावह होते. धर्मादाव हा पुण्यसंपादनाचा एक मोठा मार्ग आहे. पण तोच कुपात्रीं झाला तर पापभागी होतो. 'ज्ञानावीण जी जी कळा ही जाणावी अवकळा' ह्मटलेलें आहे तें याचसाठीं. पाणीदार तरवार खरी, पण तीच मुर्खाच्या हातीं सांपडली तर घोर अनर्थास कारणीभूत होते. आपल्या धार्मिक संस्थांची गत कमी अधिक प्रमाणानें अशीच झाली आहे. गतानुगतिक धर्माभिमान्याचें पीक सध्याच्या काळांत मुबलक येत असतें. आणखीं अज्ञाच्याच हातीं बहुधा असल्या संस्थांचें प्रमुखत्व असतें. ह्मणून अंधश्रद्धेस ऊत येत असतो.

कुपात्रदानासारखें धर्मादावाचें भेसूर रूप कोणतेंच नाहीं. आपल्या पुराणग्रंथांत सत्पा-

समजुतीचा घोटाळा

लेखांक २ रा.

श्रीयुत अनंत नारायण नाइक पाटणकर ह्यांचा व माझा परिचय नसला तरी हे एक गुणी मनुष्य असून विद्वान ज्योतिषी आणि टिळक पचांगाचे कट्टे अभिमानी असें सिद्ध होतें. हे खऱ्याचे अभिमानी ह्मणून ह्यांचें मी कौतुक करितों. श्रीयुत पाटणकरांचें महत्व माझ्या कौतुकावर विसंबून नसलें तरी बहुरूप्याच्या खेळांतील शिशुवृत्तींतील विरवलाच्या टोपी सारखा हा साधारण प्रकार आहे. पाटणकरांची योग्यता सज्ञान ओळखतीलच पण अज्ञानांकडून ओळखली जाणें हें त्यांस भूषणावह आहे. ह्यांनीं भारतांतील स्वतःच्या लेखांत दिलेली ज्योतिषविषयक माहिती ही ज्योतिषदर्पणाचे जागीं आहे. तो एक चकचकीत अरसा आहे.

आरंभींच 'सजयति सिंधुर वदनो देवो' करितांना ते ह्मणतात कीं, 'कोणत्याहि शास्त्रासंबंधीं किंवा मुद्यासंबंधीं विधान करणें असल्यास तें साधक बाधक प्रमाणांचा पूर्ण विचार करूनच केलें पाहिजे.' पाटणकर महाराज! "विचाराची" प्राप्ति सहसा होत नाहीं. त्याच्या प्राप्त्यर्थ अनेक श्रम करावे लागतात. विचार संपादन करणें हें काम महत्प्रयासानें साध्य होतें. योगवासिष्ठाच्या मुमुक्षु खंडांत वसिष्ठानें ह्मटलें आहे:—

कोऽहं कथमयं दोषः संसाराख्य उपागतः।
न्यायेनेति परामर्षो विचार इति कथ्यते ॥

(भावार्थ:— या संसारांत मी कोण जन्मास आलों? माझ्यामध्यें कोणते दोष आहेत? न्यायानें परामर्ष कसा करावा? इत्यादि प्रश्नांचा ज्यांत निर्णय होतो त्यालाच विचार असें ह्मणावें.)

कितीएक टिळक पंचांगभक्तानीं शिष्टाचार चटसारा गुंडाळून व सभ्यतेस फाटा देऊन टिळक पंचांग प्रमाण नसलेल्यांवर क्लिष्ट शब्दांची शरवृष्टि केली आहे. उदाहरणार्थ: 'चटोरपणाच्या मदिरेची चट चांगलीच लागलेली दिसते. — बाष्कळपणाच्या मदिराधुंदीची मजल गेली आहे,—छातीठोक छातीठोक असा आक्रोश करून आपलीच छाती ठोकून घेत आहेत. — जनतेचा बुद्धिभेद करण्याचा अतिशहाणपणाचा दीर्घ उपद्व्याप २।४ गाळीव प्रतिनिविष्टानीं चालविला आहे. ...या अस्सल प्रतिनिविष्टांत छातीठोक आव्हानें आहेत. हातांत कंकणें भरल्यामुळें बुरखा घेऊन वर्तमानपत्रांत आपलें खरें नांव न देतां..., इ० इ०

येथें या टिळक पंचांग भक्तानीं चांगला विचार केला नाहीं. क्रोध नावांची त्यांच्यापुढें एक अडचण उभी राहिली. त्यामुळें त्यांच्या लेखांची किंमत माझ्या दृष्टीनें कवडीमोल ठरली. 'अस्मिन्मे मानसोद्याने रागनामा विषद्रुमः (माझें मन हाच एक बाग, त्या बागेंत राग या नांवाचा एक विषवृक्ष आहे असें एका पंडितानें ह्मटलें आहे. 'अध्यात्म रामायणांत ह्मटलें आहे:—

क्रोध एष महान्शत्रुः तृष्णा
वैतरणी नदी। संतोषो नंदन
वनं शांतिदेव हि कामधुक् ॥

(भावार्थ:—क्रोध हा मोठा शत्रु, तृष्णा [कीर्तितृष्णा] वैतरणी नदी, संतोष हें इंद्राचें नंदन वन आणि शांतता ही कामधेनु होय.)

नेहमींच्या व्यवहारांत आह्मांला क्रोध पछाडित असतो, परंतु तो लेखणीच्या द्वारें—सूड उगविण्यास—लगाम सुटून सणाट मैदानांत थयथयाट करणाऱ्या स्वैर घोड्याप्रमाणें तुफान होऊन व्यक्त करणें हें सुशिक्षित ह्मणविणाऱ्यांस उचित नाहीं. मुस्कटदाबी हवी तेथें चालत नसते.

"जैन विजय नामक ग्रंथांत भट्टपाद ऊर्फ कुमारिल भट्ट या संबंधानें संक्षिप्त चरित्र दिलें आहे, त्यांत जैमनीनें अंधुक प्रकाशित केलेलें कर्मकाण्ड सूर्याप्रमाणें भट्टपादानें प्रकाशित केलें. कर्मकाण्डाचा स्पष्टार्थ भट्टपादानें उत्तम रीतीनें दृग्गोचर केला. भट्टपाद दिग्विजय करीत करीत मेदिनीपुरांत (हल्लीं या शहरास मिदनापूर असें ह्मणतात) जेथें सुधन्वा राजाची राजधानी होती तेथें आला. वैदिक सांप्रदायी पंडित आलेला पाहून राजा स्वतः जैनधर्मी असतांहि, भट्टपादास तो सामोरा आला. इतकेंच नाहीं, तर विध्युक्त आदरातिथ्य करून त्याला योग्य सन्मान देण्यांस त्या परधर्मी राजानें अनमान केला नाहीं. राजाची निःसीम श्रद्धा पाहून भट्टपादानें त्याला आशीर्वचन दिलें...........

श्रुतिदूषक बुद्धलोकांतील एका चाणाक्षानें भट्टपाद शरीरानें जर अशक्त व त्यानें मलिन वस्त्रें परिधान केलीं आहेत असें पाहून मोठ्या जोरानें खालील प्रश्न त्यास केला:—

स्वदेहं शोभनं त्यक्त्वा
पुरुषाख्यं च संमतम्।
किं मूर्ख शून्यमात्मानं
देहातीतं करोषि भो ॥

(भावार्थ:— हे मूर्खा, स्वतःचें शरीर शोभायमान करण्याचें टाकून जो शून्य आत्मा त्यास देहापेक्षां श्रेष्ठ मानितोस त्याला काय ह्मणावें?)

या श्लोकांत मूर्ख हा शब्द मुद्दाम योजिला आहे. भट्टपादास राग येतो किंवा नाहीं हें पाहण्याकरितांच या शब्दाची योजना झाली...

भरसभेंत जरी मूर्ख ह्मटलें तथापि त्याचा राग न मानितां मोठ्या शांततेनें त्याच्या प्रश्नास उत्तर देण्यास भट्टपादानें सुरवात केली. ......". तात्पर्य, भट्टपादाला मूर्ख असें ह्मटलें तरी महानुभावाची प्रशांतवृत्ति डळमळली नाहीं.

टिळक पंचांग हा एक सूर्य असून त्याची दिप्ति दाखवायाला मशाली नकोत. खरें तें खरें व खोटें तें खोटें हें कालांतरानें तरी ठरणारच. खरें आहे त्याला कोणी खोटें ह्मटलें असतां वृथाभिमान वाहून तप्त निखाऱ्याप्रमाणें होणें हें अंमळ विचित्र आहे. खोटें, खोटें अशा अनेक आवृत्या होऊं लागल्यास प्रत्येकाकडे तंडण्यास किंवा त्यांना अविचारी आणि अज्ञानी ठरविण्यास आयुष्यांतील काल पुरणार नाहीं. तंडणारे विचारी असतांहि अविचारी असल्याची, स्वतःच्या कर्तबगारीनें साक्ष देतात, हें आश्चर्यजनक आहे. माझ्या तर्फे मी कोणत्याच पंचांगाचा अभिमानी नव्हे. 'गुणाः पूजास्थानम' ह्या न्यायानें ज्या पंचांगांत जो गुण दिसेल त्या गुणाचा स्वीकार करीत असतों. वर्षफलाचें संक्रांति फलाचें वगैरे भाषांतर देऊन संस्कृतानभिज्ञांचा निर्णयसागरी पंचांगानें पहिल्यानें फायदा केला, हाहि एक गुणच होय.

मी माझ्या लेखांत चंद्रदर्शनाचा निर्णय खोटा असें मुळींच ह्मटलें नाहीं; 'खोटा' हा शब्द अगदींच वापरिला नाहीं. शुद्ध पंचांगाचा निर्णय खरा कीं अशुद्धाचा खरा? इतकेंच ह्मणून चुकलों. प्रतिपदेचे दिवशीं चंद्रदर्शन होत नसतें, द्वितियेचा योगच असला पाहिजे, ही संथा मला कोणी घालून देण्याचा प्रयत्न करण्याची गरज नाहीं. जो निरक्षर असेल तो देखील तसें ह्मणणार नाहीं. मुनिसिपालटीचे कंदील पेटविणारा केव्हां केव्हां 'बीज केव्हां हाडे?' ह्मणजे द्वितीया केव्हां असा मला प्रश्न करीत असतो, कारण शुक्ल द्वितियेचे दिवशीं रात्रौ चांदणें असतें तोंपर्यंत कंदील पेटत नसतात. प्रतिपदेचे रात्रीं नेहमीप्रमाणें चालू असतें. प्रतिपदेची अंधारी रात्र हें त्या निरक्षर कंदीलवाल्याला देखील ठाऊक असतें.

चंद्रदर्शन खुल्या जागेंत आल्यावर, द्वितियेचे दिवशीं व्हावयाचें अशी माझ्या प्रमाणें कैक लोकांची दृढ समजूत असेलच. प्रतिपदेचे दिवशीं द्वितियेचा योग असल्यामुळें चंद्रमा खप्रदेशाच्या एका टोंकावर पडद्यांतून क्षणभरच डोकावून पाहणार ही कल्पना माझ्या सारख्या प्राकृतांना नसते, ती संस्कृतांना किंवा ज्योतिर्विद, अथवा शास्त्री, तसेंच आकाशस्थ ज्योतींचे चमत्कार ओळखणारे यांना असते. पंचांग हें फक्त संस्कृतांच्या उपयोगाकरितां नसतें, प्राकृतांसाठींहि असतें. पृथ्वीचा पृष्ठभाग पाण्यानें व्यापला असतो त्या मानानें प्राकृतांची संख्या ह्मटली तरी चालेल. ग्रंथकार ग्रंथात भरपूर टिपा देऊन तो ग्रंथ सुबोध करीत असतो. ह्याच आधारानें पंचांगकारानें अज्ञान्याच्या सोईकरितां व स्वतःच्या पंचांगाच्या प्रसारासाठीं पंचांगास परिशिष्ट जोडून माझ्यासारख्या अंधारांत भडकणारांस खुलाशाचा प्रकाश पुरविला पाहिजे अशा दिशेकडे जोंपर्यंत दृष्टि वळली नाहीं तोंपर्यंत पंचांगकाराची भूल असें मी समजतों. पंचांगकार ज्योतिर्विदांकरितांच पंचांगें तयार करीत असतील तर बोलणें खुंटलें. अंधाऱ्या रात्रीं दोन पांतस्थ मार्गक्रमण करीत असतां त्यांतील एक डोळस असतांहि खाड्यांत पडतो तर डोळस नसलेल्यांची काय वाट? शुद्ध पंचांगाचा सर्वत्र प्रसार करण्यास अज्ञान्यांच्या प्रत्ययास वरील सारखे प्रकार आणून दिले पाहिजेत; 'अरसिकेषु कवित्व निवेदनम' ह्मणून चालणार नाहीं. सरकारी कायद्यांतील कलमांची छाननी करितांना शब्द किंवा त्यांची अक्षरें तोलून करीत असतात. 'दृक् प्रत्ययास बरोबर आलें नाहीं,' याचा अर्थ 'खोटें' असा कायदेपंडित करणार नाहींत.—खोटें किंवा खरें नव्हे—असेंच असेल तर त्याला खोटें ह्मणतील.—शुद्धाचा निर्णय खरा कीं अशुद्धाचा निर्णय खरा?—हें माझें विधान अगर हा माझा सवाल संशयात्मक आहे हें कोणीहि निःपक्षपाती सांगेल. खोटें असें स्पष्ट विधान केलें नसतांना आरोप प्रस्थापित करून मर्यादेबाहेर जाणें त्याला मी मुस्कटदाबी हें नांव देतों.

कांहीं वर्षामागें ह्मणजे सन १८९० मध्यें एका उपयुक्त मासिकांत कोणी असा प्रश्न केला कीं, "प्रोफेसर रामकृष्णपंत भांडारकर यांचे प्रथम पुस्तकांत ए अथवा ओ याच्यापुढें अ आला असतां तो त्यांत मिळून जातो ह्मणजे त्याचा उच्चार होत नाहीं व तो लिहितहि नाहींत, त्याबद्दल ऽ असें चिन्ह (द्विखंड चिन्ह) बहुधा लिहितात, असा नियम असून सदर स्वरांशिवाय इतर स्वरांपुढेंहि हें चिन्ह लिहिलेलें आढळतें." ह्याच मासिककारानें असें उत्तर दिलें कीं, "प्रो. भांडारकर यांचे पहिल्या संस्कृत पुस्तकांत जरी असा नियम आहे तरी जेथें अ-चा लोप होईल तेथें एक (ऽ) व आ चा लोप होईल तेथें दोन (ऽऽ) द्विखंड चिन्हें द्यावीं". ह्या मासिककाराचा नवीन सिद्धांत पाहून खुद्द प्रो. भांडारकर किंवा त्यांचे अनुयायीं पुस्तकावर ताण कशी केली? अथवा पुस्तकांतील तो ए ओ चा नियम खोटा कसा ठरविला? असें ह्मणून घसरले नाहींत किंवा तुटून पडले नाहींत. शंका ह्या असतातच. शंका निरसन सौम्य रीतीनें करणें हें निःपक्षपातीपणाचें द्योतक होय.

टिळकपंचांग खोटें असें ह्मणण्याचा माझा रोख किंवा इरादा असता तर मडगांव येथील 'हिंदु' पत्रांतील 'मुद्रणकला' ह्या माझ्या लेखांत 'निर्णय सागराचें पचांग लोकप्रिय होण्यास त्याची उत्कृष्ट छपाई हें कारण दुजोरीं असावें' असें मीं ह्मटलें नसतें. त्यांतील निष्कर्ष काय निघतो? श्रीयुत पाटणकरांचा लेख २८ मेच्या भारतांत व माझा 'मुद्रणकला' हा लेख ३० मेच्या हिंदूंत प्रसिद्ध झालेला आहे त्या अर्थी पाटणकरांकडून आक्षेप निघाल्यानंतर मीं मुद्रणकलेचें विवरण करून अवतरणांतील वाक्य लिहिलें असें ह्मणण्यास जागा नाहीं, कारण अंतर दोनच दिवसांचें. सांखळींतील दत्तमंदिरांत देखील ग्रहणाचे दिवशीं वेधकालीं व्हावयाचीं कार्यें माझ्या शिफारशीवरून टिळकपंचांगाच्या आधारें आज दोन वर्षें चाललीं आहेत. शिफारस नेहमींच मान्य होईल असें माझ्यानें ह्मणवत नाहीं, परंतु टिळकपंचांगातील ग्रहणाचे काल प्रमाण मानून शिफारस केली, त्या पंचांगाचा अभिमानी ह्मणून नव्हे. हें लांबलेलें प्रकरण तिसऱ्या लेखांकांत पुरें होईल.

सारस्वत

—कळंगूट येथील त्रिबून पत्राचे संपादक डॉ. लिनुन्हालेरियु द सौज हे हृदयाची क्रिया एकाएकीं बंद होऊन ख्रिस्तवासी झाले.

O Bharat

A SER VERDADE...

Vezes sem conta temos dito e repetido, alto e bom som, neste mesmo lugar que o *Bharat* não abriga no seu peito sentimentos de hostilidade, inveja ou de odio por quem quere-instituições que nos regem e pessoas que formam a nossa sociedade.

Confessamos que a nossa critica toca, ás vezes, ás raias de mordacidade ou de desenfreado desassombro; mas isto, longe de significar producto de hostilidade, inveja ou de odio, representa, pelo contrario, consequencia natural e lógica da mais sincera sinceridade, despida do mentiroso manto convencional.

O Bharat procura, pois, ser justo na critica de pessoas e coisas e critica pessoas e coisas para o bem da sociedade que o substenta.

Preambulamos com essas palavras explicativas o editorial de hoje, para que ninguem veja nêle, ninguem vislumbre nas palavras que a seguir vão ser registadas intenção menos honesta da nossa parte.

Informam-nos que em alguns comandos policiais do nosso territorio ficam mal servidos os cidadãos que para a cobrança de suas dividas vão valer-se da protecção delês. O que nos narram é de provocar indignação ainda ás pedras inanímadas de calçadas, motivo porque o nosso jornal se faz éco das mesmas informações e narrações.

Lá vai um exemplo do que se passa em tais comandos

O António queixa-se ao comando de policia dum certo concelho, de que o Bartolomeu lhe fica devendo a importancia de 200 rupias, levadas a titulo de emprestimo, dinheiro que o queixado não paga ao queixoso, apesar de constantes pedidos e suplicas dêste áquele. E o *suplicante* António *esperando receber mercê pede deferimento* ao seu requerimento em que solicita do mesmo comando a *graça* de determinar que o devedor Bartolomeu pague a êle, Antonio a referida importancia em divida.

O comando *recebedor* da queixa intima o queixado Bartolomeu a comparecer no quartel de policia ás tais horas do dia tal do tal mez. Em cumprimento dessa intimação apresenta-se oBartolomeu perante aquela autoridade á qual, depois de por ela interrogado, confessa a divida e compromete-se a paga-la em duas prestações, cada de 100 rupias, sendo a primeira no dia 20 de tal mez e a segunda no dia 31 de tal mez e despede-se da referida autoridade

Chega o prefixo dia 20 do mez designado e o Bartolomeu paga no comando a primeira prestação de cem rupias. Aparece lá em seguida o António a *levantar* a parcela de sua divida. Responde-se-lhe então que *reapareça* no dia marcado para o pagamento da segunda prestação, isto è, no dia 31 do tal mez.

Surge este dia 31, mas sem noticias do Bartolomeu. A policia, porem, não descança; intima-o de novo e o Bartolomeu dá-lhe a sua *copia* e pede-lhe *novo praso.* Ainda desta vez não cumpre o prometido e torna a solicitar mais prasos e prasos ...

Entretanto, o Antonio solicita de novo o *levantamento* do dinheiro cobrado; mas o pobre do homem é *mandado embora*, dizendo-se-lhe que será chamado, no dia em que fôr arrecadada a segunda prestação, para *embolsar*, duma vez sò, toda a importancia devida pelo *caloteiro* Bartolomeu... E, como este senhor devedor numa paga a segunda prestação, aquele senhor crêdor nunca fica tendo satisfação á sua pretenção !!!

Eis a exemplificação resumida do que se dá em relação á cobrança de pequenas e grandes dividas em alguns comandos policiais no dizer dos nossos informadores.

Para que a expressão *alguns comandos* não contribua para criar uma atmosfera de suspeição contra *todos os comandos*, devemos declarar que tais factos de cobrança se davam com frequencia no comando de Sanguem, no tempo do antecessor do actual comandante e se dão ainda no de Pondá. Pelo menos as nossas informações se referem só a isso, nada constando contra o que se passa noutros em relação ao assunto de que se trata.

¿Será verdade o que nos informam? E' ao sr. Comandante Geral que cabe averigua-lo para o bem do prestigio da instituição que chefêa e do interesse publico que convem não ser espesinhado.

E depois do que ficou dito nas palavras preambulares, crêmos que ninguem se afoutará a atribuir-nos propositos menos leais e menos honestos na ventilação, ligeira e rápida, do importante e delicado assunto do presente artigo.

O que o *Bharat* deseja é que a Policia seja venerada, deven do ser respeitado, tambem, o interesse publico.

Só isto e nada mais.

CARA'TER GERAL DO GANDHISMO

V

Missão da India

A India e' a mais pacifica das nações que existem no mundo, sendo um pais que como um velho experimentado e estoicista, despresou por futil o simples progresso material e volveu a sua atenção para a cultura espiritual do seu povo. Comquanto dois mil anos antes estivesse este no auge do seu esplendor, do seu poderio na India nunca houve a devassidão da moral, o esquecimento de principios religiosos, abastardamento de caracter. Ela viu ruirem grandes nações que pelo seu imperialismo, pela sua extenção, pela sua aparente estabilidade parecia terem ganhado foros da eternidade.

Ela viu ruir a Grecia, viu rüir a Roma, viu tambem surgirem essas actuais nações europeias e dessas ruinas e dessas formações colheu a lição que desde se'culos foi a peculiaridade do seu cara'cter. Mas qual e' essa lição que a India colheu do seu longo passado e do exemplo dos outros povos? E' a sua convicção de que a suprema aspiração dum povo não e' o goso nem a sua ancia.

As nações que hoje pertencem a' idade antiga cairam porque eram monumentos sem bases solidas. A India viveu porque da moral era o seu interior penetrante e relativa a' felicidade eterna, a sua aspiração. Outros povos estudaram as coisas, adquiriram-nas para as suas comodidades e conveniencias, enquanto o indio sempre avido de decifrar misterios concernentes ao criador do Universo e o fruto da sua criação, que são a natureza e o homem, tornou-se sabio, filosofo, asceta Este caracter herdado a seus antepassados diferencia o indio doutros povos no tocante a' sua scicologia simples conversações entre indios ignorantes—diz um escritor ocidental—elucidam-nos melhor do que os sabios ocidentais, certos pontos obscuros da filosofia e os principios comuns a todas as religiões. A razão disso esta' em que por muito o dominio metafisico era exclusivo do indio.

Sociedades que não tem em abundancia, no seu seio — diz Mahatma Gandhi—individuos que reconheçam o valor da perfeição espiritual e saibam enfreiar energicamente as suas paixões, embora tenham momentos da prosperidade aparente, nunca, podem resistir a duros golpes do tempo. A America e' a mais civilisada das nações que se dizem civilisadas e encarada esta afirmação sob o prisma do progresso material, ela e' verdadeira. Mas a corrupção moral do americano, a sua extrema fraquesa espiritual não tardarão a deitar por terra esse admiravel edificio da civilisação. La' todos desde velhos ate' crianças andam numa furia louca da ancia de gozo, de prazeres sensuais. A religião, ninguem vai ver o que ela e'.

O imperio da Roma caiu porque o luxo, os prazeres de todas as sortes dominaram o povo romano que ultrapassando o limite da moral apressou a sua ruina. A igual revolução social esperam os sociologos americanos. Sob a capa da civilisação praticam-se toda a casta de imoralidades, todos os crimes, todas as asneiras que nos fazem corar de vergonha; Nesta hora iminente numa proxima catastrofe social o ocidente precisa de alguem que o salve da sua queda fatal, que lhe indique o caminho certo da felicidade, da paz, da estabilidade.

Esse alguem, esse salvador das nações americanas e europeias tem de ser a India que e' unica digna de o ser. Essa e' a firme crença do Mahatma'. A regeneração social dos povos

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

मिति आषाढ शु० ११ शी शके १८४७

हिंदीस्थानचा हिरा हरपला !

त्रैलोक्यदीपके देवे लोकान्तर मुपेयुपि
तमस्तान्तमभूद्विश्वं कः सुखी महदापदि॥

हिन्दीस्थान नुसतें दुबळें, निःशक्त व वलहीन असतें तर त्याची मोठीशी पर्वा नव्हती, किंबहुना त्याची वेहत्तरहि करणें शक्य झालें असतें; परंतु अत्यंत खेदाची व निराशोत्पादक गोष्ट अशी कीं, दुर्बलतेबरोबरच दुर्दैवाचा, दुर्भाग्याचा आणि कमनशिबाचा राहु हिंदुस्थानच्या भवितव्यतेस ग्रासून बसलेला आहे. दुर्दैवी भारतवर्ष ! कमनशिबी हिन्दीस्थानची निघत असलेली ही उलट्या अंबारींतील वरात पाहून कोणाला रडें कोसळणार नाहीं ? हिन्दीस्थानचा भविष्यकाळ उज्ज्वल व उद्दीपित करूं पहाणाऱ्या देशसेवकांपुढें आर्यावर्ताच्या ह्या दुर्भाग्यानें चोहोंकडे अंधार पसरून दिला असून ह्या निबीड अंधःकारांतून आपद्ग्रस्थ व असहाय्य हिन्दी जनतेची मुक्तता करूं पहाणाराच्या डोळ्यांत धूळ फेंकण्यास व शक्य तर त्यांचे डोळेच कायमचे मिटविण्यास भारतवर्षाची ललाटरेषा डोळ्यांत तेल घालून टपून बसलेली असते. आजपर्यंतच्या भारतवर्षाच्या इतिहासाचीं पानें चाळून पाहिल्यास आमच्यावरील ह्मणण्याची सत्यता पटून येईल. न्या. मू. रानडे अल्पवयांतच आह्मांस सोडून गेले. समाजसुधारणावादि आगरकर आणि भारतसेवक गोखले ह्यांचीहि तीच गत. जणूं काय एका संस्कृत कवीनें ह्मटल्याप्रमाणें निर्दय अंतकाला आमच्या उद्धारार्थ जन्मलेले हे नेते ह्मणजे कोंबड्या पुढें टांकलेलें माणिक असें वाटत असतें व त्यांस साजून दिसणाऱ्या सुवक सोनेरी कोंदणांत बसवून देवसभा सुशोभीत करावी ह्याच उद्देशानें तो राष्ट्रोद्धारकांवर अशी अचानक व अदय झडप घालतो.

ज्या अलैकिक–नव्हे अद्वितीय महात्म्याच्या शोचनीय व अकल्पित निधनावर डोळ्यांतून अश्रुधारा झरत असतांहि हलक्या हृदयानें, कांपऱ्या हातानें व रडत्या चेहऱ्यानें चार शब्द लिहिण्यास आह्मीं प्रवृत्त झालों आहों, तो हिन्दीस्थानचा हुतात्मा, आह्मांस दुःखानलांत लोटून दिवंगत झाल्याची हृदय भेदक बातमी आमच्या कानावर येऊन आदळली. देशबंधु दासांसारख्या हिन्दीस्थानच्या 'एकमेवाद्वितीय' अशा स्वार्थत्यागी नेत्याची निधनवार्ता बेजबाबदार तारवाल्यांवर विश्वंबून भरपूर पुराव्याच्या अभावीं प्रसिद्ध करणें अप्रशस्त व अनुचित होईल अशी स्वाभाविक भीति वाटल्यावरून कांहीं काळ आह्मीं ही गोष्ट गुपचुपच ठेवली. आमच्या भोळ्याभावड्या व आशावादी मनास वाटलें कीं इडापीडाटळून व अमंगळ दूर पळून आमच्या 'गुपिता'नें तरी ही बातमी खोटी ठरो. पण ह्मणतात नां! मानवी मन व ईश्वरी इच्छा ह्या दोहोंत जमीन अस्मानाचें अंतर असतें. स्वाभाविकच आहे. दुबळे मनुष्य जमनीवर असतात तर सबळ ईश्वर आकाशांत असतो. पण बोला फुलाला गांठ, काकतालीय न्याय. जमीनीवर रहाणाऱ्या मनुष्यावर आकाशवासी ईश्वराची सत्ता कां? असा देवरायांना स्पष्ट सवाल करण्याकरितां देशबंधुदास ता. १६।६ रोजी अगदीं कातरवेळेच्या अमदानींत जमीन सोडून अस्मानांत चालते झाले. ऐन तारुण्यांत नसलें तरी वयाच्या ५५ व्या वर्षी दासबाबूंना स्वर्गी गमन करावें लागलें, ही एकच गोष्ट आर्यावर्ताचें दुर्दैव व काळाचा अस्पृहणीय आपस्वार्थ सिद्ध करण्यास पुरेशी आहे.

वेळगावांस भरलेल्या राष्ट्रीय महासभेपासूनच देशबंधूंची प्रकृति अस्वस्थ होती. पण त्याचें शारीरिक अस्वास्थ, मोठ्या अभिमानाची गोष्ट ही कीं, त्यांच्या राष्ट्रसेवेच्या कार्यांत लुडबुड (interfere) करूं शकलें नाहीं आणि खरें सांगावयाचें तर हीच गोष्ट –राष्ट्रकार्याविषयीं फाजील काळजी–त्यांची इहलोकची यात्रा संपविण्यास कारणीभूत झाली. बंगाल कौन्सिलच्या गेल्या फेब्रुवारींत सुरू असलेल्या बैठकीच्या सुमारास त्यांची प्रकृति अधिकच बिघडली होती, आणि ती इतकी कीं, देशबंधूस धड उभेंहि रहातां येत नसे, मग चालण्याची गोष्ट दूरच तरीहि पण हा लोकोत्तर देशभक्त तशा अवजड स्थितींत झालें तरी जमाखर्च–मंजूरीच्या आणीबाणीच्या वेळीं कौन्सिल मंदिरांत (?) हजर रहाण्यास चुकला नाहीं. स्वतःच्या प्रकृतिस्वास्थाविषयीं बेफिकीर राहून राष्ट्रकार्यासाठीं आत्मयज्ञ करण्याची दासबाबूंची ही तयारी पाहिली ह्मणजे "परहितनिरता नामादरोनात्मकार्ये" ह्याच्या सत्यतेसंबंधीं संशय उरत नाहीं.

मध्यंतरीं त्यांची शरीर प्रकृति जरी सुधारत चालली होती तरी, सरकारशीं दोन हात करण्याइतकी ताकद त्यांच्या अंगांत लवकरच यावी; व खेड्यांत चळवळ करून "हिन्दी प्रजापक्षाचें राजकारण ह्याचा अर्थ चार स्वयंमन्य पुढाऱ्यांची तोंडपाटिलकी नसून देशांतील सूज्ञ व सुशिक्षित लोकांच्या आधाराबरोबर अज्ञ व अल्पशिक्षित वर्गाचाहि ह्या चळवळीस पाठिंबा आहे" हें सक्रीय सिद्ध करण्यास त्यांस शक्य तितकी लवकर सवड मिळावी, यत्प्रीत्यर्थ त्यांस स्कॉटलंडास जाऊन थोडे दिवस तेथें घालविण्याविषयीं तज्ञस्थित डॉक्टरानीं सल्ला दिली होती. पण आपलें परदेशगमन आपल्या अनुयायांस नामोहरम करण्यास कारण होईल व आपल्या हितशत्रूंस भलत्याच कंड्या पिकवण्यास त्या योगें सवड सांपडेल असें वाटून ते स्कॉटलंडला न जातां हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या 'दार्जिलिंग'ला जाऊन राहिले. हळुहळू त्यांची प्रकृति सुधारत चालली व हल्लींहल्लीं तर ते चांगलेच बरे होऊन महात्माजींनीं त्यांस भेटून त्यांच्याशीं जवळ जवळ चार तास खलबत चालविलें होतें. असहाय्य जनतेचा नेता मग तो दार्जिलिंगला राहिला काय अगर स्कॉटलंडास गेला काय ? राजकीय व्यवधानें याच्या आजोबाला थोडींच सुटणार ! तीं त्यांच्या पांचवीलाच पुंजलेलीं. हिन्दीस्थानच्या दोन प्रमुख पुढाऱ्यांमध्यें झालेल्या ह्या खलबताचा निष्कर्ष, दोघांच्याहि सहीनें एक पत्रक काढून आर्यावर्तांतील लोकसत्तावादि पक्षांनीं येत्या कॉंग्रेस कमिटीच्या बैठकीस हजर राहून एक सर्वसाधारण कार्यक्रम (common programme) ठरविण्याची त्यांस विनंति करावयाची असा निघाला होता. पण विजण्यापूर्वी दिव्याची ज्योत मोठी होत असते किंवा दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें ह्मणजे अलम दुनियेला हादरून सोडून जलप्रळयाचें भय घालणाऱ्या प्रळय काळाला सुरवात होण्यापूर्वी चारहि बाजूस स्मशानशांतता नांदत असते हा सर्व साधारण, सर्व विश्रुत व सर्वसंमत सिद्धांत दासबाबूंच्या बाबतींतहि अनुभवास आला असें ह्मणावयास हरकत नाहीं. ज्या संध्याकाळीं त्यांचा आत्मा इहलोक सोडून गेला त्या दिवशीं ह्मणजे त्या मंगळवारीं दुपारीं, आपणास अशक्तता भासत असल्याचें त्यांनीं आपल्या पत्नीस सांगितलें. तावडतोब डॉक्टरला बोलावण्याची व्यवस्था करण्यांत आली. पण "होणारें न चुके होईल जरी ब्रह्मा तया आडवा" हें कविवचन थोडकेंच खोटें पडायाला! परमेश्वरी संकेतापुढें डॉक्टरी विद्येची काय चीज ? "देवाजींची इच्छा पुरी झाली, कारण तो एकटाच समर्थ आहे" ह्या महात्मोक्तीप्रमाणें जग पारखणें शहाणपणाचें होय. शेवटीं–शेवटीं काय ? हिंदु–मुसलमान, ब्राह्मण–ब्राह्मणेतर ह्या जातिभेदांत व स्वराज्य–नाफेर, मवाळ–जहाल ह्या पक्षांत दुफाळलेल्या व स्वतःचें कर्तव्य विसरून भलत्याच भानगडींत पडलेल्या आर्यावर्तस्थलोकशाहीला कंटाळलेला दासबाबूंचा आत्मा इहलोक सोडून गेला. "ईश्वरेच्छा बलीयसी" दुसरें काय ?

पांचच महिन्यापूर्वी दासबाबूंच्या अतुलनीय स्वार्थत्यागाबद्दल अभिनंदनपर एक स्फूट आह्मीं खरडलें होतें. पण त्यावेळीं आह्मांला जर कोणी सांगितलें असतें कीं, नुसत्या पांचच महिन्याच्या अल्पावकाशांत आजच्या हंसऱ्या चेहऱ्याला ढळढळां रडावें लागेल, आनंदाश्रु ढाळणाऱ्या डोळ्यांवर दुःखाश्रूंची सर काढण्याचा दुर्धर प्रसंग ओढवेल, आनंदाचें हृदय शोकाच्या कढानीं फाटून जाईल, हिंदीभवितव्यतेच्या उज्ज्वलतेविषयीं पूर्ण आशावादी मनाला निराशेचे उष्ण उच्छवास सोडावे लागतील, आश्चर्यानें, आनंदानें व अभिमानानें कांपणाऱ्या हाताला पुन्हां कांहींदा दुःखातिशयानें थरथरावें लागेल, उत्साहानें फुरफुरणाऱ्या लेखणीला नाउमेदीनें, निरुत्साहानें व नैराश्याच्या खेदानें झुरावें लागेल — आणि! और क्या? हाय! हायरे! दुर्दैवा! अभिनंदनासाठीं —उधळलेलीं—कोमल कुसुमें त्याच्या चीतेवर जाऊन पडलेलीं पहाणाऱ्या फुटक्या नशिबाशीं आमची लगीनगांठ पडली असेल.

मोठ्या दुर्भाग्याचे आह्मीं लोक कीं एक देशबंधु दास जातांत त्यांच्या ठिकाणीं तितक्याच प्रतिभेचा, तितक्याच धडाडीचा, तितक्याच कळकळीचा, तितक्यात स्फूर्तीचा दुसरा 'देशबंधु' उत्पन्न होईल कीं नाहीं ह्याच्या विषयीं ज्यांस संशय वाटावा? नामर्द भारतवर्ष —— नामर्द नव्हे तर काय? भारतवर्षाची नामर्दाई त्यास अशीच पारतंत्र्यकर्दमांत रुतलेला ठेवणार. एक गोपीनाथ शहाच्या अंगांत उसळणाऱ्या, सळसळणाऱ्या राष्ट्रीय रक्ताच्या दरेक थेंबासरशीं एकेक गोपीनाथशहा उत्पन्न करण्याची धमक, छाती, मगदूर, हिंमत, ज्या हिंदीजनतेंत नाहीं ती लोकशाही भेकड नव्हे तर काय? मर्दुमकी नाहीं त्याची माणुसकी काय जाळावयाची आहे? "न तु एव आर्यस्य दास भाव" ह्मणणाऱ्या चाणाक्याचे वंशज भ्याड ... भ्याडांना तें स्वातंत्र्य मिळणार कसचें? व ते तें खाणार कशाशीं?

स्वातंत्र्य ही कांहीं अशी एक चीज नाहीं कीं जी अल्पश्रमानें मिळूं शकेल ! तें रस्त्यावर पडत नाहीं कीं तें झाडूवाल्यांच्या हातांत सांपडेल? स्वार्थत्यागी वीरांची हिमगिरीएवढी उंच रास रचावी, तेव्हांच हिमालयाच्या उत्तुंग शिखरावर आर्यावर्ताचें स्वातंत्र्य निशाण फडफडूं लागेल. राष्ट्रार्थ एका व्यक्तीचा आत्मयज्ञ ह्मणजे स्वातंत्र्य मंदिराची एक पायरीची चढण, एका व्यक्तीचा आत्मयज्ञ ह्मणजे परकीयांचा एक बालेकिल्ला काबीज.

दासबाबूंच्या चरित्रापासून जर कोणता धडा घ्यावयाचा असेल तर तो हाच होय. वस्तुतः दासाचा आत्मा इहलोक सोडून गेलेला नाहीं हें त्यांच्याच एका वेळच्या ह्मणण्यानें आह्मीं सिद्ध करूं इच्छितों. ते ह्मणतातः–"देशकाज हेंच माझें जीवित कर्तव्य होय. त्याच्या पूर्तीप्रीत्यर्थ सर्वस्वावर लाथ मारण्याची माझी तयारी आहे. आणि हें कार्य करतांना जर मला मरण आलें तर, मला खात्री आहे कीं, मी ह्या देशांत असे कैक जन्म घेईन, त्याच ध्येयासाठीं जीवंत राहीन, पूर्ततेची उत्कंठेनें वाट पाहीन आणि माझ्या आशेचें निवान माझ्या दृष्टीच्या कक्षेंत येईपर्यंत व हिंदुस्थान आपल्या विजयस्तंभाकडे जाऊन पोहोंचेपर्यंत सर्व जीवितसामर्थ्य, जन्मजात प्रीति एकवटून मी ह्या कार्याला वाहून घेईन."

ह्या संदेशांत दासबाबूंनीं ओतलेलें अंतःकरण किती पवित्र व त्यांत दिसून येणारी त्यांची देशभक्ति किती जीवंत, जोमदार आहे हें स्पष्ट करण्याची कांहीं जरूरी नाहीं. दासबाबूंच्या अंतःकरणांत प्रदीप्त झालेल्या

चारांची नेहमीच एकवाक्यता असते. असें नसल्यावरून, आचारांच्या 'शिता'वरूनच त्यांच्या उच्चाराच्या 'भाता'ची परीक्षा करण्याची वाट पाहिलेली बरी. शिवाय आतां घोडा काय मैदानापासून फार दूर नाहीं.

दुसरें काय ! :— गोमांतकांतील सर्व स्थानिक पत्रानीं देशबंधूंच्या निधनामुळें शोक प्रदर्शित केला असून त्यांच्या आत्म्यांस चिरशांति मिळण्यासाठीं परमेश्वराची करुणा भाकिली आहे. कित्येक पोर्तुगीज पत्रानीं तर दासबाबूंच्या गुणवर्णनाप्रीत्यर्थ रकान्याचे रकानें खर्चीं घातले असून त्यांच्या थोर मनोवृत्तीचें अनुकरण करण्याविषयीं तरुण मंडळीस प्रोत्साहन दिलें आहे. थोर पुरुष ह्मणजे थोर पुरुषच, मग त्यांचा जन्म कोठल्याहि राष्टांत अगर ज्ञातींत होवो. त्यांच्या कीर्ति रवीचे किरण सर्वत्र फांकत असतात. त्यांच्या दिव्य प्रतिमेची चमक सर्व लोकांच्या दृष्टींत भरत असते. व हेंच येथील पोर्तुगीज पत्रांतील हृदयस्पर्शी लेख एकवाक्यतेनें सिद्ध करतात. आश्चर्याची गोष्ट ती हीच कीं, ज्या येथील पत्रांना दासांसारख्या थोर विभूति माननीय असतात, त्यांसच त्यांच्या चळवळीचें अनुकरण देशहितविघातक वाटावें ! स्वभावाला औषध नाहीं दुसरें काय ?

उतरेल काय ! :— लष्करी शिक्षण सक्तीचें केलें जावें एतदर्थ डॉ. परांजपे ब्रिटिश हिंदुस्थानांत किती अविश्रांत परिश्रम करीत आहेत, याची ज्यानां थोडीशी जाणीव आहे, त्यांना या विषयाचें महत्व पटवून देण्याची गरज नाहीं. लष्करी शिक्षणानें शरीर तर सुदृढ बनतेंच, शिवाय मनाचा भ्याडपणा नष्ट होऊन त्याची जागा धीरोदात्त गुणसमुच्चयानें व्यापिली जाते, हें सर्वांस कबूल आहेच. अशा या तेजस्वी लष्करी शिक्षणाचा गोमांतकांत सर्वत्र प्रसार व्हावा, या शुद्ध हेतूनें सिं. रुवेर्त कोस्तानें कोंसेल्य लेझिस्लातीव्हाच्या गेल्या एका बैठकींत ठराव पुढें आणला व लिहिण्यास आनंद वाटतो कीं, तो एकमतानें पासहि झाला. आतां त्याच्या अंमलबजावणीकडे लोकांचें लक्ष्य लागून राहिलें आहे. न मागून मिळालेल्या आवतोनोमीसारखी या खटपट न करतां पास झालेल्या सक्तीच्या लष्करी शिक्षणाची गत न होवो, इतकेंच सध्या इच्छून, लवकरच तो कायदा अमलांत येवो, अशी आशा करतों. ही आमची आशा मूर्त स्वरूपांत उतरेल काय ?

—म. गांधी यांनीं दे. बं. दास यांच्या स्मारकासाठीं उभारलेल्या फंडास आतांपर्यंत अभिवचनें व प्रत्यक्ष आलेली रक्कम मिळून सुमारें दीड लाख रुपये जमा झाले आहेत. सर पी. सी. मित्र यांनीं ५०००, सर आर. एन् सरकार यांनीं १०००० व ॲडव्होकेट जनरल एस. आर. दास यांनीं ५००० अशा रकमा दिल्या आहेत. अनेक इंग्रजी व्यापाऱ्यांनीं लहान मोठ्या रकमा दिल्या आहेत.

बाजारगप्पा

प्रस्तावना

[ले. विनोदराव]

बाजारगप्पांचा उदय मूर्खांच्या बाजारांत होऊन, आळशांच्या दरबारांत त्या गप्पांना मोल चढत असतें. गप्प जरी क्षुल्लक असली, तरी सुद्धां शिळोप्याच्या वेळीं ह्या भिकारडीला, गप्पीदास प्रतिष्ठितपणें मीठमसाला लावून महत्व आणीत असतात.

'बाळपणीच्या आठवणीं', 'तात्या पंतोजींचा घाकदपटशा', 'देशभक्तांचे चाळे' वगैरे गप्पा आपण झोंकानोकानें सांगत असतों व सर्व जगत हास्यमय करून सोडतों.

बाजारगप्पांचा उदय "मूर्खांच्या बाजारांत" होतो. व हा बाजार हासोबच्या देवालयांत किंवा एखाद्या सार्वजनीक जागीं भरत असतो. कोणत्याहि क्षुल्लक गोष्टीला "पराचा कावळा, कावळ्याचा हत्ती, हत्तीचा ऐरावत" असा अधिकार पदक्रम प्राप्त होऊन ती गोष्ट राजरोसपणें सर्वांच्या तोंडीं वसते. ह्या गोष्टीशिवाय समाजाला चर्चा करायला दुसरें स्थान नसतें !

उमाकाकूला नदीतीरावर भांडी घासताना ठमाबाई मिळाली, कीं, पूर्वी ही गोष्ट दुसऱ्याला न सांगण्यावद्दलच्या आणाभाका होऊन, मग ती तिच्या कर्णरंध्रांत शिरत असते. ठमाबाई शद्बानुशद्ब हृदयांत सांठवून देसायांच्या पार्वतीमाईस देवळांत पुराण चालतानां श्रोते गप्प राहण्यासाठीं शु-शु-शु असा शुकशुकाट करीत असतांहि शेंकडा पन्नास टक्के शब्द व्याजानें सांगत असते.

पार्वतीमाईकडून 'ऐकलें का इकडे' अशा नांदीच्या विजयी मुद्रेनें ती सगळी हकीगत रामभाऊ देसायांकडे सादर करण्यांत येते. रामभाऊ प्रवचनाला गेले कीं, पगडी तोंडाआड धरून तपकिरीची डबी पुढें करून सदर हकीगत 'नव्या खबर बातेंत, वंडोतांस कथित होते व तीच खबरबात एकमेकांच्या गुरुमुखांतून आधुनिक सुशिक्षित तरुण (?) एकमेकांना भेटले, कीं सिगरेटच्या सुगंधमय (।) धुम्रपानांत ताज्या विलायती तारेंत गोविली जाते. एवंच ह्या क्षुल्लक गोष्टीला अनेक तोंडातून 'सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्ष सहस्रपाद' असें विराट स्वरूप येतें.

इतकें सांगावयाचें कारण हें कीं, मला जेव्हां सोडतींत तीन रुपये आले तेव्हां या गोष्टीला विराटस्वरूप येऊन ताज्य विलायती तारेंत पंधरा हजार रुपये नोंदण्यांत आले. या आनंदाप्रीत्यर्थ माझ्या नांवावर ब्राह्मणींत चहाचे पेले, लाडवांचे डबे फस्त होऊं लागले. ह्या प्रकरणानें मी इतका भांबावून गेलों कीं मला एक ब्रह्म फुटेनासें झालें !

कांहीं वेळानें ही गर्दी मोडली. ब्राह्मणीच्या व्यवस्थापकानें पांचशें रुपयांचा हिशेबी कागद माझ्या अंगावर टाकला व संध्याकाळीं येईन अशी नम्र सूचना करून, तो दिवाळी झाली, कुजक्या मालाचासुद्धां पैसा आला असें पुटपुटत गेला. त्या कागदानें माझी छाती अगदीं दडपून टाकली. सोडतींत आले तीन रुपये, आणि हे पांचशें रुपये भरावे कसे ? ह्या विचारानें मी धाडकन बिछान्यावर अंग टाकलें. हे पांचशें रुपये कसे भरावे, ह्या विचारानें मी उठलों. व लवकर जेऊन त्या तीन रुपयांस शिव्या देत स्वग्रामाचा त्याग केला. अग्नीरथानें त्या दिवशीं सूं ठोकल्या शिवाय गत्यंतर न व्हतें !

माझ्या राहत्या घराची जाहीर विक्री होऊन-करून-व्यवस्थापकानें आपले पैसे वसूल करून घेतले अशी बातमी मला उदरंभरणार्थ मी ज्या चहाच्या दुकानांत नोकरीला होतों तेथें कळली.

अशा रीतीनें ह्या बाजारगप्पा कुणाच्या पथ्यावर पडतात, कुणाच्या घरावर फिरतात तर कुणाच्या अंगचा दाह करतात ! एवंच हें बाजारगप्पांचें दैवत कलियुगांत फार जागतें आहे. पुढच्या गप्पा मी अशाच विराट स्वरूपांत विलीन झालेल्या सादर करीन. गप्पा आपणालाच उद्देशून आहेत असें समजून कोणी आपलें डोकें बिघडवून घेऊं नये, अशी विनंति करून ही लांबलेली प्रस्तावना पुरी करतो !

पत्रव्यवहार

आमच्या गोमांतक प्रांतीय क्षत्रिय भंडारी ज्ञातींत गेल्या एक दोन वर्षांपासून चांभारणीच्या संसर्गापासून बाटाबाट झालेली आहे, अशा समजुतीनें एक जाती प्रकरण चालू आहे. या प्रकरणाचा योग्य तऱ्हेनें निकाल लागून समाजांत स्वस्थता नांदावी ह्मणून त्या समाजांतील कांहीं व्यक्तीनीं श्रीजगद्गुरु शंकराचार्य संकेश्वर यांकडे त्यांच्या प्रतिनिधी मार्फत दादहि मागितली ह्मणतात. व त्या प्रमाणें निकाल लावण्याकरितां त्या धर्माधिकाऱ्यांनीं सभा वगैरे करून कांहीं ठराव केल्याचें सांगण्यांत येतें. परंतु त्याच समाजांतील कांहीं व्यक्तीनीं, ज्यांची अशाच प्रकरणावर उपजिविका चालते, अशानीं, हें प्रकरण असेंच भिजत पडून राहाण्याकरितां— कारण हें मिटण्यास जेवढी कालावधि लागेल त्या मानानें आणखी कुलंगडीं उपस्थित करून आपला तळीराम गार करून घेण्यास तितकी ज्यास्त सवड मिळते— ह्मणून धर्म गुरूंच्या प्रतिनिधींचाहि हात गार करून टाकला आहे अशीहि अफवा आहे.

यामुळें त्या समाजांतील बहुतेक लोक, संकेश्वर मठाधिपतींकडून ह्या प्रकरणाची योग्य प्रकारें चौकशी होऊन हें निकालात येत नाहीं ह्मणून, असंतुष्ट व क्षुब्द होऊन, संकेश्वर मठाशीं आपला शिष्य या नात्यानें असलेला संबंध तोडून महाभागवत श्रीजगद्गुरु शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांकडून या प्रकरणाची दाद लावून घेऊन, इतउपर त्यानां आपलें धर्मगुरुत्व पत्करण्याविषयीं विनंति करण्याचे प्रयत्न ह्मणून त्यांकडे पुष्कळ लोकांच्या सह्यांचा अर्ज गुदरला आहे असें ऐकूं येतें. तरी हें चांभार प्रकरण ह्मणजे आहे तरी काय ? व या धर्मगुरूंनीं तरीं अजून पर्यंत याची चौकशीच केली नाहीं काय ? मग हीं धर्मपिठें आणि त्यांचें ते धर्माधिकारी वगैरे जे आहेत तें कशा करितां तर ? धर्मसंस्थापना करण्याकरितां कीं, भोळ्याभावड्यांची दिशाभूल करून समाजांत अशा प्रकारची वेडी वाकडी प्रकरणें माजवून धर्मलंड बनविण्याकरितां ?

—धर्माभिमानी—

वर्तमानसार

—कै० देशबंधु दास यांच्या निधनाबद्दल शोक प्रदर्शित करण्यासाठीं ह्मापशें येथें ता १८ जून रोजीं तेथील सारस्वत विद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाची सभा भरून पुढील ठराव पसार करण्यांत आला. "देशबंधु चित्तरंजन दास यांच्या निधनामुळें ह्मापशांतील नागरिकांच्या सभेस अत्यंत हळहळ वाटत आहे. हिंदुस्थानच्या राजकीय क्षितिजावरील एक देदिप्यमान तारा आज एकाएकीं तुटून पडला. त्याच्या अकालिक व आकस्मिक मृत्यूमुळें त्यांच्या कुटुंबावर व स्वराज्य पक्षावर ही जा भयंकर आपत्ति ओढवली अ हे त्यांत अखिल हिंदुस्थानाप्रमाणेंच गोवा प्रांतहि त्याचा समभागी आहे. व हा संदेश दे० ब० दास यांच्या कुटुंबास कळविण्याकरितां त्यांचें मुखपत्र जें "फॉरवर्ड" त्यास पाठविण्याचा अधिकार ही सभा आपल्या अध्यक्षांस देत आहे."

—बार्डोली तालुका कांग्रेस कमिटींत सूत काढण्यांत निष्णात असलेल्या सभासदांस बक्षिसाकरितां ह्मणून आफ्रिकेंतून सहाशें रुपय रक्कम बार्डोली कांग्रेस कमिटीला मिळाली आहे.

—लाला लालचंद नांवाच्या एका पंजाबी गृहस्थानें कामधंदा न मिळाल्यामुळें वैतागून जाऊन विहिरींत बुडून जीव दिला.

—मोपला कैद्यांच्या सुमारें पांचशें बायकामुलांनीं अंदमानांत जाऊन वसाहत करण्याची कबुली दाखविली आहे.

—अखिल मुसलमानी पक्षाची ता. १६ तें १९ जुलैपर्यंत एक परिषद भरणार असल्याचें डॉ. किश्लुनीं जाहीर केलें आहे.

—स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या डब्यांवर स्त्रीचें चित्र लावावें, या बेळगांव रेल्वे मंडळाचे सेक्रेटरी श्री. नागेशराव मराठे यांनीं केलेल्या सूचनेप्रमाणें चित्रें तयार करण्याचा हुकूम सुटला असून तीं तयार होतांच स्त्रियांच्या डब्यावर लावण्यांत येतील असें मद्रास सदर्न मराठा रेल्वे कंपनीकडून उत्तर मिळालें आहे.

—कांतारा व कराची या शहरच्या दरम्यान दर आठवड्याला वैमानिक दळणवळण लवकरच सुरू होईल.

—खिशांत ठेवण्याचें एक हिशेबाचें यंत्र तयार करण्यांत आलें असून तें ९९९९९९९०९९०३ रकमेपर्यंत बेरीज, वजाबाकी व गुणाकार करूं शकतें.

—दे. बं. दास यांचें स्मारक ह्मणून स्त्रियांकरितां एक इस्पितल स्थापून नर्सिंगच्या शिक्षणाचीही सोय करावी, आणि ह्या कार्याकरितां दहा लक्ष रुपये वर्गणी गोळा करण्यांत यावी अशी जाहीर विनंति म. गांधी, लॉर्ड सिंह, सर सुरेंद्रनाथ बानर्जी वगैरें प्रमुख पुढाऱ्यांच्या सहीनें प्रसिद्ध झाली

"प्रत्यक्षं ज्योतिषं शास्त्रं चंद्राकौं यत्र साक्षिणौ"

या सूर्यसिद्धांतोक्तीनुसार फलज्योतिः शास्त्राचा, आर्यांच्या बृहत्पाराशर्यादि ग्रंथांपासून, पाश्चिमात्यांच्या दिनवर्षपद्धतीपर्यंत विविध मतें व ग्रंथाधार विचारांत घेऊन तात्विक पद्धतीनें व भौतिक शास्त्रानुसार अनुभव घेणें असल्यास समक्ष किंवा पत्रद्वारें कळवा. पुढीलप्रमाणें सर्व कामें शुद्ध व सूक्ष्म पद्धतीनें केलीं जातात.

वर्ग १ ला, आजन्मफलवर्णनाची मोठी पत्रिका रु. १० ते २५
व० २ रा, भावचलित गणिताची मध्यम प० रु. १०
व० ३ रा, सायन व निरयन मताची प० रु. ५
व० ४ था, शुद्ध व सूक्ष्म निरयन प० रु. ३
व० ५ वा, सर्व साधारण दशांतर्दशांची प० रु. २
व० ६ वा, साधी स्पष्टग्रहादिक प० रु. १ व जन्मटिपण ८ आणे.

शिवाय वर्षमासफलें, प्रश्न, मुहूर्त, पत्रिका पाहणें वगैरे कामें सप्रमाण व सोपपत्तिक अशीं आधुनिक कालास पटण्याजोगीं टाइमशीर करून देऊं. फलज्योतिषाच्या आस्थेवाइकांनीं अनुभव घेऊन खात्री करावी.

पत्ता:— नारायण अनंत नाईक पाटणकर मालक "ज्योतिष कार्यालय आणि श्री पांडुरंग–ग्रंथ–संग्रहालय" मु० पो० सांगें प्रांत गोवा.

अस्सल काश्मिरी कोकशास्त्र

(काश्मिरचे महाराज शंभूसिंह यांचे दिवाण पंडित कोके यांच्या चरित्रासह)

या ग्रंथांत ७२ प्रकरणें दिलीं असून त्यांत ११२ चित्रांचा समावेश केला आहे. स्त्री पुरुष संबंधाची सविस्तर माहिती त्यांत सूक्ष्म रूपानें ग्रंथित झाली असून, स्त्रियांच्या तसेंच पुरुषांच्या भेदांचें वर्गीकरण फार मार्मिक रीतीनें करण्यांत आलें आहे. स्त्री पुरुषांचे रोग व ते सहज रीतीनें सुधारण्याचें खात्रीचे औषधोपचार, यांचाहि प्रस्तुत कोकशास्त्रांत ऊहापोह केला गेला असल्यानें पुस्तकाचें महत्व फारच वाढलें आहे. नपूंसकत्व पार लयास जाऊन त्याची जागा पौरुष्यानें व्यापिली जावी, असें ज्यांस वाटत असेल त्यानीं तर सदरहू पुस्तक एकदां तरी वाचावेंच. जुनाट व्याधींवर रामबाण उपाय या एकाच पुस्तकांत पहावयास मिळतात. मनोवांच्छित संतती संबंधानेंहि या दुर्मिळ पुस्तकांत महत्वपूर्ण माहिती संग्रहित करण्यांत आली आहे. मूळ संस्कृत ग्रंथाचें आह्मीं मराठींत रूपांतर केलें असून भरपूर टीकात्मक व अनुभविक माहितीहि आह्मीं या मराठी कोकशास्त्रांत संकलित केली आहे. प्रत्येक वर्षीं सदरहू पुस्तकाच्या ५६ हजारांवर प्रति खपत असतात, ही एकच गोष्ट या जुन्या व दुर्मिळ पुस्तकाचें श्रेष्ठत्व सिद्ध करण्यास पुरेसी आहे. किंमत ट. हं. सह ४ रुपये. खालील पत्त्यावर पुस्तकें मागवावींत:—

International Publishing Company
INTERNATIONAL BUILDINGS
LUDHIANA PUNJAB

विष्णु रामचंद्र केणी यांचें दुकान

जुना बाजार—मडगांव.

स्थापना १८५०

सचोटीबद्दल प्रसिद्ध असलेल्या या अत्यंत जुन्या दुकानांत सर्व तऱ्हेच्या मालाचा भरीव स्टॉक असतो. निरनिराळ्या जातीच्या शाई, रंग, सिमीट, व्हेनीज, आबोक, हरतऱ्हेचें लोखंडी सामान (खिळे, करवती वगैरे) नाना रीतीचे जस्ताचे व तांब्याचे पत्रे व इतर सर्व संसारोपयोगी वस्तू सदर दुकानांत माफक दरानें विकल्या जातात.

दर एक, माल चोख, व्यवहार रोख

अनुभवानें खात्री करून घ्या !

BOA OPORTUNIDADE

Executamos, com maximo escrupulo e pontualidade, de harmonia com a nossa legislação, todas as dependencias do Tribunal Judicial, Repartição de Fazenda e doutras Repartições oficiais, de Salsete.

Conhecendo a fundo todo o jogo das Repartições oficiais, é natural que o publico interressado seja por nós bem servido. E', ás instancias de varios nossos amigos, que encetamos o referido serviço de solicitações.

Em vista ao publico interessado !

Raia Ramacrisna Quirtonim, MARGAO

ESTABELECIMENTO COMERCIAL
DE
Visnum Ramachondra Quenim

FUNDADO EM 1850

MERCADO VELHO-MARGAO

CONTA já mais de 73 anos de fundação o sobredito estabelecimento comercial. E' portanto um dos mais antigos da vila de Margão, mantendo relações com as mais afamadas firmas comerciaes e industriais da Europa e da America, paizes donde, em regra, importa todas as qualidades de tintas, aboc, oleos, verniz, linhança, cimento, gis etc. toda a sorte de artigos de ferro, como pregos, aldraves, cadeados, bisagras, parafusos, canos de ferro etc. especialidades de pastas de zinco lisas e concavas e as de cobre.

NO REFERIDO estabelecimento vendem-se tambem artigos alimenticios da primeira necessidade e todas outras mercadorias de que se acha bem provido.

BEM SERVIR O FREGUEZ E' O SEU LEMA
Experimentem que sempre lhes será proveitosa a experiencia !

हिंदु–भारत बेकरी

आ. यन्. कामत, मडगांव–गोवा.

या कारखान्यांत ताज्या पिठाची बिस्कीट, पाव वगैरे रुचकर पदार्थ तयार करण्यांत येतात. निर्भेळपणाच्या बाबतींत आमचा माल दुसऱ्या कोठच्याहि मालाला हार जाणार नाहीं. दर माफक.

O BHARAT

PARA S. EXCIA. LER

Vivemos no século das democracias. Ha muito tempo que a República, o govêrno do povo pelo povo, foi proclamada nesta colonia. Não obstante, em tempo algum talvez, durante os quatro séculos da dominação portugueza, a disconfiança do povo pela administração pública foi maior, mais radicada do que no momento que atravessamos.

Não é preciso aprofundar muito, não se faz necessario inquirir à larga para discobrir a causa do mal. Ela pouco tem que-vêr com a psicologia do povo, a sua educação ou historia. Ela reside unica e exclusívamente na incompetencia, confusão, anarquia e indisciplina que campeia infrene nos serviços que o Estado mantem e fiscaliza.

O governo, se encarregasse uma comissão fazendo dela parte um representante da imprensa que aqui é astuciosamente qualificada de *imprensa de oposição*, de proceder a um inquerito sobre a marcha dos serviços pùblicos da colonia, teria ensejo de pôr os seus olhos num quadro algo lamentavel.

E' verdade. Para exemplo lá estão os nossos serviços de Navegação Fluvial e os serviços telegrafo-postais, os dois que pela sua funcção especial encontram-se em contacto mais intensívo e extensivo com a grande massa da população do Pais. O que aì se passa é uma autentica vergonha, como qualquer dia prometemos demonstrar por meio de factos.

Ha dias um jornal de Bombaim publicava a noticia de que os funcionarios graudos de Mapuçá escusavam-se de frequentar a repartição, dando o despacho em casa com grave prejuizo dos interessados. Isto que se diz acêrca dos funcionarios de Mapuçá pode-se repetir a proposito do geral dos funcionarios do paiz, grandes e pequenos, pois se aqueles despacham sem sair da casa, estes vão á repartição só para assinar o ponto.

São inumeros os requerimentos de caracter urgente que mezes e anos ficam sem serem decididos Ha processos nos tribunais judiciais e administrativos que arrastam-se com vagar de giboias fartas. Não è raro das nossas repartições desaparecerem documentos juntos dos processos.

Tudo isto se passa e ninguem refila, porque não consta que pelo menos até onde nós sabemos, tenha sido castigado ou simplesmente censurado um funccionario por *tão pouco!*

Nas nomeações para lugares, as normas seguidas não honram a administração. O favoritismo é a moeda corrente. Nos liceus ha professores que sairam reprovados nos concursos para magisterio secundario e nunca se reabilitaram. Ha outros que entraram sofismando a lei.

As administrações do concelho estão algumas entregues á gente, sem nenhuma cultura nem competencia especial, e cuja unica bagagem literaria é a certidão de exame de instrucção primaria e uma carta de advogado provisionario alcançada via *Universidade de Quepem.*

Eu suma ... o que não raro se vê de todos os lados, em todos os serviços, é a incompetencia, é a indisciplina, é a preguiça, é a confusão e um desprezo completo, absoluto, sistematico pela conveniencia e interesses do povo que trabalha e súa e em beneficio do qual, lá dizem os mestres, o Estado existe com a sua complicada e despendiosa maquina administrativa.

O sr. Mariano Martins traz para lema do seu governo este distico—*moralidade e justiça* — a crêr no que um filho desta terra comunicou para um jornal de Ma gão.

S. Exia. não podia encontrar pendão mais adequado;—Justiça para todos;—Moralidade em tudo—Porque,—por mais que aí se proclame que o nosso mal é devido á crise economico-financeira,—S. Excia. ha de verificar que o nosso pior mal é a crise de competencia, competencia quere sob o ponto de vista intelectual, quere sob o ponto de vista moral, crise esta que de ano a ano agravada, criou no espirito do povo uma disconfiança na administração pública.

Antes de mais urge, pois, restabelecer no público a confiança perdida na sinceridade, valor e utilidada da entidade politica Estado. Enquanto esta confiança não volte, de pouca vantagem serão os esforços dos governos em promover o progresso do paiz. E querem saber porque? Porque nunca nenhum governo fez a felicidade de um povo sem o concurso dêsse povo.

João de Algo

ECOS E CRITICA

GASTANDO A' DOIDA

O diario de Bombaim *The Indian Daily Mail* de 30 de junho publica um aviso convidando pretendentes para o lugar de professor do "Agriculture College and Research Institute" de Mandalay, Birmania.

O candidato tem que provar além de curso superior de Botanica, prática do ensino daquela sciencia ou a sua competencia para trabalhos de investigação na especialidade, competencia cabalmente demonstrada.

O lugar é mediante contrato por 3 anos, sendo o ordenado de 300 rupias pago pelo governo da Birmania que è a parte do Imperio Inglez, onde os vencimentos passam por ser relativamente elevados.

Aqui está, sr. Mariano Martins, um professor dum Instituto de ensino superior tecnico com competencia para trabalhos de investigação original, pago na riquissima Birmania a 300 rupias. E os professores de um obscuro liceu como o de Nova-Goa, a ganharem entre 400 a 500 rupias mensais!

Não ha duvida que estamos gastando á doida. S. Exia. ha de concordar.

UM AVISO UTIL

Consta que a Direcção de Fazenda vai submeter á apreciação do sr. Governador Geral a reclamação dos professores de nossos liceus, em que os mesmos vem pedindo que o seu serviço de exames seja pago a 4.500 reis ou 15 rupias.

O sr. Mariano Martins vem com o louvavel intuito de equilibrar o orçamento, e lá estão os professores, a parte da população que temos a obrigação de supor ilustrada e patriotica, a esforçar-se a arrancar do nosso exausto tesouro mais não sabemos quantos milhares.

Como um aviso, logo após a posse, é altamente útil para o governo de s. exia. E' sempre bom saber-se em que terra estamos e a gente com que vamos lidar.

ESTRAGOU TUDO

O sr. dr. Peixoto Vieira deixou depois de quase tres meses o lugar de encarregado do Governo da India.

S. exia. durante o tempo em que teve nas suas mãos a chancela do Estado—nada fez, salvo nomear administrador do Concelho de Damão "um advogado pela Universidade de Quepem" e administrador das Confrarias de Bardez, alguem que nem é "advogado pela Universidade de Quepem".

Com estas duas portarias s. exia. quebrou a sua norma de governar, e creia, estragou tudo!

UNICO REMEDIO

Começou a *sie* de sempre. Ouve-se em toda a parte, nas salas, nos clubs, nas lanchas e nos balcões, que o sr. Mariano Martins é amigo do Fulano: que, quando esteve na India, tratou muito com o Cicrano: — que o Beltrano espera muito do governo de s. exia, porque está recomendado a s. exia por alguem da Metropole.

Não é preciso ser profeta para advinhar donde partiram es

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा॥

मिति आषाढ व० ४ थी शके १८४७

नवे प्रांताधिपति

इंग्रज सरकारचें प्रत्येक कृत्य—राष्ट्रसंघातर्फे भरविल्याजाणाऱ्या शांततापरिषदेंत भाग घेण्यापासून तों तहत निर्बळ प्रजेवर तोफा डागणाऱ्या डायरास पेन्शन देण्यापर्यंतची प्रत्येक हालचाल 'पीस एन्ड ऑर्डर' [Peace and Order] या त्रयोदशाक्षरी मंत्राच्या गडगंज पायावर उभारलेली असते ही जितकी सत्यास धरून आहे तितकेंच किंवा त्याच्याहिपेक्षां तसूभर जास्त आमच्या मावाप पोर्तुगीझ सरकारची हरएक अजब करणी अंदाधुंदी व अव्यवस्था या अकारद्वयाच्या अजस्र आधारावर अधिष्टित झालेली असते हें सत्यांशपरिप्लुत आहे. दरएक तांतडीच्या कामांत दिरंगाई, महत्वाच्या राजकारणांत अंदाधुंदी, सर्वच सर्व बावतींत अव्यवस्था, आणि प्रजाहिताच्या बाबतींत अस्मानी सुलतानी जणूं काय या लोकांच्या पांचवीलाच पूजलेली. धूर्त अधिकाऱ्यांची भरमसाट व बेबंध स्तुति करण्याच्या स्वीकृत व्रतापासून आमचे सामान्य व्यवसायबंधु सि. प्रोव्हिन्सकार हे कदाचित् मागें ढळले असतील अगर पुढें ढळतील, नव्या काबिजादींतील जेंतिवांचा उद्धार करण्यासाठीं सींत चोहींकडे खिस्ती मठ स्थापन करण्यांत यावे, या आपल्या दांतीं धरलेल्या मुद्यांची पडती बाजू सांवरून धरण्याच्या कर्तव्यापासून ' आ इंदिय पोर्तुगीझ'कार च्युत झाल्याचें एखादें तरी उदाहरण दाखवून देतां येईल. पण मलबार किनाऱ्यावरील गोमांतक काबीज केल्यापासून पोर्तुगीझानीं अंधश्रद्धेनें चालवलेलें वरील व्रत मोडून आपल्या दिगंत कीर्तीस काळिमा लावण्यास ज्यांत पोर्तुगीझ पुढें सरसावले असें एकहि उदाहरण आजपर्यंतच्या इतिहासांत घडलेलें नाहीं असें प्रत्यक्ष सैतानासहि कबूल करावें लागेल. गोमंतकावर अधिकार गाजवण्यासाठीं नेमल्या जावयाच्या गव्हर्नराच्या निवडणुकीच्या बाबतींतहि हीच गोष्ट प्रत्ययास येते.

पहिल्यानें नियमित ५ वर्षांची मुदत भरतांच दो. जाइम द मोराईस यांची पोर्तुगालास हकालपट्टी व्हावयास पाहिजे होती. परंतु आज जातों उद्यां जातों या ठरीव सबबीखालीं आपलें निजधामप्रयाण विलंबावर टाकून अखेरचीं 'बांकेत झोडण्यांतच डॉ. मोराइसांनी ४ महिन्यांचा काळ कसाबसा लोटला. तिकडे पोर्तुगालच्या 'सुखवस्तु' पार्लमेंटांतहि नवीन गव्हर्नरांच्या निवडणुकीचें घोंगडें जशाचें तसें भिजत पडलेलें पाहून त्यांचें मन स्वतःचा तळीराम गार करून घेण्यास, निर्भय झालें. पण तसें झालें ह्मणून येऊन ठेपलेली वेळ थोडकीच चुकायाला. शेवटीं होय नाहीं ह्मणतां ह्मणतां एकदांचें दरवारचें आमंत्रण येऊन थडकलें व. आपलीं ५ वर्षे ५ महिन्याची चिरस्मरणीय कारकिर्द संपवून डॉ. मोराईस एकदांचे गेल्या एप्रील महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत पोर्तुगालास रवाना झाले. असें सांगतात कीं जातांना त्यांनीं बरेंच रत्तल तूप स्वतःच्या पोळीवरून स्वदेशाप्रत नेलें.पण लोकांनीं त्यावेळीं मुळींच कुरकुर केली नाहीं. एकदां 'लंचांड' जात आहे तें जाऊंद्या. चुकून हातूंन साप मेला तर त्याचें श्राद्ध वाढण्यात आह्मी इतके रुपये खर्च करतों; मग ह्यानींच आपली तुंबडी भरून घेतली तर त्यास आडवून आणखीं विकत श्राद्ध घ्या कशाला?

सेक्रेतार जेरालच्या हातात कारभाराची वस्त्रें सोंपवुन डॉ. मोराईस निजधामाप्रत गमन करते झाल्यानंतर दुसरा प्रश्न सहजिकच असा उद्भवला कीं, आतां गोमांतकाची गव्हर्नरशीप मिळणार कोणाला ? पोर्तुगालांत तर ह्या गलेलट्ट पगाराच्या जागेकरतां उभ्या राहिलेल्या प्रतिष्टित 'उमेद'वारांची अहमहमिका लागलेली. प्रत्येक जण आपलें घोडें पुढें दामटण्यास 'पैशापाड' झटूं लागलेला. ह्या वेळेस तियें सुरू झालेल्या दंगलीस उपमा ह्मणजे मुंबईच्या महालक्ष्मी रेसची. महालक्ष्मीस ज्याप्रमाणें प्रत्येक जॉकी आपला घोडा 'विजयी' व्हावा ह्मणून इरेस पेटून घोड्याच्या व आपल्या जीवाविषयीं बेफिकीर राहून उडती फेर घेत असतो त्याचप्रमाणें पोर्तुगालांतहि प्रत्येकपक्ष, आपल्या उमेदवारास विजयश्रीनें माळ घालावी एतदर्थ पदरास पडलेल्या खाराचा हिशेब न करता तनमनधन सर्वस्व खर्ची घालूं लागला. ह्याचा अर्थातच परिणाम असा झाला कीं महालक्ष्मी रेसचे प्रेक्षक व उदार आश्रयदाते जसे ह्या घोडदौडीकडे उत्सुक अंतःकरणानें टक लावून पहातात तसेच येथील पोर्तुगीज पत्रें व वरिष्ट अधिकारी अनिमीष नेत्रांनी ही गव्हर्नरीकरिता लागलेली पोर्तुगीज शर्यत पाहूं लागले आणि ज्याप्रमाणें महालक्ष्मी रेसचे आश्रयदाते आपलें घोडें दुसऱ्याच्या पेक्षा रेसभर पुढें गेलेलें पाहून आनंदानें टाळ्या पिटतात अगर मागें पडलेलें पाहून तेच हात कपाळावर मारून घेतात तसेच आपल्या मताचा उमेदवार यशस्वी होण्याचीं अस्फूट चिन्हें दिसूं लागतांच अंमलदार वर्ग पार्थ्यः झोडूं लागत आणि वृत्तपत्रें ती बातमी स्पेशल पुरवणीनें जाहीर करून खास अंकाद्वारें यशस्वी उमेदवाराचें छोटेखानीं चरित्र प्रसिद्ध करूं लागत. पोर्तुगालच्या पार्लमेंटांतील घोड दौडींत व मुंबईतील महालक्ष्मीच्या घोड दौडींत किती हें साम्य.

गोमांतकाच्या गव्हर्नरकीच्या वस्त्रांसाठीं पोर्तुगालास लागलेल्या ह्या शर्यतींत प्रमुखतः ५ मानवी घोडीं सामील झालीं होतीं. पहिल्यानें बातमी आली कीं पासुस द आर्कूनीं इतरांवर कुरघोडी केली. त्याबरोबर त्याच्या पक्षाची गोमांतकस्थ घोडीं फुरफुटलीं. लगेंच बातमी आली कीं सि. आर्कु पडले व का मोयेझस हे विजयी झाले. लगेंच दुसऱ्या दिवशींच्या त्या पक्षाच्या वृत्तपत्रांत त्यांचें चरित्र व 'त्याचें पुढील धोरण' ह्या विषयावर अग्रलेख फडकले. पण लगेंच दुसरी, तार थडकली कीं, सि कामोयेझस ह्यांच्या चपट्या नाकावर सि. मार्तीस ह्यांनीं मिरीं वाटलें. ह्याहि बातमीनें चोंहिकडे धांदल व धांवपळ उडवून दिली. ह्याच्या चौथ्या दिवशींच विद्युत्प्रवाहानें दुसरा संदेश आला कीं सि. रॉश ह्या नावांच्या एका गड्यानें कुस्तींत सि. मार्तीसांची पाठ भूईस लावली. पण हेंहि पारडें फिरण्यास वेळ लागला नाहीं व शेवटीं सि. मार्तीसच येथील गव्हर्नराच्या जाग्यावर नेमले गेल्याचें निश्चित वृत्त येऊन आदळलें. आणि हे सद्गृहस्थ आपल्या अधिकारावर रुजू होण्याकरितां पोर्तुगालहून येथें येऊन दाखलहि झाले.

सि. मारियानु मार्तीस हे हीं अधिकार वस्त्रें धारण करणार असल्याचें जाहिर झाल्यावर स्वभावतःच गोमांतकीयांना त्यांच्या राजकीय मतांविषयीं उत्कंठा लागून राहिली; आणि ह्मणूनच मडगांवच्या 'आ तेन्द' पत्राच्या पोर्तुगालस्थ प्रतिनिधीनें त्यांची तेथें मुलाखत घेतली. ह्या मुलाखतींत पुढील धोरणाविषयीं प्रश्न विचारला जातांच "परिस्थितीप्रमाणें येथील राज्यकारभार हांकण्याचें" व न्याय देवतेच्या उज्ज्वल कीर्तीस जेणें करून कलंक लागेल असें कोणतेंहि कृत्य न करण्याची पूर्ण खबरदारी घेण्याचें आपलें भावी धोरण सि. मारियानु मार्तीस ह्यानीं जाहीर केलें. "मी शब्दावडंबराचा चहाता नसून कृतीचा भोक्ता आहे" असेंहि त्यांनीं त्या बातमीदारास बजावून ठेवण्यास कमी केलें नाहीं.

' तेन्द ' कर्त्याच्या प्रतिनिधीशीं सि. मार्तीससाहेबानां काढलेल्या उद्गारांबद्दल व दिग्दर्शित केलेल्या भावी धोरणाबद्दल आह्मांस जें कांहीं लिहावयाचें आहे तें सर्व पुढील अंकीं लिहू.

—तारीख २८।६।२५ रोजीं मोरर्जी येथें श्रीशिवाजी संघातर्फे चालू असलेल्या शारदा विद्यालयाच्या जागेंत बॅ. देशबंधु दास व श्रीमंत सर माधवराव शिंदे सरकार यांच्या अकालीं झालेल्या निधनाबद्दल दुःख प्रदर्शनार्थ जाहीर सभा रा. विष्णु वि. ह्ळसकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरली. सदर प्रसंगीं रा. प्रभाकर मो लेले हेडमास्तर श्रीशिवाजी स्कूल ह्मापशें, शारदाविद्यालयचे हेडमास्तर रा. एस्. व्ही राददगांवकर व अ. मास्तर अ. गो.तिरोडकर यांचीं समयोचित भाषणें झालीं. नंतर सर्वांनीं उभें राहून गंभिर वृत्तीनें दुःखवट्याचा संदेश पास केला. सदर ठराव उभयतां कुटुंबाकडे पाठविण्याचा अधिकार अध्यक्षांस देण्यांत आला.' असें रा. बाबलो विठ्ठल आराडकर हे कळवितात

स्फुट विचार

ह्मापसेंची सभाः— गेल्या ता. १।७।२५ बुधवार रोजीं ह्मापसेंच्या 'ज्ञानप्रसारक संघा'च्या तरुण मंडळानें गावांतील एकंदर हिंदु व्यापारी वर्गास विनवून कै. दासांच्या निधन दुःखप्रदर्शनार्थ दुकानें बंद करावयास भाग पाडलें, व संध्याकाळीं बाजारांतील प्रशस्त जागेंत कै. दासांची श्वेत पुष्पहारविभूषित प्रतिमा उच्चासनीं मंडीत करून डॉ. सिनारी यांच्या अध्यक्षतेखालीं दुःखप्रदर्शनार्थ मोठी सभा भरविण्याचें ठरवून सर्वत्रांस निमंत्रण केलें. त्याप्रमाणें बहुतेक व्यापारी वगैरे मंडळी जमा झाली. परंतु ऐनवेळीं डॉ. साहेबांस येण्यास सवड न झाल्यामुळें, ते येतील ह्मणून पुष्कळ वेळ वाट पाहिल्यानंतर निराशेनें श्री. रवळू शेट खलप यांस अध्यक्षस्थान स्वीकारण्यास विनंति केली व त्यानींहि मंडळाच्या विनंतीस मान देऊन तें मान्य केलें व रीतीप्रमाणें अध्यक्षांची निवड झाल्यावर सभेस सुरुवात झाली.

दे. दासांचें स्मारकः—— वरील सभेंत देशबंधूंच्या गुणवर्णनपर अनेक वक्त्यांचीं भाषणें झाल्यावर वैद्य रामा भिवा मोरजकर याचें व्याख्यान होऊन त्यानीं दासांच्या स्मारकार्थ ह्मासें येथें अत्यंत जरूर असलेलें हिंदुनिराश्रितांकरितां एक 'हिंदु अनाथ रुग्णालय' स्थापन करण्याची कल्पना सभेपुढें मांडली. अनाथालयाची आवश्यकता असण्याचें कारण ह्मणून मोरजकरांनीं तिकडे गेल्या दिवसांमागे एक अनाथ हिंदु मरणास टेकलेला कोणी त्राता नसल्यामुळें खिस्ती अनाथालयात जाऊन बाप्तीज्मा देण्यापूर्वीच मेल्याची व नंतर त्यास हिंदु पद्धतीनें दहन केल्याची हकीकत सांगितली. पण आश्चर्याची गोष्ट कीं, त्याच्या या कल्पनेला किंवा ठरावाला त्यांच्या मागून बोललेल्या एकहि वक्त्यानें दुजोरा किंवा पाठिंबा दिला नाहीं ! इतकेंच नव्हे, तर खुद्द अध्यक्ष महाराजांनींसुद्धा आपल्या समारोपीय भाषणांत वैद्याच्या नावांशीं सांगड घालणाऱ्या त्या रुग्णालय स्थापनेच्या ठरावाचा उल्लेख करण्याचा दिलदारपणा व्यक्त केला नाहीं ! एवंच ह्मापसेंच्या या सभेपासून शोकप्रदर्शनापलीकडे दुसरा कोणताहि चिरस्थायी स्वरूपाचा असा परिणाम घडून आला नाहीं.!

दोन कारणेंः—— ह्मापसेंच्या उपरिनिर्दिष्ट सभेचा इतक्या विस्तारानें उल्लेख करण्याचीं कारणें दोन आहेत. कोणत्याहि एका कृतीस कोणत्याहि मल्लीनाथीनें ब्रिटिश राजकारणाचा वास येण्याचा संभव असला ह्मणजे डॉ. सिनाऱ्यांसारखे सरकारी कामगार त्या कृतींत प्रामुख्यानें भाग घेण्याचे ऐन प्रसंगीं लटक्या आजारानें किंवा नाटकी तऱ्हेनें एकाएकीं कसे गुप्त होत असतात, हें तेथील श्रीपांडुरंगाच्या वरप्रसादानें पूर्णपणें समजण्याची पात्रता ज्या लोकांत अजून उत्पन्न झाली नसेल तर ती व्हावी, हें पहिलें कारण. व एखादी उपयुक्त संस्था निर्माण

विस्तार भयास्तव थोडाच संवाद मासल्या-दाखल देतोः

“**मूर्खानंदः**—सत्यवक्ता? सनातनथी चालत आवेला लोहार, सूतार, सलाट (शिल्पी इ० पाथरवट), कंसारा, सोनी (सोनार) एओनीं किया वर्णमां गणना करवा जोइए?

भावार्थः— सत्यवक्ते महाराज ? अनादि कालापासुन चालत आलेले लोहार, सुतार, पाथरवट, कांसार, सोनार ह्यांची कोणत्या वर्णांत गणना केली पाहिजे ?

सत्यवक्ताः—जगतना आधार एवा जे भगवान विश्वकर्मा परिब्रह्म छे तेना पांच मुखथी पांच उपर बतावेला ब्राह्मणो उत्पन्न थयेला छे ते सर्व गर्भथीज ब्राह्मण छे.

(**भावार्थः**– जगाचा आधार असा जो भगवान विश्वकर्मा परब्रह्म आहे त्याच्या पांच मुखांपासून उपरिनिर्दिष्ट ब्राह्मण उत्पन्न झाले आहेत. उपरिनिर्दिष्ट ब्रा० – मनु, मय, त्वष्टा, तक्षा, शिल्पी. मनूपासून लोहार, मयापासून सुतार, त्वष्टांपासून कांसार, तक्षापासून सोनार, शिल्पीपासून शीलादिकाम करणार ह्मणजे पाथरवट इत्यादि ह्या कामांत मोडणारे ’ ते सर्व गर्भापासाव ब्राह्मण होत.)

इतकें ह्मणुन ‘ अने त्रणे कालमां तेना वंशमां शूद्रपणूं छेज नहीं. ’ ह्मणजे तीन त्रिकाळ त्याच्या (मनु, मय इत्यादिकांच्या) वंशांत शूद्रपणा नाहींच.

“ घनच्छन्न दृष्टिर्घनच्छन्नमर्कं यथा मन्यते निःप्रभंचाति मूढ ः॥ तथा बद्धवद्भाति यो मूढदृष्टेः सनित्योप लब्धिस्वरूपोऽ हमात्मा ॥

टीका– आड आलें मेघमंडळ॥ तेणें निज दृष्टीसी जालें पडळ॥ हें नेणोनि मूढ केवळ॥ रवि आच्छादिला मानी ॥ १ ॥ आणि ह्मणे प्रभाहीन जाला ॥ तोचि न्याय येथें घडला ॥ अज्ञानें आभास आवरिला ॥ विपरीत मानी ॥ २ ॥ ”

ही गुजराथेंतील वरील पांच ज्ञातींतील लोकांची गोष्ट आहे, हिचा गोमांतकाशीं कांहींच संबंध नाहीं. असो. विप्रयांतर झालें. ओघानुसार ज्ञातिज्ञातींतील ब्राह्मण होण्याच्या धडपडीचा एक मासला स्वतंत्रतेचा महिमा लक्ष्यांत येण्यासाठीं दाखविला.

कविकुल गुरु कालीदास, भारवी कवि इत्यादिकांमध्यें देखील समजुतीचा घोटाळा होऊन, कालीदासानें वाग्देवीला [सरस्वतीला] ‘ आइ रंडे, आइ रंडे ’ असा शद्बप्रहार केलेला आहे. कवि भारवी ज्याच्या ‘ सहसा विदधीत न क्रिया मविवेकः ’ (कोणतीहि गोष्ट एकाएकीं अविचारानें करूं नये] इत्यादि श्लोकाचें रुईच्या पानावर कांट्यानें कोरलेलें अर्ध एका सावकाराच्या हातून स्त्रीपुत्र हत्या न घडण्यास सरळमार्गदर्शक झालें, तोंच भारवी समजुतीच्या घोटाळ्यामुळें स्वतःच्या बापाच्या कपाळावर धोंडा घालण्यास सज्ज झाला होता, तेथें आमची काय कथा! एकदां सरस्वति देवी नदीतीरावर कंदुक क्रीडा करीत असतानां जवळ कालीदास व दंडी हे कवि होते, त्यावेळीं, माझ्या [illegible] जो उत्तम काव्य रचील तो खरा कवि असें सरस्वतीदेवीनें ह्मटलें. दोघेहि शीघ्र कवि; पडल्या फळाची आशा; दोघानींहि वेथल्यातेथें काव्य रचून दाखविलें. सरस्वती देवीनें मान डोलवून ‘ कविर्दंडी कविर्दंडी कविर्दंडी न संशयः ’, कवि असा दंडी ह्यांत संशय नाहीं, अशी दंडीची प्रशंसा केली. कालीदासाला हें न खपून ‘ आइ रंडे आइ रंडे, हे रांडे हे रांडे, असे शद्ब त्याच्या तोंडून निघाले, तोंच सरस्वतीनें ‘ त्वमेवाहं न संशयः ’, तूं आणि मीं एकरूप आहों असें ह्मणून कालीदासांचें समाधान केलें. ही गोष्ट फार वर्षांमागें कोठें मी वाचली होती. स्मरणांत आहे त्याप्रमाणें उतरून घेतली. चूक असल्यास माफी मिळावी.

कवि भारवीची गोष्ट पुढें लिहिल्याप्रमाणें:

“ कवि भारवी ह्याची बुद्धि फारच तीक्ष्ण असल्याबद्दल त्याची लहानपणापासूनच मोठी ख्याति असे. त्याचा बाप जेव्हां कोठेंहि वादविवाद करावयास जाई तेव्हां तो सुद्धां मुद्दाम मुलाला बरोबर नेत असे. बाप वादविवादांत कोठें हारी जात आहे असें दिसून आल्यास मुलानें आपल्या पांडित्याच्या जोरावर त्याची बाजू सांभाळण्यासाठीं किंवा कधीं कधीं स्वतःच वादविवाद करीत असावें. मुलानें कितीहि सयुक्तिक कोटिक्रमास धरून जरी उपपादन चालविलें असलें तरी बापानें मध्येंच उठून ह्मणावें कीं ‘ यात कांहींच अर्थ नाहीं ’ अशा रीतीनें बोलण्यांत निरर्थक पाडाव करून तो त्याचा नेहमीं तेजोभंग करी. मुलाला बापाचें हें बोलणें विषवत् वाटे. तो मनांत ह्मणे कीं, इतके परिश्रम करून मी मघांपासून जें पांडित्य केलें त्यांत स्वतः माझ्या बापानें माझी मानहानी केली, आणि तीहि उगीच्या उगीच. एकदां मोठमोठ्या विद्वज्जनाची एक सभा भरली होती, त्यांत भारवीनें इतक्या उत्तम रीतीनें पांडित्य केलें कीं, खरोखरच त्याच्या शत्रूंनीं देखील त्या वेळीं माना डोलविल्या असत्या, ह्मातारा जो उठला त्यानें दुसरें तिसरें कांहीं पाहिलें नाहीं; तर एकसारखी त्याची दररोजच्यापेक्षां जास्त खरडपट्टी काढण्यास सुरवात केली. भारवीचें देहभान सुटून बापास आतां जिवंत ठेऊन उपयोगी नाहीं असा त्याच्या मनाचा केवळ निर्धार झाला. त्यास असा उपाय सुचला कीं रात्रौ बाप निजला असतां डोकीवर धोंडा घालून त्याचा प्राण घ्यावा. जिकडे तिकडे सामसूम झालें असें पाहून आमचा चरित्रनायक बिछान्यावरून हळूच उठला आणि हळुहळु चांचपत अगदीं बापाच्या बिछान्याशीं येऊन भिडला. हातांतून दगड आणलेलाच होता. तो तेथेंच थबकला तों त्याच्या कानीं खालील संवाद पडलाः–

आई–आज सकाळीं सभेंतुन आल्यापासून माझा बाळ भारवी एक शब्द बोलला नाहीं. कीं त्यानें घांसभर अन्नहि खाल्लें नाहीं. मला वाटतें सभेंत आपण त्याचा कांहीं तरी अपमान केला असावा.

बापः— अग तूं काय खुळी आहेस ? तुझ्या मतें काय मी त्याला अज्ञान समजुन रागावतों ! त्याची योग्यता मी पुरी ओळखतों. माझी सुद्धां प्रत्यक्ष योग्यता नाहीं त्याच्यापुढें बोलण्याची, पण मी रागावतों त्यांतलें मर्म फारच निराळें आहे. मी त्याची अशी मानहानी करितों म्हणूनच तो आहे त्यापेक्षां ज्यास्त विद्वान होण्याच्या महत्वाकांक्षेनें अधिकाधिक ग्रंथावलोकन मोठ्या ईर्षेनें करितो. मला काय त्याचें वाईट पाहिजे ? कां मी त्याचा वैरी आहे ? तो आज जेवला नाहीं तर उद्यां जेवील, पण ग्रंथावलोकन आज नाहीं झालें तर का म्हातारपणीं होणार ? बापाचें हें भाषण ऐकून आमच्या पितृघातेच्छु कवि वर्याची स्थिति काय झाली असेल याची वाचकहो तुम्हींच कल्पना करा.”

विस्तारभयास्तव ही गोष्ट अगदीं संक्षेपांत दिली आहे. ‘सहसा विदधीत......’हा श्लोक अनुभवानंतरचा हें सांगणें नलगे.

झालें. होतां होईल तों समजुतीचा घोटाळा सुधारण्याचा मी प्रयत्न केला आहे. ‘Earnest discussion is commendable; but factions argument never yet produced a good result’ सरळ मार्गाचा वादविवाद स्तुत्य असतो, भांडखोरपणानें पुढें करू जाणाऱ्या मुद्यांचा परिणाम चांगला होत नसतो, हा वरील इंग्रजी भाषेंतील उपदेश लक्ष्यांत आणुन छातीठोक आव्हान्याचा समाचार घेणाराचें मीं अनुकरण केलेलें नाहीं. टिळक पंचांग खोटें असें कधीं मीं म्हटलें नाहीं. तें खरें असें म्हणण्यास मी ज्योतिषी नाहीं. कुंभार हा घटाचें परीक्षण करील. तलवारीचें करूं शकणार नाहीं. तरी पण जें विद्वानास मान्य तें पंचांग खरेंच असलें पाहिजे ह्यांत संशय नाहीं.

अशी कल्पना करू कीं, दक्षिण ध्रुवाकडे [टोकाकडे] एक दिगंबर दीक्षित आणि उत्तर ध्रुवाकडे एक विष्णुशर्मा हे टिळक पंचांगाविरुद्ध चकार काढणारांचें पारिपत्य करण्यास उभे राहिले, तर पंचांगाचा विजय होण्याचे जागीं उपहासच होण्यास हे कारण होतील. हा मुस्कटदाबीचा काल नाहीं. विद्वत्तेच्या जोडीस अंतःकरणाचा सुशिक्षितपणा असला पाहिजे. मनाचा थोरपणा हें भूषण आहे. जेथें हे सद्गुण नाहींत त्यांची विद्या निष्फळ असें मी समजतों. जें खरें तें नेहमी खरेंच. शंभरांतून नव्वदानीं दिवसास रात्र म्हटली तर आम्हीं इकडचें आकाश तिकडे करण्याची संधि साधून घ्यावयाची नाहीं. ह्या प्रकरणांत मी आणखी बोलूं इच्छित नाहीं. कुत्सित बुद्धीचा आश्रय न करितां सहजच जातां जातां माझ्या लेखणींतून उतरलेल्या दोन तीन ओळींमुळें श्रीयुत पाटणकरांस बरीच तसदी पडली ह्याबद्दल दिलगीर आहें.

सारस्वत

—‘श्री सारस्वतां”नीं भारतांत लिहिलेल्या ‘समजुतीच्या घोटाळ्यांत फारच महत्वाचे घोटाळे झाले असल्यानें ‘भारत’ांत याबद्दल सोपपत्तिक असें विवेचन येणार आहे असें रा. पाटणकर लिहितात.

बाजारगप्पा

बालशिक्षण

[ले०:— विनोदराव]

मनुष्याची मोठेपणींची स्थिति त्यांच्या बाळपणाच्या शिक्षणावर अवलंबून असते. लहानपणीं आईबाप जो कित्ता मुलापुढें ठेवतात त्याप्रमाणें ता पुढें बनत असतो. शिवाजी महाराजांना मातोश्री जिजाबाईनीं लहानपणींच तसे धडे घालून दिल्यामुळेंच पुढें ते राज्यसंस्थापक झाले. नेपोलियन बोनापार्टला असेंच शिक्षण मिळालें होतें. तो ह्मणतो ‘मुलाचें पुढें बरें किंवा वाईट होणें हें सगळें त्याच्या आईवर अवलंबून’ ?

वरील गोष्टीला कांहीं अपवादहि आहेत. उनाड शामूला विद्यादेवी प्रसन्न होण्यासाठीं त्याच्या आईबापानीं कितीतरी प्रयत्न केले, पण त्या प्रयत्नाचा त्याच्यावर काहींएक उपयोग झाला नाहीं.ही मराठी क्रमिक दुसऱ्या पुस्तकांतील गोष्ट सर्वांना अवगत आहेच. एखादेवेळीं घरांतील जाणत्या मंडळीचा आदर्श वाईट असतांहि पूर्व सुकृतें करून मुलगा कोळशाच्या खाणींत हिरा ह्या ह्मणीप्रमाणें उतरत असतो, पण असल्या गोष्टी क्वचित् घडून येतात. आईबापानी लावलेल्या वळणाप्रमाणेंच मनुष्य पुढें बरावाईट निपजत असतो, हेंच खरें व्यवहारसूत्र आहे.

शिनूमामा शिवाजीप्रमाणें कां बनले नाहींत, कारवारे केरी गांवी जन्मूनहि प्रती जिवबादादा बक्षी कां झाले नाहींत, ‘वकाल’ कां झाले? तर त्याना लहानपणांपासून तसें शिक्षण मिळालें नाहीं, हेंच उत्तर आपल्याला येईल. कोणी गवत पेरून जर गव्हांची अपेक्षा करूं लागला, तर लोक त्याच्या अकलेची तारीफ करूं लागतील यांत शंका नाहीं.

शिनूमामाना लहानपणीं त्यांची आई त्यांना पाळण्यांत घालून झोंके देतांना किंवा घांस घालतांना ‘किरामोरांनो तुह्मी पातळ नाचात’ हें पद ह्मणत असत. ह्या पदाचा चिरंजिवांवर कांहीं परिणाम होत नसला तर ‘शिनू मझो शिनू घरदार जळूं पूण शिनू मझो खेळूं’ हें पालूपद घोळवून घोळवून गात असत.लहानपणांपासून ही दोन पदें नित्य कनवर पडत गेल्यामुळें, शिनूमामांवर सद्या त्यांचा इतका परिणाम झाला आहे कीं, शिमग्यांत कलावंतीणींच्या मध्यें उभे राहून, सनईच्या “किरामोरांनो” या मधूर पद्योलापावर हातांत चवरी धरून ते असे नाचतात कीं, पहाणारांच्या माना आपोआप (लाजेनें) खालीं वांकतात. “शिनू मझो शिनू” याहि पदाचा त्यांजवर असाच भरपूर परिणाम झाला आहे. एके दिवशीं दारूच्या निशेंत हातीं कोलीत घेऊन नाचतां नाचतां मौजेनें ती घरावर टाकून याहि पदाची सांनीं चांगली चीज केली. त्यावेळीं शिनूमामांच्या स्वर्गस्थ मातेच्या नेत्रांतून आनंदाश्रु बाळाचा दिग्विजय पाहून खात्रीनें (निरानं

O BHARAT

PARA S. EXCIA. LER

O sr. Mariano Martins, no seu discurso da posse, lembrou de impostos para matar o nosso deficit orçamental.

Nós bem sabemos que o recurso lembrado por s. excia. è uma arma velha, experimentada, mas nem sempre com o resultado que da formula se esperava. Ha impostos que enchem os cofres publicos de dinheiro. Ha impostos que causam a ruina do tesouro. S. exia. não ignora isto e tanto que limitou cautelosamente a latitude de sua afirmação, ressalvando os impostos que perturbam a economia do pais.

Convem, pois, que antes de se pensar em decretar novos impostos, se procure saber quanto é que a India hoje paga, porque via e forma paga, se ela, na situação economica em que se encontra pode pagar mais, se os impostos até hoje lançados e cobrados, são todos criteriosos ou se pertencem á classe de impostos a que o Lord Ruthmere denominou "impostos que devoram os impostos."

Para obter estes esclarecimentos ou dados s. excia. não pode limitar-se a ouvir o Conselho Legislativo, tem que ouvir a Imprensa, tem que ouvir os interessados, aqueles em quem os impostos incidem.

Um inquerito assim feito não ha duvida que leva tempo e preciso se torna que seja guiado por pessoas competentes, honestas e sobretudo dotadas de um são patriotismo que não hesita em proferir toda a verdade, dôa a quem doer, custe a quem custar. Só assim e só então que a solução de imposto como meio (um dos meios está claro) de acabar com o deficit terá o merito de ser bem acolhida por todos, pelo menos pela parte sensata do pais, que é o que mais importa.

O que nós queremos, portanto, é que o governo reuna elementos seguros e precisos para se organisar o nosso sistema tributario em novas bases, bases modernas e scientificas, de maneira que o imposto, em vez de ser um estorvo para a vida economica do país, como ao presente sucede, constitua um verdadeiro estimulo para o trabalho e para a producção despertando iniciativas latentes que existem, e muitas, neste país.

Não basta, todavia, explorar sómente uma avenida de tantas que levam ao equilibrio orçamental. Ha outras não menos importantes, sendo a principal a revisão da tabela de vencimentos do nosso funcionalismo, sobretudo da parte dele que aufere mais de 125 rupias mensais.

A causa do desequilibrio orçamental do pais teve por motivo a creação de novas funcções, algumas delas desnecessarias e outras inoportunas; teve por motivo tambem a elevação absurda em certos casos do ordenado do pessoal burocratico.

Para V. Exia. saber, sr. Governador, o nenhum senso a que subordinou a fixação dos vencimentos; para saber a que erros e desparates conduziu a norma seguida da calcular aqui em rupias, tomando a rupia a 350 réis, os vencimentos fixados ao empregado da Africa, de igual categoria, ai tem uns exemplos frisantes.

V. Exia., de certo, conhece Japão. E' o imperio; é a quinta potencia mundial; industrialmente, financeiramente, economicamente està hoje ao par, senão acima, da propria Inglaterra—Pois bem. No Japão, sr. Mariano Martins, o presidente do Supremo Tribunal de Justiça, ganha menos do que o presidente da Relação do Estado da India. No Japão os ministros recebem do Estado tanto ou menos do que um chefe de serviço entre nós.

Tem V. Exia. alguma duvida em crêr no que vai dito? E' facil certificar-se. Partugal tem em Tokio representação diplomatica, que devidamente solicitada, não terá duvida em fornecer ao governo da India os esclarecimentos sobre o assúnto, esclarecimentos que muito contribuirão para s. exia., pelo confronto, verificar o regime financeiro de perdularios e insensatos em que vamos vivendo.

Se no alto funcionalismo ha muito onde cortar, não é menor nem mais chocante o escandalo, autentico escandado que vai no nosso Liceu Central.

Aí o professor ganha por mil maneiras. Ganha como professor, ganha pelo excesso de hora, que lecciona, ganha como director de classe, ganha pelo trabalho de exame, ganha porque veiu da Metropole ... Por todos estes carrinhos alguem que para ser professor nem precisa de ser diplomado por uma Escola Superior, local ou metropolitana, recolhe dos cofres dá Colonia entre 480 a 750 rupias. E são [illegible] os professores efectivos e quase dez a dose os provisorios!

Ora tudo isto é intoleravel, sr. Mariano Martins. E' qualquer coisa que compromete fundamente o prestigio da administração.

Antes de mais é dificil, senão impossivel cohonestar aos olhos do publico o aumento de ordenado feito na proporção de 300 a 400 por cento. Carestia da vida? Nunca a vida em Gôa, ainda nos tempos mais criticos da grande guerra, — encareceu em similhante proporção. Haverá pelo menos uma relação judiciosa e logica entre oque antes recebiam e hoje recebem? Nem tanto, pois todos sabem que o professor do Liceu ganhava em 1918, 120 e tantas rupias, isto já nos ultimos anos da guerra.

Não são só estas as anomalias. O ensino que se ministra no nosso Liceu é secundario, não é superior. Tambem as Escolas Inglezas, em Gôa, as tais *High School* tambem ensinam até *Matriculation*, que é diploma de ensino secundario inglez. E o que se vê com espanto é que, enquanto as Emprezas que administram as Escolas Inglezas pagam 75 rupias, o maximo, aos seus professores nós gastamos com os dos Liceus centenas de rupias notando alem disso que a taxa de 75 rupias é paga só aos professores que sejam pelo menos bachareis por qualquer Universidade ingleza.

Ha ainda outra anomalia. Os professores do Liceu ganham 450 a 750 rupias e os professores da Escola Medica, uma escola superior, são pagos a 120 rupias ao mêz, se não menos.

Isto é dentro de Gôa. Se o confronto extendermos um pouco mais, o contraste é mais frisante. Vamos a um exemplo. A Universidade de Calcutta é sem favor o milhor centro de estudos superiores na India E' lá que trabalham Dr. Bose, Dr. Roy e tantos outros homens de sciencia e letras de reputação mundial. Para ser admitido ao concurso de professor assistente naquela Universidade o candidato tem que ser Doutor por qualquer Universidade de fama, com, alem disso, de provar ter produzido algum trabalho de investigação original. Candidatos como o Dr. Guha que ficou segundo classificado no concurso para professor de antropologia em Calcuttá, hoje trabalha por conta do Governo de Estados Unidos da America em investigações antropologicas na região dos Texas.

São deste rigor as normas seguidas na selecção e, não obstante, um professor da Universidade de Calcuttá ganha de começo 250 a 300 rupias ao mêz.

Aí estão, pois, estes dois exemplos e podiamos citar ainda mais, provando de sobejo que para o equilibrio do orçamento que o sr. Mariano Martins tem em vista, o imposto não representa o unico factor com que s. excia. pode contar. Felizmente para s. exia. a propria tabela de despezas dá-lhe muito pano para mangas, tanto que nos palpita que s. excia. sentir-se-ha deveras á vontade, como economista e financeiro, dentro dos impostos que já existem.

João de Algo

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार श्रावण व० १० मी शके १८४७

दारू–जुगाराला मूठमाती द्या !

जुगार आणि दारू हीं दोन भयंकर व्यसनें जितक्या स्वैर गतीनें आमच्या प्रांतांत धुडगूस घालीत आहेत तितकीं जगांतील इतर कोणत्याहि भागांत क्वचितच घालीत असतील ! या दोनहि व्यसनांमुळेंच दिवसेंदिवस आमचा प्रांत नैतिक, शारीरिक व सांपत्तिक बाबतींत खालावत चालला आहे. खिस्तेतर जगास स्वधर्मपंथाखालीं ओढून त्यास पाश्चात सुधारणेचे धुटके पाजून समानशील बनविण्याचा मक्ता घेतलेल्या फिरंग्याचा प्रवेश या पुण्य भूमींत झाला तोंपासून या व्यसनाची एकसारखी वाढच झालेली दिसून येते. जुगारापासून सरकारच्या तिजोरीस ह्मणण्यासारखा फायदा झालेला दिसत नसला तरीं दारूच्या व्यसनापासून सरकारी उत्पन्नांत वार्षिक दहाबारा लाखांची भर पडत असते. या मुळें दारूच्या व्यसनास आळा घालण्याचें तत्व सरकारला कबूल असलें तरी तें आचरणांत आणण्याचें काम त्याकडून होत नाहीं हें निर्विवाद आहे. आधींच हलाखीस आलेल्या तिजोरीस मद्यपान प्रतिबंधामुळें धोका येईल ह्मणून सरकार तिकडे कानाडोळा करीत आहे ह्मणावें तर जुगारप्रतिबंधाच्या वाटेवर अशी कोणती नुकसानीं आड येते कीं, जिच्या भीतीमुळेंच सरकार व सरकारी अधिकारी आजपर्यंत जुगारास सक्रीय प्रोत्साहन देत आले आहेत ? वास्तविक खरें पाहूं गेल्यास खुद्द सरकारला, जुगाराचें व्यसन नाहींसें झालें तर सहजासहजीं दारूच्या वाढत्या खपास आळा बसून अबकारी उत्पन्नांत थोडी खोट सोसावी लागेल, या भीतीशिवाय दुसरी कशाचीहि भीति असणें संभवनीय नाहीं. मग हा राजरोस व प्रसिद्ध टिकाणीं आजपर्यंत चालत असलेला जुगार बंद करण्यास सरकारला कां जड वाटावें हेंच समजत नाहीं. मागें आह्मीं सांगितलेली काल्पनिक भीति हेंच जर खरें कारण असेल तर मात्र सरकारच्या स्वार्थास सीमा नाहीं असेंच ह्मणणें भाग आहे.

जुगाराच्या बाबतींत चालू असलेलें आजपर्यंतचें सरकारी धोरण पाहिलें तर अन्यायी लोकांना शासन करण्यासाठीं निर्माण केलेल्या फौजदारी Codigo Penal कायद्यांत जुगार खेळणें व जुगारास आश्रय वगैरे देऊन प्रोत्साहन देणें हे गुन्हे ठरवून तसल्या गुन्हेगारांस कडक शिक्षाहि सांगितल्या आहेत; हें ज्यानीं तो कायदा स्वतः वाचला नाहीं त्यांना खरें सुद्धां वाटणार नाहीं. आज जवळ जवळ चाळीसपंचेचाळीस वर्षेपर्यंत जो फौजदारी कायदा अमलांत आहे त्यांतील जुगारविषयक कलमें मात्र नेमकींच अमलांत येऊं नयेत हें आपणास सुधारलेलें ह्मणून सदैव टिमकी वाजविणाऱ्या फिरंगी सरकारासच शोभतें !

जुगारी लोकांना शासन झाल्याचें उदाहरण कोणाच्या ऐकिवांत नाहीं, उलट त्यांस जाहीर रीतीनें आपला धंदा चालविण्यात मुभा असलेली दिसून येते. जत्रांच्या मोसमांत ठिकठिकाणच्या देवस्थानांतून जुगाराचे अड्डे शेंकडों जुगाऱ्यानीं व्यापलेले कोणाच्या पहाण्यांत नाहींत ? या सर्व जत्रांत ह्याडदोळची जत्रा जुगाराच्या बाबतींत श्रेष्ठ ठरेल. तेथील गांवकरी, महाजन व अधिकारी यांच्या संभावितपणाबद्दल कोणीहि सांशक होणार नाहीं. तथापि त्यांच्या उघड्या डोळ्यांदेखत किंबहुना त्यांच्या स्पष्ट वा अस्पष्ट संमतीनेंच देवस्थान कमिटी जुगाराचे अड्डे उघडण्याचा मक्ता लिलांवानें देत असते. जी गोष्ट ह्याडदोळांत तीच थोड्या फार मानानें दुसऱ्या अनेक देवस्थानांत सऱ्हास होत असल्यास नवल नाहीं. पंचवाडीसारखें लहानसें खेडें तेथील जत्रेंत जुगाराचा मक्ता देऊन महाजन मंडळी दोनशें तीनशें रुपयांची कमाई करींत असते. फातर्प्यांत तर या कमाईचा आंकडा सातशें आठशें रुपयांवर गेला आहे. अवेडें येथील घुड्यावरील लहानग्या जत्रेंत गेल्या सालीं केवळ घडघडो-घिरघिऱ्याचा मक्ता देऊन देवस्थान कमिटीनें १३० रुपयांची जोड जोडिली आणि फांश्याच्या जुगाराचा मक्ता देऊन किती फायदा केला हें अद्याप गुपीतच आहे. या अमंगळ व निंद्य फायद्यांत भर घालण्यास ह्मणून, देवस्थान कमिटीनें देवालयाच्या मागल्या बाजूस दहाबारा कदम अंतरावर, देवस्थानच्याच मालकीच्या जागेवर दारूचा गुत्ता उघडण्याची परवानगी देऊन, जुगाऱ्यांची बरीच होणारी गैरसोय दूर केली होती. हें त्या देवस्थान कमिटीस भूषणावह आहे ! इतर देवस्थानांतहि अशीच सोय झाल्यास पवित्र सुरा देवीच्या जाळ्यांत न सांपडतां राहिलेल्या सुरलेल्या गचाळ व रानटी हिंदु–जेंतिवांना सुधारलेल्या जेंतिवांच्या पंक्तीस बसावयाचा मान मिळविण्याचा एक मार्ग खुला करून दिल्याचें श्रेय त्या त्या देवस्थान कमिटीस मिळणार आहे. याचा त्यांनीं अवश्य विचार करावा. एकंदरींत जुगार व दारू या दोनहि व्यसनांस दिवसेंदिवस समाजांत राजरोसपणें बावरावयास मिळत असून जनता, धर्मगुरू व सरकार त्यांस आळा घालण्याचे कोणतेहि प्रयत्न करीत नाहीं उलट त्यामुळें समाजाचा होत असलेला ऱ्हास विनदिक्कत अवलोकन करीत आहे. नव्या गव्हर्नरांच्या राजवटींत तरी या उभय व्यसनांस मूठमाती देण्याचा प्रयत्न कायदे कौन्सिलांतील तिघांहि हिंदु सभासदांकडून होईल काय ?

स्फुट विचार

सुरेंद्र बाबूंचें निधनः— कलकत्याचे हे नेमस्ताग्रणी पुढारी वयाच्या ७७ व्या वर्षी बराकपूर येथील आपल्या रहात्या घरीं गेल्या ६ तारखेला स्वर्गवासी झाले, हें कळविण्यास आह्मास अत्यंत वाईट वाटतें. सुरेंद्राच्या शोचनीय निधनानें हिंदी राजकारणाच्या आकाशांत आपल्या अनुभवजन्य ज्ञानतेजानें झळकणारा एक देदिप्यमान तारा लुप्त झाला, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ‘ एकच ध्येय सतत डोळ्यांपुढें ठेऊन, त्यासाठीं सर्व आयुष्यभर अत्यंत परिश्रमपूर्वक प्रयत्न केल्यामुळें व ह्या प्रयत्नाला अनुभवाची जोड मिळाल्यानें सर सुरेंद्रनाथ बानर्जी हे त्याच्या देशावर प्रेम करणाऱ्या सर्वांना आदर्शवत झाले होते. सर्व पक्षांना आदर वाटण्यास भाग पाडणारा हा पुरुष होता ’ ’ हे युरोपियन असोसियेशनच्या अध्यक्षानीं काढलेले उद्गार बाबूंच्या असामान्य थोरवीचे निदर्शक नाहींत काय ? त्यांना दोनदां हिंदी राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष निवडण्यांत आले होतें. राज्यघटनेंतील सुधारणांनंतर ते बंगालचे स्थानिक स्वराज्यखात्याचे दिवाण झाले. अशा या थोर व्यक्तीचा दहनविधि गंगानदीच्या कांठावर शांतपणें उरकण्यांत आला. दहनविधीच्या वेळीं सुप्रसिद्ध नागरिक व सर्व राजकीय पक्षाचें पुढारी हजर होते. मृताच्या आत्म्यास शांति मिळो ! हा मजकूर कंपोझ झाल्यावर एस भारतीयकडून सुरेंद्र बाबूंविषयींचा एक लेख आला. निरुपाया मुळें तो येत्या अंकासाठीं ठेवावा लागल्या मुळें आह्मांला दिलगिरी वाटते.

लिसेव सेंत्रालांत चहागृह :— गेल्या आठ दहा दिवसांमागें लिसेव सेंत्रालमध्यें जवळ जवळ गाभिनेत दु कोंसुलत दुस प्रोफेसोरीस याच्या जवळच्या खोलींत एक चहागृह उघडविण्यांत आलें असून त्याला खुर्च्या, टेबलें, कपाटें वगैरे लिसेवच्या अध्यापकांकडून मिळालेलीं आहेत. मुलांना आतां पुस्तकें, पेन्सीली वगैरे खर्चाशिवाय भजीं, चहा, लाडू, जिलबी व शेवटीं जुलाबासाठीं नवीन खर्च पुरविणें त्यांच्या पालकांना क्रम प्राप्त आहे. स्कूलमध्यें लिसांव देतांना ह्या चहागृहांतील कढईत भजीं तळतांना होणारा चुळचुळ आवाज व त्याचबरोबर नाकांत शिरणाऱ्या वासानें चळवळणारी जीभ शिक्षण विकास करून पास होण्यास जरूर असेल असेंहि ह्या लिसेवांतील शहाण्यासुरत्या प्रोफेसरानीं नवीन तत्व शोधलेलें असेल, किंवा खुद्द प्रोफेसरांना मुलांकडून ह्या भज्यांची गुरुदक्षणा मिळून त्यांच्या खर्चांत बचत होण्याचा हा एक सुलभ व सोपा मार्गहि असूं शकेल. कांहीं असलें तरी मुलांना इतर सर्व शिक्षणापेक्षां भजीं खाण्याचें शिक्षण भरपूर मिळेल यांत शंका नाहीं. पाकशास्त्राचें शिक्षण यापुढें आमच्या लिसेवं सेंत्रालांत नाहीं असें ह्मणण्याचें धाडस मात्र ह्यापुढें कोणी करणार नाहीं !

पब्लिक वर्कस् खात्यांतील मजाः— येत्या महिन्याच्या २० तारखेस फोर्टे महालांतील मिलिटरी लोकांसाठीं एक प्रार्थना मंदिर (Capela) बांधण्याबद्दलच्या पावणीची जाहिरात सरकारी ग्याझेटवर झळकली आहे. डायरेक्टर पब्लिक वर्कस् यांच्या मनांत आलें तर १०००–१५०० च्या बांधणीसाटीं सुद्धां जाहीर पावणी पुकारली जाते; पण उलट पक्षीं मजा हीच, कीं, भाणस्ताराच्या पुलासारख्या लाख दोन लाखांच्या कामासाठीं ‘ पावणी’चा आनुसहि येत नाहीं ! इतकेंच नव्हे तर एखाद्यानें मुद्दाम पावणी मागून किंवा इतरांपेक्षां ४–५ हजार कमी किंमतीनें एखादें काम करण्याची मागणी केली तरी गुपचूप ठरीव ‘ येंकान्हेगादास ’च त्या कामाचा मक्ता देण्यांत आलेला आहे ! पंधरा हजारांवरील कामें फक्त जाहीर पावणीनेंच केलीं जावीं असें कायद्यांत कलम असतां हा असा प्रकार होण्याचें कारण तसेंच ‘ गहन ’ असलें पाहिजे. गोव्यांत इतक्या भारी किंमतीचीं कामें लिलांवानें करणारे नाहींत ह्मणावें तर (Maternidade) सारखें दोन लाखाचें काम जाहीर लिलांवानें गेलेलें आहे. पण लक्ष्यांत कोण घेतो ?

वर्तमानसार

—गेल्या शुक्रवारच्या सरकारी ग्याझेटवर घरभाड्याच्या कायद्याचा मसुदा प्रसिद्ध झाला आहे.

—कोठलेसे एक मामलेदार नवीन गव्हर्नरच्या भेटीस गेले होते संभाषणास सुरवात होतांच, मामलेदारसाहेब सि. मारीयानु मार्तीसाची एकसारखीं स्तुतिस्तोत्रें गावयास लागले. या गाण्याच्या ‘घाणींत’ ज्यास्त वेळ राहिल्यास प्रकृतिस्वास्थ्य बिघडेल या भीतीनेंच कीं काय गव्हर्नरसाहेबानीं त्यांस सलाम करून ते‘ तानांच्या तलफेंत’ असतांच त्यांचा तावडतोब निरोप घेतला ! असें ‘तेम्ह’ पत्राच्या बातमीदारास कळलें आहे.

—सरकारी नोकरानीं वर्तमानपत्रांचें संपादकत्व स्वीकारणें किंवा लेखक या नात्यानें वरिष्ठांच्या कृत्यांतर टीका करणें योग्य कीं कसें, या संबंधीं गोमांतकांतील पोर्तुगीज पत्रांत वादविवाद चालू आहे.

—लिसेव सेंत्रालचें रूपांतर फिरून नासियोनालांत होण्याचा संभव असून, इंस्तिस्तुत कोमेर्सियाल बंद करण्यांत येईल, असें ह्मणतात.

—मडगांव येथें बालचमू संस्थेतर्फे ता.८ शनिवार रोजीं हिंदुस्थानातील एक प्रसिद्ध कार्यकर्ता पुढारी सर सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या मृत्यूमुळें दुःख प्रदर्शक सभा भरून ठराव त्याच्या ‘बंगाली’ पत्राकडे पाठविण्यांत आला.

—प्रो० बा. बा. सांवर्डेकर यांचें ‘ हिंदु ’ पत्रास उत्तर येत्या अंकीं प्रसिद्ध होईल.

केलें नाहीं तर आह्मीहि पण आजवर त्या-
ऱ्याकरितां आणखी कांहींहि केलेलें नाहीं एवढ्यावर समाधान मानायाला काय हरकत आहे ?

" पोंवाल नंतरच्या अधिकाऱ्यानीं पोंवालचें धोरण अखंड पुढें चालविलें नसतां इतकेंच नव्हे तर तें वेळीं अवेळीं गुंडाळूनहि ठेविलें असतां " इत्यादि माझ्या विधानाला इतिहासांत मुळींच आधार नाहीं असें आपण ह्मणतां; पण असा आधार व तोहि पोंवालच्या खुद्द हयातींतला आपण स्वतः दो. नोरोन्य यांच्या पुस्तकांतून देऊन माझ्यावरील भार कमी केलेला आहे. तो आधार हाः–

" जरी एकीकडे २२८ जेजुइतानां कैद केलें व त्यांच्या जमिनी जप्त केल्या असल्या तरी दुसरीकडे १० हजार पाद्री, शिवाय फांसिस्कान वगैरे धर्मंमंडळ्या वावरायला गोव्यांत मोकळ्या होत्याच."

पोर्तुगालांत तसा प्रकार व गोव्यांत असा प्रकार ! या वरून पुष्कळदां पोंवालचें धोरण कसें गुंडाळून ठेवण्यांत येत असे तें सहज व्यक्त होतें.

येथवर हें मुख्य विषयासंबंधानें झालें. आतां आपल्या इतर कांहीं विधानाचा थोडक्यांत विचार करून लेखणीस विश्रांती देऊं इच्छितों. करांचें समर्थन होऊं शकेल एवढी —कराच्या मानानें स्मरणीय अशी– कामगिरी पोंवाल कडून घडल्याचें आपल्या लेखांतून दिसून आलेंच आहे. तेव्हां या विषयावर पुन्हा लिहिण्याचें प्रयोजन मलाहि पण पडणार नाहीं असें वाटतें.

सत्याच्या अपलापाविषयीं तक्रार करण्यांत मुळींच हशील नाहीं. सत्य ज्या बाजूस असतें, त्याच्या उलट बाजूस हा आरोप सहजींच जातो. पुष्कळदां हा अपलाप अजाणतेपणानें होणेंहि शक्य आहे. व तसें झाल्यास तो क्षम्यच होय. पण लटपटी करून आपल्या बाजूस सत्याचा देखावा दाखवूं पाहणें हें काम मात्र केव्हांहि समर्थनीय नाहीं.

" इतरांच्या पदरालाहि थोडेंसें सत्य असूं शकेल अशी कल्पना " करायला माझ्या लेखणीस हरकत नव्हती असें आपण सगता, यावरून माझ्या पदराला सत्य असल्याचें आपल्याला कबूल आहे असें धरून चालायला हरकत नाहीं.

माझ्या लेखणीच्या त्वरित गतीचे जे टप्पे आपण वाखाणले आहेत ते वस्तुतः परस्पर निरपेक्ष नसून एकमेकांशीं संबध असेच आहेत. उत्तरोत्तर ज्यास्त ज्यास्त खोलांत जातानां ते आपल्या दृष्टिपथांत एकामागून एक आले आहेत एवढेंच.

मात्र आपण प्रत्येक खेपेस ज्या टप्प्यांवर मला उभें केलें आहे ते विचार करण्यासारखे आहेत. यांत संशय नाहीं. प्रथम जोराची तक्रार करणारा, मग आपल्या लेखणीच्या प्रभावानें मवाळलेला, आणि आता केविलवाणा बनलेला, असा मी आपणाकडून दाखविला गेलों आहें.

पण माझें एक असूं द्या. पोंवालचीहि तीच स्थिति ! प्रथम त्याच्या विरुद्ध आपला रोख नाहीं असें आपलें ह्मणणें होतें. मग तो ' अनुपकारी ' ठरला; व आतां तर ' अपकारी ' ठरतो आहे !

केवळ सोयीकरितां अवलंबिलेलीं मतें ह्मणून पाडलीं जाऊं नयेत, खरींच भासावीं, ह्मणून केवढा हा खटाटोप ! ही आपली प्रगति (!) पाहिली ह्मणजे स्वर्गलोकांतून मृत्युलोकांत उतरतांना गंगेच्या प्रवाहाची गति, टप्पे व दिशा यांस अनुलक्षून एका कवीने काढलेल्या उद्गारांची सार्थता प्रत्यास येते.

" ' हिंदूच्या धोरणाविषयीं चर्चा ' हिंदू 'नें अनेक वेळां केली आहे हें खरें; पण ज्यांची चर्चा केली त्या धोरणाविषयीं माझें कांहींहि ह्मणणें नसून जें अवलंबिले जात आहे त्याच्याच संबंधानें आहे.

ठरीव मतें घेऊन भांडण्याचा आरोप मी आपल्यावर केला हें ह्मणणें बरोबर नाहीं. ' कर झटला कीं, त्या विरुद्ध तक्रार करणें ' हें ठरीव [' रेडिमेड ' हाच शब्द येथें बरा दिसतो] मत आपणच प्रगट केलेलें आहे. या मतांतील धोरण तसेंच आपण प्रगट न केलेलें पण नेहमीं ' हिंदु ' तून प्रकट होणारें ' फिरंगी झटला कीं त्यावर सडकून टीका करणें ' हें धोरण जितकें त्याज्य, तितकींच, ' कर झटला की त्याची तरफदारी करणें ' व ' फिरंगी झटला कीं तो शिरसा वंद्य लेखणें ' हींहि धोरणें त्याज्यच होत. कारण सगळींच वेटीं ' रेडिमेड '!

रेडिमेडपणा सोडून देऊन तारतम्य बुद्धीचा आश्रय धरला ह्मणजे कोणत्या कराविरुद्ध तक्रार करावी व कोणत्या विरुद्ध करूं नये, तसेंच कोणत्या फिरंग्यावर सडकून टीका करावी व कोणाला वंद्य मानावें हें कळायला उशीर लागणार नाहीं. पण तारतम्य बुद्धीचा उदय व्हायाला स्वतंत्रपणें विचार करण्याची शक्ति अंगात आली पाहिजे व तेथेंच तर सर्व कांहीं नडतें. क. वि.

कृ. ग. केणी.

घोटाळ्याचें आविष्करण

द्वितीय विभाग

[मागील अंकावरून समाप्त]

शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे
साधवो नहि सर्वत्र चंदनं न वने वने ॥१॥

याप्रमाणें प्रत्येक टिळकपंचांगानुयायी निश्चल अशा शांत व सात्विक तत्वाचा पुरस्कर्ता असतोच असें नाहीं. स्वताच्या चुकीने लिहिलेल्या वाक्यांवरसुद्धां प्रामाणिक आक्षेप घेतलेला श्री. सारस्वतांस जसा आवडला नाहीं, तसेंच त्यानाहि सूक्ष्म व शुद्ध पंचांगास ज्यांना ज्योतिःशास्त्र कशाशीं खावें हें सुद्धां माहीत नाहीं अशानीं, बाष्कळ दूषणें देणें कसें आवडेल, तें श्री. सारस्वतांनीच पहावें.

'टिळक पंचांग हा सूर्य असल्यानें तो दाखविण्यास मशाली नकोत' असें एक वाक्य मानभावीपणानें त्यांनीं लिहिलें आहे. पण आज अनादिकालापासून पहातां, वरील दृष्टांत सकृत्दर्शनीं बरोबर वाटला तरी, अनुभव मात्र याच्या उलटा आहे. 'नहि कस्तुरिका मोदः शपथेन प्रवर्तते' हें खरें असलें तरी, ज्याला कस्तुरीचा वास येऊनहि न आल्याचें लोकांस सांगण्यांस हवें आहे, त्याची कानउघाडणी कस्तुरी नाकाजवळ नेऊनच करावी लागते. खरें असलें तरी तें 'खरें' ह्मणून सांगावेंच लागतें सुवर्णाची वस्तु असली तरी तिची किंमत स्वर्णपरीक्षकाकडून विचारून घेतली पाहिजे. आह्मांतुह्मांस ती कळणार नाहीं. संशयी इसमाला 'हा सूर्य हा जयद्रथ' असें ह्मणून वस्तुस्थिति सांगून खऱ्याचाहि ' खरेपणा ' दाखवावा लागतो. श्रीमदाद्य शंकराचार्यांचा अद्वैत सिद्धांत तर जगजाहीर खराच होता. तर मग त्यानीं आजन्म तत्प्रसारार्थ अविश्रांत मेहनत कां घेतली ? भक्ती ही मोक्षदायी खरीच, पण तिची महती आज कैक वर्षें नारदशांडिल्यांपासून तों थेट तुकाराम रामदासांपर्यंत अनेक महर्षि व संत यांनीं तिची वाखाणणी केली व लोकांस पटवून देण्याबद्दल अतोनात खटपट केली, ती काय ते रिकामे होते ह्मणून ? श्रीमन्महाभारतांत आमचे व्यासमहर्षि सांगतात–

ऊर्ध्व बाहुर्विरोम्येष नच कश्चिच्छृणोति माम्॥
धर्मादर्थश्च कामश्च सधर्म किं न सेव्यते॥१॥

या प्रमाणें बोलणाऱ्या या महर्षींस खऱ्याचा 'खरेपणा' कां दाखवावा हें पूर्ण कळत होतें. तद्वतच अज्ञानानें टिळकपंचांगाबद्दल गैरसमज करणारांना त्या पंचांगाची श्रेष्ठता सांगणें हें तदनुयायी ज्ञात्यांचें न्याय्य व योग्य कर्तव्यच आहे; व तें ते बजावीत आहेत यांत अपराध तो काय ? निर्णयसागरी पंचांगांत मराठी भाषांतरें देतात. तद्वतच टिळकपंचांगाच्या मोठ्या प्रतींत देण्यांत येतात. व पुढें लहानपंचांगांतहि देतीलच. पण एवढ्याच वैगुण्याबद्दल त्याला कोणी अवगुणी ह्मणणार नाहीं. 'चंद्रदर्शन निर्णय खोटा ह्मटला नाहीं' असें श्री. सारस्वत लिहितात. पण आह्मीं ह्मणतों कीं, निर्णय खरा तर मग तो दिसल्यावांचून राहील कसा ? व न दिसल्यास त्यांत आपलीच फसवणूक झाली नाहीं ना ? हें त्यानीं कसें पाहिलें नाहीं ? 'खोटा' हा शब्द न घातला तरी, या शब्दाचा अर्थ ध्वनित होतो अशीच त्यानीं आपली वाक्य रचना केली आहे. इतकेंच नव्हे तर त्यावरून बऱ्याच लोकांचा गैरसमज होऊन 'चंद्रदर्शन कसें झालें नाहीं' ह्मणुन त्यानीं प्रश्नहि केला. याचसाठीं श्री. सारस्वतांच्या एकरोन ओळीवरहि लेख लिहून वस्तुस्थिति मांडणें मला प्राप्त होऊन बसलें. चंद्रदर्शनास द्वितिया लागते हें श्री. सारस्वतांस माहीत होतें, तर ती कधीं लागली हें पण पाहून, तसा खुलासा करून, ह्मणजे चंद्रदर्शन शास्त्रोक्त अतएव अगदीं थोडें झालें; ढळढळीत झालें नाहीं इतकें पण कळवावयाचें होतें. नुसत्या 'दृक् प्रत्ययास तसें आलें नाहीं. अर्थात भविष्य बरोबर उतरलें नाहीं. शुद्धपंचांगाचा निर्णय खरा कीं अशुद्धाचा खरा ?' या वाक्यावरून ध्वन्यर्थ काय निघतो? तर 'अशुद्ध' पंचांगाची चूक न येतां शुद्ध पंचांगाची आली. अर्थात शुद्ध कशास ह्मणावें ? याचें उत्तर कोणी पण हेंच देईल कीं, अशुद्ध पंचांग बरोबर अतएव जुन्या पंचांगासच शुद्ध ह्मटलें पाहिजे. याचप्रमाणें वाचकांचा घोटाळा झाला व तन्निरसकरणार्थ मला हा लेख लिहावा लागला. पण, त्यांत श्री. सारस्वतांची 'मुस्कटदाबी' मीं कशी केली, हें वाचकांनींच पहावें. श्री. सारस्वत टिळकपंचांगाचे अनुयायी असले तरी त्यांचें वाक्य मात्र जाणुन बुजून सामान्य लोकांत गैरसमज पसरविण्याजोगें झालें यांत संशय नाहीं. त्यांनीं तें जिज्ञासू या दृष्टीनें लिहिलें नसून स्वतःचें ठाम मत दर्शविणारें असेंच विधान केलें, असें वाचकांस वाटल्यास त्यांची ती बिलकूल चूक नाहीं. ज्योतिःशास्त्र हें केवळ मुनिसिपल कंदील पेटविणाऱ्या इसमासाठीं' नसून, गणित, दृक्प्रत्यय, धर्मशास्त्र इत्यादीसाठीं अधिक अवश्य असल्यानें, गणितानें चंद्रदर्शन येतें त्याचवेळीं पंचांगांत लिहिण्याची शास्त्रसंमति आहे; हें मीं " चंद्रदर्शनाची चूक कीं दृष्टयाची भूल ?" या लेखांत सप्रमाण दाखविलेंच आहे. तरी या प्रमाणें टिळक पंचांगांत लिहिलें होतें. व त्या रोजी १३ अंश पश्चिमक्षितिजांत रात्रौ ७ वाजून ४२ मिनिटेंपर्यंत ह्मणजे बराच वेळपर्यंत चंद्रदर्शन काहींनीं प्रत्यक्ष पाहिलेंहि होतें. आकाशांत अभ्रें असलीं किंवा भयंकर पर्जन्य सुरू असला तर द्वितिया समजुनहि कंदील लावल्यास काय उपयोग ? व द्वितियेचा क्षय होतो तेव्हां श्री. सारस्वत त्यास ती कधीं ह्मणून सांगणार ? कांहीं झालें तरी गणितानें येणाऱ्या चंद्रदर्शनासच योग्य ह्मणणें श्री. सारस्वतांस भाग आहे. आणि अशा किरकोळ बाबीसाठीं, अनेक नियमानीं व व्यवहार उपयोगी मर्यादांनीं बद्ध असलेला चंद्रदर्शन शास्त्रार्थ बदलण्यास कोण तयार होईल ? श्रीमद्भगवद्गीतेंतील––

तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ॥
ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि॥

या सुप्रसिद्ध भगवानाच्या आज्ञेच्या आड कोण येईल ? पंचांग हें प्राकृतांसहि हवें असलें तरी ग्रहणासारिखे सूक्ष्म दृक्प्रत्यय ज्या अर्थी प्राकृतांसहि बरोबरच उतरावेसे वाटतात त्या अर्थी, ते 'सामान्य लोकांच्या समजुतीप्रमाणें देऊन 'चंद्रदर्शन'योग पहाणाऱ्याच्या सोयीनुसार लिहिण्यास कोणतहि पंचांगकर्ता तयार होणार नाहीं. आणि सामान्य लोकांस शास्त्रार्थ निराळा, स्थुल दृष्टीनें पहाणारांस निराळा, खोलगट जागेंतून आकाश निरीक्षण करणारास निराळा असे एकाचेच विविध शास्त्रार्थ धाटीत सुटलों तर मग सर्वत्र अनवस्थाच प्रसंग यावयाचे ! चंद्रदर्शनाची वस्तुस्थिति आह्मीं दाखविली यांत त्यांवर आरोप तो आह्मी काय केला ? आक्षेपाचें निरसन करणें हेंच जर 'मुस्कटदाबीचें' लक्षण श्री. सारस्वत मानीत असतील तर मग 'भारतीय युद्धकाल निर्णयासारिख्या' महत्वाच्या वादांत श्री. जर्नादन स. करंदीकर श्री. चिंतामणराव वैद्य वगैरे विद्वान एकमेकांची 'मुस्कटदाबीच' करीत असून त्यात का-

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

मिति आषाढ व० ११ शी शके १८४७

नव्या गव्हर्नरांचें धोरण

'आ तेन्द' पत्राच्या प्रतिनिधींनीं घेतलेल्या मुलाखतींत आपण शब्दावडंबराचा चहाता नसून कृतीचा भोक्ता असल्याचें नव्या गव्हर्नरनीं ठांसून जाहीर केल्याचें वाचकांस आठवत असेलच. तसेंच न्यायदेवतेस कलंक लागेल असें कसलेंहि कृत्य आपणाकडून घडून येणार नाहीं, याबद्दल काळजी वाहिली जाईल, याहि त्यांच्या अभिवचनाची आठवण वाचकांच्या स्मृतिपटलावरून इतक्यांतच दूर झाली नसेल. पोर्तुगालांत जाहीर झालेल्या या अभिवचन परंपरेची पूर्तता होण्यासाठीं ह्मणूनच कीं काय, त्यानीं येथील अधिकाराची धुरा हातीं धरतांना तिसरें एक अभिवचन गोमांतकस्थ आशावादि जनतेला बहाल केलें आहे. गोमांतक—तिजोरीच्या मानगुटीवर थैमान घालीत असलेल्या तूट—महामायेचा नक्षा उतरवून बजेटांत आदाखर्चाची तोंड मिळवणी करण्यांत कसोशीचे प्रयत्न केले जातील, हाच या नंबर तीनच्या अभिवचनाचा सारांशार्थ आहे. उद्यार सृष्टींतील हीं तिन्ही अभिवचनें आचारसृष्टींत उतरविण्यास लागणारी तडफदार व तेजस्वी पात्रता सि. मारीयानु मार्तीस यांच्या अंगीं जोरदार रीतीनें खेळत आहे, हें त्यानीं आजपर्यंत बजावलेल्या अभिनंदनीय कामगिरीवरून सिद्ध होतें. खुद्द रिपब्लिक राज्यपद्धति स्थापन होण्यास त्यानीं अविश्रांत परिश्रम केलेले असुन, रिपब्लिकन सरकारनें त्यांच्या जबाबदारीवर संपविलेलीं सर्व कार्यें त्यानीं जिवाचें रान करून निरपेक्षतेनें पार पाडलीं आहेत, असा त्यांचा लैकिक सर्वत्र गाजत आहे. व हाच लैकिक, ते आपलीं अभिवचनें सार्थ करण्यांस समर्थ आहेत, असें छातीठोक विधान करण्यास आह्मांस भाग पाडीत आहे.

पण— हा 'पण'च जेथें तेथें पुढें होऊन पवित्र भावनांची पायमल्ली करण्याचा आपला 'पण' जाहीर करीत असतो—येथील राजकीय परिस्थिति सि. मारीआनु मार्तीस यांस आपलीं अभिवचनें पुरीं करण्यास सहाय्यभूत होईल काय ? परिस्थितीला पायांखालीं दडपून त्यांचें व्यक्तिसामर्थ्य यशाचा झेंडा फडकावूं शकेल काय ? या प्रश्नांच्या उत्तरांतच उपरोक्त अभिवचनांची सार्थता किंवा असार्थता अवलंबून असल्यानें त्यांचाच विचार करणें अर्थात् क्रमप्राप्त

सि. मार्तीस हे खरोखरच शब्दावडंबराचे चहाते नाहींत, हें त्यानीं बोलण्याचे बहुतेक प्रसंग मुद्दाम टाळून व जेव्हां बोलल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें तेव्हां अगदीं मोजके शब्द उच्चारून, सिद्ध केलें आहे. आवेशयुक्त वक्तृत्वानें जनतेच्या मनांत मोह उत्पन्न करण्याच्या भरीस ते पडले नाहींत व या पुढें पडतील असेंहि वाटत नाहीं यावरून लोकगंगेच्या संमिश्र पाण्यांत शब्दजाल टाकून लोकप्रियतेचा मत्स्य हस्तगत करण्याच्या निष्फळ व्यवसायांत ते आपल्या कालाचा व्यय करणार नाहींत, हें उघड होतें.

न्यायदेवतेला कलंक लागूं न देणें, आदा खर्चाची तोंडमिळवणी करून बजेट सुस्थितींत आणणें व न बोलतां कृति करणें, हा सिं. मार्तीसांच्या अभिवचनांचा त्रिगुणात्मक सार आहे. या सारांतील शब्दावडंबराचा भाग वगळल्यास, शिल्लक राहते ती एक कृति. या 'कृती'च्या आंसाभवंतीच अभिवचनाची पृथ्वी फिरत आहे. कृति त्या प्रमाणें झाली कीं, न्यायदेवतेला कलंक लागणार नाहीं व बजेटाचा अवजड प्रश्नहि सुरक्षितपणें सुटण्यास उशीर लागणार नाहीं. एवंच कृतीवरच अभिवचनांचा सर्व यशस्वीपणा अवलंबून आहे, हें उघड होय.

सिं. मार्तीसांच्या संकल्पास गोमांतकाचें राजकारण प्रोत्साहनपर आहे काय ? राजकारण ह्मणजे नोकरी पटकावणें व सरकारची हां जी हां जी करून स्वार्थ साधणें, असा समज जेथें उजळ माथ्यानें हैदोस घालीत आहे तेथें अभिवचनांच्या त्रिगुणात्मक सारांत व्यक्त होत असलेला कृतनिश्चय विजयी होण्यास किती अडचणी पुढें येतील याची कल्पना करण्याचें काम आम्हीं वाचकांवरच संपवितों. मार्तीस साहेबांच्या व्यक्तिसामर्थ्याला येथील राजकारण कसें पोषक नाहीं, हें सिद्ध करण्यास आणखी नवीन पुराव्यांची जरूरी नाहीं. परंतु राजकारणाचें स्वार्थी स्वरूप बदलविण्याचे खंबीर उपाय नव्या गव्हर्नरांकडून योजिले जाऊन, ते यशस्वी होण्यास त्यांनीं कंबर कसल्यास, खात्रीनें ते आपलीं अभिवचनें सार्थ करण्यास शकतीलहि, अशी आमची मनोदेवता आह्मांस सांगत आहे. 'गव्हर्नरच्या हुद्यावर असेपर्यंत मी कोणत्याहि राजकीय पक्षांपासून अलिप्तच असेन' असें त्यानीं जाहीरहि केलें आहे. या जाहीर वचनाच्या पायावर निरलसपणें प्रयत्न केल्यास राजकारणाची शुद्धता होऊन अभिवचनाच्या पूर्ततेची इमारत उभारली जाण्यास शक्य होण्याचा संभव आहे. पण— हाच तो राजकारणाचा 'पण' लाथाडण्यांत आला पाहिजे. मार्तीससाहेब हा 'पण' व्यक्तिदृष्ट्या झिडकारण्यास समर्थ आहेत. पण पुन्हाहि तोच 'पण'— येथील राजकीय स्थिति तें करण्यास त्यांस सहाय्यभूत होईल काय ? या प्रश्नाचें उत्तर इतक्यांतच न देण्याचा 'मुत्सद्दीपणा' केलेला बरा, असें

स्फुट विचार

नवे गव्हर्नर व नवे पक्षः— गोमांतकांतील ख्रिस्ती राजकीय पक्षांची उभारणी कोणत्या तत्वांवर होत असते, याची ज्यांना कल्पना आहे, त्यानां मार्तीससाहेबांचें आगमन होतांच, छापसें येथें नवीनच स्थापन झालेल्या 'देमोक्रातीक सेंत्राच्या' बुडाशीं काय आहे, हें सांगण्याची गरज नाहीं. नवे गव्हर्नर 'देमोक्रातीक' पक्षाचे चहाते आहेत, त्यांना आवडणारा एखादा पक्ष निर्माण केला ह्मणजे त्यांची मर्जी सु—प्रसन्न होईल व इष्ट हेतु सहज रीतीनें तडीस पाडण्याचें सोपें साधन हस्तगत होईल, याच कल्पनेनें उपरोक्त नूतन पक्षास जन्म दिला आहे, यांत संशय नाहीं. पण असले कितीहि पक्ष आपले स्वार्थी पंख फडफडावूं लागले तरी या 'फडफडण्या'चा परिणाम मार्तीस साहेबाचें राजकीय धोरण दूषित करूं शकेल, अशी भीति वाटण्याचें कारण नाहीं. कां कीं, "सुजन व सज्जन हो, मी देमोक्रातीक पक्षाचा अनुयायी खरा; पण जोंपर्यंत येथील अधिकाराची धुरा माझ्या हातांत असेल, तोपर्यंत मी कोणत्याच पक्षाचा नाहीं. मी केवळ गव्हर्नर आहें व या नात्यानें पक्षविपक्षांचा कांहींच विचार न करितां मला जें योग्य वाटेल तेंच मी निःपक्षपातीपणानें करणार आहे, हें पूर्ण ध्यानांत ठेवा", असें त्यानीं नुकतेंच बोलून दाखविलें आहे.

हा व्यर्थ खटाटोप कां ?:— नवे पक्षवाल्यांनीं ही गव्हर्नरसाहेबांची स्पष्ट वाणी ऐकली नसेल काय ? नव्या पक्षांना ते काडीचीसुद्धा किंमत देण्यास तयार नाहींत हें ते उमजले नाहींत काय ? जर अजून उमजले नसतील, तर यापुढें तरी त्यानीं ठिकाणावर यावें व स्वार्थी राजकारणाच्या आडमार्गावर आशाळभूतपणानें रेंगाळण्यांत कालक्षेप न करतां, स्वराज्य गांठण्याचा राजमार्ग चोखाळण्याचा उपक्रम करावा, अशी आमची नवे पक्षवाल्यांस प्रेमाची सूचना आहे. शक्य असल्यास राजकारणाला पोटकारणाची लागलेली कीड चिरडून टाकण्याचा हव्यास बाळगा. राजकारणांत शिरून नोकरांची शिकार करण्यास सोकावलेल्या स्वार्थांध लोकांच्या डोळ्यांत कर्तव्य जागृतीचें अंजन कोंबा. पण कसल्याहि निमित्तानें राजकीय पक्षांची उभारणी पोटाच्या पोकळ पायावर करूं नका, अशी आमची तुह्मांस विनंति आहे. राजकारणांत पोट खुपसविण्याचा व्यर्थ खटाटोप कां ?

नीतिधैर्य दाखवा ! :— सांगें व फोंडे या तालुक्यांत पोलीसशाहीचे अनेक अत्याचार घडून आले, हें सर्वविश्रुत आहे. या अरेरावी अत्याचारांची झडती चालू असून गांजलेल्या लोकांच्या जबान्या घेण्यांत येत आहेत. जबान्या देण्याच्या कामीं असत्याची तर कोणीहि कास धरूं नयेच; पण कसल्याहि भीतीनें किंवा क्षुद्र पक्षांधतेनें स-

कटपटा कोणी करू नये, असें आम्हीं स्पष्ट बजावतों. सांगें येथें एक दोन इसमानीं सत्य लपवून ठेवण्याचा मनाचा कमकुवतपणा स्वार्थी भीतीनें व्यक्त केल्यामुळें आह्मास ही सूचना द्यावी लागत आहे. बाकी, सत्याचा विजय हा ठेवलेलाच असून, असत्यमार्गीय लोकांना अखेर धूळच खावी लागेल, हें त्यानीं खूप समजून रहावें !

सत्याचा वाली परमेश्वरः— 'सत्याचा वाली परमेश्वर' ही भावना भारताच्या अंतःकरणांत पूर्ण बिंबली असल्यानें तो प्रसंगीं स्वतःचें जीवित धोक्यांत घालूनहि, लोकहितार्थ झटत असतो सरकारी अधिकाऱ्यांकडून कसलाच उपसर्ग लोकांना होऊं नये एतदर्थ त्याचे शिकस्तीचे प्रयत्न असतात. याकडे दृष्टि देऊन तरीं स्वदुःखविमोचनार्थ भारताला सहाय्य पुरविण्यास प्रत्येक देशहितचिंतकानें पुढें येणें वाजवी आहे. पण तसें न करितां जे भीतीनें किंवा 'पोलितीकेनें' कर्तव्यभ्रष्ट होतील त्यांना परमेश्वराकडून कधींहि क्षमा होणार नाहीं. 'सत्याचा वाली परमेश्वर' हें ध्यानात आणून तरी हे लोक टाळ्यावर येतील काय?

वर्तमानसार

—सतारच्या राणीसाहेबांनीं घेतलेल्या दत्तकास व्हाइसरायांनीं मंजुरी देऊन असें कळविलें आहे कीं, भोंसले घराण्याचा सरकाराशीं हल्लीं जो स्नेहसंबंध आहे तो जोंपर्यंत अबाधित राहील तोंपर्यंत त्यांच्या घराण्याकडे अडीच हजार रुपयांचें पेन्शन चालू राहील.

—कुंकळ्ळी येथें रा. वासुदेव विठ्ठल प्रभू देसाई यानीं इंग्लिश शिक्षणाचें विद्यालय स्थापन केलें असून त्याला येत्या महिन्याच्या पहिल्या तारखेपासून सुरवात होईल.

—हिंदुस्थानचे बादशहा येत्या हिंवाळ्यांत हिंदुस्थानांत येणार असल्याचें लंडनच्या बातमीदारानें संडे टाइम्सला कळविलें आहे.

—हौरा येथें एका घरावर दरवडा घालणारांच्या टोळीशीं तेथल्या पोलिसांची झटापट होऊन त्यांत एक पोलीस कॉन्सटेबल ठार झाला एक सबइन्स्पेक्टर व कॉन्स्टेबल यांना भयंकर दुखापती झाल्या आहेत.

—ह्मैसूर युनिव्हर्सिटीनें बी. ए. ची परीक्षा २ वेळां घेण्याचें ठरविलें आहे.

—कोटाच्या महाराजानीं १८ वर्षें वयाच्या पुरुष व २० वर्षांच्या वयाच्या स्त्रीस धर्मांतर करण्यास परवानगी नाहीं असें जाहीर केलें आहे !

—कॉमनवेल्थ बिलाकरितां डॉ. ॲनिबिझांट विलायतेस रवाना झाल्या.

—डॉ. एम्. बी. वेलकर यानीं श्री. विनायकराव सावरकर यांच्यावरील निर्बंध काढून त्यांना स्वतंत्रता देण्यांत यावी, या आशयाचा ठराव मुंबई कौंसिलांत आणणार असल्याबद्दल नोटीस दिली आहे.

—पारीस येथें भरणाऱ्या स्पिरिच्युअल कॉंग्रेसला मि. व्हि. डी. ऋषि जाणारअसून अलाहाबाद येथें त्यांना जाण्याबद्दल पांचशें रुपयांची मदत मिळाली.

—दोन यसकोलास्तीक प्रासीयस या नांवच्या एका ख्रिस्ती बाइला वैद्यकीच्या सेव-

दैवज्ञ ब्राह्मणाची उपपत्ति

भारताच्या १८ जून १९२५ च्या अंकांत घोटाळ्याच्या– लेखांक लिहिण्याच्या भरांत निनावीं लेखकानीं ' सुवर्णकार ' हे कोणत्या आधारानें स्वतः दैवज्ञ ह्मणवून घेतात हें सांगण्यास मीं असमर्थ आहें, असें एक चमत्कारिक पण सहेतुक वाक्य घुसडून दिलें आहे. याबद्दल आमचें उत्तर असें आहे.

दैवज्ञ ब्राह्मण हे शब्द आज मोठमोठ्या सभादिद्वारां रूढ होऊन सोनाराबद्दल हेच शद्ब प्रचारांत आले. अर्थात सबळ आधारानेंच असल्यानें रूढ झाले आहेत. हें या लेखकानीं ध्यानांत आणावें. सध्या सुवर्णकाराचा धंदा करितात ते दैवज्ञ (सोनार) असून पूर्वी ते विश्वब्रह्म पांचाळ नावांच्या वर्गांत मोडत. पूर्वी सोनार ऊर्फ विश्वब्रह्मस्वर्णकार हे गौडसारस्वतब्राह्मणाप्रमाणें ब्रह्मवर्गांत मोडत. स्वर्णकार दैवज्ञ ब्राह्मण यानां वैदिककालीं दैवज्ञ ह्मणत असत, इत्यादि खालील आधारानें खात्री होईल.

ब्रह्मपांचाळ हे ब्राह्मण कसे व दैवज्ञ हा यांतील भेद कसा आहे तें पहा:–

" तृतीयं जन्म भेदंच सकलैः कारणैः श्रुणु ॥
पंचवक्त्रसमुत्पन्ना पंचभिः कर्मभिर्द्विजाः ॥
मनुर्मय स्तथास्त्वष्टा शिल्पिकश्चतथैवच ॥
दैवज्ञ पंचमइति ब्राह्मणाः पंचकीर्तिताः ।१॥

—स्कंद पुराणे–नागर खंडे—

यांत [शंकर पार्वती संवादांत] ब्रह्मपांचाल दैवज्ञादि कसे झाले हें सांगून यज्ञादिकर्मांत हे निष्णात असल्याचे पुरावे आहेत. यांची उत्पति पहा:–

मनुः पुर्व मुखोद्भुतो मयो याम्य मुखोद्भवः
पाश्चिमास्तथैव त्वष्टाच दैवज्ञः श्चोत्तरास्मृतः॥

नागरखंडे–रथकार कल्पद्रुमे.

दैवज्ञ ब्राह्मणाबद्दल आतां श्रुतिप्रमाण पहा.

" विश्व कर्माणी वृद्धानी ताते वाह प्रतिष्टितानीं, त्वाभ्य मनुः प्रथम, मय द्वितीय त्वष्टा तृतीय, शिल्पी चतुर्थः, दैवज्ञःपंचमः॥"

इति

पंचब्रह्मोपनिषद

" सएष्वाद्य मनुः भद्रमयः जयो त्वष्टा शिल्पी रिभु दैवज्ञः पंचम इति. ॥

श्रुत्यंतरे

पांचाल शद्बाची व्युत्पत्ति महाभारतांत व लिंगपुराणांत अशी आहे.

" विश्वकर्म सुतानेतान्, विद्धि शिल्प प्रर्वतका ॥
पांचाला नोम विज्ञेया पचभेदाहिते मताः ॥

यापैकी मूर्ति करणाऱ्या ब्राह्मणासच दैवज्ञब्राह्मण म्हणतात. शिल्पें दोन प्रकारांचीं– तच्च द्विविधं देव शिल्पं मानुषशिल्पंचेति॥

ए. ब्रा. पं. ६–२७–५

आणि ह्मणूनच ' यः दैव शिल्पं जानाती सदैवज्ञः ॥ " ह्मणजे जो दैवशिल्प जाणतो तो दैवज्ञ होय असा याचा सरळ अर्थ आहे. दैवसंबंधीं शिल्प करणाऱ्या ब्राह्मणास " दैवज्ञब्राह्मण " ह्मणतात. जीं पवित्र व उत्तम शिल्पें विश्वब्राह्मणाकडून व्हावयाची त्यांचा हल्लीं लोप झाल्यानें उदर निर्वाहार्थ विश्वब्राह्मण शिल्पीहि शुद्र धर्मीय शिल्पीसारखे धंदे दर्शक नावांनें संबोधण्याची रूढी पडली आहे वस्तुतः ही मुळचो दैवज्ञापासून झालेली संतती व दैवज्ञ हा ब्रह्मवर्गांतीलच असल्यानें त्यांचे वंशज सुवर्णकार ' ऊर्फ सोनार ' दैवज्ञ ब्राह्मण म्हणवितात हें यथा योग्यच आहे.

आणखी श्रेष्टत्वाचीं उदाहरणें पहा:–

विश्वकर्माविद्या मौर्णो महिमा विश्वचक्षा ॥

ऋग्वेद ८–३–२

त्यालाच त्वष्टा ह्मणतः–

तस्य त्वष्टा विदधद् द्रपमेति ॥

अरण्यक ३– १–१–२

त्याचें पूज्यत्व पहा:—

पांचालास्ते सदां पूज्याः प्रतिमा विश्वकर्मण ः॥

या विश्वकर्म्यांची संतति ह्मणून विश्वब्रह्मकुलोत्पन्न, असेंहि दैवज्ञ ब्राह्मणास म्हणतात हें इतिहासास धरून आहे.

दैवज्ञ ब्राह्मणांचीं पूजा करीत. पहा:—

दैवज्ञं शिल्पिनं प्रार्च्य ॥

अग्निपुराण अध्याय ५७–६३

यांचीं गोत्रें वगैरे पहा:—

शिल्पि ब्राह्मण नामानः पांचालाः परिकिर्तिताः ॥
एतेषां पंच गोत्राणि पंचच प्रवराः स्मृताः ॥

शैवा गमे ७ अध्याय

अस्तु,या सर्व प्रमाणांवरून ध्यानांत येईल कीं, हल्लीं सोनार ह्मटले जाणारे हे विश्वनिर्मित व ब्रह्मवर्गांतील असून त्यांस विश्वकर्मा ब्रह्मकुलोत्पन्न " दैवज्ञ ब्राह्मण " ह्मणणें कसें आधार सिद्ध आहे हें दिसून येईल.

तथापि इतक्या उपर सुद्धां कोणी छिद्रान्वेषणास तयार होईल तर त्यांस या सर्वांबद्दल काशीक्षेत्रांतील महापंडितांच्या यद्विषयक अभिप्रायांचीं एक दोन वाक्यें येथें सादर करितों.

" तयथा तल कोकणादि दक्षिण देशे सकलशिल्पशास्त्रज्ञ, भिज्ञ, सकल, वेदपुराण प्रसिद्धेन, लब्धवरेण, द्विजोत्तमेन, ब्रह्मनिर्मितेन, विश्वकर्माणां, निर्मीताः दैवज्ञसंज्ञकाः सुवर्णकाराः शिल्पीनः संतिबहवः तेषां उपनयनादी सर्वे संस्काराः सर्वाणि कर्माणीच जायत इति प्रसिद्धम शास्त्र सिद्धमेवच ॥

कोंकणांत दैवज्ञ–ब्राह्मण [सुवर्णकार सोनार) असून त्यांचे सर्व संस्कार व षट्कर्मादि अधिकार इतिहास व शास्त्रसिद्ध आहेत.

असो. सुवर्णकार हे दैवज्ञ ब्राह्मण कां म्हणवून घेतात हें सांगण्यास या पुढें इतक्यानें आपण समर्थ व्हाल अशी आशा आहे.

आपला दैवज्ञ— ब्राम्हण
पांडुरंग विष्णु मडकईकर. वेलींग गो.

घोटाळ्याचें आविष्करण
प्रथम विभाग

"परोक्ते रन्यथा ब्रूयायः परान् न प्रदूषयेत् ॥
तस्यैव दूषणं तद्धि न दोषो ऽ सौ ऽ न्य दूषणे ॥ १ ॥"

श्री. 'सारस्वत' यांनीं ध्वनीत केलेल्या टिळक पंचांगाच्या काल्पनिक चुकीसंबंधानें वास्तविक स्थिति काय आहे हें आह्मी ता. २८ जूनच्या भारतांत सर्वांसमोर सप्रमाण मांडलेंच होतें. त्यावर श्री. सारस्वतांनीं 'समजुतीचा घोटाळा' असें अध्याहृत नांव देऊन भारतांतच अनुक्रमानें तीन लेखांक लिहिले हें वाचकांस विदित आहेच. आधीं हें सांगितलें पाहिजे कीं, श्री. सारस्वतांचे लेख 'टीकेस प्रतिटीका' या रूढ झालेल्या पंथानुसार असले तथापि, ते टाकाऊ नसल्यानें त्यांतील विधानांत आह्मांस जे मिथ्यालाप आढळले ते आज भारतांतूनच सत्यान्वेषणार्थ मांडीत आहों. त्यांच्या लेखांकांवर लेख न लिहिला तर निरुत्तरता पदरीं येते अशा गर्हणीय समजुतीनें येथें लिहावयाचें नसून, ज्या तीन्हीं भल्या मोठ्या लेखांनीं आमच्या छोट्या लेखास उत्तर ह्मणून देण्यांत आलें, त्यात त्याचें उत्तर तर नाहींच, पण "गजाननं प्रकुर्वाणो रचयामास वानरम" या प्रमाणें भलतेच अपसिद्धांत कसे उध्दृत केले गेले हेंच क्रमवार आह्मीं सांगणार आहों. श्री. सारस्वत हे टिळक पंचांगाचे एक दोस्त आहेत. व ते एक सत्य मार्गाचे चाहते आहेत. वाद असला तरी तो क्षुल्लक विधानांपुरता असून, भारतीय वाङ्मयाचे ते एक उपभोक्ते व टिळक पंचांगासारख्या दक्प्रत्ययसिद्ध मार्गाचे पुरस्कर्ते अतएव 'समान धर्मी' असल्यानें आह्मी त्याचें सप्रेम अभिनंदन करितों.

त्यानीं आमच्या लेखास उत्तर देतांना दोन्हीं बाजु मांडीत असल्याचें वाचकांस भासविलें आहे. पण आपण काढिलेल्या शंकेवर आह्मीं काय आक्षेप काढिला तें दृष्टिआड केलें असून आमचें ह्मणणें सांगितलें नाहीं. ह्मणून ता. २८ जूनचा लेख पुन्हां वाचकांनीं एकदां वाचावा. ह्मणजे पुढील विवेचन ध्यानीं येण्यास सुलभ पडेल; अशी शिफारस करून विषयाच्या आविष्करणार्थ 'प्रकृत मनुसराम.'

आधीं त्यांनीं पंचांग ह्मणजे काय, हें सांगण्यास कांहीं ओळी खर्च केल्या. व शक १४७६ साला आधीं पंचांगें तयार करीत नसत अशा आशयाचा एका पंचांगकर्त्याचा उतारा सादर केला आहे. पण हें बरोबर नाहीं 'पंचांग' ह्मणजे 'तिथि नक्षत्र योगंच वारः करणमेवच' हें बऱ्याच शतकांआधीं भारतीयांस माहीत होतें. 'पंचांग ह्मणण्याचा परिपाठ नसला तरी पंचांगासारखींच तिथिवाराची कोष्टकें काश्मीरांतील खंडखाद्य नावांच्या ग्रंथावरून तिकडे करीत असत. खंडखाद्य ग्रंथ प्रसिद्ध ज्योतिर्विद ब्रह्मगुप्त यानें शके ५५७ या वर्षी केला. व श. १००० ते १५८० पर्यंत यावरूनच त्या भागांत पंचांगें होत होती असें दिसून येतें. तिथि ह्मणजे चंद्रसूर्यांत १२ अंश अंतर यानेंच अर्थ ह्मणजे करण, १३ अंश २० कलां विभाग ह्मणजे नक्षत्र व ८०० कला भोग चंद्रसूर्यांचा होणें ह्मणजे योग हीहि माहिती व तशी आंकडेबद्ध कोष्टकें श. १४७६ आधींच नव्हे तर शकारंभींहि होतीं. श. १७५३ मध्यें पहिलें छापी पंचांग निघालें. तसें १४७६ त हाती पंचांग सुधारणेचा खर्डा साधारण व्यवस्थित झाला. ती एक त्या मध्यें सुधारणा झाली इतकेंच ह्मणतां येईल. यजुर्वेदादि कालीं यज्ञयागकालसाधनार्थ आकाशांत नक्षत्रगति पाहून विवक्षित कालीं कर्में करीत इतकेंच काम पण इसवीसनाहूनहि बराच प्राचीन जो सुप्रसिद्ध 'वेदांग ज्योतिष' ग्रंथ त्यांतहि...

"पंचसंवत्सरमयं युगाध्यक्षं प्रजापति ॥
दिनर्त्वयनमासांगं प्रणम्य शिरसा शुचि॥१॥"

असा तत्कालिन पंचांग–पद्धतीचा उल्लेख आहेच. तशीच प्रगति होतां होतां ब्रह्मगुप्ताच्या काळीं खस्थ गोलांचें बरेंच सूक्ष्म गणित ध्यानांत आलें. आणि ग्रहलाघव, मकरंद, खंडखाद्य यांसारिखे 'करणग्रंथ' ह्मणजे पंचांग करण्याच्या सुलभ पद्धति प्रचारांत येऊन ज्यांच्या त्यांच्या सोईप्रमाणें तिथ्यादिक पांचहि अंगांची आठवण बरेच लोक ठेवूं लागले. 'पंचांग' असें नांव दिलें नसलें तरी हीं सर्व अंगें ते बाळगीत असत यांत संशय नाहीं. व त्याच प्रमाणें त्याची नोंदहि ते ठेवीत असत असें पंचांगकौतुक नांवाच्या ग्रंथांवरून दिसतें. पंचांगांतील मुळें 'राजावली' व 'कल्पलता' या ग्रंथांवरून लिहितात ते बरेच प्राचीन असून 'पंचांगस्थ गणेश द्विजगणकयुतं' हा श्लोकहि त्यांतील असल्यानें या बाबतींत तो विचारणीय आहे.

अन्य लेखकांच्या विशिष्ट हेतूंच्या वाक्यांवरून स्वमत दर्शवितांना सारस्वतांकडून जशी नकळत घालघसर झाली, तशीच ' बहुतेक पंचांगें ग्रहलाघवीय ह्मणचे 'ग्रहलाघवादि ग्रंथांच्या आधारें तयार होत असतात' यांहि वाक्यानें होत आहे. कारण, बहुतेक दक्षिणी लोकांच्या भागांखेरीज ग्रहलाघवेतरच ग्रंथावरून पंचांगें तयार करितात. काशी, ग्वाल्हेर इत्यादीकडे मकरंद ग्रंथावरून पंचांगें करितात. मद्रास येथें कांहीं भागांत सूर्यसिद्धांतास बीजसंस्कार देऊन पंचांग वापरतात. जोधपूरकडे मारवाडी लोकांत करणकुतूहल ग्रंथावरून 'चङ्कपंचांग' ह्मणुन तयार करितात. काश्मिरांत खंडखाद्य ग्रंथावरून पंचांगें तयार करितात. मद्रासेस नॉटीकल' वरून 'दृग्गणित पचांग' या नांवानें तयार होतें. हें रघुनाथाचार्यांच्या वेळेपासून निघे. नवसरी प्रांतांत प्रमुमानस रणीवरून पंचांगें काढितात. पंडित बापुदेव यांच्या ग्रंथावरून काशीस पंचांगें करीत. केरोपंतांच्या 'ग्रहसाधनकोष्टकांवरून' 'पटवर्धनी' किंवा 'केरोपंती' पंचांग निघे. पंचांगसारिणी वरूनहि कोणी पंचांगें करितात. केतकरांच्या 'ग्रहगणिता'वरून तर तयार होतातच. इत्यादि पाहिलें असतां ग्रहलाघवाप्रमाणें अन्य ग्रंथांवरूनहि अनेक प्रांतीं पुष्कळ पंचांगें निघतात हें वाचकांच्या ध्यानीं

BOA OPORTUNIDADE

Executamos, com maximo escrupulo e pontualidade, de harmonia com a nossa legislação, todas as dependencias do Tribunal Judicial, Repartição de Fazenda e doutras Repartições oficiais, de Salsete.

Conhecendo a fundo todo o jogo das Repartições oficiais, é natural que o publico interressado seja por nós bem servido. E', ás instancias de varios nossos amigos, que encetamos o referido serviço de solicitações. Em vista ao publico interessado !

Raia Ramacrisna Quirtonim, MARGAO

"प्रत्यक्षं ज्योतिषं शास्त्रं चंद्रार्कौ यत्र साक्षिणौ"

या सूर्यसिद्धांतोक्तीनुसार फलज्योतिः शास्त्राचा, आर्यांच्या बृहत्पाराशर्यादि ग्रंथांपासून, पाश्चिमात्यांच्या दिनवर्षपद्धतीपर्यंत विविध मतें व ग्रंथाधार विचारांत घेऊन तात्विक पद्धतीनें व भौतिक शास्त्रानुसार अनुभव घेणें असल्यास समक्ष किंवा पत्रद्वारें कळवा. पुढीलप्रमाणें सर्व कामें शुद्ध व सूक्ष्म पद्धतीनें केलीं जातात.

वर्ग १ ला, आजन्मफलवर्णनाची मोठी पत्रिका रु. १० ते २५
व० २ रा, भावचलित गणिताची मध्यम प० रु. १०
व० ३ रा, सायन व निरयन मताची प० रु. ५
व० ४ था, शुद्ध व सूक्ष्म निरयन प० रु. ३
व० ५ वा, सर्व साधारण दशांतर्दशांची प० रु. २
व० ६ वा, साधी स्पष्टग्रहादिक प० रु. १ व जन्मटिपण ८ आणे.

शिवाय वर्षमासफळें, प्रश्न, मुहूर्त, पत्रिका पाहणें वगैरे कामें सप्रमाण व सोपपत्तिक अशीं आधुनिक कालास पटण्याजोगीं टाइमशीर करून देऊं. फलज्योतिषाच्या आस्थेवाइकांनीं अनुभव घेऊन खात्री करावी.

पत्ताः— नारायण अनंत नाईक पाटणकर मालक "ज्योतिष कार्यालय आणि श्री पांडुरंग–ग्रंथ–संग्रहालय" मु० पो० सांगें प्रांत गोवा.

विष्णु रामचंद्र केणी यांचें दुकान

जुना बाजार—मडगांव.

स्थापना १८५०

सचोटीबद्दल प्रसिद्ध असलेल्या या अत्यंत जुन्या दुकानांत सर्व तऱ्हेच्या मालाचा भरीव स्टॉक असतो. निरनिराळ्या जातीच्या शाई, रंग, सिमीट, व्हेर्नीज, आबोक, हरतऱ्हेचें लोखंडी सामान (खिळे, करवती वगैरे) नाना रीतीचे जस्ताचे व तांब्याचे पत्रे व इतर सर्व संसारोपयोगी वस्तू सदर दुकानांत माफक दरानें विकल्या जातात.

दर एक, माल चोख, व्यवहार रोख

अनुभवानें खात्री करून घ्या !

ESTABELECIMENTO COMERCIAL
DE
Visnam Ramachondra Quenim

FUNDADO EM 1850

MERCADO VELHO-MARGAO

CONTA já mais de 73 anos de fundação o sobredito estabelecimento comercial. E' portanto um dos mais antigos da vila de Margão, mantendo relações com as mais afamadas firmas comerciaes e industriais da Europa e da America, paizes donde, em regra, importa todas as qualidades de tintas, aboc, oleos, verniz, linhança, cimento, gia etc. toda a sorte de artigos de ferro, como pregos, aldraves, cadeados, bisagras, parafusos, canos de ferro etc. especialidades de pastas de zinco lisas e concavas e as de cobre.

NO REFERIDO estabelecimento vendem-se tambem artigos alimenticios da primeira necessidade e todas outras mercadorias de que se acha bem provido.

BEM SERVIR O FREGUEZ E' O SEU LEMA

Experimentem que sempre lhes será proveitosa a experiencia !

हिंदु–भारत बेकरी

आ. यन्. कामत, मडगांव–गोवा.

या कारखान्यांत ताज्या पिठाची बिस्कीट, पाव वगैरे रुचकर पदार्थ तयार करण्यांत येतात. निर्मळपणाच्या बाबतींत आमचा माल दुसऱ्या कोठच्याहि मालाला हार जाणार नाहीं. दर माफक.

बांकु नासियोनाल उल्त्रामारिनु

लिमिटेड कंपनी

जगांत अत्यंत नाणावलेली ही बँक व्यवहारकुशलतेमुळें आपल्या लौकिकांत दिवसेंदिवस भर घालीत आहे.

मुख्य ठिकाणः— लिजबोअ

सर्व खंडांत, बेटांत व वसाहतींत प्रस्तुत संस्थेच्या एजन्सीस पसरल्या आहेत.

सामायिक भांडवलः ४८.०००.०००$०० यस्कूद
कामचलाऊ भांडवलः २४.०००.०००$०० ,,
रिझर्वः ३२.२००.०००$०० ,,

वसाहतींतील शाखा

पश्चिम आफ्रिकाः— काबु व्हेर्दि, सां. तोमे, सां. तियागु, बिसाउ, बोलाम, कौंगु बेल्ग, काबींद, लोआंद, नोव्ह रेदोंदु, लोबितु, बेंगेल, व्हील सीलुस पोर्तु मोसामेदिस आणि लुबांगु.

पूर्व आफ्रिकाः— लौरेंस मार्किस, इंजांबानि, बैर, शिंदु, तेति, केलीमाव मोसांबिक, आणि इबु.

इंडियाः— नोव्हगोवा, मोर्मुगांव, मडगांव, मुंबई.

माकाऊ तिमोर इ. इ.

या बँकचे सर्व तऱ्हेचे व्यवहार जगांतील सर्व ठिकाणीं होत असतात.

O BHARAT

PARA S. EXCIA. LER

Gladstone, o estadista notavel de uma nação que, sem duvida, tem produzido os milhores homens de governo no mundo moderno, disse um dia que *a economia era em si uma importante fonte de receita.*

Esta afirmação do grande politico britanico, se constitui um aforismo financeiro de incontestavel alcance para todos os povos, ela dir-se-ia ter sido especialmente cunhada para servir de norma ao sr. Mariano Martins, para o seu governo na India, neste momento critico que a colonia atravessa.

Efectivamente a economia, a reducção nos gastos, é um meio que em todos os tempos em toda a parte e por todos os homens de bom senso, foi sempre empregado com o fim de ordenar o orçamento. Economia é por onde começa um particular quando as dificuldades financeiras o assaltam. Economia proclama a instituição em apuros. Economia, o córte nas despezas do Estado, foi o que fizeram nações como America, Inglaterra, França, Alemanha ...... quando apóz a guerra, encontram-se nos extremos de um *debacle* financeiro. Só aqui nesta India Portuguesa; só aqui nesta nesga obscura e pobre do Malabar, os *grandes estadistas* a quem esteve entregue o destino deste povo pacato, sobrio e sofredor, pensaram e agiram de uma forma nova e imprevista, dispondo dos recursos de um cofre escasso e quase desfalcado, como se fôsse roupa de francezes. Talhou-se á larga, distribuiu se á grande, fez-se uma obra de loucos e perdularios, tudo em nome de altos principios, financeiros como se os principios fossem qualquer coisa expressamente feita para satisfazer fins de certos. E tudo isto precisamente numa epoca em que de todos os lados, e em todos os continentes, se levantava bem alto o machado de economias; precisamente num tempo em que ainda na India Inglesa onde o Estado tem a fama de gastar muito mais do que deve, o Lord Inchcape fazia milhões de rupias de reducção na tabela das despezas públicas.

Não ha, sr. Governador Geral, razões de ordem moral, financeira ou legal que impeçam a s. excia. de rever o orçamento da colonia e torna-lo pelo menos um trabalho que abone de bom senso administrativo. Digamos, pelo menos, porque aquilo que aí circula com o pomposo nome de orçamento do Estado peca por falta de senso ... ... comum.

A revisão da tabela de despesas do Estado é inevitavel, pois, como é inevitavel que a mesma se faça antes de reformar o nosso sistema tributario. Convem que os contribuintes saibam de quanto o tesouro honesta e necessariamente carece para, depois, acudirem ao mesmo com o que é preciso, mesmo que para tanto tenha que se ir até ao sacrificio.

Nos ultimos anos os governos mais de uma vez cantaram alto a aria de simplificação de serviços e revisão de vencimentos. O que, porem, se viu foi maior complicação nos serviços criando e multiplicando os logares e extraordinario aumento de ordenados, dando mais a quem, oh! o ridiculo, já ganhava de mais.

Observar-nos-ão, todavia, que a vida está cara. Não faltarão mesmo alguns — e destes aparecem mais no funcionalismo pinguemente pago—que digam que aquilo que ganham mal lhes chega para o substento. Ha verà certo quem fale das necessidades de representação de seu cargo......Mas, sr. Governador Geral, a India é pequena de mais para v. exia. não vêr o que aparece. A vida está cara—os funcionarios gastam tanto que o comercio está agonisante. O que ganham não chega para o substento—o Banco não se cansa de fazer remessas para Portugal em centenas de contos; ha funcionarios que são senhores de casas de 20 a 40 mil rupias. Levam somas as despesas de representação—os altos funcionarios vivem em palacios, das festas constantes, o seu luxo deslumbra, equipagens ofuscam.

E' verdade, sr. Governador Geral, a carestia de vida tem sido até hoje o *refrain* favorito daqueles cuja ambição não conhece termo. Mas o que é esta carestia? Qual é a sua curva? Quem a calculou? Em que dados se basea este calculo? Durante últimos 5 anoss empre, quase todos os dias, a proposito—de nada ouviu-se falar na carestia de vida e nunca ninguem disse em que proporção a vida estava cara.

Eu bem sei que a vida está cara. Eu tambem sei, porem, que entre nós tem-se abusado da formula como se ela fosse um manto protector do devorismo dos grandes, puxando a sua latitude a geito das conveniencias desta e daquela classe de servidores do Estado.

Infelizmente não existe na colónia, nem entre nós ha dinheiro e especialistas para que reunir dados e elaborar os mapas indicativos do custo da vida hoje em relação a 1914. Mas paciencia. O que não existe em casa pode-se trazer de emprestimos e com o concerto nescessario, utilizar para o fim. Assim as estatisticas que não faltamos, ha quem nos forneça. E' o *Labour Burreau* de Bombaim.

Recomendamos ao sr. Mariano Martins a leitura da *Labour Gazette* que é o orgão de Burreau, e s excia. dos dados que na gazeta colher verificará que a fixação dos vencimentos, tal como entre nós vigora, nada podia justificar menos ainda a carestia de vida de que tanto se fala.

S. excia. felizmente para a colonia chega a tempo muito, a tempo. S. excia. chega quando ainda está para ser efectivado a diploma colonial n.°. 38, o diploma que trata da revisão dos vencimentos. S. excia. pois chega numa ocasião, que é uma ocasião grave daquelas que definem a envergadura dos verdadeiros homens do governo.

Não sei porque lembro me nesta altura o que li algures: "Muitos podem distinguir o bom do mau trilho. Só os grandes tem a coragem de seguir pelo bom trilho."

João de Algo

Em volta de professores provisorios dos Liceus

Desde o momento em que estamos na maré de economias convem que o sr. Governador Geral indague o seguinte:-

Qual o número de alunos em cada classe nos Liceus de Margão e de Mapuçá?

Se o desdobramento que se tem feito em todas as 3 classes no Liceu de Margão e em uma só no de Mapuçá está a dentro da lei? caso afirmativo, se justifica a nomeação de 4 provisorios, sendo 3 nas Letras e 1 nas Sciencias no Liceu de Margão?

Porque é que só este ano no Liceu de Margão foram distribuidas algumas disciplinas da classe de exame a dois professores provisorios—já se vê, estes 2 são protegidos do Director do Liceu—contra a expressa determinação do ex-governador Jaime de Morais, da extinta Direcção dos Serviços de I. P., da Direcção dos Serviços de Fazenda e ainda contra o regulamento e praxe, seguida nos Liceus, de haver o menor número de professores nas classes de exames?

Não se diga que estes provisórios a quem se tem dado classe de exame, acompanham os seus alunos desde a 1.a classe e seria antipedagógico entregá-los a outrem na classe seguinte.

1.o Porque um desses provisórios nem foi professor o ano passado; pois que foi exonerado do seu lugar de interino do 3.° grupo em agosto de 1924, por não ter comparecido ás provas

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

मिति श्रावण शु० ३ या शके १८४७

नवे गव्हर्नर आणि नवे कर

आधीं कराची शिकस्तीची परमावधि होऊन त्रस्त झालेल्या प्रजेनें मोठ्या आस्थेनें नव्या गव्हर्नर साहेबांच्या आगमनाकडे दृष्टि लावून, ते अगोदरच भारी बोजड असलेल्या करांची छाननी करून, पो. हिंदुस्थानांत आबादि आबाद करून सोडतील अशी उत्कट आशा धरावी व त्या आशेचें स्थान गव्हर्नर साहेबांच्या एकाच शब्दामुळें निराशेनें पटकावें हें किती शोचनीय होय ? !

करांच्या विकराल स्वरूपाची नुसती आठवण होतांच जी प्रजा भयव्याकुल होते ती नव्या प्रांताधिपतीनें इकडील अधिपतित्वाचीं सूत्रें हातांत घेतानां प्रत्यक्ष उच्चारलेल्या impostos (कर) ह्या एकाच शब्दानें कशी गर्भगळीत झालीं असेल ह्याची कल्पनाच केल्यास बरें.

पोर्तुगीज हिंदुस्थानच्या सरकारी तिजोरीच्या बुडाशीं नोकरशाही असतांना त्या तिजोरीची भर कराच्या रूपानें करतां येणें अगदींच अशक्य आहे.

एकादें राष्ट्र हलाखीच्या स्थितींत जाणें ह्मणजे तें राष्ट्र लयास जाण्याची पहिली पायरी चढण्यासारखेंच आहे. ह्याचें प्रत्यंतर थोड्या अधिक प्रमाणानें आजपर्यंत नामशेष झालेल्या पौर्वात्य किंवा पाश्चात्य राज्यांच्या इतिहासांवरून अवलोकनांत येतें. ही स्थिति लक्षांत आणून नवे गव्हर्नर साहेब नवे कर लादण्याच्या भानगडींत न पडतां नोकरशाहींतील अप्रयोजक नोकरांची छाटाछाट अथवा बड्या पगारखाऊ लोकांचे पगार कांहींसे कमी करून तिजोरीच्या तुटवड्याची भरपाई करण्यास अळंटळं करणार नाहींत अशी अपेक्षा, गव्हर्नर साहेबांची पोर्तुगालच्या राजकारणांतील धडाडी व कामाचा उरक पाहिल्यास, करावीशी वाटते.

करांची उत्पत्ति कां व कशी झाली यद्विषयींची बरवर पाहणी करणाऱ्यास असें चक्क दिसूं लागतें कीं, सार्वजनिक सुधारणा करण्याच्या कामीं सरकारी तिजोरीस हातभार लावण्याकरितां किंवा एकादी नवीन मोठी राष्ट्रावरील आपत्ति टाळण्याकरितां कराचा अवलंब करावा लागतो. आणि कर घ्यावा लागला तरी त्या मानानें फायदा मिळत असल्यानें कराची प्रखरता मुळीच वाटूं लागते. पण ज्या कालीं राज्य शांततेंत नांदत आहे व नवनव्या करवाढींबरोबर त्या मानानें सोई वाढल्या जात नाहींत, तेव्हां मात्र राज्य गंभीर शांततेंत नांदत असलें तरी प्रजेस करांची प्रखरता अस्वस्थ करून सोडते.

लोकांनीं आपल्या निढळाच्या घामाचा पैसा सरकारी तिजोरींत ओतल्याबरोबर तो लठ्ठ पगारवाल्या नोकरशाहीनें गट्ट करावा व चैन मारावी आणि स्वतःचे सुखोपभोग अधिक वाढविण्याकरितां दुसऱ्या नवीन करांची योजना करावी, अशा प्रकारें पोर्तुगीज हिंदुस्थानांतील प्रजेवर सध्या करांची परंपरा कोसळूं पाहते व तिच्या भाराखालीं ती बिचारी गडप होते कीं काय असें मनांत येऊन त्या प्रजेच्या करुणावस्थेची कींव येते.

खर्चापेक्षां उत्पन्न थोडें असलें ह्मणजे हिशेबाची तोंडमिळवणी करण्यासाठीं प्रजेकडून जबरीनें पैसे उपटण्यास कराचा भार तिजवर टाकावा लागतो. असें झालें ह्मणजे राज्यांतील लोक गांजले जाऊन त्यांच्यांत सरकाराविरुद्ध असंतोष माजतो. व वारंवार करांची वाढ झाल्यानें राज्याच्या बाहेरहि इतर राष्ट्रांत सरकारी तिजोरीची हलाखी दिसून राज्याची इभ्रत कमी होते. हें मोठेंच नुकसान आहे.

ही सर्व गोष्ट खुलासेवार लक्ष्यांत घेऊन आमचे नवे गव्हर्नरसाहेब, देमोक्रातिक (प्रजापक्षीय) तत्वाचे अभिमानी असल्यावरून नव्या करांच्या यातायातींत न पडता व आपल्या तोंडांतून निघालेला इंम्पोस्त (कर) हा शब्द कृतींत न आणतां, अगोदरच्या करांतूनच कांहीं कर कमीं करून, लोकांचे धन्यवाद घेतील व राज्याची इभ्रत वाढवितील अशी आशा आहे.

आजपर्यंत, सगळ्या कराहून अधिक डोईजड झालेला डोईपटीचा कर, ह्मणजे पोर्तुगेज हिंदुस्थानची सरहद्द ओलांडून गोमांतकांतून बाहेरजाणाऱ्या प्रवाशांवरील कर आमच्या सुधारलेल्या राष्ट्रास भूषणभूत खास नसल्यावरून त्याचें समूळ उच्चाटण होणें सर्वथा इष्ट आहे. अशा प्रकारचा लाजिरवाणा कर परप्रांतस्थ उतारूंसहि फारीग करावा लागत आहे ह्मणुन ह्या राज्याचें सांपत्तिक दैन्य सरहद्दीच्या वेशीवर टांगलेलें परकी लोकांस न दिसण्यासाठीं गव्हर्नरसाहेबानीं तो कर रद्द केल्यास, राज्यकारभाराच्या आरंभास एका शुभ कृत्यानें सुरवात केल्याचें श्रेय त्यांस मिळेल व इंम्पोस्त हा शब्द तोंडांतून निसटला असला तरी कर रद्द करण्याची कृति केल्यास, त्यांच्या ब्रीद वाक्यानुरूप ते खरोखरच शब्दावडंबराचे चहाते नसून कृतीचे भोक्ते आहेत हें प्रत्ययास येईल.

–"गोमांतकाच्या शेतकीचें पुनरुज्जीवन' या नांवाचें डॉ. सांतान रुद्रीगीस या सध्या लिज्वनांत वास्तव्य करणाऱ्या गोमांतकीयानें लिहिलें असून नावांला अनुरूप अशा अनेक शेतकीविषयक गोष्टींचा त्यांत ऊहापोह करण्यांत आला आहे. आमच्या सांप्रतच्या निकृष्ट व अवनत स्थितीस पोंचलेल्या शेतकीचें खरें स्वरूप पहावयाचें असल्यास प्रस्तुत पुस्तक अवश्य वाचावें.

स्फुट विचार

गैर अधिकारांची चौकशी:—Inquerites ह्या शिरोलेखाखालीं मडगांव येथील 'तेन्द' ह्या पोर्तुगेज वर्तमानपत्रावर पुढील मजकूर आला आहे: "पुष्कळदां गुन्ह्यास राजरोसपणें वावरूं देण्यांस व अन्याय छपविण्यांसच, सत्तातिरेकाविरुद्ध व गैर अंमलबजावणीविषयींच्या चौकशा मांडल्या जातात. व अत्यंत लाजिरवाणी गोष्ट ही कीं, फिर्याद करणारांवरच खोटेपणाचा आरोप सिद्ध केला जातो ! पुष्कळदां अशा चौकशांवर भरंवसा नसल्यामुळें अधिकाऱ्यांचा रोष न संपादन करण्यासाठीं शायदी पळतात व आरोपीची गुन्हेगारी, शिक्षा झाल्याशिवाय राहते........." हें अक्षरशः खरें आहे असें सध्या चालत असलेल्या फोंडें व सांगें येथील माजी पोलीस अधिकाऱ्यांच्या गैर वर्तणूकींच्या चौकशांवरून वाटतें. खरेपणा कबूल करण्यास ज्यांस धीर होत नाहीं, त्यानीं अगोदर पोलीस खात्यांत तरी चौकशी नेऊं नये होती व पोलीस खात्यांत योग्य दाद मिळत नाहीं असें पाहताच वर्तमान पत्रकारांकडे तरी कागाळी नेऊन त्याचा बभ्रा करण्याविषयीं वर्तमानपत्रकारांच्या गळीं तरी पडूं नये होतें.

खरेपणाच तारक आहे:— खरेपणाच्या अंगीं अशी एक अजब शक्ति आहे कीं त्याचा विजय झालाच पाहिजे जी गोष्ट जशी आपणांस वाटते तशीच ती आहे असें सांगण्यास कोणाची भीति बाळगिली कीं सत्याच्या बाजूस असलेला सत्पक्ष इतरांस संशयित दिसूं लागतो. व भिवविणाऱ्यास आपल्या मनोदौर्बल्याचें एक आयतें मर्म सांपडतें व त्या मर्माचें सूत्र एकदां कोणाच्या हातांत गेलें कीं, भ्याड मनुष्य हें एक सूत्रावर नाचवण्यासारखें बाहुलें होऊन राहतें. अशी स्थिति येणें ह्मणजे जिवंत असून मेल्याप्रमाणेंच आहे ह्मणून कोणीहि मोठीच दहशत घातली तरी खरेपणा बिलकूल सोडूं नये, तो तारक आहे.

नीति व कायदा:— कायदा हा सरकारानें आंखून दिलेला हक्क संरक्षणाचा राजमार्ग.पण त्या मार्गावरून जाण्यास नीति हा वाटाड्या असला पाहिजे. कोणी ह्मणेल ऐसपैस लांब रुंद व सडक जाणाऱ्या राजमार्गावरून जाण्यास वाटाड्या कां पाहिजे ? मोठ्या शहरांत ज्यानें फेरी केली असेल त्या प्रत्येकास माहित आहे कीं, जरा रस्ता चुकविल्यास अनीतीच्या सफेत गल्लींत किंवा कायदेभंगाच्या चोर बाजारांत जाऊन पडण्याचें भय असतें. जिकडे तिकडे कायदा व नीति यांची असहकारिता दिसून येते. ही स्थिति जेव्हां सुधरेल तेव्हांच दुर्दैवाचा फेरा संपेल.

दुरून डोंगर साजरे:— नव्या गव्हर्नर साहेबांची ज्यावेळीं नेमणूक होऊन नुकतीच प्रसिद्ध झाली त्यावेळीं त्यानीं पो. हिंदुस्थानांत करावयाच्या भावी मनोराज्यांत मोठ्याच भराऱ्या मारल्या. गोव्यांत पाय दिल्याबरोबर पोर्तुगालच्या थंड वातावरणांतील तत्वपूर्ण विचारांस समशितोष्ण हवेची आंच मिळाल्यामुळेंच कीं काय प्रजेच्या हृदयांत चर्र करणारा कर हा शब्द त्यांच्या पोटीं असलेला अकस्मात् बाहेर पडला. इकडची सरकारी तिजोरी कफल्लक दिसल्यामुळें त्यानीं करस्मरण केलें कीं, दुरून दिसणारे डोंगर चढतांना राजकारणाच्या नाजूक वेलींत पाय गुंतल्यामुळें पोर्तुगालांत उच्चारलेल्या विचारांचें विस्मरण झालें ?

आमचें व माझें:– असें विस्मरण कां घडावें ? ह्या प्रश्नाचें उत्तर पण सोपेंच आहे. हे लोक पोर्तुगालांत असले ह्मणजे आशिया व आफ्रिका यांत असलेल्या वसाहती आमच्या आह्मी पोर्तुगेजानीं काबिज केलेल्या, आमच्या पोर्तुगेज रक्तानें सिंचन केलेल्या अशा विशाल दृष्टीनें पाहतात. इकडे आले कीं तीच दृष्टि बदलून हिंदुस्थानच्या पवित्र हवेनें त्यांस आत्मसाक्षात्कार होतो व जिकडे तिकडे ममत्व ह्मणजे मी माझें, हें राज्य माझ्यासाठीं असे विचार सुचूं लागतात. अशा प्रकारें आमचेपणाचें महत्व जाऊन ममत्व शिरजोर होतें. परंतु आमचे गव्हर्नरसाहेबांच्या अंगांत रेपुब्लिकन तत्वांचें शुद्ध पाणी मुरतें असा त्यांजविषयीं बोलवाला आहे. ह्मणून ते या देशाचें कांहीं तरी कल्याण करितील अशी आशा कां बाळगूं नये ?

अस्पृश्योद्धार:—राष्ट्रीय सभेचे कोशाध्यक्ष शेठ जमनालालजी यांच्या 'लोकमान्या'च्या बातमीदारानें घेतलेल्या मुलाखतींत अस्पृश्योद्धाराविषयीं सांगितलें कीं, अस्पृश्योद्धाराचा प्रश्न स्वराज्य पक्षानें व सामान्यतः हिंदूंनी अधिक तत्परतेनें हातीं घेतला पाहिजे; स्वराज्य प्राप्तीला हा आणि हिंदुमुसलमानाच्या ऐक्याचा प्रश्न सुटणें आवश्यक आहे. सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरूं न देणें, शाळा, सभा, कचेऱ्या वगैरे सार्वजनिक जागीं जाण्यायेण्याला मज्जाव न करणें व देवदर्शनाची तरतूद करणें इत्यादि गोष्टी जर हिंदुलोक अस्पृश्यांच्या बाबतींत तावडतोब न करतील तर परधर्मीय लोकाचे त्यांना बाटविण्याचे चाललेले प्रयत्न दिवसेंदिवस अधिक यशस्वी होत जातील व आपण हिंदु असल्याबद्दल त्यांना वाटणाऱ्या अभिमानाचें चीज न होतां आपल्यावर अखेरीस पस्तावण्याचा प्रसंग येईल. या समाजसेवक व मननीय विचाराची अंमलबजावणी करण्याचें हिंदुबांधव मनावर घेतील काय ?

पुन्हां एकदां:— फोंडें व सांगें येथील पोलीस अधिकाऱ्यांच्या आक्षेपार्ह कृत्यांची चवकशी करण्यासाठीं जे ऑफिसर फिरत आहेत त्यांसमोर गांजलेल्या लोकानीं आपलीं गाऱ्हाणीं निर्भयपणानें सिद्ध करण्याचा कपिलाषष्ठीचा योग साधून घ्यावा, अशी आमची आणखी एकदां वदरद्द अधिकाऱ्यांच्या नांवानें खडे फोडणाऱ्या 'श्रीयुतांस

घोटाळ्याचें आविष्करण

प्रथम विभाग

(मागील अंकावरून समाप्त)

सांगली संमेलनाचे अध्यक्ष श्री. कोल्हटकर यांच्या भाषणाचा एक उतारा देऊन श्री. सारस्वतानीं सध्याच्या पंचांगी घोटाळा लोकांसमोर मांडिला आहे. व तो कांहीं अंशीं खराहि आहे. पण त्याच भाषणांत शेवटीं कोल्हटकर ह्मणतातः "अशा जबाबदारीच्या प्रसंगीं आपापले पक्ष विसरून तडजोड करण्यास व आपणाकडे कमीपणा घेण्यासहि तयार झालें पाहिजे. तरच आपल्या धर्मनिष्ट व कर्मनिष्ट बंधूंस त्यांच्या बुद्धिभ्रमांतून, निरुद्योगीपणांतून व उपासमारींतून सोडविण्याचें श्रेय आपणास मिळणार आहे." हे त्यांचे उद्गार पंचांगाच्या बाबतींत निष्कारण दुरभिमान बाळगणारानीं लक्षांत ठेवणें अत्यंत जरूर आहे. "शुद्ध पंचांग तयार करण्याची कल्पना २० वर्षां अलिकडची असावी" हें विधान तर "सूर्यास प्रकाशच नाहीं" ह्मणण्याइतकें फोल आहे. सुमारें ५० वर्षांआधींच अनेक विद्वानानीं याबद्दल प्रयत्न केला होता. त्यांत कै० केरोपंत नाना छत्रे हे प्रमुख असून, त्यानीं या साठीं "ग्रहसाधनाचीं कोष्टकें" हा आपला अमुल्य असा ग्रंथ तयार केला. पण त्यांचेंहि अयनांश सुमारें १८ च असल्यानें, संक्रांती, नक्षत्रें वगैरे ४ अंश [दिवस] अलिकडे येणें कोणासहि बरें वाटलें नाहीं. व त्यांचे प्रयत्न अर्धवट राहिले. सांगली संमेलनांत लोकमान्य ह्मणालेः "त्या वेळीं ग्रहलाघवावरून करण्यांत येणाऱ्या पंचांगांत फरक येतो असें ह्मणणेंहि समाजाला सहन होत नव्हतें. एवढेंच नव्हे तर कित्येक वेळां शुद्ध पंचांगाची चळवळ करणारांशीं समाजांतील लोक संबंध ठेवण्याचेंहि टाळीत"! ह्याच काळ हळुहळू पालटून जनतेस शुद्ध पंचांगाची आवश्यकता भासूं लागली. मुंबई ते सांगली संमेलनापर्यंत अनेक विद्वानांनीं बहुमोल परिश्रम करून आजचें हें शुद्ध पंचांग उदयास आणिलें. व करणग्रंथहि तयार झाला. ज्यांस ज्योतिर्गणिताचीं सूक्ष्म तत्वें माहीत आहेत त्यांस यांची योग्यता कळून येणारच. पण केवळ हटवादास पेटलेल्यांना—

"अंधस्य किं हस्ततलस्थितोऽपि प्रयाशवस्यर्थमिह प्रदीपः ॥"

या प्रमाणें, शुद्धपंचांगाची महती समजून येणें शक्य नाहीं! जुने लोक केवळ परंपरेस बाधा होते ह्मणूनच तें घेण्यास भितात. पण ग्रहलाघवासहि विश्वनाथ दैवज्ञानें २११ वर्षांनीं—

"इति प्रत्यय कारणात गणितवित् श्रीविश्वनाथो भुवे ॥"

असें सांगून बीज संस्कार [सुधारणा] केले. व सूर्यादिसिद्धांतांत कालपरत्वें फरकाचीं हजारों उदाहरणें आहेत हें ठाऊक असूनहि ते पंचांगशुध्यर्थ गोष्टीबद्दल कानावर हात ठेवितात!! आरंभस्थानीं 'झीटा' घ्या किंवा 'म्यू पिशियम' घ्या, त्यांच्यामतें त्यांस किंमतच नाहीं!!।

आतां या पंचांगास जन्मतः विरोधी असा केतकी पक्ष. याचें ह्मणणें तिथींस चालन पाहिजे. व आरंभस्थान बाद सोडल्यास टिळक पंचांग मतांत व यांत फारच थोडा मतभेद राहतो. व यामुळें अशी एक मौज होते कीं जुन्यांना घटकाभर टिळक पंचांग पुरवेल पण हा चित्रायुत्तुरैवत मताचा केतकी संप्रमिश्र कधींच सहन होणार नाहीं! केतकीस आरंभस्थान 'झीटा' ताऱ्यापासून नको. चित्रा नक्षत्राचा भोग १८० अंश असें मानून, चित्रेपासून मागें रेवतींत १८० संपतात त्या जागीं योगतारा मानावी व तेथून त्यांच्या चित्रायुत्तुरैवत पक्षाच्या राशिचक्रास आरंभ करावा असें त्यांचें मत आहे. पण वैदिक कालापासून चालत आलेली व दृक्गणितैक्यसिद्धीची सशास्त्र अशी रैवतपक्षीय विद्वन्मान्य पद्धति सोडून या द्राविडी प्राणायामांत कोण पडतो? अर्थातच आज २८ वर्षें केतकी पंचांग निघूनहि निष्फल झालें. ह्मणून कोणी कितीहि आक्षेप काढिले तरी निर्विकार मनानें विचार करील तो शुद्ध निरयन रैवतपक्षीय गणित सारिणीच मान्य करील; कारण—

"यस्मिन्देशे यत्र काळे येन दृक् गणितैक्य कमू॥
दृश्यते तेन पक्षेण कुर्यात्तिथ्यादि निर्णयम् ॥ १ ॥"

या वसिष्ट संहितेंत सांगितल्याप्रमाणें सशास्त्र पायावर याची उभारणी झाली आहे. अस्तु.

श्री. सारस्वतांनीं पर्जन्य योगावरहि कांहींसें लिहिलें आहे. पण आमच्यामतेंसुद्धां पर्जन्य योगांचा स्थुलपणेंच अनुभव येणार. सारस्वतांनीं लिहिल्याप्रमाणें तो एका गांवच्या किंवा वाड्याच्या अनुभवानें प्रत्ययास येणार नाहीं! भूमीच्या एक दोन अक्षांशांत हे अनुभव ताडून पाहून फारच विचारानें त्याचा शहानिशा करणें उपयुक्त ठरेल.

"ज्योतिज मागम शास्त्रं विप्रतिपत्रौ न योग्य मस्माकम् ॥'

या वराहमिहिराचार्योक्तीनुसार विशिष्टमर्यादेंतच फलादेश अनुभवास येतो. त्याचा अतिरेक कोणीच करूं नये. तारतम्यानुसार फारच बारकाईनें फलज्योतिःशास्त्रास विचारांत घेतलें पाहिजे.

श्री. सारस्वतांचे याप्रमाणें यांत फारच महत्वाचे घोटाळे झाले. व आह्मांस उत्तर देण्याचा प्रयत्न तर यांत साधला नाहींच. मुख्य मुद्दा सोडून सारस्वतांनीं एवढा पाल्हाळ कां केला याचें आमच्या प्रमाणेंच बऱ्याच वाचकांस आश्चर्य वाटेल. तथापि, आमच्या लेखाच्या अनुपयुक्तत्व दर्शनार्थ लिहिलेल्या टीकास्पद 'समजुतीचा घोटाळ्या'ची ही एक प्रस्तावनाच असें समजून, दिसलेल्या घोटाळ्याचें आविष्करण केलें आहे. सारस्वतांनींहि इतक्यावर थोडी विश्रांति घेतल्यानें आह्मींहि येथें 'आविष्करणाचा' हा प्रथम विभाग संपवुन श्री. सारस्वताच्या दुसऱ्या लेखांककडे वळतों.

नारायण अनंत नाईक पाटणकर

बाजारगप्पा !

अनुकरण

ले०:—विनोदराव

मनुष्य हा अनुकरणप्रीय प्राणी आहे. थोरांचें अनुकरण त्याला मनःपूर्वक करावेंसें वाटतें. माझ्यासारख्या सामान्य मनुष्याला तर थोरांचें अनुकरण मग तें कसल्याहि क्षुल्लक बाबतीचें कां होईना, पण तें थोरांचें ह्मणून चटकन उचलून आत्मसात् करावेंसें वाटतें!

सुवर्तन अंगीं पुरतें बाणण्याला आयास पडूनहि दिवसहि पुष्कळ जातात. पण दुर्वर्तन मनांत आणलें तर तें तेव्हांच करतां येतें. रस्त्यावरून चालतानां देखिलेल्या सभ्य स्त्रीयेची थट्टा करणें, बोलतांना दुसऱ्याची कुरापत काढणें, प्रतिपक्षाला शिव्या देणें, दारू पिऊन तर्र होऊन राजरस्त्यांत लोळणें, वगैरे हीं कामें क्षणांत करतां येतात असा माझा स्वानुभव आहे.

मी जेव्हां प्रथमच शाळेंत गेलों होतों, तेव्हां शाळेच्या बरहुकूम दुपारच्या सुटींत मी माझ्या सोबत्यांना जमवून शाळा उघडली. मी स्वतः श्रीगणेशा शिकत असल्यामुळें मला जरी कांहीं शिकवतां येत नव्हतें तरी मुलांना छडीनें मारणें, वेळोवेळां शिव्या देणें, टेबलावर काठी आपटणें, वगैरे हीं कामें मी आमच्या गुरुवर्य तात्यापंतोजीपेक्षांहि लहान वयांत शिवाय एकदां सुद्धांच उत्तम रीतीनें पार पाडिलीं.

मुलाचे पाय पाळण्यांतच या ह्मणींप्रमाणें मी पुढें कोणीतरी मोठा होईन असें माझ्या सोबत्यानीं अनुमान बांधलें व तें पुढें खरें ठरलें! (मी स्वतःच्या हातानें ३॥ हात लांब आहे. छेव्या तीन महिन्याच्या बाबूच्या हातानें माझी मोजदाद केल्यास मी कितीतरी हात लांब होतों. व गिन्हाद करून जेव्हां मी लांब होतों, तेव्हांचें माझें क्षेत्रफळ कुणालाहि काढतां येणार नाहीं, अशी माझी खात्री आहे!).

खरोखरच मी जेव्हां मोठा झालों, तेव्हां मी थोर [कादंबऱ्यांच्या चंद्रमौळी घरांत शिरतानां ज्याचें डोकें दाराच्या वर आपटत असे] लोकांचें अनुकरण करूं लागलों. दिवसा सर्व दारूबाजांची टर उडवावी, व संध्याकाळीं पांच वाजल्याबरोबर सर्व दारूबाज दोस्तांना प्रेमभरें भेट द्यावी. यामुळें मी दिलेल्या शिव्यांबद्दल माझ्या दोस्तांना कांहींएक वाटेनासें झालें!

माझे मित्र कादंबरे हेहि अनुकरणप्रीय गृहस्थ. त्यानीं सिगार ओढणें, पोर्तुगीज पद्धतीचा पोशाख वापरणें, घरांत सुद्धां पोर्तुगीज भाषा बोलणें, गोवा हा पोर्तुगालचा भाग ह्मणून लोकांशीं वाद घेणें, इत्यादि गोष्टी सुरू केल्या आहेत. पायांत घालण्यास बूट नसल्यामुळें ते त्यानीं एका सिंयोराकडे मागितले आहेत. व उदार सिंयोरानीहि आपण नवे घेतल्यावर जुनें [फाटके) बूट मोफत देण्याचें त्यांस अभिवचन दिलें आहे. असें त्यानीं मला शपथवार सांगितलें आहे. अस्तु.

मी थोरांचें अनुकरण केलें खरें, पण जवळ आर्थिक बाबत तितकी सुसंपन्न नसल्यामुळें माझी फार त्रेधा उडूं लागली. माझ्या मित्रानीं मला फार्मसदांत नोकरी धरण्यास सांगितली, काहींनीं काम्रांत जाण्यास विनविलें, पण फार्मसदांत जाऊन जीवाची फजिती उडविणें, व काम्रांत जाऊन कर्म ओढवून घेणें माझ्या मनाला प्रशस्त दिसेना. राहतां राहिली ओरपीस, पण ती आमच्या सधन खिश्चन ब्राह्मण भाटकार भाईंची मायबाप असल्यामुळें माझा अनोळखी इसमाचा तेथें प्रवेश कसा होणार?! तेव्हां मी फुकटची दारू कशी मिळवतां येईल हें कांहीं जणाच्या आचरणावरून व स्वतःच्या हिकमतीनें राजमार्ग ठरविले आहेत.

ते असे —

फुकट्यांस राजमार्ग —

१ सटयेस जाऊन.

२ बाबांनीं सांगितल्याप्रमाणें कोणास न कळवितां बाटली गुपचूप घराकडे आणून देऊन.

३ बाब मागील दरवाजांतून गुत्त्यांत प्रवेश करताना हळूच नम्रतापूर्वक हांक मारून.

४ गांवांतील अप्सरांची (?) माहिती व ओळख करून देऊन.

५ काजरास आमंत्रण नसलें तरी बाबांबरोबर आंत प्रवेश करून घेऊन.

६ अडचणींचें काम असलें तरी तें उद्यांवर टाकून बाबांच्या सहवासास संध्याकाळीं सहा वाजल्यापासून हजर राहून.

७ बाबांस परत परत बाब बाब ह्मणून.

८ बाब गिन्र झाले असतां घराकडे आणून पोंचवून.

मुसलमानांचें हस्तपत्रक

हिंदू लोकानीं मूर्तीच्या मिरवणुकी काढूं नयेत. कारण त्यामुळें मुसलमानाच्या धार्मिक भावना दुखविल्या जातात; तेव्हां या बाबतींत सरकारकडून हिंदूच्या मिरवणुकीस मनाई करण्यांत यावी अशा हेतूनें हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं मुसलमानाच्या सभा भरवाव्या अशा आशयाचीं हस्तपत्रकें कलकत्ता येथील मशिदीच्या भिंतीवर व इतर प्रमुख ठिकाणीं लावण्यांत आलीं आहेत. बकरईदच्या सणाच्या वेळीं मुसलमानांनीं प्राण्याचा वध केलेला हिंदूंस सहन होत नाहीं तर मुसलमानानीं तरी मूर्तीची मिरवणूक कां काढूं द्यावी असा मुसलमानाचा युक्तिवाद आहे. म. गांधी व त्यांचे मुसलमान स्नेही ह्यांनीं हिंदूना दयाशीलपणानें वागविलें. वास्तविक हिंदूंनीं मुसलमानावर हल्ला केला पण त्या बाबतींत मध्यस्थ असलेले म. गांधी यांनीं हिंदूंचा पक्षपात कां करावा? असा आक्षेप कांहीं मुसलमान घेत आहेत.

—सोनवाडी येथील टाटा कंपनीचें धरण फुटून कित्येक बायका, मुलें व गुरें दगावलीं! बिचारी 'धरण'कंपास नाहक बळी पडलीं!

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Redcar, vai á praça para venda em hasta publica a porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige a estação de Sanvordem no dia 11 do proximo mez de Agosto ás 10 horas pelo maior lanço que se oferecer acima da avaliação dois terços do predio rustico da varzea denominada Givagigall da cultura de arroz, situado em Camargoll de Cotigão, avaliado em 150 rupias, discrito por inteiro na conservatoria desta comarca sob o no. 16 663 e penhorado nos autos de execução por custas que o Ministerio Publico nesta comarca move a Sucdò Babú Sudir ou Sucdó Sudir e Pondorem por outro nome Anapurnim de Camargale de Cotigão por apenso aos de embargos de executado deduzidos pelos ditos Sucdó e Pondorem á execução hipotecaria que Rongagi Gopala Sinai de Poinguinim intentou contra os referidos Sucdó e outros. O arrematante pagará a contribuição de registo por inteiro e as despesas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaisquer credores incertos e co-proprietarios. O que para ser publico se expediu este. Xeldem, 10 de Julho de 1925.

O escrivão de Direito
Babú V. Camotim Redcar

Verifiquei
O Juiz de Direito
R. Colaço

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Redcar vão á praça para venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige á estação de Sanvordem no dia 28 do proximo mez de Julho ás 10 horas pelo maior lanço que se oferecer 1/16 do predio rustico denominado Caichem da cultura de arroz sito em Mudcheli de Agonda de Canacona avaliado em 50 rupias e 1/42 de varzea do predio rustico denominado Betul da cultura de arroz sito em Mudcuda de Agonda avaliado em 100 rupias, ambos discritos respectivamente na conservatoria desta comarca sob os n ° s. 16864 e 16865 e penhorados nos autos de execução de sentença que a Fazenda Nacional move a Gonessa Rama Folo e Omú Rama Folo ambos do Tudol de Gaundongrem, por apenso aos de inventario orfanologico procedido por obito de Janqui Dessaina, que foi da mesma O arrematante pagará a contribuição de registo por inteiro e as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaisquer credores incertos e co-proprietarios. O que para ser publico se expediu este. Xeldem, 29 de Junho de 1925.

O escrivão de Direito
Babú V. Camotim Redcar

Verifiquei
O Juiz de Direito
R. Colaço

O BHARAT

PARA S. EXCIA. LER

A Provincia, de Nova-Goa, semanario, que, proclamando-se *jornal europeu*, não poupa ocasião alguma de inventar pretextos para achincalhar os homens e as coisas da India, publica na sua edição de 14 do corrente um artigo, onde, *marcando posição* dos democraticos desta colónia, tem a coragem de fazer afirmações cujo alcance de certo não prevê.

Até hoje o papel politico e social de *A Provincia* havia consistido em procurar minar, embora baldadamente, as relações de bôa e leal cooperação e amizade que durante seculos existem entre os metropolitanos e os indianos. Agora, *A Provincia*, sem calcular por certo o sentido nem as consequencias das suas palavras, foi além e com uma inconsciencia lamentavel, depois de qualificar os indios de *irrequietos* e *indisciplinados* avançou o seguinte:

"A India é assim. Quase sem iniciativas, com um trabalho rudimentar, não se abalançando a grandes emprezas, amealhando e tornando improdutivo o capital, cedendo o passo aos extrangeiros que transferem os seus lucros para pais extranho, a India não marcha julgando-se como os selvagens no sertão da Africa, felizes com os meios rudimentares da vida em que de longa data vivem embalados!

Em não lhe faltando o arroz, tudo vai bem......"

São mais de quatro séculos que Portugal exerce com amor e desinteresse, desinteresse notem bem, a sua obra de civilisação e progresso na India, e se aqui um extrangeiro entra depois de percorrer o resto do Hindostão, não encontra cidades industriais com a floresta de suas chaminés a velar o sol, centros comerciais movimentados e portos coalhados de barcos, vê alguma coisa mais impressionante, mais convincente o homem com habitos, ideas e maneiras mais occidentalizadas do que os habitantes das grandes capitaes da visinha India. Vê ainda, e isto talvez mais caracteristico, as nossas aldeias com casas belas e higienicas, com a sua igreja ou pagode, com as suas escolas, o seu mercado, e isto ainda nas povoações rurais mais piquenas, pobres e afastadas, ao contrario do que sucede no resto da India, onde as cidades se alargam á custa do despovoamento e pobresa das aldeias.

O *Bharat*, cuja atitude perante as ideas e metodos do ocidente é conhecida como sendo de prudente reserva, não pode deixar de reconhecer que muito do bom que existe na India é obra dos portugueses, que os goezes, como civilisação espiritual e habitos ocidentais, vão muito ao par dos portuguezes de Portugal, sendo incontestavelmente esta a prova provada do extraordinario poder de assimilação que caracteriza o sistema colonizador portugues.

O *Bharat*, pois, embora não seja um admirador cego do ocidentalismo, aceita como um facto iniludivel e verificado a influencia, a acção de Portugal na formação social, politica, moral e espiritual dos indo-portugueses de hoje.

Mas a opinião do *Bharat*, é quando muito, a opinião da sua redacção, perfilhada ou discutida ou combatida por uns 1200 assinantes. Outro, porem, è o caso de *A Provincia* pelo menos no assunto em questão.

A Provincia é jornal do Partido Republicano Portuguez, o partido mais poderoso da Republica, o partido donde saiu o actual ministerio; alem disso ela é dirigida por um filho de Portugal, alto funcionario da Republica, residente na India.

Nestas circunstancias, o que *A Provincia* afirma tem o valor de um atestado, autorisado, — insuspeito, quasi oficial, da acção civilisadora de Portugal na India, donde se prova que esta acção quatro vezes secular apenas serviu para fazer *um barco de carcassa arruinada* com a *tripulação* (os indios) *sofrega de benesses, irrequieta e indisciplinada, com os meios rudimentares de vida, como os selvagens no sertão da Africa.*

E este atestado é tanto mais comprometedor do prestigio de Portugal quanto é certo que a India do tempo das conquistas ...não era America. Tinha sociedade organisada sua, os seus povos possuiam civilisação e religiões proprias e privativas ... As clases nobres não se deslumbravam com o seu igualamento á dos fidalgos portugueses (Vide *A Colonização Portuguesa* por Cristovam Pinto).

Este atestado é tanto mais comprometedor do prestigio de Portugal quanto é certo que ha quatro centos e tantos anos "Os europeus, e primeiro os portugueses, acharam-se em face de uma civilisação diversa da sua, inferior em muitos traços, superior em alguns" (Conde de Ficalho).

Este atestado é tanto mais comprometedor ao prestigio de Portugal quanto é certo que "quando as caravelas portuguesas, simbolizando o genio de uma raça inteligente e heroica, aportaram a India, não era a India uma terra de selvagens, um país de costumes e instituições rudimentares". (Vide A educação e ensino na India Portuguesa, por Menezes Bragança).

Este atestado, partindo donde parte, é comprometedor ainda ao futuro de Portugal e á integridade do territorio nacional porque foi lançado, inconvenientemente, num momento internacional altamente melindroso para o futuro do dominio colonial portuguez.

João de Algo

'ERA NOVA'

Pelo que nos informam da Capital, parece que o sr. Governador Geral Mariano Martins está envidando os seus melhores esforços para moralisar, com firmesa inabalavel e tino acertado, a administração publica da India, levada á matroca pelo seu antecessor.

O funcionalismo que no tempo da governação do sr. dr. Jaime de Morais andava divorciado da pontualidade e disciplina, requisitos necessarios para a bôa direcção da maquina administrativa, rende já culto aos mesmos requisitos, desde que o sr Martins começou a habitar o Palacio do Idalcão.

Os manejos das *aranhas velhas* provam-se de nenhuma proficuidade. Já se não ouvem palestras amenas, entrecortadas de gargalhadas ruidosas e expressões sonoras. Nem se admira o convivio intimo do *novo morador* com os velhos politicões que impingiam trazer fechados nos seus punhos os destinos do País. Nem tão pouco se observa o circulo que se formava em volta do centro — *Morais*

Tudo deixa vêr, pois, que vamos entrar numa *era nova*, numa era de legalidade e moralidade, numa fase de justiça.

O nosso informador transmite-nos, tambem, muitas novidades sensacionais, todas tendentes á felicidade do Paiz — novidades que se projectam no Gabinete de Sua Excia., destinadas a pôr em ordem o desordenado estado financeiro do erario público.

E' desnecessario dizer-se que as aguardamos com a verdadeira anciedade, anciedade de quem deseja vêr salvo o Paiz do perigo iminente que ameaça arrasta-lo para o precipicio duma irremediavel bancarrota.

O *Bharat* julgar-se-ha imensamente feliz se o sr. Mariano Martins lhe proporcionar, como até aqui, ensejos de o apoiar sempre.

Avante, sr. Mariano Martins!

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

मिति श्रावण शु० ९ मी शके १८४७

जुना अनुभव व नवे मार्ग

या आमच्या पोर्तुगीज हिंदुस्थानांत लोकसत्ताक राज्यपद्धति सुरू झाल्यास उणीं पुरीं १५ वर्षे होत आलीं. इतक्या अवधींत पोर्तुगेज रिपब्लिकचे प्रतिनिधि या नात्यानें तीन गव्हर्नर येऊन गेले आणि चवथ्या गव्हर्नर जनरलचा प्रवेश नुकताच होऊन त्यानीं आपलीं अधिकारसूत्रें हातीं घेतल्यास पुरता एक महिनाहि लोटला नाहीं. नवे प्रांताधिपति काय करणार, आपला राज्यकारभार लोकसत्तेच्या मूळ तत्वांस अनुसरून चालविणार कीं मागें होऊन गेलेल्यांचीच थोड्याबहूत फरकानें 'री' ओढणार याविषयीं अनेकांकडून अनेक भविष्यें वर्तविलीं जात आहेत. या साऱ्या भविष्यांत आशावादीपणाचा मसाला भरपूर भरला असल्यामुळें तीं चाखणाऱ्यास मोहून सोडतील यांत संशय नाहीं. परंतु मागील तीन गव्हर्नर जनरलांची तापदायक कारकीर्द पाहिलेली जनता चवथ्या गव्हर्नर जनरल साहेबांकडे आस्थापूर्ण दृष्टीनें पाहात असली तरी केवळ भविष्यांवरच विसंबून राहण्यास तयार नाहीं. त्यांतल्यात्यांत अधिकारसूत्रें हातीं घेतानां केलेल्या भाषणांत गव्हर्नर साहेवांनीं जर नेमकेंच करांकडे बोट दाखविलें नसतें तर नवी कारकीर्द सुखावह होईल ह्मणून आशा करण्यास कांहीं जागा होती. तीहि आज नाहींशी झाली आहे असें जरी ह्मणवत नसलें, निदान आम्ही तरी आजच ह्मणण्यास तयार नसलों, तरी आशेची जागा कांहीं अंशीं संशयानें व्यापली आहे हें मात्र खोटें नाहीं.

मागील कारकीर्दींत तिजोरीवर बसलेला ताण व त्यामुळें तिची झालेली हलाखीची स्थिति सुधारण्यावरच पोर्तुगेज हिंदुस्थानचा भविष्काळ अवलंबून आहे. व ह्मणून झाडून सारीं वर्तमानपत्रें येथील राज्यकारभारासंबंधींचें धोरण सुचवितानां एकच मार्ग दाखवून देत आहेत व तो हा कीं, अनावश्यक खातीं काढून टांकणें, आवश्यक खात्यांतील बड्या छोट्या कामदारांची फुगलेली संख्या कमी करून राहिलेल्यांच्या पगारांत कालमान परिस्थिति पाहून योग्य फेरफार करणें, चैनीचे व पाहुणचारादाखल दाखविण्यांत येणारे खर्च काढून टांकणें, निदान कमी करणें वगैरे वगैरे. गव्हर्नर साहेबांस दाखवून दिलेला मार्ग पसंत पडला व तो अमलांत आणण्यांत आला तर बरीच मोठी बचत होईल आणि करांकडे त्यानीं केलेला अंगुलीनिर्देश परत घेण्यास त्यांस सहज संधि सांपडेल; इतकेंच नव्हे तर निर्गत माणसांवर घेण्यांत येणारा दहा आण्याचा अपमानकारक व अपकीर्तिकारक कर काढून टांकण्यास आणि इतर अनेक वाढलेले कमी करण्यास सोपें होईल.

अनावश्यक खातीं काढून टांकणें व बड्या छोट्या अधिकाऱ्यांच्या जाड्या पगारांत छाटाछाट करणें हा मार्ग अमलांत आणतानां गव्हर्नरसाहेवांच्या वाटेवर त्या त्या खात्यांच्या मुख्याधिकाऱ्यांकडून अनेक अडथळे आणण्यांत येतील. या अडथळ्यांच्या जाळ्यांत गुंतून न जाण्याइतकें मनोधैर्य गव्हर्नर साहेबानीं दाखविलें तर त्यांस त्या बड्या धेंडांची इतराजी तरी सहन करावी लागेल. असल्या परान्नपुष्ट वर्गाची पर्वा करणाऱ्यांपैकीं हे आमचे नवे गव्हर्नरसाहेब नाहींत हें आम्ही जाणून आहों; परंतु, मागील उदाहरणें दाखवून धोक्याचा तांबडा कंदील दाखविणें हेंहि आमचें कर्तव्य आहे. जवळ जवळ तीस वर्षें होत आलीं. त्यावेळीं शिपायानीं बंड केलें व त्याचें रूपांतर प्रसिद्ध दादाराण्याच्या बंडांत झालें. लोकांची, विशेषत: नवीन काविजादींतील लोकांची फार तारांवळ उडाली. " इकडे दडावितो वानर।तिकडे पुजारियाचा मार" अशीच स्थिति एकीकडून सरकारी त्रास व दुसरीकडून बंडवाल्यांचें भय झाल्यामुळें, लोकांची झाल्यास नवल नाहीं. बंड मोडण्यास सरकारनें अनेक प्रयत्न केले; पोर्तुगालहून इफांत्र दों. आफोंस यांसह गोऱ्या पलटणी आणल्या; देसाई, सरदेसाई यांस त्यांच्या सरंजामानिशीं पुढें उभें केलें; परंतु बंड कांहीं मोडवलें नाहीं. शेवटीं नुकतेच परलोकवासी झालेले जनरल जुआकीं माशाद यांस गव्हर्नर जनरलचे अधिकार देऊन पाठवितांच त्यानीं राणे लोकांच्या कागाळ्या दूर करून लगेच समेट केला व जनता व सरकार यांच्या मागचा एक ससेमिरा दूर झाला. शांतता होऊन जरा स्थिरस्थावर होतांच माशाद साहेबानीं अंतर्गत कारभारांत हात शिरकवून त्यांत बऱ्याचशा सुधारणा केल्या. सर्व जनतेचें लक्ष त्यानीं आपणाकडे ओढून घेतलें; पण वडे अधिकारी त्यांवर रुष्ट झाले व त्यांस रातोरात नाहींसें करण्याचा एक भयंकर कट करून तो अमलांत आणणार इतक्यांत उघडकीस आला. आपल्या पोळीवर लुटीचें तूप ओढण्यास सोकावलेला हा अधिकारी वर्ग तें तूप मध्येंच हिरावून घेणाऱ्या गव्हर्नरांशीं सूडबुद्धीनें वागत होता तर त्यावेळचे आर्चविष्प दो. सेवास्त्यांव व्हालेंत याचीं व कोन्हेंतांतील पाद्री वायांचीं गुप्त व कृष्णकृत्यें उघडकीस आणल्यामुळें तो धर्मगुरु वर्गहि त्यांवर डोळे वटारून पहात होता. त्याचें पर्यवसान वर सांगितलेल्या कटांत झालें. तरी कटवाल्यांचे बेत ढांसळून पडल्यामुळें गव्हर्नर साहेबांच्या जीवास अपाय झाला नाहीं. आपलें धोरण जास्त नेटानें चालविण्यास त्यांस हुरूप आला व बऱ्याच सुधारणा त्यानीं अमलांत आणल्यामुळें आज सर्वतोमुखीं त्यांचें नांव गाजत आहे व पुढेंहि येथील लोक त्यांच्या नावांकडे कृतज्ञता बुद्धीनेंच पाहतील.

मोनार्कींतील शेवटचे तडफदार गव्हर्नर जनरल ओर्त इ कोस्त यांसहि त्यांच्या धोरणामुळें असाच प्रकार भोंवल्याची दाट वदंता होती. रिपब्लिक राज्यसत्तेंतील पहिले ग. जनरल खिस्तवासी दो. कौसेर द कोस्त यांच्यावरहि साडेतिनशें रैसांचा देक्रेत अमलांत आणला नाहीं ह्मणून, फोंडें महालांत एकाकाळीं कडवे व जुलमी ह्मणून प्रसिद्ध असलेले आदमिनिस्त्रादोर, का. ब्रागांस या युरोपियन मिलिटरी आफिसराच्या नेतृत्वाखालीं बऱ्याच मिलिटरी आफिसरानीं शस्त्र उगारलें होतें; पण आरमारावरील लोकानीं ग. साहेबांची बाजू उचलल्यामुळें हें प्रकरण त्यांच्या उलट अंगावर आलें हें कोणास ठाऊक नाहीं ? दो. कोस्त यानीं आपलें पूर्वीचेंच देमोक्रातिक ह्म. लोकसंग्राहक धोरण कायम ठेवले असतें तर तसले प्रसंग वरचेवर त्यांवर आले असते. परंतु, सत्तरी महालांतील जुलमी व अत्याचारी कमांडर का. रोल पेरैर यांची इभ्रत राखण्याच्या इरेस पडल्यामुळें राणे लोकानीं बंड उभारलें व त्यांच्या कागाळ्या सहानुभूतीनें न ऐकण्याचा हट्ट धरून तें बंड तरवारीच्या जोरावर मोडण्याचा त्यानीं निश्चय केला. हें प्रकरण विकोपास जाऊन मिलिटरी लोकांच्या ते अधिकाधिक जाळ्यांत पडले व अधिकारी वर्गाचें आणि त्यांचें मेतकूट ज्यास्तच बनत चाललें. यांत पूर्वींचें त्यांचें उदार धोरण कोठें पार नाहींसें झालें. मग अधिकारी उलटण्याचें त्यांस भयच राहिलें नाहीं. कौसेर दा कोस्तानीं गोऱ्या स्थानिक आणि आफ्रीकन पलटणीच्या जोरावर बंडाचा बींमोड केला हें खरें असलें तरी बंडाच्या शमनार्थ लाखों रुपयांची झालेली धूळदाण व तीमुळें तिजोरीवर बसलेला जोराचा ताण अद्यापहि सुटला नाहीं आणि आज दिसत असलेली तिजोरीच्या हलाखीचीं कारणें काहीं अंशीं बंडाच्या शमनार्थ झालेल्या अवाढव्य निष्कारण व बेसुद खर्चातच सांपडूं शकतील. कोस्तसाहेबानीं लटक्या इभ्रतीचा नाद सोडला असता तर बंड टळून त्यांस आपलीं नव्या मनूंतील नवीं धोरणें नव्या पद्धतीनें आंखून अमलांत आणण्यास पुष्कळ वाव मिळाला असता. ते आपल्या रेपुब्लिकन मतांशीं प्रामाणिकपणानें वागणारे होते; परंतु इभ्रतीच्या भरीं पडून, बंडाच्या भोंवऱ्यांत सांपडून एककल्ली, हटवादी बनले ह्मणून देमोक्रातिक तत्वांचा सक्रीय पुरस्कार त्यांना करून दाखवितां आला नाहीं. त्यानां पहिल्या गव्हर्नरीचा मान लोकांच्या इच्छेमुळेंच मिळाला आणि त्यांच्या चुकलेल्या धोरणांमुळें लोकांनांच त्यांच्या कारकीर्दीचा कंटाळा आला. त्यांच्या मागून आलेले दुसरे रेपुब्लिकन गव्हर्नर जनरल का. दे. फ्रागात फ्रैतस रिबैर हे आपल्या मतांशीं प्रामाणिक राहणारे खंदे गडी होते. आरंभीं आपल्या देमोक्रातिक तत्वांची ओळख त्यानीं आपल्या भाषणांत करून देऊन त्याप्रमाणें येथील राजकारभारांतील घोटाळे काढून टाकण्यास सुरवात केली होती. राज्यकारभारांत माजणारे घोटाळे बड्या अधिकाऱ्यांच्या आर्थिक फायद्याचे असतात. ह्मणून ते दूर करण्याचा प्रयत्न एखाद्याकडून होऊं लागतांच त्यावर अधिकारी वर्ग, तोंडांतील सावज ओढून काढलेल्या वाघोबाप्रमाणें, तुटून पडत असतो. फ्रैतस रिबैर यांसहि तसलाच अनुभव येणार होता; पण पोर्तुगालांतील वातावरणांत मोनार्कीपक्षीयांचे ढग चमकूं लागले आणि ती संधि साधून नीच मोनार्कींपक्षाकडे कल असणारे सिदोनियु पाइस या नावांचे एक तरवार बहाद्दर पुढें येऊन खुद्द अध्यक्ष पदावर आरूढ झाले. यावेळीं रिबैर साहेबानीं आपल्या देमोक्रातिक पक्षाच्या बीदास अनुसरून राजीनामा मागावयाचा तो न मागतां एवढ्या मोठ्या प्रयासानें प्राप्त झालेल्या पो. हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलच्या बड्या जागेस ते मोहानें चिकटून बसले. अधिकारी केवढाहि मोठा असला तरी वरिष्ठाच्या धोरणांत फरक करणें त्याच्या हातचें नसतें. तसाच अनुभव आपणास निस्पृह व प्रामाणिक ह्मणून मिरवणाऱ्या फ्रैतस साहेबांच्या बाबतींत आला. 'पोर्तुगेझ हिंदुस्थान आवतोनोमीस पात्र नाहीं. अद्याप तें हिरवट आहे' हे त्यांचे शब्द येथील जनता कधींहि विसरणार नाहीं. आतां कायदेकोन्सिल या नावानें सुरू असलेली येथील मुख्य संस्था त्यांच्या मुदतींत कोंसेल्य दे गोव्हेर्न या नावानें ओळखली जात होती. त्यांत असलेली दहा लोकनियुक्त प्रतिनिधींची संख्या सहांवर आणून येथील जनतेचा त्यानीं रोष संपादन केला. एकीकडे नोकरशाही रुसलेली, सिदोनियु पाइसाच्या राजकारणांत चिकटून राहिल्यामुळें पोर्तुगालांतील इतर पक्षीयांस घुस्सा आलेला आणि पो. हिंदुस्थानास स्वराज्याच्या अपात्रतेचा व हिरवटपणाचा अहेर करून कोंसेल्य द गोव्हेर्नांतील लो. नि. प्रतिनिधींची संख्या कमी करून सहांवर आणून सोडल्यामुळें जनता संतारलेली. इतक्यांत सिदोनियु पाइसाचा खून होऊन पुनश्च लोकसत्ताक पद्धतीचे अभिमानी अधिकारारूढ झाले आणि त्या संधीकालांत फ्रैतस रिबैराच्या भोंवतीं ठांसून भरून राहिलेले सुरुंग पेटून हें अनावर झालेलें धूड कोलमडून पडलें. का. दे फ्रागात फ्रैतस रिबैर हे तडफदार, सडेतोड व निस्पृह बाण्याचे होते तरी त्यांस गव्हर्नरीस लागणारे मुत्सद्दीपणाचे गुण नसल्यामुळें त्यांची कारकीर्द अळणीच झाली. त्यांचा जन्म मिलटरी शिस्तींत गेल्यामुळें येथील राज्यकारभारांस शिस्तीचें वळण लावतील. रिपब्लिकच्या आद्यघटनेविरुद्ध खिस्ती धर्मवर्धनासाठीं होत असलेला लाखों रुपयांचा खर्च काढून समतेचें तत्व पटवून देतील आणि सर्वांस बंधु भावानें व

[पुढील मजकूर पृष्ट ७ वर पहा.]

नव्हे; कारण साधुवर्य तुकाराम महाराजच सांगतात कीं, नव्हे ब्रह्मचर्य बाइलेच्या त्यागें। वैराग्य वलगें देशत्यागें ॥१॥ काम वाढे भय, वासनेच्या द्वारें। सांडावें तें धीरें आचावाया ॥२॥

ब्रह्मचर्य धारण करण्याचे प्रकार मनुस्मृतींत सांगितलेले आहेत. तदनुसार वर्तन होणें जरूर आहे. त्याप्रमाणेच स्त्रीपुरुषांचे अकालीं विवाह किंवा गर्भादान करण्याच्या चालीहि बंद करणें अत्यावश्यक आहे. इतकेंच नव्हे, तर योग्य कालपर्यंत पुरुषांस स्त्रीसंबंधाची कल्पना व स्त्रियांस पुरुषसंबंधाची कल्पना येऊं न देण्याविषयीं फार काळजी घेण्यांत आली पाहिजे. व तसेंच शृंगारविषयक गोष्टी किंवा प्रकार हे त्यांच्या नजरेस न येण्याची विशेष खबरदारी घेण्यांत येणें जरूर आहे. व ह्याशिवाय त्यांकडून शरीराचे वाढीस पोषक असा व्यायाम करविण्यांत आला पाहिजे. वीर्यहानि न होतां, वीर्यवृद्धिकर असें खाणें, पिणेंही असलें पाहिजे. चहादि उष्ण पेयें, सुरापान व इतर व्यसनें यांस बंदी [आळा] असली पाहिजे. मनावर विशेष बोजा न पडतां, शाळेंत शिक्षकाच्या व घरांत आईबापांच्या देखरेखेखालीं शिक्षण झालें पाहिजे. बाहेर फिरतानांहि चांगली संगत लागेल, अशी खबरदारी घेण्यांत आली पाहिजे. व असें झालें तरच कदाचित् वीर्यरक्षण व वृद्धि होऊन शरीराची वाढ व पुष्टि चांगली होईल, व समाज कांहीं काल जिवंत राहून देशकार्यहि करण्यास पात्र होईल.

एस्. एच्.

—अंदमान येथें रहाण्याकरितां पुरुष स्त्री व मुलें मिळून २०० मोपले गेल्या ८ तारखेला रवाना झाले.

—हैसूर संस्थानांत वीस हजार लोकसंख्येहून कमी संख्या असणाऱ्या समाजास अल्पसंख्य समाज ह्मणून मानिलें जातें.

—ता. १७ जुलै रोजीं प्रयाग येथें श्री. सर माधवराव शिंदे यांच्या अस्थीचें विसर्जन करण्यांत आलें. अस्थी बैंकाबागपासून गंगानदीपर्यंत विमानातून नेण्यांत आल्या.

—धामणगांव स्टेशनावर बरोबर सांधा न फिरविल्यामुळें आगगाडीची टक्कर होऊन तींत मि. ब्राऊन नांवाचा ड्रायवर ठार झाला. त्याबद्दल त्याच्या बायकोनें ६० हजार रुपयाचा दावा लाविला होता. त्याच्या निकालांत उमरावतीच्या डि. जज्यांनी वादीला मागणी प्रमाणें रुपये देवविले.

—कोचीन बंदरावर ४ लक्ष रुपये खर्च करून एक हरिपतळ बांधण्याचें मद्रास सरकारनें ठरविलें आहे.

—नागपूर मुनिसिपालटीनें सरकारकडून साडेपांच लक्ष रुपये कर्ज काढण्याचा ठराव पास केला.

—मालवण येथील देवी अहिल्याबाई वसतिगृहास इंदोरच्या महाराजांनीं एक हजार रुपये देणगी दाखल दिले.

'अधिकस्याधिकं फलम्'

Quando um não quere dois não brigam.

(दोघां भांडणारांतून एक माघार घेईल तर तंटा मिटून जातो असा वरील वाक्याचा निष्कर्ष.)

हा लेख लिहिण्यास आज हातांत लेखणी धरिली नसती, परंतु श्रीयुत अनंत नारायण पाटणकरांनीं मी 'अज्ञातद्वा' बरळल्याचा दोष पदरांत टाकिल्यामुळें व त्यायोगें Plagiarismo (ग्रंथांतील विषय चोरून स्वतःचा असें दाखविणें)चा आरोप माझ्यावर प्रस्थापित होत असल्याकारणानें थोडक्यांत हें प्रकरण आटोपतें घ्यावें असें ह्मणतों.

एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, 'मराठी वर्तमानपत्राच्या आजपर्यंतच्या इतिहासावरून पाहिलें तर वर्तमानपत्रांत बहुधा राजकीय, सामाजिक व धार्मिक विषयावरच लेख पुष्कळ आले आहेत; व हल्लींहि येत असतात. शेतकी, कलाकौशल्य, व्यापार, शास्त्र, वाङ्मय हे विषय फारसे कोणी हातीं घेत नाहींत व त्यावर मेहनतीनें आणि स्वानुभवानें लिहिलेले लेख तर क्वचितच दृष्टीस पडतात." हें इंग्रजी हिंदुस्थानातील वृत्तपत्रांस उद्देशून आहे. आज मला पोर्तुगीज हिंदुस्थानांतील मराठी वर्तमानपत्रास अनुलक्षून असें ह्मणावें लागतें कीं, ज्याची असाधारण बुद्धिमत्ता व ज्योतिःशास्त्रांत पारंगतता आहे असें श्रीयुत पाटणकर ह्यानीं ज्योतिःशास्त्राच्या बाबतींत स्वतःच्या जोमदार लेखणीनें काहींअंशीं उणीव भरून काढिली आहे. ते ज्योतिषविषयक जे विचार जगापुढें मांडित असतात ते मोठ्या उमेदीनें आणि मेहनतीनें हे कोणीहि कबूल करील ह्यात संशय नाहीं. 'समजुतीचा घोटाळा' ह्या माझ्या विषयाचा तिसरा लेखांक 'भारत' पत्रात प्रसिद्ध होण्याचे संधीस त्यानीं घोटाळ्यातील घोटाळ्याचें आविष्करण करण्याचें अभिवचन दिलें, इतकी त्याची उत्सुकता किंवा तत्परता प्रबल झाली! १६ जुलै गुरुवार केव्हा उजाडेल असें त्यांना होऊन गेलें असावें.

सन १८८६ सालीं मी लॅटिन भाषेंतील व्हर्जिल काव्याचा (Eneida de Virgilio) अभ्यास करितांना त्यांतील मुख्य नायक जो येनेयश (Eneas) ह्याचा एक कार्यभाग सफल होण्याकरितां भविष्यवादिनी सिबील (Profetiza Sibila) हिनें त्यास सांगितलें कीं, जवळच्या जंगलात एक भला मोठा वृक्ष असून त्याला सोन्याची एकच फांदी आहे ती तूं काढून घे. तो वृक्ष त्याच्या दृष्टिपथांस आला त्यावेळीं त्याला एवढी उत्कंठा लागली कीं त्या झाडाजवळ पोचण्यास लागणारा अल्पकाल दीर्घकालाप्रमाणें भासूं लागला. असो. आठवण झाली ह्मणुन दोन ओळी खरडल्या ही एक उपमा दिली. गैर असल्यास क्षमा असावी.

माझ्या तिसऱ्या लेखांकांत वाद प्रतिवाद करण्याची मला हौस नाहीं असें मी जाणवून दिलेंच आहे. माघार देण्यास मी तयार आहें. बलवंताशी स्पर्धा करूं नये हें महाभारतांतील तत्व माझ्या ध्यानांत आहे. मी वादविवाद करणें ह्मणजे मृत्तिकेच्या पात्रानें धातुपात्राशीं टक्कर मारूं पाहण्यासारखें आहे. श्रीयुत पाटणकरांनीं चालू १६ जुलैच्या 'भारत' पत्रांत 'घोटाळ्याचें आविष्करण' ह्या सदराखालीं जो प्रथम विभाग सुरू ठेविला आहे त्या मानानें हें आविष्करण बरेंच विस्तृत होईल असें अनुमान निघतें; फार आनंद आहे. आविष्करणाचें स्वरूप जसजसें विस्तृत होत जाईल तसतसा त्यांच्या विद्वत्तेचा प्रकाश ज्यास्त पडून वाचकांनाहि ज्योतिषविषयक माहितीचा अलभ्य लाभ घडेल. 'अधिकस्याधिकं फलम्. 'भारत' पत्राच्या उपरिनिर्दिष्ट अंकांत जे कितीएक 'मिथ्यालाप' त्यांनीं मला लागू केले आहेत त्यां संबंधानें आज मी दोन शब्द बोलूं इच्छितों.

\+ \+ \+

१

तारीख १८ माहे जूनच्या अंकांत मीं एका पंचांगकर्त्याचा उतारा दिला आहे, त्यांत 'आह्मीं आजपर्यंत जो शोध केला त्यावरून शक १४७६ सालापर्यंतच काय तो शोध लागला आहे' असें ह्मटलें आहे. अर्थात त्या अगोदरच्या त्या पंचांगकर्त्याला शोध लागलेला नाहीं असें सिद्ध होतें. त्या शकपूर्व कोणी पंचांगें तयार करीत नसत असें त्यांचें सांगणें नाहीं.

२

बहुतेक पंचांगें ग्रहलाघवादि ग्रंथांच्या आधारानें तयार होत असतात, हें विधान 'संप्रति खलु भरतखंडे ज्योतिर्विदः सर्वे ग्रहलाघवादि ग्रंथानुसारेण पंचांगानि रचयति' ह्या अवतरणातील वाक्यावरून केलें आहे. ग्रहलाघवादि ह्यांत आदि ह्या शब्दानें ग्रहलाघवाशिवाय अन्य ग्रंथांचाहि अंतर्भाव झाला, असें असता वृथारोप लादणें हें योग्य नाहीं.

३

उदाहरणार्थं १५॥ × ७। चा गुणाकार घडघडीत अवतरण चिन्हांत दिला असतांना सारस्वतानें 'स्वमत' कसें घुसडून दिलें समजत नाहीं. टिळकशक चालू करा अशी शिफारस करणाऱ्या करणग्रंथाभिमानी टिळक पंचांगाच्या सगावाल्याचेंच तें गणित आहे, सारस्वताचें नाहीं. मी ज्योतिषी नसून सर्वज्ञहि (Omnisciente) नव्हे. ही प्रौढी मला मिरवावयाची नाहीं. लोकांवर माझी छाप बसविण्याचा हा माझा प्रयत्न नाहीं. एखादें नियतकालिक काढून माझ्या विद्वत्तेवर लक्ष्य देऊन लोकांनीं भराभर वर्गणीदार व्हावें असल्या मुळाशीं माझा हेतु असल्याची कोणी कल्पना करील तर तशीहि गोष्ट नाहीं. १५ पासून २० घटिकापर्यंत फरक येतो हें 'ह्मणे' ह्या शब्दानें उसनें भांडवल असें ठरतें. हेंहि विधान त्याच सगावाल्याचें आहे; पाहिजे असल्यास सत्यत्व दाखवून देईन.

पाटणकर महाराज, 'अज्ञातद्वाभविष्यति' हा वृथारोप माझ्यावर लादण्यांत अर्थ नाहीं. १५॥×७। चा गुणाकार आणि १५ पासून २० घटिकाचें अंतर दाखविणारे ज्योतिषी कुचकामाचे असें मी कधींहि ह्मणणार नाहीं. ह्याचें गणित जें पुस्तकांत प्रसिद्ध झालें आहे तें खोटें असें विद्वानच ठरविण्यांस समर्थ आहेत. वर्तमानपत्रांत जे लेख मी प्रसिद्ध करीत असतों त्यांत अवतरणांचा सुकाळ असतो. ह्यावरून मुख्या शिक्षकांकडून (पुस्तकांमधून) माहिती गोळा करून ती प्रकाशित असतों, ह्याची अवतरणेंच साक्ष देतात, इतर ज्योतिषांचें गणित खोटें व स्वतःचें तें खरें असेंच ह्मणण्याचा आपला इरादा काय? तर मग ज्योतिषविषयक एका उत्तम ग्रंथांतील 'पंचांग' हा विषय वर्तमानपत्रांत लवकरच उतरून घेतों, त्यांतील किती 'अज्ञातद्वा' निघतात हें मला पहावयाचें आहे.

असें सांगतात कीं, मयूरकवि हे कविता रचित असतानां एकामागून एक सुचणाऱ्या यमकांच्या गर्दीमुळें डाव्या हातानें ते त्यांना पैस पैस करीत असत, तसें लेखांचें 'आविष्करण' करण्याच्या भरांत उतावळीनें सारस्वताच्या लेखांतील अवतरण चिन्हांना श्री. पाटणकर पैस पैस ह्मणत असतील तर नकळे. मला वाटतें, ते जें शास्त्र पढले आहेत त्यात अवतरणानां कवडीमोल करून टाकिलें असावें न पेक्षां अवतरण हें चिन्ह परमतदर्शक असतां 'स्वमत घुसडून दिलें' असा सारस्वतावर वृथारोप करते ना. सारस्वत हा अविद्वान आहे, त्याला अनेक ग्रंथाच्या आधारानें लेख लिहून स्वतःच्या विद्येची लटकी छाप लोकांवर बसवावयाची नाहीं. त्याला स्वतःच्या विद्वत्तेचा प्रभाव दाखविण्यासाठीं जरा कोठें निमित्य सापडतें काय हें हुडकून काढावयाचें नाहीं. लेख लिहिणें हें त्याच्या निर्वाहास पोषक असें साधन नाहीं. लेख लिहिणें ही त्याची करमणूक आहे. कोणीहि कडून वृथारोप लादले किंवा लादावले गेले तथापि सारस्वताचा क्रम अबाधित राहील. Quem nao deve nao teme (कर नाहीं त्याला डर नाहीं]. वृत्तपत्रात लवकरच 'पंचांग' हा विषय एका उत्तम पुस्तकांतील उतरून घेऊन वाचकास सादर करीन, त्या विषयाचें खंडण करण्यास कोणाचें वाक्पांडित्य पुढें सरसावतें हें मला पहावयाचें आहे. आपलें तें खरें व दुसऱ्याचें ते खोटें? नव्हे. १५॥×७। चा गुणाकार दाखविणारे पढतमूर्ख नाहींत; ते एक उत्तम ज्योतिषी आहेत. "अतिशय विद्याभ्यासानें मनुष्याच्या अंगांतील व्यवहारज्ञान अगदीं लोपून तो मूर्ख ठरतो त्यास पढतमूर्ख असें ह्मणतात." ही व्याख्या एका विद्वान लेखकानें केलेली आहे, एखाद्या अज्ञातद्वानें केलेली नव्हे. पढतमूर्खासंबंधीची गोष्ट वर्तमानपत्रांत वाचकांच्या करमणुकीसाठीं प्रसिद्ध करणार आहें. मूर्ख ह्मणजे अविवेक करितो तो. 'मुह्यतीति मूर्खः' "ज्योतिःशास्त्र हें जागरूक शास्त्र आहे व त्यासंबंधानें नवे नवे शोध प्रत्यहीं लागत आहेत. ज्योतिःशास्त्रांतील पुष्कळ अनुमेय गोष्टींविषयीं आजपर्यंत अनेकांचे अनेक तर्क झाले आहेत" असो. विस्तार नको, की वाद नको.

देवज्ञाची उपपत्ति ह्याहि लेखाची व त्यांतील 'घुसडून' ह्या शब्दाची संभावना यथावकाशें करीन. 'घे वाण दे वाण'.

सारस्वत.

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2° aficio Barreto, correm éditos de 30 dias, a contar do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2° do art. 197 do Cod. do Proc. Civ. citando os interessados Gonpoti Bascora Sinai Nagorcencar e sua mulher Locximibai, Pandurongа Bascora Sinai Nagorcencar e sua mulher Xantabai, Datem e seu marido Sripada Sadassiva Sinai Fenanim e Auduta Bascora Sinai Nagorcencar, solteiro, este menor pubere e aqueles maiores, todos de Nagorcem e ora ausentes em Karvar na India Ingleza, para assistirem a todos os termos até final do inventario orfanologico a que se procedeu por obito de Bascora Pandurongа Sinai, natural e domiciliado que foi de Nagorcem, sendo inventariante e cabeça de casal Visvambora Bascora Sinai Nagorcencar, da mesma e deduzirem querendo nele os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento.

E para ser público se expediu este. Xeldem 18 de Junho de 1925.

O Escrivão do 2° oficio
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
R. Colaço (2a vez

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem. e cartorio do escrivão do 2° oficio, Barreto, corre editosm de 30 dias contados do dia em que se publicar o uitimo anuncio nos termos do paragrafo segundo do artigo cento noventa e sete do Codigo do Processo Civil, citando a interessada Mogrem Gauncarina, viuva de Locximona Gãuncar, de Undorna de Moclornem e ora ausente em parte incerta de Belgão do territorio britanico, para em dez dias posteriores ao praso de editos vir pagar no cartorio referido a importancia de 21 Rp. 4 tgs. 5⅛ reis proveniente de custas da sua responsabilidade liquidadas nos autos de inventario orfanologico a que se procedeu por obito de Zoinum Bodcó Gauncar e sua mulher Parvoti Gauncariua, moradores que foram de Molcornem ou nomear no mesmo praso bens suficientes a penhora para o pagamento da mencionada quantia e o mais que acrescer, sob pena de findo esse praso, ser devolvido o direito da nomeação ao exequente, Ministerio Publico nesta comarca e correr a execução os seus termos á revelia da citanda. Para ser publico se expediu esse.

Xeldem 1 de Julho de 1925
O Escrivão de Direito
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juizo de Direito
R. Colaco [2a vez

O BHARAT

PARA S. EXCIA. LER

Reproduzimos aqui, a seguir, um artigo que, sob o titulo de *"O consegue-tudo"*, saiu neste jornal, faz mais de tres meses.

Reproduzimo-lo porque, se a oportunidade das nossas considerações é mesma hoje como então, a sua utilidade é, hoje, maior do que então, como ninguem que tenha olhos de ver pode contestar. Ei-lo:

"Nós o conhecemos, conhecem-no os poderosos, conhece-o toda a gente. Humilha-se perante os grandes. Curva-se gentil perante todo o mundo.

O que faz? Qual é o seu modo de vida? Pode ser que exerça uma funcção ou oficio qualquer. Isto, porém, não passa de um ornamento, um mero pretexto, uma simples taboleta. A sua verdadeira ocupação é outra.

Ele é ignorante; mas astuto. Ele não tem cultura; mas possui uma meia duzia de vocabulos e frases em portugues. E com este arsenal ele governa tão bem e com tanta habilidade que é, sem favor, um triunfador! Os grandes não lhe regateam a mão. Os outros tiram-lhe o chapeu! Qual o segredo de sua nulidade triunfante? E' nada para êle — que é um amoral. E' o impossivel para outros dotados de noção de honra e dignidade. Sim, o seu segredo è a audacia e a sem vergonha.

Foi nomeado F.. Vem ocupar uma situação de destaque na Colonia. Lá está ele a procurar saber a hora em que Sua Excia chega, o lugar onde dessembarca. E, solicito, lá está no cais de Alfandega ou da Navegação o nosso homem, á espera do *grande*. O *grande* desce e passa de alto sem olhar por ele. Tira o seu chapeu e não desanima. Amanhã fica aguardando o *grande* á porta da Secretaria ou da Repartição que vai dirigir. Sua Excia. vem, Sua Excia. vai entrando. O nosso homem tira o chapeu — Sua Excia leva a mão ao chapeu—por mera delicadeza

Está dado o primeiro passo no caminho da conquista. Vem depois o segundo, logo o terceiro. Um dia, por mero esquecimento, alem da chapelada dá ao nosso homem *a sua elevada mão* e sorri.

Está o sucesso garantido mas não completo. Dias depois, o nosso homem cumprimenta Sua Excia. e anda ao lado dêle alguns passos pela cidade. E' o dia da vitoria para o nosso homem. E' o conquistador. Mas conquistador sempre supõe uma conquista e um conquistado. No caso, quem è conquistado? E' Sua Excia? Enganam-se. E' o provinciano! E a conquistada é a algibeira do pobre diabo.

Todos sabem, nosso homem melhor do que ninguem, que quem vem da aldeia para Capital, vem com alguma pretenção. Uns querem emprego, outros um despacho, certos uma licença ... em fim todos tem uma dependencia neste ou naquele ramo da administração. O nosso homem—que fez a conquista — não poupa a ocasião de falar com Sua Excia. na rua, entrar de quando em vez no seu gabinete, postar-se mesmo á janela do mesmo—que o parvo veja, verifique e admire—E depois é ali que consegue todos os empregos, todos os despachos, todas as resoluções que dependem de Sua Excia. Todas, sim. Se ele no litigio patrocina a causa de ambos os litigantes ? ! !

E Sua Excia ingenuamente o atura supondo que é ele, apenas, um pobre diabo que lhe maça a paciencia.

E, agora, é natural que alguem queira saber quem é ele. Ele é o *Consegue-tudo*. Hoje será uma trivialdade. Amanhã —se for tolerado — converter-se-há numa legião."

"O DIVORCIO"

Subordinado a esta sub epigrafe, *João Sartor* dedica-nos em *O Heraldo* de 29 de julho p. um artigo-carta que não só se destaca pelo fulgurante brilho de seu alto estilo mas tambem se distingue pela atraente elevação de suas idêas patrioticas,—estilo e idêas que tornam sempre notabilissima a importante serie de artigos — *Pela India Nova*—daquele festejado escritor.

Não temos a honra de conhecer pessoalmente o insigne patriota que se envolve nas misteriosas mantas do seudònimo de *João Sartor;* mas pelo insofismavel valor patriotico da sua obra jornalistica se presume que se trata duma *alma nova* que arde em ansêos de vêr, como nós, regenerada e engrandecida a India. Isto basta para que nos enfileiremos na falange de seus admiradores incondicionais.

E, porque o modesto redactor do não menos modesto *Bharat* se gloria de ser admirador incondicional do ilustre *Sartor*, apressa-se ele a declarar, alto e bom som, que em se tratando dos superiores interesses do estremecido Paiz, o seu jornal não admite diferença de especie alguma, sendo, porisso, injusto o conceito que alguns formam dele, estigmatisando-o com o igniminioso ferrete de *castista* ou *classista*—epitetos que repele com a veemencia de que é capaz.

Divorcio? Nem o admitimos nas relações sociais, quanto mais na politica que se destina a alcançar um desiderato tão grandioso como o da redenção da India, redenção que se não concebe sem a intima unificação de todos os elementos organicos que a constituem.

O *Bharat* agradece, pois, a *João Sartor* o ensejo que lhe proporcionou, de desfazer as negras nuvens de *castismo* ou *classismo* que se iam encastelando em torno da sua orientação politica, confessando-se, igualmente, muito grato ao erudito escritor pelas imerecidas referencias elogiosas com que se dignou distinguir a insignificante pessôa do seu redactor.

ECOS E CRITICA

ENGULINDO...

Debica a *Epoca* nos srs. Irenio de Almeida, Zoirama Colopo e outros. Nós não temos nada que vêr com as *fraternidades* do Concelho de Bardês. Podem as comadres auxiliar-se e zangar-se á vontade.

Quanto ao sr. Zoirama no Legislativo que o povo de Bardês contemple bem a sua a ção; quanto a nós declaramos que aqui não se costuma engulir como o colega as suas propostas no Conselho Legislativo.

As cartas virão, se preciso fôr; nada se perde com o tempo.

NAO MEXA MAIS

Por uns reparos incidentalmente feitos salta o colega d'*A Verdade* em defesa do seu editor sr. Zoirama Colopo.

Vem com ares de pavão e *sinceramente* apresenta-o como salvador do paiz na *debacle* que atravessa nos.

Felizmente o paiz não carece de *messias* feitos á pressa. E' bom que o colega não mexa muito no assunto, pois do sr. Zoirama no Legislativo e mais da sua eleição ... são contos largos ... e talvez *contos de vigario*...

A LEI NAO FOI FEITA PARA OS POSSANTES

O sr. J. L. escreve-nos uma carta em que pergunta como é que nos explicamos que no Liceu Central haja professores ensinando 21 a 22 horas durante a semana, quando o regulamento fixa o maximo de trabalho escolar semanal em 20 horas.

Por ora nós ignoramos qual seja a razão firmada em lei ou explicação baseada na astucia que leva certos professores a assim armarem-se em martires pela causa do ensino. Milhor informados voltaremos ao assunto.

Entretanto o procedimento dos professores afigura-se-nos razoavel ou justificavel pelo menos. Imagina o franzino Monteirinho e o possante Avelar Barreto ou Cota Cruz, quem pode proibir a estes ultimos não só 21 a 22 mas 100 horas de trabalho durante a semana simplesmente, porque o Monteirinho, fraco e pequeno, faz

भारत

जनसेवा ही ईश्वरसेवा।
त्याविण दुसरा धर्म न ठावा॥

गुरुवार श्रावण व० २ या शके १८४७

धन्य हे गव्हर्नर साहेब!

थोड्याच दिवसांपूर्वी गव्हर्नरसाहेबांनीं, नवीन करांच्या भरीस न पडतां सरकारी तिजोरीची तूट भरून काढण्यास राज्याचा खर्च कमी करण्याचें धोरण स्वीकारलें पाहिजे अशी मागणीवजा सूचना करून, भारतानें आपलें कर्तव्य बजावलें, व नवे प्रांताधिपति कसली नवीच कामगिरी करून आपल्या कारभारास सुरवात करितात या कडे राष्ट्राबरोबरच आमचीहि नजर लागून राहिली होती.

लिहिण्यास आनंद वाटतो कीं, आमच्या अटकळीप्रमाणेंच, नव्या गव्हर्नरसाहेबांनीं कांहीं राष्ट्रहितकर कार्ये करून, आपल्या शुभसूचक राज्यकारभारास प्रारंभ केला. त्या कार्यांचें विवरण करूं.

विशेषतः ते कोणत्याहि सरकारी कामकाजाचा स्वतः विचारपूर्वक अभ्यास करून इतरांच्या कानगोष्टी न ऐकतां निकाल देतात व 'दुष्टांचा पगडा महीपति गृहीं' ह्या म्हणीवजा श्लोकचरणाचें त्रिकालाबाधित सत्यत्व दाखविण्याकरितां गव्हर्नरसाहेबांच्या द्वारापाशीं धरणें देऊन बसले तरी, आपमतलबी व परघातकी लोकांचा त्यांच्या दिवाणखान्यांत योग्य कारणाशिवाय शिरकाव होत नाहीं.

अशा प्रकारें विचार-पारतंत्र्याचा ताबा झुगारून स्वतःच्या डोळ्यानीं राज्याची सद्यःस्थिति पाहण्यास तत्पर असलेल्या गव्हर्नरसाहेबांच्या डोळ्यांत सर्वांआधीं राज्याची कफल्लक तिजोरी शिरणें साहजिक होतें. ही तिजोरी किती निकृष्टावस्थेस पोंचली आहे ह्याचें प्रमाण, प्रत्यहीं करांची वाढ माजी गव्हर्नरांच्या अमदानींत होत असून देखील सरकारी कामगारांचा पगार तुंबून रहात आहे, ह्या एकाच गोष्टीवरून ठसठशीत दिसतें. आणि कफल्लक तिजोरी पाहिली म्हणजे तिच्यांत द्रव्यसमृद्धि होण्यासाठीं जादा खर्चाची खची केल्याशिवाय अन्य उपायच नव्हता. आतां हे जादा खर्च कोणते म्हणाल तर कांहीं माजी गव्हर्नरांचे लहान फोटो वाढविण्यासाठीं द्यावयाचे हजारों रुपये! राज्याच्या हलाख स्थितींत असले खर्चिक चाळे ऐन माजी अधिपतींनीं खेळावे व फोटो वाढविण्यासाठीं सरकारी तिजोरीची गळचेपी करावी हें जितकें शोचनीय आहे, तितकेंच नव्या गव्हर्नरसाहेबानीं माजी अधिपतींची राज्यधोरणी प्रतिष्ठा (prestigio diplomatico) कायम राखण्याची मीड न धरितां, राज्य प्रतिष्ठेस अनावश्यक अशा तो फोटो-वाढीचा जादा खर्च कमी करून तिजोरीचे हजारों रुपये राखिले, हें अभिनंदनीय आहे.

दुसरें महत्वाचें कार्य म्हणजे, तांदूळविक्रीमुळें शिलकीपैकीं राहिलेले वीस हजार रुपये जे अगोदर 'दिरेक्सांव द सेर्वीसुस आग्रीकोलस' या खात्याच्या स्वाधीन केले होते ते त्या खात्यांतून काढून सरकारी तिजोरींत घातले. सरकारी तिजोरींत उणीव असतां, सरकारी पैशांची निरनिराळ्या सबबींनीं भलत्याच खात्यांत अफरातफर व्हावी, असल्या कोणासहि सांगितल्यास खऱ्या सुद्धां न वाटणाऱ्या गोष्टी एका वेळीं उघडकीस आल्या म्हणजे त्यांचा खरेपणा पाहून मन उद्विग्न होतें.

पुरवठा खातें [Direcçao de Abastecimentos] काढून टाकल्यानंतर त्यांतील वर उल्लेखिलेले २०००० रुपये सरकारी तिजोरींतच घातले पाहिजे होते. ह्या मुद्दयानेंच सि मारियानु मार्तीस यानीं ती रकम सरकारी तिजोरींत जमा करून त्याच शिलकेंतले एक लाख रुपये पणजीच्या एका अनाथ संस्थेस बेकायदेशीर रीतीनें नजर केलेलेहि त्याच तिजोरींत जमा करण्यास लावले.

गव्हर्नरसाहेबानीं आपलें राजकारणी धोरण शाब्दिक पाल्हाळांत नसून प्रत्यक्ष कृतींत असल्याचें जाहीर करितानांच, स्वतः आपण वस्तुस्थितीस अनुसरून राज्यकारभार करीन असें सांगितलें होतें. मागील गव्हर्नरच्या सांगणींत व करणींत मोठेंच अंतर पडत असे. तसें न करितां, राज्यहितकारी पहिलें पाऊल पाहिलें म्हणजे गव्हर्नरसाहेब नीतीचा व कायद्याचा घोपट मार्ग अखेरपर्यंत चालवूं शकतील अशी आशा करावीशी वाटते.

वर नमूद केलेली कर्तव्यदक्षता गव्हर्नरसाहेबानीं दाखवून थोडा अवधि होतो न होतो, तोंच त्यांची दुसरी एक तारीफ करण्यासारखी न्यायप्रियता लोकांच्या निदर्शनास आली. तिजवरून सि. मार्तीस राज्याचें गाडें सरळ रस्त्यावर आणण्यासाठीं कसें जीवें भावें झटतात हें पाहण्यास सांपडतें.

माजी गव्हर्नर जाइम द मोराईस यानीं, पोर्तुगालहून सगळ्या पोर्तुगेज वसाहतीस लागू होणारे हुकूमनामे (Decretos) धाब्यावर ठेवून, त्या हुकूमनाम्याविरुद्ध फाजेंदाच्या यम्प्रेगादांची बढती व्हावी असें फर्मान (Portaria) काढलें. ह्या मोराइसच्या फर्मानविरुद्ध पोर्तुगालच्या मशींमंडळाकडून खरमरीत टीका झाली असतां ही टीका गुलदस्तांत ठेवून फर्मानची अमलबजावणी होऊं लागली. त्या फर्मानच्या हुकुमान्वयें फाजेंदाच्या यम्प्रेगादांची बढती लायकी असो वा नसो पांच पांच वर्षांनीं व्हावी असा परिपाठ पाडला.

जातां जातां असें सांगणें जरूरीचें आहे कीं सेंटच्या माजी गव्हर्नरनीं अशा सारखे पोर्तुगालच्या राजसत्ताधाऱ्यांकडून आलेले अनेक हुकूमनामे आपल्या दप्तरांत स्वस्थ पडूं देऊन आपणास पाहिजे तसा राज्यकारभार हाकला. व पोर्तुगाल राज्याबरोबरच वसाहतींची बदनामी केली.

पोर्तुगाल-सरकारनें फर्मावलेला टीकापर हुकूम खालील आशयाचा होता. "जाइम द मोराइस यानीं 'फाजेंदाच्या कामगारांबाबत काढलेलें फर्मान बिनकायदेशीर आहे. कां कीं, प्रत्येक कामदाराची हुशारी, दक्षता, आणि शिक्षण ज्ञान यांची जाहीर परीक्षेत (concurso) कसोटी लावून योग्यतेप्रमाणेंच बढती केल्यास त्या खात्यांतील कामांचा उरक फायदेशीर रीतीनें होईल व आपआपली अक्कल हुशारी दाखविण्यास फाजेंदाच्या कामगारांस उत्तेजन मिळेल."

हा हुकूमनामा मार्तीस साहेबानीं गुलदस्तांतून उजेडांत काढला आणि वर उल्लेख केलेलें माजी गव्हर्नरचें फर्मान बेकायदेशीर असल्यावरून रद्द केलें. अर्थात्, त्या फर्मांना बरहुकूम केलेल्या बढत्या देखील रद्दच होण्याचा संभव आहे.

ह्या कारणावरून आमच्या राज्याची सुस्थिति होण्याची वेळ जवळ आली असावी असें वाटतें. त्यांत कसलाहि अडथळा न येतां सध्याच्या न्यायीपणाचा राज्यकारभार सुरळीत चालविण्यास गव्हर्नर साहेबांस उमेद येवो असें इच्छितों. तसें झाल्यास रेपुब्लिक सरकारची प्रतिष्ठा वाढून सि. मार्तीस यांची गव्हर्नरच्या जागीं यथार्थ नेमणूक केल्याचें सार्थक होईल. आणि त्या बरोबरच, योग्य राज्यकारभार केल्यामुळें प्रांताधिपती विषयीं आभारानें लवलेली प्रजा सहानुभूति बाळगून अखंड ऋणी राहील.

वास्तविक पाहतां, ह्या पोर्तुगेज वसाहतीस जर कसलीहि निकट गरज असेल तर हीच कीं, राज्यकर्त्यांनीं व गव्हर्नर साहेबानीं होईल तितके अनावश्यक खर्च कमी करून राज्यकारभार करावा आणि अति कडक रीतीनें कायदा पाळून धन्य हे राज्यकर्ते आणि गव्हर्नरसाहेब असे उद्गार प्रजेच्या तोंडून वदवावे.

स्फुट विचार

पोलीस-प्रकरणः— सांगें व फोंडें येथील पोलीस अधिकाऱ्यांच्या अधिकारातिक्रमाविरुद्ध इतरांच्या कागाळ्यांचा पूर वाहूं लागल्याचें पाहून, हा पूर ओसरला जावा व जनता त्या पोलीस अधिकाऱ्यांच्या सुलतानशाहींतून कायमची मुक्त व्हावी, या दृष्टी हेतूनें पोलीसशाहीची कांहीं गुप्त कारस्थानें चव्हाट्यावर आणून, लोकांचें दुःख वेशीवर टांगण्याचा भारतानें निर्भय प्रयत्न केला. खात्री होती कीं, गांजलेले लोक आपखुषीनें वरिष्ठ अधिकाऱ्यांपुढें आपल्या श्रासांचा पाढा वाचण्यास मागें पुढें पहाणार नाहींत. एखादी चवकशी कमिटी नेमली गेल्यास, त्या कमिटीची चालेवाल खात्री होईपर्यंत लोक पोलीसांविरुद्ध पुरावे पुरवितील हीच आशा हा लोकहितात्मक प्रश्न हातीं घेतांना आमच्या मनांत ठाणें घेऊन बसली होती, हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं.

आशा-निराशाः— कल्पनेप्रमाणें लेखणीच्या प्रहारानीं झोंपी गेलेले वरिष्ट अधिकारी जागे झाले व आम्हीं केलेल्या टीकात्मक विधानांचा विचार केल्याशिवाय गत्यंतर नाहीं, अशी त्यांची पक्की समजूत झाल्यावर, पोलीसांच्या आक्षेपार्ह कृत्यांची शहानिशा करण्यासाठीं त्यांजकडून दोन औफिसरांची एक चौकशी कमेटी निवडण्यांत आली. व आतां पोलीसांच्या अरेरावी अत्याचारांच्या प्रखर वणव्यांत होरपळणारी जनता निःपक्षपाती चौकशीच्या जलसिंचनानें दुःखविमुक्त होईल, या भावी आशेनें आमच्या अंतःकरणांत आनंदोर्मी उठूं लागल्या; पण कल्पना सृष्टींतील हें दृश्य-व्यवहारांत अदृश्य होतें कीं काय, असें कित्येक भ्याड, लबाड व 'भ्याड' लोकांच्या स्वार्थी वृत्तीवरून वाटावयास लागून क्षणभर मन निराशाजनक स्थितींत गिरक्या खाण्यास लागलें आहे.

नामर्द स्वार्थः—चौकशी सुरू होतांच, कित्येकानीं नामर्द स्वार्थास बळी पडून तर कांहींनीं काल्पनिक भीतीनें वस्तुस्थिति लपवून ठेवण्याचा कसून प्रयत्न केला. जे बडे लोक चौकशीपूर्वी आम्हांसमोर पोलीसांच्या नावानें नित्य खडे फोडीत होते त्यांपैकींसुद्धां कित्येकानीं ऐनवेळी पगडी फिरवून पोलीसांच्या प्रेमसंपादनार्थ, भारताला तोंडघशीं पाडण्याचा बुद्धिपुरस्सर 'मुत्सद्दीपणा' केला व आपण सर्वथैव स्वराज्यास अपात्र असल्याबद्दलचें शिंग जोरानें फुंकिलें! एवंच नामर्द स्वार्थ व काल्पनिक भीति, यांचा धुमाकूळ माजल्यानें, चौकशीचा सर्वचा सर्व निकाल लोकांच्या बाजूनें होण्याचा संभव नाहीं, असें भविष्य वर्तविण्यास हरकत नाहीं.

हलकटपणाची कमालः— कित्येक नावांचे वकील तर 'एन केन प्रकारेण' नांव कमविण्याच्या व खिसे गरम करण्याच्या दुहेरी हेतूनें पोलीस अधिकाऱ्यांशीं संगनमत करून भारताविरुद्ध काहूर उठवून देण्याचा हलकटपणा करीत आहेत, असें समजतें. 'भारताच्या विधानांत अर्थ नसून पोलीस अधिकारी हे न्यायी व लोकहितदक्ष आहेत' असें वरिष्ठांस भासविण्याचाहि त्यांकडून जारीनें खटपट केली जात असल्याचीहि खात्रीलायक बातमी आहे! या घाणेरड्या प्रकारानें कोणाच्या मनांत किळस उत्पन्न होणार नाहीं? या हलकट लोकांचीं श्रीमुखें थुंकीनें रंगविण्याचा मोह कोणाला आवरतां येईल?

लक्ष्यांत ठेवा!—पण चौकशीचा कसाहि निकाल झाला तरी भारताला त्याची बिलकुल पर्वा नाहीं. कदाचित 'नरेंद्र' लोकांच्या विश्वासघातकी भेकडपणानें वाज अंगावर आली तरी त्यांतून सहीसलामत निभावून, अत्याचारी लोकांची रग न्यायकोर्टांत जिरविण्याची त्याला परमेश्वराच्या कृपेनें पूर्ण धमक आहे. सत्य हें सत्यच असल्यानें त्याचा विजय हा ठरलेलाच आहे, हें त्याच्या शत्रूनीं लक्ष्यांत ठेवलेलें बरें.

अशा रूपाच्या लेखमालेनें मला सळो कीं पळो करण्याचा उपद्याप असेल तर ती भूल आहे. लहानशा बीजापासून वटवृक्षाचा मला मोठा विस्तार होतो, तसा माझ्या एका लहानशा वाक्यामुळें संस्कृत श्लोकांचीं भराभर प्रमाणें देऊन उपपत्तीच्या रूपानें लेखाचा विस्तार केला तर नकळे.

" मनुष्य एकांतीं विचार करीत असतां देखील स्वपक्ष कसाहि असला तरी त्याला तो खरास वाटतो. मग उघडपणें दुसऱ्याशीं वाद लागल्यावर तो आपला पक्ष खरा करून दाखविण्याविषयीं भगीरथ प्रयत्न करील, ह्यांत कांहीं नवल नाहीं. जो कोणी आपणास शहाणा मानीत नाहीं तो आपला वैरी आहे असें समजतो, व त्याचा सूड उगवूं पहात असतो," असा मला अनुभव आलेला आहे.

प्राचीनकाळीं सूड हा शब्द फार परिचयाचा झाला होता. मुद्राराक्षसांत सूड उगविल्याची एक कथा आहे,तीमधील थोडासा मजेदाखल प्रतिज्ञेचा उतारा घेतोः—

"...... एके प्रसंगीं चंद्रगुप्त राज्यसूत्राधिकारावर असतां, एका कोपनशील ब्राह्मणानें पायांत रुतलेला दर्भ मोठ्या जोरानें उपटून काढिला असें त्यानें पाहिलें. तेव्हां हा चंडप्रकृति ब्राह्मण नंदोन्मूलन समर्थ आहे असें जाणून चंद्रगुप्त त्यास शरण गेला, व स्वकार्थास्तव त्याची सेवा करूं लागला. ह्या द्विजोत्तमाचें नांव विष्णुगुप्त होतें. हा उशनसाची दंडनीति आणि ज्योतिःशास्त्र यांत निष्णात होता.नीतिशास्त्र प्रणेता जो चणक त्याचा हा मुलगा ह्मणून यास चाणाक्य असेंहि नांव आहे. ह्याचें आणि गुणाढ्य चंद्रगुप्ताचें मोठें सख्य जुळलें. नंदांनीं केलेलीं पीडा चंद्रगुप्तानें त्या ब्राह्मणास निवेदन केली. तो चंद्रगुप्ताला नंदराज देण्याचें वचन देऊन क्षुधार्त असतांच नन्दांच्या भोजन शाळेंत गेला आणि अग्रासनावर बसला. तेव्हां नन्दांना राग आला आणि त्यांनीं हा कोणी सामान्य वटु आहे असें समजून त्याला आसनावरून घालवून अपमान केला...... तेव्हां तो क्रोध संतप्त झाला. नंतर त्या रागीट ब्राह्मणानें भोजनशाळेच्यामध्यें उभा राहून एका हातानें शेंडी सोडून नन्दकुलोन्मूलनाविषयीं घोर प्रतिज्ञा केली. माझी योग्यता न जाणणारे हे दर्पान्ध दुर्मति नन्दाधम, त्यांचीं पाळेंमुळें खणून काढीपर्यंत मी आपली ही शेंडी बांधणार नाहीं. अशी प्रतिज्ञा करून तो क्षुभित मानस विप्र त्या नगरांतून तसाच चालता झाला."

आजपर्यंत जे जे ग्रंथ माझ्या नजरेखालून गेले त्या त्या ग्रंथामध्यें सोनारांना दैवज्ञ ब्राह्मण ह्मटल्याचें मुळींच पाहण्यांत आलेलें नाहीं. कनोजे ब्राह्मण, उत्कल किंवा उदीय ब्रा०, नन्द ब्रा०, पन्द ब्रा०, देवलक ब्रा०, अशा अनेक ब्राह्मणांची नामावली सांपडली असून तींत पीर अल्ली ह्या नावाचेहि ब्राह्मण आहेत ह्या पीर अल्लींची कथा विस्तारभयास्तव देत नाहीं.

श्री. मडकईकरांनीं 'भारत' पत्राचे जे दोन रकाने माहितीनें भरिले आहेत त्यावरून त्यांनीं बऱ्याच धर्मग्रंथांचें अवलोकन केलें आहे असें दिसून येतें. ही एवढी मेहनत घेण्याचें कारण नव्हतें. सुवर्णकार हे ब्राह्मण कीं ब्रह्मर्षि हा माझा प्रश्न नाहीं. दैवज्ञ ह्मणजे उत्तम जोशी असें असतां सोनार तें ज्ञातिवाचक नांव स्वतःला कां लावून घेतात हा माझ्या वाक्याचा इत्यर्थ होता. जगांत जीं जीं वेडें आहेत त्यांपैकींच ब्राह्मण्याचें एक वेड आहे. अशा वेडांच्या प्रकरणांत शिरून मी कालक्षेप करूं इच्छित नाहीं. राईचा पर्वत करूं पाहण्याची संधि हुडकणारांना असल्या क्षुल्लक गोष्टी कदाचित् रुचतील.

"परमेश्वरानें ज्या अनेक अत्युत्तम वस्तु उपयोगास्तव मनुष्याच्या स्वाधीन केल्या आहेत, त्यांतील वेळ ही एक असून, ती पुष्कळ कारणांमुळें मौल्यवान् आहे; तथापि मनुष्य मात्र त्या वेळेचा हवा तसा दुरुपयोग करून त्याची पर्वा कां करीत नाहीं, याचा निर्णय करणें अवघड आहे...... इंग्लंद देशाची परलोकवासी इलिझावेद राणी प्राणोत्क्रमणाचे वेळीं करुण स्वरानें ह्मणाली:— Millions of money for an Inch of timel [एका पळासाठीं मी लाखों रुपये देईन.]वेळ आणि लहरी कोणासाठीं थांबत नाहींत. Time and tide wait for no men."

'धुमडून' हा शब्द माझ्या फार परिचयाचा होऊन गेला आहे. मडकईकरांची विवरण करण्याची शैली पाहून रत्नागिरी जिल्ह्यांतील संगमेश्वरच्या पाटणगिरी शास्त्र्याची आठवण झाली. सन १८९७ सालांत मी आगगाडींतून प्रवास करीत असतांना एका शास्त्र्याशीं गाठ पडली. त्यानें आपण संगमेश्वरचा रहिवासी असून पाटणगिरी शास्त्री ह्या नावानें ओळखिला जातों असें सांगितलें. मडकईकरांनीं दिलेल्या प्रमाणांसारखीं प्रमाणें पाटणगिरी शास्त्र्यांना मुखोद्गत् होतीं. थोड्याच सहवासानें तो 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' असून 'अल्पविद्यो महागर्वी' असल्याचें दिसून आलें. एकदां विद्वत्तेचें प्रदर्शन करूं लागला कीं, 'ब्रह्मानंदीं लागलि टाळी । कोण देहातें सांभाळी ।' असें त्याला होऊन जात असे, परंतु ही कृति 'सहेतुक' होती. दोषाविष्करण करण्यांत त्याचा हातखंडा होता. एकंदरींत श्रोत्यांना थक्क कसें करून सोडावें ही कला सोळा आणे त्याला अवगत होती. पाटणगिरी शास्त्र्यावरून इसापनीतींतील इंद्र आणि मूर्तिकार ह्या गोष्टीचें स्मरण झालें;ती गोष्ट अशी:

"एकदां इंद्राच्या मनांत असें आलें कीं, आपणाला मनुष्यलोकीं कसा काय मान मिळतो याची परीक्षा पहावी. ह्मणून तो वाटसराच्या वेषानें एका मूर्तिकाराच्या येथें गेला व तेथें अनेक देवांचे पुतळे तयार करून विकावयास ठेविले होते त्यांच्या किंमती त्यास विचारूं लागला. प्रथम त्यानें बृहस्पतीच्या मूर्तीची किंमत विचारिली. ती मूर्तिकारानें आठ आणे सांगितली. इंद्र किंचित् हंसून विचारतो, 'बरें या वरूणाचें काय पडेल?' मूर्तिकार उत्तर करितो, 'बारा आणे'. इतक्यांत इंद्राच्या दृष्टीस त्याची स्वतःची मूर्ति पडली. तेव्हां तो मनांत ह्मणतो, 'हँ, मी तर सर्व देवांचा राजा आहें. तेव्हां आतां हा माझी किंमत यांच्या दसपट तरी निदान सांगेल यांत संशय नाहीं. नंतर त्यानें मूर्तिकारास, 'आणि या इंद्राची किंमत काय?' असा प्रश्न केला. तेव्हां तो उत्तर करतो, 'तुह्मीं पहिल्यानें ज्यांची किंमत विचारिली त्या दोन्हीं मूर्ति घेत असाल तर इंद्र तुह्मांला मी वर फुकट देईन!'

आपणाला लोक कितपत मानतात हें समजण्याविषयीं जे कोणी यत्न करितात,त्यांना आपलें वास्तविक महत्व कोणी जाणत नाहीं असेंच अनुभवा अंतीं दिसून येतें.!"

वरील गोष्ट कल्पित खरी, परंतु 'तात्पर्यांवरिच सज्जनीं दृष्टि ॥ द्यावी......॥' ह्या न्यायानें इसापनीतींतील तात्पर्यच ध्यावयाचें असतें. सांगावयाचें हेंच कीं, पाटणगिरीनीं बोलण्यांतील प्रमाण आणि नेमस्तपणा ह्यांस फाजील ताण दिल्यामुळें त्याच्या वास्तविक महत्वाकडे ऐकणारांचें दुर्लक्ष झालें व हा एक लब्धप्रतिष्ठित शास्त्री आहे अशा कल्पनेनें सर्वांस घेरिलें. असो.

माझे लांबलचक लेखांक वाचण्याचा श्रीयुत मडकईकरांस कंटाळा येईल ह्मणून आजचा हा पहिला लेखांक येथें आटपून घेतों. सारस्वत.

गाणारा कुत्रा!

लंडनमध्यें मिस. डी. क्लेराबट नांवाच्या एका बाईजवळ एक लहान जातीचा कुत्रा असून आपली मालकीण गाऊं लागली कीं, तिच्या सुराला सूर मिळवून तो कुत्राहि गाऊं लागतो! यापेक्षांहि प्रसिद्धीस आलेला दुसरा एक कुत्रा आहे. मॅज्य रेथबर्ग नांवाच्या एका नटीजवळ रेक्स नांवाचा अतिशय सुंदर कुत्रा असून हा स्वतंत्र रीतीनें गात असतो. पहिल्या कुत्र्याप्रमाणें हा दुसऱ्या सुराला सूर मिळवित नाहीं. रेथबर्ग सध्या इंग्लंडांत असून कोव्हेंट गार्डनमधील रॉयल ऑपेरा हॉऊसमध्यें 'अईडा' खेळांत ती काम करीत असते. रेक्स कुत्रा खरोखरीच स्पष्ट रीतीनें गात असतो. अर्थात कुत्र्याची बुद्धिमता जेवढी असेल त्याच्या प्रमाणांतच. परंतु नुसतें न भुंकतां अथवा भलते रडके सूर न काढतां ज्याला गाणें ह्मणतां येईल असे मधुर सूर त्याच्या मुखांतून निघत असतात! या कुत्र्याला गाण्याची अत्यंत आवड असल्यानुळें एखाद्या नादलुब्धासारखा तो गाणाऱ्यांच्या तोंडाकडे एकटक पहात बसून मानहि डोलवीत असतो.

—दासस्मारकफंडाची रकमेचा आंकडा तारीख २७ जुलैपर्यंत ५ लक्ष ४७ हजारांपर्यंत गेला होता. ही रक्कम दहा लाखांवर गेल्यानंतर महात्मा गांधी बंगाल्यांतून बाहेर निघतील.

पत्रव्यवहार

रा. भारतकार ह्यांसः—

गेल्या ता. १८।७।२५ च्या 'हिंदू' त, एक अनाथ हिंदु रुग्णालय स्थापन करावें व त्याच्या फंडार्थ एक हिंदु लॉटरी उभारावी वगैरे मजकुराचें एक लांबलचक, विनंतिवजा पत्र छापसें येथील वै० मोरजकर यांच्या सहीनें प्रसिद्ध झालेलें लोकांच्या अवलोकनांत आलें असेलच. परंतु वै० मोरजकर यांस माझा एक सवाल आहे. त्यांनीं ही रुग्णालयाच्या योजनेची विनंति केली आहे ती स्तुत्य आहे व ती बद्दल मी त्यांचें, हिंदु या नात्यानें अभिनंदन करितों; परंतु हें पवित्र कार्य अमलांत आणण्याकरितां त्यांनीं जो लॉटरी सारखा छापशॅकरांस परंपराप्रिय असा जुगाराच्या वाममार्गाचा अवलंब करण्यास सांगितलें आहे व तोहि वै० मोरजकर सारख्या सुशिक्षितानीं याचें सखेदाश्चर्य वाटतें या पेक्षां सरळ भिक्षांदेहीचा मार्ग कां वाईट? अशा प्रकारचें कांहीं सार्वजनिक काम पुढें आलें कीं, जो उठतो तो पैसे जमाविण्याकरितां ह्मणून अशीच एखादी नाटकें वगैरे कोणाहि कंपनीकडे मागून तिच्या तिकिटांच्या रूपानें फंड उभारण्याची शक्कल लढवितो; पण आमच्या गोमांतकीय बंधूंस, अशाप्रकारें एखाद्या विशिष्ट कार्यास पैसे द्यावयाचें ह्मणजे फारच दुखतें! एरवीं ते स्वतःच्या चैनीकरितां व फायद्याकरितां ह्मणुन वाटेल तितक्या सोडती काढतील व कंटाळा येईपर्यंत नाटकेंहि पहातील! तरी माझी त्यांस अशी सूचना आहे कीं, त्यानीं ज्या पैसाफंडांतून मदत घेऊन त्या अनाथ प्रेतास गति दिली त्याच पैसाफंडांतून तें अनाथ रुग्णालय कां उभारूं नये? तो फंड देखील असाच अनाथांस उपयोगी पडावा ह्मणून आमचे दे० भ० आठले, कोठारी वगैरे सुशिक्षित समाजकार्यरतांच्याच संमतीने स्थापन झाला होता व त्याला जवळ जवळ ५—७ वर्षे होत आलीं व तो आज तागायत ७—८ हजारांवर गेला आहे अशी लोकवार्ता आहे आणि ती खोटी असणें शक्य नाहीं. कारण इतक्या अवधींत एवढा निधि सहज गोळा होऊं शकेल. शिवाय आजपर्यंत त्या फंडाचें ह्मणण्यासारखें झालेलें कार्य तर कांहींच दृष्टोत्पत्तीस आलें नाहीं! एक दोन रिपोर्टहि प्रसिद्ध झाले होते. त्यानंतरची कांहींच बातमी ऐकूं येत नाहीं. तेव्हां हे पैसाफंडाचे चालक व व्यवस्थापक काय झोंपा घेत असल्यास न कळे. एवढा मोठा निधि अशा सुप्तावस्थेंत ठेवायाचा ह्मणजे काय? ज्या कार्याकरितां ह्मणून तो उभारला त्याकडे त्याचा विनियोग करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. आमचे वै. मोरजकर देखील त्या चालकांपैकीं एक असतीलच. तरी त्यांनीं लोकांस लॉटरी वगैरे सारख्या फंदांत न पाडतां सध्या त्या पैसाफंडांतूनच एक लहानसें अनाथ रुग्णालय उभारण्याचें कार्य करून त्यास पूर्वीं आपली काय वैद्यकीय मदत द्यावयाची ती द्यावी व मग त्यास मोठें रूप द्यावयाचें असलें तर लोकांकडे याचना करावी, ह्मणज

FABRICA DE TILAMOLA

Perante a comissão paroquial no dia 15 do corrente pelas 11 horas serão arrematadas 18 taboas e lenha, tudo duma arvore de "Belly" abatida pelas ultimas chuvas, pertencentes á dita Fabrica.

Tilamola, 1 de Agosto de 1925

O escrivão— *J. E. P. Teodozio Pereira.*

Livraria Moderna

DE

Francisco Luís S. Mergulhão

Recebeu:

Carlos de Oliveira, Codigo administrativo anot.; *Candido Figueiredo*, Falar e escrever, Ligoes Praticas, O que se nao deve dizer, Gramatica scientifica, Combates sem sangue em favor da lingua portuguesa; *Peres Escrich*, Os que riem e os que choram; *Condessa de Gence'*, Tratado de civiidade e Etiqueta; *G. Vogt*, Como obter ideas lucidas e claresa de espirito?; *Silva Rondes*, Para abrir caminho na vida; *Rocha Martins*, A Paisao de Camilo, Monarquia do Norte, Marquez de Pombal – *Dias Ferreira*, Codigo civil, Dito processo civil, Novissima reforma anot.; – Dicionarios de diversos autores.

Novidades literarias em todas as malas.

A' venda em Margao, no estabelecimento de Basilio Silva (Novo Mercado) e Sucursal de Jorje e Filhos Velho Mercado).

भारतीय संस्कृतीचें वैशिष्ट्य दाखविणारें

"आर्यविज्ञान"

या नांवाचें शास्त्रीय व तात्विक विषयावरील मासिक स्वतःच्या छापखान्यांत थोड्याच दिवसांत निघूं लागेल. टाईप, मशनरी वगैरे आवश्यक असें सर्व सामान आलें. तूर्त मांडणी चालू आहे. आश्रयदात्यानीं आपापली मदत व ग्राहकानीं नांवें पाठवून एव्हांपासूनच वर्गणीदार व्हावें.

पत्ता:— व्यवस्थापक "आर्यविज्ञान" सांगें—गोवा

रबरस्टँप मॅन्युफॅक्चरींग कंपनी



आमच्या कारखान्यांत नांवाच्या पाट्या, नाटकाचे पडदे, पत्र्यांचीं कायम टिकणारीं क्याटेंड्रें, सर्व प्रकारचे सुंदर रबरी शिक्के, लाखेवर उठविण्याच्या मोहोरा, हरतऱ्हेचे ब्लॉक्स, रबरस्टँपची शाई, रबरी टाइपाच्या पेट्या, डेटर्स नंबर्स, व फोटोच्या फ्रेमी, वगैरे तयार करुन मिळतील.

प्रो० धारपकर, मडगांव—गोवा.

"प्रत्यक्षं ज्योतिषं शास्त्रं चंद्राकौं यत्र साक्षिणौ"

या सूर्यसिद्धांतोक्तीनुसार फलज्योतिः शास्त्राचा, आर्यांच्या बृहत्पाराशर्यादि ग्रंथांपासून, पाश्चिमात्यांच्या दिनवर्षपद्धतीपर्यंत विविध मतें व ग्रंथाधार विचारांत घेऊन तात्विक पद्धतीनें व भौतिक शास्त्रानुसार अनुभव घेणें असल्यास समक्ष किंवा पत्रद्वारें कळवा. पुढीलप्रमाणें सर्व कामें शुद्ध व सूक्ष्म पद्धतीनें केलीं जातात.

वर्ग १ ला, आजन्मफलवर्णनाची मोठी पत्रिका रु. १० ते २५

व० २ रा, भावचलित गणिताची मध्यम प० रु. १०

व० ३ रा, सायन व निरयन मताची प० रु. ५

व० ४ था, शुद्ध व सूक्ष्म निरयन प० रु. ३

व० ५ वा, सर्व साधारण दशांतर्दशांची प० रु. २

व० ६ वा, साधी स्पष्टग्रहादिक प० रु. १ व जन्मटिपण ८ आणे.

शिवाय वर्षमासफलें, प्रश्न, मुहूर्त, पत्रिका पाहणें वगैरे कामें सप्रमाण व सोपपत्तिक अशीं आधुनिक कालास पटण्याजोगीं टाइमशीर करून देऊं. फलज्योतिषाच्या आस्थेवाइकांनीं अनुभव घेऊन खात्री करावी.

पत्ता:— नारायण अनंत नाईक पाटणकर मालक "ज्योतिष कार्यालय आणि श्री पांडुरंग–ग्रंथ–संग्रहालय" मु० पो० सांगें प्रांत गोवा.

कोस्त कीर एन्ड सन्स

सोडावॉटरच्या गाजाचा दांडगा पुरवठा. पाहिजे तेवढी मागणी तात्वडतोब पुरी केली जाते.

मडगांव, पणजी व म्हापशें.

BANCO NACIONAL ULTRAMARINO

Tendo aparecido ultimamente bastantes notas com os dizeres variados escritos á tinta, ou com carimbos das casas comerciaes, previne-se o público para não aceitar notas em taes condições

A partir do fim do mez será recusado o pagamento dessas notas.

बांकु नासियोनाल उल्त्रामारीनु

शाईनें लिहिलेले अनेक तऱ्हेचे शब्द तसेंच अनेक व्यापारी लोकांचे ठसे असलेल्या नोटांचा गेल्या दिवसांमागून बराच प्रसार झालेला दिसून आल्यामुळें, तसल्या नोटा न घेण्याविषयीं लोकानां जाहीर सूचना देण्यांत येत आहे.

चालू महिन्या अखेर उपरोक्त नोटांचा स्वीकार करण्यांत येणार नाहीं.

बांकु नासियोनाल उल्त्रामारीनु

लिमिटेड कंपनी

जगांत अत्यंत नाणावलेली ही बँक व्यवहारकुशलतेमुळें आपल्या लौकिकांत दिवसेंदिवस भर घालीत आहे.

मुख्य ठिकाण:— लिजबोअ

सर्व खंडांत, बेटांत व वसाहतींत प्रस्तुत संस्थेच्या एजन्सीस पसरल्या आहेत.

सामायिक भांडवल:	४८.०००.०००$००	यस्कूद
कामचलाऊ भांडवल:	२४.०००.०००$००	"
रिझर्व:	३२.२००.०००$००	"

वसाहतींतील शाखा

पश्चिम आफ्रिका:— काबु व्हेर्दि, सां. तोमे, सां. तियागु, बिसाउ, बोलान, कँगु बेल्य, काबींद, लोआंद, नोव्ह रेदोंदु, लोबितु, बेंगेल, व्हील सीलुस पोर्तु मोसामेदिस आणि लुबांगु.

पूर्व आफ्रिका:— लौरेंस मार्किस, इंजांबानि, बैर, शिंदु, तेति, केलीमाद मोसांबिक, आणि इबु.

इंडिया:— नोव्हगोवा, मोर्मुगांव, मडगांव, मुंबई. माकाऊ तिमोर इ. इ.

या बँकेचे सर्व तऱ्हेचे व्यवहार जगांतील सर्व ठिकाणीं होत असतात.

O BHARAT

IMORALIDADES

"O meu programa resume-se em meia duzia de palavras: o maior respeito a's leis, a mais inflexivel moralidade."

Mariano Martins.

Subordinando-se ás palavras acima transcritas iniciou o sr. Mariano Martins o seu governo neste Estado.

Não podia deixar de proferi-los em uma ocasião tão oportuna, pois já nos espantava o desenrolar vergonhoso da fita governamental nos tempos decorridos. Sómente o maior respeito ás leis e a mais inflexivel moralidade serão remedio eficaz nesta *debacle* que atravessamos.

Incontestavelmente hà no presente momento imoralidades que chocam o espirito e causam apatia nos cidadãos, ficando aniquiladas muitas energias que se poderiam aproveitar.

Os alvitres e as propostas tem sido inumeros com o fim de milhorar a situação financeira da colonia e nesta aluvião de projectos, reformas e córtes crêmos que quaisquer esforços ou conselhos para uma util e sensata governação nãs serão inuteis. Sucessivamente os iremos apontando no louvavel e sincero intuito de a máquina governativa correr harmonicamente, tendo em vista interesses dos cidadãos e do Estado.

Por hoje limitamo-nos a indicar só dois problemas, dentre os mais palpitantes, que além de onerar o tesouro constituem uma completa imoralidade: Horas de excesso e acumulacões.

Nos estabelecimentos da nossa instrucção secundaria e especial há chamadas *horas de excesso* que *obrigam* os professores a dispender as suas *energias* em prol da instrução.

Mas o que se tem visto é *excessivamente* abnsarem-se delas, e em vez de ser isto um trabalho propicuo para o bem do ensino provoca uma ancia extraordinaria de estabelecer a sua *distribuição* durante a semana escolar, em busca de excessos de reis, não se respeitando nem a pedagogia nem a mais restricta moral.

Em diversos estabelecimentos de instrucção a distribuição de horas é feita duma forma diferente. Não há harmonia e criterio, mas sómente conveniencia de cada um.

No Liceu Central, um professor tem 12 horas de serviço obrigatorio e 8 de excesso. Na Escola Normal e no Instituto Comercial a mesma coisa. Só nos Liceus Muincipais a diferença é grande: 17 horas obrigatorias e 3 de excesso.

Imagina-se, á primeira vista, que o esforço despendido é maior num estabelecimento do que noutros por causa da diferença das classes e do leccionamento.

Não se nos afigura tal em frente dos programas e das responsabilidades, pois só no Liceu Central há maior numero de classes e de resto — *mutatis mutandis*—o trabalho em toda a parte é o mesmo, vigorando as mesmas leis e criterios. O que há, sómente, é a diferença de taboleta.

No Central, por exemplo, consta-nos – os horarios não estão publicados no Bol. Of como se fazia antes—que certos professores ficam *obrigados* a leccionar semanalmente durante 21 e até 22 horas; e isto ultrapassa os limites marcados pela lei que permite até 20.

Supôr-se-há, talvez, que é um *sacrificio* da parte das *vitimas de 21 e 22 horas*, em prol do Estado, o de trabalhar 1 e 2 horas a mais sem ganhar coisa alguma. Puro engano. Como pela distribuição ficava tendo, ás vezes, 19 horas e tinha direito a mais uma hora, para *salva-la* o professor lecciona uma disciplina que tenha 2 ou 3 horas de aulas no periodo semanal, o que nos faz lembrar o velho proloquio popular: *antes um na mão do que dois no ar.*

Há, portanto, sacrificios da parte dos professores de *uma* ou *duas* horas semanais para perfazer o quantitativo de 20 horas. Vê-se daqui que são capazes de trabalhar mais quando hà interesses a guardar.

Perguntamos, agora, ingenuamente:—¿Haveria o mesmo *sacrificio* se não tivessem bastos reis de excesso? Seriam elas muito disputadas? ....
... ...
Conclue-se que um professor é capaz de maior trabalho—contra todas as leis fisicas e pedagogicas—quando tenha interesses. Sendo as necessidades do tesouro ainda maiores é conveniente que o Estado acabe com a anormalidade de horas ou eleve o número de obrigotorias.

Não se entende que nuns estabelecimentos de instrucção secundaria haja 17 horas obrigatorias e noutros 12—As *horas de excesso* representam uma anormalidade e não tem absolutamente razão de ser. Por causa delas chegam-se a praticar nos horarios escolares verdadeiros desatinos pedagogicos.

Tinhamos ouvido na anterior governação que ia ser publicado um decreto do Ministro de instrucção em vigor na Metropole, elevando a 14 horas obrigatórias, sendo 6 de execsso. Infelizmente não temos á mão os *Diarios do Governo* para indicar o aliviador Decreto, mas é muito provavel que o sr. Governador Geral o não ignore, sabeder profundo como é de legislação. Doutro lado anunciam os jornais que elas vão ser lidas. Enquanto isto se faça seria de efeitos salutares que o sr. M. Martins mandasse publicar o Decreto da diminuição de horas de excesso que obrigaria diminuir despezas e reduzir o numero de professores.

Mas, se forem abolidas, por completo, fixando um determinado numero de horas de trabalho semanal e justo equilibrio nos vencimentos, estamos certo que será uma medida de maior alcance pedagogico e moral ... e um alivio para os *esforçados* de 21 e 22 horas!......

O outro aspecto das nossas considerações ligeiras é o das acumulaçoes.

Como este já vai longo fica o resto para a semana que vem.

Um contribuinte

Ao de leve ....

Le Bolchevisme, voila' l'enemi !—e' o grito do dia arrancado de animos apavorados diante do espectro sinistro da legiao comunista ameaçando arruinar as instituiçoes tradicionais da sociedade, subverter a ordem social e moral da humanidade exausta de guerras, havido de socego e paz...Ora por bolchevismo nao passa apenas a subversao de tudo o que representa razao, direito e ordem; nao e' so' a matança impune que ela alastra pelos paizes fo'ra, nao e' apenas o esbulho das nossas propriedades para delas se fazer bem publico. Nao, senhores. Nao se cifra neste ambito restrito a influencia da dotriua comunista. Bolchevismo e' a desordem que ja existe, a desordem e falta de disciplina na burocracia, nas repartiçoes publicas que o sr. Mariano Martins se esforça por chamar a capitulo; e' a ausencia de pontualidade; a falta de escrupulos enfim ... Enfim Bolchevismo e' a ganancia desenfreada que impera no nosso pais especulando o desprevenido o menos forte, o *Mig htis right* germanico!

Bolchevismo e' a revolta do espirito moderno contra a tradiçao, contra a dignidade, contra a autoridade, Bolchevismo e' a politica, baixa, intrigante, chicaneira, destruidora dos autenticos talentos que devem dirigir os destinos desta infeliz terra. A politica que elege o mediocre que envia, o *ilustre desconhecido* para o Conselho Legislativo. Bolchevismo e' o culto da incompetencia; Bolchevismo e' o imperio absoluto do *Consegue tudo*.

Bolchevismo e' a impafia do novo rico, a protervia do boçal que se quer alçar a' categoria do culto do bom do educado do letrado ... Bolchevismo e' a aboliçao do PANO das alparcas, dos chinelos, do arroz e caril para o substituir por gravatas, colarinhos altos como a torre de Lefel *boots*, pomadas, pinturas etc. etc.

Bolchevismo enfim e' a *pose* do sr. Pereira Batalha que nasceu para Angola e quere morrer na India entre *potravoles* de arroz e caril e intoxicado pelo fenim de Canacona.

JAZZ-BAND

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार श्रावण व० १० मी शके १८४७

दारू–जुगाराला मूठमाती द्या !

जुगार आणि दारू हीं दोन भयंकर व्यसनें जितक्या स्वैर गतीनें आमच्या प्रांतांत धुडगूस घालीत आहेत तितकीं जगांतील इतर कोणत्याहि भागांत क्वचितच घालीत असतील ! या दोनहि व्यसनांमुळेंच दिवसेंदिवस आमचा प्रांत नैतिक, शारीरिक व सांपत्तिक बाबतींत खालावत चालला आहे. ख्रिस्तेतर जगास स्वधर्मपंथाखालीं ओढून त्यास पाश्चात सुधारणेचे धुटके पाजून सन्मानशील बनविण्याचा मक्ता घेतलेल्या फिरंग्याचा प्रवेश या पुण्य भूमींत झाला तेंपासून या व्यसनाची एकसारखी वाढच झालेली दिसून येते. जुगारापासून सरकारच्या तिजोरीस ह्मणण्यासारखा फायदा झालेला दिसत नसला तरीं दारूच्या व्यसनापासून सरकारी उत्पन्नांत वार्षिक दहाबारा लाखांची भर पडत असते. या मुळें दारूच्या व्यसनास आळा घालण्याचें तत्व सरकारला कबूल असलें तरी तें आचरणांत आणण्याचें काम त्याकडून होत नाहीं हें निर्विवाद आहे. आधींच हलाखीस आलेल्या तिजोरीस मद्यपान प्रतिबंधामुळें धोका येईल ह्मणून सरकार तिकडे कानाडोळा करीत आहे ह्मणावें तर जुगारप्रतिबंधाच्या वाटेवर अशी कोणती नुकसानी आड येते कीं, जिच्या भीतीमुळेंच सरकार व सरकारी अधिकारी आजपर्यंत जुगारास सक्रीय प्रोत्साहन देत आले आहेत ? वास्तविक खरें पाहूं गेल्यास खुद्द सरकारला, जुगाराचें व्यसन नाहींसें झालें तर सहजासहजीं दारूच्या वाढत्या खपास आळा बसून अबकारी उत्पन्नांत थोडी खोट सोसावी लागेल, या भीतीशिवाय दुसरी कशाचीहि भीति असणें संभवनीय नाहीं. मग हा राजरोस व प्रसिद्ध ठिकाणीं आजपर्यंत चालत असलेला जुगार बंद करण्यास सरकारला कां जड वाटावें हेंच समजत नाहीं. मागें आह्मीं सांगितलेली काल्पनिक भीति हेंच जर खरें कारण असेल तर मात्र सरकारच्या स्वार्थास सीमा नाहीं असेंच ह्मणणें भाग आहे.

जुगाराच्या बाबतींत चालू असलेलें आजपर्यंतचें सरकारी धोरण पाहिलें तर अन्यायी लोकांना शासन करण्यासाठीं निर्माण केलेल्या फौजदारी Codigo Penal कायद्यांत जुगार खेळणें व जुगारास आश्रय वगैरे देऊन प्रोत्साहन देणें हे गुन्हे ठरवून तसल्या गुन्हेगारांस कडक शिक्षाहि सांगितल्या आहेत; हें ज्यानीं तो कायदा स्वतः वाचला नाहीं त्यांना खरें सुद्धां वाटणार नाहीं. आज जवळ जवळ चाळीसपंचेचाळीस वर्षेपर्यंत जो फौजदारी कायदा अमलांत आहे त्यांतील जुगारविषयक कलमें मात्र नेमकींच अमलांत येऊं नयेत हें आपणास सुधारलेलें ह्मणून सदैव टिमकी वाजविणाऱ्या फिरंगी सरकारासच शोभतें !

जुगारी लोकांना शासन झाल्याचें उदाहरण कोणाच्या ऐकिवांत नाहीं, उलट त्यांस जाहीर रीतीनें आपला धंदा चालविण्यात मुभा असलेली दिसून येते. जत्रांच्या मोसमांत ठिकठिकाणच्या देवस्थानांतून जुगाराचे अड्डे शेंकडों जुगाऱ्यानीं व्यापलेले कोणाच्या पहाण्यांत नाहींत ? या सर्व जत्रांत झाडदोळची जत्रा जुगाराच्या बाबतींत श्रेष्ठ ठरेल. तेथील गांवकरी, महाजन व अधिकारी यांच्या संभावितपणाबद्दल कोणींहि साशंक होणार नाहीं. तथापि त्यांच्या उघड्या डोळ्यांदेखत किंबहुना त्यांच्या स्पष्ट वा अस्पष्ट संमतीनेंच देवस्थान कमिटी जुगाराचे अड्डे उघडण्याचा मक्ता लिलांवानें देत असते. जी गोष्ट झाडदोळांत तीच थोड्या फार मानानें दुसऱ्या अनेक देवस्थानांत सऱ्हास होत असल्यास नवल नाहीं. पंचवाडीसारखें लहानसें खेडें तेथील जत्रेंत जुगाराचा मक्ता देऊन महाजन मंडळी दोनशें तीनशें रुपयांची कमाई करींत असते. फातर्प्यांत तर या कमाईचा आंकडा सातशें आठशें रुपयांवर गेला आहे. अवेडें येथील धुड्यावरील लहानग्या जत्रेंत गेल्या सालीं केवळ घडघडो-घिरघिऱ्याचा मक्ता देऊन देवस्थान कमिटीनें १३० रुपयांची जोड जोडिली आणि फांट्याच्या जुगाराचा मक्ता देऊन किती फायदा केला हें अद्याप गुपीतच आहे. या अमंगळ व निंद्य फायद्यांत भर घालण्यास ह्मणून, देवस्थान कमिटीनें देवालयाच्या मागल्या बाजूस दहाबारा कदम अंतरावर, देवस्थानच्याच मालकीच्या जागेवर दारूचा गुत्ता उघडण्याची परवानगी देऊन, जुगाऱ्यांची बरीच होणारी गैरसोय दूर केली होती. हें त्या देवस्थान कमिटीस भूषणावह आहे ! इतर देवस्थानांतहि अशीच सोय झाल्यास पवित्र सुरा देवींच्या जाळ्यांत न सांपडतां राहिलेल्या सुरलेल्या गचाळ व रानटी हिंदु–जेतिवांना सुधारलेल्या जेंतिवांच्या पंक्तीस बसावयाचा मान मिळविण्याचा एक मार्ग खुला करून दिल्याचें श्रेय त्या त्या देवस्थान कमिटीस मिळणार आहे. याचा त्यांनीं अवश्य विचार करावा. एकंदरींत जुगार व दारू या दोनहि व्यसनांस दिवसेंदिवस समाजांत राजरोसपणें वावरावयास मिळत असून जनता, धर्मगुरू व सरकार त्यांस आळा घालण्याचे कोणतेहि प्रयत्न करीत नाहीं उलट त्यामुळें समाजाचा होत असलेला ऱ्हास विनदिक्कत अवलोकन करीत आहे. नव्या गव्हर्नरांच्या राजवटींत तरी या उभय व्यसनांस मूठमाती देण्याचा प्रयत्न कायदे कौन्सिलांतील तिघांहि हिंदु सभासदांकडून होईल काय ?

स्फुट विचार

सुरेंद्र बाबूंचें निधनः— कलकत्याचे हे नेमस्ताग्रणी पुढारी वयाच्या ७७ व्या वर्षी बराकपूर येथील आपल्या रहात्या घरीं गेल्या ६ तारखेला स्वर्गवासी झाले, हें कळविण्यास आह्मास अत्यंत वाईट वाटतें. सुरेंद्राच्या शोचनीय निधनानें हिंदी राजकारणाच्या आकाशांत आपल्या अनुभवजन्य ज्ञानतेजानें झळकणारा एक दैदिप्यमान तारा लुप्त झाला, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ' एकच ध्येय सतत डोळ्यांपुढें ठेऊन, त्यासाठीं सर्व आयुष्यभर अत्यंत परिश्रमपूर्वक प्रयत्न केल्यामुळें व ह्या प्रयत्नाला अनुभवाची जोड मिळाल्यानें सर सुरेंद्रनाथ बानर्जी हे त्याच्या देशावर प्रेम करणाऱ्या सर्वांना आदर्शवत झाले होते. सर्व पक्षांना आदर वाटण्यास भाग पाडणारा हा पुरुष होता ' ' हे युरोपियन असोसियेशनच्या अध्यक्षानीं काढलेले उद्गार बाबूंच्या असामान्य थोरवीचे निदर्शक नाहींत काय ? त्यांना दोनदा हिंदी राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष निवडण्यांत आले होतें. राज्यघटनेंतील सुधारणांनंतर ते बंगालचे स्थानिक स्वराज्यखात्याचे दिवाण झाले. अशा या थोर व्यक्तीचा दहनविधि गंगानदीच्या कांठावर शांतपणें उरकण्यांत आला. दहनविधीच्या वेळीं सुप्रसिद्ध नागरिक व सर्व राजकीय पक्षाचे पुढारी हजर होते. मृताच्या आत्म्यास शांति मिळो ! हा मजकूर कंपोझ झाल्यावर एस. भारतीयकडून सुरेंद्र बाबूंविषयींचा एक लेख आला. निरुपाया मुळें तो येत्या अंकासाठीं ठेवावा लागल्या मुळें आह्मांला दिलगिरी वाटते.

लिसेव सेंत्रालांत चहागृह :— गेल्या आठ दहा दिवसांमागें लिसेव सेंत्रालमध्यें जवळ जवळ गाबिनेत दु कोंसुलत दुस प्रोफेसोरीस याच्या जवळच्या खोलींत एक चहागृह उघडविण्यांत आलें असून त्याला खुर्च्या, टेबलें, कपाटें वगैरे लिसेवच्या अध्यापकांकडून मिळालेलीं आहेत. मुलांना आतां पुस्तकें, पेन्सीली वगैरे खर्चाशिवाय भजीं, चहा, लाडू, जिलबी व शेवटीं जुलाबसाठीं नवीन खर्च पुरविणें त्यांच्या पालकांना क्रम प्राप्त आहे. स्कूलमध्यें लिसांव देतांना ह्या चहागृहांतील कढईंत भजीं तळतांना होणारा चुंळचुळ आवाज व त्याचबरोबर नाकांत शिरणाऱ्या वासानें चळवळणारी जीभ शिक्षण विकास करून पास होण्यास जरूर असेल असेंहि ह्या लिसेवांतील शहाण्यासुरत्या प्रोफेसरानीं नवीन तत्व शोधलेलें असेल, किंवा खुद्द प्रोफेसरांना मुलांकडून ह्या भज्यांची गुरुदक्षणा मिळून त्यांच्या खर्चांत बचत होण्याचा हा एक सुलभ व सोपा मार्गहि असूं शकेल. कांहीं असलें तरी मुलांना इतर सर्व शिक्षणापेक्षां भजीं खाण्याचें शिक्षण भरपूर मिळेल यांत शंका नाहीं. पाकशास्त्राचें शिक्षण यापुढें आमच्या लिसेव सेंत्रालांत नाहीं असें ह्मणण्याचें धाडस मात्र ह्यापुढें कोणी करणार नाहीं !

पब्लिक वर्कस् खात्यांतील मजाः— येत्या महिन्याच्या २० तारखेस फोर्डे महालांतील मिलिटरी लोकांसाठीं एक प्रार्थना मंदिर (Capela) बांधण्याबद्दलच्या पावणीची जाहिरात सरकारी ग्याझेटवर झळकली आहे. डायरेक्टर पब्लिक वर्कस् यांच्या मनांत आलें तर १०००–१५०० च्या बांधणीसाठीं सुद्धां जाहीर पावणी पुकारली जाते; पण उलट पक्षीं मजा हीच कीं, भाणस्तारच्या पुलासारख्या लाख दोन लाखांच्या कामासाठीं ' पावणी'चा आनुसहि येत नाहीं ! इतकेंच नव्हे तर एखाद्यानें मुद्दाम पावणी मागून किंवा इतरांपेक्षां ४–५ हजार कमी किंमतीनें एखादें काम करण्याची मागणी केली तरी गुपचूप ठरीव ' येंकान्हेगादास 'च त्या कामाचा मक्ता देण्यांत आलेला आहे ! पंधरा हजारांवरील कामें फक्त जाहीर पावणीनेंच केलीं जावीं असे कायद्यांत कलम असतां हा असा प्रकार होण्याचें कारण तसेंच ' गहन ' असलें पाहिजे. गोव्यांत इतक्या भारी किंमतीचीं कामें लिलांवानें करणारे नाहींत ह्मणावें तर (Maternidade) सारखें दोन लाखाचें काम जाहीर लिलांवानें गेलेलें आहें. पण लक्ष्यांत कोण घेतो ?

वर्तमानसार

—गेल्या शुक्रवारच्या सरकारी ग्याझेटवर घरभाड्याच्या कायद्याचा मसुदा प्रसिद्ध झाला आहे.

—कोठलेशे एक मामलेदार नवीन गव्हर्नरच्या भेटीस गेले होते संभाषणास सुरवात होतांच, मामलेदारसाहेब सि. मारीयानु मार्तींसाची एकसारखीं स्तुतिस्तोत्रें गावयास लागले. या गाण्याच्या 'घाणींत' ज्यास्त वेळ राहिल्यास प्रकृतिस्वास्थ्य बिघडेल या भीतीनेंच कीं काय गव्हर्नरसाहेबानीं त्यांस सलाम करून ते' तानांच्या तर्फेत' असतांच त्यांचा ताबडतोब निरोप घेतला ! असें 'तेन्हं' पत्राच्या बातमीदारास कळलें आहे.

—सरकारी नोकरानीं वर्तमानपत्रांचें संपादकत्व स्वीकारणें किंवा लेखक या नात्यानें वरिष्ठांच्या कृत्यांतर टीका करणें योग्य कीं कसें, या संबंधीं गोमंतकांतील पोर्तुगीज पत्रांत वादविवाद चालू आहे.

—लिसेव सेंत्रालचें रूपांतर फिरून नासियोनालांत होण्याचा संभव असून, इंस्तितुत कोमेर्सियाल बंद करण्यांत येईल, असें ह्मणतात.

—मडगांव येथें बालचमू संस्थेतर्फे ता.८ शनिवार रोजीं हिंदुस्थानातील एक प्रसिद्ध कार्यकर्ता पुढारी सर सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या मृत्यूमुळें दुःख प्रदर्शक सभा भरून ठराव त्याच्या 'बंगाली' पत्राकडे पाठविण्यांत आला.

—प्रो० वा. वा. सांबडेंकर यांचें ' हिंदु ' पत्रास उत्तर येत्या अंकीं प्रसिद्ध होईल.

केलें नाहीं तर आह्मींहि पण आजवर त्याच्याकरितां आणखी कांहींहि केलेलें नाहीं एवढ्यावर समाधान मानायाला काय हरकत आहे ?

" पोंबाल नंतरच्या अधिकाऱ्यानीं पोंबालचें धोरण अखंड पुढें चालविलें नसतां इतकेंच नव्हे तर तें वेळीं अवेळीं गुंडाळूनहि ठेविलें असतां " इत्यादि माझ्या विधानाला इतिहासांत मुळींच आधार नाहीं असें आपण ह्मणतां; पण असा आधार व तोहि पोंबालच्या खुद्द हयातींतला आपण स्वत: दो. नोरोन्य यांच्या पुस्तकांतून देऊन माझ्यावरील भार कमी केलेला आहे. तो आधार हा:—

" जरी एकीकडे २२८ जेजुइतानां कैद केलें व त्यांच्या जमिनी जप्त केल्या असल्या तरी दुसरीकडे १० हजार पाद्री, शिवाय फांसिस्कान वगैरे धर्ममंडळ्या वावरायला गोव्यांत मोकळ्या होत्याच. "

पोर्तुगालांत तसा प्रकार व गोव्यांत असा प्रकार ! या वरून पुष्कळदां पोंबालचें धोरण कसें गुंडाळून ठेवण्यांत येत असे तें सहज व्यक्त होतें.

येथवर हें मुख्य विषयासंबंधानें झालें. आतां आपल्या इतर काहीं विधानाचा थोडक्यांत विचार करून लेखणीस विश्रांती देऊं इच्छितों. करांचें समर्थन होऊं शकेल एवढी — कराच्या मानानें स्मरणीय अशी— कामगिरी पोंबाल कडून घडल्याचें आपल्या लेखांतून दिसून आलेंच आहे. तेव्हा या विषयावर पुन्हा लिहिण्याचें प्रयोजन मलाहि पण पडणार नाहीं असें वाटतें.

सत्याच्या अपलापाविषयीं तक्रार करण्यांत मुळींच हशील नाहीं. सत्य ज्या बाजूस असतें, त्याच्या उलट बाजूस हा आरोप सहजींच जातो. पुष्कळदां हा अपलाप अजाणतेपणानें होणेंहि शक्य आहे. व तसें झाल्यास तो क्षम्यच होय. पण लटपटी करून आपल्या बाजूस सत्याचा देखावा दाखवूं पाहणें हें काम मात्र केव्हांहि समर्थनीय नाहीं.

" इतरांच्या पदरालाहि थोडेंसें सत्य असूं शकेल अशी कल्पना " करायला माझ्या लेखणीस हरकत नव्हती असें आपण सांगता, यावरून माझ्या पदराला सत्य असल्याचें आपल्याला कबूल आहे असे धरून चालायला हरकत नाहीं.

माझ्या लेखणीच्या त्वरित गतीचे जे टप्पे आपण वाखाणले आहेत ते वस्तुत: परस्पर निरपेक्ष नसून एकमेकांशीं संबध असेच आहेत. उत्तरोत्तर ज्यास्त ज्यास्त खोलांत जातानां ते आपल्या दृष्टिपथांत एकामागून एक आले आहेत एवढेंच.

मात्र आपण प्रत्येक खेपेस ज्या टप्प्यांवर मला उभें केलें आहे ते विचार करण्यासारखे आहेत. यांत संशय नाहीं. प्रथम जोराची तक्रार करणारा, मग आपल्या लेखणीच्या प्रभावानें मवाळलेला, आणि आतां केविलवाणा बनलेला, असा मी आपणाकडून दाखविला गेलों आहें.

पण माझें एक असूं द्या. पोंबालचींहि तीच स्थिति ! प्रथम त्याच्या विरुद्ध आपला रोख नाहीं असें आपलें ह्मणणें होतें. मग तो ' अनुपकारी ' ठरला; व आतां तर ' अपकारी ' ठरतो आहे !

केवळ सोयीकरितां अवलंबिलेलीं मतें ह्मणून पाडलीं जाऊं नयेत, खरींच भासावीं, ह्मणून केवढा हा खटाटोप ! ही आपली प्रगति (!) पाहिली ह्मणजे स्वर्गलोकांतून मृत्युलोकांत उतरतांना गंगेच्या प्रवाहाची गति, टप्पे व दिशा यांस अनुलक्षून एका कवीने काढलेल्या उद्गारांची सार्थता प्रत्ययास येते.

' हिंदूच्या धोरणाविषयीं चर्चा ' हिंदू 'नें अनेक वेळां केली आहे हें खरें; पण ज्यांची चर्चा केली त्या धोरणाविषयीं माझें कांहींहि ह्मणणें नसून जें अवलंबिले जात आहे त्याच्याच संबंधानें आहे.

ठरीव मतें घेऊन भांडण्याचा आरोप मी आपल्यावर केला हें ह्मणणें बरोबर नाहीं. ' कर ह्मटला कीं, त्या विरुद्ध तक्रार करणें ' हें ठरीव [' रेडिमेड ' हाच शब्द येथें बरा दिसतो] मत आपणच प्रगट केलेलें आहे. या मतांतील धोरण तसेंच आपण प्रगट न केलेलें पण नेहमीं ' हिंदु ' तून प्रकट होणारें ' फिरंगी ह्मटला कीं त्यावर सडकून टीका करणें ' हें धोरण जितकें त्याज्य, तितकींच, ' कर ह्मटला कीं त्याची तरफदारी करणें ' व ' फिरंगी ह्मटला कीं तो शिरसा वंद्य लेखणें ' हींहि धोरणें त्याज्यच होत. कारण सगळींच बेटीं ' रेडिमेड '!

रेडिमेडपणा सोडून देऊन तारतम्य बुद्धीचा आश्रय धरला ह्मणजे कोणत्या कराविरुद्ध तक्रार करावी व कोणत्या विरुद्ध करूं नये, तसेंच कोणत्या फिरंग्यावर सडकून टीका करावी व कोणाला वंद्य मानावें हें कळायला उशीर लागणार नाहीं. पण तारतम्य बुद्धीचा उदय व्हायाला स्वतंत्रपणें विचार करण्याची शक्ति अंगांत आली पाहिजे व तेथेंच तर सर्व कांहीं नडतें. क. वि.

कृ. ग. केणी.

घोटाळ्याचें आविष्करण

द्वितीय विभाग

[मागील अंकावरून समाप्त]

शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे
साधवो नहि सर्वत्र चंदनं न वने वने ॥१॥

याप्रमाणें प्रत्येक टिळकपंचांगानुयायी निश्चल अशा शांत व सात्विक तत्वाचा पुरस्कर्ता असतोच असें नाहीं. स्वताच्या चुकीने लिहिलेल्या वाक्यांवरसुद्धां प्रामाणिक आक्षेप घेतलेला श्री. सारस्वतांस जसा आवडला नाहीं, तसेंच त्यानाहि सूक्ष्म व शुद्ध पंचांगास ज्यांना ज्योतिःशास्त्र कशाशीं खावें हें सुद्धां माहीत नाहीं अशानीं, बाष्कळ दूषणें देणें कसें आवडेल, तें श्री. सारस्वतांनींच पहावें.

'टिळक पंचांग हा सूर्य असल्यानें तो दाखविण्यास मशाली नकोत' असें एक वाक्य मानभावीपणानें त्यांनीं लिहिलें आहे. पण आज अनादिकालापासून पहातां, वरील दृष्टांत सकृत्दर्शनीं बरोबर वाटला तरी, अनुभव मात्र याच्या उलटा आहे. 'नहि कस्तुरिका मोदः शपथेन प्रवर्तते' हें खरें असलें तरी, ज्याला कस्तुरीचा वास येऊनहि न आल्याचें लोकांस सांगण्यास हवें आहे, त्याची कानउघाडणी कस्तुरी नाकाजवळ नेऊनच करावी लागते. खरें असलें तरी तें 'खरें' ह्मणून सांगावेंच लागतें. सुवर्णाची वस्तु असली तरी तिची किंमत स्वर्णपरीक्षकाकडून विचारून घेतली पाहिजे. आह्मांतुह्मांस ती कळणार नाहीं. संशयी इसमाला 'हा सूर्य हा जयद्रथ' असें ह्मणून वस्तुस्थिति सांगून खऱ्याचाहि ' खरेपणा ' दाखवावा लागतो. श्रीमदाद्य शंकराचार्यांचा अद्वैत सिद्धांत तर जगजाहीर खराच होता. तर मग त्यानीं आजन्म तत्प्रसारार्थ अविश्रांत मेहनत कां घेतली ? भक्ती ही मोक्षदायी खरीच, पण तिची महती आज कैक वर्षें नारदशांडिल्यांपासून तों थेट तुकाराम रामदासांपर्यंत अनेक महर्षि व संत यांनीं तिची वाखाणणी केली व लोकांस पटवून देण्याबद्दल अतोनात खटपट केली, ती काय ते रिकामे होते ह्मणून ? श्रीमन्महाभारतांत आमचे व्यासमहर्षि सांगतात—

ऊर्ध्व बाहुर्विरोम्येष नच कश्चिच्छृणोति माम्॥
धर्मादर्थश्च कामश्च सधर्म किं न सेव्यते ॥१॥

या प्रमाणें बोलणाऱ्या या महर्षींस खऱ्याचा 'खरेपणा' कां दाखवावा हें पूर्ण कळत होतें. तद्वतच अज्ञानानें टिळकपंचांगाबद्दल गैरसमज करणारांना त्या पंचांगाची श्रेष्ठता सांगणें हें तदनुयायी ज्ञात्यांचें न्याय्य व योग्य कर्तव्यच आहे; व तें ते बजावीत आहेत यांत अपराध तो काय ? निर्णयसागरी पंचांगांत मराठी भाषांतरें देतात. तद्वतच टिळकपंचांगाच्या मोठ्या प्रतींत देण्यांत येतात. व पुढें लहानपंचांगांतहि देतीलच. पण एवढ्याच वैगुण्याबद्दल त्याला कोणी अवगुणी ह्मणणार नाहीं. 'चंद्रदर्शन निर्णय खोटा ह्मटला नाहीं' असें श्री. सारस्वत लिहितात. पण आह्मीं ह्मणतों कीं, निर्णय खरा तर मग तो दिसल्यावांचून राहील कसा ? व न दिसल्यास त्यांत आपलीच फसवणुक झाली नाहीं ना ? हें त्यानीं कसें पाहिलें नाहीं ? 'खोटा' हा शब्द न घातला तरी, या शब्दाचा अर्थ ध्वनित होतो अशीच त्यानीं आपली वाक्य रचना केली आहे. इतकेंच नव्हे तर त्यावरून बऱ्याच लोकांचा गैरसमज होऊन 'चंद्रदर्शन कसें झालें नाहीं' ह्मणून त्यानीं प्रश्नहि केला. याचसाठीं श्री. सारस्वतांच्या एकदोन ओळीवरहि लेख लिहून वस्तुस्थिति मांडणें मला प्राप्त होऊन बसलें. चंद्रदर्शनास द्वितिया लागते हें श्री. सारस्वतांस माहीत होतें, तर ती कधीं लागली हें पण पाहून, तसा खुलासा करून, ह्मणजे चंद्रदर्शन शास्त्रोक्त अतएव अगदीं थोडें झालें; ढळढळीत झालें नाहीं इतकें पण कळवावयाचें होतें. नुसत्या 'दृक् प्रत्ययास तसें आलें नाहीं. अर्थात भविष्य बरोबर उतरलें नाही. शुद्धपंचांगाचा निर्णय खरा कीं अशुद्धाचा खरा ?' या वाक्यावरून ध्वन्यर्थ काय निघतो? तर 'अशुद्ध' पंचांगाची चूक न येतां शुद्ध पंचांगाची आली. अर्थात शुद्ध कशास ह्मणावें ? याचें उत्तर कोणी पण हेंच देईल कीं, अशुद्ध पंचांग बरोबर अतएव जुन्या पंचांगासच शुद्ध ह्मटलें पाहिजे. याचप्रमाणें वाचकांचा घोटाळा झाला व तन्निराकरणार्थ मला हा लेख लिहावा लागला. पण, त्यांत श्री. सारस्वतांची 'मुस्कटदाबी' मीं कशी केली, हें वाचकांनींच पहावें. श्री. सारस्वत टिळकपंचांगाचे अनुयायी असले तरी त्यांचें वाक्य मात्र जाणून बुजून सामान्य लोकांत गैरसमज पसरविण्याजोगें झालें यांत संशय नाहीं. त्यांनीं तें जिज्ञासू या दृष्टीनें लिहिलें नसून स्वतःचें ठाम मत दर्शविणारें असेंच विधान केलें, असें वाचकांस वाटल्यास त्यांची ती बिलकूल चूक नाहीं. ज्योतिःशास्त्र हें केवळ मुनिसिपल कंदील पेटविणाऱ्या इसमासाठीं' नसून, गणित, दृक्प्रत्यय, धर्मशास्त्र इत्यादींसाठीं अधिक अवश्य असल्यानें, गणितानें चंद्रदर्शन येतें त्याचवेळीं पंचांगांत लिहिण्याची शास्त्रासंमति आहे; हें मीं " चंद्रदर्शनाची चूक कीं दृष्टयाची भूल ?" या लेखांत सप्रमाण दाखविलेंच आहे. तरी या प्रमाणें टिळक पंचांगांत लिहिलें होतें. व त्या रोजीं १३ अंश पश्चिमक्षितिजांत रात्रौ ७ वाजून ४२ मिनिटेंपर्यंत ह्मणजे बराच वेळपर्यंत चंद्रदर्शन काहींनीं प्रत्यक्ष पाहिलेंहि होतें. आकाशांत अभ्रें असलीं किंवा भयंकर पर्जन्य सुरू असला तर द्वितिया समजूनहि कंदील लावल्यास काय उपयोग ? व द्वितियेचा क्षय होतो तेव्हां श्री. सारस्वत त्यास ती कधीं ह्मणून सांगणार ? कांहीं झालें तरी गणितानें येणाऱ्या चंद्रदर्शनासच योग्य ह्मणणें श्री. सारस्वतांस भाग आहे. आणि अशा किरकोळ बाबीसाठीं, अनेक नियमानीं व व्यवहार उपयोगी मर्यादांनीं बद्ध असलेला चंद्रदर्शन शास्त्रार्थ बदलण्यास कोण तयार होईल ? श्रीमद्भगवद्गीतेंतील——

तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितै॥
ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि १

या सुप्रसिद्ध भगवानाच्या आज्ञेच्या आड कोण येईल ? पंचांग हें प्राकृतांसहि हवें असलें तरी ग्रहणासारिखे सूक्ष्म दृक्प्रत्यय ज्या अर्थीं प्राकृतांसहि बरोबरच उतरावेसे वाटतात त्या अर्थीं, ते 'सामान्य लोकांच्या समजुतीप्रमाणें देऊन 'चंद्रदर्शन'योग पहाणाऱ्याच्या सोयीनुसार लिहिण्यास कोणतहि पंचांगकर्ता तयार होणार नाहीं. आणि सामान्य लोकांस शास्त्रार्थ निराळा, स्थूल दृष्टीनें पहाणारांस निराळा, खोलगट जागेंतून आकाश निरीक्षण करणारास निराळा असे एकाचेच विविध शास्त्रार्थ घाटीत सुटलो तर मग सर्वत्र अनवस्थाच प्रसंग यावयाचे ! चंद्रदर्शनाची वस्तुस्थिति आह्मीं दाखविली यांत त्यांवर आरोप तो आह्मी काय केला ? आक्षेपाचें निरसन करणें हेंच जर 'मुस्कटदाबीचें' लक्षण श्री. सारस्वत मानीत असतील तर मग 'भारतीय युद्धकाल निर्णयासारिख्या' महत्वाच्या वादांत श्री. जर्नादन स. करंदीकर श्री. चिंतामणराव वैद्य वगैरे विद्वान एकमेकांची 'मुस्कटदाबीच' करीत असून त्यात का-

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1° oficio Redcar, vai á praça para venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige á estação de Sanvordem no dia 21 do proximo mez de Agosto ás dez horas, pela segunda vez e por metade do seu valor, 1/42 do predio da varzea denominado "Betul" da cultura de arroz, sito em Mudcuda de Agonda, avaliado em 100 rupias, discrito na conservatoria desta comarca sob o n° 16865, e penhorado nos autos de execução de sentença que a Fazenda Nacional move a Ganessa Rama Folo e Omú Rama Folo ambos de Tudol de Gaundongrem, apensos aos de inventario orfanologico procedido por obito de Janqui Dessaina que foi da mesma.

O arrematante pagará a contribuição de Regisro por inteiro e as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaisquer credores incertos e co-proprietarios. O que para ser publico se espediu este.

Xeldem 30 de Julho de 1925

O escrivão de Direito

Babú V. Camotim Redcar

Verifiquei

O Juiz de Direito

R. Colaço

Livraria Moderna

DE

Francisco Luís S. Mergulhão

Recebeu:

Carlos de Oliveira, Codigo administrativo anot.; *Candido Figueiredo*, Falar e escrever, Liçoes Praticas, O que se nao deve dizer, Gramat'ca scientifica, Combates sem sangue em favoa da lingua portuguesa; *Peres Escrich*, Os que riem e os que choram; *Condessa de Gence'*, Tratado de civiidade e Etiqueta; *G. Vogt*, Como obter ideas lucidas e claresa de espirito?; *Silva Rondes*, Para abrir caminho na vida; *Rocha Martins*, A Paixao de Camilo, Monarquia do Norte, Marquez de Pombal – *Dias Ferreira*, Codigo civil,, Dito processo civil, Novissima reforma anot.; – Dicionarics de diversos autores.

Novidades literarias em todas as malas.

A' venda em Margao, no estabelecimento de Basilio Silva (Novo Mercado) e Sucursal de Jorje e Filhos Velho Mercado).

"प्रत्यक्षं ज्योतिषं शास्त्रं चंद्रार्कौ यत्र साक्षिणौ"

या सूर्यसिद्धांतोक्तीनुसार फलज्योतिः शास्त्राचा, आर्यांच्या बृहत्पाराशयांदि ग्रंथांपासून, पाश्चिमात्यांच्या दिनवर्षपद्धतीपर्यंत विविध मतें व ग्रंथाधार विचारांत घेऊन तात्विक पद्धतीनें व भौतिक शास्त्रानुसार अनुभव घेणें असल्यास समक्ष किंवा पत्रद्वारें कळवा. पुढीलप्रमाणें सर्व कामें शुद्ध व सूक्ष्म पद्धतीनें केलीं जातात.

वर्ग १ ला, आजन्मफलवर्णनाची मोठी पत्रिका रु. १० ते २५

व० २ रा, भावचलित गणिताची मध्यम प० रु. १०

व० ३ रा, सायन व निरयन मताची प० रु. ५

व० ४ था, शुद्ध व सूक्ष्म निरयन प० रु. ३

व० ५ वा, सर्व साधारण दशांतर्दशांची प० रु. २

व० ६ वा, साधी स्पष्टग्रहादिक प० रु. १ व जन्मटिपण ८ आणे.

शिवाय वर्षमासफलें, प्रश्न, मुहूर्त, पत्रिका पाहणें वगैरे कामें सप्रमाण व सोपपत्तिक अशीं आधुनिक कालास पटण्याजोगीं टाइमशीर करून देऊं. फलज्योतिषाच्या आस्थेवाइकांनीं अनुभव घेऊन खात्री करावी.

पत्ताः— नारायण अनंत नाईक पाटणकर मालक "ज्योतिष कार्यालय आणि श्री पांडुरंग–ग्रंथ–संग्रहालय" मु० पो० सांगें प्रांत गोवा.

कोस्त वीर एन्ड सन्स

सोडावॉटरच्या गाजाचा दांडगा पुरवठा. पाहिजे तेवढी मागणी तावडतोब पुरी केली जाते.

मडगांव, पणजी व म्हापशें.

BANCO NACIONAL ULTRAMARINO

Tendo aparecido ultimamente bastantes notas com os dizeres variados escritos á tinta, ou com carimbos das casas comerciaes, previne-se o público para não aceitar notas em taes condições

A partir do fim do mez será recusado o pagamento dessas notas.

बांकु नासियोनाल उल्त्रामारीनु

शाईनें लिहिलेले अनेक तऱ्हेचे शब्द तसेंच अनेक व्यापारी लोकांचे ठशे असलेल्या नोटांचा गेल्या दिवसांमागून बराच प्रसार झालेला दिसून आल्यामुळें, तसल्या नोटा न घेण्याविषयीं लोकानां जाहीर सूचना देण्यांत येत आहे.

चालू महिन्या अखेर उपरोक्त नोटांचा स्वीकार करण्यांत येणार नाहीं.

बांकु नासियोनाल उल्त्रामारीनु

लिमिटेड कंपनी

जगांत अत्यंत नाणावलेली ही बँक व्यवहारकुशलतेमुळें आपल्या लौकिकांत दिवसेंदिवस भर घालीत आहे.

मुख्य ठिकाणः— लिजबोअ

सर्व खंडांत, बेटांत व वसाहतींत प्रस्तुत संस्थेच्या एजन्सीस पसरल्या आहेत.

सामायिक भांडवलः ४८.०००.०००$०० यस्कूद

कामचलाऊ भांडवलः २४.०००.०००$०० ,,

रिझर्वः ३२.२००.०००$०० ,,

वसाहतींतील शाखा

पश्चिम आफ्रिकाः— काबु व्हेर्दि, सां. तोमे, सां. तियागु, बिझाउ, बोलान, कॉंगु बेला, काबींद, लोआंद, नोव्ह रेदोंदु, लोबितु, बेंगेल, व्हील सीलुस पोर्तु मोसामेदिस आणि लुबांगु.

पूर्व आफ्रिकाः— लौरेंस मार्किस, इंजांबानि, बैर, शिंदु, तेति, केलीमाव मोसांबिक, आणि इबु.

इंडियाः— नोव्हगोवा, मोर्मुगांव, मडगांव, मुंबई.

माकाऊ तिमोर इ. इ.

या बँकचे सर्व तऱ्हेचे व्यवहार जगांतील सर्व ठिकाणी होत असतात.

O BHARAT

SURENDRANAT BANERJI

Está de luto a India. Vestem-se de crepes, neste momento doloroso, mais de trezentos milhões de habitantes que povôam a peninsula hindustanica, berço duma das mais antigas e luminosas civilisações do mundo.

Morreu Banerji, *"o Demostenes da India,"* e esta noticia correu célere em todas as partes do globo. E' que Banerji, génio portentoso de palavra, pertencía á constelação de homens que constituem o patrimonio intelectual não só duma nação, mas da humanidade inteira.

Dentro de poucos anos a India perdeu sucessivamente os seus homens eminentes e principalmente a provincia de Bengala, coração do movimento da emancipação da pátria indiana.

Para não recordarmos todos os nomes eminentes do passado:- há poucos anos Tilak e Gokale, depois Chandavarkar, com algum tempo mais Asutosh Mukorji,...ontem C. R. Das e hoje Surendranat Banerji.

Todos eles foram pioneiros do movimento nacional indiano que levará a redimir a India das garras estranhas.

Entre eles, porêm, avulta a figura de Banerji, um dos fundadores do movimento iniciado na segunda metade do século passado.

A India moderna deve-lhe muito, deve lhe mesmo tudo. E' porque o grande patriota soube levar avante o seu ideal de querer só engrandecer a Pátria que o tinha visto nascer. Nunca descançou; o seu corpo não tinha fadigas e nas assembleias de mais puros intelectuais da Inglaterra e da India o orador máximo dominava os ouvintes com a argumentação cerrada das suas idêas e a convicção dos nobres principios que o abrazavam.

A sua voz poderosa era como se fosse uma trombeta que um arcanjo soprasse do alto de Himalaia, e os discursos tanto na forma como nos conceitos duma beleza incomparavel. Os adversarios temiam-no e cognominavam-no justamente:—*O Invencivel.* Labutou mais de 50 anos em todos os campos da actividade para alcançar a meta da libertação e sofrendo canseiras presidindo congressos, movimentando massas, Banerji chegou a ter a consagração de Rei ...mas sem corôa — Era o *em crowned King* de Bengala.

Embora velho, não abandonou a arena da luta e no declinar da vida — aos 78 anos de idade! — tornou a tomar a direcção do jornal *Bengalee*, porta-voz da sua palavra escrita.

E' vastissima a sua obra e sentimos não poder, pela piquenez deste jornal, fazer-lhe mais largas referencias. E' necessario longo tempo e espaço bastante para dar o balanço da vida desse homem que deixou milhares de discursos primorosos e escritos soberbos, afirmando-se como eminentissimo orador, brilhante jornalista, incomparavel polemista e grande patriota.

Estas linhas não tem outra pretenção senão a de lamentarmos com a mais profunda mágoa a perda dum dos maiores filhos da India que precisa nesta hora da sua emancipação, homens capazes de arcar com as dificuldades do momento.

A sua vida é um exemplo, vivo, para os jovens da India guiarem os seus passos. Estudá-la e propagá-la será milhor homenagem á sua impoluta e imperecivel memória.

IMORALIDADES

A divisao de trabalho e a cultura de especialidade em cada ramo de serviço pu'blico ou particular e' a milhor norma de aproveitar as energias de cidadaos e promover o engrandecimento dum povo.

Diz-se que nas nagoes principais do mundo aparecem sa'bios e doutores honrando a sua pa'tria, Mas nunca procuram saber a causa essencial que faz dum homem um profundo sabedor duma sciencia ou dum trabalho a que se dedicou.

Ora, prosseguindo nas ligeiras consideragoes antes feitas, notamos um outro mal que nos enferma:-e' o das **ACUMULAGOES** e a consequente irregularidade nos servigos pu'blicos.

Ha' criaturas que se julgam com competencia para tudo e sao *capazes* de trabalhar ate' **25 HORAS** ... por dia!........Nao veem as conveniencias do Estado nem as do publico. O decoro funcional de certos e' de se apresentarem com o dom de ubiquidade e *passar pinceladas* sobre os servigos ao seu cargo.

Contra as acumulagoes a imprensa do paiz tem fartamente falado e ainda nao foram ouvidos os seus clamores. As leis nao tem sido respeitadas e os *apaniguados* continuam a gosar dos seus caprichos a' vontade.

E' indecoroso que certos funcionarios desviem a atengao das suas repartigoes e achem tempo de sobra para tratar dos negocios doutros. O motivo que os atrai nao e' de servir bem o publico ... mas **FARTOS REIS**. Ninguem procura saber da competencia — salvo rarissimas excepgoes — e julgam-se senhores do cargo...qual quer que ele seja.

Basta uma *carta de empenho* ou um *salam tipicamente oriental* para um mortal se sentir bem em todas as situagoes, acumulando funcgoes de homens de leis ou outro ramo de servigo especial...com as de cabo de esquadra ou agrimensor ... havendo, ja' se ve, pingues rupias.

Se a lei facultasse acumular a um funcionario, sem mais estipendio ou gratuitamente, nunca seria capaz de se importar com outro servigo e se o governo o nomeasse nao faltaria clamor de lesa-magestade e mais la'murias de sempre.

Langando um ligeiro golpe de vista vemos no Liceu Central e na Escola Normal o mais frisante exemplo. Ali uma legiao de *senhores acumuladores* sacrificam as suas *energias* em prol da instrugao da nossa terra. E, *coitados* deles, andam numa ginastica continua e todos suados por causa dos alunos......

Aqueles *magisters*, feitos a' pressa dao farta materia para uma come'dia: e a historia anedoctica e' rialmente hilariante levando a' palma ao *Barnabe'*...do Almanak Bertrand.

Nao podera' haver uma harmonia nos horarios — eles ainda nao estao publicados—e os intervalos nao terao uma determinada norma em todos os dias da semana ....

....

Nuns estabelecimentos de instrucgao sao elas permitidas e noutras formalmente proibidas ! ? ......

Do Liceu se passarmos para outros lugares, os exemplos continuam. Na Repartigao de Agricultura e' o proprio chefe que acumula os servigos de Alfandega! Isto de Agricultura com Alfandega nao ha' por onde pegar.

Todos no's sabemos o esfarceu que vai contra aquela inspecgao, mas o chefe nao se importa, anda de Agricultura para a Alfandega, e dali para a Agricultura...a's vezes nao se ve em nenhuma delas, mas sobra-lhe tempo para alegar trabalhos nos campos com arados e bombas...e canceiras e fadigas...no porto...com guindastes !...

Querera' porventura o ditoso chefe-agricola dar ligoes aos emigrantes e prepara-los para uma INTENSA PROPAGANDA dos nossos arrozais, coqueiros, etc. e avocar capitais extrangeiros?

Talvez, ja' que na propria terra nao consegue convencer da sua utilidade.

E' inaceitavel o que vai por ai. Apesar de haver funccionarios disponiveis permitem-se acumulagoes com gravame do tesouro.

Na Escola Me'dica houve tempo em que o sr. dr. Wolfango da Silva as proibia formalmente aos seus subordinados; so' desde ha' pouco tem-se visto um dos lentes acumular... ... ... ¿Serao motivos de ordem tecnica e especial?.....,

Mas nao podemos deixar de aplaudir os seus gestos na disciplina funcional, obrigando os subordinados a terem mais cuidado com os servigos para que foram nomeados. E por causa disso tudo ali corre bem e a cultura de especialidade honra o nosso paiz.

No's em absoluto nao queremos dizer que aos acumuladores falta competencia; os nossos reparos sao por que com as acumulagoes os servigos ficam incompletos e um funcionario anda com a cabega hipotecada em diversos lugares.

O aperfeigoamento vem da divisao de trabalho e da constante aplicagao num so' ramo de servigo. Os professores principalmente, tem de se por a' altura e nao dar constantes GAFFES, tem de velar pelo futuro do pais. Nao e' com simples e oco PALAVREADO que se forma o cidadao de amanha.

CADA UM NO SEU LUGAR...... e' o aforismo popular que mais nos convence.

Se podem trabalhar durante 10 horas por dia em duas ou tres repartigoes, nao seria milhor aplicar essa ACTIVIDADE numa so' ?

A decadencia que se nota no campo de cultura intelectual e' devida princi-

येत्या गणेश चतुर्थीच्या सणानिमित्त आमच्या छापखान्याला सुटी असल्यानें भारताचा येत्या गुरुवारचा अंक सालाबादप्रमाणें प्रसिद्ध होणार नाहीं.

मॅ. भारत.

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार भाद्रपद शु० १ दा शके १८४७

प्रागतिक संघाच्या कार्यास लागा !

आजकाल अखिल जगाकडे सूक्ष्म नजर फेंकली तर प्रत्येक लहानमोठीं राष्ट्रें व त्या राष्ट्रांतील निरनिराळे समाज आपली उन्नति करून घेण्याच्या तीव्र लालसेनें उद्योगप्रवृत्त झालेलींच दिसून येतात. एखादें राष्ट्र बनण्यास जसे त्यांतील वेगवेगळे समाज किंवा वर्ग कारणीभूत होत असतात, तसेच ते समाज किंवा वर्ग बनण्यास त्यांतील एकंदर व्यक्ति कारणीभूत व्हाव्या लागतात. राष्ट्राची उन्नति होण्यास त्यांतील सर्व समाज ज्याप्रमाणें एकवटावे लागतात त्याचप्रमाणें समाजाची उन्नति होण्यास त्यांतील सर्व व्यक्ति एकविचारानें भारून गलेल्या व कार्याच्या तळमळीनें एकरूप झालेल्या असाव्या लागतात सर्व स्वतंत्र व स्वातंत्र्योन्मुख राष्ट्रांतील समाजांची अगर समाजांतील व्यक्तींची वृत्ति अशाच तऱ्हेची झालेली आढळून आल्याशिवाय रहात नाहीं. हें जगाच्या घडामोडीकडे ज्यांचें लक्ष आहे त्यांना सहज समजून येईल.

आज जग कोणत्या मार्गानें जात आहे यासंबंधीं विचार करणारे सूज्ञ लोक आमच्या समाजांत कांहीं योडथोडके नाहींत. इंग्रजी, पोर्तुगीज व मराठी वर्तमानपत्रें वाचून शेजारच्या इंग्रजी हिंदुस्थानांतील विविध चळवळींची माहिती करून घेऊन त्यांवर अधिकारानें अभिप्राय देणारे, चीन देशांत विद्यार्थ्यांनीं परकी लोकांविरुद्ध चालविलेल्या लढ्याकडे आणि स्पेन व फ्रेंच या दोन बलाढ्य युरोपियन राष्ट्रांवर आफ्रिका देशांतील मूटभर रिफ लोकांनीं उगारिलेल्या शस्त्राकडे आश्चर्यानें पहाणारे किती तरी लोक सांपडतील. परंतु, दुर्दैवाची गोष्ट ही कीं, या असल्या स्वातंत्र्यप्रिय लोकांनीं स्वतःच्या देशाच्या अगर समाजाच्या उत्कर्षार्थ कोणताच कधीं विचार केल्याचें दिसत नाहीं. मोनार्कीची एकमुखी सत्ता नामशेष होऊन तिच्या जागीं गोंडस अशी लोकसत्ता प्रस्थापित झाली आणि इतर समाजांबरोबर आपल्या अडचणीहि सरकारच्या कानावर घालण्यास आमच्या हिंदु समाजास अवसर सांपडल्यास उणीं पुरीं १५ वर्षे झालीं. इतक्या सवा तपाच्या दीर्घ अवधींत आमच्याकडून असे कोणते प्रयत्न झाले कीं ज्यांमुळें आमच्या उन्नतीस थोडा तरी हातभार लागला ? लोकसत्तेच्या स्वागतार्थ उच्चारलेल्या जयजयकारांनीं कोरडा झालेल्या घशास अद्याप ओलावा आलाच नसेल ! लोकसत्तेच्या जन्माचे वेळीं व तदनंतर रिकाम्या वेळीं मारिलेल्या गप्पांची वाफ अद्याप वितळलेलीच नसेल ! व लोकसत्तेच्या वाढदिवससमारंभास दिलेल्या वर्गणीनें खिशास बसलेला चट्टा अद्याप भरून आलाच नसेल ! आणि असें असूनहि आमची उदासीनता पूर्वीप्रमाणेंच कायम आहे. नुसत्या जयजयकारांनीं, गप्पागोष्टींनीं, आणि मीडेभाडेनें घातलेल्या वर्गणीच्या आंकड्यानीं लोकसत्तेचा फायदा पदरांत पडत नसतो हेंच अजून आमच्या सूज्ञ व विचारी लोकांच्या डोक्यांत आलें नाहीं यास काय म्हणावें ? रेपुब्लिक, आवतोनोमी वगैरे नांवें कानास कितीहि गोड लागत असलीं तरी नुसत्या त्या शब्दांनीं कोणत्याहि समाजाची उन्नति होत नसते. तशी उन्नति होण्यास प्रत्येक समाजानें स्वावलंबनपूर्वक पुढें आलें पाहिजे. तरच कांहींतरी त्यांत तरणोपाय आहे व हाच न्याय आमच्या हिंदुसमाजासहि लागू आहे, हें आमच्यांतील सर्व लहानमोठ्या व्यक्तींनीं ध्यानांत धरून त्याप्रमाणें वागलें पाहिजे.

आमच्या समाजांतील सर्वच व्यक्तींनां या गोष्टी अज्ञात आहेत असें आमचें म्हणणें नाहीं. तसें असतें तर आमच्या समाजांत ज्या अनेकविध चळवळी दिसतात त्या दिसल्याच नसत्या. परंतु त्या सर्व चळवळींच्या मुळाशीं एकंदर समाजाच्या हिताची तळमळ लागलेली जितकी दिसावयास पाहिजे होती तितकी ती दिसत नाहीं हें महत्प्रयासानें कबूल करणें भाग आहे. यास उदाहरण द्यावयास फार दूर जावयास नको. प्रागतिक संघ या सर्व हिंदु समाजासाठीं म्हणून स्थापन झालेल्या संस्थेकडे बोट दाखविलें तरी पुरे आहे.

प्रागतिक संघ या संस्थेची माहिती नसणारा एकहि गृहस्थ गोमांतकीय सुशिक्षित हिंदु गृहस्थांत सांपडणार नाहीं. तिची स्था० झाल्यास जवळ जवळ चार साडेचार वर्षें झालीं. तिच्या जुन्या व नवीन होऊं इच्छिणाऱ्या सभासदांची पहिली परिषद श्री स्थळ कवळें येथें १९२३ सालच्या डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत होऊन तींत संघाची घटना व संघाच्या ध्येयास अनुसरून बरेच ठराव पास करण्यांत आले आणि संघाचें काम चालविण्यास लागणाऱ्या कार्यकारी मंडळाच्या व मध्यवर्तीमंडळाच्या सभासदांच्या निवडणुकाहि झाल्या. तसेंच दुसरी परिषद साष्टी व मुर्गांव या महालांतील सभासदांनीं आमंत्रण दिल्यावरून तेथें भरविण्याचें ठरलें. या गोष्टी आज सर्वांस समजून चुकल्याच आहेत. पहिली परिषद होऊन पांच सहा महिने लोटतात न लोटतात तोंच दुसरी परिषद केव्हां होणार यासंबंधीं जिकडे तिकडे जी पृच्छा सुरू झाली ती अद्यापहि कायम आहे आणि दुसऱ्या परिषदेचें अधिवेशन पार पडेपर्यंत ती तशीच चालू असणार हें उघड आहे. प्रागतिक संघाची पहिली परिषद भरविण्याचें काम जितकें सोपें होतें तितकें ते दुसऱ्या परिषदेचें नाहीं याची जाणीव फारच थोड्यानां असेल. पहिल्या परिषदेचे सभासद होण्यास कोणासहि कसलीच आडकाठी किंवा बंधन ठेविलें नव्हतें तसें दुसऱ्या परिषदेंत सभासद म्हणून येणाऱ्याचें नाहीं. दुसऱ्या परिषदेंत ज्यानां सभासद म्हणून यावयाचें आहे त्यांना आधीं आपल्या महालांतील महालकमिटीकडे संघाचा सभासद होण्यासाठीं फार्म भरून देऊन एक रुपया वर्गणी दिली पाहिजे. अशा रीतीनें आपलें नाव सभासदाच्या पटांत नोंदलें गेलें तरच पुढें परिषदेचा सभासद होण्याचा अधिकार आहे. ही माहिती सर्वांसच आहे असें नाहीं, व असली तरी आपण होऊन आपलें नांव नोंदून घेतील असे फार थोडे लोक सांपडतील. प्रागतिक संघाच्या घटणेप्रमाणें ठिकठिकाणच्या महालांतून सभासद मिळविणें व त्यांकडून महालकमिट्या स्थापन करून नवीन सभासदांची जोड देणें हीं कामें आधीं व्हावयाचीं तीं थोडे महाल खेरीज करून झालींच नाहींत व जेथें तीं झालीं आहेत तेथें तीं कळकळीनें, उमेदीनें किंवा संघाच्या महत्वाच्या मानानें झालेलीं दिसत नाहींत; म्हणूनच आमच्या समाजांत सार्वजनिक कामाची चाड बाळगणारे गृहस्थ उतन्न व्हावयाचेच आहेत. अद्याप झालेच नाहींत असें आम्हीं वर म्हटलेंच आहे.

प्रागतिक संघाची आवश्यकता व महत्व आम्हीं अनेक वेळां भारतांतून दाखविलेंच आहे व पुढेंहि तें पुन: पुन: दाखविणें हें आमचें कर्तव्य आहे. प्रागतिक संघाच्या मूळ कार्याची जी हेळसांड झालेली दिसत आहे तिचा दोष सर्व समाजावर सारखाच असला तरी कांहीं ठराविक व्यक्तींवर तो अधिक आहे हें स्पष्टपणें सांगण्यास आम्हास कसलीच दिक्कत वाटत नाहीं. प्रागतिक संघास जन्म देणाऱ्या व परिषदेच्या निमित्तानें त्यांची गांठ सर्व समाजाशीं बांधण्याचें महत्कृत्य करणाऱ्या फोंडा महालांत परिषद होऊन दीड वर्षाचा काळ लोटला तरी महाल कमिटी स्थापन होऊं नये हें आमच्या उदासीनतेचें कीं आरंभशूरत्वाचें लक्षण आहे बरें ? संघाच्या कार्यासाठीं योजण्यांत आलेल्या इंजिनाचें मुख्य चाक जी कार्यकारी कमिटी, तिचें आफिस ज्या महालांत= राजधानीच्या शहरांत= आहे तेथें सभासद मिळविणें व त्यांकडून म. कमिटी स्थापन करविणें हीं कामें होत नाहींत हा दोष कोणाकडून येतो ? बारदेशसारख्या, साष्टीपेक्षां ज्यास्त हिंदु लोकसंख्या असलेल्या महालांत प्रागतिक संघाचें अस्तित्व दाखविणारें कोणतेंच कार्य होऊं नये हें चिन्ह कशाचें ? या थोरथोर महालांचें अनुकरण सांखळी, काणकोण सारख्या महालांतून होऊं लागलें तर ती जबाबदारी कोणावर येते ? पेडणें, सांगें, केपें व साष्टी या महालांतून महालकमिट्या स्थापन झाल्या व सभासद मिळविण्याचे प्रयत्न होऊं लागले होते ते शिथीलतेनें बंद पडल्यासारखेच झाले आहेत त्या सर्वांस गति देण्याचें काम कार्यकारी कमिटीकडून व्हावयाचें तें व्हावें तसें झाल्याचें ऐकिवांत नाहीं. लहान चक्रांस गति देण्याचें कार्य मोठ्या चक्राकडून झालें तरच इंजिन नियमित रीतीनें चालून मालकास कारखाना सुफलदायी होत असतो. हें जाणून कार्यकारी कमिटीनें अंगावरील आळस झाडून जबाबदारीनें कार्यप्रवृत्त व्हावें व इतरांसहि आपणाबरोबर न्यावें अशीच या वेळीं कोणीहि आशा करील. कार्यकारीकमिटीचे सभासद सूज्ञ, सुविचारी व दूरदर्शी आहेत. मूळ पाया भरल्याशिवाय वरील इमारत रचतां येणें शक्य नाहीं व आडमुठ्याप्रमाणें ती रचली तरी टिकण संभवनीय नाहीं. हें लक्ष्यांत आणून गेल्या नव्हंबरांत कार्यकारी कमिटीनें भरविलेल्या मध्यवर्ती कमिटीच्या सभेंत ठिकठिकाणच्या महालकमिट्या स्थापून नवीन सभासद मिळविण्याच्या उद्योगास लागण्याचा ठराव पास करून घेतला होता. त्याची व्हावी तशी अमलबजावणी झाली नाहीं हें कोणीहि सांगेल. या सर्व उदासीनतेचा व हयगयीचा परिणाम मडगांव कमिटीवर होऊन तिजकडूनहि सभासद मिळविण्याचें व परिषदेची पूर्व तयारी करण्याचें काम घडून आलें नाहीं तर नवल नाहीं. गेल्या डिसेंबरांत परिषद न भरविण्यास बेळगांव काँग्रेसचें निमित्य दाखवितां आलें. पुढील डिसेंबरांत दुसरें कोणतें निमित्त पुढें करतां येईल कीं ज्यामुळें लोकांचीं तोंडें बंद करतां येतील ? यंदाच्या वर्षीं परिषद झाली नाहीं तर लोक कार्यकारी कमिटीवर विशेषतः मडगांवकारांवर दोष ठेवतील. परंतु हा दोष ठेवितांना आपल्या हातून संघाच्या घटणेस अनुसरून कोणती कामगिरी झाली आहे याचा विचार मात्र ते करणार नाहींत. परिषदेसारखें संघाच्या घटनेस अनुसरून होणारें जबाबदारीचें कार्य, त्यास सर्व समाजबंधूंनी हातभार लावला व आपणाकडून योग्य ती कायदेशीर तयारी दाखविली तरच तें उत्तम रीतीनें पार पडणार आहे. संघाच्या हातून हिंदुसमाजाचें हित व्हावें असें पुष्कळांस वाटत आहे व तशी पृच्छा करणारे कांहीं थोडथोडकेच नाहींत. त्या सर्वांनीं पुढें येऊन कार्याचा आपापला वांटा उचलला तर पुष्कळ काम होईल व संघास अवसान येऊन त्याच्या हातून समाजोन्नतीचीं कामें होतील. हिंदु समाजावर मोनार्कीत झालेले अन्याय घालवून देण्याचें पहिलें कार्य हो-

रजा नामंजूर झाली

रा. रा. संपादक 'हिंदु' यांसः—

वि. वि. बऱ्याच उशीरां झालें तरी एक दांचें गेल्या २७–३ च्या अंकांत आपण माझें उत्तर प्रसिद्ध केलेंत, याबद्दल आभारी आहें. प्रुफकरेक्टिंग पूर्वीपेक्षां चांगलें झाल्यानें व्याख्यान प्रसिद्ध होतानां, त्यांत जशा विपर्यासकारक चुका राहिल्या होत्या, तशा त्या यांत राहिल्या नाहींत, ही एक समाधानाचीच गोष्ट आहे.

त्याच अंकांत माझ्या उत्तरावर केलेली संपादकीय टीकाहि वाचली. माझा एकूणएक मुद्दा आपण मोठ्या कौशल्यानें खोडून काढला आहे ! एका दृष्टीनें पाहिलें असतां, झालें तें योग्यच झालें. कारण, एका राजकीय संस्थेस निष्क्रीय बनविणारा आपला संपादकवर्ग व दुसरीला दोषी बनण्यास कारणीभूत झालेला आपला मुद्रकवर्ग, यांच्या दुहेरी माऱ्यांत माझा निभाव कसा लागणार ? मागें जसे आस्किथला चिमटा घेणारे संपादक होते, तसेच ज्ञानकोशकारांना चिमटा घेऊन त्यांना गप्प बसविणारे आपण, नामदार जाइम मोराईस यांचें भाषण पाणक्या स्वयंपाकिणींकडे सोंपविणार आपण; मार्केझ द पोंबाल सारख्या जगप्रसिद्ध मुत्सद्यास मेल्यानंतरहि दीडशें बर्षांनीं चीत करून त्यांची भेदनीति चव्हाट्यावर आणणार आपण; अशांशीं माझ्या सारख्या सांदी कोंपऱ्यांतल्या पोर्तुगेज शिक्षकानें चंग बांधणें म्हणजे मोठें धाडसच खरें ! तरी पण आपण माझें व्याख्यान प्रसिद्ध केल्यामुळें माझी थोडीशी प्रसिद्धी झाली ! शिवाय आपलीं शस्त्रास्त्रें अगदीं नवीं करकरीत व माझें अत्यंत जुनें ! आपल्या त्या नेत्रविध्वंसक शलाका, मनस्संकोचकारी भाले, त्या सांटवणीच्या पाण्याच्या उमळलेल्या विहिरी, त्या गरती, ते तार्तार, तीं स्वत्वें, त्या संस्कृति, त्या जागृति, छे, छे, काय तो त्यांचा भयंकर मारा ! शेवटचें शस्त्र तर अत्यंत भयंकर व अमोघ आहे. असल्या भडिमारांपुढें माझें जुनें पुराणें सत्य टिकणार तरी कसें !

चार शंका राहिल्या आहेत त्यांचें समाधान करून घेण्याकरितां, आपण केलेल्या वारांनीं तळमळत असतानांच, आपणास ही थोडी तसदी देत आहें. या शंकांचें समाधान करण्यापुरतें आणखी थोडेंसें महत्व आपण मज करितां खर्च करा, तेवढ्यानें आपलें महत्वाचें गांठोडें कांहीं एकदम खलास होत नाहीं खास, इतकें तें विविध व त्रिविध आहे.

पाद्रीवादासंबंधानें आपण जें कांहीं लिहिलें तें सि. मिनेझ ब्रागांस यांनीं मारलेल्या कबंधाचे हातपाय नसून उभयतांचे मुद्दे निरनिराळे होते, असें आपण ध्वनित करितां. ठीक आहे; पण आपण यंदांच्या मे महिन्यांत प्रसिद्ध केलेल्या ग्राद्री मंडळाच्या वाढत्या प्रस्थां सारखेच विचार ब्रागांस यांनीं पोर्तुगालांत असतानां व्याख्यानांतून गेल्यावर्षीं देखील मांडले होते. आतां एका एवढीच कीं, आपण पुढें लिहिणार असलेल्या मुद्यांची माहिती त्यांनां आगाऊच कशी झाली ?

चार शतकांपूर्वीचे गामाचे अत्याचार व दीडशें वर्षांपूर्वींची पोंबालची भेदनीति यांचा आमच्यावर जो परिणाम झाला, त्याच्या निरसनार्थ आपण दीड दीड महिना सारखा मंत्रजागर करीत राहिलां व गोसंहाराविरुद्ध केवळ ओझरतें विवेचन केलेंत. आह्मां आर्यांचें स्वत्वसंशोधन व संस्कृतिसंवर्धन करतानां, त्यांतील मधुपकांची चाल लक्ष्यांत आल्यामुळें तर त्यावर आपण आंखडता हात घेतला नसेल ना ? आणि 'मराठीस मत' ह्या विषयाची जागृति एकाच लेखानें झाली असें जें आपण समजतां तें हिंदुसमाजाची उल्लेखित तक्रार मिटली जाईल, असा एखादा संदेश वेद तांतून आपल्याला मिळाल्यामुळें तर नसेल ना ? की हि प्रजेनेंच करावयाचें काम असल्यामुळें आपण केवळ त्याचें दिग्दर्शनच केलें ?

पोर्तुगीज प्राथमिक शिक्षणाविषयीं आपण जे उदासीन दिसतां ते न वदेद्यावनीं भाषाम् या आमच्या पूर्वजांच्या वाक्यानें प्रेरित होऊन तर नसेल ना ? नाहीं तर नव्या काविजादींतल्या पोर्तुगीज शाळांचा झालेला संकोच तर असोच, पण पारोडें, आपली जन्मभूमि. निदान तेथील शाळेच्या उच्चाटना विरुद्ध आपण कांहीं तरी प्रयत्न केला असता. एखादें स्फुट लिहून तें प्रोव्हिंसकारांनां तांबड्या प्रेन्सिलीनें आंखून पाठविलें असतें तर चाललें नसतें काय ? कीं शवराज्याचे तुकडे वारंवार तोडीत राहिल्यानें आपल्याला लूझोफोबिया (lusofobia फिरंगविद्वेष) झाला व त्यामुळें उल्लेखित शाळांविषयीं आपण उदासीन आहां ?

"बजेटाची तपशिलवार माहिती 'हिंदू'नें दिलेली नाहीं" असें आपण कबूल करतां. पण साकल्यानें तरी ती कोठें दिलेली आहे हें आपण सांगितलें नाहीं. अखिल्या हिंदुस्थानांतील वृत्तपत्रें असी माहिती नेहमीं देत असतात याची आपल्याला ओळखच नाहीं काय?

नकाशावांचून व स्थलभागाची माहिती करून घेतल्याशिवाय प्रांत सर करतां येतो हें तत्व आपण प्रस्तुतच्या वाग्युद्धांत अमलांत आणल्यामुळेंच तर माझे मुद्दे खोडून काढणें आपल्याला सुलभ झालें नसेल ना ? आणि बजेट ताब्यांत घेतानां करावयाचे प्रयत्न आपल्या शवराज्यांतच करावयाचे कीं, त्याला दुसरी जागा आहे ? मागें ता. ७–११–२४ च्या अंकांत "...मुसलमान अज्ञ व अशिक्षित ह्मणून आणि खिस्ती समाज शिक्षित पण दिशाभ्रष्ट ह्मणून हिंदूंस राजकीय बाबतींतहि आपल्यापुरतें अगोदर पहावें लागतें असें आपण ह्मटलें आहे. बजेट ताब्यांत घेण्याची बाबत राजकीय आहे. तेव्हां बजेटांतील नोकऱ्यांचा आपला वाटा आपण बळकावण्यापलीकडे तूर्त तरी हिंदूंना आपल्यापुरतें अगोदर कसें पाहतां येतें याचें प्रजेकरतां दिग्दर्शन कराल काय ? की त्याला दुसरी कोणती तोड आहे ?

"ना. जाइम मोराइसच्या भाषणाना पुढें एखादे वेळीं सवडीनुसार आह्मांला विचार करावयाचा आहे, असें जें आपण ता. २१–११–२५ अंकांत ह्मटलें तें देखील प्रजेनें काय केलें पाहिजे याच्या दिग्दर्शनादाखलच कीं, ही एखादी वेळ सवडीनुसार यापुढें शेवयाची आहे ?

आपल्यांतीलच एका तरुण प्रोफेसराला अन्याय झाला हें हिंदूला समजलें. असतांहि ता. १७–१–२५ अंकांत 'जागेवरून कमी करण्यांत आलें आहे' एवढेंच कां प्रसिद्ध केलें ? असल्या प्रसंगीं, अखिल्या हिंदुस्थानांत अपरिचित व्यक्तींवर झालेला जुलूम देखील चव्हाट्यावर आणणाऱ्या एकाहि विहिरीचें पाणी इकडे हिंदुच्या साठवणीच्या पाण्याच्या विहिरींत उमळलें नाहीं काय ? कीं प्रोफेसर साहेब लिसेवांत जातानां स्वत्वशून्य असा फिरंगी पोषाख करतात ह्मणून आपला फिरंगविद्वेष ऊर्फ लूझोफोबिया चाळवला ? अन्याय झाल्याचें सिद्ध करतां येण्यासारखा पुरावा सायसंगीन आहे, असें जें आपण मला भेटींत सांगितलें होतें, तें मी खरेंच आहे असें समजतों. मग तो पुरावा नुसताच तरी कां प्रसिद्ध केला नाहीं ? नकाशाशिवाय प्रांत काबिज करतां येतो व तपशिलवार माहितीशिवाय बजेट हातीं घेतां येतें, व तें देखील मुसलमान समाज अज्ञ व अशिक्षित असताना व खिस्तीसमाज शिक्षित पण दिशाभूलींत सांपडला असतां, एकट्या हिंदुच्यानें घेतां येतें, या तत्वावरची आपली वकीली सरकारांत उपयोगी पडेल कीं नाहीं, या शंकेमुळें तर आपण मौन स्वीकारलें नसेलना ? की जो आपलेपणा राजकीय संस्थानां नसल्याचें आपण ध्वनित करतां त्याचा आपणाकडे आभावच होता ? कीं बजेटाप्रमाणें हेंहि दिग्दर्शनच आहे ?

राजकीय संस्थेच्या निष्क्री तेंतील आपल्या संपादक वर्गाचा वाटा शकारी उत्तरानें विसरला जाईल असें का आपण समजतां ? आज सारखी दीड वर्ष जागृति केली तरी, आपला वाचक उल्लेखित शकारी उत्तरानें फसण्याइतके मठ्ठ राहिल्याबद्दल आपल्या जागृति कार्याच्या निर्बलतेची तारीफ करावी कीं आपल्या वाचकवर्गाची कींव करावयाची? तेव्हां जो काय जरीपुराणा पुरावा असेल तो उजेडात आणा.

" भावनाविषयीं यथास्थित ऊहापोह मूळ स्फुटांतून केलाच आहे ". जें जे कांहीं ह्मणुन सांगावयाचें आहे तें तें सर्व त्या स्फुटांतच सांगितलें आहे ' असें आपण ह्मणतां. मागें बेकी परिषदेच्या वेळीं " माझें जें काय आहे तें यांत आहे " असें ह्मणून आकाशानें तुडुंब भरलेल्या बॅगेकडे बोट दाखविणारी एक व्यक्ति इकडे आली होती. त्याचप्रमाणें गोव्यांतील जुन्या पिढीचे खिस्ती डाक्टर वाटेल त्या विकाराचें औषध एकाच मिक्श्चरांत घातल्याचें तेंऊंव्ह तेतूंतूच घायलां या वाक्यानें पूर्वी सांगत असत. त्यांची यावेळीं आठवण होते. उपरोक्त ब्यागवाल्या व्यक्तींकडून आपण हा उपदेश घेतला कीं, जुन्या डॉक्टरांचीं औषधें घेतल्यामुळें ही युक्ती आपल्या आंगवळणी पडली एवढीच शंका आहे.

या यथास्थित ऊहापोहरूपी सर्वेकषायाची एकेक वाटली जर आपण आपल्या प्रत्येक प्रतिपक्ष्यावर फेंकीत राहिलां असतां, तर मजप्रमाणेंच तेहि चीतच झाले असते.

आपली रेडिमेड चळवळ, प्रजेकरीतां दिग्दर्शन, राजकीय संस्थांचें दोषदर्शन, इत्यादि, नाटकीं असल्यामुळें माझें आव्हान नाटकी वाटलें कीं, शकारी उत्तर देणें सोयीस्कर वाटून तसें द्यावयाचें ठरल्यामुळें आव्हान नाटकीच आहे असें आपण आपल्या मनाला पढवीत आहां ?

या शंकांचें समाधान झाल्याशिवाय आपलें तें स्वतंत्र विचारांचें, आंत केवळ जुन्या पुराण्या चिंध्याच असलेलें खादीचे खोकेवंद पागोटे आपल्या डोक्यावरून उतरूं नका. ज्या जनतेच्या हितार्थ आपण ही जागृति करीत आहां ती जनता देखील मला पुरता चीत केल्याशिवाय आपली ही रजा मंजूर करणार नाहीं.

फिर्यादीच्या वेषानें आपण या नाटकास प्रवेश केला खरा, पण पोंचाहि दिल्याशिवाय माझें उत्तर बरेच दिवस दडपून ठेवून आपण जे प्रगट झालां ते आरोपीच्या पिंजऱ्यांत बचावाची बोबडी बडबड करीत आलां आहां. आतां एक आरोप तरी कबूल करणें किंवा पुरावा पुढें आणून त्यांतून मुक्त तरी होणें हे दोनच मार्ग आहेत. तोंवर रजा मी तर मंजूर करीत नाहींच आणि विषय चोहोंकडून आपल्या पाठीस लागलेलाच आहे. शिवाय अशा मंजूर न केलेल्या रजेला, आपल्या त्या स्वत्वांत व संस्कृतींत पळपुटेपणा(desergao) असें नाव असल्यानें ती आग्रहानें घेणारास खरे सद्गृहस्थ शीलभ्रष्ट (disqualificados) मानून चालते होतात. तेव्हां आपली खात्री बाजूला ठेवून रणांगणीं याल काय ?

ह्मणजे आपल्या स्वराज्याची मीमांसा करतां येईल व स्वत्वाचा आणि संस्कृति संवर्धनाचा डोंगरहि पोखरून काढता येईल. पत्रविस्तार फार झाल्यामुळें विशेष मजकूर पुढील पत्रांत पाहूं. क. हे वि.

आ. नम्र.

बाळकृष्ण वा. सांबडेकर

साभार स्वीकार

लोकमित्र (मासिक):— खानापूर येथें प्रसिद्ध होत असलेल्या या नियतकालिकाची झपाट्यानें होत असलेली प्रगति पाहून कोणत्या साहित्यसेवकाचें अंतःकरण आनंदानें उचंबळणार नाहीं ? अल्प मोलांत भरपूर मजकुरानें वाचकांचीं मनें रिझविण्याचा जर कोणत्याहि मासिकानें निरपेक्ष व यशस्वी प्रयत्न केला असेल तर तो 'लोकमित्रानेंच', असें निर्धोकपणें ह्मणण्यास हरकत नाहीं. इतकेंहि असून शिवाय बक्षीस पुस्तकांचा गोड मेवा दरवर्षी चाखण्याची संधि लोकमित्रकार आपल्या वाचक वृंदांस पुरविल्याशिवाय रहात नाहींतच. रा. सडेकर हे आपल्या मासिकाच्या उन्नत्यर्थ व्यक्त करीत असलेल्या साहसयुक्त धडाडीबद्दल सादर अभिनंदनास पात्र आहेत, हें कोणीहि कबूल करील.

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Redcar, vai á praça para venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige a estação de Sanvordem no dia 21 do proximo mez de Agosto ás dez horas, pela segunda vez e por metade do seu valor, 1/42 do predio da varzea denominado "Betul" da cultura de arroz, sito em Mudcuda de Agonda, avaliado em 100 rupias, discrito na conservatoria desta comarca sob o n ° 16865, e penhorado nos autos de execução de sentença que a Fazenda Nacional move a Gauessa Rama Folo e Omú Rama Folo ambos de Tudol de Gaundongrem, apensos aos de inventario orfanologico procedido por obito de Janqui Dessaina que foi da mesma.

O arrematante pagará a contribuição de Regisro por inteiro e as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaisquer credores incertos e co-proprietarios. O que para ser publico se espediu este.

Xeldem 30 de Julho de 1925

O escrivão de Direito
Babú V. Camotim Redcar

Verifiquei
O Juiz de Direito
R. Colaço

BANCO NACIONAL ULTRAMARINO

Tendo aparecido ultimamente bastantes notas com os dizeres variados escritos á tinta, ou com carimbos das casas comerciaes, previne-se o público para não aceitar notas em taes condições

A partir do fim do mez será recusado o pagamento dessas notas.

बांकु नासियोनाल उल्त्रामारीनु

शाईनें लिहिलेले अनेक तऱ्हेचे शब्द तसेंच अनेक व्यापारी लोकांचे ठशे असलेल्या नोटांचा गेल्या दिवसांमागून बराच प्रसार झालेला दिसून आल्यामुळें, तसल्या नोटा न घेण्याविषयीं लोकानां जाहीर सूचना देण्यांत येत आहे.

चालू महिन्या अखेर उपरोक्त नोटांचा स्वीकार करण्यांत येणार नाहीं.

O BHARAT

SERVIÇOS PUBLICOS E A OPINIÃO PUBLICA

Entre os serviços publicos da colónia ha certos que a opinião pública não cessa de condenar frequentes vezes, sempre que de tal se oferece ocasião, uns por desnecessarios, outros por que se provaram mal na pratica, e alguns por a nossa situação financeira os tornar em luxo na miseria.

A opinião pública está, porem, sujeita a errar. A tirania do maior número, se é um facto, é mesmo, muitas vezes, um facto de consequencias funestas. Quem governa, se tem, portanto, o dever de ouvir pacientemente, tem tambem o direito de estudar serenamente a voz publica, a fim de que fugindo do escolho da ditadura, não vá esfrangalhar-se de encontro a outro pior—o escolho da sujeição passiva á opinião do maior número.

Na classe de serviços desnecessarios o público em geral sempre colocou e ainda coloca o Instituto Comercial, a Repartição das Minas e as Comarcas de Bicholim e Quepem.

Quanto ao Instituto, diz-se que êle só se aguenta porque o seu diploma é motivo de preferencia para empregos públicos e cargos de justiça, tendo-se convertido, pois, em fabrica de *mangas de alpaca*, quando o seu destino era mais elevado qual o de preparar os filhos desta terra para as profissões livres e productivas do comerciante e industrial.

A Repartição das Minas já não encontra justificação para ser mantida. Com a baixa, quase extincção, da *febre* das minas era natural que esta repartição fôsse abólida, passando as suas atribuições para uma secção qualquer das Obras Publicas.

As comarcas de Quepem e Bicholim, segundo consta, não tem movimento para legitimar o gasto que o Estado faz com a sua conservação. Houve no Conselho Legislativo um projecto reduzindo as mesmas comarcas á categoria de Julgados Municipais pelo tipo de Julgado Municipal de Mormugão.

Entrando agora nos serviços úteis em tese, mas que pouco dão na pratica, vêm-se a Caixa de Credito Agricola, a Direcção Agricola Florestal e a Repartição de Agrimensura.

A caixa de Credito, da forma como foi lançada, apezar dos panegiristas fala-se que só presta um serviço, o de arrecadar as contribuições e pagar aos empregados que lá trabalham. A ser isto assim urge a sua extincção, creando-se um serviço de crédito mais consentaneo com o feitio da população e mais accessivel. As comunidades, dizem, seriam uns excelentes meios para a montagem da maquina do crédito agricola no pais sem nenhum encargo ao Estado.

A Direcção Agricola Florestal é para a opinião pública o maior e o pior cancro que arruina as finanças do país. As necessidades do progresso da agricultura dispensam um serviço tão pomposo, mas tão ôco e improdutivo. Os trabalhos de investigação original são deslocados em Goa. Aqui nem ha dinheiro para tanto nem as possibilidades economicas e a extenção territorial tal justificam. Nós podiamos contentar-nos com uma secção de propaganda agricola dirigida por um tecnico agricola, formado na India-Inglesa, cuja funcção seria divulgar no pais pela imprensa e por meio de demonstrações práticas o que de util e adaptavel para as terras se faz na India-Inglesa, que embora seja Inglesa, é tambem India com os seus problemas agricolas em muitas zonas que são em tudo iguais aos nossos.

A Repartição de Agrimensura é de mais. Alguns poucos agrimensores constituindo uma secção das Obras Publicas faziam face ás necessidades do serviço. Tudo è util, tudo é indispensavel mas não convem perder, porisso, o sentido da relatividade. Como nos é possivel copiarmos modelos de França etc.?

Finalmente temos o Liceu Central, a Escola Normal e os Governos Distritais que são incontestavelmente um verdadeiro luxo na misèria.

O Liceu Central pelos beneficios, se alguns, o nosso paiz dele tira, não tem razão de subsistir, sendo urgente a sua redução a Liceu Nacional como dantes. E' verdade que ele habilita os alunos para imediatamente se matricularem nas escolas superiores da Metropole. Para tanto, porêm, a despesa que a elevação acarreta é grande. E depois não é tempo ainda de pôr um piqueno dique á corrente desordenada dos estudantes da India para escolas de Portugal? Milhor não seria economisar no ensino secundario daqui e com uma parte do dinheiro assim apurado subsidiar na Metropole uns poucos, 3 ou 4, estudantes merecedores pelo seu talento e aplicação deste auxilio oficial? Era preferivel sem duvida. Seriam poucos; mas capazes de nos honrar lá fóra. Acabava-se com a situação vergonhosa dos nossos estudantes em Portugal como a que hoje se observa. Quanto á milhor preparação para a Escola Médica que o Liceu Central dizem proporcionar, havia o recurso da creação de um curso preparatorio de um ano anexo á Escola Medica como existe na França, ensinando a quimica, fisica e sciencias naturais.

A Escola Normal, como todos sabem, ministra um ensino geral e um ensino tecnico. O geral é compreendido no programa do nosso Liceu até a 5 classe—e o especial ou tecnico consiste na cadeira de pedagogia e trabalhos manuais. Podia se, pois, extinguir a Escola Normal e crear anexo ao Liceu um curso onde se ministrasse o ensino tecnico para a habilitação a candidatos a professor primario que já possuissem o diploma da passagem da 5 classe do Liceu.

Os Governos Distritais tem uma justificação — o nosso passado historico. Esta, todavia, não é razão bastante para gastar em pura perda milhares de rupias. Depois manter funcionarios nas Praças de Norte, cercados de extrangeiros por todos os lados, e não lhes dar a representação condigna, coisa que não podemos dar sem passarmos por perdularios, é antes compr.meter o passado que desejamos vêr honrado.

E' isto o que, em breves palavras, constitui a opinião pública do pais sobre certos serviços.

Como dissemos, sobre a opinião publica é preciso agora que incida a atenção do Governo a fim de, em ultima analise, se apurar o que ha de verdade, o que ha de fundamentado, o que ha de justificavel em tudo o que a respeito da utilidade ou inutilidade dos serviços visados por aí se diz á boca cheia.

Nós, oportunamente, quando se nos sobrar tempo, iremos bordando as nossas considerações, fornecendo os elementos que nos pareçam de valor, pro ou contra a necessidade de cada um dos serviços condenados pela vóz publica.

Em todo o caso seria de grande vantagem, porem, que o Governo desde já escolhesse uma comissão de umas tres pessôas de seriedade, patriotismo e competencia reconhecida para procedendo a uma investigação e estudo rigorosos, emitir, dentro do determinado tempo, o seu parecer sobre os assuntos em questão.

Entretanto, está claro o sr. Governador Geral sustava e pedia ao sr. Ministro das Colonias para pôr de parte temporariamente todos os projectos referentes a estes serviços pendentes da resolução da Metropole e demais medidas tendentes a crear quaisquer direitos adquiridos, como a nomeação difinitiva do pessoal etc.

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार भाद्रपद कृ० १ दा शके १८४७

गुरुवर्य डॉ. भांडारकर

परमपूज्य डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकर यांस ता. २५ रोजीं देवाज्ञा झाली. हें कळवितानां आह्मांला फार वाईट वाटतें. डॉ. साहेबांचा जन्म १८३७ सालीं झाला. मरणाच्या वेळीं त्यांचें वय ८८ वर्षाचें होतें. ते दीर्घायुष्य भोगूनच मेले. असें दीर्घायुष्य हिंदु पुढाऱ्यांच्या वांट्याला थोड्याच जणांच्या आलेलें असेल. अलीकडे त्यांची प्रकृति बरोबर नव्हती. तशांत त्यांचेवर थोडक्याच दिवसांपूर्वी पुत्रशोकाचा जो प्रसंग आला त्यामुळें त्यांच्या प्रकृतीवर परिणाम झाला असणें साहजिक आहे.

डॉ. भांडारकर पुष्कळ दृष्टीनीं हिंदुस्थानाला आदर्शभूत होते. संस्कृत भाषेंतील पारंगत विद्वान, प्राच्य विद्येचें संशोधन करणारे, समाज सुधारणेच्या नव्या युगाला जन्म देणारे, अशा अनेक दृष्टीनीं त्यांचा दर्जा फार मोठा होता.आणि ह्मणूनच ह्यांतींत केलेलें स्मारक पहाण्याचें भाग्य त्यानां लाभलें. त्यानीं प्राच्य विद्येच्या संशोधनाकरितां किती परिश्रम केले याची कल्पना करणें सुद्धां अशक्य आहे. निरनिराळ्या ताम्र लेखांचा त्यानीं अर्थ लावून त्यांच्या माहितीनें अमूल्य व शोधक असे लेख लिहिले. याबद्दल त्यांची हिंदुस्थानांतच नव्हे तर युरोप खंडांत सुद्धां ख्याति झाली व इंग्लड, जर्मनी, फ्रान्स, इटली, रशिया, जेथें जेथें प्राच्य विद्येचें संशोधन करणाऱ्या मंडळ्या आहेत त्या सर्वांनीं डॉ. भांडारकर ह्यांस आपले सभासद करून घेतलें.

प्राच्य विद्येचें संशोधन करण्याचें बीज डॉ. भांडारकर यानीं पेरलें व त्याचा फार थोरला वृक्ष झालेलाहि त्याना पहातां आला. आज हिंदुस्थानांत या कार्याकडे अनेक विद्वान परिश्रम करीत असून प्राच्य विद्या परिषदहि भरत आहे. डॉ. भांडारकर यांच्या ८० व्या वाढदिवशीं ह्मणजे १९१७ सालीं "भांडारकर प्राच्य विद्यामंडळ" ह्या नावांची संस्था स्थापन करण्यांत आली व निरनिराळ्या ४० विद्वानानीं त्या विषयावर लेख लिहून तो ग्रंथ त्यांना अर्पण करण्यांत आला. या ग्रंथांत युरोपांतील विद्वानानीं सुद्धां लेख लिहिलेले असून त्याची योग्यता फार मोठी आहे. डॉ. भांडारकर यानीं आपला सर्व ग्रंथसंग्रह या संस्थेस दिलेला आहे. संस्कृत हस्तलिखित पोथ्यांचा संग्रह असणारी जगांतील ही तिसरी संस्था आहे असें ह्मणतात. यांत २३ हजार हस्तलिखित पोथ्या आहेत. त्यानीं लिहिलेले 'दक्षिणचा इतिहास व शैव वैष्णव मतांचा इतिहास' हे दोन ग्रंथ अत्यंत महत्वाचे असून त्यांच्या विद्वत्तेची व संशोधनाची साक्ष देणारे आहेत.

समाजसुधारणेकरतांहि त्यानीं केलेले परिश्रम अत्यंत मोठे आहेत. समाज सुधारणा झाल्याशिवाय राजकीय उन्नति होणें शक्य नाहीं. असें त्यांचें ठाम मत होतें. सुधारकांच्या बोलण्यांत व कृतींत मेळ नसतो असा कित्येकांचा आरोप असतो; परंतु डॉ. भांडारकर यानां मात्र या निंदकांना नांव ठेवतां आलें नाहीं. ते जें लोकानां सांगत तसेंच स्वतः आचरणांत आणीत. प्रौढविवाह, विधवाविवाह, जातिभेदाची अनिष्ठता परदेशगमन, अत्यंज्योद्धार या सर्व बाबतींत त्यानीं कृतीनें उदाहरण घालून दिलेलें आहे. इ.सन १८७० सालीं पुण्यास जो शंकराचार्यासमोर विधवा विवाहावर वाद विवाद झाला, त्यावेळीं आपल्या तर्फेच्या पंडितानां शास्त्राधार व मुद्दे सांगण्यांचें काम डॉ. भांडारकर यांच्याकडे होतें. एकंदरींत समाजसुधारणेकरतां त्यानीं फारच परिश्रम केलेले आहेत, यांत शंका नाहीं.

डॉ. भांडारकर हे १८७३ सालीं प्रार्थना समाजाचे सभासद झाले. व तेव्हापासून त्यानीं लेखानीं व व्याख्यानानीं समाजाच्या तत्वांचा प्रसार केला. त्यांच्या व्याख्यानाचा जो संग्रह प्रसिद्ध झालेला आहे त्यावरून त्यांच्या आत्मिक तेजाची साक्ष पटते. हा ग्रंथ ह्मणजे एक दैवी संपत्तीच आहे. या ग्रंथांतील कोणतेंहि पान काढून त्यांतील कोणताहि प्यारा वाचला तरी अंतःकरण भक्तीनें उचंबळून गेल्याशिवाय केव्हांहि रहात नाहीं. ईश्वरावर त्यांची अगाध भक्ती व अत्यंत प्रेम होतें. ते आधुनिक काळांतील एक संत होते. मनाला पटणारी "ईश्वर विषयक ज्ञान" याची चर्चा या ग्रंथांत फारच उत्तम रीतीनें केलेली आहे. हा ग्रंथ इतक्या योग्यतेचा आहे कीं, महाराष्ट्रांत आज या ग्रंथाचीं सुशिक्षित विद्वानांकडून पारायणें होत आहेत. आपल्या गोमांतकांतल्या लोकांनीं ज्यानीं हा ग्रंथ वाचलेला नसेल त्यांनीं अवश्य वाचावा अशी आह्मी जोराची शिफारस करतों.

एकंदरींत डॉ. भांडारकर हे केवळ सारस्वत जातींत जन्मलेलेच सारस्वत नसून सरस्वतीचे खरेखुरे पुत्र सारस्वत होते. या थोर व परमपूज्य गुरुवर्यांच्या चरित्राचें विवेचन लिहिण्याचें एका लेखकानें पतकरलें असून तें भारतांत प्रसिद्ध होईल. शेवटीं त्यांच्या चरित्रापासून आपण शक्य तो बोध घ्यावा व ईश्वराकडे त्यांच्या आत्म्याला शांति देण्याबद्दल प्रार्थना करावी अशी आह्मीं आमच्या वाचकांना शिफारस करून त्यांचें पुण्यस्मरण समाप्त करतों.

स्फुट विचार

कौंसेल्यु लेजिस्लातीव्ह :— गेल्या आगष्ट माहेच्या ११ तारखेस प्रहिल्यांदा गव्हर्नरसाहेब कौंसेल्यु लेझिस्लातीव्हच्या बैठकीच्या अध्यक्षपदारूढ झाले. आजपर्यंत दीड दोन महिल्याच्यां अवधींत सिं. मार्तीस यानीं दिलेले निकाल व सोडलेले हुकूमनामे पाहून त्यांच्याविषयीं पूज्यबुद्धि बाळगणारे पुष्कळ लोक त्यादिवशीं गव्हर्नरसाहेबांची तोंडओळख व कामपारख करण्यासाठीं दरबारी दिवाणखान्यांत जमले होते. राज्याची घडी बसविण्यांत गढून गेलेले प्रांताधिपति दुरुस्ती, निरुपयोगी खर्चाची छाटाछाट, योग्य स्थानीं योग्य प्रकार, इत्यादि गोष्टींमुळें थोड्याच कालांत इतके लोकप्रिय झाले आहेत कीं त्यांची कौं. लेझिस्लातीव्हांतील प्रत्यक्ष कामगिरी पाहण्यासाठीं गेलेल्या लोकांनीं तो दरबारी दिवाणखाना चिकार भरून गेला होता. अपेक्षेप्रमाणें प्रत्येक विषयाची विवेचनात्मक विल्हेवारी लावण्यांत गव्हर्नर साहेबांची राज्यकारभार प्रवीणता दिसून आल्यामुळें त्याच्याविषयीं लोकांच्या मनांत असलेला सहानुभूतीचा ग्रह झाला. पोर्तुगीज हिंदुस्थानास विपर्यावस्था येण्यास ज्या ज्या व्यक्तींचा अचाट स्वार्थ, बेपर्वा, अन्याय एकवटले, ती विपन्नावस्था सुधारण्याची सुरवात त्या व्यक्तींच्या लुप्तप्राय होण्याबरोबरच होत चालली असें ह्मणण्यास जागा आहे.

सुरवातीची सलामी :— प्रजापक्षानें निवडलेल्या सभासदांस पहिल्या प्रथम थोड्याच शद्वांत सलामी देऊन, त्यांपाशीं आपणास पोर्तुगेज हिंदुस्थानच्या हितसंवर्धक अशा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष बाबींत साह्य देण्याची विनंति करतानांच तें साह्य कळकळीचें असावें अशी त्यांस बजावणी केली. कौंसेल्य लेझिस्लातीव्हच्या साह्याशिवाय, पो. हिंदुस्थानच्या महत्वाच्या बाबींसंबंधीं योग्य ठराव घेऊन, त्यांचा हितसंवर्धक प्रकारें निकाल लावण्यास, एकटा गव्हर्नर असमर्थ आहे असेंहि सिं.मारीयानु मार्तीस यानीं सांगितलें. नंतर त्यानीं सांगितलेल्या गोष्टी ह्मटल्या ह्मणजे इकडील राज्यकारभार हातांत घेतल्यापासून ह्या राज्याची आर्थिक अवनति सुधारण्यास तनुमनधनानें ते कसे झटतात; सरकारी तिजोरीचा भयंकर तुटवडा ह्मणजे, त्यांस सर्व इतर प्रकार सुधारणें किती क्षुल्लक स्वरूपाचें वाटतें; आर्थिक उन्नति करण्याचा हा त्यांचा उत्कट हेतु साध्य करण्यास सर्वस्वाचा वेंच करण्यास ते किती तत्पर आहेत पण हें सर्व सिद्ध होण्यास कौंसेल्य लेझिस्लातीव्हच्या साह्याची त्यांस किती अपेक्षा आहे; असें सांगताना, त्यानीं बजावून सांगितलें कीं विशुद्ध नीतीच्या व कडक कायद्याच्या टप्यांत येणाऱ्या तेवढ्याच गोष्टी कौंसेल्याच्या पुढें चर्चेसाठीं आणल्या जातील. आणखीहि गव्हर्नरसाहेब ह्मणाले कीं, प्रजापक्षीय सभासदांची मातृभूमि अशी ही पोर्तुगीज इंडिया त्यांस.पोर्तुगालचा एका भागासारखी वाटते. ह्या सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करून पोर्तुगीज हिंदुस्थानची हितसमृद्धि होण्यासाठीं जे जे ठराव सभासदांस आणावेसे वाटतील ते ते नीतिशुद्ध व कायदेशीर ठराव त्यानीं अलबत पुढें आणतांना आपली त्यांस पूर्ण सहानुभूति असेल ह्याबद्दलची खात्रीं बाळगावी असें सांगून आपलें सलामीचें भाषण संपविलें.

गव्हर्नर साहेबांचा मन मोकळेपणाः— गव्हर्नर साहेबांच्या सुरवातीच्या भाषणानंतर आभार प्रदर्शनार्थ सगळ्या प्रजापक्षीय सभासदांच्या तर्फेनें, त्यांत वडील ह्मणून दो. सालिस् द आंद्रादि यांनीं भाषण करून सिं. फेरेर पेस्तान व ज़ोआकीं माशादु यांसारखे कर्तबगार व लोकप्रिय गव्हर्नर व्हावें व त्यांच्या पंक्तींत आपलें नांव शोभविण्यास झटावें अशी सिं. मारियानु मार्तीस यांस सूचना केली. दो. आंद्रादि यांस प्रत्युत्तर देतांना गव्हर्नरसाहेब ह्मणाले कीं, आपणा सर्वसाधारण माणसा प्रमाणेंच मी एक माणूस असून, इंग्रजांप्रमाणें स्वतःच्या इच्छेस पुष्कळ दिवसांपासून ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न करण्याची दक्षता राखिली आहे· ह्मणून स्वभावास योग्य वळण लावणें सुलभ होऊन, निश्चित ध्येय गांठण्यास ठराविक स्थळीं जाणें सुकर होतें. आपल्या मतें जो एकच मुख्य हेतु तूर्त वास करीत आहे तो हाच कीं, कोणत्याहि दिशेनें झालें तरी पो. हिंदुस्थानचें हित करावें आणि तो हेतु तडीस नेण्यासाठीं, आपलें शक्तिसर्वस्व धडाडी, दीर्घोद्योग यांचा उपयोग करण्यांत येईल. या उपर, इकडे तिकडे विचार परिभ्रमण करून गव्हर्नरसाहेब ह्मणाले कीं, प्रांताधिपतित्वाचा हुद्दा केवळ मिजासीखातर स्वीकारला नसून, रुपये सांठविण्यासाठीं हिंदुस्थानांत आगमन केलें नाहीं कां कीं, आजवर वसाहतविषयक अधिक जबाबदारीचे हुद्दे चालविल्याकारणानें आपण अलिप्त असल्याचें व आपली सांपत्तिक स्थिति गोव्याच्या संपत्तीवर अवलंबून नसण्याइतकी सुव्यवस्थित असल्याचें सांगून, वरील दोनहि मुद्यांचें समर्थन केलें. रेपुब्लिक सरकारनें भाग पाडल्यामुळेंच त्याच्या खुषीस मान देण्याकरितां गव्हर्नरी हुद्दा स्वीकारणें अत्यंत आवश्यक झालें. अशा प्रकारें प्राप्त झालेल्या परिस्थितींत आपणांवर सोंपविलेला कार्यभाग प्रामाणिक रीतीनें पार पाडण्यासाठीं उद्दिष्ट हेतु दृष्टीसमोर ठेवून सरळ जाण्याचा मार्ग स्वीकारण्यांत येईल· गव्हर्नर साहेबांनीं असें देखील बोलून दाखविलें आहे कीं, त्यानीं इकडे केलेल्या कांहीं सुधारणाबद्दल बरेंच लोकमत त्यांस धन्यवाद देत आहे. व ज्यांस त्याच्या सुधारणा नुकसानकारक झाल्या ते असंतुष्ट असले तरी त्यांच्या मताची गव्हर्नर साहेबांस पर्वा वाटत नाहीं. कारण कीं, हुद्याची अमलबजावणी करितांना व्यक्तींकडे व आजूबाजूस पाहिल्याशिवाय, सार्वजनिक हितातच त्यांची नजर एकवटते.

— डॉ. सर रामकृष्ण गो. भांडारकर यांच्या दुःखप्रदर्शनाकरितां ज्ञानप्रसारक संघातर्फे रा. पुरुषोत्तम विष्णु करपे यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरून रा. काशीनाथ ना. धारगळकर यानीं मांडलेला दुःखवट्याचा ठराव सर्वांनीं उभें राहून पास केला व नंतर रा. सीताराम ग. मणेरकर यांनीं योग्य असें भाषण केलें.

अनाठायीं वकिली

आदव्होगाद ज. ष. मळकर्णेकर ह्यांनीं 'भारत'पत्राच्या मागील तीन अंकीं निरनिराळ्या तडफदार अशा मथळ्यांखालीं तीन लेख लिहिले आहेत.ह्यांत मुख्यतः 'हिंदु' पत्राच्या कांहीं विवेचनाविरुद्ध मजकूर असून अवांतर प्रतिपादनहि केलेलें आहे. खुद्द हिंदुकर्त्यांनीं ह्या लेखांची एक लेखणीचा ओझरता फटकारा फिरविण्यांपलिकडे वास्तुपुस्त केलेली दिसली नाहीं. त्याचें कारण काय असावें तें मी पुढें सुचविलें आहे. माझ्यामतें ह्या लेखांची थोडीशी छाननी करणें गैर होणार नाहीं. आणि ती मी एक दोन लेखांत करूं इच्छित आहें.

मळकर्णेकर व हिंदु

जीं 'हिंदू'चीं दोन विधानें आ. मळकर्णेकर ह्यांना आक्षेपार्ह वाटून त्यांनीं 'नोकरी कां करावी' हा आपला पहिला लेख लिहिला आहे त्यांतलें पहिलें विधान पाहतां नोकरीची एवढी वकिली करण्याचें कारण काय तेंच समजत नाहीं.कारण, मूळ विधान असें आहे. "सरकारी नोकऱ्या हेंच आमचें राजकारण, सरकारी नोकऱ्या हेंच आमचें आद्यकर्तव्य, सरकारी नोकऱ्या हेंच आमचें सद्यकार्य असा जो उपदेश करण्यांत येतो तो आमच्या समाजाला कितपत हितकारक आहे ह्याचा विचार करणें अवश्य ठरतें." ह्या विधानांत नोकरी ह्याचा अर्थ मळकर्णेकर ह्यांनीं आपल्या लेखांत ताणल्याप्रमाणें व्यापारी नोकरी, शेतीची नोकरी अशा सर्वव्यापी घेतलेला नसून ती फक्त सरकारी नोकरी एवढ्याकरतां घेतला आहे. बरें, सरकारी नोकरी ह्मटलें आहे त्यांतहि प्रत्यक्ष सरकारी नोकरीवर कटाक्ष मुळींच नाहीं. तर सरकारी नोकरींतच जे, साऱ्या राजकारणाचा, साऱ्या आद्यकर्तव्यांचा, साऱ्या सद्यकर्तव्यांचा, संकोच करूं पाहतात त्यांच्याविरुद्ध कटाक्ष आहे. अर्थात, नोकऱ्यांपलीकडे राजकारण, आद्यकर्तव्य व सद्यकर्तव्य हीं शिल्लक राहतात असें सांगण्याचा लेखकाचा उघड हेतु आहे. आणि 'हिंदु'तील पुढील प्रतिपादन पाहतांहि, ह्या नोकरींतच विश्व पाहणाऱ्या मताविरुद्धच त्याचा रोख स्पष्ट दिसत आहे. अर्थात नोकऱ्यांवर बहिष्कार घाला असें 'हिंदू'नें प्रतिपादल्याचा विपर्यास जो आ. मळकर्णेकर ह्यांनीं केला आहे त्याला आधार कांहींच नाहीं. 'हिंदू'च्या एकंदर प्रतिपादनाचा निष्कर्ष असा निघतो कीं, केवळ नोकऱ्या पटकावित गेल्यानें आपलीं राजकीय ध्येयें साध्य होणार नाहींत. त्याला त्याव्यतिरिक्त स्वतंत्र व्यक्तींची न स्वतंत्र चळवळीची आवश्यकता आहे. आणि समाजानें नोकरीतच सर्व कांहीं आलें असें मानल्यास तें कार्य करायाला कोणाला सवड किंवा त्याहून आवश्यक असें स्वातंत्र्य हें राहणारच नाहीं. नोकऱ्यांवर बहिष्कार पुकारण्याचें धोरण जर 'हिंदू'ला असतें तर त्यानें अलिकडेच प्रो० पाळंदीकरांच्या सक्तीच्या राजीनाम्याविरुद्ध, किंवा मागें कांहीं दिवसांपूर्वीं, हिंदु पोर्तुगीज शिक्षकांना नवीन होऊं घातलेली शिक्षणखात्यांतील नोकरांत स्त्रियांना प्राधान्य देण्याच्या कलमाविरुद्ध जी तक्रार केली होती ती किंवा तत्सदृश्य टीका त्यानें केली नसती.

एकंदरींत ह्या महत्वाच्या मुद्याच्या बाबतींत मळकर्णेकर ह्यांनीं मूळ प्रतिपादनाचा, [कदाचित् पूर्वग्रहदूषितपणामुळें] विपर्यास केला आहे आणि त्यामुळेंच 'हिंदू'ला त्यांची उपेक्षा करणें हेंच रास्त वाटलें असावें. खरें पाहतां 'हिंदू'नें जें प्रतिपादन केलें आहे तें अभूतपूर्वही नाहीं. त्याहून अधिक जोरदार अशी विचारसरणी खुद्द 'भारता'नें आपल्या अलिकडच्या एका अंकांतील स्फुटांतून प्रगट केलेली आहे. राजकीय ध्येय संपादनाच्या बाबतींत नोकऱ्यांचें वैयर्थ्य किंवा अल्पसामर्थ्य एवढेंच 'हिंदू'नें प्रतिपादन केलें असेल. परंतु, व्यक्तिध्येय ह्या दृष्टिनेंहि त्याला 'नोकरीचें वेड' ह्या नावांनें अनेक पत्रकारांनीं पूर्वी हेटाळलेलें आहे. परंतु असें असतांहि त्याचेंच महत्व वाढविण्याचें काम केलें जातें व त्याला व्यक्तिध्ययेवरून समाजध्येयावर चढविलें जातें ह्यावरून, ह्या बाबतीत अजून बरीच जागृति व्हावी लागेल असें दिसतें. कारण, राजकीय किंवा सामाजिक कार्याला वाहून घेणारीं माणसें तर सोडाच, पण स्वतंत्र उद्योगधंदे व कारखाने ह्यात पडणारीं माणसेंहि सुशिक्षितांत आढळत नाहींत. उच्च शिक्षण व सरकारी नोकरी ह्याचा तर जणुं अभेद्य संयोगच आहे. तो एवढा कीं, एका खिस्ती लेखकानें 'इंदिय पोर्तुगेजीं'त ह्मटल्याप्रमाणें, पोर्तुगालहून उच्च शिक्षण घेतलेला पण नोकरीच्या वेडींत न अडकलेला असा मनुष्यच गोव्यांत परत आला नाहीं. ही स्थिति अनिष्ट आहे. अत्यंत उच्च शिक्षण संपादावें व लोककार्याला वाहून घ्यावें असें एक तरी उदाहरण घडल्यावांचून समाज उदयोन्मुख झाला असें ह्मणतांच येणार नाहीं.

नोकऱ्या व स्वराज्य

नोकऱ्या व स्वराज्य ह्याचा मळकर्णेकर आदव्होगाद ह्यांनीं जुळवलेला जन्यजनक संबंध नीट जुळणारा नाहीं. त्यांची स्वराज्याची कल्पनाच तसा संबंध जुळवायाला कारण झाली असावी. 'राजाचा तावेदार ह्मणून सरदारी करणारा अमलदारच पुढें राज्य स्थापतो' ह्याचा दाखला त्यांनीं स्वराज्य संपादन ह्या अर्थी दिला आहे. पण हा दाखला ह्या बाबतींत गैर लागू दिसतो. एखाद्या अमलदारानें आपल्या राजाचें राज्य ताब्यांत घेणें ह्मणजें 'स्वराज्य' स्थापणें नव्हे, तें फक्त मूळचा राजवंश (dinasty) बदलणें होय. त्याचप्रमाणें त्यानें त्या हुशारीवर मुलुखगिरी करून राज्य कमाविणें ह्मणजेहि त्यानें आपल्या लोकांला 'स्वराज्य' मिळविणें असें नव्हे, तें फक्त त्याठिकाणीं राजवंश बदलणें होय. मळकर्णेकर ह्यांनी दिलेला संस्थानांचा दाखलाहि ह्या बाबतींत बरोबर नाहीं. कारण संस्थानांतून स्वराज्य नाहीं. जेथें राज्यकारभारांत प्रजेचें तंत्र नाहीं तेथें स्वराज्य नाहीं अशी स्वराज्याची व्याख्या आहे. जी प्रजा आपल्या राज्यकारभारावर पूर्ण नियंत्रण चालविते ती प्रजा स्वराज्योपभोगी होय. राज्यकारभार नियंत्रण चालविण्याइतकी प्रजा समर्थ करणें ह्याचेंच नांव स्वराज्याची तयारी करणें. प्रजेचें नियंत्रण राजकारभारावर पडण्याकरतां प्रजेंत राजकारभारांत गुंतलेल्यांपेक्षां समर्थ, निष्णात व स्वावलंबी माणसें पाहिजेत. इंग्लंडादि स्वराज्योपभोगी देशांतून अशीं माणसें पुष्कळ असतात व ह्यांचेंच प्रजेच्या वतीनें राजकारभारावर नियंत्रण असतें. हीं माणसें स्वराज्य चालविण्याचें शिक्षण स्वराज्यें चालवून मिळवित असतात. स्थानिक स्वराज्य संस्था ही लहान लहान स्वराज्यें होत. जेथें ह्या स्थानिक स्वराज्य संस्था कार्यक्षम आहेत तेथेंच वरिष्ट स्वराज्यसंस्था कार्यक्षम असतात. आणि जेथें अशा स्वराज्य संस्थांच्या मतानें कारभार चालतो तेथेंच स्वराज्य आहे असें समजावें.

आपल्या प्रांतांत पुष्कळ काळापासून स्वराज्य नाहीं. ह्मणजे प्रजेच्या नियंत्रणानें राज्यकारभार नाहीं. त्यामुळें तसा राजकारभारावर नियंत्रण चालविणारा घटक (element) अस्तित्वांतून नष्ट झाला आहे. त्याऐवजी राजकारभारांतील नेमून दिलेली कामगिरी करून कमजास्ती मुशाहिरा मिळविणारा वर्ग मात्र हळुहळू विस्तार पावलेला आहे खरा. पण त्याचें काम मुख्यतः आपला मुशाहिरा वाढविणें व आपल्या वारसानां हा मुशाहिरा मिळवून देणें असें आहे. हें काम स्वराज्यसंस्थेपासून भिन्न आहे. व सुराज्यालाहि तें उपयोगी नाहीं.कररूपानें प्रजेपासून काढलेला पैसा प्रजोपयोगी कामांकडे न लागतां तो सर्व मुशाहिऱ्यांत गडप होण्यांची परिस्थिति त्या योगानें उत्पन्न होते. कर देणाऱ्यांचें नियंत्रण कर घेणाऱ्यांवर असल्यावर ही परिस्थिति बदलते ही परिस्थितीची बदल ह्मणजेच स्वराज्य होय.

ही परिस्थितीची बदल घडवून आणण्याकरितां कर भरणाऱ्यांच्या तर्फेनें कर घेणाऱ्यांकडे जाब मागणारीं माणसें निर्माण झालीं पाहिजेत. हा जाब त्या करांतून मुशाहिरा घेणारीं माणसें मागूं शकत नसतात. तसें ह्मणणें ह्मणजे इंजिनांतल्याच खिळ्यानें इंजिनाकडे जाब मागण्यासारखेंच आहे. इंजिनाला ड्रायव्हर वळवूं शकेल. इंजिनांतला केवढाहि मोठा बंब असला तरी तो वळवूं शकणार नाहीं.

आपल्या खिस्तीसमाजांत आजपर्यंत मुशाहिरा घेणारे फार झाले आहेत. आणि त्या योगानें एकंदर मुशाहिरा घेणाऱ्यांची संख्या वाढत गेलेली आहे, व मुशाहिराहि वाढत गेला आहे, एवढेंच. परंतु, त्या मानानें जाब विचारणारे निर्माण झालेले नाहींत. ह्मणजे स्वराज्योपयोगी घटक निर्माण झालेला नाहीं. नोकरशाही फुगाविणारा वर्ग पुष्कळ वाढला असून तिच्यावर नियंत्रण चालवूं शकेल, ह्मणजे आपल्या मताप्रमाणें, तिच्याकडून करांचा पैसा प्रजोपयोगी कामाकडे लावूं शकेल, असा वर्ग निर्माण झालेला नाहीं. आणि हीच त्यांची स्वराज्याला नालायकी आहे. ब्रिटिश इंडियांत नोकरीपेशांत सर्वांत गुंतलेला जो युरोपियन वर्ग तोच, त्याचकारणानें, आतां स्वराज्याच्या अंधुक उदयांत दिशाभित झालेला आहे. स्वराज्याची पहिली कामगिरी ह्मणजे सरकार तिजोरीरूपी शेताला आवश्यक तेवढेंच कुंपण ठेवून निरर्थक वाढलेलें व शेतच खाऊन टाकणारें कुंपण कापून टाकणें ही होणार आहे. अर्थात ज्यांचा चरितार्थ ह्मणजे हें वाढलेलें कुंपण त्यांना तो स्वराज्याचा काल लांबणीवर जाणें हेंच इष्ट वाटणार आहे. आपल्या खिस्ती समाजाची स्थिति काहींशी तशीच आहे. त्यांच्यांतला उच्च वर्ग हा ह्या नोकरशाही रूपी कुंपणांत चरितार्थ चालविणारा असल्यावरून एक तर स्वराज्य ह्याचा अर्थ तो हें वाढतें कुंपण असाच करील, किंवा तसा न केल्यास ह्या कुंपणाला कातर लावणारें स्वराज्य जितकें दुरावेल तितकें दूर ढकलील.

आपल्या हिंदु समाजांत, जो स्वराज्योपयोगी घटक, खिस्त्यांत नाहीं तो निर्माण करणें हें नोकरपेशी घटक निर्माण करण्यापेक्षां अधिक जरूरीचें आहे. खुद्द पोर्तुगालांतहि स्वराज्योपयोगी घटक कमी आहे. आणि त्यामुळेंच राज्यकारभार हा मोंगलाईच्या अखेरीला ज्याप्रमाणें घडीघडी प्रधानकी बळकावणाऱ्या इसमाकडून हांकला जात होता त्याप्रमाणेंच हांकला जात असून; बहुसंख्याक प्रजेचें वतन त्या कारभारावर पडलेलें दिसत नाहीं. ब्रिटिश इंडियांत स्वराज्योपयोगी घटक नुकताच निर्माण होत आहे. व तो राज्यकारभारावर आपलें वजन पाडूं लागला आहे. आह्मां गोमांतकांतील हिंदूंना राज्यकारभारावर नियंत्रण पाडणारा घटक निर्माण करण्यांत खिस्त्यावर सरशी केली पाहिजे. कदाचित हें काम त्यांच्यापेक्षां आमच्या लोकांकडूनच अधिक होणार आहे. फक्त आमचें ध्येय मात्र सरकारयंत्रांत गडप होऊन जाणें हें बनतां नये. पोर्तुगालहून उच्चतर शिक्षण घेतलेला, कायद्यांत व अर्थशास्त्रांत प्राविण्य असलेला आणि आपल्या बुद्धिज्ञानाचा उपयोग हिंदुसमाजाच्या हितसंबंधांच्या रक्षणाकरिता करण्याचा चंग बांधलेला एक हिंदु तरुण समाजाला जेवढा भूषणभूत व प्रगतिपथाला नेणारा होईल, तेवढा कितीहि पगाराची सरकारी नोकरी पटकावून बसलेला दुसरा एखादा होणार नाहीं. नोकरी पटकावणारा सरकारी वेतन खातो खरा, पण सरकार त्याला स्वतःलाच खाऊन टाकतें. जी प्रजा आपल्यांतील उत्तमोत्तम तरुणांना अशा तऱ्हेनें सरकारयंत्राला गिळंकृत करायाला देते ती प्रजा कशाच्या बळावर त्या यंत्राचें नियंत्रण आपल्या हातीं ठेवणार ? आणि तें यंत्र जर मग त्याच प्रजेला पिळून काढूं लागलें तर मग त्या प्रजेनें रडावें तरी कोणाच्या नावानें ?

तात्पर्य, आपल्या मागसलेल्या हिंदु समाजाला जर पुढें यायाचें असेल, खिस्त्यांच्याच कां पण पोर्तुगेजांच्याहि पुढें यायाचें असेल तर जीं स्वार्थत्यागाचीं, लोकहिताचीं, विद्या-

v. do Livro B 35 e avaliados tambem respectivamente, em 350 e 250 rupias, penhorados nos ditos autos como pertencentes aos ditos. executados. Por este são citados todos os credores incertos dos ditos executados bem oomo os co proprietarios para deduzirem os seus direitos nos termos e para os fins de lei A contribuição de registo por inteiro e as despesas de praça correrão a cargo do arrematante. E para ser publito se espediu este.

Xeldem da Comarca de Quepem 11 de Agosto de 1925.

O Escrivão de Direito do 2 ° oficio

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito

R. Colaço

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do 1 ° oficio Redcar vai a' praga para venda em hasta publica a' porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige a estagao de Sanvordem no dia 4 do proximo mez de Setembro as 10 horas, pela terceira vez e pelo prego que a praga der um quarenta e dois avos do predio denominado "Betul" da cultura de arroz, sito em Mudcudda de Agonda, discrito por inteiro na conservatoria desta comarca sob o n ° 16865 e penhorado nos autos de execugao de sentenga que a Fazenda Nacional move a Gonessa Rama Folo e Omu' Rama Folo ambos de Tudol de Gaundongrem, apensos aos de inventario orfanologico procedido por obito de Janqui Dessaina que foi da mesma. O arrematante pagara' a contribuigao de registo por inteiro e as despesas da praga alem do prego da mesma dentro de tres dias. Por este sao citados quaisquer credores incertos e co-proprietarios. O que para ser publico se expediu este, Xeldem 24 de Agosto de 1925.

O escrivao de Direito

Babu' V, Camotim Redcar.

Verifiquei

O Juiz de Direito

R. Colago

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do Escrivao do 2 ° oficio Barreto, nos autos civeis de execugao por custas que o *Digno* Agente do Munisterio Publico nesta comarca promove contra Gurgur Folo Dessai e mulher Sorospoti Dessaina, de Bali, por apenso aos autos de acgao do processo ordinario sumario estabelecido pelo Decreto de 28 de Margo de 1905 que Luis Pedro Rodrigues vulgo Jose' de Assolnam promoveu contra os mesmos Gurgur e sua mulher, vai ser vendido em hasta publica, a' porta do tribunal judicial situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a estagao de Sonvordem, no dia 8 do seguinte mez de Setembro, a's 10 horas e pelo prego superior ao de avaliagao 1/36 do predio rustico denominado "Gorbata", da cultura de coqueiros sito em Bali, avaliado por 50 rupias e discrito na conservatoria predial desta comarca sob o n ° 16767 a fl 26 do L. B. 46 penhorado nos ditos autos de execugao por custas como pertencente aos executados. Por este sao citados todos os credores incertos dos ditos executados bem como os co-proprietarios e quinhoeiros para deduzirem os seus direitos nos termos e para os fins de lei. A contribuigao de registo por inteiro e as despesas de praga correrao a cargo do arrematante. E para ser publico se expediu este.

Xeldem da Comarca de Quepem, 12 de Agosto de 1925.

O Escrivão de Direito.

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito

R. Colaço

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escravão do 1 ° oficio Redcar, vai á praça para a venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirije a estação de Sanvordem no dia 11 do proximo mez de Setembro ás 10 horas pelo maior lanço que se oferecer metade do predio denominado "Maçolpenem" da cultura de coqueiros e outras arvores frutiferas situado no bairro Babely da aldeia Moiçal avaliada por 640 rupias, discrito por inteiro na canservatoria desta comarca sob o n ° 6958 e penhorada nos autos de execução por custas que o Ministerio Publico nesta comarca move a Locximona Gonum Saunto, sua mulher e outros de Carmonem de Atbarcem por apenso aos de acção do processo ordinario sumario nos termos do Decreto de 28 de Março de 1905 que os ditos Locximoua e outros intentaram contra Hirbá Vinaeca Senay Sanvordencar e sua mulher de Sanvordem para pagamento da quantia de 388:02:09 e meia proveniente de custas liquidadas nos refereridos autos de acção e de custas e selos acrescidos da execução. O arrematante pagará a contribuição de registo por inteiro e as despesas da praça, alem do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaisquer credores incertos e co-proprietarios e os representantes do credor falecido Joaquim Santana da Silva de Margão a cujo favor e da sua mulher se acha registada uma penhora no livro F tres a fl. 87 v. sob a inscrição n ° 1574 registada em 11 de Maio de 1906 para haver dos ditos executados a quantia de 238:11: e tres oitavos que é metade de 477:06:00 tres quartos. Quepem 18 de Agosto de 1925.

O escrivão de Direito

Babú V. Camotim Redcar

Verifiquei

O Juiz de Direito

R. Colaço

O BHARAT

A QUEM COMPETIR

Consta que foi arquivado o processo do inquerito instaurado á acção policial de Pondá e Sanguem, e a que déra causa um artigo de *O Bharat*.

Não lêmos o processo nem o despacho que o mandou arquivar. Nem tão pouco lhe acompanhamos a marcha senão na parte em que o nosso director foi ouvido e *acareado* com alguns dos queixosos que, como se fossem movidos por qualquer mola oculta mas que deve ter sido, pelo visto, de efeitos poderosos, viraram-lhe as *costas*, quando fizeram *frente* ao digno oficial encarregado do inquerito.

Mas, se é certo que no processo referido houve dum lado *prudentes* e *calculistas*, é verdade, tambem, que não faltaram, doutro, cidadãos antepondo ás conveniencias as suas consciencias. Quere dizer que se uma parte das testemunhas *infirmaram* uma parte das acusações sobre que versava o inquerito, a outra parte das testemunhas *confirmaram*, segundo o seu proprio dizer, a outra parte das mesmas acusações, o que, noutras palavras e em ultima analise, significa que no processo provaram-se *parcialmente* os factos alegados.

E' possivel, porêm, que, no entender do julgador, a prova produzida não tenha sido *plenamente suficiente* para condenar os acusados. Não se segue, logo, daí que *as afirmações do Bharat tenham sido falsas* e *caluniosas*, expressões que se encontram provavelmente exaradas no despacho que pôz termo ao inquerito, segundo se depreende da local *Uma imputação caluniosa*, publicada no *Ultramar*, de 4 do corrente, jornal que pela sua *feição furta-côres* e orientação *estomacal* não figura na lista de nossas visitas.

Salvo o devido respeito, as afirmações do artigo de *O Bharat* que determinou o inquerito não podem ser, por consequencia, apodadas de *falsas* e *caluniosas*, sobretudo, em razão das circunstancias especiais que militaram, segundo temos motivos poderosos para crêr, no curso do mesmo inquerito: mêdo de dragonas e...represalias, politiquice local, deferencias, sigilo, egoismo, falta de assistencia dos queixosos e interessados, inviabilidade de inqueritos em geral, etc. etc.

Há ainda mais. Os visados no inquerito não eram nem nunca foram amigos ou inimigos de *O Bharat*, um dos quais o comandante de Pondá nem de vista, ainda hoje, o conhecemos. A critica do nosso jornal obedeceu ao único desejo de ser util á população que se julgava ofendida nos seus legitimos direitos e que viera solicitar-lhe a intervenção. A isto e a nada mais se limitou, pois, o papel de *O Bharat*.

E viu-se que a despeito de todas as *circunstancias especiais* que concorreram no inquerito e a que já fizemos ligeira alusão, *alguma coisa se apurou*, contudo.

? Em que fica, portanto, a falada *falsidade* e onde reside a apregoada *calunia* das afirmações de *O Bharat*?

Quem não deve, não teme; e como *O Bharat* na questão do inquerito não deve nada a ninguem e, portanto, não teme que seja julgado pelos tribunais competentes *falsario* e *caluniador*, pede daqui ao ilustre julgador do inquerito policial que se digne solicitar, pela respectiva via, do Juizo de Direito da Comarca de Quepem, por ser do domicilio do director de *O Bharat*, que seja êste processado pelos crimes de *falsidade* e *calunia*.

E uma vez o inquerito no Tribunal judicial de Quepem, aqui veremos com *mais lei* e com *mais forma*, se, de facto, serve a carapuça de *falsario* e *caluniador* a quem modestamente dirige *O Bharat*, não com o *infamante* fim de fazer do seu jornal um meio seguro de satisfazer ás exigencias do estomago, como sucede com certa gente do ... *Ultramar*, mas sim para defender os interesses vitais da India.

Pedimos, pois, deterimento e ... esperamos receber mercê.

ECOS E CRITICA

LIBE'RIO PEREIRA

Consta do colega *A Terra* que foi agredido barbaramente em Margão sendo grave o seu estado de saude o sr Libério Pereira.

Agressão, violencias, ameaças têm sido o pão nosso de cada dia do ilustre director da *Terra*, desde que êste jornal fundou. Isto, porêm, não é de extranhar: num meio bandalho, reles, vil, como o nosso meio politico, não é fácil tarefa ser, e, o que é mais, conservar-se homem de principios e honra. A acção jornalistica do sr. Libèrio Pereira tira o sono, atrapalha a digestão de muito comilão, de muito tirano desta terra. Daí a reacção, ás vezes selvagem, como foi agora, segundo se vê.

Felicitamos o nobre colega, e felicitamo lo porque morrer por morrer morrem todos, mas raros de pé, lutando.

... PARA INGLEZ VER

Informam nos que, quando há pouco se procedia em Canacona a uma averiguação sobre certos factos atribuidos ao sr. Comandante dali, continuava este no exercicio de suas funcções, e que entre o oficial encarregado da mesma averiguação e o visado existem relações de amisade, isto é, como quem diz relações de finezas ... reciprocas.

Não alcançamos bem o fim para que nos são fornecidas tais informações. Se, por ventura, se destinam a pôr em dúvida a seriedade da averiguação e do espirito honesto e justiceiro que caraterisa o ilustre oficial encarregado, é tempo perdido, porque nem em toda a parte as mesmas causas produzem os mesmos efeitos. Há a chamada questão de *meios ambientes* que convem não desprezar E sabe se que o *meio civil* é diverso e distincto do *meio militar*, assim como a *lei civil* não tem a mesma côr que a *lei militar*.

Lá porque se observa no *meio civil* o fenomeno juridico das mesmas causas produzirem os mesmos efeitos não se segue daí que igual fenomeno deva operar-se tambem no *meio militar*.

Para mais, o *Bharat* não professa a doutrina do *Ultramar* que diz:

"Não há poder humano por mais honesto e justiceiro que um individuo queira ser, que resista ao poder invencivel de uma fineza..."

Os interessados na averiguação de que se trata estejam, pois, socegados que *aquilo* não há de ser qualquer coisa ... para inglez vêr.

CALOR E FRIO

A excelente norma administrativa do sr. Mariano Martins, orientação que muito se aproxima do genial criterio politico do Albuquerque vai produzindo no País duas especies de sensaçoes diametralmente opostas: calor no Povo e frio no ambicioso elemento burocratico.

Sim. O *calor* de que isto há de, breve, entrar em ordem entusiasma delirantemente o Povo que não sabe como idolatrar o seu bemfeitor sr. Martins; e o *frio* de que se provará de efeitos contraproducentes qualquer reacção...cubiçosa congela, a olhos vistos, a burocracia egoista.

FUMO SEM FOGO

Do resultado do inquerito á acção policial de Ponda e Sanguem vê-se que a policia é infalivel e, portanto, não está sugeita a errar, como nós, outros pobres criaturas do Bramá ou do Cristo, propensos ... a afirmações *falsas* e *caluniosas*.

Registando com prazer a

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार भाद्रपद कृ० ८ मी शके १८४७

प्रागतिक संघाचें कार्य कोणतें?

भारताच्या गेल्या २१ व्या अंकांत 'प्रागतिक संघाच्या कार्यास लागा " या विषयावर आम्हीं चार शब्द लिहिले होते. आतां 'प्रागतिक संघाचें कार्य कोणतें यावर चार शब्द लिहिल्यास अप्रस्तुत होणार नाहीं. प्रागतिक संघाचें कार्य कोणतें? ' हें जर पहावयाचें असेल तर त्याच्या घटनेंत ठरविलेल्या ध्येयावरूनच पाहून घ्यावें लागेल आणि घटनेच्या दुसऱ्या नियमांत तें "सामान्यत: एकंदर पोर्तुगीज हिंदुस्थानाची विशेषतः त्यांतील हिंदुसमाजाचीं सर्वांगीण व प्राधान्येंकरून राजकीय प्रगति सनदशीर मार्गांनीं घडवून आणणें हें या संस्थेचें ध्येय आहे" या शब्दानीं स्पष्ट सांगितलें आहे या ध्येयास अनुसरून करावयाचीं जीं कार्यें त्यांतील कांहींकांचा उल्लेख संघाच्या पहिल्या परिषदेंतील ठरावानीं झालेला असला तरी ते ठराव जोंपर्यंत सरकारकडून निदान संघाच्या सभासदांकडून अमलांत येण्याविषयीं कांहींच खटपट झालेली दिसून आली नाहीं तोंपर्यंत प्रागतिक संघाच्या कार्याविषयीं बहुजनसमाज साशंक राहणें संभवनीय आहे व तो तसा राहिलाहि आहे, हें उघड उघड दिसतच आहे.

मराठी शिक्षणाचा प्रसार गोरक्षण, मराठी भाषाभिज्ञांस मतदारी, नवीन काविजादींतील पोर्तुगीज शाळांच्या संख्येंत वाढ वगैरे विषयांवर प्रत्यक्ष ठराव होऊन शिवाय मराठी शिक्षणपद्धति आणि रेजिस्त सिव्हील कायद्यामुळें हिंदु लोकांस भोगाव्या लागणाऱ्या अडचणी काढून टाकण्यास त्यांत कोणती सुधारणा करतां येईल हें ठरविण्यास दोन कमिट्या नेमण्यांत आल्या होत्या. प्रत्यक्ष परिषदेनें पास केलेले ठराव सरकार व जनता यानीं अमलांत आणावे ह्मणून प्रागतिक संघाच्या कार्यकारी मंडळानें नामदार गव्हर्नरसाहेबांची भेट घेऊन त्यांकडे ते सादर करून त्यांची दोनचार लोणकढीं अभिवचनें ऐकून घेण्याशिवाय, कांहींच कामगिरी केल्याचें ज्याप्रमाणें दिसून येत नाहीं त्याचप्रमाणें उभय कमिट्यांनीहि आपणांवर सोंपविलेली कामगिरी पार पाडण्यासाठी कोणतेच प्रयत्न केल्याचें कळत नाहीं. नाही ह्मणायास रेजिस्त सिव्हील कमिटीनें वर्तमानपत्रांतून जाहीर विनंति प्रसिद्ध करून त्या कायद्यांतील अडचणी व त्यांवरील उपाय यांची चर्चा समाजांतील सूज्ञ व अनुभवी गृहस्थांकडून होण्याची खटपट केली होती. या विनंतीस मान देऊन अवघ्या तीन चार गृहस्थांकडून आलेले पत्रव्यवहार भारत व हिंदु या पत्रांत त्यावेळीं प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर त्या कमिटीची पणजी येथें एक बैठक झाली व तींत ज्या ज्या सूचना विचाराकरितां पुढें आल्या त्याहि सदरील पत्रांतून लोकांच्या माहितीकरितां प्रसिद्ध झाल्या. तरीहि लोकांनीं आपलें लक्ष तिकडे वळविलें नाहीं असें कष्टानें ह्मणावें लागतें. पुढें या कमिटीच्या कामाचें घोडें कोठें अडून बसलें आहे हें समजण्यास मार्ग नाहीं. तथापि सध्या वर्तमानपत्रांतून अनुकूल प्रतिकूल टीकेस पात्र झालेल्या 'गोमांतकीय चालीरीतींच्या कायद्याचा मसुदा " कायदेमंडळांत जाऊन पास होऊन येण्यापूर्वी तिचें काम पूर्ण होईल असा आह्मास तींतील सभासदांच्या अंगीं असलेल्या सार्वजनिक कामगिरीच्या कळकळीवरून भरंवसा वाटतो.

अशा रीतीनें प्रागतिक संघाचें काम रेंगाळत चालत असल्यावरून त्याजविषयीं प्रत्यक्ष त्याच्या स्थापनेस कारणीभूत झालेल्या व आज सभासद असलेल्यांकडून देखील कोणतीच आस्था दाखविण्यांत येत नसल्यास नवल नाहीं. सर्व हिंदु समाजाच्या नावांवर प्रागतिक संघासारखी संस्था स्थापन करून केवळ आरंभशुरत्वाचा आरोप आपल्या पदरांत घेणारे हे लोक पुढच्या पिढीस कोणत्या तोंडानें या संबंधींचा जबाब सांगणार ? आपल्या हातून निर्माण झालेली ही संस्था आपल्याच डोळ्यांदेखत पोरक्या व असहाय स्थितींत दिसावयाला लागली तर आपली व पर्यायानें सर्व हिंदु समाजाची अब्रू खालावत चालल्याचें हें लक्षण नव्हे काय ? यामुळें तर आमचें नुकसान तर होईलच शिवाय पुढल्या पिढीचे हातपाय लुळे पांगळे करून टाकल्याचेंहि पातक आमच्या शिरावर बसणार आहे हें आह्मीं सर्वांनीं विसरून जातां येणार नाहीं. प्रागतिक संघास आलेली ही दु:स्थिति घालवून देणें हें पहिलें कार्य आहे व तें करून त्यास ताजा तवाना राखणें त्याच्या उत्पादकांचें, संस्थापकांचें, सभासदांचें व एकंदर हितचिंतकांचें कर्तव्य आहे.

ही दु:स्थिति घालवून देण्याचें कार्य फार मोठें कठीण आहे असें नाहीं. ज्या ज्या महालांत अद्याप महाल कमिट्या स्थापन झाल्या नाहींत. तेथें तेथें त्या स्थापन करून अगर करवून एकंदर महालांतून मिळतील तितके नवीन सभासद मिळविणें यांवरच तें अवलंबून आहे हिंदु लोकसंख्येच्या मानानें संघाच्या सभासदांची भरती झाली वरच प्रागतिक संघाचा बोज समाजांत आणि सरकारांत राहील. " सभासद ह्मणजे प्रागतिक संघ नव्हे " असा जर कोणाचा आग्रह असेल तर तो या लोकशाहीच्या व जनसंग्रहाच्या काळांत चुकीचा आहे. प्रागतिक संघासारखी संस्था जीवंत राहून वजनदार राहावयाची असल्यास शहरांतूनच नव्हे तर खेड्यांपाड्यांतून सुद्धां तिला सभासदांची जोड मिळाली पाहिजे. सभासदांच्या बहुसंख्येच्या जोरावरच प्रागतिक संघाच्या कोणत्याहि कार्याचें महत्व वाटण्यासारखें असून त्यावरच साध्यासाध्यता अवलंबून आहे.

तेव्हां आंगावर आलेला आळस व मनावर उठलेली उदासिनता दूर करून, या कार्याचा उठाव सर्वांकडून होणें अगत्याचें नाहीं असें कोण ह्मणेल ? या पहिल्या व मूळ पायारूपी कार्यास आरंभ झाला ह्मणजे शिक्षण कमिटी, र. सिव्हील कमिटी व ठिकठिकाणच्या स्थापन झालेल्या महाल कमिट्या हालूं लागतील व त्यामुळें कार्यकारी कमिटीला परिषदेंत पास झालेले ठराव नव्या गव्हर्नराच्या कानावर ते अमलांत आणून घेण्यास नवा उत्साह उत्पन्न होईल. संघाचें ध्येय व परिषदेंत पास झालेले ठराव यांविषयीं हिंदुसमाजांत दुमत नाहीं. तरीपण एकीची बेकी करण्याचा सोपा मार्ग धरून बसण्याचें ब्रीद असणाऱ्या कांहीं व्यक्तीनीं थोडा गैरसमज पसरवून त्याचा, भल्या मोठ्यांच्या नावांवर डोलारा उभारिल्यामुळें किंचित् बेबनाव झाला असल्याचें एकाकाळीं दिसून आलें होतें. हा पसरलेला गैरसमज व दिसून आलेला बेबनाव नाहीसा करण्याकरितां आपल्या इष्ट ध्येयास व त्यास अनुसरून आरंभिलेल्या कार्यास चिकटून राहून हळुहळू प्रगतिपंथ आक्रमित राहणें हेंच प्रागतिक संघाच्या सर्व अभिमान्यांचें कर्तव्य असून यांतच प्रागतिक संघाचेंहि वजन वाढण्यासारखें आहे. प्रागतिक संघाच्या हातून आपल्या इष्ट ध्येयासारखी कामगिरी होऊं लागली तर मृगजलाप्रमाणें भासणारे बेकीचे डोलारे वितळून जाण्यास उशीर लागणार नाहीं. एकदां हे बेकीचे डोलारे वितळून गेले व सर्व हिंदुसमाज प्रागतिक संघाच्या छत्राखालीं नांदूं लागला तर प्रागतिक संघ ह्मणजे हिंदुसमाज व हिंदुसमाज ह्मणजेच प्रागतिक संघ असें ह्मणवून घेण्याचें भाग्य उभयतांस लाभल्याशिवाय रहाणार नाहीं.

हिंदुसमाजाच्या गरजा दाखवून देण्यास व कायदेशीर रीतीनें त्या भागवून घेण्यास हिंदुसमाजाच्या एकंदर हितानहितावर नजर ठेवण्यासाठीं निर्माण झालेली अशी प्रागतिक संघासारखी दुसरी संस्था नाहीं. आमच्यांतील क्षुल्लक मानापमानांच्या व समज गैरसमजाच्या प्रश्नानीं तिच्या कार्याची हेळसांड होऊन ती अधिकाधिक क्षीण होऊं लागली तर अधिकारानें हिंदुसमाजाचें प्रतिनिधित्व आपणाकडे घेण्यास तिला हुरूपच येणार नाहीं. हिंदुसमाजास लोकसत्तेच्या कालांतसुद्धां अनेक गरजा आहेत व वाढत्या जिवनकलहामुळें दिवसें दिवस त्यांत भर पडत आहे. या गरजा भागवून घेण्यास आज मागील काळाप्रमाणें एकट्या दुकट्याचे प्रयत्न उपयोगास येत असून त्यासाठीं संघशक्तीचा जोर पाठीमागें असलेल्या लोकमतानुसारिणी अशा सार्वजनिक संस्थांकडूनच ते प्रयत्न व्हावयास पाहिजेत. या विचारांतच प्रागतिक संघाचा जन्म झाला व हे विचार प्रामाणिकपणानें आपल्या मनाशीं करणाऱ्या सर्व सूज्ञ लोकांचें त्याला प्रोत्साहन मिळालें. त्यांचा सदुपयोग होऊन संघाची पहिली परिषद झाली व त्या परिषदेंत संघाचें ध्येय ठरून तदनुसार पास झालेले ठराव हीं त्यांचीं कार्यें होत. त्या कार्याची माहिती जनतेंत करून देऊन जनतेचा ओढा संघाकडे झाला ह्मणजे त्याला नवीन सभासद मिळवून देतां येतील व त्या सभासदांच्या संख्येच्या जोरावर नवीं नवीं कार्यें हातांत घेण्यास संघास अवसान येऊन त्याच्या हातून समाजाचें सर्व हितानहिताचे प्रश्न बिकट असले तरी, सोडविण्यास तो कार्यक्षम होईल.

आज हिंदुसमाजासमोर असलेला "चालीरीतीचा कायद्याचा मसुदा" लवकरच कायदेमंडळांत चर्चेस येणार आहे. तेथील सभासदांच्या बहुमतानें तो पास व्हावयाचा असून, त्याची बजावणी आह्मांवर, आमची खुषी असो अगर नाखुषी असो, होणार आहे. त्या पूर्वीच त्या कायद्याची चर्चा प्रागतिक संघासारख्या संस्थेकडून होऊन त्या कायद्याच्या अगर त्यांतील कांहीं कलमाच्या इष्टानिष्टतेसंबंधीं अथवा नवीं उपयुक्त कलमें घालण्यासंबंधीं सरकारास सूचना मिळणें हें त्या संस्थेच्या अधिकारांतलें आहे. या अधिकाराचें चीज त्या संस्थेकडून होण्यास कार्यकारी कमिटी, मध्यवर्ती कमिटीची सभा बोलावून नव्या होऊं घातलेल्या कायद्यासंबंधीचें आपलें अधिकारी मत सरकारांत सादर करील अशी आह्मीं आशा केल्यास ती अनाठायीं होणार नाहीं. संघाच्या का. का. कमिटीनें तसा उपक्रम केला तर " प्रागतिक संघाचें कार्य कोणतें' हें जनतेस प्रत्यक्ष पाहावयास सांपडून हिंदु जनतेंतील सुशिक्षित व अनुभवी गृहस्थहि, विशेषत: वकील लोक, आपाआपले विचार वर्तमानपत्रांतून किंवा ठिकठिकाणीं व्याख्यान रूपानें मांडून संघाच्या या महत्वाच्या व उपयुक्त कार्यास मदत करितील याबद्दल संघाच्या का. कमिटीस आजच आह्मीं जनतेच्या वतीनें अभिवचन देऊन ठेवितों.

—" अभिनव भारताचे जनक " ही सुंदर लेखमाला येत्या अंकापासून सुरू होईल.

—मडगांवच्या ख्रिस्ती देवालयाच्या एका बाजूची जमीन खोदतांना तींत हिंदूंच्या दोन जुन्या मूर्ति सांपडल्या. पैकीं एक गणपतीची असून दुसरी वेताळाची आहे ! पोर्तुगीजांच्या करामतींचीं तीं मढींच उकरून काढलीं ह्मणायाचीं ! !

—फोंडा व सांगें येथील पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध चालू असलेली चौकशी कशीबशी संपून, त्यांच्या वरील आरोप नाशाबीत झाले. वरून त्या ' महात्म्यां'विरुद्ध लोकांनीं निरर्थक ' अंकांड तांडव ' केलें होतें, असें सिद्ध होतें.

पत्रव्यवहार

श्री. भारतकर्ते यांस वि. वि.

चालीरीतींच्या कायद्याच्या मसुद्याचा विचार करणाऱ्यांना खालील सूचना आपल्या पत्रद्वारें करीत आहें. त्यांचा त्यांनीं अवश्य विचार करावा.

यां मसुद्यांत हिंदु लोकांचे विवाह धार्मिक रीत्या होण्यापूर्वी कायदेशीर रीत्या व्हावयाचे ते तात्पुरते 'होऊनं नंतर ह्मणजे धार्मिक रीत्या झाल्यानंतर कायम होण्याची सवलत दिली आहे. तरीपण मध्यें येदितालांची ह्मणजे जाहीर खबर देण्याची अट पूर्वीप्रमाणेंच असून या जाहीर खबरांनीं कोणतीहि अडचण उपस्थित झाली नाहीं, तरच तात्पुरते नोंदलेले विवाह कायम होणार आहेत. आतां प्रश्न असा उपस्थित होतो कीं, तात्पुरत्या विवाहनोंदीनें धार्मिक विवाह ठरकला व नंतर अडचणी उपस्थित झाल्या तर मग धार्मिक विवाह मोडतां येईल काय ? जर नाहीं तर तो कायदेशीर न झाल्यास विवाहबद्ध पतिपत्नीची कोणती गत होणार याचा विचार करून येदितालांची मधली भानगड नाहींशी करण्याचा त्यांनीं मार्ग शोधावा.

या कायद्यांत अनेक पत्नीविवाहाची मुभा देण्यांत आली आहे तीस कोणतीच अट नाहीं. यामुळें स्त्रियांची स्थिति मोठी अनुकंपनीय झाली आहे. एकीकडे पूर्वीच्या ह्मणजे १८८० च्या कायद्यानें जिनगीचा समान हक्क नवऱ्यावरोबर स्त्रियांस मिळत होता तो या कायद्यानें जाणार आणि उरावर एक किंवा अनेक सवतींचें साम्राज्य थयथयाट करणार ? आपली जिनगी आपल्याच स्वाधीन राहत असल्यामुळें पुरुषांसहि अनेक बायका करून नवनव तरुणीचा आस्वाद घेण्याचा मोह आवरून घेतां येणार नाहीं. पुरुष संतती नसल्यास दुसरी बायको करून घेण्याची सवलत पुरुषांना स्त्रिया आनंदानें देतील. परंतु त्यांत कांहींतरी मर्यादा असावयास पाहिजे होती. पहिली बायको वांझ किंवा पुरुष संततीहीन निपजलीं तर दुसरी बायको करून घेणें योग्य होईल. ह्मणून दुसरी बायकोहि वांझ किंवा पुरुषसंततीहीनच निपजली तर तिसरी बायको करून घेण्याची सवलत ठेवण्यापेक्षां आपल्या वंशास दत्तकाचें कलम लावून घेण्याच्या सवलतीचा फायदा घेतल्यास काय वाईट ? जर करितां वंशवृद्धीकरतां दत्तक घेण्याची चाल चालू व नव्या होऊं घातलेल्या कायद्यानें कायदेशीर मानली आहे तर एकावर दुसरी, दुसरीवर तिसरी आणि तिसरीवर चौथी अशा क्रमानें पाहिजे तितक्या बायका करून घेण्याची सवलत पुरुषांनां कां ह्मणून ठेवण्यांत यावी ? ती सवलत एकावर दुसरी इतक्यापुरतीच व चालू कायद्यांतील अटींवरच दिल्यास अनवस्थाप्रसंग थोडा तरी टळेल.

लग्नाच्या बाबतींत कोणतीच वयोमर्यादा न घातल्यानें बालविवाह व जरठ कुमारी विवाह सध्या प्रमाणेंच सुरू रहाणार. या नीच गोष्टीस आळा पडलाच पाहिजे. बालविवाहानें संतती अल्पायुषी, रोगट, बिनकाटक व किरकिऱ्या स्वभावाची निपजावयास लागली व समाजांत बाळंतरोग, क्षय यांसारखे रोग बळावत चालले. बालमृत्यूंचें प्रमाण पूर्वीपेक्षां किती तरी पटीनें वाढलें याचा विचार व्हावयास पाहिजे. कन्येच्या लग्नास विवाहाची मर्यादा ठरवून घेण्यास हिंदुसमाज तयार होणार नाहीं असा खोटा समज करून घेणारे गृहस्थ राज्यकर्त्यांत ख्रिस्ती लोकांत व खुद्द आमच्या समाजांतहि थोडथोडके नाहींत. त्यांना वयाची मर्यादा ठरविल्यास ह्मणजे ठरलीं गेल्यास हवीच आहे; परंतु समाज नाखुष होणार ही भीति त्यांस आपले विचार बोलून दाखविण्यास आड येते. कसेंहि असलें तरी बालविवाहास आळा घालण्याची तजवीज करणें समाजहितचिंतकांच्या दृष्टीनें योग्यच ठरेल. ही इयत्ता मुलींच्या बाबतींत फक्त १२ निदान १० वर्षांपुरतीच ठेविली तर समाज आज कांहीं आड येईलसें वाटत नाहीं. कारण मुलींची सध्याची लग्नवयोमर्यादा इतकी पुढें गेलेली आहे कीं, कधीं कधीं त्या नवऱ्या मुलांच्या आयाच शोभतात ! ! तसेंच मुलांच्या बाबतींत ती प्रौढदशा आल्यानंतर ह्मणजे अठरा वर्षे उलटल्यानंतर इतकी राखण्यांत आल्यास शास्त्राची, समाजाची कसलीच कुरकूर येणार नाहीं व अठरा वर्षेपर्यंत तरी मुलांची वाढ पूर्ण नसली तरी अल्पस्वल्प होऊन पुढील पिढी क्रमाक्रमानें सशक्त व काटक होण्यास मदत होईल. बालविवाहांस आळा घालण्यांत आल्यावर जरठ कुमारी विवाहांस साफ बंदी करून घेण्याची फार मोठी नैतिक जबाबदारी आह्मांवर आहे. जरठ कुमारी विवाहाची राक्षसी व असमविवाहानें समाजांत कितीतरी बालविधवांची भर पडली आहे व एकसारखी पडत आहे ! यावरहि कायद्याचा मोठा उगारणें दूरदर्शीपणाचें होऊन त्यामुळें असंख्य अनाथ व दुबळ्या मुलींचे शुभाशीर्वाद समाजास मिळणार आहेत. या अघोर चालीस बंदी घालण्यासाठीं नवऱ्याचें वय वधूच्या वयापेक्षां निदान वीस वर्षांपेक्षां जास्ती असूं नये, असाच निर्बंध ठेवणें जरूर आहे. यामुळें असें होईल कीं, पूर्ण वाढ झालेल्या एका नवरी मुलीचें वय सोळा वर्षांचें आहे असें घेतलें तर तिचें लग्न फार तर वीस वर्षांच्या थोर अशा छत्तीस वर्षांच्या नवऱ्या मुलाबरोबर होईल. नवरी मुलगी सोळाहून जास्ती वयाची असली तर त्या मानानें नवराहि जास्ती वयाचा असला तरी हरकत येणार नाहीं. नवरा बायकोमध्यें ठेवलेलें हें वयाचें अंतर सर्व समाजास पसंत पडेल अशी आजच्या स्थितींत मला तरी खात्री आहे.

नवरी मुलीस विवाह होऊन सासरीं प्रवेश होतांच वरुण-लक्ष्मी देवतांचें पूजनानंतर नवऱ्यानें सासरचें नांव ठेवावयाचें असतें. या कायद्यांत नव्या नांवाची कांहींच तजवीज केली नाहीं व रेजिस्त सिव्हील कायद्यांत नांव कायदेशीर रित्या बदलून घेण्यास अनेक सव्यापसव्य विधी उरकून गव्हर्नर साहेबांची खास परवानगी घ्यावी लागते व त्यास जवळ जवळ वीस पंचवीस रुपये खर्च होऊन बरेच श्रम घ्यावे लागतात. हिंदु स्त्रियांना तर विवाहानंतर नवें नांव घेणें भाग आहे. तर हे श्रम, हा खर्च व ती सर्व यातायात चुकविण्यासाठीं विवाह नोंदीच्या लेखांतच नवें नांव घेण्याची सवलत असणें इष्ट नाहीं काय ? दत्तक मुलांसहि दत्तक विधानाचे वेळीं नवें नांव द्यावें लागतें. त्यांसहि तशीच सवलत दिल्यास पुढील श्रम व खर्च त्यांस वांचवितां येतील. सर्व विचारवंतांनीं विशेषतः हिंदु कोन्सिलरांनीं याचा विचार करावा. कळावें हे वि. आ.

जनार्दन विष्णु कामत.

न्पता देऊन स्त्रियांच्या उरावर दुसरी सवत आणून ठेवणें हें नाठाळ नवऱ्यांना सोपें करून ठेवलें आहे; इतकेंच नाहीं, तर खास त्यांची अशी जरी कोणतीहि इस्टेट असली तरी, मायोराझातच्या (maioralato) अमलाखाल उपरोक्त इस्टेटीच्या वहिवाटीचा त्यांचा खास हक्क देखील हिसकावून घेण्यांत आला आहे, ह्मणजे एकंदरींत या कायद्यामुळें हिंदु स्त्रिया ह्मणजे इतःपर माणसें नसून संतति उत्पादनाचीं —एवढेंच मी ह्मणतों— व पाक निष्पत्तीचीं चालतीं बोलतीं यंत्रेंच ठरणार.

वर्तमानसार

—गोमांतक भूमि प्रेक्षणीय असल्यामुळें बड्यां पाहुण्यांच्या भेटीचा योग येथील जनतेस अनेकदां घडून येतो. तथापि राजेलोकांचें आगमन क्वचित् होतें. त्यांतूनहि सरकारी पाहुणे ह्मणून अशा लोकांचें आगमन झाल्याचें उदाहरण लोकांच्या स्मरणांत तरी नाहीं. महाराणी सौ. चिमणाबाई गायकवाड साहेबांची स्वारी मेलगाडीनें येऊन ता. ५।९।२५ रोजीं संध्याकाळीं मडगांवीं उतरली. त्यांच्या आगमनाची बातमी फारशी पूर्वी कळली नव्हती. तरी पाहुण्यांच्या स्वागतार्थ नेहमीं दक्षता ठेवणाऱ्या येथील सा. ब्रा. समाजानें महाराणी साहेबांच्या सार्वजनिक स्वागताची तयारी करण्यास बरेच परिश्रम घेतले. सा. ब्रा. समाज व हिंदु समाज तर्फे क्यासलरॉक स्टेशनवर प्रतिनिधी पाठवून त्यांनीं महाराणी साहेबांची भेट घेऊन स्वागतास परवानगी मिळविली. जाहीर पत्रक काढून सर्व लोकांस त्यांच्या आगमनाची खबर दिली. गाडी येण्यापूर्वी सा. ब्रा. समाज गृहाकडून बॅंडसह सर्व मंडळी स्टेशनवर गेली. त्यांजबरोबर, महाराणी साहेबांच्या दर्शनास उत्सुक झालेलीं श्री दामोदर विद्यालयांतील मुलें मिरवणुकीमधून दुतर्फा शिस्तीनें जात होतीं. स्टेशनवर प्रेक्षकांची गर्दी अगोदरच झाली होती व ही मिरवणूक पोंचल्यावर स्टेशन चिकार भरून गेलें. तेथें ख्रिश्चन स्त्रीपुरुष मंडळीहि बरीच होती. आणि महाराणी साहेबांचें आगमन सरकारी पाहुण्याच्या नात्यानें असल्यामुळें आदमिनिस्त्रादोर प्रभृति अधिकारी वर्गहि स्टेशनवर पोलीस अधिकाऱ्यांसह हजर होता स्टेशनवर गाडी थांबतांच सरकारी रीत्या स्वागत होऊन हिंदु समाजातर्फे श्री दामोदर विद्यालयांतील मुलींकडून त्यांना हारतुरे अर्पण करण्यांत आले. नंतर महाराणी साहेबांची स्वारी आपल्या खास मोटारीनें मिरवणुकीबरोबर निघाली. व बॅंडसह वाजत गाजत सारस्वत ब्राह्मण समाजाकडे मिरवणूक निघाली परंतु स्टेशनवर त्यांची मोटार उतरून घेण्यांत बराच वेळ खर्च झाल्यामुळें, त्यांच्या पुढील ठरींव कार्यक्रमांचा विचाड होऊं नये ह्मणून सारस्वत ब्राह्मण समाजाकडून संस्थेच्या दारांतच महाराणी साहेबांस पानसुपारीचा समारंभ झाला. त्यावेळीं त्यांनीं समाजासंबंधीं व विद्यालयासंबंधीं कांहीं माहिती विचारल्यानंतर त्यांची स्वारी पणजीकडे रवाना झाली. (बातमीदार)

—येत्या ता. २५ शुक्रवार रोजीं भारताबरील वास्कोदिगामासंबंधींचा खटला सुनावणीस निघणार आहे.

—मुरगांव, दोनपावल व पणजी या बंदरांतील पावसाळ्यामुळें बंद असलेला बोटींचा व्यवहार पूर्ववत् सुरू झाला.

—बडोद्याच्या महाराणीसाहेबांचा गोमांतकांत दोन दिवस मुक्काम होऊन तिसऱ्या दिवशीं ह्मणजे गेल्या सोमवारीं त्यांची स्वारी सावंतवाडी येथें रवाना झाली.

—गेल्या मंगळवारच्या बोलेतींवर मुनिसिपल निवडणुका जाहीर व्हावयाच्या होत्या.

—गव्हर्नर साहेबांच्या पत्नी येथें यावयास पोर्तुगालहून निघाल्या.

—कित्येक ठिकाणीं 'ग्रीप'सारख्या तापाची सांथ उद्भवल्याची बातमी आहे.

—स्थलाभावामुळें जे भारतमित्रांचे लेख या अंकीं प्रसिद्ध झाले नाहींत ते पुरवणीच्या स्वरुपात येत्या भारतांत प्रसिद्ध करण्याचा विचार आहे.

—गुरुवर्य भांडारकरांच्या निधनाबद्दल गोव्यांत ठिकठिकाणीं शोक प्रदर्शित करण्यांत आला.

—अग्रलेखाच्या तिसऱ्या कालमच्या शेवटच्या ओळींत ''नसून'' याऐवजीं ''असून'' व स्फुट विचारांच्या दुसऱ्या कालमच्या पहिल्या ओळींत ''हीन'' याऐवजीं 'हीच' असे शब्द चुकीनें पडले आहत

—बडोद्याच्या महाराणी साहेबांनीं अंत्रुजेंतील मुख्य मुख्य सर्व देवस्थानांतील देवतांचें दर्शन घेतलें. गोव्यांत सर्वत्र तिचें आदरपूर्वक स्वागत करण्यांत आलें.

—ओरियंटल विमा कंपनीचीं १९२२ ते १९२४ सालचीं त्रैमासिक बोनस सर्टिफिकिटें, कंपनीचे एजंट श्री. द. आ. सरमळकर यांच्यामार्फत, येत्या १५ ते २० सप्टेंबरच्या मानानें, प्रत्येक नफ्याच्या रीतीनें विमा उतरलेल्या विमेदारांकडे, पोष्टांतून रवाना होणार असल्याचें कळतें.

orfanologico a que se procede no referido julgado por obito de Vicente Piedade Rodrigues, morador que foi de Borim, e em que e' inventariante e cabeça de casal a sua viuva MariaFernandes da dita e deduzirem nele os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento; bem como para o dito interessado Joaquim Aurelio Cardozo, comparecer no tribunal Judicial do mesmo Julgado situado na rua de ArgeloMoreira na primeira audiencia findo o referido praso de editos, pelas dez horas, afim de conferir o dote de 750 rupias por ele recebido do dito inventariado na ocasiao do seu casamento para o que se declara que as audiencias desse Julgado se fazem em todas as segundas e quintas feiras ou nos dias imediatos quando aqueles forem feriados nao o sendo tambem estes ou nao estejam compreendidos nas ferias. E para ser publico se expediu este.

Xeldem da Comarca de Quepem 21 de Julho de 1925.

O Escrivao de Direito do 2 ° oficio
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juizo de Direito da Comarca de Quepem.
R. Colaço

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem, e cartorio do escrivao do 2 ° oficio, Barreto, correm editos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos do paragrafo segundo do art. 197 do Cod. do Proc. Civ. citando a interessada Quiteria Ruberta viuva de Miguel Joao Fernandes, de Cotombi e ora ausente em parte incerta de Bombaim para assistir a todos os termos ate' final dos autos de inventario orfanologico a que se procedeu por obito do dito Miguel Joao Fernandes natural e domiciliado que foi do Bairro Baga, de Cotombi, sendo inventariante e cabeça de casal Antonio Pereira, da mesma, por apenso aos autos de inventario orfanologico a que se procedeu por obito de Ana Piedade Ruberta que foi da mesma e nele querendo os seus direitos sem prejuiso do seu devido e regular andamento. E para ser publiço se expediu este. Xeldem 25 de Julho de 1925.

O Escrivao de Direito
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
R. Colaço

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem, e cartorio do escrivao do 2 ° oficio Barreto, vao ser vendidos em hasta judicial a' porta do tribunal do Juizo situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a estaçao de Sanvordem, no dia 25 do seguinte mez de Setembro a's 10 horas e pelo preço superior ao da avaliaçao os seguintes bens:—1 ° Predio rustico "Oxelasordo" da cultura de arroz, 2 ° Predio rustico denominado "Sassonasordo" da cultura de arroz e 3 ° Predio rustico denominado "Bandi" da cultura de arroz, todos sitos em Jaqui, discritos na conservatoria predial desta comarca respectivamente, sob os nos. 16092 16093 e 16094 e avaliados tambem respectivamente em 100, 80 e 70 rupias. Penhorados nos autos de execuçao por custas que o Digno Agente do Ministerio Publico nesta comarca promove contra Narana Velipo e sua mulher Gopica, de Jaqui de Netorlim por apenso aos autos de inventario, orfanologico a que se procedeu por obito de Bimam Velipo que foi da Jaqui de Netorlim. Sao por este citados todos os credores incertos dos ditos e xecutados e os co-proprietarios nos termos e para os fins de lei. A contribuiçao do registo por inteiro ficara a cargo do arrematante. E para ser publico se expediu este.

Xeldem da Comarca de Quepem 21 de Agosto ee 1925.

O Escrivao de Direito do 2 ° oficio
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juizo de Direito,
R. Colaço

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escravão do 1 ° oficio Redcar, vai á praça para a venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirije a estação de Sanvordem no dia 11 do proximo mez de Setembro ás 10 horas pelo maior lanço que se oferecer metade do predio denominado "Maçolpenem" da cultura de coqueiros e outras arvores frutiferas situado no bairro Babely da aldeia Moiçal avaliada por 640 rupias, discrito por inteiro na conservatoria desta comarca sob o n ° 6958 e penhorada nos autos de execução por custas que o Ministerio Publico nesta comarca move a Locximona Gonum Saunto, sua mulher e outros de Carmonem de Atbarcem por apenso aos de acção do processo ordinario sumario nos termos do Decreto de 28 de Março de 1905 que os ditos Locximoua e outros intentaram contra Hirbá Vinaeca Senay Sanvordencar e sua mulher de Sanvordem para pagamento da quantia de 388:02:09 e meia proveniente de custas liquidadas nos refereridos autos de acção e de custas e selos acrescidos da execução. O arrematante pagará a contribuição de registo por inteiro e as despesas da praça, alem do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaisquer credores incertos e co-proprietarios e os representantes do credor falecido Joaquim Santana da Silva de Margão a cujo favor e da sua mulher se acha registada uma penhora no livro F tres a fl. 87 v. sob a inscrição n ° 1574 registada em 11 de Maio de 1906 para haver dos ditosexecutados a quantia de 238:11: e tres oitavos que é metade de 477:06:ootres quartos. Quepem 18 de Agosto de 1925.

O escrivão de Direito
Babú V. Camotim Redcar
Verifiquei
O Juiz de Direito
R. Colaço

O BHARAT

QUE HAVERA' ?

Chegam-nos vagos rumores de que nas regiões oficiais se vai esboçando uma decidida tendencia para revisão das matrizes prediais das Novas Conquistas. Há mesmo quem nos afirme que a Direcção dos Serviços de Fazenda está colhendo dados necessarios para o mesmo fim. Pelo que se ouve e pelo que se presume, parece, pois, que ela será, em breve, um facto concreto e positivo...

Mas ¿de quem terá partido o alvitre da revisão? Da imprensa? Não; pois os jornais do País, quase na sua totalidade, se pronunciaram contra o aumento da receita pública por aquele meio...drastico, sendo certo que alguns que aventaram tal idêa, circunscreveram o seu pedido tão sómente á revisão da matriz predial dos grandes proprietarios, proprietarios que pagnem ao Estado uma contribuição superior á importancia de centos de rupias.

A opinião publica manifestou, portanto, pelos seus orgãos, que não está disposta a aceitar sem protesto e de braços crusados a projectada medida da revisão, que, de mais a mais, como provada ficou, não poderá atenuar *em nada* a gravidade do descalabro economico a que a oninosa governação do sr. Jaime de Morais arrastou o nosso País.

¿Terá, por ventura, dimanado da propria iniciativa de Sua Excia o sr. Governador Geral Mariano Martins o mesmo alvitre reprovado pela opinião pùblica?

Pelo fino tacto e superior inteligencia que Sua Excia revelou nas providencias decretadas até á presente data, o nosso espirito se não inclina a atribuir ao sr. Mariano Martins paternidade da revisão de que se trata.

E, depois, a precisão da compressão de despesas ainda está no adro, devendo levar muito tempo para completar o seu longo percurso. Não se eliminaram ainda excrescencias orçamentais nem se reformou ainda muito serviço público que, da forma como se encontra organisado actualmente, só suga a melhor seiva do erario público.

Já dissemos e tornamos a repetir de novo que o Povo da India não recusará nenhum sacrificio ao sr. Mariano Martins, mas só depois de se convencer de que não existe outra maneira de restabelecer equilibrio no orçamento e de que o mesmo sacrificio será traduzido em melhoramentos de grande utilidade pública.

¿Não há salvação sem pretendida revisão? *O Bharat* não lhe oporá nenhuma resistencia, contanto que se persuada de que se provarão do valor insuficiente as medidas decretadas e a serem decretadas para o mesmo fim.

Sim; a revisão que hoje ten de a semear descontentamento na opinião pública, sò então será justificada. Antes disso, não.

Tratando se da revisão em questão, há a notar que no seu ambito poderão ficar compreendidos só os concelhos de Pernem, Satari, Sanquelim, Quepem e Canacona, porque os de Pondá e Sanguem foram há pouco matrizados com actualisação do preçario de coco, bate e outros productos; e que ao lado da elevação do preçario tem sido, igualmente, soberba a alta do salario, isto é, como quem diz a carestia do trabalho predial, e mais a escassez da producção—circunstancias que mesmo sem revisão tornam, actualmente, a mais critica a situação economica dos pequenos proprietarios, de que é constituido o geral dos contribuintes.

Sr. Governador Geral, não exageramos quando afirmamos ser a mais critica a situação dos pequenos proprietarios, pois de todos é sabido que eles não podem substentar-se nem com tal ou qual desafogo com o que lhes dão os seus parcos rendimentos liquidos — único meio de sua vida; não estão habituados ao duro trabalho manual de operarios nem a meza do orçamento é tão rica e copiosa que lhes dê cabida a todos.

E' verdade Todos estão nas condições de encarar de frente a frente a carestia da vida, excepto os pequenos proprietarios. Os ricas despresam na á força do seu dinheiro; os funcionarios públicos combatem na com seus vencimentos de exercicio e categaria; e os operarios e oficiais de diferentes misteres recebem na com um sorriso sarcastico a bailar-lhes nos labios satisfeitos de abastança, graças aos seus ricos salarios. Só os pequenos proprietarios é que amassam o pão de cada dia com as mais quentes lagrimas de tristeza, privações e miseria.

V.Excia., sr. Mariano Martins, não deixa de conhecer, certamente, o quadro desolador da vida precária dos pequenos proprietarios. E, por isso mesmo, não acreditamos que o alvitre da revisão das matrizes prediais das Novas Conquistas tenha tido origem no plano governativo de V. Excia. que para mais prometeu administrar a India *deante dos factos*, uma parte dos quais respeitante aòs pequenos proprietarios já a descrevemos.

E já vimos que a pretendida revisao não derivou da imprensa do País.

Não tendo dimanado do plano governativo do sr. Mariano Martins nem partido dos nossos jornais, ¿donde terá ela provindo?

Sempre desejavamos sabe-lo!

Mas, afinal de contas, terá visos de verdade o boato da revisão que nos provocou as presentes linhas?

Que de positivo haverá ?

ECOS E CRITICA

MUCH ADO ABOUT NOTHING

Duma local de *A India Portuguesa* de Majordá:

"Vai um formidavel trabalho de sapa para se ver empoleirada na regedoria de S. Tomé uma pessoa que já uma vez, não há muito, viu torpedeada essa sua pretensão com reclamações e telegramas colectivos ao governo e com declarações de várias pessoas que devem estar na Administração — é o que nos informam, pedindo a nossa atenção."

A prosa alhêa que a *India* inseriu nas suas colunas dá impressão de que a regedoria de S. Tomè é algum cargo que se confunde com as elevadas funções de governador de ... S. Tomé e Principe, pois que em volta da mesma regedoria houve torpedeamento, colectivo movimento telegrafico, declarações importantes etc. etc., numa palavra, uma guerra...civil das mais tremendas.

?Correrá, por ventura, algum grave perigo a aldêa salcetana de S. Tomé com mudança regedorial?

¿Ou quem pretende eternisar-se naquele cargosito andará esquecido de que a lei não converteu ainda em vitalicia a anual comissão regedorial ?

Como vêm, é caso para se dizer: *much ado about nothing.*

...POR CAUSA DAS EXIGENCIAS ESTOMACAIS

Naquela sua local — *Uma imputação caluniosa*, o *Ultramar* de Margão, pretendendo monopolisar simpatias policiais insinua que com o insucesso do inquerito á acção policial de Pondà e Sanguem ficou salva a honra do exercito portuguez, honra que se macularia se tivesse sido provada alguma coisa contra os oficiais visados.

Em razão da velhice decrépita que o traz alquebrado, não admira que o bissemanario mais velho daquela vila lhe tenha transtornadas as faculdades cerebrais.

¿Com que, então, acu-

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार आश्विन शु० १ दा शके १८४७

गोव्यांत

गुरुवर्य डॉ० भांडारकरांचें स्मारक

गुरुवर्य डॉ० भांडारकर या जगदवंद्य विभूतीविषयीं हिंदुस्थानांतच. नव्हे तर सगळ्या सुशिक्षित जगांत किती सहानुभूति आहे व त्या सहानुभूतीस ते कसे सुपात्र आहेत याचें थोडक्यांत विवेचन आह्मीं गेल्याच्या मागील अंकांत केलेंच आहे. त्यानीं जी काय अत्यंत मोठी कामगिरी केली ती संस्कृत भाषेस जगांत तिचा सर्व श्रेष्ट जागा मिळवून देणें ही होय. युरोपियन लोक ह्या देशांत येऊन स्थिरस्थावर झाल्यानंतर त्यांचें लक्ष्य सहज संस्कृत भाषेकडे वळलें व त्यानीं त्याविषयीं खटपट चालविली. ईजिप्तांतील दुर्बोध लिपीचें ज्ञान करून यश मिळविणारे युरोपियन, संस्कृत वाङ्मयाचा व्यापकपणा व दीर्घश्रमसाध्य अभ्यास पाहून थक्कच झाले !

अशा वेळीं ज्या भाषेंत प्राचीनतर वाङ्मय सांठलेलें आहे, वेदासारखे हिंदु आर्यांचे थोर विचारांचे ग्रंथ सांठले आहेत, श्रीमद्भग्व गीतेसारखे परम गहन वेदांताचे ग्रंथ आहेत, व थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे ज्या भाषेंत हिंदु आर्यांच्या ओजस्वी वाङ्मयाचें व तेजस्वी संस्कृतीचें सार एकवटलेलें आहे ती परमपूज्य भाषा समजण्याविषयीं आतुर झालेल्या युरोपियन जिज्ञासूंस तृप्त करणारा थोर दर्जाचा, असामान्य सामर्थ्याचा, दीर्घोद्योगी पुरुष पुढें येणें अत्यंत आवश्यक होऊन बसलें होतें, किंबहुना आपलें श्रेष्ट वाङ्मयभांडार जगासमोर मांडण्याची प्रबल इच्छा संस्कृत सरस्वतीस झाली, ह्मणून तीच सर भांडारकरांच्या जिव्हेवर बसली व विशेषतः तेथूनच तिची थोरवी जगास कळली !

सर रामकृष्णपंत हे संस्कृत भाषेंत असें आहे तसें आहे ह्मणून केवळ तिच्या संस्कृतीचा उच्चार करून गप्प राहिले नाहींत. विधवा पुनर्विवाहाच्या चाली युरोपियन समाजांतून आमच्यांत आल्या अशा वृथा प्रवादास जागा राहूं नये ह्मणून त्यानीं संस्कृत धर्मशास्त्र ग्रंथाच्या आधारानें स्वतःच्या विधवा मुलीचा पुनर्विवाह करून देऊन आपली आचारप्रियता व संस्कृत वाङ्मयभक्ति व्यक्त केली !

हिंदुस्थानच्या विचार श्रेष्टतेची महति जगास पटवून, जगास एक अत्युत्तम ज्ञानभांडार खुलें केलें, या वरून सर भांडारकर हे हिंदुस्थानच्या व जगाच्या धन्यतेस पात्र व्हावें हें उचितच होय. आणि ह्या जगांत अर्थात् हिंदुस्थानांत गोव्याचा अंतर्भाव होत असल्याकारणानें गुरुवर्यांच्या निधनप्रसंगीं इकडे सभा भरविण्याच्या कर्तव्यांतून गोमांतक कांहींसें उत्तीर्ण झालेंहि आहे. ह्यावर उल्लेखिलेल्या कर्तव्यास ज्या अनेक दृष्टीनीं गोमांतकानें जागलें पाहिजे त्या दृष्टींत एक अशी आहे कीं, संस्कृत सारस्वताचा प्रचार व प्रसार करणारे सर भांडारकर ज्या सारस्वत ब्राह्मण ज्ञातीस भूषणीभूत सुपुत्र झाले त्या सारस्वतांचें मुख्य स्थान गोमांतकच आहे. ह्मणून सभा भरविण्याबरोबरच, दुसऱ्या श्रेष्ठ कर्तव्यास जागून, गुरुवर्य सर भांडारकरांचें कायम पुण्यस्मरण देणारें स्मारक गोव्यांत होणं आवश्यक व क्रमप्राप्त ठरतें.

हे विचार सुचण्याचें कारण ह्मणजे ह्याच अंकावर पुढें प्रसिद्ध झालेला, रा. शिवा फट्ट पै आंगले यांचा लेख होय. हे गोमांतक हितेच्छू सद्गृहस्थ लेखक व वक्ते या नात्यानें सुप्रसिद्ध असून, गुरुवर्य सर भांडारकराचें स्मारक व्हावें व तें स्मारक, गुरुवर्यांस प्रिय झालेल्या संस्कृत भाषेच्या अभिवृद्धीस कारणीभूत व्हावें, ही त्याची कल्पना विचारार्हच नव्हे, तर शक्य तितक्या लवकर कृतींत आणण्या इतकी चांगली आहे.

संस्कृत भाषेचे प्रचारक सर भांडारकर यांच्या स्मारकाचे, अर्थात संस्कृत भाषेच्या अभिवृद्धीचे प्रयत्न सुरू झाल्यास रा. आंगले यांच्या ह्मणण्याप्रमाणें आमच्या धर्मगुरुंकडून व सरकारकडूनहि सहाय मिळण्यास, संस्कृत भाषेविषयीं व गुरुवर्यांविषयीं असलेला दुप्पट पूज्यभाव खास पुरेसा आहे.

आमचें धर्मशास्त्र, एकंदर संस्कारांस पावित्र्य आणणारे शास्त्रनियम, पूजा अर्चा, संस्कृत भाषेंत आहेत. त्यांचा नीट अर्थ समजून त्यांचें मर्म उमजण्यासाठीं आज संस्कृताचाहि आस्थेवाईक अभ्यास करणें सर्वथा योग्य असल्यानें त्या भाषेचा प्रसार झाला पाहिजे. व गोमांतकांत हिंदूंचीं प्रमुख देवालयें, धर्म संस्थानें असून हिंदुधर्म रक्षणाची जबाबदारी योग्य प्रकारें राखण्यांत दक्ष असल्याबद्दल त्यांची ख्याति आहे. ह्मणून धर्मशास्त्राचा खोल अभ्यास करून लोकांकडून धर्मविधीचें आचरण करविणारे व धर्मविधींच्या शास्त्रशुद्धतेची खात्री पटविणारे दिक्षित तयार होण्यासाठीं इकडेच संस्कृत पाठशाळांचा खर्च गरज पडल्यास देवालयें आणि धर्म संस्थानें यांकडून, भागविल्याशिवाय गोमांतकांतील हिंदुधर्माच्या आस्थेवाईकपणाची पुर्तता होणार नाहीं.

ह्या करितां, सर्वांनीं लक्ष्य पुरवून, कै. गुरुवर्य सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या संस्कृत भाषा पुनरुज्जीवनरूप स्मारकास मूर्त स्वरूप लवकर द्यावें अशी गोमांतकीयांपाशीं विनंति करण्यांत येत आहे.

गुरुवर्य डॉ. भांडारकर

व

गोमांतकीय सुशिक्षितांचें कर्तव्य

[लेखक:— शिवा फटू पै आंगले]

गेल्यां आगष्ट महिन्याच्या २४ तारखेस विद्वन्मान्य गुरुवर्य डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचें देहावसान झाल्याची दुःखकारक वार्ता सगळीकडे पसरली. ठिकठिकाणीं सभा भरून दुःखप्रदर्शनार्थ ठराव पास झाले. आपल्या गोमांतकांतहि २।३ ठिकाणीं जाहीर सभा भरून दुःखप्रदर्शन करण्यांत आलें. डॉ. भांडारकरांसारख्या जगमान्य पंडिताच्या निधनानें जर सगळ्या जगांतील [विद्वान लोकांना तरी] वाईट वाटणार तर गोमांतकांतील हिंदु लोकानां वाईट वाटलें असल्यास नवल तें कांहींच नाहीं.

डॉ. भांडारकरांच्या निधनानें होणाऱ्या नुकसानीस भरपाई नाहीं. परंतु ज्यांना ज्यांना त्यांच्याविषयीं आदरभाव आहे त्यांच्याकडे एक कर्तव्य बाकी राहतें. ह्या कर्तव्याचा विचार फक्त आमच्या गोमांतकापुरताच करावयाचा आहे; कारण गोमांतकाबाहेरच्या हिंदुस्थानास अगर महाराष्ट्रास आपलें कर्तव्य जाणवून देण्याचा गोमांतकास अधिकार पोचत नाहीं व जरूरीहि पण नाहीं.

डॉ. भांडारकरांच्या अनेक सद्गुणांपैकीं ज्या एका विशेष गुणांमुळें त्यांची एवढी प्रसिद्धी व मानमान्यता झाली तो गुण ह्मणजे संस्कृत भाषेचें त्यांचें अगाध ज्ञान होय डॉ. भांडारकरांच्या निधनामुळें दुःखवट्याची सभा भरविणें वगैरे औपचारिक कर्तव्य करणें हें जरी बरोबर आहे तरी त्यांचें वारंवार पुण्यस्मरण होण्यासारखें खरें कर्तव्य ह्मणजे संस्कृत विद्येचा प्रसार करणें होय

संस्कृत विद्येविषयीं गोमांतकानें काय केलें आहे ? ! ब्रिटिश हिंदुस्थानांत दुय्यम शिक्षण घेणारे हिंदु विद्यार्थी बहुत करून संस्कृत भाषेचा अभ्यास केल्याशिवाय राहत नसतात. आमच्या गोमांतकीय सुशिक्षित हिंदु लोकांत शेंकडा एक तरी संस्कृत जाणणारा आहे काय ? आतां एक गोष्ट खरी कीं, तिकडे संस्कृत शिकण्याचीं साधनें अनुकूल आहेत व इकडे नाहींत; असें जरी असलें तरी गोमांतकीय सुशिक्षित वर्गानें संस्कृत भाषेविषयीं एवढी अनावस्था दाखविणें फार लांछनास्पद होय.

आमच्या सरकारनें अगदीं जरूर असलेल्या मराठी शिक्षणाकडे जर अगदीं दुर्लक्ष्य केलेलें आहे तर संस्कृत भाषेकडे दुर्लक्ष केलें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. ह्या विषयीं बहुतेक अपराध आमचाच आहे हें नाकबूल करतां येणार नाहीं. सरकारी मराठी शाळा अवघ्याच आहेत; त्या मुलांच्या संख्येच्या अभावीं बंद होण्याच्या बेतांत आहेत. अगदीं अलीकडे 'कुडी' येथील मराठी शाळा बंद करण्यांत आली असें असून तेथील लोकांनी कांहीं प्रयत्न केल्याचें ऐकिवांत नाहीं. आमच्या मराठी हिंदु पत्रकारानीं तर त्यासंबंधीं अगदींच मुकेपणा धरलेला आहे. येथील लिसेवांत, दुय्यम शिक्षणाखेरीज संस्कृत भाषेचा २ वर्षांचा अभ्यासक्रम आहे व या भाषेचा शिक्षक ख्रिस्ती असून तज्ञ आहे, असें असतां क्वचितच विद्यार्थी तेथें शिकलेले दिसतात.

आह्मा गोमांतकीयांची भाषा मराठी [कोंकणी] आहे व ती संस्कृतजन्य आहे. आह्मांला संस्कृत ग्रंथांविषयीं अभिमान आहे. परंतु संस्कृत भाषेचें ज्ञान करून घेण्याची मात्र प्रवृत्ति व आस्था नाहीं. सरकारी आश्रयावांचून ज्याप्रमाणें आजवर आह्मीं मराठी भाषेचा संबंध न तोडतां अगदीं खाजगी प्रयत्नावर आमच्या शाळा चालविल्या आहेत त्याचप्रमाणें जर आह्मीं थोडेसे ज्यास्त प्रयत्न करूं तर हा प्रश्न कांहीं अंशीं सुटणार आहे. आमचे धर्मग्रंथ संस्कृत भाषेंत असल्यामुळें धार्मिक शिक्षणाच्या प्रसारासाठीं आमच्या धर्मगुरूंनीं कांहीं तरी प्रयत्न करावयास पाहिजे होते परंतु खासगी प्रयत्न सुरू झाल्यास, धर्मगुरूंकडून मदत मिळेल अशी आशा करण्यास पुष्कळ जागा आहे.

प्रस्तुतचा छोटा लेख संस्कृत विद्येसंबंधीं कांहीं तरी जागृति डॉ. भांडारकरांच्या निधनामुळें, आह्मा गोमांतकीय सुशिक्षितामध्यें व्हावी ह्या हेतूनें लिहिला आहे. ह्या विषयाचा ऊहापोह भरपूर व्हावा व संस्कृत भाषेसंबंधीं विशेष आस्था उत्पन्न होऊन तिच्या प्रचारास मूर्त स्वरूप प्राप्त व्हावें अशी आमची इच्छा आहे ह्मणून आपापले विचार प्रगट करण्याची संधि वायां दवडूं नये अशी गोमांतकीय सुशिक्षितांकडे आमची नम्र विनंति आहे.

—कलकत्ता उनिव्हर्सिटीचे विद्वान अध्यापक डॉ० एस् एन. सेन यांनी 'कलकत्ता रिव्हु' या मासिकांत एक लेख लिहिला असून त्यांत गोमांतकाच्या जुन्या कागदपत्रांची चर्चा केली आहे. या चर्चेनं मराठ्यांच्या इतिहासावर बराच प्रकाश पडलेला आहे.

—येत्या नव्हेंबरच्या पहिल्या तारखेस मुनिसिपल निवडणुका होतील. सार्वजनिक हिताचा पुष्कळसा विचार व थोडासा तरी आचार करण्याची ज्यांना फुरसत असेल, अशांचीच मतदारांचीं निवड करणें योग्य आहे. खुर्च्यांच्या शोभेंत आतां अर्थ राहिलेला नाहीं !

—दाभाळ येथें आश्विन शु० ९ मी शनिवार ता. २६ पासून ते ३० तारीखपर्यंत श्री सरस्वत्युत्सव साजरा होणार असून दो० सुन्नाय वि. देसाई, प्रो० बाळकृष्ण वा. सांवर्डेकर, रा. सदासिव सा. भाटकर व प्रो० शिवराम शे. संजगिरी इत्यादि वक्त्यांचीं भाषणें होणार आहेत, असें शंकर गो. प्रभू वेळगेंकर, उत्सव कमिटीचे सेक्रेटरी, हें कळवितात.

हिंदु कायद्याचें स्वरूप

[लेखांक २ रा]

(ले० प्रो. बा० वा० सांवर्डेकर)

मागील लेखांकांत प्रस्तुत कायद्याविषयीं सामान्य विचार प्रदर्शित करून त्याचा अप्रासंगिकपणा (inoportunidade) व अन्यायी स्वरूप उघड केलेंच आहे. लेख लिहिलेल्या दरम्यानच्या कालावधींत मडगांवची जाहीर सभा, जांबावलीच्या गायक समाजाचा ठराव, रा. रा. जनार्दन कामत यांची पत्रें वगैरेच्या रूपानें प्रस्तुत विषयावर चर्चा झालेली आहे. थोडा अवकाशहि मिळाला असल्यानें जरा खोल जाऊन त्याचा विचार करण्याचें आह्मीं आज योजिलें आहे. विवेचनाच्या सोयीसाठीं मागील अंकाचाच अनुक्रम आह्मीं पुढें चालविणार आहों.

८ मुलींनां पितृधनाचा हक्क नसणें हा एक या कायद्याचा विशेष आहे. तो तसा न ठेवण्यासाठीं जीं कारणें पुढें आलेलीं आहेत तीं समाधानकारक नाहींत. मुलींना पितृधनाचा हक्क ठेवल्यास कुटुंबें हलाख होतात व फुटतात; स्थावर जंगम मिळकतीवरची मालकी व्यक्तीची नसून कुटुंबाची आहे असा समज हिंदुसमाजांत पूर्वापार प्रचलीत आहे. त्याला यानें बाध येतो;असा वारसा कबूल झाला असतांहि हिंदु स्त्रियांनीं आपखुषीनेंच तो सोडून देण्याचा प्रघात पाडला आहे; मुली हुंड्याच्या रूपानेंच आपला पितृधनविभाग नेतात त्यावर आणखी त्यांना वारस हक्क असूं नये व पेडणें काणकोण सारख्या सरहद्दीशीं भिडून असलेल्या समाजांतील शरीरसंबंध इंग्रजींतील समाजाशीं होतात, तेव्हां हा वारस हक्काचा कायदा आह्मां गोवेंकरासच नुकसानकारक होतो.इतके मुद्दे या बाबतींत पुढें येतात. क्रमवारीनें विचार केल्यास कुटुंबें फुटूं नयेत या हेतूच्या सिद्ध्यर्थ केवळ मुलांनीं नेलेला - मुली नेतातच असें गृहित धरल्यास वांटा बंद करणें एवढा उपाय पुरेसा नाहीं. त्यांच्या सोबतच प्रथमपुत्र सोडून इतर मुलांचाहि वारस हक्क रद्द केला पाहिजे. नाहींतर जितके मुलगे तितके वाटे असें होऊन एवीं तेवीं कुटुंब फुटतेंच. इंग्लंडांत असा कायदा आहे. कुटुंब स्वास्थ्याला मुलींचाच बळी काय म्हणून ? स्त्री जातीचीं किंवा पुरुष जातीची संतति होणें हा सृष्टीचा धर्म आहे, पण तेवढ्यामुळें केवळ स्त्री जातीनेंच कां स्वार्थत्याग करावा ? पुरुष संतति वंशवृक्ष कायम राखणारी अतएव कुटुंबाची परंपरा राखणारी असल्यामुळें त्याना पितृधनाचा वारसा राखणें रास्तच आहे. असेंहि सांगण्यांत येतें. पण हा भावनेचा प्रश्न आहे. आणि भावनांच्या अधिष्ठानावर कायद्याचा डोलारा उभारणें फारसें सयुक्तिक नसते. कुटुंबें फुटलेलं नकों असल्यास पूर्वींच्या अविभक्त कुटुंब पद्धतीचा पुरस्कार केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. आणि ती तर सर्व सामाजिक दोषांचें आगर अशी मानली जाते. दुसरा मुद्दा देखील तसाच निराधार आहे. पूर्वीं एकाकाळीं हिंदु समाजांत मिळकत कुटुंबाच्या मालकीची आहे हा समज होता खरा; पण त्यावेळीं हिंदुसमाज समाजसत्ताप्रधान होता. त्यांत व्यक्तीच्या अस्तित्वालाच जागा नव्हती. व्यक्तीला दिवाणी हक्कच नव्हते त्याचप्रमाणें व्यक्तीला स्वतंत्र मतहि नव्हतें. व्यक्ति स्वातंत्र्याचा मागमूसहि नसलेल्या काळचें हें महा वस्त्र कितीहि उंची असलें तरी आजच्या बदललेल्या व प्रतिनिमिषास बदलणाऱ्या परिस्थितींत त्याचा उपयोग नाहीं. आजच्या हिंदु समाजांत वरील तत्वाचा नामनिर्देशापुरताच बोलबाला आहे. दोन विवाहित बंधू सामायिकपणानें राहणारे अशीं कुटुंबें शेंकडा १९ तरी असतील कीं नाहीं याचीं शंकाच आहे. इंग्लंडचे राजेसाहेबांची जेवढी इंग्लंडवर सत्ता चालते तेवढीच या तत्वाची सत्ता हिंदुसमाजावर चालते.तिसरा मुद्दा हुंड्याचा पण एका मुलीस हुंडा देतानां जेवढा खर्च होतो, त्याच्या दीडपट खर्च तरी एका मुलाच्या शिक्षणास होत असतो. तेव्हां याहि बाबतींत मुलांमुलींची समानताच दिसून येते. परप्रांतांतील शरीर संबंधाविषयीं पोर्तुगीज प्रजाजन नसलेल्या इसमाशीं विवाह झालेल्या मुलीचेच वारस हक्क नष्ट केले म्हणजे हाहि मुद्दा बासनांतींत निघतो. आज ४५ वर्षांवर आमच्या मुलींना वारस हक्क असतांना त्यांनीं तो प्रत्यक्ष बजावला नाहीं व ही गोष्ट आपल्याविरुद्ध असतांहि न्यम. ब्रा. पेरेर यानीं ती समर्थनास पुढें करावी याचें आह्मांस तरी आश्चर्य वाटतें. कारण, अर्ध शतकाच्या अवधींत जर कुटुंबें फुटलीं असतीं तर समाज नामशेषच झाला असता. तशीं तीं फुटलीं नाहींत व अर्धशतक गेलें तर मग यापुढें तीं फुटणार हा निष्कर्ष कसा काढतां येतो? तेव्हां कोठूनहि पाहिलें तरी मुलींनां पितृधनाचा वाटा आलाच पाहिजे असें ठरतें.

९ **पतीच्या धनाचा अर्धभाग** जो सन १८८० च्या कायद्यानें आमच्या स्त्रियांना मिळाला होता तो या कायद्यानें काढून घेतला आहे हा या कायद्याचा दुसरा विशेष आहे. त्याच्या समर्थनार्थ पुढील कारणें देण्यात आलीं आहेत. (अ) सामान्यत: इस्टेट नवऱ्याचीच असते. कारण बायको केवळ दागिन्यापायीं खलास होणारी क्षुद्रसी हुंड्याची रकमच कायती कुटुंबांत आणते. [आ] उपजीविकेपुरती सोय नवऱ्याच्या इस्टेटीच्या अर्ध्या उत्पन्नानें होते. [इ] नवऱ्याच्या इस्टेटीचा वांटा बायकोच्या माहेरच्या नातेवाइकांकडे जाण्याचा संभव बंद्व होतो.[ई]पतीपूर्वी पत्नी मृत्यू पावल्यास आपल्याच अर्ध्या इस्टेटीची व्यवस्था करतां येत नाहीं ती त्याच्या ताब्यांतून जाते. मुलींना पितृधनाचा वारसा असल्यावर पहिला मुद्दा फोल ठरतो. असा वारस हक्क मुलींनीं बजावूं नये असें ज्यांचें मत आहे त्यानींच मुलींनां इस्टेटीविरहित लग्न करण्यास (entrar no matrimonio sem levar bens) भाग पाडलें आहे, असें ठरतें. आणि मुली तो बजावीत नाहींत ही गोष्ट खरी असली तरी तसा तो न बजावण्यास नवरे कमी कारणीभूत होतात असेंहि नाहीं. अर्थात मुलींनां विवाहसमयीं कोणतीच इस्टेट नसण्याचा दोष नवरा बायकोस सारखाच वांटला गेला पाहिजे. अर्थात दोष जर उभयतांचा तर त्याचा परिणामहि उभयतांस सारखाच भोगणें प्राप्त आहे. पण प्रस्तुत कायद्यानें त्याचें प्रायश्चित केवळ स्त्रियांसच दिलें आहे. उपजीविकेची सोय जशी उत्पन्नानें करावी असें म्हणतात तशी ती पुरुषांनींहि करावी असें म्हटल्यास चालेल काय ? दुखणेंबाणें येऊन एकदम मोठ्या खर्चाची धोंड आल्यास त्याची सोय उपजिविकेच्या खर्चानें नेहमीं होतेंच असें नाहीं. या सर्व मुद्यांतून एकच धास्ती डोकावून पाहत असलेली दिसून येते. व ती हीच कीं, बायकोच्या माहेराकडे नवऱ्याच्या इस्टेटीचा भाग जाणें तेवढ्यापुरतेंच एक बंधनकारक कलम घातलें म्हणजे पुरे आहे. आमच्या मते हा अर्ध्यावांट्याचा त्यांचा हक्क हिरावून घेणें सर्वतोपरी अन्यायाचें होईल. कारण खरोखरी पाहिल्यास या अर्ध्या वांट्यावर त्यांचा हक्क पितृधनापेक्षां जास्त समर्थनीय आहे. मुलीचा विवाह होतांच ती आपल्या पितृगृहाला कायमची मुकते; विवाहोत्तर ती ज्या कुटुंबांत जाईल तेथेंच तिचा नवा संसार उत्पन्न होतो; तेथेंच तिच्या खऱ्या चरित्रास सुरवात होते; आपल्या नारीधर्माचें पालन तिला तेथेंच करावयाचें असतें; फार तर काय, पण पतीगृहांत प्रवेश करतांक्षणीच स्त्रिया आपलें पूर्वाश्रमातील नांव देखील गमावून नव्या कुटुंबांत नामकरण विधीपासून आपल्या नूतन जीवन क्रमांस सुरवात करतात. अर्थात या नव्या कुटुंबानें तिला कोणत्याच परक्या भावानें न वागवितां कायद्याच्या किंवा सामाजिक दृष्टीनें तिचे सारे हक्क कबूल केले पाहिजेत. इस्टेट पराधीन करतानां (contrato alienatorio) स्त्रीच्या कबूलीशिवाय नवऱ्याला कांहींच करतां येत नाहीं हें जरी खरें असलें तरी तेवढ्यानें तिच्या कायदेशीर हक्काची बजावणी होत नाहीं. धर्मेंच अर्थेच कामेच मोक्षेच पत्नीहि पतीची अर्धांगी झाली पाहिजे व तसी ती व्हावयाला तिला नवऱ्याच्या इस्टेटीचा अर्धा वांटा त्याच्या पश्चात मिळालाच पाहिजे. तसा तो न ठेवल्यास स्त्रियांची स्थिति कशी काय होते याचें वर्णन मनोरंजन वर्ष ३० जुलै व आगष्ट १९२४ या दोन अंकांत श्रीयुत ‘ मधुप ’ यानीं फारच बहारीचें केलें आहे. “ फार माजलीस होय, बघ तर खरी माझ्या बाळ्याचें दुसरें लगीन करतें ” ह्या वाक्यानें सुनांचा समाचार घेत असलेल्या सासवा तर अद्यापि दिसतात. ही स्थिति मनुस्मृतीच्या अमलांत ब्रिटिश हिंदुस्थानांत आहे. आणि तो अमल आह्मांवर येथें चालू करावयाचा ?

१० **अनेक पत्नीत्व.** सन १८८० च्या कायद्यांत ज्या मर्यादा या बाबतींत घातल्या गेल्या होत्या त्या देखील प्रस्तुत कायद्यानें काढून टाकण्यांत येऊन त्याच्या जागीं केवळ पूर्वपत्नीच्या अनुमतीचीच काय ती ठेवण्यांत आली आहे. पूर्वींच्या कायद्यानें पुरुषसंतति असलेल्या पुरुषास कोणत्याच पुरुषाला पत्नीच्या हयातींत लग्न करतां येत नसे. पण या कायद्यानें रेजिस्त सिव्हिलच्या कामगाराकडे तिची मूक मान्यता–मूक मान्यता म्हणण्याचें कारण रेजीस्त सिव्हिलांत केवळ पोर्तुगीज लिहितां येणारासच साक्षर समजण्याचा परिपाठ आहे– दिली कीं झालें. ही सवलत व तिच्या जोडीस अर्ध्या इस्टेटीचा हक्क नसणें या दोहोंच्या जोडींत किती स्त्रियांचा चूर होईल कोणाला ठाऊक ! न्या. ब्रागांस पेरेर याचें तत्वज्ञान देखील मोठें तऱ्हेवाईक दिसतें. बहुपत्नीकत्वास आळा बसण्यास त्यांना “ ज्याची शक्ती कायद्यापेक्षां बळवत्तर आहे त्या शिष्टसंप्रदायाची हमी पुरेशी वाटते पण तींच शिष्टसंप्रदायाची हमी स्त्रियांनीं पितृधन त्यागाविषयीं आज ४९ वर्षे कृतीनें दिलीं असतां व तशी दिल्याचें खुद्द न्यायमूर्तींनींच कबूल केलें असतां, त्यावेळीं मात्र त्यांना तशी स्पष्ट कलमाची आवश्यकता वाटते. आमच्या मतें या बाबतींत पूर्वींचेच नियम कायम ठेवले गेले पाहिजेत. हिंदुसंस्कृतीला इवलासा देखील धक्का बसलेला ज्यानां खपत नाहीं त्या हिंदुकारानीं सुद्धां या बाबतींत असेंच कबूल केलें आहे. त्यांनीं देखील जे फरक सुचविले आहेत ते मूळ बीलापेक्षां जुन्या कायद्याकडेच विशेष झुकलेले आहेत. तेव्हां आह्मीं सुचविलेली दिशा ग्राह्य मानल्यास हिंदुत्वास मुकण्याची भीति मुळींच नाहीं असें सिद्ध झालें.

११ **कायदाच नको आहे.** वरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं आह्माला हा कायदाच आमूलाग्र मान्य नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्याच्या व न्यायाच्या कसोटीस लावलें तर प्रस्तुत कायद्यांतील एखादें दुसरेंच कलम शाबूत राहील. नाहीं म्हणावयाला रेजिस्त सिव्हीलांतील लग्नविधीविषयीं जो फेरफार सुचविला आहे तोच काय तो अपवाद आहे.

१२ **रा. रा जनार्दन विष्णु कामत यांना :** आमचे प्रेमळ व भावनाप्रधान मित्र रा. जनार्दन वि. कामत यांनीं हिंदूच्या शेवटच्या अंकांत एक व भारताच्या गेल्या अंकांत एक अशीं दोन पत्रें लिहिलीं आहेत. रा. कामत यांची सार्वजनिक कार्याची आस्था व त्यांची तत्वनिष्ठा ही गोमांतकांत सुप्रसिद्धच आहेत. त्यांच्या हिंदूतील पत्राचा सारांश काढला तर तो प्रस्तुत कायद्याच्या समर्थनपर असाच निघेल. स्त्रियांची स्थिति जनावरांसारखी अहो असें प्रो० कामत यांनीं म्हटलेलें रा. जनार्दन कामत यांना बरेंच झोंबल्याचें दिसतें. पण बापाच्या इस्टेटीचा अधिकार नाहीं, नवऱ्याच्या इस्टेटीचा अर्धभाग नाहीं, गुरें कुरणांत चरत असलीं तरी कुरणाची मालकी जशी त्यांच्याकडे नसते, तसाच पति·

Anuncios

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.
Número avulso uma tanga.
O Bharat ano 10, n.° 24 de 17 de Setembro 1925.

Além de enigmatico, não deixa de ser original o cumprimento do Sena. E é justamente por causa dessa originalidade é que não pudemos resistir á tentação de pôr os leitores ao facto da original novidade.

Que Deus se amercie duma semilhante... saudação.

UMA CARTA

Firmada por alguns filhos da India, actualmente residentes em Lisbôa, recebemos uma carta colectiva em que se apoia com palavras que nos comoveram sobremaneira a orientação de *O Bharat*.

Na referida carta que é um documento de alto valor civico os seus jovens e patrioticos autores, garantia segura do verdadeiro progresso politico e moral do nosso Paiz, patenteam o seu vivo desejo de nos coadjuvar constitucionalmente no movimento nacionalista.

Pelo visto, ha quem nos entenda.

Muitos agradecimentos.

AO DE LE

A *India Portugue*
gão, orgão do *Parti*
de Salsete, frisando
dade de se tornar ol
ensino primario da
tuguesa, escreve o

"E' uma med
impõe por mais
tivo. Sobretudo
absurdo bárbaro,
aos céus, que, f
colónias portugu
Metropole, um t
homogeneo, ou s
camente, um unic
moral; sendo igua
todos os efeitos, a
tropolitano os
niais, considerand
ritorios ultramari
prolongamentos d
te europeu, un
sendo, em tudo e
igualmente portu
um absurdo que
universal entre t
da Lingua Nacion
o mais valioso e
trumento de unid
são moral entre o
de uma Pátria co

A quem conhece
orientação de *O Bh*
necessario dizer que
conforma com o moc
sar do ilustre colega
te á difinição da pal
tria. Isto, porém, m
te obsta a que o s
no seu desejo de v
obrigatorio o ensino
da lingua portuguesa
uma condição: o do
orgão do *Partido I*
adjuvar o *Bharat* n
de obrigatoriedade
marata aos hindús e
tani aos mouros, ant
rem uns e outros co
estudar, *obrigatoria*
lingua de Camões.

E a *India Portug*
melhor do que nós a
que se estriba a noss
cia...

E' que *ninguem*
milar "comme il fa
lingua extranha sem
ça de fundo a que
com o leite de sua mã

Se não, que o diga
mcnimo com *A*, de

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा । त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार आश्विन शु० १४ शी शके १८४७

गामाचें श्राद्ध !

भारतावरील खटल्याचा निकाल

संपादकांस ३० दिवसांची सजा ! !

कैद न भोगल्यास दंड ! ! !

जज्ज साहेबांचा संपादकांविषयीं आदर !

वरिष्ठ कोर्टाला अपील

खटल्यांची मालिका व आमचें धोरण

थोडक्यांत सर्व

ठरल्याप्रमाणें गेल्या माहेच्या २५ तारखेस ११ वाजतां भारत संपादकांवरील खटल्यास केपेंच्या कोर्टांत न्या. दो. रोदोल्फ कुलास यांसमोर सुरवात होऊन, साक्षीदारांच्या साक्षी वगैरे कायदेशीर विधानें झाल्यानंतर सुमारें १ वाजतां न्यायाधिशांनीं त्या दिवसाचें काम आटोपून ता. २९ मंगळवारच्या आव्दियेंसावर खटल्याचा निकाल वाचण्याचें जाहीर केलें. त्याप्रमाणें गेल्या मंगळवारीं सुमारें १२ वाजतां निकाल वाचण्यांत येऊन

३० दिवसांची कैद

किंवा दर दिवसास १ रु. ६ आ. १० पै प्रमाणें दंड भरण्याची शिक्षा वाचण्यांत आली. खटल्याच्या आरंभाच्या दिवशीं व निकालाच्या दिवशीं कोर्टांत पुष्कळ लोक दिसत होते.

भारत संपादकांच्या वकिलानें अर्ज केल्याप्रमाणें, ता. २८ आक्टोबर १९१० ह्या तारखेस प्रसिद्ध झालेल्या कायद्या वरहुकूम संपादकांस त्यांच्या वकिला शेजारीं ह्मणजे वकिलांच्या रांगेंतील खुर्चीवर बसण्याची परवानगी न्यायाधिशांकडून मिळाली.

वरील निकालांत न्यायाधिशानीं संपादकांच्या बुद्धिमत्तेविषयीं व कर्तबगारीविषयीं एक दोनदां प्रशंसोद्गार काढले आहेत. व निकालाचें वाचन झाल्यानंतर सुद्धां न्यायाधिशानीं संपादकांस उद्देशून सद्गदित अंतःकरणानें त्यांच्या गुणाचें खुलासेवार वर्णन करितांना, त्यांची

उत्तम बुद्धिमत्ता

संपादकांचा लिसेवांतील समकालीन विद्यार्थी या नात्यानें आपण स्वतः ओळखत असल्याचें सांगितलें व खुद्द आपण स्वतः विद्यार्थी दशेंत हेगडे देसाई यांकडून गणित शास्त्राचे धडे घेतले असल्यामुळें संपादकांची हुशारी अगोदरपासून ओळखत असल्याचें जाहीर रीतीनें कबूल करण्यास धन्यता वाटते असेंहि सांगितलें. विद्यार्थीदशेपासून आजपर्यंत १५।१६ वर्षे गेलेल्या काळांत वाढत्या वयावरोबरच त्या मानानें हेगडे देसाई यांचें ज्ञानहि वाढलें असलें पाहिजे. व या थोर ज्ञानाचा उपयोग हेगडे देसाई यांनी एकंदर गोमांतक, हिंदु ख्रिस्ती यांच्या उन्नतिप्रीत्यर्थ करण्यांत, त्यांस यश मिळावें असे उद्गार काढून शेवटीं ह्मणाले कीं, केवळ कायदेशीर कर्तव्य ह्मणूनच वरील शिक्षा भारत संपादकांस देण्यांत येत आहे, ती हायकोर्टांत कमी झाल्यास आपणास बरेंच वाटेल. अशा अर्थाचें न्यायाधिशाचें भाषण संपल्यावर, संपादकांच्या वकिलानें

अपिलाचा अर्ज

घेण्याची केलेली मागणी तावडतोब मंजूर झाली.

खटल्याचा निकाल ऐकून बहुतेक लोकांच्या मुखावर निराशेची छटा रेखाटल्याचें दिसलें; पण भारतावर निराळाच परिणाम झाला ! नेहमीं खटल्यांची कटकट मागें लागून मन घट्ट झाल्याकारणानें, शिक्षेमुळें खचून जाणें किंवा न्यायाधिशानीं केलेल्या प्रशंसेनें हुरळून जाणें भारतास संभवनीय नाहीं. जनतेचे हितसंबंध व हक्क राखण्या साठीं स्वयंस्फूर्तीचे लेख लिहिण्याच्या कर्तव्यास जागणें हेंच त्याचें उच्चतम ध्येय आहे.

ह्या कर्तव्याची जाणीव

ज्यास्त तीव्रतेनें देण्यासाठींच कीं काय हें गामा प्रकरणिक खटल्याचें काम संपतें न संपतें तोंच वरील निकालाच्याच पूर्वी एक तास पोलीस प्रकरणिक खटल्यावर जबाब देऊन एका खटल्याच्या निकालापूर्वीच दुसऱ्यास तोंड द्यावें लागलें !

कोणत्याहि वर्तमानपत्रकारावर सरकारविरुद्ध बोलल्यानें खटला होऊन शिक्षा झाली ह्मणजे तो खटल्याच्या निमित्ताचा राजमार्ग लोकप्रीति संपादण्याच्या कामीं संपादकांस उपयोगी पडतो असा एक आरोप करण्यांत येत असतो परंतु भारतावर आजपर्यंत झालेल्या १०।१२ खटल्यांकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास, त्यांत निरपेक्षतेशिवाय दुसरें कांहींच दिसणार नाहीं व चालू असलेल्या पोलीस प्रकरणिक खटल्यासंबंधीं भारतास कितीहि नुकसानी झाली, शिक्षा. दंड झाले, तरी पोलिसांचें गुप्त कारस्थान भारतानें निरभिलाषतेनें उघडकीस आणल्यामुळें त्यांत भिजत पडलेलीं प्रकरणें सुधारून लोकांचें हित झालें ह्याच समाधानानें भारत नेहमीं कर्तव्यास जागणार व खटल्यास तोंड देणार !

वर्तमानसार

—मडगांव—सा. ब्रा. समाजाचे इमारत फंडासाठीं ललित कला नाटक मंडळीनें दिलेला खेळ काल रोजीं झाला. या मदतीचें श्रेय श्री. यशवंत विष्णु नायक मडगांव यांसच आहे.

—ह्मापसें येथील ज्ञानप्रसारक संघातर्फे ज्ञानप्रसारक मंडळीच्या मराठी शाळेंत सरस्वत्युत्सवानिमित्त रा. सीताराम मणेरकर, श्रीपाद अच्युत कळंगुटकर, व शिरोडकर ह्यांचीं मराठींत व शिवराम डांगी ह्याचें कोकणींत अशीं भाषणें झालीं. शिवाय प्रत्येक दिवशीं भजन, पुराण वगैरे होऊन आश्विन शु. १० मी रविवार सायंकाळीं सरस्वती विसर्जन, मिरवणुकीचा समारंभ होऊन उत्सवाची सांगता झाली.

—प्रागतिक संघाच्या हरएक महत्वाच्या बाबतींचा त्याचप्रमाणें संघाच्या परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनासंबंधीं महत्वाच्या गोष्टींचा, व येत्या पार्लमेंट करितां व्हावयाच्या देपुतादाच्या निवडणुकीसंबंधींचा विचार करण्यासाठीं कार्यकारी मंडळाची बैठक ता. ४ रविवार अक्टोबर रोजीं संध्याकाळीं पणजी येथें भरणार आहे. कार्यकारी मंडळास "मध्यवर्ती मंडळाचा" सल्ला घ्यावीशी वाटल्यास "मध्यवर्ती मंडळाची" असाधारण सभा ता. ११ रविवार अक्टोबर रोजीं बोलावली जाण्याचा संभव आहे.

—येत्या नव्हेंबर महिन्याच्या २२ तारखेला पोर्तुगीज पार्लमेंटांत इंडियातर्फे भाग घेणाऱ्या प्रतिनिधींची निवडणूक होणार असून सध्या बोवेल मोत, सांतान रुद्रीगीस व आकीनु मिरांद हे त्या जागांना उमेदवार ह्मणून उभे राहिले आहेत. प्राजेरीस द कोस्तांचा विचार तर आपल्या जागेवरून तूर्त तरी हलण्याचा नाहीं !

—पोलीस प्रकरणासंबंधीं आह्मांवर भरण्यांत आलेल्या नवीन खटल्यानें पणजीच्या 'आ प्रोव्हींस' पत्राच्या पोटांत आनंदाच्या उकळ्या फुटल्या आहेत.

—कळविण्यास अत्यंत वाईट वाटतें कीं, कांदोळी येथील प्रसिद्ध व कुलीन काकुले घराण्यांतील गृहस्थ रा. रा. श्रिनिवास मुकुंद शे. भोबे हे वैकुंठवासी झाले. हे रा. महादेव शे. काकुले यांचे वडील व रा. हिरू कामत घाणेकर यांचे मेहुणे होते. मृताच्या आत्म्यास शांति मिळो !

—जेनेराल सिल्व्ह यानीं जरा कडक भाषेंत लिहिलेला अर्ज गव्हर्नरांकडे पाठविला होता. त्यामुळें त्यांस पांच दिवसांची कैदेची शिक्षा सुनावण्यांत आली. शिक्षेविरुद्ध आरोपीनें तक्रार केली आहे !

—पणजी पाठशाळेच्या 'आग्रेगाद' अध्यापकांची जात निःपात होईल असा रंग दिसतो.

—प्रो. विश्वांभर सीताराम केरकर यांस फोंडेच्या आल्मैद कॉलेजांत प्राथमिक शिक्षकाचें काम करण्यास सरकारनें परवानगी दिली आहे.

—येथील बालोन्नति समाजाचा एंदांचा उत्सव मोठ्या थाटानें पार पडला. वार्षिक भजनीं सप्ताहासहि बराच लोकसमाज लोटला होता.

—तेन्ह पत्राचे संपादक यांच्यावर झालेल्या हल्ल्यांत त्यांच्या एका डोळ्यास इजा झाली होती. या इजेवर उपचार करून घेण्यासाठीं सदरहू संपादक मिरजेला गेले आहेत.

—येथील भजनी सप्ताहाचे समाप्तीचे दिवशीं आमच्या संपादकांचें प्रवचन झालें. अर्ध्या तासापूर्वी खटल्याचा निकाल वाचण्यांत आला होता.

जाहीर दिलगिरी

भाषण किंवा श्रवण करण्याला आह्मांस अनेक सद्गृहस्थ व संस्थांकडून हरतऱ्हेच्या उत्सवाच्या सभानां हजर राहण्यासाठीं पत्रें आलीं व येत आहेत; परंतु ऐन प्रसंगीं खटल्याच्या कैचींत आमचें चित्तस्वास्थ्य सपशेल घोटाळत पडून राहिल्यामुळें आह्मांस त्या पत्रांनुरूप, इच्छा असतांहि, वर्तन करण्यास अवसर मिळाला नाहीं. व यापुढें कित्येक महिने कोणत्याहि दूरच्य सभेस हजर रहाण्यास फुरसत मिळेल, असें वाटत नाहीं. वरून ते लोकहितदक्ष सद्गृहस्थ व त्या लोकोपकारक संस्था कारणांच्या महत्त्वाकडे नजर पुरवून, आह्मांस क्षमा करतील अशी बळकट आशा आहे.

सं. भारत.

'बाजारांत तुरी....'

एखाद्या खोल विहिरींत एक मोठासा धोंडा पडला म्हणजे त्या विहिरीच्या पाण्यांत कांहीं काळपर्यंत खळबळ माजून राहते. असाच प्रकार वर्तमानपत्रांमधून प्रसंगानुसार उपस्थित होणाऱ्या अनेक प्रकरणासंबंधानें होत असतो.

एकानें कसला तरी एक लेख लिहावा, दुसऱ्यानें त्यावर टीका करावी, तिसऱ्यानें त्यांत आपलें मत प्रदर्शन करावें अशा रीतीनें त्या त्या विषयाची कांहीं काळपर्यंत घोषणा चाललेली असते.

हे विचार सुचण्याचें कारण तूर्त आमच्या इकडील वर्तमानपत्रांमधून चाललेला सरकारी नोकऱ्यांसंबंधाचा वाद होय.

या वादासंबंधीं तूर्त 'भारत' व 'हिंदु' यांमधून निरनिराळीं मतें प्रकट करण्यांत आलेलीं आहेत. या संबंधीं जे लेख प्रकट झालेले दिसतात त्यांपैकीं भारताच्या मागील एका अंकांतील रा. नोकर ह्यांचा लेख मला एका दृष्टीनें जरा विचारांत घेण्यासारखा वाटला.

ह्याचें कारण हेंच कीं, नोकर ह्मटला कीं नोकरीचा पक्षपाती असावा आणि तसें नसेल तर नोकरीचा पेशा त्यानें सोडून देणें हेंच उक्त होय. तें कांहींहि न करितां एक पक्षीं नोकरीपेशा कायम राखणें आणि दुसऱ्यापक्षीं नोकऱ्यांवर टीका करणें ह्मणजे 'अनांठाई वकिली' करणें होय. कसेंहि असो. व्यक्तीचा विचार सोडून देऊन मतांचाच विचार आपण करूं.

सुरुवातीसच श्रीयुत नोकर ह्यानीं प्रस्तुत वादाचा मूलभूत मुद्दा ह्मणून 'हिंदु'तील खालील उतारा दिला आहे.

"सरकारी नोकऱ्या हेंच आमचें राजकारण, सरकारी नोकऱ्या हेंच आमचें आद्यकर्तव्य, सरकारी नोकऱ्या हेंच आमचें सद्यकार्य असा जो उपदेश करण्यांत येतो तो आमच्या समाजाला कितपत हितकारक आहे ह्याचा विचार करणें अवश्य ठरतें." या उताऱ्यावर काय ती श्रीयुत नोकर यांच्या प्रतिपादनाची सगळी मदार असून त्याच्या समर्थनाचेंच काय तें कार्य त्यानीं आपल्या लेखांत बजावलें आहे.

पण हा जो उपदेश करण्यांत येतो असें 'हिंदु' कारांचें ह्मणणें आहे, तो कोठें, केव्हां व कोणाकडून करण्यांत येतो ह्याविषयीं त्यानीं कांहींहि सांगितलें नाहीं. प्रो. बाळकृष्ण वा. सांवर्डेकर ह्यानीं मागें असोळणें येथें दिलेल्या व्याख्यानाला अनुलक्षून जर हें ह्मणणें असेल तर त्याविषयीं खुद्द वादी प्रतिवादीमध्यें पूर्वपक्ष उत्तरपक्ष होऊन अखेर निकाल कसा काय लागला हें सर्वांना ठाऊकच आहे. तेव्हां तो वाद येथें जमेस धरण्याचें कारणच नाहीं.

अशा स्थितींत इतर कोणीहि वादी पुढें नसल्यामुळें खुद्द हिंदुकर्त्यांचेंच तें मत होय आणि तें त्याचें त्यांनींच खोडून काढलेलें आहे हें सहज निष्पन्न होतें. ज्याचें मत त्यानेंच खोडून काढलें तर "येथें कोण चें काय वा गेलें ॥ त्याचें त्यानेंच अनहित केलें ॥" इतरांचें वास्तविक येथें प्रयोजनच नाहीं.

आतां श्रीयुत नोकर हे 'इतर' नसतील तर मात्र गोष्ट निराळी. कसेंहि असलें तरी एवढें खरें कीं कृति व उक्ति यांच्यांत मेळ नसलेल्या कोणातरी व्यक्तीची ही एक आगंतुकीच दिसते.

आतां येथें असा एक प्रश्न उपस्थित होण्याचा संभव आहे कीं, आपणच मतें प्रगट करावींत आणि आपणच तीं खोडून काढावींत असा अव्यापारेषु व्यापार करण्याचें हिंदुकारांना तरी काय प्रयोजन असावें ? असा प्रश्न निघण्याजोगा आहे खरा; पण तो निघालाच तर एखाद्या नवख्या डोक्यांतूनच निघेल. वर्तमानपत्रांच्या धंद्याची ज्यांना माहिती आहे ते असला प्रश्न कधींहि करणार नाहींत.

वर्तमानपत्र ह्मटलें की त्याचा अंक कांहीं झालें तरी वेळेवरच निघाला पाहिजे. एका दिवसाच्या ऐवजीं दुसरा दिवस होऊन कधींहि चालावयाचें नाहीं. आणि आठवड्याच्या आठवड्याला महत्वाचे विषय मिळतातच असेंहि पण नाहीं. बरें तसे विषय मिळालेच तरी पण ब्रिटिश हिंदुस्थानांत त्याची चर्चा कशा प्रकारें होते, झाली, किंवा झाली होती हें पहिल्या प्रथम पाहिलें पाहिजे. कारण ब्रिटिश हिंदुस्थानच्या बरहुकूम नक्कल ज्या अर्थीं इकडे उठवून द्यावयाची त्या अर्थीं तें पाहणें अपरिहार्य होऊन बसतें. आणि सगळे विषय ताजेतवानें असतात असेंहि नाहीं. प्रस्तुतचा हा नोकरीचाच विषय घेतला तर त्याची चर्चा पाहायाला असहकारितेच्या अवल अमदानीकडे—गांधींजींच्या मूळ कार्यक्रमाकडे—पांच सहा वर्षांमागें गेलें पाहिजे.

एवढ्यानें झालें काय ? नाहीं. कारण एवढा खटाटोप करून तद्विषयक सगळे कोटिक्रम शोधून काढले तरी ते कोटिक्रम ज्यांच्या ह्मणण्याला उत्तरादाखल द्यावयाचे त्या व्यक्ति कांहीं येथें समोर उभ्या नसतात आणि इकडून तिकडून कोणी कडून हुडकून काढल्याच तर त्यांचें ह्मणणेंहि पण अशा रीतीनें माडलेलें नसावयाचें की, हे कोटिक्रम जशाच्या तसेच त्याच्या पुढें ठेवतां यावेत. अशा स्थितीत काल्पनिक व्यक्ति निर्माण करणें आणि सहज खोडतां येतील असे काल्पनिक आक्षेप त्यांच्या तोंडीं घालणें हाच मार्ग सर्वांत सुरक्षित असा होय.

'सुरक्षित' ह्मणण्याचें कारण हेंच कीं यदाकदाचित या कोटिक्रमाची टोपी त्या काल्पनिक व्यक्तीच्या डोक्यावर नीट न बसली तरीहि पण त्या व्यक्ति कांहीं तक्रार करण्यास पुढें येत नाहींत. आणि यामुळें अर्थातच त्याना दिलेलें उत्तर निर्विवाद ठरून बिनचूक विचारसरणीचें श्रेय आयतेंच संपादकांच्या पदरीं पडतें.

तात्पर्य वर्तमानपत्राचा धंदा (धंदाच तो! त्या अर्थी धंद्याच्याच दृष्टीनें त्याचा विचार

सरकारी मराठी शाळा

(ले:-- रुक्मिणीरमण)

गेल्या एका 'बोलेतीं ओफिसियाल' मध्यें कुरपें येथील सरकारी मराठी शाळा विद्यार्थ्यांची संख्या समाधानकारक नसल्यामुळे बंद करण्यांत आल्याचें जाहीर झालें आहे.

वास्तविक पहातां एवढी गोष्ट खरी कीं, नुसत्या कुरपें येथीलच नव्हे तर इतर ठिकाणींहि स्थापन झालेल्या सरकारी मराठी शाळांतून मुलांची संख्या अगदींच कमी असते, इतकेंच नव्हे तर पुरेशा विद्यार्थ्यांच्या अभावीं शाळा बंद करण्याचें सरकारनें ठरविलें असल्यास सर्वच मराठी शाळांस समाधि देणें आजच शक्य आहे यांत तिळमात्र शंका नाहीं.

आपल्या गोमांतकांतील हिंदु लोकांचा अत्यंत जिव्हाळ्याचा पहिला प्रश्न ह्मटला ह्मणजे मराठी – मातृभाषेच्या – शिक्षणाचा प्रसार हा होय. सरकारनें या शिक्षणासाठीं एक पै सुद्धां खर्च न केली तरी त्या शिक्षणप्रसाराला आळा बसेल अशी गोष्ट नाहीं. फक्त सरकारनें प्रजेच्या गरजांकडे लक्ष्य देण्याचें आपलें कर्तव्य योग्य रीतीनें पाळलें नाहीं हा दोष मात्र मागें पुढें त्याच्या माथीं येईल !

आह्मांस असें वाटतें कीं, मूळ ज्या येथें सात आठ मराठी शाळा सरकारनें स्थापन केल्या त्यांत त्याचा हेतु हिंदु लोकांच्या गरजा थोड्या बहुत प्रमाणांत भागविणें हा असावा; परंतु तो अल्पांशानें तरी सिद्धीस गेला आहे काय ? उलट वरील शाळांची जी आज स्थिति आहे, ती फार कींव करण्यासारखीच होय हें निःसंशय खरें आहे !

बहुतेक ठिकाणीं असा अनुभव दिसतो कीं गांवातील लोक वरील सरकारी शाळांवर बहिष्कार घालीत असतात. सरकारी मराठी शाळेंत आपला मुलगा पाठविणें ह्मणजे त्याच्या आयुष्याचा व्यर्थ व्यय करणें होय अशी सर्वांचीच समजुत झालेली असते. सरकारी मराठी शाळा लोकवस्तीच्या अगदीं नजीक असतां देखील त्यांत कोणीहि आपलीं मुलें पाठवित नाहीत व लोकवस्तींहून सरासरीं एक मैल किंबहुना त्याहूनहि अधिक दूर असलेल्या खासगी शाळांत बहुतेक लोक आपलीं मुलें पाठवितात या चमत्काराचें कारण काय असावें ? अगदीं जवळ असलेल्या सरकारी शाळेंत तीन चार मुलें व बऱ्याच दूर असलेल्या खासगी शाळेंत ५०—७५ मुलें हें प्रमाण नेहमीं दृष्टीस पडत असतें. सरकारी शाळेंत फी द्यावी लागत नाहीं. व खासगी शाळेंत ती जबरदस्त प्रमाणानें द्यावी लागते हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे. पुष्कळदां असाहि प्रकार होतो कीं, दोनचारहि मुलें मिळत नाहीत असें पाहून कांहीं सरकारी मराठी शिक्षक मुलांच्या पालकांस फूस लावून एक दोन मुलें स्वतःचें व स्वतःच्या शाळेचें अस्तित्व स्थिर करण्याकरितां उपटीत असतात ही गोष्ट नवीन आहे असें नाहीं. ती सर्वांच्याच परिचयाची आहे.

असा हा शोचनीय प्रकार कां घडावा ? महिन्याकाठीं तिजोरींतून ५०।६० रुपये घेऊन हे सरकारी मराठी शाळांतील शिक्षक लोकसमाजाच्या दृष्टीनें प्रीय न ठरावे यांतलें इंगित काय ?

याचें कारण असें आहे कीं, वरील सरकारी मराठी शिक्षकांस ब्रिटिश हिंदुस्थानांतील पद्धतशीर मराठी शिक्षणाचा लाभ झालेला नसतो व गोमांतकांतहि तशा शिक्षणाचा अभाव असल्यामुळें हे शिक्षक मराठी भाषेच्या शास्त्रोक्त ज्ञानाशीं समरस नसतात. नोर्मांल पास झालेल्यानांच नेमण्याचा सरकारचा परिपाठ आहे. परंतु पोर्तुगीज 'नोर्मांल'चा मराठी शिक्षणाशीं कोणता 'बादरायण' संबंध आहे, हें कळत नाहीं. खासगी मराठी शाळांतील शिक्षक बहुतेक ब्रिटिश हिंदुस्थानांत व्हर्नाकुलर फायनल पास झालेले असतात. व पद्धतशीर रीतीनें मुलांस शिक्षण कसें द्यावे हें त्यांना उत्तम रीतीनें कळतें. तेव्हां सरकारी शाळांत मुलें न पाठवितां खासगी शाळांत पाठविण्याचा लोकांचा जो प्रघात आहे त्याचें कारण वर दिग्दर्शित केल्याप्रमाणें आहे. याकरितां सरकारी मराठी शाळांत सुधारणा केली जाणें सर्वतोपरी योग्य आहे.

आह्मांस असें वाटतें कीं सर्व सरकारी मराठी शाळांतून सरकारनें ब्रिटिश हिंदुस्थानांत मराठी ट्रेनिंगचा कोर्स घेतलेले शिक्षक तीन वर्षांचा करार (ॲग्रिमेंट) करून आणावे व कराराची मुदत पुरी झाल्यावर त्यांची नेमणूक येथेंच कायम करावी. ट्रेनिंग कॉलेजच्या परीक्षा पास झालेले मराठी शिक्षक दरमहा ६० रुपयांस कितीतरी मिळूं शकतील.

सरकारनें हा उपक्रम सुरू केला तरच त्या शाळा उपयुक्त ठरतील व त्याचा फायदा जनतेस करून घेतां येईल. पोर्तुगीज 'नोर्मल' पास झालेले व मराठी भाषेचा पक्का परिचय नसलेले कच्च्या ज्ञानाचे शिक्षक मुळींच उपयोगाचे नाहींत; व सरकारहि त्यांना नोकऱ्या पैशावर मोफत पोसतें असेंच ह्मटल्याखेरीज गत्यंतर नाहीं !

व्हावा हें योग्य आहे.) यशस्वी करण्याच्या कामीं ज्या ज्या युक्त्या प्रयुक्त्या लढविण्याग पडतें त्यांतलीच ही एक आहे. हें लक्षीं न घेतां आमच्यांतील कांहीं लेखकांनीं हिंदुकारांवर निष्कारण शस्त्र धरलें आहे ही गोष्ट कांहीं वाजवी नाहीं.

मुख्य प्रतिपादनाविषयीं आमचें ह्मणणें हें वरील प्रमाणें आहे. तथापि ओघास अनुसरून श्रीयुत नोकर ह्यानीं आपल्या लेखांत जे कांहीं विचारार्ह मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्यांचा विचार आह्मीं दुसऱ्या खेपेस करणार आहोत.

मालक

tações vencidas e vencendas em dobro da quantia de 94:08-00 que os ditos executados Locximona Sinai Carongotó e sua mulher obrigaram-se a contribuir anualmente á dita Locximim em tres prestações cada uma de 4 mezes; a favor dc dito Camotim uma hipcteca no Livro C 4 a fl 189 v- sob a inscrição n°. 986 registada em 17 de Setembro de 1892 para haver dos mesmos executados a quautia de 650 rupias; e a favor do dito Angló uma hipoteca no Livro C 9 a fl. 163 v. sob a inscrição n°. 3091 registada em 5 de Dezembro de 1906 para haver dos mesmos executados a quantia de 300 rupias. A contribuição do registo por inteiro e as despesas da praça correrão a cargo do arrematante. E para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de Qnepam 14 de Setembro de 1925.

O Escrivão de Direito do 2° oficio,

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito

R. Colaço

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivao do 2° oficio Barreto, vao ser vendidos em hasta publica, a porta do tribunal judicial, situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem, se dirige a estagao de Sanvordem, no dia 2 do seguinte mez de Outubro, a's dez horas, e pelo preço superior ao da avaliagao os seguintes bens: 1/2 do palmar e varzea "Bonvorichemmedoc", da cultura de coqueiros e arroz; 1/2 da varzea "Matiemedoc" da cultura de arroz; 1/2 da varzea "Patevain gonacodil sordo", da cultura de arroz, 1/2 do palmar e varzea "Butorantil sordo" da cultura de coqueiros e arroz 1/2 do predio "Bondocvolo" da cultura de arroz, 1/2 do predio "Canitemxevota", da cultura de ariqueiros e coqueiros, sitos em Molcornem discritos na conservatoria predial desta comarca respectivamente sob os n°s 1634 1635, 1636, 1640, 7065 e 7066, e avaliados tambem respectivamente em 185, 45, 190, 500, 190 e 180, rupias. Penhorados nos autos de execugao por custas que o Digno Agente do Ministerio Publico nestr comarca promove contra Janqui Gaocarina, viuva de Molcornem e outros por apenso cos autos de inventario orfanologico prestado por obito de Zoinum Bodco' Gauncar e sua mulher que foram da dita. Sao por este citados todos os aredores incertos dos ditos executado os co proprietarios nos termos e para os fins de lei: A contribuigao do registo por inteiro ficara' a cargo do arrematante.

E para ser publico se expediu este. Xeldem 2 de Setembro de 1925.

O escrivao de Direito do 2° oficio

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito,

R. Colago

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivao do 1° oficio Redcar, correm editos de 30 dias a contar do dia em que se publicar o ultimo anuncio, citando a' Podmavoty Poy, viuva de Vitoba Guiri Poy de Xeli de Loliem; por si e como mae administradora da sua filha menor impubere Chempa' e cra residente em Binguem de Karvar do territorio britanico em parte incerta para assistir a todos os termos ate' final po inventario orfanologico a que se procede por obito do dito Vitoba' sendo cabeça de casal o regedor de Loliem Vitola Naraina Porobo Gauncar, sem prejuizo do seu regular andamento. E para ser publico se expediu este. Xeldem 31 de Agosto de 1925.

O Escrivao de Direito

Babu' V. Camotim Redcar

Verifiquei

O Juiz de Direito

R. Colago

O BHARAT

SABER PEDIR

Era uma vez um sugeitorio que tinha uma linda casa. Esta casa era dividida em muitos compartimentos e cada compartimento cheio de artigos de variada especie, desses que apevitam o paladar dos nossos inseparaveis companheiros noc turnos – ratos.

Ora, sem dó nem piedade do tal sugeitorío, os senhores ratos enchiam os seus insaciaveis tubos digestivos, supercarregavam-nos do apetitoso conteudo dos fardos empilhados nos quartos do nosso homem a quem, pela corrosiva acção de gastronomia murina, pouco faltou para ir valer-se ... da *cherêta.*

Andava, pois, desesperado, *fóra da cabeça*, o inconsolavel dono da casa, com a a cintosa perseguição dos ratos, para acabar com os quais cocebeu, arquitectou um exce lente plano.

E se bem o pensou melhor o fez: pegou dum archote aceso de olas e queimou-lhe a casa convertida em ratada.

E' claro que o formoso pre dio ficou reduzido a cinzas; mas os ratos, esses, ao primeiro sinal do alarme igneo, com suas excelentissimas familias inter naram-se, sãos e salvos, na primeira casa contigua que encontraram.

E assim o infeliz sugeitorio que com a zanga dos ratos queimou a casa, ficou para sempre sem habilitação *onde cair morto.*

*

Com ou sem motivos justificados, a *Epoca* de Mapuçá combate sem treguas a acção administrativa do sr. Pascoal João Gon.es, administrador de Bardez. Não lhe queremos mal porisso; porque é livre a critica quando não ultrapasse a educação jornalistica e o criticado esteja nas condições de se defender.

Mas, de criticar a delirar vai enorme diferença. E a *Epoca delira*, quando se sente com a inaudita coragem de alvitrar ao governo nomeações de administradores europeus, coisa que nem lembraria ao demonio!

¿Deseja a *Epoca* que seja *escorraçado* de suas funcções o actual administrador do concelho de Bardez, por *incompativel*?

Está perfeitamente b e m. Querer, po.êm, daí que haja administradores europeus, é que não está nada bem

E' que um tal *deside atum* se assemelha ao daquele que, como se viu no conto precedente, queimou a casa, querendo pô la ao abrigo da perseguição murina.

Sim; se a *Epoca* se persuade de que o seu alvitre possui o condão de acabar com *politiquices administrativas*, engana-se, redondamente, porque tal defeito é inerente á natureza humana, quere europêa, quere indiana.

Já vê, portanto, o ilustre colega que em sendo posto em pratica o seu alvitre, a India ficará só como aquele sugei torio que ficou sem habilitação, sem seus administradores nativos, subsistindo, de resto, os ratos de *politiquices administrativas.*

Pedir por pedir, todos pedem; mas raros sabem pedir com geito ..

ACRADECENDO

O director de *O Bharrt* esta' sendo muito cumprimentado por causa de sua condenaçao.

A falta de espaço nos inibe de maugrado nosso publicar a longa relaçao dos cidadaos que nos afirmaram a sua desinteressada solidariedade e comovedora simpatia, o que, porem, faremos, logo que as circunstacias no-lo permitam.

Agradecemos, entretanto, aos nossos amigos a sua cativante gentilesa.

ECOS E CRITICA

EIA AVANTE, POIS !

O sr. Mariano Martins desagregando os agregadas do Liceu central acaba de prestar mais um serviço relevante ao País.

Continue Sua Excia. na sua benefica obra da redenção ecocomico-financeira da colónia, dôa a quem doer, e, na plena certeza de que o nosso Povo, avido de legalidade e moralidade não lhe regateará nenhum sacrificio, digne-se de, com mão firme, vibrar golpes certeiros contra tudo o que de ilegal e imoral exista.

Eia avante, pois!

SINECURAS

Sob esta siguificativa epigrafe, lê-se no *Goan World* de Bombaim, edição de Setembro, o seguinte:

"Repetidas representações têem sido feitas ao Governo Central preconisándo lhe a conveniencia de abolir os governos de Damão e Diu, que estão pesando tanto sobre o Tesouro da India Portuguesa. O facto de que o pouco de territorio que ainda resta aos portugueses da India é administrado por tres governadores assistidos por uma legião de oficiais civis e mi litares, encerra um tanto ou quanto de bom humor. Damão e Diu não são certamente centros de tamanha importancia que mereçam dois governado res separados, cuja ocupação principal, diga se de passagem, parece ser a mudança dum lugar para outro no goso dum perpetuo feriado. Os dois gogernos em questão são praticamente sinecuras, que não ser vem senão de ornamento á custa de tanto dinheiro do Estado. E, não obstante, o Gover no central não presta nenhuma atenção á proposta de abolição destes dois lugares, que se contam entre os luxos do sistema administrativo portuguez na India. A reabilitação do Tesouro continuará a ser impossivel, enquanto ele seja forçado a substentar o peso de semelhantes sinecuras que constituem uma das fases do nosso problema financeiro".

Isto é tão claro que dispensa comentarios.

AS MESMAS CAUSAS ...

No julgamento dos acusados do movimento de 18 de Abril, o capitão tenente da Armada sr. Correa da Silva depôz o seguinte:

"O sincero sentir de bem servir o Pais foi o que inspirou senão todos, pelo menos a maioria dos acusados, embora, a meu vêr, segundo uma orientação errada."

Devido ao *sincero sentir* de *bem servir o Paiz* è que, segundo todas as probabilidades, devem ter sido absolvidos os implicados no referido movimento de Portugal.

¿Porquê é que o *Bharat* de Gôa não há de ser, tambem, absolvido, sabendo-se que ao seu artigo incriminado não presidiu outro sentir se não *o de bem servir o Paiz*?

E, depois, Gôa não é prolongamento de Portugal?...

SAIBAM QUANTOS ...

Um cavalheiro do nosso conhecimento tomou-se a liberdade de escrever nos o seguinte:

"Julgava o *Bharat* isento do dominio de conveniencias, mas, pelo visto, enganei-me no juizo. Se não fôra *isso*, V. não deixaria de, certamente, denunciar ao público ilustrado do Pais, a manifesta incompetencia da pessôa a quem, á má hora, foi confiada a delicada *agencia* do M. P. nesta Comarca de Quepem.

Não quero tratar, por hoje, nem ao de leve, do muito que se conta da falta de escrupulo funcional da mesma pessôa, porque não me sobra tempo para tanto; mas o que não posso deixar de frisar é que causa-me a mais triste impressão o vêr que o homem não sabe lêr os artigos do Codigo Penal que bem ou mal cita e escrever as promoções que bem ou mal arranja...

Uma pessôa que não sabe ler nem escrever mediocremente, ainda que se vista à última moda europêa, creio que não pode prestigiar muito o cargo do agente do

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, आश्विन कृ० ६ ष्टी शके १८४७

भारतावरील खटल्यांत जज्जसाहेबांचा न्याय-निर्णय

वाचकांची जिज्ञासा पुरविण्यासाठीं भारतावरील खटल्यांत जज्जसाहेबांनीं दिलेल्या न्यायनिर्णयाचा (Sentença) त्रोटक तरजुमा खालीं देण्यांत येत आहे. अपील झाल्याकारणानें तो निकाल कायमचा असें मानतां न आलें तरीं, निकालाचें साधारण स्वरूप समजण्यास तो उपयोगी पडेल.

न्याय-निर्णय

"सरकारी वकिलानें एकंदर लेख आरोपित म्हटलें असलें तरी अमूकच शब्दांत किंवा वाक्यांत सरकारची बदनामी केली आहे असा स्पष्ट उल्लेख केला नाहीं.

एकंदर लेखाच्या उद्देशांत अपमानकारक भाषा वापरली आहे व तीं कोणातरी एकास अनुलक्षून लिहिली आहे. ह्या दोनहि मुद्द्यावरून Seculos depois... (कांहीं शतकांनंतर) ह्या लेखांत बदनामी आहे, फार्की, तो लेख अमूकच एकाद्यास लागू करण्यांत आला आहे.

आरोपित लेख, जहाल व नालायक भाषा असल्याकरून अयोग्य व बेशिस्तीचा आहे असें त्या लेखांतील पुढील उताऱ्यांतून दिसून येतें. [हे उतारे त्या लेखांतीलच काहीं भ्यारे आहेत. पुनरावृत्ति न होण्यासाठीं इकडे दिले नाहींत].

तो लेख जो कोण वाचील त्यास, गव्हर्नर, कौंसिल्य लेजिज्लातीव्हचे मेंबर व वास्कु द गामाच्या फेस्तास विशेष उजाळा देण्यासाठीं ज्या कमिट्या परिश्रम करीत होत्या, त्यांच्या इभ्रतीस व अब्रूस बाधा येण्यासारखा मजकूर त्यांत आहे असें आढळून येईल. वास्तविक, esbanjar म्हणजे अनाठायीं खर्च करणें असें आहे व जो कोण असा अनावश्यक खर्च करितो तो गुन्हेगार ठरतो.

आरोपित लेखांत 'अनावश्यक खर्च' हा शब्दसमुच्चय अपमानकारक असून, हेगडे देसाई हे अपमान करणारे व त्याचें साधन म्हणजे फार प्रसिद्धी असलेलें भारत, हें वर्तमानपत्र होय.

फ्रोला (Frola) ह्या इतालियन न्यायशास्त्रज्ञाच्या विचारसरणीप्रमाणें 'अनावश्यक खर्च करून' 'ज्या कालीं सरकार व त्याचे बगलबच्चे मजा मारितात' ह्या वाक्यांत बदनामी करण्यास समर्थ असा अर्थ खरोखरच निघतो व आरोपीचा अपमानकारक इरादा 'कांहीं शतकांनंतर' ह्या लेखांत दिसतो. आरोपी आपल्या लेखांत गुन्हेगारी हेतु नाहीं असें प्रतिपादन करितो.

पण वर्तमान पत्राच्या गैर विचारस्वातंत्र्याच्या कायद्यांत गुन्हेगारी हेतु अध्याहृत समजला जात नाहीं, कांकीं, फ्रोला याच्या विचारपद्धतीप्रमाणें 'जर एकंदर शब्दांत अपमानकारक भाषा नसेल तर गुन्हा असंभवनीय ठरतो. कांकीं, त्या शब्दांत लेखकाचा अपमान करण्याचा हेतु असला तरी, ते शब्द कधींहि व कोणाचाहि अपमान करीत नसतात. तथापि, लेखकाचा उद्देश व गुन्हेगारी हेतु असतानां ती भाषा अपमान करणारी आहे असें सहज ठरतें. शासन शास्त्रपंडित कारमिग्वानी (Carmiguani) यांच्या म्हणण्याप्रमाणें 'लेखांत अपमानकारक भाषा असेल तर तो वाईट हेतूनें लिहिला गेला आहे असा निराळा पुरावा आणण्याची गरजच नसते व गुन्हेगारी हेतू नाहीं हें आरोपीनें पुराव्यानिशीं सिद्ध केलें पाहिजे."

आरोपीच्या लेखी जबानीतील म्हणण्याप्रमाणें २८ अक्टोबर १९१० तारखेच्या कायद्याच्या अनेक विधानांकडे चालू खटल्यात दुर्लक्ष करण्यांत आलें आहे. पण आरोपीनें चांगल्या प्रकारें असें जाणलें पाहिजे होतें कीं, हा कायदा पोर्तुगालच्या वर्तमानपत्रीं गैरविचार स्वातंत्र्यास आळा घालणारा आहे व तो इकडे लागू नाहीं. असें प्रस्तुत भारतावर झालेल्या खटल्याचा निकाल करितांनां २२ एप्रील सन १९२१ तारखेच्या निवाड्यांत पणजीच्या हायकोर्टानें ठरविलें आहे.

अशाच आशयाचा निवाडा वरील हायकोर्टानें ता. २९ फेब्रुवारी १९२४ तारखेच्या निकालांत दुसऱ्या खटल्यावर दिला आहे.

आपले विचार प्रगट करितांना मूळ कायद्याच्या संघटनेच्या (Carta constucional) कायद्यांनीं दिलेल्या सवलती उपभोगण्यास समतोल बुद्धि व शांत वृत्ति राखिली पाहिजे व त्या कायद्याचा फायदा नालस्ती करण्याच्या घातकी शस्त्राच्या रूपानें घेणें योग्य नव्हे. लोकांस सुशिक्षित व सुनीतिसंपन्न करण्याचें पवित्र व उच्चतम कर्तव्य बजावण्यासाठीं, कायद्यानें आंखलेल्या सीमेंत सरकारविरुद्ध टीका गरज पडेल त्यावेळीं करण्यासाठीं विचार स्वातंत्र्याचा फायदा अवश्य घ्यावा. वर्तमानपत्रीं विचार स्वातंत्र्य म्हणजे बेजबाबदारी नव्हे.

आरोपी हे बुद्धिमान व पुष्कळ शिकलेले आहेत. त्यांचें वर्तमानपत्र फार प्रसिद्ध आहे व त्या वर्तमानपत्राचें हिंदुसमाजावर बरेंच वजनहि पडतें.

ह्या सर्व विवेचनावरून गुन्हा लागू व पुराव्यांनीं शाबीत होतो असा निर्णय देतों व कलम ७ पारा २, कलम ८, देक्रेत नंबर १ तारीख २९ मार्च १८९० व कोदिगु पेनाल कलम ४०७ व ४११ ह्या कायद्याची अमंलबजावणी करितों.

हेगडे देसाई हे चांगल्या वर्तणुकीचे असल्यावरून ३० दिवसाची कैदी किंवा कैदीऐवजीं तीस दिवसांबद्दल ४२ रु. १३ आ. १० पै भरावे व दंड ५० इस्कूद म्हणजे १४२ रु. १३ आ. १० पै शिवाय, खटल्याच्या संच्याचा खर्च सेल वगैरे.

ता. २९ सप्टेंबर सन १९२५.

स्फुट विचार

देपुताद—निवडणुकाः—देपुतादची निवडणूक होण्याचे दिवस नजीक येत चालले तसतशी निरनिराळ्या पक्षांनीं आपआपल्या उमेदवाराप्रीत्यर्थ झटण्याच्या कार्यास जोरानें सुरवात होत चालली आहे. एका पक्षास, एका उमेदवाराची निवडणूक झाली असतां ध्येय साध्य होईल अशी अपेक्षा आहे; तर दुसरा पक्ष दुसऱ्या उमेदवाराच्या निवडणुकेंत हित पाहण्याची आशा करितो. पण उमेदवाराची उमेद कोठपर्यंत हें एकंदर जनतेनें ध्यानांत घेऊनच त्या उमेदवारास पाठिंबा दिला पाहिजे. वास्तविक पाहतां, तो उमेदवार कर्तव्यदक्ष, हुशार, विद्वान असूनहि ज्या प्रांतातर्फे निवडण्यांत आला आहे त्या प्रांताच्या उन्नतीविषयीं कळकळ बाळगणारा असा असला पाहिजे. त्यांतहि, त्या निवडून येणाऱ्या देपुतादचा अगोदर पासून, त्याच्या कोणत्याहि विशिष्ट गुणामुळें बोलबाला झाला असेल तर उत्तम ! परंतु ह्या सर्व गुणानीं मंडित असा देपुताद मिळणें बरेंच कठिण दिसतें.

निवडणुका व प्रामाणिकपणाः— राज्यकारभारांतर्गत लहानमोठे अधिकार एका निशिष्ट व्यक्तीच्या मतानें न चालतां, राज्यांतील सुशिक्षित लोकांच्या मताधिक्यानें चालावे ह्या प्रामाणिक हेतूनेंच निवडणुकांची पद्धत अस्तित्वांत आली असली पाहिजे. प्रत्येक शिक्षित व्यक्तीस मतरूपानें राज्याधिकारांत भाग घेतां यावा हा मूळ प्रामाणिक हेतु कोणीकडे व खऱ्या खोट्या मतदारांची भेसळ, प्रामाणिक अप्रामाणिक मतदारांची चंगळ, उमेदवार अधिक मतांनीं निवडून येण्यापर्यंतची दंगल इतक्या अनिश्चित गोष्टी पाहिल्या म्हणजे निवडणुका व प्रामाणिकपणा ह्यांचें साहचर्य नसून त्यांची फारकत झाल्याचें अनुभवास येतें. ज्यांत यशस्वीपणाचें मुख्य अंग असें प्रामाणिकपणा नाहीं, त्या निवडणुकेंतून निवडला गेलेला देपुताद किती प्रामाणिकपणानें वागेल हें जाणण्यास बुद्धीस श्रम देण्यापेक्षां सिं. प्राजेरीस द कोस्त ह्यांच्या देपुतादगिरींकडे लक्ष्य दिल्यास पुरे !

मागील उदाहरण व पुढील धोरण :— भावी देपुतादाचें धोरण काय असलें पाहिजे ह्याचा धडा आजपर्यंत प्राजेरीस यांनीं घालून दिलाच आहे. तो धडा आबालवृद्धांच्या परिचयाचा असला तरीं, विसरभोळ्यांच्या स्मृतीसाठीं व जाणून न कळण्याचा बहाणा करणाऱ्यास उमजविण्यासाठीं पुनः तूर्तच्या निवडणुकीच्या वेळीं, लक्ष्यांत घेतल्यास भावी देपुताद निवडणुकीच्या कामीं त्याचा थोडा तरी फायदा झाल्याशिवाय राहणार नाहीं. ह्या खेपेस देपुताद निवडणें म्हणजे एका व्यक्तीस केवळ व्यक्तिहितासाठीं व त्याच्या बगलबच्चांच्या पोळीवर तूप ओढण्यासाठीं पोर्तुगालास रवाना करणें असा अर्थ अनुभवांतीं निघतो. व प्राजेरीस यांनीं तर ह्या अर्थास पुस्ती जोडण्यांकरितां देपुतादगिरी कायमची बळकावून त्या देपुतादगिरीच्या ओसरीवर हात पाय पसरविण्याचा विडा व उचलला आहे.

पुरे झाला प्राजेरिसः— सिं. प्राजेरिस यानीं नालायक इसमाची खोगीर भरती करण्यास नवनव्या व अनावश्यक नोकऱ्यांची वाढ करून राष्ट्राच्या संपत्तीनें आपल्या इष्टमित्रांचे खिसे कसे भरले हें उघड्या डोळ्यांनीं पाहणाऱ्या पोर्तुगेज हिंदुस्थानच्या जनतेसमोर पुनः देपुताद या नात्यानें सि. प्राजेरिस राहूं पाहतात असें ऐकलें म्हणजे आश्चर्यच वाटूं लागतें. जनाची सोडाच पण मनाची तरी थोडीशी लाज असती तर प्राजेरिस आतां देपुताद राहिले नसते हें एका बाजूनें खरें असलें, तथापि प्राजेरिसची देपुतादगिरी म्हणजे स्वहितसाधकांच्या आशेची अखंड दोरी ! ह्या स्वार्थी दोरीनें जखडलेले प्राजेरिस--फक्त केवळ स्वहितासाठीं राष्ट्रास, नव्या पगारवाढीच्या बंधनानीं आवळण्याच्या इच्छेनें प्रेरित होऊन प्राजेरिसच्या नावांची दाखलगिरी करितील ह्या चिन्तेनेंच, पुरे झाला प्राजेरिस असे उद्गार मुखावाटे निघाल्यास नवल नाहीं.

प्रागतिक संघ व देपुतादः— सि. प्राजेरिस किंवा त्याच्या वळणावर जाणारे देपुताद काय करितील हें कल्पनेनेंच जाणतां येण्यासारखें असल्यानें त्यांचें प्रत्यक्ष स्वरूप न पाहण्याकरितां, आज जोराचे प्रयत्न व आस्थेवाईक खबरदारी यांच्या सहायानें देपुतादची निवडणूक केली पाहिजे. व तो देपुताद एका व्यक्तीचें व इष्टमित्राचें हित करणारा नसून अनेक व्यक्तीचें व परंपरेनें गोमांतकाचें हितसंवर्धन करणारा असाच असला पाहिजे. हें सांगण्याची गरजच नाहीं. असा देपुताद कोण असावा ह्याचा विचार, प्रागतिक संघ, ह्या गोव्याचें सामुदायिक हितवर्धक उपाय योजणाऱ्या संस्थेनें अवश्य करून जो देपुताद पसंत ठरेल त्यास सर्व लोकांनीं व विशेषतः प्रागतिक संघांतर्गत व्यक्तीनीं सहानुभूतीचा पाठिंबा द्यावा अशी आग्रहाची सूचना आहे.

उद्धरेत् आत्मनात्मानम् :— व्यक्ति असो वा समाज असो; ज्यानें त्यानें स्वतःची उन्नति करण्यास स्वतःच झटलें पाहिजे. इतरांनीं त्यांना कितीहि मदत केली, तरी स्वयंस्फूर्तीशिवाय कांहीं उपयोगी नाहीं आणि स्वयंस्फूर्तीनें आरंभिलेल्या कार्यांत सुफल प्राप्त झाल्याविना राहणार नाहीं. ह्या दृष्टीनें पाहूं गेल्यास ता. १ आक्टोबर रोजीं मडगांव येथें भरलेल्या इराळे परिषदेचें महत्व आम्हांस अधिक वाटतें. गोमांतकांत एका

मडगांवचा सरस्वत्युत्सव

(वातमीपत्र)

दिवस पहिला.

प्रसिद्ध झाल्याप्रमाणें विजयादशमीं ता. २७ रविवार रोजीं उमरावतीचे श्री. वीर वामनराव जोशी, पुण्याचे श्री. गोविंदराव रामचंद्र बाल आणि श्री. कृष्णराव सखाराम मसुरेकर हे संध्याकाळचे मेलनें मडगांवीं दाखल झाले. त्यांचे स्वागतार्थ कॉलेम येथें रा. दत्तात्रय पां. नाईक दलाल व नरसिंह रा. केणी हे गेले होते. तेथें त्यांना चहा, पाणी, अल्पाहार देण्यांत आला. उत्सवाचे नियोजित अध्यक्ष प्रो० श्रीकृष्ण नि. चापेकर हे अपरिहार्य अडचणींमुळें वरील मंडळीबरोबर येऊं शकले नाहींत. मडगांव स्टेशनवर महाराष्ट्रीय पाहुण्यांचें थाटानें स्वागत करण्यांत आलें. बालचमू संस्थेचे स्वयंसेवकाच्या पथकानें खडी ताजीम देऊन पाहुण्याचें स्वागत केल्यावर रा. रामचंद्र वि. केणी यांनीं हारतुरे अर्पण केले. पाहुण्यांची व मंडळाचे पुढाऱ्यांची रा. दलाल यांनीं ओळख करून दिल्यावर थाटाची मिरवणूक निघाली ती थेट स्टेशनवरून कापडबाजारांतून मुनिसिपालटीला डावी घालून ६॥ वाजतां श्री दामोदर विद्याभुवनांत आली. तेथें चौघड्याचे सुस्वर निनादांत व फटाक्यांचे कडकडाटांत सर्वांनीं महाराष्ट्रीयांचें स्वागत केलें. श्री सरस्वतीचें दर्शन घेऊन पाहुणें मंडळी रा. दलाल यांचे वाड्यांत विश्रांतीसाटीं दाखल झाली. सायंकाळीं ७॥। वाजतां सभेच्या कामास सुरुवात झाली. प्रथमतः रा. द. पां. ना. दलाल यांनीं पाहुणे, सभाजन वगैरे सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानून " या कुंदेंदु तुषार हार धवला " हा श्लोक ह्मणून शारदेचें स्तवन केल्यावर ते ह्मणाले:—

स्वागतपर भाषण

परमेश्वराच्या व श्री सरस्वतीच्या कृपाप्रसादानें यंदांचा नववा सरस्वत्युत्सव साजरा होत आहे याबद्दल सरस्वतीसेवक मंडळासच नव्हे तर सर्व सरस्वतीभक्तांनाहि समाधानाची जोड लाभत आहे. मंडळानें चालविलेल्या व्याख्यानमालेपासून महाराष्ट्रीय व गोमांतकीय जनतेंत स्नेहसंवर्धन होत असून आजपर्यंत महाराष्ट्रांतील बरेच पुढारी इकडे येऊन आपल्या ज्ञानाचा फायदा त्यांनीं इकडील जनतेस करून दिला आहे. ही परंपरा त्यानीं अशीच चालू ठेवावी आणि मंडळास आभारांत ठेवावें अशी विनंति केली. इकडील परिस्थितीसंबंधीं कांहीं माहिती सांगून मराठी शिक्षण इकडील हिंदु जनता सरकारचे आश्रयाचे अभावीं स्वतः झीज सोसून संपादन करते, तूर्त मराठी शिक्षणाचा प्रसार झपाट्यानें होत आहे, राजकीय क्षेत्रांत खिश्चिनासारखे हिंदु लोक भाग घेत नाहींत. याचीं कारणें जरी अनेक असलीं तरी उच्च शिक्षणाचा प्रसार व तें संपादन करून स्वतंत्र विचारांचे तरुण पुढें आल्यावांचून हिंदूंची प्रगति होणार नाहीं. व्याख्यानमालांच्या योगें समाजांत जागृति होण्यास कसें साधनीभूत होतें, सरस्वत्युत्सवासारख्या सार्वजनिक व धार्मिक उत्सवांमुळें तीन दिवसपर्यंत लहानथोरांत विद्यादेवीबद्दल कसा आदर व आनंद उत्पन्न होतो, इत्यादि स्थानिक परिस्थितीचा उल्लेख करून त्या दिवसाच्या उत्सवाचे नियोजित अध्यक्ष प्रो० चापेकर हे येऊं शकले नाहींत ह्मणून खेद प्रदर्शित करून रा. वीर वामनराव यांनीं सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारून संस्थेस आभारी करावें अशी विनंति केली. ह्या विनंतीला अनुमोदन देतांना रा. मसुरेकर यांनीं रा. वीर वामनराव जोशी व रा. गोविंदराव बाल यांची सर्वांना योग्य शद्बांत ओळख करून दिली. व श्री सरस्वतीची कृपा ह्मणूनच रा. जोशी यांचें येणें झालें नपेक्षां त्यांना प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें येतां आलें नसतें ह्मणून सांगितलें. प्रो० चापेकर हे उद्यां खचीत येतील असें सांगून आजचें अध्यक्षस्थान रा. जोशी यांनीं मंडीत करावें या रा. दलाल यांच्या विनंतीला अनुमोदन दिलें. टाळ्यांच्या प्रचंड गजरांत त्याला पुष्टि मिळाल्यावर रा. जोशी हे अध्यक्षस्थानीं विराजमान झाले. प्रथमतः रा. मसुरेकर यानीं " धर्मश्रद्धा " यासंबधीं दोन शब्द सांगितल्यावर रा जोशी यानीं थोड्या शब्दांत प्रो० चापेकर यांचे गैरहजिरींत मला अध्यक्षांचें काम करणें भाग आहे असें सांगून सरस्वत्युत्सवाच्या उपक्रमाबद्दल मंडळाचें अभिनंदन करून सरस्वतीच्या स्वरूपाबद्दल पौर्वात्य व पाश्चात्य कवि व कविता यांची तुलना, समर्थ, तुकाराम, ज्ञानेश्वर वगैरेंच्या कवितेंतील प्रसाद, आतांच्या सटरफटर कवींच्या कवितेंतील अश्लील प्रकार, वगैरे संबंधानें पाऊण तास उत्तम विवेचन करून सभाजनांना तल्लीन करून सोडलें. नंतर रा. दलाल यांनीं दुसऱ्या दिवसाचा कार्यक्रम जाहीर करतांच पहिल्या दिवसाचा समारंभ आरत्या प्रसाद वगैरे होऊन ९॥ वाजतां आटोपला.

दिवस दुसरा

ठरल्याप्रमाणें या दिवशीं प्रो० चापेकर यांची स्वारी मेलनें दाखल झाली. त्यांचें कुळें येथें रा. ह्यापर्शेकर, मळीये व कामत यांनीं स्वागत करून त्यांना अल्पाहार देण्यांत आला. मडगांव स्टेशनवर त्यांचे स्वागतार्थ निवडक मंडळी हजर होती. प्रथमतः स्टेशनवरून श्री दामोदर विद्याभुवनांत येऊन त्यानीं श्री सरस्वतीचें दर्शन घेऊन ते रा. दलाल यांचे वाड्यांत दाखल झाले व नंतर सर्व पाहुणे मंडळी ७॥ वाजतां सभेच्या कामास सभास्थानीं दाखल झाली. या दिवशीं व तिसऱ्या दिवशीं श्री दामोदर विद्याभुवनांत अतिशय गर्दी होऊन विद्याभुवन आंत बाहेर प्रेक्षकमंडळींनें अगदीं फुलून गेलें होतें. अशी गर्दी यापूर्वीं क्वचितच झाली होती असें जो तो ह्मणत होता. रा. दलाल यांच्या विनंतीनें व रा. मसुरेकर यांचे पुष्टीनें प्रो. चापेकर हे अध्यक्ष स्थानापन्न झाले. प्रथमतः त्यानीं अपरिहार्य अडचणीमुळें पूर्व दिवशीं हजर राहतां आलें नाहीं याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करून विजयादशमीचे दिवशींच आपलें सीमोल्लंघन होत आहे व गोमांतकीय जनतेशीं स्नेहसंबंध जडण्याचा या श्री सरस्वत्युत्सवामुळें सुयोग येत आहे याबद्दल आनंद प्रदर्शित करून आपल्या ' श्री शारदेचें महात्म्य ' या विषयावरील भाषणाला सुरवात केली. त्यानीं आपल्या अस्खलीत वाणीनें या विषयावर एक तास भाषण करून आपले विचार उत्तम प्रकारें पटवून दिले. त्याचा सारांश व इतर व्याख्यानाचा सारांश सवडीप्रमाणें ' भारतांत ' प्रसिद्ध होईलच. नंतर श्री. वीर वामनराव जोशी यांनीं " गीता–धर्म " या विषयावर आपल्या जोरदार व स्फुर्तिदायक भाषेंत दीड तास भाषण करून भगवान श्री कृष्णानीं गीतेंत कर्माबद्दल जो धडा अर्जुनाचे निमित्तानें सर्वांना घालून दिला आहे त्याची थोरवी वर्णन केली. हा विषय समजावून देतानां त्यांनीं जीं जीं उदाहरणें दिलीं त्यामुळें त्यांचे विद्वत्तेबद्दल व विषयप्रतिपादण्याच्या त्यांचे हातोटीबद्दल जो तो त्यांची 'वीर' ही पदवी सार्थ आहे असें ह्मणूं लागला. इतक्यांत सभाजनांपैकीं एकानें एक शंका विचारली त्याचें समाधान वेळेच्या अभावामुळें दुसऱ्या दिवशीं करूं असें सांगितलें. नंतर दुसऱ्या दिवशींचा कार्यक्रम जाहीर होतांच रात्री १० वाजतां ह. भ. प. मुकूंदराज कृष्णभट बांदकर यांच्या हरिकीर्तनास आरंभ झाला. त्यांच्या कीर्तनाचा योग मडगांव शहरीं १६।१७ वर्षांनीं होत असल्यामुळें दोनहि दिवशीं कीर्तनास जो प्रचंड समुदाय झाला तो यापूर्वीं कधींच झाला नाहीं.

दिवस तिसरा

श्री दामोदर वाचनमंदिराचा वाढदिवस समारंभ

आज आठ वर्षेंपर्यंत सर्वांना वृत्तपत्रें व विविध ज्ञानाचीं पुस्तकें सदैव वाचण्याचा लाभ करून देणाऱ्या वरील संस्थेचा आठवा वार्षिक अहवाल रा. य. वि. पै रायतुरकर यांनीं संक्षेपतः वाचून दाखविला. त्यासंबंधानें अध्यक्ष प्रो. चापेकर यानीं थोडक्यांत भाषण करून वरील वाचनमंदिरासारख्या संस्था लोकाश्रयास खरोखर पात्र आहेत ह्मणून सांगितल्यावर टाळ्यांच्या गजरांत अहवाल मंजुर झाला. नंतर कै. डॉ. रा. गो. भांडारकर यांच्या फोटोचा अनावरण विधि करतांना प्रो. चापेकर यांनीं डॉ. भांडारकरांचा योग्य शद्बानीं गुणगौरव करून सारस्वत ज्ञातीसच नव्हे तर संस्कृत जगाला ललामभूत असणाऱ्या या पंडित श्रेष्ठांच्या तसबिरीवरील पडदा फटाक्याचे कडकडाटांत व टाळ्यांच्या गजरांत दूर केला. डेक्कन कालेजांतील या माजी प्रोफेसरांचा अशाप्रकारें सन्मान करण्याचा मान स. से. मंडळानें त्याच कॉलेजांतील सहकारी मित्राला दिला या बद्दल मंडळाचे सानंदपूर्वक आभार मानल्यावर कार्यक्रमपत्रिकेप्रमाणें श्री. वीर वामनराव यास 'महात्मा गांधींच्या राजकारणांतील रहस्य व पूर्व दिवशींच्या शंकेचा खुलासा ' या जोड विषयावर भाषण करण्यास अध्यक्ष प्रो. चापेकर यांनीं विनंति केली. वीर वामनरावजीनीं या विषयावर १॥ तास विचारपरिप्लुत व सुंदर भाषण केलें. हे विषय समजावून देतांना जोशी यांच्या ओजस्वी वाणीचा व प्रगल्भ विद्वत्तेचा अनुभव सर्वांस येऊन "वीर" या पदवीस वामनराव सर्वथैव पात्र आहेत असे उद्गार सर्वांकडून ऐकूं येत होते. जोशी यांनीं स्वागत व आदरातिथ्याबद्दल संस्थेचे आभार मानून आपलें भाषण संपविलें. नंतर दोनहि दिवसातील व्याख्यानांचा थोडक्यांत समारोप करून अध्यक्ष प्रो० चापेकर यांनीं "महाराष्ट्र संतांची कामगिरी" या विषयावर विद्वत्ताप्रचूर, मार्मिक आणि उद्बोधक असें एक तास भाषण करून सभाजनांना तल्लीन करून सोडलें व शेवटीं आपणास अध्यक्षस्थान दिल्याबद्दल व स्वागत आदरादि भावाबद्दल संस्थेचे आभार मानले: नंतर रा. दलाल यांनीं अध्यक्ष, कीर्तनकार, वक्ते, स्वयंसेवक व प्रेक्षकसमूह याचे सद्गदित अंतःकरणानें आभार मानून प्रो० चापेकर, जोशी, बाल व मसुरेकर यांस एक दिवस जास्त राहण्याचा आग्रह केला. पण रा. जोशी व रिपोर्टर गोविंदराव बाल यांस बेळगावला निकटीचीं कामें असल्यावरून त्यानां राहतां येत नसल्यामुळें प्रो० चापेकर व रा मसुरेकर यांनीं राहण्याचें कबूल केलें. नंतर १०॥ वाजतां ह. भ. प. मुकूंदराज कृ. बांदकर याचें सुश्राव्य कीर्तन झालें. कीर्तनाला आदल्या दिवसाप्रमाणेंच फार गर्दी झाली होती. रात्रौ दोन वाजता आरत्या प्रसाद वगैरे होऊन तिसऱ्या दिवसाचा कार्यक्रम संपला. दुसऱ्या दिवशीं मेलनें वीर वामनराव व गोविंदराव बाल हे बेळगांवला जाण्यास गेले.

दिवस चौथा.

या दिवशीं सकाळीं प्रो० चापेकर व मसुरेकर हे फोंडें महालांतील गौड सारस्वताचीं देवस्थानें पहाण्यास गेले ते सर्व देवळें पाहून तिकडील सृष्टिसौंदर्य व देवस्थानची रचना पाहून आनंदी व समाधान वृत्तीनें सायंकाळीं ७ वाजतां परत आले. रात्रौ ८ वाजता चौथ्या दिवसाच्या उत्सवास सुरवात झाली. प्रथमतः रा. दलाल यांनीं वरील उभयतांचे ते राहिल्याबद्दल आभार मानून प्रो० चापेकर यांस " देवभक्ति व सद्गुरुभक्ति " या विषयावर प्रवचन देण्यास विनंति केली. रा. मसुरेकर यांचे आपापसांत

v. até 86 v. do Livro B 44 penhorados nos ditos autos de execução por custas como pertencentes aos executados. Por este são citados todos os credores incertos dos ditos executados bem como os co-proprietarios e quinhoeiros para deduzirem os seus direitos nos termos e para os fins de lei. A contaibuição do registo por inteiro e as despesas da praça correrão a cargo do arrematante. E para ser publico se expediu este-

Xeldem da comarca de Quepem, 26 de Setembro de 1925.

O escrivão de Direito do 2 ° oficio
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
R. Coloço

O Bharat

O NOSSO CANDIDATO

Na reunião conjunta do Directorio e das Comissões Concelhias do *Pragatica Sanga*, realisada no dia 11 do corrente em Nova Gôa, deliberou-se apoiar unanimemente a candidatura do sr. dr. Froilano de Melo, na proxima eleição do deputado pela India.

E' de todos sabido que tanto o *Sanga* como o *Bharat* pugnaram, na passada eleição, pela victoria da sabia individualidade do dr. Melo, victoria que se não alcançou por um conjunto de circunstancias imprevistas que á ultima hora surgiram.

Felizmente para o *Sanga* e felizmente tambem para o *Bharat*, tais dificuldades se superaram, sendo, porisso, de esperar que seja, desta vez, certo o triunfo do nosso candidato.

E' que o dr. Melo reune na sua simpatica e popular pessôa todos os predicados que se tornam indispensaveis para um cidadão representar condígnamente o nosso País no Parlamento Portugues.

Sua Excia que á uma inteligencia invulgar alia um alcance de vistas, verdadeiramente prodigioso, é, tambem, dotado de grandes faculdades de orador consumado, condição *sine qua non* para alguem ser bom deputado.

Mas não é só por isso que o *Bharat* dá à candidatura de Sua Excia. o seu apoio. Há mais. Sua Excia. é antes de mais e acima de tudo um patriota dedicando ao seu País um amor puro e santo, coisa rara nesses tempos em que a gente dominada por um egoismo cégo procura só atingir engrandecimento pessoal, sem previamente submeter ao criterio rigoroso de justiça, razão e moral a qualidade dos *meios* a serem empregados para a conquista do *fim* em mira.

O sr. dr. Froilano de Melo é, além disso, alma de eleição, coração de oiro e personificação de bondade á toda a prova.

¿Que mais é preciso para uma pessôa representar no Parlamento com a mais alta competencia, com o mais elevado brilho e com o mais acendrado patriotismo o nosso querido País, na assustadora crise que estamos atravessando?

Na proxima eleição do deputado pela India, o nosso voto, o nosso apoio e a nossa propaganda é, pois, a favor da candidatura do sr. dr. Melo, porque è a única que, como se viu, oferece a melhor garantia da prosperidade da India, o melhor penhor da sua felicidade e a melhor segurança do seu bem estar.

Esperamos, porisso, que os patriotas sinceros do nosso País conosco secundarão tambem a causa do dr. Melo que é igualmente a causa da nossa Patria.

ECOS E CRITICA

GRAVE E INCURAVEL!

O jornal europeu *A Provincia* na sua edição de 28 de Setembro findo informa o seguinte:

"Precedendo parecer da Procuradoria da Republica foi mandado instaurar processo crime contra um jornal de Quepem que fez acusações não provadas a um oficial que estava em Sanguem e que se encontra actualmente em Valpoi."

E' para o *Bharat* a carapuça de *um jornal* a que a folha do sr. Pereira Batalha se refere, sem o nome proprio, porque não o pode pronunciar sem medo.

E' absolutamente falso que a Procuradoria da Republica tenha emitido o seu parecer sobre o processo a que o informe de *A Provincia* diz respeito. O que ai existe é uma *nota* da mesma Repartição, coisa que è muito diferente do *parecer*.

E' para lamentar que o sr. Pereira Batalha que se blasona de adorador da *Verdade*, tenha procurado malevolamente criar confusão no espirito publico, adulterando-a.

Quando se trata de seus adversarios, o amigo Batalha não sabe o que diz e nem diz o que sabe. E' o seu feitio.

E o feitio é uma especie de *molestia grave e incuravel!*

UMA CONSULTA

Pergunta-nos alguem:

"O substituto dum delegado que no exercicio de suas funcções subordina a sua acção ao pouco escrupuloso criterio estranho de proteger seus amigos e de incomodar seus inimigos pessoais sem se dar por impedido ¿que castigo a lei lhe ordena?"

Não sabemos a que lei--humana ou divina--o nosso consulente quere referir se. Se é á lei humana, esta, falivel como o é, nem sempre consegue colher na rede de sua justiça aquele agente delinquente; mas se é á lei divina que o nosso correspondente se refere, devemos dizer-lhe que ela não deixa de inflingir, cedo ou tarde, ao mesmo agente—crimi noso promotor de crimes—castigo terrivel. E' o que, ao menos, a historia de nossas vidas constata.

Mas, quem é esse substituto dum delegado que *tão bem* procede criando jús á *Comenda de Cristo*?

Seja franco e diga-no-lo pelo menos em segredo, sim?!

MUITO OBRIGADO!

A condenação de *O Bharat* causou á imprensa portuguesa dôr tão profunda, tão viva e tão cruciante que a tornou literalmente muda. Nem o frio e laconico "*sentimos o contra tempo do colega*" foi êla capaz de proferir, no paroxismo da sua incansolavel tristeza ante a *infelicidade* dum seu modesto camarada!

São sempre mudas as grandes dôres. Elas entorpecem a lingua, provocando um terrivel *mutismo*.

O *Bharat* que conhece a tristissima situação dos seus grandes, poderosos e sensiveis *irmãos* não pode deixar de, porisso, consignar-lhes aqui os seus rendidos agradecimentos.

Muito obrigado, pois!

DE GRANDE VALOR...

O *Diario da noite*, de 13 do corrente, pública uma longa relação e resenha da *acção* e dos *trabalhos* do sr. Prazeres da Costa, a favor da India.

Não hà dúvida que é um documento de grande valor a extensa e prazenteira lista dos serviços que o referido diario *prazerista* acaba de dar á luz de publicidade para o conhecimento do eleitor indiano.

De *grande valor* para a gente poder apreciará justa a causa *principal* e *primaria* da nossa derrocada economico-financeira—està claro.

De *grande valor*, sim senhores!

BEM FEITO!

De *O Heraldo*, de 14 do corrente:—

"Diz-se que o sr. ministro das finanças mandou pedir a todos os ministerios uma relação dos lugares vagos que existem nos diferentes quadros do funcionalismo público, afim de serem extintos esses lugares."

A ser verdadeiro o informe do primeiro diario fundado nas colonias portuguesas, desejariamos tambem vêr seguido aqui, se ainda se não pensou nisso, o exelente criterio do sr. Ministro das Finanças.

Bem feito, sr. Ministro!

UM RICO MIMO

De facto é longa a relação dos serviços prestados pelo sr. Prazeres da Costa á India. Doutra forma se não explica a desoladora grandeza do nosso *deficit*, grandesa que é directamente proporcional á extenção da mencionada relação dos beneficios com que o sr. Costa nos mimoseou...

O "BHARAT"

"Muitas vezes se identificam os pontos de vista da *Terra* com os do *Bharat*, e do *Bharat* temos recebido deferências.

Seja-nos, porêm, licito discordar da sua propaganda, an-

ti-nacional como
nós anti-patriotic
anti-goesa. Formal
batemos a sua orie
tiva a certos ass
comungarmos com
to português.

Tudo isto não ob
fessemos que é pr
ragem para subste
que o *Bharat* vem
do. E'-nós grato c
tas palavras num
que os tribunais
condenar."

Eis o que diz a
o transcrevemos p
nas de *O Bharat* p
dos efeitos criticos.

ORA, O BAT

Sob a epigrafe d
mo—lê-se no *jorn*
seguinte:

"Vomíta um
atoucinhado, em
nima a nós dirig
perios proprios

Não faz mal.
francezes a ruf
le. E o covarde
qui a sujar isto
á sova que *los*
tão apanhando,
gem para insult

Não há duvida
Batalha saiu nos
modelo de educaçã

O homensinho z
os que lhe abatem
êle que adquiriu
seu sestro insultant

¿Ou serà que as
atoucinhado, *sande*
sujar etc. ocupam
nario de educação
capitulo especial?

O *jornal europ*
dá mostras de ser
gica, quando denu
dade racial do
... *anonimo*!

Já vêm, portanto
so Batalha, na arte
ver, só opera marav
do se conserva cala
com a sua previlegi
colocada por cima
direita!

Ora, o Batalha!

UM CONTO DIV

Na urdidura de
não há que u leve—
lo—supremacia ao
tado *sempiterno* s
da Costa. Corrobo

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, आश्विन कृ० १३ शी शके १८४७

शुद्धिकार्य !

हिंदुधर्मावर मिशनऱ्यांकडून – विशेषतः मुसलमानांकडून जे हल्ले होत आहेत त्यांजकडे दुर्लक्ष केल्यास आमच्या धर्माचा अंतकाळ फारसा दूर नाहीं असें खात्रीनें समजावें. आधींच जातिभेदासारख्या अनिष्ठ रूढींनीं हिंदुधर्मास कीड लागली आहे; व सहा कोटी बहिष्कृत हिंदुधर्मात असूनहि नसल्याचसारखे झाल्यामुळें, अर्धांगवायूनें बधिर झालेल्याप्रमाणें हिंदुधर्माची अवस्था झाली आहे. व आमच्या धर्मास नडलेला हा अर्धांगवायु जालीम उपायांनीं बरा केला नाहीं तर याच्याच झटक्यानें हिंदु धर्माचा अंत होणार नाहीं ह्मणून कोणी सांगावें ?

हिंदुधर्मावर होणाऱ्या हल्ल्यांची वृत्तपत्रांतून येणारी हकिकत वाचल्यास आम्हीं ह्मणतों यांत अतिशयोक्ति नाहीं अशी कोणाचीहि खात्री होईल. व कट्टा धर्माभिमानी देखील आजचें हिन्दुधर्मावरील संकट पाहून, जातिभेद व अस्पृश्यता यांचीं बंधनें शिथील करावीं असें ह्मणूं लागेल ! आज मुसलमानांकडून हिन्दूवर अत्याचार घडले नाहींत असा एक आठवडाहि जात नाहीं आहे ! तरुण तुर्कांनीं खिलाफतीस अर्धचंद्र दिल्यापासून अस्सलापेक्षां बाटग्यांसच धर्माभिमान जास्त असतो ह्मणून हिन्दुस्थानांतील मुसलमानांनीं खिलाफतीसाठीं चळवळ केली. व या चळवळीला हिन्दूंची त्यांना गरज लागल्यामुळें, भोळ्या महात्माजींस भुरळ पाडून हिन्दू–मुसलमानाचें एकीचें नाटक केलें ! महात्माजीसारखा सूत्रधार मिळाल्यामुळें या नाटकास रंगहि चांगलाच चढला. व थोडे दिवस " वडा भाई व छोटा भाई " एकमेकांच्या गळ्यांत हात घालून वावरतांनां दिसूं लागले. पण आज छोटा भाई आपल्या हातांनीं बड्या भाईचा गळा दाबून प्राण घेऊं पाहात आहे.

खिलाफत चळवळीचा शेवट झाल्याबरोबर मुसलमानाचें अंतरंग उघडें झालें. मुनिसिपालट्या, कौन्सिलें, वगैरे ठिकाणीं आपला सवतासुभा स्थापन करूनहि त्यांचे समाधान झालें नाहीं. तरी तेथून हिंदूंचें उच्चाटन कसें होईल याबद्दल ते प्रयत्न करूं लागले. धर्मभावनांच्या नावांखालीं हिंदूंच्या धार्मिक मिरवणुकी बंद पाडण्यासाठीं त्यांनीं खटपटी चालविल्या व अखेर दंगे करून हिन्दूनां चिरडून टांकण्यापर्यंत त्यांची मजल पोंचली. कोठें मिरवणुकीवर हल्ला कर तर कोठें देवालयें भ्रष्ट कर. कधीं स्त्रियांवर हात टाक तर कधीं त्यांना पळवूनच ने. कोणाच्या घराचा विध्वंस कर तर कोणावर दरोडा घाल अशा तऱ्हेचे नाना प्रकारचे अत्याचार आज मुसलमान करीत आहेत. निजामशाहींतील पुंडाई, कोहटचा दंगा वगैरेसारखे प्रकार एकामागून एक घडत आहेत. व प्रत्यहीं खून मारामाऱ्याहि त्यांचेकडून होत आहेत. नुकताच वऱ्हाडांत रामराव देशमुखांचा भरबाजारांत अमानुष रीतीनें झालेला खून आज आपणांस हेंच सांगत आहे. देशमुखांच्या खुनाचा विचार केला तर आपणांस काय दिसून येईल याचा प्रत्येक हिन्दूनें विचार केला पाहिजे. हिन्दूंची संघटना करण्याचे त्यांचे प्रयत्न मुसलमानांस दुःसह होऊं लागले व ह्मणून त्यांनीं रामरावांचा अमानुष प्रकारानें खून केला. खुनाचे वेळचें मुसलमानाचें क्रूर कृत्य पाहून आपण, चारशें वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्रावरील गुदरलेल्या प्रसंगाचा इतिहासच वाचीत आहों कीं काय असा भास होतो. देशमुखाच्या अंगावर घाव नाहीं अशी इंचभर जागाहि त्यांनीं ठेवली नाहीं. यावरून सूडाची तीव्रता दिसून येते. आणि भरबाजारांत दिवसाढवळ्या तर काय– बिनदिक्कत केलेल्या या खुनामुळें मन संतप्त होऊन जातें.

सुधारणेच्या शिखरास पोंचलेल्या व बलाढ्य अशा इंग्रजसत्तेखालीं, मुसलमानांस थैमान घालण्यास कोणाचें भय वाटत नाहीं हेंहि आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. व खून करणाऱ्या मुसलमान गुंडांपैकीं कांहींजण पकडण्यास जर पोलिसांस हिन्दूचें सहाय्य घ्यावें लागलें तर अतःपर स्वसंरक्षणाची तयारी हिन्दूनीं स्वतःच करावयास नको काय ? अजूनहि ते सरकारवरच विसंबून राहणार कीं हिन्दू मुसलमानाची एकी करा ह्मणून बडबड करीत असणार ? वारंवार घडणाऱ्या असल्या प्रकारांवरून असें वाटतें कीं हिन्दूंनीं आपला छळ चुकविण्यास स्वतःच कंबर बांधून उभें राहिलें पाहिजे. आपली संघटना करून सर्व सामर्थ्य एकवटलें पाहिजे.

ज्या महाराष्ट्रानें कांहीं वर्षांपूर्वीं मुसलमानास 'दिने दिने' करावयास लाविलें व 'मराठा' ह्मटल्याबरोबर जे चळचळां कांपत त्याच मराठ्यांचे भरबाजारांत मुसलमान खून पाडूं लागले ह्मणून हिंदुलोकांतील क्षात्रतेज लुप्त झालें असें कोणी समजूं नये. तर आज सर्व जातीचें एकीकरण होत नसल्यामुळें मुसलमानास असलीं क्रूर कृत्यें करण्यास कोणाचें भय उरलें नाहीं आहे. जातिभेदासारख्या तीव्रतर अनिष्ठ प्रकारांनीं सर्व हिंदु एक होऊं शकत नाहींत. अस्पृश्यांना तर हिंदु धर्माचा अभिमान वाटत नाहीं व वाटण्यास कांहींच कारण नाहीं. कांकीं, माणुसकीसहि लाजविणाऱ्या ज्या रूढीमुळें हिंदुधर्म, अस्पृश्यांस दूर ठेवीत आहे त्याचें संरक्षण करून, पशूं पेक्षांहि हीन स्थितींत त्यांनीं कां रहावें हेंच कळत नाहीं ! सारांश अस्पृश्यता व जातिभेद यांची हकालपट्टी केल्याशिवाय हिंदूंची खरी संघटना व्हावयाची नाहीं. व तोंपर्यंत याहिपेक्षां कडक रीतीनें मुसलमानांकडून झालेलां, जुलूम, निमूटपणें सोसून घेण्याचा प्रसंग हिंदूंवर हा येणारच. हिंदूंस आज संघटनेशिवाय तरणोपाय नाहीं. स्वराज्यापेक्षांहि अधिक जिव्हाळ्याचा असा हा प्रश्न आहे व तो सोडवला नाहीं तरी स्वराज्यहि मिळून अर्थ नाहीं. कारण स्वराज्याच्या मार्गावर हिंदुस्थान कोठें जात आहे तोंच जर हिंदुमुसलमानांमधील तंटे वारंवार होऊं लागले आहेत तर मग पुढें काय होणार हें दिसतेंच आहे. शिवाय स्वराज्य मिळविण्यापेक्षां तें टिकविणें अधिक कठिण असल्यामुळें याहि दृष्टीनें पाहूं गेल्यास हिंदु संघटनेची आवश्यकता आधीं भासते. आणि या साठींच भारतीय पुढारी लाला लजपतराय व पंडित मदनमोहन मालवीय हिंदु संघटनेकरितां अट्टाहास करीत आहेत. परंतु जोंपर्यंत आह्मीं वरील घातुक रूढी फेंकून देणार नाहींत तोंपर्यंत संघटनेस यावें तसें यश येणें शक्य नाहीं.

जातिभेद व अस्पृश्यता या रूढींचा नायनाट करण्याचे प्रयत्न 'आर्य' समाज करीत आहे. आणि आर्य समाजाच्या या कार्याबद्दल हिंदुधर्म सदैव ऋणीच राहणार आहे. आर्य समाजाचें लोकसेवेचें कार्य आपल्या डोळ्यांपुढें आहेच. परंतु स्वामिश्रद्धानंदजींनी हातीं घेतलेलें 'शुद्धिकार्य' सर्वांत महत्वाचें आहे. या शुद्धिकार्यावर हिंदूंची संघटना अवलंबून आहे. व एका अर्थी हिंदुधर्म वांचविण्याचें कार्य आज आर्यसमाज करीत आहे असें ह्मणण्यास आह्मांस मुळींच हरकत वाटत नाहीं. स्वामी श्रद्धानंदजींच्या उत्तर हिंदुस्थानांतील शुद्धिकार्याच्या चळवळीनें मुसलमानांना भीति उत्पन्न झाली आहे ही एकच गोष्ट त्यांच्या कार्याचें महत्व पटण्यास पुरे आहे. व या शुद्धिकार्याचे चळवळीविषयीं राष्ट्रीयत्वाच्या गप्पा मारणारे मुसलमानहि बोटें मोडीत आहेत. आतां स्वामी श्रद्धानंदजी आपलें कार्य करण्यास दक्षिण हिंदुस्थानांत येत आहेत. मलबारप्रांतांतील एझुवांचा उद्धार व्हावा ह्मणून ते खटपट करणार आहेत. स्वामीचें आजपर्यंतचें कार्य पाहिल्यास त्यांच्या यशाबद्दल कोणासहि शंका येण्याचें कारण नाहीं. परंतु हें कार्य अत्यंत धोक्याचें असून अतिशय खर्चाचें आहे. स्वतःचा जीव धोक्यांत घालून हें कार्य करण्यास स्वामी पुढें आले आहेत पण द्रव्यबल ते कोठून आणणार ? या कामीं द्रव्यबलहि दांडगें पाहिजे. व या कार्यास मदत करणें प्रत्येक हिंदूचें कर्तव्य आहे. कारण हिंदु धर्माच्या जीविताचा हा प्रश्न आहे व आपला धर्म वांचविण्यास प्रत्यक्ष तनुमन अर्पण करण्याचें जरी साधणें नाहीं तरी द्रव्य सहाय्य करणें योग्य आहे. यासाठीं स्वामी श्रद्धानंदजींच्या विनंतीकडे प्रत्येक हिंदूनें लक्ष देऊन शुद्धिकार्यास मदत करावी. मदत पाठविणें ती स्वामीजींच्या नांवानें 'नवा बाजार, दिल्ली' या पत्त्यावर पाठवावी, अशी त्यांनीं विनंति केली आहे. कार्याचें महत्व ध्यानीं आणून भारताचे सर्व भागांतून त्यांना मदत होईल अशी आह्मी आशा करतों.

प्रागतिक संघवार्ता !

प्रागतिक संघाच्या कार्यकारी मंडळाच्या ता. ४ अक्टोबर रोजीं भरलेल्या बैठकींत पुढील ठराव पास करण्यांत आले.

१ ला. प्रागतिक संघ परिषदेच्या शहर मडगांव येथें भरावयाच्या दुसऱ्या अधिवेशनासंबंधींचा विचार साष्टीमहालकमिटी मार्फत होणाऱ्या प्रागतिक संघाच्या स्थानिक सभासदांची संख्या कमींत कमी १०० वर गेल्यानंतर, मग करण्यांत यावा. या करितां कार्यकारी मंडळाच्या दप्तरांत प्रतिशालेख संग्रहित झाल्यावर आणि वर्गणीची फेड होऊन सभासदांच्या पटावर नांव रीतसर नोंदलें गेल्यावरच कोणीहि गृहस्थ संघाचा सभासद झाला असें मानलें जाईल.

२ रा. प्रस्तुत सभेस हजर असलेले श्री. दत्ताराम गोविंद कामत व श्री गोपाळ श्रीधर वोरकर यानीं अनुक्रमें १०० व २५ सभासद योग्य मुदतींत ह्मणजे मडगांव परिषद भरण्यापूर्वीं स्वतः मार्फत संघाला मिळवून देण्याचें स्वसंतोषानें दिलेलें वचन कार्यकारी मंडळ आभारपूर्वक स्वीकारीत आहे.

३ रा. पार्लमेंट मधील देपुतादच्या जागेकरितां आजपर्यंत जीं नांवें पुढें आलीं आहेत, त्यांत दोतोर फ्रोइलान द मेल यांचेंच नांव प्रागतिक संघाला विशेष सहानुभूति वाटण्याजोगें आहे. शिवाय ४ वर्षांपूर्वीं खुद्द प्रा. संघाकडूनच आपले उमेदवार ह्मणून त्यानां पुढें करण्यांत आलें होतें. यामुळें निवडणूकींत यशस्वी होऊन पार्लमेंटांत त्यांचा प्रवेश होईपर्यंत प्रागतिक संघाचा पाठिंबा त्यानांच मिळणें पूर्वापार संगतीस धरून आहे. ह्मणून दो. फ्रोइलान द मेल याच उमेदवाराला संघानें पाठिंबा द्यावा.

४ था. कलम ३ मध्यें निर्दिष्ट केलेला मजकूर विशेष महत्वाचा असल्यानें त्या संबंधीं मध्यवर्ती मंडळाचें मत घेणें इष्ट असल्यावरून मध्यवर्ती मंडळाची सभा येत्या ता. ११ रोजीं बोलावण्यांत यावी.

—ता. ११ रोजीं प्रा. संघाच्या मध्यवर्ती मंडळाची सभा भरली होती. सभेस गोमांतकांतील सर्व महालांतून मध्यवर्ती मंडळाचे सभासद व इतरहि बरेच वजनदार सद्गृहस्थ आमंत्रणास मान देऊन आले होते. सभेंत एक मतानें दोतोर फ्रोइलांन द मेल यानां देपुतादाच्या निवडणुकींत संघानें पाठिंबा देण्याचें ठरलें. सविस्तर मजकूर पुढील अंकांत प्रसिद्ध केला जाईल.

षेष करण्यास ते केव्हांहि कचरत नसत. हिंदुस्थानच्या परिस्थितीचा विचार करून त्यांनीं असें ठरविलेलें होतें कीं, आपल्या देशांत असे क्रांतिकारक प्रयत्न केव्हांहि सफल होणार नाहींत; आपणाला आपलें स्वराज्य सनदशीर मार्गानेंच मिळविलें पाहिजे.

या क्रान्तिकारक चळवळींत सामील झालेल्या कित्येक तरुणांना सरकारनें पकडून जन्मठेप काळेपाण्याची शिक्षा ठोठावली व अंदमानास पाठविलें. त्या तरुणांत अरविन्द घोष यांचे बंधु बरेन्द्रकुमार घोष हे होते. यांना अंदमानांत वाईट रीतीनें वागविण्यांत येत आहे, अशी कुरकूर कानीं आल्याबरोबर सुरेन्द्रनाथांनीं सरकारजवळ तक्रार करून त्यांना योग्य तऱ्हेनें वागविण्याची तरतूद केली. व पुढें त्यांची सुटका करण्याचीहि खटपट करून त्यांना आपल्या मायदेशांत परत आणण्याचें श्रेय सुरेन्द्रबाबूंनींच घेतलें. ही तरुण मंडळी आपल्या मायदेशांत परत आल्यावर ज्यांच्या उत्तेजक भाषणानीं आपण अत्याचाराला प्रवृत्त झालों, त्यांना भेटण्याकरितां गेल्यावेळीं ते देशभक्त त्यानां आपल्या वाऱ्यासहि उभे करिनासे झाले. परंतु सुरेन्द्रनाथांनीं त्यांना जवळ करून त्यांच्या पोटापाण्याचीहि तरतूद करून दिली. त्यावेळीं बरेन्द्रकुमार घोष यांनीं काढलेले उद्गार लक्ष्यांत ठेवण्यासारखे आहेत. ते ह्मणालेः "सुरेन्द्रबाबूंना मवाळ ह्मणून त्यांचा उपहास करणारे व स्वतःस अस्सल देशभक्त ह्मणवून घेणारे पुढारी यांनींच आह्मांस सर्वस्वी दगा दिला. व शेवटीं सुरेन्द्रबाबूच आह्मांस उपयोगी पडले." असो. यावरून मवाळ पुढाऱ्यांच्या मनाची व कार्याची थोरवी किती आहे, हें दिसून येतें.

पुढें १९११ सालीं ही फाळणी स्वतः बादशहानें दिल्ली येथें दरबार भरवून रद्द केली. त्यावेळीं सर्व बंगालमध्यें आनंद पसरला. सुरेन्द्रनाथांना आपल्या श्रमांचें चीज झालेंसें वाटून आनंदहि झाला.

१९०९ मध्यें इंग्लंडांत साम्राज्यातील वर्तमानपत्रांच्या संपादकांची परिषद भरलेली होती. त्यांत हिंदुस्थानच्या वतीनें बाबू सुरेंद्रनाथांची निवडणूक झाली, व ते त्या सभेला हजर राहण्याकरितां इंग्लंडला गेले. ही त्यांची पांचवी खेप होय. त्यावेळीं त्यांनीं जीं भाषणें केलीं, त्यांवरून सुरेंद्रबाबू हे अखिल जगामधील थोर पुरुष आहेत, असें दिसून आलें. त्यांचीं भाषणें ऐकून रिव्ह्यु ऑफ रिव्ह्युज या मासिकाचे संपादक स्टेड साहेब यांनीं असे उद्गार काढले कीं, सुरेंद्रबाबूंच्या योग्यतेचा इसम या परिषदेंत एकहि नाहीं.' यावरून सुरेंद्रनाथांचीं योग्यता दिसून येते.

का. दा. नायक

—फोंडा मुनिसिपालटीच्या अध्यक्षपदाचे जागेकरितां येत्या निवडणुकीत रा. भास्कर रुद्राजी प्रतापराव सरदेसाई, नारायण अनंत शेट बांदोडकर, बाल्दुइन कुयेल्य व काजी कुतुबदीन हैदर हे उमेदवार आहेत, असें कळतें।

अनार्यांचें दुर्दैव !

एका बाजूस भरती येणें ह्मणजेच दुसऱ्या बाजूस ओहोटी लागणें हा नियमित सागराचा नियाचा नियमच आहे. जगाच्या संसाराचा प्याला एवढा कांठोकांठ भरलेला आहे कीं, त्यांत आणखी एक थेंबहि राहणें शक्य नाहीं. प्रकाशाचें सर्वगात्रीत्व एकापेक्षां जास्त गोलार्धावर एकाच वेळीं प्रकाश पाडूं शकत नाहीं. क्षय व वृद्धि ह्यांचीं आसनें इतकीं निगडीत झालेलीं आहेत कीं, कल्पांतहि त्यांस विपंक्त करूं शकणार नाहीं. एकाचें सुख ह्याचाच अर्थ दुसऱ्याचें दुःख किंवा अधिक स्पष्ट करून सांगावयाचें ह्मणजे दुःखाच्या पायावर सुखाची इमारत उभारली जाते. पहिल्या व्यापाऱ्यानें उदौ उदौ केल्याशिवाय दुसरा व्यापारी गब्बर कसा व्हावा ?

अधिकार प्राप्तीचें ध्येय अष्टौ प्रहर चिंतिण्यांत निमग्न झालेल्या धुरंधरांस हें कठोर सत्य तिन्हीं त्रिकाळ उराशीं बाळगावें लागत असतें. स्वतःच्या सामृध्यासाठीं सुखमय संसाराचे मनोरे—केवळ काल्पनिक मनोरे उभविण्यांत कैंक अबलांचे बळी देणें अगर घेणें हें मानवी नीतिशास्त्राचें पहिलें कलम होय. धर्मसंस्थापना अथवा साम्राज्यस्थापना करण्यासाठीं ह्मणून जगभर हिंडत असलेल्या धर्ममार्तंडांस अगर साम्राज्य लिप्सूंस गरीब दुर्बळांच्या झोंपड्या पहिल्यानें ध्वस्त कराव्या लागतात. निर्बलांच्या चंद्रमौळी घरांदारांवरून नांगर फिरवूनच ह्या महात्म्यांना आपल्या आसुरी लालसेचें बीजारोपण करावें लागतें.

अश्रेष्टांना श्रेष्टत्व शिकविण्याकरितां ह्मणून पर्वताच्या पायऱ्या उतरून आह्मीं प्रथम रानटी जगापुढें उतरलों आणि आमच्या भावी राष्ट्रासाठीं जीवनसंग्रह करूं लागलों. रानवटींतील अनार्यांच्या घरीं आतां आह्मांला स्वर्ग उभारावयाचा होता. वन्य मानवेतरांच्या त्या प्रदेशांत आम्हीं नगरांची प्रतिष्ठा केली व समाजाची संघटित व्यवस्था बनवण्याचें कार्य हातीं घेतलें. स्मृतीचे कायदे अनार्यांच्या माना आमच्या पुढें वांकवूं लागले. परंतु प्रतिष्टापनेचें वरील 'तत्व' त्यावेळींहि नष्टप्राय झालें नव्हतें. मऊ जागीं कोपरानें खणण्याची आमची पद्धति आह्मी अनार्यांवर प्रमोजूं लागलों व आमच्या देवदत्त श्रेष्टत्वाच्या गर्विष्ट अधिकारानें दास्यत्वाची कबर आह्मीं त्यांच्यासाठीं खणून ठेवली. समाज—स्थापना झाल्यावर जे चार वर्ण करण्यांत आले त्यांचा जन्माशीं अवास्तव संबंध जोडून अनार्यांवरील अत्याचारांवर आम्हीं कळस चढविला. अस्पृश्यतेचा कलंक त्यांना सदैव विव्हल करूं लागला व आज तर तें बीज त्यांच्या प्रत्येक अणुअणूंत बिंबून गेलेलें आहे. मानवी श्रेष्टत्व त्यांच्या करणीवर अवलंबून असून ईश्वरनिर्मित श्रेष्ठत्व या जगीं असूं शकणार नाहीं हें सुवर्णमोलाचें तत्व त्यावेळीं बाष्कळ ठरलें गेलें, व आज त्याचे संस्कार हिंदुसमाजांस कलंकीत करीत आहेत व परकीय धर्मांशीं तुलनेचा प्रश्न आला असतां हिंदुसमाजाच्या दोषांपैकीं आज हा एक महत्वाचा, स्वार्थाच्या उकिरड्यावर पोसला गेलेला किळसवाणा दोष गणला जात आहे.

वर्णाश्रमधर्माचा जन्माशीं जोडलेला संबंध समाजसुधारणेसाठीं नसून स्वार्थासाठीं होता याविषयीं जरी आज महाराष्ट्रांत वाद असला तरी प्रत्येकाला अनार्यांशीं आर्यांनीं ठेवलेलें वर्तन अथवा त्यांस अज्ञान ठेवून गुलाम राखण्यासाठीं केलेली हरतऱ्हेची आटापीट स्वार्थमूलकच होती; हें निःशंकमनानें मान्य केलें पाहिजे. कांहीं आक्षेपकांच्या ह्मणण्याप्रमाणें स्मृति या कुणा अधिकारलिप्सू कायदेपंडितांनीं केल्या असोत वा नसोत तथापि इतक्या खोल इतिहासांत बुडी मारून कासावीस होण्यापेक्षां एकादें पहिल्या इयत्तेचें मूलहि सांगूं शकेल कीं, 'आर्य हे अनार्यांमध्यें आले व त्यांनीं त्यांनां गुलाम केलें' धर्मोपदेशाची बंदी न करतां आर्यांनां अनार्यांस सुधारतां आलें नसतें काय ? कांहीं धंद्याची शिकवणूक देऊन त्यांची उन्नति करणें अशक्य होतें असें कधींहि नव्हे. आर्यांनीं त्यांना फक्त रानटी स्थितींतून वर काढलें आणि तेंहि एवढ्याचसाठीं कीं त्यांना या सुधारलेल्या श्रेष्ठांची सेवा करतां यावी ह्मणूनच. इमालीच्या एकाच उद्देशानें आपली प्रतिष्ठा करूं इच्छिणाऱ्या या वरिष्ठांनीं या अनार्यांस अप्रतिष्ठ केलें. हिंदु धर्म ह्मणजे काय हा प्रश्न कधीं काळीं त्यांच्या अंतःकरणांत उद्भूत होऊं नये ह्मणून धर्मशिक्षणाची जिज्ञासाहि त्यांनीं लुप्त केली. अशा प्रकारचे कायदे आम्हीं केले कीं ज्यांनीं त्यांची हीनता प्रगट होईल. अस्तु.

शास्त्राप्रमाणें एकंदर पांच वर्ण आमच्या समाजांत झाले होते. मूळ आर्यांत एकंदर चार वर्ण व अनार्यांचा एक मिळून एकंदर पांच. या वर्णांतील शेवटच्या वर्णास अतिशूद्र हें नांव आहे व आमच्या कायद्याप्रमाणें या वर्णांतील लोकांस हीनतेचे पुतळे गणले जातें. पंचवर्णीय शूद्र, अनार्य व अत्यंत ओंगळ कामें करणारे ह्मणून त्यांना आह्मी अस्पृश्य मानतों, शास्त्राप्रमाणें हें सर्व ठीक झालें परंतु आर्यांनीं यांत जी अनीति केली तीच आह्मला येथें नोंदावयाची आहे.

वेदांच्या कालीं आर्यांचा समाज अनार्यांच्या सांगातीं आलेला नव्हता हें मान्य केल्यावर वेदांच्या दहाव्या मंडळांतील 'ब्राह्मणोऽस्य मुखमासीत्' या मंत्राप्रमाणें वेदकालीं असणारे चतुर्वर्ण आर्यांच्या समाजांतच होते हें सिद्ध होतें. अर्थातच वेदकालीं आर्यांत ब्राह्मण होते, क्षत्रिय होते, वैश्य होते व शूद्रहि पण होते. सध्याच्या शूद्रानां जीं जीं कामें, ज्यांना आम्हीं किळसवाणी किंवा अस्वच्छ ह्मणतों तीं तीं त्यांनाहि करावीं लागत हें स्पष्ट आहे. परंतु जेव्हां आर्य पुढें आले व त्यांची अनार्यांशीं संगत घडली त्यांवेळीं आर्यांनीं अनार्यांनां गुलाम केलें व हीं आपल्या आर्यांकडचीं कामें काढून तीं त्यांच्या गळां अडकविलीं. त्यांचे विषयीं वरपांगी आपुलकी दाखवण्याकरितां ह्मणून त्यांनीं त्यांना आपल्या समाजाचे घटक ह्मणून संबोधिलें. इथेंच आर्यांची स्वार्थी दृष्टी लपून आहे. आर्यांमधील ओंगळ कामें करणारा तो स्पृश्य शूद्र गण आतां वरच्या वर्गांत आला, — शेवटचा होता तो शेवटपासून दुसऱ्या वर्गांत आला, व तींच ओंगळ कामें करणारा अनार्य गण अतिशूद्र, शेवटच्या वर्गांतला व अस्पृश्य झाला. आर्यांच्या — स्मृत्यादि कायद्यांनीं— जे कायदे आज अनार्यांनीं अथवा शूद्रांनीं शेवटच्या वर्णाशिवाय दुसऱ्या कोणच्या तरी वर्णाचें काम करण्याचा अधिकार सांगू नये असें अधिकार वाणीनें सांगतात.— या शेवटच्या वर्णाचें काम काढून घेऊन तद्वर्णीयांना निरुद्योगी केल्यावर अर्थातच वरच्या वर्णांतील कामें करण्यास मोकळीक ठेवून दिली. पूर्वींचे शूद्र तेव्हांपासून निराळीं कामें करूं लागले व त्यांचीं कामें आपल्या अंगावर घेणाऱ्या अनार्यांचे उपकार न मानतां त्यांना हीन मानूं लागले. यांत आर्यांचा स्वार्थ एवढाच कीं वाईट कामें करण्यांत गढून गेलेल्या आपल्या बांधवांस त्यानीं वरचीं कामें लावून दिलीं व तींच कामें करणाऱ्या शूद्रांस मात्र — आपल्या घरधन्यांनां त्याच कामास बांधून ठेवलें. आनुवंशीक संस्काराचीं बंधनें पुढें करणाऱ्या व अतिशूद्रांच्याच दर्जाच्या शूद्रांनां धर्मदान देऊं तयार असलेल्या विद्वान पंडितानीं सध्याच्या अतिशूद्रांत कोणी आर्यशूद्र आहेत कीं काय तें उघडकीस आणून या स्वार्थाची चिकित्सा करावी.

यावर कोणी चिकित्सक असा आक्षेप पुढें करील कीं आर्यशूद्र जरी या शूद्रांसारखींच किळसवाणी कर्तव्यें करीत होते तरी त्यानां आर्यांचा सहवास असल्यानें त्यांचें आचरण या शूद्रांपेक्षां बरेंच विशुद्ध होतें. याच कारणानें पूर्वजांनीं त्यांची त्यापासून मुक्तता केली.

तात्विक दृष्ट्या विचार करतानां अनार्यत्वाची सबब पुढें आणणें अनौजन्याचें लक्षण आहे. परंतु ही सबब तशी नसल्यानें तिला उत्तर अवश्य दिलें पाहिजे. आह्मी ह्मणतो आर्यांच्या संगतीनें अथवा सानिध्यानें आर्यशूद्रांचें वर्तन सुधृत झालें हें ठीकच झालें; मग आम्हींहि आर्यच नाहीं काय ? आमच्या सहवासानें हेहि शूद्र कां बरें सुधारणार नाहींत ? अवश्य सुधारतील— कांहीं वेळानें यांच्यांत उन्नति होईल — पूर्वशूद्राप्रमाणें हे तिसऱ्या वर्णांत येतील — आणि पुढें ? स्मृतिकारांचीं याविषयीं निश्चिति होती परंतु जितकी निश्चिति होती तितकीच भीतिहि होती. पुढचा प्रश्न सुटत नव्हता ह्मणूनच त्यानीं अनार्यांस दूर ठेविलें शूद्रांची उन्नति झाली, त्यांनां धर्मज्ञान दिलें

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio Barreto, nos autos civeis de execução por custas que o Digno Agente do Ministerio Publico nesta comarca promove contra Naraina Velipo e sua mulher Gopicá de Jaqui de Netorlim e outros, por apenso aos autos de inventario orfanologico a que se procedeu por obito de Bimã Velipo que foi de Jaqui de Netorlim, vão ser vendidos em hasta publica á porta do tribunal judicial, situado em Xeldem ao lado da estrada nacional que de Quepem se dirige á estação de Sanvordem no dia 16 do seguinte mez de Outumbro ás dez horas, pela se gunda vez e pela metade do preço os seguiutes predios 1°—predio rustico "Oxelasordo" avaliado por 100 rupias da cultura de arroz; 2° — predio rustico denominado "Passonasordo" da cultura de arroz avaliado por 80 rupias 3 ° — predio rustico denominado "Bandi" da cultura de arroz, avaliado por 70 rupias, todos sitos em Jaqui e discritos respectivamente na conservatoria predial desta comarca sob os n ° s 16092, 16093 e 16094 a fl. 85 v. até 86 v. do Livro B 44 penhorados nos ditos autos de execução por custas como pertencentes aos executados. Por este são citados todos os credores incertos dos ditos executados bem como os co-proprietarios e quinhoeiros para deduzirem os seus direitos nos termos e para os fins de lei. A contribuição do registo por inteiro e as despesas da praça correrão a cargo do arrematante. E para ser publico se expediu este-

Xeldem da comarca de Quepem, 9 de Setembro de 1975.

O escrivão de Direito do 2 ° oficio
Aires Mánuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
R. Colaço

Pelo Juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio, Barreto, nos autos civeis de execução por custas que o Digno Agente do Ministerio Publico nesta comarca promove contra Gurgur Folo Dessai e mulher Sorospoti Dessaina de Bali por apenso aos autos de acção ordinaria sumaria estabelecida pelo Decreto de 28 de Março de 1905 que Luis Pedro Rodrigues vulgo José, de Assolnã, promoveu contra os mesmos Gurgur e mulher, vai ser vendido em hasta publica á porta do tribunal judicial situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige á estação de Sanvordem no dia 16 do seguinte mez de Outubro ás 10 horas, pela terceira vez e por qualquer preço 1/36 do predio rustitico denominado Gorbata, da cultura de coqueiros, sito em Bali, avaliado por 50 rupias e discrito na conservatoria predial desta comarca sob o n ° 16767 a fl 26 do Livro B 46 penhorado nos ditos autos de execução por custas como pertencente aos executados. Por este são citados todos os credores incertos dos ditos executados bem como os co-proprietarios e quinhoeiros para deduzirem os seus direitos nos termos e para os fins da lei. A contribuição do registo por inteiro e as despesas da praça correrão a cargo do arrematante. E para ser publico se expedieu este. Xeldem 26 de Setembro, de 1925.

O Escrivão de Direito do 2 ° oficio,
Aires Manul Barreto
Verifiquei
O Juiz de Direito,
R. Colaço

O BHARAT

HONTEM E HOJE...

O *Diario da Noite*, jornal proficientemente dirigido pelo talentoso jornalista sr. Luis de Menezes, pretendendo evidentemente pôr em fóco a contradição entre o nosso "modo de ver" de *hontem* e o de *hoje* no tocante á personalidade politica do sr. Prazeres da Costa, deu-se ao trabalho de inserir nas suas colunas de honra da sua edição de 17 do corrente com precedeucia dum atraente reclamc publicado na de 15, por sinal, em letras garrafais, um nosso artigo editado no extincto *O Correio da India* que, em 1911 ou 1912, dedicou um seu número especial áquele deputado por ocasião dum aniversario dêle, sr. Costa.

O nosso artigo que o *Diario* transcreveu, *para a conveniente edificação*, data, pois, duns *treze* ou *quatorze* anos atraz, tendo sido escrito numa època em que a classe hindú em peso tinha o sr. Prazeres da Costa na cònta dum verdadeiro *semi-deus*, dum *deputado insigne*.

Não é segredo a ninguem que nessa feliz época os hindús devotavam ao sr. Costa estima sem limites, dedicação a toda a prova, simpatia *sans bornes*; pois consideravam-no como *seu* um cidadão que graças aos sacrificios super-humanos e esforços insanos da popu lação hindú, conseguira ter assento no Parlamento.

O nosso "modo de ver" *de hontem* foi, portanto, uma consequencia natural e lógica das circunstancias *de hontem* cuja influencia se repercutiu em to da a sua plenitude não só no artigo que o *Diario* se dignou de desencantar das velhas colecções de *O Correio da India*, mas tambem em todos os nossos outros escritos e de mais manifestações politicas dedicadas ao sr. Lamartine Prazeres da Costa.

Tais circunstancias modificaram-se, porem, radicalmente, a breve trecho. Os hindús que esperavam vêr felicitada a India pelo seu deputado em quem dominados por uma céga fé e incomensuravel entusiasmo admitiam toda a sorte de virtudes—o valor da palavra, o brilho da pena, o alcance das idêas — convenceram-se êles com pouco tempo e em frente dos *factos concretos e positivos*, que o seu "modo de vêr" em relação à pessoa que haviam *hontem* apoteusado e quase divinisado não passava *hoje* duma autentica ilusão, dum monu mental erro.

E é precisamente ás circuns tancias de *hoje* que obedece o nosso "modo de vêr" de *hoje*; e se este está em flagrante contradição com o que *hontem* dissemos, não temos disso a culpa.

Porque a verdade é esta: tanto *hontem* come *hoje* subordinâmos o nosso "modo de vêr" com maximo escrupulo e rigoroso cuidado ao sentimento da população hindú que o *Bharat*, por direito de nascimento, representa.

E cremos que o *Diario* não pode negar que o *Bharat* traduzindo tanto *hontem* como *hoje* o sentimento dos hindús, ainda que *contradictoriamente*, cumpriu um sacrossanto dever jornalistico.

¿ Dá isso farto pasto para uma *conveniente edificação*?

Mas o *Bharat* prefere expôr-se a uma *edificação conveniente* a ser acusado da falta do cumprimento do seu dever jornalistico.

Fica assim explicada *quantum satis* a razão da contradição entre o nosso "modo de vêr" de *hontem* e o de *hoje*. E basta...

COMENTOS...

TRABALHO BALDADO

Consta-nos que alguem que hostilisa a candidatura do sr. dr. Froilano de Melo anda a pregar por aí que o nosso candidato na sua qualidade de médico da Junta de Saude é— o que imaginam os senhores?— *inelegivel*. *Inelegivel* um médico da Junta de Saude!

Decididamente, êsse alguem ou ignora a letra do codigo eleitoral ou pretende pescar nas aguas turvas, procurando lançar poeira nos olhos dos incautos.

O sr. dr. Paiva Gomes é medico da Junta de Saude de Macau e a sua qualidade de médico nunca constituiu barreira para o mesmo cidadão ser eleito deputado da Nação Portuguesa.

E', portanto, trabalho baldado o do tal alguem.

CONVEM VARIAR

Desde a implantação da Republica Portuguesa, o sr. Prazeres da Costa é deputado pela India que gosa a reputação de ser a mais ilustrada de todas as colónias portuguesas.

Ora, admitindo-se, mesmo, que Sua Excia. é tudo quanto o director do *Bharat* disse dêle no artigo transcrito pelo *Diario da Noite* — e ainda mais alguma coisa,—¿a sua eternização no Parlamento como deputado pela India não tende a deixar nos metropolitanos impressão de que não existem no Paiz pessoas que o substituam?

Se não por outros motivos, pelo menos por este, quere dizer para evitar essa impressão, faz-se preciso que a nossa representação parlamentar sofra desta vez a conveniente *variação*, o que se conseguirá com o triunfo do sr. dr. Froilano de Melo, como é fácil de se presumir.

REGIME DE PAPELADA

Nas *Informações de Lisbôa* da *Terra* escreve o sr. F. Pereira:

"Nos tempos em que era eu militar, um ilustre oficial superior arregimentado nesta cidade disse ao grande ministro da guerra Vasconcelos Porto, quando este quiz ouvir a sua opinião sobre a sua orientação, que a mesma não passava do regime de papelada. Esta afirmação custou-lhe uma inesperada transferencia que apos ponderação foi substituida por colocação á testa dum serviço honroso e importante em Lisbôa.

Infelizmente o *regime de papelada* aumentou. Nos ultimos quinze anos, tanto aqui como ai, temos tido mais regulamentação do que se fez durante 60 anos anteriores.

As sindicancias na India gastavam resmas e resmas de papel a par de dezenas de milhares de rupias consumidas, aqui só o relatorio do juiz sindicante dos Transportes Maritimos foi dactilografado em 327 folhas. Refere se êle a 105 processos que formou grossos volumes com o total de vinte e tres mil setecentas e noventa folhas."

O *Regime de papelada* inda hoje subsiste por cà, por mal dos nossos pecados.

Só as individualidades de tacto ponderado e patriotismo acrisolado como o sr. Mariano Martins é que podem acabar com êle.

E é precisamente para esse fim que trascrevemos para as colunas de *O Bharat* as informações sobre o *regime de papelada* do nosso ilustre conterraneo sr. Filipe Pereira.

Para mais Sua Excia. tem pulso forte e farta abnegação.

BURRO PETULANTE

Consta que uma *nulidade* que se julga ferida por critica justa do *Bharat* na sua vaidade balofa de pretender inculcar se o que nunca pode ser por estar fadada ao que Deus criou, procura malquistar-nos com os incautos de sua classe, e outros, impingindo-lhes tretas á força do brilho ilusório das funcções que á má hora, lhe foram conferidas para seu proprio desdouro. Uma *nulidade*, notem!

Como, porêm, dissemos a verdade e só esta, no livre exercicio da liberdade de imprensa referindo nos só áquela *sabia* cavalgadura, a petulancia atrevida desta não nos pode atingir.

E, depois, não é nosso sonho dourado guindarmo-nos á alguma administração concelhia, por meio de *salamas tipicamente orientais*, quando nos virmos obrigados a deixar o lugar ...que ocupamos...

Os burros, quando aliam petulancia á sua *burridade*, divertem muito o público.

Se não que o diga o nosso visinh...

भा र त

• जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, कार्तिक शु० ५ मी शके १८४७

देपुतादची निवडणूक

गोमांतकातर्फे पोर्तुगालच्या पार्लमेंटांत भाग घेणाऱ्या देपुतादची निवडणूक येत्या नव्हेंबरांत व्हावयाचें निश्चित झालें आहे हें सर्वांस कळून चुकलेंच आहे. ह्या निवडणुकींत भाग घेऊं इच्छिणाऱ्या उमेदवारांनीं आपापलीं नांवें प्रसिद्ध करून स्वतः निवडून यावयासाठीं हरएक उपाय योजण्यांत ते गढून गेले आहेत. तरुण व प्रगमनशील गोमांतकहि आपण कोणास निवडून दिलें असतां आपलें खरेंखुरें मत पार्लमेंटरी सभासदांच्या लोकहिताचा प्रश्न येतांच बहिरट बनणाऱ्या कानांवर पडेल, ह्याचा स्वस्थ व निश्चल मनानें विचार करण्याकडे वळलें आहे.

जें जें कांहीं पोर्तुगीज करताहेत तें तें सर्व आमच्या हितासाठीं ह्या समजुतीनें पोर्तुगालवर बसलेला गोमांतकाचा अंध विश्वास ब्रिटिश हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जागृतीचें लोण इकडे पोंचल्यामुळें ढळल्यापासून पोर्तुगालच्या मगरमिठींतून आपली सोडवणूक, स्वावलंबनाच्या जोरावर करून घेण्याचें त्यानें ठरवलें व बदललेली परिस्थिति जाणून पोर्तुगालनेंहि गोमांतकास आवतोनोमीचे हक्क दिल्याचें जाहीर केलें. गोमांतकाच्या लोकनियुक्त प्रतिनिधीला पोर्तुगालच्या पार्लमेंटांत मिळालेला मतदानाचा हक्क वरील हक्कांतच समाविष्ट होतो. आज जवळ जवळ १४ वर्षें दो. प्राजेरीस द कोस्त हे पोर्तुगालच्या पार्लमेंटांत गोमांतकीय प्रतिनिधि ह्मणून काम करीत आहेत. दर तीन तीन वर्षांनीं होणाऱ्या निवडणुकी १९१० सालच्या सनदीनंतर चार झाल्या; व त्या चारांतहि तेच निवडून आल्यामुळें वरील अधिकाराची गादी सबा तप त्यांस निर्धास्त उपभोगितां आली. पण ठेंचा खाऊन शहाणा झालेला गोमांतक ह्याहि खेपेस त्यांसच निवडून देईल हें संभवनीय नसल्यामुळें निवडणुकीस उभे राहिलेल्या इतर उमेदवारांकडे दृष्टिनिक्षेप करणें भाग आहे.

मुनिसिपालट्यांत असो, असेंब्लींत असो वा पार्लमेंटांत असो, लोकनियुक्ततेचा छाप डोक्यावर मारून घेऊन जो निवडून येणें श्रेयस्कर असेल त्याच्या अंगीं कांहीं विशिष्ट गुण असावे लागतात. त्या गुणांनीं जर का तो युक्त नसेल तर ज्यांच्यातर्फे तो निवडून येतो त्यांच्याप्रगतिऐवजीं परागतीस मात्र तो कारणीभूत होतो. गेल्या पंधरा वर्षांच्या अनुभवानें गोमांतकास ह्या गोष्टीची चांगलीच जाणीव पटून चुकली आहे. तरीहि ऐन समयीं त्यांची त्यांस पुन्हां आठवण करून देणें आवश्यक आहे.

कोणत्या उमेदवारास आपलीं मतें द्यावयाचीं ह्याचा विचार करतांनां सर्वां आधीं त्या त्या उमेदवारांचा देशाभिमान विचारांत घेतला पाहिजे. व्यक्तीकरितां शकी वेचणाऱ्या किंवा जातीकरितां माती खाणाऱ्या उमेदवारास निवडून देणें केव्हांहि व कोठेंहि घातक व अति तापकारक होत असतें. व्यक्ति, जाति समाज व धर्म ह्या सर्व धार्मिक व वैयक्तिक भावना जो देशाभिमानाच्या स्थंडिलावर बिनदिक्कत बळी देण्यास सदैव तयार राहील त्यासच निवडून देणें श्रेयस्कर होय. आमच्या गोमांतकाचें राष्ट्रीयदृष्ट्या हित व्हावें ह्या उज्ज्वल देशाभिमानानें प्रेरित होऊन गोमांतकाच्या प्रगतीसाठीं तनमनधन वेंचण्याची संधि न दवडणारा उमेदवारच निवडून देणें हें आमचें कर्तव्य होय.

उमेदवाराच्या अंगीं अवश्य असावयाचा दुसरा गुण ह्मणजे **निःस्वार्थी वृत्ति** होय. जो निःस्वार्थी असतो तोच निर्भीडपणें आपलें 'प्रातिनिधिक मत' बड्या धेंडापुढें मांडूं शकतो. वैयक्तिक स्वार्थासाठीं ज्यानीं आपणास निवडून दिलें त्यांच्याशीं बेइमान व ज्याच्या नांवावर आपण विकतों त्यांच्याशीं निमकहराम होण्याइतका ज्याचा मानसिक अधःपात झालेला आहे, स्वतःच्या पोळीवर यथेच्छ तूप ओढून भरलेल्या पोटावर ढेंकर देतानां आपल्या गरीब व असहाय्य देशबांधवांकडे पाहून दांत विचकून हंसणाऱ्याचे दांत त्याच्याच घशांत घालण्यांत खरें दूरदर्शित्व दृष्टोत्पत्तीस येत असतें. आपण निवडून दिलेला प्रतिनिधि गब्बर झाल्यानें आपणास कांहीं फायदा नसून त्यास मतदारांचे हितसंबंध राखतां आले पाहिजेत हें सदैव ध्यानीं बाळगलें पाहिजे. नुसता नावांचा प्रतिनिधि स्वदेशांतून परदेशांत वहाणारा पैशांचा प्रवाह अडकविण्यास घालावयाच्या बांधास निवळ निरुपयोगी असून त्याकामीं वैयक्तिक रीत्या निःस्वार्थी पण देशहितदृष्ट्या अमर्याद स्वार्थलंपट मनुष्याचाच उपयोग होत असतो. मळमळीत सौभाग्यापेक्षां ढळढळीत वैधव्य बरें असतें. नवऱ्याच्या नांवानें कुंकुवाचा मळवट भरून बाजारबसवीचा धंदा करणाऱ्या धनवान बायकोकडे व तीनें वाईट मार्गानें जोडलेल्या संपत्तीकडे पाहून हळहळणाऱ्या नवऱ्यासारखी स्वतःची स्थिति जर गोमांतकाला करून घ्यावयाची नसेल तर त्यानें उमेदवाराच्या **निःस्वार्थी वृत्ती**कडे लक्ष्य देणें जरूर आहे.

प्रतिनिधीच्या अंगीं असावयाचा तिसरा पण पहिल्या दोहों इतकाच महत्वाचा गुण **वक्तृत्व** हा होय. मतदारांच्या प्रामाणिक मताची छाप सहकाऱ्यांच्या मनावर पाडण्यास वाक्चातुर्याची फारच आवश्यकता आहे. केवळ मत मांडूनच उपयोगी नाहीं तर त्याला तें इतरांस पटवून देतां आलें पाहिजे; दुसऱ्यांचे कोटिक्रम खोडून काढतां आले पाहिजेत. Allow me to speak; and I shall conquer the world. (मला बोलण्यास परवानगी द्या ह्मणजे मी सारें जग जिंकीन) असें जॉन रस्किनला ह्मणण्यास लावणारी वक्तृत्व शैली जर त्याच्यापाशीं नसेल तर त्याचा देशाभिमान अपेक्षित फलाच्या दृष्टीनें निष्फल ठरणें संभवनीय आहे. ह्मणून 'मूके वदके' निवडून देण्याच्या भानगडीस न पडतां ज्याच्या जिव्हेवर रसवंति बसलेली असेल त्यासच आपलें मत देणें बाजवी होय.

वरील गुणांप्रमाणेंच तडफ, धडाडी, कर्तव्यनिष्ठुरता व समतोल विचारसरणी ह्यांच्याकडेहि मत देतानां पाहिलें पाहिजे. ह्या व वरील गुणांच्या परीक्षेंत जो उमेदवार उत्तीर्ण होईल त्यास मत देणें दूरदृष्टीचें द्योतक असल्यानें मतदारांनीं त्या गोष्टी अवश्य ध्यानांत घेतल्या पाहिजेत.

निवडणुकींत भाग घेऊं इच्छिणाऱ्यांपैकीं प्राझेरीस दे कोस्त हें पहिल्या झपाट्यास गळतात. गेल्या १५ वर्षांच्या कारकीर्दीत त्यानीं गोमांतकाच्या हितासंबंधीं केलेल्या कामाची यादीं जर पाहिलीं तर ती त्यांच्या वयाच्या, वर्षांच्या अपेक्षेच्या व कर्तव्याच्या दृष्टीनें फारच तोकडी असल्याचें आढळून येतें. शिवाय १५ वर्षें एकसारखे ते पार्लमेंटांत असल्यानें तेथील लोकांचा असा समज होऊं शकतो कीं त्यांच्याइतका कार्यक्षम, कर्तव्यतत्पर, देशाभिमानी व विश्वासपात्र अशी दुसरी कोणतीच व्यक्ति गोमांतकांत नाहीं. हा ग्रह अनिष्ट होय. बाकीच्यांपैकीं डॉ. मेलु हे मात्र एक प्रतिनिधित्वास इतरांपेक्षां लायक असे गृहस्थ आहेत. त्यांचें आतांपर्यंतचें सार्वजनिक आयुष्य गोमांतकाच्या परिचयाचें आहे. प्रागतिक संघानें त्यांसच पसंत केला आहे. आह्मींहि त्यांसच पाठिंबा दिला आहे व आमचे हितचिंतक त्यांसच आपलें मत देतील अशी आमची खात्री आहे.

—कुंभारजुवें येथील "शिक्षण प्रसारक मंडळा"मार्फत चाललेल्या "श्री शांतादुर्गा वाचनमंदिरा"चा १५ वा वाढदिवस दिपवाळीच्या सुमुहुर्तावर सदर वाचनालयाच्या दिवाणखान्यांत साजरा करण्यांत आला. आरंभीं रा. लंवदे यांनीं आलेल्या मंडळीचें स्वागत करून अध्यक्षांच्या जागीं प्रो० रामचंद्र शंकर नाईक पणजी यांची निवड केली. नंतर सेक्रेटरींनीं वार्षिक अहवाल वाचला. रा. हरि भांडारे यांचें "वाचनालयाची आवश्यकता", रा. ग. शि. सामंत श्री शारदा विद्यालयाचे हेडमास्तर यांचें "वाचनाची महति" व ह० भ० परायण विठ्ठल कामत चंदगडकर यांचें "वाचनालयें हींच देवालयें या विषयावर सुश्राव्य व्याख्यानें झालीं. नंतर अध्यक्षांनीं वाचनालयाचा तरुण पिढीनें कोणता व कसा फायदा घ्यावा वगैरे उपदेशपर गोष्टी सांगून सभाजनांचे आभार मनाल्यावर समारंभाची समाप्ति झाली, असें एक 'प्रेक्षक' कळवितात.

स्फुट विचार

विद्यालयाचें विद्यार्थी संमेलन :— सध्याचा काळ संघटनेचा आहे. हिंदु संघटना, ब्राह्मण संघटना वगैरे वर्ग संघटनांचें काम तर जोरानें चालू आहेच. प्रत्येक अवयव सशक्त करावयाचा व तोहि सारा देह सुदृढ करण्याच्या दृष्टीनेंच करावयाचा ह्या दिशेनें चोहींकडे प्रयत्न चालू आहेत. गेल्या आठवड्यांत मडगांवांस दामोदर विद्यालयाच्या माजी व चालू विद्यार्थी बंधु=भगिनींचें भरलेलें संमेलन तर ह्या दृष्टीनें फारच महत्वाचें आहे. गोमांतकीय विद्यार्थ्यांच्या अंगीं तडफ, कर्तृत्वशक्ती व देशाभिमान ह्या राष्ट्रहितास आवश्यक असणाऱ्या तीनहि चिजा आहेत. आपण ज्या घरांत राहात आहों तें घर कांचेचें असल्यानें आपणांस सुखानें झोंप अशी केव्हांच मिळणार नाहीं; जर आपणास स्वास्थ्याभिलाष असेल तर आपण दुसरें दगडांचें घर बांधण्याच्या तजवीजेस लागलें पाहिजे हें ते पक्कें जाणून आहेत; आपल्या पायांसभोंवतीं काय जळतें आहे व ह्या दावाग्नींतून आपली कशी सुटका करून घ्यावयाची ह्याची त्यांस विसर पडलेली नाहीं. आणि तशांत मराठी शाळांतील विद्यार्थ्यांस मिळणारें शिक्षण 'देशी' असल्यानें त्यांच्या मनोभूमि चांगल्या कसून तयार झालेल्या आहेत. त्यांच्यावर नुसता बीं पेरण्याचाच वेळ कीं तें उगवून निघतांनां दिसणार सुद्धां नाहीं.

रामबाण औषध :— गोमांतकांत मात्र ह्या विद्यार्थी संमेलनानें क्रांति घडवून आणली आहे. असा संघटणेचा प्रयोग अजूनपर्यंत कोणाहि वैद्याकडून गोमांतकीय अनावस्थेच्या रोगावर आजपर्यंत झाला नव्हता. गोमांतकांत संघटणात्मक दृष्टीनें झालेल्या पहिल्या प्रयत्नांचें पहिलें दृश्यफल हें विद्यार्थी संमेलन होय. सुरळीतपणें हें संमेलन पार पाडल्याचें सर्व श्रेय रा. काशीनाथ दामोदर नाईक आणि रा. राउत हेडमास्तर ह्यांसच आहे. मागें एक दोन ठिकाणीं गोमांतकीय शिक्षक संमेलन झालें होतें. पण तदनंतरच्या शिक्षक वर्गाच्या हालचालविरहिततेनें ती चळवळ थंड पडली असावी. आतां हें विद्यार्थी संमेलन नव्या स्वरूपांत भरलें आहे. ह्याचा उद्देशहि निराळा आहे. दिग्मूढ बनणाऱ्या विद्यार्थ्यांच्याभावी आयुष्यास योग्य ती दिशा लावण्याचें काम अशा संमेलनाच्या द्वारें करतां येण्याजोगें आहे. मुमुक्षु अंतःकरणें प्रेमाच्या रज्जूनें एके ठिकाणीं बांधण्यास हीं संमेलनें उपयोगी पडण्यासारखीं आहेत. किंबहुना तशी दिशा लावल्यास 'कीं कर्तव्यं कीं न कर्तव्यं' हा विद्यार्थ्यांपुढचा प्रश्न अशा उपायामुळें सुटण्याच्या पंथास लागणेंहि शक्य आहे. पण असे एकांडे प्रयत्न होऊन उपयोगी नाहींत. अशी चळवळ प्रत्येक विद्यालयांत होईल तरच त्याचा देशास फायदा होईल. दा० विद्यालयाचें हें अनुकरणीय उदाहरण इतरानीं गिरवावें अशी आमची त्यांस सूचना आहे.

शीं ठरेल--दोनहि सुधारणा जोडीनें व एकाच काळांत झाल्या तरच त्या सुपरिणामकारक ठरतील. प्रागतिक संघ हा मुख्यत्वें करून राजकीय हक्क मिळविण्यासाठीं स्थापन झालेला असल्यामुळें इलेक्शन सारख्या प्रसंगीं त्याला हालचाल न करतां स्वस्थ बसणें शक्यच नाहीं. प्रागतिक संघानें राजकीय चळवळीं-शिवाय सामाजिक सुधारणेकडे लक्षहि देऊं नये असें मी म्हणत नाहीं; पण सामाजिक चळवळ संघाकडून झालेली नाहीं म्हणून त्यानें राजकीय चळवळहि करूं नये असें म्हणणें मला तरी बरेंच धाडसाचें-हेकेखोरपणाचें वाटतें. प्रागतिक संघ इलेक्शनच्या वेळींच ते वढा जागा होतो, असा एक आरोप संघावर लादलेला ऐकूं येतो. पण तो साफ निराधार असल्याचें संघाकडून श्रीस्थळ कवळें येथील परिषदेंत पास झालेले ठराव वाचणाऱ्यांना कबूल करणें भाग पडेल. मराठी शिकलेल्या लोकांना मतदानांचा अधिकार मिळावा, मराठी भाषेला सरकारांत मान्यता असावी, ठिकठिकाणीं मराठी शाळा स्थापल्या जाऊन मराठीचें ज्ञान वाढलें जावें, पेद्र आंद्रुच्या सल्याशिवाय हिंदु नवऱ्यानवरींना अग्नी ब्राह्मणाची गांठ घेतां यावी, हिंदूंनां मातृस्थानीं असलेल्या गोमातेचा होणारा वध बंद व्हावा अतएव हिंदु संस्कृतीचा, हिंदूंचा पदोपदीं होणारा उपमर्द बंद व्हावा म्हणून संघानें परिषदेंत आपलें समाजसुधारणेबद्दलचें प्रेम ठरावांनीं व्यक्त केलेलें आहे. सामाजिक सुधारणेच्या चळवळींपासून संघानें तटस्थ असावें, मराठी शिकलेल्यांनां मुळीं मतच नको. मराठी शाळा बंद पाडा, हिंदूंचीं लग्नें, पेद्रु आंद्रुसाहेबांच्या विद्यमानें झालींच पाहिजेत किंवा हिंदु संस्कृतीच मुळीं टाकावू म्हणून तिची खच्ची झाली पाहिजे असला एखादा ठराव संघातर्फे झाला असल्याचें हे आरोप करणारे दाखवून देतील काय? सामाजिक सुधारणेसाठीं संघाकडून अजून कांहींच प्रयत्न झालेला नाहीं म्हणून संघाला इलेक्शन शिवाय इतर कांहींच नको म्हणणें शहाणपणाचें कसें ठरेल? इलेक्शनाशिवाय इतर कांहींच नको म्हणणें शहाणपणाचें कसें ठरेल? इलेक्शनच्यावेळीं संघाकडून चळवळ केली जाते हें खरें असलें तरी इतर सुधारणांसाठीं झटणाऱ्या संस्थांला ती विरोधक होईल हें गृहीत धरून त्यांवर भलताच आरोप करणें समंजसपणांचें ठरेल कीं काय ह्याचा विचार करणें जरूर नाहीं काय? गिरणींतील एकंदर काम एकाच चक्रानें केले पाहिजे—नव्हे कोट सुद्धां त्याच चक्रानें शिवून दिला पाहिजे असें म्हणून हट्ट धरण्या सारखेंच प्रागतिक संघानेंच एकंदर सुधारणा घडविणें जरूर आहे, असें म्हणणें असमंजसपणाचें होईल. गिरणींतील मोठें चाक इतर लहान सहान चाकांनां गति देण्यास कारण होईल, प्रागतिक संघ इतर संस्थांस, त्यांच्या चळवळीस तन मन धनें मदत करील. एकट्या प्रागतिक संघानें एकंदर सुधारणा घडवून आणाव्या असें म्हणून संघाला आरोप्याच्या पिंजऱ्यांत उभें करण्यास पाहणारे जगाकडे तर राहोच पण शेजारच्या ब्रिटिश हिंदुस्थानांत सुधारणेसाठीं प्रयत्न करणाऱ्या काँग्रेसशिवाय इतर हजारो संस्थांकडे दुर्लक्ष कारितात. प्रत्येक संस्था एक एक ध्येय ठरवून आपापल्यापरीनें तें गांठण्यासाठीं प्रयत्नाची शिकस्त करीत असलेली दिसते. काँग्रेसचें ध्येय राजकीय—मुख्यत्वें करून राजकीय असल्यानें तिजकडून त्याचसाठीं प्रयत्न चालू असतात. इतर सर्व संस्थानां काँग्रेसकडून सल्ला मसलत, वेळ प्रसंगीं मदत मिळालली असते. प्रागतिक संघानें आपलें मुख्य ध्येय राजकीय हक्क संपादणें हें ठरविल्यामुळें इलेक्शन सारख्या प्रसंगीं त्याकडून चळवळ होणें आश्चर्यकारक नसून न झाला तर मात्र तें आश्चर्यकारक ठरेल. शिक्षणप्रसार, मराठीला मतदान, धार्मिक हक्क, लग्न कार्याच्या भानगडीची सुधारणा इत्यादि विषयांसाठीं प्रयत्न करणाऱ्या संस्था किंवा माणसें पुढें येऊं द्या. प्रागतिक संघ या सर्वांना आपलें पूर्ण पाठबळ देईल. संघाकडून एकंदर सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न होत नाहींत—झालेले नाहींत म्हणून त्यानें इलेक्शनची चळवळ करूं नये असें म्हणणें म्हणजे एका इसमाला कीश्याधीश बनणें शक्य नाहीं म्हणून त्यानें खावुन पिऊन सुखी होण्याचा प्रयत्न करूं नये किंवा सगळ्या जगाचा व्यवहार करतां येत नाहीं—त्याला साधत नाहीं—म्हणून त्यानें आपल्या घरचा व्यवहारसुद्धां करूं नये असें म्हणण्याइतकेंच शहाणपणाचें ठरेल. संघाकडून एकंदर सुधारणा व्हाव्या असें इच्छिणारांनीं आपण संघासाठीं आजवर काय केलें याच स्वतःशींच विचार नको का करायाला? संघाच्या मागणीचा सरकारवर इष्ट परिणाम व्हावयाला संघ तसाच बलवान बनणें जरूर आहे. संघाचें बल त्याच्या सभासदांच्या संख्येवर अवलंबून असतें. संघाचें वजन सरकारवर पडूनें सरकारांतून त्याचा विचार होण्याला संघाच्या सभासदांच्या संख्येचें प्रमाण वाढणें जरूर आहे. संघाचे सभासद ज्या प्रमाणें ज्यास्त त्याच मानानें संघाचें वजन वाढलें जाऊन त्याचा मागणीचा परिणाम सरकारवर इष्ट फलदायी होऊं शकेल म्हणून संघाकडून हिंदूंच्या हितसंबंधांची चळवळ करूं इच्छिणाऱ्यांनीं आपलें नांव संघांत दाखल करून, आपले इष्टमित्रांनां तें करण्याची विनंति करून संघाचें बल वाढविण्यास झटलें पाहिजे गोमांतकीय हिंदु समाजाची पदोपदीं होणारी अवहेलना ज्यांच्या हृदयाला घरें पाडीत असेल त्या सर्वांनीं आजच संघांत सामील होऊन संघ बलवान बनविण्यास हात भार लावला पाहिजे. हिंदूंचा उपमर्द करणाऱ्यांना, मराठी जाणणाऱ्यांना मतदानाचा असलेला हक्क काढून घेऊन त्यांना प्रजाजनाच्या कायदेशीर हक्कापासून च्युत करणाऱ्यांना, हिन्दूंच्या बलांवर निवडणुकींत यशस्वी होऊन खाल्या घरचे वासे मोजणाऱ्यांना संघाचे बल खालीं ओढून खेंचण्याइतकें प्रबल आहे याचा एकदा प्रत्यय येऊं द्या. असा प्रत्यय आणून देण्याचा प्रयत्न करा आणि मग संघाकडून सुधारणा मागा. एकदा संघाचें बल अजमाविलें गेल्यावर हेंच सरकार, हाच आमचा खिस्ती बंधु वर्ग यक्षिणीच्या कांडीप्रमाणें फिरला जाईल. संघाचें बल प्रबल ठरल्यावर त्याच्या घटकांनां—हिंदूनां कस्पटाप्रमाणें लेखून वेळीं अवेळीं त्याचा उपमर्द करणारे वेडे पीर व तसले प्रसंग फक्त गतइतिहासाच्या पृष्ठांशिवाय इतरत्र दिसणें अशक्य होईल

हिंदु, हाडाचे खरे हिंदु, हिंदु संस्कृतीचे खरे अभिमानी या सर्वांनीं कंबर बांधून प्रयत्नाची शिकस्त करण्याची हीच वेळ आहे. हिंदूंच्या औदार्याच्या फायद्यानें, सत्ताधिबनून गोतास काळ झालेल्या कृतघ्नांस खालीं ओढण्यासाठींच प्रागतिक संघानें उदारमतवादि डॉ० फ्रोयलान द मेलु यांस आपला पाठिंबा देण्याचें गेल्या ता.११ च्या मध्यवर्ति मंडळाच्या बैठकींत ठरविलेलें आहे. अशा ह्या महत्वाच्या प्रसंगीं हिंदूंच्या इभ्रतीसाठीं—संघाचें वजन, संघाचें बल— व बलाची दहशत वाढण्यासाठीं खऱ्या स्वाभिमानी हिंदूनें संघांत दाखल होऊन डॉ० फ्रो. द मेलु यांस आपलें मत देणें —आपल्या इष्ट मित्रांकडून त्यानांच मत देवविणें जरूर आहे. हिंदूंची पदोपदीं होणारी अवहेलना बंद पाडण्यासाठीं, हिंदूंच्या मागणीचा सरकारवर इष्ट परिणाम होण्यासाठीं, मराठी भाषेचें ज्ञान असलें तरी मनुष्य प्रजाजन होणें न्याय्य आहे, हें तत्व सरकारास पटविण्यासाठीं, प्रागतिक संघाला इलेक्शनमध्यें भाग घेऊन इलेक्शनची चळवळ करणें क्रमप्राप्त आहे. गोमांतकीय हिंदु जनता एकदिलानें संघाच्या ह्या कार्यास मदत करून संघाची इभ्रत वाढवील अशी आशा बाळगणें अस्थानीं ठरेल काय?

उपेंद्र शे. तळावलीकर

—पोंबुर्पे येथील शाळेची स्थिति अजून सुधरलेली नसल्यानें त्या संस्थेचे सेक्रेटरी तेथील स्थानिक गृहस्थांस सदहू शाळेस मदत करण्याविषयीं विनंति करतात. विनंति योग्य असल्यानें, तिला मान देण्यांत येईल अशी आम्हांस उमेद आहे.

—संस्थान सांगली पैकीं मंगळवेढें येथील श्री. श्रीपतराव नागणे यांस त्यांच्या कामगिरीबद्दल श्रीमच्छत्रपति राजाराम महाराज सरकार यांनीं 'तानाजी मालुसरे' अशी पदवी देऊन जरीफेटा अर्पण केला.

—काश्मीरचे कै. महाराज प्रतापसिंह यांच्या शवावार ५०००० रुपये उधळण्यांत आले!

—यंदांचा स्थानिक लक्ष्मीपूजनोत्सव विशेष भानगडी उपस्थित न होतां सुरळीतपणें पार पडला. अखेरच्या दिवसाचे यजमान रा. नारायण शंभू शिरवैकर यांच्या विनंतीनें हेगडे देसाई यांचें "जरी व्हावा तुज देव, तरी हा सुलभ उपाव। करीं मस्तक ठेंगणा, लागे संतांच्या चरणा॥" या अभंगोक्तीवर प्रवचन झालें.

श्री दामोदर विद्यालय—मडगांव.

'शिक्षण प्रसारक संघा'कडे या संस्थेचीं सूत्रें आल्यापासून श्रीदामोदर विद्यालय ही एक नमुनेदार शाळा होईल अशी आशा दिसत आहे. बारा वर्षें संस्था टिकवून धरलेले दो. विष्णु रामचंद्र नायक यांच्या शिवाय संघामध्यें तरुण व उत्साही मंडळी असल्यामुळें विद्यालयामध्यें नवीन सुधारणा होत आहेत. संघाच्या इच्छेनुरूप शाळा चालविण्यास योग्य असे अनुभविक व गोव्यांत नावाजलेले असे मुख्याध्यापक शाळेला लाभले आहेत, यामुळें शिक्षणाच्या बाबतींत गेल्या वर्षांत बरीच प्रगति झालेली आहे. विद्यालयांत यंदांच सार्वजनिक गणेशोत्सव करण्यांत आला. व नुकतेंच माजी व विद्यमान विद्यार्थ्यांचें पहिलें संमेलन झालें. संमेलनाच्या कार्यक्रमांस आम्ही स्वतःच आरंभापासून हजर होतों व तें पाहून आम्हांस अत्यंत संतोष झाला. माजी विद्यार्थ्यांचें विद्यालयावरील प्रेम व त्यांचा अभिमान पाहून कौतुक वाटलें व संस्थेबद्दल ते अशीच कृतज्ञता बाळगतील तर शाळेच्या भरभराटीस अनेक मार्गांनीं त्यांना मदत करतां येईल. तसेंच विद्यमान विद्यार्थ्यांच्या मनामध्यें शाळेविषयींचें प्रेम व अभिमान याचें बीजारोपण करण्यास संमेलन हें उत्तम साधन दिसलें.

विद्यार्थी हरएक काम मोठ्या उत्साहानें करीत होते. त्यांनीं 'प्रेमसंन्यास' व 'चंद्रग्रहण' मधील जे प्रवेश केले ते त्यांच्या वयाकडे पाहिल्यास खरोखरच भूषणास्पद होते. संमेलनाची मिरवणूकहि अभूतपूर्व अशीच होती. बाकी संमेलनाविषयीं आमचें मत आम्हीं आजच्या स्फुटांत नमूद केलेंच आहे.

—श्री दामोदर विद्यालयाच्या माजी व विद्यमान विद्यार्थ्यांच्या पहिल्या संमेलनाचा आलेला सविस्तर रिपोर्ट येत्या अंकीं प्रसिद्ध होईल.

—म्हैसूर संस्थानांतील एका खेडेगावांवर दरोडा पडल्याच्या बाबतींत बंगलोर येथें असलेल्या ब्रिटिश फौजेंतील शीख व पंजाबी मुसलमान मिळून बारा इसम म्हैसूर पोलीसच्या स्वाधीन करण्यांत आले असून त्यांपैकीं चौघांनीं गुन्हा कबूल केला आहे.

—१९२४ सालीं आलेल्या महापुराच्या वेळीं लोकांचे प्राण व पैसाअडका बचावण्याच्या बाबतींत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या वीस लोकांना म्हैसूर दरबारनें पदकें दिलीं.

—अमृतसर येथें शिखांच्या सुवर्ण मंदिराजवळ हिंदूंचें एक नवीन देवालय बांधण्याचें काम सुरू असून सदर देवालयाच्या तलावांत पाणी सोडण्याचा समारंभ आक्टोबरच्या पहिल्या तारखेस झाला.

—लग्नकार्याच्या प्रसंगीं अगरवाल जातीच्या लोकांनीं छत्र व चौरी वापरूं नये, असें उदेपूर दरबारनें जाहीर केलें आहे.

O BHARAT

DEPUTADO

Dr. Indalencio Froilano de Melo

TENENTE-CORONEL MEDICO

A' URNA, POIS!

De todos os pontos do País nos chegam noticias animadoras de que a candidatura do sr. dr. Froilano de Melo vai, dia a dia, ganhando simpatia e conquistando apoio do eleitorado consciente e honesto, digno e independente da India.

E não era de esperar outra coisa, dados os primores da consciencia patriotica, dada a excelencia da honestidade de processos, dada a dignidade da coragem civica e dada a independencia do caracter nobre do sr. dr. Melo que num conjunto harmonico e excepcional, concentra na sua consciente e honesta, digna e independente pessôa, todas as virtudes que uma representação parlamentar a mais escrupulosa e a mais exigente demanda para o bem e a gloria da Pátria.

Bem sabemos, tambem, que a par do eleitorado consciente e honesto, digno e independente, que expontaneamente se movimenta, arrastado pela inegavel competencia do sr. dr. Melo, existe, igualmente, no País um elemento *arcaico* que por processos *arcaicos* trabalha *manibus pedibusque* a favor duma candidatura tambem *arcaica* que, só pelo facto de o ser, devia ser, ao menos, desta vez, posta de parte...a titulo da variação de actual *mudez parlamentar*.

Sim; ao menos desta vez, o elemento afecto ao sr. Costa, em atenção á distincta personalidade do sr. dr. Melo devia embainhar a sua espada eleitoral, deixando de a terçar contra um abnegado sabio patriota que sendo eleito nosso representante no Parlamento só dignificará a India, felicitando-a e engrandecendo-a.

E consta-nos até que alguns professores do Liceu Central de Nóva Goa estão tristemete celebrisando a sua propaganda eleitoral a favor do sr. Prazeres, lançando mão de todos os meios para conseguirem o seu fim eleitoral.

Informam-nos, por exemplo, que alguns dêles, subjugados, talvez, pelo furor eleitoral, chegaram a ameaçar com *chumbos*, ainda que indiretamente, certos pais e parentes dos alunos daquele estabelecimento secundario que lhes torceram o nariz ao pedido de votos ao seu candidato!

Acrescentam-nos, ainda, que os mesmos professores estão colhendo assignaturas de eleitores em um manifesto que projectam publicar por surpresa e com o qual esperam lançar confusão no espirito público, precisamente no fragor do combate.

Não sabemos se são ou não verdadeiros os informes que nos são fornecidos; mas se o fôrem, não podemos deixar de lamentar que o sentimento de gratidão pelos favores recebidos do sr. Costa tenha dado margem a um excesso daquela natureza, excesso que, partindo donde parte e pela maneira como parte, chega a ser um crime grave.

Faça cada qual propaganda eleitoral a favor do seu candidato como melhor lhe aprouver, mas nunca a ultrapassando da meta que a legalidade e a moralidade lhe marcam

Mas, como iamos dizendo, o eleitorado consciente e honesto, digno e independente está se pronunciando por toda a parte e como que movido por uma mola do patriotismo, puro e santo, a favor da candidatura do dr. Melo que consciente e honestamente, digna e independentemente nos representará no Parlamento.

Nada de vascilações, nada de tergiversações; nada de torpes ameaças, nada de jogos malabares; nada de mesquinhas ambições, nada de veleidades pessoais.

Nada disso, eleitor consciente e honesto, digno e independente. Nada disso.

E á urna pelo sr. dr. Melo, gloria nacional, sabedoria universal!

A' urna, pois!

Politica local

Dentre as listas camararias que foram apresentadas, há uma em que figura o nome do sr. Luis José de Sousa Junior, engenheiro agricola formado na America e ex-secretario privado do grande tribuno da India Britanica sr. Lala Lajpat Rai.

Não sabemos os nomes dos cidadãos que formam as referidas listas, nem mesmo nos ocorrem neste momento os dos restantes cavalheiros da lista do sr Sousa Junior; mas que, logo que sejam conhecidos, serão apresentados com todas as formalidades de etiqueta.

Quanto ao sr. Sousa Junior, conquanto o *Bharat* o tenha criticado no campo doutrinario dos seus modos de ver sobre agricultura, não lhe obsta, todavia, essa circunstancia a que o nosso jornal faça justiça á reconhecida competencia do ilustre patriota para com seus companheiros representar dignamente a edilidade do concelho de Quepêm.

Sim, senhores. O sr. Sousa Junior é patriota ilustre, andado e educado entre gente essencialmente patriotica como Lajpat Rai e num meio genuinamente liberal, como o da America. E quem é patriota ilustre — excusado é dizer — está livre de preocupações de castas e raças, de côres e *maças*, sendo-lhe tomado o espirito pelo único ideal de ser útil á Patria.

Um patriota ilustre — saibam-no todos mais uma vez — não é *hindú*, não é *cristão*, não é *moiro*, não é *budista* nem é *maçom*. A sua unica religião, a sua única raça e a sua única côr é—o patriotismo.

E por causa dessa única religião que o sr. Sousa Junior professa com fé e devoção, o *Bharat* que tambem se gloria de pertencer ao mesmo credo —modestia á parte—considera-o como seu consciente e honesto, digno e independente correligionario.

APOIADO!

Domingo passado houve uma reunião em Vasco da Gama afim de se difinir a atitude eleitoral de seus habitantes. Foi presidente da mesma reunião o sr. Randolfo Mendes e unanimemente se resolveu apoiar a candidatura do sr. dr. Melo.

¿Que denota isto? Que o eleitorado daquela cidade é consciente e honesto digno e independente.

D. EMPENHOCA

No nosso país em que ainda reina a sra. D. Empenhoca, até um *tapado* consegue ver-se colocado em um lugar em que nem no sonho devia pensar. Resultado: descredito do colocado, descredito do lugar e prejuiso publico.

Nós conhecemos um que sem saber que não é o lugar que honra uma pessoa, mas sim é a pessôa que honra um logar, está oferecendo espectaculos divertidos á gente que *paga* e *não bufa*...

O sr. Mariano Martins terá prestado relevantes serviços ao País que tão sabiamente governa, se conseguir antes de mais expatriar a mesma sra. Empenhoca e providenciar por forma que os lugares públicos sejam ocupados por pessôas que só os saibam honrar.

E' o que exigem a legalidade e a moralidade cujo dominio Sua Excia está implantando na colónia, com grande gaudio dos que extremecem a India, com todas as veras de sua alma.

ERRATA

No artigo *Mais uma vez*, da edição passada em vez de "comarca de Bicholim" leia-se "Comarca de Bardez",

भा र त

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, कार्तिक शु० १३ शी शके १८४७

आत्मैव रिपुरात्मनः

चालू महिना व येता नव्हेंबर महिना बराच धामधुमीचा आहे. येत्या महिन्याच्या १ ल्या तारखेस मुनिसिपल निवडणूक ठरली असून २२ तारखेस पार्लमेंटची निवडणूक जाहीर झाली आहे. निवडणुकीचा प्रसंग येतांच आह्मांला मतदारीच्या प्रश्नाकडे लक्ष्य दिल्याशिवाय रहावत नाहीं. राष्ट्रीय स्वायत्तता, प्रांतिक स्वराज्य किंवा स्थानिक स्वराज्य यांत नागरिकत्वाचा हक्क बजावण्यास मतदारीच्या कुंपणाची कोंडी फोडली पाहिजे. ह्मणजे मतदार हा एकपरी राजकीय सत्तेचा खराखुरा अंशच ठरतो. आणि ह्मणूनच या बाबतींत आपणा हिंदुलोकांची जी स्थिति आमच्या आह्मींच बनवून घेतली आहे तिच्याकडे भारताच्या वाचकवर्गाचें लक्ष्य वेधून घेण्याचें आह्मीं आज ठरविलें आहे.

गोमांतकाला जी प्रांतिक स्वायत्तता मिळाली आहे तिच्यांत आह्मां हिंदुलोकानां फारच थोडा वांटा मिळतो. आणि त्याचें कारण शोधूं गेल्यास तें आमच्याच लोकांच्या अक्षम्य हलगर्जीपणांत सांपडतें. मतदारीच्या कसोटींत अनेक प्रसंगीं जे अनेक चमत्कारिक फरक झाले त्यांपैकीं बऱ्याच वेळां आह्मां हिंदूंचा फायदा झाला होता. पण केवळ आमच्या हलगर्जीपणानेंच आह्मीं मिळालेले हक्क गमावले. आज पोर्तुगीज भाषेंत लिहितां वाचतां येणाऱ्या, प्रत्येक वयांत आलेल्या इसमास मतदारीचा हक्क मिळतो. स्वायत्ततेचें फर्मान ज्यावेळीं आरंभींच प्रसिद्ध झालें त्या वेळीं "लिहितांवाचतां येणाऱ्या प्रत्येक वयांत आलेल्या पुरुषास" मतदार होतां येई. परंतु मागाहून "लिहितां वाचतां येणें" ह्मणजे "पोर्तुगीज भाषेंत लिहितांवाचतां येणें" अशी त्यावर कलोनियल ऑफिस मधून मल्लिनाथी प्रसिद्ध झाली आणि अशा रीतीनें हिंदूंच्या बऱ्याच मोठ्या संख्येला मतदारांच्या यादींतून वगळण्यांत आलें. ह्मणजे एखादा गृहस्थ जर्मन, फ्रेंच, इंग्लीश, मराठी संस्कृत वगैरे भाषांमधून मोठा पंडित असला, तरी तो या कायद्याच्या दृष्टीनें रोमन लिपींतून पोर्तुगीज शब्द लिहितां येणाऱ्या एखाद्या पेद्रुपेक्षांहि अज्ञान आहे असें हा कायदा समजतो! हा कायदा करणाऱ्यांच्या मतें पोर्तुगीज भाषेशिवाय या जगांत दुसरी भाषाच नाहीं, किंवा असली तरी तिच्यांत ज्ञानच नाहीं, साऱ्या ज्ञानाचा ठेवा काय तो पोर्तुगीज भाषेंतच आहे, असें ठरतें. मुसलमानींधर्मप्रसारकानीं अलेक्झांड्रीया शहरांतील सारा पुस्तकसंग्रह जाळून टांकला ह्मणतात. "या पुस्तकांत जर कुराणांत सांगितलेलें ज्ञानच आहे, तर मग कुराणच पुरे यांची आणखी जरूरी नाहीं. आणि यांतील ज्ञान जर कुराणांत नसेल तर मग हें कुराणबाह्य काफिरी ज्ञान नाहींसेंच केलें पाहिजे" ही त्यांची विचारसरणी होती असें ह्मणतात. मतदारीच्या प्रश्नांत पोर्तुगीज भाषेविषयीं कायदा करणारांनीं हीच विचारसरणी अमलांत आणिली तर नसेलना?

एकंदर गोव्यांत सुमारें पावणेतीन लाख हिंदुलोकवस्ती आहे. त्यांतून ज्या लोकांनां मराठी लिहितां वाचतां येतें असे लोक ह्मणजे पांढरपेशे लोक– सुमारें ३५ हजार आहेत. पैकीं शेंकडा तेवीस इसम वयांत न आलेले ह्मणून सोडून दिले तर २७ हजार इसम राहतात आणि त्यांतून स्त्रीवर्ग शेंकडा ५० सोडला तरी साडेतेरा हजार लोकसंख्या मराठी लिहितां वाचतां येणाऱ्या व वयांत आलेल्या पुरुषवर्गाची ठरते. एवढीच संख्या आपल्या मतदारांची ठरते. एवढीच संख्या आपल्या मतदारांची असली पाहिजे होती. पण त्या ऐवजीं आज ती केवळ ३५०० च असलेली दिसून येते. नवीन काबिजादींत जेवढे खिस्ती लोक आहेत तेवढेच जुन्या काबिजादींत हिंदु लोक असल्यानें सामान्यतः नव्या काबिजादींतले मतदार तेच हिंदु मतदार असें मानून हा अंदाज आह्मी केला आहे. लोकसंख्येच्या सरकारी रिपोर्टाची प्रत हाताशीं नसल्यानें ही अनुमान परंपरा रचणें भाग झालें आहे. तेव्हां चुकीच्या संभवादाखल वर सांगितलेल्या साडेतेरा हजारांऐवजीं आपण दहा हजारच गृहित धरूं. आपल्या हलगर्जीपणामुळें, वेळींच जागृत होऊन जोराची चळवळ न केल्यामुळें आह्मां हिंदूंचें राजकीय बळ दहा हजार मतदारांऐवजीं केवळ साडेतीन हजारांवर येऊन बसलें आहे. आमच्यांतील जागरूकपणाच्या अभावामुळें आह्मींच आपलें बळ एक तृतीयांशावर आणून बसविलें आहे.

वेळींच जागृत झालों असतों तर "लिहितां वाचतां येणें" याचा अर्थ पोर्तुगीज लिहितां वाचतां येणें असा कधींच होतानां. पण तेंच कशाला आज पांच सहा वर्षे झालीं पेडणें महालांत मुनिसिपाल निवडणुकीसाठीं ह्मणून जी मतदारांची यादी तयार करण्यांत आली आहे. तींत निवळ मराठी जाणणारांचाहि समावेश करण्यांत आला आहे. ह्या यादीप्रमाणें दोन मुनिसिपल निवडणुकी होऊनहि गेल्या, इतकेंच नव्हे, तर ह्या यादी विरुद्ध व तिचा उपयोग ज्या निवडणुकींत करण्यांत आला त्या निवडणुकीविरुद्ध केलेल्या तक्रारीचाहि निकाल मराठीच्या हितीं झाला आहे. आज फोंडें, काणकोण, सांखळी सत्तरी वगैरे प्रत्येक कोंसेल्यांतील म्युनिसिपल सेक्रेटरीच्या जागा हिंदुलोकांनींच भरल्या आहेत आणि मतदारांची यादी प्रतिवर्षी या सेक्रेटरींनींच तयार करावयाची असते. असें असतां आजवर पेडणें खेरीज करून इतर कोणत्याच कोंसेल्यांत मराठी मतदारांचीं नावें मुनिसिपाल व कौन्सिलच्या मतदारांच्या यादींत कां येऊं नयेत? कायद्याची माहिती नसल्यामुळें असें होतें असें ह्मणायाला आह्मीं तरी तयार नाहीं. प्रत्येक मुनिसिपाल सेक्रेटरी आमच्या परिचयाचेच आहेत. परंतु आमच्या धर्मबंधूंनीं इतःपर आळसांत न बसतां येत्या डिसेंबरांत ज्या वेळीं नवीन याद्या तयार होतील त्यावेळीं हा प्रश्न धसास लावून घ्यावा. हवी ती कायद्याची माहिती आह्मीं पुरविण्यास तयार आहों. ही यादी केवळ मुनिसिपल निवडणुकींतच नव्हे तर कायदेकौन्सिलच्या निवडणुकींतहि उपयोगी आहे असेंहि तज्ज्ञांचें मत आहे. आमचे जे पुढारी तूर्त निवडणुकी–गडबडींत पडले आहेत व जे मराठीस मत मागतात त्यांना आमची अशी सूचना आहे कीं, त्यांनीं येत्या डिसेंबरांत होणाऱ्या यादीच्या वेळीं हा प्रश्न जोरानें पुढें आणावा. मिळालेलें खिशांत टाकूनच मग न मिळालेल्याचा हट्ट धरावयाचा.

मतदारीच्या कसोटीच्या बरोबरच जीत आमचाच हलगर्जीपणा आह्मांला भोंवतो अशी दुसरी बाबत ह्मणजे मतें नोंदण्याच्या जागांच्या गैरसोयीची होय. या जागांनां ज्या शर्ती लागतात त्या देखील आह्मां हिंदूंनां नुकसानकारक आहेत. अशी जागा ठरविण्यास निदान दीडशें मतदार तरी आसपास असले पाहिजेत. नव्या काबिजादींत पोर्तुगीज लिहितां वाचतां येणारे कमी असल्यामुळें प्रत्येक महालांत मतदार देखील सामान्यतः कमीच आहेत. आणि त्यामुळें केपें, फोंडें व सांखळी हे महाल सोडून दिले तर बाकी महालांतून बऱ्याच ठिकाणीं ह्या जागा गैरसोयींच्याच आहेत. उदाहरणार्थ सबंध सांगें महालांत सांगें कस्ब्यांतच ही एक जागा आहे व त्यामुळें एकीकडून पिळयें पांच कोस व दुसरीकडून नेतुर्लीं साडेचार कोस असें बेसुमार अंतर तोडून मतदारांना यावें लागतें. ह्याचप्रमाणें काणकोण येथील खोल गांवच्या मतदारांनां चावडीवर येतानां साडेचार कोस तुडवून यावें लागतें. सत्तर प्रांतातल्या मतदारांना देखील असीच वाळपै ही एकच जागा आहे. ही निवडणूक ह्मणजे मतदारांची कसोटीच ठरते. बरें वर ज्या महालांत थोडी फार सोय आहे असें ध्वनित करण्यांत आलें आहे तेथें देखील जुन्या काबिजादीपेक्षां गैरसोयीच्याच आहेत. तेथें सरासरी मतदाराला एक कोसापेक्षांहि कमी मजल मारावी लागते. तर नव्या काबिजादींत सरासरी अडीच कोस मजल मारून मत देण्यास यावें लागतें. त्याचप्रमाणें आपल्याला नव्या काबिजादींतहि जागा ठरवून घेतल्या पाहिजेत. या बाबतींत देखील चालेंगे चलायेगें अशी अक्षम्य हलगर्जीपणाचीच चुकी आपला समाज करीत आहे.

आपले पुढारी आजकाल पार्लमेंट निवडणुकीच्या पूर्व तयारीसाठीं दौरे काढीत आहेत त्यांनीं ह्या गोष्टीचा विचार केला असता तर फार चांगलें झालें असतें. ग्रामकमिटी Junta local साठीं ज्या जागा ठरविण्यांत आल्या आहेत त्याच जागा इतर निवडणुकीकरतांहि मुक्रर करवून घेण्याचा हक्क आह्मी नवीन काबिजादवाल्यांनीं मिळविला पाहिजे. ह्मणजे थोडा तरी त्रास वांचेल. ज्या ठिकाणी निवडून येण्यास लायक असे वीस तरी मतदार असतील तेथें गांवकमिटी स्थापन होत असते. अशा जागा प्रत्येक महालांत निदान तीन तरी मिळतातच. ह्मणजे तेवढेंच आपलें क्षेत्र कमी होऊन मतदारांना सहज मतें नोंदतां येतील.

वास्तविक ह्या गोष्टी आमच्या मुनिसिपल मेंबरानीं साध्य करून घ्यावयाच्या. व त्या तशा करून घेण्यास त्यांना कोणत्याच प्रतिपक्षाची भीति बाळगायाला नको आहे. शिवाय मतदारांची यादी करणारे इसम आपलेच असल्यामुळें त्यांच्याकडूनहि ह्या कामीं मदतच मिळाली पाहिजे होती. परंतु त्याऐवजीं पेडणें येथें मराठीस मत देऊन तयार झालेल्या यादीविरूद्ध तक्रार करायला जीं साधनें व जी कायद्याची सल्ला हवी होती ती सल्ला व मदत आपल्या उल्लेखित सेक्रेटरींपैकीं दोघांनी केल्याचें आह्मांला माहीत आहे! या गोष्टी अक्षम्य आहेत.

कायदे कौन्सिलच्या सभासदांची महाल निहाय वांटणी करतांनां देखील असाच अन्याय झाला आहे. दीवची लोकसंख्या १४ हजार व मतदारांची संख्या १२५ असून त्याला एक सभासद मिळाला आहे. तर गोव्याच्या दोन तृतियांशाइतकी भूमि व्यापणाऱ्या व अर्ध्या इतकी लोकसंख्या असणाऱ्या नव्या काबिजादींनां एकच सभासद वाटणीस आला आहे. आणि मिळालेला तेवढा एकच सभासद घेऊन आपण शांतपणें आहोंत. वेळींच कांहींतरी खटपट केली असती तर ही विषमता आपल्याला नाहींसी करून घेतां आली असती. नव्या काबिजादींनां निदान तीन तरी सभासद मिळालेच पाहिजेत. या बाबतींत देखील आमचा हलगर्जीपणाच आह्मांला नडतो आहे.

ह्मणजे राजकीय बाबतींत आपण सर्वतोपरी तुकाराम बुवांच्या "जें जें होईल तें तें पाहावें" या उक्तीवर अवलंबूनच आहोंत. ही स्थिति अक्षम्य आहे. ही बेफिकीर वृत्ति आह्मांला घातक आहे. हिच्यामुळेंच हिंदूंचें प्राबल्य असलेल्या मुनिसिपालट्यांतून खिस्ती सभासद अध्यक्षाची खुर्ची बळकावूं शकतात. मराठीस मत नोंदूं गेलें असतें व मतें नोंदण्याच्या जागांची वांटणी आह्मीं वर दाखविलेल्या दिशेनें झाली असती तर नव्या काबिजादींतलें आमचें राजकीय महत्व अबाधितच राहिलें असतें. परंतु मथाळ्यांतील श्लोकाच्या चरणाप्रमाणें आपणच आपले शत्रू झालों आहोंत तेथें उपाय नाहीं.

—लुइज जुझे द सौज जुनियर यानां येथील मुनिसिपल निवडणुकींत निवडून देण्यासाठीं त्यांच्या बऱ्याच मित्रानीं ठराव केला आहे. अमेरीकेंत दे. लाला लजपत राय यांचे सौज हे सेक्रेटरी होते, या एकाच कारणामुळें त्यांची पात्रता सिद्ध होते.

अभिनव भारताचे जनक
बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी

लेखांक ५ वा.

किल्येक पुढाऱ्यांनीं ज्याप्रमाणें पुष्कळदां लोकप्रियता कायम राखण्याकरतां मतपरिवर्तन केलें तसें बाबू सुरेन्द्रनाथांनीं केव्हांहि केलें नाहीं. रामानंद चटर्जी

प्रागतिकांपैकीं ज्यांनीं मिनिस्टर किंवा एक्झिक्युटिव्ह मेंबराच्या जागा पतकरल्या त्या केवळ डौलाकरतां किंवा फायद्याकरतां पतकरल्या नसून सरकारच्या कारभारांत प्रत्यक्ष भाग घेऊन हिंदी लोकांवर जबाबदारीचीं कामें टाकलीं असतां तीं त्यानां उत्तम प्रकारें करतां येतात, हें प्रत्यक्षपणें सिद्ध करून दाखविण्याकरतांच पतकरल्या. वसंत ना. नायक

वंगभंग रद्द झाल्यावर १९१३ सालीं बाबू सुरेंद्रनाथ हे वरिष्ट कायदेकौंसिलमध्यें निवडून आले व त्यानीं देशहिताचीं अनेक कामें केलीं. त्यानंतर १९१७ सालीं मांटेग्यु चेम्सफर्ड सुधारणेच्या कायद्याचा मसुदा तयार झाला व तो पाहून त्यानां फार आनंदहि झाला. याप्रमाणें थोड्याच काळांत आपण स्वराज्याचा पल्ला गांठूं असें त्यानां खात्रीपूर्वक वाटूं लागलें. या सुधारणेच्या कायद्याविरूद्ध देशांत मतभेद उत्पन्न होऊन त्या 'अत्यंत अग्राह्य' आहेत असें जहाल पक्षाचे धुरीण टिळक यांनीं आपलें मत दिलें. सुरेंद्रबाबूंच्याहि पक्षाला या सुधारणा अपुऱ्या आहेत असें वाटत होतें. परंतु दिलेल्या सुधारणा फेंटाळून न लावतां त्या स्वीकारून पुढें पायरीपायरीनें ज्यास्त सुधारणा देण्याला सरकारला भाग पाडावें असें या पक्षाचें ह्मणणें होतें. या सुधारणावर विचार करण्याकरितां राष्ट्रीय सभेचें खास अधिवेशन मुंबई येथें आगष्ट महिन्याच्या अखेरीस ना. हसन इमाम यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें गेलें. त्यांत पुष्कळशी वाटाघाट होऊन "या सुधारणा निराशाजनक व असमाधानकारक आहेत, वरून योग्य ते फेरफार करणें" असा ठराव शेवटीं पास झाला. परंतु वेळीं धोरण पाहिल्या अंतीं प्रागतिकानां आपली परिषद वेगळी भरविणें इष्ट आहे असें वा लागलें व त्याप्रमाणें त्यानीं आपली निराळी परिषद भरविण्याचें ठरवून तिचें पहिलें अधिवेशन मुंबईसच भरविलें गेलें. या 'राष्ट्रीय प्रागतिक परिषदेच्या पहिल्या अध्यक्षांचा मान बाबू सुरेंद्रनाथांना मिळाला. अध्यक्ष पदावरून त्यानीं जें भाषण केलें तें अत्यंत महत्वाचें होतें.

प्रथमत: त्यानीं आपल्या पक्षाला राष्ट्रीय सभेपासून वेगळी परिषद कां भरवावी लागत आहे, याचा उल्लेख केला. ते ह्मणाले: "जादां कॉंग्रेसपासून अलिप्त रहाणें हें आह्मांला अत्यंत जाचक झालें. राष्टीय सभेच्या खास अधिवेशनास गैरहजर रहाणें मला तर विशेष दु:खप्रद वाटलें. आह्मीं हाडाचीं काडें करून ही संस्था नावांरूपास आणली. संस्थेचा जन्म तिचें लालन पालन व तिचें संवर्धन या सर्वांशीं आमचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. कॉंग्रेसचें पहिलें अधिवेशन याच शहरीं झालें, त्यावेळीं माझे परम मित्र सर दिनशा वाच्छा हे हजर होते. मला तो मान मिळाला नाहीं, तरी १८८६ पासून १९१७ पर्यंतच्या कॉंग्रेसमधील सर्व अधिवेशनास मी हजर रहात आलों आहें. याला फक्त अपवाद काय तो कराची कॅांग्रेसचा होय. ज्या संस्थेचा परिपोष करण्यास आह्मी झटलों त्या संस्थेंत यादवी सुरू झाली. विचारी माणसांच्या सल्ल्यास कोणी विचारीनासें झालें. अशा स्थितींत त्या संस्थेपासून अलिप्त रहाण्याचा आमच्यावर अपरिहार्य प्रसंग आला; कारण कॅांग्रेस ज्यानीं बळकावली त्यांच्यांत व आमच्यांत तात्विक मतभेद आहेत. स्वराज्य हें कॅांग्रसचें ध्येय आहे. या ध्येयाकरतांच ती नि ाण झाली, पण गेल्या जादा अधिवेशनाच्या वेळीं जहालपणास ऊत येऊन योजनेचा धि:कार करण्यांत येईल, हें आह्मीं आधींच भाकीत केलें होतें. स्वराज्य हें साध्य असून कॅांग्रेस हें साधन आहे. साध्याकरतां साधनांचा त्याग आह्मांला करावा लागला" ह्या त्यांच्या भाषणावरूत प्रागतिक पक्षाला आपली परिषद वेगळी कां भरवावी लागली, याचें स्पष्टीकरण होईलच. सरेन्द्रबाबूचें कॅांग्रेसवर अत्यंत प्रेम होतें; परंतु कॅांग्रेस ही एकतंत्री झाल्यामुळेंच त्यांच्या पक्षाला आपली निराळी परिषद भरवावी लागली. पुढें पुढें तर कॅांग्रेस सर्वांशीं महात्मा गांधीच्या हातांत जाऊन तिच्या कार्यक्रमांत चरका व खादी या शिवाय कांहींच न रहातां (केसरीच्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास) कॅांग्रेस ही राजकारणविहीन बनली. यावरून प्रागतिक पक्षाच्या पुढाऱ्यांनीं केलेलें भविष्य तंतोतंत खरें उतरलें यांत शंका नाहीं. त्यानंतर सुरेंद्रबाबूनीं आपल्या प्रागतिक पक्षाचीं तत्वें काय याचा खुलासा केला. ते ह्मणाले "आह्मीं नेमस्त पक्षांतील लोक उत्क्रांतीचे दोस्त असून क्रांतीचे शत्रू आहोंत. आमच्या स्वत:च्या व सरकारच्या हिता करतां आह्मीं क्रांतीचा पूर्णपणें तिरस्कार करतों. फ्रांन्स रशिया वगैरे देशांत झालेल्या क्रांतीपासून काय अनर्थ ओढवले व तदनंतर तेथें प्रतिगामी-धोरण व दडपशाही यांचा सुळसुळाट होऊन एकतंत्री राज्यपद्धतीचे भोक्ते राज्यारूढ कसे झाले यांचा इतिहास आह्मांस पूर्णपणें माहीत आहे. वरून या क्रांतिकारक चळवळीपासून सर्व लोकानीं धडा शिकला पाहिजे. अशा प्रकारच्या चळवळी नाहींशा करून राजकीय सुधारणेचें सुकाणू योग्य दिशेनें हांकणें, हेंच प्रागतिकपक्षाचें ध्येय आहे. शक्य तेथें सहकारिता जरूर तेथें विरोध असें आमुचें मुख्य तत्व आहे. विरोधाकरतांच विरोध करणें आह्मांस मान्य नाहीं, हें आपल्या पक्षाचें ध्येय सांगितल्यावर आपल्या पक्षांतील लोकानां सरकार विरुद्ध चळवळ करतां येत नाहीं अशा दुसऱ्या पक्षांतील लोक गैरसमज पसरवितात. त्याविषयीं ते ह्मणाले "ज्यांनीं बंगालच्या फाळणीला विरोध करून 'वज्रलेप' ह्मणून जाहीर झालेली फाळणी रद्द केली त्यानां पुढें तशी परिस्थिति उत्पन्न झाल्यास पुन्हां विरोध करतां येणार नाहीं. असें कोणासहि ह्मणतां येणार नाहीं. पुन्हां प्रसंग येऊं द्या. ह्मणजे आम्हीं प्रागतिक पक्षांतील लोक तीच कामगिरी करण्यास मागेंपुढें पहाणार नाहीं". यानंतर आपल्या राज्यकर्त्यांच्या दृष्टीकोनांत फरक झालेला आहे. या करतां दिलेल्या सुधारणा फेटाळून न लावतां त्या स्वीकारून सुधारणा फेटाळून न लावतां त्या स्वीकारून ह्याहून ज्यास्त सुधारणा देण्यास सरकारास भाग पाडावें, यांतच खरी मुत्सद्दिगिरी आहे असें त्यानीं यावेळीं सांगितलें. सुधारणा स्वीकारण्याकरितां त्यानीं लोकानां जसा आग्रह केला त्याप्रमाणें सरकारलाहि पण असा इषारा देऊन ठेवला कीं, "या सुधारणा जर लांबणीवर टाकण्यांत आल्या किंवा त्यांत कांहीं कमी करण्यांत आलें तर तीव्र असंतोष उत्पन्न होईल. व त्यांत स र्व पक्षांचें ऐक्य होईल. दुसऱ्या बाजूनें दडपशाही होईल पण त्याचा परिणाम काय होईल तें सांगतां येणार नाहीं. हिंदुस्थानचें आयर्लंड व्हावें अशी ब्रिटिश प्रधानमंडळाची इच्छा आहे काय ?" असा सरकारलाहि इषारा देऊन शेवटीं ते ह्मणाले "आतां नवीन युगाला सुरवात होऊन आशेची सफलता होण्याचा काल समीप आला आहे. यासाठीं पूर्वकालीं ज्यांनीं आपल्या स्वार्थत्यागानें आपल्याला या स्थळीं आणून पोंहचविलें त्याचें स्मरण करणें आपल आद्य कर्तव्य आहे. कॅांग्रस व तीचे पुढारी यानींच राष्टाची जोपासना केली असल्यानें त्यांच्या कार्याविषयीं आपणास प्रेम व आदर वाटला पाहिजे. आतां त्यांचें कार्य झालें. मत प्रसाराचें कार्य आतां संपलें असून नव्या पीढीच्या रचनेच्या कार्यास सुरवात व्हावयाची आहे. या करतां व्यवहारज्ञ मुत्सद्यानीं पुढें आलें पाहिजे. हिंदी मझेनींचा काल आतां संपला असून हिंदी काव्हरांच्या युगास प्रारंभ झाला आहे यासाठीं स्वदेशाभिमान, स्वार्थत्याग त्याचप्रमाणें नेमस्तपणा व आत्मसंयम योची अत्यंत आवश्यकता आहे.

त्यानंतर महात्मा गांधीची असहकारिता, एका वर्षांत स्वराज्य, मुसलमानाच्या खिलाफतीच्या बंडाचें हिंदी राजकारणांत नसतें स्तोम, जहालांचे कोन्सिल विध्वंसन, वगैरे एकामागून एक निर्माण झालेल्या चळवळींनीं हिंदी राजकारणांचा जो चुथडा उडाला त्यांशीं वरील भाषण ताडून पहातां सात वर्षांपूर्वी सुरेंद्रबाबूनीं काढलेले उद्गार खरे ठरून शेवटीं प्रागतिक पक्षानें आंखलेल्या मार्गावरच आज हिंदी राजकारणाचा गाडा येत आहे. वरील परिषदेंत प्रागतिक पक्षातर्फे एक सहा जणांचें डेपुटेशन इंग्लंडला पाठविण्याचें ठरलें होतें. त्यांत सुरेन्द्र बाबूंची निवड झाली होती त्याप्रमाणें तें इंग्लंडला गेले व तेथून परत येतांच त्यांना सर ही पदवी देण्यांत आली.

पुढें पंजाबप्रकरण उपस्थित झाल्यामुळें महात्मा गांधीच्या असहकारितेच्या काळास सुरवात झाली. महात्मांजींच्या वैयक्तिक चारित्र्यामुळें त्यांचीं राजकारणांतील तत्वें प्रमाण मानून जनतेचा ओढा त्यांचेकडे गेला. महात्माजींच्या कार्यक्रमाप्रमाणें दारूविरुद्ध पिकेटींग, सरकारी शाळांवरील बहिष्कार, राष्ट्रीय शाळा, कोर्टांवरील बहिष्कार, कौन्सिल बहिष्कार, यांची धामधूम सुरू झाली. गांधी टोप्या जिकडे तिकडे झळकूं लागल्या. अशा तऱ्हेनें हिंदी राजकारणांत नवीन क्रांति सुरू होऊन सर्वांचें लक्ष एका वर्षांतील स्वराज्याकडे लागलें. यावेळीं प्रागतिक पक्षानें असहकारितेविरुद्ध आपलें मत प्रदर्शित करून हिंदुस्थानांत हे कायक्रम अमलांत येणें व एका वर्षांत स्वराज्य मिळणें केव्हांहि शक्य नाहीं, असें सांगितलें. तसेंच असहकारितेनें स्वराज्य मिळाल्याचा दाखला जगाच्या इतिहासांत तरी नाहीं असा स्पष्ट इषाराहि पण दिला. परंतु त्या धामधुमीच्या काळांत या उपदेशाकडे जनतेचें लक्ष गेलें नाहीं व त्याप्रमा कौन्सिल निवडणुका सुरू तांच स्वराज्यपक्षहि गांधीच्या मताकडे गेला व यामुळें प्रागतिक हे निवडून आले. बाबू सुरेंद्रनाथ हे बंगाल कौन्सिलमध्यें उमे राहिलेले होते तेथेंही विरोधी पक्ष प्रबळ नसल्यामुळें ते निवडून येऊन त्यांची १९२१ मधीं जानेवारींत दिवाणगिरीवर नेमणूक झाली. यामुळें सुरेंद्रबाबूंची लोकप्रियता कमी होऊन त्यांच्यावर बेजबाबदार टीकांचा भडिमार सुरू झाला. कित्येकांनीं तर ते केवळ पैशांच्या आशेनें प्रधानकीला बळी पडले असें ह्मणण्यापर्यंत पाळी आणली; परंतु सुरेंद्रबाबू हे लोकप्रियतेचे भोक्ते नव्हते तर आपल्या सबंध आयुष्यांत लहान मोठ्या अधिकाराकरितां सरकाराकडे जी चळवळ केली त्यांतील बरेचसे हक्क आपणाला या नवीन सुधारणेमुळें मिळत आहेत ते गमावणें ह्मणजे मूर्खपणा करण्यासारखें आहे असें त्यांना खात्रीपूर्वक वाटत होतें ह्मणूनच त्यांनीं मंत्रीपद स्वीकारलें. सुरेन्द्रबाबूंच्या मंत्री पदाबद्दल रामानंद चटर्जी ह्मणतात: ' सुरेन्द्रनाथांनीं केवळ पैशांच्या आशेनें मंत्रीपद स्वीकारलें असें ह्मणणें योग्य नाहीं कारण त्यांच्या आयुष्यांत त्यानीं पुष्कळदां सरकार विरुद्ध चळवळ केली आहे; पुष्कळ प्रसंग तर असे होते कीं, त्या चळवळी जर सुरेन्द्रबाबूंनीं बंद केल्या असत्या तर त्यांनां सरकारकडून अर्थलाभ होऊन मानहि मिळाला असता; परंतु तसें त्यानीं केव्हांहि केलें नाहीं" यावरून सुरेन्द्रबाबूंवरील आरोप कसे निष्कारण होते हें दिसून येतें. सुरेन्द्रबाबूंची तत्वनिष्ठा जबर होती. लोकप्रियतेच्या आशेनें त्यांनीं तत्व सोडलें नाहीं. लोकप्रियता मिळो अगर न मिळो आपल्या ध्येयाला अनुसरून सद्सद्विवेक बुद्धीला जो मार्ग दिसला त्या मार्गानें त्यानीं देशसेवा केली.

O BHARAT

ECOS E CRITICA

VIVA A INDIA NOVA!

O *Pragatica Sanga*, o *Partido Democratico*, o *Partido Popular de Bardez*, em massa, e quase todos os membros do *Partido Indiano* e dos restantes grupos politicos da India apoiam entusiasticamente a candidatura do sr. dr. Melo, o que lhe garante o trifunfo no acto eleitoral do dia 22 do corrente!

Bem diziamos que o eleitorado consciente e honesto, digno e independente sabe o que deve a si e á prestigiosa figura do dr. Melo, gloria nacional e sabedoria universal, sabendo igualmente, conservar-se refractario e alheio ao *joguinho oculto* dos chamados politicões *maduros*, que desesperados e desanimados pela crescente simpatia e progressivo apoio que a candidatura do dr. Melo vai atingindo, estão, mesmo, levadinhos de bréca!

O eleitorado consciente e honesto, digno e independente nao faz, porem, caso do safado caciquismo *maduro* e vai avante, pugnando, com calor e entusiasmo, pela causa do dr. Melo, causa que é toda feita de honestidade e sinceridade, patriotismo e abnegação.

A India nova, vai, pois, demonstrar no dia 22 do corrente que este pais não é feudo do sr. Prazeres que contra os principios da Democracia pretende eternisar se no parlamento.

QUEBRANDO DENTES...

Pedem-nos a publicação da seguinte declaração:

"Constando terem sido levantadas por alguns politicos do Paiz varias atoardas em volta do apoio dado pelo *Pragatica Sanga* a' candidatura do sr. Tenente-Coronel-me'dico Indalencio Froilano de Melo torna-se necessario declarar em abono da verdade

1° Que a candidatura do dr. Froilano de Melo e' apresentada nao pelo *Pragatica Sanga* mas sim pelos elementos de diferentes agremeaçoes politicas do Pais e por pessoas independentes.

2°, Que o *Pragatica Sanga* so' lhe da' o seu apoio e dando o esta' no seu livre direito.

3° Que este apoio e' dado sem nenhum compromisso previo de especie alguma com o mesmo dr. Froilano de Melo a quem reputa suficientemente digno e competente para conhecer e tratar dos verdadeiros interesses do Paiz e das suas instantes necessidades.

4° Que da parte do *Pragatica Sanga* tem pois o dr. Froilano de Melo absoluta liberdade de acçao para proceder como lhe indicarem a sua consciencia civica e o seu alto patriotismo.

Nova Goa 9 de Novembro de 1925.

Pelo *Pragatica Sanga*

Atmarama Govinda Borcar, presidente

Balcrisnh Datarama Sacardando, secretario"

¿Que dizem a isso os emeritos caluniadores do *Sanga* e eximios pescadores de aguas turvas?

A *moda* de insinuações já não *pega*, tenham disso a plena certeza.

PARTIDOS DE PERNEM

O sr. Srirama Dessai, de Pernem, pede-nos a publicação da seguinte nota eleitoral:

"Os eleitores do concelho de Pernem, pertencentes aos partidos politicos dos senhores Dessai de Arabo' e Visconde de Pernem resolveram unanimemente apoiar a candidatura do dr. Froilano de Melo."

POLITICA DE SANGUEM

O sr. Esvanta V. Dessai, de Rivona, comunica-nos o seguinte:

" O sr. Nonato Costa que e' quase desconhecido no concelho de Sanguem quiz jogar uma *trica* eleitoral em nome dos eleitores daqui, dirigindo um fantastico telegrama a' imprensa a proposito da atitude dos mesmos eleitores.

Como representante dos eleitores das Provicias de Astragar e Embarbarcem declaro aqui firmemente que todos eles apoiam unanimemente a candidatura do dr. Melo nao passando, portanto, de autentico abuso eleitoral o telegrama do sr. Nonato."

Esse sr. Nonato, imitando o exemplo do sr. Vicente Alvares, perdeu uma bôa ocasião de deixar de meter o seu bédelho...telegrafico em um assunto onde não foi chamado.

Podem, porêm, estar certos todos os Vicentes e Nonatos... eleitorais do nosso Pais, que é trabalho baldado pretenderem desnortear o eleitorado com telegramas estapafurdios e mirabolantes.

Por muito *usado, gosado* e *abusado*, tal expediente já não presta para coisa nenhuma, eleitoralmente falando, é claro.

POLITICA LOCAL

Os eleitores importantes e influentes deste concelho com os quais o nosso representante conferenciou, pronunciaram-se francamente a favor da candidatura do sr. dr. F. de Melo.

Em fim, o entusiasmo pela causa do sr. dr. Melo nas Novas Conquistas é, pois, cada vez mais crescente.

BRAVO!

O nosso presado colega e ilustre editor de *A Epoca'* de Mapuça, dr. Manuel Nascimento de Abreu que e', tambem, um dos proeminentes marechais do Partido Politico de Bardez, chefiado pelo sr. dr. Faria, acaba de apoiar a candidatura do sr. dr. Melo a quem presta a sua homenagem em palavras cheias de sinceridade e de justiça. No seu artigo dedicado ao dr. Melo, o sr. Abreu diz. entre outras coisas, o seguinte:

"Não estivesse o pais retalhado em partidos, o nome do dr. F. de Melo seria levado ás urnas por aclamação, porque possui todos os predicados para dignamente representar a India no seio do Congresso.

Não sucede, porem, assim, mercê das nossas digladiações locais, aliás sem razão de ser plausivel.

A necessidade de se abatar as armas partidarias já se reconheceu em Salcete como informam os jornais e oxalá que fôsse o mesmo em todo o territorio para o bem comum."

Se todos os nossos patriotas lessem pelo breviario politico e civico do sr. dr. Abreu, outra seria a feição de que entre no's se revestiria o acto eleitoral, completamente livre da perniciosa influencia do caciquismo que nele ora predomina.

Bravo, sr. Abreu que com o seu aludido modo de ver deu uma lição do mais puro civismo ao eleitorado da India! Bravo!!

ATOARDAS...

Propalam os *prazeristas:*

"O sr. Prazeres da Costa tem a seu lado todos os eleitores de Pondá porque Sua Excia salvou recentemente duma morte iminente e *macaca* o seu julgado municipal."

A verdade, porem, e' que ninguem pensou na extincçao daquele julgado mas sim na do de *Pemba*, Ibo, Moçambique, segundo parece; e, por um *qui pro quo*, em vez de PEMBA deve ter saido nos jornais PONDA', como bem pondera o CRENTE.

¿Em que ficou, entao, o apregoado beneficio atribuido a' influencia parlamentar do sr. Prazeres?

No TINTEIRO ELEITORAL, natural e logicamente!

FIQUEM SABENDO...

Estamos a receber, em numero cada vez mais crescente, anonimas contendo insultos e ameaças a quem modestamente dirige o nosso jornal, desde que este difiniu a sua atitude eleitoral a favor do sr. dr. Melo.

Podem exercer a' vontade, srs. de anonimas o seu vil, cobarde e infame *oficio* que o BHARAT sem lhe dar a minima *palha*, continuara' a, firme no seu posto, desempenhar o seu dever de honra.

E', pois, trabalho baldado o de anonimas!

O NOSSO APELO

Eleitores da India, ide no proximo dia 22 votar só no sr. dr. Froilano de Melo, gloria nacional e sabedoria universal!

QUEM FAZ O QUE QUERE...

O sr. Vicente Alvares que, de resto, è um exelente cavalheiro, teve a *habilidade eleitoral* de dirigir á imprensa um telegrama dizendo ter o *Partido Indiano* resolvido *por unanimidade* apoiar a candidatura do sr. Prazeres da Costa.

Dissemos *habilidade eleitoral*, porque o sr. Alvares não è chefe, nem secretario, nem tão pouco algum marechal daquele Partido de Salcete para praticar o que levianamente praticou em seu nome, isto é, telegrafar por conta propria, comunicando aos jornais a tal *unanimidade*...inexistente.

Ainda mais. O sr. Alvares quiz, em nome do Partido, arranjar uma *partida* ao eleitorado consciente e honesto, digno e independente de Salcete,

mas foi o ilustre caciq
toral apanhado *com a*
botija, tendo-se-lhe d
to, *mais cedo* do que e
o *joguinho oculto!*

Pois é verdade. O te
do sr. Vicente Alv
passa duma autentica
litica que o comprome
riamente, a ponto dos
tes daquela bem orga
gremeação politica
em irradia-lo do seu
tal criminoso abuso tel

Quem faz o que que
rimenta o que não qu

CLARAMENTE

E' certo. O Partido
não apoia a candidatu
Prazeres da Costa ne
memente nem *por ma*
que o Partido fez, c
seguinte declaração:

"Os abaixo assign
preendidos com a
que, em nome do
Indiano foi tomada
guns correligior
tornada publica en
jornais do paíz, reso
contraria os compro
honra que numero
bros do mesmo *Pa*
trairam após previ
cimento da neutra
da liberdade de v
belecidas pelo chefe
tido, conforme a p
guida nas ultimas
similares, resolver
ter fielmente os
missos tomados a
mente".

Desta clara, inequi
sante declaração se d
clara e frisantemente
merosos membros d
Indiano *baseados no*
nhecimento da neutr
da liberdade de voto,
cidas pelo chefe do P
solveram manter f
os compromissos
anteriormente, isto é,
AR A CANDID
DO SR. DR. MELO.

Ainda mais clara
QUASE TOTALID
membros do Partido
porque só ALGUNS
festam pelo sr. Prazer
am e defendem com
mo a candidatura do
Portanto o *Partido*
quase todo em peso,

भारत

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, कार्तिक व० ११ शी शके १८४७

डॉ० फ्रोयलान यांसच मतें द्या !

निवडणुकीची येती २२ तारीख जसजशी जवळ येत चालली आहे, तसतशी उमेदवार व त्यांना पाठिंबा देणाऱ्या मतदारांच्या हालचालींना रंग येत चालला असून आपआपल्या उमेदवारांना निवडून आणण्याच्या खटपटीस जारीनें सुरवात झाली आहे. एकंदर वातावरण लक्षांत घेतां ही निवडणूक फारच चुरशीची होईल यांत संशय नाहीं.

सध्याच्या लोकशाहीच्या काळांत मताधिकार हा फार महत्वाचा हक्क असून योग्य प्रतिनिधि निवडून, देशाचें हित करणें किंवा अयोग्य प्रतिनिधि निवडून देशाचें नुकसान करणें, हें ह्या हक्काच्या बरेवाईट उपयोगावर अवलंबून आहे. अशा वेळीं उभे राहिलेल्या उमेदवारांसंबंधीं समतोल मनानें विचार करणें आमचें कर्तव्य होय.

निवडणुकीस उभे राहिलेल्या चारी उमेदवारांत खरा सामना काय तो सिं. प्राजेरीस द कोस्त व दो. फ्रोइलान द मेल यांच्यांतच होईल व बाकीचे नुसते नामधारी असल्यानें वरील दोघांसंबंधींच आम्हीं आमचें मत देणार आहों.

सिं. प्राझेर द कोस्त हे आज पंधरावर्षें देपुतादगिरी भोगित आहेत. किंबहुना देपुतादगिरी हें एक त्यांचें कायमचेंच वतन होऊन बसलेलें आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आज पंधरा वर्षांचा गोमांतकाचा राजकीय इतिहास ज्यांच्या डोळ्यापुढें असेल त्यानां सिं. प्राझेरीस द कोस्त यानां मत देण्याचा मोह उत्पन्न होईल असें आह्मांस वाटत नाहीं. इतकेंच नव्हे तर उलट स्वाभिमानी व देशासंबंधीं कळकळ असणाऱ्या कोणत्याहि मतदाराला त्यांना मत देणें ह्मणजे देशाचें नुकसान करणें होय, असें अंतःकरणपूर्वक वाटत असलेंच पाहिजे अशी आमची खात्री आहे.

सिं. कोस्ताच्या पंधरा वर्षांच्या कारकिर्दींत गोमांतकाचा जर कोणता फायदा झाला असेल तर सिं. कोस्तांचे आप्त, सोयरे व मित्रमंडळी यांची वर्णी लावण्याकरितां निरुपयोगी नवीन खातीं निर्माण होऊन तद्द्वारा पडणारा खर्चाचा बोजा उचलण्याकरीतां प्रजेवर लादलेले असह्य कर हाच होय!

सिं. प्राझेरिस द कोस्त हे पार्लमेंटमध्यें शेंकड्यांनीं असणाऱ्या सभासदांपैकीं एक सभासद असतांना त्यांनीं हीं निरुपयोगी खातीं कशीं निर्माण केलीं, असा येथें प्रश्न येईल व सिं. कोस्तांच्या पक्षाचे आपमतलबी लोक भोळ्या लोकांना फसविण्याकरितां ह्याच मुद्याचा वारंवार उपयोगहि करतील. पण ज्यांना गोमांतकच्या राजकारणाची अंतस्थ माहिती आहे, त्यांना वरील मुद्याचा फोलपणा कळण्यास फारसा वेळ लागणार नाहीं.

लोक आपला प्रतिनिधि निवडून पाठवितात तो त्यानें आपल्या स्वतःचें किंवा आपल्या इष्टमित्रांचें हित साधण्याकरितां नसून आपल्या देशाचें अर्थात सर्व लोकांचें हित साधण्याकरितांच होय. व हें हित साधण्याकरितां त्यानें देशाच्या प्रत्येक हालचालींकडे डोळ्यांत तेल घालून नजर ठेविली पाहिजे.

देशाचा राज्यकारभार लोकतंत्रानें चालतो किंवा नाहीं, प्रजेपासून करांच्या रू

दाण उडवीत आहे! आवदोतोरीचें खातें उघडल्यानंतर तर विचारूंच नका. कित्येकांचा गुरु एकादशास आला. बारा रुपयांवर काम करणाऱ्याला अडीचशें रुपये मिळूं लागले. दीडशें रुपयांवर असणाऱ्यांना आठशें रुपये एकदम पगार झाला, असले चमत्कार घडून आले. दो. प्राजेरिसच्या असल्या कामगिरीचा तपशील आणखी बराच मोठा देतां येईल. पण स्थलसंकोचास्तव तसें करतां येत नाही. दो. कोस्तांच्या कामगिरीचा संक्षिप्त आढावा वरीलप्रमाणें आहे. ह्या पडद्यांतील कामगिरीशिवाय १५ वर्षांत त्यांनीं फक्त एकच ठराव पार्लमेंटमध्यें आणला होता. याशिवाय त्यांनीं पार्लमेंटांत जादा ठराव आणल्याचें किंवा भाषण केल्याचें आमच्या तरी एकिवांत नाहीं. शिवाय एकाच व्यक्तीनें नांव घेण्याजोगी कामगिरी केल्याशिवाय एकच जागा अडवून बसणें व ती आपली मिरास बनविणें, हें कोणत्याहि दृष्टीनें समर्थनीय होत नाहीं. आणि लोकशाहीच्या तत्त्वाला

हिंदु मतदारांनो, चालू महिन्याच्या २२ तारखेवर नजर ठेवा.

देशाचा कारभार योग्य रीतीनें चालावा, करांची वाढ होऊं नये असें जर तुह्मांला वाटत असेल तर तुह्मी डॉ० फ्रोयलान द मेल यांसच मतें द्या !

पानें घेतलेला पैसा त्यांचे साठींच योग्य कामीं खर्चिला जातो कीं, त्याची उधळपट्टी होत असते, प्रजेवर योग्य प्रमाणांत कर लादण्यांत येतात किंवा काटकसरीस जागा असतांना अयोग्य प्रमाणांत कर लादले जातात, यांवर त्यांनीं सक्त नजर ठेविली पाहिजे. पण ही कसोटी सिं. कोस्त यांना लाविली तर आपणास काय दृश्य दिसेल ?

त्याच्या कारकिर्दींत आपल्या गोवावळ्यांचा तळिराम गार करण्याकरितां कितीतरी निरुपयोगी खातीं निर्माण झालेलीं दिसतील "इंस्तितूत कॉमेर्सियाल"ची आपल्या या गोमांतकांत गरज आहे काय ? पण आपल्या आप्तेष्टांना भरपूर चंदी चारण्याकरितां ही घोंड आमच्या तिजोरीवर लादली गेली. लिसेव नासियोनालचें सेंत्रालांत रूपांतर केल्यानें, फार तर वर्षाकांठीं, पोर्तुगालमध्यें शिकण्यास जाणाऱ्या एक दोन विद्यार्थ्यांचा फायदा झाला असेल. पण एक दोन व्यक्तींच्या फायद्यासाठीं ४०।५० हजारांचा भूर्दंड, डॉ. प्राजेरीस द कोस्त यांच्या हस्तकांना तनखा मिळविण्याकरितांच आह्मांवर बसला ! शिवाय यामुळें विद्यार्थ्यांनां आणखी दोन वर्षें जास्त लिसेवांत रखडावें लागलें हें निराळेंच. आग्रिकुलतुरच्या खात्यासारखें सर्वांत अधिक निरुपयोगी खातें, दो. कोस्ताच्या स्तुतिपाठकांनां काम देण्याकरितां तिजोरीची धूळ

तर हें अगदीं विरोधी आहे. ह्मणून कोणत्याहि बाजूनें विचार केला तरी सिं. कोस्त यांच्या उमेदवारीला कोणत्याच मुद्यावर आह्मांस पाठिंबा देतां येत नाहीं.

उलट दो. फ्रोयलान द मेल यांचें आजपर्यंतचें वर्तन देशहितासंबंधींची त्यांची कळकळ, त्यांची विद्वत्ता व प्रतिपक्षावर अचूक छाप बसविणारें त्यांचें वक्तृत्व ही लक्षांत घेतां सर्व मतदारांनां — विशेषतः सर्व हिंदु मतदारांनां— दो. फ्रोयलान द मेल यांसच मतें द्या असें सांगण्यास आह्मांस मुळींच दिक्कत वाटत नाहीं.

येथें सिं. प्राजेरीसतर्फे असा एक आक्षेप येण्यासारखा आहे कीं, त्यांनीं नवीन लिसेवांची स्थापना केल्यामुळें शिक्षणाची वाढ झालेली आहे. व नवीन जागा त्यांनीं ज्या निर्माण केल्या आहेत त्यांवर एतद्देशीयांच्याच नेमणुका झालेल्या आहेत. पण हा आक्षेप निराधार आहे. शाळांची वाढ झाली खरी पण तें शिक्षण इतकें महाग झालें कीं मध्यम स्थितींतील लोकांना शिक्षणाचीं द्वारें कायमचीं बंद झालीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं. अर्थात लोकशिक्षणाच्या प्रसाराचा उद्देश मुळींच सिद्धीस गेला नाहीं आणि एतद्देशीय लोकाकरितां ह्मणून निर्माण केलेल्या जागांची अशी परिस्थिति आहे कीं, त्या भरभक्कम पगारामुळें हळुहळू युरोपियन लोकांच्या मध्यस्थानीं पडत आहेत व पड-

तीलहि. एतावता सिं. कोस्तांची तरफदारी कोणत्याच मुद्यावर करतां येणें शक्य नाहीं. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, ज्यांनीं पूर्व निवडणुकींत त्यांना सैतान ह्मणून संबोधिलें होतें तेच लोक आज वरील चन्दी मिळाल्याबरोबर त्यांच्या बाजूनें लढत आहेत!! आणि हा देखावा पाहिला ह्मणजे सिं. कोस्त यांच्या नैतिक पाठिंब्याची कल्पना वाचकांस आल्याशिवाय राहणार नाहीं.

शेवटीं आणखी एका गोष्टीचा विचार करणें जरूर वाटतें. काहीं लोकांचें असें ह्मणणें आहे कीं, उमेदवारानें हिंदूंच्या विशिष्ट मागण्यासंबंधीं आपला जाहीर कार्यक्रम प्रसिद्ध केल्याशिवाय त्यांना कोणाहि मतदारानें पाठिंबा देऊं नये. तत्वतः हें ह्मणणें बरोबर आहे. पण त्याबरोबरच व्यवहारहि पाहिला पाहिजे. आज हिंदूंना आपला स्वतंत्र प्रतिनिधि निवडून पाठविण्याची ताकद नाहीं. आणि कार्यक्रम प्रसिद्ध होत नाहीं ह्मणून जर आम्हीं उमेदवारांशीं असहकारता केली तर आमच्या असहकारतेला विचारतो कोण ? उलट आमच्याशीं बिलकुल सहानुभूति नसणारा उमेदवार हीं आपल्या मार्गांतील धोंड—आपत्तीच—दूर झाली ह्मणून आनंदानें नाचूं लागेल. अर्थात उभे राहिलेल्या उमेदवारांपैकीं जो आमच्या विश्वासास पात्र असेल त्यासच आह्मीं पाठिंबा दिला पाहिजे आणि अशा प्रसंगीं आपल्या गरजा उघड केल्यानें पाठिंबा दिलेला उमेदवार निवडून येण्यास अडचण येत असेल तर कार्यक्रमाचा आग्रह सोडून दिला पाहिजे. एकंदर वातावरण लक्षांत घेतां कार्यक्रम जाहीर न करणेंच शहाणपणाचें होईल. जशी परिस्थिति असेल तसेंच आपलें धोरण ठेवलें पाहिजे. नुसतें समोर चालून तत्त्वें सांगत बसण्यानें परिस्थिति आटोक्यांत येणें शक्य नाहीं. शिवाजी महाराजांना जर तुम्हीं आपलें धोरण जाहीर करा ह्मणजे मग आम्हीं तुह्मास साहाय्य करतों, असें त्या वेळच्या मावळ्यांनीं ह्मटलें असतें तर तें जितकें अव्यवहार्य ठरलें असतें तितकेंच सध्याच्या परिस्थितींत उमेदवारास कार्यक्रम जाहीर करण्यास सांगणें अव्यवहार्य ठरेल. ह्मणून सर्व मतदारांस आम्हास हेंच सांगावयाचें आहे कीं, तुह्मांस जर देशासंबंधीं कळकळ असेल, तुम्हीं लोकशाहीचे खरे चहाते असाल तर दो० फ्रोयलान द मेल यांसच मतें द्या!

श्री. सौमित्र

यांचा "गुलामगिरींत रहाणार कीं स्वतंत्र होणार" हा लेख येत्या अंकीं प्रसिद्ध होईल.

—विनोदरावांचा विनोदी लेख निवडणुकांनंतर प्रसिद्ध होईल.

—येत्या सोमवारीं ता. १७ रोजीं सायंकाळीं ५॥ वाजतां पणजी येथील बाल वाचन मंदिराच्या दिवाणखान्यांत नवीन कार्यकारी मंडळाची निवडणूक होणार आहे. तरी सर्व सभासदांनीं सदर वेळीं हजर रहावें" अशी व्यवस्थापकांची विनंति आहे.

अभिनव भारताचें जनक

बाबू सुरेन्द्रनाथ बानर्जी

लेखांक ६ वा.

सुरेन्द्रबाबूंच्या हयातींत त्यांच्या लोकप्रियतेचा ऱ्हास झाला. तरी पण त्यांनीं केलेल्या कार्यावरून हिंदुस्थानच्या आधुनिक राजकीय इतिहासांत ते अमरच राहातील.

—रामानन्द चट्टोपाध्याय

सुरेन्द्रबाबूंना दुसऱ्यांदां निवडणुकींत यश आलें नाहीं, हें त्यांच्या लोकप्रियतेच्या ऱ्हासाचें उदाहरण होय. या वयांत त्यांनीं स्वस्थ घरीं पडून रहावयाचें, परंतु त्यांच्या सारख्या मातृभूमीच्या उद्धारार्थ तळमळणाऱ्या देशभक्ताला स्वस्थता घेणें चांगलें वाटलें नाहीं. दिवाणपदावर असतांना कायद्याप्रमाणें त्यांना 'बंगाली' पत्राचें संपादकत्व सोडावें लागलें होतें. आतां परत आपण राजकारणांत पडावें, अशी त्यांना इच्छा होऊन ते पुन्हां 'बंगाली'चे संपादक झाले. याशिवाय धी न्यू एम्पायर हें इंग्रजी व 'स्वराज्य' हें बंगाली हींहि वर्तमानपत्रें त्यांनीं आपल्याकडे घेतलीं. त्यावेळीं त्यांनीं ' पुनरागमन ' या मथळ्याखालीं एक लेख लिहिला, त्यांत ते ह्मणतात, "आज जवळ जवळ चाळीस वर्षें सनदशीर मार्गांनीं स्वातंत्र्य मिळविण्याची चळवळ आपण करीत असून तिला राष्ट्रीय सभेनें मान्यता दिली आहे. सुशिक्षित हिंदुस्थाननें आतांपर्यंत अपूर्व स्वार्थत्याग केला असून तो सदैव आपल्या देशभक्तीची व स्वराज्याच्या लायकीची साक्ष देईल. माझीं पूर्वींचीं तत्वें पुन्हां प्रतिपादण्याकरितां वर्तमानपत्राच्या परिचित क्षेत्रांत मी आज प्रवेश करीत आहें. प्रागतिक तत्वांच्या खऱ्या मित्रांनीं व देशभक्तांनीं मी उभारीत असलेल्या निशाणाभोंवतीं जमावें व . 'लिबरल' पक्षाच्या मार्गानेंच चालावें, अशी माझी विनंति आहे. कारण या मार्गानेंच योग्य वेळीं वसाहतीच्या दर्जाचें स्वराज्य हिंदुस्थानला प्राप्त होईल असा मला भरंवसा वाटतो. याप्रमाणें ते पुन्हां वर्तमानपत्राच्या मार्गानें राजकारणांत पडले. वर्तमानपत्रकार या दृष्टीनेंहि त्यांची योग्यता फार मोठी होती. ते केव्हांहि कोणावर बेजबाबदार टीका करीत नसत. परंतु इतर लोक जेव्हां त्यांच्यावर टीका करून शिव्यांचा वर्षावसुद्धां करण्यास कमी करीत नसत, अशा लोकांना सुद्धां त्यांचें वर्तन पाहून त्यांच्याकडे क्षमस्व ह्मणण्याची पाळी येत असे; तसेंच कोणत्याहि पक्षाचें अगर व्यक्तीचें समर्थन त्यांनीं पैसे घेऊन आपल्या पत्रामध्यें केलें नाहीं, असा रामानंद चटर्जी यांनीं आपल्या लेखांत मुद्दाम उल्लेख केलेला आहे. यावरून त्यांचें वर्तन किती नीतिशुद्ध होतें, याची कल्पना करतां येईल. या पत्राचे संपादक असतांना ते लिहीत असलेलें आपलें आत्मचरित्र (A Nation in making घटनावस्थेंतील राष्ट्र) हें पुस्तक पुरें करून त्यांनीं प्रसिद्ध केलें.

त्यानंतर महात्मा गांधींनीं आपल्या बंगाल्यांतील दौऱ्याच्या वेळीं सुरेन्द्रबाबूंच्या गांवीं [बराकपूर येथें ते रहात असत. हें गांव कलकत्त्यापासून १७ मैलांवर आहे.] जाऊन मुद्दाम त्यांची भेट घेतली. त्यावेळीं सुरेन्द्रनाथ कांहीं लिहीत होते. महात्मा गांधी आले आहेत असें पाहतांच त्यांनीं उठून स्वागत केलें व दोघेहि प्रेमानें भेटले. सुरेन्द्रबाबूंनीं महात्माजींना पहिला प्रश्न आपल्या पुस्तकाबद्दल केला. त्यावेळीं त्यांनीं आपण हें पुस्तक अद्याप वाचलें नाहीं, असें सांगितल्यामुळें मुद्दाम एक प्रत त्यांना स्वतःच्या हातानें अर्पणपत्रिका लिहून सुरेन्द्रबाबूंनीं भेट ह्मणून दिली. त्यांत खालील वाक्य होतें:—

महात्मा गांधी यांस—

आपली साधुवृत्ति, विलक्षण स्वार्थत्याग, भरतखंडाविषयींचें निस्सीम प्रेम आणि उच्च देशभक्तिप्रेरित ध्येय यांजविषयीं मला वाटणाऱ्या आदराची खूण ह्मणून अर्पण.

यानंतर त्यांच्या संभाषणास सुरवात झाली. सुरेन्द्रबाबूंनीं बंगालमध्यें अत्यंत जिव्हाळ्याचे असे प्रश्न स्त्रियांची दुःस्थिति व मलेरिया हे दोनच होत, असें सांगून विधवाविवाहावर विशेष जोर दिला व पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांचें वरील अपुरें राहिलेलें कार्य आपण पुरें करावें, अशी महात्माजींना विनंतिहि केली. त्याशिवाय अलिकडील तरुणांत जो बेशिस्तखोरपणा वाढलेला आहे, त्याबद्दल दुःख प्रदर्शित करून सुरेन्द्रबाबू ह्मणाले, 'अलिकडे कोणत्याहि मोठ्या माणसाची फजिती करण्याची किंवा कोणतीहि सभा उधळून टाकण्याची जी प्रवृत्ति वाढलेली आहे, ती नाहींशी होणें अत्यंत जरूर आहे. करितां ही शिस्त लावण्याचें कार्य जरूर आपण केलें पाहिजे.' यानंतर त्यांनीं महात्माजींनां अस्पृश्यता व स्त्रियांची दैन्यावस्था हे दोन प्रश्न हातांत घेण्याबद्दल फार आग्रह केला.

सुरेन्द्रबाबूंनीं जो आत्मचरित्रपर ग्रंथ लिहिला, तो १९१५ सालीं लिहिण्यास घेतला व दहा वर्षांनीं पुरा केला. हा ग्रंथ ह्मणजे हिंदुस्थानचा पन्नास वर्षांचा राजकीय इतिहास होय. या ग्रंथांतील कांहीं भाग 'सरस्वति' या हिंदी मासिकांत प्रसिद्ध झालेला आहे तो अनुवाद रूपानें खालीं देत आहों. गोमांतकीय तरुणांनीं त्याकडे अवश्य लक्ष द्यावें. ते ह्मणतात, "सर्वांत पहिलें कर्तव्य ह्मणजे आरोग्य रक्षण करणें हें होय. मी माझ्या आयुष्यांत याकडे विशेष लक्ष दिलेलें आहे. शरीररूपी यंत्राला सर्व प्रकारें चांगलें ठेवलें, तरच आपणाला कांहीं काम करतां येईल. आपल्यांतील व त्याच मोठमोठ्या लोकांना भर ज्वानीमध्यें मृत्यु प्राप्त झालेला आहे. राममोहन राय, केशवचंद्र सेन, क्रिस्टोदास पाल, रामगोपाल घोष वगैरेंची हीच स्थिति आहे. आपल्या लोकांना चांगली दिशा दाखविण्याला जर हे पुढारी आणखी कांहीं काल जगले असते, तर आपल्या देशाला झाला त्यापेक्षां अधिक फायदा झाला असता."

"माझ्या मतें उत्तम आरोग्य प्राप्त होण्याला मुख्य गोष्ट ह्मणजे व्यायाम होय. व तोहि नियमित वेळीं केला पाहिजे. मी आजपर्यंत नेमानें व्यायाम करीत आहें. या वयांतसुद्धां मी नित्य सकाळीं अर्धा तास कांहीं खाल्याशिवाय व्यायाम करीत आहें. याशिवाय पुन्हां दुपारीं चहा घेतल्यावर चाळीस मिनिटें व्यायाम घेत असतों. सार्वजनिक कामांच्या गर्दीमुळें संध्याकाळच्या व्यायामाला पुष्कळदां हरकत येते. ह्मणून पुष्कळदां भोजन करण्यापूर्वीच तो करून घेत असतों. माझ्या मतें पायांनीं फिरणें हा सर्वांत उत्तम व्यायाम होय. व्यायामाबरोबरच आपलें जीवन नियमपूर्वक घालविण्याची अत्यंत आवश्यकता आहे. परंतु अत्यंत दुःखाची गोष्ट ही कीं, आपल्या हिंदी लोकानां याचें महत्व अद्यापि पटलेलें नाहीं. जेवण्याची व निजण्याची या दोन्ही वेळा ठरविलेल्या असल्या पाहिजेत. ' लवकर निजे लवकर उठे । तया ज्ञान संपत्ति आरोग्य भेटे' ही एक महत्वाची ह्मण आपल्यांत प्रचलित आहेच. मी ती लहानपणी वाचलेली होती व संबंध आयुष्यांत ती मी पाळीत आलों आहें. लवकर निजण्याच्या संवयीमुळें माझें आरोग्य नेहमीं चांगलें राहिलेलें आहे. आतां लवकर उठण्यासंबंधीं माझ्यानें कांहीं सांगवत नाहीं. कारण मीं नेहमी जरा उशिरानेंच उठत आलेलों आहें. चोवीस तासांमध्यें मी ८ तास तरी झोंप घेत असतों. कधीं कधीं ९।१० तासांवर सुद्धां मजल जाते. बिछान्यावर पडल्यावर मी माझ्या मनांतील साऱ्या चिंतांना फांटा देतों. व यामुळें मला स्वस्थ झोंप येते. अधिक काम करूनहि जर झोंप घेण्याच्या बाबतींत हेळसांड न झाली तर आरोग्याला कांहीं बाधा येत नाहीं, असें मला वाटतें."

"खाण्यापिण्याच्या बाबतींत माझें मत असें आहे कीं, उत्तम आरोग्य मिळविण्यास तंबाकू व दारू हीं दोन्हीं वर्ज्य केलीं पाहिजेत. आतां जेवणाबद्दल निरनिराळ्या लोकांचे निरनिराळे विचार आहेत. युरोपियन मांस खाणारे आहेत व हिंदी शाकाहारी आहेत. बंगाली मासळी खाणारे आहेत. मासळी स्वास्थ्यवर्धक व पौष्टिक असते. जपानी व बंगाली लोकांच्या जेवणामध्यें साम्य आहे. दोघेहि मासळी व भात खात असतात. परंतु जपानी लोकांना बंगाली लोकांपेक्षां मांस खाणें अधिक पसंत असतें. माझा स्वतःचा असा अनुभव आहे कीं, प्रत्येकानें वयाप्रमाणें आपल्या जेवणांत फेरफार केला पाहिजे. जों जों उतारवय होत जातें, तों तों प्रकृतीच शाकाहार पसंत करते."

" सामाजिक स्थितीबद्दल दोन शब्द सांगणें जरूर आहे. हिंदुसमाजामध्यें सर्वांत महत्वाचा प्रश्न ह्मणजे विधवांचा होय. व दिवसेंदिवसच या प्रश्नाला अधिक महत्व येत आहे. जे लोक पूर्वीं या बाबीकडे दुर्लक्ष करीत, ते सुद्धां या विषयाची आतां चर्चा करीत आहेत. दुसरे सामाजिक प्रश्न यापेक्षां भिन्न स्थितींत आहेत. परंतु त्यांवर लोकांची अशी करडी नजर नाहीं. हिन्दुसमाजांत असा एकहि सामाजिक प्रश्न नाहीं कीं ज्याचा संबंध धर्मांकडे नाहीं. आणि जेव्हां कोणत्याहि सामाजिक संस्थेच्या रक्षणाकरितां ईश्वरी आदेश उपस्थित केले जातात, तेव्हां सर्वसाधारण लोकांचें मत आत्मिक दृढ होऊन ते त्या संस्थेच्या रक्षणाकरितां तयार होत असतात. यामुळें हिंदुस्थानांतील सुधारकांनां एक प्रकारच्या दैवी शक्तीकडे टक्कर द्यावी लागत आहे. जो किल्ला परंपरागत भावना व धार्मिक विचाररूपी सैनिकांनीं रक्षण केलेला आहे, अशा किल्ल्यावर त्यांना मारा करावा लागत आहे. यामुळें अशा स्थितींत सामाजिक सुधारणेची गति मंद होणें स्वाभाविक आहे. सामाजिक दोष दूर करणें झाल्यास समाजाला बरोबर घेऊनच आपणांला चाललें पाहिजे. नव्या चालींना जुनें रूप देणें व जुन्या चालींना नव्यामध्यें मिळविणें ह्याप्रमाणेंच आपणाला केलें पाहिजे. हिन्दुसमाजाची उन्नति शेंकडों वर्षांपासून अशीच चालत आलेली आहे. दोनशें वर्षांपूर्वीं आपला हिन्दुसमाज ज्या स्थितींत होता, त्याच स्थितींत आज आहे, असें ह्मणणें बरोबर नाहीं. जरी तो आस्ते आस्ते पुढें जात असला, तरी पण खात्रीनें तो पुढें जात आहे, यांत शंका नाहीं. परदेशगमन, बालविवाह, विधवाविवाह या प्रश्नांची स्थिति चाळीस वर्षांपूर्वीं जी होती, ती आज नाहीं. पन्नास वर्षांपूर्वीं मी माझ्या गांवांत जातिबहिष्कृत होतों, परंतु आज माझा आदर आहे माझी लोकसेवा या आदराला कारणीभूत झालेली आहे. जातिभेद नष्ट होणें किंवा त्याचीं बंधनें ढिलीं होणें ही एक महत्वाची गोष्ट आहे. खाण्यापिण्यांत आतां पूर्वींसारखा कडक निर्बंध नाहीं. पोटजातींतील वैवाहिक निर्बंधहि ढिले पडत चालले आहेत व अनुलोम विवाह जे आजपर्यंत बंद होते, ते आतां होऊं लागलेले आहेत. बंगालमध्यें ब्राह्मण व कायस्थ यांचे वैवाहिक संबंध बरेच होत असलेले ऐकूं येत आहेत. व यांत माझा व्यक्तिगत संबंधहि आहे.

सन १८७५ मध्यें मी सार्वजनिक क्षेत्रामध्यें जेव्हां प्रवेश केला, त्यावेळीं स्थानिक संस्थांमध्यें सार्वजनिक कामें करणाऱ्यांचा बराच अभाव होता. मुनिसिपालट्यांची संख्या चार होती ती आज एकशें सोळा झालेली आहे. या सर्वांचे मेंबर व अध्यक्ष सरकार नेमीत असे. हीच स्थिति कायदेमंडळाची होती. यांतील सगळे सभासद सरकारच नेमीत असे. व जे जे कायदे करीत, त्यांप्रमाणें शासनपद्धति चाले. सरकारानेंच प्रजेचे ह्मणून निवडलेले मेंबर सुद्धां नव्हते. केवळ सिव्हिल सर्व्हंट देशांतील राज्यकारभार चालवीत. यांतहि हिंदी

de Poinguinim, de Canacona e ora ausente em parte incerta deBombaim, India Inglesa, para em dez dias posteriores ao praso de editos pagarem no cartorio referido a importancia de cinquenta rupias, uma tanga e um real e meio proveniente de custas contra eles e outros liquidada nos autos crimes de querela que o Digno Agente do Ministerio Público com acusaçao particular dos mesmos promoveu contra Voicunta PandurongaPorobo Xelcar, de Loliem e outres, ou nomearem no mesmo praso bens suficientes a penhora para o pagamento da mencionada importancia e o mais que acrescer sob pena de, findo este praso, ser devolvido o direito de nomeação ao exequente o referido Magistrado do Ministerio Publico e correr a execução os seus termos á revelia dos citandos. Para ser publico se expediu este.

Xeldem da Comarca de Quepem, 22 de Outubro de 1925.

O Escrivão de Direito,
Aires Manul Barreto
Verifiquei
O Juiz de Direito,
R. Colaço

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio Barreto, nos autos civeis de execução por custas qua o Ministerio Publicó nesta comarca promove contra Janqui Gãocarina, viuva de Molcornem e outros por apenso aos autos de inventario orfanologico aque se procedeu por obito de Zoinum Bodcó Gaucar e sua mulher que foram de Molcornem vão ser vendidos em hasta publica a porta do tribunal situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a estação de Sanvordem no dia 19 do seguinte mez de Novembro, ás 10 horas, pela terceira vez e por qualquer preço os seguintes predios: 1° ½ da varzea Patevaingonacodil serdo, da cultura de arroz; 2 ° ½ do predio "Bondoevollo", da cultura de arroz; 3 ° ½ do predio 'Canitemxevota" da cultura de arequeircs e coqueiros, todos sitos em Molcornem, discritos na conservatoria predial desta comarca respectivamente sob os n ° s. 1636, 7065 e 7066 avaliados tambem respectivamente em 190, 190 e 180 rupias penhorados nos ditos autos de execução por custas como pertencentes aos executados. Por es te são citados todos os credores incertos dos ditos executados bem como os co-proprietarios e quinhoeiros para dedu zirem os seus direitos nos termos e para os fins de lei. A contribuição de registo por inteiro e as despesas da praça correrão a cargo do arrematante. E para ser publico se expediu este. Xeldem, 23 de outubro de 1925.

O Escrivão de Direito do 2 ° oficio,
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito,
R. Colaço

Pelo juizo de Direito da Comarca deQuepem e car. do escrivão do 1 ° oficioRedcar, correm édit s de 30 dias a contar do dia da segunda publicação deste, citando a Ananta Sinai Quercar de Curdy e ora ausente em Hubly, territorio britanico em parte incerta para no praso de 10 dias findos os referidos 30 dias, pagar no sobredito cartorio a quantia de 17—14—07½ proveniente de custas dum incidente liquidada contra ele nos autos crimes de querela que o Ministerio Publico nesta comarca e o queixoso particular Crisna Porobo Bembró de Quepem promoveram contra Jegonata Sinay Tolvodcar de Amonã e outros ou dentro do mesmo praso nomear bens suficientes á peuhora para o pagamento do pedido e de custas e selos acrescidos da execução sob pena de não o fazendo ser a nomeação devolvida ao exequente Ministerio Publico prosseguindo a execução seus termos á revelia. O que para ser publico se expediu este. Xeldem 28 de Outubro de 1925.

O esorivão de Direito,
Babú V. Camotim Redcar
Verifiquei
O Juiz de Direito
R. Colaço

महाल केपें गांव शिरवई येथें

विकणें आहे.

या ठिकाणांत पांच लहान घरें, जवळ जवळ चारशें माड, कांहीं फणसाचीं, आंब्याचीं इत्यादि झाडें; शिवाय बराच जमिनीचा डोंगराळ भाग असून एकंदर ठिकाणांचे सभोंवार कुंपणहि आहे. विकत घेणारे असतील त्यांनीं खालीं पत्यावर पत्रव्यवहार करावा, अगर समक्ष भेटावें.

पांडुरंग प॰ मु॰ रायबंदर गोवा.

ओरियंटल गव्हर्नमेंट विमा कंपनी.

स्थापना १८७४ ज्युबिली वर्ष १९२४

हिंदी लोकांस आपला विमा, अनेक दृष्टया अत्यंत गैरसोईच्या अशा युरोपियन अथवा अमेरिकन कंपन्यांत उतरणें जें नाइलाजास्तव भाग पडत होतें, ती अडचण दूर होऊन हिंदी लोकांस हिंदी कंपनींतच आपला विमा उतरण्याची सुसंधि मिळावी याच मुख्य हेतूनें ही कंपनी हिंदुस्थानांतच स्थापन करण्यांत आली आहे. तसेंच तिच्या भांडवलाच्या सुरक्षितत्वाविषयीं लोकांची खात्री पटावी या हेतूनें तिच्या सर्व व्यवहारावर सरकारची उत्तम देखरेख असावी, अशी व्यवस्था करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें या कंपनींत विमा उतरणाऱ्या गोव्यांतील लोकांच्या सोयीसाठीं या कंपनीनें विम्याविषयक पोर्तुगीज कायदे मान्य करून गोव्यांतील या कंपनीच्या विमेदारांची एक फार मोठी अडचण दूर केली आहे.

वरील सर्व फायदे लक्षांत घेऊन व कंपनींची उत्तरोत्तर होत असलेली भरभराट व बोनसचा फायदा झपाट्यानें वाढत असलेला पाहून, गेल्या सालीं एका हिंदी गृहस्थानें आपल्या याच कंपनींतल्या पूर्वींच्या विम्याशिवाय ६१ हजार रुपयांचा नवीन विमा उतरविला आहे व येथील कैक समंजस गृहस्थांनीं दहा–दहा वीस–वीस हजारांचे विमे या कंपनींत उतरले आहेत. करितां ज्या कोणास विमा उतरविण्याचा असेल, त्यांनीं या कंपनींची संपूर्ण माहिती तिच्या एजंटामार्फत करून घेतल्याशिवाय, इतर कंपन्यांत विमा उतरण्यांची घाई करूं नये.

कावसजी जमशेटजी आणि कंपनी डेक्कनचे मुख्य एजंटस् पुणें.	दत्तात्रय आ. सरमळकर. गोव्याचे एजंट पणजी.

"प्रत्यक्षं ज्योतिषं शास्त्रं चंद्रार्कौ यत्र साक्षिणौ"

O referido aperfeiçoamento e a aludida correcção represen tam, pois, — aritmeticamente falando— dois factores cujo producto é a actualisação dos preços de côco e de arroz que, desde ha alguns anos para cá, se teem conservado *indiferentes* e inalteraveis.

Quem está ao facto das dificuldades economico-financeiras em que o erario da colonia se atormenta, não pode deixar de, como nós, conformar-se com a oportunidade da medida decretada pelo sr. Mariano Martins, já que soou a hora de sacrificios e que sem estes não é possivel salvarmo-nos.

Mas—e é precisamente este *mas* que impele *O Bharat* a falar da portaria de que se trata —antes de se exigir ao contribuinte o sacrificio que lhe irá causar a actualização dos prêços, urge que esta seja, possivelmente, rigorosamente, escrupulosamente, perfeita, porque perfeita não é a que a citada portaria estabelece, firmando-a evidentemente nas informações incompletas fornecidas ao Governo tanto pelos municipios como pelas administrações de concelho.

Pois é verdade. Na actualisação dos preços de côco e de arroz se não tomou em consideração nem a crescente escassez da suá producção nem o consideravel aumento das despesas, que, hoje em dia, a mesma producção determina.

Afigura-se-nos até que o aumento consideravel que os preços de coco e de arroz teem ultimamente tido é, em graude parte, devido ás circunstancias que acabamos de frisar, circunstancias por cuja causa a *oferta* dos mesmos productos tem sido *inversamente* proporcional á sua *procura*.

Um proprietario que, há mais de cinco anos, colhia trinta mil côcos, por exemplo, chega a arrecadar, hoje, um pouco menos que a metade da mesma renda. Doutro lado, êsse mesmo proprietario que, quando enchia a sua *loja* de trinta mil côcos, despendia para os trabalhos dos seus palmares uma importancia de 200 rupías, tem que gastar, na actualidade, para o mesmo fim, quasi 600 rupias, isto é, triplo daquela soma, fenomeno que se observa tambem com a produção de arroz.

Isto é: é verdade que se *duplicou* o preço de côco e de arroz, de há algum tempo para cá; mas, em contraposição *triplicaram se* as despesas da producção dos mesmos productos, ficando, alêm disso, reduzidos êstes á metade.

Ainda há mais. Nos preços actualisados a que a portaria diz respeito,—quere-nos parecer se não estudaram com escrupuloso cuidado os meios de transporte dos mesmos productos, do interior para cada uma das sédes dos concelhos, porque, então, outra havia de ser a tabela dos mesmos preços — menos elevada e mais conforme com a rialdade das coisas.

A Sua Excia. o sr. Governador Geral pedimos, pois, se digne de, antes de entrar em vigor a actualisação dos preços em objecto, mandar corrigi-la em conformidade com o que acabamos de expôr, na certeza de que será atendido o nosso pedido, formulado de harmonia com o sentir geral dos contribuintes.

De resto, é bom acentuar que a presente portaria que aceitamos como um sacrificio imposto pelas necessidades patrias, calando, mesmo, os argumentos que avançamos, quando correu, célere e veloz, o boato da revisão das matrizes das Novas Conquistas, a presente portaria, dizemos, irá aumentar o número de execuções fiscais, número que, se hoje é já consideravel, passará a ser amanhã —quando a actualisação entrar em vigor—considerabilissino.

PLAUDITE, CIVES!

A carta que no dia 22 do mez findo, isto è, no dia da propria eleição de deputado por este circulo, recebemos de Lisbôa e á qual fizemos ligeira alusão na edição passada de *O Bharat*, é do téor seguinte:-

Entre muitos candidatos, po'de-se ja' contar como certo o sr. Prazeres da Costa — o deputado cronico. O facto de tantas propostas para deputado e' ja' qualquer coisa de simptomatico na nossa maneira de sentir e pensar.

E' mais que provavel que entre os candidatos, o sr. Prazeres triunfe. Simplesmente, porque o sr. Prazeres e' na India um mito, uma figura de retorica: uma hiperbole!! Os seus maiores panegiristas sao os *comendados, os encomendados e os arrumados*. Fo'ra destes e dos que estam na expectativa de o serem, ninguem pode deixar de crer que o sr. Prazeres e' um modesto homem vulgar, tendo em seu favor, a poderosa faculdade de se exprimir com palavras e gestos oraculares. Sempre que me lembro de S. Excia. acode-me logo a' memoria a curiosa figura do proverbial Pache, co que Ega encaixou com o seu sorriso sardonico na cadeira ministerial e que, uma e u'nica vez, falou assim a um deputado interpelante: "Ao deputado que me censura so' tenho a dizer que, enquanto S. Excia. ai nessas bancadas faz berreiro, eu aqui nesta cadeira faço luz!" Entao, um seu admirador bradou com furor dando patadas no chao: "Irra que e' ter talento demais!" Felizmente o sr. Prazeres po'de contar com muitos desses admiradores.

Nao me move nenhuma animosidade pessoal contra o sr. Prazeres. Devo lhe ate' algumas finezas. A simpatia pessoal podera' relevar pequenas faltas pessoais; mas em questoes politicas, as faltas cometidas afectam o interesse publico. Eu concordo: o sr. Prazeres e' muito boa pessoa para os amigos, mas ..e' pouco.

Eu hei de provar quanto me permi-

भारत

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, मार्गशिर्ष व० ३ या शके १८४७

देपुतादची निवडणूक

देपुतादच्या जागेसाठीं उभे राहिलेल्या उमेदवारांपैकीं, प्रागतिक संघानें व स्वतंत्र मतवादी लोकांनीं पाठिंबा दिलेले, दो. फ्रोइलान द मेल हे प्रचंड बहुमतानें निवडून आले, हें आह्मीं गेल्या अंकांतून आमच्या वाचकांस कळविलें आहेच. निवडणुकीच्या धामधुमींत उत्पन्न होणारे एकमेकांचे गैरसमज, परस्परांवरील आरोप, निषेध वगैरे सर्व प्रकार आतां बंद झालेले असल्यामुळें या प्रकरणाचा शांतपणें विचार करण्यास आतां हरकत नाहीं.

वस्तुतः सूक्ष्मदृष्ट्या गेल्या निवडणुकीचें ज्यानीं निरीक्षण केलें असेल त्यांना निवडणुकीस उभें राहणाऱ्या दोन उमेदवारांमधील हा झगडा नसून दोन तत्वांबद्दल हा झगडा होता, हें सहज दिसून येईल. मिरासदारीविरुद्ध प्रातिनिधित्व, भांडवलवाले व अधिकारी वर्ग यांविरुद्ध लोकशाही अशा तऱ्हेचा हा झगडा होता. व त्यांत लोकपक्षाचीच सरशी झाली.

वर ह्मटल्याप्रमाणें या निवडणुकींत लोकशाहीची कशी सरशी झाली याबद्दल स्पष्टीकरण करणें जरूर आहे. पोर्तुगालनें एकतंत्री सत्तेला कंटाळून १९१० मध्यें लोकसत्ता स्थापन केली व या लोकसत्तेच्या काळांत ह्मणजे १९१२ मध्यें सिं. प्राझेरिस द कोस्त यांची पोर्तुगालचे पार्लेमेंटांत पोर्तुगीज इंडियाचे प्रतिनिधि ह्मणून निवडणूक झाली. या निवडणुकींत हिन्दूंनीं फार उत्साहानें भाग घेतला किंबहुना हिन्दूंच्या भगीरथ प्रयत्नांनींच सिं. प्राझेरिस हे निवडून येऊं शकले. पण या दीर्घ कालावधींत त्यांना हिन्दूंच्या हितसंबंधाची . तर आठवण झाली नाहीं; इतकेंच नव्हे तर व्यापक देशहिताची कामगिरीहि त्यांच्याकडून घडली नाहीं. लोकहिताची कोणतीच गोष्ट न करतां सिं. प्राझेरिस पुनः पुनः कसे निवडून येत याबद्दल वाचकांस आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. त्यांनीं लोकहिताची कामगिरी करण्यापेक्षां आपलें आसन स्थिर ठेवण्यासाठीं निराळाच उद्योग केला. त्यांनीं आपले सगेसोयरे व इष्टमित्र यांनां निरनिराळ्या अधिकाऱ्याच्या जागा जितक्या देतां येणें शक्य होतें तितक्या दिल्या व ज्यांना देण्याकरितां त्या उरल्या नाहींत तेव्हां नवीं खातीं निर्माण करून त्यांची सोय केली अर्थात् ही सेना सिं. कोस्त यांनीं प्रसंग पडेल तेव्हां आपल्यातर्फे लढण्याकरितां सज्ज करून ठेवली, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. व यांनींच सिं. प्राझेरिस यानां चारदां देपुतादच्या खुर्चीवर बसविलें.

जर एकतंत्री सत्तेला कंटाळून पोर्तुगीज राष्ट्र लोकसत्ताक झालें, तर या आमच्या प्रतिनिधीनें लोकहिताची कोणतीच कामगिरी न करितां आपल्या एजंटांच्या जोरावर देपुतादची खुर्ची बळकावून ती जणूं काय आपली मिरास बनविली; व तीहि लोकांच्याच नावांवर ! खरें पाहतां देपुतादच्या जागेची त्यानां मिरास बनवूं देणें हें लोकशाहीच्या तत्वाविरुद्ध होतें, ह्मणून लोकशाहीच्या चाहत्यानीं सि. प्राझेरिस यांचें आसन डळमळीत करणें हें त्यांचें पहिलें कर्तव्य होतें. तेव्हां या निवडणुकींत जनतेला जें कल्पनातित यश आलें त्यांत मिरसदारी विरुद्ध प्रातिनिधित्व या तत्वाचा ह्मणजेच लोकशाहीचा जय झाला !

सिं प्राझेरिस यांनीं आपलें आसन दृढ व्हावें ह्मणून पुष्कळांना इथलें कुरण चरण्यास मोकळें केलें, त्याचा स्वाभाविक परिणाम असा झाला कीं ते मालकांना ह्मणजे येथील प्रजेला न ओळखतां आपल्या गुराख्याला तेवढे ओळखूं लागले; व त्या ओळखीच्या जोरावर त्यानां पुष्कळ लोकहिताच्या गोष्टींस व त्या घडवून आणणाऱ्यांस विरोध करणें शक्य झालें.

येथील कायदे कौन्सिलांत पास झालेल्या बऱ्याच लोकहिताच्या बाबींस वरिष्ठ सरकारांत खो बसला. हा अधिकारी वर्ग अधिकाराच्या जोरावर लोकांस तुच्छ लेखूं लागला. कोणत्याहि देशांत आपल्या नोंकरांवर सरकारचा दाब असतो पण सि. प्राझेरिस यांच्या नाड्यावर येथें उलट स्थिति प्राप्त झाली व त्यांचा शिरजोरपणा इतका कळसास पोंचला कीं, पाठशाळेंतील मुलानां मार्क देतानांहि क्वचित् याचा परिणाम दिसून आल्याशिवाय राहिला नाहीं. यावरून सि. प्राझेरिस यानीं आपलें आसन दृढ करण्याकरितां कोणते उपाय केले याची कल्पना वाचकांस येईलच. यांतच कांहीं श्रीमंत सामील झाले व सि. कोस्त यांना जाग्यावरून हालविणें ह्मणजे त्याच्या पुठयांतील नोकरशाहीचा व भांडवलवाल्यांचा नक्षा उतरविणें असें ठरत असल्यामुळें लोकशाहीच्या दृष्टीनें त्यांना आसनावरून ढकलून देण्यांत महत्व होतें. यामुळेंच एकंदर जनता सि. प्राझेरिस विरूद्ध जोरानें लढली व यांत विरोधकानीं भासविल्याप्रमाणें व्यक्तिद्वेष नसून देपुतादच्या जागेस भांडवलशाहीचें व नोकरशाहीचें जें ग्रहण लागलें होतें तें सोडविण्याकरितांच जनतेनें इतका स्वार्थत्याग करून सि. प्राझेरिस विरुद्ध निकाल दिला.

या शिवाय आणखीहि एका महत्वाच्या कारणामुळें हिंदुजनतेला त्याच्याविरूद्ध चळवळ करणें भाग झालें. हें कारण ह्मणजे मराठी भाषेला मताधिकार हें होय. सिं. प्राझेरिस यांनीं आपल्या दीर्घ कारकिर्दींत मराठीला मताधिकार देण्यासंबंधानें कांहींच खटपट केली नाहीं. उलट अशी खटपट करणें हराम आहे असें त्यांनीं बोलून दाखविलें ! अर्थात् आपल्या मातृभाषेची अशी हेटाळणी करणाऱ्याला जितका विरोध करतां येईल तितका तो करणें, हें हिंदूचें पवित्र कर्तव्य होतें व त्यांनीं तें बजावलेंहि. यांतहि 'गांव तेथें ह्मारवाडा असावयाचाच' या न्यायानें कांहीं हरीचे लाल निघालेच.

वरील सर्व कारणाचा विचार करतां जनतेंत जो असंतोष माजला होता त्यामुळें सि. प्राझेरिस हे प्रचंड बहुतानें खालीं पडले यांत नवल नसून तसे ते पडले नसते तरच त्यांत आश्चर्य होतें.

सि. प्राझेरिस यांचे विरुद्ध प्रागतिक संघानेंच प्रथम शस्त्र धरलें व दोनदां पराभव पावून तिसऱ्या खेपेस संघास जय मिळाला. सि. प्राझेरिसचा पराभव करून लोकमतानें आपण गुलामगिरीचे भोक्ते नसून— लोकसत्तेचे चहाते आहोंत असें जगाच्या निदर्शनास आणून दिलें. आणि त्याचें प्रत्यंतर पहावयाचें असल्यास प्रत्यक्ष निवडणुकींत किती लोकानीं भाग घेतला हे आंकडे पाहिले असतां दिसून येईल. फक्त गोवें प्रांतापुरतेंच पाहिलें तर येथें मतदारांची संख्या १५०१२ आहे. पैकीं ८५३२ मतदारांनीं मतदानाच्या ठाण्यावर येऊन आपलीं मतें दिलीं ह्मणजे शेंकडा ५६ मतदार मतें देण्याकरितां आले. हें प्रमाण असमाधानकारक आहे असें ह्मणतां यावयाचें नाहीं. कारण सुधारलेल्या राष्ट्रांतील हें प्रमाण शेंकडा ७५।८० असतें. ब्रिटिश हिंदुस्थानांत मुंबई हें अत्यंत सुधारलेलें शहर पण तेथें १९२३ सालच्या निवडणुकींत स्वराज्य पक्षाची चळवळ चालू असतानां शेंकडा २७ लोक मतें देण्याकरितां आले. फक्त मद्रास प्रांतीं ब्राह्मण ब्राह्मणेतर वादाची धामधूम असल्यामुळें शेंकडा ५७ मतदार मतें देण्यास आले. यावरून वरील प्रमाण समाधानकारक आहे असें दिसून येईल.

याच आंकड्याचें महालानिहाय वर्गीकरण केलें तर जुन्याकाबिजादींत शिक्षणांत व राजकारणांत पुढारलेल्या सासष्टीचा नंबर १ ला येईल. तेथें शें० ७० मतदारांनीं मतें दिलीं व नव्या काबिजादींत बहुतेक हिंदूंची वस्ती असून ते शिक्षणांत मागसलेले असतांहि तेथें सांगें खेरीज करून बहुतेक महालांत शें० ८० मतदारांनीं मतें दिलीं. सांगें महालांत मात्र हेंच प्रमाण शें० ६० प्रमाण पडलें आहे.

मतें देण्याचे बाबतींत नव्या काबिजादींत जरी समाधानकारक परिणाम दिसून आला तरी मतदारांच्या संख्येच्या बाबतींत नव्या व जुन्या काबिजादीची तुलना केल्यास त्यांत जमीन अस्मानाची तफावत दिसून येते. या दोन्हीं भागांत लोकसंख्येंत थोडा फरक असला तरी मतदारांच्या संख्येंत एवढी तफावत राहूं देणें हिंदु समाजास केव्हांहि श्रेयस्कर नाहीं. ही तफावत केवढी आहे हें खालील कोष्टकावरून वाचकांस कळून येईल. *

कोष्टक

महाल	लोकसंख्या	मतदार
[जुनी काबिजाद]		
तिसवाडी—	५४५४०	३१४७
सासष्टी—	११३०६१	३५२०
बार्देश —	१०५३३७	५३६६
	२७२९३८	१२०३३
[नवीन काबिजाद]		
पेडणें—	३८०१४	४०६
म्रांखळी—	३१११०	३५०
सत्तर —	१९६२१	८४
फोंडें—	४५४५२	८८०
सांगें —	२६११८	२४६
केपें—	२१३८६	३५२
काणकोण—	२०८२५	२७०
	२०२५२६	२५८८

वरील कोष्ठकावरून वाचकांना दिसून आलेंच असेल कीं, जुन्या काबिजादींतील लोकवस्तीशीं तेथील मतदारांचें प्रमाण शें० ४॥ पडतें तर तेंच नव्या काबिजादींत शें० १॥ पडतें ! हें अंतर अत्यंत असमाधानकारक होय. आमच्या नवीन काबिजादींतील पुढाऱ्यांनीं हें अंतर कमी करण्याचा कसून प्रयत्न केला पाहिजे. या शिवाय इतर राजकीय चळवळ कितीहि मोठ्या प्रमाणांत केली तरी ती फलद्रुप होणें शक्य नाहीं.

आणखी एका मुद्याचा येथें उल्लेख केला पाहिजे. नवीन काबिजाद हा हिन्दु वस्तीचा भाग आहे. सि. प्राझेरिस यांनीं मराठी भाषेच्या मताधिकाराला लाथाडल्यानंतर त्यांना एकाहि हिन्दूनें मत हें द्यावयाचें नव्हतें; पण खेदाची गोष्ट ही कीं, मतें देण्यास गेलेल्या २००२ मतदारांपैकीं ६८४ मतदारानीं सिं. प्राजेरिस यांनां आपलीं मतें दिलीं ! यावरूत आमचा मातृभाषेसंबंधींचा अभिमान दिसून येतो !

असो. शेवटीं सांगावयाचें तात्पर्य हेंच कीं, प्रागतिक संघ किंवा इतर जनता यांनां सि. प्राझेरिसविरुद्ध जी लढाई पुकारली त्यांत त्यांचा सि. प्राजेरिसशीं खासगी द्वेश नसून लोकशाहीच्या तत्वाकरितांच त्यांनां ती करावी लागली.

---

* वरील खानेसुमारीचे आंकडे नवा सेन्सस जवळ नसल्यामुळें १९०० सालच्या सेन्सस रिपोर्टांवरून घेतले आहेत.

—लिमडी संस्थानांत वलजडा खेड्यांत एका वाण्याच्या स्त्रीस मूल झालें. त्या मुलाच्या मानेभोंवतीं एक मेलेला साप अडकलेला आढळला व सदर मुलाचे कित्येक अवयव विजातीय होते.

कर्तव्यो धर्मसंग्रहः

[ले० — गणेश रामचंद्र बोडस]

संजय हा युद्धांतून प्राणभयास्तव पळून आला; अर्थात् तो क्षात्रकुलोचित कर्तव्यास चुकला. या भ्याडपणाबद्दल विदुला मातेनें त्याचा धिःकार करून, कर्तव्य या विषयाची योग्यता केवढी आहे, आणि त्याला विमुख होणारांची जगांत काय किंमत मानली जाते, याविषयीं मोठ्या मार्मिक रीतीनें उपदेश केला. त्यांत ती ह्मणते, बाळा संजयाः— "कर्तव्यहीन नर संसारीं । नव्हे पुरुष ना तो नारी । ह्मणोनी प्राण वर्ते शरीरीं । तों वरी करणी न सांडिजे ॥"

सदर उपदेशाचा आह्मीं स्वतासाठीं उपयोग करून घेणें, आपल्या सामाजिक कर्तव्य जागृति करणाऱ्या दृष्टीनें अत्यंत जरूर आहे. विधर्मी साम्राज्यसत्तेमुळें एतद्देशीय लोकांचें जिणें सर्वस्वी मरणप्राय झालें असून, तोंड दाबून बुक्क्यांचा मार खावा लागत आहे. धर्मापरी धर्म नाहीं, अर्थापरी अर्थ नाहीं, हक्कांपरी हक्क नाहीं, सत्ता किंवा स्वातंत्र्य हें तर नाहींच नाहीं. अशा प्रकारें प्राप्त झालेल्या आपत्कालासंबंधीं शेंकडो कर्तव्यांचे डोंगर आपणासमोर पडले असतां त्यांच्या उल्लंघनाचे बाबतींत ह्मणजे कर्तव्यें बजावण्याचे बाबतींत आपला पुष्कळच गाफिलपणा होत आहे. हें पाहून, ज्यानीं स्वदेशाच्या उन्नतीसाठीं आपल्या पंच प्राणाचें मोल दिलें आणि धारातीर्थीं देहार्पण केलें ते शूर पूर्वज आपणाला काय ह्मणत असतील बरें ? धर्मलंड ! कर्तव्यभ्रष्ट ! नामर्द ! भ्याड ! बरोबरच आहे. त्यानीं असा धिःकार करूं नये तर काय करावें?

जीं असंख्य कर्तव्यें आपणाला करावयाचीं आहेत, त्यांपैकीं 'धर्मसंग्रह' हें सर्वांत आद्य कर्तव्य होय. कारण त्याचेवरच अवांतर विषयाची शाश्वती आहे, पण हें तत्व मानणारे लोक फारच थोडे. धर्म ह्मणजे काय व त्याचा संग्रह काय केलें ह्मणजे होतो, याविषयीं मतवैचित्र्याच्या योगानें ब्रह्मघोटाळा होऊन बसला आहे. 'नैको ऋषिर्यस्य वच्च प्रमाणम्' अशी धर्म मार्गाची स्थिति आहे.

सदर कारणानें धर्म तत्वांत कोठेंच निर्विवादपणा नाहीं, असें असलें तरी स्वधर्मास व परधर्मास संमत असणाऱ्या धर्म तत्वाचा स्वीकार करण्याला कोणतीच हरकत दिसत नाहीं. आणि असें तत्व कोणतें असेल तर तें 'अहिंसा' हेंच होय. मात्र मांसाहारी लोकांच्या दृष्टीनें त्या तत्वाला मान नाहीं ! ही घोडचूक नव्हे काय ?

परधर्मीयांनीहि स्तुति गावी अशी आमच्या आर्यधर्माची पात्रता असतां, केवळ नाना मतवादित्व आणि हिंसात्मक कृत्यें यांच्या योगानें धर्मसंग्रहाच्या मूळ हेतूचा लोप झाला; आणि धर्माच्या सदराखालीं भलत्याच क्रूर व तामसी आचारविचारांची बंडाळी माजली.

धर्ममूर्ति ईश्वराची तृप्ति, जेणें करून होईल तोच धर्मसंग्रहाचा खरा मार्ग होय. मात्र आमचे लोक त्या मार्गाचा अवलंब करण्यास तयार नाहींत ! देवाला संतोष व्हावा ह्मणून (?) आमचे लोक, अगणित द्विपद चतुष्पादांना देवासमोर कापून काढतात ! ! तोंडानें मात्र लंबेलंबे दया धर्माच्या व्याख्यानाचा वर्षाव करितात. ज्यांना धर्मशास्त्राचा आधार आहे, असे हिंसात्मक यज्ञयाग सुद्धां जर आज कोंपऱ्यांत पडले आहेत तर मग कोंबडीं बकरीं कातरण्याच्या देवकृत्यांची प्रतिष्ठा कसली ? एतद्विषयीं सांवतवाडी संस्थानच्या तूर्तच्या परिस्थितीचें अनुकरण, हे शहाणे हिंदु लोक करतील काय ? सदर संस्थानचे अधिपति श्री. बापूसाहेब यांनीं आपल्या राज्यांतील हिंसा बंद केली आहे.

'अहिंसा' हें धर्मतत्व सर्व धर्मसंमत आहे. गोभक्षक जे मुसलमान आणि ख्रिस्त यांच्या धर्मांतहि अहिंसा—निषेध केलेला आहे.

"लेइं यनाल अल्लाह लहुमहा बलादिमा ओहा वलेकिन यना लहु अत्तक वा मिन्न कुम"—कुराण

अर्थः— मांस व रक्त ईश्वराला पोंचत [मानत] नाहीं. ख्रिस्त्यांच्या बायबलांत हि, "गी, बैल, कोंकरें, बकरीं, कोंबडीं यांच्या रक्तानें प्रसन्न होत नाहीं" असें देवानें स्पष्ट सांगितलें आहे. मात्र या विधर्मी लोकांनीं ज्यांच्या धर्मांत जीव हत्येबद्दल इतका निषेध केला आहे, त्यानीं— आपल्या या देशांत आजपर्यंत असंख्यांक गाईंचा संहार करून गोरुधिराचे पूर वाहविले; व वाहवीत आहेत !

जीवहत्त्या करण्याचे कामीं आमचें हिंदु लोक तरी कुठें कमी आहेत? त्यांनीं सदर विधर्मी यांनाहि लाजविलें आहे. मुक्या प्राण्यांच्या कत्तलीशिवाय सर्व धर्मकृत्यें आमच्या लोकांनीं प्रायः आच्छादून टाकिलीं; दीन दुर्बळांचा घात करणें ह्मणजे कांहींच नाहीं असें आमच्या ज्या हिंदूनां वाटतें, त्यांच्या हृदयांना, गोमातेच्या करूण स्थितीमुळें अद्यूनपर्यंत द्रव येत नाहीं यांत नवल तें कोणतें ! ?

गाय ही तर हिन्दूधर्मीयांची अत्यंत पवित्र अशी देवताच प्रत्येक धर्मकृत्यांत तिची, व तीपासून प्राप्त होणाऱ्या गोरस—गोमयादि वस्तूंची वारंवार जरूरी भासते; त्या वस्तूंच्या अभावीं आमचीं धर्म कृत्यें अडतात. हे नित्य अनुभव घेणारे हिंदु, धर्माची व लोकजीवनाची मूलभूत जी गोमाता, तिच्या प्राणांतीं देखील खुशाल घोरत पडले आहेत ! गोरुधिराचे पूरचेपूर वाहतात तरी तिकडे नुसतें ढुंकून पाहण्याचीहि बुद्धि हिंदू लोकांना होऊं नये ना ? देवधर्माचे निमित्तानें बकरी वगैरे कापणें, आणि गोमाता कापण्याला मूक-संमति देणें यांत वस्तुतः कोणता फरक आहे ? करणें आणि करविणें वा करूं देणें हा फरक असला तरी तो व्याकरणाचा; खरा नव्हे. डोळ्यांदेखत लक्षावधि गाई चराचर चिरल्या जात असतां काडीमात्र हालचाल न करणें ही त्या कृत्याला (कशीहि कां असेना ?) मूक संमतीच नव्हे काय ?

आमच्या हिंदूंनो! डोळे उघडा आणि शुद्धिवर या ! ! जर आपल्या शूर पूर्वजांच्या एतद्विषयक उज्वल कीर्तीला स्वताच्या हातून डाग लागूं नये अशी तुमची मनापासून इच्छा असेल, स्वधर्म व स्वराष्ट्र यांचें कल्याण व्हावें, असें तुह्मांला खरोखरच वाटत असेल तर आपल्या राष्ट्रांत सुरू असलेले हिंसारूपी अत्याचार बंद करण्याच्या उद्योगाला तुह्मी जरूर लागलें पाहिजे; तरच धर्मसंग्रहरूप कर्तव्य साधेल. सुप्रसिद्ध कादंबरीकार हरि ना. आपटे काय ह्मणतात पहा:

"थोर महात्मे होऊनि गेले, चरित्र त्याचें पहा जरा । आपण त्यांच्या समान व्हावें हाचि सांपडे बोध खरा."

गोसंरक्षणासाठीं व्याघ्राच्या तोंडांत स्वतांचा कंठ देणारा राजा दिलीप, गो—ब्राह्मण प्रतिपालक शिव छत्रपति महाराज, समर्थ रामदास स्वामी महाराज इ० थोर महात्म्यांनीं स्वराष्ट्राच्या व रंजल्या गांजल्याच्या रक्षणासाठीं आपले देह झिजविले, तें आपण कां विसरलां ?

त्या थोर विभूतींची कीर्ति आज सर्व जग गात आहे. पण ह्या निद्रावस्थेमुळें पुढील पिढी आमचें नांव सुद्धां घेणार नाहीं हें पक्कें तुमच्या ध्यानांत असूं दे !

—गोविंद वि. बरवे यांजकडून

बाजारगप्पा !

पुढारी

ले:— विनोदराव

पुढारी ह्मटला ह्मणजे स्वार्थत्यागी, लोकांचा मार्गदर्शक, लोकांचें हित तेंच आपलें समजणारा, देशाविषयीं सदैव मनांत काळजी बाळगणारा असा असतो, असें ब्रिटीश हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांवरून व इतिहासावरून दिसून येतें. आणि हे गुण त्यांच्या अंगांत पूर्णपणें विकासलेले असतात, ह्मणूनच जनता त्यास मोठ्या प्रेमानें आपला जनार्दन ह्मणून संबोधित असते !

आमचे पुढारी ब्रिटीश हिंदुस्थानांतील पुढाऱ्याप्रमाणें (हातपाय हालवून) चळवळ करतात, सभा भरवितात, वेळोवेळ व्याख्यानें देतात, सरकारला न भितां आपल्या गरजा [फक्त नोकऱ्या] भागविण्यास लावतात. प्रगति प्रगति ह्मणून अहोरात्र जप करतात. या गुणांत ते कोणासहि हार जाणार नाहींत. स्वार्थत्यागाचा प्रश्न आला ह्मणजे मात्र त्यांच्या पुढारीपणाच्या नाड्या आवळतात ! छातींत धस्स होतें ! डोळ्यांपुढें काजवे चमकूं लागतात ! सात जन्म तपश्चर्येंत खर्चीं घालणाऱ्याला जें ब्रह्म दिसलें नाहीं, तें यांना क्षणांत दिसूं लागतें !

आमचे पुढारी ह्मणजे मोठ्या पगाराच्या जागेवर असलेले लोक होत ! देशसेवकांत जसे त्यांच्या कार्यावरून दर्जे ठरले आहेत, तसेंच आमच्या पुढाऱ्यांचेहि पगाराप्रमाणें दर्जे ठरले आहेत.—महिना शंभर रुपये मिळविणारा देशभक्त, २०० रुपये पगार घेणारा भारतसेवक, व यापेक्षा जास्त पगार घेणारे लोकमान्य, महात्मजी होत !

सरकारी रुपेरी शृंखला पायांत अडकल्यानें व स्वतः प्रयत्न करून अडकवून घेतल्यामुळें, सरकारविरुद्ध सरनक्षाची चळवळहि करण्यास त्यानां नोकरी जाईल ह्मणून भीति वाटते ! कदाचित मुरवतीखातर किंवा चळवळ न केल्यास पुढारीपणास काळिमा लागेल ह्मणून चळवळ केली असल्यास, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे रात्रीं प्यालेल्या दारूनें तांबडेलाल झालेले डोळे पाहिले ह्मणजे वरिष्ठ अधिकाऱ्याचे रागाचें भूत आपणास खाणार असें त्यांस वाटतें, व त्यांत आणखी पोर्तुगीज वर्तमानपत्रकारानीं, आपल्या भाईबंदांचे पगार वाढण्याकरितां, आणि अस्सल फिरंगी ह्मणून घेण्याकरितां हिंदूंच्या चळवळीविषयीं जोरानें निषेध करण्यास सुरवात केली ह्मणजे यांची अधिकच तिरपिट उडून ते आपणच आह्मीं चळवळ केली ती फार वाईट गोष्ट केली ह्मणून वर्तमानपत्रांना आणि जनतेला [मनांत शिव्या] जाहीररीत्या स्वाभिमान विसरून दूषण देऊं लागतात !

गामाविरुद्ध जी हिंदूंनीं चळवळ केली ती खरोखर पाहतां अगदीं रास्त आहे, यांत संशय नाहीं. परंतु या चळवळीमुळें नोकरशाही गरम झालेली पाहून व पोर्तुगीजांशीं बादरायण संबंध जोडलेल्या नकली लांगुलीं फिरंग्या वर्तमानपत्रकारानीं तोंड मोकाट सोडलेलें पाहून आमचे 'नोकरी राजकारण' पुढारी गामाविरुद्ध जी चळवळ केली, ती फार वाईट केली, आमच्या वर्तमानपत्रांनीं तर अधिक घाण केली ह्मणून ओरडूं लागले. एकटा पुढारी तर या प्रकारानें इतका घाबरून गेला आहे कीं, गामाचें फेस्त होऊन आज बरेच दिवस झाले तरी त्याचा आक्रोश अद्याप बंद झाला नाहीं. तो गजकेलीप्रमाणें आपलें आनन अद्याप मातींत खुपसतो आहे. त्याची समजूत होण्याकरितां वर्तमानपत्रकारांनीं कितीहि पानें खर्चीं घातलीं तरी त्याची समजूत होणार नाहीं. वरून ब्रह्मदेव जरी उतरला तरी समजूत होणें शक्य नाहीं. फक्त भूवरचा ब्रह्मदेव — सरकार "गामाविषयीं स्वाभिमानाचा खून करून तूं जे श्रम घेतले आहेत ते राजनिष्ठपणास पुरे आहेत, मागें तूं बेळगावीं कांग्रेसला गेला होतास ह्मणून तुझें नांव क्रांतिकारकांत लिहिलें होतें. पण या कामगिरीबद्दल व बेळगावीं गेलों होतों तो लोकांना परत बोलावण्याकरितां, या तुझ्या सांगणीवरून, तुझ्या पगारांत वाढ करणार, शिवाय कामांतील कायम ठेवणार ह्मणून जेव्हां पाठ थोपटील तेव्हांच तो गप्प राहील, असें आमच्या मित्रवर्य चिनूसामांचें मत आहे

संस्था या लोकसेवा करण्याला जशा उपयोगी पडतात तशाच पुढाऱ्यांनाहि आपलें पातक संस्थेच्या माथीं लादण्यालाहि उपयोगी

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem, e cartorio do escrivão do 2 ° oficio Redcar, correm éditos de 30 dias a contar do dia da segunda publicação do respectivo anuncio citando a Radá Porbinim viuva de Mortú Porobo, de Batvadó de Poinguinim por si e como mãe administradora dos seus filhos menores impuberes Venctexa Mortú Porobo, Govinda Mortú Porobo, Rama chondra Mortú Porobo e Hory Mortú Porobo, todos moradores na mesma de Poinguinim e ora ausentes em Karvar, territorio britanico em parte incerta para no praso de 10 dias findos os referidos 30 dias pagar no sobredito cartorio a quantia de 50:07:01 4/5 proveniente de quota parte de custas e selos liquidados nos autos de inventario orfanologico a que se procedeu por obito de Mortú Porobo que foi da mesma de Botvadó de Poinguinim, ou dentro do mesmo praso nomear bens suficientes á penhora para o pagamento do pedido e de custas e selos acrescidos de execução sob pena de não o fazendo ser a nomeação devolvida ao exequente Ministerio Publico prosseguindo-se a execução seus termos á revelia. E para ser publico se expediu este. Xeldem 17 de Novembro de 1925.

O escrivão de Direito
Babú V. Camotim Redcar

Verifiquei
O Juiz de Direito
R. Colaço

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Redcar, vão á praça para venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige á estação de Sanvordem no dia 8 do proximo mez de Dezembro ás 10 horas pelo maior lanço que se oferecer os seguintes predios:- Predio rustico denominado "Gorbata" em que existe casa de morada que tambem faz parte integrante do mesmo predio da cultura de jaqueiras, mangueiras e tamarindeiras, avaliado por 75 rupias:- Predio rustico denominado "Cogulgudo" da cultura de coqueiros avaliado por 40 rupias:- Predio rustico denominado "Adó" da cultura de arroz, mangueiras e outras arvores, avaliado por 50 rupias:- Predio rustico denominado "Quitaxir" da cultura de coqueiros e arroz avaliado por 25 rupias:- Predio rustico denominado "Xir" da cultura de arroz, jaqueiras, e mangueiras, avaliado por 30 rupias:- Predio rustico denominado "Gorbata" da cultura de coqueiros e outras arvores avaliado por 35 rupias; Predio rustico denominado "Xir" da cultura de arroz, avaliado por 25 rupias:- Predio rustico denominado "Ilhamoroda" por outro nome "Camaravadentil" da cultura de coqueiros, avaliado por 25 rupias:- Palmar "Borodo poiquim primeira adição" vulgarmente denominado 'Condi" cultivado de coqueiros, avaliado por 200 rupias:- 'Predio denominado "Casona" da cultura de arroz, avaliado por 450 rupias:- Oitava parte da propriedade da varzea "Ganichovantó" da cultura de arroz avaliado por 1.200 rupias:- Predio rustico denominado "Surmoroda" vulgo "Surla" da cultura de arroz, avaliado por 50 rupias:- Predio rustico denominado "Borodo sorvó" da cultura de arroz, avaliado por 25 rupias e Predio rustico denominado "Borod sorvó" da cultura de nachinim, avaliado por 25 rupias, todos situados em Cotomby e discritos respectivamente na conservatoria desta comarca sob os nos. 14428, 14429, 13109, 13110, 13111, 13112, 13115, 13116, 1656, 7605, 139, 13600, 13601, 13607 e penhorados nos autos civeis de execução hipotecaria que Babú Siurama Porobo Dessay de Cotomby como cessionario move a Gopicá Porbina, viuva de Butó Seguna Porobo, seus filhos, nora e genro de Cotomby e Avedem, para pagamento da quantia de 450 rupias, juros penas e custas da execução. O arrematante pagará a contribuição de registo por inteiro as despesas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Por este são citados quaisquer credores incertos e coproprietarios e os representantes do credor falecido Scipião Basilio Fernandes, casado, proprietario de Chandor a cujo favor se acha registada uma hipoteca no livro C doze a fls 179 v. sob o n° da inscrição 4856 registada em 10 de fevereiro de 1915 á segurança da quantia de 1400 rupias; que a favor do mesmo Scipião pesa uma penhora no livro F quatro a fls 167 sob o n° da inscrição 2675 registada em 24 de Fevereiro de 1916 para haver a quantia de 1 446:12:03 e de custas e selos de execução e que a favor do dito Scipião pesa mais uma hipoteca no livro C onze a fls. 180 sob o numero da inscrição 4233 registada em 13 de julho de 1912 á segurança da quantia de 1400 rupias que é dobro do preço de 700 rupias pelo qual os ditos Butó e mulher prometeram vender ao dito Scipião o referido predio n°. 139 dentro do praso de dois anos a contar de 15 de Fevereiro de 1911 sob pena de o pagar as referidas mil e quatro centos rupias. Xeldem, 18 de Novembro de 1925.

O escrivão de Direito
Babú V. Camotim Redcar

Verifiquei
O Juiz de Direito
R. Colaço

excesso que *obrigam* os profes- tão publicados no ...

ANO 10°,
QUINTA-FEIRA 10 DE DEZEM...
ASSINATUR...
: cada ano tres...
ANUNCIOS
...inha ainda que re...
...mero avulso um...
DIRECTOR E ED...
P. Hegdo
QUEPEM-G...

"प्रत्यक्षं ज्योतिषं...

या सूर्यसिद्धांतोक्तीनुसार...
र्यादि ग्रंथांपासून, पाश्चिमात्...
धार विचारांत घेऊन तात्वि...
घेणें असल्यास समक्ष किंवा...
व सूक्ष्म पद्धतीनें केलीं जात...

वर्ग १ ला, आजन्म...
व० २ रा, भाव्रचलि...
व० ३ रा, साया ब...
व० ४ था, शुद्ध व...
व० ५ वा, सर्व साध...
व० ६ वा, साधी स...

शिवाय वर्षमासफलें, प्रश्न,...
सोपपत्तिक अशीं आधुनिक...
फलज्योतिषाच्या आस्थेवाइक...
पत्ताः— नारायण अनंत...
आणि श्री पांडुरंग–ग्रंथ...

" अ...

या नांवाचें शास्त्रीय व तार्...
न्यांत थोड्याच दिवसांत निघ...
असें सामान आलें. तूर्त मा...
मदत व ग्राहकांनीं नावें पाठव...

कोस्त...
सोडावॉटरच्या गाजाच...
ढतीनें पुरी केली जाते.

O BHARAT

MAIS UMA VEZ

Pois é verdade. A portaria da actualização dos preços de côco e de arrôz traz alarmada a opinião pública da India.

Tirios e troianos, gregos e romanos, froilanistas e prazeristas, todos são unanimes em reconhecer que è imperfeita, defectuosa e agrávosa a tabela actualisada dos referidos preços em cuja fixação, como o acabamos de dizer, se não tomou em conta nem a baixa de producção nem a alta de salarios, factores que nela deviam ter intervindo.

A actualisação dos preços tal como se acha organisada, vem a ser, pois, uma verdadeira catastrofe que tende a arrastar para miseria e provações os pequenos proprietarios de que é constituido o geral dos contribuintes.

Dado o espirito justiceiro do sr. Mariano Martins que o *Bharat* está habituado a considerar como simbolo de Legalidade e Moralidade, pelo seu criterio governativo de equidade indefectivel e justiça inconcussa, não nos parece, porêm, que Sua Excia pretenderá vincular o seu prestigioso nome a uma portaria que, em sendo posta em vigor, abalará profundamente a já de per si critica situação economico-financeira dos contribuintes a que fizemos alusão.

Sim. Sua Excia não há de querer, certamente, que tal catastrofe se desencadêie sobre uma classe que é, propriamente, o substentaculo das instituições que nos regem—*vida do Estado*.

E, sobretudo, hoje, que ninguem ignora que é no seio da mesma classe que se agasalha *sob varias formas* a peor das pobresas—a pobresa envergonhada.

Mais uma razão para se crêr, firmemente, que o sr. Mariano Martins há de ter pressa em revogar a portaria da actualisação, que deverá ser reservada por Sua Excia. para só pôla em vigor, depois de exgotados todos os meios suasorios da extincção de varias excrescencias que pejam o orçamento, agravando-lhe sobremaneira a situação.

Mesmo, então, a referida portaria, quando se queira que entre em vigor sem grande sossobro, terà que ser remodelada de harmonia com o sentir geral dos contribuintes, isto é, actualisando-se os preços em frente da baixa da produção e da alta dos salarios.

E parece-nos que temos díto o suficiente para a pretendida actualisação não se converter em lei...

ECOS E CRITICA

ENGANARAM-SE!

Escrevem-nos de Assolnã:

"Tem causado entusiasmo nos habitantes desta localidade o triunfo sob todos os pontos de vista significativo, da candidatura do eminente tribuno, dr. Froilano de Melo que na assembleia desta freguesia o b t e v e maioria de 20 votos sobre a candidatura adversa.

Se nao fosse a promessa eleiçoeira feita no dia 17 de novembro, no sentido de ser resolvida a questao do templo de Fatarpa', relativa aos fundos pertencentes ao mesmo, a favor dos mazanes detentores que procuram substrai-los a' tutela do exmo. Governo, dr. Froilano de Melo teria tido nesta assembleia uma maioria de 38 votos. A atitude desses eleitores que no dia 17 em que se devia realisar uma reuniao de mazania na Administraçao do Concelho de Quepem, a cuja judisdiçao pertence o templo de Fatorpa', tem provocado curiosidade naqueles que tem acompanhado a referida questao desde o principio, causando igualmente reparos o procedimento da autoridade que fez a mesma promessa."

Referimo-nos a essa célebre questão na nossa edição de 12 de novembro e é de extranhar que os mazanes detentores se tenham cedido diante duma promessa que, cremos, se diluiu no dia 22 de novembro. Perderam tempo, o que era o menos mas faltaram ao seu compromisso, os tais eleitores de Assolnã, que ficaram mal colocados tanto perante o candidato a quem prometeram o seu apoio que mais tarde retiraram, como quanto á questão de Fatorpá, que, mesmo que se tenha prometido, não pode ser resolvida a seu favor, visto estarmos no governo que tem por lema a moralidade e a legalidade.

Pedimos, porisso, ao sr. Administrador rápida solução do assunto que, segundo somos informados, jáz sem devido andamento na administração deste concelho.

UM POBRE DIABO!

Quem o alheio veste, na praça o despe. E, assim, o *cretino*, *manipanso*, *triste* vereador Bandari das Ilhas, feito presidente de *gesso* na linguagem do sr. Pereira Batalha ou presidente *de pau* no apropriado dizer do sr. dr. Cunha, *despiu* por ocasião do apuramento da eleição do deputado, a *casaca eleitoral* em que os desesperados *prazeristas* o envolveram, como a um bôbo:

Pobre do Bandari! Passou momentos bem tristes na sua ambiciasa vida eleiçoeira, esquecendo se do seguinte:

Cada um para si, Deus para todos.

Pobre do Bandari!!

RUIM DEFUNCTA

Na última eleição a *Vida Nova* poude bem avaliar a *infamia* dos processos politicos da *Vida Velha* que o triunfo do sr. dr. Froilano de Melo fulminou sem dó nem piedade, com honestidade e sinceridade.

¿Que de embostes abominaveis, que de patifarias torpes e que de chicanas criminosas não puzeram em jogo os moribundos partidarios da *Vida Velha*?

Inda bem que morreu e morreu duma vez para sempre!

¿Não é prudente nestas condições deixar a gente de gastar *cera* com uma tão *ruim defuncta*?

ESCOLA DE DABAL

Em duas edições sucessivas, o jornal—*A Provincia* ocupou-se, criteriosamente, da escola de Dabal, votando, com argumentos irrespondiveis, pela sua não extincção. E' digna e justa a sua atitude.

O *Bharat* conhece a referida escola e o seu proficiente professor sr. Sansguiri que bastante se afadiga em prol da instrução de seus alunos, o que inequivocamente patentêa a sua útil acção em Dabal.

E' claro que nestas condições a pretendida extincção, a qualquer titulo que seja, será um erro e um erro cuja influencia se repercutirá desfavoravelmente no desenvolvimento instructivo da colonia.

A Sua Excia. o sr. Governador Geral pedimos, porisso, que se digne determinar que não seja extincta a escola de que se trata.

UMA EXCRESCENCIA

Lê se na *Epoca* de Mapuçá, a respeito da Comissão de Melhoramentos de Mormugão, o seguinte:—

"A *Comisso de Melhoramentos* de Mormugao pelo que informam ainda nao satisfez as justas esperanças nela depositadas ao tempo da sua criaçao.

Alem de algumas estradas construidas e outras por construir o trafego do Porto continua a ser o que foi e sera' o que aprouver aos *fieis* aliados—e a linha exploradora do nosso caminho de ferro justamente apelidada de *Cavalo Branco*.

As receitas que a C. de Melhoramentos arrecada sao importantes e representam um formidavel encargo aos contribuintes que o suportam na esperança de que concorrem para a prosperidade do pais.

Se de facto as coisas passam como se informa, o que parece certo, dado o pedido do Comicio de Mormugao em extinguir a Comissao cumpre estudar o assunto e dar-lhe o golpe de misericordia, revertendo as suas receitas em aliviar o *deficit*."

O *Bharat* foi, sempre, de parecer de que, tendo se a Comissão provado de nenhuma utilídade pública, desde a sua instalação, não havia motivos para ela existir. Os reparos do

भारत

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, मार्गशीर्ष व० ९ मी शके १८४७

प्राझेरिस साहेबांचीं महत्कृत्यें

निवडणूक होऊन गेली. आणि आज एक तपावर दृढासन घालून सार्वेत मधील देपुतादची खुर्ची अडवून बसलेले प्राझेरिस दे कोस्त यांचा दीड हजार मतानीं पराभव झाला. आसन्नमरण प्राण्याची जशी मृत्यूशीं शेवटची धडपड चालते त्याप्रमाणें प्राझेरिसच्या पक्षाची शेवटची धडपड पणजी येथें आपुरमेंताच्या सभेंत झाली. रा. लक्ष्मीधरजीचें अध्यक्षांचें सोंग दोन दिवस त्या सभेंत नाचून त्यांच्यामार्फत दो. फ्रोइलान यांच्या नांवची द्वाही फिरविण्यास हरकत घेण्याचा शेवटचा विधि झाला. आणि इतक्याहि हरकतीस न जुमानतां दो. फ्रोइलान यांची द्वाही ता. २ रोजीं बुधवारीं फिरविण्यांतहि आली. आतां प्राझेरिस साहेबांचे पित्ये असें म्हणूं लागले आहेत कीं, निवडणुकी विषयीं शेवटचा निकाल देणारी सत्ता (Verificagao dos poderes) ही प्राझेरिसच्या हातीं असल्यामुळें दो. फ्रोइलान याना तेथें उमेदवारीस नालायक असें ठरविण्यात येऊन शेवटीं प्राझेरिसच देपुतादाच्या खुर्चीवर बसणार आहेत. ही केवळ अशक्य अशी अघटित घटना आहे. पण तीहि एकवार शक्य मानली तरी एक गोष्ट मात्र खास सिद्ध झाली कीं, माजी देपुतादाची कामगिरी लोकाना नुकसानकारक वाटली, लोकमत त्यांना विरुद्ध आहे आणि इतःपर त्यांनां तें सां वेंत मध्यें बसूं देण्यास तयार नाहीं.

पण खरोखरीच त्यांची कामगिरी देशास नुकसानकारक झाली असल्यास, त्या कामगिरीची तरफदारी करण्यासाठीं धेपे, कुंडईकर केंकरे-इत्यादि जड बुडाच्या वीस छानी सह्यानीं प्राझेरिसच्या पुस्ट फोटोनिशीं जो जाहीरनामा प्रसिद्ध झाला आहे त्याची वाट काय? त्यांत तर केवळ हिंदुजनतेप्रीत्यर्थच माजी देपुतादाची नऊ महत्कृत्यें केलीं असल्याची साक्ष धेप्यांपासून देशपांड्यापर्यंत वीस साक्षीदार देतात. तेव्हां अशा उपकारकर्त्या प्राझेरिसकडे आही हिंदुलोक कृतघ्नपणानें तर वागलों नाहीं ना ?

आजवर ग्रीकांचे पौराणिक वीर हर्क्यूलीस (Hercules) यानीं केलेलीं बारा महत्कृत्यें काय तीं जगप्रसिद्ध होतीं. त्यानंतर अशा कृत्यानीं आपलें नांव अमर करणारा अलीकडील दुसरा वीर ह्मणजे हिंदभूमीचें कल्याण करणारा प्रख्यात लॉर्ड कर्झन हे होत. बंगालची फाळणी, महाराणीच्या जाहिरनाम्याचे चिटोरें बनविणें, युनिव्हर्सिटी आक्ट इत्यादि महत्कृत्यें या आधुनिक हर्क्यूलीसनें केलीं तसींच नेमेच्या वनराज केसरीस गुदमरावून ठार करणें ; लेर्नेचा भुजंग ठार करणें; येरीमांतच्या वराहास जीवंत पकडणें इत्यादि महत्कृत्यें पौराणिक हर्क्यूलीसनें केलीं. आमचे प्राझेरिससाहेब यांनीं नऊ महत्कृत्यें व तीहि केवळ गोमांतकीय हिंदुसमाजाच्या हितार्थ केलीं असें धेपे आदि वीस ' ओजस्वी व बुद्धिमान ' गृहस्थानीं प्राझेरिसच्या तोंडून वदविलें आहे ! तेव्हां अशा या महत्कृत्याची थोडी तरी तपासणी केल्याशिवाय राहणें शिष्टाचारास सोडून होणार आहे आणि ह्मणूनच हा लेख मुद्दाम लिहिण्यांत येत आहे.

त्याचें पहिले महत्कृत्य ह्मणजे नवीन काबिजादींना कोंसेल्य लेजिस्लातीव्हांत आपला

स्वतंत्र सभासद पाठविण्याचा हक्क

दिला. पोर्तुगीज हिंदुस्थानाच्या एकंदर ३७९१ चौरस किलोमीटर क्षेत्रफळापैकीं नवीन काबिजादी २६४८ चौरस किलोमीटर आहेत; १९१० च्या माणुसगणतीप्रमाणें पाहिल्यास पोर्तुगीज हिंदुस्थानच्या साडेपांच लाख लोक संख्येपैकीं दोन लाख लोकसंख्या केवळ नव्या काबिजादींत आहेत; एकंदर १५ हजार मतदारांपैकीं ३ हजार मतदार नव्या काबिजादींत आहेत; जास्तींत जास्ती कर भरणाऱ्या ९० इसमांपैकीं ३३ नव्या काबिजादींतील रहिवासी आहेत. व ते ९० इसम भरीत असलेल्या ३८ हजार करांतील १८ हजार केवळ नव्या काबिजादींतील उपरिनिर्दिष्ठ ३३ इसम भरतात. ह्मणजे क्षेत्रफळानें २।३ च्यावर असलेल्या; एकंदर लोकसंख्येपैकीं शेंकडा ३७ लोकसंख्या असलेल्या; शेंकडा वीस मतदार असलेल्या व शेंकडा तेहतीस जास्त कर भरणारे असलेल्या प्रांतास प्राझेरिस द कोस्तानीं

अकरा लोकनियुक्त सभासदांतून एक अखबंद सभासद दिला !

त्यांचें दुसरें महत्कृत्य ह्मणजे त्यानीं नव्या काबिजादींतील सरकारी नेमणुकीची कोमिसावें रद्द करून त्यांच्या जागीं मुनसिपल कामेरें केलीं व त्याकरितां सभासद निवडून देण्याचे हक्क प्रजेस दिले. काम्र मुनिसिपालच्या निवडणुकीस जी मतदाराची यादी करण्यांत येते तींत कांहीं मराठीं लिहितां वाचतां येणाऱ्यांचा समावेश होत नसतो. आणि या दृष्टीनें पाहिल्यास नव्या काबिजादींतील सत्तर प्रांत खेरीज करून प्रत्येक कोंसेल्यांत ३०० च्यावर मतदार खात्रीनें आहेत. काम्र-मुनिसिपालाकरितां जी कसोटी लावण्यांत आली आहे तींत केवळ २०० मतदारांचाच समावेश केला आहे. तेव्हां निश्चित कसोटी पेक्षां कितीतरी जास्त मतदार असलेल्या नव्या काबिजादींतील प्रत्येक कोंसेल्यास त्यानीं काम्र मुनिसिपालें दिलीं व तेवढ्यावरच न थांबतां त्याकरितां

सभासद निवडून देण्याचे हक्क प्रजेस दिले !

महत्कृत्य नंबर तीनः— ' कोमांद मिलितार असलेले रद्द करून त्याऐवजी सिव्हिल आदमिनिस्रादोर नवीन काबिजादींतील कोंसेल्यांत दिले. " दादाराण्याचें बंड व काल परवांचें बंड या दोनहि बंडांचीं स्मारकें अशा स्वरूपांत हे कोमांद गोव्यांत निष्कारण स्थापन झाले होते. स्वायतत्तेचे हक्क गोव्यास मिळावयाचें ठरतांच एरवीं कोणत्याहि कोंसेल्याच्या बरोबरीनें असणाऱ्या ह्या कोंसेल्यांवरचा हा लष्करी बागुलबुवा काढणें क्रमप्राप्तच होतें. शिवाय ह्या शासनपद्धतीमुळें उपरोक्त दोन कोंसेल्यांत खर्चाची बाबहि बरीच वाढली होती. अर्थात आधींच निष्कारण बसविले गेलेले; आवतोनोमीमुळें निष्क्रीय व निराधार झालेले व खर्चाळूपणामुळें खुद्द सरकारलाच त्रासद झालेले; सरकारनें काढावयाचे ठरविलेले कोमांद मिलितार प्राझेरिस साहेबानींच

रद्द केले !

चौथें महत्कृत्य ह्मणजे " नवीन काबिजादींत २० प्राथमिक शाळा दिल्या व त्यांवर उत्तम मराठी जाणणाऱ्यांचीच नेमणूक व्हावी असें ठरविलें." १९१२ सालीं नवीन काबिजादींत १६ प्राथमिक शाळा होत्या त्यांत ना कौसेर द कॉस्त यानीं आणखी अकरा शाळांची भर घालून हा आंकडा २७ वर आणला. अर्थात या २७ शाळांत प्राझेरिसनीं दिलेल्या २० शाळा घातल्या ह्मणजे नवीन काबिजादींतील आजच्या शाळांचा आंकडा मिळाला पाहिजे. आज हा आंकडा एकोणीस आहे. ह्मणजे गणिताच्या भाषेनें सांगावयाचें ह्मणजे

२७ शाळा + प्राझेरिसनें दिलेल्या
२० = १९ शाळा

असें समीकरण तयार होतें ! व तें प्राझेरिसनें या बाबतींत केलेल्या कामगिरीची किंमत ठरवायला पुरेसें असल्यामुळें आपण पुढील महत्कृत्यांकडे वळूं.

" सांगें व फोंडें या दोन महालांत असलेली (१ आणा) तांगपट्टी व फोरु [fo. os] रद्द केले." या बाबतींत महिना दीड महिना सरकारी दप्तर (arquivo geral धुंडाळून प्रेदियाल व फोर एकसमयावच्छेदेंकरून वसूल करणें कसें अन्यायाचें होईल हें स्पष्ट मापानें, योग्य पुराव्यानिशीं, सरकारास पटविणारा एक जंगी अर्ज तयार झाला होता; श्री. रामचंद्र पां. वैद्य यांनीं या चळवळीचा पुढाकार घेऊन कवळें येथें एक प्रचंड जाहीरसभा भरविली होती; इतकेंच नव्हे तर, प्रेदियाल व फोर वगैरे एकाच पद्धतीचे उत्पन्नावरील कर असल्यानें उभयतांचा बोजा प्रजेवर पडणें हें अन्यायाचें आहे असा खेरा पणजीच्या सरकारी वकिलांनीं [Procurador da Republica] देखील दिला होता, आणि त्याच्या भरीला त्यावेळचे गव्हर्नर ना. कौसेर द कॉस्त यांनींहि प्रजेच्या मागणीला आपला पाठिंबा दिला होता. ह्मणजे सरकारचे हितसंबंध पाहण्याची जबाबदारी ज्या दोन अधिकाऱ्यांवर प्राधान्येंकरून पडते त्या उभयतांनींहि वरील कर रद्द होण्याविषयींच्या प्रजेच्या मागणीस आपला पाठिंबाच दिला होता. अशा तयारीनें केला गेलेला अर्ज मंजूर होण्याचा प्रयत्न करून प्राझेरिस साहेबांनीं आपलें

पांचवें महत्कृत्य केलें !

" मराठी शाळाच्या (या अवघ्या ८ च आहेत) प्रोफेसरांचा पगार ३ इस्कूद (सरासरी नऊ रुपये पोर्तुगीज शाळांच्या 'प्रोफेसरांबरोबर केला." " लहान कामदारांचे, ज्यांत बहुतकरून हिंदूचा भरणा असतो, अशाचे पगार वाढविले." ही पगारवाढीची बाब ह्मणजे प्राझेरिस साहेबांचा (especi-lidade) विशेष होय. पगारवाढीच्या खटपटींत ते दर्दी असल्यामुळें हें काम त्यांनीं सफाईनें केलें यांत शंका नाहीं. लिसेवांत असलेल्या मराठी प्रोफेसराच्या जागेवर प्राथमिक मराठी शाळा प्रोफेसरांपैकींच नेमला जावा असा कायदा पास करून घेतला. नंतर तो रद्द झाला त्यावेळीं मीं विरोध केलेला " सर्वांच्या माहितींत असेलच." ह्मणजे योग्य व लायक माणसांच्या नेमणुका व्हाव्या. असा कायदा घडविण्याऐवजीं प्राथमिक प्रोफेसरांचीच, मग ते लायक असोत किंवा नालायक असोत, त्यांचीच नेमणूक व्हावी असें ठरवून घेतलें. इतकेंच नव्हे तर हा व्यक्तिनिष्ठेच्या पायावर उभारलेला कायदा रद्द होऊं घातला असतां विरोध देखील केला ! यापुढें त्याचें नववें महत्कृत्य ह्मणजे हिंदूंनीं लक्षांत ठेवण्यासारखी त्या समाजाची अत्यंत महत्वाची केलेली सेवा ती ही कीं, पोर्तुगेज वसाहतींतल्या मूळ रहिवाश्यांकरितां [indigenas] निर्माण केलेला विशिष्ट स्वरूपाचा कायदा,

हिंदुसमाजास लागू करूं दिला नाहीं.

हिंदुसमाज रानटी नसून युरोपीय समाजाच्या बरोबरीचा आहे अशी तरफदारी (खरी कीं खोटी ?) त्यांना पार्लमेंटपुढें करावी लागली. रानटी लोकांकरितां केला गेलेला हा कायदा जर गोमांतकीय हिंदुसमाजाला लागू झाला असता तर त्यांतील इभ्रतदार सद्गृहस्थाना रानटीपणाचा शिक्काहि मिळाला असता. ही तरफदारी जर त्यांनीं केली नसती तर म्यॉक्स मुल्लर, टर्ड्नर टु एनरांग इत्यादि हिंदी संस्कृतीच्या पुरस्कर्त्यांना खोटेपणा पत्करावा लागला असता; हा कायदा लागू झाला असता तर हिंदुलोक रानटी ठरले असते व थोडा वेळच जरी हा कायदा अमलांत राहिला असता तरी त्याचा परिणाम इकडील समाजावर होऊन त्यांतील कित्येक साधे भोळे इभ्रतदार सद्गृहस्थ खरोखरीच रानटी बनले असते !

स्फुट विचा

आमचे टीकाकारः— कांहीं अप्रबुद्ध लेखकांनीं राज कांगी विचार करून आपली उराशीं घट्ट बाळगून धरिलीं त्यांना इतरांचे "घातक कोटि हें स्वभावसिद्धच होय. परं असलेल्यांकडून आपले हक्क घेतेवेळीं, मिळेल तेवढें प उरलेल्या करितां पुनः भांडत यांतच व्यवहारचातुर्य आहे, तात. "जोंवर्यंत सरकारनें प्रजे शिक्षणाची सोय केली नाहीं, भाषेस मताधिकार द्या" ह्मणू टलें तें या दृष्टीनेंच होय. "जर सरकारनें प्रजेच्या शिक्ष सोय केली तर मराठीला मता ण्याचें कारण नाहीं." असलें ढीत वसतात व ते प्रासंगिक आकांक्षा ह्मणतात. पण, हि गाढ विधानाचे नावांखालीं अ पिढीला कल्पनेच्या भराऱ्यांत त्यांना कर्तव्यशून्य बनवितात ध्यानीं कसें येणार ? शिवाय कं विषें असतील तर कोणालाहि णतां येईल. 'हिंदुसमाजाचा गाढ अज्ञान' कित्येक लेख असें यांना वाटतें. यावरून सं मक्ता यांच्याचकडे येतो व ह्मण निराळ्या रीतीनें प्रतिपादन करूं त्यांना टीका करण्याचा अ होतो.

शिमगा गेला पण कवित्व देपुतादाच्या निवडणुका होऊन कांहीं बड्या धेंडांनीं जो अव्यापा करून आपलें नांव सर्वतोमुखीं क आहे त्याची स्मृति मात्र बराच राहणार आहे. या बाबतींत श्री. तींचीं मराठी जाहीर पत्रकें दी प पटकावतील. या पत्रकवाल्या

प्राझेरिस साहेब व त्याचे उदो णारे जे कोणी थोरथोर महात्मे अ आमची अशी विनंति आहे कीं, बुडामुळें नेहमीं समाज सागराच्या राहणाऱ्या दहा वीस " इभ्रतदा त्यांच्या जाड्या सह्यानीं, दोन च विधानें प्रसिद्ध केलीं ह्मणजे हिंदुस सेल अशी आशा त्यांनीं इतःपर बा तो काळ केव्हांच मागें पडला. अहा हिंदुसमाज आज आपलें हित लक्ष्यांत उपरोक्त जड बुडाच्या स पेक्षां कितीतरी वाकबगार आहे व रावा परवांच्या निवडणुकींतच त्या आहे. त्यानें सावध होऊन जर ते आपली दिशा बदलतील तर समाजा मोठा उपकार होईल.

excesso que obrigam os profes- ...

निवडणुका झाल्या; पुढें काय ?

ले. १ ला

(ले० सौमित्र)

राष्ट्राच्या जीवनांत कित्येकवेळां वर्षेंच्या वर्षें कोणत्याहि महत्वपूर्ण अशा घडामोडी शिवाय निघून जातात इतिहासांत कालदर्शना पलीकडे या वर्षांनां दुसरें स्थान नसतें. पण एकाच राष्ट्राच्या इतिहासांत एक दिवस असा उगवतो कीं, त्याच्यांत इतिहासाला निराळें वळण लावण्याची व सान्या देशाच्या भवितव्यतेचें नियमन करण्याची अद्भुत शक्ति असते. वाटर्लुची लढाई, पानिपतचा संग्राम किंवा आलझ्युबारोतासारखें [Aljubarrota] घनघोर युद्ध, इत्यादि राष्ट्रीय घडामोडी कालमानाचे दृष्टीनें अत्यंत थोड्या अवकाशांत होऊन गेल्या असल्या, तरी त्यांचे परिणाम मात्र त्या त्या राष्ट्रांच्या भावी आयुष्यक्रमावर चिरकाल असे होऊन बसले आहेत. पानिपतच्या अपजयावर मराठेशाहीच्या नाशाचा पाया रचला गेला. वाटर्लुच्या विजयामुळें इंग्रजाचें असामान्य महत्व युरोपच्या राजकारणांत स्थानलें गेलें आणि आलझ्युबारोताच्या विजयश्रीमुळें स्पेनच्या तावडींत सांपडण्याच्या बेतांत आलेल्या पोर्तुगालचें स्वातंत्र्य संरक्षण झालें. जी गोष्ट मोठ्या राष्ट्राच्या इतिहासाची, तीच गोमांतकासारख्या प्रांताची. गोमांतक गरीब खरा, पण गरीबाच्या कंटकमय आयुष्यांतहि, त्याची भवितव्यता उज्ज्वल करून व त्याच्या आयुष्यांत प्रगमनशील वळण लावणारा एकादा दिवस उगवतोच. नव्हेंबर महिन्याची बावीस तारीख हा अशांपैकींच एक दिवस होय. गोमांतकाच्या पोरक्या राजकारणांचे इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्याइतकी त्याची योग्यता आहे. खुद्द त्या दिवशांत दृश्य अशी क्रांति घडून आली नाहीं, हे खरें असलें तरी डॉ. मेलु यानां लाभलेल्या जयामुळें त्या दिवसापासूनच हिंदूच्या, खिश्चनाच्या आणि शेवटीं गोमांतकाच्या सार्वत्रिक राजकारणांतील क्रांतीला सुरवात झाली. या क्रांतीचें खरें स्वरूप लोकांपुढें ठेवावें व या निवडणुकांमुळें कलाटणी मिळालेल्या संस्थानीं पुढें काय करणें इष्ट आहे, हें पहावयाचें हा या दोन लेखांचा मुख्य उद्देश होय.

गेल्या निवडणुकांत एका बाजूला मिळालेल्या जयाकडे व दुसरीच्या अपजयाकडे जरा निराळ्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे. प्रागतिकसंघानें उचलून धरलेल्या उमेदवाराला हाणून पाडतानां, प्रतिपक्षीयांनीं योजिलेल्या बऱ्या वाईट उपायांचा उलगडा करावयाचा तर आपणांस एका गोष्टीकडे प्रथम लक्ष दिलें पाहिजे. ती गोष्ट ही कीं, प्रतिपक्षीयांनीं केलेला हल्ला डा० मेलु यांच्या विरुद्ध नव्हता; तो हिंदूच्या वर्चस्व स्थापनेविरुद्ध होता. प्राझेरिश यांच्या खासगी उपकारांतून उतराई व्हावें, म्हणून ज्यांनीं त्यांच्यातर्फे झीज सोसली, त्यांचीं गोष्ट बाजूस ठेविल्यास, इतर खिश्चन पुढाऱ्यांनीं प्राझेरिश यांच्या बाजूनें केलेल्या चळवळीचा मुख्य हेतु, हिंदूचें राजकारणांत प्रस्थापित होऊं पहाणारें वर्चस्व नष्ट करावें या पलीकडे नव्हता, ही एक गोष्ट आधीं सांगून विषयाकडे वळूं.

मतदारवर्गाच्या मनांत डॉ० मेलु यांच्या बद्दल अप्रीति, अनादर उत्पन्न व्हावा म्हणून त्यांच्या शत्रूनीं योजिलेल्या निंद्य उपायांची माहिती आजच्या घटकेला पोर्तुगीज वाचकांना होऊन चुकलीच असेल. प्राझेरिश यांच्या बाजूनें लढणाऱ्या कांहीं वर्तमानपत्रांनीं उपस्थित केलेले कांहीं मुद्दे मराठी वाचकांकरितां देणें जरूर आहे. डॉ० मेलु हे नास्तिक व धर्मद्रोही आणि गोमांतकीय खिस्ती जनता पूर्ण आस्तिक्यवादी अर्थात अशा इसम निवडून देणें म्हणजे आपल्या धार्मिक वृत्तींचा धामक भावनांचा आपण खून करणें होय, हा पहिला मुद्दा. डॉ० मेलु हे एक बडे शास्त्रज्ञ. तेव्हां शास्त्रीय ज्ञानाबद्दल वसत असलेली तळमळ व गोडी मारून टाकून त्यांनीं राजकारणासारख्या रुक्ष व हलक्या उद्योगांत लक्ष घालणें म्हणजे साऱ्या जगाचें व गोमांतकाचें शास्त्रीय बाबतींत मोठेंच नुकसान करणें होय. हा दुसरा मुद्दा होय. डॉ० मेलु हे उदारमतवादी, (democratico) नव्याचे अनुयायी व नव्याचे अभिमानी तर खिस्ती जनता पुराणमतवादी; सबब या दोघांत इतका विरोध असतांनां, ते आपले योग्य प्रतिनिधि मुळींच होऊं शकत नाहींत, हा तिसरा मुद्दा. डॉ० मेलु हे देपुताद निवडले गेल्यास हिंदूंच्या मराठीला मताधिकार देणार व खिश्चन समाजाचें महत्व नष्ट होऊं देणार. तेव्हां त्यांनां निवडून देणें म्हणजे आत्मघात करणें होय. हा चवथा मुद्दा. डॉ० मेलु यांची उमेदवारी प्रागतिक संघानें अर्थात हिंदूंनीं पुढें केली आहे व हिंदु हे तर पोर्तुगीज साम्राज्याविरुद्ध, पोर्तुगीज राष्ट्रीयत्वाविरुद्ध आणि खिश्चनाच्या उघड उघड विरुद्ध; अर्थात अशा समाजानें उचलून धरलेल्या उमेदवाराला मत देणें म्हणजे खिश्चनांच्या हक्कांना खिश्चनांच्या राष्ट्रीय कल्पनानां आणि पोर्तुगीज सत्तेच्या स्थायिकत्वाला धक्का लावणें होय. हा पांचवा मुद्दा. शेवटचा व अत्यंत हास्यास्पद मुद्दा म्हटला म्हणजे तो, डॉ० मेलु हे निवडून येण्यास कायद्यानें अपात्र (inelegivel) तेव्हां त्यांनां मतें देऊन न दिल्यासारखेंच होईल, म्हणून तीं पात्र (elegivel). अशा प्राझेरिश यानांच द्यावी, हा होय. हे प्रतिपक्षीयानीं आणलेले मुद्दे सूत्रबद्ध रूपानेंच झाले तरी येथें देण्याचें कारण म्हणजे पोर्तुगीजीचें ज्ञान नसलेल्या मराठी वाचकानां तें कळावें, हें होय. कांहीं वृत्तपत्रांनीं आणलेले हे मुद्दे वायां गेले व डॉ० मेलु हेच शेवटीं मोठ्या बहुमतानें निवडून आले. झालेल्या झगड्यांत सत्पक्षाचा जय झाला, व स्वतंत्र मनोवृत्तींचा जोर होऊन परिणामाचे दृष्टीनें गुलाम अंतःकरणाला चीत व्हावें लागलें. या मिळालेल्या जयामुळें गोमांतकाच्या, राजकारणाला निराळेंपण पूर्ण उर्ध्वगामी वळण कसें लागलें याचाच आतां विचार करूं.

निवडणुकांच्या निकालामुळें घडलेल्या गोष्टीपैकीं, हिंदूचें गोमांतकाच्या राजकीय चळवळींत महत्व स्थापन झालें, ही प्रमुख होय. महत्व स्थापनाचे दोन प्रकार असूं शकतात. आपलें आस्तित्व कांहीं तरी किंमतीचें आहे, हें कोणत्यातरी सामुदायिक कार्यानें अथवा चळवळीनें, देशांत प्रचलित असलेल्या राजकीय पक्षांना व कांहीं अंशीं सरकारलाहि पटवून देणें व आपली राजकीय कर्तत्वाची हिंमत अगर धमक वाढविणें हा एक प्रकार आणि मोठमोठीं खातीं हस्तगत करून, राज्यकारभारांत शक्य तितका ज्यास्त हात घालण्याची संधि साधावयाची, हा दुसरा प्रकार. हे दोन्हि प्रकार स्वतंत्र देशांत तत्वतः एकच होत. परंतु कायदेकारी संस्था सर्वस्वीं आपल्या हातीं नाहीं अशा या गोमांतकासारख्या प्रांतांत हे महत्वस्थापनाचे मार्ग परस्परावलंबी असले तरी निरनिराळे मानले पाहिजेत. डॉ० मेलु यांच्या जयामुळें हिंदूचें महत्व स्थापन झालें असें म्हटलें तें पहिल्या प्रकाराला अनुसरून अर्थात पक्षविषयक राजकारणाचे दृष्टीनेंच होय. डॉ० मेलु यांची उमेदवारी लढविली गेली ती हिंदूच्या बळावरच होय, हें सांगण्याची गरज नाहीं. निवडणुकांसारख्या दंगलींत उमेदवार कितीहि लायक असला तरी कोणत्यातरी पक्षाचें पाठबळ त्याला हवें असतें, आणि कोणत्यातरी पक्षाच्या बळावरच उमेदवार उभा राहूं शकतो. डॉ० मेलु हे विशिष्ट पंथाचे उमेदवार म्हणून उभे राहिले नसले, तरी त्यांचो वरीच भिस्त प्रागतिक संघाच्या कार्यावर होती आणि डॉ० मेलु यांची उमेदवारी पुढें यावयाला कारण असा प्रागतिक संघच होय. १९२१ सालच्या निवडणुकांत कांहीं कारणामुळें, प्रागतिक संघाला आपले उमेदवार यशस्वी करून दाखवितां आले नाहींत हें खरें, पण यंदांहि तोच प्रश्न घसास लावून व आपली पूर्वीचीच उमेदवारी पुढें करून, संघानेंच डॉ० मेलु यांच्या जयापजयाची एकंदर जबाबदारी व निवडणुकांतील एकंदर प्रयत्न आपल्या अंगावर घेतले होते. आतां पक्षबाह्य [extra partidario] उमेदवार म्हणून ते उभे राहिले याचें कारण अगदी उघड आहे. तें असें कीं, एकट्या प्रागतिक संघातर्फे ते उभे राहिले असते, तर संघाच्या विरुद्ध असलेल्या इतर पक्षांकडून व इतर व्यक्तींकडून त्यांना जोराचा विरोध झाला असता व त्यांची वयैक्तिक लोकप्रियता बाजूस राहून कदाचित ते निवडून न येण्याचाहि संभव होता. तात्पर्य एका विशिष्ट पक्षाचे उमेदवार म्हणून उभे न रहातां, स्वतंत्र उमेदवाराच्याच नात्यानें ते निवडणुकांच्या रणांगिणांत उतरले, हें राजकारणाच्या दृष्टीनें योग्यच झालें. पण त्यांच्या जयामुळें लाभलेल्या श्रेयाचे वांटे करावयाचेच झाले तर प्रा० संघालाच ज्यास्त महत्वाचा वांटा दिला पाहिजे. कारण, संघाच्या आग्रहाशिवाय डॉ० मेलु हे आपली प्रयोगशाळा सोडून राजकारणांत पडते ना, हें संघ व डॉ० साहेब यांचे संबंध ज्यानां ठाऊक आहेत, त्यांना तरी सांगण्याची गरज नाहीं आणि प्रा० संघ म्हटला म्हणजे साऱ्या हिंदु समाजाच्या सुसंघटीत व व्यवस्थित स्वरूपाची कल्पना उभी रहाते. अर्थात या जयामुळें संघाला आलेलें महत्व व मिळालेला दर्जा एकट्या संघाचाच न रहातां तो साऱ्या हिंदु समाजाचाच ठरतो. आतां सगळ्या हिंदु समाजाचा संघांत समावेश होत नाहीं, व संघाचे सभासद नाहींत असे हिंदु पुष्कळ मिळूं शकतील हें खरें; पण हिंदु समाजांत असलेल्या विद्वत्तेचें, उत्साहानें आणि कार्यकतृत्वाचें एकीकरण (escol) आपणास संघांतच पहावयास मिळतें. आणि प्रा. संघाचा पाठिंबा डॉ० मेलु यांस आहे हें कळतांच सारी हिंदु जनता खिश्चनांच्या वर्चस्वाविरुद्ध आहे. अशी ओरड कांहीं वर्तमानपत्रांनीं केली, याचें झालें तरी कारण हेंच कीं, संघ हा सर्वांच्या डोळ्यानां हिंदु समाज असा वाटतो; शिवाय गेल्या निवडणुकांत तरी संघानें हिंदूच्या आकांक्षा व्यक्त केल्या व त्याला प्रिय असलेलीच गोष्ट केली.

असो. याप्रमाणें गेल्या जयामुळें प्रा० संघाची लोकप्रियता व हिंदुसमाजाचा राजकीय अस्तित्वाचे दृष्टीनें दर्जा वाढला ही गोष्ट निर्विवाद आहे. खिश्चनच झाला तरी पाहिजे असलेला उमेदवारच हिंदु निवडून देऊं शकतील व आपल्या जुन्या पुराण्या पक्षांसहि चीत करतील अशी भीति आज खिश्चनानां पडली आहे. ही भीति अस्थानीं होऊं नये, व आपलें महत्वस्थापन व महत्व संवर्धन उत्तरोत्तर ज्यास्त वाढत जावें, अशी इच्छा प्रत्येक हिंदूनें आज धरिली पाहिजे. त्याकरितां, अर्थातच हिंदुसमाज सुसंघटित सुव्यवस्थित व कार्यक्षम झाला पाहिजे, व असें व्हावयास हिंदूचा म्हणून कोणता तरी एक पक्ष असावयास पाहिजे. अशा तऱ्हेचें विस्तृत स्वरूप प्रा. संघाला प्राप्त करून देणें फारसें कठीण नाहीं. त्याकरितां, एकंदर हिंदूनीं आपल्या विखुरलेल्या शक्तींचा उपयोग सभासदांवरच्याद्वारें संघाला करून देणें एकंदर दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे.

.Pelo juizo de Direito da Comarca de Quepem, e cartorio do escrivão do 2.º oficio Redcar, correm éditos de 30 dias a contar do dia da segunda publicação do respectivo anuncio citando a Radá Porbinim viuva de Mortú Porobo, de Batvadó de Poinguinim por si e como mãe administradora dos seus filhos menores impuberes Venctexa Mortú Porobo, Govinda Mortú Porobo, Rama chondra Mortú Porobo e Hory Mortú Porobo, todos moradores na mesma de Poinguinim e ora ausentes em Karvar, territorio britanico em parte incerta para no praso de 10 dias findos os referidos 30 dias pagar no sobredito cartorio a quantia de 50:07: 1 4/5 proveniente de quota parte de custas e selos liquidados nos autos de inventario orfanologico a que se procedeu por obito de Mortù Porobo que foi da mesma de Botvadó de Poinguinim, ou dentro do mesmo praso nomear bens suficientes á penhora para o pagamento do pedido e de custas e selos acrescidos de execução sob pena de não o fazendo ser a nomeação devolvida ao exequente Ministerio Publico prosseguindo-se a execução seus termos á revelia. E para ser publico se expediu este. Xeldem 17 de Novembro de 1925.

O escrivão de Direito
Babú V. Camotim Redcar
Verifiquei
O Juiz de Direito
R. Colaço

especial ... excesso que *obrigam* os profes- | tão publicados no Bol. Of ...

O BHARAT

TEORIA E PRATICA

Nos felizes tempos que lá foram, havia um grande matematico que no campo teórico da sciencia que o celebrisava, levava palma a todos os colegas da sua època.

Era o primeiro teòrico, na mais rigorosa acepção da palavra. Demasiado subtil e excessivamente agudo, não lhe escapava particularidade que, de longe ou de perto, se relacionasse com a parte teórica da sciencia em que tambem conquistou loiros o sábio portuguez Pedro Nunes.

Numa palavra, o nosso *homem* simbolisava uma perfeita perfeição na teoria matematica que nos faz, por suas cumplicadas cumplicações, girar, muitas vezes, os miolos em volta das estrelas a rebrilharem no céu carregado das mais densas trevas.

A sabedoria do nosso téorico deixava, porêm, muito a desejar na prática. Os seus axiomas, os seus teoremas, os seus lemas, em fim, tudo o que lhe havia grangeado renome na teoria, reduzia-se, sim, a um zero do tamanho duma abobara bem desenvolvida.

E, desgraçadamente, foi essa *virgindade* na pratica que facilitou á Parca cortar ao eminente *teorista* o fio da sua algebrica existencia.

Foi o caso. O ilustre matemático teórico quis, uma vez, atravessar a vau um rio em cuja margem oposta se erguia uma casa dum seu colegá com quem desejava trocar impresões sobre um assunto de transcendental importancia para sua sciencia. Era desigual o leito do rio cómo irregular a sua profundidade. Em umas partes enxergava-se-lhe o fundo, noutras era dificil sonda-lo—o que por momentos não deixou de distrair da sua profunda abstração númerica o matematico.

Precisamente, nessa atrapalhação que o dominava, suceu passar por ai um camponez. O sábio *teorista* interrogou-o sobre a profundidade do rio, perguntando-lhe, tambem, se podia ser atravessado a vau, ao que o agricultor respondeu ao seu interlocutor que a profundidade variava sensivel e desigualmente dum ponto a outro e que era invadiavel o curso de agua.

Um sorriso incrédulo e compassivo desenhou-se nos labios do sabio com as respostas do ru de homem de campo; e para lhe patentear o sobre-humano valor da sua sabedoria, exibiu lhe o seguinte espectaculo *mortifero* da sua teoria, posta na prática.

Com a *caneta* da sua disciplinada *memoria* apontou, primeiramente, no *lembrete* da mente diversas profundidades do rio, duma margem a outra, somou-as em seguida e obteve lhes últimamente a média que não exedia a cinco decimetros.

Calculada por esse modo a profundidade do rio, aprestou se a vadia-lo com incalculavel pasmaceira do camponez que lhe embargava o passo; mas o nosso insigue matematico impôs-lhe scilencio e com suas poeirentas *alparcas* numa mão e com o *pudvem*, levantado por cima dos joelhos, brandindo ao mesmo tempo contra o boçal, o bastão que levava noutra mão, mergulhou os pés na agua, naturalmente com o ar triunfante de dar uma lição de matemática prática ao papalvo.

E, como a média matematica não possui o dom de igualar as profundades desiguais, chegado á de quatro metros, o eminente teorico que não sabia nadar, foi surpreendido pela morte, com as ditas *alparcas*, *pudvem*, bastão e mais a teoria que se provou literalmente impotente diante da evidencia dos factos!

*   *   *

Oferecemos êste conto aos economistas sabios que entendendo na sua teoria económica que "os argumentos da baixa de producção e da alta de salarios se não coadunam com os preceitos da sciencia economica" aventam, ainda que com circonloquios astutos e rodeios titubeantes que os quarenta mil pequenos proprietarios se submetam *sem piar* aos rigores da portaria *statu quo* da actualisação dos preços de côco e de arroz.

Quanto a nós, esperamos, confiadamente, que Sua Excia. o sr. Governador Geral estudará com o mais escrupuloso cuidado e carinhoso desvêlo o assunto da actualísação e lhe dará uma soluçãoque tranquilise a opinião pública que continua sossobrada pela expectativa da elevação da contribuição predial.

ECOS E CRITICA

UMA PERGUNTA

Ássim como o orçamentò do Estado acusa um *deficit* assustador, assim tambem o orçamento domestico de cada um dos quarenta pequenos proprietarios se notabilisa por uma sitiação deficitiaria lamentavel.

O Estado pretende equilibrar as suas finanças pela actualisação. Nada mais justo, nada mais legal, nada mais moral.

¿Que deve fazer o pequeno proprietario para atingir o equilibrio do seu bancarrotado tesouro, bancarrota que se agravará ainda mais no regime da actualisação? ¿Não haverá algum meio eficaz para isto?

RESPOSTA

Esse meio existe e é, por sinal, de se conseguir caçar dois coelhos com uma cajadada, como se costuma dizer. O que quere dizer que êle, alem de ser adequado ao fim que se tem em vista, prima por sua eficacia moral.

Se o pequeno proprietario se decidir a elevar a 20 rupias, o minimo, o preço de cada palmeira, destinada á lavra de sura, poderà vêr, com este aumento da renda, não desequilibrado o seu orçamento que a actualisação ameaça perturbar.

Verdade é que concomitantemente se elevará o preço de espiritos nativos; mas esta elevação, longe de ser um prejuizo, representará, ao contrario, uma vantagem de alto valor moral.

E ninguem pode queixar-se de que o alvitre da elevação do preço das palmeiras lavraveis para sura peque pelas dificuldades de não realisação pratica.

E PRONTO ...

A união faz a força. Unam-se todos os grandes e pequenos proprietarios e ponham em pratica, constitucionalmente e ordeiramente, legalmente e moralmente, o meio por nós indicado. E verão, depois, que poderão, perfeita e admiravelmente, fazer face aos encargos que a portaria da actualização dos preços de côco e de arroz criar-lhes-há.

O Estado equilibrará o seu orçamento pela actualisação dos preços. Nós equilibraremos o nosso, elevando a vinte rupias o preço de palmeiras á sura.

E pronto. Fica assim resolvido sem atritos o magno problema do equilibrio dos nossos orçamentos domesticos e do Estado, que, afinal de contas, tambem, é nosso ...

AGRADECENDO

Ao ilustre e digno Presidente da Camara Municipal das Ilhas agradece o *Bharat* muito penhorado a amabilidade do excelente exemplar da "Homenagem na India Portuguesa aos insignes aviadores portugueses Gago Coutinho e Sacadura Cabral", mémoria da sessão solene por ocasião da colocação dos seus retratos no salão dos Paços do Concelho das Ilhas, a 17 de junho de 1923.

भारत

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, पौष शु० २ या शके १८४७

हिंदु महासभेचें

मुंबई प्रांतिक अधिवेशन

' हिंदु महासभेचें मुंबई प्रांतिक अधिवेशन दे० लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखालीं, गेल्या ५ । ६ । ७ या तारखांस मोठ्या थाटानें व यशस्वी रीतीनें पार पडलें. हिंदु महासभा ही अखिल हिंदु समाजाची संघटना व पुनर्घटना करण्याकरितां जन्मली असल्यामुळें ज्यांना ज्यांना ह्मणून आपला उद्धार करून घ्यावयाचा असेल, अशा कोठल्याहि भागांतील हिंदु समाजाला ते राजकीय दृष्ट्या भिन्न अमलाखालीं असले तरी या चळवळींत सामील झालेंच पाहिजे.

भिन्न संस्कृतीच्या वेगवेगळ्या राजकीय अमलाखालीं विभागल्या गेलेल्या एकाद्या समाजाला आपल्या धर्माचें, भाषेचें, परंपरेचें, इतिहासाचें किंवा एकंदरींत आपल्या संस्कृतीचें रक्षण व संवर्धन करावयाचें असेल तर त्या वेगवेगळ्या राजकीय अमलाखालीं विभागलेल्या एकाच संस्कृतीच्या समाजानें आपली जूट केल्याशिवाय त्याला आपल्या संस्कृतीचें रक्षण करितां येणें शक्य नाहीं. व हे प्रयत्न आपल्यापुरते करण्याच्या कोणी कितीहि बाता मारल्या तरी ते प्रयत्न फलद्रुप व्हावयाचे नाहीत. उलट संघटनेच्या अभावीं या प्रयत्नांना ठेंचणेंच त्या त्या सत्तेला सुलभ जाईल. हिंदुस्थानचा मागील व चालू इतिहास या गोष्टींची साक्ष देत आहे व यापुढें हिंदु समाजानें कोणतीहि हालचाल न केल्यास भविष्यकालहि तीच साक्ष देईल. मात्र ठेंचण्याचीं साधनें वेगवेगळालीं असतील इतकेंच. भूतकालीं तरवारीच्या जोरावर हिंदु संस्कृतीला बुडविण्याचे प्रयत्न झाले तर वर्तमानकाळीं तेच शांततेच्या मार्गानीं होत आहेत व भविष्यकाळीं आणखी नवीन मार्ग निघती लहि. एवंच संघटनेशिवाय हिंदुसमाजाचा टिकाव लागणें शक्य नाहीं ही गोष्ट स्पष्ट आहे. उलट या प्रयत्नांना अखिल हिंदु समाजाचें पाठबळ आहे हें एकदां नजरेस आल्यावर केवढीहि मोठी सत्ता असली तरी तिला हिंदुसमाजाचें किंवा त्याच्या अस्तित्वाचें काडीइतकेंहि वांकडें करतां येणें शक्य नाहीं. शिवाय परस्पर सहाय्यक प्रयत्नांनीं प्रगतीचें कार्य थोड्या श्रमांत व थोड्या खर्चांत होतें हें निराळेंच. आणि याच विचारसरणीमुळें आमच्यांत बाहेरच्या चळवळींत सामील न होण्याबद्दल सांगणारे जे कांहीं हरीचे लाल आहेत त्यांची आह्मांस फार कींव येते. आमच्या गोंवें प्रांताचीच गोष्ट घेऊं. या प्रांतावर पोर्तुगीजांची सत्ता आहे आणि येथें जित व जेते यांचा भेदाभेद नसल्यामुळें घटकाभर असें समजूं कीं, आह्मांस पूर्ण स्वातंत्र्य आहे; पण एवढ्यानें येथील हिंदुसमाजाला आपल्या संस्कृतीलाहि योग्य स्थान मिळालें असें ह्मणतां येईल काय? नाहीं. येथील हिन्दुसमाजाला त्याकरितां विशेष प्रयत्न करावे लागतील व त्याकरितां ब्रिटिश हिन्दुस्थानांतील आपल्या बांधवांचें सहाय्य अवश्य लागेल. शिवाय आपल्या समाजाची सामाजिक, धार्मिक, नैतिक व शारीरिक वगैरे अंतर्गत सुधारणा करून तो बलवान करण्यास त्याच्यांत ब्रि. हिन्दुस्थानांतील चळवळीचें जीवन ओतून त्याच्या पाउलावर पाऊल ठेवून चालल्याशिवाय गत्यंतर नाहीं. कारण एकाच धर्माच्या, भाषेच्या व परंपरेच्या लोकांस सुधारण्यास भिन्न राजकीय अमलामुळें ! अगदीं भिन्नभिन्न उपायांची आवश्यकता आहे असें ह्मणतां यावयाचें नाहीं. परिस्थितीमुळें एकादे वेळी क्वचित् फेरफार करावे लागतील हें निराळें पण सर्व साधारण मार्ग एकच असतील. उदाहरणार्थः— जातिभेदाचें निर्मूलन, अस्पृश्यतेचें उच्चाटन, शारीरिक वाढ, प्रौढ विवाह, धार्मिक सुधारणा वगैरे समाज सुधारणेच्या मार्गाची, फक्त ब्रि. हिन्दुस्थानांतील हिन्दुसमाजालाच गरज आहे व आह्मांला ती नाहीं असें ह्मणतां यावयाचें नाहीं. परिस्थित्यनुरूप कमी अधिक प्रमाणानें त्यांचा अवलंब आपणांस केलाच पाहिजे. शिवाय आपला हा प्रदेश अतिशय लहान असल्यामुळें आपल्या उन्नतीचे जे प्रयत्न आपणांकडून झेंपले जाणें शक्य नाहीं त्यांचे ब्रि. हिन्दुस्थानांतून आपणांस आयतेंच सहाय्य होतें. सकाळीं शाळेंत जाणाऱ्या मुलांस पाहिजे असलेल्या क्रमिक पुस्तकांच्या वाङ्मयापासून तों धार्मिक शिक्षण देणाऱ्या हरिदासांपर्यंत जर आपणांस ब्रि. हिन्दुस्थानावर अवलंबून रहावें लागतें व इतके जर आमचे हितसंबंध एकमेकांत गुंतलेले आहेत तर आमची चळवळ आमच्यापुरतीच ठेवणें या ह्मणण्यांत अर्थ तो काय राहिला ?

अशा रीतीनें निरनिराळ्या भागांतील हिन्दु समाजाच्या प्रयत्नांत एकसूत्रीपणा राहण्याकरितां हिन्दुमहासभेंत सर्व हिन्दूंनीं सामील होणें व तिच्या कार्यांत भाग घेणें हें त्यांचें कर्तव्य होय. पण अजूनहि कित्येकांस हिन्दुमहासभेच्या चळवळीची आवश्यकताच पटत नाहीं ही खेदाची गोष्ट होय. पण हें भ्रमाचें पटल दूर झाल्यावर त्यांना तिची आवश्यकता पटल्याशिवाय राहणार नाहीं अशी आमची समजूत आहे.

एक काळ असा होता कीं, सर्व जगावर हिन्दु संस्कृतीनें आपलें स्वामित्व प्रस्थापित केलें होतें. इतर समाज रानटी स्थितींत कालक्रमणा करीत असतांना हिन्दु संस्कृति अत्यंत प्रगल्भ दशेस पोंचली होती. शास्त्रें, कला, तत्त्वज्ञान वगैरेंचा सर्व बाजूंनीं विकास होत होता व त्यांत नवीन नवीन शोधांची भर पडत होती. एकंदरींत ती जगाच्या गुरुस्थानीं बसून सर्व जगास भूषणभूत झाली होती, पण चक्रनेमिक्रमानें काल बदलला व ती त्या उच्च स्थानावरून खालीं येऊं लागली. व खालीं येतां येतां प्रस्तुत हिन्दुसमाजाची स्थिति अत्यंत शोचनीय झाली आहे हें आपण पाहातच आहों. हिन्दु समाजावर हल्ल्यामागून हल्ले होत आहेत व या हल्ल्यांस तोंड देऊन अजून जरी तो उभा आहे तरी चिकाटीचे प्रयत्न न झाल्यास तो केव्हां खालीं पडेल ते सांगण्याची गरज नाहीं. आज सर्व बाजूंनीं त्यास जर्जर करण्याचे प्रयत्न चालले आहेत; सरकार परकी असल्यामुळें सत्तेचें सहाय्य तर त्याला नाहींच, उलट इतर समाज त्यावर तुटून पडले तरीहि सरकार तें स्वस्थपणें पाहात आहे. मुसलमान लोक अत्याचारी मार्गानें तर खिस्ती लोक, दुष्काळ वगैरे आपत्तींचे प्रसंग पाहून हिन्दु लोकांस बाटवूं लागले आहेत अशा ह्या बिकट परिस्थितीचा विचार करून, तिच्या प्रतिकाराचे वेळींच उपाय योजिले नाहींत तर पुढें पस्तावा करण्याची पाळी आल्याशिवाय राहणार नाहीं. या आमच्या समाजाच्या दुःस्थितीला जरी दुसरे समाज कारणीभूत असले तरी मुख्यत्वेंकरून आपणच कारण झालों आहोंत हें विसरून चालावयाचें नाहीं. जगाच्या सुधारणेबरोबर आपण पुढें पाऊल टाकलें नाहीं व पूर्वी ज्या जागेवर होतों तीच जागा घट्ट धरून बसलों; निरनिराळीं कृत्रिम बंधनें घालून आपलेच लोक बाहेर घालविले; व याचा परिणाम असा झला कीं जग पुढें पुढें गेलें व आम्हीं मात्र असलेल्या जागेवरून खालीं येत येत अधोगतीच्या गर्तेंत पडलों ! तेव्हां ही स्थिति सुधारून व आपलें पूर्व वैभव प्राप्त करून घेऊन बलवान् होणें व वर सांगितलेल्या इतर समाजांच्या हल्ल्यांचा प्रतिकार करणें या दुहेरी हेतूनें हिन्दुमहासभेचा जन्म झालेला आहे व गेल्या प्रांतिक अधिवेशनांतील पास झालेल्या ठरावांवरून व केलेल्या भाषणांवरून पाहातां हें कार्य तिच्या हातून चोखपणानें पार पडेल, यांत बिलकूल शंका नाहीं.

सभेच्या कार्याची दिशा मुख्यतः खालीलप्रमाणें आहे:—

१ हिन्दु समाजांतील सर्व पंथ व जात्युपजातींत अधिक ऐक्य व समाधान प्रस्थापित करून या सर्व पोटभेदांस एकाच समाज पुरुषाचीं सविकल्प अंगें बनविणें.

२ हिन्दु समाजांतील अस्पृश्यांसह सर्व जातींची सुधारणा व अभिवृद्धि घडवून आणणें.

३ जरूर तेथें सर्वत्र हिन्दूंचें हितसंरक्षण व संवर्धन करणें.

४ लोभ, जुलूम, जबरदस्ती, भय किंवा अशाच इतर कारणांमुळें ज्यांनीं स्वधर्मत्याग करून खिस्ती व मुसलमानी धर्मांसारख्या विधर्माचा स्वीकार केला असेल, अशा हिन्दूंस व हिन्दुसमाजास त्यांची इच्छा असल्यास परत हिन्दुत्वांत घेण्याची व अशांस योग्य धर्मशिक्षण देण्याची व्यवस्था करणें वगैरे वगैरे.

वर जो कार्यक्रम दिला आहे त्याची हिन्दुसमाजाला आज केवढी आवश्यकता आहे याचें जास्त विवेचन करण्याची गरज नाहीं. आज हिन्दुसमाजाचें सर्वांत जास्त नुकसान जर कोणीं केलें असेल तर तें जातिभेदानें, असें निःशंकपणें ह्मणण्यास कोणतीच हरकत नाहीं. या जातिभेदानेंच हिन्दुसमाजाचीं शकलें पाडलीं व त्याचीं अशीं शकलें झाल्यामुळेंच इतर समाजांना त्यावर हल्ले करणें सोपें झालें.

समाजाचे निरनिराळे भाग पाडले गेल्यामुळें एका भागावर हल्ला झाला तर दुसरा भाग त्याची पर्वा करेनासा झाला. व एकमेकांमधील द्वेष वाढून एकाचें तोंड पूर्वेकडे तर दुसऱ्याचें पश्चिमेकडे अशी स्थिति प्राप्त झाली. ब्राह्मण ब्राह्मणेतर वादहि याच विषमतेमुळें उत्पन्न झाले. हिन्दुसमाजाला पोखरणारी दुसरी कीड ह्मणजे त्यांतील अस्पृश्यता ही होय. जातिभेदाचे अत्यंत कटुतर परिणाम आज कोणास विशेष प्रमाणानें पाहावयाचे असतील तर त्यांनीं अस्पृश्य समाजाकडे लक्ष्य द्यावें. अस्पृश्यांना साधे माणुसकीचेहि हक्क द्यावयास आह्मी आज तयार नाहीं ! एकंदर हिन्दु समाजांतील एक तृतीयांश ह्मणजे सात कोटी इतका हा समाज असतांना त्यांची सुधारणा करून त्यांना अखिल हिन्दूंत प्रविष्ट करून एकंदर समाज बलवान् करण्याचें सोडून आमच्या मूर्खपणानें आह्मीं त्यांना बाहेर घालविण्याचे प्रयत्न करीत आहों. आणि याचा साहजिक परिणाम असा होत आहे कीं, परधर्मीतील लोक त्यांना आत्मसात् करून घेत आहेत. आणि मलबारांत पालघाट सारख्या ठिकाणीं ही स्थिति प्रत्यक्ष दिसत असूनहि पुराणमतवादी लोक अस्पृश्यांचीं सुधारणा करणाऱ्या लोकांना विरोध करीत आहेत. पालघाट गांवीं अस्पृश्य लोकांना कालपति रस्त्यावरून जाण्यास पुराणमतवादी लोकांकडून मज्जाव करण्यांत येत आहे ! पण ह्याच अस्पृश्यानीं जर धर्मांतर केलें तर

त्यांना ह्याच रस्त्यावरून जाण्य[ास]
प्रतिबंध नाहीं ! ! ह्मणजे हिंदु
लोकांच्या विटाळानें आपण
असें या पुराणमतवाद्यानां व
अस्पृश्य विधर्मी झाल्याबरोबर
ण्यास यानां हरकत वाटत नाहीं
मतवादी लोकांच्या वृत्तीचा फ
ह्मणून आर्य समाजानें या अस्
समाजिस्ट बनविलें तरी हा त्य
चालू आहेच ! या उदाहरणा
त्याच रक्तांमासांच्या लोकांस
मच्या धर्मातून कसे घालवून दे
दिसून येईल. व ही स्थिति अ
राहिल्यास थोड्याच वर्षांनीं हि
अर्ध्यावर आल्याशिवाय रहा
ह्मणून हिंदुसंघटनेच्या दृष्टीनें अस्
महत्व विशेष आहे. या अस्पृ
बरच हिंदुसभेनें अंगिकारलेलें प
कार्यहि फार महत्वाचें आहे.
पत्तीमुळें किंवा इतर कारणानीं
कारलेल्या लोकांस इच्छा झाल्या
स्वधर्मात येण्याची मोकळीक
मोकळीक न ठेवल्यामुळेंच हि
आपलें फार नुकसान करून घेत
आंत येण्याचें द्वार बंद केल्यामु
र्माचें जितकें नुकसान झालें, तित
कशानेंहि झालें नसेल. हें द्वार
मुळेंच जेथें एकादाहि परधर्मी इ
ण्याची मारामार होती, तेथेंच
कोटी मुसलमान व एक कोटी खि
यांची वसती आहे. आमच्या अ
वर्तनामुळेंच हिन्दुधर्मातून एवढे
धर्मांत गेले. इतकेंहि असून हिन्दु
या लोकांचें वर्तन सलोख्याचें र
प्रतिकाराच्या चळवळीची आव
उत्पन्न झाली नसती. पण या
हिन्दुसमाजावर सारखे आघ
असल्यामुळें यापुढें या लोकांची
ह्मणजे आत्मनाश करून घेणेंच
वारांत मोपल्यानीं बंड करून हजा
बाटविले. या बाटविलेल्यांना
धर्माचें द्वार मोकळें केलें नसतें, तर
लोकानां हिन्दुसमाज मुकला असता
पतितपावनाच्या चळवळीची आ
फारच मोठी आहे, हें वाचकांच्या
येईलच. त्याचप्रमाणें दंग्यांत अस
इतर बाबतींत असो, हिन्दूंची प्रति
फारच कमी दर्जाची दिसून येते.
रिक दुर्बलता घालविण्याकरितां
शारीरिक शिक्षण वगैरेंची जी चळ
सभेनें हातीं घेतलेली आहे, ती त
अत्यंत गरजेची आहे.

या एकंदर विवेचनावरून हिन्
भेनें आरंभिलेल्या हिन्दुमाजाच्या
नेच्या व पुनर्घटनेच्या कार्याची कित
वश्यकता आहे, हें वाचकानां कळू
लच. ह्मणून ज्यांना ज्यांना आपल्या

excesso que obrigam os profes- | tão publicados no Bol. Of co- gislação

खर्च करून पणजीस' ना. गोन्हेनादोरसाहेबांच्या मुलाखतीस गेलों. जातानां आम्हीं एक अर्ज नेला होता. "दाभाळ गांवाला शाळेची जरूरी आहे तेव्हां १८० रुपयांमुळें शाळा काढून टाकूं नका व निरुपायानें असें झालेंच तर, मुलें व घर नसल्यामुळें बंद ठेवलेली कुर्डीची शाळा आह्मांस दाभाळगांवीं द्या." अशी मागणी आम्हीं अर्जांत केली होती. नामदार साहेबांशीं आमचे विचार मांडण्यास आह्मांला मदत व्हावी व कांहीं अंशीं दो. व्यंकटेशराव सरदेसाई यांच्या वजनाचा फायदाहि आह्मांला मिळावा या हेतूनें पलासेंत जातानां दो. व्यंकटेशराव सरदेसाई यांकडे आम्हीं मदतीची भिक्षा मागितली व त्यांनींहि ती आपल्या नेहमींच्या सरळ स्वभावास अनुसरून दिली. पण ना. गोंन्हेनादोरसाहेबांनीं आमची भेटहि घेतली नाहीं व केवळ दो. व्यंकटेशरावांनांच आंत बोलाविलें.व त्यांच्या मार्फत आह्मांला कळविलें कीं काम्रानें पैसे दिल्यास ती शाळा देण्यांत येईल.

पण गेल्या ८ तारखेच्या बोलेतींवर आमची शाळा १८० रुपयांच्या अभावीं बंद करण्यांत आली आहे असें वाचतांच आह्माला खालील प्रश्न सुचले.

कुर्डीच्या शाळेची बदली कां देण्यांत आली नाहीं ? एरवीं तीन तीनदां ओर्सामेंत वापस पाठवून आपल्याला हवा तसा त्यांत फेरबदल होईपर्यंत काम्राला तंवी देणाऱ्या सरकारनें या १८० रुपयांची काट कसी रद्द केली नाहीं ? आह्माला या प्रश्नांचा उलगडा होईना.

आणि ह्मणूनच त्यांचा विचार होण्याकरितां आह्मीं हें दुःख वेशीवर टांगीत आहोंत. आमच्या भोळ्या मनाला असें वाटतें कीं, हा सारा प्रकार वरवरचा आहे. आंत दुसरेंच कांहीं तरी नाहीं ना ?

पणजींत असतानां आह्मीं असाहि विचार केला कीं, ज्या अर्थी आमचीं कांहीं मुलें यंदा पोर्तुगेज प्रिमैर ग्रावाच्या परीक्षेस बसावयाचीं आहेत व शाळा काढून टाकल्यानें त्यांचेंच प्रथम नुकसान होणार त्या अर्थी वर्गणी काढून राहिलेल्या तीन महिन्याचे ४५ रुपये सरकारांत भरावयाची हमी भरून वर्ष अखेर वरील शाळा चालू ठेवण्याबद्दल सरकाराला अर्जी करावी. पण तसें करण्यांत अर्थ नाहीं, शाळा मिळणें शक्य नाहीं असा सल्ला आह्मांला मिळाल्यामुळें आम्हीं तो बेत रद्द केला. पण या सल्ल्यावरून यांत कांहींतरी दुसरेंच कारण असावें हा आमचा तर्क मात्र जास्त बळकट झाला. असो.

सांग्यावर याविषयीं सभा भरणार आहे असें ऐकतों. तींत याचा उलगडा होईलच पण आपण आपल्या पत्राच्या मराठी व पोर्तुगीज भागांत याविषयीं लेख लिहून चळवळीची दिशा दाखवाल काय ? आह्मा गरिबांवर फार फार आभार झाले असते.

आमच्या शिक्षकाविषयीं मात्र आह्मांला अत्यंत वाईट वाटलें. त्यांच्या परिश्रमामुळें आह्माला बराच फायदा झाला होता.त्यांच्या हक्कांच्या रक्षणासाठीं ते प्रयत्न करतीलच देव त्यांत त्यांना यश देवो, एवढेंच लिहून हें पत्र आम्हीं पुरे करितों.

दाभाळकर

वर्तमानसार

—काश्मिर संस्थानांत गोवधास कायद्यानें बंदी केली असून गोवध करणारास सात वर्षांपर्यंत शिक्षा ठेवण्यांत आली आहे. स्तुत्य !

— मद्रास इलाख्यांत सर्वत्र गांवपंचायती स्थापन करण्याविषयीं मद्रास सरकारनें हुकूम सोडिले आहेत.

—मोर्शी [वऱ्हाड] तालुक्यांत शेंदूरजनाच्या उत्तरेकडील बारा चौदा मैल लांब व पांच सहा मैल रुंद अशा पट्टीवर गेल्या महिन्याच्या ९ तारखेस कवठा एवढाल्या गारांची भयंकर वृष्टि होऊन गुराढोरांचें व पिकांचें अत्यंत नुकसान झालें.

—' टिळक स्वराज्यफंड ' हें नांव बदलून ' कॉंग्रेस स्वराज्यफंड ' असें नांव ठेवण्याबद्दल ऑल इं. कांग्रेस कमिटीकडून फर्मान सुटलें असल्याचें समजतें !

—स्वामी श्रद्धानंदजींनीं मद्रास इलाख्यांत पांचशें ख्रिस्ती झालेल्या पंचमांना पुनः हिंन्दुधर्मांत घेतलें.

—चालू सालचें लिबरल–फेडरेशन कलकत्ता येथें भरणार असून मध्यप्रांताचे सर मोरोपंत जोशी हे अध्यक्षस्थान स्वीकारणार आहेत.

—आयरिश दरवडेखोरांनीं सभ्य गृहस्थाचा पोशाख चढवून डब्लिन येथील माउंटजॉय तुरुंगांतील १९ कैद्यांची सुटका केली.

—राष्ट्रसंघाच्या कौन्सिलकडून मोसल सरहद्दींसंबंधीं देण्यांत येणारा निकाल मान्य करण्याचें तुर्की सरकारनें नाकारलें.

—प्रशियाच्या फडणीसखात्यानें कैसरना ३ कोटी मार्कसची रोकड रक्कम १८०००० एकरची शेती, बर्लिन येथील तीन राजवाडे व ब्रॅंडनबर्गमधील एक राजवाडा एवढी मालमत्ता देण्याचें ठरविलें आहे.

—वस्तुसंशोधक लोकांना अथेन्स येथें जमिनींत पुरलेलीं जुन्याकाळचीं तीस थडगीं व विशेष महत्वाचे असे कांहीं जिन्नस सांपडले आहेत.

—केपेंची मुनिसिपल निवडणूक रद्द झाली.फडाकड्या निरर्थक फटफटल्या हाणायाच्या ! आतां फिरून 'येरे माझ्या मागल्या ' होईल !

—मुंबईचें 'लोकमान्य' दैनिक रा. मंडळीक यांच्या खास मालकतीचें झालें. आतां तरी त्याचें जीवित सुखसमाधानाचें होवो, असें अंतःकरणपूर्वक इच्छितों.

—भारताच्या स्पष्ट व सडेतोड धोरणाची प्रशंसा करून पोर्तुगालहून आह्मांस अनेक पत्रें आलीं आहेत. भारताच्या कामगिरीसंबंधीं वेळीं अवेळीं नाकें मुरडणारे जे कित्येक आमचे मित्र आहेत, त्यांनीं वरील मजकुरावरून पोर्तुगालांत कोणत्या दिशेनें वारा वाहत आहे याची अटकळ बांधावी. सत्य हें अप्रिय असलें तरी त्याला चहाणाऱ्या व्यक्ति अगदींच कमी असतात असें नाहीं. सत्य हें स्वार्थविघातक असलें तरी तें नीतिप्रसारक असतें, हें विसरून चालावयाच नाहीं.

—पोर्तुगीज रिपब्लिकचे अध्यक्ष सिं. तेशैर गोमीस यानीं आपली मुदत भरण्यापूर्वींच आरोग्य स्वास्थ्याभावामुळें राजीनामा दिल्यामुळें, त्यांची राहिलेली मुदत भरेपर्यंत त्यांच्या जागीं सिदोनिज्म चळवळीनें मागें एकदां पदभ्रष्ट झालेले दोतोर बेर्नादीन माशादु यांची निवड झालेली आहे.

—प्रेदियाल करवाढीचा विचार करण्यासाठीं पणजीच्या एडन सिनेमा गृहांत येत्या २३ तारखेस एक मोठी सभा भरणार असून, या सभेची निमंत्रणपत्रिका पणजीच्या सर्व दैनिकांत प्रसिद्ध झाली आहे. सदर निमंत्रण पत्रिकेखालीं तेवीस प्रमुख व प्रसिद्ध गृहस्थांचीं नांवें झळकत आहेत.

"संसार दर्पण"

विद्याभूषण तांबे शास्त्री यानीं लिहिलेलें हें उपयुक्त पुस्तक लोकमित्र मासिकाचे उत्साही संपादक रा. द. गो. सडेकर यांनीं आपल्या धनंजय छापखान्यांत मुद्रित करून खानापूर येथें प्रसिद्ध केलें आहे.

" संसारदर्पण " हें नावांप्रमाणेंच संसारांत हरघडी उत्पन्न होणाऱ्या हजारों लहान मोठ्या भानगडींशीं यशस्वी रीतीनें टक्कर देण्यास शिकविणारें बहुमोल पुस्तक असून त्याच्या अध्ययनानें केवळ लहानांसच नव्हे तर थोरांसहि फार उपयोग होण्यासारखा आहे. अशा तऱ्हेचें अत्यंत महत्वाचें पुस्तक तयार केल्याबद्दल तांबेशास्त्री व तें प्रसिद्ध केल्याबद्दल सडेकर या उभयतांचीहि महाराष्ट्रीय जनता सदैव आभारी राहील, अशी आमची खात्री आहे. उपयुक्त पुस्तकांच्या प्रकाशनाच्या बाबतींत सडेकरांकडून व्यक्त करण्यांत येत असलेल्या तेजस्वी धडाडीमुळें व अनुकरणीय चिकाटीमुळें 'भारता'ला त्यांचें कौतुक करावें तितकें थोडेंच वाटत आहे.

संसार दर्पणाची किंमत अवघी एकच रुपया असल्यानें ती फार माफक आहे. पुस्तकें प्रकाशकापाशीं खानापूर येथें मिळतील.

हिंदूंचा विजय

मुंबईस चाललेल्या क्रिकेटच्या चौरंगी सामन्यामध्यें अखेरीस हिंदूंसच विजयाश्रीनें माळ घातली हें ऐकून प्रत्येक हिन्दूंस आनंद झाल्याविना राहणार नाहीं. हा चौरंगी सामना हिन्दु, मुसलमान, पारशी व युरोपियन ह्या चार धर्मांमध्यें चाललेला असतो व या सामन्यामध्यें जय मिळविण्यास प्रत्येक समाज अविश्रांत खटपट करीत असतो. जणू काय यांत जय मिळविणें ह्मणजे सर्वच बाबतींत विजयी होणें अशा तऱ्हेची स्पर्धा लागते. ज्यांनीं हा क्रिकेटचा सामना पाहिला नसेल त्यांना आमचें हें ह्मणणें अतिशयोक्तीचें वाटेलें पण प्रत्येक समाज आपल्यांतील पटाईत खेळेगडी आणून दिवस उन्हांत तळतळून विजयी होण्यासाठीं अविश्रांत श्रम करीत असतात. व कॉलेजें यांना हा क्रिकेटचा खेळ पाहण्यासाठीं प्रेक्षकवर्ग एकाद्या मोठ्या यात्रेहूनहि अधिक जमत असतो. ह्या दिवसांत सर्व विद्यार्थ्यांना सुटी दिलेली असते व प्रेक्षक वर्गांत विद्यार्थ्यांचाच भरणा जास्त असतो ह्या सर्व प्रेक्षकांस सारा दिवस उन्हांत बसावें लागतें. पण ऊन, भूक व तहान हीं विसरून डोळ्यांत तेल घालून हा खेळ पहात असतात. सर्वांचें लक्ष क्षणोक्षणीं वाढणाऱ्या धावांच्या आंकड्याकडे लागलेलें असतें व प्रत्येक समाजांतील प्रेक्षक वर्ग आपापल्या समाजास विजय मिळावा अशी प्रार्थना करीत असतो. अशा तऱ्हेच्या खेळांमध्यें हिंदु विजयीझाल्याबद्दल प्रत्येक हिंदूस अभिमान वाटणें साहजिक आहे. ह्या चौरंगी सामान्यांत पहिल्यानें हिंदु विरुद्ध पारशी व मुसलमानविरुद्ध युरोपियन असा खेळ आधीं चालून त्यांत हिंदु व युरोपियन विजयी झाले व या विजयी पार्टीमध्यें दुसरा सामाना झाला. दुसऱ्या सामान्यांतील पहिल्या डावावरून युरोपियन विजयी होणार अशीं चिन्हें दिसलीं होतीं पण अखेरीस हें पारडें फिरून चार बुइकेटचा मारा युरोपियनांस मिळून युरोपियनांचा पराजय झाला. हिंदूंच्या खेळगड्यांना विजयश्रीनें माळ घालण्याचें श्रेय खेळाचे कॅप्टन श्री. पी. विठ्ठल यांसच आहे. व हे गृहस्थ अस्पृश्य वर्गापैकीं आहेत हें लक्ष्यांत ठेवण्याजोगें आहे. या खेळाप्रमाणें अस्पृश्यांपासून ब्राह्मणांपर्यंत सर्व हिन्दू भेदाभेद न धरतां एकत्र होऊन हिन्दूधर्माच्या हिताकरितां झटतील तर क्रीडांगणाप्रमाणें इतरत्रहि हिन्दूंच विजयी होणार नाहींत काय ?

—महाशेल येथें मालनी पोर्णिमेचा उत्सव येत्या २९ तारखेला होईल.

—सिं॰ प्राजेरीस द कोस्त हे कोंसेल्य कोलोनियालच्या मेंबराची उमेदवारी येत्या निवडणुकींत करतील, असें कळतें.

excesso que obrigam os profes- | tão publicados no Bol. Of co- ...

RECEBEDORIA DO CONCELHO DE QUEPEM

Edital

Pelo presente são avisados todos os indivíduos sujeitos ás contribuições predial e de juros, que se acham inscritos nas respectivas matrizes de que estará aberto o cofre desta recebedoria de 2 a 31 de Janeiro proximo seguinte, desde ás 11 até 15½ horas, para a cobrança voluntaria da 1.a prestação das suas colectas relativas ao ano civil de 1925 excepto aos sábados em que o horario é das 9 até 12½ horas e de que findo este praso ficam sujeitos ao pagamento de juros de móra na razão de 6% ao ano e multa de 3%, nos termos do regulamento de 20 de Novembro de 1896.

A cobrança das ditas colectas será feita nas aldeias e pelos cobradores abaixo designados a excepção das aldeias de Avedem, Ambaulim, Amonã, Cusmane, Quepem, Sirvoi e residencias deversas que se fará nesta recebedoria.

Torofo de Molcornem nas proximidades do templo principal de Molcornem no dia 11.

Aldeia Cotombi, nas do de Cotombi no dia 12.

Dita de Assoldá nas do de Asssoldá no dia 13.

Dita de Xelvona e Odar nas do de Xelvona no dia 14.

Dita de Xeldem nas do de Xeldem no dia 15.

Dita de Cacorá nas do de Cacorá no dia 16.

Dita de Curchorem nas proximidades de estação ferro-viaria de Sanvordem no dia 17.

Torofo de Maina Sulcorna nas proximidades do templo principal de Maina no dia 21.

Dito de Barcem nas do de Barcem no dia 22.

Dito de Arali nas proximidades da Capela de Betul no dia 23.

Dito de Bali nas proximidades do templo principal de Bali no dia 24.

Os cobradores são: Babló Rama Sinai Cossombó, Esvonta Pondori Naique Cormoli e Visvonata Govinda Sinai Cuncoliencar um na falta de outro.

Recebedoria do Concelho de Quepem, 9 do Dezembro de 1925.

O Recebedor,
Govinda Sinai Cossombó

O BHARAT

Ao Veio do Tempo...

PERDAS NOTAVEIS — A CHINA TEM RAZAO NA SUA REVOLTA — E' UM MOVIMENTO NACIONAL E NAO BOLCHEVISMO

Apo's um parenteses forçado volto ao meu lugar. Que saudades eu tive desta tribuna! Como ela me seduz, encanta e enebria! A distancia, a' leguas que me separam dela o meu espirito, arrastado por uma força intima e oculta, precisa dessas colunas para matar, reduzir a' cinza a nefasta doença da nostalgia! E e' porisso que eu para ela regresso como o filho prodigo a' casa paterna.

*

Neste exiguo espaço de tempo — quatro mezes apenas — a grande India ficou desfalcada em alguns dos seus reais valores. Nao eram desses que so' apo's a morte se lhes conhece ao certo a envergadura; nao. Em vida foram colossos e no leito da morte e' que a sua figura se avultou e engrandeceu-se mais.

Precedeu a todos o grande caudilho, C. R. Das, patriota estrenuo, integral e absolutamente devotado a' Santa causa que, denodadamente, defendia a emancipaçao da India.

Seguiu se lhe Sir Surendranat Banergi, o propulsor do movimento nacionalista. E por ultimo o dr. Ramakrisna Bandarkar, sabio indio, o termometro da sciencia indiana.

E' uma perda notavel esta destas tres individualidades de colossal renome. Mas, a *India*, embora chore de lagrimas de tristeza e de saudade sobre as cinzas gloriosas destes herois, nao devera' esmorecer nem entibiar-se no prosseguimento da linha que eles traçaram, no ideal, nobre e elevado, que nos legaram herança pesada e a'rdua a ombros debeis e hesitantes.

A India nao escassea em homens. A India do sec. XX alberga no seu seio, individualidades de renome universal. So' para a iluminar basta a austeridade e a santidade dum Mahatma e a inspiraçao soberba dum Tagore. Nada mais ela, a India, precisa, so' esses dois nomes sao suficientes para encherem um se'culo e terem paginas de oiro na Historia Patria. Gandhi e Tagore sao dois faro'is que iluminam a India inteira, sao faro'es que nos apresentam a senda por onde devemos trilhar os escolhos e os perigos que nos ameaçam. Bastam-nos eles so', nao carecemos de ninguem mais!

*

Em alguns jornais portugueses encontro, frequentes vezes, afirmaçoes muito sensatas e que me parecem ser ditadas por uma inspiraçao divina Sao destas as opinioes que passo a transcrever e cuja paternidade pertence a um jornal republicano dos quatro costados, o *Diario de Lisboa*. Nao va' o sr. Pereira Batalha, zurzir-me as costas com os seus costumados, detrambelhados, dichotes:

"Em todos os povos da Europa, e porventura do mundo, no's temos a singular preocupaçao de buscar no passado a liçao viva da nossa conduta"

....

"E prodigiosa a serie de velharias que entre no's passam por axiomas, quando deviam ser tidas unicamente como demonstraçoes arcaicas duma actividade que mirrou como uma planta sem seiva.

....

"Respeite se o passado no seu justo valor, nunca lhe atribuindo outra significaçao senao aquela que a historia lhe reconhece. (Isto ate' parece meu!)

....

Nao embaracemos, porem, os nossos movimentos com a mania retrograda de os datarmos dos se'culos das Descobertas."

Nao comento, porque e' dispensavel, por si so' eles falam bem alto.

E sao do mesmo jornal estas outras afirmaçoes sobre a China:

"Os acontecimentos da China tem uma explicaçao tam razoavel, quanto, doa a quem doer, e' injusta e cavilosa a acusaçao de bolchevismo em que se insiste para malquistar as intençoes absolutamente humanas e rigorosamente lo'gicas naquele povo revoltado." Postas as coisas nos seus devidos termos, e analizando-as em presença dos factos que se registam na historia politica da Europa, a acusaçao do bolchevismo atribuida ao nacionalismo chinez so' pode levar-nos a' conclusao lamentavel, mas verdadeira, de que *os culpados da bolchevisaçao asiatica — passe o termo — longe de serem os propagandistas russos, foram e sao os conservadores europeus, porque foram eles e mais ninguem, quem a força de expoliaçoes preparou o estado de coisas desgraçado a que se chegou."*

E mais este rebuçado que vale a pena ser saboreado, aguando o seu doce travor, por alguns que ignoram ou fingem ignorar o que a China seja:

"Quod causa causae est causa causatum" diz uma norma antiga de Direito. E na verdade, como ha de a gente aceitar como boas as aflictivas exclamaçoes que os povos ricos da Europa nos mandam pelas agencias telegraficas, quando, para se concitarem as animadversoes gerais contra a China, clamam que tudo aquilo e' bolchevismo, que tudo aquilo e' influencia do dinheiro russo, se no's nao podemos esquecer que, antes do ouro dos Soviets, foram os bancos da Inglaterra da Alemanha e da França os que primeiro fizeram do povo chines um pretexto de faceis exploraçoes"

E para terminar este pedaço de oiro porque a coluna que o *Bharat* me concede, amavelmente, nao e' esticavel:

"Os assaltos a' economia chinesa tem sido ferozes, tem sido terriveis, desde a ultima parte do se'culo XIX. A tal ponto que, mais modernamente, ja' em 1918, quando, depois de expoliaçoes sem conta, se tentou o acordo entre os Estados Unidos e o Japao, Wilson, o homem cujo espirito visionou num grande sonho de justiça a Liga das Naçoes teve de negar se a subscreve-lo por uma questao de repugnancia moral absolutamente concorde com a isençao do seu caracter.

As suas palavras de entao vale a pena regista-las, porque marcam neste momento como uma sentença de advinho:

"Tomaria sobre mim — disse ele — uma grave responsabilidade se solicitasse dos banqueiros a sua participaçao neste emprestimo que pode conduzir de maneira fatal, por virtude de desventurados acontecimentos, a uma intervençao nos assuntos financeiros e economicos desse grande Estado do Oriente, para mais, no preciso momento em que ele começa a adquirir a consciencia do seu poder e das suas obrigaçoes".

Se fosse o *Bharat* quem isto dissesse iria irremediavelmente parar nos ferros da Republica, empastelavam-lhe a tipografia, selavam-lhe a redaçao. Inda bem que nao, inda bem que e' o "Diario de Lisboa" quem o diz.

E hade concordar, sr. Pereira Batalha que a revolta da China nao terminara' numa "chinezice"! Porque se assim fosse, as chancelarias europeias nao transiriam de favor nem mandariam contigentes de tropas nem couraçados nem "dreadnougts." E Portugal nao enviaria o *Gil Eanes*! ...

E ate' a outra.

M 10 11 25

A. V.

ECOS E CRITICA

CONSOLADOR

Escrevem nos da Capital que o sr. Governador Geral teve, no decurso de sua resposta a uma interpelação do sr. Bruto da Costa, na sessão do C. L. de 18 deste, uma referencia ao *Bharat*.

Não nos diz o correspondente se a referencia foi boa ou má. Mas ... isto não temos pressa em saber. O que nos consolou é verificar que s. exia. lê este modesto jornal de Quepem, que tem apenas um e único merito, qual é o de dizer o que sente sem querer saber das consequencias que desta sua atitude podem advir ao seu director ou ao seu jornal que ele substenta com sacrificios.

EXPLICANDO

Vem a *Provincia* citando leis e transcrevendo artigos para provar a legalidade da nomeação do sr. Azaredo para sub delegado de Mormugão. Está bem. O que não está a calhar é o seu extranhamento quanto á atitude da imprensa que bordou considerações sobre o caso.

Quanto a nós que fomos dos primeiros a não apoiar a nomeação do sr. Azaredo, a nossa condenação visou a proposta da nomeação e não a propria nomeação; aliás queira a *Provincia* vêr o nosso eco "Não apoiamos" publicado na nossa edição de 3 do corrente. E que a proposta do sr. delegado da Comarca de Salcete foi absolutamente injustificada e é injustificavel dizemos nós e nem a *Provincia* nem o magistrado proponente, temos a certeza, podem provar o contrario.

Mas o mal feito está feito. E a pressa com que andarão é deveras significativa para dispensar mais comentos.

RECURSO

Consta-nos que foi já interposto recurso contra a
ção do sr. Azaredo p
delegado do Julgado
mugão.

Aos nossos patric
dentes na Metropole,
para que de todos
trabalhem em o
crear uma corrente d
nos meios politicos dai,
a salvaguardar os dir
grados do mérito e d
lho, para que esta I
continue a ser como a
feudo de certos á cast
gitimos interesses d
Sim, a incompetencia
cionalismo é um mal d
consequencias para o I

COMAM, MAS OI

Numa das proximas
do *Bharat* vai sair á p
de um artigo da epigr
mam, mas oiçam.

O artigo é da pena
contemporaneo, no Lic
tral, do sr Manuel
alguem que, como tan
tros, leva os dias a adu
melhor, a rir da caravan
sa das *glorias nacion*
passa ovante cada di
grossada.

O autor do artigo bor
siderações sobre a mo
das nomeações que nes
mos dez anos se tem fe

Quanto á legalidade,
culista vai mais longe d
Provincia terminando p
mar que ha um artigo n
tituição pela qual, per
lei, *todo o cidadão é igu*

IGREJA E ESTA

Um dos mais salutar
cipios que a Republica
guesa proclamou na su
tituição, é a neutralidad
giosa. Pode um cidadão
guez professar a religi
lhe aprouver que o Esta
da tem que ver com a s
ou aquela crença. E' que
tado não tem nenhuma
ou antes todas as crenç
pertencem, porque gara
tolera o uso de todas, c
gual carinho.

A separação da Igreja
Estado, decretada pela
blica, obedece ao menci
principio democratico,
do, actualmente, por to

especial ...
excesso que *obrigam* os profes- | tão publicados no Bol. Of co- ...

भारत

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, पौष शु० १० मी शके १८४७

खर्च वाढला आहे त्याचें काय ?

प्रेदियालाविषयीं जी व्यवस्था आजच्या गोव्हेर्नादोर साहेबांनीं योजिली आहे ती आमच्या वाचकांस नवीन नसेलच. पेनाच्या एकाच फटकाऱ्यानें हा जो वटहुकूम •Portaria• नामदार मा. मार्तीस यानी प्रसिद्ध केला आहे तो सकृद्दर्शनीं जरी रास्त दिसला तरी थोडा विचार करुन पाहिल्यास त्यांत बराच अन्याय असल्याचें सहज दिसून येतें. आणि आमच्या पोर्तुगीज भागांतून हा अन्याय आम्हीं वेळींच उघडा केला आहे. तरीपण आमच्या पत्राचें कार्य दुहेरी असल्यामुळें एका बाजूनें सरकाराकडे न्यावयाचीं गाऱ्हाणीं नेलीं गेलीं तरी दुसऱ्या बाजूनें प्रजेला योग्य ती माहिती द्यावयाची व अशा गाऱ्हाण्यांविषयीं लोकमत बनवायला मदत करायची हें कार्य थोडें फार शिल्लकच राहिल्यामुळें आज आम्ही त्याचा विचार करणार आहों. काल्च्या जाहीर सभेंत पणजी मुक्कामीं या विषयाचा ऊहापोह झालाच असेल.

सरकारी बजेट ताळ्यावर आणायला खर्चांत काटकसर करायचा जो मुख्य उपाय, त्याकडे सरकारचें लक्ष खेंचणें हें प्रजेचें पहिलें कर्तव्य होय. आणि हा खर्च तर इतका बेसुमार वाढला आहे कीं, सन १९०३ सालच्या बजेटाशी तुलना केली तर तो अडीच पट दिसतो ! मोजणीखातें [Agrimensura] शेतकीखातें [Agricultura] हिशेब तपासणीखातें [Auditoria] लिसेव सेंत्राल, व्यापारी शिक्षणाचा कोर्स इत्यादि निरुपयोगी जळवानीं तिजोरीची स्थिति अत्यंत हलाखीची करून सोडली आहे. त्यांत काट मारणें हा पहिला उपाय सोडून प्रत्येक वेळीं करांवरच वाढीचा बोजा लादणें हा शुद्ध अन्याय होय.

व्यापारी शिक्षणाच्या कोर्सविषयीं अगदीं वरवरच विचार केला तरी त्याच्या निरुपयोगित्वाची साक्ष पटते. गोव्यांतून उदरपोषणानिमित्त बाहेर जाणाऱ्या तरुणांस व्यापारी शिक्षण देऊन कार्यक्षम बनविण्यासाठीं म्हणून या संस्थेचा पाया घातला गेला पण पुढें शिक्षकांच्या नेमणुकीच्या वेळीं हा उद्देश बाजूलाच राहून बडे बापके बेटे या संस्थेंत ज्यावेळीं शिरले त्याच वेळीं म्हणजे स्थापनेच्या वेळींच तिच्या जिवन्मृतावस्थेचीहि भरपूर तरतूद करण्यांत आली. विद्यार्थ्यांनां आमीष दाखविण्यासाठीं योजण्यांत आलेली युक्ति जर यावरहि कळस चढविणारी होती. या युक्तीनें व्यापारी शिक्षण मिळालेल्या उमेदवारांना निरनिराळ्या सरकारी खात्यांत सर्वांआधीं नोकरी देण्याचे नियम करण्यांत येऊन व्यापारी कोर्स म्हणजे सरकारी नोकर मेकिंग फॅक्टरी बनविला गेला. या सारखी आंधळें दळतें व कुत्रें पीठ खातें अशी आमची स्थिति झाली आहे.

जमाबंदी खातें (Fazenda) म्हणजे गोवा सरकारचें लाडकें खातें आहे. कोठेंहि न खपणारे हरीचे लाल या खात्यांत दिसून येतात. या खात्यांतली फौज शेंकड्यांनीं गणती करण्यासारखी आहे. सरकारी पैशाचा विनियोग करतांनां तोळ्या माशांनींच नव्हे तर मिलिग्रामांनीं जबाबदारी पाहण्यांची यांची हातोटी विलक्षणच असते. ओघालाच आल्यामुळें या खात्याच्या कलासाचे दोन नमुने वाचकांसमोर ठेवण्याची परवानगी घेतों. सन १९१६ च्या मे महिन्यांत दीव येथून एका रोग्याला सरकारी खर्चानें ऑपेरेशन करावयाला मुंबईस पाठविलें होतें. रोग्याच्या बरोबर एक डॉक्टर शुश्रुषेस देण्यांत आला होता. रोगी महिन्याच्या आंतच परत आला पण त्या डॉक्टरची मेहनतानां (honcrarios,) मिळायला सन १९१८ सालचा मे महिना उजाडावा लागला. तोंवर "अमुकाचें म्हणणें ऐकून घेतलें पाहिजे." "तमुकाचें मत विचारणें अवश्य आहे." (Convem ouvir tal Repartiçao. E' indispensavel a imformaçao de...) इत्यादि प्रकारानीं जबाबदारीचा कीस काढला जातच होता. काल परवां झालेल्या केपें व सांगें येथील तिजोऱ्यांतील अफरातफरींची गोष्ट तर अगदीं करकरीत नवीच आहे. आमच्या ता. ३ डिसेंबरच्या अंकांत पोर्तुगीज भागांत त्याविषयीं ओझरता उल्लेख आम्हीं केलाच आहे. ही एवढी फौज असतांनां केपेंसारख्या क्षुल्लक उत्पन्नाच्या तिजोरींत अर्धा लाखाच्या लक्षाची अफरातफर होऊं शकते यापलीकडे या फौजेच्या नालायकीचा दुसरा पुरावा कशाला !

मोजणीखातें तर ज्या पद्धतीनें तूर्त काम करीत आहे त्या पद्धतीनें पाहिल्यास केवळ मोजणीखातेंच बनलें आहे मात्र त्याच्या नांवां अगोदर "पगार" हा शब्द घातला पाहिजे. या खात्याची हकिकतहि बरीच मनोरंजक आहे. ना. गोव्हेर्नादोर माशाद यानी या खात्याची प्राणप्रतिष्ठा केली होती व ती करतांनां मोजणी खात्यांतील नकाशांना मजिस्त प्रेदियालशीं मेळ घालावा म्हणजे आंधें अधिक कजेदलाली बंद पडेल अशा योजनेनें त्यानीं या खात्याची उभारणी केली होती. व म. माशाद साहेबांनां ती तडीस नेण्याची संधी मिळाली असती तर तिचा थोडा फार तरी परिणाम कज्जेदलालीवर झालाच असता. परंतु आणि हा परंतुच नडतो. त्यामुळे मूळ उद्देश बाजूलाच राहून गोव्याच्या तिजोरीवर एक धोंड मात्र कायमची राहून गेली. सरकारी मालकीच्या जमिनीचे अ.फ्रामेंत मोजणें व जंगलांचे गट पाहणें हीं दोन कामें मात्र या खात्यांतून आज होत आहेत. पैकीं पहिलें काम आफ्रामेंतांची संख्या तुटपुंजीच असल्यामुळें फारसें महत्वाचें नाहीं व दुसरें महत्वाचें असलें तरी तें जंगलखात्यांतील उत्पन्नांतून तात्पुरत्या नेमणुकीच्या मोजणीदारांकडून करवून घेतल्यास चालण्याजोगें असल्यानें आमच्या वरील विवेचनास पुष्टिच मिळते.

वरिष्ट शिक्षणाकरितां दरसाल जे चार दोन बडे बापके बेटे पोर्तुगालास जातात त्यांची दोन वर्षांची सोय इकडेच व्हावी यासाठीं लिसेव नासियोनालाचा लिसेव सेंत्राल बनविण्यांत आला आहे. वाढलेल्या अभ्यासक्रमांतील दोनहि वर्षांचा आढावा पाहिल्यास हा शिक्षणाचा फायदा अत्यंत महाग दरेनें आमच्या पदरांत पडतो असेंच कोणालाहि वाटेल. आणि हा फायदा तरी म्हणण्याजोगा आहे कीं काय हा प्रश्न देखील विचार करण्यासारखाच असल्यानें आपण तूर्त दुसऱ्या बाबींकडे वळूं.

कोणालाहि असें वाटेल कीं, हो महत्वाची बाब म्हणजे शेतकी खात्याची असेल व त्याच्याविषयींच भारत आतां बोलणार आहे. पण शेतकी खात्याकडे वळण्याचा आज आमचा इरादा नाहीं. तें काम बऱ्याच गमतीचें व मौजेचें असल्यामुळें त्याचा विचार एका स्वतंत्र लेखमालेनेंच करावयाचें आम्हीं योजलें आहे. तूर्त सांगावयाचेंच तर इतकें सांगतां येईल कीं, आमच्या शेतकी खात्याला अद्याप प्रयोगच करावयाचे आहेत. व या प्रयोगाकरितांच त्याचे सारे प्रयत्न आहेत. प्रयोगावस्थेंतून ज्यावेळीं तें बाहेर पडेल त्याचवेळीं त्यावर टीका करणें रास्त होईल असें तरकीयांचें म्हणणें आहे. आमच्याकडेहि दुसरा उपाय नसल्यामुळें आम्हीं तें मान्य केलेंच पाहिजे.

उल्लेखित महत्वाची बाब म्हणजे लष्करी खर्चाची होय. आवतोनोमीच्या कायद्यानें उत्पन्नाच्या शेंकडा २३ भाग आम्हीं लष्करी खर्चाप्रीत्यर्थ देण्याला बांधले गेले आहोंत. परंतु आफिसरांची भरती पोर्तुगालहून होते त्यांचा पगार भलतीकडेच वाढविला गेला आहे. व शिवाय निरनिराळ्या मुलकी खात्यांतहि सेंकडों आफिसरांची वर्णी लागते या गोष्टी जमेस धरल्या तर हा बोजा शेंकडा २३ वरून बराच वर चढेल असें आम्हांला वाटतें. या आफिसरांची गणती करण्याचें कामहि साधनांच्या अभावीं बरेंच कठीण असल्यामुळें रोख आंकडे पुढें मांडणें अशक्यच झालें आहे. पण इतकेंहि बाजूस ठेविल्यास एक प्रश्न शिल्लक राहतो व तो हाच कीं मिया मूठभर तर दाढी हातभर अशा प्रमाणें दीड हजार शिपायांवर चाळीस आफीसरांची जरूरी कां असावी हा एक प्रश्नच आहे.

तेव्हां ज्या अर्थी सरकारी बजेटाची आकारणी वैयक्तिक किंवा व्यापारी बजेटाच्या उलट्या रीतीनें होत असते. म्हणजे ज्या अर्थी त्यांत खर्चाचीच प्रथम आकारणी होणें अवश्य असते व त्या मानानें जमेची तरतूद करावी लागते त्या अर्थी ह्या खर्चाच्या वाढीकडेच प्रजेनें आपलें लक्ष प्रथम वेधलें पाहिजे. बजेटाच्या आकारणीच्या वेळीं लोकनियुक्त नामदार याची आठवण ठेवतील अशी आम्हांस आशा आहे.

स्फुट विचार

जातिविशिष्ट चळवळीः—नद्या कोठूनहि निघाल्या तरी त्यांचें पाणी शेवटीं समुद्रासच मिळावयाचें, तद्वत् जातिविशिष्ट चळवळी झाल्या तरी त्या एकंदरीनें देशहिताला पोषकच होणार हें निःसंशय आहे. मात्र प्रत्येक जातीनें आपल्या उन्नतीप्रीत्यर्थ झटतानां इतर जातीविषयीं असूया उत्पन्न होऊं नये म्हणून खबरदारी घेणें जरूर आहे. कारण ईर्षेच्या भरांत असल्या गोष्टींचा नकळत प्रादुर्भाव होतो. इकडे हल्लीं जातिविशिष्ट चळवळी दिसत असून ब्रि. हिंदुस्थानांतील चळवळींचा हा परिणाम आहे. परंतु 'पुढल्यास ठेंच मागचा शहाणा' या म्हणीप्रमाणें ब्रि. हिंदुस्थानांतील अनिष्ट प्रकार येथें होऊं नयेत म्हणून या चळवळी फार दक्षतेनेंच चालविल्या पाहिजेत. कोणत्याहि जातीनें आपली सुधारणा करून घेण्याचे प्रयत्न केल्यास त्याबद्दल इतरानां वाईट वाटण्याचें कारण नाहीं. परंतु कोणी कितीहि निर्विकार मनानें आपली उन्नति करून घेण्याचें योजिलें तरी त्यांच्या हातून नकळत पक्षपात होणें स्वाभाविक आहे. कारण निरहंकार वृत्ति ही क्वचितच. स्वाभिमानाशिवाय उन्नति होत नाहीं व कधीं कधीं स्वाभिमानाचें पर्यवसान दुरभिमानांत होऊं शकतें. जातीपुरतें हित पाहणाऱ्यांच्या ध्येयाचें क्षेत्र आकुंचित होतें आणि आकुंचित क्षेत्रामुळें स्वार्थ बुद्धि बळावते व स्वोन्नतीच्या ऐवजीं परद्वेश मात्र वाढण्याचा संभव असतो. अशा वेळीं प्रत्येकानें आपलें पाऊल पुढें टाकतानां दुसऱ्याच्या हितानहिताचा विचार करणें अत्यावश्यक आहे. विशेषतः इतर जातींच्या सुखदुःखाशीं संबंध येत असेल त्या प्रसंगी त्या जातींचें मत अवश्य घेतलें पाहिजे. यावरून आम्ही जातिविशिष्ट चळवळींचा विरुद्ध आहों

अभ्यास पत्रक

लेे०— ज. भि. राऊत

'एक शिक्षक' या नावानें 'मराठी शाळांची स्थिति' लिहितानां येथील परिस्थित्यनुरूप मराठी शाळांच्या शिक्षणक्रमांत फेरबदल केला पाहिजे, असें मला वाटत असल्याचें त्या वेळीं मीं लिहिलें होतें. व गोमांतकांतील शिक्षणाभिमानीं आणि तज्ज्ञ गृहस्थांनीं मराठी शाळांच्या शिक्षणक्रमाची दिशा ठरवावी असेंहि ह्मटलें होतें. शिवाय हा विषय चर्चेस यावा या हेतूनें जो शिक्षणक्रम इकडे असावा असें मला वाटतें तो शिक्षणक्रम त्याचवेळीं लोकांपुढें मी ठेवावयाचा. परंतु कांहीं अडचणीमुळें हें घडून येण्यास कालावधि लागला.

हल्लीं कित्येक शाळांच्या चालकांकडून श्री दामोदरविद्यालयामध्यें कोणता अभ्यास ठेवला आहे या बद्दलची माहिती विचारण्यांत आली आहे. त्यानां व्यक्तिविषय माहिती पुरविणें बरेंच गैरसोयीचें आहे, व केव्हांतरी हा विषय चर्चेस आणावयाचा माझा पूर्वींचाच हेतु असल्यामुळें येथील शाळांमधून जो शिक्षणक्रम असावा असें मला वाटतें त्याबद्दलचें अभ्यासपत्रक मी खालीं देत आहें तत्पूर्वीं थोडा खुलासा करणें इष्ट वाटतें.

येथील मराठी शाळा केवळ लोकाश्रयावर आहेत अर्थात त्या खासगी संस्था आहेत.ह्मणून सरकारी शाळांहून या शाळामध्यें थोडे अधिक अभ्यास व्हावे अशी सर्वांप्रमाणें माझीहि इच्छा आहे. परंतु तसा अभ्यासक्रम आंखल्यास तो तयार करून घेण्यास साधनेंहि चांगलीं पाहिजेत. नमुनेदार अभ्यासपत्रक तयार करणें जितकें सोपें आहे त्याहून, त्यापत्रकाप्रमाणें शाळांची तयारी करून दाखविणें फारच कठीण आहे. व या दृष्टीनें जों जों विचार करावा किंवा अनुभव पाहावा तों तों माझी निराशाच होत आहे. येथल्या 'मराठी शाळांची स्थिति' कशी आहे याचें दिग्दर्शन पूर्वीं केलेंच आहे. शिवाय मी मडगांवच्या श्रीदामोदर विद्यालयांतील मुख्य शिक्षकाचें काम करीत असल्यामुळें मला या दीड वर्षांत जो अनुभव आला त्यावरून तूर्त तरी सर्वस्वी प्रतिकूल परिस्थिति दिसते.

सर्व कांहीं अनुकूल करून घेतां येईल पण लायक शिक्षक मिळणेंच दुरापास्त झालें आहे. येथल्या शिक्षकांविषयीं पूर्वीं विस्तारानें सांगितलेंच आहे व भरपूर पगार ठेवूनहि शिक्षकांविषयींची अडचण दूर होईल असें वाटत नाहीं. कित्येक शाळांनीं वच्छला, ठेऊन, टाका आण्याला, शेकंद, माशे, असें, अस्युच, आंकणी असें लिहिणारे व वाचणारे शिक्षक आढळतात तेथं चालू शिक्षणच चांगलें होताना कठीण. मग असल्या स्थितींत सुधारणा होण्याची अपेक्षा करणेंच वाजवी नाहीं.मात्र शाळांच्या चालकांची इच्छा असल्यास सर्व कांहीं घडून येण्यास वेळ लागणार नाहीं.इच्छा असली ह्मणजे प्रयत्न होतात व साधनें जुळवितां येतात. प्रयत्नानें कोणतेंहि कष्टसाध्य काम सफल करतां येतें.

श्रीदामोदर विद्यालयामध्यें चालू सालापासून या दिशेनें प्रयत्न चालले आहेत पण सर्व गोष्टी एकदम घडून येणें शक्य नाहीं हें सांगण्याची गरज नाहीं. आतां जें अभ्यासपत्रक खालीं देत आहें त्यांतील ज्या गोष्टी विद्यालयांत अमलांत आणल्या नाहींत त्यांचे मागें खूण केली आहे.

अभ्यास

इयत्ता ५ वी.

सदर १ लें, गणित — १०० मार्क

अंकगणित :— गो. अंक. भाग २ रा, वर्गमूळ व घनमूळ.

तों. गणित :— चालींवरून होणारे हिशेब व तोंडानें सोपीं उदाहरणें करतां येणें.

सदर २ रें, भाषा. १५० मार्क

बालवाचनः— क्रमिक ५ वें पुस्तक व × चरित्र अगर निवडक गद्य पुस्तकांतील १०० पृष्ठें.

कविता:— क्रमिक पुस्तकांतील १५० ओळी व आधुनिक कवींच्या निवडक कवितां मुखोद्गत १२० ओळी. हस्तलिखित पत्रें वाचणें.

मोडीवाचन— मोडीवाचन सार भाग

व्याकरणः— आहे तेंच.

सदर ३ रें, शुद्धलेखन व अक्षर- १०० मार्क.

निबंध:—× वर्णनात्मक निबंध २०ओळी

शुद्धलेखन— ६ ओळी,बालबोध व मोडी.

अक्षर:= पत्रव्यवहारोपयोगी असें मोडी व बालबोध अक्षर—

सदर ४ थें,इतिहास, भूगोल १०० मार्क.

इतिहास :— मुसलमानांची कारकीर्द व × पोर्तुगीजांची हकिकत

भूगोल — भूवर्णन भाग २ रा. व × पोर्तुगाल व त्यांच्या वसाहतींची त्रोटक माहिती.

इयत्ता ४ थी

सदर १ लें, गणित १०० मार्क.

अंकगणित — दृढभाजक, ल. सा. भाज्य, सामान्य नियम समजण्यापुरते व्यवहारी अपूर्णांक, त्रैराशिक, बहुराशिक, कसरनेची उदाहरणें व सरळ व्याज.

तों. गणितः— चालींवरून होणारे हिशेब व सोप्या आंकड्यांची साधीं त्रैराशिकाची उदाहरणें तोंडानें करतां येणें.

सदर २ रें भाषा १००

बा. वाचन— क्रमिक ४ थें, व × लहानसें चरित्र [५० पृष्ठें.]

कविता— क्रमिक पुस्तकांतील १०० ओळी, × मोरोपंत, वामन पंडित किंवा रघुनाथ पंडित यांच्या कवितांतील ५० ओळी व आधुनिक कवींच्या निवडक ५० ओळी

व्याकरण — आहे तेंच.

मो. वाचन—सार व हस्तलिखित पत्रें वाचतां येणें.

सदर ३ रें, शुद्धलेखन व अक्षर १०० मार्क निबंध × वाचन धड्यांतीलच १५ ओळींचा सारांश शुद्ध लिहितां येणें.

शुद्धलेखन ६ ओळी बालबोध व मोडी.

अक्षर— रानड्यांच्या नं. ६ कित्याएवढें मोडी व तेवढ्याच आकाराचें बालबोध.

सदर ४ थें इतिहास भूगोल १०० मार्क

इतिहास— आहे तोच.

भूगोल — भूवर्णन भाग १ ला व × गोमांतकाची राजकीय व्यवस्था आणि व्यापारी माहिती.

इयत्ता ३ री.

सदर १ लें, गणित.

अंकगणित — विविध, गुणक व भाजक पूर्णांक असलेले रेषी गुणाकार भागाकार. × त्रैराशिकाचीं सोपीं उदाहरणें त्रैराशिक न मांडतां करतां येणें. × गोमांतकांत चालू असलेलीं कोष्टकें व त्यावरून होणारीं उदाहरणें.

तों. गणित — आहे तेंच मात्र गोव्यांत चालू असलेल्या कोष्टकावरून हिशेब करतां येणें.

सदर २ रें, भाषा.

बा. वाचन — आहे तेंच.

कविता — क्रमिक तिसऱ्या पुस्तकाशिवाय × आधुनिक कवींच्या कविता पन्नास ओळी.

व्याकरण — आहे तेंच.

मो. वाचन — आहे तेंच.

सदर ३ रें, शुद्धलेखन व अक्षर.

शुद्धलेखन = वाचनांतील ५ ओळी बालबोध व मोडी, जोडाक्षरी २० शब्द लिहितां व वाचतां येणें.

अक्षर = रानडे कित्ता नं. ४ या नमुन्याचें मोडी अक्षर व बालबोध मोठें अक्षर.

सदर ४ थें, इतिहास भूगोल १०० मार्क

इतिहास = बाल भारतांतील गोष्टी.

भूगोल — × गोमांतकचा भूगोल व मुंबई इलाख्याची सामान्य माहिती.

इयत्ता २ री.

कविता — आधुनिक कवींच्या निवडक ५० ओळी.

शुद्धलेखन — ४ ओळी बालबोध व मोडी व १५ जोडाक्षरी शब्द.

अक्षर — एक इंच जाडीच्या आकाराचें मोडी अक्षर.

— इतिहास + भूगोल १०० मार्क

इतिहास = बालरामायणांतील गोष्टी.

भूगोल — गोमांतकची सामान्य माहिती व महालाची विशेष माहिती.

बाकी विषय आहेत तेच.

इयत्ता १ ली व बालवर्ग यांना अभ्यास आहेत तेच परंतु त्या इयत्तांकडून आधुनिक कवींच्या सुंदर चालींच्या व सोप्या कविता पाठ करून घ्याव्या. असो

वर दिल्याप्रमाणें अभ्यासपत्रक असावें असें वाटतें. आतां तें कोणत्या धोरणावरून तयार केलें आहे. ह्या विषयींचें स्पष्टीकरण करणें जरूर आहे त्याशिवाय ह्या अभ्यासक्रमाची उपयुक्तता सर्वांचे ध्यानीं येईल व असें नाहीं. करितां त्याबद्दलचें विवरण पुढील लेखांत करूं.

नाट्यछटा !

(ले:— सरस्वतेंद्र)

रविवार, सोमवार, मंगळवार, बुधवार व आज गुरुवार. इलेक्शनचा निकाल आज तरी दिलाच पाहिजे. ह्याच कठीण प्रसंगाकडे दृष्टी देऊन अध्यक्षांनीं व उपाध्यक्षांनीं दडी मारली. "भिष्म द्रोण, कर्ण निमाले। प्रसंगीं पडला" अशी कायशी कोणत्याशा पोथीमध्यें एक ओवी आहे, तशी स्थिति आज माझी झाली आहे. "अध्यक्ष, उपाध्यक्ष गेले। प्रसंगीं पडलों मीच तो लक्ष्मेंद्र रे॥" तरी एका बाजूनें देव करतो तें कांहीं वाईट नाहीं असें ह्मटलें पाहिजे. कारण एवढ्या मोठ्या मुनिसिपालटीचा तात्पुरता का होईना अध्यक्ष होण्याची आपण होऊन आलेली ही संधि कांहीं कमीची नाहीं ! बरें. आतां काय ! (उघड) काय झालें ? सगळे रिपोर्ट पाहिले ? अरे वा ! काय ? डॉक्टरला १५५८ मतें जास्त ! (स्वगत) मला दो० ××× नें सांगितलें आहे कीं, कांहीं झालें तरी डाक्टरांच्या मताधिक्याचा जाहीरनामा प्रसिद्ध करूं नको ह्मणून. मलाहि तसें करण्याची खुषी नाहींच। तरी पण प्रसंग कठीण आहे ! दोन्ही बाजूंचे वडे वडे लोक आहेत ! असें केलें तरी कठीण ! तसें केलें तरी कठीण ! तूंत मी मृदंग बनलों आहें दोन्हीं बाजूंनीं थपडा खाण्याचा प्रसंग ! नको रे बाबा अध्यक्षस्थान ! "शरण शरण" करून आतांच पोबारा करूं कीं काय ! छे ! तेंहि नाहीं झेपणार ! ही पहा लष्करी तुकडी आली ? (उघड) काय ह्मणतां ? निकाल जाहीर करा। करतों हं करतों. [एका वकिलानें आपल्या हातातली लेखणी ओढलेली पाहून त्याला] छे ! छे ! डॉक्टरचें नांव मी कधींच जाहीर करणार नाहीं ! काय ! अरेच्या न्यायकचेरीच इथें आली कीं काय ! आतां मात्र कठीण प्रसंग ! "कठीण कठीण कठीण बहू" (स्वगत) अरे आतां भिऊन काय उपयोग ? (उघड) कोण रे तो ? मला मोराचें सोंग घेतलेला डोमकावळा ह्मणतोस ! काय ? लांकडी अध्यक्ष ह्मणतोस ! अरे ! बाबा ! "जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे !" (दरदरून सुटलेला घाम पुसून) काय ह्मणतां वकीलसाहेब सभेच्या मेंबरांनीं बहुमतानें डॉक्टरचें नांव जाहीर केलें ? बरं आहे मी कायद्याचें दुसरें पत्रक तर प्रसिद्ध करणारच नाहीं ! कोण तो तिकडे ? काय रे ! यावर सही ? हुं करतों. (इकडे तिकडे पहात व हात भयानें कांकडत असतांना सही करतो.) हुं ! एकदांचा मोकळा ! [मिशांत पुटपुटतो] होय हो ! मी अध्यक्षस्थान स्वीकारून ×× खाल्लें खरें ! पण काय तो प्रसंग ! अरे बाबा आठवण झाली कीं, दरदरून घाम सुटतो ! जन्मांत असला प्रसंग पाहिला नाहीं ! करायला गेलों एक आणि झालें भलतेंच ! तरीपण जीवावरचा प्रसंग गुदरला ! देवा ! नको रे बाबा या मुनिसिपालटीचें अध्यक्षस्थान ! नमो नमः नमो नमः !

बाजारगप्पा

आमची सभा

लेखक— विनोदराव

आजचा हा काल सभा भरविण्याचा असल्यामुळें आह्मीं गावांत सभा भरविण्याचा निश्चय केल[...] पुण्याला एका देशभक्ताला मानपत्र [...]साठीं सभा भरली, मुंबईला मोफत [...] प्रसाराचा विचार करण्यासाठीं सभा [...] असें वर्तमानपत्रांतील चुरचुरीत खमंग [...] वाचून, तसेंच आमच्या गावांतील प्रा[...] सभेचीं तयारी चालविलेली पा[...] आमचा निश्चय अधिक दृढ झाला.

माझा विनोदीपणा, कादंबऱ्यांची मतें, किंवा वेदांततीर्थ शिनुमामाचा टाळा उत्पन्न करणारा वेदांत, हे आम[...]जत तिन्हीं गुण सभेच्या कामाला उपयोगी पडत नव्हते. आणि अ[...] एकाचाहि 'सभा व वक्तृत्व कशाशीं [...]' हेंहि ज्ञान नसल्यानें, संन्याशाच्या [...]जशी शेंडीपासून तयारी करावी लागते [...] आह्माला तयारी करावी लागली.

मी माझ्या खोलींत उभा राहून [...]साध्य होण्यासाठीं 'सन्मान्य अध्यक्ष [...] सद्गृहस्थहो' येथ पासून दीड दीड ता[...] भाषण करूं लागलों ज्या शब्दावर [...] पडतील असें माझ्या अल्पमतीला वाट[...] वाक्य मी मोठ्यानें ह्मणून घर हलवून [...] लागलों. सरतेशेवटीं आमच्या घरच्या [...] व शेजाऱ्यांनीं 'काय कटकट च[...]आहे' असा त्रागा केल्यामुळें, जिथें [...] तपश्चर्येला अडथळे येणार नाहींत, [...] एकांतिक स्मशानाची जागा मुक्रर [...] तिथें दररोज वक्तृत्व पाठ घेऊं लागल[...]

कादंबरीहि माझ्याचप्रमाणें वक्तृत्वाच्या [...]भ्यास करूं लागले. त्यांचें लक्ष उच्च[...] आरोह अवरोहापेक्षां अभिनयाकडे [...] असे. भाषणांतील वीर, करुण, ह[...] प्रसंगांचे वेळीं कशा रीतीचा अभि[...]न्यास लोकांच्या मनावर विशेष [...] होईल याचा नीट विचार करून ते अ[...] सहित भाषण करूं लागले.

शिनुमामाचा अभ्यास मात्र आम[...] निराळ्या तऱ्हेचा होता. त्यानें टाम [...] होते कीं, 'वेळप्रसंगीं सुचतील ते [...] आणि तोंडांत येईल ते शब्द' बोलून [...] विद्वत्तेनें श्रोतृमंडळीवर परिणाम होत [...] गडबडींत एखादेवेळीं विचारहि चुकत [...]नात. ह्मणून ठरलेल्या विषयावर भाष[...]हून आणून सभेंत वाचणें बरें, ह्मणून [...] पण सुसंगत रीतीनें तयार करण्यास [...]

मला तारुण्यांत आणि जिवंतपणीं [...] देवासारखें स्मशानप्रिय झालेलें पाहून [...] उपासे सोडूं लागले, कादंबरे दिवसभ[...] त्यानें ओरडून हातवारे करीत असलेल[...]

excesso que obrigam os profes- | tão publicados no Bol. Of ...

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do primeiro oficio, Pedcar, vão á praça para venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige á estação de Sanverdem no dia 12 do proximo mez de Janeiro ás 10 horas pelo maior lanço que se oferecer os seguintes predios: Quarta parte do predio rustico denominado "Amaneusabag." da cultura de coqueiros, sito em Quindolem de Canacona, consistente em 2 adições avaliada por 250 rupias; Quarta parte do predio rustico da varzea denominada "Vanganatorlobago", da cultura de arroz, sito em Nagorcem, avaliado por 200 rupias; Quarta parte do predio rustico denominado "Pimplibaga", da cultura de coqueiros, sito em Quindolem de Canacona, avaliada por 100 rupias: Sexta parte do predio rustico da varzea denominada "Dulialem" da cultura de arroz, sito em Anvem de Gaundongrem, avaliada por 100 rupias: Sexta parte do predio rustico da varzia denominado "Peda", da cultura de arroz, sito na dita, avaliada por 100 rupias e Sexta parte do predio rustico denominado "Beroda" da cultura de arroz sito em Anvem de Gaundongrem, avaliada por 100 rupias, discritos respectivamente na conservatoria desta comarca sob os n.os 16736, 16748, 16749, 16750, 16751 e 16752 e penhora dos nos autos de execução por custas que Francisco Fernandes de Nagorcem como subrogarorio do Ministerio Publico move a Bicú Manjú Naique e outros de Quindolem por apenso aos de inventario orfanologico procedido por obito de Manjú Gebú Naique de Anvem. O arrematante pagará a contribuição de registo por inteiro e as despesas da praça alêm do preço da mesma dentro de 3 dias. Por este são citados quaisquer credores incertos e coproprietarios. E para ser publico se expediu este. Xeldem 28 de Novembro de 1925.

O escrivão de Direito
Babú V. Cumotim Redcar

Verifiquei
O Juiz de Direito
R. Colaço

excesso que *obrigam* os profes- | tão publicados no Bol. Of co-

ANO 10°, ...
QUINTA-FEIRA 31 DE DEZE...
ASSINATUR...
Por cada ano tres ...
ANUNCIOS
Por cada linha ainda que rep...
Numero avulso ...
DIRECT...
G. ...
...M-GO...

O MAGNO COM...

Foi bastante concor... Comicio do *Eden Cine*... Pangim, concorrencia q... tifica plenamente o s... produzido pela intempest... tualização dos preços de... de arroz.

Vezes sem conta tem... e repetido neste mesmo ... que o *Bharat* coloca ant... mais e primeiro que tudo ... triotismo que traz inata ... de sacrificio pelo bem es... Pais que extremecemo... todas as veras da nossa... E, porisso, se nos conv... mos de que não há salva... Pais sem sacrificios, o *B*... será o primeiro a pôr se ... do das medidas que os ... minem, sem mesmo se d... trabalho de as discutir.

¿Não há compressões ... proporcionem economias ... rario público da colonia?

¿Não existem extincçõ... organismos inuteis que o ... carregam ?

¿Exgotaram-se tod... meios suasorios do equi... economico da India que ... certo tempo para cá vem ... gando sem bufar?

Demonstrem-no-lo na ... tesa de que, uma vez conv... dos da veracidade evide... insofismavel de que não há ... pressões de que se lançar ... extincções que se fazer e ... suasorios que se empregar ... molde a que tudo isso m... duma vez para sempre, o ... roso *deficit* que nos assobe... então e só então, é que ac... panharemos o Governo, de ... po e alma, na sua justa e ... triotica exigencia de sacrific...

ECOS E CRITICA

SOCEGUE, AMIGO!

Pergunta-nos alguem que não deixa passar sem protesto nenhuma *anomalia*, porque é que nem todos os anuncios e editais da Camara Municipal de Quepem se publicam no *Bharat* que é jornal da sua séde.

Sabemos lá, porque o nosso Municipio quere fazer segredos dos seus anuncios e editais ao Povo deste concelho onde circula mais o *Bharat* do que o *Boletim Oficial*?

O que, porém, podemos garantir ao nosso *perguntante* que breve terá ocasião, como nós tambem, de encontrar resposta á sua pergunta no inquerito que será aberto á gerencia daquela edilidade que tem brilhado apenas pela cobrança de impostos e negação dos beneficios...supostos.

Socegue, pois, amigo, que cedo será satisfeita a sua curiosidade e...nossa tambem!

EM SANGUEM

Apraz-nos registar que o sr. Tenente Baptista da Silva, inteligente e activo presidente da Comissão Municipal de Sanguem, durante o pouco tempo que esteve á testa desta corporação, introduziu varios melhoramentos na séde daquele concelho, atestando exuberantemente o seu incontestavel valor e nunca desmentido amor ao trabalho.

A simpatia que o sr. Silva conquistou, crêmos, deve-se ao facto do ilustre oficial ter-se conservado completamente alheio ás maquinações da politiquice local, ao contrarlo do seu antecessor sr. Alferes Vilar que, contra a expectativa, fez da presidencia da Comissão Municipal uma poderosa arma para pôr em conflagração o inteiro concelho de Sanguem.

Bem haja, pois, o sr. Tenente Baptista da Silva pela sua meritoria obra municipal!

MAIS UMA FONTE...

Os nossos advogados provisionarios formados até na universidade de Quepem desempenham perfeitamente as funcções dos bachareis em direito, nos seus impedimentos ou falecimentos, o que, natural e logicamente, indica, que a administração da justiça não sofre nada com a falta dos formados nas universidades portuguesas de Portugal.

Aqui, nesta comarca de Quepem, por exemplo, um advogado, formado, apenas, com um segundo grau mal mastigado de instrução primaria, desempenhou por mais dum ano e meio e *a contento de todos* as elevadas funcções do digno Agente do Ministerio Publico e do Doutor Curador dos Orfãos. Dissemos *a contento de todos* porque os seus superiores nao encontraram no referido advogado coisa alguma que lhe desabonasse a competencia, o zelo e a inteligencia.

Ora, se a justiça passa bem de sua preciosa saude, quando, exercida, ainda, pelos advogados que custam menos que os bachareis, ¿não seria bem avisado nesses tempos em que o erario públíco se debate numa crise assustadora confiar se a distribuição da justiça aos mesmos advogados, *mais em conta*?

Aí tem os governantes mais uma fonte cuja agua pode mitigar algum tanto a sêde do *pavoroso deficit*, antes da actualisação dos preços de côco e de arroz

VENHAM, POIS!

O Estado da India Portuguesa, como prolongamento de Portugal republicano, tem de ser neutro na materia religiosa. A coerencia e o prestigio das instituições que nos regem exigem, pois, que a India não continue a dispensar, como até aqui, ao catolicismo do Pais, qualquer protecção.

E ninguem diga que essa exigencia é intempestiva e despropositada no momento em que a India, vergado ao peso de inúmeros encargos, está prestes a sumir-se no abismo duma irremediavel bancarrota.

Venham, pois, medidas urgentes que separem do Estado indiano a Igreja catolica, antes da actualisação dos preços de coco e de arroz!

RECORDANDO...

Na série dos artigos *Para Sua Excia. lêr*, o *Bharat*, logo após a chegada do sr. Mariano Martins, apresentou uma serie de medidas, tendentes á determinação do equilibrio financeiro da Colonia.

¿Estudou se, discutiu-se e analisou-se a viabilidade ou inviabilidade de tais alvitres?

Se não, convem faze-lo antes de se pôr em vigor, mesmo depois de modificada, a portaria da actualisação dos preços de cóco e de arroz.

Acabamos, primeiro, com ex crescencias *mórbidas* e doentias e sacrifique-no-nos, depois se necessario fôr, a bem do equilibrio financeiro da India.

UM AVISO

Os que quiserem ser cidadãos é bom que se apressem a inscrever se nos recenceamentos eleitorais das suas respectivas municipalidades.

Para o *Bharat*, o cidadão é só quem pode votar. Quem não tem direito de votar nas condições exigidas pela lei é uma existencia morta, politicamente falando.

Façam se, pois, cidadãos, *habilitando se* a votar, que a empresa não custa nada, a não ser uma pequena parcela de paciencia, aliada a uma outra de tempo, isto é, nem milessima parte do que gastamos em meter o nosso nariz nos negocios onde se não faz precisa a nossa *sabedoria*.

Inscrevam-se, pois, nos recenceamentos eleitorais, que, creiam, não será baldado o trabalho.

Pelo menos, na ocasião das eleições, serão muito procurados, muito bem tratados e alguns até—*comprados*...

रणी देखील आजच्या भावानें झाली पाहिजे. मजुरीचीच बाब घेतली तरी केपें व सांगें कोंसेल्याचाच विचार केल्यास हा भाव दुप्पटीनें वाढला आहे अशीं कांहीं ठिकाणें मिळतात तर तिप्पटीनें वाढलेल्या गांवांचा नंबरहि कांहीं कमी नाहीं. इतकेंच नव्हे कांहीं कांही भागांत कामकऱ्यांचा अगदींच तुटवडा असल्यामुळें, बाहेरून मक्त्यानें काम करणाऱ्या मजुरांवर भिस्त ठेवावी लागते इतकीहि वाढली आहे. वाहतुकीच्या साधनांच्या अभावीं सांगें कोंसेल्यांतच दोन ठिकाणांतील भावांत अगोदरच ८ – १० रुपयांचा फेर असतो तो निराळाच. नारळीच्या लहान झाडांच्या जोपासनेकडे वळल्यास, ज्या ठिकाणीं आधीं शिपणें शेंकडा ६। रुपयानीं होई तेथेंच तें शेंकडा १८॥। रुपयांनीं दिलें असतां देखील माणसें मिळत नाहींत. तीच स्थिति त्यांच्या पिकऱ्यांविषयीं देखील झाली आहे. बरें भात शेतीकडे पाहिलें तरी दुसरा प्रकार दिसून येतो असेंहि नाहीं. तींत देखील हीच परिस्थिति आहे.

उत्पन्नाची तूट:– खर्चाच्या वाढीच्या प्रश्नाप्रमाणेंच या आकारणींत उत्पन्नाच्या बाजूनेंहि बरीच तूट आलेली आहे. नारळाच्या आयातीवर इंग्लिश सरकारानें बसविलेला शेंकडा ८ टक्के जकातीचा प्रश्नहि जमेस धरिला नाहीं व तसा तो या करवाढींत जमेस धरतांहि येत नाहीं. कारण ही जकात देऊन जो भाव आमच्या व्यापाऱ्यांनां मिळतो त्याच्यावरच ही वाढ होणार आहे. तेव्हां तो नुकसानीं जमेस धरली नाहीं तरी मुळीं उत्पन्नांतच तुटवडा आला आहे. हें सरकारी तज्ज्ञानीं देखील आपल्या रिपोर्टांतून कबूल केलें आहे. मि. पेद्रु कुंय आफोंस यांनीं आपल्या नारळीच्या रिपोर्टांतच ही तूट कित्येक ठिकाणी शेंकडा पन्नासावर गेल्याचें दाखविलें आहे. तेव्हां या बाबीचाहि अवश्य विचार झाला पाहिजे दुसराहि एक पुरावा या तूटीच्या आकारणीस लावून पाहतां येणें सरकारला शक्य आहे. साधनाच्या अभावीं आज तो आह्माला पाहणें शक्य झालें नाहीं ह्मणून आह्मीं केवळ त्याची दिशाच दाखवित आहों. नारळाच्या निर्गतीचे जे सरकारी आंकडे जकातखात्याकडून दरसाल प्रसिद्ध होतात त्यांकडेच पाहिलें ह्मणजे ही तूट स्पष्ट दिसून येईल. सरकारी तज्ज्ञानीं याच दिशेनें विचार केला होता. या उत्पन्नांतील तूटीच्या आकारणीचा प्रश्नहि अगदीं सोपा आहे गोव्यांत सरासरीच्या मानानें जी शेंकडेवारी कायम ठरेल तिच्याप्रमाणें प्रत्येक बागाइतांत काट मारला ह्मणजे झालें. उदाहरणार्थ ही शेंकडेवारी जर ४० अशी ठरली तर २५००. नारळांचें मुळचें उत्पन्न आज १५०० नारळ ठरेल व आकारणी कमीशनहि नेमण्याची भानगड शिल्लक राहणार नाहीं.

संघटणाकारांस सविनय विनंति

साधारण व्यवहारांत माझें व तुझें किंवा आमचें व तुमचें अशी मनप्रवृत्ति असल्यास मोठेंसें आश्चर्य नाहीं. पण समष्टि-स्वरूपाच्या कार्यांतहि ही भावना जागृत ठेवणें अहिताचें आहे हें विसरतां कामा नये. पण, अशी स्थिति आमच्याकडील सामुदायिक ह्मणून संबोधिल्या जाणाऱ्या चळवळींत हरहंमेश दृग्गोचर होते हें दुर्दैव होय. मनुष्य एकदां दुरभिमानास बळी पडला ह्मणजे त्याची सारासार विचारबुद्धि नष्ट पावून, आपण काय करतों याचें त्याला मुळींच भान राहत नाहीं. आपल्या दुराग्रहापुढें परहिताची त्याला मुळींच किंमत वाटत नसते. अशा स्थितींत, असा मनुष्य देशहिताच्या नांवाखालीं सार्वजनिक कार्यांत जेव्हां लुडबुडूं इच्छितो, तेव्हां समाजांत बरीच अस्वस्थता पसरते यांत मुळींच संदेह नाहीं. सार्वजनिक कार्यांत भाग घेणाऱ्या मनुष्यानें पक्कें समजून राहिलें पाहिजे कीं, स्वतःच्या मतास दुसऱ्यानें मान द्यावा अशी जशी त्याची इच्छा असते, तद्वत् आपलेंहि मत इतरांकडून आदरिलें जावें असें लोकांनाहि पण वाटतें. माझें मत तेवढें चांगलें, माझ्या मतास अनुसरल्यास फायदा होईल, एतदर्थ लोकांनीं माझ्याच मतास उचलून धरावें असा हट्टाहास पुढारी ह्मणून घेणाऱ्या लोकांनीं मुळींच धरतां कामा नये. परमतसहिष्णुता हा गुण पुढाऱ्यांच्या अंगांत अवश्येंकरून वसला पाहिजे. परमताविषयीं आदर दाखविणें यांतच पुढाऱ्यांचें सौजन्य असतें. जिवंत देशांत मतवैचित्र्य हें असणारच. व त्या अनुरोधानें देशांतील चळवळी हांकरल्या जातीलच. पुढाऱ्यांनीं या चळवळींकडे सहानुभूतिपूर्वक पाहून, आपापला मार्ग आक्रमणें देशहिताचें होईल. महात्मा गांधींनीं स्वराज्यपार्टीस जो पाठिंबा दिला तो याच तत्वावर होय. देशाचा जिवंतपणा मतवैचित्र्यावर अवलंबून असतो हें जितकें खरें आहे, तितकेंच मतभिन्नतेचें पर्यवसान विकारवशतेंत झाल्यास, देशाला अवकळा प्राप्त होते, हेंहि पण खरें आहे. विविध मतांचे प्रवाह देशांत सतत वाहात असल्यानें विचारविनिमय होऊन, राष्ट्रकार्यास बरीच मदत होत असते, हें सिद्धच आहे. मात्र या मत विविधतेच्या मुळाशीं एक गोष्ट प्रामुख्यानें असली पाहिजे. ती गोष्ट ह्मणजे प्रामाणिकपणा ही होय. मतांत निर्विकारीपणा राखणें हें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें अत्यावश्यक आहे. परमताविषयीं आदर बाळगून, तदनुसार कार्य करण्यास पूर्ण मोकळीक देण्यांतच राष्ट्रकल्याण साधत असतें. आपल्या मताची छाप घालून, जनता स्वमतानुवर्ती करावयाचें झाल्यास प्रामाणिकपणा आणि सहिष्णुता हे दोन गुण अंगांत पूर्ण बाणूनच केली पाहिजे. जबरी, अधिकार, फसवणूक, लांचलुचपत हे उपाय लोकसंघटणाच्या कामीं टिकाऊ नव्हत. अशा उपायांनीं केलेली संघटणा स्थिर नसून, लोकहिताच्या दृष्टीनें नपुंसकच राहील.

वरील विचार देशांत सध्या चालू असलेल्या घरफोडीच्या चळवळीकडे पाहून सुचले. आमच्या देशाची आजची शोचनीय स्थिति पाहिली असतां अंतःकरण कळवळून आल्याशिवाय राहत नाहीं. ती सुधारणें आमचें कर्तव्य होतें; परंतु या दिशेनें खऱ्या कळकळीनें अजूनपर्यंत मुळींच प्रयत्न झालेले नाहींत. उलट, नाना तऱ्हेच्या कारवाईनें ती अधिकाधिक बिकट होण्याचे प्रयत्न मात्र अव्याहत होत असलेले पाहून, आमच्या देशाच्या दुर्दैवी भवितव्यतेच्या विचारानें मन बरेंच उदास होत असतें. आमचा समाज नानातऱ्हेच्या दुर्व्यसनांनीं, भलत्याच चालीरीतींनीं, नवीन नवीन करांच्या दडपणांनी पीडित झाला असतां, आमच्या करत्या सवरत्या मंडळीनें विकारवशतेस बळी पडून, आपलें शक्तिसर्वस्व एकमेकांच्या नाकांवर मिरच्या वांटण्यांत खर्चित राहावें हा आत्मघातकीपणा नव्हे काय ?

देशाची राजकीय, सामाजिक, औद्योगिक उन्नति लोकांच्या सहकारितेवर अवलंबून असते हें स्वयंसिद्धच आहे. कोणतेंहि काम हातीं घेऊन, तें यशस्वी करण्याचें झाल्यास, चार चौघांच्या मदतीखेरीज केव्हांहि होणार नाहीं. या परस्पर सहकारितेसच 'संघ' असें ह्मणतात. नव्या जगाला संघाचें महत्व ज्ञात आहेच. पूर्वींच्या कालीं लोकांत संघसामर्थ्याविषयीं जरी अज्ञान वसत होतें, तरी नव्या मनूंत संघ हा शब्द पूर्ण परिचयाचा झाला आहे. लोकांच्या मागण्या, गाऱ्हाणीं, तक्रारी वगैरे, अधिकाऱ्यांपर्यंत पोंचवून योग्य न्याय मिळविण्याच्या कामीं, संघ ही अमोघ शक्ति बनली आहे. हें संघ सामर्थ्य लक्ष्यांत घेऊन सर्व सुधारलेल्या देशांत, व्यापारी संघ, राजकीयसंघ औद्योगिकसंघ असे विविध स्वरूपाचे संघ स्थापन झालेले आहेत, व होतहि आहेत. ब्रिटिश हिंदुस्थानांतील चळवळ मुळें ह्मणा, कींवा उत्क्रांति तत्वाच्या नियमाप्रमाणें ह्मणा, आमच्या गोमंतकांतहि थोडीशी जागृति झाली आहे हें नाकबूल करतां येत नाहीं. अशा समयीं या जागृतीस योग्य वळण देऊन, ती इष्ट दिशेकडे नेण्याकरितां लायक पुढाऱ्यांची जरूरी होती. परंतु आमच्या दैवदुर्विपाकामुळें, अशा पुढाऱ्यांची आमच्यांत वाण आहे. त्यामुळें, ही जागृति सुपरिणामकारक न होतां तिच्या कुपरिणामाचीं बहुतेक फळें चाखण्याचें मात्र आमच्या कपनशिबामुळें प्राप्त झालें. याचें प्रत्यक्ष प्रमाण पाहिजे असल्यास, सध्याच्या घरफोडीच्या चळवळीकडे पाहिलें असतां दिसून येईल. लोककल्याणाच्या नांवाखालीं आमच्यापैकीं कांहीं मंडळींनीं, जी विघातक स्वरूपाची चळवळ आरंभिली आहे, तीकडे लक्ष दिल्यास यांची लोककल्याणाची कल्पना बरीच विचित्र दिसते. संघटनाकारांनो, संघ स्थापून खासगी द्वेष साधण्याचे दिवस आतां राहिले नाहींत. आपल्याच लोकांशीं झुंजण्यास संघ स्थापावयाचे नसतात. तर योग्य न्याय देण्यास अधिकाऱ्यांस भाग पाडणें याच सुहेतूनें संघ निर्माण झाले आहेत. आधींच भाऊबंदकीनें फूट झालेल्या समाजाची बुद्धिभेदाच्या राजकारणानें अधिक फांकाफांक करणें हें उचित नव्हे. आपल्या देशाची सध्याची स्थिति काय आहे, आपणास कोणाकोणावर टक्कर द्यावयाची आहे, कोणाशीं स्पर्धा करावयाची आहे, तरुणाचीं मनें कशीं बनलीं पाहिजेत, त्यानां कोणत्या गोष्टींचें ज्ञान असणें अवश्य आहे, इत्यादि गोष्टी विचारांत घेऊनच संघ स्थापिले पाहिजेत, आणि अशा तऱ्हेचें संघाचें धोरण बनविण्याचें झाल्यास आधीं आमचा एकलकोंडेपणा सोडून देऊन, चारचौघांत मिसळणें, विचार-विनिमय करणें, आपले विचार दुसऱ्यांना समजावून देणें अगत्याचें आहे. नुसतें दुसऱ्यानां शिव्या हांसडण्यापासून कांहीं एक फायदा नाहीं. तुमचा व इतरांचा मतभेद असेल तर एकदम सवतासुभा स्थापन न करतां, सर्वजण एकत्र जमा व देशाच्या हिताकडे लक्ष देऊन, थोडें फार देवाण घेवाण करून एक जूट करा. सवतासुभा प्रथम कितीहि गोड वाटला तरी शेवटीं तो हानिकारक झाल्याशिवाय रहाणार नाहीं, अशी संघटणाकारांस सविनय विनंति आहे.

वैकुंठ रा. प्रियोळकर

—महाल काणकोणपैकीं पाटणें (गोवा) येथें सरस्वती मंदिरांत ता. १३-१२-२१ रोजीं श्री. नारायण लक्ष्मण नाईकदेसाई यांचे अध्यक्षतेखालीं सभा होऊन विद्याप्रसारक संस्थेच्या विद्यमानें पांच मराठी शाळा स्थापन करण्यात येऊन त्या ता. १४ पासून सुरू करण्यांत आल्या असें श्री. शिवराम देसाई स. विद्य प्रसारक संस्था हे वळगांवच्या राष्ट्रमताला कळवितात.

— हिंदु महासभेचे सभासद होण्याची सरकारी नोकरानां मद्रास सरकारनें बंदी केली आहे. पहा हें इंग्रज लोकांचें शहाणपण !

—मुंबईच्या हिंदु सभेनें अहमदाबाद जिल्ह्यांतील चखळा गावांतील शंभर इसमांना हिंदुधर्मांत परत घेतलें.

— बंगाल आर्डिनन्सखालीं अटकेंत ठेवलेल्या ११० लोकांना बादशहांनीं दया दाखवून मुक्त करावें अशी कॉमन्स सभेपुढें सूचना येणार आहे.

—गेल्या २२ तारखेस इराणच्या असेंब्लीची बैठक होऊन इराणच्या गादीवर रेझाखान यांचीच सर्वानुमतें निवड करण्यांत आली. ही गादी वंशपरंपरा त्यांच्याच घराण्याकडे चालावयाची आहे.

O BHARAT

URGE ACABAR

O jornal—*A Provincia* inseriu na sua edição de 28 de Dezembro findo a seguinte local com a epigrafe de — *Os interinos*:

"A *interinidade* é um expediente muito em voga nas repartições indianas. E' como que uma porta falsa para a entrada nos quadros sem as formalidades dos concursos práticos ou documentais

Porque não se impõe a obrigação do provimento legal das vagas em praso determinado, evitando contrariar se a lei que procura dar preferencia aos individuos mais hábeis?

Esta pergunta vem a proposito de uma que carta devido aos termos em que está redigida não publicamos e em que se extranha que há 6 anos estejam sendo desempenhados interinamente os lugares de director das farmacias do Hospital Central de Diu.

Mas há mais noutras repartições."

A *Terra* transcreve a mesma local mas não a comenta. Nós o fazemos, porem, e em poucas palavras.

A *interinidade* é o mais comodo expediente de *legalisar nomeações ilegais*. A *interinidade* é, por assim dizer, um véu que cobre muitas vezes autenticas incompetencias. A *interinidade* constitui, finalmente, uma forte barreira que esmorece o mérito e desanima o trabalho.

¿Que mais é preciso para que o *Bharat* que acaricia a lei, defende a competencia e elogia o mérito e trabalho, a fulmine *in limine*?

Urge, pois, acabar com a interinidade que distôa da legalidade e moralidade do governo que nos rege.

ECOS E CRITICA

RASGADO DE MAIS

A *Provincia*, referindo-se ao nosso eco *Explicando*, diz aceitar que a critica do *Bharat* girou em volta da moralidade da proposta para sub-delegado de Mormugão visando apenas a competencia do nomeado.

Ainda bem que a *Provincia* nos faz a justiça devida. Mas a *Provincia* não para aí. Pede ao *Bharat* para *emendar o erro* em vista do *rasgado elogio* que a *Terra* tece ao nomeado.

E' natural que, nesta altura, o leitor queira conhecer a opinião da *Terra*—Aí vai ela.

"Pelo menos, no caso presente, a nomeação recaiu num rapaz honesto, com tradições honestissimas da familia."

¿Que vê o leitor?! A *Terra* sincera e verdadeira como sempre não podia dizer mais do que disse *que o nomeado* pelo menos *é rapaz honesto*. E para que qualquer leitor, mais superficial, não confundisse a nuvem com Juno, acrescentou:

"O que constatamos não quere traduzir o nosso assentimento ás normas administrativas em voga. O que agora se acabou de fazer, está na lógica do que se veiu fazendo, e, se prosseguir, é mais um elo a ligar o presente ao passado."

Não ha duvida que como elogio é *rasgado de mais*.

O MODO DE VIDA

Passou no dia 25 de Dezembro a festa do Natal,—e passou cremos, sem que alguem desse por ela, a regular pela calma pacatês que nesse dia reinou no pais, entre o elemento cristão.

Que a provincia não tivesse a festa explica se pelo nivel da pobresa a que chegaram os seus habitantes devido á carestia agravada pelo falso occidentalismo nos habitos. Mas as cidades, onde residem os que ganham centenas e milhares de rupias, tambem apresentaram-se mortas no dia 25. Porque seria?

Quando se trata de fixar o vencimento, os nossos conspicuos não cessam de clamar que o *modo de vida* dos que fizeram os seus cursos na Metropole dos que aí residiram por mais de 5 anos, exige gastos que nós outros, os *canecos*, mal podemos calcular. Natal é festa importada da Metropole, festa em que o portuguez de Portugal expande-se ruidosamente sem olhar pelos gastos.

Mesmo aqui, nos tempos em que se ganhava pouco, os portuguezes, sejam da India sejam de Portugal, todos tinham a sua festa, como agora a tiveram pouquissimos. Hoje com os ordenados a atingirem as estrelas, é o que se viu—Pelos modos já se faz preciso manda-los de novo para Portugal afim de readquirirem o tal *modo de vida* que parece terem perdido.

REFLEXOES

Todas as vezes que o total ou uma parte da população de um pais apresenta sensiveis mostras de sua fretice levada ao extremo, cumpre ao Estado intervir. Isto é sciencia. O habito de poupança como o de luxo, quando ultrapassa os limites ameaçando perturbar a vida economica do paiz, o remedio não deve tardar e convem que seja drastico — Isto é do senso comum. Oferecemos estas considerações para o sr Mariano Martins reflectir nelas, por serem as mesmas muito oportunas.

FESTIM DO BALTAZAR

A Moção votada por unanimidade na reunião dos proprietarios realizada em Nova-Gôa, agradou-nos imenso pela forma sensata e constitucional como está redigida. Agradou-nos tambem a formula da elevação da predial, por percentagem, que aí foi votada como medida provisoria.

O sacrificio a que o contribuinte voluntariamente se oferece a sujeitar é deveras significativo. O que ele revela? A boa vontade com que o pais está de cooperar na governação do sr. Mariano Martins. Crêmos que ao sr. dr. J. de Morais não davamos um ceitil da boa vontade.

Agora cabe ao sr. Mariano Martins cumprir o seu dever acabando com o Festim de Baltazar que é o nosso orçamento, tal como está.

PARA LAMENTAR ...

Como entramos em Janeiro, é possivel que já estejam na Imprensa Nacional os projectos do Orçamento para o ano economico de 1926-1927.

Temos a certeza que este ano, ao contrario do que sempre se veiu fazendo por estes ultimos tempos pelo menos, o Governo ha de mandar distribuir copias do projecto pelos jornais do país. Tem isto, como é obvio, uma grande vantagem a quem, como o sr. Mariano Martins, pretende governar de acordo com a vontade do povo.

Quanto a nós, pouco teremos talvez que dizer, alem das indicações feitas ha tempo nos artigos *Para S. Excia. lêr*. Em todo o caso queremos um exemplar ao menos para, em face dos numeros, podermos lamentar a miseria que os professores do Liceu Central, os magistrados e os altos funcionarios sofrem, coitados, neste rincão do Malabar.

DEFENDER-SE OU...

O outro dia, no tribunal de Mapuçá, o sr. dr. Rau, antes de começar a sua oração de acusação num julgamento importante, referiu-se a um caso de *chantage*, havido naquela vila, caso em que o nome do sr. dr. Rau andou envolvido.

O sr. dr Rau, lamentando o facto, declarou que a sua honra de magistrado estava ao abrigo de toda a suspeição e que repelia com veemencia qual-

भारत

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, पौष व० ८ मी शके १८४७

मागें पहा !

सरकारनें जमिनीच्या उत्पन्नावरील कर वाढविण्यासाठीं येथील मुख्य अशीं नारळ व भात, या उत्पन्नाचे दर सद्य स्थितीस धरून आकारण्याचें फर्मान काढल्यापासून आधींच अनेक करानीं मेटाकुटीस आलेल्या जमिनदार वर्गाच्या पोटांत, सन १९२६ पासूनच्या उत्पन्नावरील कर मध्यापेक्षां दुपटी तिपटीनें द्यावे लागणार म्हणून धडकी भरली आहे. नारळ व भात यांचे दर बाजारांत पूर्वीहून बरेच वाढले आहेत हें खरें असलें तरी ते वाढण्याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे नारळ व भात यांचें उत्पन्न सध्या बरेंच कमी येऊं लागलें आहे हें होय. केवळ वाढलेल्या धारणेवर नजर ठेऊन कराची आकारणी करूं पाहणाऱ्या सरकारनें मजुरांचा तुटवडा, मजुरीची महागाई, पाऊस पाण्याची कमतरता वगैरे अनेक कारणांनीं नारळाच्या व भाताच्या उत्पन्नाचें मान किती प्रमाणावर कमी झालें आहे हें लक्षांत घ्यावयास पाहिजे होतें. बोक्याची नजर उंदरावर असते त्याचप्रमाणें सरकारची नजर जमिनीवरील कर येनकेन प्रकारेण वाढविण्यावर असते व आहे हें आतांप्रमाणें पूर्वींहि अनेक वेळां प्रत्ययास येऊन चुकलें होतें. नां. कोसैर द कोस्त या पहिल्या रेपुब्लिकान गव्हर्नराच्या सत्तीनें लोकप्रिय झालेल्या राजवटींत असल्याच तऱ्हेचा प्रयत्न झाला होता. त्यावेळीं मडगांव येथें भरलेल्या जमिनदारांच्या जाहीर सभेंत त्या गोष्टीचा निषेध होऊन गव्हर्नरसाहेबांशीं सामोपचाराचीं बोलणीं करण्याकरितां एका शिष्ट मंडळाची निवड झाली होती. शिष्ट मंडळानें सरकारच्या नजरेस योग्य तक्रारी आणल्या तेव्हां जमिनधारा पद्धतींत बदल करण्याकरितां नवा कायदा तयार करण्यासाठीं जमिनदार, पत्रकार, वकील व सरकारी अधिकारी यांची एक वडी कमिटी सरकारनें सन १९१३ सालीं सरकारी मुख्य वकिलाचे (प्रोकुरादोर दा रेपुब्लिक) अध्यक्षतेखालीं नेमिली होती.

तिचें काम पुरें होऊन नव्या कायद्याचा मसुदा सरकारांत प्रविष्ट झाला व तो अभिप्रायासाठीं जमाबंदी खात्याचे मुख्याधिकाऱ्याकडे गेला होता तो तेथेंच पडून राहिला. पुढें आवतोनोमीच्या प्रथम कारांत कायदेकौंसिलचे बैठकींत त्या कमिटीचे सभासद असलेले सि. मिनेझीस ब्रागांस, यांनीं त्या मसुद्यासंबंधीं चवकशी करून तो चर्चेकरितां कायदेकौंसिलपुढें यावा अशी मागणी केली. तेव्हां तो पुढें येऊन त्याची चर्चा चालू झाली होती. पुढें त्याचें काय झालें हें कोणास समजलें नाहीं व तो कायदा तयार होऊन अमलांत आल्याशिवाय जमिनीवरील उत्पन्नाच्या करांत बदल होणें सरकारी फर्मानानेंच अशक्य ठरलेलें असल्यामुळें जमिनदार वर्गानेंहि आपण होऊन त्याची विचारपूस केली नाहीं. मागील आठवणी उकरून काढण्याचा प्रसंग सरकारनेंच बेकायदेशीर रीतीनें करांत वाढ करून आणला आहे. आपण नेमिलेल्या कमिटीनें नवा कायदा तयार करून तो सरकारी रीतीनें पास होऊन अमलांत आल्याशिवाय जमिनीवरील उत्पन्नाच्या करांचें मान सध्याप्रमाणेंच चालू राहावें असें येथील सरकारनें काढलेलें फर्मान, वसाहत मंत्र्यानींहि त्यास संमति दिल्यामुळें, कायद्याच्या दृष्टीनें वज्रलेप झालें आहे असें म्हणण्यास कोणती हरकत आहे? असें असतां कायदा व नीति या दुधारी तरवारीचा खणखणाट आपल्या शब्दांनीं पसरविणाऱ्या नां. साहेबानींच, मागील दोघां जबाबदार अधिकाऱ्यांचें कायदेशीर फर्मान, त्यास एक तप होऊन गेल्यानंतर लक्षांत सुद्धां घेऊं नये ही नवलाची गोष्ट नाहीं काय? का उक्तींत दिसलेलीं कायदा व नीति कृतीचा समय येताच पार विरघळून गेलीं? अद्यापहि गव्हर्नरसाहेब लोकांच्या आकांक्षांकडे लक्ष पुरवून उक्ति व कृति यांत कायदेशीर मेळ घालण्याचा समंजसपणा व मनोधैर्य दाखवितील अशीच आम्हांस आशा आहे.

—बाशारेल निकोलाव सोव्राज यांनीं येथील सरकारी वकिलाच्या जागेचा चार्ज घेतला.

—मच्छ विक्री वजनानें केली जावी, असा जो ठिकठिकाणच्या मुनिसिपालटीनी ठराव अमलांत आणला होता, तो सरकारकडून रद्द करण्यांत आला.

—सांगें तालुक्यांतील नायकिणी नावांच्या गावांत गेल्या रविवारीं रात्रीं एक बाई व तिचा एक गुराखी अशा दोघां व्यक्तींचा खून करण्यांत आला! खुनाच्या बुडाशीं चोरीचा हेतु असावा, असा बहुतेकांचा तर्क वहातो.

—मुरगांवचे इस्क्रिवांव-दावेलियांव रा. मंगेश शे. कारापूरकर यांची बदली दमण येथें करण्यात आली आहे.

—सांगें मुनिसिपालिटीच्या अध्यक्षाचे जागीं रा. मर्तू वेणकार यांची निवड झाल्याचें समजतें!

—प्रागतिक संघाची दुसरी परिषद येत्या मार्च महिन्यांत मडगाव येथें भरली जावी, अशा हेतूनें कित्येकाचे प्रयत्न चालू आहेत, असें कळतें.

स्फुट विचार

धारगळची वैश्य परिषद:—गेल्या माहे न्याच्या ता. २८, २९, ३० रोजीं श्री संस्थान धारगळ येथें वैश्य परिषदेचें पहिलें अधिवेशन अत्यंत यशस्वी रीतीनें पार पडलें हें येथें नमूद करण्यास आम्हाला फार समाधान होत आहे. परिषदेचा योग जुळवून आणण्यासाठीं आज अनेक वर्षांपासून खटपटी चालू होत्या; अनेकांनीं अनेक ठिकाणीं अनेक तऱ्हेचे प्रयत्न केले होते, परंतु त्यानां जें यश मिळालें नाहीं, तें छापखानेकरांच्या परिश्रमांस लाभलें, हें गोमांतकास भूषणास्पद होय. परिषदेचे स्वागताध्यक्ष श्री. रवळू शेट खलप व अध्यक्ष श्री. नारायणराव पडते यांचीं भाषणें मननीय झालीं. उभयतांहि वैश्य पुढाऱ्यांनीं आपल्या ज्ञातीचा जुना नवा इतिहास सांगून, सुशिक्षणाशिवाय प्रगतिपथ आक्रमिणें कसें अशक्य आहे, हें सूत्ररूपानें प्रेक्षकांच्या अंतःकरणांत पूर्णपणें बिंबविलें व सुशिक्षणाच्या जोरावर ज्ञातींत जागृति घडवून आणण्याचा कळकळीचा उपदेश केला.

परिषदेचे ठराव:—परिषदेंत अनेक प्रचलित विषयांची चर्चा झाली. परंतु ठरावांशीं ज्यांचा संबंध आला, असे दोनच होते: शिक्षण व आभारप्रदर्शन. शिक्षणाच्या ठरावांत स्त्रीशिक्षण, वसतीगृहांची स्थापना, धंदेशिक्षण इत्यादि गोष्टींचा शांतपणें व आस्थापूर्वक खल करण्यांत आला. व आभारप्रदर्शनाच्या ठरावांत ज्यांचे ज्यांचे प्रयत्न परिषद यशस्वी रीतीनें पार पडण्यास कारणीभूत झाले, त्यांचा त्यांचा अंतर्भाव झाला. एकंदरींत परिषदेच्या दूरदृष्टी कर्णधारानीं धार्मिक गोष्टींसारख्या वादविवादांस वाव देणाऱ्या विषयांस फांटा देऊन, परिषदेचें धोरण शिक्षणाच्या रुळावरून कधींहि घसरूं नये, याबद्दल पूर्ण खबरदारी घेतल्यानें, वैश्यपरिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचें कार्य विशेष घासाघीस न होतां, निर्विघ्नपणें तडीस गेलें, हें परिषद चालकांस अभिमानास्पद होय.

परिषद झाली; पुढें काय?:—परिषद तर यशस्वी रीतीनें पार पडली. पण या मुळें परिषद चालकांचें कर्तव्य संपलें असें मात्र होत नाहीं. उलट परिषदेंत पास झालेल्या ठरावांस अल्प कालावधींत मूर्त स्वरूप कसें येईल, ह्या दिशेनें त्यांचे अव्याहत प्रयत्न चालू असले पाहिजेत. ठरावांच्या तात्त्विक स्वरूपाचें रूपांतर व्यवहारांत कसें करतां येईल, ह्याकडे त्यांचें लक्ष वेधलें पाहिजे. वैश्य समाजांत हरतऱ्हेच्या शिक्षणाची वृद्धि कशी होईल, स्त्री शिक्षणाचा प्रसार कोणत्या साधनांनीं सुलभ रीत्या होईल व कोणकोणते धंदे प्रचारांत आणले असतां वैश्य समाजाचें गतवैभव पुन्हां प्राप्त होईल, इत्यादि प्रश्न सोडविण्याच्या मार्गास लावण्याची परिषदेच्या पुढाऱ्यांवर महत्त्वाची जबाबदारी येऊन पडते. ती ते योग्य रीतीनें पार पाडून वैश्य समाजाची कीर्ति दिगंत पसरवितील व जगांत धन्यता मिळवितील, अशी आम्हांस उमेद आहे. ही उमेद धारगळची श्री शांतादुर्गा देवी पूर्ण करो, अशी आमची प्रार्थना आहे.

जमिनदारांस नवा पायबंद:—पूर, अनावृष्टि, पिकांची रोगराई वगैरे अनेक कारणांनीं एकाद्या जमिनीचें आकारलेलें उत्पन्न कमी येऊं लागलें तर महालाच्या जमाबंदी खात्याकडे तक्रार अर्ज करून आपल्या व सरकारच्या अशा दोघां पंचामार्फत त्या जमिनीची फेरपाहणी करण्याचा हक्क जमिनदाराला आहे. उभय पंचानीं पाहणी करून अभिप्राय दिल्यानंतर त्यावर धाराकमिटीचा (ज्युंत फिस्काल) निकाल पडून उत्पन्न कमी झालें तर उभय पंचांचा खर्च सरकार सोसी व कायम राहिलें तर तो खर्च, तक्रार अर्ज देतानां जमिनदारानें ठेविलेल्या अनामत पैशांतून घेण्यांत येई. नव्या करवाढीवर उत्पन्न कमी येत असल्याची जी विचार करण्यासारखी तक्रार आहे ती कायदेशीर रीतीनें सिद्ध करण्याचा निर्धार वेळ प्रसंगीं जमिनदारांनीं केल्यास सरकार एका नव्या खर्चांत पडून शिवाय पाहणी झाल्यामुळें उत्पन्नावरील करहि कमी येण्याचा संभव आहे. त्यास पायबंद घालण्यासाठीं सरकारनें एक नवा कायदा करण्याचा घाट घालून त्याचे बिलहि गेल्या ता. ११ डिसेंबरच्या सरकारी बुलेतींवर ८७ क्रमांखाली प्रसिद्ध झालें आहे. त्याचा आशय असा:— तक्रार अर्ज देतांच मुख्याधिकाऱ्यानें आपल्या खासगींतील पाहणीदाराकडून पाहणी करून पाहून उत्पन्नाची आकारणी करावी. तिला जमिनदार मान्यता देईल तर त्या पाहणीदारांचा खर्च जमिनदारावर पडेल. मान्यता न देतां जमिनदार स्वतःचा पंच देऊन त्यामार्फत पाहणी करील, उभय पंचाच्या अभिप्रायानंतर धाराकमिटीचा निकाल जमिनदाराच्या म्हणण्याप्रमाणें झाला किंवा न झाला तरी त्याचा सर्व खर्च जमिनदारानें ठेविलेल्या अनामत पैशातूनच घेतला जाईल. या कायद्यानें जमिनदारवर्गाला सरकारनें पेंचात आणण्याचा उपक्रम केला आहे, असेंच वाटतें. आजींव तक्रार अर्जीस अनुसरून पाहणी करावयाची ती उभयतांच्या पंच शिवाय त्रयस्थ अशा सरकार पंचामार्फतीहि करून घ्यावयाची. कायद्यांत अशी उदारपणाची सवलत ठेविली नाहीं, हा एक राजरोस अन्याय चालू होता त्यांत, या लेखं घातलेल्या कायद्यानें उभयपक्षीं खर्चाचा मारा जमिनदारावर करण्यांत आल्यामुळें, नवी भर पडून पूर्वीची आकारणी ज्यास्ती असली तरी तीच निमुटपणें मान्य करण्याचा खेदकारक प्रसंग त्यावर येऊं पाहत आहे. नामदार सभासद नवा मसुदा नापास करून पूर्वीचें अन्यायी कलम बदलून त्रयस्थ पंचामार्फत पाहणी करून घेण्यास सरकारास भाग पाडतील काय?

वस्तुस्थिति दर्शन

[ले० सौमित्र)

× Sociedade de Geografia (भौगोलिक संघ) या संस्थेच्या वाढदिवसानिमित्त, नोव्हेंबर महिन्याचे ९ तारखेस, त्या संस्थेच्या तर्फेनें डॉ. ज्यायमी द मोराईस यांचें एक व्याख्यान झालें. खुद्द लिस्बन शहरांत त्यानां न ओळखणारे पुष्कळ मिळतील. पण गोमांतकांत त्यांची माहिती नसलेला कोणी आढळेल, असें वाटत नाहीं. ह्मणून ते कोण हें सांगण्याचे भरीस पडण्याचें कारण नाहीं. सतत पांच वर्षें ते गोमांतकाचे गव्हर्नर होते, इतकें सांगितलें ह्मणजे त्यांची ओळख करून दिल्यासारखें होईल. व्याख्यानाचा विषय 'अभिनव भारत' अथवा पोर्तुगीजींत सांगावयाचें तर A India Moderna हा होता. एक बहुश्रुत गृहस्थ, आणि शिवाय गव्हर्नर ह्मणून गोमांतकांत सतत पांच वर्षें काढलेलीं व येथील जनतेच्या सुखदु:खाची पर्वा कांहीं काल वाहिलेली, या दोन तीन नात्यानीं त्यानां मुद्दाम आमंत्रण देण्यांत आलें होतें. आणि गोमांतकाच्या एका निस्सीम हितचिंतकाच्या तोंडचे अनुभवपूर्ण शब्द, साधल्यास ऐकावे ह्मणून व्याख्यानाला गोमांतकीय विद्यार्थ्यांची गर्दीहि बरीच लोटली होती. व्याख्यात्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलेले मुख्य मुद्दे तेवढेच येथें देऊं.

× नैतिक दृष्टया पोर्तुगीज लोकांशीं एकजीव अगर समरस झालेली जर आपली कोणती वसाहत असेल तर ती गोमांतकहीच होय. आपल्यांत दिसून येणारा झळझळीत देशाभिमान व आपल्या आंगीं उत्कटत्वानें वसत असलेली श्रद्धा यांना गोमांतक खेरीज करून इतर ठिकाणीं तोड मुळींच मिळणार नाहीं. गोमांतकीय जनता ह्मणजे पौर्वात्य जगांत पोर्तुगीजांच्या आश्चर्यकारक कृत्यांची ती एक धवल पताकाच होय. राष्ट्रें उद्भवतील व राष्ट्रें मरतील. परंतु गोमांतक रक्ताच्या धंत्रागणिक नसला तरी इतर बाबतींत पोर्तुगीज आहे, व सदैव पोर्तुगीजच रहाणार. आज सगळी गोमांतकीय जनता पोर्तुगीजांच्या वळणावर सुधारलेली [civilisado] नसली, तरी पाद्रोआदु [padroado] खात्याच्या सहाय्यानें लवकरच ती एकजिनसी बनेल. पाद्रोआदचें हें कार्य लक्ष्यांत न घेतां त्याचें उच्चाटन करणाऱ्यांचे विरुद्ध मी होतों, याचें झालें तरी कारण तेथील लोकांचें सांस्कृतिक परिवर्तन व्हावें, हेंच होय. माझ्या कारकिर्दींत मी शक्य तितकें पाद्रोआदाला उचलून धरलें होतें. पाद्रोआद नष्ट झाल्यास, पोर्तुगीजांच्या गत इतिहासाचें एक प्रमुख स्मारक नष्ट केल्यासारखें होईल, हें विसरतां कामा नये पाद्रोआदाची याप्रमाणें तरफदारी केल्यावर गोमांतकाच्या सध्य:स्थितीबद्दल व्याख्यात्यांनीं आपले विचार प्रगट केले.

× पौराणिक कालीन सुवर्णमयभारताची गोष्ट सोडून दिली व वर्तमान कालापुरतेंच पाहिलें, तरी पो. हिंदुस्थान आज अत्यंत श्रीमंत, उत्कर्षगामी व उज्वळ भविष्यकालाला अनुरूप असें आहे. गोमांतक गरीब आहे, गोमांतक दु:खी आहे, व आजचीच स्थिति या पुढें अशीच कायम राहिली तर गोमांतकाचा भविष्यकाल दुर्धर होईल, अशी जी कांहीं वर्तमानपत्रें हाकाटी करीत आहेत ती सपशेल निराधार आहे, असें डॉ. साहेबांचें ह्मणणें आहे. ज्या देशांत आयात व निर्गत मिळून ६७९०००० इतक्या पौंडांची घडामोड होते, तो देश गरीब असें कसें ह्मणतां येईल, असा गोमांतक गरीब झाला, असें ह्मणणाऱ्यांस डाक्टरसाहेबांचा उघड सवाल आहे! एकंदर व्यापारी घडामोडीची रक्कमहि व्याख्यात्यांनीं मोठ्या धूर्ततेनें सोन्याच्या नाण्यांतच दाखविली आहे. गोमांतक एवढा श्रीमंत मग त्याच्या श्रीमंतीची व भरभराटीची कल्पना रुप्याच्या रुपयांनीं कींवा इस्कुदानीं करून न देतां ती सोन्याच्याच नाण्यानें करून दिली, यांत वावगें तें काय झालें? पण शंभर आदा व पांचशें रुपये खर्च अशी स्थिति असलेल्या मनुष्यास तो पांच सहाशें रुपयांची घडामोड करितो, ह्मणुन कोणीहि श्रीमंत ह्मणत नाहीं. मग यासारख्याच परिस्थितींत सांपडलेल्या गोमांतकास श्रीमंत ह्मणणें ह्मणजे त्याच्या दारिद्र्याचा व्याजोक्तिपूर्ण भाषेनें उपहास करणें होय, असें कोणीहि ह्मटल्याशिवाय रहाणार नाहीं. प्रत्येक महिन्याला तीन साडेतीन हजार या प्रमाणें पांच वर्षांच्या अवधींत ज्यानें आपणास कांहीं लाख रुपयांचा मलिदा चारला, तो गोमांतक त्यानां तरी एरवीं गरीब कसा दिसावा? बाकी हा दृष्टिदोष एकट्या डॉक्टरसाहेबांतच आहे, असें नाहीं. जित देशाच्या रक्तामांसावर आपली चैन चालविणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्याला हिंदुस्थानासारख्या देशांत सारेंच सोनें दिसतें, असा आजपर्यंतचा अनुभव आहे. ब्रिटिश इंडियेंतील व्हॉइसराय, गव्हर्नर व बड्या अधिकारी घडानां, हिंदुस्थान गरीब असें कोणी ह्मटलें तर अत्यंत आश्चर्य वाटतें व मुंबई व कलकत्ता यां सारख्या शहराकडे बोट दाखवून ते तावडतोब असें सांगतात कीं, कोट्यावधी रुपयांची घडामोड दर दिवशी होते आणि श्रीमंतीचें व ऐश्वर्याचें खुलें प्रदर्शन जेथें तिन्हीं त्रिकाळ सारखें मांडलेलें असतें अशीं शहरें ज्या देशांत आढळतात तो देश दरिद्री कसा?

× गोमांतक श्रीमंत व सुखी आहे, असें सांगून, आपल्या सात जन्माचें दारिद्र्य फिटविणाऱ्या या देशाबद्दल डॉ० मोराइस यांनीं आपली कृतज्ञता व्यक्त केली; हें त्या व्या दृष्टीनें योग्यच झालें. पण प्रत्यक्ष वस्तुस्थिति छपवून व्याख्यानास हजर असलेल्या लोकसमुदायाच्या डोळ्यांत त्यानीं धूळ फेंकली, व श्रीमंतीचें काल्पनिक लेणें गरीब गोमांतकाच्या अंगावर चढविलें, याबद्दल मात्र त्यांचा निषेध केला पाहिजे. पांच वर्षें आपल्या हाताखालीं असलेला गोमांतक आजच्या घटकेसहि गरीबच आहे, असें सांगणें त्यांच्या जीवावर आलें असावें, व ह्मणूनच व्यापारी घडामोडीच्या लाखों पौंडांचें गोमांतकाचें काल्पनिक धन त्यानीं सभेपुढें आणलें असावें. परंतु असें करण्यापेक्षां आलेल्या आमंत्रणाचाच स्वीकार त्यानीं केला नसता तर काय झालें असतें? पण आपण गोमांतकाचा एक हितचिंतक व आपल्या अमदानींत एकंदर बाबतींत गोमांतकाची सुधारणा झालेली आहे, असें दाखवून देण्याची आयती मिळालेली संधि त्यानीं तरी विनाकारण कां दवडावी?

× पण डॉ० साहेबानीं आपल्यां फायद्याखातर, गोमांतकावर काल्पनिक धनाचें फाटकें वस्त्र कितीहि ओढलें तरी त्याची लज्जा झांकली जाणें मुळींच शक्य नाहीं; इतका तो गरीब आहे, अथवा ज्यास्त स्पष्टपणें सांगावयाचें तर, इतका त्याला डॉ० साहेबांसारख्यानीं दरिद्र बनविलेलें आहे. नुसत्या व्यापारी घडामोडीकडेच लक्ष दिलें तरी, आयात मालाची रक्कम जवळ जवळ ५ कोटी रुपये असून, साडेतीन कोटीपेक्षां कांहीं ज्यास्त, एवढी निर्गत आहे. अर्थात या रकमांची वजाबाकी केली तर राहिलेली दीड कोटीची रक्कम दरवर्षीला गोमांतकांतून बाहेर जाते हें निर्विवाद आहे. मग गोमांतक श्रीमंत असें डॉ० साहेब कोणत्या तोंडानें सांगतात कोणाला ठाऊक! आणि दीड कोटीची रक्कम प्रत्येकवर्षीला परदेशांत पाठविणारा देश श्रीमंत आहे, असें घटकाभर गृहीत धरलें, तरी वरील सारखी रकमेची वार्षिक ओहोटी गोमांतकालाच काय तर संपन्न देशांनाहि थोडक्याच काळांत पूर्ण दरिद्री बनवील हें कोणीहि सांगू शकेल.

× तैशेर गोमीस यांनी आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा पार्लमेंटपुढें सादर केल्यामुळें त्यांचे जागीं आतां बेनार्दीन माशाद हे निवडले गेले आहेत. नव्या पार्लमेंटांत उदारमतवादी [Democraticos] पक्षाचें निर्विवाद बहुमत असल्यामुळे पोर्तुगालचें राजकारण आज त्यांचे हातांत आलेलें आहे. बेर्नादीन माशाद हे फारसे लोकप्रिय नाहींत. अध्यक्षाच्या अधिकारावर यापूर्वी ते एकदां होते, व त्यावेळीं राष्ट्रांतील श्रीमंत वर्गाकडे (Aristocracia) त्यानीं बराच ओढा दाखविला होता. यामुळें त्यांच्यापासून फारशी अपेक्षा करणें चूक होईल, असें कांहीं वर्तमानपत्रकारांचें मत आहे. कसेंहि असलें तरी पोर्तुगालच्या राजकारणावर तेथील जनतेचा मुळीच विश्वास नाहीं. आपले राजकीय पक्ष अधिकारारूढ झालेले, आपले राजकारणी पुरुष साऱ्या जनतेचें हित साधतील, अशा प्रकारची जी खात्री अगर भरंवसा लोकसत्ताक राष्ट्रांतील लोकांच्या मनांत असावयास पाहिजे ती तेथें मुळींच दृष्टीस पडत नाहीं. आपल्या भविष्यकालाबद्दल पोर्तुगीज जनता आज अनास्थाच दाखवीत आहे, याचें प्रत्यंतर गेल्या निवडणुकांत आलें. एकंदर २० लक्ष मतदारांपैकी फक्त २८८४४० इतक्याच मतदारानीं आपला हक्क बजाविला. खुद्द लिस्बन शहरांत २ लक्ष मतदार आहेत. परंतु २४००० मतदारानींच काय तीं मतें दिलीं. याचें कारण, पोर्तुगीज पार्लमेंट ही लोकमत निदर्शक अशी सभा असावयाला पाहिजे ती तशी होत नाहीं हें होय. पार्लमेंटांत जाणारे इसम लोकांचे खरे प्रतिनिधी असले पाहिजेत. परंतु पोर्तुगालांत, शहरांतून चळवळ करणारे विशिष्ट राजकारणी पुरुषच राष्ट्राच्या कोनाकोंऱ्याचे प्रतिनिधी ह्मणून उभे रहातात व लोकहि निराश व अनास्थाग्रस्त बनल्यामुळें अशाच उमेदवारांस आपलीं थोडीं बहुत मतें देतात. राजकारणांतील हा गोंधळ स्वार्थी राजकारणी इसमानां बराच फावतो, असा आजपर्यंतचा अनुभव आहे.

—गेल्याच्या मागील रविवारीं ता. २७।१२।२५ रोजीं हितचिंतक समाजामार्फत सभा भरून कांहीं उत्साही तरुणांच्या प्रयत्नानें सरस्वती वाचन मंदिर नावांचें एक वाचनालय स्थापिलें आहे. सभेंतच दहा बारा वर्गणीदार मिळून जवळ जवळ वीस सत्तावीस रुपये वर्गणीहि जमली. आणखी वर्गणीदार मिळविण्याचा प्रयत्न चालू आहे. सध्या चार पांच साप्ताहिकें व दोन चार मासिकें सुरू आहेत. शिवाय बऱ्याच गृहस्थांनीं चांगलीं चांगलीं पुस्तकें अर्पण केलीं आहेत. पुस्तकसंग्रह वाढविण्याचा प्रयत्न सुरू आहे असें सेक्रेटरी सरस्वती वाचन मंदिर मु. दाभाळ हे कळवितात.

—पोमुर्पे येथें "श्री रवळनाथ–विद्यालय" या नावांची संस्था सन १९२४ मध्यें स्थापन झाली आहे. सदर शाळेतील विद्यार्थ्यांचें द्वितीय वार्षिक परीक्षण सारस्वत विद्यालयाचे हेडमास्तर रा. रेगे, श्री शारदा विद्यालयाचे हेडमास्तर रा. सामंत, ज्ञान प्रसारक मंडळाच्या मराठी शाळेचे हेडमास्तर रा. काकतकर व पणजी येथील मुष्टिफंड नंबर १ च्या शाळेचे हेडमास्तर रा. मातोंडकर यांनीं केलें. इयत्ता ३ असून विद्यार्थ्यांची संख्या (पटावर) पांसष्ट आहे. ४५ मुलें परीक्षेस बसलीं होतीं पैकीं ३३ मुलें पास झालीं. मुलांची विषयवार प्रगति, शिस्त, ड्रील, संवाद, गाणीं वगैरे समाधानकारक होतीं. परीक्षेचें काम आटोपल्यावर मुलांस बक्षिसें देण्याचा समारंभ झाला. त्यावेळीं ग्रामस्थ व विद्यार्थी ह्यांस उद्देशून रा. सामंत व रेगे यांचीं भाषणें झालीं. एकंदरींत संस्थेचें काम समाधानकारक चाललें आहे हें शाळेचे चालक व शिक्षक यांस भूषणावह आहे.

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2º oficio que este assina, vão ser vendidos em hasta publica, á porta do tribunal judicial situado em Xeldem ao lado da estrada nacional que de Quepém se dirige a Curchodem, no dia 19 do seguinte mez de Janeiro, ás 10 horas e pelo preço superior ao de avaliação os seguintes bens:— 49/50 do predio rustico denominado "Bom boddabaga" sito em Amonã, da cultura de coqueiros e outras arvores; Palmar "Cottesumar—volo" vulgarmente denominado Cotó ou Mordi, sito no bairro Cottô da aldêa Amonã, da cultura de coqueiros, jaqueiras e outras arvores; Predio urbano com casas de morada, sito em Parodá; Predio rustico denominado "Desjecho bando" e "Toliantor", sito em Mulêm de Parodá, da cultura de coqueiros e arrôz; E direito a quarta parte do predio rustico da varzea da cultura de arroz denominado "Patoli" sito em Ambaulim, discritos na Conservatoria do registo predial desta comarca, respectivamente, sob os nº 9113, 2249, 6419 15154, e 4388 e avaliados tambem respectivamente em 8500, mil, duzentas, cem e 1500 rupias e penhorados nos autos civeis de execução hipotecaria que Tito Rafael José Antonio Vás, de Assolnã, promove contra Govinda Ramaraia Sinai Corongotó e mulher, de Parodá e outros, como pertencentes aos ditos executados. Por êste são citados todos e quaesquer credores incertos dos executados, os coproprietários e os representantes dos credores falecidos José Paulo Venancio Gomes, casado, proprietario, de Chandor e residente em Quepém, Voicunta Seguna Sinai Cuncoliencar, casado, negociante, residente em Margão, Loximim Porbinim, viuva de Nilconta Ramá Porobo Dessai, de Ponchovadi e residente em Parodá e Quessoa Soirú Poi Angló, casado, proprietario, de Cuncolim, sendo que a favor do dito José Paulo se acha registada uma hipoteca no livro C onze, sob o numero 4129, para segurança da quantia de 98:15:00; a favor do dito Voicunta uma hipoteca no livro C 5, sob o nº 1294, para segurança de 300:00:00; a favor do mesmo Voicunta uma penhora no livro F 2 sob o nº 917, para segurança de 300:00:00 e seus juros e penas; a favor do dito Loximim uma penhora no livro F 3, sob o nº 1273, para segurança de duas prestações vencidas e vincendas em dobro da quantia de 94:08:00; a favor do dito Camotim uma hipoteca no livro C 4 sob o nº 986, para segurança de 650:00:00; e a favor do dito Angló uma hipoteca no livro C 9 sob o nº 3091, para segurança de 800:00:00. A contribuição de registo por inteiro e as despesas de praça ficam a cargo do arrematante. Para ser publico se expediu este.

Xeldem da Comarca de Quepem 24 de Dezembro de 1925.

Escrivão
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juizo de direito
R. Colaço

especial na chamadas ... excesso que *obrigam* os profes-

tão publicados no Bol. Of ...

O BHARAT

TOMEM NOTA!

Sabem todos que os funcionarios recenseadores são obrigados a organisar duas especies de recenseamentos eleitorais: politico e especial. A esfera do primeiro circunscreve-se apenas aos cidadãos que saibam a lingua portuguesa, estendendo-se a do segundo aos que conheçam qualquer lingua.

Não é, igualmente, desconhecido de ninguem que os inscritos no recenseamento politico gosam do direito de votar em todas as eleições, parlamentares, municipais e do Conselho Legislativo, podendo, apenas, exercer o direito de voto na escolha dos vogais electivos deste ùltimo corpo administrativo os inscritos no recenseamento especial.

Nos respectivos editais que apareceram publicados no *Boletim Oficial*, referentes ao assunto de que se trata, se não vê, porêm, cumprida a obrigação inerente a seu cargo por todos os funcionarios recenseadores do territorio da India Portuguesa. Excepção feita dos de Pernem, Salsete, Quepem e Sanguem que satisfizeram *in continenti* ao preceituado pelo codigo e regulamentos eleitorais, os das restantes partes passaram *comodamente* por cima deles, poupando-se á *impertinencia* de confeccionar editais nos termos legais.

Como vêem, o descuido voluntario ou involuntario de quem não anunciou o recenseamento especial, privou muito cidadão da oportunidade de se habilitar para eleitor nas eleições dos vogais do Legislativo. E' um descuido, seja qual fôr a sua origem, indesculpavel e intoleravel pelo resultado funesto que acaba de produzir: *morte politica* de muitos cidadãos conhecendo qualquer lingua.

O feito está, porêm, feito e, como não é possivel operar se o milagre de *resurreição*, porque já não voltam os felizes tempos da *multiplicação de pãis*, a única forma com que os autores do tal descuido podem reparar o mal, se é possivel, é nunca mais repetirem para o diante o erro cometido, erro grave de graves consequencias.

E, já que estamos com a mão na massa, frisamos a necessidade de os funcionarios recenseadores publicarem, tratando-se do recenseamento especial, editais em marata, visto ser maior do que qualquer outro o número de cidadãos com conhecimentos dêssa lingua.

Nas democracias é a maioria quem dita as leis. E se no número dos conhecedores de qualquer lingua predomina a maioria dos que sabem a lingua marata, não poderá ser taxado, de maneira alguma, de violencia a natural conveniencia da publicação de editais maratas, sendo além disso certo que a lingua marata não é nenhuma lingua que faça mau cabelo ao Governo, que, pelo contrario, a continua subsidiando, desde tempos remotos—previlegio que não desfruta nenhuma outra lingua extra-oficial.

Em resumo:

a) Nenhum funcionario recenseador deixe de, para o futuro, cumprir a sua obrigação de, ao lado do recenseamento politico, anunciar, tambem, o especial.

b) E nenhum daqueles funcionarios deixe de, igualmente, publicar, ao lado de editais portuguezes, tambem, os maratas, anunciando o recenseamento especial.

ECOS E CRITICA

COMPRESSÃO PRIMEIRO IMPOSTOS DEPOIS

Perante as portarias e os projectos creando receita ao Estado que o sr. Mariano Martins vem publicando, ainda, em nossa modesta opinião, é cedo para se proferir solenemente a palavra—*não*.

Os projectos e portarias não são de execução imediata como todos sabem. Os projectos em particular podem ser modificados ou regeitados no C. Legislativo, onde o povo tem a maioria.

Além disso, o sr. Mariano Martins não pode demorar a publicação dos projectos de diplomas creando receita para depois da discussão do orçamento para o ano de 1926 27. Para o fazer na mesma sessão do C. Legislativo tem de publicar os projectos com antecipação devida, como é de lei.

Aguardemos, pois. Não é de admirar. E' natural mesmo que a compressão em si não possa matar o deficit. E' fatal, portanto, o recurso ao imposto. Mas compressão primeiro, impostos depois. Aliás, —*não, mil vezes não*!

CONVINHA SABER

Corre que, em virtude do último decreto sobre o abono de passagens para a Metropole aos funcionarios coloniais, o governo local mandou tornar sem efeito as passagens autorisadas, no tempo do sr. Jaime de Morais, aos srs. dr. Antonio de Noronha, F. C. Correia Mendes, Zuzarte de Mendonça e não sabemos mais aquem.

Este acto vai redundar em uma importante vantagem ao tesouro da Colónia, o que deveras estimamos.

Agora convinha saber porque os funcionários em questão teriam segurado a autorização para passagem com tamanha precedencia! E era certo que á saida do sr. dr. J. de Morais havia já sido restabelecida a normalidade na navegação maritima entre a India e o continente.

OXALA', QUE SEJA A ULTIMA ...

Vai continuar por mais 12 meses a sindicancia á Administração das Comunidades das Ilhas. E' uma portaria que tal nos anuncia, portaria que foi lavrada, em vista do que informa o magistrado sindicante.

O que motivou a prorogação? Os superiores interesses da administração comunal das Ilhas e ainda motivos de ordem social.

Anos atraz, por motivos iguais ou talvez milhores e mais ponderosos, o governo abrira uma devassa á administração em questão, o que todavia, não evitou que, passado tempo, se dessem factos justificando uma nova devassa, que é a que está em curso.

Pobres Comunidades! A tutela do governo, o que lhes tem custado! Eis a razão porque, nestes ultimos tempos, o *Bharat* luta pelos sagrados direitos do merito e do trabalho aliado á honestidade. Sem homens competentes, não há sistemas de administração que valham! Oxalá que esta seja a ultima sindicancia.

UM RELATORIO

O nosso correspondente em Mapuçá remeteu nos um exemplar do Relatorio e Contas da Gerencia do Asilo de Mapuçá, referente aos anos economicos de 1921 22 a 1924-25, cuja leitura fizemos com interesse com que sempre acompanhamos tudo o que diz respeito ás instituições de beneficencia do país.

Do relatorio se vê que é grande o apoio que o Asilo mereceu e continua a merecer dos particulares, principalmente dos emigrantes do Concelho de Bardês.

Nota-se tambem que a mania de transferencias de fundos para a metropole não poupou o Asilo, embora a quantia arriscada não seja grande.

Reparamos outrossim que a sorte da 2.a lotaria foi pior do que a da 1.a, sendo naquela maior o número de bilhetes não vendidos e enorme a importancia a arrecadar dos devedores à lotaria.

A escrituração, embora seja

especial na chamadas ... excesso que *obrigam* os profes- | tão publicados no Bol. Of co- g-

भारत

जनसेवा हीं ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, पौष व० ३० स्या शके १८४७

जमाबंदी खातें.

१९०२ तें १९१२

करवाढीच्या प्रश्नाचा विचार करतानां खर्चाच्या वाढीचा विचार अगोदर झाला पाहिजे असें आमचें मत असल्यानें, गोव्यांच्या अंदाजपत्रकांत झालेल्या अंदाधुंदीचा संक्षिप्त इतिहास आम्हीं मागें दिलाच आहे. परंतु आमच्या वाचकानां या वाढीची पूर्ण कल्पना येण्याकरितां तिचा खातेवार व कालानुक्रमदर्शक इतिहास देण्याचें आम्हीं योजिलें आहे. प्रथम जमाबंदी Fazenda खात्यापासून आम्हीं सुरवात करणार आहों. विवेचनाच्या सोयीसाठीं या इतिहासाचे दशवार्षिक टप्पे पाडणें व एकंदर आंकडे रुपयांतून देणें या दोन गोष्टी आम्हीं स्वीकारल्या आहेत. पहिला टप्पा सन १९०२ ते तीन या जमाबंदी वर्षांचा आम्हीं घेतला आहे. [जमाबंदी वर्ष पोर्तुगीज रियासतींत जुलै ते जून असें आकारण्यांत येतें.] या सालीं देखील अंदाजपत्रक रुपयांतून आकारलें जाई. सन १९०३ ते १९०४ या सालापासून ही आकारणी पोर्तुगीज नाण्यानें रैसांतून होऊं लागली.

उपरोक्त सालीं जमाबंदी खात्याच्या वरिष्ठ कचेरींत [Repartigao Superior de Fazenda) इन्स्पेक्टर पासून झाडू मारणाऱ्या नोकरापर्यंत [Servente] लहान मोठ्या दर्जाचे मिळून एकंदर ५५ अमलदार होते व त्यांच्यापायीं एकंदर ५५४२० रुपये खर्चले जात असत. खालील कोष्टकांत आमच्या वाचकांस याची विशेष माहिती मिळेल.

सन १९०२ ते १९०३ सालचें कोष्टक

१ इन्स्पेक्टर (खात्याचे वरिष्ठ अमलदार)	७५००८.८.
१ ओफिसियाल [दुय्यम]	३०००८.८.
४ पहिल्या वर्गाचे इस्क्रितुरारिय प्रत्येकीं १५०० प्रमाणें	६०००८.८.
१७ दुसऱ्या वर्गाचे इस्क्रितुरारिय प्रत्येकी १००० प्रमाणें	१७०००८.८.
१० पहिल्या वर्गाचे आस्पिरांत प्रत्येकीं ६०० प्रमाणें	६०००८.८.
१२ दुसऱ्या वर्गाचे आस्पिरांत प्रत्येकी ५०० प्रमाणें	६०००८.८.
१ पोर्तेर	५००८.८.
३ चपराशी प्रत्येकीं २४० प्र.	७२० ,,
६ शिपायी	११२५ रु
इन्स्पेक्टर फिरतीचा भत्ता	६७५ रु.
इन्स्पेक्टर फिरतीस गेल्यास दुय्यमास त्याच्या जागीं काम करावें लागतें त्याबद्दल पगारांतील फेर	१२५० रु.
रेकार्ड राखणाऱ्यास जादा	१५० रु.
१८९२ च्या २९ डिसेंबरच्या देक्रेताच्या ३१ व्या कलमाखालीं झालेली वाढ	५५००
एकंदर जमा रु.	५५४२०

येउझेबिय द फोंसेक हे अंमलदार गोव्यांतील लोकांच्या ओळखीचेच आहेत. त्यांची कारकिर्द कोलोनियाल आफिसांत चालू असतां एकंदर कोलोनींच्या जमाबंदी खात्यांची पुनर्घटना (Reorganizagao) करण्यांत आली. त्या वेळीं जो १७-८-१२ चा देक्रेत ३-१०-१९१२ च्या बोलेतीवर प्रसिद्ध झाला, त्याच्यामुळें वरिष्ठ कचेरींत १७ नोकरांची भर पडली व खर्चाच्या बाजूनें रुपयांची किंमत ४०० रैस धरली तरी १०३१७ रु. ८ आणे ची भर पडली परंतु त्यावेळीं रुपयाची किंमत ३५० रैस असल्यामुळें हे ७२ नोकर दरसाल ७५१२८ रु. ९ आ. खाऊं लागले. आणि ही वाढ १९७०८ रु. ९ आ. झाली. अर्थात जवळ जवळ २० हजार रुपये एका वरिष्ठ कचेरींतच गडप होऊं लागले. खालील कोष्टकानें याची विशेष स्पष्ट कल्पना वाचकांस होईल.

१७-८-१९१२ सालचा देक्रेत

१ इन्सनेक्टर-३००० य.	८५७१८६८
१ सुबइन्स्पेतोर १५००"	४२८५८११८
५ प्रिमैर ओफिसि. ३०००"	८५७१८६८
१८ सेगुंद ओफिसि. ७२००"	२०५७१८६८
१३ प्रिमैर इस्क्रितुरारिय ३९००"	११४३८.८.
२२ सेगुंद इस्क्रितुरारिय ४८८०"	१३८२८८१०८
१ पोरतेर २०० "	५७१८६८
३ चपराशी ३६० "	१०२८८९८
६ शिपाई ४५० "	१२८५-१०
इन्स्पेक्टरचा भत्ता २७० "	७७१ - ६
इन्स्पेक्टरच्या जागीं सुब इन्स्पेक्टरला काम करावें लागल्यास जादा २७५"	७८५-१०
दप्तर राखणारास भत्ता ६० "	१७१-६
१ खजीनदार १००० ए.	२८५७ रु.
१ टायपिस्ट २४० ए.	६८५ रु. ६ आ.
एकंदर जमा रु.	७५१२७॥.

ही वाढ केवळ वरिष्ठ कचेरींतीलच झाली, पण महालनिहाय कचेरींतील हालचाल पाहूं गेल्यास या पाऊण लाखांत आणखी कांही हजारांची भर घालावी लागते. सन १९०२ सालीं अशा महाल निहाय कचेऱ्या जुन्या गोव्यांत एक, साष्ट प्रांतांत दोन, बारदेश प्रांतांत दोन, पेडणें एक, सांखळी एक, फोंडें एक, सांगें एक, काणकोण एक, केपें एक, दमण एक व दीव एक, अशा एकंदर तेरा होत्या व त्या एकंदर कचेऱ्यांतून इस्क्रिवांव द फाझंद वरिष्ठ कचेरींतून जात असल्यामुळें ते सोडून दिले तर ५८ नोकर असत व त्यांच्यापायीं २३४६८ रुपये खर्चले जात. महालच्या किंवा महालच्या खजीनदारांस देण्यांत येणाऱ्या टक्याची भर जमेस धरली तर ३१५१८ रुपये खर्ची पडत. परंतु उपरोक्त १९१२ पुनर्घटनेमुळें हें मान सारेंच बदललें. व साष्ट व बारदेश येथें ज्या प्रत्येकीं दोन कचेऱ्या होत्या त्यांतील एक एक काढून टाकण्यांत आली व डिचोली, सत्तर व परगणानगर हवेली येथें प्रत्येकी एक अशा तीन कचेऱ्या नव्या स्थापण्यांत आल्या. डिचोलीची व सत्तर प्रांतातली अशा दोन कचेऱ्या तर केवळ जरूरी नसतानांच उत्पन्न केल्या होत्या. या रचनेमुळें कचेऱ्यांच्या संख्येंत एका कचेरीची भर पडली नोकरांची संख्या ५८ होती ती ६१ झाली व ३५० रैसांच्या दरानें खजीनदारांच्या टक्याची रकम जमेस धरतां एकंदर खर्चाचें मान ३०२२१॥≈ वर येऊन बसलें. ह्मणजे टक्क्यांत झालेली वाढ सोडली तरी ६७५३॥≈ चा वाढावा या महालनिहाय कचेऱ्यांतून झाला तर वरिष्ठ कचेरींतील जो वाढावा दिला आहे त्यांत ही रक्कम मिळविल्यास २६४६२८≈ ची वाढ ह्या दहा वर्षांतच झाली. यांत पब्लिक वर्क्स खात्यांत जमाबंदी खात्याची जी पोटकचेरी (Secgao da contadilidade) ठेवली आहे तींत जादा अलावन्स ३४२॥|= देण्यांत येतें त्याची भर घातली ह्मणजे २६८०५८१ एवढा खर्च केवळ जमाबंदी खात्यांतच तिजोरीवर १९०२ ते १९१२ या दशवार्षिक कारकिर्दींत नवा पडला. ह्मणजे १९०२ सालच्या खर्चाशीं याचें प्रमाण शेंकडा ४८ पडतें ! विशेष महत्वाची गोष्ट हीच कीं या दहा वर्षांत उत्पन्नाच्या बाजूनें किंवा कामाच्या बाजूनें नवा कर असा कोणताच पडला नाहीं किंवा जमाबंदी खात्यांत जेणें करून कामाची वाढ होईल असा कोणताच फेरफार झाला नव्हता व असें असतांहि एकंदर२० अमलदारांची वाढ त्या खात्यांत झाली.

—कांसावली येथें एक नवीन पोर्तुगीज वृत्तपत्र निघणार असून, त्यांत उदार तत्वांची समतोल दृष्टीनें चर्चा करण्यांत येणार आहे.

—यंदा कुडो व फातर्पे येथें देवींच्या नावानें जुगार बराच रंगला होता!

—पणजीच्या कोंनुनीदादीच्या आदमिनिस्त्रासवांतील 'अंधारांतील गोष्टी' आणखी एका वर्षानें उजेडांत येणार आहेत तोंपर्यंत चौकशी चालू राहील.

स्फुट विचार

धर्म व राजकारणः— ज्या वेळीं पोर्तुगीज राष्ट्रांत एकमुखी हडेलहप्पी मोनार्कीचा दरारा सर्वत्र चालू होता, त्या वेळीं क्याथोलिक धर्म तिच्या अधोगामी सत्तेशीं एकरूप बनलेला होता. राष्ट्रांतील प्रत्येक हालचालीवर, प्रत्येक घडामोडीवर व प्रत्येक स्थित्यंतरावर त्या धर्माची अनुदार छाप स्पष्टपणें उमटलेली नजरेस येई. पण रिपब्लिकच्या स्थापनेनंतर उपरोक्त धर्मास पोर्तुगीज राजकारणांतून धूम ठोकावी लागल्यानें, सांप्रत पोर्तुगाल देशांत राजकीय सत्तेचें तारूं त्याच्या घातकी, स्वार्थी व आपमतलबी प्रेरणेशिवाय सुरळीत चालू आहे. रिपब्लिक राजसत्तेच्या तत्वांची झपाट्यानें वाढ होण्यास क्याथोलिक धर्माच्या नावांखालीं मोनार्कीच्या सत्ताधाऱ्यांकडून आचरण्यांत येत असलेला असह्य छळ हाच प्रमुखत्वानें कारणीभूत झाला असल्यानें, रिपब्लिकचा विजयी झेंडा रोवला जातांच, नव्या सत्ताधाऱ्यांनीं पहिल्या प्रथमच त्या अनीतिप्रसारक धर्मावर गदा उगारून त्याचा चेंदामेंदा केल्यास त्यांत आश्चर्य असें कांहींच नाहीं. केवळ क्याथोलिक धर्माच्या संपर्कापासूनच रिपब्लिकनें आपणास मुक्त केलें असून, राजकीय बाबतींत आपणाला कोणत्याच धर्माचीं कसलींहि बंधनें लागू नसल्याचा जाहीरनामाहि प्रसिद्ध केला. व हेंच धार्मिक तटस्थपणाचें धोरण राष्ट्रघटनेच्या आद्य कलमांत कायमचें अंतर्भूत करून टाकलें.

मर्कटचेष्टाः— पोर्तुगीज रिपब्लिकला अर्थात् क्याथोलिक धर्माचा कसलाच, दूरचा किंवा जवळचा, संबंध असतां कामा नये. कसल्याहि सबबीखाल त्या किंवा दुसऱ्या एखाद्या धर्माला मलिदा चारणें हें मोठें राष्ट्रीय पाप ठरतें, हें उघड होय. व हें अघोर पाप पोर्तुगीज हिंदुस्थानांत सरकारी तिजोरीच्या सर्व धर्माच्या व जातींच्या लोकांकडून वसूल करण्यांत येणाऱ्या करांच्या उत्पन्नांतून येथील क्याथोलिक पाद्र्यांचें जीवन राजरोस चालू असलेल्या स्वरूपांत दृश्यमान होत असल्यानें, 'भारता'नें त्याचा तीव्र निषेध केला असल्यास त्यांत वावगें असें काय आहे? पण जुन्या आडमुठ्या संवयी कित्येक अंध धर्माभिमान्यांच्या रक्तांत इतक्या कांहीं भिनून गेल्या आहेत कीं, त्यांना त्या नुपल्या त्याग करण्याचा पुढें मागें केव्हांतरी आपणावर प्रसंग ओढवेल, या कल्पनेनेंच कांपरें सुटूं लागतें व त्यांना बुद्धिभ्रंश होऊं लागतो. व अशा स्थितींत ते कांहींच्या कांहींच बरळूं लागले तर, त्यांच्या मर्कटचेष्टांपासून लोकांनीं तरी आपली मनमुराद करमणूक करून कां घेऊं नये ?

अप्पलपोटेपणांची परमावधीः वरील तऱ्हेनें बुद्धिभ्रंश झालेले जे कि लेखक या गोमांतकांत "सां फ्रासि शाव्हियेराच्या कृपाछत्राखालीं जीवंत नाऱ्या गोमांतकांत" वेळीं अवेळीं आप बुद्धिभ्रंशतेचें प्रदर्शन करतांना दिस त्यांत माजोर्डे येथें प्रसिद्ध होणाऱ्या " इंदिय पोर्तुगेज"कारांची गणना करणें प्र आहे. धर्म व राजकारण यांची फार होणें न्याय्य व समतेच्या तत्वास धरून सून शिवाय काटकसरीच्या दृष्टीनेंहि तें प्र त असल्याचें आम्हीं एका पोर्तुगीज टांत दाखवून दिलें होतें. तें खोडून का या कट्ट्या व मोनार्कीतील सुखासमाधान दिवस अद्याप पाहत असलेल्या क्याथोलि लेखकाच्या आवाक्याबाहेर असल्य त्यांनीं 'शेरं कं.पेन पूरयेत्' या तत्वा बिनचूक अंगिकार करून आह्मांवर मत्स ग्रस्ततेचा पोकळ व निराधार आरोप के आहे. हा आरोप करतांना त्यांनीं रेपुब्लि कची स्थापना कोणत्या मुख्य तत्वां झाली होती याची आठवण ठेविली नव्ह स्वार्थी विकारवशता त्या अ.ठवणीच्या आ आली होती असेंच ह्मणावें लागतें. क्या थोलिक धर्मास मिळत असलेला तनख चालू ठेवण्यांत रेपुब्लिक सरकार त्या धर्मा वर कोणताच उपकार करीत नसून केव आपलें कर्तव्य बजावीत आहे, कारण, तनखा मिळणें हा एक त्याचा संपादि हक्क असून त्याच्या आड येणें बेकायदेश टरेल इ. इ. असल्या बाष्कळ प्रलापां सजविलेला आमच्यावरील आरोप इंदिय पोर्तुगेजकारांचा आपलपोटेप सिद्ध करीत आहे, इतकेंच नव्हे तर त्यांची परमावधी झालेलीच दिसून येते.

संपादित हक्कांचें बुजगावणें:— अ जपर्यंत अनेक क्याथोलिक लेखकांनीं संपादित हक्कांच्या बुजगावण्यानें सरकार व धर्म व राजकारण यांची फारकत ण्याची वाट पाहात असलेल्या खिस्तेतर नतेस भेडसावण्याचा प्रयत्न केला हो त्यांतलाच हा एक प्रयत्न आहे. अ ज्या जुलमी व परधर्मासहिष्णु अशा राज टींत हे संपादित हक्क संपादन झाले अ त्याची हे सारे लेखक कल्पना करितात मोनार्कीनें अकराव्या शतकांत संपादन लेले स्वतःचे हक्क, समता, बंधुता व स्वतंत्रता या तत्वांवर उभारलेल्या रिपब्लि कच्या जन्मकाळींच एका चुटकीसरशीं मावळे. मग त्या तसल्या एककल्ली व द्वेष्या मोनार्कीनें बहाल केले असें सम जाणारे हक्क शाबूद कसे राहतील या त्या लेखकांनीं विचार करावयास नको का ज्या काळांत क्याथोलिक धर्म हा राज ह्मणून समजला जात होता तो सुल काल जाऊन त्या जागीं, धर्मातटस्थ नवीन काल आल्यानें जगजाहीर अस

especial na chamadas ...
excesso que obrigam os profes- | tão publicados no Bol. Of ...

दा ह्मणून बाजूस ठेवून, संघ ज्यास्त कार्यक्षम, ज्यास्त लोकप्रिय आणि ज्यास्त बलाढ्य होण्यास काय होणें इष्ट आहे, याचा विचार करूं.

चळवळ कोणतीहि असली तरी तिचें ध्येय निश्चित केल्याशिवाय तिला यश मिळेल, ही आशा व्यर्थ होय. आपणांस कोठें जावयाचें आहे हें आधीं ठरविल्याशिवाय मार्गाला लागणें वेडेपणाचें होय. प्रा. संघानें आपल्या घटनेंत गांठावयाचें ध्येय उघड ठरविलेलें नाहीं. गोमांतकाची राजकीय प्रगति सदनशीर मार्गानें घडवून आणणें; असें ह्मटल्यानें संघाची ध्येयमर्यादा ठरविली गेली, असें ह्मणतां येणार नाहीं. कारण संघानें ध्येय ह्मणून ठरविलेल्या गोष्टींत साध्या राजकीय सुधारणांपासून संपूर्ण स्वराज्यापर्यंत एकंदर गोष्टींचा अंतर्भाव करितां येतो, व ध्येयमर्यादेंत अनिश्चितता उत्पन्न होते. ह्मणून, आपलें ध्येय अमुक हें उघड्या भावेंत ठरविणें अत्यंत इष्ट आहे. राजकीय पक्षाच्या बाबतींत तर ही ध्येयाची फोड स्पष्ट व निःसंदिग्धपणें झाली पाहिजे. एरवीं निव्वळ तत्व मान्य करून, त्या तत्वाकरितां मनःपूर्वक झटणारे इसम मिळणें कठीण पडतें. साध्य आधीं ठरवा व मग साधनांच्या मार्गाला लागा असेंच कोणीहि झाला तरी सांगूं शकेल. मग तें साध्य नुसत्या हिंदुसमाजाच्या हिताच्या दृष्टीनें ठरवा किंवा ख्रिश्चन व हिंदु यांच्या हितसंबंधांत विरोध उत्पन्न न होईल अशा रीतीनें गोमांतकाच्या सामुदायिक हिताचे दृष्टीनें ठरवा. पण आपणास अमुक पाहिजे, हें मात्र सरकारची काय, ख्रिश्चन समाजाची काय, किंवा इतर कोणाची काय, बिलकूल भीति न बाळगितां आपल्या घटनेंत स्पष्टपणें सांगा, अशी इच्छा कोणी प्रदर्शित केली, तर त्यांत वावगें असें कांहीं एक नाहीं."

प्रा. संघासारख्या संस्थेनें आपल्या कमाल राजकीय आकांक्षांचा उच्चार केल्याशिवाय तरुणपिढी ध्येयप्रेरित होऊन कार्याला लागणार नाहीं. आपल्या राजकीय ध्येयाची जाणीव लोकांना सदैव असणें जरूर आहे. आणि याचकरितां ध्येयाची निश्चितता हीच राजकीय चळवळीच्या यशस्वितेची पहिली पायरी होय. पोर्तुगीज सरकारचा आपल्यांवर रोष होईल, ख्रिश्चन समाजाकडून आपल्याला विरोध होईल व येथील नोकरशाही आपणावर रागावेल, ह्मणून आपली न्याय्य इच्छा दडपून टाकणें केव्हांहि इष्ट होणार नाहीं. इतर राष्ट्रांचा कल आज कसा आहे हें आपण अवश्य पाहिलें पाहिजे. आतां, ध्येय हें आपल्या हाताशींच असलें पाहिजे असें नाहीं. शक्यतेच्या आटोक्यांत नसलें तरी आपल्या दृष्टीच्या आटोक्यांत येईल, इतक्या पलीकडे तें असलें तरी हरकत नाहीं. ब्रिटिश हिंदुस्थानचें आजचें राजकीय ध्येय स्वराज्य हें आहे. स्वराज्य हा हिंदुस्थानचा राष्ट्रीय मोक्ष आहे. स्वराज्याचा मंत्र जपण्यास त्यानें आजच सुरवात केली आहे असें नाहीं. आणि आजच त्याला स्वराज्य मिळेल असेंहि नाहीं. संपूर्ण स्वायत्तता अर्थात् स्वराज्य मिळविण्यास, कदाचित् त्याला आणखीहि कांहीं वर्षें घालवावीं लागतील. परंतु आपली ध्येयमर्यादा मात्र त्यानें केव्हांच ठरवून टाकलेली आहे. उपयोगांत आणावयाच्या शस्त्रास्त्रांत बदल झाला; एक डाव चुकला ह्मणून दुसरा डाव योजला गेला. परंतु ध्येय मात्र कायम राहिलें, त्यांत बदल किंवा पिछेहाट झाली नाहीं. साध्य अथवा ध्येय ठरविल्याशिवाय आपल्या आत्यंतिक गरजांची जाणीव लोकसमुहास होणार नाहीं ह्मणून आपलें ध्येय निश्चित करून ध्येयपूर्ततेला पोषक असा कार्यक्रम संघानें आधीं ठरविला पाहिजे.

गोव्यांत प्रचलित असलेल्या राजकीय पक्षाच्या वळणावर प्रा० संघासारखी संस्था नेऊन उपयोगी नाहीं. ध्येय नाहीं, कार्यक्रम नाहीं, कार्य नाहीं, तत्वप्रेम नाहीं, अशी त्यांची स्थिति आहे. राजकारणांत गोंधळ घालण्याची तहान निवडणुकांच्याद्वारें भागवावयाची या पलीकडे त्यांच्या हातून कोणतेंच कार्य होत नाहीं. ही आजची स्थिति आहे. असल्या संस्थांचें अस्तित्व देशाच्या सुधारणेस सहाय्यक होईल असें आह्मास वाटत नाहीं. कारण, उत्कट भव्य तितुकें घ्यावें, असा प्रकार ध्येयाच्या बाबतींत त्यांच्यांत नाहीं हें एक आणि शिवाय, निवडणुकांपासून दिसून येणाऱ्या त्यांच्या कार्यांपासून देशाचें प्राय हित न होतां, उलट एकंदर दृष्टीनें नुकसानच होतें. कारण वैयक्तिक हिताचे डाव टाकून चालविलेल्या निवडणुकांच्या खेळापासून झालेंच तर त्या पक्षांच्या चालकांचें हित होतें, देशाचें होत नाहीं.

ध्येय ठरविल्यानंतर करावयाची दुसरी गोष्ट ह्मणजे त्या ध्येयाला सहाय्यक असा कार्यक्रम आपल्या पुढें ठेवणें ही होय. स्वराज्य हें ध्येय ठरविलें तर स्वराज्याला जनता कशी पात्र होईल व आपणास स्वराज्य कोणत्या रीतीनें मिळवितां येईल याचा विचार प्रामुख्येंकरून ज्यांत आहे असा कार्यक्रम अमलांत आणणें सहजच प्राप्त होतें. कार्यक्रमांत पुष्कळ गोष्टींचा समावेश होऊं शकेल. पण अत्यंत जिव्हाळ्याचे जे प्रश्न त्यांचाच तेवढा विचार प्रथम करण्यांत आला पाहिजे. कमी अधिक आवश्यकतेनुरूप, कार्यक्रमांत बदल जरूर तर अवश्य केला पाहिजे. मराठीला मताधिकार, पोर्तुगीज शिक्षण संस्थांतून मराठीचा प्रवेश, नव्या धर्तीवर प्राथमिक मराठी शिक्षणाच्या शाळांची स्थापना, वगैरे गोष्टींचा कार्यक्रमांत अन्तर्भाव व्हाला पाहिजे.

गोमांतकीय जनता तत्वप्रेमी नाहीं, त्याकरितां कोणत्याहि कार्याला सहाय्य पुरवावयाचें ही भावना अद्याप तिच्यांत उत्पन्न झालेली नाहीं. अशिक्षित लोकांचें तर दांहोच, पण खुद्द कित्येक सुशिक्षितांनींहि, गेल्या निवडणुकांत, अमुक मोठ्या अधिकाऱ्यानीं मागितलीं ह्मणून किंवा आपला फायदा होईल ह्मणून आपलीं मतें पसंत नसलेल्या उमेदवारांस दिलीं आहेत, हें कोणाला सांगितलें पाहिजे असें नाहीं. सुशिक्षितांची जर ही गोष्ट तर अशिक्षित जनसमुहानें केवळ तत्वप्रेमाकरितां कोणत्याहि चांगल्या संस्थेबद्दल कळकळ न दाखविली तर त्यांत मुळींच नवल नाहीं. ही स्थिति लक्ष्यांत आणली ह्मणजे नुसतें ध्येय कितीहि उच्च असलें, कार्यक्रम कितीहि चांगला असला व प्रत्यक्ष कार्य देशाच्या सामुदायिक हिताचें असलें तरी कां चालत नाहीं हें कळून येईल. लोकांचा संस्थेंत समावेश करून घ्यावयाचा व लोकांचा विश्वास संपादन करावयाचा तर सगळ्या देशाला एकाच वेळीं हितकर होणाऱ्या कार्याखेरीज, लोकांवर पृथक पृथक असे गांवापुरते किंवा फार झालें तर महालांपुरते उपकार केले पाहिजेत. अ गावांत पोलीस अधिकाऱ्यांकडून लोकांचा छळ होत असल्यास तो दूर करणें, ब गावांत सार्वजनिक आरोग्यासंबंधींच्या कांहीं सुधारणा करण्यांत लोकांस हातभार लावणें, क गावांत सरकारी मोफत शिक्षणाची सोय करून देणें, इत्यादि कार्यांनीं लोकांची सहानुभूति मिळविली पाहिजे. एक एक गांव मिळून देश होतो. ह्मणून प्रत्येक गांवचीं सकारण गाऱ्हाणीं लक्षांत घेऊन त्यांच्या बाजूनें सरकारांत अगर जरूर तेथें काम केलें पाहिजे. मराठीला मताधिकार मिळवून देणें हें कार्य अत्यंत महत्वाचें खरें पण ग्रामवासी लोकांना आपल्या निकटच्या अडचणीपेक्षां त्याचें महत्व ज्यास्त वाटत नाहीं. प्रस्तुत विवेचन लक्षांत घेतलें ह्मणजे प्रागतिक संघानें करावयाच्या कार्याचें महत्व कळून येतें.

गोमांतकाच्या व त्यांतल्या त्यांत हिंदु समाजाच्या हितसंबंधाच्या बऱ्याच गोष्टी ले० कौन्सिलाच्याद्वारें करावयाच्या असतात. पैकीं सगळ्याच गोष्टी सरकारपक्षीय सभासद करण्यास तयार असतात असें नाहीं. जेथें नोकरशाहीच्या सत्तेला व फायद्याला विरोध होतो, असें दिसतें तेथें सरकारी सभासदांचा एक गट लोकपक्षीय प्रतिनिधींच्या ठरावला विरोध करितो, हा नियम आहे. जेथें हितसंबंधांत विरोध नाहीं, तितक्यापुरतेच सरकारी सभासद फार झालें तर ताटस्थ्य स्वीकारतात. दुसरी गोष्ट ह्मणजे लोकपक्षीय सभासदांत ऐक्य व हित नसल्यामुळें आजपर्यंत भेदनीतीच्या बळावर सरकारनें आपलें बरेंच काम करून घेतलेलें आहे. ही स्थिति बदलावयाची तर प्रा० संघानें होईल तितके ज्यास्त सभासद पाठविण्याबद्दल खटपट केली पाहिजे. आहे त्या स्थितींत दोन तीन सभासद निवडून देणें फारसें कठीण नाहीं. तथापि, इतक्या सभासदांवर निर्वाह लागतो असें नाहीं. त्यांनी सदोदीत शक्य नसल्यास ज्यास्त महत्वाच्या प्रसंगीं लोकपक्षीय इतर सभासदांचें सहकार्य घडून आणलें पाहिजे. व असें होण्यास, आपणास इष्ट असलेल्या उमेदवारांस निवडणुकांपूर्वी प्रत्येक भागांत, शक्य तितका पाठिंबा दिला पाहिजे. या शिवाय नव्या काविजादींतील साऱ्या महालांचा ह्मणून एकटा एकच प्रतिनिधी निवडला जातो; ही स्थिति शक्य तितक्या लवकर बदलली पाहिजे कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें, तरी न० काविजादींतील सहा महालानां [concelhos] एक प्रतिनिधि व सालसेत, बारदेश, दमण वगैरे महालानां प्रत्येकीं एक, हें विषमतेचें प्रमाण नष्ट झालें पाहिजे. सदर सहाहि महालानां प्रत्येकीं एक याप्रमाणें सहा प्रतिनिधी मिळणें शक्य व युक्त नसलें तरी तीन प्रतिनिधी मिळण्यास मोठीशी अडचण पडूं नये असें वाटतें. हा प्रश्न नव्या देपुतादापाशीं संघानें मांडणें अत्यावश्यक होय. नव्या काविजादींची ही न्याय मागणी कोणी नाकारील, असें वाटत नाहीं. आतां ही मागणी पार्लमेंटच्या दृष्टीनें शक्यतेच्या आटोक्यांत आहे, असें ठरलें तर अर्थातच लोकपक्षीय प्रतिनिधींचे कौन्सिलांतील प्रमाण वाढवावें लागेल, हें खरें. पण तसें करणें 'आवतोनोमी' असलेल्या गोमांतकांत, लोकविलक्षण होणार नसून, झालें तर योग्यच होईल.

दुसरा प्रश्न ह्मणजे मराठीच्या मताचा. मराठीलाच काय तर इतर देशी भाषानां देखील मत असणें न्याय्य आहे. हें ले० कौन्सिलनें एक मुखानें अर्थात गोमांतकीय जनतेनेंहि मान्य केलें आहे. तेव्हां न्यायान्यायतेचा प्रश्न बाजूस ठेवून, डॉ. मेउ यानीं आपलेपणाचे दृष्टीनें या प्रश्नाकडे पहाणें न्यायतःच प्राप्त होतें. एकंदर साधक बाधक प्रमाणें दाखवून मराठीची बाजू पार्लमेंटांत कशी मांडतां येईल, हें नव्या देपुतादाला संघाच्या चालकांनीं दाखवून दिलें पाहिजे. याचा अर्थ, डॉ. मेउ यानां स्वतंत्र रीतीनें या प्रश्नावर विचार करता येत नाहीं, असा नव्हे पण आपल्या जिव्हाळ्याचा प्रश्न तेव्हां त्याचा शक्य तितका जास्त खल आपल्या देपुतादापाशीं करणें केव्हांहि इष्टच होणार. नव्या पार्लमेंटांत आज उदारमतवादी पक्षाचें निर्विवाद बहुमत आहे. याच पक्षाच्या गोमांतकांतील शाखेचे डॉ. मेउ हे आज अध्यक्ष आहेत. मराठीला मत या बाबतींत आपल्या पक्षाच्या सभासदांचा वारा कसा वहातो हें आधीं अजमावून, वातावरण अनुकूल दिसल्यास त्यानीं इतर कोणत्याच गोष्टींचा विचार न करिता, हा प्रश्न पार्लमेंटपुढें आणला पाहिजे. आणि

especial na chamadas ...
excesso que *obrigam* os profes- tão publicados no Bol. Of co- ...

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2° oficio que este assina, vão ser vendidos em hasta publica, á porta do tribunal judicial situado em Xeldem ao lado da estrada nacional que deQuepém se dirige a Curchodem, no dia 19 do seguinte mez de Janeiro, ás 10 horas e pelo preço superior ao de avaliação os seguintes bens:— 49/50 do predio rustico denominado "Bom boddabaga" sito em Amonã, da cultura de coqueiros e outras arvores; Palmar "Cotte—sumar—volo" vulgarmente denominado Cotó ou Mordi, sito no bairro Cottô da aldêa Amonã, da cultura de coqueiros, jaqueiras e outras arvores; Predio urbano com casas de morada, sito em Parodá; Predio rustico denominado "Desjecho bando" e "Toliantoi", sito em Mulêm de Parodá, da cultura de coqueiros e arrôz; E direito a quarta parte do predio rustico da varzea da cultura do arroz denominado "Patoli" sito em Ambaulim, discritos na Conservatoria do registo predial desta comarca, respectivamente, sob os n° 9113, 2249, 6419 15154, e 4388 e avaliados tambem respectivamente em 85co, mil, duzentas, cem e 1500 rupias e penhorados nos autos civeis de execução hipotecaria que Tito Rafael José Antonio Vás, de Assolnã, promove contra Govinda Ramaraia Sinai Corongotó e mulher, de Parodá e outros, como pertencentes aos ditos executados. Por êste são citados todos e quaesquer credores incertos dos executados, os coproprietários e os representantes dos credores falecidos José Paulo Venancio Gomes, casado, proprietario de Chander e residente em Quepém, Voicunta Seguna Sinai Cuncoliencar, casado, negociante, residente em Margão, Locximim Porbinim, viuva de Nilconta Ramá Porobo Dessai, de Ponchovadi e residente em Parodá e Quesoa Soirú Poi Angló, casado, proprietario, de Cuncolim, sendo que a favor do dito José Paulo se acha registada uma hipoteca no livro C onze, sob o numero 4129, para segurança da quantia de 98:15:00; a favor do dito Voicunta uma hipoteca no livro C 5, sob o n° 1294, para segurança de 300:00:00; a favor do mesmo Voicunta uma penhora no livro F 2 sob o n° 917, para segurança de 300:00:00 e seus juros e penas; a favor do dito Locximim uma penhora no livro F 3, sob o n° 1273, para segurança de duas prestações vencidas e vincendas em dobro da quantia de 94:08:00; a favor do dito Camotim uma hipoteca no livro C 4 sob o n° 986, para segurança de 650:00:00; e a favor do dito Angló uma hipoteca no livro C 9 sob o n° 3091, para segurança de 800:00:00. A contribuição de registo por inteiro e as despesas de praça ficam a cargo do arrematante. Para ser publico se expediu este.

Xeldem da Comarca de Quepem 24 de Dezembro de 1925.

Escrivão
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juizo de direito
R. Colaço

especial na ... excesso que *obrigam* os profes- | tão publicados no Bol. Of ...

O BHARAT

ECOS E CRITICA

NAO SERA' AINDA ?

Falando á Comissão dos Proprietarios, no dia 11 deste, disse s. excia o sr. Governador que instara mais de uma vez, com o governo da Metropole pela regeição do diploma legislativo n.° 161, que estava pendente, não podendo porisso regulamentar em outras bases o diploma n.° 38.

Crêmos que s. excia. labora num equivoco. Não se faz preciso, em nossa modesta opinião à Metropole regeitar o diploma n°. 161. Desde o momento em que o Governo da Metropole convidou o governo da Colonia para emitir a sua opinião sobre o referido diploma era esta a ocasião propicia para s. excia. submeter o assunto ao Conselho Legislativo e propôr então todas as modificações, que entendesse oportunas, justas e necessarias.

O diploma n°. 161 não é para ser regeitado ou homologado pela Metropole O relatorio que precede o diploma n°. 38, da pena do sr. Ferreira da Rocha, é claro. Distribue aos C Legislativos das colonias uma função consultiva e não deliberativa. O diploma n.° 168 não agradou á Metropole? Que o governo local mandasse um novo diploma, novas sugestões. Não será tempo ainda?

UM ARTISTA CONSUMADO

Na reportagem do que se passou no Palacio do Governo, quando lá foi representar a Comissão dos proprietarios, lê se o seguinte:

"Referindo-se á situação orçamental, declarou s. exia. estar coacto para tomar qualquer medida de caracter geral, porquanto não podia bulir nos vencimentos dos quadros gerais, cujas categorías são fixadas pelo governo central."

Na categoria dos quadros gerais entram os da magistratura, dos professores do Liceu Central, Auditoria, Chefes e sub chefes dos serviços, o militarísmo Em suma.. tudo o que oprime a colonia financeira, tornando o orçamento aquela desgraça que envergonha Portugal como nação colonial.

Se s. excia não encontra meio de atacar aquele baluarte; se s. excia. deseja equilibrar o orçamento pelo processo simplista de crear impostos, neste caso, vamos reclamar aqui a presença do sr. dr. Jaime de Morais que, na creação de impostos, provou-se um artista consumado

ADIANTE, POIS!

A calcular pelo que veiu no *Heraldo*, o sr. Mariano Martins disse que era de opinião que podiam ser eliminados alguns serviços; mas que aguardava sugestões dos vogais do Conselho Legislativo

Muito nos consola verificar que o sr. Governador Gera convence-se de que há serviços superfluos ou dispensaveis. Maior, porêm, seria o nosso entusiasmo se s. excia. tomasse sobre si o encargo de apresentar ao Conselho as propostas da extincção dos serviços inuteis. Seria isto a vantagem de as propostas irem á Metropole. — Metropole que estes anos parece viver indiferente com a sorte das colonias—com o reforço de uma opinião autorisada e insuspeita como a de sua excia.

Adiante, pois! Não é coragem que lhe falta para tanto, isto é certo. Quem toma a iniciativa de crear impostos.......

Ao de leve

Apo's um silencio que nos impuzemos durante um periodo algo longo, e animados de milhores intuitos de no vo nos lançamos na arena de imprensa. Propomo-nos, desta vez, tratar neste lugar um pouco de tudo que as nossas parcas faculdades intelectuais nos permitirem. Sem tibiezas nem desfalecimentos, procuraremos defender tudo o que nos pareça digno e nos convença da sua justeza.

O ambiente que nos cerca parece estar viciado, quando, de facto, o nao esta'. O nosso *P*ais que tanto estremecemos, a nossa sociedade digna de melhor sorte e as nossas instituiçoes que nos permitem um largo desenvolvimento, dentro da sua esfera, guiados por uma mao firme e um espirito educador, cedo nos revelarao quanto no's perdemos pela nossa incuria e pela politica de retaliaçoes em que inutilmente nos debatemos. O nosso pais, pequeno na extençao geografica, sensatamente administrado, e' capaz de nos elevar a' altura que atingiram as sociedades cultas. E' necessario, porem, desacosturmarmo nos da mandria que e' a nossa u'nica doença: e extirparmos o mal, entre no's inveterado, que e' o amor proprio. Nao devemos alhearmo-nos da politica, mesmo partidaria quando ela vise o bem estar geral sacrificando uma parcela dos nossos interesses. A politica partidaria, nao tendo o caracter destruidor, nao foi um estorvo ao desenvolvimento, das naçoes; mas, muito pelo contrario concorreu a que mutu'amente se auxiliasem os diversos organismos, um agindo, outro vigiando lhe os passos. Coisa diversa no's teremos de esperar entre no's, como a' primeira vista nos quere parecer. Impingem-nos estarmos condenados para arrastarmos uma vida, cheia de abrolhos. Proclamam ter chegado a nossa hora fatal, Louvam-nos como um povo culto e adiantado, conhecedor das grandes teorias que regem o sistema cosmografico. Resta-nos, porem, conhecer o que somos e de quanto somos capazes. Sem nos preocuparmos com o estudo dos grandes movimentos que outra coisa nao sao senao o efeito da causa cujo conhecimento impoe nos... devemos volver a nossa atençao a' origem da questao; e com muito menos tempo julgarmo nos emos mais felizes do que se fizessemos o contrario, indo a's avessas. A felicidade nao se herda como um legado; compete-nos a no's conquista' la.

Benso Cavour

PEDINDO JUSTIÇA ...

Lembram-se? Por ocasião das festas de Vasco da Gama escrevemos um artigo—*Séculos depois* ... fazendo uma revista sumaria da acção de Portugal nesta colonia, frisando o estado em que hoje Gôa se encontra.

Este artigo foi escrito na milhor das intenções e dentro do programa politico do *Bharat*.

Na primeira instancia, fomos condenados, sendo julgador o sr. dr. R. Colaço. Na Relação tambem fomos condenados, isto é; o acordão confirmou a sentença. Assinam o acordão *a favor* os srs. drs. Antonio Noronha, Melo Sampaio e Bruto da Costa, e *contra*, os srs. drs Júlio Seabra e Torgal Roque.

Com a venia devida, vai agora o *Bharat* bater á porta do Supremo, pedindo justiça.

O COITADINHO!

Um diario da capital bordando considerações sobre a resolução, em que o sr. Prazeres da Costa dizem insistir, de se retirar para Macau, deixando naturalmente para sempre, a sua carreira politica, escreve, como quem põe dizeres numa lousa, o seguinte:

Mal com a India por causa dos indios; mal com indios por causa da India.

O jornal pangineuse, como se vê, porodia, o Afonso de Albuquerque. Mas o conquistador de Gôa, quando proferiu as celebres palavras agonisava, pobre e abandonado, numa caravela. O *conquistador do Terreiro do Paço*, este é do nosso tempo, vai para Macau ganhar patacas, o coitadinho!

OS NOSSOS VOTOS

Realizou se no dia 10 deste a Assembleia Geral do Asilo de Mapuçá. Conhecemos o relato do que aí se passou, relato de que não nos fazemos eco porque muito zelamos o bom nome daquela util instituição.

Na eleição dos corpos gerentes a que se procedeu durante a reunião, tiveram representação ampla todas as correntes de opinião, sendo predominante a corrente que muito trabalhou para que os negocios do Asilo saissem da sombra que atrofia para a luz que vivifica.

Da antiga direcção foram con-

servados poucos membros. estes já não dirigem – exp

Que o Asilo, pelo men gora, entre em franco prog so, são os nossos votos.

O QUE HAVERA' ?

—O *Diario de Noticias*, jo de grande prestigio em Por gal, faz a reportagem do esc dalo do Banco de Angola Metropole, epigrafando-o "Maior burla de que resa historia do crime em Portug

Vamos acompanhando a te rivel fita na certeza de que vergonhoso manto de impu dade que nestes ultimos an tem vindo cobrindo varios cr mes, não irá desta vez tambe acolher á sua sombra os prota gonistas da formidavel burla.

Mas perguntamos; ¿o que ha verá de errado na estructura da sociedade portuguesa para tornar viavel um trama tene broso, com quantidade de protagonistas, como é o caso do Banco de Angola e Metropole? Será a crise economica depois da guerra, será o estado neutro a causa determinante do que se passa na Metropole? O que haverá?

SEM EFEITO

Depois do que o sr. Mariano Martins respondeu ao vogal do Legislativo sr. Roberto da Costa sobre o diplomo n°. 161, não súbsiste naturalmente a razão de ser da local *Não será ainda?*, escrita e impressa antes do conhecimento da mesma resposta; o que muito lamentamos.

Dito por não dito. Considere-se, pois, sem efeito, o nosso referido intempestivo e injustificavel suelto.

E a proposito: no suelto *Um artista consumado* publicou se no último paragrafo, a expressão—*processo simplista*. *Processo cómodo* é o que nós queriamos ali dizer.

UM TORNEIO DE PALAVRA.

Os *Heraldos* do Doming último publicam um convit aos corpos docentes e discente do país e mais aos exmos. cavalheiros e damas a uma serie de conferencias que vai haver no Liceu Central.

excesso que *obrigam* os profes- tão publicados no Bol. Of

भारत

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्यात्रिण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, माघ शु० ८ मी शके १८४७

जमावंदी खातें

१९१२ ते १९२३

जमावंदी खात्यांत १९०२ ते १९१२ या दशवार्षिक नोकरांची संख्या वरिष्ठ कचेरी व महालनिहाय कचेऱ्या मिळून जी पूर्वी १९०२ मध्यें ११३ होती ती १९१२ देक्रेतानें १४६ करण्यांत आली. म्हणजे जवळ जवळ पूर्वी पेक्षां १ चतुर्थांश नोकर ज्यास्ती घेण्यांत आले. आणि खर्चाची रक्कम जी पूर्वी एकंदर ७३१८८ रु. होती ती १९१२ त १०५६९३ रुपयांवर येऊन बसली म्हणजे नोकर सवापटीनें वाढले आणि खर्च दिडीनें वाढला. गेल्या अंकीं आम्हीं याची माहिती वाचकांना दिलीच आहे. या अंकीं १९१२ ते १९२३ सालांमधील हालचालीचें निरीक्षण करण्याचें आम्हीं ठरविलें आहे.

महायुद्धामुळें बदललेल्या परिस्थितीच्या जोरावर पगाराचें मान समान करण्याविषयीं (equiparacao) जो कायदा प्रसिद्ध झाला त्याच्यामुळें झालेल्यां वाढीचा बोजा तिजोरीवर पडल्यामुळें खर्चाचें मान या एका तपाच्या अवधींत भलतीकडेच वाढलें आहे. खालील कोष्टकानें या वाढीची पूर्ण माहिती आमच्या वाचकांस होईल.

१ दिरेत्तोर	१२८५७ रु.
१ दिरेत्तोर आजूंत	८५२४ रु.
४ प्रिमैर ओफि.	६८५७ रु
१३ सेगुंद ओफि.	१४८५७ रु.
११ तेर्सेर ओफि.	९४२८ रु. ८ आ.
१४ प्रिमैर आस्सिरांत.	९६०० रु.
४ तेर्सेर आसिस्तांत	२१७१ रु. ८ आ.
१ पोर्तेर	५७१ रु. ८ आ.
३ चपराशी	१०२८ रु. ८ आ.
६ शिपाई	१२८५ रु. ८ आ.
दफ्तर राखणारास भत्ता	१७१ रु. ८ आ.
एकूण जमा	६७३५२ रु.

उक्तदर्शनीं पाहाणारास १९१२ पेक्षा वरिष्ठ कचेरीचा खर्च कमी झाल्याचा भास होतो. पण याचें खरें कारण असें आहे कीं, महालनिहाय जमावंदी खात्याचे जे सेक्रेतार्य द फाझेंद असतात, त्यांचा पगार पूर्वी वरिष्ठ कचेरीच्या खर्चांतच आकारला जाई तो आता त्या त्या महालच्या कचेरीच्या नावें घातला गेल्यामुळें हा भास उत्पन्न होतो. बाकी बारीक पाहिल्यास यांत देखील खर्चाची वाढ वरिष्ठ अंमलदारांच्याच पगारांत ज्यास्त झाली असल्याचें स्पष्ट दिसून येतें. दिरेत्तोराचा पगार दिडीनें वाढला ! दिरेत्तोर आजूंत याचा पगार दुप्पट करण्यांत आला !

महालनिहाय कचेऱ्यांच्या संख्येंत मुरगांवची कचेरी वाढली आणि रेल्वेच्या दिरेस्सांव, ओब्रस पुब्लिस, इंप्रेस नासियोनाल, नाव्हेगासांव व असोळणेचें सरकारी आदमिनिस्त्रासांव या प्रत्येक ठिकाणीं एक पोटकचेरी देण्यांत आली म्हणजे पूर्वीपेक्षां या महालनिहाय कचेऱ्यांची संख्या बरीच वाढली. पूर्वीं जी त्यांची संख्या १४ होती ती या फेरफारानें २० वर येऊन बसली. त्या बरोबर महालनिहाय काम करणाऱ्या नोकरांच्या संख्येंतहि निष्कारण बरीच भर पडली. या एकंदर कचेऱ्यांतून सेक्रेतार्य फाझेंद जमेस धरून ८९ नोकर काम करीत असत त्या ऐवजीं आतां ही संख्या १२८ वांवर येऊन बसली ! म्हणजे या दहा वर्षांच्या अवधींत नोकरांची संख्या केवळ महालनिहाय कचेरीपुरतीच पाहिल्यास जवळजवळ दिडीनें वाढली आहे ! आणि या एकंदर पोटकचेऱ्यांचा खर्च व खजीनदारांस द्यावयाचा भत्ता [cotas) मिळून ९०७३६ रु. होते. हीच बाबत १९१२ सालीं ४८ हजारांच्या आंत होती. अर्थात खर्चाच्या दृष्टीनें दुप्पट वाढ झाली म्हटलें पाहिजे.

या खेरीज हिशेबतपासणी खातें [Auditaria) या नावांची जी एक नवीनच पोटकचेरी या जमावंदी खात्यास जोडली आहे, तिचा खर्चहि बराच दांडगा असून तींत एकंदर १३ नोकर काम करतात. सरकारांतून होणारा खर्च कायदेशीर असतो कीं कसें हें पाहण्याचें काम ही कचेरी करते. मोठमोठ्या पगाराच्या लठ्ठ लठ्ठ नोकरानां वगळून खालच्या नोकरानां त्यांच्या नेमणुकीच्या वगैरे वगैरे बाबतींत सतावून सोडण्याची या खात्याची हातोटी कांहीं विलक्षणच आहे. गेल्या ४–५ वर्षांत या खात्यांतून महत्वाचीं अशीं दोन तीनच कृत्यें झालीं आणि तीं म्हणजे फोंडेच्या आदमिनिस्त्रादोराच्या जागीं जकात खात्यातील एका नोकराची नेमणूक झाली होती तिला आळा घालणें, लिसेवांतील प्रोफेसर एकाच वेळीं नोर्मालातहि काम करुन दोनहि पगार घेऊं इच्छित होता त्याला बंद करणें व गोव्यात आपल्या वर्तनक्रमानें बरीच प्रसिद्धी पावलेल्या प्राथमिक शिक्षण खात्यांतील माजी इंतेरीन इंस्पेत्तोराच्या कांहीं योजना हाणून पाडणें ही होत. आणखीहि कांहीं केलें असेल, परंतु त्या खात्याच्या पायीं या पांच वर्षांत जो खर्च चालला आहे त्याच्या मानानें पाहूं गेल्यास हा फायदा म्हणजे आवळा कोहळा न्यायाचाच होय. अगदीं कालपरवां मुरगांवच्या सरकारी वकिलाच्या नेमणुकीचा जो बेकायदेशीर प्रकार घडला त्यांत कांहीं या खात्याला शास्त्रार्थ सांगतां आला नाहीं हें लक्ष्यांत घेतलें म्हणजे आमच्या म्हणण्याची सत्यता पटेल.

१ आवदीतोर	१९८८६ रु.
१ मुख्य तपासनीस	६८५७ रु.
२ तपासनीस	५४८६ रु.
३ दुय्यम तपासनीस	६००० रु.
३ तिय्यम तपासनीस	४६२८ रु.
१ टायपिष्ठ	८५७ रु.
२ शिपायी	४२८ रु
दोघां तपासनीसानां कचेरी चालविण्याबद्दल जादा	१०२९ रु
आवदीतोरास फिरतीचा भत्ता	२५७१ रु.
मुख्य तपासनीसास आवदीतोराचें काम पडल्यास भत्ता.	१०२९ रु.
आवदीतोरासहित कोंसेल्य फिनासच्या ३ मेंबरांस	६४५० रु
१ टायपिस्ट	८५७ रु.
सेक्रेटरीच्या कामाबद्दल	५१४ रु.
१ शिपायी	२१४ रु.
एकंदर जमा.	५६८०६ रु

या खात्याचा मुख्य विशेष हा आहे कीं, या ५७ हजार रुपयांपैकीं २४॥ हजार एकटा आवदीतोरच खाऊन बसतो ! शेत राखणारें हें कुंपण आहे. या कुंपणासहीत सर्व खात्याचा आढावा घेतला तर १९२३–२४ सालीं सांऱ्या जमावंदी खात्यात १९४ नोकर वर्षाचे उक्ते २१४८९५८.८. घेत असतात. ह्या खर्चाचें १९०२ सालच्या जमाखर्चाशीं प्रमाण पाहिलें म्हणजे घडकीच भरते. त्यावेळच्या एकंदर ११३ नोकरात आज ८१ नोकराची भर पडली आहे व त्या वेळच्या ७३ हजार रुपयांच्या जागीं तीच रक्कम तिप्पट झाली आहे. काम वाढलें आहे म्हणावें तर खरोखर जमावंदी खात्यास काम तें प्रत्यक्ष करांच्या वसुलीचेंच विशेष पडतें व त्याच्या खालोखाल अबकारी वसूलीच्या कामाचा दर्जा लागतो. तेव्हां या दोनहि प्रकरणाची छाननी केल्यास या विषयींचा काय तो खरा अजमास होईल. पैकीं पहिल्या बाबतींत १९०२ चें उत्पन्न व आजचें उत्पन्न यांत केवळ तीन लक्षाचेंच अंतर आहे. एकंदर उत्पन्न १२३२००० होतें त्या जागीं तें १५४२००० झालें आहे. आणि अबकारी खात्यांत जी वाढ झाली ती तर एक दीड लक्ष रुपयांची आहे. अर्थात ह्या खात्यावर साडेचार लक्षांचा हिशेब राखण्याचें जें नवें ओझें पडले त्या ओझ्यामुळेंच ही ८१ नोकरांची भर पडली असें म्हणावें लागतें. यावर कांहींच कात्री चालविणें शक्य नाहीं काय ?

महाल निहाय कचेऱ्यांत काम करण्यास म्हणून जी कारकुनांची संख्या अंदाज पत्रकांत दिली आहे ती फुकट फुगविलेली आहे ते वढ्या कारकुनांची गरज नाहीं हें पुष्कळशा कचेऱ्यांत असलेल्या कारकुनांची संख्या अंदाज पत्रकांतील संख्येपेक्षां कमी असते व असें असतांहि काम यथायुक्त चाललें आहे तें आहेच. शिवाय नोकरांची संख्या वाढविल्यानें कामाचा उरक होतो म्हणावें तर केवळ कागदी घोडे नाचविण्यापलीकडे विशेष कांहींच होत नसतें. याचा प्रत्यंतर पुरावा म्हणजे " खर्च वाढला आहे याचें काय ?" या आमच्या अग्रलेखांतील दीवचें उदाहरणच होय व नुकत्याच झालेल्या केपें व सांगें येथील तिजोऱ्यांतील अफरातफरी कांहीं कमी पुरावा देत नाहींत ! परवां डेपुटेशनाची मुलाखत झाल्यावेळीं ना. गव्हर्नर साहेबांनीं कात्री कुठें चालवावी याची जी पृच्छा केल आहे तिला या दोनहि लेखांनीं थोडीशी मदत होईल अशी आशा आहे.

स्फुट विचार

डेपुटेशनानें दिलेला अर्ज :— पणजीच्या जाहीर सभेंत निवडल्या गेलेल्या डेपुटेशनानें गेल्या ता. ११ सोमवार रोजीं ना० गव्हर्नर साहेबांची मुलाखत घेतली. व जमीनदारांतर्फेंच्या तक्रारीची मुद्देसूद मांडणी केलेला एक विस्तृत अर्ज, डेपुटेशनचे अध्यक्ष सिं. मिनेझ ब्रागांस यनीं नामदारांना वाचून दाखविला. त्याची उल्लेखित रचना सिं. मिनेझ ब्रागांस यांच्याकडून झाली असल्यामुळें, तो कसा असेल याचा आणखी विशेष विचार करण्याचें कारण नाहीं. आमच्या वाचकांच्या माहितीकरितां उपरोक्त अर्जांतील महत्वाचे मुद्दे तेवढेच पण शक्य त्या विस्तारानें आम्हीं खालीं देत आहों. ते येणेंप्रमाणें आहेत.

नारळाचा व भाताचा दर वाढला तरी, ही वाढ आमच्या जमीनदार वर्गाच्या हातीं नाहीं. किंवा आमच्या व्यापारी वर्गाच्याहि ताब्यांत या वाढीच्या किल्ल्या नसतात. ती इंग्रजी हिंदुस्थानांतील परिस्थितीप्रमाणें ठरविली जाते आणि म्हणूनच ती अनिश्चित असते. खेरीज इंग्रजी ड्यूटी, वाहतुक व दलाली मिळून इंग्रजींतील भावापेक्षां इकडे सरासरी २२ रुपयांची घट नेहमींच असते. मशागतीच्या अभावीं उत्पन्न तुटवें आहे म्हणणाऱ्यांनीं सिं. पेद्रु कुर्स्य आपोंउ या सरकारी तज्ज्ञांनीं, आपल्या नारळी रिपोर्टांत याविषयीं विवेचन केलें आहे त्याकडे लक्ष्य द्यावें. असोळणेंच्या सरकारी बागांतून मशागतीची कमताई केव्हांच नव्हती, तरी पण तेथेंहि उत्पन्नांत तूटच आली आहे. तसेंच मशागतींचा खर्चहि वाढत्या प्रमाणांत आहे. आणि तो आज जवळ जवळ तिप्पटीवर पोंचला आहे. पण असें असतांहि मजुरांची टंचाई असल्यामुळें मशागत करणं जमीनदारांना दत्तरोत्तर अशक्य होत चाललें आहे. उत्पन्नाची तूट व खर्चाची वाढ हे दोन मुद्दे सिद्ध करावयाला सरकारी

especial na chamadas ...
excesso que *obrigam* os profes- | tão publicados no Bol. Of co- ...

आह्मीं गरीब कीं श्रीमंत ?

[ले०— सहकारी]

वदला नाहींतर मरून जाल

—श्रीरामतीर्थ

सरकारनें आपला अधिकार गाजवून नोकरशाहीची स्थिति सुधारण्यासाठीं ह्मणा किंवा आपल्या आवडत्या प्रजेची हरएक सुधारणा करण्यासाठीं ह्मणा, 'सर्वारंभा स्तंडुला यत्रमूल:, या न्यायास जागून नवे कर बसवून आपल्या, त्याच्या कसली, जनतेच्याच तिजोरीचें उत्पन्न वाढविण्याचें धोरण पत्करिलें तर त्यावेळीं आह्मीं मागला पुढला सर्व संबंध विसरून एकदम आमच्या गरिबीची द्वाही पुकारतों आणि सरकारास आपल्या इच्छित कार्यापासून परावृत्त करण्यास पाहतों. सरकार व प्रजा यांचा संबंध जडल्या पासूनचा इतिहास पाहिला तर सरकारनें कराच्या नांवांखालीं प्रजेकडे पैशाची मागणी करितांच तिनें स्वसंतोषानें तो दिल्याचे अपवाद थोडेच दिसून येतील.आपण कितीहि श्रीमंत असलों तरी देव आणि राजा यांच्यापुढें गरीब ह्मणून घ्यावयाला कोणासहि लाज वाटत नसते. तर उलट तो एक शोभेचा किंवा मर्यादेचा, अदबीचा प्रकार समजला जातो. सरकारी करांची लाट आदळण्याचा संभव दिसतांच आपण गरीब गरीब ह्मणून आडमार्ग धरण्याचा क्रम राजसंस्थेइतकाच जुना असणें संभवनीय आहे. प्राचीन काळच्या प्रजेमध्यें असणारे इतर कोणतेहि बरेवुरे स्वभाव कालमानानुसार बदललेले दिसले ह्मणून कांहीं नवे कर टाळण्याचे आणि तेहि गरिबीच्या नावांखालीं टाळण्याचे प्रयत्न करूं पाहण्याचा स्वभाव अद्याप एक जात बदलल्याचें दिसत नाहीं. प्रजेनें कर चुकविण्यास आपली गरिबी चव्हाट्यावर मांडावी आणि सरकारनें तितक्या पुरता आपला बहिरटपणा निःशंक प्रगट करावा, हे मार्ग राजरोस उभयपक्षीं एकसारखे चालले आहेत. निगरगट्ट अंतःकरणानें बसविलेले कर दुःसह असले तरी थोड्याच काळांत ते चुकारपणा करणाऱ्या प्रजेच्याहि पचनीं पडतात. संवयीमुळें त्या करांचें नाविन्य गेलें ह्मणजे जड व ह्मणून अप्रिय वाटत असलेले तेच कर स्वाभाविक वाटूं लागतात. चाणाक्ष सरकारला हा फरक समजून आला कीं तें पुनः नवे कर लादण्याची तयारी करितें. प्रजाहि आपली गरिबीची ढाल नित्याप्रमाणें पुढें करिते. या सर्व नाटकी प्रकाराला ओळखून शहाणें बनलेलें सरकार, प्रजेनें कितीहि घरबसल्या आपल्या 'वदनस्थानस्थित' जिभेनें या तरवारीचे पट्टे चालविले आणि नित्याच्याच गरिबीची ढाल पुढें केली तरीहि आपला रोखलेला मार्ग तसूभर सोडण्यास तयार नसतें. या सर्व प्रकारांची जणूं काय पूर्वी प्रमाणेंच एक नवी आवृत्ति, कांहीं किरकोळ फरकानें, सुधारलेली ह्मणा पाहिजे तर, निघत असते आमच्या गोव्यांत हा रोजचाच अनुभव आहे. सरकारनें नवे नवे कर लादावे, आह्मीं घरबसल्या थोडी तोंडपाटिलकी करावी, वर्तमानपत्रांतून, फार झालें तर एखाद्या जाहीर सभेंत, नकली श्रीमंत बनून येऊन, तोंडानें गरिबीचें प्रदर्शन करावें आणि मोटारगाड्यांतून परत घरीं जावें पुढें अखेरीस सरकारला, रेपुब्लिकला, देपुतादला व शेवटीं कराचीं वसुली करणाऱ्याला दोनचार शिव्या हांसडून निमुटपणें मुदत भरतांच कराची भरती करून पावती घ्यावी व दुसरें वर्ष संपण्यापूर्वी हे सर्व प्रकार विसरून जाऊन पुनः सरकारला नवे कर बसविण्यास मार्ग मोकळा करून ठेवावा या गोष्टीच्या येथें नव्या नव्या आवृत्त्या निघतच आहेत. अगदीं शेवटची निघूं पहात असलेली, अर्धी अधिक निघालेली आवृत्ति ह्मटली ह्मणजे दरवार्डानें होऊं घातलेली करवाढ ही होय. यांहि खेपेस आह्मीं गरिबीचाच आश्रय केला हें येथें सांगण्याची गरज नाहीं.

हरहर ! ज्या हिंदुस्थान देशाला परद्वीपस्थांकडून सुवर्णभूमि असें सार्थ नामाभिधान योजण्यांत येत होतें; ज्यांच्या संपत्ति. परिमलास भाळून देशोदेशींचे संपत्तेच्छु लोक विविध वेशांत व विविध नांवाखालीं येथें येण्याचें साहस करीत असत; अनेक देशांतील शूर वीरांनीं स्वाऱ्या करून अगणित धनाची लूट नेली तरीहि उणेपणा भासला नाहीं, त्याच देशांतील रहिवाश्यांना, आह्मां हिंद पुत्रांना परकी सत्ताधिकाऱ्यांपुढें दांतीं तृण घेऊन आम्हीं गरीब, आम्हीं गरीब ह्मणून जाहीर रीतीनें धोंड काढून घेण्याची पाळी यावी हें खरोखर खेदकारक आणि चिंतनीय आहे !

आह्मांवर वरचेवर गरीब ह्मणवून घेण्याची पाळी येत असते आणि आम्हींहि विनदिक्कतपणें तिचाच काळवेळ प्रसंगानुसार अवलंब करितों ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट असली तरी आम्हीं खरोखरीच गरीब आहोंत कीं केवळ सरकारला आमच्याच पण आमच्या परिस्थितीची खरी ओळख नसलेल्या परदेशीय अधिकाऱ्यांच्या तंत्रानें चालणाऱ्या सरकारला फसविण्याकरितांच हा आमचा नुसता गरिबीचा बहाणा आहे याचा विचार प्रत्येक गरीब ह्मणवून घेणाऱ्यानें तरी अवश्य केला पाहिजे. पूर्ण विचारांतीं जर आह्मांस आढळून आलें कीं आम्हीं खरोखरीच गरीब आहोंत तर मग आमचा तो गरीब ह्मणवून घेण्याचा हक्क सरकारचाच नव्हे तर कालाच्या वापाच्यानेंहि हिरावून घेतां येणार नाहीं. आणि आम्हीं गरीब नसून दिढिजाद श्रीमंतांचे वारसदार आहोंत, सोन्या रुप्याचीं फुलें आपणांभोवतीं ओंवाळून टाकणाऱ्या श्रीमंताच्या या हिंदभूमीचे–सुवर्णभूमि या सार्थ नांवानें प्राचीनकाळीं ओळखल्या जाणाऱ्या या हिंदभूमीचे सुपुत्र आहोंत अशी जर आमची खात्री झाली तर नुसते परमेश्वर स्वरूपी असें मानल्या गेलेल्या सरकारला फसविण्यांत फायदा तरी कसला ? बाकी या फसविण्यानें सरकार कांहीं कधींहि फसलें नाहीं. आम्हीं मात्र डोईवर गरिबीचा पदर ओढून घेऊन सरकारपुढें भागुबाईपणा प्रगट करीत राहिलों. या भागुबाईपणाचे परिणाम विपरीत व्हावयाचे ते झाले व होत आहेत. आजकाल गरिबांस पायांखालीं तुडविणें, त्यांस हाल अपेष्टांत पाडणें, त्यांच्या मुखदुबळेपणाचा फायदा घेणें यासारख्या गोष्टी शूरत्वाच्या निदर्शक अशा गणल्या जातात. गरीब दुबळ्या लोकांच्या हालांतच श्रीमंतांची श्रीमंती व राज्यकर्त्यांची इभ्रत जन्म पावते. गरिबांनीं श्रम सायास करावे व श्रीमंतांनीं चैन करावी हा एक कायदेशीर व्यवहार आहे. मोठा मासा लहान माशाला खातो त्याप्रमाणें श्रीमंत आणि त्या श्रीमंतांहून परमश्रीमंत असणारें सरकार गरिबांच्या जीवावरच पोसत असतें. तुम्हीं गरीब ह्मटलें कीं, तुह्मांस श्रीमंतांच्या आणि परम श्रीमंत सरकारच्या आहारीं जावें लागणार याचा नीट विचार करा. सरकारशीं सामदामाचे दोन हात करण्यास गरिबांची गरिबी कधींच कामास येत नसते. गरिबीचा आश्रय घ्यावयाचा सोडून आम्हीं जर श्रीमंत गरीब वगैरे कोणत्याहि वर्गांत असूं शकणारी माणुसकी पुढें केली तर त्याहून उपयोग होईल याची खात्री बाळगा. श्री रामराज्यांत श्रीयुधिष्ठिर राज्यांत, श्रीविक्रमराज्यांत आणि अगदीं अलिकडे श्रीशिवराज्यांत तुमच्या गरिबीची विचारपूस होत होती. तो काल आतां बदलला. तुह्मालाहि कालप्रमाणें बदललेंच पाहिजे. हा काल माणुसकीचा आहे. तुम्हींहि माणुसकीचाच अवलंब करा. परिस्थितीप्रमाणें बदलणार नाहीं तर मरून जाल.

—रायचंदर येथील श्री शारदा वाचन मंदिर या संस्थेचा १३ वा वार्षिक वाढदिवस समारंभ रा. रा. बाळकृष्ण प्रभू न्हावेलकर यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. समयास अनुरूप अशी रा. रामचंद्र लवंदे, रा. वैकुंठ नारायण शेटये, आचरेकर मास्तर यांचीं व्याख्यानें झालीं.

—म्हापशें येथें बालसमाजाकडून बाल वैश्य या नावाचें त्रैमासिक [हस्तलिखित] बाहेर पडत आहे तरी सर्व ज्ञातिबंधूनीं आपले लेख, कविता, चित्रें वगैरे पाठवावीं. पा. प. श्री दुर्गावाचन मंदिर, म्हापशें.

—लोलीं येथें श्री शिवाजी विद्यालयांत रा. जयवंत शिवा शिरोडकर हे उत्तम तऱ्हेचें शिक्षण देतात असें एक 'अ'कळवितो.

बाजारगप्पा

कायदेकानू

लेखक— विनोदराव

जे लोक सदाचारानें वागतात, त्यांना जन्मांत एकदां तरी कायदा विचारण्याचा प्रसंग येतो कीं नाहीं याची शंकाच आहे. कारण कायद्याचें सार ह्मणजे सदाचार. साखर ही जशी गोडीपासून निराळी नसते. साखर दिल्यानंतर ही गोडी घ्या असें म्हणावयाचें कारण नाहीं, साखर आणि गोडी एकच, तद्वतच कायदा आणि नीति यांची सांगड आहे.

फक्त एकदांच अपराध करणाराला एक वेळ क्षमा करून सोडून द्यावा, हा अपराध करणाराला कायदा झाला. ज्यानें मुळीं अपराधच केला नाहीं त्याला या क्षमेचा सवंग सवलतीचा काय उपयोग ? पण जग हें विविध असल्यानें कायदेकानू निर्माण करावे लागले.

राजा कालस्य कारणम्:— गेल्या दिवसांमागें ना. गव्हर्नर साहेबानीं राजीनामा दिल्यामुळें गोमांतकभर माजलेली खळबळ अद्याप शांत झाली नाहीं. ना. गव्हेर्नादोर साहेबानीं कौन्सिलांत बील आणलें व लोकनियुक्त सभासदांनीं त्याला पाठिंबा दिल्यामुळें तें पास झालें. उपरोक्त बिलामुळें पेन्शनर लष्करी ओफिसियालांच्या अवास्तव वाढविलेल्या पेन्शनांत काट मारला जाऊन आमच्या तिजोरीवरील सरासरी एक लक्षाचा बोजा उतत होता. लष्करी पेन्शनरांच्या पायीं १९२३ ते २४ सालींच ओफिसियाल १७०९३६ रु. व शिपाई वगैरे मिळून ७५०३४ रु. केवळ पगारापायीं [Pret.] खर्च होत. या खेरीज पोटगी [alimentaçao] पोषाख (fardamento) इत्यादि कलमें आहेत तीं निराळीं. ह्मणजे उपरोक्त सालीं केवळ पेन्शनरांच्यासाठीं २४५९७० रु. खर्च होत. या खर्चाचें ओझें हलकें व्हावें या साठीं सदर बिल पास करण्यांत आलें होतें. पोर्तुगाल सरकारनें त्याला आपली मान्यता दिली नाहीं आणि येथूनच ना. गव्हर्नर साहेबानीं हट्ट धरला. एक तर कौन्सिलच्या मदतीनें पास झालेलें बिल मान्य करा नाहीं तर राजीनामा असा हा पेंच आहे. वरिष्ठ सरकारानें त्यांचा राजीनामा मंजूर केला नाहीं खरा पण बिलासहि अद्याप मान्यता दिली नाहीं. या साऱ्या गडबडींत एकंदर गोमांतकीय जनतेनें एकहि बदसूर न काढतां नामदार साहेबांच्या पहिल्या मागणीला जोराचा पाठिंबा दिला व राजीनामा मंजूर होऊं नये अशा अर्थाचा तारांचा पाऊस वसाहत मंत्र्यांवर केला. गोव्याच्या प्रजेला आपलें हिताहित समजतें व दिलेल्या अधिकारांचा योग्य उपयोग तिला करतां येतो. एवढी गोष्ट या प्रकारानें सिद्ध झाली. गत ना. जायम मोराइश यांच्या राजवटींत शिक्षण सुधारणेचा कायदा (Projecto de reorganizaçao do ensino) तयार होऊन त्याला व तशाच इतर अनेक बिलानां निरनिराळ्या पद्धतीनें धूळ चारण्यांत आली होती पण त्या वेळीं प्रजेनें कोणतीच हालचाल केली नाहीं. आणि आज तर गोमांतकांत मारे खळबळ माजली आहे. याचा उलगडा वरील सुभाषितांतच शोधला पाहिजे.

इकडे कायदा चुकला, तिकडे धोरण सुटलें:— आमच्या मतें या बाबतींत गोवा सरकार व वसाहतमंत्री या उभयतांचीहि थोडीथोडी चुकी आहे. प्रस्तुतच्या नामदार साहेबानां वसाहत मंत्र्याची जागा बराच काल उपभोगली असल्यानें भारामार देकेत प्रसिद्ध करून, वसाहतमंत्र्याचें ऑफिस वसाहत सरकारनां पेंचांत कसें आणतें याची त्यांना चांगली स्पष्ट जाणीव असली पाहिजे

शेवटचाच खुलासा

एलेसांव पुराणावर स्वयंसेवकानें जी टीका केली, तिला उत्तरादाखल शंका-निरसन प्रसिद्ध करण्यांत आलें होतें; पण त्यामुळें पुष्कळ चिडून जाऊन स्वयंसेवकानें आपल्या डिसेंबरच्या अंकांत एक स्फुट लिहिलें असून त्यांत आमचा – त्यांच्या मतें – खरपूस समाचार घेतला आहे! वस्तुत: शंका निरसनामुळें त्यांना चीड येण्याचें कांहीं कारण नव्हतें; कारण त्यांत कोणावरहि टीका नसून खुलासा केला होता; पण पुराणाच्या प्रसिद्धी मुळें आधींच मत्सरग्रस्त झालेल्या स्वयंसेवकाला या उत्तराचा अधिक राग आला असावा असें त्यांच्या स्फुटावरून दिसतें. या स्फुटावरून चाळण फिरविल्यास त्यांत एकहि मुद्दा शिल्लक रहात नसून इरसाल व वेंचीव शिव्या मात्र जागोजाग पेरलेल्या आढळतात! प्रत्येक नामामागें एकेक शिवीचें विशेषण बिनचूक घालून स्वयंसेवकानें मराठी भाषेंतील कोणत्याहि सुप्रसिद्ध कुचेष्टेखोर व निंदाप्रेमी लेखकाला लाजविलें आहे यांत शंका नाहीं. सदर स्फुट हें संपादकांचें असो, अगर त्यांच्या भात्यांत शिरून आमच्यावरील द्वेष उगवून घेणाऱ्या दुसऱ्या कोणी सद्‌गृहस्थांनीं लिहून दिलेलें असो, कसेंहि असलें तरी एका लहानशा स्फुट लेखांत इतक्या शिव्या देतां आल्या याबद्दल लेखकाचें कोणालाहि आश्चर्यच वाटेल! हें स्फुट वाचून खेडेगांवांत संध्याकाळीं कोंबडें चोरीस गेलें असतां गांवकरणीच्या तोंडांतून जे अपशब्द बाहेर पडतात त्याचाच अनुवाद स्वयंसेवकानें केला हें पाहून परम खेद होतो! बाकी शिव्या देणाऱ्याची बाजू सबळ कीं लंगडी हें जाणण्याइतका शहाणपणा आज वाचकांच्या अंगीं आहे.

स्वयंसेवकानें या स्फुटांत स्वतःच्या ठेवणींतील म्हणून जे अपशब्द आपल्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून वापरले आहेत ते सोडून दिले तर कित्येकांचा गैरसमज होण्यासारखीं एक दोन विधानें केलीं आहेत, आणि त्या विषयींचा खुलासा मात्र करणें जरूर आहे. स्वयंसेवक म्हणतो कीं, 'डॉ० बोरकर यांच्या सूचनेवरून हें पुराण मी लिहिलें, संघिस्तांसमोर तें वाचून दाखविलें आणि संघानेंच खर्च देऊन तें छापविलें' असें मी लोकांना सांगतों. ही कादंबरी त्यांची त्यांनीं रचलेली दिसते! कारण ही गोष्ट मुळांतच खोटी आहे. पुराण प्रसिद्ध होण्याच्या अगोदर एकाहि संघिस्ताला तें माहीत नव्हतें; आणि ती जबाबदारी एकट्याचीच असल्यावरून संघिस्तांना पूर्वी दाखविण्याचें कारणहि नव्हतें. सदर पुराणाचा प्रागतिक संघाशीं कांहींच संबंध नाहीं असा खुलासा मी 'शंकानिरसनांत केला असतां स्वयंसेवकानें हा मुद्दा मुद्दाम आपल्या दृष्टिआड केला आहे याला काय करावें? शिवाय, पुराणलेखनाची स्फूर्ति फोंडा येथें झाली, तेव्हां प्रणजीत रहाणाऱ्या डॉ० बोरकर प्रभृति संघिस्तांचा यांत संबंध कसा येणार? बरें, या प्रकरणांत संघ व डॉ० बोरकर यांचा संबंध आणून स्वयंसेवकाला कोणता हेतु साध्य करावयाचा आहे? डॉ० बोरकर प्रभृति संघिस्तांचें मन यामुळें कलुषित होईल अशी त्यांना आशा आहे काय? डॉ० बोरकर हे माझे आज अठरा वर्षांचे स्नेही आहेत, आणि ते अगर संघिस्तच काय पण गोमांतकांतील सुशिक्षित समाज रा. प्रियोळकर व भाई देसाई या दोघांनाहि ओळखतो. तेव्हां स्वयंसेवकानें पुष्कळ निंदा केली तरी त्यापासून माझें काहीचेंहि नुकसान होणार नाहीं.

दुसरें, मी त्यांच्याकडे जाऊन गयावया केली असें ते म्हणतात! पण गयावया करण्याचें कारण काय? पुराणासंबंधानें तुमच्यावर कोणतीहि कायदेशीर जबाबदारी येईल तर ती घ्यावयाला मी तयार आहें, असें रा. प्रियोळकर यांना सांगितलें होतें, आणि याचें कारण आपल्या कृत्याची जबाबदारी दुसऱ्यावर पडूं नये हेंच होय! शिवाय, प्रियोळकर यांच्याशीं मी प्रेमानें वागत होतों, तेव्हां निष्कारण आपल्यासाठीं त्यांना तोशीस कां? असाहि माझा त्यांना भेटण्यांत उद्देश होता. हें सांगणें त्यांना केविलवाणें वाटलें, तर आज भाषेचा अर्थच बदलला म्हणावयाचा! माझ्या कोणत्याहि कृत्याची जबाबदारी घेण्यास मी आजवर डगमगलों अगर कुचराई केली असा पुरावा नाहीं. असें असतां एखाद्या पत्रकारसंबंधानें मजवर भित्रेपणाचा आरोप फक्त स्वयंसेवकानेंच करावा, कारण हें त्यांच्या आजवरच्या कारकीर्दीस सहज शोभून जाण्यासारखें आहे. स्वयंसेवकाची आजवरची कामगिरी पाहिली व लेखणीचा इतकून दुरुपयोग करण्याची त्यांची वृत्ति लक्षांत घेतली, तर मला त्यानें शिव्यांच्या भडिमाराखालीं ओढल्याबद्दल विषाद मानण्याचें कारण नाहीं. निंदा हा त्यांचा स्वभावसिद्धच धर्म असून ती त्यांना उत्तम साधली आहे! मात्र मला ती त्यांची वृत्ति अपकारक नसून उपकारकच वाटते. 'दुर्जनाच्या तोंडीं साबणाची वडी। धुती घडोघडी माझीं पापें" या वचनाप्रमाणें स्वयंसेवकानें केलेली निंदा केव्हांहि बिनमोलच ठरेल! बाकी माझ्यासंबंधानें विचार करावयाचा झाल्यास स्वयंसेवकानेंच काय पण इतर निंदकानीं केलेली निंदा अगर नालस्ती सहन करण्याइतका शांतपणा परमेश्वरानें आपणास द्यावा हीच माझी सदिच्छा आहे! स्वयंसेवकानें यापुढें कसलेहि व कितीहि आघात व आरोप केले तथापि या अप्रिय विषयासाठीं लेखणी हातांत धरण्याचा माझा विचार नाहीं. स्वयंसेवकाचें धोरण व कार्य आतां गोमांतकांत सर्वांच्या ओळखीचें झालें आहे तेव्हां, माझ्यावरील ही त्यांची क्रूरदृष्टि विस्मयजनक अगर खेदकारक अशी कोणासहि वाटणार नाहीं! इतकें सांगून मी या प्रकरणाची शेवटची रजा घेतों.

मडगांव यशवंत सू. सरदेसाई

खुलासा करा!

मडगांव येथील कांहीं होतकरू व नाट्यप्रेमी तरुणांनीं गेल्या दिवसांत सार्वजनिक फंडार्थ म्हणून, 'उग्रमंगल' नाटकाचे दोन प्रयोग तेथील श्री दामोदर नाट्यगृहांत करून दाखविले. त्यांचें उत्पन्न अजमासें १५००—१६०० रु. आलें अशी बोलवा आहे. उभय प्रयोग नाट्यकलेच्या दृष्टीनेंहि उत्तम वठले. हें त्यांस भूषणावह आहे. ज्या निमित्तानें हे दोन प्रयोग करण्यांत आले त्या फंडाचा उपयोग कोणत्या सार्वजनिक कार्यासाठीं होणार आहे याचा अद्याप उलगडा न झाल्यामुळें उदार मनानें शक्तीबाहेर नाटकाचीं तिकिटें खरेदी करणाऱ्या सार्वजनिक कार्यप्रेमी गृहस्थांचीं मनें साशंक असल्यास नवल नाहीं. पहिला प्रयोग चालू असतानां रा. दत्तात्रेय दलाल यांनीं त्या प्रयोगासंबंधाचें आगमनिगमासारखें पुराण कथन करितांना, प्रयोगामुळें होणाऱ्या उत्पन्नाचा विनियोग श्री दामोदर सेवेसाठीं होणार आहे असा थोडासा संदिग्ध खुलासा केला होता. परंतु त्यानें प्रेक्षकांचें समाधान झालें नाहीं असें मधून मधून चालत असलेल्या कुजबुजीवरून स्पष्ट दिसतें. सार्वजनिक फंडाच्या मदतीदाखल आरंभिलेल्या या सत्कार्याच्या मुळाशीं संशयाचा उंदीर राहूं देणें परिणामीं फार घातक होणार आहे. म्हणून वरील नाट्यप्रयोगांच्या व्यवस्थापक मंडळीस आमची अशी सूचना आहे कीं, यांनीं त्या गोष्टीचा जलद खुलासा करावा. द्रव्याभावीं आपल्या इष्ट ध्येयाप्रत पोंचूं न शकणाऱ्या, बालचमू, श्री दामोदर विद्यालय, श्री दामोदर वाचन मंदिर, सारस्वत ब्राह्मण समाज, दैवज्ञ ब्राह्मण समाज वगैरे संस्था मडगांवांत आहेत. त्यांस मदत करून पर्यायानें श्री दामोदराची सेवा करावयाची असा जर व्यवस्थापकांचा हेतु असेल तर त्यांत खरोखरीच औचित्य आहे. व सुदैवानें आणखी प्रयोग करून दाखविण्याचें मनांत आल्यास फिरून मदतीची याचना करण्यास जागा राहील. यासाठीं उपरोक्त खुलासा होणें जरूर आहे असें मजप्रमाणेंच इतर बहुतेक प्रेक्षकांचें मत आहे.

[एक प्रेक्षक.]

सांगें येथील उत्सव

पूर्वी प्रसिद्ध झाल्याप्रमाणें ह्या समारंभास 'संगमोदय' छापखान्यांत ता. १६।२।२६ रोजी संध्याकाळीं ६ वाजतां सुरवात झाली. समारंभास बाहेर गावांतून अनेक सद्‌गृहस्थ व पाहुणे हजर होते. तसेंच गावांतील सर्व मंडळी प्रमुख सद्‌गृहस्थांसह निमंत्रणास मान देऊन मुद्दाम आली होती. सभागृह ध्वजापताकांनीं अत्यंत सुशोभित केल्यानें व लोकसमुदायानें गच्च भरून गेल्यानें विशेष शोभायमान झालें होतें.

सभेस सुरवात होतांना श्री. ना. अ. ना. पाटणकर संपादक आर्यविज्ञान, यांनीं सभेचा उद्देश, कार्यक्रम व सर्व मंडळी आल्याबद्दल समाधान व्यक्त करून आपलें प्रास्ताविक भाषण पुरें केलें. नंतर व्यवस्थापक श्री. आ. म. साठे पुर्णेकर यांनीं अध्यक्षस्थानाचा ठराव मांडून, तें विद्वद्वर्य अ. पां. शास्त्री सहकारी यांनीं स्वीकारावें अशी विनंति केली व तिला श्री. बाबुराव कोंबी यांनीं अनुमोदन दिल्यानंतर अध्यक्ष सहकारी शास्त्री हे स्थानापन्न झाले.

नंतर, मुद्दाम निमंत्रणानें आलेले श्री. जनार्दन वि. कामत यांनीं आपलें सुश्राव्य व पोंचदार असें 'नियतकालिकाची आवश्यकता' या विषयावर व्याख्यान दिलें. अमेरिकेसारिख्या देशांत एकादा मार्जारिक्यासुद्धां वर्तमान पत्रें विकत घेऊन व वाचून सज्ञानस्थितीचा कसा फायदा घेतो व "आर्यविज्ञान" मासिकाची तूर्त आवश्यकता कशी आहे इत्यादि मनोहर विवेचन करून व्याख्यात्यांनीं भाषण पुरें केलें. या नंतर दे. भ. गो. पुं. हेगडे देसाई संपादक 'भारत' हे भाषणास उभे राहिले, त्यांनीं आपलें वर्तमानपत्र चालवितांना आलेले अनुभव क्रमवार वर्णन करून 'भारता'बद्दल आपण केलेले प्रयत्न, त्यात पडलेली झीज, इत्यादि वर्णन करून आर्यविज्ञान सुरू करण्याबद्दल रा. पाटणकरांचा धडाडी व साहस वर्णन करून क्रिस्ती व हिंदु संस्कृतींत अविरुद्धता आणण्यास सुद्धां आर्यविज्ञान कसें सहाय्यभूत आहे याबद्दल अधिकारयुक्त वाणीनें यथोचित व्याख्यान दिलें. व 'आर्यविज्ञान'च्या आवश्यकतेबद्दल एक मुद्देसूद लेखहि वाचून दाखविला. या नंतर अध्यक्षांच्या सूचनेवरून येथील रा. श्रीपादराव वालावलीकर, रा. गजाननराव नाडकर्णी व रा. बाबूराव कोंबी या होतकरू, उत्साही व सुशिक्षित तरुणांचीं समयोचित भाषणें झालीं. 'आर्यविज्ञान'ची कल्पना दृश्य स्थितींत येईल असें मला वाटत नव्हतें. पण ती या मंगल दिवसानें व्यक्त स्वरूपास आणून दाखविली याबद्दल आनंद वाटतो. अशा महत्वाच्या कार्योत्पादनाबद्दल रा. पाटणकरांचें मी गौरवपूर्ण अभिनंदन करितों, असें रा. वालावलीकर म्हणाले. त्याच प्रमाणें रा. नाडकर्णी यांनीं आर्यविज्ञान मा·

ANUNCIOS

O Bharat ano 10 numero 47 25 de Fevereiro de 1926.

Anuncio cada linha uma tanga ainda que repetida.

Numero avulso uma tanga.

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio Barreto vão ser vendidos em hasta publca, á porta do tribunal judicial, situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepêm se dirige á estação de Sanvordem, no dia 26 do corrente mez, ás 10 horas pela segunda vêz e pela metade do preço os seguintes bens: Direito á quarta parte do predio denominado "Xipiantil xeta" da cultura de arroz direito a 4a. parte do predio rustico denominado "Nomaxi pattó da cultura de arroz; direito a 4a. parte do predio denominado " Botagale" da cultura de arroz; direito a 4a. parte do predio rustico denominado "Boiraxeta" da cultura de arroz; direito a 4a parte do predio rustico denominado "Dulialem xeta" da cultura de coqueiros; direito a um 1/19 avos do predio denominado " Tolem-Pocutolem e Coporiem" da cultura de legumes; direito a 1/16 avo do predio denominado "Gorbata" da cultura de coqueiros e direito a 1/48 avo do predio denominado "Dissapattó" da cultura de arroz todos sitos em Anvem de Gaundongrem e discritos na conservatoria predial desta comarca respectivamente sob os nos. 16773 a 16780 todos no Livro B 46, e avaliados tambem respectivamente por 100, 80, 110, 58, 50, 50, 75 e 30 rupias. Penhorados nos autos civeis de execução por custas que o digno Agente de Ministerio Publico nesta comarca promove contra Rucuminim Dessaina, viuva de Bicaró Naique Dessai, de Anvem de Gaundongrem, por apenso aos autos de inventario orfanologico a que se procedeu por obito do dito Rama. São por este citados todos os credores incertos dos ditos executados e os co-proprietarios e quinhoeiros nos termos e para os fins de lei. A contribuição de registo por inteiro ficará a cargo do arrematante.

E para ser pùblico se expediu este Xeldem da Comarca de Quepem, 6 de Fevereiro de 1926

O Escrivão de Direito de 2º oficio
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
R. Colaço

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2 ° oficio, correm editos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2 ° do art. 197 do Cod. do Proc. Civ. citando Rucminim Sinainim, mulher de Pundolica Gonexama Sinai, por outro nome Vinaica Gonexama Sinai, de Nagorcem e ora ausente em parte incerta de Karvar do territorio britanico, para uma acção facultada pelo Diploma Legislativo n ° 119 de 22 de Dezembro de 1922 e instaurada contra a citanda e dito seu marido por João Climaco Manuel José da Silva Colaço, de Velim, pretendendo que sejam aqueles reus condenados a pagar-lhe a importancia de cento e quinze rupias constantes do papel particular de 11 de Junho de 19 7 com os seus juros não prescritos a 5 por cento custas, selos e procuradoria, e para até a 3ª. audiencia posterior ao praso de editos impugnar querendo o mesmo pedido sob a cominação de ser havida por confessa. Declara-se que as audencias deste juizo se fazem em todas as terças e sextas feiras ou nos dias imediatos quando aqueles forem feriados não sendo tambem estes ou não fiquem compreendidos nas ferias, no Tribunal judicial situado em Xeldem ao lado da estrada nacional que de Quepem se dirige á Curchodem, por 10 horas. Para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de Quepém, 12 de Fevereiro de 1926.

O Escrivão de Direito
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
R. Colaço

excesso que obrigam os profes- ...

O BHARAT

À PROPOSITO...

No jornal *A Epoca*, de Mapuçá lêmcs um excelente artigo intitulado *Industrias*. No final dêste escrito em que vem descrito, em poucas palavras sím, mas numa precisão suficiente, o fiel quadro negativo da existencia industrial no Pais preconisa-se o seguinte remedio como poderoso especifico da cura da nossa anemia industrial.

> "Temos de mudar da nossa orientação e enveredarmo-nos pelas industrias, aproveitando das materias primas existentes no pais
>
> Cada pais tem de bastar-se a si proprio é o *moto* ou a divisa inscrita nas bandeiras das nações.
>
> Trabalhemos por bastarnos a nós proprios ao menos em algumas das nossas necessidades, cessando assim a drenagem de dinheiro para fóra."

O que acaba de lêr-se não é nenhuma novidade, pertence ao dominio das *coisas sabidas*. Todos sabem que na India, *essencialmente agricola*, apesar de ser positiva a existencia de abundantes materias primas, é quasi negativa a industria —*quasi*, porque, o que, por ai se macaqueia sob esse nome não passa de *brinquedos pueris*—duma manifestação mórbida de *Struggle for life*

Sim; sempre se canta no mesmo diapasão: não temos industrias, sem desenvolvimento destas não devemos nem podemos esperar que a India entre na vida de progresso no caminho de propriedades.

E é certo, todavia, que, se entre nós existe algum assunto que mais se despresa, é precisamente, o que se relaciona com o fomento industrial!

Parece incrivel mas é verdade e uma verdade que entra logo pelos olhos dentro!

Mas ¿ porque é que no nosso Pais esmorece a iniciativa industrial e se não rende culto ao principio universalmente posto em pratica de—*cada pais tem de bastar se a si proprio, é o moto ou a divisa inscrita nas bandeiras das nações*?

E' que o *modus faciendi* de substentar o *Sruggle for life* conhece sò o único caminho—emprego público. Para esta comoda maneira de ganhar a vida convergem todas as nossas aspirações.

A *burocratite* é a única doença que mais dano faz á tentativa industrial, de mãos dadas ás peias oficiais. *O seguro sempre morre de velho*, eis a doutrina que todos procurám seguir para assegurar o pão seu e dos seus. E tamanha é a influencia que êssa doutrina exerce, ainda, nos que se habilitam para as chamadas profissões livres, que êles as abandonam para se alistar no funcionalismo público!

O desenvolvimento industrial está, pois, como se vê, intimamente ligado à decadencia da *burocratite*. Tirar vida a esta é dar vida áquele.

Consequentemente, para a India se convencer, praticamente, de que *tem de bastar se a si propria*. tem de compenetrar-se, antes de mais, de que lhe impende o dever de livrar-se das garras aduncas da *burocratite*. Sem isto, nada feito.

Nesta altura ocorre, naturalmente, uma pergunta: se a *burocratite* constitue um obstaculo tão poderoso para a industria livremente poder medrar ¿ qual é o meio mais eficaz de se esterilisar a mortifera acção anti-industrial da mesma *burocratite*?

E' o *Nacionalismo* que só possue o condão de atrofiar a *burocratite*, imprimindo nova orientação às aspirações da gente nova e reformando lhe, radicalmente, a velha costumeira, denunciativa de indolencia e ociosidade que será substituida por outra, indicativa da tendencia de sofrer pela Patria, de molde a que produza, em industrias, *quantum satis*, para disfructar uma vida razoavelmente autonoma— industrialmente falando, é claro.

A' imprensa patriotica do pais cumpre, portanto, em ultima analise fazer uma propaganda intensa, ordeira e metodica dos sacrossantos principios que nobilitam o movimento nacionalista, organisado pelos nossos distinctos filhos, residentes em Lisbôa e de cujo triunfo depende, ao lado doutros beneficios, o nosso esplendoroso desenvolvimento industrial.

ECOS E CRITICA

UMA DESCOBERTA

No diario *Nava Cala* (Era Nova) que em marata se publica em Bombaim lêmos a referencia dum artigo do escritor Rama Suami Ayer, de Madrasta que, á força dos seus estudos historicos, descobriu que Jesus Cristo era *hindú* e que o apostolo *S. Paulo* era *bramane*.

E' claro que a descoberta do sr. Suami produziu sensação na França e na America, paizes de cujos sectarios de Cristo proveiu, naturalmente, um chuveiro de objecções tentando esmigalhar a força probatoria da sensacional novidade; mas, segundo se depreende do aludido escrito do *Nava Cala*, o ilustre Ayer conseguiu pulverisa-las, admiravelmente. substentando a autenticidade da sua descoberta cùjos pormenores daremos aos leitores do *Bharat*, oportunamente

Crêmos, entretanto, que o resultado dos esforços do sr. Rama Suami Ayer cotribuirá muito para que, dora em diante, a palavra *hindú* não fira escandalosamente os catolicos timpanos de certos *maduros*, cá da terra, que perdem as estribeiras, quando se lhes fale em *Patria Hindú*.

Vem, pois, muito a proposito a descoberta!

INTERINIDADE

Frisam-nos:

"Jà que o *Bharat* está empenhado em vêr acabado o regime de interinidades, devo informar que ao sr. Mariano Martins não falta a vontade de extermina-lo. O que lhe falece é a sincera coadjuvação dos seus auxiliares. Assim, por exemplo, não se cumpre, ainda, um seu despacho pelo qual Sua Excia mandara abrir concurso para o provimento definitivo da vaga de secretario de Administração do concelho de Sanguem."

Falte isto ou falte aquilo, não há duvida que sobeja a... interinidade—por mal dos nossos pecados.

EIS O QUE SE QUERE

Informam-nos que o sr. director do Liceu Municipal de Margao mais se preocupa com a sua profissão de advogado do que com a de professor e director do mésmo estabelecimento, acrescentando-se mesmo que a secretaria daquele Liceu não raro se vê transformada em autentico escritorio de advocacia.

A ser verdadeiro o informe que se nos transmíte, bom é que se evite a inconveniencia que se atribui ao visado na acima registada informação.

Chacum dans son metier, eis o que se quere.

TRISTE MAS VERDADE

Com o regulamento disciplinar em vigor supunha muita gente que o regime de acumulações deixaria de ser causa de muitos rapazes novos competentes e capazes, morrerem á fome, por falta de colocação.

Pelo que parece, tal suposição ficou só em.. suposição, não havendo maneira de acabar com a acumulação!

भारत

जनसेवा ही ईश्वरसेवा ।
त्याविण दुसरा धर्म न ठावा ॥

गुरुवार, फाल्गुन कृ० ५ मी शके १८४७

आमचा लष्करी खर्च

(ले. २ रा)

गोव्याचें अंदाजपत्रक कायदे कौंसिलांत दोनदां वाचलें जाऊन पास झाल्याचें वाचकांना समजलेंच आहे. अर्थातच या विवेचनाची आज जरूरी काय ? असा प्रश्न कदाचित् वाचक करीत असतील. तर त्याला उत्तर असें कीं, आजवर गुलदस्तांतच व केवळ सरकारी खात्यांतील लोकांनांच दिसणारा हा जमाखर्च आतां प्रजेनें समजून घेतलाच पाहिजे. स्वायत्ततेच्या [autonomia] काळांत ही माहिती प्रजेनें करून न घेणें तिला घातुक होईल. आणि ह्मणूनच कितीहि अंक खर्ची पडले तरी सरकारी जमाखर्चाचा हा प्रश्न होईल तेवढ्या विस्तारानें आमच्या वाचकांसमोर आह्मी मांडणार आहों जमाखर्चाचा विचार करतांना आह्मीं तो व्यावहारिक दृष्टीनेंच करीत आहों आहों. व आतां तर दुसरीकडे या प्रश्नाचा तात्विक खल होत असल्यामुळें आमचें धोरण एकपरी कायम राखणें आह्मांला भाग व सुकर झालें आहे. एवढें सांगून आपण आपल्या मूळ विषयाकडे वळूं.

एका वर्षांतच लष्करी खर्चांत दीड लाखाची वाढ झाली असून त्यांपैकीं ८७ हजार रुपयांची वाढ कशा पायीं झाली आहे याची कल्पना देखील होत नसल्याचें आम्हीं गेल्या ता. १८ फेब्रुवारीच्या अंकांत पाहिलेंच आहे. ना० रुबेर्त द कोस्त यांनीं अंदाज-पत्रकावर केलेल्या भाषणांत मोसांबिक प्रांत व गोवा प्रांत यांतील लष्करी खर्चांची तुलना केली आहे परंतु आमच्या मतें तींत थोडीसी उणीव राहिली आहे. तशी ती राहूं न देतां या दोनहि प्रांताच्या लष्करी खर्चांचें प्रमाण पाहिल्यास आमचा लष्करी खर्च प्रमाणाबाहेर बेसुमार वाढला आहे असेंच ह्मणावें लागतें.

कोष्टक

मोसांबिक प्रांत.	पोर्तुगीज हिंदुस्थान.
क्षेत्रफळ ७७०००० किलोमीटर	क्षेत्रफळ ३७०६ किलोमीटर
लोकसंख्या सुमारें ३५ लाख	लोकसंख्या ५४८२४२
परिस्थितिः- नेहेमीं खळबळीची. लोक अडाणी	नेहेमीं शांत. लोक सुधारलेले.
एकंदर उत्पन्न ३१६७७०१०	४८७६३२४
लष्करी खर्च २१८२५४८	१२७७६४३
ह्म० शेंकडा ९ टक्के	ह्म० शेंकडा २८ टक्के
खडें लष्कर –	२ पायदळ तुकड्या ५१९ शिपायी
१ घोडदळाची तुकडी	४ पोलिस व फिस्कालिझासांव तुकड्या
२ देशी यांत्रिक तोफखान्याच्या तुकड्या	८५७ शिपायी
१ तोफखान्याची तुकडी	
१० देशी पायदळ शिपायांच्या कंपन्या	
२ कोढी व रिक्रुटच्या कंपन्या	— ६ तुकड्या
१६	
ओफिसियाल १०९	— ६२
त्यांचा खर्च ६१३८७७	— ४४९२८६ रु.
एकंदर लष्करी खर्चाशीं ओफिसियालांच्या पगाराचें प्रमाण शेंकडा २० टक्के	एकंदर लष्करी खर्चाशीं शेंकडा ३० टक्के !
पेन्शनरांचें पेन्शन यांत जमेस धरलें नाहीं.	पेन्शनर ओफिसियालांचें पेन्शन १९४३५१ धरलें आहे त्यानें शेंकडा ५० टक्के भरतें !

या कोष्टकाकडे नजर देतांक्षणींच सुरुवातीला जी गोष्ट लक्ष्यांत येते ती ही कीं, गोव्यापेक्षां २०० पट मोठ्या क्षेत्रफळाच्या व साडेसहा पट जास्ती लोकसंख्येच्या या अवाढव्य प्रदेशांत अत्यंत रानटी लोकांवर लष्करी अंमलानें (Comandos militares) राज्य चालविण्यास लागणारा लष्करी खर्च गोव्याच्या लष्करी खर्चापेक्षां अडीच पटीनें देखील मोठा नाहीं !

पुढें प्रत्येक प्रांताच्या उत्पन्नाशीं लष्करी खर्चाचें प्रमाण पाहिले तर हा फरक विशेषच स्पष्टपणानें नजरेंत भरतो. कारण गोव्याच्या लष्करी कसानें जर मोसांबिकची लष्करी खर्चाची आकारणी केली तर ती ८० लक्षांच्या घरांत गेली पाहिजे. तिकडच्या लष्करी खर्चांत ओफिसियालांचा पगार शेंकडा २० पर्यंत जातो तर इकडे तो शेंकडा तीसांवर आहे !

गेल्या लेखांकांत सांगितल्याप्रमाणें केवळ गोवें प्रांतांतील लष्कराचा इकडच्या परिस्थितीपुरताच विचार केल्यास देखील २९ ओफिसियाल व दोन लाख रुपयें इतका खर्च वाजवी पेक्षां आमच्यावर जास्ती पडतो असें आपण पाहिलेंच आहे. व हे दोन लाख रुपये आपल्याला भरावे लागतात ते सरकारी धोरणामुळेंच भरावे लागतात असेंहि नाहीं. ना० ज्यायम द मोराईसच्या अमदानींत त्यांनीं सुरवातीला वसाहतीच्या ऑफिसाकडे फाल्तु ओफिसियालांना परत नेण्याविषयीं पुष्कळच प्रयत्न करून पाहिले परंतु त्यामुळें ज्यांना गोवें सोडणें भाग पडत होतें अशा ओफिसियालांच्या [Protectores] हितकर्त्यांच्या प्रयत्नांनीं जायम द मोराईश यांचे प्रयत्न निष्फळ झाले असें ह्मणतात. काल परवां हाच प्रश्न ज्यावेळीं ता. १७ जानेवारीच्या बैठकींत कौन्सिलासमोर आला त्यावेळीं ना० मारियानु मार्तींस यांनीं देखील भर कौन्सिलांत स्पष्ट शब्दांनीं सांगितलें कीं वेळोवेळ झालेल्या लष्कराच्या पुनर्घटनेचा बोजवारा हे हितकर्तेच उडवीत असतात. बाप, सासरे, भाऊ इत्यादिकांचा आपापल्या मुलांना जांवयांना भावांना इकडच्या लष्करांत नेमून घेण्यासाठीं वसाहत मंत्र्याच्या पाठीस सारखी बरात लागलेली असते असें सांगून गोव्हेर्नादोर या नात्यानें स्वतः आपण अद्याप ओफिसियालाची मागणी तर केलेली नाहींच पण यापुढें आणखी ओफिसियाल इकडे नकोत असेंच उलट कळविल्याचें त्यांनीं सांगितलें.

या दृष्टीनें विचार केल्यास या खर्चाचें खापर आह्मां गोमांतकीयांवर आमच्याच लोकांनीं मारलें आहे असें स्पष्ट ठरतें. एकंदर वसाहतीपेक्षा इकडची हवा विशेष फायदेशीर आहे. तसेंच इतर कोलोनीपेक्षां संस्कृतीच्या दृष्टीनें गोमांतकाचा नंबर सा मान्यता पहिलाच लागतो हेंहि एक कारण या खर्चवाढीच्या मुळाशीं आहे. कारण या दोन फायद्यांमुळें युरोपियन असो किंवा हिंदी असो पण प्रत्येक ओफिसियालाला आपलें गोमांतकांतच राहणें बरें वाटत असल्यास नवल नाहीं.

ही स्थिति पालटतां आल्यास पाहावी ह्मणून गेल्या वर्षी जनरल गोमिश द कॅास्त या ऑफिसरची इकडे नेमणूक झाली होती. त्याप्रमाणें जनरल साहेबांनीं आपली योजना वसाहतमंत्र्यांकडे पाठविली होती. परंतु ती पास न होतां जनरल साहेबांचाच वसाहत मंत्र्यांशीं कोणत्याशा निमित्तानें खटका उडाला. सदर योजनेनें ६ ओफिसियाल, १८ सार्जेंत, ३८ काब, ३० युरोपियन शिपायी ३० आफ्रिकन शिपायी, २९३ देशी शिपायी, २६२ शिपायांची कंपनी पूर्वीची सेगुंद लीन्याची [!] मिळून एकंदर ६७७ इतके लोक आमच्या लष्करांतून कमी होणार होते. आणि त्यामुळें २१७८२९ रु. ची बचत आमच्या लष्करी खात्यांत होणार होती. पुढें रुरल व फ्लोरेस्ताल पोलीस नवे निर्माण झाल्यानें या बचतींतून १०६११७ रु कमी झाले. तथापि १११७१२ रुपयांची तरी काटकसर या खात्यांत झाली असती पण वर सांगितल्याप्रमाणें त्याला वसाहत मंत्र्यानीं मुळेंच वाटाण्याच्या अक्षता लावल्या व तें प्रकरण तेथेंच संपलें.

असें झाला तरी या सगळ्या प्रकाराचा दोष आमच्याकडेच आहे असें वाटतें. कारण सार्वजनिक हितापुढें व्यैयक्तिक हिताची परवा न बाळगण्याइतकी त्यागबुद्धि किंवा सार्वजनिक शिस्त आपणाला अद्याप लागलेली नाहीं. यांत देखील थोडासा तरतमभाव आहेच. गोव्याच्या प्रजेचे जे दोन भाग झाले आहेत त्यांतील ख्रिस्ती भागाला ही त्यागबुद्धीची कल्पना हिंदूंच्या मानानें पाहिल्यास अत्यंत कमी आहे व लष्करांत तर देशी ओफिसियाल सारे त्याच समाजांतील आहेत. ज्या समाजाला ही शिस्त अद्याप उमजली नाहीं, सार्वजनिक हितासाठीं वैयक्तिक हितसंबंधाचा थोडा तरी त्याग करण्याची बुद्धि जोंवर प्रजेला होत नाहीं तोंवर ती स्वराज्याला मुळीं पात्रच होत नसते आणि ह्मणूनच तिला असे अवास्तव खर्च स्वायत्ततेच्या अमदानींत देखील चालवावे लागतात.

गेल्या लेखांकाच्या शेवटीं युरोपियन शिपायांना जास्ती पगार देणें एका अर्थी रास्तच आहे असें आह्मीं ह्मटलें होतें. त्याचें कारण देखील हेंच आहे. प्रजेला आपापलीं कर्तव्यें योग्य प्रकारें पाळतां आलीं तर राजसत्तेला प्रजेवर आपली सत्ता दंडेलीनें चालविण्याचे प्रसंगच येत नाहींत. त्याचप्रमाणें योग्य वेळीं योग्य तें धाडस करून प्रसंग राखण्याचा मगदूर देखील हिंदी शिपायांत युरोपियन शिपायांपेक्षां कमी दिसून येतो. मागें कवळें येथें मंडपास आग लागली होती त्यावेळीं हिंदी व युरोपियन असे उभय वर्गाचे शिपायी तेथें हजर होते खरे पण आगींत उडी घालून ती विझवण्याचा मान युरोपियन शिपायांनींच मिळविला.

मूळ रिक्रूट भरती होतानांच जर इतर स्वतंत्र धंद्यांत नालायक झालेल्या इसमांची हिंदी शिपायांच्या कंपन्यांतून भरती होत असते तर ते कामचुकार न निघाल्यासच आश्चर्य मानलें पाहिजे. यावरून कोणी असा निष्कर्ष काढूं नये कीं सारें हिंदी सैन्यच असें कामचुकार असतें. योग्य रीतीनें रिक्रूट भरती झाली नसतानां देखील आजच्या हिंदी सैन्यांत बरेच इसम युरोपियनाच्या तोडीनें काम करणारे मिळतील. युरोपियन शिपायांचें तसें नाहीं. त्यांची

गोरक्षणाची दुसरी बाजू

ले०— निर्भयराम

१ कोठेंहि झालें तरी, गोरक्षणाचा प्रश्न हा अत्यंत महत्वाचा आहे यांत शंका नाहीं. त्यांतल्यात्यांत प्रतिवर्षीं होणारा गुरांचा संहार, दुभत्याची उत्तरोत्तर वाढती चणचण, गुरचराईकरतां आवश्यक अशा हिरवळ कुरणांचा योग्य प्रमाणांत अभाव व गोसंगोपनाच्या अज्ञानामुळें येणाऱ्या अडचणी इत्यादि कारणामुळें गोव्यांत या प्रश्नाला विशेष तीव्र स्वरूप प्राप्त झालें आहे. शेतीचें जनावर या नात्यानें असो, किंवा अत्यंत पोषक असा दुधतुपाचा खुराक मिळत असल्यामुळें असो, परंतु गाय हें जनावर आह्मांला अत्यंत उपयुक्त आहे ही गोष्ट निर्विवाद होय. आणि ह्मणूनच तिच्या संरक्षणाचा व पोषणाचा प्रश्न गोमांतकीय जनतेस, मग ती हिंदु असो किंवा हिंदेतर असो, तिला अत्यंत अगत्याचा आहे. अर्थांत गोसंरक्षणाच्या किंवा पोषणाच्या प्रश्नास चालना देणारे समाजसेवक जेवढे जास्त मिळतील तेवढे ते गोमांतकास थोडेच आहेत. या दृष्टीनें रा. रा. गो वि. बरवे यांचें आह्मां गोमांतकीयांवर बरेच उपकार आहेत. ते गोमांतकाला परके असूनहि आपल्या व्यवसायांतून मिळणारी प्रत्येक क्षणाची मिळणारी फुरसद ते या प्रश्नाच्या विचारांत व प्रसारांत खर्च करतात. हस्तपत्रकें, लेख, व्याख्यानमाला इत्यादि आधुनिक जागृतीच्या एकंदर साधनांचा सारखा पाऊस ते गोमांतकावर आज सारखें वर्ष दीड वर्ष पाडीत आहेत. अगदीं काल परवां ता. १२ डिसेंबरच्या 'हिंदु'च्या अंकांत प्रसिद्ध झालेली या विषयावरील कविता देखील त्यांच्याच मार्फत प्रसिद्ध झालेली आहे. इतका त्यांचा प्रयत्न चाललेला असतां आह्मीं गोमांतकस्थांनीं या विषयीं मुग्धताच धरावी हें अगदीं अयोग्य आहे आणि गोरक्षणाच्या प्रश्नाच्या दुसऱ्या बाजूचाहि समाजांत विचार व्हावा, या दुहेरी हेतुमुळें प्रस्तुत लेखकानें हा प्रश्न आरंभिला आहे.

२ गोरक्षणाचा व तिच्या पोषणाचा प्रश्न अवश्य हातीं घेण्यासारखा आहे. ही गोष्ट तर ठरून गेलीच आहे; पण ह्या प्रश्नाचा विचार होत असतानां आमच्यांत प्रस्तुत चालू असलेल्या इतर रेडीमेड जागृतिप्रमाणेंच या प्रश्नाचीहि विल्हेवाट लागूं नये व या विषयीं थोडासा व्यावहारिक विचारहि व्हावा या दृष्टीनें हें विवेचन होणार आहे. गाय ही उपयुक्त आहे. आणि ह्मणूनच तिचें संरक्षण व पोषण प्रत्येकानें अवश्य केलें पाहिजे. उपयुक्ततेच्या दृष्टीनें हा प्रश्न सोडविला गेला पाहिजे. परंतु कमनशीबाची गोष्ट ही कीं, या दृष्टीनें आजकाल त्याचा विचार होत नसून केवळ धार्मिक दृष्टीनेंच भावनांच्या जोरावरच तो सोडविण्याचा प्रयत्न जिकडे तिकडे दिसून येत आहे. उपरिनिर्दिष्ट रा. रा. बरवे हे देखील या नियमांस अपवाद नाहींत. इतकेंच नव्हे पण परिस्थितिभिन्नत्वाचा विचार करून तदनुसार ह्या प्रश्नाचा ऊहापोह त्यांनीं केल्याचें हि दिसून येत नाहीं. ज्या इंग्रजी हिंदुस्थानांतून ते इकडे आलेले आहेत तेथें गोरक्षणाचे प्रयत्न चाललेले जे त्यांनीं पाहिले आहेत तेच प्रयत्न ते इकडे सुरू करतात. ह्या गोष्टी सांगितल्या तर त्या कोणालाहि रुचत नसतात. तथापि तेवढ्याचमुळें त्या न सांगतां चालत असलेले चुकीचे प्रयत्न तसेच चालूं देणें त्याहिपेक्षां चुकीचें होईल. गोरक्षणाची दुसरी बाजु दाखवितानां रा. बरवे कविवर्य पणशीकर शास्त्रीबुआ आणि इतरहि कांहीं मंडळीचा लेखकावर थोडा तरी रोष झाल्याशिवाय राहणार नाहीं हें तो जाणुन आहे. परंतु असें असूनहि कर्तव्य दृष्टीनें ही बाजू दाखविण्याचें कटु कर्तव्य त्याला केलेंच पाहिजे.

३ गोरक्षणाच्या सांप्रतच्या चळवळीवर पहिला आक्षेप हा आहे कीं, ती व्यवहार्यतेच्या भरभक्कम पायावर उभारली नसून भावनामयतेच्या पोकळ पायावर रचली जात आहे. हा भावनेचा पाया पोकळ आहे. व तसा तो असायला लेखकाच्या मतें दोन कारणें आहेत. एकतर, सर्वच समाजाच्या भावना सारख्या असत नसतात अर्थात एकाला पूज्य तें दुसऱ्याला पूज्यच असतें असें नाहीं, आणि दुसरें असें कीं, आपला गोमांतकीय समाज, सारा एकाच भावनेनें प्रेरित आहे असेंहि एकवार गृहित धरलें तरी, त्या भावनेच्या मागें जोंवर शक्तीचा जोर नसेल तोंवर भावनेंतून झालेल्या आह्मां गोमांतकीयांची गोरक्षणविषयक चळवळ आपल्या ब्रिटिश हिंदुस्थानांतील मुसलमानेतर समाजाच्या राजकीय चळवळी प्रमाणें, कागदी निषेधांतच सुरून जाईल व्यवहार्य उपयुक्तता जरा बाजूला ठेवून भावनेचाच विचार प्रथम पाहूं. गोमांतकीय समाजांत आधीं उघडे दोन समसमान तट आहेत. शरीरसंपत्तीनें, अधिकार संपत्तीनें व संख्याबलानें बळकट असा गोभक्षक खिस्ती समाज व वरील सर्व बाबींत आपल्या खिस्ती बांधवाहून कनिष्ठ असा गोरक्षक होऊं पाहणारा हिंदुसमाज. पैकीं खिस्ती समाजाला गाईबद्दल पूज्यतेची भावना मुळींच नाहीं आणि हिंदुसमाजालाहि ती आजला आहे असें त्रयस्थाला दिसून येत नाहीं.

४ फोंडें, पणजी व मडगांव येथें गोमांस विक्रय उघड उघड बाजाराच्या केंद्रांत होतो व गोमांसानें भरलेलें आपलें टोपलें एखाद्या बटलरानें सामान खरेदी करण्याच्या गडबडींत, अत्यंत धर्म कर्मनिष्ट अशा हिंदुव्यापाऱ्याच्या दुकानाच्या ओट्यावर ठेवलें तरी त्यामुळें उपरोक्त हिंदूला चीड येत नाहीं. 'टोपलें वेऊन चालता हो' असें कांहीं त्या बटलरला तो सांगत नसतो रायबंदर येथें तर भर रस्त्यावर गायी मारण्याचा कसाईखाना होता. त्याबद्दल रहिवाशानीं अर्वाचीन कालचीं, निषेध, अर्ज विनंति इत्यादि साधनें उपयोगांत आणलीं परंतु त्या विनंतीच्या मागें कशाचाच जोर नव्हता. त्यामुळें तिचा तात्काळ उपयोग झाला नाहीं. एवढी मोठी फोंड्याची मुनिसिपालटी कीं तिच्या क्षेत्रांत खिस्ती व मुसलमान मिळून घड १५ देखील होत नाहींत. तशीच सांखळीची मुनिसिपालटी कीं जेथें एका खिस्त्याला १४ हिंदु असें प्रमाण पडतें, पण तेथें देखील गोहत्येस खास मुनिसिपालटीतून योजना आहे व मक्ता देण्यांत येतो! अशा परिस्थितींत भावनांचें नांव कशाला काढतां! बरें दुसऱ्या दृष्टीनें विचार केला तरी या भावनांचें वारें देखील आह्मां हिंदूनां नाहींच असें सिद्ध होतें. जीं कांहीं थोडीशीं हिरवळ कुरणें आहेत तीं सारीं नव्या काबिजादींत आहेत. शेतवाडी किंवा बागाइती शेती त्या भागांत कमीच चराईच्या डोंगरांचा विस्तीर्णपणा, इतकीं साधनें नव्या काबिजादींनां सुलभ असूनहि जुन्या काबिजादींत गुरांची संख्या जास्त आहे हें आह्मां हिंदु लोकांच्या गोमातेवरील भक्तीचेंच द्योतक असेल नाहीं बरें! खेरीज गोरक्षणाचा टाहो फोडणाऱ्या गोसेवकांच्या पदरीं गायी किती आहेत हा प्रश्नहि उलगडला असतां बरींच मनोरंजक उत्तरें येतील.

५ असेंहि एकवार समजूं कीं, आह्मां हिंदु लोकांत आज जरी ही धार्मिक भावना नसली तरी पुढें मागें आमच्या गोसेवकांच्या प्रयत्नानें ती उत्पन्न करतां येईल. आणि मग गोरक्षणाचा प्रश्न धार्मिक स्वरूपांत आह्मांला उभा करतां येईल. पण तसा तो करणें व्यवहारास धरून आहे काय? इतिहास हा एक उत्कृष्ट गुरू आहे. त्याच्याकडे विचारलें असता या प्रश्नाचें उत्तर नकारात्मकच येईल. शत्रूनें सैन्यामोंवतीं गायी उभ्या केल्या असतां, त्यांवर तुटून न पडतां स्वतःचा पराभव करून घेतल्याचीं उदाहरणें इतिहास थोडीं सांगत नाहीं. अशा एका उदाहरणानेंच हिंदूच्या पारतंत्र्याचें महाद्वार उघडलें आहे! निदान गोव्यांत तरी पोर्तुगीजांनीं जी बाटाबाट केली तींत गाईच्या हाडकानें थोडा पराक्रम गाजविला नाहीं. गांवेंच्या गांवें एकेका हाडकानें बाटविलीं आहेत! ब्रिटिश हिंदुस्थानांत जे कांहीं दंगे हिंदुमुसलमानामध्यें होतात, ज्यांच्यामुळें आज राष्ट्राची अत्यंत हानी झाली आहे अशा दंग्यांतून ज्यांचें प्रवर्तकत्व हिंदूकडे येतें, त्यांत गाय हेंच तंट्याचें मूळ असतें. अचंब्याची गोष्ट हीच कीं, दुसऱ्यानीं आपल्या मालकीची गाय मारली, तर त्याबद्दल आह्मीं कां खवळावें? गाय आह्मीं पूज्य मानतों ह्मणून तसीच ती इतरांनींहि मानलीच पाहिजे हा आग्रह काय ह्मणून? आम्हीं गायी मारूं नये इत्यावर सांप्रतच्या समान हक्कांच्या व वैयक्तिक स्वातंत्र्याच्या कालांत या कल्पना दुसऱ्यांवर हट्टानें लादणें कितपत शक्य आहे?

६ बरें हा पूज्यभाव कां उत्पन्न झाला व तसा तो उत्पन्न होणें कितपत रास्त आहे हें पाहूं. गाय दूध देते ह्मणून ती पूज्य ह्मणावें तर म्हैसहि दूध देते व बकरीहि दूध देते आणि त्यानां कोणीच पूज्य मानीत नसतो! बरें आहारावरून पाहूं गेल्यास गाय विष्टा खाते व बकरी ती खात नाहीं तरीहि गाय पूज्यच! शेतकीस उपयोगी ह्मणून पूज्य ह्मणावें तर म्हैसहि तितकीच उपयुक्त आहे. पाणथळ जागची शेती तर म्हैस रेडे यांच्याशिवाय होतच नाहीं मग त्यांनां पूज्य कां मानू नये? गाय ही आर्यांची पूज्य देवता तर कधींच नव्हती. उलट आज कालच्या पुढारलेल्या समाजांत जशी गाईच्या मांसाची मेजवानी झोडण्यांत येते तशीच आमचे प्राचीन आर्यहि मारीत असत याबद्दलचे पुरावे थेट महाभारतांत देखील आहेत. फार कशाला, पण विवाहासारख्या मंगल प्रसंगीं वराची जी मधुपर्कपूजा करण्याची चाल अद्याप उच्च वर्गीय (ब्राह्मणांत) लोकांत देखील आहे ती या प्राचीन गोमांस भक्षणाचाच अवशेष आहे. मेजवान्या कमी दर्जाच्या देखील मानल्या जात नसत तर त्यांचा दर्जाहि आजच्या बासुंदीपुरी, केशरी भात, लाडू वगैरे पंचपक्वान्नयुक्त मेजवानी इतकाच उच्च होता. वाल्मीकीच्या आश्रमांत वसिष्ठ ऋषींचा असाच सत्कार झाला होता. आर्यांच्या श्रेष्ट संस्कृतीपासून जेव्हां आम्हीं च्युत झालों त्याच वेळीं त्या ऱ्हास कालातच हें गोमातृत्वाचें बंड, परदेशगमन निषेधाची टूम, अष्टवर्षांतत्भवेत्कन्या इत्यादि खुळें उत्पन्न झालीं. गोपाळकृष्णोपासनेचें पाठबळ मिळाल्यापासून या खुळाचें प्रस्थ फारच माजलें. या अयथार्थ अशा गोपाळकृष्णोपासनेपासूनच वल्लभी संप्रदायांच्या गुजराथी महाराजांच्या अनाचारांचीहि उत्पत्ति झाली आहे. या उपासनेच्या आधारावरच सदर अनाचारांचें समर्थन करण्यांत येत असतें.

[चालू]

—महात्मा गांधीजी मार्च अखेरपर्यंत आश्रमांत राहून त्यानंतर हवापालटीकरितां गिरीरोहण करणार आहेत.

—गेल्या जानेवारींत कोलन येथील सोन्याच्या खाणींत १७ लक्ष ९२ हजार रुपयांचें सोनें निघालें.

—वर्तमानपत्रांत बीभत्स जाहिराती छापूं नयेत, अशी पंजाब सरकारनें इशारत दिली.

—पुण्याचें लष्करी ठाणें शिकंदराबादला जाणार असल्याची बोलवा आहे.

वर्तमानसार

—महाबळेश्वर म्युनिसिपालिटीच्या
हींत मोटारीचा वेग दर तासास बारा
असावा व कोणाहि मागनास जखम
त्याची वर्दी मोटार ड्रायव्हरनें
पोलीस टाण्याकडे दिली पाहिजे
नियम मुंबई सरकारनें प्रसिद्ध केले आ

—गेल्या मंगळवारीं हेगडे देसाई यां
अध्यक्षतेखालीं मडगांवच्या सारस्वत ब्रा
समाजातर्फे श्री शिवजयंत्युत्सव साजरा
ण्यांत आला रा. केशव अ. नायक यां
सूचनेनें अध्यक्षांची निवड झाल्यावर मु
वक्ते रा. जनार्दन विष्णु कामत यांचें
चरित्रपर ओजस्वी व हृदयंगम व्याख्
होऊन उपवक्ते या नात्यानें श्री दामो
विद्यालयाचे हेडमास्तर रा जयराम भिका
राऊत व रा. काशीनाथ दामोदर ना
यांचीं समयोचित व सुश्राव्य भाषणें झा
शेवटीं अध्यक्षांच्या समारोपानंतर रा. य
वंत स. सरदेसाई यांकडून आभार प्रद
नाची कामगिरी बजावली गेल्यावर उ
वाची यशस्वी रीतीनें परिसमाप्ति झा

—मडगांवच्या श्री दामोदर विद्याल
तहि त्याच रोजीं हेडमास्तर यांच्या
परिश्रमानें श्री शिवजयंत्युत्सव साज
करण्यांत आला.

—काकोडें येथेंहि रा. विर्जिनकर, पा
णकर, सहकारी वगैरे वक्त्यांचीं भाषणें
ऊन श्री शिवजयंत्युत्सव पार पडला.

—अखेर बावला–बावडी प्रकरणा
शेवट इंदुराधिपतीच्या स्वगादी त्याग
झाला, हें फार वाईट झालें! होणार
' कधीं नच टळे '.

—नर्मदेच्या दक्षिण तीरावर भडे
नजीक असलेल्या वीरभद्रा नांवाच्या
वास आग लागून शंभर घरांची राखरांगो
झाली.

—चिनी समुद्रांत हत्यारबंद चांचे
कांनीं एका फ्रेंच बोटीवर हल्ला करून
भारें पावणें दोन लाखांचा ऐवज लांबवि

—बडोद्याचे सेनापति मि देस
यांच्या पत्नीचें बडोदें रेसकोर्स जव
एका विहिरींत प्रेत सांपडलें. त्यांच्या गळ
एक माळ व हातांत आंगठी व रिस्ट
होतें. फक्त एका सोन्याच्या बांगडींतील
हापैकीं एक बांगडी सांपडली नाहीं.
देसकेथ यांच्या राहात्या भागांत चोऱ्य
सुळसुळाट होता अशी बोलवा आहे.

—मुंबई युनिव्हर्सिटीच्या मतदार
तर्फे झालेल्या निवडणुकींत डॉ० पर
यांस १२५४ मतें व डॉ० देशमुख
१०३८ मिळालीं. अर्थात् डॉ० परांजपे
इन आले; हें मागें कळलेंच आहे.

—कलकत्ता येथें बरा बाजारमध्यें
माच्या एका दुकानास आग लागून
हजार रुपयांचें नुकसान झालें.

ANUNCIOS

O *Bharat* ano 10 numero 48 4 de Março de 1926.

Anuncio cada linha uma tanga ainda que repetida.

Numero avulso uma tanga.

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2 ° oficio, correm editos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2 ° do art. 197 do Cod. do Proc. Civ. citando Rucminim Sinainim, mulher de Pundolica Gonexama Sinai, por outro nome Vinaica Gonexama Sinai, de Nagorcem e ora ausente em parte incerta de Karvar do territorio britanico, para uma acção facultada pelo Diploma Legislativo n ° 119 de 22 de Dezembro de 1922 e instaurada contra a citanda e dito seu marido por João Climaco Manuel José da Silva Colaço, de Velim, pretendendo que sejam aqueles reus condenados a pagar lhe a importancia de cento e quinze rupias constantes do papel particular de 11 de Junho de 1917 com os seus juros não prescritos a 5 por cento custas, selos e procuradoria, e para até a 3ª audiencia posterior ao praso de editos impugnar querendo o mesmo pedido sob a cominação de ser havida por confessa. Declara-se que as audiencias deste juizo se fazem em todas as terças e sextas feiras ou nos dias imediatos quando aquelles forem feriados não sendo tambem estes ou não fiquem compreendidos nas ferias, no Tribunal judicial situado em Xeldem ao lado da estrada nacional que de Quepem se dirige á Curchodem, por 10 horas. Para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de Quepém, 12 de Fevereiro de 1926

O Escrivão de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito
R. Colaço

O BHARAT

UM CONFRONTO

O desinteresse é pai do destemor e irmão do brio, assim como o egoismo é pai da cobardia e irmão do comodismo. A primeira qualidade que é uma virtude faz de quem a possui uma criatura simpatica, honesta e popular; e a segunda que é um vicio torna o homem por ela dominado um ser despresivel, isto é, antipatico, desonesto e anti-popular.

O segredo de ser alvo de demonstrações de simpatia o governo do sr. Mariano Martins reside, precisamente, no desinteresse com que Sua Excia. encara todos os assuntos, grandes ou pequenos, que se relacionam com a administração publica da India. Se, no incidente desenrolado, há pouco, entre os srs. Ministro das Colonias e Mariano Martins, deu-nos Sua Excia inequivocas provas de destemor e brio, foi, exatamente, porque o desinteresse constitue o solido alicerce em que se ergue o edificio do seu governo de legalidade e moralidade. E, se o *Bharat* deseja que Sua Excia continue, sem obstrucionismo do Terreiro do Paço, governando a India, até que de todo—até á medula dos ossos—se legalise e se moralise, é tambem, por causa do seu nunca desmentido desinteresse de que nasce a coragem e de que provem o brio.

Será, agora, facil tarefa indagar a razão por que o *jaimismo* foi pasto dos mais acres vituperios das mais violentas criticas e do mais encarniçado oposicionismo. Foi, sim, o egoismo do sr Jaime de Morais, a sua febre de ambição de *fazer India* é que deu margem a que se assignalasse tristemente o seu governo, cheio de actos de cobardia e de comodismo.

Mas, ¿a que proposito vem esse confronto dos dois governos, passado e presente?—perguntará o leitor.

Tal paralelo tem a sua razão da ser e esta consiste em incutir animo áqueles que se desesperam com a demora que supõe haver na implantação do regime de legalidade e moralidade em todos os ramos da actividade da pública administração. O confronto inspira-se, pois, no prefixo fim de insuflar esperança a quantos ardem no fogo de ancia de vêr melhorado, radicalmente, o nosso Paiz do mal que o enferma por culpa dos ambiciosos e por erros dos comodistas.

Tenhamos, porisso, confiança inabalavel, de que, se o sr. Mariano Martins continuar á testa da India, atè que se perfaça o periodo da sua nomeação, Sua Excia conseguirá, certamente, pôr em ordem os negocios da India, desde os mais comesinhos até os mais transcedentes—para o que o sr. Mariano Martins trocou o seu socego pelos dessabores do governo.

Não tenhamos dúvidas nem alimentemos desconfianças. O sr. Mariano Martins porà em ordem a nossa casa que tem, por ultimos tempos, sido tão mal administrada por falta do desinteresse, pai do destemor e irmão do brio.

OPORTUNAMENTE

Contra o *sistema* de, pela dívida do Pedro assaltar os bens do Antonio, recebemos algumas cartas cuja publicação se fará oportunamente.

ECOS E CRITICA

SERIA ILOGICO!

Nem sempre—*inter duos litigantes tertius gaudet*—a lucta entre dois é proveitosa a terceiro. Pelo contrario, êste torna se, muitas vezes, objecto duma terêa de criar bichos, quando dois cavalheiros se dão ao prazer de se desentender.

Quando dois bois ou bufalos marram numa floresta, quem sofre na sua *péle* com a formidavel lucta, são os pobres dos arbustos, espectadores mudos e scilenciosos da mesma *querra*.

Ora, segundo nos informam, a essencia deste mesmo *principio activo* aromatisou o apuramento dos alunos liceais na última epoca que teve o seu *terminus* no inicio do corrente mez. Isto é: por causa da lucta entre o *froilanismo* e o *prazerismo*, foram os pobres estudantes que pagaram *as favas*!

Mas no meio em que respiramos o contrario daquilo que sucedeu só seria ilogico!

FAUNA DOS INCOMPETENTES

Ha lugares publicos que são providos sob propostas dos respectivos chefes das Repartições, os quais, não raro, anicham nêles os seus serviveis afilhados—*serviveis* a êles mas *inserviveis* ao bom desêmpenho das funcções que se lhes confiam.

¿ Não seria bem avisado subordinar-se ao único sistema de concursos publicos o provimento de todos os lugares do Governo, grandes e pequenos, indistintamente?

Isto, além de *democratisar* o emprego pùblico, reduzir a ao minimo a *fauna dos incompetentes*.

PERIGO SOCIAL

A dispensa do diploma do Instituto Comercial á admissão para concursos publicos não deve querer dizer que para estes devê ter entrada franca todo e qualquer candidato ao emprego público—quem sò resumir a sua bagagem scientifico—literaria á posse duma certidão do exame de instrução primaria. Não. Para cargos de certa responsabilidade e representação é conveniente que se exija, pelo menos, a habilitação do 5.° ano do Liceu Central.

Que diabo! Desanimar os que estudam com sacrificio mil seria mesmo avolumar a massa dos descontentes e aumentar o número dos *ilustrados ociosos* que representam um perigo social dos mais temiveis.

DE MINIMIS...

Mais um exemplo de como a lucta entre dois liligantes tem sido desfavoravel a um terceiro. Trata-se da escola oficial de Dabal que continua, ainda, encerrada.

Sabe-se que a mesma escola foi fechada, por um incidente de caracter economico, havido entre a Inspecção de Instrucção e a Camara Municipal de Sanguem.

Quem, porêm, ficou prejudicado com a lucta dessas *comadres* são alguns estudantes que não puderam examinar-se do 1.° grau e do marata, a despeito da sua devida preparação, no ano lectivo findo.

Mas *de minimis non curant pretores*!

MERITO E TRABALHO

Contra a criatura que o favoritismo investiu nas funcções de substituto de delegado desta comarca houve protestos veementes; mas o sr. Procurador da Republica não tratou, ainda, de providenciar sobre o assunto. Porque será?

Se, por ventura, supõe Sua Excia que é prejudicar o prestigio de autoridade atender aos justos protestos da Opinião Publica, garantimos ao digno magistrado que, no caso, a substituição do referido substituto por uma pessôa idonea, incapaz de fomentar politiquices e de semear zizanias, socorrendo se do cargo, sò contribuirá para o brilho do prestigio da Justiça.

E, depois, no regime em que vivemos, a Opinião Publica deve merecer aos poderes públicos alguma atenção, sobre tudo, tratando-se do respeito pelo mérito e trabalho.

MUNICIPIO DE SANGUEM

O prometido é devido. *O Bharat* fez-se eco dumas acusações graves mas vagas, transmitidas por uma pessoa de sua confiança, contra a edilidade de Sanguem. O nosso correspondente concretisa-as, hoje, pela maneira seguinte:-

Tendo o Comando de Policia de Sanguem exigido, no dia 2 do corrente, a varios *carroceiros* a apresentação de licenças de taxa camararia, êles não o fizeram, o que deu causa a que lhes fôsse imposta nos termos do artigo 121.° do codigo de Posturas Municipais em vigor, a multa de 2 rupias.

Os *carroceiros* protestaram contra a multa, alegando terem pago, *ha muito*, o custo das respectivas licenças; uns apresentaram umas tabo letas marcadas com as iniciais C. M. S 1926—mas sem número algum e outros, conhecimentos ou talões de matricula—o que determinou uma investigação policial.

E, efectivamente, desta investigação se apurou que os *carroceiros* tinham razão, por que haviam pago em devido tempo as respectivas taxas nas mãos dos empregados municipais, mas que estes, *até ás 12 horas do dia 3 do corrente*, não lhes entregaram os competentes alvarás. Computa-se em centenas de rupias arrecadadas aos *carroceiros* e se não explica a demora no aviamento dos mesmos alvarás!...¿Terá, em tudo isso, havido desleixo ou *positividade*? Urge averigua-lo por meio dum inquerito a valer.

A Camara Municipal de Sanguem tem passado licenças como para reedificação e modificações nas construções existentes junto das estradas municipais, sem nenhum respeito pelas formalidades exigidas pelo artigo. 1° da P. P n° 167 de 22 de Março de 1924 e pelo preceituado na P. P. n° 69 de 2 de fevereiro p. f., espesinhando, desta feita, o parecer da Procuradoria da Republica, n° 49 de 8 de Dezembro do dito ano, que recomenda as Camaras rigorosa observancia da citada P. P. parecer que lhes foi enviado por circular da Direcção das Obras Publicas n° V. H. 13 de Junho de 1925.

Ha, ainda, outros factos concretos que não abonam muito a actual Camara; mas, como eles são menos importantes, ainda que sejam tão comprometedores como os já expostos, fica reservado para outra vez o seu registo.

E' bom que se frise que o *Bharat* não alimenta á Camara nenhuma má vontade. Fiel á sua orientação, limita-se a velar pelo rigoroso cumprimento de leis, sem o qual nao existe nem *Ordem* nem *Trabalho*.

गोव्यांत एकाचं कुटुंबांत

तेरा कोटी रामनामाचें अनुष्टान !

हल्लीं महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं राम नामाच्या १३ कोटीचीं अनुष्टानें सांघुदायिक पद्धतीनें चाललीं आहेत व देशाच्या उन्नतीला धार्मिक दृष्टीनें त्याची हल्लीं फार आवश्यकताहि आहे. गेल्या सालीं कार्तिक महिन्यांत मुंबईंत असें अनुष्टान श्री चौंडे महाराजांनीं करविल्याची हकीकत प्रसिद्ध आहे. पण आह्मांस कळविण्यास आनंद वाटतो कीं, आमच्या गोव्यांत ह्या जपयज्ञास सात वर्षांपूर्वींच आरंभ झाला आहे. शके १८४१ च्या कार्तिक महिन्यांत रा. रामचंद्र त्रिविक्रम नाईक बांदिवडेकर मुं. कायसूव यांनीं आपल्या मोठ्या कुटुंबांत याचा उपक्रम करून तेवढा जप पुरा केला, हें त्यांस मोठें भूषण आहे. परवां फा० शु० १३ शीं गुरुवारीं त्याची सांगता त्यांचे कुल देवस्थान श्री स्थळ नागेशीं येथें झाली. द्वादशी बुधवारीं लघुरुद्र होऊन संध्याकाळीं ह० भ० प० रामचंद्र कृष्ण कामत चंदगडकर यांचें भजनी कीर्तन झालें. त्यानंतर रात्रौ ह० भ० प० मुकुंदराज कृष्ण बांदेकर यांचें व ह० भ० प० बाळुबुवा नामक एका तरुण हरिदासाचें कीर्तन झालें. त्रयोदशी गुरुवारीं देवता अधिवासन होऊन पुण्याहवाचन झाल्यानंतर विधियुक्त रीतीनें त्याच तारक मंत्रानें तेरा हजार हवन झालें. नंतर पूर्णाहुती झाल्यावर अन्न संतर्पण होऊन रात्रौ ह० भ० प० मुकुंदराज यांचें दुसरें कीर्तन झालें. त्यानंतर मडगांवचे सुप्रसिद्ध व्यापारी व भजनप्रेमी रा. दत्तोपंत सडेकर यांचें वारकरी सांप्रदायाचें भजन मोठ्या थाटानें झालें. एकंदरींत सर्व समारंभ मोठ्या आनंदानें पार पडला. या जपयज्ञानें आपल्या कौटुंबिक परिस्थितींत किती व कसा फरक पडला हें रा. रामचंद्र नायक यांनीं आपल्या समारोपाच्या भाषणांत विशद करून सांगितलें. गोव्यांतील इतर मोठ मोठ्या कुटुंबांत याचें अनुकरण होईल तर किती आनंदाचें होईल बरें ? परमेश्वर सर्वांना तशी बुद्धि देवो !

एक जपयज्ञप्रेमी.

जारांनीं रुपये देणारे बॅबे मिल-ओनर्स असोसिएशन मूर्ख आहे अशी आपली समजूत आहे काय ? व एवढें असतांहि शिशुसप्ताहाची चळवळ समाजसेवेची चळवळ आहे असें कोणास समजावयाचें असल्यास त्या आल्पाकच्या कोटाच्या खिशांतील आकडे, जगाचा इतिहास, समाजशास्त्र, कार्ल मार्क्स सर्व चूक आहेत व पुणेरी पागड्यानी विभुषित झालेली आमच्या समाजसेवकांचीं कपाळें मात्र बरोबर आहेत. म० गांधी व मि. कोंई चूक आहेत व लेडी विल्सन, सांवतवाडीच्या महाराणीसाहेब, लेडी कॉवसजी जहांगीर व डॅा० टिळक हे मात्र बरोबर आहेत असें आपणांस समजलें पाहिजे.

वार्ताविहार, (मडगांव)

ह्या आमच्या हलाखीच्या स्थितीचें कारण जर कांहीं असेल तर ती –आम्ही स्पष्ट सांगू शकतों– आमची अपात्रता होय. स्वराज्य आपण होऊन दिलें जात नाहीं, तें घेतलें पाहिजे. (Swarajya is taken, never given) ह्या इंग्लीश म्हणीचा उघड उघड असा अर्थ होतो कीं, आधीं आपण स्वराज्य राखण्याची पात्रता अंगांत आणली पाहिजे. ह्याच कारणासाठीं आमचे ब्रिटिश हिंदुस्थानस्थ प्रांतबंधु केतें कंवच वर्ष स्वराज्याची पात्रता आपल्या अंगांत आणण्यास खर्चं घालणार आहेत; पण आम्हाला स्वायत्तेचे हक्क मिळाले आहेत व आतां आम्हीं ते राखण्यासाठीं झटणें हेंच योग्य आहे. हे मिळालेले हक्क राखण्याची पात्रता आपल्या अंगीं बाणवून घेण्यासाठीं प्रथम आपण राजकीय धर्तीवर संघ अगर स्वतंत्र पक्ष निर्माण केले पाहिजेत व त्या संघाद्वारें आपण गोमांतकीयांच्या हितास व हक्कांस जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे हें उघड आहे.

—सांगें मुनिसिपालटीनें एक पत्रक प्रसिद्ध केलें असून, आपल्या कारकीर्दीचें जाहीर स्पष्टिकरण करण्याचें त्यांत अभिवचन दिलें आहे.

—कराची व मुंबई येथील गोवानिजांनीं गामोत्सव मोठ्या थाटानें पाळला.

—गेल्या ५ तारखेला कोंसेल्य लेजिस्लातीव्हाच्या नवीन सभासदांची बैठक झाली.

Ano 9 N. 42

...a 15 de Janeiro de 1925

...SSINATURA
...ada ano tres rupias

...NUNCIOS
por c... ...ada que repetida uma tanga
...avulso uma tanga

...OR E EDITOR
...Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत

BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४२

गुरुवार ता. १५ जानेवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

MUCH ADO ABOUT NOTHING

A *India Portugueza* de Margão formula, na sua edição de 8 do corrente, uma especie de libelo acusatorio contra os hindús que se mantiveram alheios aos festejos do Centenario de D. Vasco da Gama, lembrando ao mesmo tempo, ao governo *o dever de punir severamente os que pretenderam arvorar a bandeira da rebelião, os insensatos que assumiram uma atitude subversiva, altamente condenavel* perante os mesmos festejos, *os dementados que se sublevaram audaciosamente contra a comemoração do centenario, os exaltados que pretendem desorientar as massas com uma propaganda sediciosa*, finalmente, *a meia duzia de tresloucados que, pelos desvairos*, procuraram pôr em perigo *os interesses da Soberania Nãcional* e afrontar *os Brios Nacionais*.

Não sabemos o que admirar nessa *scintilante* e *faiscante* prosa da *India Portuguesa*, se a crassa ignorancia de quem imaginou factos que se não deram, se a sua manifesta má fé, se, finalmente, a sua acendrada má vontade para com os hindús, traduzida numa adjectivação insultuosa e impertinente!

Mas ¿que *loucuras* cometeram os tais *de meia duzia de cérebros escandencidos*? ¿Que *movimento asnatico promoveram* contra o centenario do Gama? ¿Em que consistiu a *sua rebelião, a sua atitude subversiva*, a *afronta feita* por elês *aos Brios Nacionais*, periclitando *os interesses* da *Soberania Nacional*?

Scilencio profundo, nem um pio a êsse respeito. Há sò alegações atrevidas — ¿e porque não petulantes? — e não existe coisa alguma que as comprove, que as justifique, nem por alto. Multiplicam-se aí só *as generalisações que são sempre perigosas*. Só isto e nada mais.

O *Bharat* pouco se preocuparia com a *brincadeira* da *India marganense*; mas, como essa brincadeira é de mau gosto, dimanada, sobretuto, duma pessôa em quem, por erro de visão, julgavamos arraigados bom senso, rara acuidade de vistas e indefectivel ponderação na analise e apreciação dos actos e factos — torna-se forçoso repelir as insinuações maldosas com que, levianamente, o aludido hebdomodario pretendeu atingir-nos, deturpando, ou por ignorancia ou por petulancia, a verdadeira significação das coisas.

* * *

Vejamos, agora, se no ambito da adjectivaçao acusato'ria, maldosa e insultuosa da *India marganense*, podera', embora remotamente, ficar compreendido o *Bharat* ou qualquer outro que, como ele, tenha procedido nas festas do Centenario.

O *Bharat*, como orgao independente dopiniao hindu', analisou, no seu pleno direito da liberdade de expressao, a personalidade historica do Gama, apreciando lhe sob varios pontos de vista a obra e o seu resultado. Tanto a mesma analise como a referida apreciaçao se alicerçaram nos dados fornecidos pelas proprias autoridades historicas portuguesas. Nada acrescentou nem nada suprimiu por iniciativa propria. *O Bharat* fez-se, por assim dizer, sem mais nem menos que uma especie de "porta-voz" ou "gramofone" da Historia. E para ser coerente com os ditames da consciencia moral, formada pela Mestra da Vida, o nosso jornal absteve-se, pura e simplesmente, de tomar parte nos festejos do Gama.

A isto e so' a isto e' que se circunscreveu o nosso papel perante *as comemoraçoes do 4° centenario*.

¿Sera' alguem capaz de descobrir no nosso franco e sincero proceder o mais ligeiro vislumbre, enxergar a mais palida sombra de "atitude subversiva" de "rebeliao," do perigo "dos interesses da Soberania Nacional, da "manifestaçao de chauvenismo" de afronta aos Brios Nacionais" e de outras coisas de que a *India* acusa, a torto e a direito, ao ar e genericamente, prontificando se ate' *a estar ao lado do governo*, "enquanto se tratar de punir seja com que violencia for," os...criminosos?

¿Desde quando para a *India*, a simples abstençao, como consequencia dos ensinamentos da Historia, passou a significar "rebeliao, subversao, perigo dos interesses da Soberania Nacional" e outras coisas semilhantes?

Simplesmente piramidal !!

O que a propria *A Provincia* nao foi capaz de dizer, insinuou a *India* tentando maliciosamente criar uma atmosfera de suspeiçoes contra os que tiveram a franqueza inocente de dizer o que sentiram, sem ofender minimamente a Republica e os Brios Nacionais que todos os hindu's, todos sem exepçao, amam mais do que tudo!

Essa "diversidade" que e' bem significativa, como o leitor deve ter bem compreendido, confirma mais uma vez o que tantissimas vezes temos dito aqui: se os destinos do nosso Paiz fossem confiados aos da laia da "India Portuguesa" e nao houvesse ca' europeus liberais e magnanimos que animaram e animam sempre o progresso dos hindu's, deixariam de estes existir!

A "India Marganense" foi, pois, infeliz em fazer insinuaçoes perigosas e nao tardara' que se arrependa do seu passo impensado.

* * *

Quem sabe, porem, que a *India* de Margao e' uma metamorfose de "Popular, Rebate, Opiniao e Lanterna" conhece tambem o passado politico do seu director, passado que varreramos da memoria mas que, agora, se torna forçoso revolve-lo, mau grado.

¿Pensa, por ventura, o sr. Loiola que os hindu's andam esquecidos da sua "atitude subversiva, da sua rebeliao, das suas manifestaçoes de chauvinismo, da sua afronta," contra a Republica, contra a "Soberania Nacional" e contra os "Brios Nacionais" quando eles festejavam, entusiastica e delirantemente, a implantaçao do regime de 5 de outubro que guerreou sem descansó, negando ate', por muito tempo, obediencia a' bandeira verde-vermelha?

¿Supoi Sua Excia. que os hindu's nao trazem gravada na memoria aquela sua celebre expressao que dizia que "O regosijo dos hindu's e' o lucto dos cristaos," juntamente com a tentativa de estrangular a' nascença o amor dos indios pela Republica?

¿Imagina que a gente nao se lembra da odienta campanha de descredito fomentada contra o regime democratico a cujas expensas ora se regala em troca da renegaçao dos principios que aparentava professa-los?

Os hindu's nao sao nem nunca serao capazes disso. Eles sao e serao sempre republicanos devotados. E, se alguns deles se abstiveram de tomar parte nas festas do centenario, foi precisamente, porque quizeram se coerentes com a Historia; mas, se se convencerem, em face da mesma Historia, e nao com adjectivaçao maldosa e insultuosa, de que laboraram no erro, de que foram "injustos e ingratos, nao terao eles duvida em corrigir publicamente, esse seu erro e penitenciar-se de sua falta. --

A "India" quiz, pelo visto, julgar outros por si; mas enganou-se com o nu'mero da porta...

QUEM NASCEU TORTO...

No Congresso Nacional Social, reunido em Lucknow, um congressista *reformer* apresentou uma proposta no sentido de se permitir divorcio aos hindu's. Houve acalorada discussao sobre a mesma these que, afinal, foi regeitada *in limine* por uma maioria esmagadora.

E' de notar que tomaram parte na discussao varios graduados em diferentes Universidades de Londres e da India Britanica, os quais, na sua quase totalidade, frisaram que a civilisaçao indiana nao era de molde a poder *digerir* o divorcio.

¿Que dirao, agora, a isto os que defendem, *a' outrance*, o divorcio requerido por tal senhora hindu' de nobre estirpe, mas duma familia cujo rico chefe manifestou-se, publica e espalhafatosamente, contra o simpatico movimento da fusao de sub-castas entre os bramanes *sarasvatas*?

O divorcio requerido pela referida senhora de nobre estirpe foi, pois, — repetimos mais uma vez e repetiremos sempre—um mau exemplo de piores consequencias sociais e de pessimo resultado moral.

Mas, quem nasceu torto nunca se endireita...

...nvordem no dia 21 do corrente para ouvirem os vereado... da Câmara Municipal que acha dissolvida, vereadores, ne tambem ficam convidados e solverem sobre a atitude a ...r tomada perante a portaria a dissolução, segundo o que ...r apurado na mesma reunião.
Aos 11 de janeiro de 1925.
Govinda J. Porobo Dessai
Maruti Sinai Monercar
Gunó R. P. Dessai

ANUNCIOS

Vende-se, em hasta, em globo ou em glebas.

Predio Silva-Batta em que existem 3 casas e 2 lojas, sito na séde do concelho de Quepem, no dia 25 de janeiro proximo pelas 11 horas, na residencia do sr. tabelião Salinho da Silva, reservando o signatario deste a quem pertence retirar da praça não lhe convindo o preço. O arrematante depositará no acto 10% do preço. Quepem 22 de Dezembro de 1924
Jeronimo Francisco da Silva

पत्रव्यवहार

श्रीयुत सारस्वत यांचा जीवनार्थ कलह हा लेख वाचून व मीही एक 'रणसंग्राम' साप्ताहिकाचा वर्गणीदार असल्यानें रा. कोल्हटकर यांची लबाडी चव्हाटयावर यावी असें वाटलें. तरी कृपा करून हें पत्र प्रसिद्ध कराल, अशी आशा आहे.

मीं रणसंग्राम साप्ताहिकाच्या सुरवातीच्या चार अंकांनंतर वर्गणीदार झालों व दोन रुपये पाठविले तेहि व्ही पी. आल्यावरून. त्यानंतर लौकरच, रणसंग्राम साप्ताहिक वृत्तपत्र दैनिक झालें. व आम्हांस अंक येण्याचें बंद झालें. कांहीं दिवसांनंतर म्हणजे तारीख २ आगष्ट १९२४ रोजीं चाबुकाचा पहिला अंक रा० अच्युत बळवंत कोल्हटकर यांच्याच संपादकत्वाखालीं बाहेर पडला व त्यावर, रणसंग्रामच्या वर्गणीदारांचें नुकसान होऊं नये म्हणून युगांतर किंवा चाबूक पाठवूं असें सदहू कोल्हटकर यांनीं जाहीर केलें त्याप्रमाणें मीं त्यांस चाबूक पाठविण्यास लिहिलें. त्याप्रमाणें चाबूक वृत्तपत्राचा दुसरा अंक पाठविला व त्यानंतर पासून तों आजतागायत एकहि अंक पाठविला नसून वर्गणी मात्र गिळंकृत करण्याची फसवेगिरी ह्या प्रतिष्ठित संपादकांनीं केली. मी कितीतरी पत्रें पाठविलीं, परंतु त्यांनीं दाद दिली नाहीं.

त्याचप्रमाणें रा० केशव विष्णु ...ट हे राहणार, वाडातळें धारगळ यांनीं युगांतराची वर्गणी भरून त्यांचें आश्रयदाते झाले, त्या नंतर त्यांस कांहीं अंक आले व नंतर तें युगांतर येण्याचेंच बंद झालें असें स्वतः त्यांनीं मला कळविलें होतें. व अजूनहि येत नाहीं.

रामचंद्र शंकर कुळकर्णी
धारगळ—गोवा.

भारत

मिति पौष कृ० ५ मी शके १८४६

पीयूपकांती घोषांची मुलाखत

राष्ट्रीय महासभेच्या आठवड्यांत विजयानगरांत भरलेल्या परलोकविद्या परिषदेचे नियोजित अध्यक्ष व कलकत्त्यास प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक 'अमृतबझार पत्रिके'चे संपादक बाबु पीयूषकांती घोष सध्या गोमांतकाच्या गतवैभाची व सद्यःपरिस्थितीची खात्रीलायक माहिती मिळविण्याकरतां इकडे आले आहेत. गेल्या बुधवारीं आमच्या प्रतिनिधींनीं सांवर्डें स्टेशनावर त्यांची मुलाखत घेतली. त्या वेळीं आमच्या प्रतिनिधींनीं यंदांच्या राष्ट्रीय सभेच्या यशस्वीतेविषयीं आपणास काय वाटतें ? असा प्रश्न त्यांस विचारतांच त्यांनीं खालील उत्तर दिलें.

राष्ट्रीय महासभेनें यंदा जो कार्यक्रम सभासदांपुढें ठेवला आहे तो ज्या प्रमाणांत पुरा केला जाईल त्यावरून राष्ट्रीय सभेच्या यशाचें अनुमान निघण्यासारखें आहे. पण महात्माजी आदिकरून निरनिराळ्या प्रांताच्या पुढाऱ्यांनीं 'खादी व चरका' ह्या दोहोंवर दिलेल्या शक्तिसर्वस्वपूर्ण जोरावरून तर्क करावयाचा झाल्यास 'खाद्दर प्रोग्राम' पुरा करण्याकडेच प्रत्येकजण आपली वेळ वेंचील अशी माझी खात्री आहे. दुसरी आनंदाची गोष्ट ही कीं, ह्या महासभेंत सुदैवानें स्वराजिस्ट व नाफेर ह्या पक्षांमध्यें खटका उडाला नाहीं. महात्माजींच्या विनंतीस मान देऊन त्यांनीं द्वेषबुद्धीस तात्पुरती जलसमाधी दिली आहे व यास्तवच खादी प्रसाराचें कार्य जीवाच्या जोमानें करण्याची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली आहे. महात्मा गांधी ही एक कामकरी व्यक्ति असल्यानें त्यांना कामाशिवाय दूजें कांहींच माहीत नाहीं. आणि दुसऱ्याकडून त्यांना केव्हाहि कामाचीच अपेक्षा असते. त्यांनीं सेक्रेटरींची निवडहि अशाच धर्तीवर केली आहे कीं, खादीची निपज धडाडीनें व्हावी. महासभेनंतर दोन दिवसानीं भरलेल्या "खादी व कॅर्ड कॉन्फरन्स"मध्यें महात्माजींना सर्वांकडून प्रोत्साहनपर, उत्साहवर्धक व समाधानकारक असें वचन—अर्थातच पुढील कार्याचें प्रोत्साहन मिळालें आहे. स्वराज्य संपादनांत महात्माजींचें मुख्य तत्व खादी हेंच आहे. खादीशिवाय त्यांस कांहींच प्रीय नाहीं. ह्याचसाठीं खादी प्रसाराचें कार्य ज्या महात्म्याची गणना जगांतील अत्यंत श्रेष्ठ व्यक्तींत होते त्यांच्या नियंत्रणाखालीं एकत्र आचार, विचार व उच्चार करणाऱ्या एकंदर पक्षाकडून तडीस नेलें जाईल असें मला वाटतें. बंगालविषयींच सांगावयाचें झालें तर तेथें स्वराजिष्टांनीं संघटनेच्या जोरावर बरीच मजल मारली आहे. बंगाल्यांतील बहुतेक डिस्ट्रीक्ट बोर्डें, मुनिसिपालट्या व इतर स्थानिक स्वराज्य संस्था कलकत्ता मुनिसिपालटीसह स्वराजिष्टांनीं पुऱ्या काबीज केल्या आहेत. कॉंग्रेसचा हुकूम व कार्यक्रम पाळण्याची अवघड जबाबदारी त्यांनीं आपण होऊनच स्वतःवर ओढून घेतली आहे. शिवाय त्या पक्षाचें ध्येय कॉंग्रेसनें पसंत केलें असल्यानें त्यांस आतां कुरकुर करण्याचें कोणतेंच कारण राहिलेलें नाहीं; तर उलट त्यांच्या कार्यास जोरच मिळाला आहे. ह्यावरून मी खात्री देऊं शकतों कीं, बंगालांत तरी निदान जोराची चळवळ केली जाईल.

स्फुट विचार

सत्यमेव जयते नानृतम्:— ब्रिटिश हिंदुस्थानच्या व्हाइसरॉय साहेबांची स्वारी लवाजम्यानिशीं कांहीं सरकारी कामासाठीं गेल्या महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत मुंबापुरीस येणार असल्याचें जेव्हां निश्चित झालें, तेव्हां त्याचें अपालोबंदरावर स्वागत करून आपल्या राजभक्तीचें प्रदर्शन करण्याविषयीं निमंत्रणवजा हुकूम सर्वत्र सुटले होते. पण मुंबई कोर्पोरेशनचे अध्यक्ष ह्या नात्यानें श्री. पटेलांस जें आमंत्रण पाठविलें गेलें होतें तें जरा आग्रहाचें व विनवणीचें असेंच होतें. वास्तविक लाट साहेबांस दिल्या जाणाऱ्या 'बड्याखान्यांत' भाग घेण्याविषयीं सरकाररीत्या जाहीर आमंत्रण म्हणजे आपल्या आयुष्यांतील अगर कारकिर्दीतल एक अत्यंत महत्वाचा व स्वर्गीय आनंदाचा प्रसंग पूर्वापार वहिवाटीनुसार समजला जावयाचा; पण श्री. पटेल यानीं अध्यक्ष ह्या नात्यानें स्वागत समारंभांत उत्साहानें भाग घेण्याचें आपलें कर्तव्यकर्म असतां ती विनंति लाथाडली. हें निमंत्रण फेटाळतांना श्री. पटेलानीं स्पष्ट जाहीर केलें कीं 'ज्या हातानें बंगाल ऑर्डीनन्स सारख्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर घाला घालणाऱ्या जादा हुकुमावर सही करण्याइतकी उद्दाम वृत्ति दाखविली, त्या हाताशीं आपला हात भिडवून स्वतःस विटाळून घेण्याची आपली मुळींच तयारी नाहीं; पण कोर्पोरेशनच्या अध्यक्षानीं ह्या राजभक्ति प्रदर्शनांत भाग घ्यावा असा ठराव बहुमतानें पास केल्यानें श्री. पटेलांस अध्यक्षपदाचा राजिनामा खरडून सदसद्विवेक बुद्धीस जागणें भाग पडलें. अशा रीतीनें कर्तव्यकर्म व विवेकबुद्धि ह्यांमध्यें लागलेल्या लढ्यांत विवेकबुद्धीचाच विजय झाला; व हिन्दी लोकशाहीच्या स्वाभिमानाचें प्रत्यंतर व्हाईसराय साहेबांस दाखविलें गेलें. पण सत्य तें केव्हांहि झालें तरी सत्यच. दिव्य तेजाच्या हिऱ्यावर चढलेला मळ काढून टाकतांच तो ज्याप्रमाणें तिप्पट ताकदीनेंच चकाकूं लागतो त्याचप्रमाणें कोर्पोरेशनच्या अध्यक्षांच्या निवडणुकींत गेल्या आठवड्यांत श्री पटेल ह्यांचीच बहुमतानें अध्यक्षपदावर नेमणूक झाली व जोहुकुमवर्गालाहि सदसद्विवेकबुद्धीपुढें मान वांकविणें अपरिहार्य झालें.

महात्माजी व गोमांतकीय ख्रिस्ती वर्गः— थोडक्याच दिवसांत म० गांधी गोमांतकास भेट देणार असल्याचें जाहीर झालें मात्र, तोंच आमच्या ख्रिश्चन प्रांतबंधूनीं अकांडतांडव करून आकाश पाताळ एक करून सोडण्याचा घाट घातला. आधींच ठरून गेल्याप्रमाणें महात्माजींची भेट घेण्यास गेलेल्या गोमांतकीय शिष्टमंडळाचेंच हें सारें कुटिल कारस्थान असा काकतालीय न्यायाचा संशय घेऊन त्यांनीं ह्या राजकारणाच्या नसत्या उठाठेवी व उलाढाली करणाऱ्या हिंदूंना त्याबद्दल प्रेमभावानें शिव्यांची लाखोलीहि वाहिली. महात्मा गांधी ! आणि तेहि गोमांतकांत ! पोर्तुगीज सरकारच्या हक्काच्या व मालकीच्या कुरणांत ह्या जितींबांना त्यांनीं आपली एक उदार अंतःकरणानें फिरकावयाची चराव याची नव्हे, तो हक्क पोर्तुगीजांच्या किंवा बाटग्या ख्रिश्चनांच्या—मालकीचा—दिली; म्हणून का त्यानीं ह्या राज्यक्रांत्या करणाऱ्या गांधीलाहि आंत आणावें? हें बायबलच्या कोणत्या भागांत आहे ! व जें बायबलांत नाहीं अगर पाद्र्यांच्याहि तोंडीं नाहीं तें त्यांनीं कोणत्या आधारावर करूं द्यावें ? महात्मा गांधी हे चालू ब्रिटिश राज्यपद्धतीचे कट्टे शत्रू समजले जातात अर्थातच आमच्या पोर्तुगीज राज्यकारभाराचाहि कदाचित् अनुभवानें त्यास किळस यावयाचा. हें अगदीं उघड उघड दिसत असतां आपल्याच पायावर धोंडा पाडून घेण्यास आमच्या परधर्मीय प्रांतबंधूनीं कसें तयार व्हावें ? हिंदूंचा हा कोठला न्याय ? मडगांवास महात्माजींच्या छायाचित्र मिरवणुकीस जी अधिकारी वर्गानें बंदी केली तीनें 'सावधान' न होतां ह्या काळ्या कातडीच्या रानवटानीं महात्मा गांधींना गोमांतकांत येण्याविषयीं आमंत्रण देऊन बाबाची संध्या मूळावर कां आणावी ? वरील प्रकारचे विचार आज गोमांतकातील हिंदुद्वेष्ट्या मंडळीच्या डोक्यांत वावरत आहेत. बरें झालें कीं, कांहीं जरूरीच्या कामासाठीं महात्माजींना अहमदाबादेस जावें लागलें व म्हणून त्यांची वेंगुर्ल्यांहून गोव्यांस येण्याची खेप चुकली ! व त्यांच्या आगमनानें जिकडे तिकडे अराजकता पसरून बंडाळी माजल्याचें कल्पनाचित्र रेखाटण्याचे आमच्या ख्रिस्ती बांधवांचे श्रम वांचले.

आजचें पोर्तुगीज सदर

अग्रलेखः—

मडगांवच्या 'इंदिय पोर्तुगेज' पत्राला उत्तर; गामोत्सव व गोमांतकस्थ हिंदु.

स्फुट व इतर विषयः—

घटस्फोट व लखनौची हिंदी सामाजिक परिषद; डो० सुबाय विठ्ठल प्रभु देसाई यांचा सांगें मुनिसिपाल्टीसंबंधींचा लेख, इ.

वर्तमानसार

—रायबंदर येथील श्री शारदा वाचन मंदिराचा बारावा वाढदिवस मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. याप्रसंगीं भरलेल्या सभेंत रामचंद्र नारायण प्रभू लंवदे, सुब्राय विठ्ठल मांद्रेकर [अध्यक्ष], नारायण राया धोंड, इत्यादि गृहस्थांचीं भाषणें झालीं.

—ज्या सरकारी हुकुमान्वयें सांगें मुनिसिपालटीच्या मेंबरांची बदनामी करण्यांत आली, त्याचा विचार करण्यासाठीं सांवर्डें येथें येत्या २१ तारखेला सांगें तालुक्यांतील नागरिकांची जाहीर सभा भरणार आहे.

—सिलव्हेस्त्र परैर नांवांच्या एका सर्जंटानें कुंडई येथील एका प्रतिष्ठित गृहस्थावर दारूच्या निशेंत अत्याचार केल्यावरून फोंडें-तालुक्यांत गडबड उडाली आहे. दिवसेंदिवस पोलीस लोकांविषयीं लोकांत अप्रीति वाढण्यास वरील गोष्ट कारणीभूत होईल, हें उघड आहे.

—प्रो० आत्माराम पाणंदीकर—मडगांवच्या पाठशाळेचे तात्पुर्ते अध्यापक—यांस कामावरून बडतर्फ केल्याची बातमी आहे!

—गामोत्सव सोडून बेळगांव कॉंग्रेसला हजर राहिलेल्या कित्येक सरकारी नोकरांची हकालपट्टी करण्यांत येईल, अशी बोलवा आहे ! खरें खोटें राम जाणें !

—कांहीं हिंदुद्वेष्ट्यांनीं गामोत्सव प्रकरणाचा फायदा घेऊन हिंदूविरुद्ध भलभलत्या कंड्या उठविण्याचा एकसारखा सपाटा चालू ठेविला आहे !

वर्गणीदारांस—

भारताचें नववें वर्ष संपत आलें असून ज्यांकडून चालू व मागच्या वर्षांची वर्गणी आली नसेल, त्यांनीं ती ताबडतोब चुकती करण्याची कृपा करावी. म. भारत

समाज सुधारणा

विवाह

लेखांक १ ला.

आपल्या देशाच्या उन्नतीकडे आज बऱ्याच लोकांचें लक्ष्य लागलेलें आहे. इतर देशाकडे पहातां आपल्या देशाची स्थिति फारशी आशाजनक नाहीं. असें जरी असलें तरी पण पुष्कळ विद्वानांचें लक्ष्य त्या कामीं लागलेलें असून त्यांचे निरनिराळ्या दिशानींहि प्रयत्न चाललेले आहेत. ही अत्यंत समाधानाची गोष्ट होय. देशाची उन्नति होण्याला या देशामध्यें उच्च प्रकारचें वाङ्मय तयार व्हावें लागतें. त्याप्रमाणें आज देशी भाषांमध्यें निरनिराळ्या विषयांवरील उत्तम प्रकारचे ग्रंथ तयार होत असून आपल्या देशाची उन्नति फार दूर नाहीं अशी खात्री बाळगण्याला कोणतीच हरकत नाहीं.

हिन्दुस्थानामध्यें अनेक भाषा आहेत. परंतु राष्ट्रीय भाषेचें स्थान हिंदीनें पटकारलेलें आहे. सर्व हिन्दुस्थानची एक भाषा होण्याला हिन्दी हीच योग्य आहे व ती झालेलीहि असून उच्च प्रकारचें वाङ्मय तयार करण्याकडे त्या भाषेतील विद्वानाचें लक्ष लागलेलें आहे. राष्ट्रीयशिक्षणाकरतां

विरोधीचा फोलकट पुरावा

भारताच्या गेल्या ता. २७ नवंबरच्या अंकांतील 'विरोधी' च्या सर्वथा असत्य आणि कुत्सित विधानाबद्दल, त्यानें प्रकाशांत येऊन योग्य पुरावा द्यावा ह्मणून आह्मीं ११ डिसेंबरच्या भारतांतून जें आव्हान केलें होतें, त्या संबंधीं समर्पक पुराव्याच्या अभावीं २५ डिसेंबरच्या अंकामध्यें विरोधीनें ' रामशास्त्री प्रभुण्यासारखे उघड पुरावा देणारे निस्पृह कितीसे मिळतील याची वानवाच आहे ' अशा मिषानें ' स्वतःचें अंतःकरण शोधून पहा ' या मथळ्याखालीं आपल्या पूर्व विधानाला आणखी लवाड्यांची पुस्ती जोडून, स्वतःच्या अंगावर अधिक पुराव्याची जबाबदारी मात्र ' बुडत्याचा पाय खोलांत ' या ह्मणी प्रमाणें ओढून घेतली आहे; व असें करतानां त्याच्या समर्थनार्थ बऱ्याच गुलदस्तांतल्या सामग्रीचें प्रदर्शन करून केवळ निराकाराचा मायावी रावण बनवण्याची कारागिरी दाखविली आहे, तीचें कौतुक केलें पाहिजे.

कैकयी राणीनें आंगठ्यावरून रावण काढला होता अशी कथा आहे. सदर बाईच्या रावणाला एक आंगठ्याचा तरी आधार होता, पण आमच्या विरोधीरावांनीं रावणरचनेचें नखशिखांत काम फक्त अनृत कल्पनेच्या आधारावरच उभारून दाखविलें आहे ही मोठी तारीफ करण्याजोगी गोष्ट आहे.

' आपल्या हातून कळत नकळत घडलेल्या गोष्टीचा खुलासा ' एकंदर नव्हे 'बऱ्याच हिंदु पाहुण्यास' 'खर्च खुषीनें नसला तरी केवळ भीडेखातर केला' 'गावच्या एका हिंदु गृहस्थाच्या घरीं ' इ० सत्य–विरोधी वचनें विरोधीरावांच्या कृत्रिम रावणाचे अवयव आहेत. खुद्द यजमानास नकळत घडलेल्या गोष्टीचा संबंध–ती घडलीच असली तरी–आमच्या येथील मुंजी समारंभास विरोधीनें काय ह्मणून लागू करावी ? न जाणो, विरोधीच्या खास कांहीं अथवा बऱ्याच परिचितांकडून तें कुकर्म घडलें असेल, तरी पण तत्संबंधीक बरीच खर्चाची रक्कम मुंजी समारंभाच्या खर्चाला कशी जोडावी ! कदाचित ' तो उग्रवास ' नाकांत जाऊन त्यामुळें झालेल्या गुंगींत विरोधीला तसें वाटल्यास नवल नाहीं. पण त्यांतल्या त्यांत विरोधीचा उपकारच मानावयाचा कीं, कुंकळ्ळींत बरीचशी दारू विक्रीचीं दुकानें आहेत. त्या सर्व दुकानांत त्या समारंभाचे दिवशीं झालेल्या दारूखपाचा हिशेब आकारून तो एकंदर आंकड्याचा बोजा समारंभाच्या खर्चाशीं सामील करण्याचें त्याच्या डोक्यांत आलें नाहीं !

मूळ विधानांत ' मुंजी समारंभास आलेल्या हिंदु पाहुण्यास ' असा सर्व समुदायाचा उद्देश करून, आतां ' एकंदर नव्हे बऱ्याच हिंदु पाहुण्यास ' अशा दुरुस्तीचा चावटपणा करितानां, निदान त्या चुकीबद्दल सर्व पाहुण्यांची माफी मागण्याचें कर्तव्य कां केलें नाहीं ? वरील ' बऱ्याच पाहुण्यांस गांवच्या एका हिंदु गृहस्थाच्या घरीं नेऊन दारू पाजण्यांत आली!' हें कृत्य कोणीं केलें व कोणत्या वेळीं घडलें ? त्या हिंदु गृहस्थाचें नांव तरी काय ? तर ' या गोष्टीचा उघड पुरावा देणारे रामशास्त्री प्रभुण्यासारखे निःस्पृह मिळण्याची वानवाच आहे. ह्मणून ' कान असून ऐकायाचें नाहीं डोळे असून पहायाचें नाहीं, जीभ असून बोलायाचें नाहीं ' अशी बादशहाच्या पोपटासारखी बिचाऱ्या विरोधीची स्थिति होण्याची वेळ आली आहे. तर मग, ' जुवेबाजी, रंडीबाजी, दारूबाजी, चैनबाजी वगैरे सर्व बाजींशीं हटकून आपला विरोध आहे ह्मणून छाती बडवून घेऊन कै० आगरकरांच्या तोडीचा समाजसुधारकाचा बाणा व्यक्त करण्यामध्यें कोणता अर्थ शिल्लक राहिला ? मुंजीसमारंभांत आलेले बरेच [पुष्कळसे) दारूबाज हिंदु पाहुणे, गांवचा एक घरवाला हिंदुगृहस्थ, त्या पाहुण्यानां दारू पाजणारा कोणी एक अध्याहृत कर्ता, आमंत्रणास मान देऊन आलेला पण दारूबाज नसलेला प्रत्येक पाहुणा, अर्थात सगळेच पाहुणे, त्यांतहि विशेषेंकरून आमचा एक सोयसंबंधीचा पाहुणा आणि स्वतः आमचा विरोधीराव एक, मिळून एवढी भक्कम पुराव्याची सामग्री एकवटली तरी आमच्या आव्हानाचें किंवा आपल्या विधानाचें अंशतः तरी समाधान ह्मणून एकहि नामनिर्देश विरोधीला पुराव्याच्या उपयोगीं पडूं नये हें विरोधीचें दुर्दैव नव्हे काय ?

कोणाची इच्छा नसतां वेळीं अवेळीं आपण मोजीत असलेलीं दोघांचीं मापें घालण्यासाठीं बळेंच लोकांचे पदर ओढूं पाहणाऱ्या विरोधीनें आमच्या पदरांत इच्छित पुराव्याचें माप घालण्यास कमी केलें नसतें. पण ' पुरावा उलट पुरावा देतां घेतां अनेक दारूबाजांचा नाम निर्देश होणार असल्यामुळें ' (केवळ त्यांच्या भीडेखातर अथवा न जाणो एखादा दारूबाज उठून आपली मानगुटी धरील या भीतीखातर !) तितक्या पुरती आपली अनावर लेखणी आवरती घेण्याचा शहाणपणाचा बहाणा विरोधीकडून दाखविण्यांत येत आहे; परंतु भारतामधूनच धर्मगुरूंवर मोघम टीका करून आजपर्यंत कैकवेळां ' विरोधी'चें रुपडें घालून स्वकीय समाजांतील, धर्मनिष्ट, कर्तव्य-निष्ट, कुलीन इ० गुणविशिष्ट अशा थोर व्यक्तींची, नुसता नामनिर्देशच नव्हे तर तिच्या नावांचा पुकारा जगभर करितांना, गईचा पर्वत करून मनसोक्त निंदा करण्यांत ज्यांच्या स्वैर लेखणीनें तिळप्राय क्षिति बाळगली नाहीं, त्या लेखकाच्या वरील मानभावीपणावर भारताचे चाणाक्ष वाचक थोडाच विश्वास ठेवणार आहेत !

येथपर्यंत सापेक्षपणें करावें लागलेल्या स्पष्टिकरणावरून आमच्या विरोधीरावांच्या कृत्रिम रावणाचे अवयव कशाचे बनविले आहेत याचा पुरता निर्णय, त्याच्या मुख्य धडाची पुढीलप्रमाणें झालेली अवस्था पाहूनं, भारताचे प्रीय वाचक सहज करणार आहेत. आणि त्यामुळें विरोधीच्या अंतःकरणांतहि पण कमी प्रकाश पडणार नाहीं. आमच्या येथील मुंजीचा समारंभ गत रुधिरोद्गारी सं० माघ शु० १० मी मितीस झालेला असून दत्तकसंबंधीं कायदेशीर विधान (दुअसांवचें इस्त्रीतुर ; चालू रक्ताक्षी सं० भाद्रपद व० ८ मी मितीला ह्मणजे सात महिने १३ दिवसांच्या अंतरानें मागाहून झालें आहे हें पुष्कळांस माहीत आहे. असें असतां ' विरोधी ' आपल्या मूळच्या लचकत्या विधानाला मजबूत टेंका देण्यासाठीं मान वर करून सांगतात:– " त्याच्याहि (मुंजी समारंभाच्या) पूर्वी ह्मणजे मुलाचें दत्तकविधान कायदेशीर करतांना या असल्या (यजमानांस दारू पाजण्याच्या !) पाहुणचारास आरंभ झाला होता; तो या मुंजी समारंभानें पूर्ण झाला" [?]. ह्याप्रमाणें विरोधीच्या गंधर्व नगरांतील सामग्रीच्या रावणाची ' ऊर्ध्वपादावधःशीर्ष ' अशी केवीलवाणी स्थिति झालेली पाहून, विरोधीराव, आतां पुन्हा एकवार या प्रकरणीक आमूलाग्र हकिकत मननपूर्वक वाचून तुह्मींच स्वतःचें अंतःकरण चांगलें शोधून सांगा: भारताच्या प्रत्येक वाचकानें कींव कोणाची केली पाहिजे ? भटजी पुरोहिताच्या कोणा तरी हितचिंतकाच्या कान फुंकणीवरून विरोधीच्या मेंदूला विकृति झाली आणि त्यामुळें भलतींसलतीं विधानें करून विरोधीला विनाकारण गोत्यांत पाडून घ्यावें लागलें ह्मणून ती तुमचीच करायाला नको काय ?

विरोधीला इतक्या थरावर ही गोष्ट येईल व आपला कोणी हिशेब घ्यावयाला तयार होईल याची कल्पनाच नसून नेहमी या संवयीप्रमाणें दूषणप्रीय जनांचें रंजन करणाऱ्या कुत्सित विधानांनीं आपण केलेला सत्याचा खून राजरोसपणें पचून जाईल असा ठाींव भरवंसा होता; परंतु ते पापाचे घडे किती दिवस टिकून राहतील ? ' खुनाला वाचा फुटते, हें तत्व खरोखरीच विरोधीला उमगलें असेल तर, रामशास्त्री प्रभुणासारख्या निःस्पृह न्यायाधिशाच्या समोर सदर खुनाचा खटला चालता तर त्याच्या कर्त्याला आनंदीबाईच्यापेक्षां विशेष मानाची जागा प्राप्त झाली असती असें जाणून इत उत्तर त्याची खुनी वाचा बदच पडली पाहिजे. !

आमच्या पुरोहितकीच्या नात्याचे पुष्कळ यजमान, ज्यांस आमचीं मद्यपान निषेधाचीं तत्वें किती जागृत आहेत याची पूर्ण जाणीव असून विरोधीच्या ' परोपदेशे पांडित्यम् ' अशा धर्तीच्या शहाजोग विधानांची खूबशी ओळख आहे, ते आह्मीं, आमच्या वैदिकी कर्तव्यापुढें अशा आड राहून खडे मारण्याराच्या निंद्य कृतीला मुळीं महत्वच देणं प्रशस्त नव्हतें अस ह्मणतील व तें बरोबर नाहीं असें नाहीं; परंतु आह्माकडून स्वप्नांतसुद्धां जी गोष्ट घडली नाहीं, तीचें एकाएकी बिभत्स चित्र रेखाटून दाखवून आमच्या येथील मुंजीच्या धार्मिक समारंभास लांछन देण्याचें आणि उपकारबुद्धीनें आलेल्या सर्व सद्गृहस्थ पाहुण्यांची बेअब्रू करण्याचें धाडस करणारा अनामीक कोण आहे, त्याचें नांव-तोंड तरी लोकांपुढें दिसून यावें ह्मणून आह्मांला आव्हान देणें भाग झालें. असें असतां अजून तें बाहेर दिसलें नाहीं, तथापि त्याचें अंतरंग केवळ ' खलःसर्षपमात्राणि परच्छिद्राणि पश्यति ' अशाच स्वरूपाचें सर्वकाळ कसें आहे त्याचें प्रदर्शन जगापुढें व्हावयाचें कार्य त्याच्या बुरख्याच्या तोंडाकडूनच झालें, असें जाणून यापुढें विरोधीनें बुरखा तसाच ठेवून आह्माविषयीं कितीहि कल्पित विधानांची परमावधी केली तरी त्यास काडीचेंहि महत्व दिलें जाणार नाहीं.

सरतेशेवटीं या सहज ओघानें लांबलेल्या लेखाची रजा घेण्यापूर्वी विरोधीच्या आमच्या भाषेबद्दलच्या तक्रारीचें थोडेंसें समाधान करणें इष्ट आहे. विरोधीला आमची भाषा बरीच कडू लागली आहे. त्यानां मधुरशा शब्दांची सौम्य भाषा आपल्याकरितां पाहिजे होती व कोणाहि विरोधीसारख्या कोमल भाषावादी परनिंदकाची अपेक्षा अशीच रहाणार. परंतु कुचाळखोर बुद्धीनें दुसऱ्याचें छिद्रान्वेषण करून त्यावरील मिथ्या दोषारोपाच्या मंडणाचें काम जसें मंजूळ; कोमलशा भाषेनें होणें अगदीं सोपें असतें, तसें त्याच्या खंडणाचें नसून तेथें कितीहि सौम्यपणा पतकरण्याचा यत्न केला तरी, ' शुनःकपाले लगुडप्रहारः ' हाच न्याय अभिमुख होतो, आणि तदनुसार आह्मास अवलंबाव्या लागलेल्या भाषेपासून विरोधीच्या नाकाला कांहीं मिर्च्या लागल्या असल्यास त्यानीं रुसावा करण्याचें कारण नाहीं.

कुंक्कळी पौष शु० १०मी शके १८४६

पांडुरंग शाणू कामत,

बाल-वाचन-मंदिर संस्थेच्या व्याख्यानमालेचा रिपोर्ट

शारीर शास्त्राप्रमाणें वागलें तर जीविताची शारीरिक उन्नति होईल, १०० वर्षे जगेल. पण मानसिक व आत्मिक उन्नतीशिवाय मनुष्यजीवित व्यर्थ होय. रानटी मनुष्याला सुद्धां परोपकार बुद्धि असते. एखादा चांगला शिक्षक पगारापुरतें काम करीन ह्मणेल, तर तें होणार नाहीं. चांगल्या गुरूचे पगाराप्रमाणें श्रम असत नाहींत. सज्जन वैद्य सुद्धां फी प्रमाणें औषध देत नाहींत. आपली सर्वशक्ति समाजकार्याला लावावी ही प्रत्येक मनुष्याची इच्छा असली पाहिजे. प्रत्येकाला नांवांची आवड आहे. हें नांव पाळण्यांतलें नव्हे तर सुकीर्तीचें नांव होय. केवळ नांवासाठीं परोपकार करणें योग्य नव्हे. निष्काम कर्म आचरणाऱ्यांसच समाजसेवक ह्मणतात. केवळ राजकीय चळवळ करितो, तोच देशकार्य करितो असें नाहीं. पुण्यशील कर्वे यांनीं केलेली स्त्रीशिक्षणाची कामगिरी दुसऱ्या कोणत्याहि समाजसेवकापेक्षां कमी दर्जाची नाहीं. आजकाल आह्मीं जोरदार बोलणारा व लिहिणारा यानांच देशभक्त ह्मणतों. गरीब कर्त्याला ही पदवी देण्याला तयार नाहींत. आमच्या समाजाची उन्नति होण्यासाठीं धार्मिक सुधारणा घडवून आणिली पाहिजे. उच्च वेदकालीन धर्माला — ज्या धर्माकडे आजचें सुधारलेलें जग आदरानें पाहतें त्याला — परिस्थितीमुळें जें विकृत स्वरूप प्राप्त झालें आहे; तें विकृत स्वरूप धार्मिक एकीनें दुरुस्त केलें पाहिजे. समाजामध्यें धार्मिक बंधनानीं जी फाटाफूट पडली आहे ती नाहींशी करून संघशक्तीनें कामें चालविलीं पाहिजेत. समाजमंदिरांतील जातिभेदाच्या भिंती दगडी किंवा लोखंडी आहेत त्या लांकडी - ह्मणजे प्रसंग विशेषीं नाहींशा करितां येणाऱ्या - झाल्याशिवाय हिंदी समाजाचा तरणोपाय नाहीं. तशीच औद्योगिक उन्नति झाली पाहिजे. किर्लोस्कर ओगले हेच खरे समाजसेवक होत. वाङ्मयसेवा हीहि राष्ट्रसेवा होय. वाङ्मय हा राष्ट्राचा प्राण होय. वाङ्मयसेवक स्वतःची प्रतिभा खर्ची घालून, लोकांच्या विचारांना वळण देतात. चिपळूणकर, आगरकर यांच्या लेखणीनें पुष्कळ राष्ट्रकार्य केलें—आमच्यांत जागृती उत्पन्न केली. समाजाच्या उन्नतीसाठीं ज्या ज्या करण्यास योग्य गोष्टी असतील तीच समाजसेवा; कोणतीहि सेवा केली तर ती समाजाला सारखीच वंद्य आहे. समाजसेवा दैवी शक्तीशिवाय व्हावयाची नाहीं ही कल्पना चुकीची आहे. प्रत्येकाला समाजसेवक होतां आलेंच पाहिजे. अति गरिबाला सुद्धां समाजसेवा करितां येईल. समाज कोणाच्याहि सेवेची उपेक्षा करीत नाहीं. तो सांगतो कीं, तुमच्या गरीब कष्टांची मालकी व मोठ्यांची मोठी सेवा सारखीच आहे कितीहि मोठा जगाला गवसणी घालूं शकत नाहीं. प्रत्येकानें श्रमविभागानें एक एक काम केलें तर समाज सर्वांग परिपूर्ण होईल. फूल—फळझाडांप्रमाणें कांटेरी झाडांचाहि मनुष्याला उपयोग होतो. ईश्वराच्या दारांत ज्याप्रमाणें कोणालाहि मज्जाव नाहीं त्याचप्रमाणें समाजाच्या दारांत कोणाच्याहि सेवेला मज्जाव नाहीं. समाजसेवेचें पवित्र कार्य आबाल वृद्धानां व स्त्री पुरुषांना करितां आलें पाहिजे व त्यानीं तें केलें पाहिजे. आज चुलीचें सिंहासन, फुंकणीचा राजदंड, पोतेऱ्याचा भगवा झेंडा हींच स्त्री राज्यांतील भूषणें झालीं आहेत. ही शोचनीय स्थिति बदलून ‘ अनृतं साहसं माया ’ या श्लोकाऐवजीं ‘ गृहिणी सचिवः सखी मित्रः’ हा श्लोक सर्वत्र ह्मटला गेला पाहिजे. ऋषीकाळीं जें शिक्षण मिळत असे, तेंच शिक्षण आज प्रचारांत आलें पाहिजे. प्राचीनकाळीं आमची हिंदभूमी सुवर्णभूमी होती असें आह्मीं ह्मणतों. बुद्धिमान् ऋषींच्या कीर्तीमुळें आज आह्मीं जगांत उजळ माथ्यानें फिरूं शकतों. आम्हीं असें केलें पाहिजे कीं, आमच्या वंशजानां भूतभूत काळाकडे न पाहतां भूतकाळाकडेच पहावें. आम्हीं आमच्या समाजाचा अर्धांभाग - अखिल नारी जनता — आंधळा केला असल्यामुळें प्रगतीला पुष्कळ अडथळा उत्पन्न झाला आहे. ही स्थिति बदलून कशाचाहि विचार केला तरी स्त्रियानां त्यांत भाग घेतां आला पाहिजे. त्यांची उन्नति झाल्याशिवाय समाजाची उन्नति होणार नाहीं. सरकार स्वतंत्रता देऊं शकेल पण उत्तम गृहिणी देऊं शकत नाहीं. कुटुंबाच्या सुधारणेशिवाय इतर सुधारणा निष्फल होत. समाजसुधारणेच्या विचारांत स्त्रियानां वगळून उपयोगी नाहीं. आपल्या समाजसेवेंत पुरुषांइतक्याच स्त्रिया भागिदार आहेत. निसर्गानें कांहीं गोष्टी प्रतिकुल व कांहीं अनुकुळ आहेत. विवेकाची मदत वृद्धानां तर उत्साहाची मदत तरुणानां असते. त्या त्या प्रमाणें त्यानां कामें दिलीं पाहिजेत.

आपण सर्व एकाच हिंदी राष्ट्राचे नागरिक आहोंत अशी एकराष्ट्रीयत्वाची कल्पना सर्वत्र फैलावली पाहिजे. पूर्वींच्यासारखी संकुचित परिस्थिति आज नाहीं. कधीं काळीं भाषाभिन्नत्व दूर झालें तर सर्व जगाचें एकराष्ट्र बनूं शकेल. आह्मांला जगाच्या शर्यतींत धांवावयाचें आहे हिंदुस्थानानें योगसमाधी लावली तर जग त्याची धुंदी उतरवील. धर्मभिन्नत्व आहे ह्मणूनच तुमच्यांत एकी होत नाहीं; हा प्रश्न उपस्थित होऊं देतां कामा नये. धर्म किंवा जाती विचारी पुरुषांच्या आड येऊं शकत नाहींत. अति उत्तम गोष्ट ह्मणजे हिंदुधर्म, व अति नीच गोष्ट ह्मणजे त्याचें आजचें स्वरूप होय हिंदुधर्म गंगेचें शुद्धपाणी खोलीवर राहून नासका कुजका भाग वर आला आहे. हा कुजगा भाग ह्मणजे रूढी होत.

(रिपोर्टाचा पुढील भाग येत्या अंकीं संपूर्ण होईल.)

सं. भारत.

Ano 9 N. 43

Quinta-feira 22 de J. neiro de 1925

ASSINATURA
Por cada ano ... rupias

AN...
por cada linha ainda ... cada uma tanga
Numero av... tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.

BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४३

गुरुवार ता. २२ जानेवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें--गोवा

MAIS UM PROCESSO

Por causa do seu artigo *Seculos depois...*, publicado no° 38 de Dezembro findo, acaba de ser instaurado mais um processo crime contra o *Bharat*.

O digno Agente do M, P. que o requereu, deve ter, na sua alta sabedoria, JULGADO o artigo incriminado capaz de periclitar o prestigio das iiisti tuiçoes que nos regem e que —que ironia !—o *Bharat* sempre as aplaudiu.

Conquanto seja verdadeira a filosofia dum ditado marata que diz— *ninguem chora a morte de quem sempre morre*,—nao e' menos verdadeiro, tambem, que a convivencia quase constánte com os processos crimes tem sido para o BHARAT um habito inveterado, uma segunda natureza, um estimulo para se sacrificar cada vez com mais energia, em prol dos interesses patrios.

Fique, porisso, sabendo, o digno Agente do M. P. que a sua atitude nao nos causou FRIO mas sim CALOR para prosseguirmos ainda com mais VIDA na nossa missao jornalistica a que temos dado tudo o que somos, material e moralmente.

De colo erguido, pois, o BHARAT se sujeitara' a mais este seu julgamento, preparando-se a receber, sempre com um sorriso a bailar nos labios, SORTE que o insondavel Destino lhe marcar.

O que tem de ser, ha' de ser e nao serao as perseguiçoes ou favores humanos que o evitarao. E a gente que segue a doutrina dum semilhante BRÉVIARIO, nao desfalece contra quaisquere contratempos que, porventura, pretendam aterrorisa la.

PARA A SEMANA QUE VEM

A falta de espaço obriga o BHARAT a reservar para o n°. imediato muita materia ja" composta, nomeadamente e'cos sobre o incidente " Jovens hindus e Centenario de Vasco da Gama."

Nada se perdera' com a demora, desde que esta' ainda em continuaçao a campanha anti—hindu', promovida astutamente por parte dalguns nossos irmaos cristaos.

Ao veio do tempo ...

UM BANQUETE DE SUBSCRIÇAO NO PALACIO DO GOVERNO—NARRA--SE UM SIMPLES BOATO QUE CORRE COM MUITA FORÇA—A VERDADE DOS FACTOS SOBRE A ATITUDE DA ACADEMIA NAS FESTAS DO GAMA.

Circula entre pessoas graudas, conselheiros do Estado, oficiais de alta patente, chefes de serviço uma lista de subscriçao para um estrondoso baile de subscriçao que vai ter lugar no palacio do Governo—ignoramos se no do Cabo ou no do Hidal Khan—; porem, onde quer que seja, no nosso modesto modo de ver isto e'um autentico sinal dos tempos... Nao se sabe para o que se ... memorar; ao que nos consta nao ha nenhum SANTO de CASA a celebrar com estrondo e espavento. La' se foram, na voragem do nada, as belas 14,000 rupias que muita fome haviam de saciar e matar muita sede. Mas, basta que pode estar la' suspensa sobre a nossa cabeça a terrivel espada de Damoclos. E, porisso ponto

Crispim

P.S. Em 'posto escriptum' fique bem patente que e' um mero boato e nada mais, o que ai fica. O mais que vier soara'

C.

Apo's o rabisco destas linhas para este numero, aparece-me A EPOCA de Mapuça', cujo correspondente de " Alem ", um A. N. R. que pelas iniciais, nos parece tal como um Antonio de Noronha Rodrigues, o eximio representante da Academia, da Comissao magna das festas do Gama que, ignoramos, porque alçapao ou porque artes encafuou-se sem dar sinal da sua pessoa, a tantos titulos ilustre da mesma magua comissao.

Este sr, na sua ultima cronica sob a sub- epigrafe " Fim do Começo " refere-se ao incidente havido entre a Academia e o Governo nas festas. No's, por simples pudor deixaramos de nos referir mais de largo a' dita tragi comedia. Por artes do sr. Pereira Batalha a quem o A. N. R. se acha filiado, ligado pelos laços fraternais de ir...na loja *India*, foi nomeado vogal da Comissao magna quase representante da Academia. Foi o rastilho; a Accademia, a sua fina- flor agitou-se e, com razao, deliberou nao tomar parte nas festas como de facto nao tomou. Houve muitas *demarches* no sentido de se apaziguar a Academia, mas todas elas redundaram num grande fiasco. A Academia terminantemente expressava se dizendo que A. N. R. nao era seu representante, pois quem devia representar a Academia era um 5° anista da Medicina e mais ninguem e porisso estatuiram uma condiçao *sine qua non*, a de irradiar o mesmo A. N. R. da Comissao, e como isto nao teve lugar, a Academia, celebrando a festa do Liceu, absteve-se de tomar parte nas festas. Tanto e' que para o tal numero do programa em que a Academia tomava parte arrebanharam-se rapazes das escolas primarias da Capital, de Pilerne, Nerul e muitas outras, cada um com o respectivo uniforme que dava a impressao duns homens de *brincos*. Se os rapazes foram a Cidade Velha foram como simples cidadaos e...como ninguem mais. E nao sei se se possa chamar a Academia a umas duzias de academicos da Cidade e aldeias circunvisinhas que ai estiveram, por uma curiosidade muito natural.

Fica, pois, restabelecida a verdade dos factos que o A. N. R. deturpou com intuitos mesquinhos. A questao academica ouvimos a um Academico que nos merece inteira fe' e que e' *alguem* na Academia.

Portanto, como se ve, nao foi um cavalo de batalha feito pelo *Bharat*, ja' ele por sua natureza o era,

Crispim

Os hindus

...Sr. Director do *Bharat*

Em *N.* da *R.* a uma carta que escrevi ao ULTRAMAR, desmentindo a balela do convite ao *Mahatma Gandhi* e pedindo-lhe a fineza de me declarar os nomes das pessoas que fizeram parte da suposta deputaçao a que se atribuia o mesmo convite, dispensa-se o mesmo jornal de declinar " os nomes dos respectivos informadores, um dos quais e' hindu, por nao se julgar obrigado a isso, "

Nao e' de peso o que o *Ultramar* alega para se esquivar ao dever de declinar os nomes dos informadores cuja existencia, segundo os rodeios de que lança mao, nao deve ser senao imaginaria. E, depois, quem nao deve, nao teme.

Isto de dizer que a noticia nao ofende pessoa alguma e' uma evasiva que so' teria valor, se a mesma noticia nao ofendesse verdade, porque so a verdade nao ofende ninguem. E, porque a noticia inserta nas colunas do *Ultramar* desvirtuava a verdade dos factos, e' que me apressei a dismenti-la e nao por qualquer " terrivel desarmonia que presentemente entraram de reinar na classe hindu, desorientando uma parte dela."

Espalhar noticias imaginarias, como a que o *Ultramar* registou na " A ultima hora " de 2 do corrente, e' sempre ofensivo e, porque o era-repito—escrevi-lhe aquela carta.

De resto, nem os *jovens* nem os *velhos* hindus teriam duvida de dizer alto e bom som, que dirigiram convite ao *Mahatma* se, de facto, o tivessem feito, porque sabem eles, demais, que nao e' nenhum crime desejar ca' presença de quem, hoje, constitui gloria universal.

Por quem e', porem, nao editem noticias imaginarias, na suposiçao de que *nao ofendem pessoa alguma*.

E ponto.

Margao 16/1/1925.

De V. etc.

Esvanta Suria Rau Sar Dessai

Uma carta

Recebemos a seguinte carta:

Sr. Director do *Bharat*

Numa local, subordinada ao titulo *Panico* escreve a TERRA entre outras coisas, o seguinte:

" Correm explicaçoes de que foi removida a tipografia (do jornal marata HINDU) pelo facto de constar que tendo sido feita ilegalmente a concessao dum valioso edificio publico, vai ser revisto o processo, visto ser forçoso reverter aquela ao Estado e ate' hoje nao haver sido utilisada para o fim a que se distinava, mas a bem diferentes, julgando as enstancias oficiais que se abusou da munificencia ou generosidade do chefe da provincia com actos subversivos."

Entendo ser, absolutamente, despropositado entrar na apreciaçao da remoçao da tipografia do HINDU, porque ela nao, diz directamente, respeito a' instituiçao de que sou secretario. Cabe-me, apenas, derramar

Pagode. Aos 21 de Janei-
e 1925. O escrivão da me-
amacrisna Ananta Nar-
m. Visto. O presidente
anta Ganaxama Molcor-
ar

VENDE-SE

ende-se, em hasta, em glo-
a em glebas.
redio Silva-Batta em que
em 3 casas e 2 lojas, sito
de do concelho de Que-
no dia 25 de janeiro pro-
pelas 11 horas, na resi-
a do sr. tabelião Salinho
lva, reservando o signata-
este a quem pertence reti-
a praça não lhe convindo
ço. O arrematante deposi-
no acto 10% do preço. Que-
22 de Dezembro de 1924.
ronimo Francisco da Silva

वर्तमानसार

ाच्या श्राद्धोत्सवासंबंधीं मडगांवच्या
' पत्रावरहि खटला भरण्यांत आला
कुटिल कुळकर्ण्याप्रमाणेंच ' तो अद्वि-
ाणी ' मरणोत्तर सुद्धां हिंदूनां छळीत
ाचें पाहून आश्चर्य वाटण्याऐवजीं हंसू

-गामोत्सवासंबंधीं खुद्द पोर्तुगालांत
तिकडे तटस्थपणाच स्वीकारण्यांत आला
असें तथील पत्रांवरून समजतें !
-अपरिहार्य कारणांमुळें या खेपेला पु-
प्रसिद्ध करणें शक्य झाले नाहीं.
' भारत ' व ' हिंदु ' या पत्रांसंबंधीं
असलेल्या भलभलत्या कंड्यांवर लो-
विश्वास ठेवूं नये अशी आमची लो-
सूचना आहे.
-डॉ० जाइम मोराइस यांची नेमणूक
ळच्या हाय कमिशनचे जागीं झाली
त्यांच्या ऐवजीं येथें जुवांव कामोये-
येतील.
-फार्झेदाचे मुख्याधिकारी तिनोकु, प-
वर्कस खात्याचे मुख्य मेंदोंस व डॉ०
मोराईस हे लवकरच पोर्तुगालला र-
होणार आहेत.

भारत

भारत

मिति पौष कृ० १३ शी शके १८४६

"विनाशकाले विपरीत बुद्धि"

गोमांतकाविषयीं ज्यांच्या ज्यांच्या ह्मणून अंतःकरणांत पवित्र पुज्यभाव व अज्ञात अभिमान वास्तव्य करीत आहे, परशुराम क्षेत्राचा हा विभक्त विभाग पुन्हां एकदा उत्तुंग उन्नतिशिखरावर विलसूं व तळपूं लागलेला ईश्वरदत्त चर्मचक्षूंनीं अवलोकन करून डोळ्यांचें पारणें फेडण्याचें महद्भाग्य – आपल्या फुटक्या नशिबीं नसलें तर नसो बापडें पण – भावी पिढीस तरी निदान लाभावें हीच ज्यांची अढळ आकांक्षा आहे, व त्या विषयीं ज्यांस उत्कट उत्कंठाहि लागून राहिली आहे, त्यापैकीं बहुसंख्यांक जनसमाज आज दिवस गोमांतक बंगाल बनविलें जाणार काय? हाच प्रश्न स्वतःशींच सोडविण्याचें साहस करण्यास उद्युक्त झाला आहे. गोमांतक दुसरा बंगाल बनणार काय? ह्या पंचावयवी प्रश्नानें आज एकाद्या जादुविद्याकुशल पंचाक्षराप्रमाणें प्रगतिपंथावलंबी प्रजापक्षाच्या हृदयावर सुरळ घालून तें भारून टाकलें आहे. ह्या प्रश्नाचा गूढार्थच तितका गहन आहे; किंबहुना गोमांतकाच्या भावी इतिहासाचीं पानें लालभडक रक्तानें रंगविलीं जावीं किंवा नयेत, गोमांतकांत सैतानी सत्तेची सोटेशाही साम्राज्य सुरू व्हावें अगर होऊं नये, बेंडाळी व बेबंदशाही ह्या दुर्दैवप्रणीत दुक्कलीचा मूर्तिमंत अवतार ह्मणून गोमांतकाकडे इतर प्रांतानीं बोट दाखवावें किंवा दाखवूं नये हे तिन्हीं महत्वपूर्ण समास त्या एकाच सवालावर हवाला टाकून स्वतः नाम निराळे राहिले आहेत असेंच ह्मटल्यास चालेल. आणि ह्याचसाठीं वरील प्रश्नाचें उत्तर नकारात्मक आलेलें कोणाहि समंजस माणसास हवें!

गोमांतकानें बंगाल बनणें जें आह्मांस भीतिजनक वाटतें त्याचा अर्थ जर एखादे 'देवाघरचें रत्न' असा घेऊं लागेल की महर्षि देवेंद्रनाथांसारखे तपोनिधी, जगदीशचंद्रांसारखे जगद्वंद्य तत्ववेत्ते, राजकवि रवींद्रनाथांसारखे कविसम्राट व देशबंधू दासांसारख अतुलनीय स्वार्थत्यागी राष्ट्रवीर गोमांतकासाठीं–आपल्या देशमातेसाठीं--ज्याचें रक्त तिळतिळ तुटणें परिस्थितीनुरूप जरुरीचें झालें आहे- त्या तडफदार व कार्यकर्त्या उसळत्या उमरीच्या तरुण पिढीतून निपजणें देशहित विघातक होय असा आमचा समज आहे; तर आह्मी त्यांस पुन्हां पुन्हां बजावून ठेवतो की त्या बाबतींत तरुण गोमांतकानें बंगालचा धडा बेधडक गिरवावा, इतकेंच नव्हे तर बंगालच्या पाऊलांवर आपलें पाऊल टाकून वीरमातेच्या पवित्र सिंहासनावर जेव्हां गोमांतक अधिष्ठित होईल तेव्हांच गोमांतकीय तरुण पिढीच्या कल्पना सृष्टींत सुद्धां स्पष्टपणें दृग्गोचर होत नसलेलें सुराज्य दृश्य व मूर्त स्वरूपांत येण्याची स्वल्प तरी आशा दाखविणें शहाणपणाचें ठरेल. एरवीं नाहीं. हा आमचा पूर्वग्रह आज देखील अबाधित आहे; इतकेंच नव्हे तर त्यास दिवसें दिवस पुष्टीच मिळत चालली आहे.

पण ज्या बाबतींत गोमांतकानें बंगालची 'री' ओढलेली आह्मांस नको आहे, जिचा कोणाहि समंजस व सुविचारी पुरुषास तीन्ही त्रिकाळ बंगीच्या देठापासून कंटाळा व किळसच यईल अशी आह्मांस खात्री वाटते, ती बाबत निराळीच. गोमांतकानें बंगालसारखें विद्वान, सुशील, बाणेदार व कर्तृत्वशाली बनावें असा आमचा आग्रह आहे खरा, पण त्याचबरोबर अत्याचारी व सूडाच्या भावनेनें पूरीत होऊं नये हाहि हट्ट घेऊन बसण्याचा आमचा हक्क आहे. कठोर हृदयी कर्झन साहेबानीं वंगभंगाखातर लोकशाहीचीं हृदयें तुडविण्यात व लाथाडण्यांत जी अधिकार बहाद्दुरी व बेफाम वृत्ति जगाच्या निदर्शनास आणली तिचा आमच्या गोमांतकांतील वरिष्ठ सरकारी अंमलदारांनीं उपयोग करून, खाल्या घराचे वांसे मोजण्याइतकी उद्दाम वृत्ती दाखवून, 'विषाची परीक्षा' पहाण्याचें मौर्ख्य पदरात घेऊं नये असें आह्मांस वाटतें. कारण ह्या निंद्य व गर्हणीय कृत्यांनीं खवळून गेलेला लोकसमाज राग व अविचार ह्या दुक्कलीस मानवी स्वभावानुसार बळी पडून अत्याचार करण्यास कदाचित प्रवृत्त व्हावयाचा! बंगाल गव्हर्नर लॉर्ड लिटन साहेबांनीं व्हाइसराय साहेबाच्या वट हुकुमाच्या जोरावर जी सध्या बंगाल्यांत बेबंदशाही सुरू केली आहे तिचें प्रतिबिंब आमच्या गोव्यांतहि दिसूं लागावें हें इष्ट व व्यवहार्य नाहीं. वैयक्तिक स्वातंत्र्यावर व सार्वजनिक स्वास्थ्यावर घाला घालण्याचा पोर्तुगीज सरकारास मुळींच अधिकार नाहीं. व अधिकारबाह्य बेकायदेशीर कृत्य करण्यास जर अंमलदार वर्ग धजावला तर त्यास प्रतिकार करणें प्रत्येकाचें –हिंदू–ख्रिश्चन, ब्राह्मण–ब्राह्मणेतर, जित–जेते, ख्रिश्चन–द्वेष्टे, हिंदु–द्वेष्टे ह्या सर्वांचें आद्य कर्तव्य ठरतें. सार्वजनिक स्वास्थ्याची किंमत कोणास कळत नाहीं. सर्वांस सारखीच समजते. ह्मणून आह्मी ह्मणतो की राजकर्त्यांना कुबुद्धि सुचूं नये. प्रजेचें वित्त व जीवित रक्षण्याकरितांच गरिबांनीं घामाच्या धारा पिळून व रक्ताचें अर्घ्य अर्पून मिळवलेल्या पैशांतून ह्या अधिकाऱ्यांचा पींड पोसला जातो हे आतां प्रत्येक सुशिक्षित अशिक्षितास समजून व उमजूनहि चुकलें असून मनास वाटेल तसा कारभार करून प्रजेस जुलमानें बेजार करणाऱ्या अंमलदारास काय शिक्षा द्यावी ह्याचा विचार करतांना बंगालचें सद्यःकालीन दृश्य लोकशाहीचे पुढारी ह्मणविणाऱ्यांच्या डोळ्यांपुढें दिसूं लागण्यापूर्वीं अधिकाराचा दुरुपयोग करण्यास सरसावलेल्या कामदारांनीं सावध व्हावें हें अत्युत्तम. पण इतके विचार त्यांच्या डोक्यांत घोळायला डोकें कुठें थाऱ्यावर आहे. अधिकारी वर्गाचें गोमांतकस्थ हिंदु वर्गानें यंदां राष्ट्रीय महासभेच्या कार्यक्रमांत भाग घेतल्यामुळे वरिष्ठ कामदारांनीं कॉंग्रेसला हजर राहिलेल्या सरकारी कामगारांना नोकरीवरून दूर करण्याचा निश्चय व्यक्त केला असल्याचें नुकतेंच कानावर आदळल्यामुळें उपरिनिर्दिष्ट विचारांनीं आमचें डोकें भंडावून सोडलें आहे. ब्रिटिश अनुकरणाची सवंय आमच्या पोर्तुगीज सरकारास फार दिवसांपासून जडली असून चालू बबंदशाही हे तिचेंच एक प्रत्यंतर असेल!

अशा आणीबाणीच्या वेळीं आमच्या ख्रिस्ती व्यवसाय बंधूंनीं जें धोरण पत्करलें आहे तें मात्र अनुदारतेची कमाल दर्शविणारें आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या कर्दमांत लोळत पडलेल्या ह्या महिषीनंदनांना त्यांतच सुख वाटतें ह्मणून ह्मणा, अगर अव्यापारेषु व्यापार केल्यामुळें शेपटी तुटलेल्या कोल्ह्यानें जसा इतरांसहि 'लांडे' बनण्याबद्दल सम्यतेचा आव आणून मारे एखाद्या वृद्ध कपिंजलाप्रमाणें उपदेशामृताचें पान पाजण्यास सुरवात केली, तशीच ह्यांचीहि अवस्था झाली असल्यानें ह्मणा, हिंदूचें हितशत्रुत्व करण्यांतच ज्यांचें सारें आयुष्य खर्चीं पडलें त्या आमच्या बाटक्या व्यवसाय बंधूंनीं चारी बाजूंनीं संकटांत सांपडलेल्या हिंदु धर्मानुयायांचा पुरा सूड उगवून घेण्याचा निश्चय केला आहे. गामाच्या मरणोत्सवांत हिंदूनीं दाखविलेली तटस्थ वृति ह्यांचें चित्त खवळविण्यास कारणीभूत झाली असून सूडाच्या भावनेची कावीळ झाल्यामुळें ह्या पत्रकारांना चोहींकडे पिंवळी अराजकता दिसत आहे. मडगांवच्या 'आ इंदिय पोर्तुगेज, पत्रानें हिंदूंवर बंडाचा आरोप लादण्या इतकी आघाडी मारण्याचा पुरुषार्थ गाजविला आहे. ह्या भ्रमित चित्त पत्रकर्त्यांना आह्मी गेल्या अंकीं पोर्तुगीझांत सडतोड उत्तर दिलेंच आहे ह्या वेळीं 'धनीं एक हात तर कुत्रें सात हात' ह्या वाक्प्रचाराची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. स्वतः आमच्या विषयीं सांगावयाचें झाल्यास आमच्या Mad cap मॅडकॅप परधर्मीय प्रांतबंधूंनां आह्मी एवढेंच बजावून ठेवतो कीं हिंदू धर्मांत ज्या ज्या बाबी निषिद्ध मानल्या आहेत त्या सर्वांस विरोध करण्याचें कार्य आह्मी मागें बजावलें, सध्या तर बजावतोंच, व पुढेंहि शक्य तोंवर बजावूंच. गामाला आपला उद्धारकर्ता ह्मणण्यास आह्मी केव्हांहि तयार नसल्यानें गामोत्सवी कार्यक्रमांत भाग घेण्यास तर सोडाच पण तत्समयीं तटस्थ वृत्तिहि दाखविण्यास आह्मी कबूल नाहींत; मग त्याबद्दल आमच्या अर्धनारी नटेश्वरांचा आमच्यावर रोष होवो अगर अंमलदारांस आमचा राग येवो.

झाल्या गोष्टींचा अशा रीतीनें ऊहापोह केल्यानंतर आह्मी अधिकार बाह्य वर्तन करणाऱ्या अंमलदारांस व अर्ध्या हळकुंडानें पिवळे झालेल्या हिंदु द्वेष्ट्यांस इतकेंच कळविण्याची तसदी घेतो कीं:—

दोरी तुटे पर्यंत ताणूं नका ! बंगाल मध्यें सध्या काय चाललें आहे ह्याकडे जरा दृष्टि फेंका व वेळींच सावध व्हा! पुढें कांहीं भलतेंच घडून आल्यास आह्मी जबाबदार नाहीं. ईश्वर तुह्मांस सद्बुद्धि देवो.

स्फुट विचार

भारतावरील खटला:— भारताच्या गेल्या ३८ व्या [१९-१२ २४ रोजीं प्रसिद्ध झालेल्या] अंकांत ' कांहीं शतकांनंतर ' ह्या सदराखालीं पोर्तुगीज भाषेंत प्रसिद्ध झालेल्या लेखांत कांहीं आक्षेपार्ह भाग आहे, असें निमित्त दाखवून पोर्तुगीज सरकारकडून भारतावर ता. १९ रोजीं खटला भरण्यांत आला आहे. ह्यांच नमुन्याचे आजपर्यंत ७ खटले व हा आठवा आपणांवर ओढून घेण्यांत आह्मीं दाखवलेला कोडगपणा अगर कांहीं लोकांच्या शब्दानें सांगावयाचें ह्मणजे निलंज्जपणा जनतेस कांहीं नवा नाहीं. आणि जोंपर्यंत अधिकारी वर्गाच्या ' हम करेसो कायदा ' ह्या लोकसत्ताक राज्यपद्धतीस कालिमा फांसणाऱ्या तत्वास त्यांच्याच हातून हरताळ फांसला जाणार नाहीं, तोंपर्यंत लोकसत्तेखातर सर्वस्वीं आपलें जीवित ज्यानें वाहून घतलें आहे त्या ' भारत'पत्रास आपला कोडगपणा-कांहीच फरक न करितां-कायम ठेवावा लागेल. जनतचें मुख ह्मणून वावरणाऱ्या 'भारता'च्या कोडगपणास अधिकाऱ्यांची विकारवशताच कारण होय. ज्या गामानें सत्याचा व न्यायाचा दिवसा ढवळ्या खून केला त्या पोर्तुगीजांच्या उद्धारकर्त्याचीं कृष्ण कृत्यें व त्यानंतर इतर गामाभक्तांनीं केलेले अनन्वित अत्याचार चव्हाट्यावर मांडतानां आह्मांवर हा प्रसंग ओढवणार ह्याची आह्मांस जाणीव नव्हती असें नाही परंतु बेकायदेशीर वर्तणुकीचा, मग ती भले लठ्ठ पगार खाणाऱ्या अमलदारांकडून केली गेली असो, अगर दोन प्रहरच्या ददातीनें व्यग्र झालेल्या भणंग भिकाऱ्याची असो–मात्र ती सार्वत्रिक हितास अनुलक्षून असली पाहिजे–परिस्फोट करून तिच्या जन्मदात्यांचा जाहीर धिक्कार करणं आमचें कर्तव्य होतें व आहे.

सत्य संकल्पाचा दाता भगवान !:– वास्तविक उपरोक्त लेखांत ह्या पांढऱ्या कातडीच्या देव माणसांनीं ह्या देशांत पाय दिल्यापासून जीं कांहीं अनन्वित व उद्वेगजनक कृत्यें केलीं, ज्यांना ' पवित्र ' करण्याकरितां ह्या ख्रिस्त प्रोषितांस हा देश वशाखालीं उतरविणें भाइलाजानें प्राप्त झालें; ज्या आमच्या रानटी(जितीव) पूर्वजांचा त्यांनीं अमानुष छळ करण्यांत जें प्राविण्य दाखविलें तें साधार व सप्रमाण जनतारूपी जनार्दनापुढें कांहींहि आड पडदा न ठेवतां मांडण्याचा आह्मां प्रयत्न केला होता. पोर्तुगीज सत्तेच्या अंमलाखालीं हा देश गेल्यापासून त्याची कसकसी पायरी पायरीनें अवनति होत गेली व आज तो बेबंदशाहीच्या गर्तेत कसा खितपत पडला आहे ह्याचें स्पष्ट व मुद्देसूद वर्णन आह्मीं आरोपीत लेखांत केलें होतें. त्यात आह्मी जे कांहीं विचार प्रगट केले आहेत ते सत्यास सोडून असते तर लोकसमाजाची योग्य पुरावा सादर करून खात्री केली गेली असती; व भारताच्या खोडसाळपणाचें माप त्याच्या पदरांत प्रतिपक्षानें घालण्याची कुशलता दाखविली असती तर त्याविरुद्ध सरकारचे हात धरण्यास अगर तोंड दाबण्याचा कोणीच मूर्खपणा केला नसता. पण औदार्य, व्यवहारकुशलता व कायदा कशाशीं खातात ह्याचीहि ज्यांस पुरती कल्पना नाहीं अशाच माणसांची अधिकारी वर्गांत रिकूड भरती होत असल्यामुळें हे साधे मार्ग त्यांस पसंत पडणें असंभवनीयच होतें. आह्मीं जें लिहिलें आहे त्याविरुद्ध बचावाचें साधन जवळ पास मुळींच न मिळाल्यामुळें अंमलदार वर्गानें आपल्या हातांत असलेलें हें खटल्याचें शस्त्र भारतावर उगारलें आहे. परिणामीं कांहीहि होवो पण भारतानें प्रगट केलेले विचार सत्यास, ध्येयास व परिस्थितीस धरून असल्यामुळें असले पांचशें खटले एकदम करण्याचें शौर्य जरी सरकारानें दाखविलें तरी आह्मी डगमगत नाहीं व त्यास जुमानीतहि नाहीं.

Ano 9 N. 44

Quinta-feira 29 d[e] [J]aneiro de 1925

Por[illegible]as

ANO

ada linha ainda [illegible]nga

Numero avulso [illegible]

DIRECTOR E EDITOR

G. P. Hegdo Dessay

Quepem-Goa

S. R. Biblioteca Nacional Pangim

भारत.

BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४४

गुरुवार ता. २९ जानेवारी सन १९२५

वर्गणीचे दर.

सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.

समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.

गो. पु. हेगडे देसाई

केपें–गोवा

DE RELANCE...

A si proprios se contradizem aqueles que simultaneamente atribuem aos hindús propaganda *gandhista* e movimento *separatista*.

E' que o *gandhismo* condena tudo o que, de perto ou de longe, directa ou indirectamente se prenda ao *separatismo* Onde ha *gadhismo*, não existe *separatismo*.

¿Como, pois, nestas condições, os hindús, considerados como autores do crime da propaganda *gandhista* podem, ao mesmo tempo, ser acusados do crime do movimento *separatista*?

Gandhi é comparado c o m Cristo e a doutrina dêste é, na sua essencia, igualada á daquele. As personalidades de ambos se confundem como se unificam os s e u s principios. Quem faz a propaganda do ideal do primeiro protege, portanto, indirectamente, o triunfo da moral do segundo.

Logo, os promotores da propaganda gandhista não podem ser atingidos, como o fazem alguns discolos cristãos, pelo epiteto de *inimigos dos catolicos*.

Os hindùs de Goa acompanham o movimento dos seus irmãos do imperio visinho, imitando-os no que lhes fôr possivel e preciso.

¿Que mal poderá daqui advir ás nossas instituições politicas? ¿Será a imitação dos visinhos em todos os ramos de sua actividade capaz de aluir a Republica, a ponto de se lobrigar na mesma imitação espirito de *sedição*, *rebelião* e *subversão* contra a Nacionalidade portuguesa?

Quem tal pensa, denota lamentavel ignorancia dos factos sobre que incide a tão injustamente criticada imitação que foi que principalmente deu forte impulso ao progresso dos hindús que, não há pouco, constituiu objecto dos mais rasgados elogios ao sr. *M. Dias*, distincto colaborador da *India Portuguesa*, de Margão.

A imitação que os hindús goezes fazem do movimento dos seus irmaos da India Britanica é, pois, tão inofensiva como a propria inocencia e tão pura como a propria puresa.

Insinua-se, de quando em vez, que os hindús conseguiram colocações em diferentes ramos de administração pública, devido á *munificencia* ou *generosidade* do Governo. Fazer uma afirmação semilhante é acusar ao mesmo tempo de injusto o Governo e de incompetentes os hindùs, quando é certo que os lugares de destaque que êstes alcançaram e alcançam na burocracia foram e são por concursos públicos, abertos pelo Governo nos termos de leis e regulamentos, feitos a *todos os cidadãos portugueses* !

A *história* de *munificencia* ou *generosidade* é, pois, uma detestavel manifestação do invejoso odio que alguns nutrem aos hindús, pelo seu rapido progresso.

Mas ¿Porque é que os hindús elogiam, então, a cada passo o liberal e magnanimo elemento europeu ?

E' porque êste, alheio ás digladiações da politiquice local cristã tem envidado e envida os seus milhores esforços por forma a que justiça lhes fosse e seja feita.

¿Quantas vezes, os europeus liberais e magnanimos tem-nos livrado da acintosa perseguição religiosa e politiqueira, q u e lhes foi movida pelos *irmãos não hindús* de antiga geração?

Não acusem, pois, os hindús de *crimes* que não cometeram e unamo-nos todos para equilibrar o orçamento provincial, matando o terrivel *deficit* que a todos nós está perseguindo, cruelmente...

SERENAMENTE!

O nosso presado colega de *A Epoca* escreve na sua edigao de 20 do corrente, sob a epigrafe de *Errada Orientagao*, o seguinte:

"Nao passa de errada visao dos factos, a orientagao de certos hindu's que, mais antes pelo espirito de curiosidade do que da politica, foram ate' Belgaum assistir a's sessoes do Congresso Nacional Indiano reunido naquela cidade em 25 de dezembro findo.

Os hindu's de Goa, merce da generosa nagao Portuguesa, gosam de regalias politicas cuja uma metade nao lograrao obter os do imperio visinho por longos anos por vir. Nao e' portanto por este lado que se pode filiar o entusiasmo manifestado.

E' somente pelo espirito de curiosidade de conhecer pessoalmente os *leaders* do movimento, especialmente o *Mahtma' Gandhi*, seu ilustre presidente e outros *leaders* do movimento politico, pois o discurso do presidente do *comite'e* da recegao foi proferido em *canarese*, lingua desconhecida da maioria ou do geral dos goezes e os trabalhos conduzidos em lingua inglesa igualmente nao conhecida dos visitantes.

E' portanto, uma errada concepgao, se e' que ha', da parte dos hindu's de quererem imitar os seus irmaos do imperio visinho.

Mas a imitagao nao se sabe para que fim?

Nao pode ser para fins politicos como se viu, nem para nenhuns outros que no's temos de lhes invejar.

No entanto, dizem que esta concepgao causou ja' uma vitima, tendo o governo dado um exemplo de firmeza e de bom senso.

Pena e' que o sr. dr. Jaime de Morais nao tivesse tido semilhante gesto em outras ocasioes e das mais atrozes consequencias.

¿Nao terao havido muitas ocasioes para se fazer justiga rigorosa durante os longos 5 anos da sua comissao?

Que as houve, sabem-no todos, mas no Olimpo reinou profundo silencio.

Nao aplaudimos a atitude dos hindu's, pelo contrario reprovamo la por insensata e estouvada.

E eles proprios devem ter voltado desiludidos e mais lavados de ideas com o que lhe respondeu a poetiza mrs. Sorojini Naidu, recomendando-lhes que andàssem unidos aos cristaos — como temos lido."

Francamente, nao conseguimos atingir o intuito que ditou a prosa transcrita. Na ida de certos hindu's ao Congresso de Belgaum ou prevaleceu o espirito de curiosidade ou sobressaiu a intengao politica. E, como o proprio colega confessa ser verdadeira a primeira disjuntiva, conclui-se que a assistencia dos mesmos hindu's ao referido Congresso nao obedeceu a qualquer fim politico. Tanto isto e' verdaque diz: "E' S'OMENTE pelo espirito de curiosidade de conhecer pessoalmente os *leaders* do movimento etc."

Ate' aqui esta' perfeitamente bem O que nao faz sentido e' a referencia do colega a "uma errada concepgao da parte dos hindu's, de quererem imitar os sens irmaos do imperio visinho" sobretudo, quandò logo a seguir assegura "nao poder ser a imitagao para fins politicos, nem para nenhuns outros que a *Epoca* tem de lhes invejar."

Ora, se na assistencia dos hindu's ao Congresso se nao lobriga nem o espirito politico nem a imitagao para fins a serem *invejados* ¿como diacho o presado colega admite, ainda que em tom vacilante, uma *concepgao errada* da parte dos mesmos hindu's?

A referencia de *A Epoca* a' uma *errada concepgao* e', pois, descabida como inoportuna e' a censura com que profliga a atitude dos hindu's sendo por completo injusta a parte final do trecho reproduzido, por quanto a comuninade hindu' nunca *errou concebendo* qualquer plano contra os seus irmaos cristaos.

Quanto ao que o mesmo semanario regista no tocante a' vitima da concepgao errada, temos a significar-lhe que a ser verdadeiro o que lhe transmitiram, merece-nos, simplesmente reprovagao. E' que ninguem pode, em boa razao, ser punido por causa de sua boa ou ma', errada ou nao concepgao que nao e' nenhum crime previsto pelo Codigo Penal. Porque o pensamento nao pode ser *opened by censure*, ainda que esteja em conflagragao todo o mundo e mais o fundo do inferno.

A Republica se nao fez para que o governo seja autor dos "exemplos de firmeza e de bom senso," infligindo castigos aos "criminosas de concepgoes.".

¿Nao acha a *Epoca* que seriamos, entao, piores do que negros?

वर्तमानसार

च्या रोषास पात्र झालेल्या सांगे
दीनें स्वसमर्थनार्थ एक पुस्तक प्रसिद्ध
, सरकारास त्यांत सडेतोड उत्तर
! या मुनिसिपालटीसंबंधानें आ-
लिहावयाचें आहे.

सुब्राय वि. प्रभु देसाई यानींहि
यत' प्रसिद्ध केली असून, तींत मि-
सरकारची कान उपटणी केली आहे.
शें येथें वैश्य समाजातर्फे उभारण्यांत
वैश्य भुवना"चा पाया वैश्य समा-
कडून गल्या चार रोजांत घालण्यांत

रेक्सांव द इंस्त्रुसांव' खातें रद्द
ाले असून, प्रस्तुतच्या दिरोक्तराची
शिक्षणाचा नवीन' मसुदा तयार कर-
करण्यांत आली आहे.

दीतोरीच्या नोकर वर्गाचीहि छाटा-
यांत आली आहे.

कोत कुझानीं वकिलीची परीक्षा
र्तमान प्रसिद्ध झालें आहे!

वाह' विषयाचा ३ रा लेखांक येत्या
द्ध होईल.

ारता'च्या खटल्यासंबंधानें ठिकठि-
स्फूर्तिदायक संदेश येत आहेत. संदे-
भारत अत्यंताभारी आहे.

देस प्रांताचे लेजिस्लातीव्ह कौन्सि-
प्रतिनिधि दो० जयराम खलप हे
जानेवारीच्या कौन्सिलच्या पहिल्या
हजर राहून परत म्हापशास येतानां
ारदेशकरांनीं थाटाचें स्वागत केलें.
गर्नालच्या आवाजांत त्यांची मिरव-
न ज्ञानप्रसारक मंडळीच्या दिवाणखा-
स हारतुरे देऊन त्यांचा सन्मान केला.
सर्व मराठी शाळांतील मुलांस त्यानीं
ां लाडू वगैरे वांटले होते.

भारत' व 'हिंदु' हीं साप्ताहिकें
बंद केल्याची जी एक पुण्याच्या स्व-
ातमी प्रसिद्ध झाली आहे, ती निरा-
याची गोष्ट सिद्ध करण्यास दुसरा पु-
!

ांतील बिनसरकारी मराठी शाळांत
हिंदुस्थानांतील शिक्षकांकडून शिक्षण
, या गोष्टीबद्दल सरकारांत भलभलतीं
ालू आहेत असें कळतें!

या अंकापासून श्री. सारस्वताची
ाषेवरील लेखमाला सुरू होईल.

. देतींज्यु यांचें आक्षेपार्ह पत्र खा-
याचें होतें व तें कवळ नजरचुकीनें
ाले, असा प्रोव्हींसकर्त्यानीं 'मल्ली-
ार्थ लढविला आहे! आणखीं को-
वीन शास्त्रार्थ निघतात ते पाहूं!
प्रकरणांमुळें गामप्रकरण थंडावत चा-
, ही त्यांतल्या त्यांत समाधानाची
!

ील प्रोकुरादोर जेराल दो. रोश दि-
मकाव येथें झालेली नेमणूक रद्द
यथेंच आपल्या हुद्यावर स्थिर होतील
ा आहे.

ईच्या आंग्लो-लुजितानांनेहि गामो-
ीं व्यक्त केलेल्या तटस्थपणाबद्दल आ-
ति प्रदर्शित केली आहे! पण यांच्या
पर्वा करतो कोण?

———

तीन तांगे त्र्यस्थ

श्री. भारतकर्ते यांस नम्र विनंति.

आपल्या सन्मान्य पत्रांत अशा तऱ्हेचे पत्र व्यवहार पुनः पुनः येण्यापेक्षां दुसरे चांगले पुष्कळ विषय आहेत; परंतु त्र्यस्थास जबाब दिल्याशिवाय राहणें निरुपायाचें म्हणून खालीं लिहिलेले चार शब्द प्रसिद्ध करण्याविषयीं आपणास नम्र विनंति करतो.

ता. २५-१२-१९२४ च्या भारताच्या अंकांत 'राशिनकरांची कथा' सांगण्याच्या निमित्तानें कोणी एका त्र्यस्थानें आपला 'सांसर्गिक अडाणीपणा' दाखविण्यास सुरवात केली आहे. आमची अशी अपेक्षा होती कीं 'राशिनकरांची कथा' सांगण्यास सुशिक्षित श्रोता आपलें सुशिक्षित तोंड लपविणार नाहीं पण वेड्याच्या सुशिक्षितपणातील मत्सरीपणा मुरलीधर समाजानें चव्हाट्यावर आणल्यामुळें किंवा जन्माचा भ्याड असल्यामुळें कुठें दिवंगत झाला कीं काय? पण छे! वेड्यानें आपलें सुशिक्षित डोकें त्र्यस्थाच्या पायांखालीं घालून ह्या तीन तांग्या त्र्यस्थास पुढें केलें आहे. श्रोता मत्सरी आहे किंवा नाहीं याचा भरपूर पुरावा आमच्याकडे आहे. असें श्रोत्यास स्पष्ट बजावलें असतांना हा तीन तांग त्र्यस्थ पुढें आला आहे. या त्र्यस्थास उत्तर देण्याची आह्मास जरूरी नव्हती. परंतु या तीन तांग्या त्र्यस्थाची न्यायी म्हणविणारी नजर कशी आंधळी आहे ती न दाखविल्यास समाजांत असले त्र्यस्थी न्यायशून्य चाळे चालविण्यास ह्याला मोकळा सोडला असें होईल आणि हा पत्रव्यवहार 'श्रोत्याचा शिमगा' आह्मास चालू ठेवायाचा नसल्यामुळें जें कांहीं सांगायाचें तें याच लेखांत शेवटचें सांगून आह्मीं हा पत्रव्यवहार बंद ठेवणार. मग कोणास या संबंधीं ज्यास्त माहिती पाहिजे असल्यास समाजाकडे पत्रव्यवहार करावा. मुरलीधर समाजानें राशिनकर बुवांस कीर्तन करण्यास लावलें आणि तें कीर्तन ऐकण्यास श्रोता गेला होता हें त्यांच्याच सांगण्यावरून सिद्ध होत आहे. मग त्याच समाजानें धडधडीत आपल्या उघड्या नावानें श्रोत्यास उत्तर दिलें आहे कीं, मत्सराचा भरपूर पुरावा पाहिजे असल्यास श्रोत्यानें उघड नावानें पुढें यावें. असें बजावलें असतानां भ्याडासारखा श्रोता दिवंगत तर झालाच- परंतु हा कुठला भांडखोर त्र्यस्थ धडधडीत समाजानें आपल्या नावानें लेख प्रसिद्ध केला असतानां, उलट समाजालाच नांव ठेवण्यास पुढें येतो, त्यावरून या त्र्यस्थाच्या डोळ्यांत कुसळें मुसळें तर आहेतच, शिवाय मत्सराळ श्रोताहि याच्या डोळ्यांत खुपून राहिला आहे वाटतें—वाटतें कशाला!—मत्सराळ श्रोता आणि भांडखोर त्र्यस्थ हे एकच सांसर्गिक आहेत हें त्र्यस्थाच्याच लेखावरून सिद्ध होत आहे. ही एक 'आपली मंडळी' आहे. नाहीं तर एका श्रोत्यास आमचें उत्तर असतांना या भांडखोर त्र्यस्थास आह्मीं 'आपल्या मंडळीकडे' भांडतो आहों असें वाटलें नसतें. कांहींहि झालें तरी खरें तेंच बाहेर निघतें. पहिल्या लेखांतील विधानें खोडून काढलीं नाहींत असें त्र्यस्थ लिहितो पण सर्व लेखासंबंधीं लिहिण्याची आह्मांस गरज नाहीं असें स्पष्ट लिहिलेलें त्र्यस्थाच्या भांडखोर दृष्टीस कसें पडणार! दुसऱ्या लेखांतील उलटे स्वल्पविराम त्र्यस्थास दृष्टीस पडले पण दुसऱ्या लेखांतील उलट्या स्वल्पविरामाच्या आंत लिहिलेले सारे शब्द पहिल्या लेखांतील श्रोत्याच्या किटलेल्या काळजांतील आहेत हें दर्शविण्याकरीतांच उलट्या स्वल्पविरामांत लिहिले हें उलट्या काळजाच्या त्र्यस्थास न समजल्यास नवल नाहीं. राशिनकरबुवांच्या कीर्तनाची फी रुपये दहा आह्मीं ठरविल्याप्रमाणें दिली हें सिद्ध करण्यास मडगांवच्या ज्या सारस्वत समाजामार्फत राशिनकरबुवांस आमंत्रण दिलें तो समाजसुद्धां हें सिद्ध करून देईल असें असतांना मत्सराळ श्रोत्याचें २५ रु. फी म्हणून किटलेल्या काळजांतील केलेलें खोटें विधान सुशिक्षितपणास कु लावणारें असतानां हा त्र्यस्थ तें खोटें विधान झांकण्याकरितां आपले तीन टांगी कसरी पांघरूण घालून आपण एक सायंटीफीक आहे हें दाखविण्याकरीतां 'संख्यावाचकत्व' 'गुरुत्व' वगैरे जडे शब्द वापरून २४-१२ आणे कां नसावे असे दुसरे लेखक अप्रत्यक्षपणें प्रश्न करतात असा दुसऱ्याचा हवाला देतो पण असे तीन टांगे कसरी त्र्यस्थाप्रमाणे अप्रत्यक्ष प्रश्नच उपस्थित करण्यास पाहिजे तर २४-१५-११ पै पर्यंत वाव आहे पण ही २४-१२ आणे कां नसावे या तीन तांगे कसरी अकलेस हा भांडखोर त्र्यस्थच पात्र आहे यांत अतिशयोक्ती नाहीं. शेवटीं इतकेंच सांगायाचें कीं, हा न्याय करण्यास आलेला त्र्यस्थ न्यायशून्य आंधळा तर आहेच पण श्रोत्याप्रमाणें मत्सराळ हे असून वरती भांडखोर आहे हें असें सिद्ध होतें कीं दुसरा लेख मुरलीधर समाजातर्फे + × + असा प्रसिद्ध झाला असतांना उगीच भांडण्यास निमित्य पाहिजे म्हणून किंवा त्याच्या भांडखोर जन्मस्वभावावरून समाजाचे पूर्ण नांवसुद्धां त्याच्या भांडखोर दृष्टीस पडलें नाहीं आणि 'विठोबाच्यातर्फे × × × बदलावा लागेल असा आपला भांडखोर स्वभाव प्रदर्शित केला आहे तेव्हा हा कोणतरी पांडुरंगानुयायी भांडखोर आहेसें वाटत. बाकी श्रोता आणि त्र्यस्थ हे दोन्ही इतके एकरूप आहेत कीं दोघांच्या नावांत सुद्धां तितकींच व तींच अक्षरें असून त्र्यस्थांत मात्र थकार जास्त आहे. आणि श्रोत्याचें मात्रारूपी डोकें त्र्यस्थात ज्यास्त असलेल्या थकाररूपी पायाखालीं त्र्यस्थाच्या उलट्या काळजाप्रमाणे उलटें घातलें —आणि तें अप्रत्यक्ष घातलेंच आहे —म्हणजे त्र्यस्थांत थकार ज्यास्त झाला तेव्हां त्र्यस्थाची नजर न्यायी तर नाहींच पण थु म्हणून घेण्यास मात्र पात्र आहे हे स्पष्ट दिसून येत आहे.

आतः यापुढें आह्मांस असल्या पत्रव्यवहारास जबाब देण्याची गरज नाहीं हें सुज्ञ वाचकच समजतील. तरी श्रोता व त्र्यस्थ यानां आणखी खुलासा पाहिजे असल्यास आपल्या खऱ्या नावानें – मुरलीधर समाज म्हापसें येथें पत्रव्यवहार करावा किंवा समक्ष भेटून खुलासा करावा.

म्हापसें ता. ७ जानेवारी १९२५

मुरलीधर समाजतर्फे * * *

गोविंद अ. शेटये.

बाल-वाचन-मंदिर संस्थेच्या व्याख्यानमालेचा रिपोर्ट

या रूढी बदलून धर्माचा प्रक्षिप्त भाग वर काढिला पाहिजे. आज 'शास्त्रात् रूढी बलीयसी' आहेत. ज्यांना समाजाची, ध्येयाची कल्पना नाहीं अशानींच रूढी केल्या. व मनूला जिंकिलें. स्त्रिशिक्षण, अस्पृश्योद्धार, जातिभेद यानां रूढी आड येते. या रूढी बदलणें सरकारच्या हातीं नाहीं तर समाजाच्या हातीं आहे. या सुधारणा समाजाच्या अंतःकरणांतून निघाल्या पाहिजेत. हें काम या विद्यार्थी वर्गाचें आहे. रूढीच्या शृंखला तोडल्याशिवाय जगाच्या तोडीला हिंदुस्थान वसूं शकणार नाहीं. धार्मिक प्रश्न इतकाच शारीरिक उन्नति हा प्रश्न समाजापुढें आहे. मनाइतकीच शरीराची गरज आहे. तसेंच वाङ्मय, कला, शास्त्रें यांची आवश्यकता आहे. शास्त्रांच्या अभावामुळें इतर राष्ट्रांनीं हिंदुस्थान जिंकलें. राष्ट्राची सुधारणा करावयाची असल्यास सर्व राष्ट्रांच्या सुधारणा आमच्यांत पाहिजेत. वाङ्मय व शास्त्रें हे समाजाचे डोळे आहेत. आपण सर्व एका राष्ट्राचे आहोंत ही कल्पना सर्वत्र फैलावणें वाङ्मयाच्या योगानें शक्य होईल. मराठी स्वराज्याची स्थापना शिवछत्रपतीकडून व मराठ्यांकडून समर्थांच्या दासबोधानेंच घडवून आणिली. समर्थ म्हणजे त्यावेळचा चालता बोलता छापखानाच होता. प्रत्येक संदेश कानाकोंपऱ्यांत पोंचविण्याला वाङ्मयाची आवश्यकता आहे. आमच्या तरुणांच्या विचारांना वळण देणारा वाङ्मय सेवक आज पाहिजे आहे. तरवारी इतकीच वाङ्मय सेवकाची गरज आहे. अपुऱ्या असलेल्या सर्व उणीवा भरून काढण्यासाठीं बालांपासून वृद्धांपर्यंत व स्त्रियांनीं सुद्धां तास अर्धातास खर्चावा. लिहावयाला येईल त्यानें राष्ट्राकरितां कांहींतरी करावें. लेखन प्रतिभा ईश्वरदत्त आहे पण प्रयत्न सर्वसाध्य आहेत. हे कामाचे डोंगर वाढत चाललेले आहेत ते कमी कमी करणें हें आजच्या तरुणाचें कर्तव्य आहे. भावी पिढी आह्मांला जबाबदार धरील व कलंक लावील अशी स्थिती न होऊ देण्याचा आह्मीं प्रयत्न केला पाहिजे. इतकें सांगून व्याख्यात्यांनीं आपलें भाषण संपविलें. नंतर एका विद्यार्थ्यानें येथें एक तालीमखाना काढावा अशी सूचना केल्यावर, कोणीहि उपवक्ता नसल्यामुळें अध्यक्ष श्री. केणी समारोपास उठले. ते म्हणालेः आजच्या वक्त्यांनीं विषय इतका उत्तम प्रतिपादन केला कीं, विशेष कांहीं बोलण्याची आवश्यकताच नाहीं. आजच्यासारखीं विद्वत्तापरिप्लुत व अस्खलित भाषणें क्वचितच ऐकावयास सांपडतात. विषय व्यापक असल्यामुळें थोड्या वेळांत भरपूर विचार करणें अशक्य आहे. व्याख्यात्यांनीं कांहीं मुद्यांचा विस्तार केला व कांहींचें त्रोटक दिग्दर्शन केलें. समाजसेवा हा शब्द या पन्नास वर्षांतच रूढ झाला. समाजाची कल्पनाच आमच्या लोकांना झाली नाहीं. सर्व हिंदूंचा एक समाज आहे ही कल्पना आह्मांला परकीयांनीं दिली. मुसलमान लोकांनीं ज्यावेळीं हिंदुस्थान जिंकिला त्यावेळीं हिंदुसमाजाला ते आपल्यापासून दूर राखूं लागल्यामुळें सर्व हिंदूंचीं सुखदुःखें एक आहेत. आपण सर्व एक असून मुसलमानांचे जित आहोंत ही भावना त्यांच्या मनांत उत्पन्न होऊं लागली. यापूर्वी हिंदूंनीं मोठमोठीं साम्राज्यें केलीं. सुधारणेच्या शिखरावर जाऊन पोंचले, पण आपण सर्व हिंदू एक समाजीय आहोंत ही कल्पना कधींच केली नाहीं. आपल्यामध्यें त्यावेळीं फक्त जातीच होत्या व जातिभेद हे या कल्पनेला विघातक आहेत. पारशी भाषेमध्यें 'हिंदु' या शब्दाचा अर्थ पाखंडी, काळा, असा आहे. व बहुतकरून हिंदु हें तुच्छता दर्शक नांव मुसलमानानीं आह्मांला दिलें असावें. आमच्यामध्यें Sentimento nacional म्हणजे एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचा पूर्ण अभाव आहे. ही भावना उत्पन्न होण्याला समाजाची व राष्ट्राची गरज आहे. जिथें समाज नाहीं तिथें हा प्रश्न मुळीं संभवतच नाहीं. मुसलमानांच्या त्रासानें, तात्पुरते आह्मी एक झालों पण समरस कधींच झालों नाहीं. मुसलमानांचा जाच कमी झाल्याबरोबर जातिद्वेष पुढें आणला व मराठी राज्यें बुडविलीं. जिझीयाकरांसारखे जुलूम झाल्यामुळें मराठे एक झाले व शिवाजीला स्वराज्याची संस्थापना करितां आली. समाजाच्या कल्पनेला एकराष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न झाली पाहिजे., अर्थात् जातिभेद नष्ट केला पाहिजे. हिंदूंची व्याख्या फारच व्यापक असून तींत सर्व जातींचा समावेश करिता येतो. व त्याच दिशेनें प्रयत्न सुरू केले पाहिजेत नास्तिकाला सुद्धां हिंदु होता येतें. हिंदुधर्म हा अनेक पंथांचा समुच्चय आहे. चार्वाक नास्तिक होता पण हिंदु होता. लिंगाईत शिखाहीन आहेत, वेद मानीत नाहींत पण हिंदु आहेत. हिंदूला अमुकच लक्षणें असलीं पाहिजेत असें नाहीं. आह्मीं आमच्या स्त्रियांना शुद्रांच्या पंक्तीला बसविलें आहे. स्मृतमध्यें तर त्यानां कसलाहि अधिकार नाहीं. आजच्या काळीं स्मृतींप्रमाणें अनुकरण करणें योग्य नाहीं. व्याख्यात्यांनीं सांगितल्याप्रमाणें अस्पृश्यता निवारण करणें अवश्य आहे. आज हिंदुधर्म व संस्कृति यांची जी स्थिति आहे ती तशीच कायम ठेवण्यापेक्षां मरूं देणेंच चांगलें होईल. संस्कृतीला पूर्वकालीन उज्ज्वल स्वरूपांत जगापुढें आणावयाची असल्यास स्त्रीदास्यत्व व अस्पृश्यता आदि काळिमा नाहींसा केला पाहिजे. असो. व्याख्यात्यांनीं सांगितल्याप्रमाणें समाजाच्या संघटनास विघातक असे दोष नष्ट करून टाकावेत. व ज्या योगानें भिन्न भिन्न जाती समरस होऊन स्वातंत्र्य व सुख वाढेल असें करावें. मीं माझें चऱ्हाट वाढवून व्याख्यात्यांच्या भाषणानें श्रोतृवर्गावर झालेला गोड परिणाम नष्ट करूं इच्छित नाहीं इतकें सांगून अध्यक्षांनीं समारोप संपविला.

भारत

मिति माघ शु० ५ मी शके १८४६

हृदयाविष्करण

नवै राजन्न राजसीन्न दण्डो नच दण्डिकः
धर्मेणैव प्रजाः सर्वा रक्षन्ति स्म परस्परम्

लोकमताचा वारा कोणत्या दिशेस वहात आहे व त्या विषयीं बेफिकीर राहिल्यास परिणाम काय होईल ह्याची आह्मी वरचेवर जाणीव करून देत असतांहि अनियंत्रित अधिकाराचें तारूं भलत्याच दिशेस हांकण्यास नोकरशाहीची नादानवृत्ति प्रवृत्त होत आहे ही अत्यंत असमाधानकारक गोष्ट तर खरीच; पण निदान आह्मांला तरी त्यांत आश्चर्यकारक काय हें कळत नाहीं. गोमांतकांत माजू घातलेल्या बेबन्दशाहीस कारणीभूत होणाऱ्या नोकरशाहीचें वेताल डोकें बेफाम व बेदरकार बनूं न देण्यासाठीं दिसण्यांस अप्रीय पण परिणामीं गोड अशा चार उपदेशाच्या गोष्टींचा त्यांस बोध देण्यास आह्मीं सरसावतों खरे; परंतु आपला लांडा कारभार वाटेल त्यांत घुसण्यास सोकावलेल्या वशिल्याच्या वर त्याचा मुळीं सुद्धां परिणाम न होतां पुन्हां ते कोरे ठणठणीत गोटेच रहातील ह्याची खुणगाठ आह्मीं पूर्वीच बांधून टांकीत असतों. भारतीय युद्धापूर्वीं दुर्योधनाशीं शिष्टाई करण्यासाठीं पांडवांतर्फेंचा वकील ह्या नात्यानें कौरव सभेंत जातांना 'आपला अपमान झाला तरी बेहत्तर पण भावी अनर्थपात टाळण्याचा शक्यतोंवर यत्न करावा, हा भगवान श्रीकृष्णाचा हेतु होता हें जितकें सत्यास धरून आहे तितकेंच 'फलनिष्पत्ति कांहींच होणार नाहीं ह्याची त्यास खात्री होती हें सत्यांशपूर्ण आहे. त्याच प्रमाणें इतिहासाच्या पुनरावृत्तीकडे ध्यान देऊन ' केवळ कर्तव्य ह्मणूनच, अधिकारी वर्गाची शक्य तेथें कान उघडणी व जरूर तेथें कान उपटणी करण्याचा आमचा हक्क आह्मीं प्रस्थापित करीत असतों. नुसतें नावांपुरते कां होईना, लोकसत्ताक राज्यपद्धतींत वावरणाऱ्या गोमांतकीय लोकशाहीचें प्रमुख मुखपत्र असल्यानें भारतावर लोकसत्तेच्या सार्थक्याखातर भांडण्याची दुप्पट जबाब्दारी पडलेली आहे; जनतेच्या हक्कांस जपण्याची पहिली व हिंदुत्वावरील प्रतिपक्षांच्या हल्ल्यांस प्रतिकार करणें ही दुसरी. ह्याचा परिणाम कधीं कधीं असा होतो कीं आह्मास सरकार व खिस्ती वर्ग ह्या दोहोंकडूनहि तिरस्कृत व्हावें लागतें. सरकार तर भारतास उघड उघड बंडखोर समजत असून खिस्ती प्रांतबंधूंनां तो खिस्त द्वेष्टा वाटतो. पण ह्यामुळें आमच्या प्रगतीपर गतीस कांहींच अडथळा येऊं शकत नाहीं हें स्वाभिमानाचें फळ नव्हे तर काय ?

भारतावर गेल्या आठवड्यांत गुजरला गेलेला खटला हें आह्मीं गतांकीं अनुमान केलेल्या 'विनाशकाले विपरीत बुद्धीचें' द्वितीय भ्रमण होय. 'बुडत्याचा पाय खोलांत' ह्या ईश्वरी न्यायानुसार आमच्या अधिकारी वर्गाच्या बुद्धिभ्रंशाचें प्रमाण दिवसेंदिवस कलेकलेनें वाढतच असून वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करण्यापर्यंत अरेराव बहाद्दरानीं मजल मारलेली पाहून अमलदारशाहीच्या पापांचे घडे भरल्याचें कोणी अनुमान केल्यास तें निराधार किंवा अनाठायीं ह्मणतां येत नाहीं. भारताची आशेवरील आसक्ति सुदैवानें अगर दुर्दैवानें इतकी जबर आहे कीं त्यास अजून पर्यंत तसें वाटत नाहीं; मात्र अधिकारी वर्गाची अरेरावी अशीच ' मागील खेपेवरून पुढें चालू' राहिल्यास—नोकरशाहीनें आपल्या अरेराव पातशाहीच्या सोटेशाहीची सीमा लोकसमाजाच्या स्वाभाविक सहनशीलतेच्या परम सीमेस भिडविल्यास त्याचा परिणाम भीषण व भयंकर होऊन प्रक्षुब्ध लोकमताच्या त्वेषपूरित निश्वासानें सारें वातावरण दुमदुमून राहील आणि तेव्हां 'अवश्यमेव होणारा पश्चात् + ताप निरर्थक ठरून 'शिष्यापराधे गुरोर्दंडः'चा प्रकार होईल ही त्याला आज दिवसादेखील भीति वाटते. व तेवढ्यासाठींच भारत बहकल्या बुद्धीच्या, बेदरकार वृत्तीच्या व बेकायदेशीर वर्तनक्रमाच्या अंमलदारांकडून चालवल्या जाणाऱ्या व अविचाराच्या उतरणीवर भर वेगानें धांवणाऱ्या गाडीचें भावी अनर्थ परंपरेपासून रक्षण करण्यासाठीं दोन्ही हातानीं लाल बावटा हालवून एकसारखा कंठशोष करीत आहे; पण अधिकार गुंगीनें धुंद झालेल्या ड्रायव्हर साहेबांचा तिकडे कानाडोळा होत आहे व गाडी त्याच्या अंगावरून नेण्याचा घाट घातला जात आहे त्याला भारत काय करूं शकेल ? आपलें अंग चेंगरलें ह्मणून भारतास भीतीचा लवलेश देखील शिवत नसून 'पुढें काय ?' ह्याच प्रश्नानें त्याला बेजार करून सोडलें आहे !

जो लेख आरोपीत धरून भारतावर सरकारकडून खटला भरण्यांत आला आहे त्या पोर्तुगीज लेखाचें समग्र व शब्दशः मराठी भाषांतर भारताच्या येत्या अंकीं मुद्दाम दिलें जाईल. ज्याच्या दप्तरांत आमची सेवाचाकरी रुजू व्हावी अशी आम्ही इच्छा बाळगतों, त्या जनतारूपी जनार्दनाच्या निःपक्षपाती न्यायासनासमोर तो जशाच्या तसा ठेवण्यांत येईल. तो लेख आमूलाग्र शुद्ध अंतःकरणानें निर्विकार मनानें व पक्षपात हीन नजरेनें वाचून त्याचें स्वस्थ चित्तानें मनन करणाऱ्या विचारी पुरुषाच्या डोळ्यांपुढें ' हें काय गौडबंगाल ?' हा प्रश्न उभा राहील. आमच्या मतें त्यांत चुकीची विचारसरणी कांहींच नसतां सरकारच्या केवळ दृष्टी दोषामुळें व अंमलदारकीची वस्त्रें स्वीकारणाऱ्या उल्लु लोकांच्या बुद्धि भ्रंशामुळें तो आरोपीत ठरविला गेला असल्यानें आह्मी त्याचें पुनः रूपांतर प्रसिद्ध करणार आहोंत. हें ज्या कोणास कायद्यास सोडून असल्याचा संशय येईल त्यास आम्ही एवढेंच विचारण्याची परवानगी घेतों कीं:--

ह्या सुवर्णभूमीचीं द्वारें पांढऱ्या पायांच्या परकीयांस सताड उघडीं टांकलीं जाऊन त्यांतील एकूण एक चिज वस्त पसार केली जाऊन--थोड्याच शतकांच्या अवधींत जींत एकेकाळीं सोन्याचा धूर निघत होता त्या पुण्यभूमीच्या मालकांस ' भिक्षापात्र अवलंबिणें । जळो जिणें लाजिरवाणें' ही तुकोबांची अभंगवाणी कानांत दुमदुमत असतां वीतभर पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठीं आमच्याच गाठोडीवर गब्बर झालेल्या गठडीखांपुढें नोकरीसाठीं (भिक्षेसाठीं?) तोंड वासण्याचा प्रसंग येऊन त्यावेळीं ' तुम्ही भारताकडे नोकरी मागा ' असा गालफडात जिभली घालून जबाब दिला जावा व ह्या आमच्या नैतिक व आर्थिक अधःपतनास कारण झालेल्या गामाच्या पुण्य (?) तिथींत भाग घेण्याबद्दल हिंदूंवर जबरी केली गेल्यास तें कायदेबरहुकूम असें आपण ह्मणूं शकाल काय ? ज्या व्यक्तीनें आम्हां हिंदूंवर अमानुष अत्याचार करून ज्याची नुसती आठवण झाल्यास अजून अंगांवर कांटा उभा रहातो असा हिंदूंचा धर्मांतरासाठीं छळ करण्यांत पहिलें प्राविण्य पदक संपादन केलें त्या व्यक्तीच्या उत्सव समारंभांत आपल्या वंशजानीं भाग घेऊं नये एतदर्थ स्वर्गांतून आश्रांस संलग्न हृदयाच्या नेत्रपल्लवीनें निरोप पाठवून आमच्या हृदयास पाझर फुटावा ह्मणून डोळ्यांतून ढळढळां अश्रुधारा गाळणाऱ्या पूर्वजांच्या विनवणीनें हृदय पिळवटून गेल्यामुळें हिंदूंनीं श्राध्दोत्सवांत उदासीन वृत्त स्वीकारली, ह्या साठीं त्यांना जुलमाखालीं भरडून काढण्यांत आल्यास तें कायद्याबरहुकुम आहे असें आपणांस वाटतें काय ? राष्ट्रीय सभेस गेलेल्या सरकारी नोकरांतून एका विशिष्ट संस्कृत्यनुयायांची हकालट्टी केली जात असल्यास त्यास काय ह्याचा आधार आहे काय ? कायदेबहाद्दरानों ! कायदे अमलांत आणण्याकरिताच नेमलेली नोकरशाही स्वतः कायदेमोडीत असतां इतरांनांच ते पाळण्याविषयीं 'परोपदेशेपांडित्यं' दाखविलें जावें व तेंहि लोकसत्तेच्या राज्यकारभारांत, हें कायद्याचें कोणतें कलम ?

सरकाराच्या हातांत कायदा असेल, न्यायदानाच्या तराजूचा कांटा हवा त्या बाजूस झुकविण्याचें कौशल्य प्रतिपक्षाच्या मारवाडी डोक्यांत असेल पण सत्याचा पाठिराख्या परमेश्वराचें पाठबळ भारतास आहे !

—केपेंचे जज्ज सां–तोमें येथें नेमले जाणार असून त्यांचे जागीं बार्देसचे कोंसेल्हादोर दो० रोदोल्फ कुलास, हे येतील, अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे.

स्फुट विचार

विद्यार्थी वर्गाचें महत्व:— कार्यकर्त्या तरुणपिढीच्या कर्तृत्वशक्तीची मागच्या अग्रलेखांत दिग्दर्शित केलेल्या रीतीनें वासलात नव्हे निल्हेवाट लाविल्यानंतर उत्साही विद्यार्थी वर्गाच्या बाणेदार वृत्तीकडे व हृदय संशोधनाकडे विचारशक्ती साहजिकच ओढ घेते. कोणत्याहि देशाचा अगर राष्ट्राचा वर्तमान काल त्यांतील तरुण पिढीच्या साहसी स्वभावर सर्वस्वी अवलंबून असतो हें जेवढ्या प्रमाणांत सत्यांशपूर्ण ह्मणतां येईल त्याच्याहून शेकडा शंभर टक्के (cent percent) त्या राष्ट्राचा भविष्यकाळ निराशांधःकारानें काळाकुट्ट करावा किंवा यशोरवीच्या उज्जल दिप्तीनें प्रकाशित करावा हें ठरविण्याचा व सत्यसृष्टींत आणण्याचा पूर्ण मक्ता (sole agency) सृष्टीनिर्मित्या परमेश्वरानें विद्यार्थ्यांच्याच खास पदरांत टांकला आहे. शोकाची पहिली सर ओसरतांच एखादी नवविधवा ज्याप्रमाणें आपल्या उदरांत जन्म घेतलेल्या चिमकुल्या बालकाकडे पाहून जिवाचें समाधान करून घेते तद्वतच तरुणपिढी नादान व निमकहराम निपजली तरी विद्यार्थी वर्गाकडून मिळणाऱ्या आशेच्या अंधुक प्रकाशावर नजर ठेवण्याचा व त्यांच्या सडेतोड वृत्तीकडे कुतुहलपूर्ण दृष्टीनें पहाण्याचा प्रत्येक राष्ट्राला हक्क पोहोंचतो.

शाबास ! भलेगाजी ! शाबास ! :— पण दुःखात सुख एवढेंच कीं, गोमांतकाला ह्या बाबतींत निराशेचा स्पर्श देखील व्हायाला नको. नुसत्या विद्यार्थी वर्गाची शालीनता, सडेतोड व निर्भयवृत्ती ह्यांकडेसच लक्ष्य दिल्यास जगातील इतर कोणत्याहि राष्ट्रापुढें आघाडी मारण्याची ताकद अजून शरीरांत भिनलेली नसली तरी गोमांतकानें ब्रिटिश हिंदुस्थानाच्याहि वरचा नंबर पटकावला आहे असेंच ह्मणावें लागतें. पोर्तुगीज उच्च शिक्षण (लिसेवाचें) घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वशक्तीकडे व आत्मविश्वासाकडे पाहिलें ह्मणजे ' ये भी दिन जायें गे ' ह्मणण्यास भरपूर आधार मिळतो. तीन वर्षांपूर्वीं ह्या विद्यार्थ्यांनीं 'गांधी टोपी' प्रकरणांत हिंदूंचें आत्मिक बल व संघशक्तीचें सात्विक सामर्थ्य कितपत ' कर्तुंम कर्तुमन्यथा कर्तुम ' आहे हें खिस्ती प्रोफेसरांच्या प्रत्ययास आणलें होतें. तसेंच गेल्या महिन्यांत झालेल्या व आज सर्वत्र गाजून राहिलेल्या गामाच्या श्राद्धापासून बारा हात दूर, अलग व अलिप्त राहण्यांत जी सत्यावरील अढळ निष्ठा व्यक्त केली व 'कॉलेजतर्फे, ह्या सदराखालीं घातल्या जाणाऱ्या धागडधिंग्यावर ' येशुभक्तांतर्फे ' हा अन्वर्थक छाप ठोकला त्याबद्दल ते खरोखरीच स्तुतीस पात्र आहेत. विद्यार्थी बंधूंनो ! कायमच्या कर्तव्यास जागृत रहा !

वेडगळ प्रलाप:— 'गोव्यांतील उच्च, मध्यम व प्राथमिक शाळांच्या व पाठशाळांच्या शिक्षकानां व विद्यार्थ्यांना पोर्तुगीज भाषा धड बोलतांहि येत नाहीं व धड लिहितांहि येत नाहीं' अशा अर्थाचें एक निंदा-

रवाना करतों. पुढारी व्हावयाचें
र नेमस्त, जहाल, असहकारवादी
पक्षाचें व्हावयाचें तें सांगा म्हणजे
तशी व्यवस्था करतों." मी हें सर्व ऐ-
आदीं थक झालों व घाबरलों देखील.
त्रांची नेहमींच मोठी भिति वाटत
जाणों यानें एखाद्या यंत्रांत मला
मृत्युलोकांत देशभक्त बनण्याऐ-
ी जर का एकदम स्वर्ग लोकांतला
बनलों तर. हा विचार मनांत
मी देशभक्त व पुढारी होण्याचें दो-
टाळलें व त्या महात्म्यास म्हटलें, "म-
दुर्दैवानें आपल्या ह्या अलौकिक
सहाय्य घेऊन देशभक्त व पुढारी
ला मला तूर्त धैर्य व इच्छा नाहीं,
ज अनायासें आपल्या कारखान्याचें
ें दर्शन झालेंच आहे. करिता आ-
या दिव्य यंत्रांचें अद्भुत सामर्थ्य
चा माझा विचार आहे. करितां आ-
कृपा करून पूर्ण करा."
ह्या तोंडून हे शब्द ऐकतांच कार-
चा मालक हंसला व 'माझ्या पाठी
या तर' असें सांगून त्यानें मला
एका दालनांत नेलें. या दालनांत
तों जिकडे तिकडे खादीचे ढीग पडले
अनेक शिंपी "सिंगर सोइंग मशीन-
जोरानें काम करीत होते. खादीच्या
, खादीच्या फकनीवजा पैरणी, खादी-
ट, खादीच्या पाटलोणी अधांतरीं दो-
र इतस्ततः लोंबत होत्या. अनेक देश-
होऊं पहाणारे लोक या ठिकाणीं उभे
मध्यभागीं एक मोठें यंत्र होतें. त्याकडे
दाखवून कारखान्याचे मालक मला
ले, "हें आमचें सर्वांत मोठें व मह-
यंत्र. बाहेरून कच्चा माल आला कीं
ला प्रथम या यंत्रांत घालावा लागतो.
क बनावयाचें असलें तर प्रथम या
ा आश्रय केलाच पाहिजे कपड्यां-
सर्व कांहीं फुकट आहे. कपडे श्री-
मनुष्य बनवितात. कपड्यानेंच मनुष्य
सभ्य व "रिफाईन्ड" दिसतो, कप-
ड्यांवरूनच मनुष्याची योग्यता समाजात बा-
कपड्यानेंच देशभक्त व पुढारी ब-
येतें. डोकीवर खादी टोपी व आंगावर
असली म्हणजे मग देशभक्त बनाव-
मुळींच अवकाश लागणार नाहीं. हें
ळींच नवें बनविलें; पूर्वींचें एक यंत्र
ण तें आतां बंद करावें लागलें आहे.
तुम्हांला दाखवीन" इतकें बोलून
यंत्राची कामगिरी दाखविण्यासाठीं ज-
ा कच्च्या मालापैकीं एक जणाला
न यंत्रांत टाकलें. या इसमाच्या डो-
एक जरीचा फेटा, आंगांत एक पर-
काळा कोट वगैरे पोशाख होता त्यामुळें
देशभक्त असा मुळींच वाटत नसे. पण
टाकल्याबरोबर थोड्याच अवकाशांत
असा कांहीं बनाव झाला कीं तो
न् एक मोठा देशभक्त दिसूं लागला.
स्वच्छ खादीची टोपी, आंगांत एक
ची पैरण व एक खादी पंचा यानें तो
कांत अग्रगण्य दिसूं लागला.

(अपूर्ण)

Ano 9 N. 45

...nta-feira 5 de Fevereiro de 1925

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
...r cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.

BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४५

गुरुवार ता. ५ फेब्रुवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

POLITICA HINDU'

Mais duma vez, tem-se dito e repetido nêste mesmo lugar que a politica hindú não admite violencia no emprego de meios para a consecução do seu já delineado fim.

A nossa aspiração é justa e democratica. E, porque justa e democratica ela é, não pode, de maneira alguma, ferir interesses legitimos de quem quere, e muito menos do liberal e magnanimo elemento europeu que a tem protegido e que a protege com um carinho puro e desinteressado.

¿Envolve *sedição* a dita aspiração que, afinal de contas, se reduz a uma perfeita descentralisação, completamente livre da central intervenção?

Não, certamente, porque *sedição*, que tira a sua origem do latim *seditio*, significa *tumulto*, *revolta contra o poder estabelecido*.

¿Pretenderam os hindus concretisar a sua aspiração, *por meio da revolta contra o poder estabelecido*?

Se não, ¿como se atrevem os seus detratores a desvirtuar a puresa do seu movimento politico? ¿E só, por ocasião da inofensiva abstenção nas festas do Centenario?

Mas não só os hindùs abstencionistas que deixaram de tomar parte nas referidas festas por motivos, já agora, do dominio publico. Delas se absteve tambem a Academia; com elas se não entusiasmaram os empregados famintos; com elas se não importaram, até, alguns funcionarios europeus de destaque, cada qual por causa dos seus *motivos privados*.

Nestas condições, ¿porque é que *tão sómente* levantaram escarceu e fizeram zaragata contra os hindús abstencionistas, atribuindo-lhes propositos sediciosos e intenções revolucionarias e criando suspeições descabidas em volta da politica hindú?

Chegaram, até, *as criticas* a ponto de condenar, vibrantemente nos hindús o espirito de imitação das mais nobres e elevadas qualidades do movimento social, instructivo, industrial e moral dos seus irmãos do visinho territorio!!!

¿Pode lá haver ignorancia tão crassa, como a que revelaram as mesmas criticas, superficiais e levianas, politiqueiras e interesseiras?

E', simplesmente, lamentavel que, no regime de *fraternidade*, irmãos queiram guerrear irmãos, sem motivo justificado e que haja tendência para lutas fratricidas, por um *qüi pro quo* fútil!

A politica hindù é, sempre, franca e despida de violencia, não encerrando ela nenhuns fins ocultos que mereçam reprovação a quem ame a *liberdade* e a *igualdade*, tomadas estas palavras no seu verdadeiro e rigoroso significado.

Calem-se, pois, as *más linguas* e partam-se as *penas suspeitas*!

A B C

O sr. Francisco Luiz S. Mergulhao, acreditado proprietario da *Livraria Moderna* obsequiou-nos com um exemplar do A B C do estilo e da composiçao do sr. Antonio Figueirinhas para uso das escolas primarias, 1a, 2a e 3 classes.

Na inauguraçao do seu novo metodo *racional* e *pratico*, o sr. Figueirinhas tem revelado profundo conhecimento da scicologia infantil, em todos os seus graus, de sorte que o ensino primario, guiado pelo referido metodo nao pode—e' nossa convicçao—deixar de ser de alta utilidade racional e pratica aos estudantes.

Sob estes pontos de vista torna-se, pois, recomendavel a importante obra do sr. Figueirinhas que se escontra a' venda na aludida «Livraria Moderna» a cujo inteligente e amavel proprietario sr. Mergulhao agradecemos a oferta do mencionado exemplar.

AO VEIO DO TEMPO

UM CASO SINGULAR; AS SUAS CONSEQUENCIAS; OS SEUS EFEITOS — AO A. N. R.

Ja' este semanario se referiu ao caso que, por estes dias, e' o pao nosso citadino. Fe-lo com desassombro, como o fizeram varios outros jornais. Sim, uma acusaçao de tal monta embora feita num jornal obscuro e ignorado de Portugal e' a sintese fiel, a verdade inteira que o sr. dr. Dentinho Jr. expendeu numa carta particular que nao se destinava a' publicidade. E porisso mesmo o caso e' grave, e as palavras que ai ficam tem um autentico cunho de sinceridade. Sao palavras que se fossem destinadas a' letra de forma nao viriam tal como elas agora vieram. Sairiam afrancesadas, fingidas, mentirosas: seria a sintese do seu pensamento deturpado, medido com receio da Opiniao Publica e mescladas dum sentimento de cobardia e de temor.

Mas nao compreendo, nem de certo ninguem podera' compreender a plena satisfaçao do Conselho Escolar do Liceu Central com as explicaçoes que o sr. dr. Dentinho deu e que tornou publicas. Sejam elas embora um *Confiteor* que s. exa. grave e contrito, rezou nao podem contudo satisfazer os atingidos e assoalbados.

A' culminancia de insultos devia corresponder, naturalmente, uma retrataçao igual.

Analisando, fria e serenamente, estas explicaçoes chego a' uma conclusao estapafurdia, inverossimil.

A alinea (a) foi ja' suficientemente dissecada no principio destas linhas.

A alinea (b) diz:

"as assserçoes nela contidas foram o resultado de impressoes de momento, baseadas no imperfeito conhecimento da India, seus usos e costumes e, em especial, do ensino aqui ministrado";

Ora, desde o momento em que s. exa. nao tinha conhecimento completo ensino aqui ministrado ignoro como s. exa. emitiu opinioes tao avançadas e criticou dum modo tam a'spero e grosseiro. Nao haja duvida, foi prosa facil que s. exa. fez. Mas, nunca se fazem juizos nem se escrevem asserçoes apoiadas em impressoes do momento e baseadas em imperfeito conhecimento das coisas.

E demais a mais a um educador da mocidade! Isto da' a historia de gata apressada parindo filhos tortos!

As outras duas alineas nao dao lugar a notas a' margem; sao a conclusao natural das primeiras duas. Pois, nao sei como a permanencia de seis ou cinco meses na India e a convivencia com os seus colegas nao o tenham habituado a formar o seu juizo sobre os seus colegas e sobre o ensino aqui ministrado.

E vem agora a ultima alinea em que s. exa. pretende de algum modo agravar as melhores relaçoes que mantem com os seus colegas.

Nao atino com o motivo; apo's o excrando enxovalho com que os cobriu a todos com excepçao honrosa dele e a do Carmo Reis, nao sei como podera' manter com eles as melhores relaçoes que nao pretendia agravar! Que pretenderia s. exa?

Nao damos com o numero da porta.

Chegam nos tambem vagos rumores de pancadaria e disturbios entre os alunos da Escola Medica e o dr. Dentinno Jr. A cidade tem tomado um ar marcial. Quase em estado de sitio. Todas as opinioes emitidas, a' pressa, podem ser de efeitos contraproducentes.

Cale-se, pois, a minha pena.

*

Ao sr. Alberto Nogueira Ribeiro agradeço a fineza de se apresentar despido de *travesti* que eu, tao injustamente, lhe vestira.

Quanto a *umas duzias de academicos* tenho a dizer-lhe que e' uma maneira de dizer. Pois tratando-se de academicos tem que se toma'-los por uma corporaçao homogenea e uma. E nao, assim, lançada aos bocados, dispersa, levada pelo simples respeito de curiosidade.

Porque a verdade e' essa: o numero em que a Academia devia ter a representaçao foi um grande e autentico fiasco, sendo necessario arrebanhar-se estudantes estranhos a' Academia panginense.

E ponto a' discussao pois nao estou disposto nem me' sobra tempo para entreter e alimentar pole'micas.

Crispim.

भारत

ANUNCIOS

O *Bharat*, ano 9° n° 45 de 5 de Fevereiro de 1925

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida

Numero avulso 1 tanga

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2° oficio que êste assina correm editos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2° do artigo 197 do Cod. da. Proc. Civ. citando os interessados Gunum e marido Hori Jeganata Seil residentes em parte incerta de Carvar do territorio Inglez, para assistirem a todos os termos do inventario orfanologico requerido por obito de Bissó Naique, por outro nome Bissó Naique Delencar, morador que foi de Delem, de Canacona, sendo inventariante Putú Narana Folo, de Mudcuda de Canacona, deduzirem querendo nele os seus direitos sem prejuize de seu devido e regular andamento. E para ser publico se expediu este.

Xeldem da Comarca deQuepém, 10 de Janeiro de 1925

O Escrivao de Direito do 2° oficio

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito

A. A. de Brito e Nascimento

Pelo Juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1° oficio Redcar a requerimento de Roque Piedade Pinto, de Assolnã, correm éditos de trinta dias a contar da segunda publicação deste no Boletim Oficial, citando as executadas Locximibai, mulher de Datarama Vitola Sinai Volvotcar e Moturabai mulher de Gopala Vitola Sinai Volvotcar, de Cuncolim, ora ausentes em Narsobavadi do territorio Britanico, para renovação da instancia dos autos civeis de execução hipotecaria que o dito Roque Piedade Pinto, como cessionario de Luciano Xavier Dias, de Sarzorá move ás ditas citandas e outros. E para ser publico se expediu este. Quepem 22 de Janeiro de 1925.

O escrivão de Direito

Babú V. Camotim Redcar

Verifiquei

O Juiz de Direito

A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1° oficio Redcar, á instancia do exequente Augusto Piedade Martins de Ambelim de Velim, cessionario dos primitivos exequentes João Antonio Fernandes de Sernabatim e seu cessionario Vitorino Gregorio Constancio Coutinho, de Cuncolim, vai a venda em hasta publica pela terceira vez, á porta do Tribunal Judicial desta comarca, situado em Xeldem, ao lado da estrada que deQuepem se dirige á Curchorem, no dia 17 do corrente mez pelas dez horas, por qualquer preço, o predio rustico denominado "Butram roinim Soclem molo" situado em Fatorpá com exclusão da terceira adição ou sejam primeira e segunda adições do mesmo predio que é cultivado de coqueiros, discrito na conservatoria predial desta comarca sob o n° 5135 a fl. 124 do Livro B 16 e avaliado por 2500 rupias nos autos da carta precatoria vinda da comarca de Salcete e extraida dos autos de execução hipotecaria que o dito exequente Martins promove contro Jeganata Sinai Quencró e sua mulher Maturabai Sinainim e outros de Cuncolim. Quem o quizer comprar compareça nos indicados dia horas e local correndo por conta do arrematante as despezas da praça e a contribuição do registo por inteiro Por este são citados nos termos e para os efeitos da lei, t dos cs credores incertos dos ditos executados bem assim os co-proprietarios, ficam tambem igualmente citados os representantes dos credores falecidos Frederico Francisco Xavier Ligorio Raimundo Rebelo Visnum Sinai Quirtonim e Madu Sinai Quirtonim, todos que foram de Margão, sendo o credito do 1° na importancia de 1300 rupias o do 2° na de 520 rupias e finalmente o do 3° na de 200 rupias. E para ser publico se expediu este. Quepem, 2 de Fevereiro de 1925.

O Escrivão do 2° oficio encarregado do 1°

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito

A. A. de Brito e Nascimento

ESTABELECIMENTO COMERCIAL
DE
Visnum Ramachondra Quenim

FUNDADO EM 1850

MERCADO VELHO-MARGAO

CONTA já mais de 73 anos de fundação o sobredito estabelecimento comercial. E' portanto um dos mais antigos da vila de Margão, mantendo relações com as mais afamadas firmas comerciaes e industriais da Europa e da America, paizes donde, em regra, importa todas as qualidades de tintas, aboc, oleos, verniz, linhança, cimento, gis etc. toda a sorte de artigos de ferro, como pregos, aldraves, cadeados, bisagras, parafusos, canos de ferro etc. especialidades de pastas de zinco lisas e concavas e as de cobre.

NO REFERIDO estabelecimento vendem-se tambem artigos alimenticios da primeira necessidade e todas outras mercadorias de que se acha bem provido.

BEM SERVIR O FRECUEZ E' O SEU LEMA

Experimentem que sempre lhes será proveitosa a experiencia!

ऱ्होदीन

जुनाट संधिवात, मस्तक शूळ, कपाळ दुखणें या व्याधींवर उत्तम फ्रेंच औषध 'ऱ्होदीन'च्या १।२ वड्यांनीं खात्रीनें गुण येतो. तसेंच थंडी वाजणें, इंन्फ्लुयंझा, संधीज्वर (टायफड) व साधारणपणें सर्व जंतुत्पादक तापांवर या औषधाचा फारच उपयोग होतो. २० वड्या असलेल्या बाटलीची किमत फक्त दहा आणे.

मिळण्याचीं ठिकाणें

पणजी— द्रोगारी—फार्मसी आझावेद. | फार्मसी गास्पार [illegible]लेमांव, फोंडें.
द्रोगारी आर्यन. | हिंदु फार्मसी, पणजी.

लुझो इंदियान दवाखाना, पणजी

किष्णु रामचंद्र केणी यांचें दुकान

जुना बाजार—मडगांव.

स्थापना १८५०

सचोटीबद्दल प्रसिद्ध असलेल्या या अत्यंत जुन्या दुकानांत सर्व तऱ्हेच्या मालाचा भरीव स्टॉक असतो. निरनिराळ्या जातीच्या शाई, रंग, सिमीट, व्हेर्नीज, आबोक, हरतऱ्हेचें लोखंडी सामान (खिळे, करवती वगैरे) नाना रीतीचे जस्ताचे व तांब्याचे पत्रे व इतर सर्व संसारोपयोगी वस्तू सदर दुकानांत माफक दरानें विकल्या जातात.

दर एक, माल चोख, व्यवहार रोख

अनुभवानें खात्री करून घ्या!

भारत

भारत

मिति माघ शु० २ शी शके १८४६

आमचा धर्म तुह्मांसाठीं !

हिंदुस्थानच्या इतिहासाचें तात्विक दृष्ट्या परिशीलन केल्यास आपणास आढळून येईल कीं, 'आमचें राज्य तुह्मांसाठीं, तुह्मी सुशिक्षित, दंमदार व स्वराज्य चालविण्यास लायक झालां कीं आह्मीं आपलें चंबुगवाळें आटपून निजधामाप्रत गमन करूं, ह्या सारखी निष्फळ व वाष्कळ वडबड करणाऱ्या इंग्रजांचा व 'आमचा धर्म तुह्मासाठीं,आह्मीं उदार व भले माणूस असून, मुसलमानाच्या जुलुमांतून आह्मींच तुमची सोडवणूक केली असल्यानें तुह्मी आमचे ऋणी आहांत, आम्हीं होतों ह्मणून तुमच शेंडी शाबूत राहिली' अशी शेखी मिरवणाऱ्या पोर्तुगीझांच्या ह्या गरम हवेंत व काळ्या लोकांत प्रवेश करण्याचा मूळ हेतु हिन्दीस्थानचा युरोपशीं चालणारा व्यापार घशांत कोंबण्याचा होता. भारत वर्षाचें व्यापारी दळण वळण एक हाती करून आपण हस्तगत करावें ह्याच उद्देशानें पोर्तुगीझ दर्यावर्दी–ज्याचें श्राद्ध डिसेंबरच्या शेवटल्या आठवड्यांत घालण्यांत आलें तो–वास्कोडिगामा इ. स १४९८ त कालिकट बंदरास उतरला व इंग्रजांचा वकील सर थोमासरो ह्यानें भावी धुळवडीचें पूर्वचिन्ह ह्मणून आपल्या पाढऱ्या पायाची तांबडी पायधूळ मोंगल बादशहा जाहांगीरच्या दिल्लीं दरबारांत सन १६१५ त झाडून तो पावन केला. हिंदुस्थानच्या व्यापाराचीं एकंदर सूत्रें आपल्याच हातांत असावीं, अशा इच्छेनें धडपड करणारें त्या वेळीं आणखीहि एक राष्ट्र होतें. तें फ्रान्स होय.

फ्रान्स, इंग्लंड व पोर्तुगाल ह्या तीनहि युरोपियन राष्ट्रांतील व्यापारी अशा रीतीनें हिंदुस्थानचा व्यापार गट्ट करण्याकरितां टपून वसले असतां बाकीच्या दोघानाहि जिमल्या चाटीत बसावयाला लावून शेवटीं एकलें इंग्लंडच हिन्दभूमीचा व्यापार,साम्राज्यसत्ता व मालमत्ता ह्या सर्वांचें नि:प्रतिस्पर्धी मालक बनलें व इतरांस ह्वा तितका लत्तांचा खुराक चारूं लाविण्या इतकें ताकदवान झालें ह्याचा अर्थ कांय ? एकव्या फ्रान्सची गोष्ट सोडून दिली तर पोर्तुगीज सत्तेची एवढी धूळधाण कां व्हावी?इंग्रज लोकांनीं आर्यावर्तात प्रवेश करण्यापूर्वी १५२ वर्षें पोर्तुगीझांचा पाय मलबार किनाऱ्यास लागला होता व एतद्देशीय संस्थानिकांच्या राजकारणांत कोणत्याच रीतीनें भाग न घेण्याचें (non-interference with native states) धोरण कंपनी सरकारनें इंग्लंडच्या अनुमतीनें बदलण्यापूर्वी २२८ वर्षें प्रसिद्ध पोर्तुगीझ मुत्सदी आल्फान्सो ॲल्बुकेर्कनें

स्थापना केली होती पण शेवटीं अपयश पोर्तुगीझानांच येऊन त्यांस 'फेस्तें करीत व फोल्ग मारीत' रहावें लागलें, हें सर्व विश्रुत आहेच.

पोर्तुगीझ सत्तेचा ऱ्हास कां झाला ह्यावर ऐतिहासिक दृष्ट्या विवेचन करतांना लोकमान्य इतिहासकार कै. नु. चंदाभाई ह्मणतो: **कांहीं कामदारांच्या क्रूर स्वभावामुळें व ख्रिस्ती धर्म प्रसाराच्या केलेल्या प्रयत्नांमुळें पोर्तुगीझांना एतद्देशीयांचा विश्वास व प्रेम संपादन करतां आलें नाहीं व हेंच पोर्तुगीझ सत्तेच्या अस्ताचें खरें कारण होय.**

आमचेंहि निश्चित मत वरीलप्रमाणेंच आहे. परिस्थितीला तोंड देण्यासाठीं पोर्तुगीजांना व इंग्रजानाहि हिंदुस्थानची सत्ता हातांत आणणें अपरिहार्य होतें खरें पण इंग्लंडची दृष्टि केवळ व्यापारावर होती व त्याच्या सुरक्षिततेसाठींच त्यांना राज्यकारभाराचीं सूत्रें हवीं होतीं. पोर्तुगीजांची गोष्ट तशी नव्हती. एकटा आल्बुकेर्क वजा करून इतर सर्व प्रांत प्रतिनिधींची दृष्टि व्यापारापेक्षां धर्मप्रसारावरच अधिक खिळून राहिली होती. हिन्दी लोक आपलें सर्वस्व परकीयानां हरण करूं देतील पण धार्मिक प्रकरणांत परक्यांनीं चाळवाचाळव केलेली त्यांस सहन होणें जन्मांतरींहि शक्य नव्हतें. हें त्यांस त्यावेळीं पटलें नव्हतें व आजहि पटलेलें दिसत नाहीं. हा त्यांचा वेडेपणा ह्मणावा कीं ईशघटना ह्मणावी हें आह्मांस समजत नाहीं. हिन्दी लोकाची धर्मश्रद्धा किती तीव्र अढळ व उदात्त असते ह्याचें उदाहरण त्यांस शीख गुरुद्वार प्रबंधक कमिटीच्या स्वयंसेवकानीं सध्या चालविलेल्या सत्याग्रहांत मिळालें असतें, पण तेवढी सुबुद्धि सरकारास कोठून यायाला ? बंधुप्रेमाच्या उत्कटतेमुळें बिभीषणानें केलेला उपदेश रावणास जर पटला असता तर रामाचें अवतार कार्यच मुळीं संपुष्टांत आलें असतें. त्यावेळीं उन्मत्त रावणानें बिभीषणास हांकलून देणें हेंच उचीत. रावणास बिभीषण राजद्रोही वाटला. कारण परस्त्री हरणाचें रावणानें केलेल निंद्यकृत्य त्यास पसंत न पडून सती पतिव्रता सीता रामचंद्राच्या हवालीं करण्याविषयीं व पश्चातापेन शुद्धता मिळविण्याबद्दल तो रावणास नाना तऱ्हानीं जीव तोडून विनवण्या करीत होता, पण व्हावयाचें तें होऊन जाण्याचें काहीं त्यायोगें चुकलें नाहीं.

गोमांतकांतील लोकप्रतिनिधींची अवस्थाहि सध्या बिभीषणासारखीच झाली आहे. प्रजेची धर्मनिष्ठा हिरावून घेण्याचा जो गामाच्या फेस्तांत घाट घातला गेला होता त्याविरुद्ध त्यांनीं जोराची चळवळ केल्यामुळें सरकारनें त्यांवर बहिष्कार पुकारला आहे. ' जनपदहितकर्तात्यजते पार्थीवेन ' ही संस्कृत उक्ति खोटी ठरल्यासच नवल ह्मणावयाचें.

देशभक्तां प्रासाद बंदिशाला ।
शृङ्खलांच्या गुंफिल्या दिव्यमाला ॥
चिता सिंहासन शूल राजदंड ।
मृत्यु सुंदर दे अमरता उदंड ॥

—विनायक.

स्फुट विचार

भारतावरील खटला:— गेल्या शुक्रवार रोजीं—ता. ३०–१–२५—आक्षेपार्ह लेखाची येथील कोर्टाकडून तपासणी करण्यांत आली. येथील उभय तावेलियांवाकडे ही महत्वपूर्ण जबाबदारीची कामगिरी संपविण्यांत आली होती. उपरोक्त परीक्षक द्वयानीं आरोपीत लेखावर कोणत्या अर्थाचा अभिप्राय व्यक्त केला असेल, त्यांत त्यांना ' राज्यद्रोह ' दिसला असेल किंवा ' मत स्वातंत्र्य ' भासलें असेल, हें साधनाभावामुळें आह्मांस अजून पूर्ण ज्ञात झालें नाहीं. खटला सुनावणीस निघण्यापूर्वी केव्हांतरी एक दिवस लेखाच्या जबाबदारी संबंधानें आह्मांस जाब विचारला जाईल. त्यावेळीं खटल्याचे कागद आह्मांस पहाण्यास मिळण्याचा योग जुळून येणार असल्यानें परीक्षकांच्या परीक्षणाचें मनमुराद परीक्षणहि करितां येईल. तोंपर्यंत आह्माप्रमाणेंच आमच्या शेंकडो मित्रांचीहि 'तपासणी जिज्ञासा' तृप्त होणें दुरापास्त होय.

लिसेवांतील भानगड:– प्रो. देंतीझ्यांनी पोर्तुगालच्या एका साप्ताहिकांत आपल्या अक्कलेचे तारे तोडून जी भानगड उपस्थित केली होती, तीनें एक सबंध आठवडा गोव्यांत गडबड उडवून दिली होती. उपरोक्त प्रोफेसर साहेब व कित्येक मेडिकल विद्यार्थी यांची परस्परांत झोंबाझोंबी होऊन हें प्रकरण आतां बरेंच थंडावत चाललें आहे. ' नेटिव्ह विरूद्ध युरोपियन ' अशा तऱ्हेचें विकृत स्वरूप उपरोक्त भानगडीस प्राप्त होणार होतें; परतु उभयपक्षीं शहाणपणाचें व दूरदर्शीत्वाचें धोरण राखलें गेल्यावरून ती आपत्ति वेळींच टळली, ही त्यांतल्यात्यांत आनंदाची गोष्ट होय. लेखनबहादूर प्रोफेसरांनीं ' दियारियु दे नोयती ' या पत्राच्या संपादकांवरहि अवचित व गुप्तपणें हल्ला करून, त्यांस बरेंच हैराण केलें होतें. सदहू संपादकहि आतां आजारंतून सुखरूपपणें निभावल्यावरून, ' खुना ' शिवाय, एकंदर प्रकरणावर ' चुना ' सारवला गेला ह्मणण्यास हरकत नाहीं! सविस्तर माहिती हातीं येतांच प्रस्तुत ' फाल्गुनोत्सवा 'संबंधीं टीकात्मक चर्चा करूं.

गामाचें श्राद्ध:– गामोत्सवांत पुष्कळ हिंदूंनीं भाग घेतला नाहीं, हें जितकें सत्यास धरून आहे, तितकेंच पुष्कळशा ख्रिस्ती व युरोपियनांनींहि गामाच्या आत्म्यास पिंडदान वाहिलें नाहीं, हेंहि आहे. हिंदूंनीं तर केवळ तटस्थवृत्तीच स्वीकारली होती; पण ख्रिस्ती व युरोपियन लोकांच्या तटस्थवृत्तीला विरोधाचीहि झांक झळकत होती. या खऱ्या वस्तुस्थितीकडे मुद्दाम डोळे झांक करून कांहीं ख्रिस्त्यानड्यांकडून हिंदूविरूद्ध चालू करण्यांत आलेली स्वार्थी व पोटार्थी मोहीम किती निंद्यनीय आहे,याचा वाचकानींच विचार करावा. आजच्या पोर्तुगीज अग्रलेखांत प्रस्तुत विषयाची आम्हीं सगोपांग चर्चा केली आहे. यामुळें तरी त्यांच्या डोळ्यांत अंजन पडून त्यांची धुंदी उतरो, अशी आमची इच्छा आहे.

एक विलक्षण कारखाना

(मागील अंकावरून)

पण सर्वांत मोठा चमत्कार ह्मणजे त्याच्या चेहऱ्यावरील झालेला बदल. त्याचा चेहरा पूर्वी एकाद्या क्षुद्र चित्त्याप्रमाणें तारवटलेला दिसत होता. पण त्या यंत्रांतून तो बाहेर पडतांच हिमालयांत अनेक वर्षें तपश्चर्या करून आलेल्या एका तपस्वी योग्याप्रमाणें शांत व गंभीर दिसूं लागला. हा त्याच्या चेहऱ्यावरील एकाएकीं झालेला बदल पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें.मी मालकास ह्मटलें,"या सद्गृहस्थाच्या चेहऱ्यावर हा जो एकाएकीं बदल झाला आहे त्याप्रमाणें या गृहस्थाची मनोवृत्ती खरोखरीच बदलली आहे काय ?" त्या गृहस्थाला दुसऱ्या दालनांत पाठविल्यानंतर मालक जरा इकडेतिकडे पाहून हंसत ह्मणाला, ' अहो हा बोलून चालून यांत्रिक कारखाना. असे तुह्मीं अगदीं भोळे कसे ! या यंत्रांत अगदीं खालच्या बाजुला एक प्रकारच्या पावडरीनें भरलेले दोन खण आहेत. मनुष्याचें डोकें या यंत्रांत गेलें कीं दोन्ही बाजुला बसविलेले ब्रश ही पावडर त्याच्या तोंडावर मारतात व मग तावडतोब चेहऱ्यावर इष्ट तो बदल होतो. " यत्किंचित पावडरीच्या अंगीं एवढी शक्ती पाहून अगदीं आश्चर्यानें मूढ झालों. या पावडरीचें नांव तरी काय असा प्रश्न मी त्यांस करतांच, त्यानें त्या पावडरीचें नांव " दांभिकता " असें सांगितलें आणि आह्मीं तेथुन दुसऱ्या दालनांत जाण्यास निघालों.

या दालनांत एक जुने यंत्र पडलें होतें. अद्याप त्याचे कांहीं भाग चालू होते. पण नवीन कच्चा माल फारसा या दालनांत नव्हता. ' हा सर्व प्रकार काय आहे " असा प्रश्न करताच मालकानें मला " पुढारी " बनविण्याचें हें एक जुनें यंत्र आहे असें सांगितलें. हें यंत्र चांगलें आहे पण अलीकडे महात्मा गांधीच्या चळवळीमुळें या यंत्रांतला माल लोकांना फारसा आवडत नाहीं. असहकारितेच्या चळवळीच्या ऐन भरांत या मालाला कोणी कुत्रा सुद्धां विचारीत नव्हता. पण अलीकडे पुन्हां बाजारांत या मालास थोडी थोडी मागणी येत आहे. अद्याप बाजारभाव कदाचित सुधरेल असें वाटतें. या दालनांत जुन्या कारखान्यांस लागणाऱ्या अनेक मालानीं भरलेलीं निरनिराळीं कपाटें होतीं. त्यांत बऱ्याचशा सुंदर, झिळमिळ्या पगड्या, रेशीमकाठी धोतरजोडे करवतकाठी उपरणी, कानांतल्या भिकबाळ्या, आल्पाकचे कोट इत्यादि रद्दी माल पडला होता. " पूर्वीच्याकाळीं पुढारी बनविण्याला या साधनाचा फार उपयोग होत होता. व यामुळें आमचें टेलरींग खातें फार जोरांत चालू असे. पण अलिकडे गांधीजींच्या चळवळीमुळें हा सर्व धंदा बसून गेला आहे व यामुळें कारखान्यांतल्या बऱ्याचशा शिंप्यांना रजा द्यावी लागली. विशेषतः पगडबंदांची जर अगदीं गैरसोय झाली आहे; देशांतल्या वाढत्या बेकारीला ही आणखी जादा मदत. अद्याप या यंत्राचे कांहीं भाग चालू आहेत. कारण ' नेमस्त ' बाजारांतून अद्याप याच

Ano 9 N. 46

[Q]uinta-feira 12 de Fevereiro de 1925

ASSINATURA
cada ano tres rupias.

ANUNCIOS
ainda que repetida uma tanga
avulso uma tanga

[PROPRIE]TOR E EDITOR
[G. P. H]egdo Dessay
[Cape]m-Goa

भारत.
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४६

गुरुवार ता. १२ फेब्रुवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

EM ... PAZ

O sr. dr. S. Rau, primeiro bacharel hindú, formado na Universidade de Lisbôa, acaba de dedicar á *Politica Hindú* um artigo que o jornal europeu *A Provincia* inseriu no seu lugar de honra.

O sr. dr. Rau que, de resto, nos merece consideração não só pelo seu estudo mas tambem pela sua educação, perdeu, como se costuma dizer, uma bôa ocasião de estar calado.

Sua Excia, desde que regressou de Lisbôa, investido na magistratura judicial, tem contraido o habito de alhear-se da politica de toda a sorte, lidando, tão sómente, com os livros do seu *metiér*.

O ilustre magistrado não pode saber, portanto, bem o que seja a politica hindú que não é qualquer coisa que se pareça com algum artigo do Codigo Penal ou com alguma disposição da Novissima Reforma Judiciaria.

E quem emite pareceres conselheiros sobre assuntos desconhecidos, comete um grave erro de incompetencia e pratica uma falta de leviandade.

As considerações do sr. dr. Rau sôbre a *Politica Hindú* pecam, por conseguinte, por incompetencia e leviandade, por quanto incidem elas sobre uma tése que o distincto primeiro bacharel hindú não procurou, pelo visto, conhecer em todas as suas fases, particularidades e minudencias, antes de aprecia-la públicamente.

Claro é, portanto, que o aliás brilhante artigo do sr. Rau não pode ser considerado como um termómetro pelo qual se procure graduar a temperatura da *Politica Hindú*, na qual, para mais, Sua Excia. não tem *inspiração* nem filiação partidaria, como se viu.

Se o artigo do sr. Rau é destituido de valor algum como termómetro *pelo qual se procure graduar a temperatura da Politica Hindú*, êle se reveste, porêm, de grande importancia como instrumento de medição do *calor* da politica governamental. O que no artigo em questão se encontra traduzido, não é o sentir dos *jovens* ou *velhos hindús*, mas sim está ali expressa a *orientação* que a burocracia entende que a *Politica Hindú* deve seguir. Só isto e nada mais.

Pela *bôca* da caneta do sr. dr. Rau não fala, pois, a *Opinião Hindú*, com a qual Sua Excia. tanto se familiarisara, tendo-lhe até dado a sua melhor seiva, antes de ir cursar em Lisbôa. Quem fala pelo mesmo *bico*, é a burocracia, inimiga declarada do elemento popular, quere êste seja hindú, quere não.

¿Será o sr. dr. Rau capaz de jurar que as recentes afirmações contidas no seu artigo de *A Provincia* não vão de encontro com as velhas, bordadas *in ilo tempore* no seu jornal *A Opinião Hindú* e na sua revista *Chitacarchana*?

Crêmos que não.

E' que Sua Excia. não era então, como hoje, magistrado judicial ocupando um alto cargo de confiança governamental. Era um jornalista, como o somos agora, de confiança popular, de permanente lida com *a gente do Povo*.

E porisso mesmo repetimos que, quebrando o scilencio que sempre é de oiro, o sr. Rau perdeu uma bôa ocasião de estar calado.

De resto, com o seu artigo, o festejado primeiro bacharel hindù não invalida nenhum dos argumentos, aduzidos nas suas colunas pelo *Bharat* em volta da *Politica Hindú* que, não admitindo na concretisação do seu supremo desiderato violencia de especie alguma, está muitissimo longe de merecer o apòdo de *subversiva*, como o sr. dr. Rau, hoje governamental, pretende classifica-la, menospresando a circunstancia de estar *sub judice* uma das inofensivas e constitucionais manifestações da mesma *Politica*.

Diga-se isto em bôa paz.

Insistindo....

O nosso presado colega de *A Epoca* promete, a proposito da concepção errada, dar-nos a sua resposta completa, logo que tenhamos conhecimento dos *ponderosos motivos que determinaram a exoneração* a que nos referimos.

Insistimos com o distincto colega—se isto não o incomoda—em que se digne de frisar e em tom claro, visto que já se extinguiu a tal fogueira, em que consiste a *concepção errada de alguns hindús*, sendo certo que a nossa insistencia se basêa na certeza matemática de que nunca lograremos explicação solicitada no nosso suelto *Porque?*

Crêa o colega que o nosso pedido não mascara nem envolve nenhum jogo politico: representa apenas o vivo desejo de apreciarmos a tal *concepção errada* que vergastaremos sem dó nem piedade, no caso em que se comprove a sua existencia.

Que diabo! Não queremos que a *Politica Hindú* se vicie, se macule e se comprometa com *concepções erradas*. A nossa ancia é que ela cresça e se desenvolva, completamente livre de quaisquere defeitos que, porventura, possam contribuir para lhe apoucar o valor moral e social.

Pois é verdade, ilustre colega!

Despresamos, sempre, a dissimulação que a diplomacia julga ser condição *sine qua non* da Politica. E despresamo-la, ainda com o risco de nossas pele e despauperada fortuna.

Na *Politica*, os *fins* tem de ser claros como claros tem de ser os *meios* destinadas á consecução dos mesmos *fins*. E, como crêmos que o nosso colega bardezano tambem comunga nêste nosso modo de ver politico, é que pretendemos que a *Epoca* seja clara e desassombrada na explicação da *concepção errada* que viu em alguns hindùs e que, levada pelo único desejo de os enveredar pelo bom caminho, denunciou, em tom vacilante, *para não lançar achas na fogueira que se ia atear, devido á estouvada atitude de certos.*

LIVRARIA MODERNA

O sr. Francisco Luiz S. Mergulhão, proprietario desta importante Livraria vende livros a preços mòdicos, aos preços da propria factura, o que já representa grande vantagem aos compradores.

Segundo o conhecimento que temos do sr. Mergulhão, podemos afiançar que, se a compra de toda a sore de livros, tais como escolares, literarios, judiciais, didaticos, scientificos, romanticos, religiosos, é proveitosa aos particulares, muito mais se o torna aìnda aos gabinetes de leitura, destinados ao público. E' vêr e crêr.

Experimentem que a experiencia só lhes será lucrativa.

समाज सुधारणा

विवाह

लेखांक ४ था.

बालविवाह

पशूमध्यें सुद्धां पूर्ण यौवनावस्था प्राप्त झाल्याशिवाय संतानोत्पत्ति होत नाहीं. मनुष्यांची यावनावस्था पूर्ण होण्याला पंचवीस वर्षांहून अधिक काल लोटला पाहिजे. याकरतां अपूर्ण वयांत गर्भादान करणें ह्मणजे पशूपेक्षांहि हीन कर्य करणें होये. हें कार्य निंद्यनीयच आहे असें नाहीं तर अत्यंत हानिकारकहि आहे.

इंदुमाधव मल्लिक एम ए. बील.

तारुण्याच्या प्रथम चिन्हांवरून ते विषय भोग भोगण्याला योग्य झालेले आहेत असें केव्हांहि सांगतां येणार नाहीं.

लहानपणीं बाहुला बाहुलीचा खेळ खेळणें, त्यांचीं लग्नें करणें, त्यांना एकत्र निजविणें व पुढें त्यांना मुलें झालींशी करणें इत्यादि प्रकारांनीं तसेंच प्रत्येक रीतीनें त्यांच्या तोंडावर त्यांच्याच लग्नाच्या गोष्टी बोलणें इत्यादि प्रकारांनीं मुलांच्या मनावर वाईट परिणाम होतात

पूर्ण तारुण्यावस्था प्राप्त होण्यापूर्वी राहिलेला गर्भ माता पिता व पोटांतील संतान या तिघानांहि हानिकारक असतो. बहुतेक अशा स्थितीतील गर्भ नष्ट होत असतो. लहान वयांतील स्त्रियांचा प्रसूति समय अत्यंत कष्टकारक असतो इतकेंच नव्हे तर कित्येकदां त्यांना आपले प्राण यावेळीं खर्ची घालावे लागतात. जरी यावेळीं ती बिचारी जीवंत राहिली तरी पण त्या बालकाच्या दुध पानानें तिला क्षीणता प्राप्त होते व पुढें आणखी एक दोन मुलें होतांच तिचें शरीर इतकें निर्बल होऊन जातें कीं, पुढें सगळ्या जन्ममरपर्यंत त्या बिचारीला आरोग्य माहीत नसतें व फार करून प्रसूतीच्या वेळीं अगर कोणत्या तरी असाध्य रोगानें त्या बिचारीचा अंत होतो.

पंचवीस बाल गर्भवती स्त्रियांचीं तपासणी केल्या अंतीं असें आढळून आलें कीं, पाच स्त्रियांचा गर्भ अकालीं नष्ट झाला. तिघांना प्रसूतीच्या वेळीं प्राण द्यावे लागले, सहा जणींना प्रसूतीच्या वेळीं इतके कष्ट झाले कीं, शस्त्रप्रयोग करून मुलें काढावीं लागलीं, पांचाना मुलें झाल्यावर जुना मूत्ररोग उपस्थित झाला, दोघ्या जणींस मूल झाल्यावर बाळंत रोग होऊन परलोकीं गेल्या, तीघांना दुसऱ्या खेपेस हाच मार्ग धरावा लागला. दोघांना हा मार्ग तिसऱ्या खेपेस गांठावा लागला. बारा जणींना अत्यंत त्रास होऊन मृत्यूच्या दाढेंतून सुटल्या पण जन्माच्या रोगी होऊन बसल्या. अर्थात या पंचविशीपैकीं दहा मरण पावल्या, तेरा जन्माच्या रोगी होऊन बसल्या व केवळ दोघी जणी मात्र चांगल्या स्थितींत राहिल्या.

(येथें पंचविशीचा मेळ मिळत नाहीं असें दिसन येईल. याचें कारण एकाच स्त्रिला तीन खेप रोग झाल्यामुळें परत संख्येंत धरलेलें आहे व यांवरून ही संख्या वाढलेली आहे.)

बाल मातांना अत्यंत कष्ट होत असतात. अकालीं गर्भ नष्ट होणं, मेलेलें मूल निघणें अशा वेळीं त्यांच्या हालानां सीमा नसते. एखादेवेळीं मूल जीवंत राहिलेंच तर तें इतकें निर्बल होऊन जातें कीं त्याला दूध सुद्धां पितां येत नाहीं व यांतूनहि तें जर जीवंत राहिलें तर केवळ पाण्याचे पितर बनून या संसारांत दिवस कंठीत असतें.

गेल्या सेन्सार रिपोर्टावरून असें दिसून येतें कीं, बाल्यावस्थेंतील गर्भ बहुतेक वेळां नष्ट होतो. बहुतेक बालपणांतील मुलें वांचत नसतात व वांचलींच तर रोगी निर्बल कृश अशीं होतात. एका हजारांतून ३३६ मुलें बहुदा एका वर्षाच्या आंतच मरण पावतात. अर्थात तीघांतून एक मूल मरण पावत असतें.

आपल्या हिंदुस्थानांतील बहुतेक तरुण मूत्ररोग, अग्निमांद्य, ताप वगैरे रोगानीं पिडलेले असतात. मूत्ररोगानें सगळया जगापेक्षां अधिक लोक ह्मणजे शेंकडा १५ तरुण या आपल्या हिंदुस्थानांमध्यें मरण पावत असतात.

आपल्या लोकांचें शारीरिक स्वास्थ्य बहुधा तीस ते चाळीस वर्षांच्या वयापर्यंत बिघडलें जातें हें मोठमोठ्या नामांकित वैद्यानीं सुद्धां कबूल केलेलें आहे. याचें कारण असें आहे कीं, बाल विवाहानें त्याचें शरीर क्षीण होत असतें व त्यांत अकालीं त्याच्यावर मुलांचा बोझा पडतो व या कारणामुळें त्याच्यावर चिंतेचा इतका परिणाम होतो कीं, त्यांचें स्वास्थ्य बिघडल्याशिवाय रहात नाहीं.

कित्येक विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षणाच्या भाराबरोबरच मुलाचाहि बोझा उचलावा लागतो व या दुहेरी ओझ्यामुळें त्यांची स्थिति करुणजनक होऊन त्याच्या शारीरिक स्वास्थ्याचा बिघाड होत असतो

Wake up India

Anne Besant

सारांश बालविवाहामुळें भारत गारत झालेला आहे. या पुढें आह्मीं सावध होऊन हा मार्ग जर सुधारला नाहीं तर आमच्या पुढील सर्व आशा निष्फल होऊन जातील. यद्यपि आह्मीं आमच्या स्त्रियानां जरी विद्या व विज्ञान यानीं पारखें केलेलें आहे तरीपण परमेश्वरी कृपेमुळें सुशीलता, पवित्रता, नम्रता पातिव्रत्य, यांत आपल्या राष्ट्रांतील स्त्रिया इतर राष्ट्रांतील स्त्रियांपेक्षां पुढें आहेत. शिक्षण नसतानां असे पवित्र विचार, गुलामगिरींत राहूनसुद्धां असा उत्तम स्वभाव, बालमाता असतानांसुद्धां असें सुंदर व मनोहर शरीर ही स्थिति यावत्कालपर्यंत टिकली गेली, याचें आपण आश्चर्यच मानलें पाहिजे. **बालविवाहाची चाल नवीन भारताला अत्यंत लज्जास्पद आहे.** वरून या चालीचें निर्मुलन करून टाकणें प्रत्येक भारतवासीयांचें कर्तव्य आहे.

अनुचित प्रवृत्ति

पत्नि उल्लंघी मर्यादेला ।
माता मारी निज बाळाला ॥
बंधु विकि जरी निज भगिनीला ।
अनुचित हा मार्ग ॥ १ ॥

मागें भारतांत प्रसिद्ध झालेली एका श्रीमंत घराण्यांतील घटस्फोटाच्या दाव्याची हकीगत वाचून कोणालाहि विस्मय व खेद वाटल्याशिवाय राहणार नाहीं. विशेष चौकशी अंतीं आमच्या पणजी शहरानेंच या कामीं आघाडी मारली हें समजून तर परम दुःख झालें.

इतिहासप्रसिद्ध गोमांतकांतील मुख्य शहर व पोर्तुगीज हिंदुस्थानची राजधानी असा दुहेरी मान पणजीला आहे, ह्मणूनच कीं काय हिंदु ज्ञातींतील ब्राह्मण वर्गांतील एका स्त्रीनें आजपर्यंत कोर्टामार्फत घटस्फोटाचा अर्ज सादर करून, अर्थात पतीच्या हयातींत त्याचा त्याग करण्याची मनःप्रवृत्ति आचरणांत आणली नाहीं, तीची सुटसुटीत तयारी एका कुलवान व धनवान स्त्रीनें करावी हें या शहराचें दुर्दैव होय.

धार्मिक व व्यवहारदृष्ट्याहि हें करणें उचित आहे, असें ह्मणणारा वरील स्त्रीच्या आप्तेष्टांतसुद्धां कोणी असूं शकेल याची वानवाच आहे, इतकें तीव्रतर लोकमत जिकडे तिकडे अनुभवास येतें. हिन्दुसंस्कृतीला व आजपर्यंतच्या पूर्वपरंपरेला या कृतीनें काळीमा फासला जाणार हें निर्विवाद होय.

हिन्दूच्या चालीरूढीच्या कायद्यास पो. सरकारकडून जोंपर्यंत अर्धचंद्र मिळाला नाहीं तोंपर्यंत अशा तऱ्हेच्या खटल्यांस कोर्टांत थारा मिळणार नाहीं हें कोणीहि सांगू शकेल व याच्या पुष्टिकरणार्थ ह्मणूनच कीं काय बऱ्याच सरकारी व बिनसरकारी वकीलांचें मतहि "हिन्दूंतील ब्राह्मणवर्गांत स्त्रीच्या व्यभिचार प्रवृत्तीशिवाय इतर आधारानें घटस्फोटाचा कायदा लागू होत नाहीं" असें मागें प्रसिद्ध झालें आहे व आतांहि होत आहे. 'आचारसंपन्न समाजांत घटस्फोटाकडे प्रवृति असणें, हें केव्हांहि इष्ट नव्हे, असें क्रिश्चन सुबुद्ध वकीलांचें ह्मणणें आहे, या वरून व गेल्या डिसेंबर महिन्यांत रिफोर्मर्सच्या अग्रणीच्या लखनौच्या सभेंत घटस्फोटाचा कायदा पास करविण्याच्या ठरावास जो बहुमतानें कसून विरोध करण्यांत आला, त्यावरून हिंदुस्थानांतील विद्वान व सुविचारी बहुजनमताचाहि रोख घटस्फोटाच्या विरूद्ध आहे, हें सिद्ध होत नाहीं काय ?

आमच्या आर्यऋषीनीं व स्मृतिकारांनीं प्रपंचाचा रथ सुरळीत व सुव्यवस्थीत चालण्यासाठीं पतिपत्नींच्या संबंधाचे दृढीकरणार्थ जे नियम घालून दिलेले आहेत त्यांचें उल्लंघन करणें ह्मणजे त्यांच्याशीं व पर्यायेंकरून आपल्या पूर्वजांशीं कृतघ्न होणें नव्हे काय ? या कृतघ्नतेच्या दोषास पात्र होणें ह्मणजेच स्वधर्माभिमानशून्य बनणें होय.

या खाजगी स्वरूपाच्या खटल्याची "भारतानें" परिस्फुटता करावयास नको होती असें कांहीं लोकाचें ह्मणणें आहे. पण या खटल्याचं स्वरूप हिंदु समाजाचे पूर्व परंपरेस किती विघातक आहे याकडे दृष्टी दिल्यास भारताकडे कसलाच दोष येत नाहीं. खटला खाजगी असला तरी हिंदूच्या चाली रूढींच्या कायद्याविरुद्ध त्यांतील मागणी असल्यावरून, त्याचा बरा वाईट परिणाम सर्व समाजाला भोगावा लागणार, एतदर्थ त्याचा सद्विचारी जनानीं वेळींच प्रतिकार व निषेध करणें प्रत्येकाचें कर्तव्य होय.

प्रसिद्ध ताई महाराजांचा खटलाहि सकृत्दर्शनी खाजगी स्वरूपाचाच होता पण त्यांतील दत्तकासंबंधीचीं विधानें हिंदु समाजांतील चालीरूढीस प्रतिबंधक असल्यामुळें व अशा तऱ्हेच्या खटल्याची पुनरुक्ति न व्हावी यासाठीं ताई महाराजांच्या खटल्यास लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक स्वरूप देऊन तो त्यांनीं आमरण चालविला व त्यांचे पश्चात् त्याचा निकाल प्रिव्ही कौन्सिलनेंहि योग्य असाच दिला, हें सर्वांस विदित आहेच.

सौभद्र नाटकांतील सुभद्रेच्या अंजनी गीतांत थोडा फेरफार करून या लेखाचे शिरोभागीं तें उधृत केल्याप्रमाणें ह्या अनुचित मार्गापासून आमच्या शहरच्या श्रीमंतास परावृत्त करण्यास त्यांचा एखादा आप्त स्नेही अगर त्यांचे धर्मगुरू पुढाकार घेऊन स्वकर्तव्य बजावतील काय ?

पणजीकर

शेवटीं सुप्रसिद्ध इतिहासकार टाल बाईस व्हीलर याचा उतारा देऊन हा लेखांक पुरा करूं. ते ह्मणतात "जोपर्यंत भारतीय लोक लहान मुलांमुलींचा विवाह करण्याचें चालू ठेवतील तोंपर्यंत त्यांची संतती उत्तम स्थितीला पोंचणार नाहीं. स्वाधिनता व स्वराज्याच्या चालू चळवळींत ते बलहीन व निस्तेज ठरतील व राजकीय उन्नतीचा उपयोग करण्याकरितां तें कोणत्याहि प्रकारच्या शिक्षणानें समर्थ होणार नाहींत. शिक्षणाच्या प्रभावामुळें त्यांची बुद्धि गंभीर होऊन जरी ते कोणत्याहि गंभीर व प्रौढ माणसाप्रमाणें वर्तन ठेवूं शकतील तरीपण त्यांचें आचरण असहाय्य बालकांप्रमाणेंच राहील यांत शंका नाहीं.

आजचें पोर्तुगीज सदर

अग्रलेखः—

डॉ० राव व हिंदु राजकारण; जुने लेख व नवें धोरण; "हिंदुमत" व "चित्ताकर्षण"; डॉ० रावांनीं मुग्धता राखण्याची सोन्याची संधि दवडली.

लेख दुसराः—

'आ बेपोक' पत्राला प्रत्युतर; कांहीं हिंदूंची 'दिशाभूल' कोठें आहे ?

स्फुट विषयः—

आभारप्रदर्शन; दिपांव प्रकरण इ. इ. इ.

भारत

करणें हें कृत्य स्वदेशद्रोही, अदूरदर्शी व क्रांतिकारक होय.

वरील वाक्यांतील राष्ट्रीय हा शब्द त्यांनीं कोणत्या अर्थानें योजलेला आहे हें आह्मांस समजत नाहीं. त्या शब्दानें पोर्तुगाल देशाला संबोधिण्याचा जर त्यांचा इरादा असेल तर गोष्ट निराळी. पण तें तसें असेल असें आम्हांस वाटत नाहीं. बॅ. राव सुशिक्षित आहेत, नव्या पिढीचा जहरी जोम व मार्दव त्यांच्या अंगांत वसत आहे. ताज्या दमाच्या तरुणांत प्रामुख्येंकरून इ-ग्रेल्पत्तीस येणारी तेजपूर्ण तडफ त्यांच्या छातींत मुसमुसलेली आहे. मग जें पोर्तुगाल करतें तेंच आह्मांहि करावें असें ह्मणण्यास ते कसे तयार होतील ? पाश्चात्य सुधारणेला भुरकटलेल्या स्वाभिमानशून्य 'नरवीरांनीं' हवें तर पोर्तुगालच्या पावलावर पाऊल टाकून नागवेंच नाचूं लागवें; आह्मीं त्याच्याकडे ढुंकूनहि न पहातां आपल्या आंखीव कार्यास लागूं. पण ज्या आह्मास पाश्चात्य सुधारणेची उपयुक्तता पटत नाहीं, इतकेंच नव्हे तर तिच्यामुळें आह्मीं माणुसकीस मुकूं असें वाटतें, त्यानां पोर्तुगालच्या हडेलहप्पी हुकुमाचें जोखड माने वर बाळगिण्याचें काय जरूर ? स्वराज्य मिळालें असतांहि जर गोमांतक पोर्तुगालची 'री' ओढण्यास जबाबदार धरलें जात असेल तर–आह्मीं विचारतों– स्वराज्याची व्याख्या काय ? व तिनें आह्मास कोणते नवीन हक्क मिळाले आहेत ? 'राष्टीय' ह्या शब्दानें पोर्तुगालला न संबोधितां गोमांतकालाच उद्देशून जर तो वापरण्यांत आला असेल तर गोमांतकांतील धर्मासाठीं झटणारे खिस्ती व धर्मासाठीं मरणारे हिंदु लोक संख्येनें परस्पर समान आहेत, हें ध्यानांत वागविणें अपरिहार्य आहे. एकीकडे खिस्त्यानुयायीवर्ग गामाला आपला उद्धारकर्ता समजतो तर दुसरीकडे आपल्या आजच्या 'अहलख' स्थितीस केवळ गामच कारण होय असें हिंदुधर्मीयांचें – अर्थातच बॅ. रावांस हिन्दु या नात्यानें जमेस धरून– ठाम मत आहे. ज्यानां 'गामानें आपले हितसंबंध राखले' असें वाटतें, त्यानीं खुशाल त्याचीं श्राद्धें वाढावींत व त्याच्या नावानें पोटभर रडावें! पण आम्हीं– ज्यांच्या पूर्वजांच्या नरडीचा घोंट गामानें घेतला, ज्यांच्या पूर्वजाचा गामानें अमानुष खून केला, धर्मच्छलाच्या अत्याचारानें गामानें ज्यांच्या पूर्वजांस देशत्याग करून परागंदा व्हावयास लावलें, ज्यांच्या पूर्वजाना गामानें जिवंत जाळलें, ज्यांच्या पूर्वजांस तोफेच्या तोंडी कोंबून गामानें भरकन् उडवून दिलें त्या आर्यांच्या अस्सल छाप्यानीं, केसरीच्या छवड्यानीं सत्व व स्वत्व विसरून त्या अजापुत्रांत कां सामील व्हावें ! ज्या आमच्या पूर्वजांनीं धर्माकरितां सर्वस्वाची होळी केली, स्वदेश त्याग केला, व प्रसंगीं आत्मयज्ञ करूनहि आर्यांच्या धर्मनिष्टेची पताका आकाशांत फडफडत ठेविली, त्या धर्मनिष्टांच्या रक्तानें ज्यांचा देह बनला आहे त्या आह्मीं आपल्या पूर्वजांच्या दिगंत कीर्तीस, उज्वल यशास व अनुपमेय स्वार्थत्यागास काळिमा फांसून जन्मदात्यांशीं हराम कसें व्हावें ! धर्म व स्वातंत्र्य ह्या जगांतील अशा दोन चिजा आहेत कीं, पृथ्वीवरील प्रत्येक प्राण्याला पंच प्राणाहूनहि ज्यांची किंमत अधिक वाटावी. मग असें असतां गामाच्या श्राद्धांत भाग घेण्याबद्दल पडद्या आडून जबरदस्ती करून धर्मावर व ज्यांनीं उत्सवांत भाग घेतला नाहीं त्यांवर अराजकता, बंडखोरी ह्या सारखे भलते सलते आरोप लादून स्वातंत्र्यावर बेधडक घाला घातला जात असतां तरुण गोमांतकीयांनीं क्रांतीला कां भ्यावें ! गामोत्सवांत (बॅ. रावांच्या मतें) दडी देऊन बसलेलें 'राष्ट्रीयत्वच' ज्यांस पटत नाहीं, स्वतंत्रमतवादी गोमांतकीयांवर बॅ. रावांकडून स्वदेशद्रोहासारखे शेंकडो आरोप जरी लादण्यांत आले तरी ते त्यापुढें मान वांकविण्यास केव्हांहि तयार होणार नाहींत व यदाकदाचित् त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें आम्ही स्वदेशद्रोही ठरलोंच तर स्वधर्मद्रोह, समाजद्रोह व पितृद्रोह ह्या द्रोहत्रयीं पुढें स्वदेशद्रोह तेव्हांच लंगडा पडेल ह्याची आम्हांस खात्री वाटते. उघड्या डोळ्यानीं प्राण जात नाहीं त्यास आम्ही तरी काय करावें !

स्फुट विचार

हें चित्र पहा ! :– हिन्दूची चळवळ सात्विक गुणविशिष्ट असते तर खिस्त्यांच्या चळवळीच्या आरंभांत तामसवृत्तीचें भेसूर प्रतिबिंब हरवडी पाहावयास सांपडतें. हिंदूंचा प्रतिकार फार तर मनांत उगम पावून ओंठांतून निघेल. हस्तपादादि विरोधापर्यंत त्याची सहसा मजल पोंचत नसते. गेल्या दोन वर्षांमागें गांधी–टोपी प्रकरणांत लिसेवच्या कांहीं हिंदुद्वेष्टे शिक्षकांकडून हिन्दुविद्यार्थ्यांचा अपमान केला गेला, त्यांच्या धर्माभिमानावर लत्ताप्रहार हाणण्यांत आला व 'नको हे शिक्षक व नको हें शिक्षण' असे निरुत्साहपूर्ण उद्गार काढण्यापर्यंत त्यांच्यावर पाळी आणण्यांत आली. या गोष्टींमुळें हिन्दुविद्यार्थ्यांच्या रागाचा पारा मराऱ्या मारीत बराच वर चढला; पण ही रागाची उष्णता अपमानकर्त्यांनां चुकून सुद्धां 'चर्मदंश' करण्यास शकली नाहीं. विद्यार्थ्यांनीं सभा भरवून राजरोस मार्गांनीं आपला निषेध व्यक्त केला. वर्तमानपत्रांतून सुद्धां दुरुत्तरांचा जाहीर व स्पष्ट रीतीनें इनकार केला. परंतु आपल्या अपमानकर्त्यांच्या शारीरिक स्वास्थावर घाला आणण्याचा आडदंड विचार त्यांच्या मनाला कधींहि शिवला नाही. याचें कारण हेंच कीं, हिन्दूच्या चळवळी – मग त्या कसल्याहि प्रतिकारार्थ जन्मलेल्या असोत – सात्विक गुणप्रधान असतात. त्यानां त्यांच्या स्वभावाप्रमाणें सात्विक स्वरूपच प्राप्त होत असतें. 'असुरी लिलेंत' त्यांचें पर्यवसान चुकून सुद्धां होणें फार दुरापास्त असतें.

आणि हें चित्र पहा :– नाहीं र खिस्त्यांच्या चळवळीची दिशा पहा, प्रो. देतींज्ज यांकडून सरसकट हिन्दी विद्यार्थ्यांचें व शिक्षकांचा उपमर्द व तोहि केवळ वस्तुस्थितीच्या अज्ञानामुळें केला गेला. प्रोफेसर मजकुरांचीं गैरशिस्त विधानें कांहीं खिस्ती विद्यार्थ्यांचीं डोकीं बिथरण्यास कारणीभूत झालीं. पण त्यानीं आपला त्वेश व आपला निषेध जाहीर सभानीं व लेखानीं व्यक्त करण्यापूर्वीं, मारामारी सारख्या खुनशी व तामशी मार्गांचा अवलंब केला ! हा पंथ हिंदूनीं केव्हांच स्वीकारला नसता. कारण त्यांच्या चळवळीचा जोर व्यक्तिपेक्षां तत्वावरच जास्त असतो. हिन्दूनां 'बंडखोर' ह्मणून वेळीं अवेळीं हिणविणाऱ्या वर्गांतील लोकांकडूनच वरील 'बंडाळी' माजविली गेली हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

वर्तमानसार

—खटला सुनावणीस निघण्यापूर्वीं आरोपीत लेखाचें भाषांतर प्रसिद्ध करण्यांत येऊं नये, अशी कांहीं मित्रांनीं इच्छा प्रदर्शीत केल्यामुळें, याहि अंकांत तें छापण्यांत आलें नाहीं.

—अखेर डॉ॰ जुवांव कामोयेन्स यांचीच नेमणूक येथील गव्हर्नरचे जागीं निश्चित होईल, असें पोर्तुगालच्या ताज्या पत्रांवरून समजतें.

—येथील जज्जांची नेमणूक सां–तोम (आफ्रिका) यथें झाली असून, याच महिन्यांत ते येथून निघतील, असा रंग दिसतो.

—सांवर्डें येथें 'उद्योगवर्धक' नावांची एक लिमिटेड कंपनी स्थापन झाली आहे.

—येथील नजिकच्या गांवांत देवीचा आजार वाढत्या प्रमाणावर आहे.

—चिनचे डॉ॰ सुनयतूसेन हे मरण पावल्याची बातमी कांहीं दिवसांमागें प्रसिद्ध झाली होती; पण ही बातमी खोटी असल्याचे कळतें !

—रा. दामोदर मांवळाराम यंदे यांना साप्ताहिक इंदुप्रकाश पत्र त्यांच्या नवीन 'श्री शिवाजी' पत्रांत सामील करण्याचा अधिकार नाहीं, असा मुंबई हायकोर्टानें मनाई हुकूम काढला आहे.

वर्गणीदारांस विनंति

ज्यांच्याकडून अजून वर्गणीची फेड झाली नसेल, त्यांनीं ती तावडतोब करण्याची कृपा करावी. सगळीकडे वसूलदार पाठविणें शक्य नसल्यामुळें, वसूलदाराची वाट न पहातां टपालमार्गानें वर्गणी पाठविणें, हाच मार्ग उभयपक्षीं फायद्याचा आहे. खटल्याकडे तरी नजर पुरवून आमच्या विनंतीचा अनादर करूं नये, अशी आश्रयदात्यांस आमची अगत्याची सूचना आहे.

म. भारत.

काळजी कां करतां ?

तुह्मांस शालोपयोगी पुस्तकें पाहिजेत ना तर मग वेळ न करतां चला, व अनंत व्यं. शे. नावेलकर यांच्या दुकानांत आपणांस पाहिजे तीं शालोपयोगी पुस्तकें विकत घेऊन मुलास श्री रवळनाथ विद्याभुवन शाळेंत पाठवा.

विद्याप्रसारक फंड कमिटी–पोंगुर्वे

नवें वर्ष, नवें संकट

गामाच्या श्राद्धोत्सवाच्या गडबडींतच यंदांचे सालास प्रारंभ झाला. राष्ट्राच्या संसारांत प्रत्येक वर्ष कोणती तरी क्रांति घडवून आणीत असतें. ही क्रांति कमी अगर जास्त महत्वाची असणें, राष्ट्रीय विकासाला सानुकूल अगर प्रतिकूल असणें हें हरएक गोष्टीवर अवलंबून असतें. विशेषतः बद्ध राष्ट्रांचे बाबतींत, राजकारणाचे दृष्टीनें, नवें वर्ष क्रांतिकारक असणेंच जास्त संभवनीय असतें. ही एक गोष्ट लक्षांत आणली ह्मणजे हिंदु समाजावर नोकरशाहीची झालेली वक्रदृष्टि पाहून, फारसें भिऊन जाण्याचें कारण नाहीं. इतकें आधीं सांगून नोकरशाहीनें हिंदुसमाजाचे बाबतींत आंखलेल्या धोरणाची थोडीशी छाननी या लेखांत करूं.

हिंदुसमाजावर गेल्या पांच सहा वर्षांत, येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांची कृपादृष्टि होती, असें कांहीं ह्मणतात व तें एका दृष्टीनें खरेंहि आहे. एका दृष्टीनें ह्मटलें याचें कारण असें कीं, निरनिराळ्या राजकीय खात्यांत या शेवटल्या वर्षांत, बऱ्याच हिंदूंची झालेली नेमणूक ह्मणजे, खुद्द त्यांच्या लायकीचें तें एक सर्टिफिकीट जरी असलें, तरी 'प्रोव्हिंसिया' पत्राचे पोर्तुगीज संपादक यानीं आपल्या पत्राच्या गेल्या सालच्या एका अंकांत ह्मटल्याप्रमाणें, लायकी, विद्वत्ता किंवा इतर कोणतेहि स्पृहणीय गुण बाजूस ठेवून, वाटेल त्यांनांच सरकारी खात्यांत आम्हीं शिरकाव करूं असें जर बडे अधिकारी ह्मणते तर त्यानां कोणींहि कांहीं ह्मटलें नसतें व ह्मटल्यास त्याचा कांहीं उपयोग झाला नसता, हें पाहिजे तो सांगूं शकेल. कारण, ज्यांचे हातांत सत्ता तोच पारधी हें तत्व परतंत्र राष्ट्रांचे राजकारणांत जास्त भासमान होतें. ह्मणून हिंदूंचा नोकरशाहींत झालेला शिरकाव, युरोपियनांचा कल हिंदूंकडे होता ह्मणून झाला; एरवीं प्राप्त झालेलें थोडें फार महत्व दहा पंधरा वर्षांचे अवधींत त्यांना लाभतें ना, ही गोष्ट कबूल केली पाहिजे. पण, हिंदूसारख्या विधर्मीय, भिन्न संस्कृतीय लोकांबद्दल पोर्तुगीज प्रांतिक अधिकाऱ्यांनीं जी सहानुभूति दाखविली तिचें कारण काय ! हिंदु निर्बल तेव्हां त्याला सबल करावा, किंवा हिंदु राजकारणाला पारखा झालेला तेव्हां शक्यतर, त्याला राजकारणांत उच्चहीन कसलें तरी स्थान द्यावें. किंवा चार शतकांच्या दीर्घकालीन जुलुमानें गांजलेल्या हिंदूला सुखाचे शांततेचे दिवस दाखवावे, अशा हेतूनें निव्वळ हिंदूंच्या हिताकडे दृष्टि देऊन, पोर्तुगीझानीं त्याला हात दिला असें मानणें मात्र चुकीचें आहे. सरकारनें हिंदूंवर केलेली मोहबत ह्मणजे राजकारणांतील एक डावपेंच होय. याची साक्ष देण्यास प्रत्येक राष्ट्राचा इतिहास तयार आहे. शेजारच्या हिंदुस्थानांतील वरिष्ठ नोकरशाहीनें मवाळ पक्षाला जवळ केलें होतें तें कां ! आणि सध्या मुस-

भारत

Ano 9 N. 47

...feira 19 de Feveeriro de 192...

...SINATURA
...a ano tres rupias

...NUNCIOS
...inda que repetida uma tanga
... avulso uma tanga

...ECTOR E EDITOR
... Hegdo Dessay
...nepem-Goa

भारत.
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४७

गुरुवार ता. १९ फेब्रुवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें—गोवा

C... UMA MANIA

Recebemos o manifesto *Ao Paiz*, publicado pelos estudantes da Escola Médica de Nova Gôa e no qual os seus autores falam, alto e claro, explicando a sua atitude e repondo os factos no seu lugar.

Desnecessário é dizer que, se, dum lado, nos indignou imenso o cinismo com que o jornal europeu *A Provincia* desvirtuou a verdade do caso que narrou a seu sabor e... calor, imprimindo lhe, de caso pensado, uma feição, a seu modo, assaz comprometedora aos académicos envolvidos na questão, desanimou-nos muito, doutro lado, a sem-cerimónia com que a folha do sr. Batalha pretendeu, hipòcritamente, aromatisar com... *essencia estilistica* a nauseabunda e suja masmorra em que a Policia encarcerou alguns quasi formados medicos !

A indignação e o desanimo, eis o que nos causou, pois, a atitude ..., *jesuitica* de quem, por mal dos nossos pecados, se intitula, de mais a mais, *orgão do Partido Republicano Por Portuguez* na India.

Nunca supunhamos a *A Provincia* capaz duma tal desfaçatez, conquanto ela nos tivesse dado motivos para não nos fiarmos muito na lisura e sinceridade dos seus processos, como se viu no celeberrimo *Caso de Canvorem*, caso em que ao menos, havia a atenuante... do egoismo que o sr. Pereira Batalha julgou ferido.

No *Caso Dentinho Junior*, porêm, o procedimento de *A Provincia* não representa já um simples e inofensivo *truc*... do jogo politico. Vai mais para alêm. Ele significa, sem mais nem menos, um crime contra o qual o *Bharat* não pode deixar de protestar com a veemencia de que é capaz.

E' ainda cedo para a gente poder formar o seu juiso ditinitivo sobre os acontecimentos que tanto celebrisaram o *Caso Dentinho*, porquanto se não desvaneceu, ainda, de todo, a exacerbação que traz exaltados alguns espiritos. Logo que estes voltem á normalidade, pronunciar-nos-hemos sobre o mesmo assunto *commi il feaut*.

Entretanto fique registado nas colunas do *Bharat* o nosso protesto contra a criminosa atitude que o jornal *A Provincia* assumiu, pretendendo criar no espirito pùblico uma tremenda confusão em volta do mesmo *Caso*.

Tudo tem limites, ainda a mania de pregar...pêtas.

Agradecimento

O signatario agradece muito penhorado a quantos, solicitos e anciosos, procuraram conhecer a origam dos acontecimentos dos dias 15 e 16 do corrente, acontecimentos que em nada abonam a politica governativa do *Idalcão*, como se verá pelo seu sucinto relato que o signatario promete fazer e já.

Pode, entretanto, assegurar a todos que não se trata senão dum desses jogos politicos, baseado no *quero, posso* e *mando* e engendrado pelo dito *Idãlcão* à custa do pobre zé-pagante. Com a sua *arma* politica o *Idalcão* quiz amedronta-lo mas errou sériamento no alvo ...

Ele há *valentes*, a cada passo !...

Curchorem, 16—2—1925.

S. V. Dessai

ECOS & CRITICA

QUOT CAPITA TOT SENSUS

Referindo-se a' abstengao dalguns hindu's nos festejos do Centenario de Vasco da Gama, a *India Portuguesa*, de Majorda' formula as seguintes duas perguntas:

"Mas como se explica essa tendencia reactiva por parte desses (hindu's), mesmo poucos, e por forma tao espaventosa? Fosse esse Centenario uns 20 a 30 anos atraz daria se essa reacgao de maneira como teve lugar com o mesmo ousio e liberdade?"

¿Como se explica essa *tendencia reactiva*? E' boa a pergunta ! ¿Entao o reverendo colega anda ja' esquecido daquele capitulo da Historia de Goa, em que se registam episodios sensacionais da perseguigao fradesca contra os hindu's naturais deste *ditoso Pais sempre amado*? ¿Nao sabe a *India* o papel *terrorista* que a reacgao dos tonsurados exerceu em tempos que la' foram contra eles, privando os de seus *pagodes*, de suas fortunas e ainda de sua Patria,—*ad majorem Dei gloriam*?

E' muito engragada a segunda pergunta do catolico colega, catolico e logico.

Nao se daria essa reacgao de maneira como teve lugar com o mesmo ousio e liberdade, tanto se fosse esse Centenario uns 20 a 30 anos atraz, como se fosse uns 80 a 90 ditos, e'pocas em que, por toda a parte, dominava o poder absoluto das reverendas batinas.

¿Nao acha o colega que nao sao banais essas respostas, historicamente, politicamente e sociologicamente encaradas?

Em fim, *quot capita tot sensus* !

ESNECESSARIO

Pelo visto, a *India* de Majorda' pretende endireitar a *Politica Hindu'* preconisando lhe medidas e orientagao, esbogadas pelo sr. dr. Rau.

Ja' dissemas o que tinhamos a dizer sobre as consideragoes do ilustre magistrado. E' portanto, desnecessario responder a' critica do semanario majordense.

MAGISTER DIXIT ?

Referindo se ao incidente de abstengao do Centenario do Gama, a *Luz do Oriente* irradiou o seguinte *feixe* de raios:

"Mas numa terra em que a compreensao do dever e do civismo ja' desapareceram de ha muito, e onde o rigosijo duma classe considerou-se luto de outra, esta' bem de se ver, que tudo e' possivel, abstengao imprevidente e insensata pelas festas do Centenario de Vasco da Gama, como critica insensata e imprevidente censurando e condenandenando o mesmo facto."

Ha' raios luminosos que ofuscam a vista. Pelos que despediu a *Luz do Oriente* sobre o caso do Centenario, prova-se que tambem existem raios que ofuscam o entendimento.

O *Bharat* que nao e' muito forte na diplomacia politica, sobretudo na diplomacia politica que se relaciona com o estomago, ficou *zonzo*, como vulgarmente se diz, quando lhe bateu na retina a luz intensa dos raios luminosos da *Luz do Oriente*, secretariada pelo nosso distincto colega sr. Sitarama Quercar e nao menos distinto secretario da Camara Municipal de Ponda'.

Para no's que somos admiradores do *Gandhismo*, a politica nao e' uma arte de dissimular mas sim de *assimilar* ... a franquesa, o sentido que expressa a locugao *pa-p-a' santa justa*.

Que diabo? Nem tudo e' para todos nem a *Luz* e' para as *trevas* em que andamos a's cegas!

INTER DUOS LITIGANTES ...

Inter duos litigantes tertius gaudet, e' o que nos faz lembrar a contenda que vai accesa entre a INDIA de Margao e o ULTRAMAR da mesma vila.

Com a guerra civil que se esta' travando entre aqueles dois jornais no espagoso campo do Hospicio, quem esta' a lucrar e' a verdade. Tornam-se conhecidos da actualidade os episo'dios divertidos como o da bosta. Descobre se o mo'bil da ignobil campanha do ULTRAMAR contra o integro juiz sr. dr. Brito Santos. Numa palavra, gragas aos esforgos e estudos aturados da INDIA vai replandecen.

गोमंतकी भाषा

लेखांक २ रा.

श्रीयुत जोशी आपल्या ' मराठी शद्ब सिद्धि ' ह्या पुस्तकांत अपभ्रंश दोन प्रकारचे आहेत असें सांगतातः ' रूपापभ्रंश व व रूपार्थापभ्रंश. जेथें शद्बांचें रूप बदलतें पण अर्थ बदलत नाहीं तेथें तो रूपापभ्रंश जाणावाः जसें, सिंदूर,–शेंदूर, अमंगळ–ओंगळ इ०. जेथेंशद्बांच्या रूपांबरोबर त्यांच्या अर्थांतहि बदल होतो तेथें तो रूपार्थापभ्रंश जाणावा. जसें, आचमन–आंचवणें, अन्य–आणि इ० "

गोमंतकी भाषेंत कोणी कोणी ड चे ऐवजीं ण ची, ग चे जागीं क ची व द चे बदली न ची योजना करीत असतात; उदाहरणार्थ, मांड [दुकान] ह्याचा माण, कांदो (कांदा) ह्याचा कानो, उगड (उघड क्रि०) ह्याचा उकड असा उच्चार करण्यांत येतो. मांड हा शब्द मांडणें ह्यावरून तयार झाला ह्मणून उ चाच उच्चार कायम राहणें इष्ट आहे. बाराखडींतील आ ह्या स्वराचें चिन्ह ज्याला मराठींत (ा) असें ह्मणतात त्याचें गोमंतकींत कानो असें रूप झालें, हें अर्थ भिन्नत्व लक्ष्यांत येण्यासाठीं कांदो ह्याचें कानो असें रूपांतर होणें शक्य नाहीं. उकडणें ह्मणजे शिजविणें, हा शद्ब उघडण्याच्या क्रियेला लागू करणें ह्मणजे जरा चमत्कारिक आहे.

[illegible] शान नोंठिका [illegible] प्र[illegible]

हातीं [illegible] मराठी भाषेस अनुलक्षून श्रीयुत जोशी शब्द सिद्धींत ह्मणतात कीं, ' मुसलमानी अंमल झाल्यावर मराठींत पारशी व आरबी शब्द आले. त्यानंतर युरोपियन लोक इकडे आल्यावर पोर्तुगीज, फ्रेंच व इंग्लिश शब्दहि आले. त्याच प्रमाणें हिंदी, गुजराथी वगैरे देशभाषांतले शद्बहि मराठींत आढळतात. हीच स्थिति गोमंतकी भाषेची आहे. मराठी शिवाय इतर कांही भाषांमधून जे शद्ब गोमंतकींत घुसले त्यांतील थोडे खालीं देतों.

बंगालींतून

सांकव – बं. सांको ह्याचें रूपांतर (पूल)
हालवेकार – बं. हालुइकर (हलवाई)
भितर – बं. भितर (आंत, मध्यें)
बुन्याद – बं. बनियाद [पाया]
पोटली – बं. पोंटला [गांठोडें]
चलो – बं. छेले (मुलगा)
तेरीज – बं. तेरिज [बेरीज)
बेकार – बं. बेकार (रिकामा]
आराब – ब. आराव (शब्द, ध्वनि, ह्यावरून गोमंतकींत ताशाला नांव दिलें.]

गुजराथींतून

कुटको – गु. कटकरे, कुटको (तुकडा)
नळे – गु. नळिया (कौलें)
भेरो – गु. बेहेरो (बहिरा)
दिवली – गु. दिवी (समई)
पोरूं – गु. पोर (गुदस्तां)
तिसों – गु. तिरछुं (तिरवा)

कानडींतील

कॅप – का. कॅपु [माणिक लाल नांवाचें रत्न)
तुवक – का. तुबाकी (बंदूक)
कुत्रों – का. कुत्रेमर (डोलकाठी)
वरय – का. वरि, बरे, बरेषु (लिही)
हाऊ – का. हावु (साप. गोमंतकींत बागुलचा वाचक झाला.)
दुडू – का. दुड्ड (पैसा)
भांगर – का. भंगार (सोनें)
सांसव – का. सांसिव [राईह्म० मोहरी)
मोचे – का. मॅाच्चें (पायांतले जोडे)
मांव – का. माव (सासरा)
सांबार – का संभार (मसाला)

संस्कृतांतून

भोव – सं. बहु (फार)
आपय – सं. आव्हय (बोलाव)
निसण – सं. निःश्रेणि (शिडी)
सपण – सं. सोपान (जिन्याची पायरी)
हांव – सं. अहम् (मी)
पूत – सं. पुत्रक (मुलगा)
मानांय – सं. मानव (मनुष्य व ह्यावरून मजुरास लागू झाला)
राजू – सं. रज्जु (विहिरीचा दोर)
वच – व्रज (जा)

फिरंगीमधून

चावी – फि. शावि (किल्ली)
आरमार – फि. अर्मारियु (कपाट)
रेगादोर – फि. रेगादोर (हजारा, फुलझाडांस पाणी घालण्याचें बारीक छिद्रांचें पात्र)
वल्ल – फि. बार्रील (मध्यम प्रकारचें पीप]
बुयांव – फि. बुयांव [वरणी [
जनेल – फि. ज्यानेल [खिडकी]
[illegible] – फि. [illegible]
कलियाद – फि. कादियादु [तालें]
बिरव – फि. ब्रेव [डामर, डांबर]
खांप्री – फि. काफ्रि [शिद्दी]
बंदेर – फि. बांदेर [बावटा [

इंग्रजींतून

बोत्ल – इं बाट्ल (बाटली)
पाकीट – इं. पॅकेट (पिशवी. ह्याची हॅंडबॅग किंवा पैशांची पिशवी ह्याकडे योजना झाली]
टाइप – इं. टाइप् (छापण्याचे खिळे]
नोट – इं. नोट [कागदी नाणें]
तिफीण – इं टिफ्फिन [फराळ उपहार फिरंगी लोकांत न्याहारी व दुपारचें जेवण ह्याच्या मधल्यावेळचा उपहार)
रूळ – इं. रूल [नियम, गोल आंखणी]
मार्क – इं. मार्क [गुण ह्म. परीक्षेंतील वगैरे मार्क.]
मार्किट – इं मार्केट (बाजार]
मास्तर – इ, मास्टर [शिक्षक]
पोष्ट – इं. पोष्ट [टपाल ऑफिस. क्वचित रूढींत आहे.]

ह्यांशिवाय रजिष्टर, प्रेस, पेन्सील, स्लेट, फी, बूक, पास इ० शब्दहि प्रचारांत अहेत. रजिस्टर, ऑगस्ट, पोस्ट ह्यांचे जागीं रजिष्टर, ऑगष्ट, पोष्ट असें लिहिण्याविषयीं श्री. रामचंद्र भिकाजी जोशी ह्यांचें मत आहे.

गोमंतकी भाषा स्वतंत्र कीं परतंत्र हा विचार येथें कर्तव्य नाहीं. ह्या भाषेचा मराठीशीं निकट संबंध आहे एवढें खरें. प्रत्येक भाषेंत अन्य भाषांमधील शब्द समुच्चय असतोच. खरी व्युत्पत्ति पाहूं गेल्यास दीर्घ काल परिशीलन करावें लागेल. बंगाली भाषेंत वगैरे कांहीं पोर्तुगीज शब्द मला आढळले तेः

बंगाली

आलपिन – पो. आलफिनेति [धातूची टांचणी]
केदारा – कादेर [खुर्ची]
आस्ताबल – पो. इस्ताबुलु [गोठा]
वरंड – पो. वारांद [ओसरी, पडवी].
रसिद – पो. रेसिबु [पावती]
कामीज – पो. कामीज [खमीस, शर्ट]
जानाला – पो. ज्यानेल [खिडकी]
आलमारी – पो. आर्मारियु (कपाट)
काकातुया – पो. काकातूअ (पोपटाच्या वर्गांतील एक पक्षी. मलाया भाषेतील मूळ शब्द काकाऊ]

मराठी

कडाबीन – पो. काराबीन, क्लाबीन [एकप्रकारची आंखूड बंदूक]
बिजागरी – पो. बिजाग्र [साधेपट्टी]
पगार – पो. पागार क्रि. फारीग करणे ह्यावरून [मुशाहिरा]
चावी – पो. शावि (किल्ली)
जुगार – पो ज्युगार क्रि. खेळणे [द्यूत)
पिस्तूल – पो. पिश्तोल (एका हातांत धरून उडविण्याची फार लहान बंदूक)
तिजोरी – पो. तिजौरु (खजिना)
लिलांव – पो. लैलांव (हराजी)
सावण – पो. साबांव (साबू]
परात – पो. प्रातु (मोठें ताट)
आरमार – पो. आर्माद [लढाऊ जहाजांचा [illegible]]
पत्राज – पो. पातारोत (डौल, दिमाख)
बाल्दी – पो. बालदि (पोहरा)

बटाटा हा मूळ स्पॅनिश शब्द पातात यावरून, इंग्रजींत पोटेटो व पोर्तुगीज मध्यें बातात असा झाला. संत्रा, तुरुंग, टोपी, गटार, लिंबू, ह्या शब्दांचा उगम पोर्तुगीजवरून अशी किती एकांची समजूत आहे ती निराधार होय. स्पॅनिशमध्यें नाज्या [Naja] हें एका जातीच्या सर्पाला नांव असून स्पॅनिशद्वारें पोर्तुगीजमध्यें नाज्य [Naja] असें रूढ झालें. ह्याची संस्कृतांतील नाग ह्या शब्दाशीं तुलना केली तर सुयुक्तिक होणार नाहीं. संस्कृतांत अग्रेसर ह्म. पुढारी आणि पोर्तुगीजमध्यें आग्रेसोर ह्म. हल्ला करणारा अंगावर जाणारा असा अर्थ होतो. ह्या सादृश्यावरून परस्परसंबंध जुळविण्यांत अर्थ नाहीं. पुरावा हा लातीन प्रोवा ह्यावरून उत्पन्न झाला. पोर्तुगीज प्रोव.

गटार हा फ्रेंच मधील गुतिये ह्यावरून इंग्रजींत गटर ह्या रूपानें शिरला. लिंबू हा आरबी आणि फारशी लिमन ह्यावरून तयार झाला. टोपी हा टोप ह्याचा लघुत्वदर्शक शब्द असावा. संत्रा आणि तुरुंग हे शब्द कोठून आले ह्याचा मला उलगडा होत नाहीं.

संस्कृतांतील पोर्तुगीजमध्यें तसेंच इंग्रजींतील पोर्तुगीजमध्यें व पोर्तुगीज मधील इंग्रजींत देखील फार कमी प्रमाणानें शब्द सांपडतात.

श्रीयुत गुंजीकर सरस्वतीमंडळ ह्या पुस्तकांत लिहितातः

'गोमंतकी भाषा ही बहुतकरून प्राचीन सरस्वती भाषेचें रूपांतर होऊन आलेली असावी असें दिसतें. प्राचीन बालभाषेशीं हिचें साम्य पुष्कळ आहे. आणि सांप्रतची मराठी भाषाहि बालभाषेपासूनच आलेली असल्यामुळें या दोहोंचा बराच निकट संबंध आहे. तशांत पुनः ही भाषा मराठीच्या संनिध असल्यामुळें सांप्रत प्रायः मराठीच्या अनुषंगानेंच वागते असें ह्मणण्यास कांहीं बाध नाहीं.'

श्रीयुत जोशांच्या प्रौढबोध व्याकरणांत व मराठी शब्दसिद्धींत पुढील माहिती मिळतेः

'सांप्रत पुणें, मुंबई, वगैरे प्रांतांत प्रमुख लोक ज्या मराठी भाषेंत बोलतात आणि लेखन व्यवहार चालवितात ती मुख्य मराठी आणि चितपावनी, परभी, कोंकणी, मालवणी, गोमंतकी, वऱ्हाडी, नागपुरी, खानदेशी, वगैरे हे तिचे प्रकार.' प्रौ. व्या.

'पश्चिमेकडे सिंध–पंजाब पासून पूर्वेकडे आसाम – कटकपर्यंत, आणि उत्तरेकडे काश्मीर–नेपाळपासून दक्षिणेकडे गोदावरीपर्यंत, एवढा जो विस्तृत देश, त्या ठिकाणीं आर्यांनीं वसती केली. या सर्वांची मुख्यतः भाषा एक होती, तरी तिच्या स्थानिक शाखा निरनिराळ्या होत्या. प्रथमतः त्यांमध्यें परस्पर असणारा भेद, कोंकणी मराठी, देशी मराठी, गोमंतकी, मालवणी, कोल्हापुरी [illegible] वऱ्हाडी यांमध्यें आहे, [illegible] थोडा [illegible] रीची कायदे [illegible] वाढत जाऊन, सांप्रत जशी मराठी, गुजराथी, बंगाली, हिंदी, अशा भाषा स्थलांतरानें व कालांतरानें झाल्या आहेत, तशाच त्यावेळीं आर्यांच्या अनेक भाषा असाव्या.'

'कोंकणांत गोमंतकी, कोंकणी, मालवणी चित्तपावनी, कऱ्हाडी, परभी अशा मुख्य मुख्य जुन्या उपभाषा असून त्यांमध्यें सांप्रतच्या प्रौढ मराठीच्या अगोदरचें स्वरूप आढळून येतें, आणि त्यांचा मराठी भाषेच्या जुन्या इतिहासाचा छडा लावण्यास फार उपयोग होतो.' म. श.

श्री. रामचंद्र भिकाजी गुंजीकर व रामचंद्र भिकाजी जोशी ह्यांचे ग्रंथ डोक्यास श्रम देऊन व खोल विचार करून लिहिलेले आहेत असें सकृतदर्शनीं दिसून येतें. केवळ पैसे मिळविण्याच्या हेतूनें उतावीळ करून झरझर लिपीनें भारदस्त नावें देऊन कांहींतरी आपटाआपट केलेली नाहीं असें मला वाटतें.

गोमंतकी आणि कोंकणी ह्या भाषा भिन्न नव्हत असें कोणास वाटत असल्यास वादविवाद करण्याची माझी हौस नाहीं, किंबहुना तेवढें ज्ञान माझ्यांत सांठलेलें नाहीं. तथापि, इंग्रजी हिंदुस्थानांतील तत्संबंधिक तज्ज्ञ विद्वानांचें मत मला ग्राह्य आहे. सवडीप्रमाणें " नोटेशन " हा लेख लिहीन.

डि० फं० ४ आणे. सारस्वत.

भा र त

मिति माघ व० ११ श्री शके १८४६

राजनीतीचें एक तत्व

कौर्म संकोचमास्थाय प्रहारमपि मर्षयेत् ।
प्राप्तकालेपु नीतिज्ञ उत्तिष्ठेत्क्रूर सर्पवत ॥
॥ पंचतत्रम् ॥

पोलीस आणि मिलिटरी खातें किती आडदांड, अडाणी अशिक्षित आणि अज्ञानी असतें हें विशेष स्पष्ट करून सांगण्याचें कारण नाहीं. अशाचे हातीं विशेष अधिकार सोंपविले ह्मणजे मग विचाराव यासच नको ! आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला अशी स्थिति व्हावयाला उशीर नको. कोणी कोणी त्याच्याकडे फिर्यादीस आले तर कोणाची शेंडीच काप, तर कोणाच्या भिवयाचेंच वाटोळें कर, तर कोणाच्या एका बाजूच्या मिशाच उतर तर कोणाला मरेपर्यंत मार तर कोणाला दिवसाचे दिवस उपवाशीं कैदेंत ठेव, असे चाळे हे आपल्या स्वभावानुसार करीत असतात. ज्याना सारासार विचार नाहीं, कायदा कशाशीं खातात याचें तारतम्य ज्ञान नाहीं अशांच्या हातीं हें एक अधिकाराचें नवें कोलीत आमच्या सरकारनें दिलें आहे. आणि त्याचा परिणाम जसा व्हावयाचा त्याचीं पूर्वचिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं आहेत.

अगोदरच सरकारच्या अजाण व्यवस्थेमुळें लोक हवालदील बनले आहेत. त्यांतच ही एक भर पडली. याचें पर्यावसान कोठपर्यंत होईल हें जरी आज निश्चित सागतां येत नाहीं तरी अशा प्रकारच्या आघातांना प्रत्याघात केव्हां तरी मिळतील हें निश्चित आहे. गोमांतकीय लोकांची अजून अनुकूल वेळ आलेली नाहीं. राष्ट्रीय वारें त्यांच्या अंगांत अजून शिरलेलें नाहीं, हे काय घोंटाळे उडत आहेत, याच्या मुळाशीं त्यांनी पाहिलेलें नाहीं. किंबहुना अशा बाबतींत ते उदासीनतेच्या गुंगींत असल्यामुळें त्याचा तिकडे कानाडोळा झालेला आहे. यावरून सरकार जर मनांत मांडे खात असेल तर खुशाल खावो बापडें ! पण या उदासीनतेचें रूपांतर क्रमाक्रमानें असंतोषांत, द्वेषांत व शेवटीं बंडांत होणार नाहीं अशी खात्री मात्र त्यानें बाळगूं नये. एका परीनें सरकार करीत आहे तें ठीकच आहे. कारण मनुष्य स्वभाव जात्या जिज्ञासावान आणि अनुकरणप्रीय असल्यामुळें सरकारचेंच कां होईना पण अनुकरण होईल आणि 'टोल्यास ठोला' याच्या ऐवजीं 'टोल्यास टोला' अशी खरी प्रतिकृति घडेल.

बंडखोरा, बंड खोर बना असें कांहीं आह्मी लोकानां सांगत नाहीं. सरकार व अधिकारी वर्ग नोकरशाहीच्या रूपानें कसें वागत आहे, राष्ट्राच्या हिताहिताकडे कसें लक्ष्य देत नाहीं, आपण व आपले जातभाई याविषयीं कसें तत्पर असतें, त्यांच्या या तुंबडी भरणीच्या कामीं कायद्याचें उल्लंघन झालें तरी त्यानां शिक्षा न होतां त्याचें कौतुक कसें केलें जातें, उलटपक्षीं राष्ट्राच्या हिताच्या गोष्टी प्रजेच्या मनांत वावरत असल्यास त्यास अडथळे कसे येतात, हें आह्मीं वरचेवर सांगत आलों आहोंत. स्वार्थ साधणें हें त्यांतलें तत्व आहे आणि तें साधतानां राष्ट्राचें अधःपतन झालें, प्रजेचें नुकसान झालें, हाल झाले, काय याच्या ठिकाणीं जुलुमाचें वस्तान बसलें, न्यायाचें अधिष्टान दडपशाहीनें पत्करलें आणि नीतीच्या भागांत अवदशा थैमान घालूं लागली तरी त्याची परवा करूं नये हा त्याचा मतितार्थ आहे. अशा प्रकारें वागलें असतां तो, नीच, दुष्ट, दरोडेखोर, बंडखोर बनत नसून, कायदा, न्याय आणि सद्सद्विवेकबुद्धि यांच्या कचाट्यांत सांपडत नाहीं हें सरकारनें स्वतःच्या वागणुकीनें प्रयोगसिद्ध उदाहरण घालून दिलेलें आहे.

शरीरसौख्य, चैन, व निरनिराळे उपभोग भोगण्याच्या इच्छेनें वासनारूपी प्रकृतीच्या पूर्ण आधीन होऊन निवळ नेभळट बनलेल्या गोवा प्रांतीय लोकांनां सरकारचें उक्त प्रकारचें धोरण नेभळटपणा घालून परावृत्त करूं शकत नाहीं काय ? यांचा स्वाभिमान, देशाभिमान, राष्ट्रप्रेम; मातृभूभक्ति, वीरत्व, पौरुषत्व यानां खळबळून सोडण्यासाठीं उपरोक्त कृत्यांच्या अंकुशाच्या टोंचण्या, बोंचण्या मारे पुरेसे होत नाहींत काय ? बंडखोर बनावें असें आमचें ह्मणणें नाहीं पण सरकार तिकडे लक्ष देऊन प्रसंगानुसार उच्च मनोभावनांना चलन दिलें पाहिजे. असें करितांना राजनीतीचें मात्र एक तत्व लक्षात ठेविलें पाहिजे आणि तें या लेखाच्या शिरोभागींच दिलें आहे. प्राप्तकालेषु नीतिज्ञ उत्तिष्टेत्क्रूर सर्पवत्

स्फुट विचार

नोकरशाहीची भेदनीति :— 'फोडा व झोडा (divide and rule) ह्या एकाच चाणाक्य नीतींतील अजिंक्य शस्त्ररूपी रामबाण या उपायावर ब्रिटिश सरकारानें हिंदुस्थानचें साम्राज्य सिंहासन पटकाविलें; आज जवळ जवळ दीडशें वर्षें आपल्या हातांत टिकविलें व पुढेंहि अनंत कालपर्यंत तें तसेंच कायम राखावयाचा त्यांचा फुशारकीवजा इरादा आहे. शिंद्यांनां उचलून होळकरांवर मार, भोसल्याना धरून पेशव्यांवर आपट, पेशव्यांना धरून शिंद्यांना झोडप, मराठ्यांना उचलून टिपूवर मार, असा गनिमी कावा लढवूनच इंग्रजानीं हिंदवी पातशाही व मुसलमानी बादशाही पादाक्रांत केली असल्याची साक्ष देण्यास इतिहास तयार आहे. सध्याहि वेळेचें महत्व जाणून त्यांनीं पुन्हां एकदां त्या धोरणाचा अंगिकार केला आहे. एकीकडे हिंदुविरुद्ध मुसलमानांना फुसलावणी दे, तर दुसरीकडे ब्राह्मणांवर चढ करण्याला नोकरीचें आमीष दाखवून ब्राह्मणेतरांना फितूर कर, असा दुहेरी डाव खेळून काँग्रेसवर कशी तरी कुरघोडी करण्याची नोकरशाही सध्या खटपट करीत आहे.

तिचा आह्मांवर होणारा परिणामः— ब्रिटिश सरकारचें आमच्याशीं असलेलें वर्तन कसें दुटप्पी धोरणाचें आहे, व त्यांत त्यांचा अंतिम उद्देश काय आहे, ह्याचा पुरता उमज न पडल्यामुळें आमच्यांतील कांहीं सुशिक्षितांची होत असलेली दिशाभूल पाहून कोणासहि त्यांची कींवच करावीशी वाटेल. कोंबडीं झुंजविण्याच्या उद्देशानें ब्रिटिश सरकारानें आह्मांपुढें टांकलेल्या चार दाण्यांस लालचावून बसून ह्या बहाद्दरांनीं माजविलेला जातवार प्रतिनिधित्वाचा लढा दिवसें दिवस विकोपास जात असून त्याचीं कडु फळें चाखण्याचा प्रसंग आह्मांवर आज गुजरला आहे. संघटित राष्ट्रकार्यावरील दृष्टि 'केवळ ज्ञातिहित पहाण्याइतकी' आकुंचित केल्यामुळें पंजाब व बंगाल ह्या दोन प्रांतांत तर नुसतीं रणें माजून राहिलीं आहेत. मद्रास इलाख्यांत व आमच्या महाराष्ट्रांत जोरानें चालू असलेल्या ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाकडे पाहिलें ह्मणजे 'नकोत त्या दिवाणगिऱ्या' 'नकोत तीं कौन्सिलें' व 'नकोत त्या सरकारी नोकऱ्या' असेच उद्वेगपूर्ण उद्गार प्रत्येक समंजस विवेचकाच्या तोंडांतून कळत नकळत बाहेर पडतील हें निर्विवाद आहे.

महात्माजी व जातवार प्रतिनिधित्वः— हा किळसवाणा प्रकार बंद पडावा व राष्ट्रकार्याचा गाडा अनत्याचार पथावरून सुरळीत चालूं लागावा एवढ्यासाठींच महात्माजीनीं नोकरशाहीशीं झगडण्याचें तूर्त तहकूब ठेवून 'राष्ट्रीय ऐक्याची' 'पाठपुरवणी, करण्याचें कार्य सध्या आरंभिलें आहे. दिल्लीस भरलेल्या सर्वपक्षीय ऐक्य कमिटीनें निवडलेल्या पोट कमिटीकडे हा जातवार प्रतिनिधित्वाचा प्रश्न निकालासाठीं सोंपविला आहे व ठरल्याप्रमाणें तीनें आपला रिपोर्ट परवांचे दिवशीं सादरा केलाच असेल, पण ह्या महत्वपूर्ण विषयावर महात्माजीनीं आपलें खालील स्वतंत्र मत प्रसिद्ध केलें आहे. ते ह्मणतातः "तत्वतः जातवार प्रतिनिधित्वास जरी माझा अंतःकरणपूर्वक विरोध असला तरी दोन्ही परस्पर विरुद्ध पक्षांस भूषणावह व शांततेस बाध न आणणारें असें जें कांहीं ठरविलें जाईल त्याला माझी पूर्ण संमति आहे" पहा ! महात्माजींच्या अनत्याचारी चळवळीस 'बंडखोरी' समजणाऱ्या गोमांतकीय ख्रिस्ती महात्म्यांनो ! असहकारिता किती शांतताप्रधान आहे ती जरा डोळे उघडून पहा ! व मग सांगा कीं महात्मा गांधींस गोमांतकांत येऊं दिल्यास, हिंदूंत अराजकता प्रसार पावेल अशी आपण केलेली हाकाटी निष्फळ होती कीं नव्हती !

वर्तमानसार

—पेडणें महालांतील मोरजी गांवांत स्थापन झालेल्या 'विद्याप्रसारक समाजा"च्या श्री सरस्वती मंदिराच्या इमारतीचा पाया वे. मू. रा. रा. श्रीपाद बाळंभट मणेरीकर यांच्या हस्तें शुक्रवार तारीख ५–१२–१९२४ रोजीं बसविण्यांत आला. त्याचवेळीं वे. मू. गणेश केशव कऱ्हाडकर यांच्या अध्यक्षतेखालीं समाजाच्या कामगिरीबद्दल सदर शाळेचे हेडमास्तर एस्. व्ही. राव यांचें व प्राथमिक शिक्षणापासून फायदे यावर फट्टे अ. कामत मास्तर यांचें भाषण झालें. नंतर सदर शाळेचे शिक्षक गो. रा. परकीकृत गाणीं व संवाद मुलांनीं ह्मणून दाखविल्यावर अध्यक्षांनीं ह्या संस्थेनें अवघ्या ३ महिन्यांत इमारत बांधण्याचें धाडस केल्याबद्दल मोरजींतील सर्व मंडळीचें अभिनंदन केलें. शेवटीं रा. रा. नारायण बुरये यांनीं अध्यक्ष व शिक्षक यांचे आभार मानिले. सध्या या शाळेंत २०० मुलें मराठी ५ व्या इयत्तेचें शिक्षण घेत आहेत. लवकरच इमारत फंडाकरितां व कायम फंडाकरितां गोव्यांतील उदार धनिक लोकांकडे व शिक्षणप्रेमी गृहस्थांकडे संस्थेचें कार्यकारी मंडळ आश्रयार्थ निघणार आहेत, इत्यादि जगन्नाथ लक्ष्मण सामंत हे कळवितात.

—येत्या अंकीं 'विवाह' लेख मालेचा पांचवा लेखांक प्रसिद्ध होईल.

—लॉर्ड रेडिंग नंतर हिंदुस्थानच्या व्हाइसरॉयच्या जागीं बंगाल गव्हर्नर लॉर्ड लिटन ह्यांची नेमणूक होणार असल्याचें 'व्हाईस ऑफ इंडिया' ह्मणतो.

—क्रोनिकल पत्राचे माजी संपादक बी. जी. हॉर्निमन ह्यांना झालेली हद्दपारीची कायदे बाह्य शिक्षा रद्द करावी असा ठराव बॉंबे लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें डॉ० वेलकर आणणार आहेत.

—आपण विनंति केल्याप्रमाणें एक वर्ष सोडून चार वर्षें आह्मीं आपली चळवळ बंद ठेवून असहकारितेच्या यशस्वितेकडे आपली आशादृष्टि रोंखली; पण आपण सुरू केलेल्या चळवळीनें नोकरशाहींत कांहींच फेरबदल न झाल्याचें दिसून आल्यामुळें पुन्हां क्रांतिकारक चळवळ हातांत घेणें आह्मांस अपरिहार्य झालें आहे, अशा अर्थाचें एका क्रांतिकारकाचें महात्माजींस गेलेलें पत्र त्यांनीं आपल्या 'यंग इंडियांत, प्रसिद्ध केलें आहे.

—गेल्या ता. ९ रोजीं दिल्लीस स्वराज्य पक्षाची सभा भरून दिवाणांचा पगार ४००० रुपयांपर्यंत असावा असें तिनें ठरविलें आहे.

—कुडाळ [रत्नागिरी] जवळील डीगस गांवीं भुताटकीचे विलक्षण प्रकार चालू झाले आहेत.

—बरद्वानच्या महाराजांनीं लाहोरच्या सनातन धर्म कॉलेजला १२ हजार रु. देणगी दिली.

—सैबेरियांत एक नवीन सोन्याची खाण सांपडली आहे.

—'इंस्तितुत वास्कु दा गाम' या नांवाची एक संस्था गामस्मारकानिमित्त स्थापन करण्यांत आली असून, तींत केवळ पाश्चात्य संस्कृतीच्याच पुरस्कर्त्यांचा समावेश होणार आहे.

—बेतींहून ह्मापशें येथें जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला एका हिंदूचें प्रेत बरेच दिवस पडून राहिलें होतें, अशी एक बातमी पणजीच्या उ येराल्दांत प्रसिद्ध झाली आहे.

Quinta-

...ulim por apenso aos de acção do processo especial do Decreto de 28 de Março de 1905 que o dito Tucobá moveu a referida Rucmiuim para pagamento da quantia de 346:08:02 proviniente do capital, juros penas e custas liquidados nos referidos autos de acção e de custas e selos acrescidos da execuçáo. O arrematante pagará a contribuição de registo por inteiro e as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias Por este são citados quaisquer credores e co-proprietarios O que para ser publico se espediu este.

Xeldem 8 de Abril de 1924

O escrivão do 2° oficio encarregado de 1°

Aires Manuel Barreto
¿Como, quando e em que o "Bharat" foi desapontado pelo sr. Governador Geral nao nos dira'?

Quanto a' lo'gica, leia o reverendo o nosso artigo de fundo da presente edigao.

GENERALIDADES IRRITANTES

Sentado em Lisboa, o sr: dr. C. Mascarenhas, todo empertigado na sua casaca e luva branca, atira-se com a sua furia de 500 anos de ocidentalisado contra os "ecos" dum artigo que dois amigos seus deram causa a um *chinfrim* da parte da imprensa indo-portuguesa. Fes mal o sr. dr. Constancio de nao ler o artigo dos amigos e de se adeantar fazendo consideragoes de toda especie numas generalidades, num criterio onde ha' absoluta falta de conhecimento de tudo que se relaciona com o grande movimento que esta' a convulsionar a India e prender atengoes de todas cabegas pensantes do mundo!

Apo's um preambulo ligeiro sobre o "eco" do artigo em questao diz o ilustre articulista: "sao pessoas que vivem uma vida que vale por si so' o desmentido formal do nacionalismo indiano: nao vestem *swadeshis*, nao usam o *gandhi cap*, nao se perfumam com *zaios*, e interpretam os mestres da musica europeia."

Em levar uma vida pacata, porque todos nao dispoem de meios, nao importa desmentir o sentimento duma alma que anceia por ver livre o solo sagrado da sua patria; e nem e' necessario usar fatos *swadeshis*, e o *gandhi cap* para se manifestarem pelo nacionalismo indio, pois antes destes factos, havia indios francamente defendendo as ideas liberais duma India livre!

Numa ingenuidade unica cita o sr. dr. Mascarenhas Romain Rolland e varios outros autores europeus que tem tratado do assunto, dando causa a "desencontradas opinioes."

Nao sabemos porque ocultou os nomes doutros autores e nao cita as suas opinioes, distringando-as, dando a cada um da sua justiga e tirando a conclusao lo'gica dos livros de Rolland e doutros que afirma ter lido.

Neste caso haviamos de ver como e' que influiram estes livros no grande numero de rapazes da India, que se encontram em Portugal" andando pelas ruas, gesticulando e falando o concanim!

Com a responsabilidade dos diplomas que o sr. dr. acarreta tinhamos di-

विचार-लहरी

लहर १० वी.

मागील लहरींत सांगितल्याप्रमाणें दार्शनिक काळाकडे वळूं. या काळांत श्रेष्ठ असे तिघे दार्शनिक उत्पन्न झाले. ते कपिल, महावीर व बुद्ध हे होत.

\+ + +

सांख्य मताचे प्रस्थापक कपिल हे होत. गौतमबुद्ध व कपिल हे एकाच शहरांत जन्माला आले. परंतु गौतम बुद्धाचा काळ कपिलानंतर शंभर वर्षांचा होय. आद्य दर्शनकार या नात्यानें कपिलांची योग्यता फार मोठी आहे. आणि ह्मणूनच भागवतामध्यें त्यांना अवतार असें ह्मटलेलें आहे. सांख्यशास्त्राची योग्यता इतकी मोठी आहे कीं, महा भारतामध्यें नारद ऋषींनीं दक्ष प्रजापतींच्या मुलांना सांख्य शास्त्राचें अध्ययन करण्यास सांगितलें आहे. सांख्य मत निरीश्वर वादी आहे. इतर बहुतेक सर्व धर्म अगर पंथ ज्या एका सर्वशक्तिमान ईश्वराचें अस्तित्व मानतात अगर ज्या शक्तीच्या योगें हें विश्व चालतेंअसें समजतात, तें मत कपिलांना मान्य नाहीं. हें विश्व चालविण्याला एका सर्व शक्तिमान परमेश्वराची जरूरी आहे असें त्यांना वाटत नाहीं. ते ह्मणतात:—

\+ * +

प्रकृति व पुरुष ह्या दोनच सद्वस्तु होत. पुरुष ह्मणजे आत्मा. हा निर्विकार आणि निष्क्रीय असा असून फक्त साक्षी असतो. जगांत ज्या घडामोडी होतात त्या प्रकृतीच्याच योगें होत. प्रकृतीच हे सर्व खेळ खेळण्याला समर्थ आहे. प्रकृतीमध्यें सत्व, रज, आणि तम हे गुण ज्यावेळीं सारखे असतात त्या वेळीं ती साम्यामध्यें असते व यांत जेव्हां बिघाड होऊं लागतो तेव्हां प्रकृति आपले खेळ खेळण्याला सुरवात करते. आत्म्याचें मात्र तसें नाहीं. तो केवळ साक्षी असतो. प्रकृतीची गांठ पडली ह्मणजे आत्म्याचें शुद्ध आणि निर्विकार स्वरूप मूळ स्वरूपापासून भिन्न होतें. आत्म्याला जें दुःख भोगावें लागतें तें प्रकृतीच्या संगतीमुळें होय. हिच्यापासून मुक्त होण्याची तयारी करणें ह्मणजेच पूर्व स्वरूपास जाऊन मिळणें होय.

* * *

ह्यावरून कपिलमुनीचें मत काय आहे हें कळून येईलच. त्यांच्या मतें ह्या विश्वचालनाला सर्व शक्तिमान परमेश्वराची गरज नाहीं. हें करण्याला प्रकृतीच समर्थ आहे आम्हीं अगर इतर बहुजन समाज ज्या एका सर्व शक्तिमान परमेश्वराचें अस्तित्व मानतों तें मत त्यांना बिलकूल पसंत नाहीं. ते ह्मणतात परमेश्वर मुक्त स्थितींत असला पाहिजे. तरी अशा मुक्त स्थितींत असलेल्या परमेश्वराला तेथें त्या स्थितींत कोणत्याहि तऱ्हेच्या इच्छा उत्पन्न होणें शक्य नाहीं. असें जर आहे तर त्यानें हे विश्व विनाकारण कां उत्पन्न करावें?

\+ + +

अशा ईश्वराचें अस्तित्व जरी कपिलमुनी मानीत नसले तरी पण ते दुसऱ्या एका परमेश्वराचें अस्तित्व मानतात. ते द्वैतवादी आहेत. त्यांच्यामतें पुरुष अनंत आहेत व प्रत्येक आत्मा आपापल्यापरी मुक्तावस्थेस जाण्याचा प्रयत्न करीत आहे. यावरून जो आत्मा मुक्त होतो तो त्याची इच्छा असल्यास नव्या कल्पाच्या वेळीं सर्वज्ञ असा रूपानें अवतीर्ण होतो व त्या कल्पापुरतें विश्व नियमनाचें कार्य त्याच्याकडे येतें.यावरून कोणत्याहि मनुष्याला मुक्त स्थितींत पोंचल्यावर परमेश्वर होतां येतें मात्र हें परमेश्वरत्व चिरकाल टिकणारें नाहीं असें कपिलाचें ह्मणणें आहे. प्रत्येक पुरुषाला मुक्त होण्याचा मार्ग ह्मणजे चांगलीं कर्मे व ज्ञान हीं होत.

\+ + +

आतां गौतम बुद्ध काय ह्मणतात तें पाहूं. बौद्धधर्म ईश्वरवादी कीं निरीश्वरवादी याबद्दल बरेच मतभेद आहेत व अद्यापपर्यंत या वादाचा पक्का निर्णय लागलेला नाहीं. याचें कारण त्या धर्माचे संस्थापक जे गौतमबुद्ध त्यांनीं आपल्या हयातींत या बद्दलचा पक्का निर्णय दिलेला नाहीं. जेव्हां जेव्हां त्यांना याबद्दल प्रश्न करण्यांत येई तेव्हां तेव्हां ते बहुतकरून संदिग्ध अशीं उत्तरें देत व कधीं कधीं मुग्धता स्वीकारीत बाबू सत्येंदनाथ टागोर हे आपल्या 'बौद्धधर्म' या पुस्तकांत ह्मणतात. जीवात्मा, परमात्मा, सृष्टि, परकाल याविषयीं मानव हृदयांत ज्या स्वभावताच शंका उत्पन्न होतात त्यांना बौद्धधर्म शास्त्रामध्यें संतोषजनक असें कोणतेंच उत्तर नाहीं. याचे कारण बुद्ध देव हे सर्व प्रश्नाचीं उत्तरें देण्याला संकोच धरीत असत.

\+ + +

एकदां त्यांना मालुंख्यपुत्र नावांच्या एका शिष्यानें याविषयीं उपदेश करण्याबद्दल विनंति केली असतां ते ह्मणाले:— मालुंख्यपुत्र तूं शिष्य झालास तर या प्रश्नाचीं उत्तरें देईन असें आपणाला कधीं सांगितलें होतें काय? त्यानीं नाहीं असें उत्तर दिलें. त्यानंतर बुद्धदेव ह्मणाले. हे मालुंख्य पुत्र, आपण रोगानें पीडित होऊन औषधाकरतां माझेकडे आलां आहां, करतां आपणाला आरोग्यदायी औषध मी सांगितलेलें आहे, मी जें प्रकाशित करूं इच्छित नाहीं तें तसेच ठेवा व जें व्यक्त केलें आहे तें प्रकाशित करा.

\+ * +

या त्यांच्या मुग्धतेमुळें त्याचें खरें मत काय याबद्दल पुष्कळांना कोडें पडलेलें आहे. बौद्धाचा मिलिंद प्रश्न या नावांचा एक ग्रंथ आहे त्यांत यवनराजा मिलिंद व बौद्ध पंडित नागसेन यां यामध्यें झालेला संवाद वर्णन केलेला आहे. त्या यवन राजानेंहि याबद्दल जेव्हां त्या बौद्ध पंडिताला प्रश्न केला त्यावेळीं त्यानें असें उत्तर दिलें कीं, अशा प्रश्नांना निरुत्तर रहाणें हेंच उत्तर होय. या प्रश्नानां कांहींच उत्तर नाहीं, उत्तरें दिल्यास त्यापासून फायदा नाहीं. अशा प्रश्नानां उत्तरें देऊन वाक्यव्यय करणें बुद्धदेवानां पसंत नव्हतें.

* + *

कित्येकांच्या मतें उपनिषदांतील ब्रह्म हेंच बुद्धांचे निर्वाण होत व तें कांहीं अंशीं खरें असेल तरीपण बुद्धांना ईश्वराची प्रार्थना वगैरे करणें अनावश्यक वाटत होतें. त्याचें असें ह्मणणें होतें कीं, लोक ईश्वराकडे जाण्याच्या मार्गाकडे दुर्लक्ष करून फक्त ईश्वरास शोधित असतात. एकदां त्यानीं याबद्दल एका शिष्याला असा दृष्टांत दिला कीं, समज तूं एकाद्या गांवाला जातानां अत्यंत खोल अशी नदी लागल्यावरून तुला तींतून जाणें शक्य नव्हतें. अशा वेळीं जर तूं एका काठावर बसून दुसऱ्या कांठाची प्रार्थना करूं लागला तर तो कांठ कांहीं अलिकडे येणें शक्य नाहीं. त्याकरतां तुला होडीचाच आश्रय करून दुसरा कांठ गांठला पाहिजे. यावरून त्याचें असें सांगणें होतें कीं नुसत्या प्रार्थनादीनीं परमेश्वराकडे जाणें शक्य नाहीं तर ईश्वराकडे पोंचण्याचा खरा मार्ग ह्मणजे इंद्रियांचा जय करून मनाची शुद्धि करणें हा होय व या मार्गाचेंच जास्त विवरण त्यानीं आपल्या हयातींत केलें.

\+ × +

या सर्व विवेचनावरून त्यांना मूर्तिमंत ईश्वर personal god मान्य नव्हता असें दिसतें.त्यांचा या गोष्टीवर फार कटाक्ष होता ते असें ह्मणत असत कीं, मनुष्यें स्वतःच्या बऱ्या वाईट कर्माचें कर्तृत्व स्वताकडे न घेतां ईश्वरावर टाकतात व आपण मुक्त होऊं पहातात. यावरून पापाचा कोणी शास्ता नाहीं व पुण्याचा पुरस्कर्ताहि कोणी नाहीं. याकरतां देव आराधना अनावश्यक आहे, असें सांगत असत.

\+ + +

इतकें जरी ते सांगत असत तरी वेदांतानें जें स्थान ईश्वराला दिलें तें स्थान बुद्धांनीं कर्मवादाला दिलें. त्यांचें असें सांगणें असे कीं पापाचा शास्ता जरी कोणी नाहीं तरी पण त्याची फळें मिळाल्यावांचून मात्र रहाणार नाहींत. आपण जीं बरीं वाईट कर्मे करतों त्या बऱ्या वाईट कृत्याचे परिणाम आपणाला भोगावेच लागतात. बौद्धांचा कर्मवाद इतका जबरदस्त आहे कीं, त्यांतून कांहीहि सुटणें शक्य नाहीं. आपण जीं वाईट कर्मे करतों त्या कर्माचें क्षालन होईपर्यंत आपणास या मृत्युलोकीं रहावें लागणार व त्या कृत्याचे परिणाम भोगावेच लागणार. भोगितल्यावाचून सुटका होणें शक्य नाहीं व त्यांत कांहीं रदबदलीहि होणें शक्य नाहीं. करतां जर आपणाला उच्च स्थिति प्राप्त करून घेऊन मुक्त व्हावयाचें असेल तर आपण चांगल्या कर्माचें अवलंबन करून शेवटीं निर्वाण पद प्राप्त करून घ्यावें.

\+ × +

मूळ बुद्धदेवांचें जरी असें मत असलें तरी थोडक्याच काळांत त्याचें रूपांतर होत गेलें. कारण मानव स्वभावच असा आहे कीं त्याला ईश्वर मानल्याशिवाय गत्यंतर नाहीं आणि त्या कारणामुळेंच त्या धर्मांत महायान नावांचा एक नवा पंथ उत्पन्न होऊन त्यानें आपल्यांत बेधडक ईश्वराला स्थान दिलें व आज बौद्ध धर्माची स्थिति चालू हिंदुधर्माप्रमाणेंच आहे यांत शंका नाहीं.

के. भारती

हिंदुस्थानचें राजकारण

(लेः— संजय, मुंबई.)

'भारत'च्या एका अंकांत गोव्याच्या कौन्सिलांत घडलेल्या प्रसंगाची हकिकत प्रसिद्ध झाल्यावर, बऱ्याच अंशीं सारख्या स्वरूपाच्या ब्रिटिश पार्लमेन्टमध्यें घडलेल्या प्रसंगाची तार २–४ दिवसांपूर्वी इकडील वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली आहे. पार्लमेन्टच्या बैठकींत वादविवाद चालला असत ले. क. ॲमेरी ह्यांनीं दुसऱ्या स्कॉटिश सभासदांस आक्षेपार्ह वाटणारें असें कांहीं विधान केलें. बैठक आटोपल्यावर ले. क. साहेबांची ह्या गृहस्थाबरोबर त्या संबंधीं बाचाबाची होऊन त्यानां 'कुत्रा' 'डुक्कर' व 'गटारांत लोळणारा' ह्या विशेषणाचा अहेर करण्यांत आला. एवढेंच नाहीं, तर त्यांनीं एकमेकांस चोपण्यास सुरवात केली व शेवटीं आजुबाजुच्या मंडळीस मध्यें पडावें लागून ही मारामारी थांबवावी लागली.

परवां मुंबई कॉर्पोरेशन मध्यें दुसरा पण अगदीं वेगळ्या स्वरूपाचा प्रकार घडला. कॉर्पोरेटर डॉक्टर मुखिया ह्यांना त्या दिवशींच्या वादविवादासंबंधीं कांहीं शास्त्रीय स्वरूपाचे उतारे वाचून दाखवावयाचे होते. ते वाचून दाखविण्यापूर्वी (विनोदानें) 'मी वाचणार असलेला मजकूर ऐकणाऱ्यांना समजला पाहिजे, नाहीं तर 'डुकरापुढें मौक्तिकें' टाकण्याचाच प्रकार व्हावयाचा अशी प्रस्तावना केली. वास्तविक ह्या वाक्यांत आक्षेपार्ह असें कांहींच नव्हतें. 'डुकरापुढें मौक्तिकें' हा इंग्रजी शब्दप्रयोग आपल्या 'गाढवास गुळाची चव' किंवा 'मूर्खांपुढें गीता पठण' असल्या शब्द प्रयोगांसारखा, पण, एकंदर परिस्थिति ध्यानांत घेतां ह्या प्रयोगांनी ध्वनित होणारा निंदाव्यंजक विनोद शक्य तेवढ्या कमी प्रमाणांत असलेला, असा आहे. ह्मणजे ज्यांना (वैद्यकी सारख्या शास्त्रीय ज्ञानाच्या क्षेत्रांत येणाऱ्या) ह्या विषयांत जरूर असलेलें प्राथमिक ज्ञान नाहीं त्यानां आपण वाचणार असलेल्या मजकुरांतील मुद्यांचें नीट आकलन होणार नाहीं असें डॉक्टर साहेबास सुचवावयाचें होतें. पण बॅ. जमनदास मेहतानां 'डुक्कर' हा शब्द आक्षेपार्ह वाटला व तो वापरणाऱ्यांनें तो परत घ्यावा अशी अध्यक्षांकडे मागणी केली. अध्यक्ष श्री. विठ्ठलभाई पटेल ह्यांनीं हा शब्द 'पार्लमेन्टरी' असल्याचा निकाल दिला व बिचाऱ्या बॅरिस्टर साहेबानां अध्यक्ष सुद्धां 'डुक्कर' ह्या सदराखालीं येतात

Anuncios

O Bharat, ano 9°, n° 6, 1 de Maio de 1924.

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do 1° oficio Redcar, vai a' praça para venda em hasta publica a' porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige a' estaçao de Sanvordem no dia 3 do proximo mez de Junho a's dez horas pelo maior lanço que se oferecer oitava parte da varzea "Camargale" da cultura de arroz sito na aldeia Baregal de Cotigao avaliada por 100 rupias, discrita na conservatoria desta comarca sob o n.° 2.548 e penhorada nos autos de execuçao por custas que o Ministerio Publico nesta comarca move a Utoma Bicaro' Camotim de Poinguinim por apenso aos de querela que o dito Magistrado promoveu contra o referido Utoma, para pagamento da quantia de 41:02:00 proveniente de custas e selos acrescidos da execuçao. O arrematante pagara' a contribuiçao do registo por inteiro e as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Por este sao citados quaisquer credores incertos e co-proprietarios. O que para ser publico se expediu este. Xeldem 3 de Abrii de 1924.

O Escrivao do 2° oficio encarregado do 1°.

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito

A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do 1° oficio Redcar; vao a' praça para venda em hasta publica a' porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirije a estaçao de Sanvordem no dia tres do proximo mez de Junho a's dez horas pelo maior lanço que se oferecer os seguintes predios: Metade do lado de sul do predio denominado "Malecumbo" da cultura de coqueiros sito em Caregal do Cotigao avaliado por 200 rupias; Quarta parte do palmar e varzia "Gorbata" da cultura de coqueiros e mais arvores fructiferas e arroz sito na aldeia Poinguinim, avaliada por 300, e quarta parte da varzea "Dundo" da cultura de arroz, avaliada por 200 rupias, discritos respectivamente por inteiro na conservatoria desta comarca sob os nos. 5659, 2509 e 2510 e penhorados nos autos civeis de execuçao por custas e selos que o Ministerio Publico nesta comarca move a Utoma Bicaro' Camotim de Galiem de Poinguinim por apenso aos de querela que o dito Magistrado promoveu contra o referido Utoma, para pagamento da quantia de 275:11:0 1/2 proveeiente de custas e selos liquidados nos referidos autos de querela e de custas e selos acrescidos da execuçao O arrematante pagara' a contribuiçao do registo por inteiro e as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias, Por este sao citados quaisquer credores incertos e co-proprietarios. Xeldem 3 de Abril de 1924.

O escrivao do 2° oficio encarregado do 1°

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito

A. A. de Brito e Nascimento

ाचक हो, आमच्या लिहिण्याचा विषाद
नका. बुध्दीच्या आकलन शक्तीप्रमाणें
लेत परिस्थितीची रूपरेखा सदर लेखांत
ण्याचा प्रयत्न केला आहे. मुख्य हेतु-
लक्ष देऊन त्यांत गैरसमज कोठें
ा असल्यास थोरमनानें त्याची
करा. 'तुका ह्मणे येथें पाहिजे जातीचें ॥
गाबाळाचें कामा नये ॥ माझ्या
हृण्यामधला सारांशहि हाच.

—सालवादप्रमाणें श्री स्थळ कपिलेश्वर
ा–गोवा, येथें येत्या वैशाख शु० १०
रोजीं श्री मत् शंकराचार्योत्सव साजरा
ार असून, पूजा, प्रवचन, व्याख्यानें
रे कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व आ-
मींयांनीं हजर राहून आभारांत ठेवावें.
शी उत्सवाचे एक हितचिंतक नारायण
नंत नाईक पाटणकर हे सर्वांस विनंति
रेतात.

—१९४५ पर्यंत जगात शांतता ना-
ार नसून, पुष्कळ राजसिंहासनें जमीन-
स्त होतील, तसेंच पुष्कळ इमारती, पूल,
ं वगैरे ढासळतील, असें जुवांव फैराज
नावांच्या पाश्चिमात्य ज्योतिषानें भविष्य
ावलें आहे.

Ano 9° N. 7

Qui[...]tei[...] 8 de Maio de 1924

[...]NATURA
[...]no tres rupias

[...]NCIOS
Por cada [...] que repetida uma tanga
[...]lso uma tanga

[...] E EDITOR
G. [...]jdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ७

गुरुवार ता. ८ मे सन १९२४.

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केंपें–गोवा.

ETERNA ARIÁ ?...

Os jornais metropolitanos registam o seguinte informe:

"Pelo Ministerio das Colonias foram recomendados todos os gover nos das nossas colonias para que reduzam ao minimo as despesas e procurem criar receitas, afim de melhorar, quanto possivel, a crise financeira por que estao passando quasi todas as provincias ultramarinas"

A *Terra* de Margao comenta o com a seguinte interrogagao:

Mas ¿que e' que ha' feito?

¿Que e' que ha' feito? Tem graga a pergunta.

¿Ignora, porventura, o independente bissemanario tantos milagres operados "procurando criar receitas, a fim de milhorar, quanto possivel, a crise financeira" por que esta' passando a India?

Os estrondosos ecos produzidos pela "avalanche" de novos impostos nao se apagaram, ainda, de todo e cremos que nunca se apagarao. O tino governativo, posto em execugao, ca' pelo Pais dentro tem procurado cumprir, no seu maximo limite potencial, a aludida recomendagao ministerial, no tocante a' criagao de receitas, "a fim de milhorar," quanto possivel, a crise financeira que nos assoberba.

¿Que e' que ha' feito?

¿Que mais queria a *Terra* que se fizesse, para criar receitas a fim de milhorar a nossa *bancarrota*?

Havera' qualbuer outra maneira de abarrotar de dinheiro o tesouro publico do que aquela com a qual esta' familiarisado o governo local, a de langar tributos novos?

A "formula" mais corrente, mais facil e mais comoda de equilibrar um orgamento, apertado nas garras dalguma crise financeira e' o lançamento de tributos novos. Pelo menos, e a "doutrina" que esta' em voga no nosso meio "estadistico."

Ja' ve, portanto, o intemerato jornal, que ha' muita coisa feita no sentido do aumento de receitas, a fim de milhorar a nossa "incuravel" crise financeira que, pelo facto de ser, continua, sempre, no "statu quo".

Se, porem, a interrogagao adversativa da *Terra* se refere a' reducgao de despesas ao minimo ... temos convresado.

Nao e' facil o cumprimento dessa parte da recomendagao ministerial, porque ela vai de encontro com o interesse burocratico. E quando se diz interesse, compreende se que se trata de barriga, esse formidavel eixo, em volta e para volta do qual gira toda a nossa atividade politica e patriotica.

Creia, por isso, o ilustre colega, que se nao fosse o "senao" de barriga, origem prehistorica de todos os males que nos "embelesam" a vida—teria sido, igualmente, satisfeita, tambem, a primeira parte do louvavel desejo ministerial.

Se o governo nao reduziu ao minimo as verbas de despesas, foi, portanto, porque nao poude superar a dificuldade, criada pela "barriga," que e' um bicho terrivel, apesar de ser nos tao querido amigo, um "alter ego" nosso.

Quanto a' recomendagao ministerial o nosso governo fez, pois, o que poude empregando para isso toda a sua inteligencia, todas as suas faculdades dum estadista ponderado e previdente E quem da' o que pode, nao esta' obrigado a mais, la' diz o ditado.

¿Que e' que ha' feito? — Pergunta ingenuamente a *Terra*.

Mas e' uma *eterna a'ria* isto de recomendar a reducgao de despesas e a criagao de receitas! — replicar-nos ha', exclamativa, a *Terra*.

A'ria cu nao, o certo e', porem, que a recomendagao foi cumprida a' risca...

UM FOLHETO

Recebemos um folheto, firmado pelo sr. P. E. Candialcar que na sua obra trata dum caso ocorrido nesta comarca e referente a um canavial de Curpem.

Dêle nos ocuparemos oportunamente, sobretudo, na parte que diz respeito ao nosso director.

AGRADECENDO

Aos presados confrades de imprensa e dedicados assinantes que nos dirigiram felicitações por ocasião do nono aniversario do *Bharat*, apresentamos a expressão do nosso sincero agradecimento.

Ecos & Critica

SEM MAIS NEM MENOS

A *Provincia* dedica o artigo de fundo do seu ultimo número ao jornal marata *Hindú* de Margão, aconselhando-o a que faça *vista grossa* ás coisas e loisas referentes aos catolicos do Paiz.

E' prudente o conselho do ilustre colega que batalha pelo bem estar désta terra. E teriamos até acompanhado a *Provincia* no sermão que, na qualidade de orgão do Livre Pensamento, préga ao *Hindú*, se nos convencessemos de que se lhe apagou da memòria a viva imagem da acintosa perseguição, movida em Parodá á procissão hindú de Chandranate e a que pôz termo a energica intervenção do sr. dr. Antonio José de Almeida, ao tempo deputado do Partido Republicano Portuguêz.

E, depois, aquele jornal marganense faz antes uma discrição sentimental da procissão a que a *Provincia* se refere, do que uma narração critica, tendente a ofender o catolicismo.

O *Hindú* é amigo da HISTORIA e é possivel que a proposito da discrição, a tenha *apimentado* com comentos historicos, o que todavia, não quere dizer que tenha procurado ofender o catolicismo, porque o fazer historia duma coisa não é ofender, é registar verdades decolhidas.

Sem mais nem menos.

NONA FAISCA

Entrou já em circulação a 9a. faisca que foi custeada pelo sr. Martinho Francisco Xavier de Sousa, digno professor de portugues na vila de Mapuçá, o que o *Bharat* regista com grande prazer.

Vê-se portanto, que nem todos os cristãos são inimigos das *faiscas*. Ao sr. dr. Barros seguiu o sr. prof. Sousa e não tardará que o exemplo dêste seja imitado por outros cristãos liberais.

APOIANDO

O sr. *A. V.* apresentou no *Bharat* a louvavel idêa de introduzir no programa liceal o ensino da Historia da India.

E' escusado dizer que apoiamos do fundo de alma a patriotica idêa do nosso prezado colaborador.

Quem não se conhece a si, não pode conhecer a outros Diz-se com razão: *nosce te ipsum!*

A modorra que vêmos desenvolvida, dia a dia, nos filhos da India, é, em grande parte, devida á fálta de conhecimentos da historia dos seus antepassados que tão alto ergueram o nome de sua Patria.

O sr. Director dos serviços de instrução não há de querer, certamente, que os filhos da India se desconheçam, eternamente, continuando, sempre, na modorra que os entorpece.

Esperamos, porisso, que S. Excia. envidará os seus milhores esforços de molde a que se introduza no programa liceal o ensino da Historia da India, preconisado em bôa hora pelo nosso distinto colaborador sr. *A. V.*

SIVAJI MAHARAJA'

O *Sárasvat Bhaman Samaj* de Margão realisou uma sessão extraordinaria, festejando o aniversorio de Sivaji Maharajá, fundador que foi do reino dos maratas.

Vale a pena conhecer a aventurosa vida de Sivaji, que com o auxilio duns *Maulês* soube aniquilar o poderôso dominio dos mussulmanos que então ocupavam uma grande parte da

न घेण्यांत आम्हाला मोठेपणा वाटूं ला-
ला. आह्माला [Colonisagao pela assi-
milagao) कोलोनिजासांव पेल आस्सिमिला-
सांवाचे भिकार डोहाळे आठवूं लागले !!

स्वातंत्र्याच्या उज्ज्वल भावनेनें सारें हिंदी राष्ट्र जागृत होऊन " हिंदी लोकांकरितां हिंदुस्थान " " हिंदी लोकांची भाषा हिंदी " अशी गर्जना करूं लागलें असतांना आह्मा हिंदी गोवानिजाना पोर्तुगीज भाषेचें प्रेम वाटावें व पोर्तुगीज नागरिक ह्मणविण्यांत भूषण वाटावें, आह्मीं हिंदी नसून पोर्तुगीजच आहों असें वांटण्यांत अभिमान वाटावा, ही काय रेपुब्लिकच्या उच्च तत्वाची थट्टा कीं आमच्या करंटेपणाचें अवलक्षण ? ह्मणें पोर्तुगीजांनीं सर्वांना कायदे सारखे ठेविले आहेत. गोऱ्या काळ्यांत भेद ठेविला नाहीं ! नसेल. पण तो आमच्या बऱ्याकरितां नसून आह्मांला हिंदीत्वापासून दूर करून पोतुगीज बनविण्याकरितां आहे, हें आह्माला कधीं कळणार ?

दुष्टाच्या स्नेहापेक्षां त्यांचें शत्रुत्वच शतपटीनें बरें असतें. इंग्रजानीं हिंदी लोकाना आपल्यापासून दूर ठेवण्यांतच हिंदी लोकांवर मोठा उपकार केला आहे. त्यामुळें हिंदी लोकांच्या ठिकाणीं " आह्मीं हिंदी " अशी भावना कायम आहे. आह्मा गोमांतकच्या हिंदु लोकांना कसली भावना आहे? त्यांना नांवानें फक्त हिंदू ह्मणावयाचे बाकी त्यांना आपला धर्म खरा खुरा माहीत नाहीं भाषा नाहीं, राष्टीयत्व नाहीं, कांहीं नाहीं.

हिंदी राष्ट्र स्वतंत्र झाल्यावर टीचभर तुकड्यातले गोमांतकस्थ पोर्तुगीज ह्मणून पोर्तुगालात पळून जाणार आहोंत काय? 'चढवा पुन्हां विभवाच्या धवलगिरीवरी हा पोर्तुगाल' असे मोठ्या अभिमानानें बेंबीच्या देंठापासून ओरडून ह्मणणारा हिंदु हा 'हिंदी' या नांवाला कधींतरी पात्र होईल काय ? गुलामगिरीचें जोखड अभिमानानें खांद्यावर वाहून पुन्हां आणखीं त्याची स्तुति स्तोत्रें गाणारे लोक गर्भांतच कां मरण पावले नाहींत. असें पाश्चात्य लोक समजतात. फ्रान्स किंवा इंग्लंडच्या ताब्यांत पोर्तुगाल देश करून 'चढवा फ्रान्स देश विभवाला' असें कोणता खऱ्या बीजाचा पोर्तुगीज ह्मणेल ? पण त्याच पोर्तुगीजांच्या अमलाखालीं राहणाऱ्या हिंदु लोकानीं स्वतःच्या नाशाची इच्छा करून पोर्तुगीजांच्या अखंड गुलामगिरीची हांव धरावी यापेक्षां अधःपतन तें कोणतें ? यापेक्षां कोणता नरकवास जास्त नीच आहे ?

पण आह्मीं खरे हिंदु व हिंदी आहोंत. आह्मीं नरकवासांत राहण्यास कधींहि तयार होणार नाहीं. परकीसत्तेच्या भयाच्या मायेतून आतां आह्मीं मुक्त झालें पाहिजे व आमचें हिंदित्व कसें कायम टिकेल याचें चिंतन केलें पाहिजे. आह्माला आमची भाषा नाहीं तर आह्माला राष्ट्रीयत्व नाहीं. ह्मणून देवनागरी लिपींत असलेल्या आमच्या मराठी भाषेचा प्रसार गोमांतकांत अधिक करून तिला राजकीय पूर्ण पाठबळ मिळविण्याच्या मागें आह्मी लागलें पाहिजे. साडे-

पांच लाख वस्तीच्या देशांत तीन लाख लोकांच्या भाषेला कांहींच किंमत नसावी लोकांच्या करांतून त्याकरितां एक पैहि खर्च न व्हावा व सरकारी शाळाखात्यानें उघडलेली एकहि मराठी शाळा नसावी ही शरमेची गोष्ट आहे. मराठी जाणणाऱ्याला मतदानाचा अधिकार मिळण्याची जोरानें खटपट केली पाहिजे व मराठी करितां स्वतंत्र शाळाखातें उघडण्यास आमच्या दयाळु रेपुब्लिक सरकारास भाग पाडलें पाहिजे. आह्मीं तीन लाख हिंदी लोकांचें प्राथमिक शिक्षण याचा अर्थच मातृभाषेचे प्राथमिक शिक्षण.

पोर्तुगीज प्रि० से० हें प्राथमिक शिक्षण असें समजून आह्मीं आपल्या खऱ्या प्राथमिक शिक्षणाला मूठमाती दिली आहे. आह्माला प्रथम मराठी शिकून नंतर वाटल्यास पोर्तुगीज शिकलें पाहिजे. मराठी चार इयत्ता झाल्याशिवाय पोर्तुगीज शिकतां येऊं नये असा निदान हिंदूकरतां तरी कायदा झाला पाहिजे. येथें रेपुब्लिक आहे ह्मणून हें शक्य आहे. 'अल्पसंख्यांकांचें हक्क शावूत ठेवण्याकरितां रेपुब्लिक सरकार बांधलें गेलें आहे"

पण आह्मीं चळवळ केली पाहिजे. 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' आमच्यांत कांहीं बोलणारे आहेत त्यांनीं प्रत्यक्ष चळवळीला आतां पुढें आलें पाहिजे. ह्मणून परमेश्वराच्या कृपेनें गोमांतकांत शिल्लक राहिलेल्या ३ लाख हिंदु ह्मणवून घेणाराना स्वतःचें राष्ट्रीयत्व राखावयाचें असल्यास त्यानीं दंड ठोकून चळवळीच्या आखाड्यांत उडी टाकिली पाहिजे.

स्फुट विचार

एक सोपा उपायः— एकंदर पोर्तुगीज वसाहती सांपत्तिक हलाखीच्या खोल गर्तेत खिचपत असल्याचें पाहून वसाहतींच्या प्रधानजींस त्यांची करुणा आली. काळीज शतशः विदिर्ण करणारे त्यांचे करुणजनक हाल पाहून प्रधानजींचें धैर्य गळालें. सहा सहा महिनें आपल्या नोकरशाहीला पगार न मिळाल्यानें तिची चालत असलेली दैना पाहून, प्रधानजींच्या डोळ्यांतून अश्रूंचा पूर वाहूं लागला. व वसाहतींची व वसाहतींच्या नोकरशाहीची हाल अपेष्टा असह्य होऊन, मशारनिल्हे प्रधानजी वसाहतींच्या मानगुटीवर धिंगाणा घालणाऱ्या त्या हलाखीच्या समंधाला गाडण्याच्या विचारांत चूर होऊन गेले. असतील नसतील तितक्याहि उपायांची छाननी त्यानीं मनांतल्या मनांत केली व अखेर त्यांनीं त्या समंधाला चीत करणारा एक सोपा उपाय त्या त्या वसाहतींच्या गव्हर्नरांना सुचविला.

जिज्ञासाः— 'हा सोपा उपाय' जाणण्याची जिज्ञासा वाचकांत स्फुरण झाली असेल यांत संशय नाहीं. प्रधानजींच्या मस्तकरूपी तव्यावर त्या उच्च विचारांची भाजलेली भाकर खाण्याला कितीतरी लोक उत्सुक झाले असतील; कितीतरी लोकांच्या तोंडाला सडकून पाणी सुटलें असेल. पण बिचाऱ्यांना काय माहीत कीं, त्या भाकरीच्या चवीनें तोंडचें पाणी कायमचें पळून जाईल ह्मणून ! प्रधानजी सांगतात:— "शक्य त्या रीतीनें खर्च कमी करा व शक्य त्याच रीतीनें उत्पन्न वाढवा, ह्मणजे सर्वत्र आबादीआबाद होईल. विचारांत कां पडता ? मी शिकविलेला हा मंत्र जपा व हलाखीच्या समंधाला गाडून टाका !" प्रधानजींच्या विचार सागरांतून प्रगट झालेलें हें 'रत्न' पोर्तुगीज राजकारणी मुकुटाला साजेसेंच आहे, हें कोण नाकबूल करील ?

पण...:— वसाहतींतील गव्हर्नरसाहेब आपल्या वरिष्ठाच्या अर्ध्या वचनांत असल्यानें, वरिष्ठांच्या शिकवणीचा व्हावा तसा उपयोग होत नसतो. 'खर्च कमी करा व उत्पन्न वाढवा' या सगळ्या वचनाला पाळा देण्याच्या ऐवजीं ते 'उत्पन्न वाढवा' या अर्ध्या वचनालाच पाळा देऊन आपली कार्य तत्परता व्यक्त करीत असतात. या कार्यतत्परतेचें पर्यवसान करभाराच्या वृद्धींत होऊन, जनतेस 'त्राहि भगवान' होत असल्यास त्यांत नवल तें कोणतें ? असो. 'खर्च कमी करा व उत्पन्न वाढवा' अशा तात्विक उपायांनीं आमची सांपत्तिक स्थिति थोडीच सुधरावयाची आहे ! तत्व नको आहे. तपशील पाहिजे आहे. तत्व आह्मांला कबूल आहे. पण तपशील कबूल नाहीं. अशा घोर स्थितींत सांपत्तिक हलाखीचा जोर कसा कमी होईल ?

गैरसमज नको ! :— मागील एका स्फुटांत 'मडगांवात एकहि मराठी शाळा व्यवस्थित नाहीं' अशा अर्थाचें एक विधान केलें गेल्याचें वाचकांस आठवत असेलच. त्याचा अर्थ इतकाच होता कीं, म्हापशेच्या सारस्वत विद्यालयासारखी प्राथमिक मराठी शिक्षणाचें बहुतेक पूर्ण ज्ञान करून देणारी एकहि संस्था तेथें नाहीं. त्या स्फुटाचा शेवटचा भाग वाचल्यानंतर आमच्या या ह्मणण्याची खात्री वाचकांच पटेल. असें जरी असलें तरी त्या वाक्यानें —विशेषतः त्याचा अलग व स्वतंत्र रीतीनें विचार केला असतां— गैरसमज उत्पन्न होण्यास जागा राहूं नये ह्मणून स्पष्ट कळवितों कीं, त्या वाक्यानें मडगांवांत थोड्या शिक्षणाच्या पण व्यवस्थित रीतीनें चालू असलेल्या मराठी शाळांचें किंवा त्यांच्या उत्साही व मेहनती चालकांचें महत्व कमी करण्याचा आमचा कधींच उद्देश नव्हता व नाहीं. 'नवीन मराठी शाळे'सारखी संस्था तर मडगावांत इतकी लोकप्रिय आहे कीं तींत सध्या सवादोनशेंवर मुलें शिक्षण घेत असतात. ही शाळा व्यवस्थित नाहीं असें कोण ह्मणेल ! याच शाळेनें म्हापशेसारखी प्राथमिक शिक्षणाची सगळी सोय केल्यास 'मडगावांत एकहि मराठी शाळा व्यवस्थित नाहीं' असें म्हणण्याला कोण धजेल ?

—श्रीमती रमाबाई गोविंद रानडे या परोपकारी व लोकहिततत्पर बाईच्या विधनानें 'भारतास' अत्यंत वाईट वाटत आहे. परमेश्वर बाईंच्या आत्म्यास शांति देवो !

एक अव्यवहार्य कल्पना

(लेः— रामचंद्र व्यंकटेश नाईक.)

प्राणिमात्राच्या सर्वसामान्य स्वभावधर्माचा सूक्ष्म मानानें विचार केला असतां असा एक सिद्धांत सांगतां येतो कीं, प्रत्येक मनुष्य जात्याच आपल्या सर्व अंगीकृत व्यवहाराच्या बाबतींत, अगदीं आरंभीं, आशावादी असतो. परंतु पुढें, आपल्या कार्यासंबंधीं जसजसा साधक बाधक विचार परिस्थित्यनुसार त्याकडून होत जाईल, तसतसे ते ते विचार, त्या त्या कल्पना किंवा ते ते व्यवहार, शक्याशक्यतेच्या भट्टींतून सुलाखून बाहेर निघतांच, परिस्थित्यनुसार व्यवहार्य विचार व परिस्थित्यनुसार अव्यवहार्य कल्पना, असे त्याचे दोन भाग होतात.

व्यवहार्य ठरलेल्या विचारांसंबंधीं मनुष्यमात्राच्या कल्पना दृढीकरण पावतात व मूळ आशावाद दुणावतो, व परिस्थित्यनुसार सध्या अव्यवहार्य ठरलेल्या कल्पनासंबंधीं मनुष्यमात्र निराशावादी बनतो, व योग्य परिस्थिति येई तोपर्यंत, आपल्या त्या उद्भुत कल्पना, शहाणे लोक दाबून ठेवतात तेव्हां, या विचार सरणीनुसार, विशेषें करून समंजस मनुष्याच्या डोक्यांत उद्भवणाऱ्या कल्पना, योग्य रीतीनें न सुलाखतां त्या व्यवहारांत आणण्याचा प्रयत्न झाला ह्मणजे किंवा त्या व्यवहार्य मानून लोकांपुढें मांडण्यांचा प्रयत्न झाला ह्मणजे, ज्या प्रकारच्या दोपपरंपरित, मडगांवचे " हिंदु " वर्तमानपत्रकार ता. २५ च्या अंकांत " एक हृदय द्रावक देखावा " या लेखलेखनाच्याद्वारा हिंदु जनतेपुढें मांडलेल्या एका अव्यवहार्य कल्पनेमुळें, सांपडलेले पाहून फार आश्चर्य वाटतें.

क्रिस्ताच्या मरणतिथीचा देखावा हिंदुजनतेपुढें फाजील रंगवून–नटवून आणतांनां "आणीबाणीचा" 'हृदय द्रावक' वगैरे सारखी त्या लेखांतील शब्दयोजना पाहून 'हिंदु'कारांचें कौतुक वाटतें. तसेंच, क्रिस्ताच्या औपचारिक दफनविधीस 'उत्सव, 'फार्स' 'देखावा' 'मिरवणूक' अशीं विशेषणें लावूनहि त्यांत सामील असलेल्या माणसांच्या तोंडावर प्रेतकळा व नैराश्य आल्याचें त्यांनीं लिहिलेलें वाचून त्यांच्या लेखणीच्या स्वातंत्र्याचें कोड करावें तितकें थोडेंच होईल. त्याचप्रमाणें या दोनहि प्रमादांवर ताण करून, 'भयाण स्वरूप' व 'उत्सव' 'गांभीर्य' व 'भीषणता,' या चारहि परस्पर विरोधी स्थिति, ते आपण एकाच वेळीं एकाच दफन विधीच्या देखाव्यांत पाहिल्याची साक्ष देतात. विश्वामित्राच्या दुज्या सृष्टींतील गाय व वाघ, उंदीर व मांजर यांच्या मैत्री पलीकडील ही गोष्ट होय. असो. तरी या गोष्टींत मी अनभिज्ञ असल्यावरून व त्या 'हिंदु' कारांसारख्या नाणावलेल्या लेखकाच्या लेखणींतून अवतीर्ण झाल्याकारणानें त्या मी भाषागैरव शास्त्रज्ञांपुढें मांडून मुख्य विषयाकडे वळतों.

'हिंदु' कार आपल्या त्या लेखांतील, हिंदु धर्माची अभ्युदयविषयक पतितपरावर्तनाची कल्पना, व्यवहार्य ठरविण्याच्या यातायातींत, रिपब्लिकची स्थापना व तदंतर्गत राजकीय युगांतराचें चित्र पुढें करून नंतर ह्मणतात:— हे (क्रिस्तांव) चुकलेलें अगर दुसऱ्या रस्त्यास लागलेले लोक आपण (हिंदूंनीं) योग्य ज्ञानामृत पाजून सावध केलें पाहिजेत व परत पूर्वीच्या परंपरित रस्त्याला लावले पाहिजेत' या कार्यास ते 'पतित परावर्तनाचा यज्ञ' अशी संज्ञा देतात.

सुंदर कल्पना या दृष्टीनें पाहिल्यास 'हिंदु कारांचा विचार रमणीय आहे. व त्याचा शेवट कल्पनेंतच व्हावयाचा असल्यास, ती आनंदपर्यवसायी आहे; पण ती अमलांत आणण्यासंबंधींचे विचार मात्र दुःखपर्यवसायी ठरतील हिंदु धर्माच्या रक्षणाकरितां ते पतितपरावर्तनाचा मार्ग सुचवितात. माझ्यामतें हिंदुधर्माच्या रक्षणाची कल्पना फार नामी आहे. पण तत्प्रीत्यर्थ सुचविलेला मार्ग मात्र अव्यवहार्य होय. कारण पतितपरावर्तनाच्या कार्यांत दोन गोष्टींची आवश्यकता असते. एक पतितांची व दुसरी या पतितांस परावर्तनाच्या कल्पनेची.

'हिंदु' कारांनीं क्रिस्ताच्या मृत्युतिथीच्या दिवसा निमित्त क्रिस्तानुयायांतर्गत ज्या विवक्षित समाजाचें चित्र आपल्या लेखांत रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे, त्या विवक्षित समाजांत स्वतःच्या पतितत्वाची कल्पना सुद्धां नाहीं व अर्थात परावर्तनाची गोष्ट तर नाहींच नाहीं. पण 'हिंदु' कार, या पतितत्वाची कल्पना क्रिस्तीसमाजास करून देऊन परावर्तनाची इच्छा त्याच्यांत कोणत्याविषयीं सुचवितात. पण हेंहि कार्य सद्यःपरिस्थितीच्या दृष्टीनें अव्यवहार्य होय. कारण पक्वान्न जरी फार उत्तम असलें तरी तें पचण्यास खाणाऱ्यांत भुकेची आवश्यकता असते. ज्या क्रिस्ती समाजास हिंदु बनवून हिंदु धर्माच्या अभ्युदयाची मोहक सुखस्वप्नें हिंदुकारांस पडतात, त्या क्रिस्ती समाजास पतितत्वरूपी भुकेची अगदीं अंधूक सुद्धां कल्पना नाहीं, कीं त्याना परावर्तनरूपी पक्वान्नाच्या सेवनाची कल्पना व्हावी.

जगांतील सर्व नवीन व्यवहाराच्या बाबतींत अशी एक खुबी असते कीं, कोणत्याहि समाजावर एखादी नवीन कल्पना लादण्याची असल्यास, त्या समाजांत, त्या नवीन कल्पनेची फार थोडी, अगदीं सूक्ष्ममानानें निदान, अंधूक अंधूक जाणीव भासलेली असावी लागते; किंवा त्या गोष्टींची, अगदीं सूक्ष्ममानानें कां होईना, आवश्यकता भासलेली असावी लागते. पुढें ही अंधूक कल्पना हळुहळु जिज्ञासेला प्रसवते. पण ही जिज्ञासा मात्र मुळांतच उत्पन्न करावयाची नसते. तर ती त्या त्या विवक्षित परिस्थित्यनुसार उत्पन्न झालेल्या कल्पनेपासून निपजलेली असते. व नंतर तो तो काळ येतांच किंवा ती ती आवश्यकता भासतांच, शहाणे लोक किंवा पुढारी मंडळी, आपापल्या शहाणपणाच्या जोरावर, त्या त्या

अधार्मिक) भावना दुखांवतील ह्या भीतीनें आपण हिंदुसमाजांत त्या समाजाच्या हिताला आज पोषक नसलेली फाळणी करावयाची काय ?

अस्पृश्यतेच्या प्रश्नाचा विचार फक्त ह्याच दृष्टीनें करण्यास माझी वाचकांस विनंति आहे. ह्या प्रश्नाला दुसऱ्या अनेक बाजू आहेत, व त्या सुद्धां कमी महत्वाच्या नाहींत. आमचा वेळोवेळीं अपमान करताना परकीयानीं व आमच्या शत्रूनीं आमच्या धर्माच्या विराट देहावरील ह्या क्षताकडे बोट दाखवून आह्मांस खिजविण्याचा क्षुद्रपणा दाखविला आहे. त्याच्या खिजविण्याकडे जरी आपण दुर्लक्ष केलें तरी ह्या विराट पुरुषाच्या जीवनाचा दृष्टीनें आपणास त्या क्षतांकडे लक्ष दिलें पाहिजे.—हाच वायकोमचा संदेश.

सारस्वत विद्यालयाची वार्षिक परीक्षा

ह्यापर्डे येथील सारस्वत विद्यालयाची वार्षिक परीक्षा विद्यालयाचे सेक्रेटरी श्री. काकासाहेब दणाइत यांच्या आमंत्रणावरून रत्नागिरी येथील ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपल श्री माधवराव सबनीस यानीं गेल्या महिन्याच्या २९ व ३० रोजीं घेतली. परीक्षा फार कसून घेतली हें सांगावयास नकोच. परीक्षा घेतेवेळीं शिक्षकांस योग्य त्या सूचना देण्यासहि ते विसरले नाहींत. परीक्षेचे वेळीं गावांतील बरीचशी मंडळी हजर होती. परीक्षेचा निकाल ता. २० रोजी सायंकाळीं ५ वा. देण्यांत आला. त्या वेळीं लोकसमुदाय बराच होता. परीक्षा व तीचा निकाल या संबंधीं त्रोटक माहिती शाळेचे हेडमास्तर श्री. नारायण लक्ष्मण रंगे यानीं देऊन पास झालेल्या मुलांमुलींची नांवानशी फ. अ. श्री. सोयराजी रामचंद्र आरांवदेकर यानीं वाचून दाखविली. व परीक्षकांची ओळख याच शाळेचे माजी इंग्रजी प्रोफेसर श्री. रामचंद्र सोनबा कामत यानीं त्या ठिकाणी जमलेल्या लोकसमुदायास करून दिली. विद्यालयांत सध्या ७ शिक्षक व ३०० विद्यार्थी असून परीक्षेचा निकाल शें. ९० वर लागला असें दिसून आलें. या विद्यालयांत अस्पृश्य जाती पैकीं चांभारजातींचीं १०, १२ मुलें आहेत. त्यांतील एका मुलानें आपल्या अभ्यासांत बरीचशी हुशारी दाखविल्यामुळें त्यास परीक्षकांनीं स्वयंस्फूर्तीनें बक्षिस दिलें. याप्रमाणें दिवसेंदिवस या विद्यालयाची होत असलेली भरभराट पाहून आह्मां गोमांतकीयांना अभिमान वाटणें साहजिकच आहे. अशाच तऱ्हेच्या शिक्षणसंस्था आमच्या गोमांतकांत उदयास येऊन सर्व गोमांतकीय बालांस आपल्या किरणांनीं आल्हादित करितील तोच सुदीन !

एक गोमांतकीय

येत्या अंकांत

" अंत्यज प्रांतांतील इंत्यज " किंवा " शठंप्रति शाठ्यं " हा मडगांवचा कोणी एक प्रो० केणी यांचा लेख प्रसिद्ध होईल.

Anuncios

O Bharat, ano 9°, n° 7, 1 de Maio de 1924.

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do 1° oficio Redcar, vai a' praça para venda em hasta publica a' porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige a' estaçao de Sanvordem no dia 3 do proximo mez de Junho a's dez horas pelo maior lanço que se oferecer oitava parte da varzea "Camargale" da cultura de arroz sito na aldeia Baregal de Cotigao avaliada por 100 rupias, discrita na conservatoria desta comarca sob o n.° 2.548 e penhorada nos autos de execuçao por custas que o Ministerio Publico nesta comarca move a Utoma Bicaro' Camotim de Poinguinim por apenso aos de querela que o dito Magistrado promoveu contra o referido Utoma, para pagamento da quantia de 41:02:00 proveniente de custas e selos acrescidos da execuçao. O arrematante pagara' a contribuiçao do registo por inteiro e as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias. Por este sao citados quaisquer credores incertos e co-proprietarios. O que para ser publico se expediu este. Xeldem 3 de Abril de 1924.

O Escrivao do 2° oficio encarregado do 1°.

Aires Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do 1° oficio Redcar; vao a' praça para venda em hasta publica a' porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada naciona que de Quepem se dirije a estaçao de Sanvordem no dia tres do proximo mez ve Junho a's dez horas pelo maior lanço que se oferecer os seguintes predios: Metade do lado de sul do predio denominado "Madecumbo" da cultura de coqueiros sito em Caregal do Cotigao avaliado por 200 rupias; Quarta parte do palmar e varzia "Gorbata" da cultura de coqueiros e mais arvores fructiferas e arroz sito na aldeia Poinguinim, avaliada por 300, e quarta parte da varzea "Dundo" da cultura de arroz, avaliada por 200 rupias, discritos respectivamente por inteiro na conservatoria desta comarca sob os nos. 5659, 2509 e 2510 e penhorados nos autos civeis de execuçao por custas e selos que o Ministerio Publico nesta comarca move a Utoma Bicaro' Camotim de Galiem de Poinguinim por apenso aos de querela que o dito Magistrado promoveu contra o referido Utoma, para pagamento da quantia de 275:11:0 1/2 proveeiente de custas e selos liquidados nos referidos autos de querela e de custas e selos acrescidos da execuçao O arrematante pagara' a contribuiçao do registo por inteiro e as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias, Por este sao citados quaisquer credores incertos e co-proprietarios. Xeldem 3 de Abril de 1924.

O escrivao do 2° oficio encarregado do 1°

Aires Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

public…
conhece a…
terna dos nos…
nhos:

Ei-los:

— O sentimento de indep… nacional foi sempre timbre cnt… indianos. As lutas renhidas contra hunos, arabes, turcos, mongoes e afghans, as guerras sangrentas do Deccan, a confederaçao maratha e a confederaçao sikh fizeram-se contra os invasores. Foi constante preocupaçao dos hiudu's manter a unidade da India. E se a dinastia mogol, durante perto de um seculo, dominou na India foi que os imperadores mogoes

do
ao do…
Venceu… 4
comprom…
self govern…
de tempo, e a…
dos seus *leaders*…

Anno 9° N. 8

Quinta-feira 15 de Maio de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

...tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem Goa

भारत

BHARAT

वर्ष ९ वें. अंक ८

गुरुवार ता. १५ मे सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केंपें—गोवा.

SEM EQUIVOCOS...

Referindo-se, há dias, ao movimento nacionalista que se está a esboçar no céu politico da India Portuguesa, a *Provincia* manifestou o seu desagrado por essa *tendencia*, troçando, ao mesmo tempo, da agitação *swaragista* do vasto Industão que o excelente jornal do sr. Pereira Batalha acha *inútil* e *improficuo* por *nada* ter produzido durante 50 anos de sua existencia.

Não nos ocorrem nêste momento palavras textuais com que apreciou a politica indo-britanica aquele nosso colega europeu que é uma especie de *Times of India*, de Gôa; mas afiança-nos a memória que a *Provincia* apregoou aos quatro ventos a inutilidade do *movimento nacionalista* dos nossos visinhos.

O *Times* de Goa labora, porêm, no erro, quando levianamente afirma *nada ter produzido* o movimento nacionalista da India Britanica, que, cedo ou tarde, levantará o pendão do seu triunfo.

Para a *Provincia* se convencer da exatidão do que asseveramos, transcrevemos os seguintes trechos dum livrinho publicado, há pouco, por quem conhece a fundo a politica interna dos nossos irmãos visinhos:

Ei-los:

— O sentimento de independencia nacional foi sempre timbre entre os indianos. As lutas renhidas contra os hunos, arabes, turcos, mongoes e afghans, as guerras sangrentas do Deccan, a confederaçao maratha e a confederaçao sikh fizeram-se contra os invasores. Foi constante preocupaçao dos hindu's manter a unidade da India. E se a dinastia mogol, durante perto de um seculo, dominou na India foi que os imperadores mogoes eram casados com princezas indianas e os seus primeiros ministros e generais como Todar Mall e Man Sinha eram hindu's.

A India e' um paiz que mais ambiçoes despertou e as tentativas da invasao duram desde o seculo VIII ate' ao seculo XVIII, em que a confederaçao maratha desbaratou os maometanos e prendeu no seu proprio palacio, em Delhi, o imperador. Foi nesta altura que os ingleses que ahi entraram com pe's de lam, por concessao magnanima de Shah Jahan, para fins mercantis, aproveitando habilmente o fanatismo dos vencidos e intrigando melhor, venceram em lutas porfiadas os valentes marathas e estabeleceram-se na India. Mas nao tem faltado revoltas. As sangrentas revoltas de 1819, 39, 45, a grande conflagraçao de 1857, centenas de associaçoes, de revistas e periodicos contra os ingleses dao bem a nota vibrante do anceio nacional. Ha, porem, uma diferença entre o modo de ser do nacionalismo antigo e o do actual. E' que antigamente todos os movimentos eram feitos pela nobreza, a massa ficava neutra ou numa obediencia inconsciente; hoje ele vem do coraçao do povo.

*

Nasceu em 1884 com a fundaçao do Congresso Nacional Indiano, onde se reunem num amplexo fraternal, todos os anos, representantes eleitos de todas as provincias, castas, religioes e associaçoes e ahi dirimem todas as necessidades do paiz; ele e' hoje a legitima representaçao da aspiraçao indiana. Foi ahi que se fez a confraternisaçao entre os hindu's e os mahometanos, que Gandhi habilmente cimentou com o seu inegualavel apostolado.

*

Logo no principio da guerra, duas correntes se desenvolveram: uma que queria a guerra *a' outrance* a' Inglaterra e outra que contentava-se, por entao, com a concessao imediata do regime de *self dominion*, igual ao do Canada' e da Africa do Sul. Venceu a segunda; o governo inglez comprometeu-se para a concessao do *self government*, no mais curto praso de tempo, e a India com a cooperaçao dos seus *leaders* enviou uma valiosa contribuiçao em dinheiro, materias primas e soldados para a guerra ... Passaram-se anos, acabou a guerra e o governo ingles faltou quatro vezes ao compromisso. E ao cabo de longos debates, concedeu-lhe a dadiva generosa de uma mitigada autonomia. A questao do Califado e os massacres de Jalianvala Bagh encheram as medidas. Foi so', entao, que Gandhi proclamou o bloqueio imediato dos ingleses.

*

A drenagem da riqueza da India para a Inglaterra, o exorbitante custo do governo extrangeiro, a enorme despesa militar, os impostos desalmados, os monopolios crueis, o sacrificio total das industrias nacionais reduziram a India em um seculo e pouco mais de dominio a uma penuria sem paralelo. Conta Bernier, ministro da França na India, no seculo 17, escrevendo ao grande Colbert *que este* Hindostao *era um sorvedouro onde o ouro e prata tinham milhares de entradas e nem uma so' saida*, querendo dizer que toda a gente ai ia comprar e que a India de nada necessitava. Pois hoje, tudo importa. So' *exporta* dinheiro, e se exporta cereais e alguma materia prima, deixa a' fome o seu povo para encher a *burra* dos desalmados capitalistas ingleses.

Em pouco menos de um seculo ultimo, houve 14 crises de fome, quando durante tantos seculos anteriores nao tinha havido senao duas. Os caminhos de ferros luxosos de que tanto se fala, custaram um ror de dinheiro e os seus resultados economicos sao desastrosos.

*

India livre constituira' com as sete grandes provincias, hoje sob o dominio directo dos inglese, os Estados Unidos, Os Confederados da India, cada um com o seu parlamento autonomo e havera', entao um senado ou parlamento onde serao representados todos os Estados, juuto do supremo eleito. Os raja's continuarao como ate' aqui, mas tributarios do Estado Central.

Como se ve, os rajas em nada ficarao prejudicados, pagarao ao paiz o que pagam a Inglaterra continuando a gerir os negocios da sua regiao. Terao ainda a vantagem de poderem ascender a' suprema magistratura quando conquistem como o Gaekwar de Baroda' simpatias gerais da Naçao.

Ecos & Critica

DANADO?!...

O sr. Pe. L. A. de Campos, o tal reverendo que se chamou *cão* e se impôs o dever de *ladrar* a favor da Igrejá catolica que o substenta, soltou no *Heraldo* do sr. Messias Gomes o seguinte latido:

"O Hindu nasçe para ser dominado e não para dominar. Se rejeita a dominação das nações cristãs necessariamente terá de aceitar o jugo maometano. Pouco importa a inferioridade numérica dos 80 milhões dos sectarios de Maomet entre 300 milhões de indús, timidos, cobardes e insusceptiviveis de organisação."

Decididamente, o ilustre frade não só tem direito a chamar-se *cão*, mas tambem pode vangloriar-se de ser um *cão danado*. Doutra forma se não explica a fúria do seu formidando *latido*.

Mas o sr. Campos ¿será só *cão danado* ou reunirá tambem *requesitos* daquele paciente animal que tem orelhas cumpridas e cuja vóz se distingue pela atraente denominação de ... *zurrar*?

Não sabemos. O que, porêm, deduzimos do *ladrar* ou *zurrar* do curioso tipo zoológico que o é por dupla razão o reverendo Campos, que essa pobre criatura de Cristo ostenta um bestunto absolutamente virgem na História da India.

Daí o seu desconexo *ladrar* dai o seu desparatado *zurrar*.

Leia o Pe. Campos a Historia da India, estude-a e medite-a! Verá, então, que o *hindú* está muito longe de ficar compreendido na vergonhosa acepção dos *insultosos* adjectivos com que, estupidamente, mas sem

रयतेवर हरतऱ्हेचे जुलमी कायदे लादीत असत. 'झिजीया'सारखे स्वातंत्र्यहारक व अपमानकारक कर तिच्यावर बसविले जात असत. या व इतर कारणांमुळें गोमांतक मुसलमानी नियंत्रणास अगदीं कंटाळून गेला होता. हें नाकबूल करून पोर्तुगीजांच्या गुन्ह्यानां आहे त्यापेक्षां आणखी जास्त उग्र स्वरूप देण्याची आमची इच्छा नाहीं. कारण, हायकोर्टचे प्रेसिडेंट " आंतोनीया द नोरोंज्य" यानीं आपल्या "हिंदु लोक आणि रिपब्लिकची स्थापना" ह्या पुस्तकांत ह्यटल्याप्रमाणें आमच्या विजयी राजकर्त्यांचीं कृष्णकृत्यें इतकीं कांहीं भयंकर आहेत कीं, मानव जातीबद्दल अभिमान बाळगिणारा कोणीहि मनुष्य, आहेत त्यापेक्षां जास्त भडक रंगांत तीं जगापुढें न मांडतां, उलट त्यांना सौम्य स्वरूप देण्याचीच खटपट करील."

मुसलमानी कारकिर्दीत कित्येक बाबतींत जरी येथें अन्याय होत होते, व यामुळें जनतेंत अशांतता नांदत होती, तरी हिंदूंना व्यापार उदीम करण्यास पूर्ण मोकळीक होती मोटमोठ्या हुद्यांच्या सरकारी जागा बहुतकरून मराठे वगैरे हिंदूनीं व्यापिलेल्या असत. धार्मिक बाबतींत देखील त्यानां बरेंच स्वातंत्र्य होतें. धार्मिक आचार व विचार उघडपणें करण्यास त्यानां ह्मणण्यासारखी आडकाठी नसे. परंतु सुखाच्या राशींत यत्किंचित् दुःखाचा अंश मनुष्याला खपत नसतो व आहे त्यापेक्षां जास्त सुख मिळविण्याकरितां सतत त्याची धडपड चालू असते. पण भविष्यकालांत काय झांकलेलें असतें व आपली कृति त्या कालांत कशी उतरेल, याचा योग्य अंदाज नसल्यामुळें, सुखाबद्दलची ही त्याची धडपड पुष्कळ वेळां त्या या सत्यानाशाला कारणीभूत होत असते. या मानवी स्वभावाला अनुसरून येथील हिंदुप्रजा, त्यावेळीं, मुसलमान सरकारचें पारिपत्य करून स्वतःचे ताब्यांत गोमांतक घेणाऱ्या कोणातरी प्रबल शत्रूची वाट पहात बसत असल्यास त्यांत नवल असें कांहींच नाहीं. बरोबर याचवेळीं पोर्तुगीजांचा येथें प्रवेश झाला. ह्या प्रवेशाला त्यांच्या शौर्यापेक्षां जास्त कारणीभूत झालेली अशी जर दुसरी कोणती गोष्ट असेल तर ती येथील प्रजेनें हा प्रांत काबीज करण्याबद्दल गुप्त रीतीनें त्यांना दिलेलें पाठबळ हें होय. ही अमुल्य मदत पुरवितांना तिनें पोर्तुगीज लोकांकडे केलेल्या अटीवजा मागण्या मात्र चांगल्या लक्षांत ठेविल्या पाहिजेत. ज्या गोष्टी मुसलमानी छत्राखालीं असतानां करण्याची तिला बंदी होती, त्या गोष्टी स्वतंत्र रीतीनें नवीन राजवटींत करण्यास मिळाव्या हेंच तिच्या एकंदर मागण्यांचें सार होतें. ह्या योग्य मागण्या फळाला येण्याचें सोडून, घरादारांची, बायकोपोरांची, व्यापार उदीमाची, व स्थाविक मालमत्तेची, इतकेंच नव्हे, तर आपल्या हिंदुत्वाची आपल्या स्वत्वाची मानून आणलेल्या ह्या नवीन राजवटींत, राखरांगोळी होऊन जाईल, असें जर तिला आधीं कळतें, तर मुसलमानी राजपद्धतीचेच जुल्म तिनें हजारदां पत्करिले असते, व 'आगींतून उडाला व फोफाट्यांत पडला' अशी आपली स्थिति तिनें खात्रीनें करून घेसली नसती, हें कोणीहि सांगू शकेल. येथपर्यंत मुसलमानी लोकांच्या हाताखालच्या गोमांतकाचा विचार झाला. पोर्तुगीज लोकांच्या नियंत्रणाखालील गोमांतकीय हिंदु जनतेचें निरीक्षण भारतांत अनेकदां व अनेक दृष्टीनीं झालेलेंच आहे.

स्फुट विचार

अकलेचे तारेः— पाद्री कांपुस यानीं आपल्या कॅथोलीक धर्माची थोरवी गाण्याच्या मिषानें हिंदुधर्माचा उपमर्द केला. हिंदूंना त्वेष येईल, त्यांच्या अंतःकरणास घरें पडतील अशा बाणेरड्या विचारांची टांकी चालविली हिंदुधर्माचा कमीपणा व खिस्ती धर्माचें श्रेष्टत्व प्रस्थापिण्यासाठीं जिवाची हुल्लड चालविली व आपल्या अंधधर्मानुयायांकडून आपल्या या शौर्याच्या झेंडा नाचविला. हिंदु लोक हे जात्याच हलगीत असल्यानें पाद्री साहेबांच्या तुणतुण्याकडे त्यानीं आधीं आधीं दुर्लक्षच केलें; पण जेव्हां अगदीं नाइलाजच झाला तेव्हां हिंदूंनीं कांपुसच्या टिवल्या बाहुल्यांना पड घेण्यास लावण्याच्या सदिच्छेनें ' फाइस्कां ' चा मार्ग अमलांत आणिला. हेतु हा कीं, पाद्रीच्या अर्थशुन्य व निरर्गल प्रलापांस आळा पडून हिंदु व खिस्ती या उभय जातींत मांजू पहाणाऱ्या धार्मिक ' तेणवारांना ' धूळ खाणें भाग पडावें.

स्वभावो दुरतिक्रमः— पण ' फाइस्कां ' च्या प्रखर आगीचा परिणाम पाद्रीच्या दगडी मेंदूवर झालेला पहाण्याचें भाग्य हिंदूंना लाभलें नाहीं उलट त्याच्या कुल्हेकुईना ऊत मात्र आलेली दिसून येतो. आपल्या बेअकली विचारांचें मागून आलेलें लोण बंद ठेवण्याच्या ऐवजीं, त्यानीं ते पुढें पोंचविण्याचाच कसून प्रयत्न चालविला असून, ह्या योगें हिंदु लोक माटमुट करतील व त्यांचा जीव मट्टयास येईल, असें त्या हिंदुद्वेष्ट्यास वाटत असावें, असा कयास बांधण्यास जागा आहे. ह्याच दृष्टीनें कांपुसानीं गेल्या १० तारखेच्या ' उयराल्दांत ' हिंदूंवर नसतेच शितोडे उडवून आपल्या कुत्सित अंतःकरणाचें व बुद्धिमांद्याचें प्रदर्शन केलें आहे. पाद्रीसाहेबांचीं अंडीपिल्लीं बाहेर काढलीं गेलीं असतांहि, आपल्या पांयावर धोंडा पाडून घेण्याच्या आड मार्गांपासून ते परावृत्त होत नाहींत, ही आश्चर्याची गोष्ट असली तरी त्याच्या जनावरी वृत्तीस साजेशीच आहे !

' निवळ हिंदु ':— ' हिंदु लोकांचा जन्म दुसऱ्यांवर पराक्रम गाजविण्यासाठीं नसून दुसऱ्यांनीं त्याच्यावर पराक्रम गाजावण्यासाठीं आहे ' ' हिंदु लोक भागुबाई असून पळपुटे आहेत त्याच्यांत अगदीं राम नाहीं. ' असें पाद्री साहबांचें ह्मणणें आहे. या निंदाव्यंजक विशेषणामुळें पाद्रीसाहेबांच्या पाठीचे जितके चकदे निघतील तितके थोडे आहेत. हिंदु लोक ' निवळ हिंदु ' असल्यानेंच पाद्रीसाहेबांची जीभ दिवसेंदिवस लांब होत आहे. जीभ पाघळण्यानें व जीभ नरकांत घालण्याचें त्यांचें देशहितविघातक कार्य केवळ हिंदूंच्या ' निवळ हिंदुत्वा ' मुळें निरंकुश चालू आहे. काळजाला पेच येईपर्यंत हिंदूंवर दुगाण्या झाडण्यास त्याना कसलीच पर्वा न वाटण्याचें कारण, हिंदूंचा फाजील सात्विकपणा होय. ह्या सात्विकपणाचा पारा आहे त्या अंशावरच स्थिर राहिल्यास, पाद्रीसाहेबांकडून आणखी कसकसल्या तऱ्हेचे मिथ्यारोप हिंदूविरुद्ध केले जातील याचा सुमार नाहीं.

हिंदूंचा इतिहासः— कांपुसना हिंदुस्थानचा इतिहास अवगत नाहीं. हिंदूंच्या पराक्रमाच्या सोनेरी अक्षरानीं व्यापलेलीं त्या इतिहासाचीं पानें पाद्रीसाहेबांच्या नजरे खालून गेलीं नाहींत. शिवाजी महाराजांच्या शौर्याच्या गोष्टी त्याना माहीत नाहींत. एवंच हिंदूंच्या इतिहास मंदिरांत त्याचा प्रवेश झालेला नाहीं. असें असतां हिंदूंचे बेचाळीस उद्धरण्यास पुढें सरसावून त्याचे बारा पंधरा करण्यास धजणें किती मूर्खपणाचें आहे, हें वाचकानींच आपल्याशीं ठरवावें. स्वधर्माच्या नांवें भंडार उधळण्यास, परधर्मावर शिव्याची लाखोली वाहिलीच पाहिजे, असें कोठें बायबलांत वाक्य.चें आह्मास आठवत नाहीं. असो. जित्याची खोड मेल्याशिवाय कशी नष्ट होईल ? पाद्रीसाहेब तर मोठ्या अभिमानानें आपणाला कुत्रा ह्मणवून घेत असून आपल्या लेखानां ' कुत्र्याचें भुंकणें ' असें ह्मगत असतात !

मतवैचित्र्यः— इंग्रजी हिंदुस्थानाप्रमाणेंच गोमांतकांतहि नवजीवन संचरलें असून पुढें मागें त्याला स्वातंत्र्याचीं गोड फळें येतील, या भारतांतील इतिहाससिद्ध विधानाची रेवडी उडविण्याच्या स्वार्थी उद्देशानें पणजीच्या ' आ प्रोव्हींस ' पत्रानें आमच्या शेजारच्या बंधूंनीं चालविलेल्या धडपडीची थट्टा केलेली आहे. त्या चळवळींत बिलकूल अर्थ नसून, हिंदुस्थानाला स्वराज्य देण्याचा मूर्खपणा इंग्रजलोकांकडून कधींहि घडून येणें शक्य नाहीं, अशी गप्पा छाटली आहे. हिंदुस्थानच्या चळवळीचें महत्व न कळण्या इतके ' आ प्रोव्हींसकार ' खास मूर्ख नाहींत. ' वचस्येकं मनस्येकम् ' अगर ' ओठांत एक आणि पोटांत एक ' अशी त्याची अनेक कारणानीं स्थिति झाली असल्यानें, हरेक बाबतींत त्याला उभयानें येऊन ओणव्यानें जावें लागते. याला त्यांचा निरुपाय आहे. बाकी प्रोव्हींसकारानींच नव्हे तर, खुद्द इंग्रजीं मुत्सद्यानों जरी हिंदुस्थानला स्वराज्य मिळूं नये, यासाठीं कितीहि घोर तप केलें, तरी हिंदुस्थानला स्वराज्य मिळावयाचें थोडेंच अडून रहाणार आहे, याची त्यानीं पूर्ण खूणगांठ बांधून ठेवावी.

येत्या अंकांत 'हिंदुस्थानचें राजकारण' हा श्री. संजयांचा लेख व साभार स्वीकार प्रसिद्ध होईल.

प्रायःश्चित पुराण

(ले॰ विरोधी)

सुमारें वर्ष दीड वर्षामागें मद्रास इलाख्यांतील एका शहरांत हिंदुधर्मांतील समस्त जातीभेद मोडून टाकण्याच्या इराद्यानें, अनेक ज्ञातींतील शिष्टानीं एक सहभोजन समारंभ घडवून आणला होता. या सहभोजनास मंगळुर कडील कांही वैष्णव संप्रदायी गौडसारस्वत ब्राह्मण सामील झाले होते. हें त्या ज्ञातींतील ब्रह्मवृंदास न खपून त्यानें त्या सहभोजनवाल्यांवर श्री काशीमठसंस्थानांत विनंतिपत्र सादर केलें. लगेच संस्थानांतूनहि बहिष्काराचा आज्ञारायस निघाला. त्या रायसाची अमलबजावणी होऊं लागल्यावर बहिष्कृत गृहस्थांपैकीं जे दोघे श्री गोकर्णमठाच्या शिष्यवर्गांतील होते ते त्या आज्ञारायसास जुमानीतनासे झाले. त्या दोघांवर धार्मिक अधिकार गाजविण्याचा हक्क श्री काशीमठ स्वामीचा कीं श्री गोकर्णमठस्वामीचा ? हा वाद बराच काळपर्यंत माजून राहिला होता. शेवटीं तें प्रकरण श्री गोकर्णमठापर्यंत पोंचून ते दोघेहि गृहस्थ श्री पर्तगाळीस येऊन योग्य प्रायःश्चितानें पुनित होऊन गेले. त्या पूर्वींच त्या प्रकरणाचा खटला सरकार दरबारांत चालू होता. त्याचा निकाल श्री काशीमठस्वामीच्या तर्फें ह्मणजे " आपल्या शिष्यवर्गावर धार्मिक अधिकार गाजविण्याचा हक हिंदु धर्मगुरूस असून बहिष्कार घालणें हेंहि त्याच सदरांत येतें " असाच झाल्याचें कळतें.

× × ×

वरील खटला चालू असतांना, सदरील सहभोजनांत सामील होणें प्रायश्चिताई आहे कीं नाहीं, या बद्दल श्री गोकर्ण व श्री कैवल्य या उभय मठांच्या स्वामी महाराजांकडे अभिप्राय घेण्यास कोर्टामार्फत एक मंडळहि आलें होतें. त्या वेळीं श्री कैवल्यमठाधिपति श्री मत्पूर्णानंद सरस्वती स्वामी कारवार जिल्ह्यांत संचारार्थ होते. त्यानीं आपला विस्तारशः अभिप्राय कमिशन पुढें सादर केला. तो मनन करण्यासारखा आहे असें ह्मणतात. त्यानंतर तें कमिशन पर्तगाळीस आलें तेव्हां श्री मदिंदिराकांत तीर्थ स्वामी यानीं आपला अभिप्राय देण्याचें नाकारालें. कारण त्याच्यापुढें असा एक दुसरा प्रश्न होता कीं, या संस्थानातून प्रायःश्चित घेऊन, पुनित होऊन गेलेल्या गृहस्थानीं संस्थान देवतेपुढें कोणत्या अपराधाची कबुली दिली होती ? खरोखरीच अनेक जातीय सहभोजनांत भाग घेतल्याचा अपराध कबूल केला होता काय ? व तें खरें असल्यास शास्त्रांत त्याला प्रायःश्चित आहे काय ? या प्रश्नास श्री स्वामीनीं ताबडतोब उत्तर दिलें कीं, येथील खिस्ती लोक पापक्षालनार्थ स्वतःच्या पापांची कबुली अनुतापपूर्वक पाद्री जवळ देतात व नंतर देवाच्या नांवानें पाद्री त्या पातकांपासून त्यानां मुक्त करतो. ती कबुली गुप्त रीतीनें दिली जात असल्यानें, उघड अथवा जाहीर करण्यास पाद्रीस कायद्यानें

दिली आणि त्यांच्या मागून वैष्णवानांहि ती आंवरेनाशी झाली. स्मार्त व वैष्णव या दोन समाजांत वेदांतिक मतभिन्नता असली तरी इतर सर्व बाबतींत त्यांचा एक जीव झाला आहे. हे दोन समाज वेगळे करणें कष्टसाध्यमुद्धां नाहीं. आतां वेकी प्रकरणांत रा. धेंप्यानां बऱ्याच स्मार्तांनीं तुरीच्या झाडावर चढविलें ही गोष्ट खरी आहे. त्यांस पुढें घालून मागें टांचा हाणण्याचें काम कित्येक स्मार्तांकडून झालें त्यास आतां उपाय नाहीं. गेले दिवस निघून गेले. यापुढें "विवेकं पदे पदे" या मंत्राचा पाठ करीत करीत कोणत्याहि चळवळीस आरंभ केला पाहिजे. असो.

\+ \+ \+

एकी वेकीची चळवळ नामशेष होण्याच्या पंथास लागली असतां, श्री. धेंप्यांनीं प्रत्यक्ष आपल्या नातीच्या लग्नास, पुतण्याच्या प्रायःश्चितानें अपशकून करावा ही गोष्ट अनुचित होय. प्रायःश्चिताचें हें प्रकरण त्यांनीं मुद्दाम घडवून आणलें आहे, असें कित्येक आग्रहानें सांगणारे आहेत. त्यांत जर किंचित सत्यांश असेल तर ही त्यांची करणी त्यांच्या शीलास शोभणारी नाहीं; आणि प्रायःश्चिताच्या अपशकुनानें आपली नात संयुक्तांच्या घरांत पडायाची थांबेल याहि समजास पुष्टिकारक होणार नाहीं. जनलोकांत पसरून वाढीस लागलेले हे नानातऱ्हेचे अपवाद मात्र त्यांना सोसावे लागतील. कसेंहि असो. श्रीगोकर्ण मठाधिशानीं, एकीवेकीच्या चळवळीच्या पूर्वीं 'बारदेशकर समाज निर्दोषी असून, त्यांचा शिष्यत्वाचा संबंध मठाशीं आतांपर्यंत अबाधित चालू आहे. समाजांतील इतर समाजानें पाहून घ्यावें' असें, आज्ञा रायसाच्या द्वारें जाहीर केलें होतें. तें रा. धेंपे आदि त्या भागांतील कांहीं मंडळींना न खपून, बारदेशकराशीं रोटी बेटी व्यवहार ठेवणाऱ्यांस बहिष्कार घालण्याचा, आणि नंतर दंड-प्रायःश्चित देऊन मुक्त करण्याचा अधिकार त्यांनीं आपणाकडां बळकावून घेतला होता. त्यामुळें बारदेशकरसमाजाचें, किंवा त्यांस निर्दोषत्वाचा दाखला देणाऱ्या संस्थानचें कांहींच नुकसान न होतां, कालांतरानें कां होईना, सर्व पोटभेदांचें एकीकरण होण्याचा सुयोग येऊन, त्या निमित्तानें रा. धेंप्यानांच, आपल्या पुतण्यास दोनदां प्रायःश्चित देऊन शुद्ध करून घ्यावें लागलें. 'इच्छी परा तें येई घरा' ह्मणतात तें हें.

× * ×

रा. श्रीनिवास धेंपे यानीं, आपणास दोनदां प्रायःश्चित घेण्याची संधी आणून दिल्याबद्दल एकीवाल्याचे आभारच मानले पाहिजेत. कारण त्यामुळें त्यांची ओळख व नांवलौकिक बराच वाढला. धेंपे घराण्याचा नांवलौकिक कितीहि मोठा असला तरी त्या घराण्याचे मालक विष्णुबाबा हयात असतां दुसऱ्यांच्या वांट्यास त्याचा कणसुद्धां येणें संभवनीय नाहीं. तसेंच केवळ श्रीमंताच्या पोटीं जन्मास येऊन श्रीमंतीचे सर्व सुखोपभोग यथेच्छ भोगण्यांत आले ह्मणून जगानेंहि त्यांची विचारपूस केली नसती. त्यांस ही आयत्या प्रसिद्धिकरण्याची आयतीच संधी मिळाली. एकीवेकीच्या चळवळीच्या आरंभीं आणि ती नामशेष होण्याच्या पंथास लागली असतां, प्रायश्चिताच्या निमित्तानें जें नांव त्याना कमावितां आलें तें प्रत्यक्ष वेकीपरिषदेचे अध्यक्ष, स्वागताध्यक्ष किंवा स्वयंसेवकांचे कप्टनसुद्धां होऊन, मिळवितां आलें नसतें. प्रागतिक संघाच्या मध्यवर्ति मंडळाच्या सभासदत्वाच्या राजीनाम्या मुळेंहि त्यानां असाच फायदा झाला. प्रागतिक संघांत राहून त्या संस्थेचें किंवा पुढें मागें एखाद्या परिषदेचें अध्यक्षस्थान त्यानां सहज प्राप्त करून घेतां आलें असतें. परंतु त्यांत त्यांना हिंदु मंडळाच्या स्थापनेसाठीं भरलेल्या सभेच्या अध्यक्षांइतकाच सुलौकिक झाला असता. त्याहिपेक्षां, त्यानीं शहाणपणा करून जो त्या सभासदत्वाचा राजीनामा दिला आणि त्यासाठीं केलेल्या पत्रव्यवहारांत आपलें अगाध घटना शास्त्र नैपुण्य व समाजहित प्रेम दाखविलें, त्यामुळें किती तरीपटीनें अधिक झाला ! प्रत्यक्ष झीज सोसून, कार्य करून जें मिळवितां येत नाहीं तें प्रायःश्चितानीं व राजीनाम्यानें साध्य करून घेतलें याबद्दल ते स्तुतीसपात्र आहेत. हिंदुमंडळानें कृपा करून त्यास चवथी संधी आणून द्यावी. इति ॐ.

ANUNCIOS

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do 2 ° oficio Barreto, vao ser vendidos em hasta publica, a porta do tribunal judicial desta comarca, situado em Xeldem, ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a estagao de Sanvordem, no dia 3 de Junho do corrente ano, a's 10 horas em segunda praça e pela metade do preço porque foram avaliados os bens seguintes: Direito a quarta parte do predio rustico da varzea denominada "Borichem mola" sito em Barcem, da cultura de arroz, Direiio a quarta parte do predio rustico da varzea denominada "Maddantulemxeta" sito na dita da cultura de arroz, Direito a quarta parte do predio rustico denominado "Gorbata," sito na dita da cultura de coqueiros e outras arvores frutiferas e direito a quarta parta do predio rustico da varzea denominada "Nondonavoli" sito na dita, da cultura de arroz, todos descritos na conservatoria predial desta comarca respectivamente sob os nos. 16593, 16594, 16595 e 16596 a fl. 137 v. te 139 do Livro B. 45 e avaliados tambem respectivamente por 230, 150. 220 e 325 rupias, Penhorados nos autos civeis de execugao por custas que o Ministerio Publico nesta comarca promove contra Malcuma Gaocarina viuva de Panglo' Gaocar, de Barcem e outros por apenso aos autos de inventario orfanologico a que se procedeu por obito do dito Panglo'. Sao por este citados todos os credores incertos dos ditos executados e os co-propriatarios e quinhoeiros nos termos e para os fins da lei. A contribuigao de registo por inteiro ficara' a cargo do arrematante. E para ser publico se expediu este. Xeldem 30 de Abril de 1924

O Escrivao de Direito do 2 ° oficio
Aires Manuel Barreto
Verifiquei O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

THE GOA FLOOD RELIEF FUND BOMBAY

Nesta cidade de Bombaim reuniram-se, sob os auspicios *de The Goa Hindu Associdtion*, no magno comicio, todos os hindus de Goa a fim de promover um fundo para socorrer possivelmente as victimas das inundações que o ano passado fizeram de Goa o teatro das ruinas e distruições. E para dar um destino digno àquele fundo organisou-se, na mesma reuniao uma comissão de alguns cavalheiros de Goa, autorisada para tanto. Como porem decorreram oito meses sem que a mesma comissão fizesse alguma coisa a esse respeito, a de Bombaim incumbiu-se de dar destino ao mencionado fundo.

Só aqueles cujas casas tiverem sido distruidas pela inundação e que precisarem do auxilio para a reconstrução delas, poderão recebe-lo, sem distinção de castas, credos ou seitas.

Os pedidos com o certificado de dois cavalheiros da aldeia do requerente, devem ser dirigidos aos abaixo assignados sob o endereço ai indicado e enviados por intermedio do sr. Panduronga Sadassiva Danaito, de Mapuçá, Goa. Os pedidos serão prontamente satisfeitos.

Ratan House
Tribhuwan Road
Girgaon-Bombay

Venkatesh Paduronga Kamat
Yeshwānt Manguexa Lad.
(Secretarios)

Ano, 1o N. 9

Quinta-feira 22 de Maio de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
P. Hegde Dessay
Quepem-Goa

S. R.
Biblioteca Nacional
Panjim

भारत.

BHARAT.

वर्ष १ लें. अंक ९

गुरुवार ता. २२ मे सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केंपें—गोवा.

CONTRA O ALCOOLISMO

Não há, hoje, quem se não sinta desfalecido perante o triste sudário de consequências destructivas que o alcoolismo deriva nas sociedades que lhe prestam culto.

Alcoolismo é o único assunto em que, geralmente, se não observa divergencia de opiniões quanto a seu corrossivo e arruinador papel. Todos são de acôrdo, todos concordam em que o alcool seja um *virus* de pior especie, um poderoso veneno que faz baquear organisações as mais solidas, quere individuais, quere sociais.

America foi a primeira nação que meteu hombros á moralisadora empresa de libertar o seu povo das garras hiantes dêsse perigoso abutre que é o alcoolismo. Foi ela que demonstrou, práticamente, que se *podia governar*, sem que no orçamento figurasse receita alcoolica que nós outros julgamos indispensavel para o nosso equilibrio orçamental.

O bom exemplo dos americanos foi seguido por outros que se convenceram da excelencia da expulsão do alcool. Na propria India Britanica, um minusculo Estado Nativo, coartando o uso de bebidas alcoolicas aos seus subditos provou que mesmo na Asia não era impossivel acabar com o alcoolismo.

E notem que quem está atestando o mesmo Estado é uma criatura de sexo fraco!...

Não é, portanto, difícil, como á primeira vista se afigura, a resolução do problema alcoolico na India. Esta pode perfeitamente manter o seu equilibrio financeiro sem se apropriar da chamada receita do *abkari* que nos representa a maior calamidade, o maior flagelo.

Importunado pela formidavel campanha anti-alcoolica dos patriotas da Presidencia de Bombaim, o governo desta, ficou, á má cara, obrigado a nomear em 1922 uma comissão do *abkari*, encarregada de lhe sugerir alvitres tendentes a porêm termo ao uso e abuso de bebidas alcoolicas entre os subditos daquela Presidencia.

Essa comissão de que faziam parte individualidades de destaque naquele meio concluiu, há pouco, os seus trabalhos, tendo apresentado ao governo varias propostas, tendendo todas á abolição gradual do alcoolismo, propostas, que sucessivamente iremos trasladando para as colunas do *Bharat* para que os que trazem fechados nos seus punhos os destinos da nossa terra, tambem se convençam da possibilidade da extinção do alcoolismo entre nós.

A primeira daquelas propostas se acha concebida nos seguintes termos:—

«Torna-se, antes de mais, nessessario que o Governo, nao so para o bem estar social mas tambem para o seu proprio prestigio, modifique, a breve trecho, a atual orientaçao do *abkari* de molde a que decresça gradualmente o vicio de beber, decrescimento que deve terminar pela radical extincçao do alcoolismo, devendo o mesmo Governo fazer, desde ja', publica esta sua nova orientaçao.»

Tem razão de ser êste alvitre; porque conhecendo a generalidade burocratica predisposição anti-alcoolica do Governo, êla envidará os seus melhores esforços por forma a que no praso muito curto se traduza em facto a aspiração governamental.

¿Quem não conhece a filosofia que encerra a corriqueira frase do *Senhor mandar* e *Senhor querer*?

A segunda indicação resa o seguinte:—

«Para que triunfe a mencionada orientaçao, deve o Governo adoptar, como primeiro passo, o principio de *opçao local*, mandando encerrar, no praso devido, tavernas nas localidades cujos habitantes se pronunciarem, na sua maioria, contra o funcionamento das mesmas tavernas. No regulamento que tera' de se confeccionar a esse respeito, devera' ser concedido direito de voto a todos os homens e mulheres de maior idade, sendo que, resolvido, uma vez, o encerramento de qualquer taverna, por maioria de votos, nao mais podera' ser consultado o sufragio sobre o mesmo assunto; mas se o resultado da votaçao for desfavoravel ao mesmo encerramento, repetir-se-ha' o acto eleitoral, frequentes vezes, nos prasos preestabelecidos.»

Da segunda sugestão flui nitida a intenção democratica da comissão que pretende, apenas, que se respeite a opinião publica, ainda, num assunto em que podia bem considerar dispensavel o mesmo respeito, dada a influencia moralisadora que irá produzir na socidade a extinção do alcoolismo.

Diz o terceiro alvitre:—

«Enquanto nao forem encerradas, pelo modo ja' exposto, as tavernas existentes, fixar se ha' o quantitativo de suas bebidas alcoolicas, quanfitativo que ira' diminuindo, anualmente.

Deduz-se do teor desta proposta que se deseja aniquilar o alcoolismo, não dum momento a outro, mas sim gradualmente e dum modo metódico.

O teor da quarta proposta é o que segue:—

«Para o futuro nao devera' conceder-se licença para a abertura de novas tavernas em cuja substituiçao, porem, podera' consentir-se a venda de *tadi*.»

¿Não marcha para o mesmo fim, o da extinção do alcool, o conceito desta última observação.

Crêmos que governantes e governados da nossa India terão muito que aprender nos alvitres da Comissão do *Abkari*, nomeada pelo Governo de Bombaim. Registaremos, porisso, tambem nas colunas do nosso jornal, as restantes sujestões da mesma que hoje nos vai escasseando espaço.

E, depois, no mez de maio que é de *folgas* e *galgas* as maçadas são insuportaveis e portanto são proibidas.

Proseguiremos, pois, no assunto, na seguinte semana

Ecos & Critica

PROMETENDO...

Recebemos algumas cartas em que se fazem acusaçoes graves ao sr. Secretario de Fazenda do concelho de Salsete.

As referidas epistolas prometem convencer-nos da veracidade das mesmas acusaçoes com documentos autenticos. Esta' bem'

Venham os documentos prometidos que prometemos tomar conta do caso, pois sem eles tornar-se-ha' suspeita a ventilaçao do assunto de que se trata, dada a circunstancia do *Bharat* ser adversario politico do funcionario visado.

Ca' pela Redacçao dentro e' desconhecida a *bitola* de atacar quem quere, sem provas concretas e positivas, bem como a de antepor conveniencias pessoais ou materiais ao interesse publico que e' a unica preocupaçao do *Bharat*.

CORDELEJO ...

A *Provincia* que e', como se sabe, orgao do Livre Pensamento, pregou um *cordelejo* no nosso colegá marganense *Hindu'*, la' porque este bordou algumas consideraçoes historicas, de resto, perfeitamente oportunas, a pro-

य व्यक्तिगत गोष्टीकडे असला तरी
ाईट हें खरेंच. पण संस्कृति
,त्तम गोष्टीकडे जेव्हां त्याची म-
ऊन भिडते तेव्हां त्याचे परिणाम
ंतर व भयप्रद असे असतात.
अंधानुकरणाची कीड समूळ ना-
ण्याबद्दल झटलें पाहिजे. असो.
एवढी प्रस्तावना करण्याचें कारण
णजे सध्याच्या तरुण हिंदु विद्यार्थी
पोर्तुगीज आचार विचारांचें अथवा
तेंवर बोलावयाचें झाल्यास खिश्चन
विचारांचें चालविलेलें अंधानुकरण
रकीय लोकांचें विशेषेंकरून पाश्चात्य
प्रस्तुतच्या भौतिक युगांत कांहीं
बाबतींत अनुकरण आपणांस हवें
बद्दल वाद नाहीं. किंबहुना, पा-
दयोन्मुख राष्ट्राचें उदाहरण आप-
न ठेविल्यास व कित्येक गोष्टींत
पूर्वपरंपरा सोडल्याखेरीज गोमंत-
ाग्याचे दिवस लाभणें शक्य नाहीं,
ाह्मांस मान्य आहे./परंतु, पाश्चा-
ोणतीहि गोष्ट केवळ त्यांची आहे,
 करितां, स्वतःच्या सारासार बुद्धी-
रें करून आमच्या सुशिक्षित (?)
ं उचलावी हें हिंदी रक्ताच्या सच्चा
कोणांस आवडणार नाहीं. अमुक
ापला आचार खरोखरीच वाईट
किंवा कसें याचा पूर्ण विचार केल्या-
त्याचे ऐवजीं परकीय आचार सुरू
त कांहीं विद्यार्थ्यांस वाटणारें भू-
दुसरें तिसरें कांहीं नसून, त्यांच्या
त्तेचें, त्यांच्या हलक्या मनोवृत्तीचें,
स्वाभिमान व स्वधर्माभिमान शुन्य-
ं द्योतक होय, असेंच कोणीहि
तरी सांगू शकेल. एरवीं त्यांनीं आ-
बुद्धि व त्याचबरोबर आपलें मन ग-
विलें नसतें. या नागड्या उघड्या
सत्यता पहावयाची असल्यास फार
वियास नको. परकीयांच्या थोर वि-
त्यांचीं मननीय व महनीय कृत्यें
च्या व त्याप्रमाणें आपल्या वर्तनाची
रविण्याच्या वेळीं आमच्या लिसेवस्थ
ची अनुकरणप्रियता कोठें व कशी
ारून बसते याची मीमांसा केल्यास
चित्राचा फार लवकर उलगडा होतो.
गच पाहिजे असल्यास, युरोपियन
अनुकरणीय गुण कांहीं थोडथोडके
धाडसाच्या व साहसाच्या बाबतींत
सेतु श्रीप्रति वसति" या म्हणण्याची
पटविणाऱ्या चार शतका पूर्वीच्या
 लोकांचें अनुकरण करा. स्वातंत्र्य-
पाहिजे असल्यास आयरिश लोकांचें
ण घ्या. ज्ञान लालसा व उद्यम
हीं पाहिजे असल्यास जर्मन लोकां-
जर फेंका. कला कुशलता हवी अस-
इटलीकडे पहा. याप्रमाणें कांहींना
री प्रत्येक पाश्चात्य राष्ट्रांत आपणास
न येईल. ही झाली प्रत्येक राष्ट्राच्या
णीय वैशिष्ट्यांची गोष्ट. त्यांतील वेग-

वेगळ्या व्यक्तींकडे पाहिल्यास देखील त्यांच्यापासून पुष्कळ घेण्यासारखें आहे. नेपोलीयन, टॉलस्टाय, रस्कीन, अर्वाचीन शास्त्रज्ञ इमर्सन वगैरे राष्ट्रीय वीरांचें विभूतिमत्व कशांत होतें याचा विचार करण्याची व तसल्या विभूति परमेश्वरा आम्हांला दे असें प्रयत्नांसह म्हणण्याची सध्याची वेळ आहे. चालण्याची ऐट किंवा बोलण्याची ढब अथवा पोशाखाची तऱ्हा इत्यादि किरकोळ गोष्टींचें, आपलें स्वत्व व सत्व गमावून अनुकरण करण्यापासून हिंदु समाजाचें तर सोडाच पण तें अनुकरण करणाऱ्या बुद्धिभ्रष्ट प्राण्यांचें देखील त्यांत कोणतेंच हित नाहीं. **स्वत्वरक्षक व सत्वशील व्यक्तीला त्याचप्रमाणें राष्ट्रालाच आज जगांत मान आहे.** ही गोष्ट, तुर्की शिपायांनीं पोशाखाचे बाबतींत केलेल्या इंग्रज लोकांच्या अनुकरणापासून उद्भवलेल्या वाईट परिणामावरून चांगली सिद्ध झालेली आहे. आचार व विचार हीं संस्कृतीचीं अंगभूत लक्षणें होत; म्हणून परकीयांचे आचार व विचार वासनाबद्ध होऊन, कोणत्याच फायद्याची आशा नसतां अमलांत आणून स्वतःच्या संस्कृतीला पर संस्कृतीची दास बनविण्यासारखें सुशिक्षितास दुसरें लांछन नाहीं. परकीय संस्कृतीला भाळून तिचे दास बनण्याऐवजीं तिला तुमची दास बनवा असेंच विवेकानंद, चिपळूणकर, टिळक वगैरे हिंदवीरत्नानीं आपणांस शिकविलें आहे, तें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे.

पोर्तुगीज लोकांचेंच अनुकरण पाहिजे. असल्यास त्यांची भाषा– विचार नव्हे– आपलीशी म्हणजे करतलामलवत् करून आपण टाकिली पाहिजे. पोर्तुगीज भाषेच्या भरपूर ज्ञानाच्या अभावीं हिंदु समाजाची बाजू ख्रिस्ती समाजापुढें उचलून धरण्याच्या कामीं आपली केवढी पंचाईत होते हें कोणास ठाऊक नाहीं असें नाहीं. ही गोष्ट मागील पिढीसच लागू पडते असें नाहीं. सध्याचे विद्यार्थी वर्गाकडे पाहिलें असतां "मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात" या न्यायानें आमच्या वरील म्हणण्याची जास्त सत्यता पटते. सतत ७ वर्षें आपला देह झिजवून लिसेवोत्तीर्ण झालेल्या व होत असलेल्या आपल्या विद्यार्थांत शें. कितीसे मिळतील कीं जे आपले विचार लेखन द्वारा लोकांपुढें मांडू शकतील ? आपल्या समाजाच्या मुलाहिजांकरितां या प्रश्नाच्या उत्तरांत न पडणेंच बरें. इतकें मात्र सांगण्यास दिक्कत वाटते कीं "विषकुंभे पयोमुखं" हें लक्षांत न ठेविल्यामुळेंच परकीय संस्कृतीचें अंधानुकरण करण्याचे बाबतींत त्यांची, अशी स्थिति झालेली आहे. पोर्तुगीज भाषेच्या बाबतींत झालेली आपली हीनावस्था दूर करण्यास त्या भाषेंतील उत्तमोत्तम लेखकांचें अनुकरण करण्यास कोणतीच आडकाठी नाहीं. रोमान्टीक स्कूल व escola romantica चे जनक Almeida Garret यांच्या ग्रंथाचें भाषेच्या दृष्टीनें अध्ययन करा. व त्यांची लेखन शैली (estlio) आपलीशी करून घ्या. पाहिजे असल्यास प्रसिद्ध कांदबरीकार Eça de Queiroz याच्या कादंबरींचा नुसत्या वाङ्मयाचे दृष्टीनें अभ्यास करा. त्याबद्दल कोणाचा मतभेद नाहीं. इतकेंच नव्हे तर तसें केल्यास हिंदु समाजाचा तर असोच पण तुमचा स्वतःचाच त्यांत फायदा आहे.

मनुष्य हा समाजाचा एच घटक आहे. कारण समाजांत राहूनच तो मनुष्य बनतो. जन्मतःच याप्रमाणें आपली इच्छा असो किंवा नसो प्रत्येक मनुष्य समाजाचा ऋणी बनतो. समाजाला ऋणी करून ठेवणें शक्य नसल्यास निदान त्याचें मूळ ऋण तरी आपल्या हयातींत फेडणें हें आपलें एक पवित्र कर्तव्य होय. कित्येक व्यक्ति अशा स्वरूपाच्या असतात. त्या समाजाशी असलेलें आपलें ऋण केव्हांच फेडून केवळ समाजालाच नव्हे तर एकंदर राष्ट्राला व कित्येक वेळां साऱ्या जगाला आपल्या अलौकिक कामगिरीनें कायमचे ऋणीं करून ठेवितात. या कोटींत त्या विभूतींचा नावनिर्देश करावयाचें झाल्यास, स्वामी विवेकानंद भगवद्गीतेचें द्रष्टे श्रीकृष्ण, याच गीतेचे परिस्थित्यनुरूप आमच्याच नव्हे तर सर्व राष्ट्राच्या अत्युच हितासंबंधीं **रहस्य** सांगणारे लो. टिळक, शांततेचे भोक्ते म० गांधीं वगैरे कित्येक अवतार आपल्या या भारत–वर्षांत व इतर ठिकाणीं झालेले आढळून येतात. असल्या व्यक्ति एकट्या दुकट्या समाजांच्या नव्हत किंवा राष्ट्राच्या नव्हत त्या सगळ्या जगाच्या होत- सगळें जग त्यांचे ऋणी बनतें. दुसरे कित्येक लोक असे असतात कीं, ते आपल्या अलौलिक असलीं तरी परहितार्थ कृत्यानीं आपलें ऋण फेडून टाकिंतात. कोणी झाला तरी, अशा लोकांचे धन्यवाद गाय त्याशिवाय रहाणार नाहीं. कारण असे सुप्रवृत्त लोक राष्ट्रांत निपजणें, हें त्या राष्ट्राच्या भाग्याचें एक पूर्व लक्षण होय. प्रत्येक मनुष्याला अशा कोटींत आपला समावेश करून घेतां येणें शक्य आहे. इतकेंच नव्हे तर समाज घटक या नात्यानें तें त्याचें एक पवित्र कर्तव्य होय, हें वर सांगितलेंच आहे. पहिल्या कोटींतील तर सोडाच पण या दुसऱ्या वर्गांतील शेंकडा पांच तरी लोक आमच्या या गोमांतकांत मिळतील कीं नाहीं या बद्दल शंकाच आहे. असो.

राहतां राहिला तिसऱ्या व कनिष्ठ प्रकारच्या लोकांचा वर्ग. यांत पडणारे लोक म्हणजे स्वतःच्या फायद्याकरितां, किंवा स्वतःचा फायदा नसून उलट नुकसान असतां समाजाच्या नाशास अंशतः किंवा सर्वस्वी कारणीभूत होणारे समाजद्रोही प्राणी होत. होतां होईतों या वर्गांत आपला समावेश न होण्याबद्दल प्रत्येकानें झटलें पाहिजे. परंतु, दुर्दैवानें असले लोकच जगांत व त्यांतल्या त्यांत या आपल्या गोमांतकांत फार. ह्याला, एक प्रमुख कारण म्हणजे दूरानुकरण व विद्यार्थी वर्गानें चालविलेलें अंधानुकरण होय. तेव्हां सध्याच्या तरुण विद्यार्थी पिढीनें चालविलेलें स्वत्व शुन्य अनुकरण टाकून देऊन "महा जनो येन, गतः स पन्थः" म्हणजे थोर पुरुष ज्या मार्गानें गेले त्या मार्गानें जाऊन आपलें स्वतःचें हित व समाजाची उन्नति करण्याची एकल्या तिच्यावर असलेली जबाबदारी तिनें योग्य रीतीनें पार पाडण्यानेंच आह्मां गोमांतकीयांना सध्याचा हीन दर्जा जाऊन त्याचे ऐवजीं जगांत उच्च दर्जा लाभणार आहे. एरवीं, नुसत्या या रंगढंगानीं आधींच भिकारी बनलेला हिंदुसमाज जगाच्या हास्यास "आपलें नासें व जगाचें हासें" या नात्यानें पात्र होणार आहे. म्हणून प्रत्येकानें स्त्रीपुरुष, गृहस्थाश्रमी किंवा विद्यार्थी, साधु किंवा सन्यासी वगैरे भेदभाव न बाळगितां "परमेश्वरा आपल्या गोमांतकाला लवकर भाग्याचें= स्वातंत्र्याचे= दिवस दाखव" असें एक मुखानें मागणें करून व त्या प्रार्थनेला प्रयत्नाची जोड देऊन वागावें, अशी विनंति आहे

प्रासंगिक बोल

(ले० रामदेव)

* श्रीमती रमाबाई ह्या थोर विदुषीनीं गेल्या महिन्यांत परलोकीं प्रयाण केलें हें 'भारता'च्या वाचकानां अवगत आहेच. ठिकठिकाणीं हिच्या दुखवट्या निमित्त महाराष्ट्राबाहेर सुद्धां सभा होऊन गेल्या; परंतु आपल्या गोमातकांत एकहि सभा झालेली ऐकिवांत नाहीं. आपल्या लोकांना ह्या थोर विदुषीचें महत्व अद्याप कळून आलें नाहीं हेंच खरें.

* श्रीमती रानडे या न्या. रानडे यांच्या पत्नि होत्या. केवळ याच दृष्टीनें त्यांची थोरवी नाहीं; तर न्या. रानड्यांनीं ज्याप्रमाणें महाराष्ट्रांतील, जनतेच्या थंड झालेल्या गोळ्याला चेतना उत्पन्न करून चालन दिलें त्याच प्रमाणें त्यांच्या पत्नीनें स्त्रीसमाजांत चेतना उत्पन्न करून स्त्रीशिक्षणाचा प्रश्न सोडविला. आज पुणें शहर हें महाराष्ट्रांत स्त्रीशिक्षणाचें केंद्र असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं व याचें बरेंसचें श्रेय श्री. रमाबाई यांच्या सेवा सदन संस्थेस देतां येईल. आज या संस्थेचा व्याप केवढा मोठा आहे हें पाहिलें असतां श्री. रमाबाई यांच्या कार्याची खरी कल्पना येईल.

* श्री. रमाबाई यांचें लग्न १८७३ मध्यें झालें. न्या. रानड्यानीं केलेला हा द्वितीय विवाह होय. या वेळीं विधवा विवाहाची चळवळ जोरांत होतीं. न्या. माधवराव तर त्या पक्षाचे अध्वर्यु होते. असें असतां त्यानीं आपला द्वितीय विवाह कुमारकेशीं केला याबद्दल त्याच्यावर टीकेचा गहजब सुरू झाला. न्या. रानड्यानांहि फार वाईट वाटलें; परंतु त्यांना पित्राज्ञा मोडतां आली नाहीं. असें त्याच्या चरित्रावरून दिसतें. रमाबाईचें वय त्या वेळीं ११ वर्षांचें होतें. त्या काळच्या मानानें ती वयोमर्यादा बरीच मोठी होती असें म्हणणें भाग आहे. या वेळीं त्यांस शिक्षणाचा संस्कार कांहींच झालेला नव्हता तरी पण पुढें स्वतः उत्तम शिक्षण संपादून महाराष्ट्रांतील स्त्रीसमाजाला शिक्षित करून सोडण्याचें श्रेय या माउलीनें घेतलें, यांतच तिची थोरवी दिसून येते. लग्न करते वेळीं तिच्या बापानें केलेला **चहाडीनें स्वतःचीं कुटूंबेंच काय पण राज्यें सुधां धुळीला जातात,** हा उपदेश स्वतः अक्षरशः पाळून त्या थोर पुरुषाची अनुरूप पत्नि असें म्हणवून घेतलें.

* न्या. रानडे १९०१ मध्यें परलोकवासी झाले. पतीच्या सहवासांत एकंदर चळवळींची योग्य आखणी केलेली होती व त्याप्रमाणें पति निधनानंतर समाजसेवेचें व्रत आजन्म स्वीकारून स्त्रियांना अनुरूप अशा सेवासदन संस्थेची स्थापना १९०८ मध्यें केली. आज ही संस्था पुण्यामध्यें तसेंच महाराष्ट्रांतील इतर ठिकाणीं कार्य करीत असून रा. गो. कृ. देवधर यासारख्या कर्तृत्ववान माणसाची तिला जोड मिळून त्यांच्या मुळेंच या संस्थेचा व्याप जरी वाढला तरीपण सेवासदनाच्या कार्यांचें बरेंचसें श्रेय श्रीमती रानड्यानां दिलें पाहिजे.

* सेवासदन या संस्थेचें कार्य किती जोमदार रीतीनें चाललें आहे याची कल्पना येण्यास त्या संस्थेविषयीं थोडीशी माहिती दिल्यास वावगें होणार नाहीं. या संस्थेचें कार्य स्त्रियांपुरतें आहे हें सांगणें नकोच. महाराष्ट्रांत २५। ३० वर्षांपूर्वीं स्त्रियांची अत्यंत दीन स्थिति होती. एकाद्या विधवा स्त्रियेला आपलें शील कायम राखून जीवनार्थ कलह चालवितां येणें शक्य नव्हतें. कारण त्यानां कोणताच धंदा माहीत नव्हता. पुष्कळ स्त्रियानां पुरुष डाक्टरकडे जाण्याची लाज वाटे व त्यामुळें औषधोपचार नीट होत नसत. लग्न होण्यापूर्वीं जर एकाद्या मुलीला अक्षर ओळख झाली तर ठीक त्यापुढें शिक्षण घेण्याची सोय नव्हती. जगामध्यें काय चाललें आहे याची तर कल्पनाच नव्हती. नर्सिंग सुईणपणा आदींचे शिक्षण शास्त्रीय व पद्धतशीर नव्हतें. अशा संस्थेची व ती योग्य रीतीनें चालविणाऱ्या थोर व्यक्तीची आवश्यकता होती व हें काम श्रीमती रानड्यांनी व त्यांच्या सेवासदन या संस्थेनें बजावलें; व आज जी तीची थोरवी आहे ती याचमुळें होय.

* सेवासदन या संस्थेच्या शाखा पुण्याशिवाय, बारामती, सोलापूर, सातारा व अहमदनगर या ठिकाणीं असून, पुण्यामध्यें १ हजार स्त्रिया शिक्षण घेत आहेत. एकंदर शिक्षणाच्या शाखा नऊ आहेत. डॉक्टर व नर्सेसच्या शाळेंत ६० स्त्रिया शिक्षण घेत असून शिक्षाकिणीच्या धंद्याकरितां ११० विद्यार्थीनीं प्रौढ स्त्रियांच्या, प्राथमिक शिक्षणाच्या शाळेंत १६६, इंग्रजी भाषा व फस्ट-एडचें शिक्षण यामध्यें ५१, शिवणकाम विणकाम वगैरे कलांच्या धंद्यांत ५१, व संगीत कलेच्या शाळेंत १३२ स्त्रिया आहेत. तसेंच बाहेर गांवच्या विद्यार्थीनी करतां ४ वसतीगृहें स्थापन केलेलीं असून त्यांत १७५ स्त्रिया आहेत. आज या संस्थेचा वार्षिक खर्च ८५ हजार रु. आहे. या संस्थेनें स्त्रियांच्या सर्व अडचणी नाहींशा करण्याचें श्रेय घेतलें असें म्हटल्यास बिलकूल अतिशयोक्ति होणार नाहीं.

ह्यांची संख्या कट्टया ह्मणजे म. गांधीच्या पक्षास चिकटून राहण्याऱ्या लोकांच्या संखे पेक्षां कमीच होती आणि ह्मणुन कॉंग्रेसमध्यें ह्या पक्षाची सरशी झाली नाहीं. पण कॉंग्रेसचा कार्यक्रम बदलतां आला नाहीं तरी हे 'बंडखोर' लोक स्वस्थ राहिले नाहींत; लोकमत आपल्या पक्षास अनुकूल करुन घेण्यासाठीं ह्यानीं बाहेर चळवळ चालविली व पूर्वींच्या कॉंग्रेस बैठकींत मुक्रर केलेले बहिष्कारत्रयीच्या (सरकारी कौन्सिलें, शिक्षणसंस्था व न्याय कचेऱ्या ह्यां वरील बहिष्कार) ठरावांची तीव्रता कमी करण्यांत यावी अशीं जोरानें मागणी केली. कॉंग्रेसशीं बेइमान न होतां आपणास आपला कार्यक्रम, सुधारलेल्या कौंसिलांत जाऊन १९१९ च्या सुधारणा किती कृत्रिम आहेत हें जगास दाखविण्यासाठीं करावयाचा विध्वंस व अडवणूक—पुरा करण्यास कॉंग्रेसनें संमति द्यावी, ही त्यांची मागणी असहकारितेच्या तत्वाविरुद्ध आहे ह्या सबबीवर, कट्टया असहकारवाद्यांनीं फेंटाळून लावण्याचा प्रयत्न केला. पण कित्येक कॉंग्रेसपुढाऱ्यांनीं आपलीं मतें बाजूस ठेवून कॉंग्रेसच्या तळांत होऊं पहाणारी दुफळी टाळली. १९२३ ची बठक [मौं. महमद अल्लीच्या अध्यक्षतेखालीं] कोकोनाडास होण्यापूर्वीं, मुंबईस कार्यकारी मंडळानें आपल्या बैठकींत समेटाचा ठराव पास केला व कॉंग्रेससारखी प्रातिनिधिक संस्था ही कोणत्याच विशिष्ट पंथाच्या लोकांच्या हातांत नसून खरोखरच राष्टीय स्वरूपाची आहे हें सत्य पुन्हां एकदां जगाच्या निदर्शनास आणून दिलें. कोकोनाडाच्या कॉंग्रेसमध्यें दे. बं. दास ह्यांच्या मागणीच्या मुळाशीं असलेल्या तत्वास मान्यता देण्यांत येऊन ह्मणजे कॉंग्रेसने आपले पूर्वींचे ठराव रद्द न करतां कॉंग्रेसच्या सभासदांना त्या सभेशीं असलेला संबंध कायम ठेऊनहि ह्या बहिष्कारत्रयीं संबंधीं निर्बंध त्यानीं पाळण्याचें कारण नाहीं असें ठरवून कौंन्सिल प्रवेशास संमति दिली.

ह्या संमतीचा फायदा घेऊन कौन्सिलवादी १९२३ च्या कौंन्सिल निवडणुकीस उभे राहिले व त्यांपैकीं बरेचसे निवडूनहि आले. मध्यप्रांताच्या स्वराजिष्टांची कौन्सिलांत व विशेषत: लेजिस्लेटीव्ह–ॲसेंब्लीमध्यें स्वराजिष्टांचा बराचसा भरणा आहे व हल्लीं स्वतंत्र पक्षाच्या लोकांची मदत मिळविल्यामुळें पुष्कळदां सरकारचा व त्यांच्य बगलबच्यांचा पराभव करणें त्यानां जड जाव नाहीं. ह्या पक्षांतील लोकांचा आपआपसांत मतभेद नाहीं असें नाहीं; व्यक्तीच्याच मताचा प्रश्न असता तर त्यांच्यांत बरीचशी मतभिन्नता दिसून येती त्यांत श्री. केळकरांसारखे 'प्रागतिक' मतांचे, ज्यानीं फक्त कौन्सिलांत विरोध करून द्विदळ पद्धति नष्ट करणें हेंच आपलें ध्येय ठरविलेलें नाहीं, असे लोक आहेत, पण अर्थातच अशांना सुद्धां आपल्या पार्टीची शिस्त पाळावी लागते; श्री बापटिस्टानां स्वतंत्र उमेदवार ह्मणूनआपल्या आवडीनिवडीचे जे हक्क आहेत ते हक्क स्वराज्य पक्षाच्या अशा उमेदवारांना नाहींत. स्वराज्य पक्षाचें आज असलेलें ध्येय नेहमीच कायम राहणार नाहीं, हें खरें आहे, तरी पण सध्या त्या पक्षांत श्री. केळकरासारख्यांच्या मताचें प्राबल्य होणें शक्य दिसत नाहीं. किंबहुना अशा प्राबल्याबरोबर स्वराज्य पक्षांत व दुसऱ्या पक्षांत जो फरक आज दिसत आहे तो नाहींसा होऊन कौन्सिलांतील असहकारितेचे प्रतियोगी सहकारतेत क्षणीं रूपांतर होईल त्याचक्षणी स्वराज्य–पक्षाचा लोप होऊन त्या पक्षाचें स्वतंत्र किंवा दुसऱ्या एखाद्या पक्षांत रूपांतर होईल. पण असा प्रसंग आज किंवा पुढें केव्हांतरी येणार नाहीं, असें मानण्यास बरीचशी जागा आहे. तसें नसतें तर स्वराज्य पक्षानें दिवाणगिऱ्या पत्कराव्या ही कांहीं 'दिवसांपूर्वीं बंगाल व मध्यप्रांताच्या गव्हर्नरांनीं केलेली सूचना स्वराज्य पक्षानें केव्हांच मान्य केली असती. एकंदरींत, स्वराज्यपक्ष (त्याचें दुसरें कोणतेही गुणदोष असोत) सरकारी गळ गिळण्या एवढा भोळा, किंवा नोकरशाहीचा डाव न ओळखण्या एवढा मूर्ख नाहीं.

Anuncios

O Bharat, ano 9°, n° 9, 22 de Maio de 1924.

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.

TEMPLO DE SRY MAHADEU DE CACORA'

E' convocada a masania do templo para se reunir em uma sessão que terá lugar no dia 26 do corrente mês, ás 15 horas, no logar das sessões, afim de eleger a nova mesa administrativa e seus suplentes para o segundo bienio desde 1924 a 1926. Aos 18 de Maio de 1924.

O escrivão da mesa,
Vossonta Vamona Sinai Cacodcar

Visto o presidente
M. H. Porobo.

JUIZO DAS EXECUCOES ADMINISTRATIVAS DE QUEPEM

Pelo juizo das execuções administrativas do Concelho de Quepém e cartorio do escrivão Volvotcar, vão ser arrematados no dia 27 de Junho proximo seguinte, ás 12 horas, á porta da administração doConcelho pelo maior lanço que fôr oferecido, na hasta publica por tempo de um ano, os rendimentos da varzia do aforamento Dondiamolla, sito em Teloy e pertencente a Balcrisna Sinai Quenerò, de Cuncolim e penhorados na execução administrativa que o comunidade da provincia de Baly move contra o dito Balcrisna, para cobrança da divida de foros do aforamento dos ános de 1915 a 1918, na Importancia de 38:14.01, alem de respectivos juros de mora, selos e custos do processo.

Quepém, 13 de Maio de 1923

O escrivão do processo
Caxinata Sinai Volvotcar

Visto

O Juiz das execuções
M. Rebelo

JUIZO DAS EXECUCOES ADMINISTRATIVAS DE QUEPEM

Pelo juizo das execuções administrativas do Concelho de Quepém e cartorio do escrivão Volvotcar ,vão ser arrematadas no dia 27 de Junho proximo seguinte, as 12 horas, á porta da administarção do Concelho pëlo maior lanço que for oferecido, na hasta publica por tempo de um ano, os rendimentos dos predíos Cungudem, Zorod. da ponsogal, sito em Quepém e dos de Beneabata sito em Cusmane, pertencentes a Xencora Sini Contoco, de Utordá, de Salcete e penhorado na execução administrativa que a Comunidade da provincia de Baly move contra o dito executado Xencora, para cobrança da divida de foros dos anos de 1911 a 1914, na importancia de 97:12:04, além dos respectivos juros de mora, selos e custas do processo.

Quepém 13 de Maio de 1924

O escrivão do processo
Caxinata Sinai Volvotcar

Visto

O juiz das execuções
M. Rebelo

JU ZO DAS EXECUCOES ABMINISTRATIVAS DE QUEPEM

Pelo juizo das execuções administrativas do Concelho de Quepém e cartorio do escrivão Volvotcar, vão ser arrematados no dia 27 de junho proximo seguinte, ás 12 horas á pórta da administração do concelho, pelo maior lanço que for oferecido, na hasta publica, por tempo de um ano os rendimentos dos predios Molavoril borodda sito em Cusmane dos predios Torla cünoguy Colemanddo primeira adição, sito em Sirvoy, Clapabata, sito em Amonã, Vagxepa, sito em Molcornem e do de Patmollem bagaeta tucoda sito, em Curchorem e pertencente ao executado Butó Sinai Sirvoicar, de Sirvoi, e pendorados na execução administrativa que a comunidade de Sirvoi, move contra o dito executado Butó, para cobrança da divida da renda dos campos do ano de 1901 na importancia de 64:0:1 alêm dos respectivos juros de mora selos e custas do processo.

Quepém, 13 de Maio de 1924

O escrivão do processo
Caxinata Sinai Volvotcar

Visto

O juiz das execuções
M. Rebelo

Ano 1 N. 10

Quinta-feira 29 de Maio de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
Por cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष १ ले. अंक १०

गुरुवार ता. २९ मे सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगेडे देसाई
केंपें—गोवा.

PROSSEGUINDO...

O *Bharat* registou na sua edição passada os quatro primeiros alvitres, sugeridos pela Comissão de *abkari* ao Governo da Presidencia de Bombaim.

Prosseguindo, temos a fazer publicos mais os seguintes:

«Devera' ser proibido o *habito* de beber nas tavernas; para se conseguir este fim, caducadas as licenças actuais, nao se concederao novas nao se aplicando esta regra a hoteis, restaurantes e outros estabelecimentos similares. Havera', porem escrupuloso cuidado para estes estabelecimentos se nao transformarem em tavernas disfarçadas, devendo-lhes ser proibida a venda de bebidas alcoolicas. Nao sera', igualmente, permitida a sua saida dos estabelecimentos daquela classe, ja' existentes.

*

Entrara' ja' em vigor a orientaçao de reduzir o numero de tavernas de espiritos nativos; mas em caso algum, sera' consentida a venda de bebidas alcoolicas europeas, em lugar das mesmas tavernas, cuja bitola de reducçao deve subordinar se aos conselhos das comissoes locais, e nao ser uniforme ou depender da densidade da populaçao.

*

A escolha do lugar para o estabelecimento das tavernas e' da competencia das comissoes locais; mas nenhuma taverna se estabelecera' nas estradas e lugares publicos, nas visinhanças do mercado, escolas, igrejas, templos, mesquitas, casas de recreio e outros sitios movimentados. O local da taverna deve ser limpo e higienico.

*

As tavernas que funccionarem ao pe' das tecelanias e fabricas encerrar-se-hao, transformando-se em lojas as existentes nas suas proximidades, lojas que deixarao, tambem, de funcionar nos dias em que se conservarem fechadas as mesmas fabricas e se fizer pagamento aos seus empregados.

*

Nos concelhos, nos dias do bazar, feiras e *zatras* manter-se hao fechadas as tavernas; nos restantes dias estas funcionarao nas cidades desde dez e meia horas ate' sol posto e nas aldeias desde dez e meia ate' doze horas e desde 15 horas ate' sol posto.

*

Para o futuro, nao se elevara' o preço de bebidas alcoolicas, nao sendo, porem, estensivo este previlegio a's bebidas alcoolicas europeas sobretudo baratas.

*

Aos rapazes da idade inferior a 20 anos, e' proibido vender-lhes qualquer bebida alcoolica, nao podendo eles ser admitidos como empregados em qualquer taverna. Nos concelhos e nas cidades serao nomeadas comissoes de *abkari* em cuja constituiçao deverao entrar dois terços do elemento popular e um terço do oficial, com as obrigaçoes de:

(a) Reduzir o numero de tavernas
(b) Estabelecer-lhes o horario
(c) Marcar lhes o lugar
(d) Limitar-lhes a percentagem alcoolica e
(e) Fixar o quantitativo da vendagem de *tadi* nos estabelecimentos e por *debaixo dos arvores*.

As referidas comissoes funccionarao por tempo de tres anos, decorridos os quais serao renovadas. Nenhuma destas comissoes podera' propor, durante o periodo do seu funcionamento, reducçao do numero das tavernas, superior a' sua terça parte. Todos os assuntos em que nao houver uniformidade de vistas serao resolvidos por maioria de votos.

*

Nas arremataçoes de bebidas alcoolicas, sempre tera' preferencia a sociedade de temperança que concorrer a praça.

*

As regras aplicadas a's bebidas alcoolicas nativas deverao tambem estender se, todas as vezes que as circunstancias o permitirem, a's bebidas europeas.

*

Até aqui alvitres, tendantes a pôrem termo á desenfreiada difusão do alcool.

Mas ¿qual a maneira de criar novas fontes da receita que o *abkari* ora produz e que desaparecerá com o desaparecimento do alcoolismo, quando se procure trilhar a senda apresentada pela Comissão de Abkari de Bombaim?

Ora, quem preconisou a urgencia e necessidade da extinção do uso e abuso das bebidas alcoolicas, tâmbem aventou o modo de criar novas fontes de receita e as quais consistem no seguinte: no aumento do imposto de transmissão, na elevação dos impostos sobre o jogo de azar, sobre o tabaco e contribuição de juros, no lançamento de impostos sobre operarios etc.

E' claro que a criação das fontes de receita tem de obedecer ás condições economicas do nosso paiz, não podendo, portanto, ser copiado aqui tudo o que se refere á Presidencia de Bombaim, no tocante á mesma criação.

Em todo o caso, do esboço sumario que fizemos da utilissima obra dos ilustrados membros da Comissão de *Abkari* de Bombaim, pode o nosso governo colher ensinamentos proveitosos que lhe facilitem a solução do problema do alcoolismo, reputado *insoluvel*...

Por linhas tortas

Sejamos francos para que todos nos entendam bem. A classe hindu' tem-nos merecido profunda simpatia, e ainda nao desceu sequer um ponto do excelente conceito que dela sempre temos formado.

Ha, porem, uma coisa que nos desgosta e que partindo dos que dirigem periodicos nao pode passar despercebida. Bem sabemos que nem todos e talvez mesmo a maioria dos hindus ilustrados, aprovam a politica desfarçadamente hostil que se vem fazendo contra a soberania portugueza nestas paragens. A verdade porem, e' que essa politica vai impressionando mal e vai nos predispondo para uma atitude de que bem nos desejariamos manter afastados.

Volta e meia fere se a Republica em *sueltos* que se nao harmonisam com a justiça, nem com a verdade, e comtudo a' Republica e so' aos republicanos os hindus devem o verem-se investidos de todos os direitos, de todas as regalias concedidas aos cidadaos portugueses. A' Republica e aos republicanos devem os hindus a sua colocaçao nos lugares publicos los mais elevados. E' certo que os hindu's conquistaram esses lugarse pelo seu trabalho, pelo seu esforço individual, pelo seu reconhecido merecimento.

Mas nao e' menos certo que quem tem a faca e o queijo na mao pode talhar a fatia da forma a melhor servir o afilhado, e de maneira que, mesmo dentro da lei, outros possam ser os melhores servidos.

Nestas condiçoes nada ha que justifique uma politica que possa ferir ou magoar a Republica Portugueza, e fere ou magoa a tentativa que se vai fazendo para fazer prevalecer a lingua marata sobre a lingua portugueza, antepor ao dominio portugues uma independencia pela qual um jornal hindu' ha' dias pedia rezas aos seus deuses, e a insistencia na sementeira de uma futura India donde se expurgue o chamado europeismo.

Quem dirige as massas populares tem obrigaçao de ser ponderado, tem o dever de racionar; tem de prever as consequencias dos seus actos.

A India Portuguesa pode constituir um estado tipicamente hindu' num futuro mais ou menos proximo? Nao, pode, salvo querendo ser encorporada, na India visinha. Mas neste caso a que fica reduzida? A uma aldeia, a uma dependencia de qualquer outro Estado, dado que a nova India revista a forma de uma federaçao.

E porque? Porque a nossa India sem recursos economicos que lhe permitam sequer o titulo de uma pequena naçao, nao pode subsistir desagregada de qualquer Estado.

Mal por mal, antes o que existe.

Querem os hindu's levantar a nossa India, engrandece-la, fazer que ela seja um elemento de peso na vida mundial?

Tambem no's, os europeus, o ambicionamos.

Querem mais liberdades? façam por elas que Portugal lhas nao recusara'

संस्कृतीचें ज्ञ गोमांतकावर अखंड चालू असावें, अशी त्यांची इच्छा आहे. परंतु ईश्वरेच्छा दुसरीच असल्यानें हिंदूंकडून बाताल्यवाहेवांची 'घमेंडानंदनी' अट पाळली जाऊन ते परकीयांच्या लाथा खात अनंत काळ परदास्यरूपीगर्तेंत खिचपत पडल्याचें पहाण्याचें भाग्य प्रोव्हिंसकारांच्या वंशजानां लाभेल, असें आह्मांस वाटत नाहीं. पेरैर बाताल्यांच्या मनांत कितीहि मोठें मांडे असले तरी अखेर त्यांच्या पदरांत धोंडेच शिल्लक रहातील, असेंच लोकांना वाटणार आहे.

वर्तमानसार

—शांतिविस्तार लिहितातः— भारताच्या १५ मे १९२४ च्या अंकांत प्रसिद्ध झालेला " प्रायश्चित पुराण " हा लेख वाचून मी आश्चर्यचकीत झालों आहें. खेद वाटण्याचें कारण हें कीं,श्री० धेंपे यांना एकीवेकीप्रकरणाच्या वेळीं बाहेरगांवच्या स्वकार्यसाधु लोकांनीं निष्कारण बळी पाडलें होतें अशी समजूत स ठिकाणी झाली होती व त्यामुळें श्री. धेंप्यांची कींवच करणें योग्य वाटत होतें. सांप्रतच्या त्याच्या वर्तनानें असें वाटतें कीं, मागील चळवळीस श्री. धेंपेच कारण असून बाहेरच्या लोकांचें प्रोत्साहन त्यांस दुजोरा मिळण्यास कारण झालें. असो. मला आश्चर्य वाटण्याचें कारण, धेंप्यांस परोक्ष अगर अपरोक्ष श्री. शांताराम नारायण दाभोळकरांविषयीं थोडी बहुत माहिती असताहि त्यांनीं दाभोळकरांविरुद्ध आपली कर्मकहाणी पुढें करीत असावें. स्वज्ञात काय, तिचा इतिहास काय, शुद्ध आचार विचार कोणते, ज्ञातीच्या हिताची खरी दिशा कोणती, वगैरे वगैरे वार्तांचा श्री. दाभोळकरांनीं आज सरासरी चाळीस वर्षे इतका अभ्यास व शोध केला आहे कीं श्री. धेंपे यांस त्या कामीं कांहीं काळ श्री. दाभोळकरांचें शिष्यत्व पत्करणें उचित होईल. ज्ञातींतील भेद पोटभेद एक करणें हें पुण्य किंवा पाप याचें निराकरण श्रीमंतीच्या जोरावर कधींच अवलंबून नसतें. लक्ष्मीचा व सरस्वतीचा विरोध बहुतेक जागीं दिसून येतो, व याचा अनुभव श्री. धेंपे कृतीनें दाखवीत आहेत. श्री. दाभोळकर हे कट्टे धर्माभिमानी व शुद्ध आचारप्रिय असून ठिकठिकाणी त्यांजविषयीं असलेला पूज्यभाव वाढत चालला आहे हें पाहून देखील श्री. धेंपे यांजसारख्या सद्गृहस्थानें त्यांजकडे विरोध करीत रहाणें ह्मणजे आपल्या खुळेपणाचें दुकानं रात्रंदिवस उघडें ठेवणें होय. श्रीमंत दाभोळकरांचें ऐश्वर्य, औदार्य इतर सद्गुण व तत्संबंधीं कीर्ति यांच्या परोक्ष श्रवणानें मत्सरग्रस्त होऊनच जर श्री. धेंपे आपलें अशुभकार्य चालवीत राहणार तर साधुवचनाप्रमाणें " ज्याचें त्याणेंच अनहित केलें ॥ तेथें कोणाचें काय बा गेलें ॥ असेंच ह्मणावें लागतें. ॐ शांति :

—पणजीच्या पाठशाळेंत प्रत्येक वर्गाचे पुढें दिल्याप्रमाणें भाग (turmas) पाडण्यांत येणार आहेतः वर्ग पहिला (वर्ष पहिलें), ३ भाग; व. २ रा, ४; व. ३ रा, २; व. ४ था ३; व. ५ वा, ५; व. ६ वा, प्रत्येकीं १ ; व व. ७ वा, लेत्रस १ व सियेंसियस १ विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित करण्यांत येणार असून, ज्यांचा प्रवेश होणें अशक्य होईल त्यांची फी त्यांना परत केली जाईल.

—ब्राझिल देशानें गहूं व पीठ या आयात मालावरील ४० टक्के कर कमी केला. येथें तर तांदळावर कर वाढविला जातो !

—'मौज' पत्राचा 'वसंत अंक' प्रसिद्ध झाला. मजेनें होत असलेली 'मौजेची' भरभराट पाहून मजा वाटते.

—'सार्वत्रिक शिक्षण फंड' या नांवांचा एक फंड निर्माण केला गेला असून, त्याची व्यवस्था एका मंडळाकडून राखिली जाईल. या मंडळांत शिक्षण खात्याचे मुख्याधिकारी, मुलकी खात्याचे अधिकारी व शिक्षण खात्याचे एक कामदार, इत्यादींचा समावेश करण्यांत आला आहे. या शेवटच्या कामदाराची नेमणूक दोन दोन वर्षांनीं होणार आहे.

प्रासंगिक बोल

कर्तार नारायणसिंग आगरवाला यांनी सोवळ्या हिंदूंकरतां एक स्वतंत्र आगबोट ठरवून युरोपचा प्रवास करण्याचें ठरविलें आहे. आजपर्यंत शंभर प्रवाश्यांनीं आपलीं नावें नोंदल्याचें कळतें. या बोटीवर सर्व व्यवस्था सोंवळी होणार आहे. आगबोटीवर जेवणाची व्यवस्था हिंदु तऱ्हेची असून पूजेकरतां देवांच्या मूर्ति, सोंवळें व पवित्र गंगाजळादि नेण्यांत येणार आहे. ही मंडळी इटाली, फ्रान्स, जर्मनी व हालंड या देशांत प्रवास करून नंतर लंडनमध्यें हिंदुकरितां एक स्वतंत्र भोजनालय स्थापन करण्याचें यांच्या मनांत आहे. प्रवास खर्च पहिला वर्ग ५ हजार, दुसरा वर्ग ४ हजार व तिसरा वर्ग ३ हजार रुपये आहे.

\+ + +

या मुळें हिंदूंच्या खुळचटपणाचें प्रदर्शन जरी जगभर झालें तरीपण आपल्या पुराणमतवादी बंधूंना जग कसें चाललें आहे याचा तरी अनुभव प्राप्त होईल. प्रवासाचा मुख्य उद्देश अनुभवानें शहाणपणा प्राप्त करून घेण्याचा असतो व या प्रवासामुळें असा शहाणपणा जर आपल्या पुराणवादी बंधूंना प्राप्त झाला तर ते आपला हट्टवादीपणा बराचसा सोडून देऊन हिंदुस्थानच्या भावी उत्कर्षाला मदत करतील यांत शंका [illegible] धनिकानां [illegible] गांधीची चळवळ [illegible] इच्छा होईल काय ? इतकी सोंवळी व्यवस्था असतां आपल्या धर्मगुरूंनींसुधां प्रवास करण्यास कोणती हरकत आहे !

× व्यवस्थापकांचा पत्ता ३३ जार्ज टाउन अलाहाबाद [प्रयाग] असा आहे.

\+ + +

रा. महादेव शास्त्री दिवेकर यांई प्राज्ञ पाठशाळेचे प्रचारक यानीं हिंदुधर्माविषयींचा खोल अभ्यास केलेला आहे. त्यांचे लेख वाचनीय व मननीय असतात. चालू वसंत व्याख्यान मालेंत त्यानीं एक 'हिंदुसमाजाची पुनर्घटना' या विषयावर व्याख्यान दिल. त्यावेळीं ते ह्मणाले 'आपल्या लोकांत असा एक गैरसमज पसरलेला आहे कीं, सुवर्ण युग होऊन गेलें असून यापुढें कलियुगाचा महिमा वाढणार आहे.या कलियुगांत नाना तऱ्हेचे अनाचार वाढतील लोकांची प्रवृत्ति त्यापासून पराङ्मुख होऊन सर्व वाईट प्रकार घडतील. तेंच ख्रिस्ती व मुसलमान लोकांकडे पहा. त्याच्यांत सुवर्णयुग पुढें येणार आहे अशी दृढ समजूत असल्यामुळें, त्यांचा आयुष्यक्रम आशाजनक असतो. तेव्हां आपल्या लोकांत जी घातुक कल्पना पसरलेली आहे ती अवश्य काढून टाकली पाहिजे तरच आपला पुढील मार्ग आशाजनक होईल.

\+ + +

रा. दिवेकर शास्त्री ह्मणतात तें खरें आहे. थियोसफीस सुधां मैत्रेय ऋषींच्या आगमनाची वाट पहात आहेत. त्यांच्या मतें हा अवतार झाल्यावर हें जग सुखाचें नंदनवन बनून जाईल. यांचे एक अध्वर्यु मि. लेट बीटर यानी एक 'भविष्य पुराण' केलेलें आहे. हें पुराण इतकें हृदयंगम आहे कीं, त्यापुढं इंद्राचा स्वर्ग सुधां तुच्छ वाटेल. एकंदरींत हिंदुलोकांशिवाय इतरानीं आशावादाला फांटा दिलेला नाहीं. फक्त आह्मींच निराशावादी होऊन रडतराउतासारखे वावरत आहोंत. याचें उदाहरण ह्मणजे पतित परावर्तनासारखा अत्यंत आवश्यक प्रश्न सुधा पुढें येतांच आपल्या जुन्या लोकांचा असा ग्रहठाम होतो कीं, हे सर्व चाळे कलियुगाचीं पूर्वचिन्हें आहेत. कलियुगांत अशीं कृत्यें घडणार हें आमच्या पूर्वजानीं पूर्वींच लिहून ठेवलेलें आहे. अशा गैरसमजुतीमुळें आपल्या लोकानां काम करण्याला बरेच अडथळे उत्पन्न होतात. तरी यापुढें ही घातूक कल्पना मनातूंन घालवून पुढें येणारें सुवर्णयुग आहे अशा समजुतीनें कामाला लागलें पाहिजे, यांत कांहींच शंका नाहीं.

\+ + +

कलकत्यांतील एका तरुण मुसलमानानें अत्यंत परिश्रम करून बी. ए. ची परीक्षा पास करून घेतली. ह्याची घरची गरिबी होती तरी पण आपण पास होऊन डिग्री मिळतांच आपणाला भरपूर पगाराची नोकरी मिळेल या आशेनें गरिबीकडे लक्ष न देतां एकदांची परीक्षा देऊन डिप्लोमा घेतला. पुढें नोकरीच्या आशेनें त्यानें दोन वर्षें पर्यंत सारखे अर्ज केले. त्यांत त्यानें तीस रुपयांची नोकरी सुधां आपण पत्करण्यास तयार आहों असें स्पष्ट लिहिलें होतें. परंतु त्याला कांहीं नोकरी मिळाली नाहीं. शेवटीं त्यानें रतीबारला एक पत्र लिहून आपला डिप्लोमा परत पाठविला व असें पत्र लिहिलें कीं, याची किंमत बाजारांत एक पैसा सुधां नाहीं. करितां आपला डिप्लोमा परत घ्यावा. या तरुणाचे 'बोल' आमच्या गोमांतकांतील विद्यार्थ्यांनीं अवश्य ध्यानात ठेवावे अशी आमचीं विनंति आहे.

स्वयंसेवककारांची आत्मप्रौढी

(लेः– विरोधी.)

फोंडा येथें प्रसिद्ध होत असलेल्या स्वयंसेवकाचा, फेब्रुवारीचा ह्मणून, ता. ३० एप्रील रोजीं जो एक अंक प्रसिद्ध झाला आहे, त्यांतील कित्येक मजकुराचा बोध नीटसा होत नाहीं. सबब त्याचा जाहीर खुलासा व्हावा या इच्छेनें खालील चार शब्द लिहीत आहें.

१ ' इतस्ततः' या सदराखालीं, मडगांव येथील सारस्वत ब्राह्मण समाज, या संस्थेमार्फत होणाऱ्या व्याख्यानमालेवर एक स्फुट आहे. त्यांत संपादक लिहितातः— "स्वयंसेवकानें बृहन्महाराष्ट्र कल्पनेच्या प्रसारार्थ जी चळवळ चालविली आहे, तिला मूर्त स्वरूप येण्यासाठीं अशा प्रकारच्या संस्थांची सहकारिता आह्मांस विशेषेंकरून हवी आहे."

यावर असा एक प्रश्न उपस्थित होत असतो कीं, बृहन्महाराष्ट्र कल्पनेच्या प्रसारार्थ स्वयंसेवकानें कोणती चळवळ चालविली आहे ? व त्याला या कामीं आणखी इतर कोणत्या संस्थेची सहकारिता मिळत असते ? 'स्वयंसेवकानें' या चळवळीच्या जनकस्थानीं स्वतःस अभिषिक्त केलें असून इतरांकडून सहकारितेची अपेक्षा केली आहे. बा त्याच्या लिहिण्यांत कांहीं तथ्यांश आहे काय ?

गोमांतक व महाराष्ट्र परस्परांस [illegible] लागल्यास बरीच वर्षे झालीं, अशी माझी समजूत आहे. पण या उभय भागांवरील त्रुटितपणा काढून टाकून त्यांचा सर्व प्रकारें एकजीव करण्याच्या कांहीं युक्तीचें नवें पेटंट किंवा मक्ता स्वयंसेवकानें घेतला आहे काय ?

२ दुसरा मजकूर, रा. दामोदर विश्वनाथ गोखले यांचा अभिप्राय ह्मणून छापलेला, शेवटल्या पत्रावर खालीलप्रमाणें आहे:—

"स्वयंसेवकानें इकडील (गोमांतकीय) महाराष्ट्रीयांस स्वत्वाची ओळख करून दिली आहे. राजकीय परिस्थितीनें तुटकलेल्या प्रांतास मूळ महाराष्ट्रीयांस कायमचें जोडण्याचें श्रेय स्वयंसेवकानें घेतल आहे ..... तो खरा स्वयंसेवक आहे इ०". केवढा धाडसाचा आणि वस्तुस्थितीचा विपर्यास करणारा अभिप्राय पहा ! स्वयंसेवक प्रसिद्ध होण्याच्या पूर्वी गोमांतकांत स्वत्वाची ओळख नव्हतीं काय ? सत्संगासारखीं मासिकें, प्रभात भारतासारखीं पत्रें, ठिकठिकाणचीं वाचनालयें, ह्मापसेंचें सारस्वत विद्यालय, फोंडा येथें आज बरेच वर्षें सुव्यवस्थित चालणारें आल्मैदा कॉलेज व त्या संस्थेमार्फत निघणारें प्राची-प्रभा पत्र, पणजी येथील श्री महालक्ष्मी वाचनमंदीर, श्री शारदा वाचनमंदीर व मुष्टि-फंड संस्थेमार्फत चालणारें विद्यालय. आणि मडगांवच्या सा. ब्रा. समाजानें व श्री सरस्वतीसेवक मंडळानें, चालविलेल्या व्याख्यानमाला हीं काय गोमांतकांतील, स्वयंसेवकाच्या जन्मापूर्वीं झालेल्या स्वत्वाचें निदर्शक

तशीर रीतीनें कशी नष्ट करण्यांत आली, राष्टीय उद्योगधंदे बुडवून परकीयांना व्यापारी सवलती मिळवून देऊन राष्ट्राची आर्थिक व दुसरी संपत्ति—त्याचें रक्त कसें शोषून घे॰ण्यांत आले, ही दुर्दैवी कहाणी रमेशचंद्र दत्त, दादाभाई नवरोजी व मदन मोहन मालवीय ह्यांनीं सांगितलेली आहे. ह्या व दुसऱ्या हिंदी माणसांखेरीज बऱ्याचशा इंग्रज इतिहासकारांनीं हिंदुस्थानांतल्या इंग्रजी राज्यपद्धतीच्या धोरणाविषयींची— आपली राज्यसत्ता बळकट करण्यासाठीं हिंदुस्थानच्या आर्थिक स्वातंत्र्याचा पाया उडवून देण्याच्या त्या पद्धतीच्या धोरणाविषयींची—हकिकत जगाच्या नजरेस आणलेली आहे. एडमंड बर्कनें वॉरन हेस्टिंगसच्या काळीं कृत्यें उजेडांत आणण्याकरितां जो पुरावा पार्लमेंट पुढें मांडला त्यांत सुद्धां हेंच सत्य बाहेर आलें आहे. आज आह्मांला हें आर्थिक परावलंबन व दारिद्र्य नाहींसें करावयाचें असल्यास ज्या परकीय सत्तेनें आमच्या स्वतःच्या समृद्ध देशांत आह्मांस भिकारी बनविलें, ती राज्यसत्ता उलथून पाडण्यासाठीं असहकारितेच्या [विधायक) बहिष्कारांपेक्षां दुसरा सुलभ उपाय नाहीं हेंच गांधीच्या उपदेशाचें सार आहे. परदेशी मालावरील बहिष्कार यशस्वी केल्यास हिंदुस्थानांतून दरवर्षी बाहेर जाणारे कोडो रुपये देशांत राहून देशाच्या दारिद्र्याचा प्रश्न बऱ्याच अंशीं सुटेल. अर्धनग्न व अर्धपोटी असलेले लाखों हि लोक आपली स्थिति सुधारतील. सरकारी शिक्षण संस्थांवरील बहिष्कार यशस्वी केल्यास, आपल्यांत असलेली दास्यवृत्ति नाहींशी करतां येईल. आमच्या मेंदूंत खोल पुरल्या गेलेल्या ह्या वृत्तीमुळें परक्याबद्दल असणाऱ्या खोट्या कल्पना नाहींशा होऊन तिच्या गुण दोषांकडे पाहण्याची दृष्टि बदलून जाईल. ह्या संस्थांच्या कार्यक्षेत्रांत हिंदी गरजा व हिंदी दृष्टिकोन ह्यांना जागा नसते. गोव्यांतल्या संस्थांत 'भारता'च्या संपादकांना जो दोष आढळतो तोच दोष ह्या संस्थात आह्माला आज कित्येक वर्षें आढळून येत आहे. ह्या संस्था सुधारण्याचा एकच उपाय ह्मणजे त्यांच्या ऐवजीं आपल्या राष्ट्रीय संस्था स्थापणें हा होय:— हें कार्य करण्याशाठीं बहिष्काराची गरज आहे. कायदे मंडळांच्या बहिष्कारासंबंधींचा उल्लेख गेल्या आठवड्यांत करण्यांत आलाच आहे. हें बहिष्कार कार्य यशस्वी झाल्यास हिंदुस्थानांतल्या नोकरशाहीचें उच्चाटण करण्यास किती मदत मिळेल ह्याची कल्पना करतां येईल. हा कार्यक्रम पुरा करतां आल्यास त्यापासून उत्पन्न होणाऱ्या शक्तीचा उपयोग स्वराज्य मिळविण्यासाठींच होणार नसून, मिळविलेलें स्वराज्य कायम राखण्याकडे होणार आहे. जुलमी, सदोष व (दास बाबूंच्या शब्दांत बोलावयाचें ह्मणजे) राष्ट्रीय विकास होऊं न देणाऱ्या ह्या संस्थांवर घालावयाचा बहिष्कार हें आमच्यासारख्या निःसत्व राष्ट्राच्या हातांत असलेलें एकच शस्त्र आहे. ह्याच्यापेक्षां जास्ती परिणामकारक शस्त्र आमच्या टीकाकारांनीं दिल्यास आह्मीं तें आनंदानें स्वीकारूं. ह्या असहकारितावाद्यांच्या आव्हानाला कोणतें उत्तर मिळेल किंवा मिळत आहे ?

ह्या आव्हानाला एकादें नवीन कींवा समाधानकारक उत्तर मिळाल्याचें मला ठाऊक नाहीं. आतांपर्यंत जें उत्तर मिळालेलें आहे त्याचा फोलपणा १९१४ च्या युरोपीय लढाईनंतर सबंध जगांत आलेल्या क्रांतीनें सिद्ध केलेला आहे. मग ह्या जुन्या व मृत ध्येयांचे दास बनण्यांत काय अर्थ आहे ? इतिहासाचा मनुष्यास कांहीतरी उपयोग असल्यास, आजुबाजूस घडत असलेल्या गोष्टींचा आमच्या आयुष्यावर बरावाईट परिणाम होत असल्यास, एकंदर जगाच्या वातावरणांत ह्या घटकेस होत असलेल्या फरकांकडे आपण लक्ष्य न देऊन चालणार नाहीं. ह्या फरकांचा व महात्मा गांधीच्या असहकारितेशीं असलेला निकट संबंध स्पष्ट न दिसण्याऐवढी बुद्धिमंदता आपणांस नसल्यास, गांधीच्या तत्त्वांच्या मुळाशीं असलेलीं सत्यें समजल्याखेरीज रहाणार नाहींत. पण हें सर्व बाजूस ठेवलें तरीसुद्धां असहकारितेनें हिंदुस्थानांत केलेलें कार्य किती महत्त्वाचें आहे हें पहाण्यासाठीं लांब जावयास नको. असहकारिता जन्मास येण्यापूर्वीची परिस्थिती आज असलेल्या परिस्थितीशीं ताडून पाहिल्यास त्या चळवळीनें केलेल्या कार्याचें महत्त्व ध्यानांत येईल. आपण ह्या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष क obscuramente, ela अपात्र ठरली असें meaçador e क्षम्य ठरेल पण ज्या ध्येयाच्या प्राप्तीकरीतां म० गांधीच्या अस्तित्वाची सबब आहे त्या ध्येयाचा अर्थ समजून घेण्याचा आपण प्रयत्न केला नाहीं× व वार्धक्यानें चेतना हीन बनलेल्या, जुन्या आणि निरुपयोगी ध्येयांचा फास परंपरेच्या नावाखालीं आपल्या गळ्यांत घालून घेतला तर तें मात्र क्षम्य ठरणार नाहीं. असहकारिता अपात्र ठरली काय ? ह्या प्रश्नाचें उत्तर 'होय' असें आल्यास हरकत नाहीं. पण आह्मीं अपात्र ठरलों काय ? ह्या प्रश्नाचें उत्तर नेहमींच 'नाहीं' असें आलें पाहिजे.

—परदेशगमनास पर्तगाळ संस्थानानें मोकळिक दिल्याचें वर्तमान मडगांवच्या आ तेऱ्हानें प्रसिद्ध केलें असून, त्यासंबधीं आपला आनंद व्यक्त केला आहे !

—दाबोली व वास्को या दोन रेल्वे स्टेशनामध्यें एका युरोपियनाचें छिन्नभिन्न झालेलें प्रेत आढळून आलें. सरकारी तपास चालू आहे.

—सरकारी बजेट रुपयानींच ठरविण्यांत यावें असा वरिष्ठ सरकारनें हुकूम सोडला आहे.

—ह्मापसें येथें नवीन स्थापन झालेल्या 'आजील लॉटरी'ची पहिली प्रेम साठ हजारांची आहे.

—पुण्याची 'अनाथ विद्यार्थी गृह' ही संस्था किती उपयुक्त आहे, हें आज सर्वांला माहीत झालेंच आहे. संस्थेच्या वाढदिवसानिमित्त प्रसिद्ध झालेल्या माहितीवरून सदहू 'गृह' ही एक नमूनेदार संस्था असून, तीनें आजपर्यंत बजावलेली कामगिरी लोकोत्तर आहे.

Anuncios

O Bharat, ano 9 °; n ° 10
29 de Maio de 1924.

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.

JUIZO DAS EXECUCOES ADMI-
NISTRATIVAS DE QUEPEM

Pelo juizo das execuções administrativas do Concelho de Quepém e cartorio do escrivão de Volvotcar ,vão ser arrematados no dia 27 de Junho proximo seguinte, ás 12 horas, á porta da administação do Concelho pelo maior lanço que for oferecido, na hasta publica, por tempo de um ano, os rendimentos do predio Vagxepa, sito em Molcornem, do predio Chanfeabata, sito em Amonã e do de Torls-cunoguy sito em Sirvoi e pertencentes ao executado Butó Sinai Sirvoicar, de Sirvoy e penhorados na execução administrativa que a comunidade de Sirvoi, move contra o dito Butó para cobrança da divida da renda dos campos da referida comunidade do ano de 1914, na importancia de 27:4:7 ¼, além dos respectivos juros de mora, selos e custas do processo.

Quepém 13 de Maio de 1924
O escrivão do processo
Caxinata Sinai Volvotcar
Visto
O juiz das execuções
M. Rebelo

JUZO DAS EXECUCOES ADMI-
NISTRATIVAS DE QUEPEM

Pelo juizo das execuções administrativas do Concelho de Quepém e cartorio do escrivão Volvotcar, vão ser arrematados no dia 27 de junho proximo seguinte, ás 12 horas á porta da administração do concelho, pelo maior lanço que fôr oferecido, na hasta publica, por tempo de um ano os rendimentos da varzea Galunga, do palmar Borodda posquim Canssurdy, consistente em varzea e palmar e do predio Conssurdey Gira-eta e Bagaeta, sitos em Sirvoy e pertencentes a Gonoxama Visuú Sinay Sirvoicar, de Sirvoi e penhorados na execução administrativa que a comunidade de Sirvoi move contra o dito Gonoxama, como fiador e principal pagador ao executado Xantarama Sinai Cacodcar de Cacorá, para cobrança da divida da renda dos campos da referida comunidade dos anos de 1908 a 1910 na importancia de 42:11:3 3/4 além dos respectivos juros de mora, sêlos e custas do processo.

Quepém, 13 de Maio de 1924
O escrivão do processo
Caxinata Sinai tal feno-
Visto
O juiz das execuções
M. Rebelo

JUIZO DAS EXECUCOES ADMI-
NISTRATIVAS DE QUEPEM

Pelo juizo das execuções administrativas do Concelho de Quepém e cartorio do escrivão Volvotcar, vão ser arrematados no dia 27 de Junho proximo seguinte ás 12 horas, á porta da administração doConcelho pelo maior lanço que fôr oferecido, na hasta publica por tempo de um ano os rendimentos dos predios Ducleabatta e Narainabata, sitos em Amonã e do Molávonil bagaet, sito em Cusmane e pertencentes á Gonoxama Visnum Sinay Sirvoicar, de Sirvoi e penhorados na execução administrativa que a comunidade de Sirvoi move contra o dito Gonoxama, como fiador e principal pagador ao executado ...tu Sinay Sirvoicar, de Sirvoy, para cobrança da divida da renda dos campos da referida comunidade do ano de 1919 na importancia de 31:07:00 além dos respectivos juros de mora, selos e custas do processo.

Quepém, 13 de Maio de 1924
O escrivão do processo
Caxinata Sinai Volvotcar
Visto
O Juiz das execuções
M. Rebelo

Anno 9 N. 11

Quinta-feira 5 de Junho de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत

BHARAT

वर्ष ९ वें. अंक ११

गुरुवार ता. ५ जून सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केंपें—गोवा.

Desfazendo calunias

Quem promete, na divida se mete. E o *Bharat* que na sua edição transacta contraiu com o seu ilustre colega europeu da *Provincia* o compromisso de lhe escalpelisar as afirmações do artigo *Por linhas tortas* mostrando-lhes a flagrante inanidade, vai lançar mão do necessario mas dificil cumprimento de sua atrevida promessa— não vá alguem tentar estigmatisa-lo com o igniminioso ferrete de *mau pagador*.

Antes de mais, permita-nos a *Provincia* que lhe expressemos publicamente o nosso fundo agradecimento por dois motivos. Primeiro, porque *a elas se hindú lhe tem merecido profunda simpatia* e segundo, por que *ainda não desceu se . . uer um ponto do excelente conceito que dela sempre tem formado.*

A Cesar...

Cumprido o grato dever de agradecimento, concentremo-nos, agora, a atenção para a *ingrata* tarefa de analisar a substanciosa prosa do mui acreditado orgão dos europeus na India.

E vamos devagar, porque, como diriam os italianos, *chi va plano, va sano*, o que na lingua da *Provincia* sinifica "quem vai devar, vai com segurança".

O primeiro funambulo com que o nosso censor nos assetea a orientação jornalistica, consiste em afirmar que nos periodicos hindus—e o *Bharat* é um deles— se vem fazendo uma politica disfarçadamente hostil contra a soberania portuguesa nestas paragens, *coisa* que o disgosta, que o impressiona mal, a ponto de o ir predispondo *para uma atitude de que bem se desejaria manter afastado.*

E para concretisar milhor essa sua acusação escreve:–

". Volta e meia fere.. se a Republica em *sueltos* que se nao harmonisam com a justiça, nem com a verdade e comtudo a' Republica e so' aos republicanos os hindus devem o verem se investidos de todos os direitos, de todas as regalias concedidas aos cidadaos portuguezes..."

¿Donde tirou a *Provincia* o material para construir o vasto e vistoso edificio duma tão grave acusação? ¡Quem lho forneceu?

Não o diz nem clara nem obscuramente, ela que em tom ameaçador e iracundo de *Jupiter tonante* nos arremeça aquele raio...acusatorio!

Afiançamos, porêm, aos leitores, sem receio de desmentido, que em nenhum *suelto* do *Bharat* se feriu a Repùblica, para a defesa, generalisação e ingresso dos elevados principios da qual temos, pelo contrario, dedicado a nossa milhor energia politica, o nosso milhor esforço de propagandista, ainda que modesto e de jornalista, ainda que insignificante.

Não exhibimos esta folha de serviços á Republica para que os representantes desta no-los galardoem com alguma comenda ou alguma *fatia* do queijo burocratico. Apresentamo-la, apenas, rasgando, de mais a mais, o véu da modéstia que nos envolve, para demonstrar que está muito longe da verdade a tal acusação, formulada contra nós pelo semanário europeu.

Verdade é que o *Bharat* não poupa ensejo de fulminar, como nunca poupou nem poupará, desmandos burocraticos, nem recúa a criticar, desassombradamente, acção governamental que repute prejudicial ao seu Paiz. Isto. porêm, não quere dizer que o *Bharat volta e meia fere a* Republica.

Uma coisa é bem diversa de outra. Castigar erros dos funcionarios republicanos é coisa bem diversa e distinta de ferir a Republica e os republicanos.

¿Será a *Provincia* capaz de pôr os seus dedos nas *chagas*, abertas pelos ferimentos feitos pelo *Bharat* á Republica?

Garantimos-lhe que não o será, por mais *santa* paciencia que ponha na cuidadosa e escrupulosa missão de desencantar os mesmos ferimentos nas colecções do nosso jornal.

A *Provincia* mentiu, pois, descaradamente, quando nos acusou dos *ferimentos* á Republica, ferimentos que nem o *Bharat* nem qualquer outro periodico hindú lhe fez, aberta ou desfarçadamente.

Esta é que é a verdade.

Admitamos, todavia, por momentos, que os periodicos hindus fazem uma politica *disfarçadamente hostil* contra a Republica; mas se essa politica *não é aprovada pela maioria dos hindús ilustrados*, única força que pode pesar na balança politica ¿por que é que a *Provincia* nos teme, então, *predispondo-se para uma atitude de que bem se desejaria manter afastada*?

¿Duma politica que não conta adeptos no elemento ilustrado, duma politica, portanto, que prima pela insignificáncia, deverá tratar-se em um jornal tão importante como a *Provincia*?

Assalta-nos a suspeita de que o abuso da intima convivencia que o ilustre colega mantem com o seu predilecto *sôr Artur* lhe varreu da memória o latinório que diz: *de minimis non curat pretor.*

A classe hindú nunca foi nem nunca será ingrata com o glorioso regime que a libertou do vergonhoso jugo da monarquia.

E sendo os periodicos hindús dirigidos e redigidos pelos hindus, ¿podem eles *volta e meia* ferir a Republica que os cumulou de tantos e tão importantes previlegios e regalias?

Franquesa franca, a *Provincia* incomodou, pois, sem motivo justificado, os periodos hindús, caluniando-os. Fez mal.

Na semana seguinte veremos, ainda, o pior que nos fez.

Ecos & Critica

A REPUBLICA E OS HINDUS

E' certo que a Republica Portuguesa facilitou o desenvolvimento da consciencia civica nos hindu's; o regime democratico, acabando com diferenças odiosas contribuiu preponderantemente para que a tendencia burocratica hindu' atingisse o ponto culminante; o liberalismo do 5 de Outubro criou, numa palavra, uma situação de desabafo a' comunidade hindu que dela tirou e vai tirando o milhor partido possivel para seu progresso.

¿Querera', porem, tudo isso dizer que foi a Republica que acordou a *consciencia civica* nos hindu's?

Nao, certamente. Quem tal fenomeno politico operou, foi a imprensa marata do visinho territorio. Foi ela que incutiu civismo na acobardada alma dos hindus, consequencia da escravidao a que os votara o absolutismo monarquico,

O movimento civico que se observa nos hindu's nao e', portanto, exclusivamente devido a' implantaçao do novo regime que *apenas* facilitou o desenvolvimento do que a britanica imprensa marata lhes criara, mesmo na vigencia da extinta monarquia.

Afirmar o contrario e' dar a Cesar o que e' de Deus e a Deus o que e' de Cesar...

¿Que diz a isto a *Provincia*?

A LINGUA MARATA

Foi, em ultima analise, o conhecimento desta lingua, conhecimento que

---

ठेवा (आहे काय पाहूं
पासून मुक्त व्हाल

विकार कराल तर
क्षिणता
राखून ठेवाल

आलेले शिथिलत्व व नपुं
ळपणा व गेगट असल्याने
टाळा, मेंदूचे अशक्ततेपा-
पाठीस ओढ लागणें, व
झालेले विकार लववीची
वळणें, डोळ्यांस अंधारी येणें
डो व पांढरी धुपणी; विटाळ
गत व सौन्दर्यास बाघ होते
येतो, वीर्य स्तंभन होऊन
तन्हेचा अवर्णनीय व काय-
तीचा अमोली व बहुगुणी
इच्छा असणारांनी एक वेळ

र व वेचक वनस्पति, शतपुष्पा
कंद, जेष्ठकंद, मधुकंद, मुस-
तोकाचे बीज, शतवीज, साग-
मीगव, जायपत्री,
मामिश्री सकेतामिश्री, तालीम-
लकडी, शतावरी सर्कमिगज,
सत्व, इसबगोल आवळकाठी
गून सिद्ध करून देणारास
तोळ्याची वडी व रात्री ने-
विलेले गाईचे दूध प्यावें. पथ्य
चा ८४ तोळे डबीची किंमत
खर्च निराळा.
एम. इनामदार, मिरज

ागिदारांस दोकडा ९ टक्के

विश्वासू व हुशार

. व इतर माहिती साठीं
करावा.

. पी. ओगले अँड कंपनी
मॅनेजिंग एजंटस

ापेंतून शिक्षण दिलें असतां
वाईट न होतां चांगला होतो
ाहरण इंग्लिश हिंदुस्थानां-
:. ते सर्व बाबतींत आज
बरी करितात.

म.गच्या काळांत गो ह्मणजे
ाषा, व गोधर्म ह्मणजे हिंदु-
होता; पण आज त्याचा येथें
दिसतो, हें लक्षण बऱ्याचें
ापण सर्वांनीं पोर्तुगीज राष्ट्री-
आपल्या मातेचें ह्मणजे वर
र्वीचें संरक्षण केलें पाहिजे.
राजसत्तेप्रमाणें पूर्वीहि अनेक
या व भाषा शिकाव्या ला-
जांपूर्वी येथें कानडी मुसल-
चालू असे. पण स्वभाषेचा
नव्हता, ह्मणून आपणहि तें
तिच्या अभिवृद्धिसाठीं प्रयत्न

र्तुगीज शाळा नवीन काबिजा
हालानिहाय स्थापन करण्यांत
ा. पण त्यांच्या अपुरेपणामुळें
उपयोग झाला नाहीं. मारात पो-
तोर व लिंव द इस्ताद ह्मणून
ांस मराठीचें ज्ञान करून
रकारनें हुद्देदार नेमलेले आहेत.
–विशेषेंकरून मराठी भाषा–ही
भाषा आहे हें लिंव द इस्ताद
ाजून येतेंच.

सरकार आपल्या प्रजेस प्रथमतः
ून देशी व इंग्लिश शिक्षण देतें;
हे, तर आपणहि त्यांची भाषा
शिकून त्यांतील रहस्यें आपल्या
आणि इकडे तद्विरुद्ध दिसून
पोष्टाविरुद्ध तक्रार करणें झा-
देशी भाषेंत लिहून लखोट्यावर
तक्रार' असा मथळा लिहून तो
केला ह्मणजे न्याय मिळतो. इतकी
व्यवस्था आहे. येथें तद्विरुद्ध
इ. सेलांद फोलीवर पोर्तुगीजींतून
तरी जेथें न्याय मिळण्याची पंचा-
साध्या कागदावर मराठींतून अ-
पाठविल्यास न्याय कसा मिळेल
आहेच. तिकडील प्रमाणें इकडे
वस्था झाली पाहिजे ह्मणून देशी
पोर्तुगीज प्राथमिक व कांहीं उच्च
बहुतेक सरकारी खालचा व्यव-
प्रकार देशी भाषेंतून येथें झाला
ंग्लिशांचें धोरण इतर बाबतींत जरी
ासल, तरी तें या बाबतींत चांगलें
सें ह्मणण्यास कसलाच प्रत्यवाय

शिक्षणाचे बाबतींत आम्ही केवळ
सरकारवरच अवलंबून रहाणें योग्य
ाम्हीहि खाजगी रीत्या तसा प्रयत्न
हिजे व सरकारकडे त्याकामीं त्याचें
ागितलें पाहिजे. आज आह्मास दि-
शिक्षण देण्यास पोर्तुगीज सरकारास
जाणार. कारण त्याप्रमाणें शाळा

स्थापन करण्यास खर्च ... चें बराच लागणार व तसा तो खर्च करण्यास त्यास आज तितकें सामर्थ्य नाहीं, हें २८ (अठ्ठावीस) लक्ष खर्च व २४ (चोवीस) लक्ष उत्पन्न यावरून दिसून येतें. ह्मणून आह्मी शाळा स्थापन करून त्या सरकारांत मंजूर होण्यास व सरकारचा त्यांस पाठिंबा असण्यास व सरकारकडूनहि तसा शक्त्यनुसार त्या बाबतींत प्रयत्न होण्यास सरकारकडे मागणी केली पाहिजे. व ही मागणी असी असावी:– **मराठी शिक्षणास सरकारी पाठिंबा असणें; कोंकणी किंवा मराठींतून पोर्तुगीज शिक्षण देणें; त्याकामीं मराठी जाणणारे प्रोफेसर सरकारी शाळांवर विशेषतः नवीन काबिजादींतील सरकारी शाळांवर तरी नेमण्यांत येणें; लिसेवच्या ३ क्लासपर्यंत देशी भाषेंतून (कोंकणी किंवा मराठी) पोर्तुगीज शिक्षण मिळणें; मारात पोर्तुगीजच्या शाळांवर दोन्ही भाषांचें ज्ञान असलेले हिंदु मराठी शिक्षक नेमून त्यांकडून विद्यार्थी मुलांस मारात पोर्तुगेजचें चांगलें व यथार्थ ज्ञान करून देणें, खासगी शाळांतून मराठी किंवा देशी भाषा शिकलेल्यांस मताधिकार असणें; मराठी लिपींतून सरकारी पोर्तुगीज लेखांचें (escrituras) मराठी भाषांतर होणें मात्र मागच्या सारखा अव्यापारेषु व्यापार ह्मणजे पोर्तुगीज लिपींतून कोंकणी किंवा मराठी भाषांतर करून नव्हे; शेतकीची [agricultura] माहिती मराठींतूनहि प्रसिद्ध करणें; पाश्चात्य वैदकाप्रमाणें आयुर्वेदकाचें पौर्वात्य वैदकाचें हि शिक्षण मराठींतून मिळणें, व पाश्चात्य वैदकास सरकारी पाठिंबा व उत्तेजन मिळणें, कांहीं कांहीं ठळक कायद्यांचीं मराठींत भाषांतरें होणें इ० इ०**

स्फुट विचार

खुलासा पाहिजे:– सुइणीच्या कोर्साच्या ज्या अटी 'सांतकाजा'नें प्रसिद्ध केल्या आहेत, त्यांवरून त्या कोर्सांत हिंदु बायांचा कसा प्रवेश होईल, याचा नीटसा बोध होत नाहीं. या पूर्वी कोणत्याहि हिंदु स्त्रिला पोर्तुगीज प्राथमिक शिक्षणाचें सर्टिफिकेट दाखविण्याचें कारण नव्हतें. या सर्टिफिकेटाशिवाय तिचा बिनहरकत सदर कोर्सांत प्रवेश होत असे व या पद्धतीनें कोणाचें नुकसान झाल्याचेंहि सिद्ध नाहीं. असें असतां, परोपकाराचा तोरा मिरवणाऱ्या एका मायपोट संस्थेनें सदहू सर्टिफिकेटच्या मिषानें असहाय्य हिंदु स्त्रियांच्या भल्या आकांक्षांवर आकस्मिक हल्ला करण्यास पुढें सरसावें, ही फार दुःखाची गोष्ट होय! मिजेरकोर्दांच्या या वेडेचाराचा उगम घाशीरामी कारभाराला सुद्धां खाली पाहण्यास लावणारा असल्यानें, तो कोणत्याहि दृष्टीनें समर्थनीय ठरत नाहीं. सुइणीच्या कोर्सांतील ज्ञानभांडार चाखण्यास पोर्तुगीज भाषेचीच दिव्य दृष्टि पाहिजे, असें जोंपर्यंत सिद्ध झालें नाहीं तो पर्यंत वरील अट ही एक हिंदु बायांना त्या कोर्सांत बंदी करणारी शकल आहे, असाच लोकांचा समज होईल. हा समज 'सांतकाजाची' अपकीर्ति पसरण्यास कारणीभूत होणार असून सत्कृत्यांचा टेंभा पाजळणाऱ्या तिला तो खास भुषणास्पद नाहीं, हें कोणीहि कबूल करील. 'मिजेरकोर्दां'चें कार्यकारी मंडळ डोळ्यावर कातडें न ओढतां, अनाथ हिंदु स्त्रियांच्या हितसंबंधावर गाढवाचा नांगर फिरविणाऱ्या उपरोक्त अटीला तिलांजली देण्याचा दिलदारपणा व्यक्त करून तो समज दूर करण्याचा प्रयत्न करील, अशी अजून आह्मांस आशा आहे. 'गतं न शोचेत्' असें ह्मणून हात न जोडतां, हिंदु पुढारीहि 'मुखमस्तीति वक्तव्यम्' दर्शक अशा त्या हिंदुहितविघातक गळग्रही अटीला चंबुगबाळें आटोपण्यास भाग पाडतील व आपल्या निराश्रित भगिनीचे आशीर्वाद घेतील, अशी आह्मांस उमेद आहे. परंतु या पूर्वी आपल्या त्या अटीस जन्म देणाऱ्या हेतूंचा 'मिजेरकोर्द' खुलासा करील काय?

तुह्मी आह्मी एक:—'तुह्मी आह्मी एक व कंटाळीला मेख' या ह्मणींतील स्वार्थी तत्वाचा अनुभव करून देण्याचें यज्ञकंकण प्रोव्हिंसकारानें आपल्या गोऱ्या हातांना बांधल्याचें वाचकांस अवगत आहेच. हिंदूंना मित्र ह्मणावयाचें पण त्यानीं स्वराज्याचा मार्ग खुला करणाऱ्या एकाद्या साधनांचें नुसतें नामोच्चरण करतांच त्यांविरुद्ध पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें तुटून पडावयाचें! स्वजातीयच्या सत्तेचा झेंडा येथें यावच्चंद्रदिवाकरौ नाचत राहून, त्यानीं चंगीभंगींत दिवस घालवावेत व गोमांतकीय जनतेनें त्यानां 'ब्र'हिन उच्चारतां मदत करीत रहावें असा प्रोव्हिंसकारांचा उद्देश आहे. त्यांच्यामतें या उद्देशाविरुद्ध हिंदु पत्रानीं तक्रार करणें ह्मणजे निवळ राज्यद्रोहासारखा भयंकर अपराध करण्यासारखें आहे! आहे कीं नाहीं मजेची ही गोरी विचारसरणी? पण परकीयांची सत्ता व स्वदेशाचें हित या परस्परांत विळ्या भोपळ्याइतकें उजू असल्यानें प्रोव्हिंसकारांची ही विचारसरणी ज्या सुशिक्षित (?) हिंदूंना आमचें राजकीय धोरण पसंत नाहीं, त्यांच्या नाजूक प्रकृतीला सुद्धां मानवेल कीं नाहीं याचा संशय आहे. शकी आह्मांस खात्री आहे कीं, कसल्याहि हेतूनें हिंदु सुशिक्षितांस आपल्या गोटांत ओढून घेण्याचा विभु रचण्याचा प्रोव्हिंसकार प्रयत्न करीत असतील, तर तो त्यांचा विभु समूळ ढासळल्याखेरीज रहाणार नाहीं. भिकेवर कोठें श्राद्ध होतें? ह्मणून प्रोव्हिंसकारांस आमची अशी शिफारस आहे कीं, त्यानीं राजकारणासारख्या रुक्ष प्रदेशांत धडपडण्यापेक्षां मोहक रमणींच्या रमणीय वर्णनानीं आपली मधुर लेखणी खुलवून रंगेल वाचकांची रंगेल जिज्ञासा तृप्त करण्याचें संसारी सुख अनुभवावें. गाढवाला गुळाची चव काय माहीत!

उघड्या डोळ्यानें प्राण जात नाहीं:– हिंदु पत्रानी धिटाईनें चालविलेल्या खऱ्या स्वराज्य प्राप्तीच्या चळवळीला 'खो' बसून सरकारकडून त्यांची मुस्कटदाबी व्हावी, हा एकच नीच हेतु प्रोव्हिंसेनें आम्हांविरुद्ध उगारलेल्या चकचकित शस्त्रांत प्रतिबिंबीत होत आहे. हिंदुस्थानांत उगवलेल्या नवजीवन सूर्याच्या तेजस्वी किरणानीं जागा झालेल्या हिंदु गोमांतकाची दिशाभूल होऊन, त्यांत उत्पन्न झालेल्या स्वत्वाची होळी व्हावी व त्यानें सदासर्वकाळ परकीयांची थुंकी झेलावी, असें सि. बातालयांना वाटत असल्यानें, त्यानीं आमच्याविषयीं सरकारी दरबारांत भलभलते गैरसमज पसरविण्याचा अधर्मपंथ स्वीकारला आहे, यांत शंका नाहीं. अशानें हिंदुपत्रें भेदरून जाऊन अंगीकृत कार्यापासून परावृत्त होतील, असें जर प्रोव्हिंसकारांना वाटत असेल, तर ते सपशेल चुकत आहेत, असें त्यांस बजावल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं. पोर्तुगीज सदरांत म्हणा, किंवा मराठी सदरांत म्हणा, एकहि ओळ आह्मीं लिहित नसतों, कीं ती सरकारच्या नजरेखालून जाऊं नये. लोकांप्रमाणेंच सरकारलाहि आपल्यासभोंवार काय शिजत आहे याची यथार्थ कल्पना व्हावी, यासाठीं 'भारताचा' सततोद्योग असतो. सरकारच्या 'गहिरी' नजरेची इच्छा त्याला स्वप्नांतसुद्धां शिवली नाहीं, याची ग्वाहि त्याचा इतिहासच स्पष्टपणें देईल. अशा स्थितींत प्रोव्हिंसकारांची सदर कृति पाहून आम्हांस 'साक्षात पशु पुच्छविषाण हीन' या वाक्याची आठवण होते. असो. चंदुलाल प्रोव्हिंसकारानें आपला निंद्यमार्ग खुशाल चोखळीत रहावें. मात्र 'भारता'वर त्याचा कवडीचाहि परिणाम होणार नाहीं, याची त्यानीं आपल्या मनांत पूर्ण खूणगांठ बांधावी, अशी आमची त्यांस सूचना आहे.

वर्तमानसार

—कळंगुटच्या 'ग्रीबून' पत्रानें 'भावि हिंदुस्थान' या नावांचें एक सदर उघडलें असून त्यांत मासलेदार व मसालेदार माहिती प्रथीत करण्यांत येत असते. सदर सदरांत नावेलकर नावांच्या एका गृहस्थानें, विष्णु शेणवी नावांच्या आफ्रिकेंत वास्तव्य करणाऱ्या इसमानें तेथील एका निग्रोबाईशीं विवाह करण्याचा आपला निश्चय, श्रुत केल्याचें लिहिलें आहे.

—ह्मापसें व मडगांव येथील पाठशाळांत उघडलेल्या कोंकुसांत पुढील हिंदु गृहस्थ पास झाल्याचें प्रसिद्ध झालें आहे:— आत्माराम शंभू पै पाणंदीकर, पंढरी कामत, रामचंद्र श्रीधर पै, श्रीपाद प्रभू लंवदे, व्यंकटेश पुरुषोत्तम प्रभू धारवठकर, विनायक शेणवीं शेळडेंकर व शांताराम कृष्ण शेणवीं शेळडेंकर.

—ह्मापसेंच्या 'आजील' नावांच्या नूतन लॉटरीचा निकाल तेथील मुनिसिपाल हालांत येत्या ५ आगस्टला लागणार असून, त्यावेळीं या शहरांतील एकंदर अधिकारी वर्ग हजर रहाणार आहे.

—आकाशांतून तरून जाण्याचा पोर्तुगीज वैमानिकांचा उत्कट उद्देश यशस्वी होण्याप्रीत्यर्थ पोर्तुगालांत ठिकठिकाणीं फंड गोळा करण्यांत येत आहेत.

—चालू महिन्यापासून ब्रिटिश इंडीया, दमण, दिव, साष्टी, मुरगांव, काणकोण, सांगें, केपें, पोर्तुगीज पूर्व आफ्रिका, माकाव व तिमोर या ठिकाणीं पाटविलीं जाणारीं पत्रें रात्रीचीं साडेआठ वाजेपर्यंत पणजीच्या मुख्य टपाल आफिसांत स्वीकारलीं जातात. दर बुधवारीं याचवेळीं लिजबोअ येथें जाणारें टपाल बंद करण्यांत येतें.

—नवीन घटनेनुरूप शिक्षण खात्याच्या सल्लागार मंडळाच्या मेंबरांची निवडणूक येत्या २९ तारखेला पार पडेल.

—प्रोव्हिंस पत्राचे गोरे संपादक पेरेर बातालय यांची नेमणूक, सांतकाज दे मिजेरकोर्द या संस्थेमार्फत चालू असलेल्या सेन्ह नामक शिक्षण गृहांतील अनाथ मुलींस पोर्तुगीज व फ्रेंच शिकविण्याचे कामीं होईल असें ह्मणतात. ही वदंता आह्मांस विश्वसनीय वाटत नाहीं.

—प्रो. आराऊज मास्कारेंजस यानीं पणजीच्या पाठशाळेंत सातव्या वर्षाची परीक्षा (लेत्रस) दिली. प्रोफेसर साहेबांना परीक्षेंत १९ मार्क मिळाले.

—गोमांतकीय शेतकीखात्यांत नवीन दोन 'तेकनीकां'ची भर पडली असून त्यांच्या वेतनाबावत तिजोरीला सहा हजार रुपयांचा चट्टा बसेल!

—प्राथमिक शिक्षणाच्या खासगी शाळांची नोंद करण्याची मुदत येत्या २० तारखेला संपते ही मुदत वाढविली जाणार नसल्यानें गरजूंनीं आपापल्या शाळा 'रजिस्तार' करण्याचे कामीं तत्परता दाखविणें उचित आहे. नोंदणीचा हा नियम द्विवार्षिक असून तो मराठी शाळेंस लागू होत नाहीं, असें शिक्षणखात्यानें प्रसिद्ध केलेल्या 'आव्हिजा'वरून वाटतें.

प्राथमिक शिक्षण

(ले. उपेंद्र शे. तळावलीकर)

मनुष्याचा समाजाला व राष्ट्राला योग्य उपयोग करून घ्यायाचा असेल किंवा स्वतः मनुष्याला ईश्वरापासून प्राप्त झालेल्या शक्तींचा योग्य फायदा मिळावा अशी इच्छा असेल तर त्या समाजानें, राष्ट्रानें किंवा माणसानें शिक्षणाकडे दुर्लक्ष करणें आत्मघातक होय. कांहीं शतकांपासून आमचीं मनें एका विशिष्ट गुलामगिरींत हळहळू पूर्णपणें गुरफटलेलीं आहेत. आधुनिक जगास माणूस ह्या दृष्टीनें आमचा कितपत उपयोग होऊं शकेल हा प्रश्न बराच वादग्रस्थ आहे; किंवा तूर्तच्या संक्रमणावस्थेंत जीवनार्थकलहांत आज ज्याला आपण शिक्षण समजतों त्यानें आपण नामशेष तर होणार नाहीं ना अशीहि एकवेळ शंका आल्याविना राहणें अपरिहार्य होय.

डॉ. रविंद्रनाथ टागोर ह्यांनी शिक्षणासंबंधी एका ठिकाणीं दिलेला आपला अनुभवी शेरा खरोखर अमोल्य आहे. ते ह्मणतात. 'परकी संवयी, परकी रीतिभाती, परकी संस्कृति, परकी इतिहास यांच्या संमिश्रणानें विशेषेंकरून परभाषेंत लहानमुलांस दिलेलें शिक्षण नसून मनुष्याचा स्वाभिमान नष्ट करून राष्ट्रनाश करण्यासाठीं नकळत पाजलेलें जहर होय'. केवळ पोट भरावें व सरकारी नोकरीसाठीं कांहीं गुलाम

अभक्ष्यभक्षण दिसोकैरितां आहे समजून
घेण्यास हरकत नाहीं
अस्पृश्य वर्ग किंवा अंत्यज वर्ग
त्तीसंबंधानें चार मतें आहेत.
, अनार्य, चातुर्वर्ण्यभ्रष्टजातकी
र्ण्यात प्रविष्ट न झालेले लोक
श्य वर्ग होय. अस्पृश्यतेला शा-
हि आहे परंतु परिस्थिति लक्षांत
उद्धार धार्मिक, सामाजिक व
नीं करणें भाग आहे. अस्पृश्या
रे पाण्याचे अन्याय लवकर
आणि
कारंच नद्यं धीवर मेवच। बुरुडंच
शुद्धेदाचमनात् द्विजः ॥
अंगिरस्मृति
ण्येषु जलेषु वै गिरौ दोण्यांजलं
च। श्वपाकचंडालपरिग्रहेषु पीत्वा
येन शुद्धिः ॥ आपस्तंभ
हेषु यज्ञप्रकरणेषु च
सर्वेषु स्पृष्टास्पृष्टिर्नविद्यते ॥
अत्रिसंहिता
विषमप्रदेशे सेनानिवेशे भुवनस्य
यज्ञेषु महोत्सवेषु तथैव दोषा न
ः ॥ अत्रिः
मृतिवाक्यांचा हेतू पाहून अ-
ची सार्वजनिक व सामुदायिक
घालवावी.
आर्य संस्कृतीवर आज जशा
हल्ला होत आहे तसा आजवर
हता. तेव्हां मिशनऱ्यांचा कावा
ऊन फसगतीनें, अज्ञानानें, व जु
रस्ती झाले असतील, त्यांना प-
ला असल्यास व त्यांचें रक्त शुद्ध
देवल स्मृतीच्या आधारें प्राय-
समावेशन केलें पाहिजे.

[...]वान बुद्धाचें पुण्यस्मरण

[...]या खास बातमीदाराकडून]

मुंबई, २३ मे १९२४

र ता. १८ रोजीं येथील बुद्ध सोसा-
यमानें बुद्धजयंतीच्या—गौतम बु-
न्माची, कार्याची व परनिर्वाणाची
थीं साजरी करण्याच—उत्सव म.
अध्यक्षतेखालीं मुंबईहून फार दूर
व गांधींच्या वास्तव्यानें महत्व आ
द्रकांठाच्या रम्य ठिकाणीं—जुहूस—
तीनें पार पडला. म. गांधींच्या
सम्नंतर व जीवनाच्या दुखण्यानून
ल्यावर सार्वजनिक रीतीनें बोलण्याचा
हिलाच प्रसंग असल्यामुळें व
च्या पोटीं जन्मास येऊन जगात
णाऱ्या भगवान बुद्धाच्या पुण्यस्म-
पवित्र प्रसंगीं प्रतिबुद्ध असलेल्या
सानें प्रमुख स्थान स्वीकारल्यानें
ऐतिहासिक महत्वामुळें सर्व जातीच्या
आणि मताच्या माणसांनीं हजर
समारंभास शोभा आणली होती.
वर बुद्धाची सुंदर फुलांनीं सज-
तिमा ठेवत होती. म. गांधींची प्र-

(पुरवणी पहा)

इति जरी सर्वांच्या सुधारलेली असली तरी ते अशक्त दिसत होते; त्यांनीं हलक्या आवाजांत गुजराथींत व नंतर इंग्रजींत भाषण केलें.

प्रथमतः सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल म. गांधीस विनंति करताना श्री. नटराजन ह्यांनीं ह्या प्रसंगीं म. गांधी सारखा मा[illegible] लाभल्यामुळें होणाऱ्या बुद्ध सो[illegible]द्दल व भाग्यावद्दल आदरपूर्वक उल्लेख केला. २५०० वर्षांपूर्वी त्या शाक्य मुनीनें आरंभिलेल्या व त्यासाठीं—अनाथ, पतित व गांजलेल्या जीवांच्या कल्याणासाठीं—केलेल्या कार्याची परंपरा आज गांधी चालवीत असल्याचें त्यांनीं सांगितलें. आज धर्माचा लोप झाला आहे असें आपणांस सांगण्यांत येतें:— त्यांच्यामतें असा धर्मलोप होणें हिंदुस्थानांत शक्य नाहीं. म० गांधीच्या कार्यास सुरुवात झाल्यापासून आमच्या वागणुकींत, स्मृतींत, अर्थ स्मृतींत, विचारांत, जणुं काय नैसर्गिकच असणारें धर्माचें अस्तित्व— जें वैदिक काळापासूनच्या संस्कृतीच्या मुळाशीं असल्याचें आपण पहात आलों आहोंत—दृश्यमान होत आहे; म. गांधींत सर्वंध राष्ट्राची संस्कृति एकवटलेली आहे व ह्मणूनच त्यांनीं राष्ट्राचें नेतृत्व स्वीकारलें आहे.

म० गांधींचें भाषण

म. गांधी ह्मणाले:— ह्या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्यासाठीं मला आमंत्रण देण्याचें एकच कारण, भगवान बुद्धांनीं ज्या सत्यांच्या प्रस्थापनेसाठीं स्वताचें आयुष्य खर्चीं घातलें त्या सत्यांचा बऱ्याचशा माणसांपेक्षां जास्त प्रसार मी करीत आहें, हें असावें अशी माझी समजूत आहे. बौद्ध धर्माचें पुस्तकी ज्ञान मला फारसें अवगत नाहीं. ३५ वर्षांपूर्वी वाचलेलें सर एडविन ॲर्नाल्डचें उत्कृष्ट पुस्तक व नंतर थोड्याच दिवसांपूर्वी एरवड्याच्या तुरुंगांत वाचलेलीं १-२ पुस्तकें एवढ्यांवरून मी थोडेंसें ज्ञान मिळविलेलें आहे. त्या धर्माच्या अभ्यासांत नैपुण्य मिळविलेले विद्वान प्रो० कोसंबी, [गोमांतकास परिचित असलेले] यांचे अर्नाल्डचें 'लाइट ऑफ एशिया' वाचून बुद्धाच्या आयुष्याची फक्त अस्पष्ट कल्पना येते व त्या सुंदर काव्यातील निदान एका प्रसंगाचा जुन्या व विश्वसनीय ग्रंथांत उल्लेख असल्याचें मला सांगतात. पुढें मागें प्रोफेसरसाहेब बुद्धाच्या आयुष्याची खरी हकिकत असलेलें एकादें पुस्तक प्रसिद्ध करून आपल्या विद्वत्तेचा फायदा आह्मांस देतील, अशी मला आशा आहे.

गांधी व बौद्ध धर्म

मला बौद्ध धर्म ह्मणजे हिंदुधर्माचा एक भाग वाटतो. बुद्धानीं जगांत एकादा नवीन धर्म स्थापन केला नाहीं. त्यांनीं पूर्वींच अस्तित्वांत असलेल्या धर्माचा नवीन रीतीनें अर्थ लावला. बळी दुसऱ्यांचा द्यावयाचा नसून स्वताचाच दिला पाहिजे, हें त्यांनें हिंदु धर्मास शिकविलें. बळीच्या वैदिक कल्पनेविरुद्ध हा अर्थ लावण्यांत आल्यामुळें तत्कालीन हिंदूनीं त्याचा निषेध केला. पण शेवटीं त्यानीं वैदिक धर्माविरुद्ध व नवीन समजल्या जाणाऱ्या ह्या धर्मातील बुद्धाच्या शिकवणीचें मुख्य तत्व स्वीकारलें. बौद्ध धर्मांतील तत्वांचा स्वीकार केल्यामुळें हिंदुधर्माचा ऱ्हास झाला असें कित्येक ठिकाणीं प्रतिपादण्यांत येतें; असें प्रतिपादणें ह्मणजे जगांत प्रेमाच्या व दयेच्या कल्पना पूर्णपणें प्रचारांत आणल्यास जगाचा नाश होईल असें ह्मणणें होय. वेगळ्या शब्दांत सांगावयाचें ह्मणजे (टीकाकारांच्या ह्मणण्याप्रमाणें) असत्याचा शेवटीं विजयच झाला पाहिजे ! गौतमाच्या तत्वांचा स्वीकार केल्यामुळें हिंदुधर्म अधोगतीस गेला नसून, त्या तत्वांप्रमाणें त्यानें आपलें आचरण ठेवलें नाहीं ह्मणून तो अधोगतीस गेला असें माझें ठाम मत आहे. वेद खरे ईश्वरप्रणित वेद रहावयाचें असल्यास त्यांत जिवंतपणा असला पाहिजे. त्यांची वाढ वेळोवेळीं झाली पाहिजे; त्यांचें प्रसरण झालें पाहिजे. नवीन उत्पन्न होणाऱ्या परिस्थितीला ते पुरून उरले पाहिजेत. परंतु धर्म —पुरोहितानें फक्त त्यांतील शब्द तेवढेच उचलून उराशीं बाळगले पण त्यांतील तत्वें ग्रहण केलीं नाहींत.

गांधींचा आशावाद

पण आपण निराश होण्याचें कारण नाहीं. ज्या सुधारणेचा प्रसार करण्याचा बुद्धानें प्रयत्न केला त्या सुधारणेचा व्हावयास पाहिजे तेवढा फैलावच मुळीं झालेला नाहीं. जगाच्या आयुष्यांत २५०० वर्षांचा अवधि ह्मणजे कांहींच नाहीं. जर नुसत्या जडाची उत्क्रांति होण्यास युगाचीं युगें लागतात तर बौद्धिक उत्क्रांति थोड्याशा काळांत पूर्ण होईल अशी अपेक्षा आपण कां करावी ? — तरीपण चमत्कृतिच्या अस्तित्वांचे दिवस गेलेले नाहींत. जी स्थिति व्यक्तीची तीच राष्ट्राची—सर्वंध राष्ट्रांतील लोकांची अचानक रीतीनें उन्नति होणें शक्यतेच्या पलीकडे आहे असें मला वाटत नाहीं. अशा प्रकारचा आकस्मितपणा फक्त वरवर दिसणारा आहे. हा फरक दृश्य होण्यापूर्वी अंतःस्फुर्तीचें वास्तव्य नक्की किती काळ पर्यंत त्याच्या पोटांत होतें हें कोणासहि सांगतां येणार नाहीं, सुधारणेचीं बीजें आपणास सहसा दिसून येत नाहीत. त्यांचें अस्तित्व असल्याचें सुद्धां आपणास कळून येत नाहीं. अदृश्य व परम शक्तीच्या अस्तित्वांत असलेला दृढ विश्वास — ह्यालाच मी धर्म समजतों. त्या शक्तीनें आतां पर्यंत मनुष्यजातीवर मायेचा प्रयोग केलेला आहे व आजसुद्धां आमच्यावर तोच प्रयोग करण्यांत येत आहे. वरवर दिसणाऱ्या गोष्टींवर — भ्रमोत्पादक दृश्यांवर — विश्वास न ठेवतां सत्याच्या व प्रेमाच्या होणाऱ्या अंतिम विजयावर विश्वास ठेवण्यास बुद्धानें आह्मांस शिकविलें; ह्या अतुलनिय सत्याचा त्यानें हिंदु धर्मास व जगास आदेर केला.

जैनमुनी जैनविजयजी ह्यांनीं म० गांधीच्या भाषणाचा अनुवाद करणारें भाषण केल्यावर प्रो. कृपलानीं ह्यांनीं सी. एफ. ॲंड्रुज साहेबांचा संदेश वाचून दाखविला. भगवान, बुद्धाच्या कामगिरीचा त्यांत उल्लेख करून, भिल्ल कॉफरन्ससाठीं जुहुहून निघून जावें लागल्यामुळें सभेस हजर रहातां आलें नाहीं ह्या बद्दल त्यानीं दुःख प्रदर्शित केलें होतें. नंतर नाखुषीनें परंतु लोकांच्या आग्रहास्तव दे. ब. दास बोलण्यास उठले.

दे. ब. चित्तरंजन दास.

ते ह्मणाले:— ह्या सभेस हजर रहाताना मला आज बोलावें लागेल अशी मी कल्पना सुद्धां केली नव्हती. मी म. गांधीचा पाठीचा आश्रय केला होता. पण शेवटीं त्यानीं मला सभेच्या हवालीं केलेंच [हंशा]. बुद्धासंबंधीं पूर्वींच्या वक्त्यानीं जें सांगितलें त्यात भर घालण्यासारखें नवीन असें मला कांहींच सांगावयाचें नाहीं. अहिंसेचा व प्रेमाचा प्रसार करण्यासाठीं बुद्ध जन्मास आले होते, हें शाळेंत जाणाऱ्या प्रत्येक मुलास माहीत आहे. मी बौद्ध धर्माच्या वाङ्मयाचा अभ्यास केला नसल्यामुळें फक्त बुद्धासंबंधीची मला ठाऊक असलेली एक गोष्ट सांगून मला माझें समाधान केलें पाहीजे. एकदां बुद्धानें, कांहीं बकरीं एका राजाच्या हुकुमानें बळी देण्याकरीतां नेण्यांत येत असल्याचें पाहिलें. तो त्याच्या मागून गेला व त्या मुक्या व निरपराधी जीवांचा बळी देण्याऐवजीं आपला बळी देऊन बळीदानापासून होणाऱ्या पुण्याचा संचय करण्यास त्याने त्या राजास विनंति केली. उदार हृदय बुद्धाच्या ह्या मागणीनें राजा विरघळून गेला व त्यानें तावडतोब होत असलेली बळीहत्या थांबविली. ही एकच गोष्ट काय ती माझ्या बौद्ध धर्मज्ञानाचें भांडवल आहे. (हंशा) दास बाबू नंतर श्री. लुलुभाई सामळदास ह्यानीं बुद्धास हिंदु समजुतीप्रमाणें नववा अवतार मानण्यांत येतो व ह्यावरून बुद्धाचा व हिंदु धर्माचा संबंध ध्यानांत येईल असें सांगितल्यावर प्रो. कोसंबी ह्यानीं अध्यक्षाचें व वक्त्यांचे आभार मानण्याची सूचना पुढें आणली.

प्रो. कोसंबी

प्रो. साहेब ह्मणाले:— हा समारंभ जुहूस पार पाडण्यांत आला ही गोष्ट योग्यच झाली. कारण, अशाच ठिकाणीं भगवान बुद्ध प्राचीन काळीं आपल्या शिष्यांस शिकवीत असत; ते अशा शांत व निसर्ग शोभ सुंदर ठिकाणीं आपला श्रोतृवर्ग जमवीत असत. आज आपण हा उत्सव हिंदुस्थानांतच नव्हे तर सर्वंध जगांत सर्वांत श्रेष्ट समजल्या जाणाऱ्या एका माणसाच्या अध्यक्षतेखालीं साजरा करीत आहोंत. बौद्ध धर्म ही भूमि सोडून गेलेला नाहीं; सर्वंध देशांत त्याच्या अस्तित्वाचें द्योतक असलेल्या गुहा व स्तूप पहाण्यांत येत आहेत. ह्याचा अर्थ, बौद्ध धर्मानें ह्या देशाचा त्याग केलेला नाहीं, हाच आहे. (ठाणें जिल्ह्यांतील बोरीवली पासून जवळ असलेल्या] केनेर गुहांचीच दुरुस्ति करावयाची ह्मटली तर आज लाखो रुपयांचा खर्च येईल. पण आपणास दुसरें कांहीं तरी कार्य करतां येईल. मुंबईच्या बुद्ध सोसायटीनें रोमन लिपींत असलेले पाली व जन ग्रंथ देवनागरींत उतरविण्याचें ठरविलें आहे. ह्या संपादकीय कामासाठीं नेमलेल्या कमिटीवर जैनमुनी, ब. जयकर ह्यांची व माझी नेमणूक करण्यांत आली असून त्या दिशेनें प्रयत्न करण्यासाठीं डॉ. नायर ह्यानीं तीन वर्षेपर्यंत सालीना १००० रु. देण्याचें कबूल केलें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. ह्या कार्यासाठीं कोणी लहानसहान द्रव्यसहाय्य देऊन मदत केल्यास ती कृतज्ञतापूर्वक स्वीकारण्यात येईल. [illegible]देशांत तेथील राजापैकीं एकानें पुष्कळ बौद्ध मंदीरांतील स्टीकांच्या भिंतीवर तु कनिष्कानें तर सुवर्णपत्रावर भगवान बुद्धाचा उपदेश कोरून ठेवलेला आहे.

एवढें झाल्यावर सभेचें काम आटोपलें.

Ano 9.º — N. 12

Quinta-feira 12 de Junho de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
Cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegde Dessay
Quepem-Goa

भारत.
BHARAT

वर्ष ९ वें. अंक १२

गुरुवार ता. १२ जून सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगेडे देसाई
केंपें—गोवा.

EMENDANDO ERROS

Naquele seu célebre artigo *Por linhas tortas*, a *Provincia*, para acentuar a importancia dos beneficios dispensados pela República aos hindus grita, alto e bom som:

"A' República e aos republicanos devem os hindus a sua colocação nos lugares públicos dos mais elevados."

Não há duvida que a Republica acabando com diferenças odiosas contribuiu preponderantemente para que a tendencia burocratica hindú atingisse o ponto culminante, o que, porem, não sinifica, de maneira alguma, que o regime democratico tenha colocado os hindús *nos lugares publicos dos mais elevados.*

Quere-nos parecer que a *Provincia* tinha a intenção de dizer "nos lugares publicos dos mais variados;" mas dominada como se achava pela febre de defender as instituições republicanas e os seus apostolos, da *politica disfarçadamente hostil* que lhes é feita pelos que dirigem periodicos hindús, não deu a importante folha europêa com o tal erro, que é, em ultima analise, consequencia lógica duma excitação ultra-patriotica, perfeitamente justificavel.

¿Quem pode ter cabeça no seu lugar, quando vê perigar a existencia dum regime para quem vive e por quem sofreu maiores privações e fez maximos sacrificios?

De admirar, portanto, não é que o referido jornal europeu tivesse falhado no emprego daquela expressão—*dos mais elevados*; porque não é admissivel que a *Provincia* ignore que mesmo na Monarquia houve, entre os hindús, quem tivesse ocupado um lugar o mais elevado de todos os lugares, conquistados por êles na Republica que só—repetimos—*concorreu grandemente para que a tendencia burocratica hindú atingisse o ponto culminamte.*

Isto é: tanto na Monarquia como na Republica houve empregados hindús, com a dife rença de que o seu numero se vai multiplicando nêste ultimo regime, graças á sua essencia democratica e liberal.

E' certo que um hindú ornamenta a magistratura judicial, coisa que se não viu na extinta Monarquia. Náo é, porem, menos certo que *uma andorinha não faz verão.*

E, depois, a Monarquia nao era a . . Republica, alicerçada na triangular pedra de Igualidade, Liberdade e Fraternidade...

Referindo-se aos lugares *conquistados* pelos hindús, prossegue, ainda a *Provincia:*

"E' certo que os hindús conquistaram esses lugares pelo seu trabalho, pelo seu esforço individual, pelo seu reconhecido merecimento."

E, mais adiante, com a franquesa que lhe é o apanagio, acrescenta:

"Mas não é menos certo que quem tem a faca e o queijo na mão pode talhar a fatia da forma a melhor servir o afilhado e de maneira que, mesmo dentro da lei, outros possam ser os melhores servidos."

Isto quere dizer, noutros termos mais claros, que os republicanos, detentores do Poder, isto é, *da faca e do queijo podiam talhar a fatia da forma a melhor servir o afilhado e de maneira que*, mesmo dentro da lei, *outros pudessem ser os milhores servidos, em preterição dos hindús, a despeito do trabalho, do esforço intelectual e reconhecido merecimento* destes—o que, porêm, não fizeram por *favor*.

Outro erro da *Provincia* mas mais grave do que o primeiro que, qual dardo sinistro, vai, impiedosamente, férir a Republica no que lhe é mais caro — o prestigio.

¿Com que, então os hindús ocupam os seus lugares por *favor* e não por *justiga* e *lei* cujo imperio pode ser—sobre pujado pela afilhadagem e favoritismo que na nossa ingenuidade reputavamos *extinctos* com a extincção do regime monarquico de compadrio, de injustiças, e ilegalidades e de esbanjamentos?

A *Provincia* que se intitula republicana atingiu, pois, a propria Republica com uma ofensa tão afrontosa que faria baixar a cabeça até a um monarquico dos mais ferrenhos.

¿Como teria manejado a *faca* e o *queijo* o ilustre redactor da *Provincia*, quando director dos correios e telegrafos e de que bitola se servirá, quando novamente, segundo se diz, fôr reintegrado nas mesmas funcções?

Havemos de vê-lo, se Deus quiser.

Mas ¿em que ficou a promessa do *Bharat* de tratar nesta semana do *pior que a Provincia fez*?—perguntar-nos-há nesta altura o leitor.

Por força das *circunstancias supervenientes* responder-lhe-he-mos que fica *adiada a diligencia* para a semana seguinte—vá a linguagem forense.

Ecos & Critica

TUDO ESPECIAL...

O especial é sempre especial; e como o especial é sempre especial, o especial tem suas especialidades que tambem são especiais.

O especial exame que, há dias em que por sinal se sentia um calor insuportavelmente especial, o sr. dr. Araujo Mascarenhas fez especialmente perante um juri especial e por especial autorização do Governo, tem dado margem especial a comentos tambem especiais.

Sobre dois motivos especiais se baseam especialmente os tais comentos especiais. O primeiro motivo especial é que do juri especial do exame especial foram especialmente excluidos sabe Deus por que especialidades os professores especiais srs. dr. Benedito Gomes e Cota Cruz; e o segundo motivo especial é que o exame especial, segundo os rumores especiais, fez-se especialmente por uma forma tão especial que nenhum especialista extranho pudesse no dito exame especial especialisar coisa alguma especial.

Depois dumas especialidades tão especiais não admira—especialmente o especialisamos — que o especial favorecido da sorte sr. dr. Mascarenhas tenha obtido a especial classificação de 19 valores.

O contrario... especial é que seria um especial assunto para especial admiração.

E viva a especialidade que tão especialmente está divertindo o público que é sempre critico especial das especialidades especiais.

Um rôr de especialidades...

RARIDADES

Terra de raridades é a que

देश, बागाइताच्या बाजू इत्यादि ठिकाणी ाळशी, देवकापूस, एरंड यांचें उत्पन्न हो- ासारखें आहे. अशा प्रकारच्या लागवडी- ा गोवाप्रांतात पावसाच्या पाण्याशिवाय सलीहि गरज नसते. केळीं, फणस, आंबे, रु इत्यादि प्रस्तुत उत्पन्नावरून बागाईत जिराईत शेती राखूनहि या बाबी भरीव उत्पन्नदायी कशा होणाऱ्या आहेत हें सहज मजून येणारें आहे. असल्या मालाची ोवा प्रांताला जरुरी तर आहेच पण परदे- ानाहि आहे. ह्मणून तेथें पुरून उरणाऱ्या ालाचा आर्थिक परिस्थिति सुधारण्याच्या ामींच उपयोग झाला तर होईल.

कच्चा माल परदेशांत पाठविण्यापेक्षां ाचा पक्का माल बनवून तो परदेशांत रवा- ा केला तर त्यापासून अधिक फायदा होतो ांत मतभेद नाहीं. नारळ ज्या स्थितींत आज विशेषेंकरून पर ठिकाणीं जातो त्याचे अवशेष काथ्या येथें शिल्लक रहातो व क- चित करटीहि शिल्लक रहाते. यांचा सध्या उपयोग जाळण्याकडे व राहिलेल्याचा कुजून जाण्याकडे होत असतो. काथ्यापासून ब्रश चटया व किंमतवान गालीचे बन- वितां येतात व त्याचप्रमाणें करटी नरम करून ती पासून भारी किंमतीच्या नाजूक व नक्- शी लहान लहान पेट्या, कप, पेले वगैरे फॅन्सी पदार्थ होण्याजोगे असतात. दुसरें, ना- रळा पासून अत्यंत उपयोगी पदार्थ बनण्या- जोगे आहेत ते ह्मणजे साबण व मेणबत्त्या हे होत. खोबऱ्याच्या तेलांत तीन द्रव्यें असतात; १ घट्ट चरबी (Stearin and palmitin) २ स्निग्ध चरबी (olem) आ- णि ३ ग्लीसरीन. या पैकीं पातळ चरबी सा- बण करण्याच्या उपयोगांत आणून घट्ट चरबी मेणबत्त्या करण्याच्या कामीं लाविली तर त्या पासून फार मोठा फायदा होण्याचा संभव असतो. साधारणपणें वरील दोन्ही प्रकारचे पदार्थ एकाच समायिक भांडवलाखालीं झाले पाहिजेत. कारण त्या शिवाय तो धंदा तेवढा फायदेशीर होत नसतो. या शिवाय ग्लीसरीन शिल्लक राहतेंच. याच्या पासून भयंकर स्फोटक द्रव्यें बनत असतात. इतकेंच नाहीं तर वैद्यकीय बाबतींत ग्लीसरीनचा फार मोठा उपयोग होतो. एका कारखान्यांत वरील तीन प्रकारचे पदार्थ होऊं शकतात. त्या पैकीं खुद्द साबण हा खर्चांप्रीत्यर्थ काढला तर बाकीचे दोन पदार्थ निवळ फा- यदेशीर आहेत असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं. आज गोवा प्रांतांतून जितका नारळ बाहेर जातो त्याच्या एक चर्तुर्थांशाचाहि उपयोग अशा बाबतींत झाला तरी त्यापासून कित्येक लाख रुपयांचा व्यापार वाढण्या- जोगा आहे. या शिवाय येथें उंडी, तीळ वगैरे जातींचीं तेलें आहेत. त्यांचाहि या कामीं मिश्र करण्यास उपयोग होण्यासारखा आहे. साबण, मेणबत्ती व ग्लीसरीन याच्या कारखान्याला ४० पासून ५० हजार रुपयां- चें भांडवल लागतें.

सुपारीमध्यें टॅनिक व कॅटेच्चुईक ह्मणजे

काताच्या तेजाबाचा अंश असतो. पाश्चात्य राष्ट्रांत बरीच सुपारी जात असते. तिचा उपयोग बऱ्याच अंशीं हीं द्रव्यें तयार कर- ण्यांत होतो. त्या शिवाय त्यांत पक्या पिंगट रंगाचें तत्व असतें. त्या पासून तिकडे तो रंग तयार करितात. सुपारींत जीं द्रव्यें आहेत त्याच सारखीं खैर, आंवळा व हरडा यांतहि आहेत. त्यामुळें हेहि पदार्थ परदेशांत रवाना होत असतात. शिकाकाई या नांवाचाहि एक पदार्थ याच जातीचा आहे. तोहि पर- देशांत कच्चा स्वरुपत बराच जात असतो. तेव्हां गोवा प्रांतानें यद्विषयक प्रयत्न केले किंवा निदान जे पदार्थ आज बिलकूल नि रुपयोगी पदार्थ ह्मणून पडून राहिले आहेत त्यांचा योग्य उपयोग केला तर त्या पासून बरेंच उत्पन्न वाढण्याचा संभव आहे.

या शिवाय खाद्य भुस्तर पदार्थ गोवा प्रांतांत पुष्कळ होतात, निदान होण्यासारखे आहेत. ते पेरु आंबे, फणस अननसें, केळी इत्यादि परक्याठिकाणीं पाठ विण्याजोगे आहेत. हे पदार्थ फार दिवस टि- कणारे नाहींत आणि हंगामांनंतर ह्यानां फार किंमत येते ह्मणून ते योग्य प्रकारें राखून (reserved) किंवा बर्फाच्या आवरणांतून (refrigerator) किंवा मुरंब्याच्या रूपानें परदेशांत पाठविले तर असले प्रयत्न एकदम रिकामटेकडेपणाचे होतील असें समजण्याचें कारण नाहीं. दुसरे परदेशांत पाठवितां ये ण्याजोगे पदार्थ ह्मणजे हरडे, जाफर, शिका काई, मुळे, आंवळे व सांवरीचा कापूस [Silk cotton] हे होत. यांपैकीं हरडे, शिकाकाई व आंवळे यांचा उल्लेख मागें आ- लाच आहे. जाफरचें बीं रंगाच्या उपयोगीं येतें असा समज असून तें बहुतेक जर्मनी मध्यें जातें. सांवरीचा कापूस इटाली, जर्मनी व अमेरिका येथें जात असून तेथें त्याचा रेशीम व लोंकर यांत मिश्र करून किंमतवान कपडे बनविण्याकडे उपयोग होत असतो.

वर्तमानसार

—एका शिक्षकास चोप दिला गेल्याची बातमी 'तेन्हांत' प्रसिद्ध झाली आहे.

— ६ तारखेच्या बोलेतींवर प्राथमिक (पोर्तुगीज) शिक्षकांच्या नेमणुका प्रसिद्ध झाल्या आहेत.

—शिक्षण-सल्लागार मंडळांत भाग घेणाऱ्या सभासदांच्या निवडणुकींत मत देण्याचा अधि- कार मिळविण्याची ज्या खासगी मराठी व गु- जराथी शाळामास्तरांची इच्छा असेल त्यानीं शिक्षणखात्याच्या दिरेक्तोरास पुढील दाखले जो- डून अर्ज केला पाहिजे. जुन्या किंवा नव्या नो- र्माल स्कूलचें सेर्तिदांव व लिसेवांतील किंवा दुसऱ्या कोणत्याहि सरकारी मारात-पोर्तुगीज अथवा गुजराथी परीक्षेचें सेर्तिदांव, नोर्मालच्या ऐवजीं लिसेवच्या ५ व्या किंवा ७ व्या परी- क्षेचा दिप्लोमा उपयोगी पडेल—इंग्रजी हिंदु- स्थानांतील मराठी किंवा गुजराथी सहाव्या इयत्तेचें सर्टिफिकेट व पोर्तुगीज हिंदुस्थानांत एक वर्षपर्यंत शिक्षकाची कामगिरी बजावल्या बद्दलचा मामलेदाराचा आतेस्ताद—या शिवाय सभ्य वर्तणुकीचा व देवी आल्याबद्दलचा किंवा टोंचून घेतल्या विषयींचा, असे दोन दाखले दाखविले पाहिजेत. लिसेव व नोर्मालचा डि- प्लोमा असलेल्या प्रोफेसरांची नोंद कायमची स- मजण्यांत येऊन बाकीच्यांची दोन वर्षांनंतर चालू किंवा रद्द करण्यांत येईल. पण या गोष्टी सरकारी तपासणीवर अवलंबून रहातील.

—दुसऱ्या 'येपोकाच्या' वेळीं लिसेवच्या पांचव्या वर्षाच्या परीक्षेला एकंदर २० विद्यार्थी बसले होते. तितकेहि नापास झाले!

—असोळणेचें 'वे० प्रा० ज्ञानमंदिर' अंतस्थ कलहामुळें बंद असल्याचें कळून फार वाईट वाटतें.

—सरकारी शेतकी पतपेढ्या स्थापन कर- ण्यांत आल्या असून, बेर्नादीन कोस्त, मिनेज ब्रागांस व सिप्रीयान गोमीस या तिघांचाहि चालक मंडळींत समावेश करण्यांत आला आहे.

—ज्या परीक्षक मंडळापुढें आराउज मास- कारेंजस यानीं आपली परीक्षा दिली तें मंडळ कायदेशीर नसल्याची कित्येक वृत्तपत्रानीं 'गुप्त' बातमी दिली आहे. आंधळे दळतें व कुत्रें पीठ खातें.

—सदर्न मराठा रेलवे व पोर्तुगीज सर- कार यांच्यामध्यें असलेल्या कराराची फेर त- पासणी होण्याचें घाटत आहे.

—दींव येथें अनेक सुधारणा करण्याच्या हेतूनें तेथील गव्हर्नर साहेबांनीं डा. जाइम द मोराइस यांची मुलाखत घेतली.

—मुंबईच्या पोलीसांनीं ९०० पठाणांना कैद केल्याची बातमी आहे पठाणांच्या लीलां- ना आतां तरी आळा पडेल असें दिसतें.

श्रीपीठ सेवक सत्धर्मप्रेमी रंगबोधेच्छु नाट्यसमाज

रा. रा. संपादक 'भारत' यांसः—

आपल्यापाशीं फर्स्ट क्लास कंप्लीमेंटरी पास असल्यामुळें, खालील मजकूर, बा- कीच्या विषयांची गर्दी असली तरी श्री दा- मोदर थिएटरांतील खुर्च्यांप्रमाणें त्यांची खें- चाखेंची करून किंवा एकाद्या सेकंड क्लास कंप्लीमेंटरी पासवाल्यास दुसऱ्या ठिकाणीं अथवा दुसऱ्या वेळेवर ढकलून, आपण तो जरूर प्रसिद्ध करून आभारांत ठेवाल अशी आशा आहे. आमची ही भीड भलतीच आहे असें आपण कृपा करून समजूं नये.

आमचे प्रांतबंधु श्री.सावकार यांच्या व्य वस्थेखालीं चाललेल्या उपरोक्त समाजाक- डून झालेले कै० देवलकृत 'सं. संशय क ल्लोल' ह्या लोकप्रिय नाटकाचे २ प्रयोग आमच्या अवलोकनांत आले. नाटकाचे शोकी नसतां केवळ एका मित्राची भीड मोडवेना ह्मणून आह्मी नाटक पाहण्यास गेलों होतों व कळविण्यास आनंद वाटतो कीं, समाज नवीन आणि त्याचे व्यवस्थापक हे 'शेजारचें चेडूं' असल्यामुळें त्याच्या- कडून होणारे प्रयोग चांगले वटतील कीं नाहीं असा आमच्या मनांत गोंधळ घालीत असलेला संशय, 'संशय कल्लोल'चा प्र- त्यक्ष प्रयोग पाहून फिटल्याशिवाय राहिला नाहीं दोन्ही प्रयोग एकापेक्षां एक सरस वठल्याचा पुरावा, 'भोळीं खुळीं' नसून सहज पाशांत सहसा न गवसणाऱ्या अनुभ- विक व व्यवहारी (वणिक नव्हे) बाळांनीं ए- कच नाटक दोन वेळां अगदीं आरंभापा- सून शेवटपर्यंत श्री दामोदर थिएटरांतील खेंचाखेंचींत व [बीन] हवाशीर जाग्यांत क- रून दाखविलें असल्यानें त्या बाबतींत को- णीहि फाल्गुनराव, आश्विनशेट किंवा कृ- त्तिका अथवा थोड्या वेळासाठीं तरी मघा नायकिणीची मुलगी रेवती होण्याचें कारण नाहीं अशी खात्री आहे. किंबहुना ह्या बा- बतींत आह्मीं वैशाखशेट समजले जाण्यास हरकत नाहीं.

ह्या श्री पीठसेवक समाजाच्या म्यानेज- रच्या शब्दांनीं सांगावयाचें असल्यास आ- मच्या गुणग्राही व ललित कलेच्या पूर्ण माहितगार समाजावर इतकी छाप बस- ल्याचें दिसत आहे कीं तो ह्या सद्धर्म- प्रेमी मंडळीच्या पायांवर आपली संपदा अर्पण करून [एकंदर नव्हे हो !] तिला आप लीशी करण्यांत आश्विन शेटीवरहि खास ताण करील हें सांगण्यास उत्तेरकडचे माघ माघे श्वरांचीं मुळींच गरज नाहीं. व समाजाचें खासगी शुद्ध वर्तन, धर्मश्रद्धा व शिस्त अ- गदीं तंतोतंत त्याच्या एकंदर अभिधानाप्र- माणेच असल्यामुळें आमच्या गुणग्राही स- माजाचें हें करणें अयोग्य होईल कीं काय असा संशय शिल्लक राहण्याचें–रेवती नाय- किणीची मुलगी असली तरी–मुळींच कारण नाहीं. आणि सांगून ठेवितों कीं, सद्धर्म प्रेमी असल्यामुळें समाजाला तो मुळींच खपणारहि नाहीं.

श्री गुरुगणेशाच्या कृपेस पात्र असलेल्या ह्या समाजाचा उत्तरोत्तर उत्कर्षच होईल. अशी आशा बाळगण्यास जागा असल्यामुळें ह्या बाबतींत नाटकांतील नायिकेच्या किंवा खाशी झालेल्या गवई बुवांप्रमाणें (किंवा खानाप्रमाणें ह्मणाना) घोळून घोळून तेंच टंच पुन्हां पुन्हां लिहून आपल्या पत्राची फुकट मिळाली ह्मणून जागा अडविण्याची आमची इच्छा नाहीं.

परंतु जातां जातां हेंहि सांगितलें पाहिजे कीं, समाजानें आर्थिक परिस्थिति सुधारली तरी आमच्या बहुतेक मंडळीप्रमाणें हुरळून न जातां आपलें रंग बोधेच्छु हें नांव कायम राखावें. नाहीं तर काय विचारतां ? रंग बो धेच्छु ऐवजीं समाज रंगेच्छूच राहील तर आ- मच्या ह्या प्रांतापुरतें तरी नाट्यकलेचें थोबाड चांगलेंच रंगून निघेल.

मंडळी गुणी आहे, तिचा उत्कर्ष होवो अशी मनापासून इच्छा करून आणि, संपादक महाराज, वरील मजकूर प्रसिद्ध करण्यांत समाजाच्या म्यानेज़रांइतकी तरी मुरवत बा- ळगा, अशी सूचना करून इथेंच थांबण्याची परवानगी घेतों.

कर नाहीं त्याला डर नाहीं:- मडगांव येथें "इंदिया पोर्तुगेज" ह्मणुन जें एक साप्ताहिक पत्र प्रसिद्ध होत असतें, त्यांत एम्. दियस नावांच्या लेखकाचा एक लेख छापला गेला आहे. या लेखांत लेखकानें सुधारणेचा शिखर गांठण्यासाठीं होत असलेल्या हिंदूंच्या चिकाटीयुक्त प्रयत्नाचें कौतुक केलें असून, परकी चोंचल्यांच्या नकली भपक्यानें हुरळून जाऊन आत्मनाशास प्रवृत्त झालेल्या खिस्ती लोकांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातलें आहे. उपरोक्त लेखांत अशीं अनेक विधानें आहेत कीं तीं आमच्या विचारसरणीशीं बिलकूल जुळत नाहींत. असें जरी असलें तरी लेखाचा एकंदर रोख हिंदूंना प्रोत्साहनपरच असल्यानें हिंदूंच्या वतीनें एम्. दियस यांचें साभार अभिनंदन केल्याशिवाय भारताच्यानें रहावत नाहीं. बाकी खिस्ती लोकांच्या नानाविध जाचणींतून ताऊन सुलाखून निघालेले असल्यामुळें, हिंदूंचे डोळे आतां साफ उघडले असून, त्यांच्या अंतःकरणांत खऱ्या कर्तव्य जाग्रतीचा सूर्योदय झाला आहे. आत्मशुद्धीची गुरुकिल्ली कशांत आहे, हें त्यांना आत्मप्रत्ययानेंच कळून चुकलें आहे. अशा स्थितींत दुसऱ्यांच्या बऱ्या किंवा वाईट योग्य वा अयोग्य टीकानीं त्यांना नवीन असें कांहींच शिकावयाचें राहिलें नाहीं, हें जातां जातां नमूद करून ठेवलेलें बरें. इष्ट ध्येय साधनाचा राजमार्ग हिंदु लोक या पुढें सामोऱ्या येणाऱ्या अडचणींचा चक्काचूर उडवून धिमेपणानें चोखाळण्यास कोणलाहि डरणार

वर्तमानसार

—दो० . पास्कुआल जु० गोमीस, बार्देस महालचे मामलेदार यानीं तेथें मोठमोठया सुधारणा अमलांत आणल्याची 'गुप्त' गोष्ट पोर्तुगालच्या वृत्तपत्रांनीं उघड केली आहे !

—वसाहत– परिपदेंत अनेक महत्वाच्या विपयांची चर्चा केली गेली. अनेक विपयांवर अनेकांचीं अनेक भापणें झालीं. पण त्यांचा व्यवहारांत कांहीं उपयोग होईल काय, अशी एक वाचक पृच्छा करितात.

—गोरक्षणाला प्रोत्साहनपर असा एक ठराव फोंडा–मुनिसिपालटीनें गल्या दिवसांमागें पास केला. हा ठराव सदहू मुनिसिपालटीचे व्हिसे–प्रेजिदेंत भास्करराव सरदेसाई यानीं पुढें आणला होता.

—मडगांवच्या समाज सेवा संघानें तेथील मराठी व पोर्तुगीज प्राथमिक शिक्षणाची वरीचशी जवाबदारी स्वतःच्या अंगावर घेतली आहे, असें एका हस्तपत्रकावरून दिसून येतें

—सांगें येथील विठ्ठल सेवक मंडळाची नियमावली सरकारनें पास केली असून, ती बोलेतींवर प्रसिद्ध झाली आहे.

—येथील माजी देलेगाद (सरकारी वकील) यांच्या मडगांवच्या रहात्या घरावर वीज कडाडली. विशेप नुकसान झालें नाहीं.

—गोव्याचे इतिहाससंशोधक प्रो० पांडुरंग पिसुर्लेकर हे पारीस येथील ' सोसियेते आजियातिक ' या सुप्रसिद्ध संस्थेचे सभासद निवडून आल्याबद्दल प्रोफेसर साहेबांचे आम्हीं अंतःकरणपूर्वक अभिनंदन करितों.

—नागवें, पारोडें व आरांबोल येथें चालू असलेल्या पोर्तुगीज प्राथमिक शाळा तात्पुर्त्या उठविण्यांत आल्या असल्याचें वृत्त सरकाररीत्या जाहीर झालें आहे-

—मद्रासच्या एका ख्रिस्ती देवळांत काथोलिक लोकांची परस्परांत खडाजंगी उडून, ख्रिस्ताच्या त्या घरांत सध्या पोलीसानीं ठाणें ठोकलें आहे ! धन्य हे ख्रिस्तभक्त !

—गोव्यांच्या ग्रामसंस्थानीं शेतकी पतपेढीच्या कायद्याविरुद्ध जोराची तक्रार करण्याची तजवीज केली आहे, असें म्हणतात.

—पिळगांवच्या नदींत एक होडी उलथून ४ पुरुष व २ स्त्रियांना जलसमाधी मिळाली. प्रेतांचा पत्ता अजून नाहीं.

—ताबेलियांवाचें कार्यक्षेत्र ठरविणारा नवीन कायदा प्रसिद्ध होणार असल्याचें कळतें.

—यंदा लिसेव सेंत्रालचें ' मादाम नोव्हाइस ' हें बक्षीस गोविंद वैद्य यांस व ' कोंसेल्यैरु फेरनांदु कुंज्य ' हें श्रीपाद अनंत शेणवी नाडकर्णी यांस मिळाल्याबद्दल उभय हिंदु विद्यार्थ्यांचें आम्हीं मोठ्या कौतुकानें अभिनंदन करितों.

—कांवरें–प्रकरणाचा उत्तर भाग प्रसिद्ध होणार असून त्यांत कित्येक गुप्त गोष्टींचा गौप्यस्फोट होईल असें वि· वेलीप कळवितात.

—रोमचे पोप ११ वे पियु हे अत्यवस्थ आहेत.

—ज. गोमीस द कोस्त हे कार्यसंन्यास घेणार असल्याची बातमी पसिद्ध झाली आहे.

—शेळडें येथील एका ख्रिस्ती भंडान्यानें एका देवळ्याचा शिरच्छेद केला. खुनी इसम दखान्यांत आहे.

—पोर्तुगीज राष्ट्रानें ग्रटब्रिटनला तीस लाख पौंड देणें आहे. हें ऋण चुकतें करण्याची मुदत संपली होती. पण ती आणखी तीन वर्षे वाढविण्यांत आली असल्याचें कळतें.

—नुकतेंच सरकारकडून विकत घेतलेल्या पेडणेंच्या लंगरवागेंत श्री. केणी यानी वरेच हजार रुपये खर्चून अनेक महत्वाच्या सुधारणा केल्या आहेत.

—फ्रेंच वजेटांत ४४ कोटी फ्रांकांची छाटाछाट करून, तिजोरीच्या तुटीचा भार हलका करण्यांत आला. आणि येथें...?

—केवळ सांपत्तिक हलाखीमुळें पोर्तुगालसरकारनें पुष्कळ लिसेव सेंत्रालचें लिसेव नासियोनालांत रूपांतर होण्याचा कायदा केला आहे.

—अमेरिकेंतील निग्रो लोकांनी ५० वर वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें सुस्थितींत चालू ठेविलीं असून आत्मोद्धारार्थ त्यांचे जारीनें प्रयत्न सुरू आहेत. त्यांच्यांतील अशिक्षितांचें प्रमाण जें १९१० साली शेंकडा ४० असें होतें तें १९२० या वर्षी २२ पर्यंत उतरलें आहे.

—फ्रेंच रिपब्लिकच्या अध्यक्षपदावर एम. दुमेर्ग यांची निवड झाली आहे.

—इटालीच्या राजाराणीनीं स्पेनला भेट दिली.

—अमेरिका व जपान या उभयतांमधील तेढ तीव्र स्वरूपांतच आहे.

—डिचोलीच्या विद्यावर्धक मंडळाचा अकराव्या वर्षाचा वृत्तांत या नमूनेदार संस्थेचे चिटणीस पुरुषोत्तम महादेम आळवे यानीं प्रसिद्ध केला असून, त्याची एक प्रत भारताला भेटी दाखल आली आहे. संस्थापकांची चिकाटी, कार्यतत्परता व निरपेक्षपणा, हे गुण वर्णन करण्यासारखे आहेत. संस्था चिरायु होवो असें इच्छितों.

—डॉ. जाइम द मोराइस यांची आंगोल येथील आल्त कोमिसारीयाचे जागीं नेमणूक होणार अशी वदंता आहे.

—आज रोजीं सांगें येथील विठ्ठल सेवक मंडळाच्या सभासदांची असाधारण सभा भरून तींत संस्थेच्या अंतर–घटनेची चर्चा होणार आहे. सरकारांत पास झालेल्या नियमानुरूप संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाविषयींहि विचार होणार असल्याचें कळतें. विठ्ठल सेवक मंडळाचा दिवसें दिवस अभ्युदय होवो असें अंतःकरण पूर्वक इच्छितों.

—सांगें येथील मुनिसिपालटींत 'आगीचें' एक नवीनच प्रकरण उपस्थित झाल्याची अफवा आहे. काय असेल ?

—पणजीच्या लिसेव सेंत्रालचें यंदांचें वेळापत्रक विद्यार्थ्यांना फार सोयीचें आहे, असें पणजीचे आमचे वातमीदार कळवितात.

—येत्या नव्हेंवरांत लेझिस्लातिव्ह कौन्सिलच्या मेंवरांच्या नवीन निवडणुका होणार आहेत. नवीन कान्जिादीतर्फे यंदा नवीन उमेदवार कोण रहातील, हें समजलें नाहीं.

—मडगांवच्या 'इंदिया पोर्तुगेज' पत्राच्या मनेजराच्या जागीं पां० गो० विर्जिनकर यांस नेमण्यांत आलें आहे.

—भारतांस भेटीदाखल आलेली नवीन मासिकें व पुस्तकें इत्यादिकांवर आमचा लवकरच अभिप्राय प्रसिद्ध होईल.

—'सेन राध' या टोपण नांवानें डॉ० सांतान रुद्रीग यानीं पोर्तुगालच्या 'दीय' नामक पत्रावर एक हिंदुस्थानहित विषयक लेख माला सुरू केली असून, तिचें तेथें फार कौतुक होत आहे.

—शिक्षण खात्यांत नवीन फेरफार होणार असल्याची बातमी आहे.

सूचना

भारताचा कारकून वसुलीसाठीं फिरतीवर निघाला आहे. त्यापाशीं आमच्या आश्रयदात्यानीं आपापल्या वर्गणीची फेड करून आह्मांला आभारांत ठेवावें अशी विनंति आहे.

मनेजर भारत

Anuncios

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 2° oficio que este assina, correm éditos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos do § 2° do art. 197 do Cod. do Proc. Civil citando o interessado Manuel José Feliciano Mascarenhas, solteiro, maior de Amonã e ora ausente em parte incerta de Bombáim para assistir a todos os termos até final dos autos de inventario orfanologico a que se procede por obito de Joaquim Mascarenhas domiciliado que foi de Amonã, sendo inventariante e cabeça de casal Nicolau Coutinho, de Sirvoi e deduzir querendo nele os seus direitos nos termos de lei sem prejuizo do seu devido e regular andamento. E para ser publico se expediu este.

Xeldem de Quepem 29 de maio de 1924.

O escrivão de direito do 2° oficio.

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito

A. A. de Brito e Nascimento

Ano 9 ° . N. 15

Quinta-feira 3 de Julho de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
r cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.
BHARAT

वर्ष ९ वें. अंक १५

गुरुवार ता. ३ जुलैसन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें—गोवा.

As Lotarias

Ja' tinhamos no pais duas lotarias, realizando cada uma, 12 extracçoes na roda do ano. Agora surgiu mais uma das bandas de Bardez, a do Asilo da N. S. dos Milagres de Mapuça'— cujas ambiçoes parecem, a calcular pelo plano de sua primeira emissao, exceder a tudo o que *a musa antiga canta*, isto e', sobrelevarem as das suas congeneres.

O Estado da India Portuguesa, onde as duas lotarias antigas, a do Hospicio e a da Sta. Casa medram e a nova, a do Asilo, pretende crear suas raizes e medrar tambem, e' um pais com 500.000 e tantos habitantes— Ora, supondo que cada familia e' constituida do minimo admissivel em estatistica, — 5 membros, temos 100.000 familias desprezados os *tantos* habitantes. No Agosto, por exemplo, vao correr a roda todas as tres lotarias, importando a soma dos planos de todas em mais de 500.000 rupias. E', pois, admissivel que todos os bilhetes das lotarias seram consumidas dentro do paiz? Nao de certo, pois para tanto era preciso que cada habitante incluindo creança de mama, comprasse ao mes uma cautela, ou cada chefe de familia um bilhete inteiro, o que e' inadmissivel, pois, nem a riqueza da populaçao nem os seus habitos e ideas comportam similhante conclusao. Nao ha duvida portanto que estes bilhetes sao vendidos na India-Inglesa na sua quasi totalidade, pois na nossa opiniao na India Portugueza havera' logar quando muito, para ano, 10.000 cautelas ou 2.000 bilhetes.

Ve-se daqui que das 500.000 cautelas das extracçoes do Agosto proximo, 490.000 tem que procurar o seu mercado na India Inglesa ou propriamente na cidade de Bombaim para onde se diriva a maior parte dos bilhetes das lotarias de Goa.

Nestas alturas hao de concordar os leitores que e' um *imposto* excessivo, formidavel, que as instituiçoes de Caridade de Goa vao lançar sobre a visinha cidade. imposto este iniquo, porquanto vai ele. como sabem os que sabem, incidir precisamente na parte a mais pobre, a mais miseravel, a mais desgraçada da populaçao daquela cidade;—os operarios das tecelanias das docas, etc.

Nao ha duvida que o dinheiro das lotarias e' para as instituiçoes da benificencia. Mas *est modus in rebus.*

A caridade de Goa parece querer enriquecer-se de pressa. Convinha que fosse de vagar para nao dar nas vistas e provocar uma reacçao mais energica e dicisiva.

E' sabido de todos que uma parte de opiniao publica de Bombaim ve com maus olhos as lotarias de Goa pelo desequilibrio que elas determinam nas finanças. E numa certa secçao dos habitantes da cidade, esta ma' vontade vai intensificando-se a medida que chegam para la infiltrados de mil modos, as noticias de como e' administrado o dinheiro que dai se drena para Goa, em nome da caridade. Sim e' urgente que a Sta. Casa acabe com os salarios elevados que paga aos seus empregados. Medicos pagos a 300 rupias mensais numa terra onde o governo, cuja fidalguia e' celebre recruta delegados de saude, entre alunos premiados, mediante o ordenado de 140 rupias, nao e' coisa que possa e deva substituir numa casa de pobres. E depois os medicos sao 3 por um, pequeno Hospital e o delegado, coitado, aguenta com o serviço de um concelho inteiro. Tambem o pessoal da secretaria de Sta. Casa ganha ordenados que nao se justificam — O mesmo ou pior se da' no Hospicio, onde pelos modos, entrou a praxe de dar festas aos altos funcionarios. Depois o luxo com que estam feitas as instalaçoes dos Hospitais e dependencias das ambas as instituiçoes e' o que ha de condenavel. Haja aceio, haja ordem, haja estetica; mas luxo...isso nao! O palacete do Ataide onde vao ser transferidas as recolhidas de Chimbel, da forma como se vai montar e mobilar, representa uma afronta a' classe media do pais ou, pior faz com que certa pobreza seja mais invejada do que a mediana. O que vale e' que as recolhidas do Chimbel sao as pobre tiradas da classe luso decendente ... alias no's nao teriamos du'vida de pedir la' um cantinho, pois isso de trabalhos e canceiras por causa de um pobre arroz e caril duas vezes ao dia, era maçada que se dispensava.

Isto, quanto ao Hospicio. e Sta. Casa. Quanto ao Asilo de Mapuça' e' uma instituiçao ainda pobre que nunca devia ter embarcado para uma aventura como a de lotarias sem ter um fundo para fazer face a qualquer rajada de ma' sorte. E depois devia ir mais devagar. De assentada, um plano de lotarias de 250.000 rupias e', com licença, um salto que pode ser perigoso. E depois quem assume a responsabilidade? O presidente da Direcçao que e um modesto funcionario ganhando 140 rupias ao mez e cheio de familia? O tesoureiro? Quem? Goa e' uma terra de pobres, onde dificilmente se arranjam 3 ou 4 homens capazes de, somados, valerem 1 *laque*, quando muito 2 1/2 *laques.*

Para no's ja e' tempo de o Governo intervir mais eficaz e energicamente na administraçao das instituiçoes do que vimos tratando, como e' tempo tambem de limitar os planos, bem assim as emissoes, para que de tanta fidalguia e de tanta ambiçao nao venha qualquer dia a ...... *perdiçao.*

Ninguem se esqueça que a opiniao publica na visinha cidade esta' vigilante e pode impacientar-se dado o momento.

COLEGIO A. J. DE ALMEIDA

Não há hoje na India quem não conheça a benefica acção educativa e instrutiva que o popular Colégio Almeida de Pondá está exercendo na mocidade estudiosa.

Se a percentagem animadora de alunos aprovados demonstra a competencia comprovada do corpo docente do exemplar estabelecimento, a frequencia cada vez mais crescente da população discente do mesmo faz ressaltar a sua indiscutivel popularidade.

O corpo docente do Colegio é constituido dos srs. professores Naraina A. Bandorcar (Director), Datatria Rama Pauçó, Bascora Xambá Cacodcar, Xantarama S. Singbal e Crisna D. Borcar (Secretario).

Do recondito de alma, estimamos os progressos do Colégio.

Ecos & Critica

TRISTE COLHEITA!

Ha dias o *Heraldo* estampou uma prosa do sr. F. X. Natividade Menezes, professor primario, aplaudindo e justificando umas providencias dimanadas da D. S. de Instruçao. No's ate' hoje tinhamos visto, e com agrado, professores a discutir, ainda a combater as medidas daquela Direcçao; mas a aplaudir, a justificar — nunca. Nem era preciso tal. O exemplo do sr. Menezes e' lamentavel, e deu-nos grande tristeza! Enfim nao e' de admirar. Quem semeia colhe, e esta e' a colheita do *Beija mao*. Triste colheita!

ANTES TARDE...

La' veiu *A Terra* com um "fundo" sobre os nossos serviços do ensino. Vem timida. Vem hesitante — assim como quem vem pela mao alheia...... da opiniao publica. Contra o seu feitio, da' um na ferradura dois no prego aqui, dois na ferradura e um no prego acola'. Mas o que nos consola ...... e' que sempre vem. Antes tarde...

ASSIM, ESTA' CERTO

O *Diario da Noite* justamente assustado com o constante aumento da populaçao escolar dos nossos liceus, sugere um inquerito urgente em ordem a conhecer a carreira que cada aluno tem em vista e depois conforme orientar o nosso ensino secundario.

A idea do ilustre colega e' excelente mas o plano do inquerito que no artigo indica, para ser completo, convem que sejam tambem ouvidos os *amanuenses* do Terreiro do Paço. Assim, esta' certo. Ha de concordar o ilustre colega.

FORCEPS DE S. EXIA.

Le-se no *Heraldo*: "Estao afinal creadas as Caixas do Credito Rural... ...constituindo a sua creaçao, arrancada a forceps do Ministerio das Colonias, um verdadeiro titulo da gloria para o Governador Geral........."

Sempre nos convencemos que a tal conquista do *titulo da gloria* nesta nossa adoravel terra era uma coisa muito facil, graças a' nossa adoravel imprensa. Mas deixemos isto de gloria! Vamos ao essencial. O sr. dr. Jaime de Morais que tem pelos modos, um forceps a valer porque nao nos arranca tambem os projectos, trazendo economia ao pais, como a extinçao das conservatorias do registo predial,

ज्ञानाखेरीज गोमांतकाच्या राजकीय घडामोडींत हिंदु समाजाला कसलेंच महत्व मिळणार नाहीं. कारण राजकारण हेंच देशाचें देशसर्वस्व होय; इतर बाबी अंगभूत खन्या पण त्या दुय्यम अतएव सहाय्यक होत आणि ह्मणूनच हिंदुविद्यार्थ्यांनीं पोर्तुगीज शिक्षण घेणें आवश्यक होय. यावर, कोणी असें ह्मणणार कीं, कांहीं विद्यार्थ्यांनां पोर्तुगीज शिक्षण घेण्यास बंदी झाली ह्मणून काय झालें ? खासगी रीत्या शिक्षण घेण्यास कोणाचा प्रतिबंध नसला ह्मणजे झालें. खुशाल त्यानीं पोर्तुगीज भाषेचा अभ्यास करावा आणि राजकारणांत हिंदूचें महत्व प्रस्थापित करावें. पण, या युक्तिवादामुळें सरकारी ऑफिसांतून शिक्षणाच्या दाखल्याचे अभावीं हिंदूंना सहजच बंदी होणार व अर्थातच राजकीय घडामोडीचीं मूळ सूत्रें त्याचें हातून जाणार हें उघड आहे. मिळून, कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें, तरी हिंदुविद्यार्थीपिढीला येथें मिळणारें सरकारी शिक्षण–टाकाऊच का असेना–घेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं. परंतु तेंहि सुखासुखी तिच्या पदरीं पडणें अशक्य अशी सध्या गत होऊन बसली आहे. कारण, इच्छा असली तरी, लिसेव सेंत्रालनें आंखलेल्या धोरणामुळें सरकारी दुय्यम शिक्षण घेणें बन्याच हिंदूंना अवघड आहे.

कोणतेंहि सरकार झालें तरी आपल्या प्रजेच्या शिक्षणाची योग्य ती व्यवस्था करणें हें त्यांचें एक पवित्रतम कर्तव्य होय. हा न्याय स्वतंत्र देशांतील सरकारलाच तेवढा लागू पडतो असें नाहीं. परतंत्र देशांतील जनतेच्या शिक्षणाची जबाबदारी सर्वस्वी त्या देशांतील सरकारावरच असते. जनतेकडून कराच्या रूपानें मिळणाऱ्या पैशाचा मोबदला ह्मणून सरकार ज्या कित्येक गोष्टी जनहितार्थ करतें त्या सर्वांत शिक्षणज्ञान ही एक प्रमुख होय. उदारमतवादी राष्ट्रें सोडून दिल्यास, आपल्या प्रजेशीं अत्यंत कडक रीतीनें व भेदभावानें वागणाऱ्या इंग्रज सरकारनें देखील ब्रिटिश इंडियेंत देण्यांत येणाऱ्या शिक्षणाची मजल प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्यापर्यंत नेऊन पोंहचविली आहे. याचें सगळें नसलें तरी बरेंचसें श्रेय तेथील सरकारलाच दिलें पाहिजे, हें उघड आहे. आणि दुर्दैवानें आमच्या इकडे सक्तीचें सोडाच पण स्वेच्छेचें शिक्षण देखील लोकानां मिळत नाहीं अशी गत. यामुळें, राजकीय दृष्टीनें नसलें तरी इतर दृष्टीनीं गोमांतकाचें हितच आहे, हें भविष्यकाळ लक्षांत आणून खोल विचार केल्यास कबूल करणें भाग आहे. असो.

विद्यार्थ्यांचा नंबर कमी करतानां दाखविलेलें कारण इतकें पोकळ, निराधार आणि हास्यास्पद आहे कीं, तें पाहून 'आधीं बुद्धि जाते आणि मग भांडवल जातें' असें ह्मणतात त्याची सत्यता पटते. प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांचा वाढता आंकडा लक्षांत घेतां कायदेशीर नंबराची (numero legal) भरती होण्यास जितके विद्यार्थी आवश्यक असतील तितक्यानां आंत घेऊन बाकीच्यानां काढून टाकणें हेंच झालें तर शिक्षणखात्याचे दृष्टीनें सयुक्तिक कारण होऊं शकेल, दुसरें नाहीं. पण कहींहि ह्मटलें तरी, या कायदेशीर नंबराची मर्यादाच आधीं कशी व कोणी ठरविली ? लिसेवस्थ विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येस आळा घालावा हें एकच धोरण विशेषेंकरून वरील मर्यादा ठरविणाऱ्याच्या डोळ्यांपुढें असलें पाहिजे ह्मणून वर ह्मटलेंच आहे. परिणामावर दृष्टि ठेऊन दुसऱ्या भाषेंत सांगावयाचें झाल्यास 'तुह्मां एकंदर लोकांची तुमच्या मनाप्रमाणें शिक्षणाचे बाबतींत सोय यापुढें आह्मांला करतां येणें शक्य नाहीं. आमच्या इच्छेस येईल तितक्याच विद्यार्थ्यानां आम्हीं शिक्षणदान करूं, असा वरील धोरणाचा साधा आणि सरळ अर्थ आहे, त्यावर लक्ष देऊन आपण एव्हांपासूनच योग्य त्या तऱ्हेनें हातपाय हालविले पाहिजेत. न पेक्षां राजकीय दृष्टया आपणावर वाईट प्रसंग गुदरण्याचा बराचसा संभव आहे.

पोर्तुगीज शिक्षणांत अद्याप पावेतों हिंदु किती मागें आहे हें कोणास ठाऊक नाहीं असें नाहीं. या भाषानभिज्ञतेचा फायदा घेऊन तत्समाजीय राजकीय गोष्टींत हिंदूंना विघातक अशा किती उलाढाली करीतात हें महशूर आहे. दुय्यम शिक्षण संस्थेंत कोणालाहि बंदी नव्हती तेव्हांची ही गोष्ट. यापुढें लिसेवांत शिरूं पहाणाऱ्या या कायद्यामुळें, हिंदूंनांच ज्यास्त कळ सोसावी लागणार आहे. यावर कोणी असें विचारील, कीं, हिंदूंनांच तेवढा हा कायदा लागू पडतो, ख्रिश्चनानां नाहीं कीं काय ? पण, हिंदूनां आधीं आपलें मराठी शिक्षण पुरें करून मग झाल्यास पोर्तुगीज शिक्षण संस्थेंत प्रवेश करावा लागतो; यामुळें सहजच सरासरीनें पाहूं जातां, हिंदु विद्यार्थी आपल्या ख्रिश्चन सहाध्यायापेक्षां ज्यास्त वयाचे असतात, हें लक्षांत आणिलें आणि वरील कायद्यानें कमी केलेल्या विद्यार्थ्यांच्या वयाकडे लक्ष दिलें आहे ह्मणजे जे विद्यार्थी ज्यास्त वयस्थ अशानांच काढून टाकण्यांत आलेलें आहे, या दोन्हीं गोष्टी ध्यानांत आणिल्या ह्मणजे वरील विधानाची सत्यता सहज पटते. एतावता वयाचे दृष्टीनें पाहिलें काय, किंवा दुसऱ्या इतर दृष्टीनें पाहिलें काय, हिंदु विद्यार्थ्याखेरीज इतरानां हा कायदा ह्मणण्यासारखा जाचक होणार नाहीं.

पण, दुःखांत देखील अचूक सुख हुडकून काढणाऱ्या आमच्या कित्येक समाजबांधवाचें यावर असें ह्मणणें आहे कीं जें झालें तें एका बाजूनें चांगलेंच झाले. पुढचा मागचा विचार न करितां प्रत्येक विद्यार्थी उठल्यासुटल्या लिसेवस्थ बनतो त्याला या कायद्यामुळें कांहीं तरी पायबंद बसणार व अशा रीतीनें पोर्तुगिज शिक्षणाच्या द्वारें होणाऱ्या अर्थ साधनास दुरावल्यामुळें सहजच त्यांस निर्वाहाचे जें दुसरें पण महत्वानें पहिलें साधन उद्योग त्याकडे वळावें लागणार. ही विचारसरणी एका बाजूनें चांगली आहे याबद्दल वाद नाहीं. पण ती एकाच बाजूनें; इतर महत्वाच्या बाजूनीं नव्हे. मिळेल तो विद्यार्थी पोर्तुगीज शिक्षण घेतो, (बाकी ही गोष्ट खरी नव्हे) असें ह्मणणाऱ्यांस आमचा असा प्रश्न आहे कीं, कोणत्या देशांत विशेषेंकरून परतंत्र देशांत, लोकसमाज केवळ ज्ञानार्जनावर दृष्टि ठेऊन विजयी राष्ट्राच्या भाषांतून दिलें जाणारें शिक्षण घेत असतो ? या प्रश्नाच्या उत्तरानेंच वरील आक्षेपाचें समाधान होणार आहे. दुसरें असें कीं, एकंदर विद्यार्थी नुसत्या सरकारी नोकरीवरच दृष्टि ठेऊन शिक्षण घेतात असें ह्मणणें सत्याचा अपलाप करणारें आहे. ज्या विद्यार्थ्यांची आर्थिक स्थिति फारशी समाधानकारक नसते ह्मणजे ज्यानां आपल्या ज्ञानप्राप्तीवरच आयुष्यांतील पुढील मार्ग काढावा लागतो, त्यानां वरील गोष्ट एखाद्या वेळेस लागू पडेल, नाहीं असें नाहीं. किंबहुना तसें असणें सध्याच्या स्थितींत तरी योग्य आहे. अलगता गलबता हिंदु इसम नोकरीची हांव धरूं लागला; ह्मणूनच आजला एकंदर सरकारी ऑफिसांतून ख्रिश्चनांच्या इतक्या नसल्या तरी बऱ्याचशा जागा हिंदूनीं व्यापिलेल्या आहेत. याहि वर्गातील लोक झाले, तरी ते नुसत्या अर्थप्राप्तीवरच दृष्टि ठेऊन पोर्तुगीज शिक्षण घेतात, असें ह्मणतां यावयाचें नाहीं; कारण अर्थसाधन हेंच जर त्याचें ध्येय, तर तेंच अर्थसाधन ज्यास्त उत्तम तऱ्हेनें ज्या शिक्षणानें साधतें तें शिक्षण ते कां ह्मणून घेत नाहींत ? सरकारी जागा आपणास यापुढें मिळणें शक्य नाहीं हे काय त्यांना माहीत नाहीं ह्मणून ते हरतऱ्हेची झीज सोसून पोर्तुगीज शिक्षण घेतात ? या प्रश्नाचें उत्तर सोपें आहे, तें असें कीं आपलें राजकीय वर्चस्व प्रस्थापित व्हावें व राजकारण हा ख्रिश्चनांचाच सवतासुभा या उपर राहूं नये हाच हेतु प्राधान्य करून हिंदु विद्यार्थ्यांच्या पुढें असतो. आणि ही त्यांची न्याय्य आकांक्षा, त्यानां नोकरी न मिळाल्यास देखील पुरी होण्यासारखी असते, हा फायदा कांहीं लहान सहान नव्हे.

पण यापुढें हिंदूंच्या मार्गांत कायद्याबजावरील नियमाची धोंड आल्यामुळें, त्यानां शिक्षणाचा हा बदलता रंग भोंवणार आहे. नियमित नंबर घेण्याच्या या नवीन कायद्यान्वयें लिसेवांतून पुढें मागें होणारी विद्यार्थ्यांची हकालपट्टी सोडून दिल्यास केवळ आजलाच लिसेवांत अर्ज करून जे परत झाले अशांची संख्याच ५० पेक्षां अधिक झालेली आहे. विद्यार्थ्यांचे अर्ज दाखल होण्यापूर्वीच जर या कायद्याची लोकानां माहिती झाली असती तर कमी झालेल्या विद्यार्थ्यांना विनाकारण श्रम पडले नसते व त्यांना झालेला बराचसा खर्चहि वांचता. विवक्षित वयापलीकडच्या विद्यार्थ्यांना काढून टाकण्यांत आलेलें आहे असें दिसतें. पण हाच नियम पूर्वी प्रकाशांत कां आणला गेला नाहीं ? दुसरी गोष्ट अशी कीं, लिसेवांत विद्यार्थ्यांची संख्या ज्यास्त झाली हेंच जर विद्यार्थ्यांची हकालपट्टी करण्यानें कारण असेल तर जवळ जवळ कोर्स पुरा होण्याच्या बेतांत आहे अशा विद्यार्थ्यांत (उदा. ६ व्या वर्षांचे विद्यार्थी) काढून टाकण्याचे ऐवजीं नवीन विद्यार्थ्यांना पहिल्या वर्षांतच न घेणें किंचित तरी सयुक्तिक झालें असतें. पण एवढी बुद्धि आमच्या शिक्षणखात्याला व पर्यायेंकरून आमच्या सरकारला कुठली असायाला ! स्वतःच्या डोक्यांत आलेली कल्पना खरी करण्याचें व ती खरी करतानां लोकांच्या गरजा आपल्या पायाखालीं तुडविण्याचें जोंपर्यंत येथील लिसेवच्या प्रस्तुत मुख्याध्यापकांसारखी बडी गोरीं बाळें सोडणार नाहींत तोंपर्यंत हिंदु समाजाचें दुर्दैव असेंच चालू रहाणार याबद्दल आह्मांस बिलकूल शंका नाहीं.

म० गांधींची लेखी मुलाखत

(खास प्रतिनिधींकडून)

माझ्या ता. ७ च्या पत्रांत मी म. गांधींस पाठविलेल्या दुसऱ्या पत्राचें उत्तर येणें शक्यतेच्या पलिकडे नसल्याचें सुचविलें होतें. वास्तविक गांधी मला उत्तर पाठवितील अशी माझी खात्री होती. व हें 'भारता'च्या वाचकांना मी स्पष्टपणें कळवावयास पाहिजे होतें. मी तसें कां केलें नाहीं ह्याचें एक कारण मला साधारण धंदेवाईक वृत्तपत्रकारांच्या परिचयाच्या असलेल्या coup de main (आकस्मिक रीतीनें केलेला हल्ला) च्या पद्धतीचा–ती पद्धत अमेरिकेंत व इतरत्र कितीहि प्रतिष्ठित समजली जावो–तिटकारा आहे, हें होय. न जाणो एकाद्या अपरिहार्य अडचणीमुळें गांधींना पत्र पाठवितां आलें नाहीं तर,– पण माझी भीति निराधार ठरली. गेल्या मंगळवारीं मला गांधींचें पत्र मिळालें. हें सुद्धां त्यांच्या स्वतःच्या हस्ताक्षरांत आहे. ह्यांतील मजकूर त्यांनीं आपल्या नेहमीच्या लेखनपद्धतीप्रमाणें थोड्याशा शब्दांत पण संपूर्ण व कुशलतेनें लिहिलेला आहे. Le style cest lhomme (लेखन ह्मणजेच माणूस) हें प्रख्यात सत्य गांधींच्या बाबतींत किती साहजिक रीतीनें सिद्ध होतें ! पण माझ्या प्रश्नांचा व त्यांच्या उत्तरांचा मूळच्या इंग्रजींतून आशय देण्यापूर्वी मला वाचकांस एक महत्वाची सूचना केली पाहिजे. मी तयार केलेले प्रश्न सदोष असले तरी सुधां त्यांत आकुंचितपणा व विशिष्ट पंथास चिकटून रहाणाऱ्या मनोरचनेची छाया रहाणार नाहीं अशा प्रकारचा प्रामाणिक प्रयत्न मी केलेला आहे. ते गांधींकडे पाठवितानां मी व्यक्तींचा दृष्टिकोण बाजूस ठेवून व्यापक व गोमांतकाच्या सामुदायिक हिताचा दृष्टिकोण ध्यानांत घेतलेला आहे. अशा प्रकारचा नम्र प्रयत्न गांधींच्या उज्ज्वल चारित्र्याच्या व योग्यतेच्या अफाट समुद्रांत एक थेंब आहे. गांधींनीं दिलेलीं उत्तरें किती महत्वाचीं आहेत, तीं देणारा माणूस उत्क्रांतीच्या कोणत्या पायरीवर—नैतिक व बौद्धिक गोष्टींत आमच्या सारख्या क्षुद्र माणसांपासून किती उच्च ठिकाणावर—आहे ह्याची थोडीशी तरी खरी कल्पना आणून देणें माझ्या लेखणीच्या शक्तीपलिकडचें

ध्यावाहेरील बहुतेक, (खिस्ती सोडून) सगळ्या समाजांत वापरतात. व पटका तर गेल्या महायुद्धाच्या वेळीं सैनिकानीं युरोपांतहि वापरल्याचें वाचण्यांत आहे. टोपी ही तर येऊन जाऊन विलायतीच. ती हंगेरी टर्की वगैरे ठिकाणीं वापरतात. टोप हा बहुतेक पार्शी समाजांतच आढळतो. चेपें (हॅट) हें गोव्यांतील व गोव्यांवाहेरील युरोपियन व खिस्ती समाजांत वापरून बाकीच्याहि समाजांत वापरतात.

ह्या वरील विवेचनावरून दुसऱ्या समाजांत न वापरलेलें असें पगडी हें एकच शिरस्त्राण. वरून तें हिंदूंनीं वापरावें.

आतां आंगांत झगा, चोळणा, उपर्णी, कोट, पारशी कोट, उघड्या गळ्याचा कोट, बंडी, पैरण, खमीस, हातकापें, बानयान ह्या पैकीं हिंदूंनीं काय वापरावें तें पाहूं. झगा हा मुसलमान वगैरे दुसऱ्या समाजांत वापरतात. चोळणा हिंदु मुसलमान वापरतात. उपर्णी, हिंदु व गोव्यावाहेरील मुसलमान व नेटीव्ह खिस्ती वापरतात. गळ्यांत दोन बटण असलेला अंगरखा (इयुदी) गोव्यांत बहुतेक सगळ्या समाजांत व जातींत वापरतात. खोजे मात्र वापरीत नाहींत असें वाटतें. पारशी कोट युरोपियन व हिंदीखिस्ती खेरीज सगळ्या समाजांत वापरतात. गोव्यांत किंवा गोव्यावाहेरील एकहि समाज असा नसेल कीं त्यांत एखादा माणूस तरी उघड्या गळ्याचा कोट वापरीत नाहीं. बंडी ही गोव्यांत जरी फारच थोडे हिंदु वापरीत असले तरी गोव्यावाहेरील युरोपियन खेरीज करून सगळ्या समाजांत वापरण्यांत येते. पैरण, गोव्यांतील व बाहेरील युरोपियन व गोव्यांतील हिंदी खिस्ती ह्या शिवाय सगळया समाजांत वापरतात. खमीस हें तर बिनचूक सगळ्या समाजात वापरण्यांत येतें. हातकापें युरोपियनाशिवाय सगळ्या समाजांत वापरण्यांत येतें. बानयान सगळ्या समाजांत वापरतात. ह्या विवेचनावरून बहुतेक सगळे अंगरखे दुसऱ्या समाजानें दूपित केल्यावरून त्यावर हिंदूंनीं बहिष्कार घालावा हे सिद्ध झालेंच.

आतां धोतर इजार, ह्यांपैकीं हिंदूंनीं काय वापरावें तें पाहूं.

धोतर हें हिंदु, मुसलमान, गोव्यावाहेरील खिश्चनसमाज, वगैरे वापरतात. इजार ही बहुतेक सगळया समाजांत वापरतात. ह्याहि विवेचनावरून धोतर किंवा इजार ह्यापैकीं हि हिंदूंनीं एकहि वापरूं नये असें सिद्ध झालें. आतां हिंदूंचें पादत्राण काय असावें तें पाहूं.

बूट, स्लीपर, चिनेल, मोचे (जोडे) जुतें, खडावा ह्यापैकीं बूट, स्लीपर, जुतें हीं बहुतेक सगळ्या समाजात वापरतात. चिनेल हें पादत्राण मध्यम प्रतीचे हिंदीखिस्ती वापरतात. मोचे (जोडे) बहुतेक हिंदूच वापरतात, परंतु अलीकडे पुष्कळ युरोपियनानीं घरांत वापरल्याचें पहाण्यांत आहे. ह्या सर्वांचा विचार केला असतां, एका पगडीशिवाय पोषाखांत भाग घेणारें असें एकहि हिंदूच्या वाट्यास राहत नाहीं. ते पुढें लिहितातः—

'पोषाखावरून एखादा इसम अमुकच समाजांतील आहे असें जर आपण बिनचूक सांगूं शकतों तर तें त्या पोशाखाला कोणतें तरी वैशिष्ट्य असल्याखेरीजच काय ?"

वरील विधानांत ' समाजांतील ' ह्या ऐवजीं 'खात्यांतील' असें लिहिल्यास मात्र आह्मास त्याचा बोध झाला असता, कारण गोवा सरकारनें बहुतेक खात्यांतील पोषाख (uniforme) अमुकच तऱ्हेचा व निरनिराळा असावा असें ठरविल्यावरून पोषाखावरून अमुक इसम अमुक खात्यांतील असावा असें ओळखतां येणें शक्य आहे. परंतु पोषाखावरून एखादा इसम अमुकच समाजांतील आहे असें बिनचूक ओळखण्याचें हिंदुपत्रकारांचें ज्ञान साश्चर्य वाखाणण्यासारखें आहे. एखादा इसम अमुकच समाजांतील असावा असें बिनचूक ओळखण्याच्या खुणेस, हिंदुपत्रकार वैशिष्ट्य अशी संज्ञा देतात ती खूण तरी काय असावी ह्याहि बद्दल आमचा तर्क चालत नाहीं.

" आणि असें वैशिष्ट्य हिंदु पोषाखास नाहीं असें कोणी ह्मणूं शकेल काय ? " असा हिंदुपत्रकर्ते प्रश्न करितात त्यास जोंपर्यंत हिंदु पोषाखास असलेलें असें वैशिष्ट्य साधार सिद्ध करून दाखविणारा नाहीं तों पर्यंत, हो अलबत,हिंद पोषाखास वैशिष्ट्य असें मुळींच नाही, असें आमचें छातिठोक उत्तर असेल. ते पुढें ह्मणतात:— उलट हिंदु पोपाख वापरणाऱ्यांत अत्यंत सुशिक्षित लोक असतात. हें कोणास सांगितलें पाहिजे असें नाहीं. "

वापरतात तो हिंदु पोषाख असें ठरविल्यास प्रत्येक हिंदु आपापल्या आवडी, इच्छा , परिस्थितीप्रमाणें पोषाख करितो असें लेखकाच्या पाहण्यांत आलें आहे. वरील त्याचा समज खरा नसेल तर हिंदु पोषाख कसा असावा हें हिंदु कर्त्यांनीं सांगण्याची मेहरबानी करावी.

शेवटीं, प्रस्तुत लेखकास संशय आलेले वरील मुद्दे सोडून " हिंदु विद्यार्थ्यांस " लिहिलेला संदेश मननीय आहे. वरून तो विद्यार्थ्यांनीं लक्ष्यपूर्वक वाचावा अशी इच्छा दर्शवून व खालीं सही करणाऱ्याचा वरील मुद्यांचा गैरसमज दूर करण्याबद्दल हिंदु संपादकांस विनंति करून वाचकांची रजा घेतों.

नीळकंठ व. मळकर्णेकर.

वर्तमानसार

—चालू सालीं वकिलीच्या परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या गृहस्थानां सनदा देण्यांत येतील, असें 'त्रिबून' पत्राला वाटतें.

—म्हापसें येथें एका औद्योगिक संग्रहालयाचा अनावरण विधि लवकरच उरकण्यांत येणार असून, तन्निमित्त तेथील मुनिसिपाल हॉलांत एक सभाहि भरणार आहे.

—वेर्रें-वार्देस येथील पोलीसानी तेथील स्थानिक अधिकाऱ्यांच्या मदतीनें दोघां बदमाषानां पकडलें होतें; परंतु पोलीसांना चकवून त्यानीं पोबारा केला !

—डॉ कोसैर द कोस्त यानां पुन्हां येथील गव्हर्नर नेमण्यांत येईल, अशी वदंता आहे.

—गजानन शे. केंकरे या होतकरू व तरुण विद्यार्थ्यांचें देहावसान झाल्याबद्दल भारताला फार वाईट वाटतें ! ईश्वर मृताच्या आत्म्यास शांति देवो !

—म्हापसें येथील सारस्वत विद्यालयाचे माजी हेडमास्तर परशुरामराव सिनारी हे निवर्तल्याची बातमीं कळून फार खेद वाटतो

—वसाहतींतील सरकारी कामगारानां सरकारी वाहनांचा खासगी कामासाठीं मोफत उपयोग करण्याची सक्त मनाई केली आहे.

—गोमांतकीय शेतकी सुधारणेचे नवीन कायदे प्रसिद्ध करण्याची खटपट चालू आहे.

—गोमांतकीय तिजोरीची तूट भरून निघण्यासाठीं 'बांकु नासियोनाल उल्त्रामारीन' या संस्थेकडे कर्जाऊ रक्कम घेण्याचा अधिकार स्थानिक सरकारला देण्याचें घाटत आहे !

—निरनिराळ्या खात्यांतील फाजील खर्चाचें प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न स्थानिक सरकारकडून व्हावा, अशी वरिष्ट सरकारनें इच्छा प्रगट केली आहे. तत्व कबूल पण....!

—लिसेव मुनिसिपालच्या प्रोफेसरांच्या परीक्षेसाठी पुढील परीक्षक मंडळें नेमण्यांत आलीं आहेत. पहिलें मंडळ— अध्यक्ष, गारसीय दा सिल्व्ह, रैतोर; पेद्रु लेयांव दे वान्डुस, व्हिक्तोर मानुयेल दियस, मेडिकल स्कुलचे शिक्षक; व येजिप्सी सौज व बासु मार्कीस, लिसेव सेंत्रालचे शिक्षक. दुसरें मंडळ— अध्यक्ष, गारसीय दा सिल्व्ह, रैतोर; आइरिस द सा व व्हिक्तोर दियस, मेडिकल स्कूलचे शिक्षक; आणि आलबेर्त मारतोंस व बासु मार्कीस, लिसेव सेंत्रालचे शिक्षक. अर्थात दोन्हीहि परीक्षक मंडळांत गारसीय दा सिल्व्ह, व्हिक्तोर दियस व बासु मार्कीस यांचा समावेश होत असल्याचें स्पष्ट दिसून येतें !

—खांदियाळकरांच्या 'बिन छापखानीं' चोपड्यानें येथें द्वेषाग्नीच्या रोपड्यास जन्म दिला असून, या रोपड्यापासून तयार होणाऱ्या मोठ्या वृक्षाचीं उष्ण फळें खुद्द 'वीजे'च्या पोटांत जातील, असा रंग दिसतो, असें एक कुशबनस्थ कळवितात.

Anuncios

१०० रुपये बक्षीस

आमच्या पाव तयार करण्याच्या कारखान्यांत भंगी लोक नोकरीला ठेविले असून ते पाव भाजीत असतात, अशी आमच्या कित्येक हितशत्रूनीं केवळ असुयाग्नीनें भलतीच कंडी उठविली आहे व ती साफ खोटी आहे. जो कोण योग्य मार्गानें सदरील कंडी खरी आहे असें सिद्ध करून दाखवील त्यास १०० रु. बक्षीस दिलें जाईल. कारखान्याच्या स्थापनेपासून पाव तयार करण्याचें काम हिंदूंकडूनच होत असून कारखान्यांत भंगी लोकांचा शिरकाव झाला असता, तर त्यानीं आपल्या नोकऱ्या कधींच सोडल्या असत्या. तेव्हां सर्व लोकानीं आमच्याच कारखान्यांतून पाव घ्यावे अशी विनंति आहे.

सांवडें, ता. १।७।१९२४.

मालक—आव्हेलीन नोरोंज

O Bharat, ano 9 °, n ° 15
3 de Julho de 1924.
Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.

PAGODE DE XRI DEUS BETAL DE FATORPA'

Do Concelho de Quepem

Terá lugar arrematação das avenças da receita trienal dos anos economicos de 1924 a 1925 a 1926 a 1927, do pagode de Xri Deus Betal de Fatorpá, no dia 21 de Julho proximo seguinte, ás 12 horas no local das sessões em Fatorpá, deste concelho. Os que quiserem arremata los deverão comparecer com fiança idonea no mesmo dia horas e local. As condições serao patentes no acto da arrematação.

Fatorpá, 30 de Julho de 1924
O escrivão supte em exercicio
Voicunta Camotim
Visto:—o presidente
Mucunda Baburai Camotim

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do 2 ° oficio Barreto vão ser vendidos em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige á estação de Sanvordem no dia 15 do seguinte mez de Julho ás dez horas, pela 2a vez e pela metade do preço da sua avaliação os seguintes predios. Direitos a sexta parte do predio rustico denóminado Gauntona Velpanvadó ou Gauntona Aforamento sito em Sigão da cultura de arroz coqueiros e outras arvores discrito na conservatoia predial desta comarca sob o n ° 9566 a fl. 196 v. do Livro B 27 avaliado por 500 rupias. Peuhorado nos autos civeis de execução por custas que o M. P. nesta comarca promove contra Baiu Naique por outro nome Baem conhecida tambem por Gopica viuva de Bicó Nunom Naique de Sigáo e outros por apenso acs autos de inventario orfanologico a que se procedeu por obito do dito Bico Nunom Naique. São por este citados todos os credores incertos dos ditos executados Báiu e outros e os co-proprietarios e quinhoeiros nos termos e para os fins de lei. A contribuição do registo por inteiro ficará a cargo do arramatante E para ser publico se expediu este.

Xeldem 27 de Junho de 1924
O escrivão de direito do 2 ° oficio.
Aires Manuel Barreto
Verifiquei—O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

nº 9 — N. 16

...eira 10 de Julho de 1924

ASSINATURA
cada ano tres rupias

ANUNCIOS
ainda que repetida uma tanga
...ero avulso uma tanga

...CTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक १६

गुरुवार ता. १० जुलै सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें—गोवा.

AGORA NO'S

O *Bharat*, jornal hindú, em números sucessivos acabou de fazer uma autópsia rigorosa das afirmações contidas no artigo *Por linhas tortas* ... do semanário *A Provincia*, orgão da burocracia indo-portuguesa. Aquele foi sem duvida um trabalho cheio de factos e argumentos, onde plenamente se demonstrou, convencendo os leitores á saciedade, de que pensando o *Bharat* ou quem quere numa India autónoma e independente não ofendia a República Portúguesa. Antes pelo contrario provava que os indios eram tão dignos do ideal republicano que, apesar de dominados, sentiam em si o civismo e a coragem de principios bastante para proclamar bem alto que a sua aspiração era de agora, depois ou num futuro remoto viverem livres e independentes.

O dominio por mais suasório que seja é sempre um dominio. A liberdade por mais aflições e incertezas em que nos lancem é sempre liberdade. Portugal no tempo dos Filipes sofreu a dominação espanhola. E ninguem que sabe prezar a honra duma raça pode admitir que Portugal, sacudindo o jugo castelhano procurou querer *ferir* a Espanha. O que fez, é dignificar-se, é reabilitar-se, é manter intacto o património dos seus antepassados.

A América do Norte foi, como a India, uma colónia. Ai quem dominava, quem tinha nas suas mãos a chave de administração era a Inglaterra, nação cujo senso de justiça e equidade, cuja acção como factor do progresso e da riquêsa, os americanos, hoje como então, nao podiam pôr em dúvida. Depois, a América ao tempo não tinha história e era habitada da quáse completamente pelos oriundos da Inglaterra e seus descendentes; mas tudo isto não obstou a que a mesma América deixasse bem vivo o anseio pela liberdade e independencia nacional, anseio este, que ninguem pôde contestar, é uma das principais carateristicas que distinguem o homem das outras especies inferiores.

Para nós, por toda esta peninsula hindustaníca povoada, não há nem pode haver um homem obscuro que ele seja que, acima de todos os bens não coloque a sua independencia e liberdade, por conseguinte, a liberdade e independencia da sua Pátria. Nem todos proclamam este seu anseio, é verdade, mas nem porisso, os que tem a coragem moral de o fazer devem ser vistos por quem quer como *suspeitos*. Antes pelo coutrario, são os tais *suspeitos*, sem exagero, os melhores elementos de cujo conselho e de cuja bôa vontade podem facil e admiravelmente utilisar-se os que sinceramente desejam e procuram o bem-estar da India, sejam eles indianos ou extrangeiros. Nós não sabemos qual é a opinião de *A Provincia* a este respeito. E' natural que os que ali trabalham pensem doutra forma, cristalizados como mostram viver em velhas formulas, em corriqueiros moldes da sciencia colonial. O que, porem, nos consola é que estadistas como Macdonald e outros que, neste momento histórico, estão a dar um novo geito, mais liberal, mais humano e mais moderno, á politica da velha Europa, com relação ao resto do mundo estejam conosco. Sim a *A Provincia* talvez deve ter lido com o coração a sangrar de dôr que o primeiro ministro da Inglaterra imperialista, militarista, daquela Inglaterra, que, segundo noticiou a *A Provincia*, com gaudio, mandára fabricar *tanks* armados para meter em ordem os indianos rebeldes, que o primeiro ministro desta mesma Inglaterra havia jantado e conversado amigavelmente sobre os *affaires* na India com o primeiro *rebelde* da India — Lala Lajpat Rai.

Felizmente para Portugal, felizmente para a India, *A Provincia* e a sua gente tem o seu valor já conhecido na balança da Opinião Publica, aquela Opinião que pesa e marca, seja na India, seja em Portugal. As diatribes que *A Provincia* lançou aos quatro ventos de publicidade, envoltas em ameaças que a ninguem intimidam, são como as bolas de sabão que o menor sôpro desfaz.

A prosa pretenciosa que *A Provincia* botou só teve um mérito, qual é o de proporcionar ao *Bharat* o feliz e agradavel ensejo de mais uma vez fazer franca e honestamente a profissão da sua fé politica. E' verdade, sr. Pereira Batalha, aqui com ôlho no orçamento fala-se e escreve-se muita hipocrisia. Aquilo talvez consola e anima o sr. Pereira Batalha; mas cá para nós só nos dá tristeza e mágoa, porque é sempre doloroso vêr de ratos um ente que a propria natureza criou para destinos mais elevados.

Um grupo de academicos

Expediente

A partir do proximo mez de Agosto, publicar-se-hão duas edições do *Bharat*, uma, portuguesa, e outra, portuguesa-marata, representando a primeira só a parte portuguesa da segunda.

A assinatura da edição portuguesa é de uma rupia e doze tangas. Desde já aceitam-se assinaturas.

A EMPRESA DO "BHARAT"

Ecos & Critica

ERA DE ESPERAR

O outro dia, em Bardez, puzeram-se ao largo dois autenticos gatunos; que alguns soldados de policia conduziam de Verem a Mapuga' — Dizem; que a policia nao fez fogo contra os meliantes, porque nao tinha armas carregadas.

Era de esperar. A policia de Bardez exgotou as *armas carregadas* levando cidadaos pacatos e inofensivos para o quartel em Mapuga', nos saudosos tempos do *soba'* Dias—Agora e' o que se ve.

CA' E LA'

O sr. dr. Jacinto Nunes, republicano como poucos que o sao a valer, diz, entre outras coisas, o seguinte no "O Jornal" de Lisboa:

"Vive-se num autentico regime burocrotico em que a quase totalidade das receitas do Estado e' absorvida pelo funcionalismo."

Isto e' la'. Ca' e' coisa melhor. E' absorvida pelo funcionalismo nao so' *a quase tatalidade*; mas sim a totalidade das receitas do Estado e mais alguma coisa que vem dos emprestimos. E digam agora que Goa nao e' prolongamento de Portugal!

PODIA SER MAIS CLARO

De uma entrevista que o sr. Menezes Braganga concedeu ao "Diario de Lisboa" tiramos o seguinte que e digno de registo:

— "Mas nao foi da iniciativa local o agravamento do "deficit"?

— De maneira alguma. Proveiu de varios decretos dimanados do terreiro do Paço sem audiçao ou consulta do governo da colonia. Resultou principalmente de varios aumentos de vencimentos dos funcionarios decretados em 1919...

O sr. Braganga podia ser mais claro. A' nossa ruina começou com o decreto de equiparaçao que o "Debate" jornal de s. exia classificara ao tempo de "Festim do Baltazar". E a acreditar que este *festim* fora patrocinado pelo sr. dr. Jaime de Morais, o *colonial distinto*. E a acreditar que o sr. dr. Wolfango da Silva, entao vogal nato do Conselho do Governo, qualificára de um *gesto de rebeldia*, a reclamaçao que a parte electiva do mesmo conselho tendo a' testa o sr. M. Braganga queria levar ate' o Governo da Metropole! Passam os anos. Pas-

वर्तमानसार

—फारमासेवतीक कृष्ण शेणवी भोबे यांची दमणच्या ओस्पितालाच्या मुख्य अधिकाऱ्याचे जागीं तात्पुर्ती नेमणूक झाल्याचें कळविण्यास आनंद वाटतो.

—कुमारी इद आलव्हरीस या नावांच्या मुलीनें वकिलीची परीक्षा दिली असून, ती लवकरच वकिलीचा धंदा सुरू करणार आहे. इद आलव्हरीस या गोमांतकांतील पहिल्या वकिलीणबाई होत.

—दो. कायतान गोंसालव्हीस यांना सुप्रेम त्रिबुनालाचा जज्ज नेमण्यांत आलें आहे. एवढ्या मोठ्या हुद्यावर यापूर्वी कोणाहि इंडियनाची नेमणूक झाली नव्हती.

—गोव्याचें ब्रिटिश टेलेग्राफखातें लवकरच गोवा सरकारच्या ताब्यांत जाणार असून यत्संबंधीं तयारी चालू आहे.

—पोर्तुगीज वसाहतींच्या प्रधानजीकडून स्थानिक सरकारला एक हुकूम आला असून, आणखी दोन महिन्यानीं त्याची अंमलबजावणी होणार आहे. प्रस्तुत गुलदस्तांत असलेला सदर हुकूम प्रकाशांत येतांच जिकडे तिकडे गडबड उडणार आहे; अशा अर्थाचीं मुक्ताफळें पणजीच्या आ प्रोव्हिसनें उधळलीं आहेत !

—पूर्वी प्रसिद्ध झाल्याप्रमाणें गेल्याच्या मागील गुरुवारीं सांगें येथील श्री विठ्ठल सेवक मंडळाची संस्थेच्या दिवाणखान्यांत असाधारण सभा भरून संस्थेची अंतरघटना एकमतानें निश्चित करण्यांत आली. त्याच सभेंत मुख्य अधिकारी मंडळ, कार्यकारी मंडळ, हिशेब तपासनीस मंडळ वगैरे मंडळें सरकारी बोलेतींवर प्रसिद्ध झालेल्या नियमानुरूप ठरविण्यांत येऊन, पहिल्या मंडळाचें अध्यक्षस्थान द. ना. बाक्रे, दुसऱ्याचें नारायण अ. ना. पाटणकर व तिसऱ्या मंडळाचें अध्यक्षस्थान रा. गो. मसूरकर यांस निवडणुकी अंतीं मिळालें. नवीन मंडळानीं आपापल्या कामांचा चार्ज घेतला असून, संस्थेची एकंदर व्यवस्था नमूनेदार रीतीनें चालेल यांत संशय नाहीं. संस्थेच्या नेतृत्वाखालीं सुरू असलेली मराठी–इंग्लिश शाळाहि जोरांत असल्यानें श्री विठ्ठल सेवक मंडळाच्या परिश्रमानें तेथील जनतेला अपरिमित फायदे होतील हेंहि उघड आहे.

—डॉ. जाइम द मोराइस यांची आंगोलच्या (आफ्रिका) हॅय–कमिशनरच्या जागीं नेमणूक होणार असल्याची बातमी पसरते न पसरते तोंच आणखी दोन वर्षे त्यानीं येथेंच 'राज्य' करावें अशी वरिष्ठांची इच्छा असल्याची दुसरीच एक हूल उठली आहे !

—म्हापसेंच्या आजील संस्थेनें मांडलेल्या सोडतीच्या 'पसाऱ्यांत' लफंगेगिरीचा हैदोस चालू असल्याचें उघडकीस आलें आहे. कांहीं सोडतींवर पहिल्या बक्षीसाची रक्कम ५० हजार रु. ठरविलेली आढळून येते, तर कित्येकांवर त्याच बक्षिसाची रक्कम ६० हजार रु. असल्याचें नमूद आहे. दुसऱ्या बक्षिसाचीहि अशीच कांहीं विपरीत स्थिति आहे. एका ठिकाणी या बक्षिसांची रक्कम १५ हजारांची लिहिली असून दुसऱ्या ठिकाणी तीच २० हजारांची दिसून येते. तसेंच एकीकडे ५० हजार रु. संस्थेच्या तिजोरींत जमा होतील असें दृष्टोत्पत्तीस येतें, तर दुसरीकडे संस्था ६२ हजार रु. आपल्या गरिबांसाठीं ठेवणार असल्याचें आढळून येतें ! या 'सांवळ्या गोंधळाचें' उगमस्थान शोधून काढण्यासाठीं सरकारचे प्रयत्न चालू असल्याची वदंता आहे. सोडतींत पैसे उडविणाऱ्या शहाणे लोकांनीं 'आजील'च्या बाबतींत फाजील काळजी न घेतल्यास 'स्वताचें नाशें व जगाचें हासें' होईल या कडे लक्ष द्यावें, अशी आमची त्यांना इशारत आहे.

—बार्देस मुनिसिपालटीनें म्हापसेंच्या ज्ञानप्रसारक संस्थेला स्वतंत्र इमारतीसाठीं जागा बहाल केली असून, सदर संस्था इमारतीचा पाया खोदण्याचा समारंभ लवकरच उरकून घेईल, असा रंग दिसतो.

—म्हापसेंच्या सारस्वत विद्यालयांत पोर्तुगीज शिक्षण देण्याचें काम दो. नीळकंठ घ. मळकर्णेकर यांवर संपविलें आहे.

—यशवंत गोविंद कामत यांची नेमणूक फोंडेच्या आल्मेद कॉलेजच्या शिक्षकाचे जागीं झाली आहे.

—प्रो. आत्माराम शं. पाणदीकर व रामचंद्र श्रीधर पै यांची मडगांवच्या पाठशाळेंतील शिक्षकाचे जागीं नेमणूक झाल्याचें वाचकांस कळलेंच आहे. प्रोफेसरद्वयानीं आपल्या कामाचा चार्ज घेतला असून, उभयतांच्याहि हातून शिक्षणदानाची पवित्रतम कामगिरी उत्कृष्ट रीतीनें पार पडेल, अशी भारताला उमेद आहे.

—रामचंद्र मंगेश अडवळपालकर हे आणखी ६ महिने पोर्तुगीज पब्लिक वर्कस खात्यांत काम करणार आहेत.

—दिल्ली येथील हिंदु–मुसलमानाच्या दुहीला तीव्र स्वरूप येत असून, तीचें पर्यवसान दंगेधोप्यांत होण्याचा संभव असल्यानें सरकार डोळयांत तेल घालून जागत आहे.

—येत्या वर्षाच्या फेब्रुआरी महिन्यांत सलोनच्या समुद्रांतून मोतीं काढण्यांत येणार असून त्यांची संख्या तीन कोटी होईल अशी तज्ज्ञाची अटकळ आहे. १९०७ सालीं त्याच समुद्रांतून मोतीं काढण्यांत आलीं होतीं व या कामीं ६१५ होड्या व ११ हजार पाणबुडी लोक खपत होते.

—दमण येथें देवीचा आजार जोरावला असून त्यामुळें तेथील लोकांचीं मनें त्रस्त झालीं आहेत.

—प्रो. पिसुर्लेकर हे एक नवीन ग्रंथ लिहीत असून त्यांत हिंदुस्थानच्या जुन्या इतिहासाची मनोरंजक माहिती संग्रहित होईल असें कळतें.

—अक्रावें फाइस्क लवकरच प्रसिद्ध होईल, असें कळतें.

वर्गणीदारांस सूचना.

पणजीचे व्यापारी भारताभिमानी उपेंद्र शे. तळावलीकर यानीं तेथील व त्या बाजूकडील इतर गावांतील आश्रयदात्यांची वर्गणी वसूल करण्याचें काम, केवळ भारताचा उत्कर्ष व्हावा या एकाच निरपेक्ष हेतूनें, आपल्या शिरावर घेतलें आहे. आमच्या वर्गणीदारानीं त्यांकडे वर्गणी चुकती करून भारताला नेहमींप्रमाणेंच प्रोत्साहन द्यावें, अशी आमची त्यांस आग्रहाची विनंति आहे.

मनेजर भारत.

Anuncios

O Bharat, ano 9 °, n ° 16 10 de Julho de 1924.

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do 1 ° oficio Redcar, a instancia do autor, Usso' Govinda Porobo Dessay de Rivona, correm e'ditos de 60 dias a contar do dia da segunda publicagao deste citando o reu Subraia Gan de Zambaulim de Rivona e ora ausente em Bombaim em parte incerta para acgao do processo ordinario e seus termos da petigao ja' autuada neste juizo e instaurada pelo dito Usso, contra o referido citando Subraia e outros, e na qual o mesmo autor alega que por escritura publica de 24 de Margo de 1916 os reus Mogu' Bailadeira Xeuntem Bailadeira, Gojanona Gan, Subraia Gan e Gocul Cuxem Bailadeira de Zambaulim de Rivona, e bem assim Gonoxama Gan que foi da dita prometeram vender a Govinda Pundolica Hegdo' Dessay de Cusmane a metade do lado sul do dominio util do seu predio Benamola por outro nome Cuntiemola sito em Rivona, e discrito na conservatoria desta comarca sob o n ° 1245. Que essa promessa da venda foi feita pelo prego de trezentas rupias que foram recebidas do dito Hegdo' Dessay, pelos reus e o referido Gonoxama obrigando-se estes a dár verificada a venda dentro dum ano a contar da data escritura sob pena de pagarem ao referido Hegdo' Dessay a quantia de duas mil rupias. Que os reus e o dito Gonoxama apesar de varias vezes pedidos pelo dito Hegdo' Dessay nao realizaram a venda prometida, deixando assim expirar o praso de um ano convencionado para realisagao da venda ajustada. Que desta maneira os reus e o dito Gonoxama ficaram incursos na responsabilidade de pagarem a pena estipulada de 2.000 rupias ao mencionado Hegdo' Dessay Que por escritura publica de 17 de Maio de 1917 o mesmo Hegdo' Dessay cedeu ao autor todos os seus direitos emergentes da citada escriptura de 24 de Margo de 1916 para haver dos reus e do dito Gonoxama a referida pena de 2 mil rupias. Que conclue por pedir no artigo oitavo da petigao inicial que julgada procedente e provada a mesma acgao devem ser condenados os reus a pagarem ao autor a referida importancia de 2 mil rupias da pena estipulada e nas custas e selos do processo e procuradoria Esta citagao findo praso de editos hade ser acusada na segunda audiencia deste juizo onde sera' assinado o praso da lei para contestar querendo a mesma acgao. As audiencias deste juizo se fazem em todas as tergas e sextas feiras a's 12 horas no tribunal judicial desta comarca situado em Xeldem ao lado de estrada nacional que de Quepem se dirige a estagao de Sanvordem se nao forem feriados, porque neste caso terao lugar nos dias imediatos se tambem nao o forem e nao estiverem compreendidos nas ferias. O que para ser publico se expediu este. Xeldem 13 de Novembro de 1923.

O escrivao de direito do 1 ° oficio
Babu' V. Camotim Redcar

Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do 2 ° oficio Barreto vão ser vendidos em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige á estação de Sanvordem no dia 15 do seguinte mez de Julho ás dez horas, pela 2a vez e pela metade do preço da sua avaliação os seguintes predios. Direitos a sexta parte do predio rustico denóminado Gauntona Velpanvadó ou Gauntona Aforamento sito em Sigão da cultura de arroz, coqueiros e outras arvores discrito na conservatoia predial desta comarca sob o n ° 9566 a fl. 196 v. do Livro B 27 avaliado por 500 rupias. Peuhorado nos autos civeis de execução por custas que o M. P. nesta comarca promove contra Baiu Naique por outro nome Baem conhecida tambem por Gopica viuva de Bicó Nunom Naique de Sigão e outros por apenso aos autos de inventario orfanologico a que se procedeu por obito do dito Bico Nunom Naique. São por este citados todos os credores incertos dos ditos executados Báiu e outros e os co-proprietarios e quinhoeiros nos termos e para os fins de lei. A contribuição do registo por inteiro ficará a cargo do arramatante E para ser publico se expediu este. Xeldem 27 de Junho de 1924

O escrivão de direito do 2 ° oficio.
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
A. A.de Brito e Nascimenot

स्थिति होती. आरंभीं पुष्कळांची हिंदुधर्मावरील श्रद्धा कमी होऊन त्यांनीं परधर्मांत प्रवेश केला. कांहीं ब्राह्मणानीं सुधां हिंदुधर्माचा जेव्हां त्याग केला तेव्हां समाजांत बरीच खळबळ उडून गेली. त्यानंतर आपल्या लोकानीं गुप्तसभा या नावांची एक सभा स्थापन करून त्या द्वारें धर्मचर्चा व प्रार्थना करण्याचा प्रधात सुरू केला. ह्या सभेचे पुढें काय झालें हें कळल नाहीं. त्यानंतर १८४९ मध्ये सुप्रसिद्ध व्याकरणकर्ते दादोबा पांडुरंग याच्या खटपटीवरून 'परमहंससभा' या नावांची एक सभा स्थापन झाली. ह्यादि सभेचें कार्य थोडे दिवस चालून १८६७ च्या सुमारास 'प्रार्थना समाज' निघाला. महाराष्ट्रांत प्रार्थनासमाज या पंथाचा प्रसार जरी सार्वत्रिक झालेला नसला तरी पण या पंथाचीं मतें मात्र जनतेंत रुजलेलीं आहेत.

* * *

उत्तर हिंदुस्थानांत अशा एका पंथाची जरूरी होती व हें काम उत्तम प्रकारें आर्य समाजानें बजावलें. आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानंद हे गुजराथमधील ब्राह्मण परंतु त्यानां उत्तम प्रकारची जमीन पर्जावांत मिळाली व तेथें आज याचा मोटा थोरला वृक्ष होऊन त्यानें फार मोठें कार्य केलें. आर्यसमाजानें जें आज काम केलेलें आहे तें काम आधुनिक काळांत कोणत्याच दुसऱ्या पंथानें केलेलें नाहीं हें निःसंशय कबूल करणें भाग आहे. आर्यसमाजाची धडाडी काहीं औरच आहे. या समाजानें नुसतें धार्मिक बाबतींतच काम केलें असें नाहीं तर सामाजिक बाबतींत नादुरुस्त झालेली समाजाची घडी दुरुस्त करणें, शिक्षणाचा प्रसार करणें स्त्रियानां योग्य असें शिक्षण देणें वगैरे महत्वाचीं कामें केलेलीं आहेत. गुरुकुलासारखी उत्तम विद्यालयें याची साक्ष आज देत आहेत. इतकेंच नव्हे तर हिंदुधर्मावरील हल्ले परतविण्याचें श्रेय जर कोणास द्यावयाचें असेल तर आज ह्याच समाजास दिलें पाहिजे. हिंदुमुसलमानाची वेगडी एकी आज कळून आलेलीच आहे. त्याच्याशीं जर सर्व बाबतींत टक्कर देण्याला कोणता समाज तयार असेल तर तो आर्यसमाजच होय.

\+ + +

आर्यसमाज हा वयानें सर्वांत लहान असला तरी कार्यानें सर्वांत मोठा आहे. करून त्या समाजाचे संस्थापक जे दयानंद सरस्वती याकडे प्रथम वळूं.

\+ + +

स्वामी दयानंद हे गुजराथ मधील असून नागर ब्राह्मण कुळांत जन्माला आले. याचें मूळ नांव मुळशंकर असें होतें. याचे बाप कट्टे शिवोपासक होते, शिवरात्रीचें व्रत ते मोठ्या नेमानें करीत व आपल्या घराच्या मंडळीसहि तें नेमानें पाळण्यास लावीत. त्या व्रताच्या दिवशीं प्रत्येकानें अन्नपाणीसुद्धां न घेतां भजन पूजन करावें, असा सक्तीचा नियम होता. मुळशंकर जेव्हां चौदा वर्षांचा झाला तेव्हां त्याच्यावरहि ही पाळी आली. एका शिवरात्रीच्या दिवशीं वरील नियम पाळून रात्रौ पूजन वगैरे करीत असतां मध्यरात्र उलटून गेल्यावर सर्वांना निद्रेच्या डुलक्या येऊं लागल्या. मुळशंकरच्या वडीलांवर सुद्धां निद्रेनें आपला अंमल बजावला; मात्र मुळ शंकर तसाच जाग्रत बसला.

\+ + +

थोड्याच वेळानें त्याला दिसून आलें कीं, एक उंदीर शिवाच्या पिंडीकेच्या डोक्यावर नाचत आहे व प्रसादाकरितां ठेवलेला नैवेद्य हि गट्ट करून टाकलेला आहे. हा प्रकार पाहून त्याला फार आश्चर्य वाटलें. आपला बाप ज्या देवापुढें नाक घांसून व हात जोडून आपणाला धन धान्य समृद्धि मागत होता त्या देवाला स्वतःच्या डोक्यावरील उंदीर घालवितां येत नाहीं. स्वतःचें संरक्षण ज्या देवाला करतां येत नाहीं तो देव आपल्या बापाच्या मागण्या कशा पुरवील. तेव्हां ही पिंडिका देव नाहीं अशी त्याची खात्री झाली.

× × ×

त्यानंतर त्यानें बापाला जाग्रत करून हा प्रकार निवेदन केला आणि विचारलें कीं, श्रुति स्मृतींत वर्णन केलेला परमेश्वर हाच काय ? जर हाच असेल तर याची अशी विटंबना कां व्हावी ? बापानें त्याला सांगितलें कीं, आपण जो मूर्तीपुढें नैवेद्य वगैरे ठेवतों तो या पिंडिकेच्या द्वारें ईश्वराला पोंचत असतो परंतु या उत्तरानें त्याचें समाधान न होतां उलट मूळची जिज्ञासा फारच बळावली. काहीं काळानें त्याच्या बहिणीवर मृत्यूचा घाला पडला. या प्रकारानें तर त्याच्या मनांत विचारांची कालवाकालव सुरू झाली. मृत्यु म्हणजे काय ? मृत्यूच्या पुढें काय आहे विगैरेची जिज्ञासा फारच वाढली. याच वेळीं त्याच्या बापानें त्याचें लग्न करण्याचें ठरविलें. वरून त्याला घरांत रहाणें बरें न वाटून त्यानें अज्ञातमज्ञानाचा व ईश्वराचा शोध लावण्या करतां घरांतून पोबारा केला.

× × ×

घरादाराला रामराम ठोकून मुळशंकर सर्व हिंदुस्थानभर फिरला. ज्यांच्याकडून आपणाला ज्ञान मिळू शकेल असें त्याला दिसत होतें त्याच्यापाशीं त्याचें शिष्यत्व पत्करून ज्ञानाची याचना केली. सर्व तीर्थें पालथीं घातलीं, हिंदुस्थानभर प्रवास केला, हिमालयांत राहून योग विद्येचा अभ्यास केला. कंदमुळांच्या आहारावर राहून पाहिलें, हजारों साधूंच्या मेळ्यांत राहून पाहिलें, जेथें जेथें तत्वज्ञानाची चर्चा होई तेथें राहून पाहिलें. परंतु त्याला मनासारखा गुरू मिळाला नाहीं. यापुढें त्यानें सन्यास घेऊन दयानंद सरस्वती असें नांव धारण केलें.

* * *

त्यानंतर मात्र त्यांना योग्य असे गुरु मिळाले. त्याचें नांव स्वामी विरजानंद होय. स्वामी विरजानंदानीं हिंदुधर्माचा खोल अभ्यास केलेला होता. हिंदुधर्मावर जीं वेडगळ समजुतीचीं पुटें चढलेलीं आहेत, तीं पाहून स्वामीना फार खेद होई. यांतील अनेक वाईट चाली पाहून त्यांचा जीव चडफडे. मूर्तिपूजेवर तर त्यांचा फारच कटाक्ष होता. अशा मताचा गुरू स्वामी दयानंदाना मिळाला हें फार चांगलें झालें. याकडे अडीच वर्षें अभ्यास करून जें काहीं ज्ञान मिळण्याजोगें होतें ते मिळविलें. शेवटीं गुरूनीं आपल्या शिष्याला सांगितलें कीं, आपल्या जवळ आणखी शिकविण्याचें कांहीं शिल्लक राहिलेलें नाहीं. तरी तूं जें काय शिकला आहेस त्याच्या योगें सत्य ज्ञानाचा प्रसार कर.

× + +

दयानंद गुरूंचा निरोप घेण्यास गेल्या वेळीं गुरूनीं त्याला सांगितलें कीं, अद्याप आपण गुरुदक्षिणा दिलेली नाहीं. हा प्रश्न ऐकून दयानंदाना आश्चर्य वाटलें. आपले गुरूजी लोभी आहेत कीं काय असा त्यांना संशय आला. गुरूनीं दयानंदाची मुद्रा पाहून त्याच्या मनांतील आशय जाणला व ते त्याला म्हणाले " वत्सा भिण्याचें कांहीं कारण नाहीं. मला सुवर्ण दक्षिणेची मुळींच गरज नाहीं. आपल्या पासून एका वचनाची मात्र अपेक्षा करतों. तें हें कीं, " आज पासून सत्याचा प्रसार करण्याच्या कामीं आयुष्य खर्च करीन व पौराणिक कालीं शिरलेल्या असत्य कल्पना नाहींशा करून आर्य धर्माचें विशुद्ध स्वरूप जगाच्या दिग्दर्शनास आणीन, अशी प्रतिज्ञा हीच माझी गुरुदक्षिणा होय.

× × +

या नंतर स्वामीनीं आपलें आयुष्य उपदेश करण्यांत घालविलें. हजारों पंडितांशी तसेंच मिशनरींशीं वाद केला. एकदां तर बनारस मध्यें साडेतिनशें पंडितांकडे एकट्यानेंच वाद चालविला होता. त्याच्या उपदेशानें पुष्कळ जुन्या मताचे लोक चिडून जात. एकदा तर एका शैवमतानुयायानें चिडून जाऊन त्याचेवर भयंकर पाळीव नाग घातला व तो स्वामी दयानंदाना म्हणाला "पहा आतां हा वासुकी देवच आमच्यांतील वादाचा निर्णय करील." नागानें स्वामीच्या पायाला विळखा घातला तोंच स्वामीनी पाय हासडून त्याचे पासून सुटका करून घेतली व त्याच्या डोक्यावर पाय ठेऊन त्याला गतप्राण केलें व तो त्या शैवमतानुयायाला म्हणालाः हा पहा तुझा देव आतां यमसदनाला जात आहे अशा खोट्या देवानां असेंच मरावें लागतें.

\+ + ×

आर्यसमाज कट्टा एकेश्वरवादी आहे, ईश्वराचें अवतारत्व त्याला कबूल नाहीं. कांहीं महात्म्यांच्या आंगी ईश्वरी अंश ज्यास्त असतो परंतु ते ईश्वराचे अवतार आहेत असें आर्यसमाज मानीत नाहीं. ईश्वर व माणसें यांमध्यें तिसऱ्या मध्यस्थांनीं गरज नाहीं असें ते म्हणतात. स्वामीच्यामतें प्रत्येक व्यक्तीला मग ती कोणत्यांहि जातीची असो, वेदाध्ययन करून त्या द्वारें ईश्वराची आराधना करण्याचा हक्क आहे. ईश्वराची प्रार्थना, उपासना, वगैरे आर्यसमाजाला मान्य आहेत. प्रार्थनेच्या योगें आंगांत नम्रपणा उत्पन्न होऊन मनाला आनंद व शांति प्राप्त होतात. मात्र प्रार्थना याचा अर्थ असा नाहीं कीं, मिळेल तें ईश्वराकडे मागायाचें.

× + ×

आर्यसमाजानें आपल्या पक्षांत येणाऱ्यां करतां दहा नियम केलेले आहेत ते मान्य केल्यानंतर समाजांत दाखल होतां येतें. त्यांतील दुसऱ्या नियमामध्यें ईश्वराचें स्वरूप खालील प्रमाणें वर्णन केलें आहेः—

परमेश्वर सच्चिदानंद स्वरूप, निराकार, सर्व शक्तिमान, न्यायी, दयाळू, अजन्मा, अनंत, निर्विकार, अनादि, अनुपम, सर्वाधारी सर्वेश्वर, सर्वव्यापक, सर्वांतर्यामी, अजर, अमर, अभय, नित्यपवित्र, सृष्टिकर्ता आहे. त्याचीच उपासना करणें योग्य आहे. या नियमावरून आर्यसमाज कोणत्या प्रकारचा ईश्वर मानतो हें कळून आलेंच असेल. बाकीच्या पंथांचा विचार पुढील लहरींमध्यें करूं.

के. भारती

हिंदुस्थानचें राजकारण

(ले० संजय)

मौ० महंमदअल्लीच्या अध्यक्षतेखालीं अहमदाबादेस आज (शुक्रवार ता. २७-६-२४) भरणारी ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची बैठक राष्ट्रीय सभेच्या संबंध इतिहासांत महत्वाची समजली जाईल यांत शंका नाहीं. ह्या बैठकीस म. गांधी, बारडोलीस दोन वर्षांपूर्वी भरलेल्या बैठकीनंतर, पहिल्यानदांच जातीनें हजर राहून त्या कमिटीचा पुढील कार्यक्रम व घटना ह्या संबंधीं अत्यंत महत्वाच्या काहीं सूचना पुढें मांडणार असल्यामुळें व विशेषतः ह्या सूचनास स्वराज्यपक्षीय सभासदांकडून जोराचा विरोध होणार असल्यामुळें ह्या प्रसंगास ऐतिहासिक स्वरूप येणें सहाजिक आहे. ह्या बैठकींत काय निष्पन्न होतें ह्या संबंधीं बरेंचसें कुतुहल वाटत असलें किंवा या निष्पत्ति संबंधी निश्चितपणाची व [कायद्याचे भाषेंत बोलावयाचें म्हणजे] शपथेवर विधानें, असहकारी 'कट्टर' 'स्वराजिस्ट' व आमचे दोस्त व हितचिंतक अँग्लो इंडियन मतांचे प्रतिनिधी मुंबईच्या 'टाईम्स' पत्रासारखीं पत्रें करीत असले तरी सुद्धां ह्या ओळी प्रसिद्ध होण्यापूर्वीच ऑ. इ. काँ. कमेटीनें खल करून म. गांधीच्या ठरावासंबंधीं दिलेला निकाल प्रसिद्ध झाला असेल. ह्या एकाच कारणा करितां ह्या वादविवाद निष्पत्तिसंबंधी तर्क करणें निरुपयोगी ठरेल. तेव्हां म. गांधींच्या ठरावांच्या भवितव्यतेच्या वादाच्या भोवऱ्यांत गुरफटले न जातां आपणापुढें असलेल्या ह्या ठरावांचाच विचार करणें योग्य होईल.

म. गांधी मांडणार असलेलेः (१) हातानें सूत काढणें हा हिंदी राष्ट्रीय सभेनें

Ano 9 N. 17

Quinta-feira 17 de Julho de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
por cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक १७

गुरुवार ता. १७ जुलै सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष . अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें—गोवा.

ASILO DE MAPUCA'

FALA UM BARDEZANO

Acabei de lêr, sr. Director, o seu mui importante e ponderado editorial de 3 de Julho sobre as *Lotarias* e rialmente fiquei com o coração a sangrar de dôr, vendo o abuso de tanto dinheiro gasto em nome dos pobres.

Não quero ... nem desejo falar das *Lotarias* em geral, sòmente vou tratar da Lotaria do Asilo de Mapuçá e mais o seu célebre Hospital.

Poderá alguem imaginar que um filho de Bardêz vai protestar contra a Lotaria e mais o Hospital de que o meu Concelho carece — Não. Nunca isso podia ser, porque todos estamos convencidos de que Bardez precisa dum Hospital.

Mas é necessário ir paulatinamente, de vagar, sem nenhuns espaventos e luxo para não cairmos em erros e dali resultar um fiasco, ficando tudo reduzido a um sonho, a uma ilusão pura e candida.

Por ora, o que nos basta, é um modesto Hospital dumas cincoenta mil rupias, de modo que haja lugar suficiente para alojamento de doentes estrictamente pobres. Pode-se mesmo ir um pouco mais adiante e construir uns dois quartos bem postos e uma razoavel sala de operações e isto de maneira que caiba tudo dentro da verba subscrita.

Nunca, porém, dar um salto, atingir o extremo do luxo...do espalhafato sem a previa garantia do necessário para manter a obra feita!

Não só basta construir o Hospital, a sua manutenção ha-de ser um trabalho muito custôso, demandando verba muito importante.

¡E se amanhã houver uma guerra ás Lotarias, onde iremos procurar o dinheiro?

Para ampliação basta deixar o lugar suficiente e, por ora, ir lentamente, com muito sossêgo e arranjar as coisas com o dinheiro que temos, pois não vale apena fiar-se no que ha-de vir, pois ainda o futuro é muito duvidoso e incerto!

O Hospital que Bardês vai ter, tal como se acha planeado, é um autentico luxo e até a sua realisação não sabemos que voltas o mundo ha de dar. O plano representa uma ousadia singular e já entra nos dominios da psiquiatria — permita-me a expressão. ¡Admiravel dirão todos! e achar-me-hão um pessimista e farão a pregunta natural: ¡Bardês não tem dinheiro? Tem, e demais, mas o que se vê é que, apesar disto, ainda não se apurou quantia suficiente para custear a construcção do Hospital que está orçada em 126 mil rupias, sem os célebres *orçamentos suplementares* que não podem faltar.

Dos subscritores apuraram-se umas 80 mil rupias e o resto espera-se que venha das Lotarias.

Mas a Direcção, ou a alma dela, como por lá se diz, o sr. dr. F. Ribeiro pelos modos pouca experiencia tem do mecanismo destes e as suas faculdades de previsão são de fraco alcance, duma *cabeça de alfinete*, pois o *Bharat* diz bem: "De assentada, um plano de Lotaria de 250.000 rupias é, com licença, um salto que pode ser perigoso. E depois, quem assume a responsabilidade? O Presidente da Direcção que é um modesto funcionario ganhando 140 rupias ao mês e cheio de familia? O tesoureiro? Quem?" —E a pergunta que V. dirige é que nós os Bardezanos repetimos perante o peso da calamídade iminente! Dizemos calamidade, porquanto, se o recurso ás *Lotarias* falhar, como há receio de que falhe, dada a lamentavel pressa da Direcção, será muito dificil, quasi impossivel manter o crédito do Asilo, e uma instituição destas, desacreditada, é uma instituição morta!

Há mais e pior. Dizem que para cima de 50.000 cautelas continuam ainda sem ser destinadas, e das destinadas sò Deus sabe quantas virão voltadas! A previsão de tal *rajada de má sorte* que o *Bharat* faz estará proxima da rialdade?

Oxalá que tal não seja, mas se por nossa infelicidade o presagio se realisar, não será dificil apontar o responsavel. Francamente, a *alma* da Direcção apressou demais e os planos tomaram o arrojo que nos faz recordar a façanha mitológica do Icaro!

E, concluindo, aqui fazemos os nossos sinceros votos para que tudo se faça com prudencia e geito e que tudo acabe do milhor modo possivel. Pois, se a ambição dos absorventes da gloria é grande, maior ainda é o prestigio e orgulho do brioso Concelho, que cumpre aos Bardezanos de toda a forma salvar!!!

Bardes, Julho de 1924.

UM BARDEZANO

Ecos & Critica

A VELHA LERIA ...

Na sua ediçao de 3 do corrente, respondendo ao nosso 'suelto' "Beija mao" dizia o "Diario" em justificaçao da posse a que ultimamente a Direcçao obrigou os professores de instrucçao primaria, que a Direcçao tal havia feito "no interesse" dos proprios professores, porquanto os processos de aposentaçao dos mesmos tinham que ser instruidos com certidao da "cada posse de cada lugar". Agora o mesmo "Diario", na sua ediçao de 12 pretendendo desembrulhar-se da maeda em que se meteu confessa que houve professores que foram forçados a tomar posse do mesmo lugar por "duas vezes". Onde ficou entao aquela de "cada posse de cada lugar"? Nao ve o "Diario" que graças a' celebrina idea da Direcçao ja' temos professores com "duas posses de cada lugar"?

E o "Diario" a atirar-nos a' cara a velha e safada le'ria de "colheres de pau"!

NAO, DE CERTO

O "Diario" tambem cita, em defesa das celebradas posses, a portaria de colocaçoes dos professores ultimamente publicada na folha oficial. Mas o "Diario" bem deve saber que a intençao do *Bharat* foi, ao redigir o suelto de interpretar as determinantes desta portaria, inspirada pela Direcçao como todos sabem. Entao, que diabo o *Bharat* era um *bebe'* para admitir que a Direcçao tivesse convocado os professores para um "beija mao" assim "carrement" como quem convida a um "five o clock tea"? Nao, de certo

XENCORA R. S. NADKARNI

Consta-nos ter passado o 3° ano do Instituto Superior do Comercio de Lisboa o sr. Xencora Ramachondra Senai Nadkarni que acaba de obter as mais altas classificaçoes nas cadeiras de Operaçoes Comerciaes e de Regimes Aduaneiros. Nesta ultima cadeira o laureado estudante, a convite do distinto economista e Director do Instituto sr. Professor Francisco Antonio Correa, teve o ensejo de apresentar uma dissertaçao intitulada "Relaçoes economicas das Colonias Portuguesas com a Metropole e com o Extrangeiro", que brevemente sera' publicada em Revista do mesmo Instituto.

दृष्टीनें नुसतें काव्य म्हणून त्याचा विचार करणें हा दुसरा प्रकार. या दोन प्रकारांपैकीं सध्या आपणास पहिल्यावरच भिस्त ठेऊन चाललें पाहिजे. कारण कोणीहि झाला तरी तो राष्टीयत्वाच्या दोरीनें कोणत्या तरी देशाला जखडून गेलेला असतो. हा निसर्गनिर्मित न्याय हिंदूंनाच तेवढा लागू पडत नाहीं असें नाहीं दुर्दैवानें कित्येक जण याचे उलट वस्तुस्थिति मानतात,पण त्याला निरुपाय आहे. हिंदुस्थानं हें इंग्लिश लोकांकरितां आहे; इंग्लंडाशिवाय त्याला स्वत:चें अस्तित्वच मुळीं नाहीं, आणि झाल्यास इंग्लिशांचे हाताखालींच त्याला आपलें सर्वस्व साधतां येणार आहे अशा अर्थाचा एक लेख १२ तारखेच्या पणजीच्या Heraldo पत्रांत “ India com os ingleses ” या सदराखालीं प्रसिद्ध झाला आहे. गोमांतकासंबंधानेंहि कित्येकांचे विचार वरील सारखेच आहेत. पण ते उँकींचे आहेत. आमचा म्हणून एक आम्हाला देश आहे. राष्टीयत्व आहे. सर्व कांहीं आहे. म्हणून जितकें कांहीं आमच्या या राष्टीयत्वाला, स्वत:ला बंधनकारक होईल तितक्याचा ऊहापोह नुसत्या तिऱ्हाइतांचे नात्यानें केल्यास पुढेंहि तें तसेंच बंधनकारक राहील. हें बंधन तोडण्यास वर सांगितलेल्या पहिल्या प्रकारचेंच सहाय्य घेतलें पाहिजे. दुसरें असें कीं, कामोंईसनें एक राष्ट्रीय कवि म्हणून लुझियडस लिहिलें. आपण त्याचा एक राष्ट्रीय हिंदी व्यक्ति म्हणून समाचार घेतला पाहिजे. राष्ट्रीयत्व डोळ्यांपुढें ठेऊन लिहिलेल्या ग्रंथाचें अध्ययन राष्ट्रीयत्वाची कल्पना मनांत आणूनच व्हावयास पाहिजे. तें इतर दृष्टीनें करून चालणार नाहीं. अस्तु.

लुझियडस काव्यांत इतर कितीहि दोष असले तरी आमच्या मतें दोनच दोष ज्यास्त भयंकर स्वरूपाचे आहेत.नुसत्या हिंदूंचेंच नव्हे तर खुद्द कामोंईसच्या धर्मबंधूंचें देखील सदर काव्य वाचतानां कवीनें एकीकडे अज्ञानानें तर दुसरीकडे बुद्धिपुरस्सर, इतर राष्टांवर व धर्मांवर उडविलेले शिंतोडे पाहून कपाळ उठल्याशिवाय रहात नाहीं. इतर धर्मांची जागोजाग केलेली नालस्ती व कुत्सित शद्बांची त्यानां बहाल केलेली पुष्पांजलि, हा त्या काव्याचा पहिला असह्य दोष होय. त्याचा दुसरा दोष असा आहे कीं, इतर लोकांच्या रहाणींसंबंधीं पोषाखासंबंधीं चालीरीतीसंबंधीं, थोडक्यांत सांगायाचें झाल्यास, हिंदुस्थानच्या आर्य लोकांच्या संस्कृतीसंबंधीं देखील कामोंईसनें आपल्या काव्यांत काढलेले उद्गार सपशेल निराधार, खोटे आणि त्या त्या लोकांची बदनामी करणारे आहेत. याचा खरेपणा पहावयाचा असल्यास Lusiadas चा नववा खंड बरवर चाळल्यास पुरे. आपल्या या ग्रंथांत, एक ना दोन, पावलो पावलीं त्यानीं आम्हां हिंदूंना व आमच्या धर्माला उद्देशून काढलेलीं मुक्ताफळें, राष्टीय हृदयाचा चुराडा करणारीं, स्वाभिमानाची राखरांगोळी करणारीं आहेत. अशा प्रकारचा ग्रंथ येथील दुय्यम शिक्षण संस्थांतून हिंदूंना शिकविला जात आहे. ज्यांची बुद्धि अद्याप स्वतंत्र झालेली नाहीं, ज्यानां राष्टींयत्वाची अद्याप म्हणण्यासारखी कल्पना नाहीं, ग्रंथांतील प्रतिकूल विचार झुगारून देऊन, आपल्या स्वतंत्र विचारशक्तीनें बरें तेंच शोधून काढण्यांची ज्यांची अजून तयारी नाहीं, अशा कोंवळ्या मनाच्या हिंदु विद्यार्थ्यांपुढें चहरा वेडा वांकडा करून सोडणारा लुझियडचा मायावी आरसा सदोदीत धरला गेल्यास, त्याला पुढें आपण खरोखरीच कुरूप नाहीं ना, अशी शंकाच नव्हे तर तशी त्यांची भावना झाल्यास त्यांत त्या विद्यार्थ्यांचा काय दोष ? वरील शिक्षण संस्थांतून लुझियडस शिकविलें जात आहे याचें मूळ कारण कोणतें असेल तर वरील हेतु साध्य व्हावा हेंच होय. दुसरें तिसरें कांहीं नाहीं ही गोष्ट जाणत्या विद्यार्थ्यांनीं नवख्या व अज्ञानी विद्यार्थ्यांस दाखवून दिली पाहिजे. जी गोष्ट कायद्याच्या बलावर अथवा शक्तीच्या जोरावर झाली नसती ती गोष्ट आतांपर्यंत लुझियडस सहज लीलेनें करीत होती. पण या पुढें त्याचा हा डाव उदयोन्मुख हिंदु विद्यार्थी साधूं देणार नाहींत, असें मानण्यास बरीच जागा आहे.

स्फुट विचार

यूरोपियन राष्टसंघ:—पुण्याच्या ‘चित्रमय जगतच्या’ शवच्या म्हणजे जून महिन्याच्या अंकांत ‘ यूरोपियन राष्टसंघ’ या मथळ्याखालीं महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध लेखक महादेव राजाराम बोडस यांचा एक उत्कृष्ट लेख प्रसिद्ध झाला आहे. इतर लेखांप्रमाणें हाहि रा. बोडसांचा लेख नानाविध व उपयुक्त माहितीनें ओतप्रत भरलेला असून परदास्य शृंखलेंतून हिंदुस्थानची मुक्तता व्हावी, अशा उदात्त हेतूनें जे आपल्या हाडांची काडें करीत आहेत, त्यांना तो मननीय आहे. यूरोपियन राष्टें परमुलूख गिळंकृत करण्यास परस्परांस कसकशी मदत पुरवीत असतात हें ऐतिहासिक पुराव्यानिशीं दाखवून, आशियाखंडांतील स्वातंत्र्योत्सुक व स्वातंत्र्यरत राष्ट्रांचा सदरप्रमाणेंच एक मजबूत संघ असणें किती आवश्यक आहे, हें बोडसानीं अत्यंत मार्मिक रीतीनें सिद्ध केलें आहे. महादेवरावांचा हा लेख आमच्या प्रांतबंधूंनीं मनन करावा म्हणून आम्हीं त्याचा मुद्दाम उल्लेख केला असून, शिवाय सदर लेखांत जी एक ऐतिहासिक चुकी आम्हांस आढळून आली, तिचीहि सहज दुरुस्ति व्हावी, असाहि हेतु या उल्लेखाच्या बुडाशीं आहे. इंग्रज लोक पोर्तुगिजांना परमुलूख पचनार्थ वेळोवेळीं सहाय्याचा टेंकू कसा देत असतात, हें वाचकांना पटवून देण्यासाठीं बोडस लिहितात: “ कांहीं वर्षांपूर्वी गोव्यांत झालेलें राण्यांचें बंड इंग्रजी गोलिसांच्या मदतीनेंच मोडलें हें पुष्कळानां आठवत असेल.’ अनेकदां गोव्यांत राण्यांचीं बंडें झालीं असून, बंडाचा मोड किंवा बंडवाल्याशीं तडजोड गोवासरकारच्या मार्फतीनेंच झाली आहे. या कामीं त्याला इंग्रजसरकारची ‘उघड’ मदत घेणें केव्हाहि भाग पडलें नाहीं, अशीच साक्ष बंडांचा इतिहास देत आहे. नजर चुकीनें घडलेल्या ऐतिहासिक प्रमादाचें क्षालन महादेवराव सवड मिळतांच करतील, अशी आम्हास उमेद आहे.

गोरक्षण:— गेल्या दिवसांमागें पुणें येथें भरलेल्या महाराष्ट–हिंदुधर्म–परिषदेच्या चवथ्या अधिवेशनांत जे अनेक ठराव पास झाले त्यांत गोरक्षणविषयकहि एक ठराव पास झाला. ‘प्रत्येक हिंदुधर्मीयानें धर्माची पूज्य देवता म्हणून गाईचें संरक्षण करावें. शक्य तर प्रत्येकानें गाय बाळगावी. वधिकास गोविक्री करूं नये.” अशा अर्थाचा तो ठराव असून गोमांतकस्थ हिंदु जनतेकडून तो सहज रीतीनें पाळला जाण्यासारखा आहे. गोमांतकांत गोमातेची हमरस्त्यांत व हरहमेश कशी विटंबना होत असते, याची ज्यानां जाणीव आहे त्यानीं कंबर कसून उपरोक्त ठरावाचं सामुदायिक पालन होण्याप्रीत्यर्थ अविश्रांत झटलें पाहिजे. नुसत्या ‘बोलाच्या भातानें’ गोरक्षणाचा प्रश्न सोडविण्याचा अट्टाहास धरणें म्हणजे मुलांच्या कागदी होडींत आरूढ होऊन नदीपार होण्याची अशक्य आशा बाळगण्यासारखें हास्यास्पद होय, हें गोरक्षणाचे कागदीं घोडे नाचविणारांनीं ध्यानांत धरावें. शिवाय गोमांतकाची आर्थिक स्थिति इतकी विकट नाहीं कीं सदर ठरावानुरूप आचरण करण्यास हिंदु जनतेचा जीव मेटाकुटीस येईल.

अर्थी दान महा पुण्य:—गोवा सरकारनें स्थापिलेल्या शेतकी पतपेढींचा मूर्त फायदा शेतकरी वर्गानें करून घ्यावा, असें सरकारला वाटत असेल तर त्यानें तद्विषयक पोर्तुगीजींत प्रसिद्ध झालेल्या नियमांचा मराठी भाषेंत प्रसार करणें अत्यावश्यक होय, यांत संशय नाहीं. गोमांतकांतील अर्ध्याधिक लोक संख्या हिंदु जनतेनें व्यापिली असल्यानें,उपरोक्त नियमच नव्हे तर मागें झालेले व पुढें होणारे एकंदर कायदे सुद्धां मराठी पेहरावांत लोकांसमोर आणणें सरकारचें कर्तव्य होय. पण हें कर्तव्य पार पाडण्यास सरकारला भाग पाडणें हिंदूंना क्रमप्राप्तच असलें तरी, जोंपर्यंत ज्यांच्यासाठीं उपरिनिदिष्ट कायदे तयार करण्यांत येतात, त्यांच्या गळीं मराठी उतरणें शक्य नाहीं किंवा ती उतरून घेण्यास त्यांना सवड नाहीं, तोंपर्यंत लोकसेवकानीं ठिकणिकाणीं हिंडून त्या कायद्याचे ज्ञान अज्ञजनतेला व्याख्यानद्वारा करून देण्याचे कामीं तनु झिजविणें, हाच ‘ अर्थीदान महापुण्याचा ’ मार्ग आहे, हें कोणीहि कबूल करील. आमचा शेतकरी वर्ग तर आपल्या कार्य बाहुल्याच्या दडपणानें इतका चेंगरला आहे कीं, स्वयंस्फुर्तीनें मराठीशीं हितगुज करण्यास त्याला पुरेसा वेळच मुळी नाहीं. अशा स्थितींत व्याख्यानाचीच कल्पना झाल्यास उपयुक्त होईल, हें निर्विवाद होय.

—गेल्या एप्रिल महिन्यांत हिंदुस्थान सरकारच्या रेलवेचें उत्पन्न ८ कोटी ४ लक्षांचें होऊन खर्च ४ कोटी ९५ लक्ष रुपयांचा झाला.

वर्तमानसार

—हिंदुस्थानांत एकंदर बारा कोटी बायका असून, त्यांत तीन कोटी विधवा आहेत.

—पणजी शहराची नवीन रचना सुचविण्यासाठीं सरकारनें एक कमिटी नेमेली आहे.

—मुंबईचा अडव्होकेट ऑफ इंडीयाचा छापखाना एक लक्ष पंचवीस हजार रुपयांस विकला गेला.

—इंग्रजी कार्डें, तिकिटें, करन्सी नोटा व स्टॅंप्स यांची छपाई या पुढें इंग्लंडमध्यें न होतां ती नाशिक येथें होणार आहे.

—आपणास भेटणाऱ्या हिंदु लोकानीं ‘ कालर्स चेपें ’ घालूनच भेटीस आलें पाहिजे, असें हिंदुस्थानच्या व्हाइसराय साहेबानी फर्माविलें आहे !

—गोपाळ श्रीधर बोरकर हे वकिलीच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाल्याबद्दल आम्हीं त्यांचें अभिनंदन करितों.

—काणकोण मुनिसिपालटीनें माडांची दारू तयार करणाऱ्या भंडारी लोकांवर आठ आणे कर बसविला असून या कराच्या उत्पन्नाचा विनियोग पगार वाढींत होणार आहे.

—ब्राझील येथें उद्भवलेल्या बंडाचा उपशम झाला.

—पोर्तुगीज कविसम्राट लुईज द कामोंईस यांच्या निधनाच्या चतुर्थ शतसांवत्सरिक उत्सवास पोर्तुगाल येथें गेल्या महिन्याच्या ३ तारखेला सुरवात होऊन त्याच महिन्याच्या १० तारखेला त्याची समाप्ति झाली. पुष्कळ व्याख्यानें ‘ झोडपण्यांत ’ आलीं.

—मकावच्या कोंबाति नामक पत्रानें येथील पोलीसखात्याकडून अमलांत येत असलेल्या देहदंडन शिक्षेविरुद्ध खरमरीत टीका केली असून, सदर पद्धतीचा शेवट होणें जरूर आहे, अशी आपली इच्छा प्रदर्शित केली आहे.

—आग्रा येथें एक विश्वविद्यालय स्थापन करण्यांत येणार आहे.

—‘ फासिज्मो ’ विरुद्ध इटलींत निकराचें युद्ध सुरू आहे.

—ब्रिटिश सरकारनें गोवा सरकारकडे परराष्ट्रीय व्यापार विषयक माहिती मागितली आहे. कारण प्रसिद्ध झालें नाहीं.

—पणजीच्या प्राथमिक शाळांच्या मुलानीं गव्हरनरपाशीं सदर शाळांसाठीं नवीन, विस्तृत व हवाशीर इमारतीची मागणी केली आहे.

—इंग्लिश सरकारनें तिघां जर्मन मिशनरींना मलबारांत ‘धर्मकार्य’ करण्यास परवानगी दिली आहे !

—क्षयरोग प्रतिबंधक लस शोधून काढण्यांत आली आहे.

—मोरोक्को येथें स्पेनिश सैन्याची तारांबळ उठली असून स्पेनमधून त्यांच्या सहाय्यार्थ नव्या नव्या तुकड्या रवाना होत आहेत.

—पोर्तुगाल येथें असलेल्या वसाहतींतील सरकारी कामदारांचा पगार चुकता करण्यासाठीं वसाहतींच्या प्रधानानीं त्या त्या वसाहतींच्या गव्हरनरांना पैसे पाठविण्याचा ससेमिरा लावला आहे.

—गोमांतकांत वास्तव्य करणाऱ्या मोसांबिकच्या बैठे नोकरांच्या पगाराची फेड करण्यासाठीं पांच हजार गिनी त्या वसाहतसरकारनें पाठविल्या आहेत.

—पटकीसारख्या रोगानें या बाजूकडील गुरांचा संहार चालविला आहे.

मतें तो बहुतेक अनच होय. हिंदुस्थानांतील लोकांतून, स्वधर्म आणि स्वसंस्कृति, मनापासून पालन करणाऱ्या हिंदूंचें प्रमाण अजमासें शेंकडा काय भरेल ? असें कोणी विचारल्यास खालीं मान घालून गप्प रहाण्याची पाळी. पाश्चिमात्य शिक्षणाचा व संस्कृतीचा आमच्या लोकांना विटाळ झाल्या दिवसापासून आत्मस्वरूपाची जाणीव नष्ट होत जाऊन आतां त्या नष्टत्वाचा कळसच होऊं पहात आहे ! कारण आपल्या हिंदूंना जणूं काय आपलेपणाचा कंटाळा येऊं लागला. परकीयांच्या लाथा बसल्या तरी त्याचें कांहीं वाटत नाहीं. पण आपल्यांतील कोणी नम्र—सदुद्देश केल्यासहि त्यांना तो अपमानकारक दिसून मारामारीपर्यंत प्रसंग येतात !

'सर्वेषु गात्रेषु शिर प्रधानम्' परानुकरणीत्व स्वाभिमानहीनपणाला मस्तकापासून प्रारंभ. पाश्चिमात्य धर्तीच्या शिक्षेंत तयार झालेले लोक साहेबी थाटानें मिरवणें हीच त्या शिक्षणाची सिद्धि समजतात. इंग्रेजींत किंवा पोर्तुगिजींत सरासरी अडखळत अडखळत बोलणाऱ्या सामान्य विद्यार्थ्यापासून वड्या वाङ्मयविशारदापर्यंत कम जास्त मानानें एक नमूना ! डोक्यापासून पायांपर्यंत कांहींना कांहीं साहेबी अनुकरण दिसेलच दिसेल. चेरें, कॉलर ऊर्फ गळफांस, पाटलोन, बूट हा पोपाख खर्च व—आरोग्य यांच्या दृष्टीनें पोपक मुळींच नसतां आधुनिक लोक तो मोठ्या भक्तिपूर्वक मनानें धारण करितात ! मिशा (आईबाप असतांहि) तासून ओंठावर निळा आणणें, शेंडी काढणें, तोंडावर सफेत पावडरचें रोगण. यांत फायदा तर कांहींच नाहीं, मात्र नैसर्गिक मुख शोभा नाहींशी होते. आपल्या आंवट शोकानां बळी पडण्याची प्रवृत्ति आमच्या समाजाला अधिकाधिक होत चालली, हा कशाचा परिणाम ? स्वधर्म प्रियता व संस्कृत्यभिमान व्हावा तसा —नव्हे मुळींच— जागृत झाला नाहीं. असें ह्मणणें भाग आहे.

लष्करी हिंदुकामगार अगर सरकारी अन्य खात्यांतील हिंदु अधिकारी यासाठीं केवळ आपद्धर्म ह्मणून पोपाखी बाब—ती ह निरुपायास्तव—क्षम्य मानतां येईल. परंतु राष्ट्रीय अगर खाजगी स्वरूपाच्या कोणत्याहि कार्यांत तिला बहिष्कार घातला पाहिजे. तो चेहऱ्याची तर बाजू सदासर्वदा सारखी. तो कुरूप करण्याची जरूरी नाहीं. अशा वहकलेल्यानां 'सुधारक' ह्या निंदाव्यंजक नावानें संबोधिलें जातें, याचा त्यानीं विचार करावा

नवीन प्रभुत्व संपादन करण्याला किंवा दगलबाजपणें परक्यानीं हिरावलेलें परत मिळवण्याला आपलें मूळचें सोंग विटवून घेण्याचें मुळींच कारण नाहीं. हें इतिहासावरूनहि समजतें. पूर्वीं झालेल्या व सध्या असलेल्या सत्ताधीशांनीं या देशांत सत्ता गाजविली पण—ती स्वत्व गमावून नव्हे—मूळचा बाणा सोडणाऱ्या स्वजातीयांस ते लोक बहिष्कृत मानितात. असें असून आमच्या हिंदूंतच तेवढी नादान स्थिति कां ? पाण्यासारखी जणूं काय आमची अवस्था ! पाण्यांत जो रंग घालावा त्या रंगाचें पाणी बनतें ! पण सत्य स्वाभिमानी मात्र अद्याप आह्मी बनत नाहीं, ही खेदाची गोष्ट होय.

हे लोक शेंड्या कां काढतात ? ह्यापुढें, यज्ञोपवितधिकारी यांनीं — यज्ञोपवीत तोडणें अगर कंबरेला गुंडाळणें हा विषय गौण ठरतो. कारण तेहि शिखानष्ट — दीक्षित बनत असतात ! शिखा—सूत्र हें आर्यधर्माचें मुख्य लक्षण होय. मिशा तासणें, ठेवल्यास उंदरानीं कुरतडल्याप्रमाणें (फ्रेंच कट, ढेंकूण फॅशनच्या) ठेवणें इत्यादि आंवट शोकांचा पगडा समाज आपणावर बसूं देतो, ही शरमेची गोष्ट होय. सभेंत कार्य करणारे धुरंधर मुद्दाम युरोपियनांचीं सोंगें करून सभेला येतात, याचें कारण काय ?

ध्येय प्राप्तीला आणि या युरोपियनों ढोलक्याच्या तालावर हिंदूंनीं आरंभिलेल्या नृत्याला काय संबंध आहे; त्याच प्रमाणें म० गांधी प्रभृतींच्या कोणत्या तात्विक विचारांचा त्यांत साचार परिपोष केला जात आहे, या बद्दल शहाण्या माणसानीं अगत्य विचार करून आंवट शोकी फ्यॅशन बहाद्दरांची कान उघाडणी करण्यास मुळींच चुकूं नये. पाश्चिमात्य वर्तीच्या हिंदूंची, नामदारी आमदारीची भीड धरावयास नको.

आतां पर्यंतचें वर्णन बहकलेल्या समाज स्थितीचें —तेंहि त्रोटकसेंच—केलें. आणखीहि तें पुष्कळ प्रकारानीं व पुष्कळ बाबतींत करतां येण्यासारखें आहे. परंतु विषय अपरिमित वाढतो ह्मणून शक्य तितकें आटोपशीर केलें. तरी परोपकारीपणाविषयीं थोडक्यांत लहितों. लोकांचीं अंत:करणें या दृष्टीनें तरी जागृत आहेत असें ह्मणावें तर आतांचा काळ पराकाष्टेच्या नास्तिकपणाचा. दारांत दोन प्रहरीं आलेल्या भिकाऱ्याला मूठभर दाणे, मोकळ्या मनानें कोणी घालीत असतील किंवा काय याची भ्रांति. कोणी उष्ट्या हातानें कावळा हांकीत नाहीं, कीं कोणी कुणाच्या कातरलेल्या आंगठ्यावर ** सुद्धां करीत नाहींत. एकूण सद्धर्म बुद्धीनें दुसऱ्याचे उपयोगीं पडणारी नि:स्वार्थी जनता उत्तरोत्तर कमी निपजत आहे. प्रचलित शिक्षणांत तशी कांहीं जादू असावी किंवा सामाजिक, धार्मिक, स्वदेशी चळवळीचा परिणाम योग्य प्रमाणांत लोकांच्या मनावर होत नसावा, यादोहोंतून कोणतें विधान खरें हें वाचकानींच ठरविलेलें बरें.

देशांतील लोकांत, परस्पर सत्यप्रेम, सत्य सहानुभूति, स्वाभिमान व निष्कपट बुद्धि नांदण्यावर सगळी मदार आहे. आमच्या हातून कार्य किती झालें व आमची कार्यक्षमता कोणत्या स्वरूपांत आहे, याची पुढील लेखांत चिकित्सा केली जाईल. शुद्ध चित्तानें लेख वाचून हंसक्षिर न्यायानें त्यांतील तात्पर्य घ्यावें व प्रसंगोपात खऱ्या सुधारणा दृष्टीनें त्याची अमल बजावणी करावी अशी वाचकांस नम्र विनंति करून तूर्त रजा घेतों.

गणेश रामचंद्र बोडस

Anuncios

O Bharat, ano 9 °, n ° 17 17 de Julho de 1924.

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do I ° oficio Redcar, a instancia do autor, Usso' Govinda Porobo Dessay de Rivona. correm e'ditos de 60 dias a contar do dia da segunda publicagao deste citando o reu Subraia Gan de Zambaulim de Rivona e ora ausente em Bombaim em parte incerta para acgao do processo ordinario e seus termos da petigao ja' autuada neste juizo e instaurada pelo dito Usso, contra o referido citando Subraia e outros, e na qual o mesmo autor alega que por escritura publica de 24 de Margo de 1916 os reus Mogu' Bailadeira Xeuntem Bailadeira, Gojanona Gan, Subraia Gan e Gocul Cuxem Bailadeira de Zambaulim de Rivona, e bem assim Gonoxama Gan que foi da dita prometeram vender a Govinda Pundolica Hegdo' Dessay de Cusmane a metade do lado sul do dominio util do seu predio Benamola por outro nome Cuntiemola sito em Rivona, e discrito na conservatoria desta comarca sob o n ° 1245. Que essa promessa da venda foi feita pelo prego de trezentas rupias que foram recebidas do dito Hegdo' Dessay, pelos reus e o referido Gonoxama obrigando-se estes a dar verificada a venda dentro dum ano a contar da data escritura sob pena de pagarem ao referido Hegdo' Dessay a quantia de duas mil rupias. Que os reus e o dito Gonoxama apesar de varias vezes pedidos pelo dito Hegdo' Dessay nao realizaram a venda prometida, deixando assim expirar o praso de um ano convencionado para realisagao da venda ajustada. Que desta maneira os reus e o dito Gonoxama ficaram incursos na responsabilidade de pagarem a pena estipulada de 2.000 rupias ao mencionado Hegdo' Dessay Que por escritura publica de 17 de Maio de 1917 o mesmo Hegdo' Dessay cedeu ao autor todos os seus direitos emergentes da citada escriptura de 24 de Margo de 1916 para haver dos reus e do dito Gonoxama a referida pena de 2 mil rupias. Que conclue por pedir no artigo oitavo da petigao inicial que julgada procedente provada a mesma aecgao devem ser condenados os reus a pagarem ao autor a referida importancia de 2 mil rupias da pena estipulada e nas custas e selos do processo e procuradoria Esta citagao findo praso de editos hade ser acusada na segunda audiencia deste juizo onde sera' assinado o praso da lei para contestar querendo a mesma acgao. As audiencias deste juizo se fazem em todas as tergas e sextas feiras a's 12 horas no tribunal judicial desta comarca situado em Xeldem ao lado de estrada nacional que de Quepem se dirige a estagao de Sanvordem se nao forem feriados, porque neste caso terao lugar nos dias imediatos se tambem nao o forem e nao estiverem compreendidos nas ferias. O que para ser publico se expediu este. Xeldem 13 de Novembro de 1923.

O escrivao de direito do 1 ° oficio
Babu' V. Camotim Redcar

Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do 2 oficio que este assina, correm editos de 30 dias, contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2 ° do art. 197 do Cod. do Proc. Civ. citando todos e quaisquer herdeiros de Baem Durbatcarina, de Calem, ora falecida, para na segunda audiencia posterior ao praso de editos, deduzirem querendo a sua habilitagao, nos termos e para os fins do § 1 ° do art. 691 do citado Codigo, visto que existem no referido cartorio algumas joias apreendidas no processo crime de corpo de delicto instaurado a' queixa digo queixa da dita Baem, pelo Digno Agente do Ministerio Publico nesta comarca, contra Xencora Vamona Patel da dita estando este arquivado. Declara se que as audiencias deste se fazem em todas as tergas e sextas-feiras as dez horas. no tribunal deste juizo situado em Xeldem, ao lado de estrada Nacional que de Quepem se dirige a Curchorem nao sendo feriados porque neste caso tem lugar nos dias imediatos quando os nao sejam tambem ou nao estejam compreendidos nas ferias Para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de Quepem, oito de Junho de 1924.

O Escrivao de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei. O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Ano 9 N. 18

Quinta-feira — Julho de 1924

Por ... RA ... es rupias

por cada li ... CIOS ... ue repetida uma tanga ... lso uma tanga

OR E EDITOR
Hegdo Dessay
Quepem-Goa

Biblioteca Nacional ... Panjim

भारत.

BHARAT.

वर्ष ९ वें. अंक १८

गुरुवार ता. २४ जुलै सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें—गोवा.

BRAVO, ACADEMICOS

E' desnenessário dizer que nos encheu de maior satisfação e natural orgulho o patriótico artigo com que *Um Grupo de Academicos* honrou a penultima edição do *Bharat*, provando, sem rebuços nem subterfugios, que vontades decididas e energias imaculadas secundam entusiastica e calorosamente o nobre ideal de independencia que o nosso jornal professa.

Os briosos academicos lavaram para sempre pela sua digna atitude o labeu que denegria o prestigio da India, porquanto o seu Pôvo era taxado de *pusilanime* e *falho de patriotismo*, tomada esta palavra no seu rigoroso sinificado.

O futuro da India, como em toda a parte, depende de sua classe academica, e desejando esta que no futuro a India seja dos indios, como sempre foi antes da dominação extrangeira, não pode deixar de traduzir-se em facto positivo e palpavel o alevantado desejo dos nossos estudantes que—vá o lugar comum — representam a única esperança de quantos anceâm pela verdadeira prosperidade desta terra, prosperidade que é inadmissivel sem uma independencia perfeita nem uma liberdade completa.

Bravo, academicos! Pela vossa atitude que é cúmulo de coragem e nobresa, marcastes uma nova era na politica indiana imprimindo-lhe feição á altura dos tempos que estamos atravessando e declarando ao mesmo tempo g u e r r a sem treguas á sujeição inadmissivel e eterna dos *factos consumados*.

Academicos! Honrastes o vosso nome, dignificastes e glorificastes a India, nobilitando-lhe as tradições do passado sem mácula, passado que a História regista com letras de oiro.

Está, pois, traçado o supremo ideal politico da India que é a independencia; é sabido, tambem, o meio de se conseguir êste fim, meio que é despido, por completo, de idêas que nem de longe, traduzem a mais ligeira violencia.

Já não constituem, portanto nenhum segredo politico tanto o nosso desiderato como o meio de o atingir, para que os nossos adversarios façam juizos temerarios sobre a nossa orientação politica e nos malsinem as intenções.

Envidarmos os nossos milhores esforços, desenvolvermos a nossa milhor energia e actividade e sacrificarmo-nos os cómodos em pról duma India nova, duma India independente e livre, numa palavra, duma India feliz — eis o que o nosso patriotismo nos exige.

Avante, academicos?

PROMETE POUCO ...

Mais um trambulhao na politica em Portugal. E mais um ministerio em terra e mais um ministerio la' em cima, no cocuruto.

Cremos que, desta feita, o sr. Rodrigues Gaspar foi quem se arrojou a triste responsabilidade de formar ministerio. O elenco, com que s. exia. vai continuar a *fita*, e' fraco, pouco sensacional, sendo muito de esperar que o espectaculo, em vez de atrair os aplausos da assistencia, so' provoque uma forte *pateada*. E ai nao tarda no cartaz uma nova companhia com um novo repertorio—para em fim sumir-se tambem entre apupos!

O rumo que leva tudo isso?! Qualquer dia ficara' Portugal sem governo por falta de quem queira dar-se a massada de governar? Pela maneira como as coisas vao, a *fita* promete pouco.

Ecos & Critica

E' PEDIR, POIS

O decreto de equiparaçao que produziu um descalabro irremediavel nas finanças desta colonia,—foi e e' ainda condenado por toda a imprensa do pais. So'mente a "A Provincia", orgao da burocracia, tem-se esfalfado em provar a legitimidade daquele "mostrengo", alegando que a equiparaçao era indispensavel, nao so' ai onde a moeda corrente e' o depreciado escudo, mas tambem nas coloniss do Oriente, onde a moeda local mantem hoje a mesma cotaçao que antes da Guerra.

Uma vez ate' lembrou a' "A Provincia" apresentar, em justificaçao do decreto, o argumento de que a vida na India era tanto ou mais cara do que na Metropole, onde a moeda e' em escudos.

Pois bem; agora, para ser coerente, convinha que a "A Provincia" pedisse a duplicaçao dos ordenados dos funcionarios da India, principalmente aos graudos, uma vez que o cambio sobre Lisboa, que ao tempo do decreto era de 5 Esc. e tanto ... esta' agora em quase dobro-10 Esc. e tanto! E' natural, e' de coerencia que "A Provincia" formule o pedido E quem nos diz que nao sera' atendida! E' pedir, pois.

NICHOS E NADA MAIS

Le se na "Tribuna" que a Administraçao das Confrarias de Bardez organisou o orçamento das suas receitas e despezas por anos economicos, o que e' uma inovaçao em Bardez e porventura neste Estado, relativamente a's Administraçoes das Confrarias.

La' e' alguma coisa o que o sr. Administrador das Confrarias fez. Mas o pa's tem direito a esperar e exigir do sr. dr. Valério Sousa, como jornalista ponderado e criterioso que e', mais um serviço, e este de grande alcance, qual o de propor ao Governo a extincçao das administraçoes das Confrarias,—repartiçoes estas despendiosas e dispensaveis fazendo reverter as suas funcçoes para a Administraçao das Comunidades, a' simile do que se ve nas Novas Conquistas.

As Administraçoes das Confrarias, para no's, so' tem uma serventia: constituem magnificos nichos para os Governadores recompensarem com elas os serviços politicos dos seus apaniguados e ... nada mais! E este e' um grande mal para um paiz que disfructa uma Autonomia Administrativa. Ha de concordar o sr. dr. Sousa.

NEM UM PENEDO !

O *Sind National College*, um dos mais considerados institutos, de ensino superior em Hidrabad (notem bem) publica um anuncio no "Indian Daily Mail" convidando os pretendentes para o lugar vago de Reitor do mesmo *College*. O candidato deve ser M. A. com *Honours* na Historia ou Inglez. E' exigida grande experiencia do magisterio superior. O ordenado e' de 400 rupias mensais com aumento ate' 500 rupias depois de completar determinados anos de serviço.

Hidrabad e' um Estado independente da India. Com milhoes de habitantes, tem *crores* de receita; tem industrias; tem comercio. E' progressivo e rico e paga ao director do seu instituto de instrucçao *superior* 400 rupias!

No's aqui que nem temos *condiçoes economicas que justificam a independencia* segundo o insuspeito sr. Pereira Batalha, pagamos ao Reitor do nosso Liceu 700 e tantos rupias. E o sr. Batalha que sabe da nossa miseria economica...esta' mudo e quedo que...nem um penedo!

O RICO TRABALHINHO

A proposito das tais certidoes de *cada posse de cada lugar*, escreve-nos um distincto professor de instrucçao primaria o seguinte:

"Tomada a posse de cada lugar e' esta publicada no Boletim Oficial para os fins legais, e, a seguir lançada no livro de assentamento dos professores. Em vista da fe' de oficio, passada pela Direcçao, faz-se a liquidaçao do tempo de serviço no Boletim Oficial, cujo numero bem como a fe' de oficio vao juntos ao processo. Sendo assim nao percebo o motivo de exigencia da certidao da posse de *cada lugar*, posse que, alia's, consta da propria fe' de oficio que e' a bem dizer a biografia da vida funcional do professor ".

Pois agora o *Bharat* vai esclarece-lo, caro professor. Esta colonia em peso foi contra a criaçao, *assim desarticulada*' da Direcçao dos Serviços de Instrucçao Eram precisos e urgentemente dois sub-inspectores; mas o Director com as suas atribuiçoes e ordenado faustosos — dispensava se-

[विजयते

णाबरोबर गोरक्षण हि आवश्यकता आहे षा आहे कीं, पहिल्यानें नंतर फूल व फळ. हि आहेत. कांहीं झा- ावल्यानेंच त्यांचे वृक्ष हि पालवी फुटे पर्यंत लागतेंच. गोरक्षणाच्या मांतकाची स्थिति वरील गोरक्षण संस्था स्थापन रंतु ती अद्याप जीव ध ं हेंहि समजत नाहीं ! महाराष्ट्राकडे पाहि- मजल राष्ट्रीय सभेबरो- ीय गोपरिषद भरविण्या- महाराष्ट्राची राजकीय गोमांतक हा एक घटका- ष्ट्राच्या धंटारवानें अफाट नठाळ्या बसतात, त्या मगदीं जवळ असलेल्या त्याचा कांहींच परिणाम ा दुःखाची गोष्ट नाहीं ? यांत आश्चर्य वाटण्या- हीं. कारण, आपला पा- उला पाहिजे. गोरक्षणा- कांत अद्याप व्हावी तशी नाहीं. गोमांतकांत राज- ध प्रत्येकाला दिसतो व अंगावर शहारेहि येतात. ंच्या सवईमुळें, व त्यांच्यांत ळें त्यांना त्याबद्दल कांहीं लें आहे. मांसहारी लोक ऊन जातांना आपण नाहीं सवईमुळें आपणांस त्याचें हीं ! तीच स्थिति गोव- हे दिसून येते ! प्रत्येक हिंदु- ा धर्माचा पूर्ण अभिमान माहीत आहे कीं, आपल्या स्तंभ पूज्य गोमाता आहे. कालापासून तिला आमच्या न दिलेलें आहे. व हल्लींहि तिचें महत्व प्रत्येकाला सम- ा ह्मण आहे ना ? समजतें नाहीं ! तीच स्थिति आ- मजतें पण प्रतिकार करा क- त नाहीं. आगीची ठिणगी पण ती सर्वांत आहे. फक्त ाजुला केली पाहिजे. पण कर- ना ! तें काम सुशिक्षित पुढा- पण तेंहि ह्या विषयाकडे द्यावें त नाहींत! कोणत्याहि गोष्टीचा वयाचा किंवा तिला प्रतिबंध वा- जे समाजांत एकी लागते. एकी त नाहीं. ती व्हावयाची ह्मणजे चार परस्परांनां समजले पाहि- ... साधन ह्मणजे हल्लींचे र्तमानपत्रें होत. पण त्यांच्या वा तसा प्रयत्न होत नाहीं, असें नें ह्मणावें लागतें. प्रयत्न अग-

दींच होत नाहीं असें नाहीं. वर्षांतून एकदा स्फूट लेख लिहिला जात असेल ! परंतु जनतेचें लक्ष तेवढ्यानें त्या विषयाकडे थोडेंच वेधणार ! या करितां त्या विषयाला सर्वस्वी वाहिलेलें एकादें तरी स्वतंत्र पत्र पाहिजे तरी पण गाडा अडतोच ! एका चाकावर तो थोडाच चालणार ! त्याला दुसरें चाक पाहिजे. ह्मणजे लोकांच्या मनांत त्या विषयाची आवड पाहिजे. आवड तरी आपोआप कशी उत्पन्न होणार ! चांगल्या विषयाकडे लक्ष वेधणें ह्मणजे पूर्व पुण्याईच लागते. तीहि आमच्यांत दिसत नाही. पुण्याई असती तर आह्मी दुसऱ्याचे गुलाम कां झालों असतों ! गुलामांतहि कच्चा व पक्का हा भेद आहेच. आह्मीं अद्यापि कच्चे आहोंत ह्मणजे आमचा धर्माभिमान अद्याप नष्ट झालेला नाहीं ह्मणून हीच वेळ आहे. ह्याच वेळीं आह्मीं कांहीं तरी प्रयत्न केले पाहिजेत. ह्याच वेळीं आह्मीं आपल्या समाजास जाणीव देऊन त्यास आवड उत्पन्न केली पाहिजे. ह्मणजे पुढारी लोकांनी व्याख्यान द्वारा वगैरे त्या विषयाचें महत्व जनतेला पटवून दिलें पाहिजे. एकदां महत्व समजलें ह्मणजे कार्याला उशीर लागत नाहीं. कृति घडल्यावर फळ मिळालेंच पाहिजे, असा सिद्धांत आहे. तरी पण प्रत्येक चांगल्या कार्याला अडथळे हे यावयाचेच. अडथाळ्यांना झुगारून काम करण्यास शक्ति व तडफ लागते. ती तडफ आमच्या जुन्या पिढींत नाहीं. ह्मणूनच आतांचे पुढारी ह्मणविणारे लोक स्वस्थ आहेत. कायदे कौन्सिलांत आमचे प्रतिनिधी आहेत त्यानीं या बाबतींत कितीसे प्रयत्न केले ? पण त्यांना तरी दोष कां द्यावा ! कारण पक्क्यां लोकांचें तेथें बहुमत आहे. ह्मणजे त्यांची संख्या ज्यास्त आहे. या करितां आपण आपल्या खिस्ती बांधवांतहि आर्थिक दृष्टीनें चळवळ सुरू केली पाहिजे. 'प्रयत्ने वाळूचे कण रगडितां तेलहि गळे' असें वचन आहे. त्याप्रमाणें आह्मीं प्रयत्न केला पाहिजे. आर्थिक दृष्टीनें गोमातेचें महत्व आह्मीं त्यानां समजाऊन दिलें पाहिजे. इतक्यानेंहि ते उमजले नाहींत तर नवीन तीक्ष्ण धारेचें सत्याग्रह हें शस्त्र आपल्या हातांत आहेच. पण तशी वेळ यावयाचीच नाही. आलीच तर ती फार उशिरां. त्या गोष्टीचा विचार आतांच कशाला? संकटाच्या वेळं उपाय सुचतोच, मात्र शांति पाहिजे. वरील विवेचनावरून मी गोरक्षण संस्थेच्या विरुद्ध आहे कीं काय ? अशी शंका येईल. मी तिच्याविरुद्ध मुळींच नाहीं हें मथळ्यावरून समजेलच. माझें ह्मणणें एवढेंच कीं, बोट दाखविण्यापुरती एखादी संस्था असली तरी तेवढ्यानें कार्यभाग होत नाहीं. गोरक्षण गुरांची निपज वाढविण्याकरितां अवश्य पाहिजे. पण नुसत्या गोरक्षणानें गोवध थांबणार नाहीं. हल्लींच्या परिस्थितींत गोवध बंद करावयाचा ह्मणजे त्यावर सरकारचेंच नियंत्रण पाहिजे. तें तर बोलून चालून विजातीय ! आतां वर सांगितलेल्या उपायानें खिस्ती बांधवांच्या सहकारितेनें मुळींच न- सली तरी कांहीं तरी मर्यादा घालतां येईल. कल्पना करूं कीं, बाजारांत आलेली प्रत्येक गाय द्रव्यबलावर संस्थेनें खरीद केली पण हा क्रम किती दिवस चालणार ? शिवाय कसायांनां लागणारीं गुरें ते बाहेरून आणणारच ? कदाचित तींहि बंद करतां येतील. परंतु तीं नुसत्या गोरक्षण संस्थेच्या अस्तित्वानें नव्हेत. त्याला वर सांगितलेले उपायच अमलांत आणले पाहिजेत. ते अमलांत आणण्याचें काम तरुण पिढीचें आहे. परंतु तें एकट्याच्यानें होणारें नव्हे. त्याना संघच निर्माण केला पाहिजे. व संघामार्फत वर्तमानपत्रद्वारा, वाङ्मयद्वारा व व्याख्यान द्वारा वगैरे प्रयत्न झाले पाहिजेत. ह्मणूनच मी ह्मणतों कीं, गोरक्षण संस्थेबरोबरच गोरक्षण ज्ञानप्रसारक संघाचीहि गोमांतकास आवश्यकता आहे. इकडे आमचे संस्थेचे चालक व उत्साही तरुण लक्ष देतील काय ?

मी ठाणे येतील गोरक्षण ज्ञानप्रसारक संघातर्फेंच कां काम करीत आहें हें वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. असो. विस्तार बराच झाला शेवटीं वरीलप्रमाणें एखादा संघ निर्माण झाल्यास मी आनंदानें त्याचें स्वयंसेवकत्व पत्करीन अशी सूचना करून हा लांबलेला विषय पुरा करितों.

मुर्गाव–हार्बर
१९।७।२४

गोविंद विनायक बरवे
स्वयंसेवक
गोरक्षण ज्ञानप्रसारक संघ, ठाणें

टिळकांची पुण्यतिथी

कामोंईसच्या श्राद्धासंबंधीं गेल्या अंकांत लिहून झाल्यास अद्याप आमच्या लेखणीची शाईहि वाळली नाहीं तोंच आज लो. टिळकाच्या पुण्यतिथीविषयीं दोन शब्द लिहिण्याची संधि प्राप्त होत आहे हें आम्हीं खरोखर भाग्य समजतों. कामोंईस आणि टिळक यांनीं आपल्या गोमांतकांत प्रत्यक्ष रीतीनें नसलें तरी अप्रत्यक्ष रीतीनें केलेल्या कार्यांत भयंकर परस्पर विरोध आहे हें वेगळें सांगण्याची गरज आहे असें नाहीं. पहिल्या व्यक्तीनें लुझियडसच्याद्वारें हिंदूनां स्वत्वशुन्य व निस्तेज करून टाकिलें तर दुसरीनें आपल्या 'केसरी'च्या गर्जनेनें त्यानां स्वत्वशील आणि सतेज बनविण्याचें श्रेय घेतलें. कामोंईसनें हिंदुसमाजाला अस्तित्वशुन्य बनवून टाकिलें आणि टिळकानीं त्याला अस्तित्वमय करून सोडलें. टिळकानीं निदान गोमांतकाचे बाबतींत तरी आपला हा प्रयत्न बुद्धिपुरस्सर केला नाहीं हें जरी खरें असलें तरी त्यांच्या कार्याचें बीज येथील जमिनींत धरलें जाण्यास, त्यामुळें कोणतीच आडकाठी आली नाहीं. चाळीस वर्षांपूर्वींच्या गोमांतकाकडे जर नजर फेंकली तर आपणास असें दिसून येईल कीं, त्यावेळीं हिंदुसमाज येथें असून नसून सारखाच होता. हेंचर्से काय, गोमांतक आपला हक्काचा आहे, आपला ह्मणून एक वेगळा आणि स्वतंत्र असा समाज आहे याची देखील त्याला जाणीव नव्हती. स्वतःचें घर असून नसल्या सारखी त्याची स्थिति होती. राजकारण कशाशीं खातात व आपले राजकीय हक्क काय याची तर त्याला जाणीव नव्हतीच. पण आपण पुढें यावें व मार्ग शोधून काढावा याचें देखील त्याला भान नव्हतें. सध्या गोमांतकांतील अल्पसंख्याक मुसलमानाची जी स्थिति दृष्टीस पडते तशाच स्थितींत त्यावेळीं बहुसंख्याक हिंदुसमाज होता. उपमान हुडकावयाचेंच झाल्यास त्याला धर्मशाळेंत उतरणाऱ्या वाटसरूची उपमा चांगली शोभेल. आतां एकंदर गोष्टी पाहूं जातां हिंदुसमाजाची ही शोचनीय स्थिति अपरिहार्य होती हें कबूल केलें पाहिजे धर्मावर, मालमत्तेवर आणि बायकांमुलांवर होत असलेल्या असह्य जुलूमांत तीन साडेतीन शतकांएवढा काळ काढल्यामूळें हिंदुसमाज मृतप्राय झाला होता. त्याच्यांत पुनरुज्जिवन आणण्याचें काम टिळकांनीं आपल्या केसरीच्या द्वारें केलें. हिंदुसमाजाचे उदयोन्मुखतेला ही एकच गोष्ट कारणीभूत झाली नाहीं, हें जरी खरें असलें तरी राष्ट्री त्याची फुंकर केसरीनेंच घातली हें कबूल केलें पाहिजे. इतर महाराष्ट्रीय वर्तमानपत्रानीं हि या कार्यास हातभार लाविला पण केसरीसारखी अप्रतिष्ट कामगिरी कोणीच केली नाहीं. केसरीच्या खालोखाल रिपब्लीकच्या स्थापनेला आपण मान दिला पाहिजे. या एका गोष्टीवरूनच टिळकांच्या उपकाराची कल्पना होण्यासारखी आहे. रिपब्लीकनें गोमांतकाला स्वातंत्र्य दिलें नाहीं किंवा दुसरें कोणतेंच मोठें कार्य केलें नाहीं हें जरी खरें असलें तरी त्यानें हिंदुसमाजाच्या मानेवरील जुलूमाचें दडपण दूर केलें आणि यामुळें त्याला नीट उभें रहाण्याची संधि मिळाली. असो.

यापुढें गोमांतकीय हिंदूंना गीतारहस्य हेंच लुझियडसच्या जागीं असणार. जितक्या आवडीनें आणि प्रेमानें पोर्तुगीज लोक कामोंईसचे लुझियडस हातांत घेतात त्यापेक्षां किती तरी पटीनी हिंदूंना टिळकांच्या रहस्याबद्दल आदर आणि प्रेम वाटतें, हें हिंदूच सांगू शकेल. टिळक गेले पण आपल्या कामगिरीच्या रूपानें ते येथील हिंदूंच्या हृदयांत अमर होऊन राहिले आहेत. प्रस्तुत प्रसंगीं टिळकांचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेऊन चालल्यास हिंदु समाजाला पुढेंमागें सुखाचे दिवस लाभणार आहेत, यांत संशय नाहीं.

—माजोर्डें येथें प्रसिद्ध होणाऱ्या ''आ इंदीय पोर्तुगेज' पत्रानें मडगांवचे ग्राम संस्थांचे मामलेदार सि. लोयल यांच्या विरुद्ध निरनिराळ्या भयंकर आरोपांच काहूर केलें आहे.

—सि. मिनेझीस ब्रागांस यांचें लिज्बोअ येथें गोमांतकाच्या परिस्थितीवर एक व्याख्यान झालें. या प्रसंगीं सुप्रेम त्रिबुनालचे जज्ज दो. कायतान गोसाल्व्हीस हे अध्यक्ष होते.

—ठिकठिकाणच्या तालुक्यांत नवीन मामलेदार नेमण्यांत येतील, अशी अफवा आहे.

—दमणचे गव्हर्नर फेर्नांद क्रूझ याना गोवा सरकारचें मध्यवर्ति मंडळ या नवीन स्थापण्यांत येणाऱ्या संस्थेचे मुख्याधिकारी नेमण्यांत येईल असें पणजीच्या एका पत्रानें प्रसिद्ध केलें आहे.

वर्तमानसार

—ब्रिटिश हिंदुस्थानांत लोकसंख्या सुमारें २४॥ कोटी आहे व गुरें ढोरें १४॥। कोटी आहेत ह्मणजे माणसांच्या संख्येशीं गुरांचें प्रमाण शेंकडा ६१ पडतें. तेंच डेन्मार्कांत ७४, संयुक्त संस्थानांत (अमेरिका) ७९, कानडांत ८०, केप कॉलनीमध्यें १२०, न्यू झीलंडमध्यें १५०, आस्ट्रेलियांत २५९, अर्जेंटाईनमध्यें ३२३, आणि युरोपमध्यें ५०० या प्रमाणें आहे.

—हिंदुस्थानांतील पशुधनाचा दिवसें दिवस कसा ऱ्हास होत चालला आहे तें खालील आंकड्यावरून दिसून येईल. १९१५।१६ सालीं ३८२८००० बैल, २६५५००० गाई, १३३५०००ह्मशी आणि३३०८००० वासरें व रेडकें होतीं तींच १९१९।२०सालीं३६२२००० बैल २२५३००० गाई, १२४६००० ह्मशी, आणि २६६२००० वासरें व रेडकें होतीं. आणि सबंध हिंदुस्थानांत १९१६।१७ सालीं ४ को. ९४ लक्ष बैल, ३ को. ७५॥ ल. गाई, ५५॥। लक्ष रेडे, १ को. ३७लक्ष ह्मशी व ४को. ३१ल वासरें होतीं, परंतु १९२०—२१ सालीं ही संख्या ४ को. ८९ ल. बैल, ३ को. ७१ लक्ष गाई, ५४ लक्ष रेडे, १ को. ३३ लक्ष ह्मशी, ४ को. ३ लक्ष वासरें इतक्यांवर आली.

—ह्मापशें येथील 'सिमिनारी'च्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे.

—पणजीच्या प्लेगाचें बीज नष्ट झाल्याचें सरकाररीत्या जाहीर झालें आहे.

—निजामच्या हद्दींत सक्तीनें बाटविणाऱ्यांच्या बंदोबस्ताकरितां कोर्टांत काम चालविण्यास वकील मिळत नाहीं ! आणि हें संस्थान ह्मणे वऱ्हाडला स्वराज्य देणार !

—बेळगावीं कॉंग्रेस बरोबर अखिल भारतीय गो–परिषदहि भरणार आहे. गोमांतकीय गोभक्तांनीं सदर परिषदेंत अवश्य भाग घ्यावा.

—टाटा कंपनीच्या 'मुळशी धरणा' खालीं ज्यांच्या जमिनी बिरडल्या गेल्या त्यांना भरपूर मोबदला मिळाला नाहीं. सत्याग्रही देशभक्तांनीं या अनिष्ट प्रकाराचें भविष्य पूर्वींच वर्तविलें होतें.

—कऱ्हाड क्षेत्रांतील हिंदूंच्या निरनिराळ्या देवालयांतील सोळा मूर्ति मुसलमानानीं फोडल्या ! अशा आततायी कृत्यानीं हिंदू–मुसलमानांचें ऐक्य, शक्य कोटींत उतरण्याचा संभव आहे काय ?

—ता. १० जून रोजीं पेडणें येथील वजनदार व लोकप्रिय नागरिक श्री. घनःशाम रघुनाथ शे. देसाई ऊर्फ दाजी साहेब देसाई यांचे चिरंजीव श्री. सीताराम घनःशाम शेणवी देसाई यांचा विवाह मोठ्या थाटानें झाला. समारंभाला खुद्द पेडणें महालांतील बहुतेक मंडळी हजर असून, इतर ठिकाणचेहि बरेच सन्मान्य पाहुणे, ब. राव, प्रो० डॉ. सिनारी, डॉ. बोरकर, रा. काकासाहेब दणाईत, डॉ. साखरदांडे, रा. पुंडलीक राव केणी, इ० इ० गेले होते. एकंदर समारंभ श्री. दाजीसाहेब यांच्या लौकिकास व योग्यतेस साजेसाच झाला. वधुवरांचें आह्मीं मनापासून अभिष्ट चिंतन करितों.

ग्राहकांस सूचना

अपरिहार्य अडचणीमुळें प्रस्तुत अंकाचें पुरवणी पत्रक प्रसिद्ध करणें शक्य झालें नाहीं.

मनेजर भारत.

Ano 9 º N. 19

Pangim, a 31 de Julho de 1924

[A]SSINATURA
[C]ada ano tres rupias

ANUNCIOS
[...] ainda que repetida uma tanga
[Num]ero avulso uma tanga

[DIR]ECTOR E EDITOR
[G. P.] Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.
BHARAT.

वर्ष ९ वें. अंक १९
गुरुवार ता. ३१ जुलै सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केंपें—गोवा.

A ESFOLA DUM DOUTOR

वर्णाचा श्रेष्ठ कनिष्ठ दर्जाचा प्रश्न मुदतीवर टांकून तूर्त एवढें सांगितलें ह्मणजे पुरे कीं आल्बुकेर्क याणीं वसाहतींस सद्दढता आणण्यासाठीं केलेले प्रयत्न फसले एवढी गोष्ट निर्विवाद आहे. कारण त्या उपाययोजनेच्या पायीं इंडिया, पोर्तुगाल देशांत सामील होण्या ऐवजीं, पोर्तुगालच इंडियेंत समाविष्ट झाला असता. आलेशांद्र येर्कुलानानें ह्मटलें आहे कीं, पोर्तुगीज जनतेच्या कॉलनी स्थापण्यांतील चुकीच्या धोरणामुळें, ब्राजील देश पोर्तुगालची कॉलनी बनण्या ऐवजीं उलट पोर्तुगालच ब्राझीलची कॉलनी बनली. तसाच प्रसंग येथेंहि ओढवला असता.

याप्रमाणें आल्बुकेर्कच्या मुत्सद्दिगिरीचे दोष ठळकपणें दृग्गोचर होत असतां आलबुकेर्क साहेबांची जयंति इंडियन लोकानी करण्याचें आणखीहि एक कारण शिल्लक राहतें. तें ह्मटलें ह्मणजे युरोपियन संस्कृती पासून हिंदुस्थानास झालेले फायदे लक्षांत घेतां ती संस्कृति प्रारंभीच आमच्यापर्यंत आणून ज्या व्यक्तीनें भिडविली, त्या व्यक्तीबद्दलचा आमच्या ठिकाणीं वसत असलेला आदर; पण या वज्रप्रमाणें अभंग मानलेल्या संस्कृतीचें दिवाळें वाजल्याचें सुप्रसिद्ध समाजशास्त्रवेत्त्यांनीं जाहीर केलें असून तेव्हा संस्कृतीच्या पायावर रचलें असल्यामुळें ज्या समाजांत स्थैर्य असें कधींच नव्हतें त्या समाजाच्या नाशाचें त्यांच्या अंतःचक्षूंस दिसणारें भविष्यहि केव्हांच वर्तऊन ठेवलें आहे.

आधुनिक कालांतील सुप्रसिद्ध समाजशास्त्रवेत्ता जार्जवाल यानें युरोपियन समाजाची पुनर्घटना, ज्या आश्चर्यजनक अशा तत्वांवर पूर्वेकडील, आणि त्यांतहि हिंदुस्थानांतील समाज बनले आहेत, त्याच तत्वांवर करावयाचा उपदेश केला आहे.

इकडे एकाकाळीं उंच शिखर गांठलेली इंडियन संस्कृति, ज्या काळीं शेंकडो वर्षां पासून अचेतन पडलेली दिसते त्याच काळीं तिकडे युरोपियन संस्कृति स्वैर संवाराचा नंगा नाच नाचून आपला आपला नाश करून घेते, यावरून उच्च शिखर गांठून कुंठीत झालेली संस्कृति आणि भीषण अशा जड वादाच्या कच्छपीं लागून क्रार्य आणि अत्याचार या आसुरी साधनानीं ध्येय गांठू पाहणारी संस्कृति या दोहोंतून श्रेष्ठ कोणती असावी बरें ?

ज्या परिस्थितींत जन्म पावली तेथेंच जिचा फोलपणा शाबीत झाला ती संस्कृति वाखाणेश्र अर्थात अभंग अशा संस्कृतीशीं एकरूप झालेल्या समाजास फायदेशीर कशी व्हावी ? ह्या एकंदर मुद्यांवरून आमचें मत असें बनलें आहे कीं, आल्बुकेर्क यानें केलेली हिंदुस्थानातील राज्यस्थापना आणि त्यामुळें आमच्यावर पडलेलें युरोपियन संस्कृतीचें दडपण या गोष्टी फार वाईट असा झाल्या. इंडियन लोकानीं तर युरोपियन संस्कृति उचलून हिंदुस्थानचें अहित करून घेतलें आहे.

स्फुट विचार

महत्वाचा प्रश्न.— अग्रलेखांत नमूद केलेले विचार प्रदर्शित केल्यानंतर फ्रियस व मिरांद हे पुढें ह्मणतातः—

" लिसेव सेंत्रालच्या सुशिक्षित रैतोराकडून छात्रगणाच्या साहचर्यानें जी आल्बुकेर्कची जयंती करण्यांत आली ती त्याच्या योद्धा व राज्यस्थापक यां पैकीं कोणत्या गुणावर लुब्ध होऊन करण्यांत आली असावी ? कारण जीत समाज जेत्याचे उत्सव स्वयंस्फूर्तीनें कधींहि करीत नसतात अशा दृष्टीनें आफोंस दे आल्बुकेर्कची गोमांतकांतील लिसेवांत झालेली जयंती ही राष्ट्राच्या इतिहासांत अश्रुत पूर्व होय, आणि त्या मुळें जी गोष्ट स्पष्ट दिसते ती ही कीं पोर्तुगीज लोकांच्या वसाहतींतील धोरणामुळें आमच्या समाजाचा नैतिक दृष्ट्या अधःपात होऊन आमच्या राष्ट्रीय सद्गुणांचा व स्वत्वरूपी भावनाचा लोप झाला. याच करितां आमच्या रैतोराच्या देखरेखेखालीं आणि त्याच्याच प्रेरणेनें आपल्या गोमांतकांतील छात्र वर्गानें केलेला उत्सव, हा आह्मी अयोग्य ठरवतों. आमच्या गोमांतकांतील विद्यार्थीवर्गास आणि त्यांच्या रैतोरास उत्सव आणि जयंत्या करण्यालायक असे दिवंगत झालेले इंडियन कांहीं कमी आहेत असें नाहीं. आदल्यांतील नश्वर जगाचा त्याग केलेल्या अनेक व्यक्ती पैकीं ज्यानीं सद्गुणानें आणि ज्ञानानें दिगंत कीर्ति मिळविली त्या सर्वांचा नामनिर्देश करणें शक्य नसल्यानें त्यां पैकीं

... unia lembranga.

... अनत नाईक यानीं संस्थेचा यांत.पोर्तुगीज राज्य आ...

भारत

गुरुवार फा॰ शु॰ ७ मी शके १८४५

संस्कृतींचा झगडा !

"पोर्तुगीज लोकांनीं पूर्वेकडे बाजून स्थापन केलेल्या साम्राज्य सत्तेंत पर्यवसान भयाण आणि लांछनास्पद अशा स्मारकांत झालें."

आलेशांद्र येर्कुलान

गेल्या २० फेब्रुआरीच्या उ एगोल्ट पत्रांत आमच्या गोमांतकस्थ खिस्ती बांधवांपैकीं, कोइंब्र येथील विश्वविद्यालयांत अभ्यास करीत असलेले इजिदेर फ्रियस व लुसियु मिरांद या विद्यार्थी द्वयांनीं एक विचारपरिप्लुत आणि बाणेदार लेख लिहून, आपल्या समाजांतील स्वत्वास पारखे झालेल्या लोकांच्या डोळ्यांत जळजळीत अंजन घालण्याचा प्रयत्न केला आहे.

वरील विद्यार्थीद्वय शिरोभागीं असलेलें आलेशांद्र येर्कुलान या सुप्रसिद्ध पोर्तुगीज लेखकाचें वाक्य उध्दृत करून ह्मणतात:—

"गोव्याहून आलेल्या वृत्तपत्रांवरून, आह्मांस इतर बातम्यांशेवर, नवीन गोवें येथील लिसेव सेंत्रालांत झालेल्या उत्सवाची बातमी वाचावयास मिळाली हा उत्सव आफोंस दे आलबुकेर्क याच्या जयंतीचा असून त्या उत्सवाच्या कार्यक्रमात ४ व्याख्यानें, १ फुटबॉल म्यांच व दीप प्रकाशातील मिरवणूक या गोष्टींचा समावेश झाला होता

असा हा इंडिया जिंकलेल्या व्यक्तीच्या जयंतीच्या निमित्तानें केलेला उत्सव, आमच्या लिसेव सेंत्रालच्या इतिहासांतील पहिलाच असून आजपर्यंत जे इतर उत्सव झालले आहेत त्यांत या सदरील उत्सवाची आणखी एक भर पडली आहे.

या उत्सवासंबंधानें आह्मांस सुचलेले विचार आमच्या लिसेव सेंत्रालचे रैतोर तसेंच आमच्या गोमातकांतील नीतिमान आणि बुद्धिमत्तेंत नांवाजलेले लोक यां पुढें मांडण्याचा प्रयत्न करीत आहों. हे विचार माडण्यांत, आमच्या राष्ट्राच्या आणि समाजाच्या भविष्यत्कालीन उन्नतीची आमच्या अंतःकरणांत वसत असलेली दृढ आशा असल्यामुळें, आह्मी आमच्या देशबांधवास उद्देशून जें लिहीत आहों, हें आमच्या ठिकाणी आह्मी इंडियन असल्याबद्दल स्फुरत असलेल्या भावनेचें फळ होय.

आतां आपण आफोंस द आल्बुकेर्क याच्या विषयीं आमच्या मनांत पूज्यबुद्धि असणें युक्त आहे कीं काय याचा विचार करण्यासाठीं त्याच्या चरित्राचा थोडासा अभ्यास करून त्या पासून काय निष्कर्ष निघतो, तें पाहूं.

हें काम हातीं घेण्यापूर्वी आह्मांस आमच्या अंतःकरणांतील राजकीय बाबतींतील मत्सर बुद्धीस फांटा देऊन शांतपणानें आणि समतोल मनानें कार्य कारण पद्धतीचा चिकित्सापूर्वक विचार करून दाखवावयाचें आहे कीं, आपल्या पूर्वजांनीं युरोपियन चालीरीति स्वीकारण्यांत नुसती चुकीच नव्हे पण फार भयंकर गुन्हां केला आणि त्या चुकीपासून व गुन्ह्यापासून आधुनिक लोकहि परावृत्त झालेले दिसत नाहींत.

ही आपली चिकित्सापद्धति प्रथमतः खिस्ती धर्मानें केलेल्या कार्याकडे लाऊन पाहूं कारण याच बाजूनें पोर्तुगीज लोकांनीं आपलें शक्तिसर्वस्व खर्चिलें आहे. असें करण्यापूर्वी आह्मी करीत असलेल्या टीकेंत दुराग्रहाचा अथवा असद्धेतूचा संशय कोणासहि येऊं नये ह्मणून एवढें सांगून टाकतों कीं आह्मी स्वतः क्याथोलिक धर्मपंथाचे पूर्ण अभिमान असून आमची स्वतःची वागणूक त्या धर्मास धरून आहे. आह्मी आमच्या पूर्वजांस तर गोपायाचा मार्ग शिकविण्याकरितां म्हणून खिस्तच्या नावांनें शांतताप्रधान आणि प्रेममय धर्माच्या निशाणाखालीं सर्व प्रकारच्या अत्याचाराचा उपयोग करण्यात आला. वास्तविक विचार करितां एकाद्या क्याथोलिक इसमानें तदितर इसमांस आपल्या धर्मांत आणण्याचा प्रयत्न करणें या सारखी सामान्य बाब कोणतीहि नाहीं. पण धर्म लादण्याकरितां जुलुमाचा उपयोग व्हावा ही बाब मात्र असमर्थनीय होय. धर्म हा श्रद्धेच्या पायावर उभारलेला असून तलवार आणि रक्तपात यांच्या मदतीनें तो लादणें अशक्य होय.

अशा पद्धतीनें विचार करितां पोर्तुगीज लोकांनीं अनेक लोकांस आपल्या धर्मांत घेतलें हें कृत्य चांगलें झालें असें बिलकूल ह्मणतां येणार नाहीं. परधर्मी लोकांस आपल्या धर्मांत सामील करून घेऊन खिस्ती धर्मानें कांहीं एक मिळविलें नसून हिंदु धर्माचा बाह्यतः पाडाव झाल्याचा भास झाला आहे तो नैतिक दृष्ट्या अबाधितच राहिला. क्याथोलिक धर्म ज्यांच्या मतास प्रमाणभूत समजतो, त्यांचें म्हणणें असें आहे कीं ज्या कोणत्याहि धर्माचीं नीतितत्त्वें खिस्ती धर्मविरुद्ध नसतील त्या धर्मांतून मोक्ष संपादन करितां येतो. मात्र अशा प्रकारच्या कोणत्याहि धर्माप्रमाणें वागत असतां प्रामाणिकपणा व श्रद्धा यांचा आश्रय करून, तो एकच सत्यधर्म अशी भावना दृढ पाहिजे. ही आपली कसोटी हिंदु धर्मास लाऊन पाहतां आपल्यास दिसून येईल कीं हिंदु धर्मांतील नीतितत्त्वें बव्हंशी खिस्ती धर्म सदृश असून शिवाय तो धर्म शिस्तीच्या बाबतींत खिस्ती धर्मापेक्षां वरचढ आहे. यावरून आमचें मत असें आहे कीं खिस्ती आणि हिंदु यानीं आक्रमिलेले मार्ग निरनिराळे असले तरी दोन्ही हे धर्म मोक्षप्रद असल्यामुळें खिस्ती धर्मापासून हिंदुस्थानांत वाईट झालें नाहीं असें धरून चाललें तरी चांगलें मात्र झालें नाहीं, हें खचीत होय.

आतां आफोंस दे अल्बुकेर्क याच्या चारित्र्यापैकीं, आल्बुकेर्क मजकुरानें वसाहतीची स्थापना दृढमूल करण्याकरितां योजिलेल्या मुत्सद्देगिरीचा विचार करून पाहूं. या कार्यासाठीं त्यानीं अमलांत आणलेली योजना ह्मटली ह्मणजे आपल्या शिपायांचीं लग्नें देशी स्त्रियांशीं लावण्याचा प्रयत्न ही होय. अशा प्रकारें वर्णसंकर साधून घेण्यासाठीं प्रयत्न करण्यांत या मुत्सद्याच्या हेतूची मीमांसा करणें शक्य नाहीं.

यांत एकपक्षी पोर्तुगीज समाजाच्या होत असलेल्या अधःपातास आळा घालण्यासाठीं देशी स्त्रियांपासून नवीन जात निर्माण करून त्या समाजाची पुनर्घटना करणें किंवा दुसऱ्या पक्षीं इंडियन समाजाच्या रक्तांत पोर्तुगीज उच्च वीर्याची स्थापना करणें, या शिवाय तिसरा अर्थ संभवत नाहीं.

पहिला मुद्दा ग्रहीत धरल्यास असें ठरतें कीं आल्बुकेर्क याणें लढविलेली मुत्सद्दांगिरी इंडियन लोकांस बाधक झाली असून त्या पुढें ओघानेंच आणखी एक गोष्ट सिद्ध होते ती ही कीं त्या काळीं हिंदुस्थानची स्थिति अवल दर्जाची असून तो अवनतिपंथास लागला होता ही गोष्ट खरी नाहीं. आणि दुसरा मुद्दा गृहीत धरल्यास त्यांत दिसून येत असलेल्या मुत्सद्देगिरीच्या अभावाचें समर्थन फाजील परोपकार बुद्धीच्या कारणाशिवाय होणें शक्य नाहीं.

वर्णाचा श्रेष्ठ कनिष्ठ दर्जाचा प्रश्न मुदतीवर टाकून तूर्त एवढें सांगितलें ह्मणजे पुरे कीं आल्बुकेर्क याणी वसाहतींस सदृढता आणण्यासाठीं केलेले प्रयत्न फसले एवढी गोष्ट निर्विवाद आहे. कारण त्या उपाययोजनेच्या पायीं इंडिया, पोर्तुगाल देशांत सामील होण्या ऐवजीं, पोर्तुगालच इंडियेंत समाविष्ट झाला असता. आलेशांद्र येर्कुलानानें ह्मटलें आहे कीं, पोर्तुगीज जनतेच्या कॉलनी स्थापण्यांतील चुकीच्या धोरणामुळें, ब्राजील देश पोर्तुगालची कॉलनी बनण्या ऐवजीं उलट पोर्तुगालच ब्राझीलची कॉलनी बनली. तसाच प्रसंग येथेंहि ओढवला असता.

याप्रमाणें आल्बुकेर्कच्या मुत्सद्देगिरीचे दोष ठळकपणें दृग्गोचर होत असतां आल्बुकेर्क साहेबांची जयंति इंडियन लोकानी करण्याचें आणखीहि एक कारण शिल्लक राहतें. तें ह्मटलें ह्मणजे युरोपियन संस्कृतीपासून हिंदुस्थानास झालेले फायदे लक्षांत घेतां ती संस्कृति प्रारंभीच आमच्यापर्यंत आणून ज्या व्यक्तीनें भिडविली, त्या व्यक्तीबद्दलचा आमच्या ठिकाणीं वसत असलेला आदर; पण या वज्रप्रमाणें अभंग मानलेल्या संस्कृतीचें दिवाळें वाजल्याचें सुप्रसिद्ध समाजशास्त्रवेत्त्यांनीं जाहीर केलें असून तें त्या संस्कृतीच्या पायावर रचलें असल्यामुळें ज्या समाजांत स्थैर्य असें कधींच नव्हतें त्या समाजाच्या नाशाचें त्यांच्या अंतःचक्षूस दिसणारें भविष्यहि केव्हांच वर्तऊन ठेवलें आहे.

आधुनिक कालांतील सुप्रसिद्ध समाजशास्त्रवेत्ता जार्जवाल यानें युरोपियन समाजाची पुनर्घटना, ज्या आश्चर्यजनक अशा तत्त्वांवर पूर्वेकडील, आणि त्यांतहि हिंदुस्थानांतील समाज बनले आहेत, त्याच तत्त्वांवर करावयाचा उपदेश केला आहे.

इकडे एकाकाळीं उंच शिखर गांठलेली इंडियन संस्कृति, जरा काळीं शेंकडो वर्षांपासून अचेतन पडलेली दिसते त्याच काळीं तिकडे युरोपियन संस्कृति स्वैर संहाराचा नंगा नाच नाचून आपणच आपला नाश करून घेते, यावरून उच्च शिखर गांठून कुंठीत झालेली संस्कृति आणि भीषण अशा जड वादाच्या कच्छपीं लागून क्रौर्य आणि अत्याचार या आसुरी साधनानीं ध्येय गांठू पाहणारी संस्कृति या दोहोंतून श्रेष्ठ कोणती असावी बरें?

ज्या परिस्थितींत जन्म पावली तेथेंच जिचा फोलपणा शाबीत झाला ती संस्कृति वाऱ्जेष्ठ अर्थात अभंग अशा संस्कृतीशीं एकरूप झालेल्या समाजास फायदेशीर कशी व्हावी? ह्या एकंदर मुद्यांवरून आमचें मत असें बनलें आहे कीं, आलबुकर्क यानें केलेली हिंदुस्थानांतील राज्यस्थापना आणि त्यामुळें आमच्यावर पडलेले युरोपियन संस्कृतीचें दडपण या गोष्टी फार वाईट अशा झाल्या. इंडियन लोकानीं तर युरोपियन संस्कृति उचलून हिंदुस्थानचें आहतच करून घेतलें आहे.

स्फुट विचार

महत्वाचा प्रश्न.— अग्रलेखांत नमूद केलेले विचार प्रदर्शित केल्यानंतर फ्रियस व मिरांद हे पुढें ह्मणतात:— "लिसेव सेंत्रालच्या सुशिक्षित रैतोराकडून छत्रगाच्या साहचर्यानें जी आल्बुकेर्कची जयंती करण्यांत आली ती त्याच्या योद्धा व राज्यस्थापक यां पैकीं कोणत्या गुणावर लुब्ध होऊन करण्यांत आली असावी? कारण ज्ञात समाज जे त्याचे उत्सव स्वयंस्फूर्तानें कधींहि करीत नसतात अशा दृष्टीनें आफोंस दे आल्बुकेर्कची गोमांतकांतील लिसेवांत झालेली जयंती ही राष्ट्राच्या इतिहासांत अश्रुतपूर्व होय, आणि त्या मुळें जी गोष्ट स्पष्ट दिसते ती ही कीं पोर्तुगीज लोकांच्या वसाहतींतील धोरणामुळें आमच्या समाजाचा नैतिक दृष्ट्या अधःपात होऊन आमच्या राष्ट्रीय सद्गुणाचा व स्वत्वरूपी भावनाचा लोप झाला. याच करितां आमच्या रैतोरांच्या देखरेखेखालीं आणि त्याच्याच प्रेरणेनें आपल्या गोमांतकांतील छात्र वर्गानें केलेला उत्सव, हा आह्मी अयोग्य ठरवतों. आमच्या गोमांतकांतील विद्यार्थीवर्गास आणि त्यांच्या रैतोरास उत्सव आणि जयंत्या करण्यालायक असे दिवंगत झालेले इंडियन काहीं कमी आहेत असें नाहीं. आदल्यांतील नश्वर जगाचा त्याग केलेल्या अनेक व्यक्ती पैकीं ज्यानीं सद्गुणानें आणि ज्ञानानें दिगंत कीर्ति मिळविली त्या सर्वांचा नामनिर्देश करणें शक्य नसल्यानें त्यां पैकीं

…a uma lembrança.

पायमल्ली होते व आपल्यासच दुःख का
भोगावें लागतें ?

पण, या प्रश्नाचें उत्तर फार सोपें आहे
गुणाकार पडताळून पाहिला म्हणजे त्यांत
चूक असल्यास जशी ती सहज बाहेर नि-
घते, तसें प्रजासत्ताक राज्यपद्धति ज्या त-
त्वांनीं निगडित झालेली आहे त्या तत्वांशी
प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या नांवावर चालू
असलेली परिस्थिति पडताळली कीं, वरील
प्रश्नाचें उत्तर सहज मिळतें. व त्याच प्रश्ना-
च्या उत्तरार्थ थोडा ऊहापोह करणें हा
आजच्या या लेख लेखनाचा मुख्य उद्देश
होय. तेव्हां, अनेकविध राज्यपद्धति गो-
व्यांत चालू असलेल्या प्रजासत्ताक राजपद्धती
च्या आधारभूत तत्वांचा आधीं विचार
करूं.

प्रजासत्ताक राज्यपद्धति अमलांत येण्या-
च्या मुळाशी असा एक राजकीय सिद्धांत
आहे कीं, एकादा मनुष्य इतर मनुष्यांहून
प्रबल असला म्हणजे, तो प्रबल मनुष्य, आ-
पल्या इच्छेस येईल त्या प्रमाणें, इतर दुर्बल
मनुष्याकडून पाहिजे तें हिरावून घेईल. हें
तत्व प्राणिमात्राच्या नैसर्गिक स्वभाव धर्मा-
नुसार प्रस्थापित झालेलें आहे. करितां जें
तत्व एका मनुष्यास लागू तेंच तत्व सम-
सुखदुःखानीं निगडित असलेल्या अनेक
मनुष्यांसहि लागू आहे. अर्थात, कोणतीहि
राजकीय सत्ता, इतर समाजाहून तुलना-
त्मक दृष्टया लहान समाज ऊर्फ कंपूच्या हा-
तांत राहली असतां, तो लहान समाज ऊर्फ
कंपू, आपल्या व्यतिरिक्त राहिलेल्या इतर
समाजाकडून, आपल्या इच्छांनुसार पाहिजे
तें हिरावून किंवा करून घेईल, किंवा आ-
पल्या सुखसोईनुसार पाहिजे तें त्या इतर
राहिलेल्या, अधिक संख्यांक पण राजकीय
सत्तेस प्रत्यक्ष रीतीनें मुकलेल्या समाजावर
लादून टाकील. अशा परिस्थितींत हा बिन
सत्ताधारी समाज अल्प संख्यांक सत्ताधारी
समाजाचा अधिकाधिक गुलाम बनून दि-
वसें दिवस अधिकाधिक दुःखी होईल.
दुर्दैवानें कैक वर्षांच्या अनुभवाअंती
ओळखलें जाऊन वरील राजकीय तत्वाचा
दुर्बल्यांक बिनसत्ताधारी समाजाकडून
धिक्कार होऊन, ती राजकीय सत्ता, सरस-
कट सर्व सामान्य जनतेकडून आपल्या हा
तीं घेण्यांत आली, म्हणजेच प्रजासत्ताक
राज्यपद्धति प्रस्थापित झाली.

या मिळच्या राजकीय तत्वास जगांतील
सर्व देशांच्या राजकीय इतिहासाचा पूर्ण
पाठिंबा आहे. यावरून त्या तत्वानुसार
गोव्यांतील प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा थोडा
विचार करूं; म्हणजे करवाढी सारखे जाचक
कायदे, आपणच चालविलेली आपली राज्
यपद्धति कशी प्रसवते, हें कोडें सहज उ-
लगडलें जाईल.

—पणजी व मुर्गांव या दोन्हा ठिकाणी
चे उन्दीर अजूनहि आढळतात.

Ano 9° N. 2

[...]a-feira 27 de Março de 1924

ASSINATURA
cada ano tres rupias

[A]NUNCIOS
Por [...]da que repetida uma tanga
[...]vulso uma tanga

[...]OR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.

BHARAT

वर्ष ९ वें. अंक २

गुरुवार ता. २७ मार्च सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

A PROPOSITO . . .

O Conselho Legislativo deste Estado numa das suas sessoes, escolheu, por eleiçao, dois representantes da India para o Congresso Colonial que se vai reunir em Lisboa.

No's sabemos que o tesouro da Colo'nia esta' pobre, exausto mal podendo fazer face a's despezas ordina'rias do orçamento. Mas, nem por isso, podemos deixar de dar o nosso incondicional aplauso a' idea de a India ter os seus representantes num Congresso em que se vao debater problemas que, sendo do interesse para o dominio ultramarino portuguez afectam tambem a este pais que faz parte do ultramar lusitano.

A India sofre de males que vem de longe uns, e outros que surgiram nestes ultimos tempos, se nao pelo mau uso da autonomia, pelo menos pela insuficiencia da mesma. E' preciso acudir ao doente com medidas eficazes e isto urgentemente, porquanto o mal que se entretem com paliativos e' sempre um mal que se complica, e algumas veses tanto que a cura torna-se impossivel. O regime de panos quentes, de que o governo local bem como o governo central vem desde muitos anos lançando mao, e' inadiavel que tenha o seu termo, adoptando se desde logo, sem perda do tempo, bases para uma administraçao mais activa, mais eficaz, mais directa e mais local. Em suma, o que se quere e' que na India vigore um regime de Autonomia mais ampla ou mesmo uma Autonomia completa, reservando-se ao poder executivo o direito de *veto* em assuntos que envolvam os direitos de soberania e a politica externa. A nossa opiniao sincera e leal e' esta, pois aquilo que nos mandaram da Metropole com o rotulo de Autonomia nao passa de uma reverenda burla—que mais valia nunca ter existido;

E' esta para no's a missao patriotica que aos nossos representantes cabe desempenhar quer seja dentro do Congresso quer seja fora dele pela imprensa, pela conferencia, pela discussao com homens em evidencia na politica metropolitana. Esta' claro que fora deste, ha outros problemas, mais ou menos importantes, que tratar; mas todos secundarios, cuja soluçao em grande parte se nao de todo, depende da forma como for resolvido o problema da nossa organisaçao administrativa e fiscal.

Felizmente para o pais, segue para a Metropole, como um dos representantes, o sr. Minezes Bragança. A sua inteligencia fulgurante, a sua cultura, o seu conhecimento directo e profundo da vida da colonia em todos os seus variados aspectos, as suas qualidades de verdadeiro parlamentar constituem um penhor seguro, a garantia solida de que a causa de India vai entregue a um patrono quo representa o orgulho desta terra.

Para no's, o sr. Menezes Bragança prestou um relevantissimo serviço a' terra do seu berço aceitando esta missao, pois ele, sinceramente o dizemos, e' um dos pouquissimos, infinitamente poucos que encontrando-se em condiçoes excepcionais de defender os interesses da India de hoje, reune em si igualmente qualidades todas para reatar o fio, interrompido ha' anos, do brilhante passado desta colonia em relaçao com Portugal, passado onde fulguram nomes como o de Estevam Jeremias Mascerenhas, Francisco Luis Gomes, Bernardo Frencisco da Costa e mais poucos.

Va, pois, sr. Menezes Bragança que a India o contempla envaidecida e confiada.

* * *

Se o periodo que atravessamos nao fosse da decadencia franca em que tudo de todos os lados nos aparece a cair em bocados, iria para o Congresso, acompanhando o sr. Bragança, alguem que pelos seus serviços a causa publica — ponham de parte o talento que e' um dom natural—se impuzesse a' consideraçao publica. Tal nao foi. E foi bem de um lado. Era preciso que ao lado do sr. M. Bragança que representa brilhantemente o passado brilhante desta India, consubstanciando tambem o sonho doirado do seu futuro da luz e grandeza, fosse para Lisboa o representante do nosso presente—presente confuso, incerto, hesitante, sem ideal nem grandeza, mas bem jantado e bem instalado.

X.

Expediente

Pede-se aos srs. assinantes do *Bharat* a fineza de saldarem os seus debitos por via postal, u'nica que e' comoda a todos.

O Administrador

Ecos do Mandovi

(Do nosso correspondente)

A atmosfera politica esta' turvada por densas e caliginosas nuvens, e intempestivas novas extraordinarias geram com uma velocidade de raio. Apos o acto louvavel e heroico dos 8 vogais "vencidos" na sessao de 27 de Dezembro, sessao que deve ser inscrita, nos anais desta terra, em letras de oiro zera-se um silencio desolador e te'trico, as suspeiçoes pairavam nos ares a' espera da sua descepaçao. E o silencio terminou, a suspeiçao la' veiu tacita e terminantemente formulada pelo *Seculo* num artigo editorial, e a suspeita tacita e terminantemente formulada foi, de que na India onde o C. L. tem uma maioria de vogais nao funcionarios, o respectivo governador tem encontrado os maiores embaraços a' aprovaçao de medidas que aumentem as receitas e ainda de outras em absoluto necessarias ao exercicio da sua soberania."

Apo's tanta celeuma que atroou os ares, ferindo os nossos timpanos; apo's razoes e manifestos ao *Paiz* que ninguem, absolutamente ninguem teve a coragem de admitir e de desfazer, *O Seculo*, sem fundamento e sem provas, faz-se eco dumas noticias absolutamente comicas e ridiculas! ... E' isto, nao haja duvida, uma autentica *portuguesada*, porque bem disse o Bispo de Madrasta, a terra portuguesa e' terra de *novidades*. E esta e' uma *novidade* genuinamente, estructuralmente portuguesa.

Falando do jornalismo portugues Alfredo Pimenta, um dos mais brilhantes e eruditos escritores escrevia:

"A vida jornalistica e' pelo seu lado a consagraçao desvairada da mais imprudente imbecilidade. O jornalismo portugues forma uma classe a'parte, no jornalismo do mundo civilisado."

E nao admira, pois, que o *Seculo* tenha-se referido, duma maneira so dele, a um momentoso assunto. Sem escrulo, sem criterio ele faz afirmaçoes que caem sob o peso de sua propria inviabilidade!...

"Encontrou o respectivo governador embaraços a' aprovaçao de medidas que aumentem as receitas". Que receitas? nao nos diz o *Seculo*. Aumentar as receitas, aumentando destrambelhadamente as Pautas Aduaneiras, que nem a retorica, nem as belas palavras do sr. Jaime de Morais podem justificar. Aumentar as receitas sem comprimir as despesas? Quando a palavra compressao de despesas " esta' por estes dias, estampada em colunas e colunas de jornais metropolitanos com *tipos* de todos os tamanhos e? com o cambio a subir, a subir sempre!...como e' que os vogais podiam aprovar umam edida deste quilate Porque e' que o *Seculo* nao abre uma campanha contra as sinecuras que aqui, nesta nossa desditosa terra, estao a medrar impunes a' sombra de todas as Compressoes preconizadas e preconizaveis?

Porque e' que o *Seculo* que alia's nem sabe da existencia da *India Portuguesa*, que nao ouve os seus gemidos, nem as suas queixas, so' nesta ocasiao, ex-oficio referiu se a' atitude de vogais electivos duma forma que indica o pouco ou nenhum conhecimento da causa? Vao la desfiar a meada os pacientes, mas, cautela Magdalena nao mexa que e' ... pior!

A resposta a esta atoarda infundada e' um aparte picaresco do sr. Governador Geral, na sessao de 25 de Fevereiro, anterior a' chegada da mala de Portugal:

—Realmente votadas, *malgre' tout* sr. Sales de Andrade, e com muita razao diz *O Heraldo* no seu ponderado e criterioso editoral de 13 do corrente "podemos calcular quanta intençao e quanta enfase s. excia teria posto naquela frase curta e simples, que compreende um mundo de ideas".

Agora quanto "as medidas em absoluto necessarias ao exercicio da sua soberania" e' de facto na conceituada frase do *Heraldo* um verdadeiro *puzzle* evidentemente criado para lançar a confusao no espirito publico. E este foi, afinal, como se ve, o resultado do celebrado acto dos vogais electivos do C. Legislativo!

Mas porque os "vencidos" nao hao-de chamar a' responsabilidade o *Seculo* que de adrede forja novas para encher papel e Terreiro do Paço fazer os seus calculos de cabo de esquadra.

Aqui fica, pois, a lembrança.

Eis um trecho da sessao do C. Legislativo de 27 de Fevereiro.

"O sr. P. A. de Sousa ... Nao sabe ate' que ponto e' verdadeira a noticia que os jornais dao, da fraca procura da manga para exportaçao, devido ao gravame aduaneiro. Estes jornais tambem...

[...] fica uma lembrança.

देलेली आहे, असें समजलें जातें. तर कित्येक
ठिकाणीं सुशिक्षित ह्मणविणारी मंडळी नाटकें
करणें, सुंवारी वाजविणें, कलावंतिणीचा नाच
करणे, त्यांचे बरोबर स्वतः नाचणें, रंग उध-
ळणें, अनीतीला प्रोत्साहन देणें वगैरे कामें
करीत असतात. कित्येक ठिकाणीं या कामा-
करितां शेंकडो, तर जांबावली सारख्या ठि-
काणीं हजारों (७।८ हजार रुपयांचा तरी
नाश होतो) रुपये खर्च होतात. अशा उ-
त्सवांचा आपल्या समाजाला कांहींच फायदा
नाहीं, अशा सूर अलीकडे कांहीं विचारी त-
रुणांच्या डोक्यांतून निघत आहे. हें खरोखर
देशाच्या भाग्योदयाचें सुचिन्ह होय. परंतु
यावर

जुन्या मंडळीचा आक्षेप

असा आहे कीं, शेंकडो वर्षे आपले पूर्वज हा
सण साजरा करीत आहेत, असें असतां जर
तो आतां बंद केला, तर आमच्यावर ईश्व-
राचा कोप होणार नाहीं काय ? तसेंच आह्मी
या दिवसांत जें अन्नछत्र घालतों त्या योगानें
गरीब लोकांचें कल्याण होतें. हें अन्नदानाचें
पुण्य कां घालवावें ? याला

आमचें उत्तर

असें आहे कीं, अन्नदानाचें पुण्य उत्तम आहे
परंतु तें केव्हां ? भुकेलेल्यानांच अन्नदान करूं
तेव्हां. उलट केवळ आळसामुळें श्रम न क-
रितां जे फुकट खाऊ समाजावर पोसणारे
आहेत, त्यानां अन्नदान करणें, म्हणजे संभा-
व्यत भिकाऱ्यांची संख्या वाढविणें होय. या-
दानाचा असा विपरीत अर्थ झाल्यामुळेंच
हिंदुस्थानांत भिकाऱ्यांची संख्या २० । २२
लाख झाली आहे, व हे समाजावर भारभूत
होऊन राहिले आहेत. दुसरा मुद्दा म्हणजे
ईश्वराविषयांचा होय. या बद्दल आमचें असें
सांगणें आहे कीं, आपण जे मूर्ति म्हणजेच
देव असें समजतां, तें सोडून द्या. मूर्ति ह्या
ईश्वराकडे लक्ष्य लावण्याचीं साधनें आहेत.
मूर्ति जर देव असत्या, तर १२५१ सालांत
सोमनाथमध्यें शहाबुद्दीन घोरीनें एकाच दिव-
सांत एक हजार मूर्तींचा विध्वंस केला नसता.
पाषाण मूर्तीच्या अंगावरील दागिनें चोरूं श-
कले नसते. ह्याचा पूर्ण विचार करा. देव या
शब्दाची व्याख्या काय आहे ? अनीतीच्या
कार्यांनीं जर देव प्रसन्न होतात, तर मग ते
देव कसले ? हा सर्व आपल्या भोळेपणाचा
परिणाम आहे. तो सोडून द्या, व परिस्थिती-
प्रमाणें वागा. त्याचप्रमाणें

तरुण मंडळीचा आक्षेप

असा आहे कीं, वर्षभर काम करणाऱ्या लो-
कांना, वर्षाकांठीं कांहीं थोडे दिवस तरी क-
रमणूक पाहिज. हे आठ दिवस मौजेने घाल-
विल्यानें पुढील सालीं काम करण्यास उत्तेजन
मिळतें. शिवाय आज युरोपांत सुद्धां कार्निव्हालचा
सण आहे. तसेंच आमचेच बांधव जे ख्रि-
स्ती आहेत, ते सुद्धां हा सण तीन दिवस मोठ्या
आनंदानें पाळतात. मग आह्मींच तो कां
साजरा करूं नये ? याला

आमचें उत्तर

असें आहे कीं, युरोपांतील परिस्थिति निराळी
आहे. ते लोक नुसता कार्निव्हालचा सण सा-

जरा करून स्वस्थ बसत नाहींत, तर देशाच्या, समाजाच्या उन्नतीसाठीं अहोरात्र श्रम करीत असतात. आमच्या सारखी परतंत्रता त्यांची आहे काय? कदाचित ती प्राप्त झाल्यास त्यांतून मुक्त होण्याची त्यांची तयारी नाहीं कांय ? शिक्षणा करितां, अनाथ रोग्यांकरितां गरीब विद्यार्थ्यांकरितां, त्यानीं तजवीज केलेली नाहीं काय ? समाजाच्या उन्नती करितां ते किती पैसे खर्च करितात ? अशीं शेकडों किंबहुना हजारों अनुकरणीय कामें डोळ्यांपुढें असतांना कार्निव्हालचेंच अनुकरण कां ? दुसरा मुद्दा ख्रिश्चन बांधवांचा होय हे लोक पाश्चात्य संस्कृतीनें पिसाळलेले आहेत. त्यांचें हें बीद उतरणारा कोणीहि ' महात्मा ' गोमांतकांत उत्पन्न झाल्याशिवाय उतरणें शक्य नाहीं. त्यानां शिवाजी कोण वाटतो ? हिंदुस्थान ही मातृभूमि वाटते काय ? अशोक युधिष्ठिरचें नांव सुद्धां यांनां माहीत आहे काय ? शेंकडा नव्याण्णवद लोकांकडून 'नाहीं' असेंच उत्तर येईल. तर मग यांचा चष्मा बदलेपर्यंत आपण त्यांचें अनुकरण करणें योग्य नाहीं. यांचा कार्निव्हालचा सण केवळ युरोपचें अनुकरण होय.

तिसरा मुद्दा आपल्या लोकांचा. मनुष्य उत्सव प्रीय आहे हें आम्हीं नाकबूल करीत नाहींत. परंतु हे उत्सव परिस्थितीप्रमाणें बदलले पाहिजेत. सात आठ हजार रुपये केवळ आठ दिवसांच्या चैनींत घालविण्यापेक्षां देशाच्या उन्नतीला पोषक असे दुसरे उत्सव बरेच करितां आले असते. आज ठिकठिकाणीं व्याख्यानमाला होत आहेत. प्रागतिक संघाची बैठक होत आहे. हे नव्या मनूंतील उत्सवच नाहींत काय ? आणखीं उत्सव पाहिजे असल्यास पुष्कळ करितां येतील: साहित्यसंमेलनासारखीं संमेलनें, औद्योगिक किंवा कलाकौशल्याचीं प्रदर्शनें वगैरेसारखीं भरविल्यास पैशांचा योग्य उपयोग होऊन देशाचाहि फायदा झाला असता. तेव्हां सुशिक्षित म्हणविणाऱ्या बांधवांनो, याचा विचार करा. व यापुढें अशी उधळपट्टी बंद करून देशाच्या उन्नतीची कास धरा. ' मन बदलतें अगर मनु बदलतो, कांहीं तरी बदलतें खरें ' असें जर आहे, तर बांधवांनो

या पुढें

अशा रीतीनें पैशाची उधळपट्टी करण्याचें बंद केलें पाहिजे. हें नवें युग आहे. आपणावर फार मोठी जबाबदारी येऊन पडलेली आहे. आपणास जेथें पहावें तेथें निराशेचे डोंगर दृष्टीस पडत आहेत. आह्मीं आमच्या देशासाठीं काय केलें आहे ? एकादा गरीब हिंदु व्याधीनें दुखणाईत झाल्यास ' आस्पीस ' किंवा ' मिझेरिकोर्दिय ' यां सारख्या परधर्मी लोकांच्या संस्थांकडे धांव घ्यावी लागत असून शेवटीं परधर्मांत प्राण सोडण्याचीं पाळी येत आहे. असें असतां धर्मनिष्ठ ह्मणविणाऱ्या दांभिकांनो, याची आपण कांहीं तरी तजवीज केली आहे काय ? तर मग तुह्मांला शिमग्यासारखा चैनबाजीला हजारों रुपये खर्च करण्याचा कसा अधिकार पोंचतो ? आपला समाज आज कोणत्या स्थितींत आहे ? शेंकडों व्यसनाचा सुळसुळाट झालेला आहे. आपण परमेश्वराचे मोठे भक्त आहोंत, असें बाहेर दाखवून व्यसनाचा प्रसार करणाऱ्यानों अनीतीचीं कामें करताना आपणास त्या ईश्वराची आठवण होत नाहीं काय ? असल्या दांभिक-सोंगांनी जनता फसली जाणार नाहीं.

आपल्या ब्रिटीश हिंदुस्थानांतील बांधवांकडे पहा. त्यानीं शिमग्याला कसें नवीन तऱ्हेचें स्वरूप दिलेलें आहे. हें डोळ्यासमोर ठेवा. देशाकरितां त्यांचे कसे प्रयत्न चालले आहेत हें पहा आणि नंतर आपल्याकडे पहा. आपणाला आज किती तरी कामें करावयाचीं आहेत. गोमांतकांत स्त्रियांची स्थिति काय आहे ? स्त्रियानां अत्यंत आवश्यक असें नर्सींग, शिवणकाम, हिशेब, स्वयंपाक या प्रकारचीं साधीं पण नित्य व्यवहारांतील शिक्षणाची तरी आपण सोय केली आहे काय ?

बांधव हो ! जरा विचार करा. आमच्या लिहिण्याच्या कुत्सित बुद्धीनें कांहीं तरी विपर्यास करूं नका. सगळ्या जगभर नजर फेंका. ह्मणजे प्रत्येक राष्ट्र कसें पुढें जात आहे हें दिसून येईल. आपला देश एके काळीं उच्च होता. या आपल्या देशांत सोन्याचा धूर निघत असल्याबद्दल पुष्कळ प्रवाशानीं लिहून ठेविलें आहे. हें लक्ष्यांत आणा. व आजच्या आपल्या देशाकडे पहा. ह्मणजे निराशेनें अंतःकरण खिन्न होऊन जाईल. आपण शेंकडों वर्षें शिमग्याचे उत्सव करीत आहोत परंतु त्यामुळें देशाला कांहीं फायदा झाला काय ? उलट व्यसनांत जखडले जात आहोंत आपल्या अशा कृत्यानीं मातृभूमीच्या तोंडाला काळिमा फांसला जात आहे. तो धुवून टाकण्याचे ऐवजीं उलट कलावंतीच्या तोंडास रंग फासणें योग्य आहे काय ? स्वतःच्या चैनीची मिरास चालण्यासाठीं देवाचें नांव पुढें करितां काय ? पण हें लक्षांत ठेवा कीं हिंदु धर्मातील देव शिमगे करणारे नाहींत. जुन्या भाविक लोकांच्या अंध श्रद्धेचा हा परिणाम आहे. परंतु यां पुढें तरी अशा गोष्टीना फांटा दिला पाहिजे. आतांचा काल निराळा आहे. या कालांत आपण

काय केलें पाहिजे ?

आपण आपला पैसा, आपला वेळ आपले श्रम शक्य त्या तऱ्हेनें देशाच्या कामीं लावले पाहिजेत. गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करणें, स्त्रियांना आवश्यक शिक्षण देणें, प्राथमिक शिक्षणाचें जाळें सर्व देशभर पसरविणें, वाचनालयाचा प्रसार करणें. परधर्मांत गेलेल्या आपल्या बांधवाना परत आपल्या धर्मांत घेणें. भोळ्या समजुतीचा नायनाट करणें, एकादी दुसरी औद्योगिक शिक्षणाची शाळा काढणें, असे एक कीं दोन, शेकडो प्रश्न आपल्या डोळ्यांसमोर आहेत. त्यांकडे ढुंकून सुद्धां न पहातां, आपल्या पैशाचा असा अपव्यय करणें योग्य वाटतें काय ? जन सेवा ही ईश्वर सेवा नाहीं काय ? तेव्हां उच्च शिक्षण घेतलेल्या

तरुण सुशिक्षितानो

केवळ परीक्षा पास होऊन अपटूडेट फिरणें, अथवा एखादी दुसरी नोकरी मिळविणें, ह्मणजेच सुशिक्षितपणाचें लक्षण नव्हे- तर जो आपल्याखालीं असलेल्या बांधवाना हात देतो तोच खरा सुशिक्षित होय. ही जबाबदारी आपणावर आहे. हिंदमाता आह्मांकडे दीन वदनानें पहात आहे. अशा वेळीं आपल्या आईला सहाय्य करणें योग्य वाटत नाहीं काय अशा प्रकारची सेवा ही ईश्वरसेवेचेंच एक अंग आहे, असें आपणास वाटत नाहीं काय ? विचार करा, आपली पुढील पिढी आह्मांला या बद्दल जबाबदार धरल्याशिवाय रहाणार नाही. करितां वर उध्दृत केलेल्या थोर पुरुषांच्या वचनाकडे लक्ष्य द्या, व योग्य मार्गाला लागा. रोम शहर एका दिवसांत झालें नाहीं. हें आह्मांला माहीत आहे. आणि त्याच दृष्टीनें केवळ एखादा दुसऱ्या लेखानें, शिमग्यासारखे उत्सव बंद होतील असेंहि आह्मीं मानीत नाहीं. हें आमचें कर्तव्य आह्मीं बजावित आहों. आज ना उद्यां केव्हां तरी या प्रयत्नानां यश येणारच. त्याची आह्मांला पूर्ण खात्री आहे.

स्फुट विचार

मूर्ख विचारसरणी:- सांप्रत कालीं पोर्तुगीज राज्यसत्तेखालीं धडपडत असलेला गोमांतक देश पुढें मागें परक्यांचें जूं झुगारून स्वतंत्रतेचा झेंडा फडकावणार निदान हिंदुस्थानशीं तो एकजीव होणार, असें आह्मीं इतिहासाच्या जोरावर भविष्य वर्तविलें होतें. परंतु हें भविष्य आमच्या कांहीं ख्रिस्ती बांधवांस पटत नसून, प्रसंग आलाच तर आह्मीं गोमांतकचें स्वातंत्र मान्य करूं पण हिंदुस्थानशीं समरस होण्याची आमची बिलकुल इच्छानाहीं, अशा तऱ्हेची विचारसरणी त्यानीं आपल्या मुख पत्रांतून ध्वनित करण्याचा सपाटा चालू ठेविला आहे ! जणू काय या महाशयांची इच्छा ह्मणजे एखाद्या इंग्रजी राष्ट्रासारख्या महाबलवान राष्ट्राची इच्छा कीं जिच्यापुढें सर्वांनीं आपल्या कमकुवत माना वांकविल्याच पाहिजेत ! परकीसंस्कृतीच्या मदिरेनें झिंगलेल्या दारुडी डोळ्यांतून वरील प्रकारचे अकलेचे तारे निघावेत, यांत मुळींच नवल नाहीं. उलट स्थिति मात्र आश्चर्योत्पादक बनली असती ! बाकी, कोळसा उगळावा तितका काळाच !

श्री मुखाची शोभा:- गेल्या १७ ता. खेच्या कोंसेल्य लेझिस्लातीव्हाच्या बैठकींत मुलकी खात्याचे मुख्याधिकारी मि. फ्लिनियु तिनोकु यानीं रागाच्या भरांत नामदार फिग्रेद यांचें श्रीमुख रंगवून काढलें ! तिनोक मजकुरांच्या या अत्याचारामुळें गोमांतकचें एकंदर वातावरण असंतोषाच्या खळबळीनें व्यापून जाईल, अशी कित्येकांची समजूत होती; पण ती सपशेल निराधार ठरून, उलट जिकडे तिकडे — कांहींशी हिणकस चळवळ खेरीज करून —निःस्तब्ध शांतताच आढळून आली ! या वरून मी मी ह्मणविणाऱ्या सुशिक्षितांच्या मनांत सुद्धां अनेक वर्षांच्या परावलंबीपणामुळें भ्याडपणा कसा मुरून राहिला आहे, याची कोणालाहि सहज कल्पना होण्यासारखी आहे. ह्या स्वार्थी भ्याडपणाचें उच्चाटन जों पर्यंत मुळासकट होणार नाहीं व ' ठोशास ठोसा ' या तत्वाच्या जोमदार अंमल बजावणीचें तेज जोंपर्यंत सर्वत्र फांकणार नाहीं, तों पर्यंत गोमांतकाच्या अभ्युदयाची आशा बाळगणें व्यर्थ होय. तिनोकांच्या मूर्खपणाबद्दल भारतानें पुरवणीच्या रूपानें आपला निषेध व्यक्त केलाच असल्यानें, यद्विषयीं आणखी विशेष चर्चा करणें अप्रासंगिक होय.

पत्रव्यवहार

श्री. रा. रा. संपादक 'भारत' केपें गोवा

कृ. सा. न. वि. वि. या खालील माझ्या पत्रास आपल्या येत्या 'भारता'च्या अंकीं मुद्दाम जागा द्याल अशी आशा करतों.

श्रीयुत रा. रा. संपादक 'हिंदु मिशनरी' यांस— कृ. सा. न. वि. वि. " माझ्या पत्राचा त्रोटक सारांश आपल्या ता. १०-३-२४ च्या अंकांत दिलेला वाचून त्यांतील कांहीं चुकांची दुरुस्ती तावडतोब व्हावी म्हणून हें लिहीत आहें माझ्या पत्रांतील कित्येक वाक्यें आपण गाळल्यामुळें त्यांची एकमेकांशी जुळवाजुळव होत नाहीं. व भलताच ग्रह होतो व पुष्कळ अंशीं झालेलाहि आहे. उदाहरणार्थ, आपल्या वरील तारखेच्या अंकाच्या १४१ व्या पष्ठावरील दुसऱ्या कालमांतील शेवटचें वाक्य येणें प्रमाणें आहे. ' ते पणजी येथील सरकारी कॉलेजचे परीक्षक आहेत. त्यांत संस्कृत, मराठी, व इंग्रजी शिकवितात, तें तसें नसून खालील प्रमाणें असलें पाहिजे. 'ते पणजी येथील सरकारी कॉलेजचे फक्त परीक्षक (मदतनीस) असून ते त्यांत संस्कृत इंग्रजी व मराठी शिकवीत नाहींत' तसेंच आजपर्यंत येथें एकहि मराठी शाळा नव्हती, असें नसून या पूर्वींचीं व नंतरचीं कांहीं वाक्यें गाळल्यामुळें एकमेकांचा संबंध मुळींच जुळत नाहीं त्याचप्रमाणें, के. श्री. रा. रा. डॉ. पुरुषोत्तम वा. शिरगावकर यांचा मुळीं उल्लेखच न केल्यामुळें, ही सर्व कांहीं दिशाभूलच झाली असें दिसतें. तसेंच पान १४२ पहिल्या कलमांतील शेवटचें वाक्य प्रो. केणी जर येथें आले नसते तर या प्रांतांत मुळींच जागृति झाली नसती हेंहि चुकलेलें आहे. ' पान १४२ दुसरें कलम ओळ चवथी— 'बंद पाडण्यांत आली नसून' कांहींना कांहीं कारणामुळें बंद पडली. तसेंच त्यानीं गोव्यांत येण्यापूर्वींच सोडली होती. वगैरे वगैरे. अशा प्रकारें पुष्कळ चुका झाल्यावरून कित्येकांचा वेगवेगळा ग्रह झालेला आहे. म्हणून आपण क्षणभरही विलंब न लावतां या लहानशा पत्रास आपल्या येत्या अंकीं न विसरतां जागा देऊन मला एकदां दोषमुक्त करावें ही विनंति अधिक लिहिणें नलगे. कळावे लोभ असावा ही विनंति. मडगांव, ता. २० । ३ । २४

आपला नम्र

पुरुषोत्तम पां. केणी

Ano 9º N.º 3

Quinta-feira 10 de Abril de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rúpias

ANUNCIOS
cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.

BHARAT.

वर्ष ९ वें. अंक ३

गुरुवार ता. १० एप्रील सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ८. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

"NARRATIVAS ELOQUENTES"

Desiderio Frias e Lucio Miranda, prestimosos filhos de Goa estudando em Coimbra, publicaram em *O Herald*o um artigo sob a epigrafe "*Reagindo*, que logrou a rara fortuna de despertar interesse. Uns deram aos autores uma simples reprimenda, outros acudiram-nos com conselhos de prudencia, so' o sr. V. S. dedicou ao trabalho dos rapazes um momento de atençao e critica.

E' no seu artigo "Dominaçao Portuguesa na India" estampado na *Tribuna* de 15 do corrente. Quem escreve estas linhas esta' com o sr. V. S. O sr. V. S. nao torce a orelha aos rapazes, nem lhes arregala o olho. Antes pelo contrario, chama-os para si, e dando-lhes um abraço fraternal presta-lhes o auxilio da sua rara erudiçao e prudente crite'rio.

Efectivamente, no's estamos com o sr. V. S. no seu propo'sito de "Contribuir com um conjanto de informes e consideraçoes" proveitosas "aos estudantes da ala de muitos novos' e porque o estamos, tomamos a liberda de de oferecer algumas observaçoes e factos ao exame do ilustre articulista.

Dizem os rapazes que "a) Os portugueses conseguiram impor a sua religiao a uma grande maioria de indianos; isto, se nao e' mal, tambem nao foi um bem, sendo que tanto o indu' como o cristao podem atingir a salvaçao eterna, embora por vias diversas. A isto replica o sr. V. S. que "As conversoes pela via de espada podem desmerecer o aplauso do bom senso; mas, as conversoes pelo ensinamento e pela pregaçao sao absolutamente correctas. Porisso, deve-se dizer que as conversoes operadas pelos antigos missionarios europeus no Oriente sao um bem".

Vamos agora a ver em face da historia em que consistiram os tais "ensinamento e pregaçao", de que os antigos missionarios se serviram; para isso reportemos a factos, poucos factos.

O sr. V. S., erudito como e', deve conhecer as provisoes firmadas em 1559 pelo governador Francisco Barreto. Estas provisoes resumiu as o autor do "Oriente Conquistado" o Pe. Francisco de Sousa, nas seguintes linhas: "Nelas se proibiam sob graves penas aos infieis vassalos do Estado todos os ritos, cerimonias e festas gentilicas nas nossas terras; todos os oficios da Republica; servirem aos ministros ou oficiais del-Rei; administrarem rendas havendo algum cristao que lançasse nelas outro tanto; mandava se que as mulheres dos gentios fazendo se cristas fossem meeiras nos bens do casal, segundo as leis de Portugal; que os orfaos dos pais gentios antes de terem uso de razao fossem tomados e baptizados, ainda que tivessem mai ou outro qualquer ascendente, e depois de discriçao estivessem sujeitos a tutores cristaos ate os 14 anos".

Estas provisoes nao foram obra da *espada*; mas solicita las e obtidas pelos missionarios. por via de uma deputaçao ao Governador F. Barreto, deputaçao de que faziam parte o Bispo de Etiopia, Pe. provincial Gonçalo de Silveira e o Pe. Anto'nio de Quadros e o Pe. Francisco Rodrigues.

Para que o sr. V. S. nao suponha que este facto e' um caso esporadico, um acto de violencia que uma exaltaçao momentanea justifica, estando porisso muito longe de exemplificar uma norma de conducta por parte dos missionarios, ai damos mais uma prova, frisante e clara, do que era a orientaçao dos ..luminares da fe' do tempo

"Em 1557 reunia-se em Goa o 1º Concilio Provincial, e apezar de no 1º decreto estatuir que hao de trazer os infieis a fe' com exemplo de vida e pregaçao da verdade" logo nos decretos seguintes, leiam-se coisas estupendas como as que seguem "E a esta pregaçao obrigarao a vir todos os infieis que viverem em suas dioceses de 15 anos para cima, com pena de os privar do comercio dos fieis" — "Gravissimo pecado e' ... o da idolatria. O que considerando este Santo Sinodo ...pede a S. A. que se desfaçam todos os idolos, templos, arvores, e qualquer outro lugar em que o demonio e' venerado dos gentios"... e os que fizerem qualquer destas coisas que nestes canones se proibem sejam castigados com grandes penas". Nao para. E conformando-se com os canones manda que em terras de S. A. se nao de oficio, dignidade, honra, preeminencia, nem dominio algum infiel sobre pessoa fiel ... nem haja mocadaes nem rendeiro em suas rendas que sejam infieis."

Ha de concordar o sr. V. S. que estes decretos do Concilio estabeleciam um regimen de *Cres* ou *morres* com a diferença de que, em vez do o infiel morrer trespassado pela tal *espada*, morria a' fome.

Para coroar esta obra toda feita do "ensinamento e pregaçao", veiu a Goa o Tribunal do Santo oficio acerca de cuja obra e feitos tenha a palavra o proprio Arcebispo de Evora: "Se em toda a parte a Inquisiçao foi um tribunal infame, nunca a infamia, por mais baixa, por mais vil, mais eivada e determinada por interesses mundanos do que do Tribunal de Goa, por ironia chamado o Santo Oficio.

Sao dados como estes e muitos mais que a exiguidade do espaço nao permite trasladar para este jornal que nos podem ajudar a explicar o fenomeno de 20,737 conversoes durante 3 anos do governo de D. Constantino de Bragança, e a destruiçao dos pagodes das Velhas Conquistas.

Sao de certo estas as razoes e tiradas dos livros e documentos antigos que dois dos mais notaveis escritores desta terra divulgaram ainda ha' pouco que levaram os jovens estudantes a afirmar que a religiao imposta nao foi um bem. E eles nao estam so' na sua afirmaçao. La' o director de uma missao franceza na India confessou abertamente num relato'rio que a India despensava biblias, o que lhe faltava era trabalho e pao. O muito que resta fica para outro numero.

X.

Ecos & Critica

NAO HAJA DUVIDAS

Cremos que os artigos sobre o futuro de Goa, publicados neste jornal, nao levaram ao ilustre colega da *Terra* a idea nitida do que representa a opiniao nossa perante o momentoso problema.

Para que nao haja duvidas, aqui damos a nossa maneira de ver.

Para o *Bharat*, Goa autonoma dentro da India independente, Goa constituindo um Estado dos Estados Unidos da India, representa uma *fatalidade* historica, embora de uma realizaçao longinqua.

Para o *Bharat*, a Goa autonoma (com a politica administrativa e fiscal interna propria) dentro da India fruindo o *Domini ou Status* e' uma consequencia fatal da Revoluçao politica na India Ingleza, que nao pode demorar muito.

O *Bharat* e' contra o sistema duro e autocratico da administraçao inglesa da India, como e' contra todas as autocracias donde quer que elas venham.

Por hoje vai isto resumidamente. Qualquer dia teremos o prazer de voltar ao assunto com mais vagar e espaço.

DR FONTES

Tomou posse do importante cargo de delegado desta comarca o sr. dr Joao Fontes.

Quem estas linhas escreve, julga-se habilitado a afirmar que o sr. dr. Fontes e' um coraçao bem formado, reunindo todos os requesitos necessarios para enaltecer as elevadas funcçoes em que a Republica o investiu.

Conhecemo-lo desde novo e se umas vezes tivemos a felicidade de admirar as manifestaçoes de sua lu'cida inteligencia, como estudante prestimoso que o foi, outras vezes gosamos a ventura de testemunhar rasgos emocinantes de sua fina nobresa como descendente duma familia honrada a que pertence.

Por todos estes motivos, o *Bharat* considera-se feliz em ver o digno magistrado colocado nesta comarca dando-lhe os cumprimentos de boas vindas com votos pelas crescentes prosperidades.

GANDHISMO

Mahatma' Gandhi e' considerado pelos sabios americanos como o primeiro homem do mundo, opiniao esta que e' reforçada ainda pelos eminentes pensadores da Europa.

Este conceito que Gandhi gosa, *la' fo'ra*, e' originado, proveniente da excelencia dos principios do *Mahatma'*, principios verdadeiramente santos e angelicos, porque nao admitem na sua pratica *pecado* algum.

Tais principios constituem objecto do culto do *Bharat*, ainda que isto desagrade ao *gandhifago* sr. Pereira Batalha e outros...caudilhos *provincianos*.

भा र त
त्र शु० ६ श्री गुरुवार १८४६

ार्थांचें राजकारण

[लेखांक १ ला.]

ांचे विद्वान संपादक श्री. केळकर
ापल्या एका निबंधांत ह्मटल्याप्रमाणें
वा मनु यांतील कांहीं तरी बदलतें
र्वीं मानवी सृष्टींत प्रत्यहीं होणारे
वडून येते ना. जगांतील घडामोडीं-
कद्वयीपैकीं ज्यास्त प्रभावशाली कोण
नूचा ओघ मनप्रवाहा बरहुकूम
ीं मनूच्या चलस्वभाव जाळ्यांत
फटून बसतें, वगैरे वादग्रस्त पण
प्रश्न बाजूस ठेविल्यांस सूत्रधार न-
जोडपें किंवा या जोडप्या कीं
ी स्वतंत्र रीतीनें नाचत असतें,
त्र खरें. विजापूरच्या अदिलखा-
ाव्यांत असलेल्या गोमांतकाचें, पो-
राजवटीखालीं चार शतकांच्या दीर्घ-
निद्रेनुळें, आज जे एवढें अंतर्बाह्य
ालेलें आहे तें पाहिलें ह्मणजे ति-
मनुष्यांचें मन सखेदाश्चर्यानें मूढ
वाय रहात नाहीं. १९२० सालीं
या कॉंग्रेसनें असहकारितेचें उघड
ग फुंकलें व त्या दिवसापासून या
चें एक प्रमुख अंग जें कोन्सिल
, त्यावर लोकांचा विशेष कटाक्ष
ाला; पण थोडक्याच काळांत काय
दिल्लीच्या कॉंग्रेसनें राष्ट्राला कौंन्सिल
संमति दिली. तीन वर्षांपूर्वीचें लो-
वादळ, या थोडक्याच काळानंतर
ाडूं लागलें व कौंन्सिल बहिष्का-
रस्कर्त्यांचें रूपांतर कौंन्सिल प्रवे-
ुरस्कर्त्यांत झालें; याची साक्ष ब्रिटि-
येंत झालेल्या कौंन्सिलच्या व इतर
कांवरून उत्तम पटण्यासारखी आहे.
सृष्टींत होणारे हे फेरफार, शब्द
आपला प्रभाव गाजवितात, हें
रलें पाहिजे. इतर वाङ्मयें सोडून
, मराठी वाङ्मयांतील कित्येक शब्द
सध्या जास्त अर्थबोधक व अति-
ाऊन बसलेले आहेत. 'स्वराज्य'
कारितां' हे शब्द सध्या किती अर्थ-
लेले आहेत हें सर्वांनाच ठाऊक
फेरवाले, नाफेरवाले वगैरे साध्या
शब्द देखील राजकीय वाङ्मयाचे
तिहासांत बरेंच उच्च स्थान पटका-
असें वाटतें. या शब्दांना इतकें म-
्याचें कारण काय हें उघडच आहे.
ा जीवनाशीं निगडित असलेल्या
उलाढालींचा व चळवळींचा बोध
ृटीत शब्दानींच आपणांस करून दि-

लेला आहे, हेंच त्या शब्द तीव्र अर्थव्यापकत्वाचें कारण होय. यावरून एवढेंच लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, असल्या शब्दांची व्याप्ति कमी होणें किंवा वाढणें हें व्यवहारांतील ज्या गोष्टींशीं ते अनुबद्ध असतात त्या गोष्टींच्या कमी अधिक महत्वावर अवलंबून असतें. ज्या प्रश्नासंबंधीं आतां आपण चर्चा करणार आहों त्या प्रश्नाच्या "राजकारण" या निदर्शक शब्दांत देखील असाच फेरफार घडून आलेला आहे. लो० टिळकांच्या राष्ट्रीय कामगिरी पूर्वी या शब्दाची व्याप्ति बरीच संकुचित होती. या शब्दाचे द्वारा विशिष्ट व मर्यादित अशा कल्पनेचाच उल्लेख करीत असत. याचा खरेपणा पहाण्याचें झाल्यास "राजकीय सुधारणा आधीं कीं सामाजिक सुधारणा आधीं" वगैरे झालेल्या वादविवादावरून कळून येण्यासारखें आहे; पण सध्या ही स्थिति बदललेली आहे व कित्येक सामाजिक सुधारणा राजकीय सुधारणांच्या अनुगामी असतात, याबद्दल बहुधा आतां लोकांचें एकमतच बनत चाललें आहे. थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, दिवसें दिवस राजकीय सुधारणांच्या अभावामुळें जनतेला अनेकविध अडचणी भासं लागल्या व स्वातंत्र्य भ्रष्ट देशाचें आत्यंतिक हित साधणें असल्यास राजकारणाचें कंकण हातीं बांधल्याशिवाय गत्यंतर नाहीं, अशी स्वदेशहितरत व बुद्धिवान मनुष्यांची समजूत जिकडे तिकडे झालेली दिसून आल्याशिवाय रहात नाहीं.

सामाजिक सुधारणांचे पूर्वी राजकीय सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत, असें वर ह्मटलें याचें कारण आम्हीं गोमांतकवासी काय किंवा आमचे शेजारचे ब्रिटिश प्रजाजन काय, सर्वजण परकीयांचे राजवटींत आहोंत हेंच होय. स्वतंत्र राष्ट्रांत असले हे प्रश्न उद्भवणेंच मुळीं शक्य नाहीं. व एकादेवेळीं ते उद्भवल्यास देखील त्यांना महत्वहि पण तितक्याच पुरतें असतें. स्वतंत्र राष्ट्राच्या सामाजिक हिताची कोणतीहि गोष्ट तेथील राज्यसंस्था लक्षांत घेतल्याशिवाय रहात नाहीं. व म्हणून कोणतीहि सामाजिक सुधारणा राजकीय सुधारणांवर अवलंबून असत नाहीं. उलट समाज–हिताच्या अनुरोधानेंच राज्य संस्थेंत इष्ट ते फेरबदल होतात. स्वतंत्र देशांत लोकहिताकरितांच राज्यसंस्थेचा उदय झालेला असतो. निदान या संस्थेचें संक्रमण राष्ट्रहितभिलाषी संस्थेंत होत जातें. पण परतंत्र देशांत ही गोष्ट बदलते. जनतेच्या युक्त आकांक्षांच्या अनुरोधानें राज्यसंस्थांचे स्वरूपांत बदल होत नसून लोक समाजाची शेंडी प्रत्येक बाबतींत सरकारच्या हातांत जाते. व कित्येक सामाजिक सुधारणांना अनुकूल परिस्थितीचे अभावी राजकीय सुधारणाच्या कुबड्या चा आश्रय करावा लागतो. अशा स्थितींत लंगड्या बनलेल्या समाजाला सुधारणेच्या मार्गावरील कुबड्यांचे अभावीं एक पाऊल देखील टाकणें शक्य नसतें. व ह्मणूनच पारंत्र्यांत रुतलेले देश "न चा गंत सुखं यजते" हें लक्षांत ठेऊन राजकीय सुधारणेच्या कुबड्यां प्रथम हस्तगत करण्याचे प्रयत्नास लागतात.

राजकारणाचें महत्व, लो० टिळक, म० गांधी वगैरे आधुनिक पुढाऱ्यानींच आम्हांस आजकाल पटविलेलें नसून अडीच शतकांपूर्वी श्री समर्थ रामदास महाराजांनींहि याची महती गायलेली आहे. "मुख्य हरिकथा निरूपण ॥ दुसरें तें राजकारण ॥" या ओवींत किंवा 'प्रपंची जाणे राजकारण ॥ परमार्थी साकल्य विवरण' या व इतर कांहीं ठिकाणीं त्यानीं राजकारणाची थोरवी वर्णिलेली आहे. यालाच महाराष्ट्रीय धर्म असें ह्मणतात. प्रपंच (ह्मणजे केवळ कुटुंबाचा संसार नव्हे तर देशाचा–राष्ट्राचा संसार) व परमार्थ याचा मेळ घालणाऱ्या या शिवकालीन महाराष्ट्रधर्माची पुनरावृत्ती सध्या हिंदुस्थानांत झालेली आपण पाहतों. शिवाजी महाराज आपली बुद्धि व शक्ति केवळ सामाजिक सुधारणेकडेच खर्च करते तर स्वराज्य संस्थापनेचें अवघड कार्य त्यांचे हातून झालें असतें कीं नाहीं या बद्दल शंकाच आहे. हिंदुपदपातशाहीची प्रस्थापना करण्यापूर्वी आपल्या जातभाईच्या निबळ सामाजिक सुधारणेला त्यानीं हात घातला असता तरी देखील त्यानां तसें करणें मुसलमानी कारकिर्दीचे जाचामुळें दुर्घटच नव्हे तर कांहीं अंशीं अशक्य होऊन बसलें असतें. पण तीच गोष्ट स्वराज्य स्थापनेनंतर करणें त्यानां शक्य होऊन आपल्या समाजाची व राज्याची घडी तत्कालीन कल्पनेप्रमाणें त्यानां घालतां आली हें इतिहासज्ञानां ठाऊक असल्याशिवाय रहाणार नाहीं. संसारावर लाथ मारून आत्मशोधनांत गुंतलेल्या श्री समर्थांनीं शिवबाना राजकारणाबद्दल उपदेश कां केला याचें रहस्य वर सांगितलेल्या गोष्टींतच आहे, हें विसरतां कामा नये.

कोणत्याहि शब्दाचा रूढ अर्थ देशकालपरिस्थित्यनुरूप बदलत असतो, हें वर सांगितलेंच आहे. राजकारण हा शब्द एकच खरा परंतु, आपल्या गोमांतकांत या शब्दाचे द्वारा होणारा प्रचलित अर्थबोध ब्रिटीश इंडियेंत घेतल्या जाणाऱ्या अर्थापेक्षां निराळाच नव्हे तर विरोधीहि आहे, हें लक्षांत घेतलें पाहिजे. राजकारणाचे ऐवजीं पोर्तुगीज भाषेंतील त्याच अर्थाचा पोलीटीक politica हा शब्द इकडे आपल्यामध्यें फारच हीन व संकुचित अर्थानें वापरला जातो. स्वतःचे क्षुद्र हितसंबंधावर दृष्टि ठेऊन राजकीय बाबतींत मन घालणें हाच politica या शब्दाचा रूढ अर्थ होय. कोणत्याहि कमस्सल चळवळ्या प्राण्याला politico हा शब्द क्षुद्र अर्थानेंच बहुतकरून वापरला जातो. या व्याप्तिदोषाचें कारण एवढेंच, कीं, जीव सृष्टींचें प्रतिबिंब शब्द सृष्टींत पडलेलें असतें. आपल्या इकडे राजकारणांत पडणारे पुरुष (बहुतकरून ख्रिश्चन हें सांगणें नकोच.) आपलपोट्या वृत्तीचेच असतात असा कोणी आजपर्यंतच्या इतिहासावरून सिद्धांत काढल्यास तो चुकीचा आहे असें ह्मणण्याचें धाडस अनुभवावरून तरी करतां यावयाचें नाहीं. Beocia देशांतील Helicon नावांच्या डोंगरांत असलेल्या एका झऱ्याचें पाणी पिण्याबरोबर कवि बनत, असें पोर्तुगीज कवि Luis de Camoes यानीं आपल्या Lusiadas नावांच्या जगन्मान्य काव्यांत ह्मटलेलें आहे. त्या प्रमाणें येथील राजकारणाचे आखाड्यात शिरल्याबरोबर मनुष्य स्वार्थी–पूर्ण स्वार्थी बनत असल्यास न कळे! परंतु, वस्तुस्थिति अशी आहे हें मात्र खरें. याचा खरेपणा पहावयाचा झाल्यास ख्रिश्चन पुढाऱ्यानीं चालविलेल्या कित्येक वर्तमानपत्रांच्या बदलत्या धोरणाकडे पहाणें जरूर व मनोरंजकहि होणार आहे.

Recebeu muitas felicitaçaes pela sua entrada no 8.° ano, felicitaçoes que o *Bharat* agradece muito penhorado.

O *Bharat* e' um jornal de maior circulaçao na India Portuguesa. Da'-se nas suas colunas cabida a todas as opinioes, contanto que venham decentemente expendidas. Tem procurado e procura ser imparcial na apreciaçao de pessoas e na analise de coisas. Nunca falou bem ou mal de ninguem por interesse privado, tendo seguido sempre a norma de antes sofrer do que fazer sofrer a quem quere.

Quem modestamente mas independentemente o dirige tem dado e da' toda a sua vida ao *Bharat*, na suposiçao de que, com o seu sacrificio, esta' prestando algum serviço ao seu Paiz que extremece

Apesar de tudo isso, bem poucas vezes somos compreendidos, bem raras vezes e' apreciado devidamente o nosso intuito, o pensamento que preside a' nossa critica. Criaturas de Deus houve que nos movessem guerra, la' porque nao lhes fizemos *vontades particulares*. Assinantes houve que se indispuseram comnosco porque nao publica'mos coisas de alao la' com elas...

Numa palavra atura'mos com santa paciencia impertinentes de toda a sorte e casta, simplesmente na certeza de que faziamos bem ..do Paiz.

Depois de tudo isso, depois de mil sacrificios a favor do ideal patriotico ¿que e' que lucra o *Bharat*?

Bancarrota economica e fisica do seu director, calunias contra este, e mais coisas que so' cerebros diabolicos podem egendrar...

Mas o oasis de felicitaçoes, acompanhadas de palavras que nos animam sobre maneira, oasis que surge no meio desse vasto deserto de dessabores, imprime fixidez a' nossa acçao, despertando-nos uma insensibilidade que e' mesmo cro'nica, a actos perversos de nossos adversarios ruins e de figados podres...

E', porisso, sem limites a nossa gratidao aos que nos desejam prosperidades e longa dura.

E' de dois dias a vida humana. Ninguem sabe a hora em que ter' de fechar o ciclo de sua existencia. ¿Porque nao havemos de fazer bom uso da nossa vida, tao cara? Porque nao havemos de votar ao estracismo odios, invejas e tantas mas coisas que da vida fazem uma miseria aviltante e um charco abominavel?

E de mais a mais, podemor garantir que ainda nao entrou na materia colectavel a bondade cujo livre exercicio esta' portanto, isento do pagamento de qualquer tributo direto ou indireto.

Renovando finalmente mais uma vez a expressao do nosso rendido agradecimento aos que nos dispensam o seu valioso e imprescendivel apoio, damos aqui por terminado o nosso desafogo.

Ecos & Critica

Digno de apoio

A população hindú de Assolnà vai, no proximo mez de Maio, promover um drama do afamado dramaturgo Gadkari, *Punia-Prabhau*, cuja receita liquida será revertida a favor da escola marata que ai funciona.

Dado o fim altruista que determinou o mesmo drama, esperamos que os hindus de Assolnà terão só apoio animador em toda a parte, especialmente porque são os proprios filhos da terra que desempenharão todos os papeis dos actores da referida récita. E', pois, digno de apoio o drama dos hindus de Assolnà.

Dr- Atmarama Borcar

No impedimento do efectivo, está no exercicio de funcções de presidente do *Pragatic Sanga* o nosso presado amigo sr. dr. Atmarama Borcar.

Quem conhece o patriotismo de S. Exia. não há de deixar de rejubilar-se com a grata noticia que acabamos de publicar, por assim dizer, nas vesperas do primeiro Congresso do *Sanga* que terá lugar no dia 5 do proximo mez de Maio numa aldea do Concelho de Pondá cujo nome será oportunamente e com a devida antecipação publicada.

O sr. Borcar não precisa do nosso elogio, como não precisam dele tantos outros patriotas que trabalham por intermedio do *Sanga* pelo engrandecimento do seu Paiz.

E'que conquistaram no meio em que agem, renome, á força de seus sacrificios, honrando sobremaneira a classe a qua pertencem e constituindo a unica esperança do *Bharat* em que incutem a fé dum porvir cheio de gloria.

Uniao Goana

Pelo sr. Presidente desta simpatica associação foi dirigi-

तावर पसरल्याशिवाय राहणार नाहींत.

या लेखाच्या उपसंहारार्थ हेंही सांगणें इष्ट आहे कीं, शिक्षणाची कार्यपरंपरा पूर्ण स्वातंत्र्यापर्यंत येऊन थडकली म्हणजे मग त्याला 'नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' या अध्यात्मिक ज्ञानाच्या शाखावर शाखा फुटून शिक्षणाचें ध्येय जें ज्ञान तें ब्रह्माशीं तादात्म्य पावतें. क्रमनियमानुरूप या भारतवर्षांत याच्या किती आवृत्या होऊन गेल्या व होतील हें परमात्माच जाणें पण 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचनः' या गीतोक्तीप्रमाणें निष्काम बुद्धीनें प्रयत्न करीत राहणें हें प्रत्येकाचें कर्तव्य असतें.

जे हा लेख वाचून त्यांतील हेतूचें मनन करतील त्यांचा मी आभारी आहे. ॐ तत्सत.

जाहीर सूचना.

पोर्तुगीज–मराठी कोश

आमचे परमपूज्य तीर्थरूप कै॰ मुकुंद व्यंकटेश शे. सांवर्डेकर यांनीं अत्यंत परिश्रमपूर्वक तयार केलेल्या या अत्युपयुक्त ग्रंथ प्रकाशनाचें काम कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें आजवर अधवट स्थितींत बंद पडलें होतें, परंतु अनेक विद्याभिलाषि गृहस्थांच्या विनंतीमुळें अपुरें राहिलेलें तें कार्य पूर्ण करावें असी आमची इच्छा होऊन उपरिनिर्दिष्ट कोशाच्या अवशिष्ट भागाचें प्रकाशन भारतप्रेसच्या मालकांकडे संपविलें आहे. ग्राहकाच्या सोईसाठीं पूर्वीप्रमाणेंच तो ग्रंथ भागशः प्रसिद्ध करण्यांत येईल. व. वाढलेल्या महागाईमुळें भागाच्या दरांत थोडीशी वाढ करणें आम्हांस भाग पडत आहे.

पूर्वीच्या ग्राहकांची नांवनिशी आम्हांकडे राहिली नसल्यानें, आम्हीं नवी यादी तयार करीत आहों. तरी सर्व नव्या जुन्या ग्राहकांनीं पत्र (कार्ड) लिहून आपापला पत्ता आम्हांस कळवावा व मदत कायम करून आभारांत ठेवावें ज्या कोणास मागील भाग पाहिजे असतील, त्यांनीं तसें कळविल्यास त्यांस व्ही.पी. नें ते भाग पाठवून देऊं. तरी एप्रील अखेर पर्यंत आपली इच्छा कळवावी. स.वर्डे

३१ मार्च १९२३

श्रीधर मुकुंद शेणवी सांवर्डेकर,

सारस्वत ब्रा. समाज-मडगांव.

" महाराष्ट्रांतील लोकांची गोवें मागसलेलें आहे अशी समजूत आहे व स्वतः माझीही तशीच होती. पण कालपासून मला जें येथें दिसत आहे त्यावरून ती चुकीची होती हें मी कबूल करितों मला इकडची परिस्थिति माहीत नसल्यानें माझ्या भाषणांत येणारीं उदाहरणें तिकडचींच येतील व मधून मधून एखादा इंग्रजी शब्द अगर वाक्य येण्याचाही संभव आहे. तरी त्याबद्दल श्रोत्यांनीं मला क्षमा करावी.

या शहरांत तीन मराठी आणि कांहीं इंग्लीश व पोर्तुगीज शाळा आहेत. सा. ब्रा. समाज ही संस्था आपलें ज्ञानदानाचें कार्य १०।१२ वर्षें करीत आहे. सरस्वतीची उपासना म्हणजे, ज्ञानाचा प्रसार सारस्वतांनीं केलाच पाहिजे. दरसाल बाहेरच्या मंडळींना बोलावून आणण्याचा त्रास सोसून जें हें ज्ञानसत्र उघडण्यांत येते, त्याबद्दल या शहराचें अभिनंदन केलें पाहिजे आज ३०।४० वर्षें माझा पुण्यामुंबईकडे परिचय आहे. पण तिकडील भाषणांत किंवा लेखांत गोव्याचा उल्लेख इकडील परिस्थितीच्या अज्ञानामुळें अगदीं क्वचितच येतो. हा दोष जी मंडळी गोव्यांतून बाहेर गेल्यावर आपल्या मायभूमीला विसरली त्यांचा दोष त्यांनीं आपल्या भूमीची सुधारणा करण्याचा विशेष प्रयत्न केला नाहीं व इतरांसही या भागाची पाहिजे तितकी माहिती करून दिली नाहीं. तरी पण गोमांतक आम्हां बाहेर गेलेल्या लोकाना विसरलें नाहीं. तें आपलेपणानें आम्हांस बोलावून आणुन मातृभूमीचें दर्शन घडवीत आहे हे तिचे आम्हांवर उपकार असून त्यामुळें गोमांतक व महाराष्ट्र यांचा संबंध विशेष निगडीत होत आहे. असो.

आतां सारस्वतांचें मुख्य कर्तव्य, जें आपल्यापेक्षां ज्ञानादि बाबतींत खालीं आहेत त्याना वर आणण्याचा प्रयत्न करणें हें होय. ज्ञानसंपादन ही सरस्वतीची उपासना असून ती सर्वांनीं केलीच पाहिजे कोणी म्हणतील कीं, एक आठवडाभर व्याख्यनमाला गुंफल्यानें ज्ञानप्रसाराचें कार्य कितसें होणार ? परंतु, 'घड्या ज्या वस्त्रांच्या रजक परिमार्जित जितुक्या॥' जलस्पर्शी होती थरिल घडीनें शुद्ध तितुक्या या वामन पंडितांच्या उक्तीप्रमाणें अल्पकालिक पुण्यकृत्यानें सर्व कालाचें श्रेय मिळतेंच.

कोंकणाचा गोमांतक हा एक भाग असून रत्नागिरि, कारवार वगैरे ठिकाणच्या कोंकणस्थादि ब्राम्हण किंवा अन्य लोकांचा ओघ अव्याहतपणें महाराष्ट्राकडे चालू राहिल्यानें त्यांचा व महाराष्ट्राचा जसा एकजीव झाला तसा गोव्याचा झाला नाहीं. याचें कारण राजकीय भिन्नतेमुळेंच येथील लोकांचें महाराष्ट्राशीं दळणवळण राहिलें नाहीं हें होय. इतिहासावरून पाहिलें असतां या प्रांतावर कदंबादि रोज होऊन गेले, अर्थात महाराष्ट्र व गोवें यांचा एकजीव होता असें दिसून येतें. पण मागाहून हा भाग तुटक झाला. पण आतां सा. ब्रा. स. त्यास अन्य रीतीनें पुनः एकजीवी करूं पहात आहे या बद्दल त्याचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे.

आमच्या देशाचा पूर्वकालीन इतिहास अवलोकन केला तर या देशावर सिथियन ग्रीक, मुसलमान व शेवटीं इंग्लीशादि युरोपियन लोकांनीं स्वाऱ्या केल्या व राज्येंही घेतलीं. परंतु इतक्यांचे सर्व आघात सोसूनही आमचें राष्ट्र जिवंत आहे यावरून आमची संस्कृति तशाच प्रकारची उच्चतर असली पाहिजे हें उघड होतें. नाहीं तर अमेरिकेंतील रेड इंडियनासारखे आम्हीं नामशेष होऊन गेलों असतों. आमच्या पूर्वकालीन वाङ्मयादिकांविषयीं मॅक्स मुल्लरांसारखे इंग्लीश ग्रंथकारही धन्य द्वार काढतात. मि. थिबा यानीं लावलेल्या शोधांवरून युक्लिडचे सिद्धांत हे 'सूर्यसूत्र' या नांवानें आमच्याकडे रूढ होते व त्यांचा यज्ञयागादिकांची स्थंडिलें काढण्याकडे उपयोग होत असे असें दिसून येतें. तसेंच बिजगणीत व तत्वज्ञान यांची जन्मभूमि हिंदुस्थान असल्याचें तर सिद्धच आहे. जिला एकेकाळीं सुवर्णभूमि असें सार्थ नामाभिदान होतें. त्या आपल्या मातृभूमीची आज काय दशा आहे ? इतिहासावरून उत्पन्न झालेला आपल्या पूर्वजांविषयींचा अभिमान योग्य कृतीशिवाय व्यर्थ होय ! सांगे वडिलांची कीर्ती तो एक मूर्ख असें समर्थांनीं म्हटलें आहे तें याच अर्थानें होय. कै न्या. रानडे म्हणत असत कीं, आम्हीं असे जे पूर्वीं थोर होतों ते हल्लीं इंग्लीशांच्या पांचशें वर्षें मागें पडलेले आहोंत. आणि आम्हीं असेच रेंगाळत राहिलो तर आमची दशा रेड इंडियन किंवा निग्रो यांच्यासारखी होणार नाहीं कशावरून ? हिंदुस्थानच्या पूर्व वैभवात सारस्वतांनीं केलेली कामगिरी पाहून ध

(या नंतर चवथ्या पृष्ठावरील पहिल्या कालमच्या नऊ ओळी वाचाव्या)

लेखन व्यवसायावरून व ओरियंटल परिषदेंत त्यानीं बजावलेल्या कामगिरीवरून मालाकार चिपळूणकरांनीं "त्यानीं पंडित हें नांव सार्थ केलें" असें म्हटलें आहे. कै० न्या. तेलंग यांची अल्पवयांतील कामगिरी कोणास भूषणास्पद वाटणार नाहीं? त्यांची योग्यता केवढी होती हें मि. चार्लस, गव्हर्नर लॉर्ड रे, मि. मलबारी, व इतर अनेक थोर माणसांनीं त्यांच्या स्मारकार्थ भरलेल्या सभेच्या वेळीं काढलेल्या उद्गारांवरून कोणासही सहज दिसून येईल. असो. आपणा सारस्वतांस या पूज्य पूर्वजांनीं आंखून दिलेल्या मार्गानेंच गेलें पाहिजे. हें सर्वांनीं लक्षांत बाळगावें.

इतर जातींतही श्रीशिवाजी महाराजांसारखे अत्यंत थोर व जगद्वंदनीय पुरुष होऊन गेले. जिजाबाई, दादोजी कोंडदेव व रामदास स्वामी यांनीं त्याना शिक्षण दिल्यामुळें महाराजांनीं आपलें मुळचें तेज जगास दाखविलें व महाराष्ट्राची योग्यता जगांत प्रस्थापित केली. त्यांची अष्टप्रधान योजना कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्राच्या तोडीची होती हें इतिहास वाचकांस ज्ञात आहेच. असो.

एके काळीं महत्वाची कामगिरी बजावलेल्या सारस्वतांची आजची स्थिति काय आहे याचा थोडा विचार करूं.

पुण्याच्या संस्थांकडे पाहिलें असतां आपणास त्या संस्था चालविणारांचें अभिनंदन करावेंसें वाटतें. कै. माधवराव रानडे यांनीं पन्नास वर्षांपूर्वीं सुरू केलेल्या संस्था उत्तरोत्तर अधिकाधिक नेटानें चालल्या आहेत. या संस्थांपैकीं वसंतव्याख्यानमालेवर तर त्यांचें इतकें प्रेम होतें कीं, तिच्याकरितां कांहीं वार्षिक देणगी त्यानीं आपल्या मृत्युपत्रांत लिहून ठेवली असून ती श्री रमाबाईसाहेबांकडून दरसाल देण्यांत येत असते. डेक्कन एज्युकेशन सोसायटी आज सतत ४५ वर्षें यशस्वी रीतीनें कार्य करीत आहे. तिच्यांत जी एक गंमत आहे ती ही कीं, तिच्या टिळक, आगरकर, चिपळूणकर इत्यादि संस्थापकांपासून आज तागायत तिची शिक्षणपरंपरा अव्याहत चालू आहे. आपल्या संस्थेस श्रेष्ठत्व प्राप्त होण्यासाठीं तिचे चालक तिच्यातर्फेत अनेक तरुणाना जगांतील निरनिराळ्या विश्वविद्यालयांत पाठवून विषय वैशिष्ट्य संपादन करवितात. मुंबई इलाख्यांतील शिक्षणखात्याचे प्रस्तुतचे दिवाण डॉ. परांजपे हे त्याच संस्थेच्या फर्ग्युसन कॉलेजचे विद्यार्थी होत ते जेव्हां सिनियर रँगलर झाले तेव्हां लार्ड कर्झनसाहेबांनींही इंग्लंडांत, त्याचा गौरव केला.. इकडेही, अर्थातच, त्यांचें अभिनंदन झालें. डॉ. परांजपे रँग्लर झाल्यावेळीं इंग्लंडांतील एका वर्तमानपत्राच्या प्रतिनिधीनें त्यांची मुलाखत घेतली त्यावेळीं त्यानीं मोठ्या अभिमानानें सांगितलें कीं, ज्या फर्ग्युसन कॉलेजांत आपण शिकलों त्यांत जाऊन काम केल्याशिवाय आपल्या मनाला समाधान होणार नाहीं मग तेथें पगार कितीही कमी मिळो. डॉ. साहेब एखाद्या सरकारी संस्थेंत शिरले असते तर ते दरमहा दोन–तीन हजारांपेक्षाही ज्यास्त पगार सहज मिळवूं शकले असते. पण त्यांवर लाथ मारून फर्ग्युसन कॉलेजांत मिळणाऱ्या अवघ्या शें सवाशें रुपयांच्या पगारावरच ते संतुष्ट झाले ! काय हा स्वार्थत्याग !

त्याच कॉलेजचे एक प्रोफेसर ना. गोखले यानीं स्थापन केलेल्या 'भारत सेवक समाज' ही संस्था हिंदुस्थानचें आज किती महत्वाचें काम करीत आहे हें कोणास नव्यानें सांगण्याची गरज नाहीं. गोखल्यांची थोरवी वर्णन करावी तेवढी थोडीच मोर्लेमिंटोच्या सुधारणा हें गोखल्यांच्याच प्रयत्नानें फळ ! मि. साहेबानीं लॉर्ड कर्झनना एकदां असें सांगितलें कीं, ना. गोखले म्हणजेच इंडिया ऑफीस ! त्यांच्या जागीं प्रस्तुत कार्य करीत असलेले नेक ना. श्रीनिवास शास्त्री यांचा अधिकारही तसाच फार मोठा आहे. असो. कारवारपासून रत्नागिरी पर्यंतचा टापू कोंकणांत मोडत असून गोमांतकाखेरीज इतर ठिकाणचे लोक तेवढे तिकडे जाऊन नावलौकिकास चढलेले दिसतात. गोखले परांजपे इत्यादिकांशिवाय, कै॰ प्रि. आगरकर कै. वामन शिवराम आपटे, कै ल ग. वैद्य यांच्यासारखी मोठेपणास चढलेली मंडळी प्रसंगीं माधुकरी मागूनही विद्या शिकली कार्यकर्ती झाली व नावलौकिकास चढली त्यांची व त्याचप्रमाणें महिलाविद्यापिठाचे संस्थापक प्रो. कर्वे इत्यादि चिपळूणवनांतल्य थोर गृहस्थाची कामगिरी सर्वांच्या परिचयाची आहेच. डॉ. परांजप्याची तर इतकी गरिबी होती कीं, ते रँग्लर झाल्याचें वृत्त

Ano VIII *N.º* 3

Quinta-feira 19 de Abril de 1923

ASSINATURA.

Por c... rupias

A...

Por cada linha ai... ...tida uma tanga

DIREC...TOR

G. P. ... Dessay

Qu...a

भारत.

BHARAT

वर्ष ८ वें, अंक ३

गुरुवार ता. १९ एप्रल सन १९२३

वर्गणीचे दर.

सालीना रु. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचें दर.

समक्ष अ...र पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.

गो. पु. हेगडे देसाई.

कें‍पे–गोवा.

Pela agricultura

A Direcção dos Serviços Agricolas deste Estado tem, como sabem, adoptado o sistema de difundir pelos agricultores úteis e variados conhecimentos sobre melhoramentos a serem introduzidos na nossa agricultura.

E' um passo muito bem entendido; e teria correspondido ao fim pratico que o ditou, se o nosso agricultor estivesse nas condições de tirar dêle o maior partido possivel.

Mas não sucede isto, infelizmente, porque o geral dos agricultores é analfabeto. Não é para admirar, porisso, que lhe passe desapercebido tudo o que em letra redonda lhe seja destinado.

Impende ao governo para acabar duma vez para sempre com êste principal inconveniente o dever de instruir o nosso agricultor. Instruido este, as informações á imprensa surtirão o seu efeito. Sem isto nada feito.

Mas, enquanto isto se não consiga, será criminoso conservar-se a referida Direcção de braços cruzados: compete lhe o papel de o interessar na ciencia agricola por meio de experiencias praticas, realisadas em lugares acessiveis a todos. Se o Povo agricultor não estiver disposto a frequentar as estações experimentais da Direcção, que esta escolha para o mesmo fim lugares que possam ser percorridos por êle com facilidade e anceidade.

Só desta maneira poderá entrar no novo caminho do progresso, liberta das garras da rotina, a nossa agricultura. Alias não!

Entusiasmo que se traduz em palavreado óco não acredita a ninguem. Fará apenas, quando mais que for, aparvalhar as galerias.

Solicitamos, porisso, dos poderes competentes que haja por parte deles uma acção productiva, um esforço util e uma atitude *frutifera* no assunto agricola.

O Sr. Fragoso e o Seu Maharaja

(No. 8)

A obra do sr. Pissurlencar

Apo's a publicaçao do nosso ultimo artigo, recebemos o mui esperado trabalho do sr. Pissurlencar: Sivaji Com Sangue Portuguez?

E' escusado dizer que muito nos agradou a sua leitura. Nao era de esperar outra coisa, dada a competencia do ilustre autor. As numerosas autoridades que ele cita, constituem uma indisputavel prova de assiduidade do sr. Pissurlencar nesta sua obra. Nao e' para admirar, pois, que todos os argumentos do sr. Fragoso estejam muito bem refutados.

Nao nos parece, contudo, que com o aparecimento da referida obra devemos por de parte a nossa tarefa. Pois tanto o nosso objetivo em abordar este assunto como o nosso ponto de vista de o encarar, sao bem diferentes dos do sr. Pissurlencar. Nao julgamos, como ele, que haja alguma necessidade de provar da nossa parte, a pureza do sangue de Sivaji ou a castidade de Jizabai, das quais, nem uma nem outra, historiador algum poz em duvida. Pelo contrario, estamos convencidos de que ate' o proprio sr. Fragoso nao julga, no fundo do seu coraçao, que Sivaji seja filho dum portuguez, ou Jizabai seja uma adultera. E' que S. Exia. nao e' certamente, tao ignorante da historia que seja incapaz de distinguir factos historicos de fabulas fantasticas. Antes o consideramos como conhecedor da vida de Sivaji e dos seus pais. E, apesar disso, se encontramos tantas cousas exquesitas e tantas doutrinas espantosas no seu opusculo que se acha recheado de deturpaçoes, como tantas vezes se viu, a causa de tudo isso deve ser procurada nao na ignorancia de S. Exia. mas sim na intençao de querer fazer uma *descoberta*.

O sr. Pissurlencar, porem, parece nao ter atinado isso e porisso imaginou que o sr. Fragoso laborasse no engano derivado da sua ignorancia da historia dos maratas.

Mas essa suposiçao e' erronea como vamos provar neste mesmo logar servindo-nos um exemplo tirado da propria obra do sr. Pissurlencar.

A's paginas 16 te 19 encontra-se o sr. Pissurlencar explicando ao sr. Fragoso a significaçao do termo 'Firanga' do vocabulo antigo marata e a denominaçao verdadadeira que a espada de Sivaji teve! Nesta tarefa, o assiduo escritor gasta mais de tres paginas do seu valioso trabalho. A nosso ver porem, tudo isso era desnecessario porquanto do proprio opusculo do sr. Fragoso se ve que este nao ignorava a verdadeira denominaçao da espada de Sivaji, nem desconhecia a verdadeira significaçao do vocabulo 'Firangui'.

Vejam como:

A' pagina 9 deste seu opusculo da o sr. Fragoso uma nota sobre a palavra "vag nak" garras de ferro chamadas vag-nak, garras de tigre, arma favorita de Sivaji que com a sua espada 'Firangui' Portugueza, esta' hoje em poder da casa do Sardar Rajaram Bonsulo, de Satara."

Ora, quem le esta nota sobre o destino da espada de Sivaji ve logo que os esclarecimentos dados ai foram tirados da pagina XXII da obra de M. Acworth, tantas vezes citada pelo sr Fragoso, com a unica diferença de que enquanto Mr. Acworth diz que "a espada *Bhawani* de Sivaji esta em poder da casa de Rajaram Bonsule", o nosso escrupuloso investigador de Cuncolim afirma que a "espada Firangui esta em poder da casa de Rajarama Bonsulo'."

Ja' se ve que esta alteraçao nao foi devida a' inadvertencia. E' que o sr Fragoso quere ocultar a denominaçao verdadeira da espada de Sivaji e dar lhe uma outra que sugira a sua procedencia portuguesa, pretendendo insinuar, como ele o faz, mais adiante, a pagina 22 do seu opusculo, que aquela espada deve ter sido oferecida a Sivaji por D. Manuel de Menezes.

Isto e' quanto a' denominaçao da espada de Sivaji. Quanto a' significaçao do termo "Firangui" do vocabulo antigo marata tambem notamos o mesmo. Pois, em quanto o sr. Pissurlencar supoe que o sr Fragoso ignora a significaçao daquele termo, o proprio opusculo do sr. Fragoso mostra quao erronea e' aquela suposiçao, porisso, que este nao so' conhece a verdadeira significaçao daquele termo; mas ate' o traduz muito correctamente a' pagina 3 da sua obra onde ele da' a sua versao de algumas linhas do poemeto marata "Powade."

"Pacha louva e lhe da' uma *espada*, um cavalo, um penacho......"

No original de que estas linhas sao a versao, encontra-se o termo "Firanga" empregado como sinonimo de *espada*; e o sr. Fragoso que da' a sua traduçao, tem-no tambem traduzido por espada. Portanto, claro que o sr. Fragoso sabe muito bem que "Firanga" significa apenas *uma espada*, e' um termo generico e nao e' o nome da espada de Sivaji; porque nestas linhas ora citadas da traduçao dada pelo proprio sr. Fragoso, fala-se numa espada que fora oferecida pelo sultao de Bijapur a Abdul Khan, inimigo de Sivaji; e com tudo, e' chamada uma 'Firanga' ("...Firanga Ghoda'r Sadare dila atchayjada navazila").

Em vista destes factos, e' forçoso concluir que o sr. Fragoso fez afirmaçoes inexatas e insinuaçoes falsas, apesar de conhecer a verdadeira denominaçao da espada de Sivaji ou a verdadeira significaçao do termo "Firangui."

Mas, nao acabou aqui; vai mais alem e acrescenta S. Exia. que "...Mr. Acworth diz que Sivaji usava uma espada denominada "Firangui." Vemos porem, na obra de Mr. Acworth que ali na se afirma nada disso, mas so' se refere ao termo generico "Firangui" ('The sword called Firangui is spoken of as twisted round the waist,' etc.) e nao se fala da *denominacao* da espada que Sivaji usava. Pelo contrario, a pagina XXII desta obra existe mençao expressa do nome de espada de Sivaji como sendo "Bhavani." O sr. Fragoso nao e', certamente, tao ignorante do inglez que nao perceba nada disso.

Depois de provar que o nome da espada de Sivaji nao era Firangui, nao ha mais necessidade de dizer que a theoria do sr. Fragoso de que ela deve ter tido procedencia Firangui (Portuguesa) cae por terra.

Mas, so', por curiosidade, vamos a ver quando o tal D. Manuel de Menezes chegou a oferecer a tal espada a Sivaji, como insinua o sr. Fragoso.

A's paginas 43 e 44 do opusculo do sr. Fragoso encontram-se os pormenores sobre a vida do dito D. Manuel de Menezes e ai temos o seguinte:

"No ano de 1627, D. Manuel de Menezes foi mandado para conduzir as

अपूर्व समारंभ.

[खास बातमीदाराकडून]

चैत्र शु० २ या सोमवारीं काकोडें येथील रघुनाथ शे. काकोडकर यांचे येथें त्यांच्या मुलाचा मुंजीसमारंभ झाला. आनंदाची गोष्ट ही कीं, समारंभांत वेदशास्त्र पूर्ण बहिष्कार घातला होता. तथापि गाण्याची न्यूनता भासूं नये म्हणून श्री संस्थान मंगेशीचे ह. भ. प. नारायण बाळूबुवा यांस मुद्दाम पाचारण करून आणलें होतें. मुंजीचा मुहूर्त साधून वेतसुदांवर यजमानांनीं गलेल्या मंडळीस समारंभास अनुरूप अशा विषयांची चर्चा झाल्यास ती बरीच फायदेशीर होणारी आहे तरी तसा प्रयत्न करून आभारांत ठेवावें अशी विनंति केली. नंतर प्रो. बा. बा. सांवर्डेकर यांनीं मुंजीसारख्या परम पवित्र संस्कारानिमित्त होणाऱ्या या समारंभास वेदशास्त्र्याच्या नाचण्याचा विटाळ होऊं दिला नाहीं यावद्दल यजमानांचें अभिनंदन करून, समारंभाला महानदा सभेचें रूप देऊन तीचें अध्यक्षस्थान सुज्ञाय वि. देसाई यांनीं स्वीकारावें व जनार्दन वि. कामत यांनीं व्रतबंध संस्कार, ब्रह्मचर्य, विद्याभ्यास, सदाचार वगैरे विषयांवर चार शब्द सांगावे अशी सूचना केली. या सूचनेस प्रो शिवराम शेणवी यांनीं दुजोरा दिल्यावर, टाळ्यांच्या गजरांत देसाई यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारिलें आणि म्हणाले:—आज समाजाची परिस्थिति बरीच कष्टमय झाली आहे. पूर्वीचे चैनीनें वागण्याचे दिवस आज नाहींत, लग्नमुंजीसारख्या समारंभांत अनावश्यक रूढींस फांटा दिला पाहिजे आणि तसा कोणी प्रयत्न करीत असेल तर त्याचें अनुकरण करण्यांतच आपलें व समाजाचें हित आहे. लोकनिंदेची भीतीनें नैतिक बांधीपुरती गाल वी. दुष्ट व धार्मिक रूढी मोडल्या तर लोकनिंदा सोसावी लागली तरी हरकत नाहीं. या दृष्टीनें प्रस्तुत समारंभाचें महत्त्व फार आहे. नवीन रंग न देतां परंतु पवित्रता राखून समारंभ करण्याचें नीतिधैर्य दाखविल्याबद्दल जरा करण्याचें काकोडकर यांचे आभार मानणें रास्त आहे व ते सर्वांचें वतीनें मानणें मी माझें कर्तव्य समजतों. आमचे मि. सांवर्डेकर यांच्या सुचविल्याप्रमाणें मि. जनार्दन कामत यांनीं आपलें भाषण करण्याविषयीं विनंति केली.' नंतर रा. कामत हे बोलावयास उठून म्हणाले:—"आजचा समारंभ म्हणजे या प्रमाणेंच खरा शुद्ध पवित्र आहे. कारण त्यांत पापी नजरेनें पाहण्यासारखें कांहीं नाहीं. पवित्र समारंभांत पवित्र विषयांचीच चर्चा होणें इष्ट आहे. आजच्या पवित्र प्रसंगीं भर घालण्याइतका मी अधिकारी नाहीं. तरी पण केवळ विषयप्रवेश या दृष्टीनें बोलणार ते शब्द गोड करून घेऊन उपयोगांत आणावे. आजकाल आर्यजातीचे सर्व जगावर ज्ञात आहे ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या त्रैवर्णिक आर्यांना उपन-

यन संस्कार म्हणजे मुंजविधी हा सांगितला आहे. हे त्रैवर्णिक जन्मतः शुद्र असले तरी वरील संस्कारानें त्यांस द्विजत्व येतें असतें. वयाच्या आठव्या वर्षी बालपणाचें अज्ञान संपण्याच्या बेतांत आलें आहे, संसारांतील बऱ्या वाईट गोष्टींची शुद्धीच ओळख पटत चालली आहे, अशा सुसंधीस आमच्या पूर्वजांनीं या संस्काराची योजना करून, आमची दृष्टी विद्याभ्यासाकडे वळविण्याची आणि तेणेंकरून ब्रह्मचर्याश्रमानंतरच्या गृहस्थाश्रमांतील जबाबदारी-भार पाडण्यास आवश्यक असलेल्या हरेक ज्ञानाची प्राप्ती करून घेण्याची तरतूद करून ठेविली आहे. बालपणची नाचण्याबागडण्याची दृष्टी काढून आपण कोण, आपला व जगाचा संबंध काय आहे, जग निर्माण कसें झालें, त्याचा कर्ता कोण, धर्म म्हणजे काय? वगैरे सारख्या विषयांवर म्हणजे आहे त्यापेक्षां पुढें नेण्याची कामगिरी या संस्कारापासून सुरू होते, म्हणूनच त्याला उपनयन संस्कार असें सार्थ नांव दिलें असावें. आज काल हे संस्कार नामांपुरते राहिले आहेत. यांतील धर्मविधींपेक्षां सोहळ्यांकडेच लोकांचें लक्ष गुंतून राहिलें आहे. व यामुळें खऱ्या हेतूंचा विपर्यास होऊन, हळुहळु नाचगाणीं, दारूकाम; वरमाथा, रुसणें फुगणें यांचेंच बंड माजत चाललें आहे. हजारों रुपये खर्चून मुलाला मुंज बांधावी आणि सोडमुंज झाली की तो पूर्वीप्रमाणेंच कोरा तो कोराच रहावा, गळ्याखांद्यावर अवजड होणाऱ्या जानव्याशिवाय कोणतीच नवीनवलाई त्यांच्यांत नसावी आणि लग्नासाठीं उमेदवारी करण्यास मात्र तो लायक ठरावा इतकाच जर या संस्काराचा फायदा असेल तर 'संस्कारात् द्वीज उच्चते, या वचनाला कांहींच किंमत नाहीं असें होईल मुलाला मुंज बांधली कीं, त्याबरोबर त्याला योग्य शिक्षण देणें हें आईबापांचें कर्तव्य आहे. पूर्वी मुंज झाली कीं, मुलाला गुरुगृहीं पाठवीत. हीं गुरुगृहें रानावनांत राहणाऱ्या ऋषींनीं चालविलीं जात. तेथें राहणाऱ्या मुलांच्या मनांवर सदासर्वकाळ उत्तमोत्तम संस्कार घडत. तेथें दुर्गुणाचें कोणतेंच वारें शिवत नसे. बारा वर्षें अध्ययन व ब्रह्मचर्य रक्षणानें शरीरसंवर्धन, ज्ञानार्जन झाल्यावर गुरुजीच्या खास परवानगीनेंच गृहस्थाश्रमांत यावें लागत असे. आजची स्थिति सर्वस्वी विपरीत झाली आहे. विद्याभ्यासासाठीं शहरांतून राहावें लागतें आहे तेथील राहणी फार खर्चाची, आरोग्यास ब्रह्मचर्य रक्षणास अपायकारक असी आहे व त्यामुळें आमची पिढी निःसत्व होत आहे याचा विचार आम्हीं सर्वांनीं एक दिलानें केला पाहिजे. विद्याध्ययन आणि ब्रह्मचर्यरक्षण झालें नसेल तर गृहस्थाश्रमांतील कर्तव्यें पार पाडण्यास आमचीं मुलें योग्य होणार नाहींत. या करितां मुंजीत होणारा खर्च कमी करून तो पैसा मुलांच्या शिक्षणा-

ण्यांत म्हणजे विद्यालयें आणि व्यायामशाळा काढण्यांत खर्च केला तर असल्या संस्काराची उपयुक्तता दिसेल. सकाळीं उठणें, स्नान करणें, नमस्कार घालणें, संध्या देवपूजा करणें, नियमित व साधा आहार घेणें पोषाखांत साधेपणा पण सभ्यता राखणें, अवाच्य शब्द न उच्चारणें वगैरेचें ज्ञान घरच्या घरीं मुलांस करून दिल्यास मुलें काटक, आरोग्यवान व मितव्ययी होतील. असा प्रयत्न झाला तर समाजाचें कल्याण होणें फार दूर नाहीं प्रत्येकानें या विषयीं शक्य तो प्रयत्न करून पाहावा' नंतर वे. अनंतभट साइकारी यांनीं मुंजयाम 'अथा तो धर्मजिज्ञासा' वगैरे वाक्यांनीं बराच वेळ उपदेश केला. अध्यक्षांनीं समारोप व प्रो. सांवर्डेकर यांनीं आभार मानल्यावर ह. भ. प. बाळूबुवा यांचें मनोहर गायन झालें. नंतर हारतुरे गंधगुलाब वांटून झाल्यावर समारंभ समाप्त झाला. रात्रौ श्री. महादेवाचे देवालयांत समारंभानिमित्त बाळूबुवा यांचें सुश्राव्य कीर्तन झालें.

शेतकी खातें.

माहितीपत्रक नं. २ (सारांश).

ज्या काळीं नारळांचें पीक कमी असल्यामुळें किंवा धारण उतरल्यामुळें (हीं कारणें दुसऱ्या एका पत्रकाचा विषय होईल) त्यांच्या उत्पन्नांत तूट येण्याचा संभव असतो, तेव्हां, या खात्यानें कांहीं सरकारी बागांतून जोपासनेच्या नवीन प्रकारांचे अनुभव घेऊन पाहिले. ते प्रसिद्ध केल्यास फार फायदेशीर होतील.

सन १९१९ सालीं, सरकारी सहागार मंडळानें आपल्या २४ सेप्टेंबरच्या बैठकींत ठरविलें कीं, सरकारनें आपल्या असोळणें, वेळ्ळी आणि आंबेली येथील जमिनी विकण्यापूर्वी नवीन पद्धतीनें शेतकीचे प्रयोग करून पाहण्यासाठीं त्यांतील निरनिराळ्या जातींच्या बागाईत जमिनी राखून ठेवाव्या. त्यानंतर १९२० सालच्या आरंभीं तेथील ठिकाणच्या कारभार करणारे (आदमिनिस्त्रांव) जमिनी निवडण्यासाठीं या खात्याकडून कळविण्यांत आलें. त्याप्रमाणें 'आंतरूज 'थोरलें तिवेत' यांचे दोन भाग डोंगाळ ठिकाण 'नागनळ नमस' हीं ठिकाणें निवडण्यांत आलीं. आणि पुढें 'पारोड' हें डोंगराळ व कांहीं भाग पडीत असें ठिकाणहि निवडण्यांत आलें. या प्रमाणें नवीन पद्धतीनें रोप लावण्यासाठींहि जमीन मिळविण्यांत आली.

हीं वरील सर्व ठिकाणें योग्य मशागत नसल्यामुळें फार निकृष्ट स्थितीस पोंचली होतीं. म्हणून चालू वहिवाटीच्या ढांगडुजीनें तीं पूर्वी स्थितीवर आणणें भाग होतें त्यास अनुसरून त्यांतील निरुपयोगी झाडें

रवठा होण्यासाठीं चर खणणें, ओलावा राखण्यासाठीं जमीन सपाट करणें, कोळलेल्या घडा [कांठ] बांधून काढणें वगैरे कामें करण्यांत आलीं. अशा तऱ्हेनें पूर्वस्थिती आणण्याची खटपट करितां समाधानकारक असा फायदा मिळाल्याशिवाय राहिला नाहीं. या सर्व कामाबरोबरच सुधारलेले नांगरहि उपयोगांत आणण्यांत आले होते. सदरहू ठिकाणांत आज बरीच बदल झाली आहे. खालील कोष्टकांत दिल्याप्रमाणें उत्पन्नांतच वाढ झाली आहे असेंच नाहीं तर जिच्या नांवानें ठिकाणदार लोक खडे फोडतात ती, १९२० सालची पावसाची उघाडी (मृगनक्षत्रास पाऊस नसणें) त्यांस बाधली नाहीं.

बागाइतांतील नारळांचें पीक.

वर्ष	मातासकळ	नागनळ	तिवेत
[१]			
१९१६-१७	[illegible]	[illegible]	[illegible]
१९१७-१८	[illegible]	[illegible]	[illegible]
१९१८-१९	[illegible]	[illegible]	[illegible]
१९१९-२०	[illegible]	[illegible]	[illegible]
[२] १९२२ सालच्या उत्पन्नाशीं तुलना.			
१९२२-२३	[illegible]	[illegible]	[illegible]

अशा रीतीनें पूर्वस्थिति सुधारली म्हणूनच त्यांचे भाग करून नवीन पद्धतीनें खते वगैरेचे प्रयोग करून पाहण्यास तीं लायक झालीं. तिवेत ठिकाणांत १९२२ सालीं केवळ नमून्यदाखल ६० नारळीच्या झाडांपुरता खालील खतांच्या मिश्रणाचा प्रयोग करून पहाण्यांत आला तो येणेंप्रमाणें;— पेंड २ रत्तल, हाडांची पूड १२ रत्तल अणि कायनीत (एक द्रव्य) २ रत्तल मिळून प्रत्येक झाडास १६ रत्तल प्रमाणें

वर दिलेले परिणाम दिवसेंदिवस वाढतेच असून ते कायम राहणार असा रंग दिसतो. या प्रमाणें ठिकाणाची स्थिति सुधारल्यामुळें आतां नवीं नवीं खतें किंवा खतांचीं मिश्रणें नवीन पद्धतीनें वापरण्याचा उपक्रम करण्याची या खात्यानें तजवीज केली आहे. अशा तऱ्हेचे प्रयोग यापूर्वी केले असते तर उलट नुकसानकारक झाले असते. कारण वापरण्यांत येणारी रासायनिक खतें पचण्यास अथवा त्यांचा फायदा घेण्यास तीं ठिकाणें समर्थ नव्हतीं. म्हणून पूर्वीची स्थिति सुधारण्यावरच बहुतकरून त्या खतांचा फायदा अवलंबून असतो.

—येत्या मे महिन्यांत असोळणें येथें कै राम ग. गडकरी याच्यां सं. पुण्यप्रभाव नाटकाचा प्रयोग होणार असून, त्याचें एकंदर उत्पन्न तेथील शाळेस अर्पण करण्यांत येणार

खुलासा पाहिजे.

हिंदुधर्म परिषद या नांवाखालीं शके १८४५ चैत्र शु.५ गुरुवार रोजीं (ता. २२ मार्च १९२३) कवळें येथें श्री. वें. शा. रघुनाथ बाळकृष्ण जोशी ज्ञापतांवेकर धर्माधिकारी नियुक्त श्रीसंस्थान संकेश्वर व करवीर यांनीं आगाऊ जाहीररित्या निमंत्रण केल्याप्रमाणे हिंदुधर्म परिषदेचें तहावें अधिवेशन भरण्यांत आलें. परीषदेचा रिपोर्ट पुस्तक रूपानें प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून असें कळतें कीं, या परिषदेंत पांच ठराव पास करण्यांत आले. त्यापैकीं धर्माधिकारी यांनीं तयार केलेला दुसरा ठराव या परिषदेचे सेक्रेटरी श्री. दत्तात्रय व्यंकटेश पै यानीं वाचून दाखविला तो असाः- प्रस्तुत वाणी, मराठे व इतर शुद्र यांचे धार्मिक संस्कार हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें वर्णाश्रमाविहित झाले पाहिजेत यासाठीं त्यांचीं योग्य पुस्तकें तयार करण्यासाठीं सभेंतल्या कांहीं शा. विद्वानांची निवड करण्यांत आली. हीं पुस्तक जरूर तयार करून श्रीमतजगद्गुरु महाराजांकडे पाठवून पसंत झाल्यावर छापून तयार करण्यांत येतील.

धर्माच्या सभेंत वर्ण व्यवस्थेप्रमाणें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र असा उल्लेख न करितां वाणी, मराठे व इतर शुद्र असले शब्द धर्माधिकारी यांच्या ठरावांत कां यावेत? यांत त्यांचा कांहींतरी उच्चनिचत्वाचा अंतस्थ हेतु असला पहिजे; हें सहज दिसून येतें. हा माझा झालेला गैरसमज ते खुलासेवार दूर करतील, अशी मी आशा करितों.

भडगांव ता. १५।४।१९२३

मिकाजी उसो नारवेंकर.

प्रागतिक संघ.

रा. रा. अध्यक्ष "प्रागतिक संघ" केपें यांस.

सा. न. वि. वि. गेल्या २४ तारखेस मडगांव येथें भरलेल्या "प्रागतिक संघाच्या" कार्यकारी मंडळाच्या सभेस मी हजर असल्यानें संघाचें देशहितकारक ध्येय स्पष्टपणें ध्यानांत आलें. पण या कामीं योग्य व कळकळीनें काम करणारीं माणसें पुढें येऊन संघास हात भार लाविल्यास हें कार्य जोमानें चालेल; असें ध्यानीं आल्यावरून, यासंबंधीं मला करतां येण्यासारखें कोणतेंहि काम असल्यास यथाशक्या तें करण्यास मी तयार आहें. इतर देशबंधूनीहि यांचे पुढें येऊन, प्रागतिक संघाची खरी प्रगति होण्यास झटणें अत्यंत अवश्य असल्यानें, तेहि निरनिराळीं कामें अंगावर घेऊन हातभार लावतील अशी आशा आहे.

सांगें, २९ ३-९२३

नारायण अनंत नाईक पाटणकर.

प्रयोग तेथील तरुण मंडळी करणार असून, अंगीकृत कार्यांत यश येण्यासाठीं सर्वांचे ज्यूरीनें प्रयत्न सुरू आहेत. उपरोक्त कार्य सार्वजनिक हिताचें असल्यावरून, त्यास सर्व देशबंधू सढळ हातानें मदत करतील अशी

Ano VIII *No 4*.

Quinta-feira 26 de Abril de 1923

P... ...TURA
... tres rupias

... CIOS
Por cada li... ...ue repetida uma tanga

... E EDITOR
G... ...egdo Dessay
...em-Goa

भारत.
BHARAT

वर्ष ८ वें, अंक ४
गुरुवार ता. २६ एप्रिल सन १९२३

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

Um cancro social....
A PRAGA DA TABERNA

Num grito de revolta fundamente sincero, o *Bharat* profligava, ha' pouco tempo, esse cancro social que roe e desmoraliza, um indiviuuo, um lar, uma aldeia, um pais, uma naçao...

O alcoolismo e' um vicio dos piores e dos mais nefastos para a saude; e' um cancro cuja acçao e' das mais funestas pois que, abastardando os costumes, se transforma em um dos mais terriveis e horriveis fo'cos de desmoralizaçao dos povos e das sociedades.

Dando-nos a maçada de recorrermos a varios livros de psiquiatria e de criminologia, veremos que, como diz Lombroso, o alcoolismo "e' uma tripla causa, pois o homem alcoolico origina futuros criminosos. "E acrescenta: "o alcool e' um instrumento, uma razao de crime quer porque certos individuos cometem delictos para poderem embriagar-se, quer porque os co vardes encontram na embriagues a co ragem necessaria para meter ombros as suas criminosas empresas e creem encontrar na continuaçao dela um meio de justificaçao, quer emfim, por que as orgias precoces impelem os jovens ao crime".

E assim e' na verdade, e dia a dia, as provas se nos patenteiam bem eloquentes.

Passando uma rev sta pela estatistica criminal ve-se com surpresa que o roubo e o homicidio, produto das paixoes exacerbadas, sao devidos ao alcoolismo.

O criminoso nato e', por excelencia, um tarado alcoolico, um facinora, mais ou menos, perigoso, conforme a sua propria "tara.' Para mais o bebado tanto pela seu aspecto repugnante e imundo; tanto pelo ambiente fe'tido e ignobil em que tripudia, como pelo perigo para a sociedade e' necessario que se estude e o façam entrar no caminho de regeneraçao.

Combater o alcoolismo numa guerra medonha e sem tre'guas e' um acto louvavel e sumamente proveitoso para a sociedade.

O veiculo donde dimana essa chaga social e' a taberna, que na expressao do citado Lombroso "e' o lugar onde os malfeitores teem a certeza de encontrar os seus cumplices; e' o paradeiro habitual onde nao somente med'tam os crimes, mas onde, ainda gastam o seu producto. E' mesmo para muitos deles, o unico, o verdadeiro domicilio que conhecem, acrescendo ainda que o "dono" da taberna e' em muitos casos banqueiro o mais fiel banqueiro, a's maos de quem o criminoso confia o seu lucro culpavel."

Pangim, tem mais ou menos 40 e tantas tabernas, tomando em linha de conta, os restaurantes "elegantes" que porisso nao deixam de ser antros de devassidao e de mise'rias.

Os *habitantes* destas tavolangens, a proporçao que vao descendo os degraus da degradaçao, olvidam o seu trabalho, a familia.

Os operarios que se *deleitam* com aquele vicio arruinam-se e o seu magro peculio e mais as joias da mulher vao direitinhos ao *pre'go*.

Um vicio atrai outro. Dalcool para o jogo. O jogo nao educa, como alguns dizem, vicia. E os bebados apaixonam-se profundamente das emoçoes do jogo.

Ate' a calada da noite, ora jogando ora "beberricando" entregam-se a toda a sorte de origias; emquanto no remanço dos seus lares as mulheres pa'lidas, duma livivez funebre e sulcos cavados no rosto, maos transparentes e descoradas de filhinhos pequenitos e enfezados, que pedem uma codea de pao entre lagrimas convulsas e suplicas torturantes, pranteiam amarguradamente a sua desdita...

E no entretanto os maridos sempre a divertirem-se, a riem-se nuns esgares cinicos e repelentes nestas fetidas "*tascas*-"!...

Embora as mulheres, os filhos lhes venham dizer "que a hora vai adiantada"; "que os filhinhos nao teem que comer"; ai permanecem e rogam pragas, atiram palavras obscenas aos seus filhos e as suas esposas; ... E estas desditosas, pobres "florinhas da rua", nao tendo com que sustentar a sua prole, cujos doridos lamentos nao podem escutar poem a prego o seu corpo de martires e assim os sustentam...

E as infelizes que fizeram da prostituiçao o seu modo de vida e o deles estao por tudo. Sofrendo insultos, pancadas, sao *riscadas*....do rol dos vivos e descem a vala comum, sem um beijo de saudade, sem um afectuoso carinho e sem a bençao de Deus!...

E' ...a sua sina...o seu fado triste doloroso...

Volvamos os nossos olhos para as es atisticas, pois os numeros falam quasi sempre a Verdade sem rebuços

Catorze sumidades me'dicas, a pedido do rei da Inglaterra redigiram em 1904 relato'rios sobre as deterioraçoes produzidas pelo alcool. Num destes factos le-se este horripilante e horrorizante facto: no hospital de Liverpool o dr. Sullivan observou a progenitura de 21 maes dadas a' bebida e a' porgenitura de 28 mais sobrias.

Todas estas perten iam a' mesma condiçao social. Ora as 21 mais intemperantes deram a luz 125 filhos, e 68 destes morreram antes de dois anos. Pelo seu lado as 28 maes so'brias tiveram 138 crianças e destas somentes 33 morreram antes da idade de 2 anos. Em outras palavras: a mortalidade infantil foi duma parte 55% e da outra 24% somente.

O Dr. Berzolla fez para a Suissa uma experiencia bem elucidativa. O recenceamento da Suissa acusava 9 mil idiotas. Ora calculando-se pela data do seu nascimento a data da sua conceiçao, e representando-se a conceiçao dos idiotas por uma curva ve-se a curva da conceiçao dos 9.300 idiotas atingir em duas epocas do ano, os dois maximos. Estas duas epocas sao a do carnaval e a das vindimas, as epocas dos grandes excessos alcoolicos na Suissa.—

E assim a hereditariedade, atira ao mundo milhares e milhares de idiotas, de tarados, com as maiores propensoes para o vicio, inuteis e imbecis.

Ainda vejamos em algumas cidades opulentas. Dos 254 delinquentes que em 1914 entraram e foram examinados na Penitenciaria de Lisboa, somente 62 eram isentos do vicio da bebida, para os restantes 192, isto e' para 75 60% o alcool e o vinho eram o seu veneno cotidiano. E viu-se tambem que os paes tinha sido alcoolicos.

Cada ano na Belgica: 200.000 casos de doença sao ocasiados pelo alcool: 20.000 belgas morreram devido ao alcool; 600.000 indigentes sobre 800.000 sao-o por causa do alcool. 75% de condenaçoes devem-se ao mesmo vicio; 50% de suicidios sao preparados pelo mesmo corrosivo.

Que desolador e dololoso espectaculo este Que c' desta imensa mo'le de gente que vivendo numa mansarda nojenta, degrada-se e por outaa vez deita no caminho da perdiçao a outros tantos.

Qual o remedio para esse mal? Veremos na proxima semana, que isto nao vai a matar...

Alma Velha

Ecos de Mandovi
(Do nosso correspondente)

Em primeiro lugar envio as minhas saudaçoes pelo 8 º. aniversario desta interessante folha. 8 anos na vida dum jornal e' alguma coisa, e' muito mesmo, porque nesta epoca de egoismo perfido que tudo avassala e denigre, ninguem se abalança a publicar uma folha do interesse doutrem. Sim todos metem-se na politica, emporcalham-se e ninguem desvela a sua atençao pelo Ze' Povinho que entrebucha e solta doloridos gemidos. Assim porem nao e' o *Bharat*, a orientaçao que o seu director lhe deu e' humana e recta. A directriz que traçou e' sa', e' louvavel.

Em todos os problemas de interesse publico, ai, la' no primeiro artigo o valente director, acerca-se do assunto e com uma mestria propria sna da' conta do recado admiravelmente.

Ha' fraudes, destemperos? Logo o *Bharat* desce na liça, empunha o sabre, e sem tirte-nem-guarte ataca os de *fond en comble*. E e' por tudo isto e por outras varias circunstancias que no's ofelicitamos e lhe desejamos uma longa vida coroada de melhor exito.

S. Exia o sr. Governador Geral foi lançar a pedra fundamental do futuro edificio para o *Asilo de Milagres deMapuça*. Esta'bem, mas o que e' intoleravel e' que S. Exia. interrompa a carreira de lancha para Aldona— Para vir a Betim servia-se da lancha da carreira, suspendendo-a por uma hora em vez de transtornar tanta gente que vai ate' tam longe.

× × ×

Uma medida de segurança

Consta que os nossos poderes constituidos vão fortificar uma raia sêca que de Valpoi se dirige para a India Inglesa. Dizem que é uma medida de prevénção no caso de a India visinha conquistar a sua independencia, é para Gandhi não invadir esta terra!...

E que é da nossa invasão nos dominios do rei da Inglaterra?...Pensou alguem no que virá a ser o magno problema da nossa emigração? E mesmo que Gandhi queira anexar o Estado da India Portuguesa ao seu dominio será necesssario que êle o invada?...

सा. ब्रा. समाज, मडगांव

श्री. सामंत यांचें व्याख्यान.

पोर्तुगीज व ब्रिटिश राज्यकारभाराची तुलना करणें कठीण आहे. कारण त्यांत राज्यक्षेत्राच्या आकारमानाची साम्यता नाहीं. परंतु आमचें सरकार ज्या प्रमाणें या टीचभर टापूला 'इस्तादु दा इंदीय' असें मोठें व्यापक नांव देऊन राज्यकारभार करीत असतें त्याप्रमाणेंच आपणही घटकाभर करूं. पोर्तुगीज राज्यकारभार सोळाव्या व इंग्लीश राज्यकारभार १८ व्या शतकांत सुरू झाला. तत्पूर्वी दोन्ही राष्ट्रांचा राज्यविस्तार यूरोपाबाहेर पसरला नव्हता. इंग्लिश लोक हिंदुस्थानांत १६ व्या शतकाच्या अखेरीस आले. त्यावेळीं इंग्लडांत इलिझाबेथ राणी राज्यावर असून प्रोटेस्टंट पथांचें प्राबल्य झालें होतें. बेकनसारखे तत्वज्ञ मिल्टनसारखे कवि, शेक्सपीयरसारखे नाटककार त्यावेळीं इंग्लडांत झाले होते. इंग्लिश लोकांची इच्छा आपला व्यापार वाढावा इतकी होती. राज्यविस्तारास त्यांनीं गौणस्थान दिलें होतें तरी तो व्हावा असें त्याना वाटतच होतें. पोर्तुगीज लोकांची इच्छा जगावर खिस्ताच्या आज्ञांचा प्रसार करावयाची होती. त्यामुळें, या धोरणानें पूर्वी बाबरनें राज्यकारभार केला. त्या धोरणानें इंग्रजांनीं आपला कारभार चालविला. त्यांनीं धार्मिक व सामाजिक बाबतींत लोकांचीं मनें राखिलीं. पोर्तुगीज लोकांनीं अफगाणाप्रमाणें आपला धर्म व संस्कृति एथील लोकांवर लादण्याकरितां अनन्वित जुलूम केले. इंग्लिश लोक हिंदुस्थानांत आले. त्यावेळीं मराठी, मोंगल वगैरे अनेक लहानमोटीं राज्यें होतीं. पण त्या सर्वांस नियामक असें एखादें राज्य किंवा राज्यसंस्था नव्हती. बाबर १६ व्या शतकाच्या सुरवातीस झाला व त्यानें हिंदुस्थानांत साम्राज्य स्थापन केलें. त्यापूर्वी पावशतक पोर्तुगेज लोक आपलें साम्राज्य स्थापण्याचा प्रयत्न करीत होते. पण या प्रयत्नांच्या मुळाशी धर्मभावना असल्यानें त्यानां यश आलें नाहीं. मोंगलांना हिंदु लोकांची संस्कृति व धर्म यांबद्दल आदरभाव होता तर पोर्तुगेजानां ती अगदीं कमी प्रतीची वाटे. वास्को दि गामानें आरब लोकांशीं झालेल्या झगड्याचा सूड कालिकत येथील माणसें पकडून नेऊन घेतला खरा. पण या कृत्यानें आपण आपलें भावी यश घालवून देत आहें. हें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं. आफोंस द आल्बुकेर्क यास ज्या तिमाजी नाईकानें साह्य केलें त्याच्या हयातींत येथें विजापुरचें राज्य होतें. आदिलशाहीच्या त्रासानें लोक अगदीं कंटाळून गेले होते. त्या जुलमांतून आपल्या धर्मबांधवानां सोडवतां आल्यास पहावें याच हेतूनें तिमाजी नाईकानें आल्बुकेर्कास गोवें घेण्याची सल्ला दिली !

द. सनापूर्वी ४ थ्या शतकापासून द

क्षिण हिंदुस्थानांत एक मोठें साम्राज्य असून त्यांतच गोव्याचा अंतर्भाव होत होता तें साम्राज्य नष्ट झाल्यावर गोवें देवगिरीच्या यादवांकडे गेलें. त्यांच्याकडून तें अलाउद्दीनाकडे गेलें व त्यांच्या वंशजांकडून तें विजयनगरचे प्रधान विद्यारण्य माधवाचार्य यांनीं घेऊन मोडलेलीं देवळें व विसकटलेली धार्मिक घडी नीट बसवण्याचा प्रयत्न केला. ही व्यवस्था सुमारें एक शतकभर चालली. नंतर आदिलशाही स्थापन होऊन तिनें आपला सवाईसोटा हिंदुधर्म व लोक यांच्यावर सरसहा चालू केला होता. जेथून ही छोटेशाही चालू झाली ती संस्थाच उलथून पाडावी म्हणून तिमया हा आल्बुकेर्कास भेटला. व वर सांगितल्याप्रमाणें त्यानें त्यास सल्ला दिली व साह्य केलें. आपलें राज्य वाढावें पण लोकांवर धार्मिक जुलूम होऊं नये अशी आल्बुकेर्कची मनीशा होती. तिमया हा गलबतावरून येणाऱ्या मालावर जकात घेत असे. त्यानें साठ हजार पार्दाव (७५००० रुपये) खंडणी देण्याचें कबूल केलें. पुढें विजापूरकरांनीं आल्बुकेर्क यास गोव्यांतून हाकून लावल्यामुळे तो आंजेदीव (अंजनीद्वीप) बेटात जाऊन राहिला. नंतर त्यानें पुनः स्वारी करून विजापूरकरांकडून गोवें घेतलें. त्या वेळीं त्यानें भयंकर अत्याचार केले पण लवकरच ही चूक त्याच्या लक्षांत येऊन तो तें करीनासा झाला. आतां प्रमाणेंच त्यावेळीं हि ग्रामसंस्था होत्या. ग्रामसंस्था म्हणजे गांवापुरतें एक लहानसें स्वतंत्र स्वराज्यच होते ग्रामसंस्थेकडून ठरलेल्या वेळीं ठरलेला पैसा पोंचला म्हणजे तिला कोणीही विचारणारा नव्हता. व म्हणून मध्यवर्ती संस्था कोणती का असेना तिच्याबद्दल ग्रामसंस्थेला विचार करण्याचें कारणही पडलें नाहीं. 'आपले पाय धुवावे आपण जेवावें' हेंच त्यावेळीं त्यांचें ब्रीदवाक्य असल्यानें देशांत आवश्यक असलेली संघशक्ति उत्पन्न झाली नाहीं व हें परदेशी यांच्या पथ्यावरच पडलें. असो.

राज्य ताब्यांत आल्यावर राज्यकर्त्यांत आपल्या धर्माचा प्रसार करण्याची इच्छा उत्पन्न झाली. खिस्ती तर सर्व धर्म अगदीं रानटी आहेत अशी त्यांची समजूत होती. हिंदूंना तर ते gentios म्हणजे धर्मलंड म्हणत. त्यावेळीं जिकडे तिकडे भव्य देवालयें पसरलीं होतीं. त्यांचा त्यांनीं अगदीं उच्छेद करून टाकिला. मूर्ति फोडल्या, लोकानां बाटवण्याकरितां त्यांवर अनेक प्रकारचे जुलूम केले ! कांहीं देवळांचा आपल्या प्रार्थनामंदिराकडे उपयोग केला. लष्करी शिपायांपेक्षां लोकांना बाटवण्याकरितां पाद्री लोकच अधिक बाळगण्यांत आले. बाबर वगैरे मोंगल बादशहानीं धार्मिक तटस्थपणा ठेवून आपला राज्यविस्तार केला. मोंगलांचा घडा पोर्तुगेजांनीं गिरवला असता तर त्यांचें दर्रें झालें असतें. पण तसें न झाल्यामुळें त्यांचे राज्य संपुष्टांत आलें. अफगाणाचीही स्थिति अशीच झाली होती. अकबरासारख्या मुसलमान बादशहानीं हिंदूंच्या महाभारतासारख्या कित्येक ग्रंथांचीं भाषांतरें फारशी भाषेंत करविलीं. इंग्रजांनींही हिंदूंच्या वाङ्मयाचा आदर व मान केला. पण या पोर्तुगीज लोकांनीं मात्र हिंदूंचे धर्मग्रंथ व वाङ्मय जाळण्याच्या बहादुरीपलीकडे दुसरें कांहीं केलें नाहीं. ! या अनन्वित छळाची सविस्तर माहिती दो. आं. नोरोंज्य यांच्या पुस्तकांत सविस्तर वाचावयास मिळेल. हिंदूंचें कलाकौशल्य, त्यांचें वाङ्मय, त्यांचा धर्म, त्यांची नीति इत्यादि बाबतींत अकबराची भावना उच्च प्रकारची होती; सर्व धर्मांविषयीं तो सहानुभूति बाळगणारा होता व यचसाठीं त्याला महात्मा ही पदवी मिळाली. पण त्याचा पणतू औरंगजेब यानें ही पद्धती सोडून पोर्तुगीज-अफगाणाची पद्धति स्वीकारली व त्यांच्याप्रमाणेंच एवढ्या मोठ्या साम्राज्यास त्यांस लवकरच मुकावें लागलें.

बाटण्याच्या भयानें इकडील जे लोक पळून परठिकाणीं गेले त्यांचा जमिनजुमला त्यांच्यांतल्या बाटलेल्या लोकांस देण्यांत आला. पोर्तुगेजांनीं एकदां असा जाहीरनामा लावला कीं, पळून गेलेल्या सर्व लोकांनीं परत आपापल्या गांवीं यावें. त्याप्रमाणें कांहीं आले. पण आल्यावर राज्यकर्त्यांनीं पूर्ववत अत्याचार चालू केले. त्यामुळें लोकांस अगदीं त्राही भगवान होऊन गेलें. हिंदूंना आपले धर्मविधी उघडपणें करतां येत नसत. एकदां असा हुकूम सुटला कीं, हिंदूंनी आपलीं लग्नें उघड मंडपांत न करतां घराचीं दारें लावून करावीं, दुसऱ्यांदां असें फर्मान निघालें कीं, हिंदूंनीं आपलीं लग्नें पुरोहिताशिवाय करावीं. पुढें लोकांच्या विनंतीवरून पुरोहित आणण्याला परवानगी मिळाली पण ती अशा अटीवर कीं, पुरोहितानें वाटेंत कोणाशीं बोलतां कामा नये ! पुढें धर्मसुप्रीक्षण सभा स्थापन झाल्यावर जे अत्याचार झाले त्यांची कल्पनाही करूं नये !

इंग्रजांनीं सर्वांस आपापल्या धर्मानुसार वागण्याची मोकळीक दिली. हिंदूंसाठीं हिंदू लॉ केला, मुसलमानासाठीं मुसलमानी लॉ केला ! त्या त्या प्रांतांतल्या लोकांस आपापली मातृभाषा शिकण्याची सोय करून ठेवली. पण पोर्तुगेजांनीं सर्वच बाबतींत "तोद सोलदाद औतु गार्दाव" असें करून टाकलें. हिंदूचा धर्म बुडवला. त्याच्या मातृभाषेची खच्ची केली शेंडीपट्टीसारखा काही बसवला ! गेल्या वर्षीच ब्रिटिश युवराजांनीं संस्कृत विद्यालयाची कोनशिला बसवितानां हिंदु शास्त्र्यासारखा पोशाख केला. मुसलमानी शाला उघडतेवेळीं कलकत्यास उलेमासारखा पोषाख केला. हेतु हा कीं, आपल्या प्रजेचा धर्म व चाली रीती यांच्याविषयीं आपणास किती आदरमान आहे हें तिच्या लक्षांत येऊन प्रेमवृद्धि व्हावी. पण पोर्तुगेजांनीं काय केलें ? जी भाषा जिवंत रहावी म्हणून आम्हीं स्वार्थत्यागपूर्वक प्रयत्न करितों ती आपली मातृभाषा पोर्तुगीज करण्याचा हास्यास्पद प्रयत्न ते करू लागले व या जुन्या तत्वाचा अंमल आजही चालून आहे. आपल्या प्रजेस नवीन वळण लागावें म्हणून इंग्रजांनीं इंग्रजी भाषा हिंदी लोकानां शिकवली पण त्या बरोबरच जुनीं परंपरा तुटून जाऊं नये म्हणून हिंदी वाङ्मयाचेंही त्यानीं शिक्षण चालू ठेवलें. पोर्तुगेजांनीं या बाबतींत मागें कांहीं केलें नाहीं व पुढें करण्याचीही आशा नाहीं. ते मराठी भाषा रानटी समजतात व तदनुसार सरकार तिला मताधिकारही देत नाहीं. आपल्या रयतेला योग्य ज्ञान करून देऊन तिच्या देशाची व्यवस्था तिच्या हातीं देण्याचें धोरण या पूर्वीच जाहीर झालें होतें. हिंदुस्थान हें स्वतंत्र राष्ट्र असून त्यांतील लोकांची संस्कृति, धर्म, वाङ्मय हें सव जगाच्या अभ्यासास व आदरास पात्र आहे हें इंग्लिशानीं प्रथमपासून ताडलें होतें. व तदनुसार त्यांच्या वृत्तपत्रांतून तसे विचार प्रकट होत होते आणि आजही होत आहेत. पोर्तुगीज लोक व त्यांनीं टाकलेल्या भाकरीच्या तुकड्यानें संतुष्ट होणारे बगलबच्चे गोवें हा पोर्तुगालचाच एक भाग असून आम्हींही पोर्तुगीजच व्हावें असा दुराग्रहच घेऊन बसले आहेत ! असो. ही स्थिति सुधारण्याकरितां आम्हीं आमच्या ब्रिटिश हिंदी बांधवांप्रमाणे आमचें ध्येय व हक्क निश्चित करून त्याची जाणीव सरकारास करून दिली पाहिजे. या पैकीं महत्वाचा असा आपल्या मातृभाषेला मताधिकार व तिचें सांगोपांग शिक्षण मिळवण्याचा होय " इत्यादि प्रमाणें श्री. सामंताचें परिणामकारक भाषण झाल्यावर रा. यशवंतराव सरदेसाइ म्हणाले कीं, "पोर्तुगीज लोक आजपर्यंत आपणास gentios म्हणत आले आहेत व आपण तें ऐकत आलों आहोंत. पण आपली लायकी काय आहे हें त्यांस दाखवून देण्याची वेळ आतां खास आली आहे. गोवें हा पोर्तुगालचा एक भाग आहे. असें पोर्तुगीज लोक तर समजतातच पण खुद्द गोव्यांतील खिस्ती लोकही साधारणतः तसेंच समजतात. गोवें पोर्तुगालचा भाग व्हावा म्हणून पोर्तुगीजांनीं येथील हिंदूंस खिस्ती केलें, त्यांच्यांवर आपली भाषा लादली, संस्कृति लादली व येथील खिस्त्यांशीं लग्न करून 'आसिमिलसांव' करण्याचा प्रयत्न केला.' खिस्ती लोकांपुरता तो बव्हंशीं सफल झाला. पण सुदैवानें हिंदूंनीं अजून आपलें स्वत्व कायमचें सोडलेलें नाहीं. महाराष्ट्रांतही खिस्ती आहेत. पण ते धर्मानें खिस्ती असले तरी राष्ट्रीय त्वाच्या दृष्टीनें आपणास हिंदीच समजतात हें रे. ना. वा. टिळक इत्यादिकांच्या उदाहरणावरून दिसून येतें. येथील खिस्त्यांचा आपलेपणा कसा नष्ट झाला आहे हें कांग्रेस प्रोव्हिंसियाल सारख्या संस्थांच्या ध्येयावरूनही दिसून येण्यासारखें आहे. त्यांचा हा परकीपणा नाहींसा करण्यांची जबाबदारी हिंदूंवर असून तो घालवण्यांचा प्रयत्न आपण मोठ्या सावधगिरीनें केला पाहिजे. हा प्रयत्न करण्यास उत्तेजन मिळण्याच्या दृष्टीनें श्री. सामंतांचें व्याख्यान फार महत्वाचें आहे. त्यांच्या व्याख्यानावरून जो एक नवीनच मुद्दा पुढें आला आहे, तोही फार महत्वाचा आहे. पोर्तुगेजांस गोवें घेण्यास हिंदूंनें जें साह्य केलें होतें. तें त्यांनीं आम्हांस आसिमिलार करून घ्यावें म्हणून नसून आदिलशाहीच्या त्रासांतून मुक्त होण्याकरतांच केलें होतें. हा त्यांचा हेतु कितपत सफल झाला व होत आहे. हा प्रश्नही विचार करण्यासारखा असून आपली तरुणपिढी तो करील अशी मला आशा आहे."

वर्तमानसार.

सालाबादप्रमाणें सांगें येथें श्रीदत्तमंदिरांत येत्या वै.शु. १५ (ता.३०-४ २३) रोजीं श्रीमदाद्यशंकराचार्य जयंत्युत्सव साजरा होणार असून वर्षी प्रमाणें निरनिराळ्या वक्त्यांचीं व्याख्यानें, प्रवचनें, पुराण वगैरे कार्यक्रम होईल. तरी उत्सवास सर्वांनीं हजर राहून शोभा आणावी. असें उत्सव कमेटीचे व्यवस्थापक ना. अ. ना. पाटणकर हे कळवितात

—गेल्या महिन्यांत गोमांतकीय मराठी शिक्षक संघातर्फे श्री. अनंत लक्ष्मण काळे बी. ए [डिचोली] व श्री. गणपतराव सामंत [कुंभारजुवें] यांनीं काकोडें येथील श्री शारदा विद्यालयाची वार्षिक परीक्षा घेतली.

—मडगांव येथील नवीन मराठी शाळा या संस्थेची वार्षिक परीक्षा श्री. जी. एच. जांबोटकर एम. ए. व्हाइस प्रिन्सिपल मिशन हायस्कूल-बेळगांव, व श्री. डॉ. एच. डी. तिळवे-बेळगांव हे ता. २८ एप्रील पासून घेणार असून ता. ३० रोजीं विद्यार्थ्यांचें संमेलन होऊन बक्षीस समारंभदि होणार आहे.

—ता. १८।४।२३ रोजीं, सा. ब्रा. समाजातर्फे श्रीशिवजयंत्युत्सव प्रो. व्यकटेश रामचंद्र नाईक यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. त्याप्रसंगीं जनार्दन विष्णु कामत, प्रो. दत्तात्रय व्यं. पै, प्रो. बा. वा सांवर्डेकर, पुंडलीक वा. विर्जिनकर, पुंडलीक कामत, प्रो. तिरोडकर व भिकाजी उसो नार्वेकर यांचीं भाषणें झालीं.

Ano VIII — Nº 5

Quinta-feira 3 de [illegible] 1923

ASSINATURAS

ANUNCIOS

[illegible] uma [illegible]

DIRECTOR E EDITOR

G. P. Hegdo Dessay

Quepem-Goa

भारत.

BHARAT

वर्ष ८ वें, अंक ५

गुरुवार ता. ३ मे सन १९२३

वर्गणीचे दर.

सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.

समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.

गो. पु. हेगडे देसाई.

केपें–गोवा.

Matas, matas....

Sob este titulo escreveramos no *Bharat* nº. 2 do corrente ano um artigo sobre certos assuntos relativos a's nossas matas.

Um doutor silvicultor, julgando-se abrangido numa ou nalgumas afirmaçoes daquele artigo solicitou, por conta propria, intimaçao do nosso director para, entre outras caisas, concretisar as aludidas afirmaçoes.

E' desnecessario constatar que o referido funcionario dirigiu o seu requerimento ao sr. Juiz de Direito da comarca de Quepem, por nesta se editar o nosso jornal.

Com a mesma ancia com que se procurou intimar o director do *Bharat* aceitou este a intimaçao, devendo por todo este mez de Maio publicar o seu artigo explicato'rio, em cumprimento da intimaçao, dimanada duma autoridade que todos no's, cidadaos portuguezes, temos a expressa obrigaçao de acatar.

A intimaçao nao estabelece o praso, durante o qual o nosso director deva dar cumprimento ao que a intimaçao reza: eis à razao porque o nosso director nao quiz ter pressa nesse curioso assunto *matoso*

E' depois, quem dirige esta folha pretende aproveitar do ensejo do artigo explicato'rio para ao mesmo tempo, por a' mostra muita coisa *boa* e *bonita* que anda escondida nas matas ...oficiais.

Como veem, o assunto nao deixa de ser interessante, convindo, porisso, que a pressa que, muitas vezes, tem o defeito de desarranjar *os capitulos*, nao empane o *brilho* do interesse do mencionado assunto.

Por enquanto nao desejamos por mais cartas na mesa. E' que o jogo esta' suspenso, para se recomeçar com mais atividade. Esta' decretado o periodo das treguas, que o mez de Maio o e' para guerras nem para caçadas, ainda que estas sejam para os bichos ocultos nas nossas matas ... oficiais.

Sera' pois, cumprida, com todo o prazer, a intimaçao de que se trata, por todo o corrente mez.

6°. Congresso Provincial da India Portuguesa

A Comissão Central do 6°. Congresso Provincial deliberou iniciar a 1 de Maio proximo seguinte a inscrição dos congressistas. O pedido de inscrição deve vir acompanhado da respectiva cota, que será enviada ao tesoureiro do Congresso sr. Cristovam Fernandes. A cota é de 3 rupias por inscrição pessoal, de 30 para as municipalidades de Ilhas, Salcete e Bardês e 15 para as dos outros concelhos e 10 para as comunidades agricolas e outras associações.

Os assuntos a versar nas sessões do Congresso serão os seguintes:

I

Problemas economicos

a) Actual situação das pequenas e grandes industrias na India Portuguesa.

b) Recursos locais que permitam estabelecer pequenas ou grandes industrias para a transformação da matéria prima ou para o fomento da riqueza publica.

c) Meios praticos de adopção imediata para o desenvolvimento industrial da India com o minimo da intervenção do Estado.

d) Medidas imediatas de que carecem as pequenas e grandes industrias para a sua criação ou para o seu desenvolvimento.

II

Problemas sociais

a) Medidas urgentes a adoptar para a regeneração dos menores e assistencia á infancia desvalida.

b) Meios praticos para se efectivar a educação moral e civil do individuo em particular e do povo em geral, afim de firmarem asseguradas a integridade do caracter e a disciplina social.

III

Problemas politicos

a) A autonomia administrativa e a autonomia financeira ial como vigoram satisfazem as aspirações da India e correspondem aos fins que as ditaram?

b) Em caso negativo:

Quais as modificações a introduzir-lhes para que elas correspondam ás exigencias da administração publica e sejam a efectiva da liberdade politica local sem quebra da do direito da soberania portuguesa?

IV

Regime comunal

Bases para a remodelação das comunidades, conservando a estas o primitivo carater de Instituições agrarias mas adaptando-as ás actuais exigencias da transformação social e economica da India.

As memórias sôbre qualquer dos pontos indicados devem ser enviadas ao Secretário Geral sr. Roberto Bruto da Costa, até 31 de Outubro do corrente ano, escritas ou dactilografadas de um só lado tendo à parte o resumo e as respectivas conclusões.

Nova Goa, 22 de Abril de 1923.

O presidente do 6°. Congresso Provincial,

F. X. Teodoro de Miranda

Mais um golpe!

O director do *Bharat* acaba de receber mais um golpe, vibrado pelo insondavel Destino que, pelos modos, se esforça para que ele tenha cada vez menos apego a' vida material e coisas deste mundo.

Referimo-nos ao falecimento de quem se chamou Vitol Porobo Dessai, este mesmo que incutiu no director do *Bharat* sentimentos do amor pelo trabalho, da dedicaçao pelos seus semlhantes e do sacrificio pela Patria, sendo coadjuvado nesta alevantada missao pela tao nobre quao digna sra. Rucminim Dessaina, carinhosa esposa do extinto e a qual com a sua numerosa familia esta' hoje submergida no oceano da mais cruciante dor.

Ha dores e dores. As que o nosso director esta' sofrendo neste momento nao se descrevem: so' se experimentam.

E, porisso, sem mais consideraçoes sobre um tao funesto acontecimento fazemos aqui ponto.

Ecos e Critica

Agradecendo

Aos nossos presados colegas da *India Portuguesa*, *Tribuna* e *Verdade* agradecemos muito penhorados os cumprimentos pela entrada do *Bharat* no 8°. ano.

O Ultramar

Completou 60 anos este acreditado periodico da vila de Margão. E' um *velho* em cujas veias circula um sangue *novo*. Dai a posição de destaque que disfruta na imprensa indo-portuguesa.

Cumprimentamo-lo.

Era escusado...

A' *India Portuguesa* aprouve, há dias, afirmar do alto de suas colunas, que não era verdade que alguns cristãos tenham movido guerra ao livro *Os indus de Goa e a Republica* do sr. dr. Noronha, sinificando-nos que o mesmo livro não precisava dos nossos reclames berrantes.

O nosso presado colega labora no erro crasso, quanto á sua asserção, relativa á g u e r r a, quando a faz alicerçar no *testimunho negativo* dos jornais da terra, isto é, no facto de nenhum deles se referir, a não ser o *Bharat*, á tal guerra; pois é sabido que nem todas as guerras, cá no nosso meio, são movidas por meio de jornais, sabretudo guerras religiosas.

A outra parte, relativa aos reclames berrantes é, simplesmente, própria duma velha rabugenta que não é certamente a antiga folha de Majordà, por isso que analisar um livro não é fazer dêle reclame.

Era, pois, escusado, que a *India* tocasse em um assunto em que a sua intervenção resultasse esteril e infecunda.

Dr. Siurama B. Rau

A comarca de Quepem dedicou a êste ilustre magistrado uma demonstração de simpatia, na sua saida daqui.

Fez bem, isto é, cumpriu

ज्ञातोश्रीच्या दुःखाची तर कल्पनाच करतें अशक्य आहे. तिच्या खंडतर तपश्चर्येस यश न आल्यानें तिच्या मनाची कशी केवीलवाणी स्थिति झाली असेल हें वर्णन करण्यास मानवी लेखणी सर्वथैव असमर्थ आहे. असो. सध्या परमपूज्य सूताच्या आत्म्यास शांति लाभो इतकें इच्छून, लेखणी आटोपती घेतों.

जंगलखा तेंः — जंगलखाल्याविरुद्ध लिहिलेल्या मजकुरामुळें भारतावर खटला भरण्यांत येणार असून पुष्कळ गमतीच्या गोष्टी तें खटलें प्रसवण्याचा संभव आहे.. ज्यांच्या साठीं आम्हीं उपरोक्त माहिती प्रसिद्ध केली होती त्यांजकडून भारताला हरतऱ्हेचें सहाय्य मिळणें रास्त आहे. ओढूं पहात असलेल्या आपत्तीनें भारताला त्याच्या अढळपरमेश्वर निष्ठेमुळें काडीचीसुद्धां भीति वाटत नाहीं. कारण जनताजनार्दनाची सेवा निष्कंटक नाहीं. याची पूर्ण जाणीव होऊनच त्यानें तें व्रत स्वीकारलेलें आहे. असें जरी असलें तरी अंगीकृत कार्यांत यशप्राप्ती होण्यासाठीं त्याला पाठिंबा मिळणें जरूर आहे. व तो मिळेल अशी आह्मांस खात्री आहे.

आलमेद कॉलेजः — फोंड येथील ही शिक्षण संस्था दिवसेंदिवस नांवारुपास चढत असलेली पाहून आह्मांस समाधान वाटतें. संस्थेनें मडगांव येथें परीक्षेसाठीं पाठविलेल्या विद्यार्थ्यांचे यंदांचें प्रमाण साधारण मोठें असतांहि, ४ खेरीज करून एकंदर मुलें लिसेवाच्या निरनिराळ्या वर्गपरीक्षेंत उत्तीर्ण झालीं, हें आमच्या वरील विधानाची साक्ष पटविण्यास पुरेसें आहे. निरपेक्ष चिकाटीला कोणती गोष्ट शक्य नाहीं? आणि आलमेद कॉलेजला तर तिचें निस्सीम पाठबळ आहे. असो. संस्थेचा असाच अभ्युदय होऊन, याहिपेक्षां तिच्या हातून विशेष महत्वाची कामगिरी पार पडो, अशी आमची परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

वर्तमानसार

— गोवा विद्याप्रसारक मंडळातर्फे कसबा फोंडा येथें चालू असलेल्या शाळांतील मुलांची वार्षिक परीक्षा गेल्या माहेच्या १८ व १९ तारखेस प्रो. नारायण अनंत शेट वांदोडकर, डायरेक्टर आलमेद कॉलेज, गजानन पांडुरंग दाते व प्रो. शिदबा सरदेसाई ह्यांकडून घेण्यांत आल्या. परीक्षेस अजमासें ३० मुलें बसलीं होतीं. तीं सर्व पास झालीं. नंतर १९ तारखेस संध्याकाळीं ५ वाजतां बक्षीस समारंभ आत्माराम शंकर शेट वेरेंकर ह्याच्या अध्यक्षतेखालीं झाला. सभेस कांहीं विद्यार्थ्यांची भाषणें झाल्यावर अध्यक्षानीं मुलांस चार उपदेशपर गोष्टी व शिक्षणाचें महत्व सांगितलें. पहिल्या वर्गांत आलेल्या विद्यार्थ्यांस बक्षिसें व बाकीच्यांस खाऊ वगैरे देऊन सभा बरखास्त झाली.

— ह्यांपसें येथें एक सार्वजनिक मोफत हॉस्पिटल साठीं इमारत बांधण्याचें काम

सुरू असून तिच्या पायाचा दगड गव्हर्नरसाहेबांच्या हस्तें बसविण्यांत आला.

— वे. येथील गोरक्षणाची चळवळ जोरांत चालू आहे.

— मडगांवची मुनिसिपाल पाठशाळा नासियोनाल करण्याचें घाटत आहे.

— येत्या जून महिन्यांत सांगें येथें मुनिसिपाल निवडणुका होणार असून देसाई, वालावलीकर व सांवर्डेकर यांस निवडून देण्याचा तेथील नागरिकांचा विचार आहे, असें एक मतदार कळवितात.

— प्रागतिक संघ परिषदेचा नक्की दिवस लवकरच कळविण्यांत येईल.

— गेल्या महिन्यापासून गोव्यांत जिकडे तिकडे तापाची सांथ पसरली आहे.

जाहीर विनंति

जलमार्गानें व अग्निरथद्वारा प्रवास करणारे लोक सांवर्डें (कुडचडें) येथें एकत्रित होत असल्यामुळें या ठिकाणी एकादें विश्रांतिस्थान झाल्यास प्रवासीजनास विश्रांति मिळून त्यांच्या सर्व गैरसोई दूर होऊं शकतात. फार दिवसांपासून ही अडचण गोव्यांच्या बाहेरील मंडळीस व गोमांतकांतील रहिवासीयांस बरीच जाचत आहे. येथें स्टेशन समोरील सरकारी जागेंत एक अत्यंत सोइसकर अशी धर्म शाळा बांधण्यांचा विचार ठरला असून जमीनीचे बाबतींत सरकारकडे मागणी केल्याचें तर आमचें गोव्यांतील बंधु जाणतच आहेत. हें कार्य पैशाचें असल्यानें यास सर्वांनीं हातभार लावून दसकालकडी एकका बोजा– या नात्यानें ही सर्वांची गैरसोय एकत्र मतानें सर्व मंडळीतर्फे दूर झाली पाहिजे–याकामीं सर्व गोमांचलवासी यांची पूर्ण सहानुभूति आहे असें म्हणणें वृथा होणार नाहीं. सर्व भूतमात्रांचे अंतःकरणांत ज्यांची वस्ती आहे असा जो अंतर्यामी दीनानाथ याची या कार्यास पूर्ण कृपा द्रष्टी असलीच पाहिजे हें निराळें सांगणें नकोच. हें कार्य धर्माचें आहे, परोपकाराचें आहे, अत्यंतागत्याचें असून फारच लोकोपयोगी आहे. अशा सत्कार्यास प्रत्येकानें ईश्वरास ओळखून अपले शक्तीप्रमाणें योग्य ती मदत करणें हें मनुष्यमात्रांचें शील आहे. हें दान सात्विक वृत्तिवाढतिणतें तसेच प्रत्यक्ष फल देणारें आहे. येथें देश, काल, पात्र, असा त्रिवेणी संगम असून या संगमात स्नान-करणारांची सर्व पापें भस्म होतील. असा हा कपिलाषष्टीचा योग आहे धर्माभिमानी, देशाभिमानी सत्वशील, याचा फायदा अवश्य घेऊन इतरांसहि तो घेण्यास रस्ता दाखवितील अशी उमेद आहे. श्रीमत् भगवत् गीतेंत – देशे कालेच पात्रेच तद्दानं सात्विकं स्मृतं– हेंच खरें दान, हेंच खरें तीर्थ व क्षेत्र, असें म्हटलें आहे. याचा सूज्ञ जरुर विचार करतीलच. अनेक देशांतील प्रसिद्धामुळें या कामीं योग्य ती सुधारणा व व्यवस्थित मांडणी करून धर्मशाळा प्रवासी लोकांस अत्यंत उपयुक्त होईल अशा तऱ्हेची करण्याचा विचार ठरला आहे. व यत्संमधीं शक्य तो प्रयत्न चालूहि झाला आहे. कोणीहि आह्मांस उपयुक्त सूचना केल्यास त्यांचेहि आह्मीं आभारी होऊं. धर्म शाळे करितां सावर्डें (कुडचडें) येथीलच पंच नेमावेत असा विचार आहे. म्हणजे देखरेख चांगली राखिली जाऊन इमारतीची जोपासना व व्यवस्था कायम राहील. वर्गणीचें आंकडे नामनिशीवार घेऊन ती पूर्ण जमा झाल्यावर ज्या गावांत ती केली जाईल त्या गावांपुरतीच ती थैली श्रीं. वेंपे यांचेकडे रवाना होईल, म्हणजे कोणाचेहि शंकेला जागा उरणार नाहीं या विश्रांति स्थानाकरितां पत्र पुष्पं जी योग्य ती व तशी सेवा प्रत्येक बंधु भगिनींनीं करून आपले सत्कीर्ति नौबदीचा डंका वाजेल. अशा तऱ्हेची सुस्वागतमची पाटी गोमांतकांत गोमांतकियांतर्फेच लागावी व आह्मांस पूर्ण आभारांत ठेवावें अशी आमची नम्र विनंति आहे.

पूर्णाश्रम;

माझा आंगोलचा प्रवास.

पत्र नं. ३

आजपर्यंत आह्मीं जो समुद्रप्रवासाचा बागुलबुवा करीत होतों तो अवघा पोरबंदरहून आफ्रिकेंतील पहिलें लागणारें बंदर जें मोंबास, तेथपर्यंतचा होय. हा प्रवास फक्त दहा दिवसांचा असून भूमध्य समुद्रांतून होत असतो. मध्यंतरीं 'सकोत्रा' नामक एक समुद्र लागतो, तो नेहमीं खवळलेला असतो. असें दर्यावर्दी लोकांचें म्हणणें असतें. व त्याप्रमाणें त्या जागीं पोंचण्यापूर्वीं एक दिवस प्रसंगीं प्राणरक्षणास लागणाऱ्या तयारीचें, फक्त पहिल्या व दुसऱ्या क्लासच्या उतारूंस शिक्षण देण्यांत येत असतें 'जणूं काय तिसऱ्या क्लासांतील उतारुनां प्राणाची गरजच नाहीं !' तें शिक्षण म्हणजे बुडणारी बोट सोडून छोट्या बोटींवर किंवा समुद्रांत उडी टांकणे, समुद्रांत पोहतां यावें म्हणून, रबरी वाटोळीं कड़ीं असतात, त्यांचा उपयोग करणें, धोक्याची शिटी होतांच सावध राहणें वगैरे तऱ्हेचें असतें. बोटीचे कप्टन जातीनें हें शिक्षण देत असतात. परंतु, ईश्वर कृपेनें आह्मांवर तसा प्रसंग आला नाहीं. इतकेंच नव्हे तर आह्मीं क्याबीनमध्यें असताना समुद्रप्रवासांत आहोंत ही कल्पनाच रावी लागत असे. बाहेर डेकवर आलों तरच, सभोंवतीं पसरलेलें महासागराचें भव्य स्वरूप पाहून प्रवासाची जाणीव होई. नाहीं तर एखाद्या राजवाड्यांत ऐषआरामांत असल्याप्रमाणें वाटत असे. कांठावर राहून सागराचें सागरत्व लक्षांत येत नाहीं. त्याचें खरें खुरें स्वरूप अजमावण्यास असलाच

अशा रीतीनें काल २ मार्चला सकाळीं ९ वाजतां येथें मोंबास बंदरांत सुखरूप पोंचलों. तदनंतरचीं बंदरें फार झालीं तर १२ तासांच्या अंतरांत असल्यानें बोट एका बाजूनेंच चालूं लागणार. पणजीहून मुंबईला जाण्यास जसी आह्मीं भीति बाळगीत नसतों त्याप्रमाणेंच आतां भीण्याचें कांहींच कारण नाहीं.

"मोंबास" हें शहर फार मोठें नसलें तरी पाहण्यासारखें आहे. हें बेट असून येथें इंग्लिश अंमल आहे. येथून आगगाडीचा रस्ता गेला आहे. आमच्या मुर्गाव प्रमाणेंच येथेंहि रेल्वेस्टेशन व बोटीचा धक्का यांचा सांधा जुळला आहे. येथें उतरायाचें झाल्यास प्रथमतः इमिग्रेशन खात्यांत २० पौंडांची रकम अनामत ठेवावी लागते. न पेक्षां परत लावण्यांत येतें. या बंदरांत आमच्या हिंदी लोकांची व्यापार नोकरी वगैरेच्या निमित्तानें पुष्कळ येजा असते. त्यांचीच वस्ती येथें ज्यास्त. व्यापारी, नोकर वगैरेंत बनिया, खोजे, मेमण यांचाच भरणा फार. निग्रो तर क्वचित् आणि तेहि मजूर पेशाचें. येथें दोन ओस्पिटलें, एक नेटीवांकरितां व दुसरें इंग्लिशांकरितां असीं आहेत. भाषा इंग्लिश आणि निग्रो लोकांची स्लोली नावांची देशभाषा. जमिन रेताड, उत्पन्न एकंदर आमच्या गोव्यांप्रमाणेंच. सर्व जातींची फळफळावळ मिळते. इतकें सांगितलें तर पुरे कीं, येथें आंबोड्या, बिंबलें देखील मिळत असून तींहि पणजी, मडगांव पेक्षां स्वस्त. पणजीस जांबुळें पैशाला कमाल तर वीस आणि इकडे शेंकडावार. फणस आंब्यांचा तर सुकाळ. अननस, पोपई, लिंबु, केळीं सीताफळें, ऊंस, नारळ, हीं तर गोव्यांत त्या सारखींच चवदार आहेत.

पपनस तर रसाळ व फार मधूर आहेत. नारळीच्या बागा पुष्कळ असून सर्व प्रांत त्यांच्या लागवटीला व पिकाला उत्तम आहे. येथें हिंदु लोकाना लागणारा सर्व माल उत्तम प्रकारचा मिळतो येथें उतरताना सोबत आणलेला 'पासपोर्त' इमिग्रेशन खात्याचा अधिकारी बंदरांत बोट पोंचल्यावर बोटीवर येऊन बसतो, त्यास दाखवून पास घ्यावा लागतो. त्याशिवाय उतरूं देत नाहींत. येथें दर पौंडाचीं किंमत दहा रुपये असून हिंदी रुपयाची किंमत दहा आणे आहे. येथील चलनी नाणीं म्हटलीं म्हणजे पौंड, शिलींग, पेन्स व सेंट. १ पौंड म्हणजे १०० सेंट. असो. येथून आज सायकाळीं ४ वाजतां आमची बोट निघणार. उद्यां झांजिबारला व परवां दारसलामला पोंचूं. क. कृ. अ. ही विनंति.

मोंबास, ता. ३-३-१९२३.

आ. उपी बावली कामत.

–मुरगांव शिक्षण संघ, वास्को डी गामा या संस्थेच्या "मुरगांव विद्यालयाची" वार्षिक परीक्षा श्रीयुत पारुजी नारायण मिसाळ संपादक बालसन्मित्र पुस्तकमाला मालवण जि० रत्नागिरी हे तारीख ७-५ २३पासून घेणार असून लवकरच बक्षिस समारंभ

खुलाशाकरितां खुलासा पाहिजे.

क्षत्रिय व वैश्य असें लिहिण्याचे ऐवजीं मराठे व वाणी असें लिहिलें असतां अर्थांतर होणें अथवा 'उच्चनीचत्वाचा अंतस्थ हेतु' सिद्ध होणें अगर तसी शंका उत्पन्न होणें यास आधार कोणता ? हें उपकार करून आपल्या भारत पत्राच्या ता. १९–४–२३ च्या अंकांत 'खुलासा पाहिजे' असें लिहिणारे रा. भिकाजी उसो नार्वेकर यानीं प्रसिद्ध केल्यास बरें होईल. कारण आजकाल ऐतिहासिक चर्चेवरून मराठ्यांचें क्षत्रियत्व आणि वाणी यांचें वैश्यत्व नष्ट झाल्याचें किंवा खोटें ठरल्याचें माझ्या वाचनांत नाहीं. किंबहुना विशेष उजळ झालें असेंही दाखवितां येईल, असें वाटत आहे. तेव्हां नारवेकरांच्या 'गैरसमजा'चा आधार कोणता ! हेंच प्रसिद्ध होणें अवश्य.

कवळेंच्या धर्मसभेंतील
एक प्रेक्षक.

नाटकी संवाद.

वंदन—काय बुवा, सध्या गोव्यांत खेळ करीत असलेल्या बलवंत सं. नाटक मंडळी विषयीं आपलें कसें काय मत आहे !

कंदन–मला तर बुवा त्यांच्याकडे फारशा महत्वाच्या गोष्टी असल्याचें दिसून आलें नाहीं.

वंदन–म्हणजे ! कंपनीकडे महत्वाच्या गोष्टी नसत्या तर चांगल्यां चांगल्यांकडून तिचा गौरव झाला असता काय ! अहो, ज्या मंडळींत श्री. मंगेशकर रत्नसारखे चमकले, जिला श्री. कोल्लटकरनीं भुषविलें आणि जिंथ श्री. कोल्हापुरेनीं स्वरसारंग नांव मिळविलें ती मंडळी नांवासारखी बळवंतच आहे.

कंदन–थांबा, आपलं स्तुतीस्तोत्र बंद करा. आपण सुशिक्षिताचं आणि मंडळीचं मिळून गाईलेलें स्तोत्र, स्तुती करण्यासारखं मला कांहीं वाटत नाहीं. आमच्या श्री. मंगेशकरकडे संगीताशिवाय 'नटाला' लागणाऱ्या गोष्टी असल्याचें मला नाहीं माहीत. श्री. कोल्हापुरे नुस्ते 'संगीत' गातात. त्यांच्यांत नाविन्य म्हणून आढळत नाहीं. आणि श्री. कोल्हटकर तर संगीतांत पूज्यच आहेत. अहो, आमच्या त्या मंडळीच्या प्रत्येक नाटकाच्या प्रयोगाला मी हजर होतों. गडकऱ्यांचीं नाटकें शिवाय करून त्यांचा दुसरा कोणताच प्रयोग पहाण्यालायक नाहीं.

वंदन–त्यांचे गडकऱ्यांच्या नाटकाचे प्रयोग तरी पाहण्यालायक आहेत ना ! मग झालं. त्यांचे जे प्रयोग चांगले वठतात. त्यांच्याच बद्दल बोलूं. चांगलें काम करणारे असल्याशिवाय तरी चांगले कसे वठतील?

कंदन–आपण आपलं मत बनवितानां चांगले चुकलां–नव्हे चकलां. गडकऱ्यांच्या नाटकांचे त्यांचे प्रयोग श्री. कोल्हटकर व-

Ano VIII *No* 6

Quinta-feira 9 de Maio de 1923

ASSINATURA
cada ano tres rupias

ANUNCIOS
a linha ainda que repetida uma tanga

DIRECTOR E'EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa.

भारत

BHARAT

वर्ष ८ वें. अंक ६

गुरुवार तां. ९ मे सनं १९२३

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें–गोवा.

Matas, matas....

O que vai pelas matas nacionais e' um verdadeiro horror, escandalo sem nome, roubalheira autentica.

Donde vem essa pouca vergonha esse estado de coisas que as esta'-desvalorizando a olhos vistos?

E' por falta de rigorosa fiscalizaçao que as nossas matas estao sofrendo um prejuizo tremendo, devendo notar se que nem preside escrupulo em toda a sua estençao a' pequena vigilancia que, aqui e acola' se manifesta.

A Administraçao do conceiho de Quepem, por exemplo, discubriu, devido a' isençao e actividade do seu prestimoso empregado sr. Carvalho, animado pelo admistrador sr. Rebelo, muitos *lagartos* para cujo aniquilamento radical vao-se adoptando medidas energicas.

Nao basta, porem. Mister se torn, tambem, que se generalise e se siga o exemplo dos srs. Rebelo e Carvalho, para que se ponha cobro a devastaçao das matas do Estado, chamando a' ordem os tais que obtendo licenças para o corte de lenha ou madeira nos terrenos das comunidades, costumam apossar-se, de colo erguido, da lenha ou madeira das matas do Estado.

A propria mata *Sidhu*, segundo nos consta, perdeu o seu *pristino orgulho* de ser possuidora de riquesas florestais, por ninguem *vistas*... mas ... por muitos aproveitadas, a torto e direito.

As matas constituem a riqueza nacional. Todo o cidadao portuguez tem a obrigaçao de respeita-la e faze-la respeitada, envidando os seus esforços para que ela se valorise, de dia para dia.

Mas tratando-se de matas, ocorrem-nos em trupel consideraçoes de varia ordem que iremos registando, aos poucos nas colunas do *Bharat* para a edificaçao dos gentes,

Ponto, portanto, por enquanto.

Diz-se...

Consta-nos que os praticantes dos Correios e Telegrafos vão reclamár ao sr. Presidente do Conselho Legislativa pedindo a não aprovação do artigo 30 do projecto do reg. da escola pratica dos C. E. T. publicado no B. Oficial de 17 de abril p. findo por estar em contradição com o paragrafo unico do art. 5 °. de p. p. n °. 863 de 21 de outubro de 1920, visto ferir os seus legitimos direitos.

Ecos de Mandovi

(Do nosso correspondente)

Co'os diabos! A nossa repartiçao de Agrimensura vai ser largamente, principescamente contemplada pelas terras de Guilherme II. O grande Kaiser, de *saudosa memoria*, teve um remorço de consciencia por nao ter recompensado os bastantes serviços, que devia a' Direcçao dos Serviços Agricolas, Pecuarios Florestais, Improficuos etc. deste stado. A imperial figura vem descendo do seu triste exilio de Doorn com uma carga de charruas, teodolitos, pantografos, taquiometros e mil surpresas todas de arromba. A nossa agricultura vai ficar agora as mil maravilhas.

Acorda e esfrega os dentes com o dendro'metro, penteia-se com o lindo pantagrafo, barbeia-se com um corta-paihas!..E assim sai a rua fresquinha desembaraçando-se da sua mavortica figura. E' o que se queria. As reparaçoes que da Alemanha se exigiam eram realmente exiguas. *Nos quoque gens sumus*. Porque nao havemos de ser comtemplados? Melhor seria, porem que se mandasse vir uma boa duzia de talheres e pratos para o uso de um certo *bourgeois gentillome*.

Nao basta comer. A agricultura fomentada uara' muito, nao ha' duvida. Mas e' preciso saber comer ... E' por isso necessario que nos venham da Alemanha e vao logo para as bandas do már muitos aprestos de mesa e sobretudo um livro de civilidade e etiqueta. Nao e' assim?

E com mais um ano pode o Governador de Bombaim voltar para aqui e ficar surpreendido de estarmos ja' com a cara bem lavada e com uma *douche* de civilizaçao.

Eu quizera escrever um livro para o uso de certa gente, no genero de *Arte de ensinança de bem cavalgar toda a sela* e que eu intitularia *Arte de ensinanca de bem pregar em todo o garfo*. E' possivel que publique em breve este livro que ha de ser impresso em bom papel, com uma capa flamejante representando um bojudo burgues a contemplar afficto o cabo duma facal...

—x—

O *Bharat*, segundo se infere da suá ediçao passada, vai ser processado, devido a um seu artigo em que promete revelar-nos muitas novidades. Pediu que o levassem a' barra do Tribunal; fizeram-lhe a vontade. *Tadinhos* deles que ate' fazem-nos a nossa inteira vontade!

ALMA VELHA

O BHARAT

Na aquisiçao do novo material tipografico, O *Bharat* teve de lançar mao de emprestimos importantes cujo pagamento pontual e' o seu impreterivel dever.

Pedimos, porisso, aos nossos amaveis assignantes a finesa de saldarem por via postal os seus debitos, para que, livre dos encargos contraidos, o nosso jornal possa pugnar, com desafogo economico, os interesses do Paiz que extremece, com todas as veras da sua alma

Nao mendigamos apoio improficuo e indevido: pedimos apenas que paguem o que nos e' devido.

Nossos agradecimentos a'queles que tiveram a delicadeza de pagar adiantado o custo de suas assinaturas.

E muito para desejar que os outros lhes sigam o exemplo para o bem da Empresa que e' popular.

O administrador do Bharat

Ecos e Critica

Digno de louvor

Nos anos idos, a receita da alvidração dos *cumeeins* deste concelho não subia para alem de 275 rupias. A mesma receita, porem, marcou êste ano um aumento de 650 rupias, graças ao escrupulo do sr. Carvalho zeloso empregado dadministração do concelho, secundado na honesta tarefa pelo seu chefe sr. Rebelo.

Honra-lhes seja a ambos pois!

Queixas

Consta-nos que nas bandas de Molem, de Canvorem, em nome dum importante proprietario dê-te concelho, um certo tipo está praticando actos de verdadeira selvageria, ofendendo direitos dos terceiros.

Pelo que nos dizem, o tal homem e sempre em nome do referido proprietário, tem estabelecido ai o regime de terror dando, por momentos, a idêa de que em Molem não hà outra autoridade, se não a daquele tipo, amigo do Baco.

E' pena que ás barbas dos poderes constituidos surjam criaturas que incomodem o Povo. Se não fôra isto, pouco nos importaria que o pobre diabo estivesse embebedar-se e atirar-se ao precipicio da ruina propria.

E' grave o que nos referem e porisso recomendamos o caso ao sr. Administrador do concelho em nome dos perseguidos que nos solicitaram ingerencia no assunto.

Loucura?

Um amigo nosso, digno de respeito, quere pela sua avançada idade, quere pela sua experiencia, teve a amabilidade de dar-nos o consehlo de não tratarmos no *Bharat* de certas coisas, referentes aos *grandaços* di cá, rematando que era loucura proceder domodo contrario.

Loucura? Pode ser, de facto. Tal loucura é, porêm, uma necessidade. E todos sabem que a necessidade não tem lei...

Dádo o sentimento de amizade que ditou o referido con

नाचें घोडें मरता एके ठिकाणीं पाणी पीत नाहीं. हीतर अशा दुनियेंत रामबाण ठरलेली गोष्ट. असे एक का दोन? स्त्रीविषयक ... अढळतात. आणि यांतली एकेक गोष्ट कानावर येऊं लागली म्हणजे मुलींच्या बापाचें डोळे उघडतात. व दुरून डोंगर साजरे आणि जवळ जातां कावरे, हीं व अशीं अनंत वचनें समोर नाचूं लागून मरणप्राय जिणें होतें. यांत आश्चर्य कसलें?

या स्थितीचीं निदर्शक वर्णनें 'मसीच्या बाजारांत' आहेत, हें कशाचें फळ? फक्त गाजर-पारखेपणाचें. ही गोष्ट विसरतां कामा नये. याला अपवादही असतील पण थोडे. आणि ज्यास्त मिळतील तर आपल्यास इष्टच होत. आता या एकंदर वस्तुस्थितीचा खटतर परिणाम मुलींस मात्र जाचक होतो. ती त्यांतल्या त्यांत अधिक हृदयद्रावक बाजू आहे. जगांतील सगळे लोक व सगळे विषय दिसतात, त्याप्रमाणे असत नाहीत आणि असतात त्याप्रमाणें दिसत नाहीत. यामुळें पुष्कळ वेळां लोकांची दिशाभूल होते.

तेव्हां कन्यार्पण करण्याआधीं योग्या योग्य स्थळाची निवडणुक करणें मुलींच्या बापाच्या चतुराईवर जास्त अवलंबून आहे या ठिकाणीं आपल्या प्रिय कन्येला सौख्य प्राप्तीच्या दृष्टीनें पोषक अशा कोणत्या विषयांची अनुकूलता आहे आणि ते विषय कोणते हें त्यास चांगलें समजत असलें पाहिजे. तशांत ज्याच्या ताब्यांत आपण एक अमूल्य रत्न [कन्या) देत आहों, त्याचें उत्तम प्रकारें संरक्षण करुन योग्य उपयोग घेण्यास तो पुरुष किती समर्थ किंवा असमर्थ आहे. याची पारख करणें पित्याचें कर्तव्य होय. शिवाय त्या दोघांच्या (भावी पति-पत्नी-या] अंगीभूत इष्टानिष्ट गुणधर्माची तुलनात्मक संगति ठरवली पाहिजे ती निराळीच. बाह्य भपक्याला हुरळून जाणें माणसुकीला सोडून आहे. पिवळें दिसतें आणि चकाकतें म्हणून सर्वच सोनें असत नाहीं.

थोर कूळ, थोर प्रतिष्ठितपणा, आणि थोर संपत्ति इ. सर्व कांहीं थोर असलें तरी इतक्याला मनुष्यानें भूषण समजणं योग्य नव्हे.

हीं भूषणें खरीं शोभा देणारीं नाहींत. व त्यांच्या योगानें खरी शोभा कोणासही यावयाची नाहीं. मनुष्यास खरें शोभादायक आणि सर्व भूषणाचें मूलभूत भूषण म्हणजे 'शीलं परंभूषणं' हें होय या भूषणानें विभूषित माणसें असतील तीच जागा कन्यार्पणालायक निःसंशय समजावी. सुशील माणसें नेहमीं पूज्य व सदाचार संपन्न असतात.. शीलरूपी भूषणाविरहीत मनुष्यें असलेल्या जागेला उत्तम जागा समजणें शहाणपणाचें लक्षण आहे असें निदान मी तरी म्हणणार नाहीं. कारण सुशीलता नसताना कन्यार्पणालायक उत्तम जागा मानणें शहाणपणाचें असेल, तर मग नखशिखांत अलंकारांनीं नटलेल्या पण कुंकुम तिलक-रहित एकाद्या युवतीला सौभाग्यवती मानणारास वेडा पीर कां म्हणावयाचा? त्याला देखील उत्तम शहाणा म्हणावें लागेल.!

वरील विवेचनांत शीलाला दिलेलें महत्व निर्विवाद सिद्ध आहे. व वरपरीक्षेंत शील माझ्या मतें पहिली बाजू आहे. मुलगा फक्त विद्वान, गोरा गोमटा इंग्रजी बहुत शिकलेला इतकें पाहून भागत नाहीं. वरसंशोधनाच्या बाबतींत कोणत्या गोष्टींकडे लक्ष पुरविलें पाहिजे याचा खालील श्लोकांत निकाल चांगला दिला आहे.

> कुलंच शीलंच सनाथताच।
> विद्याच वित्तंच वपुर्वयश्च।
> एतान् गुणान् सप्त विचिंत्य देया।
> कन्या बुधाः शेष न चिंतनीयम् ॥१॥
> एतैरेव गुणैर्युक्तः सवर्णः श्रोत्रियो वरः।
> यत्नात्परीक्षिते पुंस्तत्वे युवा धीमान जनप्रियः ॥२॥

ज्यांस कन्यादानाचें खरें पुण्य मनापासून जोडावयाचें असेल त्यानीं वरील श्लोकाचें नीट मनन करून विचार करावा व त्याप्रमाणें आपली योजना अमलांत आणावी 'सत्पात्रीं दान' ही म्हणच मुळी आहे. मग तिकडे दुर्लक्ष करून भागणार कसें?

कुल [विशेषतः) शील, सनाथता, [आईबाप वगैरे असणें] विद्या द्रव्य, असावा. एवंच मुलींच्या बापानीं आपलें बुद्धिसर्वस्व येथें खर्च करावयास पाहिजे. या उभयतांच्या युक्तायुक्तेवर सर्व [गार्हस्थ्याची] संसाराची टोलेजंग इमारत उभारणारी असते. म्हणून हा शरीर संबंध जुळवणारानें दोघां वधुवरांच्या स्थळ आणि काल म्हणजे वय यांचे बद्दल शास्त्रोक्त पण व्यवहार्य सांगोपांग विचार ठरविल्याशिवाय आपल्या योजनेची अमल बजावणी केल्यास मागें लिहिल्याप्रमाणें परिणामी तापदायक होऊन 'आपली हानी व जगाचा हंसा' व्हावा लागेल.

स्थल निर्णय व काल निर्णय यांतून काल निर्णयाचा विषय माझे अधिकाराबाहेरचा असून शास्त्रज्ञांनीच तो सोडवला पाहिजे. शिवाय स्थळ विषयक लिहिण्याचा मुख्य उद्देश असल्यामुळें तो अप्रस्तुत भाग आहे. फक्त उपांग म्हणून त्याची या लेखांत झुळूक दाखविली इतकेंच. तो स्वतंत्र विषय आहे. असो. आमच्या समाजात ज्या अनेक अव्यवहार्य रूढी प्रचारांत आहेत त्यांस शक्य त्या रीतीनें आळा घालावा म्हणुन यथामती प्रयत्न केला. आणि पुढेंही करण्याचा निश्चय आहे. माझ्याच खटपटीनें कायसें होणार म्हणा? परंतु निदान त्या उघड दृष्टीस येतील. व समाज हितवाद्यांस अंशतः तरी पुष्टि मिळेल. अशी माझी समजूत आहे. कांहींच नाहीं म्हणतांनां विषय बराच लांबला. पुढील लेखांत मित्र-विवाहाबद्दल थोडें स्वमताविष्करण करून 'विवाहमीमांसे'ची परिसमाप्ति केली जाईल.

ग. रा. बोडस.

माझा आंगोलचा प्रवास

पत्र नं. ४

कालच्या पत्रांत लिहिल्याप्रमाणें ता. ३ रोजीं सायंकालीं आमची बोट मोंबास बंदरांतून सुटून काल सकाळीं सहा वाजतां झांजिबारला पोंचली. तेथें इमिग्रेशनचें कांहीं लचांड नाहीं. मोकळेपणानें उतरून शहरभर फिरून यावें. फक्त जे तिकडे राहणार असतील त्यानां मात्र तीन पौंड अनामत ठेवावे लागतात. झांजिबार शहर मोंबास पेक्षां फार विस्तीर्ण व भव्य आहे. तेथील घरें बंगल्यासारखीं ठेंगणीं तर झांजिबारचीं मुंबईसारखीं तीन चार मजली असून वस्ती फार दाट. मोंबासचे रस्ते फार रुंद तर झांजिबारचे अगदीं अरुंद पण डांबरनें तुळतुळीत केलेले दिसतात. तेथील घरांची पद्धत इंग्लिश नमून्याची तर झांजिबारांत मुसलमानी नमूना. कारण तेथील राज्य सुलतानाच्या ताब्यांत आहे. तेथें हस्तीदंती सामान, तारतारुग, पावप्रेत कावालमार्टिज्य वगैरे जिनसा व इतर नक्षी केलेलीं हस्तकलेचीं कामें सुरेख मिळतात. पात्रेलावरील व काळ्या लांकडावरील अगर हस्तीदंताचीं किंवा रुप्याचीं कोरीव कामें फारच मनोवेधक असतात. बोट बंदरांत येऊन नांगरली म्हणजे तेथील व्यापारी वर येऊन डेकवर आपल्या जिनसा मांडून दुकानें थाटून बसतात. अर्थात् बोट निघेपर्यंत जत्राच भरल्याचा भास होत असतो. तेथील मूळ रहिवाशी मुसलमान लोक आपलीं घरें जमिनी वगैरे जिनगी आमच्या हिंदी लोकानां विकून आपण आतील भागांत म्ह. खेड्यांतून रहावयास जातात. कारण शहरांतील महाग राहणी त्यांस झेंपत नाहीं. त्यामुळें शहरांतून ज्यास्त वस्ती गुजराथी, मेमण, बोजे, आमचे गोवानीज यांचीच. कोण दुकानदार तर कोण दवाखान्यांचे मालक कोण वकिली तर कोण डाक्टरी करतात. तेथील बाजारांत फळफळावळीची सुबत्ताच दिसते. लिंबू तर फारच मोठे असून पैशाला चार पांच देखील मिळतात. लिंबाचें मिर्च्याचें वगैरे लोणचें फार सरस असून स्वस्तहि पण आहे. मी थोडें वाटखर्चासाठीं घेतलें आहे मासळी बाजारांत अनेक रंगाचे लाल, हिरवे वगैरे मासे पाहून आश्चर्यचकीत झालों. मोंबासला मासे पुष्कळ पाहिले होते. पण ते गोव्यांसारखे असो. तेथून रात्रीचे दोन वाजतां बोट सुटावयाची. परंतु माल उतरण्यास वेळ झाल्यामुळें आज सकाळीं ७॥ ला सुटून अकरा वाजतां, म्ह दोन तास आधींच येथें पोंचली. मुंगांवहून मोझांबिक पर्यंत जाणाऱ्या बोटी हें बंदर करीत नसतात. मुंबईहून लौरेंस मार्केला जाणारी बोट मात्र येथें बंदर करिते. येथें उतरतांच मी दुसरा तिसरा विचार न करितां एक रिक्षा [माणसानीं ओढून न्यावयाची गाडी) भाड्यानें करून रिक्षेवाल्यास रेल्वे आफीस मध्यें नेण्यास सांगितलें. तेथें पोंचतांच श्री. विष्णु पुरुषोत्तम शे. कुडचडकर यांचे नांव लिहून रिक्षेवाल्याकडून चिठी आंत पाठविली. व मागाहून मी वर मांडीवर गेलों. तों तो बाहेर निघण्यास व मी आंत जाण्यास बरोबर गांठ. मग काय विचारतां? एकमेकांना जो आनंद झाला तो लिहवत नाहीं. परदेशांत स्वदेशीय, स्वधर्मीय असा ओळखीचा, स्नेहाचा इसम भेटल्यावर एकमेकांची स्थिति कशी होईल याची इतरांनीं कल्पनाच करावी. !! आपले सर्वच वाचक कांहीं रा. कुडचडकराना ओळखत नसतील. ते आमच्या इकडल्या कुडचडें गांवचे रहिवासी, वयानें तरुण व होतकरू असून स्वतंत्र रीतीनें नशीब काढावें म्हणून दोन अडीच वर्षामागें येथें परदेशांत येऊन राहिले आहेत. त्याना साधारण पोर्तुगीज व इंग्रजी या भाषा अवगत असल्यामुळें, येथें येतांच त्यानीं रेल्वे आफिसात आपला प्रवेश करून घेतला. त्यांची कामगिरी त्यांच्या वरिष्ठांस मानवत असल्या. वरून हळु हळु हुद्यांत व पगारांत वाढ होण्यास अडचण येणार नाहीं. त्यांचे वरिष्ठ हेहि एक हिंदु गृहस्थ असून सुशील व शांत स्वभावाचे आहेत. येथें मुंबईकडील ब्राम्हण, परभु रत्नागीरीकडील शेणवींपैकीं सारस्वत ब्राम्हण वगैरे बरेच लोक आहेत. ते सर्व कुडचडकरांशीं फार प्रेमानें वागतात. मी त्यांच्या गांवचा आहें हें समजतांच माझ्याशींहि ते आदरपूर्वक वागले. मजबरोबर इकडे तिकडे फिरावयास आले. अशा सुस्वभावी मित्रांच्या सहवासांत कुडचडकरांचे दिवस मजेनें गेल्यास नवल नाहीं. त्यांतले त्यांत गोडबोले कर्णिक, पंत वगैरे गृहस्थ तर फार घरोब्यानें वागतात. अवेडें येथील 'आलेलुइ' हा इकडे भेटला. रा. कुडचडकरांच्या आफिसांत काम करीत असून, आपल्या बायकोसह त्यांच्या शेजारींच बिऱ्हाड करून आहे. त्यांच्या आग्रहानें त्यांच्या बिऱ्हाडीं जाऊन घटकाभर बसून आलों. तोहि येथें आनंदानें आहे..रा. कुडचडकर आपल्या सात रुपये पगाराच्या स्वयंपाक्यासह स्वतंत्र बिऱ्हाड थाटून आहे. सोबत 'दोस्त' नावांचा 'माखजनचा' एक मुलगा आहे. घरभाडें २३ रुपये भरावे लागतात. इतर दाणागोटा वगैरे सामान स्वस्त असल्यानें बिऱ्हाड खर्च ज्यास्त येत नाहीं.

असो. थोडा वेळ विश्रांति घेऊन शहरांत फिरावयास गेलों. दारेसलाम हें एक नुकत्याच झालेल्या महायुद्धांत, लढाईचें ठिकाण होऊन गेल्याचें आपल्या वाचकांस माहीत असेलच. येथें एक निकराची लढाई झाली होती. त्याच्या खुणा म्हणून जर्मनानें फोडून टाकलेल्या दोन तीन बोटीचे सांगाडे दाखवितात. हें शहर फार टुमदार असून जर्मन थाटाचें आहे. १९१७ सालीं जर्मनीकडून तें इंग्लिशानीं काबीज केलें. जमिन फार सुपीक असून जनावरेंहि देशावरील जनावरांसारखीं पुष्ठ व काटक दिसतात. एकेक गाय, किंवा

Ano VIII *No* 7

...a 17 de Maio d 1923

ASSINATURA
cada ano tres rupias

ANUNCIOS
linha ainda que repetida uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ८ वें, अंक ७
गुरुवार ता. १७ मे सन १९२३

वर्गणीचे दर.
सालीना रु. स. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

UM CANCRO SOCIAL...

A PRAGA DA TABERNA

VOLTANDO A' VACA FRIA...

No artigo anterior sucintamente narramos os males, que assoberbam a Humanidade, provenientes do alcool Baco infilitra-se nosnossos organismos seduz-nos e nos arrasta para a senda da perdigao...

A fita de consequencias funestas do vinho, nao terminou, e' longa, e' interminavel...Porem, como para a desenrolar toda inteira eram necessarios alguns numeros deste semanario e talvez um grosso *in-folio* apontaremos a' *vol de oiseau* as mais salientes: Em 1908 o Bispo de Strasburgo fazia esta justa observagao: "O alcoolico esta' fortemente disposto a violar os sentimentos mais nobres e altruistas: a blasfemar; a desprezar a Autoridade; a espancar, ferir e matar; a entregar-se bestialmente aos prazeres impuros; a gastar na taberna o dinheiro que era preciso para a sua mae, para sua esposa e para seus filhos, e mesmo a roubar para satisfazer a sua imperiosa e maldita paixao." E tinha toda a razao o rev. Bispo.

Isto e' ali, na grande e *avangada* cidade de Strasburgo e nao o e' menos nesta minuscula cidade, qual jardimsito plantado a'-beira do suave e caudaloso Mandovi...

Nao escoa muito tempo, que a *Epoca* encetara uma campanha contra esse virus degradante, e os casos que cotidianamente relatava pormenorizadamente eram de fazer por os cabelos em pe a um careca, de ter tremuras nas pernas e perlar do suor frio a fronte...E era necessario que assim se procedesse era urgente que aquela crapula nojenta se pusesse a'mostra e que o pus nauseabundo desta ferida em gangrena se abrisse para que todos transidos do mais algido pavor se considerassem, se regenerassem.. "A rialidade e' dura, diz o seu *reporter* agressivo, brutal, irreverente, talvez. Concordamos. Mas nao nos pertence o direito. e sobretudo, o dever moral de a abandonar, deixando-a livremente continuar chafurdando no enxurro em que vive. Nao.",

E quais eram esses casos que ele reportava com o titulo *A Margem da Vida...Vadias*...etc? Sao factos que os meus leitores, nao podem ignorar e presenciam quasi de hora a hora, de minuto a minuto, neste desgragado Pais. desgragado por culpa nao de Deus, mas somente dos homens.

Ai num almanac divisei algures esta noticia que e' de imprescendivel utilidade para no's:

"O alcool e' uma despesa, primeiro inconveniente.

O alcool nao mata a sede: quanto mais alcol se bebe, mais sede se tem,

O alcool nao nutre; nutre tanto como a chicotada o cavalo.

O alcool gera doengas; doengas do estomago, de intestinos, etc; etc,

O alcool gera a loucura; os doidos sobre so devem a sua loucura ao alcool.

O alcool gera o vicio: a esse respeito nao digo nada, com medo de dizer muito.

O alcool gera o crime. As cidades, ou povoagoes onde mais se bebe, sao aquelas onde mais crimes se cometem.

O alcool mata a geragao presente, depois de a ter corrompido.

O alcool mata a geragao futura 50% dos idiotas sao filhos de alcasticos. 60% entre os epilepticos.

Quer saber seus efeitos no ultimo decenio?

Alem das extraordinarias despesas directas e indirectas que ocasionou:

1. Causou a morte a 300.000 pessoas.

2. Reduziu a casas de azilo a 100.(0) individuos.

3. Levou a' prisao 150,100 individuos.

4. Produziu a loucura em mais de 100.000.

5. Provocou 1.500 assassinatos, e 20.000 suicidios.

6. Ocasionou a destruigao de edificios e mercadorias no valor de 10.000.000 de pezos.

7. Deixou 200.000 mulheres viuvas e 1. 000.000 de meninos orfaos.

Pois sao os lamentaveis efeitos da arte de destilar.

E' aterrorisante, e' medonho o que ai se le ... E isto continua...e esta chaga nojenta continua aberta exalando um odor acre e nauseabundo! ... Nao ha ninguem que o combata, que se erga de espada com punho e corte o mal de raiz e nem a espada de Damocles paira para cima dos alcoolicos para extermina'-los duma assentada...

A mise'ria hade progredir, hade perpetuar-se nas geragoes futuras, se ele tem o caracter hereditario ... E' simplesmente desolador e te'trico o que se presenceia.

E cada dia abre se uma taverna e consequentemente acresce a legiao ja consideravel de "bebados".

E' veridico o ditado. Uma taberna abre se e fecha-se uma escola: Em toda a parte. no fundo duma aldeia mais sertaneja, ha quatro tabernas — e' regra que nao tem exepgao... E sempre essas tabernas. por menor que seja o seu numero regorgitam de fregueses, que ate' nao ha' lugar para la se meter uma agulha ... E a policia complacente afasta o seu olhar enviezado e segue para diante!

E e' devido a nossa complacencia e indiferenga que isto progride.

E' verdade que esta indiferenga diz um ilustrado colaborador do *Heraldo*, faz de no's um povo pacifico, sereno e incapaz de iusubordinagao o que e' uma grande virtude; mas tambem e' ela que nos faz permanentemeute inuteis e criminosos, a ponto de assistirmos de bragos cruzados, a' nossa propria ruina — o que e' um gravissimo defeito!!

E qual essa ruina? E' a ruina moral sem duvida. A material estamos no's fartos de ver e de atinar que aquilo nao se concerta nem a setima facada... sim "a nossa educagao moral esta' por se fazer" diz ele com toda a razao E essa ruina provem deste vicio predominante que atrai todos os vicios como acabamos de dizer e convem frizar outra vez...

"*O mundo e' um pantano de emanacoes nauseabund*os dizia ha' pouco o Cardial Primaz de Espanha. E' infelizmente a verdade o que dizia o ilustre purpurado.

Em todo o lugar tropega-se no lodo na lama, na podridao: Nem tudo e' assim. Deus seja louvado. Ao lado do vicio existe e existiu sempre a virtude Sempre uma multidao houve de individuos que se se deixaram arrastar pelo vicio e outros que souberam fugir dele. Mas a nossa complacencia e' que e' o esteio seguro deste vicio intoleravel. Eis o que verberava nao ha muito o "Se'culo": Mas a "indiferenga perante o alastramento dos costumes licenciosos, a tolerancia e quasi complacencia dispensada aos corruptos isso significa que o organismo social se encontra enfermo e nas condigoes mais propicias para se gangrenar e dissolver. Eis o que acontece conosco. Mais do que a indiferenga e a tolerancia, a complacencia e' manifesta, O vicio *campeia a' sombra benigna da propria autoridade, vigilante para que o nao perturbem.* Que outra coisa senao um complacente patrocinio representa e testemunha a existencia de tantas tavolagens com os seus anexos de prazer que constituem ora a isca, ora o disfarce? Que outra coisa senao criminosa cumplicidade se conclue da abstengao absoluta de medidas que impegam a frequencia desses outros (que o nao deixam de ser, embora muito dourados) por uma juventude que neles arraza a saude, a dignidade, a honra, comprometendo, esbanjando o seu e o alheio? Que outra coisa senao aquiescencia a secretos influxos se infere da impunidade de que gozam os que exercem o trafico de toxicos vulgarisados entre uma certa clientela das casas de jogo e cuja apologia, em prosa e verso, vem sendo feita por uma literatura de contrabando que individuos da chamada roda elegante se nao pejam de firmar com os seus nomes?

Desculpem-uos o longo da transcrigao, pois so' assim e' que poderao calar fundamente no animo dos meus leitores. So' assim as palavras autorisadas, devem modificar a maneira de ser actual. Vindo donde vem, devemos acata-las com religioso fervor.

A procissao nao terminou, esta' ainda no adro...

Alma Velha

Dnian Mandir.

No dia 21 do corrente recai o aniversario da fundação de *Sri Vethal Praçadica Dnian Mandir* de Assolnã que está prestando, sem discripancia de opiniões, relevantes serviços ao Povo daquela localidade.

A mesma Associação que muito honra a população hindu daquela região, possui um passado glorioso e nobre, o que dispensa a nossa apresentação. Longa vida lhe disejamos.

इलु पण बराच जोरदार प्रतिबंध होऊं शकेल. या बद्दल बरीच खात्री वाटत आहे. हा मार्ग असा:—

सध्या अमेरिकेंत बऱ्याच वैद्यशास्त्रज्ञ शोधक डाक्टरांची विचारसरणी एकंदरींत मांसाहाराला विरुद्ध येनत चालली आहे. ह्या विचारसरणीला अनुसरून तेथें फार मोठे प्रयत्न चालू आहेत. म्हणजे त्या मतानें वागणारे डाक्टरांनीं कोठें कोठें रोग्यांची इस्पितालें उघडलीं आहेत, प्रयोग शाळा चालविल्या आहेत, त्यांचे सूक्ष्म अनुभव घेऊन तात्विक आणि व्यावहारिक सिद्धांताचे उत्तम उत्तम ग्रंथ तयार केले आहेत. आणि ह्या ग्रंथांतील प्रमेयांचा सर्व लोकांत प्रसार व्हावा म्हणून वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, व्याख्यानमाला इत्यादि सर्व प्रकारचे उपाय तिकडे चालू आहेत.

आमच्या गोव्यांत जे कोणी श्रीमंत आणि मध्यम ऐपतदार असून गोहत्याप्रतिबंधाची खरी इच्छा बाळगणारे गृहस्थ असतील, त्यांनीं गोरक्षण हें सर्वांत अग्र त्याचें कर्तव्य म्हणून त्यासाठीं शक्य तितकें द्रव्य खर्च करण्याचा निश्चय करून, वर आम्हीं लिहिलेलें हिंसानिषेधात्मक वाङ्मय मिळेल तितकें विकत घेऊन, आपापल्याला शक्य तितक्या प्रयत्नानें त्या त्या ग्रंथांतील महत्वाच्या मुद्यांचें, त्या त्या ठिकाणच्या अनुभविक सिद्धांताची वर्तमानपत्रें व मासिकें यांतील व विद्वानांच्या व्याख्यानांतील प्रतिपादनाचें, आमच्या गोव्यांतील पोर्तुगीज भाषेंत भाषांतर [पैसे खर्चून] करून तें येथील चालू वर्तमानपत्रांतून क्रमशः नेहमीं प्रसिद्ध होईल अशी योजना चालू ठेवावी. हीं भाषांतरें उत्तम तयार करणारांस बक्षिसें लावावीं. अशा रीतीनें कांहीं वर्षें सर्वत्र त्या वाङ्मयाचा जोरानें प्रसार करण्याचें बाबतींत होईल तितका स्वार्थत्याग आणि प्रयत्न करावा. म्हणजे वर सांगितलेल्या अल्पहि बीजापासून अहिंसामताचें पीक गोव्यांत हवें तितकें पिकणें संभवनीय आहे. त्याला हिंदूंच्या सद्वासनाचें जलसिंचन आणि गोरक्षणार्थ करण्यांत येणाऱ्या द्रव्यखर्चाचें खत भरपूर आणि वक्तशीर पडेल तर ह्या आमच्या, कुजून घाण झालेल्या ख्रिस्ती समाजाच्या मनोभूमीवर भूतदया, अहिंसा पवित्रान्नसेवनाचे परिणाम, अंतर्बाह्य स्वच्छतेचें सुख इत्यादिकांचीं रोपें खचीत रुजून येतील आणि तो क्रम सतत चालू राहिला म्हणजे पुढें आपोआप त्या रोपांचें मोठे वृक्ष होऊन त्यांला जास्त फळें, त्या फळांपासून नवीन झाडें असा क्रम ईश्वरी कृपेनें आणि हिंदूव्यक्तींच्या पुण्यकर्मानें तपश्चर्या निर्दोष चालविल्यानें, प्राप्त होईल. आणि ह्या क्रमाचा परिणाम म्हणजे, गोमांस खाणें हेंच रोगांला आमंत्रण अशी ख्रिस्ती लोकांतील सुज्ञांची समजूत बनली कीं इतर त्यांचे अनुयायी आपोआपच मांसत्याग करितील, मग कसाई लोक गवळी बनतील. दहीं, दूध, तूप, लोणी यांच्या विक्रयानें सधन होतील. तथास्तु.

स्फुट विचार.

जंगलखातें:— जंगलांत चालत असलेल्या अंदाधुंदीच्या दंगलीबद्दल भारतानें सरकारविरुद्ध खरमरींत टीका करून सरकारच्या अन्यायाचें माप मुद्देमालासह सरकारच्या पदरांत बांधलें जावें येतदर्थ त्या खात्याच्या अत्याचारानें त्रस्त झालेल्या जनतेला आपलीं गाऱ्हाणीं भारतद्वारा सरकारसमोर मांडण्यास निमंत्रण केलें होतें. परंतु दुःखाची गोष्ट कीं, या विषयांत जितकी जागृति दिसून यावयास पाहिजे होती तितकी बिलकूल आली नाहीं! अशा स्थितींत सरकारनें आह्मांस मृत माणसें मानून आम्हांवर दंडेली चालविली तर त्याबद्दल आह्मीं कुरकुर तरी कां करावी?

गोरक्षणः— आमचे वाचक आजच्या अग्रलेखाकडे विशेष काळजीपूर्वक लक्ष देऊन, गोरक्षणाच्या कार्यासाठीं त्यांस सुचविलेल्या मार्गाचा ताबडतोब अवलंब करतील, अशी आह्मांस खात्री आहे. आतां फुकटच्या बातांत अर्थ नाहीं. प्रत्यक्ष कार्याला वाहून घेतल्याशिवाय कसल्याहि गोष्टींत यशप्राप्तीची आशा करणें व्यर्थ होय.

वर्तमानसार

— काल रोजीं कन्याशाळे संबंधानें पणजी येथें एक निवडक मंडळीची सभा प्रो. धर्मानंद कोसंबी यांच्या खास निमंत्रणानें भरावयाची होती. आमंत्रणाचा मान दिल्याबद्दल प्रोफेसर साहेबांचे आह्मीं आभारी आहोंत.

— गेल्या सोमवारीं प्रो. शेशाद्रा यांनीं खर्च वजा करून आपल्या सर्कशीच्या खेळाचें उत्पन्न येथील बालोन्नति समाजाला दिलें. खेळास ठिकठिकाणच्या लोकांनीं मदत केल्यांबद्दल समाज त्या सर्वांचे आभार मानीत आहे असें त्याचें सेक्रेटरी रा. शिरवैकर हे कळवितात

—पणजी येथें मळ्यांत ता. २–५-२३ रोजीं सदाशिव भिकू मडकईकर यांच्या मुलांचा व्रतबंध समारंभ अगदीं नवीन पद्धतीनें करण्यांत आला. या प्रसंगीं कलावंतिणीच्या धिंगाण्यास व इतर अप्रशस्त प्रकारांस आळा घालण्यांत येऊन, त्यांचेच पुरोहित रामचंद्र रायप्पा भट्ट रायकर यांच्या अध्यक्षतेखालीं शिवराम गोविंद साळगांवकर यांचे व्रतस्थांस उपदेशपर भाषण झालें.

—पणजी येथील मुष्टिफंड संस्थेच्या दोन्हीं शाळांची वार्षिक परीक्षा ता. १–५–२३ रोजीं सुरू होऊन ता. ४–५–२३ रोजीं शा. नं. २ मध्यें [महालक्ष्मीचे देवालय) बक्षीस समारंभ साजरा करण्यांत आला. अध्यक्षांच्या टेबलावर हिंदुस्थानांतील लोकांचें प्रापंचिक बल वाढविणारे सूताचे ३१४ चरके ठेविले होते. व त्या लगतच विद्यार्थ्यांनीं काढलेल्या सूताच्या कांहीं गुंड्या व वस्त्रें नांवनिशीसह मांडलेल्या होत्या. सभेच्या जागीं शहरांतील प्रमुख मंडळी आल्यावर समारंभास ५॥ वाजतां सुरवात झाली. प्रो. रामचंद्र शंकर नाईक यांची टाळ्यांच्या गजरांत अध्यक्षस्थानीं योजना झाल्यावर मुलांमुलींकडून मधूर आवाजांत ईशस्तवनपर व स्वागतपर पद्यें म्हणण्यांत आलीं. नंतर गणेश शिवराम सामंत यांचें व्याख्यान होऊन अध्यक्षसाहेबांकडून समारोप करण्यांत आला. या प्रसंगीं विद्यार्थ्यांनीं 'मुष्टिफंड' व "माझा हिंदुस्थान देश' या विषयांवर संवादात्मक भाषणें केल्यावर समारंभ समाप्त झाला.

— पणजी–मळें येथें स्थापन झालेल्या राष्ट्रीय शाळेंतील विद्यार्थ्यांकडून ता. २९-४-२३ रोजीं एक वनभोजनाचा समारंभ शेजारच्या डोंगराच्या टेंकडीवरील प्रदेशांत पार पाडण्यांत आला. या प्रसंगीं रामचंद्र प्र. लवंदे व शाळेचे मास्तर शिवराम गोसौळगांवकर व गवाणकर यांचीं भाषणें झालीं असें एक प्रेक्षक लिहितात.

अधिक मास निर्णय

'नवा करणग्रंथ व त्याच्या सारख्या सर्वत्र निर्विवाद विद्वन्मान्य होईपर्यंत कोणतेंही पंचांग धार्मिक कृत्यांत मानूं नये . ' असा जो ठराव , मुंबई ज्योतिषसंशोधनसमितीच्या नांवें प्रसिद्ध करण्यांत आला आहे, तो भ्रामक , लोकांची फसवणूक करणारा व नकर्त्याचा वार शनिवार ह्या म्हणीप्रमाणें अप्रयोजकपणाचा आहे. त्याचीं कारणें:-

१ ज्योतिषाच्या संशोधनासारखें महत्कार्य शिरावर घेणाऱ्या संस्थेनें 'आम्हीं वेध वगैरेंच्या सहायानें पंचांगशोधन व नवीन करणग्रंथ करण्याची योजना करीत आहों. तरी कोणीहि कमिटीचें पंचांग मानण्याची घाई करूं नये अशा अर्थाचा ठराव केला पाहिजे होता. पण तसें न करितां वरच्यासारखा विघातक ठराव करून 'आह्मीं कांहीं करणार नाहीं, व दुसऱ्यानें केलेलें पहावत नाहीं, ह्मणून इतरानींही आमचें अनुकरण करून चुकत असलेलें जुनें पंचांग वापरून कमिटीचे यत्न हाणून पाडावे अशी सूडाची बुद्धि, वरील ठरावानें ज्योतिषसंशोधन समितीच्या कंपूनें व्यक्त केल्याचें स्पष्ट दिसतें. या वरून ही समिती हें काय थोतांड आहे, याचें अनुमान सुज्ञांनीं करावें.

२ निर्णयसागराच्या खोलींत प्रसवलेल्या ठरावांत नवीनपणा नसून तशा जातीचे ठराव , कमिटीचें पहिलें पंचांग प्रसिद्ध झालें त्यावेळीं ही कांहीं शास्त्रीमंडळी जमून केले होते.

३ कोणता अधिकमास खरा किंवा खोटा याचा निर्णय करण्याचा अधिकार शास्त्रीपंडितांचा नसून गणितज्ञ अशा सिद्धांती ज्योतिष्यांचा आहे. ज्योतिष्यानीं तिथ्यादिक वर्तवून त्यावरून शास्त्र्यानीं शास्त्रार्थ सांगावा असा हा अधिकारविनिमय आहे. निर्णयसागरांतील सभेंत कोणीही ज्योतिषी असल्याचें दिसत नाहीं. एक अधिकारी ज्योतिषी सरवस्थे होते. त्यानीं तर नवाथ्यांच्या निबंधाचा निषेध केला होता.

४ निर्णयसागरी ठरावांत कमिटीचें पंचांग मान्य न करण्याची ह्मणून जीं चार कारणें दिलीं आहेत तीं पोकळ असून त्यांचा आजवर पुष्कळ वेळां निरासानें तीं शिळीं झालेलीं आहेत. नमुन्यासाठीं खालील पोटकलमें पहा—

(क) कमिटीचा करणग्रंथ छापून सर्वमान्य होण्यापूर्वींच हें पंचांग प्रसिद्ध होऊं लागलें आहे. हें ह्मणणें—खरेपणाची ओळख पटून देखील 'क्ष' हा 'ब' चा बाप ह्मणून सर्वमान्य होईपर्यंत 'ब' ला आह्मीं 'क्ष' चा मुलगा म्हणणार नाहीं असें ह्मणण्याप्रमाणें असमंजस होय. (बाकी, ग्रंथ छापून लवकर प्रसिद्ध करणें जरूर असल्याचें आम्हांस मान्य असून पुरेशी मदत मिळण्यावर ही बाब अवलंबून आहे. त्या ग्रंथाचा लेखी भाग खंडशः कोणास पहावयाचा असल्यास आह्मीं दाखवूं शकूं.)

(ख) 'ग्रहण बरोबर लागलें ह्मणून पंचांग शुद्ध आहे असें म्हणणें अप्रबुद्धपणाचें लक्षण आहे.' असें ज्योतिषसंशोधन समितीने ४ थ्या कलमाच्या पोटकलमांत लिहून आपलाच अप्रबुद्धपणा जाहीर केला आहे.

(ग) 'केवळ गणित बरोबर असल्यानेंच कोणतेंही पंचांग ज्योतिषशास्त्रशुद्ध व धर्मशास्त्रसंमत ठरूं शकत नाहीं. ' हें म्हणणें आम्हांस कबूल आहे. ग्रहलाघवाच्या रीतीप्रमाणें बिनचूक गणित करून आलेल्या रव्यादिकांच्या स्थिति त्याचवेळीं वेधादि साधनानीं प्रत्यक्ष पडताळून पहातां आकाशांतील त्या त्या तेजोगोलांच्या स्थितीशीं जुळत नाहीं. आणि म्हणूनच तर ग्रहलाघवी पंचांग हें ज्योतिःशास्त्रशुद्ध नसल्यानें शास्त्रशुद्धही नाहीं असें तज्ज्ञ म्हणतात.

यासाठीं निर्णयसागरी ठरावानें व त्यासोबत वांटलेल्या सायनवादी नवाथे यांच्या निबंधानें कोणीही बुचकळ्यांत न पडतां चालू सालीं (१८४५)सर्व धर्माभिमानी लोकानीं यथाकालीं धर्माचरण घडावें अशा सत्यनिष्टेनें अधिक श्रावणमासच मानावा अशी सर्वांस सूचना आहे.

श्री. भिषग्वर्य रामचंद्र पांडुरंग ऊर्फ दादा वैद्य काय म्हणतात पहा—

"पंचांगासंबंधानें निर्णयसागर सभेंतील निबंध मला आला आहे. पण ती केवळ अज्ञान्यांच्या डोळ्यांत धूळ फेंकणें या पेक्षां अधिक कांहींच नाहीं. मुद्दे तर अगदीं पोंचट ! काय म्हणावें ! पण कांहीं काळ असें चालावयाचेंच. सुज्ञ जर पक्षपाती, तर अज्ञांचा अपराध कसचा ?

पेडणें, गोवा. सर्वांचा नम्र

दत्तात्रेय तुकाराम पणशीकर-

त

ता आज तरुण नो ।
ल कोण? सांगा हो ।
रक्तावरी जगलां ।
ीं अहां आलां ।
दु:ख तें तुमचें ।
ां सोडितां तुम्हीं ।
ीं मग दृष्टि फिरवाहो ।
जी लाथाडनी घाहो ।
ा शरण घेराचा ।
वें पतन येणें ।
वाहीन ;
आणीन ।
छावेच सिंव्हांचे ।
ा लागलां साचे ।
पुण्य कृत्यानां ।
णार तें आह्मां ।
हा धैर्यमेरुसे :
ष्टे अंहा दैवा ॥

अज्ञातवासी.

रेल्वे स्टेशन मडगांव

१९१८
वर्ग दरसाल प्रमाणें ता ६ जून

पद्धतीनें देऊन वरच्या वर्गांचें इं
स, हे विषय ब्रिटिश हायस्कुलाच्या

कपणा उत्पन्न करण्याचा प्रयत्न
ेलें जातें.
ा समक्ष पाहाण्याबद्दल पालकांस
्या मुलांस या शाळेचा फायदा क-

T. B. Tirodkar

Anno VIII No 8

…-feira 24 de Maio de 1923

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
la linha ainda que repetida uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.
BHARAT

वर्ष ८ वें. अंक ८

गुरुवार ता. २४ मे सन १९२३

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

Assunto religioso

मला वाटतें, फिरंग्यामुळें हें सगळें सुरळीत चाललें-मी तर असेंहि समजतों कीं, सगळ्या नवीन काबिजादींतील कोंसेल्यांत फिरंगी आदमिनिस्त्रादोर झाले असते तर व गोव्यांत नकली स्वराज्य नसतें तर आमच्या घरांत पूर्ण शांतता नांदली असती जातीजातींच्या अहमहमिकेंतून निष्पन्न होणाऱ्या चहाड्यांस जागा राहिली नसती; स्वार्थी व उद्धट नेटीव लोकांकडून सरकार-दरबार कलुशित झाला नसता. व शेवटीं, जी मुळें इतकी अशांतता झाली व होत आहे, त्या मोठ्या माशांच्या त्रासदायक सत्तेस आळा पडला असता.

भाटकारशाहीनें, नव्या काबिजादींतील लोकांस दरिद्रावस्थेंत पोंचविलें आहे. भाटकार शाहीकडून त्यांच्या श्रमाचें फळ शोषिलें जात आहे, आणि, मुसलमान व मुगदुम यांच्या घशांत शिरत आहे. जे अगोदर जमिनीचे मालक होते, ते मुंडकार; ह्मणून गुलामासारखे वाईट रीतीनें वागविले जातात.

आपमतलबी व सर्व सत्ताधीश भाटकारशाही, नव्या काबिजादींतील कुणब्यांच्या दुःखाचें मुख्य कारण होऊन बसली आहे. या कुणब्यांस आज काल पहातांच मनाची भयंकर स्थिति होते.

याप्रमाणें, भाटकारशाहीच्या हस्तकांच्या त्रासानें कंटाळलेले कुणबी, भाटकारांचा, आणि शेतकीचा त्याग करून मुर्गांव येथें कोळसा भरण्याच्या कामावर किंवा देश सोडून जातात!!!

अरेरे, किती कठिण ही आमची स्थिति?

भाटकारशाही, मुगदूम, मुसलमान, महार, दर दिवसास दीड रुपया फारीक करण्याचा करार, व त्यांपुढें नम्र करून सोडणाऱ्या इतर छानदार गोष्टी आह्मांस भारी झाल्या आहेत. त्या आह्मांस खाण्यास, झोंपण्यास व सुखानें मरण्यास देखील देत नाहींत.

अशा स्थितींत, नव्या काबिजादींत कामकरी लोकांची उणीव कां भासणार नाहीं? मोठ्या जमिनी लागवडीशिवाय कां रहाणार नाहींत? दुष्काळ कां पडणार नाहीं? शेवटीं ह्या एकतंत्री भाटकारशाहीविरुद्ध असंतोष कां माजणार नाहीं?

मला माहीत आहे कीं, पुष्कळ भाटकार कोंसेल्य लेजिस्लातिवांत प्रजेच्या हक्कांविषयीं झगडत आहेत, जसे काय ह्या प्रजेंत, गुलामगिरींत लोळणारे व त्रासलेले असे त्यांचे मुंडकार व देणेकार नाहींतच. मुंडकार हे रेपुब्लिकाचे नागरिक नव्हत काय? मोठ्या लोकांचे ऋणको ह्मणजे कसाईखान्यांत काढल्या जाणाऱ्या आत्मारहित गाईसारखे. ज्यानें बंड, दंगे, बोलशेव्हिज्म कहिरलें त्या आदमसारख्या यवनाच्या व बड्या लोकांच्या वासना पुरविण्याकरतांच त्यांचा जन्म झाला......

हें आमचें दुर्दैव. खरोखरच आह्मां बिचाऱ्यांचें दुर्दैव कीं, आमचे सहाय्यकर्ते सुद्धां, भाटकारी सार्वभौमत्वाकडून वाईट दृष्टीनें पाहिले जावेत.

एक गोष्ट चुकून राहिली होती. ती गोष्ट ह्मटली ह्मणजे मानवी दुष्टपणाचा कळसच होय.

ती गोष्ट अशी कीं, आपल्या भाटकारांच्या वशील्यानें पाहिजे तेव्हां शिपाई आणून त्यांच्या साह्यानें धरपकड, फोडमोड, मारहाण करीन अशा धमक्या देऊन नेहमी आम्हांस तो आदम भय घालीत असतो. त्या मुसलमानानें, आम्हीं पावसाळ्यासाठी केलेली बेगमी पगारी लोकांच्या सहाय्यानें नेली. ह्या वेळीं कांवरें गांव, पलटणीच्या भयानें लोक पळून गेल्यामुळें ओस पडलें होतें. दारें सुद्धां ठिकाणावर नव्हतीं.

असें सांगतात कीं सतरी येथें गरीबांचा कनवाळू असा फिरंगी आदमिनिस्त्रादोर आहे– त्यांचें नांव कापितांव पोंब असून तो आपल्या ताब्यांतील लोकांस मुलांसारखें वागवितो.

सरकार आम्हांसहि पोंबासारख्या दिलदार फिरंगी आदमिनिस्त्रादोराच्या हुद्यांवर कां पाठवीत नाहीं,कां–कीं, नेटीवांच्या भाववंध.' कीपासून लूट, त्रास,चहाड्या, व गैर समज उत्पन्न होतात.........

आम्हांस ठाऊक आहेकीं, आमच्या धनको भाटकारांचे मित्र पोर्तुगालांत देखील आहेत त्याच प्रमाणें असेंहि जाणतों कीं, ते पैशेवाले आहेत. आणि त्यांच्या बराण्यांत पुष्कळ वकीलहि आहेत.

पण, हे सगळे बडेजाव आह्मांस काय करितात? जर आम्हीं त्या मुसलमानांकडून त्रस्त होतों, जर आमच्या निढळाच्या घामाचें फळ त्यांस देणें भाग पडून, दारिद्र्यांत अमच्या प्राणाचे णाप्र–मुलेंलेंकरें खितपत पडतात.

सबब, कांवरे–प्रकरणांचा निकाल कसाहि लागला तरी, भाटकारांच्या मुसलनांचे त्रास कधींहि सहन करणार नाहीं.देणेकार ठरलों तर ऋण फारीग करूं.मुंडकार असें सिद्ध झाल्यास आमच्या जमिनीचा त्याग करूं–

आमचा निश्चय ठरला आहे.सुदैवेंकरून अखेर पर्यंत भांडणारे स्वतंत्रबाण्याचे वकील आहेत. या सगळ्यांचा विश्वास पोर्तुगीज कायद्यांवर फिरंग्याच्या व दिलदारपणावरहि आहे.

ह्या ठरावास सगळे पाठिंबा देतील अशी खात्री आहे. ज्या अर्थी, कांहींच अन्याय नसतां त्या क्रूर आदमच्या चहाड्यानीं, आह्मांस हजारों आपत्ति भोगाव्या लागल्या. व अशा थरावर गोष्ट गेली कीं, निरपराधी असतां आह्मांवर व आमचे वकील साहेब हेगडे देसाई यांवर बंडाचा व बोलशेविझमचा संशय पाखडला गेला.

गोव्यांत फिरंगी नसते तर आमचें काय झालें असतें कोणास ठाऊक! वास्तविकपणें नातिवांच्या भाववंधकीनें लंगोट्या व कांबळी यांसह आह्मांस गट्ट केलें असतें.

वाईटापासून बराहि परिणाम होता, व आदमनें जें वाईट आह्मांस केलें. त्यामुळेंच, आमच्या दुःखी अंतःकरणांत चाललेले विचार व्यक्त करण्याची सुसंधि मिळाली.

पण आज पुरे, गरज पडल्यास योग्य वेळीं आमच्या प्रकरणाशीं संबंध असलेले मुद्दे विशेष खुलाशानें दाखल करीन.

—मांगें येथील कामराची शेवटची निवडणूक कायदेशीर ठरून–अध्यक्ष श्री. सुब्राव विठ्ठल देसाई व सभासद ग. सांवर्डेकर व वालावलीकर हेंच मंडळ कायम करण्यांत आलें.

—दियारियु द नोयती पत्राचे मुख्य लेखक सिं. लुईज दे मिनेझीस माजी तात्पुरते इंशपेक्तोर सिं. आल्व्हिश् पहदेति ह्यांची सुब इंशपेक्तोरच्या जाग्यावर नेमणूक झाली.

—कुंमग व अवेडें येथील रजिदोऱ्या निरनिराळ्या करण्यांत आल्या.

—सांगें व काणकोण येथें होणाऱ्या कोणत्या तरी एका कोमांदमिलितारच्या कोमांदांतीच्या जागीं कापितांव मेंदोंस यांची नेमणूक होणार आहे असें ह्मणतात.

—ओस्पिसेच्या अधिकारी मंडळाच्या निवडणुकीसंबंधीं ब्राज पक्षानें केलेल्या तक्रारीवरून निवडणूक रद्द करण्यांत आली.

—लिसेव सेंत्रालचे प्रो. आलबेर्त गार्सिय द सिल्व्ह हे सहकुटुंब पणजीस पोंहोचले.

—गागु कोर्तीनु व साकादूर काब्राल या पोर्तुगेज वैमानकांनीं गोव्यापर्यंत यावें अशी आपली इच्छा असल्याचें लिसेव सेंत्रालच्या कोंसेल्यु इस्कोलारनें सरकारला कळवलें आहे.

तीर्थांचें महत्व.

प्रकृतीच्या पलिकडे जाऊन निर्भयानंद स्थितीमध्यें राहतां येणें ज्याला शक्य आहे अशा कर्तृत्ववान पुरुषास जगांत अप्राप्त असें कांहींच नाहीं. पूर्णतया ज्ञानाची गोष्ट थोडी बाजूला ठेऊन सामान्य जनतेच्या दृष्टीनें आपण जगाकडे न्याहाळून पाहूं लागलों असतां आपणास तीन गोष्टी दुर्मिळ आहेत असें आढळून येईल. त्या कोणत्या तर—मनुष्यत्व–मुमुक्षत्व–महापुरुषांचा सहवास–असें शास्त्रवचन आहे. या तिन्हीं गोष्टी प्राप्त होण्याकरितां प्रथम जन्मजन्माचें पाप दूर झालें पाहिजे. तरच त्या जिवाला सात्मदर्शनाची लालसा उत्पन्न होऊन तो काचवृक्षतरु जे महान सत्पुरुष त्यांच्या दर्शनाची अभिलाषा करील. तें पाप दूर व्हावें ह्मणून हिंदुधर्मांतील महान सामर्थ्यवान ऋषींनीं धृति, युक्ति व अनुभव यांस धरून अधिकार परत्वें अनेक मार्गांची योजना केली आहे त्यांतच तीर्थयात्रा हें एक सर्वसामान्य लोकांकरितां [स्थूल) साधन योजिलें आहे व ही चाल फार कालापासून आतांपर्यंत चालू असल्यामुळें तें धर्माचें एक अंग होऊन बसल्याप्रमाणें झालें आहे. या तीर्थयात्रेचा मूळ उद्देश वरील सहज तीन वस्तूंची प्राप्ति हा आहे.

—तीर्थे तीर्थे निर्मलं ब्रह्मवृंदं। वृंदे वृंदे तत्वचिंतानुवादः। वादे वादे जायते तत्व बोधः बोधे बोधे भासते चंद्रचूडः– अर्थ स्पष्टच आहे. आपल्या हिंददेशांत ज्या वेळीं अग्निरथ नौकायानादि यांत्रिक वाहनें उपलब्ध झालेलीं नव्हतीं. त्या वेळीं पायीं प्रवास करणाऱ्या लोकांची गैरसोय उदार मनाच्या धार्मिक धनिक लोकांकडून दूर केली जात असे. व त्यामुळें जागोजाग धर्मशाळा, पाणपोया, इत्यादि पथिक लोकांकरितां सोई करणें हें मोठें पुण्याईचें कृत्य समजलें जात असे. यात्रेकरू लोकांतील पोटभरूंचा भरणा वगळला तर बरेच भाविक, सात्विक वृत्तीचे, भजनानंदी लोक 'पायीं तीर्थयात्रा मुखीं हरी नाम' अशा पद्धतीनें जातानां दिसत होते. व गृहस्थाश्रमी लोकानां सत्पात्रीं अन्नदान करण्याची सुसंधी मिळत होती. वर्तमानकाळामध्यें पायीं तीर्थयात्रेचें महत्व पार उडून गेलें असल्यामुळें ते रस्तेही हल्लीं निरुपयोगी होऊन गेले आहेत, परंतु अद्यापिही पायीं प्रवास करून जगाचा अनुभव मिळविणाऱ्या व्यक्ती कांहीं कमी नाहींत. उदंड देशाटण करावें। तरीच घडे दिग्विजये निस्पृहासी –ही श्रीरामदास स्वामीची ह्मण ज्यानें अशा तऱ्हेनें प्रवास केला असेल त्यासच बरोबर पटून त्यांतील मर्म ध्यानीं येईल. नर्मदा प्रदक्षणा अद्यापिही पायींच केली जाते. ती संपूर्ण होण्यास तीन वर्षें लागतात. आंखलेली मर्यादा सोडून जलदी केली असतां एक वर्षांतही पूर्ण होते. या प्रवासांत अद्यापि धनिकांकडून प्रदक्षणावादी लोकांकरितां व्यवस्था केली जात आहे. दयेचा सागर प्रसिद्ध देवी अहिल्याबाई होळकरीण यांची या यात्रेंत बरीच मदत होऊन तिचा जयजयकार होत असतो.

एके कालीं ही आमची आर्य भूमाता आपल्या सृष्टिसुंदरतेच्या अलंकारानें अत्यंत रमणीय व मनस्वी वृत्ती ऊत्पन्न करणारी अशी दैदिप्यमान दिसत होती त्यावेळी आमचीं प्रसिद्ध तीर्थें एकंदर त्याना

An. VIII *No 17*

Quinta- [...] e Julho de 1923

[ASSIN]ATURA
[...]o tres rupias

[ANU]NCIOS
Por ca[...]a que repeti la uma tanga
[...] avulso uma tanga

[DIRE]CTOR E EDITOR
[...] Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.

BHARAT

वर्ष ८ वें, अंक १७

गुरुवार ता. २६ जुलै सन १९२३

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

Destacamento policial

Ja' e' do dominio publico a noticia da instalaçao dum destacamento do Corpo de Policia em Sanguem, com atribuiçoes estensivas ao concelho de Quepem.

Nao auscultamos, ainda, a opiniao publica sobre esta medida policial nem tivemos vagar para colher sobre o assunto impressoes das cabeças pensantes dos dois referidos concelhos.

Quanto ao *Bharat*, esse recebeu com agrado a mencionada medida, porque se persuade de que ela contribuira', preponderantemente, para a consolidaçao do direito da segurança de propriedade, hoje, tao abalada por constantes atentados e frequentes violencias, uns e outras, sem devido correctivo.

A se julgar pelas decisoes das ocorrencias policiais que a imprensa do Pais regista em todas as semanas, e' de se esperar que questiunculas que, pela frouxidao das medidas administrativas ou pelo retardamento das medidas judiciais, ficavam sem resultado imediato com pronto castigo dos delinquentes, terao agora soluçao urgente.

Anima-nos, mesmo, a esperança de que a instalaçao do novo destacamento que subordinando, naturalmente, as suas decisoes ao criterio imparcial e justo, patenteado noutras partes, esforçar-se-ha', como se nos afigura, por fazer triunfar a verdade, evitara' necessariamente, que a inocencia seja *pasto* do egoismo influente, que o pequeno seja oprimido pelo grande, que o fraco desprotegido seja perseguido pelo forte de *costas* quentes, que finalmente, continue em esplendor o regime do *peixe...grau'do comer o peixe ... mendo.*

O *Bharat*, como se ve, e', pois, a favor do Corpo de Policia em geral e do destacamento de Sanguem, em especial.

So' uma coisa o preocupa: a escolha do elemento inferior: soldados.

Entendemos que estes devem ser escolihdos dos que, ao menos, possuam a habilitaçao do ensino primario complementar, reunindo a uma energia indomavel um fundo de justiça integra, para que se nao deturpe a verdade, como recentemente sucedeu no caso de Canvorem que for falta do devido escrupulo no elemento inferior, assumiu proporçoes ..*belicas*, deixando em todos os que conheciam, de fundo, o assunto impressoes pouco agradaveis.

E' claro que o pessoal recrutado nas condiçoes por no's indicadas tera' de ser bem pago, cada soldado de policia por trinta rupias mensais, pelo menos. Nao importa, porem, pois ele honrrara', inda mais, a utilissima instituiçao que e' o Corpo de Policia, levantando bem alto o seu bom nome e prestando serviços relevantes ao Paiz.

Ao terminar estas ligeiras consideraçoes, o *Bharat* espera que o novo destacamento com sede em Sanguem criara', tambem, em sua volta uma boa fama, identica a' que desfrutàm os de Pangim, Margao e outras partes de Goa.

RIDICULO!

A *Terra* de 7 do corrente dedica um longo artigo a' debatida questao dos *Velipos* de Canvorem, artigo que e', a todos os titulos, digno de ser lido e ponderado por quem deseje aprofundar-se no estudo scicologico de certas criaturas que por causa de seus interesses mesquinhas sao capazes de toda a casta de vilanias.

Pelo mesmo artigo que côntem conceitos patrioticos, carateristica inflexivel que sempre embelesa a prösa daquele nosso presado colega, se vê que a *gente ultramarina* bateu pe's e maos para, utilisando a graça oficial, conquistada, como de costume, a' custa da vergonhosa bajulaçao, incomodar uns inocentes cidadaos portugueses que constitucionalmente pretendiam, como pretendem, fazer velar os seus direitos, garantidos pelo Codigo Civil.

Basta saber-se que um *primo* ex conselheiro que e' uma autentica *hidra do nativismo* colheu um nosso importante amigo na sua boa fe', urdindo mentirolas em volta dum telegrama, simplesmente para comprometer o director do *Bharat*.

Mas ¿Quem nao conhece, hoje a curiosa modalidade de ser dos *acrobaticos* inventores do *bolshevismo, sediçoes, insubordinaçao* e *revoltas* de Canvorem?

Conhecem-na todos, tirios e troianos, gregos e romanos, governo e povo. Crea nisso *a gente ultramarina.*

E essa gente a se fazer alarde de seu patriotismo, de seu desprendimendimento, de sua insençao!!!

Como tudo isso e' ridiculo ?!

Os tolos eram 99 e no ano passado esticaram e canela 100, bem diz o *O Heraldo.* Nao ha', portanto, nenhum papalvo que agora fique intrujado pelas artimunhas do *Ultramar.*

Ecos & Critica

Sanquelim-Valpoi

A catastrofe, causada nestas e outras localidades, pela inesperada inundação das aguas pluviais entristeceu-nos imenso, não possuindo expressões que traduzam, á justa, a intensidade da nossa profunda dôr

A' chegada da horrivel noticia suspendemos por algum tempo os nossos trabalhos, continuando a martirisar-nos o espirito o pensar na sorte dos nossos semelhantes que ficaram sem tecto e sem pão!

Impende a todo o cidadão indo-portuguez o dever de ajudar, no limite maximo de suas posses, auxiliar as victimas da catastrofe. Apelamos para o seu sentimento de generosidade, de humanidade, de fraternidade.

O *Bharat* envidará tambem os seus esforços para que seja util aos desfavorecidos da sorte, cujas afliçóes compartilha

Policia

O concelho de Quepem está já beneficiado com a instalação policial. Se ao lado deste beneficio temporario, tivessemos tambem, o da nomeação dum administrador europeu, liberal justo e protector dos oprimidos, o Povo ficaria livre das garras aduncas do perigoso *primismo* do *nativismo* que tantos e tão graves males está provocando.

Cá fica a lembrança...

Colegio Nacional

Começou já a funcionar este colegio de Pangim da proficiente direcção do mui digno professor sr. Sridora Ramachondra Poi.

Sabemos que é pratico o ensino no referido colegio que tem por professores jovens activos, inteligentes e estudiosos.

Esperamos que êle será muito concorrido.

Pigmeu

O julgamento de quatro processos do 'Pigmeu" que fora designado para o dia 13, foi adiado para 30 do corrente ás 13 horas. Houve uma inumera concorrencia. Não havia lugar para se là meter uma agulha...E' o que nos escrevem da Capital.

Registe-se

O nosso *reporter*, despachado para Margão para colher informações fidedignas sobre o caso da herança dos irmãos Pereiras informa-nos "que *aquilo* não passa dum mero romance, astutamente *preparado* com a pericia maldosa de que é capaz, pelo director d*O Ultramar* para vêr se desta maneira, fica moralmente salvo perante o governo (pois perante o Povo já não tem salvação porque o conhece bem) do mar de comprometimentos em que se encontra submergido, *até à garganta...* por causa do Hospicio"

Pela leitura da propria prosa ultramarina previamos, de resto, o que nos transmeteria o nosso correspondente especial.

De mais, quem sabe a historia do *bolshevismo* de Canvorem, deve ter feito a idêa nitida do romance da herança dos irmãos Pereiras, cuja popularidade, cada vez mais crescente, constitue, como ninguem o ignora, o eterno pesadelo da *gente ultramarina.*

¿Que de fantasias não engendra a inveja?

A verdade, porêm, triunfa sempre, ainda que o nosso *primo Mariano*, cá da visinhança se persuada do contrario. . .

Convite

Sao por este convidados os habitantes do concelho de Sanguem para se reunirem em comicio na sala das sessoes da sua Camara Municipal no dia 30 do corrente a's 14 horas a fim de se resolver sobre a melhor maneira de socorrer os sinistrados das inundaçoes havidas em varios pontos do pais.

Aos 24—7—23

Subraia V. P. Dessai
Presidente da Camara Municipal de Sanguem

त्यानें सांगितलें की, 'आपण मातृभूमीच्या सेवेसाठीं आठवड्याच्या ७५० रुपये उत्पन्नावर लाथ मारलेली आहे. आपल्याला पलटणमध्यें फारच थोडें वेतन मिळत असून शिवाय पुष्कळ त्रासही भोगावा लागत आहे, तरी पण हें सर्व मी मातृभूमीच्या सेवेसाठीं करीत आहें."

अशा प्रकारें, महायुद्धाच्या वेळीं पुष्कळ मोठमोठ्या लोकांनीं आपल्या दांडग्या उत्पन्नावर लाथ मारून, आपल्या देशाकरितां शिपायगिरीचीं कामें केलेलीं आहेत. मोठमोठ्या अमीर उमरावांनीं सुद्धां पलटनमध्यें शिरून, आपल्यां मातृभूमीची सेवा केली आहे.

ब्रिटिश सरकारनें महायुद्ध सुरू झाल्याबरोबर सवा पांच अब्ज रुपये मागितले असतां, लोकांनीं अगदीं थोड्या मुदतींत मागणीपेक्षां जास्त रक्कम देऊन सरकारची चिंता दूर केली.

पुष्कळ स्त्रियांनीं या कामीं आपलें योग्य कर्तव्य बजावलें आहे. घायाळ सैनिकांकरितां खाद्यपदार्थ, कपडे लत्ते वगैरे दिलेले असून, पुष्कळांनीं रेडक्रॉस सोसायटींत शिरून सैनिकांची सुश्रुषा केलेली आहे. ह्या अल्प उच्च दर्जाच्या स्वार्थत्यागामुळेंच तो देश युद्धांत पूर्ण विजयी होऊन, स्वातंत्र्योपभोग घेत आहे. ह्या लोकांचें उदाहरण आपल्या लोकांनीं सदैव डोळ्यांसमोर ठेविलें पाहिजे.

मोंगल बादशहांच्या वेळीं जे पाश्चात लोक इकडे आले, व प्रसंगविशेषीं बादशहांकडून देणग्या मिळायाचा योग आला, त्या त्या वेळीं स्वतःचा फायदा बाजूला ठेऊन, आपल्या ज्ञातीच्या किंवा राष्ट्राच्या उन्नतीचें कार्य साधून घेतलें आहे. पण असेच प्रश्न आपल्या लोकांपुढें आल्यावेळीं, त्यांनीं राष्ट्रहित बाजूला ठेवून देऊन स्वतःचाच फायदा भरपूर करून घेतला आहे. असो.

शिक्षणाकरितां पाश्चात्य लोकांनीं केलेले प्रयत्न वाखाणण्याजोगे आहेत. अमेरिकेंतील शिकागो विश्वविद्यालयाचेंच उदाहरण घेतल्यास, पुरें होईल. या विश्वविद्यालयाकरिता सुप्रसिद्ध कोट्याधीश राकफेलर यांनीं ३ कोटी ३० लक्ष रुपये दिलेले आहेत. सर अँड्रु कॉर्नेजी यांनीं दोन कोटी १० लक्ष रुपये देऊन, शिल्प विद्यालय चालविलेलें आहे. जर्मनी, इंग्लंड वगैरे देशांतही ह्या लोकांनीं शिक्षणाकरितां मोठमोठ्या देणग्या दिलेल्या आहेत. इंग्लंडमध्यें आंधळ्या सैनिकांकरितां सर ऑर्थर पियर्सन यांनीं शिल्प विद्यालय चालविलेलें असून, त्या लोकांना शिक्षण देण्याची व्यवस्था केलेली आहे. लंडनमध्यें कुमार्गी मुलांना, योग्य तें वळण देऊन, त्यांची पोटापाण्याची व्यवस्था करणाऱ्या किती तरी संस्था आहेत! आंधळे, मुके, बहिरे यांना शिकविण्याकरितां, कितीतरी संस्था निघालेल्या असून, त्यांत शेंकडों नव्हे हजारों तरुण माणसें स्वार्थावर तिलांजली देऊन काम करीत आहेत. अशा लोकांच्या योग्य कर्तव्यनिष्ठेमुळें त्यांचे देश पुढें येऊन जगांतील राष्ट्रांत प्रमुखस्थान पटकावून बसले आहेत.

ह्या पाश्चात्य लोकांनीं समाजसेवेविषयीं केलेले प्रयत्न आपल्या पुढें आणणें जरूर आहे. या बाबतींत प्रथमतः मुक्ति फौज Salvation Army या संस्थेचा उल्लेख करणें जरूर आहे. ही संस्था जनरल बूथ यांनीं काढली ह्या संस्थेला पूर्वीं पुष्कळ लोकांनीं विरोध केला. परंतु संस्थेचें काम डोळ्यांपुढें येतांच मग विरोध करण्याचें बंद करून पुष्कळ जणानीं मदत केली. आज ही संस्था सर्व जगभर काम करीत आहे. सन १९११ मध्यें हिचा प्रसार जगांतील ५९ देशांत झाला होता. व भिन्न भिन्न चौतीस भाषांमध्यें तिचें वाङ्मय प्रसिद्ध झालें होतें सन १९१२ मध्यें हिच्या ८५८२ शाखा होत्या. केवळ ब्रिटिश कॉलनीमध्यें यांचे सव्वा लाख सैनिक आहेत. हिंदुस्थानामध्येंही हिच्या पुष्कळ शाखा असून, दुष्काळग्रस्तांना मदत, रोग्यांची सेवा, पतित लोकांचा उद्धार वगैरे कामें ती संस्था जोरानें करीत आहे.

ह्या संस्थेप्रमाणें टायनबी हॉल ह्या संस्थेची माहिती आपल्या डोळ्यांसमोर असणें इष्ट आहे. आज ही संस्था जीं लोकोपयोगी कामें करीत आहे त्यांची सविस्तर माहिती स्थलसंकोचास्तव देतां येत नसल्यानें, मुंबईस प्रसिद्ध होणाऱ्या समाजसेवक मासिकाचा १९२१ सालचा फेब्रुवारी महिन्याचा अंक अवश्य वाचावा अशी आमच्या लोकांस सूचना आहे.

पाश्चात्य लोकांचे समाजसेवेविषयींचे प्रयत्न फार दांडगे आहेत. हें वर सांगितलेल्या उदाहरणावरून लक्षांत येईलच, परंतु आणखी एक उदाहरण देतों. एकट्या लंडन शहरांत ६०।७० हास्पिटलें आहेत. तीं सर्व लोकांनीं चालविलेलीं आहेत. इतकेंच नव्हे तर ज्या ज्या वेळीं अशा संस्थांच्या अडचणी लोकांपुढें जाहीर करतांच तेथील लोक शेंकडों निनांवीं रकमासुद्धा पाठवून संस्थांचीं कार्यें पार पाडीत असतात.

ह्या लोकांच्या दोन प्रवृत्तींचे एक अनुकरणीय उदाहरण, ब्राह्म समाजाचे उपदेशक पंडित शिवनाथ शास्त्री यांनीं आपल्या आत्मचरित्रामध्यें दिलेलें आहे; ते म्हणतात: इंग्लिश लोकांची दानवृत्ति पाहून आपण फार आश्चर्य चकित झालों. इंग्लंडमधील श्रीमंतांपासून गरिबांपर्यंत सर्व वर्गाचे लोक आपआपल्या ऐपतीप्रमाणें दान करीत असतात. एक वेळ आपण असें वाचलें कीं एका सत्पुरुषानें एका संस्थेकरितां १२लक्ष रुपयांची देणगी निनावी पाठविलेली होती! आपण इंग्लंडांत ज्या बिल्डिंगमधें राहात होतों. त्यांतील कांहीं तरुणी सायंकाळच्या जेवणानंतर वर्तमानपत्र वाचीत होत्या. इतक्यांत, एक नवीन उभारलेल्या संस्थेची जाहिरात त्यांच्या वाचण्यांत आली. त्याबरोबर एकीनें त्या संस्थेची सर्व हकिकत आपल्या आईलाही वाचून दाखवून आपण ही कांहीं मदत पाठविण्याची इच्छा दर्शविली. आईनें मुलींस आपला हिशेब पाहण्यास सांगून जी कांहीं शिल्लक राहील ती पाठविण्यास सांगितली, त्याप्रमाणें त्यानीं पांच शिलिंगांचा चेक त्या संस्थेकडे पाठवून देऊन आपलें कर्तव्य बजावलें.

हिंदुस्थानांत सुद्धां ह्या लोकांनी केलेले प्रयत्न वाखाणण्यासारखे आहेत. कितीतरी कुष्ठ रोग्यांसारख्या रोग्यांना ह्या संस्थेकडून मदत मिळते. मध्य प्रांतांतील चांपा जिल्ह्यांतील विलासपूर एथें अमेरिकन मिशननें एक कुष्ठाश्रम स्थापन केलेला असून, त्यापासून कितीतरी कुष्ठ रोग्यांचें संरक्षण केलें जातें याशिवाय ठिकठिकाणीं त्यांनीं हास्पिटलें चालविलेलीं आहेत. अशातऱ्हेनें हे लोक समाजाविषयींचें आपलें योग्य कर्तव्य बजावित आहेत यांत कांहींच शंका नाहीं. विद्यार्जनाविषयीं हे लोक उत्तम तऱ्हेनें आपलें कर्तव्य बजावीत आहेत. याची साक्ष या लोकांनीं चालविलेल्या मोठमोठ्या लॅायब्ररींमधील ग्रंथसंग्रहावरूनसुद्धां पटेल. इंग्लंडमधील ब्रिटिश म्यूझियममधील लॅायब्ररीमध्येंच ३५ ते ४० लक्ष ग्रंथ असून, ५६ हजार पोथ्या आहेत! तसेंच अमेरिकेंतील हार्वर्ड युनिव्हर्सिटीच्या लायब्ररीमध्येंही ८ लक्ष ग्रंथ आहेत. बर्लिन मधील रॉयल लायब्ररीमध्येंही १२ लक्ष ३० हजार ग्रंथ असून, २० हजार पोथ्या आहेत. याशिवाय अनेक ठिकाणीं मोठमोठ्या लायब्ररऱ्या आहेतच. यावरून या लोकांच्या विद्याप्रियतेचें कौतुक वाटणें साहजिक आहे.

संस्कृत भाषा हिंदुस्थानची. पण त्या भाषेचा चिकित्सक पद्धतीनें अभ्यास पाश्चात्य लोकांनीं —विशेषतः जर्मन लोकांनीं चालविलेला आहे. बर्लीन विश्वविद्यालयांत आज, लुडर्स, ग्लासनैप आणि नोबल असे तीन संस्कृत भाषेचे अध्यापक आहेत. बान विश्वविद्यालयाचे अध्यापक आफरेट ह्यानीं हस्तलिखित संस्कृत ग्रंथांचें सूचिपत्र मोठ्या तीन भागामध्यें प्रसिद्ध करून आपलें नांव अमर केलेलें आहे. जेना विद्यालयाचे अध्यापक केपलक यानीं संस्कृत व जर्मन भाषेचा कोश तयार केलेला असून, शिशुपाल वध, किरातार्जुनीय या काव्यांचें जर्मन मध्यें केलेलें आहे. मि० रीस डेव्हिड यानीं बौद्ध वाङ्मयाचें परिशीलन करून इतकें कांहीं वाङ्मय निर्माण केलें आहे कीं, बौद्ध धर्माचें ज्ञान सर्व लोकांना आज सुलभ झालेलें आहे. असो.

या लोकांत शिस्त कशी पाळिली जाते, याचें उदाहरण म्हणजे नेक नामदार व्हाइसराय. लोर्ड हार्डीज यांच्या दिल्लीं प्रवेशनाच्या वेळचें होय. दिल्ली दरबारानंतर दुसऱ्या वर्षी दिल्लीं प्रवेशनाकरीतां मिरवणूक निघाली असतां, कोणी अत्याचारी माणसानें व्हाइसराय यांजवर बॅांब टाकला! अशा आकस्मिक भयंकर प्रसंगींसुद्धा कांहींही गडबड न होऊं देतां, जखमी माणसांना इस्पितळांत पोहोंचवून मिरवणूक न थांबवितां ठरविलेला कार्यक्रम अमलांत आणला गेला!

असो. या लोकांची अशीं कामें आपण नित्य डोळ्यांपुढें ठेविलीं पाहिजेत. एक बंगाली लेखक म्हणतो कीं, या पाश्चात्यांचें जें आमच्यावर राज्य आहे तें "विधाताका विधान" आहे; तें पुष्कळ अंशीं खरें दिसतें. ईश्वराच्या ठिकाणीं सर्व माणसें सारखीं आहेत. त्याला भेदभाव कांहीं नाहीं. ज्याची योग्यता आहे तो श्रेष्ठ बनतो, व योग्यता नाहीं तो कनिष्ठ स्थितीला जातो. हाच न्याय राष्ट्रांसही लागू आहे. आगगाड्या, तारायंत्रें, विमानें, टेलिफोन, व इतर शास्त्रांतील शोध त्यांनींच लावले नाहींत काय? वैद्यकारसारख्या शास्त्रांत त्यांनीं किती तरी शोध लावले असून, आणखी लावण्याची त्यांची तयारी आहेच; मग त्या शोधांसाठीं स्वतःच्या प्राणाचा सुद्धां बळी देण्यास ते मागें पुढें पाहात नाहींत. हिमालय पर्वताच्या गौरीशंकरासारख्या आजपर्यंत अगम्य व अज्ञान असलेल्या शिखरांवर चढून जाण्यास त्यांनीं कितीतरी प्रयत्न चालविले असून, संकटाची परवा न करतां ते प्रयत्न पुढें चालविण्याची त्यांचीं तयारी आहेच.

गोमांतकांतील हिंदुबांधवांनो, हे लोक आपलें कर्तव्य कसें बजावित आहेत तें पाहा, म्हणजे आपणांस आपल्या लोकांच्या स्थितीची कल्पना येईल व लोकांनीं आपल्यावर राज्य चालविल्यास त्यांत वावगें असें कांहींच नाहीं, असें दिसून येईल. या लोकांच्या अंगीं असलेल्या गुणांचें सर्वतोपरी अनुकरण करण्यास आपण सदैव तत्पर असलें पाहिजे तरच खात्रीनें आपल्या देशाची उन्नति होईल. ब्रिटिश हिंदुस्थानांतले आपले बांधव अशाच प्रकारें आपलें कर्तव्य कसें बजावित आहेत त्यांचें दिग्दर्शन पुढील लेखांकांत करूं.

———

सांखळी येथील--
भयंकर जलप्रळय!

रा. रा. भारतकर्ते ह्यांसः—

या दिवसांत होत असलेल्या अतिवृष्टींचा परिणाम पूर येण्यास ज्या ज्या गांवीं झाला त्यांपैकीं येथें ता. १९ गुरुवार रोजीं सकाळीं ११ वाजतां नदीच्या पुरास सुरवात होऊन संध्याकाळीं ३ वाजेपर्यंत जरी पाणी थोडेंथोडें बाजारांत चढत होतें तरी नेहमीच्या वहिवाटीबाहेर त्याची मजल न पोंचल्यामुळें सर्व लोक आरंभीं जरा स्वस्थ राहिले; परंतु पुढें पाण्याची वाढ जेव्हां जोरानें होऊं लागली तेव्हां लोक एकदम घाबरे होऊन आपल्या घरांतील चीजवस्तु व मुलांबाळांची व्यवस्था सुरक्षित जागीं करण्याचे कामी लागतात न लागतात इतक्यांत संध्याकाळीं ६ वाजण्याच्या मानानें पाण्यानें फार वाढ घेतली. तेव्हां कुठलें सामान व कुठलें काय. "शीर सलामत तर पगड्या पंचायशीं" अथवा बीरबलाच्या

a 2 de Agosto de 1923

SINATURA
ano tres rupias

NCIOS
cada ... que repetida uma tanga
lso uma tanga

D. ... E EDITOR
G. ... Dessay
Q... em-Goa

भारत.

BHARAT

गुरुवार ता. २ आगष्ट सन १९२३

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें–गोवा.

Um sinistro terrivel

Na nossa ediçao transacta discrevemos em poucas mas sinceras palavras a tristissima impressao que em no's produziu o terrivel sinistro das inundaçoes, havidas em diferentes partes de Goa.

O nosso presado colaborador e querido correspondente de Nova-Goa, *Alma Velha*, condoido da lamentavel sorte dos sinistrados envia-nos um artigo sob a epigrafe acima, solicitando subsidio aos mesmos.

Na secçao marata do nosso jornal abrimos, desde o numero passado, subscriçao para o mesmo fim, na plena convicçao de que a generosidade do Povo da India Portuguesa fara' o maximo sacrificio para, possivelmente, atenuar a intensidade de dor das vitimas do horrivel sinistro.

Eis o que nos escreve o nosso assiduo colaborador e patriotico *reporter*:

Já os jornais diários, com certeza, terão dado noticias das cheias medonhas, horriveis, trágicas de que foi teatro Sanquelim. Já todos terão estremecido de terror e de comoçã perante uma catastrofe tam tétrica, tam horripilante...

E'assim, quási sempre. Quando um facto excepcional, horrendo se vai passar ou tudo anda desprevenido, ou tudo dorme sono solto a sonhar, a sonhar quem sabe em quê! ... E' triste, é desoladôr!...

Que dôr, que mágua, não há de não deve ser, ao destes desditosos entes vendo sumiremse na voragem indómita, incessante da corrente, os seus queridos lares, a que traziam prendidas as mais doces, as mais gratas recordações! ...

Que raiva de desespêro, não há de ser deles, embora a *nota oficiosa* reze que "o moral das populações é o melhor possivel! . . ."

Na casabé de Sanquelim, desmoronaram-se 200 casas/ Sabe Deus quantos habitantes sem conchêgo, sem pão! Em Valpoi quasi todas as casas da zona baixa! E' horrivel!

Meu Deus, quantos entes chafurdando-se nos regêlos da desgraça! . . . Quantos! . . . Não houve morte a lamentar! E cremos que ha erro nesta informação. Ontem foi pescado junto do Liceu Central, cadaver de um homem! E varios boatos fazem giro! . . . Leitores! *Não encheu o vosso coração de uma dôr intensa, profunda? Abri as vossas bolsas, o boa gente de Quepem! Socorrei estes desgraçados, estas "almas sem lares"!*

Pelo amor de Deus, Senhores! esmola ricos e nobres! esmola aos entes pobres! esmola aos vossos irmaos!

Nova Goa 22-7-1623

Alma Velha

Partido Indiano

Foi proclamado chefe deste grande agrupamento politico de Salsete o sr. dr. Jose' Ignacio de Loiola.

Oriundo duma familia nobre cujo nome esta', indissoluvelmente, ligado a va'rios feitos patrioticos do Paiz, o sr. dr. Loiola reune na sua distinta individualidade predicados que o fazem digno do elevado cargo popular para que, no meio do entusiasmo do Povo salcetano, manifestado no comicio do salao da Camars Municipal de Margao, foi eleito.

Ao novo chefe do *Partido Indiano*, nossas calorosas felicitaçoes.

Partido Popular

Obteve diploma de advogado o sr. Giu Xaba' Folo Dessai, estimado chefe do Partido Popular deste concelho,

O dr. Dessai e' um verdadeiro *Dessai*, isto e', capaz de sacrificar tudo em prol dos interresses dos seus correligionarios, em particular, e do seu extremecido Paiz em geral.

Basta esta unica circunstancia que e' importantissima, para o *Bharat* se rejubilar com a obtençao do diploma de advogado do prestante cidadao que o sr. Givaji e', animando-nos a esperança de que a sua competencia profissional sera' so'mente util aos oprimidos.

Cumprimentamo-lo.

NOTA OFICIOSA

Todos os socorros a's vitimas das inundaçoes devem ser, directamente, enviados ao cuidado dos srs. Administradores dos concelhos de Sanquelim e Ponda' e Comandante Militar de Satari. E' o que se pede aos filantropicos do Paiz numa nota oficiosa do Governo, recebida pela administraçao do *Bharat*, da do concelho.

Ecos & Critica

Em Curchorem

O vicio de bebedeira tem atingido o maximo de sua intensidade na Vila Nova de Curchorem.

Basta saber-se que numa povoação de quasi duzentos metros quadrados funcionam nove tabernas estando em via de instalação mais uma!

E' vergonhoso, é horrivel !!

E', alem disso, indecoroso e ilegal; pois existem lá, mesmo ao pé daquelas casas de corrupção uma escola de ensino primario oficial e uma capela!!! . . .

Sim a povoação de Vila Nova de Curchorem não tem por enquanto, mais do que aquela area. Mas esta é *banhada* por todos os lados pelo mar do alcool, receando-se que, cedo ou tarde, uma sua cheia a arraste para *o nada* do precipicio da desmoralização. . .

Mesmo agora, o tétrico espectaculó que se oferece das 19 horas para diante, á vista do transeunte ... *calotado*, põe-lhe em perigo a integridade de pele.

Para a Policia de Sanguem tomar em devida consideração regista o *Bharat* nas suas colunas as belesas alcoolicas da Vila Nova . . .

Voltāremos, oportunamente

Pelas vitimas

Sob a iniciativa dos srs. Nagueshrao Sadecar e Bombi Naique, comerciantes de Margão foi organisada uma comissão composta dos srs. Narsinva Damodar Naique, Purshotoma S Suqueroar, Bhaurao B. Dalal, Ramnaata V. Poi, Nagueshrao Sadecar, Bombi Naique, Jairam Xete Catcar e Gurpad Baguevádi, afim de angariar meios para socorrer as vitimas de inundações de Valpoi, Sanquelim etc.

O sr. Bombi Naique descreveu. em poucas palavras, a misera situação em que se encontram os habitantes das aldeias acima referidas, pedindo com interesse aos assistentes o seu valioso apoio aos desafortunados.

As suas palavras produziram uma tal impressão que imediatamente sob a proposta do sr. Suquercar foi aberta no mesmo dia e à mesma hora, uma subscrição que foi coberta pelos negociantes, apurando-se no acto mais de 500 rupias, estando a comissão activamente ocupada em coalhar meios para auxiliar os seus semilhantes.

Secundando a proposta do sr. Bombi Naique o sr. Virgincar, médico aiurvedico, proferiu um discurso fazendo comover os assistentes.

Pede-se aos cavalheiros que desejarem concorrer com o seu valioso auxilio, se digne manda-lo com o sr. Bombi Naique.

Deliberou-se tambem que devia ser adicionado a essa subscrição o saldo da subscrição havida em 1919 para acudir aos indigentes na ocasião da fome que grassou na mesma epoca.

AVISO AOS SINISTRADOS

O pessoal que trabalha na redacção, administração e tipografia do BHARAT, *pede aos srs. sinistrados das inundaçoes a finesa de lhe comunicarem se se sente nas suas rẽgiões a falta do apoio braçal que ele se prontifica, no caso afirmativo, a presta-lo no maximo limite de suas forças, suspendendo, atè, temporariamente, a sua faina cotidiana.*

Desde o director do BHARAT *até o seu ultimo servente terão muita honra em ser uteis aos seus irmãos no infortunio, o que de resto, acabamos de sinificar aos principais* LEADERS *das localidades sinistradas.*

BHARAT-Quepem

आहे तरी या संस्थेकरितां पंडीत मालवीय यांनींच फार परिश्रम केले आहेत. त्या कार्याकरितां त्यांनीं सर्व हिंदुस्थानांत फिरून वर्गणी जमविलेली आहे. आज संस्थेनें ८० लक्षांवर फंड जमविला असून त्यांपैकीं ५०. लक्ष रुपये कायद्याप्रमाणें रिझर्व फंडांत ठेविले आहेत. इमारतींकरितां ४२ लक्ष रुपये लागले आहेत. संस्थेंत तूर्त ६२४ विद्यार्थी राहण्याची सोय असून आणखी ३०० विद्यार्थ्यांची सोय व्हावयाची आहे. संस्थेचें वार्षिक उत्पन्न ७ लक्ष रुपये आहे. या सर्व कार्याचा आत्मा पंडीत मालवीय हे होत. या युनिव्हर्सिटीमध्यें हिंदुशास्त्रांचें व संस्कृत साहित्याचें अध्ययन, हिंदु विद्या व हिंदुस्थानची प्राचीन सभ्यता (सुधारणा), तसेंच देशांतील उद्योग धंद्याच्या उन्नतिकरितां वैज्ञानिक पद्धतीचें शिक्षण, धर्मनीति शिक्षण हेंही दिलें जातें.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीनें चालविलेल्या संस्थांपैकीं, पुण्याचें फर्ग्युसन कॉलेज हें मुख्य होय. शिवाय या सोसायटीनें विलिंग्डन कॉलेज काढून त्या बाजूच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली आहे. हीं दोन्हीं कॉलेजें अतिशय उत्तम प्रकारें चालत आहेत. शिवाय आणखी ठिकठिकाणीं हायस्कुलें व मराठी शाळा चालत आहेत तीं निराळींच. या सोसायटीला पुष्कळ तरुणानीं आजन्म वाहून घेतलें असून, संस्थेचें कार्य खंड न पडतां त्यानीं पुढें चालू ठेविलें आहे. ना. गोखल्यानीं या संस्थेंत प्रिन्सिपालचें काम केलें आहे. अशा प्रकारची ही संस्था आपलें कर्तव्य बजावून देश उन्नतिप्रत नेत आहे.

या नंतर उल्लेख करण्याच्या संस्था म्हणजे स्त्रीशिक्षणाकरितां काढलेल्या अनाथ बालिकाश्रम व महिला विद्यापिठ ह्या होत. श्री. कर्वे यांनीं या कामाकरितां सर्व हिंदुस्थानभर फिरून, वर्गणी गोळा केलेली असून, प वा. विठ्ठलदास दामोदरदास ठाकरसी यांनीं १५ लक्ष रुपयांची देणगी कांहीं अटींवर देऊन, संस्था चिरकाल टिकेल असें केलें आहे.

स्फुट विचार

आंस्पिसेंतील खेळखंडोबाः—ओस्पिसच्या कारभारासंबंधीं सध्या दोन पक्षांची लढाई चालू असून, ते परस्परांविरुद्ध लेखीं, तोंडीं व इतर हरतऱ्हेच्या मार्गानीं निरनिराळ्या अफवा पसरविण्यांत मारे चूर होऊन गेलेले दृष्टोत्पत्तीस येतात. त्या अफवांसच अनुसरून आह्मीं गेल्याच्या मागील अंकांत कांहीं विचार प्रगट केले होते. व्यक्तिशः कोणालाहि दोषी अगर निर्दोषी ठरविण्याचा त्यांत आमचा बिलकूल मानस नव्हता व नाहीं. मात्र त्या संस्थेसंबंधीं चालत असलेल्या अनिष्ट प्रकारांवरून तीजविषयीं आह्मीं अविश्वास दाखविला असून सदरील विचार या अविश्वासाचे अनुवादक आहेत, हें उघड आहे. अर्थात् अर्थाचा अनर्थ करून, दुसऱ्यांच्या सात्विक भावनांचा विपर्यास करणें केव्हांहि न्याय्य होणार नाहीं, हें निराळें लिहिणें नलगे.

"धोक्याची सूचना":—कुडचडें येथें अनीतिवर्धक अशा दारूच्या व्यसनाला ऊत येत चालला असून अवघ्या चारशें हातांच्या औरसचौरस टापूंत नऊ गुत्ते, तळीरामांस मोठ्या जोमानें पसरविण्यांत, रात्रंदिवस गुंतून गेलेले आहेत! या गुत्त्यांची संख्या कमी ह्मणूनच कीं काय आमच्या अति शहाण्या सरकारनें मुख्य रहदारीच्या दुकानाशेजारीं व रहदारीच्या हमरस्त्यावर दहावा गुत्ता उघडण्यास परवानगी दिली आहे, अशी वदंता आहे. ही अशुभ वदंता खरी असल्यास सरकारच्या स्वार्थलोलुपतेची कोणीहि कींवच करील. अमेरिकेसारख्या राष्ट्रांत दारूला गचांडी दिली जात असतां व त्या मादक पेयाचे अनिष्ट परिणाम प्रत्यहीं जाणत असतांहि, सरकारनें लोकांच्या नीतिमत्तेकडे दुर्लक्ष करावें, हें आमच्या हतभागी देशाचें दुर्दैव नव्हे काय?

—रा. काशिनाथ दामोदर नाईक व केशव अनंत नाईक यांच्या प्रयत्नानें पुरानें अनाथ बनलेल्या लोकांसाठीं फंड गोळा करण्यासाठीं मडगांव येथें एक सभा भरून रा. नागेशराव सडेकर व बोर्वी नाईक यांच्या सूचनेनें सदर्हू कार्यासाठीं रा. नरसिंह दामोदर नाईक, पुरुषोत्तम सुकेरकर, भाऊराव दलाल, रामनाथ पै, नयराम कातकर व गुरुपाद भागेवाडी यांची कमेटी नेमण्यांत आली. या कमेटींत सडेकर व नाईक यांचाहि समावेश करण्यांत आला. सभेंतल्या सभेंत ५०० रु. चे आंकडे पडून, फंडाची रकम एक हजारावर गेली आहे, हें मडगांवकर बंधूंस फार भूषणावह आहे.

—मुंबईचे दानशूर व गरिबांचे कैवारी श्रीमंत शांताराम नारायण दाभोळकर यांनीं पुरानें अनाथ बनलेल्या लोकांस दोन हजार रुपयांची मदत केली, हें कळविण्यांस मोठें समाधान वाटतें. श्रीमंतांनीं गोमांतकीयांवर अनेक उपकार केलेले असून, आपल्या परोपकारी अंतःकरणाची साक्ष त्यांना पटविलेली आहे.

—श्रीमंत दाभोळकर ह्यांची श्रीदत्तवाडीतील सारस्वत वेदपाठशाळा आषाढ शुद्ध पौर्णिमेपासून पुनरेव सुरू झाली.

—पणजी येथेंहि अनाथांच्या मदतीसाठीं फंड उभारण्यांत आला असून त्याची रक्कम हजार रुपयांवर गेली असल्याचें कळतें.

—हापसेंतहि फंडाला मोठें स्वरूप येण्याचा रंग दिसतो.

—वाळपैच्या मुनिसिपालटीनें अनाथांसाठीं १० हजार रु. ची मंजुरी दिली आहे.

—प्रसिद्ध वैमानिक साकादुर काब्राल व गागु कुतिनु यांस, पणजी मुनिसिपालटीनें, पृथ्वीप्रदक्षणा करतानां, गोमांतक प्रांताला भेट देण्याविषयीं विनंति केली आहे. सदर्हू वैमानिकांच्या नवीन धाडसाप्रीत्यर्थ ठिकठिकाणीं फंड गोळा करण्यांत येत असून तो शक्य तितका मोठा होण्यासाठीं सरकारचे जोराचे प्रयत्न चालू आहेत.

—दो. जिऊ शावा फळ देसाई यांस वकिलीची सनद मिळाली असून तिचा उपयोग ते लोक कल्याणार्थ करणार आहेत, हें कळविण्यास आनंद वाटतो. रा. देसाई हे येथील स्थानिक पुढारी असून, लोकहितार्थ स्वार्थत्याग करण्याचा त्यांचा नैसर्गिकच ओढा आहे.

अनाथांस विनंति.

महापुरानें अनाथ बनलेल्या गोमांतकीयांस कोणत्याहि प्रकारची शारीरिक मदत पुरविण्यास भारतकार व भारतप्रेसांत काम करणारे त्याचे प्रेमळ सहाय्यक एका पायानें तयार आहेत. अनाथांची सेवा बजावण्याची सुसंधि लाभत असल्यास, कांहीं काळ भारत ऑफीस सुद्धां बंद ठेवण्यास ते माघार घेणार नाहींत, यद्विषयीं त्या त्या स्थानिक पुढाऱ्यांच्या सूचनांचीच ते मार्गप्रतीक्षा करीत आहेत.

भारत-कर्ते.

प्रासंगिक विचार.

आमची जुनी पुराणी चातुर्वर्ण्य व्यवस्था डळमळली; धार्मिक बंधने ढिलीं पडलीं, युरोपीय संस्कृति पुढें आली; समता स्वातंत्र्य व बंधुता हीं तत्वें लोकांत वावरूं लागलीं, व आतां कुठेंशें बोलशेविझमचें तत्व वर डोकें काढूं लागलें आहे!

* * *

भविष्यकाल ही गतकालाची पुनरावृत्ति असून इतिहासाची पुनरावृत्ति होते, असें ह्मणतात. रवीचा उदय होऊन अस्त होतो व पुनः उदय होतो, तद्वत उन्नतीच्या मागें अवनति व अवनतीच्या मागें उन्नति असें हें रहाटचक्राप्रमाणें होत असतें.

* * *

पूर्वी एका कालीं युरोपची अवनति होती, पुढें कांहीं काळ उन्नति झाली, व पुनः उन्नतावस्थेस प्रारंभ होऊन कालपरवांपर्यंत तिची मध्यान्हीच्या रवीप्रमाणें पूर्णता झाली व आतां सायंकालास सुरवात झाल्याचें दिसून येतें. भविष्य कालाचा अनुभवच याची जाणीव करून देईल.

× × ×

पूर्वी एकदां हिंदुस्थानची ही उन्नती झाली होती व तें पुढें युरोपप्रमाणें अनेकदां उन्नति-अवनति यांच्या कक्षेंतून जाऊन, कालपरवां अवनतावस्थापंकजांत लोळत पडलें होतें. तूर्तची व पुढें येणारी स्थिति अवनतीचीच आहे किंवा उन्नतीची आहे, हें समजून येत नाही; ती भविष्यतकालीं समजून येईल. तरी 'मुलांचे पाय पाळण्यांत दिसतात' या न्यायानें त्याची अजून अवनतावस्था संपली नसून, पुढेंही कांही कालतें त्याचस्थितींत, पण भासमान अस्तंगत युरोपीयन उन्नतावस्थेंत रहाणार असल्याचें दिसून येतें. मग कांहीं कालानें अवनतावस्थेंत असलेलें हिंदुस्थानच चक्रनेमीक्रमानें उन्नत झाल्याशिवाय रहाणार नाही, ही गोष्ट खरी आहे. पण तो त्याचा उन्नतकाल तितका मात्र जवळ नसावा, असें दिसून येतें.

* * *

आज येथें दिसणारी उन्नतावस्था म्हणजे युरोपियन उन्नतावस्थेच्या उतरत्या लागलेल्या कळेची इकडे आलेली लाट असून, ती त्याजबरोबरच नाहींशी होणार, हें स्पष्ट आहे. ह्या आलेल्या लाटेचा इकडे सुपरिणाम होईल किंवा दुष्परिणाम घडेल, हें सूर्य व बिंब या न्यायानें दिसून येणारच. त्याबद्दल भविष्य वर्तविण्याची जरूरी नाहीं.

× × ×

मोनार्कीचें रेपुब्लिकांत स्थित्यंतर झालें आणि आतां यापुढें रेपुब्लिकचें बोल्शेविज्मांत रूपान्तर होणार. अशी चिन्हें दिसत आहेत. पूर्वी श्रीमान व वजनदार लोकांचें प्राबल्य होतें; मध्यें अधिकारी लोकांचें प्राबल्य झालें; आतां लोकशाहीचें प्राबल्य, असून पुढें गरीब रयतेचें प्राबल्य होण्याचा संभव दिसतो. कालापुढें कोणाचा इलाज नसतो. "कालायतस्मैनमः" एस. एन.

Ano VIII *No.* 19

Qu... de Agosto de 1923

...TURA
... tres rupias
...OS
Por cada linh... repetida uma tanga
Núm... na tanga

DIRE... ITOR
G. P. ... Dessay
Quepem-Goa

भारत.

BHARAT

वर्ष ८ वें, अंक १९
गुरुवार ता. ९ आगष्ट सन १९२३

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केंपें—गोवा.

Para meditar . . .

Esta' exausto o erario publico. Exausta se acha a capacidade contribuitiva do Ze' pagante. A propriedade e o comercio, principal *materia prima* de impostos nao atravessam certamente uma era de prosperidade, estando nas condiçoes identicas as artes e profissoes liberais.

A crise economica que nos assoberba merece ser olhada com grande cuidado. Todo o esforço que se envidar no sentido de a debelar e' pouco. Uma pequena desatençao ou incuria neste tao importante assunto pode originar consequencias fatais, consequencias sem eficaz remedio, consequencias sem possivel salvaçao.

Nao basta *estarmos tristes* porque tristesas nao pagam dividas nem *proferirmos discursos flamantes*, porque nas graves condiçoes a que as coisas tem chegado, a *palavra*, por mais *demostenica* que seja, perde o dom de operar milagres para os quais nao sao, certamente, propicios os dias que correm...

Governantes e governados tem, pois de, numa acçao conjugada, convergir o maximo de sua energia para a sacrossanta empresa de salvaçao desta terra que nos e' tao querida e a' qual tradiçoes as mais honrosas tem ligado o prestigioso nome dos nossos avoengos.

Nao ha' que duvidar. A hora e' de sacrificios e sacrificios sem sombras nem capas do comodismo egoista ou do egoismo comodista. Sera' um indisculpavel crime de lesa patria conservar-se de braços crusados, estando iminente o perigo duma monumental derrocada.

Deixemos em parte as questiunculas personalistas e luctas partidarias; votemos ao secundario plano o exercicio do *dize tu, direi eu*; esqueçamos finalmente, tudo para so' ocuparmo-nos da nobilissima tarefa da conjuraçao do grande perigo que nos ameaça.

Nada de discussoes, nada de conjecturas, que nem para umas nem para outras o tempo e' propicio, como o vimos.

Convençamo-nos duma ves para sempre, que o nosso esforço em prol da salvaçao do Paiz que estremecemos com todas as veras de nossa alma nao admite delongas. Toda a pressa e' pouca; toda a actividade e' insufici-ente; todo o zelo e' incompleto...

Ninguem se desanime e todos concentrem, coglobem a soma das suas forças vivas para salvar o Paiz, ameaçado da formidanda queda da aniquilaçao, do seu fatal arrastamento para o precipicio da queda irremediavel...

Sim, trabalhemos todos, governantes e governados, pela salvaçao da Patria que nos e' tao cara.

A' Janela....

A horrorosa catastrofe...

Em fugidias linhas, com pranto no coraçao, narramos o terrivel sinistro de que foi teatro Sanquelim, Valpol e Candiapar...

Mais uns poucos de episodios desenrolemos agora. Todo o local inundado lembra uma cidade devastada, como a Sadoma ou Gomorra. Tudo nos incute pavor, tristesa, desoloçao. A corrente devastadora e indomita derruiu tudo, casas, arvores animais ... Crianças ficaram sem seus livros: Homens sem seu magro "pe' de meia".

Tudo arrasou a horrenda corrente, qual serpente furiosa sibilando, sibilando sempre ... avançou com uma força inacreditavel...Se fosse de noite...oh! o espectaculo seria mais titanico ainda!...

*D*eus, porem, nao permitiu que assim fosse.

Oh! como e' consolador, como e' grato, ver essa interminavel e ininterrupta lista de subscriçao que o *Heraldo* publica! Gomo e' doce ver, abrirem-se espontaneamente todas as bolsas para minorarem a desgraça que a catastrofe causou!...

Ate crianças das escolas, sacrificam os seus miseros *ana's* que os paes lhes tinham entregue para grao" e enviaram aos seus colegas infelizes.., a quem a inundaçao levara a riquesa dos seus livros, penas e lapis...

Os olhos embaciam-se de lagrimas, tam grande e' a alegria que se nos vai pela alma dentro...

Benedito seja, mil vezes, o povo de Goa. Benedito seja!...

: Alma Velha

Para n.° imediato

Artigo sôbre
GUERRA JUNQUEIRO

Ecos & Critica

Ja' se vai embora..

Dizem os jornais da capital que sua Excia. o sr. Governador Geral dr. Jaime de Morais segue breve para Portugal. E' tempo, portanto, de se apreciar a sua acção governativa, o que prometemos fazer, oportunamente, mas sempre durante a estada de Sua Excia á testa da Colónia.

Entretanto diga-se, em pouco, que a governação do sr. dr. Morais, foi assinalada por muitos erros, derivados, em grande parte, do producto das impressões que nêle muito astutamente souberam exercer os *satelites*, cá da terrinha ...

Mas .... aguardemos.

Novas-Conquistas

A valorização de muitos terrenos das N. Conquistas, hoje votados ao completo abandono depende, como, varias vezes, temos frisado no *Bharat*, de duas condições essenciais: segurança e salubridade.

Quem pretender trazer á cultura pequena ou grande porção deles, tem de ter arraigada no espirito a convicção inabalavel de que, com o seu empreendimento agricola, nada, absolutamente nada terá que sofrer a sua saude e o fruto de sua labuta.

Quanto á segurança de propriedade, isso pode correr por conta da policia quando esta se empenhar, a valer, por libertar a sua correspondente jurisdição dos clandestinos atentados.

Resta, agora, a questão de salubridade, até hoje, refractaria á acção dos delegados de saude, *figuras decorativas*, talvez, á mingua de meios e atribuições.

¿Porque é que os nossos governantes não hão de dedicar uma pequena parcela de seus cuidados á saude dos habitantes das N. Conquistas?

Pro vitimas

Apraz-nos registar que vai tomando incremento o movimento em prol das vitimas das inundações, graças á generosidade dos filantropicos do Paiz e de fóra deste como o sr. Shantaram Narayen Dabolcar.

O *Xilonati Samaj* de Pernem despachou para diversas aldeas voluntarios com o fim de angariar fundos para o auxilio dos sinistrados aos quais a camara de Sanguem votou um subsidio de 100 rupias, isto é, o dobre do que lhes deu o municipio das Ilhas.

E' tambem digna de elogios a atitude das autoridades administrativas que não pouparam nem poupam esforços em prol das vitimas.

Os Pereiras

Escrevem-nos—

"A ignobil campanha da *gente ultramarina* contra os irmãos Pereiras tem por fim tentar diminuir-lhes o incontestavel e incontestado valor no conceito público. Tal tentativa, porem, dá em droga por serem sobejamente conhecidos "os processos" da mesma *gente* cujas tenebrosas proesas a historia politica do Paiz regista com letras tintas do sangue das vitimas do *21 de setembro*. Recentemente, pretendeu repetir o *scenario sanguinolento* do passado em Canvorem, procurando exercer represalias nos pobres *Velipos*, não satisfeita de os reduzir á desgraça ... A honra dos srs. Pereiras não pode ser, pois, atingida pela *chicana* da mesma gente cujo patriotismo não vai, como se tem provado á saciedade, para alem do seu bojudo estomago."

Registando a titulo de curiosidade o que se nos escreve sobre a *guerra civil* do Hospicio, o *Bharat* nada mais faz do que contribuir para a completa ilucidação do modo de ser de quem aperta nas suas mãos as redeas da direcção daquela instituição e dos seus acolitos...

Pragatica-Sanga

Ao sr. Vice-Presidente do *Sanga* em exercicio, frisamos a necessidade de, conforme o deliberado na reunião do Directorio, celebrada em Margão, envidar os seus esforços por forma que se efectue, quanto antes, o Congresso do mesmo *Sanga*, anunciado, aliás para os

मित्र, या सारख्या विद्वान गृहस्थांनीं पुराणेतिहासाचें संशोधन केलेलें आहे. डॉ. भांडारकर हे हिंदभूमींतील एक अमूल्य रत्न आहे. डॉ. भांडारकरांनीं केलेलें कार्य लक्षांत घेऊन त्यांचें नांव कायम राहण्याकरितां, तेथील लोकांनीं भांडारकर रिसर्च इन्स्टिट्यूट या नांवाची एक संस्था स्थापन केली आहे.

पुण्यांतील भारतेतिहास संशोधक मंडळानें केलेले प्रयत्न लक्षांत घेण्यासारखे आहेत. आपल्या देशाचा जुना इतिहास संशोधन करून लोकांपुढें आणण्याचें काम ही संस्था करीत आहे. राजवाडे, खरे, पारसनीस वगैरे सारखे लोक या कार्यार्थ सतत प्रयत्न करीत आहेत. बंगालचे यदुनाथ सरकार यांचे प्रयत्न फार दांडगे आहेत. त्यांनीं मराठ्यांच्या व मुसलमानांच्या इतिहासावर पुष्कळ पुस्तकें लिहिलीं आहेत! व त्या विषयावर त्यांचा व्यासंग सतत चालूच आहे.

डॉ. रविंद्रनाथ टागोर यांनीं पौर्वात्य व पाश्चात् संस्कृतिचा मेळ घालण्याकरितां, विश्वभारतीय नांवाचें विश्वविद्यालय काढलें असून, त्यांचा ज्ञानप्रवाह अखंड चालू आहे.

याप्रमाणें ब्रिटिश हिंदुस्थानांत आपले बांधव आपल्या मातृभूमीचें नांव उज्वल होऊन ती पूर्वी प्रमाणेंच सर्व राष्ट्रांना आदर्शभूत व्हावी म्हणून करीत असलेली खटपट यशस्वी होईल यांत अगदींच शंका नाहीं. आतां पुढील लेखांकांत गोमांतकीय हिंदु समाजानें आपलें कर्तव्य कसें बजावावें त्याविषयीं कांहीं सूचना करून हा विषय पुरा करूं.

स्फुट विचार

"दुतोंडी राजकारण":—हिंदु व ख्रिस्ती या उभय जातींत पूर्ण एकी झाल्याशिवाय गोमांतकाचा राजकीय उद्धार होणें कदापिही शक्य नाहीं, अशी कांहीं ख्रिस्ती पत्रें वेळीं अवेळीं जोरानें प्रतिपादन करीत असतात; परंतु मजा ही की, एकीच्या नांवानें ओरड करणारे हेच ख्रिस्ती महाशय हिंदूना हितकारक होणाऱ्या प्रत्येक गोष्टीला विरोध करण्याची संधी दवडीत नाहींत! एखाद्या हिंदु हितविषयक प्रश्नाशीं सदरहू लोकांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध असला कीं, त्यांनीं आपला मत्सरी दावा साधलाच म्हणून समजावें! या विधानांचें सत्यत्व पटविणारीं अनेक उदाहरणें दाखवितां येतील., ओस्पिसचीच गोष्ट घ्या ना. या संस्थेचा मेंबर होण्याची गेल्या वर्षामागें हिंदूनां पूर्ण मोकळीक होती. परंतु सदहू संस्था उन्नति पंथ आक्रमित असल्याचें पाहातांच, खुद्द एकीचे पोवाडे गाणाऱ्यांसच भयंकर पोटदुखीच्या व्यथेनें पछाडलें व ओस्पिसेची द्वारें हिंदूनां कायमचीं बंद करण्यांत आलीं! हें दुतोंडी राजकारण—ऊर्फ पोटकारण हिंदु व ख्रिस्ती या उभय जातींचीं अतःकरणें राजकीय क्षेत्रांत समांतर होतील, याची उमेद बाळगणें निवळ वेडेपणा आहे.

अनाथांस मदत:—जलप्रलयानें अनाथ बनलेल्या लोकांस दुःखं निवारण करण्यासाठीं जिकडे तिकडे वर्गण्या गोळा करण्यांत येत असून, त्यानां जनतेकडून मोठ्या उदार अन्तःकरणानें हात भार लावला जात आहे, ही समाधानाची गोष्ट होय. प्रत्येक जण आप आपल्या शक्तिनुसार संकटांत पडलेल्या आपल्या बंधुभगिनीस कोणत्या ना कोणत्या रूपानें सहाय्य पुरविण्यांस पुढें सरसावत असल्याचें पाहून कोणाचें अंतःकरण सद्गदित होणार नाही?

काटकसर:—बेसुमार फोफावलेल्या नोकरशाहीच्या वृक्षाची खच्ची केल्याशिवाय, तिजोरीच्या मानगुटीवर धिंगाणा घालणाऱ्या तुटीच्या खवीसाच्या लीलाना आळा पडणार नाहीं, हें तत्व आतां हलकें हलकें सरकाराला पटत चालल्याचें दिसून येत आहे. कांकीं, काहीं कांहीं अनावश्यक जागा कमी करण्यात येत असून कांहीं कांहीं खातीं अजिबात काढून टाकण्यांचें घाटत आहे. काटकसरीची ही प्रवृत्ति मागेंच प्रगट झाली असती तर तिचा परिणाम तत्काळ दृष्टोत्पत्तीस पडला असता. पण ज्या थराला सांप्रत आमची सांपत्तिक स्थिति पोंचली आहे. त्या 'थरांत' सदहू 'औषधाचा' परिणाम होईल कीं नाहीं व झाल्यास तो कितपत होईल याचें प्रमाण ठरविण्यास बरीच डोकेफोड करावी लागणार, हें उघड आहे.

राष्ट्रीय फंड:—पोर्तुगीज वैमानिकांची पृथ्वी प्रदक्षणेची नूतन कल्पना यशस्वी होण्यार्थ एक 'राष्ट्रीय' फंड उभारण्यांत आला असून, तो शक्य तितका 'अवाढव्य करण्यासाठीं सरकारचे प्रयत्न चालू आहेत. जनतेची सांपत्तिक स्थिति कितीहि वाईट असली, तरी ज्या अर्थीं सरकारचा हेतु वाईट नाहीं, त्या अर्थीं ऐपत असलेल्यानीं त्या राष्ट्रकार्यास दोन्हींही हातांनीं मदत करावी, अशी आमची शिफारस आहे मात्र 'राष्ट्रीय' फंडास मदत करीत असतानां जलप्रळयानें उघडे बोडके पडलेल्या लोकांसाटीं उभारण्यांत आलेल्या 'प्रांतिक' फंडाला सहाय्य पुरविण्यास त्यानीं विसरूं नये. 'आप राखून धर्म करणें' हें तत्व लाथाडलें गेल्यास कोटेंदी झालें तरी त्याचा परिणाम गोड होत नसतो, असा अनुभव आहे.

जाहीर नोटीस

मी खालीं सही करणार सर्व लोकांस जाहीर करितों कीं, माझी एक सही केलेली सेलाद फोल हरवली असून, त्यावर आमच्या स्थावर जंगम इस्टेटी संबंधीचा कोणत्याहि प्रकारचा लेख कोणत्याहि तारखेनें कोणीहि लिहून घेऊं नये. घेतल्यास तो मला कबूल नाहीं. मी प्रौढ दशेंत आल्यापासून सरकारी खात्याखेरीज (कोर्तारीउद तावेलियांव) इतर प्रकारें कोणाचेंहि ऋण काढलें नाहीं. ता.-७-८-१९२३

शाबा रामचंद्र गांवस देसाई अवेडेंकर.

जेटी--मराठी शाळा.

मोर्मुगांव-हार्बर.

[खास बातमीदाराकडून]

पुढें श्री. तारकर यांनीं आपणास अध्यक्ष निवडल्याबद्दल आभार मानून शाळेचा हालहवाल वाचून दाखविण्यास सेक्रेटरी यांस विनंति केली. त्याप्रमाणें श्री. दणाईत यांनीं खालील रिपोर्ट वाचून दाखविला.

सभ्य गृहस्थ हो, आमच्या विनंतीस मान देऊन व आपला अमूल्य वेळ खर्चून आपण येथें येण्याची तसदी घेतली याबद्दल आपले सर्वांचे आभार मानून मी या शाळेचा सन १९२२ चा वार्षिक रिपोर्ट आपल्यापुढें सादर करण्याची परवानगी घेतों. हा रिपोर्ट वर्षाच्या अखेरीस डिसेंबर महिन्यांतच सादर करावयाचा. व त्या प्रमाणें योग्य व्यवस्था ठरवून सर्वांना जाहीर विनंतीही केली होती. परंतु, कांहीं अपरिहार्य कारणामुळें त्या वेळीं तो बेत रहीत करणें भाग पडून आज ऐन पावसाळ्यांत आपणा सर्वांस तसदी देणें भाग पडत आहे. याबद्दल आपण क्षमा कराल अशी आशा करितों.

मागील वर्षाची शिल्लक कांहीं नसून या वर्षी प्रवेश फी, ५ रु. ८ आ. मुलांची मासिक फी, १४८ रु. मेंबर कडील वर्गणी १४० रु. ४ आणे. व देणगी २ रुपये मिळून उत्पन्न २९५ रु. १२ आणे आहे. व खर्च, मास्तरांचा पगार २८७ रु. ८ आणे, बक्षिस पुस्तकें ६ रु. व शाळा खर्च ८१ रु. ४ आ. ९ पै. मिळून ३७४ रु. १२ आणे. ९ पै. इतका आहे. ६५ रुपये ८ आ. मेंबरांकडून यावयाचे आहेत. वरील जमाखर्चाचा हिशेब पहातां जमेपेक्षां खर्च ७९ रु. जास्त झालेला आहे. वरील खर्चांत काटकसर करणें मुळींच शक्य नाहीं., उत्पन्नाच्या बाजूनें जरी अशी शोचनीय स्थिति असली तरी मुलांची संख्या पहिल्यापेक्षां जास्त म्हणजे जवळ जवळ ८० आहे. हें पाहून कोणासही आनंदच होईल. आणखीही मुलें येण्यासारखीं आहेत परंतु जागेच्या व शिक्षकांच्या अडचणीमुळें मुलें घेण्याचीं बंद करावीं लागत आहेत, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. जागेच्या अडचणीबद्दल कांहीं तरी व्यवस्था करण्यांत येईल, परंतु, मुख्य अडचण ती नसून ८० मुलानां एकाच शिक्षकाकडून योग्य शिक्षण मिळणें शक्य नाहीं, ही होय. मुलांची फी वाढवावयाची तर आतां आहे तीच फी कमालीची जास्त आहे. एवढ्यानेंच भागतें असें नाहीं, तर मुलानां हल्लींच्या सुधारलेल्या पद्धतीप्रमाणें पूर्ण शिक्षण द्यावयाचें म्हणजे त्याला लागणारीं सर्व तऱ्हेचीं उपकरणेंही पाहिजेत. यावरून आहेत त्याच मुलानां योग्य शिक्षण देण्यास निदान दोन शिक्षकांची अगदीं जरूरी आहे हें कोणीही कबूल करील. तात्पर्य, शाळेची सुधारणा करण्याचें राहोंच. परंतु, आहे त्याच स्थितींत शाळा चालविणें मोठ्या मुष्कीलीचें झालें आहे. हल्लीं येत असलेली मुलांची फी व मेंबर शीप यांतून कसा बसा एकच मास्तरचा पगार भागूं शकेल. मास्तरांच्या अडचणी करितां मुलांची संख्या मर्यादित करावी तर तेंही बरोबर नाहीं. सारांश मास्तरांना एकतरी असिस्टंट देणें भाग आहे. दसकी लकडी एकका बोजा या न्यायानें या सार्वजनिक कार्यास आपसांतील मतभेद बाजूस ठेऊन येथील सुशिक्षित लोकांनीं मनांत आणल्यास एका शिक्षकाच्या पगाराची भर होण्यास कठीण पडणार नाही.

वर्तमानसार

—डिचोलीचे दोतोर सखाराम सरदेसाई हे अनाथांसाठीं मोठ्या चिकाटीनें फंड गोळा करीत आहेत. 'परोपकाराय पुण्याय'.

—पोर्तुगालचे आधुनिक कविश्रेष्ठ गेर्र जुंकैर यांचें देहावसान झालें!

—जर्मनींत बंडाळी माजली असून केवळ मिठ भाकरीसाठीं भरदिवसा दरोडे घालण्यांत येत आहेत!

—हिंदूंचे चहाते कापितांव कोस्त आलवीश हे लवकरच पोर्तुगालला रवाना होणार आहेत.

—मडगांवच्या ओस्पिसनें सांखळी व इतर ठिकाणच्या अनाथांस एक हजार रुपये पाठविण्याचा ठराव केला आहे.

—सांत काज द मिजेरकोर्दिय या संस्थेच्या नोकरांचे पगार वाढविण्यांत आले आहेत.

—जंगलखात्यांतील अनेक लहान नोकरांच्या जागा कमी करण्यांत आल्या आहेत.

—कोमिसांव द मिल्योरामेंतच्या जुन्या मोटारींचा लिलांव जाहीर करण्यांत आला आहे!

—पब्लिक वर्क खात्याचे मुख्य सि. आमोरी यांची मुदत संपल्यानें त्यांचे जागीं सि. जुझार्त मेंदोंस यांची नेमणूक झाली. आहे.

—विस्कोंद द पेर्नें यांनीं अनाथांस ५०० रुपयांची मदत पाठविली असून पेडणें मुनिसिपालटीनें २५ रुपयांचें सहाय्य केलें आहे. शिवाय तेथील शीलोन्नति समाजानें निराळा फंड उभारला आहे.

—डॉ. फ्रोइलानु दे मेलु यांनीं आंगोल येथें आरोग्यविषयक अनेक उपयुक्त पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत.

—माकाव येथें एका भयंकर वावटळीनें बरीच नुकसानी आणल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

—मडगांवच्या मुनिसिपाल हॉलांत एक सभा भरून दो. फांचु लोयोल यांस पारतीदु इंदियानाचा सूत्रधार निवडण्यांत आलें.

—काल रोजीं येथील कुशावती नदीला भयंकर पूर येऊन तिच्या तिरांवरील बागायतांस बरीच नुकसानी आली. पारोडें येथेंहि पुरानें लोकांना हवालदील करून सोडलें.

Ano VIII No. 20
Quinta-feira 16 de Agosto de 1923

NATURA
no tres rupias
CIOS
Por cada li[illegible] te repetida uma tanga
Nu. uma tanga

DIR. EDITOR
G. P. Dessay
Qde,

वर्ष ८ वें. अंक २०
गुरुवार ता. १६ आगष्ट सन १९२३
वर्गणीचे दर.
[illegible]लीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)
जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.
संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

BHARAT

Guerra Junqueiro

Extatica, inanimada a tumba fria sorveu o involucro material, da majestosa, da soberba aguia do lirismo luso.

Nesta hora, por certo, as lagrimas da patria inteira lhe tornaram leve a terra dura; em misticas preces ergueram-se a espuma, as vagas: e entre o arvoredo chora o vento em salmos piedosos.

Nao e somente o isocrono fenomeno de "a anarquia da dor a protestar contra o despotismo da morte", mas e'atmbem a circunstancia especial de nao se nivelar a superficie da campa rasa, a carcassa gelida em que reverberaram celeres, os raios santos da Pefeiçao!

A morte!...Oh! A ecuridao e' inoxia a's scintilaçoes das estrelas, numa noite escura.

No mundo moral, no intelectual tambem estrelas ha', como no sidereo espaço, essas estrelas sao faro'is que guiam as multidoes, no drama tumultuario da nossa existencia, a estes.

Morrer! que serve!
A morte é o prologo da vida!

Positivamente nao tem morte quem de armas na mao clame pela integridade, pela unidade da raça, da patria; quem rompendo os veus das tenebrosas lendas, se erga a' proa das gale's a desafiar a furia dos oceanos entumescidos; quem, a' guisa das aves sulgre o oceano aerio, pondo em tremulaçoes a bandeira da patria, ao sabor das correntes aerias, ou quem em voos arrojados nas regioes da poesia lave a alma de um povo, da vida comum, banal.

Nao podem morrer estes, nao devem morrer!

A mao negra da Morte atira para a vala comum, de olhos vedados criaturas grandes ou pequenas, grossas ou magras, ricas ou pobres, mas quando elas se chamam Camoes ou Dante, Vasco da Gama ou Newton, Antonio Candido ou Mirabeau, o seu nome tem efeito de pedra lançada na aguas: no meio das massas como nas agaus dum tanque, levanta circunvoluçoes e passa de geraçao a' geraçao!

E se a frauta rude dos pastores, se o versejar ambidextro dos primitivos incolas das selvas, foi a sinfonia do progresso universal, se as epopeias dos gregos, dos latinos, dos portugueses sao horas supremas da Humanidade, e se de todas nacionalidades, em todos tempos compete gravar em letras do fulgor intenso os momentos e monumentos psicolo'gicos — esta missao sacrossanta e' dos poetas, porque so' a toada suave dos versos pode domar o eterno *homo homini lupus*, ainda, so' do orquestrar das harpas eo'lias, e' condao especial fazer herois.

E Guerra Junqueiro, a peito nu' rasgou vias de soluçao, a muitos enigmas, a muitos misterios do seu tempo: trovejou, trabalhou, derruiu, sublimou, e, para tudo dizer, ate' foi o ultimo a desaparecer dos *Vencidos da Vida*!.

...Ultimo da luminosa galeria dos *Vencidos da Vida*!

Oh! como se extinguiu essa pleiade de homens que eram sa'bios, ascetas a viver somente, sorvendo os nectares do espiritualismo, misticismo!

Foi em declive para o Nada essa falange de santos, um por um, era ontem Anto'nio Candido, a seguir Marquez de Soveral, depois Conde de Sabugosa e hoje Guerra Junqueiro!

De Portugal se pode dizer, apo's a morte do Junqueiro:

A Deus só pedia água...
Mas o raio caiu em tanta mágua!...
E a Nuvem desabou em dura frágua!...
A Nuvem não tem olhos para vêr...

Oh! Saudade dos tempos em que vinham luzes de Coimbra, "gosto amargo dos infelizes".

No meio da boemia esturdia de Coimbra—o "Cena'culo da Sapiencia"—vinham os rebates das novas fo'rmulas sociaes, scientificas, filosoficas, literarias, artisticas, etc.

No entanto os velhos moldes da naçao iam gastos, o pensamento se debatia na estreita regiao craneana, a gangrena aduladora se alastrava assustadoramente e a inercia era feiçao predominante, em tudo e todos — urgia que fazer.

E neste momento, Junqueiro, desdespedindo-se das historicas fadas das Nuvens, deixando esse velho tema, cingiu o séu elmo de guerreiro e profeta novo decididamente caminhou a'vante, traçando senda nova, com os seus livros, "Patria" "Finis Patriae", "Musa em ferias", "Os Simples", "A Lagrima", Oraçao a' Luz e ao Pao" etc.

Em tudo novos moldes, revogaçao das obrigatoriedades ficticias, verso expontaneo, musical, variedade ritmica; uma esplendorosa orgia de imagens; esfuziar deslumbrante de antiteses.

Era aurora nova, da Ide'a Nova, na senda nova.

Nao se descreve tudo, nem a minha pena emperrada ousa ao tamanho sacrificio, — o que nos poemas dele ha' e' muita luz e muita luz obscurece a vista e pela prova este pedacito de oiro vai:

Vai despontando o rosicler d'aurora;
O azul sereno e vasto
Empalidece e córa
Como se Deus lhe desse
Um grande beijo luminoso e cauto
A' estrela da manhã.
Na altura resplandece;
E a cotovia, e a sua linda irmã,
Vai pelo azul um cantico vibrando
Tão limpido, tão alto, que até parece
Que é estrela no céu que está cantando.

A musa de Junqueiro e' soberba como a e'poca que gerou, tem tempestades, tem o ecoar da metralha da indignaçao, tem o ressoar dos gritos dos Proteus, tem escadas para o infinito e para as regioes subterraneas. Ha' adejos luminosos para o Olimpo, como ha rastejos para a lama. Contudo os seus livros marcam uma e'poca na historia da harmoniosa e doce palavra portuguesa.

Enfim, a sua musa e' duma geraçao opressa que viu em pedaços os grilhoes pesados. Entre estes um ha' que vale por um desvairamento proprio da mocidade ou por efeito do virus ministrado pelos falsos profetas daqueles tempos: e' "Velhice do Padre Eterno" que ele mesmo confessou ser ... *abominavel*, porque o e', sem duvida.

Mas, alem disso, em Guerra Junqueiro, de grande nao sao somente as trovoadas liricas que abalam as abobadas celestes, a expressao singela, cantante que, como o rio entre os arvoredos penetra todas almas; ou ser ele o homem de maior cultura intelectual na peninsula: e' sobretudo a sua figura moral, de asceta puro, dum monge esperando delicias no paraiso, vagueando nos desertos montes, o seu horror as culminancias; o seu desassombro em patentear a Verdade Eterna ser ... Guerra Junqueiro.

Morrer! Morrer e' belo quando se morre como ele, bailando na boca a *Verdade Eterna*, e' isso a suprema eloquencia duma consciencia desassombrada.

Na sua furia devastadora, envoltos nos seus formidaveis versos dardejam setas ao Intangivel e hoje e' o mesmo Junqueiro que voluntariamente enclausurado no "Convento", em extase dum santo embebido em meditaçoes, em comunhao com o universo.

Importa, pois que aqueles que o seguiram, que nortearam pelas teorias do poeta durante a sua vida, tomem por divisa o exemplo da sua morte santa, que gravem na memoria as palavras: "*Vim esperar a morte, vivendo em Deus.*"

"Os triunfos e as conquistas do Napoleao nao valem a lagrima dum santo.
"As pompas das suas vitorias nao va-
"le o burel de S. Francisco. O clamor
"de apoteoses guerreiras e sangrentas
"nao vale o murmurio flebil duma o-
"raçao, voando dos la'bios dum justo
"para Deus."

Nao so' isto:

"Deviamos todos comungar, catolicos e nao catolicos, na essencia profunda da mesma espiritualidade religiosa."

Bela, magnifica morte!

No solo da Patria apagou-se uma lampada, mas la' no ce'u. se acendeu uma estrela. Do alto velara' adejando sobre a Patria, ele apenas como sorriso a bailar nos labios desprendeu-se recitando o hino dos *Vencidos da Vida*:

Na mão de Deus, na sua mão direita,
Descançou afinal o meu coração...
Do Palácio encantado da Ilusão.

Juvenal da Rocha

Uma Verdade ...

Por mais que se pretenda tergiversar nunca pode diminuir do seu valor esta verdade: o peixe pequeno sempre ha' de ser pasto do peixe grande ainda que nem sempre seja mesma a *forma* cujos aspectos variam conforme o meio grau de civilisação e outros factores.

E' que o homem sempre foi *bruto*, Se hontem, foi um *bruto selvagem* hoje e', sem mais nem menos, um *bruto civilisado*.

ल्याकरितां अगर पालखीला किंवा दरवाज्याला सोन्या रुप्याचा पत्रा मढविण्याकरितां, पाहिजे तितकी रक्कम येतील; परंतु लोकोपयोगी संस्थांना मदत देण्याचें मनांत सुद्धां आणणार नाहींत. गोमांतकांत देवळांची व त्यांत चालणाऱ्या उत्सवांची संख्या पुष्कळ आहे. त्यांत आणखी भर घालणें ह्मणजे पोटभर मिष्टान्न जेवलेल्यांनां आणखी वाढणें होय. अशा उत्सवांची संख्या खरोखर योग्य ती ठेऊन, बाकीचे कमी करून त्या पैशांचा विनियोग परिस्थितीप्रमाणें लोकोपयोगी अशा कार्याकडे केला पाहिजे. असें केल्यास ईश्वराचा कोप होईल ही सबब पुढें आणणारांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, 'जसे लोक तसे त्यांचे देव' हेंच खरें आहे. अगदीं अशिक्षित लोकांच्या देवांकडे पाहिलें असतां, त्यांचे देव हे त्यांच्या भावनेप्रमाणें अगर गरजेप्रमाणें निर्माण झालेले असतात, व ते कोंबड्या बकऱ्यांचा बळीही घेतात. त्याहून वरच्या पायरीच्या ह्मणजे मध्यम स्थितींतील लोकांचे देव, पालख्यांतून मिरवणारे व पलंगावर निजणारे असे असतात. आणि त्याहूनपुढें गेलेल्यांचा 'सर्व देवो विश्वकर्मा महात्मा सदा जनानां हृदये सन्निविष्टः ह्मणजे 'सर्व विश्वाचा कर्ता महान आत्मा देव मनुष्यांच्या अंतःकरणामध्यें स्थित आहे' अशा तऱ्हेचा देव असतो. यावरून काय सिद्ध होतें ? लोकांच्या भावनाच बदलल्या पाहिजेत हें सिद्ध होत नाहीं काय ? याकरितां आपल्या लोकांनीं धर्मादायाच्या कल्पना बदलून त्यांचा विनियोग योग्य कामाकडे केला पाहिजे.

तिसरा दुर्गुण ह्मणजे प्रातिनिधिक संस्था चालविण्याची आमच्या अंगांत लायकी नाहीं हा होय. एकादी संस्था काढून ती चार चौघांनीं चालवून दाखविण्याची आह्मांस संवय नाहीं. आपल्याकडे पुष्कळ संस्था निघाल्या, हजारों रुपये वर्गणी जमा झाली, परंतु मतभेद व तंटे होतातच. व पुष्कळ वेळां याचा परिणाम फार वाईट होतो. आपली सर्व शक्ति अशा कामीं खर्च होते. आपल्यामध्यें यांचीं, उदाहरणें पुष्कळच आहेत. गोमांतकामध्यें आज ज्या कांहीं संस्था आहेत, त्यांतील पुष्कळशा संस्था अंतःकरणाच्या तळमळीनें उत्पन्न झालेल्या नसून, हमरी तुमरीवरच त्यांची उभारणी झाली आहे. अशा योगानें शेवटीं काय होतें ? पक्ष करतेवेळीं आणलेला उत्साह कमी होतांच या संस्थाही मरूं लागतात. तेव्हां आपण आपलें कर्तव्य काय आहे याचा नीट विचार करून कामाला लागलें पाहिजे.

आपल्या लोकांपुढें कामाचा डोंगर पडला आहे. आज आह्मांस हरएक कामाकरितां दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहावें लागत आहे. सुशिक्षित व कर्त्या लोकांनीं काढलेली प्रागतिक संघासारखी संस्था नीट चालत नाहीं, नव्हे तिची व्यवस्थित रीतीनें सुरुवात करतांही आली नाहीं. आमच्याच एकदा धार्मिक बाबतींतला जरी झगडा असला तरी सुद्धां ख्रिस्ती वकिलांची मनधरणी केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. गोमांतकांत आपल्या लोकांचें एक तरी हायस्कूल आहे काय ? यावरून हिंदु लोकांत भूतदया हा गुणच नाहीं असा आरोप आमच्यावर केल्यास त्यांत वावगें असें कांहींच नाहीं असें वाटत नाहीं काय ? गोमांतकीय बंधूंनो, शिमग्यासारख्या निंद्य व सर्वथैव बंद करण्यास योग्य अशा उत्सवां करितां हजारों रुपये खर्चून ते चालविण्याची परिस्थिति आज आहे काय ? आजची परिस्थिति काय आहे, जगाची धडपड कशी चालली आहे, हें आपण पाहातच आहां. अशा भौतिक युगामध्यें आपला निभाव लागला पाहिजे; व ह्या करितां पाश्चात्य देशांतील लोक कशा प्रकारें आपलें कर्तव्य बजावीत आहेत, याचीं उदाहरणें नित्य डोळ्यांपुढें ठेविलीं पाहिजेत. आज जीवनार्थ कलह किती भयंकर वाढलेला आहे, याचा विचार करा. अद्याप चैन करीत बसण्याचे दिवस नाहींत, हें लक्षांत आणा. या करितां गोमांतकीय तरुणांनो, आम्हीं बरेच प्रयत्न केले पाहिजेत. स्थानिक कार्यें किती तरी आहेत. मद्यपानासारख्या निंद्य व भयंकर व्यसनांचा प्रसार तरुणामध्यें जारीनें होत आहे, याची आपण वेळींच खबरदारी घेऊन पिछेहाट केली पाहिजे, व या करतां सुशिक्षित तरुणांनीं मद्यपान निषेधक चळवळी हातांत घेतल्या पाहिजेत. पतितपरावर्तनासारखें कार्य करावयाचें आहे, त्याकरितां अगोदर लोकमत जागृत केलें पाहिजे. हिंदुधर्म व ख्रिश्चनधर्म यांची तुलनात्मक विवेचनपद्धती लोकांपुढें मांडली पाहिजे. याची सर्व जबाबदारी नवीन सुशिक्षित पिढीवर आहे. त्यांनीं प्रथमतः जनतेची भावना जागृत केली पाहिजे. सरकारी नोकरी ह्मणजे सर्वस्व हें तत्व सोडून आह्मीं आपलें कर्तव्य योग्य प्रकारें बजाविलें पाहिजे. तरच आपल्या देशाची उन्नति होईल. आपला भूतकाळ अत्यंत उज्वल होता. पण तो उज्वल होण्यासाठीं जसे प्रयत्न आमच्या पूर्वजांनीं केले, तसेच प्रयत्न आपण आपला भविष्य काळ उज्वळ होण्याकरितां करावयास नको काय ?

शेवटीं, सुप्रसिद्ध हिंदी कवि मैथली शरण गुप्त यांच्या काव्यांतील तरुणास उद्देशून काढलेले उद्गार लिहून, ही विस्तारावलेली लेखमाला पुरी करितों. "हे नवयुवाओ देशभरकी दृष्टि तुमपरही लगी, है मनुज जीवनकी तुह्मींमें जोति सबसे जगमगी। दोगे न तुमतो कौन देगा योग देशोद्धारमें, देखो कहां क्या हो रहा है आजकाल संसारमें ॥"

—श्रीमंत दाभोळकरांच्या दोन हजार पंचावन्न रुपयांची सांखळीतील निराश्रितानां योग्य प्रमाणानें (रोख नाण्याची) विभागणी झाली. धान्याच्या अगर कपड्यांच्या रूपानें मदत झाली असती तर खरोखरीच निराश्रित कोण हें समजण्याला मार्ग राहिला नसता.

हिंदुस्थान व कापड

दर माणसीं फक्त १३.४ वार !

ले० मुक्त. मुंबई.

स्वदेशभक्त खालील आंकडेवारीकडे अवश्य लक्ष पुरवितील अशी आशा आहे. ही आंकडेवारी सरकारी व इतर खासगी व खात्रीलायक रिपोर्टावरून मांडली आहे तेव्हां त्यांत विशेष खोटेपणा असण्याचा संभव नाही, हें उघड आहे. गेल्या मार्च महिन्यापासून पुऱ्या झालेल्या १९२२–२३ वर्षाची ही आंकडेवारी आहे.

सरकारी रिपोर्टावरून असें दिसून येतें कीं, या पुऱ्या झालेल्या एका वर्षांत, हिंदुस्थानांतील सर्व गिरण्या मिळून ७०,५८,४८,००० पौंड सूत कांतलें व त्यापासून ४०,५२,००,००० पौंड कापड तयार केलें यांपैकीं ५६८६१४९० पौंड सूत व १५६९५१२३५ यार्ड कापड परदेशांत पाठविण्यांत आलें. याच पुऱ्या झालेल्या एका वर्षांत ५९२७४२२९ पौंड सूत व १५९३२९५०९६ यार्ड कापड विलायतेहून हिंदुस्थानांत आलें. आणि यांतून १४७९८८८ पौंड सूत व ७४५७११४० यार्ड कापड पुनः परदेशांत रवाना झालें. या दिलेल्या आंकड्यावरून खुद्द हिंदुस्थानांत किती कापड तयार झालें व दर वर्षाकांठीं दर मनुष्यास किती कापड लागलें याचें प्रमाणें काढणें विशेष कठीण नाहीं.

हिंदी गिरण्यांत तयार केलेलें सूत	७०५८४८००० पौंड.
हिंदुस्थानांत आलेलें विलायती सूत	......५९२७४२२९ ,,
एकंदर	७६५१२२२२९ पौंड
यांतून हिंदी सूत बाहेर गेलेलें	५६८६१४५० पौंड
व हिंदुस्थानांत येऊन परत परदे० पाठ० सूत.	१४७९८८८ पौंड,
मिळून एकंदर	५८३४१३७८ पौंड
वजा केले तर	७६५१२२२२९ पौंड
	५८३४१३७८
	७०६७८०८५१ पौंड

सूत हिंदुस्थानच्या गिरण्यानीं व हातमागांनीं विणलें असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं.

परंतु हिंदुस्थानांतील गिरण्यांमधून ४०५२००००० पौंड कापड तयार झालें. सुतापासून कापड विणताना सुतास खळ देतात व तेणेंकरून त्याचें वजन वाढतें. हें वजन-वाढीचें प्रमाण साधारणपणें १० टक्केप्रमाणें धरलें तर खरेपणीं ४०५२०००० पौंड कपड्याच्या ऐवजीं फक्त ३६४६८०००० पौंड कापड हिंदुस्थानांतील गिरण्यांनीं तयार केलें असें सिद्ध होतें. अर्थांत बाकी राहिलेलें सूत, हातमाग, दोऱ्या, गुंड्या वगैरे कामांत गेलें. हातमागावर कपडा विणावयाचा असला तरी ताण्याला खळ ही द्यावी लागतेच. पण हें प्रमाण दोऱ्या, गुंड्या इत्यादि प्रीत्यर्थ खर्च झालेल्या सुताबद्दल जमेस धरलें तर हिशेबांत विशेष फरक पडण्याचा संभव नाहीं. तेव्हां बाकीचें सर्वच ३४११००८५४ पौंड सूत हातमागांनीं वापरलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

साधारणपणें गिरणींत १ पौंड सुताचें ३ ४ वार व हातमागावर ४ वार कापड बनतें. त्यावरून हिंदुस्थानांतल्या गिरणींत

	१५६८१२४०७० वार.
,, ,, हातमागावर	१३६४४०३४१६ वार.
	२९३२५२७४१६ वार

कापड तयार झालें हें सिद्ध झालें. पण यांतून १५६९५१२३५ वार कापड परदेशांत पाठविण्यांत आलें. तेव्हां

हिंदुस्थानांत बनलें	२९३२५२७४१६ वार
हिंदुस्थानांत बनून बाहेर गांवीं गेलें	१५६९५१२३५ वार
बाकी.	२७७५५७६१८१ वार

कापड हिंदुस्थानांत शिल्लक राहिलें. हे कापड हिंदुनस्थास पुरणें अगदींच अशक्य असल्यामुळें गेल्या सालीं १५९३२९५०९६ वार विलायती कपडा हिंदुस्थानांत आला पण त्यांतूनहि ७४५७११४० वार कापड परदेशीं गेल्यामुळें हिंदुस्थानांत परदेशी कापड १५१८७२२९५६ वार इतकें राहिलें. हें व देशी मिळून एकंदर ४२९४२९९१३७ वार कापड हिंदी लोकांनीं गेल्या सालात वापरलें.

हिंदुस्थानांतील एकंदर लोकसंख्या ३२ कोटी आहे असें गृहीत धरलें तर दर माणसीं १३.४ वार कापडाचें प्रमाण पडतें.

हिंदु लोकांनीं फक्त अत्यंत जरुरी पुरतें कापड वापरलें तरी दर माणसीं दरसाल, धोतरें, कोट, खमिसें, पंचा, हातरुमाल, उपरणें इत्यादि मिळून कमींतकमी ३०॥ वार लागतें. व ख्रिश्चनादि इतर जातीना हि तेवढेंच [अंदाजानें] लागतें. पण प्रमाण तर १३.४ आहे. तेव्हां कमींत कमी व जरुरीपुरतें वापरणाऱ्यांची संख्या किती असेल व त्याच्या पोषाखावरून धड वस्त्राला सुद्धां महाग झालेले लोक या भरतखंडांत सुवर्णभूमी ह्मणून नांवाजलेल्या आर्यावर्तांत वस्त्राभावीं शीत उष्ण सहन करीत तळमळणारे मनुष्य जीव किती असतील याची कल्पना वाचकानींच करावी ! !

परदेशी कापडापायीं कित्येक अब्ज रुपयांचा निष्कारण फन्ना उडूनहि धडवस्त्रहि मिळणें कसें अशक्य झालें आहे, इकडे स्वदेशभक्त अवश्य लक्ष पुरवितील अशी आशा आहे. अखिल आर्यावर्ताभिमानी श्रीमंत व भांडवलवाले लोकांनींहि अशा परिस्थितींत भयंकर अतिलोभास बळीं न पडतां ही अडचण दूर करण्याचे प्रयत्न करावे अशी त्यांस सविनय प्रार्थना आहे.

—'मुरगांव-शिक्षण-संघास' मुंबईचे श्रीमंत गणपतराव पुंडलीक घुमटकर यांनीं ता. २७-५-२३ रोजीं घड्याळ अर्पण केलें.

—सांखळी येथील श्रीमती लक्ष्मीबाई बाक्रे या ब्राह्मण बाईनीं तेथील पुरामुळें अनाथ झालेल्या व इतर गरीब लोकांस प्रत्येकीं १० पड तांदूळ, अर्धा नारळ व थोडी डाळ यांची खेरात केली. शाबास ! सत्पात्रीं दान झालें ! धनिक लोक या बाईंचा कित्ता गिरवितील काय ?

VIII No. 21

Qu… 23 de Agosto de 1923

SINATURA
… ano tres rupias

…NCIOS
Por cada … que repetida uma tanga
…lso uma tanga

भारत.

BHARAT

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

वर्ष ८ वें, अंक २१

गुरुवार ता. २३ आगष्ट सन १९२३

बर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

Inexplicavel!

Por ter dado cabida nas suas colunas alguns sueltos, publicados nos periodicos metropolitanos, contra o nosso intemerato colega d *A Terra* foram instaurados alguns processos crimes pelo Agente do M. P na comarca de Salsete.

Acusada de ter cometido o mesmo delicto, mandou-se, igualmente, proceder, criminalmente, contra a *A Tribuna* de Calangute

E nao sera' para admirar se na igual *arma dilha* for, amanha, *colhido* algum outro jornal da India, se tiver *ousadia* de inserir nas suas colunas alguma local de qualquer jornal da Mae-Patria.

E'certo, todavia, que os agentes do M. P dos tribunais judiciais de Portugal nao entenderam que fossem *criminosos* os referidos sueltos, transcritos pelos nossos ja' aludidos jornais!!!

E' inexplicavel, na realidade, esse *desigual* ponto de vistas numa nagao republicana, onde se cantam loas a' *Igualdade* e ao *fraternal* principio de que "a India e' prolongamento de Portugal"!

Se, de facto, o nosso paiz fosse prolongamento da Metropole, coisas que no seio desta sao consideradas como inocentes, nao se reputariam no daquele como crimonosas, nao se observaria ca', com grande pasmo e profunda magua, flexibilidade de criterios sobre um e mesmo objecto; nem finalmente se notaria diversidade sentimental diante dum e mesmo aspecto nos governos que se dizem feitos da mesma massa de sangue...republicano e democratico.

Franquesa franca, e' essa a conclusao que flui, inequivoca e nitida, da atitude *febril* de quem promove, de quando em vez, *por da' ca' aquela palha* processos crimes contra o nosso colega d "A Terra". Afigura-se-nos, mesmo, que em relagao ao destemido jornalista que o e' o seu director faz-se "em farrapos" a lei de imprensa...

O "Bharat", quaisquer que sejam as suas relagoes com aquele bissemanario, protesta com toda a veemencia contra a perseguigao que lhe e' movida, so porque ele se nao faz adulador ou turibulario do Poder, como por ai se comenta a' boca cheia!

Para que, pois, as instituigoes que felizmente nos regem, nao sofram no seu imaculado prestigio a mais leve sombra de "desigualidade", torna-se necessario que os nossos dirigentes acabem, duma vez para sempre, com as tais flexibilidade de criterios e diversidade sentimental...

Aos bons portugueses impende o dever de desfazer o inexplicavel da orientagao dos nossos agentes do M. P. os quais nao tem razao para adoptar modos de ver, diametralmente opostos, dos dos seus colegas de Portugal, tendo todos, estes e aqueles, deliciado a pura e cristalina agua duma mesma fonte e adorado o mesmo *Deus* de sabedoria...

A' "Terra" e a' "Tribuna" desejamos absolvigao nos seus processos, nao so' pela camaradagem que nolas une, mas tambem pela ansia de vermos exaltado o bom nome da Republica Portuguesa.

A' Janela....

Va' em preto a minha coluna do *Bharat*!

Nos Jeronimos, no Panteon da Histo'ria, deu a sua ultima entrada quem com maos de marfim tangeu a lira do heroismo da Raga Lusitania—Guerra Junqueiro.

Nao mais veremos orgias diamantinas de versos soberbos que levaram a consupgao, a Redengao da Patria, versos deste ciclopiço bardo de nome —Guerra Junqueiro.

Ninguem o negara', a mais nefasta obra da morte foi cintilar essa grandiosa esta'tua da Moralidade, do Civismo, do Patriotismo—Guerra Junqueiro.

Silencio! ... Leitores pios por momentos, remontemos o nosso espirito ante a esquife fria que guarda:

Raio animado de uma luz celeste
A qual a morte a's almas restitue
Restituindo a terra o po' que as veste.

Relanceemos, de joelhos, o olhar pelo livro do Civismo, da abdicagao das grandezas-a vida do grande Guerra Junqueiro.

Nao me cabe a critica da sua vasta, sublime obra literaria, scientifica, filosofica, nao. Eu bem creio que ate' as altivas aguias nao defrontam o sol, eu bem sei que os pigmeus sao sempre piquenos... ante os gigantes.

Nao vai a tanto a nossa pretengao, e' simples, e' modesta: prestar homenagem de respeito a quem em tintas de sangue embora, soube escrever no solo da Patria a epopeia da Liberdade, Igualdade e Fraternidade. Sim as quinas que fulguram no Campo de Ourique; as Cortes de Leiria; o penedo de Sagres; a gloriosa data de 1 de Dezembro; a aboligao de escravatura fizeram com que Portugal na vanguarda das nagoes europeias algas se o estandarte da Civilisagao. Era portanto, mister manter esta heranga inalienavel. Infelizmente na vida dos homens como na das nagoes surgem circunstancias que fazem oscilar; vozes agourentas surdem persistindo as renovagoes que e' a formula do verdadeiro Progresso. Entao so' uma e unica coisa resta: luta: expressao ultima do valor fisico, intelectual, moral.

Nelas retinem-se em fragor conchas solertes a' cuja sombra jazem monturos de interesses individuais ou sejam, tronos ou instituigoes carcomidas pela ferrugem do tempo. Nelas ao indiferentismo criminoso de uns opoe-se o desvario iconoclasta, geral. E' entao inevitavel que o rugir da metralha reboe no espaço, o grito da aspiragao colectiva; que o sangue escreva no solo a Epopeia do Ideal. Nesta ordem de ideas os versos de Junqueiro, chama da idea ateiaram fogo no que de podre, de falso, de adulador se erguia impune. E essa mesma fogueira que inconscientemente lambeu tudo desde as Biblias seculares, ate' as Cartas Constitucionais, alumiou-nos a estrada do Progresso. Nesta faina, dever e' confessar, tocou as raias do sacrilegio, aluiu a fe' de um povo: foi um produto de ma' hora, porem duma sinceridade santa e disto temos a prova nas suas ultimas palavras, no seu magnifico *canto de cisne*.

Nao fosse a sua figura moral, nao fosse aquela inge'nua santidade, os seus versos nao possuiriam a força talismanica de como Amphion ergueu muralhas. Nao seriam de um povo de uma geragao que empurrou para a senda do Progresso a nagao de velhas formas os seus versos:

Rasga-te o peito sem cautela.
Da-lhe o teu sangue todo.
Va'! o' mocidade heroica e bela
Morre a cantar...Morre porque ela
Revivera'

E este homem morreu!

Embora. *Sic transit gloria mundi* ...nao se talhou para os homens do quilate de Guerra Junqueiro, para eles a morte e' o abrir misterioso, de par em par, das portas que se dao para os paramos da Eternidade, para os pinaculos da Imortalidade!

E neste momento em que a crise do caracter e' pavorosa, e neste momento em que todos berramos pelo saneamento moral, urge reviver em nossos coragoes, de grandes e piquenos, de pais e filhos, de mestres e alunos essa figura simbolica da Heroica Patria.

Como prestar esta homenagem-ligao civica para no's todos?

De-se um feriado a todos em geral e em especial a' mocidade escolar porque so'mente assim as colecgoes novas poderao ligar esta concessao ao dever de estudar, recordar, gravar na memoria o nome da Maxima Gloria Patria-GUERRA JUNQUEIRO!

Alma Velha

Ecos & Critica

O sr. Mariano

Está cada vez mais divertido o sr. Mariano, administrador dêste concelho. Farto de troçar da gente com assuntos de madeira, sua excia zomba, agora, dos seus jurisdicionados, administrando-os de Margão por meio dum *vai-vem* constante dos sipais da sua dependencia.

O sr. Rebelo esteve em Margão sem licença, fazendo companhia á sra sua esposa e crêmos que fez muito bem, porque prova que sabe respeitar a familia em primeiro lugar.

E quem respeita a familia sem prejuiso de sua algibeira, presume-se que saberá tratar, condignamente, os seus jurisdicionados...

Ou então, a logica é uma batata...

India Portuguesa

E' o titulo dum novo semanario que encetou a sua publicação na vila de Margão sob a direcção do festejado escritor sr. José Ignacio de Loiolá, como orgão de grande agremeação politica que é o *Partido Indiano*, há pouco reorganisado e consolidado.

Prometendo apreciar ope

मदत करणें हें होय. आज गोमांतकामध्यें कांहीं ठिकाणीं या लोकांच्या मदतीकरतां फंड गोळा करण्याचें काम चालू आहे. परंतु वर्तमान पत्रांमधून जे आंकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यावरून पाहतां काम समाधानकारक नाहीं, हें मोठ्या खेदानें कबूल करणें भाग आहे. आपल्या गोमांतकांत पुष्कळ श्रीमंत लोक मोठमोठे उत्पन्नदार आहेत. पुष्कळ देवालयांतून व्याजी लावण्यांकरितां पैसा पडून आहे. धर्मगुरूंकडेही पुष्कळसा पैसा सांठलेला आहे. परंतु या सर्वांनां आपल्या पैशांचा व्यय करण्यास मुळींच समजत नाहीं, असें ह्मणावें लागतें. देवालयांनीं मोठमोठे उत्सव करून आतषबाजीसारख्या निरुपयोगी कामांत पैसा खर्च करावा व धर्मगुरूंनीं मठांतील प्रत्येक उपकरण सोन्यांचें करण्याकडे शिलकेचा उपयोग करावा, या पलीकडे आपलें कांहीं कर्तव्य आहे यांची त्यांस जाणीव होऊं नये, या सारखी कोणतीच खेदाची गोष्ट नाहीं. भूतदया हें धर्माचें मुख्य अंग आहे. या विषयीं सर्व साधु संतांनीं व धर्मग्रंथांनीं टाहो फोडून कंठशोष केला असूनही आमच्या धर्माच्या मुख्य अधिपतीची ही स्थिति! मग इतरांविषयीं काय बलावें? गोमांतकांत बऱ्याच गांवीं जलप्रळयामुळें उडालेल्या दुर्दशेची करुण कहाणी या धर्मगुरूंच्या कानीं गेलीच नाहीं काय? गेली असणारच. मग लोकांकडून मिळालेल्या देणग्या वर्गण्यातून अस्तित्वांत आलेल्या व चाललेल्या या संस्थानांतून अशा निराधार लोकांना मदत कां होऊं नये? परमार्थास आड येणारी इतकी स्वार्थबुद्धि, धर्मगुरूनींच दाखविल्यास, त्यांच्या संसारमग्न शिष्यवर्गास तरी कां दोष द्यावा? संन्यासधर्माचा असा विपरित अर्थ झाल्यामुळेंच हिंदुस्थान अधोगतीला पोहोंचला आहे. हिंदु समाजाच्या धर्मगुरूंनीं पाषाणाच्या निर्जीव मूर्ति सोन्यारुप्यानें मढवून आपल्या डोळ्याचें पारणें फेडण्यापेक्षां या चालत्या बोलत्या जिवंत देवांकडे आधीं पहावें व त्यांसच संतुष्ट करावें. हेच देव आपल्या राष्ट्राच्या उपयोगी पडणारे आहेत. सोमनाथाच्या देवालयांत खंडो गणती संपत्ति एकत्र झाली होती. तिच्या लोभानेंच गजनीच्या महंमुदाचें इकडे आगमन झालें! हीच संपत्ति त्यावेळीं जनस्वरूप देवांकडे खर्च करण्यांत आली असती तर महंमुदाच्या सेवेचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य या जिवंत देवांच्या अंगीं आलें असतें. मुसलमानांनीं हजारों देवळें बाटविलीं! खंडो गणती संपत्ति लुटली! हजारों देवांच्या मूर्ति फोडल्या! परंतु या देवांनीं त्या दांडग्या लोकांचा प्रतिकार करण्याचें सोडून उलट, आपलें राज्यच दीर्घकाल पर्यंत त्यानां देऊन टाकलें! यांत परमेश्वराचा उद्देश आपल्या लोकांचे डोळे लौकर उघडून यापुढें तरी अशा संपत्तीचा विनियोग जनरूपी देवांकडे व्हावा हाच असला पाहिजे. परंतु अद्यापही या गोष्टीकडे डोळेझांक केली जाते, हें आपलें दुर्दैव होय. आपल्या धर्मगुरूनीं ख्रिस्ती धर्माच्या मिशनरींकडे पहावें ह्मणजे ते लोक अशा निराश्रित लोकांकडे आपण होऊन कसे धांव घेतात, तें दिसून येईल. भूतदयेचीं तत्वें पोथ्यांत गुंडाळून ठेऊन त्यांचां पूजा करीत बसण्याकडे त्यांचा कल नसून, तीं तत्वें ते शक्य तितकीं अधिक व्यवहारांत आणीत असल्यानें आज त्यांच्या धर्माला उज्वलता मिळाली आहे. असो.

ही स्थिति पालटण्याकरितां आपण शक्य तितकी अधिक मेहनत घेतली पाहिजे. याची जबाबदारी तरुण पिढीवर आहे. आपले लोक पुष्कळशा निरुपयोगी कामांकडे पैसा खर्च करितात. परंतु अशा लोकोपयोगी व राष्ट्रोपयोगी कामांस पैसा देण्य चें पुष्कळशा जिवावर येतें. आमच्यांतल्या त्यांच्या श्रीमंत लोकांनीं हिंदु देवळांची गोष्ट सोडाच, पण ख्रिश्चन देवळें बांधण्याला सुद्धां भरपूर मदत केली आहे! परंतु त्याच लोकांचे अशा भूतसेवेच्या कामीं पडलेले आंकडे पाहिले ह्मणजे त्यांच्या अज्ञानाची फार कींव येते. ही स्थिति श्रीमंत लोकांचीच नसून मध्यम स्थितींतील लोकांची हीच स्थिति दिसून येते. गोमांतकांतल्या देवळांतून जो पुष्कळसा पैसा व्याजीं लावण्याकरीतां ठेविला आहे, त्याचा विनियोग अशा वेळी व अशा कामीं केला पाहिजे. नुसते तीळ–तांदूळ जाळून अगर मोठमोठे उत्सव करण्यापेक्षां या जनरूपी देवांकडे त्या पैशांचा विनियोग केल्यास खरी ईश्वरसेवा केल्यासारखें होईल. देवाकरितां मनुष्यें नसून, मनुष्यांकरितांच देवांचें अस्तित्व आहे.

गोमांतकीय तरुणांनो! आपल्या गोमांतकाप्रमणेंच मलबारमध्यें कहर उडालेला आहे; परंतु तिकडे सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटीसारख्या संस्था काम करीत आहेत. आपणांकडे अशी संस्था नाहीं. तरी आपण या कामीं प्रत्येक खेड्यापाड्यांतून फंड गोळा करून या निराश्रित लोकांना मदत केली पाहिजे. हीच खरी ईश्वर सेवा होय. यासारखा दुसरा पवित्र धर्म नाहीं. आपल्यापैकीं पुष्कळ लोकांना अशा कामीं भिक्षांदेही करण्यास लाज वाटते. त्यांनीं जरा बाहेर नजर फेंकून पाहिल्यास सर प्रफुल्लचंद्र राय यांसारखे थोर पुरुष अशा कामाकरितां फिरून कशी मदत मिळवीत आहेत, तें दिसून येईल. त्यांच्या सारखेंच आपण आपलें कर्तव्य बजावण्यास यावेळीं तयार झालेंच पाहिजे.

---o---

—रा० भालचंद्र का० शिरवैकर यानीं आपल्या ब्यारिस्टरच्या कोर्साचें तिसरें वर्ष यशस्वी रीतीनें संपविलें. आणखी दोन वर्षांनीं त्यांचा कोर्स पुरा होईल. रा० शंकर रामचंद्र नाडकर्णी यांचेंहि पोर्तुगालचें शिक्षण फार समाधानकारक चाललें आहे.

—जर्मनींतील अंतःस्थ धुमफुसीला भयंकर स्वरूप येत चाललें आहे!

श्रीमंत दामोळकर

लेखांक १ ला.

"वनीं विलसती बहू विविध वृक्ष चोहींकडे ॥ तयांत मम चंदनासम न एक ही सांपडे ॥"

वनांत चंदनाचे वृक्ष असतात, त्यांचा इतस्ततः परिमळ सुटतो, परंतु तो चंदन वृक्ष कोणत्या योग्यतेचा आहे हें जवळ गेल्यावरच परिज्ञान होतें. आपल्या भरतखंडांत परोपकारार्थ ज्या विभूतींनीं आजपर्यंत चंदनाप्रमाणें देह झिजविला त्यांतीलच एक श्रीमंत शांताराम नारायण दाभोळकर हे होत. ह्यांची कीर्ति ऐकून माहीत होती प्रत्यक्ष परिचयाचा योग गेल्या एप्रिल–मे महिन्यांत मला आला.

गोमांतकांत दाभोळकरांचें नांव अपरिचित नाहीं, गोमांतकस्थांसंबंधानें त्यांची विशेष आदरबुद्धि दिसून येते. 'श्रीदत्त पद गुच्छ' ह्या नांवानें त्यांनीं एक चिमुकलें पुस्तक प्रसिद्ध करून त्याच्या शेंकडो प्रती लोकानां नजर केलेल्या आहेत. ह्या पुस्तकाचा आकार लहान; परंतु योग्यता मोठी आहे. ह्यांतील किती एक पद्यावली दाभोळकरांच्या स्वभावाचा आदर्श होत. एका अभंगांत ते ह्मणतातः—

माझी निंदा प्रियमज। स्तुति अप्रिय सहज ॥ १ ॥
याचें कारण शोधावें। मज सम तुह्मीं व्हावें ॥ २ ॥
अहंस्फूर्ती जी बाधक। निंदुनियां करा चोख ॥ ३ ॥
मूळ हिता तैं पावाल। शांताराम जैं निंदाल ॥ ४ ॥

'स्वयें सर्वदा नम्र वाचें वदावें' हें दाभोळकरांचें व्रत असून, हे दीनाचे वाली, विद्येचे भोक्ते, गुणाचे ग्राहक आणि देवाचे भक्त आहेत. त्यांच्या द्रव्याचा सद्व्यय अखिल भरतखंडांत विद्यादानाकडे व अन्य परोपकारी कृत्यांकडे अधिक्यानें होतो. त्यांची दानशूरता अवर्णनीय आहे. ह्याचें द्योतक गेल्या जुलै महिन्यांत सांखळींतील महापुराच्या योगें निराश्रित झाले त्यांस उदार मनानें पाठविलेली दोन हजार पंचायशीं रुपयांची कळकळीची देणगी होय. नेहमीं पात्रापात्र विचार करून हातभार लागत असतो. सत्पात्र पाहून दान करवें हाच त्यांचा मुख्य नियम समजला पाहिजे.

दाभोळकरांचा साधेपणा, नियमितपण नेमनिष्ठा आणि व्यवहारदक्षता अनुकरणीय असून श्रीमंत, धीमंत आणि विद्वंस ह्या तीनही विशेषणांस ते खरोखरीच पात्र आहेत. परमेश्वरानें त्यांना ही गुणत्रयी एकसमयावच्छेदें बहाल केली आहे.

श्री दत्तभक्त या नात्यानें दाभोळकरांनीं सांखळींतील श्री दत्तवाडींत जी आज तागायत सुधारणा केली त्या मानानें त्यांचें नांव चिरस्मरणीय होऊन राहिलें आहे. एका शब्दांत सांगावयाचें ह्मणजे त्यांनीं आणखी नवीन सुधारणा करण्यांत स्वतःवर आतां बोजा घेतलाच पाहिजे, असें नाहीं; तथापि हजारों रुपये खर्च करून श्री दत्तवाडीची ऊर्जितावस्था व्हावी ही त्यांची उमेद अद्यापि कायम आहे. मूर्त स्वरूपांतीं जनतेची खात्री होईलच.

परवांच्या महापुराचें वर्तमान समजल्याबरोबर श्री दत्तवाडींत न्यूनता काय आहे ह्याचा तारेनें लागलाच तपास करून अग्रशाळादि देवालयांचीं उपांगें पुरास बळी पडल्याचें ऐकून दाभोळकर फार हळहळले. श्री दत्तवाडीस पूर्व स्वरूप प्राप्त करून देण्यास दाभोळकरांशिवाय अन्य कोणी समर्थ असल्याचें तूर्त तरी दिसून येत नाहीं.

अल्प सहवासानें जे त्यांचे सद्गुण माझ्या प्रत्ययास आले, त्यांचेंच येथें दिग्दर्शन केलें आहे, हें यथार्थ असून ह्यांत अतिशयोक्ति मुळींच नाहीं. श्रीमंत गृहस्थांना सर्टिफिकेट देत सुटून त्यांचे पोवाडे गाण्याचा मुत्सद्दीपणा ह्यांत नाहीं. पूज्यबुद्धीचे हे उद्गार होत.

दुसऱ्या लेखांकांत श्री दत्तवाडींत सारस्वतवेदपाठशाळेसंबंधानें विवरण करण्यांत येईल. डि० फंड ४ आणे.

गणेश सदाशिव शिरोडकर.

अनाथांस मदत

सांखळी व इतर ठिकाणीं झालेल्या जलप्रलयामुळें निराश्रित लोकांस बरेच ठिकाणीं फंड वगैरे उभारून मदत करण्यांत येत आहे परंतु ती अपुरीच होणार आहे. तरी पण प्रत्येकानें आपापल्या शक्तीप्रमाणें कांहीं तरी मदत करून पुण्य संपादन करावें अशी विनंति आहे.

आतांपर्यंत पुढील सद्गृहस्थानीं मदत केली आहे.

	रु. आ.
रा. शांताराम काशीनाथ दणाईत	१–८
,, गोविंद विनायक बरवे	१–०
सौ. अन्नपूर्णा गो. बरवे.	१–०
कु. चंपाबाई काशीनाथ दणाईत	१–०
वे.शा.सं. श्रीधर नारायण जोशी	१–४
रा. शांताजी नाथाजी चौगुले	१–८
,, सदाशीव यशवंत नावर.	१–६

Ano VIII *No.* 22

Quinta-feira 30 de Agosto de 1923

ASSINATURA

Por ... tres rupias

...IOS

Por cada linha ... e repetida uma tanga

... uma tanga

... E EDITOR

G. ... gdo Dessay

...m-Goa

भारत.

BHARAT.

वर्ष ८ वें, अंक २२

गुरुवार ता. ३० आगष्ट सन १९२३

वर्गणीचे दर.

सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.

समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.

गो. पु. हेगडे देसाई.

केपें—गोवा.

Em volta do segredo do sr. Alfredo

O que sobre ele diz a Epoca

UM FUNCIONARIO MODELO

O *Bharat* fez em tempo consideraçoes sobre o caso do chamado *segredo* do sr. Alfredo Rodrigues, director interino que foi de Fazenda deste Estado,— a proposito da indevida arrecadaçao do dinheiro do contribuinte esfarrapado.

Houve quem lhe opuzesse argumentos, tentando desvanecer a força do nosso ataque, argumentos que, fiel ao seu programa, o nosso jornal os estampou nas suas colunas e em lugar de destaque.

Vem, agora, a *Epoca*, bem informado eacreditado jornal metropolitano irradiar em jorros luz sobre o mesmo caso, o que representa, mesmo, uma resposta a' letra ao nosso contendor.

Diz a *Epoca*:—

Aquele ministe'rio das Colo'nias esta', ai que nos consta, dando pano para mangas. Ha', la' dentro, certas creaturas que tomaram a' sua conta a *administraçao* colonial e...e' deixa-las. Entao o proteccionismo, o favoritismo desenvolvem-se por la' duma maneira que causa assombros aos menos dados a preocuparem-se com a de *gringolade* que por ai vai. O caso que vamos referir e' simptomatico e foi-nos relatado por pessoa que o conhece bem, sendo prova flagrante da protecçao dispensada a funcionarios delinquentes.

Existe um funcionario que foi director da Fazenda adjunto do Estado da India e que ultimamente nomearam director de Fazenda da Provincia de Guina' ... talvez como recompensa aos seus *primorosos* serviços.

Pois este funcionario, que pretendia passar por meticuloso e zeloso, hostilisando principalmente os europeus, ao que nos dizem, cometeu o delicto de contrabando, tentando passar aos direitos artigos de seda e outros, quando veio ha pouco tempo da India, pelo que foi multado em 22.000$00, quantia que deve ser decuplicada, visto tratar-se de um funcionario do Estado.

Nao contente com isto o mesmo funciona'rio praticou a fraude ao Estado da quantia de 8.000 rupias, ou sejam perto de 60.000$00, fazendo se abonar daquela importancia para passagem da India para Lisboa a ele e a sua familia, quando esta se encontrava na metropole, desde que ele veio de licença, regressando sozinho a' India, donde agora voltou por motivo da sua promoçao e transferencia para a Guine'.

Alguns parlamentares, patricios do funcionario em questao, trabalham activamente para que nao seja castigado, limitando-se ao reembolso a Fazenda da quantia defraudada, mas julgamos que o sr. Ministro das Colo'nias nao deixara' ficar impunes os crimes do citado funcionario, que perdeu toda a autoridade para exercer o lugar de director de Fazenda, ou outro qualquer, seja onde for.

A nao ser que o sr. Rodrigues Gaspar esteja de cocoras ante creaturas de duvidosa cor.

Ca' tem o sr. Pitagoras e Sousa informaçoes completas sobre o assunto que lhe provocou a carta.

Da leitura delas deve ter concluido que o *Bharat* nao abriga contra quem quere sentimentos menos honestos: patua a sua orientaçao, segundo os ditames de sa e pura consiencia, ainda que na sua esfera critica fiquem abrangidos os seus mais irredutiveis adversarios politicos.

O *Bharat*, como todo o ente mortal, esta' sujeito a errar; mas creiam todos que ele nunca ha de *fingir erro* seja por que motivo for, para criar ou lançar suspeiçoes em volta da reputaçao de quem quere...

Fique isto dito, alto e bom som!

Venham sacrificios !

E' critica a situaçao economica do Paiz. E' precisamente este o unico assunto em que nao ha' divergencia de opiniois, no dificil momento que estamos a atravessar.

Governantes e governados acham que o Paiz esta', na realdade, por cima duma montanha de area, bastando-lhe apenas um sopro de vento para ir parar ao precipicio da irremediavel bancarrota.

Acham isto, sim, mas em tese so', *Teoricamente* concordam que *tudo vai* mal; mas na pratica demonstram absolutamente o contrario, dando-nos a triste impressao de que em ambas as fileiras se procura fazer valer o *comodismo de quem puder*...

E' ma'u; e pior sera' se insistirmos em trilhar a mesma errada senda que arrastara' irremediavelmente o Paiz para a completa ruina.

Nao basta que cada um lamente so' com lagrimas de crocodilo a sorte do Paiz. Mister se torna que se esforce por traduzir por *actos* a nobresa de seus sentimentoe, prontificando-se a sofrer pelo bem de sua terra natal privaçoes de toda a especie.

So', assim, com um supremo esforço de sacrificios dos governantes e governados, e' que poderemos entrar na *vida nova*. A fase da crise e' terrivel. Palavras e discursos ja' nao tem o condao de abrandar-lhe a gravidade. So' sacrificios a valer poderao curar o mal.

Venham, pois, sacrificios!

Coisas & Loisas

Politica...

Toda a regra tem sua excepçao. Assim, a regra de que cada homem tem seu modo de pensar sobre um certo e determinado assunto tem tambem a sua exepçao.

E' tratando-se da *politica* que se observa o tal fenemeno *excepcional*; pois so' sobre a significaçao da expressao *politica* encontramos uma admiravel uniformidade de vistas em todos os *patriotas* da terrinha os quais sao outros tantos homens com outras tantas cabeças...

Para eles, a *politica* sinifica *barriga*: o politico e' *barre-dou*. Um *patriota politico* que nao pense na sua *barriga* perde duplamente a sua *dubia* qualidade de "patriota" e "politico".

O "Patriotismo" e', pois, um culto devotado a's exigencias da "barriga; a politica, idem" e "na mesma data.

Representando isto uma "verdade axiomatica", nao sabemos porque alguns tipos fogosos pretendem maldizer dos que, sendo "patriotas" e "politicos", afagam com mimos as suas "barrigas"...

Ecos & Critica

O sr. Rebelo

A proposito da nossa local *O sr. Mariano* informam-nos que o sr. Rebelo tinha autorisação do sr. Governador Geral para de Margão administrar a gente do concelho de Quepem.

Não acreditamos nêsse *tendencioso* informe, pôrque reputamos o sr. dr. Jaime de Morais incapaz de conceder a quem quere uma tal regalia que em última analise representa ...*chacina* do prestigio da Republica.

Porque, a ser legal e razoavel uma autorização para um funcionario dirigir as suas funcções dum conceiho, tendo residencia noutro, legal e razoavel seria, tambem, uma regalia que pelo sr. Ministro das Colonias fôsse outorgada ao sr. Governador da India para êste nos governar...da Metropole.

A balela de autorisação não pega, portanto. De resto o sr. Mariano Rebelo pode estar socegado com suas arbitrariedades que, enquanto tiver costas quentes, ninguem se meterá consigo...

Lala Lajpat Rai

Por motivos de doença foi posto em liberdade êste grande paladino das liberdades politicas da India Britanica.

Inda bem que o tiraram da prisão com vida!

Honra lhes seja

O sr Eduardo Pereira, digno administrador de Pondá envidou os seus milhores esfoços em prol dos sinistrados das últimas inundações cujos sofrimentos minorou em grande parte.

Igual empenho desenvolve—

आपल्या श्रीकृष्ण चरित्रांत ह्मणतातः 'पुराण व इतिहास यांमध्यें श्रीकृष्णचरित्र कसें आहे तें पाहाण्याचा मी यत्न यथामति केला; त्यांत मला दिसून आलें कीं, श्रीकृष्णासंबंधीं जे जे आक्षेप घेतले जातात ते सर्व पायाशुद्ध नसल्यानें खोटे आहेत श्रीकृष्णाविषयीं ह्या ज्या कल्पना आहेत, त्या मागाहून केल्या गेल्या असून, त्यांना कशाचाच आधार नाहीं. खरोखर श्रीकृष्णचरित्र हें अत्यंत शुद्ध, पवित्र आणि महत्वाचें आहे. माझा असा अभिप्राय आहे कीं, श्रीकृष्णाचें चारित्र्य सद्गुण संपन्न, सगळ्या पापांपासून अलिप्त व आदर्शभूत असें असून, कोणत्याहि देशामध्यें असा थोर पुरुष उत्पन्न झालेला नाहीं. ख्रिस्त व बुद्ध हे केवळ उदासीन व संसार सोडून कौपिन धारण केलेलें केवळ धर्मवेत्तेच होते; पण श्रीकृष्ण तसा नव्हता. तो सर्व गुण संपन्न न सगळ्या वृत्तींमध्यें पूर्णता पावलेला असा होता.'

असो. आतां आपण थोडक्यांतच श्रीकृष्ण चरित्र पाहूं. श्रीकृष्णांचा जन्म मथुरेंत झाला. त्यांचे तीर्थरूप हे कंसाचे मांडलिक होते. कंसानें आपल्या राज्यांत फार अत्याचार सुरू केले होते, व आपल्या बापालाच कैद करून सिंहासन बळकाविलें होतें, अशींच आणखी पुष्कळ अनन्वित कृत्यें करण्याचा सपाटा चालविल्यानें प्रजेंत अत्यंत असंतोष माजला होता. यावरून कंसाला या आपल्या कृत्यांबद्दल शासन करणारा कोणी तरी उत्पन्न होईल अशी भीति वाटत होतीच; तदनुसार त्यानें आपलें गुप्तहेरांचें जाळें सर्वत्र पसरून टाकलें होतें. त्या वेळीं वसुदेव हाच मुख्यत्वें आपल्या विरुद्ध उठेल असें त्याला त्याचेकडून कळलें. शिवाय, उग्रसेनाच्या धाकट्या भावाची मुलगी देवकी ही वसुदेवाला दिली होती. तेव्हां आपल्या सासऱ्याच्या मदतीला हा केव्हां तरी धावून येईल, असें त्याला वाटत होतें. ह्मणून कंसानें वसुदेव व देवकी या दोघांनाही मथुरेंत कैद करून ठेविलें. आपल्यावर कंसाची करडी नजर आहे, हें जाणून आपली दुसरी बायको रोहिणी, हिला, ती गरोदर आहे असें पाहून आपला गोकुळांत राहणारा जिवलग मित्र जो नंद त्याच्या घरीं ठेविलें. तेथें तिला बलराम हा मुलगा झाला. कंसानें वसुदेव व देवकी यानां मथुरेस आणून बंदींत ठेवल्यानंतर त्यांच्या पोटीं जी संतती होईल तीस ठार मारण्याचा सपाटा चालविला! परंतु अशा अधिकारानें धुंद झालेल्या राजांचीं कृष्णकृत्यें जेव्हां अनावर होतात, तेव्हां प्रजापक्ष बलावत जातो, व याच पक्षाकडून अशा राजांच्या शत्रूंनां मदत होत असते. राजांचा कितीही कडेकोट बंदोबस्त असला तरीही त्यांतून मार्ग काढण्याची मदत लोकांना मिळत असते, आणि याचमुळें वसुदेवाचा आठवा मुलगा श्रीकृष्ण हा जन्माला येतांच त्याला निर्भय स्थळीं पोहोंचविण्याची मदत प्रजापक्षाकडून मिळाली, व त्यानें आपला मुलगा गोकुळांत यशोदेजवळ ठेवून तिची नुकतीच जन्मलेली मुलगी कंसाच्या वाड्यांत आणून ठेविली. यशोदेनेंही, मथुरेंत कंसाकडून होणारा वसुदेवाच्या मुलांसंबंधाचा भयंकर अन्याय माहीत असतांहि—आपली मुलगी वसुदेवाच्या स्वाधीन करण्यांत राष्ट्रीय स्वार्थत्यागाचा हेतु होता. हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांतही राजकुमारांच्या संरक्षणाकरितां स्वतःचा मुलगा बळी दिल्याचीं उदाहरणें पन्नादाईच्या इतिहासावरून आपणास माहीत झालेलींच आहेत.

श्रीकृष्णांचें बाळपण गोकुळांत गेलें. त्यावेळीं दुधासारखा सात्विक आहार, स्वतंत्र वृत्ति, मोकळी हवा, या शिवाय ब्रह्मचर्य व्रताचें पालन यामुळें त्याला शारीरिक बळ उत्तम प्रकारें कमवितां आलें. तेथें त्यानें मल्लविद्येचाही अभ्यास केला. ह्याप्रमाणें त्याच्या अंगीं शारीरिक बळ फारच असल्यानें, त्यास पूतना, धेनुकासूर, वगैरेंचा वध करतां आला. पुराणकारांनीं श्रीकृष्णाचें ईश्वरत्व सिद्ध करण्याकरितां या साध्या गोष्टी सुद्धां फुगवून लिहिल्या आहेत. कालियामर्दनाची गोष्ट भागवतामध्यें कालिया नांवाचा एक महाभयंकर विषारी सर्प यमुनेच्या डोहांत राहून लोकांस व पशुपक्ष्यांदिकास त्रास देत होता, त्यास श्रीकृष्णानें घालवून दिलें, अशा रीतीनें लिहिली आहे. परंतु तो हल्लीं आपण पाहातो तसला सर्प नसून, नाग या नांवानें संबोधिली जाणारी अनार्यांची एक जात त्यावेळीं हिंदुस्थानांत होती, त्यांपैकीं होता. याच जातीचें सर्प सत्र ह्मणून पुढें जन्मेजयानें केलें. ह्या नाग जतीचाच कोणी री कालिया नांवाचा पुंड त्या रानांत राहून सर्वांना त्रास देत असल्यानें श्रीकृष्णानें त्यास पारिपत्य करून घालवून दिलें असावें. भागवतांत, कालियाच्या बायकांनीं श्रीकृष्णाची केलेली स्तुति दिलेली आहे. तींत पुष्कळ वेदांत भरलेला आहे. यावरूनही तो सर्प नसून नाग जातीच्या अनार्यांचा एक सरदार होता असें दिसतें.

दुसरी गोष्ट ह्मणजे त्यावेळीं गोकुळांत वर्ष अखेर एक इंद्रयज्ञ करण्याची चाल होती. पावसाची देवता इंद्र ही होय. त्याअर्थीं त्या देवतेला संतुष्ट केल्यानेंच आपणांस फायदा होईल अशी समजूत होती. या त्यांच्या कल्पनेला श्रीकृष्णानें निराळें वळण लाविलें. त्यानें सांगितलें कीं, या विश्वाला चालन देणारी एक निराळीच शक्ति असून तिचें अस्तित्व सर्व वस्तूंमध्यें आहे. यावरून इंद्रयज्ञ करण्यापेक्षां आपणांस गाई व पर्वत यांच्या करितां यज्ञ करणें जरूर आहे; कारण आपला सर्व आधार त्यांच्यावरच आहे; ह्मणून उत्तम प्रकारचें अन्न करून गाईंस व ब्राह्मणांस अर्पण करा! नंदानें या प्रमाणें केलें. भागवतामध्यें, यामुळें इंद्राचा गोपाळांवर कोप होऊन, त्यानें एक सारखा मुसळधार पाऊस पाडला! त्याच्या निवारणार्थ श्रीकृष्णाला गोवर्धन पर्वत उचलून धरावा लागला, असें लिहिलें आहे. परंतु ही सर्व कविकल्पना आहे. कारण जुन्या लोकांच्या कल्पनेप्रमाणें पाहिलें तरी सर्व देवांत विष्णू श्रेष्ठ आहे, व त्याचाच अवतार श्रीकृष्ण होय. कंस मदोन्मत्त झाल्या कारणानें इंद्राच्या सभेंत भाषणें होऊन श्रीविष्णूनेंच कृष्णरूपानें अवतार घ्यावा असें ठरलें. यावरून पाहातां श्रीकृष्ण या श्रीविष्णूच्या अवताराहून इंद्राची पायरी खालची असल्यानें तो त्याविरुद्ध जाणें शक्य नाहीं. असो

श्रीकृष्ण चरित्रांवर जे कांहीं आरोप घेतले जातात त्यापैकीं मुख्य आरोप म्हणजे रासलीला हा होय. या आरोपाचें साहित्य सम्राट बंकिमचंद्र व देशभक्त लाला लजपतराय यांनीं आपल्या श्रीकृष्णचरित्रांमध्यें मुद्देसूद खंडन केलेलें आहे; त्याविषयीं सविस्तर प्रमाणें देत बसल्यास लेखविस्तार जास्त होईल. याकरितां पुढें केव्हां तरी एक स्वतंत्र लेखांकांत त्याचें सविस्तर विवेचन करूं. बंकिमचंद्र म्हणतात—"गोपींचा उल्लेख महा भारतांत नाहीं; राजसूयज्ञाच्या वेळीं शिशुपाळानें श्रीकृष्णाची फारच नींदा केली, त्यांतही हा उल्लेख आला नाहीं. शिवाय द्रौपदी वस्त्रहरणाचे वेळीं तिनें केलेल्या धाव्यांत श्रीकृष्णास गोपीजनप्रिय असें ह्मटलें आहे, तें गोपीविषयक श्रृंगारिक कल्पना मनांत आणून ह्मटलेलें नसून तो गोपींचीं संकटें दूर करणारा अशा उदात्त व पवित्र भावनेनें ह्मटलेलें आहे. महाभारतानंतरच्या विष्णुपुराणांतही त्याचा उल्लेख आहे, परंतु तो पवित्र भावानें आहे. हरिवंशांत थोडासा विलासभाव आहे. भागवतामध्यें विलासास ऊत आलेला असून, ब्रह्मवैवर्त पुराणामध्यें तर त्याच्या नद्याच वाहात आहेत!"

श्रीकृष्णावरील गोपींचें प्रेम श्रृंगारिक नसून शुद्ध असलें पाहिजे; कारण या वेळीं त्याचें वय १२ वर्षांचें असावें. अशा लहान वयांत त्यांच्या मनांत विलास भाव उत्पन्न होणें शक्य नाहीं. शिवाय त्यानें गोकुळांत शक्तीदर्शक कामें केलीं त्यावरून त्यामध्यें ब्रह्मचर्याचा अभाव होता असें वाटत नाहीं. यानंतर मथुरेस आल्यावर कंसाच्या पदरचे मोठमोठे मल्ल व कंस यांसारख्या बलवानांशीं कुस्ती मारून त्यांना ठार केलें आहे; त्यावरून त्याचें ब्रह्मचर्य कायम होतें असेंच दिसतें.

रासलीलेचा खरा अर्थ म्हणजे त्या लोकांमध्यें स्त्रीपुरुषांनीं एकत्र नाचण्याची व गाण्याची चाल होती. विराट राजाची मुलगी उत्तरा ही अर्जुनापाशीं नृत्य शिकत होती. यावरून अर्जुनसुद्धां त्याविद्येंत पारंगत होता असें दिसतें. आज युरोपियन लोकांमध्यें या चालीचें फार महत्व आहे. हें सांगावयास नकोच. आपल्या हिंदुस्थानांतही सुरत जिल्ह्यांतील चौधरा, नयडा, दुबळा, वगैरे जातींमध्यें ही चाल अद्याप चालू आहे.

—०—

—केंपेहून मडगांव येथें जाणारा रस्ता सुधारण्याचें घाटत आहे.

स्फुट विचार.

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio, Barreto, correm editos de 30 dias a contar do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos da § 20 do art. 197 do Cod. do Proc. Civ. citando os interessados Crisna bai e seu marido Govinda Rau Sidorcar, maiores, ausentes em parte incerta de Bombaim para assistirem a todos os termos ate final do inventario orfanologico a que se procede por obito de Mucunda Subraia Sinai, natural e domicilio do que foi de Palolem sendo inventariante e cabeça de casal Nilconta Trimboca Sinai da mesma e nele deduzirem querendo os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento. E para ser publico se expediu este.

Xeldem da Comarca de Quepem, 14 de Outubro de 1923

O Escrivão de Direito do 2 ° oficio

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direto, 1 ° Substituto,

Baptista Gomes

येत्या जानेवारी महिन्यापासून भारत आजच्याप्रमाणें सहा पृष्ठांचा निघणार असून त्यांत सरकारी बातम्या जास्ती प्रमाणानें येणार आहेत. म. 'भारत'

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Radcar, vao a praça para venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirige a estação de Sanvordem no dia 30 do corrente n oz as 13 horas pelo maior lanço que se oferecer acima de avaliação os seguintes bens: Um dezoitavo do predio rustico denominado 'Asolasordo' ou Oxolasordo" da cultura de arroz avaliado por 75 rupias, Um dezoitavos do predio rustico denominado 'Sordo Fondiem' da cultura de arroz avaliado por 100 rupias, Um dezoitavo do predio rustico denominado Sordo Chindiem" ou Chudiem da cultura de arroz avaliado por 200 rupias, Um dezoitavo do predio rustico denominado 'Xir' da cultura de coqueiros avaliado por 75 rupias Um dezoitavo do predio rustico denominado Vagradeulacodil da cultura de coqueiros avaliado por 100 rupias, Um dezoitavos do predio rustico denominado Porlpou

विचार लहरी.

लहर ४ थी

हिंदु संघटना व शुद्धिकार्य याबद्दल ब्रिटिश हिंदुस्थानांत जोराची चळवळ चालू झाली आहे. स्वामी श्रद्धानंद, पंडित मदन मोहन मालवीय यांसारख्या थोर पुरुषांनी हीं कार्यें हातांत घेतलेलीं आहेत. या दोन्ही व्यक्ति असामान्य आहेत. स्वामीजींच्या कार्याची घडाडी आर्य समाजांतून दिसून आलेलीच आहे. तसेंच पंडितजींच्या दीर्घ परिश्रमामुळेंच हिंदूंच्या पवित्र अशा काशी क्षेत्रांत हिंदु विश्व विद्यालयाची स्थापना होऊन, हिंदु धर्माचें नांव उज्वल झालेलें आहे. यावरून वरील चळवळींना योग्य असे पुढारी लाभले आहेत, यांत कांहींच शंका नाहीं.

× × ×

हिंदुधर्म अत्यंत उदार आहे. या धर्माचें स्वरूप फार व्यापक आहे; हा धर्म कोणत्याहि एका व्यक्तीपासून उत्पन्न झालेला नाहीं. पुष्कळ ऋषींच्या दीर्घ परिश्रमानें तो तयार झालेला आहे. यांत अनेक मतांचा व अनेक पंथांचा समावेश होतो सांख्यासारख्या निरीश्वर वादी व योगासारख्या सेश्वरवादी मतांचा, तसेंच पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा (ज्यांचीं मतें अगदीं परस्परांच्या पासून भिन्न आहेत.) - अशांचाही यांत समावेश केलेला आहे. त्याप्रमाणेंच, शैव, वैष्णव, नानक, दादु किंबहुना शाक्त व चार्वाक यांसारख्या वाममार्गी व नास्तिक पंथाचाहि यांत समावेश झालेला आहे. यावरून या धर्माचें व्यापक स्वरूप आपल्या लक्षांत येईलच. महात्मा गौतम बुद्धांना तर हिंदुधर्मानें विष्णुदेवाचा नववा अवतार मानलें आहे

\+ + +

हिंदुधर्म व बौद्धधर्म हे एकाच आईच्या पोटांतून उत्पन्न झाले. गौतम बुद्धांच्या मनांत हिंदुधर्म नाहींसा करून, त्याऐवजीं दुसरा धर्म स्थापन करावयाचें नव्हतें; तर सनातन हिंदुधर्माच्या तत्वांचें रहस्य न समजतां केवळ भलत्याच कल्पना हृदयाशीं धरून जग चाललें आहे; पण त्यांतील खरें रहस्य आपणांस समजून चुकलें असून तेंच आपण विशद करून सांगत आहों. असाच त्याचा समज होता. यावरून प्रॉटेस्टंट ब्राह्मण धर्म स्थापन करण्याची गौतम बुद्धांची इच्छा होती असें दिसतें. बौद्ध धर्मांत ज्या ज्या मतांचा प्रामुख्यानें स्वीकार करण्यांत आला, तीं मतें हिंदु धर्मांतीलच होतीं. बुद्धीला, ज्ञानाला, तर्काला, व्यवहाराला जीं जीं मतें ग्राह्य वाटलीं, त्याच मतांचा त्यानें स्वीकार केला. कालांतरानें बौद्ध धर्म हिंदुस्थानांतून नाहींसा झाला असें सकृद्दर्शनीं दिसतें; परंतु तो धर्म नाहींसा झाला नसून, ज्या हिंदुधर्मांतून तो उत्पन्न झाला, त्याच्यांतच तो मिळून गेला हेंच खरें. आज आम्हां हिंदु लोकांना जैन धर्मापेक्षां बौद्ध धर्म दरकी असा वाटतो, याचें कारण प्रस्तुत त्या धर्माचा प्रसार हिंदुस्थानाबाहेर जास्त झाला आहे, हेंच असावें.

\+ * +

हिंदुधर्माप्रमाणें बौद्धधर्मानेंही धर्मवेड पांघरून लोकांवर अत्याचार केले नाहींत. कारण जेथें युक्तीची वाढ खुंटते, तेथें शक्तीचें प्रदर्शन करण्यांत येतें. ह्या धर्मांतील बहुतेक तत्वें युक्तिग्राह्य असल्यामुळें त्याचा प्रसार होण्यास तरवारीची गरज भासत नाहीं. बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन धर्मोपदेश करण्याकरितां जाण्यास निघालेल्या एका शिष्याला खुद्द गौतम बुद्धांनी विचारलें कीं, ' तूं ज्या देशात उपदेश करण्यास जात आहेस, तेथील लोक दुष्ट, कडवे व अत्याचारी आहेत, ते तुझी निंदा करूं लागले किंवा अपशब्द बोलून तुला दुखवूं लागले तर तूं काय करशील? ' शिष्यानें उत्तर दिलें, 'मी चूप राहीन' यावर भगवान म्हणाले, ' त्यांनीं तुला मारलें तर! ' शिष्य म्हणाला, " मी त्यांना उलटून मारणार नाहीं. " पुढें आणखी भगवानांनी विचारलें, ' त्यांनीं तुला ठार मारण्याचा प्रयत्न केला तर! ' शिष्य म्हणाला, " मी त्यांचे आभार मानीन. कारण, या संसारांत जे त्रिविध ताप भोगावे लागतात, त्यांतून माझी आयतीच सुटका होईल. " हें ऐकून भगवानांना फार समाधान वाटलें, व त्यांनीं त्याला आशीर्वाद देऊन धर्मोपदेश करण्यास पाठवून दिलें.

\+ + +

सम्राट अशोक याच्या दीर्घ परीश्रमामुळें त्या धर्माचा प्रसार जास्त झाला. त्यानें खुद्द आपल्या मुलास व मुलीस भिक्षु-भिक्षुणीची दीक्षा देऊन, त्यानें द्विपांतरास धर्म प्रसाराकरितां पाठवून दिलें. त्यानें खालील निरनिराळ्या ठिकाणीं आपले धर्म प्रचारक पाठवून दिले होतेः- काश्मीर, कंदाहार, महिशा [म्हैसूर] वनवास [राजपुताना,] अपरांतक [पश्चिम पंजाब,] महाराष्ट्र, यवन देश [बाक्ट्रिया, ग्रीस वगैरे,] हिमवत [मध्य हिमालय] सुवर्ण भूमी, ब्रह्मदेश व लंका या ठिकाणीं पाठविले होते. त्याच्या अनुशासनांतील लेखावरून असें कळतें कीं, मिसर, मासिडोनिया व ग्रीक राज्यें या ठिकाणींही त्यानें आपले धर्मप्रचारक पाठविले होते.

* * *

हिंदु धर्मावर खरा हल्ला मुसलमानाचा झाला. मुस्लीम धर्माची स्थापना केवळ तरवारीच्या जोरावर झाली. जेथें जेथें ह्यानीं राज्य घेतलें, तेथें तेथें त्याच्या जोरावरच आपल्या धर्माचा प्रसार केला. 'काफर' आपल्या धर्माचा प्रसार केला. 'काफर' लोकांच्या कत्तली करून आपल्या धर्माची दीक्षा दे! हा प्रकार सररास चालू होता. हिंदुस्थानांत या लोकांनीं फार अत्याचार केले. या लोकांची स्वाभाविक प्रवृत्तिच आसुरी असल्यानें हिंदुस्थानांतील हजारों देवळें मोडून, मूर्ति फोडून शिल्पकला नाहींशी केली ! हजारों ग्रंथ जाळून साहित्य संग्रहाला मूठमाती दिली. हजारों देवांच्या मूर्ति फोडून त्यांनीं आपल्या धर्म समजुतीप्रमाणें पुण्याचें श्रेय घेतलें. त्यांतल्या त्यांत विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं हिंदुस्थानांतल्या कांहीं व्यक्तीनीं ह्या धर्माचा स्वीकार करतांच पूर्व धर्मावर असेच अत्याचार केले ! बंगल्यांतल्या 'काळा पहाड' नावांच्या एका हिंदूनें मुसलमानी धर्म स्वीकारतांच इतक्या मूर्ति फोडून टाकल्या कीं, तितक्या मूर्ति फोडण्याचें श्रेय आजपर्यंत एकाही मुसलमान बादशहानें घेतलें नाहीं. यावरून त्या धर्मांतच असा आडदांडपणा करण्याचें सामर्थ्य असावें, असें दिसतें. आज हिंदुस्थानांत या लोकांची संख्या ७ कोटी आहे !

× × ×

त्यानंतर हिंदुधर्मावर दुसरा हल्ला ख्रिस्ती धर्माचा झाला. इ. सन ७१ त एक ख्रिस्ती मिशिनरी मलबारमध्यें आलेला होता, परंतु त्याचें तस्तान इकडे जमलें नाहीं. इ. स. १४९७ मध्यें वास्को दी गामा हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर उतरला. ह्या नंतर पोर्तुगीज लोकांनीं हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व किनारे काबीज केले होते. परंतु राजकारणांत धर्माची सांगड घालून राजकारण बिघडून टाकलें, व जिंकलेले बहुतेक प्रांत गमावून बसले. गोमांतकांत धर्माच्या नांवाखालीं पोर्तुगीज मिशनरीनीं अनन्वित अत्याचार केले. पोर्तुगीज लोकांना लागलेला हा कांळिमा यावचंद्र दिवाकरौ धुतला जाणार नाहीं. यांनीं आपल्या धर्माचा प्रसार करण्याकरितां, जितके कांहीं अत्याचार करितां येणें शक्य होते तितके सर्व परधर्मीयांवर करून टाकले ! शिल्लक म्हणून ठेवले नाहींत, आणि विशेष हें कीं, या सर्व अत्याचारानां कायद्याचेंही पाठबळ मिळविलें. यांच्या या क्रूर कृत्यांमुळें देश उजाड पडला, जमिनीचें पीक बुडून गेलें. गोमंतकांतील बऱ्याच हिंदु लोकांनीं ज्यांची आपल्या धर्मावर श्रद्धा होती, त्यांनीं हे सर्व छळ मुकाट्यानें सोसून घेतले. व ज्यानां परदेशांत जाणें शक्य होतें, त्यांनीं तो मार्ग स्वीकारला. आपल्या जन्मभूमीवर, आपल्या घरादारांवर, आपल्या संपत्तीवर, आपल्या परमपूज्य अशा देवालयांवर पाणी सोडून अत्यंत दीन स्थितींत ज्यानां दुसऱ्या प्रांतांत जावें लागलें, त्यांच्या त्या वेळच्या स्थितीची जाणीव कल्पनेनेंही होणें शक्य नाहीं. बरोबर न्यायाला पसा नाहीं, जमिनी विकूं गेल्यास घेणारा नाहीं, हजारों लोक परप्रांतांत जाणारे, तेव्हां घेतो कोण ? शिवाय एखादा हिंदु जमिनदार मयत झाल्यास त्याची इस्टेट त्याच्यामागें त्याच्या मुलानें व बायकोनें ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केल्याशिवाय कायद्यानें वारसदार होतां येणें शक्य नव्हतें. शिवाय लग्नेंसुद्धां या प्रांतांत करण्याची कायद्यानें पंचाईत होती. अशा स्थितींतही अत्यंत कष्ट सोसून ज्या हिंदूंनीं परधर्माचा स्वीकार केला नाहीं. त्या आमच्या पूर्वजांची धन्य असो ! एकवार नव्हे तर त्रिवार धन्य असो ! ! हा सर्व इतिहास निःपक्षपातपणानें उजेडांत आणल्याबद्दल गोमांतकीय हिंदु समाज दोतोर नोरोंज्य यांचा फार आभारी राहील.

* * *

इंग्लिश लोकांनीं सर्व हिंदुस्थानांत आपलें साम्राज्य स्थापन केलें, पण धर्माच्या नांवाखालीं अत्याचार केले नाहींत. अकबराचें सिंहासन स्थायिक होण्यास धार्मिक बाबतींत समानता, व औरंगजेबाचें सिंहासन डळमळीत होण्यास धर्मवेडेपणा हीं कारण झालीं, हें त्यानीं तेव्हांच ओळखलें. हिंदुस्थानच्या लोकांवर छाप बसविणें झाल्यास धार्मिक बाबतींत हात घालून उपयोग नाहीं, हें त्यानीं पहिल्यानेंच ठरविलें. शिवाय, त्याना धर्मप्रसाराची तितकी गरजही नव्हती. यांचें धोरण व्यापारी होतें, म्हणून त्याचें राज्य इतक्या सुलभ रीतीनें स्थापन झालें. आतां कित्येक इंग्लिश मिशनरीनीं आपल्या धर्माचा प्रसार केला, परंतु, तो अत्याचारांनीं नव्हे तर केवळ भूतदया प्रेरीत कार्यांनींच होय. ह्यांत त्यांचा दोष नाहीं, सर्व कांहीं दोष आपलाच आहे. आज ८ कोट लोकानां आपण महारोग्यांसारखें अस्पृश्य म्हणून वागवीत नाहीं काय ? या लोकानीं असा कोणता अन्याय केला होता ? केवळ खालच्या जातींत उत्पन्न झाल्यामुळेंच आपण त्यानां असे वागवतों. यावरून या जातींतल्या पुष्कळशा लोकांनीं ख्रिस्ती मिशनऱ्यांकडे धांव घेतल्यास अन्याय कोणाचा व आश्चर्य कसलें ? आई जेऊं वाढीना, व बाप भीक मागूं देईना, अशी त्याची स्थिति असल्यामुळें त्यांनीं ख्रिस्ती मिशनऱ्यांकडे धाव घेणें साहजिक नाहीं काय ? आज या मिशनरी लोकांनीं जरी थोडा फार धर्मप्रसार केला असला तरी पण भूतदयात्मक कृत्यांनीं आम्हांला ऋणी करून ठेविलें आहे. ठिकठिकाणचीं हास्पिटलें यांची साक्ष देत नाहींत काय ?

* * *

येण केन प्रकारेण हिंदु धर्माला ओहोटी लागलेली आहे. यापुढें हा क्रम असाच चालू दिला तर थोड्याच अवधींत हिंदुधर्म हिंदुस्थानांत राहील किंवा काय अशी काशीस गेल्या सालांत भरलेल्या हिंदु परिषदेच्या स्वागताध्यक्षानां आलेली शंका अयथार्थ नाहीं. म्हणून या कार्यार्थ प्रतिकाराचे प्रयत्न झाले पाहिजेत. आज जगांतल्या सर्व धर्मांना राजकीय पाठबळ आहे, पण राजकीय पाठबळ नसलेला धर्म जर कोणता असेल तर तो हिंदुधर्म हा होय. तेव्हां अशा असहाय स्थितींत आपण जर त्याला पाठबळ दिलें नाहीं तर कोण देणार ? हिंदुबांधवांनो ! आपल्या पूर्वजांनीं धर्मरक्षणाकरितां किती परिश्रम केले हे लक्षांत आणा. हिंदु धर्म अत्यंत थोर व पवित्र आहे. हिंदु तत्वज्ञान सर्व जगांत श्रेष्ठ आहे. हिंदु तत्वज्ञान, जगांतील सर्व तत्व-

Anno 8.° N.-35

Quinta-feira 29 de Novembro de 923

ASSINATURA

Por cada tres rupias

Por cada linha tanga

E EDITOR

gdo Dessay

em-Goa

भारत

BHARAT

वर्ष ८ वें. अंक ३५

गुरुवार ता. २९ नव्हंबर सन १९२३

वर्गणीचे दर.

साली‍ना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.

समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.

गो. पु. हेगडे देसाई.

केपें—गोवा.

"BABISMO"

Babismo e' um neologismo *mestiço* derivado da palavra concanim *baba'* e do sufixo portuguez *ismo*. O vocabulo *baba'* que e' uma especie de tratamento feudal, dedicado aos *batcara's* pelos *mundcares* ou aos *grandaços* pelos *pequeninos*, sinifica, pouco mais ou menos, *senhor meu*, denotando ao mesmo tempo veneraçao dum humilde a quem seja *influente*, por qualquer titulo de...capacidade, adquirido por direito de conquista...

Ora o *babismo* foi e continua sendo inda hoje, o maior flagelo dalguns dos concelhos das Novas Conquistas. Traduzindo a idea do termo *absolutismo* o *babismo* tem ai cavado ruinas de muita gente inocente, crente e tementе, tendo operado, miraculosamente, muitas mudanças nos dominios de propriedades da exclusiva posse dos *pequeninos*.

Basta saber-se que o *baba'* e' considerado, nas referidas regioes como um *senhor que quer, pode e manda*, nao havendo quem lhe contrarie a vontade soberana e omnipotente.

O terror que os encarregados desses *baba's* semeam na gente pequena para a extorquir e aniquilar, e' conhecido como *babismo* que como se viu gosa ja' foros de instituiçao, desprestigiando e suplantando a propria autoridade do Governo.

Um *mundcar* de qualquer *baba'* supoe que este e' quem governa nao so' esta terra de...*Ultramar* mas tambem a que fica para alem. E nesta suposiçao pratica, escudado no *babismo*, mil diabruras, a's barbas das autoridades constituidas que nem sempre se conservam extranhas a's maquinaçoes que o *todo o poderoso baba'* tece para manter o seu prestigio ou seja o BABISMO, quando tenha de co-honestar qualquer abuso do dito seu *mundcar*.

O *Bolshevismo*... nativo que, ha' pouco, se imaginou nesta pecata terra foi uma manifestaçao do mais ferrenho *babismo* que por uma coisa de nada deixou, seriamente, comprometido o Governo, que ja' deve ter avaliado *costas* duns certos sujeitos que o adulam com o seu *salam...tipicamente oriental*, para manter o seu *babismo*.

Ha' muito que o *Bharat* declarou guerra franca ao BABISMO que detesta que odea q... convencer ... falange de ... continuara ... *anti-babi*... assiste ao ... cialmente ... mos.

BABISMO ... os que o p... peitam ! !

ue abomina; e apesar de se de que vai aumentando a seus BABAS adversarios, ele a substentar a campanha ...sta em prol da justiça que ...pequeno, no regime essen... republicano em que vive...

...! Fora com ele, fora com ...rotegem, alimentam e res...

Fora !...

Ecos & Critica

Pela policia.

O *Bharat* ja' manifestou mais duma vez o seu franco rigosijo pelo estabelecimento do destacamento policial nos concélhos de Sanguem e Quepem, tendo ate' profetisado que a policia havia de contribuir nao so' para a boa manutençao dordem publica mas tambem para a boa segurança de propriedade.

Apraz-nos registar, agora, com verdadeiro desvanecimento que, devido a' zelosa actividade, superior inteligencia e sobretudo a' exemplar imparcialidade do brioso comandante do referido destacamento, se vai realisando a nossa profecia, o que representa um titulo muito honroso ao sr. Alferes Vilar, acreditando, tambem, sobremaneira, ao sr. Tenente Coronel Craveiro Lopes que o escolheu para aquele posto.

So' aqui, em Quepem e' que nao temos, ainda, um comandante que se imponha pela sua actividade, porquanto o actual, conquanto seja um sargento honesto inteligente, bom e justiceiro, nao pode todavia arcar, pela sua algum tanto avançada idade, com o multiplo serviço policial, ficando impelido, porisso, a sobrecarregar dele o seu superior de Sanguem e avocar para si auxilio do elemento extranho, o que nao nos agrada pela muita consideraçao que professamos pela policia de Goa.

Aos competentes, pois.

Um julgamento

Devido a' AMABILIDADE do sr. Mariano Rebelo, defensor nato do BABISMO, o nosso director teve de responder, no dia 21 do corrento, a um julgamento de policia correccional, tendo neste acto sido defendido, brilhantemente, pelo sr. dr. João Baptista Gomes, digno e acreditado 1.° substituto do juis de direito desta comarca

O director do BHARAT era acusado de ter cometido transgressao da lei de selos, la' porque na melhor de suas intençoes tivera a audacia de por carta timbrada de sua redacçao, fornecer ao administrador do concelho sr. Mariano Rebelo esclarecimentos baseados na mais absoluta verdade legal e moral sobre o tao falado caso de Canvorem, caso em que essa autoridade, subjugada pelo brilho retorico e influencia opulenta duns BABAS pretendeu espesinhar a olhos vistos a justa causa duns pobres diabos, perseguidos pelo BABISMO.

O sr. Mariano que, conquanto leve palma a todos na sua predilecta SUPOSTA, deixa, todavia muito a desejar na sciencia juridica, entendeu, porem, apreender os referidos esclarecimentos, apreensao esta que deu lugar ao referido julgamento do nosso director que nele saiu absolvido, com grande alegria de seus inumeros amigos que o felicitaram por este novo triunfo ...injustiça e com grande magua do sr. Rebelo, a quem, todavia, o BHARAT perdoa a PICARDIA, pelo simplas motivo de nao alimentar inimisade pessoal por Sua Excia nem por quem quere que seja.

Ao terminar esta local, o BHARAT consigna aqui o seu sincero agradecimento a quantos felicitaram o nosso director pelo bom exito do julgamento, em especial ao sr. dr. Gomes que o defendeu inteligente e desinteressadameate, confirmando, mais uma vez, o seu merito juridico e generosidade de seu coraçao honrado.

Essencialmente catolico

Na sua local deste titulo, a INDIA de Majorda' diz tambem que os hindus odeam os cristaos, sobretudo desde a implantaçao da Republica.

E' falso. O que os hindus fazem na vigencia da Republica que QUASE acabou com a chamada religiao do Estado, e' defenderem-se das arremetidas dos catolicos FERRENHOS e INTOLERANTES que lhes votam um odio infernal. Nada mais.

De resto a confraternisaçao dos hindus e cristaos que em toda a perte se ve, e' um eloquente desmentido a's despropositadas insinuaçoes do semanario catolico de Majorda'.

« Nao faças a outrem, o que nao queres que outros te façam"

Registando...

O BHARAT registou, ha' dias, nas suas colunas, a generosidade do sr. dr. Taumaturgo Pereira que pagou de sua algibeira multa imposta a um transgressor remediado.

Consta-nos, agora, que acto de igual natuteza fora tambem praticado ha' muito, pelo inteligente e benquisto escrivao do juizo de direito desta comarca sr. Babu' *V*. C. Redcar, que esportulou do seu multa devida por uma velha condenada de Velim, o que justifica e confirma mais uma vez o elogio que o BHARAT lhe dedicou, quando se referiu a' posse de seu lugar.

O sr. Redcar nao so' honra, pois, a classe hindu pela alta competencia com que a contento de seus superiores e do publico, exerce as suas funcçoes de escrivao, mas tambem a nobilita pela magnanimidade do seu honrado e afidalgado coraçao.

Bravo, pois !

Pelos correios

Agradou-nos imenso a solicita maneira com que o digno Director dos Correios e Telegrafos pretende castigar irregularidades a que a nossa local desta mesma epigrafe se referiu na ediçao passada.

O *Bharat* nao avança nunca afirmaçoes infundadas nem se procura esquivar a' responsabilidade do que afirma. Louge dele a mania de criar suspeiçoes e amesquinhar quem quere.

Mas aguardemos o desfecho da averiguaçao a que se esta' a proceder e a' qual remetemos e remeteremos nossos esclarecimentos.

"Coisas sabidas"

O BHARAT muito satisfeito anda, com esta poetica obra do conhecido e acreditado homem de letras sr. Roque B. B. de Miranda, nao tendo achado nela nada que exija a sua critica *penada*.

O BHARAT agradrcendo, pois, ao autor a valiosa oferta, na sua livraria a enxerta, para que toda a casa fique de COISAS SABIDAS farta.

Em Sanguem

Segundo nos informam, a fauna do anonimáto de Sanguem tem ja' dias contados, pois se vai conhecendo a sua fonte limpa.

Tambem a garotada vai apanhando PISADELAS, A TORTO E DIREITO.

Em fim, tudo indica que se vai discobrindo a MAROSCA.

Inda bem !

वर्तमानसार

—गेल्या ता. २२।११।२३ गुरुवार रोजीं पणजी येथें श्री महालक्ष्मीच्या देवालयांत–सुटीकंड संस्थेच्या बाल व इतर प्रौढ विद्यार्थ्यांसाठीं "बाल वाचन मंदिर' या नावांची संस्था शिवा फटू पैंआंगले यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झाली. या समारंभास लिसेवस्थ व लिसेवोत्तीर्ण विद्यार्थ्यांची बरीच दाटी झाली असून, शिवाय कृष्णराव केणी, प्रो. बाळकृष्ण सांवईकर व शांताराम सरदेसाई यांच्या सारख्या विद्याप्रिय लोकांचा जमाव बराच असल्यामुळें विशेष शोभा आली होती.

—डिचोलीचे जज्ज दो. ब्रागांस पेरैरा यांची रॅलाकोर्टांत बढती होऊन, त्यांची लोआंद [आफ्रिका] येथें बदली झाली आहे.

—जे. गोमीस द कोस्त यानीं मडगांवच्या ओस्पिसला भेट दिली.

—कवळें येथें येत्या डिसेंबर महिन्याच्या शेवटीं पेडणेचे रावराजे यांच्या अध्यक्षतेखालीं प्रागतिक संघाची प्रथम परिषद भरणार आहे. आतांपर्यंत ५०० मेंबरांनीं येण्याचें कबूल केलें आहे.

—पणजी येथें गेल्या दिवसामागें जो फूटबॉल मॅचचा सामना झाला त्यांत हिंदु खेळाडूंस राजरोस बहिष्कार घातला होता, असें 'मुरलीधर' कळवितात. हा 'वर्णभेदी' प्रकार खरा असल्यास त्याविषयीं वेळींच निषेध प्रगट करणें इष्ट आहे.

—मडगांवांत प्रसिद्ध होणाऱ्या मराठी साप्ताहिकास 'हिंदु' असें नांव देण्यांत येणार आहे; असें कळतें.

—रिवण येथें झालेल्या नकली चोरीचा इतिहास व इतस्ततः समर्थन करणाऱ्या तिच्या त्रिकाल-अज्ञ टीकाकारांस पुराव्यासह उत्तर, 'स्वतंत्र पा ा'च्या रूपानें छापत असल्याचें तेथील सगुण अनंत प्रभू देसाई, हे कळवितात.

—६० टक्के पेन्शनचा कायदा रद्द होत असल्यामुळें अनेकांना आतांपासून कपाळदुखीची व्यथा जडूं पहात आहे. हा कायदा येत्या जानेवारी महिन्यापासून अमलांत येणार आहे.

—महात्मा गांधीनां कैद करूं लावणारे मुंबईचे गव्हर्नर येत्या महिन्याच्या ५ तारखेला निजधामास जाणार असून, नवे गव्हर्नर त्याच महिन्याच्या ता. ८ रोजीं 'उगवणार' आहेत.

—बेळगांवनजीक दुष्काळाचीं चिन्हें दिसत असून, गुरांचा संहार होण्याचा संभव आहे. गोव्यांतील गोमंतकानीं गुरानां आश्रय दिल्यास, त्यानां मोठें पुण्य लाभणार आहे.

आहे! मात्र दुसऱ्या दिशेनें शिक्षण खात्यासारखें 'वहण' चालू राहिल्यास, त्या आशावादीपणाचा पुनर्जन्म व मरण या दोन्हि गोष्टी एकाच घटकेला घडणार आहेत!

एका पाद्रीचे
अकलेचे विचित्र तारे

पाद्रि कांपूस, मि. आंद्राद यांच्या उत्तरादाखल तोडलेल्या आपल्या विचित्र ताऱ्यांच्या लेखांत म्हणतातः–खिस्त तेओलोग [ब्रह्मज्ञानी] होता व तो जुदेवांचीं अप्रामाणिक मतें खोडून काढण्यासाठीं अध्यात्मविषयक वादविवाद करी. खिस्ताच्या मताचा प्रसार करण्यासाठीं त्याच्या शिष्यानींही त्याचेंच अनुकरण केलें. हें त्याचे आपास्तोलांचे (उपदेशकांचे) आक्त, विशेषतः सां. पावल याचीं येपिस्तोलें (पत्रें) जर वाचलीं असतीं, तर कळून आलें असतें. आणि खिस्ती धर्माचें रक्षण करण्यासाठीं त्याचेंच अनुकरण सांतूस [पूज्य] पाद्री व इगर्जेचे आचार्य यांकडून केलें गेलें. तेओलोजीच्या विषयांत धर्मोपदेशक गण तयार करण्यासाठीं इगर्जेनें सदोदीत फार प्रयत्न केले. ज्या कालीं जुलुमाचा अतिशय कहर उडाला, त्या कालांत इतिहासज्ञाच्या चांगल्या परिचयाचे असलेले सान्त सेदिआपोस्तोलिक यांकडून हरघडी प्रतिकार होत असतांही राजनीतिशास्त्रानें (politica) अध्यात्मशास्त्र (teologia) काबिज केलें, आणि म्हणूनच गोमांतकांतील हिंदूंवर जुलूम होऊन, इंक्विजिशनचीं अग्निकुंडें पेटलीं व तेथूनचें ज्या तेओलोजीचा सारांश म्हणजे त्रेंतच्या पवित्र कोंसिलचा प्रसार झाला, त्या सां. तोमाजकडून शिकविल्या गेलेल्या उत्कृष्ठ अध्यात्मशास्त्रास [तेओलोजीस] असंमत असलेल्या उपायांनीं परधर्मांतर (किंवा बाटाबाटी) झालें.

पण १३०० व तितक्याच सालांतील सां. तोमास यांची तेओलोजी, १५०० व तितक्याच सालांतील तिसऱ्या पाप जुलियाची घटना व १६०० व तितक्याच सालांतील कोंसिलयाच्या कोंग्रेग्रासांवचा देक्रेत (बिशप सभामंडळाचा हुकूमनामा) पूज्य मानिला नाहीं, कारण चऱ्यानें किंवा वाईटानें इंदियन लोकांस खिस्तीयन केलें नसतें, तर हिंदुस्थानांत (India) पोर्तुगीज लोकांस आपली सत्ता दृढ करितां आली नसती. व तिजपासून त्यानां अन्य रीतीनें मागेंच पलायन करायास पाहिजे होतें. म्हणून जे उपदेशामृतानें खिस्ती झाले नाहींत, ते जुलूमाच्या (विषारी) उपायानीं बाटविले गेले! [कां! आहेत कीं नाहीं पाद्रि साहेबांच्या अकलेचे तारे हे! आणखी पुढें पहा.]

आतां प्रचारांत दिसाऊ सामर्थ्य ... आस डर ...

वर्तमानपत्रांत सध्या पुष्कळ आणिल्या गेलेल्या ओटीवरील चमक्या न देतां, ज्या कोणास असेल, त्यानें माझ्या खालील प्रश्नांचीं उत्तरें द्यावीं.

१) जर मराठे लोकानां इंग्लिश सत्ता झुगारून देणें साध्य होईल, तर गोव्यांतील आमचे हिंदु (तरी बरें, जेन्तीय किंवा अर्थबोध न झाल्यानें, म्हणण्यांत येणाऱ्या कोकणे या नावानें संबोधिलें नाहीं.) ह्या देशांत, जी धार्मिक बाबतींत इंग्लिश राजसत्ते इतकीच तटस्थ आहे, ती पोर्तुगीज राजसत्ता टिको, म्हणून स्वस्थ रहातील काय [यावर श्री. गोपाळ गुडे यांनीं सणसणीत उत्तर केलें आहे, त्यास उलट जबाब आला नाहीं.]

२ महादेवाच्या, सतीच्या व जत्रेच्या धर्मविधींबद्दल ज्यांचे पूर्वज छळिले गेले, ते आमचे आंद्रादिस व नोरोंज्यस व बहुतेक खिस्ती व स्वतंत्र विचारी, वरील अनुमानिक गोष्ट घडून आल्यास, व जी घडून येण्यास दूर नाहीं, पोर्तुगीज राजसत्तेपेक्षां मराठी राजसत्ता मान्य करितील काय? (कोण हे अप्रासंगिक, स्वाभिमानशुन्य, वेडगळ, वेगडी व अनुकंपनीय विचार! पाद्रि साहेबानां मुळीं स्वतंत्र विचारशक्ति नाहीं, त्यांची ती इनापनीतींतील गाढवाप्रमाणें, दशनवट आहे. स्वत्वाचीही ओळख नाहीं. जरी पोर्तुगीज लोक यानां नेटीव समजतात तरी हे आपणास पोर्तुगालचेच युरोपियन कल्पितात! आश्चर्य नव्हे काय? भ्रमाचा भोंपळा फुटेल तेव्हांच आपण कोण हें समजून ताळ्यावर येतील! तोंपर्यंत हीच स्थिति! व ती घालविण्यास कदाचित् पुनः जेजूखिस्तच प्रत्यक्ष अवतरावा लागेल कीं काय हें समजत नाहीं. स्वत्वाचा विसर पडलेल्या, वाघाचें चामडें अंगावर घेऊन वाघ मानणाऱ्या 'यतो भ्रष्टः स्ततो भ्रष्टः, झालेल्या कुपमंडुकवत् स्थितींत राहिलेल्या खिस्त धर्मांध पाद्रि साहेबानें आपल्या अकलेचे तोडिलेले वरील विचित्र तारे पाहून कोणालही त्यांची कींवच वाटेल. व ही त्याची कींवच येऊन मनांतून नसतांही केवळ पाद्रींच्या व तत्सम अज्ञानग्रस्त खिस्त्याच्या संशय निरसनार्थ सि. पात्रोसिन द आंद्राद याना थोडक्यांत दुसरा आणखी एक लेख (desfazendo equivocos) लिहावा लागला व त्यांत त्यांच्या विचित्र ताऱ्यांचें विकारवशतेचें–कांहींसें छेदन केलें). त्या लेखाचा सारांश असाः–'मला वादविवाद करण्याची हौस आहे, कारण त्या योगें असत्याचा अपलाप होऊन, सत्याचा प्रकाश पडतो' ('वादे वादे जायते तत्वबोधः') पण हा वादविवाद नीट मार्गानें झाला तर ही गोष्ट; न पेक्षा 'वादे वादे जायते वैरवन्हीं' अशांतील गोष्ट व्हावयाची. म्हणून पाद्रिसाहेबांच्या वरील लेखास उत्तर करण्याचें माझ्या मनांतून नव्हतें. तथापि ज्या अर्थी त्यांत कांहीं 'अकलेचे तोडलेले विचित्र तारे' आहेत व जरी त्यांत थोडासा सत्यांश आहेसा दिसला, तरी ते अज्ञानग्रस्त लोकानां भुलविणारे असल्यानें त्यांचें थोडक्यांत छेदन करणें इष्ट वाटलें.

माझा प्रतिपक्षी जरी माझ्या म्हणण्याला विरोध करतो आहे, असें दिसलें, तरी तो 'धर्म म्हणजे परमार्थज्ञान [तेवोलोजी] नव्हे हें कबूल करतो; कारण तोही 'धर्म हा परमार्थ ज्ञानाचा विषय आहे' असें म्हणतो. परंतु स्वतःला इतिहासज्ञ समजून म्हणतो कीं 'तेवोलोजीनें इंकिजिशनचीं अग्निकुंडें' पेटविलीं नाहींत, तर राजनीतिशास्त्रानें तेवोलोजीवर स्वारी करून, इंक्विजिशनचीं अग्निकुंडें पेटविलीं'. सि. आंद्राद, विकारग्रस्त अंधधर्माभिमानी पाद्रि साहेबांस असें सुचवितात कीं, 'त्यानें दो. नोरोंज्य यांचा ग्रंथ वाचून पहावा. म्हणजे वाचनांतीं तो रसभरीत व विद्वत्तापूर्ण आहे, अशी खात्री होईल व तेथें सादर केलेल्या दाखल्यांवरून असें दिसून येईल कीं; गोव्यांतील हिंदूंचा जर कोणी छळ केला असेल, तर तो थियालजीनें राजनीतिशास्त्र (पोलीतिक) काबिज करूनच होय. आणि राजनीतिशास्त्रानें (सरकारनें) या आगळिकीविरुद्ध प्रतिकार करून पुष्कळदां या देवज्ञानाच्या (तेवोलोगाच्या) जुलूमी आवेशाला आळा घालण्याचा प्रयत्न केला!'

लेखाचे शेवटीं ज्या प्रश्नांनीं आमच्या आंद्रादिस व नोरोंज्यस यांवर नेम धरिला आहे, ते पाद्रीसाहेबांचे अप्रासंगिक प्रश्न कोणत्या उद्देशाखातर आले, हें समजत नाहीं मला तर, ते म्हणजे लेखकाची अध्यात्मविषयक शोचनीय स्थिति उघड करितात. कां तर, ते असें दर्शवितात कीं, लेखकाच्या कल्पनेप्रमाणें गोव्यांत जे जुलूम झाले, त्यांस योग्य कारण होतें व ते हिंदुधर्म समूळ नाहींसा होईपर्यंत चालू असल्यास पाहिजे होते. कारण मराठ्यांनीं जर इंग्लिश राजसत्ता झुगारून दिली, तर गोव्यांतील हिंदु लोकही गोव्यांत पोर्तुगीज राजसत्ता टिकूं देणार नाहींत. एकूण शेवटीं शिक्षण व प्रगति यांच्या इतक्या वर्षांनंतरही आम्हीं वरील स्थितींतच आहों काय? (किती सुसंस्कृत व निर्मत्सरयुक्त विषादोद्गार हे!)

'आणि शेवटीं, खिस्त हा ब्रह्मवेत्ता [तेवोलोग] होऊन गेला' हें सदांच खरें काय? जर लेखकानें, आपल्या अध्यात्म ज्ञानाच्या चष्म्या खालून नव्हे, तर शांत चित्तानें येव्हांजेल्यूस वाचले असते, तर त्यास तेथें तेओलोजी आढळली नसती, परंतु एका अतिशय सोप्या भाषेंत एक अतिशय साधा उपदेश आढळला असता! ज्या वादविवादानें जुदेवाचीं अप्रामाणिक मतें खिस्तानें खोडून काढिलीं, ते वादविवादसुद्धां इतके सोपे आहेत कीं, जे सर्व लोकांच्या बुद्धीला सहज आकलन होण्यासारखे आहेत. "माझ्या प्रतिपक्षाला खिस्ताचे खालील शब्द मननार्थ ठेविल्याशिवाय मीं हा लेख संपविणार नाहीं."

"धिःकार असो त्या तुम्हां कायदेपंडितांना! ज्ञानाची किल्ली उपटल्यावर जे इतर तुम्हीं त्यांत शिरले नाहींत व जे कोणी शिरूं पहात होते, त्या-

S. R. Biblioteca Nacional Pangim

no 8 — N. 36

ira 6 de Dezeembro de 923

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

भारत.

BHARAT

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

वर्ष ८ वें. अंक ३६

गुरुवार ता. ६ डिसेंबर सन १९२३

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

CONTROVERSIAS...

A "Modern Review", de Culcutta, no seu numero referente ao mez de Agosto do corrente ano, publicou uma apreciaçao duma nova obra, "A Moral hindu, Um Ensaio Historico e Critico", por John Mckenzie, M. A.

A obra esta' dividida em tres partes A primeira trata da "Moral Antiga" a segunda versa sobre a "Moral das Filosofias e Teologias" e na ultima parte o autor fala dos "Elementos Preponderantes do Pensamento Moral dos Hindus"

No Epilogo da obra o autor estabelece um confronto da "Moral Hindu" com a "Moral Crista".

O ilustre critico da obra, Maheschandra Ghosh, erudito Bengali, que tem consagrado quasi toda a sua vida a estudos filosoficos, refere-se ao autor e ao livro em termos correctissimos e resume nos seguintes termos a sua opiniao sobre o livro:

"E' uma descriçao popular da Moral Hindu. O assunto tem sido habilmente versado e a composiçao da obra e' clara, conquanto superficial. So' a superficie, a pelicula, tem merecido atençao, mantendo se inexploradas as regioes profundas. O autor tem envidado seus esforços para ser justo e imparcial, mas algumas vezes tem sido arrastado pelo seu pendor para o Cristianismo, o que era inevitavel desde que nasceu e cresceu numa Comunidade Crista".

Em seguida diz o critico:

"O livro e' ao mesmo tempo critico e descritivo. No Cap. IV da Parte 3 a. o autor tem procurado mostrar o lado bom do Hinduismo, mas o louvor ressente-se da falta de entusiasmo. Neste Capitulo, ele chega a' conclusao de que o Cristianismo e' a mais elevada forma de religiao. No Epilogo o autor discute o merito comparativo do ideal Hindu e Cristao. A sua critica da moralidade Hindu e' antagonica, mas nao revela animosidade".

E depois de assim sumariar o conteudo da obra, o ilustre critico entra a discutir largamente algumas das proposiçoes do autor, refutando as suas opinioes especialmente no tocante a' suposta inferioridade da Moral Hindu', pondo em confronto algumas das passagens da Biblia com outros dos Upanixads, Bhagwad Guita', etc.

No numero de Setembro da mesma revista, o Rev. C. F. Andrews, europeu e cristao, mas ao mesmo tempo um devotado amigo da India e dos Indios, director do Vishwa Bharati' a ja' celebre Universidade Internacional de Tagore e braço direito do "Poeta laureado da Asia", responde a Maheschandra Ghosh em um artigo subordinado ao titulo "Critica da Biblia", em que afirma que o metodo analitico seguido por este na sua critica e' puramente negativo e pretende dar a interpretaçao que, em sua opiniao, e' a unica verdadeira das passagens da Biblia citadas por Maheschandra Ghosh.

A polemica continua no numero subsequente da "Modern Review" tomando nela parte, alem do Babu Maheschandra, que publica a sua resposta ao Dr. Andrews, mais um ilustre escritor indio Dhivendranath Choudhuri.

Estava o debate neste pe' quando no ultimo numero da citada revista, correspondente no mez de Novembro o Rev. Andrews publica uma carta dando por finda a controversia, carta que, pelos termos em que esta' redigida e pela envergadura moral e intelectual de quem a escreve, merece ser aqui transcrita na sua integra:

"Lamento muito profundamente que, num momento de irritaçao, eu proprio tenha sido a causa de introduzir nas colunas da "Modern Review" a nota de controversia religiosa, que agora, nos meus momentos de lucidez, eu detesto em razao de ser essencialmeate fu'til e esteril, Se, de alguma maneira, em qualquer cousa que escrevi a seu respeito, eu, tiver magoado o sr. M. Ghosh, eu quero aqui testimunhar-lhe o meu pezer e declarar que me retiro da discussao."

Shantiniketan *C. F. Andrews.*

E assim terminou a controversia que, dada a incontestavel erudiçao dos doutos contraditores, podia ter ocupado dezenas de numeros da "Modern Review".

Ate' aqui o simples facto.

Seja-nos, porem, permitido bordar umas ligeiras consideraçoes acerca da controversia a que nos temos referido.

O leitor acabou ja' de ver que o que provocou a discussao foram as afirmaçoes dum livro em que se fazia uma apreciaçao superficial e pouca justa da Moral Hindu.

Como era natural, essas afirmaçoes mereceram reparos por parte de Maheschandra Ghosh, um hindu. Num momento de irreflexao, saiu a' estacada o Rev. C. F. Andrews impugnando a critica do Sr. Ghosh. Mas espirito claro e ponderado no mais levantado sentido do termo, logo que se sentiu em terreno escorregadio, retirou-se prontamente da discussao, manifestando o seu pesar sincero pelo incidente ocorrido.

Tambem a dentro do pais uma controversia religiosa esta' presentemente dividindo as opinioes, controversia que tem muitos pontos de contacto com aquela de que nos temos ocupado. Por sua vez a polemica daqui teve como origem uma apreciaçao justamente encomiastica que um ilustre filho de Goa residente na India Inglesa, professor do "Elphinston Colege", escritor de valor e espirito desempoeirado, fez da obra dum magistrado distintissimo *double'* de eminente cultor de letras.

Essa apreciaçao bastou para que um sacerdote catolico que ja' anteriormente, em varios escritos seus, publicados nos jornais do Paiz, se havia revelado um espirito imbuido de estreito e anacronico sectarismo verberando acres recriminaçoes contra o hinduismo e os hindus.

As acintosas arremetidas do padre-jornalista tiveram como resultado como nao podiam deixar de ter, um momento de reacçao e um hindu da capital deu a' estampa essas folhas soltas denominadas as "Faiscas" que o leitor certamente ja' conhece e em que, num gesto de legitimo desagravo, o seu autor procura repelir os ataques e as afrontas dirigidas contra o hinduismo.

Nada mais justo e natural do que esse belo gesto, com o qual se solidarizou - digamo-lo de passagem, em que pese aos proceres da imprensa goeza que pretendem em vao demonstrar o contrario - toda a classe hindu de Goa.

Nao obstante houve jornais que se dizem porta-vozes da opiniao publica e que acoimaram de *torpes enxovalhos e infames blasfemias e sistematica hostilidade contra os cristaos*, o que nao eram mais do que expressoes de justificada desafronta. Houve mesmo quem trazendo no coraçao a terrivel hidra de odio e sectarismo, atribuisse a's "Faiscas" um fim oculto, procurando, com a sua lingua praguenta, malsinar, envenenar e ridicularizar a sincera e nobre intençao de quem entrou na liga em defesa dum nobre ideal.

Largo flanco ofereciam os escritos do sr. Pe. Campos a' censura dos jornais catolicos da terra. Todos, porem, guardaram o mais condenavel silencio perante as suas protervias. Mas agora que os hindus aparecem em defesa da sua religiao, desvirtuam as suas intençoes, atribuindo-lhes propositos reservados.

Como isto e' triste e desolador!

* * *

Nos tempos modernos e nas nossas sociedades democraticas, o jornalista, pela garantia de imediata publicidade e larga circulaçao das suas ideas, e' um autentico poder, e esta circunstancia faz do jornalismo uma profissao intelectual que acima de tudo deve assentar imediatamente na probidade e dela extrair toda a seiva de energia para viver.

Infelizmente o que aqui se ve, as mais das vezes, e' que o sentido, valor e a elevaçao das ideas que arremessa para a publicidade nem sempre preocupam o jornalista, porquanto destituido do sentimento de sua responsabilidade e procedendo por deliberada malevolencia, ele drena frequentemente a opiniao para um caminho errado, difundindo ideas falsas e sentimentos nem sempre elevados.

Nem doutra forma procedem os jornais que deturpam os factos, apodando de sistematica hostilidade contra os catolicos o que nao e' mais do que uma defesa legitima e imputando propositos ocultos aqueles que obram a' [illegible] luz do dia [illegible] elevada das intençoes.

A esses jornalistas que nao sao mais do que simples "escamoteadores de frases coloridas", uns "enche-colunas pirotecnicos", no pitoresco dizer de Fialho de Almeida, apontamos o nobre e edificante exemplo do Dr. Andrews.

Tanto Maheschandra Ghosh como C. F. Andrews sao dois espiritos que fazem um verdadeiro sacerdocio da sacrossanta missao de escrever, nao se deixando guiar, nos seus escritos, por interesses condenaveis, vaidades estultas e morbidos egoismos. E foi por isso mesmo que o ultimo, quando se compenetrou "num momento de lucidez" de que era justa a critica que o primeiro fizera do livro "Hindu Ethics", nao hesitou um momen-

भारत

गुरुवार कार्तिक व० १३ शी १८४५

प्रागतिक संघाची परिषद.

पोर्तुगीज लोकसत्ताक राज्यपद्धतीची अमदानी या आमच्या प्रांतांत सुरू झाल्या पासून, हिंदु समाजास कोठें आपली मान वर काढण्यास फुरसत सांपडली. पूर्वीची तीं एकमुखी, धर्मवेड्या कथोलिक पाद्रींच्या हुकमतीनें चालणारी, पदोपदीं परधर्मीयांस वेठबिगारी सारखें छळणारी राजसत्ता नामशेष होऊन तिच्या जागीं लोकमतानुवर्ती, धार्मिक बाबतींत तटस्थ, सर्वांस समतेनें वागविणारी, उदार मनाची, लोकसत्ता स्थापन झाल्यावर, कोण सुविचारी मायेचा पूत आपला आळस झाडून जुलमाच्या बंधनानें गारठलेले हातपाय हालविल्यावांचून राहील? पोर्तुगीज लोकांनीं या देशांत आपल्या सत्तेबरोबर ख्रिस्ती धर्म आणल्यानंतर येथील रहिवाशांना धर्माच्या नांवाखालीं जो जुलूम, जी यातायात भोगावी लागली तिची आठवण झाली तर, डोळ्यांत आंसवें आणून तें दुःख हलकें करण्यापलीकडे आमच्या हातून कोणतीच कामगिरी झाली नाहीं, व होणेंहि शक्य नव्हती. परंतु सुदैवानें राज्यपद्धतींतच बदल झाल्यामुळें आतां या बारा तेरा वर्षांत कायदेशीर रीतीनें आमचीं नवीं जुनीं गाऱ्हाणीं सरकारापुढें मांडून, दाद लावून घेण्याची सुसंधी, अनायासें प्राप्त झाली आहे. तिचा योग्य फायदा घेतां यावा, सर्व हिंदूंना एका केंद्रांत राहतां यावें, आपल्या गरजा काय आहेत याचा विचारपूर्वक खल करितां यावा, त्या येथील आणि मध्यवर्ती सरकारांत मांडून भागवितां याव्या आणि एकंदरींत इतर समाजांच्या बरोबरीनें राहून, खांद्यास खांदा लावून आपल्या जन्मदात्या मायभूमीची अंशतः पांग फेडितां यावी यासाठीं आम्हांस एका संघटित संस्थेची आवश्यकता होती ती, आज दोन वर्षेंपर्यंत मधून मधून आपलें अस्तित्व प्रगट करणाऱ्या प्रागतिक संघानें दूर केली आहे.

उपरिनिर्दिष्ट संस्था पोर्तुगीज हिंदुस्थानांतील सुशिक्षित व देशहिताकडे नजर देणाऱ्या गृहस्थांस कांहीं अनोळखी नाहीं. या प्रांतांतून पोर्तुगालच्या पार्लमेंटांत व सेनेट सभेंत, निवडून जाणाऱ्या प्रतिनिधींच्या निवडणुकींत भाग घेतल्यामुळें पोर्तुगालपर्यंत तिची ओळख वाढली आहे. या उभय निवडणुकांत तीस यश मिळालें नाहीं, हें जरी खरें असलें तरी त्या दोनहि प्रसंगीं तिला आपल्यामागें असलेलें लोकमत अजमावितां आलें. सरकारी अधिकारी, सदैव आम्हांस पाण्यांत पाहणारी ख्रिस्ती जनता यांसहि आपल्या डोळ्यांवरील भ्रमाचें पटल दूर सारण्यास व हिंदु म्हणजे रानटी लोक, त्यांना शिस्त नाहीं, त्यांनां राजकारण समजत नाहीं, त्यांच्या हालचाली निर्जीव आहेत, हा आपला आजपर्यंतचा समज चुकीचा-मूर्खपणाचा होता. ही जाणीव होण्यास याच निवडणुकी कारण झाल्या.

त्या नंतरच्या काळांत संघाकडून कांहींच सांगण्यासारखी कामगिरी झाली नाहीं. व बरेच जरा शिथीलता आलेली दिसत होती; ही गोष्ट लपवून ठेवण्यांत अर्थ नाहीं. परंतु आलेली शिथीलता जावून संघ कार्यक्षम होण्यास, सर्व हिंदूंची निदान त्याच्या सभासदांची एक परिषद भरविणें अगत्याचें आहे, असें कार्यकारी मंडळास वाटून, गेल्या मार्च महिन्यांत मडगांव येथें भरलेल्या मंडळाच्या सभेंत परिषद भरविण्याचा व त्या कामीं लागणारे सर्व अधिकार मंडळाचे उपाध्यक्ष डॉ० आत्माराम गोविंद बोरकर यांजकडे सोंपविण्याचा, असे दोन ठराव सर्वानुमतें पास करण्यांत आले व त्याप्रमाणें कार्यास सुरवातहि झाली आहे. बहुतकरून येत्या नाताळाच्या सुटींत कवळें येथें परिषदेचें पहिलें अधिवेशन भरणार आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

अशा रीतीनें कार्यकारी मंडळ व डॉ० बोरकर यांनीं आपली जबाबदारी ओळखून, ती पार पाडण्याच्या कार्यास आरंभ केला असून लवकरच जाहीरपत्रकें, आमंत्रण पत्रिका निघणार आहेत. तेव्हां यापुढें आपल्या वांट्यास येत असलेली जबाबदारी शिरावर घेण्यास म्हणजे आपण संघाचे सभासद नसलों तर सभासद होऊन आपल्या आगमनानें परिषदेची बैठक उत्तम रीतीनें पार पाडण्यास, सर्व हिंदुजनतेनें पुढें सरसावलें पाहिजे. संघ ही संस्था सर्व हिंदूंच्या हिताकरितां निर्माण झाली असल्यावरून ती, सार्वजनिक आहे. तिच्या कार्यास सर्वांनीं हातभार लावला नाहीं तर कार्यकारी मंडळानें आरंभिलेलें हें महत्वाचें कार्य लोकमताचा जोर नसल्यामुळें लंगडें राहून, हिंदुसमाजाच्या जीवावर जीव घेऊन राहिलेली ही अत्यंत उपयुक्त संस्था हतबल व पोरकी होऊन, तिची व पर्यायानें एकंदर हिंदुसमाजाची इभ्रत खालावल्यावांचून राहणार नाहीं.

प्रागतिक संघ ही संस्था, कांहीं व्यक्तींनींच स्थापन केली असली तरी, ती जाहीर रीतीनें, राजधानीच्या शहरांत, कॉंग्रेस प्रोव्हिंसिआलच्या बैठकीस बहुतेक ठिकाणचे लोक जमलेले असतां, स्थापन झाली असल्यावरून तिच्यावर सर्व हिंदूंची मालकी आहे. याची खात्री सध्याच्या स्थितींत असलेल्या तिच्या नियमावलीवरून कोणासहि करून घेतां येईल. संघाच्या स्थापनेस आपण हजर नव्हतों किंवा सभासदांच्या पटांत आपलें नांव नाहीं म्हणून तो आपला होऊं शकत नाहीं, ही शंका जर कोणाच्या अंतःकरणांत वास करीत असेल तर, ती घालविण्यास त्यांनीं या होऊं घातलेल्या व लवकरच भरणाऱ्या परिषदेच्या पहिल्या अधिवेशनास सक्रीय हजर राहणें अगत्याचें आहे. व आम्ही असेंहि सांगूं शकतों कीं, परिषदेंत जमणाऱ्या सर्व सभासदांत संघाबद्दल कधींहि दुमत राहणार नाहीं.

परिषदेस हजर राहून शंकीतानीं संघ सर्वांचा आहे, अशी खात्री करून घेतली म्हणजे संघाचा पाया बळकट आहे त्याहून बळकट बसून त्याला आपल्या शिरावर असलेलीं कामें झेपून धरण्यास क्षिति राहणार नाहीं. व सदोदीत असाच आत्मविश्वास वाढत राहिला तर, आपल्यापुढें असलेलें ध्येय साध्य करण्यास संघास एक तपाचाहि अवकाश लागणार नाहीं.

हिंदु बांधव हो, संसार हा एकप्रकारें संशयखोर आहे. त्याच्या नादीं लागून 'काय होईल काय नाहीं' या निराशावादी तंत्राचा जर न करितां 'यत्नेकृते यदिन सिद्धति कोत्र दोषः!' या वचनावर विश्वास ठेऊन नुकताच रुजलेल्या व लोकमताच्या कुंडींत लहानाचा मोठा होऊन आपल्या फळांपुष्पांनीं समाजाची तहानभूक निवडूं पाहणाऱ्या या संघाच्या रोपट्यास तुम्ही आपला म्हणणार नाहीं काय? तुमच्या आश्रयावरच त्याचें जीवित अवलंबून आहे. त्याला तुमच्या शीतळ छायेंत वाढूं द्या. तुमची पांग फेडण्याची ताकद त्याच्या आंगांत आणण्यास त्याच्या मुळाशीं प्रेमजलाचे सिंचन करून साह्याचें मनमुराद खत द्या. त्याची उपेक्षा करूं नका. त्याची आबाळ झाली तर, तो नेभळा, निर्जीव होऊन जाईल याची कल्पना करा. तुमची अपेक्षा सिद्धीस नेण्यास प्रागतिक संघासारखी एखादी संस्था हवीच होती. तर, तिला दूर लोटून आकाशांतील ताऱ्यांकडे आशापूर्ण दृष्टीनें पाहण्यांत कांहींच साध्य होणार नाहीं, हें लक्ष्यांत आणा. आणि संघाचे सभासद होऊन परिषदेसहि आपल्या बुद्धीचा फायदा द्या. हीच तुम्हांकडे आमची विनंति आहे.

स्फुट विचार

खोड मोडली:--'फाइस्कां'पासून जे अनेक फायदे झाले, त्यांत वेळीं अवेळीं व सकारण अकारण हिंदुधर्माविरुद्ध मिळेल त्यानें तोंडसुख घेण्याची जी कित्येक ख्रिस्ती लोकांत प्रवृत्ति होती, ती समूळ नष्ट होण्याच्या पंथास लागली, हा मुख्य फायदा होय. हा फायदा कांहीं लहान सहान नाहीं. हिंदु लोकांतहि ख्रिस्ती धर्म ओळखण्याचें व त्यावर मनमुराद वादविवाद करण्याचें पाणी मुरत असून, भोळ्याभाबड्या व अज्ञ 'कोंकरां'च्या डोळ्यानां पाणी लावण्याचा 'अव्यापारेषु व्यापार' यापुढें नफादायक होणें शक्य नाहीं, अशी ख्रिस्ती 'गुराख्यां'ची समजूत पटावयास लागली, हा 'फाइस्कां'चा फायदा महत्वाचा नाहीं, असें म्हणणारे लोक केवळ जन्मांध असले पाहिजेत!

प्रागतिक संघः—या संस्थेविषयीं बरी वाईट चर्चा भारतांत अनेकदां झालेली असून, संघ कार्यक्षम व्हावा, त्याच्या हातून अखंड लोकसेवा व्हावी व तो लोकप्रिय व्हावा, इतकाच त्या चर्चेचा हेतु होता, हें वाचकांस कळून चुकलेंच आहे. संघाचें अस्तित्व नावापुरतें नसून, आपल्या पराक्रमानें हिंदुसमाजाचें नांव राजकारणांत अजरामर करण्यासाठीं आहे, याची जाणीव संघचालकांत जीवंत रहावी, असें कोणास वाटणार नाहीं? असो. आजच्या अग्रलेखांत म्हटल्याप्रमाणें, झाल्या गेल्या गोष्टींचा खल न करण्यांत वेळ न दवडतां सर्वांनीं संघाची परिषद यशस्वी होण्यासाठीं तनमनधनानें खटपट करावी, अशी सर्व हिंदुबांधवांस आमहाची विनंति आहे.

वर्तमानसार

—यंदा सांखळी येथें श्रीदत्तजयंतीचा वार्षिक उत्सव तारीख २२ डिसेंबर शनिवार रोजीं साजरा होणार आहे.

—म्हापसें येथें वैश्य समाजाची प्रचंड सभा भरून 'वैश्य भुवन' नावांची शिक्षण संस्था स्थापण्याचा ठराव पास झाला. गोमांतकांतील वैश्य समाजाची दिवसेंदिवस होत असलेली उन्नति पाहून 'भारताला' अंतःकरणपूर्वक समाधान वाटत आहे.

—सांगेवरील 'निनावीं' कंपू उघडकीस येण्याचीं चिन्हें दिसत आहेत.

—या बाजूनें इंफ्लूएंजाची सांथ पुन्हां डोकाऊं लागली आहे.

—मडगावांत प्लेगचे उंदीर अजून पडतच आहेत.

—दमण व दीव या प्रदेशांतील दौरा संपवून गव्हर्नर साहेबांची स्वारी गेल्या ३ तारखेला परत आली.

—आतांपर्यंत ५ 'फाइस्कें' प्रसिद्ध झालीं असून, ख्रिस्ती समाजांत त्यानीं बरीच आग पाखडली आहे.

—वेंगुर्लें येथें 'किरात' नावांचें नवीन साप्ताहिक प्रसिद्ध होत असून, त्यांत गोमांतकस्थ लोकांच्या हिताची कधींमधीं चर्चा होत असते.

—येथील नवीन जज्ज कोर्टांतील कामें झपाझप करीत असल्यानें, लोकांस संतोष होत आहे.

—प्रागतिक संघाच्या परिषदेप्रीत्यर्थ दोन हजार रु. निदान खर्च येईल असा अजमास आहे.

—यंदा महाशेल येथील श्री दुर्गादत्तमंदिरांतील श्रीदत्तजयंत्युत्सवासाठीं बेळगांवहून सुप्रसिद्ध कीर्तनकार व 'राष्ट्रधर्म' मासिकाचे संपादक-दे० ह० भ० प० रा. कृष्ण ऊर्फ अण्णाबुवा अर्जुनवाडकर हे येणार असून, शिवाय ह०भ०प० रामकृष्णबोवा महाभागवत यांचेंहि आगमन होणार आहे. उत्सवाच्या समाप्ति दिवशीं वर्षचालीच्या नित्यक्रमाप्रमाणें ह. भ. प. कामत, वे. शा. सं धूपकर, सौ० सीताबाई गोडबोले वगैरे वक्त्यांचीं व्याख्यानें होऊन उत्सव साजरा होणार आहे, असें तथील व्यवस्थापक कळवितात.

Ano 8 ° N. 37

Quinta-feira 13 de Dezembro de 923

ASSINATURA

Por cada ano tres rupias

ANUNCIOS

linha ainda que repetida uma tanga

Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR

G. P. Hegdo Dessay

Quepem-Goa

भारत.

BHARAT.

वर्ष ८ वें. अंक ३७

गुरुवार ता. १३ डिसेंबर सन १९२३

वर्गणीचे दर.

सालीना ट. ख.. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.

समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.

गो. पु हेगडे देसाई.

केपें—गोवा.

COMENTOS...

Hindus e catolicos

O Hinduismo nunca foi inimigo de religiao alguma : acatou e acata todas com uma magnanimidade sem outra igual na Historia.

Para a sua difusao, o Hinduismo andou sempre afastado da terrivel arma do CRE OU MORRES, arma de que usaram e abusaram AD MAJOREM DEI GLORIAM os ferrenhos e intolerantes sectarios deCristo cuja sacrossanta doutrina enlamearam e a cobriram de vergonha por um fanatismo brutal e satanico.

A INDIA PORTUGESA de Majorda', INESPUGNAVEL BALUARTE do catolicismo DI CA' deve conhecer naturalmente os sanguinolentos episodios da fatidica inquisiçao e mais COISAS E LOISAS da debochada vida fradesca que representam autentico desdoiro e eterna aberraçao do sentimento humano.

O Hinduismo viveu alheio 'a tudo isso e, apesar de perseguido A' OUTRANCE pela cobarde e infame espada do catolicismo intolerante e ferrenho VIVEU BEM, o que denota a sua indomavel resistencia, adquirida, certamente, pela excelencia de seus santos principios.

Esta unica circunstancia seria mais que suficiente para os sectarios de todas as demais religioes deste mundo e de SEU PAI curvarem a cerviz ante a magestade do Hinduismo.

Ou entao a logica e' uma CRIATURA que rendeu a sua alma ao. demo inquisitorial...

Um relatorio

Recebemos e agradecemos um magnifiao exemplar do Relatorio sobre os melhoramentos ag icolas dos campos comunais de Goa, remetido pela Direcçao dos Serviços Agricolas e Florestais deste Estado.

O referido relatorio que e' uma versao em portuguez do trabalho do sr. Rau Bhahadur G. K. Kelkar, tecnico agricola.

O livro contem muita materia util ao nosso agricultor; mas nao sabemos como ele sabera' tirar partido do que ha' de util no mesmo opusculo, visto a maioriados que se dedicam a' agricultura, deixar muito a desejar no conhecimento da lingua em que se acha escrito o relatorio.

O *BHARAT* combateu a acçao AGRICOLA do sr. Kelkar, chegando ate' a afirmar que, na pratica, o ilustre tecnico nao correspondeu a' expectativa geral.

Sem embargo, manifesta, porem, o seu entusiasmo pelo Relatorio, que na verdade, e' uma obra digna de apreço e apropriada para o elemento ilustrado poder dela tirar vantagens de grande valor.

Nativismo interesseiro

Entre nativos, ha' alguns tipos que sao dominados pela ambiçao da conquista de influencia nas regioes oficiais. Sao variados os manejos que tais tipos poe em pratica para se aproximar de qualquer cavalheiro, investido em alguma autoridade importante, sobretudo, quando esse cavalheiro seja europeu.

Hao de promover em sua honra mil festas; hao de dedicar-lhe nos seus jornais mil adjectivos *emocinantes*; hao de impingir-lhe a importancia de suas relaçoes; numa palavra, hao de exercer tais artes que o convençam de que nem uma folha de arvore deste Paiz se move sem a vontade deles...

Salvo raras excepçoes, o bom europeu a' cuja nobre, sincera e liberal raça devemos tanto se nao deixa fascinar por aquelas provas de falsa amizade, traduzida em manifestaçoes festivas de *alto la' com o chapeu.*

Pois, sim, senhores ! Nem o engodo dos mais pitorescos *pic-nics* de Chandranata o atrai para quem os organisa...

E, louvado Deus, nao pega a moda, porque hoje em dia nao ha' entre europeus democraticos e PURO SANGUE ninguem que desconheça o maquiavelico SALAMISMO do nativismo interesseiro...

Jogatina.

Vai desenfreada numa BOTICA de Avedem. As autoridades administrativas nao saberao o que ai vai ?

No's lho denunciamos, pois nao podemos tolerar sem protesto que se jogue a's barbas da regedoria da mesma aldeia.

Quem nao deve...

Quem nao deve, nao teme. O nosso director nada deve ao sr. Mariano Rebelo e portanto nao lhe recea a acintosa e impertinente perseguiçao que o sr. Administrador do Concelho lhe move

Decididamente, o sr. Mariano perdeu a bola e no auge do rancar vingativo que nos vota, nao sabe o que faz ou antes faz o que nao sabe.

Dizemos isto a proposito de mais um processo que, a' queixa *oficiosa* do sr. Rebelo, se acha instaurado contra o nosso director, la' porque este deixou de, no entender do mesmo jurisconsulto...*suposto*, cumprir certas formalidades, como proprietario da Empresa tipografica do *Bharat*.

A seu tempo, tera', porem, o simpatico amigo do *babismo* ocasiao de se arrepender da desastrada vingança com que, obcecado pelo odio injustificado, pretende *manibus pedibusque* molestar-nos...em vao.

Quem cança...

Quem cança, alcança. O sr. Mariano se continuar a *cançar* em exercer vingança contra no's, e' possivel que *alcance*, tarde ou cedo, o seu odiento e satanico fim de nos incomodar a *epiderme pecuniari* .

O que, porem, sua excia. nao ha' de lograr - e disto pode estar certo ja' - e' fazer nos trepidar a caneta. Isso nao.

E' que estamos habituados a sacrificar tudo pela defesa da Verdade e dos interesses do Paiz que estremecemos. Nao nos acusa a consciencia de termos feito uso, em nosso proveito, dalgum produto florestal, pertencente ao Estado, nem de termos maltratado jesuiticamente algum pobre diabo por causa de qualquer bufala vendida, nem tao pouco de termos recebido do Estado vencimentos por um trabalho imperfeito ou nao feito.

Mais ainda. Nunca albergamos no nosso coraçao sentimentos menos honestos, como odio, rancor, vingança etc., contra quem quere.

Quem semea...

Quem semea ventos, tempestades colhe. O sr. Mariano que tem semeado ventos de maldades, para, como infeliz administrador deste concelho, ser util ao *babismo* de seus visinhos e causar desgraça dos adversarios destes, nao ha' de tardar que colha tempestades das pragas dos ofendidos.

Creia, sr. Rebelo que Deus nao dorme e, se porventura, os que o protegem conseguirem, por graça da situaçao, acobertar-lhe as faltas, Ele, todavia, o julgara', como merece.

Pense, pois, no caso de aguieiros de Molcornem, na madeira com que se construem grades de Margao, na brincadeira de mau gosto da bufala vendida e, finalmente, na tendenciosa informaçao prestada ao governo na questao dos Velipos de Canvorem, alheando-a da verdade e do bom senso.

O *Bharat* nao trama na sombra; desconhece o sestro de maquinaçoes jesuiticas; nao acusa nem defende *pro domo sua*; nunca procurou amigar-se do Poder por egoismo nem ataca-lo para alardear serviços patrioticos.

No seu modesto viver, cheio de sacrificios, limita-se ele, sem grandes espalhafatos, a ser util a seus concidadaos, que o julgarao como merece.

Quem boa...

Quem boa cama fizer, nela se deitara'. O sr. Mariano Rebelo se fizer *boa cama*, nela se deitara' com tranquila alma. E' o que *oficiosamente* temos a dizer-lhe, por fim, epilogando estes comentos que o odio, disfarçado no cumprimento da lei, do sr. Administrador nos provocou.

Uma coisa e' saber jogar com mestria a *suposta* e outra coisa e' saber admninistrar um concelho.

Mas, se neste Paiz cada um ocupasse a posiçao que merecesse, nao teriamos a lamentar, certamente, tanto desvairo que vai por ai fora.

J. U. Counto'

Apraz-nos registar que este nosso talentoso correligionario hindu obteve a classificaçao de 20 valores no exame da cadeira de matematica, feito ha' pouco em Lisboa.

Nao nos admirou, mas apenas nos entusiasmou sobremaneira a honrosa classificaçao do sr. Counto", que corroborou' mais uma vez, o conceito que o *BHARAT* formou dele. O sr. Counto honrou, pois, o seu nome e o da classe a que pertence, provando, exuberantemente, que o hindu e', tambem, *gente* e que, posto no *meio*, sabe brilhar pelo seu proprio valor, como qualquer estrela de primeira grandesa.

Que va' fazendo progressos na sua carreira, eis os nossos sinceros votos.

Bravo, sr. Counto' !

De lucto...

Esta' de lucto *pesado* o*Bharat* pelo repentino passamento desta para melhor do seu velho e sexagenario confrade *O Ultramar* de Margao.

O finado que se primava pela sua arte do *salam tipicamente oriental*,

निवडणुकींत प्रागतिक संघानें न पडलेलेंच बरें. कसेंहि असो. निवडणुकींत भाग घेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं. परंतु, तारतम्य ओळखून कोणकोणत्या निवडणुकांत भाग घेणें रास्त आहे हें परिषदेंतच ठरविणें भाग आहे. याशिवाय आर्यवैद्यकावरील बंदी उठवून त्यास प्रोत्साहन देवविणें, विवाह नोंद प्रकरणा संबंधींची रेजिस्त कायद्यांतील कांहीं कलमें बदलविणें, ख्रिस्ती धर्मास व ख्रिस्ती धर्मशिक्षणास होत असलेली सरकारी मदत काढविणें; कायदे कौन्सिलांतील लोकनियुक्त प्रतिनिधींच्या जागांची लोकसंख्येप्रमाणें वांटणी करविणें, इ. विषय कांहीं कमी महत्वाचे नाहींत. त्यांचाहि विचारपूर्वक खल होण्यास परिषदेची जागा योग्य आहे. त्या जागेची योग्यता वाढविण्यास आम्हीं आमच्या आगमनानें व धनबुद्धिबलानें झटलें पाहिजे. आमच्या हातून निर्धारपूर्वक कळकळीचे प्रयत्न झाले व प्रांतिक आणि वरिष्ठ सरकारपर्यंत आमच्या गरजा मांडण्यांत आल्या तर स्वतंत्रता, समता व बंधुता या त्रयीवर उभारलेलें व आपण होऊन जमाखर्चाचे व अंतर्गत कारभाराचे अधिकार आमच्या हातीं देणारें पोर्तुगीज लोकसत्ताक सरकार आम्हांस नाखुष करणार नाहीं अशी आमची मनोदेवता साक्ष देते. मात्र सर्व हिंदूंनीं आपसांतील द्वेषभाव विसरून जाऊन, स्थानिक मतभेद बाजूस ठेवून, परिषदेच्या अधिवेशनास हजर राहावें व संघाला जोमदार बनवावें. एकवेळ संघाचें मंदीर ऐक्याच्या पायावर उभारलें गेलें आणि परस्पर सहानुभूतीच्या तत्वानें आकारण्यांत आलें तर पुढील कार्य नेटानें चालविण्यास सर्व शक्तिमान परमेश्वराचें अधिष्ठानहि त्याच मंदिरांत सांपडल्याशिवाय राहाणार नाहीं.

स्फुट विचार

प्रागतिक संघ:—कवळें येथें होऊं घातलेल्या यासंघाच्या परिषदेपुढें कोणकोणत्या महत्वाच्या विषयांची सांगोपांग चर्चा होणें इष्ट आहे, त्याचें दिग्दर्शन आजच्या अग्रलेखांत झालेंच आहे. त्याशिवाय आणखी कसल्याहि गोष्टींचा विचार होणें कोणालाहि अगत्याचें वाटत असल्यास, त्याला तसें करण्याविषयीं आमची शिफारस आहे. त्याच्या विचारांना भारतांत स्थळ मिळेल, हें अर्थात् सांगण्याची गरज नाहीं. राष्ट्रहिताकडेच दृष्टीकोण वळविणें सांप्रतच्या आणीबाणीच्या प्रसंगी सर्वत्रांचें पवित्र कर्तव्य असल्यानें स्थानिक किंवा इतर कसलेहि मतभेद उकरून काढणें सध्या भयंकर पाप होय. घर सुधरून वेळ मिळाल्यास पाहिजे तसले खेळ खेळण्यास सर्वत्रांस पूर्ण मुभा आहेच.

विचार करा !:—'तरुणांनों, पुढें या' या लेखाकडे आमची तरुण मंडळी आपली सक्रीय नजर वळवील, अशी आशा

तरुणांनो, पुढें या !

आपला समाज आज शेंकडो वर्षें अवनतावस्थेंत आहे; हजारों अनिष्ट चालीरीति आमच्या समाजांत शिरलेल्या असून, त्या दिवसेंदिवस समाजाचें अंग पोखरून टाकीत आहेत; आणि त्यांतलेत्यांत दुर्दैवाची गोष्ट ही कीं, कित्येक व्यसनांचा प्रसार झपाट्यानें होऊं लागलेला आहे. समाजांतील व्यक्तीच्या शीलास व नीतिमत्तेस अशी ओहोटी लागलेली पाहून आपल्या देशासंबंधीं थोडीसी सुधां कळकळ असणाऱ्यास आमची स्थिति पुढें काय होणार याची चिंता वाटल्यास आश्चर्य कोणतें ?

वर्तमान जगाकडे जर आपण नजर फेकूं तर ज्यांची स्थिति गेल्या शतकांतहि अगदींच रानटी होती ते निग्रोलोक सुधां झपाट्यानें पुढें जात आहेत ! पण ज्याची स्थिति प्राचीन काळीं अत्यंत सुधारलेली होती, व जे ज्ञात जगाच्या गुरुस्थानीं विराजमान झालेले होते, ते आम्ही लोक कर्तव्यपराङ्मुख होऊन उलट दिवसेंदिवस अधोगतीच्या खोल खड्यांत जाऊन पडत आहोंत ! हें पाहून कित्येक व्यक्ति समाजाच्या उन्नतीप्रीत्यर्थ आपलें कर्तव्य करीत आहेत; परंतु हें काम रेंगाळत न चालतां जोरानें चाललें पाहिजे. तर आपण या अवनतावस्थेंतून वर येऊं.

समाजाची उन्नति होण्यास व्यक्तीची उन्नति झाली पाहिजे. अनेक व्यक्ति मिळूनच समाज होतो व राष्ट्रांत अनेक समाज अंतर्भूत झालेले असतात. या करतां राष्ट्राची उन्नति होण्यास व्यक्तीची उन्नति झाली पाहिजे. म्हणून व्यक्तीची उन्नति जेणें करून होईल असे प्रयत्न आपण केले पाहिजेत.

कोणाहि व्यक्तीचें शील बिघडण्यास कारणीभूत असणाऱ्या गोष्टींपैकीं मुख्य गोष्ट म्हणजे ती व्यक्ती व्यसनाधीन होणें ही होय. मनुष्य एकदां व्यसनीं झाला म्हणजे तो आपला समाज, देश, धर्म कशाचीहि पर्वा करीत नाहीं ! तो स्वत: अधोगतीला जातोच व आपणा बरोबर आपल्या बांधवानांहि त्याच स्थितीला नेतो. मग राष्ट्राच्या उन्नतीची आशा करणें व्यर्थ आहे. या करतां समाजांतील अशा व्यक्ति कशा सुधारतील याचे मार्ग नियोजित करून त्या प्रमाणें इष्ट त्या सुधारणा घडवून आणण्याच्या प्रयत्नास आपण लागलें पाहिजे.

आपल्या समाजाची आजची स्थिति काय आहे, हें कोणाला सांगितलें पाहिजे असें नाहीं. अमेरिका व युरोप या सारख्या देशांतून ज्या दारूची हकालपट्टी क-

आहे. दारुबाजी व जुवेबाजी, या दोन बाजी प्रकारानीं समाज किती खालावला आहे, याचें नव्यानें वर्णन करण्याचें कारण नाहीं. मदिरेच्या गळ्यावर सुरा ठेवणें व फांसयांना फांशी देणें हीं कामें तरुणानीं असल्यानें भारतसेवकानें त्यांचा धांवा केलेला आहे. त्याला 'पावा' इतकें सांगितल्याशिवाय आमच्यानें राहावत नाहीं.

रण्यांत आली, व येत आहे तिचा प्रसार तर आपल्या समाजांत फारच झपाट्यानें होत आहे. व या. सळीरामी सांप्रदायाचा प्रसार करण्याचें व्रत कित्येक पुढारी म्हणविणाऱ्यानीं धारण केलेलें आहे. व ते लहान थोर, ब्राह्मण ब्राह्मणेतर इत्यादि प्रकारचा भेदभाव न ठेवतां, सर्वांनां या सांप्रदायाची दीक्षा देऊन त्याचा प्रसार करण्यास झटत आहेत. तसेंच हें कार्य पूर्णपणें पार पाडावें किंवा यांतहि सोवळ्या ओंवळ्यांचा प्रश्न सोडविला जावा म्हणून कीं काय कित्येक ब्राह्मणानीं भर रस्त्यावर दारू विकण्याचें वेधडकपणें सुरू केलेलें आहे. ही स्थिति अत्यंत शोचनीय नाहीं काय ? पढना और पढाना हेंच ज्या ब्राह्मणाचें व्रत किंबहुना हें व्रत हजारों वर्षें एकनिष्ठपणानें आचरून ज्या ब्राह्मणानीं आपला देश उच्च पदावर जाण्यास मदत केली, त्याचेच वंशज म्हणविणाऱ्या ब्राह्मणानों, आपल्या पूर्वजांच्या स्वर्गस्थ आत्म्यांना, आपल्या वंशजाचें हें निंद्य आचरण पाहून काय वाटत असेल बरें ! समाज व देश यांच्या कल्याणार्थ ज्यांनीं आपल्या देहाचें समर्पण करून हाडें सुद्धां दिलीं, त्या अत्यंत थोर पूर्वजांच्या वंशजानो, आपणांस ब्राह्मण या नावांची जर कांहीं चाड असेल तर हे प्रकार बंद पाडा! कदाचित् या प्रकारामुळें आपणास थोडा फार फायदा होत असेल किंवा आपला जीवनार्थ कलहाचा प्रश्न थोड्या फार प्रमानें सुटत असेल; परंतु ह्या कृत्यांनीं आपले शेंकडों किंबहुना हजारों बांधव या व्यसनाधीन होऊन आपल्या घरांदाराची राखरांगोळी करींत आहेत. व आपल्या बायका मुलांवर भिक्षांदेही करण्याचा प्रसंग आणीत आहेत. एका व्यक्तीच्या फायद्याकरतां शेंकडों लोकांचें नुकसान करणें चांगलें आहे काय ? विचार करून पहा. तसेंच दारू पिण्याच्या व्यसनाचा प्रसार करणाऱ्या ब्राम्हणांनों, आपणांस परमेश्वरानें जो देह दिला आहे व जें बुद्धिश्रेष्ठत्व दिलें आहे तें गरीब लोकांचा सत्यनाश करण्याकरितां नसून, केवळ त्यांना सहाय करण्याकरतांच आहे. तें सोडून उलट त्यांचा सत्यनाश करणें ईश्वराला अवडण्यासारखें नाहीं. आपल्या या कृत्यानीं आज आपली चंगळ उडत असेल, आजचे आपले दिवस सुखांत जात असतील, किंबहुना आपल्या भोवतीं उदो उदो करणाऱ्याचें मंडळ जमलेलें असेल; परंतु हें लक्षांत ठेवा कीं, 'जसें पेरावें तसें उगवतें' आपणाला या कृत्यांचीं फळें भोगल्याशिवाय या संसारांतून जाण्यास मिळणार नाहीं. करतां "आतां तरी पुढें हाचि उपदेश" स्मरून ताळ्यावर या व या नीच कृत्यांपासून परावृत व्हा. आपल्या या अशा कृत्यांनीं गावांतील शेंकडो कुटुंबें धुळीस मिळालीं आहेत, त्यांच्या पोराबाळांना एक वेळचें जाडें भरडें अन्नहि मिळण्याची पंचाइत झालेली आहे; हजारो रु. उत्पन्न येतो

असलेल्या कित्येक तरुणांना या व्यसनानीं फकफक केल्यामुळें बायका मुलांची खरी स्थिति नंतर डोळ्यांपुढें उभी राहून आज वेड लागलेलें आहे. ही स्थिति पाहून आपलें अंतःकरण कळवळत नाहीं काय ? आपला देश आज हजारों वर्षें अवनतावस्थेंत आहे त्याला पूर्व स्थितीतर पोंहचविण्याकरतांच आपणास या पुण्यभूमींत जन्म देऊन आपली कसोटी पहाण्याचा परमेश्वरानें विचार केला आहे. तें आपलें कर्तव्य सोडून अशा नरकांत निमग्न होऊन रहावें हें चांगलें काय ? मानव देहांत जन्म घेऊन पशूंच्या कृति करणें श्रेयस्कर आहे काय ? मानव जन्म हा महत्वाचा जन्म आहे. ज्या स्थानापासून आपण सुटलों त्या स्थानाला परत जाण्याचें एक मोठें थोरलें जंक्शन म्हणजे मानव् जन्म होय. ह्या जंक्शन वरून मागें न जातां पुढें जावें असाच ईश्वराचा उद्देश आहे. पण आपण मात्र अशा कृत्यांनीं पुढें न जातां अत्यंत मागें जाऊन ईश्वराच्या कोपास मात्र पात्र होऊं.

आपला समाज प्राचीन काळीं फार उच्चस्थानीं होता. हें त्या वेळच्या इकडे आलेल्या प्रवाशानीं लिहून ठेवलेल्या हकिकतीवरून आपणास कळून येतें. इ. स. पूर्वी २९२ व्या वर्षी मेग्कास्थानीस नावांच्या एक ग्रीक राजदूत संम्राट चंद्रगुप्ताच्या दरबारीं आलेला होता. तो म्हणतो:—"या देशांत चोरी पुष्कळ कमी आहे, लोकांत साधेपणा दिसून येतो व त्यामुळें ते सुखानें रहातात. त्यांच्या ठिकाणीं जो साधेपणा व जी सचोटी दिसून येते त्याचें मुख्य कारण म्हणजे त्यांचे कोर्टांत जाणें फारच कमी असतें. हे लोक एकमेकांवर इतका विश्वास ठेवतात कीं, तो पाहून फार आश्चर्य वाटतें. आपलें घरदार व संपत्ति यांच्या रक्षणाकरतां त्यांना कायद्याची गरज लागत नाहीं, ते आपल्या वस्तु कडीकुलपांत ठेवीत नसतांहि त्या चोरीस जात नाहींत. लोकांत सदाचार व सचोटी या गुणाची फार प्रतिष्ठा आहे."

बांधवानों, आपल्या समाजाची एकेकाळीं स्थिति काय होती तें अवलोकन करा. त्या कांळीं कोर्टांत कज्जेभांडत बसणें हें अत्यंत कमी प्रतीचें समजणारे लोक असल्यामुळेंच अलेक्झांडर सारख्या ग्रीक वीराचें बस्तान नीट जमलें नाहीं. ते आपले पूर्वज कोणीकडे व आज देमांदाचें विकत श्राद्ध घेऊन लोकाच्या घरदारावर वरवंटा फिरवून परत मध्यस्थीच्यां रूपानें सभ्यपणानें लोकहिताचा आव घालणारे त्यांचे वंशज कोणीकडे ! ! या बद्दल खरोखर आपणाला लाज वाटली पाहिजे.

आपला समाज पूर्वीच्या उच्चपदावर नेण्याची तजवीज करणें हें आपलें पहिलें कर्तव्य होय. या करतां गोमांतकांतील सर्व तरुणानीं पुढें आलें पाहिजें. आपल्या समाजांत अनीतीचा धिंगाणा घालून सभ्य म्हणून मिरविणारे बरेच लोक आहेत. अशा

Ano 8.° N. 38

Quinta-feira 20 de Dezembro de 923

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
...da que repetida uma tanga
...o uma tanga

DIR...
G. P. Hegu... ssay
Quepem-Goa

भारत

BHARAT

वर्ष ८ वें. अंक ३८

गुरुवार ता. २० डिसेंबर सन १९२३

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु हेगडे देसाई.
केंपे—गोवा.

COMENTOS...

Pontos nos i i ...

A India. Portuguesa, de Majorda' teima em insistir que o movimento religioso dos hindu's, determinado, de resto, por um sacerdote catolico e' uma prova de odio que eles votam a' classe crista, desde certo tempo.

E' descabida a insistente insistencia do colega, portanto e' do dominio pu'blico que os hindu's contam no ilustrado seio de cristaos inumeros e prestigiosos amigos, dedicando lhes uma ternura cordeal e respeito reverente, sentimentos que nem de longe se parecem com o tal odio, tao apregoado.

¿Quereria, por ventura, a *Indiq* que os hindu's ofendidos guardassem de Conrado prudente silencio diante das impertinentes investidas do sr. Pe. Campos.

Mas o *Bharat* nao e' responsavel pela liberal e democratica feiçao que o modernismo assumiu, reduzindo a po', cinzas e nada o colossal edificio da temivel e temida inquisiçao e fazendo em cacos o *vitreo ornamento* da monarquia...indo-lusitana.

Sim; os hindu's nao podem ser acusados da culpa da extincçao de amaldiçoada inquisiçao de fogueiras e de malfadada monarquia de adiantamentos.

Quauto a' sua difiniçao do adverbio *essencialmente*, temos a frisar ao nosso catolico colega de Majorda' que nao resiste ao menor sopro de bom senso a sua sofistica argumentaçao *de diminuir*, porque seja pelo numero seja pela fe' religiosa, este trecho de Malabar nao pode ser considerado *essencialmente catolico*.

Contra factos nao ha' argumentos.

Deixemos, pois, em paz a religiao e de braços dados, tratemos de levantar o nosso pobre Paiz da derrocada financeira em que se esta' atormentando.

Olhe que ha' mais de 7 mezes que os funcionarios publicos estao sem vencimentos, por consequencia famintos, merecendo-lhes, porisso, a nossa atençao!

Pragatica Sanga

A uniao faz força. E precisamente para unir todos os hindu's deste Estado e' que se fundou o *Pragatica Sanga*.

Custe o que custar, ao *Sanga* impende, pois, o sacrossanto dever de conseguir a uniao para, com a força que ela lhe ha' de imprimir, pugnar pelo bem do Paiz, patrioticamente.

No Congresso de Queula' que esta' anunciado para os fins do corrente mez, esperamos que os dirigentes da classe hindu', envidarao os seus milhores esforços por atingir o refer'do ideal que e' o solido alicerce do suntuoso edificio do nosso progresso social, politico e moral.

Grave!

Ha' mais de sete mezes que, como noticiou o nosso presado colega do *Heraldo*, os funcionarios publicos nao recebem seus vencimentos. Nem o Banco Nacional que lhes minorava a sorte com a finesa de adiantamentos esta' disposto a favorece-los com o mesmo *beneficio* por algum tempo.

E', portanto, grave a situaçao economica daqueles que disperdiçaram a sua milhor seiva em prol de serviços publicos, situaçao que nos incomoda sobremaneira por que ela directamente, se relaciona com a fome que e' ma' conselheira...

Dos que nos governam, esperamos uma soluçao pronta e digna do desesperado problema de vencimentos que tao cruciantes tormentos estao causando ao Paiz.

Ao Congresso!

Constou-nos a' ultima hora que as sessoes do Congresso do PRAGATICA SANGA estao designadas para os dias 29, 30, e 31 do corrente.

O dever de todo o hindu que arda em anseo de ver levantado o seu Paiz e' de assistir ao referido Congrsso e de nele tomar parte activa, pondo de parte quaisquer ressentimentos pessoais que, por ventura, nutra pelo SANGA, por mal-entendidos cabidos ou descabidos.

E' que a hora nao e' para tanto, porquanto uma uniao completa dos hindus se impoe para a integridade do seu prestigio politico.

Temos de antepor o patriotismo a's demais questoes doutros *ismos*. A hora e' solene. Tenham todos bem presente isto e acudam pressurosos ao chamamento do Congresso do P. S, em Queula'

Ao Congresso, pois!

Saibam quantos...

O hindu nunca foi inimigo do cristao. O respeito que mutuamente se professam corrobora a nossa asserçao.

E' claro que na palavra *cristao* acima empregada ficam compreendidos todos os membros liberais e tolerantes da classe crista que aos outros que se celebrisaram e se celebrisam pelo fanatismo odiento e inveja diabolica, o hindu votou-lhes e vota uma ma' vontade que, se, hontem, se ocultava nos coraçoes oprimidos pela religiao chamada do Estado, manifesta-se, hoje, francamente sob a forma de *faiscas* dedicadas tao somente ao elemento catolico, ferrenho e intolerante.

¿ Que mal ha' nisso ao liberalismo catolico pelo qual *o* hindu professa sempre uma veneraçao a toda a prova?

Faisca

Comunicam—nos de Paugim que a proxima *FAISCA* so' se publicara' depois da realisaçao do Congresso do PRAGATICA SANGA cujas sessoes estao designadas para os dias 29, 30 e 31 do corrente.

Naturalmente, o sr. Crisnarao G. Kenim deve estar a preparar-se para assistir dignamente ao referido Congresso.

Chamando ao dever

Todo o hindu' que pense na felicidade desta terra tem o indiclinavel dever de cooperar, de todos os modos a seu alcance, o Congresso do *Pragatica Sanga*.

E' mister que se conglobe em volta do estandarte do *Sanga* todo o esforço hindu' para que esta associaçao se imponha a todos, pela sua força patriotica e politica.

Embainhemos, pois, a espada da diversidade de opinioes e metamos hombros a' obra do levantamento do Paiz, animados da melhor boa vontade.

X. R. Nadkarnim

Este nosso conterraueo hindu' concluiu com feliz exito o 2.° ano de direito na Universidade de Lisboa.

O *Bharat* que imenso se rejubila pelos loiros que o sr. Nadkarnim vai colhendo na sua carreira, honrando a classe a que pertence, felicita, cordealmente, o distincto estudante, almejando-lhe um futuro, cheio de felicidades.

Meditemos!

E' inadmissivel ou antes condenavel a rixa intestina, quando se trata de promover o bem patrio.

A Patria e' sagrada; e, quando Ela exige o nosso sacrificio, temos de dispensar-Lho, relegando ao secundario plano a politica de campanario, as rixas de visinhas comadres, o *dize tu direi eu* e as questoes de *lana caprina*.

Anima-nos, porisso, a esperança de que os hindus dedicarao o maximo de seus esforços a' boa realizaçao do C. P. S. associaçao nascida so' para felicitar esta terra.

¿O *P. Sanga* errou algumas vezes? Mas ¿quem nao erra?

Desculpemo-lo, pois, porque o *S. nga*, se por ventura errou, nao foi isto nunca por qualquer positividade.

E' que a todos os seus actos presidiu a mais pura intençao de benificiar a clase e a *Patria*.

Meditemos, portanto, nesta circunstancia de valor e movidos pelo mesmo ideal de trabalhar *pro Patria*, auxiliemos o seu Congresso de Queula'!

Mais um processo

Correu um boato e cujos rumores chegaram ate' no's- de que o sr. Mariano Rebelo pretende levantar mais um processo crime contra o *BHARAT*, por julgar-se ofendido com os sueltos que lhe dedicou para lhe punir o intento malevolo.

Nao nos intimidou o boato pelo simples motivo de termos medido bem o alcance do que pomos no papel em letra redonda.

O processo tem sido uma necessidade *vital* do *BHARAT*. Nao lhe causa portanto, nenhum assombro.

Enquanto forças tiver, sabera' defender se da perseguiçao que lhe for movida, mostrando a quatro ventos, que so' trabaihamos pelo Paiz e para o qual vivemos.

Saiba-o o sr. Administrador do Concelho e quantos procuram a seu modo desanimar-nos com boatos terroristas.

¿ O sr. Rebelo acha que o difamamos?

Pois bem! Saberemos provar o que a seu respeito acabamos de afirmar nas colunas do *BHARAT* que so' nelas insere o que e' a genuina expressao de verdade.

Saiba-o, duma vez para sempre!

Um apelo

O sr. dr. Antonio Joaquim Va's, digno delegado de Saude de Colem e' um medico que tem coraçao generoso e compassivo, o que irrefragavelmente se comprova o seu apelo, publicado em parte a seguir:

प्रागतिक संघाची परिषद

अधिवेशन १ लें.

अध्यक्ष— विस्कोंद द पेडणें

चालू डिसेंबर महिन्याच्या अखेरीस फोंडें महालांतील श्रीसंस्थान कवळें येथें प्रागतिक संघाची पहिली परिषद भरविण्याचें निश्चित झालें असून श्री. रावराजे आत्माराम वासुदेव प्रभू देसाई देशप्रभू [विस्कोंद द पेडणें] यांनीं तिचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें कबूल केलें आहे हें कळविण्यास आम्हांस संतोष वाटतो.

परिषदेच्या नक्की तारखा अजून ठरावयाच्या आहेत व स्वागत कमिटीची रचना होत आहे. ती पुरी झाल्यानंतर आणि एकंदर व्यवस्था ठरल्यानंतर सर्व हिंदु बांधवांना, परिषदेपूर्वी निदान १० दिवस, रीतसर निमंत्रणें रवाना होतीलच.

पण त्यापूर्वी, प्रागतिक संघ व त्याचें कार्य यासंबंधानें विशेष माहिती सर्वांना देणें जरूरीचें वाटल्यानें ती या पत्रकाच्या द्वारें देण्याची परवानगी घेत आहों.

वास्तविक ही माहिती वेळोवेळ देण्यांत आलेलीच आहे. तथापि सर्वांनीं सर्व कांहीं वाचलें असेलच असें मानतां येत नसल्यानें आणखी एकदां खुलासा करणें वावगें होणार नाहीं.

प्रागतिक संघ ही संस्था गेल्या अडीच वर्षांमागें फोंडें येथें भरलेल्या सभेच्या ठरावानुसार स्थापन झाली असून सामान्यतः पोर्तुगीज हिंदुस्थानची व विशेषतः त्यांतील हिंदु समाजाची,सामाजिक, आर्थिक व प्राधान्येंकरून राजकीय उन्नति सनदशीर मार्गांनीं घडवून आणणें हें तिचें ध्येय आहे.

या ध्येयास अनुसरून संस्थेची झालेली उभारणी, तिची ठरविण्यांत आलेली घटना, तींत मागाहून झालेले फेरफार, इ० सर्व कांहीं वृत्तांत मागें सर्वत्र वांटण्यांत आलेल्या संघाच्या छापील पुस्तकांत दिलेलाच आहे.

तथापि वरील फेरफार होऊनही, त्याच पुस्तकांत सांगितल्याप्रमाणें, ही घटना केवळ तात्पुरत्या अमल बजावणीकरितां "स्थूल मानानें"च पसंत करण्यांत आली असून या तात्पुरत्या स्वरूपाला अजून कायमपणा आलेला नाहीं.

हा दोष दूर व्हावा व सर्वसंमत अशा कायम स्वरूपाची घटना तयार व्हावी म्हणून ता० १५–४–९२१ रोजीं मडगांव येथें भरलेल्या सभेंतील ७ व्या ठरावा अन्वयें सर्व लोकांच्या अभिप्रायार्थ ती घटना [वर निर्दिष्ट केलेल्या पुस्तकाच्या रूपानें] छापून वांटण्यांत आली व तींत आणखी फेरबदल सुचविण्याचा अधिकार सभासद होऊं इच्छिणाऱ्या सर्वांस देण्यांत आला.

या योजनेस अनुसरून समाजांतील अनेक बांधवांचे लेखी व तोंडी जे जे अभिप्राय आजवर आले, त्या सर्वांचा विचार करून कायम स्वरूपाची घटना सर्वानुमतें ठरवून संघाला कायमपणा आणणें आणि त्याचबरोबर हिंदुसमाजाचा विशेषें करून राजकीय क्षेत्रांतील कार्यक्रम निश्चित करून तदनुसार कार्याची दिशा आखणें हा प्रस्तुत परिषद भरविण्यांतील मुख्य उद्देश होय.

वास्तविक हा उद्देश यापूर्वीच अमलांत आणावयास पाहिजे होता. पण अनेक अंतर्बाह्य अडचणींमुळें आतांपर्यंत ती गोष्ट शक्य झाली नाहीं. हातीं घेतलेल्या कोणत्याही कार्यांत वेळोवेळ येणाऱ्या अडचणी कार्यकर्त्यांनांच योग्य प्रकारें कळून येतात. इतरांनां त्यांची यथार्थ कल्पना होणें बहुतेक अशक्य असतें.

शिवाय, सर्व समाजबांधवांचे अभिप्राय घेऊन तदनुसार संघाचें कायम स्वरूप विचारपूर्वक निश्चित व्हायाला कांहीं कालवधी जाऊं देणें अपरिहार्यच होतें.

तथापि एवढ्या अवधींत प्रागतिक संघ कांहीं स्वस्थ राहिला असें नाहीं. तात्पुरत्याच संघटनेनुसार, सत्तेनें प्रमुख मानलेल्या राजकीय क्षेत्रांत शक्य तसें काम करून आपलें अस्तित्व त्यानें सर्वांस जाणविलें आहे.

सनदशीर राजकीय चळवळीचा अग्रभाग म्हटला म्हणजे स्थानिक व सार्वत्रिक निवडणुकांत भाग घेणें हा होय. असा भाग घेऊन काम करण्याची संधि संघाला दोनतीनदां आली, व ती त्यानें साधून घेतलीही.

या चळवळींत संघाचें जें धोरण प्रगट झालें, त्याच्या संबंधानें संघावर बरेच आक्षेप आले; पण त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट ही कीं, कार्याच्या दिशेसंबंधानें मतभेद झाला तरी त्याच्या हेतूंचा विपर्यास कोणीही केला नाहीं. अज्ञानाचा आरोप केव्हांही पतकरेल; पण असद्हेतूचा आरोप पतकरण्यासारखा नसतो.

या आक्षेपांपैकीं मुख्य आक्षेप हा कीं, संघ अझून सर्वांचा झालेला नसल्यामुळें सर्व हिंदुसमाजाच्या प्रतिनिधित्वानें कार्य करण्याचा त्यानें घेतलेला अधिकार वस्तुस्थितिदर्शक नव्हे.

असा आक्षेप केव्हांही झालें तरी असावयाचाच; पण अधिकार घेतला असला तरी तो असद्हेतूनें घेतला असें कोणाच्यानेंही म्हणवणार नाहीं.

तथापि हा आक्षेपही पतकरायाला आम्हांकडून मुळींच हरकत नाहीं. मात्र आक्षेपकांनां आमचें असें सांगणें आहे कीं, हिंदुसमाजाचें जें प्रतिनिधित्व संघाला नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे तें स्वतः संघांत प्रविष्ट होऊन व इतरांना प्रविष्ट करून संघाला त्यांनीं मिळवून द्यावें.

या बाबतींत कदाचित् धोरणासंबंधीं मतभेद व्हायला जागा असेल तर त्यावर आमचें असें सांगणें आहे कीं, जें धोरण आम्हीं आखलेलें आहे, तेंही जर बहुमताविरुद्ध असल्यास बदलायला आम्ही अवश्यमेव तयार आहों. मात्र नवीन धोरण ज्यांच्या तंत्रानें ठरेल त्यांनीं त्या धोरणानुसार स्वतः काम करायाला व आम्हांकडून करून घ्यावयाला पुढें यावें.

आणि याच्याही पुढें जाऊन आम्ही असेंही सांगून ठेवतों कीं, संघाची कायमची घटना ज्या अर्थी ठरावयाचीच आहे, त्या अर्थी केवळ आजपर्यंत झालेल्या सभासदांसच नव्हे तर कोणाही हिंदूंना, स्वागत कमिटीचे अगर खुद्द परिषदेचे सभासद या नात्यानें परिषदेंत भाग घेऊं द्यायला आमची मुळींच हरकत नाहीं. एवढेंच नव्हे तर सर्वांनींच तींत भाग घ्यावा अशी आमची मनापासूनची इच्छा आहे. मात्र तसा भाग घेतल्यानंतर सर्वानुमतें अगर बहुमतानें परिषदेंत जें कांहीं ठरेल, तें मान्य करून तदनुसार संघाचे सभासद व्हावयाला त्यांची एव्हांपासून तयारी असली पाहिजे.

एवढा खुलासा झाल्यानंतर मतभेदाला कांहीं जागा राहूं नये असें वाटतें. तशी ती राहणार नाहीं आणि जिच्या अभावीं आमचें पावलो पावलीं नडतें, जिच्या अभावीं आमचें सामाजिक महत्व नष्टप्राय झालें आहे, ती सर्व हिंदूंची संघटित शक्ती परिषदेंतून निर्माण होण्याच्या कामीं सर्वांकडून आम्हांला मदत होईल अशी आम्ही आशा करितों.

नवीन गोवें ता. ६–१२–१९२३

प्रागतिक संघातर्फे
आत्माराम गोविंद बोरकर 'उपाध्यक्ष

*हें पत्रक प्रसिद्ध झाल्यानंतर परिषदेच्या तारखा ठरल्या व स्वागत कमिटीची रचनाहि पुरी झाली, हें निमंत्रण पत्रिकेवरून वाचकांस कळून आलेंच असेल. . सं. भारत

स्फुट विचार

प्रागतिक संघ:—प्रागतिक संघ परिषदेची तयारी जारीनें चालली असून, तिचें प्रथम अधिवेशन थाटानें पार पडेल, असा रंग दिसतो. हरेक कारणानें माजलेल्या देवीचा धुव्वा उडवून, हिंदुसमाजांत ऐक्यसंवर्धन करण्यास प्रागतिक संघाची परिषद कारणीभूत होईल, अशी आमची मनोदेवता आम्हांस साक्ष पटवीत आहे सध्या आम्हांला हरतऱ्हेच्या व भयंकर शत्रूंनीं गराडा दिलेला असून, आपली इभ्रत संरक्षण करण्यासाठीं हिंदुसमाजानें आटोकाट प्रयत्न केले पाहिजेत. या प्रयत्नांची दिशा ठरविण्यास सदरील परिषदेपेक्षां दुसरा एखादा जास्त उपयुक्त मार्ग सांपडेल, अशी आशा करणें निवळ वेडेपणाचें होईल. अर्थात् सर्व देशहितचिंतक हिंदूंनीं परिषदेस हजर राहिलेंच पाहिजे, हें आणखी निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

"धोक्याची सूचना":—'फाइस्कांनी' चळवळ हिंदूंनीं अशीच पुढें चालू ठेविली तर हिंदूंनां खिस्ती वकिलांच्या वकिली सहाय्यास कायमचें मुकावें लागेल, अशी कित्येकांस भीति पडलेली आहे. आमच्यामतें ही भीति निरर्थक आहे; कां कीं सुदैवानें वरील धंदेवाल्यांनीं हिंदूंची वकिली करण्याचें सोडून दिल्यास, एकतर हिंदूनां 'देमांद' सोडून द्यावा लागेल, नाहींतर हिंदू वकिलांना आपलें वकिली सामर्थ्य तरी वाढवावें लागेल. दोन्हीहि गोष्टी हिंदूंच्या हिताच्याच असल्यानें खिस्ती वकिलांनीं हिंदूंची वकिली सोडावी, असीच आमची इच्छा आहे. परंतु अशी परिस्थिति प्राप्त होण्यामारखें हिंदूंचें दैव खास उघडलेलें नाहीं! कित्येकांकडून देण्यांत येत असलेली वकिली सोडण्याची "धोक्याची सूचना" अर्थात् तितका धोका आणण्याच्या लायकीची नाहीं, हें उघड आहे.

वर्तमानसार

—ता. २०-२१-व २२ डिसेंबर रोजीं कुंकळी येथें क्रातिकौशल्य, मृच्छीकटिक व डाव जिंकला हे प्रयोग करण्यांत येतील, असें एक वाचक कळवितात.

—डॉ. लवंदे यानीं काणकोण येथील आपल्या हुद्याचा चार्ज घेतला.

—गेल्याच्या मागील आठवड्यांत लिस्बन शहरांत दंगेधोपे झाल्याची वर्दंता आहे.

—गव्हर्नर साहेबांची स्वारी लवकरच निजधामास जाणार असल्याची वातमी आहे.

—भारतावर आणखी एक नवीन खटला भरण्यांत येणार असल्याची वोलवा आहे.

—येत्या मार्च महिन्यांपासून म्हणजे नवीन वर्षापासून भारत नवीन स्वरूपांत प्रसिद्ध होईल.

—ना. व्यंकटेश सरदेसाई, डॉ. आत्माराम गो. बोरकर, विद्वद्वर्य शांबाराव सरदेसाई, आर्यवैद्य मोरजकर, देशहितचिंतक हिरबा सांवर्डेकर व शिवा फट्ट आंग्ले, प्रो. गजानन सांवर्डेकर व इतर अनेक देशबांधव प्रागतिक परिषदेच्या चळवळीसाठीं ठिकठिकाणीं दौरा करीत आहेत.

जुगारी !

[जुगाऱ्यांचें आयुष्य चित्र]

(लेः—"गडकरी चेला.")

"जुगार म्हटला म्हणजे, त्याच्या जोडीस मद्यपानाचें व्यसन मागोमाग तयार असतें. हिंदुलोकांत मद्यपानाचें व्यसन वाढविण्यास जुगारानें जितकी मदत केली आहे तितकी दुसऱ्या कोणी केली नसेल."

भारत.

हं मला भ्याड म्हणून का! मी पैशाला भीत नाहीं! पैसा म्हणजे काय गोष्ट आहे! अच्छा!- लोकांना मी थोडाच भीक घालीत आहें! तुमचीं तरी मनें कां मोडा? मंडळी; मी तुमच्या आग्रहास्तव एक रुपया लावतों? तोप एक रुपया. वा:! आले पांच रुपये! अच्छा! कुबेर संपत्ति आपल्या घरांत ओढून आणण्याचें "जुगार" हें एक भलें साधन आहे! वा: लाखाची गोष्ट! आले ५० रुपये. तोप! तोप!! अरे अरे सर्व गेले! छे. हें हो काय? मी कुठें वाईट मानून घेतों! जगाचा न्यायच तसा! आले तसे गेले! अं:. काय म्हणतांत? माझा धीर खचला. ही आंगठी १५ रुपये! अरेच्या? तिही गेली! बस. पुरे हा सर्व नाशक भयंकर जुगार!

× * ×

रावसाहेब, हें षष्ठीपूजन आहे! आंगठीचें काय? अहो गेली तशी येईलही! हा आमचा आनंदाचा दिवस! आमच्या आवडीला मुलगा झाला आहे, म्हणून तर ही गंमत! नाहींतर कुणाला पाहिजे जुगार! तुमचें मन अस्वस्थ झालें वाटतें! हरकत नाहीं! ह्या तुमच्या दुखण्यावर मी दिव्य औषधी– स्वर्गीची अमृतवल्ली देतों! गम्या, दे बाबाना भरून. घ्या! विसरलेल्या मनांला हुशारीही येईल! आणि ही तर सठी! अवश्य घ्यावीच. मी तरी कुठें घेत असतों? छे बाबा इतका आग्रह केला तरी कांहीं नाहीं, उलट्या घागरीवर पाणी! तुम्ही वडी मंडळी! यथा राजा तथा प्रजा. गोरे लोकांची ओळख, त्याच्यांतच मानमान्यता मिळण्यासाठीं आपणांला तर ही अवश्य घेतलीच पाहिजे! परवां तर तुम्हांला साकीस्तावांच्या कावराला आमंत्रण आहेना! तिथें काय कराल? अं! आमची मान खालीं घालायाला लावाल तुम्हीं अशानें! अगदींच हिंदु. कसे वळणावर आलां! घ्या ही. गम्या आणखी ओत थोडी दे ती बाटली इकडे! अर्धी खलास झाली! होऊं दे. लावतोंच तोंडाला!

* * *

करा पुन्हां डाव सुरू. अं: काय पर्वा आहे पैशाची! माझं घड्याळ, हा सोन्याचा छेडा. चल लाव! तोप– तोप! गेलं? आणखी काहीं नाहीं माझ्याजवळ! छेडाही गेला! वाव, तुमच्या सटीला आम्हीं मजा केली, आमच्याकडेही तुम्ही अशीच मजा करायाची अं! लक्ष्यांत ठेवा. चढली केला! ए:SSS तळीरामSSS

* * *

मेल्यासारखी ओरड काय करतोस? जिवंत आहे मी. दे तो इकडे कंठा! आज रावसाहेबानीं मला मुद्दाम आमंत्रण केलं आहे! मी नाहीं गेलों, तर ते रागावतील ना! आपल्या घराण्याच्या लौकिकाप्रमाणें चालायला पाहिजे! बघ उद्यां! तुला अशी सोन्यानं मढवून टाकतों कीं यंव! पोरं,–मरूं दे तीं! हरकत नाहीं! तुला काय गाढविलां? पहा उद्यां बोलावतों सोनाराला अंSSचल जाव रड? विहीर पाहिजे तर जवळ आहे. कंठा तर मिळालाच? जातों आतां!

* * *

हं आलों, आमचें लाल औषध तयार आहे ना? छान, छान? बोला ५०० रुपयांचा कंठा कोण घेतो. तुम्हालाच योग्य, आहे हा. काय म्हणतां २०० रुपये किंमत याची. अहो मी खोटें कशाला बोलूं? ५०० रुपयांचा कंठा आहे. अरेच्या त्यांनी तर डाव सुरू केला. बरं द्या २०० रुपये. काय? तुमच्या जवळ १५० रुपये आहेत. ज्यास्ती नाहींत? आणखी ५० रुपये पाहिजेत. पहा बोवा. ओ: इकडे दुसरा डाव सुरू झाला द्या लवकर इकडे १५० रुपये ...... तूद तोप. गेले, डाव हरला. अरे, अरे, अरे,. देवा, अरे, थोडी दारू लाव आणखी- एकच तळीराम. दे आणखी एकच प्याला. तूद प्रेम जुगार? तळीराम?

* * *

मी तुमचे पैसे उद्यांला बाकी ठेवीत नाहीं. उद्यां तुम्ही आपला चुकता हिशोब करून घेऊन चला. तोंड वांकडें करूं नका. ही कांही नित्यासारखी थाप नाहीं. तुम्ही या, आपली रकम मोजून न्या. याहो खचीत. काय म्हणतोस दुकानदार आला. बाळ रडू, बाबा घरीं नाहींत म्हणून सांग. चल घर त्यानां थोपवून दारांत, नाहींतर आंत येतील शंखध्वनी करून. कोण देतो यांना पैसे. रड लेका असाच. मी तुझ्या बारशास जेवलों आहें. हे आलेच आतां. आतां पळून जावें मागील दारांतून? घर म्हणावे आतां त्याला.

× + +

हा आणखी गाढव आज कुठें होता! सकाळीं कुणाचें तोंड पाहिलें कोण जाणें. राम राम कसें काय? ठीक. काय म्हणतां मलाच शोधायाला आलांत. तुमचा तो दागिना कुणी मागून घेतला आहे. काय? आत्तांच पाहिजे. उद्यां पाठवून देईन, अगदीं तुमच्या गळ्याची शपथ. तरी आत्तांच पाहिजे? नाहीं देत. चल जा. मी विकून खाल्ला, काय म्हणणें आहे तुमचें? खुशाल जा चावडीवर. माझ्या हातांत जमल्यावर देईन. रडणार कीं काय? जा तुझ्यानें होईल तें कर? कसा जातोय पहां शेवलत.

+ + +

डाव अंगावर आला हरकत नाहीं! मी खरा जुगारी आहें! अंत्रूज महालांतला प्रसिद्ध खेळगडी पेगूं, ह्याना मी चेला आहें! काय लागून गेली आहे तुमची! राहतें घर तोप! गेलं हरकत नाहीं.! पाल्या, तोप, वगैरे सर्व भाडीं घरदार सकट तूद तोप! गेलं, जाऊं दे! तळिराम दे ती बाटली इकडे!

+ × +

तुम्हीं आमचे नातेवाईक! माझ्या मामीचे पुतणे! अगदीं सख्खे! मी आलों होतों एका कामाला! उद्यां जाणार जत्रेला! तिथें आमची बडी बडी सोयरी मंडळी येणार! तेव्हां म्हटलं आपणच कां, उघडे जा? आंगठी जरा पाहिजे होती! खचीत परवां येईन! आपले मजवर फार उपकार झाले! मर लेका. दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये!

× × ×

मी ना, जातों झाडदोळला! जत्रा आहे मोठी! बरं यंदा तिथें जुगाराची वगैरे फार चंगळ उडेल नाहीं? तो देवळा लगतचा गुत्ता आहे तर! बरं जा तुम्ही! बोलतां बोलतां पोंचलोंच! ए: रंभाजी! मी कमचा शेट! आहे आपला! बरं तसं म्हण! काय म्हणतां? आपल्याला ही आंगठी मानवली? तुला आवडली भाग्य उघडलं आमचं! घे ही तुला! हें पहा अशानें मला राग येतो! आंगठीचं काय? मला उद्यां करून घेतां येईल! छे: बुवा, तुला उगाच संकोच वाटतो! मीच घालतों तुझ्या बोटाला! हें पहा तुझा दिल-खूष असला, म्हणजे मग आमचें त्यांत समाधान!

* * *

सर्व कांहीं गेलें! कफल्लक झालों! कुछ फिकीर नाहीं! उठूं आपण. ए: रंभा दार उघड! नाहीं उघडत! दे माझी आंगठी! धिःकार असो मला! तुम्ही रांडा अशाच असायच्या! जिथं पैसा, तिथं तुमचं प्रेम, आणि सर्व कांहीं! जावें कुठें! द्यावी झुकांडी इकडे!

+ * +

तुम्हांला काय करायचें माझ्या जाण्याशीं! फारच फाजील तुम्ही! मी गेलों होतों मू मू मू मू मसणांत!

Ano 8 ° N. 39

Quinta-fe[illegible] [illegible]ezembro de 923

[illegible]URA
P. [illegible]res rupias
[illegible]IOS
Por cada li[illegible] e repetida uma tanga
N[illegible] o uma tanga

[illegible]E EDITOR
- G. [illegible]ido Dessay
Quepem-Goa

भारत.

BHARAT

वर्ष ८ वें. अंक ३९
गुरुवार ता. २७ डिसेंबर सन १९२३

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केंपे—गोवा.

Ingenuidades . . .

No artigo "Controversias" publicado no *Bharat* de 6 de Dezembro, o seu ilustre autor, que modestamente se oculta atras da letra *V.*, indica ao padre Campos e Cia. o leal caminho seguido por dr. Andrews numa controversia religiosa que teve lugar nas colunas da "Modern Review" entre aquele eminente professor e M. Ghosh.

O V. que pelos modos parece um ingenuo, esquece-se, porem, que Goa nao e' patria de Tagore nem o padre Campos o rev. director do *Vishwa Bharati.*

Nao sao as pole'micas religiosas que preocupam as cabeças pensantes de alem—fronteira. Sao questoes doutra ordem que fazem giro na imprensa e sao doutro estofo os homens que as versam.

Para Bsptista, por exemplo, e' indiferente que os irmaos Alis sejam maometanos e hindu's Pandit Neharu' e Dass. Comungam o mesmo ideal tem a mesma fe' nos destinos do seu paiz; e tanto basta para que esteja de perfeita harmonia esse mosaico de algumas religioes.

Pore'm, *nesta terra de S. Francisco, essencialmente catolica, onde o livre pensamento nao medra,* o fanatismo dum padre nao tolera outra religiao que nao seja a que pregou o filho de Maria! Fossem outros tempos o padre Campos, se nao chamasse os fieis a' matança, ao menos conquistaria o lugar de Pedro, o Eremita, pregando uma nova cruzada contra os hindu's e a sua religiao.

Um ja' ganhou esporas de oiro com a sua campanha contra o livre pensamento, e nao tardara' quem ofereça a esse novo cirineu ... uma *cabeça de burro* para dele se nao dizer *prius dementat.*

Nao notou o V. como cerraram as fileiras para, por paus e por pedras provar que e' a *unica verdadeira?*

"E' milagre tornar-se o mundo (todo) cristao; e como milagres so' Deus os faz, existe o Deus do Cristianismo." Depois de tanto jogo malabarico e tanta acrobatica silogistica, a conclusao a que chegaram e' esta, deduzida da existencia do Cristianismo, como se igual nao pudesse tirar do Brahamanismo, Budismo ou Mahometanismo cuja existencia tambem nao ha ninguem que possa por em duvida.

Diz-se que o goez "nao cre sem ver e o hindu, olhando tudo atraves da luz da razao e procurando uma crença raciocinada na religiao desparata, indo crer nos deuses da sua imaginaçao porque nao chega a conhecer o verdadeiro."

Esquecem, porem, os catolicos *di ca'* que os seus avoengos foram goeses e hindus tambem.

Teriam eles abraçado o catolicismo *porque viram?* Nao consta que a segunda pessoa se tivesse separado mais da Trindade, depois que morreu uma vez na cruz, apesar de a propria religiao chamada *revelada* demandar a sua presença com mais insistencia do que *quando se fez homem para a corrigir e remir a culpa original de* que nao poude esquivar-se, sendo alias um ser absolutamente perfeito. A propria lenda de Ourique—alias reduzida a's suas justas proporçoes pelo grande historiador portugues—nao lhes pode valer nos apuros, em razao do espaço e tempo que medeiam entre esta e o facto de conversao dos goeses sob o regime do terror que seguiu a' conquista.

"Te-lo-iam feito por *disparate?* Que o digam os que agora, sendo goeses *nao veem e c eem.*

Querem que a gente va' aprender a vida de Jesus so' nos livros da grei que pelos modos parece passou a declaraçao de *aos costumes disse nada!*

Explorador russo, Renan? Alto la' que sao inimigos da igreja, conquanto pensadores profundos e sabios de renome.

Cristo que *conheceu todas as fraquezas humanas* nao previu com certeza a fraqueza a que podia conduzir o sectarismo dos seus adoradores. Porque, se tal soubesse diria: "bemaventurados os fana'ticos"...assim como disse "bem aventurados os pobres do espirito etc.

Fique pois sabendo o "V." que nao ha de ser o exemplo da nobre atitude do Rev. Andrews que demovera' quem decididamente porfia ... em puxar a sardinha para sua brasa.

Para Andrews e' futil e esteril a questao em que se descute a superioridade desta ou daquela moral religiosa. Espirito culto e desempoeirado do sectarismo acanhado, A n d r e w s compreende o verdadeiro sinificado do "ama o pro'ximo" e, alem disso, sabe que "quem tem telhado de vidro nao atira pedras ao do visinho". Foi por isso que escreveu aquela carta que bem traduz "nao faças a outrem o que nao queres que te façam a ti".

Mas se o *V.* espera da parte dos que "provocaram a controversia a dentro do pais" procedimento analo'go eu lhe digo: moita! O que pode esperar, sem receio de errar, e' mais um arrazoado talvez sobre a origem ... de Jesus e o qualificativo de "joven turco", aposto a' letra com que figurou o artigo.

Ora, um inge'nuo.

V. Senior

Ecos & Critica

Dr. Antonio de Noronha

O "Bharat" manifestou, mais duma vez, a sua sincera opiniao sobre este formoso talento de primeira grandeza que fulgura no ceu literario e juridico do Paiz, honrando-o sobremaneira.

E devido a' sua superior inteligencia e poderosas faculdades de trabalho que Sua Ex.cia chegou a alcançar o honroso cargo que ocupa na magistratura.

E' o primeiro indio que pela sua inconcussa probidade e imaculada nobresa de caracter enobrece as elevadas funcçoes de Presidente da Relaçao de Nova-Goa. Tem, porisso, incontestavel direito a' homenagem que o Paiz ha' dias lhe rendeu, homenagem com a qual o "Bharat" se associa, fazendo votos pelas crescentes prosperidades de quem levantou bem alto o nome da India, tanto aqui como em Portugal.

O nosso julgamento

No dia 24 do corrente realisou-se no tribunal desta comarca o julgamanto do "Bharat," arrastado ao banco dos reus por causa do seu artigo "Inexplicavel," ja' conhecido dos nossos leitores.

Presidiu a' audiencia o integro Juiz sr. dr. A. A. de Brito e Nascimento, sendo a acusaçao representada pelo ilustre Delegado sr. dr. Vasco Camelier. O defensor do re'u era o distincto causidico sr. dr. Lourenço Caitano Monteiro, ornamento do foro indiano.

Cumpridas as formalidades de estilo, deu-se começo ao julgamento com o interrogatorio do re'u que limitou-se a dizer que nao teve nenhum intuito de ofender quem quere com as consideraçoes que bordou no artigo incriminado.

Terminado o interrogatorio, foram inquiridas duas testimunhas de acusaçao, as quais depuzeram sobre a publicaçao e circulaçao do "Bharat" e da sua ediçao que contem o artigo incriminado.

Depois do que o sr. dr. Juiz deu palavra ao digno Agente do M. P., visto o patrono da defesa ter-se renunciado ao inquerito de suas testimunhas.

No seu brilhante discurso acusatorio, o sr. dr. Delegado analisou, largamente, o artigo incriminado, começando por afirmar que nao era ele hostil a' imprensa colonial cuja esfera de acçao, disse, deve, antes de mais e principalmente, circunscrever-se a' ventilaçao de diversos problemas administrativos por forma a que o governo possa orientar bem a sua acçao. Prosseguindo, acentuou que o artigo incriminado encerrava conceitos ofensivos da honra e dignidade da magistratura colonial, sobretudo, desprimorosos ao seu ex-colega da comarca de Salcete. O sr. dr. Delegado deteve-se mais na analise das palavras do artigo incriminado ARMADILHA E FARRAPOS DA LEI DE IMRPENSA, usando de argumentos tendentes a' corraboraçao da materia acusada e concluiu a acusaçao, pedindo condenaçao do re'u,

Apraz-nos registar nesta altura e com verdadeiro desvanecimento que a acusaçao foi dirigida com uma seriedade e correcçao exemplares que muito honram o sr. dr. Camelier.

Foi, em seguida, dada palavra ao sr. advogado de defesa, sr. dr. Lourenço Caitano Monteiro.

E' escusado dizer que o discurso proferido pelo notavel procurador da defesa esteve, sob todos os pontos de vista, a' altura de seus creditos e de justa fama que, sem favor, disfruta no nosso meio, de ser primeiro orador forense.

Defendendo o nosso director, o sr. dr. Monteiro principiou por afirmar que nao podia manter-se a acusaçao que, frisou, nao so' era vaga por nao terem sido especificadas por ela as palavras ofensivas do artigo incriminado mas tambem porque tinha deixado de no decurso do processo, observar-se a formalidade indispensavel de tomar ao arguido a declaraçao sobre se ele teve ou nao intuito de, com o artigo incriminado, ofender alguem. Continuando, bordou varias consideraçoes sobre a materia da acusaçao, demonstrando como esta nao podia sustentar-se e como nao eram ofensivas a ninguem as palavras ARMADILHA E FARRAPOS DA LEI DE IMPRENSA, tendo sido

विचार लहरी

लहर–पांचवी.

कवि सम्राट रवींद्रनाथ टागोर, आपल्या आवरण या निबंधांत म्हणतात:- “आमचा असा समज झालेला आहे कीं, सभ्य समाजामध्यें कपड्यालत्त्यांची व बूट स्टाकिंगची अत्यंत आवश्यकता असल्यावरूनच, त्याची सृष्टि बनलेली आहे. परंतु ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, या कृत्रिम उपकरणांना आपले स्वामी बनवून, स्वतःला संकुचित करून घेणें चांगलें नाहीं. या अव्यापारेषु व्यापारानें केव्हांच फायदा होणार नाहीं. कारण, भारत वर्षाचें हवामान इतकें उत्तम आहे कीं, या उपकरणांच्या आधीन होऊन राहाण्याची जरूरी नाहीं. पूर्वीही आपण त्यांचे दास नव्हतों. कामाच्या वेळींच त्यांचा उपयोग करून इतर वेळीं त्यांना विश्रांति देत होतों. आम्हांला पूर्णपणें माहिती होती कीं, कपडेलत्ते ह्या नैमित्तिक वस्तु आहेत. याशिवाय त्यांत विशेष महत्व नाहीं. जरूरीच्या वेळीं च शीतोष्णापासून रक्षण करण्यापुरतेंच त्या वस्तूंचें आमच्यावर स्वामित्व होतें. यामुळेंच आमचें आंग उघडें ठेवण्यांत आम्ही लाज मानीत नव्हतों व दुसऱ्याचें उघडें पाहूनही लज्जित होत नव्हतों.”

\+ + +

“मनुष्याच्या पायाचे तळवे ईश्वरानें असे बनविलेले आहेत कीं, पृथ्वीवर उभे राहून चालण्याची व्यवस्था यासारखी दुसरी होणेंच शक्य नाहीं. परंतु ज्या वेळीं आपण पायतणासारख्या कृत्रिम उपकरणांनीं पायांची पूजा करूं लागलों, त्या दिवसांपासून पायांचें जें मुख्य कार्य तें मातीमोल झालें. ज्या गरजेकरितां ते बनविण्यांत आले, तिचा लोकांना विसर पडत चालला. आजपर्यंत पाय आमच्या देहाचा भार सांभाळीत असत; परंतु आतां पायांचा भार आह्मांला सांभाळणें भाग आहे. कारण, जर आम्ही अनवाणी चालूं लागलों, तर ते आमचे सहाय्यक न होतां उलट त्रासाचे साधन होऊन बसतात, व जरासें पाणी वगैरे लागल्यास थंडी होण्याचें भय असतें, म्हणून बूट स्टाकिंग यांनीं त्यांची पूजा करणें भाग आहे.”

× × ×

“प्राचीन काळाकडे जर नजर फेकूं तर आपणास असें दिसून येईल कीं, कपड्यांना एकाद्या आंधळ्याच्या मुठीप्रमाणें घट्ट धरून ठेवण्याची गरज आमच्या या गरम देशामध्यें नव्हती. एक तर आपण कपड्यांचा उपयोग अगदींच थोडा करीत होतों. लहानपणापासून आमचीं मुलें कपड्या–लत्त्याशिवाय नग्न शरिरानेंच या नग्न जगाचा संयोग संकोच न धरतां करीत असत. परंतु आज आपण इंग्रजांचें अनुकरण केल्यापासून मुलांना सुद्धां पाहून लज्जित होण्याचें आरंभिलेलें आहे. विलायतेस जाऊन आलेल्यांचीच ही स्थिति आहे असें नाहीं तर इकडे शहरांत राहाणाऱ्यांची सुद्धां तीच गत आहे.

* * *

डॉ. रवींद्रनाथ म्हणतात तें खरें आहे. मनुष्य प्राणी हा अनुकरणप्रिय असल्याकारणानें आपल्याहून जे श्रेष्ठ आहेत त्यांचें अनुकरण कनिष्ठांकडून होत असतें. यांत शंका नाहीं. परंतु कोणत्याहि गोष्टीचें अनुकरण करतांना त्याबद्दल पूर्ण विचार केल्यावरच तें केलें पाहिजे. नाहींतर नाकापेक्षां मोतीं जड होण्याचा फार संभव असतो.

* * *

हिंदुस्थानची स्वतंत्रता जाऊन त्यावर परकी यांचा अमल सुरू झाला; अर्थातच आपल्या लोकांना कनिष्ठत्व प्राप्त झालें. मोंगल लोकांचें इकडेच स्थायिकत्व झाल्यामुळें, त्यांना हिंदुस्थान हा स्वदेश वाटूं लागला. शिवाय हिंदुस्थान त्यावेळीं आजच्या इतका परतंत्र नसल्यामुळें म्हणा अगर आमच्या संस्कृतीचें तेज त्यांच्यावर पडल्यामुळें म्हणा, आम्हींच त्यांचें अनुकरण केलें असें नाहीं, तर त्यांनींही आमच्या पुष्कळशा चालीचें अनुकरण केलें आहे. हिंदूंचीं पागोटीं, भाषा, वंदनाचे प्रकार हे मुसलमानांनीं घेतले, व आम्हीही त्यांच्या कांहीं चालीचें अनुकरण केलें. असा हा अदला बदलीचा प्रकार चालू होता.

× × ×

त्यानंतर त्यांची सत्ता नष्ट होऊन पाश्चात्य युग सुरू झालें त्यावेळची आमची स्थिति अत्यंत अवनत असल्यानें पाश्चात्य संस्कृतीच्या उजेडानें आमचे डोळे अगदीं दिपून गेले. व त्यांचें आपण सरास अनुकरण करूं लागलों. परंतु कांहीं काळानंतर विचारी लोकांच्या मनांत [डोक्यांत] पुन्हां उजेड पडून आपलीहि संस्कृति बरीच उच्च असून तिचें जर आपण पुनरुज्जीवन केलें नाहीं तर ती नामशेष होईल, व आपली दिशाभूल होऊन, आपण भलतीकडेच जाऊं. असें यांना वाटूं लागलें महात्मा गांधी हे याबद्दल प्रमुख होत.

* * *

पाश्चात्यांच्या आंगीं शेंकडों गुण अनुकरण करण्यासारखे आहेत. किंबहुना त्यांचें अनुकरण केल्यावांचून या भौतिक युगांत आमचा तरणोपाय नाहीं. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, ज्या गोष्टीचें अनुकरण केल्यापासून, आमच्या राष्ट्राचा अगर समाजाचा फायदा होईल ती सोडून आम्ही भलतीकडेच वाहात आहोंत. ज्या कांहीं गोष्टीचें विनाकारण अनुकरण करण्याचें आज आपण आरंभिलें आहे, त्यांपैकीं मुख्य गोष्ट म्हटली म्हणजे पोशाखाची बाब ही होय.

× × ×

आपल्यांतील सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांकडून यांचें अनुकरण होऊं लागल्यामुळें बहुजन समाजही त्याच मार्गानें जात आहे. पुष्कळ सभ्य लोकांची सभ्यत्वाबद्दल अशी भावना झाली आहे कीं, आपण अप् टुडेट असलों तरच सभ्य असें ओळखलों जाऊं. ह्या सभ्यपणाच्या खालीं असभ्यतेचीं कितीही कृत्यें केलीं तरी हरकत नाहीं. तसेंच आपण आज जे पारतंत्र्यांत आहोंत, त्यापासून मुक्त होण्याला म्हणजे स्वतंत्रता मिळविण्याला पोशाखाच्या बाबतींत अनुकरण करणें हें एक साधन आहे. आपल्या राजकर्त्यांसारखें पोशाखांत अप् टुडेट झाल्याशिवाय त्यांची बरोबरी आपण करूं शकणार नाहीं.”

\+ + +

ही विचारसरणी खरी आहे काय? पोशाखाच्या बाबतींत अप् टुडेट झाल्याशिवाय आम्हांला स्वतंत्र होण्यास अडचण येऊन स्वतंत्र होतां येणार नाहीं काय? पाश्चात्य लोकांनीं जे आज मोठमोठे शोध भौतिकशास्त्रांत लाविले आहेत, तसे शोध आपल्याला अप्टुडेट झाल्याशिवाय लावितां येणार नाहींत काय? विचार केल्याअंतीं हीं सर्व विधानें खोटीं आहेत असें दिसतें.

* * *

स्वतंत्रतेचा पोशाखाशीं कांहींच संबंध नाहीं. हिंदुस्थान आज जरी परतंत्र असला तरी एकेकाळीं स्वतंत्र होता–उच्च पदावर होता. जगाला ज्ञान देण्याच्या योग्यतेचा होता; हें काम त्यानें—आपल्या परमपूज्य भारतवर्षानें—हजारों वर्षें केलेलें आहे. त्यावेळीं आपला पोशाख कसा होता तें पाहूं.

* * *

हिंदुस्थानचा भरभराटीचा काळ म्हणजे महाभारताचा काळ होय. या काळीं पोशाखाची तऱ्हा काय होती तें आपण पाहूं: उ अ.१५३–२ मध्यें याचें वर्णन खालील श्लोकांत आहे “उष्णीषाणि नियच्छन पुण्डरीक नाभः करैः। अंतरीयोत्तरीयाणि भूषणारिच सर्वरी॥” यावरून त्याकाळीं दोनच वस्त्रांचा उपयोग करीत असत असें दिसतें. एक वस्त्र नेसावयाचें व दुसरें पांघरावयाचें असे. नेसावयाच्या वस्त्राला अंतरीय व पांघरावयाच्या वस्त्राला उत्तरीय असें म्हणत. याशिवाय डोक्याला पागोटें घालीत त्याला उष्णीष असें म्हणत– सर्व साधारण जनतेचा सुद्धां हाच पोशाख होता. मात्र श्रीमंतांचीं धोतरें उंची व बारीक सुताचीं असत व गरीबांचीं जाडी भरडीं असत, हाच फरक होता. उत्तरीय वस्त्रानें अंग नेहमीं झांकलेलेंच असे असें नाहीं तर नेहमींच्या व्यवहाराला अडचण भासूं नये, म्हणून विद्यार्थ्यांकरितां असा नियम होता कीं उजवा हात उत्तरीय वस्त्राबाहेर काढून त्या वस्त्राला डाव्या खांद्यावर गांठ द्यावी. शिवलेले कपडे त्याकाळीं होते किंवा नाहीं याबद्दल मतभेद आहे. परंतु नसावे हेंच मत खरें दिसतें. शिवण्याची कला ग्रीकांच्या स्वारीमुळें प्राप्त झाली असावी हेंच मत खरें दिसते.

\+ × ×

त्यानंत इ.स६०० च्या सुमारास ह्यूएनत्संग हिंदुस्थानांत आला होता. तो आपल्या प्रवासवर्णनामध्यें लिहितो कीं, या लोकांचे आंतले अगर बाहेरचे असे कोणतेच कपडे शिवून तयार केलेले नसतात. त्यांच्या कपड्यांचा रंग पांढरा असून दुसऱ्या रंगीत कपड्यांची यांना आवड नाहीं. पुरुष कमरेभोंवतीं एक लांब वस्त्र गुंडाळतात. तसेंच दुसरें काखेपर्यंत घेऊन उजवा खांदा उघडा ठेवितात. ते डोक्यावर फुलांच्या माळा गुंडाळून गळ्यांत हार घालतात. ह्या वर्णनाची सत्यता पाहावयाची असल्यास बाणभट्ट यानें केलेल्या हर्ष राजाच्या वर्णनाशीं ताडून पाहावें. हर्षराजा दिग्विजयास निघाला त्यावेळचें त्याचें वर्णन करतांना बाणभट्ट लिहितो:– त्यानें बाहेर निघतेवेळीं राजहंस छापाचीं दोन सारखीं वस्त्रें परिधान केलीं होतीं, व चक्रवर्तित्वाची खूण म्हणून चंद्रकोरे सारखी पांढऱ्या फुलांची माळ मस्तकावर बांधलेली होती.

\+ + +

यावरून ज्या काळीं आम्हीं स्वतंत्र होतों इतकेंच नव्हे तर जगापेक्षां अत्यंत पुढें होतों; त्या काळचा आपला पोशाख किती साधा होता हें दिसून येईलच. अजूनही कित्येक ठिकाणी–विशेषतः खेडेगांवांतील जुन्या मंडळींत ही चाल प्रचलीत आहे. परंतु त्या चालीचा मात्र आपण आज उपहास करीत आहों.

* × *

आजची परिस्थिति निराळी आहे ही गोष्ट खोटी नाहीं. मागील काळापेक्षां आज जगाशीं आपला संबंध जास्त निगडित झालेला आहे. त्याशिवाय पाश्चात्यांचें हरेक बाबतींत आपल्यवर स्वामित्व असल्यामुळें त्यांच्या कांहीं गोष्टीचें अनुकरण होणारच. परंतु त्या अनुकरणानें आपलें नुकसान होतां कामा नये. अप्टुडेटची फ्याशन उचलल्यामुळें आमच्या साध्या राहाणीला फांटा मिळणाचा संभव आहे. त्याशिवाय ती बाब अत्यंत खर्चाची असून, आपणांस एकूणएक बाबतींत परावलंबनांत पाडणारी आहे. त्यांना ती साध्य असेल; कारण, पाश्चात्यांची संस्कृति निराळी आहे. शिवाय ज्या वस्तु त्यांच्या वापरण्यांत येतात, त्या त्यांच्याच देशांतील असल्यामुळें, त्यांकरितां खर्च होणारा पैसा त्यांच्याच देशांत राहातो. एकंदरींत त्यांपासून त्यांना नुकसान नाहीं.

राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनेंही आपल्याला पोशाखाकडे पाहिलें पाहिजे. आज आपल्या गोमांतकांतील हिंदुसमाज नुकताच पुढें सरत आहे. अशा वेळीं कांहीं

Ano 8° N. 40

ta-feira 3 de Janeiro de 1924

S. R. Biblioteca Nacional Panjim

. ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ८ वें. अंक ४०

गुरुवार ता. ३ जानेवारी सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केंपें—गोवा.

Gloria aos "Vencidos"

A sessão de 27 de Dezembro de 1923 do Conselho Legislativo deste Estado marca, incontestavelmente, uma pagina gloriosa nos anais politicos desta terra. Foi aquele um certamen, uma luta larga e vigorosa entre o Poder e a Verdade.

Apresar das democracias, apesar das ideas humanitarias que a tricolor desfraldou para o mundo, quando a Revolução Francêsa fechou o periodo longo e doloroso da Idade Média que foi, verdadeiramente, uma Idade de ignominia, apesar de tudo e muito mais, o Poder dos fortes ainda triunfou no mundo e há-de continuar a triunfar, enquanto a Revolução no vocabulário das Constituições nao fôr *pari passu* acompanhado de uma revolução, sublime revolução—a revolução nas consciencias, os povos, sobretudo, as fracas, muitas vezes, muitissimas vezes mesmo, em momentos dificeis, em transes criticos terão como consolação suprema de gritar diante dos conflitos em que a força do Direito suplantar o direito da Força esse grito sublime:

Gloria aos "Vencidos"

Gloria aos "Vencidos" que na sessão de 27 de Dezembro na sua retirada gloriosa salvaram a dignidade do Pais. Gloria aos "Vencidos" que na sessão de 27 de Dezembro ao deixar triunfantes a sala do Conselho mostraram que acima de todas as conveniencias e interesses, colocavam o bem estar do Pais.

Gloria aos "Vencidos" que na sessão de 27 na sua derrota que os exaltou para sempre prestigiaram o eleitorado que os levara para aquela sala, mostrando-se verdadeiros patronos liais e desassombrados, da sua causa que é a Causa do Pais.

O que foi esta sessão?

Não comportam as paginas deste jornal o descreve-la.

—प्रो॰ कृष्ण दत्ताराम बोरकर हे एक मराठी मासिक प्रसिद्ध करणार असून, प्रो॰ लिंगपाळ हे त्याचे सहाय्यक–संपादक होणार आहेत.

Ano 8.º N. 43

Quinta-feira 24 de Janeiro de 1924

ASSINATURA
Por ano tres rupias

ANUNCIOS
Por cada linha que repetida uma tanga
Avulso uma tanga

PROPRIETARIO E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत

BHARAT

वर्ष ८ वें. अंक ४३

गुरुवार ता. २४ जानेवारी सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक-व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें–गोवा.

COMENTOS...

Sem fundo ..

Em sinal de profundo descontentamento, criado pela desmedida elevação de pautas, o *Bharat* apresenta-se hoje, sem o seu artigo de fundo, quebrando, desta sorte, por momentos, uma exigencia da respeitavel praxe deste redondo mundo jornalistico que sempre se esfalpa em fazer ...fundos

Nesta hora de excessos tributarios, anima-nos a esperança de que ninguem nos querera' mal, la' porque *pautamos* a nossa acção para a presente edição sem o artigo de fundo, sabido que ate' o proprio erario se encontra sem fundo.

Fundos? Nem e' bom falar nisso que roça por qualquer assunto imundo!

Ingratos!

Outro adjectivo nao merecem os jornalistas que se revoltam contra o aumento de taxas aduaneiras.

Nao veem, por ventura, que as novas pautas livraram de direitos as maquinas tipograficas, caracteres e ornatos de imprensa, reduzindo a simplicidade originaria o papel inferior de jornais?

Esta', pois, satisfeito, em grande parte, o egoismo dos "especuladores" da opiniao publica. E apesar disto, nao sabemos porque as novas pautas lhes fazem mau cabelo!

Mau! Tudo se pode desculpar menos a ingratidao.

Façam, pois, "brutos", um "salam tipicamente oriental" aos srs. das pautas, a começar pelo valentao que traz fechados nos punhos os destinos desta rica terra de arroz e caril.

Patriotismo? Ora bolas!

Duvidas...

Pelos modos, parece que a capacidade do contribuinte da India Portuguesa nao esta' exausta, como por ai se diz; pois se o estivesse, ninguem pagaria os excessos tributarios que sao satisfeitos sem "bufos" ate'.

A chiadeira ensurdecedora com que atroam os ares oficiais nao passam de gestos estudados dum come diante consumado.

Esta', por conseguinte, bem feito o aumento pautal como bem posto o "mandarim" – desculpem-nos a "chinesice" – em cuja reinação se fez o mesmo aumento.

Nao haja duvidas...que sim.

Riquesa .

Existem ainda por este paiz de "Parashuram" cavalheiros sinceros que acreditam na riquesa que encerram as nossas terras das Novas Conquistas, la' das bandas de Calem, Colem "et cetera," cobertas da exuberante vegetação e oferecendo a' vista do entusiasta espectador um pitoresco panorama—va' o estilo poetico.

Tais cavalheiros sinceros, porem ignoram, pelo que parece, o engraçado conto da Concessao Magnier e outros "pontos" fracos que fazem "problematica" a exploração daquelas terras, a qual exploração esta' provado que pertence ao dominio das "mil e uma noites arabicas"

Escursionistas

Tivemos o prazer de ver na cassabe' os escursionistas da 7.a classe do Liceu Central de Nova Goa e os quais imprimiram por algumas horas animação a este concelho com a sua alegria franca e jovial.

Alguns dos escursionistas visitaram a oficina onde se imprime e se compoe o "Bharat".

O "Bharat", amigo nato dos estudantes, rejubilou-se imenso com a visita dos simpaticos escursionistas.

A chicana ...

Ha' dias uma chicana, habilmente urdida, privou uns pobres diabos do fruto do seu sangue. A mesma chicana traiu a policia, enganou o bom senso e ludibriou a boa fe' de quem confiava cegamente na Republica e nos seus agentes policiais.

Tarde ou cedo, soara' a hora de justiça e os verdugos dhoje terao, entao, de verter lagrimas de arrependimento, acusados mais pela sua consciencia do que pelo "veridicfum" dos tribunais constituidos.

E' que a providencia existe, por "maiores" que sejam os argumentos que oponham para a negar!

Tenham paciencia!

Pois bem!

Nem sempre a ilimitada confiança pode ser considerada como segura garantia de que nao havera' ludibrio. Pois num caso em que se depositou inteira confiança nas autoridades policiais, uns pobres interessados foram roubados traiçoeiramente por quem pensa trazer no papo o governo cujas botas lamacentas lambe, prostrado num "Salam tipicamente oriental."

Esta' bem. Deus nao dorme e os que semearam desolação nos esfarrapados Velipo, nao tardara' que se vejam a braços com o aguilhao de remorsos de que ninguem se pode alhear, ainda mesmo que esse ninguem corte, por ora, com sorriso protector do Poder que adora.

Um fenomeno!

Nao temos muita idade nem temos percorrido muita cidade; mas durante a nossa existencia, relativamente acanhada, a Providencia houve por bem proporcionar-nos ocasioes suficientes para podermos conhecer pessoas e coisas nos seus diversos aspectos...politicos.

Mas franquesa, franquesinha, nunca nos assaltou a desgraça de assistirmos a um *salamismo* tao *brutal* como o que esta' a rodear, actualmente, o palacio do Idalcao—*salamismo* de que nem um cao e' capaz apesar de sua reconhecida *brutalidade*.

A que sera' devido tal fenomeno singular?

Valentia mal empregada

No dia 11 do corrente, pelas 17 horas, o secretario do *Uttramar* esteve, em berrata estrepitosa, a' porta da redacção do *Diario da Noite*, a intimar a sair para a rua o nosso colega sr. Luis de Menezes, que foi ao seu encontro ate' ai.

Positivamente pede mu'sica a scena desse representante do *Ultramar*. E' ele um latagao, fisicamente reforçado enquanto que o sr. Menezes e' meudo e duma estatura muito fraca, conquanto o aço da sua pena, a's vezes seja forte.

A valentia do sr. R. Bruto da Costa, teria sido melhor empregada quando do caso Areosa em vez de ele se dirigir entao — com outros modos — aos srs. capitao Eça e Jose' Correia da Gama, que, felizmente, e' dos vivos e pode contar os feitos de s. exa., como narrava, na ocasiao, em Margao, o sr. Armando A'lvares.

A supradita valentia, ainda ha pouco, teve ensejo para, pelo menos doutra forma, perfeitamente correcta, querer explicações duma frase por demais contundente do sr. director de Fazendo sr. Plinio Tinoco.

Semelhantes proezas podem, um dia, epilogar mal. Quem nao tem musculos de carregador, pode, uma vez, suprir a falta dos mesmos com alguma coisa certeira — a coragem de se desagravar ou defender pelo meio que estiver ao seu alcance. E se a muitos desagrada a visao do mal que por ventura suceda ao seu agressor e por isso se retraem, momentos pode haver em que cedam a pressao de brios mal orientados, liquidando a questao com uma imprudencia.

(D'*A Terra*)

D. Quichote no sec. xx?!...

Escrevem-nos:-

Com grande espanto lemos na edição do nosso intemerato colega *Diario da Noite* que o sr. Roberto Bruto da Costa "chama'ra o director desta folha para a rua..." Para que seria? E' a pergunta que nos ocorre formular. Nao lhe disse, com certeza o sr. Costa.

Dizem-nos, igualmente, que o advogado, conselheiro, Presidente da Associação Comercial, representante das forças vivas do Paiz e da firma Rodrigues Alvares Ltda. etc, etc, etc. ululava com seus bofes do *Bretere de Sahib, de salam tipicamente orientais* e da *Hidra do Nativismo*, increpava a sair para a rua *todos* os redactores do *Diario*, todos os tipografos, impressores!!!

Nao haja duvida que e' um D. Quixote no sec. xx. a esgrimir contra os *caixotins das tipografias* de todos os jornais que primem pela verdade e digam-na sem rebuços nem ambages. Nao haja duvida que e' a "segunda incarnação" do D. Quixote de La Mancha que apo's um lauto bodo a' custa alheia, a' custa dos pobres, ter fartado a rotundidade macia da pança governamental, quando o pais estrebucha e o Ze' ja' nao pode pagar mais,—impa-se em ser o genuino tutor da Causa Publica!!

Sempre fomos adversarios estrenuos do direito da Força. O Murro, a Bofetada e o Cacete e' bom para os Brutos .... de ... tal *Tia* de Camelolandia! Se o sr. Robreito da Costa achou que o sr. Luiz de Menezes trapaceava, mentia, tinha ele os tribunais e mais ainda, o seu *Ultramar* onde podia desmascarar o seu adversario, embora com a sua logica de funil! Nao o sr. Roberto que quando do Governo Freitas Ribeiro, fora chamado a Pangim, porque se "ENCASTELAVAM NUVENS NO HORISONTE POLITICO DA NOSSA TERRA", como se fora um PA'RA RAIOS POLITICO, o sr. Roberto que, quando da agressao a' um jornalista clamava em altos brados contra as prepotencias e mandos preguntando se "isto e' terra civilizada ou coio dos bandoleiros," e' ele hoje

'बालोन्नति-समाज'

• पेडणें–गोवा

(आमच्या खास बातमीदाराकडून)

बालोन्नति समाजाची प्रतिवार्षिक हेमंत व्याख्यानमाला यंदाच्या वर्षी ता ५–१–२४ रोजीं सुरु झाली. प्रतिवर्षी ही व्याख्यानमाला नाताळच्या सणांत होत असे; परंतु या वर्षी गोमांतकांतील बहुतेक सुशिक्षित हिंदु समाज त्याचवेळ 'प्रागतिक' संघ व हिंदु मंडळ' यांच्या परिषदा ज्या कवळें व पणजी येथें भरल्या होत्या, त्या ठिकाणीं गुंतल्यामुळें मालेच्या तारखा जानेवारीच्या ५ तारखेपर्यंत लांबवाव्या लागल्या. मालेसाठीं रेरारलीसावांच्या समोर भगवतीच्या देवळाच्या मागच्या बाजूस भव्य मंडप उभारलेला होता व पताकादिकानीं तो उत्तम रीतीनें शृंगारलेला होता. मालेविषयीं लोकांच्या मनांत बराच उत्साह व आदरभाव वसत होता. हें बरवर पहाणाऱ्याच्याही मनांत आल्यावांचून रहात नव्हतें. संध्याकाळीं ब्याख्यानासही रोज बराच श्रोतृसमाज जमत असे.

मालेचें प्रथम पुष्प श्री.जनार्दन कामत [पारोडें]यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. सुभाव रामकृष्ण सामत यांजकडून "आमच्या सार्वजनिक चळवळी" या विषयावर गुंफण्यांत आलें. सर्व सार्वजनिक चळवळींचें अंतीम साध्य एकंदर मानवजातीमध्यें प्रेमाचा व बंधु भावाचा प्रार्दुभाव हें असून त्याची अधिष्ठात्र देवता प्रत्यक्ष परमेश्वर आहे, हें व्याख्यात्यानीं सप्रमाण सिद्ध केलें. विश्वबंधुत्वाच्या विस्तृत वर्तुलावरून, नंतर आपलें दृष्टीक्षेत्र थोडेंसें आकुंचित करून हिंदुस्थानांतील सार्वजनिक चळवळींच्या उत्क्रांतीचें त्यांनी थोडक्यांत दिग्दर्शन केलें व शेवटीं गोमांतकांतील चळवळींचा पूर्वेतिहास सांगून त्यांचा उगम थेट कुर्मोदादीच्या काळापर्यंत नेऊन भिडविला व येथील प्रचलित सार्वजनिक चळवळींचें समालोचन करून आपलें सुश्राव्य व्याख्यान आटोपलें. श्री. सामंत यांची विचारशैली, विषय प्रतिपादनाची त्यांची हातोटी, त्यांचें उत्तम वक्तृत्व यांचा अनुभव प्रथमतः याच वर्षी पेडणेंयांतील लोकांस मिळाल्यामुळें मालेस यावर्षी एक प्रकारचें अपूर्वत्व मिळालें यांत शंका नाहीं.

मालेचें दुसरें पुष्प ना. व्यंकटेश सू. सरदेसाई यांच्या अध्यक्षतेखालीं प्रो.बाळकृष्ण सांवर्डेकर यांजकडून "नवीन कायिद्यांदीतील प्राथमिक शिक्षण" याविषयावर गोंवण्यांत आले. प्राथमिक शिक्षणाचा व्याप, त्याची दिशा प्राथमिक शिक्षणाची पद्धत या मध्यें फेरफार होणें फार अगत्याचें आहे, हें व्याख्यात्यांनी निरनिराळे आंकडे देऊन सप्रमाण सिद्ध करून दिलें. त्याचप्रमाणें आमच्या प्राथमिक शिक्षण क्रमांत आमची मातृभाषा जी मराठी हीचा समावेश नसल्यामुळें किती तंटे होतात व ते दूर करण्याला आपल्याला काय केलें पाहिजे या विषयीं बरीच चर्चा त्या दिवशीं झाल्यामुळें त्या दिवसाच्या कार्यक्रमास बराच रंग आलेला होता

तिसरें पुष्प नियोजित वक्ते प्रो. अ. र. काळे यांच्या अभावीं श्री. जनार्दन कामत यांजकडून श्री. शिवा फटु पै आंग्ले यांच्या अध्यक्षतेखालीं "धंदे शिक्षणाची आवश्यकता" या विषयावर गुंफण्यांत आलें. जगतांमध्यें जो भयंकर जीवनार्थ कलह व स्पर्धा माजून राहिलेली आहे त्यांत आपलें योग्य तें स्थान पटकावण्यास धंदेशिक्षण किती आवश्यक आहे हें समजून गोमांतकांत अनेक धंदे उत्तम रीतीनें चालविण्यासारखे आहेत; मात्र आधुनिक पद्धतीवर ते उभारण्यास आपणास शिक्षण पाहिजे व तें संपादन करण्यांकरितां प्रतिवर्षी कांहीं तरूण परदेशीं धंदेशिक्षणाकरितां पाठविणें जरुर आहे असें व्याख्यात्यानीं सांगितलें.

मालेचें चवथें पुष्प प्रागतिक 'संघ' याविषयावर श्री. शांबाराव सरदेसाइ, यांजकडून श्री.डॅा. आत्माराम बोरकर यांचे अध्यक्षतेखालीं गोंवण्यात आलें. प्रागतिक संघाचे उद्देश, त्याचें कार्य, प्रागतिक संघाचे अंतिम साध्य याविषयींचे विचार व प्रागतिक संघाविरूद्ध जे आक्षेप आहेत त्यांस समर्पक उत्तर श्री. शांबाराव व डॅा. बोरकर यांच्या सारख्याच्या अधिकारी मुखांतून ऐकण्यास मिळाल्यामुळें प्रागतिक संघाविषयीं आपलें स्वतःचे स्वतंत्र मत बनविण्यास या व्याख्यानाचा बराच उपयोग होईल असें दिसतें.

मालेचें पांचवें पुष्प श्री. यशवंत राव सरदेसाई यांचे अध्यक्षतेखालीं श्री. गणेश शि. सामंत यांजकडून "अथिगष्ट्रेन वर्धताम्" या विषयावर गुंफण्यांत आलें. राष्ट्राकरितां व्यक्ति कीं व्यक्तीकरितां राष्ट्र याचा ऊहापोह करून राष्ट्राच्या अभ्युदयाकरितां व्यक्तींनीं थोडीशी झीज सोसणें किती जरूर आहे हें व्याख्यात्यानीं सांगितलें व त्यांगाशिवाय प्राप्ति नाहीं. त्याग व ग्रहण या क्रिया जगतामध्यें एकसमयावच्छेदें करून अव्याहतपणें कशा चालल्या आहेत हें त्यांनीं अनेक उदाहरणें देऊन सिद्ध केलें.

मालेचें शेवटचें पुष्प श्री. डॅा शिनारी यानीं दो. शि. ब. राव यांचे अध्यक्षतेखालीं ,O Futuro da Mocidade indu या विषयावर पोर्तुगीज भाषेंत गोंविलें. एक तास पर्यंत अत्यन्त जोरदार व अस्खलित भाषेंत विवेचन करून आपल्या तरुणाची, शारीरिक' मानसिक बौद्धिक व नैतिक उन्नति घडून येणें किती आवश्यक आहे हें त्यांनीं सांगितलें.

शेवटीं श्री. रामचंद्र सो. कामत यांनीं समयोचित शब्दांत मालेचा समारोप केला. मालेच्या आक्षेपकांस उत्तर देतांना त्यानी सांगितलें कीं, आमच्या गोमांतकांमध्यें जी नवीन राष्ट्रीय जागृति, आमच्या तरुणाच्या मनांत जें एक नवीन चैतन्य, नवीन विचारांचा ओघ सांप्रत निर्माण झालेला आहे त्याला या आक्षेपकांकडून अडविण्याचा, त्याला बांध घालून थोपविण्याचा कितीही प्रयत्न झाला तरी तो ओघ ते सर्व बांध फोडून आपली योग्य ती दिशा आक्रमण केल्याशिवाय कधींही रहाणार नाहीं. नंतर सर्वांचे आभार वगैरे मानून झाल्यानंतर हा समारंभ खलास झाला.

शेवटच्या दिवशीं आरावेकर देसाई बंधुद्वय यांनीं स्वतः हजर राहून या मालेविषयीं आपली सहानुभूति व प्रेम व्यक्त केलें. त्याजप्रमाणें गोमांतकांतील बहुतेक सर्व सुशिक्षित व विद्वान पुढारी मंडळीचा या मालेंत समावेश झाला असल्यामुळें यंदाच्या समारंभास एक प्रकारचें विशिष्ट रम्य स्वरूप प्राप्त झालेलें होतें.

...विरुद्ध जें जें काहीं बोलतां येण्यासारखें आहे तें सारें बोलून संपल्यानंतरहि त्यांची उज्वल मूर्ती आकाशांतील छायाचित्राप्रमाणें या हल्ल्याच्या धुक्यांतून स्पष्ट दिसते. जगाच्या आजपर्यंतच्या इतिहासांत कोणाहि एका व्यक्तीनें एकाच उद्योगांत आपला सारा जन्म घालवूनहि जेवढें यश संपादन केलें नसेल, तेवढें यश केवळ दोन वर्षांच्या अवधींत आपल्या शुद्ध दानतीच्या बळावर महात्मा गांधी यांनीं संपादिलें आहे.

वर्तमानसार

—पूर्वी प्रसिद्ध झाल्याप्रमाणें म्हापसें येथें सभा भरून कौंसिल्य लेजिज्लातीव्हाचे लोकपक्षीय मेंबरानीं करवाढीच्या बाबतींत व्यक्त केलेल्या धोरणास दुजोरा देण्यांत आला.

—ज. गोमीस द कोस्त यानीं मिलिटरी खात्यांत जी सुधारणा सुचविली आहे, ती अमलांत आल्यास तिजोरीला नव्वद हजारांची बचत होणार आहे.

—महात्मा गांधीचें आरोग्य बरेंच सुधारल्याची वार्ता आहे.

—येत्या फेब्रुवारी महिन्याच्या ३ तारखेस "गोवा हिंदुमंडळा'च्या चालकानीं पणजीच्या एडन सिनेमांत एक सभा बोलावली असून, या सभेला सर्व हिंदुसंस्थानीं आपापले प्रतिनिधी पाठविण्याविषयीं विनंति केली आहे. 'लहान तोंडीं मोठा घांस' ऊर्फ 'मोठ्या तोंडीं लहान घांस'!

—मडगांवच्या प्लेगचें वातावरण साफ निवळल्यामुळें, आतां सर्व दळणवळण पूर्व स्थितीवर आलें आहे. वास्कु द गाम व सांकवाळ येथें मात्र प्लेगच्या केसीस अजून सुरू आहेत.

—डॉ॰ जाइम द मोराइस हे आपली मुदत संपतांच, पोर्तुगालला रवाना होतील ही मुदत संपण्यास थोडे महिनें लोटले पाहिजेत!.

—रायबंदरचे डॉ॰ येळेकर यांस तेथील नागरिकांनी एक टिपार्टी देऊन त्यांचा गौरव केला: विशेष माहिती येत्या अंकीं.

लुप्त विद्येचा पुनः प्रसार

ह्या पुराण प्रसिद्ध ऋषीवन [रिवण] गावांची माहिती आमच्या गोव्यांतील बहुतेक बांधवांस असावी अशी आमची खात्री आहे. परंतु गोव्याबाहेरील लोकांस ह्या प्रांतांत अशा प्रकारचें पुण्यस्थल असल्याबद्दल योग्य माहिती नसणें स्वाभाविक व शक्य असल्यामुळें त्याबद्दलची त्रोटक माहिती पूर्वी देऊन मागाहून मुख्य विषयाकडे वळूं.

हें गांव परम पवित्र अशा कुशावती नदीच्या दोनही तिरांवर असून W. I. P. रेलवेच्या सांवर्डे स्टेशनपासून दक्षिण बाजूस साधारण आठेक मैलांवर आहे. ह्या गांवची नैसर्गिक परिस्थिति फार सोयीची असल्यामुळें पूर्वकालीन ऋषींनी ईशाराधना करण्यासाठीं हें स्थल सर्व दृष्टींनीं योग्य ठरविल्यामुळें त्यास ऋषीवन असें सार्थ नांव प्राप्त झालें. आणि खरोखरीच या गांवांतील विपुल झऱ्यांचें पाणी व रम्य वनश्री पाहिली असतां मनःशांतीसाठीं यासारखें दुसरें स्थल मिळणें फार कठीण आहे. अशा या पुण्य स्थलांत श्री विमलेश्वराचें फार जागरूक देवस्थान असून त्यांतील लींग स्वयंभु आहे. या देवस्थानची पूर्वी फार प्रख्याती असून, भक्तमंडळीस संकटाच्या अनेक प्रसंगीं दैविक रीतीनें त्यांची त्या संकटांतून मुक्तता झाली असल्याच्या पुष्कळश आख्यायिका प्रस्तुत लेखकाच्या ऐकिवांत होत्या व ह्या किंवा कर्नाटक प्रांतांतील पुष्कळशा देवालयांप्रमाणें ह्याही देवस्थानात अवसर [अंगांत येणें] येण्याची पद्धति आहे. व गेल्या ५० वर्षांपूर्वी अनेक तऱ्हेचे विलक्षण चमत्कार ह्या अवसरांकडून घडल्याबद्दलचे पुरावे कांहीं वृद्ध मंडळीच्या तोंडून ऐकण्यांत आले होते. अशा तऱ्हेचे कांहींसे चमत्कार तूर्त मुलकी मंजेश्वर, धर्मस्थल इ॰ ठिकाणीं होत असल्याचें समजतें. परंतु ह्या सगळ्या गोष्टी नुसत्या ऐकलेल्याच असल्यामुळें त्यांवर कितपत विश्वास ठेवावा हें समजणें खरोखरच कठीण होतें. शिवाय तूर्त परकीय शिक्षणामुळें युरोपियन लोकांच्या चाली रीतींकडे बहुतेक तरुण लोकांचा साहजिक ओढा झाल्यामुळें

Anno 8.º N. 44

1 de Janeiro de 1924

NATURA

tres rupias

Por cada linh.

Nume

etida uma tanga

tanga

DIRECTOR E EDITOR

G. P. Hegdo Dessay

Quepem-Goa

भारत.

BHARAT

वर्ष ८ वें. अंक ४४

गुरुवार ता. ३१ जानेवारी सन १९२४

वर्गणीचे दर.

सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.

समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.

गो. पु. हेगडे देसाई.

केंपे—गोवा.

Pela Escola Normal

A Ginastica

Jaime de Ramos, o brilhante e espirituoso cronista de *A Tribuna*, emoldurou em um dos seus artigos o perfil do ilustre professor e director da Escola Normal, dr. Diogo do Carmo Reis.

Um artigo de justiça, vibrante que abrindo *brecha*, na estagnaçao e no esterquilinio em que vivemos, fez luzir ante os nossos olhos, poidos de scepticismo, um valente jardineiro regando as florinhas, que, num futuro nao distante, florirao frondosas como uma alvorada da Nova India.

E, no's a quem ainda o patriotismo nao e' adorar a patria...em expectro, viemos, alargando a nossa capacidade retentiva, contemplar maravilhados e apreciar a' justa, toda a sua vasta obra educativa: a iniciaçao do ensino e pra'tica da ginastica, o lançamento das bases para uma "Associaçao da Escola Normal e anexas etc., o estabelecimento, em miniatura da escola materna na Escola Normal E, agora, por tudo quanto vimos, ca' estamos no's, com turibulo da gratidao, na mao, incensar cada uma destas suas obras, e entre hosanas proclamar:

Ecce Homo!

Trazer o seu nome no alto das colunas dum semanario, nao lhe seria glorificaçao suficiente, nem justa; cada uma das suas obras — bem o sabemos no's—deve ter lhe sido uma cruz no meio como o nosso, so' a plebe consciente, a massa ignara que sab. aquilatar o valor de altas empresas, um dia ira' atroar os ares: *crucifige eum! crucifige eum!* ... na Cruz da Gloria!

Posto isto, permitimo nos a liberdade duma observaçao, cordata e respeitosamente formulada. Quando, S Excia. vai, altivo, introduzindo novidades, entao nossos aplausos sao lhe todos devidos, e somos no's tambem que por hoje, vamos dizer-lhe: Mas!

Mas! sinistra palavra de tres letras palavra feita de breu, rufiando negra como a asa do diabo.

Mas?...o horario da ginastica diaria, na Escola Normal!...Eis aqui um caso que deve merecer meticulosa atençao do seu ilustre director, para que tudo quanto fizer, em prol da instruçao e educaçao dos nossos filhos, seja para no's, um motivo para lhe sermos eternamente gratos, e para S. Excia. um titulo de Glo'ria!

E' que o hora'rio estabelecido para a pratica da ginastica, nesta Escola, entendemos no's, na nossa humilima opiniao, nao pode, certamente, conduzir ao efeito que e' licito esperar sendo como e', o começo das aulas a's 7, 45, 8, ate' o principio doutras aulas que terminam as 11 1/2, 12 1/2 e 13 1/2.

Vejamos: Um aluno das 2.a e 3.a classes, da Escola Normal, que, a falar claro, nao e' de pa'u, do contrario excusava-se a ginastica tem, em me'dia, 4 a' 5 disciplinas, que sao tantas horas em que os seus miolos estao a arder se no fogo das sciencias, matematicas, pedagogias, desenhos, eu sei la'!...

Depois sai, vai para a sua casa, entorna, um pouco de agua sobre o cerebro em brasa, em ebuliçao, recheia o estomago, aguarda que duas horas passem segundo o preceito de higiene. Veste-se, usa o chapeu e ao sair, o relogio da Camara, como um dobre de finados, ressoa 3 badaladas. Sao 3 horas de tarde!... Santo Deus! Desastre! O mestre de exercicios metodologicos, grave e hirto, cansado de o esperar, ferreteou-o com *F.* negro e soturno; Hesitaçoes, como as de Hamlet, mas com a variante: ir ou nao ir? E' o caso, mas com a soluçao positiva, pois que a soma destes tres *F.* em tres semanas, e' uma guia de marcha forçada ate'...a sua casinha, para nao voltar mais para a cidade a' beira do Mandovi plantada senao para o ano letivo que vem!...

Entra, e se, por acaso, nao calhou com a Dona *F.* principia as suas funçoes de mestre aluno, pelo espaço de cinco horas! que com as cinco de manha perfazem a bonita soma de 10 horas! e' isto, sem tomar em linha de conta a 1 1/2 de ginastica!! ... E no's aqui, ingenua e tolamente a ulularmos contra as 8 horas de trabalho.... pago!...

E la' fica o pobre rapaz ou menina, essa mimosa flor ha pouco plantada no jardim da vida, ate' que o escuro manso de noite vem descendo sobre a cidade frouxamente aluminiada pelos bicos electricos, que antes, parecem, pirilampos a luzirem!

Chega para casa, descança um bocado; para que os musculos retomem a posiçao —a' vontade — e os nervos se ponham serenos.

Sao oito horas de noite!

Sem mais delongas assenta-se a' mesa de estudo. Mas o' decepçao! Ve com pasmo ante seus o'hos extaticos, uma pilha enorme de horas tao altaneira tao medonha que nem as piramides de Egipto, donde uma voz de algum Napoleao oculto lhes berra:

"Menino, no alto destes livros esta' suspenso, o certificado da tua aprovaçao no fim do ano!"

"Menino, do alto destes livros te contemplarao, amanha, a's 8 horas de manha, cinco professores de cadernetas na mao!!"

Aterra se o pobresinho, decide se, num esforço supremo, abre um livro mas as letras dansam uma dança macabra e diabolica, e convicto destas palavras misteriosas, tremulo, e assustado e entrega se nos braços de Morfeu!...

Pois que, se vinha exa'usto, topego de ensinar, estudar, a impossibilidade de humananamente preparar as liçoe... do dia imediato e' uma sentenc...

Ecos & Critica

Pontos nos i i ..

La' porque o *Bharat* empregou a expressao *capital hindu'* numa local justificativa da ausencia do sr. Venctexa Dessai a' memoravel sessao de 27 de Dezembro o nosso presado colega d'a *Terra* viu naquelas inofensivas palavras "obsessao sectarista" que ignoramos o que seja. Se destacamos a circustancia de que as nossas pau as iam ferir o comercio dirigido pelo "capital hindu'," foi simplesmente porque quizemos mostrar que sendo *hindu'* o sr. Dessai nao faria mais por este facto causa comum, fosse porque fosse, com os srs. Polibio e Pedro Antonio, se tivesse assistido a' referida historica sessao a que faltou involuntariamente, por causa da propaganda do P. Sanga. Foi so' isto e nada mai .

Onde ha' pois, "obsessao sectarista?

Qanto ao que no mesmo "eco" da *Terra*, diz respeito aos srs. drs. Borcar e Sacardando', ao Pragatica Sanga, ao seu Congresso de Queula' e o *vivorio* que ai atrou os ares, o *Bharat* nada tem que ver com isso, pelo simples motivo de nao ser orgao da-mesma associaçao nem defensor incondicional dos que politicam em volta da bandeira do *Sanga*, ainda que Hegdo' Dessai seja um socio deste e amigo pessoal e muito obrigado daqueles.

Cremos, porem, de resto, que era escusada esta declaraçao, sabido que o *Bharat*, sendo folha independente manteve e mantem sempre uma atitude de mais franca oposiçao perante os desatinos dos verdugos da sua terra, o que comprova a' saciedade o seu curto passado, farto de processos crimes.

Por hoje nao e' possivel, a' mingua de espaço, bordar consideraçoes mais largas sobre o presente assunto que nos faz aflu'r a' caneta uma serie de argumentos e pensamentos.

Para a historia ...

O sr. prof dr. Sinari e seu respeitavel pai dedicaram uma missa *requiem* ao finado dr. Alpoim, exteriorisando deste modo gratidao pelos favores que receberam do ilustre morto.

Em geral, as aparencias sao interesseiras, porque visam conquistas estomacais; mas a da referida missa e' despida da mais ligeira sombra de interesse, porquanto um morto, ainda que seja ateu, nao consta ter adquirido o dom de operar maravilhas, la' dos umbrais do ceu ou do inferno. Sob este ponto de vista, o "catolico" acto dos hindus Sinaris merece ser registado nas colunas, do *Bharat*, quando mais nao fosse, para a sciencia dos vindouros, o que fazemos no milhor dos intuitos, louvando, expontaneamente, a religiosa atitude dos srs. Sinaris perante a alma a ... *penar* ... do nobilissimo magistrado ateu que foi o dr. Alpoim, seu amigo e protector.

Mais uma!

Temos ja mais uma lotaria. E' a do Azilo de N. S. dos Milagres de Mapuça. Nao nas agradou a novidade, porquanto nao e' de conformar-se com o bom senso e principio de democracias o exercicio de caridade por aquele sistema, tao mao como o jogo de azar a que ele se assemelha muito.

...Mas no regime de "jogos malabaricos" em que vivemos, desde que, por mal dos nossos pecados, assumiu as redeas do governo provincial o sr. dr. Jaime de Morais, explica-se perfeitamente o da referida lotaria.

Sim, senhores, Aproveitem enquanto puderam, pois e' tempo de "quem mais puder...Sim?

आतां हा आंधळा करभाराचा कारभार जनतेनें बंद पाडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सरकारी तिजोरीस आतां पासूनच आळा पडत गेला नाहीं तर भविष्यकाळीं आतांपेक्षांहि जास्ती तीव्र–तर क्लेश लोकांना सोसावे लागणार आहेत. 'मागेल तें द्यावें व सुखी असावें' या निःसत्व व निस्तेज तत्वाला कायमची मूठ माती देऊन आपलेपणाची जीवंत खूण सरकारला पटवून दिली पाहिजे. या कामीं 'देह जावो अथवा राहो' याची क्षिति न बाळगितां अव्याहत झटण्यास पुढें सरसावल्यासच मात्र सरकार नमतें घेईल, याची प्रत्येकानें आपल्या मनांत खूणगांठ बांधावी, अशी आमची विनंति आहे.

तिजोरीवरची शिरजोरी सनदशीर मार्गाच्या बळजबरीनें दूर लोटली न गेल्यास सोन्याचा धूर निघणाऱ्या या प्रांतांत लवकरच आमच्या घरदारांचा व मालमत्तेचा धूर निघेल, हें प्रत्येकानें पक्कें लक्ष्यांत ठेवावें.

तर बांधव हो, उठा! जागे व्हा!! आळस झाडा व तुमचा नायनाट करण्याच्या राक्षसी महत्वाकांक्षेनें टपून बसलेल्या सरकारी केंद्रशाहीच्या शरीरावर एकदम तुटून त्याला हाणुन पाडा!

उठा! जागे व्हा!! मतभेदाला विश्रांति द्या. स्वार्थाशीं तह करा. सुखसोयींना झोपवून घ्या. व हां हां म्हणतां सरकारला वठणीवर आणा!

स्फुट विचार

१ आलफांताचे कर:— आलफांताच्या [कस्टम] करवाढीमुळें लोकांचीं मनें असंतुष्ट होण्यास विशेषें करून ज्या गोष्टी कारणीभूत झाल्या त्यांत, तांदळासारख्या सर्वसाधारण जनतेच्या मुख्य आहारावर लादण्यांत आलेला - तिप्पट कर, या गोष्टीचा प्रामुख्यानें समावेश होतो. १९२१ सालीं तांदळाच्या आयातीनें उत्पन्न ४७४२५ रु. होतें. पुढें कोमिसांव द सिल्योरामेंताच्या अधाशीपणानें या उत्पन्नाची वाढ ६३२३३ रु. पर्यंत झाली. व नवीन वाढी मुळें हें उत्पन्न आतां ११८५६२ रुपयांनीं फुगलें असून, १९२१ सालच्या मानानें त्यांत ५५३२९ रुपयांची नवीन भर पडली आहे! चैनीच्या एखाद्या पदार्थावर सरकारनें करवाढीच्या चाबुकाचा मारा किंचित् जोरानें केला असता, तर जनतेनें त्याला खुशाल पाठ दिली असती. पण प्रश्न पडला पोटाचा व पोटाच्या उपासमारीचा सर्वस्व प्रत्यक्ष मरणाशीं येत असल्यानें, अशांततेचा वणवा सर्वत्र पसरला असल्यास त्यांत नवल तें कोणतें?

२ याला काय म्हणावें? :—आलफांताच्या करवाढीचा कायदा, स्वार्थी सरकारपक्षीय व विश्वासघातकी लोकपक्षीय या उभय जातीच्या मेंबरांच्या अरेरावी वर्तनानें कसा बसा पास झाल्यावर तो हुकुमाच्या स्वरूपांत सरकारी बोलेतींवर प्रसिद्ध झाला, ही गोष्ट ठीकच झाली, पण या नंतर पास झालेल्या त्या ठरावावर व्यापारी मंडळाचें मत घेण्याचा जो नाट्य प्रयोग दाखविण्यांत आला, त्याला काय नांव द्यावें हेंच आम्हांला सुचत नाहीं. व्यापारी मंडळ हें कांहीं प्रांतिक सरकारवर अधिकार चालवणारें एखादें वरिष्ठ सरकार नव्हे कीं त्याला पास झालेल्या लेजिस्लातीव्ह कोंसेलयाच्या ठरावांत पाहिजे तसा फेरबदल करण्याची सत्ता आहे! बाकी त्या फार्सानें करवाढीच्या कायद्यांत फरक तर झाला नाहींच; उलट त्या दागण्यानें जनतेच्या दुःखांत विशेष भर मात्र पडली.

३ नसती उठाठेव:–कोणत्याहि अधिकाऱ्यानें आपल्या अधिकाराचें अतिक्रमण केलें म्हणजे त्या विरुद्ध 'सिंदिकांसी' नावांचें एक शस्त्र उगारलें जातें. अशा तऱ्हेचें शस्त्र आजपर्यंत अनेक अधिकाऱ्यांच्या गळ्यावर ठेवण्यांत आलें. पण मजा ही कीं, त्यापासून सरकारी तिजोरीशिवाय कोणासहि नुकसान झालेलें आमच्या दृष्टोत्पत्तीस आलें नाहीं. जंगलखात्याचे माजी मामलेदार सिं. ग्रीत यांविरुद्धहि एक 'सिंदिकास' गेल्या ४ वर्षांमागून चालू होती. तिचा शेवट होऊन ते निरपराधी असल्याचें सिद्ध झालें आहे! तोरगाल, बारग्रोज, आमोरिंद्रुग्र वगैरे यांविरुद्ध फर्मावण्यांत आलेल्या सिंदिकांसीचाहि परिणाम वरील प्रमाणेंच झालेला असल्याचें वाचकांस आठवत असेलच. अशा स्थितींत 'सिंदिकांसी'ची नसती उठाठेव माजविण्यांत सरकाराला कोणता पुरुषार्थ वाटत असेल, त्याचा 'उकळ एक हरीच जाणें' असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. या पुढें तरी सिंदिकांसी सारख्या बोंथट शस्त्राचा उपयोग न करितां, उद्धट अधिकाऱ्यांची रग जिरविण्यासाठीं, सरकार दुसऱ्या कसल्याहि तिखट धारेच्या शस्त्राचा उपाय योजना करील, अशी आशा आहे.

४ सुस्वागतम्:–अखेर गेल्या ता. २७ रोजीं गेल्या दोन वर्षांपासून गाजत असलेल्या 'हिंदु' पत्राचा प्रथमांक मडगांव येथें प्रसिद्ध झाला. छापखाना व टैप अगदीं नवीन असल्यानें 'हिंदू'ची छपाई नवीन पत्राला साजेल अशीच मोहक व नयनमनोहर झाली आहे. ही गोष्ट झाली बाह्यांगाविषयींची. अंतरंगाच्या दृष्टीनेंहि 'हिंदु'पत्राचा दर्जा, त्याच्या संपादक मंडळाच्या उदार, दिलदार व जोरदार धोरणावर आमचा पूर्ण विश्वास असल्यानें, वाढतच जाईल, अशी आमची खात्री आहे. 'हिंदु' साप्ताहिक 'भारता' प्रमाणेंच स्वतंत्र असल्यानें कसल्याहि 'पक्षपाती' धोरणापासून तें अलिप्तच राहील असें दिसतें. 'हिंदु' पत्र हें निवळ मराठी असल्यानें त्यांतील लोकहितविषयक महत्वाच्या चर्चेचें दिग्दर्शन वेळोवेळीं भारताच्या पोर्तुगीज भागांत करण्याचा आमचा मनोदय आहे. असो. 'हिंदू'चें अंतःकरणपूर्वक स्वागत करून, हें नूतन पत्र चिरायु होवो असें इच्छितों.

वर्तमानसार

—ठिकठिकाणीं प्रागतिक संघाच्या महाल कमिट्या निवडण्यांत आल्या.

—बाणावली येथील श्री कात्यायनी बाणेश्वरी शाळेचा बक्षीस समारंभ मोठ्या थाटानें पार पडला.

—अमेरिकेंत एका ५० वर्षांच्या बाईचा विवाह १६ वर्षांच्या मुलाशीं झाला. पोक्त अमेरिकेंतील हा 'पोरकटपणा' जाहिला म्हणजे मनसोक्त वर्तणुकीचे दुष्परिणाम चट्दिशीं लक्ष्यांत येतात.

—श्री. शांबाराव सरदेसाई हे उद्यां दमणला रवाना होतील.

—प्रागतिक संघानें पास केलेले ठराव अजून सरकारच्या नजरेसमोर मांडण्यास सवड झाली नाहीं, असें कळतें. कां?

—दो. मानुयेल क्वाद्रुस, येथील माजी जज्ज यांची नेमणूक पणजीच्या हायकोर्टांत झाली असल्याची वदंता आहे.

—गोरक्षणाच्या चळवळीस नेट देण्याच्या हेतूनें रायबंदरचे रामचंद्र नरसिंह लवंदे हे 'गोवा-गोरक्षण' नावाचें मासिक पत्र काढण्याच्या तयारींत आहेत असें कळतें.

—म्हापसें येथें एक नवीन लॉटरी काढण्याची सरकारनें मंजुरी दिली आहे! हिंदूनीहि एक स्वतःची लॉटरी कां स्थापूं नये?

—येथील सरकारी पोष्टकार्डांचा स्टॉक संपून आज जवळ जवळ ४॥ महिने होत आले; परंतु नवीन कार्डांचें नांव नाहीं! हीहि एक अप्रत्यक्ष करवाढच म्हणावयाची!

—पणजी येथें प्लेगचे उंदीर सांपडल्यानें तेथील जनता घाबरी झाली आहे. मुरगांव व सांकवाळ येथें प्लेगच्या बऱ्याच केसीस होत असून, मडगांव नजीकच्या नावेली गावांतहि त्या रोगानें एक माणुस वारला असें कळतें.

—अपरिहार्य कारणामुळें बंद पडलेलें कालापुरचें 'नवजीवन' हेंच 'गोवा हिंदुमंडळा'चें मुखपत्र होणार असून तें येत्या महिन्यापासून फिरून प्रसिद्ध होणार असल्याचें आमचे पणजीचे बातमीदार कळवितात. सुस्वागतम्.

—येथील माजी देलेगाद दो. फेरैर फोंसेक यांची नेमणूक पणजीच्या क्रिमिनल कोर्टांत झाली आहे.

—भालचंद्र विनायक देसाई यांची कस्टमखात्यांत नेमणूक झाल्यानें व दत्ताराम गोविंद कामत व नारायण पंढरीनाथ शिर्वेकर यांची त्याच खात्यांत बढती झाल्यानें आम्हीं त्यां सर्वांचें अभिनंदन करितों.

—दो॰ मानुयेल क्वाद्रुस यांस इंडियेंत पाठवूं नये, अशा अर्थाची मागणी येथील सरकारनें वरिष्ठ सरकारला केली होती असें म्हणतात. पण उपरोक्त जज्जांची स्वारी गेल्या रविवारीं आकस्मिकपणें गोव्यांत प्राप्त झाली आहे.

प्रागतिक संघाची परिषद

अध्यक्षांच्या भाषणाचा सारांश

वरवर क्षुल्लक दिसणारा हा मुद्दा कांहींसा विस्तारानें मी आपल्यापुढें मांडला यांतील हेतू त्याच्या पुढच्या विवेचनावर पूर्ण प्रकाश पडावा हा होय. वरील विचारसरणी लक्ष्यांत ठेवून पाहिलें असतां आपल्याला असें दिसून येईल कीं, कोणत्याहि व्यक्तीच्या अगर समाजाच्या प्रगतीची भावी इमारत त्या व्यक्तीच्या अगर समाजाच्या पूर्वपरंपरेवरच उभारली पाहिजे. भूतकाळास अनुसरून मनुष्याचा भविष्यकाळ बनतो; किंवा भूत व वर्तमान हे दोन बिंदु सांधून मारलेली रेषाच पुढें वाढविली असतां ती भविष्यकाळाची दिशा दर्शविते असें जें म्हणतात त्यांतील इंगित हेंच होय.

एवढें विवेचन झाल्यावर आतां आपल्या तहकुब राहिलेल्या शंकेचा उत्तर देणें मुळींच कठीण नाहीं. व तें हें आहे. ज्या अर्थीं आम्ही हिंदु आहोंत, हिंदुपरंपरेपासून झालों आहोंत, हिंदुधर्म अनुसरत आहोंत; हिंदूंची भाषा बोलत आहोंत, हिंदु आचार विचार पाळीत आहोंत व हिंदु परिस्थितींत उत्पत्ति, जीवन व वाढ पावून तीशीं तादात्म्य पावलों आहोंत, त्याअर्थीं या सर्व गोष्टी जमेस धरून प्रगतीचा जो कार्यक्रम आंखावयाचा, तो आम्हांला हिंदुसमाजासंबंधानें आंखतां येईल. इतर समाजांच्या संबंधानें आंखतां येणार नाहीं. आणि म्हणूनच हिंदु खेरीज इतर समाजांचाहि समावेश आमच्या कार्यक्रमांत केल्यास तो कार्यक्रम विनाकारण संकीर्ण व अव्यवहार्य होऊन बसेल व निदान आम्हाला तरी तो योग्य प्रकारें अमलांत आणतां येणार नाहीं. केवळ तात्त्विकदृष्ट्या एखादें ध्येय डोळ्यांपुढें ठेवावयाचें असल्यास तें केवढेंहि व्यापक असावयाला हरकत नाहीं. पण आम्हासारखें ज्यानां प्रत्यक्ष काम करावयाचें आहे, त्यांना शुद्ध तात्त्विक अतएव अव्यवहार्य ध्येय घेऊन चालावयाचें नाहीं.

आतां एवढ्यावरून असें समजावयाचें नाहीं कीं, इतर समाजांच्या प्रगतीविषयीं आम्हीं त्यांशीं विरोधभाव बाळगणार किंवा उदासीन तरी राहणार नाहीं, असें केव्हांहि होणें शक्य नाहीं. कारण, आम्हाला पूर्णपणें ठाऊक आहे कीं, ज्याप्रामाणें समाजाची प्रगति झाल्याशिवाय त्यांतील एखाद्या दुसऱ्या व्यक्तींची झालेली प्रगति, त्या त्या व्यक्तींच्या पदरीं पडणें सुलभ नाहीं त्याचप्रमाणें, देशाचीं प्रगति झाल्याशिवाय त्यांतील एखाद्या दुसऱ्या समाजाची झालेली प्रगतिहि त्या समाजाच्या पदरीं पडणें शक्य नाहीं. एवढेंच नव्हे तर इतर समाज प्रगतिपराङ्मुख बनल्यास धांवणाऱ्या बैलाच्या गळ्यांत बांधण्यांत

रामदासांसारखं दमरली ! दूरदूरचे लोक रुपये घेऊन, त्यांच्या हातची लॉटरी मिळविण्यास धांवत येत ! परदेशस्थ पाहुणे अर्थात जेवायला मामाचे घरांत हें सांगायला नकोच !

तिन्ही त्रिकाळ मामाचें घर लोकांच्या रहदारीनें फुलून दिसूं लागलें ! चहाकॉफीच्या सुखसदनांत, आर्य मदिरालयांत जसे पट्टी, विड्या विकणारे असतात, तशींच मामाचे घरीं सोडती वाल्यानीं ठाणीं बसविलीं ! 'जोड पिंजऱ्याची, खर्च बादशाही' ह्या नात्यानें खाऊन पिऊन सुखी असलेले शिनुमामा, उद्यां माधुकरी कुठें मिळेल ह्या विचारांतच सुखानें गुंग होऊं लागले !

मामा अगदीं ह्या त्रासानें थकून गेले, शिवाय चिंता ज्वरानें तर ते जळतच होते ! एकेकाळीं जे मामा सोडत घेऊन तासचे तास प्रेमानें सारखे टकटक पहात बसत, एका नंबराला चुकली हो ! नाहींतर १५ हजार रुपये यावयाचे ! असें प्रत्येकाचे घरीं जाऊन आपण होऊन सांगायचे, सोडतीला प्रेमानें अश्रुस्नान घालायचे ! सोडत दृष्टीस पडतांच सुखानें नाचायचे ! सोडती वाल्याला परमेश्वराप्रमाणें शुन्य (०) मानायचे ! भगवत् गीतेच्याच दृष्टीनें, सोडतीच्या चेंडोळ्यांकडे पहावयाचे ! तेच प्रेमा सोडत दृष्टीस पडतांच, योजनाचीं अनर्थें पळूं लागले ! स्वप्नांत सुध्दां लॉटरी तला. ...न ते चटकन् जागे होऊं ला-

—पोर्तुगालहून... नशीव शिकंदर हें तिकिटांच्या २२ पेट्या ...दां " प्रला पो... शिनुमामा ह्यांच्या हातचं अस्सल ...री ! " फक्त आमच्याच इ... मिळेल ! ला...टरी घेतानां " शिनुमामा ह... छाप " दिसून पारखून घ्या ! फसूं ...ा ! अशा ...थींच्या जाहिराती झळकूं ...गल्या !

मामा चारांच्या गाडी... जाण्यासाठीं, ...ला वाजतां बाहेर पडत, परंतु ...ऱ्या जन्मांत ...डी एकदां तरी मिळाली, असें झालेंच ...स्टेशनाकडून हात हालवीत पर... यावें ...यसे ! कारण मामा बाहेर ...घाले, सगळे लॉटरीवाले ...ल्या लवाज... पडायचे ! अर्थात त्यांचें जा... निकाच्या दसऱ्याच्या स्वारी... ऊं लागलें ! मी तर असें ह्मणतों, ...च्या स्वारीपुढें, हल्लीं झालेलें युवराज आगमन सोडाच, पण दिल्ली दरबारीं झालेली स्वारी सुध्दां शिनुमामाच्या नित्याच्या जाण्याच्या स्वारीपुढें अ...की दिसेल ! शिनुमामाच्या स्वारीचें ...र्णन, प्रसिद्ध मासिक पुस्तकांचे ...दरबार " अंकानाहि खालीं मान ...स लावील ! जादा अंक सोडाच !

कळविण्याला मला फार वाईट ...हें कीं, " यदृष्टं तन्नष्टं " या ...नुमामा लॉटरीच्या चितेमुळें म... ! मामानां जळायला लाकडांची गरज लागली नाहीं ! निर्माल्य ...लॉटरीनींच त्यांनां जाळण्यांत आलें ! आज मामाच्या घरीं निर्माल्य सोडतीचें इतकें कोठार भरलें आहे कीं, त्यांच्या पुढच्या ५ पिढी पर्यंत ते कागद, शाळेंत पुस्त्या काढण्यास, पावसाळ्यांत होड्या करण्यास, जाणतेपणी * * पत्रें लिहिण्यास, हिशेब ठेवण्यास, मृत्युपत्र लिहिण्यास अखेर जाळण्यास सुध्दां पुरून उरतील असें शास्त्रज्ञाचें ह्मणणें आहे.

मी मात्र शिनुमामाचें गुपीत जाणीत होतों ! त्यांना मी कधींहि त्रास दिलेला नाहीं ! मी स्वतःच्या हातानेंच लॉटरी काढूं लागलों ! पण छट्! लॉटरीची माझ्यावर कृपा होईना ! तरी माझा नाद इतका वाढला कीं, गर्भांतील मुलाच्या नावांनें, काकूंच्या नावांनें, मृत्युपंथास लागलेल्या आजोबांच्या अंत्यविधीसाठीं, आजीच्या श्राद्ध खर्चासाठीं, उपवर ठमीच्या लग्न खर्चासाठीं लॉटरी घेऊं लागलों ! शिवाय लॉटरीवाला वळेंच, रावसाहेब ही लॉटरी घ्या, पहिली प्रेम ठेवलेली आहे ! ह्मणून मुद्दाम खिशांत कोंबूं लागला, तर नको ह्मणून कोणी ह्मणावें ?

लॉटरी खर्चासाठीं महिना ५० रुपये सहज उडूं लागले ! एकाहि लॉटरीस ३ रु. सुध्दां लागले नाहींत ह्मणून मी उदास झालों नाहीं. ! " अनंत हस्तें कमलाकरानें, देतां किती घेशील दोकरानें " किंवा " अल्ला देईल तर निजल्या ठिकाणीं सुध्दां देईल " ह्या वाक्यांवर माझा पुरा विश्वास आहे ! येत्या नाताळच्या लॉटरीला मला ५० हजार रुपये लागणार नाहींत, असें कोण ह्मणेल ? पण आमची घरची मंडळी इतकी वस्ताद कीं, " लॉटरी घेऊं नकोस " ह्या उपदेशामृतांत मला गटंगळ्या खाईपर्यंत बुडवूं लागली ! इतकें झालें तरी मी लॉटरी घेण्याला कधींच अळंटळं केलं नाहीं. लॉटरी घेऊन फिरणारा जर मारे जहागिरदारासारखा फिरतो, आठ आठ दिवस भोज्याच्या सायंकली घरांत वाळगूं शकतो; शिवाय ब्राह्मणीला आठ आणे रोज मुगरा ठेवलेलेंच, इतुकें स्वर्गसुख जर लॉटरी घेऊन विक्रीसाठीं फिरणाराला, तर ती विकत घेणाराला त्याच्या दुप्पटीनें मिळालें पाहिजे, असें माझें ह्मणणें आहे !

लॉटरीमुळें मी जरी स्या कफल्लक झालों, तरी " लॉटरी " " लॉटरी संस्था " " लाटरीवाला " मला प्राणाहून प्रिय आहेत ! इतकेंच नव्हे तर निर्माल्य झालेली लॉटरी मीं गळ्यांत ताईताप्रमाणें बांधली आहे !

जरा करमेनासें झालें ह्मणजे मीं जिवास विरंगुळा करण्यासाठीं शिनुमामाचे घरीं—लॉटरी मठांत जाऊन बसतों ! ते लॉटरींचे ढिग पाहिले ह्मणजे मनाला फार समाधान वाटतें ! पांडुरंग ह्या नामघोषानें जशी साधूंची ब्रह्मानंदीं टाळी लागते, तशीच माझी " सोर्ते—प्रेम फोर्ते—आयतारा—आवेर्ते " हें पालुपद ऐकतांना लागत असते !

श्री नागेश वांदिवडें

जाहीर विनंति

सर्व महाजन, भजक, पूजक, उत्साही वगैरे सर्व लोकांस येत्या "चैत्र पौर्णिमा" या उत्सवास, यंदा सालाबादापेक्षां जास्त (उघड) नीतिमत्ता, धर्मजागृति, आणि ब्राह्मणभोजन अशा धर्तीवर उत्सव करण्याचें ठरलेलें आहे: आमच्या धर्मांत कायकाय लिहिलेलें आहे व त्याची जागृति आबाल वृद्धांस कशी प्राप्त व्हावी ती अशा धर्तीच्या उत्सवांतून कशी सहजासहज प्राप्त करून घेतां येते, हें तत्व, पूर्वजानीं फार बारकाईनें विचार करून ठरविलेलें आहे. तें उक्त रीतीनें आजच्या आधुनिकांना समजून घेण्यास हे, व अशा धर्तीचे राष्ट्रीय उत्सव कसे कारणीभूत होतात, हें पाहण्यास व त्याप्रमाणें वागण्यास बरें पडेल; अशा समजुतीनें ही जाहीर विनंति सादर करण्यांत येत आहे अशा समयीं सर्वांनी हजर होऊन लाभ करून घ्यावा:—

१ श्रींच्या उत्सवास चैत्र शु० ११ दर्शानें आरंभ तो पौर्णिमेपुढें द्वितीया पर्यंत एकसारखा चालू राहील; कीर्तन, पुराण, नाटकें, असा हा उत्सव आहे.

२ द्वादशीपासून नित्य दुपारीं व रात्रीं आरत्या होतांच अग्रशाळेवर सर्वांस भोजनें आहेत. आरत्या नंतर मंत्रपुष्प होईल (राष्ट्रांत सर्व शांतता असावी, दाण्यापाण्याची समृद्धि असावी, रोगराई होऊं नये, सर्वत्र आबादी असावी, अशी उच्च स्वरानें प्रार्थना असते, ती सर्व प्रेक्षकांनीं हात जोडून डोई नम्र करून आपण शरणार्थी आहों अशा भावनेनें ऐकावी, असा मंत्रपुष्पांतील मंत्रांचा अर्थ आहे.)

३ कीर्तन संपून भोजन आटोपल्यानंतर रात्रौ श्रीची पालखी देवालयांतून निघून पेणी व्हावयाची, त्यांत वेदघोष, वाद्यें, दारुसामानाचे बार कलावंतिणीचा नाच–गाणे–व झुला (प्रार्थना) अशा थाटानें थोरल्या शेज्यावर श्रीची मूर्ती स्थापन व्हावयाची, नंतर नाटकास आरंभ होईल (वेद घोषानें पातकांचा नाश व्हावयाचा, वाद्यानें अभद्र शब्द कानावर येणार नाहींत, भूत पिशाच्च दुरावतात. बारानी, जे कोणी ह्मातारे कोतारे, ज्यांच्यानीं देवाच्या उत्सवांत येऊन भाग घेतां येत नाहीं, त्याना बसल्या ठिकाणी राहून देवाच्या पालखी मिरवणूकीची स्मृति होऊन तेथूनच देवास नमस्कार करण्यास जागृति व्हावी असा संदेश आहे.)

४ एकादशी पासून ते द्वितियापर्यंत रात्रौ प्रसिद्ध नटनटी यांच्या सानिध्याचे लोकशिक्षणपर नाटकांचे प्रयोग होतील, (यांत नाजूक कला धिटाई वक्तृत्वें विनयादि अभिनय संपादण्यास सुलभ पडेल)

५ श्रीची स्वारी उत्तम लालखींत आरोहण होऊन जंगी मिरवणूक होईल, त्यावेळीं गांवोगांवचे लोक मिळून एकमेकांचीं प्रीतिबंधनें, बंधुप्रेम व एकमेकांचे हेतूचें समीकरण करून घेण्यास फारच सोईचें होईल (हा मोठा फायदा राष्ट्रहितावह आहे, ह्मणून हे उत्सव आहेत.

६६ श्रीची स्वारी रुप्याच्या पालखींतून तशीच अंबारींतून मिरवत राहील. व थोरल्या रथांतून मिरवणूक होईल.

७. श्रीची स्वारी आरामवायनांत बसून हुड्यावर जाईल, तेथें वसंत पूजेचा उत्सव ... परत देवालयांत येईल ... दारुसामान ...

...वरतील, सर्व व्यापार, तामण, ... राणा व्यापार पटवेकरी वगैरे लोकांच्या ...नाची रेलचेल होईल.

९ हलवाई व ताजी मिठाई याचीं दुकानें योग्य व्यवस्थेच्या ठिकाणीं असून निर्मळ व स्वच्छ जिनसा मिळतील.

१० सर्व, व्यवस्थेनें चालण्यास व स्वस्थता रक्षण होण्यास, पोलीस शिपाईहि असतील. वरून, कोणत्याच काळजीचें कारण नाहीं.

नागेश वांदिवडें ता० १ आप्रील १९२४

मेज मं. अध्यक्ष

व्यंकटेश रामचंद्र नाईक

वर्तमानसार

—हस्तांदोलनाची पद्धत हाणून पाडण्याच्या उद्देशानें पणजी येथें एक नवीनच संस्थास्थापन झाली असून, या संस्थेचा जो मेंबर हस्तांदोलनाला वळी पडेल, त्याकडून प्रत्येक खेपेला २ आणे दंड वसूल केला जाईल, असें प्रसिद्ध झालें आहे. संसर्गजन्य रोगाची भीति ही सदर्हू संस्थेची जननी ...

—वसाहतींतील सैनिकांची ... करण्यांत येणार आहे.

—वसाहत खर्चाबद्दल येथील सरकार ४ लक्ष २९ हजार रु. पोर्तुगालला रवाना करण्याच्या बेतांत आहे.

—मिनेझीस ब्रागांस व रुयेर्त कोस्त हे वसाहत परिषदेला हजर रहाण्यासाठीं गे मंगळवारीं पोर्तुगालला रवाना झाले.

—पेडणेच्या मुनिसिपालटीनेंहि आप बसलीची मदत वाढविली आहे.

—यंदा पणजीच्या पाठशाळेंत ६९९ विद्यार्थ्यांनीं प्रवेश केला होता. त्या ३८५ विद्यार्थी पास झाले. नोर्मॉल स्कूलच्या ६० मुलांपैकीं अवघे २८ सच पास झाले !

—कानपूर येथें गोळीबार होऊन बरेच लोक मृत्यूमुखीं पडले.

—एक प्रकारचीं भ्रमोत्पादक तापाची सां... कांवरें येथें उद्भवल्याची बोलवा आहे.

साभार स्वीकार

रण–संग्राम (साप्ताहिक):— 'संदेश' दैनिकाचे कर्ते दे. अ० कोल्हटकर हे 'संग्रामा'चे संपादक ...कर यावरून सदरहू पत्राच्या जोमदार धोर... कल्पना वाचकांस सहज होईल. ... लेखणींत एक प्रकारचें माधुर्य वसत असतें. कोल्हटकरी भाषाशैली अंतःकरणांत गुदगुल्या उत्पन्न करणारी असते. कोणताहि विषय चित्ताल्हादक कसा करावा, हें कोल्हटकरांना चांगलें समजतें. 'रण–संग्राम'च्या प्रथमांकांत आमच्या उपरोक्त ह्मणण्याची साक्ष जागोजागीं पटते. कोल्हटकरानीं आपल्या 'संग्रामाचें' शिंग नागपूर येथें फुंकण्यास सुरवात केली असून, अवघ्या १ रु. १३ आण्यानें त्याच्या ध्वनीचा मनमुराद फायदा घेतां येतो.

राजहंस (वर्तमानपत्र):— हें पत्र ...न्याला ३ दां अकोल्या येथें प्रसिद्ध होत असून, त्यांत विशेषतः ब्राह्मणेतर पक्षाच्या ...हितविषयक प्रश्नांची चर्चा करण्यात ... लेख वाचनीय असतात.

—"गेल्या २ तारखेला मडगांव येथें दैवज्ञसमाजाची एक जंगी सभा भरली होती. सभेला अध्यक्ष होते व त्यांचें भाषण वक्तृत्वपूर्ण तर झालेंच.शिवाय अनेक व्याख्यात्यानीं आपापल्या सैल जिभांना पूर्ण संचार करण्यास मुभा दिली होती. त्यांच्या वक्तृत्वपुरांत सभाजन नुसते गटंगळ्या खात होते. व्याख्यात्यांचे बाबतींत 'एक हात मिया व दीड हात दाढी' असाच प्रकार दिसून येत होता. व्याख्यात्यांची व व्याख्यानांची इतकी गर्दी उसळलीं असतांहि अखेर सभेंत काय ठरलें याचा ६००|७०० समाजनांपैकीं एकालाहि मागमूस लागला नाही. सभेला सरकारी अधिकारी हजर होते. विशेष माहिती मागाहून कळवीन", असें" एक 'दैवज्ञ' कळवितात.

—हेलदेर रिबैर हेहि गोव्याच्या गव्हर्नरच्या जागेसाटीं उमेदवार आहेत, असें म्हणतात.

—पणजीच्या कस्टमखात्यांत ज्या वस्तूंचा लिलांव चालू माहेच्या १८, १९ व २० या तारखांस व्हावयाचा होता त्या वस्तूंचा लिलांव येत्या सप्टेंबर महिन्याच्या१,२ व ३ तारखानां होईल, असें आतां प्रसिद्ध झालें आहे.

—पणजी पाठशाळेचे नवे शिक्षक देंतीनु जुनियोर यानीं आपल्या जागेचा चार्ज घेतला.

—पोर्तुगालहून निघालेल्या टपालच्या तिकिटांच्या २२ पेट्या लवकरच मुरगांवला पोंचणार आहेत

—पुण्यांत रेमार्कीटांत लोकमान्याचा पुतळा बसविण्याचे वेळीं जनतेंत अपूर्व उत्साह दिसून येत होता.

—गोव्यांत एकदां प्रसिद्धीस आलेले यँजेविवु द फांसेक यांच्यावरील संकट दूर होऊन, ते फिरून आपल्या नोकरीवर रुजू झाले.

—येथील रेलासावांचे जज्ज डॉ० मेंदीस आनोंत यांची नेमणूक लिज्बोंअ येथील हायकोर्टांत झाली आहे.

—सिंध प्रांतांत एकसारखा पाऊस पडत असल्यानें सिंधू नदीला महापूर आला आहे

—अहमदाबाद येथें एक गिरणी कोसळून, शेंकडो माणसें गारद झाली.

विचार तरंग

इटलीच्या क्षितिजावर चकाकणारा फासिस्मोचा सूर्य मावळण्याच्या पंथास लागला असून, महामपदावर आरूढ झालेला त्याचा जनक मुसोलिनी पदभ्रष्ट होण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत याला कारण काय तर फासिस्ट पक्षान अधिकार मदानें शेफारून माटियोटी यांचा केलेला खून! एकच खून व तोहि देहिक; पण त्यानें इटलीच्या लोकमतांत इतकी खळबळ उडवून दिली आहे कीं, तिला अडवून धरण्याचें सामर्थ्य इटालियन सरकारच्या मनगटांत असलेंच, असें वाटत नाहीं.

× × +

आमच्या गोमांतकाचें वातावरणहि खूनसारख्या आततायी कृत्यांनीं विटाळत नाहीं असें नाहीं; मात्र त्या खुनांचें स्वरूप देहिक रवजीं नैतिक असतें. लोकांच्या नैसर्गिक हक्कांची पायमल्ली करणें ह्मणजेच नैतिक खून मारण्या इतकेंच निंद्य नव्हे काय? व्यक्तींचा देहिक खून क्षणभर दृष्टिआड करण्यास मन धजेल; पण सामुदायिक हक्कांचा नैतिक खून. कोठेंहि झालें तरी, स्वाभिमानशून्य व पौरुषहीन राष्ट्र वगळून, सहज पचनं पडणें कठीण असतें. जगांतील एकंदर राज्यक्रांत्या हीं सदरील नैतिक खुनाचींच अपत्यें होत, हें इतिहासज्ञांस सांगण्याचें कारण नाहीं.

* * *

खुनानीं सुद्धां ज्या लोकांची शांति ढळत नाहीं, ते लोक खरोखर साधुत्वाच्या मुक्त कोटींत भराऱ्या मारणारे असले पाहिजेत. अर्थात गोमांतकीय लोकांनीं अध्यात्मिक शास्त्रांत परीक्षा देऊन पहिलें बक्षीस पटकावलें असलें पाहिजे. जें मिळविण्यास थोर लोक संसारावर लाथ मारून, नाना तऱ्हेनें देह दंडवितात, तें गोमांतकीय लोकांना जन्मतःच प्राप्त झाल्यानें, 'हरिजनाना' त्यांचा हेवाच वाटला पाहिजे, हें उघड आहे. गोमांतका, तुला प्रणिपात असो!

भारतमातेची आळवणी!

(चालः वाजवरे वाळा)

कविः— विनोदराव, मडगांव–गोवा.

उठरे उठ राया। भारतिया। काळ जातसे वाया!॥ ध्रु० ॥
निद्रा सोडोनी। जागोनी। करीं पहारा सदनीं!
दुष्टा ही मदिरा! आलि घरा! पसरवि अंधःकारा!
वीषाचें जाळें। पसरीलें। त्यांत जीव जाळीले!
घालुनि मोहीनी। दुष्टानीं। लोटीलें दुर्व्यसनीं!
निश्चय बाणोनी। ठांसोनी। सद्भावा मनि धरुनि—
घालावा हात। कार्यांत। पीक येत जोमात!
कित्ता वडिलांचा! शुभसाचा! ध्यावयास ध्येयांचा!
परी जुनें–सोनें। न ह्मणणें। उत्तम गुण ते घेणें।
ह्मणती आधार। ज्ञाननर। तुझ्यावरी वा भार!
किति तुज सांगावें। 'बाळा, हें। वेगें कार्या झटणें!

Anuncios

O Bharat, ano 9º, nº 20
7 de Agosto de 1924.
Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.
Numero avulso 1 tanga.

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivao de 2º oficio que este assina, correm editos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos do § 2º do art. 197 do Codigo do Processo Civil, citando a Suriag Esvonta Sinai Odarcar marido da Parvoti Sinainim de Oddar e ora ausente em parte incerta de Bombaim para assistir a todos os termos ate a final do inventario orfanologico a que se procedeu por obito de Anandibai Odorcar que foi de Oddar, sendo inventariante e cabeça de casal Utoma Panduronga Sinai Odorcar da mesma, deduzir, querendo, nele os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento.

E para ser publico se expediu est
Xeldem 3 de Julho de 1924

O Escrivao de Direito do 2º oficio

Aires Manuel Barreto

Verifiqui

O Juiz de Direito

A. A, de Brito e Nascimento

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do Escrivao de 2º oficio que este assina, correm editos de 60 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos do § 2º do artº 197 do Cod. do Proc. Civ. citando os interessados Francisc Xavier Ramiro da Conceiçao Rodrigues e mulher Ignez Monteiro, Antonio Joao Rodrigues, solteiro, maior e Glaudio Abilio Rodrigues, solteiro, maior, todos de Assolna e ora ausentes, sendo o ultimo em parte incerta de Lisboa e os demais em parte incerta de Africa, para assistirem a todos os termos ate' final do inventario orfanologico a que se procede por obito de Ana Florinda Maria Ignez Monteiro e Rodrigues, moradora que foi de Assolna, sendo inventariante e cabeça de casal o seu filho Renato Monteiro Rodrigues, por outro nome Jose Renato Raimundo de Pompeia Rodrigues, da dita e deduzirem querendo nele os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento. Para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de uepem, 24 de Julho de 1924

O Escrivao de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito.
A. A. de Brito e Nascimento

श्री खळनाथ विद्या भुवन

पोंत्रुपें येथें ता. एक आगष्टपासून श्री खळनाथ विद्याभुवन ह्या नांवाची मराठी शाळा स्थापन झाली आहे. तेव्हा सर्व पालकांनीं आपल्या मुलांस शिक्षण देववून शाळा उदयास आणण्याची आकांक्षा धरून मुलें पाठवावींत.

शाळेचेसक्रेटरी
व्यंकटेश धाकू शेणवीं नावेलकर
कृष्ण ग. म. लंवदे

Ano 9 o N. 21
Quinta-feira 14 de Agosto de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias
ANUNCIOS
cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक २१
गुरुवार ता. १४ आगष्ट सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)
जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें—गोवा.

ABAIXO A GREVE!

Nos concelhos das Ilhas, Bardês e Pondá as respectivas camaras *decretaram* umas tabelas de preços para a venda de peixe a peso. A esta medida os vendedores de peixe respondem com a greve que começou no proprio dia 1 de Agosto, dia em que entravam a vigorar as tabelas.

Embora na Metropole, o recurso á greve seja um direito reconhecido pela legislação da Repúblíca, este direito, porêm, não tem sido, felizmente, até hoje tornado extensivo para a India. Aqui a greve é um acto que bem longe está de merecer a protecção do codigo, e, porque assim é, cumpre aos poderes públicos fazer sentir de to dos os modos ao seu alcance, aos grevistas, que o meio proprio de obter o remedio pa ra os males, de alcançar o respeito aos seus direitos, no caso de estes e aqueles sofrerem al guma lesão, é a reclamação, é a queixa, é ainda um protesto mas não a greve.

A *moda* das greves, como tantas outras modas perniciosas, veiu-nos importada da Europa. Aqui, entre nós, apezar de nossa pobreza de nosso tam decantado atrazo, era desconhecida a greve, e ninguem pode contestar que a gente vivia feliz e satisfeita sem essa *conquista do progresso*...

Ultimamente é que surgiram as greves. A primeira, senão estamos em erro, deram nos os lavradores de palmeiras, e foi bem sucedida. Este triunfo levou os comerciantes e industriais de Bardês a ensaiarem as suas forças. Tambem verificou-se que podiam muito. E assim chegamos, num declive perigoso, a ver arvorada a greve numa arma invencivel—Hoje por coisa de nada fala-se em greves. São *greves* de estudantes, dos fornecedores de carne, e até uma vez já esteve iminente a greve dos funcionarios telegrafo-postais.

Ora, sinceramente, urge que o governo e o povo, porque a todos o problema interessa, se esforcem por estrangular o *bicho* á nacença, nunca se esquecendo de que, pelo ocidente que se blasona de civilisado, não existe uma desordem, uma crise, um problema de qualquer ordem que seja, cuja solução não seja embaraçada sempre, impossibilitada, muitas vezes, pela ameaça da greve.

Tenham em vista a historia politica destes ultimos anos da Republica Portuguesa. Estudem a sua historia economico-financeira, que já cheira á tragedia, e não será dificil a um observador mediano descubrir que o direito á greve, a tal *grande conquista* está no fundo de todas as crises. E' ela uma medida ideal, sim, mas para po vos ideais que por ora só encontramos na fantasia dos doutrinarios.

A obra dos governos deve acomodar-se ás verdades de factos, deve ser uma obra positiva. O que nestes ultimos anos a Europa com os seus filosofos e sonhadores teem feito foi uma teía confusa e perigosa que o Mussolini, na Italia, e Primo de Riviera em Espanha, procuram desfazer, talvez em vão!

Sim. A acção dos pescadores tem que ter a sua reacção forte e solida que só pode surgir da união do Governo e do Povo, sob a legenda: *abaixo a greve!*

ECOS & CRITICA

SINAL DOS TEMPOS!

Num breve artigo que dedica ao *Caso Matteotti* a *Terra* de Margao escreve o seguinte:—

«Infelizmente a histo'ria da humanidade e' feita com tantas torpesas! Nem sempre o inocente e' absolvido e o criminoso punido, *por haver julgadores do barro vil de verdadeiros re'os.*"

Nao e' para admirar que *isto* suceda, sabido que nem sempre preside escrupulosa selecçao a' escolha daqueles a quem se confia a sacrcssanta missao de julgar.

Constata se, infelizmente, que ja' vai caindo em desuso o principio que dizia: e' preferivel absolviçao de 100 criminosos a' condenaçao dum so' i nocente.

Sinal dos tempos!

E' TRISTE

Ha geral e ensurdecedor clamor contra a anormalidade de, ha' mais dum ano, nao aparecerem em circulaçao os bilhetes postais.

Isto do elemento oficial nao ligar importancia a' berrata do *ze-'pagante* nao e' nenhuma novidade nesta paca ta terra de *canja* e *arroz-caril*. E' ordem do dia.

Nao somos, por ventura, um povo *conquistado*, sem voz ativa nem passiva?

Se assim nao fora, ha' muito que, de pronto se atenderia a' legitima reclamaçao contra a cro'nica falta de bilhetes postais, reclamaçao de quem deve pagar e nao...*bufar*.

Decididamente, estao semeando espinhos para colher abrolhos!

E' triste!

SEM MAIS NEN MENOS

La' porque o sr. Menezes Bragança se pronunciou hoje a favor da criaçao dos Liceus Municipais que hontem combateu, com manifesto proposito de estar bem com o sr. dr. Couceiro da Costa, entende um nosso colega que tal mudança opinativa do sr. Bragança lhe representa uma cruel expiaçao.

No's porem, lemos por outro breviario. Ca' para no's, o sr. Bragança mudando do seu parecer, a modo de quem muda do seu casaco, amarrotado e sujo, mostrou, apenas, que e' politico, tambem, e de alto coturno, por que a politica nao e' outra coisa se nao uma sciencia que ensina a gente a *virar costas* conforme o vento de interesses do estomago ou da fama.

O director de *O Debate* esta', pois, perfeitamente, dentro do circulo traçado pela politica portuguesa.

Sem mais nem menos.

HONRA LHE SEJA!

A *Provincia* de 4 de Agosto epiloga o seu artigo de fundo da seguinte maneira:

«O sr. Helder Ribeiro cumpriu a lei. A seu favor levantou-se a parte liberal do Paiz que e' a mais numerosa, que e' a mais disposta a dizer aos catolicos—apostolicos — romanos que limitem a sua acçao ao culto, se querem viver socegados a' sombra da Republica.

Senao..."

Este trecho e' do artigo intitulado *Lourdes e a Medicina* com a sub epigrafe de= *O ex-ministro da Instruçao* (Helder Ribeiro) *da' uma merecida censura a' Faculdade de Medicina de Coimbra*=.

Trasladamos para as colunas do «Bharat" o mesmo trecho por afigurar-se nos que ele envolve uma terrivel ameaça ao elemento catolico da Naçao Portuguesa.

Ha tempos e a proposito de umas consideraçoes que um jornal hindu de Margao bordara sobre uma procissao catolica, o jornal do sr. Batalha ameaçava com ferro e fogo o hinduismo, procurando, a seu modo, ser agradável ao catolicismo do Paiz que agora ameaça.

Nao ha' duvida que o sr. Pereira Batalha e' um jornalista dos mais distintos, sabendo a *fina* arte de *se aclimatar* a' toda a sorte de meios politicos...e religiosos!

Honra lhe seja!

BATE CERTO

No Estado Nativo de Rajkot pretende-se matar a industria de espiritos e o vicio de beber vinhos.

Entre no's, e' outro o cantar.

Aqui pensa-se que os espiritos e os vinhos constituem uma especie de gazolina, indispensavel para o funcionamento do automovol — Estado, isto e', do Estado, comparado com um automovel da Comissao de Melhoramentos.

Bate certo.

स्फुट विचार

गोव्याचें राजकरणः— परसत्तेच्या लत्ताप्रहाराचें पर्यवसान गोमांतकीय जनतेच्या स्वाभिमानशुन्यतेंत कसें झालें, याचें दिग्दर्शन आह्मी गेल्या अंकीं केलेंच आहे. याच स्वाभिमानशुन्यतेचा ठसा आमच्या राजकारणांतहि उमटलेला स्पष्ट दिसून आल्यास त्यांत नवल नाहीं. गोमांतक व पोर्तुगाल या दोन्हीं देशांचे देह निरनिराळे असले तरी या उभयतांत एकच राजकीय आत्मा खेळत असल्याच्या ठाम कल्पनेनें राजकारणांत वावरणाऱ्या बहुसंख्यांक लोकांच्या मनांत आपलें ठाणें बसविलें गेल्यानें, स्वदेश व स्वराज्य, स्वत्व व स्वातंत्र्य, या उच्चतम भावनांचा उदय त्यांच्या फिरंगाळलेल्या अतएव मचाळलेल्या मनांत होणें अशक्य झालें व त्यांच्या राजकारणाच्या ध्येयाची व्याप्ति सरकारी मेहरनजरेच्या मवाळ मदतीनें नोकरशाहींत स्वार्थी बढती कमावणें या पलीकडे जाऊं शकली नाहीं. परसत्तेनें आमच्या सांपत्तिक मत्तेचें मातेरें तर केलेंच, शिवाय नीतिमत्तेचाहि फन्ना उडविला, हें, गोव्याच्या राजकारणाच्या इतिहासावरुन, सिद्ध होत आहे.

विनाश काले विपरीत बुद्धिः—गोमांतकीय राजकारणाची इमारत स्वार्थाच्या दूषित पायावर उभारली गेली असल्यानें, स्वराज्यसुंदरीला तींत पूर्ण मज्जाव असावा, हें अर्थात योग्यच आहे. "पोर्तुगालचें स्वराज्य तेंच गोमांतकाचें स्वराज्य, गोमांतकदेश हा पोर्तुगालचाच एक भाग आहे," ही विचारसरणी ठळक अक्षरानीं त्या इमारतीवर फडकत असलेल्या पताकांवर खोदली गेली असल्यानें स्वतंत्रतेची शुद्ध व आत्मोद्धारक हवा तींत न शिरली तर नवल कोण,तें? नवजीवनाच्या सोसाट्याच्या वाऱ्यानें तरी उपरोक्त जुनी इमारत खिळखिळेल, अशी कित्येक आशावादी देशहितचिंतकांस आशा होती; पण तीहि मिनेजीस ब्रागांस व रबेर्त ब्रूत दा कोस्त यानीं, पोर्तुगालांत आपल्या अकलेचे विनाश कालाला योग्यच असे विपरित बुद्धि दर्शविणारे तारे तोडून, सपशेल फोल केली, हें वाचकांच्या स्मरणांतून गेलें नसेल.

स्वभावो दुरति क्रमः— तात्पर्य, गोमांतकीय राजकारण फळाचा स्वार्थाशिवाय दुसरा रसच निघणें परसत्तेनें अशक्य करून टाकलें आहे. इतर देशांतल्याप्रमाणें येथेंहि राजकीय पक्ष आहेत. भेद इतकाच कीं, इतर देशांतील पक्ष देशकल्याणासाठीं आपल्या रक्ताचें पाणी करीत असतात, तर आमचे पक्ष स्वार्थासाठीं आपल्या देशाच्या व देशबांधवांच्या रक्ताचें पाणी करीत असतात! सरकारच्या सहाय्यानें आपलें व आपल्या अनुयायांचें पोट जाळणें, हाच प्रमुख हेतु येथील राजकारणी पक्षानां जन्म देत असतो, असें स्पष्ट विधान केल्यास, तें अतिशयोक्तीच्या दोषास पात्र होईल, असें वाटत नाहीं. स्वार्थ हा आमच्या राजकारणी लोकांचा स्वभावच बनला आहे व याचा अनुभव राजकारणाच्या अगदीं क्षुल्लक गोष्टींत सुद्धां दिसून येत असतो. जी व्यक्ति येथील राजकारणांत शिरुन, स्वार्थमूलक हेतूनें स्वताचे खिसे गरम करीत नाहीं, ती व्यक्ति आमच्या राजकारणी मुत्सद्यांच्या उपहासास सदैव पात्र होत असते. यावरून गोमांतकाच्या राजकारणाची खरी कल्पना आमच्या वाचकांस होईल, अशी आशा आहे.

दुःखांत सुखः— दुःखांत सुख एवढेंच कीं, गोव्याच्या राजकारणास जडलेला हा स्वार्थाचा जुना व भयंकर रोग नष्ट करण्यासाठीं आमचीं हिंदु पत्रें व हिंदु लोक आपली शक्तिसर्वस्व वेंचीत आहेत. पोर्तुगाल सारख्या परकीय राष्ट्राचे लत्ताप्रहार विनब्रोभाट सहन करण्यासाठीं परमेश्वरानें गोमांतक देश निर्माण केला नसून, इतर स्वतंत्र राष्टांप्रमाणेंच स्वातंत्र्याचा पूर्ण उपभोग घेण्याची त्याची योग्यता आहे, असें हिंदु राजकारणाने जगजाहीर करण्याचें धैर्य प्रगट केलें आहे. व आनंदाची गोष्ट कीं, या ध्येयाला कवटाळून धरण्याला कांहीं ख्रिस्ती तरुणहि पुढें सरसावत आहेत. गोष्ट खरी कीं, ह्या तरुणांचें संख्याबल आज अगदीं कमी आहे; परंतु आमच्या चळवळीला सध्या प्रमाणेंच यापुढेंहि स्वाभिमानी नेटाचा टेकू अप्रतिबंधपणें मिळाला गेल्यास, तें संख्याबल फुगत गेल्याखेरीज खास रहाणार नाही, याची खात्री प्रत्येक हिंदूनें बाळगावी.

विचारानें आचार करा! :—माझोडें येथें गेल्या दिवसांमागें कांहीं ख्रिस्ती लोकानीं आपल्या 'क्रोस' दैवताचीं स्तुतिस्तोत्रें गाइलीं. या समारंभास कांहीं हिंदु लोकहि हजर होते, असें कित्येक ख्रिस्ती पत्रांत वाचून मन आश्चर्यानें थक्क झालें! केवळ 'दोन घटका मनोरंजन' करण्याच्या इराद्यानें सदरील 'क्रोस' उत्सवास ते हिंदु हजर राहिले असते तर त्यांची हजेरी घेण्याचें कोणासहि कारण पडलें नसतें; पण वर्तमान पत्रांनीं ज्या रीतीनें उत्सवाची हकीकत प्रसिद्ध केली आहे, त्या रीतीचें सूक्ष्म अवलोकन केल्यास उपरोक्त हिंदूंचा मनोरंजनाशिवाय दुसरा एखादा हेतु होता, असें ध्वनित होऊन, ह्या हेतूंमुळें त्यांचें आचरण आक्षेपार्ह ठरतें. आह्मांला असें वाटतें कीं, जे हिंदु त्या उत्सवांत सामील झाले, ते मुळीं अस्सल हिंदु धर्माचेच नसले पाहिजेत. ते कोणीं तरी ख्रिस्ती लोकांची 'हां जी हां जी' करून आपला तळीराम गार करणारे अधर्माचरणी नुसते नांवाचे हिंदु असावेत, असा आमचा तर्क वहातो. हिंदु धर्माचे खरे चहाते असे एकाएकीं बहकतील, असा समज करून घेण्यास आमचें मन धजत नाहीं. कसेंहि असो, माझोडेंचे हाडाचे हिंदु लोक स्वार्थांध बनलेल्या आपल्या धर्मबांधवांस ताळ्यावर आणण्याचें पुण्य संपादून, ख्रिस्ती टीकाकारांचीं बेमुर्वतखोर तोंडें यापुढें तरी बंद पाडतील, अशी आह्मांस उमेद आहे. कोठेंहि झालें तरी विचारविरहित आचार दोषार्हच मानला जातो.

आवतोनोमीः—"आवतोनोमी" ह्मणजेच ज्याला स्वराज्य या पर्याय शब्दानें संबोधण्याची आह्मांस वाईट खोड लागली आहे त्या आवतोनोमीनें येथें सध्या दोन पक्षांस जन्म दिला आहे. एक पक्ष तिचीं स्तुतिस्तोत्रें गाणारा असून, दुसरा तिच्या अस्तित्वावर एक सारखा टीकास्त्राचे जोरदार प्रहार करणारा आहे. एका पक्षाला आवतोनोमी मान्य आहे तर दुसरा पक्ष, गोमांतकाला ज्या आपत्तीनें संकटांच्या समुद्रांत गटांगळ्या खावयास लाविलें आहे, त्या आपत्तीची सगळी जबाबदारी, आवतोनोमीवर लादण्यास मागें पुढें पहात नाहीं. एका पक्षाच्या मतें गोमांतकांत आवतोनोमी आहे, ह्मणून गोमांतकीयानां दुःख नाहीं तर दुसऱ्या पक्षाचें ह्मणणें, गोमांतकाला वरिष्ट सरकारनें आवतोनोमीचा अहेर केला नसता, तर गोमांतकीयांची स्थिति एकदम इतकी दुःखग्रस्त झाली नसती, असें आहे. एवंच दोन बाइलांच्या दादल्याच्या स्थितीप्रमाणें आमच्या आवतोनोमीची प्रस्तुत कष्टद अवस्था झाली आहे. बाकी आमच्या मतें, ज्या परिस्थितींत सांप्रत आवतोनोमीचा पोरखेळ चालू आहे,त्या परिस्थितीची छाननी केली असतां, आवतोनीमी असली काय किंवा नसली काय, मिळून एकच. ज्या आवतोनोमीच्या कार्यक्षेत्रांत पोर्तुगाल सरकारला मन मानेल तसा धिंगाणा घालण्यास वाव आहे, ती मुळीं आवतोनोमीच नव्हे. ती आवतोनोमीची नक्कलसुद्धां नसून वेअकली लोंकानां राजरोस रीतीनें फसविण्याची ती एक अजब शक्कल आहे. असो. आवतोनोमीचा कोळसा जितका उगाळावा तितका काळाच!

पोर्तुगालची राजकीय परिस्थितिः— पोर्तुगालच्या राजकीय परिस्थितीची तुलना कुत्र्याच्या शेंपुटाशीं केल्यास, अतिशयोक्तीच्या दोषारोपास आह्मीं पात्र होऊं, असें वाटत नाहीं. कुत्र्याचें शेंपूट कितीहि काळ नळींत कोंबून ठेविलें तरी जसें तें आपल्या वांकुडपणाला फांटा देण्याला तयार नसतें, तद्वत पोर्तुगालच्या राजकीय परिस्थितीची हुबेहुब अवस्था झाली आहे. कितीहि खंबीर प्रधानमंडळाच्या नळींत पोर्तुगालच्या राजकीय अस्वस्थतेचें वक्र शेंपूट रिपब्लिकच्या अध्यक्षसाहेबानीं दडपून दिलें, तरी अखेर त्याच्या पूर्व व विकृत स्वरूपांत बदल ह्मणून व्हावयाचाच नाहीं, असें बिनदिक्कत ह्मणण्यास कोणतीच हरकत नाहीं. बाँबचे अत्याचार, जाळपोळ, दंगेधोपे व यत्सम इतर शांतताविघातक गोष्टी रिपब्लिकच्या प्राणप्रतिष्टेपासून तों आज तागायत एकसारखा धुमाकूल घालीतच आहेत. त्यांना कायमचा मोक्ष देणारा महात्मा अजून तेथें कोणीच जन्मलेला नाहीं. प्रधानमंडळाच्या जीविताप्रमाणेंच व्यक्तीचेंहि जीवित क्षणभंगुरतेच्या फेऱ्यांत पक्के गुरफटलेलें असून, घटकेनें परत येण्याच्या इराद्यानें घराबाहेर पडलेला इसम परत आपल्या कुटुंबाला जिवंतपणीं भेटेलच, याची खात्री देणारास खुषाल वेड्याचा हॉस्पिटलांत रवाना करावें. एतावता प्रजासत्ताक राजक्रांतीनें पोर्तुगालच्या राजकीय वातावरणांत उत्पन्न केलेल्या अस्थिरतेचें निर्मूलन करण्यास १३।१४ वर्षांच्या दीर्घ अवधींत नवीन राज्यपद्धतीचे नेते शकले नाहींत, ही दुर्दैवाची गोष्ट होय.

आणखीं एक सत्कृत्यः—डॉ॰ जाइम द मोराईस यांची येथील कारकीर्द अनेक दृष्टीनीं चिरस्मरणीय होईल,यांत संशय नाहीं कारांच्या भयंकर मान्शासारख्या अनेक मत्कृत्यांचें तेज फिकें पडेल ह्मणूनच कीं काय मशारनिल्हे प्रांताधिकाऱ्यानीं दमणला घोड्यांच्या शर्यतीचा लाभ करून देऊन, आपली कीर्ति उज्वल राखण्याचा प्रयत्न केला आहे. लॉटरींच्या मायाजाळांतून एकादा वेडा मुक्त झाल्यास तो अचूक शर्यतीच्या पकडींत सांपडला जाऊन त्याच्या संपत्तीबरोबरच दानतीचेंहि खोबरें व्हावें, असाच या शर्यतेच्या बुडाशीं निःस्वार्थी हेतु नाचत असला पाहिजे कूक–बटलर ॲंड को॰, कलावंतिणी व आंबे इत्याद्यनेक चिजानीं नावांरूपास आलेली आमची मातृभूमि लॉटरींच्याच सुकाळानें आपल्या अनुपमेय लौकिकांत भर घालील असें नसून त्याला दमणच्या शर्यतीचीहि मौल्यवान जोड मिळाल्याचें पाहून, कोणत्या पाषाण हृदयी माणसाचें अंतःकरण कृतज्ञतेनें द्रवल्याशिवाय राहील? खरोखर आमचें भाग्यच ह्मणून पो- हिंदुस्थानाला डॉ. जाईम द मोराईस यांच्या सारख्या लोकहितवादी मुत्सद्यांचा अपूर्व लाभ झाला!

दैवज्ञ–प्रकरणः— मडगांवच्या दैवज्ञ प्रकरणासंबंधीं आह्मांकडे प्रसिद्धीसाठीं अनेक पत्रव्यवहार आले असून, त्यांच्या नुसत्या सारांशानेंहि 'भारता'ची बरीच जागा व्यापिली जाण्याचा संभव आहे. प्रत्येक पत्रलेखकानें आपापल्यापरी त्या प्रकरणाविषयीं विचार वैचित्र्य प्रगट केलें असून, तयार दागिन्याच्या दुकानांविरुद्ध करण्यांत आलेल्या गिल्याचें व हल्याचें समर्थन त्यांपैकीं एकानेंहि केलें नाहीं, हें नमूद करण्यास समाधान वाटतें. तयार दागिन्याचें दुकान कोणीहि खुषाल उघडावें. स्वतंत्रतेच्या या चालत्या युगांत, त्याला मज्जाव करण्यास कोणीहि पुढें सरसावणें ह्मणजे एका पवित्र तत्वाविषयी त्यानें आपली नापसंती दर्शवून जाणून बुजून स्वताला वेडेपणाचा शिक्का मारून घेण्यासारखें अनुचित होय. मडगांवच्या दैवज्ञ–प्रकरणानें उत्पन्न झालेला परस्परांतील द्वेषाग्नी विझून त्यांच्यांत पूर्णैक्य नांदो व त्याची भरभराटी होवो, अशीच भारताची परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

—दमण येथें नवीनच स्थापण्यांत येणाऱ्या घोड्यांच्या शर्यतीच्या मक्त्याचा लिलांव येत्या सप्टेंबर महिन्याच्या २१ तारखेला पुकारला जाणार आहे.

——लोकमान्यांच्या गेल्या चतुर्वार्षिक श्राद्धदिना निमित्त आह्मी लोकमान्यांच्या स्मारकाकरितां ह्मणून स्थापण्यांत आलेल्या सार्वजनिक वाचनालयांना फक्त १ रु. ट. खर्च घेऊन आमचें 'लोकपक्ष' साप्ताहिक पत्र कॉंग्रेस पर्यंत देण्याचें ठरविलें आहे. कर्नाटकांतील साधंत माहितीनें भरलेलें राष्ट्रीय पक्षाचें हेंच पहिलें मराठी साप्ताहिक आहे, असें त्या पत्राचे मॅनेजर कळवितात.

—डिचोली गोवा येथें श्रीशिवतत्वप्रसारक संघ नागपंचमीच्या मुहुर्तावर स्थापण्यांत आला व संघातर्फे श्रीयुत रामराव देसाई यांच्या हस्तें श्री शांतादुर्गा वाचनालय उघडण्यांत आलें.

— डॉ. जाइम द मोराइस हे निजधामास गेल्यानंतर प्रस्तुतचे सेक्रेतारियु दु गोव्हेर्नु डॉ. पेशोतु व्हियेरु यांची गव्हर्नरचे जागीं तात्पुर्ती नेमणूक होणार आहे.

—राजकोट संस्थाननें दारूच्या आयातीला कडक निर्बंध घातला आहे. आणि इकडे तर दारूला राज्यशकटाच्या मोटारचें 'गाजोलीन' मानलें जातें !

—दुष्काळी प्रदेशांतील दारूचीं सर्व दुकानें बंद करण्यांत यावींत, असा ठराव मद्रास कौन्सि-लपुढें येणार आहे.

—सिद्दिक नामक एक मुसलमान आपण चनवसवेश्वराचे अवतार आहोंत, असें सांगून बेळगांवच्या लिंगायतांना चकवित आहेत !

—दे० दास या समवेत त्यांची सहकारिणी वासंतीदेवी याहि विलायतेला जाणार आहेत.

— मि. हजरत मोहानी यांची आगष्टच्या १२ तारखेस येरवड्याच्या तुरुंगांतून सुटका होईल असें ह्मणतात.

— म्हैसूर येथें आंधळे व मुके यांच्याकरितां एक पाठशाळा असून तींत आंधळ्यांना लिहिणें, वाचणें, गाणें व वाजविणें शिकविण्यांत येतें आणि मुक्यांना विणणें, शिवणें वगैरे शिकविलें जातें. हिंदुस्थान सरकार निदान प्रत्येक जिल्ह्यांत एक तरी अशी शाळा उघडील काय?

— बागलकोट येथें भरलेल्या औद्योगिक व शेतकी प्रदर्शनांत श्री. फातर्फेकर यांना आंच्याच्या कलमाच्या कौशल्याबद्दल रौप्य पदक देण्यांत आलें.

— इंग्लंडांतील ट्रेड फॅसिलिटीज ॲक्टच्या अन्वयें तेथील सरकारनें दूध, दहीं ठेवण्याचे व खाण्याचे पदार्थ वगैरेंचा धंदा करणाऱ्या सरकारी सोसायट्यांना पैशाची मदत करण्याचीं योजना प्रसिद्ध केली आहे.

— इटालींत प्रेस ॲक्टाची अमलबजावणी सुरू केल्यामुळें बरींच वर्तमानपत्रें बंद पडलीं.

— चीनमध्यें जलप्रलय होऊन लाखों लोक निराश्रित झाले असून अनेक लोक प्राणास मुकल्याची वार्ता आहे.

–धारवाड जिल्ह्यांतील यमनूरच्या जत्रेंत देवाच्या नांवावर १४।१५ हजार बकऱ्यांचा बळी देण्यांत येत असे; तो जीवदयामंडळीच्या प्रयत्नामुळें चार हजारांवरच आला. अर्थात १०।११ हजार बकऱ्यांचा जीव वचावला गेला, हें उघड आहे.

—वीस वर्षांत पूर्ण दारूबंदी करण्याचें बिल मुंबई–कायदे कैन्सिलांत गेल्या महिन्याच्या ३० तारखेला पास झालें.

—देवी सरोजिनी नायडू या हिंदु–मुसलमानांचें ऐक्य घडवून आणण्यासाठीं सिंध व उत्तर प्रांतांत दौरा काढणार आहेत.

—परलोक विद्या विशारदांची आंतर-राष्ट्रीय परिषद पॅरिस येथें सप्टेंबरच्या २८।२९ तारखांना भरणार असून त्या सभेला हजर राहण्याकरितां रा. ऋषि यांना निमंत्रण दिले आहे.

—आरुमगाह नांवचा बडखोर कुंभकोण प्रांतांत बरेच अत्याचार करीत आहे. त्यानें एका गांवकुलकर्ण्याचा व आपल्या चुलत्याचा खून केला असून त्याच्या हालचालीची वर्दी देणाऱ्यांचा तो खून करीत असतो! त्यास पकडण्याचा प्रयत्न चालला आहे

—नागपूरच्या युनिव्हर्सिटीला इमारती करितां मेसर्स टाटा अँड सन्स यांनीं १ लाख रुपयांची देणगी दिली.

—मद्रास शहरांत ११४१ पुरुष व ६४६ बायका असे एकंदर १७८७ भिकारी असून त्यांत ११९६ हिंदु, ५८४ मुसलमान ८० इंडियन ख्रिश्चन व १ अँग्लो इंडियन अशी वर्गवारी आहे.

एक भयंकर टोळी !

केपें येथील कोमार्कांची सध्या फार चमत्कारिक स्थिति झाली असून, केव्हां कोणावर कसा प्रसंग येईल याचा नेम नाहीं. कांहीं उडाणटप्पू लोकांची एक भयंकर टोळी जमली असून, या टोळीचें मुख्य काम ह्मणजे निरपराधी न निरुपद्रवी लोकांस निर्दयपणें छळण्याचें होय. या टोळींतला एकादा इसम फिर्यादीची कामगिरी पत्करतो, कित्येक साक्षीदारांचें सोंग आणतात व या कपट नाटकाचा शेवट यशस्वी व्हावा या पापी हेतूनें बाकीचे आपल्या पाताळयंत्री सल्यानें आंतून नाटकाचीं सूत्रें हालवीत असतात ! राजरोस रीतीनें 'विजे'च्या प्रकाशांत चालू असलेली उपरोक्त टोळीचीं 'कृष्ण'कृत्यें मानवी न्यायाचे तर धिंडवडे उडवितातच. शिवाय तीं समाजाची नीति बिघडविण्यास प्रमुखत्वानें कारणीभूत होत असतात ! नवीन जन्मास आलेली सदरील टोळी ही पहिलीच नसून, तिच्याच सारख्या टोळ्या यापूर्वींहि येथें निर्माण झाल्या होत्या; परंतु येथील काहीं माजी जड्यांच्या निःपक्षपाती व जोरदार धोरणानें त्यांचा तेव्हांच नायनाट झाला. वेळ येतांच प्रस्तुत टोळीलाहि आपल्या अघोर कृत्यांचा जाब देण्यास यमाच्या दरबारीं गमन करावें लागेलच. पण तोंपर्यंत ती किती निरपराधी लोकांचा बळी घेईल, हें समजणें कठीण आहे. न्यायाच्या वर्तुळाबाहेर एकहि पाऊल न टाकणाऱ्या सभ्य गृहस्थांसच प्रस्तुतच्या सोनेरी टोळीपासून ज्यास्त उपद्रव होण्याचा संभव आहे. असें जरी असलें, तरी सत्पक्षानें आपलें धैर्य खचूं न देतां प्राप्त संकटाशीं दोन हात करण्यास समरांगणांत उभें ठाकलें पाहिजे. दुष्ट लोकांच्या पापी कृत्यांचा घडा भरत चालला आहे, असें आह्मीं कां समजूं नये ! असो. केवळ सार्वजनिक स्वास्थ्याला ती टोळी धोका आणण्याचा कसून प्रयत्न करीत असल्यावरून आह्मांला या विषयाची माहिती स्थानिक लोकांस करून देणें भाग पडत आहे.

Anuncios

O Bharat, ano 9°, n° 21
14 de Agosto de 1924.

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.

Numero avulso 1 tanga.

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 of que este assina, correm éditos de 30 d as contados do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos do § 2° do art. 197 do Cod. do. Proc. Civ. citando Madeva Purxotoma Xete, casado, proprietario e residente em parte incerta de Mudguiry de Karvar do territorio extrangeiro para na qualidade de credor hipotecario inscrito com credito registado a seu favor na importancia de setsentos rupias, assistir a todos os termos da execução por custas que o Digno Agente do Ministerio Publico nesta comarca promove contra Naraina Venctexa Xete e mulher e Santoia Venctexa Xete e mulher, todos de Poinguinim de Canacona, por apenso aos autos de embargos de executado deduzidos por este á execuçao hipotecaria contra eles instaurada por Ramachondra Madeva Achári, de Portagale de Canacona e deduzir querendo nela os seus direitos. E para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de Quepem, 2 de Agosto de 1924.

O escrivão de direito do 2° oficio.

Aires Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito
A. A de Brito e Nascimento

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do Escrivao de 2° oficio que este assina, correm editos de 60 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos do § 2° do art° 197 do Cod. do Proc. Civ. citando os interessados Francisco Xavier Ramiro da Conceiçao Rodrigues e mulher Ignez Monteiro, Antonio Joao Rodrigues, solteiro, maior e Glaudio Abilio Rodrigues, solteiro, maior, todos de Assolna e ora ausentes, sendo o ultimo em parte incerta de Lisboa e os demais em parte incerta de Africa, para assistirem a todos os termos ate' final do inventario orfanologico a que se procede por obito de Ana Florinda Maria Ignez Monteiro e Rodrigues, moradora que foi de Assolna, sendo inventariante e cabeça de casal o seu filho Renato Monteiro Rodrigues, por outro nome Jose Renato Raimundo de Pompeia Rodrigues, da dita e deduzirem querendo nela os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento. Para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de Quepem, 24 de Julho de 1924

O Escrivao de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

श्री रवळनाथ विद्या भुवन

पोंब्रुर्पे येथें ता. एक आगष्टपासून श्री रवळनाथ विद्याभुवन ह्या नांवाची मराठी शाळा स्थापन झाली आहे. तेव्हां सर्व पालकांनीं आपल्या मुलांस शिक्षण देववून शाळा उदयास आणण्याची आकांक्षा धरून मुलें पाठवावींत.

शाळेचेसक्रेटरी
व्यंकटेश धाकू शेणवी नावेलकर
कृष्ण ग. म. लंवदे

Ano 9º N.º 22

…ta-feira 21 de Agosto de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
…linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
J. P. Kegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक २२

गुरुवार ता. २१ आगष्ट सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा.

DE RELANCE...

INSPECÇOES EM BICHOLIM

No nosso distinto colega "A terra„ aparece sob a epigrafe "Uma gazeta" o seguinte, cujo criterio apoiamos calorosamente:

"De curioso fomos ler o ultimo numero da "Gazeta da Relagao de Nova Goa".

Lemos o Acordao do Conselho Colonial sobre o recurso do funcionario de fazenda sr. Caetano de Albuquerque. Nao nos espantou, porque a "Gazeta" vem publicando decisoes e arestos. Notamos, porem, que em nota a' redacçao condenava a posterior nomeaçao do sr. Albuquerque para um lugar da Caixa de Credito.

Ficamos entao sabendo que a "Gazeta" passava a ser jornal com esfera mais ampla do que aquela que pelo seu caracter lhe compete—ja' se mete na administraçao publica.

Conviria que de'sse o seu parecer sobre todas as nomeaçoes ilegais e abonos inverossimeis de transportes por causa de inspecçoes do Registo Civil em Bicholim e se manifestasse francamente uma "gazeta politica," contra o programa que se propo's.

—Ca' vao os nossos votos. E vamos de curioso, ler os estatutos da Gazeta."

E' UM CONSELHO...

No ultimo numero da apreciada revista dos novos *A Patria* vem uma aguarela interessante, traçada em linhas cuidadas, em que o conhecido cultor das letras indo-portuguesas sr. Nogar Prudente Lourenço pinta o "Manilheiro", um tipo tam popular e tam atraente da nossa terra.

Bem sabemos que o sr. Nogar dispensa os elogios nossos, mas no's se nos referimos ao trabalho do mesmo e' para chamar a atençao dos novos que colaboram na revista, para o repositorio inexgotavel e impressionavel co *fol-crore* indiano, onde os rapazes podem ir com mais proveito e mais originalidade tirar os motivos para os ensaios literarios, do que reproduzindo as *coisas sabidas* sobre a Inquisiçao, e sobre os ateus que morrem na mao de Deus, na sua mao direita.

E' um conselho, rapazes, e sincero.

APO'S A ABERTURA DA LOTARIA DE MAPUÇA'

FALA UM BARDEZANO

Snr. Director!

Dias de anciedade e de tristeza foram êsses que antecederam á abertura da Lotaria do meu Concelho.

Mais uma vêz se viu a impáfia ser abatida pela eloquencia esmagadora dos numeros e ruir o castelo de cartas engendrado pelas *grandes cabeças financeiras* que querem avançar demais sem primeiro lançar umas bases sólidas, onde erigir o edificio do seu ideal.

Sucedeu o que tinhamos previsto no seu apreciado jornal e se não fosse o nosso rebate, a Lotaria estaria irremediavelmente perdida. Se não foi um desastre, não se atingiu também um triunfo que o povo de Bardês tinha o direito de obter, dadas as tradições mantidas em todos os momentos da sua história cívica. Mas os bardezanos não teem de se envergonhar pelo fiasco da lotaria, pois as responsabilid des cabem únicamente áquele que procurou conglobar em si todas as funcções e atribuições e apesar de longos seis mezes não conseguiu colocar nem metade de cautelas.

Rialmente a *direcção* do sr. dr. F. Ribeiro estava para se sumir e com êle o nosso pundonor mas em frente da vergonha que nos ia encher vimos pessoas sem olhar canceiras nem fadigas, redobrarem de esforços para nos salvar da calamidade iminente! E assim, entre outros, os srs. F. Mascarenhas, J. Menezes, N. Sequeira, o adv. C. F. Saldanha, João Mariano de Almeida, dr. Millot Faria, o farmacêutico F. A. de Noronha e principalmente o administrador deste Concelho sr. P. J. Gomes foram os verdadeiros salvadores da Lotaria, sem os quais a *alma da direcção* teria vendido a alma da Lotaria e do Asilo ao diabo.

Sem embargo deste concurso de pessoas cheias de dedicação e boa vontade pelo Asilo nada menos de quarenta mil cautelas ficaram, segundo nos consta, sem serem vendidas e crêmos que o calculo é quasi exacto a calcular pelo montão de bilhetes que se via na mesa da Direcção no dia da abertura da Lotaria, montão que valia por uma prova mais flagrante e incontestavel da inaptidão do sr. dr. F. Ribeiro.

Não sabemos se a lotaria deixará lucros, mas mesmo que apresente algumas mil rupias a favor do Asilo, bem longe está o dia em que o sr. dr. F. Ribeiro, ávido de uma glória falsa consiga construir o Hospital, sem medir o alcance do seu plano traçado confiando em miragens que só nos trarão vergonha e ruina!

Era inadiavel e de máxima necessidade que todos os bilhetes da Lotaria fossem vendidos e que neste ensaio a casa fôsse acreditada, o que certament seria se não fosse o silencio propositado e o *plano prudente* do sr. dr. Ribeiro em ocultar tudo para emfim andar em piruetas á aproximação do fiasco.

Depois de tantas lutas e esforços e gastos, os lucros do Asilo serão tão grandes como os seus *mirabolantes planos*, e *promessas* dos fantasistas.

E nem calculamos o que seria da Lotaria se o primitivo plano de quinhentas mil cautelas fôsse aprovado! A catastrofe seria irremediavel se o sr. governador geral, dr. Jaime de Morais não entravasse de pronto o *vôo funambulesco* a que se entregara a *alma* da direcção.

Antes do plano e post-plano aqui ninguem foi consultado e o seu resultado é o que estamos a vêr—um completo desapontamento.

O sr. dr. Ribeiro na ancia de reter tudo nas suas mãos julgou-se capaz de arcar com todas as dificuldades e encontrou-se á ultima hora num labirinto,—tal era a amarga rialidade dos factos e dos números.

Neste transe terrivel houve um sossobro tamanho que muitos não hesitaram, perante o sacrificio, de revender cada cautela @ de 14 e até 12 tangas, sofrendo a diferença com o fim de salvar o Asilo.

Perante o resultado da primeira lotaria que foi pouco satisfatorio por culpas que aos bardezanos não se podem imputar, não sabemos o que pensa a Direcção no que diz respeito á construcção do Hospital. Quanto a nós nem vale a pena desde já meter-se em tais assados sem dantemão preparar os fundos suficientes para a manutenção do mesmo e andar muito confiado em Lotarias, dada a oposição dos patriotas da India Inglêsa.

E' verdade que todos se interessam pelo alto ideal de bem comum, mas aquêle que procura levar avante um fim público ás escuras, não pode inspirar confiança e só irá afugentar intenções puras e bemfasejas.

गतो याबद्दल भगवान सांगतात—

परित्राणाय साधुनां विनाशाय च दुष्कृताम्।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥

"साधूंच्या संरक्षणार्थ आणि दुष्टांचा नाश करण्यास युगीं युगीं, धर्मसंस्थापनेसाठीं मी जन्म घेत असतों."

वरील श्रीकृष्ण पूर्वकालिन परिस्थितीकडे लक्ष्य दिलें असतां या महात्म्यासारखी कोणती तरी एकादी विभूति पाहिजे होती व हें कार्य श्रीकृष्णाकडून झालें याचमुळें त्या महात्म्याचें आपण पूजन करणें इष्ट आहे. श्रीकृष्ण कालाकडे नजर फेकल्यास नुसत्या धार्मिक बाबतींतच नव्हे तर इतर बाबतींत सुद्धां या महात्म्याची अत्यंत आवश्यकता होती. भारतवर्ष त्यावेळीं ऐश्वर्याच्या शिखरावर होता व ह्या ऐश्वर्यमदाचा परिणाम बऱ्याचशा राजांवर झालेला होता. कंस, जरासंध, नरकासूर वगैरे राजे मदोन्मत्त होऊन आपल्या प्रजेवर अत्याचार करूं लागले होते. त्याचें पारिपत्य करणारा कोणी तरी पाहिजे होता व हें कार्य श्रीकृष्णाकडून पार पडलें हें श्रीकृष्ण चरित्र वाचकांस अवगत आहेच.

श्रीकृष्ण ही एक जगांतील थोर व सर्वगुणसंपन्न विभूति होती. श्री कृष्णानें सर्व शास्त्रांचा व अस्त्रांचा अभ्यास केलेला होता. त्या काळीं श्री कृष्णाशीं तुलना करणारी दुसरी कोणतीच व्यक्ति नव्हती. सभापर्व अ. ३८ मध्यें भिष्म सांगतातः "कृष्ण वेद व वेदांगें जाणणारा आहे, तसेंच त्यांच्यामध्यें सर्वांपेक्षां ज्यास्त बळ आहे, या जगांतील मनुष्यामध्यें श्री कृष्णापेक्षां दुसरा कोण श्रेष्ठ आहे?". या वरून श्रीकृष्णाच्या श्रेष्ठत्वाची कल्पना होईल. आज कांहीं जण श्रीकृष्णाची तुलना बुद्ध किंवा खिस्त यांच्याशीं करतात. परंतु ही तुलना करतानां त्यांनीं एक मुद्दा लक्षांत घेणें जरूरीचें आहे. तो हा कीं, ह्या दोनहि व्यक्ति संसाराविषयीं अत्यंत उदासीन होत्या. संसारांत राहून मोक्ष मिळवितां येतो हें तत्वें, त्यांना मान्य नव्हतें. बुद्धानें आपल्या बायकोला व मुलाला सुद्धां भिक्षूची दीक्षा दिलेली होती. खिस्ताचेंहि मत तेंच होतें. एकदां त्यांना एका श्रीमंत सावकार पुत्रानें मोक्षाचा मार्ग कोणता, हा प्रश्न करतांच त्यानें सर्व संपत्ति गरिबानां देऊन माझ्या मागें ये ह्मणजेच मोक्ष मिळेल असें उत्तर दिलें होतें. तो असें ह्मणत असे कीं, एकादा उंट सुईच्या नेढ्यांतून पार जाऊं शकेल. परंतु देवाच्या राज्यांत श्रीमंताचा प्रवेश होणें शक्य नाहीं. या वरून यांचीं मतें संसाराविषयीं उदासीन होतीं. त्याच्या हातीं जर राज्यकारभार दिला असता तर तो चालवितां आला असतां कीं काय याची शंका आहे. याच्या उलट श्रीकृष्णाचें होतें तो जसा धर्मशास्त्रांत पारंगत होता तसाच व्यवहारांतहि निपुण होता. आणि ह्मणूनच त्यानें मोक्षाचा मार्ग ह्मणजे संसारांत राहून निष्काम कर्म करणेंच होय असें सांगितलें व या निष्काम कर्मयोगाचेंच महत्व त्यांच्या गीतेंत सांगितलेलें आहे.

अशा या थोर विभूतीच्या चारित्र्यावर निरनिराळे आरोप केले जातात. ते सर्व निराधार आहेत. त्यांतील बऱ्याचशा मुद्यांचें आह्मीं गेल्या वर्षी खंडण केलेलें आहे. या विषयीं सविस्तर माहिती सुप्रसिद्ध बंगाली साहित्यसम्राट बंकिमचंद्र यांच्या श्रीकृष्ण चरित्रांमध्यें आहे. जिज्ञासूंनीं त्याचा मराठी अनुवाद अवश्य वाचावा अशी आह्मीं शिफारस करतों. श्री कृष्णचरित्र अत्यंत निष्कलंक व थोर आहे. श्री कृष्णानें आपल्या चरित्रावरून संसारांत राहून इतकेंच नव्हे तर उत्तम प्रकारचा संसार करून मोक्ष मिळवितां येतो, या मोक्षाकरतां कपड्यांना रंग फासून अरण्यांत जावयाची गरज नाहीं, हें दाखवून दिलेलें आहे ह्मणून त्याच्या तत्वज्ञानाची थोडीशी चर्चा करून हा विषय पुरा करूं.

हें तत्वज्ञान आपल्याला गीतेच्या रूपानें लाभलेलें आहे. कांहीं विद्वानाच्या मतें आज जी गीता आपणा पुढें आहे ती श्रीकृष्णानीं सांगितलेली नसून ती नंतरची आहे परंतु गीतेंत जें तत्वज्ञान सांगितलेलें आहे तें मात्र श्री कृष्णाचें, याबद्दल कोणाचाच मतभेद नाहीं. गीता ग्रंथाचें तत्वज्ञान किती थोर आहे हें आह्मीं सांगण्याची जरूरी नाहीं आज जगामध्यें शास्त्रीय स्वरूपाशीं मेळ घालणारा असा कोणता धर्मग्रंथ असेल तर गीतेकडेच बोट दाखवावें लागेल व ह्मणूनच जगांतील बहुतेक सर्व भाषांमध्यें या ग्रंथाचे अनुवाद झालेले आहेत. असो.

समाजाचें सूक्ष्म दृष्ट्या निरीक्षण केल्यास असें दिसून येईल कीं, चांगल्या कर्माचें फळ नेहमीं चांगलेंच येतें असें नाहीं. धर्मानें वागणाऱ्या लोकांवर नेहमी संकटें येतात तर अधर्मानें वागणारे, दुसऱ्यानां लुबाडणारे अनीतीचा प्रसार करणारे हेच नेहमीं सुखी असतात. तेव्हां याचा मेळ कसा घालावा हा प्रश्न विचारी लोकांपुढें असतो. प्रश्न आजचाच आहे असें नाहीं तर हजारों वर्षांपासून थोड्या फार प्रमाणानें हीच स्थिति होती. महाभारतांत ह्या विषयीं एक मजेदार संवाद आहे. " आपले पति नेहमीं धर्मानें वागत असतां त्यांच्यावर संकटाचे पूर येतात. व दुर्योधन हा नेहमीं अधर्मानें वागत असतां त्याच्या पायांशीं ऐश्वर्य लोळत असतें तुमच्या धर्माचरणाचा फायदा काय?" या द्रौपदीच्या प्रश्नाला तेव्हां धर्मराजानें उत्तर दिलें: " आर्ये, धर्मापासून मला फळ प्राप्त व्हावें अशी इच्छा मनांत धरून मी धर्माचरण करीत नाहीं, तर हे कृष्णे, फळ असो किंवा नसो, पुरुषांचें जें कर्तव्य विशेषतः गृहस्थाचें तें मी यथाशक्ति करीत असतों. फलासाठीं धर्म करावा असा मी धर्माचा विकरा करीत नाहीं "

हा मुद्दा विशद रीतीनें भगवंतानीं आपल्या गीतेंत सांगितला आहे. ते ह्मणतात:—

कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ॥
मा कर्मफल हेतु र्भुमा ते संगोऽस्त्व कर्मणि ॥

"कर्म करण्या पुरताच तुझा अधिकार आहे. फल केव्हांहि तुझ्या अधिकारांतील नाहीं. अमुक फल मिळावें असा हेतु मनांत धरून काम करणारा होऊं नकोस आणि कर्म न करण्याचाहि तूं आग्रह धरूं नकोस", हा संदेश देऊन भगवान सांगतात: "बाबानो तुह्मीं सदासर्वदा कर्मरत रहा; कर्माशिवाय जग चालणें शक्य नाहीं. पृथ्वी, आप, वायु, तेज, हीं सर्व महाभूतें आपापलीं कर्में करीत आहेत. कर्माचा त्याग करूच अरण्यांत जाण्यांत कोणताच पुरुषार्थ नाहीं. अरण्यांत गेलों तरी कर्म थोडें बहुत केलेंच पाहिजे. करतां संसारांत राहून इंद्रिय जय करा, मन ताब्यांत ठेवा, मनाचा निग्रह करा. हाच मोक्ष आहे. फळाची आशा धरूं नका. फळ मिळो अथवा न मिळो. जें ज्या परिस्थितींत योग्य आहे, जें कर्तव्य आहे, तें सदैव करीत रहा. फळ न मिळालें तरी खचूं नका कारण

नियतं कुरू कर्मत्वं ज्यायो ह्य कर्मणा ॥
शरीर यात्रापि च ते न प्रसिद्धेद कर्मणा ॥

(तुझ्या धर्माप्रमाणें) नेमलेलें कर्म तूं कर कारण कर्म न करण्यापेक्षां कर्म करणें हें अधिक चांगलें होय. खेरीज [असें पहा कीं कर्म न केलेंस तर [खायाला न मिळतां) तुझा शरीरनिर्वाह सुद्धां चालणार नाहीं.' या श्लोकावरून भगवंताचा कर्म करण्याबद्दल लोकांना किती आग्रह आहे हें कळून येईल. कर्म केल्याशिवाय कांहीं होणें शक्य नाहीं. तुमचा जर उद्धार व्हावयास पाहिजे तर तुह्मीं रात्रंदिवस कर्मरत रहा, ह्मणजेच तुमचा उद्धार होईल. तुमचा उद्धार कोणी करणारा नसून तुमचे तुह्मींच उद्धारक आहांत.

उद्धरेदात्माना नात्मानमवसादयेत ॥
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥

आपणच आपला उद्धार करावा, आपणच आपल्या स्वतःला (कधींहि) खचवूं नये. कारण (प्रत्येक मनुष्य) आपणच आपल्या स्वतःचा बंधु (ह्मणजे मदत करणारा) किंवा आपणच आपला शत्रू ह्मटला आहे. भगवान सांगतात कीं, स्वतःच्या पायावर उभे रहा, धीर खचूं देऊं नका, स्वावलंबनाचा मार्ग अवलंबन करा, परावलंबी होऊं नका, स्वताच्या हिंमतीवर कार्य करा. धीर खचूं देऊं नका. हिंमत धरा व कार्य करा. असें केल्यानें तुमचा उद्धार होईल. स्वतःचा उद्धार स्वतःच केला पाहिजे, दुसरा कोणी करणारा नाहीं हें लक्षांत ठेवा, ह्मणजे तुमची उन्नति होईल.

आपण श्रीकृष्ण जयंति करतों, भगवद्गीतेचें पठन करतों; परंतु श्रीकृष्णाचा कर्मयोग आपल्या आचरणांत अद्याप आलेला नाहीं. आपल्या राष्टाला आज याच महात्म्याच्या उपदेशाची गरज आहे. हाच उपदेश आपल्याला मार्गदर्शक होईल. या करतां हा सण राष्ट्रीयदृष्ट्या साजरा करणें आवश्यक आहे. प्रत्येक गावांत या दिवशीं एक सार्वजनिक रीत्या हा सण साजरा करून त्या दिवशीं श्रीकृष्णचरित्राचें महत्व -कर्मयोगाचा उपदेश- लोकांच्या मनांत बिंबेल असें केले पाहिजे. ह्याच महात्म्याच्या उपदेशानें आपल्या राष्ट्राचें कल्याण होइल. निवळ पूजेनें कांहीहि होणें शक्य नाहीं हें सांगून व श्रीकृष्णाला वंदन करून हा विषय पुरा करतों.

मेघराजाची लीला

कालिकत (मद्रास) महापुरामुळ १२ मनुष्यें मृत्युमुखीं पडलीं व सुमारें ५० लाख रुपयांचें नुकसान झालें. कावेरी नदीवरील एरोडचा पूल मोडला. ह्मैसूरसंस्थानांतील होनपूर खेडेगावांतील सर्व घरें वाहून गेलीं. कोइंबतूर जिल्ह्यांतील गोबी तालुक्यांतील ६ खेड्यांतील १८०० घरें, भवानी तालुक्यांतील ३०० घरें, अवानशी तालुक्यांतील ३०० घरें, जमीनदोस्त झालीं. एर्नाड तालुक्यांतील एक डोंगराचा कडा कोसळून त्या खालचें एक खेडेगांव गडप झालें. कडा कोसळण्यापूर्वीं बराच मोठा आवाज झाला. या मुळें त्या खेड्यांतील लोक आधींच बाजूला झाले होते. तरी दोन मुलें त्यांत मरण पावलींच ! पोनानींनांवचें खेडेगांव पुराच्या पाण्यानें वाहून गेलें. अमदाबाद येथें गुजराथ जिनिंगमिल अकस्मात कोसळून पडून त्या खालीं ६० माणसें गडप झालीं व २९ लोक जखमी झाले. तुंगभद्रा नदीच्या पुरामुळें नदीवरील पुलाच्या कमानी वाहून गेल्या व हरिहर गावांतील २०० घरें जमीनदोस्त झालीं. शोरनूर (मद्रास) जवळ असलेली मुलांची शाळा कोसळून त्याखालीं ९ शिक्षक व ६४ विद्यार्थी सापडून मरण पावले.

ब्रिटिश न्याय!!!

केसरी पत्रांचे संपादक श्री. न. चिं. केळकर यांनीं ता. ६।५।२४ च्या केसरीच्या अंकांत टीकात्मक स्फुट लेख लिहून हायकोर्टाची बेअदबी केली या आरोपावरून त्यांजवर निघालेल्या नोटिशीचा खटला गेल्या ता. ७।८ रोजीं मुंबई हायकोर्टांत न्या० मू० सर मार्टिन व न्या० मू० किंकेड यांजपुढें चालून श्री. केळकर यानीं सदर अपराधाबद्दल ५००० रु. दंड व २०० रु. कोर्टखर्च द्यावा असा निकाल सांगण्यांत आला. 'विनोद' कर्त्यांवर याच बाबतींत नोटीस निघाली होती. त्यास या कामीं १५०० रु. दंड होऊन २०० रु. कोर्टखर्च द्यावा असा निकाल देण्यांत आला. व सदर पत्राचे मुद्रकास १०० रु. दंड झाला.

अस्पृश्योद्धार

अस्पृश्योद्धाराच्या कार्यासाठी कलकत्ता येथील मारवाडी लोकांनीं ६०००० रुपये लाला लजपतराय व पं. मालवीय यांच्या स्वाधीन केले आहेत. व बिडला ब्रदर्स व लाला रघुनाथ यांच्याकडून प्रत्येकीं दरमहा २५०० व १००० रुपये स्वामी श्रद्धानंदाच्या हवालीं केले जातात.

गांधींचा दौरा

महात्मा गांधीजींचा दौरा सिंध प्रांतीं असतांना नवाबादची कांग्रेस संस्था त्यांस २५००० रुपयांची थैली अर्पण करणार आहे.

गोमांतक हिंदु विद्यार्थी मंडळ

गोमांतक हिंदु विद्यार्थि मंडळ या संस्थेचा पहिला वार्षिक समारंभ या महिन्याचे १४ तारखेला नारळी पौर्णिमेच्या दिवशीं मोठ्या थाटानें व अपूर्व यशस्वी रीतीनें पार पडला. सतत एक वर्ष पर्यंत धिमेपणानें बिनबोभाट व उत्कृष्टपणें आपलें उद्दिष्ट कार्य करीत असलेल्या या संस्थेची माहिती, तिच्या वार्षिक उत्सवानिमित्त जाहीर आमंत्रण देण्याच्या अगोदर फारच थोड्यानां माहीत होती. संस्थेचें अध्यक्षस्थान श्री. यशवंत मं. लाड यानीं मंडित केलें होतें. कार्यक्रमापैकीं ईशप्रार्थना, स्वागतपर भाषणें व पदें, वार्षिक अहवाल वाचन, भावबंधन व संशय कल्लोल नाटकांतील एकेक प्रवेश, गाणें, उपहार कीर्तन व कॉफीपान हे प्रमुख विषय होते. या समयीं संस्थेच्या ध्येयास व कार्यास अनुसरुन न्यायशास्त्री भवानी शंकर सुखठाणकर श्री य. मंगेश लाड इत्यादिकांचीं बोधपर भाषणें झालीं. परस्पर स्नेहवर्धन व एक मेकांच्या सहाय्यानें वाङ्मय प्रदेशाचें आक्रमण करणें हें या संस्थेचें ध्येय असून त्यास अनुसरुन आजपर्यंत जें कार्य या मंडळाच्या हातून व्याख्यानाच्या व द्विमासिक “ गोमांतक हिंदु विद्यार्थी ” या रूपानें झालें तें अवर्णनीय झालें असेंच ह्मणावें लागतें. प्रस्तुत हें मासिक आर्थिक मदतीच्या अभावीं हस्त लिखितांनूनच प्रसिद्ध होत असतें. धि गोवा हिंदु असोसियेशनशीं या मंडळाचा अर्थाअर्थी कांहीं एक संबंध नाहीं. व्यर्थ भाराभर-चिंध्या या दृष्टीनें एक संस्था बरोबर चालत नसतानां यांतच दुसऱ्या संस्थेची भर पडली, ही गोष्ट खेदजनक असली तरी त्या संस्थेच्या संपर्काभावीं या मंडळाचें ध्येय अविकृत राहिलें व त्यामुळें एकंदर कार्य व सम्मेलन शिस्तवार व व्यवस्थेशीर झालें याबद्दल आनंद झल्यावांचून रहात नाहीं. एकाच गोमांतकीय जनतारूपी मातापितरांचीं हीं दोन्हीहि लेंकरें असल्यामुळें दोन्ही संस्था एकमेकांच्या धीरावर स्वतंत्रपणें आपलें अवतार कार्य उत्कृष्ट प्रकारें बजावून, गोमांतकीय जनतेच्या अंतःकरणांत असूया, अहंकार व परमतासहिष्णुता इत्यादि अज्ञानरूपी अंधःकाराचा नाश करुन तेथें परस्पर सहानुकंपा व एकी यांचें तेज फैलावतील अशी पूर्ण आशा आहे. तसेंच “ धि गोवा हिंदु असोसिएशन ही संस्था ज्या कारणामुळें कमी कार्यक्षम झाली त्या कारणांचा सूक्ष्मपणें अभ्यास करून ही संस्था आपलें कार्यक्षेत्र ज्ञानप्रकाशांत आक्रमण करील असें गेल्या संम्मेलनांत दिसून आलेल्या एकंदर सभासदांच्या अहंभावाभावीं कार्य करण्यांत तदाकार झालेल्या वृत्तीवरुन ह्मणण्यास हरकत नाही. ह्मणून त्यानां माझें अंतःकरणपूर्वक असें सांगणें आहे कीं, अहंकार बाजूला ठेऊन ‘ चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती ’ या तत्वानुरूप चोख वर्तन जोंपर्यंत त्यांच्या हातून होईल तों पर्यंत त्यांची क्रियाप्रतिक्रिया या न्यायानें उत्तरोत्तर भरभराटच होईल. जगचालक या संस्थेस दीर्घायु करो.” असें एक सम्मेलनास हजर असलेला निमंत्रित कळवीत आहे.

+ एकाच ध्येयाच्या एकाच शहरीं एकाच तऱ्हेच्या लोकांकडून अनेक संस्था स्थापिल्या जाणें हें एका दृष्टीनें प्रगतिवृद्धीचें चिन्हच आहे. मात्र या अनेक संस्थांचे परस्पर संबंध प्रेमशृंखलेनें निगडीत असले पाहिजेत. उलट पक्षीं उपरोक्त संस्थांच्या अनेकत्वाच्या बुडाशीं द्वेश, हेवा किंवा याचसारखी दुसरी कोणतीहि क्षुद्र मनोवृत्ति गुप्त अथवा प्रगट स्वरूपांत खेळत असेल तर तें अनेकत्व प्रगति ऐवजी अधोगतीच प्रसवेल, हें उघड आहे. गोमांतक हिंदु वि. मंडळ ही संस्था प्रेमाच्या शुद्ध व पवित्र पायावरच उभारली गेली आहे, असें मानण्यास आह्माला भरपूर जागा आहे.

सं. भारत

बाल वाचन मंदिर, नवीन--गोवें

ही संस्था इतर कोणत्याहि संस्थेच्या विरुद्ध नसून उलट शिक्षण प्रसारानें किंवा इतर कोणत्याहि उपयुक्त मार्गानें देशसुधारणेला मदत करणाऱ्या सर्व संस्थांशीं प्रेमभावानेंच वागणारी एक बाळगोपाळांची संस्था आहे. तिच्यांत दोषांचा लवलेश नाहीं, असें चालकांचें ह्मणणें नाहीं. नावांप्रमाणें ती ‘बाल’ असल्यामुळें ‘बालां’च्या या मंदिरांत पुष्कळ सुधारणा करण्यासारख्या असतील. अशी खरी वस्तुस्थिति असतां, कित्येक विघ्न संतोषी लोकानीं जो मंदिराविरुद्ध भलभलत्या व निराधार आरोपांचा मारा सुरू केला आहे, तो कोणत्याहि दृष्टीनें समर्थनीय नाहीं. उदाहरणार्थ “मंदिर, सरस्वति वाचन मंदिर व मुष्टिफंड संस्था यांच्या विरुद्ध आहे” असा गैरसमज पसरविण्याचा जो कोणी उपद्व्याप केला, तो सपशेल खोटा असून, द्वेषबुद्धीखेरीज त्याला दुसरा कोणताच आधार नाहीं. मुलांच्या बुद्धीचा विकास होऊन, त्यांची नीतित्तमा सुधरली जाण्यास प्रयत्न करणाऱ्या संस्थेला इतर संस्थेशीं तेढ वागविण्याचें कोणतेंच कारण नाहीं, हें उघड आहे. इ. इ. उपरोक्त संस्थेचे अध्यक्ष श्रीपाद नारायण कोल्वाळकर व सेक्रेटरी विष्णु गणेश कामत कळवून संस्थेस सिनेमाच्या एका खेळाचें उत्पन्न अर्पण केल्याबद्दल रवळू बळवंत देशपांडे यांचे आभार प्रदर्शित करतात.

× बालमंदिराचें ध्येय देशहिताला पोषक असल्यानें मंदिराला देशहितप्रेमी गृहस्थानीं हातभार लावणें सर्वथैव योग्य आहे, ही येथें निराळी शिफारस करण्याचें कारण नाहीं.

सं भारत

— त्रावणकोर संस्थानांतील कायदे कौन्सिलनें प्राथमिक शाळांतील शिक्षणक्रमांत सूत काढण्याचा सक्तीचा विषय ठेवावा असा ठराव केला असून त्यास संस्थानच्या सरकारनेंहि आपली संमति दिली.

वर्तमानसार

— सर मालकम हेले साहेबानां मानपत्र देणें आपल्याला पसंत नाहीं, असें अमृतसरच्या मुसलमानांनीं ठरविलें आहे.

— लखनौ जिल्ह्यांत अमेथी येथें ता. १२ रोजीं कांहीं मुसलमान लोक जबरदस्तीनें एका हिंदू देवालयांत शिरले. त्यामुळें हिंदू-मुसलमानांत साधारण चकमकी उडाल्या. त्यायोगानें तेथील परिस्थिती उग्र झाली आहे.

— अमृतसरमध्यें खिलाफतवाले व इतर मुसलमान यांमध्यें मोहरमचा सण करण्याच्या बाबतींत खटका उडाला.

— ता. १२ रोजीं मौ. हजरत मोहानी यांस येरवडा जेलमधून आणून मुंबईच्या भायखळ्याच्या हॉऊस ऑफ करेक्शनमध्यें ठेवण्यांत आलें होतें. ता. १३ रोजीं बोरीबंदरवर आणून सोडून देण्यांत आले. पंजाब मेलनें ते कानपूरकडे गेले.

—जुवांव कामोयेजस यांची नेमणूक येथील गव्हर्नरचे जागीं होणार असून, डॉ. जाईम द मोराइस हे आंगोलचा अधिकार गाजविणार आहेत, असें कळतें. येथील गव्हर्नरचे जाग्याला आतांपर्यंत पुष्कळांचीं नांवें सुचविण्यांत आलीं; अखेर कोणाची निवड होईल ती खरी !

—पावसाळ्यानंतर मुंबईहून येणारी पहिली बोट येत्या महिन्याच्या ७ तारखेला तेथून निघेल.

— पणजीच्या प्रोव्हींस पत्रानें कुंडईचे श्रीमंत संतश घनःश्याम शेणवी यांचा फोटो प्रसिद्ध केला आहे.

—अखेर मासळीविक्या लोकांचा संप मोडला जाऊन, ‘ जळशाके’च्या भक्तांची ‘ दाद ’ लागली !

—दक्षिण हिंदुस्थानांत पटकीचा आजार मनस्वी वाढला आहे.

—सदर्न मराठा रेलवे कंपनीच्या आगगाडीच्या वेळापत्रकांत येत्या सप्टेंबर महिन्यापासून बदल होणार आहे.

— नीलगिरीमधील एका भागांत धरणीकंपाचा धक्का बसून ५० इसम मृत्युमुखीं पडले.

—म्हापसें येथें ‘येपोक’ या नावांचें एक पोर्तुगीज साप्ताहिक प्रसिद्ध होणार आहे.

—केवळ आपल्या लोकांच्याच उपयोगासाठीं, म्हापशें येथील चांभारानीं तेथील कोटीनजीकच एक स्वतंत्र देवालय उभारण्याचा निश्चय केला आहे.

—ठिकठिकाणच्या ग्रामसंस्थांच्या मुखत्यार लोकांची एक सभा पणजीच्या मुनिसिपाल हॉलांत भरुन, शेतकी पतपेढींच्या कायद्यानें ग्रामसंस्थांवर लादलेल्या असह्य बोज्याविरुद्ध निषेधाचा ठराव पसार करण्यांत आला.

—म्हापसें येथें मोटारखालीं एक मूल सांपडलें जाऊन, त्याला जबर दुखापत झाली.

—चालू महिन्याच्या १२ तारखेला पोर्तुगालच्या वातावरणांत बंडाचे ढग जमले होते; पण पोलीस लोकांच्या उष्णतेनें ते लगेच वितळले, असें …

राष्ट्रीय सभा व परकीय लोकमत

जो दुसऱ्यावरी विश्वासला ।
त्याचा कार्यभाग बुडाला ॥

रामदास

इंग्लंड, दुसरीं युरोपीय राष्ट्रें व अमेरिका ह्या देशांत हिंदुस्थानविषयक खऱ्या व विश्वसनीय माहितीचा प्रसार करण्यासाठीं राष्ट्रीय सभेनें कांहींतरी प्रयत्न करावा ही सूचना [मला वाटतें] अहंमदाबादेस भरलेल्या कॉंग्रेस बैठकीच्या विचारासाठीं पुढें मांडण्यांत आली होती. त्या प्रसंगीं व नंतर वेळोवेळीं म. गांधीनीं अशा प्रकारचा उपद्व्याप करणें निष्फळ असल्याचें दाखवून दिलेलें आहे. ह्या बाबतींत म. गांधीचें मत ग्राह्य न वाटणाऱ्या कित्येक जबाबदार व्यक्तीनीं गांधीजीच्या निराशावादास त्यावेळीं दोष दिलेला होता. गेल्या थोड्या वर्षांच्या अनुभवानें आपणास कांहीं शिकविलें असल्यास म. गांधीचें ह्मणणें आज खरें आहे हें कबूल करणें भाग आहे. म. गांधीनीं कॉंग्रेस काबीज केल्यानंतर नागपूर कॉंग्रेसच्या बैठकींत पास झालेल्या ठरावाप्रमाणें लंडनमधील ‘इंडिया’ पत्र बंद पाडून तेथील कॉंग्रेसच्या ब्रिटिश कमिटाचें माहितीखातें व ऑफिस काढून टाकण्यांत आलें ही गोष्ट पुष्कळांस आवडली नाहीं. कॉंग्रेसच्या ह्या शाखेच्या उपयुक्ततेबद्दल कोणताच प्रश्न नव्हता व नाहीं; ह्या शाखेमार्फत बरेंचसें कार्य करण्यांत आलें होतें, ह्यांत शंका नाहीं. पण मुख्य प्रश्न हा आहे कीं, परकीय लोकमत तयार करून आह्मांस कोणता फायदा होणार आहे ? जगाचें लोकमत आपल्या बाजूनें केल्यावरच आपणास स्वातंत्र्य मिळवितां येईल असें मानणाऱ्यानीं ‘फॉरीन प्रॉपॅगँडा’ यशस्वी करण्यासाठीं पैशाचा व दुसऱ्या साधनांचा व्यय करणें क्षम्य ठरेल परंतु स्वताच्या प्रयत्नावरच सर्वस्वी भिस्त ठेवणाऱ्यांनीं लोकमताची काय ह्मणून पर्वा करावी ? लोकमत ‘बनविणें’ हें एक पाश्चिमात्य ध्येय आहे; व तें जाहिराती देऊन गिऱ्हाईक मिळविण्याएवढेंच कृत्रिम व स्वस्त आहे, हें आह्मांस कळलें पाहिजे. आमच्या राजकीय मागण्या किंवा आकांक्षा न्याय्य असल्यास त्या न्याय्य नाहींत असें ठरविण्याचा कोणी प्रयत्न केल्यास तो केव्हांहि यशस्वी होणार नाही, हें आपणास माहीत असल्यावर तो निष्फळ ठरविण्याकरितां आपण आपल्या शक्तीचा व्यय कां करावा ?

माझ्यामतें परकीय लोकमताचा व आमच्या राजकीय उन्नतीचा किंवा हक्कांचा (निदान आजच्या परिस्थितींत) कांहीं संबंध आहे असें मानणेंच मुळीं चुकीचें आहे. परकीयांनीं आमचीं दुःखें समजावून घेऊन आह्मांस नैतिक मदत केल्यास त्यानीं स्वतांस सुधारलेलीं माणसें ह्मणविणाऱ्यांचा हक्क शाबीत केल्यासारखें होईल. त्यानीं आपली जबाबदारी व कर्तव्य ओळखल्यास ते नै-

...या विक्री अवकाशार नाही.
...न सिद्ध होते की, सत्य नहीं.
...नीन नरवेकरी आहे व त्याची
...अवश्य आहे. लोकमत तयार
...न तयार करण्यासाठीं अग.
...रना सुरवात नेहमीच तयार
...र्वितिविन माध्यमावर्यांच्या पुढे
...दीत अर्धेच्या वाढतीत धोडात
... संगावयाचें हाती लोकमत
...टवित आहे.

Anuncios

...arat, ano 9 º, n º 22
...gosto de 1924.
...cios cada linha uma
...inda que repetida.
...ro avulso 1 tanga.

...juizo de direito da Co-
...e Quepem e cartorio
...vão do 2º of. que este
...orrem éditos de 30 dias
...s do dia em que se pu-
... ultimo anuncio, nos
...do § 2º do art. 197 do
... Proc. Civ. citando
... Purxotoma Xete, ca-
...oprietario e residente
...e incerta de Mudguiry
...var do territorio extran-
...para na qualidade de
... hipotecario inscrito com
... registado a seu favor
... port ncia de setsentos
..., assistir a todos os ter-
...a execução por custas
... Digno agente do Minis.
... Publico nesta comarca
...ove contra Naraina Venc-
...Xete e mulher e Santoia
...exa Xete e mulher, to-
...e Poinguinim de Canaco-
...r apenso aos autos de em-
...s de executado deduzidos
...ste á execuçao hipoteca-
...ntra eles instaurada por
...chondra Madeva Achári,
...rtagale de Canacona e
...ir querendo nela os seus
...os. E para ser publico se
...iu este. Xeldem da Co-
... de Quepem, 2 de Agos-
...1924.
...scrivão de direito do 2º

...Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito

A de Brito e Nascimento

Ano 9 º N. 23

Quinta-feira 28 de Agosto de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
por cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegde Dessay
Quepem-Goa

भारत.

BHARAT

वर्ष ९ वें. अंक २३

गुरुवार ता. २८ आगष्ट सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ल. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केंपे—गोवा.

C. C. R.

Já o leitor está farto de saborear toda a sorte de *manjares criticos* que a imprensa do Paiz *cosinhou* para satisfazer á *fome* de quantos queriam aprofundar-se na sciencia de Caixas de Crédito Rural.

E' claro que nem todas as *iguarias* podiam ter o mesmo gosto nem exalar o mesmo cheiro, pela natural diversidade de *modus faciendi* que, inevitavelmente, presidiu á sua confecção. Assim, se alguns *praios* fizeram crescer agua na bôca, houve outros que perturbassem a regularidade orgánica de funcções intestinais, incomodando, por esta forma, a saude pública, isto é, a saude do publico que numa voracidade sôfrega ou numa sofreguidão voraz os *engulia...*

E' verdade. A critica, originada pelo diploma legislativo que criou as Caixas de Crédito Rural demonstra que a Opinião Pública sobre elas se divide, varia, havendo, ao lado dos que as defendem, outros que as condenam *in limine...*

O *Bharat*, conquanto não pertença ao grupo dêstes últimos, não se sente, todavia, livre para desassombradamente apoiar a actual organisação das C. C. R. por notar nesta dois defeitos de capital importancia. O primeiro consiste em ter o governo reservado para si o direito da escolha dos corpos gerentes e da fixação da sua remuneração, direito que, exclusivamente, devia pertencer aos proprietarios, associações e outras entidades obrigadas a contribuirem para o cofre das C. C. R. com o seu rico dinheiro.

E' absurdo insubstentavel que os accionistas não tenham voto na selecção do pessoal encarregado da gerencia do seu capital e que não sejam ouvidos na fixação da gratificação do mesmo pessoal.

Importa mesmo uma arbitrariedade sem nome isto do governo reservar para si o que a outrem pertence. Em parte alguma se observa um *fenomeno* semilhante.

O segundo defeito reside na obtenção do emprestimo das Caixas em objecto. Já pela elevação de juros, já pelas dificuldades que eriçam de espinhos o cumplicado sistema de aproveitar o dinheiro das C. C. R. a referida obtenção do emprestimo se torna uma *empresa arrojada.*

E agora uma observação.

¿Qual o fim que presidiu á organisação das C. C. R? Suprir a falta de dinheiro com que — se pensa — está luctando o agricultor e livra-lo a êste das garras aduncas da temivel agiota que se chama *usura.*

Pois bem. A nossa experiencia e o nosso estudo ensinuam-nos, porém, que a decadencia agricola do Paiz não é bem uma consequéncia da pobresa do agricultor mas sim um corolario da falta do braço. E' esta que esmorece as mais nobres tentativas do fomento agricola. Há dinheiro mas falta braço. Há capitais mas faltam operarios. Há oferta do capital mas não há oferta do trabalho.

Nestas condições ¿que papel benefico poderão desempenhar as C. C. R. no desenvolvimento agricola do Paiz?

Elas só servirão para os *Quelleam Camilo Reprovados* e outros de sua *elite* encherem de dinheiro suas algibeiras e se divertirem com passeatas *automobilistas!*

¡Não conhecem o *Quelleam Camilo Reprovado*?

Pois leiam a crónica alegre do sr. *J. da S. C.*, publicada na edição da *India Portuguesa* de Margão, nº 31, ano 1º.

ECOS & CRITICA

SERVEM PARA TUDO

No *O Heraldo* le-se um estudo sobre a influencia das religioes na natalidade E' um trabalho baseado nos dados que fornece o censo da populagao de Hungria, e dele se conclue que o catolicismo e' mais favoravel ao desenvolvimento populacional do que o protestantismo.

Infelizmente, porem, os termos de comparagao sao apenas dois a—populagao catolica e a protestante—Valia a pena ensaiar na Hungria o budismo e confucionismo e ver a sua influencia no que diz respeito a' natalidade, pois o censo da China e Japao levam-nos a crer que, se as religioes tem algum efeito na natalidade, este e' muito abonatorio destas duas religioes.

Nao ha' duvida que as estatisticas servem para...tudo.

ESTA' TRANSMICRADO

No artigo *A India Portuguesa* publicado na Gazeta das Colonias diz o sr. Menezes Braganga, referindo-sode ao ensino entre no's o seguinte:

"Ha quatro anos, esbogou-se um plano completo de reforma de ensino, com a incalculavel vantagem de crear recursos para que ele pudesse passar do papel. Era porventura este o seu principal merito. Mas o projecto foi dormir o sono dos arquivos do Terreiro do Pago. Porque era mau?

Nunca se soube porque."

Dormir o sono dos arquivos?! Nao sr. Menezes Braganga. Ele la' esta' *transmigrado* na pessoa de um Director dos Servigos de Instrucgao, a 1200 rupias mensais! Que mais queria o sr. Braganga? S. exia muitas vezes revela ta ingenuidade que ate' parece ignorar os processos modernos de felicitar os povos!

DESPOJOS HUMANOS

O sr. Radrigues Gaspar, presidente do ministerio, tragou o perfil biografico dos homens que o acompanham no Gabinete. Um, o ministro de marinha, e' *merecedor de toda a consideragao egualmente prestigioso.* O outro, do comercio, "homem *com inteligencia e faculdades de acgao.* O ministro das colonias tem apreciavel activo de *trabalhos continuos na Africa e grande* "experiencia" (nao se sabe de que). O sr. Xavier da Silva, ministro de trabalho, e' alguem que a "todos os titulos se recomenda para aquela pasta„ (nao dis que titulos sao estes) E assim os mais.

O interessante, porem, e' que o sr. Rodrigues Gaspar nao hesitou em confessar que "nao ha nos despojos humanos onde ir buscar grandes elementos"?

Pelo visto os "despojos humanos' na politica portugueza estam pela hora da morte.

CAUTELA, POIS!

A Direcgao das Obras Publicas, apesar de possuir um pessoal numeroso e bem pago, nem sempre se apresenta zelosa no cumprimento de seus deveres. Assim, por exemplo, a energia que desenvolve na abertura de estradas e construcgao de pontes nao se ve empregada por ela na conservagao das mesmas estradas e pontes.

A ponte de Quepem e' o vivo exemplo que comprova a' saciedade o que acabamos de afirmar. Ela ja' conta mais de 14 anos de construgao e todavia, durante todo este tempo, foi *oleada* uma vez so' e isto mesmo ha quatro ou cinco anos atraz! Nao admira, portanto, que a ferrugem a tenha carcomido, impiedosamente, deixando-a em um estado verdadeiramente lamentavel. Recea-se mesmo que, cedo ou tarde, ela provoque qualquer fatalidade, se os competentes continuarem a votar-lhe a mesma indiferenga que ate' aqui.

Urge, porisso, que as Obras Publicas volvam a atengao para o misero estado da mesma ponte, tratando ja' de repara la ou que quando nao possam, confiem ao menos ao Municipio do Concelho a sua reparagao. De duas uma. Nao ha' meio termo.

A cautela sempre foi aconselhada nas obras que se ligam a' vida dos mortais que as pagam...Cautela, pois!

NAO PARECE?

Nao atinamos com o motivo por que o sr. Pereira Batalha esta' naln-

जरूर गुत्त्यांची संख्या अगदीं परिमित करण्याचें ठरविल्यास, हा ठराव अमलांत येण्यास प्रयास पडतील काय ? मोठ्या व वजनदार जमिनदारांनीं आपल्या जमिनींत गुत्ते स्थापण्याची बंदी केल्यास व आपल्या 'मुंडकारांत' दारूच्या धंद्याची मनाई केल्यास, दारूच्या व्यसनाला आळा पडून गुत्त्यांची संख्या मनस्वी उतरल्याखेरीज रहाणार नाहीं, हें अर्थात सूर्यप्रकाशाइतकें स्वच्छ व स्पष्ट आहे.

अशानें दारूचा भाव चढेल. चढेना ? गुत्त्यांचें परस्परांतील अंतर साहजिक रीत्याच जास्त रहाणार असल्यानें व मध्यम व कनिष्ट स्थितीचा मद्यपि जात्याच आळशी असल्यानें, तो मुद्दाम लांब पल्ल्याच्या गुत्त्यांत जाऊन, आपली दारूची तलफ भागविण्यास सहसा उद्युक्त होणार नाहीं; आणि असें झालें ह्मणजे त्याच्या व्यसनी मनोवृत्तीला अर्थातूच पायबंद बसेल. परंतु दारूची किंमत वाढली ह्मणजे मजुरीचीहि किंमत वाढविण्यास मजूर मद्यपि मागें पुढें पहाणार नाहींत, याला उपाय काय ? याला उपाय ह्मणजे जमिनदार लोकांचा दृढ निश्चय. जमिनदार लोकांनीं आपलें सामुदायिक तेज प्रगट केल्यास मजूर लोकांचा मजुरी वाढविण्याचा हेतु तडीस जाणें अगदीं अशक्य होय.

फार दुःखाची गोष्ट कीं, खुद्द देवस्थानच्या जमिनींत सुद्धां गुत्त्यांची स्थापना झालेली दिसून येते. या अनीतिमूलक गोष्टीनें मनाला खेद व चिळस आल्याशिवाय रहात नाहीं. देवस्थानच्या लौकिकास गुत्त्यांनीं फासलेला हा अनीतीचा काळा कलंक, त्या त्या कारभारी मंडळानीं पुसून काढणें, हें त्यांचें पवित्र कर्तव्य आहे. त्यांनीं या आपल्या कर्तव्यपालनांत उत्साह दाखवून, इतरांना उदाहरण घालून देणें बाजवी होय.

जनतेला अधोगतीच्या गर्तेत सदोदित खिचपत ठेवूं पहाणाऱ्या दारूच्या व्यसनाविरुद्ध जोराची मोहीम व तीहि तावडतोब सुरू न झाल्यास, देशाचा भविष्यकाळ भीषण व दुःखद होणार आहे. ह्मणून दारूच्या भयंकर व्यसनाच्या प्रसाराला आळा घालण्यासाठीं उत्साही मागसांनीं पुढें सरसावलें पाहिजे, हें उघड आहे.

दारूचें व्यसन ही आह्मावर ओढवलेली मोठ्यांतली मोठी आपत्ति होय. मदिरापानानें गोमांतकीय लोकांची शारीरिक व नैतिक अधोगति दिवसेंदिवस वाढतच आहे. जो 'कुळंबी' पूर्वी पैलवानासारखा सशक्त व कणखर असे, तोच आतां दारूबाईच्या कचाट्यांत सांपडल्यापासून, निःसत्व व नेभळट बनला आहे. शेतकरी व इतर कारागीरहि दारूमुळें केवळ काडी पैलवान व पाप्याचे पितर यानां हार जाण्याच्या पंथास लागले आहेत. तात्पर्य, शक्तिवान लोकांची संख्या खालावत जाऊन अशक्त माणसांचीच भर समाजांत पडत जात आहे. अपचन हा रोग जो पूर्वी श्रीमंतांच्याच घरीं ठाणें देऊन बसत असे, तो आतां सार्वत्रिक स्वरूपाचा झाला असून त्यानें प्रत्येक गरिबाच्या घरांत आपलें बिऱ्हाड ठोकलें आहे ! हा परिणाम निवळ दारूच्या व्यसनाचा आहे, यांत संशय नाहीं.

जर आह्माला दारूच्या व्यसनाचे हात पाय छाटून, त्याचा नायनाट करण्याचें असेल, तर या दिशेनें आह्मीं तावडतोब प्रयत्न करण्याच्या मार्गाला लागलें पाहिजे. या कामीं नुसतीं व्याख्यानें व तात्विक विवेचनें–प्रवचनें उपयोगाचीं नसून, चिकाटीयुक्त कृतीचीच आवश्यकता आहे.

सर्व जमिनदार व प्रतिष्ठित लोक एकत्र जमून त्यांनीं एक संघ स्थापन केल्यास, दारूच्या व्यसनाला 'हा हां' ह्मणतां आळा पडेल याची खात्री प्रत्येकानें बाळगावी. प्रसंग आणीबाणीचा आहे. आतां हलगर्जीपणा बिलकूल कामाचा नाहीं. शिवाय हें काम एकट्यादुकट्याच्या हातून पार पडण्यासारखेंहि नाहीं. त्याला सामुदायिक प्रयत्नच झाले पाहिजेत व या प्रयत्नाला निर्धाराचा पूर्ण पाठिंबा मिळणें अगत्याचें आहे.

तेव्हां गोमांतकीय जमिनदार हो, कंबरा कसा व एक जुटीनें व एक नेटानें दारूच्या व्यसनरूपी शत्रूवर जोराचा हल्ला चढवा !

स्फुट विचार

दारूबाजीविरुद्ध मोहीमः— आजच्या अग्रलेखांत दारूबाजीचा विचार केला आहे. मदिराराक्षसीचें हृदयद्रावक व भेसूर चित्र गडकऱ्यानीं आपल्या 'एकच प्याला' नाटकांत उत्कृष्ट रीतीनें रेखाटलेलें आहे. सुरादेवी आपल्या भक्ताच्या वित्ताची व नीतिमत्तेची कशी राखरांगोळी उडवीत असते, हें गडकऱ्यानीं आपल्या काव्यमय व अनुभवसिद्ध वाणीनें जगाच्या निदर्शनास आणलेंच आहे. 'दारूचें उच्चाटण ह्मणजेच समृद्धीला आमंत्रण' हें सत्य नित्य डोळ्यांसमोर ठेऊन, दारूच्या निंद्य व्यसनाला गचांडी देण्यासाठीं गोमांतकीय जबाबदार पुढाऱ्यानीं जिवापाड मेहनत केली पाहिजे. तळिरामी पंथ गार पडेपर्यंत फार खटपट करून, दारूच्या नरकानें विटाळलेलें गोमांतकाचें वातावरण शुद्ध करण्याप्रीत्यर्थ देशभक्तानीं, दिव्य तेज प्रगट केल्याशिवाय गत्यंतर नाही दारूला नरक दाखविल्याशिवाय आमच्या अधोगतींत फरक पाडण्याची इच्छा मनांत बाळगणें ह्मणजे पाया विरहित गगनचुंबित इमारत उभारण्याची हास्यास्पद हौस बाळगण्यासारखा मूर्खपणा होय.

कालक्षेप उपयोगी नाहींः— दारूच्या व्यसनाविरुद्ध निकराचा हल्ला चढविण्यास मुहूर्त पाहण्याचें कारण नाहीं. वाढलेल्या वधूच्या लग्नाला, आधींच वरसंशोधनाच्या विकट, विकट व तिखट मोहिमेनें आपाद मस्तक थकलेला वधूपक्ष, मुहूर्त शोधण्याच्या भानगडीच्या उलाढालींत पडतोच, असें नाहीं. तद्वत दारूविरुद्ध चळवळीची गोष्ट आहे. दारूबाजीच्या रोगानें गोमांतक इतका पोखरला गेला आहे कीं, मुहूर्त ठरवून चळवळीची रूपरेखा आंखेपर्यंत, रोग्याचें देहावसान होणार नाहींच, याची हमी देणारी व्यक्ति अजून जन्मली नाहीं. तात्पर्य कालक्षेप न करतां, तावडतोब–शुभस्य शीघ्र–हाच सुमुहूर्त मानून प्रस्तुत व्यसनाच्या नाड्या आंखडण्याची अचूक तजवीज केली पाहिजे. आतां व्याख्यानानीं काम भागेल, हें तर मनांत आणतांच कामा नये. कृति पाहिजे. केवळ निरपेक्ष कृतीनेंच मदिरापानाला पडला तर कांहीं आळा पडण्याचा संभव आहे. मात्र या कृतीचें स्वरूप सामुदायिक असणें जरूर आहे. एकाद दुसऱ्याच्या प्रयत्नाला यश मिळण्यासारखी सांप्रतची परिस्थिति नाहीं, हें विसरतां कामा नये.

शेतकी पतपेढ्याः— गरीब शेतकऱ्यांना द्रव्याचें सहाय्य मिळून, त्यांच्या हातून शेतकीची व पर्यायानें गोमांतकाची उन्नति व्हावी, याच हेतूनें शेतकी पतपेढ्या स्थापन करणाऱ्या कायद्याला जन्म दिला आहे. पण हा हेतु कितपत साध्य होईल, हा एक प्रश्नच आहे. कारण आमच्या शेतकी अधोगतीच्या बुडाशीं द्रव्याभाव नसून श्रमाभाव आहे. नवीन काबिजादींतील ज्या जमिनी आज ओस व पडित पडलेल्या आढळून येतात, याचें कारण त्या जमिनीच्या मालकांना द्रव्यानुकुलता नाहीं, हें नसून त्यांत पेरणी करण्याला पुरेसे मजूरच मिळत नाहींत, हें आहे. शेतकी पतपेढ्या फार तर शेतकऱ्यांना पैशाचें सहाय्य पुरवितील; पण मजुरांचा प्रश्न कसा सोडवितील ? व जोंपर्यंत हा प्रश्न प्रश्नाच्याच रूपांत राहील तोंपर्यंत नुसत्या पतपेढ्यांमुळें, शेतकीची व शेतकऱ्यांची निकृष्टावस्था दुरावेल, ही कल्पनाच करणें चुकीचें आहे. आधीं मजुरांचा पुरवठा व मग शेतकी पतपेढ्या. असे झालें तरच शेतकी आपलें तोंड वर काढील.

मूळ स्वभाव जाईनाः— रिपब्लिकची प्राणप्रतिष्ठा झाल्यास आज जवळ जवळ चवदा वर्षे पुरीं होत आलीं. परंतु इतका हा कालावधी मोनार्कीच्या 'हम करेसो, अमदानींत कांहीं अहंमन्य अधिकाऱ्यांच्या रक्तांत भिनलेले दुर्गुण नष्ट होण्यास पुरेसा झाला नाहीं, असें कष्टानें ह्मणावें लागतें. कांहीं दिवसांमागें पणजीच्या मुनिसिपाल हॉलांत ठिकठिकाणच्या ग्रामसंस्थांच्या मुखत्यारांची, शेतकीपतपेढ्यांच्या कायद्यानें या संस्थावर नाहक लादलेल्या बोज्याविरुद्ध निषेध व्यक्त करण्यार्थ, एक सभा भरली होती. सरकारचे प्रतिनिधी या नात्यानें सभेला पणजीचे मामलेदारसाहेब हजर होते. या साहेबाचें काम ह्मणजे सभेला हजर राहून, सभेची साद्यंत माहिती सरकारला देणें इतकेंच असून, या कार्यापलीकडे त्यांच्या अधिकार क्षेत्राची व्यापकता विस्तृत पावत नाहीं. असें असतां प्रस्तुत सभा ही सरकारच्या अब्रूची इमारत ढांसळून पाडील, अशा खोट्या समजानें, उपरोक्त अधिकाऱ्यानें जं त्या सभेंत गोंधळ माजविला, त्यामुळें सदर मामलेदाराच्या अकलेचें दिवाळें वाजलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. वरिष्ठांची मर्जी संपादण्यासाठीं लोकमत पायाखालीं तुडविण्याची जी वाईट खोड कित्येकानां जडली आहे, तिचा परिणाम अखेर 'हां जी हां जी, वाल्यानांच भोंवणार, हें पणजीच्या मामलेदारानीं आपल्या स्मरणवहींत टिपून ठेवलेलें बरें, अशी आमची त्यांस मित्रत्वाची सूचना आहे. सरकारची मेहरनजर न गमावण्यास जनतेवर आततायीपणाचा कहर केलाच पाहिजे, असें कोठें कायद्यांत कलम नाहीं. पण स्वभावाला औषध नाहीं त्याला कोण काय करील ? वरिष्ठांची मर्जी राखण्यासाठीं कसलींहि कृत्यें करण्याची जी मोनार्कीच्या अमदानींत कित्येकांना सवय लागली होती ती अजून नष्ट झाली नाहीं, याचें मूर्तिमंत उदाहरण ह्मणजे पणजीचे मामलेदार होत, हें सिद्ध करण्यास, आह्मांला वाटतें, आणखीं विशेष लिहिण्याचें कारण नाहीं.

पोर्तुगालची राजकीय स्थितिः— पोर्तुगालच्या राजकीय वातावरणांत जमलेले अस्वस्थतेचे ढग अजून अस्तंगत झाले नाहींत. उलट त्यांची संख्या वाढत्याच प्रमाणावर आहे. सैन्यांतली शिस्त विस्कळित होत चालली असून, शिस्तीच्या या शैथिल्यामुळें पोर्तुगालांत अंतःकलहास दारूण स्वरूप केव्हां येईल, याचा नेम नाहीं. मोठे व छोटे लोक या उभयतांतहि कलहप्रियतेनें आपलें ठाणें दिलेलें दृष्टोत्पत्तीस येतें. ज० गोमीस द कोस्ताच्या धमकीवजा भाषणानें या कलहप्रियतेची रग थोडी तरी जिरेल, अशी जी कित्येक आशावादी लोकांस उमेद होती, तीहि सपशेल मावळली ! एवंच, पोर्तुगालची स्थिति भविष्यकाळीं काय होईल याचें भविष्य वर्तविणें फार कठीण आहे. असो. पोर्तुगालांत शांतता देवीची स्थापना होईल तो दिवस खरा ! तोंपर्यंत कोणकोणत्या उलाढाली उपस्थित होतील हें एक भविष्यकाळच जाणे ! व भविष्य काळाच्या पोटांत काय आहे हे समजणें कठीण असल्यानें, तूर्त या विषयाची इतक्यांतच रजा घेणें अर्थात क्रमप्राप्त आहे.

साभार स्वीकार

मनोरंजन (मासिक):— या मनोरंजक मासिकाची ओळख नाहीं, असा महाराष्ट्रांत तरी कोणी मराठी जाणणारा वाचक असेल, असें आह्मांस वाटत नाहीं. मनोरंजन मराठी वाचकाप्रमाणेंच, मराठी साहित्य सेवकांच्याहि निकट परिचयाचें आहे. विविध माहितीनें ओथंबलेले, विविध लेखकांनीं लिहिलेले मनोरंजनांतील विविध लेख वाचून कोणाचें मन प्रसन्न होणार नाही ? गोष्टी व कादंबऱ्यांच्या वाचनानें समाधान पावणारे, हरेक शास्त्रीय विषयांवरील नवीन नवीन शोधांच्या माहितीनें आनंदित होणारे, मार्मिक व भारदस्त विनोदानें घटकाभर देहभान विसरणारे काव्यसृष्टींत स्वैर विहार करण्यास भुकेलेले इ० अनेक रुचींच्या वाचकांस भुलविणारें एकादें मासिक असेल, तर तें मनोरंजनच होय. इतकें सांगितलें ह्मणजे 'मनोरंजनाची उपयुक्तता सहज सिद्ध होते. अशा

(पुरवणी पहा)

श्रीगणेशोत्सव

भाद्रपद शुद्ध चतुर्थी हा दिवस गणेशचतुर्थीच्या सणाचा होय. इतर सणप्रमाणेंच हा सण सर्व वर्णांच्या लोकांकडून पाळण्यांत येतो. मात्र सर्व ठिकाणींहि पाळण्यांत येतो, असें सांगतां येत नाहीं. उदाहरणार्थ बंगाल्यांत हा सण रूढ नाहीं. महाराष्ट्रांत या सणाला विशेष महत्व आहे.

ह्या सणाचा धार्मिक विधी काय आहे हें आम्हीं सांगण्याची जरूरी नाहीं. आपल्या गोमांतकांत कित्येक कागदावर काढलेल्या मूर्तीची तर कित्येक मृत्तिकेच्या मूर्तींची पूजा करीत असतात. शास्त्रोक्त विधी मृत्तिकेचीच पूजा करावी असा आहे. परंतु कागदाच्या चित्राची पूजा करण्याचें कारण पोर्तुगीजांचा धार्मिक छळ होय, असें दिसतें.

गणपतीची उत्पत्ति कित्येक पुराणांतून मिळते; विशेषतः गणेश पुराण, मुद्गल पुराण हीं होत; हीं उपपुराणें आहेत. मुख्य पुराणें जीं अठरा त्यांतील स्कंदपुराण यांतहि कांहीं कथा आहेत; परंतु या सर्व कथा आहेत, ऐतिहासिक आधार नाहींत, हें वाचकानीं ध्यानांत ठेवावें. गणेशपुराणाचा काल अगदीं अलीकडचा म्हणजे इ. स. १४व्या शतकानंतरचा आहे. असें मत कै. काळे यानीं आपल्या पुराणनिरीक्षण या ग्रंथांत दिलेलें आहे.

ही देवता काल्पनिक असली तरी फार प्राचीन काळापासून ह्या देवतेचें पूजन प्रचारांत आहे. सिद्धि व बुद्धि देणारी ही देवता असून प्रथमारंभीं आपण ह्याच देवतेचें पूजन करतो ह्या देवतेची पूजा केव्हांपासून प्रचारांत आली या बद्दलचा वाद महाराष्ट्रांतील विद्वानांत लागलेला होता. हे सर्व लेख मराठींतील जेष्ट श्रेष्ट अशा विविधज्ञानविस्ताराच्या १९०६ वर्षात प्रसिद्ध झालेले आहेत. जिज्ञासूनीं ते अवश्य वाचावेत.

या विद्वानांच्या मतें गणपतीचें पूजन इ. स. २००–४०० सुमारास प्रचलित होतें. कथासरित्सागर या नावांचा जो ग्रंथ आहे त्या ग्रंथांत गणपतिपूजनाचा उल्लेख मिळतो. मूळ ग्रंथ इ. स. ३०० चा आहे, असें बुव्हर या युरोपीयन पंडिताचें मत आहे. या शिवाय पुष्कळ प्राचीन ग्रंथांत गणपति पूजनाचा उल्लेख मिळतो.

गणपती ह्या देवतेला हत्तीची सोंड कां आली याबद्दल पुराणांत जी कथा सांगितली आहे त्या कथेवर निवळ भाविक लोकांशिवाय विश्वास बसणें शक्य नाहीं. गणेश पुराणांत गणपतीचें ॐ कार स्वरूप अध्याय चार ह्या मध्य वर्णन केलें आहे. व या ॐ कार स्वरूपाचीच दर्शक सोंड ही होय. या ॐ कार स्वरूपावरूनच गणपतीच्या मूर्तीची घडवणूक केलेली आहे असें आम्हास वाटतें.

या देवतेसारखी व नामसादृश्याचीच देवता युरोपांतहि आहे. श्री. सी. म. फडके हे 'मूर्तिपूजा' ह्या आपल्या ग्रंथांत म्हणतातः 'ह्या गणपती सारखा पश्चिमेस जेनस Janeas (मनेश–गणेश) देव होय. त्याचीं नावें व वर्णन सलपिटियसच्या Sulpitius काव्यांत आहे. पिता जेनस, सर्व साक्षी जेनस, वाचस्पति, विद्याधिपति अशीं विशेषणें त्याला लावलेलीं आहेत; कांहीं ठिकाणीं जेनसची मूर्ति दोन तोंडांची आहे, आणि हेटुस्कन 'चालीची फलिशी Falisci येथील मूर्ति चार तोंडांची आहे. असला भिन्न प्रकार दिसला तरी त्यांत उणीव येत नाहीं. आपल्या इकडे घरांच्या दारांवर गणपतीची मूर्ति लाकडांत कोरतात त्याप्रमाणें ह्या जेनस वरून तिकडच्या दारानांच जेनुइ (Janoe) म्हणतात. हा जेनसच्या पूजेचा अवशेप आहे. पूर्वी रोमन वर्षाचा आरंभ मार्च पासून होत असे तो बदलून (दहाचे ऐवजीं बारा महिन्याचें वर्ष झालें तेव्हां) पहिला महिना जानुवारी (जानस–जेनसचा) झाला. यावरून आपल्या गणेशासारखीच तिकडेहि पूर्वीच्या काळीं मूर्ति होती हें कळून येईलच.

आपल्याकडे गणपतीचें पूजन ज्या दिवशी होतें त्या दिवशीं चंद्रदर्शन घेऊं नये असा जनप्रघात आहे. आज ह्या चालीचा हळुहळु लोप होत आहे ही आनंदाची गोष्ट होय. अशा रूढीची खरी उत्पत्ति जोंपर्यंत पुढें आलेली नाहीं, तोंपर्यंत लोकांचा विश्वास त्यावर बसणें शक्य नाहीं. कांहीं विद्वान याचा आत्मिक अर्थ असा लावतात कीं, चंद्र ही मनाची देवता आहे. व मन हें चंचल आहे. चतुर्थ तुर्यावस्थेंत परमात्म्याचा साक्षात्कार होतो, अर्थात चंद्रदर्शन न घेणें म्हणजे मनोलय करणें होय.

गणपतीसारख्या तसेंच इतर देवतांच्या मूर्तींची आपण हिंदु लोक पूजा करतों म्हणून आपणावर इतर धर्मियांचा मोठा आक्षेप आहे. करतां त्याबद्दल दोन शब्द लिहिणें वावगें होणार नाहीं. मूळ वैदिक धर्म मूर्तिपूजक नव्हता. वेदकालीं वेदांत मूर्तींचा उल्लेख नाहीं असें आर्य समाजिष्ट लोक म्हणतात तर काही कट्टे 'सनातनधर्मी ओढून ताणून कांहीं ऋच्याचा अर्थ करून वेदांत मूर्तींचा उल्लेख सांपडतो असे विधान करतात; परंतु मूर्तिपूजा किंवा मूर्तिपूजेचीं देवळें ही त्या काळीं नव्हती हें मत मात्र सर्वांना मान्य आहे.

इ. स. पूर्वी ६ व्या शतकांत गौतम बुद्ध उत्पन्न झाले. त्यानीं यज्ञयाग वगैरेचा निषेध करून त्यांवर शस्त्र धरलें; परंतु मूर्तिपूजेसंबंधानें त्यांच्या तोंडून कांहींच निघालें नाहीं. यावरून त्या काळीं मूर्तिपूजा प्रचारांत नव्हती हें सिद्ध होतें. जर प्रचारांत असती तर 'तिचा निषेध केल्याशिवाय ते कदापि राहिले नसते. कारण त्याना देवच मान्य नव्हता. मग त्यांची पूजा कुठली? परंतु आश्चर्य करण्यासारखी गोष्ट ही कीं ज्यांनें ईश्वराचें अस्तित्व सुद्धां कबूल केलें नाहीं त्याच्यामुळेंच मूर्तिपूजेला ज्यास्त उत्तेजन मिळालें.

बौद्ध धर्मांत कोणालाहि मज्जाव नव्हता अत्यंत हीन जातीच्या मनुष्याला सुद्धां भिक्षूची दीक्षा घेतांच श्रेष्टपणा प्राप्त होई. यावरून मूळ वैदिक धर्मांत हीन जातीच्या इसमाला श्रेष्टपणा प्राप्त करून घेतां येत नसे असें मात्र नाहीं. स्वतःच्या कर्तबगारीपणानें वरची पदवी प्राप्त करून घेण्याचा हक्क सर्वांना होता मात्र तो बौद्धधर्माइतका अगदीं सुलभ नव्हता. बौद्धधर्मांत कोणालाहि मज्जाव नसल्यामुळें मूळच्या रानटी जातीचा त्यांत भराभर प्रवेश होऊं लागला. बहुजन समाज हा वरवर पहाणारा व आचारप्रिय असतो. त्यांचा धर्म बदलला खरा परंतु आचार बदलला नाहीं. हे लोक आचाराचें मूळ गाठोडें पाठीवर घेऊनच या नवीन धर्मांत शिरले व तेथें त्यानीं आपल्या पाठीवरचें गांठोडें सोडून त्यांतील वस्तु आपल्या बरोबरच्यानां देण्यास सुरवात केली. व अशा रीतीनें अनार्य चालींचा हळुहळू शिरकाव त्या धर्मांत झाला.

बौद्ध धर्मांत पुष्कळ प्रकारची सुलभता मिळाल्यामुळें त्या धर्माचा प्रसार वाढला व हिंदु धर्माला उतरती कळा लागली. त्या वेळीं हिंदुधर्म नामशेष होतो कीं काय असा प्रश्न उभा राहिला. व आपणालासुद्धां त्यांच्या सारख्या चाली आपल्या धर्मांत रूढ कराव्या लागल्या. नेहमीं तत्वप्रियतेमुळें धर्मांतर करणारे असे थोडेच. बाह्य सुलभता जितकी ज्यास्त तिकडे बहुजन समाजाचें लक्ष वेधलें या कारणामुळें आपल्यालाहि तितकी सुलभता देणें भाग पडलें. अशा चाली रूढ केल्या नसत्या तर आपल्या धर्माकडे लोकांचें लक्ष वेधलें नसतें

हिंदुधर्मानें जसें इतर अनेक चालीनां शुद्ध स्वरूप दिलें तसेंच मूर्ति पूजेलाहि दिलें तें कसें याचा थोडासा विचार करूं. आपले खिश्चन बंधूचेंच उदाहरण घ्या. त्यांच्या मतें हिंदु हे जेंतीव–पाखंडी–मूर्तिपूजक आहेत, हे गणपतीसारख्या मातीच्या देवाला हत्ती सारख्या जनावराची सोंड असलेल्या मूर्तिला देव म्हणून समजतात. तेव्हां अशा देवानां मान्यता देणारा त्यांचा धर्म काय असेल हें कळून येतच आहे. हा विचार त्यांच्या डोक्यांत यतानां आपल्या धर्मांतहि दगडाच्या वगैरे केलेल्या चिन्हाला देव मानणारे लोक शेंकडा ९९ आहेत हें कसें येत नाहीं कोण जाणें! याच्यापेक्षां पुढें जाऊन आम्हीं त्यांना असें बजावतों कीं, हिंदुलोक मूर्तिपूजक नसून मनाचे पूजक आहेत. एकाद्या चित्रशाळेंत शेंकडो गणपतीच्या मूर्ति तयार असतात. त्या वेळीं त्यांना देव असें कोणीही समजत नाहीं. तसेंच बाजारांत [illegible] देवाचीं चित्रें पुष्कळ विकत मिळतात; परंतु अशा चित्रांसहि आपण देव असें समजत नाहीं. तर हीं चित्रें अगर या मूर्ति घरीं आणून त्यांची पूजा केल्यानंतरच आपण त्यानां देव मानतों पूजा केल्याशिवाय कोणत्याच मूर्तींत ईश्वरांश आलेला आहे असें आपण मानण्यास तयार नाहीं. तसेंच या मूर्तीचें विसर्जन करतांच [illegible]पली समजूत दुसरी होते. यावरून [illegible] मूर्तिपूजक नसून मनाचे पूजक कसे आ[illegible] हें सिद्ध होईलच. हिंदु लोकांचा देव मन वास करीत असतो हें तत्व हिंदुधर्मांतील गर्दी खालच्या वर्गांत सुद्धां पसरलेलें [illegible] हिंदुधर्मानें मूर्तिपूजेला जें शुद्ध स्वरूप दि[लें] हेंच होय.

मूर्तिपूजा आज कोणत्या ना कोणत्या तऱ्हेने सर्व धर्मांत आहे. मुसलमानानीं पूजा नाहींसी करण्याकरतां जंगजंग पछा[डले] जितक्या मूर्ति फोडतां येणें शक्य होतें त्या[ही] फोडून टाकल्या. पोर्तुगीजानीं तर कट्टर मूर्तिपूजेचें बंड मोडून आकाशांतील बाप[ाची] स्थापना करण्याचा शक्य तितका प्रयत्न [केला]; परंतु कांहींहि झालें नाहीं. उलट [illegible]डिला तरु फुटे आणखी भरानें ह्या प्रम[ाणें] अद्यापि जिवंत आहे.

अशा उत्सवांचा चालू युगांत काहीं [फा]यदा करून घेणें अगत्याचें आहे. प्रा[चीन] काळीं अशा उत्सवांमुळें दळणवळण वाढ[े व] प्रेमसंवर्धन होई. आपण हिंदु लोक धार्मि[क] प्रवृत्तीचे आहोंत. धर्म हाच आमचा [illegible] आहे. करतां अशा धार्मिक उत्सवांचा [रा]ष्ट्रीय दृष्ट्या फायदा करून घेतला पाहि[जे] तो असा कीं, निदान एक तरी प्रत्येक [गा]वांत सार्वजनिक गणपती करणें हें हो[य]. अशा उत्सवांत व्याख्यानें होणें अत्यंत जरूरीचें आहे. आपल्या राष्ट्राची स्थिति [आज] काय आहे, समाज कोणत्या स्थितींत [आहे] व ही स्थिति येण्याला काय कारण [illegible] पूर्वकाळीं आपली स्थिति काय होती वगैरे विषय व्याख्यानद्वारा मांडले पाहिजे. अशा वेळीं व्याख्यानें करण्यांत एक फायदा असतो तो हा कीं, उत्सव धार्मिक असल्यामुळें आमची जुनी मंडळी हजर राहील व विचारविनिमय जास्त होईल- दुसऱ्या कोणत्याहि वेळीं व्याख्यानें केल्यास ही मंडळी हजर रहाण्याचा संभव नसतो. याशिवा[य] काहीं सुशिक्षित मंडळीचा असा आरोप आहे कीं, आमचे हरदास पुराणिक कथा कीर्तनाच्या वेळीं नुसत्या भाकडकथा सांगत असतात. ही गोष्ट खोटी नाहीं. परंतु याला उपाय म्हणजे हा कीं, आपल्या [illegible] ग्रंथांचा सुशिक्षितानीं अभ्यास करून [त्यां]तील तत्वें नव्या पद्धतीनें लोकानां सांगणें होय. दुर्दैवाची गोष्ट ही कीं, आपली [सुशि]क्षित मंडळी आज धर्म विषयाकडे [दुर्लक्ष] करीत आहे. असो. यापुढें या गोष्टी [क]रणें अगत्याचें आहे. प्रत्येक जात, राष्ट पुढें जाण्याची तयारी करीत [आहे] तेव्हां आपणहि तशाच प्रकारची [तयारी] करणें रास्त नाहीं काय!

के.

लक्ष्यांत घेतलें असतां; किंवा, प्राजेरिस दे कोस्त, आल्वेर्त झाव्हियर, आंद्राद, कांस्तांसियु रोकि दे कोस्त, वगैरे सारख्या कैकजित इंडियनाचा दर्जा पोर्तुगालांत सुद्धां, पोर्तुगीजांच्या अव्दैती राजकारणामुळें, केवढ्या जबाबदारीचा आहे व होता याच्यावर जरा नजर फेकिली असतां; किंवा, कै. सूर्याजी आनंदराव हे येथील पाठशाळेच्या रैतोरच्या अत्यंत जबाबदारीच्या व बहुमानाच्या जागेवर अधिकृत होते, ते जित होते कीं जेते होते, याची जाणीव करून घेतली असतां, माझ्या म्हणण्याचें तंतोतंत सत्यत्व पटतें व त्याच बरोबर केसरीकारांच्या म्हणण्याचा पोलपणा दृष्टोत्पत्तीस येतो.

स्पष्टवक्ता.

Ano 9o N. 24.

Quinta-feira 11 de Setembro de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
A linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.

BHARAT.

वर्ष ९ वें. अंक २४

गुरुवार ता. ११ सप्टेंबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें—गोवा.

AINDA A LOTARIA DE MAPUÇA'

Factos graves!

...Sr. Redactor.

Cada vez o caso da lotaria de Bardez se complica e custa ouvir os ecos impressionantes que nos chegam.

Um correspondente de Mapuçá no jornal *Tribuna* de 23 do mês corrente, descreve sumariamente vários episódios que passaram durante a abertura e da sua leitura vê se que a Direcção do Asilo praticou irregularídades, dando assim lugar a varios comentos e interpretações.

Diz o referido jornal que a abertura começou nas salas da Camara e outros trabalhos foram concluidos em outra parte —segundo a resolução da *luminosa* Direcção! E temos ai uma abertura *trilobada*, pois, se a segunda parte foi na casa particular, a terceira realisou-se nas dependencias do Asilo; e rematando conclue **F. B:**

"No nosso modesto entender, a "Direcçao deveria ter procedido es "crupulosamente neste grave nego "cio de abertura da Lotaria—**POIS "ESCANDALOS TEM HAVIDO EM "OUTRA PARTE**—e terminado tudo "onde se efectuou o sorteio; pois, "cremos que a edilidade nao nega "ria aquela sala para um fim tao "altruista e alem disso o edificio da "Camara sendo um ponto central "da vila, todos veriam o que ai se "estava a fazer e ninguem ousaria "abordar comentos e historietas "sobre o procedimento posterior da "Direcçao. ¿Por que motivo a Di "recçao insistiu em levar todos "aqueles papeis naquela mesma "noite da sala da Camara para ou tro sitio?"

São justas as considerações do sr. F. B., porquanto a Direcção com o seu procedimento imprudente e imprevidente deu logar a que toda a gente achasse a sua atitude condenavel e repetisse o velho rifão: **na arca aberta ate' o santo peca.**

Imaginemos, por momentos, que a Diracção é constituida por uns querubins e serafins; nem, porisso, ela se livra da responsabilidade do ambiente de suspeições que motivam em vôlta da extracção e estamos certo que tudo andaria em paz se os trabalhos fôssem concluidos, onde e pela forma como tinham começado.

Pois, a reforçar nossos argumentos, vão narrados dois casos tipicos que teem sido assunto do dia, cá em Bárdez—Ora como a abertura duma lotaria era um facto novo neste concelho, tinham vindo muitas pessoas para assistir á mesma e, como era natural, seguiam com atenção a marcha dos trabalhos, tomando nota dos números premiados. Entre outros lá estavam os srs. A de Sousa, professor de inglês e A. Sahacary que tiveram a ocasião de verificar as cautelas de que eram portadores, tendo cada um deles alcançado premios de *tres rupias*.

Mas, oh cruel decepção! Quando foram lêr a lista que saiu depois da *gestação de dez dias*, estiveram boquiabertos e com olhos esgazeados perante a realidade que lhes foi desoladora!

Não há dúvida de que este desapontamento dos dois cavalheiros nunca produziria o rebate que produziu, acarretando descredito para a Direcção, se esta procedesse com a cautela que o caso requeria e hoje ninguem se sentiria com a coragem de atirar a lama na reputação de quem quer que fosse.

Poderá alguem preguntar: ¿Então a Direcção e outros terão trocado, de proposito, os numeros, etc?

Não podemos afirma-lo; por que a sua honestidade não foi discutida. Mas tambem não podemos nega-lo, porque a Direcção com os seus actos tirou-nos o direito e o dever de o fazer.

No dia anterior ao da abertura, para inspirar confiança no publico, a Direcção havia convidado todas as autoridades da vila. Foi uma feliz lembrança e todos estivam satisfeitos. Mas lá pelas *vinte e duas horas do dia cinco de Agosto* vieram-lhe á cabeça os fumos da **soberania** e lá se foi ela da Camara, no meio de geral espanto, levando todos os papeis e havendo naquele momento um pequeno *chinfrim*.

Agora com respeito á soberania da Direcção temos conversado e se fôsse assim seria milhor que a mesma, sentada em qualquer parte, arranjasse as coisas como quizesse e não aquilo que se ouve — pois envergonha a todos nós e não abona ninguem...muito menos os créditos da instituição á cuja testa se acha.

Era necessario que se usasse de todo escrupulo e zêlo e que os bilhetes, antes da abertura, fossem cadastrados e fechados com sêlo e lacre, como se faz em outras partes. Vimos durante a abertura, remexerse muito nos maços das cáute las devolvidas que estavam sobre a mesa, o que não se pode fazer.

Pois bêm diz **F. B.** :— **pois escandalos tem havido em outra parte.**

Indubitavelmente, não podia a Direcção assumir todas as funcções e julgar-se *soberana*, pois, se as coisas não forem abertas e claras, há denuncias, inqueritos, sindincancias e mais complicações que levam dinheiros fabulosos dos cofres das instituições, em nome da *moralidade*, para haver moralidade.

Ora, isto é preciso evitar desde já e dar outro rumo a todos estes negocios e estamos certo que os bardezanos não descançarão, a fim de não haver incidentes lamentaveis e todos se interessarão pelas coisas do Asilo.

¡E' necessário evitar suspeições!!

Praza a Deus, não haja mais escandalos

Bardês, Agosto de 1924

UM BARDEZANO

P. S.

Ao concluirmos esta carta, veiu-nos a' mao *A Verdade*, de Mapuça' a quem, pelos modos, tudo o que nao parir la' em casa—da' *rato*.

E' o menos. Aqui cumpre-nos apenas dizer a' *A Verdade*, que a nossa ancia de abarcar a *gloria do brilhante exito da lotaria* e' tal que demo.la toda aos srs. C. F. Saldanha, Francisco Antonio de Noronha, dr. Milot Faria, Mascarenhas, Menezes, P. J. Gomes e outros. E agora onde a grei e os conselheiros?

Para escrever disparates.........

Bardez, Agosto de 1924

UM BARDEZANO

N. da R. — Apezar da nossa nota feita na ediçao passada, somos obrigados a abrir um parentesis a favor da carta de *Um Bardezano*, porque entendemos que os factos concretos que a mesma contem, devem ser conhecidos do publico e do governo.

त्याला त्या भाकरीचा थोडासा तुकडा सहज जादा अधिकाराच्या जोरावर निर्वेधपणें पार पाडूं शकतो. मग गोमंतकाच्या स्वराज्यांत तो काय अर्थ राहिला वगैरे विचार हिंदूंच्या डोक्यांत तर येत होतेच पण ख्रिश्चनांनांहि ते दिवसेंदिवस भेडावूं लागले. याचा खरेपणा पहावयाचा झाल्यास दोन वर्षांमागें O Heraldo पत्रांतून Paulo da Gama या टोपण नावांखालीं एका प्रसिद्ध ख्रिश्चन पुढाऱ्यानें स्वराज्यावर एक लेख माला लिहिली होती ती वाचून पहावी. दुसरें असें कीं बारा तेरा वर्षांच्या अनुभवानें आपलें स्वराज्य फोल असल्याचें लोकानां कळून चुकलें. गव्हर्नमेंट कौन्सिल जाऊन त्याचे जागीं इंग्लिश धर्तीवर एक्झे-क्युटिव्ह कौंसिल आलें व लोकप्रतिनिधीनांहि तेथें पूर्वींपेक्षां जास्त मान देण्यांत आला. परंतु हा मान व घरधनी आपल्या चाकरास देत असलेला मान या दोहोंत मात्र तत्वतः कांहींच अंतर नाहीं नाहीं ह्मणावयास घरधनी आपल्या स्वतःचे घरांत चाकराला कमी वागवितो तर येथील जनतेवर खुद्द आपल्या घरांत चाकराप्रमाणें वागण्याची पाळी, इतकेंच काय ते अंतर! तेव्हां अशा स्थितींत हिंदूंच्या विशिष्ट मागण्या सोडाच पण हिंदु व ख्रिस्ती यांच्या सर्व साधारण इच्छा फळाला येतील अशी आशा धरून बसणें निवळ वेडेपणाचें ठरेल. मूळ कायदाच जेथें दोषपूर्ण, तेथें त्याची अंमलबजावणी सदोष झाल्यास त्यांत नवल असें कांहींच नाहीं. कांहींच्या मतें, गोमंतकाच्या प्रस्तुत दुःखपूर्ण स्थितीला जर कोण ज्यास्त जबाबदार तर कौंसिलांतील लोकनियुक्त सभासदच. इतर कोणी नाहीं. पण येथील लोकनियुक्त सभासदाचे बाबतींत अपवादभूत ह्मणून धरीत असलेला एक प्रकार लक्षांत आणला ह्मणजे वरील समज सर्वांशीं नसला तरी बव्हंशी चुकीचा असल्याचें कळून येईल. हा प्रकार ह्मणजे गेल्या सालीं करवादीच्या निमित्तानें सरकारनियुक्त व लोकनियुक्त सभासदांत झालेल्या बाचाबाचीमुळें लोकनियुक्त प्रतिनिधीनां कौंसिल हॉल सोडून जाणें प्राप्त झालें हा होय. आतां एकंदर लोकप्रतिनिधीनीं या कार्यांत भाग घेतला नाहीं, ही गोष्ट आलाहिदा आहे. कारण सरकारास अनुकूल अशा वाटा राजकीय घटनेनें ठेविलेल्या आहेतच. त्या विसरून चालणार नाहींत. आतां प्रतिनिधि लोकहिततत्पर व निःस्वार्थी असते तर कांहीं किरकोळ सुधारणा त्यानां गव्हर्नरांच्या अनुमतानें करतां आल्या असत्या, नाहीं असें नाहीं. पण असल्या सुधारणांत कांहीं स्वराज्याचें सर्वस्व नाहीं. त्याची गोडी चाखावयाची असल्यास आपल्या राजकीय घटनेंत आमुलाग्र फेरबदल घडवून आणला पाहिजे. एरवीं गत्यंतर नाहीं.

येथील लोक मिळालेल्या स्वराज्यालाच मुळीं अपात्र असा कित्येकांकडून गोमंतकावर दोषारोप करण्यांत येत आहे तर दुसऱ्या बाजूनें आपली पात्रता सिद्ध करण्याची कामगिरी पार पाडतानां कित्येक ख्रिस्तियनांची उडालेली गडबड पाहिली ह्मणजे आह्मांला एका साध्या पण वरील प्रकाराला तंतोतंत लागू पडणारी एक गोष्ट आठवते. एका आईनें आपल्या लहान मुलाला खाऊ देण्यासाठीं ह्मणून लाडू काढिला व मुलाला दिलाहि पण हा सगळा लाडू कांहीं आपणास एकट्यासच नाहीं असें त्याला वाटलें व आपल्या आईशीं तो त्या लाडवाचें अर्धेच मागूं लागला. आईनें तर त्याला सगळा लाडू दिलेला पण मुलगाच जर अर्धे मागतो तर तें तिला हवेंच होतें. आईनें अर्धे काढून घेतलें व मुलापाशीं राहिलेलें अर्धेहि 'बाळ तें तुला फार होईल,' असें सांगण्यासहि कमी केलें नाहीं. या गोष्टींतील मुलाच्या पंक्तीला येथील कांहीं वर्तमानपत्रकार व ख्रिश्चन पुढारी बसत आहेत, हें पाहून त्यांची कींवच करावीशी वाटते.

कसेंहि असो. पोर्तुगालांत गोमांतकीय लोकांवर करण्यांत येणाऱ्या आरोपाखालीं एक कुटिल धोरण दडी मारून बसलें आहे तें सांगावेंसें वाटतें. हिंदु काय किंवा ख्रिश्चन काय पुढें मागें कांहीं हक्कांची जोराची मागणी करतील ह्मणून हा एकंदर कावा आहे. असलेल्या हक्कांचाच जर तुह्मीं गोमंतकाच्या दुर्दशेकडे उपयोग करतां तर फिरून नवीन हक्क कोणत्या तोंडानें मागतां? असला अर्थ वरील आरोपांत गर्भित होत आहे तिकडे लक्ष दिलें पाहिजे. अद्याप हा प्रश्न वैयक्तिक स्वरूपाचाच ह्मणजे प्रत्येकाचें मत ह्मणून करण्यांत आलेला आहे, हें उघड आहे. पण असले प्रश्न उपस्थित झाले व आपली बाजू ह्मणून त्यांचा जरी नियम करण्यांत आला तरी सहजच ज्यास्त व नवीन हक्कानां आपली अपात्रताच सिद्ध होते, हें कांहीं खोटें नाहीं. पण पोर्तुगीजानीं तरी तसें कां करूं नये. असलेल्या हक्कांचेंच जर येथील कांहीं लोक व विशेषतः वर्तमानपत्रकार निर्लज्यपणें गोडवे गातात तर पोर्तुगीज लोकानींहि दिलेलें परत घेण्यास कां खटपट करूं नये? असो. याला खरे जबाबदार कोण हें पुढें सांगण्याचें टरवून हा लेख आटोपता घेतों.

स्फुट विचार

माफीचा कायदाः— राजकीय मिलिटरी कैदी, गुन्हेगार वर्तमानपत्रकार व कायद्यानें ज्या इतर गुन्हेगारांना सहा महिन्यापेक्षां जास्ती कैदीची सजा फर्माविली नाहीं, अशा सर्व लोकांना गुन्हे माफ करणारा पोर्तुगीज सरकारनें एक कायदा पास केला असून, एप्रील ता. ४ सन १९२४ पर्यंत ज्यांच्याविरुद्ध वरील प्रकारचे गुन्हे शाबीत झाले असतील किंवा शाबीत करण्यार्थ सरकारी वकिलानें खटले भरले असतील, त्या सर्वांना माफीचा कायदा लागू आहे. मात्र चौर्य, विश्वासघात व लफंगेगिरी या तीन जातीच्या गुन्ह्यांना प्रस्तुत कायद्याचा कोणत्याच प्रकारचा फायदा मिळणार नाहीं. येथील सरकारी बुलेटिनवर उपरोक्त माफीचा कायदा प्रसिद्ध होतांच पणजी व ह्मापशें येथील कोर्टांनीं या कायद्याची ताबडतोब अमलबजावणी करून शेंकडो खटले काढून टाकले. इतर ठिकाणच्या कोर्टांत अजून सदरहू कायद्याचें अर्थमंथन चालूच असून, त्यापासून कोणतें 'रत्न' निष्पन्न होईल याकडे लोकांचे, विशेषतः गुन्हेगारांचें, डोळे एकसारखे लागून गेले आहेत. वाकी कायद्याचा अर्थ सरळ असून, त्यांत अर्थविपर्यासाचें गरळ ओतण्याचा जो कित्येक अहंमन्य कायदे पंडितांकडून अघळपघळ प्रयत्न करण्यांत येत आहे, तो निवळ अमंगळ वृत्तीचा द्योतक आहे, असें आमचें स्पष्ट मत आहे.

माफीचे प्रकार :—सरकारकडून गुन्हेगारांना देण्यांत येत असलेल्या माफीचे दोन प्रकार असतात. एका प्रकारानें गुन्हेगारास लागलेला खटल्यांचा कलंक साफ धुतला जाऊन, जणूं काय त्यानें केव्हांच गुन्हा केला नाहीं, असें त्याला मानण्यांत येतें. या प्रकाराला amnistia अशी कायद्यांत संज्ञा असून, जो माफीचा हुकूम सरकारनें प्रसिद्ध केला आहे, त्याचा समावेश आम्नीस्तीयेंतच होतो. दुसऱ्या प्रकाराला, perdao असें नांव असून, गुन्ह्यांचा डाग 'पेरदांवा'नें पुसला न जातां, केवळ शिल्लक राहिलेली भोगण्याची शिक्षा मात्र माफ होत असते. मोनार्कीच्या अमदानींत कोणत्याहि शुभप्रसंगाच्या वेळीं या प्रकाराची माफी देण्याची वहिवाट असे. पण राजकीय कैद्यांना आतांप्रमाणेंच तेव्हांहि 'आम्नीस्तीय'च देण्यांत येत असे. असो. कोणत्याहि कारणानें कां असेना, ज्या आमच्या व्यवसायबंधूंस व इतर लोकांस माफीचा कायदा लागू होऊन दोषमुक्त झाले किंवा होण्याची खात्री आहे, त्यांचें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करण्यास भारताला फार समाधान वाटतें.

राजकीय वातावरणः— पोर्तुगालच्या राजकीय वातावरणांत अस्वस्थतेचे ढग दिवसें दिवस जास्तच जमत आहेत. यामुळें बंडाचें पीक तेथें मुबलक पिकत असल्यास नवल नाहीं. तेथील वर्तमानपत्रांतून उघड उघड बंडास उत्तेजक असे लेख प्रसिद्ध होत असून, सरकारच्या मनगटांत त्यांना मज्जाव करण्याची धमक बिलकूल नाहीं, असें मानण्यास भरपूर आधार आहे. गेल्याच्या मागील आठवड्यांत कांहीं लोकांकडून बंडाचा उपद्व्याप करण्याचा प्रयत्न झाला; पण तो, बहुमताच्या असहानभूतीमुळें, मुळांतच अयशस्वी ठरला. तरी पण त्याचे अनिष्ट परिणाम सरकारास भोंवले नाहींत असें नाहीं. अनिष्ट परिणामाची आंच तर सरकारी तिजोरीला शांतता प्रस्थापिण्यासाठीं बसलीच. शिवाय दुलैकिक कांत भर पडली ती निराळीच!

मोठ्यांचा अनुभव :— मोडकळीस आलेली एखादी संस्था दुरुस्त करण्यासाठीं निरर्थक शक्तिव्यय करण्यापेक्षां ती मोडून तिच्या जागीं दुसरी नवीन स्थापन करणें जास्त हितावह आहे, असें स्वामी विवेकानंद महाराजांसारख्या मोठ्या लोकांचें मत आहे. पोर्तुगालची सांप्रतची नोकरशाहीची 'संस्था' अगदीं मोडकळीस आलेली आहे. आतांपर्यंतचा अनुभव जमेस धरला तर नोकरशाहीचें हें फुटलेलें कांचेचें भांडें फिरून सांधणें मानवी शक्तिबाहेरचें काम आहे. तेव्हां विवेकानंदजींची शिकवण व ज० गोमीस द कोस्तांची सूचना लक्ष्यांत घेऊन, मोडकळीस आलेल्या जुन्या व कर्तव्यशून्य नोकरशाहीच्या समाधीवर नवी व कर्तव्यदक्ष नोकरशाहीची संस्था उभारली गेल्यास मात्र पोर्तुगालची परिस्थिति सुधरणें संभवनीय आहे. नाहींतर 'बुडत्याचा पाय खोलांत' या न्यायानें पोर्तुगालची राजकीय परिस्थिति दिवसें दिवस गुंतागुंतीचीच होईल, हें निर्विवाद आहे.

जाहीर विनंति

" मौजे कवळें येथें बांधण्यांत आलेल्या श्री शंकराचार्य मंदिरांत नास्तिकमतोच्छेदक सकलवैदिकधर्माद्वैततत्त्वज्ञानामृतवेदांत प्रवर्तक पूज्यपाद भगवान् श्रीशंकराचार्यांच्या पादुका व देवताप्रतिष्ठा करण्याकरितां चातुर्वर्ण शिष्यवर्गास दर्शन देण्यास्तव, श्रीमत् जगद्गुरु श्रीशंकराचार्य मठ सं. संकेश्वर व करवीर यांचा येत्या भाद्रपद शु॥ १५ मा १८४६ रोजीं चातुर्मास समाप्ती होऊन गोमांतक प्रांतांत स्वारीसंचार होणार आहे. सदर समारंभाचे वेळीं ' हिंदु धर्मसभेचें ' सातवें अधिवेशन श्रींच्याच अध्यक्षतेखालीं भरविण्यांत येणार आहे; सदर सभेंत हिंदुधर्म संरक्षक सुसंघटित कार्योपयोगी अशी मुख्य संस्था येथील हिंदु समाजांत अवश्य त्या धार्मिक सुधारणा घडून येण्याकरितां कायमची स्थापन कशी करतां येईल याचा बहुमतानें योग्य विचार करण्यांत येईल. या सर्व कार्याची पूर्वतयारी अखिल शिष्यवर्गांचे सहाय्यानें जरूर होण्याविषयीं ज्येष्ठ व॥ ३ या १८४६ तारीख १९ जून सन १९२४ वार अंक १७ स्वारी मु। संकेश्वर येथून श्रींची आज्ञा झाली आहे. त्याचप्रमाणें येथील स्थानिक सरकार मेहरबान गव्हर्नर जनरल साहेब बहादुर पणजी यांचेकडे नारायण अनंत शेट वादिवडेकर, कॉलेज फोंडा; भार्गव सगूण कामत वाघ राहणार पानवेल पणजी; रामचंद्र पांडुरंग वैद्य, केरी वगैरे सद्गृहस्थांचें शिष्टमंडळ जाऊन श्री संस्थानचें थैलीपत्र जुलैच्या ९ तारखेस १९२४ समक्ष दाखल करण्यांत आलें. साहेब बहादुरांनीं गेलेल्या शिष्टमंडळाची आदरपूर्वक मुलाखत घेऊन थैलीपत्राप्रमाणें श्री स्वारींचा मानमोतंब वगैरे योग्य तऱ्हेनें राहण्याकरतां पूर्व वहिवाटीस अनुसरून सर्वत्र बंदोबस्त व व्यवस्था ठेवण्याकरतां हुकूम केला आहे. तरी सर्व सनातन धर्माभिमानी शिष्यवर्गानें वरील कार्याकरितां शक्य होईल त्या तऱ्हेनें मनःपूर्वक सहाय्य करून हें पवित्र व अपूर्व कार्य घडवून आणून, श्री सेवा व धर्मपीठाचें संरक्षण करणें हें आद्य कर्तव्य आहे. इत्यलं० " इ. इ. र. बा. जो. धर्माधिकारी, कवळें, हे कळवितात.

निजामसरकार व हिंदु

एकीकडे निजाम सरकार पूर्वी एकदां त्याच्या राज्यांत समावेश होत असलेल्या पण मध्यां ब्रिटिश सरकारच्या ताब्यांत असलेल्या वऱ्हाड प्रांताची मागणी करुन ती न्याय्य आहे हें ब्रिटिश सरकारास पटवून देण्याची खटपट करीत असतांना दुसरीकडे त्याच्या राज्यव्यवस्थेच्या व्यवस्थितपणाविषयीं संशय उत्पन्न करणाऱ्या कित्येक चमत्कारिक गोष्टी घडत आहेत.

वऱ्हाड प्रांतावरील आपला हक्क शाबीत करण्यासाठीं इंग्लंडास पाठविलेल्या व ह्या प्रश्नाची तेथें वाटाघाट करीत असलेल्या त्याच्या प्रतिनिधीचें, सर हसन अली इमाम ह्यांचें कार्य कितपत यशस्वी झालें आहे हें नक्की कळण्याचा मार्ग नाहीं; परंतु सर हसन अलीची ह्या वकिली करितां नेमणूक झाल्या-दिवसापासून निजामाच्या मुलुखांतील परिस्थितीकडे हिंदुस्थानांतील लोकांचें लक्ष वेधून राहिलें आहे. खुद्द वऱ्हाडांत व इतरत्र ह्या मुसलमान राजाच्या ताब्यात तो प्रांत जाण्याच्या म्हणजे ब्रिटिश सरकारनें देण्याच्या विरुद्ध असलेल्या लोकमतानें निजामास अप्रिय वाटणारे कित्येक प्रश्न उपस्थित केले आहेत व कित्येक पत्रांतून ह्या विषयावर चर्चाहि सुरु झाली आहे. अर्थातच निजामपादशाहीस हें खपलें नाहीं; त्यानें तावडतोब फर्मानें सोडून मद्रासेंतील 'हिंदु', स्वराज्य' व मुंबईंतील 'मराठा', 'सर्व्हंट ऑफ इंडिया' वगैरे पत्रांवर त्यांच्या अक्षम्य पातकाबद्दल शिक्षा म्हणून बहिष्कार घातला व तीं त्याच्या राज्यात आल्यास किंवा कोणी मागविल्यास तो गुन्हा ठरवून त्यास जब्बर शिक्षा करण्याचें प्रसिद्ध केलें.

वऱ्हाड निजामशाहींत सामील झाल्यावर त्याला स्वराज्य देण्याचें अभिवचन देणाऱ्या निजामाच्या ह्या कृत्याबद्दलची बातमी प्रसिद्ध होते न होते तोंच त्याच्या हिंदु प्रजेवर होत असलेल्या धार्मिक जुलमाची व छळाची हकीगत ऐकूं येऊं लागली व गेल्या आठवड्यात गुलबर्गा ह्या सोलापूर पासून ६० मैलांवर व मुंबई—मद्रास रेल्वेच्या रस्त्यावर असलेल्या शहरांत झालेल्या दंग्याच्या बातमीनें हिंदूंवर कल्या जाणाऱ्या धार्मिक जबरदस्तीविषयीं मुळींच संशय उरला नाहीं गुलबर्ग्यांच्या एकंदर ३५,००० लोकवस्तीपैकीं १९,००० हिंदु असून त्यापैकीं बहुतेक लिंगाईत व मराठे आहेत. गेल्या मोहरमच्या सणाचा फायदा घेऊन तेथील मुसलमानांनीं स्थानिक कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या विशेषत: पोलिसाच्या मदतीनें ता. १६ आगष्ट रोजीं रात्रौ हिंदूंच्या देवालयावर हल्ला चढविला व त्यांच्यावर अत्याचार करण्यास सुरुवात केली. त्यांनीं एकंदर ५० देवळें भ्रष्ट केलीं; त्यापैकीं कित्येकांना आग लावुन देवून बाकींचीं मोडून तोडून त्यांचा नाश करुन, आंतील मूर्तींची मनास वाटेल तशी वाटलात लावून (आमच्या नंदीवर त्याचा जास्त रोख होता) देवालयांतील उपकरणें वगैरे मालमत्ता लुटली. ह्या देवळांपैकीं लिंगाईतांना व दुसऱ्या हिंदूंनाहीं अत्यंत पूज्य असलेलें शरणबसवेश्वराचें सुप्रसिद्ध देवालय होतें. हिंदु हे अत्याचार चालू असतांना आपल्या भ्याडपणाच्या त्रिदास जागले व पशू बनलेल्या (त्या बिचाऱ्या मुक्या प्राण्यांना धार्मिक भावनाचे मशिदीचें व लांबदाढ्यांचें अस्तित्व माहीत नसतें हें ध्यानांत ठेविलें पाहिजे) मुसलमानाच्या 'दिन दिन' च्या रानटी आरोळ्यांना त्यानीं भीतीच्या आरोळ्यांचें उत्तर देऊन, जागा सांपडेल तेथें ते लपून बसले, हें सांगणें नकोच. ह्या हल्ल्यांत बंदुका, तरवारी वगैरे हत्यारांचा उपयोग करण्यांत आला होता व एका देवालयापुढें मुसलमानांच्या घोळक्याला थोपवून धरण्याचा प्रयत्न करीत असतां पोलीस (सी. आय. डी.) खात्याचे लोकप्रिय व हुशार सुपरिन्टेन्डंट मि. अशिफुल्हा ह्यानां गोळी घालून ठार मारण्यांत आलें.ह्या झटपटींत दंगेखोरांपैकीं तिघे जण ठार होऊन सहा जण जखमी झाले. नंतर लष्करानें शहर ताब्यांत घेतल्यावर सुशिक्षित व सधन वर्गापैकीं पुष्कळांनीं आपलीं बायको पोरें सुरक्षिततेसाठीं सोलापुरास पाठवून दिलीं. मुसलमानांनीं दिलेलें दंग्याचें कारण, त्यांच्या मशिदींचा हिंदूनीं केलेला अपमान हें असलें तरी तें कोणासहि—खुद्द वरिष्ट अधिकाऱ्यांसहि—समाधानकारक वाटत नाहीं. खरें कारण त्यांना हिंदूवर उगवावयाचा असलेला सूड हें होतें. गेले कित्येक दिवस निजामाच्या हद्दींत हिंदूंना जबरदस्तीनें बाटविण्याचा क्रम चालू होता कित्येक हिंदूनीं ह्या प्रकाराबद्दल निजामाकडे निषेध प्रदर्शित केल्याबद्दल देवाच्या आवडत्या इस्लामियांचा हिंदु काफिरांवर दांत होता. निजामसरकारनें कृपाळू होऊन व एक फर्मान सोडून ह्या दंग्याची चवकशी करण्यासाठीं एक कमिटी नेमली आहे.परंतु तिजवर लोकांच्या प्रतिनिधींपैकीं कोणाचीहि नेमणूक न झाल्यामुळें मुसलमानी पोलीस व दुसरे अधिकारी ह्या सध्याच्या सभासदांवर हिंदूंचा विश्वास नसल्यामुळें त्यांना ह्या कमिटीविषयीं अविश्वास वाटतो.

मोंगलाईतील हिंदूंना पोंचत असलेला मुसलमानाच्या धर्मवेडाचा उपसर्ग गंभीर स्वरूपाचा आहे; कारण, तो थांबविणें किंवा न थांबविणें सर्वस्वी निजामाच्या मर्जीवर अवलंबून आहे. निजामसाहेब स्वत: कर्मठ मुसलमान आहेत व त्यांना वाटल्यास सध्या चालू असलेला प्रकार थांबविण्याचा कोणताच प्रयत्न ते करणार नाहींत ! त्यानीं ह्या बाबतींत पक्षपाती धोरण स्वीकारल्यास निजामासारख्या वरिष्ट संस्थानिकांच्या कारभारांत हात घालण्याची छाती खुद्द हिंदुस्थान सरकारासहि होणार नाहीं. ब्रिटिश हिंदुस्थानांतील हिंदूंना मुसलमानांकडून त्रास झाल्यास त्याची दाद त्यांना हिंदुस्थानसरकारासारख्या खिश्चन सरकाराकडे मागतां येईल. ह्या खिश्चन सरकारची न्यायबुद्धि अगदींच नि:स्वार्थी नसली किंवा कुत्र्यानीं कुत्र्यांना (किंवा शीळपट मेंढऱ्यांना) फाडून खाणें, त्यांच्या हिताम कदाचित फायदेशीर असलें तरी सुद्धां तें नेहमींच मुसलमानानां प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणें प्रोत्साहनच देतील असें म्हणवत नाहीं. हिंदुस्थान सरकार पूर्ण जबाबदार नसलें तरी त्या टोंकाला जाण्याएवढें तें बेजबाबदार नाहीं. लॉर्ड कर्झन व्हॉइसरॉयाच्या गादीवर लोळत असतांना ते आपल्या मुसलमान बिबीवर फिदा झालेले होते. ते स्वतः ही गोष्ट सांगत असत. लॉर्ड कर्झनसारखा व्यवहारी ओबडधोबड व धूर्त इंग्रज त्याच्या बिबीनें दाढीमिशांची सवलत दिली असतांहि तिच्या बुरख्याच्या पाशांत गुरफटला गेला असेल हें शक्य दिसत नाहीं. खरी स्थिति अशी होती कीं, मुसलमानानां खूष ठेवण्यांत कर्झनचा डाव होता व तो टाळण्यासाठींच त्याची नेमणूक झालेली होती. तें कसेंहि असलें तरी कर्झनच्या वेळीं असलेली परिस्थिति आज राहिलेली नाहीं. कर्झनचा सूर्य केव्हांच अस्तंगत झालेला आहे व कर्झन साहेबांच्या घराण्याच्या चिलखतावर जरी Curson holds what Curson held हें कर्झन कुळाच्या वैभवाच्या चिरकालित्वाचें भविष्य लिहिलेलें असलें तरी तें खरें ठरणें दुर्दैवानें सृष्टिक्रमाविरुद्ध आहे. तेव्हां ब्रिटिश हिंदुस्थानांतील हिंदूंची स्थिति, ह्या बाबतींत, हैद्राबादच्या दुर्दैवी हिंदूंना हेवा वाटण्यासारखी आहे, ही पण ब्रिटिश राज्याची चांगली बाजू !

वास्तविक, मुसलमानानीं हिंदूंवर केलेल्या अत्याचाराच्या मुळाशीं 'धार्मिक भावना' असणें अशक्य आहे. त्याच्या मुळाशीं धर्माची कल्पना नसून अधर्माची दंडेलीची व क्रौर्याची कल्पना आहे. मुसलमानाना धार्मिक भावना असल्यास त्या हिंदूंकडून दुखविल्या जाणें अशक्य आहे. हिंदुधर्म हिंदुस्थानच्या सात्विक व निरुपद्रवी भूमींत रुजलेला आहे. हिंदुधर्माचा वृक्ष, आज जरी त्याचें आयुष्य कष्टमय दिसत असलें किंवा त्यानें हजारो निघृण घाव पूर्वी सहन केले असले तरी, बुद्ध धर्मासारख्या धर्मांना जन्म देणाऱ्या समृद्ध भूमीनें पोसलेला आहे. अरेबियाच्या रुक्ष व अस्वस्थ वाळूनें तो पोसलेला नाहीं. हिंदूधर्माला किंवा तो आचरणाऱ्या हिंदूंना दुसऱ्या धर्मांबरोबर स्पर्धा करुन किंवा त्या धर्मांच्या अनुयायांच्या भावना दुखवून काय मिळणार आहे ? हिंदूंनीं दुसऱ्या धर्मानुयायांच्या भावना दुखविण्याचें सोडाच, त्यानीं स्वतःच्या धार्मिक भावनाची फाजील काळजी केव्हांहि घेतली नाहीं ! आम्हाला धार्मिक भावना नाहींत काय ? आमच्या धार्मिक भावनाविषयीं ह्या मुसलमानानीं किंवा दुसऱ्या कोणी केव्हां व कितीशी आस्था दाखविली किंवा दाखवीत आहेत ? मुसलमान डुकरांना जेवढें निंद्य मानतात तेवढेंच गाईला आम्ही पूज्य मानतों; डुकराच्या उल्लेखानें त्याचें पित्त जेवढें खवळतें तेवढेंच गाईच्या वधानें आमचें खवळतें. मग, धार्मिक भावनेच्या सबबीवर आम्ही मुसलमानांची कपाळें कां फोडीत नाहीं ? मला मुसलमानाच्या दाढीची अत्यंत चीड आहे. मी एकदां स्वतः दाढी वाढविण्याचा प्रयत्न करून पाहिला होता. पण तो फसला; मग मी रस्त्यावर भेटलेल्या मुसलमानाची दाढी कां ओढीत नाहीं ? गाई खाणाऱ्या किंवा गलिच्छ दाढ्या वाढविणाऱ्या मुसलमानांवर हिंदु हात टाकीत नाहींत ह्याचें कारण, मी कबूल करतो, आजचे हिंदु—हिंदु नसलेले हिंदु—भ्याड आहेत; पण मुसलमानाच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड समंजस हिंदु येत नाहींत किंवा त्यानीं येऊं नये ह्याचें खरें कारण, दाढ्या वाढविणें सोडून दिलें (आमचे प्रो. कोसंबी दाढी वाढवितात) तरी गोहत्तेची जबाबदारी सर्वस्वी हिंदूंवर आहे हें होय. हिंदूंनीं मनांत आणलें तर गोहत्या अशक्य होइल. सामाजिक बहिष्कारानें, संघटनेनें हिंदूंना गाईचें मांस सिंहाच्या मांसाएवढें दुर्मिळ करतां येईल. अस्पृश्यानां दूर ठेवण्यांत ज्या शक्तीचा अपव्यय होत आला आहे ती शक्ति आज एकवटून हिंदूंना गोहत्या थांबवितां येणार नाही काय ?

परंतु एकवेळ धार्मिक भावनाची सबब खरी धरली तरी सुधां, जेव्हां खुद्द मुसलमानच मुसलमानाच्या ह्या भावना दुखवितात तेव्हां त्या बलिष्ट मुसलमानांचें काय पारिपत्य करण्यांत येतें ? तुर्कस्थानांत परवां जेव्हां मुस्तफा केमाल पाशानें खिलाफतीचें त्या देशांतून काय़मचें उच्चाटन केलें; खलिफा हा पैगंबरापासून चालत आलेल्या ओथमानच्या जुन्या (गोंमातकाच्या टेकड्यापेक्षांहि जुन्या) व पवित्र घराण्यातील वंशजाला नास्तिक कुत्र्यांच्या देशांत पळून जावयास लावलें, तेव्हां हिंदी मुसलमानानीं आपल्या दुखविलेल्या भावना कशा नीट केल्या ? केमालनें— त्या शूर सेनापतीनें व हुशार मुत्सद्यानें—स्वदेशहिता करितां तुर्कांच्या दुहीचें, दौर्बल्याचें परतंत्रतेचें व अज्ञानाचें मूळ उपटून टाकलें असेल; युरोपियन जुगाऱ्यांचा अड्डा उठवून लावणें एका स्वतंत्र राष्ट्राच्या वृद्धीकरितां तुर्की प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष म्हणून त्याला भाग पडलें असेल; पण इस्लामाची भवितव्यता—सर्व आज्ञाधारक मुसलमानांवर अधिकार गाजविणाऱ्या धर्मगुरूची वाटलात लावली जाण्यांत इस्लामांची भवितव्यता कोठें राहिली ? आज भेकड, निरपराधी हिंदूंची कपाळें फुटलीं जात आहेत; त्या पूज्य पैगंबराचा (जयजयकार असो) पवित्र आज्ञेचा उघड उघड अनादर करून त्यांच्या निर्बल बायकांची इज्जत घेतली जात आहे; केमालचा जबडा शाबूत असून त्याची बायको बुरखा फेंकून देऊन निर्लज्जपणें एका अमेरिकन वर्तमानपत्राच्या बातमीदार कुत्र्याबरोबर सलगीनें स्त्रीशिक्षणाविषयीं, चहा पित पित, गप्पा मारण्यांत गढून गेली आहे. वर्तमानपत्रांत दिलेल्या तिच्या फोटोकडे मेक्सिकोच्या दुसऱ्या टोकावर असलेल्या ठिकाणीं दोन लफंगे तरुण कौतुकानें पहात आहेत; हा सर्व प्रकार चालला असतां गुलबर्ग्याच्या रस्त्यावर वापरल्या जाणाऱ्या गांजलेल्या बंदुका, तरवारी व विटा कोठें आहेत, ते धमक्या देणारे उलेमा कोठें आहेत ? इस्लामाचें स्वातंत्र्य धोक्यांत आहे. पदच्युत व निर्धन खलीफास त्या खऱ्या मुसलमानानें निजामसाहेबानें खर्चासाठीं वर्षासन तोडून दिलें असलें तरी तें स्वातंत्र्य प्रस्थापित होत नाहीं ! मुसलमानांच्या धार्मिक भावना मेल्या काय ?

संजय

...mara Munici-
...al de Quepem

De ordem da Exma Camara
...nicipal deste concelho, se
...publico que na sessão ordi-
...ia de 13 de Outubro proxi-
... seguinte e sessões imedia-
..., serão arrematadas, em has-
...publica, pelas 13 horas as a-
...nças de receita e despesa do
...nicipio, relativas ao ano civil
... 1925, tais como, assentada
... vendilhões do concelho á
...epção de Curchorem e Ca-
...rà, passagens de Assoldá, Co-
...mbi e Betul, carros extra-
...os, imposto de feiras, car-
...s verdes, coima, exportação
... lenha, madeira etc. por via
...rrestre ou fluvial, imposto de
...nas, de capacidade não infe-
...or a uma tonelada que en-
...arem ou sairem com merca-
...ria pelo porto de Betul e
...em assim o serviço de ilumi-
...ção publica da cassabé.

Faz-se mais publico que nos
...as 12 e 19 do dito mez de
...utubro terá lugar na estação
...erro-viaria de Curchorem pe-
...as 10 horas, a adjudicação de
...placas para o serviço do trans-
...orte de bagagem dos passa-
...geiros das lanchas e da estação
...ferro viaria daquela localidade
...bem assim de passagens de
Sanvordem, Capxem e Xelvo-
...na, de coima e asentada de
...vendilhões de Curchorem, Ca-
...corá e Odar, do imposto de to-
...nas de capacidade não inferior
... uma tonelada que entrarem
...ou sairem com mercadoria de
...qualquer ponto marginal dos
...rios que banham este concelho
...á exepção do porto de Betul
... bem assim o serviço de ilumi-
...nação pública em Curchorem.

Declara-se mais que a Cama-
...ra reserva o direito de não ul-
...mar a arrematação do imposto
...de tonas nas condições acima
...ditas quando o preço oferecido
...na praça não fôr vantajoso ao
Municipio.

As condições de arremata-
...ção estarão patentes no acto da
praça,

Secretaria da Camara Muni-
cipal em Quepem, 8 de Setem-
bro de 1924.

O Secretario da Camara,
Visvonata Rudragi S. Sir-
...

Ano 9 o N. 25

Quinta-feira 18 de Setembro de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
por cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.

BHARAT

वर्ष ९ वें. अंक २५

गुरुवार ता. १८ सप्टेंबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें-गोवा

CODIGO DE USOS E COSTUMES DE GOA

Dia mais, dia menos entrara' na tela da discussao o projeto deste codigo de tao palpitante interesse vital aos sectarios da religiao hindu', que constitue mais da metade da populaçao de Goa, elaborado pelo eminente orientalista e afamado jurisconsulto sr. Dr. Bragança Pereira, projecto que foi distribuido pelos vogais do Conselho Legislativo.

Os usos e costumes dos hindu's de Goa foram ultimamente codificados pelo Decreto de 16 de Dezembro de 1880; mas como esta lei nao satisfazia, em geral, a' aspiraçao dos sectarios da mesma religiao, exigia-se ha muito a modificaçao desse Decreto.

Em que bases devera' inspirar-se essa modificaçao?

Pertence isto aos competentes.

Entretanto, como um dos obscuros membros daquela scita, entendemos do nosso dever abordar as nossas modestas consideraçoes sobre o mesmo projeto; mas antes desta ardua tarefa vejamos em rapidas linhas o que sejam os usos e costumes hindu's e ate' que ponto convem mante-los dando-lhes a sancçao legal ou restringi-lòs possivelmente para o bem estar tanto dos interessados como da nacionalidade portuguesa.

Veem a talho estas preguntas porque se notam sobre o assunto duas correntes de opinioes, uma baseada na velha e decrepita civilisaçao indiana e a outra originada nos principios progressivos da evoluçao ocidental; e como nas regioes oficiais predomina o segundo elemeuto, as suas voz e opiniao teem sido de peso e valor.

Para pano de amostra do que dizemos, veja o leitor no relatorio que precede ao Co'digo do Registo Civil promulgado pelo Dec. de 9 de Novembro de 1912, entre outros, os seguintes conceitos.

"Respeitaram neste projecto os usos e costumes dos habitantes nao cristaos.................................."

"E' certo que esses usos e costumes se *nao coadunam com a nossa civilisaçao, mas tambem nao podem banir-se rapidamente, tradiçoes e praticas religiosas ja' muito inveteradas* sem grandes abalos, que neste momento convem muito naturalmente evitar. *Uma educaçao cuidadosa e diplomas* "especiais ponderadamente estudadas e publicadas nao duma so' vez, mas segundo uma conveniente evoluçao levarao os povos da India a modificar ou acabar, aos poucos, com tais usos e costumes.'

HIC JACET LEPUS...

¿Porque haveria tamanha relutancia em ver mantidos estes usos e costumes?

So' porque se nao coadunam eles com a civilisaçao ocidental?

¿Porventura os nossos dirigentes convencem se de que a civilisaçao ocidental tem atingido o seu maximo topo e nao tem lacunas a preenche las representando ela a ultima aspiraçao da humanidade inteira?

E se a civilisaçao ocidental esta' no seu auge ¿por que e' que se notam, a cada passo, revoluçoes e anarquismos sociaes nas naçoes europeas com uma velocidade vertiginosa e sem rumo nem prumo?

¿Porque sera', entao, que a *e'lite* intelectual daqueles paizes nao tem uniformidade de vistas sobre os problemas de reformas sociaes que se lhes deparam?

Se uns defendem o regime da propriedade individual, outros preconisam o da sua municipalisaçao ou socialisaçao. Se uns procuram a salvaçao do paiz no socialismo outros pretendem valer-se do bolchevismo, facismo etc.

Em fim uma barafunda caotica e sem saida!

Ha quem raciocine que a emancipaçao dos povos consiste na adaptaçao da civilisaçao ocidental, argumentando outros, com respeito ao nosso paiz, que pela assimilaçao dos costumes ocidentaes e' que devemos procurar a firmeza da soberania portuguesa.

Pura utopia!

Nao somos acerrimo admirador de uma ou de outra civilisaçao o que desejamos e' que o fiel da balança mantenha o equilibrio para o bom funcionamento da maquina social. Nestas condiçoes, e' aceitavel todo o costume ocidental, que nao va' bulir com a essencia da civilisaçao indiana, cabendo tambem aos ocidentais, na igualidade de circunstancias, o papel de aceitar os costumes indianos.

O que se observa porem e' bem contrario! Por quanto os defensores da civilisaçao ocidental tem tamanha aversao por todo o costume indiano, ainda que seja este aconselhado pela sciencia e consciencia, que da' margem a serias criticas.

A sciencia moderna reconhece vantagens da incineraçao dos cadaveres, pratica seguida entre os hindu's desde os tempos remotissimos; mas ¿quantos dos ocidentalisados estarao dispostos a aceitar este uso, banindo o sistema por eles seguido e que e' incompativel com a sciencia?

Temos fresca a memo'ria da guerra movida ao General Machado, quando Governador desta India, por ter publicado uma Portaria determinando incineraçoes dos cadaveres de individuos falecidos pela peste bubonica.

Japao, esta naçao progressiva que se celebrisou no concerto de naçoes e leva a primazia na vanguarda da civilisaçao mundial sem se renunciar aos seus velhos usos e costumes procura reforma-los dentro da orbita das suas instituiçoes nacionais.

Os usos e costumes de cada povo variam segundo o seu temperamento tradiçoes, historia, religiao e varios outros factores distrutivos que sao formados pelo conjuncto das producçoes de longa experiencia.

Ora, estes factores, que criam os usos e costumes, divergindo profundamente na constituiçao de sociedades orientaes e ocidentaes, a enxertia dos costumes ocidentaes nos habitos da maquina social oriental longe de beneficiar esta, redundara' antes em seu prejuizo.

Tambem nao e' verdade que a assimilaçao dos costumes seja a base solida da manutensao da soberania de qualquer naçao. Se assim fosse o Brasil e Estados Unidos cujos habitantes foram da mesma raça, lingua, costumes, e religiao dos metropolitanos nunca se proclamariam independentes.

E' erro politico procurar a fusao de nacionalidades distintas pela assimilaçao de costumes quando, estejam separadas pela situaçao geografica.

Ha' mais ainda.

A sujeiçao vexatoria dum determinado povo a outro pertence a histo'ria.

O progresso das ideas liberais que criou o espirito moderno admite tutela no caso em que um povo nao se julgue apto para reger a sua pessoa e bens mas essa tutela tambem tem limites, porquanto, cessado o motivo, tem de cessar forçosamente o efeito. 'Sublata causa tolitur efectus."

O entusiasmo dos portugueses pela independencia do Brazil e dos ingleses pela dos Estados Unidos tem origem neste invariavel principio.

¿Porque, pois nao havemos de seguir o exemplo de Japao para formaçao dos nossos costumes, sem perder o relevo da nossa civilisaçao milenaria?

Cada terra com seu uso, cada roca com seu fuso.

G. C. Guddó

Apelo

Chamamos a atençao dos nossos leitores para o seguinte apelo;—

Vai fazer um ano que exalou o derradeiro alento o venerando anciao Padre A'lvares, espirito de abnegaçao, de bondade, de altruismo, de isençao e de patriotismo. Sempre esquecido de si pro'prio so' professou o culto do amor do pro'ximo.

Nos maiores flagelos que assolaram povoaçoes desta terra, nao o acobardaram perigos nem o amolentaram canceiras; guiado pelo sentimento do bem, preocupou se u'nicamente em levar o'bulo ao pobre, remedio ao enfermo, consolaçao ao aflito. Acalentou a infancia, amparou a senectude, abrigou proscritos, alimentou famintos, saciou sedentos. Carretou mortos nos seus hombros, abriu sepulturas com as suas maos Orou pelo socego de todos e chorou pela desgraça alheia.

Cidadao esforçado, e denodado campeao das liberdades publicas, a maior aspiraçao de toda a sua vida foi o engrandecimento e o bem estar do seu pais.

A apoteose que representou o se ultra-ordinario funeral, ao qu[illegible] acorreu gente de todas as condiçoes sociais, e que de comovida admiraçao e espirito recolhido, acompanhou o feretro ate' a deposiçao na sepultura, e' o irrefragavel depoimento de tudo o que foi e mereceu esse, nunca assa's lembrado homem, de tao invulgar grandeza de coraçao; e bem demonstra como o sentimento popular o sagrou no rencondito da sua consciencia.

Desejando, por isso, a comissao constituida apo's o falecimento de Padre A'lvares, perpetuar a memo'ria deste inclito varao, de tao preclaras virtudes, para que a posteridade o traga sempre presente como o milhor modelo de alma singela e humanitaria, apela ao sentimente bemfazejo de todos os concidadaos, cavalheiros e senhoras e roga o seu valioso auxilio pecuniario, para se erigir um padrao comemorativo condigno do valor moral do excelso finado.

(N.B.--O produto da subscriçao devera' ser entregue ao Exmo Sr. J J da Cunha.)

A comissao,

Antonio Tamauturgo Pereira
Visnum Siuay Dempó
Luis de Minezes
J. J. da Cunha
Milagres Lobo

पाणी— विक्रीचें दुकान मांडलें. तावडतोब एकीनें चहाची लज्जत अनुभवण्यास आरंभहि केला. पण ह्या चहाच्या पाण्यांतहि विषारी द्रव्यांचें मिश्रण केलें गेलें असल्यानें, मृत्यु शिवाय तिला चहाशीं देह विसर्जन करावा लागला!

आपल्या सर्व सोबतीणींच्या शोचनीय निधनानें दैतागून गेलेल्या त्या संघाच्या शेवटच्या मक्षिकेनें आत्महत्या करून या नश्वर व दुःखमय जगाचा अखेरचा रामराम ठोकण्याचा निर्धार केला. आपल्या जिवलग मैत्रिणींवांचून सर्व सृष्टि व सृष्टींतील सर्व सुखोपभोग तिला उदासवाणे वाटून, तिनें वरील निर्धार केला असल्यास आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. अस्तु. आत्महत्या करण्याच्या उद्देशानें त्या बिचाऱ्या मक्षिकेनें विष सेवन करण्याचा सपाटा चालविला; पण आश्चर्याची गोष्ट, ह्या विषसेवनामुळें तिला मरण तर आलें नाहींच, उलट मरणालाच मात्र तिला शरण जावें लागलें. या विपरीत प्रकारें तिला परमावधीचा विस्मय वाटला व ती ह्या अशक्य समजला जाणारा प्रकार घडवणाऱ्या कारणांचा शोध करूं लागली. शेवटीं तिला समजून आलें कीं, खुद्द विषांतसुद्धां कमरसल व नकली द्रव्यांची भेसळ करण्यास मानवी स्वार्थपरायणता या नवीन युगांत चुकली नाहीं.

स्फुट विचार

" विगारीच्या घोड्याला ":— 'विगारीच्या घोड्याला तरवडाचा फोक' अशी एक ह्मण आमच्यांत प्रचलित आहे. या ह्मणीचा अर्थ असा आहे कीं, भाड्याच्या घोड्याला हांकावयाला तरवडा-या फोकाचा ह्मणजे फांदीचा सढळ हातानें उपयोग करण्यांत येत असतो. कारण उघडच आहे. विगारीचा घोडा दुसऱ्यांचा – परक्यांचा असल्यानें, अगदीं थोड्या वेळांत त्याच्याकडून जितकें जास्त काम करून घेणें शक्य असेल तितकें करून घेण्याची स्वार्थी पण निदर्य प्रवृत्ति कोणत्याहि 'व्यवहारज्ञ' माणसाची झाल्यास, त्यांत आश्चर्य मानण्याचें बिलकूल कारण नाहीं. ज्या ज्या प्रवृत्तिपर गोष्टींत परक्यांचा संबंध असतो, त्या त्या गोष्टींत "विगारीच्या घोड्या"च्या न्यायाची स्पष्ट छटा उमटलेली ठळकपणें दृष्टोत्पत्तीस आल्याखेरीज रहात नाहीं. गोमांतक हा देश तरी परक्यांच्या दृष्टीनें 'भाड्याचेंच घोडें' नाहीं काय? हा प्रांत आमचा नाहीं, तो 'काफरां'कडून आह्मी काबीज केला आहे, अशाच भावनेचा पगडा परक्यांच्या समजुतीवर बसलेला दिसून येत नाहीं काय? तर मग या 'भाड्याच्या घोड्या'चा कररूपी तरवडाच्या फोकानें खरपूस समाचार घेऊन भाडेकरी महात्म्यानीं स्वतःचे खिसे गरम करण्याचा सरळ व राजमार्ग पत्करला असल्यास, या न्याय्य कृतीविरुद्ध जित लोकांना अकांडतांडव करण्याचें पायाशुद्ध असें कोणतें कारण आहे? ! कोणतेंच नाहीं अर्सेच जगांतील बच्चाबच्चा जेते लोक एकसमयावच्छेदें उद्गारतील, यांत संशय नाहीं.

"नरहरदेवाची पालखी":— उदरगिरीच्या खोल गुहेंत परवित्त व जीवित अदृश्य करण्यास सोकावलेल्या जेते लोकांची पुरातन खोड बिनतोड मोडली जावी असें जित जनतेंतील कांहीं स्वातंत्र्योत्सुक व्यक्तींस वाटत नाहीं, असें नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्या दिशेनें त्यांचे थोडे बहुत प्रयत्नहि चालू असतात. पण या बाबतींत नुसता 'नरहर देवाच्या पालखी'चाच उत्सव साजरा होत असल्यानें, तो सर्व उद्योग केवळ निष्फळ होत असतो. जें काम करावयाला सर्व लोकांच्या मदतीची आवश्यकता आहे व ज्याची जबाबदारी कोणा एका विशिष्ट माणसावर नाहीं, आणि जें काम चांगल्या रीतीनें झाल्याची किंवा न झाल्याची कोणाला पर्वा नसते, अशा कामाला 'नरहरदेवाची पालखी' या अर्थपूर्ण संज्ञेनें संबोधण्याचा प्रचार आहे, हें वाचकांस अवगत असेलच. ही 'नरहर देवाची पालखी' जित लोकांच्या प्रत्येक कृतीच्या आड येत असल्यानें, ती कृति वांजट बनत असल्यास आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं.

"दगडाचा दोर होत नाहीं":— मडगांवच्या 'आ तेन्ह' पत्राच्या संपादकानीं पोंर्तुगालच्या 'दियार्यु दे लिजबोअ' नामक दैनिकास एक पत्र लिहून कररूपी तरवडाच्या फोकानें गोमांतकासारख्या विगारीच्या घोड्याची कशी भंबेरी उडवून दिली आहे, याचें यथार्थ वर्णन केलें आहे. आवतोनोमीच्या प्रथम प्रवेशापासून तों आजतागायत, लोकपक्षीय मेंबरानीं आपल्या सगेसोयऱ्यांचा प्रपंच थाटण्यासाठीं प्रत्येक लोकहितविघातक कार्यांत सरकारशीं कशी अनिष्ट सहकारिता केली, याचें चित्र तर सदर पत्रकारानें इतक्या बेमालुम रीतीनें रंगविलें आहे कीं, त्यांत सत्याच्या झगझगित प्रकाशाशिवाय दुसरें कांहींच दिसून येत नाहीं. नामदारांचीच हजेरी घेऊन तेन्हकार स्वस्थ बसले नाहीत; गव्हर्नरसाहेबांचीहि त्यानीं आपल्या त्या स्पष्टोक्तींत रेवडी उडविली आहे. परंतु या त्यांच्या प्रयत्नापासून जेथें तेथें 'नरहर देवाच्या पालखीच्या' गोंगाटानें कानठाळया बसत असल्यानें, सध्यःस्थितींत कोणताहि उपयुक्त फरक होण्याची आशा बाळगणें ह्मणजे दगडाची दोरी तयार करण्याची वांजटी हांव बाळगण्यासारखें आहे, हें कोणीहि कबूल करील.

गर्जेल तो पडेल काय?:— पण तेन्हकारांसारख्यांच्या नुसत्या बोंबलण्यानें काय निष्पन्न होणार आहे! गर्जेल तो पडेल काय? जोपर्यंत त्यांची व त्याच्या इतर जित जातभाईंची जेते लोकांच्या संस्कृतीवरील स्वाभिमानशून्य श्रद्धा ढळणार नाहीं, जोंपर्यंत जेते लोकांच्या हितसंबंधांतच आपले हितसंबंध संलग्न झाले आहेत, ही त्यांची चुकीची समजूत किंवा समजुतीची चूक नष्ट होणार नाहीं व जोंपर्यंत अंधधर्माभिमानाचा सक्रीय त्याग त्यांच्या कडून होणार नाहीं, तोंपर्यंत सुकाणूशिवाय अनिश्चित राजकीय ध्येयाच्या तुफानलेल्या समुद्रांत सांपडलेली आमची गोमांतक राष्ट्र–नौका सुस्थितीच्या किनाऱ्याला सुखरूपपणें लागेल ही आशा करणें व्यर्थ होय. एवंच जित लोकांचें निकट व बळकट एकीकरण झाल्याविना, जेते लोकांनीं बनलेलें हें 'कुरण,' खऱ्या मालकांच्या स्वाधीन होणें कदापि शक्य नाहीं, हें उघड आहे.

वस्तुस्थितीचें अज्ञानः— कार्लुस कास्त्रु नावांच्या एका पोर्तुगीज पार्लमेंटच्या सभासदानें 'प्रस्तुतच्या किंमतीनें प्रेदियाल कर वसूल करण्यांत आला असता, तर या करांचें उत्पन्न तिप्पट झालें असतें,' असे उद्गार काढल्याचें प्रसिद्ध झालें आहे. प्रेदियाल करविषक माहिती त्यानां कोणी पुरविली असेल ती असो, पण ती वस्तुस्थितीशीं कशी विसंगत आहे, हें राव्यानिशीं सिद्ध करून देण्याचें काम सि. लिबेरियु पेरैर यानीं चोख रीतीनें बजावलें आहे. 'जर जमिनीचें उत्पन्न वाढल्या प्रमाणावर आहे, तर सरकार आपल्या राज्यांतील जमिनी माफकदरानें विकण्याचा आंतवट्याचा 'अव्यापारेषु व्यापार' कां करीत असतें? अशा सरळ सवालाचा मारा करून, तेन्हकारानीं त्यांना गप्प बसविलें आहे. तुटपुंज्या ज्ञानावर विशेष भरवसा ठेविला ह्मणजे या 'भरवंशाच्या ह्मशीस टोणगा' अशी स्थिति होऊन जिकडे तिकडे फजिती उडावी, हें योग्यच आहे. त्यांत नवल मानण्यासारखें असें कांहींच नाहीं.

स्वदेशीं प्रयाणः— हो ना ह्मणतां ह्मणता अखेर डा० जाइम द मोराइस हे आपला येथील गाशा गुंडाळतील, असें वाटावयास लागलें आहे. मोराइसची कारकीर्द अनेक दृष्टीनीं येथील प्रजेला सुखकारक झाली नाहीं, असेंच मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें! प्रजेच्या हिताकडे दुर्लक्ष करून स्वतःची तुंबडी भरण्याचीच कोणत्याहि गव्हर्नरनें जास्त काळजी वाहिली असेल तर ती मोराइसनींच, असें खुद्द पोर्तुगालच्या पत्रांतून ओरड चालू आहे. डोईपट्टी, कस्टम करांची बेसुमार वाढ, वर्तमानपत्रांची मुस्कट दाबी इ. इ. सारख्या अनुचित कृत्यांनीं डॉ० जाईम साहेबांची कारकीर्द तिरस्करणीयच झाली आहे, असाच बहुजन समाजाचा तिच्या संबंधानें स्पष्ट अभिप्राय पडेल. खुद्द भारतालाहि अनेक गोष्टींत त्यांचें गव्हर्नरी अस्तित्व बरेंच बाधक व अनुपकारक झालेल आहे. पण असें जरी असलें तरी त्यांचें 'निजधामी गमन' सुखरूपपणें होवो, असें इच्छिल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं.

मुनिसिपल निवडणुकाः— येत्या नव्हेंबरांत ठिकठिकाणच्या मुनिसिपल निवडणुका पार पडतील, असा ध्वनि उमटूं लागला असून, निवडणुकींच्या रणक्षेत्रांत दंड थोपटून सामना देण्याच्या जय्यत तयारीनें अनेक वीर उभे टाकणार आहेत, अशा अर्थाच्या वदंताहि प्रस्तुत पावत आहेत. परंतु या युद्धापासून जनेतला कोणताहि उपयुक्त फायदा घेण्याची संधि लाभणार नसल्यानें, त्याच्या परिणामाकडे आमेंच विशेषेंस लक्ष वेधणें अर्थातच शक्य नाहीं. सध्याच्या मुनिसिपल कायद्यांची अशीच रचना आहे कीं, या रचनेमुळें करवाढीशिवाय दुसरी कसलीहि महत्त्वाची कामगिरी मुनिसिपालटींच्या हातून पार पडण्यासारखी परिस्थिति निर्माण करणें कठीण आहे! मग ध्येनाटार्थी शक्तीचा व्यय कां करा! ज्या कामांत लोकहिताचा 'राम' नाहीं, त्या कामांत निरर्थक घाम काढण्यांत कोणता फायदा आहे?

पोर्तुगालः— पोर्तुगालची राजकीय परिस्थिति 'गढूळ'च असून मतभेदाचें पिशाच्च तेथें निष्कंटक धिंगाणा घालीत असल्याचें दृश्य दिसून येत आहे. खुद्द प्रधान मंडळांतील ऐक्याचीं शकलें झालीं असून, या ऐक्यभंगाचे दुष्परिणाम पोर्तुगीज प्रजेला केव्हां व कसे भोंवतील याचा नेम नाहीं! बंडखोर मिलिटरी लोकांच्या पर ठिकाणीं बदल्या करण्यंत आल्या असून, जनरल गोमीस द कोस्तांचीं 'सन्माननीय' उचलबांगडी लोरेस मार्कीस येथें होईल असें वाटतें. 'सन्माननीय' ह्मणण्याचें कारण इतकेंच कीं, एकाद्या हलकट दर्जाच्या गुन्हेगाराप्रमाणें त्यांना आफ्रिकेंत कोंबण्यांत येणार नसून, वसाहतींतील मिलटरी खात्याचे सर्वाधिकारी ह्मणून त्यांची आफ्रिकेंत नेमणूक होणार आहे! असो. होईल तें दिसेलच. घोडा मैदान जवळच आहे. अनिश्चित परिस्थितीवर निश्चित स्वरूपाचे विचार प्रदर्शित करण्यांत काय हंशील आहे?

हिंदु समाजाचे सभासद व हितचिंतक यांस

ता. २८ माहे फेब्रुआरी १९१९ रोजीं रिवण–गोवा येथें स्थापन झालेल्या 'हिंदु समाज' या संस्थेचें कार्य मध्यंतरी कार्यकर्त्या पुरुषाच्या अभावीं व फंडाच्या कमतरतेमुळें तसेंच पडलेलें असून; त्या संस्थेनें सुरू केलेलें मासिक 'भारतोदय' बंद पडलेलें आहे. तेव्हां हें संस्थेचें कार्य व मासिक पुनः सुरू करावें असें वाटत असल्यामुळें हिंदुसमाजाशीं संबंध असलेल्या प्रत्येक गृहस्थास या नोटीशीद्वारें अशी सूचना देण्यात येत आहे कीं, ज्या कोणास या संस्थेशीं पूर्वीप्रमाणेंच संबंध ठेवावयाचा असेल तर त्यानीं ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत तसेंच या संस्थेचे जनरल सेक्रेटरी वासुदेव विठ्ठल प्रभू देसाई रिवण–गोवा यांस कळवावें. ज्यांकडून असा लेखी हेतु वरील मुदतींत सेक्रेटरीकडे येणार नाहीं, त्यांचा त्या संस्थेशीं कोणत्याहि प्रकारचा पूर्वसंबंध मानण्यांत येणार नाहीं. तसेंच याद्वारें अखिल हिंदु समाजाला असें कळविण्यांत येत आहे कीं परिस्थित्यनुरूप या संस्थेची पुनर्घटना करण्यांत येणार असून या नवीन घटनेन्वयें सुरू करण्यंत येणाऱ्या संस्थेच्या कार्यांत जुने व नवे असा भेद न होतां सर्वांना पुनः वर्गणीदार, सभासद व वाली होतां येईल. एक महिन्यानंतर या संस्थेचें ध्येय, मार्ग व नियम याच वर्तमानपत्रांत क्रमशः प्रसिद्ध होतील.

सर्वांचा नम्र सेवक
सेक्रेटरी— हिंदुसमाज

फॅशन

ले० १ ला.

(श्रीपाद जगन्नाथ देसाई, कुडचडें)

आम्ही कांहीं कसलेले लेखक नाहींत, कीं कोणांची कारवाई करून आरंभलेला विषय वाचकांपुढें—टीकाकारांचें कौशल्य बाजूला ठेऊन— मांडू शकूं. हा विषय साधारण जनसमूहाकरतांच आम्हीं हातांत घेतलेला असला तरी शिकलेल्या शहाण्यासुरत्या सुधारकांनीहि त्याचा उपयोग करून घेऊं नये, असें कोणास कसें ह्मणतां येईल?

शिक्षित सुधारकांनो? कांठें कोठें आपल्या चवचाल छिचोर चालचलणूकीवर कडक कोरडे उडविले जातील; पण आमच्या पवित्र उद्देशावर नजर ठेवून हंसक्षीर न्यायानें आपण त्यांतील बोधाचें ग्रहण कराल अशी आशा आहे.

उपद्यापी टीकाकारानों, संपूर्ण लेख वाचल्याशिवाय नुसत्या एकाच लेखांकावरून स्वतःचें त्याविषयीं मत बनवून घेण्याचा व्यर्थ खटाटोप करूं नका! प्रस्तावनेनंतर आतांआपण आपल्या विषयाकडे वळूं.

फॅशन हा एक सांसर्गजन्य रोग आहे. पण इतर जंतुजन्य सांसर्गिक रोगांत व ह्या रोगांत पुष्कळ फरक आहे. इतर रोगांचे जंतु श्वासोश्वासाच्या मार्गानें नासिकाद्वारें देहांत प्रवेश करतात व आपलें ठाणें शरीराच्या इतर भागांत वसवतात, तर ह्या असाध्य रोगाचे जंतु दोन्ही डोळ्यांवाटे आपला शरीरांत प्रवेश करून घेतात व आपलें बस्तान डोक्यांतच बसवून सारी मनोभूमि रक्तपाताशिवाय हस्तगत करितात. इतर रोगांवर अचूक औषध तयार करण्यास शिकावें ह्मणून भुरटे लोक परदेशांत जातात, तर परदेशचें पाणी प्यालेल्या तरतरित तरुणांस हा रोग आपलें रजिष्टर्ड Registerd कुळ बनवितो. इतर रोगांतून बरें होण्यास कांचनाचें पाठबळ असावें लागतें, तर ह्या रोगांतून सहीसलामत निभावण्यास लक्ष्मीच्या अभावाचीच अधिक अपेक्षा असते. इतर रोगांची वाढ दोन प्रहरची ददात असलेल्या दैवहीन दरिद्री लोकांतच जास्त होते; पण ह्या रोगाचा फैलाव भोळ्या बापड्या भिकाऱ्यांपेक्षां 'फजर'ची फिकीर नसलेल्या ऐतखाऊ बडे बापके बेट्यांत विशेष होतो. सरस्वतीच्या सेवनानें संपूर्णतेस [!] पावलेल्या ताज्या दमाच्या तरुणांस इतर रोगांच्या सर्वनाशक जंतूपासून अलग असावेंसें वाटतें. पण ह्या रोगाच्या सर्वभक्षक जंतूस तर ते प्रेमानें कवटाळतात. इतर रोगांचें भय चाळीसी चढवून पुढें सरलेल्या व साठीच्या सुमारास आलेल्या तावून सुलाखून निघालेल्या जख्खडांसच जास्त असतें; तर ह्या सर्वव्यापी रोगाचें भय दहांच्या दशेची दहशत [illegible] ... बत्तीशीच्या बेतांत आलेल्या प्रत्येकास भोंवतें. इतर रोगांच्या वळीं पडलेला मनुष्य एक पाय स्वर्गात व एक पाय मृत्युभूमीवर अशा अवजड अवस्थेंत असतो; तर ह्या फॅशनच्या फसवणूकीच्या फशीं पडलेल्या मनुष्यास स्वर्ग दोनच बोटें असतो. इतर रोगांनीं ग्रासलेला मनुष्य त्रस्त जीवित असा होतो; पण ह्या रोगाच्या तडाक्यांत आलेल्या मनुष्याला आनंदाचे उमाळेच फुटत असतात. आणि सर्वांत मोठा फरक तो हाच कीं, इतर रोगांच्या वशाखालीं वसरलेल्या जीवास स्वतःच्या रोगाची पूर्ण जाणीव असते पण ह्या मुत्रारकी रोगाच्या फशीं पडलेला जीव स्वतःस कृतकृत्य समजतो!

वर्तमानसार

— शिर्शी [कारवार] तालुक्यांत हत्तींचा सुळसुळाट फारच वाढला असून ते भाताच्या पिकांचें फारच नुकसान करीत आहेत.

—राजमहेंद्री येथें २५ लक्ष भांडवलावर एक कागदाचा कारखाना उभारण्यांत आला आहे.

—यंदा विलायतेंत आय. सी. एस. च्या परीक्षेस २१ ब्रिटिश व ४६ हिंदी उमेदवार बसले होते.

—तुर्कस्थानला मदत करण्यास फ्रान्स तयार असल्याचें मुख्य प्रधान मि. हेरियत यांनीं एका भाषणांत सांगितलें.

—इंग्लंडच्या पार्लमेंटची नवी निवडणूक येत्या नोव्हेंबरमध्यें होईल. व तींत सर शंकर नायर हे मजूर पक्षाचे एक उमेदवार ह्मणून उभे रहाणार आहेत.

—सबंध जगांत मोठें असें एक मांजर अमेरिकेंत असून त्याचें वजन ६० पौंड आहे, असें ह्मणतात.

—आस्ट्रेलियांतील हिंदी इसमाला मतदानाच्या अधिकार मिळाला.

—मोरोक्कोमध्यें स्पॅनिश लष्कर व नेटिवांच्या टोळ्या यांमध्यें जोराची लढाई चालू असून स्पेननें मोरोक्कोमध्यें ८ पलटणी पाठवल्या आहेत.

—लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत एक स्वतंत्रपक्षाची स्थापना होणार आहे.

—पुणें येथील संट्रल टेलिग्राफ ऑफिसांत रात्रौ १॥ वाजतां चार पठाणांनी दरवडा घातला. रात्रपाळीवर असलेल्या मि. नायडू यांस जखम करून १०५ रुपये लांबविले.

—परराष्ट्रीय हितसंबंध व परचक्रापासून संरक्षण हीं दोन खातीं खेरीज करून बाकीचीं सर्व प्रांतिक सत्ता प्रांतिक सरकारच्या हातीं देण्यांत यावी असा ब्रह्मदेशच्या कायदेकौन्सिलनें ठराव पास केला.

—दक्षिण हिंदुस्थानांतील निराश्रित मदत फंडास सिलोन सरकारनें १०००० रुपये दिले.

—जो इसम कसाबास अगर कसाईखान्यांत पाठविणाऱ्या दलालास जनावर विकील त्यास २० रुपये दंड व दंड न दिल्यास ८ दिवसांची साधी कैद अशी शिक्षा देण्यांत येईल असा फलटणच्या सरकारनें जाहिरनामा काढिला आहे.

—वायकमच्या सत्याग्रहासाठीं तुरुंगांत घातलेल्या इसमांना बंधमुक्त करण्यांत आलें.

—एक रुपायाच्या नोटा काढण्याचें इंग्लिश सरकारनें इतःपर बंद केलें असून व्यवहारांत चालू असलेल्या जुन्या नोटा सरकारी खजिन्यांत जमा होईपर्यंत चालू राहातील.

—भरतपूर येथें एका बदमाप मुसलमानानें एका हिंदु स्त्रीची रस्तांत बेइज्जत केली ह्मणून त्यास पोलीस शिपाई पकडून नेत असतां मुसलमानांनीं त्यास सोडवून घेतलें!

—संबळ येथील एका हिंदु देवालयावर मुसलमानांनीं हल्ला करून त्यांतल्या पुजाऱ्यास विहिरींत फेंकिलें व मूर्ति फोडून टाकिल्या. या दंग्यांत १७ हिंदु जखमी झाले.

—हरिद्वार येथें एका मुसलमानास, गाईला भाल्यानें ठार मारल्याबद्दल ३ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली.

—असोळणेच्या " श्री वेताळप्रासादिक ज्ञानमंदिराची " नियमावलि सरकारनें पास केल्याची वातमी मागें प्रसिध्द झालीच आहे. आतां या नियमावलीस अनुसरून संस्थेच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक झाली आहे, असें एक वाचक कळवितात.

—वेंगुर्लें येथील अमेरिकन मिशनचे डॉ० गोहेन हे यत्या २५ तारखेला रायबंदर येथें येणार असून, गरजूंनीं त्यांच्या वैद्यकीय ज्ञानाचा फायदा अवश्य घ्यावा.

—नवीन गोवें येथें चालू असलेलें ब्रिटिश टेलिग्राफ खातें पोर्तुगीज लोकांच्या स्वाधीन करण्याचा करार मदार होऊन गेल्या जुलै महिन्यांत त्याची अमलबजावणी व्हावयाची; पण लिजबोअ व लंडन या उभयसरकारांचा त्या करारावर मान्यतेचा शिक्कामोर्तब न झाल्यामुळें, हें घोंगडें अजून भिजतच पडलें आहे!

—ग्रामसंस्थांच्या कायद्यांत महत्वाच्या सुधारणा लवकरच घडून येतील, असा रंग दिसत आहे.

—"सांवर्डेहून जांबवलीच्या बाजूनें सरळ रिवणास आलेल्या मार्गास जांबावली व रिवण यांच्या हद्दीजवळ रस्त्याच्या बरोबर मध्यभागीं प्रथमतः एक लहानसें भोंक पडलें व तें आतां हळुहळू एवढें मोठें झालें आहे कीं, तें गाडयांना तर ओलांडणें कठीणच व माणसानींहिपण तिकडून सावधगिरीनेंच पलीकडे गेलें पाहिजे. परवां रिवणचेच एक गृहस्थ रात्रीच्यावेळीं तिकडून जातांना एकदम त्यांत पडले. सुदैवानें त्यांवरून आणखी माती कोसळली नाहीं ह्मणून! नपेक्षां सहजच त्यांत ते जीवंत गाडले गेले असते! ह्या दिवसांत तर दुसऱ्या गांवचीं अनोळखी माणसें त्यांत बहुशः पडत असून एकसारख्या त्यांच्या कागाळ्या ऐकूं येतात. गांवच्या रजिदोरांनीं पुष्कळांच्या कागाळ्यांवरून Administração कित्येक वेळां लिहून कळविलें असें त्यांकडून कळतें. परंतु अजून कांहीं Administração तर्फे अगर कामरा तर्फे किंवा गांवकऱ्यांतर्फे वरील गोष्टीचा मुळींच विचार होत नाहीं. व इकडे तर तें भोंक मोठें होत चाललें असून रात्रीच्यावेळीं अनोळखी माणूस त्या बाजूनें आल्यास त्यांत पडल्यावांचून त्याला दुसरी बाजूच मिळत नाहीं. तेव्हां अशी भयंकर स्थिति प्रत्यहीं घडत असतांना सगळ्यांचीच अशी ही घोर निद्रावस्था कां!" अशी एक "रिवणकर" पृच्छा करितात.

दैवज्ञ बंधूंशीं हितगुज

अखिल गोमांतकस्थ दैवज्ञ बंधूंनो! आज ह्या सर्व जगावर कायकाय चळवळी, कोणकोणते नवीन शोध, आणि कोणकोणते विलक्षण ज्ञान व्यवसाय चालू आहेत, हें तुह्मांस माहीतच आहे. ह्मणूनच या सध्याच्या युगास 'ज्ञानयुग' असें ह्मटलें आहे. ज्ञान हेंच अंतिम ध्येय व विज्ञान हेंच साधन होय. ह्या विज्ञानावांचून ज्ञान प्राप्त करून घेतां येणार नाहीं. भगवंतांनीं गीतेंत ह्मटलें आहे: "ज्ञान विज्ञान मास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजं।' आणि ह्मणूनच आह्मींहि हेंच ध्येय डोळ्यांपुढें ठेऊन, सर्व प्रकारचे धंदे केले पाहिजेत. केवळ एकाच व्यवहारांत निमग्न राहून शिल्पकामाशिवाय आह्मांत इतर कांहींच रुचूं नये हें दुर्दैव होय. निदान सध्याच्या परिस्थितीकडे लक्ष देऊन आह्मीं व्यापक दृष्टि केली पाहिजे व इतर समाजाबरोबर उन्नति करून घेतली पाहिजे. पुरातन कालापासून गोमांतकांत, आमच्या ज्ञातींत केवळ सोन्यारुप्याचे दागिने करण्याशिवाय दुसरा धंदाच नाहीं असें होऊन बसलें आहे. हाच जणूं काय आमचा जन्मसिद्ध हक्क! बाकी कोणतेहि धंदे करण्यास मज्जाव. अशी बहुतेकांनीं 'कूपमंडुक वृत्ति' स्वीकारल्यानें आम्हीं सर्व गोमांतकस्थ दैवज्ञ, एकदेशीपणास पात्र झालों आहोंत. हें प्रत्येकास समजत असलें तरी उमजत मात्र नाहीं! ह्मणून याची कटु फळें अनेक वेळां दृष्टोत्पत्तीस येतात. तूर्त कालचेंच उदाहरण घ्या. ५।६ शॉपवाले व अखिल स्वज्ञातीय समाज यांचा सामना कोठें? परंतु त्या दुकानानीं आपणाकडे इतकें सामर्थ्य आणलें आहे कीं, सर्व समाज त्यांना वचकूं लागला आहे. समाज बंधूंनो, या अनिष्ट प्रकाराचें कारण हेंच कीं, प्रत्येकाच्या हातांत हातोडा व पुढें ऐरण आमच्या वडिलानीं ठेवल्यानें सर्वांचा एकच धंदा होऊन परस्परांत तंटे बखेडे होऊं लागले आहेत. आमच्या लोकानीं जरा बाहेर नजर फेंकून पाहिलें असतें तर थोडा बहुत तरी चांगला परिणाम झाला असता. ह्मणजे आस्ते आस्ते नवीन वळण लागून पुढची पिढी तरी इतर ज्ञानशिक्षणानें व्यवहारसंपन्न झाली असती. याचा कांहीं तरी विचार करा. आमच्यांत अनेक तऱ्हेचे धंदे शिक्षण व्यापार इत्यादि निर्माण होऊन उपरोक्त दुकानांपासून कोणाचेंहि नुकसान झालें नसतें. तरी 'नारायण विठ्ठल शॉप' या नावांचीं पारायणें न करितां, जेणें करून समाजांत अनेक धंदे उत्पन्न होतील, अशा सदिच्छेनें हातपाय हलवा! कारण ते दुकानवाले कांहीहि करोत, त्यांच्याशीं आह्मांस कर्तव्य नाहीं. उद्योग हा श्रेष्ठ. तो 'शॉपा'चा असो वा अन्य असो. तुह्मीं तसा धंदा काढा किंवा शक्य नसल्यास इतर उद्योग करा. नेमळे होऊन नारायणाचें पारायण करण्यांत तथ्य नाहीं. कारण प्रस्तुतच्या परिस्थितींत दुसऱ्यावर अवलंबून राहणें योग्य नाहीं. ह्म-

Esso Naique, pai do e-
nte Balcrisna com todos
pectivos juros vencidos
prescritos em dobro se-
o estipulado no auto de
iação datado de 12 de Se-
de 1905 bem como os
dos e pena convencio-
uma rupia diaria desde
itação é a real solução
o o-que for devido alem
tas do processo sob pe-
a execução seguir seus
com penhora dos bens
que foi registada a hipo-
para ser publico se ex
este. Quepêm 26 de A-
de 1924.

escrivão de Direito
V. Camotim Rebcar

erifiquei a exatidão
O Juiz de Direito
M. de Brito e Nascimento

Ano 9 o N. 26

Qui[illegible] 26 de Setembro de 1924

ASSINATURA
cada ano tres rupias

ANUNCIOS
linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegde Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें, अंक २६

गुरुवार ता. २५ सप्टेंबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें—गोवा

UMA ENTREVISTA ... INFELIZ

O sr. Roberto Bruto da Costa, do seu regresso de Portugal, concedeu em Bombaim, no dia 15 de Agosto ultimo, uma entrevista a "Associated Press" que teve repercussao na imprensa da visinha cidade bem assim nos jornais do pais.

O sr. Costa, e' preciso que se diga antes de entrarmos no assunto, apresentou-se ao jornalista da "Press" na sua qualidade de Presidente da Associagao Comercial da India Portugueza, ex-vogal do Conselho Legislativo, representante da colo'nia no 2 º Congresso Colonial Portuguez, e — iamos esquecendo—como *lowyer-journalist*.

Deixando de parte o *lowyer journalist*, e outras prebendas a no's o que nos chamou a atengao para a entrevista, foi o facto de o sr. Costa ter falado na sua qualidade de *répresentante da India* no Congresso Colonial, porquanto, se a constituiçao garante a livre expressao do pensamento, esta expressao tem que ser exacta, cautelosa e comedida, quando se fala em nome de um pais.

O sr. Costa na sua *interview*, depois de fazer em breves palavras, o relatorio de sua missao em Portugal, missao cujo resultado negativo se fez sentir ja como se ve do projecto da alteragao para pior de alguns preceitos, da legislagao concernente a' autonomia colonial, — afirmou imprudentemente que:—

"Os indo-portugueses, ao contrario dos "indo-britanicos", nao tinham motivos de queixas contra o governo, porque eram cidadaos da Republica Portuguesa com iguais direitos aos dos cidadaos portuguezes."

Os indo-portuguezes nao tem motivos de queixas—disse o sr. Costa. E, entretanto, o mesmo sr. Costa a' custa do tesouro da India foi a Portugal defender a primeira prestaçao — prestaçao insignificante, ridicula — que a' India foi concedida e da qual nos pretendem privar ao mesmo tempo que na India inglesa, naquela India onde o *povo tem motivos de queixas contra o seu Governo*, o mesmo Governo prometeu ja' e vai preparando-se a instalar o *Home Rule* tendo ainda para dar a prova antecipada de sua sinceridade, anunciando a nomeagao do Principe Arthur de Canaugth para futuro Vice-Rei.

Os indo portuguezes nao tem motivos de queixas e tem-nos a India Inglesa, onde as obras de fomento, seja agricola, seja industrial ou seja comercial, tem atingido um progresso tal que para no's, isto e', para o nosso atrazo,—tudo aquilo paira nas regioes do impossivel.

Os indo portuguezes nao tem motivos de queixas e todos nos, inclusive' o sr. Costa, condenamos noite e dia o nosso sistema de ensino como improprio, contraproducente, ao mesmo tempo que nao cessamos de apontar os metodos seguidos na visinha India como dignos de serem imitados e os seus estabelecimentos de ensino como simplesmente modelares.

Os indo-portugueses nao tem motivos de queixas e entretanto nos aguentamo nos aqui pelo dinheiro que nos vem, por via dos nossos 60.000 e tantos filhos que lutam pela vida por faltar trabalho aqui naquela India-Inglesa que o sr. Costa tanto lamenta.

Os indo-portuguezes nao tem motivos de queixas ...... Mas basta que seria loucura da nossa parte querer comprimir uum artigo do jornal, um assunto que reclama a estensao de um livro, de alguns livros talvez.

Pelos modos, o sr. Costa baba-se pelas palavras. Ouviu que eles eram "subjects" e no's gozamos os foros de "citizens" e pronto, atirou aquela. Nao se lembrou, porem, que os prétos selvagens e incultos da Africa eram tambem cidadaos perante a Constituigao, e que ser cidadao e' nada, o que vale e' o poder exercer os direitos de cidadao como os exercem os cidadaos portuguezes de Portugal, sobretudo os direitos politicos.

Concluindo o sr. Costa foi de uma leviandade unica, quando pretendeu estabelecer o confronto entre no's e os habitantes da outra India — pois ao mesmo passo que afirmava um disparate acerca da situagao do seu paiz, o que era menos, — nao refletiu que a sua afirmagao ia ferir profundamente os melindres da Inglaterra. Sinceramente o sr. Costa prestou-nos um mau serviço.

CODIGO DE USOS E COSTUMES DE GOA

Ja' demonstramos no numero passado que nas reformas a introduzir nos nossos usos e costumes, devemos ter em vista o relevo do caracter da nossa civilisagao oriental, que mantem o nosso individualismo, atrave's de vicissitudes e contratempos sem numero. So' nao e' de accitar o costume que se oponha a' moral e a' orde publica.

Para se aquilatar o grau da civilisagao de qualquer povo basta principalmente analisar a sua constituigao de familia e o seu sistema matrimonial por eles constituirem o alicerce sobre o qual se assenta o edificio sumptuoso das sociedades civilisadas.

Ora a constituigao familiar indiana e o seu sistema matrimonial que rivalisam com as instituigoes similares doutros paizes adiantados na civilisagao nao deixam de ser mais ou menos perfeitos.

Coscuvilha-se, porem, amiudadas vezes, entre os admiradores da civilisagao ocidental, que a mulher indiana carece de emancipagao, urgindo por isso no entender deles, eleva la ao nivel que de direito lhe pertenga.

Nao ha' duas correntes de opinioes sobre a necessidade da emancipagao da mulher, nem negamos em princip o a exatidao deste conceito; mas ¿em que bases se devera' proceder a esta emancipagao? Atendendo ao criterio ocidental ou oriental? Eis o problema que fica por solver.

Nao padece duvida que a reforma dos costumes deve acompanhar a evolugao social; mas como a constituigao das sociedades ocidentais nao e' vasada nos moldes das sociedades orientais a evolugao produzida nestas nao e' a mesma que a operada naquelas.

Nestas condigoes, e porque a civilisagao de cada povo representa o conjunto de nogoes da ordem psicologica, o dever que incumbe a quem acalenta a idea da nossa reforma social, e' de procurar, de preferencia, os elementos necessarios para vingar o seu *desideratum*, nas criagoes do conjunto dessas nogoes que nos foram legadas pelos nossos antepassados, langando mao doutras fontes no caso da necessidade extrema.

Ja' passaram e'pocas ominosas para nunca mais voltarem, de intolerancia em que predominava a orientagao sectarista de exterminar tudo o que fosse indiano, tido como um entrave no caminho do progresso da humanidade. O espirito moderno porem, sem do' nem paixao por qualquer crenga ou preconceito esforga-se por joirar o bem do mal e adoptar tudo o que seja adequado ao meio e a indole das populagoes e que seja aconselhado pela tecnica sociologica.

O que se disse com respeito a quaisquer reformas sociaes e' aplicavel, igualmente, por forga das razoes ao sistema de sucessoes, pelo facto do regime da propriedade indiana nao ter os carateristicos que se notam no regime ocidental, o que e' manifestado ainda pelo seu instituto da "sociedade familiar," patrimonio legado pelos nossos antepassados e que conservamos ate' aos nossos dias como uma reliquia sagrada.

Pelos modos parece que, estao todos de acordo quanto a' manutengao da instituigao das sociedades familiares, divergindo se, apenas no campo de sucessoes. Temos de ver, porem, ao mesmo tempo, que uma e outra coisa sao tao ligadas entre si por afinidade de ideas que nao se pode conceber a nogao da primeita sem o auxilio da segunda.

Admite-se a evolugao de direitos, quando ela se justifique em face da hermeneutica sociologica de cada povo.

Objetar se ha talvez dizendo que o regime da propriedade indiana nao e' perfeito. Mas se os sociologos de outros paizes nao tem uniformidade de vistas sobre a sua individualisagao ou socialisagao ¿por que e' que havemos de introduzir a inovagao nos nossos costumes sem que sejamos impelidos para isso por necessidades imperiosas?

O regime da propriedade individual tem ainda o inconveniente de sua pulverisagao, o que e' antieconomico numa terra onde esta pulverisagao tem atingido proporgoes colossais ! ! !

G. C. Guddó

No 1º artigo desta serie lea-se *factores distintivos*, em vez de *factores distructivos* como por um erro tipografico saiu.

तरुण माता !

[खालीं दिलेलें गद्य भाषांतर एका पोर्तुगीज कवीच्या [J oven me] 'तरुण माता' नांवाच्या एका कवितेचें आहे. कै. गडकरी यांच्या "राजहंस माझा निजला" या लोकमान्य कवितेशीं या भाषांतरित कवितेचें केवढें साम्य आहे हें ती वाचल्यावर सहज कळून येईल.]

* * *

आपल्या निद्रिस्त बालकाच्या सुंदर पाळण्याकडे वळून अनिमीष नेत्रानीं, त्याल पहात असलेल्या तरुण मातेला आपण पाहिलीत का ? आपलें गोजिरवाणें बालक खेरीज करून इतर जगाची तिला काय पर्वा ? परमेश्वरानें साऱ्या विश्वाला बहाल केलेल्या हरएक चमत्कारांचें बीजभूत दृश्य त्या पाळण्यांत तिला दिसत आहे. त्या नवयौवन गतभर्तिकेला आणखीं दुसरें काय पाहिजे ?

\+ \+ \+

जगांतील राष्ट्रांत तुंबळ युद्धें सुरू आहेत. तृषार्त वसुंधरा वहात्या रक्तानें न्हात आहे. जीवनकलहाचा घनघोर संग्राम प्रत्येक मर्त्य प्राण्याला भेडसावीत आहे. परंतु, या एकंदर चळवळींचें वारें, त्या मातापुत्रांच्या पवित्र वातावरणांत प्रशांत स्वरूप धारण करीत आहे. इतकेंच नव्हे, तर जगानें मांडिलेल्या आकांतामुळें, त्या एकांताला पावित्र्ययुक्त गांभीर्य प्राप्त झालें आहे.

\+ × \+

सायंकाळची वेळ. भगवान सूर्यनारायण आपलें किरणरश्मिजाल आवरीत आहे. अशा समयीं, ती मुग्ध बाला आपल्या तान्हुल्याचे पाळण्याला झोके देत होती. आपले नयनद्वय तिनें पाळण्यांत स्थिर केले होते, हें खरें. पण तिचें मन मात्र भावी सुख स्वप्नांत विहरत होतें. व आपल्या दुःखमय वर्तमानकालाचा व भूतकालाचा लय आशायुक्त भविष्यकाळांत करण्यांत ती गढून गेली होती. बाळानें डोळे उघडून क्षणभर आपल्या मातेला पाहिलें; आणि आपल्या मृदु हास्याची एक शीतल चंद्रिका आईकडे फेकली ! पण तें कसलें हास्य ! बाळाच्या चाळ्यांना ती परकी नव्हती. त्याच्या एकुणएक क्रियेचें तिला पूर्ण ज्ञान होतें. तें हास्य पहातांच ती दचकली, विमूढ झाली. कारण, तें आनंदाचें नव्हतें ! हाय ! तें तसलें नव्हतें ! तें शेवटचें होतें !

× \+ ×

तिचें हृदय दुःखानें, भयानें धडधडूं लागलें. पण दुर्दैव विचारीचें ! तिला काय शक्य होतें ? हळुच तिनें बाळाचें चुंबन घेतलें ! पण, त्या प्रेमयुक्त चुंबनांत आपल्या निष्पाप, पवित्र अर्भकाची प्राणज्योत स्वर्गांत विलीन होत असल्याचें मात्र तिला दिसून आलें !

\+ × \+

वालुकामय प्रदेशावरा बागडणारा शांत पण गंभीर दर्या आपण कधीं पाहिला आहे का ? पण तुफान-वायु सुरू होतांच, आयाळ उभारलेल्या क्रुद्ध, घायाळ सिंहाप्रमाणें, पुळणी ओलांडून सर्पाप्रमाणें धांवणाऱ्या त्याच दर्याला आपण कधीं पाहिला आहे काय !

\+ × \+

पर्वताचे दरींतून मंजुळ स्वर काढीत फिरणारा शांत व शीतल वायु आपण कधीं पाहिला नाहीं का ? परंतु, तोच वायु भयंकर रूप धारण करून दऱ्याखोऱ्यांची उलथापालथ करतो; शहरांची नासधुस करितो; आणि सर्वभक्षक काळाप्रमाणें, जगाचा नायनाट करण्यास सिद्ध होतो, हें आपण पाहिलें आहे का ?

\+ × \+

पाहिलें असल्यास तीच स्थिति या गतभर्तिकेची झाली ! बसलेल्या जागेवरून, वेड्याप्रमाणें ती ताडकन उठली, आणि तिनें दुःखाचा हंबरडा फोडला ! पिंजऱ्यांत अडकलेल्या क्रूर श्वापदाप्रमाणें आपल्या हृदयभेदक किंकाळ्यानीं तेथील वातावरण तीनें दुमदुमवून सोडलें. दुर्दैवी माता मिळेल तेथें सैरावैरा धांवूं लागली. तिची दृष्टि आकाशाकडे वर लागलेली होती!

\+ × ×

कोणती तरी अतिमानुष शक्ति तिला कुठें तरी लोटीत आहे असें पहाणाऱ्यास वाटे. शत्रूच्या तावडींतून सुटण्याकरितां, धडपडणाऱ्या हरीणापेक्षां ती जास्त जलद घांवत होती.

× \+ ×

पण मध्येंच, मंजुळ गायन ऐकल्यासारखें करून ती थांबली. मिनिटा मिनीटाचे दरम्यान एक चमत्कारिक कांति तिच्या गुलाबी गालांवर झळकत होती. आणि त्यावरून पहाणारांस असें वाटे, कीं कोणतें तरी उच्चतम व सात्विक समाधान त्यावेळेपुरतें तिला मिळे.

* * *

पण, ती पहा मृत बाळाच्या पाळण्याकडे परत फिरली ! आणि तेथें पोंचल्यावर स्थिर झाली. डोळे भरून तिनें त्याला पाहून घेतलें व कसल्याशा विचारांत ती घटकाभर गढून गेली. कांहीं वेळानें तिनें त्या मृत देहाला पाळण्यांतून बाहेर काढलें आणि आपल्या जळत्या हृदयाशीं त्याला आंवळून धरलें ! इतकेंच करून ती थांबली नाहीं. आपल्या बाळासह तिनें समुद्राकडे निर्वाणीची धांव घेतली ! यावेळी समुद्र खवळला होता.

\+ \+ \+

नच जाई वरी एकला । मीहि येतें तुजसीं बाळा ॥ इतकें म्हणून तिनें आपल्या बाळाला ज्यास्त कवटाळून धरिलें आणि उसळत्या लाटांत ती त्याच्यासह अदृश्य झाली

* * *

जगावर लाथ मारून मृत्युशय्येवर–आपल्या बालकाला हृदयाशीं घट्ट धरून–सुखानें, शांतीनें, समाधानानें, आनंदानें, पहुडलेली ती बाल माता आपण पाहिलींत काय ? ज्या विश्वांत तिला आपला राजहंस दिसत नव्हता त्या विश्वाची तिला काय किंमत ? पूर्वीप्रमाणेंच, ती आतांहि आपल्या बाळाला हलवीत झोंपी गेली होती ! पण कुठें ! काळाच्या जबड्यांत ! मृत्यूच्या शयेवर ! !

त्यांचे आभारी होतील.

सरस्वत्युत्सवांत भाग घेणाऱ्या सर्व वक्त्यांनीं एक दिलानें व एक नेटानें डॉ० केतकरांच्या बहुमोल शिकवणीनुरूप 'सामुच्चयिक जबाबदारीचा' प्रश्न अंशतः तरी सोडविण्याचा प्रयत्न करावा, अशी 'भारता'ची त्यांस प्रेमाची सूचना आहे. व 'सामुच्चयिक जबाबदारीच्या' जागृतीवर आमच्या तिचें भवितव्य अवलंबून आहे, हें सतत दृष्टीसमोर ठेवून, ते येत्या उत्सवांतील व्याख्यान मालांचें ध्येय आंखतील, अशी आम्हांला उमेद आहे.

वर्तमानसार

—मुंबईच्या मौज पत्रावर बीभत्स जाहिरात प्रसिद्ध केल्याबद्दल ५० रु. दंड अथवा १४ दिवसांची सक्तमजुरीची शिक्षा मजिस्ट्रेटनीं दिली.

—अहमदाबाद म्युनिसिपालिटीच्या नवीन दिवाणखान्यास 'गांधी हॉल' असें नांव देण्याचा त्या म्युनिसिपालिटीनें ठराव पास केला.

—कराची म्युनिसिपालिटीला महात्मा गांधींना मानपत्र देण्याकरतां २००० रुपये खर्च करण्यास सिंधच्या कमिशनरांकडून मंजुरी मिळाली.

—तुर्कस्थान सरकारचें तंबाखूचें वार्षिक उत्पन्न १६॥ कोटी रुपयांचें आहे.

– पारीस येथें नुकत्याच झालेल्या ऑलिंपीक गेम्सचें, खर्चाचे ४० लाख फ्रॅंक वजा जातां, २० लाख फ्रॅंक उत्पन्न झालें.

– फ्रेंचांनीं जर्मन सरहद्दीवर बसविलेलें जकातीचें नाकें उठविलें.

—इंग्लंडांतील बेकार लोकांची संख्या गेल्या दोन महिन्यांत १३७००० नें वाढली आहे

—कोलंबो येथील एका चहाच्या दुकानास आग लागून ४ लाख रुपयांचें नुकसान झालें.

—दक्षिण हिंदुस्थानांत जलप्रलयानें झालेली नासाडी भरून काढण्यास अदमासें १ कोट रुपये लागतील असें मद्रास सरकारनें हिंदुस्थान सरकारास सुचविलें आहे.

—हुबळी, गदग वगैरेच्या गुजराथी समाजाकडून महात्मा गांधीच्या थैलीसाठीं १२००० रुपयें जमले.

—नंदीदुर्ग येथील सोन्याच्या खाणींत भयंकर स्फोट होऊन त्यामुळें अनेक इमारतींची नासाडी झाली व कांहीं माणसें जखमी झालीं.

—कळंगुट येथें एका २० वर्षे वयाच्या तरुणानें दारूच्या निशेंत खुद्द आपल्या आईच्या खुनास मान्यता दिली ! सदरील तरुण व इतर खुनी इसम म्हापशेंच्या कैदखान्यांत पापाचें प्रायःश्चित भोगीत आहेत. खुनी माणसानीं कसल्यादि शस्त्राचा उपयोग न करतां, केवळ गळा दाबून त्या बिचाऱ्या बाईचा जीव घेतला ! खून उघडकीस येऊं नये म्हणून प्रेत एका गोणांत घालून पुरलेलें होतें; पण तें कुत्र्यानीं उघडकीस आणलें ! खुनाला वाचा फुटते म्हणतात, हें कांहीं खोटें नाहीं !!!

—शेतकी पतपेढ्यांविरुद्ध येथील पोर्तुगीज पत्रांत अजून विरुद्ध टीकात्मक लेख प्रसिद्ध होत आहेत.

—मडगांव पाठशाळेचे माजी शिक्षक बारबोज हे एकाएकीं ऐन तारुण्यांत ख्रिस्तवासी झाले !

—कलकत्याच्या युनिव्हर्सिटींत फ्रेंच व जर्मन भाषांप्रमाणेंच पोर्तुगीज भाषाहि शिकविण्यांत यावी, असें ठरविण्यांत आलें आहे.

—पोर्तुगीज पार्लमेंटचा इंडियेच्या वतीनें देपुताद ' निवडून येण्यासाठीं, येत्या नवीन 'निवडणुकींतहि प्राजेरीस द कोस्त उभे रहाणार आहेत !

—असोळणेच्या श्री वेताळ प्रासादिक ज्ञानमंदिराची पोर्तुगीज नियमावलि स्वतंत्र पुस्तकाच्या रूपानें वांटण्यांत आली आहे.

—वसाहतींतील 'आवर्दातोरींवर' गदा येईल असें वाटतें.

—परमुलुखांत जीवितरक्षणार्थ वावरणाऱ्या गोमांतकीय लोकांचें हितसंबंध योग्य रीतीनें संभाळले जावे या हेतूनें एक म्हापसें येथें संस्था स्थापण्यांत आली आहे.

—येथील कित्येक ख्रिस्ती धर्माधिकाऱ्यानीं ख्रिस्ती बायांच्या ' लांडया साडया' व 'फॅशनच्या इतर खोडया' हाणून पाडण्याचा जोराचा प्रयत्न चालविला आहे.

—यंदाचें नाट्यसंमेलन कोलापूर येथें भरविण्याची वाटाघाट चालू आहे.

—अमेरिकेंतील 'धुम्रपानी' बायांच्या वाढत्या संख्येला आळा घालण्याच्या हेतूनें एक नवीन संस्था जन्मास आली आहे.

—पणजी येथील कांपालच्या किनाऱ्यावर एक प्रेत आढळून आलें असून तें कोणाचें तें अजून समजलें नाहीं .

—पोर्तुगालांत नवीन प्रधान मंडळ अधिकाररूढ होईल व त्याचें अध्यक्षत्व डॉ. आफोंस कोस्त हे स्वीकारतील असें, तेथील पत्रांनीं ध्वनित केलें आहे.

=पूर्वी प्रसिद्ध झाल्याप्रमाणें, म्हापसें येथे आ वेपोक नावाचें साप्ताहिक पोर्तुगीज पत्र सुरू झालें.

—पारीस येथे एक शीळ घालणारे झाड आणण्यांत आलें आहे.

—एक लक्ष पंचवीस हजार वर्षांमागें मरण पावलेल्या पांच माणसांच्या हाडांचे सांपळे मिळाले आहे !

— आजच्या अंकाचा पोर्तुगीज भाग तयार झाल्यावर, आमच्या हातांत 'प्रोव्हींस' पत्राचा शेवटचा अंक आला. या अंकांत सि. पेरेर बातालयानीं कांबरें प्रकरणासंबंधानें आमच्या संपादकांस उद्देशून आपल्या अकलेचे भरपूर तार तोडले आहेत. त्यांना आमचें उत्तर प्रसिद्ध झाल्यावर वरील प्रकरणांत उपरोक्त युरोपियन गृहस्थाची मदत आमच्या संपादकांस कशी भोवली व पेरेर बातालयाच्या वजनाचा सरकारी भोपळा कसा फुटला हें सविस्तर कळून येईल. पेरेर बातालय मराठी वाचावितात, म्हणून त्याच्या खोडसाळपणाचा ओझरता उल्लेख येथें करणें भाग पडत आहे.

सुधारणेची मीमांसा

पाश्चात्यांचें विशेषत: इंग्रजांचें हिंदुस्थानांत आगमन झाल्यापासून ह्या देशांत एक विशिष्ट प्रकारची अभ्युदयात्मक अशी क्रांति घडून आली.

आपली भारतीय संस्कृति बरीच उच्च दर्जाची होती यांत शंका नाहीं. व तिनें बरेंच कार्यहि केलेलें होतें. असें जरी असलें तरी पण चक्रनेमिक्रमानुळें तिला उतरती कळा लागली. हिंदुस्थानावर संपत्तीच्या आशेनें अनेक आडदंड लोकांच्या स्वाऱ्या झाल्या; पुष्कळशी जाळपोळ झाली; हजारों ग्रंथ अग्नीला अर्पण केले गेले व अशा प्रकारें देशांतून शांततेचें उच्चाटन झालें. मुसलमानीं संस्कृति भारतीय संस्कृति पेक्षां फार उच्च दर्जाची नव्हती व तिचा ह्मणण्यासारखा प्रभाव आपल्या संस्कृतीवर पडलाहि नाहीं.

कालांतरानें ह्याहि लोकांचें राज्य हिंदुस्थानांत टिकले नाहीं. जिकडे तिकडे अशांतता माजलेली होती. अशा वेळीं इंग्रज लोक नुकतेच व्यापाराकरितां ह्मणून ह्या देशांत आलेले होते. त्यांपैकीं बहुतेक धोरणी बुद्धिमान, व्यवहारी, राष्ट्राचा अभिमान बाळगणारे, स्वतःच्या फायद्याकडे लक्ष न देतां राष्ट्राचें हित साधणारे असे होते. त्यानीं येथील परिस्थितीचें सूक्ष्म अवलोकन केरून आपले पाय पसरविण्यास सुरवात केली व त्यांचें धोरण तडीस जाऊन हळुहळु सर्व देश त्यांच्या ताब्यांत गेला.

राजकीय बाबतींत जशी अंदाधुंदी माजलेली होती तशीच सामाजिक बाबतींतहि पण माजली होती. बाह्य आचारांना महत्व होतें; सती सारख्या क्रूर चाली प्रचारांत होत्या; अगदीं लहान अशा बाल विधवानां सुद्धां खुषी नसतां धगधगित जळणाऱ्या चितेंत ढकलून दिलें जाई; कित्येक आपणाला स्वर्ग मिळावा ह्मणून गंगेंत उड्या घेऊन प्राण देत, तर कित्येक जगन्नाथाच्या रथाखालीं आपण होऊन चाकून घेत व मरण स्वीकारीत. बालविवाह प्रचारांत होता. यामुळें पुष्कळशा बालविधवा होत असत. यांनां सगळा जन्म वैधव्यांत घालावा लागल्यामुळें त्यांची साहजिकच अनाचारांकडे प्रवृति होई. ब्राह्मणानां आपण ईश्वराचे लाडके पुत्र आहोंत असें वाटे व यामुळें ते वेळीं अवेळीं आपला अधिकारहि इतर जातींवर गाजवीत. अशा अनेक विचित्र चालीमुळें बजबजपुरी माजून राहिली होती. इंग्रजांच्या राज्यस्थापनेनंतर त्यानीं हळुहळू त्यांपैकीं अनेक चालींना कायद्यानें बंदी केली. " १८४० पासून १८६० पर्यंत वीस वर्षांत तर हिंदुसमाज रचनेमध्यें हजारों वर्षांच्या परंपरेनें दृढत्व पावलेली व समाजाच्या नैतिक आरोग्याचा फन्ना उडविणारीं किती तरी बाडगुळें इंग्रज राज्यकर्त्यांनीं छाटून काढलीं." (पहा– रा. फाटककृत न्या० रानडे चरित्र पान. १०२)

परंतु सर्वच चाली कायद्यानें बंद करणें शक्य नव्हतें. कांहीं चाली समाजानें आपखुषीनें बंद करणें योग्य होतें, परंतु समाज तितका विचारी नव्हता. बरून पुष्कळशा अनिष्ट चालींचा हैदोस उजळ माथ्यानें चालत होता. विधवांचें वपन केल्याशिवाय मृत्यु आल्यास त्यानां स्वर्गद्वार खुलें होणार नाहीं असा समज होता व अशा विधवांच्या प्रेतालासुद्धां स्पर्श करीत नसत. १८५९ सालीं सोलापूर जवळ माढें गावांत एका गरीब ब्राह्मणाचें घर पावसामुळें पडून त्यांत त्याची विधवा बहीण प्राणास मुकली. या विधवेचें वपन झालें नव्हतें. यामुळे तिच्या प्रेताला कोणीच शिवेना. शेवटीं तें प्रेत शुद्रांकडून नेणें भाग पडलें. यावरून वाचकानां त्या काळच्या सामाजिक चालींची कल्पना होईल. धर्मगुरूंनां आपण एक समाजाचे मोठे अधिकारी आहोंत असें वाटे व वेळीं अवेळीं ते आपला अधिकारहि गाजवीत, परन्तु इंग्रजी अमलामुळें हे त्यांचे अधिकारहि संपुष्टांत आलेले होते. " १८५४ सालीं शंकराचार्यांची स्वारी नगरास आली असतां त्या वेळीं त्यांच्यापुढें व्यभिचारिणी स्त्रियांबद्दल पुष्कळसे अर्ज दाखल करण्यांत आलेले होते. त्यांपैकीं एका विधवेच्या बापाला गोमूत्र वगैरे पाजून व १९ रुपये दंड घेऊन त्याचा उद्धार केला; पण जेव्हां त्या बापानें आपल्या मुलीबद्दलची गोष्ट काढली त्या वेळीं शंकराचार्यांनीं फर्मावलेलें प्रायःश्चित मासलेवाईक आहे ! शंकराचार्यांनीं सांगितलें कीं, एका आंब्याच्या झाडाचा बुंधा पोखरून त्या ढोलींत तिला बसवावी व बाहेर जवळपास गवत पेटवावें; अशा रीतीनें तिला बरीच धग लागल्यावर बाहेर काढून वपन करावें व सहस्र भोजन घालावें ह्मणजे शुद्ध होईल ! (पहा न्या० रानडे चरित्र पा. ११७). हें विचित्र प्रायश्चित इंग्रजी अमलामुळें अमलांत आलें नाहीं ही गोष्ट निराळी; परतु यावरून त्या कालच्या समाजस्थितीचें स्वरूप चांगलें लक्षांत येतें.

अशा कित्येक चालींचा थयथयाट उजळ माथ्यानें समाजांत चालू होता. कित्येक लोक धर्माचा दांभिक आव आणून आपण मोठे धर्मनिष्ठ आहोंत असें भासवीत व गरीब लोकानां त्रास देत. ह्या गरीब लोकानां इंग्रजी अमल सुरू झाल्याबद्दल समाधान वाटलें व आतां अशा लोकांनां भिण्याचें कारण नाहीं असें वाटूं लागलें. या निर्भयतेचा परिणाम अबला ह्मणून समजणाऱ्या बायकांवर सुद्धा कसा झाला होता, हें खालील उदाहरणावरून कळून येईल. एकदां कांहीं विधवांवर ब्रह्मवृंदानीं व्यभिचाराचा आरोप ठेऊन शंकराचार्यांकडे फिर्याद केली. शंकराचार्यांनीं त्यानां वपनाची शिक्षा दिली; परंतु आपली आज्ञा आह्मीं जुमानीत नाहीं असा स्पष्ट जबाब त्या स्त्रीयानीं त्याच्या तोंडावर दिला. तेव्हां शंकराचार्यांनीं मुसक्या बांधून त्यांचें वपन करण्याबद्दल सांगितलें. तेव्हां त्या बायानीं निर्भयपणें सांगितलें कीं, ही मोंगलाई नाहीं. अत्याचार कराल तर फिर्याद होईल हें पूर्ण लक्षांत ठेवा. हें उत्तर ऐकून शंकराचार्यांची घमेंड जिरली व त्यानां आपलें गंजलेलें बहिष्काराचें शस्त्र बाहेर काढणें भाग पडलें. असो.

वरील विवेचनावरून इंग्रजी अमल सुरू झाल्यावेळींसुद्धां समाजाची स्थिति कशी होती हें दिसून येईलच. अनीतीचा प्रसार कांहीं कमी नव्हता, हें वेळीं अवेळीं शंकराचार्यांकडे व्यभिचारिणी स्त्रियांबद्दल जे अर्ज जात,त्यांवरून सिद्ध होतें. पाश्चात्य शिक्षणामुळेंच समाजांत अनीति पसरली असें ह्मणणाऱ्या पुराणमतवादी लोकानीं उपरोक्त उदाहरणाकडे जरूर लक्ष पुरवावें.

या वेळीं धर्माचें मुख्य आंग जें आंतरिक स्थिति सुधारणें त्याकडे कोणाचेंच लक्ष्य न व्हतें. बाह्य आचारांकडेच सर्व लक्ष्य देत. तत्पूर्वी ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम यां सारखे धर्मसुधारक उत्पन्न होऊन जरी त्यानीं शुद्ध धर्माचें स्वरूप लोकांत पसरविण्याचा प्रयत्न केलेला होता, तरीपण तीं तत्वें सर्व साधारण लोकांच्या पचनीं पडण्यासारखी परिस्थिति उत्पन्न झालेली नव्हती, यांत शंका नाहीं.

अशा स्थितींत मिशनरी लोकांचें आगमन हिंदुस्थानांत झालें. त्यानीं वरील स्थितीचें सूक्ष्म अवलोकन करून आपल्या धर्माचें बीं रोवण्याचा प्रयत्न केला. ठिकठिकाणीं शाळा काढणें, वर्तमानपत्रें काढणें, लोकानां - स हा य्य पुरविणें वगैरे कार्याच्या द्वारा त्यानीं आपल्या धर्माचा प्रसार सुरू केला. व या त्यांच्या प्रयत्नाला थोडें फार यशहि येत गेलें. हळुहळू आपल्यांतील बरेच सुशिक्षित लोक हिंदुधर्माचा त्याग करून परधर्मात जाऊं लागले. मिशनरी लोकांच्या प्रयत्नानें लोकांचा असा समज झाला कीं, त्यांचा धर्म ह्मणजे उदारमतवादी; सर्व उदात्त तत्वांचा सांठा त्यांच्या धर्मात; आपल्या सारख्या दगडा धोंड्यांची पूजा त्यांच्या धर्मांत नाहीं. असे समज दृढ होऊन लोकाचें लक्ष्य त्यांच्या धर्माकडे वेढलें गेलें व आतां थोडक्याच काळांत हिंदुस्थान खिस्ताचा अनुयायी होणार अशीं भविष्यें मेकाले साहेबासारखे इंग्रज लोक करूं लागले; परंतु आनंदाची गोष्ट ही कीं, हीं सर्व भविष्यें फोल ठरून आज कोणताहि सुशिक्षित हिंदवासी सहसा परधर्मांत जात नाहीं.

या पाश्चात्य शिक्षणामुळें आपल्याकडे एक विचारी वर्ग तयार झाला. या वर्गाला आपल्या समाजांतील सुशिक्षित लोक परधर्मात जाणें इष्ट नाहीं असें वाटूं लागलें व त्यानीं आपल्या धर्मांतील उच्च तत्वें लोकांपुढें मांडून त्यांच्याहिपेक्षां आपला धर्म किती श्रेष्ट आहे हें सिद्ध करून दाखविलें; तसेंच आपल्या समाजांतील चाली रीतींचें सूक्ष्म निरीक्षण करून असें ठरविलें कीं, ह्या चाली रीति सुधारल्याशिवाय आपल्या देशाची उन्नति होणें शक्य नाहीं. व या प्रमाणें समाजसुधारण्याचें कार्य हातांत घेतल्यानें या वर्गाला सुधारक असें नांव मिळालें. सुधारकानीं समाजांतील चालीनां योग्य वळण देण्याचें कार्य हातांत घेतलें. महाराष्ट्रांत सुधारकांची गर्जना सिंहाप्रमाणें होऊं लागली व या नवीन पक्षाच्या निशाणाखालीं न्या. रानडे, भांडारकर, आगरकर, गोपाळराव देशमुख, विष्णुशास्त्री पंडित यांसारखे वीर एकत्र होऊन त्यांची मोहीम सुरू झाली. ही मोहीम जेव्हां यशस्वी होऊं लागली, तेव्हां पुराणमतवाद्यांच्या तोंडचे पाणी पळालें त्यांना आपल्या हक्कांवर गदा आली असें वाटून जो तो आपापलें शस्त्र घेऊन त्यांच्यावर फेकूं लागला. बहिष्काराचीं ब्रह्मास्त्रेंसुद्धां कित्येक वेळां फोल ठरूं लागलीं, कारण अशा शस्त्रांना भिणारी आमची सुधारक मंडळी नव्हती. एका बाजूला बाजारबुणग्यांसारखे पुराणमतवादी लोक, शंकराचार्यांसारखे धर्मगुरू तसेंच कित्येक राजेरजवाडे तर दुसऱ्या बाजूला शेलकी परंतु खंबीर अशी सुधारक मंडळी, असा त्यांचा सामनाहि कित्येक ठिकाणीं झाला. पैकीं पुण्यास सन १८७० सालीं शंकराचार्यांसमोर मार्च महिन्यात झालेला पुनर्विवाह विषयावरील वाद महत्वाचा होता. हा वाद नऊ दिवस चाललेला होता. दोनहि बाजूला पंच या नात्यानें नामांकित शास्त्र्यांची योजना झालेली होती. मंडन पक्षाच्या बाजूनेंच कृष्णशास्त्री चिपळूणकर यांची पंचांत योजना झाली; परंतु त्यानीं मागें एकदां युरोपियनाबरोबर मुसतीं फळें खाल्ल्याच्या आरोपावरून त्यानां, पांचशें रुपये दंडासह सक्षौर प्रायश्चितानंतरच, हा अधिकार देण्यांत आला. रा. भांडारकरानां हा अधिकार केवळ सारस्वत ज्ञातींत जन्माला आल्यामुळें देण्यांत आला नाहीं ! असो. या वादांत मंडण पक्षाच्या एका शास्त्र्याला विरुद्ध बाजूच्या लोकानीं फूस दिल्यामुळें बहुमत विरुद्ध दिसलें तरीपण मंडन पक्षाची बाजू किती जोरदार आहे हें बाहेर आलें. हळूहळू परिस्थिति सुधारत चालली व सुधारणेच्या वृक्षाला गोड फळें येऊं लागलीं. स्त्रिशिक्षणाचा बराच प्रसार झाला; बालविवाहाची मर्यादा वाढली; पुनर्विवाह प्रचारांत येऊं लागला; धर्माधिकाऱ्यानां आतां आपले अधिकार काय आहेत व ते कितपत अमलांत आणणें योग्य आहे हें कळून आलें; ज्ञातिभेदाचें बंड मोडलें; परदेशगमनाची आडकाठी राहिली नाहीं. अशा रीतीनें समाजाची स्थिति सुधरत चालली.

सुधारक वर्गाच्या प्रयत्नाला यश आलें, परंतु कोणत्याहि सैन्यांत जसे शूर शिपायांच्या बरोबरच बाजारबुणगेहि असतात, त्याचप्रमाणें सुधारक वर्गात दुसरा एक बेगडी सुधारकांचा वर्ग आपणास सामील करून घेऊं लागला. त्यानें केवळ पोषाकापुरतेंच पाश्चात्याचें अनुकरण केलें; परंतु त्यांची गणना कोणीहि खऱ्या सुधारकांत करणार नाहीं.

आपल्या गोमांतकांत नुकतेच सुधारणारूपी उषेचे किरण फांकत आहेत. अशा वेळीं पुराणमतवादी लोक आपलीं शस्त्रें घेऊन पुढें सरसावत आहेत व निरनिराळ्या प्रकारचे खोटे आरोप सुधारणेवर करून जुन्या मताचें समर्थन करीत आहेत. तरी त्यांचे आरोप काय आहेत व ते कितपत समर्थनीय आहेत, याची मीमांसा पुढल्या लेखांकांत करूं.

के० भारती

UNIDADE DE AVE
, SIRVOI, XELDEM
HAIFI E ODAR

io arrematadas as aven- despesa anual do ano de das Comunidades de Ave. Sirvoi, Xeldem, Chaifi r nos dias 29 do corrente le Setembro e 1, 2, 3 e 4 ez de Outubro proximo nte pelas 16 horas, res. ramente, nos lugares das sessões. Aos 18 de Setem- e 1924.

O escrivão
macrisna Ananta Nar m

IUNIDADE DE MOL-
CORNEM

rão arrematadas as aven- la receita trienal do trie- le 1925 a 1927 e de depesa l de 1925 da Comunidade Molcornem, no dia 4 de mbro corrente, ás 15 horas gar das suas sessões. Aos e setembro de 1924.

O escrivão
amacrisna Ananta Nar- im

GODE DE XRY CHA-
NDESVORY DE SIR-
VOY

No dia 6 de outubro p. se nte ás 16 horas no templo referido Pagode irão á pra as avenças da receita para trienio de 1925 a 1927 s da despesa para o año de 25 pelo preço do respectivo u'o. Os concorrentes deverão nparecer no local do Pagode referido dia e horas, onde rão presentes os calculos m as respectivas condições. Aos 24 de Setembro de 1924

O escrivão da meza
Naraina Xembú Sinai Sir. oicar

Visto
O presidente suplente em exercicio
Quessova Sinai Sirvoicar

Ano 9 N.º 27

-feira 1 de Outubro de 1924

ASSINATURA
por cada ano tres rupias

ANUNCIOS
por ... ainda que repetida uma tanga
numero avulso uma tanga

DIRECTOR E P...
G. P. Hegd...
Quepem-Go...

भारत.
BHARAT.

वर्ष ९ वें. अंक २७

गुरुवार ता. १ अक्टोवर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें-गोवा

PELA POLICIA

Foi o *Bharat* que primeiro manifestou o seu entusiasmo pelo estabelecimento dos Comandos de Policia nas Novas Conquistas onde a sua acçao se fazia precisa para manutençao de ordem publica e segurança de propriedade, amiudadas vezes alterada por alguns tiporios, propensos ao vandalismo.

¿Conseguiu a Policia coibir, dum modo eficaz, o vandalismo destas paragens, consequencia de ociosidade, mae de vicios de toda a sorte e...morte?

Nao, certamente, ainda com o forte freio que lhe esta' pondo pela sua incansavel e exemplar actividade. Nem e' para admirar que isto suceda, dada a curta idade que alguns daqueles comandos contam de sua instalaçao e a norma pouco aprovavel que seguem em algumas partes.

Chegam-nos aos ouvidos, por exemplo, ecos de Ponda' e Canacona, comentando pouco agradavelmente a acçao policial dos seus comandos. Em Ponda' faz-se abuso da palmatoria e em Canacona acrescenta-se a este abuso o de rapar *xendi*, sobrancelhas e bigodes.

A serem verdadeiros os informes, o *Bharat*, conquanto apologista sincero da Policia, nao pode todavia deixar de exteriorisar o seu desprazer por uns actos que destoam da seriedade humana, fazendo, ao mesmo tempo, lembrar as horripilantes scenas dos ominosos tempos inquisitoriais.

A Policia nao pode nem deve abusar a palmatoria nem rapar cabelos e pelos, principalmente o *xendi*, daqueles que lhe cairem nas garras; porquanto, se e' mais que suficiente o uso de prisao ou detençao a quem tenha vergonha para nao repetir a imprudencia, o expediente duplo do abuso da palmatoria e corte de cabelos nao possui o condao de corrigir um desenvergonhado a quem importa bem pouco qualquer conceito desprimoroso que o publico dele forme.

Nestas condiçoes¿ em que ficou a palmatoria cançada e o *xendi*...desligado?

Ha' a notar se, tambem, que o criterio policial, humano como e', esta' sujeito a errar, sendo natural, porisso que, entre os criminosos, paguem igualmentas as *favas* os inocentes, o que convem evitar-se para o bom nome e prestigio da Policia.

E quanto ao *xendi*, e' bem avisado que se nao toque nele que pelo geral dos hindus e' considerado como emblema de sua religiao. Cortar o *Xendi* representa melindrar o sentimento religioso hindu'.

Esperamos, porisso, que a nossa Policia pora' de parte tais praticas, empregando, apenas, o poder de persuasao e, se necessario for, o de prisao para preencher cabalmente o fim que tanto ela como no's temos em vista.

UM 'FAVOR' DO SR. BATALHA

O sr. Pereira Batalha foi muito infeliz em alardear o *favor que prestou* ao nosso director "intercedendo por êle junto das autoridades para que a policia lhe não lançasse as garras, quando foi da questão dos Velipos e do ataque armado aos soldados." [*A Provincia*, n.º 336, ano X]

Desgraçadamente, porêm, o *favor* do sr. Batalha, longe de ser útil á causa dos Velipos, foi-lhe antes prejudicial, como o leitor vai vêr.

Quando constou ao nosso director que por maquinações engendradas por um *satelite* do sr. dr. Jaime de Morais fôra expedida para Canvorem uma força de cem soldados com ordens de fazer fogo, se necessário fôsse, contra os submissos e pacatos Velipos, pintados como *rebeldes* pelo dito *satelite* de *costas quentes*, o sr. Hegdó Dessai dirigiu-se a Pangim para e l u c i d a r a verdade do *casus beli*... Trocou sobre o assunto impressões com varios dos seus amigos e tambem com o sr. Pereira Batalha por recomendação do sr. Emilio da Costa Martins de Assolnã, um dos procuradores dos referidos Velipos.

O sr. Batalha prontificou-se a acompanhar o nosso director ao Comando Geral do Corpo de Policia e disfazer ali a rêde de intrigas, astutamente tecida pelo *figurão* governamental. E, de facto, o sr. Pereira Batalha, então *desprovinciado* e o sr. Hegdó Dessai foram falar ao sr. Coronel Craveiro Lopes, sobre a maroteira de quem, segundo o tradicional costume *politiqueiro* dos da grei estava apegado á sola dos sapatos do sr. Governador Geral.

O sr. Craveiro Lopes, comandante geral, recebeu, porem, nesse dia só ao sr. Batalha, o qual, depois da conversa que entabolou com aquela autoridade, disse ao sr. Hegdó Dessai, em tom de tristeza mesclada de laivos de compaixão, que nas regiões oficiais estava tudo contra o nosso director que era considerado como inimigo figadal dos europeus e da República, desde a publicação no *Bharat* da local, referente ao centenario de Vasco da Gama, que êle, *o sr. Batalha nada podia no entretanto fazer em prol dos Velipos*, mas que faria o que estivesse ao seu alcance, quando o caso fôsse afecto aos tribunais competentes.

Foi isto ao pé do Liceu Central. E' aqui que o sr. Batalha se despedíu *para sempre* do sr. Hegdó Dessai que nunca mais lhe falou sobre o caso de Canvorem.

A isto se resume o *importante favor* do sr. Batalha. Mas não acabou a historia...

Depois do que se passou no Comando de Policia, o nosso director, resolvido a pedir justiça ao Govêrno de Portugal por telegramas, dispunha-se a voltar para Quepem. Precisamente nêste momento foi-lhe transmitido por parte do sr. Craveiro Lopes que êste senhor desejava ouvi-lo no dia imediato sobre o malfadado caso de Canvorem.

Efectivamente, o sr. Hegdó Dessai entrevistou-se com aquela autoridade no dia imediato. Na entrevista, o director do *Bharat* desfez, uma por uma, todas as acusações que circulavam contra êle e os seus constituintes, instando, finalmente, com o sr. Coronel Craveiro Lopes para êle proprio, como arbitro, dicidir o tão falado caso, o que, porêm, não foi possivel por circunstancias cuja narração não vem a proposito.

Só, após a entrevista, é que graças ao espirito justiceiro do digno comandante geral, os Velipos, injusta e arbitrariamente presos, foram postos em liberdade, *concluindo então o nosso director no decurso da conversa tida com o sr. Craveiro Lopes que ele não lograra ser recebido por Sua Excia no dia anterior por causa da companhia do sr. P. Batalha*, o que, mau grado nosso, somos forçados a trazer á luz, já que o sr. director de a *A Provincia* nos provocou sem motivo plausivel.

Como o leitor vê, o *favor* do sr. Batalha em vez de favorecer a causa dos Velipos, só a prejudicou!

E é um *favor* desses que o sr. Batalha, hoje *provinciado*, está alardeando !!!

Não há dúvida que o sr. Batalha é um *favoreiro* dos quatro costados. Se não fôra seu *favor* o director do *Bharat* estaria, a estas horas, reduzido a *poeira*, *cinsas* e *nada*, em consequência do fusilamento a que a Policia havia de proceder por seu grave crime de ter-se revoltado contra a prepotencia dos *sobas* de Canvorem ... e o que o *influente* jornalista euro

… त्या मंडळाकडून अव्याहत सुरू आहे. या उत्सवाची कल्पना बहुजन समाजास प्रिय होऊन त्याचें अनुकरण गोमांतकांतील बऱ्याच भागांत झालें आहे. व अल्पाव-धींत ह्या उत्सवास राष्ट्रीय स्वरूप येईल, असें वाटावयास लागलें आहे.

श्री गणपत्युत्सवापेक्षां श्री सरस्वत्युत्सव सार्वजनिक करण्यांत अनेक फायदे असून यांत जास्त सुलभता आहे एक तर विद्यार्थी वर्गाकडे या उत्सवाचा जास्त संबंध, दुसरें कोणत्याहि गांवीं कसलीहि स्थानिक अडचण असली तरी प्रत्येक शाळेच्या जागीं –जेथें तसा प्रघात नसेल तेथें– श्री सरस्वतीच्या मूर्तीची स्थापना करून व्याख्यानें, प्रवचनें वगैरे करण्यास प्रत्यवाय येणार नाहीं. तिसरें हा उत्सव गणपत्युत्सवाप्रमाणें खाजगी रीतीनें साजरा होत नसल्यामुळें या समारंभास हजर राहण्यास लोकांस कोणतीच अडचण पडत नाहीं सारांश या उत्सवाचा गोमांतकांत अशा प्रकारें प्रसार झाला म्हणजे प्राथमिक शिक्षणाची खेड्यापाड्यांतूनहि उन्नति होण्यास अवकाश लागणार नाहीं. व समाज सुशिक्षित होऊं देणें हें नव गोमंतकाचें आज आद्य कर्तव्य आहे, याबद्दल दुमत नाहीं.

श्रीयुत ऋग्वेदीहि आपल्या एका ग्रंथाच्या शेवटीं अशी कळकळीची प्रार्थना करतात कीं, "जनतेंत प्रेमसंवर्धन करून एकोपा घडवून आणण्यास उत्सवासारखा दुसरा रामबाण उपायच नाहीं. नागरिकांचे व खेडवळांचेहि उत्साहवर्धक उत्सव राहिलेच पाहिजेत; मात्र त्यांच्यांतील अनाचार व अनीति काढून टाकून त्यांस शुद्ध वळण देण्यास सुशिक्षितांनीं शैथिल्य टाकून कंबर बांधली पाहिजे. आमचे गृह्यसंस्कार शुद्ध झाले, उत्सवांतील शिष्टसंमत नसलेला भाग नाहींसा झाला, बंधुत्व भावनेचा विकास झाला व परमात्म्याची ओळख पटूं लागली म्हणजे आह्मीं खास उन्नतिपथ आक्रमूं लागलों असें म्हणावयास हरकत नाहीं. उपदेशामृतानें सर्वतोपरी आमची कायिक, वाचिक व मानसिक प्रगति व्हावी हेंच आमचीं कथाकीर्तनें, जत्रा, पूजासमारंभ, प्रवचनें इत्यादिकांचें उद्दिष्ट आहे"

नवगोमांतका, आज या परिस्थितींत ही प्रार्थना तुला आशेच्या टिकणीं आहे असें समजून श्री सरस्वतीच्या सान्निध्यांत आपल्या शुद्ध भावनेला जागृत करून व मतभेदाची द्वैत भावनेस तिलांजली देऊन सर्व प्रकारच्या देशोन्नतीच्या कार्यास लागण्याची हिंमत धर, एवढेंच तुला सांगणें आहे!

—हिंदुस्थानच्या पोष्ट खात्यांतून सन १९२२–२३ सालीं १५१२० लक्ष रुपये किंमतीच्या विमा उतरलेल्या पार्सलांतून १२२ हजार रुपये किंमतीचीं पार्सलें गहाळ झालीं, ६६० लक्ष रजिस्टर्ड नगांपैकीं हरवलेल्या नगांबद्दल १२००० रुपये भरावे लागले व १२०८० लक्ष रुपये किंमतीच्या मनीऑर्डरींत ८९००० रुपयांची तूट आली.

स्फुट विचार

महात्माजींचा उपवास:— गेल्या च्या मागील गुरुवारीं म्हणजे गेल्या १८ रोजीं सकाळीं दोन वाजतां महात्माजींनीं आपल्या खासगी कारभाऱ्याकरवें पुढील पत्रक प्रसिद्ध केलें आहे: " हल्लीं होत असलेल्या उद्वेगजनक गोष्टी मला असह्य झाल्या आहेत व तशांत ही माझी झालेली निर्मळ निराशा सहन करणें मला अगदीं दुरापास्त आहे. माझ्या धर्माची मला अशी शिकवण आहे कीं जेव्हां जेव्हां एखादा मनुष्य संकटाच्या वेळीं जाळ्यांत अडकतो व जेव्हां जेव्हां त्या परिस्थितीच्या फेऱ्यांतून पार पडणें त्याला अगदीं अशक्य होतें तेव्हां तेव्हां प्रायोपवेशनाचा व प्रार्थनेचा मार्ग स्वीकारावा आणि म्हणूनच मीहि तसेंच करण्याचें योजिलें आहे. मी जें कांहीं लिहितों किंवा बोलतों त्यानें ह्या दोन संस्कृतीचें एकीकरण होऊं शकत नाहीं.ह्याचकरितां मी स्वतःला एकवीस दिवसांच्या उपवासाची शिक्षा देत आहें. ह्या अवधींत मी जीव संरक्षणाचें अंतिम साधन म्हणून फक्त पाणीच पीत जाईन व जरूरच पडल्यास थोडेंसें मीठहि खाईन. प्रायश्चित व प्रार्थना ह्या दुहेरी दृष्टीनें मी हा मार्ग स्वीकारला आहे. प्रायश्चित या दृष्टीनें माझा नवीन निश्चय लोकसमाजापुढें मांडण्याची मला जरी कांहींच जरूरी नसली तर आजपर्यंत परस्परांशीं गुण्यागोविंदानें वागलेल्या हिंदु मुसलमान या दोघांसहि असा अत्याचार न करण्याबद्दल विनंति व प्रार्थना करण्याचा मला हक्क पोहोंचतो व म्हणून हा निश्चय तुह्मांपुढें जाहीर करणें मला भाग आहे. मी इंग्रजांसहित सर्व ज्ञातींच्या व वर्गांच्या पुढाऱ्यांना एकत्र जमवून ह्या धर्मांच्या पवित्र तत्वांस व माणुसकीस लाजविणाऱ्या अमानुष प्रकारांस आळा घालण्याचे उपाय योजण्याबद्दल नम्र विनंति करतों. ह्या प्रकारचे दंगे म्हणजे परमेश्वरा या साम्राज्य सत्तेचा ऱ्हास होय. आपण सर्व मिळून त्या परमशक्ति परमेश्वराचा आपल्या हृदय कपाटांत अधिष्ठान देऊं या!!!" हा अशा प्रकारचा निर्दय निश्चय करतांना त्यानीं कोणाचाच–त्यांच्या दिलजान दोस्त महंमद अल्लीचाहि – विचार घेतला नाहीं, नव्हे त्यांना एका शब्दानेंहि सुचविलें नाहीं. कोहाटमध्यें घडलेल्या भयंकर अत्याचाराची बातमी त्यांच्या कानांवर जातांच त्यांच्या फुलापेक्षांहि कोमल व लोण्यापेक्षांहि मऊ अंतःकरणाला आत्यंतिक दुःख झालें. हिंदु मुसलमानच्या टिकाऊ एकीकरितां त्यानीं केलेली अविश्रांत मेहनत निष्फळ झालेली पहातांच त्यांना कसेंसेंच वाटलें; त्याचें हृदय हादरूं लागलें; डोळ्यांत अश्रु उभे राहिले. ब्रिटिश न्याय कोर्टानें राजद्रोहाबद्दल ठोकलेली सहा वर्षांची शिक्षा ऐकतांना ज्यांचें मुखकमल हांसरें दिसलें ते महात्माजी त्यावेळं रडले. आपल्या अपूर्व स्वार्थत्यागानें दधिची ऋषीस लाजविणारा तो हिंदुस्थानचा हिंमतदार आत्मा रडला. हें सारें कां?

एकी पाहिजे:— त्या महात्म्याची काया कोणाकरितां इतकी झटत आहे! त्यांचा अमोलिक जीव कोणाकरितां तिळतिळ तुटत आहे! त्या कृशदेही मोहन लालाचें रक्त कोणाकरितां शेरशेरानें आटत आहे? ह्या सर्व प्रश्नांचें उत्तर एकच. हिंद देशाकरितां! ह्या हिंदभूमीचा अभिमान बाळगणाऱ्या प्रत्येक प्राण्याकरितां! ह्या आर्यावर्तांत वास करणाऱ्या हिंदु, मुसलमान, पारशी, यहुदी, ख्रिश्चन वगैरे सर्व धर्मांतील लोकांकरितां! त्या महात्म्याला हिंदु-मुसलमानाच्या कामचलाऊ एकींत आनंद नाहीं! दिलसफाईशिवाय दिलजमाई कशी होऊं शकेल? त्यानां सर्व ज्ञातींची टिकाऊ एकी पाहिजे. ज्या चार भर भक्कम पायांवर ते आपल्या स्वराज्याची इमारत उभी करूं शकतात त्यांतील खादीच्या खालोखाल दुसरें महत्वाचें तत्व म्हणजे हिंदुमुसलमान एकी. ह्या एकीच महत्व त्यांना फारच वाटतें. आजपर्यंत दोनदां उपोषण करण्याचें जाहीर केलें होतें. व दोन्हीदां ते खऱ्या आर्यबाण्याला स्मरून वागले. पहिला चौदा दिवसांचा उपवास दक्षिण आफ्रिकेंत त्यानीं जाहीर केला व तोहि पाशवी शक्तीशीं झुंज देण्याकरितां. दुसरा पांच दिवसांचा उपवास त्यानीं चौरिचौऱ्याच्या दंग्याच्या वेळीं व तोहि आपल्या देशबांधवांकरितांच. त्यांच्या पहिल्या उपवासाची मुदत चौदा दिवसांची व दुसऱ्या उपवासाची पांच दिवसांची होती; पण ह्या तिसऱ्या उपवासाची कालावधी तर एकवीस दिवसांची ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, त्या दोन्हींहि अन्यायापेक्षां हा अत्याचार अधिक असह्य झाला. नोकरशाहीच्या आपस्वार्थी कृत्यांपेक्षां आपल्या लोकांचे अनन्वित अत्याचार त्यांना अधिक असह्य होतात. आपसांत बेबंदशाही माजली असतां परकीयांच्या सोटेशाहीचा प्रतिकार कसा करितां येईल. आपस तील झगडे आधीं निवडावयाचे व मग सर्वांनीं मिळून परकीयांस तोंड द्यावयाचें! नाहीं तर चौरीचौऱ्यास घडलेल्या प्रसाराप्रमाणें आपले लोकच आयत्यावेळीं आपणाला दगा देतील अशी त्याना भीति वाटते.

हिंदु मुसलमान:— पण हिंदु मुसलमानाचे झगडे आजकालचेच नाहींत कीं ते महात्माजींच्या उपदेशानें चटकन मिटविले जातील. कित्येक शतकें त्यानीं परस्परांच्या नरड्यांचा घोट घेण्यांत घालविलीं आहेत व त्या द्वेषाच्या पाळेमुळें दोन्हीहि धर्मांच्या लोकांच्या अंतःकरणांत इतकीं खोल पसरलीं आहेत कीं महात्माजींच्या मध्यस्थीनें जरी त्या दोन्हींहि संस्कृतींची एकी केली गेली तरीहि तो द्वेषाग्नी त्यांच्या हृदयांत धुमसतच राहील व तो केव्हां फिरून पेट घेईल ह्याचा निश्चित नियम नसल्यानें त्यांची केली जाणारी एकी अल्पकालीन अतएव निरुपयोगीच ठरेल. पण महात्माजी निग्रही आहेत. व त्या एकी करितां आज ते आपल्या जिवाचें मोल तोलण्यास तयार आहेत. त्यांचे प्राण हिंदु इतकेच मुसलमानानांहि प्रिय आहेत व ह्मणूनच गेल्या महिन्याच्या सव्वीस तारखेस दिल्ली येथें भरली जाणाऱ्या हिंदुमुस्लीम परिषदेंत दोन्हींहि समाजांच्या धार्मिक तत्वांची तोंडमिळवणी केली गेलीच असेल कांहींहि असो; गुलबर्गा, लखनौ, कोहाट वगैरे ठिकाणीं घडलेले अत्याचार जितके मुसलमानांना तितके हिंदूंनांहि लाजिरवाणे होत हें कोणासहि नाकबूल करतां येणार नाहीं व महात्माजीनें आपलें अर्धेअधिक आयुष्य खर्चून जो हिंदुमुसलमानांची एकी करण्याचा प्रयत्न केला व आपल्या प्रयत्नांस तपोबलाची जोड मिळावी म्हणून जी दोन वर्षें खडतर तपश्चर्या केली ती निष्फळ होऊन त्यांना आणखीहि एकवीस दिवसांची तपश्चर्या करण्याची जरूरी भासावी.ही गोष्ट दोन्हीहि संस्कृतींना लज्यास्पद व खालीं मान घालण्यास लावणारी आहे.

वर्तमानसार

—पेडणें येथील शीलोन्नति समाजाच्या वार्षिक व्याख्यानमालेस ता० ७ रोजीं आरंभ होईल.

—सांगें येथील विठ्ठलसेवक मंडळाचा सरस्वत्युत्सव ता० ७ व ८ रोजीं साजरा होईल.

—दुष्काळामध्यें गुरांना चारा पुरविण्याकरितां मुंबई सरकारनें दक्षिण भागांत करजगी (धारवाड) व मध्यप्रांतांत कोपरगांव आणि नागपूर येथें गवताचे डेपो उघडले आहेत.

—दरमहा ५ रुपये भाडें देणाराला म्युनिसिपालटींत मत देण्याचा बडोद्याच्या रहिवाश्यांना अधिकार मिळाला आहे.

—दरवडेखोर बाबरदेव यांस पकडल्याच्या कर्तबगारीबद्दल ब्रिटिश सरकारनें बडोद्याच्या पोलीसाना बक्षिसाकरितां ९००० रुपये दिले.

—नागपूर येथें १२ वर्षे वयाच्या एका मुलीचा खून होऊन तिचें प्रेत मेहदी बागेंत सांपडलें. या बागेच्या आसपास मुसल्मानाची वस्ती आहे.

—'खुदीराम' या नावाचें बंगाली पुस्तक जप्त करण्यांत आलें.

—बेळगांव येथें भरणाऱ्या खिलाफत परिषदेच्या अध्यक्षस्थानाकरितां मौ. झफरअल्लीखान यांची निवडणूक करण्यांत आली.

—इब्न सय्यद हा मक्का आपल्या ताब्यांत घेण्याच्या विचारांत आहे.

—एका इटालियन कामकऱ्यानें फॅसिष्ट कॉर्पोरेशनचे अंडर सेक्रेटरी डे. कामालिनी यांस ठार मारिलें.

—जर्मनीनें २ कोटी सुवर्ण मार्कांचा दुसरा हप्ता भरला.

—बंगालचे प्रसिद्ध कायदेपंडित व प्रागतिक पक्षाचे एक सन्मान्य पुढारी भूपेंद्रनाथ वसू यानीं इहलोकची आपली यात्रा संपविल्याचें कळविण्यास आह्मांस फार वाईट वाटतें.

बालोन्नति समाज, केपें–गोवा

या संस्थेचा वार्षिक सरस्वत्युत्सव येत्या अक्टोबर ता. ४।५।६ रोजीं समाजाच्या दिवाणखान्यांत साजरा होणार असून त्या प्रसंगीं मास्तर दळवी, ना. अ. पाटणकर वगैरे गृहस्थांचीं भाषणें होणार आहेत. तरी सदरील उत्सवास सर्वांनीं अगत्यपूर्वक येऊन, संस्थेस आभारांत ठेवावें अशी नम्र विनंति आहे.

से. बा. समाज, श्रीपाद नी. भेंडे

श्रीमहालक्ष्मी प्रासादिक बाल समाज संस्था, तळावली–दुर्भाट,

या संस्थेचा वार्षिक सरस्वतीपूजनोत्सव येत्या, अष्टमी नवमी आणि दसमी (ता० ५ ६–७) रोजीं श्रीमहालक्ष्मीच्या आलयांत साजरा होणार असून, त्या तीन्हीं दिवस पूजा, आरत्या, कीर्तन वगैरे होणार आहे. तेव्हां सदरहू उत्सवास सर्वांनीं अगत्य येऊन संस्थेस आभारांत ठेवावें अशी विनंति आहे.

सर्वांचा, नम्र! सदाशिव विठ्ठल सांवत

राष्ट्रीय शिक्षण

---*---

असहकारितेच्या कार्यक्रमाविषयीं विशेषतः त्याच्या विधायक बाजूविषयीं लिहितानां राष्ट्रीयशिक्षणाचा सरकारी शिक्षणसंस्थांवरील बहिष्काराशीं असलेल्या संबंधाचा उल्लेख ह्या पत्रांतून कित्येक महिन्यापूर्वी करण्यांत आला होता. आज त्यावेळीं असलेल्या परिस्थितीहून अगदीं भिन्न अशी परिस्थिति उत्पन्न झालेली आहे. असहकारितेच्या उत्पादकानें पूर्वी वेळोवेळीं फेरफार केला गेलेल्या बहिष्काराचा कार्यक्रम बदलण्याचा आपला निश्चय जाहीर केला असून येत्या काँग्रेसच्या बैठकीच्या विचारासाठीं मांडण्यांत येणार असलेल्या कांहीं नवीन योजनाहि त्यानें जाहीर केल्या आहेत म० गांधींच्या नव्या योजनांविषयीं दुसऱ्या प्रसंगीं लिहिण्याचा माझा विचार आहे. आपणांस सध्यां फक्त त्यांतील राष्ट्रीय शिक्षणाचा भाग पूर्वीच्या स्वरूपाहून वेगळा आहे किंवा काय हें पहावयाचें आहे. म० गांधीचा त्यांच्या कार्यक्रमावर असलेल्या अढळ विश्वासाविषयीं, त्याच्या लेखांवरून पहातां, प्रश्नच उरत नाहीं. त्यांनीं आपला 'पराजय' कबूल केलेला आहे. पण त्यांच्या ह्या पराजयानें त्यांच्या कार्यक्रमाची व असहकाराच्या तत्वाची निष्फळता सिद्ध होत नाहीं. सध्या अस्तित्वांत असलेल्या राष्ट्रीय शिक्षणसंस्था काँग्रेसनें चालवाव्या व शक्य असल्यास नवीन संस्था उघडण्यांत येऊन त्या सरकारच्या मदती पासून व संसर्गापासून दूर रहातील ह्याची काळजी घेण्यात यावी, असें त्यानीं सुचविलें आहे. असहकारितेच्या कार्यक्रमाचा बराच मोठा भाग राष्ट्रीय ऐक्यासाठीं गाळीत असतांहि गांधीनां राष्ट्रीय शिक्षणाचा तपशील पूर्वीच्याच स्वरूपांत कायम ठेवण्याची गरज वाटो. सरकारी शिक्षणसंस्थांवरील बहिष्कार उठविल्यानें राष्ट्रीय शिक्षणसंस्थाचें महत्व किंवा त्यांची जरूरी कमी न होतां उलट या संस्था योग्य रीतीनें चालवून उर्जितावस्थेस आणल्यानें सरकारी संस्थांवरील बहिष्कार अपोआपच यशस्वी होतो, हें सहज दिसून येईल. गांधींच्या ह्या सूचनेस काँग्रेसमध्य विरोध होईल असें मला वाटत नाहीं. काँग्रेस मध्यें व बाहेर असलेल्या वेगवेगळ्या पक्षपैकीं कोणताहि पक्ष राष्ट्रीय शिक्षणाच्या तत्वाविरुद्ध नाही व त्या सवास भाग घेतां येईल अशा विधायक कार्यांत राष्ट्रीय शिक्षणाचा प्रामुख्यानें समावेश होतो.

वास्तविक दुसऱ्या देशांत शिक्षणसंस्था स्थापण्यासाठीं किंवा त्या चालविण्यासाठीं त्या त्या देशाच्या राज्यव्यवस्थेवर अवलंबून रहावें लागत नाहीं; एवढेंच नव्हे तर त्या सर्वांवी स्वतंत्र असतात व त्याच्या चालकाना त्यांच्या व्यवस्थेसंबंधीं वाटेल ती सुधारणा अमलांत आणण्यांत कोणतीच अडचण उत्पन्न होत नाहीं. अमेरिकेंतील उच्च शिक्षणसंस्था त्या त्या संस्थांचे 'ट्रस्ट' चालवीत असतात. पण हिंदुस्थानांत सर्व शिक्षणसंस्थांच्या कारभारांत सरकारचा हात असतो व क्वचित् प्रसंगीं एकाद्या म्युनिसिपालिटीनें किंवा लोकल बोर्डानें स्वतेच्या इच्छेवरून परंतु सरकारी संमतीखेरीज त्यांत सुधारणा घडवून आणण्याचें मनांत आणलें तर सरकारास त्याच्या नैतिक अधिकारांत वाटेल ती ढवळाढवळ करतां येते हें सुरत किंवा अहमदाबाद म्युनिसिपालिटीच्या उदाहरणानें दाखवून दिलेलें आहे. लोकांना स्वतःच्या संस्था उघडतां येत नाहींत ह्याचें दुसरें व मुख्य कारण पैशांची अडचण हें होय. येथें फक्त खासगी खर्चानें चाललेल्या दुसऱ्या अवाढव्य संस्था आहेत; पण त्यांच्या क्षेत्रांत स्वतंत्र शिक्षणसंस्थानां जागा नाहीं शिक्षणासारख्या अत्यंत महत्वाच्या विषयांत सरकारी मदतीशिवाय चालत नाहीं म्हणून नव्हे किंवा शिक्षणसंस्था चालविण्यास आर्थिक मदत देणारे रॉकफेलर कार्नेजी येथें नाहींत म्हणूनहि नव्हे, तर राष्ट्रीय शिक्षणसंस्था स्थापणें किंवा त्या पूर्वीच अस्तित्वांत असल्यास त्यांना कोणत्याचप्रकारें हिंदी धनिकांनीं मदत करणें सरकारास संमत नाहीं म्हणून राष्ट्राला सरकार व सदोष संस्थांच्या शिक्षणावरच समाधान मानून रहावें लागतें. आमचे रॉकफेलर एकाद्या व्हाइसरॉयच्या किंवा गव्हर्नरच्या सहीनें निघालेल्या 'अपीलाच्या' यादीवर लक्षांचें आंकडे टाकून अमेरिकन रॉकफेलरला लाजवतात; पण राष्ट्रीय शिक्षणाकडे एक पैचाहि व्यय करण्याचें पाप करीत नाहींत. ह्यावरून अमेरिकेसारख्या स्वतंत्र देशांतील धनिक व तेथील राज्यव्यवस्था राष्ट्रीय शिक्षणास मदत करणें राजद्रोह समजत नाहींत, हें उघड आहे.

हिंदुस्थानांत आतांपर्यंत स्वतंत्र शिक्षणसंस्था स्थापण्याचे झालेले प्रयत्न स्वावलंबनाच्या तत्वावर केले गेले आहेत. डॉ. टागोरचें शांतिनिकेतन, म० गांधींचा सत्याग्रह आश्रम, प्रो० कर्व्यांची संस्था, दयानंद वैदिक कॉलेज, गुरुकूल संस्था व इतर राष्ट्रीय शिक्षण संस्था वगळल्यासहि सर्वांगी शिक्षणाची सोय करण्यासाठीं काँग्रेसनें असहकारितेचा ठराव १९२० त पास झाल्यानंतर यशस्वी प्रयत्न केला, त्यावरून राष्ट्रीय शिक्षणाच्या आवश्यकतेच्या जागीवेची कल्पना येईल. गुजरात विद्यापिठ व टिळक विद्यापिठ स्थापन करण्यानें ह्या देशांत राष्ट्रीय शिक्षणाचा पाया घालण्यांत आला आहे. ह्या पिठाच्या विद्यमानें चालणारीं प्राथमिक, दुय्यम व वरिष्ट शिक्षणाचीं विद्यालयें, जीं दोन तीन वर्षांपूर्वी चालत होतीं तेवढ्या जोमानें आज चालत नसलीं, किंवा त्यांपैकीं कांहीं निरुपायास्तव उद्यां बंद करावीं लागलीं तरी तीं उघडण्यांत दिसून आलेलें धैर्य व उत्साह ह्यांचें महत्व कमी होत नाहीं; ज्या अशक्य परिस्थितींत तीं उघडण्यांत आलीं, ज्या उदात्त ध्येयासाठीं व ज्या स्फूर्तीमुळें तीं चालविणें शक्य झालें त्या सर्वांचा विचार केल्यास, राष्ट्रानें स्वातंत्र्यासाठीं केलेल्या प्रयत्नांत किती प्रगति झाली हें कळून येईल. राष्ट्रीय शिक्षणसंस्थांनीं महत्व त्या सरकारीसंस्थांबरोबर स्पर्धा करण्यासाठीं उभारलेल्या आहेत म्हणून प्रस्थापित होत नाहीं; राष्ट्रीय शिक्षणाच्या तत्वांत स्पर्धेची कल्पनाच अस्तित्वांत नाहीं. राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें योग्य व उपयुक्त असें शिक्षण देण्याचा राष्ट्रीय शिक्षणाचा उद्देश आहे व राष्ट्रीय शिक्षण संस्थांतील शिक्षणपद्धति हा उद्देश डोळ्यांसमोर ठेऊन आंखण्यांत आलेली आहे. सर्वच शिक्षणाचा प्रश्न हा एक वादग्रस्त प्रश्न आहे. व त्याचा समाधानकारक निकाल लागण्याच्या मार्गांत बऱ्याचशा अडचणी आहेत. आज कोणत्याहि देशांतील विशिष्ट शिक्षण-पद्धति निर्दोष अशी नाहीं. त्यांत सुधारणेला वाव आहे. परंतु हिंदुस्थानांतील शिक्षणपद्धति एवढी सदोष व एकांगी शिक्षणपद्धति जगांत कोठेंहि आढळणार नाहीं. परकीयानीं आपली राजसत्ता चिरस्थायी करण्यासाठीं व हें राष्ट्र नेहमींच गुलामगिरींत रहावें ह्या उद्देशानें स्थापलेल्या शिक्षणसंस्थांत सुधारणा होणें ब्रिटिशांच्या आर्थिक फायद्यास अनुकूल नसल्यानें सरकारी संस्थांत सुधारणेचे प्रयोग होणें सोडाच पण त्यांतील उघडउघड दोष नाहींसे होणें किंवा करणें अशक्य आहे. म्हणून राष्ट्रीय संस्थांतील शिक्षणक्रम आज जरी पूर्ण नसला तरी त्यांत आमच्या उन्नतीला पोषक अशाच गोष्टींचा भरणा असल्यानें सरकारी संस्थातील शिक्षणक्रमापेक्षां लाखों पटीनीं चांगला आहे.

काँग्रेसचा संबंध असलेल्या वेगवेगळ्या ठिकाणच्या व मुंबईतील मराठी व गुजराथी राष्ट्रीय शाळा, इंग्रजी महाविद्यालय व मेडिकल कॉलेज ह्या संस्था राष्ट्रीय शिक्षणाच्या तत्वावर चालविण्यांत आलेल्या आहेत; त्यांतील शिक्षणक्रम त्या तत्वास अनुसरणारा असाच आहे. परंतु त्याचा फायदा घेणें, सरकारी शिक्षण संस्थांचा तिटकारा वाटत असतांहि, सर्वांनाच शक्य होत नाहीं. सध्याच्या आर्थिक स्थितींत साधारण तरुण माणसास राष्ट्रीय विद्यापिठाचा पदवीधर होऊन स्वतःच्या व कुटुंबाच्या उदरनिर्वाहाच्या शक्याशक्यतेवर अवलंबून रहाण्यापेक्षां जास्त सुरक्षिततेचा मार्ग अवलंबावा लागतो. हा त्याचा दोष नाहीं; हा राष्ट्रीय शिक्षणाचाहि दोष नाहीं. जोंपर्यंत आपल्या आजूबाजूची प्रतिकूल परिस्थिति बदलली जाणार नाहीं; जोंपर्यंत हिंदुस्थानचें सरकार राष्ट्रीय सरकार होणार नाहीं, तोंपर्यंत राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार व्हावयास पाहिजे तेवढ्या प्रमाणावर होणार नाहीं. ती विशिष्ट स्थिति उत्पन्न करण्यासाठीं राष्ट्रीय सभेनें प्रयत्न चालविलेला आहे; राष्ट्रीय शिक्षण हा या प्रयत्नाचा एक भाग आहे. राष्ट्रीय शिक्षण कार्याची मर्यादा आज आकुंचित असली तरी तें कार्य चालविण्यानें अत्यंत जरूरीच्या राष्ट्रीय जागृतीच्या कार्यास मदत होणार आहे. परंतु राष्ट्रीय शिक्षणाच्या बाबतींत पुरुषांना नसलें तरी स्त्रियांना बरेंच काम करतां येईल. त्यांच्या सुदैवानें किंवा दुर्दैवानें आमच्या सामाजिक व्यवस्थेंत स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य नाहीं; त्यांना उपजीविकेसाठीं पुरुषांप्रमाणें कोणताच व्यवसाय करण्याची जरूरी वाटत नसते. निदान अशा स्त्रियांनीं राष्ट्रीय संस्थांतूनशिक्षण घेतल्यास त्यांना योग्य व त्यांच्या कर्तव्यांतून उत्तम रीतीनें पार पडण्यास मदत करणारें असें शिक्षण मिळून प्रसंग आल्यास परावलंबनहि टाळतां येईल. मुंबईत उच्च शिक्षण संपादन करण्याची सोय पुरुषांबरोबर कॉलेजांत करण्यांत आली आहे. प्राथमिक व दुय्यम शिक्षणाकरितां त्यांनीं श्री लोकमान्य राष्ट्रीय कन्या शाळेसारख्यासंस्थेचा उपयोग करतां येईल. ह्या शाळेंत देण्यांत येत असलेलें शिक्षण सरकारी, निम सरकारी किंवा सरकारनें मंजूर केलेल्या संस्थांत मिळणाऱ्या शिक्षणाहून किती उच्च प्रकारचें असतें हें कळण्यासाठीं त्यांतील शिक्षणक्रमाचें थोडक्यांत वर्णन करणें अप्रस्तुत होणार नाहीं. ह्या शाळेंतील शिक्षण पद्धतीकडे पहातां स्त्री शिक्षणाची आदर्श संस्था कशी असावी ह्याची चांगलीच कल्पना येईल; हिंदुस्थानांत स्त्रीशिक्षण यशस्वी, उपयुक्त व लोकप्रिय करावयाचें असल्यास ह्या संस्थेसारख्या संस्था उघडून त्याचा प्रसार व्हावयास पाहिजे.

ह्या शाळेची स्थापना २२- जून १९२१ रोजीं म. गांधींच्या हस्तें करण्यांत आली व लो. टिळकांची स्मृति कायम राखण्यासाठीं तिला त्यांचें नाव देण्यांत आलें. शाळा उघडण्यास मुंबईच्या कांहीं गुजराथी व्यापाऱ्यांनीं २२००० रु.ची सुरवातीस मोठ्या औदार्यानें मदत केली असून तिला जागेच्या रूपानें नंतर वेळोवेळीं ह्याच वर्गानें मदत केलेली आहे; सध्या तिची व्यवस्था स्वराज्य सभेमार्फत पहाण्यांत येत असून ती चालविण्याची सर्व जबाबदारी श्रीमती कृष्णाबाई तुळसकर प्रिन्सिपॉल, यांच्यावर सोंपविलेली आहे व गेलीं तीन वर्षे ती उत्कृष्ट रीतीनें चालविल्याचें बरें चसें श्रेयहि अडचणींस न जुमानणाऱ्या त्यांच्या एकनिष्ट कर्तृत्वास दिलें पाहिजे. श्री. तुळसकर अमेरिकेंतील कोलंबिया युनिव्हर्सिटीच्या एम. ए. आहेत. त्यांच्यासारख्या पदवीधर स्त्रीनें सरकारी नोकरीच्या आमिषास बळी न पडतां ह्या शाळेच्या चालकत्वाचें जगदगीचें निःस्वार्थी काम पत्करावें ह्याचें खरोखर कौतुक केल्याखेरीज राहवत नाहीं. विशेषतः ह्या दिवसांत काँग्रेससारख्या संस्थेच्या आंतील कारभाराच्या स्वरूपाची ज्यांना ओळख आहे, त्यानांच श्री. तुळसकरांच्या स्वार्थत्यागाची खरी किंमत कळेल. शाळेंत गुजराथी व मराठी असे दोन विभाग असून मॅट्रीकपर्यंतचा अभ्यासक्रम १० वर्षांचा आहे. सर्व मुख्य विषय मातृभाषेंत शिकविले जाऊन त्या त्या विषयांत अपुरेपणा किंवा दोष रहाणार नाहींत अशा प्रकारची काळजी क्रमिक पुस्तकांच्या व इतर बाबतींत घेण्यांत येते. इंग्रजी दुसरी भाषा म्हणून शिकविण्यांत येते. हिंदी चांगलें समजतां व बोलतां येईल, एवढें ज्ञान करून देण्यांत येतें. शास्त्रीय संगीत शिकविण्याची व्यवस्था केली असून तो विषय शिकविण्यासाठीं येथील गांधर्वमहाविद्यालयांतील प्रो. पटवर्धन यांची नेमणूक झालेली आहे. घरगुती धंद्यांपैकीं, सूत

Ano 9 N.° 28

Quinta-feira 9 de Outubro de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
or cadalinha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepém-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक २८

गुरुवार ता. ९ अक्टोबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

PENSAMENTOS DUM DESVAIRADO

O' India, tu que foste o berço da civilisação e epitome de todo o mundo o enlevo de poetas nacionais e estrangeiros, que possuias, a par de uma infinidade de cidades histo'ricas, ouro e outras preciosidades, uma nação cujo espirito audaz cortava com o voo langoroso espaços ignotos no momento em que o resto do mundo dormitava na sua letargia de obscurantisimo, a nação nobre de filosofo na expressão de Max Muller, descendente dum povo o mais valente que espalhou para o mundo inteiro a sua lingua e literatura, a sua sciencia e arte e ainda as suas leis!

O' India, seres tu governada por um povo idolo,esmagado sob um principio que em nada se conforma com o que tens por alvo! Tu, esse filtro de poesia e be'esa de quem o amor e moral constituem o verdadeiro e unico apanagio, seres governada por entes subjugados por materialismo e violencia organisados! Compares o divorcio da civilisação ocidental, infanticidios frequentes, prostituição clandestina abortos vulgares, danças, matine'es, e todas essas patranhas de disparates que se praticam em nome da civilisação, com o teu amor, a tua moral, a SATI que hoje todos combatem, mas que continua a ser ainda uma prova do acrisolado amor que no coração da mulher indiana germina raizes tam arraigadas que procura ate' acompanhar o marido para o alem tumulo, a candura, a castidade e o pudor, e essa pedra triangular em que se assenta a dignidade de mulher indiana, o respeito que o filho tributa ao pai, e tanta coisa que orna a tua grandeza e magnificencia...Mas onde foram agora todos teus sagrados principios, a beleza de outros tempos, os usos e costumes tam belos e tam singelos que passam de admiraveis a's nações entregues a' cultura?

O' India, todo esse manancial de quanto tinha de mais belo e sublime foi ja' derrubado por um povo feroz e dogmatico que acaba de te violar e conspurcar com a influencia duma civilisação nova, uma civilisação corrupta e superficial, a civilisação ocidental. Tu propria acabas de ser...ocidentalisada!!

O India, tu e's grande, infinitamente grande!, mae fecunda dum povo cujos pensamentos irradiam ate' ao infinito, os seus claroes todos cheios de Moral, todos aromatisados de sublimidade, todos carregados de verbo fluente de eloquencia! Tu tens posto a' evidencia bradando alto e bom som a imperfeição de materia ante o espirito. Rompe, pois, esses ferros que te prendem os ocidentais e entra de novo no concerto de nações que tem diante de se um problema a solucionar, um destino a preencher. Ou entao, se te julgares alquebrada com a fadiga do delirio, mais vale que precipites ao abismo e acabes o ciclo da existencia, que eu tarei ia', a' beira do teu tumulo a desfolhar um punhado de goivos sobre a tua campa, dizendo como todos REQUIESCAT IN PACEM:

S. R.

ECOS & CRITICA

UMA DISCRIÇÃO HIPERMINUNCIOSA

Em *A Provincia* de 22 de setembro lê-se o seguinte *Conto Relampago*:

"O sr. alferes Duarte fracturou um braço, resultado da queda de um cavalo.

O animal seguia a trote pela estrada de Ribandar. Encontrando um automovel assustou-se e passou rapidamente de trote a galope, sendo com dificuldade que o sr. alferes Duarte conseguiu evitar que um individuo de idade fosse atropelado já perto da igreja de Ribandar.

A barbela desprendeu-se, e o animal passou a galopar livremente, sendo com muito custo que o sr. alferes Duarte destribado de um dos lados, se aguentava.

Ao passar junto de um prestito funebre o animal deu de repente um salto, e o sr. alferes Duarte, caiu indo bater com o corpo de encontro a uma escada, ferindo-se na cabeça e quebrando um braço."

E esqueceu-se *A provincia* de um detalhe importante: que o prestito funebre com que o sr. Duarte topou foi na ponte de Linhares, e a queda desastrada foi aquem da casa do dr. Mota, medico do Hospital. Portanto a causa da queda não foi o prestito funebre. E ensine depois lições de escrupulo e exactidão aos outros jornais! E nós a supormos que a discrição era do *Heraldo* do dr. A M. da Cunha!

SUSPENSÃO DOS JORNAIS

A proposito da suspensão em Lisboa, dos jornais: *A Patria*, *A Vanguarda*, *O Paiz*, *A República*, O *Radical* e O *Jornal* diz *A Provincia* que foi consequencia das dificuldades financeiras das respectivas emprezas." Batalha amigo! Quem lhe mandou essas informações? Mas só estes jornais ficariam afectados com a carestia do papel, tinta e mais apretos da imprensa? E que é doutros jornais que dão emprezas ainda mais fracas do que as dos suspensos?

Para mais todos os suspensos são jornais retintamente republicanos ... Aqui é que está o *busilis*. Informe-se melhor, Batalha do coração! E não meta o seu nariz respeitavel, onde não é chamado!

PALAVRAS QUE NÃO SE PERDEM...

O delegado da India Portuguesa, Roberto Bruto da Costa, escreve para o seu jornal um artigo interessante sob a epigrafe *Conversando*...do qual extraimos o seguinte trecho que vale oiro, porque é delo:

"E, após uma laboriosa pesquisa, apuramos que o projecto A. dormia profundamente na gaveta do sr. Fulano, ilustre vogal do Conselho Colonial, á espera de que sua excia se resolve-se a dar o seu parecer; que o projecto B. tinha já nada menos de uma duzia de apensos com informação, pró e contra, de outras tantas entidades, desde o Chefe da Repartição até ao amanuense, e todavia ficara incompleto porque lhe faltava o luminoso parecer não sabemos de quem, talvez do erudito continuo do sr. Ministro, que é uma figura imponente e simpatica e em inteligencia fica de certo superior a muitos ministros cerebralmente esvasiados e a cuja passagem pelo gabinete êle tem cerimoniosamente saudado com um sorriso desdenhoso e irónico; que o projecto C. está *encravado* na pasta de um chefe da secção, porque mão misteriosa lhe lançou á margem, a lapis azul, a seguinte nota preventiva: *este projecto visa a excluir* o *elemento europeu do quadro respectivo*."

O italico é do autor do artigo Não anotamos, não comentamos...porque tudo, tudo absolutamente inutil!...

As ultimas palavras então falam bem alto, muito alto e é bom que o sr. Pereira Batalha as atarrache fortemente ao nó de sua memória!

LAMENTAÇÕES ROBERTACEAS...

Leiam, leitores amigos, a lamentação do Jeremias, dizemos mal, do Conselheiro, negociante, representante das forças vivas etc. sr. Roberto:

E', rialmente, triste que os processos de sapa e mexerico prevaleçam tão triunfantemente no Terreiro do Paço onde a par de funcionarios madraços e neurastenizados no ambiente empostado em que vivem, existem tambem funcionarios inteligentes e competentissi-

मात्र 'डिलीव्हरी घेतानां मालधन्यानें चोरीचा प्रकार कंपनीच्या नोकराचे नजरेस आणला पाहिजे' अशी एक शर्त यांत घातली आहे. आग, थांबल्या गाडींतील चोरी अगर इतर एकादी अकल्पित गोष्ट अथवा अपघात घडला तर पूर्वी कंपनीवर मुळींच जोखम नसे. आतां हे शब्द काढून त्या ऐवजीं आग व गाडीस अपघात असे शब्द घातले आहेत व ह्यामुळें नुकसान झालें तर तें नुकसान कसें झालें हें मालधन्यास दाखविण्याचा बोजा कंपनीवर नाहीं. 'बी' रिस्कनोट असली ह्मणजे पूर्वीं अंशतः होणाऱ्या नुकसानीचा (Partial..shortage) दावा करतां येत नसे व ह्यामुळें गुळाच्या भेल्यांची निव्वळ धुडकी मिळाली किंवा धान्य जाऊन निव्वळ पोतें हातांत आलें तरी त्याबद्दल मूग गिळून व्यापाऱ्यास गप्प बसावें लागे! हल्लीं हें नुकसान कंपनीच्या नोकरांच्या गैरशिस्त वर्तनामुळें झालें असें कंपनीच्या पुराव्यावरूनच योग्य रीतीनें जर अनुमानीत होत असेल तर अशा अंशतः नुकसानीचाहि दावा लागू होऊं शकेल. कोर्टासमोर आलेल्या वस्तुस्थितीवरून कंपनीच्या नोकरांच्या गैरवर्तनाबद्दल अनुमान काढतां येणार नाहीं. अशा वेळींच वादीनें त्यांच्या गैरवर्तनाचा पुरावा केला पाहिजे अशी सवलत नवीन नमुन्यांत आहे. बी रिस्कनोट भरून घेताना पॅकिंग कसें होतें व गैरे शेरा कंपनीच्या नोकरानें तीवर मारावा असाहि नियम केला आहे.

'बी' प्रमाणेंच 'एच' रिस्कनोटमध्यें सुधारणा झाली आहे. पण ह्या सुधारणांचा फायदा घ्यावयाचा असेल तर व्यापाऱ्यांनीं हि जास्त काळजीनें माल पाठविण्यास शिकलें पाहिजे व डिलिव्हरी घेतानांहि खबरदारी ठेविली पाहिजे. गुळाची प्रत्येक भेली किंवा तेला तुपाचा प्रत्येक डबा किंवा धान्याचें प्रत्येक पोतें अगर कापडाची किंवा कापसाची प्रत्येक गांठ ह्यावर आपले नांव निशाणी घातली पाहिजे व हातानें सहज निघेल असें पॅकिंग करतां कामा नये. तसेंच मालाचे डिलिव्हरी घेतांना झालेलें नुकसान कंपनीच्या नोकरांचे नजरेस आणलें पाहिजे.

प्रागतिक संघ व गोवा हिंदु मंडळ

गुदस्तच्या डिसेंबरांत या राजकीय म्हणविल्या जाणाऱ्या संस्थांच्या परिषदेंत किती तरी ठराव पास झाले होते. परंतु हे सभेंत पास झालेले ठराव सरकारकडून कोणत्या रीतीनें निकालांत काढले गेले व या कार्यार्थ नेमिलेल्या कमिशन मंडळाचा त्यासाठीं कितीसा प्रयत्न झाला, याची माहिती आतां २ऱ्या डिसेंबरांत २ ऱ्या सालच्या परिषदा जवळ येत चालल्या तरी अद्याप कळत नसल्यानें लोक साशंक आहेत. तेव्हां त्यांनीं आपापल्या कामाचा त्रोटक रिपोर्ट वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध करून लोकांस आपल्या कार्यांची माहिती द्यावी अशी माझी सूचना आहे. आ. नम्र,

एक गोमांतकीय

भारताची भालाफेंक

फेंकणार–निःपक्षपाती

आमची पुण्यनगरी ह्मटली कीं, अलम दुनियेंत असलेल्या नसलेल्या सर्व पक्षांचें माहेर घर. तेथें मवाळ आहेत, जहाल आहेत, फेरवाले आहेत, नाफेरवाले आहेत, सुधारक आहेत, उद्धारक आहेत, सत्यशोधक आहेत, गचाळ आहेत व टवाळहि आहेत. या सर्व पक्षांच्या फोफाट्यांतून एखादी सार्वजनिक हिताची बाब पार पडणें केवळ अशक्यच. पण परिस्थितीचा फेरबदल होतांच जगांत अशक्य कोटींत गणल्या जाणाऱ्या गोष्टीहि कशा चुटकीसरशीं शक्यतेच्या आवारांत येतात ह्याचें उदाहरण पहावयाचें असल्यास परवां तेथें रेमार्केटच्या मैदानांत भरलेल्या सभेकडे लक्ष देणें अवश्य आहे. ही सभा ता. २३ रोजीं शंकरराव लवाट्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती; व तिला पुण्यांतील सर्व पक्षांचे निमंत्रित पुढारी हजर होते. स्वपराक्रमाच्या बळावर स्वातंत्र्यपक्षाच्या धुरीणत्वास पोंचलेल्या प्रो. परांजप्यांनीं जेव्हां आपल्या रसाळवाणींत 'हिंदुमुसलमानाची एकी प्रस्थापित करण्याचा व महात्माजीनां उपवासाचें उद्यापन करण्याविषयीं विनंति करण्याचा' ठराव सभेपुढें मांडला तेव्हां प्रत्येक पक्षाच्या पुढाऱ्यांचें त्यावर अनुकूल असें भाषण होऊन तो महत्वाचा ठराव एक मतानें पसार झाल्याचें जाहीर झालें. पुण्यनगरींत आजपर्यंत भरलेल्या सर्व सभांत सुखासमाधानानें तंट्याभांडणाशिवाय पार पडलेली ही एकच नमूनेदार सभा होय. पण ह्या सभेंत विशेष मजा ती हीच कीं, प्रो. परांजप्यांस एके वेळीं पराड-पे ह्या कपोलकल्पित कडु नावांनें संबोधणारे कलम बहाद्दर त्यांचीच कालाचा अजब तडाखा बसतांच आज भरजोर स्तुति करूं लागले! कालाय तस्मै नमः!

\+ \+ \+

कोणी कांहींहि ह्मणो, स्वराज्यपक्षानें महात्माजींच्या जयजयकारांत जो कायदे कौंसिलांत पाय ठेवला त्याचें त्यांनीं होतां होईल तो हंसें होऊं दिलें नाहीं ही गोष्ट कोणालाहि आपल्या डोळ्यां पुढून काढून टाकतां येणार नाहीं. स्वराजिष्ट परांच्या मऊ गाद्या गिरद्यांनां भुलले नाहींत, लांचलुचपतीस लाळ्चावून बसले नाहींत, कीं त्यांना मानमरातबाचा मोह सुटला नाहीं. महात्माजींच्या अतुल स्वार्थत्यागाच्या भयंकर दिव्यांतून पार पडून पवित्रतम बनलेल्या खादीचें वेष्टन डोक्यांस असतां कोणत्या नादान नराधमाला स्वतःचा सैतानी स्वार्थ सुटेल? पण सुराज्येच्छु स्वराज्यपक्षानें तर सर्वत्र बहारच उडवून दिली. जेव्हां त्यांना नोकरशाहीचा पाडाव करणें इष्ट व शक्य पडे तेव्हां तेव्हां त्यांनीं सरकारला हिंदुस्थानचा कारभार कसा हांकावयाचा हें शिकविल्याशिवाय सोडलें नाहीं. असेंब्लींत जेव्हां त्यांना स्वपक्षाच्या बहुमताचा अभाव भासला, तेव्हां त्यानीं जरा नमतें घेऊन असेंब्लींतील स्वतंत्र पक्षाला आपलेंसें करून घेतलें व हिंदुस्थानची प्रजा ही केवळ मेंढरीं व वरिष्ट युरोपियन अधिकारी हे त्यास वळविणारे मेंढपाळ आहेत अशी आज कित्येक वर्षें होऊन बसलेली परकीयांची समजूत फोल ठरविली. प्रतिपक्षाचा पुरा पाडाव करून हा पक्ष त्याच्या छातीवर बसला. व त्यानें भीषण सिंह गर्जना करून सर्व जगाला जाहीर केलें कीं "आजपर्यंत निद्रितावस्थेंत घोरत पडलेला हिंदुस्थान आज पूर्णपणें जागा झाला आहे ह्या जाग्या केसरीला दुखविण्याचा यत्किंचितहि प्रयत्न जर तुह्मांकडून होईल तर त्याचा घोर परिणाम आपणास भोगावा लागेल. ह्या पुढें हिंदुस्थान आकाशांतल्या देवबापानें आपल्या पृथ्वीवरील पुत्रास खुशाल चरण्याकरितां केलेलें एक कुरण न राहतां जगांतील इतर राष्ट्राच्या बरोबरीचें एक राष्ट्रच राहील. शाबास! भलेगाजी! चिरायु भव!

× + ×

जगांतील प्रत्येक मनुष्याप्रमाणें राष्ट्रालाहि महत्वाकांक्षा अत्यंत आवश्यक आहे; इतकेंच नव्हे तर तीजशिवाय कोणत्याहि राष्ट्राचें राष्ट्रीयत्व स्थापन होऊं शकत नाहीं. आतां ती महत्वाकांक्षा राक्षसी लालसेच्या कक्षेंत न उतरूं देणें हें प्रत्येक उदयगामी राष्ट्राचें कर्तव्य आहे ही गोष्ट निराळी. इजिप्त व इंग्लंड या दोन्हीं राष्ट्रांचा सुदान विषयीं सध्या चाललेला लढा ह्मणजे त्या दोन्हीं राष्ट्राच्या वाढत्या महत्वाकांक्षेचें एक उत्कृष्ट उदाहरण होय! हा लढा सुदान देशावर इंग्लंडची सत्ता रहावी कीं इजिप्त याचा अधिकार असावा ह्याविषयीं परस्परामध्यें सध्या चालला असून इजिप्तचे पुढारी झगलुलपाशा त्या बाबतींत तडजोड सुचविण्याकरितां इंग्लंडचें मुख्य मंत्री रेम्से मॅक्डोनोल्डची मुलाखत घेण्याच्या गडबडींत सध्या आहेत. पण सुदानच्या बाबतींत आपलें असलेलें 'खंबीरपणाचें धोरण' बदलण्यास आज इंग्लंड एक तसूभरहि तयार नाहीं. त्या दोघां मुत्सद्यांच्या भेटीचा निष्कर्ष काय निघणार तो निघो; ह्या दोन्ही राष्ट्रांना सुदानच्या सत्तेची हांव कां सुटावी हा प्रश्न मोठा मजेदार आहे. इंग्लंडची सुदान सरकारकडे आज एक कोटी दहा लक्ष पौंड बाकी निघत आहे व मकवारचें धरण बांधल्यास होणारी कापसाची लागवड इंग्लंडला जपान, अमेरिकेशीं हवी तशी स्पर्धा Compitition मांडण्यास बरीच मदत करणार आहे. आतां इजिप्तनें सुदानचा अधिकार सोडल्यास मकवारचें धरण बांधलें जाईल व त्यानें नाईल नदीस महापूर येऊन इजिप्तचें कापसाचें पीक बुडून जाईल. ह्याच कारणानें तीं दोन्हीं राष्ट्रें सुदानचा अधिकार सुखासुखी सोडल्यास ती आपली राजकारणांतील घोडचूक political blunder होईल ह्मणून भीत आहेत. पण सुदाननेंतरी ह्या दोन्हीं शिरजोर सत्ता पार फेंकून देऊन स्वतःचें स्वातंत्र्य कां प्रस्थापित करूं नये? स्वभावो दुरति क्रमः

—काशीचे प्रख्यात पुढारी बाबु शिवप्रसाद गुप्त यांनीं आपल्या भावाच्या स्मरणार्थ दहा लक्ष रुपये किंमतीची मिळकत ट्रस्टच्या ताब्यांत दिली आहे. या मिळकतीच्या व्याजांतून बिन-सरकारी शाळांत भाषाविषय व यांत्रिक शिक्षण यांना मदत करावयाची आहे.

साभार स्वीकार

ब्राह्मण–अब्राह्मण–बोधः— इसलामपूर (सातारा) येथें प्रसिद्ध होत असलेल्या "ब्राह्मण-मासिक-पत्रिके"च्या विद्वान संपादकांनीं–वा० दा० मुंडले–यानीं प्रस्तुत पुस्तक प्रकाशित करून ब्राह्मण्यसेवेचें पुण्य जोडलें आहे, यांत संशय नाहीं. ब्राह्मण व ब्राह्मण्य यांवर उठल्यासुठल्या यथेच्छ तोंडसुख घेणारे, नाना दुरुत्तरांनीं वेळीं अवेळीं ब्राह्मणाचीं मनें दुखविण्यास न कचरणारे व खुद्द हिंदुस्थानच्या अवनतीचें खापर ब्राह्मणाच्या डोक्यावर फोडण्यांत समाधान मानणारे इ० लोक जर सदरील ग्रंथ निर्विकार चित्तानें वाचून, त्यांतील विचारांचें मनन करतील, तर त्यांचे बरेच गैरसमज दूर होण्याचा संभव आहे. ब्राह्मण अब्राह्मण हा विषय वादग्रस्त असून, तो कोणालाहि सहज, शास्त्रग्रंथांच्या भरीव अध्ययनाखेरीज, आकलन होणें शक्य नाहीं, हें उघड आहे. अशा या कठिण व नाजूक विषयावर मुंडले यानां आपले लेख तयार करण्यास किती परिश्रम पडले असतील, याचीं वाचकानींच कल्पना करावी. दामोदर विश्वनाथ गोखले, शंकर दत्तात्रेय जावडेकर, महादेव राजाराम बोडस, महादेव शास्त्री दिवेकर, रामचंद्र पांडुरंग वैद्य [गोवा] व एक समाजसुधारक इ० लेखकांचेहि लेख प्रस्तुत पुस्तकात झळकत असून, 'बोधां'तील हे व इतर सर्व लेख पूर्वी 'पत्रिके'त छापले गेले होते, असें त्याच्या एकंदर रोखावरून स्पष्ट सिद्ध होतें. ब्राह्मण ह्मणजे काय, ब्राह्मण्याचा काय अर्थ होतो, या गोष्टींचा ज्यांना बोध करून घेण्याची इच्छा असेल, त्यानीं निदान एकदां तरी मुंडले यांचा हा ग्रंथ वाचावा, अशी आमची शिफारस आहे. पुस्तकाची किंमत अवघी २ रु. असून, "वा० दा० मुंडले, पोष्ट इसलामपूर, (सातारा)" या पत्त्यावर लिहिलें असतां तें मिळेल.

क्याटलॉगः—मुंबई स्वदेशी स्टोअर्सचा क्याटलॉग आह्मीं समग्र अवलोकन केला. त्यांतील माहितीवरून हिंदुस्थानांत किती उत्तम प्रकारच्या मालाची निपज होत असते, हें सहज कळून येतें. स्वदेशी मालाला नाकें मुरडणारांनीं हा क्याटलॉग पाहून, आपल्या विलयती चोचल्यानां आळा घालण्याचा प्रयत्न करावा अशी आमची त्यांना सूचना आहे. स्वदेशी मालाला उत्तेजन देण्याचा हा समय असल्यानें, ते आमच्या सदिच्छेला कानाडोळा करणार नाहींत अशी उमेद आहे.



बेळगांव राष्ट्रीय सभेच्या कार्यकारी मंडळास प्रेमाची विनंति

येत्या बेळगांव कॉंग्रेसच्या प्रेक्षकांकरितां तिकीट चार्ज तीस रुपये ठेवल्याचें वर्तमान 'भारत' पत्रावरून वाचकांस कळलेंच असेल बेळगांवची कॉंग्रेस, यंदां अनेक दृष्टींनीं अद्भूत होणार आहे, ह्यांत संशय नाहीं; पण ह्या सर्व अद्भूतपणांत जर अत्यंत अद्भूत अशी एखादी गोष्ट असेल तर ती प्रेक्षकांसाठी तीस रुपये फी ठेऊन हजारो रुपये उत्पन्न करणें ही होय. अद्भूत रसाची ह्या एका गोष्टींत कमाल झालेली आहे आणि यापुढें दुसरी कितीहि आश्चर्यकारक गोष्ट घडली तरी तिला ह्या गोष्टीची सर कधींहि येणार नाहीं.

पण त्याबद्दल कॉंग्रेसला नावें ठेवावयाला आह्मीं तयार नाहींत. व ज्यांच्या हातांत बेळगांव कॉंग्रेसचीं सूत्रें आहेत त्यांच्या संबंधानें हि आह्मांस वाईट हेतूचा आरोप करावयाचा नाहीं. सार्वजानिक कामं ही पैशांचीं असतात. व पैशांच्याच जिवावर तीं चालावयाचीं असतात. तेव्हां यंदां लोकांत कॉंग्रेस संबंधानें उत्पन्न झालेल्या विलक्षण जिज्ञासेचा फायदा घेऊन कॉंग्रेसनें प्रेक्षकांचें तिकीट जर पन्नास रुपये ठेवलें तर तें स्वाभाविक पणाचेंच झालें, असें ह्मणावें लागेल. मात्र ह्या स्वाभाविक पणाबरोबर ज्या आणखी कित्येक गोष्टींचा कॉंग्रेसनें विचार करावयाला पाहिजे, त्या गोष्टी लोकांच्या वतीनें कॉंग्रेससमोर मांडणें, हें आह्मीं आमचें कर्तव्य समजतों. आणि ह्मणूनच कॉंग्रेसच्या व्यवस्थापकांविषयीं मनांत पूर्ण आदर बाळगून आह्मीं त्या गोष्टींचा येथें निर्देश करीत आहोत.

पहिली गोष्ट ही कीं, कॉंग्रेसला प्रेक्षक ह्मणून येणें किंवा कॉंग्रेसमध्यें काम चाललेलें प्रत्यक्ष पहाण्याची इच्छा करणें को णत्याहि प्रकारें गुन्हा नाहीं. कॉंग्रेसमध्यें कांहीं गोष्टी गुप्त चर्चेच्या असतात व सर्वच राजकारण चवाठ्यावर नेऊन उघडें केल्यास त्यांत गूजहि रहात नाहीं. तथापि अशा चर्चेच्या ज्या गोष्टी असतात, व जेथें सामान्य जनतेनें न येणें योग्य असतें, त्या करितां ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी किंवा विषय नियामक कमिट्या ह्या असतात! पण त्या चर्चेतून राजकीय प्रश्न तावून सुलाखून निघाल्यानंतर त्या वरील नाविन्य वृद्धि जनतेनें पहाणें हा जनतेचा हक्कच आहे व त्यासाठीं जनतेस येऊं देणें हें कॉंग्रेसचें कर्तव्य आहे पण पार्लमेंट सभेंतसुद्धां ह्या सारख्या प्रसंगीं. कोणालाहि मज्जाव करण्यांत येत नाहीं. कॉंग्रेसनें हें उदाहरण लक्षांत ठेवायाला नको काय ?

दुसरी गोष्ट अशी आहे कीं, लोकांच्या उत्सुकतेचा फायदा घेऊन त्यांवर पैसा कमावणें हें व्यापारी पेशांत सुद्धां अयोग्य समजलें जातें. 'नफाबाजी' हें असल्याच वर्तनास नांव आहे. असल्या वर्तनाचा धडा बेळगावच्या सुजाण कार्यकर्त्यांनीं घालूं नये. कारण कॉंग्रेसला पैसा द्यावयाला लोक केव्हांहि …………

गांधीच्या हुकमाबरोबर मागें केव्हांच थैल्या दिलेले आहेत. तेव्हां ही इतकी अभिमानास्पद गोष्ट कॉंग्रेसला माहीत असतां व देशबांधवांच्या सदिच्छेचें एवढें रम्य उदाहरण समोर असतां नफेबाजीच्या अप्रत्यक्ष ग्राम्य उपायाचा कॉंग्रेसनें आश्रय करावा हें चांगलें नाहीं. गरीब लोकांकरितां निराळीं व्यवस्था ठरविण्यांत येणार आहेत, असाहि एक मुद्दा या संबंधानें सांगण्यांत येतो; पण कॉंग्रेसमध्यें कोण काय बोलतात व कोणाच्या प्रतिपादनाचा कसा परिणाम होतो, हें पाहण्याची लोकांची उत्सुकता असल्या व्यवस्थेनामुळें भागणें शक्य नाहीं, हें उघड आहे. कॉंग्रेस प्रत्यक्ष पाहूं देण्यांत एक महत्वाचें राजकीय शिक्षणहि लोकांस मिळत असतें तें मिळूं देण्याचीं द्वारें बंद करणें हें लोकशिक्षणाच्या दृष्टीनें अतिशय घातक आहे.

शेवटीं एक नाजूक गोष्टीचा आह्मां भितभित उच्चार करावयाचा आहे, व त्याबद्दल कॉंग्रेस कामिटीचे अधिकारी आपला गैरसमज करून घेणार नाहींत अशी आह्मांस आशा आहे. ती नाजूक गोष्ट ही की, आमचा महाराष्ट्रीय समाज इतर समाजापेक्षां आणि गोमांतकीय हिंदुसमाज त्याहिपेक्षां निर्धन आहे इतर समाजांना जी गोष्ट सहज वाटते ती महाराष्ट्रीय समाजास तशी वाटत नाहीं. ती त्यास पर्वतप्राय वाटते. यद्यापि ३० रुपये हा प्रेक्षकांकरितां सर्वांत हलका दर ह्मणून जरी ठेवलेला असला तथापि तो आमच्या गोमांतकीय बांधवांस अत्यंत जड आहे. शिवाय प्रवासखर्चास आणखी तीस रुपये खर्च करणें ही जिवाभावीकडची गोष्ट आहे. करितां ह्या अमोल्य संधींचा फायदा परप्रांतीय स्वजनास मिळवून देण्यासाठीं सदरील तिकीटें ठेवण्याचा विचार टाकून देऊन प्रेक्षकासाठीं नेहमीचीच फी ठेवावी, किंबहुना मोठ्या आतुरतेनें येणाऱ्या गोमांतकीय तरुणाकरितां सवलतीचे तरी दर ठरवावेत अशी त्यांना आमची प्रेमाची विनंति आहे. कारण अनेक प्रांतीय प्रमुख पुढाऱ्यांचें दर्शन घेण्यास व प्रियतम भूमातेच्या उद्धारार्थ चाललेल्या चळवळीचें केंद्र जी कॉंग्रेस ती इतक्याजवळ आल्यानें वाढलेली गोमांतकीय तरुणाची जिज्ञासा वरील फीच्या धोंडीनें विफळ होऊं नये, ह्मणून केलेल्या विनंतिबद्दल कार्यकारी मंडळी राग मानणार नाहीं अशी आशा बाळगतों.

डिचोली-गोवा. १-१०-२४ } वामन नारायण पालेकर.

वर्तमानसार

—सरकारच्या संमतीनें वर्धा म्युनिसिपल हद्दींत ता. १ सप्टेंबरपासून गोवध बंद करण्यांत आला असून गायरानासाठीं २०००० रुपये खर्च करून दहा वर्षांपर्यंत जनावरांची सोय करण्याचें ठरविलें आहे.

—रंगून येथील बर्मा ऑईल कंपनीच्या मातीच्या तेलाच्या टाकीवर वीज पडून २० …

ग्रामोन्नति समाज, केपें

या समाजाचा सरस्वत्युत्सव फार थाटानें पार पडला. यंदांची व्याख्यानमालाहि निर्विघ्न रीतीनें तडीस गेली. मालेचें पहिलें पुष्प आमच्या संपादकांकडून गुंफलें गेलें. आपल्या भाषणांत यानीं ऐतिहासिक पुराव्यानिशीं जगाच्या उत्पत्तीपासून तों आज पर्यंत "धर्म व राजकारण" या उभय गोष्टींतील परस्पर संबंधाचें पर्यालोचन केलें. दुसऱ्या दिवशीं सांवर्डेचे तरुण गृहस्थ श्री. ज. देसाई यांचें 'आजचें हिंदीस्थान व आमचें कर्तव्य' या विषयावर वक्तृत्वपूर्ण भाषण झालें. आपल्या रसाळ, मधूर, चित्ताल्हादक, सार्थ उपमालंकारानीं युक्त व मुद्देसूद वाणीनें देसाई यानीं श्रोत्यांचीं मनें तल्लीन करून सोडलीं. देसाई यांचें वय १६-१७ वर्षा पेक्षा जास्त नाहीं इतक्या अल्पवयांत मराठी साहित्य व हिंदीराजकारण यांवरील त्यांचें प्रभुत्व पाहून श्रोतृवृंदास सानंद कौतुक वाटलें असल्यास नवल नाहीं. प्रतिपादित विषयाचा ओघ न बदलतां, त्यांनीं गोमांतकाच्या परिस्थितीचेंहि चित्र मार्मिक रीतीनें रेखाटलें. एकंदरींत त्यांच्या भाषणाचा परिणाम श्रोत्यांच्या मनावर उत्कृष्ट असाच झाला. 'गोरक्षण' या विषयावर तिसऱ्या व शेवटच्या दिवशीं सांगें येथील ज्योतिषी नारायण अनंत पाटणकर यांचें व्याख्यान झालें. नेहमीप्रमाणेंच त्यांचें भाषण अनेक उपयुक्त माहितीनें ओतप्रत भरलेलें असेंच झालें. त्यांच्याहि भाषणाचा परीणाम श्रोत्यांवर योग्य असाच झाला. व अशा रीतीनें तीन दिवस चालू असलेली समाजाची व्याख्यानमाला यशस्वी स्वरूपांत संपली.

COMUNIDADE DA PROVINCIA DE BALI

No dia 19 do corrente mês, pelas 11 horas, serão novamente levad s á praç as avença de despesa do seguinte ano, com aumento de 1/5 sobre o preço do respectivo calculo, no lugar das suas sessões da mesma comunidade.

Aos 6 de outubro de 1924.

O escrivão da Comunidade

Ramacrisna Vencú Sinai Regó

—देशभक्त लाला लजपतराय यानीं कोहट रिलिफ फंडास २००० रुपयांची देणगी दिली

—जांबावली येथें ता. ६-१०-२४ रोजीं रात्रौ, वे. शा. सं. केशव भट्ट सावैकर यांच्या घरीं वार्षिक श्रीसरस्वत्युत्सव साजरा करण्यांत आला. अध्यक्षस्थानीं ज्योतिषी ना. अ. ना. पाटणकर यांची योजना होऊन, शाळेंतील विद्यार्थ्यांचीं भाषणें, एकदोन वक्त्यांचीं समयोचित भाषणें वगैरे झाल्यानंतर श्री. पाटणकर यानीं "सरस्वतीचें त्रिविधस्वरूप" या विषयावर विस्तृत भाषण केलें व ज्ञानदेवीचें अध्यात्मिक, दैविक व भौतिक स्वरूप कसें आहे आणि पाश्चात्यांच्या कल्पनेहून भारतीय पूर्वजांच्या सरस्वतीबद्दल कल्पनेंत वैशिष्ट कोणतें व कसें इ. सप्रमाण सिद्ध केलें, असें एक प्रेक्षक कळवितात.

एक खुलासा

गेल्या अंकांतील अग्रलेखांत श्री सरस्वत्युत्सवाची हकीकत सांगतांना मडगाव येथील 'श्री सरस्वतीसेवकमंडळ' व 'श्री दामोदर विद्याभुवन' या दोन्ही संस्थाचा ओझरता उल्लेख आला आहे. या उल्लेखासाठीं जी भाषा सरणी वापरली गेली आहे, तिच्या रोंखावरून त्या उभय संस्थांचा परस्पर संबंध ध्वनित होण्याचा संभव आहे. अशा अर्थाच्या तक्रारी आल्यावरून, आह्मी जाहीर रीतीनें खुलासा करितों, कीं, त्या दोन्हीं संस्था पृथक पृथक अशा असून, प्रत्येकीचे संस्थापकहि निरनिराळे आहेत. विशेष चौकशी अंतीं असें कळतें कीं, सरस्वतीमंडळाच्या उत्सवास व त्याच्य वाचनमंदिरास भुवनाच्या विद्यमान व्यवस्थापकानीं केवळ जागाच दिली असून, त्याबद्दल भाडेंहि आकारण्याचा त्यांचा विचार आहे. ज्यांच्या कल्पनेनें, परिश्रमानें व द्रव्यानें भुवनाची इमारत उभारण्यांत आली त्या मंडळीचा सरस्वत्युत्सवाशीं अगर भुवनांत होणाऱ्या इतर गोष्टींशीं कांहींच संबंध नाहीं. सरस्वतीमंडळाची स्वतःची इमारत नाहीं व ती असण्याविषयीं त्यांची उघड खटपटहि झालेली दिसून येत नाहीं इतकें सांगितल्यावर कोणाच्याहि गैरसमजास जागा रहाणार नाहीं, असा भरंवसा आहे.

बी रिस्कनोटचा नवा कायदा

(ले: विश्वनाथ गणेश जावडेकर, वकील धुळें)

कमी दरानें माल चढविला असतां 'बी रिस्कनोट भरून घेतात. ही रिस्कनोट ह्मणजे कसायाची सुरीच होय. ती भरून दिली असतां कोणी फिर्याद केली तर पुराव्याचा सर्व बोजा वादीवर [व्यापाऱ्यावर] पडे व तो त्यास निस्तारतां येणें अशक्य असल्यानें दावे बुडत. परंतु नवीन नमुन्यानें ही स्थिति बरीच पालटली आहे. पहिलींतील बुद्धिपुरस्सर हयगय[Wilful neglect हे शब्द काढून त्या ऐवजीं साधा 'गैरवर्तन (Misconduct) हा शब्द घातला आहे. एकादें संपूर्ण कनसाइनमें अगर त्यांतील पूर्ण डाग नाहींसे झाले, तरी ते कसे नाहींसे झाले अगर त्यास कसें नुकसान पोंहचलें हें दाखविण्याचा बोजा पूर्वी कंपनीवर पडत असे. हल्लीं तो बोजा कंपनीवर टाकला आहे व माल कंपनीच्या ताब्यांत दिल्यापासून तिनें त्याचें काय काय केलें हें सर्व मालधन्यास सांगितलें पाहिजे व प्रसंग विशेषीं त्याबद्दल पुरावाहि केला पाहिजे असा फरक केलेला आहे. पूर्ण डाग न जातां चोरीमुळें, (Pillerage) अंशत: नुकसान पोहोंचलें' असेलतर पूर्वी कंपनीवर नुकसानीची मुळींच जोखम पडत नसे. हल्लीं ही जोखम बऱ्याच अंशांनीं तरी कंपनीवर टाकली आहे. टारिफमध्यें लिहिल्याप्रमाणें पॅकिंग असलें किंवा ज्या ठिकाणी पॅकिंग कसें असावें हें सांगितलें नसेल तेथें कागद अगर हातानें सहज निघणाऱ्या पदार्थानें पॅकिंग केलें नसेल, व 'प्रत्येक डागावर पूर्ण पत्ता असला तर अशा वेळीं अशा डागांतून चोरी झाली हें मालधन्याला कंपनीनें दाखविलें पाहिजे असा हल्लींकायदा केला आहे.

Ano 9 N.° 29

Quinta-feira 16 de Outubro de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
Por cadalinha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक २९

गुरुवार ता. १६ अक्टोबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारे.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

UM CRIME HORRIVEL!

E' já do dominio público o celebre telegrama que de Vengurlá foi, em nome de todas as municipalidades da India, dirigido para Portugal pelo Vice presidente da edilidade das Ilhas, solicitando conservação do sr. dr. Jaime de Morais no governo deste Estado.

Quem está ao facto dos *segredos* governativos de Sua Excia, sabe bem que durante a sua estada nesta colónia, o sr. dr. Morais trabalhou mais por milhorar as suas economias pessoais e dos seus aulicos do que as da India que, devido aos desatinos do sucessor do sr. Freitas Ribeiro, está hoje arrastando uma vida, repleta de dificuldades de toda a ordem e ... desordem.

E' na governação do sr. dr. Morais que os funcionários não são pagos regularmente. E' o governo de Sua Excia que se celebrisa pelo imposto *capital* e outros que em nada o honram. E', devido á falta de bom senso politico de Sua Excia, que a hidra do nativismo e o esqueci do caftanismo chegaram a exercer predominio na sua acção administrativa. E', finalmente, aos desmandos repreensiveis e favoritismo...legalisado de Sua Excia. que a India deve a sua derrocada, a sua bancarrota, a sua ruina.

Pedir, nestas condições, que o sr. dr. Jaime de Morais seja reconduzido por mais cinco anos para timonear a esfrangalhada nau da India é cometer o mais hediondo crime de lesa-patria. Não pode haver duas opiniões sobre esta verdadeira einificação do pedido de manutenção de Sua Excia nesta colónia.

O dito Vice-Presidente perpetrou, pois, com o seu infeliz telegrama, o mais grave crime de lesa-patria, tornando se só merecedor da consideração que despensamos aos vendedores de suas patrias, traidores.

Só a indolencia dos indios consentiu que pela sua pouca vergonha, o sr. Fermino Dias não lhe sofresse na integridade fisica. Em qualquer outra parte diversa teria sido a sua situação.

O *Bharat* não protesta contra o abominavel telegrama, porque entende que ele nem é digno dessa honra. Despreza-mo-lo como qualquer coisa em que é defeso tocar sob pena de abluções...e penitencias.

Mas será, de facto, obra *colectiva* a vergonhosa messagem? Não. E' uma obra pessoal, sugestionada, como se diz, pelo proprio detentor das redeas do governo da India, pois a êsse proposito lê-se no *Diario da Noite* de 13 do corrente o seguinte:

«Com efeito, cada dia que passa e cada vez que se pensa com mais serenidade sobre o telegrama em questao a indignaçao e' mais profunda, quanto e' certo que o abuso mais avulta.

E' verdade. O vice presidente das Ilhas fez o telegrama em nome de todas as municipalidades pedindo a reconduçao do actual governador.

Em virtude de que?

Houve alguma deliberaçao da Municipalidade das Ilhas? Nao houve.

Mas o vice presidente das Ilas para falar de papo por todas as Municipalidades, teve presentes as deliberaçoes, de outras municipalidades? De uma se quer?

Podemos afirmar que nao.

Teriam, pelo menos, estado presentes os representantes dessas outras Municipalidades, em nome de quem falou o vice-presidente das Ilhas?

Tambem nao!

Quere dizer, o vice-presidente das Ilhas, no memento em que deu a sua assinatura para telegrafar em nome de todas as Municipalidades, nao teve deante de si nem as actas dessas Municipalidades (nao a tendo nem, se quer, a das Ilhas,) nem os representantes de cada uma delas, em cujo depoimento possa agora justificar o arrojo que tomou, arrastado certamente na sua boa fe'.

Deante de si, sim, teve presente so' – o sr. Cipriano da Cunha Gomes?

O unico apoio em que confiou foi a declaraçao verbal do – presidente da Camara de Bardez.

Mas perguntamos no's. Em virtude de que o sr. Cunha Gomes falou por todas as Municipalidades? Como e' què garantiu o conselho de todos o prsidente da Camara de Bardez que todos sabem como ai chegou nao podendo, por isso, garantir pelo proprio Conselho ao menos enquanto a sua situaçao nao seja definida pelas estaçoes competentes?

E' que o sr. Cunha Gomes—o presidente da Camara de Bardez—atraz de si tinha alguem? Quem sera?

Quem seria capaz de lhe ter dado tamanha coragem?

Sera' o mesmo que, na tarde de e de Outubro, pelas 17 horas aguardava comunicaçao e que a'quela hora recebendo o facto – estar consumado?

Não queremos prosseguir mais, porque o exposto aclara mais do que *claramente* a interrogação que paira sobre êste misterio...desvendado.

ECOS & CRITICA

NOVOS RICOS

A fortuna do Governador da India monta a 2.000 contos! Agora e' que se compreendem as constantes perseguiçoes a' imprensa da India, que num justo queixume, disse do sr. dr. Jaime de Morais, mais ou menos o seguinte:

"...gastou e gasta, nao como deve gastar um estadista, mas ridiculamente, como um pandego, um frascario, um libertino!..."

Tudo vai na mesma cegueira das ambiçoes. Homens que nao tinham ainda ha dias onde cair morto, possuem hoje uma fortuna avultada, enquanto as finanças portuguesas se vao arruinando, sem cotaçao na praça, a ponto de chegar a um acordo clandestino: A VINDA DA PRATA!

Isto vai mal, muito mal, senhores!

Nas colonias a situaçao financeira e pe'ssima! As receitas sao inferiores, a's despesas. O *deficit* aumenta e o dinheiro da receita nao chega para pagar os juros da divida adquirida

Para onde vamos senhores? So' o Governador da India tem uma fortuna de 2 mil contos! Isto ja' arrepia o cabelo do Ze' Povinho, que de todos os lados sente se ludibriado.

O' India misteriosa, o' terra do Brama, erguei-vos contra os que te exploram!

Arrastai ate' os Ganges, estes tiranos que arrazam os teus bens, sem dar em troco a minima parcela do seu trabalho.

O' incompreensivel Xavier, o' inesquecivel Albuquerque, erguei-vos do seu tumulo para ouvir os clamores dum povo que pede:

Justiça!...

Fala-Rudé

(Do *Emancipador*, de Lourenço Marques). *(A Terra)*

ELES QUE FAZEM ...

"Aquila", num artigo ao *O Heraldo* tratando da nossa fantastica autonomia, escreve:

"*Os. eleitos nao podem ter iniciativa alguma sem criaçao da previa receita e tudo deve ser decidido afinal pelo Poder Executivo, E enquanto vai e vem, fica tudo como dantes quartel general em abrantes*".

Fosse assim, Aquila amigo, e'Goa teria muito a lucrar. O *Bharat*, apezar de sua pobreza, nao regatearia mesmo uma festa de acçao de graça pelo *quartel em abrantes*. Mas o que sucede e' ...... o diabo Cada mala sao decretos e decretos em que os *A*manuenses criam contas para no's as pagarmos por todos os meios possiveis... impostos, emprestimos, penhoras, vendas...

Quem nos mandou pagar? Perguntara' o Aquila. Mas isto e' la' com os conselheiros. Eles que fazem sabem...

DE REMISSA

Temos ja' em nosso poder mais dois artigos do nosso ilustrado colaborador sr. G. C Guddo', da serie com que esta' honrando as modestas colunas do nosso jornal.

Recebemos tambem de Canacona uma extensa carta do sr. *X*. refutando algumas das consideraçoes do artigo *Pela Policia*, publicado no *Bharat* de 2 do corrente.

Iremos publicando tudo.

भारत

आश्विन व० ४ थी शके १८४६

ऐक्य-दिन-समारंभ

दिल्ली येथें भरलेल्या ऐक्यपरिषदेनें आज्ञा केल्याप्रमाणें ता. ८ हा महात्माजींचा उपवासोद्यापनाचा व ऐक्यवर्धनाचा दिवस अखिल हिंदीस्थानांत मोठ्या उत्साहानें व समारंभानें पार पडला. हिंदीस्थानच्या भविष्यकालीन इतिहासांत हा दिवस सुवर्णाक्षरांनीं कोरला जावा इतका हा दिवस महत्त्वाचा आहे. हिंदु मुसलमानासाठीं जिवाचें रान करून रक्ताचें अर्घ्यादक सोडणारा तेजस्वी व तपोनिधि महात्म्यानें त्या दिवशीं ह्या दोन संस्कृतींची चिरकालीन एकी व्हावी, हें आपलें गान्हाणें आपले देशबंधु ऐकत नाहींत असें पाहून ती आपली मागणी देवाजींच्या पायांकडे रुजू करण्याकरितां केलेल्या त्रिसप्तक तपश्चर्येची सांगता व प्रायश्चित्ताकरितां केलेल्या उपवासाचें उद्यापन केलें. हिंदुमुसलमानामधील अविचारानें माजलेली तेढ मोडून त्याच दिवशीं तिच्या जागीं एकीची मुहूर्तमेढ रोवली गेली आहे, म्हणून तो दिवस समारंभानें साजरा करण्याविषयीं आम्हांस परिषदेकडून आज्ञा झाली होती व ती आज्ञा पार पाडलीहि गेली आहे.

ह्या समारंभोत्सव दिनास खालील आशयाचे आशीर्वाद हिंदुस्थानच्या हितशत्रूप्रमाणें दिलजान दोस्तांकडूनहि मिळाले आहेत.

" एकी हीच आजची सर्व श्रेष्ठ देवता होय " *Mahatmá Gandhi*

" ऐक्य परिषदेनें ऐक्यवर्धनाकरितां केलेल्या सर्व श्रमांचें चीज होवो ".

Lord Reading

" ऐक्य दिनाचें मी प्रेमपूर्वक स्वागत करितों. एके काळीं इग्लंडहि ह्या धर्मांच्या नांवाखालीं दुभड केलें गेलें होतें. पण ' मानसिक औदार्य व विवेक स्वातंत्र्य ' ह्या सार्वजनिक स्वास्थ्याच्या मूलतत्त्वांचा धडा मिळतांच हा गोंधळ बंद पडला ".

Lord Oliver

" मानसिक औदार्याशिवाय आम्हांस जगांतील इतर सुधारलेल्या व स्वतंत्र राष्ट्रांच्या पंक्तीस बसण्याची आशाच करावयास नको".

Yakub Hussain

या एकंदर गोष्टींवरून, हिंदी राजकारणाची इमारत एकीच्या भक्कम पायावर उभारली गेल्याशिवाय स्वराज्याचा सोनेरी कळस तिला लटकावण्याचा कितीहि प्रयत्न झाला तरी तो कदापि यशस्वी होणार नाहीं, या तत्त्वाची व्यवहारिक जाणीव आतां सर्व रंगांच्या व पंथांच्या हिंदी लोकांस होऊं लागली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. एकीच्या या अत्यंत महत्त्वाच्या आंसाभोंवतीं आतां सर्व स्वराज्योन्मुख चळवळींची पृथ्वी फिरूं लागली असून, ती महात्मा गांधींसारख्याच्या सूर्यप्रकाशानें चमकत आहे, हें हिंदुस्थानचें भाग्यच होय.

म० गांधींच्या तपश्चर्येचा शेवट ऐक्य निर्माण होण्यांत झाला ही आनंदाची गोष्ट तर खरीच. पण आतां हें ऐक्य रक्षण करण्यासाठीं पुढाऱ्यांनीं अविश्रांत झटलें पाहिजे. ऐक्यरक्षणाचें कार्य करण्याची जबाबदारी त्यांनीं कोणाच्या रागालोभाची किंवा इतर विकृत भावनांची परवा न करतां आपल्या शिरावर घेतलीच पाहिजे. मात्र हा ऐक्यरक्षणाचा मार्ग आक्रमित असतां त्यांनीं लोभाविष्ट बनून भोगरत होऊन राहतां कामा नये. त्यांनीं सर्व चळवळी निष्काम कर्मयोगाच्या वृत्तीनें केल्या पाहिजेत. कार्यसिद्धि यशस्वी रीतीनें होण्यासाठीं, पाहिजे तितकें ऐश्वर्य, संपत्ति अथवा इतर साधनसामुग्री जमविण्याचा व्याप पुढाऱ्यांनीं करावा; परंतु त्याचा उपयोग त्यांनीं आपली सुखलालसा तृप्त करण्याकडे करूं नये. अशा धोरणानें पुढारी वर्तूं लागल्यास वाऱ्याची मोट बांधण्यापेक्षांहि जास्त कठिण वाटणारा हा ऐक्यरक्षणाचा प्रश्न सहज रीतीनें सुटणार आहे.

नव गोमांतका ! त्वां महात्माजींच्या आयुरारोग्य व ऐक्यवर्धन प्रयत्नाला यश चिंतीलेंच पाहिजे.

स्फुट विचार

चूक कोणाची ? :— प्रायोपवेशनाच्या दिव्यांतून म० गांधी सुखरूपपणें निभावल्याबद्दल आनंद प्रदर्शित करण्याच्या सात्त्विक हेतूनें महात्माजींच्या फोटोची मिरवणूक काढण्याचा मडगांवच्या कांहीं गांधीभक्त देशप्रेमी नागरिकांनीं निरुपद्रवी निश्चय केला व या निश्चयाच्या आड कसलेंहि सरकारी कुलंगडें उपस्थित होऊं नये म्हणून त्यांनीं तेथील मामलेदारांची मिरवणुकीसाठीं परवानगी मागितली; पण निर्जीव फोटोच्या मिरवणुकींत कदाचित् सजीव राजकारण दडून बसल्याचा संशय आला म्हणून असो किंवा इतर कोणेत्याहि साधारनिराधार कारणामुळें असो, मामलेदारसाहेबांनीं परवानगीची विनंति फेंटाळून दिली व मिरवणूकवाल्यांचा बेत मनः सृष्टींतच विरून गेला ! येथील राज्यसूत्रचालकांच्या अंतःकरणाचा ज्यांनीं ठाव घेतला आहे, ज्यांनीं गोमांतकीय राजकीय परिस्थितीचें सूक्ष्म अवलोकन केलें आहे व ज्यांनी पोर्तुगीज बड्या व छोट्या नोकरशाहीच्या मनोधर्माचें गौप्य ओळखिलें आहे, त्यांच्यामतें, झाला तो प्रकार अवास्तविक झाला, असें मुळींच नाहीं. चूक झाली ती मिरवणूकवाल्यांची. त्यांनीं परवानगीशिवाय मिरवणुकीची [illegible]स फेडून घेण्याची तजवीज केली असती, तर त्यांना या कामीं सरकाररीत्या कोणीच मज्जाव केला नसता नव्हे कोणी विचारलें सुद्धां नसतें. केवळ परवानगीच्या विनंतीनें परवानगी धुडकावली गेली, असें मानण्यास भरपूर आधार आहे.

वस्तुस्थितिदर्शन:— गोमांतकांत पुष्कळ ठिकाणीं उत्सवानिमित्त देवादिकांच्या मिरवणुकी काढण्यांत येत असतात. कित्येक ठिकाणच्या सत्पाहोत्सवांत राष्ट्र पुरुषांच्या चित्रांच्या किंवा फोटोंच्याहि मिरवणुकी निघत असतात, हें वाचकांस अपरिचित असेल, असें आम्हांस वाटत नाहीं. या सर्व मिरवणुकींना सरकारी परवानगीची आवश्यकता असते काय ? व ती मिळविण्यासाठीं उत्सवप्रवर्तक मामलेदार कचेरींचे उंबरठे झिजवितात काय ? जर नाहीं तर मग मडगांवच्या मिरवणूकवाल्यांची गांधी फोटोच्या मिरवणुकीसाठीं तेथील मामलेदारांपाशीं परवानगी मागण्यांत चूक झाली, असेंच म्हणावें लागतें, हें कोण नाकबूल करील ? अंधेर नगरींत कुठें सुविचारबुद्धीचा प्रकाश पडतो ? जेथें तेथें कुविकाराचा धिंगाणा व अविचाराचा हैदोस ! करील त्याचा कारभार व मारील त्याची तरवार ! कोणत्याहि सत्कृत्याला परवानगी मागायाला जा, कीं ती कसल्याना कसल्या निमित्तानें धुडकावून दिलीच म्हणून समजावें. उलट कोणतेंहि आक्षेपार्ह कृत्यसुद्धां कोणीहि उजळमाथ्यानें व विनपरवानगीनें अमलांत आणलें असल्यास त्यालाहि कोणी विचारीत नाहीं. एवंच पोर्तुगीज राज्यव्यवस्था कित्येक बाबतींत सतरा गुणांचा खंडोबा आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

मूर्खपणाची कमाल ! :— पणजी मुनिसिपालटीच्या व्हाइस–प्रेसिडेंटनें वेंगुर्लें येथील ब्रिटीश तार ऑफिसांतून गोव्यांच्या सर्व मुनिसिपालटीच्या नावानें सध्याचे गव्हर्नर जाइम द मोराईस यांस आणखीं पांच वर्षें येथें कायम करण्यांत यावें, अशा अर्थाची पोर्तुगाल सरकारला तार केल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे ! मोराईस यांच्या कुटील व पाताळयंत्री कारस्थानाची मख्खी ज्यांनीं ओळखिली आहे, त्यांना ह्या तारेचा लाजिरवाणा उपद्याप पाहून मनस्वी तिटकारा वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. उपरोक्त चंदुलालनीं, येथील तार ऑफिसें सोडून, वेंगुर्लेंच्या ब्रिटीश तार ऑफिसाकडे धाव मारली, या एकाच कारणामुळें त्यानांच स्वतःचें कृत्य किती अनुचित वाटलें असेल, याची ठळक कल्पना होते. आपण करतों तें कृत्य देशहितविघातक आहे, आपलें हें कृत्य चव्हाट्यावर आल्यास लोक आपल्या तोंडावर राजरोस रीतीनें थुंकतील, शेणमारानें आपली बोळवण करितील, या खात्रीनेंच त्यांनीं वेंगुर्लेंचा रस्ता सुधारला, हें उघड आहे. आपल्या बात्रटपणास लोकमान्यतेचा लेप काढण्याचा शिवराळ प्रयत्न कधीं तरी उघडकीस येईल, याचें भान स्वार्थांध बनल्यानें त्यांनां मुळींच राहिलें नाहीं. पण अखेर बिंग बाहेर पडलेंच ! व्हाइस–प्रेसिडेंटच्या कृष्ण कारस्थाचा गवगवा होऊन स्वतःचें निंद्य कृत्य लोकांच्या नावानें विकण्याचें त्यांचें मूर्खपण शेवटीं त्यानांच भोंवलें व या मूर्खपणाचें प्रायश्चित्त ते एकाद्या नवविधवेप्रमाणें घरांतील एका अप्रकाशित कोंपऱ्यांत दडून भोगीत आहेत, अशी दाट वदंता आहे !

स्वभावाला औषध नसतें :— उपरिनिर्दिष्ट अनर्थावह व अधोगामी प्रयत्नांचीं कटु फळें येथील लोकांनीं वाटेल तितकीं चाखलेलीं आहेत. वर्तमानपत्रांतूनहि वरचेवर असल्या हानिकारक कृत्यांविरुद्ध टाहो फोडण्यांत येत असतो; परंतु खरी स्थिति अवगत असूनहि स्वार्थामुळें ती झांकून ठेवण्यांत कित्येक आपमतलबी देशबुडव्यांना भूषण वाटत असल्यानें, ते त्या दुष्ट व अनिष्ट प्रयत्नांपासून परावृत्त होत नाहींत, हें खास देशाचें दुर्दैव होय ! मावळते राज्यसूत्रधार यामुळें त्यांच्यावर फिदा होत असतील; राजसत्तेच्या चक्रांतील दुय्यमपणा त्यांस संपादन करतां येत असेल; डोळ्यांवर झांपड घेऊन पोर्तुगीज राज्ययंत्राचा घाणा दमेपर्यंत ओढण्याचें भाग्य त्यांनां लाभत असेल; त्या पोटभरू यंत्राच्या साखळींत निरालस्यपणें त्यांना गुरफटून घेतां येत असेल. पण यांत देशाचें हित कांहींच नाहीं. उलट त्यापासून देशाच्या चिंधड्याच उडत असतात. देश अधोगतीच्याच गर्तेत एकसारखा लोळत पडत असतो. म्हणून वरीलसारख्या देशद्रोही कृत्यांची 'री' ओढली न जाणें यांतच आमच्या देशाचें कल्याण आहे, हें आमचे लोकप्रतिनिधि यापुढें तरी विसरणार नाहींत, अशी आम्हाला आशा आहे.

वर्तमानसार

—बनारस येथील सेंट्रल हिंदुस्कूलमध्यें गेल्या ता. २० रोजीं महात्मा गांधीजींच्या तसबिरीचा अनावरण समारंभ झाला.

—संयुक्त प्रांतांतील १९ म्युनिसिपालट्यांकडून सक्तीचें प्राथमिक शिक्षण लौकरच अमलांत आणलें जाणार आहे.

—फ्रान्स व रशिया यांचा संबंध पूर्ववत् जोडण्याविषयींच्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां फ्रान्सच्या सरकारनें एक कमिशन नेमिलें आहे.

—हौरा म्युनिसिपालटीच्या हद्दींतून दारूचीं दुकानें उठविण्यांत यावीं, असा सदर म्युनिसिपालटीनें ठराव पास केला.

—बंगालचे पंडित मोतिलाल नेहरू यांचे चिरंजीव पंडित रतन कुमार नेहरू हे विलायतंतील सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेत पहिले आले.

—हिंदुस्थान सरकारच्या मालकीच्या आगगाडीचें उत्पन्न गेल्या सप्टेंबरच्या तेरा तारखेस पुऱ्या झालेल्या एका आठवड्यांत १ कोटी ६८ लक्ष रुपये झाले. गत सालीं या आठवड्यांत आलेल्या उत्पन्नापेक्षां हें उत्पन्न २२ लाखांनीं जास्त आहे.

—कालिकत येथें ता. २७ सप्टेंबर पासून पाऊस जोराचा पडून समुद्र खवळला व त्यामुळें एक बोट गडप झाली. खलाशी कसेबसे बचावले.

पहाण्यासाठीं पाहुणे मंडळी गेली होती ह्मणून थोडा वेळ झाला. बेळगांवहून गंगाधरराव देशपांडे यांचें सहानुभूतिपर व गोमांतकीयांना कांग्रेसला निमंत्रणपर आलेलें पत्र फाटक यांनीं वाचून दाखविलें. सर्वांनीं या आमंत्रणाबद्दल आदर व्यक्त केला व दलाल यांना देशपांडे यांकडे पत्रव्यवहार करून तिकिटांचे फीबद्दल गोमांतकीयांना सवलत मिळवण्याबद्दल सूचना केल्यानंतर दा. सा. यंदे याचें 'ग्रंथ प्रकाशनाचे द्वारें सरस्वती देवीची उपासना या विषयावर विचार परिप्लुत, स्फूर्तिदायक व लहान थोरांच्या अंत:करणांस पटणारें असें सुंदर भाषण झालें. या दिवशीं दामोदर वाचनमंदिराच्या सातव्या वर्षाचा त्रोटक रिपोर्ट द. पा. दलाल यानीं वाचून दाखविला. तो मंजूर होतांच मसुरेकर, सडेकर व आठल्ये यांचीं समयोचित भाषणें झालीं. शेवटीं अध्यक्षांच्या वतीनें फाटक यांनीं समारोप केला. शेवटीं मसुरेकर यांनीं सर्व पाहुण्याचे व दलाल यांनी अध्यक्षांचे आभार मानले. या वेळी रामनाथ विष्णू पै रायतुरकर यानीं उत्सवाची परिसमाप्ति न करतां उत्सव आणखी एक दिवस वाढवावा अशी सूचना केल्यानें दलाल यानीं पाहुणेमंडळीस एक दिवस जास्त रहाण्याबद्दल विनंति केली. पण रा. व. खोपकर आणि भोंडे यांना निकडीचीं कामें असल्यावरून त्यांनीं याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करून सर्वांची माफी मागून पाहुणचाराबद्दल मडगांवकारांचे आभार मानले व दुसऱ्या दिवशी हे उभयतां पुण्यास जाण्यास गेले. रात्रौ पुराण कीर्तन वगैरे कार्यक्रम झाला.

दिवस चौथा

या दिवशीं सभेचें अध्यक्षस्थान फाटक यांचे सूचनेनें व दलाल यांच्या अनुमोदनानें आठल्ये यांनीं स्वीकारलें होतें. त्यांनीं आजचा उत्सवाचा दिवस ह्मणजे श्री सरस्वतीच्या कृपेचें दर्शक चिन्ह होय असें सांगून ज्या नवसासाठीं ही उत्सवाची रात्र वाढविली त्याबद्दल देवीची आराधना केली. नंतर नरहर र. फाटक यांनीं "राष्ट्रोद्धाराचीं मूलतत्वें" या विषयावर अव.ना यक करून सोडणारें मुद्देसूद एक तासपर्यंत भाषण केलें. यंदे यांनींहि याच विषयावर सोपपत्तिक अशा माहितीनें परिपूर्ण असें १। तासपर्यंत भाषण करून लोकमान्य व महात्मा यांच्या राष्ट्रोद्धाराची महती वर्णन केली. मसुरेकर यांनीं, खोपकर व यंदे यांनीं प्रत्येकीं ५० रुपयांची देणगी संस्थेस दिल्याचें जाहीर करून या उभयतांकडून संस्थेच्या वाचनमंदिरास पुस्तकरूपानेंहि मदत मिळणार असें आश्वासन दिलें गेलें आहे ह्मणून सांगितलें. नंतर सडेकर यांकडून गोमांतकीय प्रमुख सारस्वतांच्या कामगिरीबद्दल कौतुक करण्यांत येऊन गोमांतकांतील गेल्या व चालू शतकांतील वृत्तपत्रांचाहि नामनिर्देश करण्यांत आला. अध्यक्षांनीं योग्य शब्दांनीं थोडक्यात समारोप केल्यानंतर दलाल यांनीं सदर देणगीबद्दल उभय पाहुण्याचे, ज्यांनीं ज्यांनीं संस्थेस मासिकें व वृत्तपत्रें मोफत दिलीं त्याचे, अध्यक्षांचे, सभाजनांचे, स्वयंसेवकाचे वगैरे सर्वत्रांचे आभार मानले व शेवटीं कोंकणी भाषेंत एक गोष्ट सांगून समाजात विध्वंसक शक्तीचा दुरुपयोग करूं नका अशी कळकळीची विनंति केली व श्री सरस्वती देवीच्या जयजयकारांत उत्सवाची समाप्ति करण्यात आली. रात्रौ कीर्तन वगैरे झालें.

पाहुणे मंडळीनीं कवळेंपासून मंगेशपर्यंत सर्व देवालयें पाहिलीं. त्याचप्रमाणें मडगांवच्या शाळा, वाचनालयें, देवस्थानें, हॉस्पीटल व मुख्य इमारती पाहिल्या. पाचव्या दिवशीं मंडळी पणजी शहर, जुनें गोवें, तेथील चर्चेस, पणजींतील मुख्य ऑफिसें, इमारती पाहून सर्व मंडळी गोव्याचें सृष्टिसौंदर्य व एकंदर राहणी वगैरेची तारीफ करीत ता. १२ सोमवार रोजीं आनंद पावून व मडगांवकरांच्या आदरातिथ्याचें कौतुक करीत पुण्यास जाण्यास निघाली. सारस्वत ब्राह्मण समाज व नी. वि. दळवी यानीं मध्यंतरीं पाहुणे मंडळीस टी पार्टी देऊन त्यांचा सन्मान केला, असेंहि समजतें.

—शिरोडें येथें आनंद विद्यालयांत रविवार ता. ५ रोजीं सरस्वतीपूजन झालें. सोमवारीं संध्याकाळीं ४ वाजतां गणेश वा. गुडे यांच्या अध्यक्षतेखालीं गोपाळ कृष्ण गुडे, श्रीपाद गो. हेदे, प्रो. शंकर र. कुडचडेंकर, गणेश सदाशिव गुड, विष्णू गो. हेदे, विठ्ठल नी. गुडे, सखाराम गो. गुडे व आठले यांचीं शिक्षण या विषयावर भाषणें झालीं. शाळेचे मास्तर बाबुराव भि. प्रभु यानीं सर्वांचे आभार मानल्यावर लक्ष्मण बुवा जोग यांचें कीर्तन होऊन दुसऱ्या दिवशीं उत्सवसमाप्ति झाली.

—पूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणें सांगें येथील श्री विठ्ठल सेवक मंडळामार्फत चालू असलेल्या मराठी शाळेंत ता० ७ मंगळवार रोजीं दुपारीं श्री सरस्वत्युत्सवास प्रारंभ झाला. पूजा, आरती, वगैरे उरकल्या नंतर संध्याकाळीं ६ वाजतां पुराण झालें; रात्रौ सात वाजतां हेगडे देसाई, संपादक भारत, यांचें प्रवचन झालें. प्रवचन दीड तास चालू होतें. नंतर आरती प्रसाद होऊन या दिवसाचें काम संपलें. दुसऱ्या दिवशीं पूर्व दिवसाप्रमाणेंच इतर कार्यक्रम होऊन संध्याकाळीं सात वाजतां दोतोर जयवंत घनःश्याम मळकर्णेकर यांच्या अध्यक्षतेखालीं सभेस सुरवात झाली. प्रथमतः अध्यक्षांनीं प्रास्ताविक भाषण केल्यावर सदाशिव सांवळोबा प्रभू भाटीकर यांनी 'सरस्वतीचें महत्व' या विषयावर सुश्राव्य व्याख्यान केलें. नंतर विद्यार्थी श्री. कंसरकर, मडगांव यांनीहि समयोचित असा एक निबंध वाचला व नंतर, अध्यक्ष मळकर्णेकर यानी 'शाळेंतील शिक्षण' या विषयावर विद्वत्ताप्रचुर व सुंदर असें भाषण केलें व या दिवसाचा कार्यक्रम संपला. तिसऱ्या दिवशी, ता. ९ गुरुवार रोजीं नित्याचा कार्यक्रम होऊन रात्रौं सात वाजतां वे० शा० सं० अनंत शास्त्री सद्कारी, सांवर्डे यांच्या अध्यक्षतेखालीं व्याख्यानास सुरवात झाली. व्याख्याते बाळुबुवा पुर्णेकर यांनी 'सरस्वतीचें वास्तविक स्वरूप' या विषयावर सुश्राव्य भाषण केल्यानंतर मनों यशवंत सिगांवकर यानी एक निबंध वाचला. यानंतर ना. अ. ना. पाटणकर यानी उत्सवाचा समारोप केला व सर्वांचे आभार मानल्यावर कार्यक्रम समाप्त झाला.

—पोंबुर्पे येथील श्री रवळनाथ विद्याभुवन शाळेंत यंदां श्री सरस्वत्युत्सव थाटानें पार पडला. उत्सव अष्टमी, नवमी व दसमी असा तीन दिवस चालू होता.

—ता. ८ बुधवार रोजीं मडगांव येथील श्री दामोदराच्या सालांत, महात्मा गांधींस दीर्घायुष्य देण्याबद्दल प्रार्थना करण्याकरतां, सभा भरली होती. सभेस सुमारें ३०० मंडळी जमली होती. सभेचें अध्यक्षस्थान वैद्य पुंडलीक वामन विर्जिनकर यांनीं मंडित केलें होतें भोंडे वकील, मसुरकर, सडेकर वगैरे गृहस्थांची भाषणें झालीं.

—गणेश चतुर्थीच्या मंगल दिवसापासून मोरजी येथील सर्व हिंदु जातींतील पुढारी मंडळीनें गावांत फिरून येथें शिक्षण विषयक चळवळ व्हावी ह्मणून प्रयत्न करण्यास सुरवात केली. गावांतील सर्व मंडळीनें या कामीं सहानुभूति दर्शविल्यावर ता. ११-९-२४ रोजीं रामचंद्र दामोदर नाईक यांच्या अध्यक्षतेखालीं असनोडें येथील श्रीशांतादुर्गा विद्यालयाचे हेडमास्तर एस. व्ही. राव यांचें "शिक्षणापासून फायदे' या विषयावर मोरजाय देवीच्या देवालयांत व्याख्यान झालें, व या गावांत शिक्षण विषयक संस्था असणें किती अगत्याचें आहे, व ती कशी चालवावी वगैरे मुद्दे त्यानीं सोप्या भाषेंत मांडले. नंतर नारायण नाईक बुरये, के. रा. पल्की वगैरे यांचीं भाषणें झाल्यावर अध्यक्षांनीं समारोप केला. सर्व जातींतील पुढाऱ्यांचा कार्यकारी मंडळींत समावेश करण्यांत आला. गावांतील भाटीकर गांवकर मंडळीनें समाजास इमारत बांधण्यास जागा मोफत दिली आहे. गावांत एकंदर पांच हजार रुपयांवर आंकडे पडले असून त्यांतील पवया हप्ता वसूल करण्यांत आला आहे. या गांवच्या लोकांनी तात्पुरत्या उभारलेल्या इमारतींत ता. ३ अक्टोबर सन १९२४ रोजीं विद्याप्रसारक समाज मोरजींत स्थापन करण्यांत आला. सदर प्रसंगीं येथील पोर्तुगीज शाळेचे प्रोफेसर पु. वि धोंपे यांच्या अध्यक्षते खालीं असनोडचे हेडमास्तर एस. व्ही. राव यांचें "समाजाची कामगिरी" या विषयावर जाहीर व्याख्यान झालें. नंतर वाद्यांच्या गजरांत के. रा. पल्की यांच्या मार्फत मराठी शाळेंतील मुलांचें गणपती पूजन झाल्यावर शाळा सुरू करण्यांत आली. त्या वेळीं १०५ मुलें या शाळेत आलीं. सध्या तीन शिक्षक नेमण्यांत आले असून लवकरच मुलांची वरील संख्या वाढण्याचा संभव आहे. सध्या शाळेची इमारत साधी उभारली असून लवकरच मोठी इमारत वरील जागेंत बांधण्याचें काम सुरू करण्यांत येणार आहे. ही शाळा फुकट ठेवण्यांत आली आहे. या शाळेंत ता० ७ पासून ९ पर्यंत पहिला सरस्वत्युत्सव साजरा करण्यांत आला. सध्या गावांत हिरु नाईक, भिवा गांवकर, आत्माराम गांवकर, विठ्ठल जोशी वगैरे मंडळी फार मेहनत घेऊन समाजकार्य करीत आहेत. लवकरच अनुभविक शिक्षक असनोडचे एस. व्ही. राव हे ह्या समाजाच्या शाळेचे हेडमास्तर होणार आहेत. इ. 'मोरजी विद्याप्रसारक मंडळाचे सेक्रेटरी लिहितात.

—पणजीचे तरुण रेसेबदोर विश्वनाथ अनंत केणी हे आकस्मिक रीतीनें वैकुंठवासी झाल्याचें कळविण्यास आह्मांस अत्यंत दुःख वाटतें. अनेक सद्गुण समुच्चयामुळे विश्वनाथराव यानीं अल्पवयांत बरीच लोकप्रियता संपादन केली होती. मृताच्या आत्म्यांस चिरशांति लाभो!

—येथील दर्यासाल्याचे मुख्याधिकारी सिं. तितु मोराइस यांची येथील गव्हर्नरचे जागीं तात्पुरती नेमणूक व्हावयाची वदंता आहे.

वर्गणीदारांस विनंति

भारताचा वसूलदार फिरतीवर निघाला आहे. त्याकडे आश्रयदात्यांनीं वर्गणी चुकती करावी, अशी विनंति आहे

म. भारत.

फॅशन

लेखांक ३ रा.

(लेः—श्रीपाद ज. देसाई.)

त्या तीन बाजींतील पहिल्या जुवेबाजीची व ह्या फॅशनची परस्पर तुलना करण्याचें, कोणकोणत्या गोष्टींत त्यांचें एकमेकांशीं पटतें व कोणकोणत्या बाबतींत ह्या दोन्ही बाजी परस्परांपासून विलग आहेत हें आमच्या सारासार विचार शक्तीनें पण निस्पृह मनानें ताडून पहाण्याचें काम आह्मीं द्वितीय लेखांकांत उरकून घेतलेंच आहे व ह्या त्रितीय लेखांकांत तीच फॅशन आह्मांस व्यभिचार बाजीशीं ताडून पहावयाची आहे.

पण त्यापूर्वी आह्मांस एक खुलासा करणें अत्यंत आवश्यक झालें आहे. तो खुलासा हाच कीं, स्वसमाजांतील सर्व साधारण जनसमुहावर ह्या आमच्या लेखणीरूपी चाबकाचे चुणचुणीत फटकारे ओढण्याचें काम अवघड असतां आवश्यक ह्मणून जें आह्मीं हातांत घेतलें आहे त्या आमच्या कृत्याच्या मुळाशीं कोणत्याच प्रकारचा व्यक्तिद्वेषाचा किंवा ज्ञातीद्वेषाचा हराम हेतु नसून अज्ञ जनतेला लोकशिक्षणाचा व सुज्ञ जनांला व्यवहारिक ज्ञानाचा धडा घालून देण्याचा आदर्श उद्देशच त्यांत आहे.

चमकत्या चंद्रम्याच्या चांदण्याचा निशाचरांना राग येत असतो; पण त्या त्यांच्या रागाबद्दल किंवा जळफळाटाबद्दल शहाणे लोक रजनीकांताला जबाबदार न धरतां त्या

दान्धर्मांचे वेळीं आठवण ठेवा !

[illegible]णें अनाथ विद्यार्थी गृह

१५ वर्षें झालीं. गरीब मुलांचें [illegible]ण—शिक्षण करणें हा उद्देश [illegible] अन्नखर्च दरमहा रु. १००० [illegible]रितां मासिक रु. १ (अथवा १२ = १ मुलाचा मासिक [illegible]गारे २००० वर्गणीदार पा[illegible]स्यांपैकीं आपण व्हावें अशी [illegible]हे. नांव पत्ता कळवावा.

[illegible]वा पुणें, वि. गं. केतकर

ANUNCIOS

O Bharat, ano 9° n° 29 de 16 de outubro de 1924

Anuncics cada linha uma [illegible] ainda que repetida. [Nu]nero avulso 1 tanga

[illegible] Juizo de Direito da Co[marca d]e Quepem e cartorio [do Esc]rivão do 2° oficio cor[rem éd]itos de 30 dias, conta[dos do] dia em que se publicar [o ult]imo anuncio, nos termos [do §] 2° do art. 197 do Ccd. [illegible] ausc[illegible] ilegitimos [illegible] mae [illegible] professe. qualiá e Belgaun parte incerta [illegible] ritorio Bri[illegible]o, para [illegible] habilitação [illegible]va deduzida por João Fer[nande]s e mulher Sebastiana [illegible] Mulem, de Pa[illegible] [illegible]so aos autos de partilha [illegible] instaura[dos] contra [illegible] por Agosti[nho F]ernandes da dita de Mu[illegible] pela qual podem os [illegible]nos João e m[illegible] habilita[r]se como unic[os e] univer[sais] herdeiros do filho o re[ferid]o Agostinho antes legi[timo]s para com prosseguir [nos] ulteriores deferida exe[cuçã]o, e para na audiencia [illegible]rior ao p[illegible] de editos [illegible] citações e [illegible] art. [illegible] tes d[illegible]ncias ime[illegible] vos querendo a [illegible] Co seguindo [illegible] xer Declara-se [illegible] deste juizo [illegible]is as terças e [illegible]o sendo feria[do] [illegible]e caso se fazem [illegible]tos não sendo [illegible] quando não

estejam compreendidas nas ferias, no tribunal judicial situado em Xeldem ao lado da estrada nacional que de Quepem se dirige a Curchorem, por dez horas, para ser publico se expediu este. Xeldem da comarca de Quepem, 2 de outubro de 1924

O Escrivão de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo Juizo de Direiro da Comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2° oficio, correm éditos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anúncio, nos termos do § 2° do artigo 197 do Cod. do Proc. Civ, citando Quensoa Moturem Zambaulicar, de Zambaulim, de Rivona e ora ausente em parte incerta da India Inglesa, para em dez dias posteriores ao referido praso de éditos, pagar á mesa administrativa do Pagode de Sri Deus Damodar de Zambaulim [illegible] e quatro rupias, tres tangas e cinco reis e dezassete vinte e dois avos, proveniente de custas liquidadas a favor do mesmo Pagode nos autos de justificação de meia posse por este instaurada contra incertos e em que o dito citando e outros contestaram e para haver as quais foi instaurada a competente execução, alem de custas desta, ou nomear no mesmo praso bens suficientes á penhora para pagamento da mencionada importancia e o mais que acrescer, sob pena de ser devolvido este direito á dita exequente a mesa administrativa e seguir a execução os ulteriores. Para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de Quepem, 29 de Setembro de 1924.

O Escrivão de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2° oficio que este assina correm éditos de 30 dias, contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2° do art. 197 do Ccd. do Proc. Civ citando Babagi Deuli é Butó Essó Deuli, solteiros de Maina e ora ausentes em parte incerta do territorio Ingles, para em dez dias posteriores ao praso de editos, pagarem a Ramacrisna Ananta Narcornim, residente em Cusmane, a quantia de quatrocéntas e cinquenta rupias de que os citandos e outros se constituiram devedores solidarios de Babnó Vamona Sirvoicar, da dita de Cusmane, por escritura publica de 2 de Março de 1911 das notas do tabelião desta comarca Dolvi, tendo sido essa importancia no inventario prestado por obito do dito Babnó, aplicada a sua viuva Muctabai Sirvoicar e por esta cedida ao referido Narcornim, seus juros vencidos e registados como credito distincto desde 2 de Março de 1918 até igual data de 1923, os posteriores e os vincendos a razão de dez rupias por cada cento ao ano, pena de rupia diaria [illegible] integral pagamento de tudo quanto é devido, custas e mais responsabilidades constantes da citada escritura, sob pena de seguir a execução instaurada contra os ditos citandos e outros pelo nomeado Narcornim os ulteriores com penhora dos bens sobre que foi registada a hipoteca. Para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de Quepem, 9 de Outubro de 1924

O Escrivão de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do primeiro oficio Redcar á instancia do exequente Datatria Sadassiva Boto Dessai de Xeldem, vão ser vendidas em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca no dia 24 do Outubro proximo pelas 10 horas, pelo preço de avaliação tres quintas partes do predio palmar e arecal denominado "Rasambó", cultivado de coqueiros e arequeiras situado em Molcornem, discrito na Conservatória do Registo Predial desta comarca sob o n° 1275 e avaliadas por 1550 rupias, nos autos de execução hipotecaria promovida pelo dito exequente contra Naraina Chondru Porobo Velguencar e Rucminim viuva de Rama Chondrú Porobo Velguencar, de Molcornem. Quem quizer arrematar compareça nos indicados dia, horas e local, correndo por conta do arrematante as despesas da praça e a contribuição de registo por inteiro Por este são citados todos os credores incertos bem como os co-proprietarios nos termos e para os fins da lei, assim como ficam citados os representantes do credor falecido Diogo Caitano Rodrigues, de Molcornem, que tem a seu favor uma hipoteca registada para segurança da quantia de 250 rupias. E para ser publico se expediu este.

Quepem, 26 de Setembro de 1924.

O Escrivão de Direito do 1° oficio
Babú V. Camotim Redcar

Verifiquei a exatidão
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

PAGODE DE SRI CHAMUNDESVORY DE SIRVOY

No dia 25 de Outubro ás 15 horas no referido Pagode irão á praça as avenças da receita para o trienio de 1925 a 1927 e as da despesa para o ano de de 1925 pelo preço do respectivo calculo. Os concorrentes deverão comparecer no local do Pagode no referido dia e horas onde serão presentes os calculos com as respectivas condições.

Aos 12 de Outubro de 1924.

O escrivão de moza
Naraina Xembú Sinai Sirvoicar

Visto
O presidente suplente em exercio
Quessova Sinai Sirvoicar

Ano 9 Nº 30

Quinta-feira 23 de Outubro de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
Por cadalinha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.

BHARAT.

वर्ष ९ वें. अंक ३०

गुरुवार ता. २३ अक्टोबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

CODIGO DE USOS E COSTUMES DE GOA

Pelos escritos precedentes ja' os leitores devem ter feito a idea da nossa orientaçao sobre a reforma a introduzir na legislaçao dos usos e costumes dos hindu's.

Nao querendo mais abusar lhes a paciencia resolvemos entrar hoje na apreciaçao do projecto que motivou esses escritos, o que fazemos nao com o prurido de abrir polemica num assunto juridico que fica muito alem da nossa competencia mas unicamente com o fim de deixar consignado o nosso modo de pensar para os competentes tomarem em consideraçao se encontrarem nele qualquer cousa digna de nota.

* * *

"Art. 3º. Ficam sujeitos a's disposiçoes do presente Codigo os filhos ilegitimos de mae oriunda de Goa, que professe qualquer religiao nao cristam, salvo os que se tenham convertido ao cristianismo."

Nao esta' declarado no projecto o motivo que ditou o presente artigo, mas de modo como ele se acha redigido, afigura se nos que tem o defeito de dar lugar a interpretaçoes sobre a aplicaçao dos direitos a' sucessao e partilhas. Pois o artigo 38. do presente projecto do Codigo diz: Os filhos ou descendentes das bailadeiras, das mulheres solteiras, das viuvas e das separadas ou divorciadas por adulterio, sucedem a's suas maes e parentes maternos, bem assim estas ou aquelas."

A doutrina substentada neste artigo com respeito aos descendentes ilegitimos do sexo feminino nao passara' por diferença alguma, emquanto estes levarem a vida de solteiros; mas estarao os mesmos ao abrigo deste artigo tambem sendo casados? Parece-nos que nao, por ser expresso do art. 36 do projecto que "os descendentes do sexo feminino, casados ou viuvos nao teram direito a' legitima",

Ora uma filha de bailadeira, por exemplo, sendo casada e convertida ao cristianismo por estar sujeita a's disposiçoes da lei geral e nao a's privativas, ressalvadas no Codigo de usos e costumes, podera' exigir a legitima materna, a que nao tinha direito, antes da sua conversao ao cristianismo o que, necessariamente, dara' lugar constantes discordias e mal estar geral no gremio da sociedade hindu'.

O mesmo sucedera' no instituto das sociedades familiares, admitido pelos usos e costumes, por o direito desse socio tornar se incompativel com os dos outros, pela motivo ja' exposto.

Para obviar a este inconveniente, o direito hindu' considera o convertido inteiramente extranho a' familia. E por isso somos de opiniao que ao mesmo artigo 3º devem ser aditadas as seguintes palavras:

"Considerando-se o convertido inteiramente extranho a' familia a que pertencer antes da sua conversao".

Entendemos mais aditar ao mesmo artigo 3º o seguinte paragrafo:

"§ unico — Nao e' permitido aos hindu's varoes a perfilhaçao de filhos ilegitimos de qualquer qualidade."

O paragrafo supra e' a transcriçao do art 9 do Decreto de 16 de Dezembro de 1880.

Art. 8º "E' permitida a poligamia com consentimento das primeiras mulheres manifestado no acto do Registo Civil do casamento, pessoalmente ou por procuraçao especial."

Este artigo que substitui o art. 3º do Dec de 1880 amplia a liberdade da poligamia, restringida alias no cit. Dec. de 1880 o que e' irrisorio!

Salvo o devido respeito, nao nos parece aceitavel a justificaçao que fez o ilustre autor do projecto, do mesmo seu artigo 8 tanto do lado moral como do do senso comum:

Pela redaccao do mesmo parece que tamanha e' a liberdade do marido para contrair casamentos por poligamia que ate' uma mulher excessivamente obediente sera' vitima dos desejos ilicitos dele!

Entende o ilustre autor do projecto que "o consentimento das primeiras mulheres ja' limita o arbitrio do marido.

Aceitemos, por momentos, como regra este alvitre enquanto nao houver quem nos apresente o reverso da medalha com as suas cores hediondas, mas nos casos excecionais ¿quem nos garante que nao havera' abusos?

Nao so' isso, ainda ha mais.

Quem tiver lida com a sociedade hindu' ha de convencer se que a obediencia da mulher ao marido e muitas vezes tao cega que ha' mulheres que preferem sacrificar o seu bem estar a contrariar os desejos do marido. "Que destino sera' destas criaturas inocentes consentindo aos maridos casamentos por poligamia, unicamente para entrarem lhe na graça? Convem que estas, embora em numero limitado expiem pecados da sua imprevidencia, implorando misercordia?

Nao negamos que o direito hindu' admite a poligamia, mas esta tambem com certas restriçoes, por motivos justificados e nos casos extremos.

ECOS & CRITICA

PELA POLICIA

E' do seguinte teor a carta do sr. X., missiva a que nos referimos na ediçao transacta:

"E' certo que o castigo a que se refere o *Bharat* foi aplicado pelo dito comando a uns bebados *cronicos* e so' depois de esgotados todos outros meios de os corregir.

Esse castigo que foi aplicado pela Policia—so' depois que se convenceu de que a simples prevençao, detençao e ainda a palmatoria se tornaram impotentes para os corrigir – tem dado posso afirmar a V., magnificos resultados, nao so' na sede do concelho — os tais bebados que mereceram o castigo sao todos de Chaudi – onde ja' nao se vem agora os tristes espectaculos produzidos pelos adoradores fervorosos do Baco, mas ainda em outras aldeias, a ponto de nao se exibir nenhum bebado em qualquer via publica.

O actual comandante de Policia, sr. tanente Coelho, com pouco tempo da sua estada neste concelho alem de reprimir o abuso de alcoolismo, tem procurado, e conseguido por freio a' voracidade das ambiçoes e grosserias dos actos de certos graudos, verdadeiros sugadores da sociedade; o que, como era de esperar, tem dado em resutado os despreitados procurarem difamar o sr. tenente e ao que consta pensam em dirigir-se e' que nao dirigiram ainda – uma representaçao contra o mesmo oficial.

Nao quero arvorar me em defensor do sr. Coelho que nao precisa certamente da defesa de ninguem; mas, como filho da terra, entendo dever erguer a minha voz, embora muito debil—sempre que o torne necessario para desfazer a atmosfera de calunias urdidas contra quem so' e' merecedor de louvores por parte do concelho".

* * *

A referida carta vem acompanhada dum longo artigo doutrinario justificando a necessidade daplicaçao do castigo de corte de cabelos, como ultimo recurso, artigo que oportunamente, publicaremos circundando-o de nossas consideraçoes.

Entretanto esperamos que a Opiniao Publica de Canacona se manifeste sobre o assunto por uma forma clara e insuspeita, para que a nossa critica jornalistica seja a mais justa, a mais desassombrada e a mais consentanea com a rialdadade dos factos a apreciar...em recurso.

Pronuncie se, pois, antes o Povo canaconense sobre a presente questao para depois o *Bharat* dizer tambem da sua justifica nao va' ninguem dizer que impera por ca' facciosismo.

De resto, o sr. X. que e' devotado amigo do *Bharat* e do seu desvalioso director, merece nos inteira confiança pessoalmente – diga se tambem para evitar malentendidos e equivocos de qualquer ordem.

TUDO LIQUIDADO ...

A nossa admiraçao pelas *Aduanas* começou, quando, por um acaso feliz tivemos o prazer delicioso de ler na sua colossal obra "Estatistica"—Comercio e navegaçao—Ano de 1920— uma discriçao deveras saborosa do nosso Brindoeiro e de seu fruto-brindao. Depois ela foi crescendo, crescendo, sempre crescendo. Agora e' ilimitada porque foram as "Aduanas" que segundo o sr. Pedro S. de Figueiredo, transformaram, graças ao seu magico criterio, os extratos liquidos em oleos essenciais, o que em si representa uma mina inexgotavel,—fixando alem disso, segundo o "Ze' Pagante" o "valor da unidade" duma forma tam interessante que qualquer dia, graças ao poder creador daqueles nossos serviços — estara' tudo liquidado;— o deficit e o paiz.

A EPOCA

Recebemos e agradecemos a visita deste novo semanario que se edita em Mapuça'. E' seu editor o sr. advogado Manuel Nascimento de Abeu.

A julgar pelos numeros que recebemos, *A Epoca* promete ser orgao intemerato da opiniao sensata de Bardez.

Longa vida e muitas prosperidades

हून टाकणें आवश्यक आहेत, नवीन कर बसविण्याचा प्रसंग आल्यास ते लोकांस न दुखतील आणि झाले तर परिणामीं हित करच होतील अशा जातीचे कोणते कर बसविणें शक्य आहे, वगैरे अनेक विचारांचें काहूर त्यांच्या मनांत उठावयाचें, पण यांतील एकहि विचार त्यांच्या मनाला स्पर्श करील तर शपथ ! येऊन जाऊन लोकांकडून मिळालेल्या अधिकाराच्या तोऱ्यांत झाला तर गरीब लोकांचा छळ करावयाचा; नवीन नवीन खर्चाचीं कलमें पास करून त्यांची तोंडमिळवणी करण्याकरितां नवीन कर बसवावयाचे; करांची वसुली, रस्ते दुरुस्तीचे लिलांव, मुनिसिपल कचेरींत सटरफटर कामदारांच्या जागा निर्माण करणें या बाबतींत आपल्या सोय संबंधीयांकडे लक्ष ठेवणें अथवा मिळाला तर आपला हात भिजवून घेणें कसें साध्य होईल हीच विवंचना त्यांच्या डोक्यांत घोळत असली तर ती मानवी स्वभावाच्या विरुद्ध नाहीं. फिरंगणांतील मुनिसिपालिट्यांचा इतिहास काढून पाहिला तर शिक्षणप्रसार करणें, आरोग्यसंवर्धन करणें, व्यापार धंदे वाढविणें, शेतीस हरतऱ्हेची मदत करणें, शेतकीचें मुख्य साधन जीं गुरें त्यांचें रक्षणसंवर्धन करणें, अनाथ, दीन, दुबळे, रोगी यांची योग्य सोय करणें, मद्यपान, जुगार, रंडीबाजी आदि घातक व्यसनांस आळा घालण्याविषयीं प्रयत्न करणें, जनतेच्या खऱ्या गरजा सरकारांत वेळोवेळ मांडून तिच्या योग्य मागण्याची दाद लावून घेणें हीं कामें त्यांनीं कधीं तरी आपल्या कर्तव्यांपैकीं आहेत असें मानल्याचें दिसून येत नाहीं. एखादा प्रसंग आला तर लोकांच्या अडचणीपेक्षां सरकारच्याच अडचणी यांना लवकर कळून येतात. सरकारची मर्जी राखण्याकडे त्यांचा विशेष कल असल्यानें जनतेची पर्वा त्यांना थोडीच असते. मुनिसिपालटीत एकवेळ निवडून आल्यानंतर लोकांकडे त्यांची पाठ फिरणें व सरकारच्या पदकमलांकडे आशाळभूतपणानें दृष्टि लागणें साहजिकच असतें. अशा वेळीं ती नजर परत आपणांकडे वळविण्याचें सामर्थ्य जनतेला असलें तरी त्याचा अनुभव पाहण्याचें मुनिसिपल किंवा इतर दुसऱ्या कोणत्याहि सभासदाच्या नशिबीं अद्याप आलें नाहीं. मग तिच्या गुप्त व लुप्त सामर्थ्याची पर्वा कोणीच करणार नाहीं, हें उघड आहे.

मुनिसिपालट्यांच्या सभासदांकडून आपल्या कर्तव्याची ओळख नसल्यामुळें ह्मणा किंवा आपली निवड होतांच आपणास निवडून देणाऱ्या जनतेची पर्वा करण्याची यांस सवयच नसल्यामुळें ह्मणा, आजपर्यंत लोकहिताची हेळसांड झाली हें कोणीहि सांगेल. त्याचप्रमाणें वेळोवेळ त्यांस जागृत राखण्याचें काम जनतेकडूनहि झालें नाहीं हेंहि तितकेंच खरें आहे. "पोटांत नाहीं तें ओंठांत कसें येणार" असें ह्मणतात. त्याप्रमाणें जनतेंत जी कर्तव्याची ओळख नाहीं ती जनतेनें आपल्यांतूनच निवडलेल्या सभासदांत तरी कशी असेल ? या सभासदानीं तरी मुनिसिपल उमेदवार होण्यापूर्वी कोणतीं लोकहिताचीं कामें केलीं आहेत; निदान लोकहिताविषयीं तरी कोणती व केव्हां आस्था दाखविली आहे कीं जिच्या बळावर त्यानीं लोकांकडे आपणास निवडून द्या ह्मणून याचना करावी आणि लोकांनीं ती मान्य करावी ? कांहीं नाहीं. मागील पुण्याच्या जोरावर मुनिसिपालटीच्या सभासदत्वाचा दरवाजा उघडा होण्याची अट असल्याखेरीज, " मला निवडून द्या " "मला निवडून द्या " ह्मणून कोणीहि उठावें व आपलें नांव उमेदवारींत दाखल करावयाचें हा क्रम बंद पडणार नाहीं. जनतेनें या बाबतींत यापुढें जरा स्पष्टवक्तेपणानें वागलें पाहिजे. शतकेंच्या शतकें अंगांत मुरलेलें नेभळटपणाचें, हांजी हांजीखोरपणाचें व निराशावादीपणाचें विष घालवून दिलें तरच आमच्या मुनिसिपालिट्यांतून कर्तव्यदक्ष व इमानी सभासद चमकूं लागतील. नाहींतर पुढचे मागल्यांस बरे ह्मणवितील यांत संशय नाहीं.

स्फुट विचार

पक्षभेद व जातिभेदः– हा आजच्या सुधारकी काळांतहि जगांतील प्रत्येक राष्टांत कमी अधिक प्रमाणांत आहेच; नाहीं असें नाहीं, पण त्या पक्षभेदाला पक्षद्वेषाचें व जातिभेदाला जातिद्वेषाचें स्वरूप येणें किंवा येऊं देणें हें कोणत्याहि देशाच्या किंवा राष्टाच्या प्रगमनशील ध्येयाला समूळ विघातकच ठरतें हें निःसंशय आहे. एका पक्षानें दुसऱ्या पक्षाचा व एका जातीनें दुसऱ्या जातीचा हेवा करून परस्परांशीं चुरशीचा सामना खेळण्याकरितां आपसांतील बंडाळी मोडून स्वरक्षाची जय्यत तयारी करून ठेवणें हें जरी आत्मनिरीक्षणाच्या दुहेरी दृष्टीनें राष्ट्राला प्रगतिकारकच– निदान परिणामीं तरी– होत असलें तरी त्या चढाओढीच्या चुरशींत चेंगरून जाऊन त्यांनीं परस्परांचा निष्कारण मत्सर करणें व स्वतःच्या कोत्या समजुतीनें स्वपक्षाची प्रतिष्ठा वाढविण्याकरितां प्रतिपक्षाची कुचेष्टा करण्यासाठीं अहर्निश झटणें ह्या सारख्या वेडेचारांचा उपयोग त्या राष्टाला उन्नतिमार्ग दर्शनापेक्षां अधःपतनाकडेच विशेष होतो हें आतां बहुतेकांस कळून चुकलें आहे. पण आह्मांस आश्चर्य वाटतें तें ह्याचेंच कीं आजपर्यंतच्या इतिहासावरून व आतापर्यंत मिळालेल्या अनुभवावरून स्वतःच्या इष्ट मार्गाची रूपरेषा आखण्याचें काम त्यापैकीं फारच थोड्यांकडून–एका हाताच्या बोटावर मोजल्या जाणाऱ्या व्यक्तीकडूनहि नव्हे– होत आहे, तर बहुजन समाजाची प्रवृत्ति प्रतिपक्षाच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्यांतच स्वतःच्या कर्तृमशक्तीची इतिकर्तव्यतां समजण्याकडेच आहे, हें डोळ्यांपुढचें दृश्य कठोरपणानें काढून टाकणें कोणास कसें शक्य व्हावें ? पक्षद्वेषाचा व जातिद्वेषाचा परिणाम ह्मणून आजकाल आमच्या समाजांत वरचेवर दृष्टीस पडणारीं अनर्थावह उदाहरणें पाहून ह्या सैतानाच्या सोटेशाही साम्राज्याचा सत्यानास लवकरच होवो, ह्यां सारखे हळहळणाऱ्या हृदयाच्या तळमळीचे निदर्शक उद्गार कोणत्या कार्यकर्त्या निस्पृह पुरुषाच्या तोंडून निघणार नाहींत ?

विवेक बुद्धीचा ऱ्हासः– परावलंबनाच्या पारतंत्र्यांतील काळ्याकुट्ट काळोखांतून बाहेर पडून स्वातंत्र्योद्यानांत स्वैरसंचार करण्यास सध्या आमच्या हिंदुस्थानाला जर कशाची आडकाठी येत असेल तर ती जातिद्वेषाचीच होय. तशांतहि बुद्धिसामर्थ्यासारखी अजब संजीवनी मात्रा संग्रहीं असतांहि आम्हां हिंदूंना जागच्या जागीं दाबून ठेवण्यास व प्रगतीची अव्याहत चालणारी गति अधोगतीस मिळवण्यास हा एकच एक जातिद्वेष कारण होय हा तर स्वयंसिद्ध सिद्धांत आहे. आमच्या महाराष्ट्र देशांत तर ह्या जातिद्वेषापासून जन्मास आलेला ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद फारच निकरास पोंहचल्याचें आढळून येतें. कांहीं ब्राम्हण समाज आज ब्राह्मणेतरांस अज्ञानांधःकारांत पूर्वील प्रमाणेंच दाबून टेवूं पहात आहे, तर ब्राह्मणेतर समाज आपल्या कोशांतील शेलक्या शिव्यांची लाखोली वाहून ब्राह्मणाची पाद्यपूजा करीत आहेत व सावल्यास लाठ्यांचा नैवेद्यहि भक्तिभावानें त्यांस समर्पण करण्याकरितां तयार झाला आहे. एकीकडे ब्राह्मण समाज आपल्या पवित्र वाह्मण्यावर पाणी सोडूनहि ब्राह्मणेतरांवरील आपलें अनादिकालीन वर्चस्व श्रुतीस्मृतीच्या आधारानें सिद्ध करण्याच्या कसून उद्योगास लागला आहे, तर दुसरीकडे ब्राह्मणेतर समाजाचे निवडक पुढारी परम दयाळु नोकरशाहीच्या कच्छपीं लागून सत्तेच्या सामर्थ्यावर ब्राह्मणाचा नसता छळ करून त्यांस ' त्राहि सत्यशोधक ' ह्मणण्यास लावण्याचा प्रसंग आणण्यास पहात आहेत. खुद ब्राह्मणांतहि निरनिराळे वर्ग आहेत व ब्राह्मणेतर समाजांतर्गत वर्गाप्रमाणेंच ते एकमेकांच्या डोळ्यांतील कुसळें शोधून काढण्याकरितां नसती भांडणें उपस्थित करीत आहेत. मद्रास इलाख्यांतहि महाराष्ट्राप्रमाणें सध्या ब्राह्मण ब्राह्मणेतर वादाचें प्रस्थ प्रमाणाबाहेर वाढलें आहे. व त्यानींहि महाराष्ट्रांतील ब्राह्मणेतरांचा कित्ता हुबेहुब गिरविण्याचें काम पत्करलें आहे. लोकमान्याचा राष्टीय पक्ष कॉंग्रेसमधून फुटून कौन्सिलांत शिरलेला पहातांच महाराष्ट्रांतील ब्राम्हणेतर पक्षानें बहुरुप्याच्या तालमींतून माकडासारखी उलटी लाग मारली व तो चटकन कौन्सिलविरोधी गांधीपक्षाला जाऊन मिळाला व त्यानीं अशा रीतीनें ब्राम्हणाचा पुरा डाव साधला. अर्थांतच मद्रासेंतील ब्राम्हणेतरांनीं त्यांचीच री ओढली, व एकदम ब्राम्हणेतर समाजाचें सातवें सम्मेलन परवां तारीख ११ रोजीं दि. ब. कृष्णन् नायर च्या अध्यक्षतेखालीं भरवून त्यानीं ब्रिटिश सरकारास एकदम हुकूम फर्माविला कीं,'दयाघन सरकार ! ब्राम्हणेतर समाजाची सर्वांगीण सुधारणा झाल्याशिवाय हिंदुस्थानास स्वराज्य देऊं नका ! थोडा वेळ थांबा. आम्ही समाजसुधारणा करण्यास घालीत आहोंत, तयार झाल्यावर कळवूं ! ! !'

"शफरी फुर्फुरायते"—काव्यप्रतिभा व तर्कशास्त्र ह्यांचें परस्परांशीं विळ्या भोंपळ्या एवढेंच सख्य असतें, अशी पुरातनकालापासून आजपर्यंत आमच्या लोकांत समजूत वावरत आहे; पण ही वेडी (?) समजूत पार बदलून टाकण्याचें महत्कार्य उमरावतीच्या राष्ट्रीय पक्षाभिमानी 'उदय' पत्राच्या संपादकानीं आनखुषीनें लोकसमाजाकरितां स्वीकारलें आहे. ह्या कविभूषण व तर्कशास्त्रज्ञ संपादकांनीं ता. ७ च्या 'उदय' पत्रांत 'उपास परिषद' ह्या मथळ्याखालील अग्रलेखांत आपल्या नवअपूर्व दित तर्क ज्ञानाचे तारे तोडले आहेत. महात्माजींनीं जाहीर केलेल्या त्रिसप्तक उपवासावर स्वतःचें तर्कशास्त्र लढवतांना हे कविभूषण संपादक लिहितात. "गांधीजींना लोकांचें लक्ष राजकारणांतून काढून तें आपल्या व्यक्तीकडे सर्वस्वीं वेधून घ्यावयाचें आहे; अहमदाबादेला ढसढसां रडूनहि तें जमलें नाहीं ह्मणून लोकांच्या मनांत स्वतः विषयीं दया उत्पन्न करण्याकरितां त्याच रडण्याची ही उपवास ह्मणजे सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति होय * * * गांधीजींना लोकांच्या व कॉंग्रेसच्या हातून राजकारण अजिबात सोडवावयाचें आहे + + + व म्हणून कसेंबसें करून लोकांची नकळत दिशाभूल त्यांनां करवून घेणें आहे.' हा त्यांच्या कविकल्पनेचा एक मामला असता तर त्याबद्दल आह्मीं कांहीं ह्मटलें नसतें पण ह्या निरीक्षणांत त्यांचा वास्तविक हेतु आहे असा आह्मांस संशय येतो. महात्माजींच्या अहमदाबादच्या रडण्याची हा उपास ह्मणजे सुधारून वाढलेली [वाढविलेली नव्हे !] दुसरी आवृत्ति होय. या उदयकारांच्या मताशीं आमचेंहि मत जुळतें आहे; पण लोकांच्या मनांत स्वतःविषयीं दया उत्पन्न व्हावी ह्मणून त्यांनीं हा उपवास अंगिकारिला हें त्यांचें तत्वज्ञान आह्मांस मुळींच पसंत नाहीं. मृत पुत्राला पुरे दिवस उलटण्यापूर्वींच स्वपत्नीला मरणाच्या दारांत सोडूनहि कर्तव्याला जागण्याकरितां ज्या महात्म्यानें आफ्रिकेच्या रणकुंडांत उडी घेतली, व लोकसेवेकरितां आपल्या उच्च कुलास व शिक्षणास विसरून ज्या अजात शत्रू पुरुषसिंहानें रोग्यांचें मलमूत्र वाहिलें त्या लोकोत्तर पुरुषावर वरील प्रमाणें आरोप करणें हें आपल्या कुत्र्या मनाचें व हलक्या हृदयाचें प्रदर्शन होय असें कोणत्या निर्भीड टीकाकाराला वाटणार नाहीं. कॅांग्रेसमध्यें फाटाफूट होऊन ती दुघड होऊं नये ह्मणून ज्या कोमलहृदयी महात्माजींनीं आपल्या बहिष्कार चतुष्टयांतील कौन्सिल बहिष्कारास व कोर्ट बहिष्कारास फांटा दिला व आपल्या स्वातंत्र्य पक्षांतील इतर पुढाऱ्यांच्या रागाची पर्वा न धरतां जनापवादाकरितां कौन्सिलवाल्यांपुढें नमतें घेतलें त्या मोहनलालाला कॅांग्रेसच्या हातून राजकारण काढून घेण्याच्या प्रयत्नाबद्दल दोषी ठरविण्यास पुरेसें कारण आहे का महाराज ! कविभूषण ही पदवी ह्मणजे कोणासहि सारासार विचार न करितां दूषण देण्याचें License नव्हे ! जाणून असा !

वृत्तपत्रें व वाङ्मय

मुंबई शहरांतील 'इंदुप्रकाश' या जुन्या दैनिकाचे सन्माननीय संपादक न. र. फाटक बी. ए. यांनीं मडगांवच्या श्रीसरस्वत्युत्सवाचे व्याख्यान मालेंत जें वरील विषयावर व्याख्यान दिलें, त्याचा सारांश वाचकांकरितां आज खालीं देत आहों.

कै० चिपळूणकरच्या पूर्वीहि ब्रिटिश हिंदुस्थानांत वास करीत असलेल्या गोमांतकीय सारस्वतांकडून मराठी भाषेच्या अभिवृद्धयर्थ प्रयत्न झालेले होते, याचा इतिहास एका अधिकारी कोंकणस्थ ब्राह्मणानें सांगितला गेला, हा त्यांतील विशेष असून तो कोंकणस्थ व सारस्वत यांच्या मधील पुरातन दुजाभाव लयास पावल्याचा दर्शक नव्हे असें कोण ह्मणेल ? सन १९१९ सालीं प्रो. गि. म. परांजपे यांनींहि सदर व्याख्यानमालेंत 'कोंकणस्थ व सारस्वत यांनीं खांद्यास खांदा लावून कार्य करण्याची आवश्यकता असून या सरस्वत्युत्सवाचे निमित्तानें आज तो सुयोग आलेला आहे व यापुढें तो चिरकाल टिकेल' असे उद्गार काढले होते. एकंदरींत महाराष्ट्रीय विद्वानांच्या या स्नेहसंवर्धनापासून कोणा गोमांतकस्थास स्वाभिमान कौतुक वाटणार नाहीं ?

सरस्वत्युत्सवाचे उपक्रमाबद्दल संतोष व्यक्त करून व्याख्याते ह्मणाले: 'मडगांवच्या ह्या सरस्वती सेवक मंडळाचें मला व्याख्यानाकरितां आमंत्रण आल्याबरोबर मला एक अडचण आली. ती ही कीं, गोव्यांतील आपणासारख्या मित्रांस आमच्या तिकडील राजकारणाची माहिती सांगणें योग्य नाहीं, कारण आपण इकडे खुद्द रिपब्लीकचाच उपभोग घेत आहांत. म. गांधींची चळवळ सांगावी तर त्यांतील तत्वें येथें लागू नाहींत. कारण सरकारच मुळीं लोकसत्ताक असल्यानें लोकानीं लोकांच्या राजसेवेशीं असहकारिता ती काय करावयाची ? त्याचप्रमाणें सामाजिक सुधारणेचें सध्याचें तीव्र अंग ह्मणजे ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद, त्याचीहि येथें आवश्यकता नाहीं. अनेक दृष्टीनीं विचार करून मी हा वाङ्मयात्मक विषय घेतला आहे. या विषयाचें नांव 'वृत्तपत्रें व वाङ्मयवृद्धि' हें आहे. महाराष्ट्रांत व विशेषतः मुंबईत ज्यानीं नवीन ज्योत पेटविली त्यांत सारस्वत गृहस्थच प्रमुख होत. त्यांच्या आडनावावरून ते याच गावचे असावेत असें दिसतें. ते गोविंद नारायण माडगांवकर हे होत. यांनींच इ. स. १८४० च्या सुमारास मराठी उत्तमोत्तम पुस्तकें लिहून वाङ्मयाभिवृद्धीस आरंभ केला. सन १८८० च्या सुमारास विष्णुशास्त्री चिपळूणकर यानीं मराठी वाङ्मयांत क्रांति केली; पण त्याच्यांमागें ४० वर्षें जाऊन आपण जर पाहिलें, तर मराठीची जोपासना गोविंद नारायण मडगांवकर यांनींच केली असें कबूल केलें पाहिजे. सन १८४० तील ज्ञानोदय वृत्तपत्राच्या एका अंकांत 'मराठी भाषेचा ऱ्हास' या विषयावर निबंध लिहिला आहे; त्यांत त्यांची मराठी भाषेविषयींची कळकळ चांगलीच व्यक्त होते. त्यानंतर युनिव्हर्सिटीच्या पहिल्या मट्रींतून निघालेल्या लोकांची गोष्ट पाहिली असतां, त्यांत गुरुवर्य सर गो. भांडारकर, शंकर पांडुरंग पंडित, न्या. काशीनाथ त्र्यंबक तेलंग ही सारस्वत मंडळीच वाङ्मयाभिवृद्धयर्थ प्रयत्न करण्यांत प्रामुख्यानें दिसून येईल. ही सारस्वत मंडळीची माहिती सांगण्याचें कारण, याच लोकांनीं वृत्तपत्राद्वारें वाङ्मयाभिवृद्धीस सुरवात केली. सन १८४८ त 'ज्ञान प्रसारक सभा' सुरू झाली. त्या सभेमार्फत निघणाऱ्या 'ज्ञानप्रसारक' मासिक पुस्तकांत गोविंद नारायण माडगांवकर यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. ते लेख उत्कृष्ट होते. वृत्तपत्र हा जो शब्द मी उपयोगांत आणीत आहें, तो निवळ बातमी पुरविणारें पत्र अशा अर्थी नाहीं. त्यास ह्यापेक्षां 'नियतकालिक' ह्मटल्यास बरें होईल. त्यावेळीं छापखान्याच्या सोयी आतांसारख्या नसल्या कारणानें 'दैनिक वर्तमानपत्र' काढतां येत नसे. रावबहादुर गोपाळराव हरि देशमुख यांचें नांव मराठी वाचकांच्या पूर्ण परिचयाचें आहे. त्यानीं लोकहितवादी नांवाचें मासिक सुरू करून त्याच्याद्वारें वाङ्मयवृद्धिस अत्यंत मोठेंच साह्य केलें आहे. आज जगांत जो ज्ञानाचा प्रसार इतका झपाट्यानें होत आहे, त्याचें कारण ही मुद्रणकला होय. ज्यावेळीं मुद्रणकलेचा शोध लागून तिच्यांत सुधारणा होऊं लागली, त्यावेळीं ज्ञानप्रसार युरोपखंडांतसुद्धां फारच झपाट्यानें होऊं लागला, हें सर्वांस ठाऊक आहेच. नंतर १८४९ सालीं 'ज्ञानप्रकाश' पत्र निघालें. त्यावेळीं 'लोकहितवादीनीं' त्यांतून आपले विचार लोकांपुढें मांडले. हल्लीं लोकहितवादींच्या लेखांचें एक पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. त्यांत स्वदेशीचें धोरण प्रसिद्ध झालेलें आहे; त्यांत इंग्रज लोकांच्या कावेबाज व धूर्त स्वभावाची माहिती दिली आहे, व त्यांचें हिंदुस्थानच्या व्यापाराचें धोरणहि त्यांत सांगितलें आहे; यावरून स्वदेशीच्या चळवळीला आतांचें स्वरूप आहे, तें जरी त्यावेळीं नव्हतें तरी त्याबद्दल इशारत मात्र पूर्वीच दिली गेली होती असें यावरून दिसतें. त्यांनं सामाजिक सुधारणेकरितां समाजांत जी जागृति केली, ती वर्तमानपत्रांतूनच केली. १२०० वर्षेपर्यंत सामाजिक गुलामगिरींत दडपला गेलेला हा देश वर यावा ह्मणून प्रयत्न करावा असें १८५० नंतर पुढाऱ्यांना वाटूं लागलें व त्या दिशेनें त्यांचे प्रयत्न चालू झाले. 'इंदुप्रकाशाचा' जन्म या धोरणानुसार सामाजिक सुधारणेकरितां झाला. त्यावेळीं त्याचे एडिटर रानडे हे होते. ते इंग्रजींत लेख लिहीत असत. विष्णुशास्त्री पंडित मराठींतून लिहीत असत. त्यांनीं इंदुप्रकाशांतून पुनर्विवाहाबद्दल फार जोराची चळवळ केली. ते त्यांचे लेख इतके उत्तम आहेत कीं, त्या वरून वृत्तपत्रें हीं वाङ्मयवृद्धीस कशीं पोशक होतात, हें कळून येईल. सन १८४३ सालीं पहिला पुनर्विवाह झाला त्यावेळीं मसुरकरांनीं थोड्यावेळापूर्वी ठार मारण्याविषयीं धमक्या दिल्या वगैरे हकीगत सांगितली, तशीच स्थिति विष्णुशास्त्री पंडिताविषयीं झाली. कृष्णशास्त्री चिपळूणकरांसारखी मंडळीं त्या पुनर्विवाहित जोडप्याच्या [वधुवरांच्या] वर घोड्याची कुचेष्टा करण्यास प्रवृत्त झाली होती. त्या वेळच्या परिस्थितीनें अंतःकरणास पीळ पडून विष्णुशास्त्री पंडितांनी त्या विषयावर जो लेख लिहिला आहे, तो वाङ्मय या दृष्टीनें अत्यंत वरचें स्थान पावलेला आहे. सन १८४८ त 'इंदुप्रकाश' पत्र निघालें, तेव्हां पासून तें आतांपर्यंत वाङ्मयाच्या अभिवृद्धीस मदत करीत आहे. टिळक व आगरकर या अद्वितीय जोडीचे गुरु विष्णुशास्त्री चिपळुणकर यांनी १८८० सालीं 'निबंधमाला' सुरू केली. पण तें मासिक अगदींच अनियमित निघत असे; त्या निबंधमालेच्या द्वारें चिपळूणकरांनीं जें कार्य केलें तें महाराष्ट्राल ठाऊक आहे. नंतर सन १८८१ सालीं केसरी निघाली; केसरींत बाळ गंगाधर टिळक व गोपाळ गणेश आगरकर ही बाळ–गोपाळांची जोडी लेख लिहीत असे. पुढें आगरकरांचे सामाजिक बाबतींत तीव्र मतभेद होऊन केसरींत भांडणें सुरू झालीं. त्यांचा परिणाम या बाळगोपाळांची जोडी फुटून त्यांतून सामाजिक सुधारणेकरितां 'सुधारक' पत्राचा जन्म होण्यांत झाला व केसरींत राजकारणात्मकच लेख येऊं लागले. लोकमान्य टिळकांचे लेख हल्लीं प्रसिद्ध झाले आहेत व आगारकरांचा लेखसंग्रहहि प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून लेखांनीं वाङ्मयाभिवृद्धीस केवढी मोठी मदत केली आहे, हें समजून येतें. या सर्व लेखांचें महत्व अत्यंत मोठें आहे. त्यापूर्वी मराठींतून बखरी इत्यादिकांच्या रूपानें गद्य वाङ्मय प्रसिद्ध होत असे; व त्यांत प्रतिभा नव्हती. तिच्या कारणासंबंधानें मतभेद आहेत. त्या वेळची राजकारणाची कल्पना अगदीं संकुचित होती. कारण एखाद्या कोणी व्यक्तीनें सर्व देशावर किंवा देशाच्या एका भागावर राज्य करावें व लोकांनीं राज्य करणाराच्या धोरणावर अनुकूल असावें, अशी त्यावेळीं स्थिति होती. इंग्रजी राज्यानंतर राजकारणाचें ध्येय बदललें. आतां लोकांसहि आपण राजकारणांत आपल्या प्रतिनिधींच्या द्वारें हक्क असावेत असें वाटूं लागलें. तदनुसार चळवळहि जोरानें सुरू झाली. त्याबरोबरच पूर्वी भाषेंत रूढ असलेले शब्द योग्य अर्थ दर्शित करण्यास अपुरे पडूं लागले. व त्यामुळें नव्या नव्या विशेषार्थ दर्शक शब्दांची भर पडूं लागली. नोकरशाही ह्मणजे ब्युरॉक्रसी. हा नोकरशाही शब्द लो० टिळकांना वऱ्हाडांत एके ठिकाणीं व्याख्यान देत असताना सूचला. व तोच सन्मार्ग दर्शक व योग्यार्थ दर्शक असल्यानें सर्वत्र कायम रूढ झाला आहे. त्यापूर्वी ब्युरॉक्रसी या शब्दाला गोरा अधिकारी, सनदी अधिकारी हे शब्द वापरीत असत. व राजधोरणाला राजकीय संविधानक किंवा राजकीय व्यवहारिक स्वरूप असें ह्मणत असत. पण जसजसे नवीन नवीन विचार लोकांत जागृत होऊं लागले, तस तसे नवीन नवीन शब्द प्रचारांत रूढ करून ते विचार कायम ठेवण्याची कामगिरी वृत्तपत्रानींच केली आहे. नवीन पिढीचें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयाविषयीं फारसें मत अनुकूल नाहीं. परंतु वर्तमानपत्रांची जबाबदारी एवढी मोठी आहे कीं, त्यांस २० । २५ वर्षांनंतर येणारी परिस्थिति लक्षांत घेऊन आज लेख लिहावे लागतात. त्यावरून समाजांत भविष्यकालानुसारी विचार जागृति होत असते. केसरीमध्यें आठ दहा वर्षांमागें संस्कृत भाषेचें पुनरुज्जीवन ह्मणून प्रसिद्ध झालेली लेखमाला आपल्या वाचनांत आलीच असेल. ती लेखमाला नरसोपंत केळकरांनीं लिहिलेली आहे. तिचें महत्व मराठी भाषेच्या वाङ्मयाच्या दृष्टीनें फारच मोठें आहे. १८९३ सालीं लो० टिळकांनीं 'एकचेंज' या विषयावर एक लेख केसरींत लिहिलेला प्रसिद्ध आहे. निरनिराळ्या इंग्लिश शब्दांस योजलेले नवे नवे मराठी किंवा संस्कृत प्रतिशब्द त्यांतील भाषेचा मार्मिकपणा, यामुळें तो लेख मराठी भाषेंत एक कायमचाच झाला आहे. नवील नवीन शब्द भाषेंत रूढ होत असतांना योग्यायोग्यतेकडे लक्ष द्यावें लागतें उदाहरणार्थ डोळे असलेल्या माणसास डोळस ह्मणतात. त्याचप्रमाणें कानानें चांगलें ऐकूं येणाऱ्या माणसास कानस हा शब्द आगरकर यांनीं उपयोगांत आणिला. त्यावेळीं बूट घालणाऱ्या माणसास बूटस असें कां ह्मणूं नये, अशा प्रकारें विष्णुशास्त्री चिपळूणकरांसारख्यानीं पृच्छा केल्यानें, त्या शब्दाचें अर्थ निदर्शकत्व कमी ठरल्यानें तो शब्द वाङ्मयांतून अगदींच नाहींसा झाला. त्याचप्रमाणें हरिभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्या वाचल्या असतां आपणांस आढळून येईल कीं, त्यानीं पुष्कळशीं नामसाधित क्रियापदें तयार केलीं आहेत. [उदाहरणार्थ उद्गार शब्दावरून उद्गारला हें क्रियापद] अशा प्रकारचे हे नवीन शब्द नवार्थ दर्शक असल्यानें कायमचे रूढ होऊन बसले आहेत. हरिभाऊ आपट्यांचें चरित्र बापुराव आंबेकर यानीं लिहिलें आहे; त्यांत या कादंबऱ्याविषयीं असें लिहिलें आहे कीं, ज्यावेळीं आतां छापावयाचा मजकूर अगदीं शिल्लक नाहीं, टैप जुळविणारे रिकामे बसताहेत अशी स्थिति आल्यामुळें म्यानेजरांनीं हरिभाऊंकडे जाऊन बसावयाचें. तेव्हां त्यांनीं एक दोन प्रकरणें तेथेंच लिहून देऊन त्यांना रवाना करावयाचें. हें नवें प्रकरण लिहितांना त्यांना पूर्वीचीं कोणतींच प्रकरणें वगैरे पहावीं लागत नसत. इतकें त्याचें अवधान व संदर्भ ग्रहणशक्ति पूर्णत्वास पोंहोंचली होती. तात्पर्य लेख, विष्णुशास्त्री पंडितासारख्या कार्यस्फूर्तीनें लिहिला जावो किंवा निवळ कर-

Ano 9 N.º 31

[Qu]inta-feira 30 de Outubro de 1924

ASSINATURA
Por cada ano três rupias

ANUNCIOS
[Po]r cadalinha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ३१

गुरुवार ता. ३० अक्टोबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. खं. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

CODIGO DE USOS E COSTUMES DE GOA

"Art. 12 º. Os contractos antenupciais dos menores impuberes devem ser celebrados pelos pais, na falta dos pais pelo maioral, e na falta deste, pelo tutor".

" § unico. Sao permitidos pactos sucessorios nas escritaras antenupciaes."

"Art. 13 º. Na falta de escritura antenupcial o regime matrimonial sera' o de separagao dos bens, sem comunhao dos adquiridos, nao sendo aplicaveis os artigos, 1.130 º a 1133 º do Codigo Civil, e tendo a mulher direito ao usufruto da metade dos bens do marido apoz a morte deste, salvo no caso do adulterio dela, provada na acgao da separagao ou divorcio."

"§ No caso da poligamia o usufruto dos bens do marido pertencera' em partes iguais, a's mulheres, aos filhos varoes e a's filhas solteiras.

"Art. 14 º. Presumem-se do marido, salvo prova em contrario, todos os bens do casal."

O Codigo de usos e costumes de 1880 permitia o casamento dos impuberes, mas nao prescrevia a forma de suprir a incapacidade dos menores nas escrituras antenupciaes. O art. 12 º do projecto era indispensável portanto para preencher esta lacuna.

A doutrina do parágrafo unico do artigo 12 º e do 13 º revoga os principios contidos na nossa legislagao comum, o de "nao ser permitido, nem se quer por contrato antenupcial, renunciar a' sucessao de pessoa viva ou alienar ou obrigar os direitos que eventualmente possa ter a sua heranga (art. 2042 do Codigo Civil), e o de entender-se que, na falta de qualquer acordo ou convengao, o regime matrimonial sera' da comunhao dos bens (art 1098) e parece-nos mais sensata quer por tender mais a aproximar-se dos habitos e costumes dos hindu's, desde ha' seculos inveterados, quer por procurar o meio termo, entre os principios expendidos nos usos e costumes de 1853 e os adoptados nos de 1880 exigido pelas necessidades nos periodos da transigao de qualquer sociedade dum estado a outro.

A missao do legislador e' tao melindrosa e complicada quando tenha por objecto a reforma social, que todo o seu cuidado e' empenho se torna esteril se a sua obra nao for acomodada ao grau da civilisagao dos povos.

Os inglezes por serem mais praticos que teoricos nos assuntos coloniais, ao contrario do que se pratica no nosso meio, quando tenham em mira qualquer medida tendente a reformas sociaes, antes de promulgar a lei procuram estudar de perto as sociedades, adquirem conhecimentos dos seus habitos, usos e costumes, aus-

As petas do sr. Batalha

Positivamente, o sr. Pereira Batalha perdeu as estribeiras, vendo-se colocado em mau terreno no assunto do tal *favor* que o *Bharat* demonstrou n o passar duma...*caganifancia*. E pretendendo desembaraçar-se da séria entalação em que se embrulhou pela sua própria prosápia, o atrapalhado di[re]ctor de *A Provincia* tenta agora, mas sem exito, empanar, a seu modo, o brilho da verdade que resplandece na historia d[o] mesmo *alardeado favor* que narramos, sem rebuços nem ambages.

Pois é verdade. O sr. Batalha não sabe o que escreve nem escreve o que sabe...tal é o estado de *sitio* que o *Bharat* lhe criou na cabeça ... respeitavel.

Alardeando o seu *favor* o director de *A Provincia* disse, pela primeira vez, que prestara o favor ao nosso director, *intercedendo ele junto das autoridades para que a policia lhe não lançasse as garras, quando foi da questão dos Velipos e do ataque armado aos soldados*. Agora, porêm, desdizendo o que disse, afirma:

"E (o sr. Craveiro Lopes) recebeu-o (o nosso director) depois por motivos que o sr. Dessai conhece, mas que, por conveniencia propria ou por desmemoriado, omite como omitiu as declaragoes e promessas que fez para justificar que era digno de nao ir para o calabougo como instigador das proesas dos Velipos..."

O sr. Batalha emporcalhou se, portanto, na lama da mais abjecta mentira, quando arvorou-se em *libertador* do nosso director das garras da p[o]licia, quando o sr. Hegdó Dessai se livrou delas, como agora a *A Provincia* rectifica, á forç[a] d[a]s suas proprias declarações e promessas!

E que "mais depressa se apanha um mentiroso que um c[o]x[o]"!

Mas ¿Que declarações e promessas haveria feito o sr. Hegdò Dessai ao sr. coronel Craveiro Lopes para justificar que era digno de não ir ao calabouço como instigador das *proesas* dos Velipos? Convinha que o sr. Batalha as relatasse para a sciencia e consciencia do publico e para o que o aprasamos para ainda esmagar-lhe a basofia.

O que o sr. Hegdó Dessai fez no comando de Pangim, é relatar as peripecias de que se revestiu o caso de Canvorem pela *intrujice bajulatoria* dum proprietario dessa aldêa, ao tempo capacho reles da governação do sr. dr. Jaime de Morais, aproveitando, tambem, incidentalmente, do ensejo para irradiar em jorros a luz sobre certos pontos obscuros da politica hindú e da modesta pessoa dele, como ficou dito no artigo *Um "favor" do sr. Batalha*.

Autorisado pelo sr. Coronel Craveiro Lopes declara o sr. Pereira Batalha *ser absolutamente errada a "conclusão"* a que o director do *Bharat* chegou na entrevista entabolada com aquela autoridade.

Não acreditamos na autorisação que o jornalista europeu invoca para, a seu modo, salvar o seu comprometimento de eximio ... *favoreiro*, porquanto o sr. Hegdó Dessai nunca procurou entrevistar-se com o sr. Craveiro Lopes, na qualidade de advogado dos Velipos, mas sim como um jornalista conhecedor da verdadeira situação duns pobres diabos, vitimas da prepotencia do já referido *capacho governamental*, o tal de *costas quentes*! Se o director do *Bharat* quizesse falar com o sr. Comandante Geral, como advogado, dispensaria a ajuda da companhia do sr. Batalha: fa-lo-ia por si.

A relutancia do sr. coronel Craveiro Lopes em receber o sr. Dessai resultou, portanto, não deste sr. se apresentar como advogado dos Velipos mas sim porque foi acompanhado do sr. Pereira Batalha que é, como se soube depois, um tipo sem consideração no meio europeu da colónia por causa de certas aventuras e habitos que o celebrisam tristemente.

¿Quem não conhece a *tetri*[ca] influencia de *má* companhia? [O] proprio sr. Batalha sabe [mais] melhor do que nós pela [carta] de que mantem com o s[r.] *Jesus* que é o tal negro Afr[icano].

Pelo exposto se vê que o *Bharat* disse a verdade e só esta quanto ao *favor* do sr. Batalha, que para salvar o seu rubicundo nariz, atribui, de novo, á Policia propositos que nunca albergou, como os da prisão, sem culpa formada, do sr. Hegdó Dessai que lhe não dera causa, no caso de Canvorem. E se êla quizesse prende-lo como criminoso te-lo-ia feito e não seria a *intercedencia* do... *favoreiro universal* que o evitaria...

Mas é inutil gastar cera com um ruim defunto como o sr. Batalha.

भा र त

कार्तिक शु० ३ या शके १८४६

ऐक्य परिषदेचें कार्य

दिल्लीची ऐक्य परिषद कितपत यशस्वी झाली, तिच्या कार्यांत व वादविवादांत भाग घेणाऱ्या प्रतिनिधींपुढें असलेले प्रश्न किती बिकट होते व ते सोडविण्याच्या मार्गांत असलेल्या अडचणींतून त्यानीं किती कुशलतेनें व धैर्यानें आपला मार्ग काढला ह्याची योग्य कल्पना आणण्यास परिषदेनें मोठ्या परिश्रमानें व बराच खल करून शेवटीं पास केलेल्या ठरावाकडे लक्ष देणें जरूरीचें आहे. पहिल्या ठरावांत धार्मिक मतभेदांच्या नांवाखालीं होणाऱ्या अत्याचारांचा निषेध करण्यांत आला आहे. कोणत्याहि प्रकारच्या धार्मिक समजुतीमुळें उत्पन्न झालेल्या कारणांचा निकाल बेकायदेशीरपणानें व दंडेलीनें न करतां तो प्रातिनिधिक पंचायतीकडून व तें शक्य नसल्यास सरकारी कोर्टांतून करण्यांत यावा असें परिषदेनें ठरविलें आहे. दुसऱ्या ठरावांत अशा प्रकारची पंचायतीची व्यवस्था करण्यासाठीं हिंदु, मुसलमान, पारशी, खिश्चन व शीख समाजांच्या प्रतिनिधींची एक मध्यवर्ती पंचायत स्थापून त्याचा कार्यक्रम निश्चित केला आहे. तिसऱ्या ठरावांत वेगवेगळ्या जातींच्या व धर्मांच्या माणसांत ऐक्य उत्पन्न करण्यासाठीं व धार्मिक,व सामाजिक बाबतींत प्रत्येकाचें स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यासाठीं एका धर्माच्या माणसानें दुसऱ्या धर्माच्या माणसाशीं वागतांना कोणत्या ढोबळ तत्वांचा अवलंब केला पाहिजे ह्या विषयींचा विस्तृत खुलासा करण्यांत आला आहे. एकमेकांच्या धर्माची नालस्ती, देवस्थानांवर हल्ले, गोवध, मशिदीपुढें वाद्य वाजविणें, धर्म परिवर्तन वगैरे वगैरे दंग्यास कारणीभूत होणाऱ्या गोष्टींचा विचार ह्या ठरावांत करण्यांत येऊन त्यासंबंधीचें परिषदेचीं मतें नमूद करण्यांत आलीं आहेत. ठराव चार पांच व सहाचे विषय अनुक्रमें पक्षांध वृत्तपत्रांतील मजकूर आणि अत्याचारासंबंधींची त्यांची जबाबदारी मशिदी, देवळें इत्यादि इमारतींचा नाश व आर्थिक व सामाजिक जाति बहिष्कार हे आहेत. सातव्या ठरावांत ता. ८ हा ऐक्य दिवस मानून परिषदेच्या उपरिनिर्दिष्ट ठरावांना हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं दुजोरा मिळून ते स्वीकारण्यांत यावे, अशी विनंति करण्यांत आलेली आहे. ह्या एकंदर ठरावांत म. गांधींच्या ऐक्याच्या तत्वाला प्रमुख स्थान मिळालें आहे हें सहज दिसून येईल. ऐक्य परिषदेच्या कार्यास भारत मंत्री लॉर्ड ऑलिव्हीयर, व्हायसरॉय साहेब प्रांताधिपति व दुसरे बडे अधिकारी यानीं प्रसंगोचित संदेश पाठवून मदत केलेली आहे, हें आह्मी मागें नमूद केलेंच आहे.

दिल्लीस जमलेले वेगवेगळ्या धर्मांचे व मताचे पुढारी हिंदुस्थानांतील लोकांचे योग्य व जबाबदार पुढारी होते हें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेली त्यांच्या नावाची यादि व त्यांच्या बैठकींतील वादविवादांच्या हकिगती वाचल्यास कळून येईल.परिषदेस हजर राहण्यासाठीं हकिम अजमलखान,स्वामी श्रद्धानंदजी व मौलाना महंमद अल्ली ह्यानीं अशाच व्यक्तींची निवड केली होती, कीं कोणत्याहि विशिष्ट जातीच्या किंवा संप्रदायांच्या लोकांस आपलीं मतें पुढें मांडतां आलीं नाहींत किंवा परिषदेच्या कार्यांत आपणास भाग घेतां आला नाहीं अशी तक्रार करण्यास मुळींच जागा राहूं नये. निमंत्रित मंडळीपैकीं सर्वांनीं त्यानां देण्यांत आलेल्या या संधीचा फायदा घेऊन देशांत शांतता उत्पन्न करण्याच्या प्रयत्नाच्या ह्या सत्कृत्यास हातभार लावला ही समाधानाची गोष्ट होय. ख्रिस्ती धर्माच्या प्रतिनिधीनीं विशेषतः हिंदुस्थान व ब्रह्मदेशच्या मुख्य बिशपानीं व ' स्टेट्समन ' सारख्या ॲंग्लो इंडीयन पत्राच्या संपादकानीं आपल्या शहाणपणाच्या व कळकळीच्या सल्ल्याचा व प्रत्येक प्रकारच्या दुसऱ्या मदतीचा परिषदेस वेळोवेळीं जो फायदा दिला व ती यशस्वी करण्यास प्रामुख्यानें जो भाग घेतला त्याचा थोड्याशा शब्दानीं पुरेसा उल्लेख करणें अशक्य आहे. जाति जातींतील सलोखा वाढणें हिंदुस्थानांतील ख्रिस्ती धर्मानुयायांस व इंग्रजास आवश्यक वाटत असून हें घडवून आणण्यास मदत करणें त्यांना आपलें कर्तव्य वाटतें हें बिशप वेस्टकॉट, मि. मूर, मि. जेम्स वगैरे गृहस्थानीं त्या प्रसंगीं दाखवून दिलें. ख्रिस्ती व इंग्रज समाजास ही गोष्ट भूषणास्पदच आहे. आपल्या मुलाखतींत व पत्रांत म. गांधींविषयीं प्रेम व आदर व्यक्त करण्यांत त्यानीं क्षुल्लक भेदाभेद बाजूस ठेऊन ख्रिस्तीधर्माचें मूलभूत तत्व प्रस्थापित केलें. " ह्या देशांतील प्रत्येक माणसाचे व आपल्या धर्माच्या शिकवणीस जागणाऱ्या खऱ्या ख्रिस्ती माणसाचें अंतःकरण आपण चालविलेल्या ह्या प्रायश्चित्तव्रताच्या दृश्यानें हालवून गेल्या खेरीज राहणार नाहीं " ह्या वाय. एम्. सी. ये च्या मि. जेम्स् ह्या इंग्रजांच्या एका वाक्यांत इंग्रज समाजाच्या अंतःकरणाचें व भावनाचें प्रतिबिंब पडलेलें आढळेल.

ह्या देशाच्या प्रत्येक भागांतून परिषदेस हजर राहिलेले पुढारी ते दंग्यांत सामील झालेले नसल्यामुळें दंग्यांत भाग घेणाऱ्या लोकांचे खरे प्रतिनिधीच नव्हते व ह्मणून ह्या उप्पर दंगे होण्याची शक्यता कायमच राहते. ह्या दृष्टीनें पहातां परिषदेनें कोणतें उपयुक्त कार्य केलें ? हा प्रश्न परिषदेचे शत्रू आज विचारीत आहेत. ह्या प्रश्नाचें उत्तर आपणास असें देतां येईल:-

हिंदु मुसलमानाच्या दंग्याचीं कारणें एवढीं क्षुद्र असतात कीं, त्यांना कारणें ह्मणणें प्रत्येक समंजस माणसास लाजिरवाणें वाटतें. दंग्यांचें एकंदर स्वरूप पाहतां त्यांच्या मुळाशीं धार्मिक भावना किंवा मतभेद असणें कोणत्याहि धर्माच्या कीर्तीस काळिमा आणणारें आहे तरीपण हे दंगे फक्त बदमाष किंवा अशिक्षित लोकांकडून केले जातात असें ह्मणणें धाडसाचें होईल. आतांपर्यंत झालेल्या दंग्यांच्या हकिगतीवरून असें दिसून येतें कीं, दंग्यांची सुरवात जरी दोन्ही जातींच्या बदमाष वर्गाकडून करण्यांत येत असली तरी दंग्याचा संबंध समाजाच्या बऱ्याच मोठ्या भागाकडे पोंचतो. सुशिक्षित पांढरपेशा व जबाबदार वर्गाची अप्रत्यक्षपणें मदत मिळत असल्याखेरीज नुसत्या बदमाषानां लखनौ, दिल्ली, कोहाट वगैरे ठिकाणीं झालेल्या दंग्यासारखे भयंकर दंगे करून शांतता भंग करणें शक्य होणार नाहीं. विशेषतः हिंदुस्थानाच्या लोकवस्तींतील मोठ्या प्रमाणाला आर्थिक, राजकीय व धार्मिक सत्वाची जाणीव नसल्यामुळें व ह्या विषयासंबंधीं स्वतः विचार करून त्याप्रमाणें वागण्याएवढी जागृति त्यांच्या बाबतींत झाली नसल्यामुळें ते पूर्णपणें परावलंबी बनलेले आहेत. ह्मणून त्यांच्या वर्तनाची जबाबदारी बव्हंशीं समाजाच्या स्तंभावर सुशिक्षित व पुढारी ह्मणविणाऱ्या लोकांवर राहते. ही जबाबदारी प्रस्थापित करणें दिल्लीच्या परिषदेला आवश्यक वाटलें. दिल्लीच्या परिषदेनें जबाबदार पुढाऱ्यांस एकत्र जमवून त्यांना आपापसांतील मतभेदांचा विचार करण्याची व वेगवेगळ्या जातीच्या हिताकडे दुर्लक्ष न करतां व्यापक अशी ऐक्याची योजना तयार करण्याची संधी आणून दिली. ह्या पुढाऱ्यानीं त्यांच्यापुढें असलेल्या प्रश्नाची चर्चा मोकळ्या मनानें केली व ती संपण्यास जवळजवळ ७–८ दिवस लागले. ह्यावरून परिषदेचें प्रातिनिधिक स्वरूप दिसून येतें. परिषदेची उपयुक्तता सुद्धां ह्यावरून सिद्ध होते. दंग्यासंबंधींच परिषदेचें क्षेत्र नियमित होतें, हें अगोदरच कबूल केलें पाहिजे. दंगे होणें किंवा न होणें परिषदेच्या निकालावर अवलंबून आहे, असें ह्मणणें मूर्खपणाचें होईल. दंगे एकदम थांबविणें परिषदेच्या हातांत नाहीं. तें अशक्य करण्यासाठीं जरी परिषद बोलावलेली होती व ती यशस्वी झाल्यास शांततेच, सहिष्णुतेचें, ऐक्याचें कार्य चालू राहण्यास मदत मिळेल अशी जरी सर्वांची अपेक्षा होती तरी तीनें पास केलेले ठराव सर्वत्र अमलांत येऊन एकदम शांतता प्रस्थापित होईल अशी आशा करणें धाडसाचें झालें असतें. ऐक्य परिषदेनें ऐक्य घडवून आणलें नाहीं. तीनें ऐक्य घडवून आणण्याचा फक्त मार्ग आंखून दिला. तिनें ऐक्याच्या इमारतीची उभारणी केली नाहीं; तीनें फक्त त्या इमारतीचा पाया घातला. ऐक्याच्या मार्गांत प्रगति करण्याचें ऐक्याची इमारत उभारण्याचें काम अजून व्हावयाचें आहे. त्याला बराच अवधि लागण्याचा संभव आहे.

ह्या संयुक्त व प्रातिनिधिक परिषदेनें पास केलेले ठराव अंतःकरणपूर्वक व निर्भयपणें व्यवहारांत आचरणें हें समाजाच्या पुढाऱ्यांचें व प्रत्येक जबाबदार व विचारी माणसांचें कर्तव्य होऊन बसलें पाहिजे. परिषदेस सामील झालेल्या पुढाऱ्यांस व लोकप्रतिनीधींस व्यक्ति स्वातंत्र्याच तत्व सामाजिक व धार्मिक गोष्टींत लागू करण्यांत शक्य तो मदत प्रत्येक व्यक्तीनें दिल्यानेंच परिषदेनें सुरू केलेलें कार्य यशस्वी होईल. एरवीं हे ठराव कितीहि उत्कृष्ट व संपूर्ण असले तरी निरुपयोगी ठरतील हें ध्यानांत ठेवणें अत्यांत जरूरीचें आहे. ह्या ठरावांच्या स्वरूपाचा विचार केल्यास त्याच्या व्यापकतेमुळें ते व्यवहारांत आणणें कोणत्याहि माणसाला मग त्याचीं धार्मिक मतें कितीहि कर्मठ व आकुंचित असोत, सोपें आहे एकंदर सातहि ठरावांत कायद्याची भाषा किंवा कायद्याची सक्ति ह्यापैकीं एकहि गोष्ट नाहीं. त्यांत कोणत्याहि धर्माच्या किंवा मताच्या माणसाला आक्षेपार्ह वाटणारी अशी कोणतीच गोष्ट नाहीं, हें न्यायाची व सत्याची थोडीशी तरी कल्पना असणाऱ्या प्रत्येक माणसास कबूल करणें भाग आहे. किंबहुन ह्या ठरावांत उल्लेख केलेली अशी एकहि गोष्ट नाहीं कीं जी सामान्य आचरणात विशेष महत्वाची समजली जाण्याची किंमतीची ठरेल. माणसा माणसांतील वागणुकींत उपयोगात आणावयाचे साधे नियम ह्या ठरावांत क्रमवार मांडण्यात यावेत ह्यापेक्षां आमच्या नैतिक व मानसिक दैन्याच्या अधोगतीचें दुसरें कोणतें उदाहरण देतां येईल ! आमच्या भ्याडपणाकडे, गुलामगिरीकडे, स्वातंत्र्याची किंमत न ओळखणाऱ्या बुद्धिमंदतेकडे बोट दाखवून सुधारलेल्या जगानें आमचा उपहास करण्याचें दुसरें कोणतें सबळ कारण असूं शकेल ? सध्याच्या परिस्थितींत अस्वस्थतेच्या अज्ञानाच्या अत्यंत निराशाजनक स्थितींत ह्या गर्द अंधःकारांत व अधोगतीच्या ह्या खोल गर्तेत उजेडाची, दिव्य स्फुर्तीची, आशेची एक ज्योत एका कोपऱ्यांत तेवत आहे. भगवान श्री कृष्णानें, बुद्धानें, पावन केलेल्या आमच्या ह्या अभागी देशात अंधःकाराचें राज्य पूर्णपणें पसरण्यास अजून वेळ आहे. आजच त्याची पुण्याई संपलेली नाहीं अशी आपण आशा बाळगूं या !

—कौंसल्य लेजिस्लातीव्हाच्या मेंबरांच्या नवीन निवडणुका पुढें नमूद केलेल्या तारखांस होणार आहेत. गोवें, दमण, ग्रामसंस्था व जास्त कर भरणारे ९० ठिकाणदार यांच्यातर्फे होणारी— ७ डिसेंबर. व्यापारी मंडळ,शेतकरी व जमिनदारांची संस्था व इतर यांचं नमुन्यांच्या संस्थांतर्फे होणारी—१४ डिसेंबर. मुनिसिपाल निवडणुकांचे दिवस मात्र अजून प्रसिद्ध करण्यांत आले नाहींत. ते कां ?

श्रीशारदोत्सवांतील व्याख्यानें

विजयादशमी व सरस्वतीची आराधना

या विषयावर दामोदर सां. यंदे यांचें रा. ब. खोपकर यांचे अध्यक्षतेखालीं मडगांवच्या श्रीदामोदर विद्याभुवनांत पुढील प्रमाणें भाषण झालें. व्याख्याते ह्मणाले: आपण मडगांवकर मंडळीनें आपल्या या समारंभास आमंत्रण करून मला बोलण्याची सुसंधि आणून दिली ह्मणून मुंबईकरांतर्फे मी आपले आभार मानीत आहें. मित्रहो, सर्व उत्सवांत हा शारदोत्सव महत्वाचा कां, याचा आपण विचार करूं लागलों व तसेंच शारदोत्सव प्रचारांत कसा आला इकडे लक्ष पुरविलें तर आपणास काय दिसतें ? प्रभूनें आपणास मानव जन्मास घातलें आहे,त्याचें कार्य मोक्षप्राप्ति करून घेणें ह्मणजे पुन्हा ईश्वरास जाऊन मिळणें, हें आहे. ती मोक्षप्राप्ति कशी करून घेतां येईल, आयुष्य उत्तम प्रकारें कसें पार पाडतां येईल, याच साठीं आमच्या ऋषींनीं व पूर्वजांनीं असले हे उत्सव घालून दिले आहेत. देवीपुराणांत व भविष्य पुराणांत असें वर्णन आलें आहे कीं, महिषासूर नावांचा एक राक्षस शंकराच्या वरानें फार माजला; त्यास वर असा होता कीं, त्याला कोणाकडूनहि मृत्यु येऊं नये. त्यांत त्यानें स्त्रीजातीचाच मात्र उल्लेख केला नव्हता, कारण त्याला स्त्रीजात हा क:पदार्थ वाटत होता. शेवटीं दैत्याचा त्रास सहन न होऊन सर्व देव जमून देवीची प्रार्थना करूं लागले; तेव्हां देवीनें महिषासुराचा वध केला व सर्व लोकांस त्रासमुक्त केलें. देवीपुराणांत अशी कथा आहे कीं, सर्व देवांनीं आपापली शक्ति एकवटून ही शारदादेवी निर्माण केली आहे; अर्थात् ही शारदा ह्मणजे शक्तीच असल्यानें ही सर्व कांहीं आहे असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. अशा या देवीची आराधना वेगवेगळ्या ठिकाणीं वेगवेगळ्या पद्धतीनें होते. बंगालमध्यें हा उत्सव फार मोठ्या प्रमाणानें पाळला जातो, हें आपणास ठाऊक आहेच. आपल्या महाराष्ट्रांत हा उत्सव आपण अशा प्रकारें पाळीत असल्यानें त्याची माहिती मी आपणास सांगितली पाहिजे असें नाहीं. अशा या उत्सवापासून काय शिकावयाचें, हे आपण आपल्या ऋषींनीं घालून दिलेल्या नियमाशीं सांगड घालून पाहिल्यास आपणास यांत कोणते पोक्त विचार केल्याचें आढळून येईल तें आपण पाहूं. आपल्या चातुर्मासांत मुख्य महिना श्रावण हा होय. या महिन्यांतील रविवार, सोमवार, मंगळवार इत्यादि वारांत सूर्य, शंकर, देवी इत्यादि देवतांची आराधना करून एकभुक्त राहाण्यास सांगण्याचा हेतु काय ? मनुष्यास देवाची आराधना करावयाची तर त्यानें सात्विक आहार केला पाहिजे; व त्यानें आपलें पोट रिकामें ठेविलें पाहिजे. खादाड मनुष्य आळशी होतो व आळशी मनुष्य ईश्वरप्राप्ति करून घेण्यास अयोग्य ठरतो. आपणास शर्यतींच्या घोड्यांची व स्वारांची गोष्ट माहीत असेलच. जो घोडा शर्यतीवर नेण्याचा असतो त्यास व त्याच्या स्वारास त्या दिवशीं अन्न मुळींच न देतां थोडेंथोडें दूध मात्र देतात.त्यामुळें त्याची सुस्ती झडून ते पळण्यास व पळविण्यास लायक होतात. त्याप्रमाणेंच जें पात्र रंगभूमीवर यावयाचें असतें, तें त्या दिवशीं जेऊन केव्हांच रंगणार नाहीं. कार्य झाल्यानंतर जेवील हें सर्वांस ठाऊक आहेच. आपल्या आंगांत जागृति राहिली पाहिजे तर आपण अल्पसेवन केलें पाहिजे. या अल्पसेवनाच्या वैद्यकीय दृष्टीनेंहि एक उपयोग आहे. वर्षाऋतूंत अन्न पचन होण्यास जड जातें ह्मणून या रीतीनें एकभुक्त रहाण्यास सांगितलें आहे. पारमार्थिक व व्यवहारिक अशा दोन्हीं दृष्टीनीं मांग सांगितल्याप्रमाणें याचा उपयोग आहे. श्रावण महिन्यानंतर आपला भाद्रपद मास आला. या महिन्यांत मुख्य आराधना श्रीगणपतीची होय. ॐकार स्वरूप जो परमेश्वर तोच गणपति होय. त्याच्याठायीं मन स्थिर करावें, असा हा उत्सव करण्यांत व सण नेमून ऋषींचा हेतु आहे; पण आतां ह्या उत्सवप्रसंगीं एकमेकांच्या चढाओढीनें फाजील व वाष्कळ खर्च होतो. त्यानें १० हंड्या लावल्या तर आपण आपल्या गणपतीसमोर २० हंड्या लावणार. त्यानें एक नायकीण नाचविली तर आपण दोन दोन नाचविणार, अशा प्रकारें मौजेंत, चढाओढींत व चैनींत उत्सव साजरा केला जातो. ज्या उत्सवानें एकमेकांत द्वेष, मत्सर, ईर्ष्या वगैरे उत्पन्न होत असेल, तर आमच्या आर्यऋषींनीं घालून दिलेला नियम फुकट गेला नाहीं काय ? या नंतर पित्रतिथी आल्या. गाय,कावळ्यांना या दिवसांत आपण घांस घालतों त्याचा हेतु काय? सर्व प्राण्यास समान लेखा.कारण सर्वांच्या अंतर्यामीं एकच ईश्वर वास करीत आहे. पण ही पितृतिथीसुद्धां व्हावी तशी ऋषींनीं घालून दिलेल्या नियमांप्रमाणें साजरी होत असल्याचें दिसत नाहीं. पितृतिथींनंतर घटस्थापना आली. घटस्थापना ह्मणजे घटाची स्थापना करणें, इतकाच अर्थ नसून या औपचारिक प्रकारांत गर्भितार्थ आहे, तो हा कीं, जर ईश्वरप्राप्ति करून घ्यावयाची असेल तर मन एकाग्र करा. मन किंवा बुद्धि याची स्थिरता एकाच दिवसांत होत नसून ती क्रमाक्रमानें झाली पाहिजे व होते; ती होण्यास हा नऊ दिवसांचा अवधि ठेविला आहे. या नऊ दिवसांत मन व बुद्धि हीं परमेश्वराकडे एकाग्र करून आदिशक्ति जी देवी जगन्माता तिची उपासना करा. बुद्धीस चलन देणारी ही शारदा देवीच आहे. तिची आराधना केल्याशिवाय आपल्या बुद्धिशक्तीची वाढ कशी होईल ? या दिवसांत कोंबडीं, बकरीं, रेडे वगैरे गरीब प्राण्यांचा बळी देण्याची चाल कित्येक ठिकाणीं आहे; पण खरोखर देवीपुढें आळस, द्वेष, मत्सर, संताप वगैरे रूपी जे राक्षस समाजांत धुडघूस घालतात त्यांचा देवीपुढें बळी दिला पाहिजे.तो देऊन देश,समाज,प्रपंच व स्वत: यांच्याविषयीं कर्तव्य करण्यास आजच्या मुमुर्तानें जागृत व्हा. आज विजयादशमी.हा मोठा मुहूर्त समजला जातो. याचें कारण या दिवशीं आपल्या आर्यांच्या थोर थोर पूर्वजांनीं अत्यंत महत्वाच्या कार्यास आरंभ करून तीं सिद्धीस नेलीं आहेत. उदाहरणार्थ, श्रीरामचंद्रांनीं याच दिवशीं रावणाचा वध केला. पांडव अज्ञातवासास होते, ते याच दिवशीं ज्ञात झाले. याच दिवशीं गाई घेऊन जाण्या करितां आलेल्या कौरवांनां विजय ह्मणजे अर्जुन ह्यानें हांकून देऊन विजय मिळविला. आमचे मराठे राजेरजवाडे ह्याच शुभ मुहुर्तावर स्वारी शिकारीस निघत असत. आतां आपणास कांहीं पूर्वीसारख्या लढाया वगैरे करण्याकरितां स्वारी शिकारीस जाण्याचें कारण नाहीं. आज आपणावर पोर्तुगीज सरकारचें राज्य आहे. त्या सरकारशीं सहकारिता ठेवून शिक्षण वाढवून, आळस, द्वेष, मत्सर टांकून या श्रीसरस्वतीची आराधना करा. व एकमेकांना साह्य करून राष्ट्र, समाज, प्रपंच व आपण स्वतः यांचा उद्धार करून घ्या. एवढी विनंति करून मी आपली रजा घेतों.

धर्म आणि अधिभौतिक शास्त्रें

रा. ब. खोपकर यांचे अध्यक्षतेखालीं मडगांवच्या सरस्वत्युत्सवांत रा. ना. वि. भोंडे वकील यांनीं वरील शास्त्रीय विषयावर जें भाषण केलें, त्याचा सारांश येणें प्रमाण आहे: आज या शारदादेवीच्या उत्सवांत शारदा देवींविषयक एकादा विषय व्याख्यानास घेतला पाहिजे होता. परंतु हा विषय ह्मणजे आधिभौतिक शास्त्रें हीं शेवटीं धर्मालाच ह्मणजे ईश्वरालाच जाऊन मिळतात. तर त्यांचा एकमेकांशी असणारा संबंध मी दाखविणार आहें. आज ५०० वर्षे पूर्वींचा एकादा माणूस समाधींतून उठून युरोपियन लोकानीं केलेल्या सुधारणाकडे पाहूं लागला तर त्याला काय दिसेल. जिकडे तिकडे आगगाड्या, आगबोटी, मोटार ट्राम, वगैरे प्रकार त्याच्या नजरेसमोर आल्यास तो अगदीं थकच होऊन जाईल. आमच्या जर इतक्या सुधारणा तर आधुनिक सुधारणेचें माहेर असें ज्या अमेरिका युरोप खंडास ह्मणतात तेथें किती सुधारणा झालेल्या असतील ? त्या पाहून तो तर थकच होऊन जाईल. हें जरी खरें आहे, तरी या आधुनिक सुधारणेमुळें मनुष्य ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं साशंक होतो ! हा एक महत्वाचा प्रश्न आहे. आह्मी हिंदुस्थानांतले लोक धर्मभावना प्रधान असल्या कारणानें या सुधारणांचा परिणाम आह्मांस ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं शंकित करण्याकडे होत नाहीं. पण तिकडील लोक हे प्रत्यक्षवादी असल्यानें या आधुनिक शोधांमुळें त्यांची मनोवृत्ति ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं साशंक बनली आहे. या दोन्हीं ह्मणजे पाश्चात्य व पौर्वात्य मनोवृत्तीची छाननी करून पाहिलें तर शेवटीं ईश्वराचें अस्तित्व मानावेंच लागेल, हें मी आपल्या व्याख्यानांत दाखविणार आहें. जें शास्त्र पंचमहाभूतांवर कमी अधिक ताबा चालवून, तसेंच जगांत गुप्त असलेली शक्ति उपयोगांत आणून त्या मानवी जातींस अधिकाधिक सुखी करण्याचा प्रयत्न करतें, त्यास आधिभौतिकशास्त्र असें साधारणपणें मानतां येईल. आगगाड्या, आगबोटी, विमानें वगैरे ज्या आपण गोष्टी पहात आहोंत, त्या सर्व आधिभौतिक शास्त्राचेंच दृश्य फळ होय ! या आधिभौतिक शास्त्राचें किंवा ज्ञानाचें रसायन, पदार्थविज्ञान, वनस्पती, प्राणी व भूस्तर इत्यादि भाग, त्या त्या भागांचा पूर्णपणें अभ्यास केला जावा अशा उद्देशानें पाडले आहेत. कारण सर्व भागांचा अभ्यास कोणत्याहि एका माणसाकडून एका जन्मांत पुरा होणार नाहीं; मग त्यात नवीन नवीन शोधांची भर तो कशी घालूं शकेल? पदार्थ विज्ञानशास्त्राचे निरिंद्रीय पदार्थ विज्ञान व इंद्रिय पदार्थ विज्ञान असे आणखी दोन भाग पाडले आहेत. असा फरक करतां करतां, शास्त्रज्ञांनां असें दिसून आलें कीं कोणत्याहि शास्त्राची सीमा निश्चित करतां येणें शक्य नाहीं. पदार्थांत कांहीं पदार्थ पारदर्शक व कांहीं अपारदर्शक असे आहेत कीं, त्यातून वीज वहातें व कांहींतून वहात नाहीं; पण पुढें शोधाअंतीं ही विचारसरणीहि चुकीची ठरली. ज्या पदार्थाचें पृथ:करण होत नाहीं, असे मूलतत्वरूप पदार्थ ७० असल्याचें रसायन शास्त्रज्ञानीं शोधून काढलें आहे. पण त्याचें अधिक सूक्ष्मतेनें पृथःकरण केलें असतां ते पदार्थ ७० नसून खरा मूलतत्वरूप पदार्थ एकच आहे, असें आढळून आलें. उदाहरणार्थ पाणी हें पृथ:स्खलित केलें असता त्यांत हैद्रोजन व अक्सिजन असे दोन वायु सांपडतात. त्या वायुचें आणखी कांहीं पथःकरण केलें असतां त्यात इलेक्ट्रॉन हा परमाणू सांपडतो. हे जे वर वायु सांगितले ते त्या सत्तर पदार्थांतलेच होत. हा इलेक्टॉन परमाणूपेक्षां १/१००० नीं लहान आहे. हा सर्व जगांत सर्वत्र भरलेला पदार्थ आहे. यास अएन असेंहि ह्मणतात. दिवा लागणें, आवाज उत्पन्न होणें, इत्यादि क्रिया ईथरच्या लहरीपासून होतात. ह्मणजे यास ईथरची अनर्जी खर्च व्हावी लागते. लॉर्ड केल्विन या शास्त्रज्ञानीं असें सिद्ध केलें आहे कीं, जगात मूळभूत असे दोनच पदार्थ आहेत. एक इथर व दुसरा अॅट्म. आज आपणास जगांत निरनिराळे प्राणी दिसत आहेत ते सर्व वरील मूलभूत अशा अत्यंत सूक्ष्म तत्वांपासून झालेले असल्यानें सामान्यतः एक रूपच आहेत, असा सामान्य सिद्धांत निघतो.

ANUNCIOS.

EDITAL

CAMARA MUNICIPAL DE QUEPEM

Madeva Manguexa Sirvoicar, presidente da Câmara Municipal do Concelho de Quepem.

Faço saber que estando generalisada a venda de peixe a peso quasi em todos os Concelhos deste Estado, principalmente no de Salcete de que depende em maior parte o mercado deste Concelho, e convindo que se adopte tambem neste o mesmo sistema, deliberou a Câmara que a venda de peixe neste Concelho seja feita a peso, a partir de 15 de Novembro seguinte, devendo, para tanto os vendedores apresentar.se munidos de necessarias balanças e pesos. O preçario será provisóriamente o constante da tabela infra.

Faço saber mais que a Camara deliberou tambem que seja gratuita a aferição de pesos, destinados para a venda de peixe até o fim de Dezembro do corrente ano, devendo cobrar-se as respectivas taxas, a partir de Janeiro de 1925.

Tabela de preços de peixe no Concelho de Quepem

Esmargal [morsó], robalo (rauns), serra (visvono), mugem grande	arratel	0 : 03 : 03
Mugem grande do rio	,,	0 : 04 : 06
Mugem piqueno	,,	0 : 01 : 09
Dito do rio	,,	0 : 03 : 03
Garopa (gobró), truta (thiguc) panpano grande (pampla), peixe-espada ou carlim (corli), peixe pedra (palú), saltão (golxi), savel (quer), tainha (chaó), naire (goll), peixe madama ou murd. xi (muddoxi), caboz (korchi ou korchandi) e similar (anim assoli massoli)	,,	0 : 02 : 09
Doirada (daina), corvina grande (odló dodiaró)	,,	0 :02 : 03
Arraia ou raia (vagolem), bagre (saug.ta), cação (mori) e similar (anim assoli)	,,	0 : 01 : 03
Bordalo (pittól), cavala), bangdó) peixe agulha (tonqui), sardinh. (tarló), pedvó e similar, incluindo topó e calandur (peixe-escrivão)	,,	0 : 00 : 09
Peixe lefte (velhiô)	,,	0 : 01 : 09
Peixe miudo de qualquer especie (barica massoli) ou corbota	,,	0 : 00 : 09
Lagostas (sinvôs)	duzia	0 : 03 : 06
Lagostins (vaguios)	,,	0 : 02 : 06
Camarão grande (mottim sunatã)	arratel	0 : 02 : 03
Dito do rio	,,	0 : 03 : 00
Camarão fresco (givim sunctã)	,,	0 : 02 : 03
Dito do rio	,,	0 : 02 : 06
Camarão sêco (suquim sunctã)	medida	0 : 02 : 06
Camarão fino fresco (givò galmó)	arratel	0 : 01 : 03
Camarão fino sêco (sucó galmó)	,,	0 : 01 : 00
Cambadas de peixe do rio	,,	0 : 04 : 00
Carangueijos brancos grandes [olleô culeo dovêo]	duzia	0 : 02 : 03
Ditos piquenos [dactêo cullêo dovêo]	,,	0 : 01 : 09
Dítos pretos grandes com coral (odliô caliô cullêo laquichô)	,,	0 : 06 : 00
Ditos pretos grande (odliô caliô culliô)	,,	0 : 05 : 00
Ditos pretos piquenos, [dactiò culliô caliô)	,,	0 : 03 : 00
Ostras grandes de 1.a sorte (odlim calvã, poili sort)	cento	2 : 04 : 00
Ditas de 2.a sorte	,,	1 : 08 : 00
Ditas finas de 3.a sorte (dactim calvã tisri sort)	arratel	0 : 02 : 06
Mexilhões [sinanêo]	cento	0 : 06 : 06
Lulas grandes (odliô manquio)	duzia	0 : 04 : 03
Ameijoas grandes (khubé)	cento	0 : 01 : 09
Ditas piquenas (tisrêo)	,,	0 : 01 : 00
Pampanos salgados [karim pamplã]	,,	0 : 08 : 06
Cavalas salgados grandes (odlê karé bangddé)	,,	0 : 08 : 00
Ditas piquenas [dacté karé bangdé]	,,	0 : 03 : 00
Fodquiôs salgados grandes	,,	1 : 00 : 00
Corvinas e soundoliós grandes salgados (odló karó dodiaré anim soundaliô)	,,	0 : 08 : 06
Corvin s e sound liôs salgados pequenos (dacté karé doddiaré anim soundoliô)	,,	0 : 03 : 00
Sardinhas (tarlé) pedvés, peixe-eite (verliô), rabo de galo [vinong] e peixe miudo salgado	,,	0 : 01 : 00
Cação sêco grande (odli mori suqui)	duzia	3 : 08 : 00
Dito piqueno (dacti mori suqui)	,,	2 : 04 : 00
Caç o sêco (su.ui mori)	arratel	0 : 06 : 00
Tiras de cação (moriche solvé)	cento	2 : I2 : 00
Tiras de arraia grande (odlea vagoliaché solvé)	,,	1 : 08 : 00
Peixe miudo de qualquer especie sec (uquem) corbot	arratel	0 : 0I : 00
Carao.l (kongó)	,,	0 : 00 : 06

Quepêm, 15 de Outubro de 1924.

O Presidente da Câmara,

Madeva Manguexa Sirvoicar

Ano 9 N.° 32

ta-feira 6 de Novembro de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
Cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.

BHARAT.

वर्ष ९ वें. अंक ३२

गुरुवार ता. ६ नव्हंबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोंवा

BOA VIAGEM!

Daqui a poucos dias, o sr. dr. Jaime de Morais deixa o governo da India. Sua Excia. vai finalmente e — diga-se a verdade — sem deixar saudades.

Não ha' duvida que, durante a sua estada nesta Colónia, o sr. dr. Morais revelou uma inteligencia invulgar e mostrou ser dotado de prodigiosas faculdades de trabalho e actividade. Mas, por mal dos nossos pecados, Sua Excia. que podia ser um excelente e modelar governador, criou só em volta de si uma aureola, *nimbada* duma oposição a mais franca e a mais desassombrada, por ter posto ao exclusivo serviço dos seus interesses e dos da sua grei, tanto a decantada inteligencia invulgar como as festejadas prodigiosas faculdades de trabalho e actividade.

O *Bharat* prometera fazer balanço dos actos governativos de Sua Excia. Não é dificil o cumprimento da promessa, porque com uma meia duzia de palavras se pode coustruir o edificio do tal balanço.

Divide et regna foi o desastrado principio que presidiu á sua politica administrativa, tendo-se divertido a valer á custa de dissensões que entre indigenas provocou, protegendo uns contra outros.

O entendimento de Sua Excia. com a fracção *ultramarina* e o *caitanismo* que não tinham podido exercer durante trinta anos a sua politiquice odienta e interesseira, é uma prova frisante de que o sr. dr. Jajme de Morais *governou dividindo* ou *dividiu governando*, em flagrante prejuizo da politica patriotica e sensata do Paiz.

Numa palavra: Sua Excia empregou mal a sua invulgar inteligencia e, pior ainda, as suas prodigiosas faculdades de trabalho e actividade, tornando-se, porisso, principal cumplice de todas as calamidades que contra a India se desencadearam no seu governo de funestas consequencias e tristes recordações.

A *avalanche* de impostos, o nepotismo, o egoismo, o europeismo e outros *ismos* que substentaram uma dança macabra, enquanto o sr. dr. Morais esteve governando *este jardim á beira mar plantado*, carateri sam, numa admiravel sintese, o balanço dos actos governativos de Sua Excia.

Mas, agora que Sua Excia nos deixa, não lhe queremos nenhum mal. Apagamo-nos, mesmo, da memória todos os agravos que nos infligiu, ou para nos paralisar a lingua ou para favorecer a prepotencia escandalosa dos nossos inimigos e do nosso Paiz. Sim, agora que Sua Excia. nos deixa, almejamos-lhe sò: **Boa Viagem!**

ECOS & CRITICA

UMA AUTOPSIA

O *Bharat*, em numeros sucessivos, criticou, em tempo, desfavoravelmente certas atitudes do sr. dr. Araujo Mascarenhas que como professor liceal assumira. Foi por *dever de oficio* que o fizemos.

A campanha, algo dura, que entao lhe movemos, nao obsta, porem, a que hoje rendamos a Sua Excia. a nossa sincera homenagem pelos serviços de altissimo valor, prestados a' jurisprudencia e literatura portuguesas, quere como advogado intemerato e de mao cheia, quere como jornalista dum estilo superfino e emocinante.

A recente obra do sr. dr. Mascarenhas, *Uma Autopsia*, e' o mais vivo testemunho do que afirmamos. Ela constitui, ao mesmo tempo, a dupla glorificaçao do autor como jurisperito fluente e literato importante.

Individualidades como o sr. dr. Araujo Mascarenhas so' honram o seu nome, elevando "pari passu" o prestigio do Paiz onde nascem e dignificando a Naçao a que pertencem.

E's o que ao *Bharat* se oferece registar nas suas modestas colunas, acusando e agradecendo a = *Uma Autopsia* = da brilhante lavra do sr. dr. Mascarenhas.

AMIGO DA VERDADE

No dia 25 de outubro estiveram suspensas todas as carreiras de lanchas a' excepçao das de Mormugao e Verem. O motivo? Deveras simples e profundamente lo'gico: — *nao havia lanchas capazes para navegar*. E, no meio desta *beleza de hortaliça*, o governo da Metropole a insistir que para milhor garantia de bons serviços ao publico, a nossa Navegaçao Fluvial continue a ser administada pelo Estado, como e' agora. Quem teria sido o informador do Governo de Lisboa? Convinha conhece-lo.

Ha de ser forçosamente um grande amigo da verdade.

E PARA NADA MAIS...

O governo consta que resolveu que o produto da venda dos bens nacionais fosse depositado na Caixa Economica Postal e que esta caixa fosse autorisada a emprestar aos funcionarios 80% do valor dos seus titulos de vencimento. E' uma operaçao esta que tem o aspecto de uma coisa mais simples e natural do mundo.

Mas se alguem se lembrasse de exprimir a transacçao em formula mais resumida e dissesse que o *Governo de liberou vender os bens nacionais para pagar o funcionalismo publico*, ja' haveria clamor geral. Nao ha duvida. A palavra foi feita para disfarçar o pensamento. E e' para isso que os notaveis estadistas tem prestimo e para nada mais.

E' O ... PALEIO!

Na sessao do C. Legislativo, no dia 22 de Outubro, o sr. dr. Jaime do Morais, falando, em resposta ao sr. P. A. Sousa, desenvolveu largamente a tese de que "o progresso agricola do meu pais em relaçao a outro, tem a sua razao de ser nas condiçoes privativas de cada regiao" e, referindo-se ao progreso economico de Scandinavia e Alemanha, afirmou que "*tambem no's ai chegaremos, a bom termo.* E' verdade, sr. Governdor, No's com os nossos engenheiros agronomos, silvicultores, tecnicos agricolas que multiplicam-se como cogumelos, a razao de 250 rupias o cogumelo—havemos de chegar nao so' la' mas muito alem muito alem ao ... *polo norte.* O que nos salva e' o ... *paleio.*

PELA POLICIA

Sao cada vez mais crescentes as queixas e reclamaçoes que estamos a receber de Canacona contra a acçao policial do sr. tenente Coelho.

Se umas o acusam de sua intervençao nas questoes de propriedade, outras o atacam pelas prisoes arbitrarias a que esta' afeito, violando por esta forma a portaria provincial n.° 741 de 12 de Setembro, criadora do Corpo da Policia de Goa.

Uma carta, entao, relata pormenores duma scena de pugilato que se travou entre os srs. Comandante Militar e Secretario da Administraçao daquele concelho, scena cuja provocaçao se atribui ao primeiro.

Sabemos que, em Canacona como em algumas outras partes das Novas Conquistas, campea infrene o espirito da chicana cuja destruiçao cabe ao esforço conjugado das respectivas administraçoes concelhias e comandos militares.

O que, porem, esta' a suceder em Chaudi, sede do concelho de Canacona, nao e' de molde a que seja de agrado geral, sobretudo depois daquela scena que se desenrolou.

Tudo e' bom para exterminaçao do mal social, quando as medidas empregadas para este fim nobre nao ultrapassem o ambito da Lei, Bom Senso e Moral.

Mas, como ja' acabamos de dizer, limitamo nos, por emquanto, a registar factos e colher dados e documentos para, dada a ocasiao, utilisarmos deles para emitir o nosso imparcial parecer sobre o assunto policial de Canacona, esperando que nos ajudara' nesta delicada tarefa a Opiniao Publica dali, que se encontra, ao que parece, dividida em duas correntes, diametralmente opostas, claramente antagonistas.

णांत भरपूर आहे असें उमेदवारांनीं समजूं नये. तशी पात्रता येण्यास लोकांसाठीं शांत मोसमें दुष्काळ रोगराई यांसारख्या कठिण प्रसंगीं जनतेस हरएक तऱ्हेची मदत आपहस्तें परहस्तें पुरविणें, जनतेच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठीं खासगी, सार्वजनिक किंवा सरकारी रीतीनें खटपट करणें; अर्ज, विनंत्या, डेपुटेशनें, प्रसंगीं निषेध यांच्या द्वारा सरकार व सरकारी पुढ्यांतील संस्था यांस लोकमत कळविणें; एकंदरींत जनतेच्या हिताकडे कळकळीनें नजर पुरवून आपल्या हातून होईल ती कामगिरी करण्यास पुढें येणें वगैरेंची गरज आहे. तशी कामगिरी आपल्या हातून झाली आहे कीं काय याचा विचार करूनच उमेदवारांनीं पुढें यावें; आणि अशी कामगिरी ज्यांच्या हातून घडली नाहीं त्यांस मतदारांनीं निवडून देऊन मागें पुढें अपशकून करून घेऊं नये. यांत उभयतांचें हित आहे. मतदारी मिळणें हा या कालांतील फार मोठा लाभ होय. त्याचा सदुपयोग करून आपण सुखी होऊन उदार मन करून देणाऱ्या सरकारनेंहि कृतकृत्य व्हावें असेंच धोरण यापुढें मतदारानीं ठेवलें पाहिजे. मुनिसिपाळ्ट्या व जुंत लोकालें यासंबधीं सरकारी धोरण काय आहे हें वरील कलमांवरून मतदारानीं व उमेदवारांनीं समजून घेऊन सरकार व सरकारी प्रभावळींतील लोकनियुक्त संस्था यांच्याशीं सहकारित्व करण्यास मुनिसिपाल्ट्या व जुंत लोकालें यांच्या द्वारा काय करणें शक्य आहे तें पाहूं.

" शरीर संरक्षणार्थ लागणाऱ्या अन्नवस्त्राची तरतूद झाली कीं त्याच्यामागून शिक्षित होणें ही एक जनतेची फार मोठी गरज आहे " अशी एक पोर्तुगीजींत ह्मण आहे व ती कोणत्याहि देशांतील रहिवाश्यांना लागू आहे. अन्नवस्त्राची तरतूद करण्याचें काम प्रत्येक व्यक्ति किंवा अनेक व्यक्तींचें बनलेलें कुटुंब आपापल्या पुरतें पाहात असतें यांत संशय नाहीं. तरीपण प्रत्येक व्यक्तीला किंवा कुटुंबाला त्या तरतुदीसाठीं ज्या कमी अधिक हाल अपेष्टा सोसाव्या लागतात त्या झाल्यातर कमी जांचक व्हाव्या आणि त्यासंबंधींचे परस्परांमधील व्यवहार सुरळीत व सुव्यवस्थीत चालावे ह्मणून मुनिसिपाल्ट्यांकडून कांहीं प्रयत्न होणें जरूर आहे. जनता अधिकाधिक सुशिक्षित व्हावी, कोणताहि मनुष्यप्राणी निरक्षर राहूं नये, आरोग्यसंरक्षण, शेतकी, व्यापार किरकोळ उद्योग धंदे यांचें निदान व्यवहारापुरतें ज्ञान मिळावें ह्मणून ठिकठिकाणीं प्राथमिक व इतर शाळा उघडून लोकांची शिक्षणाची सोय करणें आवश्यक ठरतें. देशी भाषेचा प्रसार करणें, जनतेस मिळणारें शिक्षण देशी भाषांतूनच मिळावें यासाठीं खटपट करणें, स्वतःच्या खात्यांतील किरकोळ पावत्या, जाहिराती, आज्ञापत्रें, आमंत्रणपत्रें इ. चे लेखनव्यवहार देशी भाषेंत ठेवणें हीं कामें मुनिसिपाल्ट्या व जुंत लोकालें यांस सहज साध्य आहेत. सरकार देत असलेल्या शिक्षणाची आणि त्या शिक्षणक्रमाची येथील परिस्थितीस अनुसरून पाहणी करून त्यांत सुधारणा सुचवून त्या घडवून आणण्याविषयीं प्रयत्न करणें त्यांनां सोपें आहे. सरकारी टांकसाळेंतून वरचेवर निघणारे कायदे लोकांना जाचक आहेत कीं सुखदायक आहेत या विषयीं लोकमत अजमावून तें कायदेशीर रीतीनें सरकारास वरचेवर कळविणें हेंहि एक सरकारशीं सहकारित्व केल्यासारखेंच होऊन जनतेचे जाच निवारण होण्यास यामुळें बरीच मदत होईल. सरकारी कायद्यांवर व सरकार वेळोवेळ बसवीत असलेल्या करांवर सडकून टीका करणारे अनेक वृद्ध तरूण प्रत्येक गावांत आढळल्याशिवाय राहणार नाहींत. परंतु अशा रीतीनें विस्खळीत असलेलें हें लोकमताचें गवत सरकाररूपी हत्तीवर बंधन घालण्यास उपयोगी पडत नाहीं. त्याची वळीव व सुसंघटीत दोरीच केली पाहिजे. तरच त्याचा थोडाबहुत परिणाम दिसून येईल. आपापल्या महालांतील सुज्ञ, व तज्ञ, विचारी व व्यवहारनिपूण लोकांचें मत घेऊन त्याचा रिपोर्ट आपल्या ह्मणण्यासह ठिकठिकाणच्या मुनिसिपाल्ट्यानीं वरचेवर सरकारास कळविण्याचा क्रम ठेविला तर आज ना उद्यां सरकारास लोकमतापुढें नमतेंच घ्यावें लागेल. शिवाय लोकांनाहि राजकीय शिक्षणाचा धडा मिळून वाचाळपणास आळा पडणार असल्यामुळें, आणि पूर्ण विचारांतींच मत देणें भाग होणार असल्यामुळें राज्यकारभाराचें ज्ञान अधिकाधिक करून घ्यावें लागेल. जनतेला सरकारी लहान मोठ्या कारभाराचें ज्ञान असणें ही गोष्ट फार महत्वाची व आह्मां लोकसत्ताक राज्याच्या नागरिकांस तर अत्युपयुक्त आहे. या गोष्टीकडे दुर्लक्ष होऊं देतां कामा नये. सरकारचे कायदे परक्या भाषेंत ह्मणजे पोर्तुगीज भाषेंत प्रसिद्ध होत असतात. यामुळें लोकांना त्याचें ज्ञान करून घेण्यास अवघड होत असतें. त्या कायद्यांचीं देशी भाषेंत भाषांतरें झालीं असतीं तर सुलभ तऱ्हेनें लोक कायदा समजून घेतल्याशिवाय राहिले नसते. ही उणीव दूर करण्याविषयीं सरकारांत खटपट करणें न पेक्षा स्वतः दूर करणें मुनिसिपालिट्यानीं आपल्या आंगावर घेतलें पाहिजे.

—अखेर डॉ॰ जाइम द मोराइस यांची येथून उचलबांगडी होऊन त्यांचे जागीं डॉ॰ जुवांव कामोयेजस यांची नेमणूक होईल, असें निश्चित झालें आहे.

—काणकोणच्या आदमिनिस्त्रासांवाचे सेक्रेतारीयु वैकुंठ प्रभू चोडणेकर व तेनेंत कुयेल्य पोलीस अधिकारी या उभय सरकारी अलमदारांची हमरस्त्यांत व हमदिवसा लठ्ठालठ्ठी झाली !

—दमण येथें चोऱ्यांना ऊत आला आहे ! मग घोरत पडलेल्या पोलिसांची घोरपड तरी कां पाहिजे !

स्फुट विचार

शुभं भवतु:— गेल्या महिन्याच्या २९ तारखेस कार्तिक शुद्ध १ दा रोजीं गोमांतकाच्या सीमशेजारीं सांवतवाडी संस्थानचे सर्वाधिकार राज्यकर्त्यां ब्रिटिश पार्लमेंटकडून संस्थानच्या गादीचे वारस हीजहायनेस राजे साहेब खेम सांवत भोंसले ह्यांस समर्पण करण्यांत आले आहेत. श्री छत्रपति शिवाजी महाराजानीं स्थापन केलेल्या हिंदी पातशाहीचा वाडी संस्थान हा एक घटक असून भगव्या झेंड्याचें वर्चस्व वाढविण्यास सत्ताधारी मध्यवर्ती मंडळास ज्या ज्या संस्थानानीं स्वार्थत्याग करूनहि मदत दिली, तीं तीं संस्थानें एका मालिकेंत गोंवल्यास सांवतवाडीचा नंबर निःसंशय वराच वर लागेल. कालाच्या फिरत्या फेऱ्यांत सांपडून व कंपनी सरकारच्या घटोत्कची बाजारास भुरळून हें संस्थान जरी शिरजोर ब्रिटिश सत्तेच्या संरक्षणाखालीं आज कितीएक वर्षें चालत आहे, तरी महायुद्धांत सध्याचे राजे बापूसाहेब भोंसले ह्यांनीं गाजविलेली तर बारबहाद्दरी इंग्रज सरकारास फारच पसंत पडून त्यांनीं राजे बहादुरांस संस्थानचीं अधिकार सूत्रें सप्रेम बहाल केलीं आहेत. मेसॉपोटोमियांत राजे साहेबांनीं केलेले पराक्रम पाहून बडोदें सरकारांनीं त्यांचा विवाह आपल्या पौत्रीशीं करून त्यांस आपले नातजांवई केलें. वाडी संस्थानच्या राणीसाहेबहि सुशिक्षित असून त्यांचें संस्कृत अध्ययन चालू आहे. गायकवाड सरकारच्या मोहब्बती खातर ह्मणा, किंवा राजे साहेबांच्या कर्तबगारीकडे पाहून ह्मणा, राजेसाहेबांच्या हातांत अधिकार देऊन इंग्लिश सरकार संस्थानच्या प्रजेचा दुवा घेत आहे. ह्या मंगल प्रसंगीं आह्मीहि गोमांतकातर्फे हीजहायनेस खेम सावंत भोंसले ऊर्फ बापूसाहेबांचें अभिनंदन करून त्यांची कारकीर्द प्रजेस सुखकर होवो असें इच्छितों.

लॉर्ड रेडिंगचें जादापत्रक !:– आपल्या जादापत्रकान्वयें बंगाल सरकारास विशिष्ट जादा अधिकार देतांना व्हाइसराय साहेब आपल्या कठोर कृत्याचें खालील प्रमाणें समर्थन करीत आहेत. " क्रांतिकारक चळवळ जोरांत चालत असून तीचें दृश्यमान होणारें स्वरूप फारच भयानक आहे; ह्या बद्दल समाधानकारक पुरावा माझ्याकडे दाखल करण्यांत आला आहे. व त्या बद्दल प्रजेची मी खात्री करतों. १९२३ सालीं ह्या सारखीच भयंकर परिस्थिति उत्पन्न झाली होती, व सुरू केले गेलेले इतर सर्व सनदशीर उपाय निष्फल ठरे पर्यंत हा निर्वाणीचा उपाय योजण्याची माझी खुषी नव्हती. पण सध्या अत्याचार प्रवर्तक कृत्यांचा उपक्रम फारच झपाट्यानें केला जात असल्याचें प्रमाण सिद्ध झाल्यानें हे जादा अधिकार बंगाल सरकारास बहाल करणें मला अत्यंत आवश्यक झालें आहे. ह्या परिस्थितिला तोंड देण्याचे टिकाऊ उपाय बंगाल सरकार योग्य वेळीं आचरणांत आणीलच. ह्या जादा अधिकाराचा उपयोग शांततावादी लोकांचें स्वातंत्र्य हरण करण्यांत होणार नाहीं ह्या बद्दल मी हमी घेतों. सार्वजनिक सुरक्षिततेवरच राजकीय प्रगतीचा अवलंब असल्यानें ती सुरक्षितता राखणें सरकारचें प्रथम कर्तव्य आहे. अत्याचाराच्या बलावर कायम टिकणारी राजकीय उन्नति काबीज होणें अशक्य असल्यानें त्या उन्नतीस अत्याचाराचा अडथळा होणार नाहीं अशी खबरदारी सरकारनें घेतलीच पाहिजे. आणि ह्याच कारणास्तव मी हें जादा अधिकार पत्रक काढीत असून हिंदुस्थानच्या फायद्याची व राजकीय प्रगतीची आशा व इच्छा बाळगणाऱ्या सर्व जनतेचें सहकार्य सरकारास मिळेल असा भरंवसा वाटत आहे; ह्या पत्रकान्वयें व्हाइसराय साहेबांतर्फे हिंदुस्थान सरकारनें बंगाल सरकारास दोन सेशन्स किंवा ॲडिशनल सेशन्स जज्जांची मसलत घेऊन विशिष्ट बहिमी लोकांसंबंधी योग्य वाटेल तें करण्यास व वॉरंटाशिवाय धरपकड करण्यास अधिकार अर्पण केले असून चांगल्या उद्देशानें केल्या गेलेल्या सर्व सरकारी कृत्यांस परवानगी देण्यांत आली आहे. ह्या हिंदुस्थान सरकारच्या दडपशाही धोरणाविरूद्ध जिकडे तिकडे खळबळ उडून गेली असून प्रागतिक वृत्तपत्रेंहि ह्या सरकारी कृत्यावर कडक टीकेचा भडिमार करण्यास आपखुषीनें प्रवृत्त झालीं आहेत.

व्यावहारिक कीं अव्यावहारिक !:— जादा अधिकाराचा आश्रय घेऊन व्हाइसरायानीं बंगाल सरकारास दिलेले वरील जादा अधिकार जनतेच्या मनोभूमीवर कोणत्या प्रकारचा परिणाम करतील व त्या योगें हिंदुस्थान सरकारचें इष्ट साधेल कीं डोळ्यांपुढून पळून पलीकडे जाईल, यतद्विषयक वादास आजकाल चोहींकडे ऊत आला आहे. बंगालचें लोकमत तर व्हाइसराय साहेबांच्या ह्या हडेलहप्पी विरुद्ध अतिशय खवळून गेलें असून हें त्याचें अनन्वित कृत्य मात्र खरोखरच एखाद्या गर्भितावस्थेंत असलेल्या लाल बंगालच्या क्रांतिकारक चळवळीस जन्म दिल्याचें श्रेय घेईल असा कित्येकांचा समज बनत चालला आहे व तो बव्हंशीं खराहि आहे. दडपशाहीचा हा पहिला रामराम बंगाल ऐवजीं महाराष्ट्रास ठोकण्यांत आला असता तर कदाचित् आजच्या महाराष्ट्रानें तो जुलमी खुषीनें – आनंदानें नव्हे– स्वीकारला असता; पण जात्याच हूड, अविचारी व अभिमानी अशा तरुण बंगालला तो सहन न होतां त्याच्याकडून ह्या सरकारी कृत्यास अत्याचारानें प्रतिकार होण्याचा संभव आहे. देशबंधु दासांनीं एकदां कौन्सिलांत उल्लेखिलेल्या क्रांतिकारक चळवळीच्या गुप्त कृत्यांचा आधार घेऊन हिंदुस्थान सरकारनें हें दडपशाहीचें एकदां तीस हजार हिंदी लोकांचा जीवंत बळी घेऊन निरुपयोगी ठरलेलें शस्त्र उगारून हवेंत गोळीबार करण्याच्या मिषानें लोक समाजावर गोळी झाडण्याचें काम सुरू केलें आहे. व

श्रीसरस्वती व सदोष शिक्षण पद्धति

मडगांवच्या श्रीसरस्वतीसेवक मंडळाच्या आठव्या सरस्वत्युत्सवाच्या पहिल्या दिवशीं वरील विषयावर महाराष्ट्रभाषाचित्र मयूर कृष्णाजी नारायण आठल्ये यांचें रा. ब. अण्णासाहेब खोपकर यांचे अध्यक्षतेखालीं व्याख्यान झालें. व्याख्याते ह्मणाले: आजच्या या समारंभास हजर राहणाऱ्याच्या योगाची अपूर्वतता दर्शित करण्यास खरोखरच माझ्याजवळ शब्द नाहींत. आज माझी जुनी स्नेही मंडळी भेटली आहे, असें मी समजतों. मी मागें एकदां गोमांतकांत आलों होतो. त्या वेळीं मी काढीत असलेल्या 'केरळ कोकिळ' मासिकाचे सर्वांत ज्यास्त वर्गणीदार या प्रांतांतच होते. आतां या उत्सव प्रसंगीं मला बोलण्यास संधि दिल्याबद्दल मी फार आभारी आहें. श्री ज्ञानेश्वरांनीं एके ठिकाणीं असें सांगितलें आहे कीं, जर तुह्मांस सर्व झाडांस पाणी पोंचवावयाचें असेल तर त्याचे मुळास तें घाला. ह्मणजे तें सर्वत्र पोंचेल. प्रत्येक प्राण्यास सुख पाहिजे व मनुष्यासहि पाहिजे. तर तें मिळविण्याचें बीज श्रीसरस्वती देवीची आराधना हें होय. यावर कोणी असें ह्मणेल कीं, घरांत मीठ तेल नसेल तर श्रीसरस्वती देवीची आराधना करून काय फायदा होईल? त्या करितां लक्ष्मीच नको का प्रश्न व्हायला! हें जरी खरें असलें तरी लक्ष्मी ही सरस्वतीच्या पाठी मागून येणारी आहे. अर्थात लक्ष्मी ही सरस्वतीची दासी आहे. आमच्या संस्कृत वाङ्मयांत छंदनिवृत्ति ह्मणून ग्रंथ आहे. तो सर्व सूत्रबद्ध आहे. आतांच्या सारखा पाल्हाळ त्या वेळच्या ग्रंथांत नसून ते सर्व सूत्रबद्ध असत. व त्यांत सर्व व्याख्यां दर्शविलेली असे त्यांत एका सूत्रांत गणांचीं नांवें त्याच्या पुढच्या पासून प्रत्येक गणांत ऱ्हस्वदीर्घाक्षरें कशा रीतीनें आलीं पाहिजेत तें सांगितलें आहे. ह्याच पुस्तकावर कै० परशुराम तात्या गोडबोले यांनीं आपलें वृतदर्पण हें पुस्तक केलें आहे. त्यांत अनेकार्थ गर्भ सूत्रमय भाषेची गंमत सांगतों; त्यांत गणांची तीनहि अक्षरें दीर्घ असलीं तर मगण ह्मणावें, 'अशा अर्थाचें एक सूत्र आहे; त्याची धी, श्री, स्त्री मगण अशी रचना आहे. हें सूत्र आपणास काय शिकवितें? यांत अशी खुबी आहे कीं, धी ह्मणजे बुद्धि वाढविली पाहिजे, मग श्री ह्मणजे लक्ष्मी मिळते व नंतर स्त्री ह्मणजे संसार सुखानें थाटावा. हें सूत्र किती खुबीदार आहे बरें! सर्व संस्कृत ग्रंथांत आपणास असाच मासला पहावयास मिळेल! पण हल्लींच्या सरस्वत्याराधन पद्धतीकडे पहा! सर्वच कांहीं विचित्र! गोव्यांतल्या मराठी शिक्षणाची पद्धति कशी काय आहे, हें मला ठाऊक नाहीं. पण तिकडील ह्मणजे महाराष्ट्रांतील पद्धति मला ठाऊक आहे. त्यांतल्या क्रमिक पुस्तकांतील कवितांचा मासला आपणास सांगतों. 'लंकुडतोड्या रोज कसा तोड तोड तोडितो (हंस्या) धोबी कपडे रोज कसा बडव बडव बडवितो (हंस्यावर हंस्या) वाहवा वाहवा चेंडु हा सुंदर किती तरी खचित अहा॥ (हंस्या) अशा मासल्यांच्या कवितांनीं विद्यार्थ्यांस वाङ्मयांची गोडी कशी लागणार? हा झाला पद्य वाङ्मयाचा नमूना. आतां गद्य वाङ्मयाकडे पाहिलें तर त्या विषयींहि हीच रड. त्यामुळे विद्यार्थी हिंदु नें यवनः असे धेड गुजरी बनत आहेत. धेड गुजरी भाषेच्या नमून्याची एक आर्या आपणास ह्मणून दाखवितों. 'मिस्तर नानाभाई तुह्मी जो पाठविलांत सर्व्हेंट, गुडफॉर नथींग आहे आणखीं कोणाचीहि मला वॉंट, या दोन ओळींत मिस्टर सर्व्हेंट, गुड, नथींग आणि वॉंट हे पांच शब्द इंग्रिश आहेत. हा झाला धेड गुजरी भाषेचा नमूना. आतां लहान विद्यार्थ्यांवर ओझें केवढें मोठें लादतात त्याचा नमूना पहा. एकदां म्यट्रिकच्या परीक्षेंत असा प्रश्न आला होता कीं कवीच्या आंगांत प्रतिभा उत्पन्न होण्यास परिस्थिति काय असावी लागते? असला प्रश्न त्या १५।१६ वर्षांच्या पोरांनीं सोडवावयाचा कसा? तसेंच युक्लिडचीं पुस्तकें मारे सहा सहा शिकवितात. पण त्यांचा उपयोग व्यवहारांत कांहीं होत नसल्यानें शेंकडो नव्हे हजारों दाखले देण्यांत येतील. तर अशा पद्धतीचें हें शिक्षण जें निष्कळ होत आहे, तें परिणामकारक होण्यास असे समारंभ होऊन तद्वारेंच वाङ्मयसेवा झाली पाहिजे. ती होण्याविषयीं श्रीसरस्वतीदेवीची प्रार्थना करून मी आपलें भाषण संपवितों.

मुंबईंत चाललेला एक अपूर्व सोहळा

भगवंताच्या घरची व्यवस्था ह्मणजे सृष्टीची योजना अशी आहे कीं तिची कल्पना मानव बुद्धीस होणें शक्य नाहीं. हा सिद्धांत सामान्य व्यवहारिक बाबतींत जेवढा खरा आहे तेवढाच तो धर्मोद्धार व राष्ट्रोद्धार या बाबतींतहि खरा आहे. ज्या वेळीं विद्या व बुद्धिमता यांच्या कमताईमुळें इतरांचा पगडा आह्मावर बसूं लागला त्या वेळीं श्रीशंकराचार्य मध्वाचार्यांसारखे बुद्धिमान व विद्वान धर्मवीर उत्पन्न झाले. ज्या वेळीं तलवारीच्या बळावर आमचें राष्ट्र व धर्म रसातळास जाण्याची भीति पडली तेव्हां श्रीशिवरायांसारखा जणुं तलवारीचाच अवतार झाला. ज्या वेळीं इंग्रजी राज्याच्या अवल अमदानींत आंग्ल भाषाकोविदांच्या परानुकरण शीलामुळें आमच्या संस्कृतीचा लोप होऊं लागला, त्या वेळीं त्याच भाषेंत व पाश्चात्य विद्येंत प्रवीण झालेले कै० चिपळूणकर, लो० टिळक, स्वामी विवेकानंद, रामतीर्थ यांच्या व निःपक्षपातबुद्धीनें ह्मणणेस हरकत नाहीं कीं अस्सल युरोपियन बेझंटबाई व तदनुयायी झालेले आमचे अनेक विद्वान यांच्याहि व्याख्यानांनीं व लेखांनींच आमच्या तरुण पिढीस स्वधर्माकडे व स्वकीय आचारविचारांकडे खेंचून आणिलें. त्याचप्रमाणें थोडक्यांत आजच्या परिस्थितीचें स्थूलमानानें मूळ कारण शोधून काढण्याचा यत्न करणाऱ्याच्या दृष्टीनें विचार केला तर असें ह्मणतां येईल कीं मुंबई शहरीं जाणें येणें नोकरी व्यापारासंबंधीं कारणपरत्वें मुंबईंत रहिवास घडूं लागल्यानें धर्म कर्महीनता लोकांत वाढूं लागली. मुंबईंतील आचार हीनतेचा संसर्गजन्य रोग जणु गोव्यांपर्यंतहि पोंचला!! हा आक्षेप सर्वथैव खरा नसला तरी अगदींच खोटाहि ह्मणतां येणार नाहीं. यावर कांहीं उत्तर असो नसो; पण आज मितीस मुंबईसारख्या 'धर्मलंड' वाटणाऱ्या शहरांत ही इतर सर्व ठिकाणच्या धर्माभिमानी व देवभक्त व देशभक्त यानां लाजविणारी अशी एक महत्वाची गोष्ट चालली आहे — अशी एक नवीन लाट उसळली आहे. तिची हकीगत आजपर्यंत सविस्तर रीतीनें गोरक्षण पत्रांत व त्रोटक रीतीनें इतर कांहीं पत्रांतून या तीन-चार महिने पर्यंत येत असते. त्या गोष्टीचा अनुवाद तरी आमच्या 'भारत' पत्राच्या वाचकांच्या कानावर घालावा अशी माझी इच्छा आहे. ती गोष्ट ह्मटली ह्मणजे सर्व चळवळी यशस्वी होण्यास अत्यावश्यक असलेली दैवी कृपाशक्ति जी, ती उत्पन्न होण्याच्या संकल्पानें चाललेला त्रयोदशाक्षरी राममंत्राच्या तेरा कोटी जपानुष्ठानाचा अपूर्व सोहाळा होय.

त्या संबंधी प्रत्यक्ष पाहून लिहिलेली हकीगत फारच श्रवणीय आहे. पण ती एका अंकांतूनच प्रसिद्ध करणें शक्य नसल्यामुळें 'भारत' वाचकांना मी हात जोडून प्रार्थना करितों की विशेष अडचणीमुळें अशक्य नसेल त्यांनीं होतां होईल तो यत्न करून येत्या कार्तिक पौर्णिमेपूर्वी चार दिवस तरी मुंबईस जावें. तो अपूर्व सोहाळा कार्तिक पौर्णिमे पर्यंत खचित संपणार. पुराण काळीं विशेष राष्ट्रीय आपत्तीचे समयीं ज्याप्रमाणें देव-मुनि-यक्ष गंधर्वादि समुदाय भगवंतास आळविण्यास क्षीरसागराचे तीरावर जाऊन अनेक दिवस तपश्चर्या करीत असत असें सांगतात, तो व तसा सोहळा आणि भजन पूजन प्रवचन कीर्तनादि गोष्टींचा अदृष्टपूर्व सोहळा कुणास पहावयाचा असेल तर त्यानें याच दिवसांत मुंबईस जावें, आणि सुप्रसिद्ध श्री चौंडे महाराजांच्या देखरेखीखालीं होत असणारा हा जपयज्ञ पाहून तरी यावा. कांदेवाडी (गिरगांव) तील चंदारामजी हायस्कूल समोर श्रीराधाकृष्णमंदिराच्या भव्य महाजन वाडींत पहिल्या मजल्यावर हा आनंद चालला आहे

एक गोमांतकस्थ

आजचें पोर्तुगीज सदर

अग्रलेखः—

मावळत्या गव्हर्नरसाहेबांच्या कारकीर्दीवर सणसणीत टीका; डॉ० जाइम द मोराइस यांच्या कुटील धोरणाचें संक्षिप्त समालोचन, 'फोडा व झोडा' या तत्वाचें स्पष्टिकरण.

स्फुट विचारः—

दो० आराउज मास्कारेंजस यांच्या 'उम आवतोप्सीय' या नवीन पुस्तकावर अभिप्राय; सत्यमित्र; केवळ यासाठीं...; नुसती जाहिरात; काणकोण-पोलीस-प्रकरण; तिळामळ-प्रकरण; बंगालचें गौडबंगाल; व्हाइसराय व त्यांचा परिवार [ऐतिहासिक उतारा] व कांवरें-प्रकरण.

वर्तमानसार

—बार्देसची मुनिसिपालटी ह्मापशेंच्या पाठशाळेसाठीं नवीन इमारत बांधणार आहे.

—गोमांतकीय ग्रामसंस्थांच्या लेखक मंडळीची एक सभा पणजी येथें पगार वाढ करून घेण्यासाठीं भरली होती.

—म० गांधींनां कोहट येथें जाण्याला ब्रिटिश सरकारनें बंदी केली.

—काकोडें येथें 'प्रागतिक बाल समाज' या नांवाची एक संस्था जन्मास आली असून शिक्षणप्रसार व ज्ञानवृद्धि असें या उपयुक्त संस्थेचें दुहेरी ध्येय आहे.

—इंग्लंडच्या पार्लमेंटच्या सभासदांची निवडणूक होऊन तींत कांझरवेटिव्ह पक्षाचा विजय झाला. बाकीचे सर्व पक्ष एकवटले तरीहि कांझरवेटिव्ह पक्षाच्या बाजूस अधिक प्रतिनिधि होतील, इतका हा विजय 'भरींव' आहे.

—सांवतवाडी दरबारच्या गॅझीटाचा जादा अंक काढून ज्यांत श्री. सरदेसाई हे राज्याधिकारारूढ झाल्याबद्दल जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत आला आहे, त्यांतच तेथील अखिल प्रजाजनांना सन १९२५ च्या मे महिन्यांतील पहिल्या हप्त्याची जमीन साऱ्याची माफी व कैद्यांना शिक्षेची माफी करण्यांत आल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे.

—पणजीच्या बाल वा. मंदिरातर्फे एक व्याख्यानमाला गुंफण्यांत येणार असून तिला येत्या २२ नव्हंबरला सुरवात होणार आहे. माला एकसारखी ५ दिवस चालू राहील.

—हळदुणें (बार्देस) येथील ग्रामसंस्थेंतील वाढता कलह शमविण्यासाठीं सरकारनें तिचे दोन विभाग केले असून, या विभागांची इमारत जातिभेदाच्या तत्वावर उभारली गेली आहे. पहिला विभाग ख्रिस्ती ब्राह्मण व ख्रिस्ती सोनार या दोन वर्गांचा बनविला गेला असून त्याचें नांव 'फ्रातेर्नाल' (बंधुतादर्शक) व दुसरा विभाग चाड्डी (ख्रिस्ती क्षत्रीय) व ख्रिस्ती शूद्र यांचा केला गेला असून त्याचें नांव 'दॅ बोअ यस्पेरांस' (शुभाशादर्शक) असें आहे. चार शतकांचा दीर्घकाळ लोटला असतांहि फिरंगाळलेल्या ख्रिस्ती समाजांत सुद्धां जातिभेदाचीं तत्वें नष्ट झालीं नाहींत, याचें हें एकराजमान्य प्रत्यंतरच ह्मणायाचें!

लोकपक्ष, केपें.

येत्या कोंसेल्य लेजिस्लातीव्हच्या मेंबरांच्या निवडणुकींच्या बाबतींत आपलें धोरण निश्चित करण्यासाठीं येथील लोकपक्षाची एका सभा येत्या १५ तारखेस १६ तासांवर येथील मुनिसिपॉल हॉलांत भरणार आहे. तरी सदरहू पक्षाच्या अभिमान्यांनीं या सभेस हजर राहून, आपापलें मत स्पष्ट रीतीनें व्यक्त करावें, अशी विनंति आहे.

ता० ४ माहे नव्हंबर सन १९२४

अनंत राया शिरवईकर
आविलीयु दा सं. सौझ
रामा बोंबे गांवस देसाई

लेखकांस सूचना

मार्जीन सोडून एकाच बाजूनें लिहिलेल्या लेखांची ताबडतोब वासलात लावण्याचें काम सोपें असतें, हें लेखकांनीं विसरूं नये, अशी विनंति आहे.

म. भारत

Ano 9 N.° 33

[Qu]inta-feira 13 de Novembro de 924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
cadalinha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.

BHARAT

वर्ष ९ वें. अंक ३३

गुरुवार ता. १३ नव्हेंबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें-गोवा

SEJAMOS FRANCOS

Já não constitui segredo a ninguem o modo como o *Bharat* encara a personalidade historica de D. Vasco da Gama. Para nós, que representamos um povo cujos antepassados fôram vitimas da mais furiosa perseguição religiosa e politica do Gama que os privou, *ad majorem Dei et regis gloriam* do mais preciso bem que a humanidade almeja, a liberdade, e do valioso fruto do seu aturado trabalho, a propriedade,—para nós, como iamos dizendo, o discobridor do caminho maritimo para a India não pode, naturalmente representar *objecto* de culto patrio.

¿Foi Vasco da Gama guerreiro destemido, almirante insigne e navegador glorioso que descobriu o caminho maritimo para a India, sulcando mares nunca dantes navegados, numa palavra, foi êle um heroi portuguez que enalteceu a gloria de Portugal no conceito mundial?

Perfeitamente de acôrdo. E tanto não contestamos as excelsas qualidades do Gama que no número de seus admiradores ocupamos o primeiro lugar. Isto, porem, não obsta a que o consideremos como causador da desgraça dos que eram senhores desta terra que foi por êle conquistada.

E não é, porisso, para admirar que os *conquistados* em cujos cerebros se não apagou ainda, de vez, a tétrica lembrança dos agravos, inflingidos aos seus avoengos, reduzidos á extrema miseria, se nao entusiasmem por uns festejos a serem dedicados ao seu *conquistador*; antes se sintam vexados pelos mesmos.

Nestas condições o *Bharat*, conquanto fiel ao regime republicano, como cidadão portuguez, á força da vontade do insondavel Destino, não pode, contudo, contentar-se, pois, com os projectos das festas do dia 24 do proximo dezembro para os preparativos das quais o Governo local acaba até de nomear uma magna comissão composta, de resto, dos cavalheiros que nos merecem respeito·

AO VEIO DO TEMPO ...

Porque ha' dias os estudantes do Liceu Central Afonso de Albuquerque venceram por duas vezes, nos desafios do *Foot ball*, os nossos jornais a' uma, entre cabriolas de satisfaçao e de alegria, aplaudiam delirantemente com um *Bravo rapazes*...retumbante e festivo.

Porem, o que os jornais ignoram e' que entre os jogadores que tomaram parte na *equipe* da A. A. havia tres jogadores estranhos ao Liceu. Nao so' isto; os melhores jogadores desta *equipe* exceptuando a defesa, Luis Costa, tinham sido alunos das escolas inglesas—note-se que falo so' dos alunos.

Apo's estes esclarecimentos, naturalmente ocorre preguntar ao leitor benevolo que me le. Pois entao no Liceu Central, entre 600 a 700 alunos nao se consegue arrebanhar 11 rapazes para se formar uma "equipe", dum jogo tam facil como o "foot ball"? E' isto mesmo que interrogo a mim proprio e nao obtenho resposta. E' isto mesmo que ha muito, me esta' admirando sobremaneira.

Os jornais aplaudiram o entusiasmo que, "por estes tempos se nota, entre os nossos estudantes pelo "sport" mas, jornalistas divinos da minha terra, nao vos admirceis da verdade que vos vou dizer reverente e respeitosamente: Nunca entre os nossos estudantes se notou um entusiasmo pelo "sport" e pela ginastica. Alias tenham, os nossos jornalistas a bondade de entrevistar o prof. de ginastica do Liceu, o sr. Alberto Martins, alma dos exercicios ginasticos, e perguntar-lhe qual e' a percentagem dos alunos que frequentam a aula da ginastica semanal. Verdade seja que a aula semanal nao traz nehum efeito, verdade seja que esta aula nao pode produzir nada, conquanto de resto, a aula diaria seja obrigatoria! Se fosse uma nova cadeira de anatomia ou filologia haveria um exame de pretendentes habilitados no marata e grego quem havia de requerer e ficar servido com os empenhos e cunhas que sao ordem do dia. Mas, como e' uma aula util e necessaria nao se gratifica o prof. de ginastica que existe ou nao se nomeia outro que e' necessario. Como estou com a mao na massa, permitam-me os leitores, que lhes narre um facto deveras significativo que se deu no ano passado.

Foi o caso; projectava-se um grande "sport" entre os alunos de todos os tres liceus de Goa, a Escola Normal, o Instituto Comercial etc. Os professores srs. Alvaro de Miranda e ten. Antonio Paulino adestravam varios alunos, todas as manhas antes de principiar a aula, em variados exercicios fisicos como o salto de trampolim, trapezio, barra etc. Mas ... esta desinteressada iniciativa gorou! A causa vao la' averiguar os que tenham paciencia para isso!

Vou passar agora a provar a minha segunda assergao, os alunos do Liceu de Pangim nunca tiveram gosto nem entusiasmo pelo "sport" nenhum. *Ha'* tantos campos do jogo na cidade de Nova-Goa, mas todos eles andam a's moscas exceptuando uns 40 rapazes que se adestram no jogo de "foot ball". Tam insignificante percentagem para 600 a 700 alunos, e' uma miseria!

A re'les gloriola de vencerem duas "e'quipes" as mais fracas de Bardes deu lhes, aos jornalistas, uma satisfaçao sem limites. Nao escoara muito tempo sobre o retumbante triunfo das medalhas ganhas no torneio em Mapuga' quando uma "e'quipe" do afamado "Lusitania Club," derrotava a "e'quipe" mixta do C. C. e da A. A que era a flor dos jogadores de ambos os partidos, por 3 "goals" e dizia o "Heraldo" que a "e'quipe," do Lusitania desenvolveu um jogo de tactica admiravel apesar de serem pequenos na corpulencia. Isto e' que se chama jogar, meus caros jornalistas. E tanto e' que o capitao da "e'quipe" da A. A" dizia a um "reporter" de "O Heraldo que naquele jogo triunfal de Mapuga preferia perder a jogar tam mal!...

A educaçao fisica esta' muitissimo atrazada nos nossos liceus. E dai a geraçao actual, que sera' a sociedade de amanha, sair dos nossos liceus dessorada fisica e mental e moralmente. Acresce a isto a ma' disposiçao do horario que neste ano dizem estar sofrivel. Ja' se lhes deram mais salas e ainda nao se podera' deixar a quinta-feira livre.

No ano transacto pelos festejos do Liceu houve um medonho amontuado de discursos sobre a educaçao fisica dos professores, Governador etc. e a isto se cifrou a' decantada educaçao fisica no nosso Liceu Central.

Nao e' este o caminho que se deve enveredar, nao de forma nenhuma. Enquanto pelos paises que se dizem civilizados a educaçao fisica ocupa um lugar preponderante, no's, aqui vivemos nessa modorra "non vali pena ..."

Apresentamos a opiniao de alguns conspicuos na materia. Veja se por exemplo Max Muller; diz ele que "a força e inteligencia duma raça depende de sua saude fisica". Ramalho Ortigao nas suas masculas Farpas escrevia estas verdades: "A educaçao do corpo cultivada pela ginastica e' a primeira condiçao do vigor da saude nos individuos, e e' do vigor dos individuos que procede a energia das sociedades."

Quando hoje em dia ja' esta' absoluta e individualmente confirmado de que os exercicios ginasticos servem para a formaçao da alma, e' que o desenvolvimento do corpo influi poderosamente no do espirito, e' um crime nao se lhe ligar a importancia que merece, deixa'-la absolutamente a' margem como uma coisa inutil e prejudicial. Todos os paizes civilizados carinhosamente e desveladamente tornam na obrigatoria nos colegios, nas Escolas e nos quarteis.

Citando opinioes em louvor da ginastica teria que encher paginas e paginas de jornais e porisso pego a todos que se compenetrem da grave situaçao a que estamos sujeitos e nao continue a pairar sobre no's o triste conceito do Grande e inolvidavel Bga que dizia que "o indio era duma debilidade gelatinosa."

Crispim

भारत

कार्तिक व० ३ या शके १८४६

वेळ आली, सांभाळा वरें !

राजानें मारलें व पावसानें भिजविलें तर त्याची तक्रार दुसऱ्याकडे घेऊन जाण्यांत अर्थ काय ? त्या विषयीं स्वत:चीच सारासार विचारशक्ति लढवून पुढील मार्ग— पावलेल्या परिस्थितींतून पाय काढण्याचा उपाय — शोधून काढला पाहिजे. व हेंच शहाणपणाचें लक्षण होय.

व्हाइसराय साहेबांनीं आपल्या वट हुकुमान्वयें बंगाल सरकारास बहाल केलेले अप्रस्तुत अधिकार व त्याच्या अनियंत्रित बळावर बंगाल सरकार घालीत असलेला नंगानाच व तोहि मनसापेक्ष—ह्या विषयीं छाननी करीत बसून उगाच शब्दच्छलाचें अवडंबर वाढविण्याची ही परिस्थिति व वेळ नसून सरकारनें उभारलेल्या ह्या सरसकट दंडपशाहीस सक्रीय प्रत्युत्तर तरुण बंगालानें कसें द्यावयाचें व त्या बाबतींत आह्मीं महाराष्ट्रीयानीं कोणत्या मार्गानें आक्रमण करून आपदग्रस्त बंगालास सहानुभूति द्यावयाची ह्या महत्वपूर्ण प्रस्तुत प्रश्नाचा विवेक बुद्धीनें विचार करणें सध्या इष्ट आहे.

महात्माजींच्या मतें आपल्या हृदयांत अंशत: अधिष्ठित झालेल्या परमेश्वरी सर्वव्यापि शक्तीला हृदय सिंहासनावरून खालीं लोटण्याचा आत्मघातकी प्रयत्न करून आपसांत झगडे व प्रसंगीं लठ्ठालठ्ठीहि खेळण्यास प्रवृत्त झालेल्या हिंदी प्रजेला बंगाल सरकारच्या ह्या नवीन सोटेशाही कृत्यांस जर कृतीनें उत्तर द्यावयाचें असेल तर त्यांनीं परस्परांतील झगडे मोडून ऐक्य प्रस्थापित केलें पाहिजे. सत्तेच्या मदाची गुंगी चढून बहकलेल्या नोकरशाहीनें अधिकाराच्या पाशवी शक्तीच्या जोरावर सुरू केलेला हा दडपशाहीचा कसावखाना जर अखिल हिंदीवासियांना मोडावयाचा असेल तर त्यांनीं एकमेकांमध्यें दिनेदिने पसरत चाललेली बेकीची तिरसट तेढ आळेबंधास आणून— व्यक्तीव्यक्तींमधील विघातकारी वैमनस्याला तात्पुरता तरी फाटा देऊन— एकजुटीनें व एक दिलानें काळ कंठण्यास शिकलें पाहिजे. ‘ फोडा व राज्य करा ’ (Divide and rule) ह्या एकाच चाणाक्य-नीतींतील अस्सल राजकारणी तत्वावर ‘ जलचरांचें ’ कंपनी सरकार ’ व ‘ कंपनी सरकार’चें ‘हिंदुस्थान सरकार’ झालेलें राजकारणपटु ब्रिटिश गव्हर्नमेंट जर कशापुढें झुकें पडत असेल तर तें निर्भय एकीपुढें ! आणि ह्मणूनच सर्वंच हिंदुस्थानानें निश्चयाच्या बळावर जर त्याला एकमुखी व एकमती प्रत्युत्तर दिलें तरच हिंदुस्थान सरकार नाइलाजानें नमतें घेईल ! नाहीं तर.........

ही दडपशाही आजच्या दिवसास नुसती बंगालांतच – ताला माला पाहून— सुरू करण्यांत आली आहे, पण ह्या बाबतींत दुर्दैवें व आमच्या मतविषयक फाजील हट्टानें बंगाल हतवीर्य झाल्यास स्वराज्यवाद्यांचा पुरा नि:पात करून ‘ नि:प्रतिपक्षी हिंदुस्थान करण्याकरितां आरंभिलेल्या ह्या ‘ स्वातंत्र्यवादी सत्रांत’ प्रत्येक प्रतिपक्षाच्या पुढाऱ्यांची आहुती घेतली जाण्याचा प्रसंग अखिल आर्यावर्तावर—येऊन ठेपणार. आज बंगाल्यांतच रुजत घातलेल्या ह्या विषवृक्षाच्या बीजांतून अंकूर फुटून वाढीस लागणारा हा सोटेशाही वृक्ष आपल्या जगड्व्याळ फांद्यांनीशीं उद्यां इतका फैलावेल कीं त्यानें सबंध हिंदुस्थान व्यापून जाईल व मग त्या वृक्षाची वाढ आकुंचित करणें अर्थातच हाता वाहेरचें होऊन राहील. आणि शेवटीं त्या वृक्षाचीं विषारी फळें चाखण्याचा प्रसंग येतांच मागाहून पश्चात्ताप करण्याची वेळ येऊन ठेपेल; त्या पेक्षां ह्या विषवृक्षाची मुळी आजच – एका प्रांतिकांचा अनुभव घेत असतांच – छेदून टांकणें सोपें व श्रेयस्कर होईल. अखिल हिंदुस्थानाला उलथून पाडण्याकरितां ह्या दडपशाहीचीं पाळेंमुळें भुईंत जाऊन खोल रुजेपर्यंत मौजेनें वाट पाहत राहून मग लगट होतांच हवालदील होण्यापेक्षां आतांच सर्वांनीं एक होऊन तीं खणून काढून ह्या वृक्षाचा नायनाट करणें इष्ट नाहीं काय ?

आपण कोणत्याहि मताचे असा ! मवाळ असा ! जहाल असा ! सत्यशोधक असा ! प्रार्थनासमाजिष्ट असा ! ब्राह्मण्यरक्षक असा ! सुधारणावादी असा ! स्वतंत्र असा ! कोणत्याहि मताचा मार्ग आपणास पसंत असो ! सर्व मार्गांचें इष्ट ध्येय एकच ना ? उन्नतिमार्गाकडे जाण्याकरितांच तुमची सर्वांची धडपड आहे ना ! तें साध्य गाठण्याचे तुमचे प्रत्येकाचे आक्रमित मार्ग निरनिराळे असूं शकतील ! ते परस्परांपासून विरुद्ध दिशेसहि निघाले असतील ! कित्येकांस स्वदेशोन्नतीस स्वराज्याची जरूर भासत असेल ! कित्येकांस सुराज्यानेंच उन्नति शिखरावर चढणें सोपें दिसत असेल ! कित्येकांस याचक वृत्तींतच संतुष्टता वाटत असेल ! पण देशोन्नतीसाठींच आपण एवढी घटपटादि खटपट करीत आहां ना ? स्वदेशोन्नति तर तुमच्यापैकीं कोणासच नकोशी नाहीं ना ? मग ?

बंगाल सरकारनें उगारलेल्या ह्या दडपशाहीच्या सर्वग्रासी अस्त्रानें देशोन्नतीस ‘खो’ बसेल असें आपणांस वाटत नाहीं काय ? तुमच्याचकरितां कौन्सिलांत घुसून नोकरशाहीचे ‘बारा वाजविण्याकरितां’ बोलक्या देशभक्तीस फांटा देऊन पुढें सरसावलेल्या स्वराज्य पक्षाच्या सभासदांनीं अंधार कोठडीची हवा खावी, हमदिवस खडी फोडीत बसावें व तुमच्याच हिताचें चिंतन करीत झुरत जावें, असें आपणांस वाटतें काय ? हिंदुस्थानच्या जनतेचें मत स्पष्ट करून सनदशीरपणानें प्रतिपक्षास चारी मुंड्या चीत केल्याबद्दल त्यांची जेलांत रवानगी व्हावी, व ज्यांच्याकरितां त्यानीं सरकाराचा रोषहि पत्करला त्या आह्मीं त्यांस उलट गोत्यांत आणून त्यांच्याकडे पहात ‘फिदी’ ‘फिदी’ हंसावें व हें चित्र हिंदीस्थानाच्या भावी इतिहासांत रक्तवर्णांत हृदयस्पर्शी रीतीनें कोरलें जावें हें कोणासच पसंत पडणार नाहीं ! त्या चित्राकडे पाहून भावी तरुण अश्रु ढाळतील तें कोणाच्या हृदयास झोंबणार नाहीं ? स्वर्गांतून छत्रपति शिवाजी महाराज, गोखले, आगरकर, लोकमान्य आदिकरून महाराष्ट्राचे लोकोत्तर पुरुष आह्मांकडे अभिमानानें पहात आहेत. ज्यांच्याकरितां आपण सारा जन्म राबविला त्या आपल्या देशबंधूनीं मराठ्यांच्या धवल यशास कालिमा लावलेला पहातांच त्यांच्या हृदयास धक्का बसेल हें कोण जाणून नाहीं ! हें दृश्य आमच्या डोळ्यांपुढें दिसत असतां एकमेकांच्या मागील गोष्टी स्मरून कर्में वर्में काढीत बसणें अधमपणाचें होणार हेंहि आह्मीं जाणतच आहों! आपसांतील उखाळ्या पाखाळ्या वर काढून त्यांवर वाष्कळ वादविवाद करीत बसणें ह्या वेळीं अप्रस्तुत आहे.

आजची परिस्थिति अशी आहे कीं, ह्यावेळीं विसरा व क्षमा करा [forget and forgive] ह्या तत्वाचा पुरस्कार करून संकटांत सापडलेल्या स्वराज्य पक्षाला सप्रेम मदत करून आज स्वराज्य पक्षावर उगारलेला पण उद्यां सर्व प्रगमनशील व प्रतिपक्षाच्या धोरणास बाध आणणाऱ्या पक्षांवर उगारला जाणारा दडपशाहीचा लिटनशाही टोला परतवून लावणें व आत्मिक बलाबरोबर झुंज खेळण्याचा प्रसंग पाशवी शक्तीस आल्यास त्यांत निश्चयेंकरून होणारा पाशवी शक्तीचा पराजय जगाच्या निदर्शनास आणून देणें हें प्रत्येक पक्षाच्या लोकांचें आद्यकर्तव्य आहे ! मात्र एकीच्या भरजोर बळावर आह्मां महाराष्ट्रीयांकडून बंगालीयांकडूनहि दडपशाहीच्या प्रतिकारार्थ आचरणांत आणले जाणारे सर्व मार्ग अनत्याचारी असहकारिते वरूनच आंखून घेतले गेले पाहिजेत ! अत्याचारांचा त्या प्रतिक्रियादर्शक प्रयत्नांस मागमूसहि लागतां कामा नये ! सरकार तर आतां उघड उघडपणें धरपकडीचा मार्ग स्वीकारीत आहे; अशा तऱ्हेनें चारीहि बाजूनीं झपाट्यांत सांपडलेल्या आह्मांला जर ह्यांतून सुटावयाचें असेल तर आपसांतील तंटेबखेडे सध्यां सोडून देऊन एकजुटीनें सरकारच्या ह्या दडपशाही धोरणाचा प्रतिकार केला पाहिजे.

उदयोन्मुख महाराष्ट्रीयांनो ! ज्या परिस्थितीची महात्माजी औत्सुक्यानें वाट पहात होते ती परिस्थिति आली. स्वदेशास्तव मरणें हेंच शिवबांच्या मराठ्यांचें ब्रीद ! वेळ आली, संभाळा वरें !

स्फुट विचार

बेळगांवची राष्ट्रीय सभा: — येत्या डिसेंबर महिन्याच्या चौथ्या आठवड्यांत इंडियन नेशनल कॉंग्रेसची ३८ वी बैठक बेळगांवास भरविण्याचें मुक्रर झालें असून तद्विषयक जय्यत तयारी मोठ्या जोरांत चालली आहे. राष्ट्रीय सभेच्या खास बैठकीखातर एक खादी . मंदिर उभारण्याचें काम जारीनें चालू झालें असून उतारूंच्या सोयीसाठीं सदर्न मराठा रेल्वेहि कॉंग्रेसच्या कँपाजवळच एक तात्पुरतें स्टेशन बांधण्याच्या तयारींत आहे. राष्ट्रीय सभेचें काम जास्त सुलभ रीतीनें चालावें ह्मणून कॉंग्रेसचे स्वागताध्यक्ष कर्नाटकीय केसरी दे. गंगाधरराव देशपांडे हे सध्या जातीनें तेथें हजर असून आपल्या देखरेखेखालीं सर्व कामें निर्विघ्नपणें पार पाडीत आहेत. उदयोन्मुख गोमांतकीयांस ही राष्ट्रीय सभेची बैठक शेजारीच वाटत असल्यानें तेहि राष्ट्रीय सभेस पाठवावयाच्या प्रतिनिधींची निवडणूक करण्यांत दंग होऊन गेले आहेत. पण यंदांच्या राष्ट्रीय सभेची अपूर्वाई एवढ्यांतच सांठवलेली नसून तीजविषयीं कुतुहलपूर्ण नाविन्य दाखविणारीं कारणें याहूनहि फार निराळीं आहेत. ह्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान महात्माजी सारख्या तपोभास्कर व त्यागी पुरुषाकडून मंडित होणार असून हिंदुस्थानांतील सर्व पंथांच्या व पक्षांच्या लोकप्रतिनिधींचाहि समावेश होणार असून ऑल इंडियन नशनल कॉंग्रेस हें नांव सार्थ करण्यांत येणार आहे. बंगाल सरकारकडून चांगलाच चोप बसल्यानें स्वराज्यपक्ष आतां नरमाईस आला असून यंदांची कॉंग्रेस यशस्वी व्हावी ह्मणून त्या पक्षाचे अध्वर्यु श्री. दास बाबूनीं स्वपक्षाच्या कार्यक्रमांत योग्य व शक्य ते फेरबदल करण्यास स्वराज्यपक्ष तयार असल्याचें नुकतेंच जाहीर केलें आहे.

ऐक्य होईल:— ह्यावरून अहमदाबादेंत केल्याप्रमाणें बेळगांवांसहि अश्रु ढाळण्याचा प्रसंग महात्माजींवर येणार नाहीं ह्या बद्दल खात्री बाळगण्यास बराच आधार मिळतो. स्वतः महात्मा गांधीहि अखिल हिंदुस्थानची एकच मागणी तयार व्हावी ह्मणून आपल्या बहिष्कार चतुष्टयांतील कापड बहिष्कारा शिवाय बाकीच्या तीनहि बहिष्कारांचें अवलंबन तात्पुरतें आंखडून धरण्यास तयार असून परदेशांतून धुडकावून लावल्यानें गलितवीर्य बनलेला बिझंट पक्षहि आपखुषीनें ह्या अधिवेशनास हजर राहणार आहे. बिझंट बाईस महात्माजींच्या मार्गाची खात्री पटून तीहि दिवसांतून अर्धा तास सूत नियमानें काढीत असलेली पाहून लज्जेने खालीं मान घालणारे ‘ कट्टर स्वराजिष्ट ’ त्या बाबतींत तडजोड सुचविण्यास आज तयार झाले असून महात्माजींचीं तत्वें साधारणत: पटत चालल्यानें श्री. मालवीयांचा स्वतंत्र पक्षहि ह्या सभेंत आनंदानें व आपखुषीनें भाग घेणार आहे. तीन वर्षें ‘ बोला-

यंदांचें लक्ष्मी पूजन

उद्योगिनं सिंह मुपैति लक्ष्मी
दैंवेत देयमिति का पुरुषा वदन्ति
॥ पंचतंत्रम् ॥

यंदां सालाबादापेक्षां बरेच अधिक लक्ष्मीं पूजनाचे उत्साह गोवा प्रांतांत निरनिराळया ठिकाणीं साजरे करण्यांत आले. विशेषत: अष्टग्रहार प्रांतांत तर ते अधिकच करण्यांत आले हें एक समाधान मानण्याजोगें कृत्य घडून आलेलें आहे.

हिंदी व्यापारी जगांत आपापल्या दुकानावर व पेढ्यांवर लक्ष्मीपूजन करण्याची वहिवाट पडून गेलेली आहेच. आणि त्यांत विशेष संतोष प्रगट करण्याचें कारणहि नाही. पण सार्वजनिक रीत्या असले उत्साह होणें यांत विशेष अर्थ असतो. स्वार्थ हा प्रत्येक मनुष्याला असतो. तदनुसार एकेकट्यानें किंवा विशिष्ठ समुदायानें हें पूजन करणें हें ठीकच असतें; परंतु असले उत्साह होणें सार्वजनिक रीत्या होतात तेथील जनतेमधील स्वार्थपरायणता अधिक विरल झालेली असते असें हाणण्यास कांहीं प्रत्यवाय आहे, असें वाटत नाहीं.

लक्ष्मीपूजन हें कोणत्याहि हेतूनें अस्तित्वांत आलेलें असलें तरी आजच्या परिस्थितींत हे उत्साह होतील तितके कमीच आहेत. आज जरी नुसत्या मृणय मूर्तींचें पूजन होत असलें तरीं कालांतरानें त्याचें पर्यवसान प्रत्यक्ष लक्ष्मीपूजनांत होणार नाहीं, असें कशावरून हाणावें ? बुद्धि, विचार व आचार या त्रयींचा एकमेकाशीं इतका निकटेतचा संबंध असतो कीं, बुद्धीप्रमाणें विचार येतात व विचाराप्रमाणें हातून कामें होत असतात. सार्वजानिक रीत्या हा उत्सव साजरा करण्यांत, एकी, संघ याचें महत्व आपणास दिसून येतें; आणि हा उत्सव साजरा करण्याच्या इच्छेनें आपली लक्ष्मी–संपत्ति–नाहींसी होऊन, निकृष्टावस्थेच्या जाळ्यांत कसे सांपडलों आहोंत ही जाणीव प्रादुर्भूत होत असते.

एकदां असा काल येऊन गेला कीं त्या वेळीं संपत्तींत सुख नाहीं, किंबहुना ऐश्वर्य हें दुःखाचें मूळ आहे असें वाटून भारत निवासी लोक लक्ष्मीविषयीं अनुत्सूक राहिले.

मानवी इतिकर्तव्य हाणजे अंःतकरणाला शांति, सुख किंवा धार्मिक भाषेंत हाणायाचे तर मोक्ष हें असलें तथापि अखिल जग लक्ष्मीचे उपासक बनलेलें असल्यामुळें हिची कृपादृष्टी ज्याच्यावर नाहीं त्याचे सर्व ऐहिक व्यवहार सुरळीत चालत नाहींत. जगांतील इतर राष्ट्राच्या बरोबरीनें आपलें स्वत्व न विसरतां ऐहिक कर्म करावयाचें असेल, जगांतील इतर लोकाच्या बरोबरीनें चालून आपलें कर्तव्य करावयाचें असेल तर लक्ष्मी सेवेचें व्रतच अगोदर सर्वांनीं यथासांग पार पाडण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. लक्ष्यांत बाळगिलें पाहिजे कीं, ज्या काळीं लक्ष्मी सरस्वतीस मान वाकवीत होती तो काल जाऊन सरस्वतीच लक्ष्मीची सेविका बनली आहे. लक्ष्मी पुत्रांचेंच आज चलती असून सरस्वतीसेवक दारोदार फिरत असतात. ज्ञानापेक्षां संपत्तीचें महत्व आज तरी अधिक आहे. 'नहि ज्ञानेन सदृशं पवित्र मीह विद्यते' असें तोंडानें मात्र हाणतात पण 'सर्वे गुणाः कांचन माश्रयंती' या वाक्याचा जप अंतःकरणपूर्वक सदासर्वकाळ करीत असतें. आजचें जग हें असें आहे. न्यायकोर्टांत एखादा आपला अर्ज न्यायाधीशाला सादर करावयाचा असला हाणजे त्याला जशी वेलीफाची पांग धरावी लागते तद्वत लक्ष्मीची–संपत्तीची नजर आपणकडे खेंचून घेणयपूर्वीच सरस्वतीचा विद्येच्या ज्ञानाचा उपयोग होत असतो. आज जग विद्येचें महत्व गात असलें तरी त्याचें कारण हेंच, असें जगांतील घडामोडीवरून दिसून येतें. संपत्ति ही मुख्य असून विद्या हें उपांग आहे. लक्ष्मी हें साध्य बनून सरस्वती हें साधन बनलें आहे. तेव्हां लक्ष्मीची आराधना करतांना तिच्याकडे जाण्याला मध्यें सरस्वतीचा पहारा असतो. तिला प्रसन्न केल्यावांचून लक्ष्मीची प्राप्ती होणें शक्य नाहीं. हें आज स्पष्ट दिसून आल्याखेरीज रहात नाहीं.

आमच्या गोवा प्रांतांत लक्ष्मीचें अधिष्ठान नाहीं असे नाहीं. परंतु तिच्या भोंवतीं सरस्वतीचा पहारा असल्यामुळें, विद्या, ज्ञान संपादन केल्याशिवाय तिच्यावर नजर पडणें मुश्कील आहे. इतका जरी यंदाचे लक्ष्मीपूजनावरून गोमांतकीयांनीं बोध घेऊन त्या दिशेनें प्रयत्न करण्याचा निश्चय करून सुरवात केली तरच हा उत्सव यथासांग पार पाडल्याचें श्रेय मिळणार आहे. उद्यमेन हि सिध्यंति कार्याणि न मनोरथैः । न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशान्ति मुखे मृगाः ।

मुक्तेशचंद्र

वर्तमानसार

—'मालवणच्या लोकमान्य शिक्षण संस्थेला निधि जमविण्यासाठीं फिरणारे प्रचारक श्री. कमलाकांत गोविंद व त्यांचे स्नेही श्री. गंगाधर कृष्णाजी राऊत सह संपादक रामकृष्ण निकेतन मालवण ह्यांना वरील संस्थेसाठीं ह्मापशें व पेडणें मुक्कामीं अनुक्रमें २३ व २९ रुपयांची वर्गणी तेथील सद्गृहस्थांकडून मिळाली. व त्यांत श्रीमंत रावराजे व्हॅायकॅाउंट ऑफ पेडणें आत्माराम वासुदेव प्रभू देसाई देशप्रभू ह्यांनीं उदार हस्तानें १० रुपयांची देणगी देऊन संस्थेस ऋणी केलें आहे, असें एक गृहस्थ कळवितात.

—सांवर्डे (कुडचडें) येथील श्री महादेवाच्या देवालयांत गेल्या रविवार ता. ९-११-२४ पासून भजनी सप्ताह चालू असून येत्या रविवारीं १६-११-२४ रोजीं समाप्ति होणार आहे. तरी मेहरबानी करून एकंदर भजन प्रेमी मंडळीनें येऊन आह्मांस आभारांत ठेवावें, अशी समस्त रहिवाशी, कुडचडें हे विनंति करितात.

—स्वराज्य पक्षाच्या कार्यकारी मंडळाची सभा ता. ४ रोजीं कलकत्ता येथें भरलेली होती. सभेस महात्माजीहि हजर होते. ह्या सभेची चर्चाविषयक वातमी जरी सर्वस्वीं गुप्त राखण्यांत आली असली तरी, ह्या सभेंत 'सर्व पक्षांनीं महात्माजींच्या पुढारीत्वाखालीं काम करण्याचें घाटून बेळगांवच्या राष्ट्रीय सभेस सर्वमान्य असा एक कार्यक्रम ठरत असल्याची वातमी आहे.' त्याविषयीं एक 'संयुक्तपत्रक' लवकरच प्रसिद्ध करण्यांत येणार आहे.

—बेळगांवास भरणाऱ्या खिलाफत परिषदेचें अध्यक्षस्थान डॅा० किश्लु यांस अर्पण करण्यांत आलें आहे.

—ह्या महिन्याच्या १ ल्या तारखेस मलबार येथें भयंकर वादळ उपस्थित होऊन वीज पडल्यानें कित्येक माणसांचा संहार झाला.

—अमेरिकेंतील टेक्सेसच्या गव्हर्नरच्या जागेवर मिसेस फर्ग्युसन ह्या एका स्त्रीची नेमणूक झाली. 'स्त्रीयांचें राज्य'!

—येथील जज्जांची प्रोकुरादोर जेरालचे जागीं तात्पुरती नेमणूक होणार असून, प्रोकुरादोर जेरालची तात्पुरती नेमणूक गव्हर्नरचे जागीं होईल असें ह्मणतात.

साभार स्वीकार

पुढारी:— हें एक नवीन साप्ताहिक शांताराम सां. मिरजकर ह्यांच्या अधिकारी संपादकत्वाखालीं ह्या महिन्याच्या २ तारखेपासून निघूं लागलें असून त्याचा प्रथमांक आह्मांकडे भेटीस आला आहे. सारासार विचारशक्तीच्या ताजव्यांतून सद्यःस्थिति तोलून पाहून 'उत्कट भव्य तेंचि घ्यावें । मळमळीत अवघेंचि टांकावें । निस्पृहपणें विख्यात व्हावें । भूमंडळीं ॥' या समर्थांच्या बहुमोल शिकवणीस अनुसरून आजच्या पुढाऱ्यांचे कर्तव्य आंखून देतांना दाखविलेलें निर्भिडत्व असेंच 'व्यक्तिद्वेषाची बाधा न होतां, कायमचें टिकेल तर हा 'पुढारी' अल्पावधींत बराच पुढारून निघेल असें अनुमान निघतें. 'गडबड गुंडाची घाबरगुंड, उडविण्यांत ह्या पत्रकारानें दाखविलेलें लेखन कौशल्य बरें आहे. वा. व. ३ रु. १२ आणे वाजवी आहे. पत्ता:— २२७ न्यु फोरास रोड, मुंबई नं. ७.

वैनतेय:— ह्या नांवाचें एक नवरुचिर साप्ताहिक मे. द. शिरोडकर ह्यांस संपादक पदावर राखून प्रसिद्ध होऊं लागलें असून त्याचे दोन अंक आमच्या भेटीस आले आहेत. सांवतवाडी संस्थानचें असें आजच्या सुधारकी काळांत एकहि वृत्तपत्र नसल्यानें अशा एखाद्या नियतकालिकाची फारच उणीव भासत होती. ती उणीव यथाशक्ति भरून काढण्याचा प्रयत्न वैनतेयाकडून होणार असून 'व्यक्तिविषयक कुचेष्टेची काकदृष्टी, उदरंभरणास्तव बक ध्यान, डाळींबाच्या दाण्यास्तव होणारी पोपटपंची' ह्यां पासून सर्वथैव अलिप्त रहाणें, हेंच त्याचें हृद्गतांत ध्येय ठरवण्यांत आलें आहे. संपादक होतकरु तरुण असल्यानें नुसतें वाचिवीरत्व न दाखवितां वैनतेय भरारीच्या भरांत कुठच्या कुठेंच वहकून जाण्याच्या भरीस पडणार नाहीं, असें अनुमान काढण्यास बरीच जागा आहे इष्ट मार्गानें स्वसमाजाची सर्वांगीण सुधारणा करण्याचें 'वैनतेयाचें' साध्य सनदशीर साधनांनीं साधून जावो असें आह्मीं इच्छितों. वा. वं. ट. हं. सह ३ रु. पत्ता— 'वैनतेय' ऑफिस, सांवतवाडी.

O *Bharat*, ano 9 ° n ° 33
de 13 de Novembro de 1924
Anuncios cada linha uma tanga, aínda que repetida
Numero avulso 1 tanga.

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do primeiro oficio Redcar, vão ser vendidos, em hasta publica á porta do Tribunal judicial desta comarca no dia 28 dó corrente pelas 10 horas, pela preço da sua avaliação, os seguintes bens: Predio rustico denominado Aforamento vulgarmente conhecido como Vadolagali, da cultura de árroz discrito na conservatoria desta comarca sob o n ° 12909 a fl 83 do livro B. 36 avaliado por duzentas rupias e predio donominado Aforamento vulgarmente conhecido como Gala, tambem da cultura de arroz, discrito na conservatoria sob o n ° 12910 a fl 83 v. do livro B. 36 avaliado por duzentas rupias, ambos situados em Parodá. Estes predios foram penhorados na execução hipotecaria que Luis Carvalho de Ambaulim, promove contra Conceição Oliveira, viuva de Miguel Carvalho de Quepem. Quem os quizer comprar compareça nos indicados dia, horas e local, correndo por conta do arrematante as despesas da praça e a contribuição de registo por inteiro. Por este são citados todos os credores incertos da dita executada nos termos e para os efeitos da lei E para ser publico se espediu este.

Quepem 4 de novembro de 1924.

O escrivão de Direito do 1 ° oficio.

Babá V. Camotim Rédcar

Verifiquei a exactidão
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

SOCIEDADE PATRIOTICA DOS BALDIOS DAS NOVAS CONQTISTAS.

Em Sanvordem (Curchorem) no hotel do sr. Crispino Dautas, se procederá no domingo 30 do corrente pelas 11. horas á venda do bate desta Sociedade e da lenha do desbaste dos compos em Colem. As condiçóes e outras informaçóes, presta o abaixo assinado em Pangim e o administrador dos Campos em Sanguem.

Nova-Goa, 11 de novembro de 1924.

O secretario da Direcção
Francisco Sales d'Abreu

Ano 9 N.º 36

Q a 4 de Dezembro de 1924

SSINATURA
da ano tres rupias

IUNCIOS
por cad a que repetida uma tanga
ulso uma tanga

E EDITOR
G. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत

BHARAT

वर्ष ९ वें. अंक ३६

गुरुवार ता. ४ डिसेंबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें-गोवा

A NOSSA ATITUDE

A sra. Politica é, segundo a filosofia hindú, uma verdadeira bailadeira, uma autentica prostituta de quem se espera toda a casta de *surpresas*. E' esta a sua principal se não única caracteristica, o seu *especial* distinctivo.

Não admira, portanto, que em se tratando de eleições, ligadas áquela sra. pelos indissoluveis laços de consanguenidade, surjam por aí novidades em tropel, pondo tudo numa agitação tremenda.

E' o que, justamente, sucedeu com a eleição a ser realisada no domingo proximo dos vogais efectivo e suplente do C. Legislativo pelas Novas Conquistas, cargos para que se apresentaram varias listas, tendo cada uma seus defensores incançaveis e incondicionais.

Bem longe estava o *Bharat* de prever o desenrolar dum tão cumplicado fenomeno politico eleiçoeiro, quando se apressou a apresentar ás urnas os nomes dos srs. Bandorcar, Borcar e Dessai, pelas Novas Conquistas, maiores contribuintes e procuradores das Comunidades respectivamente, sobretudo, porque a mesma apresentação fôra feita, depois que o *Pragatica Sanga* e o *Partido Popular* do concelho tinham acabado de, nas suas reuniões realisadas para difinição de suas atitudes nas eleições resolverem a não apresentação dos seus candidatos privativos, — associações politicas com as quais simpatisamos, ainda que não sejamos orgão nem duma nem doutra.

Desejavamos que tivessem assento no Legislativo os conselheiros indicados na nossa edição de 20 do mez findo; mas pelo que se vê, não há maneira de se conseguir isto, não só porque o sr. Borcar não pretende entrar no Concelho mas tambem, porque tanto o sr. Sacarama Dessai como o sr. Bandorcar disputam o mesmo cargo de representante das Novas Conquistas.

Os factos politicos, posteriores á apresentação por nós feita modificaram, como se vê, profundamente, o estado das coisas politicas, modificação a que necessariamente, dentro da coerencia e bons principios, tivemos de moldar-nos a atitude a assumir na proxima eleição do vogal pelas Novas Conquistas. E fizemo-lo, resolvendo assumir uma atitude completamente passiva no acto eleitoral do proximo domingo, não vá a nossa intervenção nêle críar malentendidos que prejudiquem a disciplina e integridade partidarias, que colocamos acima de todas as conveniencias pessoais.

Sim. Sacrificamo-nos a opinião em holocausto do *Pragatica Sanga* e *Partido Popular*. E, sobretudo, porque tanto o candidato, recomendado por estas associações politicas como o candidato independente sr. Bandorcar nos merecem igual estima.

O *Bharat* conservar-se-há, neutro na eleição do vogal das Novas Conquistas, deixando, porem, campo livre a todos os seus amigos que podem votar em quem lhes fôr do agrado e assumir atitudes que entenderem.

A nossa atitude jornalistica nas proximas eleições é, pois, absolutamente neutra, indiferente e passiva.

ECOS & CRITICA

UMA NOVA...

Na ve'spera da festa de S. Francisco Xavier correu na capital de Goa a nova de que o sr. Messias Gomes recebera um telegrama de Alves — capitao Costa Alves? — dizendo que esta' assente a nomeagao do sr. Joao Camoezas para a Governo da India.

E' uma nova bem velha. A nova que continua, ainda, sendo *nova* apesar de ter decorrido um periodo suficiente de tempo, e a que diz respeito a' "continuagao" do sr. dr. Jaime de Morais no mesmo Governo, depois de se provar a ilegitimidade das tais "instrugoes" do sr. Bulhao Pato.

Deslocou se o "instrutor"; mas o "instruido" esta' no seu lugar, consolidado pelas "instrugoes" do mesmo instrutor...

A NOSSA OPINIAO

Alguem que nos merece consideragao deseja saber o que pensamos sobre o banquete de 12 de Novembro. A nossa opiniao e' a mesma do pais, porquanto, em volta do banquete — caso raro — so'mente houve uma e unica opiniao:— de que o banquete resultara num tremendo desastre para o prestigio do sr. dr. Jaime de Morais como governador e dos seus aulicos e turibularios que fartam-se de louvar a acgao administrativa de s. exia. —tal vez porque a mesma lhes tem garantido a fartura.

Efectivamente o banquete, apesar de pressao de cima: — a dos chefes do servigo, e a pressao dos lados: — a dos amigos de s. excia. apenas logrou atrair 127 adesoes, sendo destes 100 funcionarios publicos e os restantes 27 pertencendo a' classe dos tais que nao podem, por forga da sua situagao especial, apesar do modo diferente do que pensa o Governo. Ha' quem diga que a inscrigao nao foi publica, alia's ... alia's seria o fiasco mais confrangedor, creiam. Nao ha' retorica que salve o sr. dr. Jaime de Morais da confusao, ruina e descalabro em que deixa a India.

KOLOSSAL !

A calcular pelo que certos periodicos comegaram a propinar aos seus ingenuos leitores sobre as proximas festas de Vasco da Gama, e' de esperar que a homenagem ao grande portuguez venha a ser uma manifestagao publica KOLOSSAL .... so' no papel.

Anunciam se festas nos pagodes Ha' quem consinta *admisso ao publico* nas conferencias que o professorado e' convidado a fazer nas escolas primarias do pais acerca de obras e feitos do Argonauta. E ... assim para diante. Quando as classes dirigentes vivem de semelhantes expedientes, de astucia e de burla, nao sabemos se ha direito de exigir e esperar a fe' no que quer que seja por parte do povo.

Nao ha' duvida, isto vai afundar e sem dignidade—miseravelmente.

FESTA DE RENOVAGAO...

O *Diario da Noite* lamentando a ausencia de brilho com que decorreu este ano o aniversario de reconquista de Goa, que bem se pode classificar de uma festa de renovagao da nossa sugeigao ao dominio de Portugal, verbera a atitude do Governo, alto funcionalismo etc. que foi nesta data, de um significativo ou vergonhoso indiferentismo para nao dizermos coisa pior.

Que o povo se alheiasse da festa pouco seria de espantar, pois que os tempos nao sao proprios para os *dominios*! Mas o funcionalismo, o alto e o baixo. o governo!...isso convida nos a' meditagao. Que sinal *sera'* este ? O *Diario* lembra o patriotismo e muitas coisas assim excelentes. Tolice, presado colega. Proponha uma gratificagao aos funcionarios que assistirem a' festa de 25 de Novembro, e ... mande alargar a Se' Patriarcal. E veja o resultado. Talvez seja preciso um barracao mais! ...

DIZ-SE...

Que o sr. Antonio de Noronha Rodrigues, aluno da 7a classe (Letras) do Liceu Central e vogal da comissao magna vai fazer conferencias, desde o 1º do corrente, a proposito dos centenarios de Camoes e Vasco da Gama nas escolas primarias da Capital.

N. da Redacgao: Esta informagao obriga-nos a bordar uns ligeiros comentarios, tomando no's a liberdade de formular estas inocentes preguntas:

¿Que autoridade tem o sr. Noronha Rodrigues para fazer conferencias em escolas oficiais primarias, onde de resto existem professores competen-

ao mundo Sublimes palavras aquelas! de Deus, Sim, nao podia ser dada

ज्या मुलाशीं लॉर्ड लिटन साहेबांची सूडाची सैतानी भावना दडी देऊन बसल्याचा आतां कित्येक पुढारी लोकांस खात्रीलायक संशय येत असून त्यांत सत्यांशाचा बराच भाग असल्याचें कोणासहि अल्पविचारांअंतीं कळून येण्याजोगें आहे. उपरिनिर्दिष्ट गोष्ट जरी खरी नसली तर आरोपित इसमांची चौकशी न्याय सभेच्या भर चव्हाट्यांत करण्याचें सोडून देऊन तिथां न्यायनिपूण (?) कमिशनरांच्या खासगी चौकशीच्या बुरख्या आड अंग चोरून बसण्याचें बंगाल सरकारास कोणतें कारण होतें व आहे हें समजत नाहीं. धारवाडी कांट्यानें तोलल्या जाणाऱ्या इंग्रज सरकारच्या न्यायाला जाहीर न्याय कचेरींत वेगळें व खासगी न्यायसभेंत वेगळें स्वरूप दिलें जाण्याचें महापाप हें नीतिविशारद ब्रिटिश सरकार युद्दाम होऊन केव्हांच डोक्यावर लादून घेणार नाहीं हें कोण जाणत नाहीं? पण ज्या अर्थी बंगाल सरकारनें आपण होऊन हा नवीन घाट घातला आहे त्या अर्थी त्यास जाहीर न्याय देणाऱ्या कोर्टांत व ह्या खासगी न्यायसभेंत कांहीं तरी भेद वाटत आहे हें निर्विवाद आहे. लॉ. लिटन साहेबानां भेदरून सोडणारा हा भेद तीन प्रकारचा असू शकेल. १ जाहीर न्यायदान करणाऱ्या कोर्टांची न्याय करण्यांत कांहीं तरी चूक होत असते हा एक. २ न्याय कचेरींत दिला जाणारा निकाल सरकारच्या कदाचित् विरुद्ध होईल हा दुसरा व ३ खासगी ह्मणून करविल्या जाणाऱ्या न्यायाचें न्यायसभेचें पारडें जनसमुहाच्या दृष्टिआड असल्यानें आपणास हवें तेव्हां आपल्या बाजूस जड करतां येण्यासारखें आहे हा तिसरा.

ह्यांतील पहिल्या भेदास भिऊन बंगाल-सरकारनें ह्या १८१८ च्या तिसऱ्या रेग्युलेशन ॲक्टच्या बाबतींत जाहीर न्यायकोर्टांची फारकत करून घेतली असेल हें संभवत नाहीं कारण न्यायकोर्टांच्या जाहीर न्यायदानांत सरकारास जर कांहीं चूक आढळून येत असेल तर त्यांतून अजिबात शक्य तो लवकर काढून टाकणें वाजवी असते; नाहीं तर त्याच कोर्टांकडून न्यायाचा फायदा दिल्या गेलेल्या इतर अपराध्यांस– त्यांतील कांहीं बिनअपराधीहि असू शकतील – खोटा न्याय देवविल्याचें सरकारच्या माथीं येऊन बसेल. तेव्हां हा पहिला भेद अप्रस्तुत ह्मणून सोडून दिला पाहिजे. दुसरा व तिसरा फरक लक्ष्यांत घेतां कोणाहि समतोलवृत्तीच्या मनुष्यास असें आढळून येईल कीं, ज्या अर्थी निःपक्षपाती न्याय देण्याकरितां ब्रिटिश सरकारनें स्थापन केलेल्या कोर्टांकडून दोन्ही बाजूंकडील पुराव्याची ज्यूरीच्या प्रगतीनें सूक्ष्म व न्याय दृष्टीनें वाटाघाट करून दिला जाणारा निकाल आपणास खो घालील असा संशय बंगाल सरकारास येत आहे त्या अर्थी कायदा सरकारच्या बाजूनें मांडण्यास तयार असला तरी न्याय व न्यायांतर्गत सत्य त्याच्या विरुद्ध बाजूस असल्याची लिटन साहेबास पुरी जाणीव आहे; तिसऱ्या भेदानें तर न्यायाची विटंबना करून इतरांवर कडीच होणार आहे. इतिहासाची आवृत्ति वरचेवर होत असते असें ह्मणतात व ह्या गोष्टीनें त्याचें प्रत्यंतरहि पटतें. चारशें वर्षांपूर्वी जी गोष्ट खुद्द इंग्लंडांत घडली तीचीच ही हिंदुस्थानांत पुनरावृत्ति होत जाते. ह्या सर्व गोष्टींचा विचार करतांच नवल विशेष तें इतकेंच कीं आज बंगाल सरकार अधरपक्षानें प्रजेबरोबर हटवाद खेळत आहे. सूर्यप्रकाशाइतकी सत्य दिसणारी ही गोष्ट क्षणभर बाजूलाच ठेवून आपण दुसऱ्या गोष्टीकडे वळूं. ज्या क्रांतिकारकांचें नांव पुढें करून बंगाल सरकारनें ही सोटेशाही सुरू केली आहे त्या लोकांना क्रांतीची आवश्यकता कां भासली ह्याचा हिंदुस्थान सरकारनें थोडातरी विचार केला आहे काय ? इंग्रज सरकारच्या राज्यांत काठीला सोनें बांधून काशीपासून रामेश्वरपर्यंत एकटें जावें अशी आमच्या पूर्वजांची समजूत होती. पण आतां क्षुधाव्यथेनें पोट पाठीस मिळालें असतांना त्याचें प्रत्यंतर पहाण्यास काठीस बांधण्यासाठीं सोनें हुडून आणावें. १९१८।१९ सालीं दयाळु सरकारच्या कृपाकटाक्षानें ज्या क्रांतिकारकांची तुरुंगांतून सुटका झाली त्यांनीं आपल्या उदरंभरणाचे इतर धंदे सोडून देऊन क्रांतिकारक कट उभारून आपला जीव धोक्यांत कां घालावा? 'कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें' ह्या ह्मणीची साक्ष पटविण्याकरितांच कीं काय एकदां अंधार कोठडीची ह्या क्रांतिकारकानां हवा दाखवून त्यांच्या कार्यावर कुठार प्रहार केला असतांहि पुन्हां तुरुंगांतून सुटतांच इतकी जोराची चळवळ करावी कीं त्यामुळें सरकारास सारें पिनलकोड, क्रिमिनल प्रोसेजर कोड, लॉ अँमेंडमेंट ॲक्ट धुंडाळून टाकून शेवटीं कुंपणी सरकारच्या १०० वर्षामागील कायद्याकडे धांव घ्यावी लागली व ज्याचा उपयोग १९२१ सालांतील आणिबाणीच्या वेळीहि सरकारास करणें प्रशस्त वाटलें नाहीं त्या निर्वाणीच्या ब्रह्मास्त्राचा उपयोग करणें भाग पडावें ह्याचा अर्थ काय ? महायुद्धांत ज्यांनीं आपला जीव व देह इंग्रजांखातर राबविला व ब्रिटिश सरकारास कल्पनेच्याहि बाहेर साह्य करून स्वतःस त्यावेळच्या लोकाग्रणींकडून देशद्रोही ह्मणवून घेतलें ते महात्मा गांधी इंग्रज सरकारच्या राज्यपद्धतीवर आज उलटण्याचें कारण काय ? दोन वर्षांपूर्वी हिंदमातेनें क्रि. प्रो. कोडास जे आपले ३० हजार लाडके पुत्र बळी दिले व स्वातंत्र्याच्या लढ्यास धैर्यानें तोंड देऊन सरकारास pro. tect me Christe करून सोडलें त्याचा अर्थ काय ? पंडित नेहरू सारख्या समंजस व सहनशील गृहस्थालाहि भर कौन्सिलांत नोकरशाहीस 'शुद्धीवर न याल तर कटाच्या भोंवऱ्यांत गोते खाल' ही सूचना देणें भाग पडावें व परवांच्या समेट परिषदेंत 'सरकारचा कारभार असाच चालू राहिल्यास मीहि बंड करीन, ह्या सारखा हृदयभेदक व भयसूचक उद्गार त्यांच्या तोंडून निघावे ह्याचा अर्थ काय ? मुंबईच्या सर्व पक्षीय ऐक्य परिषदेंत जो सरकारच्या दंडुकशाहीचा एक दिलानें व एकमतानें जाहीर निषेध केला त्याचा उद्देश काय ?

ह्या सर्वांचा अर्थ एकच कीं इंग्रजसरकारच्या सध्याच्या सदोष न्यायपद्धतीविरूद्ध आंखिल हिंदुस्थानांतील जनतेचीं मतें खवळून गेलीं असून सरकारच्या कल्पनेनें बंगालांत अवतरलेले क्रांतिकारकांचे कट ही त्याचेंच प्रत्यंतर होय.! लॉर्ड कर्झन साहेबानीं केलेला बंगभंग, सरकारनें केलेला वचनभंग, डायर साहेबानीं नाहक ४०० हिंदी प्रजेचे घेतलेले प्राण, खिलाफतीची केली गेलेली खिराफत, धारवाडांतील गोळीबार, ह्यांसारख्या हिंदुस्थानांतील प्रजेला अपमानास्पद अशा घडलेल्या इतर कित्येक गोष्टी कोणा देशाभिमान्याच्या मनांत क्षोभ उत्पन्न करणार नाहींत ! हिंदी स्त्रियांच्या पातिव्रत्याविषयीं लिटन साहेबानीं काढलेले अत्यंत किळसवाणे उद्गार ऐकून कोणाहि हिंदी क्षात्रियाच्या शिरानशिरा तडाडणार नाहींत ? कोणा आर्य तरुणाचें रक्त उसळी खाणार नाहीं ? हिंदी लोक नामर्द नाहींत हें नोकरशाही जाणत नाहीं काय ?

तसें तात्विक दृष्टीनें पाहूं गेल्यास आज अखिल आर्यावर्त अराजक बनून गेलें आहे. कारण ब्रिटिश सरकारनें अराजकतेची केलेली व्याख्याच तितकी व्यापक आहे. मग सर्व भारतवर्षास अराजक (सरकारच्या दृष्टीनें) ठरवून सोडणाऱ्या ह्या द्विदल राज्यकारभारास व सदोष न्यायपद्धतीस फांटा देऊन अराजकतेचें 'बी'च मोडून टाकण्याचें सात्विक श्रेय न घेतां सरकार आपल्या अरेरावीचें पाणी ओतून हा जो अराजकतेचा वृक्ष नकळत फोंफावून सोडीत आहे तो वृक्ष त्याची एखादी खांदी तोडली ह्मणून मरून जाईल असें नोकरशाहीस वाटत असल्यास तो तिचा मूर्खपणा होय !

ब्रिटिश सरकारच्या राज्यकारभारांत होत असलेल्या ह्या चुकीवर आह्मीं जो धोक्याचा बावटा रोवला आहे त्या विषयीं आमच्या पोर्तुगीज सरकारनें सावध राहून आपलें कारभाराचें तारूं ह्या कठड्या खडपास आपटूं न द्यावें अशी आमची त्यास आग्रहाची सूचना आहे.

—पणजी येथील 'बाल वाचन मंदिरा'च्या व्याख्यान माळेचा रिपोर्ट येत्या अंकांत प्रसिद्ध व्हावयास लागल.

—पणजीच्या "बाल–वाचन–मंदिरा"चा कारभार चालविण्यासाठीं नवीन व्यवस्थापक मंडळ निवडण्यांत आलें असून त्यांत सदाशिव मं. सरदेसाई, अध्यक्ष, शांताराम के. कामत, उपाध्यक्ष, श्रीपाद ना. कोलवाळकर, सेक्रेटरी, पुरुषोत्तम रा. केणी, डु. सेक्रेटरी, अनंत वि. कणी, खजिनदार, दत्ताराम ला. रेगे व चिंतामण शा. सरदेसाई, हिशेब तपासनीस, व शांबा रा. सौदागार, पुस्तकें देणारा चिटणीस, यांचा समावेश होतो.

— नारायण अनंत वांदोडकर यानींहि आपणांला मतें देण्याविषयीं मतदारांस विनंति करून एक मानिफेस्तो प्रसिद्ध केला आहे.

औद्योगिक क्रांति

लेखांक १ ला.

इसापनीतींतली 'खेडे गांवचा उंदीर व शहरांतला उंदीर' ही गोष्ट पुष्कळांनीं वाचली असेल. एका खेड्यांतला उंदराला गांवच्या शेतांतल्या बाजरी जोंधळ्यांची कणसें खाऊन कंटाळा आला. व तो आपल्या शहरच्या मित्राबरोबर शहरास गेला. शहरांत आल्याबरोबर तिकडील वैभव पाहून त्याचे डोळे दिपले. तो आपल्या मित्राबरोबर एका श्रीमंत गृहस्थाच्या वाड्यांत शिरून स्वयंपाकघरांत उंची पक्वान्नें खात बसला. पण त्या खेड्यांतल्या उंदराचे दिवस गांवच्या शेतांतल्या निसर्ग सौंदर्याचा व स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यांत गेलेले त्याला शहरांतील जागेचा आकुंचितपणा व धांवपळ कशी सोसणार. स्वयंपाक्याचा आवाज ऐकल्याबरोबर शहरच्या उंदरानें दुणकन उडी मारून दडी दिली. खेड्यांतल्या उंदराला तें जमेना. बोका आल्याबरोबर त्याला उडी मारून फसें पसवावें हें शहरच्या उंदराला माहीत. खेड्यांतल्या उंदराची आरोळी ऐकतांच गाळण उडाली. थोडक्याच अवकाशांत खेड्यांतल्या उंदराला शहरनिवासाचा कंटाळा आला व तो परत आपल्या खेड्यांत गेला.

वरील गोष्ट लहानच आहे पण त्यांत एक मोठें सामाजिक व आर्थिक उत्क्रांतीचें तत्व दडी मारून बसलेलें आहे. वरील गोष्टींत 'उंदराच्या' ऐवजीं 'माणूस' हा शब्द घातला तरी त्यापासून आपणास वेगळ्या अर्थानें बराच बोध प्राप्त होण्यासारखा आहे. वरील गोष्टींतला उंदीर ज्याप्रमाणें शहरांतल्या रहाणीला कंटाळला त्याप्रमाणें कित्येक माणसेंहि कंटाळतांना आपण नेहमीं पहातों. खेड्यांत मिळणाऱ्या शुद्ध व स्वच्छ हवेचा शहरांत नेहमीं अभाव असतो. खेड्यांत कित्येक बाबतींत स्वस्ताई तर शहरांतील राहाणी फार महागाईची. खेड्यांत जीवनकलहासाठीं कराव्या लागणाऱ्या परिश्रमाचें व आथापिटीचें स्वरूप शहराइतकें तीव्र नसतें. तात्पर्य अशा अनेक कारणानीं मुंबईसारख्या शहरांतली रहाणी पुष्कळांस आवडत नाहीं व यामुळें पुष्कळ जण खेड्यांतल्या उंदराप्रमाणें शहरास कंटाळून-परत जातात. परंतु सर्वच माणसें कांहीं अशीं नसतात. समाजाचा बराचसा मोठा भाग दिवसभर पोटाची खळगी भरण्यासाठींच ह्मणून केवळ नव्हे तर कांहीं कामधंदा करून अर्थ साधण्यासाठीं ह्मणून शहरांत नित्य ठाणें देऊन राहिलेला असतो. अशांना शहरांत होणाऱ्या हालांची पर्वा नसते व असून देखील कांहीं चालत नाहीं. आज आपणाला या वर्गाचा विचार करावयाचा आहे. या शहरवासीयांची सद्यःस्थिति तीची अगर भावी परिस्थितीची चर्चा करणें ह्मणजे खेडेगांव व शहर यांची प्रथम तुलना

पत्रव्यवहार

रा. रा. भारतकर्ते यांसः—

मडगांव येथील "हिंदु" पत्राच्या ता.१४ मे माहेच्या अंकांत गं. दे. खानोलकर या नांवाच्या कोणी गृहस्थानीं सदर पत्राच्या ता.३१ आक्टोबरच्या अंकांत "विश्वभारती युनिव्हर्सिटी" या विषयावर ह्मापसें येथील शारदोत्सवांत झालेल्या माझ्या व्याख्याना संबंधीं टीकात्मक पत्र प्रसिद्ध केलें आहे.

रा. खानोलकर यानीं आपल्या पत्रांत असें विधान केलें आहे कीं, व्याख्यानविषयाची मी सांगोपांग माहिती करून घेतली नाहीं व डॉ० टागोर यांच्या चरित्रांतील कांहीं गोष्टी सांगतानां मी "अक्षम्य हलगर्जीपणा" करून भलत्याच "विचित्र गोष्टी" दडपून दिल्या. अर्थातच हें मत माझ्या व्याख्यानाचा "हिंदूंत" प्रसिद्ध झालेला गोषवारा वाचून त्यानीं बनविलेलें आहे. आणखींहि त्यांचे मजवर बरेच आरोप आहेत. तरी त्यांसंबंधीं खुलाशादाखल पुढील मजकुरास आपल्या पत्रामध्यें जागा द्याल अशी आशा आहे.

विषयाची सांगोपांग माहिती करून घेऊन व्याख्यान द्यावें ही गोष्ट सर्वथैव मान्य. पण कोणत्याहि विषयाची माहिती "सांगोपांग" झाली असें केव्हां समजावयाचें ? माहिती कितीहि असली तरी तींत भर घालण्यासारखी असतेच. अशा स्थितींत जिज्ञासू मनुष्याला आपली माहिती "सांगोपांग" [पुरी] झाली असें केव्हांहि वाटावयाचें नाहीं. तेव्हां जेवढी माहिती आपल्याला असेल तेवढी (अपुरी ह्मणून) लोकांनां देऊं नये कीं काय ? ज्यांनां ती अपुरी वाटेल त्यांनीं तिचा अपुरेपणा अवश्य भरून काढावा. उगीच अपुरी माहिती दिली ह्मणून दुसऱ्याला दोष देत सुटूं नये. खुद्द खानोलकरानीं आपल्या पत्राच्या शेवटीं "कार्यबाहुल्यामुळें वेळ नाहीं" या सबबीवर आणखी लिहावयाच्या गोष्टी लिहिल्याशिवाय ठेवल्या कीं नाहीं ?

ह्मापशेंच्या व्याख्यानमालेंतील व्याख्यानें निर्णायक स्वरूपाची नसून चर्चात्मक असतात. व्याख्यानानंतर चर्चा होत असते हें वाचलेल्या रिपोर्टावरून खानोलकरांना कळून आलेंच असेल. अशा व्याख्यानांचा हेतु श्रोत्यांपुढें एखादा विषय ठेवून त्याकडे त्यांचें लक्ष्य वेधावें एवढाच असतो. चर्चेस मांडण्यांत येणारें व्याख्यान, अर्थात त्यांत चर्चा करावयाला जागा असते. ह्मणजे एका दृष्टीनें अपुरेपणा असतोच. अशा व्याख्यानांनां "सांगोपांग" माहितीचें बंधन कांटेकोर दृष्टीनें लावावयाचें नाहीं. बाकी विषयाची मांडणी होईल तितक्या पुऱ्या स्वरूपांत असावी हें उत्तमच.

रा. खानोलकर यानीं केवळ आपली टीकाच करण्याची आवड भागविली आहे असें दिसतें. माहिती अपुरी आहे तर ती त्यांनीं पुरी करावयाची होती. पण तसें कांहीं न करतां आपले दोन लेख, डॉ० रवींद्रनाथाचें Creative Unity पुस्तक व अजित कुमार चक्रवर्ती यानीं बंगालींत लिहिलेलीं पुस्तकें यांचा केवळ त्यानीं हवाला दिला आहे. अशानें वाचकांचें (विशेषतः इंग्रजी व त्यांतहि बंगाली न समजणाऱ्या गोव्यांतील वाचकांचें) समाधान होणार नाहीं. व हीं पुस्तकें वाचण्याच्या कामीं "कार्य बाहुल्यानें वेळ नसणाऱ्या" मलाहि माझ्या व्याख्यानांतला अपुरेपणा कळून येणार नाहीं. तथापि वाचकांची गैरसमजूत होऊं नये यासाठीं एवढा खुलासा करणें भाग आहे कीं, ह्मापशें येथील व्याख्यानाला जरूर तेवढी विश्वभारतीविषयीं व तिच्या संस्थापकाविषयीं माहिती खुद्द डॉ० रवींद्रनाथ व रे. सी. एफ. अंड्रयूज यांनीं लिहिलेल्या व मद्रास येथील नटेशन कंपनीनें प्रसिद्ध केलेल्या Vishva Bharati या पुस्तकावरून, खुद्द विश्वभारतीमार्फत वेळोवेळ प्रसिद्ध होणाऱ्या Bulletin वरून व Modern Review वगैरे मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांवरून आणि Thompson व अय्यर या ग्रंथकारांचीं टागोर चरित्रें वाचून गोळा केली होती. व ह्मापशें येथील माझ्या व्याख्यानाच्या विषयाचें प्रतिपादन करण्यास तीं केवळ अपुरीं होतीं असें ह्मणता येणार नाहीं.

व्याख्यानें विश्वभारतीविषयींचीं अर्थात डॉ. रवींद्रनाथासंबंधाची माहिती त्यांत आनुषंगिकत्वानें यावयाची. ती पुरेपूर यावी हा आग्रह कां ? खानोलकरानीं उल्लेखिलेल्या 'जिवनस्मृतींत' तरी ती माहिती पुरी कोठें आहे ? अर्थात 'गुरुदेवावरहि' तें तसाच आरोप करणार काय ? रवींद्रनाथाच्या विद्यालयीन शिक्षणाविषयीं मीं केलेला उल्लेख 'विद्यालयांतील पद्धतशीर (!) शिक्षण त्यानां मिळालें नव्हतें, अर्थात त्यांचें शिक्षण पुस्तकी नसून स्वतंत्र स्फूर्तीचें आहे' एवढें दाखविण्याकरितां होता. व रा. खानोलकर तें नाकबूल करीत नाहींत तर मग अक्षम्य हलगर्जीपणा कोठें आहे ? मोर्लेच्या ऐवजीं मॅकाले एवढ्यांतच ना ? पण ही चूक व्याख्यानाचा घोषवारा घेणाऱ्याकडून झालेली आहे हें रा. खानोलकर यांच्या लक्ष्यांत, सदर गोषवारा 'एवढें लिहिले आहे तरी काय' अशा प्रकारच्या आढ्यतेच्या दृष्टीनें न पहातां 'काय लिहिलें आहे' अशाच निर्विकार बुद्धीनें त्यानं तो वाचला असता तर सहज लक्ष्यांत आलें असतें.

त्याच प्रमाणें अवनींद्रनाथांच्या ऐवजीं अरवींद्रनाथ आले ही चूक रिपोर्टर अगर कंपोझीटर यांची असावी. ती माझी नव्हे. अवनींद्रनाथ हे रवींद्रनाथांचे पुतणे आहेत, बंधु नव्हेत, हें खानोलकरांचें विधान माझ्यापेक्षां ते जास्त माहितगार आहेत, या समजुतीनें मी अवश्यमेव मान्य करतों. बाकी, विश्वभारती मार्फत प्रसिद्ध झालेल्या Bulletin नं० ४ मध्ये कलाभवनाविषयीं A School of Indian Painting with distinctive features of its own is developing at Santiniketan under the supervision of Abanindranath Tagore and the direct guidance of Nandalal Bose and Surendranath Kar, the resident teachers अशी जी माहिती देण्यांत आली आहे तिजवरून अवनींद्रनाथांचा विश्वभारतीशीं मी जोडलेला संबंध केवळ निराधार नव्हता हें वाचकांच्या तावडतोब लक्ष्यांत येईल.

तात्पर्य अपुरी माहिती, अक्षम्य हलगर्जीपणा, भलत्याच विचित्र गोष्टी, किती तरी चुका, निष्काळजीपणाचीं विधानें, इत्यादि शद्बांचें अवडंबर माजवून रा. खानोलकर यानीं 'पराचा कावळा' किंवा राईचा पर्वत करण्याचे वृथा श्रम घेतले आहेत. रवींद्रनाथ आपले 'गुरुदेव' आहेत आणि त्यांच्या विषयीं आपण लेख लिहिले आहेत एवढें सांगावयाला इतक्या पाल्हाळाची जरूरी नव्हती.

पणजी — आ. नम्र सेवक
२४–११–९२४ — कृष्णराव ग. केणी

वर्तमानसार

—येथील पारतीद पोपुलारनें एक जाहीर पत्रक प्रसिद्ध केलें असून त्यांत नवीन काविजादीतर्फे उभे राहिलेले मुख्य व दुय्यम उमेदवार अनुक्रमें दो० सखाराम सदाशिव सूर्यराव देसाई, डिचोली, व दो० बाबू शिवराम प्रभू देसाई यांसच येत्या रविवारीं होणाऱ्या निवडणुकींत मतें देण्याची मतदारांस विनंति केली आहे.

—पोर्तुगालचें जुनें प्रधानमंडळ बदलून त्या जागीं नवीन अधिकारारूढ झालें. या नवीन मंडळांत हेलदेर रिबैर यांची युद्ध मंत्र्याचे जागीं योजना झाली आहे. सि. रिबैर हे प्रागतिक संघाचे अभिमानी आहेत.

— मुंबईचें जुनें दैनिक 'इंदुप्रकाश' बंद पडलें.

—बेळगांवच्या राष्ट्रीय सभेला येत्या ता० २६ रोजीं प्रारंभ होईल. दोन दिवस पूर्वी विषयनियामक कमिटीच्या बैठका भरतील.

—इजिप्त–इंग्लंड प्रकरण विकोपास जाईल, असा एकंदरीत रोंख दिसतो.

—सास्ष्ट व इल्यस या उभय तालुक्यांतर्फे लेजिस्लातीव्ह 'कोंसेल्यांत जाणाऱ्या मेंबरांच्या निवडणुकांस गंभीर स्वरूप प्राप्त होत आहे. ब्रार्देसलाहि हीच परिस्थिति निर्माण होण्याचा संभव आहे.

—२७ तारखेच्या लोकमान्यांत एक गोवावृत्त प्रसिद्ध झालें असून त्यांत गोमांतकांतील प्रचलित विषयांवर निर्भिड टीका केली आहे. कांहीं दिवसांपासून गाजत असलेल्या बटस्फोटाचाहि त्यांत उल्लेख आहे.

—सांखळीच्या दत्तवाडींत येत्या १० तारखेला श्री दत्तजयंतीच्या वार्षिकोत्सवास प्रारंभ होईल. भारताचे सन्माननीय मित्र सारस्वत यांचा प्रस्तुत उत्सवासंबंधीं आलेला लेख येत्या अंकीं प्रसिद्ध होईल.

—कोमुनीदादींतर्फे सि. दियोगु वान्हेत हे एक उमेदवार असल्याची बातमी आहे.

——=——

भारत व येत्या निवडणुका

दो० सखाराम देसाई व नारायण बांदोडकर हे दोघेहि गृहस्थ कोन्सिलांत जाण्याला पात्र आहेत व त्या उभयतांचा कौन्सिलांत प्रवेश झाला तर देशसुधारणेच्या गाड्यास चालना मिळेल, या खात्रीनेंच भिन्नभिन्न मतदार संघातर्फे त्यांची निवडूक व्हावी, अशी 'भारता'नें आपली इच्छा व्यक्त केली होती. पणजीचा 'प्रागतिक संघ' व येथील 'लोकपक्ष'—कीं ज्या संस्थाशीं भारत संपादकांचा संबंध आहे —यानीं आपले स्वतंत्र उमेदवार दाखविण्याचा हेतु नसल्याचें जाहीर करतांच 'भारतानें' आपली उपरोक्त इच्छा व्यक्त केली होती, हे विसरतां कामा नये.

आतां अशी परिस्थिति निर्माण झाली आहे कीं, एकाच मतदार संघातर्फे—नवीन काविजादीतर्फे—उपरिनिर्दिष्ट गृहस्थ मुख्य उमेदवार निवडून येण्यासाठीं उभे राहिले आहेत. 'भारताला' तर ते दोघेहि सारखेच आदरणीय आहेत. व या मुळें त्याची स्थिति चमत्कारिक झाली असल्यास नवल नाहीं. या चमत्कारिक स्थितींतून स्वतःची मुक्तता करून घेण्यास त्याला एकच उपाय सूचला व तो हा कीं, येत्या निवडणुकापीसून अगदीं अलिप्त रहावें. 'भारत' अर्थात येत्या निवडणूकींत भाग घेणार नाहीं. तसेंच भारताभिमानी मतदारांनां जें धोरण योग्य वाटेल तें त्यानीं आपापल्या मताप्रमाणें खुशाल स्वीकारावें. त्यापासून भारताला किंचित् सुद्धां वाईट वाटणार नाहीं हेंहि जातां जातां सुचविलेलें बरें.

ao mundo .Sublimes palavras aquelas de Deus, Sim, não podia ser dada

Ano 9 N.° 38
·feira 18 de Dezembro de 924
ASSINATURA
or cada ano tres rupias
ANUNCIOS
a ainda que repetida uma tanga
ro avulso uma tanga
CTOR E EDITOR
Hegdo Dessay
uepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ३८
गुरुवार ता. १८ डिसेंबर सन १९२४
वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)
जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.
संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

QUARTO CENTENARIO DE VASCO DE GAMA

O BHARAT, *jornal hindú independente, abstem-se de tomar parte nos festejos dos dias 23, 24 e 25, porque se persuade de que o Discobridor do caminho maritimo para India contribuiu, como disse* CUNHA RIVARA, *para nosso infortunio e para o dos nossos antepassados !*

Cunha Rivara deixou escrito: "No primeiro fogo da conquista derrubaram-se os pagodes, esmigalharam-se todos os emblemas do culto gentilico e queimaram-se todos os livros escritos na lingua vernacula, como convictos ou suspeitos de conterem os preceitos de idolatria. O desejo era exterminar tambem toda a parte da população que se não convertesse logo, e não só era este o desejo de então mas ainda, passados dois seculos, havia quem com gravidade magistral aconselhasse ao Governo esta providencia."

SECULOS DEPOIS...

Nos dias 23, 24 e 25 do corrente mês o Governo e os que dele dependem directamente ou indirectamente vão comemorar a morte do Vasco da Gama, portugues que aos olhos dos europeus passa por ter descoberto o caminho da India.

As festas vão ser custeadas pelo tesouro da Colónia que votou, para o fim, 14 mil e tantas rupias. Eis aqui, pela milionessima vez talvez, os dominadores esbanjando o dinheiro dos dominados em expansões de um sentimento ou de uma convicção que os dominados não partilham ou a que são inteiramente indiferentes.

Efectivamente, apesar de tantos programas, variados, interessantes, curiosos que das juntas locais e municipios vem vindo á luz de publicidade, — o povo mantem-se longe das festas. Este é um facto que dispersa provas porque é claro e evidente de mais.

Nós, porêm, emquanto o Governo e os seus apaniguados folgam, relembrando a data da morte de quem foi o pioneiro da civilisação europeia na India, nós convidamos o povo a meditar, no seu recolhimento, sobre os efeitos da mesma civilisação em relação ao progresso de Goa que todos o sabem, quando a Europa apoderou-se dela, era uma terra que pelo seu comercio industria e situaçao geografica sem par merecera ser escolhida como capital, centro de suas operações pelo maior Colonial que Portugal teve— *Afonso de Albuquerque.*

Passam mais de 4 séculos que Portugal faz progredir este rincão do Malabar— *Goa*, e, depois de todos os esforços dos administradores, os sacrificios feitos muitas vezes de privações, dos administrados, o que nos dias 23, 24 e 25 de Dezembro de 1924 o povo pode ver é o seguinte:

O individuo moral e fisicamente dessorado. A familia sem estabilidade nem coesão. A sociedade em deliquecencia, sem as grandes virtudes que tornam os povos fortes e amados. A industria não existe. O comercio negativo,—importando mais do que exporta. A riqueza agricola cada vez mais decrescente. A emigração despovoando os campos, acossado o povo pelas incertezas do dia de amanhã.

O alcool e tabaco, estes dois flagelos da humanidade, o paiz absorve em dose aterradora. Não existe por todo este imenso Oriente povo que nos leve a dianteira nesta corrida para o abismo. Lá se fazem sentir as consequencias destes *instrumentos civilisados.* Os crimes aumentaram. Temos os assassinatos, envenenamentos, os roubos, os atentados contra o pudor etc. etc.

A tuberculose que é a companheira fatal da miseria, assentou os seus arraiaes entre nós, e faz as suas vitimas aos centos. A siflis encontra-se espalhada. Em certos concelhos é tam frequente como o paludismo, embora viva encuberta.

O analfabetismo existe em proporção desoladora, não obstante as escolas instaladas em pardieiros ministrarem um ensino de resultados negativos que custa ao povo bem caro. A contrabalançar a ignorancia das massas não temos sequer as *elites*, Existe a praga dos *diplomados* fazendo mais dano ao pais que o *mundolim* ao coqueiro.

Temos estradas, pontes grandiosas; mas só no papel. As que existem de facto encontram-se intransitaveis — A Navegação Fluvial a vapor passou a ser um perigo para a vida de quem serve-se dela.

As obras de engenharia—os monumentos arquitectonicos e literarios dos tempos da civilisação puramente indiana desapareceram totalmente ou porque os distruiram num momento de furia iconoclasta ou porque não souberam conserva-los.

A lingua originaria do pais moribunda, se não morta já.

Em suma estamos moral, economica, intelectual e fisicamente arrasados.

Não há duvida, pois, que um paiz nestas condições é uma arena magnifica para o Governo com os seus apaniguados gastar dinheiros aos milhares, comemorando o inicio de um periodo historico em que este povo tam superiormente dotado—entrou numa fase de estagnação.

———

ao mundo .Sublimes palavras aquelas de Deus, Sim, não podia ser dada

तुला नाहीं मला, घाल कुत्र्याला ' अशा प्रकारचा प्रकार होऊन त्यापासून सत्ताधारी व सर्वस्वी परकी अशा पोर्तुगीज सरकारला मात्र हवी तशी पोळी पिकविण्यास व स्वतः-च्या पोळीवर हवें तितकें तूप ओतून घेण्यास मदत होते. आमच्या ख्रिश्चन बांधवांस ह्या सर्व गोष्टी समजत नाहींत किंवा आपल्या ह्या कृत्यानीं देशद्रोहाची निपज व वाढ होते ह्याची जाणीव त्यांस मुळींच नसते असें नाहीं; पण पाश्चात्यानुकरणाची व त्यांचें हित तेंच आपलेंहि हित समजण्याची त्यांची तयारीच इतकी शिखरास पोंहचली असते कीं, तात्पुरती तरी कां होईना, त्यांची सद्-सद्विवेकबुद्धि नष्ट होऊन त्यांना आपण युरोपियनच आहोंत हा भास उत्पन्न होतो. जातीचे युरोपियन जरी ह्या काळ्या (?) युरोपियनची गणना आपल्यांत करून घेण्यास तयार नसले तरी ह्यांना मात्र आपण युरोपियनच आहोंत असें वाटतें. एकीकडे कलकत्यास ॲंग्लो इंडियन असोशियशनचे अध्यक्ष आपल्या अनुयायांस काळ्या हिंदु व हिंदी प्रजेबरोबरच कांहींहि आड पडदा न ठेवतां सहकार्य करण्याचा व हिंदी लोकांच्या राजकीय चळवळींत भाग घेण्याचा जीव तोडून उपदेश करीत आहेत, तर दुसरीकडे आह्मा हिंदूंतीलच कांहीं वर्षांपूर्वी बाटून ख्रिस्ती झालेले आमचे ' बाटगे ' प्रांतबंधू ' जितीव ' ह्या अपमानास्पद नावानें हिंदूंस हिणविण्यांत व पोर्तुगीझापुढें लांगूलचालन झालें तरी करून राजकीय सुधारणेच्या मार्गावरून गोमंतकाला समजून सवरून मागें खेंचीत, गोमंतक हा यावच्चंद्रदिवाकरौ पोर्तुगीजाचाच अविभाज्य विभाग व्हावा यद्विषयक अविरत प्रयत्न करीत आहेत. अर्ध्या हळकुंडानें पिवळे झालेले हे आमचे गोमांतकीय ख्रिश्चन सहकारी बांधव अशा रितीनें आमच्या सुधारणेच्या व प्रगतीच्या कारणविरहीत आड येत असतां कोणाला खऱ्या कळकळीच्या देशहितपक्षाला त्यांच्या विषयीं आपलेपणा वाटणें शक्य आहे ?

ह्या प्रकारचें हरामपणाचें वर्तन करून गोमांतकीय ख्रिश्चनानीं हिंदूंच्या आपल्या वरील विश्वासास जलसमाधी दिल्यावर आह्माला मदतीच्या अपेक्षेचें ब्रिटिश हिंदुस्थान हें एकच ठाणें उरतें. तेथील प्रजा ही आह्मासारखीच अडलेली व गांजलेली आहे खरी, पण स्वदेशदास्य शृंखलेतून मुक्त करण्यासाठीं धडपडण्यात व आचारविचारांची सुसंगत सांगड घालण्यांत त्यानीं आह्मा गोमांतकीयापेक्षां बरीच पुढें मजल मारली आहे. त्यांचा देशसेवाविषयक धडाडी व स्वार्थावर लाथ मारण्याची तयारी ध्यानांत घेतां तरुण व प्रगमनशील गोमांतकानें त्यांचाच धडा बेदरकार गिरवावा व त्यांच्याच पाउलावर पाऊल टांकून गोमांतकाची चालू नष्टचर्यावस्थेंतून सोडवणूक करावी असें कोणासहि वाटल्याशिवाय रहाणार नाही.

ह्या महिन्याच्या तारीख२६पासून पुढें दोन दिवस अखिलभारत राष्ट्रीय सभेची एकुणचाळिसावी बैठक बेळगावांस विजयनगर कॉंग्रेस कॅंप मध्यें भरणार आहे. राष्ट्रीयसभेची यंदांची बैठक अनेक दृष्टी नें महत्वाची आहे. आज जवळ जवळ सात वर्षे परस्परांपासून विभक्त असलेले प्रागतिक विझंट, वगैरे नेमस्त ह्या राष्ट्रीय सभेच्या एक छत्री अमलाखालीं जमण्याचा प्रयत्न करणार आहेत. आज तीन वर्षे कॉंग्रेसमध्यें थैमान व हैदोस घालीत असलेली बेकीची तेढ मोडून त्या ठिकाणी यंदां ऐक्याची मुहूर्तमेढ रोवली जाणार आहे. व सर्वांत महत्वाची गोष्ट ती हीच कीं ह्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान महात्माजींसारख्या पुण्यश्लोक महात्म्याकडून मंडित होणार आहे. खुद्द राष्ट्रीय सभेला जरी २६ तारखेपासून सुरवात होणार असली तरी अंतरराष्ट्रीय इतर परिषदांच्या बैठकी भरण्यास नाफेरवा त्यांच्या २० तारखे दिवशीं भरविल्या जाणाऱ्या परिषदेपासून सुरुवात होईल.

ह्या पुढें गोमांतकानें आपला मार्ग ब्रिटिश इंडियाच्या लोकशाहीच्या मार्गावरूनच आंखून घ्यावयाचा असल्यानें गोमांतकांतील राष्ट्रहितेच्छु तरुणानीं ह्या राष्ट्रीय सभेस प्रतिनिधि ह्या नात्यानें हजर राहून गोमांतक हा हिंदुस्थानचाच एक विभाग आहे हें सक्रीय सिद्ध करावें अशी आमची प्रगति-पर **गोमांतकास सूचना आहे.**

गामाच्या मरणाचा आनंद

बरोबर चारशें वर्षे झाली, कोची येथें व्हास्कु द गाम या फिरंगी व्हायसरायांचा अंत झाला. त्यावेळीं त्याच्या मरणाची बातमी ऐकून ज्यांना ज्यांना त्यांच्या जीवंतपणीच्या क्रूर कृत्यांची ओळख स्वानुभवानें किंवा पाहून अथवा ऐकून माहीत होती त्यांना आपणावरचें हें अरिष्ट पराभव झालें ह्मणुन फार मोठा आनंद झाला असेल. गामाच्या पायगुणानें ज्या हिंदी स्त्रियांच्या सौभाग्यावर आणि ज्या हिंदी मुलांबाळांच्या मातृपितृसुखावर घाला पडला होता त्यांना, गामा मरण पावला ह्मणून कांहीं आपलें सौभाग्य आणि मातृपितृ सुख परत मिळणार नव्हतें. परंतु मनुष्य स्वभावच असा आहे कीं ज्यांच्या क्रूर कृत्यांस आपलीं प्रिय माणसें बळी पडलीं किंवा ज्यांच्या दुष्ट आचरणानें आपण आपल्या सर्वोत्तम अशा सैभाग्यास मातृपितृसुखास अथवा इतर कोणत्याहि सुखास आंचवतों त्यांना आपला शत्रू मानून साधल्यास त्यांचें अनिष्ट करणें निदान मनांतल्या मनांत तरी चिंतीत राहणें हा होय. या स्वभावास अनुसरून गामानें ज्यांचें अहित केलें किंवा गामापासून ज्यांचें अहित केलें किंवा गामापासून ज्यांचें अहित घडलें त्यांना गामाला यमाजी भास्करानें मृत्युलोकांतून नाहींसें केल्याबद्दल हर्ष होणें साहाजिक आहे. गामा मेला आणि त्याच्या अनान्वित अशा जुलमापासून आपण सुटलों असा जरी त्यांचा प्रामाणिक समज झाला होता तरी गामाची फिरंगी परंपरा चालविणारे अनेक फिरंगी सरदार पाद्रींचे थव्यांचे थवे घेऊन हिंदुस्थानांत एकसारखे येतच होते. आपलें कार्य अव्याहत पुढें पिढ्यानुपिढ्या चालू राहावें ह्मणूनच गामानें तेव्हां पासून असाध्य होऊन बसलेला हिंदुस्थानचा जलमार्ग शोधून काढण्याचें धाडस केलें. हिंदुस्थानचें हें पश्चिमद्वार एकदां गामाच्या प्रयत्नानीं मोकळें होतांच युरोपांतील अनेक राष्ट्रांतील सरदार, व्यापारी, पाद्री यांच्या झुंडी आंत घुसूं लागल्या. कोणाच्या हातांत तरवार कोणाच्या हातांत तराजू तर कोणाच्या खांद्यावर क्रूस आणि हातांत बायबल अशी त्रिविध तऱ्हेनें सज्ज होऊन हे लोक आले होते. यांच्या आगमनानें हिंदुस्थानांत बऱ्याच क्रांत्या झाल्या व त्याची कटू फळें आह्मी हिंदी लोक आजपर्यंत भोगीत आहोत.

हिंदुस्थानचा जलमार्ग शोधून काढून गामानें युरोपियन राष्ट्रावर बरेच उपकार करून ठेवले आहेत. हिंदुस्थानसारखें अफाट कुरण त्यांना आज चरण्यास मोकळें मिळालें आहे. तें नसतें तर युरोपियन राष्ट्राचें वैभव आज जेमतेमच दिसलें असतें यात शंका नाहीं. आपलें पोट भरण्याची कोणतीहि युक्ति युरोपियन लोकानीं काढली कीं तिचा खप हिंदुस्थानांतच व्हावयाचा. इतरत्र तो क्वचित होण्यासारखा असतो. आज चारशें वर्षेपर्यंत युरोपियन पायगुणाचा प्रताप इतका दिसूं लागला आहे कीं हिंदी लोक विशेषेंकरून गामाच्या वंशजांच्या हातीं असलेल्या पोर्तुगीझ हिंदुस्थानांतील हिंदी लोक युरोपियन सुधारणेच्या कडक तेजानें दिपून जाऊन स्वत्वभावनांस पारखे झाले आहेत; आपला धर्म, आपला देश, आपले रीतिरिवाज यांची त्यांना ओळख नाहींशी झाली आहे; आपण कोण आमचे पूर्वज कोण होते, त्यानीं आपल्या धर्मासाठीं किती हाल सोसले, गामानें व त्याच्या मागून आलेल्या फिरंगी सरदारानीं चालविलेल्या धार्मिक जुलमास त्याना कसें तोंड द्यावें लागलें याकडे त्यांचें लक्ष जावें तितकें जात नाहीं. एकंदरींत हे आमचे लोक काया वाचा मनानें फिरंगीच होत चालले आहेत. ह्मणूनच आमच्या लोकांना गामाविषयीं यत्किंचितहि तिरस्कार वाटत नाहीं. गामानें आणि त्याच्या मागून आलेल्या फिरंग्यानीं आमच्या पूर्वजांस दिलेले त्रास, त्यांची केलेली विटंबना, अनेक तऱ्हेनें केलेला छळ यांची आठवण होतांच या सर्वांस कारणीभूत झालेल्या या गामांचें नांव घेणेंसुद्धां कठीण वाटावयास पाहिजे होतें. पण तें तसें वाटत नाही याचें कारण आम्हास स्वतःविषयींचा अभिमान जागृत नाहीं हेंच होय.

आज जिकडे तिकडे सारा गोमांतक गामा गामा या शब्दांनीं दुमदुमून गेला आहे. गामाचा प्रत्येक नामोच्चार आम्हास पागील इतिहासाची आठवण करून देत आहे. गामा इकडे आल्यामुळेंच आमचे लाखों भाईबंद फिरंग्याच्या त्रासांस कंटाळून परागंदा झाले; लाखोंजणानीं खुषी नसतां परधर्म स्वीकारिला; लाखोंजणास स्वधर्मच्युत होऊन देण्यास स्वतःला जिवंत जाळून घ्यावें लागलें गामा इकडे आल्यामुळेंच हजारों देवळें मोडण्यांत येऊन, त्यांतील देवाच्या मूर्ति छिन्नविछिन्न झाल्या, अगणीत संपत्ति पाद्यांच्या भक्षस्थानीं पडली, हिंदूंचे ग्रामहक्क नाहींसे झाले, लपून छपून धार्मिक कृत्यें करण्याचा दुर्धर प्रसंग आला, देशी भाषा बोलणाऱ्यांवर शेंडी धरणाऱ्यांवर कर बसूं लागले, सरकारांत मान मान्यता नाहींसी झाली वगैरे जुलूम सुरू झाले आणि त्यांचे दुष्परिणाम अद्यापपर्यंत आह्मी हिंदु लोक भोगीत आहोंत. गामाचा पायगुण आह्मांस किती बाधक झाला हें सविस्तर कोणास पहावयाचें असेल तर त्यानीं कृपा करून सध्याचे चीफ जस्टीस न्याफ्लोरियान नोरोंज्य यांचें 'आ रेपुब्लिक पोर्तुगेझ इ उस हिंदूस' हें पुस्तक अवश्य वाचावें. त्याच्या जोडीस दुसरें पुस्तक पाहिजे असल्यास मि. मिनेझिस ब्रागांस यांचें 'आ इंस्त्रुसांव ना इंदिय पोर्तुगेझ' हें पुस्तक घेण्यास हरकत नाहीं. या उभय ग्रंथकारांनीं आह्मांस फिरंग्यानीं आमच्या पूर्वजांवर केलेल्या भयंकर जुलुमांची व त्यामुळें त्यानीं भोगलेल्या, हाल अपेष्टांची, माहिती देऊन आम्हावर बरेच उपकार करून ठेवले आहेत. याबद्दल आम्हीं त्यांचे सदैव ऋणी असलें पाहिजे.

आमच्या सकल दुःखांस कारण झालेला हा गामा मरण पावला तेव्हां आमच्या पूर्वजानां बराच आनंद झाला असला पाहिजे असें आम्हीं वर म्हटलेंच आहे व गामाची ओळख जितकी अधिक होईल तितकें आमच्या म्हणण्याचें सत्यत्व लोकानां अधिक पटेल. गामा मेल्यास आज चारशें वर्षे झालीं तेव्हां कुठें आम्हांस म्हणजे, गामाच्या मरणाचे वेळीं ज्यांना आनंद झाला होता त्यांच्या वंशजांस, गामाच्या मरणाचा आनंद प्रदर्शित करण्याची संधी मिळाली आहे. धन्य आमची कीं, ज्या गोष्टीमुळें आमच्या पूर्वजानीं आनंद मानला त्याच गोष्टीमुळें आनंद प्रदर्शित करण्यांचा सुयोग नव्हे राजयोग चारशें वर्षानीं आम्हास प्राप्त झाला आहे. फरक इतकाच कीं, आमच्या पूर्वजांनीं केलेला आनंद खरांखुरा पण लपत छपत होता आणि आम्ही त्यांचे या स्वतंत्रता युगांतील त्यांचे वंशज राजरोस, दिवसाढवळ्या, दिव्यांच्या रोषनाईत, गर्नालांच्या आवाजांत, बेंडच्यां सुस्वर गजरांत, गामाच्या जयजयकारांत हा आनंद साजरा करणार आहोंत. त्यावेळीं आमच्या पूर्वजांनीं गामासारख्या राक्षसांच्या तडाक्यांतून आपण एकदांचे सुटलों ह्मणून आनंदातिशयानें नेत्रकमलांतून दोन टिपें गाळलीं असतीलं आणि आह्मास त्यांच्या वंशजानां हा गामाच्या मरणाचा चतुरसांवत्सरिक दिन साजरा करण्याकरितां स्वत्वाचें दान देऊन वरती कांहीं रुपयांची दक्षणा वर्गणीदाखल देणें भाग झालें आहे. हा फरक फार मोठा दिसत असला तरी चारशें वर्षांच्या दीर्घ कालावर नजर देऊनच आह्मीं समाधान मानून घेणें प्राप्त आहे. गामाचे वेळीं आमचे पूर्वज शेंडीसाठीं जीव

बाल-वाचन-मंदिर संस्थेच्या व्याख्यानमालेचा रिपोर्ट

[मागील अंकावरून]

राष्ट्राची किंवा देशाची आर्थिक व भौतिक उन्नति व्हावयाची असल्यास बौद्धिक उन्नतीची गरज आहे. " India est una " हाच मंत्रघोष प्रत्येकाच्या अंतःकरणांत चालला पाहिजे. गोवें व हिंदुस्थान एक होतील! त्याचवेळीं आमची उन्नति होईल. बरेच लोक असें ह्मणतात कीं, आज पुष्कळ वर्षें गोवें हिंदुस्थानापासून स्वतंत्र असल्यामुळें यापुढेंहि तें स्वतंत्र असावें; अशा प्रकारची तर्कशास्त्राची लीला उपयोगी नाहीं. आह्मीं आहोंत तो विंदु होतो. तो विंदु व जाणार तो विंदु यांचा मिलाफ करणारें ध्येय ठरवून आमच्या विद्यार्थ्यांनीं काय केलें पाहिजे हा आज प्रश्न आहे. आमचें ध्येय गांठण्याच्या बाबतींत ख्रिस्तीसमाज निरुपयोगी आहे. आह्मीं हिंदुस्थानाशीं एक होऊं असें जर त्यांना सांगितलें तर आह्मांला कैद करण्यास ते मागें पुढें पहाणार नाहींत. मागें एका प्रसिद्ध ख्रिस्ती मनुष्यानें असें सांगितलें होतें कीं महार चांभार चालतील पण स्वराजिष्ठ नकोत. गोव्याच्या उन्नतीची सर्व जबाबदारी आमच्यावर पडते. आमच्या ख्रिस्ती बांधवांना आह्मीं आमच्या बाजूला वळविले पाहिजेत. येत्या २५ डिसेंबरला व्हास्को डी गामाचा चतुर्थ शत सांवत्सरिक वाढदिवस आहे. ज्यानें आमच्या पूर्वजांचे हालहाल केले, देश नागविला त्याच्या कीर्तीची ध्वजा फडकविण्याची आमचेच ख्रिस्ती बंधू तयारी करीत आहेत. वाढदिवस समारंभासाठीं जी कमिटी नेमली आहे त्यांत आमचे देसाई (अध्यक्षांकडे बोट दाखवून) आहेत. त्यांना याबद्दल फार वाईट वाटतें अशी माझी समजूत आहे. परंतु बेधडकपणें राजीनामा देण्यासारखी आज स्थिति नाहीं. पुष्कळ लोक असें ह्मणतात कीं, आमच्या तरुणांनीं नोकऱ्या धरून सत्ता पटकाविली पाहिजे. मी सुद्धां याच मताचा आहें. परंतु आज जे सरकारी नोकरीवर आहेत ते आमच्या गरजांची सरकारांतून दाद लावून घेण्याचा मुळींच प्रयत्न करीत नाहींत. ते आपली जबाबदारी विसरतात. परवांच्या गामाच्या वाढदिवशीं जाहीर सभा भरवून आह्मीं निषेध केला पाहिजे. आमच्यांत पोर्तुगीज पत्रें आहेत, स्वाभिमान आहे पण प्रयत्न झाला नाहीं. आमच्यांत पोर्तुगीज जाणणारे आहेत पण ख्रिस्तीसमाजाला आमच्यांत काय आहे हें सांगण्याला यक नाहींत. पण आमच्यांत काय आहे याची आमच्याच लोकांना मुळीं माहितीच नाहीं. नंतर अध्यक्षांनीं विषयाकडे वळण्याची सूचना दिल्यावर ते ह्मणाले:— आतां आमच्या विद्यार्थ्यांनीं काय केलें पाहिजे तें पाहूं:त्यानीं पोर्तुगीज भाषेंत प्राविण्य मिळविलें पाहिजे. इतर भाषेंत पुष्कळ ज्ञान असेल. आह्मांला भाषा ज्ञानाकरितां शिकावयाची नाहीं. तर ख्रिस्ती बांधवाना हाताशीं धरून आमच्या उन्नतीचा प्रयत्न केला पाहिजे. तेव्हां आमच्या कल्पनेचा त्यांच्यांत फैलाव करण्याकरितांच ती भाषा संपादन केली पाहिजे. आज त्यांची प्रवृत्ति अशी झाली आहे कीं, मराठींतून किंवा कोंकणींतून बोलून दाखविलेली कल्पना चुकीची आहे असें समजतील. उत्तम पोर्तुगीज बोलणाऱ्याला किंवा लिहिणाऱ्याला प्रागतिक संघानें अगर देशाची कळकळ असलेल्यांनीं चांगलींशीं बक्षिसें ठेवावीं. तसेंच संस्कृतांत व इग्रजींत प्राविण्य संपादिलें पाहिजे. गोव्याचा इतिहास लिहिला पाहिजे. पोर्तुगीज—मराठी—कोश केले पाहिजेत. कोणाला स्वतःच घरीं पोर्तुगीज शिकावयाचें झाल्यास इंग्रजीवरून शिकावें लागतें. संस्कृत अध्यात्माकरितां शिकावयाचें नाहीं, तर आमच्या आर्य संस्कृतीची उज्ज्वलता ख्रिस्तीसमाजाला पटविण्याकरितांच शिकावें. सध्या अंगांत जें अंतिम ध्येय आहे तें आमच्या प्राचीन हिंदु संस्कृतींत होतें. हेंच त्यांना दाखविलें पाहिजे. मूर्तिपूजा करितात ह्मणून आह्मांला ते त्याज्य समजतात ह्मणून मूर्तिपूजेची आवश्यकता त्यांना पटविली पाहिजे. त्यानां आर्यसंस्कृतीकडे वळविले पाहिजेत. आमच्या उज्वल शास्त्रांचा व संस्कृतीचा उगम कसा, व आज त्याचा विपर्यास कसा झाला याचा विचार आह्मीं केला पाहिजे. आज लिसेवांत आमच्या इतिहासाचें नांव नाहीं. इतिहासानें अभिमान वाढतो. पोर्तुगीजानीं आमचा इतिहास नाहींसा करून अभिमानाच्या मुळावरच घाला घातला आहे. पोर्तुगीज वर्तमानपत्रें चालविण्यांत हिंदु लोक पटाईत आहेत असें ख्रिस्तीसमाजाला आह्मीं दाखविलें पाहिजे. विद्यार्थ्यांनीं राजकारणांतहि अवश्य भाग घ्यावा. आमचा गोमांतक पारतंत्र्यांत आहे, करांनीं गांजलेला आहे. आमच्या लोकांच्या आकांक्षा पार लयाला गेल्या आहेत. आज जरी नाहीं तरी विद्यार्थी दशा संपल्यावर मुलांनीं राजकारणांत पडावें. पोर्तुगीजानीं आमच्या भाषेच्या उन्नतीसाठीं कांहींच प्रयत्न केला नाहीं. आमच्या पुढाऱ्यांनीं हिंदु पोशाख वापरिला पाहिजे. देसाई आदि आमच्या पुढाऱ्यानीं परकी पोशाख करून समाजाला कमीपणा आणला आहे. साधारणतः पुढारी जो पोशाख करितात तो मानाचा आहे असें सामान्य लोक समजतात. आमचे पुढारी परकी पोशाख वापरून हिंदु पोशाख हीन आहे असें अप्रत्यक्षपणें कबूल करितात. उद्यां जर हिंदु पुढारी कौंसेल्यांत जुतें घालून जाऊन अस्खलीत पोर्तुगीजींत काम करूं लागेल तर ही कल्पना नष्ट होईल. राजकारणांत पडून स्वत्व विसराल तर वाईट. मातृभाषा मराठी त्यागूं नका. आमच्या ह्मातान्या आईकडे आम्हीं कसे पाहतों, ती सुंदर गोरी ह्मणूनच नव्हे. तर ती माझी ह्मणून ! त्याचप्रमाणें मराठीकडे पहा. तिला अंतर देऊं नका, तिच्या उन्नतीप्रीत्यर्थ झटा. इतकें जोराजोरानें सांगून व्याख्यात्यांनीं भाषण संपविलें. नंतर अध्यक्षांनीं उपवक्त्यांना बोलावयास परवानगी दिल्यावर श्री. खांडेकर बोलावयास उठले. ते ह्मणाले:— आजच्या व्याख्यानास गोमांतकीय विद्यार्थ्यांचें राष्ट्रकार्य हें नांव योग्य होतें. या विषयाचा राजकारणाशीं अति निकट संबंध आलेला आहे. गोमांतकाच्या राजकारणाशीं मी अपरिचीत असल्यामुळें उपवक्ता या नात्यानें येथें बोलणें अयोग्य होय. गोमांतक आज जरी महाराष्ट्रापासून अलग असलें तरी उद्यां तें तसेंच रहाणार नाहीं वाङ्मयिक, औद्योगिक व धार्मिक बाबतींत गोवा व महाराष्ट्र एक आहेत. गोमांतकांत हरिभाऊ, गडकरी जरी निपजले नाहींत तरी बाहेरचें ज्ञान आणून गोमांतकाची उन्नति केली पाहिजे. राष्ट्ररूपी मंदिराचा विद्यार्थी हा पाया असल्यामुळें प्रत्येक राष्ट्र त्यांच्या उन्नति करितां झटत असतें. विद्यार्थ्यांच्या पालकांस मला एवढीच सूचना करावयाचीं आहे कीं, विद्यार्थ्यांमध्यें शरीर सामर्थ्य वाढविलें पाहिजे. कोश, इतिहास वगैरे कामें शरीर सामर्थ्याशिवाय होत नसतात. शरीरसामर्थ्य संपादण्याला व्यायामाची आवश्यकता आहे. या करितां व्यायामाचे आखाडे स्थापिले पाहिजेत. माझ्या मनाच्या उड्या पुष्कळ आहेत पण शरीराच्या उड्या कमी. शरीरसामर्थ्याशिवाय जगाच्या स्पर्धा क्षेत्रांत आह्मीं निरुपयोगी ठरूं. शरीर हें साधन साध्य नव्हे, शरीराचा उपयोग स्वार्थाकडेच मात्र करूं नये. आमच्या पुष्कळ पदवीधरांनां मराठी येत नाहीं. स्वदेश स्वभाषा— स्वधर्म या त्रयींच्या वाढी विषयीं तीव्र इच्छा धरून त्यांच्या कामींच शरीर वेंचलें पाहिजे. व अशा तीव्र इच्छा उत्पन्न करणाऱ्या शिक्षणाचा फैलाव झाला पाहिजे. सध्याचें युग यांत्रिक आहे. शास्त्रीयशिक्षण संपादन करून मातृभूमीच्या उन्नतीचे प्रयत्न केले पाहिजेत व शक्तिसर्वस्वाचा मनोभावनेच्या वाढीकडे उपयोग केला पाहिजे. नंतर श्री पै थोडासा खुलासा करावयास उठले. त्यानीं सांगितलें कीं, शास्त्रीय विषय सर्वांनीं शिकावा. सर्वांनीं रँगलर व्हावें पण एकाच विषयाकडे त्यानीं आपलें तनमन वेंचावें. लिसेवांतील शास्त्र शिकूनच जर कार्य करणार असाल तर तें न केलेलेंच बरें शास्त्रीय शोधानां वाहून घेणाऱ्यांनां ही गोष्ट लागू नाहीं. शेवटीं अध्यक्ष समारोपास उठले. ते ह्मणाले, कांहीं आकस्मिक कारणानें व्याख्यानास वेळ झालाच आहे. मीं विशेष बोलून आपला वेळ घेऊं इच्छित नाहीं. आजच्या व्याख्यानास श्री. पै. यानीं विद्यार्थ्यांचें देशकार्य हें नांव ठेविलें होतें. श्री. खांडेकर यांचा सार्वत्रिक विद्यार्थ्यांच्या देशकार्याचा ऊहापोह होईल असा समज होता. माझाहि असाच समज होता. आजच्या व्याख्यानास गोमांतकीय हिंदु विद्यार्थ्यांचें राष्ट्रकार्य हें नांव अधिक योग्य झालें असतें. कांहीं ख्रिस्ती विद्यार्थी येथें जमलेले आहेत त्यांच्या करितां असें कांहींच सांगितलेलें नाहीं. व्याख्यात्यानीं कॉ. प्रो. नें एक खुळचट विधान केलें असें ह्मटलें. मीं कॉ. चालू वर्षाचा सेक्रेटरी असल्यामुळें थोडीशी माहिती देतों. गोव्याच्या जिवनास आवश्यक असणारें सर्व धान्य गोमांतकांतच उत्पन्न करतां येईल असें विधान कॉ. कधींच केलें नाहीं. लढाईच्या वेळीं ब्रिटिश हिंदुस्थानात कंट्रॉल असल्यामुळें गोव्यांत ज्या वेळीं धान्याचा तुटवडा पडला तेव्हां गोव्यांचें उत्पन्न किती पर्यंत वाढवितां येईल हा प्रश्न कॉ. पुढें उभा राहिला होता. त्या वेळीं बेर्नार्दीन कोस्त यानीं सध्याच्या दुप्पट धान्य गोव्यांत कसें उत्पन्न करितां येईल या विषयीं एक साधार निबंध वाचून दाखविला होता. एवढेंच. व्हा. डी गामाच्या समारंभ कमिटींत मी काम करावें कीं नाहीं हा प्रश्न आजच्या सभेचा नाहीं. पोर्तुगीजानीं आह्माला जी स्थिति दाखविली आहे त्याबद्दल सध्या फक्त नाखुषी दाखवावयाची. फक्त बोलावयाचें. प्रत्यक्ष कृति करावयाची नाहीं. आज फक्त आम्हीं आमचें सामर्थ्य वाढविण्यासाठीं तयारी करीत राहिलें पाहिजे. आमच्यांत धीराचे प्राणी फारच थोडे आहेत. कोणत्याहि खऱ्या खोट्या गोष्टी योग्यायोग्यतेचा विचार करूनच ठरविल्याशिवाय उगाच दुसऱ्याच्या माथीं अपराधाचें खापर फोडूं नये. श्री. पै. यानीं जीं कांहीं बेजबाबदारपणाचीं विधानें केलीं तीं अमलांत आणल्यास समाजाचें फारच नुकसान होण्याचा संभव आहे. पोशाखाचें विवेचन हा आजचा विषय नसल्यामुळें मी त्याविषयी विशेष विवेचन करीत नाहीं. गोमांतकांतील एक पुढारी ह्मणून मला जें त्यानीं आव्हाहन केलें त्याबद्दल मी त्यानां इतकेंच सांगतों कीं, मी कोणत्याहि पोशाखाला सारखाच मान देतों. हिंदु पोशाखाचा मला फारच अभिमान आहे. कोणत्याहि समारंभास मीं हिंदु पोशाखानेंच जात असतों. आजचे उपवक्ते श्री. खांडेकर यानीं शरीर सामर्थ्या विषयीं फारच उपयुक्त विवेचन केलें. स्पर्धा क्षेत्रातील शत्रूशीं टक्कर देण्यासाठीं आमच्या विद्यार्थ्यांनीं शरीर सामर्थ्य संपादन केलें पाहिजे. इतकें सांगून अध्यक्षांनीं आपलें भाषण संपविलें. नंतर आभार प्रदर्शन हारतुरे झाल्यावर व्याख्यानमालेचा पहिल्या दिवसाचा कार्यक्रम संपला.

ao mundo .Sublimes palavras aquelas de Deus, Sim, nao

Ano 9 N. 39

...nta-feira 25 de Dezembro de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
...linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत

BHARAT

वर्ष ९ वें. अंक ३९

गुरुवार ता. २५ डिसेंबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना रु. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें-गोवा

A SEMANA DO GAMA

Estamos na semana do Gama e não será, porisso, despropositado reduzir a justas proporções a sua arcaica fama que a inflexibilidade historica compara com a ... lama ou com a má dama.

*

¿Quem é, afinal, o descobridor do caminho maritimo da ou para a India? E' o tal piloto, como bem afirma o nosso ilustrado colaborador *Crispim* estribado em dados historicos cuja originalidade é flagrante, é irrefutavel, e clarividente.

Quem criou, portanto *jús não só á gratidão dos nacionais mas á admiração de todos quantos bemdizem da Luz*, foi o mesmo piloto africano, que *ipso facto* se torna merecedor dos pomposos festejos que ora se solenisam em honra do trama ... do Gama.

*

A *Terra* de Margão censura a atitude abstencionista do *Bharat* nos festejos comemorativos do Gama, dizendo ser este figura que pertence á Humanidade, constituir o patrimonio da Civilisação. E compara o seudo argonauta com os eminentes sabios Bose e Kitasato.

E' descabido o reparo, como mal feito é o paralelo. O nosso artigo *Seculos depois*... prova-o á saciedade, demonstra-o exuberantemente.

¿Pulverisou a *Terra* os nossos argumentos? Evidenciou-lhes a inanidade?

Não. Alonga-se, apenas, em considerações que, nem de perto nem de longe, se aplicam ao *Bharat*.

*

A obra do Gama, como berra a Historia, contribuiu para o infortunio, para a desgraça, para o aniquilamento dos povos conquistados, os quais, por culpa que não era deles, ficaram privados da sua religião, dos seus pagodes, das suas propriedades, da sua liberdade, da sua Patria e até da sua vida.

O proprio portuguez Eça de Queiroz sente-se horrorisado deante da obra de ... perdição do Gama. A História não o endeusa, antes o condena com a severidade que a caracterisa.

¿Será a *Terra* capaz de nos apresentar alguma proesa deste jaez dos sábios Bose e Kitasato?

¿Poderá ela citar algum exemplo dêstes grandes homens terem concorrido, com suas importantes descobertas, para a privação da religião, pagodes, propriedades, liberdade, Patria e vida dos povos estranhos?

Não. ¿Para que, então, o reparo descabido e para que o paralelo mal feito?

*

Não há a independencia politica sem a independencia de caracter—diz a *Terra*.

O *Bharat* está, perfeitamente de acordo com esta autorisada opinião do colega e, porisso, não poupa o ensejo de verberar *dominantes* que se fartam de cuspir sobre *esta gente* o seu despreso—de causticar municipios que solicitam a conservação dum governo que com os seus apaniguados produz uma sociedade em deliquêscencia, sem as grandes virtudes que tornam os povos fortes e amados, — e de censurar os *principais hindus que prodigalisam ás suas aclamações e salamas orientais aos nossos verdugos*.

¿Ha municipios hindús que se unem ao governo, coadjuvando-o na sua obra anti-popular? ¿Há hindús que lhe fazem *salamas*, turibulando o a proposito e desproposito de tudo e de nada?

Pois bem!

¿Poderá o *Bharat* ser consi-

AO VEIO DO TEMPO...

Quem descobriuo Caminho maritimo a' India?

Em todos os momentos solenes em que os corações patriotas vibram de emoção e de entusiasmo dizem-se dislates, escrevem-se falsidades, deturpando a verdade dos factos, a grande verdade historica. Compulsando-se vários livros referentes á história da descoberta do Caminho Maritimo á India todos os escritores são concordes e unanimes em afirmar que V. da Gama ao vir descobrir este caminho tomara em Melinde pilotos que o guiassem á terra que ele queria descobrir o Eldorado a que ardente e cubiçosamente desejava lançar as suas garras — a India: terra rica faustosa e imensa.

E todos eles afirmam e nisto inclua se igualmente o inclito principe dos poetas, que o piloto chamado Amad Ibns Musjid, um homem muito erudito e sabedor do seu oficio, avistando terra bradára: 'Terra, terra de Calecut." E', pois, pela razão historica absolutamente falsa a denominação de descobridor de Caminho maritimo á India concedida a V. da Gama, quando quem deveria ser coberto de gloria, apoteosado pelos portugueses, era o pilolo que sem armas, sem espirito de ambição nem de honrarias, apresentára ao Gama a terra que tanto eles suspiraram por possuir. E para mais diz G. Ferrand, socio d'Academia das Sciencias, que os roteiros portugueses são copia dos roteiros árabes.

Outros ditirambos elevam-se em côro á memoria do Gama, e estes são, atribuindo-se á sua façanha um espirito scientifico. Eis o que a este respeito escreveu Edgar Quinet no seu celebre livro *Les revolutions da Italie*:" Quereis medir o que separa o espirito scientifico do espirito revelador? Vêde quão diferente é o metodo dos portugueses para descobrir o caminho maritimo á India e a marcha de Cristovam Colombo á America. Os portugueses avançam, voltam pelo mesmo caminho, recomeçam o seu ensaio, tacteiam durante 50 anos as costas desconhecidas da Africa; é o método prudente da experiencia. Bordejam as margens, buscam, contornam, esperam; depois retiram se novamente com precipitação, marcham duvidando. Olhai, ao contrario, a direcção do navio de Colombo; marcha com linha recta, sem desviar, como se ele visse o seu fim com olhos de alma."

Esta opinião insuspeita e valiosa dum frances coloca as coisas no seu devido pé e restabelece a verdade pura e honesta dos factos.

Para que dar-se proporções de Himalaias a um feito que não passa dum Chandarnate, para que atribuir-se-lhe a força dum Niagara quando não passa dum açude do Canal de Parodá!! ...

CRISPIM

———

"ao mundo".Sublimes palavras aquelas | de Deus, Sim, não podia ...

भारत

मार्गशीर्ष व० १४ शी शके १८४६

समर्थांचें राजकारण

[ले० ३ रा.]

नाना जनाचें हृदय । मृदु शब्दें उकलावें । ही समर्थांची आणखी एक शिकवण होय. राजकारणी पुरुषाला या गोष्टीची केवढी गरज आहे हे सांगणें नकोच. जनतेला मित्र करावयाचें तर तें तिचा सेवक होऊनच साध्य होणार, धनी ह्मणून होणार नाहीं. उंच नीच ह्मणों नये । सकळांचें निववावें हृदय । इतकें थोर अंतःकरण पुढाऱ्यांचें असलें पाहिजे. आपली योग्यता मोठी ना? मग आपण अज्ञान जन समुदायाशीं संबंध ठेवावयाचा ह्मणजे काय? असला प्रश्न त्याचे मनांत मुळींच उद्भवतां कामा नये. समर्थ ह्मणतातः — वेड्यासी वेडें ह्मणूं नये । वर्म कदापि बोलूं नये । तरीच घडे दिग्विजये । निस्पृहासी । हें ध्यानांत धरलें पाहिजे. कड्यावरून दरींत पडणारा धबधबा भयंकर व वाईट ना? पण त्याचा उपयोग मनुष्य करून घेतोच कीं नाहीं? दोन वस्तूंच्या घर्षणानें उत्पन्न होणारी वीज प्राणघातक व वाईट खरी; पण तिच्यापासून मनुष्य आपलें केवढें हित साधूं शकतो! तीच गोष्ट वेड्यांची अगर अज्ञान मनुष्यांची. पुढाऱ्यानें असल्या मनुष्यांस देखील आपल्या कार्यांत सहाय्यभूत केलें पाहिजे. शिवाय, फड नासोंचि न द्यावा । पडिला प्रसंग सांवरावा । अतिवाद न करावा । कोणी एकाशीं ।. या तत्वाचाहि वरील शिकवणींत अंतर्भाव होतो. आपण ज्या संघांत अगर संस्थेंत होतों, त्या संघाशीं आपलें पटत नाहीं ह्मणून, तो संघ समूळ नाहींसा करावयाचा, असलें अधोगामी कृत्य पुढाऱ्यानें केव्हांच करूं नये. तर, त्यांतच राहून व शक्य तर आपण पटतें घेऊन करावयाचें कार्य करून दाखवावें, असा वरील ओंवीचा अर्थ आहे; त्यापासून, वर्तमानकालीन पुढाऱ्यांनीं पुष्कळ घेतां येण्याजोगें आहे. येथें काय, किंवा ब्रिटिश इंडियेंत काय, बहुतेक राजकीय पक्षांची शक्ति, दुष्ट सरकारच्या अधम कृत्यांना आळा घालण्यांत खर्च होण्याचे ऐवजीं परस्परांचें बळ कमी करण्यांतच खर्च होते हें कांहीं खोटें नाहीं ही. गोष्ट टळणें असल्यास, समर्थांच्या वरील शिकवणीकडे लक्ष गेलें पाहिजे.

राजकारणी पुरुष क्षमाशील, शांत, सहिष्णु असा असला पाहिजे. उदंड विकारून बोलती । तरी चळों नेदावी शांति । दुर्जनास मिळोन जाती । धन्य ते साधु ॥ अशी त्याची वृत्ति असली पाहिजे. जनतेला कित्येक वेळा, बऱ्याच गोष्टी वाईट भासतात. अशा वेळीं पुढाऱ्याला तिच्याकडून उणे अधिक शब्द मिळण्याचा बराच संभव असतो. खऱ्या पुढाऱ्यानें शांतीच्या जोरावर असले प्रसंग निभावून नेले पाहिजेत. ह्मणजे प्रथम आपल्याचे विरुद्ध खवळणारी जनता कांहीं काळानें आपल्याच मागें आल्याशिवाय रहाणार नाहीं, असें त्यास आढळून येईल. समर्थ ह्मणतात:– धके चपाटे सोसावे । नीच शब्द साहात जावे । पस्तावोन परावे । आपले होती । आज लोकमान्य झालेल्या प्रत्येक पुढाऱ्याला, वरील ओवीचा कमी अधिक प्रमाणावर अनुभव आलेला आहे. आपलीं मतें, मग तीं खरींच कां असेना, इतरांना पटत नाहींत ह्मणून विनाकारण त्रागा करणारे अहंमन्य पुढारी, कमी अधिक प्रमाणांत प्रत्येक समाजांत असतातच, त्यांनीं समर्थांची वरील शिकवण आपलीशी करावी.

महंताचे काय किंवा निव्वळ राजकारणी पुरुषांचे काय, अंगांत वरील गुण असले पाहिजेत हें निर्विवाद होय. समर्थ महंत लक्षण नामक एका समासांत ह्मणतात: — तस्मात लौकिकीं वर्ततां नये । त्यास महंती कामा नये । परत्र साधनाचा उपाये । श्रवण करून असावे । अभ्यासें प्रगट व्हावें । नाहीं तरी झांकोनी असावें । प्रगट होऊनी नासावें । हें बरें नव्हे. गुणाचे दृष्टीनें स्वतःची योग्यता दीड दमडीचीहिं नसतांना, केवळ नांवासाठीं पुढाऱ्यांचें कवच धारण करून, देशाचें नासें व आपलें हासें करून घेणाऱ्या व्यक्तींनां वरील समासाचीं पारायणें अवश्य आहेत. स्वतःची सुधारणा करण्याचे पूर्वी, इतरांची सुधारणा करण्याच्या भरीस पडण्याचा मोह कित्येक तरुणांस आवरत नाहीं. त्यांनींहि वरील ओव्यांपासून धडा घेण्याजोगा आहे.

समर्थांनीं आपल्या दासबोधांत राजकारणाचा पुष्कळ ठिकाणीं विचार केलेला आढळतो. नुसत्या राजकारणाकरितां त्यांनीं दोन संबंध समास खर्ची घातलेले आहेत. याशिवाय, दासबोधाच्या उत्तरार्धांत तर प्रत्येक समासांत राजकारणावर एक दोन ओंव्या आढळतात. वर्तमानकालीन राजकारणाला लागू पडतील अशीं रत्नें काढावयाचींच तर तीं दासबोधांतून पुष्कळ काढतां येतील. परंतु असल्या लेखांत तसें करणें शक्य व इष्टहि नाहीं. त्याकरितां मूळ ग्रंथच प्रत्येकानें पहाणें अवश्य आहे.

दासबोधाची महति पारमार्थिकाला तर आहेच. पण शिवाय, इतर संतांच्या दृष्टोत्पत्तीस न येणारा ऐहिक वादहि त्यांत आहे. आत्मोन्नति हा तर दासबोधाचा हेतु आहेच. याबद्दल संशय नाहीं. पण, आत्मोन्नति साधतानांच राष्ट्रोन्नति कशी साधावयाची व दुसरी पहिलीला किती पोषक आहे हें दाखवावयानें हेंच त्याचें वैशिष्ट्य होय. देशसेवा व धर्मसेवा या दोन भावनांचें दिवसें दिवस दुरीकरण होत चाललेलें आहे, तें समर्थांनीं नाहींसें केलें व प्रथम त्यांच्यांत साध्य साधनभाव घडवून आणला. हिंदु धर्माचें ध्येय आध्यात्मिक उन्नति साधणें, एवढेंच नसून, राष्ट्रोन्नतीचाहि त्यांत अंतर्भाव होतो. इतर धर्मांची गोष्ट तशी नाहीं. आत्मोन्नति हेंच त्यांचें उद्दिष्ट. मग त्याकरितां स्वजनानां हालांत लोटलें तरी हरकत नाहीं. इतर धर्मांत, राष्ट्राच्या कल्पनेचा मागमूसहि मिळत नाहीं. हिंदु धर्माची गोष्ट तशी नाहीं. खुद्द हिंदु धर्माचे प्रणेते ऋषी, राष्ट्रसंस्थापक व राष्ट्रोद्धारक होऊन गेले. हिंदु राष्ट्रानंतर हिंदुधर्म जन्मास आला; हिंदु राष्ट्राकरितां हिंदुधर्म जन्मास आला. आणि ह्मणूनच त्यानें व्यक्तीबरोबर समाजाचें व राष्ट्राचेंहि नियमन केलेलें आहे. नैसर्गिक सीमानीं स्वतंत्र असलेल्या हिंदुस्थानाकरितां, हिंदुधर्म स्थापन झाला होता. सबब, त्याचीं तत्वें अगर आचार स्वतंत्र हिंदुस्थानांतच उपभोगावयाचे; इतरत्र नव्हे. मग, देश जर दुसऱ्याचे ताब्यांत तर, धर्म तरी आपणांस शांततेंत कुठून लाभणार? व्यक्ति व समष्टि या दोनहि दृष्टींनीं आपले धर्मांत विचार केलेला आहे. हें वेदांतील कांहीं भागांवरून कळून येतें. ह्मणून, हिंदु धर्मीय ह्मणून घेणें असल्यास, त्या धर्मांत सांगितल्याप्रमाणें आत्मोन्नति व राष्ट्रोन्नति या दोनहि कार्यांत आपण आपली शक्ति खर्ची घातली पाहिजे.

समर्थ पूर्वकालीन अगर तत्कालीन संतांनीं हिंदूंच्या आध्यात्मिक उन्नतीस हातभार लावला असेल व त्याचा परिणाम टिकाऊ झाला असेल; कदाचित् नसेलहि. पण, ऐहिक साधनाकडे त्यानीं निखालस दुर्लक्ष केलें होतें. यामुळें, परमेश्वरावर हवाला ठेवून फार तर पोटापुरतें मिळवायाचें; अशी लाजिरवाणी वृत्ति हिंदुसमाजांत शिरली, ती अजून ह्मणण्यासारखी गेलेली नाहीं. आह्मीं पुष्कळ मनुष्य असे पाहिलेले आहेत कीं, त्यांना देशसेवा ही एक निरर्थक चळवळ वाटते. व मोठमोठ्या स्वार्थत्यागी देशभक्तांच्या गोष्टी निघतांच, यांचीं नाकें आपोआपच मुरडतात. जणूं काय देशभक्त करीत असलेली चळवळ ह्मणजे शुद्ध पोरखेळ! देशरक्षण व धर्मरक्षण, देशपालन व धर्मपालन या दोन भावना भिन्न किंबहुना परस्पर विरोधी आहेत अशी त्यांची खोटी समजूत झालेली असते. असल्या व्यक्तींचाच आमच्या समाजांत भरणा फार झटल्यास चालेल. त्या राष्ट्रोन्नतीबद्दल उदासीन असतात. या विकट परिस्थितीला तोंड देणें असल्यास, एकंदर हिंदूंना राष्ट्रकार्याभिमुख करणें असल्यास समर्थांचें राजकारण प्रचारांत व प्रसारांत आलें पाहिजे. सोळाव्या शतकांतल्याप्रमाणें, धार्मिक पायावर आपण देशोन्नतीची इमारत उभारली पाहिजे. कारण ही इमारत उठल्याशिवाय धर्मपालन व धर्मरक्षण कसें होणार? आमच्या धर्मांचें संवर्धन आमच्याच घरांत होणार. पण, मुळीं आमचें ह्मणून जर स्वतःच्या मालकीचें घर नाहीं, तर तें शक्य तितक्या लवकर बांधावयास नको काय? तें कसें काय बांधावयाचें हें पहाणें असल्यास, तें आपणांस पाहिलेंच पाहिजे समर्थकालीन परिस्थितीच्या इतिहासाचें अवलोकन केलें पाहिजे, व समर्थांचा राजकारण–विशिष्ट महाराष्ट्र धर्म आचरणांत आणला पाहिजे–एरवीं गत्यंतर नाहीं.

स्फुट विचार

मतदारीचा हक्क सांभाळाः— येत्या ता. २ ते ११ जानेवारीपर्यंत मतदारांच्या यादींत नांवें नोंदून घेण्यासाठीं ठिकठिकाणच्या नोंदणीकामगारांकडून जाहीर झालें आहे. कोणत्याहि सज्ञान, पोर्तुगेझ भाषेंत लिहावयाला वाचावयाला येणाऱ्या येथील रहिवाशी पुरुषांस मतदार होण्याचा हक्क आहे. त्यास जागून वेळींच आपलें नांव नोंदून घेण्याची तयारी एव्हांपासूनच ठेवलेली बरी असें आह्मांस वाटतें. पोर्तुगेझ राष्ट्राच्या फाजील स्वभाषाध्येयानें असो किंवा इतर भाषाभिज्ञांस मतदारीचा हक्क दिल्यास हिंदुमतदारांचें डोईजड प्रमाण पुढें मागें आपणास नडणार या भीतीनें घाबरून गेलेल्या बावळटांच्या कारवाईमुळें असो, मराठी जाणणाऱ्यांचा मतदारीचा हक्क काढून घेतल्यामुळें हिंदु समाजाचें राजकीय वजन बरेंच कमी झालें आहे. हा विषमतेचा दोष घालवून रेपुब्लिकसरकाराचा समतेचा आव कायम रहावा ह्मणून ना. व्यंकटेश देसाई यांनीं मागें कायदेमंडळांत तशा अर्थाचा ठराव आणून तो पासहि करून घेतला होता. तरी तो पोर्तुगाल सरकारकडून अद्याप मंजूर होऊन येत नाहीं. प्रागतिक संघाच्या १ ल्या परिषदेंतहि मराठी जाणणाऱ्यांस मतदारीचा हक्क मिळावा ह्मणून एक ठराव घेऊन तो इतर ठरावांबरोबर सरकारांत दाखल करण्यांत आला होता, हें सर्वांस माहीत आहेच. याची वासलात लोकसत्तेच्या अधिकाऱ्यांनीं कशी लाविली हें मात्र अद्याप समजलें नाहीं. असो. गेलें तें गेलें; कधीं तरी तें मिळेल किंवा मिळवून घेऊं अथवा मिळविल्याशिवाय राहणार नाहीं असा आशावादीपणा बाळगून राहिलेले हक्क सांभाळण्याची खबरदारी घेतली पाहिजे. पोर्तुगेझ भाषा जाणणारे अद्याप आमच्या समाजांत किती तरी सज्ञान नागरिक हलगर्जीपणानें आपल्या मतदारीच्या हक्कांस जाणून बुजून मुकले आहेत! त्यांची कींव करावी तितकी थोडीच आहे! यापुढें त्यांस तसेंच राहूं देणें समाजहिताच्या दृष्टीनें आत्मघातकीपणाचें होईल. हें लक्षांत ठेवून प्रत्येकानें आपलें व आपल्याबरोबर इतर समाजबांधवांचें, मग ते कोणत्याहि पक्षाचे असोत, नांव मतदारांच्या यादींत मुदतींत दाखल करून घेण्याचें दाक्षिण्य दाखवावें. 'प्रागतिक संघानें' या बाबतींत चालू सालीं बराच प्रयत्न केला व कांहीं अंशीं तो फलद्रूप झालाहि. येत्या सा-

' ददतु ददतु गालिर्गालिमंतो भवंत: वयमपि तदभावात् गालिदानोऽसमर्थः' असें ह्मणून या विषयावरील वादाला इथेंच कायमचा विराम देऊं इच्छितों. आत्मसमर्थनपर एकहि ओळ यापुढें लिहिण्याची आमची इच्छा नाहीं. क. प्रमोद ऑफिस, मालवण.

ता. ८-१२-२४

आ. नम्र,
गं. दे खानोलकर.

राशीनकरांची कथा

श्री. रा. रा. भारतकर्ते यांसः—

वि. वि. पत्राचें कारण आपल्या वर्तमानपत्राच्या ता. २०।११ च्या अंकांत कीर्तनांतील शिमगा या मथळ्याखालीं एक लेख प्रसिद्ध झाला असून त्यास 'कीर्तनांतील श्रोता' या मथळ्याखालीं ता. ११।१२ च्या अंकांत उत्तरवजा लेख प्रसिद्ध झाला आहे. दोन्ही लेख वाचून जें कांहीं वाटलें तें या पत्रानें वाचकांपुढें ठेवण्याची इच्छा असल्यानें हें पत्र आपण प्रसिद्ध कराल अशी आशा करितों.

दोन्ही लेखांचा न्यायी नजरेनें विचार केला तर एक गोष्ट स्पष्ट दिसून येते ती ही कीं पहिल्या लेखांतील कोणतेंहि विधान दुसऱ्या लेखांत खोडून काढलेलं नाहीं. 'कीर्तनकर राशीनकर बोवा हे अडाणी समाजाला येऊन मिळाले, सुशिक्षित समाजांत मिसळले नाहींत' असें दर्शविण्याचा प्रयत्न पहिल्या लेखकानें केला आहे असें दुसऱ्या लेखकानें स्पष्ट लिहितानां असें दर्शविणारीं वाक्यें कोणतीं आहेत हें दाखविलें असतें तर त्रयस्थ माणसाला पहिला लेख मत्सरी वृत्तीनें लिहिला आहे असें समजायाला बरें पडलें असतें; परंतु जोंपर्यंत तसें दाखविलें गेलें नाहीं तोंपर्यंत उलट्या स्वल्पविरामांची रेलचेल करून उलट्या काळजाचें धाडस कितीहि दाखविलें तरी तें वाचकांच्या न्याय बुद्धीला पटणार नाहीं. फीच्या पंचवीस रुपयांच्या विधानासंबंधींहि अशीच गोष्ट झाली आहे. पहिल्या लेखकानें पंचवीस रुपयांचा निर्देश करतानां त्याच्या संख्यावाचकत्वाचें महत्व दाखविलें नसून त्याचें विशिष्ट गुरुत्व दाखविलें आहे. परंतु ही साधी गोष्ट समजण्याची पात्रता नसल्यानें २४ रुपये १२ आणेच कां नसावे असा अप्रत्यक्ष प्रश्न उपस्थित करून विधानांचा खोटेपणा दुसरे लेखक सिद्ध करूं पहातात. व स्वत: मात्र ते किती हें सांगत नाहींत हें आश्चर्य आहे.

टोपण नावानें पत्रव्यवहार केल्याबद्दल पहिल्या लेखकाला नांवें ठेवतानां स्वत:चें तोंड लपवून तें दाखविण्याचें धाडस आपल्या अंगांत किती आहे हें त्यानीं सर्वांस दाखविलें आहे. स्वतःच्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं, दुसऱ्याच्या डोळ्यांतलें कुसळ दिसतें ह्मणतात तें असें !

असो. एकाद्या परकी माणसानें वाटेल तीं विधानें बेधडकपणें करावीं व आमच्या बांधवांनां त्याचें मुळींसुद्धां वाईट न वाटतां उलट आपल्याच मंडळींशीं भांडण्याला तयार व्हावें हा न्याय खासा आहे यांत शंका नाहीं. व यावरूनच मात्र एखाद्याला असें वाटेल कीं राशीनकर बोवा योग्यच बोलले व अडाणीपणाच्या संसर्गानेंच त्यांनां हें धाडस झालें असावें.

दुसऱ्या लेखकानें आपल्या अंत:करणांतील मत्सर इतक्या तीव्रतेनें दाखविला आहे कीं, त्या मत्सरावर पांघरूणच घालायाचें झालें तर 'मुरलीधराच्या तर्फे ××× असें धारण केलेलें नांव बदलून 'विठोबाच्या तर्फे + + +' असें तें बदलावें लागेल. खरोखरच जर पहिल्या लेखकानें मत्सरी वृत्तीनें पत्र लिहिलें आहे व त्या संबंधीचा 'भरपूर पुरावा' त्यांजकडे आहे तर त्यानीं भ्याडासारखें मागें कां रहावें ? तो अलबत प्रसिद्ध करावा. समाजांतील हे अभिमान शून्य चाळे जनतेसमोर यावे ह्मणून मीं हें पत्र पाठवीत आहें.

त्रयस्थ

प्रागतिक संघवार्ता

[आमच्या खास बातमीदाराकडून]

ठरल्याप्रमाणें पणजी येथें श्री. काकुले यांच्या वाड्यांत गेल्या ता. ३० रविवार रोजीं 'प्रागतिक संघाच्या' म. मंडळाची सभा भरण्यांत आली. बहुतेक सर्व सभासद हजर होते. हजर नसलेल्यांनीं पत्रद्वारें आपली सहानुभूति दाखविली होती. श्री. फटू बाबू केंकरे, मंडळाचे अध्यक्ष हे हजर होते. तरी त्यांनां लवकरच निघून जावयाचें असल्यानें त्यांच्याच अनुमतीनें मि. रामचंद्र पांडुरंग वैद्य यांची अध्यक्षाचे जागीं योजना होऊन सभेच्या कामास सुरवात झाली. अनेक विषयांचा खल होऊन खालील ठराव घेण्यांत आले:—

१ ला. दो. काशीनाथ घ. शिर्वेकर, यांच्या आकस्मिक तऱ्हेनें झालेल्या निधनाबद्दल या संघाला फार दुःख होत आहे. कै॰ शिर्वेकर यानीं संघाबद्दल वारंवार दाखविलेली सहानुभूति, चालकांस दिलेलें प्रोत्साहन व केलेली मदत या मुळें संघानें त्यांच्याशीं कृतज्ञ असणें हें त्याचें कर्तव्य आहे असें ही सभा समजते. त्याच्या मरणानें मृताच्या कुटुंबियांवर आलेल्या दु:ख प्रसंगांत संघहि भागेकरी आहे असें त्यांस कळविण्यास संघाचे अध्यक्ष व सेक्रेटरी यांस हीं सभा अधिकार देते.

२ मध्यवर्ति कमिटीच्या सभासदांपैकीं ज्यानीं नवे प्रतिज्ञालेख भरून दिले नाहींत त्यानीं ते भरून, आपापल्या महालांत महालकमिटी स्थापन झाली नसल्यास ती स्थापण्याचा उपक्रम करावा. येथ हजर असलेल्यानीं तरी लगेच कामास आरंभ करण्यास चुकूं नये. तसेंच येत्या जानुवारी, फेब्रुवारी महिन्यापर्यंत मिळतील तितके नवीन सभासद मिळविण्याची खटपट करावी. या कामीं कार्यकारी कमिटीचे सभासद, संघाचे प्रचारक व स्वयंसेवक यांची मदत हवी असल्यास मागावी व त्यानीं ती अवश्य द्यावी.

३ रा. संघाची दुसरीं परिषद येत्या डिसेंबरांत भरणें अनेक कारणानीं शक्य नसल्यानें व ठिकठिकाणच्या महालकमिट्या स्थापण्यास व नवीन सभासद मिळविण्यास येत्या फेब्रुवारीपर्यंतची मुदत घातली असल्यानें सध्या साष्टी महालकमिटीच्या परिषदेचा काल निश्चित करण्यासंबंधीच्या प्रश्नास उत्तर देतां येत नाहीं. उक्त मुदत संपतांच कार्यकारी कमिटीची व सा. म. कमिटीची संयुक्त सभा बोलावण्यांत येऊन परिषदेसंबंधीचा विचार करावा. पाहिजे असल्यास मध्यवर्ति मंडळाची सभा बोलवावी.

ठराव ४ व ५ हे निवडणुकांसंबंधानें असल्यानें, त्यांचा गोषवारा येथें देत नाहीं.

६ वा. येत्या डिसेंबरांत बेळगांव येथें अ. भा गो परिषदेचें ५ वें अधिवेशन भरणार आहे. त्यांत भाग घेऊन त्या उपयुक्त संस्थेशीं सहकारित्व करणें हे संघाच्या कार्यांपैकींच असल्यानें ही सभा, त्या अधिवेशनास प्रतिनिधि या नात्यानें हजर राहण्यासाठीं संघाचे सभासद श्री. जनार्दन वि. कामत, पारोडें व श्री यशवंतराव सरदेसाई, मडगांव यांस निवडीत आहे. मात्र परिषदेंत आंतरराष्ट्रीय भानगडीचे प्रश्न उपस्थित झाल्यास त्यानां संघाच्या सल्ल्याशिवाय मान्यता देतां येणार नाहीं.

७ वा. ना. व्यंकटेश वि. सरदेसाई व ना. फटू बाबू केंकरे यानीं तूर्तच्या कायदेकोन्सिलांत, सभासद या नात्यानें केलेल्या कामगिरीबद्दल ही सभा संतोष व्यक्त करीत आहे. तसेंच ना. देसाई यांची निवडणूक येत्या सालाकरितां त्रिबुनाल कोंतेंसिओझच्या सभासदाच्या जागीं झाली असल्यावरून आपला आनंद व्यक्त करून त्यांचें अभिनंदन करीत आहे.

या सर्व ठरावांवर बऱ्याच वक्त्यांचीं भाषणें झालीं; कांहींजणांनीं सूचना उपसूचना आणल्या किस्येकानीं दुरुस्त्या सुचविल्या त्या सर्व लक्षांत घेऊन वरील ठराव एकमतानें पास झाले. जमलेल्या मंडळीनीं ना. देसाई यांच्या गौरवार्थ त्यानां चहापार्टी देण्याचें ठरवून सर्वांस रात्रो ८ वाजतां सभेच्या जागीं येण्यास आमंत्रण दिलें. कार्यक्रमाप्रमाणें काम उरकल्यावर श्री. जनार्दन विष्णू कामत यानीं केवळ नवीन काविजादींतील सभासदांच्या एका जागेवरच अडलेली आमची नजर जरा विस्तृत करून ती जमिनदारवर्ग, ग्रामसंस्थांचे अखत्यार यांच्या मतदार संघाकडेहि वळवावी व कायदेमंडळांत हिंदूंच्या ध्येयावर ह्मणजे प्रा. संघाच्या ध्येयावर दृष्टि ठेवूनच काम करणारे सभासद निवडून येतील अशी खटपट करण्याची सर्वांस विनंति केली. डॉ. बोरकरानीं उत्तरादाखल सांगितलें कीं, संघ आस्ते आस्ते या गोष्टीचा विचार करील. जमीनदारवर्गांतील बहुमत आमचेंच आहे. ग्रामसंस्थांचे अखत्यार आमचे कांहीं कमी नाहींत. या नाहीं पुढल्या निवडणुकांत आमचा हात तेथेंहि शिरकेल याबद्दल खात्री बाळगावी. शेवटीं अध्यक्षानीं संमत पास झालेले ठराव अमलांत आणण्यास कुचराई होऊं देऊं नका अशी गोड पण थोडक्याच शब्दांत विनंति करून सभेचें काम आटपल्याचें जाहीर केलें.

स्वत:चें अंत:करण शोधून पहा !

(ले॰ विरोधी)

भारताच्या २७ नव्हेंबरच्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या माझ्या लेखांतील 'कुंकळ्ळी येथील एका वैदिकास आपल्या दत्तक मुलाच्या मुंजीसमारंभास आलेल्या हिंदु पाहुण्यास दारूचा पाहुणचार देण्यास बरेच रुपये खर्च झाले असल्याचें सर्व विश्रुत आहे' या विधानानें चिडून जाऊन, वे. पांडुरंग शाणु कामत या कुंकळ्ळीच्या एका वैदिकानें, त्या बद्दल भारतांतूनच खुलासा करण्याविषयीं लेखकास जाहीर आव्हान भारताच्या गेल्या अंकांत केलें आहे. तें वाचून भारताच्या प्रत्येक वाचकास उक्त वैदिकाची बरीच कींव येईल यांत संशय नाहीं. आपल्या हातून कळत नकळत घडलेल्या गोष्टीचा खुलासा मागतानां त्यांना इतकें वर्दळीवर येऊन लिहावयाला नको होतें. लेखकाकडून खुलासा करून घेतल्यानंतरच त्यानीं आव्हानांत वापरलेली भाषा वापरणें घटकाभर शोभलें असतें. परतु तितका दम त्याच्यानें धरवला नाहीं त्याचें कारण केवळ बड्या पाहुण्यांच्या भीडेखातर केलेलें मद्यदानाचें कृत्य जगजाहीर झाल्यामुळें त्यांनां नखशिखांत उठलेली तिडीक हेंच होय. त्याच भरांत 'शेंप कोपेन पूरयेत' या न्यायाचा त्यांच्याकडून अवलंब झाला. याची जाणीव लेखकाला असल्यावरून तिकडे दुर्लक्ष्य करणें भाग आहे.

वे. कामत यांच्या लिहिण्याचा मुख्य आशय् "आपल्या येथें झालेल्या मुंजीसमारंभांत हिंदु पाहुण्यास दारूचा पाहुणचार केला असल्यास त्यास पुरावा काय" हाच असावा. इतक्या थरावर हें प्रकरण येऊं नये ह्मणून आह्मींहि आमच्या लेखांत जाणून बुजून यजमानाचा नामनिर्देश केला नव्हता. तथापि खुनाला वाचा फुटते असें ह्मणतात त्या प्रमाणें या पातकाला स्वयंस्फूर्तीनें वाचा फुटली त्यास कोण काय करणार? झांकलें पातक किती काळ दडून राहील ! तें उघड हें झालेंच पाहिजे. व ह्मणूनच त्यानां हा खुलासा मागण्याची बुद्धि सुचली. त्यानीं जरी हें आव्हान करितानां दूरदर्शीपणा दाखविला नाहीं तरी तें स्वीकारतानां सभ्यतेस अनुसरून वागणें लेखकास भाग आहे. हिंदुसमाजांत दारूचें व्यसन फारच बोकाळत असतां कान असून ऐकावयाचें नाहीं, डोळे असून पहावयाचें नाहीं, जीभ असून बोलावयाचें नाहीं, अशा तऱ्हेचें वर्तन बहुजनसमाजाकडून होत आहे. मग मुंजीसमारंभांत आणि तोहि एका प्रसिद्ध वैदिकघराण्यांत झालेल्या मुंजीसमारंभांत झालेल्या दारूच्या पाहुणचाराचा उघड पुरावा देणारे रामशास्त्री प्रभुण्यासारखे निस्पृह कितीसे मिळतील याची वानवाच आहे.

समाजाच्या या मनोदौर्बल्याचा फायदा घेण्यासाठींच कामतमजकूर पुढें आले आहेत. त्यांच्या इच्छेप्रमाणें पुराव्याचें माप त्यांच्या पदरांत आह्मीं घातलें असतें; परंतु पुरावा उलट पुरावादेतां घेतां दारूचा पाहुणचार घेणाऱ्या अनेक दारूबाजांचा नामनिर्देश हटकून होणार असल्यामुळें तितक्या पुरती

ANUNCIOS

O *Bharat*, ano 9 ° n ° 39 de 25 de Dezembro de 1924
Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida
Numero avulso 1 tanga

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio que este assina, a requerimento de Maria Felicia Siqueira, viuva de Sanguem, na execução hipotecaria que ela move a Xamba Sazú Sinai Salelcar e mulher e outros, da dita, vão ser vendidos em hasta judicial á porta do tribunal situado em Xeldem ao lado da estrada nacional que de Quepem se dirige á Curchorem, no dia 9 do seguinte mez de Janeiro, ás 10 horas e pelo preço superior ao da avaliação os seguintes bens: Direito a dois quintos da metade do predio denominado Cautor; Direito a um quinto do predio denominado Gundibata; E direito a um quinto da 1.a adição e a dois quintos da 2 a adição do predio denominado Zambapar, estes dois sitos em Cotarli e o 1 ° em Cacorá, todos da cultura de coqueiros, discritos na conservatoria do registo predial desta comarca, respectivamente, sob os n ° s. 6312, 3190, e 6740 e avaliados em 300, 600 e 500 rupias, tambem respectivamente penhoardos na referida execução ficando por este citados todos os credores incertos dos ditos executados e os herdeiros do credor falecido Xamba Nagbá Saunto Dessai, casado proprietario que foi de Colem e o qual tem a seu favor creditos de 250 rupias e 70 rupias e 5 tangas assegurados por inscrições hipotecarias n ° s. 1922 e 3513, bem como os co-proprietarios e quinhoeiros, para deduzirem querendo, os seus direitos nos termos e para os fins da lei. E para ser publico se expediu este.

Xeldem da Comarca de Quepem, 10 de Dezembro de 1924
O Escrivão de Direito
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento.

Pelo juizo de Direito da Comarca de Quepum e cartorio do escrivão do 1 ° oficio Redcar vai á venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca, no dia 9 de Janeiro proximo pelas 10 horas pelo maior lanço que se oferecer acima da avaliação o predio da varzea denominado Catorlem da cultura de arroz, coqueiros e outras arvores, situado em Sirvoi discrito na conservatoria desta comarca sob o n ° 3380 da copia avaliado por mil e quinhentas rupias, nos autos da carta precatoria vinda do Juizo de direito da comarca de Salcete e extraida dos autos de execução comum, que nesse juizo Pedro Antonio Alvares, morador em Lisboa, promove contra Agostinho da Piedade dos Santos Alvares e mulher de Margão e ora ousentes em parte incerta de Brazil. Quem o quizer arrematar compareça nos indicados dia, hora e local, correndo por conta do arrematante as despezas da praça e a contribuição de registo por inteiro. Por este são citados, nos termos e para os efeitos de lei, todos os credores incertos e os co-proprietarios. E para ser publico se expediu este. Xeldem 10 de dezembro de 1924.

O Escrivão de Direito do 1 ° oficio
Babú V. Camotim Redcar
Verifiquei
O juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem, e cartorio do escrivão do 1 ° oficio Redcar, a requerimento da inventariante Etermina Henriques que é mãe administradora da sua filha menor Maria Antonieta Eronia Anastasio das Dores Fernandes, a quem foi autorisada á venda em hasta publica por deliberação do respectivo conselho de familia e ouvido o sr. Dr. Curador dos Orfãos, vai á venda em hasta publica a porta do tribunal judicial desta comarca no dia nove de Janeiro proximo pelas dez horas pels respectivo preço da sua avaliação, a metade do predio denominado Queloxiachi nomoxi, que fica ao nascente com metade sul do terreno que fica ao nascente denominado Soucreachem mola, da cultura de arroz, coqueiros, jaqueiras e outras arvores, sito em Cola de Cabo da Rama, discrito na conservatoria desta comarca sob o n ° 5495 a folhas 146 do livro B. 17 avaliado por 1250 rupias, nos autos da carta precatoria vinda a este juizo e extraida dos autos de inventario orfanologico a que se procedeu no juizo de Direito da comarca de Salcete por obito de Faustino Aleluia Fernandes, que foi de Cavelossim, sendo inventariante a sua viuva dita Etermina Henriques. Quem a quizer comprar, compareça nos indicados dia, horas e local correndo por conta do arrematante as despesas da praça e a contribuição de registo por inteiro. Por este são citados nos termos e para os efeitos da lei todos os credores incertos, co-proprietarios, contra quaisquer preferentes. E para ser publico se expediu este. Quepem, 10 de Dezembro de 1924

O escrivão de Direito do 1 ° oficio
Babú V. Camotim Redcar
Verifiquei
O Juiz de Direito,
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio que este assina, correm editos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2 ° do art. 197 do Cod. do Proc. Civ. citando a Socorro Rodrigues de Cavelossim, de Salcete e ora ausente em parte incerta de Bombaim do territorio Britanico, para na qualidade de marido da interessada Inacinha Rodrigues assistir a todos os termos até final do inventario orfanologico que o regedor de Cola, Govinda Visnum Porobo Dessai, presta por obito de Filomena Fernandes, moradora que foi de Cabo de Rama e deduzir querendo nele os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento. E para ser publico se expediu este. Quepem, 10 de Setembro de 1924.

O escrivão de Direito
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de Direito da comarca de Quepem, e cartorio do escrivao do 1 ° oficio Redcar, correm editos de trinta dias a contar da segunda publicaçao deste no Boletim Oficial, citando do Caxinata Sadassiva Sinai Gudo marido da interessada Siulem por outro nome Tarabai, residente actualmente em Bombaim, em parte incerta para assistir, querendo a todos os termos do inventario orfanologico a que se procede neste juizo por obito de Xembu' Sadassiva Odarcar que foi de Odar, sendo invetariante e cabeça de casal o seu filho Ramachondra Xembu' Sinai Odarcar da dita e deduzir os seus direitos sem prejuiso do andamento regular do mesmo inventario.

E para ser publico se expediu este
Quepem, 2 de outubro de 1924
O Escrivao de Direito do 1 ° oficio
Babu' V. Camotim Redcar.
Verifiquei a Exactidao
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem, e cartorio do escrivão do 1° oficio Redcar á instancia do exequente cessionario Roque Piedade Pinto de Assolná, correm éditos de trinta dias a contar da segunda publicação deste no Boletim Oficial, citando a executada Locximi bai, mulher de Datarama Vitola Sinai Volvotcar, de Cuncolim, ora ausente em Narsobá-vadi, do territorio britanico, para a renovação da instancia dos autos civis de execução hipotecaria que o dito Roque promove contra a mencionada citanda e outros. E para ser publico se expediu este. Quepem, 16 de Dezembro de 1924.

O escrivão de Direito do 1 ° oficio,
Babú V. Camotim Redcar
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Ano 9 N. 40

Quinta-feira 1 de Janeiro de 1925

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
Por cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegde Dessay
Quepem–Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४०

गुरुवार ता. १ जानेवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

DEPOIS DA FESTA...

ESCREVE DEUS...

O Povo de Gôa desinteressou-se, completamente, das festas comemorativas do Gama cuja personalidade historica é-lhe desconhecida. Um nosso *reporter* que cuidadosa e escrupulosamente auscultou a opinião das camadas populares sobre os festejos...*gamicos* — vá o neologismo festivo— chegou a convencer-se de que o Zé-povinho se absteve de tomar neles parte, excepção feita dalguns patuscos que, obrigados pelas respectivas autoridades, condescenderam em organisar, cá e lá, alguns *brincos* barulhentos mas sem gosto, em honra do *rei pescador de Gôa*.

Os festejos do quarto centenario de D. Vasco da Gama revestiram-se, pois, apenas, de caracter oficial, não se tendo importado com eles o Povo cuja alma não vibrou, nem mesmo ao som da música dos *içares* e *arreares* de bandeiras...

Não há duvida. Os festejos do Gama foram um verdadeiro fiasco. Nem doutra coisa era merecedora a alma de quem foi cruel dos crueis.

Sim. Vasco da Gama — *o rei pescador* como lhe chama o nosso Povo — celebrisou-se pelas crueldades, *a ponto de causarem pessima impressão na Corte em Lisbôa.*

E' caso para dizer: escreve Deus direito por linhas tortas...

*

UMA CARTA

A proposito datitude do *Bharat* nos festejos do Centenario recebemos uma carta, escrita a lapis e á pressa. E' assinada por um *Dessai* e resa o seguinte:

"A atitude que V., sr. Redactor, manifestou nos festejos do Centenario é louvavel mas os nossos *leaders* occidentalisados *(não diz quem são)* que como tais se arvoram, ambicionando só a graça do Governo, fizeram uma declaração verbal com uma autoridade que os jornais hindús não eram responsaveis, eram antipatrioticos e petulantes e que êles, os *leaders* apoiavam os festejos etc..."

O autor da carta relata tambem certas particularidades que omitimos, não vá alguem supôr que alimentamos má vontade a quem quere. E, se trasladamos para as colunas do *Bharat* o trecho acima, é para o leitor se orientar sobre os ventos que por aì sopraram...em volta dos festejos do Gama, que, repetimos, foram um tremendo fiasco, a despeito de todo o aparato oficial e semi oficial que se lhes imprimiu.

*

DEVER DE OFICIO

Como se disse, o Povo se não importou com os festejos do Gama e, como se viu tambem, muitos dos que se entusiasmaram por êles, fizeram-no menos sinceramente e mais por *dever de oficio...politico.*

*

PONTO FINAL

Os principais jornais da India Britanica, jornais de maior tiragem e de não menor circulação aconselharam aos hindús de Gôa completa abstenção nas festas do Centenario, tendo bordado varias considerações sobre os feitos historicos de D. Vasco da Gama que, tambem no entender dêles, foi o nosso verdugo,

Mas, como se desfez já o último éco do foguetorio do Centenario da morte do Gama, inutil será expraiarmo-nos em mais considerações...festivas.

Ponhamos, pois, ponto final a elas.

ECOS & CRITICA

TAL ARVORE, TAL FRUCTO

Muitos patricios nossos, na sua maioria hindu's, foram assistir a's sessoes do Congresso Nacional India na em Belgao onde tambem se realisaram varias outras Conferencias. A concorrencia foi aos milhares, tendo nela figurado todas as forças vivas do Indostao, anciosas pela independencia politica da sua Patria.

Na Semana do Congresso, Belgao oferecia um espectaculo magestoso, deslumbrante e emocinante. Tudo ai vibrava, tudo ardia em desejos de ver a India desjungida do opressivo jugo da burocracia britanica.

Na escola do patriotismo que ai funcionou durante os dias do Congresso, os nossos patricios devem ter tido a oportunidade de aprenderem muito, sobretudo os que porfiam em substentar que a politica nao passa da conquista de lugares ou empregos de pingues vencimentos, apoiando a torto e direito, mas sempre incondicionalmente a situaçao, isto e', o governo e que o patriotismo nao significa outra coisa senao o *barriguismo...*

A Semana do Congresso Nacional de Belgao nao so' excedeu a *Semana de Vasca da Gama,* quanto a' imponencia, mas tambem a primeira suplantou a segunda, quanto aos resultados.

E nao e' para admirar, porquanto, ao passo que a Semana do Gama foi de *morte,* a do Congresso foi de *vida* Como eram de naturezas diametralmente opostas, produziram tambem efeitos diametralmente opostos.

Tal arvore, tal fructo.

FESTAS DE ... PROTESTO

A comunidade hindu' e' apologista de tudo o que seja bom, venha donde vier. La' porque um bem provem dalguma individualidade ou naçao, extranha a' sua raça ou ao credo, ela nao o deprecia, desde logo: aprecia-o, antes, com todo o calor, entusiasma-se com ele sinceramente.

Quanto ao mal, opera-se nela um fenomeno de consequencias, diametralmente opostas.

O sr. dr. Antonio Jose' de Almeida, defendendo, quando do caso Chandarnate, um direito hindu', praticou um bem. A classe hindu', la' porque o autor do bem fosse um europeu, nao apoucou a importancia do beneficio dispensado liberal e magnanimamente pelo eminente republicano portuguez. Este exemplo generalisa-se a tudo quanto ha' de bom em todos os mundos deste Universo.

Isto, porem, nao impende a que os hindu's se insurjam contra as crueldades do Gama e se indignem contra as barbaridades inquisitoriais.

¿Foi D. Vasco da Gama um europeu portuguez? Foram os algozes inquisidores europeus portuguezes?

Tanto um como os outros foram europeus portugueses ma'us e, porisso os hindus nunca simpatisarao com eles, so' por pertencerem a' Naçao que por insondavel vontade do Destino nos governa.

E' que o mau e' sempre mau e o ma'u so' merece festas de...protesto.

ESPEREMOS, POIS

No jornal do sr. Pereira Batalha— o tal *favoreiro universal,* cognominado *Piolho Branco* — P. B. — zumbe um gracioso Mosquito, que a's vezes nao deixa de ter graça, pelas *piadas poeticas* que, a torto e a direito, atira.

Sim. As vezes o Mosquito tem pilhas de graça, o que quere dizer que o referido diptero nem sempre e' divertido e inofensivo.

Assim, as venenosas piadas com que o insecto pretende aguilhoar alguns hindu's, escolhidos para o novo Conselho Legislativo demonstram a sua ma' vontade a' classe a que os eleitos pertencem.

¿Mas donde sera' o tal diptero? Da Europa ? Da India?

Da Europa, cremos que nao, porque sao ai raros, muito raros insectos tao mortiferos. O *Mosquito* da *Provincia* deve ser portanto, pelo que parece um animal indiano. ¿Quem sera' ele, porem?

Tudo se sabera', terminada a situaçao e chegada a nova eleiçao. Esperemos, pois.

OLITICA DO ... JADU'

O sr. dr. Jaime de Morais naquele seu celebre discurso de despedida provou que havia um colossal *superavit* no orçamento da India, graças a seu tino administrativo—*superavit* de que Sua Excia foi progenitor ilustre.

Perguntamos agora: ¿Se ha tanto

पोर्तुगेज हिंदुस्थानवासी हिंदु बांधवांस नम्र विनंति

बांधव हो, आपल्या पोर्तुगेज राष्ट्राची राज्यपद्धति " रेपुब्लिकान " ह्मणजे लोकशाहीची आहे. आणि वरिष्ठ सरकारकडून पोर्तुगेज हिंदुस्थानास " आवतोनोमीय " ह्मणजे साम्राज्यांतर्गत स्वराज्याची देणगी बहाल करण्यांत आली आहे.

प्रचलित युरोपीय साम्राज्यें, त्यांच्या राज्यपद्धति व अंतीम आकांक्षा यांशीं आपल्या पोर्तुगेज सरकारची निर्विकारमनानें तुलना केली तर सहज लक्षांत येणार आहे कीं, पोर्तुगेज हिंदुस्थानवासी स्वतंत्र नागरिकांनीं ध्येयोन्मुख होऊन जुटीनें प्रयत्न करीत राहिल्यास आपल्या प्रांतापुरतें पूर्ण स्वराज्य गांठणें शक्य असून शिवाय पोर्तुगेज नागरिकत्वाच्या जोरावर खुद्द पोर्तुगालवासी पोर्तुगेज नागरिकांस कोणत्याहि पोर्तुगेज प्रांतामध्यें व इतरत्र जे हक्क आहेत आणि जसें वावरतां येतें तसेंच वावरणें आणि सर्व ठिकाणीं तेच हक्क मिळणें आपणांस खात्रीनें शक्य आहे.

परंतु कल्पना करा कीं, एखाद्या यजमानानें आपणांस सुग्रास भोजनाचें आमंत्रण देऊन बोलावून नेलें; पाटावर बसवून घेतलें आणि आपल्या अपेक्षेप्रमाणें चांगले व पाचक असे कांहीं जिन्नस ठरवून ते ताटांतून पुढें केले. यजमानाची आपल्या शक्तीप्रमाणें यथेच्छ भोजन घालण्याची मनीषा होती असें गृहीत धरणें प्राप्त आहे. कारण, त्यानें आपण होऊन भोजन देण्याची तयारी दाखविली होती. इतकेंहि असून, जर त्यांतून चांगल्या जिन्नसांची निवड करून आपण खाल्ले नाहींत, पाचक व पौष्टिक अशा आणखी जिन्नसांची मागणी करून, पूर्वी ताटांतून वाढून ठेवलेले जिन्नस आपली भूक शमविण्यास अपुरे होते असें दाखवून दिलें नाहीं, तर आपणांस अर्धपोटीं उपवाशीं राहावें लागणार हें निश्चित आहे. पण त्यांत यजमानाचा अपराध नसून आपलाच हलगर्जीपणा आहे, हें कबूल केलें पाहिजे.

तेव्हां पोर्तुगेज हिंदुस्थानच्या राजकीय हलाखीचें खरें कारण " रेपूब्लिक " अग " आवतोनोमीय " नव्हे. पोर्तुगेज हिंदुस्थानचे नागरिकच आपल्या छळांस कारणीभूत आहेत, हें कोणीहि तिऱ्हाईत सहज सांगू शकेल.

बांधव हो, कोणत्याहि देशामध्यें राजकारणी पक्ष देशांतील सर्वसामान्य जनतेच्या हिताचें रक्षण करण्यासाठींच झटत असतात. परंतु या आपल्या दुर्दैवी प्रांतामध्यें, सर्वसामान्य जनतेचें हित साधणें हेंच मुख्य ध्येय मानणारा राजकारणी पक्ष एकहि नाहीं. पोर्तुगेज शिक्षणांत पुढारलेले आपले ख्रिस्ती बांधव असोत अथवा त्या शिक्षणाच्या बाबतींत मागसलेले असे आपले हिंदु बांधव असोत. मिळून सारखेच. कांहीं विवक्षित ख्रिस्ती बंधूनीं आपापले पक्ष बनवून आज शेंकडों वर्षेंपर्यंत वेळीं अवेळीं सरकारला एकंदर जनतेच्या मताचा बाऊ दाखवून वरिष्ट कनिष्ट जितक्या नोकऱ्या पटकावण्यासारख्या होत्या त्या तर पटकावल्याच, शिवाय गरजे बाहेरच्या नव्या जागा निर्माण करवून त्याहि पचनीं पाडून, कोरी ठणठणीत केलेल्या सरकारी तिजोरीच्या भरतीसाठीं करांच्या दिवसें दिवस वाढत्या ओझ्यांत जनतेचें हित सोडून देण्याचें कार्य मात्र सफाईनें साधलें आहे. हल्लीं हिंदूंचे पक्ष झाले आहेत, पण अत्यंत खेदाची गोष्ट ही कीं, खरें राजकारण गौण मानून, साध्याच्या बाबतींत ते अहमहमिकेनें ख्रिस्ती पक्षांच्याच कार्याची री ओढण्यापलीकडे आपली निराळी प्रवृत्ति दाखवीत नाहींत !...

साधारणत: अशा परिस्थितींत आपला देश सांपडला आहे. करितां, बांधव हो, आपणांपैकींच कांहीं सुविचारी, निरपेक्ष, स्वतंत्र आणि बाणेदार अशा नागरिकांची मनीषा आहे कीं, खालीं सही करीत असलेल्या या आपल्या नम्र सेवकानें पुढाकार घेऊन, हिंदुसमाजांतर्गत ज्ञाति आणि प्रमुख उपज्ञाति पैकीं एकैक कामचलाऊ स्वतंत्र अर्थांत सरकारी नोकर नसलेल्या नागरिकाची निवड करून, १५–२० असामींचें तात्पुरतें कार्यकारी मंडळ बनवून एका "रेपुब्लिकॉनु इंदेपेंदेंत" ह्मणजे लोकसत्तावादी स्वतंत्र पक्षाची स्थापना करावी. आणि पूर्ण समतेच्या तत्वावर स्वराज्यप्रेमी सर्व दर्जांच्या सर्व धंद्यांतील हिंदु लोकांचा समावेश त्याच्या मध्यें होईल अशी संघटना ठरवूनं कामास लागावें. सर्व साधारण जनतेचें हित साधणें हेंच या पक्षाचें मुख्य ध्येय असावें. अशी सामान्यत: सदर्हू गृहस्थांची अपेक्षा आहे.

बांधव हो, स्वतंत्र विचारांच्या कांहीं ख्रिस्ती नागरिकांनींहि अशीच इच्छा दाखविली आहे. परंतु, पूर्ण विचारांतीं आह्मीं असें ठरविलें आहे कीं, पहिल्यांदा फक्त हिंदुसमाजापुरतेंच या नवीन पक्षाचें कार्यक्षेत्र आंखून, तो चांगला सुदृढ, सुटसुटीत आणि कार्यक्षम होऊन स्वतःच्याच पांयांवर मजबूतपणें उभा राहण्यासारखा तयार झाल्या नंतर, ध्येयाशीं जुळतें घेतील अशा सर्व ख्रिस्ती बंधूंचा आणि मुसलमान बंधूंचाहि त्यांत समावेश करून घेणें इष्ट व योग्य आहे.

तेव्हां, प्रस्तुत विनंतीद्वारें पोर्तुगेज हिंदुस्थानवासी हिंदु नागरिकांस कळविण्याची परवानगी घेतों कीं, या नवीन होऊं घातलेल्या पक्षासंबंधीं ज्या कोणास साधक बाधक योग्य सूचना करावयाच्या असतील, त्यानीं त्या येत्या जानेवारी अखेरपर्यंत, खालील पत्त्यावर लेखी पाठविण्याची मेहरबानी करावी.

सर्वांचा न. से.

बांदिवडें, नारायण अ. बांदोडकर

फोंडा, गोवा

२३–१२–१९२४

जीवनार्थ कलह

" O talento sem o caracter, em vez de irradiar todas as belezas, pode deflagrar todas as infamias " *Alves Mendes*

वरील विषयाचा भावार्थ हाच कीं, शीलावांचून बुद्धि किंवा विद्वता लंगडी असून तदग्भूत सद्गुण प्रकाशमान होण्याचे जागीं दुष्कीर्तीचा मात्र प्रसार होण्याचा संभव असतो.

जीवनार्थ कलहाला Luta pela existencia असें पोर्तुगीज भाषेंत व The struggle for life असें इंग्रजींत ह्मणतात. जीवनयात्रा अबाधित चालण्यास शीलाची आवश्यकता आहे. विद्वान असला तरी शीलावांचून प्रतिष्ठा पावत नाहीं. विद्वानास द्रव्यापेक्षां अब्रू प्रीय असावी हें तत्व सर्वमान्य आहे.

हे विचार चालू १९२४ सालांत नागपूर येथें ' रणसंग्राम ' नांवाचें साप्ताहिक पत्र निघत असे त्यावरून सुचले. ह्या पत्राचा ' स्वराज्य, स्वधर्म व स्वातंत्र्य ' ह्या त्रयींचे उन्नतीप्रीत्यर्थ उदय झाला. ह्याचे संपादक श्रीयुत अच्युत बलवंत कोल्हटकर हे होत. साप्ताहिक रणसंग्रामाचे थोडे अंक निघून झाल्यावर त्याला एकाएकीं प्रात्याहिकाचें स्वरूप आलें, इतकेंच नव्हें, स्वतःच्याच संपादकत्वाखालीं ' युगांतर ' नांवाच्या नियतकालिकाचीहि जाहिरात उजेडास आली व ' चाबूक ' चे कमअस्सल व भोंदू देशभक्तांवर ' खुसखुशीत तडाखे ' देण्यांस देखील सज्ज झाले. एवढ्यानेंच ते थांबले नाहींत, ' चोरी कशी करावी ' (दिवसाढवळ्या ?) ह्या पुस्तकाची जाहिरात फडकावून दिली.

' रणसंग्राम ' पत्र दैनिक झालें, पण साप्ताहिकाच्या वर्गणीदारांची व्यवस्था कशी काय झाली ह्याकडे संपादकांनीं लक्ष्य पुरविलें नाहीं. निदान गोव्यांतल्या वर्गणीदारांकडे तरी कानाडोळा झाला असें ह्मणावें लागतें. त्यास पुरावा सांखळींतील एक गृहस्थ पुरे आहेत. ह्यानीं सुरवातीस दोन रुपयांची व्ही. पी. भरली असतांहि ह्यांच्या हातांत अंक २ पासून ७, ९ व १० आणि १८ (असे अवघे नऊ अंक) हातांत पडले व पुढें साप्ताहिक रणसंग्रामानें ह्यांच्याकडे पाठ फिरविली. मध्यंतरीं आठवा अंक दुसऱ्यानदां व्ही. पी. नें आला तो परत केला. हा अव्यवस्थेचा परिणाम होय. दोनदां व्ही. पी. येणें हें व्यवस्थित कचेरींतून घडणें शक्य नाहीं. संपादकांस त्या सांखळींतील वर्गणीदाराची विचारपूस करून अनेक पत्रें गेलीं असतां उत्तर महाग झालें !

' युगांतर, आणि ' चाबूक ' ह्यांची उठाठेव करण्यापेक्षां साप्ताहिक रणसंग्राम चालू ठेविला असता तर वर्गणीदारांचीं मनें कलुषित झालीं नसतीं. चाबकाचे फटकारे लगावणारा देशभक्त न्यायप्रीय असला पाहिजे. देशसुधारणा करणारा पुढारी सत्यप्रीय असला पाहिजे. अर्थात स्वधर्म स्वराज्य आणि स्वातंत्र्य ह्या त्रयीला वाहिलेल्यांनीं प्रथमत: स्वतः नीतिमान, सत्यशील आणि व्यवहारज्ञ बनणें फार अगत्याचें आहे. शास्त्रकोविदांचा असा अभिप्राय आहे कीं " Better to correct omissions than to add to the number of commissions " ह्मणजे कर्तव्य गोष्टींच्या संख्येंत उगीच भर घालीत बसण्यापेक्षां (सनातन व सर्वमान्य ठरलेल्या) कर्तव्याचरणांत होत असणाऱ्या चुका सुधारणें हें बरें ' असा अभिप्राय.

कांहीं वर्षांमागें ' श्रुतिबोध ' आणि 'उषा' ह्या नांवांचीं मासिक पुस्तकें एकाच संपादकांकडून इंग्रजी अमलांत चालू होतीं, तीं ' कागद नाहीं ' या सबबीवर महायुद्धाच्या संधीस समाधिस्त झालीं, परंतु प्रत्येकीं सरासरी १० अंकांची वर्गणी संपादकांच्या खिशांत झोंपत राहिली. एवढें खरें कीं, ' संदेशकारांची लबाडी ' हा लेख केसरीकारांसारख्यांस लिहावा लागला. तेथें रणसंग्रामकारांच्या शिताफीबद्दल नवल नाहीं.

इंग्रजी हिन्दुस्थानांतील कितीएक धंदेवाल्यांना गोवाप्रांत फॉरिन Floreign परदेश) असल्यानें गोवेकराशीं इमानें इतबारें वागण्याचें धैर्य होत नाहीं. ह्या धंदेवाल्यांत कांहीं बुकसेलरांचा आधिक्यानें नंबर वरती येईल. यांद्वषयीं लिहूं गेल्यास एका स्वतंत्र लेखाची भरती होईल. बुकडेपो नसलेले व विद्वानांत मोडणारे देखील कांहीं ग्रंथकार गोवेंकराशीं बेइमानानें वागण्यास कचरत नाहींत. निर्णयसागर व या मासल्याचे क्वचित बुकडेपो सोडून इतरांकडे आज मितीस व्ही. पी. नें अगर आगाऊ मनिऑर्डरनें पुस्तकें मागविणें फार धाडसाचें आहे, या विषयीं नावांची त्रिल्हेवारी देण्या इतका प्रत्यक्ष अनुभव आहे. जाहिराती ह्मणजे भपका होय.

" ग्लाडस्टन साहेब ह्मणतात त्याप्रमाणें मनुष्यांची काय आणि राष्ट्रांचीं काय धनतृष्णा वाढत चालली आहे, त्यामुळें जीवनार्थ कलहाच मान फार वाढतें आहे. प्रत्यक्ष लढाया फार थोड्या होवोत; परंतु ह्या धनतृष्णेच्या लढाया आपणाभोंवतीं पदोपदीं चालल्या आहेत. देशहिताची सबब पुढें करून एनकेनप्रकारेण दुसऱ्याचा तोटा करणें ह्याला ' जीवनार्थ कलह ' असें ह्मणावें कीं नाहीं ?

दोन दरडींवर हात ठेवण्याची शकल ही मुत्सद्दीगिरी कोणाला वाटेल ती वाटो. मुत्सद्दीगिरी ह्मणजे डोळ्यांत धूळ फेंकण्याचीं एक कला असें मला वाटतें. मुत्सद्दीगिरीच्या पायींमोठमोठालीं राष्ट्रें तोंडघशीं कशीं पडतात हें जर आपल्या अनुभवास येतें तर स्वराज्य, स्वधर्म आणि स्वतंत्रता ह्या त्रयींची उन्नति करणाऱ्यानें सरळपणाचा मार्ग रोखून सालसपणा दाखविणें श्रेयस्कर आहे. आंधळा आडांत पडल्याचें नवल नाहीं, डोळस जाणून बुजून उडी टाकितो ह्यापासून दुष्कीर्ति पदरांत पडते हें 'स्वधर्म' शिकवीत नाहीं काय ? 'उषा' मासिकांतील संतसुधेचा आणि डॉक्टर वॉलेसच्या Social environment and moral progress [सामाजिक परिस्थिति आणि नैतिक प्रगति] ह्या पुस्तकांत 'परिपक्व विचारांचें अमृत भरलें आहे.' त्याचा आस्वाद श्रीयुत कोल्हटकरांनीं घेतला नसेल.

साप्ताहिक रणसंग्रामाच्या असंतुष्ट स्थितींत ठेविलेल्या वर्गणीदाराचें 'युगान्तर' अगर 'चाबूक' ह्यांच्या अंकांनीं श्री. कोल्हटकर हे नुकसान भरून काढितील तर हा चाललेला सांवळागोंधळ ह्मणजे कोल्हाट्याचें भारूड किंवा गारुड्याचें गारूड आहे असें मानण्यास जागा उरणार नाहीं. शहाण्यास एकच शब्द पुरा आहे.

डि. फं. ४ आणे. सारस्वत

---

aquele !

'ao mundo''. Sublimes palavras aquelas de Deus, Sim, nao podia ser dada

विजया नगरी विजयी झाली !

मिति पौष शु० ७ मी शके १८४६

भारताच्या प्रतिनिधीनीं बेळगांव येथें महात्मा गांधी, लाला लजपतराय, मालवीय, देवी सरोजनी व श्री. प्रकाशम यांच्या मु ाखती घेतल्या. मुलाखतींचा गोषवारा येत्या अंकीं प्रसिद्ध होईल. सं. भारत.

बेळगांव कॉंग्रेस

हो ना ह्मणतां ह्मणतां व यशापयशाचें विविधरंगी कल्पनाचित्र रेखाटतां रेखाटतां गेल्या महिन्याच्या २६ तारखेस ३ वाजतां महात्मा गांधींच्या अध्यक्षतेखालीं विजया नगरांतील कॉंग्रेससाठीं उभारलेल्या पॅंडल मध्यें राष्ट्रीय महासभेच्या कार्यास सुरवात होऊन दुसऱ्या दिवशीं ह्मणजे ता. २७ रोजीं ६ वाजतां तें संपलेंहि. विजयानगरांतील कॉंग्रेसच्या अवाढव्य पसाऱ्यानें एकंदर ८५ एकर जमीन व्यापून टाकिली होती निरनिराळ्या परिषदांसाठीं उभारलेल्या तंबूंवरील व प्रतिनिधींसाठीं बांधलेल्या कॅंपांवरील . तत्यांच्या पांढूर वर्णानें तेवढ्या भूप्रदेशाला एक प्रकारची अवर्णनीय शोभा प्राप्त झाली होती. महासभेच्या पॅंडल समोर 'गोपूर', [महादरवाजा] ह्या नांवाची टॉवर उभारली असून कर्नाटकाच्या कलाकौशल्याचें उंच मान करून प्रत्यंतर व उदाहरण दाखविणाऱ्या ह्या गोपूराची एकंदर उंची अंदाजें ७२ फूट होती. ह्या महादरवाजांतून आंत प्रवेश करतांच एक लहानशी फुलबाग होती. तींत लोकमान्य टिळकांचा पुतळा ठेवला असून त्याच्या मागें एक कारंजें उदकाचे फवारे उडवीत असलेलें दृष्टीस पडत होतें. कॉंग्रेसचा तंबू आंत १५०००लोक बसतील एवढा मोठा असून वक्त्यांचें भाषण सर्वांस सारखेंच ऐकूं येण्याजोगी मध्यस्थानीं व्यासपिठाची उभारणी केली होती. बड्या बड्या पुढाऱ्यांना रहाण्यासाठीं बंगल्यांची सोय केली होती पण महात्माजी मात्र एका झोंपडींतच रहात होते.

डॉ० हर्डीकरांच्या तडफदार तालमींत तयार झालेल्या हिंदुस्थानी सेवादलानें विजयानगरींत राखलेली शिकस्तीची शिस्त खरोखरीच अवर्णनीय होती. अलोट गर्दीनें लोटलेल्या लोकसमुदायाची जिज्ञासुवृत्ति अतृप्त न ठेवतांहि त्यांनीं शिस्तीस धोका दिला नाहीं. खुद्द विजयानगरींत तर सोडाच पण तिच्या आसपास ३।४ फर्लोंग काळा डगलावाले सरकार दूत फिरकले नाहींत व अभिमानाची गोष्ट ती हीच कीं, त्यांची तेथें काहीइतर्काहि जरुर भासली नाहीं. एकंदरींत लिहावयाचें ह्मणजे भावी हिंदी स्वराज्याचें मूर्तिमंत चित्र व त्यांतील राज्यकारभाराची हुबेहुब ठेवण जणुं काय रानटी हिंदी प्रजेचा जीव व मालमत्ता सुरक्षित राखण्याकरितांच केवळ सप्तसमुद्रपार वस्तींतून ७ हजार मैलांचें अंतर तोडून हिंदुस्थानांत आलेल्या गोऱ्या येशुभक्तांचा नक्षा उतरण्यासाठींच तेथें अवतरली असल्याचा शोधक दृष्टीनें त्या पांढऱ्या समुद्रावर नजर फेंकणाऱ्यास भास होत होता.

महात्माजींनीं आपल्या भाषणांत स्वराज्य योजनेची रूपरेखा खालीलप्रमाणें रेखाटली:—

चरका, हिंदु—मुसलमानांचें ऐक्य आणि अस्पृश्यता निवारण हीं फक्त एका साध्याच्या प्राप्तीसाठीं उपयोगांत आणण्याचीं साधनें आहेत. साध्य काय आहे, हें आपणांस माहीत नाहीं. मला साधनें कळलीं ह्मणजे पुरे. माझ्या जीवन तत्वज्ञानांत साधनें व साध्य हे एकमेकांचे पर्याय शब्द आहेत. पण मी पूर्वीच प्रसिद्ध केलें आहे कीं, बाबू भगवान दास यांच्या मताप्रमाणें लोकांना आपण कशाकरितां खटपट करीत आहों, हें कळणें जरूर आहे. साध्य त्यांच्या दृष्टीसमोर अगदीं स्वच्छपणें असलें पाहिजे. त्यांना स्वराज्याची योजना समजली पाहिजे. सुदैवानें सर्व-पक्षीय परिषदेनें नेमलेल्या राजकीय ऐक्य कमिटीकडे हें काम सोपविण्यांत आलेलें आहे आणि अशी आशा करणें वावगें नाहीं कीं, सर्व पक्षांना मान्य होईल अशा तऱ्हेची योजना ही कमिटी तयार करील. या कमिटीनें विचार करावा ह्मणून मी पुढील मुद्दे मांडीत आहें.

(१) मतदानाचा हक्क जिंदगी किंवा सामाजिक दर्जा यांजवर अवलंबून न राहतां शारीरिक कष्टाच्या मानानें प्राप्त व्हावा. उदाहरणार्थ, कॉंग्रेसच्या मताधिकारासाठीं सुचविलेली सूत काढण्याची अट. विद्वता किंवा मालमत्ता यांनीं उत्पन्न होणारी लायकी फसवणूक करणारी आहे. सरकारच्या व राज्याच्या हिताला उपयुक्त होईल असें काम करण्याची संधि शारीरिक कष्टाचें काम देते.

(२) सामान्यतः जीवित आणि मालमत्ता यांचें रक्षण होईल इतक्या पुरताच लष्करी खर्च करण्यांत यावा.

(३) न्यायदानानें काम स्वतः करण्यांत यावें. अखेरचें न्यायकोर्ट लंडन येथें न राहतां दिल्लीस असावें. पंचायती किंवा लवाद या मार्फतच शक्य तितके तंटे तुटतील अशी सक्तीची योजना असावी. पंचायतींचे निकाल होतां होईतों बंधनकारक असावे. मधलीं बरीच कोर्टें नाहींशीं करावीं. 'केस लॉ' ह्मणजे पूर्वीचे खटल्याचे निकाल अनुसरण्याची पद्धत बंद व्हावी व न्यायदानाचें काम सोपें करावें. इंग्रजी कायद्याचे प्रघात आपण आंधळ्या दास्य वृत्तीनें पाळले आहेत. वसाहतींत ही प्रवृत्ति नाहींशी करण्यांत येत असून वादीप्रतिवादीनीं आपले खटले चालवावे अशा करितां उत्तेजन देण्यांत येत आहे.

(४) मादक द्रव्यें व आसवें, शराब वगैरेपासून होणारें उत्पन्न एकदम रद्द करावें

(५) देशाला खरोखर सोसेल इतक्याच प्रमाणांत मुलकी व लष्करी [illegible] पगार बांधून देण्यांत यावे.

(६) प्रांतरचना भाषांवार व्हावी आणि अंतर्गत प्रगति व कारभार या बाबतींत प्रांतांना शक्य तितकें स्वातंत्र्य प्राप्त होईल असें करावें.

(७) परदेशाच्या लोकांना जे हक्क प्राप्त झाले आहेत, त्यांची एका कमिशनकडून चौकशी व्हावी आणि ते न्याय्य तऱ्हेनें प्राप्त झाले असल्यास त्यांच्या संरक्षणाबद्दल सरकारी रीतीनें जिम्मेदारी पत्करण्यांत यावी.

(८) संस्थानिकांना त्यांची स्थिति आहे अशीच व मध्यवर्ती सरकार त्यांत कांहीं बदल करणार नाहीं अशी खात्री देण्यांत यावी; मात्र संस्थानीं प्रजेला तिनें पीनल कोडाखालीं कांहं गुन्हा केला नसेल, तर स्वराज्योपभोगी हिंदुस्थानांत येऊन राहण्याची मोकळीक असावी.

(९) सर्व सुलतानी व अरेरावी अधिकार रद्द व्हावे.

(१०) लायकीप्रमाणें कोणतीहि जागा कोणालाहि मिळावी. मुलकी व लष्करी नोकऱ्यांच्या परीक्षा हिंदुस्थानांत व्हाव्या.

(११ ; सर्व धर्मांच्या व पंथाच्या लोकांना पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य असावें.

(१२) प्रांतिक सरकारें, कायदेमंडळें व कोर्टें यांची भाषा त्या त्या प्रांताची देशी भाषा असावी. प्रिव्ही कौन्सिल ह्मणजे अखेरची अदालत; त्याची भाषा हिंदुस्थानी असावी. लिपि देवनागरी किंवा पार्शियन. मध्यवर्ती सरकारची व कायदेमंडळाची भाषा हिंदुस्थानी असावी., आंतरराष्ट्रीय पत्रव्यवहाराची भाषा इंग्रजी असावी.

अखिल हिन्दुस्थानाच्या पुढील कार्याची दिशा आंखून देण्याकरीतां भरलेल्या ह्या राष्ट्रीय महासभेच्या ३९ व्या अधिवेशनात खालील ठराव पास झाले आहेतः—

१ ही राष्ट्रीय सभा बी. अम्मा, चौधरी, मुकर्जी, बसू, अय्यर, गिरी, याळगी, महारीर, गोपालस्वामी, शिवम् गोरखदु, नायडु व भुग्री ह्यांच्या मृत्युबद्दल दुःख प्रदर्शित करीत असून मृताच्या कुटुंबावर कोसळलेल्या आपत्तीबद्दल त्यांच्याशीं सहकार्य करीत आहे.

२अ] कलकत्त्यास झालेल्या गांधी—दास—नेहरू तहनाम्याला ही सभा पसंति दर्शवीत असून राष्ट्रीय सभेंतील दोन्ही पक्षांत एकी घडवून आणण्यांत व इतर राजकीय पक्षांस कॉंग्रेसला येउन मिळण्यांत ह्या पक्टाचा उपयोग होईल असें हीला वाटतें. बंगाल मध्यें जादा वटहुकुमान्वयें पकडलेल्या स्वराजिष्ट व तदितर मंडळीचें ही सभा अभिनंदन करीत असून ह्या प्रकाराला स्वायत्ततेच्या हक्कांशिवाय आळा घालणें शक्य नसल्यानें ते हक्क मिळविण्यास परदेशी कापडावर बहिष्कार घालणें इष्ट होय. राजकीय हक्कांविषयीं आपली उत्सुकता दाखविण्यास हातसुताची खादी हीच खूण प्रत्येकानें वापरावी. एतदर्थ सर्व विदेशी कापडांवर बहिष्कार टाकून हातसुती व हातविणीची खादी प्रत्येकानें वापरावी अशी हीची इच्छा आहे. ही राष्ट्रीयसभा राजपुत्रानां, इतर लक्ष्मीपुत्राना व राजकारण खेळणाऱ्या गड्यानां विनंति करते कीं त्यांनीं खादीचा प्रसार करून खादीवर नक्शी काम करणाऱ्या व सुंदर खादी विणणाऱ्या देशबंधूंस पारितोषक देण्याची व्यवस्था करावी. देशांतील व्यापाऱ्यानीं विदेशी कापडाचा व्यापार तहकूब ठेऊन स्वदेशोन्नतीस मदत करावी, गिरणीवर कापड विणून तें शुद्ध खादीच्या नावांखालीं विकणाऱ्या व्यापाऱ्यानीं व गिरणीवाल्यानीं हा अनिष्ट प्रकार बंद करून हिंदुस्थानांतील प्राचीन उद्योगधंद्यास सक्रीय उत्तेजन द्यावें. सर्व पक्षाच्या, धर्माच्या पुढाऱ्यानीं आपल्या अनुयायांस विदेशी कपडा टाकून खादीच वापरण्याविषयीं उपदेश करावा.

ब] प्रत्येक वर्षास २४००० वार आपल्या हातांनीं काढलेलें सूत कॉंग्रेसला दिल्याशिवाय कोणासच कॉंग्रेसचा सभासद होतां येत नाहीं. सिकपणा, नाखुषी किंवा असलेंच एकादें कारण असल्यास दुसऱ्याकडून काढून घेतलेलें तितकेंच सूत दिल्यास चालेल. ह्या सभासदत्वाचा वर्षारंभ १ जानुवारी पासून धरला जात असल्यानें प्रत्येक महिन्याच्या आगाऊ त्या महिन्याचें सूत द्यावें लागेल. येत्या वर्षाची सूत वर्गणी २०००० यार्ड सूतच ठेवली असून ती १ मार्चपर्यंत किंवा वर ठरविलेल्या मुदतीनें द्यावी. ही सूत वर्गणी न दिल्यास कोणासच कॉंग्रेसच्या व प्रांतिक समित्यांच्या कसल्याहि कामांत भाग घेतां येणार नाहीं. प्रत्येक प्रांतिक समितीनें सभासदांची संख्या व सूताची आयात प्रत्येक महिन्यास ऑ. इं. कॉं- कमिटीस कळवावी व उत्पन्नांतील शेंकडा दहा टक्के तीस रवाना करावें.

३ हिन्दुस्थानाबाहेर वसाहतींत रहाणाऱ्या हिन्दीगृहस्थांस भोगावे लागणाऱ्या कष्टांत ही सभा भाग घेत आहे.

४ श्रीमती सरोजनीबाई व श्री. वझे व चतुर्वेदी ह्यांनीं केलेल्या समुद्रपार चळवळीबद्दल ही राष्ट्रीय सभा पसंती व्यक्त करीत आहे.

५ ब्रह्मदेशस्थ लोकांस भोगाव्या लागणाऱ्या दुःखांबद्दलहि ही सभा खेद प्रदर्शीत करीत आहे.

६ हिन्दु मुसलमानांत दंगा होऊन झालेले कोहाट व गुलबुर्गा येथील अत्याचार या सभेला दुःख देत असून त्यांत दुःख भोगणाऱ्या वर्गाच्या कष्टांतहि ती भाग घेत आहे.

७ राष्ट्रैक्यास व हिंन्दुधर्मोन्नतीस अस्पृश्यता विघातक असल्यानें ती घालवून देण्याचा प्रयत्न प्रत्येकानें करावा असें ह्या राष्ट्रीय सभेचें मत आहे.

राष्ट्रीय महासभेंत पास झालेले ठराव हे असून त्यावर झालेलीं हृदय हालवून सोडणारीं भाषणें, हिंदु महासभेंतील ठराविक भाषणें, भारताच्या प्रतिनिधीमार्फत महात्माजींनीं 'भारत'कारांस पाठविलेला संदेश तसेंच इतर मोठमोठ्या पुढाऱ्यानीं भारताच्या प्रतिनिधीद्वारें दिलेले गोमांतकाला संदेश येत्या अंकीं प्रसिद्ध होतील.

... aquele ! ... ao mundo Sublimes palavras aquelas de Deus, Sim, nao podia ...

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2° oficio que este assina, a requerimento de Maria Felicia Siqueira, viuva de Sanguem, na execução hipotecaria que ela move a Xambá Sazú Sinai Salelcar e mulher e outros, da dita, vão ser vendidos em hasta judicial á porta do tribunal situado em Xeldem ao lado da estrada nacional que de Quepem se dirige á Curchorem, no dia 9 do seguinte mez de Janeiro, ás 10 horas e pelo preço superior ao da avaliação os seguintes bens: Direito a dois quintos da metade do predio denominado Cautor; Direito a um quinto do predio denominado Gundibata; E direit a um quinto da 1.a adição e a dois quintos da 2 a adição do predio denominado Zambapar, estes dois sitos em Cotarli e o 1° em Caccrá, todos da cultura de coqueiros, discritos na conservatoria do registo predial desta comarca, respectivamente, sob os n°s. 6312, 3190, e 6740 e avaliados em 300, 600 e 500 rupias, tambem respectivamente penhoardos na referida execução ficando por este citados todos os credores incertos dos ditos executados e os herdeiros do credor falecido Xamba Nagbá Saunto Dessai, casado proprietario que foi de Colem e o qual tem a seu favor creditos de 250 rupias e 70 rupias e 5 tangas as segurados por inscrições hipotecarias n°s. 1922 e 3513, bem como os co-proprietarios e quinboeiros, para deduzirem querendo, os seus direitos nos termos e para os fins da lei. E para ser publico se expediu este.

Xeldem da Comarca de Quepem, 10 de Dezembro de 1924

O Escrivão de Direito
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de rito e Nascimento

Pelo juizo de Direito da Comarca de Quepum e cartorio do escrivão do 1° oficio Redcar vai á venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca, no dia 9 de Janeiro proximo pelas 10 horas pelo maior lanço que se oferecer acima da avaliação o predio da varzea denominado Catorlem da cultura de arroz coqueiros e outras arvores, situado em Sirvoi discrito na conservatoria desta comarca sob o n° 3380 da copia avaliado por mil e quinhentas rupias, nos autos da carta precatoria vinda do Juizo de direito da comarca de Salcete e extraida dos autos de execução comum, que nesse juizo Pedro Antonio Alvares, morador em Lisboa, promove contra Agostinho da Piedade dos Santos Alvares e mulher de Margão e ora ousentes em parte incerta de Brazil. Quem o quizer arrematar compareça nos indicados dia, hora e local, correndo por conta do arrematante as despezas da praça e a contribuição de registo por inteiro. Por este são citados, nos termos e para os efeitos de lei, todos os credores incertos e os co-proprietarios. E para ser publico se expediu este. Xeldem 10 de dezembro de 1924

O Escrivão de Direito do 1° oficio
Babú V. Camotim Redcar
Verifiquei
O juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem, e cartorio do escrivão do 1° oficio Redcar, a requerimento da inventariante Etermina Henriques que é mãe administradora da sua filha menor Maria Antonieta Eronia Anastasio das Dores Fernandes, a quem foi autorisada á venda em hasta publica por deliberação do respectivo conselho de familia e ouvido o sr. Dr. Curador dos Orfãos, vai á venda em hasta publica a porta do tribunal judicial desta comarca no dia nove de Janeiro proximo pelas dez horas pels respectivo preço da sua avaliação, a metade do predio denominado Queloxia chi nomoxi, que fica ao nascente com metade sul do terreno que fica ao nascente denominado Soucreachem mola, da cultura de arroz, coqueiros, jaqueiras e outras arvores, sito em Cola de Cabo da Rama, discrito na conservatoria desta comarca sob o n° 5495 a fohas 146 do livro B. 17 avaliado por 1250 rupias, nos autos da carta precatoria vinda a este juizo e extraida dos autos de inventario orfanologico a que se procedeu no juizo de Direit da comarca de Salcete por obito de Faustino Aleluia Fernandes, que foi de Cavelossim, sendo inventariante a sua viuva dita Etermina Henriques. Quem a quizer comprar, compareça nos indicados dia, horas e local correndo por conta do arrematante as despesas da praça e a contribuição de registo por inteiro. Por este são citados nos termos e para os efeitos da lei todos os credores incertos, co-proprietarios, contra quaisquer preferentes. E para ser publico se expediu este. Quepem, 10 de Dezembre de 1924

O escrivão de Direito do 1° oficio
Babú V. Camotim Redcar
Verifiquei
O Juiz de Direito,
A. A: de rito e Nascimento

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 2° oficio que este assina, correm editos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2° do art. 197 do Cod. do Proc. Civ. citando a Socorro Rodrigues de Cavelossim, de Salcete e ora ausente em parte incerta de Bombaim do territorio Britanico, para na qualidade de marido da interessada Inacinha Rodrigues assistir a todas os termos até final do inventario orfanologico que o regedor de Cola, Govinda Visnum Porobo Dessaí, presta por obito de Filomena Fernandes, moradora que foi de Cabo de Rama e deduzir querendo nele os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento. E para ser publico se expediu este. Quepem, 10 de Setembro de 1924.

O escrivão de Direito
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de Direito da comarca de Quepem, e cartorio do escrivao do 1° oficio Redcar. correm editos de trinta dias a contar da segunda publicaçao deste no Boletim Oficial, citando Caxinata Sadassiva Sinai Gudo marido da interessada Siulem por outro nome Tarabai, residente actualmente em Bombaim, em parte incerta para assistir, querendo a todos os termos do inventario orfanologico a que se procede neste juizo por obito de Xembu' Sadassiva Odarcar que fo de Odar, sendo invetariante e cabeça de casal o seu filho Ramachondra Xembu' Sinai Odarcar da dita e deduzir os seus direitos sem prejuiso do andamento regular do mesmo inventario E para ser publico se expediu est, Quepem, 2 de outubro de 1924

O Escrivao de Direitc do 1° oficio
Babu' V. Camotim Redcar.
Verifiquei a Exactidao
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem, e cartorio do escrivão do 1° oficio Redcar á instancia do exequente cessionario Roque Piedade Pinto de Assolnã, correm éditos de trinta dias a contar da segunda publicação deste no Boletim Oficial, citando a executada Loximi bai, mulher de Data rama Vitola Sinai Volvotcar de Cuncolim, ora ausente em Narsobá-vadi, do territorio britanico, para a renovação da instancia dos autos civis de execução hipotecaria que o dito Roque promove contra a mencionada citanda e outros. E para ser publico se expediu este. Quepem, 16 de Dezembro de 1924.

O escrivão de Direito do 1° oficio,
Babú V. Camotim Redcar
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

स्फुट विचार

…कन्यात्र दुर्लभः— …व सरकारच्या निर्बंधांच्या ज्या दुर्दीच्या असल रोगानें ज…र्जर करून टाकलें आहे, त्याच दुर्धर रोगानें मकाववासीयांचेंहि जीवित कष्टतर बनविलें आहे. पण मकावसरकारनें नेतरहिताचें गोवासरकारच्या मिळेल त्या गोष्टीवर तारतम्यविचार-विरहीत कर लादण्याच्या अश्लाघ्य व लोकघातक धोरणाचें अनुकरण न करितां, ज्या वस्तु सार्वजनिक नीतीला व आरोग्याला बाधक आहेत, अशांतूनच करांच्या रूपानें तूट भरपाईला आवश्यक इतकें उत्पन्न काढण्याचा बेत केला आहे. दारू व तंबाकू या दोन गोष्टींकडेच मकाव येथें करांचा मोर्चा वळणार असून, येथील प्रमाणें त्यांची बाधा तांदळासारख्या गरीब लोकांच्या अन्नाला शिवणार नाहीं, ही समाधानाची गोष्ट होय. गार्नियें, स्मीथ, मिल्ल इत्यादिकांचीं अर्थशास्त्रांतील तत्वें तोंडपाठ म्हणून जनतेला गारीगार करून सोडणारे पण प्रसंग येतांच 'शेपटी पकडली गेलेल्या' पोराप्रमाणें मूळ स्वभावावरच जाऊन, तिच्या पाठीवर कररूपी तीक्ष्ण तरवारीचे निर्दय प्रहार करणारे आमचे शहाणे मुत्सद्दी व कसलेले राजकारणी मकाव सरकारच्या उपरोक्त त्यागापासून धडा घेतील काय ?

दुसरें उदाहरणः— बोकाळलेल्या चैनीला पायबंद घालण्याच्या हेतूनें जपाननें चहा, दारू, सेंट व इतर मौल्यवान पदार्थांवर १०० टक्के कर बसविण्याचा ठराव केला असून, बिचारी लोकांचें या ठरावाला पूर्ण पाठबळ आहे, अशा अर्थाची एक तार आली आहे. या वरून सुधारलेल्या जपानला चैनीचा कंटाळा आला असावा, असें सहज सिद्ध होतें. प्रत्येक बाबतींत नखशिखांत युरोपियनांचें अनुकरण करण्यास सढळ हातानें निढळच्या घामानें मिळविलेल्या संपत्तीचा चक्काचूर करण्यास पुढें न पहाणाऱ्या 'कंट्री साहेबांनां' जपानच्या उदाहरणानें, तरी साधा पेहराव करण्याची सद्बुद्धि होवो, असें इच्छितों. …ध्येयानुरूप आचरणांत फरक हा झाला पाहिजे. त्या शिवाय निभाव लागणें कठीण होय. सध्याची परिस्थिति चैनबाजीला अत्यंत प्रतिकूल असून, जो अभागी तिच्याशीं दंड थोपटून झगड्याला उभा राहील त्याला दांतीं तृण घेऊन शरण यावेंच लागेल. हें पूर्ण लक्षांत धरून, लोकांनीं स्वसंरक्षणार्थ सावधपणा ठेवावा, हेंच त्यांस उचित आहे.

…वचें शिक्षणः— आमच्या पाठशाळांतून देण्यांत येणारें शिक्षण एकांगी, अपूर्ण व भेसळट असून, या अशा सदोष शिक्षणांतून तयार होणारे नागरिक देशाचें नांव उज्ज्वळ राखण्यास किंवा मातृभूमीच्या वैभवांत भर घालण्यास सर्वथैव असमर्थ ठरतात, हें आज कोणास नव्यानें …णें असें नाहीं. लिस्बनचें शिक्षण देशभक्तांची निपज तर करीत नाहींच; उलट स्वतःच्या पायावर उभें राहून दुसऱ्याची वेळ निभावून नेण्यापुरती सुद्धां त्यांच्यांत पात्रता तयार करण्याची शक्ति लिस्बनांत नाहीं, असा अनुभव आहे. शारीरिक ऱ्हासाचें तर वर्णन करण्याचें कारण नाहीं. याची साक्ष खुद्द त्यांची निःसत्व, गलित व निवळलेली देहयष्टिच देत आहे. तात्पर्य लिस्बनचें शिक्षण राष्ट्र व भावी 'राष्ट्रवीर' या उभयतांसहि बिलकूल तारक नसून उलट मारक आहे, असेंच कबूल करणें भाग आहे.

'घरोघरीं मातीच्याच चुली':— पण गोमांतकांत जें लिस्बनच्या शिक्षणाचें भेसूर व हृदयविदारक दृश्य दृष्टिगोचर होत आहे, त्याच तऱ्हेचें किंबहुना त्याहि पेक्षां जास्त तापदायक स्वरूप इंग्रजी हिंदुस्थानांतील शिक्षणसंस्थांत अजूनहि आढळून येत आहे, हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. डोळे खोल गेलेले, नाकाच्या टप्पूवर 'चाळीसी' खिजविणारे, फिकटलेले व लांबटलेले 'पाप्याचे पितर' इतस्ततः विहार करतांना शेजारच्या प्रांतांत दिसून येत नाहींत, असें नाहीं. ही झाली शारीरिक अधोगतीची बाबत. ज्ञानसाधनाच्याहि गोष्टींत दोहोंकडे जवळ जवळ एकच मासला. म्हणण्यासारखा फरक नाहीं. व या फरकाच्या अभावामुळें अथवा दोहोंकडे शिक्षणाच्या अधोगतींत दिसून येणाऱ्या साम्यतेमुळें नवल वाटण्याचें वास्तविक कारण नाहीं. कां कीं, पोर्तुगीज-हिंदुस्थानांतील शिक्षण काय, किंवा इंग्रजी हिंदुस्थानांतील शिक्षण काय, दोन्हीहि परक्यांच्या देखरेखेखाल दिलीं जात असल्यानें, 'पोटतिडीके'च्या अभावीं दोन्हीकडच्या शिक्षणसंस्थांत एकाच प्रकारच्या दोषसमुच्चयानें धागडधिंगा व तोहि निष्कंटकपणें घालावा, यांत आश्चर्य तें कोणतें ? 'सातसमुद्र ओलांडून' आलेल्या स्वार्थी लोकानां जर आमच्या देशाच्या अभ्युदयाच्या काळजीनें डंचिलें असतें, तर पूर्वेचा सूर्य कधींच स्थानत्याग करून पश्चिमेला उदय पावला असता किंवा समुद्रानें आपल्या पाण्यांतील नैसर्गिक खारटपणाचें रूपांतर गोड्या पाण्यांत केलें असतें, हें उघड आहे.

'राजा कालस्य कारणम्'— लिस्बनच्या शिक्षणांत नादानपणा बोकाळण्याचें कारण अर्थात परकीयांचा एकसूत्री अंमल हें होय. गोमांतकप्रांत जोपर्यंत पोर्तुगालच्या मत्तेंत गणला गेला जाईल, तोंपर्यंत आम्हीं शिक्षणखात्यांत सत्ता गाजविण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी तो निष्फळच होईल, हें उघड आहे. खाजगी प्रयत्न यशस्वी होण्यासारखी …ल्यान्वी परिस्थिति असती तर त्यांतल्यात्यांत शिक्षणांत शक्य तितके फेरफार करून, त्याच्या नेभळट पणाची तीव्रता कमी करण्यास सोपें झालें असतें. परंतु सरकारी शिक्का नसलेल्या शिक्षणाची आवडच मुळीं बहुजन समाजाला नाहीं! अशा चमत्कारिक स्थितींत, एक तर सरकारकडून मेहरबानीनें दिला जात असलेला निरस व बेचवशिक्षणरूपी भाकरीचा तुकडा चघळीत समाधानवृत्तींत दिवस कंठणें भाग आहे, नपेक्षां अपहारलेल्या सत्तेचें माणिक परत मिळविण्याचे सामुदायिक प्रयत्न तरी झाले पाहिजेत. तिसरा मार्ग नाहीं. सदरील दोन मार्गांपैकीं दुसराच पंथ आक्रमिण्याची भावना जनतेंत प्रसृत करण्याची जबाबदारी पुढाऱ्यांवर येऊन पडते, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

अहोरूप महोध्वनिः— ब्रागांस व कोस्त हे गोमांतकातर्फे प्रतिनिधी या नात्यानें गेल्या मे महिन्यात लिस्बोअ येथें भरलेल्या वसाहत परिषदेला हजर राहिले होते, हें वाचकांस माहीत आहेच. परस्पराचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यांतच आमच्या शब्दशूर प्रतिनिधींची सर्व शक्ति गमावली गेल्यामुळें त्यांना इतर महत्वाची कोणतीच गोष्ट साध्य करणें अद्याप शक्य झालें नाहीं. नाहीं म्हटल्यास त्यांनीं वर्तमानपत्रांवर लेख खरडून व क्वचित् प्रसंगीं व्याख्यानेंहि झोडून गोमांतकांच्या गरजांची जाणीव पोर्तुगालला करून देण्याचा योग पदरांत घेतला. पण 'पोर्तुगाल गोमांतकाला विनस्थानीं आहे' या मुख्य तत्वाच्या पायावर उपरोक्त लेखांची व व्याख्यानांची इमारत उभारली गेली असल्यानें, त्यांच्या त्या चित्ताकर्षक लेखाचा व वक्तृत्वपूर्ण व्याख्यानांचा गोमांतकाला कितपत फायदा होईल, हें दिसतेंच आहे! एवंच तिजोरीच्या हलक्तीत शतभार लादण्याच्या शतकृत्याखेरीज, आमच्या प्रतिनिधींकडून दुसरी नांव घेण्यासारखी कसलीच कामगिरी पार पडली नाहीं, हें आमचें दुर्भाग्य होय !

सुखंच मे शयनंच मेः— 'कष्टेंवीण फळ नाहीं' या समर्थांच्या बहुमोल शिकवणाचें विस्मरण सामाजिक प्रगतीच्या गाड्याला खीळ घालीत असलेलें पहून, कोणालाहि खेदाश्रु वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. 'खाना पिना मजा मारना' या आळशी तत्वाचा पगडा बहुतेक तरुणांवर बसला असल्यानें, त्यानां सरकारी नोकरीचा व्यामोह इतका चिकटून राहिला आहे कीं, त्यांना त्या व्यतिरिक्त दुसरी बुद्धितेज फांकविणारी कोणतीच गोष्ट सूचत नाहीं ! जो उठतो तो कोणाचीहि कास धरून नोकरीची आपली आशा पुरविण्याचे कामीं शक्तिसर्वस्व वेंचण्यांत गढून गेलेला दिसतो ! वकील, डॉक्टर, जमिनदार हे लोकसुद्धां आपल्या स्वतंत्र धंद्यांत दरताळ फांसून नोकरीच्या बेगडी सत्तेनें स्वतःचें अस्तित्व विभूषित करण्याच्या कार्यांत चूर झालेले आढळून येतात. तात्पर्य, 'सुखंच मे शयनंच मे,' या मवाळ तत्वानें सुशिक्षित म्हणून मानला गेलेल्या वर्गाला अगदींच गचाळ बनविलें असून त्यानें राष्ट्रीय जिवास जहानागिरी केलें आहे, ही दुःखाची गोष्ट होय. जिवाचा धडा करून, जिवानिशीं अधोगतीस जाऊं पहात असलेल्या तरुणपिढीचा जीवसंरक्षण करणें, हें पुढाऱ्यांचें कर्तव्य होय.

साभार स्वीकार

मासफल शिक्षण क्रमः— ज्योतिष विषयक कोर्साचें हें एक लहानसें पुस्तक असून यांत मासफल शिक्षण क्रम आधुनिक शास्त्रीय पद्धतीनें आंखला गेला असल्यानें, जिज्ञासूंस सदर विषयाचें ज्ञान सुलभ व सहज रीत्या होण्या जोगें आहे.

मुहूर्त दीपिकाः— हेंहि एक ज्योतिष विषयक माहितीनें भरलेलें पुस्तक असून, यांत 'मुहूर्तकालसाधन' नावाचें एक प्रकरण आहे. विषयरचना सोपी आहे.

विवाह ज्योतिषः— या पुस्तकांत कोणत्या विषयाचा ऊहापोह केला असेल, हें वाचकांस त्याच्या नावांवरूनच समजण्यासारखें आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या आधारानें वधुवरांचीं नक्षत्रें जुळविण्यास ज्योतिष्यास त्रास देण्याचें कारण पडत नाहीं.

आकाश–ज्योतिषः— 'ज्योतिष शिक्षण कोर्सा' करितां लिहिला गेलेला हा निबंध जिज्ञासूंच्या सोईकरितां लेखकानें मुद्दाम स्वतंत्र छापण्याची परवानगी देऊन, ज्योतिष शास्त्रावर एक प्रकारें उपकारच केला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांतील माहितीहि फार उपयुक्त आहे.

ग्रहयोगः— हर्शल–नेपच्यून ग्रहयुति आणि कुंडली गुणनिर्णय हेंहि पुस्तक सदरील मालेचेंच असून, ज्योतिषशास्त्रांत ज्यांना प्रगति करून घेण्याची आकांक्षा असेल, त्यांनीं त्याचा अवश्य उपयोग करावा. वरील सर्व पुस्तकांचे प्रकाशक पुणें येथील 'ज्योतिर्भूषण'चे संपादक पंडित रघुनाथ शास्त्री पटवर्धन हे असून ज्योतिष शास्त्राच्या अभ्युदयासाठीं त्यांनीं चालविलेली चळवळ अभिनंदनीय आहे.

संध्याविधिः— ऋग्वेदी संध्याविधि भाग १।२ हें धार्मिक पुस्तक वा० ज० सिद्धये–किरात ऑफिस, वेंगुर्लें— यांकडून भेटीदाखल आलें आहे. पुस्तकाच्या पहिल्या भागांत त्रिकाल संध्येच्या समंत्रक प्रयोगाची माहिती दिली असून दुसऱ्यांत संध्येची उपयुक्तता वगैरे विवेचन आलें आहे. सर्वांनां संग्राह्य आहे. किंमत ४ आणे.

हितबोधः— बापाचा सासुरवासिनीस हितबोध हें पद्यमय पुस्तक कवि द. तु. पणशीकर, पेडणें, यांकडून 'भारताला' नजर आल्यास बरेच दिवस लोटले. केवळ स्थलसंकोचास्तव आजपर्यंत सदर पुस्तकाची पोंच देतां आली नाहीं, याबद्दल आम्हीं फार दिलगीर आहों. 'हितबोध' आम्हीं समग्र वाचला व लिहिण्यास आनंद वाटतो कीं, पणशीकरांची साधी पण रसाळ व हृदयांत आनंदाच्या गुदगुल्या उत्पन्न करणारी कविता आम्हांस मनापासून आवडली. पण शीकरांचा कवितेचा नाद फार जुना असून, त्यांचा नैसर्गिक कलहि काव्योत्पादनाला पोषक असल्यानें, दत्तात्रयपंताची कविता नेहमींच गोड व चित्ताल्हादक असते, असें नमूद करण्यास …

para ser … dos povos da India ? | que o Himu… | outro que … aquele ! | … da India | "ao mundo". Sublimes palavras aquelas | … fosse a propria parte da Verdade ou de Deus, Sim, nao podia ser dada

स्फुट विचार

मोगलाईतच दुर्लभ:— चीन सरकारच्या तिजोरीला ज्या तुटीच्या असाध्य रोगानें जर्जर करून टाकलें आहे, त्याच दुर्धर रोगानें मकावचेंहि जीवित कष्टतर बनविलें आहे. पण मकावसरकारनें रोगपरिहारार्थ गोवासरकारच्या मिळेल त्या गोष्टीवर सारासारविचारविरहीत कर लादण्याच्या अश्लाघ्य व लोकघातुक धोरणाचें अनुकरण न करितां, ज्या वस्तु सार्वजनिक नीतीला व आरोग्याला बाधक आहेत, अशांतूनच करांच्या रूपानें तूट भरपाईला आवश्यक इतकें उत्पन्न काढण्याचा बेत केला आहे. दारू व तंबाकू या दोन गोष्टींकडेच मकाव येथें करांच्या मोर्चा वळणार असून, येथील प्रमाणें साधी भाजी तांदळासारख्या गरीब लोकांच्या अन्नाला शिवणार नाहीं, ही समाधानाची गोष्ट होय. गार्नियें, स्मीथ, मिल्ल इत्यादिकांनीं अर्थशास्त्रांतील तत्वें तोंडपाठ म्हणून जनतेला गारीगार करून सोडणारे पण प्रसंग येतांच 'शेपटी पकडली गेलेल्या' पोपटाप्रमाणें मूळ स्वभावावरच जाऊन, तिच्या पोटावर कररूपी तीक्ष्ण तरवारीचे निर्दय प्रहार करणारे आमचे शहाणे मुत्सद्दी व कसलेले राजकारणी मकाव सरकारच्या उपरोक्त कृत्यापासून धडा घेतील काय ?

दुसरें उदाहरण:— बोकाळलेल्या चैनबाजीला पायबंद घालण्याच्या हेतूने जपाननें चहा, दारू, सेंट व इतर मौल्यवान पदार्थांवर १००टक्के कर बसविण्याचा निर्णय केला असून, विचारी लोकांचें या ठरावाला पूर्ण पाठबळ आहे, अशा अर्थाची एक तार आली आहे. या वरून सुधारलेल्या जपानला चैनीचा कंटाळा आला असावा, असें सहज सिद्ध होतें. प्रत्येक बाबतींत नखशिखांत युरोपियनाचें अनुकरण करण्यास सढळ हातानें निढळाच्या घामानें कमावलेल्या संपत्तीचा चक्काचूर करण्यास मागें पुढें न पहाणाऱ्या 'कंट्री साहेबानां' जपानच्या उदाहरणानें, तरी साधा पेहराव करण्याची सद्बुद्धि होवो, असें इच्छितों. परिस्थित्यनुरूप आचरणांत फरक हा झालाच पाहिजे. त्या शिवाय निभाव लागणें अशक्य होय. सध्याची परिस्थिति चैनबाजीला अत्यंत प्रतिकूल असून, जो अभागी तिच्या समोर दंड थोपटून झगड्याला उभा राहील, त्याला दांतीं तृण घेऊन शरण यावेंच लागेल. हें पूर्ण लक्षांत धरून, आज लोकांनीं स्वसंरक्षणार्थ साधेपणा स्वीकारावा, हेंच त्यांस उचित आहे.

लिसेवचें शिक्षण:— आमच्या पाठशाळांतून देण्यांत येणारें शिक्षण एकांगी, अपुरें व बेभरंवशाचें असून, या अशा सदोष शिक्षणांतून तयार होणारे नागरिक देशाची कीर्ति उज्ज्वल राखण्यास किंवा मातृभूमीच्या उन्नतींत भर घालण्यास सर्वथैव असमर्थ बनतात, हें आज कोणास नव्यानें सांगावयास पाहिजे असें नाहीं. लिसेवचें शिक्षण देशभक्तांची निपज तर करीत नाहींच; उलट स्वतःच्या पायावर उभें राहून दुसऱ्याची वेळ निभावून नेण्याइतकी सुद्धां त्यांच्यांत पात्रता तयार करण्याची शक्ति लिसेवांत नाहीं, असा अनुभव आहे. शारीरिक ऱ्हासाचें तर वर्णन करण्याचें कारण नाहीं. याची साक्ष खुद्द त्यांची निःसत्व, गलित व पिचलटलेली देहयष्टिच देत आहे. तात्पर्य लिसेवचें शिक्षण राष्ट्र व भावी 'राष्ट्रवीर' या उभयतांसहि बिलकूल तारक नसून उलट मारक आहे, असेंच कबूल करणें भाग आहे.

'घरोघरीं मातीच्याच चुली':— पण गोमांतकांत जें लिसेवच्या शिक्षणाचें भेसूर व हृदयविदारक दृश्य दृष्टिगोचर होत आहे, त्याच तऱ्हेचें किंबहुना त्याहि पेक्षां जास्त तापदायक स्वरूप इंग्रजी हिंदुस्थानांतील शिक्षणसंस्थांत अजूनहि आढळून येत आहे, हें नाकबूल करण्यात अर्थ नाहीं. डोळे खोल गेलेले, नाकाच्या टोकावर 'चाळीसी' खिजविणारे, फिकटलेले व लांबटलेले 'पाण्याचे पितर' इतस्ततः विहार करतांना शेजारच्या प्रांतांत दिसून येत नाहींत, असें नाहीं. ही झाली शारीरिक अधोगतीची बाबत. ज्ञानसाधनाच्याहि गोष्टींत दोहोंकडे जवळ जवळ एकच मासला. म्हणण्यासारखा फरक नाहीं. व या फरकाच्या अभावामुळें अथवा दोहोंकडे शिक्षणाच्या अधोगतींत दिसून येणाऱ्या साम्यतेमुळें नवल वाटण्याचें वास्तविक कारण नाहीं. कां कीं, पोर्तुगीज हिंदुस्थानांतील शिक्षण काय, किंवा इंग्रजी हिंदुस्थानांतील शिक्षण काय, दोन्हीहि परक्यांच्या देखरेखेखाल दिलीं जात असल्यानें, 'पोटतिडीके'च्या अभावीं दोन्हीकडच्या शिक्षणसंस्थांत एकाच प्रकारच्या दोषसमुच्चयानें धागडधिंगा व तोहि निष्कंटकपणें घालावा, यांत आश्चर्य तें कोणतें ? 'सातसमुद्र ओलांडून' आलेल्या स्वार्थी लोकानां जर आमच्या देशाच्या अभ्युदयाच्या काळजीनें झपाटलें असतें, तर पूर्वेचा सूर्य कधींच स्थानत्याग करून पश्चिमेला उदय पावला असता किंवा समुद्रानें आपल्या पाण्यांतील नैसर्गिक खारटपणाचें रूपांतर गोड्या पाण्यांत केलें असतें, हें उघड आहे.

'राजा कालस्य कारणम्'— लिसेवच्या शिक्षणांत नादानपणा बोकाळण्याचें कारण अर्थात परकीयांचा एकसूत्री अंमल हें होय. गोमांतकप्रांत जोपर्यंत पोर्तुगालच्या मत्तेंत गणला गेला जाईल, तोंपर्यंत आम्हीं शिक्षणखात्यांत सत्ता गाजविण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी तो निष्फळच होईल, हें उघड आहे. खाजगी प्रयत्न यशस्वी होण्यासारखी गोव्याची परिस्थिति असती तर त्यांतल्यात्यांत शिक्षणांत शक्य तितके फेरफार करून, त्याच्या नेभळटपणाची तीव्रता कमी करण्यास सोपें झालें असतें. परंतु सरकारी शिक्का नसलेल्या शिक्षणाची आवडच मुळीं बहुजन समाजाला नाहीं! अशा चमत्कारिक स्थितींत, एक तर सरकारकडून मेहरबानीनें दिला जात असलेला निरस व बेचवशिक्षणरूपी भाकरीचा तुकडा चघळीत समाधानवृत्तींत दिवस कंठणें भाग आहे, नपेक्षां अपहारलेल्या सत्तेचें माणिक परत मिळविण्याचे सामुदायिक प्रयत्न तरी झाले पाहिजेत. तिसरा मार्ग नाहीं. सदरील दोन मार्गांपैकीं दुसराच पंथ आक्रमिण्याची भावना जनतेंत प्रसृत करण्याची जबाबदारी पुढाऱ्यांवर येऊन पडते, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

अहोरूप महोध्वनिः—ब्रागांस व कोस्त हे गोमांतकातर्फे प्रतिनिधी या नात्यानें गेल्या मे महिन्यात लिस्बोअ येथें भरलेल्या वसाहत परिषदेला हजर राहिले होते, हें वाचकांस माहीत आहेच. परस्परांचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यांतच आमच्या शब्दशूर प्रतिनिधींची सर्व शक्ति गमावली गेल्यामुळें त्यांना इतर महत्त्वाची कोणतीच गोष्ट साध्य करणें अर्थात शक्य झालें नाहीं. नाहीं म्हटल्यास त्यांनीं वर्तमानपत्रांवर लेख खरडून व क्वचित् प्रसंगीं व्याख्यानेंहि झोडून गोमांतकाच्या गरजांची जाणीव पोर्तुगालला करून देण्याचा योग पदरांत घेतला. पण 'पोर्तुगाल गोमांतकाला पित्रस्थानीं आहे' या मुख्य तत्वाच्या पायावर उपरोक्त लेखांची व व्याख्यानांची इमारत उभारली गेली असल्यानें, त्यांच्या त्या चित्ताकर्षक लेखाचा व वक्तृत्वपूर्ण व्याख्यानांचा गोमांतकाला कितपत फायदा होईल, हें दिसतेंच आहे ! एवंच तिजोरीच्या हलाखींत दातमार लादण्याच्या शतकृत्याखेरीज, आमच्या प्रतिनिधींकडून दुसरी नांव घेण्यासारखी कसलीच कामगिरी पार पडली नाहीं, हें आमचें दुर्भाग्य होय !

सुखंच मे शयनंच मेः— 'कष्टेंवीण फळ नाहीं' या समर्थांच्या बहुमोल शिकवणीचें विस्मरण सामाजिक प्रगतीच्या गाड्याला खीळ घालीत असलेलें पाहून, कोणालाहि सखेदाश्चर्य वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. 'खाना पिना मजा मारना' या आळशी वर्गाचा पगडा बहुतेक तरुणांवर बसला असल्यानें, त्यानां सरकारी नोकरीचा व्यामोह इतका चिकटून राहिला आहे कीं, त्यांना त्या व्यतिरिक्त दुसरी बुद्धितेज फांकविणारी कोणतीच गोष्ट सूचत नाहीं ! जो उठतो तो कोणाचीहि कास धरून नोकरीची आपली आस पुरविण्याचे कामीं शक्तिसर्वस्व वेंचण्यांत गढून गेलेला दिसतो ! वकील, डॉक्टर, जमिनदार हे लोकसुद्धां आपल्या स्वतंत्र धंद्यांस हरताळ फांसून नोकरीच्या बेगडी सत्तेनें स्वतःचें अस्तित्व विभूषित करण्याच्या कार्यांत चूर झालेले आढळून येतात. तात्पर्य, 'सुखंच मे शयनं च मे,' या मवाळ तत्वानें सुशिक्षित म्हणून मानला गेलेल्या वर्गाला अगदींच गचाळ बनविलें असून त्यानें राष्ट्रीय जिवास उद्दामगिरी केलें आहे, ही दुःखाची गोष्ट होय. जिवाचा धडा करून, जिवानिशीं अधोगतीस जाऊं पहात असलेल्या तरुणपिढीचा जीवसंरक्षण करणें, हें पुढाऱ्याचें कर्तव्य होय.

साभार स्वीकार

मासफल शिक्षण क्रमः— ज्योतिष विषयक कोर्साचें हें एक लहानसें पुस्तक असून यांत मासफल शिक्षण क्रम आधुनिक शास्त्रीय पद्धतीनें आंखला गेला असल्यानें, जिज्ञासूंस सदर विषयाचें ज्ञान सुलभ व सहज रीत्या होण्या जोगें आहे.

मुहूर्त दीपिकाः— हेंहि एक ज्योतिष विषयक माहितीनें भरलेलें पुस्तक असून, यांत 'मुहूर्तकालसाधन' नावाचें एक प्रकरण आहे. विषयरचना सोपी आहे.

विवाह ज्योतिषः— या पुस्तकांत कोणत्या विषयाचा ऊहापोह केला असेल, हें वाचकांस त्याच्या नावांवरूनच समजण्यासारखें आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या आधारानें वधुवरांचीं नक्षत्रें कुळविण्यास डोक्यास त्रास देण्याचें कारण पडत नाहीं.

आकाश–ज्योतिषः—'ज्योतिष शिक्षण कोर्सा' करितां लिहिला गेलेला हा निबंध जिज्ञासूंच्या सोईकरितां लेखकानें मुद्दाम स्वतंत्र छापण्याची परवानगी देऊन, ज्योतिषशास्त्रावर एक प्रकारें उपकारच केला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांतील माहितीहि फार उपयुक्त आहे.

ग्रहयोगः— हर्शल–नेपच्यून ग्रहयोग आणि कुंडली गुणनिर्णय हेंहि पुस्तक वरील मालेचेंच असून, ज्योतिषशास्त्राची ज्यांना प्रगति करून घेण्याची आकांक्षा असेल, त्यानीं त्याचा अवश्य उपयोग करावा. वरील सर्व पुस्तकांचे प्रकाशक पुणें येथील 'ज्योतिर्भूषण'चे संपादक पंडित रघुनाथ शास्त्री पटवर्धन हे असून ज्योतिष शास्त्राच्या अभ्युदयासाठीं त्यांनीं चालविलेली चळवळ अभिनंदनीय आहे.

संध्याविधिः— ऋग्वेदी संध्याविधि भाग १।२ हें धार्मिक पुस्तक वा० ज० सिद्धये–किरात ऑफिस, वेंगुर्लें— यांकडून भेटीदाखल आलें आहे. पुस्तकाच्या पहिल्या भागांत त्रिकाल संध्येच्या समंत्रक प्रयोगाची माहिती दिली असून दुसऱ्यांत संध्येची उपयुक्तता वगैरे विवेचन आलें आहे. सर्वानां संग्राह्य आहे. किंमत ४ आणे.

हितबोधः— बापाचा सासुरवासिनीस हितबोध हें पद्यमय पुस्तक कवि द. तु. पणशीकर, पेडणें, यांकडून 'भारताला' नजर आल्यास बरेच दिवस लोटले. केवळ स्थलसंकोचास्तव आजपर्यंत सदर पुस्तकाची पोंच देतां आली नाहीं, याबद्दल आम्हीं फार दिलगीर आहों. 'हितबोध' आम्हीं समग्र वाचला व लिहिण्यास आनंद वाटतो कीं, पणशीकरांची साधी पण रसाळ व हृदयांत आनंदाच्या गुदगुल्या उत्पन्न करणारी कविता आम्हांस मनापासून आवडली. पण शीकरांचा कवितेचा नाद फार जुना असून, त्यांचा नैसर्गिक कलहि काव्योत्पादनाला पोषक असल्यानें, दत्तात्रयपंताची कविता नेहमींच गोड व चित्ताल्हादक असते, असें नमूद करण्यास

9 ... 48

Quint... de Feveraito de 1925

S. R. Biblioteca Na... Pangim

...NATURA
...ano tres rupias

...NCIOS
Por ca... a que repetida uma tanga
...uiso uma tanga

...OR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत

BHARAT

...९ ... ५ अंक ४८

गुरुवार ता. २६ फेब्रुवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें-गोवा

AO VEIO DO TEMPO...

O Ultramar tem, por estes tempos desvelado a sua atençao pelos problemas que afeiam, profundamente, a epiderme da India, pela pena dum dos seus ilustres colaboradores que assistiu a's sessoes do Congresso de Belgao, o sr. Sebastiao de Figueiredo. Em tres primeiros artigos o sr. Figueiredo pos os leitores ao corrente do que se passara em Belgao com mais verdade do que o diario *Times of India* que, ninguem ignora, e' uma porta-voz do sentir e pensar do Governo britanico.

Todos os aplausos sao devidos ao sr. S. de Figueiredo pelo grande serviço que prestou aos leitores que nao sabem ler o ingles ou nao leem jornais escritos em ingles.

Porem, no seu ultimo artigo *"Satyagraha"*, saltaram-nos a' vista alguns deslises que antes parecem filhos de uma errada interpretaçao.

Vejamos, pormencrisadamente, quais sao eles:

"...o seu ideal, luminoso sim, mas vertiginoso, ala se pelas culminancias ideologicas e transcendentais, nao se dedignando de baixar para os dominios das realisaçoes praticas."

Nao podemos concordar com esse modo de ver. Pois nao ignora, com certeza, o sr. Figueiredo os triunfos alcançados pelo Mahatma' na Africa do Sul. Que mais realisaçoes praticas queria o sr. Figueiredo, alem da *boycotage* a's escolas e a's repartiçoes publicas, de directamente intrometer-se em questoes de mais vital interesse a' India. Incessantemente incitando-os, por meio de discursos, conferencias e artigos ponderados no seu excelente jornal *Young India*.

Que mais queria o sr. Figueiredo que Gandhi fizesse?

Mais adiante encontram-se estas linhas: "mas dificilmente sera' o libertador da India."

E' uma afirmaçao muito ousada. Se Gandhi nao pode ser o libertador da India quem acha o sr. Figueiredo que tenha dotes e qualidades suficientes para arcar com as tremendas responsabilidades de um libertador? Quem ha que tenha uma alma tao limpa, uma consciencia tao tranquila, enfim, que seja um homem perfeito para ser um mentor dos povos da India?

Sem duvida, so' Mahatma', "o homem identificado com Deus, a *Alma Grande*, pode com plena certeza, aspirar um tao enorme triunfo. Apesar de divergencias as mais desencontradas, apesar de a India estar dividida e fracionada em inumeros partidos, que grande nao sera' o poder dominador de Gandhi, para, apesar de tudo isto, Gandhi ser eleito Presidente do Congresso Nacional de Belgao, por uma maioria esmagadora?...

Depois disto o sr. Figueiredo assaca a Gandhi erros tao grandes como os Himalaias e cre' que o futuro lhe acarretara' maiores ainda. Julgamos que o sr. Figueiredo nao tenha, talvez tido noçao da altura do Everest, ou que o Himalaia do sr. Figueiredo seja outro que nao a...uele!

Mas o que desejava o sr. Figueiredo que Gandhi fizesse? Seguisse uma politica diversa daquela que ele, tao ardentemente, segue? Onde estara' pois, entao a sua bondade que e' a faceta mais brilhante e mais simpatica do espirito humano?...

Que maiores erros nao teria Gandhi, que resultados mais tristes nao adviriam se ele, ao contrario do que hoje prega, ensinasse a todos a doutrina perigosa da violencia, da guerra que e' arma estupida da carnificina sangrenta de que foi teatro a Europa durante os horrendos e terrificos quatro anos!

A *ahinsa'* ou a *nao violencia*, bem a definiu Romain Rolland, "palavra magica, sublime mensagem da India ao mundo". Sublimes palavras aquelas de Rolland no prefacio do ultimo livro *La Jeune Inde*, repositorio de todos os artigos publicados por Gandhi no seu *Young India*, trasladados a frances macisso por Hetene Hart "Gandhi nao diz que ela (a Nao-Violencia) salvara' hoje a Humanidade. Ele nao sabe se a Humanidade actua sera' salva. Mas se ela o for, nao pod ser senao pela Nao-Violencia." E o proprio Gandhi diz: "A nao-violencia compreende, assim, a inocencia absoluta A nao violencia absoluta e' uma ausencia total de mau querer contra tudo o que vive..." A nao-violencia, e' desejar o bem a tudo oqui existe. E' o amor puro. Eu o li na Escrioura santa hindu', na Biblia e no Alkorao. "A nao-violencia e' um estado perfeito."

Depois o sr. Figueiredo analisa este trecho do magistral discurso de Gandhi, muito de animo leve, sem querer prescrutar o sentido oculto e as entrelinhas, pois, tudo tem de ser interpretado segundo duplo criterio, e fazer o possivel para se ser capaz de aproximar-se da idea do autor:

"Satyagraha is search for Truth and God is Truth. Ahimsa or non-violence is the light that reveals that truth to me. Swaraj for me is part of that truth."

Analisa este periodo da seguinte maneira:

"O sr. Gandhi diz, e diz muito bem que Deus e' a verdade. Mas, infelismente, obcecado pelo amor da patria diz a seguir que o Swaraj, para ele e' parte daquela Verdade. Com o que temos que o Swaraj e' parte de Deus! O unico sentido qua se pode espremer dessa asserçao e' que a formula do Swaraj e' tao universal e necessaria como a propria existencia de Deus."

Nao e' esta a unica ilaçao que se pode tirar deste periodo; nao. "Ahinsa' ou nao-violencia e' a luz que me revela esta verdade. O *Swaraj* para mim, e' a parte desta verdade" diz Gandhi; Quer isto dizer que o Swaraj e' a parte de Deus? Nao, de forma alguma. Gandhi, o mistico, o religioso nunca podia interpretar deste modo. O que, naturalmente, dimana daquelas palavras e' que sendo a *Ahinsa'* a luz por meio da qual ele fica sciente da Verdede, e que o *Swaraj* para ele e' tao precioso, tao querido como se fosse a propria parte da Verdade ou de Deus, Sim, nao podia ser dada

RECORDANDO...

Diz o *Bharat* que o sr. Dr. S. Rau, que falou das colunas da *Provincia* perdeu uma bela ocasião de estar calado.

Eu não conheço o Dr. Rau nem o seu artigo estampado no semanario do Batalha, nem preciso conhece-lo. Basta, para fazer as minhas notas, que saiba que o Dr. Rau é burocrata e o assunto do artigo é a *politica hindú*. Podia o burocrata Dr. Rau exprimir em letra de forma, com o seu nome por baixo, opinião diversa da que manifestou? Não, de certo, porque, nos tempos que vão correndo, tal não é permetido. Hoje em Gôa, a norma é—"Se não é por nós é contra nós"—a mesma dos *saudosos* tempos da Santa Inquisição. Porventura o Dr. Rau, porventura os leitores estarão esquecidos da sorte do prof Palondicar? Na verdade o Dr. Rau podia continuar calado. Quem não pode ter sinão uma certa opinião, milhor faz de não ter nenhuma. O Dr. Rau taxa de subversiva a politica hindú, o que è mesmo que dizer agentes subversivos aos que a dirigem, como o H. Dessai.

Ha dias, quando soube esta opinião do Dr. Rau, lembrei-me de um outro magistrado, então delegado, que no plenario, afirmara -"que em outra parte quem nada tem a fazer faz colheres de pau e aqui faz jornal"— e isto referindo-se a Siurama Rau, director de um jornal *Opinião Hindú* em N. Gôa, como hoje sucede com H. Dessai, em Quepêm.

Passaram anos. Siurama Rau tornou-se Dr. S. Rau, magistrado colega daquele magistrado, e a merecida reparação veio por sinal numa memória ultimamente publicada.

¿Quere H. Dessai uma reparação igual? O caminho está indicado —Portugal—Bacharel—Magistrado. E' facil e o cambio é favoravel. Peço, porém, que não me chame *colher de pau* nem *subversivo* depois de bem jantado e bem instalado. Isto é em paga do conselho. Doutros pode dizer mal—fomenta o *bacharelismo*!

Zé—Zé

समाज सुधारणा

विवाह

लेखांक ५ वा.

बालविवाहाचें कारण हिंदुस्थानची उष्णता नाहीं

आमच्या नव्या धर्मशास्त्रानें बहुतेक सुशिक्षितांवर सुद्धां असा पगडा बसविलेला आहे कीं, आपल्या देशांत मुलीला बऱ्याच लवकर रजोदर्शन होत असतें व याचें कारण भारत वर्षाची उष्णता होय. व याला उदाहरणा दाखल ते बंगालमधील १२–१३ वयाच्या बाल मातांकडे बोट दाखवीत असतात. लोकांचा असा दृढ विश्वास झालेला आहे कीं, जरी सबंध हिंदुस्थानांमध्यें असा प्रकार दिसून येत नसला तरी बंगाल व संयुक्त प्रांत यांमध्यें प्रकृति दहा वर्षांच्या मुलींना विवाहाला किंबहुना माता होण्याला तयार करीत असते. ते ह्मणतात दहा वर्षांच्या स्त्रियांना मुलें झालेलीं असून त्यांतील बहुतेक मुलें व त्यांच्या आया अद्याप जीवंत आहेत.

डॉ० चक्रवर्ती ह्मणतात: " जिला दहा वर्षांवर मूल झालें अशा एका स्त्रिला मी लहानपणापासून ओळखीत आहें ". डॉ० राबर्टसन ह्मणतात: " एका कारखान्यामध्यें काम करणारी ११ वर्षांची स्त्री गर्भवती झाली." डॉ० बेली ह्मणतात" कलकत्त्यांतील एका जमीनदाराच्या मुलीला अकरा वर्षें ५ महिने वर्षांच्या वयावर मुलगा झाला ". याशिवाय आणखी कांहीं जमीनदारांच्या स्त्रियांची नांवें त्यांनीं दिलेलीं आहेत. डॉ० ग्रीन ह्मणतात" ढाकामध्यें एका स्त्रीला १२ वर्षांच्या वयावर मुलगा झाला पण तिला आपला देह ठेवावा लागला. डॉ० कन्हयालाल ह्मणतात: " बंगालमध्यें बहुतेक स्त्रिया बाराव्या वर्षी माता होत असतात.'

[पहा Medical G. For India पा.६७३]

याप्रमाणें एक दोनच नाहींत तर हजारों बालमाता आपल्या हिंदुस्थानामध्यें आहेत. आतां आपणाला हें पाहिलें पाहिजे कीं, ही स्थिति येण्याला हिंदुस्थानामधील उष्णता कारण आहे कीं काय ? नसल्यास दुसरीं कारणें कोणतीं ? तसेंच दुसऱ्या देशामध्यें काय स्थिति आहे ?

जगप्रसिद्ध डॉ० हालिक ह्मणतात " पुष्कळ शोधाअंतीं असें दिसून आलें आहे कीं, जगांतील सर्व जातीच्या मुलींनां एकाच वेळीं रजोदर्शन प्राप्त होत असतें. आफ्रिकेसारख्या उष्ण देशांतील काफ्री मुलगी व युरोपसारख्या थंड देशांतील गोरी मुलगी या दोन्हीहि जर एकाच परिस्थितींत असल्या तर दोघांनाहि एकाच वेळीं रजोदर्शन प्राप्त होणार.

(पहा The Origin Of Life पा. ३६३)

मिस्टर राबर्टसन यांनीं पुष्कळ शोध करून असें मत ठरविलेलें आहे कीं, जगांतील सर्व देशांतील मुलींनां लगभग एकाच वेळीं रजोदर्शन प्राप्त होत असतें. ते ह्मणतात कीं हिन्दुस्थानांतील मुली प्राकृतिक नियमानुसार रजस्वला होत नसतात तर कांहीं चालींतील परिस्थितीच त्यानां ही स्थिति लवकर प्राप्त करून देते. ते ह्मणतात " हिन्दुस्थानांतील राजकीय व सामाजिक परिस्थिति अतिशय बिघडलेली आहे. येथील कायदे व रीतिरिवाज अशा स्थितींत आहेत कीं, त्यानीं हिन्दुस्थानांतील स्त्रियांना मूर्ख बनवून टाकलेलें आहे. येथील विवाहसंबंधीं धार्मिक पुस्तकें असा उपदेश देत असतात कीं, हिन्दुस्थानांतील मुली लवकर रजस्वला होत असतात. जर अमेरिका व इंग्लंड या देशामध्येंहि अशीच परिस्थिति असती तर तेथील मुलीनाहि हीच स्थिति प्राप्त झाली असती. अमेरिकेंतील ११–१२ वर्षांच्या वाईट चालीच्या Prostitutis मुली सुद्धां १७–१८ वर्षांच्या स्त्रियांसारख्या दिसत असतात. कोणत्याहि देशांतील मुलींनां जर वाईट परिस्थितींत ठेवलें तर त्यांना इतरांपेक्षां लवकर रजोदर्शन प्राप्त होणार. खेडेगावांतील मुलीपेक्षां शहरांतील मुली जास्त लवकर रजस्वला होत असतात. याचें कारण शहरांतील परिस्थिति होय.

(The Origin Of Life पान 378)

तारुण्यावस्था अकालीं प्राप्त होण्याचा एक मार्ग ह्मणजे प्रेमाच्या गोष्टी करणें हा होय. अशा प्रकारच्या गोष्टीनीं लहान मुलांमुलींच्या मनावर वाईट परिणाम होत असतो. भगवान धन्वंतरी आपल्या सुश्रुतमध्यें ह्मणतातः "हिन्दुस्थानांत कन्या बारा वर्षांच्या वयावर रजस्वला होत असते व हा रजोधर्म पन्नास वर्षें वयाच्या दरम्यान बंद होत असतो."

जगांतील सर्व देशामध्यें रजस्वला होण्याचा हाच नियम आहे. अत्यंत थंड प्रदेश अशा इंग्लंडमध्यें सुद्धां तेथील मुली इतक्याच वयावर रजस्वला होत असतात. तेथेंहि बारा ते सतरापर्यंत, केव्हां केव्हां तर नऊ वर्षांच्या वयावर त्यांनां रजोदर्शन प्राप्त होऊन ४५ ते ५० पर्यंत बंद होत असतें.

इंग्लंडमधील " मंचेस्टर लाइंग इन " या हॉस्पिटलमध्यें ३४० मुलींची परीक्षा घेतली त्यांत १० मुलीनां अकराव्या वर्षी, १९ मुलीनां बाराव्या वर्षी, ५३ मुलीनां तेराव्या वर्षी, ८५ मुलीनां चौदाव्या वर्षी, ९७ मुलीनां पंधराव्या वर्षी व ७६ मुलीनां सोळाव्या वर्षी रजोदर्शन प्राप्त झालें.

हिंदुस्थानांमध्येंहि २७ युरोपियन मुलींची परीक्षा केली त्यांत खालील प्रमाण आढळून आलें:

४	मुलींना	१२ – १३	वयामध्यें
८	,,	१३ – १४	,,
९	,,	१४ – १५	,,
५	,,	१५ – १६	,,
१	,,	१६ – १७	मुलीनां रजोदर्शन प्राप्त झालें.

डॉ० हाटक्लिन्स ह्मणतात " दोघां युरोपियन मुलीनां इतक्या लवकर रजोदर्शन प्राप्त झालें कीं, त्या ११ वर्षें ७ महिने वयावर माता झाल्या असत्या. डॉ० राबर्टसन ह्मणतात "हिंदुस्तान व इंग्लंड या दोनहि देशांमध्यें नऊ वर्षांच्या मुली रजस्वला होत असतात."

या थोर पुरुषांच्या शोधांवरून असें दिसून येतें कीं, जगामध्यें रजस्वला होण्याची वेळ प्रकृतीनें एकच ठेवलेली आहे. आतां आपणाला दुसऱ्या देशांमध्यें बालविवाहाची चाल होती किंवा काय हें पाहिलें पाहिजे.

बाल विवाहाची चाल सर्व देशांमध्यें —ज्या वेळीं ते देश असभ्यतावस्थेंत होते त्या वेळीं—होती. इंग्लंडमध्यें अठराव्या शतकाच्या सुरवातीला सुधां ही वाईट चाल प्रचारांत होती. फ्रान्समधील फिलीप राजानें इंग्लंडांतील बारा वर्षांच्या राजकुमारीकडे लग्न केलेलें होतें. तसेंच दुसऱ्या राजकुमारीचा विवाह नवव्या वर्षी झालेला होता. ज्यावेळीं इंग्लंडमधील राजा रिचर्ड याचा विवाह फ्रान्सच्या राजकन्येकडे झाला त्या वेळीं तीचें वय आठ वर्षांचें होतें. श्रीमती एलिझाबेत हार्डविकचा विवाह तेराव्या वर्षी झाला. इंग्लंडचा राजा सातवा हेनरी अति दुर्बल होता. याचें कारण त्याची आई लेडी मार्गारेट इचा विवाह नवव्या वर्षी झाला होता. व ज्या वेळीं हेनरीचा जन्म झाला त्यावेळीं तिचें वय केवळ दहा वर्षांचें होतें. त्याकाळीं इंग्लंड मधील उच्च लोकांची स्थिति अशी होती. ते बहुतेक लहान वयांत आपल्या मुलांमुलींचा विवाह करीत असत.

मॉरिस(Maurice 23, Lord Berkly Edward 1) चा विवाह आठ वर्षांच्या वयावर झालेला होता. त्यानां चवदावें वर्ष लागण्यापूर्वी मुलगा झाला. बरजीनीया मधील एका मुलीला तेराव्या वर्षी कोणतेहि कष्ट न पडतां मुलगा झाला. इंग्लंड मधील एका तरुण स्त्रीनें दहा वर्षांच्या मुलाकडे पापकर्म केलें. हें कर्म करते वेळीं तिच्या मनांत आपणाला गर्भ राहील अशी अंधुकशी सुधां कल्पना नव्हती परंतु तिचा तर्क चुकला. तसेंच एका दहा वर्षें तेरा दिवस वयाच्या मुलीला मुलगा झाला. त्याचें वजन ७ पौंड होतें. टेलर साहेब ह्मणतात 'कोणत्याहि देशांतील नऊ वर्षांच्या मुली सुधां गर्भवती होऊं शकतात, यांत आश्चर्यकारक असें कांहीं नाहीं.'

जग प्रसिद्ध डाक्टर हालिक लिहितात " मी एक सात वर्षांचा मुलगा विषय सेवन करण्यास योग्य असा पाहिलेला आहे. सात वर्षांच्या मुलाकडून गर्भधारणा होऊं शकते, हें पाहून प्रकृतीच्या अद्भुत नियमाबद्दल फार आश्चर्य वाटतें.

वरील प्रमाणावरून असें सिद्ध होतें कीं, अतिशय थंड प्रदेशांत सुधां हिंदुस्थानसारख्या उष्ण प्रदेशाप्रमाणेंच स्त्रियांना रजोदर्शन व गर्भधारणा होऊं शकते. अर्थातच हिंदुस्थानांतील या चालीचा उष्णतेशीं कांहींच संबंध नाहीं.

मुसलमानांमध्यें सुद्धां ही वाईट चाल प्रचारांत होती. त्यांच्या कायदे कानूच्या पुस्तकावरून असें दिसून येतें कीं, सात वर्षें वयाच्या पुढें मुलीकडे संभोग करणें नियम बाह्य नाहीं. मुसलमानाच्या नबी मुटफट साहेबांनीं सात वर्षें वयाच्या आयेशेशीं लग्न केलेलें होतें व जेव्हां ती आठ वर्षांची झालीं त्यावेळीं तिच्याकडे स्त्रियेसारखें वर्तन ठेवलें. जर कोणत्याहि मुलीला नवव्या अगर दहाव्या वर्षी तारुण्याचीं चिन्हें प्राप्त झालीं तर ती स्त्री झालेली आहे असें समजलें जातें. पुष्कळशा उदाहरणावरून भिन्न अशा देशांमध्यें ही ज्या अर्थी एकसारखी स्थिति आहे त्या अर्थी हिंदुस्थानांतील बाल विवाहाची चाल येथल्या हवामानावरून रुढ झालेली आहे, हा मुद्दा टिकत नाहीं. जगांतील सर्व देशांमध्यें व जातीमध्यें प्रकृतीचा एकच नियम आहे. हिंदुस्थानामध्यें प्रकृति देवीनें तो नियम बदललेला नाहीं. बालविवाहाचें खरें कारण इतकेंच कीं, देशाची अधोगति व अज्ञान हें होय व याच वेळीं त्या चालीचा फैलाव समाजांत होतो.

प्रकृतीचें अद्भुत रहस्य

वर आह्मीं नऊ वर्षांच्या स्त्रिया सुद्धां गर्भवती होऊन मुलांना जन्म देऊं शकतात हे दाखविलेंच आहे. आतां याची दुसरी बाजू पुढें मांडून हा लेखांक पुरा करूं.

टामस पार हे १५२ वर्षेपर्यंत वांचले. त्यानीं आपल्या वयाच्या १२० व्या वर्षी विवाह केला व १४० व्या वर्षी त्यानां मुलगा झाला. फेलिक्स प्लेटर लिहितात कीं, आपल्या बापाला १०० वर्षी सुद्धां मुलें झालेलीं होतीं. सीज शहरांतील एक पाद्री लिहितात कीं, त्या शहरांतील एका ९४ वर्षें वयाच्या पुरुषानें ८३ वर्षें वयाच्या स्त्रीशीं लग्न केलें व तिच्यापासून त्याला मुलगा झाला. मारशल धी एस्ट्रीनें आपलें दुसरें लग्न ९१ व्या वर्षी केलें. मारशल डी रिचेलनें मडम डीराथ इच्याकडे ८४ व्या वर्षी लग्न केलें. सर स्टीफन फाक्सचें लग्न ७७ व्या वर्षी झालें होतें व त्यांनां ७८ व्या वर्षी मुलगा नंतर एकाच खेपेस दोन मुलगे व शेवटचा चौथा मुलगा ८१ व्या वर्षी झाला. मिमायर्स डी आर्मोननर (Memoires de Armionrer) यानें ८० व्या वर्षी विवाह केला. व त्यानां चांगले शक्तिमान मुलगे झाले. बेगन साहेब ह्मणतात " माझे एक मित्र ७५ व्या वर्षी एका स्त्रिच्या मोहजालांत सापडून तिच्याशीं विवाह केला "

याप्रमाणें दोनहि बाजू पुढें आलेल्या आहेत. आतां विवाहाच्या काल निर्णयाबद्दलची चर्चा पुढच्या लेखांकांत करूं.

नेमलेले गव्हर्नर व व्हाइसराय असूं शकत नाहींत. लोकसत्तेनें चालविलेलें; लोकमताचें निदर्शक असलेलें व लोकांच्या कल्याणाचा विचार करणारें, तेंच खरें स्वराज्य होय '

(In swarajya there should be no Kings or Governors and Viceroys appointed by Kings There should be a Government of the people by the people for the people.)

मौलाना साहेबांची ही ' स्वराज्याची योजना ' कोणा हिंदी तरुणाच्या अंतःकरणांत ठाणें घेऊन बसणार नाहीं? अमृतसरास ३०० गरीब हिंद पुत्रांचे नाहक प्राण घेऊन बंदूक बहादर डायर साहेबांनीं ज्यांच्या अंतःकरणास क्षत पाडलें आहे, खिलाफतीची खिराफत करून ब्रिटिश सरकारानें ज्यांचीं अंतःकरणें निर्दयपणें लाथाडलीं आहेत, स्वराज्याच्या तहानेनें व्याकूळ झालेल्या प्रजेच्या प्राणांची चिता पेटवीत बंगालचा वट हुकूम पास करून लॉर्ड रेडिंग साहेबांनीं ज्यांचीं हृदयें पायांखालीं तुडविलीं आहेत त्या ब्रिटिश हिंदुस्थानवासी जनतेस भावी हिंद्वी स्वराज्याची ही व्याख्या पसंत पडेल ती पडेलच पण आमच्या तरुण गोमांतकीयांस या ' संपूर्ण स्वातंत्र्याची ' किंमत अधिक पटण्याजोगी आहे.

भारताचें राजकीय ध्येय हेंच असल्यामुळें ह्या स्वराज्याच्या योजनेकडे गोमांतकीय तरुणाचें जितकें जितकें लक्ष वेधेल तितकें तितकें त्यास हवेंच आहे. जोंपर्यंत परक्यांचा हात हिंदुस्थानच्या राजकारणांत राहील तोंपर्यंत हिंदुस्थाननें जगांतील इतर राष्ट्रांच्या पंक्तीस बसण्याची आशा धरणें मूर्खपणाचें होय असें त्यास वाटतें. पाश्चात्यानीं आपल्या औदार्याच्या हव्या तितक्या बढाया मारुं द्यात पण आमचें कल्याण करण्याकरतां नव्हे तर आह्माकडे असेल नसेल तें लुबाडून घेऊन नारळाची आई आमच्या हातांत देण्याकरतां सात हजार मैलांवरून व सप्त समुद्र ओलांडून हे परदेशी पाहुणे आमच्या घरीं आले व त्यांचे 'खावयाचें दांत निराळे व दाखवावयाचे निराळे' हें क्षणोक्षणीं प्रत्ययास येत असतांहि त्यांच्या केवळ भूलथापांस भुलून आह्मीं आमच्या पायांवर धोंडा मारून घेण्यास तयार झालों. पण इतउत्तर तसें रहाणें अशक्य झाल्यामुळें भारतानें राजकारणाच्या आखाड्यांत उडी घेतली व मिळालेले हक्क पदरांत घेऊन आणखी मिळविण्याकरितां पोर्तुगीज सरकारशीं झगडणें हेंच आपलें राजकीय ध्येय ठरवून टांकलें. लोकशाहीच्या नैसर्गिक हक्कांची पायमल्ली करण्यास सरकार जेव्हां जेव्हां पुढें सरसावतें, तेव्हां तेव्हां त्यांच्या हक्कांसाठीं झगडण्यास भारतानें आजपर्यंत केव्हांच कसूर केलेली नाहीं, सध्या करीत नाहीं व पुढेंहि शक्यतोंवर करणार नाहीं हें त्याच्या राजकीय ध्येयाची पृच्छा करणाऱ्या ख्रिस्ताच्या लालनीं पुरें जाणून असावें. ।

स्फुट विचार

१ होळीला आळाः– गायकवाड नांवाचे एक गृहस्थ होळीसंबंधानें लिहितातः – जो तो आपल्या शक्तीप्रमाणें चार पैसे कर्जाऊ अगर स्वकष्टानें जमवून कुटुंबांतील चार माणसांत आणि मित्रांत कोणताहि सण आनंदात पार पाडण्यासाठीं चूर होऊन जातो. अशा रीतीनें सणांतील आनंदाचा स्वाद घतेवेळीं कोणाचें कर्ज किती झालें, कोणा पठाणाचा कसा दंडुका भररस्त्यावर पाठीवर बसेल ह्याची कल्पनासुद्धां आमच्या कांहीं समाजास राहात नाही. अडाणी आणि भोळसर रूढीला चिकटून असणारे या भोळ्या भावड्यांना सणांची महति न उमजतां सुमुहूर्तीं आलेल्या मंगल सणांच्या दिवशीं या लोकांच्या घरांतून आनंदाच्या उकळ्या बाहेर न येतां, अक्राळविक्राळ आरोळ्या मात्र ऐकायला येतात; अज्ञानमय गडद अंधःकारांत खितपत पडल्यामुळें हा कष्टमय आणि भेसूर देखावा दिसावा यांत नवल तें काय? आपण जे सण साजरे करीत असतों, ते एवढ्याच करितां कीं त्यांपासून आपणांस कांहीं ना कांहीं बोध व्हावा. सणांची योजना जी पूर्वींपासून चालत आली आहे; ती एवढ्याचकरितां. रागरंग आणि दारूच्या पिपा रिकाम्या करण्याकरितां नव्हे. हें ध्यानीं येईल तेव्हां ना? हां हां ह्मणतां लौकरच पुरुषस्त्रियांचा आनंदाचा दिवस " गोजिरवाणा शिमगा !" येणार !! आणि रूढीच्या अजब लीलेनें लीला करून अज्ञान समूहाचा पैसा बराच व्यर्थ दवडणार !!! नवीन एकादी नाटक कंपनी येणार–येऊन रशिक मंडळींच्या पैशांचा खेळ करून लौकरच (५–६ महिन्यांनीं) हें जसें खरें, तसेंच त्याहिपेक्षां कांकणभर जास्त हा शिमगा येणार ह्मणून एक महिना अगोदर जाहिराती (बोंबा !) लहान कोमल बालकांच्या त्यांच्या पालकांच्या आज्ञेवरून भीष्म प्रतिज्ञेप्रमाणें चालू असतात, तीं दोन्ही ओंठ सुजून आपल्या मातापितरांचा उद्धार, आणि संज्ज्वल शिमग्यास आव्हान गल्लोगल्लीनें करीत असतात, या लहानग्या गुंड्यानें [!] अशा तऱ्हेनें उरकलेली कामगिरी पाहून त्याच्या [अज्ञानी] पालकांस पराकाष्टेचा आनंद होतो."

पुढें चालूः– ते पुढें ह्मणतातः "नाटक कंपनींप्रमाणें शिमगा येणाऱ्या दिवशीं येणारच. त्या दिवशीं ह्यांच्याहि भिकार आणि बेकार शौकांचा त्यामध्यें मिलाफ होऊन त्या आनंदाच्या सणांत ह्या बिभत्स प्रकाराला अतिशय जोम येतो. आणि मग त्या सणाची खरी भडकेबाज होळी शीलाची राखरांगोळी पाहण्याचें आमच्या नशिबीं देवें, कोण हा अडाणीपणा ! ! मग सांगा माझ्या प्रिय बंधूंनो, या आपल्या अमूल्य आयुष्याचा अशा तऱ्हेनें शिमगा करून नरकवासी होणार काय? मायबहिणीची उकळावकळी काढून त्यानां भरचव्हाट्यावर लज्जेनें मान खालीं घालण्यास लावणार काय? गलिच्छ चिंध्या, गटारांतील दुर्गंधीचें पाणी आपल्या आणि दुसऱ्याच्या अंगावर राजरोसपणें ओतून आपल्या अकलेचें प्रदर्शन दाखविणार काय? आहे नाहीं त्या पैशांचा व्यर्थ चुराडा करून सुरा देवीचा विजयी (!) झेंडा शिमग्याच्या दुसऱ्या तिसऱ्या दिवशीं कोर्टांत फडकविणार कां?"

३ तात्पर्यः– उपरोक्त विवेचनापासून निष्पन्न होणारा उपदेश आपल्या गळीं उतरविण्याचा शहाणा प्रयत्न गोमांतकीय जनता करील, अशी आह्मांस आशा आहे. राष्ट्रपुरुष अनेक दुःखद आपत्तीनीं ग्रासला गेला असतां, आपल्या अवास्तव उत्सवप्रियतेचें घोडें दामटण्याच्या दंगलींत गुंग असण्याचा कोणाहि देशहितचिंतकाला अधिकार नाहीं. आपला आवडता गोमांतक दुःखार्णवांत गटंगळ्या खात असतां, तिकडे कानाडोळा करून, होळी–शिमग्याची मजा अनुभवण्याची उत्सुकता दाखविणाराचें अंतःकरण खास कठोर असलें पाहिजे. तात्पर्य हेंच कीं, गायकवाड यानी धिःकारलेल्या प्रकारांचा इकडेहि निषेध होणें सर्व दृष्टीनीं योग्य आहे.

४ परीक्षकांची उचलबांगडीः– गुरु-शिष्यांचें नातें किती पवित्र असतें हें हिंदवी संस्कृति ज्यांच्या अंगीं पूर्णपणें मिनली आहे अशा आह्मां हिंदुस्थानवासीयांस सांगण्याचें कारण नाहीं. परंतु उपरोक्त नात्याचा युरोपांत राजरोस रीतीनें चुथडा उडविला जात असल्याचें पाहून, त्या संबंधींचा पवित्रपणा तेथील उल्लू समाजाच्या मनांत बिंबविण्यासाठीं कित्येक उपदेशकांची गरज आहे, असें भासावयास लागलें आहे. पुढील चमत्कारिक गोष्ट कळतांच, आमच्या लिहिण्यांत कशी अतिशयोक्ति नाहीं, हें वाचकांच्या ध्यानांत लवकरच येईल. पोर्तुगालच्या कोइंब्र येथील विश्वविद्यालयांत विद्यार्थ्यांच्या परीक्षा चालू होत्या. हवा पालट करण्याच्या तांतडीमुळें यंदा परीक्षक मंडळानें मामूल वहिवाटीप्रमाणें चारचार विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याऐवजीं आठआठांच्या परीक्षा घेण्याचा नवीनच उपक्रम अंमलांत आणला होता. शिवाय परीक्षा घेण्यालाहि बऱ्याच आधीं सुरवात केली होती. या दोन्हीं गोष्टींमुळ विद्यार्थीवर्गांत असंतोषाचा वणवा पेटला. व त्यानीं परीक्षकांची रग जिरविण्यासाठीं एक कट–अर्थात गुप्त तयार करून, त्यानें परीक्षक मंडळाच्या अध्यक्षांसच 'लांबविलें' ! तीन चार दिवसपर्यंत त्या कटानें अध्यक्षांचा पत्ताच लागूं दिला नाहीं. अखेर पोलीसानीं 'चोरीस गेलेला माल' मोठ्या शहाणपणानें 'उघडकीस' आणला व कटवाल्यांस कोर्टाच्या स्वाधीन केलें. खटल्याचा शेवट कसा होईल तो होवो, पण वरील एकंदर प्रकारावरून गुरुशिष्यांचें नातें, इतर अनेक नात्यांप्रमाणेंच युरोपांत गोते खात आहे, हें उघड होत नाहीं काय?

—श्री सरस्वती विद्यालय वेंगुर्ले या संस्थे मार्फत ता. १२।२।२५ रोजीं साधुवर्य श्री नरहरी महाराज यांची पुण्यतिथी श्री. रामकृष्ण शिवराम तळवडेकर वकील रत्नागिरी यांच्या अध्यक्षतेखालीं साजरी करण्यांत आली होती.

—अमेरिकेंत २० लक्ष डॉलरचें सोनें हिंदुस्थानांत पाठविण्याचें ठरलें आहे. सोनें थोडें सवंग होणार तर.

वर्तमानसार

—ह्मापशें येथील मुनिसिपालटीनें गोमांस विक्रीची जागा मासळी मार्कीटाला व भाजी मार्कीटाला अगदीं भिडवून ठेवण्याचें ठरविलें असून, तदनुसार बांधकाम चालू आहे!

—भंडारी ज्ञातींतील गेल्या एक दोन वर्षांपूर्वीं उपस्थित झालेलें चांभार प्रकरण चालू लग्न सराईंत पुन्हां डोकावून पहात आहे. धर्मगुरू किंवा त्यांचे प्रतिनिधि या बाबतींत पूर्ण शांतता करायला कां असमर्थ आहेत हें कळत नाहीं. प्रकरण धार्मिक स्वरूपाचें असलें तरी समाज शांततेकरितां सरकारला यांत हात घालण्याचा प्रसंग न आला ह्मणजे पुरे.

—ह्मापशें येथें गौड सारस्वत ब्रह्मवृन्दांकडून श्री लक्ष्मीनारायणाच्या बांधण्यांत येत असलेल्या देवालयाचें काम जवळ जवळ अर्धें होत आलें असून पुरें व्हावयाला उदार भाविक धनिकांच्या मदतीची अपेक्षा आहे.

—विलायतेंतल्या शिक्षणासाठीं द्यावयाच्या शिष्यवृतींत हिंदूंना एक चतुर्थांश दिलाच पाहिजे असें निजाम सरकारनें ठरविलें आहे.

—बेंगळूर येथील एका सोल्जरानें दुसऱ्याचीं बनावट सही करून पोस्टाच्या सेव्हिंग बंकेंतून १५० रुपये उपटिले व दुसऱ्या सोल्जरानें त्यास मदत केली याबद्दल मद्रास हायकोर्टनें त्या दोघांस अनुक्रमें १८ महिन्यांची व १२ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा दिली. इंग्रजांचीहि दानत १५० रुपये किंमतीपर्यंत खालीं उतरली काय?

—महाराष्ट्र पत्रावरील कटोलच्या तहशीलदारांच्या अब्रू नुकसानीबद्दल १५००० रुपयांच्या दिवाणी दाव्यास गेल्या गुरुवारापासून सुरुवात झाली आहे.

—बहार प्रांताचे माजी दिवाण श्री. मधुसूदन दास यांची कन्या कुमारी शैलाबाई दास यांना पाटणा जिल्ह्यांत ३ ऱ्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटचे तीन वर्षांच्या मुदतीनें अधिकार देण्यांत आले आहेत.

—पुणें येथें जनी नांवाच्या एका बाईनें आपल्या नवऱ्याला भाकरींतून कांचेचे तुकडे दिल्याबद्दल, तिच्यावर खटला होऊन १ वर्ष सक्तमजुरीची शिक्षा झाली।

—लाहोरच्या स्टॅंडर्ड ब्यांकेचे मॅनेजिंग डायरेक्टर सरदार किसनसिंग यांनीं बँकेच्या २ लाख रुपयांची अफरातफर केल्याबद्दल, पकडण्यांत आलें आहे.

—रशियाच्या तुरुंगांत सध्या ९० हजार राजकीय कैदी असून त्यांपैकीं ८९ हजार कैद्यांनां चौकशीशिवाय तुरुंगांत टाकलें असल्याचें समजतें! मग चौकशीशिवाय केवळ ६६ लोकच तुरुंगांत टाकिलेल्या आमच्या बंगाल सरकारला काय ह्मणून नांव ठेवावयाचें।

—तुर्कस्थाननें मँचेस्टरला कापसाचे १ लक्ष गठ्ठे पाठविण्याचें ठरविलें असून त्यांपैकीं १००० गठ्ठे मँचेस्टरला जाऊन पडले। हिंदी कापसापेक्षां तुर्की कापूसच बरा असें तिकडील लोक ह्मणतात.

—जर्मनीच्या राजकारणांत माजी जर्मन युवराजांचें प्रस्थ माजत चाललें आहे व त्याला उठावणी देणाऱ्यांत मेजर मुलीनेर यासारखेहि कांहीं प्रसिद्ध पुढारी आहेत.

—नेपाळच्या महाराजांची त्यांनी गुलामगिरी बंद करण्यासाठीं जाहीर विनंति केल्याबद्दल, ब्रिटनमधील वृत्तपत्रें प्रशंसा करीत आहेत.

Ano 9 N. 49

uinta-feira 5 de Março de 1925

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
inha ainda que repetida uma tanga
imero avulso uma tanga

RECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत

BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४९

गुरुवार ता. ५ मार्च सन १९२५

वर्गणीचे दर.
वार्षिक रु. व. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

O "CONSEGUE-TUDO"

Nós o conhecemos, conhecem-no os poderosos, conhece-o toda a gente. Humilha-se perante os grandes. Curva-se gentil perante todo o mundo.

O que faz ? Qual é o seu modo de vida ? Pode ser que exerça uma funcção ou oficio qualquer. Isto, porem, não passa de um ornamento, um mero pretexto, uma simples taboleta. A sua verdadeira ocupação é outra.

Ele é ignorante; mas astuto. Ele não tem cultura; mas possui uma meia duzia de vocabulos e frases em portugues. E com este arsenal ele governa tão bem e com tanta habilidade que è, sem faver, um triunfador ! Os grandes não lhe regateam a mão. Os outros tiram-lhe o chapeu ! Qual o segredo de sua nulidade triunfante ? E' nada para ele—que é um anormal. E' o impossivel para outros dotados de noção de honra e dignidade. Sim, o seu segredo é a audacia e a sem-vergonha.

Foi nomeado F. Vem ocupar uma situação de distaque na Colonia. Lá está ele a procurar saber a hora em que Sua Excia chega, o lugar onde desembarca. E, solicito, lá está no cais de Alfandega ou da Navegação o nosso homem, á espera do *grande*. O *grande* desce e passa de alto sem olhar por ele. Tira o seu chapeu e não desanima. Amanhã fica aguardando o *grande* á porta da Secretaria ou da Repartição que vai dirigir. Sua Ecia vem. Sua Excia vai entrando. O nosso homem tira o chapeu. Sua Excia leva a mão ao chapeu—por mera delicadeza.

Está dado o primeiro passo no caminho da conquista. Vem depois o segundo, logo o terceiro. Um dia, por mero esquecimento, alem da chapelada, dá ao nosso homem *a sua elevada mão* e sorri.

Está o sucesso garantido mas não completo. Dias depois, o nosso homem cumprimenta Sua Excia e anda ao lado dêle alguns passos pela cidade. E' o dia da victoria para o nosso homem. E' o conquistador. Mas conquistador sempre supõe uma conquista e um conquistado. No caso, quem é conquistado ? E' Sua Excia ? Enganam-se. E' o provinciano ! E a conquistada é algibeira do pobre diabo.

Todos sabem, nosso homem melhor do que ninguem, que quem vem da aldeia para Capital, vem com alguma pretenção. Uns querem emprego, outros um despacho, certos uma licença... em fim todos tem uma dependencia neste ou naquele ramo da administração. O nosso homem— que fez a conquista — não poupa a ocasião de falar com Sua Excia na rua, entrar de quando em vez no seu gobinete, postar-se mesmo á janela do mesmo — que o parvo veja, verifique e admire —E depois é ali que consegue todos os empregos, todos os despachos, todas as resoluções que dependem de Sua Excia Todas, sim. Se êle num litigio patrocina a causa de ambos litigantes ?!!

E Sua Excia ingenuamente o atura supondo que é ele, apenas, um pobre diabo que lhe maça a paciencia.

E, agora, é natural que alguem queira saber quem é ele. Ele é o *Consegue-tudo*. Hoje será uma trivialdade. Amanhã —se fôr tolerado— converter-se-há numa legião.

Ao veio do tempo . . .

Prosseguindo nas nossas considerações em volta das cerebrinas opiniões do sr. Sebástião de Figueiredo, naturalmente, temos que coucluir a refutação que ficou em meio, pois, ela dá ainda para mangas...

Quanto aos erros assacados a Gandhi de alturas descomunais dum Himalaia, temos que repetir mais uma vez que se não fôsse a sua sublime doutrina de não violencia e do sacrificio de si proprio consequencias mais funestas ainda teriamos que lamentar, contratempos mais insúperaveis se antolhariam e a deteriam no caminho.

Se o ideal de Gandhi fôsse outro que nao êsse, quando ele foi preso, todo o povo da India como um só homem esbravejaria de indignação, despedaçaria com plena certeza, as grades da sua prisão. E muitos mortos e feridos e poças de sangue seria a consequencia, triste e fatal deste acontecimento. Pois, o seu poder de seduçao sobre o povo indiano é fenomenal, colossal. Só o pode ignorar ou fingir ignorar quem ande obcecado pelas idêas ministradas, em pilulas amargas, dificeis de engulir, pelos orgãos da opinião britanica. Dizer em frases balôfas e sem apoio na Verdade, que o poder e a supremacia de Gandhi decresceram é léria, é mentira. A sua figura espiritual, apostolica, até hoje, gosa duma influencia extraordinaria. Quem sabe o que será para o futuro ?

Prevendo que ia ser preso, Gandhi escreveu para o seu *Young India*, um magistral artigo que é uma sentida evocaçao do seu amor pela India e uma salutar lição aos vindouros: naquelas linhas, breves mas eloquentissimas, exorta e aconselha os seus conterraneos a não perderem o sangue frio nas circunstancias as mais criticas, as mais tremendas: a serenidade é a melhor arma para enfrentar os mais imprevistos acidentes. Vem, por ultimo, a resposta, a sua ultima afirmação que ficou em branco de que a India não podia ser independente da Inglaterra.

Os nossos leitores podem, perfeitamente, fazer uma idea nitida e precisa dos contrasensos em que o sr. S. de Figueiredo vai deslisando. E' um ponto mais que assente que a campanha nacionalista de Gandhi não é anti-Inglaterra, as suas sêtas pacificas não se dirigem à Inglaterra mas á Europa inteira que está a desagregar se a olhos vistos.

Se a India pode ser independente á ilharga da Grã-Bretanha não percebemos como não poderá sê-lo sobre si, sem mais apendice de especie alguma.

A necessidade e a urgencia de se conceder independencia a India foi já, larga e elogiosamente abonada por homens de mais rara envergadura. Henri Cotton escreveu: " Homens que falam o ingles melhor que muitos ingleses, que leem Mill e Comte, Max Muller e Maine, que ocupam um lugar no tribunal judicial, que administram os negocios dos Estados indigenas de muitos milhões de habitantes, que gerem as fabricas de algodão e dirigem as mais complicadas operações do comercio, que redigem jornais em inglez e se correspondem em perfeita igualdade com os escritores da Europa— não podem ser tratados como raça inferior "

Citar outras opiniões que

"स्त्रीशिक्षण"

(ले:— दिलशाद सैयाद.)

शिक्षण हा शद्ब शिक्ष् ह्या धातूवरून झाला आहे. स्त्रीशिक्षण ह्मणजे स्त्रियांना जें शिकविलें पाहिजे तें आपल्या देशांत काय किंवा परदेशांत काय, स्त्रियांना शिक्षण द्यावें किंवा नाहीं व दिल्यास कशा प्रकारचें द्यावें याबद्दलचा वाद पुष्कळ दिवसांपासून चालला आहे. त्याचा निकाल लागेल तेव्हां खरें. सध्याच्या काळांत पाश्चात्य देशांत स्त्रियांना व पुरुषांना समसमान शिक्षण देण्यांत येत आहे. व आपल्या देशांत त्यांचेंच अनुकरण करण्याची रीत पडल्यामुळें आपल्याकडेहि स्त्रियांना व पुरुषांना जवळ जवळ सारखेंच शिक्षण देण्यांत येत आहे. त्या शिक्षणापासून किती फायदे होतात व किती तोटे होतात याबद्दल निरनिराळ्य लोकांचीं निरनिराळीं मतें आहेत. परंतु तसल्या शिक्षणानें कितीहि भयंकर तोटे होत असले तरी त्यांत फरक करणें आपल्या हातीं नसल्यानें आपल्या स्त्रियांना व मुलींना पाश्चात्य पद्धतीचेंच शिक्षण द्यावें लागतें. ही एकंदर आपल्या देशांतील शिक्षणाची स्थिति आहे. असो. ह्या स्त्रीशिक्षणावर माझ्या अल्प मतीला सुचलेले कांहीं विचार ह्या निबंधांत लिहीत आहें.

अगदीं प्राचीन काळीं आपल्या देशांतील स्त्रिया साध्वी, विद्वान ह्मणून प्रसिद्धीस आल्या होत्या. ह्याचें मुख्य कारण ह्मणजे त्यावेळीं त्यांना मिळणारें योग्य शिक्षण त्या वेळच्या आपल्या स्त्रियांना आपल्या घरचा व्यवहार जाणण्यापुरतें शिक्षण देण्यांत येत होतें. त्यावेळीं त्यांना गृहशिक्षण, पोथ्यापुराणें वाचण्याइतकें लिहिणें वाचणें, हिशेब ठेवण्यापुरतें गणीत इत्यादि शिकवीत असत. तें शिकावयास त्यांना शाळेंत जावें लागत नसे. त्यांच्या मातांनीं त्यांच्या आत्मवृक्षाला उत्तम शिक्षणाचें अन्न व सद्विचारांचें अमृत पाजल्यामुळेंच त्या इतक्या प्रसिद्धीस आल्या. त्यांना योग्य तें शिक्षण मिळाल्यामुळें त्या स्वावलंबी, धाडशी, साध्वी, सुविचारी, गृहकृत्यांत निपूण अशा बनल्या. त्यांनीं आपल्या बालकांना उत्तम शिक्षण देण्याचें सामर्थ्य आपणांमध्यें आणिलें. त्यांनीं आपली गृहव्यवस्था नीट ठेविली. त्यांचीं मनें सुविचारांनीं प्रगल्भदशेस पोंच ल्यामुळें त्यांनीं आपल्या बालकांस सुविचारांचें बाळकडू पाजिलें. "ज्यानें त्यानें आपणां स्वतःस सुधारण्याचा प्रयत्न केला कीं, जग सुधारेल" असें ह्मटलें आहे, त्याप्रमाणें त्याकाळच्या स्त्रियांनीं आपणां स्वतःस सुधारण्याचा प्रयत्न करून आपला देश भरभराटीस आणला. ही त्यावेळची शिक्षणाची स्थिति झाली.

आतां आपण मध्यकालीन स्त्रीशिक्षणाची स्थिति पाहूं. त्यावेळीं हिंदुस्थानावर परकीयांच्या स्वाऱ्या होत असल्याकारणानें, आपल्या स्त्रियांस घरीं बसून रहावें लागत असे, ह्मणून स्त्रियांना शिक्षण देवां येत नसे. ज्या कांहीं स्त्रिया शिक्षण घेत असत, त्यांनाहि चांगलें शिक्षण मिळत नसे. घरींच बसून शिवणें, टिपणें वगैरे कामें करावीं लागत असत. बाहेरचें शिक्षण त्यांना मुळींच मिळत नसे. त्यामुळें पुनः आपला देश अवनतीस पोंचूं लागला. त्यावेळच्या पुरुषांस उत्तम शिक्षण मिळत होतें, तरी संसार शकटाचीं दोन्हीं चक्रें सारखीं असलीं तरच तो नीट चालतो. ह्याचा अर्थ स्त्रियांना व पुरुषांना सारखेंच शिक्षण द्यावयास पाहिजे असा नव्हे. तर पुरुषांना व स्त्रियांना जें योग्य असेल तें शिक्षण दिलें तर शकट नीट चालेल, व उन्नतीच्या डोंगराच्या शिखरावर जाईल. परंतु एक चक्र मोठें व एक लहान असें असलें ह्मणजे पुरुष सुशिक्षित व स्त्री अशिक्षित तर शकट अवनतीच्या खोल दरींत जाऊन पडेल ह्मणून स्त्री ही केव्हांहि सुशिक्षित असलीच पाहिजे. असो. त्याकाळीं योग्य तें तर दूरच राहो. पण कसलेंहि शिक्षण न मिळा त्यामुळें त्या परावलंबी, भित्र्या बनल्या. त्यांच्यांतील आपल्या बालकांना चांगलें शिक्षण देण्याचें सामर्थ्य नाहींसें झालें; त्यांच्या मनामध्यें कुविचारांचें प्राबल्य सुरू झालें; त्यांना बाहेरच्या जगाविषयीं कांहींच ज्ञान न मिळाल्यामुळें त्या व्यवहारांत फसूं लागल्या. आपल्या देशाविषयीं त्यांना कांहींच अभिमान वाटेनासा झाला. आपलें राष्ट्र ह्मणजे काय हें सुद्धां त्यांना समजेना. त्यावेळची त्या स्त्रियांची दुःस्थिति फारच भयंकर! ह्या स्त्रिया अशा सर्व बाजूंनीं दुर्बल बनल्यामुळें, "जैशी माता तैशीं बालें" ह्याप्रमाणें त्यांचीं बालकेंहि त्यांच्याचप्रमाणें दुर्बल बनूं लागलीं, व असें होतां होत त्यांच्या पुढील पिढ्या अवनतीस पोंचल्या. इतकी त्यांची स्थिति झाल्यावर कांहीं वर्षांनीं थोड्या फार स्त्रियांना शिक्षण घेण्याची आवड उत्पन्न झाली. परंतु त्या जुन्या काळच्या जुन्या स्त्रियांच्या मनांमध्यें जो कांहीं शिक्षणासंबंधानें तिटकारा उत्पन्न झाला होता, त्यामुळें त्या स्त्रियांना शिक्षण घेण्यास फारच त्रास होऊं लागला. असो. आतां आपण हल्लींच्या शिक्षणाविषयीं विचार करूं.

हल्लींचें शिक्षण सर्व पाश्चात्य पद्धतीचें. मुलींला थोडेंसें इंग्लिश आलें कीं झालें. मग तिला गृहकृत्यें न कां येइनात? तिला सुविचारांचें वळण न कां लागेना? तिचें शील सुशील न कां बनेना! तिला इंग्लिश आलें कीं झालें. ती सर्वगुण संपन्न बनली अशी वेडी समजूत झालेली. सध्या जरी मुली शिकतात, तरी त्यांना योग्य तें शिक्षण तर मिळत नाहींच, परंतु भलतेंच अयोग्य शिक्षण मात्र मिळतें. त्यामुळें ज्या जुन्या काळच्या स्त्रिया असतात, त्यांना असें वाटतें कीं, मुली शाळेंत जाऊं लागल्या कीं, उद्धट बनतात. त्या शिक्षणामुळें मुलींना गृहशिक्षणाची यत्किंचितहि माहिती होत नाहीं, त्या दांडग्या बनतात. व त्यांना फार गर्व झालेला असतो. "अल्प ज्ञान परि गर्व शिरोमणी" अशी त्यांची स्थिति झालेली असते. त्यांना स्वावलंबनाचें तर वारेंहि लागलेलें नसतें. त्या पाश्चात्य लोकांचें सर्व गोष्टींत अनुकरण करतात. त्यांना इतकें शिक्षण मिळालेलें असतें तरी त्यांत देशाभिमानाचा लवलेशहि नसल्यामुळें मुलींना त्याचें नांवहि ठाऊक नसतें. आपल्या देशांत सध्या काय चाललें आहे, दयाळु सरकारानें (?) चालविलेला जुलूम कसा जाचक होत आहे ह्याची तर त्यांना कल्पना सुद्धां नसते. त्यांना त्या शिक्षणापासून फायदे न होतां उलट तोटेच होत असतात.

आतां आपण स्त्रिशिक्षणाविषयीं इतर लोकांचें काय मत आहे ह्याकडे दृष्टि फेंकूं. पहिल्या मताचे लोक ह्मणतात, स्त्रियांना शिक्षण मुळींच नको. स्त्रियांना शिक्षण दिल्यामुळें त्या उद्धट बनतात. व त्यांची संसारांतील गोडी जाऊन त्या मुलांप्रमाणें स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करतात. आपल्या देशांतील पूर्वींच्या स्त्रियांना शिक्षण देत नसत ह्मणून त्या इतक्या प्रसिद्धीस आल्या आहेत. शिक्षणानें स्त्रिया पाश्चात्य स्त्रियांप्रमाणें निरनिराळे चाळे करूं लागतात. स्त्रियांना शिक्षण घेऊन नोकऱ्या कां करावयाच्या आहेत! त्या नोकऱ्या करूं लागल्यावर पुरुषांनीं भाकऱ्या भाजीत बसलें पाहिजे. दुसरा वर्ग स्त्रियांना सर्व पाश्चात्य पद्धतीचें शिक्षण द्यावें ह्मणणारांचा. ते ह्मणतातः पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणानें स्त्रिया स्वतंत्र, धाडशी, व स्वावलंबनी बनतात. ते ह्मणतात कीं, मुलांचा व मुलींचा पक्षपात कां असावा? शिक्षण दिल्यानें स्त्रियांचें पुरुषांशिवाय अडत नाहीं. वेळ पडली तर ह्मणजे स्त्रिया जास्त शिकलेल्या असल्या तर पुरुषनींहि भाकऱ्या भाजाव्या. तिसरा वर्ग स्त्रियांना जें योग्य तें शिक्षण द्यावें असें ह्मणणाऱ्यांचा. स्त्रियांना प्रथम गृहशिक्षण द्यावें. व नंतर त्यांना व्यवहारापुरतें शिक्षण द्यावें. जास्त शिकून स्वतंत्र होऊं इच्छिणारांस अडथळा करूं नये व शिकण्याची आवड नसणारांवर जुलूम करूं नये ह्यावरून पहिल्या वर्गाचें ह्मणणें जितकें मूर्खपणाचें आहे तितकेंच दुसऱ्या वर्गाचेंहि आहे. तिसऱ्या वर्गाचेंच ह्मणणें जास्त संयुक्तिक आहे.

एखाद्या स्त्रिला जर लिहितां वाचतां येत नसेल तर तिचे किती हाल होतात हें आपण नेहमीं पहातोंच. व अशा तऱ्हेच्या स्त्रिया आपल्या समाजांत पुष्कळ आहेत. त्यांना शिक्षणाची खरोखरीच जरूरी आहे. परंतु तें शिक्षण अशा तऱ्हेचें असलें पाहिजे कीं, त्यापासून पदोपदीं फायदा झाला पाहिजे. स्त्रियांना मुख्य गोष्ट ह्मणजे गृहशिक्षण अवश्य पाहिजे. हल्लींच्या कांहीं मुलींना स्वयंपाक सुद्धां करतां येत नाहीं. त्यांना देशाभिमान, स्वावलंबन, शालीनता, ऐक्यता वगैरेचें शिक्षण दिलें पाहिजे. ह्या सर्व तऱ्हेचें शिक्षण हल्लीं ठिकाणीं उघडण्यांत आलेल्या राष्ट्रीय शाळेंत मिळतें. प्रत्येक मुलीला सुशील बनविणें हें तेथील आद्यकर्तव्य होय. त्यानंतर तेथें मातृभाषेचें उत्तम ज्ञान दिलें जातें. हल्लींच्या मुलींना कोठल्याहि वाक्यामध्यें एखादा इंग्लिश शब्द घातल्याशिवाय बोलतांच येत नाहीं. ह्यामुळें मराठी भाषेचें फार नुकसान होत आहे. राष्ट्रीय शाळांतून मातृभाषेचें संपूर्ण ज्ञान, खरा इतिहास व धर्माची खरी व उत्तम माहिती देण्यांत येते. इतिहासापासून पूर्वींच्या सर्व गोष्टी कळतात व धर्मापासून आपली आत्मिक उन्नति कशी करावी हें समजतें. किती शिकविणें हीहि एक तेथील महत्वाची गोष्ट होय. ह्यानंतर सध्याच्या काळांत सूत काढणें व कापड विणणें ह्या गोष्टी प्रत्येक स्त्रिला व मुलीला यावयास पाहिजेत. ह्याहि गोष्टी राष्ट्रीय शाळेंत शिकविल्या जातात. हें शिक्षण घेतानां कितीहि त्रास पडला तरी तो सहन केलाच पाहिजे. वर सांगितलेलें राष्ट्रीय शिक्षण जर स्त्रीशिक्षण होईल तर लौकरच आपल्या स्त्रियांमध्यें कै० डॉ० आनंदीबाई जोशी, कै० रमाबाई रानडे ह्यांसारख्या स्त्रिया निर्माण होतील. व आपल्या राष्ट्र शकटास दोन्हीं चक्रें समतोल मिळून तो सरळ मार्गानें लौकरच उन्नतीच्या डोंगरावर चढूं लागेल. वाचक हो, हे जे विचार लिहिले आहेत, त्याचा आपण अल्पबहु फायदा करून घ्याल अशी आशा आहे.

नोटीस

नं.–२००

प्रागतिक संघाचा १९२४ सालाचा एकंदर व्यवहार पुरा करण्याकरितां या नोटीशीच्या द्वारें संघाच्या महाल कमिट्यांस व इतर प्रचारकांस विनंति करण्यांत येत आहे कीं, त्यानीं केलेल्या कामाचा आढावा, तसेंच सभासदांचे प्रतिज्ञा लेख पावत्या पुस्तकें व त्यांच्याकडे झालेला वसूल ता. ३१ मार्चपर्यंत संघाच्या सेक्रेटरीकडे पाठविण्याची मेहेरबानी करावी. पावत्याचीं पुस्तकें तपासल्यानंतर परत करण्यांत येतील व कामाचा आढावा प्रसिद्ध केला जाईल

पणजी–प्रागतिक संघाची कचेरी

ता. १ मार्च सन १९२५

संमत-अध्यक्ष — आत्माराम गो. बोरकर.

बाळकृष्ण दत्ताराम साखरदांडे

से. प्रा. सं. का. मंडळ

॥ श्रीग्रहरूपिणेनमः ॥

जन्मकुंडली अगर नक्की जन्मवेळ पाठविली असतां साऱ्या आयुष्यातील महत्वाच्या गोष्टींचें विवेचन व हयातीपर्यंतचें स्थूल भविष्य आणि ५ वर्षांचें निरनिराळें प्रत्येक वर्षांत घडणाऱ्या महत्वाच्या गोष्टीचें व भाग्योदय काळ व अनिष्ट काळाचें भविष्य वर्तविलेली पत्रिका ६॥ रुपयांच्या व्ही. पी. नें पाठवूं. दशा स्पष्ट केलेलें जन्म टिपण ८ आणे.

रामचंद्र लक्ष्मण प्रभु गांवकर.
मु. लोलियें पो० काणकोण–गोवा.

—डॉ० जाइम द मोराइस हे येत्या महिन्याच्या ६ व्या तारखेस निजधामास जाणार असल्याची वदंता आहे. ही तरी बातमी खरी कां?

Ano 9 N. 50

[...]ira 12 de Março de 1925

[ASS]INATURA
[...] tres rupias
Por cada linha [...] uma tanga
Numero [...]

DIRECTOR E E[...]
G P. Hegdo Dessay
Querem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ५०

गुरुवार ता. १२ मार्च सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारॅ.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे दसाई

NA MESMA...

O ilustre bacharel sr. dr. S. Rau, defendendo as considerações expendidas no seu artigo sobre a *Politica Hindú*, publicado no jornal europeu— A *Provincia*, artigo que notulamos com ligeiros e fugitivos reparos, dá-nos a grata noticia de que *conhece bem qual deveria ser a orientação politica dos jornais hindús e qual a aspiração dos jovens ou velhos hindús*, porisso que Sua Excia não emprega todo o seu tempo em estudar apenas processos e resolver os mais intrincados problemas juridicos, mas utilisa tambem de horas vagas para *acompanhar a politica geral do paiz* da qual *não está excluida a politica hindú*.

E', sim, grata a noticia que o sr. dr. Rau estampa no jornal de sua predilecção; mas sentimos dizer-lhe que ela não pode constituir uma defesa tão forte que o desembarace da séria entalação em que a extemporaneidade da sua prosa o envolveu.

¿Ignora, porventura, o nosso contendor que *acompanhar uma coisa não significa estuda-la* e que *sem estudar uma coisa não ha maneira de conhece-la?*

O sr. dr. Rau acompanha a politica geral do paiz? Não se segue, porem, dai que Sua Exa pôi a sua inteligencia ao serviço do *estudo*, portanto, do *conhecimento profundo* dela.

E depois, o conhecimento da politica geral não abrange, em regra, *o conhecimento profundo* da politica particular que no caso é a politica hiudú, conquanto êle compreenda uma *tintura incidental* ou *superficial* da mesma politica particular.

Nunca afirmamos ser ao dr. Rau *indiferente* a prosperidade ou a decadencia da classe hindú. O que dissemos e continuamos a substentar é que o dig no magistrado não conhece a politica hindú, por andar atarefado sempre no exercicio de suas funcções oficiais.

Quanto ao testimunho que cita em sua defeza—a opinião do nosso colega *Luz do Oriente*, só temos a frisar-lhe, alto e bom som, que tal testimunho não nos vale nem caracol, promanado como o foi duma entidade semioficial, *autoridade* que o *Bharat* apreciou em tempo, devidamente.

Lembra-nos o sr. dr. Rau que o director do *Bharat* não deve esquecer-se de que é cidadão portuguez.

Mas ¿ que tem a sua qualidade de cidadão partuguez com a atitude abstencionista e desfavoravel nas festas do centenario do Gama?

¿ Entende, acaso, Sua Excia. que o director do *Bharat* pelo facto de ser cidadão portuguez deve defender *incondicionalmente* tudo o que seja portuguez, abdicando o direito da critica e abstendo-se de tomar conhecimento das historicas *barbaridades* lusitanas?

Se sim, engana-se redondamente. ¿ O sr. Rau não leu o que escreveu a proposito do Gama o jornal *A Batalha* de Lisbôa, redigido pelos insuspeitos cidadaos portuguezes de Portugal? Pois *A Batalha* aprecia da seguinte forma a personalidade historica do Gama:

"Vasco da Gama foi um pirata—um dos muitos piratas de que está cheia a historia dos portugueses, dos hespanhoes, dos holandezes.

Ele descobriu o caminho maritimo pāra a India não por amor á humanidade, não pela anciedade do incognito, do misterio fabuloso.

Ao contrario...

Seu heroismo, como o da maioria dos navegadores de antanho, provinha duma idéa baixa— a ambição, a rapacidade.

Ah! Se pudessem falar os espectros dos Samorins que os descobridores portuguezes expoliaram e massacraram!

A flamula de suas caravelas não representava um ideal belo mas sim tres elementos de servidão e de ampliação: Deus Patria e Rei."

A Batalha
(Dezembro de 1924)

¿ Que diz a isso o distincto colaborador de *A Provincia?*

Não diz nada, limitando-se apenas a, escandalisado e talvez horrorisado, pôr dedo na bôca.

E saiba o sr. dr. Rau que não consta ter a *Batalha* sido processada pela sua atitude *sediciosa* e *revolucionaria* contra um heroi que pertenceu á sua raça.

Já vê, portanto, o antigo editor do extincto jornal *Opinião Hindú* que com o seu reaparecimento na imprensa perdeu uma bôa ocasião de estar calado.

Quanto ao convite que nos faz, para transcrevermos da *O. H.* e *Chitacarxana tudo o que for contrario ás afirmações contidas no seu artigo*, aceitamo-lo, prometendo-lhe dar, *serenamente*, conta do *recado*, logo que tenhamos à mão as colecções das mesmas publicações que já solicitamos.

ECOS & CRITICA

O SR. BRAZ EM SCENA

O sr. Braz da Costa que esta' habituado a considerar o Hospicio como feudo seu, do sr. Bernardino da Costa e Cia, fica aterrorisado com a idea de ter de deixa—lo algum dia.

Eis a razao por que receando que se lhe escapasse da mao a *gamela* nao se dedignou por ao servigo desta o seu *Ultramar* no qual, de lança em riste, pretendeu quixotescamente criar uma falsa atmosfera de antipatias em volta do integro magistrado sr. dr. Brito Santos, tendo ate' chegado o seu atrevimento a' culminancia de o apodar de falho de serenidade.

Ora, o sr. Costa devia ser o ultimo falar na deficiencia de *serenidade* e outras *dades virtuosas* nos outros, ele que tem a sua portentosa personalidade so' repleta de *maldade, inimisade, hostilidade, perversidade, vacuidade, indignidade* e outras *dades* que nascem do estomago insatisfeito.

Pode faltar serenidade ao sr. dr Brito Santos? Mas diga la', sr. Costa; ¿ Supoe que a serenidade e' qualquer coisa parecida com o resto de *beefes, neurios* e *ladu's* que come aos seus constituintes bogais e simplorios?

Engana-se entao. E creia que nao e' dado conhecer a SERENIDADE a quem durante toda a sua vida politica e privada nao contraiu outra MANIA senao a de encher o papo, PER FAS ET NEFAS...ora intrujando o governo ora enganando o povo.

O meio em que nos agitamos e' pequeno e todos se conhecem maravilhosamente.

¿ Que valor tera' nestas condigoes a farga do sr. Braz da Costa?

FEIRA EM DABAL

A aldeia de Dabal conquanto tradicionalmente assaz conhecida e votada em grande parte a pouco desvelo da parte das autoridades dirigentes, se ve hoje, gragas ao natural iufluxo do progresso e dispertar geral, no relativo grau de aperfeigoamento que lhe nao permite em grande parte deixar-se arrastar a's antigas e tacanhas peias como e' natural.

Varias circunstancias felizes para esta aldeia, sobretudo a louvavel iniciativa da *Camara Municipal do Concelho de Sanguem*, da presidencia

कायदेभंग करा

(लेः— मुक्त.)

स्नेहं दयां तथा सौख्यमपि वा जानकीमपि ।
आराधनाय लोकस्य मुंचतो नास्तिमे व्यथा ॥

उत्तररामचरीत्

'कायदेभंग करा' आणि तो काय ह्मणून? वरील मथळा वाचून कित्येक जनाशीं नाहीं तरी आपल्या मनाशीं साश्चर्य प्रश्न विचारण्याचा संभव आहे. एकतंत्रीय राजकीय सत्तेच्या तुफानी वाऱ्यांतून मुक्त होऊन जीनें प्रशांत व गंभीर प्रजासत्ताक पद्धतीच्या महासागरांत प्रवेश केला आहे आणि जीवर स्वयंनिर्णय पद्धतीचें सोज्वल किरण पसरल्याचा भास होत आहे, त्या गोमांतकीय नौकेंतील जन तेथुढें 'कायदेभंग करा' असें ह्मणणें किती मूर्खपणाचें व धाष्टर्याचें आहे? हे शब्द मूर्खपणाचे किंवा धाष्टर्याचे आहेत असेंहि कोणाला वाटो, पण ते शब्द आह्मीं स्वयंस्फूर्तीनें उच्चारीत आहों, अशांतला मात्र भाग नाहीं. हे शब्द आह्मांला बोलायाला, लिहायाला आणि लोकांना सांगावयाला सुचविलेले आहेत, त्याप्रमाणें आमचें आह्मीं कर्तव्य करीत आहोत.

प्रस्तुतच्या राजकीय घडामोडी व व्यवस्था पाहिली ह्मणजे आह्मीं कोणत्या पद्धतीच्या राष्टात आहों याचें भान रहात नाहीं. धड एकतंत्री सत्ता नाहीं, नाधड लोकसत्ताक राज्य नाधड न्याय तर कायदे, अंमल बजावणीहि धड नाहीं, अशा कोणत्याशा राष्टात आह्मीं जीवन कंठीत आहोंत. या पद्धतीला 'झोटींग पाच्छाई' असें जरी स्पष्ट ह्मणतां येत नाहीं तरी असें ह्मणता येतें कीं जेथें जातों तेथें हत्तींसुद्धा जातो, नाहीं तेथें मुंगीचासुद्धा शिराव होत नाहीं. अशा तऱ्हेची ही एक पद्धत आहे. एक राजरोस दुसऱ्याच्या घरांवर नाहक कुर्‍हाड चढवून स्वतःचा तळीराम गार करून घेत असतो तर आपण बरा व आपलें काम बरें असें ह्मणून वागणारा सदैव नागविला जातो. या सर्वांच्या मुळाशीं पाहूं गेलें तर आह्मांला एकच तत्व आढळून येतें. व ते आमच्यातील 'राष्टीयत्वाभाव' हें होय. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं. अशा प्रकारच्या व्यवस्थेनें जनतेंत असावयास पाहिजे असलेली राष्टीय भावना इथा येथूनं अस्त झालेला असल्यामुळें आह्मीं कोण हें आह्मींच स्वतः विसरून गेलेले आहोंत. आमची जन्मभूमि, आमची अन्नदाती भूमि, आमचे बांधव या सर्वांना आह्मी विसरून गेलेलों असल्यामुळें सत्ताधाऱ्यांनी आमचें अस्तित्वहि क्षुल्लक मानल्यास त्याचा दोष कोणाकडे?

या दृष्टीनें आमच्यापेक्षां आमच्या ख्रिश्चन बंधूंचें अधिक अधःपतन झालेलें आहे. आज हिंदूंतील हिंदुत्व कायम राहून नुसतें चैतन्यच अव्यक्त असलेलें दिसतें तर आमचे किरिस्ताव लोक, धर्म व चैतन्य ही दोन्हीं घालवून बसले आहेत. आपल्या तीन चार शतकांपूर्वीच्या पूर्व स्थितीकडे यांनीं नजर फेंकून तें दृष्य अवलोकन करावें अशी आमची त्यानां आग्रहाची विनंति आहे. आयाबहिणीवर झालेले अत्याचार, दोरखंडाप्रमाणें रहाटावर ताणणें, तप्त तव्यावर उभे करणें, हात, पाय, जीभ इत्यादि फक्त अवयव जीवंत असतां छाटणें, अंगाची कातडीं सोलणें, डागणें, कढत तेलाचे थेंब अंगावर टाकणें, उपवासी ठेवणें, लहान अर्भकांची त्यांच्या मातापित रांसमोर कत्तल करणें इत्याद्यनेक अनन्वित छळ त्यांच्या पूर्वजानीं सोसलेले त्यांच्या स्मरणांतून इतक्या लवकर जाणें शक्य होतें काय? पण आजची वस्तुस्थिति काय दर्शविते? त्याचेच वंशज हे बाटके ख्रिश्चन आज आपलें राष्ट विसरले आहेत, पोर्तुगाल हीच त्याना आपली जन्मभूमि वाटत आहे!! ज्यांनीं आपल्या आयाबहिणींचें धिंडवडे काढले ज्यांनीं आह्मांला परतंत्र व केवळ दास बनविलें, ज्यांनीं आमचें वैभव हिरावून नेलें ज्यांनीं संस्कृति नष्ट केली, धर्म बुडविला, राष्टीयत्वास विमुख केलें. त्यांच्या पुढें लागून चालन करून आलले इतर भाई जे हिंदु त्याच्या चुगल्या गामोत्सवासारख्या प्रसंगीं करण्यास ते चुकत नाहींत! राष्टाचें दुसरें दुर्दैव तें कोणतें? वास्तविक गामा हा कांहीं गोमांतकाचा काका लागत नाहीं. याच्याकडून गोमांतकाला फायदा होण्याऐवजीं तोटाच अधिक झाला आहे. अखिल गोमांतक वासियानीं—मग ते बाटके असोत, हिंदु असोत अगर मुसलमान असोत—याची स्मरण तिथि बाळगायलाच पाहिजे असें असेल तर ती हरताळाच्याच रूपानें पाळायला पाहिजे होती. परंतु हे आमच्यांतीलच राष्टबुडवे बाटके, 'मी पोर्तुगीज नागरिक आहें' या भावनेनें स्वत्व विसरून गामाच्या भजनी लागल्यावर हिंदूंना चूप बसण्यापलिकडे गत्यंतर नव्हतें. बरें असें करण्यापासून त्यांचा विशेष फायदा झाला किंवा होणार असें नाहीं. चतुःशांवत्सरिक उत्सवाप्रीत्यर्थ खर्च झालेल्या रकमेची भरपाई होण्याकरितां जो पोस्टेज वाढविण्यांत आला तो या ख्रिश्चनानां तेवढा माफ अशांतलाहि प्रकार दिसला नाहीं. येऊन जाऊन कायती नोकरशाहींत जरा ऐस पैस जागा यानां मिळेल; पण त्यामुळें हिंदूंचें नुकसान न होतां झाला तर फायदाच होईल असें मानण्यास भरपूर आधार आहे. जो उठे तो तोन अक्षरें आलीं रे आलीं नोकरीच्या मागें लागे. त्यामुळें कृषिकर्माकडे दुर्लक्ष होऊन जात असे आणि पगाराचें मानहि जिवनकलहार्थ जेमतेमच पोषक होत असल्यामुळें अशांची प्रवृत्ति लांचलुचपतीकडे झुकत असे. ह्मणून सरकारनें एकाहि नोकरी हिंदुकडे सोंपविली नाहीं तरीहि फारच नामी गोष्ट होणार आहे. हिंदूंतील ऐदीपणा नष्ट होण्यास सरकारकडून ही एकप्रकारची मदतच होणार आहे. पण नोकरीचा एथें प्रश्नच नाहीं. आहे तो राष्ट्रीयत्वाचा आणि आमचे ख्रिश्चनबंधु तो साफ विसरून गेले आहेत. यामुळें गोमांतकीय राष्ट्रीयत्व, गोवा प्रांत आणि पोर्तुगाल यांच्या दरम्यान असलेल्या सागरांत गटंगळ्या खात आहे!

अर्थात स्वत्व नाहीं, स्वाभिमान नाहीं राष्ट्रीयत्व नाहीं तेथल्या लोकांवर घरदार नसल्यामुळें पोर्तुगालांत स्वस्त अशा पांचव्या मजल्यावर उदक पाण्याची हालअपेष्टा सोसून रहाणाऱ्या, व ज्यांची नजर स्वार्थापलीकडे गेलेली नाहीं अशा हलक्या दर्जाच्या मनुष्यांच्या हातांत सत्ता यावी व त्यानीं मनमुराद बिनधोक गोंधळ घालून आपला तळीराम गार करून घ्यावा यांत नवल तें काय? येथें जर राष्ट्रीयत्व असतें तर त्याच्या चैतन्यानें परकी लोकांचे डोळे दिपले असते. नोकरी ह्मणजे सुळावरची पोळी, याची जाणीव विसरून कायद्याची पायमल्ली झाली नसती आणि कदाचित अशा परिस्थितींत सध्याच्या सारखे स्वार्थसाधु व मित्र गव्हर्नर आणि इतर अधिकारी इकडे येण्यास गांगरले असते.

पण येथला राष्ट्रीय मृतपणाचा परिचय पूर्णपणें त्यानां झालेला असल्यामुळेंच त्याना फावतें! राष्ट्रीय भावना उद्दीपीत व्हावयाला कालावधी पाहिजे. अशा परिस्थितींत या अधिकारी वर्गानें दाखविलेल्या मार्गानें जाणें उचित आहे एवढें जरी आमचे लोक समजले तरी आमच्या राष्ट्राला बरीच मदत होणार आहे. आह्मी कोण व आमचें ध्येय काय यांची ज्यानां जाणीव नाहीं त्यानीं निदान सरकारनें आपल्या सोदाहरण कृतीनें कसें वागावें याचा कित्ता घालून दिला व देत आहे तिकडे तरी अवश्यमेव लक्ष्य देऊन तसें वागणें न्याय्य नाहीं काय? राजा कालस्य कारणम् हें तत्व जर खरें आहे तर सरकारच्या वागणुकीप्रमाणें आमची वर्तणूक व्हावयाला नको काय? सरकारनें जर रस्ते बगेवर जुवा खेळण्याचें आरंभलें तर प्रजेनें त्याच्याबरोबर खेळावयाला नको काय? गव्हर्नरनें एखादा खेळ आरंभावा व त्यांत भाग घेण्याची नाखुषी दर्शविल्यास प्रो. आत्माराम पैपाळंदीकर यांच्यासारख्याची उचलबांगडी व्हावी. सांगें मुनिसिपालिटीसारख्या स्थानिक स्वराज्यात ढवळाढवळ करतानां कायदेभंग गव्हर्नरनी जाणून बुजून करावा, स्वतःची अब्रू चवाट्यावर येण्याचा संभव असल्यावरून लोकमत व वेंहि नुसतें लोकमतचदर्शविल्यास 'भारत' व 'हिंदु' सारख्या वर्तमानपत्रांवर खटले भरावे— मिलिटरी खात्याच्या ऐदी लोकानां फुकटचा बिनगरजे शिवाय पगार वाढविल्याबद्दल तक्रार वर्तमानपत्रकर्त्यांनीं केल्यास त्यांच्या संपादकानां शेंकडो लोकांसमोर मरपर्यंत मारावें व सरकारनें अशानां शिक्षा न करतां त्यांच्या कृत्याची उलट स्तब्धतेनें कौतुक करावें हें सर्व आह्मांला काय सांगतें? वरील गोष्टी आह्मांला काय सुचवितात? वरील प्रकारच्या कृति आह्मांला कोणता धडा देतात? अशा प्रकारांत काय संभवतें? वरील सर्वांत एकच गोष्ट आह्मांला दाखविली जाते आणि ती 'कायदेभंग' ही होय. सरकार स्वकृतीनें 'कायदेभंग करा' असेंच सांगत आहे. तेव्हां स्वतःची अक्कल नसली तरी सरकार जी बहुमोल अक्कल देत आहे, जो धडा त्यानें घालून दिला आहे, त्यांत किती पारंगतपणा मिळविला आहे, तो धडा किती दक्षतेनें पाठ केला आहे हे आह्मीं त्यानां दाखवावयाला नको काय? सरकारनें आमच्याशीं कायदेभंग केला, आह्मीं सरकारशीं कायदेभंग केला पाहिजे. असाच 'जशास तसें' या राजमान्य राजकीय नीतीस अनुसरून नाहीं काय? खुनास खून, अपराधास शिक्षा, शठंप्रति शाठ्यंम ही राजन्यायाचीं अंगें नाहींत काय? ह्मणुन सरकारनें सुचविलेला कायदेभंगाचा उघड संदेश जनतेस कळविण्याची कामगिरी आह्मीं स्वखुषीनें पत्करली आहे आणि या परोपकाराबद्दल सरकार आमचें सदैव ऋणी राहील यांत शंका नाहीं.

सारस्वत ब्राह्मण समाज—मडगांव

जाहिर विनंति

सालाबादप्रमाणें शिवजयंत्युत्सव तारीख १३–३–२५ फाल्गुन वद्य ३ या शुक्रवार रोजीं संध्याकाळीं ७॥ वाजतां समाज-गृहांत साजरा होणार असून, तन्निमित्त निरनिराळ्या वक्त्यांचीं भाषणें होतील. तरी सर्वांनीं वेळेवर हजर राहण्याची कृपा करावी.

सेक्रेटरी
केशव अनंत नायक.

हुशार व गरीब विद्यार्थ्यांची सोय !

पुणें अनाथ विद्यार्थीगृह

१ पुणें अनाथ विद्यार्थी गृहांत नवीन विद्यार्थी घ्यावयाचे आहेत. विद्यार्थ्यांचें वय १२–१५ असून तो निदान मराठी ४ थी इयत्ता पास असावा. बुद्धीनें हुशार, शरीरानें सुदृढ, व स्वभावानें सुशील असेच विद्यार्थी घेतले जातील.

२ संस्थेचें स्वतःचें महाराष्ट्र हायस्कूल असून त्यांत बौद्धिक शिक्षणाबरोबर धंदे शिक्षणहि दिलें जातें. होतकरू मुलाच्या कॉलेज शिक्षणाचीहि व्यवस्था होते.

३ फक्त गरीब विद्यार्थीच या संस्थेंत घेतले जातात. पैसे घेऊन सुखवस्तु विद्यार्थी घेतले जात नाहींत घरीं आपल्या ताब्यांत रहात नाहींत ह्मणून उनाड मुलें सुधारण्याकरितां पालक आणितात; तसेंच शाळेंत बुद्धि चालत नाहीं ह्मणून बुद्धिमंद मुलें कांहीं पालक आणितात; पण अशा मुलांची या ठिकाणीं सोय होऊं शकत नाहीं. उभयतांना विनाकारण पत्रव्यवहाराचा व गाडीभाड्याचा त्रास पडूं नये, ह्मणून या सूचना दिल्या आहेत.

४ संस्थेंत येऊं इच्छिणाऱ्या मुलांनीं ०॥ च्या पोस्टेजसह छापील अर्ज नमुने मागवून घ्यावेत व ते १७ मार्चचे आंत भरून पाठवावेत.

६१७ कसबा पुणें. { वि. गं. केतकर. व्य.अ.वि.गृह,पुणें.

भा र त

मिति फाल्गुन व० २ या शके १८४६

आक्षेपार्ह लेखाचें मराठींत भाषांतर

ज्या पोर्तुगीझानें हिंदुस्थानचा मार्ग शोधून काढला असें युरोपियन नजरेस दिसतें; त्या वास्कोडिगामाची पुण्यतिथी सरकार व सरकारावर प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष अवलंबून असलेले बगलबच्चे येत्या ता. २३, २४ व २५ रोजीं पाळणार आहेत. ह्या समारंभास लागणारा सर्व पैसा वसाहतीच्या तिजोरींतून–गोमातकीय गंगाजळ तून–खर्च केला जावयाचा असून सरकारनें त्यासाठीं १४ हजारांवर कांहीं रुपये मंजूरहि केले आहेत.

ज्यांच्याविषयीं जित लोकांच्या अंतःकरणांत तिलमात्रहि आदर वसत नाहीं, उलट जित वर्ग ज्याच्याविषयी निर्भेळ उदासीनत्वच धारण करतो अशा आपल्या कांहीं भावनासाठीं–विकार शांततेसाठीं झटल्यासहि चालेल–जित लोकांच्या पैशाची उधळपट्टी आजपर्यंत लाखों खेपा जेत्यांनीं केलेली असून ही तदनंतरची खेप होय ! खरेंच ! लोकलबोर्डें, मुनिसिपालिट्या ह्यांसारख्या संस्थाकडून आज दिवस गामोत्सवाच्या तऱ्हेवाईक, कौतुकास्पद, चटकदार, व औत्सुक्यवर्धक कार्यक्रमाच्या जाहिराती फडकविल्या जात असता लोकसमाज ह्या उत्सवापासून शक्य तितका दूरच रहात आहे. ह्या गोष्टीवरून आमच्या वरील विधानाची सत्यता पटते. आणि ह्मणूनच जिज्ञासु जीवाच्या समाधानार्थ आणखी पुरावे पुढें करण्याचें कारणच उरत नाहीं, हें स्पष्ट व उघड ठरतें.

पाश्चात्य सुधारणा आर्यावर्तांस बहाल करणारा पहिला विजयी वीर ह्या नात्यानें वास्कोडिगामाच्या नावें त्याची मृत्युतिथी आठवून सरकार व त्याचा बगलबच्चा अगर जो हुकूमवर्ग चैन, चंगळ व पैशांचा धुमडा उडवीत असतां आह्मी मात्र ज्या भूमीची औद्योगिक, भौगोलिक व व्यापारविषयक उपयुक्तता नव्हे अनुपमता पाहून पोर्तुगालचा जाडा मुत्सद्दी आल्फोन्सो ऑल्बुकेर्क ह्यास ती आपैली राजधानी करवीसें वाटलें. आपल्या राजकारणाचें केंद्रस्थान करावेंसें वाटलें त्या गोमातकाच्या उन्नतीवर पाश्चात्य सुधारणेचा कोणता परिणाम कसा झाला ह्याचा एकांतांत बसून विचार करण्यास सर्व लोकांस आम्हीं आव्हान देतों.

गोमांतक–मलबार किनाऱ्यावरील हा तुकडा सुधारण्याचें कंकण पोर्तुगालनें हातीं बांधल्यास आज चार शतकाहून अधिक वर्षें लोटलीं. इतकीं वर्षें पोर्तुगाल ही भूमि उन्नतावस्थेस नेण्याची खटपट करीत आहे. तरीहि कारभारी लोकांच्या धडपडीनंतर व प्रजेचे अनंत हाल होऊनहि चालू २३, २४ व २५ या तारखांस जें दृश्य दिसतें तें पुढील प्रमाणें होय.

मनुष्यें नैतिक व शारीरिक बाबतींत धुळीस मिळालेलीं कुटुंबें, स्थितिस्थापकता किंबहुना आधार नसून लंगडीं झालेलीं, सर्व समाज विरघळण्याच्या-अधःपाताच्या स्थितीस पोंहोचलेला, प्रेम व शक्ति हीं ज्यांच्यापासून उत्पन्न होतात अशा उच सद्गुणांनीं रहीत, कलाकौशल्य शून्यवत, व्यापारधंद्यांचा पूर्ण अभाव व निर्गत मालापेक्षां आयात मालाचा भरणा जास्त, शेतीभातीचें उत्पन्न कमी प्रमाणावर व उद्यांचा दिवस कसा ढकलेल ह्याची खात्री नसल्यामुळ जमीन जुमले पाड टाकून परदेशगमनाची वीतभर पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठी मातृभूमि वियोगाची प्रवृत्ति दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणांत आहे. मनुष्य जातीचीं जीं दोन घोर दैन्यें दारू व तंबाकू ह्यांचें लोक बेसुमार सेवन करीत सुटले आहेत. अधःपतनाच्या ह्या खोल गर्तेंतून वर येण्याची दिशा आह्मांस दाखवून देणारा एखादा महात्मा ह्या पौर्वात्य देशांत सध्या कुठें दिसत नाहीं; पण हे सुधारणेचे परिणाम मात्र आमच्या उघड्या डोळ्यांस दिसत आहेत.

गुन्ह्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. खून होत आहेत. विषप्रयोग तर 'मी मी ' ह्मणतच आहेत. चोऱ्या व स्त्रियांची अब्रू हानि ह्यांच्या विषयीं तर बोलूंच नये. दारिद्र्याच्या सहकारी क्षयावस्थेनें तर आपलीं पाळें मुळें आमच्या ह्या देशांत बरींच पसरलीं आहेत व शेकडों, हजारों लोकांचा बळी ती रोजरोज घेतच आहे. उपदंश तर जिकडे तिकडे बोकाळलेला दिसत आहे. कांहीं तालुक्यांनीं तर त्याचें प्रमाण लपून छपून कां होईना हिंवज्वराबरोबर आहे.

लोकांनां महाग झालेलें व शाळांनीं दिलें जाणारें परिणामशून्य शिक्षण मिळत असतांहि निरक्षरतेचें प्रमाण भयंकर स्थितींत आहे. ज्ञानहिन लोकांच्या नुकसान भरतीसाठीं ह्मणून आह्मांपाशीं चांगल्यापैकींहि कांहीं निवडक मंडळी नाहीं. ग्रॅज्युएट लोकांच विध्वंसक पथक मात्र भरपूर आहे व मुंडली [एक प्रकारचा कीडा] माडाचा जसा नाश करिते त्याचप्रमाणे हे लोक देशाचें नुकसानच करीत आहेत. बडे रस्ते व मोठे पूल कागदी नकाशावर मात्र दिसतात; बाकी जे कांहीं वस्तुस्थितींत टिकाव धरून आहेत ते जाण्यायेण्याला निवळ निरुपयोगी आहेत. नद्यांतून सफर करणाऱ्या वाफेच्या बोटींत बसणें, प्रवाशानां एक जीवावरचें संकटच वाटत आहे. हिंदी कलाकौशल्याची, जुन्या इमारतींची व ग्रंथाची इतिश्री केली गेली आहे. मग ती मूर्तिभंजक आवेशामुळें असो किंवा रक्षण करण्यास असमर्थ ह्मणून असो, पण प्राचीन कलाकौशल्य लुप्त झाले मात्र खरें.

देशाची मूळ भाषा मेली मात्र नाहीं पण मरण्याच्या पंथास लागली आहे.

ह्या सर्वांचें तात्पर्य हेंच कीं, आह्मी आज नैतिक, सांपत्तिक, शारीरिक व बौद्धिक दृष्ट्या खालावलेले आहोंत.

खरोखर, आज आमचा देश अशा करुणास्पद स्थितींत असतां स्मारकासाठीं हजारों रुपयांची उधळपट्टी करून आपल्या बगलबच्चांसह मजा मारण्यास ही परिस्थिति उत्कृष्ट आहे ! ह्याचें कारण हें कीं जे लोक एका काळीं उच्चतम स्थितींत होते, ते पूर्वकालीन एका घोड चूकीचा परिणाम ह्मणून बिघडण्याच्या पंथास लागले आहेत.

[भारत, अंक ३८ वर्ष ९]

स्फुट विचार

महात्मा गांधी व एक क्रांतिकारकः– गेल्या महिन्याच्या ता. १२ च्या ' यंग इंडियां'त महात्मा गांधींनीं आपणास आलेलें एका क्रांतिकारकाचें पत्र समग्र छापिलें असून त्याच्या खालीं त्या पत्रास आपलें उत्तरहि प्रसिद्ध केलें आहे. त्या पत्रलेखकानें महात्माजीस आपलें नांव कळविलें आहे, पण पत्ता मात्र दिलेला नाहीं. आपल्या पत्रांत त्या पत्रलेखकानें महात्माजींस इतउत्तर ' तुह्मीं राजकारणांतून आपलें अंग अजिबात काढून घ्यावें एक; अगर क्रांतिकारकांनां अडथळा न होतां उलट मदतच होईल अशा रीतीनें आपल्या चळवळींचा मोर्चा फिरवावा एक, अशी विनंतिवजा ताकीद दिली आहे. त्या पत्राच्या उत्तरांत आपल्या नित्याच्या गोडपण हृदय थरारून सोडणाऱ्या शद्बांत महात्माजी लिहितात " माझा संदेश देशाला न पटतां रक्ताच्या नद्या वाहविणाऱ्या क्रांतीचीच हिन्दी जनतेस लालसा असल्याचें जर मला आढळून येईल, तर तत्क्षणीं राजकारणाच्या आखाड्यांतून मी निघून जाईन.×××× क्रांतिकारकांची चळवळ हिंदुस्थानांत यशस्वी होणें अशक्य आहे असें माझें ठाम मत आहे, कारण त्या चळवळीला बहुजनसमाजाचा कौल मिळणें शक्य नाहीं. आणि यदाकदाचित या चळवळीच्या वांट्यास यश आलेंच तर बहुजन समाजाला मात्र तें जास्तच जाचक होईल. ज्या चळवळींत बहुजनसमाजाला सामील होतां येत नाहीं, त्या चळवळीनें मिळालेलें स्वराज्य हें त्यांच्या वांट्याला परराज्यच होय. कारण बहुजन समाजाला असल्या प्रकारांचा परिणामार्ती परकीय सत्तेसारखाच जाच होईल.

महात्माजींचें शत्रुत्व कोणाशीं ?:– " धर्मासाठींच मी राजकारणाच्या आखाड्यांत उतरलों आहें, धर्मासाठींच अगण्याची माझी इच्छा आहे, व जरूर पडल्यास धर्मासाठींच देह ठेवण्याची माझी तयारी आहे " अशा तऱ्हेचे वेळोवेळ उद्गार काढून " धर्म व राजकारण " ह्यांची सांगड घालणाऱ्या विसाव्या शतकांतील समर्थ रामदासांच्या – शांतिसम्राट महात्म्याच्या लेखणींतून उतरलेल्या वरील विचारांचें निर्विकार मनानें मनन करणाऱ्यास त्यांत गोवल्या गेलेल्या दुहेरी सत्याचा साक्षात्कार झाल्यावांचून रहात नाहीं. ज्याच्यासाठीं ते एवढे झटताहेत त्या भावी हिन्दवी स्वराज्याचें निशाण प्रतिस्पर्ध्यांच्या लाल रक्तानें माखलेलें असणें त्यास मुळींच नको आहे. धर्म व सत्य ह्या जगांतील दोन श्रेष्ठतम तत्वांचें जर हिन्दी जनतेस पाठबळ आहे तर सत्याच्या जोरावर आपल्या प्रतिस्पर्ध्यास जिंकणें त्यांस केव्हांहि अशक्य नाहीं असें त्यांचें ह्मणणें आहे. स्वातंत्र्यासाठीं दुसऱ्याचे प्राण घेण्यापेक्षां स्वधर्मासाठीं स्वतःचे प्राण देण्यानेंच अधिक उज्वल स्वार्थत्याग व्यक्त होत असतो. ही त्यांची विचारसरणी कोणाहि हिंदुधर्मानुयायास सहज पटण्याजोगी आहे, कारण आह्मां हिंदूंच्या चळवळीला व्यक्तिविशिष्ट स्वरूप असें कधींच येत नसतें. ब्रिटिश लोक युरोपांतून येऊन आह्मावर सत्ता गाजवितात–आमच्या नैसर्गिक स्वातंत्र्यावर घाला घालतात ह्मणून त्यांचा व्देश करणें महात्माजींस अर्थातच पसंत नाहीं. इंग्रजांस आपले राजकारणातील प्रतिस्पर्धी किंवा शत्रू मानण्यास ते तयार नसून सध्यांच्या द्विदल राज्यपद्धतीशींच ते शत्रुत्व करितात हें ह्यावरून सिद्ध होतें.

महात्माजींच्या मार्गांचा मूल सिद्धांतः- त्या क्रांतिकारकानें आपल्या पत्रांत केलेलीं विधानें खोडून काढण्याच्या भरांत महात्माजीनीं खरोखरच आपलें हृदय खुलें करून दाखविलें आहे. ते ह्मणतात " ज्या चळवळींत बहुजन समाजाला सामील होतां येत नाहीं, त्या चळवळीनें मिळालेलें स्वराज्य हें त्याच्या वाट्याला परराज्यच होय " स्वतः महात्माजीनीं आजपर्यंत असा कोणताच कार्यक्रम आंखलेला नाहीं कीं, ज्यांत बहुजन समाजाला भाग घेतां येत नाहीं. दक्षिण आफ्रिकेंतील त्यांची चळवळ घ्या, सामुदायिक कायदेभंग घ्या, असहकारिता घ्या, बहिष्कारपंचक घ्या; व कायदेभंगाची कल्पना नैराश्याच्या वातावरणांत साफ वितळून गेल्यावर विजयानगर कॉंग्रेसींत त्यांनीं लोकसमाजापुढें फेंकलेलीं चरखा, हिंदु–मुसलमान ऐक्य व अस्पृश्यता निवारण हीं विधायक कार्यक्रमाची तीनहि अंगें घ्या–आपणास असेंच आढळून येईल कीं, राष्ट्रापुढें ठेवावयाच्या कार्यक्रमाची उभारणी व जुळवणी महात्माजी, त्यांत बहुजन समाजाला हकानें भाग घेतां येईल, अशाच रीतीनें करीत असतात. स्वराज्य हें ज्याचें साधन तें सुराज्य जर हिंदी जनतेला उपभोगावयाचें असेल तर स्वायत्ततेची इमारत उभारण्यांत हिंदी ह्मणविणाऱ्या प्रत्येकास भाग मिळणें इष्ट व वाजवी आहे हें कोणीहि कबूल करील. स्वराज्य मिळविण्यास किती परिश्रम पडतात हें समजून आल्याशिवाय तें राखावें कसें, हें समजणें दुरापास्त आहे. नाहीं तर आमच्या गोमांतकासारखी कदाचित स्थिति व्हावयाची !

Ano 9 N. 51

Q... ...ira 19 de Março de 1925

ASSINATURA
cada ano tres rupias

ANUNCIOS
...lha ainda que repetida uma tanga
...ımero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdó Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ५१

गुरुवार ता. १९ मार्च सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे दसाई

ETERNO CARNAVAL

Estamos no mez de *Xigmó*, isto é, na época do *carnaral hindú*, periodo destinado a divertimentos públicos entre os sectarios do *Bramá*.

Quem, como nós, conhece, porém, a fundo o nosso divertido meio, propenso a pandegas de toda a sorte e .. morte, desde logo se persuade, sem esforços de maior, de que estamos num entrudo que não tem limites—num carnaval eterno—numa orgia sem fim.

Isto de dizer, portanto, que "estamos no mez de Xigmó" não passa duma expressão pleonastica, porquanto temos aqui sempre, durante os doze mezes de que o ano se compõe, o tal periodo destinado a divertimentos públicos...

Não faltam entre nós bailes de desusada pompa, ladainhas brilhantes, entronisações concorridas, *natocas*, sessões extra ordinarias e ordinarias do Conselho Legislativo; não se sente a falta do *circus*, de eleições das juntas locais, camaras municipais, dos deputados, dos senadores e do... Hospicio do *Sagrado Coração de Jesus*; há, finalmente, entre nós uma *cornucópia* alegre de diversões fantasticas, *aclimataveis* a todos os sabores...e *rubores*, entrando no seu n° a batota e o alcoolismo.

Era desnecessario fazer-se, pois, menção especial do *Xigmó*. E, se apezar disso, a fazemos, è simplesmente para que o zé-povinho não se julgue numa época especial, numa fase particular do ano.

Se não digam:

¿ Quando nos sentimos mal aqui, apesar de *avalanche* de impostos, criação desnecessaria de mil e um encargos e tantos outros atentados contra os mais sacrossantos interesses, contra as mais legitimas aspirações do nosso Paiz ?

Pelo contrario, sempre nos sentimos bem, sem despreocupações de especie alguma, como filosofos da antiga Grecia.

Carnaval ! Xigmõ !

Pense cada um na sua vida de cidadão e veja se lhe assiste o direito de se divertir, estando o Paiz sob o jugo indomavel de opressões e desatinos administrativos que lhe asfixiam o progresso, enlameando-o no lodaçal da miseria.

DE RELANCE...

A' PROVINCIA

O jornal europeu— *A Provincia* estampando nas suas colunas a fotogravura do sr. dr. Siurama Rau dedica a este ilustre magistrado o seguinte elogio, de mistura com uma adjectivação biliosa e fedorenta á imprensa que se absteve de tomar parte no centenario do Gama:

"Dr. Siurama Rau—*E' uma individualdade que marca na India Portugueza. Desempenha o cargo de delegado do M. P. na comarca de Baadez. Amigo de Portugal, conhecendo o nosso paiz metropolitano onde fez a sua formatura, revoltou se contra individuos desorientados que feriram uma nota anti-patriotica por ocasião do 4° centenario da morte de Vasco da Gama, e rompendo com a popularidade que o tem aclamado, veio á imprensa açoutar os que sem titulos que os recomendem atrairam sobre uma classe digna de respeito, como a hindú, as más vontades dos verdadeiramente patriotas.*"

Pelo visto, o sr. Pereira Batalha é um eminente advogado—de causas perdidas. A sua pericia juridica consiste em estragar *artisticamente a* defeza da causa que lhe fôr confiada.

Não admira, por tanto, que Sua Excia. que pretendeu defender a *causa* do sr. Rau, lha tivesse comprometido e duma maneira completamente desastrada

Ora diga-nos, sr. Batalha.

Se o sr. dr. Rau *rompeu com a popularidade que o aclamara, pelo facto de ter ele vindo á imprensa açoutar os que atrairam sobre uma classe digna de respeito, como a hindú as más vontades dos verdadeiramente patriotas,* ¿ fes bem ou mal o delegado do M. P. na comarca de Bardez ?

Quem tem um pouco de bom senso, inclina-se logo a responder que o sr. dr. Rau fez mal, *rompendo com a popularidade* por sua prosa tão extemporanea quão inconveniente.

Dum lado confessa a *Provincia* que o sr. Rau perdeu a popularidade com a sua vinda á imprensa e doutro lado o elogia por esse facto !

E' bico ou cabeça ?

De resto, a caneta do sr. Pereira Batalha, escrevendo o que escreveu, só fugiu para a verdade.

O sr. dr. Rau gosava de *popularidade* na sua classe, porque esta o supunha indiferente aos festejos do centenario do Gama; mas, quando a mesma classe se persuadiu de que andava iludida, porisso que aquele distincto magistrado vinha á imprensa *açoutar* os seus verdadeiros representantes, colocando-se ao lado do centenario retirou lhe, desde logo, a simpatia, ficando *ipso facto* o constituinte do *advogado* sr. Batalha *rompido* com a popularidade *que o aclamara*.

Na politica, nem sempre triunfa a *intrujice*. Saiba o o jornal—*A Provincia* e saibam-no todos quantos se distinguem pela veleidade de pensar como êle.

Para a gente ser lógica, não lhe bastam apenas *titulos que a recomendem*. Necessário é ter o que precisamente falta ao sr. Batalha: inteligencia e sinceridade.

PREMIO AO MERITO

O sr. Panduronga Sacarama Sinai Sirvoicar, ilustre secretario de Fazenda do concelho de Salsete foi transferido para o identico cargo de Pernem.

Naturalmente, o governo deve ter colocado o sr. Sirvoicar no concelho de Pernem em atenção aos relevantes e *altissonantes* serviços por ele prestados ao centenario de Vasco da Gama.

A transferencia do sr. Panduronga indica bem, pois, que o Governo nunca olvida os funccionarios que o servem a valer.

Nossas calorosas felicitações tanto ao beneficiado sr. Sirvoicar como ao benfeitor agradecido do Governo.

"O LIBERTADOR"

Recebemos a visita deste brilhante semanàrio republicano de Lisbôa de que é fundador o intemerato e desinteressado jornalista sr. Martins Junior.

Tanto material como moralmente, o jornal— *O Libertador* é um verdadeiro primor e, porisso, entendemos, tambem, que todo o sincero republicano deve lêr o referido jornal e fazê-lo circular.

Agradecendo a visita, desejamos ao simpatico colega longa dura e perene ventura.

Ano 9 N. 41

a-feira 8 de Janeiro de 1925

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
aha ainda que repetida uma tanga
ime. o avulso uma tanga

IRECTOR E EDITOR
P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.

BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४१

गुरुवार ता. ८ जानेवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोंयं

Regime de papelada

Vezes sem conta temos condenado o regime de papelada que entre nós campêa infrene. em grave prejuiso, tanto dos governantes c mo dos governados.

Para o leitor pôder fazer, mais uma vez, idêa nitida d. que seja o mesmo regime, inserimos a seguir o que a respeito dêle diz o jornal *Noticias* de Margão.

Regime de papelada! E' o maior cancro que noa roe o mais precioso objecto que possuimos: o tempo. O que nao quere dizer que o tal sistema deixe de incomodar, tambem, as magras e esfarrapadas algibeiras do Zé-povinho.

Se não, que digam os governantas e os governados, lendo o seguinte:

Extinguiu-se o regime da monarquia, mas não se extinguiu o regime de papelada nas repartições do Estado. Temos hoje o telefonio, e contudo as tais notas de serviço e oficios são por uma pá velha. Para dizer digo que não digo, lá temos um oficio. E para dizer digo o que digo, uma nota de serviço. E o papel que se consome é em milhares de balas. Nada diremos do tempo que se perde, porque se daquela maneira se não gastasse o tempo nada haveria que fazer.

Isto posto á guisa de preambulo, vamos contar um caso que de simples passou a ser composto, sucedido em uma colónia nos tempos dos *ladrões da monarquia*, assim classificados por alguem, entre socos e murros nas mesas.

Um tambor de uma banda regimental mostrou ao seu regente uma baqueta partida e pediu que mandasse facturar uma outra. E o regente disse que nas despesas que estava autorisado a fazer não entrava o pagamento para a compra das baquetas. Que este assunto era da competencia do chefe do Estado Maior, a quem ia oficiar.

E lá foi dirigido o oficio com este chāvão do estilo: Tenho a honra de...

Resposta do chefe do Estado Maior: Que não estava nas suas atribuições autorizar despezas afora das marcadas nos regulamentos das bandas. Que por isso, ia participar o caso ao sr. governador por oficio.

E o governador responde dizendo que tendo sido criadas as bandas regimentais por decreto ministerial, é ao ministro que cabe d r providencias para o assunto em questão. Que portanto tinha que oficiar ao ministro.

Decorrem seis mezes. Do ministerio nenhuma resposta. O governador é pedido pelo regente para em telegrama fazer lembrar ao ministro o assunto. E o telegrama é feito. Nem pio. Mais telegrama. Mais outro. Mais outro. Silêncio!

Decorrem anos, e o regente da banda, finda a sua comissão regressa para Portugal, trata do caso no ministerio, e conseguе liquidá-lo.

Feita a conta do custo dos telegramas, deu a soma cêrca de 300 mil réis. E a mais bem facturada baqueta não custaria então nem uma corôa (500 réis) ! ! !

AO PUBLICO

Recebemos uma folha solta da especie de *Ao Publico*, da Camara Municipal de Sanguem, que promete elucidar o Povo sobre factos sensacionais que tem havido na mesma instituiçao, constituindo farto pasto a' ociosidade indigena.

Venha a mesma elucidaçao que so' depois de estuda la emitiremos sobre o caso a nossa modesta opiniao.

. . किंती तरी
नवतानां दिसले असतील.

ECOS & CRITICA

INTRIGAS

Muitos hindu's de Goa foram assistir ao Congresso Nacional Indiano, a cujas sessoes, realisadas, como se sabe, em Belgao asistiram, tambem, cristaos goeses, como o sr. J. J. da Cunha que nelas representou ate' o jornal *A Terra* de Margao, e outros.

Os inimigos dos hindu's, porem, aproveitaram da ida deles ao mesmo Congresso para os malquistar com a colonia europea da India, inventando mentiras, como por exemplo, a de ter sido convidado o *Mahatma' Gandhi* para Goa por uma deputaçao hindu', *Mahatma'* que e' considerado, equivocamente por muitos, entre no's, como um revolucionario tremendo.

Certo e', todavia, que ninguem o convidou para ca' pelo simples motivo do santo patriota do Indostao estar decidido a nao se divertir com passeatas onde nao tenha nenhuma missao patriotica a cumprir.

Mas, mesmo que tivesse havido convite ao *Mahatma* para visitar Goa ¿que mal teria disso resultado a nossa terra ? Nenhum.

E' que Gandhi e' apostolo de paz e nao violencia. A sua politica basea-se na *linha* e no *Charca'*. Detesta e repele tudo o que cheire a odio, sangue, violencia e outras coisas semilhantes Aconselha frugaldade no comer e simplicidade no vestir.

Numa palavra. Gandhi, e' um *mahatma'* que pelo credo politico e religioso que professa, e' comparado com o Cristo que conta na nossa terra *essencialmente catolica* mumerosos adeptos.

Nao pega, pois, o perigoso plano daqueles que tentaram em vao indispor os hindu's com a nossa colonia europea, atribuindo-lhe propositos que nunca tiveram e que, mesmo que os tivessem, nao teria advindo deles a ninguem mal algum.

CARTA DA CAPITAL

Recebemos uma carta de Pangim, na qual o seu autor, *Diavolo* se insurge contra a insinuaçao do "pendor anti portugues"', estampada nas colunas pelo "Heraldo" do ... nha, a proposito do cent... Gama.

O *Diar...* de...

o "pendor anti estomacal" que vai, directamente, de encontro com o "pendor anti-indio" que o sr. Antonio Maria e outros da mesma marca revelam.

PROCESSOS POLITICOS

Surge por ai um *Recruta* do numero digito a indigitar aos competentes a falta de delicadeza de, "Mundasso's Chogo's e pudvens" na festa do Gama pretendendo a seu modo insinuar que os hindu's se acham dominados por um "pendor anti-portugues".

Era escusada a intriga, porquanto e' demasiado conhecida de todos a sinceridade do ideal e processos politicos dos hindu's que nao alimentam sentimentos menos honestos e menos delicados por ninguem, ainda que seja desassombrada a sua maneira de encarar algumas personalidades portuguesas historicas.

Os hindu's presam mais a verdade do que a elasticidade abdomenal, preferindo sieceridade a' bajulaçao,

CRITICA ALHEA...

O sr, J. J. da Cunha, referindo-se a's festas do Centenario escreve na *Terra* o seguinte:

Em quanto naquela India o seu povo reclama constitucionalmente, pelas vozes dos seus campeões, autonomia completa com poderes para regular as finanças, receitas e despesas públicas, nesta India o seu Povo com os seus dirigentes á frente se entretem em folias para festejar (que ironia!) a morte (o seu 4.° centenário) de D. Vasco da Gama, o inclito argonauta, com iluminações, fogos e discursos, cujos sons e cuja ... mória passarão em po... gastando nessas ... perrimo te... mais ...

माजासाठीं असें समतोल धोरण राखिल्यावांचून कोणचाहि समाज सुखी होणार नाहीं. यःकश्चित मनुष्यसुद्धां हिंदु समाजाला फोडूं शकतो. व्यक्तिनिष्ट मनुष्य स्वार्थ संपादून श्रीमंत झाला ह्मणून समाज श्रीमंत होत नाही. समाजाच्या प्रत्येक घटकानें स्वोन्नति करून घेतली ह्मणजे पर्यायानें समाज सुखी होईल हें ह्मणणें तत्वत: सोपें आहे, पण त्यामध्यें जर योग्य परंपरा असेल तरच समाजाची उन्नति होईल. परतंत्र होणें असा या सेवाधर्माचा अर्थ नव्हे. समाजसेवकाला पारतंत्र्याचें दुःख होणार नाहीं; कारण ती प्रेमाची भक्ति असते. स्वार्थ संपादनाचा सुखाचा मार्ग सोडून खिसे मोकळे करणारा हा समाजसेवेचा धंदा कोणी सांगितला ? असा एक प्रश्न उभा राहील. ज्या भरत भूमींत निष्काम कर्माचीं तत्वें प्रत्येकाच्या अंगांत भिनलीं होतीं तेथेंच या प्रश्नाचा विचार करणें दुदैवानें भाग आहे. समाजसेवा हेंच मनुष्याचें इहलोकचें आद्य कर्तव्य होय. राष्ट्ररूपी जीवित शरीराचें समाजसेवा हें काळीज होय. या सेवा धर्मापासून मनुष्याच्या सदसद्वासना त्याला उगीच बदूं द्यावयाच्या नाहींत. केवळ राजकीय स्वातंत्र्यानेंच आपलीं सर्व दुःखें नाहींशीं व्हावयाचीं नाहींत. कांहीं थोडीं कमी होतील पण तें मिळविण्यासाठीं प्रत्येकानें स्वतःची शारीरिक मानसिक व आर्थिक उन्नति करून घेतली पाहिजे. आधीं स्वार्थ मग परमार्थ; स्वार्थ हीं मनुष्याच्या जीविताचा पाया असून परमार्थ हा कळस आहे. अपूर्ण)

उत्सवप्रीय गोमांतक

गेला सबंध आठवडा गामाच्या फेस्ताचा गेला, मोठ्या शहरीं थाटानें व लहान शहरीं लहान समारंभानें हें फेस्त साजरें करण्यांत येऊन आधींच फेस्तांनीं व जत्रांनीं बजबजलेल्या ह्या गोमांतकांत आणखीं एका नव्या फेस्ताची भर घालण्यांत आली.

आमचें गोमांतक हें फेस्तांचें व जत्रांचें माहेरघर आहे. किती तरी जत्रा व किती तरी फेस्तें ह्या आपल्या गोमांतकांत उजळ माथ्यानें आपला हैदोस घालीत आहेत; व याची पूर्व परंपरा बऱ्याच वर्षांपासून चालून आलेली आहे. पोर्तुगीज लोकांनीं ज्या कांहीं वस्तु आह्मांस समुद्रापलीकडील आणून दिल्या त्यांत 'व्हीन्य' व 'फे ह्या दोन होत. व या दोनहि वस्तूंनीं आज आपला अंमल इतका बसविलेला आहे कीं, एखाद्या धान्याचा दुष्काळ शेंकडो वेळां पुरवेल परंतु 'व्हीन्यां'चा दुष्काळ मात्र कदाकाळीं न येवो ही प्रार्थना ईश्वराकडे आह्मांला करावी लागत आहे.

पोर्तुगीज लोक मूळ व्यापाराच्या आशेनें आले व त्यानीं येतानां धर्मालाहि बरोबर आणलें. ह्या धर्माला ही गोव्याची समशीतोष्ण हवा बरीच मानवून त्यानें आपलेंहि राज्य इकडे स्थापन करण्यास सुरवात केली. बिचारे त्या काळचे पोर्तुगीज लोक या लोकांपेक्षां परलोकावर ज्यास्त भरवंसा ठेवणारे होते ह्मणूनच त्यानीं राज्य विस्तार संपुष्टांत आणून येनकेन प्रकारें धर्म विस्तार करून आकाशांतील पाप्याच्या साम्राज्यस्थापनेकडे विशेष लक्ष्य दिलें.

धर्माचें साम्राज्य तेंहि अत्याचारांच्या व तरवारीच्या बळावर. मग काय ? फेस्तांचेहि पाय हळुहळु पसरूं लागून सबंध गोमांतक फेस्तांनीं गजबजला गेला. त्या वेळीं बिचाऱ्या जत्रांना राजाश्रय नसल्यामुळें त्यांना डोंगरांत पळून जावें लागून निर्जन अरण्यांत आपलें आयुष्य कंठावें लागलें. जत्रांची हकालपटी सरकारी बळावर डोंगरांत केल्यावर फेस्तांनां आपला हैदोस उजळ माथ्यानें पाहिजे तसा घालतां येऊं लागला.

पोट भरल्यावर नसते ढंग सुरू होतात हें खोटें नाहीं व त्याप्रमाणें प्रथमच्या पोर्तुगीज लोकांना ही सुवर्णभूमि मिळाल्यावर त्यांच्या फेस्तांना उत येऊं लागला. डीलाव्हीला या नावांचा एक प्रवासी १६२३ मध्यें गोव्यांत आलेला होता. त्यानें आपलें प्रवास वर्णन लिहून ठेवलेलें आहे. तो ह्मणतो **गोवें शहरांत जितके उत्सव आणि समारंभ होत तितके जगांतील दुसऱ्या कोणत्याहि शहरीं होत नसतील.** याचें कारण तेथें धर्मपंथच पुष्कळ असून पाद्री लोकांची संख्या जरूरीपेक्षां ज्यास्त व सधन होती. गोव्यांचे खिस्ती लोक आळशी व निरुद्योगी असल्यामुळें अशा उत्सवांत कालक्षेप करणें त्यांस आवडे. खिस्ताच्या मरणाच्या उत्सवांत त्याचें चित्र दाखविण्यांत आलें त्या वेळी सर्व बायका पुरुष मोठमोठ्यानें रडूं लागले. बायकांना तर रडण्याचा इतका आवेश आला होता कीं, त्या आपला बरोबरीच्या दासीनांसुद्धां रडण्यास सांगत. इतकेंहि करून दासी न रडल्या तर त्यांस मोठमोठ्या मारीत. तेणें करून त्यांचें रडणें दूरवर ऐकूं येई. (पहा मु. रियासत ७९४पृ.) सारांश काय कीं चारशें वर्षांपूर्वीं जी फेस्तांविषयीं स्थिति होती तीच आज आहे. गोव्यानें फेस्तें व शिमगेजत्रांशिवाय अद्याप कांहीं केलेलें नाहीं. गोव्यांतील लोकांचा उत्सवप्रीय स्वभाव अद्याप बदलला नाहीं. बदलला असता तर आधींच सहासहा महिने पगार नसलेल्या ह्या देशांत आणखीं एका नव्या फेस्ताची भर पडली नसती ऋण काढून सण करणारे लोक जर जगाच्या पाठीवर कुठें असतील तर आपल्या गोमांतकांतच होय.

सरकारला चौदा हजार खर्च, कामोंना पुतळे उभारण्याचा खर्च, व लोकांना 'व्हीन्यं'व 'दांस' या करतां खर्च. इतका खर्च सोसून गोमांतकांतील जनतेनें हें फेस्त साजरें केलें. कौन्सिलमधील एकाहि मेंबरनें ह्या कामीं हरकत घेतली नाहीं. कल्पनां पुढें मांडण्याचा अवकाश तोंच फेस्तप्रीय गोमांतकानें ती घट्ट कवटाळून धरली. असा फेस्तप्रीय गोयबाबूंतील एकाद्या इसमानें त्याविरुद्ध आपलें मत दिलें किंवा तटस्थ वृत्तिसुद्धां दाखविली तर ह्या आवतोनोमीच्या राज्यांत राजद्रोह होण्याची भीति. सारांश गोमांतकांत सर्व कांहीं औरच.

हिंदूनी ह्या फेस्ताला बराचसा तटस्थपणा दाखविला. परंतु आतां त्यांच्या जत्रांना उत आला आहे. फातर्पेच्या जत्रेला किती तरी हिंदू लोक भटकत असतानां दिसले असतील. त्या नंतर ह्या लोकांना प्रसिद्ध ह्माड्डोळची जत्रा आहे तेथें कित्येक दिवस मौजेनें कालक्रमणा केल्यानंतर शिमग्याचा धुडगूस सुरू होणार आहे. अशा तऱ्हेनें वर्षामधील बरेचसे दिवस फेस्तां, जत्रा व शिमगे यांत जातील या तिघां अवदसानीं आपल्या जबड्यांत ह्या गोमांतकाला धरलेलें आहे. त्यांच्या जबड्यांतून जेव्हां आपण सुटूं तेव्हांच गोमांतकांतील लोंकांकडून कांहीं कार्य होईल. गामाच्या फेस्ताला तटस्थपणा दाखविणाऱ्या हिंदूंनीं जत्रा व शिमगे यांकडेहि तटस्थपणा दाखविल्यास फार चांगलें होईल.

वर्तमानसार

—"रा. राजाराम पं. कुडचडकर ह्मणीं येथील हिंदुसमाजावर भीरुत्वाचा शितोडा वृथा उडविलेला पाहून वस्तुस्थितीचा विपर्यास करण्यास त्यानें बरेंच कौशल्य मिळविलें आहे असें वाटतें. वस्तुत: सरकार अंकीत बनलेले, वरिष्ठांची इतराजी होऊं नये ह्मणूनच, फक्त दोन तीन हिंदु कामगार, हें गामाचें पवित्र श्राद्ध मोठया त्रासानें चालविण्यास हजर होते रोषनाई गडगडाड इत्यादि वरिष्ठांच्या हुकुमान्वयें कामरानें स्वखर्चानें केले होते. त्यांत कोणत्याहि हिंदूनें भाग घेतला नाहीं. असें असतां त्याच्या माथ्यावर हें खापर फोडणें अन्याय नव्हे काय ? रा. कुडचडकर यांनीं निरर्थक भारताची जागा अडवून पराचा कावळा करून लेखनकौशल्य दाखविण्यापेक्षां जर त्या दिवशीं निषेधार्थ सभा भरविली असती, तर त्या सभेला लोकांची गर्दी कशी उसळली असती हें समजलें असतें. येथील जनता कांहीं नेभळट नाहीं.गोव्यांतील सबंध महालांत नोकरशाहीचा पाणउतारा अगर फजिती जर कोठें होत असेल तर येथेंच. असें असतां हिंदूंनीं व्हिवा व्हिवा घातल्याचें दृश्य रा. कुडचडकर यांनां स्वप्नांत तर दिसलें नसेल ना?" असें दुर्गा पां. गायतोंडे पाळोळें–काणकोण, हे लिहितात.

—डॉ० जुवांव कामोयेन्नस यांच्याच हातांत गोमांतकाचीं राज्यसूत्रें जातील, असें पोर्तुगालच्या पत्रांचें ठाम मत आहे.

—बांदें–सांवतवाडी येथील गोसेवा संघाचीं विनंति पत्रें प्रसिद्ध झालीं असून, संघाला मदत करणें प्रत्येक हिंदूचे पवित्र कर्तव्य होय.

—गव्हर्नर साहेबांच्या इच्छेनुरूप शिक्षणखाते, व्हार क्रीम व कोंसेव्हादोरीस कमी करण्यांत येतीलच, असें ह्मणवत नाहीं !.

—महात्मा गांधी यांस गोमांतकस्थ हिंदूनीं हा प्रांत पाहण्याचें आमंत्रण दिल्याची अफवा उठविण्यांत आली असुन, हिंदूविरुद्ध येथील युरोपियनांचीं मनें कलुषीत करण्याचा कांहीं मडगांवच्या खिस्ती ब्राह्मणांनीं उपद्याप आरंभिला आहे.

आजचें पोर्तुगीज सदर

अग्रलेख:—

कागदी साम्राज्य व त्यापासून होणारे तोटे.

स्फुट विचार:—

गोमांतकस्थ हिंदु व म. गांधी; पणजीचें पत्र; हिंदुव्देष्टे खिस्ती ब्राह्मण; सागें मुनिसिपालटीचें जाहीर पत्रक; हिंदूंचे राजकीय मार्ग इ. इ. इ.

मोठ्या माणसांचे छोटे संदेश

महात्माजींची मुलाखत

रविवारीं दुपारीं ११ वाजून ४५ मिनिटांवर आमच्या प्रतिनिधींनीं अध्यक्षांच्या कोटेजमध्यें महात्माजींची भेट घेतली. त्यावेळीं खालील प्रश्नोत्तरें घडलीं.

प्रश्नः—ह्याच वर्षी आमच्या गोमांतकानें राष्ट्रीय महासभेच्या कार्यांत भाग घेतला ह्याबद्दल आपणांस काय वाटतें ?

उत्तरः— खरोखर मला त्याचा फार आनंद वाटत आहे. गोमांतक हिंदुस्थानापासून विभक्त नाहीं. ह्याची त्यांस आतां तरी जाणीव झाली ही महत्वाची गोष्ट होय.

प्रश्नः— गोमांतकाला व भारताला आपला काय संदेश आहे ?

उत्तरः— चरका, चरका चरका. **चरका फिरवा हाच माझा गोमांतकाला संदेश आहे. चरक्यांच्या प्रसारार्थ झटण्याविषयीं भारताला माझा निरोप कळवा.**

—— २८।१२।२४

देवी सरोजनीची मुलाखत

रविवारीं सकाळीं ८ वाजतां आमच्या प्रतिनिधींनीं श्रीमती सरोजनी देवींची भेट घेतली. त्या वेळचीं प्रश्नोत्तरें खालील होत.

प्रश्नः— गोमांतकानें ब्रिटिश हिंदुस्थानच्या राजकारणांत भाग घ्यावा कीं त्यापासून त्यानें अलिप्त रहावें ?

उत्तरः— राजकारण बिजकारण मी कांहींच ओळखीत नाहीं; पण इतकी मात्र गोष्ट खरी कीं आपल्या विपद्ग्रस्तबांधवांस आपत्कालीं मदत करणें हें प्रत्येकाचें कर्तव्यकर्म होय व तें बजावल्याशिवाय बंधुत्वाचें नातें सांगणें मूर्खपणा ठरेल.

प्रश्नः— पण राजकीय बाबतींत गोमांतक हिंदुस्थानापासून विभक्त नाहीं काय ?

उत्तरः—ह्मणून त्याला आपल्या बांधवांस मदत करण्यास प्रतिबंध होऊं शकेल काय ? तुह्मांला स्वराज्य मिळालें आहे; मग तुमच्या विवेक बुद्धीस वाटेल तसें वागण्यास मुभाच आहे.

प्रश्नः— आह्मांस मिळालेल्या स्वराज्यानें आचार स्वातंत्र्याचा हक्क आह्मांस दिला जातो असा आपला समज आहे काय ?

उत्तरः— हें गान्हाणें आह्मांला सांगून काय उपयोग ? त्याचा विचार तुह्मींच करावा. तुह्मीं नामर्द आहां काय ? तुमचे ख्रिस्तीभाई तुह्मांस विरोध करीत असतील तर त्यांनां तुह्मीं समजाविलें पाहिजे. आमच्या सहानुभूतीचा काय उपयोग ?

प्रश्नः— पण तुमचे असे दोन शब्द उपदेशादाखल आह्मी गोमंतकीयांस काय सांगावे ?

उत्तरः— गोमांतकीयांना माझी सध्या सांगणी इतकीच कीं, त्यांनीं गोव्यांत उद्योग धंदे, कलाकौशल्य वाढवावें. खादीवरहि नकशी काम करण्यास शिकावें, व दरवर्षी परदेशास जाणारे लाखों रुपये थांबवावे.

—— २८।१२।२४

लाला लजपतराय यांची मुलाखत

शनिवारीं रात्रो ९ वाजता लालाजींनीं आमच्या प्रतिनिधींस दिलेल्या मुलाखतीचा गोषवाराः—

प्रश्नः— हिंदुमुसलमान ऐक्याची व राष्ट्रीय महासभेच्या यशस्वीतेचीं सांगड आपण कशी घालाल ?

उत्तरः— परस्परांतील छोट्या छोट्या वर्गांकडे थोडा वेळ तरी दुर्लक्ष करून हिंदु व मुस्लीम ह्या दोन्हीं हिंदुस्थानांतील बहुसंख्यांक ज्ञातींनीं कांहीं विशिष्ट अटींवर राष्ट्रीय ऐक्य करणें आज अगत्याचें होऊन बसलें आहे; जातीजातींतील व धर्माधर्मांतील तंटे मिटवून सर्वांनीं एकमतानें राष्ट्रासाठीं झगडण्यास तयार होईपर्यंत स्वराज्य मिळणें तर दूरच पण कोहाटसारख्या अत्याचारांची पुनरावृत्ति होऊन राष्ट्रीय महासभेस पुढें पाऊल टाकतांहि येणार नाहीं. ह्या दोन्हीं ज्ञातींतील तेढीचा समाधानकारक निकाल लावण्यासाठीं सर्व पुढाऱ्यांनीं व विशेषतः वृत्तपत्रकारांनीं झटलें पाहिजे.

प्रश्नः— सूताच्या वर्गणीच्या अटीस आपण नापसंति दर्शविण्याचें कारण काय ?

उत्तरः—ह्याचें कारण इतकेंच कीं सुताची व्यवहार्यता व्यक्तिशः जरी पसंत असली तरी तत्वशः ज्यानीं त्यास महात्माजींच्या भीडेखातर ती मान्य केली, त्यांपैकीं पुष्कळांस नापसंत होती. अशा स्थितींत सद्सद्विवेक बुद्धीची फसवणूक केली जाऊं नये असा माझा इरादा होता.

प्रश्नः— ब्रिटिश हिदुस्थानांत जसे हिंदु व मुस्लीम असे दोन वर्ग आहेत तशाच आमच्या गोमांतकांतहि हिंदु व ख्रिश्चन अशा दोन ज्ञाति आहेत व त्यांचे ध्येय शोधक मार्गहि परस्पर विसंगत आहेत हें आपणास माहीत आहे काय ?

उत्तरः—ह्याची मला थोडीशी माहिति मिळाली होती; त्या वरून मी आपणाला इतकेंच सांगू शकतों कीं गोव्यातील तुह्मीं हिन्दूंनीं एका विशिष्ट मंडळाच्या एकछत्री अमलांत संघटित व्हावें व स्वधर्माचें रक्षण करावें. तुमच्या ‘ भारत ’ पत्रानेंहि अशी एखादी संघटनेची टूम निघाल्यास तीस मदत करावी, मात्र ज्ञातीज्ञातींत द्वेश पसरूं नयेत. ता. २७।१२।२४

——

टी. प्रकाशम् यांची मुलाखत

सोमवारीं सकाळीं १० वाजून २५ मिनिटांवर भारत प्रतिनिधींनीं टी. प्रकाशम् [संपादक दैनिक ‘ स्वराज्य ’ मद्रास] यांची भेट घेतली त्या वेळचीं प्रश्नोत्तरेंः—

प्रश्नः— राष्ट्रीय महासभेंतील सुताच्या अटीविषयीं आपणास काय वाटतें ?

उत्तरः— ती अट मला पूर्णशी पसंत नसली तरी तीनें माझ्या समाधानीस मुळींच धक्का दिलेला नाहीं. त्यात घातलेलें प्रत्येक अक्षर तोलून व दोन्हीं पक्षांस बांधून घेण्याजोगें घातलें आहे. मात्र ती अट प्रत्येकानें बिनचूक पाळली पाहिजे.

प्रश्नः— हिंदुमुसलमानांचें टिकाऊ ऐक्य होण्यास त्यांच्यांत कोणत्या प्रकारची ‘ देवाण घेवाण ’ व्हावी ?

उत्तरः— माझी अशी खात्री आहे कीं मुसलमानास जर हिंदु बंगालमध्यें व पंजाबमध्यें लोकसंखेच्या प्रमाणानें सरकारी नोकऱ्यांत, कौन्सिलांत प्रवेश करण्यास मोकळीक देतील तर हे सर्व तंटे मिटतील. मारामारी करण्यांत हात जरी मुसलमानाचे असले तरी डोकें तिसऱ्याचेंच असतें व वरील प्रमाणें व्यवस्था झाल्यास तें डोकें थंड पडेल. एकमेकांत तंटे उपस्थित करण्यांत अर्थ नाहीं कारण मुस्लीम पातशाही तर सध्या नाहींच पण हिंदवी राज्याचाहि नायनाट झालेला आहे; मग भांडणांत उपस्थित काय होईल?

प्रश्नः— स्वराज्य चरख्यानें मिळेल असें तुह्मांस वाटतें काय ?

उत्तरः— स्वराज्य कांहीं माझ्या जन्मांत मला हिंदुस्थानास प्राप्त झालेलें पहावयास मिळेल असें वाटत नाहीं. वास्तविक स्वराज्य ह्मणजे गरिबांचें राज्य. व त्याच दृष्टीनें पाहूं गेल्यास चरख्यानें स्वराज्य मिळेल कीं नाहीं हा प्रश्न सुटूं शकेल. भिकारी बनलेल्या हिंदुस्थानांतून दर वर्षी परदेशास कपड्यापायीं जाणाऱ्या ६० कोट रुपयांपैकीं १५ कोट रुपये जरी आमच्या राष्ट्रांतील गरिबांत वाटले जातील तरी भरपूर होतील. गोमांतकानेंहि हाच धडा गिरवावा. ता. २९।१२।२४

——

डॉ. ना. दा. सावरकरांचें भाषण

(हिंदुमहासभा, बेळगांव)

माझ्यापूर्वी बोलेलेल्या वक्त्यानीं हिंदु-मुसलमानाची आजची स्थिति सविस्तर सांगितली आहे. हिंदु धर्म—मी खात्री देऊं शकतों—उदार आहे, पवित्र आहे व परधर्मसहिष्णुताहि त्यांत आहे, पण त्याला ह्यापुढें तसें रहातां येत नाहीं. जगांतील प्रत्येक राष्ट्र संपत्तीसाठीं, स्वार्थासाठीं व धर्मप्रसारासाठीं सध्या ‘ चोर ’ बनून गेलें आहे; ह्या वेळीं हिंदुधर्म जर आपल्या औदार्यावर व ‘ साव ’ स्वभावावर विसंबून आपलें परधर्म सहिष्णुतेचें दुकान उघडें सांडील तर त्यांतील प्रत्येक वस्तु चोरीस जाऊन उलट मूर्खपणा मात्र त्याच्या डोक्यांत बसेल. प्रत्यक्ष कुबेर जरी अवतरला तरी सर्व दुनियेंतील भिकाऱ्यानां संपत्ति वाटून देतांना तो स्वतःच एक दिवशीं भिकारी बनून जाईल; मग आमच्या हिंदुधर्माची काय कथा ? हिंदुधर्म हा हिमालय आहे. तो हिमालयासारखा स्थिर व अचल आहे; पण माझे मुसलमान भाई हिमालयावरील बर्फाच्या थरांवरून तो सारा डोंगर मऊ मेणासारखा आहे अशी आपली समज जर करून घेतील, तर मी त्यांस बजावून सांगतों कीं आकाश भेदून गेलेल्या ह्या हिमालयावरील बर्फाच्या थरांच्या आंत ज्वालामुखीचा कडकडाट होत आहे, व त्याला संतप्त करून सोडल्यास तो ज्वालामुखी पेट घेईल व त्यांत तुमच्या मुस्लीम धर्माची केव्हा आहुति पडेल ती तुह्मास समजणार देखील नाहीं. माझ्या हिंदु बधूनों ! तुह्मी संघटित व्हा; आपल्यांत संघशक्ति निर्माण करा ह्मणजे जगांतील एकाहि राष्ट्राला वर मान करून हिंदुधर्माच्या तेजस्वी तेजाकडे पहावणार सुद्धा नाहीं, मग विरोधाची काय बिशाद ! मुसलमान भाईनों जोंपर्यंत हिंदुस्थानांत हिंदु आहेत तों पर्यंतच तुह्मास हिंदी ह्मणून मिरवण्यास मिळेल. मी माझ्या हिंदुधर्मबंधूनां पुन्हा बजावून ठेवतों कीं तुह्मी निद्रस्थ केसरी आहांत पण झोंपून रहाण्याची सध्या वेळ नाहीं, तेव्हा जागे व्हा, डोळे उघडा, आयाळ हालवा; व आपल्यावर चढ करून येऊं पहाणाऱ्या शत्रूवर एकदम हल्ला करा.

—सांगें मुनिसिपालटीनें एक पत्रक प्रसिद्ध केलें असून, आपल्या कारकीर्दीचें जाहीर स्पष्टिकरण करण्याचें त्यांत अभिवचन दिलें आहे.

—कराची व मुंबई येथील गोवानिजांनीं गामोत्सव मोठ्या थाटानें पाळला.

—गेल्या ५ तारखेला कौंसेल्य लेजिस्लातीव्हाच्या नवीन सभासदांची बैठक झाली.

दिवस पवित्र ह्मणून पाळीत असतां वरील विचार आमच्यापैकीं किती जणांच्या डोक्यांत येत असतील बरें ?

ह्या आमच्या हलाखीच्या स्थितीचें कारण जर कांहीं असेल तर ती —आह्मी स्पष्ट सांगू शकतों— आमची अपात्रता होय. स्वराज्य आपण होऊन दिलें जात नाहीं, तें घेतलें पाहिजे. (Swarajya is taken, never given) ह्या इंग्लीश ह्मणीचा उघड उघड असा अर्थ होतो कीं, आधीं आपण स्वराज्य राखण्याची पात्रता अंगांत आणली पाहिजे. ह्याच कारणासाठीं आमचे ब्रिटिश हिंदुस्थानस्थ प्रांतबंधु केतें किंबहु वर्षे स्वराज्याची पात्रता आपल्या अंगांत आणण्यास खर्च घालणार आहेत; पण आम्हाला स्वायतत्तेचे हक्क मिळाले आहेत व आतां आह्मीं ते राखण्यासाठीं झटणें हेंच योग्य आहे. हे मिळालेले हक्क राखण्याची पात्रता आपल्या अंगीं बाणवून घेण्यासाठीं प्रथम आपण राजकीय धर्तीवर संघ अगर स्वतंत्र पक्ष निर्माण केले पाहिजेत व त्या संघाद्वारें आपण गोमांतकीयांच्या हितास व हक्कांस जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे हें उघड आहे.

Ano 9 N. 42

[...]a 15 de Janeiro de 1925

[A]SSINATURA
[C]ada ano tres rupias

[A]NUNCIOS
[C]ada que repetida uma tanga
[A]vulso uma tanga

[DIRECT]OR E EDITOR
[...] Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४२

गुरुवार ता. १५ जानेवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केंपें–गोवा

MUCH ADO ABOUT NOTHING

A *India Portugueza* de Margão formula, na sua edição de 8 do corrente, uma especie de libelo acusatorio contra os hindús que se mantiveram alheios aos festejos do Centenario de D. Vasco da Gama, lembrando ao mesmo tempo, ao governo *o dever de punir severamente os que pretenderam arvorar a bandeira da rebelião, os insensatos que assumiram uma atitude subversiva, altamente condenavel* perante os mesmos festejos, *os dementados que se sublevaram audaciosamente contra a comemoração do centenario, os exaltados que pretendem desorientar as massas com uma propaganda sediciosa,* finalmente, *a meia duzia de tresloucados que, pelos desvairos,* procuraram pôr em perigo *os interesses da Soberania Nacional* e afrontar *os Brios Nacionais.*

Não sabemos o que admirar nessa *scintilante* e *faiscante* prosa da *India Portuguesa,* se a crassa ignorancia de quem imaginou factos que se não deram, se a sua manifesta má fé, se, finalmente, a sua acendrada má vontade para com os hindús, traduzida numa adjectivação insultuosa e impertinente!

Mas ¿que *loucuras* cometeram os tais *de meia duzia de cérebros escandencidos*? ¿Que *movimento asnatico promoveram* contra o centenario do Gama? ¿Em que consistiu a *sua rebelião, a sua atitude subversiva,* a *afronta feita* por elês *aos Brios Nacionais,* periclitando *os interesses* da *Soberania Nacional*?

Scilencio profundo, nem um pio a êsse respeito. Há sò alegações atrevidas — ¿e porque não petulantes? — e não existe coisa alguma que as comprove, que as justifique, nem por isto. Multiplicam-se aí só *as generalisações que são sempre perigosas.* Só isto e nada mais.

O *Bharat* pouco se preocuparia com a *brincadeira* da *India marganense;* mas, como essa brincadeira é de mau gosto, dimanada, sobretuto, duma pessôa em quem, por erro de visão, julgavamos arraigados bom senso, rara acuidade de vistas e indefectivel ponderação na analise e apreciação dos actos e factos — torna se forçoso repelir as insinuações maldosas com que, levianamente, o aludido hebdomodario pretendeu atingir-nos, deturpando, ou por ignorancia ou por petulancia, a verdadeira significação das coisas.

* * *

Vejamos, agora, se no ambito da adjectivaçao acusato'ria, maldosa e insultuosa da *India marganense,* podera', embora remotamente, ficar compreendido o *Bharat* ou qualquer outro que, como ele, tenha procedido nas festas do Centenario.

O *Bharat,* como orgao independente dopiniao hindu', analisou, no seu pleno direito da liberdade de expresao, a personalidade historica do Gama, apreciando lhe sob varios pontos de vista a obra e o seu resultado. Tanto a mesma analise como a referida apreciaçao se alicerçaram nos dados fornecidos pelas proprias autoridades historicas portuguesas. Nada acrescentou nem nada suprimiu por iniciativa propria. *O Bharat* fez-se, por assim dizer, sem mais nem menos que uma especie de "porta-voz" ou "gramofone" da Historia. E para ser coerente com os ditames da consciencia moral, formada pela Mestra da Vida, o nosso jornal absteve-se, pura e simplesmente, de tomar parte nos festejos do Gama.

A isto e so' a isto e' que se circunscreveu o nosso papel perante *as comemoraçoes do 4° centenario.*

¿Sera' alguem capaz de descobrir no nosso franco e sincero proceder o mais ligeiro vislumbre, enxergar a mais palida sombra de "atitude subversiva" de "rebeliao," do perigo "dos interesses da Soberania Nacional, da "manifestaçao de chauvenismo" de afronta aos Brios Nacionais" e de outras coisas de que a *India* acusa, a torto e a direito, ao ar e genericamente, prontificando se ate' *a estar ao lado do governo,* "enquanto se tratar de punir seja com que violencia for," os...criminosos?

¿Desde quando para a *India,* a simples abstençao, como consequencia dos ensinamentos da Historia, passou a significar "rebeliao, subversao, perigo dos interesses da Soberania Nacional" e outras coisas semilhantes?

Simplesmente piramidal!!

O que a propria *A Provincia* nao foi capaz de dizer, insinuou a *India* tentando maliciosamente criar uma atmosfera de suspeiçoes contra os que tiveram a franqueza inocente de dizer o que sentiram, sem ofender minimamente a Republica e os Brios Nacionais que todos os hindu's, todos sem exepçao, amam mais do que tudo!

Essa "diversidade" que e' bem significativa, como o leitor deve ter bem compreendido, confirma mais uma vez o que tantissimas vezes temos dito aqui: se os destinos do nosso Paiz fossem confiados aos da laia da "India Portuguesa" e nao houvesse ca' europeus liberais e magnanimos que animaram e animam sempre o progresso dos hindu's, deixariam de estes existir!

A "India Marganense" foi, pois, infeliz em fazer insinuaçoes perigosas e nao tardara' que se arrependa do seu passo impensado.

* * *

Quem sabe, porem, que a *India* de Margao e' uma metamorfose de "Popular, Rebate, Opiniao e Lanterna" conhece tambem o passado politico do seu director, passado que varreramos da memoria mas que, agora, se torna forçoso revolve-lo, mau grado.

¿Pensa, por ventura, o sr. Loiola que os hindu's andam esquecidos da sua "atitude subversiva, da sua rebeliao, das suas manifestaçoes de chauvinismo, da sua afronta," contra a Republica, contra a "Soberania Nacional" e contra os "Brios Nacionais" quando eles festejavam, entusiastica e delirantemente, a implantaçao do regime de 5 de outubro que guerreou sem descansò, negando ate', por muito tempo, obediencia a' bandeira verde-vermelha?

¿Supoi Sua Excia. que os hindu's nao trazem gravada na memoria aquela sua celebre expressao que dizia que "O regosijo dos hindu's e' o lucto dos cristaos," juntamente com a tentativa de estrangular a' nascença o amor dos indios pela Republica?

¿Imagina que a gente nao se lembra da odienta campanha de descredito fomentada contra o regime democratico a cujas expensas ora se regala em troca da renegaçao dos principios que aparentava professa-los?

Os hindu's nao sao nem nunca serao capazes disso. Eles sao e serao sempre republicanos devotados. E, se alguns deles se abstiveram de tomar parte nas festas do centenario, foi precisamente, porque quizeram se coerentes com a Historia; mas, se se convencerem, em face da mesma Historia, e nao com adjectivaçao maldosa e insultuosa, de que laboraram no erro, de que foram "injustos e ingratos, nao terao eles duvida em corrigir publicamente, esse seu erro e penitenciar-se de sua falta.

A "India" quiz, pelo visto, julgar outros por si; mas enganou-se com o nu'mero da porta...

QUEM NASCEU TORTO...

No Congresso Nacional Social, reunido em Lucknow, um congressista *reformer* apresentou uma proposta no sentido de se permitir divorcio aos hindu's. Houve acalorada discussao sobre a mesma these que, afinal, foi regeitada *in limine* por uma maioria esmagadora.

E' de notar que tomaram parte na discussao varios graduados em diferentes Universidades de Londres e da India Britanica, os quais, na sua quase totalidade, frisaram que a civilisaçao indiana nao era de molde a poder *digerir* o divorcio.

¿Que dirao, agora, a isto os que defendem, *a' outrance,* o divorcio requerido por tal senhora hindu' de nobre estirpe, mas duma familia cujo rico chefe manifestou-se, publica e espalhafatosamente, contra o simpatico movimento da fusao de sub-castas entre os bramanes *sarasvatas*?

O divorcio requerido pela referida senhora de nobre estirpe foi, pois, — repetimos mais uma vez e repetiremos sempre—um mau exemplo de piores consequencias sociais e de pessimo resultado moral.

Mas, quem nasceu torto nunca se endireita...

भारत

मिति पौष कृ० ५ श्री शके १८४६

पीयूषकांती घोषांची मुलाखत

राष्ट्रीय महासभेच्या आठवड्यांत विजयानगरांत भरलेल्या परलोकविद्या परिषदेचे नियोजित अध्यक्ष व कलकत्त्यास प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक 'अमृतबझार पत्रिके'चे संपादक बाबु पीयूषकांती घोष सध्या गोमंतकाच्या गतवैभाची व सद्य:परिस्थितीची खात्रीलायक माहिती मिळविण्याकरतां इकडे आले आहेत. गेल्या बुधवारीं आमच्या प्रतिनिधीनीं सांवर्डे स्टेशनावर त्यांची मुलाखत घेतली. त्या वेळीं आमच्या प्रतिनिधीनीं यंदांच्या राष्ट्रीय सभेच्या यशस्वीतेविषयीं आपणास काय वाटतें ? असा प्रश्न त्यांस विचारतांच त्यांनीं खालील उत्तर दिलें.

राष्ट्रीय महासभेनें यंदा जो कार्यक्रम सभासदांपुढें ठेवला आहे तो ज्या प्रमाणांत पुरा केला जाईल त्यावरून राष्ट्रीय सभेच्या यशाचें अनुमान निघण्यासारखें आहे. पण महात्माजी आदिकरून निरनिराळ्या प्रांताच्या पुढाऱ्यांनीं 'खादी व चरका' ह्या दोहोंवर दिलेल्या शक्तिसर्वस्वपूर्ण जोरावरून तर्क करावयाचा झाल्यास 'खादर प्रोग्राम' पुरा करण्याकडेच प्रत्येकजण आपली वेळ वेंचील अशी माझी खात्री आहे. दुसरी आनंदाची गोष्ट ही कीं, ह्या महासभेंत सुदैवानें स्वराजिस्ट व नाफेर ह्या पक्षांमध्यें खटका उडाला नाहीं. महात्माजींच्या विनंतीस मान देऊन त्यांनीं द्वेषबुद्धीस तारुरती जलसमाधी दिली आहे व यास्तवच खादी प्रसाराचें कार्य जीवाच्या जोमानें करण्याची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली आहे. महात्मा गांधी ही एक कामकरी व्यक्ति असल्यानें त्यांना कामाशिवाय दुजें कांहींच माहीत नाहीं. आणि दुसऱ्याकडून त्यांना केव्हांहि कामाचीच अपेक्षा असते. त्यांनीं सेक्रेटरींची निवडहि अशाच धर्तीवर केली आहे कीं, खादीची निपज धडाडीनें व्हावी. महासभेनंतर दोन दिवसांनीं भरलेल्या "खादी व कैर्ड कॉन्फरन्स"मध्यें महात्माजींना सर्वांकडून प्रोत्साहनपर, उत्साहवर्धक व समाधानकारक असें वचन—अर्थातच पुढील कार्याचें प्रोत्साहन मिळालें आहे. स्वराज्य संपादनांत महात्माजींचें मुख्य तत्व खादी हेंच आहे. खादीशिवाय त्यांस कांहींच प्रीय नाहीं. म्हणूनच खादी प्रसाराचें कार्य ज्या महात्म्याची गणना जगांतील अत्यंत श्रेष्ठ व्यक्तींत होते त्यांच्या नियंत्रणाखालीं एकत्र आचार, विचार व उच्चार करणाऱ्या एकंदर पक्षाकडून तडीस नेलें जाईल असें मला वाटतें. बंगालविषयींच सांगावयाचें झालें तर, तेथें स्वराजिष्टांनीं संघटनेच्या जोरावर बरीच मजल मारली आहे. बंगाल्यांतील बहुतेक डिस्ट्रीक्ट बोर्डें, मुनिसिपालट्या व इतर स्थानिक स्वराज्य संस्था कलकत्ता मुनिसिपालटीसह स्वराजिष्टांनीं पुन्हा काबीज केल्या आहेत. कॉंग्रेसचा हुकूम व कार्यक्रम पाळण्याची अवघड जबाबदारी त्यांनीं आपण होऊनच स्वतःवर ओढून घेतली आहे. शिवाय त्या पक्षाच ध्येय कॉंग्रेसनें पसंत केलें असल्यानें त्यांस आतां कुरकुर करण्याचें कोणतेंच कारण राहिलेलें नाहीं; तर उलट त्यांच्या कार्यास जोरच मिळाला आहे. ह्यावरून मी खात्री देऊं शकतों कीं, बंगालांत तरी निदान जोराची चळवळ केली जाईल.

स्फुट विचार

सत्यमेव जयते नानृतम्:— ब्रिटिश हिंदुस्थानच्या व्हाइसरॉय साहेबांची स्वारी लवाजम्यानिशीं कांहीं सरकारी कामासाठीं गेल्या महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत मुंबापुरीस येणार असल्याचें जेव्हां निश्चित झालें, तेव्हां त्याचें अपोलोबंदरावर स्वागत करून आपल्या राजभक्तीचें प्रदर्शन करण्याविषयीं निमंत्रणवजा हुकूम सर्वत्र सुटले होते. पण मुंबई कॉर्पोरेशनचे अध्यक्ष ह्या नात्यानें श्री. पटेलांस जें आमंत्रण पाठविलें गेलें होतें तें जरा आग्रहाचें व विनवणीचें असेंच होतें. वास्तविक लाट साहेबांस दिल्या जाणाऱ्या 'बड्याखान्यांत' भाग घेण्याविषयीं सरकाररीत्या जाहीर आमंत्रण म्हणजे आपल्या आयुष्यांतील अगर कारकिर्दींतील एक अत्यंत महत्वाचा व स्वर्गीय आनंदाचा प्रसंग पूर्वापार वहिवाटीनुसार समजला जावयाचा; पण श्री. पटेल यांनीं अध्यक्ष ह्या नात्यानें स्वागत समारंभांत उत्साहानें भाग घेण्याचें आपलें कर्तव्यकर्म असतां ती विनंति लाथाडली. हें निमंत्रण फेटाळतांना श्री. पटेलांनीं स्पष्ट जाहीर केलें कीं 'ज्या हातानें बंगाल ऑर्डीनन्स सारख्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर घाला घालणाऱ्या जादा हुकुमावर सही करण्याइतकी उद्दाम वृत्ति दाखविली, त्या हाताशीं आपला हात भिडवून स्वतःस विटाळून घेण्याची आपली मुळींच तयारी नाहीं; पण कॉर्पोरेशनच्या अध्यक्षानीं ह्या राजभक्ति प्रदर्शनांत भाग घ्यावा असा ठराव बहुमतानें पास केल्यानें श्री. पटेलांस अध्यक्षपदाचा राजिनामा खरडून सदसद्विवेक बुद्धीस जागणें भाग पडलें. अशा रीतीनें कर्तव्यकर्म व विवेकबुद्धि ह्यांमध्यें लागलेल्या लढ्यांत विवेकबुद्धीचाच विजय झाला; व हिन्दी लोकशाहीच्या स्वाभिमानाचें प्रत्यंतर व्हाईसराय साहेबांस दाखविलें गेलें. पण सत्य तें केव्हांहि झालें तरी सत्यच. दिव्य तेजाच्या हिऱ्यावर चढलेला मळ काढून टांकतांच तो ज्याप्रमाणें तिप्पट ताकदीनेंच चकाकूं लागतो त्याचप्रमाणें कॉर्पोरेशनच्या अध्यक्षांच्या निवडणुकींत गेल्या आठवड्यांत श्री. पटेल ह्यांचीच बहुमतानें अध्यक्षपदावर नेमणूक झाली व जोहुकुमवर्गालाहि सदसद्विवेकबुद्धीपुढें मान वांकविणें अपरिहार्य झालें.

महात्माजी व गोमांतकीय ख्रिस्ती वर्ग:— थोडक्याच दिवसांत म० गांधी गोमांतकास भेट देणार असल्याचें जाहीर झालें मात्र, तोंच आमच्या ख्रिश्चन प्रांतबंधूनीं अकांडतांडव करून आकाश पाताळ एक करून सोडण्याचा घाट घातला. आधींच ठरून गेल्याप्रमाणें महात्माजींची भेट घेण्यास गेलेल्या गोमांतकीय शिष्टमंडळाचेंच हें सारें कुटिल कारस्थान असा काकतालीय न्यायाचा संशय घेऊन त्यांनीं ह्या राजकारणाच्या नसत्या उठाठेवी व उलाढाली करणाऱ्या हिंदूंना लावदल प्रेमभावानें शिव्यांची लाखोलीहि वाहिली. महात्मा गांधी ! आणि तेहि गोमांतकांत ! पोर्तुगीज सरकारच्या हक्काच्या व मालकीच्या कुरणांत ह्या जितीगांना त्यांनीं आपली एक उदार अंतःकरणानें फिरकावयाची चराव याची नव्हे, तो हक्क पोर्तुगीजाच्या किंवा वाटग्या ख्रिश्चनाचा—मालकीक दिली; ह्मणून का त्यांनीं ह्या राज्यकर्त्यांना करणाऱ्या गांधी लाहि आंत आणावें? हें बायबलच्या कोणत्या भागात आहे ? व जें बायबलांत नाहीं अगर पाद्र्याच्याहि तोंडीं नाहीं तें त्यांनीं कोणत्या आधारावर करूं द्यावें ? महात्मा गांधी हे चालू ब्रिटिश राज्यपद्धतीचे कट्टे शत्रू समजले जातात अर्थातच आमच्या पोर्तुगीज राज्यकारभाराचाहि कदाचित् अनुभवानें त्यास किळस यावयाचा. हें अगदीं उघड उघड दिसत असतां आपल्याच पायावर धोंडा पाडून घेण्यास आमच्या परधर्मीय प्रांतबंधूंनीं कसें तयार व्हावें? हिंदूंचा हा कोठला न्याय ? मडगांवांस महात्मा जींच्या छायाचित्र मिरवणुकीस जी अधिकारी वर्गानें बंदी केली तीनें 'सावधान' न होतां ह्या काळ्या कातडीच्या रानवटांनीं महात्मा गांधींना गोमांतकांत येण्याविषयीं आमंत्रण देऊन बाबाची संध्या मूळावर कां आणावी ? वरील प्रकारचे विचार आज गोमांतकातील हिंदुद्वेष्ट्या मंडळीच्या डोक्यांत वावरत आहेत. बरें झालें कीं, कांहीं जरूरीच्या कामासाठीं महात्माजींना अहमदाबादेस जावें लागलें व ह्मणून त्यांची बेंगुर्ल्याहून गोमांतकास येण्याची खेप चुकली ! व त्यांच्या आगमनानें जिकडे तिकडे अराजकता पसरून बंडाळी माजल्याचें कल्पनाचित्र रेखाटण्याचे आमच्या ख्रिस्ती बांधवांचे श्रम वांचले.

आजचें पोर्तुगीज सदर

अग्रलेखः—

मडगांवच्या 'इंदिय पोर्तुगेज' पत्राला उत्तर; गामोत्सव व गोमांतकस्थ हिंदु.

स्फुट व इतर विषय:—

पटस्फोट व लखनौची हिंदी सामाजिक परिषद; दो० सुभाष विठ्ठल प्रभु देसाई यांचा सांगें मुनिसिपालटीसंबंधींचा लेख, इ.

वर्तमानसार

—रायबंदर येथील श्री शारदा वाचन मंदिराचा बारावा वाढदिवस मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. यांप्रसंगीं भरलेल्या सभेंत रामचंद्र नारायण प्रभू लवंदे, सुभाय विठ्ठल मांद्रेकर [अध्यक्ष], नारायण राया धोंड, इत्यादि गृहस्थांचीं भाषणें झालीं.

—ज्या सरकारी हुकुमान्वयें सांगें मुनिसिपालटीच्या मेंबरांची बदनामी करण्यांत आली, त्याचा विचार करण्यासाठीं सांवर्डें येथें येत्या २१ तारखेला सांगें तालुक्यांतील नागरिकांची जाहीर सभा भरणार आहे.

—सिलव्हेस्त्र पेरेर नांवाच्या एका सर्जंटानें कुंडई येथील एका प्रतिष्ठित गृहस्थावर दारूच्या निशेंत अत्याचार केल्यावरून फोंडें-तालुक्यांत गडबड उडाली आहे. दिवसेंदिवस पोलीस लोकांविषयीं लोकांत अप्रीति वाढण्यास वरील गोष्ट कारणीभूत होईल,हें उघड आहे.

—प्रो० आत्माराम पाणंदीकर–मडगांवच्या पाठशाळेचे तात्पुर्ते अध्यापक–यांस कामावरून बडतर्फ केल्याची बातमी आहे!

—गामोत्सव सोडून बेळगांव कॉंग्रेसला हजर राहिलेल्या कित्येक सरकारी नोकरांची हकालपट्टी करण्यांत येईल, अशी बोलवा आहे ! खरें खोटें राम जाणें !

—कांहीं हिंदुद्वेष्ट्यांनीं गामोत्सव प्रकरणाचा फायदा घेऊन हिंदूंविरुद्ध भलभलत्या कंड्या उठविण्याचा एकसारखा सपाटा चालू ठेविला आहे !

वर्गणीदारांस—

भारताचें नववें वर्ष संपत आलें असून ज्यांकडून चालू व मागच्या वर्षांची वर्गणी आली नसेल, त्यांनीं ती तावडतोब चुकती करण्यांची कृपा करावी. म. भारत

समाज सुधारणा

विवाह

लेखांक १ ला.

आपल्या देशाच्या उन्नतीकडे आज बऱ्याच लोकांचें लक्ष्य लागलेलें आहे. इतर देशाकडे पहातां आपल्या देशाची स्थिति फारशी आशाजनक नाहीं. असें जरी असलें तरी पण पुष्कळ विद्वानांचें लक्ष्य त्या कामीं लागलेलें असून त्यांचे निरनिराळ्या दिशानींहि प्रयत्न चाललेले आहेत. ही अत्यंत समाधानाची गोष्ट होय. देशाची उन्नति होण्याला या देशामध्यें उच्च प्रकारचें वाङ्मय तयार व्हावें लागतें. त्याप्रमाणें आज देशी भाषांमध्यें निरनिराळ्या विषयांवरील उत्तम प्रकारचे ग्रंथ तयार होत असून आपल्या देशाची उन्नति फार दूर नाहीं अशी खात्री बाळगण्याला कोणतीच हरकत नाहीं.

हिन्दुस्थानामध्यें अनेक भाषा आहेत. परंतु राष्ट्रीय भाषेचें स्थान हिंदीनें पटकारलेलें आहे. सर्व हिन्दुस्थानची एक भाषा होण्याला हिन्दी हीच योग्य आहे व ती झालेलीहि असून उच्च प्रकारचें वाङ्मय तयार करण्याकडे त्या भाषेंतील विद्वानांचें लक्ष लागलेलें आहे. राष्ट्रीयशिक्षणाकरतां

विरोधीचा फोलकट पुरावा

भारताच्या गेल्या ता. २७ नवंबरच्या अंकांतील 'विरोधी' च्या सर्वथा असत्य आणि कुत्सित विधानाबद्दल, त्यानें प्रकाशांत येऊन योग्य पुरावा द्यावा ह्मणून आह्मीं ११ डिसेंबरच्या भारतांतून जें आव्हान केलें होतें, त्या सबंधीं समर्पक पुराव्याच्या अभावीं २५ डिसेंबरच्या अंकामध्यें विरोधीनें ' रामशास्त्री प्रभुण्यासारखे उघड पुरावा देणारे निस्पृह कितीसे मिळतील याची वानवाच आहे ' अशा मिषानें ' स्वतःचें अंतःकरण शोधून पहा ' या मथळ्याखालीं आपल्या पूर्व विधानाला आणखी लबाड्यांची पुस्ती जोडून, स्वतःच्या अंगावर अधिक पुराव्याची जबाबदारी मात्र ' बुडत्याचा पाय खोलांत ' या ह्मणी प्रमाणें ओढून घेतली आहे; व असें करतानां त्याच्या समर्थनार्थ बऱ्याच गुलदस्तांतल्या सामग्रीचें प्रदर्शन करून केवळ निराकाराचा मायावी रावण बनवण्याची कारागिरी दाखविली आहे, तीचें कौतुक केलें पाहिजे.

कैकयी राणीनें आंगठ्यावरून रावण काढला होता अशी कथा आहे. सदर बाईच्या रावणाला एक आंगठ्याचा तरी आधार होता, पण आमच्या विरोधीरावांनीं रावणरचनेचें नखशिखांत काम फक्त अनृत कल्पनेच्या आधारावरच उभारून दाखविलें आहे ही मोठी तारीफ करण्याजोगी गोष्ट आहे.

' आपल्या हातून कळत नकळत घडलेल्या गोष्टीचा खुलासा ' एकंदर नव्हे 'बऱ्याच हिंदु पाहुण्यास' 'खर्च खुषीनें नसला तरी केवळ भीडेखातर केला' 'गांवच्या एका हिंदु गृहस्थाच्या घरीं ' इ० सत्य–विरोधीवचनें विरोधीरावांच्या कृत्रिम रावणाचे अवयव आहेत. खुद्द यजमानास नकळत घडलेल्या गोष्टीचा संबंध–ती घडलीच असली तरी–आमच्या येथील मुंजी समारंभास विरोधीनें काय ह्मणून लागू करावी ? न जाणो, विरोधीच्या खास कांहीं अथवा बऱ्याच परिचितांकडून तें कुकर्म घडलें असेल, तरी पण तत्संबंधीक बरीच खर्चाची रकम मुंजी समारंभाच्या खर्चाला कशी जोडावी ! कदाचित ' तो उग्रवास ' नाकांत जाऊन त्यामुळें झालेल्या गुंगींत विरोधीला तसें वाटल्यास नवल नाहीं. पण त्यांतल्या त्यांत विरोधीचा उपकारच मानावयाचा कीं, कुंकळ्ळींत बरीचशी दारू विक्रीचीं दुकानें आहेत. त्या सर्व दुकानांत त्या समारंभाचे दिवशीं झालेल्या दारूखपाचा हिशेब आकारून तो एकंदर आंकड्याचा बोजा समारंभाच्या खर्चाशीं सामील करण्याचें त्याच्या डोक्यांत आलें नाहीं !

मूळ विधानांत ' मुंजी समारंभास आलेल्या हिंदु पाहुण्यास ' असा सर्व समुदायाची उद्देश करून, आतां ' एकंदर नव्हे बऱ्याच हिंदु पाहुण्यास ' अशा दुरुस्तीचा चावटपणा करितानां, निदान त्या चुकीबद्दल सर्व पाहुण्यांची माफी मागण्याचें कर्तव्य कां केलें नाहीं ? वरील ' बऱ्याच पाहुण्यांस गांवच्या एका हिंदु गृहस्थाच्या घरीं नेऊन दारू पाजण्यांत आली!' हें कृत्य कोणीं केलें व कोणत्या वेळीं घडलें ! त्या हिंदु गृहस्थाचें नांव तरी काय ? तर ' या गोष्टीचा उघड पुरावा देणारे रामशास्त्री प्रभुण्यासारखे निःस्पृह मिळण्याची वानवाच आहे. ह्मणून ' कान असून ऐकायाचें नाहीं डोळे असून पहायाचें नाहीं, जीभ असून बोलायाचें नाहीं ' अशी बादशहाच्या पोपटासारखी बिचाऱ्या विरोधीची स्थिति होण्याची वेळ आली आहे. तर मग, ' जुवेबाजी, रंडीबाजी, दारूबाजी, चैनबाजी वगैरे सर्व बाजींशीं हटकून आपला विरोध आहे ह्मणून छाती बडवून घेऊन कै० आगरकरांच्या तोडीचा समाजसुधारकाचा बाणा व्यक्त करण्यामध्यें कोणता अर्थ शिल्लक राहिला ! मुंजीसमारंभांत आलेले बरेच [पुष्कळसे) दारूबाज हिंदु पाहुणे, गांवचा एक घरवाला हिंदुगृहस्थ, त्या पाहुण्यानां दारू पाजणारा कोणी एक अध्याहृत कर्ता, आमंत्रणास मान देऊन आलेला पण दारूबाज नसलेला प्रत्येक पाहुणा, अर्थात सगळेच पाहुणे, त्यांतहि विशेषेंकरून आमचा एक सोय संबंधीचा पाहुणा आणि स्वतः आमचा विरोधीराव एक, मिळून एवढी भक्कम पुराव्याची सामग्री एकवटली तरी आमच्या आव्हानाचें किंवा आपल्या विधानाचें अंशतः तरी समाधान ह्मणून एकहि नामनिर्देश विरोधीला पुराव्याच्या उपयोगीं पडूं नये हें विरोधीचें दुर्दैव नव्हे काय ?

कोणाची इच्छा नसतां वेळीं अवेळीं आपण मोजीत असलेलीं दोषांचीं मापें घालण्यासाठीं बळेंच लोकांचे पदर ओढूं पाहणाऱ्या विरोधीनें आमच्या पदरांत इच्छित पुराव्याचें माप घालण्यास कमी केलें नसतें. पण ' पुरावा उलट पुरावा देतां घेतां अनेक दारूबाजांचा नाम निर्देश होणार असल्यामुळें ' (केवळ त्यांच्या भीडेखातर अथवा न जाणो एखादा दारूबाज उठून आपली मानगुटी धरील या भीतीखातर !) तितक्या पुरती आपली अनावर लेखणी आवरती घेण्याचा शहाणपणाचा बहाणा विरोधीकडून दाखविण्यांत येत आहे; परंतु भारतामधूनच धर्मगुरूंवर मोघम टीका करून आजपर्यंत कैकवेळां ' विरोधी'चें रुपडें घालून स्वकीय समाजांतील, धर्म निष्ट, कर्तव्य-निष्ट, कुलीन इ० गुणविशिष्ट अशा थोर व्यक्तींची, नुसता नामनिर्देशच नव्हे तर तिच्या नावांचा पुकारा जगभर करितांना, राईचा पर्वत करून मनसोक्त निंदा करण्यांत ज्यांच्या स्वैर लेखणीनें तिळप्राय क्षिति बाळगली नाहीं, त्या लेखकाच्या वरील मानभावीपणावर भारताचे चाणाक्ष वाचक थोडाच विश्वास ठेवणार आहेत !

येथपर्यंत सापेक्षपणें करावें लागलेल्या स्पष्टिकरणावरून आमच्या विरोधीरावांच्या कृत्रिम रावणाचे अवयव कशाचे बनविले आहेत याचा पुरता निर्णय, त्याच्या मुख्य धडाची पुढीलप्रमाणें झालेली अवस्था पाहूनं, भारताचे प्रीय वाचक सहज करणार आहेत. आणि त्यामुळें विरोधीच्या अंतःकरणांतहि पण कमी प्रकाश पडणार नाहीं. आमच्या येथील मुंजीचा समारंभ गत रुधिरोद्गारी सं० माघ शु० १० मी मितीस झालेला असून दत्तकसंबंधीं कायदेशीर विधान (दुसऱ्यांचें इस्त्रीतुर ; चालू रक्ताक्षी सं० भाद्रपद व० ८ मी मितीला ह्मणजे सात महिने १३ दिवसांच्या अंतरानें मागाहून झालें आहे हें पुष्कळांस माहीत आहे. असें असतां ' विरोधी ' आपल्या मूळच्या लचकल्या विधानाला मजबूत टेंका देण्यासाठीं मानवर करून सांगतातः– " त्याच्याहि (मुंजी समारंभाच्या) पूर्वीं ह्मणजे मुलाचें दत्तक विधान कायदेशीर करतांना या असल्या (यजमानांस दारू पाजण्याच्या !) पाहुणचारास आरंभ झाला होता; तो या मुंजी समारंभानें पूर्ण झाला" [?]. ह्याप्रमाणें विरोधीच्या गंधर्व नगरांतील सामग्रीच्या रावणाची ' ऊर्ध्वपादावघःशीर्ष ' अशी केवीलवाणी स्थिति झालेली पाहून, विरोधीराव, आतां पुन्हा एकवार या प्रकरणीक आमूलाग्र हकिकत मननपूर्वक वाचून तुह्मींच स्वतःचें अंतःकरण चांगलें शोधून सांगाः भारताच्या प्रत्येक वाचकानें कींव कोणाची केली पाहिजे ? भटजी पुरोहिताच्या कोणा तरी हितचिंतकाच्या कान फुंकणींवरून विरोधीच्या मेंदूला विकृति झाली आणि त्यामुळें भलतींसलतीं विधानें करून विरोधीला विनाकारण गोत्यांत पाडून घ्यावें लागलें ह्मणून ती तुमचीच करायाला नको काय ?

विरोधीला इतक्या थरावर ही गोष्ट येईल व आपला कोणी हिशेब घ्यावयाला तयार होईल याची कल्पनाच नसून नेहमी या संवयीप्रमाणें दूषणप्रीय जनांचें रंजन करणाऱ्या कुत्सित विधानांनीं आपण केलेला सत्याचा खून राजरोसपणें पचून जाईल असा ठाम भरंवसा होता; परंतु ते पापाचे घडे किती दिवस टिकून राहतील ? ' खुनाला वाचा फुटते, हें तत्व खरोखरीच विरोधीला उमगलें असेल तर, रामशास्त्री प्रभुणासारख्या निःस्पृह न्यायाधिशाच्या समोर सदर खुनाचा खटला चालता तर त्याच्या कर्त्याला आनंदीबाईच्यापेक्षां विशेष मानाची जागा प्राप्त झाली असती असें जाणून इत उत्तर त्याची खुनी वाचा बदच पडली पाहिजे. !

आमच्या पुरोहितकीच्या नात्याचे पुष्कळ यजमान, ज्यांस आमचीं मद्यपान निषेधाचीं तत्वें किती जागृत आहेत याची पूर्ण जाणीव असून विरोधीच्या ' परोपदेशे पांडित्यम् ' अशा धर्तीच्या शहाजोग विधानांची खूबशी ओळख आहे, ते आह्मीं, आमच्या वैदिकी कर्तव्यापुढें अशा आड राहून खडे मारण्याराच्या निंद्य कृतीला मुळीं महत्वच देणं प्रशस्त नव्हतें असं ह्मणतील व तें बरोबर नाहीं असें नाहीं; परंतु आह्मांकडून स्वप्नांत सुद्धां जी गोष्ट घडली नाही, तीचें एकाएकी बिभत्स चित्र रेखाटून दाखवून आमच्या येथील मुंजीच्या धार्मिक समारंभास लांछन देण्याचें आणि उपकारबुद्धीनें आलेल्या सर्व सद्गृहस्थ पाहुण्यांची बेअब्रू करण्याचें धाडस करणारा अनामीक कोण आहे, त्याचें नांव-तोंड तरी लोकांपुढें दिसून यावें ह्मणून आह्मांला आव्हान देणें भाग झालें. असें असतां अजून तें बाहेर दिसलें नाहीं, तथापि त्याचें अंतरंग केवळ ' खलःसर्षपमात्राणि परच्छिद्राणि पश्यति ' अशाच स्वरूपाचें सर्वकाळ कसें आहे त्याचें प्रदर्शन जगापुढें व्हावयाचें कार्य त्याच्या बुरख्याच्या तोंडाकडूनच झालें, असें जाणून यापुढें विरोधीनें बुरखा तसाच ठेवून आह्माविषयीं कितीहि कल्पित विधानांची परमावधी केली तरी त्यास काडीचेंहि महत्व दिलें जाणार नाहीं.

सरतेशेवटीं या सहज ओघानें लांबलेल्या लेखाची रजा घेण्यापूर्वी विरोधीच्या आमच्या भाषेबद्दलच्या तक्रारीचें थोडेंसें समाधान करणें इष्ट आहे. विरोधीला आमची भाषा बरीच कडू लागली आहे. त्यानां मधुरशा शब्दांची सौम्य भाषा आपल्याकरितां पाहिजे होती व कोणाहि विरोधीसारख्या कोमल भाषावादी परनिंदकाची अपेक्षा अशीच रहाणार. परंतु कुचाळखोर बुद्धीनें दुसऱ्याचें छिद्रान्वेषण करून त्यावरील मिथ्या दोषारोपाच्या मंडणाचें काम जसें मंजूळ; कोमलशा भाषेनें होणें अगदीं सोपें असतें, तसें त्याच्या खंडणाचें नसून तेथें कितीहि सौम्यपणा पतकरण्याचा यत्न केला तरी, ' शुनःकपाले लगुडप्रहारः ' हाच न्याय अभिमुख होतो, आणि तदनुसार आह्मास अवलंबाव्या लागलेल्या भाषेपासून विरोधीच्या नाकाला कांहीं मिर्च्या लागल्या असल्यास त्यानीं रुसावा करण्याचें कारण नाहीं.

कुंकळ्ळी पौष शु० १०मी शके १८४६
पांडुरंग शाणू कामत.

बाल-वाचन-मंदिर संस्थेच्या व्याख्यानमालेचा रिपोर्ट

शारीर शास्त्राप्रमाणें वागलें तर जीविताची शारीरिक उन्नति होईल, १०० वर्षें जगेल. पण मानसिक व आत्मिक उन्नतीशिवाय मनुष्यजीवित व्यर्थ होय. रानटी मनुष्याला सुद्धां परोपकार बुद्धि असते. एखादा चांगला शिक्षक पगारापुरतें काम करीन ह्मणेल, तर तें होणार नाहीं. चांगल्या गुरूचे पगाराप्रमाणें श्रम असत नाहींत. सज्जन वैद्य सुद्धां फी प्रमाणें औषध देत नाहींत. आपली सर्वशक्ति समाजकार्याला लावावी ही प्रत्येक मनुष्याची इच्छा असली पाहिजे. प्रत्येकाला नांवांची आवड आहे. हें नांव पाळण्यांतलें नव्हे तर सुकीर्तीचें नांव होय. केवळ नांवासाठीं परोपकार करणें योग्य नव्हे. निष्काम कर्म आचरणाऱ्यांसच समाजसेवक ह्मणतात. केवळ राजकीय चळवळ करितो, तोच देशकार्य करितो असें नाहीं. पुण्यशील कर्वे यांनीं केलेली स्त्रीशिक्षणाची कामगिरी दुसऱ्या कोणत्याहि समाजसेवकापेक्षां कमी दर्जाची नाहीं. आजकाल आह्मीं जोरदार बोलणारा व लिहिणारा यानांच देशभक्त ह्मणतों. गरीब कर्व्यांला ही पदवी देण्याला तयार नाहींत. आमच्या समाजाची उन्नति होण्यासाठीं धार्मिक सुधारणा घडवून आणिली पाहिजे. उच्च वेदकालीन धर्माला – ज्या धर्माकडे आजचें सुधारलेलें जग आदरानें पाहतें त्याला – परिस्थितीमुळें जें विकृत स्वरूप प्राप्त झालें आहे; तें विकृत स्वरूप धार्मिक एकीनें दुरुस्त केलें पाहिजे. समाजामध्यें धार्मिक बंधनानीं जी फाटाफूट पडली आहे ती नाहींशी करून संघशक्तीनें कामें चालविलीं पाहिजेत. समाजमंदिरांतील जातिभेदाच्या भिंती दगडी किंवा लोखंडी आहेत त्या लांकडी ह्मणजे प्रसंग विशेषीं नाहींशा करितां येणाऱ्या झाल्याशिवाय हिंदी समाजाचा तरणोपाय नाहीं. तशीच औद्योगिक उन्नति झाली पाहिजे. किर्लोस्कर ओगले हेच खरे समाजसेवक होत. वाङ्मयसेवा हीहि राष्ट्रसेवा होय. वाङ्मय हा राष्ट्राचा प्राण होय. वाङ्मयसेवक स्वतःची प्रतिभा खर्ची घालून, लोकांच्या विचारांना वळण देतात. चिपळूणकर, आगरकर यांच्या लेखणीनें पुष्कळ राष्ट्रकार्य केलें–आमच्यांत जागृती उत्पन्न केली. समाजाच्या उन्नतीसाठीं ज्या ज्या करण्यास योग्य गोष्टी असतील तीच समाजसेवा; कोणतीहि सेवा केली तर ती समाजाला सारखीच वंद्य आहे. समाजसेवा दैवी शक्तीशिवाय व्हावयाची नाहीं ही कल्पना चुकीची आहे. प्रत्येकाला समाजसेवक होतां आलेंच पाहिजे. अति गरिबाला सुद्धां समाजसेवा करितां येईल. समाज कोणाच्याहि सेवेची उपेक्षा करीत नाहीं. तो सांगतो कीं, तुमच्या गरीब कष्टांची मालकी व मोठ्यांची मोठी सेवा सारखीच आहे कितीहि मोठा जगाला गवसणी घालूं शकत नाहीं. प्रत्येकानें श्रमविभागानें एक एक काम केलें तर समाज सर्वांग परिपूर्ण होईल. फूल–फळझाडांप्रमाणें कांटेरी झाडांचाहि मनुष्याला उपयोग होतो. ईश्वराच्या दारांत ज्याप्रमाणें कोणालाहि मज्जाव नाहीं त्याचप्रमाणें समाजाच्या दारांत कोणाच्याहि सेवेला मज्जाव नाहीं. समाजसेवेचें पवित्र कार्य आबाल वृद्धानां व स्त्री पुरुषांना करितां आलें पाहिजे व त्यानीं तें केलें पाहिजे. आज चुलीचें सिंहासन, फुंकणीचा राजदंड, पोतेऱ्याचा भगवा झेंडा हींच स्त्री राज्यांतील भूषणें झालीं आहेत. ही शोचनीय स्थिति बदलून ' अनृतं साहसं माया ' या श्लोकाऐवजीं ' गृहिणी सचिवः सखी मित्रः ' हा श्लोक सर्वत्र ह्मटला गेला पाहिजे. ऋषीकाळी जें शिक्षण मिळत असे, तेंच शिक्षण आज प्रचारांत आलें पाहिजे. प्राचीनकाळीं आमची हिंदभूमी सुवर्णभूमी होती असें आह्मीं ह्मणतों. बुद्धिमान् ऋषींच्या कीर्तीमुळें आज आह्मीं जगांत उजळ माथ्यानें फिरूं शकतों. आम्हीं असें केलें पाहिजे कीं, आमच्या वंशजानां भूतभूत काळाकडे न पाहतां भूतकाळाकडेच पहावें. आम्हीं आमच्या समाजाचा अर्धाभाग - अखिल नारी जनता – आंधळा केला असल्यामुळें प्रगतीला पुष्कळ अडथळा उत्पन्न झाला आहे. ही स्थिति बदलून कशाचाहि विचार केला तरी स्त्रियानां त्यांत भाग घेतां आला पाहिजे. त्यांची उन्नति झाल्याशिवाय समाजाची उन्नति होणार नाहीं. सरकार स्वतंत्रता देऊं शकेल पण उत्तम गृहिणी देऊं शकत नाहीं. कुटुंबाच्या सुधारणेशिवाय इतर सुधारणा निष्फल होत. समाजसुधारणेच्या विचारांत स्त्रियानां वगळून उपयोगी नाहीं. आपल्या समाजसेवेंत पुरुषांइतक्याच स्त्रिया भागिदार आहेत. निसर्गानें कांहीं गोष्टी प्रतिकुल व कांहीं अनुकुळ आहेत. विवेकाची मदत वृद्धानां तर उत्साहाची मदत तरुणानां असते. त्या त्या प्रमाणें त्यानां कामें दिलीं पाहिजेत.

आपण सर्व एकाच हिंदी राष्ट्राचे नागरिक आहोंत अशी एकराष्ट्रीयत्वाची कल्पना सर्वत्र फैलावली पाहिजे. पूर्वीच्या सारखी संकुचित परिस्थिति आज नाहीं. कधीं काळीं भाषाभिन्नत्व दूर झालें तर सर्व जगाचें एकराष्ट्र बनूं शकेल. आह्मांला जगाच्या शर्यतींत धांवावयाचें आहे हिंदुस्थानानें योगसमाधी लावली तर जग त्याची धुंदी उतरवील. धर्मभिन्नत्व आहे ह्मणूनच तुमच्यांत एकी होत नाहीं; हा प्रश्न उपस्थित होऊं देतां कामा नये. धर्म किंवा जाती विचारी पुरुषांच्या आड येऊं शकत नाहींत. अति उत्तम गोष्ट ह्मणजे हिंदुधर्म, व अति नीच गोष्ट ह्मणजे त्याचें आजचें स्वरूप होय हिंदुधर्म गंगेचें शुद्धपाणी खोलीवर राहून नासका कुजका भाग वर आला आहे. हा कुजका भाग ह्मणजे रूढी होत.

(रिपोर्टाचा पुढील भाग येत्या अंकीं संपूर्ण होईल.)

सं. भारत.

भारत

Ano 9 N. 43

Quinta-feira 22 de Janeiro de 1925

ASSINATURA
Por cada ... rupias

AN...
por cada linha ainda ... ida uma tanga
Numero av... ...anga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४३

गुरुवार ता. २२ जानेवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
साठीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

MAIS UM PROCESSO

Por causa do seu artigo *Seculos depois*... publicado no ° 38 de Dezembro findo, acaba de ser instaurado mais um processo crime contra o *Bharat*.

O digno Agente do M, P. que o requereu, deve ter, na sua alta sabedoria, JULGADO o artigo incriminado capaz de periclitar o prestigio das instituiçoes que nos regem e que —que ironia !—o *Bharat* sempre as aplaudiu.

Conquanto seja verdadeira a filosofia dum ditado marata que diz— *ninguem chora a morte de quem sempre morre*, – nao e' menos verdadeiro, tambem, que a convivencia quase constante com os processos crimes tem sido para o BHARAT um habito inveterado, uma segunda natureza, um estimulo para se sacrificar cada vez com mais energia, em prol dos interesses patrios.

Fique, porisso, sabendo, o digno Agente do M. P. que a sua atitude nao nos causou FRIO mas sim CALOR para prosseguirmos ainda com mais VIDA na nossa missao jornalistica a que temos dado tudo o que somos, material e moralmente.

De colo erguido, pois, o BHARAT se sujeitara' a mais este seu julgamento, preparando -se a receber, sempre com um sorriso a bailar nos labios, SORTE que o insondavel Destino lhe marcar.

O que tem de ser, ha' de ser e nao serao as perseguiçoes ou favores humanos que o evitarao. E a gente que segue a doutrina dum semilhante BREVIARIO, nao desfalece contra quaisquere contratempos que, porventura, pretendam aterrorisa la.

PARA A SEMANA QUE VEM

A falta de espaço obriga o BHARAT a reservar para o n °. imediato muita materia ja' composta, nomeadamente e'cos sobre o incidente " Jovens hindus e Centenario de Vasco da Gama."

Nada se perdera' com a demora, desde que esta' ainda em continuaçao a campanha anti—hindu', promovida astutamente por parte dalguns nossos irmaos cristaos.

Ao veio do tempo . . .

UM BANQUETE DE SUBSCRIÇAO NO PALACIO DO GOVERNO—NARRA-SE UM SIMPLES BOATO QUE CORRE COM MUITA FORÇA—A VERDADE DOS FACTOS SOBRE A ATITUDE DA ACADEMIA NAS FESTAS DO GAMA.

Circula entre pessoas graudas, conselheiros do Estado, oficiais de alta patente, chefes de serviço uma lista de subscriçao para um estrondoso baile de subscriçao que vai ter lugar no palacio do Governo—ignoramos se no do Cabo ou no do Hidal Khan—; porem, onde quer que seja, no nosso modesto modo de ver isto e'um autentico sinal dos tempos... Nao se sabe para o que se ... memorar; ao que nos consta nao ha nenhum SANTO de CASA a celebrar com estrondo e espavento. La' se foram, na voragem do nada, as belas 14.000 rupias que muita fome haviam de saciar e matar muita sede. Mas, basta que pode estar la' suspensa sobre a nossa cabeça a terrivel espada de Damocles. E, porisso ponto

Crispim

P.S. Em 'posto escriptum' fique bem patente que e' um mero boato e nada mais, o que ai fica. O mais que vier soara'

C.

Apo's o rabisco destas linhas para este numero, aparece-me A EPOCA de Mapuça', cujo correspondente de " Alem ", um A. N. R. que pelas iniciais, nos parece tal como um Antonio de Noronha Rodrigues, o eximio representante da Academia, da Comissao magna das festas do Gama que, ignoramos, porque alçapao ou porque artes encafuou-se sem dar sinal da sua pessoa, a tantos titulos ilustre da mesma magua comissao.

Este sr. na sua ultima cronica sob a sub— epigrafe " Fim do Começo " refere- se ao incidente havido entre a Academia e o Governo nas festas. No's, por simples pudor deixaramos de nos referir mais de largo a' dita tragi comedia. Por artes do sr. Pereira Batalha a quem o A. N. R. se acha filiado, ligado pelos laços fraternais de ir...na loja *India*, foi nomeado vogal da Comissao magna quase representante da Academia. Foi o rastilho; a Accademia, a sua fina- flor agitou-se e, com razao, deliberou nao tomar parte nas festas como de facto nao tomou. Houve muitas *demarches* no sentido de se apaziguar a Academia, mas todas elas redundaram num grande fiasco. AAcademia terminantemente expressava se dizendo que A. N. R. nao era seu representante, pois quem devia representar a Academia era um 5 ° anista da Medicina e mais ninguem e porisso estatuiram uma condiçao *sine qua non*, a de irradiar o mesmo A. N. R. da Comissao, e como isto nao teve lugar, a Academia, celebrando a festa do Liceu, absteve-se de tomar parte nas festas. Tanto e' que para o tal numero do programa em que a Academia tomava parte arrebanharam-se rapazes das escolas primarias da Capital, de Pilerne, Nerul e muitas outras, cada um com o respectivo uniforme que dava a impressao duns homens de *brincos*. Se os rapazes foram a Cidade Velha foram como simples cidadaos e...como ninguem mais. E nao sei se se possa chamar a Academia a umas duzias de academicos da Cidade e aldeias circunvisinhas que ai estiveram, por uma curiosidade muito natural.

Fica, pois, restabelecida a verdade dos factos que o A. N. R. deturpou com intuitos mesquinhos. A questao academica ouvimos a um Academico que nos merece inteira fe' e que e' *alguem* na Academia.

Portanto, como se ve, nao foi um cavalo de batalha feito pelo *Bharat*, ja' ele por sua natureza o era,

Crispim

Os hindus

...Sr. Director do *Bharat*

Em *N. da R.* a uma carta que escrevi ao ULTRAMAR, desmentindo a balela do convite ao *Mahatma Gandhi* e pedindo-lhe a fineza de me declarar os nomes das pessoas que fizeram parte da suposta deputaçao a que se atribuia o mesmo convite, dispensa-se o mesmo jornal de declinar " os nomes dos respectivos informadores, um dos quais e' hindu, por nao se julgar obrigado a isso, "

Nao e' de peso o que o *Ultramar* alega para se esquivar ao dever de declinar os nomes dos informadores cuja existencia, segundo os rodeios de que lança mao, nao deve ser senao imaginaria. E, depois, quem nao deve, nao teme.

Isto de dizer que a noticia nao ofende pessoa alguma e' uma evasiva que so' teria valor, se a mesma noticia nao ofendesse verdade, porque so a verdade nao ofende ninguem. E, porque a noticia inserta nas colunas do *Ultramar* desvirtuava a verdade dos factos, e' que me apressei a desmenti-la e nao por qualquer " terrivel desarmonia que presentemente entraram de reinar na classe' hindu, desorientando uma parte dela. "

Espalhar noticias imaginarias, como a que o *Ultramar* registou na " A ultima hora " de 2 do corrente, e' sempre ofensivo e, porque o era, repito —escrevi- lhe aquela carta.

De resto, nem os *jovens* nem os *velhos* hindus teriam duvida de dizer alto e bom som, que dirigiram convite ao *Mahatma* se, de facto, o tivessem feito, porque sabem eles, de mais, que nao e' nenhum crime desejar ca' presença de quem, hoje, constitui gloria universal.

Por quem e', porem, nao editem noticias imaginarias, na suposiçao de que *nao ofendem pessoa alguma*.

E ponto.

Margao 16/1/1925.

De V. etc.

Esvanta Suria Rau Sar Dessai

Uma carta

Recebemos a seguinte carta:

Sr. Director do *Bharat*

Numa local, subordinada ao titulo *Panico* escreve a TERRA entre outras coisas, o seguinte:

" Correm explicaçoes de que foi removida a tipografia (do jornal marata HINDU) pelo facto de constar que tendo sido feita ilegalmente a concessao dum valioso edificio publico, vai ser revisto o processo, visto ser forçoso reverter aquela ao Estado e ate' hoje nao haver sido utilisada para o fim a que se distinava, mas a bem diferentes, julgando as estancias oficiais que se abusou da munificencia ou generosidade do chefe da provincia com actos subversivos."

Entendo ser, absolutamente, despropositado entrar na apreciaçao da remoçao da tipografia do HINDU, porque ela nao, diz directamente, respeito a' instituiçao de que sou secretario. Cabe-me, apenas, derrama-

भारत

मिति पौष कृ० १३ शी शके १८४६

"विनाशकाले विपरीत बुद्धि"

गोमांतकाविषयीं ज्यांच्या ज्यांच्या ह्मणून अंतःकरणांत पवित्र पुज्यभाव व अज्ञात अभिमान वास्तव्य करीत आहे, परशुराम क्षेत्राचा हा विभक्त विभाग पुन्हां एकदा उत्तुंग उन्नतिशिखरावर विलसूं व तळपूं लागलेला ईश्वरदत्त चर्मचक्षूंनीं अवलोकन करून डोळ्यांचें पारणें फेडण्याचें महद्भाग्य — आपल्या फुटक्या नशिबीं नसलें तर नसो बापडें पण — भावी पिढीस तरी निदान लाभावें हीच ज्यांची अढळ आकांक्षा आहे, व त्या विषयीं ज्यांस उत्कट उत्कंठाहि लागून राहिली आहे, त्यापैकीं बहुसंख्यांक जनसमाज आज दिवसा गोमांतक बंगाल बनविलें जाणार काय ? हाच प्रश्न स्वतःशींच सोडविण्याचें साहस करण्यास उद्युक्त झाला आहे. गोमांतक दुसरा बंगाल बनणार काय ? ह्या पंचावयवी प्रश्नानें आज एकाद्या जादुविद्याकुशल पंचाक्षराप्रमाणें प्रगतिपंथावलंबी प्रजापक्षाच्या हृदयावर मुरळ घालून तें भारून टाकलें आहे. ह्या प्रश्नाचा गूढार्थच तितका गहन आहे; किंबहुना गोमांतकाच्या भावी इतिहासाचीं पानें लालभडक रक्तानें रंगविलीं जावीं किंवा नयेत, गोमांतकांत सैतानी सत्तेची सोटेशाही साम्राज्य सुरू व्हावें अगर होऊं नये, बंडाळी व बेबंदशाही ह्या दुर्दैवप्रणीत दुकलीचा मूर्तीमंत अवतार ह्मणून गोमांतकाकडे इतर प्रांतानीं बोट दाखवावें किंवा दाखवूं नये हे तिन्ही महत्वपूर्ण समास त्या एकाच सवालावर हवाला टाकून स्वतः नाम निराळें राहिले आहेत असेंच ह्मटल्यास चालेल. आणि ह्याचसाठीं वरील प्रश्नाचें उत्तर नकारात्मक आलेलें कोणाहि समंजस माणसास हवें!

गोमांतकानें बंगाल बनणें जें आह्मांस भीतिजनक वाटतें त्याचा अर्थ जर एखादे 'देवाघरचें रत्न' असा घेऊं लागेल की महर्षि देवेंद्रनाथांसारखे तपोनिधी, जगदीशचंद्रांसारखे जगद्वंद्य तत्ववेत्ते, राजकवि रवींद्रनाथांसारखे कविसम्राट व देशबंधू दासांसारख अतुलनीय स्वार्थत्यागी राष्ट्रवीर गोमांतकासाठीं—आपल्या देशमातेसाठीं--ज्याचें रक्त तिळतिळ तुटणें परिस्थितीनुरूप जरूरीचें झालें आहे- त्या तडफदार व कार्यकर्त्या उसळत्या उमरीच्या तरुण पिढींतून निपजणें देशहित विघातक होय असा आमचा समज आहे; तर आह्मीं त्यांस पुन्हां पुन्हां बजावून ठेवतों की त्या बाबतींत तरुण गोमांतकानें बंगालचा धडा बेधडक गिरवावा, इतकेंच नव्हे तर बंगालच्या पाऊलांवर आपलें पाऊल टाकून वीरमातेच्या पवित्र सिंहासनावर जेव्हां गोमांतक अधिष्ठित होईल तेव्हाच गोमांतकीय तरुण पिढीच्या कल्पना सृष्टींत सुद्धां स्पष्टपणें दृगोचर होत नसलेलें सुराज्य दृश्य व मूर्त स्वरूपांत येण्याची स्वल्प तरी आशा दाखविणें शहाणपणाचें ठरेल. एरवीं नाहीं. हा आमचा पूर्वग्रह आज देखील अबाधित आहे; इतकेंच नव्हे तर त्यास दिवसें दिवस पुष्टीच मिळत चालली आहे.

पण ज्या बाबतींत गोमांतकानें बंगालची 'री' ओढलेली आह्मांस नको आहे, जिचा कोणाहि समंजस व सुविचारी पुरुषास तीन्ही त्रिकाळ बंबीच्या देठापासून कंटाळा व किळसच येईल अशी आह्मांस खात्री वाटते, ती बाबत निराळीच. गोमांतकानें बंगालसारखें विद्वान, सुशील, बाणेदार व कर्तृत्वशाली बनावें असा आमचा आग्रह आहे खरा, पण त्याचबरोबर अत्याचारी व सूडाच्या भावनेनें पूरीत होऊं नये हाहि हट्ट घेऊन बसण्याचा आमचा हक्क आहे. कठोर हृदयी कर्झन साहेबांनीं वंगभंगाखातर लोकशाहीचीं हृदयें तुडविण्यात व लाथाडण्यांत जी अधिकार बहाद्दुरी व बेफाम वृत्ति जगाच्या निदर्शनास आणली तिचा आमच्या गोमांतकांतील वरिष्ट सरकारी अंमलदारांनीं उपयोग करून, खाल्ल्या घराचे वांसे मोजण्याइतकी उद्दाम वृत्ती दाखवून, 'विषाची परीक्षा' पहाण्याचें मौर्ख्य पदरात घेऊं नये असें आह्मांस वाटतें. कारण ह्या निंद्य व गर्हणीय कृत्यांनीं खवळून गेलेला लोकसमाज राग व अविचार ह्या दुक्कलीस मानवी स्वभावानुसार बळी पडून अत्याचार करण्यास कदाचित प्रवृत्त व्हावयाचा! बंगाल गव्हर्नर लॉर्ड लिटन साहेबांनीं व्हाइसराय साहेबांच्या वट हुकुमाच्या जोरावर जी सध्या बंगाल्यांत बेबंदशाही सुरू केली आहे तिचें प्रतिबिंब आमच्या गोव्यांतहि दिसूं लागावें हें इष्ट व व्यवहार्य नाहीं. वैयक्तिक स्वातंत्र्यावर व सार्वजनिक स्वास्थ्यावर घाला घालण्याचा पोर्तुगीज सरकारास मुळींच अधिकार नाहीं. व अधिकारबाह्य बेकायदेशीर कृत्य करण्यास जर अंमलदार वर्ग धजावला तर त्यास प्रतिकार करणें प्रत्येकाचें —हिंदू —ख्रिश्चन, ब्राह्मण—ब्राह्मणेतर, जित—जेते, ख्रिश्चन—द्वेष्टे, हिंदु—द्वेष्टे ह्या सर्वांचें आद्य कर्तव्य ठरतें. सार्वजनिक स्वास्थ्याची किंमत कोणास कळत नाहीं. सर्वांस सारखीच समजते. ह्मणून आह्मीं ह्मणतों कीं राजकर्त्यांना कुबुद्धि सुचूं नये. प्रजेचें वित्त व जीवित रक्षण्याकरितांच गरिबांनीं घामाच्या धारा पिळून व रक्ताचें अर्घ्य अर्पून मिळवलेल्या पैशांतून ह्या अधिकाऱ्यांचा पींड पोसला जातो हे आतां प्रत्येक सुशिक्षित अशिक्षितास समजून व उमजूनहि चुकलें असून मनास वाटेल तसा कारभार करून प्रजेस जुलमानें बेजार करणाऱ्या अंमलदारास काय शिक्षा द्यावी ह्याचा विचार करतांना बंगालचें सद्यःकालीन दृश्य लोकशाहीचे पुढारी ह्मणविणाऱ्यांच्या डोळ्यांपुढें दिसूं लागण्यापूर्वी अधिकाराचा दुरुपयोग करण्यास सरसावलेल्या कामदारांनीं सावध व्हावें हें अत्युत्तम. पण इतका विचार त्यांच्या डोक्यांत घोळायला डोकें कुठें थाऱ्यावर आहे. अधिकारी वर्गाचें गोमांतकस्थ हिंदु वर्गानें यंदां राष्ट्रीय महासभेच्या कार्यक्रमांत भाग घेतल्यामुळे वरिष्ट कामदारांनीं काँग्रेसला हजर राहिलेल्या सरकारी कामगारांना नोकरीवरून दूर करण्याचा निश्चय व्यक्त केला असल्याचें नुकतेंच कानावर आदळल्यामुळें उपरिनिर्दिष्ट विचारांनीं आमचें डोकें भंडावून सोडलें आहे. ब्रिटिश अनुकरणाची सवंय आमच्या पोर्तुगीज सरकारास फार दिवसांपासून जडली असून चालू बबंदशाही हें तिचेंच एक प्रत्यंतर असेल !

अशा आणीबाणीच्या वेळीं आमच्या ख्रिस्ती व्यवसाय बंधूंनीं जें धोरण पत्करलें आहे तें मात्र अनुदारतेची कमाल दर्शविणारें आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या कर्दमांत लोळत पडलेल्या ह्या महिषीनंदनांना त्यांतच सुख वाटतें ह्मणून ह्मणा, अगर अव्यापारेषु व्यापार केल्यामुळें शेंपटी तुटलेल्या कोल्ह्यानें जसा इतरांसहि 'लांडे' बनण्याबद्दल सम्मतेचा आव आणून मारे एखाद्या वृद्ध कपिलाप्रमाणें उपदेशामृताचें पान पाजण्यास सुरवात केली, तशीच ह्यांचीहि अवस्था झाली असल्यानें ह्मणा, हिंदूंचें हितसंरक्षण करण्यांतच ज्यांचें सारें आयुष्य खर्ची पडलें त्या आमच्या बाटक्या व्यवसाय बंधूंनीं चारी बाजूंनीं संकटांत सांपडलेल्या हिंदु धर्मानुयांयांचा पुरा सूड उगवून घेण्याचा निश्चय केला आहे. गामाच्या मरणोत्सवांत हिंदूंनीं दाखविलेली तटस्थ वृत्ति ह्यांचें चित्त खवळविण्यास कारणीभूत झाली असून सूडाच्या भावनेची कावीळ झाल्यामुळें ह्या पत्रकारांना चोहींकडे पिवळी अराजकता दिसत आहे. मडगांवच्या 'आ इंदिय पोर्तुगेज' पत्रानें हिंदूंवर बंडाचा आरोप लादण्या इतकी आघाडी मारण्याचा पुरुषार्थ गाजविला आहे. ह्या भ्रमित चित्त पत्रकर्त्यांना आह्मीं गेल्या अंकीं पोर्तुगीजांत सडतोड उत्तर दिलेंच आहे ह्यावेळीं 'धनी एक हात तर कुत्रें सात हात' ह्या म्हणीच्या प्रचाराची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. स्वतः आमच्या विषयीं सागावयाचें झाल्यास आमच्या Mad cap मॅडकॅप परधर्मीय प्रांतबंधूंनां आह्मीं एवढेंच बजावून ठेवतों कीं हिंदू धर्मांत ज्या ज्या बाबी निषिद्ध मानल्या आहेत त्या सर्वांस विरोध करण्याचें कार्य आह्मीं मागें बजावलें, सध्या तर बजावतोंच, व पुढेंहि शक्य तोंवर बजावूंच. गामाला आपला उद्धारकर्ता ह्मणण्यास आह्मी केव्हांहि तयार नसल्यानें गामोत्सवी कार्यक्रमांत भाग घेण्यास तर सोडाच पण तत्समयीं तटस्थ वृत्तिहि दाखविण्यास आह्मीं कबूल नाहींत;मग त्याबद्दल आमच्या अर्धनारी नटेश्वरांचा आमच्यावर रोष होवो अगर अंमलदारांस आमचा राग येवो.

झाल्या गोष्टींचा अशा रीतीनें ऊहापोह केल्यानंतर आह्मीं अधिकार बाह्य वर्तन करणाऱ्या अंमलदारांस व अर्ध्या हळकुंडानें पिवळे झालेल्या हिंदु द्वेष्ट्यांस इतकेंच कळविण्याची तसदी घेतों कीं:—

दोरी तुटे पर्यंत ताणूं नका ! बंगालमध्यें सध्या काय चाललें आहे ह्याकडे जरा दृष्टि फेंका व वेळींच सावध व्हा ! पुढें कांहीं भलतेंच घडून आल्यास आह्मी जबाबदार नाहीं. ईश्वर तुह्मांस सद्बुद्धि देवो.

स्फुट विचार

भारतावरील खटला:— भारताच्या गेल्या ३८ व्या [१९-१२ २४ रोजीं प्रसिद्ध झालेल्या] अंकांत 'कांहीं शतकांनंतर' ह्या सदराखालीं पोर्तुगीज भाषेंत प्रसिद्ध झालेल्या लेखांत कांहीं आक्षेपार्ह भाग आहे, असें निमित्त दाखवून पोर्तुगीज सरकारकडून भारतावर ता. १९ रोजीं खटला भरण्यांत आला आहे. ह्यांच नमुन्याचे आजपर्यंत ७ खटले व हा आठवा आपणांवर ओढून घेण्यांत आह्मीं दाखवलेला कोडगेपणा अगर कांहीं लोकांच्या शब्दानें सांगावयाचें ह्मणजे निलंज्यपणा जनतेस कांहीं नवा नाहीं. आणि जोंपर्यंत अधिकारी वर्गाच्या 'हम करेसो कायदा' ह्या लोकसत्ताक राज्यपद्धतीस कालिमा फांसणाऱ्या तत्वास त्यांच्याच हातून हरताळ फांसला जाणार नाहीं, तोंपर्यंत लोकसत्तेखातर सर्वस्वीं आपलें जीवित ज्यानें वाहून घेतलें आहे त्या 'भारत'पत्रास आपला कोडगेपणा-कांहींच फरक न करितां-कायम ठेवावा लागेल. जनतेचें मुख ह्मणून वावरणाऱ्या 'भारता'च्या कोडगेपणास अधिकाऱ्यांची विकारवशताच कारण होय. ज्या गामानें सत्याचा व न्यायाचा दिवसा ढवळ्या खून केला त्या पोर्तुगीजांच्या उद्धारकर्त्यांचीं कृष्ण कृत्यें व त्यानंतर इतर गामाभक्तांनीं केलेले अनन्वित अत्याचार चव्हाट्यावर मांडतानां आह्मांवर हा प्रसंग ओढवणार ह्याची आह्मांस जाणीव नव्हती असें नाहीं परंतु बेकायदेशीर वर्तणुकीचा, मग ती भले लठ्ठ पगार खाणाऱ्या अंमलदारांकडून केली गेली असो, अगर दोन प्रहरच्या ददातीनें व्यग्र झालेल्या भणंग भिकाऱ्याचीं असो—मात्र ती सार्वत्रिक हितास अनुलक्षून असली पाहिजे—परिस्फोट करून तिच्या जन्मदात्यांचा जाहीर धिक्कार करणं आमचें कर्तव्य होतें व आहे.

सत्य संकल्पाचा दाता भगवान ! :— वास्तविक उपरोक्त लेखांत ह्या पांढऱ्या कातडीच्या देव माणसांनीं ह्या देशांत पाय दिल्यापासून जीं कांहीं अनन्वित व उद्वेगजनक कृत्यें केलीं, ज्यांना 'पवित्र' करण्याकरितां ह्या ख्रिस्त प्रार्थतांस हा देश वशाखालीं उतरविणें नाइलाजानें प्राप्त झालें; ज्या आमच्या रानटी(जितीव) पूर्वजांचा त्यांनीं अमानुष छळ करण्यांत जें प्राविण्य दाखविलें तें साधार व सप्रमाण जनतारूपी जनार्दनापुढें कांहींहि आड पडदा न ठेवतां मांडण्याचा आह्मां प्रयत्न केला होता. पोर्तुगीज सत्तेच्या अंमलाखालीं हा देश गेल्यापासून त्याची कसकसी पायरी पायरीनें अवनति होत गेली व आज तो बेबंदशाहीच्या गर्तेत कसा खितपत पडला आहे ह्याचें स्पष्ट व मुद्दसूद वर्णन आह्मीं आरोपीत लेखांत केलें होतें. त्यात आह्मी जे कांहीं विचार प्रगट केले आहेत ते सत्यास सोडून असते तर लोकसमाजाची योग्य पुरावा सादर करून खात्री केली गेली असती;व भारताच्या खोडसाळपणाचें माप त्याच्या पदरांत प्रतिपक्षानें घालण्याची कुशलता दाखविली असती तर त्याविरुद्ध सरकारचे हात धरण्यास अगर तोंड दाबण्याचा कोणींच मूर्खपणा केला नसता. पण औदार्य, व्यवहारकुशलता व कायदा कशाशीं खातात ह्याचीहि ज्यांस पुरती कल्पना नाहीं अशाच माणसांची अधिकारी वर्गात रिक्रूट भरती होत असल्यामुळें हे साधे मार्ग त्यांस पसंत पडणें असंभवनीयच होतें। आह्मी जें लिहिलें आहे त्याविरुद्ध बचावाचें साधन जवळ पास मुळींच न मिळाल्यामुळें अंमलदार वर्गानें आपल्या हातांत असलेलें हें खटल्याचें शस्त्र भारतावर उगारलें आहे. परिणामीं कांहींहि होवो पण भारतानें प्रगट केलेले विचार सत्यास, ध्येयास व परिस्थितीस धरून असल्यामुळें असले पांचशें खटले एकदम करण्याचें शौर्य जरी सरकारानें दाखविलें तरी आह्मी डगमगत नाहीं व त्यास जुमानीतहि नाहीं.

Ano 9 N. 44

Quinta-feira 29 de Janeiro de 1925

Por... ...las

ANN...

...ada linha ainda ... ...nga

Numero avulso ...

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४४

गुरुवार ता. २९ जानेवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें—गोवा

DE RELANCE...

A si proprios se contradizem aqueles que simultaneamente atribuem aos hindús propaganda *gandhista* e movimento *separatista*.

E' que o *gandhismo* condena tudo o que, de perto ou de longe, directa ou indirectamente se prenda ao *separatismo*. Onde ha *gadhismo*, não existe *separatismo*.

¿Como, pois, nestas condições, os hindús, considerados como autores do crime da propaganda *gandhista* podem, ao mesmo tempo, ser acusados do crime do movimento *separatista*?

Gandhi é comparado com Cristo e a doutrina dêste é, na sua essencia, igualada á daquele. As personalidades de ambos se confundem como se unificam os seus principios. Quem faz a propaganda do ideal do primeiro protege, portanto, indirectamente, o triunfo da moral do segundo.

Logo, os promotores da propaganda gandhista não podem ser atingidos, como o fazem alguns discolos cristãos, pelo epiteto de *inimigos dos catolicos*.

Os hindùs de Goa acompanham o movimento dos seus irmãos do imperio visinho, imitando-os no que lhes fôr possivel e preciso.

¿Que mal poderá daqui advir ás nossas instituições politicas? ¿Será a imitação dos visinhos em todos os ramos de sua actividade capaz de aluir a Republica, a ponto de se lobrigar na mesma imitação espirito de *sedição*, *rebelião* e *subversão* contra a Nacionalidade portuguesa?

Quem tal pensa, denota lamentavel ignorancia dos factos sobre que incide a tão injustamente criticada imitação que foi que principalmente deu forte impulso ao progresso dos hindús que, não há pouco, constituiu objecto dos mais rasgados elogios ao sr. *M. Dias*, distincto colaborador da *India Portuguesa*, de Margão.

A imitação que os hindús goezes fazem do movimento dos seus irmãos da India Britanica é, pois, tão inofensiva como a propria inocencia e tão pura como a propria puresa.

Insinua-se, de quando em vez, que os hindús conseguiram colocações em diferentes ramos de administração pública, devido á *munificencia* ou *generosidade* do Governo. Fazer uma afirmação semilhante é acusar ao mesmo tempo de injusto o Governo e de incompetentes os hindùs, quando é certo que os lugares de destaque que êstes alcançaram e alcançam na burocracia foram e são por concursos públicos, abertos pelo Governo nos termos de leis e regulamentos, feitos a *todos os cidadãos portugueses*!

A *história* de *munificencia* ou *generosidade* é, pois, uma detestavel manifestação do invejoso odio que alguns nutrem aos hindús, pelo seu rapido progresso.

Mas ¿Porque é que os hindús elogiam, então, a cada passo o liberal e magnanimo elemento europeu?

E' porque êste, alheio ás digladiações da politiquice local cristã tem envidado e envida os seus milhores esforços por forma a que justiça lhes fosse e seja feita.

¿Quantas vezes, os europeus liberais e magnanimos tem-nos livrado da acintosa perseguição religiosa e politiqueira, que lhes foi movida pelos *irmãos não hindús* de antiga geração?

Não acusem, pois, os hindús de *crimes* que não cometeram e unamo-nos todos para equilibrar o orçamento provincial, matando o terrivel *deficit* que a todos nós está perseguindo, cruelmente...

SERENAMENTE!

O nosso presado colega de *A Epoca* escreve na sua edição de 20 do corrente, sob a epigrafe de *Errada Orientação*, o seguinte:

"Nao passa de errada visao dos factos, a orientaçao de certos hindu's que, mais antes pelo espirito de curiosidade do que da politica, foram ate' Belgaum assistir a's sessoes do Congresso Nacional Indiano reunido naquela cidade em 25 de dezembro findo.

Os hindu's de Goa, merce da generosa naçao Portuguesa, gosam de regalias politicas cuja uma metade nao lograrao obter os do imperio visinho por longos anos por vir. Nao e' portanto por este lado que se pode filiar o entusiasmo manifestado.

E' somente pelo espirito de curiosidade de conhecer pessoalmente os *leaders* do movimento, especialmente o *Mahtma' Gandhi*, seu ilustre presidente e outros *leaders* do movimento politico, pois o discurso do presidente do *comite'e* da receçao foi proferido em *canarese*, lingua desconhecida da maioria ou do geral dos goezes e os trabalhos conduzidos em lingua inglesa igualmente nao conhecida dos visitantes.

E' portanto, uma errada concepçao, se e' que ha', da parte dos hindu's de quererem imitar os seus irmaos do imperio visinho.

Mas a imitaçao nao se sabe para que fim?

Nao pode ser para fins politicos como se viu, nem para nenhuns outros que no's temos de lhes invejar.

No entanto, dizem que esta concepçao causou ja' uma vitima, tendo o governo dado um exemplo de firmeza e de bom senso.

Pena e' que o sr. dr. Jaime de Morais nao tivesse tido semilhante gesto em outras ocasioes e das mais atrozes consequencias.

¿Nao terao havido muitas ocasioes para se fazer justiça rigorosa durante os longos 5 anos da sua comissao?

Que as houve, sabem-no todos, mas no Olimpo reinou profundo silencio.

Nao aplaudimos a atitude dos hindu's, pelo contrario reprovamo la por insensata e estouvada.

E eles proprios devem ter voltado desiludidos e mais lavados de ideas com o que lhe respondeu a poetiza mrs. Sorojini Naidu, recomendando-lhes que andàssem unidos aos cristaos — como temos lido."

Francamente, nao conseguimos atingir o intuito que ditou a prosa transcrita. Na ida de certos hindu's ao Congresso de Belgaum ou prevaleceu o espirito de curiosidade ou sobressaiu a intençao politica. E, como o proprio colega confessa ser verdadeira a primeira disjuntiva, conclui-se que a assistencia dos mesmos hindu's ao referido Congresso nao obedeceu a qualquer fim politico. Tanto isto e' verdaque diz: "E' SÓMENTE pelo espirito de curiosidade de conhecer pessoalmente os *leaders* do movimento etc."

Ate' aqui esta' perfeitamente bem O que nao faz sentido e' a referencia do colega a "uma errada concepçao da parte dos hindu's, de quererem imitar os sens irmaos do imperio visinho" sobretudo, quando logo a seguir assegura "nao poder ser a imitaçao para fins politicos, nem para nenhuns outros que a *Epoca* tem de lhes invejar."

Ora, se na assistencia dos hindu's ao Congresso se nao lobriga nem o espirito politico nem a imitaçao para fins a serem *invejados* ¿como diacho o presado colega admite, ainda que em tom vacilante, uma *concepçao errada* da parte dos mesmos hindu's?

A referencia de *A Epoca* a' uma *errada concepçao* e', pois, descabida como inoportuna e' a censura com que profliga a atitude dos hindu's sendo por completo injusta a parte final do trecho reproduzido, por quanto a comuninade hindu' nunca *errou concebendo* qualquer plano contra os seus irmaos cristaos.

Quanto ao que o mesmo semanario regista no tocante a' vitima da concepçao errada, temos a significar-lhe que a ser verdadeiro o que lhe transmitiram, merece-nos, simplesmente reprovaçao. E' que ninguem pode, em boa razao, ser punido por causa de sua boa ou ma', errada ou nao concepçao que nao e' nenhum crime previsto pelo Codigo Penal. Porque o pensamento nao pode ser *opened by censure*, ainda que esteja em conflagraçao todo o mundo e mais o fundo do inferno.

A Republica se nao fez para que o governo seja autor dos "exemplos de firmeza e de bom senso," infligindo castigos aos "criminosas de concepçoes..."

¿Nao acha a *Epoca* que seriamos, entao, piores do que negros?

भारत ता २९ माहे जानेवारी सन १९२५

तीन तांगे त्र्यस्थ

श्री. भारतकर्ते यांस नम्र विनंति.

आपल्या सन्मान्य पत्रांत अशा तऱ्हेचे पत्रव्यवहार पुनः पुनः येण्यापेक्षां दुसरे चांगले पुष्कळ विषय आहेत; परंतु त्र्यस्थास जबाब दिल्याशिवाय राहणें निरुपायाचें ह्मणून खालीं लिहिलेले चार शद्ब प्रसिद्ध करण्याविषयीं आपणास नम्र विनंति करतो.

ता. २५–१२–१९२४ च्या भारताच्या अंकांत 'राशिनकरांची कथा' सांगण्याच्या निमित्तानें कोणी एका त्र्यस्थानें आपला 'सांसर्गिक अडाणीपणा' दाखविण्यास सुरवात कली आहे. आमची अशी अपेक्षा होती कीं 'राशिनकरांची कथा' सांगण्यास सुशिक्षित श्रोता आपलें सुशिक्षित तोंड लपविणार नाहीं पण वेश्यांच्या सुशिक्षितपणातील मत्सरीपणा मुरलीधर समाजानें चव्हाट्यावर आणल्यामुळें किंवा जन्माचा भ्याड असल्यामुळें कुठें दिवंगत झाला कीं काय? पण छे! वेश्यानें आपलें सुशिक्षित डोकें त्र्यस्थाच्या पायांखालीं घालून ह्या तीन तांग्या त्र्यस्थास पुढें केलें आहे. श्रोता मत्सरी आहे किंवा नाहीं याचा भरपूर पुरावा आमच्याकडे आहे. असें श्रोत्यास स्पष्ट बजावलें असताना हा तीन तांग त्र्यस्थ पुढें आला आहे. या त्र्यस्थास उत्तर देण्याची आह्मास जरूरी नव्हती. परंतु या तीन तांग्या त्र्यस्थाची न्यायी ह्मणविणारी नजर कशी आंधळी आहे ती न दाखविल्यास समाजांत असले त्र्यस्थी न्यायशुन्य चाळे चालविण्यास ह्याला मोकळा सोडला असें होईल आणि हा पत्रव्यवहार 'श्रोत्याचा शिमगा' आह्मास चालू ठेवायाचा नसल्यामुळें जें कांहीं सांगायाचें तें याच लेखांत शेवटचें सांगून आह्मीं हा पत्रव्यवहार बंद ठेवणार. मग कोणास या संबंधीं ज्यास्त माहिती पाहिजे असल्यास समाजाकडे पत्रव्यवहार करावा. मुरलीधर समाजानें राशिनकर बुवांस कीर्तन करण्यास लावलें आणि तें कीर्तन ऐकण्यास श्रोता गेला होता हें त्यांच्याच सांगण्यावरून सिद्ध होत आहे. मग त्याच समाजानें धडधडीत आपल्या उघड्या नावानें श्रोत्यास उत्तर दिलें आहे कीं, मत्सराचा भरपूर पुरावा पाहिजे असल्यास श्रोत्यानें उघड नावानें पुढें यावें. असें बजावलें असतानां भ्याडासारखा श्रोता दिवंगत तर झालाच- परंतु हा कुठला भांडखोर त्र्यस्थ धडधडीत समाजानें आपल्या नावानें लेख प्रसिद्ध केला असतानां, उलट समाजालाच नांवं ठेवण्यास पुढें येतो, त्यावरून या त्र्यस्थाच्या डोळ्यांत कुसळें मुसळें तर आहेतच, शिवाय मत्सराळ श्रोताहि याच्या डोळ्यांत खुपून राहिला आहे वाटतें–वाटतें कशाला!–मत्सराळ श्रोता आणि भांडखोर त्र्यस्थ हे एकच सांसर्गिक आहेत हें त्र्यस्थाच्याच लेखावरून सिद्ध होत आहे. ही एक 'आपली मंडळी' आहे. नाहीं तर एका श्रोत्यास आमचें उत्तर असताना या भांडखोर त्र्यस्थास आह्मीं 'आपल्या मंडळीकडे' भांडतो आहों असें वाटल नसत. कव्हांहि झालें तरी खरें तेंच बाहेर निघतें. पहिल्या लेखांतील विधानें खोडून काढलीं नाहींत असें त्र्यस्थ लिहितो पण सर्व लेखासंबंधीं लीहिण्याची आह्मांस गरज नाहीं असें स्पष्ट लिहिलेलें त्र्यस्थाच्या भांडखोर दृष्टीस कसें पडणार! दुसऱ्या लेखांतील उलटे स्वल्पविराम त्र्यस्थास दृष्टीस पडले पण दुसऱ्या लेखांतील उलट्या स्वल्पविरामाच्या आंत लिहिलेले सारे शद्ब पहिल्या लेखांतील श्रोत्याच्या किटलेल्या काळजांतील आहेत हें दर्शविण्याकरीतांच उलट्या स्वल्पविरामांत लिहिले हें उलट्या काळजाच्या त्र्यस्थास न समजल्यास नवल नाहीं. राशिनकरबुवांच्या कीर्तनाची फी रुपये दहा आह्मीं ठरविल्याप्रमाणे दिली हें सिद्ध करण्यास मडगांवच्या ज्या सारस्वत समाजामार्फत राशिनकरबुवांस आमंत्रण दिलें तो समाजसुद्धां हें सिद्ध करून देईल असें असतांना मत्सराळ श्रोत्याचें २५ रु. फी ह्मणून किटलेल्या काळजांतील केलेलें खोटें विधान सुशिक्षितपणास कु लावणारें असतानां हा त्र्यस्थ तें खोटें विधान झांकण्याकरितां आपले तीन टांगी कसरी पांघरूण घालून आपण एक सायंटीफीक आहे हें दाखविण्याकरीतां 'संख्यावाचकत्व'. 'गुरुत्व' वगैरे जडे शद्ब वापरून २४–१२ आणे कां नसावे असे दुसरे लेखक अप्रत्यक्षपणें प्रश्न करतात असा दुसऱ्याचा हवाला देतो पण असे तीन टांगे कसरी त्र्यस्थाप्रमाणे अप्रत्यक्ष प्रश्नच उपस्थित करण्यास पाहिजे तर २४–१५–११ पै पर्यंत वाव आहे पण ही २४–१२ आणे कां नसावे य. तीन तांगे कसरी अकलेस हा भांडखोर त्र्यस्थच पात्र आहे यांत अतिशयोक्ती नाहीं. शेवटीं इतकेंच सांगायाचें कीं, हा न्याय करण्यास आलेला त्र्यस्थ न्यायशुन्य आंधळा तर आहेच पण श्रोत्याप्रमाणें मत्सराळ हे असून वरती भांडखोर आहे हें असें सिद्ध होतें कीं दुसरा लेख मुरलीधर समाजातर्फे + × + असा प्रसिद्ध झाला असतांना उगीच भांडण्यांस निमित्य पाहिजे ह्मणून किंवा त्याच्या भांडखोर जन्मस्वभावावरून समाजाचे पूर्ण नांवसुद्धां त्याच्या भांडखोर दृष्टीस पडलें नाहीं आणि 'विठोबाच्यातर्फे × × × बदलावा लागेल असा आपला भांडखोर स्वभाव प्रदर्शित केला आहे तेव्हा हा कोणतरी पांडुरंगानुयायी भांडखोर आहेसें वाटत. बाकी श्रोता आणि त्र्यस्थ हे दोन्ही इतके एकरूप आहेत कीं दोघांच्या नांवांत सुद्धां तितकींच व तींच अक्षरें असून त्र्यस्थांत मात्र थकार ज्यास्त आहे. आणि श्रोत्याचें मात्रारूपी डोकें त्र्यस्थात ज्यास्त असलेल्या थकाररूपी पायाखालीं त्र्यस्थाच्या उलट्या काळजाप्रमाणे उलटें घातलें –आणि तें अप्रत्यक्ष घातलेंच आहे –ह्मणजे त्र्यस्थांत थुकार ज्यास्त झाला तेव्हां त्र्यस्थाची नजर न्यायी तर नाहींच पण थु ह्मणून घेण्यास मात्र पात्र आहे हे स्पष्ट दिसून येत आहे.

आत यापुढें आह्मांस असल्या पत्रव्यवहारास जबाब देण्याची गरज नाहीं हें सुज्ञ वाचकच समजतील. तरी श्रोता व त्र्यस्थ यानां आणखी खुलासा पाहिजे असल्यास आपल्या खऱ्या नावानें – मुरलीधर समाज ह्मापसें येथें पत्रव्यवहार करावा किंवा समक्ष भेटून खुलासा करावा.

ह्मापसें ता. ७ जानेवारी १९२५

मुरलीधर समाजतर्फे * * *

गोविंद अ. शेट्ये.

बाल-वाचन-मंदिर संस्थेच्या व्याख्यानमालेचा रिपोर्ट

या रूढी बदलून धर्माचा प्रक्षिप्त भाग वर काढिला पाहिजे. आज 'शास्त्रात् रूढी बलीयसी' आहेत. ज्यांना समाजाची, ध्येयाची कल्पना नाहीं अशानींच रूढी केल्या. व मनूला जिंकिलें. स्त्रिशिक्षण, अस्पृश्योद्धार, जातिभेद यानां रूढी आड येते. या रूढी बदलणें सरकारच्या हातीं नाहीं तर समाजाच्या हातीं आहे. या सुधारणा समाजाच्या अंतःकरणांतून निघाल्या पाहिजेत. हें काम या विद्यार्थी वर्गाचें आहे. रूढीच्या शृंखला तोडल्याशिवाय जगाच्या तोडीला हिंदुस्थान बसूं शकणार नाहीं. धार्मिक प्रश्ना इतकाच शारीरिक उन्नति हा प्रश्न समाजापुढें आहे. मनाइतकीच शरीराची गरज आहे. तसेंच वाङ्मय, कला, शास्त्रें यांची आवश्यकता आहे. शास्त्रांच्या अभावामुळें इतर राष्ट्रांनीं हिंदुस्थान जिंकलें. राष्ट्राची सुधारणा करावयाची असल्यास सर्व राष्ट्रांच्या सुधारणा आमच्यांत पाहिजेत. वाङ्मय व शास्त्रें हे समाजाचे डोळे आहेत. आपण सर्व एका राष्ट्राचे आहोंत ही कल्पना सर्वत्र फैलावणें वाङ्मयाच्या योगानें शक्य होईल. मराठी स्वराज्याची स्थापना शिवछत्रपतीकडून व मराठ्यांकडून समर्थांच्या दासबोधानेंच घडवून आणिली. समर्थ ह्मणजे त्यावेळचा चालता बोलता छापखानाच होता. प्रत्येक संदेश कानाकोंपऱ्यांत पोंचविण्याला वाङ्मयाची आवश्यकता आहे. आमच्या तरुणांच्या विचारांना वळण देणारा वाङ्मय सेवक आज पाहिजे आहे. तरवारी इतकीच वाङ्मय सेवकाची गरज आहे. अपुऱ्या असलेल्या सर्व उणीवा भरून काढण्यासाठीं बालांपासून वृद्धांपर्यंत व स्त्रियांनीं सुद्धां तास अर्धातास खर्चावा. लिहावयाला येईल त्यानें राष्ट्राकरितां कांहींतरी करावें. लेखन प्रतिभा ईश्वरदत्त आहे पण प्रयत्न सर्वसाध्य आहेत. हे कामाचे डोंगर वाढत चाललेले आहेत ते कमी कमी करणें हें आजच्या तरुणाचें कर्तव्य आहे. भावी पिढी आह्मांला जबाबदार धरील व कलंक लावील अशी स्थिति न होऊ देण्याचा आह्मीं प्रयत्न केला पाहिजे. इतकें सांगून व्याख्यात्यांनीं आपलें भाषण संपविलें. नंतर एका विद्यार्थ्यानें येथें एक तालीमखाना काढावा अशी सूचना केल्यावर, कोणीहि उपवक्ता नसल्यामुळें अध्यक्ष श्री. केणी समारोपास उठले. ते ह्मणालेः आजच्या वक्त्यांनीं विषय इतका उत्तम प्रतिपादन केला कीं, विशेष कांहीं बोलण्याची आवश्यकताच नाहीं. आजच्यासारखीं विद्वत्तापरिप्लुत व अस्खलित भाषणें क्वचितच ऐकावयास सांपडतात. विषय व्यापक असल्यामुळें थोड्या वेळांत भरपूर विचार करणें अशक्य आहे. व्याख्यात्यांनीं कांहीं मुद्यांचा विस्तार केला व कांहींचें त्रोटक दिग्दर्शन केलें. समाजसेवा हा शद्ब या पन्नास वर्षांतच रूढ झाला. समाजाची कल्पनाच आमच्या लोकांना झाली नाहीं. सर्व हिंदूंचा एक समाज आहे ही कल्पना आह्मांला परकीयांनीं दिली. मुसलमान लोकांनीं ज्यावेळीं हिंदुस्थान जिंकिला त्यावेळीं हिंदुसमाजाला ते आपल्यापासून दूर राखूं लागल्यामुळें सर्व हिंदूंचीं सुखदुःखें एक आहेत. आपण सर्व एक असून मुसलमानांचे जित आहोंत ही भावना त्यांच्या मनांत उत्पन्न होऊं लागली. यापूर्वी हिंदूंनीं मोठमोठीं साम्राज्यें केलीं. सुधारणेच्या शिखरावर जाऊन पोंचले, पण आपण सर्व हिंदू एक समाजीय आहोंत ही कल्पना कधींच केली नाहीं. आपल्यामध्यें त्यावेळीं फक्त जातीच होत्या व जातिभेद हे या कल्पनेला विघातक आहेत. पारशी भाषेमध्यें 'हिंदु' या शब्दाचा अर्थ पाखंडी, काळा, असा आहे. व बहुतकरून हिंदु हें तुच्छता दर्शक नांव मुसलमानानीं आह्माला दिलें असावें. आंमच्यामध्यें Sentimento nacional ह्मणजे एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचा पूर्ण अभाव आहे. ही भावना उत्पन्न होण्याला समाजाची व राष्ट्राची गरज आहे. जिथें समाज नाहीं तिथें हा प्रश्न मुळीं संभवतच नाहीं. मुसलमानांच्या त्रासानें, तात्पुरते आह्मीं एक झालों पण समरस कधींच झालों नाहीं. मुसलमानांचा जाच कमी झाल्याबरोबर जातिद्वेष पुढें आणला व मराठी राज्यें बुडविलीं. जिझीयाकरांसारखे जुलूम झाल्यामुळें मराठे एक झाले व शिवाजीला स्वराज्याची संस्थापना करितां आली. समाजाच्या कल्पनेला एकराष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न झाली पाहिजे., अर्थात् जातिभेद नष्ट केला पाहिजे. हिंदूंची व्याख्या फारच व्यापक असून तींत सर्व जातींचा समावेश करिता येतो. व त्याच दिशेनें प्रयत्न सुरू केले पाहिजेत नास्तिकाला सुद्धां हिंदु होतां येतें. हिंदुधर्म हा अनेक पंथांचा समुच्चय आहे. चार्वाक नास्तिक होता पण हिंदु होता. लिंगाईत शिखाहीन आहेत, वेद मानीत नाहींत पण हिंदु आहेत. हिंदूला अमुकच लक्षणें असलीं पाहिजेत असें नाहीं. आह्मीं आमच्या स्त्रियांना शुद्रांच्या पंक्तीला बसविलें आहे. स्मृतींमध्यें तर त्यानां कसलाहि अधिकार नाहीं. आजच्या काळीं स्मृतींप्रमाणें अनुकरण करणें योग्य नाहीं. व्याख्यात्यांनीं सांगितल्याप्रमाणें अस्पृश्यता निवारण करणें अवश्य आहे. आज हिंदुधर्म व संस्कृति यांची जी स्थिति आहे ती तशीच कायम ठेवण्यापेक्षां मरूं देणेंच चांगलें होईल. संस्कृतीला पूर्वकालीन उज्ज्वल स्वरूपांत जगापुढें आणावयाची असल्यास स्त्रीदास्यत्व व अस्पृश्यता आदि कालिमा नाहींसा केला पाहिजे. असो. व्याख्यात्यांनीं सांगितल्याप्रमाणें समाजाच्या संघटनास विघातक असे दोष नष्ट करून टाकावेत. व ज्या योगानें भिन्न भिन्न जाती समरस होऊन स्वातंत्र्य व सुख वाढेल असें करावें. मीं माझें चऱ्हाट वाढवून व्याख्यात्यांच्या भाषणानें श्रोतृवर्गावर झालेला गोड परिणाम नष्ट करूं इच्छित नाहीं इतकें सांगून अध्यक्षांनीं समारोप संपविला.

भारत

मिति माघ शु० ५ मी शके १८४६

हृदयाविष्करण

नवै राजन्न राजसीन्न दण्डो नच दण्डिकः
धर्मेणैव प्रजाः सर्वा रक्षन्ति स्म परस्परम्

लोकमताचा वारा कोणत्या दिशेस वहात आहे व त्या विषयीं बेफिकीर राहिल्यास परिणाम काय होईल ह्याची आह्मी वरचेवर जाणीव करून देत असतांहि अनियंत्रित अधिकाराचें तारूं भलत्याच दिशेस हांकण्यास नोकरशाहीची नादानवृत्ति प्रवृत्त होत आहे ही अत्यंत असमाधानकारक गोष्ट तर खरीच; पण निदान आह्मांला तरी त्यांत आश्चर्यकारक काय हें कळत नाहीं. गोमांतकांत माजूं घातलेल्या बेबन्दशाहीस कारणीभूत होणाऱ्या नोकरशाहीचें बेताल डोकें बेफाम व बेदरकार बनूं न देण्यासाठीं दिसण्यांस अप्रीय पण परिणामीं गोड अशा चार उपदेशाच्या गोष्टींचा त्यांस बोध देण्यास आह्मीं सरसावतों खरे; परंतु आपला लांडा कारभार वाटेल त्यांत घुसण्यास सोकावलेल्या वशिल्याच्या वर त्याचा मुळीं सुद्धां परिणाम न होतां पुन्हां ते कोरे ठणठणीत गोटेच रहातील ह्याची खुणगाठ आह्मीं पूर्वीच बांधून टाकीत असतों. भारतीय युद्धापूर्वी दुर्योधनाशीं शिष्टाई करण्यासाठीं पांडवांकडचा वकील ह्या नात्यानें कौरव सभेंत जातांना 'आपला अपमान झाला तरी बेहत्तर पण भावी अनर्थपात टाळण्याचा शक्यतोंवर यत्न करावा, हा भगवान श्री कृष्णाचा हेतु होता हें जितकें सत्यास धरून आहे तितकेंच 'फलनिष्पत्ति कांहींच होणार नाहीं, ह्याची त्यास खात्री होती हें सत्यांशपूर्ण आहे. त्याच प्रमाणें इतिहासाच्या पुनरावृत्तीकडे ध्यान देऊन ' केवळ कर्तव्य ह्मणूनच, अधिकारी वर्गाची जरूर तेथें कान उघडणी व जरूर तेथें कान उपटणी करण्याचा आमचा हक्क आह्मीं प्रस्थापित करीत असतों. नुसतें नावांपुरतें कां होईना, लोकसत्ताक राज्यपद्धतींत वावरणाऱ्या गोमांतकीय लोकशाहीचें प्रमुख मुखपत्र असल्यानें भारतावर लोकसत्तेच्या साथैक्याखातर भांडण्याची दुप्पट जबाब्दारी पडलेली आहे; जनतेच्या हक्कांस जपण्याची पहिली व हिंदुत्वावरील प्रतिपक्षांच्या हल्ल्यांस प्रतिकार करणें ही दुसरी. ह्याचा परिणाम कधीं कधीं असा होतो कीं आह्मास सरकार व खिस्ती वर्ग ह्या दोहोंकडूनहि तिरस्कृत व्हावें लागतें. सरकार तर भारतास उघड उघड बंडखोर समजत असून खिस्ती प्रांतबंधूंनां तो खिस्त द्वेष्टा वाटतो. पण ह्यामुळें आमच्या प्रगतीपर गतीस कांहींच अडथळा येऊं शकत नाहीं हें स्वाभिमानाचें फळ नव्हे तर काय ?

भारतावर गेल्या आठवड्यांत गुजरला गेलेला खटला ह आह्मीं गतांकीं अनुमान केलेल्या 'विनाशकाले विपरीत बुद्धीचें' द्वितीय भ्रमण होय. 'बुडत्याचा पाय खोलांत' ह्या ईश्वरी न्यायानुसार आमच्या अधिकारी वर्गाच्या बुद्धिभ्रंशाचें प्रमाण दिवसेंदिवस कलेकलेनें वाढतच असून वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करण्यापर्यंत अरेराव बहाद्दरानीं मजल मारलेली पाहून अमलदारशाहीच्या पापांचे घडे भरल्याचें कोणी अनुमान केल्यास तें निराधार किंवा अनाठायीं ह्मणतां येत नाहीं. भारताची आशेवरील आसक्ति सुदैवानें अगर दुर्दैवानें इतकी जबर आहे कीं त्यास अजून पर्यंत तसें वाटत नाहीं; मात्र अधिकारी वर्गाची अरेरावी अशीच ' मागील खेपेवरून पुढें चालू' राहिल्यास—नोकरशाहीनें आपल्या अरेराव पातशाहीच्या सोटेशाहीची सीमा लोकसमाजाच्या स्वाभाविक सहनशीलतेच्या परम सीमेस भिडविल्यास त्याचा परिणाम भीषण व भयंकर होऊन प्रक्षुब्ध लोकमताच्या त्वेषपूरित निश्वासानें सारें वातावरण दुमदुमून राहील आणि तेव्हां 'अवश्यमेव होणारा पश्चात् + ताप निरर्थक ठरून 'शिष्यापराधे गुरोर्दंडः'चा प्रकार होईल ही त्याला आज दिवसादेखील भीति वाटते. व तेवढ्यासाठींच भारत बहकल्या बुद्धीच्या, बेदरकार वृत्तीच्या व बेकायदेशीर वर्तनक्रमाच्या अंमलदारांकडून चालवल्या जाणाऱ्या व अविचाराच्या उतरणीवर भर वेगानें धांवणाऱ्या गाडीचें भावी अनर्थ परंपरेपासून रक्षण करण्यासाठीं दोन्ही हातानीं लाल बावटा हालवून एकसारखा कंठशोष करीत आहे; पण अधिकार गुंगीनें धुंद झालेल्या ड्रायव्हर साहेबांचा तिकडे कानाडोळा होत आहे व गाडी त्याच्या अंगावरून नेण्याचा घाट घातला जात आहे त्याला भारत काय करूं शकेल ? आपलें अंग चेंगरलें ह्मणून भारतास भीतीचा लवलेश देखील शिवत नसून 'पुढें काय ?' ह्याच प्रश्नानें त्याला बेजार करून सोडलें आहे !

जो लेख आरोपीत धरून भारतावर सरकारकडून खटला भरण्यांत आला आहे त्या पोर्तुगीज लेखाचें समग्र व शब्दशः मराठी भाषांतर भारताच्या येत्या अंकीं मुद्दाम दिलें जाईल. ज्याच्या दप्तरांत आमची सेवाचाकरी रुजू व्हावी अशी आम्ही इच्छा बाळगतों, त्या जनतारूपी जनार्दनाच्या निःपक्षपाती न्यायासनासमोर तो जशाचा तसा ठेवण्यांत येईल. तो लेख आमूलाग्र शुद्ध अंतःकरणानें निर्विकार मनानें व पक्षपातहीन नजरेनें वाचून त्याचें स्वस्थ चित्तानें मनन करणाऱ्या विचारी पुरुषाच्या डोळ्यांपुढें ' हें काय गौडबंगाल ?' हा प्रश्न उभा राहील. आमच्या मतें त्यांत चुकीची विचारसरणी कांहींच नसतां सरकाराच्या केवळ दृष्टी दोषामुळें व अंमलदारकीची वस्त्रें स्वीकारणाऱ्या उल्लु लोकांच्या बुद्धि भ्रंशामुळें तो आरोपीत ठरविला गेला असल्यानें आह्मी त्याचें पुनः रूपांतर प्रसिद्ध करणार आहोंत. हें ज्या कोणास कायद्यास सोडून असल्याचा संशय येईल त्यास आम्ही एवढेंच विचारण्याची परवानगी घेतों कीं:--

ह्या सुवर्णभूमीचीं द्वारें पांढऱ्या पायांच्या परकीयांस सताड उघडीं टाकलीं जाऊन त्यांतील एकूण एक चिज वस्त पसार केली जाऊन--थोड्याच शतकांच्या अवधींत जींत एकेकाळीं सोन्याचा धूर निघत होता त्या पुण्यभूमीच्या मालकांस ' भिक्षापात्र अवलंबिणें । जळो जिणें लाजिरवाणें' ही तुकोबांची अभंगवाणी कानांत दुमदुमत असतां वीतभर पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठीं आमच्याच गाठोडीवर गब्बर झालेल्या गठडीखाऊंपुढें नोकरीसाठीं (भिक्षेसाठीं?) तोंड वासण्याचा प्रसंग येऊन त्यावेळीं ' तुम्ही भारताकडे नोकरी मागा ' असा गालफडात जिभली घालून जबाब दिला जावा व ह्या आमच्या नैतिक व आर्थिक अधःपतनास कारण झालेल्या गामाच्या पुण्य (?) तिथींत भाग घेण्याबद्दल हिंदूंवर जबरी केली गेल्यास तें कायदेबरहुकूम असें आपण ह्मणूं शकाल काय ? ज्या व्यक्तीनें आम्हां हिंदूंवर अमानुष अत्याचार करून ज्याची नुसती आठवण झाल्यास अजून अंगावर कांटा उभा रहातो असा हिंदूंचा धर्मांतरासाठीं छळ करण्यांत पहिलें प्राविण्य पदक संपादन केलें त्या व्यक्तीच्या उत्सव समारंभांत आपल्या वंशजानीं भाग घेऊं नये एतदर्थ स्वर्गातून आज्ञांस संलग्न हृदयाच्या नेत्रपल्लवीनें निरोप पाठवून आमच्या हृदयास पाझर फुटावा ह्मणून डोळ्यांतून ढळढळां अश्रुधारा गाळणाऱ्या पूर्वजांच्या विनवणीनें हृदय पिळवटून गेल्यामुळें हिंदूंनीं श्राध्दोत्सवांत उदासीन वृत्त स्वीकारली, ह्या साठीं त्यांना जुलमाखालीं भरडून काढण्यांत आल्यास तें कायद्याबरहुकुम आहे असें आपणांस वाटतें काय ? राष्ट्रीय सभेस गेलेल्या सरकारी नोकरांतून एका विशिष्ट संस्कृत्यनुयायांची हकालट्टी केली जात असल्यास त्यास काय ह्याचा आधार आहे काय ? कायदेबहाद्दरानों ! कायदे अमलांत आणण्याकरिताच नेमलेली नोकरशाही स्वतः कायदेमोडीत असतां इतरांनांच ते पाळण्याविषयीं 'परोपदेशेपांडित्यं' दाखविलें जावें व तेंहि लोकसत्तेच्या राज्यकारभारांत, हें कायद्याचें कोणतें कलम ?

सरकाराच्या हातांत कायदा असेल, न्यायदानाच्या तराजूचा कांटा हवा त्या बाजूस झुकविण्याचें कौशल्य प्रतिपक्षाच्या मारवाडी डोक्यांत असेल पण सत्याचा पाठिराख्या परमेश्वराचें पाठबळ भारतास आहे !

--केपेंचे जज्ज सां—तोमें येथें नेमले जाणार असून त्यांचे जागीं बार्देसचे कोंसेर्व्हादोर दो॰ रोदोल्फ कुलास, हे येतील, अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे.

स्फुट विचार

विद्यार्थी वर्गाचें महत्वः— कार्यकर्त्या तरुणपिढीच्या कर्तृत्वशक्तीची मागच्या अग्रलेखांत दिग्दर्शित केलेल्या रीतीनें वासलात नव्हे विल्हेवाट लाविल्यानंतर उत्साही विद्यार्थी वर्गाच्या बाणेदार वृत्तीकडे व हृदय संशोधनाकडे विचारशक्ती साहजिकच ओढ घेते. कोणत्याहि देशाचा अगर राष्ट्राचा वर्तमान काल त्यांतील तरुण पिढीच्या साहसी स्वभावर सर्वस्वी अवलंबून असतो हें जेवढ्या प्रमाणांत सत्यांशपूर्ण ह्मणतां येईल त्याच्याहून शेकडा शंभर टक्के (cent percent) त्या राष्ट्राचा भविष्यकाळ निराशांधःकारानें काळाकुट्ट करावा किंवा यशोरवीच्या उज्जल दिप्तीनें प्रकाशित करावा हें ठरविण्याचा व सत्यसृष्टींत आणण्याचा पूर्ण मक्ता (sole agency) सृष्टीनिर्मित्या परमेश्वरानें विद्यार्थ्यांच्याच खास पदरांत टाकला आहे. शोकाची पहिली सर ओसरतांच एखादी नवविधवा ज्याप्रमाणें आपल्या उदरांत जन्म घेतलेल्या चिमकुल्या बालकाकडे पाहून जिवाचें समाधान करून घेते तद्वतच तरुणपिढी नादान व निमकहराम निपजली तरी विद्यार्थी वर्गाकडून मिळणाऱ्या आशेच्या अंधुक प्रकाशावर नजर ठेवण्याचा व त्यांच्या सडेतोड वृत्तीकडे कुतुहलपूर्ण दृष्टीनें पहाण्याचा प्रत्येक राष्ट्राला हक्क पोहोंचतो.

शाबास ! भलेशाबास ! शाबास ! :— पण दुःखात सुख एवढेंच कीं, गोमांतकाला ह्या बाबतींत निराशेचा स्पर्श देखील व्हायाला नको. नुसत्या विद्यार्थी वर्गाची शालीनता, सडेतोड व निर्भयवृत्ती ह्यांकडेसच लक्ष्य दिल्यास जगातील इतर कोणत्याहि राष्ट्रापुढें आघाडी मारण्याची ताकद अजून शरीरांत भिनलेली नसली तरी गोमांतकानें ब्रिटिश हिंदुस्थानाच्याहि वरचा नंबर पटकावला आहे असेंच ह्मणावें लागतें. पोर्तुगीझ उच्च शिक्षण (लिसेवाचें) घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वशक्तीकडे व आत्मविश्वासाकडे पाहिलें ह्मणजे ' ये भी दिन जायें गे ' ह्मणण्यास भरपूर आधार मिळतो. तीन वर्षांपूर्वी ह्या विद्यार्थ्यांनीं 'गांधी टोपी' प्रकरणांत हिंदूंचें आत्मिक बल व संघशक्तीचें सात्विक सामर्थ्य कितपत ' कर्तुम कर्तुमन्यथा कर्तुम ' आहे हें खिस्तों प्रोफेसरांच्या प्रत्ययास आणलें होतें. तसेंच गेल्या महिन्यांत झालेल्या व आज सर्वत्र गाजून राहिलेल्या गामाच्या श्राद्धापासन बारा हात दूर, अलग व अलिप्त राहण्यांत जी सत्यावरील अढळ निष्ठा व्यक्त केली व 'कॉलेजतर्फे, ह्या सदराखालीं घातल्या जाणाऱ्या धागडधिंग्यावर ' येशुभक्तांतर्फे ' हा अन्वर्थक छाप ठोकला त्याबद्दल ते खरोखरीच स्तुतीस पात्र आहेत. विद्यार्थी बंधूंनो ! कायमच्या कर्तव्यास जागृत रहा !

वेडगळ प्रलापः— 'गोव्यांतील उच्च, मध्यम व प्राथमिक शाळांच्या व पाठशाळांच्या शिक्षकानां व विद्यार्थ्यांना पोर्तुगीज भाषा धड बोलतांहि येत नाहीं व धड लिहितांहि येत नाहीं' अशा अर्थाचें एक निंदा-

Ano 9 N. 45

...nta-feira 5 de Feveeiro de 1925

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
...r cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४५

गुरुवार ता. ५ फेब्रुवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केंपें–गोवा

POLITICA HINDU'

Mais duma vez, tem-se dito e repetido nêste mesmo lugar que a politica hindú não admite violencia no emprego de meios para a consecução do seu já delineado fim.

A nossa aspiração é justa e democratica. E, porque justa e democratica ela é, não pode, de maneira alguma, ferir interesses legitimos de quem quere, e muito menos do liberal e magnanimo elemento europeu que a tem protegido e que a protege com um carinho puro e desinteressado.

¿Envolve *sedição* a dita aspiração que, afinal de contas, se reduz a uma perfeita discentralisação, completamente livre da central intervenção?

Não, certamente, porque *sedição*, que tira a sua origem do latim *seditio*, significa *tumulto, revolta contra o poder estabelecido*

¿Pretenderam os hindus concretisar a sua aspiração, *por meio da revolta contra o poder estabelecido*?

Se não, ¿como se atrevem os seus detratores a desvirtuar a puresa do seu movimento politico? ¿E só, por ocasião da inofensiva abstenção nas festas do Centenario?

Mas não só os hindùs abstencionistas que deixaram de tomar parte nas referidas festas por motivos, já agora, do dominio publico. Delas se absteve tambem a Academia; com elas se não entusiasmaram os empregados famintos; com elas se não importaram, até, alguns funcionarios europeus de destaque, cada qual por causa dos seus *motivos privados*.

Nestas condições, ¿porque é que *tão sómente* levantaram escarceu e fizeram zaragata contra os hindús abstencionistas, atribuindo-lhes propositos sediciosos e intenções revolucionarias e criando suspeições descabidas em volta da politica hindú?

Chegaram, até, *as criticas* a ponto de condenar, vibrantemente nos hindús o espirito de imitação das mais nobres e elevadas qualidades do movimento social, instructivo, industrial e moral dos seus irmãos do visinho territorio !!!

¿Pode lá haver ignorancia tão crassa, como a que revelaram as mesmas criticas, superficiais e levianas, politiqueiras e interesseiras?

E', simplesmente, lamentavel que, no regime de *fraternidade*, irmãos queiram guerrear irmãos, sem motivo justificado e que haja tendência para lutas fratricidas, por um *qüi pro quo* fútil!

A politica hindù é, sempre, franca e despida de violencia, não encerrando ela nenhuns fins ocultos que mereçam reprovação a quem ame a *liberdade* e a *igualdade*, tomadas estas palavras no seu verdadeiro e rigoroso significado.

Calem-se, pois, as *más linguas* e partam-se as *penas suspeitas*!

A B C

O sr. Francisco Luiz S. Mergulhao, acreditado proprietario da *Livraria Moderna* obsequiou-nos com um exemplar do A B C do estilo e da composiçao do sr. Antonio Figueirinhas para uso das escolas primarias, 1a, 2a e 3 classes.

Na inauguraçao do seu novo metodo *racional* e *pratico*, o sr. Figueirinhas tem revelado profundo conhecimento da scicologia infantil, em todos os seus graus, de sorte que o ensino primario, guiado pelo referido metodo nao pode—e' nossa convicçao—deixar de ser de alta utilidade racional e pratica aos estudantes.

Sob estes pontos de vista torna-se, pois, recomendavel a importante obra do sr. Figueirinhas que se escontra a' venda na aludida «Livraria Moderna» a cujo inteligente e amavel proprietario sr. Mergulhao agradecemos a oferta do mencionado exemplar.

AO VEIO DO TEMPO

UM CASO SINCULAR; AS SUAS CONSEQUENCIAS; OS SEUS EFEITOS — AO A. N. R.

Ja' este semanario se referiu ao caso que, por estes dias, e' o pao nosso citadino. Pe-lo com desassombro como o fizeram varios outros jornais' Sim, uma acusaçao de tal monta em bora feita num jornal obscuro e ignorado de Portugal e' a sintese fiel, a verdade inteira que o sr. dr. Dentinho Jr. expendeu numa carta particular que nao se destinava a' publicidade. E porisso mesmo o caso e' grave, e as palavras que ai ficam tem um autentico cunho de sinceridade. Sao palavras que se fossem destinadas a' letra de forma nao viriam tal como elas agora vieram. Sairiam afrancesadas, fingidas, mentirosas: seria a sintese do seu pensamento deturpado, medido com receio da Opiniao Publica e mesciadas dum sentimento de cobardia e de temor.

Mas nao compreendo, nem de certo ninguem podera' compreender a plena satisfaçao do Conselho Escolar do Liceu Central com as explicaçoes que o sr. dr. Dentinho deu e que tornou publicas. Sejam elas embora um *Confiteor* que s. exa. grave e contrito, rezou nao podem contudo satisfazer os atingidos e assoalhados.

A' culminancia de insultos devia corresponder, naturalmente, uma retrataçao igual.

Analisando, fria e serenamente, estas explicaçoes chego a' uma conclusao estapafurdia, inverossimil.

A alinea (a) foi ja' suficientemente dissecada no principio destas linhas.

A alinea (b) diz:

«as assserçoes nela contidas foram o resultado de impressoes de momento, baseadas no imperfeito conhecimento da India, seus usos e costumes e, em especial, do ensino aqui ministrado";

Ora, desde o momento em que s. exa. nao tinha conhecimento completo ensino aqui ministrado ignoro como s. exa. emitiu opinioes tao avançadas e criticou dum modo tam a'spero e grosseiro. Nao haja duvida, foi prosa facil que s. exa. fez. Mas, nunca se fazem juizos nem se escrevem asserçoes apoiadas em impressoes do momento e baseadas em imperfeito conhecimento das coisas.

E demais a mais a um educador da mocidade! Isto da' a historia de gata apressada parindo filhos tortos!

As outras duas alineas nao dao lugar a notas a' margem; sao a conclusao natural das primeiras duas. Pois, nao sei como a permanencia de seis ou cinco meses na India e a convivencia com os seus colegas nao o tenham habituado a formar o seu juizo sobre os seus colegas e sobre o ensino aqui ministrado.

E vem agora a ultima alinea em que s. exa. pretende de algum modo agravar as melhores relaçoes que mantem com os seus colegas.

Nao atino com o motivo; apo's o excrando enxovalho com que os cobriu a todos com excepçao honrosa dele e a do Carmo Reis, nao sei como podera' manter com eles as melhores relaçoes que nao pretendia agravar! Que pretenderia s. exa?

Nao damos com o numero da porta.

Chegam nos tambem vagos rumores de pancadaria e disturbios entre os alunos da Escola Medica e o dr. Dentinno Jr. A cidade tem tomado um ar marcial. Quase em estado de sitio. Todas as opinioes emitidas, a' pressa, podem ser de efeitos contraproducentes.

Cale-se, pois, a minha pena.

*

Ao sr. Alberto Nogueira Ribeiro agradeço a fineza de se apresentar despido de *travesti* que eu, tao injustamente, lhe vestira.

Quanto a *umas duzias de academicos* tenho a dizer-lhe que e' uma maneira de dizer. Pois tratando-se de academicos tem que se toma'-los por uma corporaçao homogenéa e uma. E nao, assim, lançada aos bocados, dispersa, levada pelo simples respeito de curiosidade.

Porque a verdade e' essa: o numero em que a Academia devia ter a representaçao foi um grande e autentico fiasco, sendo necessario arrebanhar-se estudantes estranhos a' Academia panginense.

E ponto a' discussao pois nao estou disposto nem me sobra tempo para entreter e alimentar pole'micas.

Crispim.

भारत

ANUNCIOS

O *Bharat*, ano 9° n° 45 de 5 de Fevereiro de 1925

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida

Numero avulso 1 tanga

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2° oficio que êste assina correm editos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2° do artigo 197 do Cod. da. Proc. Civ. citando os interessados Gunum e marido Hori Jeganata Seil residentes em parte incerta de Carvar do territorio Inglez, para assistirem a todos os termos do inventario orfanologico requerido por obito de Bissó Naique, por outro nome Bissó Naique Delencar, morador que foi de Delem, de Canacona, sendo inventariante Putú Narana Folo, de Mudcuda de Canacona e deduzirem querendo nele os seus direitos sem prejuize de seu devido e regular andamento. E para ser publico se expediu este.

Xeldem da Comarca deQuepém, 10 de Janeiro de 1925

O Escrivao de Direito do 2° oficio
Aires Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo Juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1° oficio Redcar a requerimento de Roque Piedade Pinto, de Assolnã, correm éditos de trinta dias a contar da segunda publicação deste no Boletim Oficial, citando as executadas Locximibai, mulher de Datarama Vitola Sinai Volvotcar e Moturabai mulher de Gopala Vitola Sinai Volvotcar, de Cuncolim, ora ausentes em Narsobavadi do territorio Britanico, para renovação da instancia dos autos civeis de execução hipotecaria que o dito Roque Piedade Pinto, como cessionario de Luciano Xavier Dias, de Sarzorá move ás ditas citandas e outros.E para ser publico se expediu este. Quepem 22 de Janeiro de 1925.

O escrivão de Direito
Babú V. Camotim Redcar

Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 1° oficio Redcar,á instancia do exequente Augusto Piedade Martins de Ambelim de Velim, cessionario dos primitivos exequentes João Antonio Fernandes de Sernabatim e seu cessionario Vitorino Gregorio Constancio Coutinho, de Cuncolim, vai a venda em hasta publica pela terceira vez, á porta do Tribunal Judicial desta comarca, situado em Xeldem, ao lado da estrada que deQuepem se dirige á Curchorem,no dia 17 do corrente mez pelas dez horas,por qualquer preço, o predio rustico denominado "Butram roinim Soclem molo" situado em Fatorpá com exclusão da terceira adição ou sejam primeira e segunda adições do mesmo predio que é cultivado de coqueiros,discrito na conservatoria predial desta comarca sob o n° 5135 a fl. 124 do Livro B 16 e avaliado por 2500 rupias nos autos da carta precatoria vinda da comarca de Salcete e extraida dos autos de execução hipotecaria que o dito exequente Martins promove contro Jeganata Sinai Quencró e sua mulher Maturabai Sinainim e outros de Cuncolim. Quem o quizer comprar compareça nos indicados dia horas e local correndo por conta do arrematante as despezas da praça e a contribuição do registo por inteiro Por este são citados nos termos e para os efeitos da lei, t dos os credores incertos dos ditos executados bem assim os co-proprietarios, ficam tambem igualmente citados os representantes dos credores falecidos Frederico Francisco Xavier Ligorio Raimundo Rebelo Visnum Sinai Quirtonim e Madu Sinai Quirtonim, todos que foram de Margão, sendo o credito do 1° na importancia de 1300 rupias o do 2° na de 520 rupias e finalmente o do 3° na de 200 rupias. E para ser publico se expediu este. Quepem, 2 de Fevereiro de 1925.

O Escrivão do 2° oficio encarregado do 1°
Aires Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

भारत

भा र त

मिति माघ शु० २ शी शके १८४६

आपचा धर्म तुह्मांसाठीं !

हिंदुस्थानच्या इतिहासाचें तात्विक दृष्ट्या परिशीलन केल्यास आपणास आढळून येईल कीं, 'आमचें राज्य तुह्मांसाठीं, तुह्मी सुशिक्षित, दंमदार व स्वराज्य चालविण्यास लायक झालां कीं आह्मीं आपलें चंबुगवाळें आटपून निजधामाप्रत गमन करूं, ह्या सारखी निष्फळ व बाष्कळ बडबड करणाऱ्या इंग्रजांचा व 'आमचा धर्म तुह्मासाठीं, आह्मीं उदार व भले माणूस असून, मुसलमानाच्या जुलुमांतून आह्मींच तुमची सोडवणूक केली असल्यानें तुह्मी आमचे ऋणी आहांत, आम्हीं होतों ह्मणून तुमच शेंडी शाबूत राहिली' अशी शेखी मिरवणाऱ्या पोर्तुगीझांच्या ह्या गरम हवेंत व काळ्या लोकत प्रवेश करण्याचा मूळ हेतु हिन्दीस्थानचा युरोपशीं चालणारा व्यापार घशात कोंबण्याचा होता. भारत वर्षाचें व्यापारी दळण वळण एक हाती करून आपण हस्तगत करावें ह्याच उद्देशानें पोर्तुगीझ दर्यावर्दी-ज्याचें श्राद्ध डिसेंबरच्या शेवटल्या आठवड्यात घालण्यांत आलें तो-वास्कोडिगामा इ. स १४९८ त कालिकट बंदरास उतरला व इंग्रजांचा वकील सर थोमासरो ह्यानें भावी धुळवडीचें पूर्वचिन्ह ह्मणून आपल्या पाढऱ्या पायाची तांबडी पायधूळ मोंगल बादशहा जाहांगीरच्या दिल्लीं दरबारांत सन १६१५ त झाडून तो पावन केला. हिंदुस्थानच्या व्यापाराचीं एकंदर सूत्रें आपल्याच हातांत असावीं, अशा इच्छेनें धडपड करणारें त्या वेळीं आणखीहि एक राष्ट्र होतें. तें फ्रान्स होय.

फ्रान्स, इंग्लंड व पोर्तुगाल ह्या तीनहि युरोपियन राष्ट्रांतील व्यापारी अशा रीतीनें हिंदुस्थानचा व्यापार गट्ट करण्याकरितां टपून बसले असतां बाकीच्या दोघानाहि जिभल्या चाटीत बसावयाला लावून शेवटीं एकलें इंग्लंडच हिन्दभूमीचा व्यापार, साम्राज्यसत्ता व मालमत्ता ह्या सर्वांचें निःप्रतिस्पर्धी मालक बनलें व इतरांस ह्वा तितका लत्तांचा खुराक चारूं लाविण्या इतकें ताकदवान झालें ह्याचा अर्थ कांय ? एकट्या फ्रान्सची गोष्ट सोडून दिली तर पोर्तुगीज सत्तेची एवढी धूळधाण कां व्हावी? इंग्रज लोकांनीं आर्यावर्तात प्रवेश करण्यापूर्वी १५२ वर्षे पोर्तुगीझांचा पाय मलबार किनाऱ्यास लागला होता व एतद्देशीय संस्थानिकाच्या राजकारणांत कोणत्याच रीतीनें भाग न घेण्याचें (non-interference with native states) धोरण कंपनी सरकारनें इंग्लंडच्या अनुमतीनें बदलण्यापूर्वी २३८ वर्षें प्रसिद्ध पोर्तुगीझ मुत्सदी आल्फान्सो ॲल्बुके

स्थापना केली होती पण शेवटीं अपयश पोर्तुगीझानांच येऊन त्यांस 'फेरतें करीत व फोलग मारीत' रहावें लागलें, हें सर्व विश्रुत आहेच.

पोर्तुगीझ सत्तेचा ऱ्हास कां झाला ह्यावर ऐतिहासिक दृष्ट्या विवेचन करतांनां लोकमान्य इतिहासकार कै. नु. चंदाभाई ह्मणतो: **कांहीं कामदारांच्या क्रूर स्वभावामुळें व ख्रिस्ती धर्म प्रसाराच्या केलेल्या प्रयत्नांमुळें पोर्तुगीझांना एतद्देशीयांचा विश्वास व प्रेम संपादन करतां आलें नाहीं व हेंच पोर्तुगीझ सत्तेच्या अस्ताचें खरें कारण होय.**

आमचेंहि निश्चित मत वरीलप्रमाणेंच आहे. परिस्थितीला तोंड देण्यासाठीं पोर्तुगीजांना व इंग्रजानाहि हिंदुस्थानची सत्ता हातांत आणणें अपरिहार्य होतें खरें पण इंग्लंडची दृष्टि केवळ व्यापारावर होती व त्याच्या सुरक्षिततेसाठींच त्यांना राज्यकारभाराचीं सूत्रें हवीं होतीं. पोर्तुगीजांची गोष्ट तशी नव्हती. एकटा आल्बुकेर्क वजा करून इतर सर्व प्रांत प्रतिनिधींची दृष्टि व्यापारापेक्षां धर्मप्रसारावरच अधिक खिळून राहिली होती. हिन्दी लोक आपलें सर्वस्व परकीयानां हरण करूं देतील पण धार्मिक प्रकरणांत परक्यांनीं चाळवाचाळव केलेली त्यांस सहन होणें जन्मांतरींहि शक्य नव्हतें. हें त्यांस त्यावेळीं पटलें नव्हतें व आजहि पटलेलें दिसत नाहीं. हा त्यांचा वेडेपणा ह्मणावा कीं ईशघटना ह्मणावी हें आह्मांस समजत नाहीं. हिन्दी लोकाची धर्मश्रद्धा किती तीव्र अढळ व उदात्त असते ह्याचें उदाहरण त्यांस शीख गुरुद्वार प्रबंधक कमिटीच्या स्वयंसेवकानीं सध्या चालविलेल्या सत्याग्रहांत मिळालें असतें, पण तेवढी सुबुद्धि सरकारास कोठून यायाला ? बंधुप्रेमाच्या उत्कटतेमुळें बिभीषणानें केलेला उपदेश रावणास जर पटला असता तर रामाचें अवतार कार्यच मुळीं संपुष्टांत आलें असतें. त्यावेळीं उन्मत्त रावणानें बिभीषणास हांकलून देणें हेंच उचीत. रावणास बिभीषण राजद्रोही वाटला. कारण परस्त्री हरणाचें रावणानें केलेल निंद्यकृत्य त्यास पसंत न पडून सती पतिव्रता सीता रामचंद्राच्या हवालीं करण्याविषयीं व पश्चातापेन शुद्धता मिळविण्याबद्दल तो रावणास नाना तऱ्हानीं जीव तोडून विनवण्या करीत होता, पण व्हावयाचें तें होऊन जाण्याचें काहीं त्यायोगें चुकलें नाहीं.

गोमांतकांतील लोकप्रतिनिधींची अवस्थाहि सध्या बिभीषणासारखीच झाली आहे. प्रजेची धर्मनिष्ठा हिरावून घेण्याचा जो गामाच्या फेस्तांत घाट घातला गेला होता त्याविरुद्ध त्यांनीं जोराची चळवळ केल्यामुळें सरकारनें त्यांवर बहिष्कार पुकारला आहे. 'जनपदहितकर्तात्यजते पार्थीवेन' ही संस्कृत उक्ति खोटी ठरल्यासच नवल ह्मणावयाचें.

देशभक्तां प्रासाद बंदिशाला ।
शृंखलांच्या गुंफिल्या दिव्यमाला ॥
चिता सिंहासन शूळ राजदंड ।
मृत्यु सुंदर दे अमरता उदंड ॥

—विनायक.

स्फुट विचार

भारतावरील खटला:— गेल्या शुक्रवार रोजीं—ता. ३०–१–२५—आक्षेपार्ह लेखाची येथील कोर्टाकडून तपासणी करण्यांत आली. येथील उभय तावेलियांवाकडे ही महत्वपूर्ण जबाबदारीची कामगिरी संपविण्यांत आली होती. उपरोक्त परीक्षक द्वयानीं आरोपीत लेखावर कोणत्या अर्थाचा अभिप्राय व्यक्त केला असेल, त्यांत त्यांना 'राज्यद्रोह' दिसला असेल किंवा 'मत स्वातंत्र्य' भासलें असेल, हें साधनाभावामुळें आह्मांस अजून पूर्ण ज्ञात झालें नाहीं. खटला सुनावणीस निघण्यापूर्वीं केव्हांतरी एक दिवस लेखाच्या जबाबदारी संबंधानें आह्मांस जाब विचारला जाईल. त्यावेळीं खटल्याचे कागद आह्मांस पहाण्यास मिळण्याचा योग जुळून येणार असल्यानें परीक्षकांच्या परीक्षणाचें मनमुराद परीक्षणहि करितां येईल. तोंपर्यंत आह्माप्रमाणेंच आमच्या शेंकडो मित्रांचीहि 'तपासणी जिज्ञासा' तृप्त होणें दुरापास्त होय.

लिसबोंतील भानगड:– प्रो. देंतीइयांनो पोर्तुगालच्या एका साप्ताहिकांत आपल्या अकलेचे तारे तोडून जी भानगड उपस्थित केली होती, तीनें एक सबंध आठवडा गोव्यांत गडबड उडवून दिली होती. उपरोक्त प्रोफेसर साहेब व कित्येक मेडिकल विद्यार्थी यांची परस्परांत झोंबाझोंबी होऊन हें प्रकरण आतां बरेंच थंडावत चाललें आहे. 'नेटिव्ह विरूद्ध युरोपियन' अशा तऱ्हेचें विकृत स्वरूप उपरोक्त भानगडीस प्राप्त होणार होतें; परतु उभयपक्षीं शहाणपणाचें व दूरदर्शीत्वाचें धोरण राखलें गेल्यावरून ती आपत्ति वेळींच टळली, ही त्यांतल्यात्यांत आनंदाची गोष्ट होय. लेखनबहाद्दर प्रोफेसरांनीं 'दियारियु दे नोयती' या पत्राच्या संपादकांवरहि अवचित व गुप्तपणें हल्ला करून, त्यांस बरेंच हैराण केलें होतें. सदहू संपादकहि आतां आजारांतून सुखरूपपणें निभावल्यावरून, 'खुना' शिवाय, एकंदर प्रकरणावर 'चुना' खारवला गेला ह्मणण्यास हरकत नाहीं! सविस्तर माहिती हातीं येतांच प्रस्तुत 'फाल्गुनोत्सवा' संबंधीं टीकात्मक चर्चा करूं.

गामाचें श्राद्ध:– गामोत्सवांत पुष्कळ हिंदूंनीं भाग घेतला नाहीं, हें जितकें सत्यास धरून आहे, तितकेंच पुष्कळशा ख्रिस्ती व युरोपियनांनींहि गामाच्या आत्म्यास पिंडदान वाहिलें नाहीं, हेंहि आहे. हिंदूंनी तर केवळ तटस्थवृत्तीच स्वीकारली होती; पण ख्रिस्ती व युरोपियन लोकांच्या तटस्थवृत्तीला विरोधाचीहि झांक झळकत होती. या खऱ्या वस्तुस्थितीकडे मुद्दाम डोळेझांक करून कांहीं ख्रिस्त्यानड्यांकडून हिंदूविरूद्ध चालू करण्यांत आलेली स्वार्थी व पोटार्थी मोहीम किती निंद्यनीय आहे, याचा वाचकानींच विचार करावा. आजच्या पोर्तुगीज अग्रलेखांत प्रस्तुत विषयाची आम्हीं सगोपांग चर्चा केली आहे. यामुळें तरी त्यांच्या डोळ्यांत अंजन पडून त्यांची धुंदी उतरो, अशी आमची इच्छा आहे.

एक विलक्षण कारखाना

(मागील अंकावरून)

पण सर्वांत मोठा चमत्कार ह्मणजे त्याच्या चेहऱ्यावरील झालेला बदल. त्याचा चेहरा पूर्वी एकाद्या क्षुद्र चित्त्याप्रमाणें तारवटलेला दिसत होता. पण त्या यंत्रांतून तो बाहेर पडतांच हिमालयांत अनेक वर्षे तपश्चर्या करून आलेल्या एका तपस्वी योग्याप्रमाणें शांत व गंभीर दिसूं लागला. हा त्याच्या चेहऱ्यावरील एकाएकीं झालेला बदल पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें. मी मालकास ह्मटलें, "या सद्गृहस्थाच्या चेहऱ्यावर हा जो एकाएकीं बदल झाला आहे त्याप्रमाणें या गृहस्थाची मनोवृत्ती खरोखरीच बदलली आहे काय ?" त्या गृहस्थाला दुसऱ्या दालनांत पाठविल्यानंतर मालक जरा इकडेतिकडे पाहून हंसत ह्मणाला, 'अहो हा बोलून चालून यांत्रिक कारखाना. असे तुह्मीं अगदीं भोळे कसे ! या यंत्रांत अगदीं खालच्या बाजुला एक प्रकारच्या पावडरीनें भरलेले दोन खण आहेत. मनुष्याचें डोकें या यंत्रांत गेलें कीं दोन्ही बाजुला बसविलेले ब्रश ही पावडर त्याच्या तोंडावर मारतात व मग ताबडतोब चेहऱ्यावर इष्ट तो बदल होतो." यःकश्चित पावडरीच्या अंगीं एवढी शक्ती पाहून अगदीं आश्चर्यानें मूढ झालों. या पावडरीचें नांव तरी काय असा प्रश्न मी त्यांस करतांच, त्यानें त्या पावडरीचें नांव "दांभिकता" असें सांगितलें आणि आह्मीं तेथून दुसऱ्या दालनांत जाण्यास निघालों.

या दालनांत एक जुने यंत्र पडलें होतें. अद्याप त्याचे कांहीं भाग चालू होते. पण नवीन कच्चा माल फारसा या दालनांत नव्हता. 'हा सर्व प्रकार काय आहे" असा प्रश्न करताच मालकानें मला "पुढारी" बनविण्याचें हें एक जुनें यंत्र आहे असें सांगितलें. हें यंत्र चांगलें आहे पण अलीकडे महात्मा गांधीच्या चळवळीमुळें या यंत्रांतला माल लोकांना फारसा आवडत नाहीं. असहकारितेच्या चळवळीच्या ऐन भरांत या मालाला कोणी कुत्रा सुद्धां विचारीत नव्हता. पण अलीकडे पुन्हां बाजारांत या मालास थोडी थोडी मागणी येत आहे. अद्याप बाजारभाव कदाचित सुधरेल असें वाटतें. या दालनांत जुन्या कारखान्यांत लागणाऱ्या अनेक मालानीं भरलेलीं निरनिराळीं कपाटें होतीं. त्यांत बऱ्याचशा सुंदर, झिळमिळ्या पगड्या, रेशीमकाठी धोतरजोडे करवतकाठी उपरणी, कानांतल्या भिकबाळया, आल्पाकचे कोट इत्यादि रद्दी माल पडला होता. "पूर्वीच्याकाळीं पुढारी बनविण्याला या साधनाचा फार उपयोग होत होता. व यामुळें आमचें टेलरींग खातें फार जोरांत चालू असे. पण अलिकडे गांधीजींच्या चळवळीमुळें हा सर्व धंदा बसून गेला आहे व यामुळें कारखान्यांतल्या बऱ्याचशा शिंप्याना रजा द्यावी लागली. विशेषतः पगडबंदांची जर अगदीं गैरसोय झाली आहे; देशांतल्या वाढत्या बेकारीला ही आणखी जादा मदत. अद्याप या यंत्राचे कांहीं भाग चालू आहेत. कारण 'नेमस्त' बाजारांतून अद्याप याच

Ano 9 N. 46

[illegible]-feira 12 de Fevereiro de 1925

ASSINATURA
[illegible] cada ano tres rupias.

ANUNCIOS
por [illegible] ainda que repetida uma tanga
[illegible] avulso uma tanga

[illegible]TOR E EDITOR
[illegible]egdo Dessay
[illegible]m-Goa

भारत

BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४६

गुरुवार ता. १२ फेब्रुवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

EM [illegible] PAZ

O sr. dr. S. Rau, primeiro bacharel hindú, formado na Universidade de Lisbôa, acaba de dedicar á *Politica Hindú* um artigo que o jornal europeu *A Provincia* inseriu no seu lugar de honra.

O sr. dr. Rau que, de resto, nos merece consideração não só pelo seu estudo mas tambem pela sua educação, perdeu, como se costuma dizer, uma bôa ocasião de estar calado.

Sua Excia, desde que regressou de Lisbôa, investido na magistratura judicial, tem contraido o habito de alhear-se da politica de toda a sorte, lidando, tão sómente, com os livros do seu *metiér*.

O ilustre magistrado não pode saber, portanto, bem o que seja a politica hindú que não é qualquer coisa que se pareça com algum artigo do Codigo Penal ou com alguma disposição da Novissima Reforma Judiciaria.

E quem emite pareceres conselheiros sobre assuntos desconhecidos, comete um grave erro de incompetencia e pratica uma falta de leviandade.

As considerações do sr. dr. Rau sôbre a *Politica Hindú* pecam, por conseguinte, por incompetencia e leviandade, por quanto incidem elas sobre uma tése que o distincto primeiro bacharel hindú não procurou, pelo visto, conhecer em todas as suas fases, particularidades e minudencias, antes de aprecia-la públicamente.

Claro é, portanto, que o aliás brilhante artigo do sr. Rau não pode ser considerado como um termómetro pelo qual se procure graduar a temperatura da *Politica Hindú*, na qual, para mais, Sua Excia. não tem *inspiração* nem filiação partidaria, como se viu.

Se o artigo do sr. Rau é destituido de valor algum como termómetro *pelo qual se procure graduar a temperatura da Politica Hindú*, êle se reveste, porêm, de grande importancia como instrumento de medição do *calor* da politica governamental. O que no artigo em questão se encontra traduzido, não é o sentir dos *jovens* ou *velhos hindús*, mas sim está ali expressa a *orientação* que a burocracia entende que a *Politica Hindú* deve seguir. Só isto e nada mais.

Pela *bôca* da caneta do sr. dr. Rau não fala, pois, a *Opinião Hindú*, com a qual Sua Excia. tanto se familiarisara, tendo-lhe até dado a sua melhor seiva, antes de ir cursar em Lisbôa. Quem fala pelo mesmo *bico*, é a burocracia, inimiga declarada do elemento popular, quere êste seja hindú, quere não.

¿Será o sr. dr. Rau capaz de jurar que as recentes afirmações contidas no seu artigo de *A Provincia* não vão de encontro com as velhas, bordadas *in ilo tempore* no seu jornal *A Opinião Hindú* e na sua revista *Chitacarchana*?

Crêmos que não.

E' que Sua Excia. não era então, como hoje, magistrado judicial ocupando um alto cargo de confiança governamental. Era um jornalista, como o somos agora, de confiança popular, de permanente lida com *a gente do Povo.*

E porisso mesmo repetimos que, quebrando o scilencio que sempre é de oiro, o sr. Rau perdeu uma bôa ocasião de estar calado.

De resto, com o seu artigo, o festejado primeiro bacharel hindù não invalida nenhum dos argumentos, aduzidos nas suas colunas pelo *Bharat* em volta da *Politica Hindú* que, não admitindo na concretisação do seu supremo desiderato violencia de especie alguma, está muitissimo longe de merecer o apôdo de *subversiva*, como o sr. dr. Rau, hoje governamental, pretende classifica-la, menospresando a circunstancia de estar *sub judice* uma das inofensivas e constitucionais manifestações da mesma *Politica*.

Diga-se isto em bôa paz.

Insistindo....

O nosso presado colega de *A Epoca* promete, a proposito da concepção errada, dar-nos a sua resposta completa, logo que tenhamos conhecimento dos *ponderosos motivos que determinaram a exoneração* a que nos referimos.

Insistimos com o distincto colega—se isto não o incomoda—em que se digne de frisar e em tom claro, visto que já se extinguiu a tal fogueira, em que consiste a *concepção errada de alguns hindús*, sendo certo que a nossa insistencia se baséa na certeza matemática de que nunca lograremos explicação solicitada no nosso suelto *Porque!*

Crêa o colega que o nosso pedido não mascara nem envolve nenhum jogo politico: representa apenas o vivo desejo de apreciarmos a tal *concepção errada* que vergastaremos sem dó nem piedade, no caso em que se comprove a sua existencia.

Que diabo! Não queremos que a *Politica Hindú* se vicie, se macule e se comprometa com *concepções erradas*. A nossa ancia é que ela cresça e se desenvolva, completamente livre de quaisquere defeitos que, porventura, possam contribuir para lhe apoucar o valor moral e social.

Pois é verdade, ilustre colega! Despresamos, sempre, a dissimulação que a diplomacia julga ser condição *sine qua non* da Politica. E despresamo-la, ainda com o risco de nossas pele e despauperada fortuna.

Na *Politica*, os *fins* tem de ser claros como claros tem de ser os *meios* destinadas á consecução dos mesmos *fins*. E, como crêmos que o nosso colega bardezano tambem comunga nêste nosso modo de ver politico, é que pretendemos que a *Epoca* seja clara e desassombrada na explicação da *concepção errada* que viu em alguns hindús e que, levada pelo único desejo de os enveredar pelo bom caminho, denunciou, em tom vacilante, *para não lançar achas na fogueira que se ia atear, devido á estouvada atitude de certos.*

समाज सुधारणा

विवाह

लेखांक ४ था.

बालविवाह

पशूंमध्यें सुद्धां पूर्ण यौवनावस्था प्राप्त झाल्याशिवाय संतानोत्पत्ति होत नाहीं. मनुष्यांची यौवनावस्था पूर्ण होण्याला पंचवीस वर्षांहून अधिक काल लोटला पाहिजे. याकरतां अपूर्ण वयांत गर्भादान करणें ह्मणजे पशूंपेक्षांहि हीन कार्य करणें होय. हें कार्य निंद्यनीयच आहे असें नाहीं तर अत्यंत हानिकारकहि आहे.

इंदुमाधव मल्लिक एम् ए. बील.

तारुण्याच्या प्रथम चिन्हांवरून ते विषय भोग भोगण्याला योग्य झालेले आहेत असें केव्हांहि सांगतां येणार नाहीं.

लहानपणीं बाहुला बाहुलीचा खेळ खेळणें, त्यांचीं लग्नें करणें, त्यांना एकत्र निजविणें व पुढें त्यांना मुलें झालींशी करणें इत्यादि प्रकारांनीं तसेंच प्रत्येक रीतीनें त्यांच्या तोंडा वर त्यांच्याच लग्नाच्या गोष्टी बोलणें इत्यादि प्रकारांनीं मुलांच्या मनावर वाईट परिणाम होतात

पूर्ण तारुण्यावस्था प्राप्त होण्यापूर्वी राहिलेला गर्भ माता पिता व पोटांतील संतान या तिघानांहि हानिकारक असतो. बहुतेक अशा स्थितीतील गर्भ नष्ट होत असतो.लहान वयांतील स्त्रियांचा प्रसूति समय अत्यंत कष्टकारक असतो इतकेंच नव्हे तर कित्येकदां त्यांना आपले प्राण यावेळीं खर्ची घालावे लागतात. जरी यावेळीं ती बिचारी जीवंत राहिली तरी पण त्या बालकाच्या दुध पानानें तिला क्षीणता प्राप्त होते व पुढें आणखी एक दोन मुलें होतांच तिचें शरीर इतकें निर्बल होऊन जातें कीं, पुढें सगळ्या जन्ममरपर्यंत त्या बिचारीला आरोग्य माहीत नसतें व फार करून प्रसूतीच्या वेळीं अगर कोणत्या तरी असाध्य रोगानें त्या बिचारीचा अंत होतो.

पंचवीस बाल गर्भवती स्त्रियांची तपासणी केल्या अंतीं असें आढळून आलें कीं, पाच स्त्रियांचा गर्भ अकालीं नष्ट झाला. तिघांना प्रसूतीच्या वेळीं प्राण द्यावे लागले, सहा जणींनां प्रसूतीच्या वेळीं इतके कष्ट झाले कीं, शस्त्रप्रयोग करून मुलें काढावीं लागलीं, पांचाना मुलें झाल्यावर जुना मूत्ररोग उपस्थित झाला, दोघ्या जणींस मूल झाल्यावर बाळंतरोग होऊन परलोकीं गेल्या, तीघांना दुसऱ्या खेपेस हाच मार्ग धरावा लागला. दोघांना हा मार्ग तिसऱ्या खेपेस गांठावा लागला. बारा जणींना अत्यंत त्रास होऊन मृत्यूच्या दाढेंतून सुटल्या पण जन्माच्या रोगी होऊन बसल्या. अर्थात या पंचविशीपैकीं दहा मरण पावल्या, तेरा जन्माच्या रोगी होऊन बसल्या व केवळ दोघी जणी मात्र चांगल्या स्थितींत राहिल्या.

(येथें पंचविशीचा मेळ मिळत नाहीं असें दिसून येईल. याचें कारण एकाच स्त्रिला तीन खेप रोग झाल्यामुळें परत संख्येंत धरलेलें आहे व यावरून ही संख्या वाढलेली आहे.)

बाल मातांना अत्यंत कष्ट होत असतात. अकालीं गर्भ नष्ट होणें, मेलेलें मूल निपजणें अशा वेळीं त्यांच्या हालानां सीमा नसते. एखादेवेळीं मूल जीवंत राहिलेंच तर तें इतकें निर्बल होऊन जातें कीं त्याला दूध सुद्धां पितां येत नाहीं व यांतूनहि तें जर जीवंत राहिलें तर केवळ पाप्याचे पितर बनून या संसारांत दिवस कंठीत असतें.

गेल्या सेन्सस रिपोर्टावरून असें दिसून येतें कीं, बाल्यावस्थेंतील गर्भ बहुतेक वेळां नष्ट होतो. बहुतेक बालपणांतील मुलें वांचत नसतात व वांचलींच तर रोगी निर्बल कृश अशीं होतात. एका हजारांतून ३३६ मुलें बहुदा एका वर्षाच्या आंतच मरण पावतात. अर्थात तीघांतून एक मूल मरण पावत असतें.

आपल्या हिंदुस्थानांतील बहुतेक तरुण मूत्ररोग, अग्निमांद्य, ताप वगैरे रोगानीं पिडलेले असतात. मूत्ररोगानें सगळ्या जगापेक्षां अधिक लोक ह्मणजे शेंकडा १५ तरुण या आपल्या हिंदुस्थानांमध्यें मरण पावत असतात.

आपल्या लोकांचें शारीरिक स्वास्थ्य बहुधा तीस ते चाळीस वर्षाच्या वयापर्यंत बिघडलें जातें हें मोठमोठ्या नामांकित वैद्यानीं सुद्धां कबूल केलेलें आहे. याचें कारण असें आहे कीं, बाल विवाहानें त्याचें शरीर क्षीण होत असतें व त्यांत अकालीं त्याच्यावर मुलांचा बोझा पडतो व या कारणामुळें त्याच्यावर चिंतेचा इतका परिणाम होतो कीं, त्याचें स्वास्थ्य बिघडल्याशिवाय रहात नाहीं.

कित्येक विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षणाच्या भाराबरोबरच मुलाचाहि बोझा उचलावा लागतो व या दुहेरी ओझ्यामुळें त्यांची स्थिति करुणजनक होऊन त्यांच्या शारीरिक स्वास्थ्याचा बिघाड होत असतो

Wake up India
Anne Besant

सारांश बालविवाहामुळें भारत गारत झालेला आहे. या पुढें आह्मी सावध होऊन हा मार्ग जर सुधारला नाहीं तर आमच्या पुढील सर्व आशा निष्फल होऊन जातील. यद्यपि आह्मीं आमच्या स्त्रियानां जरी विद्या व विज्ञान यानीं पारखें केलेलें आहे तरीपण परमेश्वरी कृपेमुळें सुशीलता, पवित्रता, नम्रता पातिव्रत्य, यांत आपल्या राष्ट्रांतील स्त्रिया इतर राष्ट्रांतील स्त्रियांपेक्षां पुढें आहेत. शिक्षण नसतानां असे पवित्र विचार, गुलामगिरींत राहूनसुद्धां असा उत्तम स्वभाव, बालमाता असतानांसुद्धां असें सुंदर व मनोहर शरीर ही स्थिति यावत्कालपर्यंत टिकली गेली, याचें आपण आश्चर्यच मानलें पाहिजे. **बालविवाहाची चाल नवीन भारताला अत्यंत लज्जास्पद आहे.** वरून या चालीचें निर्मूलन करून टाकणें प्रत्येक भारतवासीयांचें कर्तव्य आहे.

अनुचित प्रकृति

परनि उल्लंघी मर्यादेला ।
माता मारी निज बाळाला ॥
बंधु विकि जरी निज भगिनीला ।
अनुचित हा मार्ग ॥ १ ॥

मागें भारतांत प्रसिद्ध झालेली एका श्रीमंत घराण्यांतील घटस्फोटाच्या दाव्याची हकीगत वाचून कोणालाहि विस्मय व खेद वाटल्याशिवाय राहणार नाहीं. विशेष ची कशी अंतीं आमच्या पणजी शहरानेंच या कामीं आघाडी मारली हें समजून तर परम दुःख झालें.

इतिहासप्रसिद्ध गोमांतकांतील मुख्य शहर व पोर्तुगीज हिंदुस्थानची राजधानी अशा दुहेरी मान पणजीला आहे, ह्मणूनच कीं काय हिंदु शातींतील ब्राह्मण वर्गांतील एकाहि स्त्रीनें आजपर्यंत कोर्टामार्फत घटस्फोटाचा अर्ज सादर करून, अर्थात पतीच्या हयातींत त्याचा त्याग करण्याची मनःप्रवृत्ति आचरणांत आणली नाहीं, तीची सुटसुटीत तयारी एका कुलवान व धनवान स्त्रीनें करावी हें या शहराचें दुर्दैव होय.

धार्मीक व व्यवहारदृष्ट्याहि हें करणें उचित आहे, असें ह्मणणारा वरील स्त्रीच्या आप्तेष्टांतसुद्धां कोणी असूं शकेल याची वानवाच आहे, इतकें तीव्रतर लोकमत जिकडे तिकडे अनुभवास येतें. हिन्दुसंस्कृतीला व आजपर्यंतच्या पूर्वपरंपरेला या कृतीनें काळीमा फासला जाणार हें निर्विवाद होय.

हिन्दूंच्या चालीरूढीच्या कायद्यास पो. सरकारकडून जोंपर्यंत अर्धचंद्र मिळाला नाहीं तोंपर्यंत अशा तऱ्हेच्या खटल्यांस कोर्टांत थारा मिळणार नाहीं हें कोणीहि सांगू शकेल व याच्या पुष्टिकरणार्थ ह्मणूनच कीं काय बऱ्याच सरकारी व बिनसरकारी वकीलांचें मतहि " हिन्दूंतील ब्राह्मणवर्गांत स्त्रीच्या व्यभिचार प्रवृत्तीशिवाय इतर आधारानें घटस्फोटाचा कायदा लागू होत नाहीं " असें मागें प्रसिद्ध झालें आहे व आतांहि होत आहे. ' आचारसंपन्न समाजांत घटस्फोटाकडे प्रवृत्ति असणें, हें केव्हांहि इष्ट नव्हे, असें क्रिश्चन सुबुद्ध वकीलांचें ह्मणणें आहे, या वरून व गेल्या डिसेंबर महिन्यांत रिफोर्मर्सच्या अग्रणींच्या लखनौच्या सभेंत घटस्फोटाचा कायदा पास करविण्याच्या ठरावास जो बहुमतानें कसून विरोध करण्यांत आला, त्यावरून हिंदुस्थानांतील विद्वान व सुविचारी बहुजनमताचाहि रोख घटस्फोटाच्या विरुद्ध आहे, हें सिद्ध होत नाहीं काय ?

आमच्या आर्यऋषींनीं व स्मृतिकारांनीं प्रपंचाचा रथ सुरळीत व सुव्यवस्थीत चालण्यासाठीं पतिपत्नींच्या संबंधाचे दृढीकरणार्थ जे नियम घालून दिलेले आहेत त्यांचें उलंघन करणें ह्मणजे त्यांच्याशीं व पर्यायेंकरून आपल्या पूर्वजांशीं कृतघ्न होणें नव्हे काय ? या कृतघ्नतेच्या दोषास पात्र होणें ह्मणजेच स्वधर्माभिमानशून्य बनणें होय.

या खाजगी स्वरूपाच्या खटल्याची "भारतानें" परिस्फुटता करावयास नको होती असें कांहीं लोकाचें ह्मणणें आहे. पण या खटल्याचें स्वरूप हिंदु समाजाचे पूर्व परंपरेस किती विघातक आहे याकडे दृष्टी दिल्यास भारताकडे कसलाच दोष येत नाहीं. खटला खाजगी असला तरी हिंदूच्या चाली रूढींच्या कायद्याविरुद्ध त्यांतील मागणी असल्यावरून, त्याचा बरा वाईट परिणाम सर्व समाजाला भोगावा लागणार,एतदर्थ त्याचा सद्विचारी जनानीं वेळींच प्रतिकार व निषेध करणें प्रत्येकाचें कर्तव्य होय.

प्रसिद्ध ताई महाराजांचा खटलाहि सकृत् दर्शनी खाजगी स्वरूपाचाच होता पण त्यांतील दत्तकासंबंधीचीं विधानें हिंदु समाजांतील चालीरूढीस प्रतिबंधक असल्यामुळें व अशा तऱ्हेच्या खटल्याची पुनरुक्ति न व्हावी यासाठीं ताई महाराजांच्या खटल्यास लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक स्वरूप देऊन तो त्यांनीं आमरण चालविला व त्यांचे पश्चात् त्याचा निकाल प्रिव्ही कौन्सिलनेंहि योग्य असाच दिला, हें सर्वांस विदित आहेच.

सौभद्र नाटकांतील सुभद्रेच्या अंजनी गीतांत थोडा फेरफार करून या लेखाचे शिरोभागीं तें उधृत केल्याप्रमाणें ह्या अनुचित मार्गापासून आमच्या शहरच्या श्रीमंतास परावृत्त करण्यास त्यांचा एखादा आप्त स्नेही अगर त्यांचे धर्मगुरू पुढाकार घेऊन स्वकर्तव्य बजावतील काय ?

पणजीकर

शेवटीं सुप्रसिद्ध इतिहासकार टाल बाईस व्हीलर यांचा उतारा देऊन हा लेखांक पुरा करूं. ते ह्मणतात " जोंपर्यंत भारतीय लोक लहान मुलांमुलींचा विवाह करण्याचें चालू ठेवतील तोंपर्यंत त्यांची संतती उत्तम स्थितीला पोंचणार नाहीं. स्वाधिनता व स्वराज्याच्या चालू चळवळींत ते बलहीन व निस्तेज ठरतील व राजकीय उन्नतीचा उपयोग करण्याकरितां तें कोणत्याहि प्रकारच्या शिक्षणानें समर्थ होणार नाहींत. शिक्षणाच्या प्रभावामुळें त्यांची बुद्धि गंभीर होऊन जरी ते कोणत्याहि गंभीर व प्रौढ माणसाप्रमाणें वर्तन ठेवूं शकतील तरीपण त्यांचें आचरण असहाय्य बालकांप्रमाणेंच राहील यांत शंका नाहीं.

आजचें पोर्तुगीज सदर

अग्रलेखः—

डॉ॰ राव व हिंदु राजकारण; जुने लेख व नवें धोरण; " हिंदुमत " व " चित्ताकर्षण "; डॉ॰ रावांनीं मुग्धता राखण्याची सोन्याची संधि दवडली.

लेख दुसराः—

' आ वेपोक ' पत्राला प्रत्युत्तर; कांहीं हिंदूंची ' दिशाभूल ' कोठें आहे ?

स्फुट विषयः—

आभारप्रदर्शन; दिर्वाव प्रकरण इ. इ. इ.

भारत

करणें हें कृत्य स्वदेशद्रोही, अदूरदर्शी व क्रांतिकारक होय.

वरील वाक्यांतील राष्ट्रीय हा शब्द त्यांनीं कोणत्या अर्थानें योजलेला आहे हें आह्मांस समजत नाहीं. त्या शब्दानें पोर्तुगाल देशाला संबोधिण्याचा जर त्यांचा इरादा असेल तर गोष्ट निराळी. पण तें तसें असेल असें आम्हांस वाटत नाहीं. बॅ. राव सुशिक्षित आहेत, नव्या पिढीचा जहरी जोम व मार्दव त्यांच्या अंगांत वसत आहे. ताज्या दमाच्या तरुणांत प्रामुख्येंकरून ह्या उत्पत्तीस येणारी तेजपूर्ण तडफ त्यांच्या छातींत मुसमुसलेली आहे. मग जें पोर्तुगाल करतें तेंच आह्मांहि करावें असें ह्मणण्यास ते कसे तयार होतील ? पाश्चात्य सुधारणेला भुरकटलेल्या स्वाभिमानशून्य ' नरवीरांनीं ' हवें तर पोर्तुगालच्या पावलावर पाऊल टाकून नागवेंच नाचूं लागवें; आह्मीं त्याच्याकडे ढुंकूनहि न पहातां आपल्या आंखीव कार्यास लागूं. पण ज्या आह्मास पाश्चात्य सुधारणेची उपयुक्तता पटत नाहीं, इतकेंच नव्हे तर तिच्यामुळें आह्मीं माणुसकीस मुकूं असें वाटतें, त्यानां पोर्तुगालच्या हडेलहप्पी हुकुमाचें जोखड माने वर वाळगिण्याचें काय जरूर ? स्वराज्य मिळालें असतांहि जर गोमांतक पोर्तुगालची ' री ' ओढण्यास जबाबदार धरलें जात असेल तर—आह्मीं विचारतों— स्वराज्याची व्याख्या काय ? व तिनें आह्मास कोणते नवीन हक्क मिळाले आहेत ? ' राष्ट्रीय ' ह्या शब्दानें पोर्तुगालला न संबोधितां गोमांतकालाच उद्देशून जर तो वापरण्यांत आला असेल तर गोमांतकांतील धर्मासाठीं झटणारे खिस्ती व धर्मासाठीं मरणारे हिंदु लोक संख्येनें परस्पर समान आहेत, हें ध्यानांत वागविणें अपरिहार्य आहे. एकीकडे खिस्त्यानुयायीवर्ग गामाला आपला उद्धारकर्ता समजतो तर दुसरीकडे आपल्या आजच्या ' अहहल ' स्थितीस केवळ गामच कारण होय असें हिंदुधर्मीयांचें — अर्थातच बॅ. रावांस हिन्दु या नात्यानें जमेस धरून— ठाम मत आहे. ज्यानां ' गामानें आपले हितसंबंध राखले ' असें वाटतें, त्यांनीं खुशाल त्याचीं श्राद्धें वाढावींत व त्याच्या नावानें पोटभर रडावें! पण आम्हीं— ज्यांच्या पूर्वजांच्या नरडीचा घोंट गामानें घेतला, ज्यांच्या पूर्वजांचा गामानें अमानुष खून केला, धर्मच्छलाच्या अत्याचारानें गामानें ज्यांच्या पूर्वजांस देशत्याग करून परागंदा व्हावयास लावलें, ज्यांच्या पूर्वजाना गामानें जिवंत जाळलें, ज्यांच्या पूर्वजांस तोफेच्या तोंडी कोंबून गामानें भरकन् उडवून दिलें त्या आर्यांच्या अस्सल छाप्यानीं, केसरीच्या छवड्यानीं सत्व व स्वत्व विसरून त्या अजापुत्रांत कां सामील व्हावें ? ज्या आमच्या पूर्वजांनीं धर्माकरितां सर्वस्वाची होळी केली, स्वदेश त्याग केला, व प्रसंगीं आत्मयज्ञ करूनहि आर्यांच्या धर्मनिष्ठेची पताका आकाशांत फडफडत ठेविली, त्या धर्मनिष्ठांच्या रक्तानें ज्यांचा देह बनला आहे त्या आह्मीं आपल्या पूर्वजांच्या दिगंत कीर्तीस, उज्वल यशास व अनुपमेय स्वार्थत्यागास काळिमा फांसून जन्मदात्यांशीं हराम कसें व्हावें ! धर्म व स्वातंत्र्य ह्या जगांतील अशा दोन चिजा आहेत् कीं, पृथ्वीवरील प्रत्येक प्राण्याला पंच प्राणाहूनहि ज्यांची किंमत अधिक वाटावी. मग असें असतां गामाच्या श्राद्धांत भाग घेण्याबद्दल पडद्या आडून जबरदस्ती करून धर्मावर व ज्यांनीं उत्सवांत भाग घेतला नाहीं त्यांवर अराजकता, बंडखोरी ह्या सारखे भलते सलते आरोप लादून स्वातंत्र्यावर बेधडक घाला घातला जात असतां तरुण गोमांतकीयांनीं क्रांतीला कां भ्यावें ! गामोत्सवांत (बॅ. रावांच्या मतें) दडी देऊन बसलेलें ' राष्ट्रीयत्वच ' ज्यांस पटत नाहीं, स्वतंत्रमतवादी गोमांतकीयांवर बॅ. रावांकडून स्वदेशद्रोहासारखे शेंकडो आरोप जरी लादण्यांत आले तरी ते त्यापुढें मान वांकविण्यास केव्हांहि तयार होणार नाहींत व यदाकदाचित् त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें आम्ही स्वदेशद्रोही ठरलोंच तर स्वधर्मद्रोह, समाजद्रोह व पितृद्रोह ह्या द्रोहत्रयीं पुढें स्वदेशद्रोह तेव्हांच लंगडा पडेल ह्याची आम्हांस खात्री वाटते. उघड्या डोळ्यानीं प्राण जात नाहीं त्यास आम्ही तरी काय करावें ?

स्फुट विचार

हें चित्र पहा ! :— हिन्दूंची चळवळ सात्विक गुणविशिष्ट असते तर खिस्त्यांच्या चळवळीच्या आरशांत तामसवृत्तीचें भेसूर प्रतिबिंब हरघडी पाहावयास सांपडतें. हिंदूंचा प्रतिकार फार तर मनांत उगम पावून ओंठांतून निघेल. हस्तपादादि विरोधापर्यंत त्याची सहसा मजल पोंचत नसते. गेल्या दोन वर्षांमागें गांधी—टोपी प्रकरणांत लिसेवच्या कांहीं हिंदुद्वेष्टे शिक्षकांकडून हिन्दुविद्यार्थ्यांचा अपमान केला गेला, त्यांच्या धर्माभिमानावर लत्ताप्रहार हाणण्यांत आला व ' नको हे शिक्षक व नको हें शिक्षण ' असे निरुत्साहपूर्ण उद्गार काढण्यापर्यंत त्यांच्यावर पाळी आणण्यांत आली. या गोष्टींमुळें हिन्दुविद्यार्थ्यांच्या रागाचा पारा भराच्या मारीत बराच वर चढला; पण ही रागाची उष्णता अपमानकर्त्यांनां चुकून सुद्धां ' चर्मदंश ' करण्यास शकली नाहीं. विद्यार्थ्यांनीं सभा भरवून राजरोस मार्गांनीं आपला निषेध व्यक्त केला. वर्तमानपत्रांतून सुद्धां दुरुत्तरांचा जाहीर व स्पष्ट रीतीनें इनकार केला. परंतु आपल्या अपमानकर्त्यांच्या शारीरिक स्वास्थावर घाला आणण्याचा आडदंड विचार त्यांच्या मनाला कधींहि शिवला नाहीं. याचें कारण हेंच कीं, हिन्दूंच्या चळवळी — मग त्या कसल्याहि प्रतिकारार्थ जन्मलेल्या असोत — सात्विक गुणप्रधान असतात. त्यानां त्यांच्या स्वभावाप्रमाणें सात्विक स्वरूपच प्राप्त होत असतें. ' असुरी लिंलत ' त्यांचें पर्यवसान चुकून सुद्धां होणें फार दुरापास्त असतें.

आणि हें चित्र पहा :— नाहीं र खिस्त्यांच्या चळवळीची दिशा पहा. प्रो. देतोंञ्ज यांकडून सरसकट हिन्दी विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा उपमर्द व तोहि केवळ वस्तुस्थितीच्या अज्ञानामुळें केला गेला. प्रोफेसर मजकुरांच्या गैरशिस्त विधानें कांहीं खिस्ती विद्यार्थ्यांच्या डोकीं बिथरण्यास कारणीभूत झालीं. पण त्यानीं आपला त्वेश व आपला निषेध जाहीर सभानीं व लेखानीं व्यक्त करण्यापूर्वीं, मारामारी सारख्या खुनशी व तामशी मार्गाचा अवलंब केला ! हा पंथ हिंदूनीं केव्हांच स्वीकारला नसता. कारण त्यांच्या चळवळीचा जोर व्यक्तिपेक्षां तत्वावरच जास्त असतो. हिन्दूनां ' बंडखोर ' ह्मणून वेळीं अवेळीं हिणविणाऱ्या वर्गांतील लोकांकडूनच वरील ' बंडाळी ' माजविली गेली हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

वर्तमानसार

—खटला सुनावणीस निघण्यापूर्वी आरोपीत लेखाचें भाषांतर प्रसिद्ध करण्यांत येऊं नये, अशी कांहीं मित्रांनीं इच्छा प्रदर्शित केल्यामुळें, याहि अंकांत तें छापण्यांत आलें नाहीं.

—अखेर डॉ॰ जुवांव कामोयेन्स यांचीच नेमणूक येथील गव्हर्नरचे जागीं निश्चित होईल, असें पोर्तुगालच्या ताज्या पत्रांवरून समजतें.

—येथील जज्जांची नेमणूक सां—तोम (आफ्रिका) येथें झाली असून, याच महिन्यांत ते येथून निघतील, असा रंग दिसतो.

—सांवर्डे येथें ' उद्योगवर्धक ' नावांची एक लिमिटेड कंपनी स्थापन झाली आहे.

—येथील नजिकच्या गांवांत देवीचा आजार वाढत्या प्रमाणावर आहे.

—चिनचे डॉ॰ सुनयतूसेन हे मरण पावल्याची वातमी कांहीं दिवसांमागें प्रसिद्ध झाली होती; पण ही बातमी खोटी असल्याचें कळतें !

—रा. दामोदर मांवळाराम यंदे यांना साप्ताहिक इंदुप्रकाश पत्र त्यांच्या नवीन ' श्री शिवाजी ' पत्रांत सामील करण्याचा अधिकार नाहीं, असा मुंबई हायकोर्टानें मनाई हुकूम काढला आहे.

वर्गणीदारांस विनंति

ज्यांच्याकडून अजून वर्गणीची फेड झाली नसेल, त्यांनीं ती तावडतोब करण्याची कृपा करावी. सगळीचकडे वसूलदार पाठविणें शक्य नसल्यामुळें, वसूलदाराची वाट न पहातां टपालमार्फतानें वर्गणी पाठविणें, हाच मार्ग उभयपक्षीं फायद्याचा आहे. खटल्याकडे तरी नजर पुरवून आमच्या विनंतीचा अनादर करूं नये, अशी आश्रयदात्यांस आमची अगत्याची सूचना आहे.

म. भारत.

नवें वर्ष, नवें संकट

गामाच्या श्राद्धोत्सवाच्या गडबडींतच यंदांचे सालास प्रारंभ झाला. राष्ट्राच्या संसारांत प्रत्येक वर्ष कोणती तरी क्रांति घडवून आणीत असतें. ही क्रांति कमी अगर जास्त महत्वाची असणें, राष्ट्रीय विकासाला सानुकूल अगर प्रतिकूल असणें हें हरएक गोष्टींवर अवलंबून असतें. विशेषतः बद्ध राष्ट्रांचे बाबतींत, राजकारणाचे दृष्टीनें, नवें वर्ष क्रांतिकारक असणेंच जास्त संभवनीय असतें. ही एक गोष्ट लक्षांत आणली ह्मणजे हिंदु समाजावर नोकरशाहीची झालेली वक्रदृष्टि पाहून, फारसें भिऊन जाण्याचें कारण नाहीं. इतकें आधीं सांगून नोकरशाहीनें हिंदुसमाजाचे बाबतींत आंखलेल्या धोरणाची थोडीशी छाननी या लेखांत करूं.

हिंदुसमाजावर गेल्या पांच सहा वर्षांत, येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांची कृपादृष्टि होती, असें कांहीं ह्मणतात व तें एका दृष्टीनें खरेंहि आहे. एका दृष्टीनें ह्मटलें याचें कारण असें कीं, निरनिराळ्या राजकीय खात्यांत या शेवटल्या वर्षांत, बऱ्याच हिंदूंची झालेली नेमणूक ह्मणजे, खुद्द त्यांच्या लायकीचें तें एक सर्टिफिकीट जरी असलें, तरी ' प्रोव्हिंसिया ' पत्राचे पोर्तुगीज संपादक यानीं आपल्या पत्राच्या गेल्या सालच्या एका अंकांत ह्मटल्याप्रमाणें, लायकी, विद्वत्ता किंवा इतर कोणतेहि स्पृहणीय गुण बाजूस ठेवून, वाटेल त्यांनांच सरकारी खात्यांत आम्हीं शिरकाव करूं असें जर बडे अधिकारी ह्मणते तर त्यानां कोणींहि कांहीं ह्मटलें नसतें व ह्मटल्यास त्याचा कांहीं उपयोग झाला नसता, हें पाहिजे तो सांगू शकेल. कारण, ज्यांचे हातांत सत्ता तोच पारधी हें तत्व परतंत्र राष्ट्रांचे राजकारणांत जास्त भासमान होतें. ह्मणून हिंदूंचा नोकरशाहींत झालेला शिरकाव, युरोपियनांचा कल हिंदूंकडे होता ह्मणून झाला; एरवीं प्राप्त झालेलें थोडें फार महत्व दहा पंधरा वर्षांचे अवधींत त्यांना लाभतें ना, ही गोष्ट कबूल केली पाहिजे. पण, हिंदूंसारख्या विधर्मीय, भिन्न संस्कृतीय लोकांबद्दल पोर्तुगीज प्रांतिक अधिकाऱ्यांनीं जी सहानुभूति दाखविली तिचें कारण काय ? हिंदु निर्बल तेव्हां त्याला सबल करावा, किंवा हिंदु राजकारणाला पारखा झालेला तेव्हां शक्यतर, त्याला राजकारणांत उच्चहीन कसलें तरी स्थान द्यावें. किंवा चार शतकांच्या दीर्घकालीन जुलुमानें गांजलेल्या हिंदूला सुखाचे शांततेचे दिवस दाखवावे, अशा हेतूनें निव्वळ हिंदूंच्या हिताकडे दृष्टि देऊन, पोर्तुगीझांनीं त्याला हात दिला असें मानणें मात्र चुकीचें आहे. सरकारनें हिंदूंवर केलेली मोहबत ह्मणजे राजकारणांतील एक डावपेंच होय. याची साक्ष देण्यास प्रत्येक राष्ट्राचा इतिहास तयार आहे. शेजारच्या हिंदुस्थानांतील वरिष्ठ नोकरशाहीनें मवाळ पक्षाला जवळ केलें होतें तें कां ? आणि सध्या मुस-

Ano 9 N. 47

...ta-feira 19 de Feveeriro de 192.

...SINATURA
...a ano tres rupias

...NUNCIOS
...inda que repetida uma tanga
... avulso uma tanga

...ECTOR E EDITOR
... Hegdo Dessay
...nepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४७

गुरुवार ता. १९ फेब्रुवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

C... UMA MANIA

Recebemos o manifesto *Ao Paiz*, publicado pelos estudantes da Escola Médica de Nova Gôa e no qual os seus autores falam, alto e claro, explicando a sua atitude e repondo os factos no seu lugar.

Desnecessário é dizer que, se, dum lado, nos indignou imenso o cinismo com que o jornal europeu *A Provincia* desvirtuou a verdade do caso que narrou a seu sabor e... calor, imprimindo lhe, de caso pensado, uma feição, a seu modo, assaz comprometedora aos académicos envolvidos na questão, desanimou-nos muito, doutro lado, a sem-cerimónia com que a folha do sr. Batalha pretendeu, hipòcritamente, aromatisar com... *essencia estilistica* a nauseabunda e suja masmorra em que a Policia encarcerou alguns quasi formados medicos !

A indignação e o desanimo, eis o que nos causou, pois, a atitude ... *jesuitica* de quem, por mal dos nossos pecados, se intitula, de mais a mais, *orgão do Partido Republicano Por Portuguez* na India.

Nunca supunhamos a *A Provincia* capaz duma tal desfaçatez, conquanto ela nos tivesse dado motivos para não nos fiarmos muito na lisura e sinceridade dos seus processos, como se viu no celeberrimo *Caso de Canvorem*, coso em que ao menos, havia a atenuante... do egoismo que o sr. Pereira Batalha julgou ferido.

No *Caso Dentinho Junior*, porêm, o procedimento de *A Provincia* não representa já um simples e inofensivo *truc ...* do jogo politico. Vai mais para além. Ele significa, sem mais nem menos, um crime contra o qual o *Bharat* não pode deixar de protestar com a veemencia de que é capaz.

E' ainda cedo para a gente poder formar o seu juiso difinitivo sobre os acontecimentos que tanto celebrisaram o *Caso Dentinho*, porquanto se não desvaneceu, ainda, de todo, a exacerbação que traz exaltados alguns espiritos. Logo que estes voltem à normalidade, pronunciar-nos-hemos sobre o mesmo assunto *commi il feaut*.

Entretanto fique registado nas colunas do *Bharat* o nosso protesto contra a criminosa atitude que o jornal *A Provincia* assumiu, pretendendo criar no espirito pùblico uma tremenda confusão em volta do mesmo *Caso*.

Tudo tem limites, ainda a mania de pregar ...pêtas.

Agradecimento

O signatario agradece muito penhorado a quantos, solicitos e anciosos, procuraram conhecer a origem dos acontecimentos dos dias 15 e 16 do corrente, acontecimentos que em nada abonam a politica governativa do *Idalcão*, como se verá pelo seu sucinto relato que o signatario promete fazer e já.

Pode, entretanto, assegurar a todos que não se trata senão dum desses jogos politicos, baseado no *quero, posso e mando* e engendrado pelo dito *Idalcão* à custa do pobre zé-pagante. Com a sua *arma* politica o *Idalcão* quiz amedronta-lo mas errou sèriamente no alvo ...

Ele há *valentes*, a cada passo !...

Curchorem, 16—2—1925.

S. V. Dessai

ECOS & CRITICA

QUOT CAPITA TOT SENSUS

Referindo-se a' abstengao dalguns hindu's nos festejos do Centenario de Vasco da Gama, a *India Portuguesa*, de Majorda' formula as seguintes duas perguntas:

"Mas como se explica essa tendencia reactiva por parte desses (hindu's), mesmo poucos, e por forma tao espaventosa? Fosse esse Centenario uns 20 a 30 anos atraz daria se essa reacgao de maneira — como teve lugar com o mesmo ousio e liberdade?"

¿Como se explica essa *tendencia reactiva*? E' boa a pergunta ! ¿Entao o reverendo colega anda ja' esquecido daquele capitulo da Historia de Goa, em que se registam episodios sensacionais da perseguigao fradesca contra os hindu's naturais deste *ditoso Pais sempre amado*? ¿Nao sabe a *India* o papel *terrorista* que a reacgao dos tonsurados exerceu em tempos que la' foram contra eles, privando os de seus *pagodes*, de suas fortunas e ainda de sua Patria,—*ad majorem Dei gloriam*?

E' muito engragada a segunda pergunta do catolico colega, catolico e logico.

Nao se daria essa reacgao de maneira como teve lugar com o mesmo ousio e liberdade, tanto se fosse esse Centenario uns 20 a 30 anos atraz, como se fosse uns 80 a 90 ditos, e'pocas em que, por toda a parte, dominava o poder absoluto das reverendas batinas.

¿Nao acha o colega que nao sao banais essas respostas, historicamente, politicamente e sociologicamente encaradas?

Em fim, *quot capita tot sensus* !

ESNECESSARIO

Pelo visto, a *India* de Majorda' pretende endireitar a *Politica Hindu'* preconisando lhe medidas e orientagao, esbogadas pelo sr. dr. Rau.

Ja' dissemas o que tinhamos a dizer sobre as consideragoes do ilustre magistrado. E' portanto, desnecessario responder a' critica do semanario majordense.

MAGISTER DIXIT ?

Referindo se ao incidente de abstengao do Centenario do Gama, a *Luz do Oriente* irradiou o seguinte *feixe* de raios:

"Mas numa terra em que a compreensao do dever e do civismo ja' desapareceram de ha muito, e onde o rigosijo duma classe considerou-se luto de outra, esta' bem de se ver, que tudo e' possivel, abstengao imprevidente e insensata pelas festas do Centenario de Vasco da Gama, como critica insensata e imprevidente censurando e condenandenando o mesmo facto."

Ha' raios luminosos que ofuscam a vista. Pelos que despediu a *Luz do Oriente* sobre o caso do Centenario, prova-se que tambem existem raios que ofuscam o entendimento.

O *Bharat* que nao e' muito forte na diplomacia politica, sobretudo na diplomacia politica que se relaciona com o estomago, ficou *zonzo*, como vulgarmente se diz, quando lhe bateu na retina a luz intensa dos raios luminosos da *Luz do Oriente*, secretariada pelo nosso distincto colega sr. Sitarama Quercar e nao menos distinto secretario da Camara Municipal de Ponda'.

Para no's que somos admiradores do *Gandhismo*, a politica nao e' uma arte de dissimular mas sim de *assimilar* ... a franquesa, o sentido que expressa a locugao *pa-p-a' santa justa*.

Que diabo? Nem tudo e' para todos nem a *Luz* e' para as *trevas* em que andamos a's cegas!

INTER DUOS LITIGANTES ...

Inter duos litigantes tertius gaudet, e' o que nos faz lembrar a contenda que vai accesa entre a INDIA de Margao e o ULTRAMAR da mesma vila.

Com a guerra civil que se esta' travando entre aqueles dois jornais no espagoso campo do Hospicio, quem esta' a lucrar e' a verdade. Tornam-se conhecidos da actualidade os episo'dios divertidos como o da bosta. Descobre se o mo'bil da ignobil campanha do ULTRAMAR contra o integro juiz sr. dr. Brito Santos. Numa palavra, gragas aos esforgos e estudos aturados da INDIA vai replandecen-

गोमंतकी भाषा

लेखांक २ रा.

श्रीयुत जोशी आपल्या ' मराठी शद्ब सिद्धि ' ह्या पुस्तकांत अपभ्रंश दोन प्रकारचे आहेत असें सांगतातः ' रूपापभ्रंश व व रूपार्थापभ्रंश. जेथें शद्बांचें रूप बदलतें पण अर्थ बदलत नाहीं तेथें तो रूपापभ्रंश जाणावाः जसें, सिंदूर,–शेंदूर, अमंगळ–ओंगळ इ०. जेथेंशद्बांच्या रूपांतरोबर त्यांच्या अर्थांतहि बदल होतो तेथें तो रूपार्थापभ्रंश जाणावा. जसें, आचमन–आंचवणें, अन्य–आणि इ० ”

गोमंतकी भाषेंत कोणी कोणी ड चे ऐवजीं ण ची, ग चे जागीं क ची व द चे बदली न ची योजना करीत असतात; उदाहरणार्थ, मांड [दुकान] ह्याचा माण, कांदो (कांदा) ह्याचा कानो, उगड (उघड क्रि०) ह्याचा उकड असा उच्चार करण्यांत येतो. मांड हा शब्द मांडणें ह्यावरून तयार झाला ह्मणून उ चाच उच्चार कायम राहणें इष्ट आहे. बाराखडींतील आ ह्या स्वराचें चिन्ह ज्याला मराठींत (ा) असें ह्मणतात त्याचें गोमंतकींत कानो असें रूप झालें, हें अर्थ भिन्नत्व लक्ष्यांत येण्यासाठीं कांदो ह्याचें कानो असें रूपांतर होणें शक्य नाहीं. उकडणें ह्मणजे शिजविणें, हा शद्ब उघडण्याच्या क्रियेला लागू करणें ह्मणजे जरा चमत्कारिक आहे.

[illegible] ज्ञान नोंठिका [illegible] प्र[illegible]

हातीं [illegible] मराठी भाषेस अनुलक्षून श्रीयुत जोशी शब्द सिद्धींत ह्मणतात कीं, ' मुसलमानी अंमल झाल्यावर मराठींत पारशी व आरबी शब्द आले. त्यानंतर युरोपियन लोक इकडे आल्यावर पोर्तुगीज, फ्रेंच व इंग्लिश शब्दहि आले. त्याच प्रमाणें हिंदी, गुजराथी वगैरे देशभाषांतले शद्बहि मराठींत आढळतात. हीच स्थिति गोमंतकी भाषेची आहे. मराठी शिवाय इतर कांही भाषांमधून जे शद्ब गोमंतकींत घुसले त्यांतील थोडे खालीं देतों.

बंगालींतून

सांकव – बं. सांको ह्याचें रूपांतर (पूल)
हालवेकार – बं. हालुइकर (हलवाई)
भितर – बं. भितर (आंत, मध्यें)
बुन्याद – बं. बनियाद [पाया]
पोटली – बं. पोंट्ला [गांठोडें]
चलो – बं. छेले (मुलगा)
तेरीज – बं. तेरिज [बेरीज)
बेकार – बं. बेकार (रिकामा]
आराब – ब. आराब (शब्द, ध्वनि, ह्यावरून गोमंतकींत ताशाला नांव दिलें.]

गुजराथींतून

कुटको – गु. कटकरे, कुटको (तुकडा)
नळे – गु. नळिया (कौलें)
भेरो – गु. बेहेरो (बहिरा)
दिवली – गु. दिवी (समई)
पोरू – गु. पोर (गुदस्तां)
तिसों – गु. तिरछुं (तिरवा)

कानडींतील

कॅंप – का. कॅंपु [माणिक लाक नांवाचें रत्न)
तुबक – का. तुबाकी (बंदूक)
कुत्रों – का. कुत्रेंमर (डोलकाठी)
बरय – का. बरि, बरे, बरेयु (लिही)
हाऊ – का. हावु (साप. गोमंतकींत वागुलचा वाचक झाला.)
दुडू – का. दुड्ड (पैसा)
भांगर – का. भंगार (सोने)
सांसव – का. सांसिव [राई ह्म० मोहरी)
मोचे – का. मॉच्चें (पायांतले जोडे)
मांव – का. माव (सासरा)
सांबार – का संभार (मसाला)

संस्कृतांतून

भोव – सं. बहु (फार)
आप्य – सं. आव्हय (बोलाव)
निसण – सं. निःश्रेणि (शिडी)
सपण – सं. सोपान (जिन्याची पायरी)
हांव – सं. अहम् (मी)
पूत – सं. पुत्रक (मुलगा)
मानांय – सं. मानव (मनुष्य व ह्यावरून मजुरास लागू झाला)
राजू – सं. रज्जु (विहिरीचा दोर)
वच – व्रज (जा)

फिरंगीमधून

चावी – फि. शावि (किल्ली)
आरमार – फि. अर्मारियु (कपाट)
रेगादोर – फि. रेगादोर (हजारा, फुलझाडांस पाणी घालण्याचें बारीक छिद्रांचें पात्र)
बल्ल – फि. बार्रील (मध्यम प्रकारचं पीप]
बुय्रांव – फि. बुय्रांव [बरणी [
जनेल – फि. ज्यानेल [खिडकी]
[illegible]
कलियाद – फि. कार्डियादु [ताळें]
बिरव – फि. ब्रेव [डामर, डांबर]
खांग्री – फि. काफ्रि [शिद्दी]
बंदेर – फि. बांदैर [बावटा [

इंग्रजींतून

बोत्ल – इं बाट्ल (बाटली)
पाकीट – इं. पांकेट (पिशवी. ह्याची हॅंडबॅग किंवा पैशांची पिशवी ह्याकडे योजना झाली]
टाइप – इं. टाइप् (छापण्याचे खिळे]
नोट – इं. नोट [कागदी नाणें]
तिफीण – इं टिफ्फिन [फराळ उपहार फिरंगी लोकांत न्याहारी व दुपारचें जेवण ह्याच्या मधल्यावेळचा उपहार)
रूळ – इं. रूल [नियम, गोल आंखणी]
मार्क – इं. मार्क [गुण ह्म. परीक्षेंतील वगैरे मार्क.]
मार्कीट – इं मार्केट (बाजार]
मास्तर – इ, मास्टर [शिक्षक]
पोष्ट – इं. पोष्ट [टपाल ऑफिस. क्वचित रूढींत आहे.]

ह्यांशिवाय रजिष्टर, प्रेस, पेन्सील, स्लेट, फी, बूक, पास इ० शब्दहि प्रचारांत अहेत. रजिस्टर, ऑगस्ट, पोस्ट ह्यांचे जागीं रजिष्टर, ऑगष्ट, पोष्ट असें लिहिण्याविषयीं श्री. रामचंद्र भिकाजी जोशी ह्यांचें मत आहे.

गोमंतकी भाषा स्वतंत्र कीं परतंत्र हा विचार येथें कर्तव्य नाहीं. ह्या भाषेचा मराठीशीं निकट संबंध आहे एवढें खरें. प्रत्येक भाषेंत अन्य भाषांमधील शब्द समुच्चय असतोच. खरी व्युत्पत्ति पाहूं गेल्यास दीर्घ काल परिशीलन करावें लागेल. बंगाली भाषेंत वगैरे कांहीं पोर्तुगीज शब्द मला आढळले तेः

बंगाली

आलपिन – पो. आलफिनेति [धातूची टांचणी]
केदारा – कादेर [खुर्ची]
आस्ताबल – पो. इस्ताबुलु [गोठा]
वरंड – पो. वारांद [ओसरी, पडवी].
रसिद – पो. रेसिबु [पावती]
कामीज – पो. कामीज [खमीस, शर्ट]
जानाला – पो. ज्यानेल [खिडकी]
आलमारी – पो. आर्मारियु (कपाट)
काकातुया – पो. काकातूअ (पोपटाच्या वर्गांतील एक पक्षी. मलाया भाषंतील मूळ शब्द काकाऊ]

मराठी

कडाबीन – पो. काराबीन, क्लाबीन [एक-प्रकारची आंखूड बंदूक]
बिजागरी – पो. बिजाग्र [साधेपट्टी]
पगार – पो. पागार क्रि. फारीग करणे ह्यावरून [मुशाहिरा]
चावी – पो. शावि (किल्ली)
जुगार – पो ज्युगार क्रि. खेळणे [धूत)
पिस्तूल – पो. पिश्तोल (एका हातांत धरून उडविण्याची फार लहान बंदूक)
तिजोरी – पो. तिजौरु (खजिना)
लिलांव – पो. लैलांव (हरराजी)
सावण – पो. साबांव (साबू]
परात – पो. प्रातु (मोठें ताट)
आरमार – पो. आर्मांद [लढाऊ जहाजांचा [illegible] मुदा[illegible]]
पत्राज – पो. पातारोत (डौल, दिमाख)
बाल्दी – पो. बालदि (पोहरा)

बटाटा हा मूळ स्पॅनिश शब्द पातात यावरून, इंग्रजींत पोटेटो व पोर्तुगीज मध्यें बातात असा झाला. संत्रा, तुरुंग, टोपी, गटार, लिंबू, ह्या शब्दांचा उगम पोर्तुगीजवरून अशी किती एकांची समजूत आहे ती निराधार होय. स्पॅनिशमध्यें नाज्या [Naja] हें एका जातीच्या सर्पाला नांव असून स्पॅनिशद्वारें पोर्तुगीजमध्यें नाज्य [Naja] असें रूढ झालें. ह्याची संस्कृतांतील नाग ह्या शब्दांशीं तुलना केली तर सुयुक्तिक होणार नाहीं. संस्कृतांत अग्रेसर ह्म. पुढारी आणि पोर्तुगीजमध्यें आग्रेसोर ह्म. हल्ला करणारा अंगावर जाणारा असा अर्थ होतो. ह्या सादृश्यावरून परस्परसंबंध जुळविण्यांत अर्थ नाहीं. पुरावा हा लातीन प्रोवा ह्यावरून उत्पन्न झाला. पोर्तुगीज प्रोव.

गटार हा फ्रेंच मधील गुतिये ह्यावरून इंग्रजींत गटर ह्या रूपानें शिरला. लिंबू हा आरबी आणि फारशी लिमन ह्यावरून तयार झाला. टोपी हा टोप ह्याचा लघुत्वदर्शक शब्द असावा. संत्रा आणि तुरुंग हे शब्द कोठून आले ह्याचा मला उलगडा होत नाहीं.

संस्कृतांतील पोर्तुगीजमध्यें तसेंच इंग्रजींतील पोर्तुगीजमध्यें व पोर्तुगीज मधील इंग्रजींत देखील फार कमी प्रमाणानें शब्द सांपडतात.

श्रीयुत गुंजीकर सरस्वतीमंडळ ह्या पुस्तकांत लिहितातः

'गोमंतकी भाषा ही बहुतकरून प्राचीन सरस्वती भाषेचें रूपांतर होऊन आलेली असावी असें दिसतें. प्राचीन बालभाषेशीं हिचें साम्य पुष्कळ आहे. आणि सांप्रतची मराठी भाषाहि बालभाषेपासूनच आलेली असल्यामुळें या दोहोंचा बराच निकट संबंध आहे. तशांत पुनः ही भाषा मराठीच्या संनिध असल्यामुळें सांप्रत प्रायः मराठीच्या अनुषंगानेंच वागते असें ह्मणण्यास कांहीं बाध नाहीं.'

श्रीयुत जोशांच्या प्रौढबोध व्याकरणांत व मराठी शब्दसिद्धींत पुढील माहिती मिळतेः

'सांप्रत पुणें, मुंबई, वगैरे प्रांतांत प्रमुख लोक ज्या मराठी भाषेंत बोलतात आणि लेखन व्यवहार चालवितात ती मुख्य मराठी आणि चितपावनी, परभी, कोंकणी, मालवणी, गोमंतकी, वऱ्हाडी, नागपुरी, खानदेशी, वगैरे हे तिचे प्रकार.' प्रौ. व्या.

'पश्चिमेकडे सिंध–पंजाब पासून पूर्वेकडे आसाम – कटकपर्यंत, आणि उत्तरेकडे काश्मीर–नेपाळपासून दक्षिणेकडे गोदावरीपर्यंत, एवढा जो विस्तृत देश, त्या ठिकाणीं आर्यांनीं वसती केली. या सर्वांची मुख्यतः भाषा एक होती, तरी तिच्या स्थानिक शाखा निरनिराळ्या होत्या. प्रथमतः त्यांमध्यें परस्पर असणारा भेद, कोंकणी मराठी, देशी मराठी, गोमंतकी, मालवणी, कोल्हापुर[illegible] वऱ्हाडी यांमध्यें आहे, [illegible]च थोडा [illegible]रीची कायदे [illegible] तरी [illegible] वाढत जाऊन, [illegible]प्रांत जशी मराठी, [illegible] जराथी, बंगाली, हिंदी, अशा भाषा स्थलांतरानें व कालांतरानें झाल्या आहेत, तशाच त्यावेळीं आर्यांच्या अनेक भाषा असाव्या.'

'कोंकणांत गोमंतकी, कोंकणी, मालवणी चित्तपावनी, कऱ्हाडी, परभी अशा मुख्य मुख्य जुन्या उपभाषा असून त्यांमध्यें सांप्रतच्या प्रौढ मराठीच्या अगोदरचें स्वरूप आढळून येतें, आणि त्यांचा मराठी भाषेच्या जुन्या इतिहासाचा छडा लावण्यास फार उपयोग होतो.' म. श.

श्री. रामचंद्र भिकाजी गुंजीकर व रामचंद्र भिकाजी जोशी ह्यांचे ग्रंथ डोक्यास श्रम देऊन व खोल विचार करून लिहिलेले आहेत असें सकृतदर्शनीं दिसून येतें. केवळ पैसे मिळविण्याच्या हेतूनें उतावीळ करून झरझर लिपीनें भारदस्त नावें देऊन कांहीं तरी आपटाआपट केलेली नाहीं असें मला वाटतें.

गोमंतकी आणि कोंकणी ह्या भाषा भिन्न नव्हत असें कोणास वाटत असल्यास वादविवाद करण्याची माझी हौस नाहीं, किंबहुना तेवढें ज्ञान माझ्यांत सांठलेलें नाहीं. तथापि, इंग्रजी हिंदुस्थानांतील तत्संबंधिक तज्ज्ञ विद्वानांचें मत मला माहित आहे. सवडीप्रमाणें “ नोटेशन ” हा लेख लिहीन.

डि० फं० ४ आणे. सारस्वत.

भा र त

मिति माघ व० ११ श्री शके १८४६

राजनीतीचें एक तत्व

कौर्म संकोचमास्थाय प्रहारमपि मर्षयेत् ।
प्राप्तकालेपु नीतिज्ञ उत्तिष्ठेत्क्रूर सर्पवत ॥
॥ पंचतत्रम् ॥

पोलीस आणि मिलिटरी खातें किती आडदांड, अडाणी अशिक्षित आणि अज्ञानीं असतें हें विशेष स्पष्ट करून सांगण्याचें कारण नाहीं. अशाचे हातीं विशेष अधिकार सोंपविले ह्मणजे मग विचाराव यासच नको ! आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला अशी स्थिति व्हावयाला उशीर नको. कोणी कोणी त्याच्याकडे फिर्यादीस आले तर कोणाची शेंडीच काप, तर कोणाच्या भिवयाचेंच वाटोळें कर, तर कोणाच्या एका बाजूच्या मिशाच उतर तर कोणाला मरेपर्यंत मार तर कोणाला दिवसाचे दिवस उपवाशीं कैदेंत ठेव, असे चाळे हे आपल्या स्वभावानुसार करीत असतात. ज्याना सारासार विचार नाहीं, कायदा कशाशीं खातात यांचें तारतम्य ज्ञान नाहीं अशांच्या हातीं हें एक अधिकाराचें नवें कोलीत आमच्या सरकारनें दिलें आहे. आणि त्याचा परिणाम जसा व्हावयाचा त्याचीं पूर्वचिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं आहेत.

अगोदरच सरकारच्या अजाण व्यवस्थेमुळें लोक हवालदील बनले आहेत. त्यांतच ही एक भर पडलेली. याचें पर्यावसान कोठपर्यंत होईल हें जरी आज निश्चित सागतां येत नाहीं तरी अशा प्रकारच्या आघाताना प्रत्याघात केव्हां तरी मिळतील हें निश्चित आहे. गोमांतकीय लोकांची अजून अनुकूल वेळ आलेली नाहीं. राष्ट्रीय वारें त्यांच्या अंगांत अजून शिरलेलें नाहीं, हे काय घोटाळे उडत आहेत, याच्या मुळाशीं त्यानी पाहिलेलें नाहीं. किंबहुना अशा बाबतींत ते उदासीनतेच्या गुर्मीत असल्यामुळें त्याचा तिकडे कानाडोळा झालेला आहे. यावरून सरकार जर मनांत मांडे खात असेल तर खुशाल खावो बापडें ! पण या उदासीनतेचें रूपांतर क्रमाक्रमानें असंतोषांत, द्वेषात व शेवटीं बंडांत होणार नाहीं अशी खात्री मात्र त्यानें बाळगूं नये. एका परीनें सरकार करीत आहे तें ठीकच आहे. कारण मनुष्य स्वभाव जात्या जिज्ञासावान आणि अनुकरणप्रीय असल्यामुळें सरकारचेंच कां होईना पण अनुकरण होईल आणि 'टोल्यास टोला' याच्या ऐवजीं 'टोल्यास टोला' अशी बरी प्रतिकृति घडेल.

बंडकरा, बंड खोर बना असें कांहीं आह्मी लोकानां सांगत नाहीं. सरकार व अधिकारी वर्ग नोकरशाहीच्या रूपानें कसें वागत आहे, राष्टाच्या हिताहिताकडे कसें लक्ष्य देत नाहीं, आपण व आपले जातभाई याविषयीं कसें तत्पर असतें, त्यांच्या या तुंबडी भरणीच्या कामीं कायद्याचें उल्लंघन झालें तरी त्याना शिक्षा न होतां त्याचें कौतुक कसें केलें जातें, उलटपक्षीं राष्ट्राच्या हिताच्या गोष्टी प्रजेच्या मनांत वावरत असल्यास त्यास अडथळे कसे येतात, हें आह्मीं वरचेवर सांगत आलों आहोंत. स्वार्थ साधणें हें त्यांतलें तत्व आहे आणि तें साधतानां राष्टाचें अधःपतन झालें, प्रजेचें नुकसान झालें, हाल झाले, काय याच्या ठिकाणीं जुलूमाचें वस्तान बसलें, न्यायाचें अधिष्टान दडपशाहीनें पत्करलें आणि नीतीच्या भागांत अवदशा थैमान घालूं लागली तरी त्याची परवा करूं नये हा त्याचा मतितार्थ आहे. अशा प्रकारें वागलें असतां तीं, नीच, दुष्ट, दरोडेखोर, बंडखोर बनत नसून, कायदा, न्याय आणि सद्सद्विवेकबुद्धि यांच्या कचाट्यांत सांपडत नाहीं हें सरकारनें स्वतःच्या वागणुकीनें प्रयोगसिद्ध उदाहरण घालून दिलेलें आहे.

शरीरसौख्य, चैन, व निरनिराळे उपभोग भोगण्याच्या इच्छेनें वासनारूपी प्रकृतीच्या पूर्ण आधीन होऊन निवळ नेभळट बनलेल्या गोवा प्रांतीय लोकांनां सरकारचें उक्त प्रकारचें धोरण नेभळटपणापासून परावृत्त करूं शकत नाहीं काय ? यांचा स्वाभिमान, देशाभिमान, राष्ट्रप्रेम; मातृभूभक्ति, वीरत्व, पौरुषत्व यानां खळबळून सोडण्यासाठीं उपरोक्त कृत्यांच्या अंकुशाच्या टोंचण्या, वोंचण्या मारे पुरेसे होत नाहींत काय ? बंडखोर बनावें असें आमचें ह्मणणें नाहीं पण सरकार तिकडे लक्ष देऊन प्रसंगानुसार उच्च मनोभावनांना चलन दिलें पाहिजे. असें करितांना राजनीतीचें मात्र एक तत्व लक्षात ठेविलें पाहिजे आणि तें या लेखाच्या शिरोभागींच दिलें आहे. प्राप्तकालेषु नीतिज्ञ उत्तिष्टेत्क्रूर सर्पवत्

स्फुट विचार

नोकरशाहीची भेदनीति :— फोडा व झोडा (divide aud rule) ह्या एकाच चाणाक्य नीतींतील अजिंक्य शस्त्रूवरील रामबाण या उपायावर ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानचें साम्राज्य सिंहासन पटकाविलें; आज जवळ जवळ दीडशें वर्षें आपल्या हातांत टिकविलें व पुढेंहि अनंत कालपर्यंत तें तसेंच कायम राखावयाचा त्यांचा फुगारकीवजा इरादा आहे. शिंद्यांनां उचलून होळकरांवर मार, भोंसल्याना धरून पेशव्यांवर आपट, पेशव्यांना धरून शिंद्यांना झोडप, मराठ्यांना उचलून टिपूवर मार, असा गनिमी कावा लढवूनच इंग्रजानीं हिंदवी पातशाही व मुसलमानी बादशाही पादाक्रांत केली असल्याची साक्ष देण्यास इतिहास तयार आहे. सध्याहि वेळेचें महत्व जाणून त्यांनीं पुन्हां एकदां त्या धोरणाचा अंगिकार केला आहे. एकीकडे हिंदुविरुद्ध मुसलमानांना फुसलावणी दे, तर दुसरीकडे ब्राह्मणांवर चढ करण्याला नोकरीचें आमीष दाखवून ब्राह्मणेतरांना फितूर कर, असा दुहेरी डाव खेळून कॉंग्रेसवर कशी तरी कुरघोडी करण्याची नोकरशाही सध्या खटपट करीत आहे.

तिचा आह्मांवर होणारा परिणामः— ब्रिटिश सरकारचें आमच्याशीं असलेलें वर्तन कसें दुटपी धोरणाचें आहे, व त्यांत त्यांचा अंतिम उद्देश काय आहे, ह्याचा पुरता उमज न पडल्यामुळें आमच्यांतील कांहीं सुशिक्षितांची होत असलेली दिशाभूल पाहून कोणासहि त्यांची कींवच करावीशी वाटेल. कोंबडीं झुंजविण्याच्या उद्देशानें ब्रिटिश सरकारानें आह्मांपुढें टांकलेल्या चार दाण्यांस लालचावून बसून ह्या बहाद्दरांनीं माजविलेला जातवार प्रतिनिधित्वाचा लढा दिवसें दिवस विकोपास जात असून त्याचीं कडु फळें चाखण्याचा प्रसंग आह्मांवर आज गुजरला आहे. संघटित राष्ट्रकार्यावरील दृष्टि 'केवळ ज्ञातिहित पहाण्याइतकी' आकुंचित केल्यामुळें पंजाब व बंगाल ह्या दोन प्रांतांत तर नुसतीं रणें माजून राहिलीं आहेत. मद्रास इलाख्यांत व आमच्या महाराष्ट्रांत जोरानें चालू असलेल्या ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाकडे पाहिलें ह्मणजे 'नकोत त्या दिवाणगिऱ्या' 'नकोत तीं कौन्सिलें' व 'नकोत त्या सरकारी नोकऱ्या' असेच उद्वेगपूर्ण उद्गार प्रत्येक समंजस विवेचकाच्या तोंडांतून कळत नकळत बाहेर पडतील हें निर्विवाद आहे.

महात्माजी व जातवार प्रतिनिधित्वः— हा किळसवाणा प्रकार बंद पडावा व राष्ट्रकार्याचा गाडा अनत्याचार पथावरून सुरळीत चालूं लागावा एवढ्यासाठींच महात्माजीनीं नोकरशाहीशीं झगडण्याचें तूर्त तहकूब ठेवून 'राष्ट्रीय ऐक्याची' 'पाठपुरवणी, करण्याचें कार्य सध्या आरंभिलें आहे. दिल्लीस भरलेल्या सर्वपक्षीय ऐक्य कमिटीनें निवडलेल्या पोट कमिटीकडे हा जातवार प्रतिनिधित्वाचा प्रश्न निकालासाठीं सोंपविला आहे व ठरल्याप्रमाणें तीनें आपला रिपोर्ट परवांचे दिवशीं साजरा केलाच असेल, पण ह्या महत्वपूर्ण विषयावर महात्माजीनीं आपलें खालील स्वतंत्र मत प्रसिद्ध केलें आहे. ते ह्मणतातः "तत्वतः जातवार प्रतिनिधित्वास जरी माझा अंतःकरणपूर्वक विरोध असला तरी दोन्ही परस्पर विरुद्ध पक्षांस भूषणावह व शांततेस बाध न आणणारें असें जें कांहीं ठरविलें जाईल त्याला माझी पूर्ण संमति आहे" पहा ! महात्माजींच्या अनत्याचारी चळवळीस 'बंडखोरी' समजणाऱ्या गोमांतकीय ख्रिस्ती महात्म्यांनो ! असहकारिता किती शांतताप्रधान आहे ती जरा डोळे उघडून पहा ! व मग सांगा कीं महात्मा गांधींस गोमांतकांत येऊं दिल्यास, हिंदूंत अराजकता प्रसार पावेल अशी आपण केलेली हाकाटी निष्फळ होती कीं नव्हती !

वर्तमानसार

—पेडणें महालांतील मोरजी गांवांत स्थापन झालेल्या 'विद्याप्रसारक समाजा"च्या श्री सरस्वती मंदिराच्या इमारतीचा पाया वे. मू. रा. रा. श्रीपाद बाळभट मणेरीकर यांच्या हस्तें शुक्रवार तारीख ५–१२–१९२४ रोजीं बसविण्यांत आला. त्याचवेळीं वे. मू. गणेश केशव कऱ्हाडकर यांच्या अध्यक्षतेखालीं समाजाच्या कामगिरीबद्दल सदर शाळेचे हेडमास्तर एस्. व्ही. राव यांचें व प्राथमिक शिक्षणापासून फायदे थोवर फुर्स्ट अ. कामत मास्तर यांचें भाषण झालें. नंतर सदर शाळेचे शिक्षक गो. रा. पत्कीकृत गाणीं व संवाद मुलांनीं ह्मणून दाखविल्यावर अध्यक्षांनीं ह्या संस्थेनें अवघ्या ३ महिन्यांत इमारत बांधण्याचें धाडस केल्याबद्दल मोरजींतील सर्व मंडळीचें अभिनंदन केलें. शेवटीं रा. रा. नारायण बुरये यांनीं अध्यक्ष व शिक्षक यांचे आभार मानिले. सध्या या शाळेंत २०० मुलें मराठी ५ व्या इयत्तेचें शिक्षण घेत आहेत. लवकरच इमारत फंडाकरितां व कायम फंडाकरितां गोव्यांतील उदार धनिक लोकांकडे व शिक्षणप्रेमी गृहस्थांकडे संस्थेचें कार्यकारी मंडळ आश्रयार्थ निघणार आहेत, इत्यादि जगन्नाथ लक्ष्मण सामंत हे कळवितात.

—येत्या अंकीं 'विवाह' लेख मालेचा पांचवा लेखांक प्रसिद्ध होईल.

—लॉर्ड रेडिंग नंतर हिंदुस्थानच्या व्हाइसरॉयच्या जागीं बंगाल गव्हर्नर लॉर्ड लिटन ह्यांची नेमणूक होणार असल्याचें 'व्हाईस ऑफ इंडिया' ह्मणतो.

—क्रोनिकल पत्राचे माजी संपादक बी. जी. हॉर्निमन ह्यांना झालेली हद्दपारीची कायदे बाह्य शिक्षा रद्द करावी असा ठराव बॉंबे लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें डॉ० वेलकर आणणार आहेत.

—आपण विनंति केल्याप्रमाणें एक वर्ष सोडून चार वर्षें आह्मां आपली चळवळ बंद ठेवून असहकारितेच्या यशस्वितेकडे आपली आशादृष्टि रोंखली; पण आपण सुरू केलेल्या चळवळीनें नोकरशाहींत कांहींच फरबदल न झाल्याचें दिसून आल्यामुळें पुन्हां क्रांतिकारक चळवळ हातांत घेणें आह्मांस अपरिहार्य झालें आहे, अशा अर्थाचें एका क्रांतिकारकाचें महात्माजोंस गेलेलें पत्र त्यांनीं आपल्या 'यंग इंडियांत, प्रसिद्ध केलें आहे.

—गेल्या ता. ९ रोजीं दिल्लीस स्वराज्य पक्षाची सभा भरून दिवाणांचा पगार ४००० रुपयांपर्यंत असावा असें तिनें ठरविलें आहे.

—कुडाळ [रत्नागिरी] जवळील हीगस गांवीं भुताटकीचे विलक्षण प्रकार चालू झाले आहेत.

—बरद्वानच्या महाराजांनीं लाहोरच्या सनातन धर्म कॉलेजला १२ हजार रु. देणगी दिली.

—सैबेरियांत एक नवीन सोन्याची खाण सांपडली आहे.

—'इंस्तितुत वास्कु दा गाम' या नांवाची एक संस्था गामस्मारकानिमित्त स्थापन करण्यांत आली असून, तींत केवळ पाश्चात्य संस्कृतीच्याच पुरस्कर्त्यांचा समावेश होणार आहे.

—बेतींहून ह्मापशें येथें जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला एका हिंदूचें प्रेत बरेच दिवस पडून राहिलें होतें, अशी एक बातमी पणजीच्या उ येराल्दांत प्रसिद्ध झाली आहे.

Quinta-f

...aulim por apenso aos de acção do processo especial do Decreto de 28 de Março de 1905 que o dito Tucobá moveu a referida Rucmiuim para pagamento da quantia de 346:08:02 proviniente do capital, juros penas e custas liquidados nos referidos autos de acção e de custas e selos acrescidos da execuçáo. O arrematante pagará a contribuição de registo por inteiro e as despezas da praça alem do preço da mesma dentro de tres dias Por este são citados quaisquer credores e co-proprietarios O que para ser publico se espediu este.

Xeldem 8 de Abril de 1924

O escrivão do 2 ° oficio encarregado de 1 °

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito,

A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio. Barreto, vão ser vendidos em hasta publica, á porta do tribunal judicial desta comarca, situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se dirige a estaçáo de Sanvordem no dia 29 do corrente mez ás 10 horas, pela terceira vez e pelo preço que a praça der os seguintes bens 1/24 do predio rustico denominado "Galicodulsordo" sito em Colomba e 1/24 do predio rustico denominado "Choudalem ou Choudavisvé" sito na dita ambos da cultura de arroz, descritos na conservatória predial desta comarca respectivamente sob os nos. 12.459 12 460 a f 56 e 57 do livro B. 35 e avaliados em 40 e 30 rupias respectivamente. penhoranos nos autos civeis de execução por custas que o Digno Agente do Ministerio Publico nesta comarca promove contra Xeuntú e seu marido Arjuna Gãocar de Molcopona de Molcornem, por apenso aos autos de inventario orfanologico a que se procedeu por obito de Seguna Vellpo que foi de Colomba. São por este citados todos os credores incertos dos ditos executados e os co-proprietarios e quinheeiros nos termos e para os fins da lei ficando a contribuição do registo por inteiro a cargo do arrematante. E para ser publico se expediu este. Xeldem 11 de April de 1924.

O Escrivao de Direito do 2 ° ficio.

Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito,

A. A. de Brito e Nascimento

Anno 9 — N. 5

Quinta-feira 24 de Abril de 1924

ASSINATURA

Po[illegible] s rupias

[illegible]OS

Por cada linha [illegible] repetida uma tanga

Num[illegible] ma tanga

DI[illegible] EDITOR

G. [illegible] Dessay

[illegible] Goa

भारत

BHARAT

वर्ष ९ वें. अंक ५

गुरुवार ता. २४ एप्रील सन १९२४

वर्गणीचे दर.

सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.

समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.

गो. पु. हेगडे देसाई.

केपें—गोवा.

"NARRATIVAS ELOQUENTES"

II

Continuando, passemos a' 2.a secçao que feriu os nervos do sr. *V. S*, e' a que vai:

"A politica de cruzamentos dos portugueses com os indianos, emprendida por Albuquerque, foi um mal para os indianos e um erro politico do conquistador";

O sr. *V. S.* defendendo Albuquerque, diz que esta politica *obedeceu a' ideia do dominante confundir se com o dominado*, Admitida como verdadeira a explicaçao da *Tribuna*, qual e' pois a consequencia que dela flui? Porventura, os europeus casando com os indios dao filhos europeus? Nao,de certo . Onde a *confusao*, pois?

Nao ha duvida. A politica do cruzamento trouxe mais um mal para a India. Alem de tantas castas que nos separam, dividem e alheiam uns dos outros, criou mais uma, a dos *mestiços*. Eis o resultado da tal 'confusao"

Entremos, agora, a ver o que diz o sr. V. S. acerca da 3a. afirmaçao que e':

"Na India Portuguesa não se deve glorificar Afonso de Albuquerque por se tratar de "Conquistador de Goa;" a festa realisada no Liceu Central de Nova Goa foi um absurdo, significativo do abastardamento da raça indiana, preparada pela politica do dominante;

A isto observa o ilustre articulista que:

"A conquista de Goa nao foi feita por Albuquerque aos naturais desta mas sim, aos mouros que a traziam subjugada;e fe-la o inclito portuguez a pedido de Timoja que atestou o jugo de ferro e fogo do dominante mussulmano"

Com isto quere dizer o sr. V. S. que Goa nao foi conquistada? Para o ponto de vista indiana, fosse Albuquerque conquistar Goa aos mouros ou ao diabo, uma vez que ele nao restituiu Goa aos seus naturais para que eles mandassem nela como em sua casa, antes pelo contrar o, estabeleceu ai o dominio dos portugueses —para o criterio indiano—repitimos— "Albuquerque Conquistou Goa. Aos outros, como ao sr. V. S. e' livre dizer que libertou Goa ou coisa milhor, Isto, porem, e' sentimentalismo, nao e' historia.

A 4.a e ultima opiniao dos jovens articulistas que mereceu, reparo ao sr. *V.* S. e' esta:

"A civilizaçao europeia abriu falencia na Europa, segundo sociologos de autoridade: e porisso, nem em nome da utilidade dessa civilizaçao na India se pode glorificar Afonso de Albuquerque."

O sr. V. S. comentando acrescenta:

"E' uma opiniao pessoal de quem a emitiu; nao pode ela ser aceita na forma lata como esta' expressa no artigo a que aludimos,"

Simplesmente queira o ilustre V. S. dizer quantas opinioes quere no mesmo sentido. E, entretanto, pode ler o nterressante artigo do *O. N.* "A Proxima renascença" publicado em "A Patria", revista dos novos, que se publica em Nova-Goa, 3. ° numero.

Continua o sr. V. S. na sua defesa da civilizaçao ocidental

"A civilizaçao europeia pode ter defeitos: mas e' certo que ela e' superior a todas outras, como se ve do facto dos proprios portugueses adquirirem dela os ensinamentos politicos, legislativos e scientificos; como se ve do exodo dos indianos de Goa e da India britanica para Portugal. Inglaterra,França, Alemanha, etc. etc.; como se ve das naçois como o Japao, a China,o Egipto, os principados indianos, copiarem a essa civilizaçao as normas administrativas e sociais que caraterizam".

Nao ha' civilizaçoes superiores e inferiores. Ha civilizaçoes distintas e caracteristicas, porque as civilizaçoes sao producto de homens e do momento. Todas elas tem muito de apreciavel, tem tambem muito de condenavel.

Contesta a "Tribuna" isto? Nao de certo—A maxima aspiraçao da civilizaçao europeia e' o "comunismo", que ja' era facto na India antiga sob o nome do "comunalismo" !

Continua o mesmo neste diapasao:

"A civilizaçao europeia e'a que nos da' as siencias, que nos envia maquinas e engenhos de todo o genero; que nos da' comunicaçoes telegraficas para toda a parte; que nos serve com os produtos de suas riquissimas industrias."

Todas as civilizaçoes contribuiram para o avanço das sciencias, construiram maquinas e engenhos...conforme o saber e ualc tura do tempo em que elas floresceram, O sr. V. S. gosta de erudiçao, nao deve ignorar que foi a China que inventou a palavra com que ao presente os europeus "civilizam" os paises "barbaros" de hoje. Digo de hoje, porque os europeus tambem foram "barbaros" de entao.

E' finalmente, no seu "hosana" ao ocidentalismo, desfecha o sr. V. Sr. o seguinte trecho:

"E nao nos veiu de Europa o gostinho de liberbades civicas?

Pelo juizo das execuções administrativas do Concelhos de Quepém e cartorio do escrivão de Volvotcar ,vão ser arrematadãos no dia 27 de Junho proximo seguinte, ás 12 horas, á porta da administação do Concelho pelo maior lanço que for oferecido, na hasta publica por tempo de um ano, os rendimentos do predio Vagxepa, sito em Molcornem, do predio Chanfeabata, sito em Amonã e do de Torla-cunoguy sito em Sirvoi e pertencentes ao executado Butó Sinai Sirvoicar, de Sirvoy e penhorados na execução administrativa que a comunidade de Sirvoi, move contra o dito Butó para cobrança da divida da renda dos campos da referida comunidade do ano de 1914, na importancia de 27:4:7 ¼, alêm dos respectivos juros de mora, selos e custas do processo.

Quepém 13 de Maio de 1924
O escrivão do processo
Caxinata Sinai Volvotcar

Visto

O juiz das execuções
M. Rebelo

JUZO DAS EXECUCOES ADMI-
NISTRATIVAS DE QUEPEM

Pelo juizo das execuções administrativas do Concelho de Quepém e cartorio do escrivão Volvotcar, vão ser arrematados no dia 27 de junho proximo seguinte, ás 12 horas á porta da administração do concelho, pelo maior lanço que fôr oferecido, na hasta publica, por tempo de um ano os rendimentos da varzea Galunga, do palmar Borodda poxquim Canssurdy, consistente em varzea e palmar e do predio Conssurdey Giraeta e Bagaeta, sitos em Sirvoy e pertencentes a Gonoxama Visnú Sinay Sirvoicar, de Sirvoi e penhorados na execução administrativa que a comunidade de Sirvoi move contra o dito Gonoxama, como fiador e principal pagador ao executado Xantarama Sinai Cacodcar de Cacorá, para cobrança da divida da renda dos campos da referida comunidade d... 1908 a 1910 na ... anos de 42:11:3 3/4 ... importancia de vos juro... alem dos respectitas d... de mora, sêlos e custas ... processo.

...epém, 13 de Maio de 1924

O escrivão do processo
Caxinata Si... tal feno-

...isto

O juiz das execuções
M. Rebelo

JUIZO DAS EXECUCOES ADMI-
NISTRATIVAS DE QUEPEM

Pelo juizo das execuções administrativas do Concelho de Quepém e cartorio do escrivão Volvotcar, vão ser arrematados no dia 27 de Junho proximo seguinte ás 12 horas, á porta da administração doConcelho pelo maior lanço que fôr oferecido, na hasta publica por tempo de um ano os rendimentos dos predios Ducleabatta e Narainabatta, sitos em Amonã ... Cus... Molávonil bagaet, sito em noxa... pertencentes á Go... car, de... Visnum Sinay Sirvoi... Sirvoi e penhorados na execução administrativa que a comunidade de Sirvoi move contra o dito Gonoxama, como fiador e principal pagador ao executado F... car, de Sirvoy, ...tu Sinay Sirvoi... para cobrança da divida da renda dos campos da referida comunidade do ano de 1919 na importancia de 31:07:00 além dos respectivos juros de mora, selos e custas do processo.

Quepém, 13 de Maio de 1924
O escrivão do processo
Caxinata Sinai Volvotcar

Visto

O Juiz das execuções
M. Rebelo

Anno 9º N. 11

Quinta-feira 5 de Junho de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ११

गुरुवार ता. ५ जून सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना रु. ३ ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केंपें—गोवा.

Desfazendo calunias

Quem promete, na divida se mete. E o *Bharat* que na sua edição transacta contraiu com o seu ilustre colega europeu da *Provincia* o compromisso de lhe escalpelisar as afirmações do artigo *Por linhas tortas* mostrando-lhes a flagrante inanidade, vai lançar mão do necessario mas dificil cumprimento de sua atrevida promessa— não vá alguem tentar estigmatisa-lo com o igniminioso ferrete de *mau pagador*.

Antes de mais, permita-nos a *Provincia* que lhe expressemos publicamente o nosso fundo agradecimento por dois motivos. Primeiro, porque *a clas se hindú lhe tem merecido profunda simpatia* e segundo, por que *ainda não desceu se . quer um ponto do excelente conceito que dela sempre tem formado.*

A Cesar...

Cumprido o grato dever de agradecimento, concentremo-nos, agora, a atenção para a *ingrata* tarefa de analisar a substanciosa prosa do mui acreditado orgão dos europeus na India.

E vamos devagar, porque, como diriam os italianos, *chi va plano, va sano*, o que na lingua da *Provincia* sinifica " quem vai devar, vai com segurança ".

O primeiro funambulo com que o nosso censor nos assetea a orientação jornalistica, consiste em afirmar que nos periodicos hindus—e o *Bharat* é um déles— se vem fazendo uma politica disfarçadamente hostil contra a soberania portuguesa nestas paragens, *coisa* que o disgosta, que o impressiona mal, a ponto de o ir predispondo *para uma atitude de que bem se desejaria manter afastado.*

E para concretisar milhor essa sua acusação escreve:—

"Volta e meia fere-se a Republica em *sueltos* que se nao harmonisam com a justiça, nem com a verdade e comtudo a' Republica e so' aos republicanos os hindus devem o verem se investidos de todos os direitos, de todas as regalias concedidas aos cidadaos portuguezes..."

¿Donde tirou a *Provincia* o material para construir o vasto e vistoso edificio duma tão grave acusação? ¿Quem lho forneceu?

Não o diz nem clara nem obscuramente, ela que em tom ameaçador e iracundo de *Jupiter tonante* nos arremeça aquele raio...acusatorio!

Afiançamos, porêm, aos leitores, sem receio de desmentido, que em nenhum *suelto* do *Bharat* se feriu a República, para a defesa, generalisação e ingresso dos elevados principios da qual temos, pelo contrario, dedicado a nossa milhor energia politica, o nosso milhor esforço de propagandista, ainda que modesto e de jornalista, ainda que insignificante.

Não exhibimos esta folha de serviços á Republica para que os representantes desta no-los galardoem com alguma comenda ou alguma *fatia* do queijo burocratico. Apresentamo-la, apenas, rasgando, de mais a mais, o véu da modéstia que nos envolve, para demonstrar que está muito longe da verdade a tal acusação, formulada contra nós pelo semanário europeu.

Verdade é que o *Bharat* não poupa ensejo de fulminar, como nunca poupou nem poupará, desmandos burocraticos, nem recúa a criticar, desassombradamente, acção governamental que repute prejudicial ao seu Paiz. Isto. porêm, não quere dizer que o *Bharat volta e meia fere a* Republica.

Uma coisa é bem diversa de outra. Castigar erros dos funcionarios republicanos é coisa bem diversa e distinta de ferir a Republica e os republicanos.

¿Será a *Provincia* capaz de pôr os seus dedos nas *chagas*, abertas pelos ferimentos feitos pelo *Bharat* á Republica?

Garantimos-lhe que não o será, por mais *santa* paciencia que ponha na cuidadosa e escrupulosa missão de desencantar os mesmos ferimentos nas colecções do nosso jornal.

A *Provincia* mentiu, pois, descaradamente, quando nos acusou dos *ferimentos* á Republica, ferimentos que nem o *Bharat* nem qualquer outro periodico hindú lhe fez, aberta ou desfarçadamente.

Esta é que é a verdade.

Admitamos, todavia, por momentos, que os periodicos hindus fazem uma politica *disfarçadamente hostil* contra a Republica; mas se essa politica *não é aprovada pela maioria dos hindús ilustrados*, única força que pode pesar na balança politica ¿por que é que a *Provincia* nos teme, então, *predispondo-se para uma atitude de que bem se desejaria manter afastada*?

¿Duma politica que não conta adeptos no elemento ilustrado, duma politica, portanto, que prima pela insignificáncia, deverá tratar-se em um jornal tão importante como a *Provincia*?

Assalta-nos a suspeita de que o abuso da intima convivencia que o ilustre colega mantem com o seu predilecto *sôr Artur* lhe varreu da memória o latinório que diz: *de minimis non curat pretor.*

A classe hindú nunca foi nem nunca será ingrata com o glorioso regime que a libertou do vergonhoso jugo da monarquia.

E sendo os periodicos hindús dirigidos e redigidos pelos hindus, ¿podem eles *volta e meia* ferir a Republica que os cumulou de tantos e tão importantes previlegios e regalias?

Franquesa franca, a *Provincia* incomodou, pois, sem motivo justificado, os periodos hindús, caluniando-os. Fez mal.

Na semana seguinte veremos, ainda, o pior que nos fez.

Ecos & Critica

A REPUBLICA E OS HINDUS

E' certo que a Republica Portuguesa facilitou o desenvolvimento da consciencia civica nos hindu's; o regime democratico, acabando com diferenças odiosas contribuiu preponderantemente para que a tendencia burocratica hindu' atingisse o ponto culminante; o liberalismo do 5 de Outubro criou, numa palavra, uma situação de desabafo a' comunidade hindu que dela tirou e vai tirando o milhor partido possivel para seu progresso.

¿Querera', porem, tudo isso dizer que foi a Republica que acordou a *consciencia civica* nos hindu's?

Nao, certamente. Quem tal fenomeno politico operou, foi a imprensa marata do visinho territorio. Foi ela que incutiu civismo na acobardada alma dos hindus, consequencia da escravidao a que os votara o absolutismo monarquico,

O movimento civico que se observa nos hindu's nao e', portanto, exclusivamente devido a' implantaçao do novo regime que *apenas* facilitou o desenvolvimento do que a britanica imprensa marata lhes criara, mesmo na vigencia da extinta monarquia.

Afirmar o contrario e' dar a Cesar o que e' de Deus e a Deus o que e' de Cesar...

¿Que diz a isto a *Provincia*?

A LINGUA MARATA

Foi, em ultima analise, o conhecimento desta lingua, conhecimento que

ापेंतून शिक्षण दिलें असतां
वाईट न होतां चांगला होतो
दाहरण इंग्लिश हिंदुस्थानां-
:. ते सर्व बाबतींत आज
वरी करितात.
म.ग.च्या काळांत गो ह्मणजे
ाषा, व गोधर्म ह्मणजे हिंदु-
होता; पण आज त्याचा येथें
दिसतो, हें लक्षण बऱ्याचें
आपण सर्वांनीं पोर्तुगीज राष्ट्री-
आपल्या मातेचें ह्मणजे वर
र्वीचें संरक्षण केलें पाहिजे.
राजसत्तेप्रमाणें पूर्वीहि अनेक
या व भाषा शिकाव्या ला-
जांपूर्वी येथें कानडी मुसल-
चालू असे. पण स्वभाषेचा
नव्हता, ह्मणून आपणहि तं
तिच्या अभिवृद्धिसाठीं प्रयत्न

र्तुगीज शाळा नवीन काबिजा
हालानिहाय स्थापन करण्यांत
. पण त्यांच्या अपुरेपणामुळें
उपयोग झाला नाहीं. मारात पो-
तोर व लिंग्व द इस्ताद ह्मणून
कांस मराठीचें ज्ञान करून
रकारनें हुद्देदार नेमलेले आहेत.
–विशेषेंकरून मराठी भाषा–ही
भाषा आहे हें लिंग्व द इस्ताद
जून येतेंच.
सरकार आपल्या प्रजेस प्रथमतः
ून देशी व इंग्लिश शिक्षण देतें;
हे, तर आपणहि त्यांची भाषा
शिकून त्यांतील रहस्यें आपल्या
आणि इकडे तद्विरुद्ध दिसून
पोष्टाविरुद्ध तक्रार करणें झा-
देशी भाषेंत लिहून लखोट्यावर
तक्रार' असा मथळा लिहून तो
केला ह्मणजे न्याय मिळतो. इतकी
व्यवस्था आहे. येथें तद्विरुद्ध
इ. सेलांद फोलीवर पोर्तुगीजींतून
तरी जेथें न्याय मिळण्याची पंचा-
साध्या कागदावर मराठींतून अ-
पाठविल्यास न्याय कसा मिळेल
आहेच. तिकडील प्रमाणें इकडे
वस्थ झाली पाहिजे ह्मणून देशी
पोर्तुगीज प्राथमिक व कांहीं उच
बहुतेक सरकारी खालचा व्यव-
प्रकार देशी भाषेंतून येथें झाला
ग्लिशांचें धोरण इतर बाबतींत जरी
सल, तरी तें या बाबतींत चांगलें
सें ह्मणण्यास कसलाच प्रत्यवाय

शिक्षणाचे बाबतींत आम्ही केवळ
सरकारवरच अवलंबून रहाणें योग्य
आम्हीहि खाजगी रीत्या तसा प्रयत्न
हिजे व सरकारकडे त्याकामीं त्याचें
गितलें पाहिजे. आज आह्मास दि-
शिक्षण देण्यास पोर्तुगीज सरकारस
जाणार. कारण त्याप्रमाणें शाळा

स्थापन करण्यास ख[illegible]चें बराच लागणार व तसा तो खर्च करण्यास त्यास आज तितकें सामर्थ्य नाहीं, हें २८ (अठ्ठावीस) [illegible] खर्च व २४ (चोवीस) लक्ष उत्पन्न यावरून दिसून येतें. ह्मणून आह्मी शाळा स्थापन करून त्या सरकारांत मंजूर होण्यास व सरकारचा त्यांस पाठिंबा असण्यास व सरकारकडूनहि तसा शक्त्यनुसार त्या बाबतींत प्रयत्न होण्यास सरकारकडे मागणी केली पाहिजे. व ही मागणी असी असावी:– **मराठी शिक्षणास सरकारी पाठिंबा असणें; कोंकणी किंवा मराठींतून पोर्तुगीज शिक्षण देणें; त्याकामीं मराठी जाणणारे प्रोफेसर सरकारी शाळांवर विशेषतः नवीन काबिजादींतील सरकारी शाळांवर तरी नेमण्यांत येणें; लिसेवच्या ३ क्लासपर्यंत देशी भाषेंतून (कोंकणी किंवा मराठी) पोर्तुगीज शिक्षण मिळणें; मारात पोर्तुगीजच्या शाळांवर दोन्ही भाषांचें ज्ञान असलेले हिंदु मराठी शिक्षक नेमून त्यांकडून विद्यार्थी मुलांस मारात पोर्तुगेज चें चांगलें व यथार्थ ज्ञान करून देणें, खासगी शाळांतून मराठी किंवा देशी भाषा शिकलेल्यांस मताधिकार असणें; मराठी लिपींतून सरकारी पोर्तुगीज लेखांचें (escrituras) मराठी भाषांतर होणें मात्र मागच्या सारखा अव्यापारेषु व्यापार ह्मणजे पोर्तुगीज लिपींतून कोंकणी किंवा मराठी भाषांतर करून नव्हे; शेतकीची [agricultura] माहिती मराठींतूनहि प्रसिद्ध करणें; पाश्चात्य वैदकाप्रमाणें आयुर्वेदकाचें पौर्वात्य वैदकाचें हि शिक्षण मराठींतून मिळणें, व पाश्चात्य वैदकास सरकारी पाठिंबा व उत्तेजन मिळणें, कांहीं कांहीं ठळक कायद्यांचीं मराठींत भाषांतरें होणें इ० इ०**

स्फुट विचार

खुलासा पाहिजे:– मुड्डणीच्या कोर्सा च्या ज्या अटी 'सांतकाजा'नें प्रसिद्ध केल्या आहेत, त्यांवरून त्या कोर्सांत हिंदु बायांचा कसा प्रवेश होईल, याचा नीटसा बोध होत नाहीं. या पूर्वीं कोणत्याहि हिंदु स्त्रिला पोर्तुगीज प्राथमिक शिक्षणाचें सर्टिफिकेट दाखविण्याच कारण नव्हतें. या सर्टिफिकेटाशिवाय तिचा विनशर्त सदर कोर्सांत प्रवेश होत असे व या पद्धतीनें कोणाचें नुकसान झाल्याचेंहि सिद्ध नाहीं. असें असतां परोपकाराचा तोरा मिरवणाऱ्या एका मायपोट संस्थेनें सदई सर्टिफिकेटच्या मिषानें असहाय्य हिंदु स्त्रियांच्या भल्या आकांक्षांवर आकस्मिक हल्ला करण्यास पुढें सरसावें, ही फार दुःखाची गोष्ट होय! मिजेरकोर्दीच्या या वेडेचाराचा उगम घाशीरामी कारभारालासुद्धां खाली पाहण्यास लावणारा असल्यानें, तो कोणत्याहि दृष्टीनें समर्थनीय ठरत नाहीं. मुड्डणीच्या कोर्सांतील ज्ञानभांडार चाखण्यास पोर्तुगीज भाषेचीच दिव्य दृष्टि पाहिजे, असें जोंपर्यंत सिद्ध झालें नाहीं तो पर्यंत वरील अट ही एक हिंदु बायांना त्या कोर्सांत बंदी करणारी शक्कल आहे, असाच लोकांचा समज होईल. हा समज 'सांतकाजाची' अपकीर्ति पसरण्यास कारणीभूत होणार असून सत्कृत्यांचा टेंभा पाजळणाऱ्या तिला तो खास भुषणास्पद नाहीं, हें कोणीहि कबूल करील. 'मिजेरकोर्दी'चें कार्यकारी मंडळ डोळ्यावर कातडें न ओढतां, अनाथ हिंदु स्त्रियांच्या हितसंबंधावर गाढवाचा नांगर फिरविणाऱ्या उपरोक्त अटीला तिलांजली देण्याचा दिलदारपणा व्यक्त करून तो समज दूर करण्याचा प्रयत्न करील, अशी अजून आह्मांस आशा आहे. 'गतं न शोचेत्' असें ह्मणून हात न जोडतां, हिंदु पुढारीहि 'मुखमस्तीति वक्तव्यम्' दर्शक अशा त्या हिंदुहितविघातक गळग्रही अटीला चंबुगबाळें आटोपण्यास भाग पाडतील व आपल्या निराश्रित भगिनीचे आशीर्वाद घेतील, अशी आह्मांस उमेद आहे. परंतु या पूर्वीं आपल्या त्या अटीस जन्म देणाऱ्या हेतूंचा 'मिजेरकोर्द' खुलासा करील काय?

तुह्मी आह्मी एक:—'तुह्मी आह्मी एक व कंटाळीला मेख' या ह्मणींतील स्वार्थी तत्वाचा अनुभव करून देण्याचें यशकंकण प्रोव्हिंसकारानें आपल्या गोऱ्या हातांना बांधल्याचें वाचकांस अवगत आहेच. हिंदूंना मित्र ह्मणावयाचें पण त्यानीं स्वराज्याचा मार्ग खुला करणाऱ्या एकाद्या साधनांचें नुसतें नामोच्चरण करतांच त्यांविरुद्ध पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें तुटून पडावयाचें! स्वजातीयच्या सत्तेचा झेंडा येथें यावच्चंद्रदिवाकरौ नाचत राहून, त्यानीं चंगीभंगींत दिवस घालवावेत व गोमांतकीय जनतेनें त्यानां 'ब्र'हिन उच्चारतां मदत करीत रहावें असा प्रोव्हिंसकारांचा उद्देश आहे. त्यांच्यामतें या उद्देशाविरुद्ध हिंदु पत्रानीं तक्रार करणें ह्मणजे निवळ राज्यद्रोहासारखा भयंकर अपराध करण्यासारखें आहे! आहे कीं नाहीं मजेची ही गोरी विचारसरणी? पण परकीयांची सत्ता व स्वदेशाचें हित या परस्परांत विळ्या भोपळ्याइतकें उजू असल्यानें प्रोव्हिंसकारांची ही विचारसरणी ज्या सुशिक्षित (?) हिंदूंना आमचें राजकीय धोरण पसंत नाहीं, त्यांच्या नाजूक प्रकृतीला सुद्धां मानवेल कीं नाहीं याचा संशय आहे. बाकी आह्मांस खात्री आहे कीं, कसल्याहि हेतूनें हिंदु सुशिक्षितांस आपल्या गोटांत ओढून घेण्याचा बिभु रचण्याचा प्रोव्हिंसकार प्रयत्न करीत असतील, तर तो त्यांचा बिभु समूळ ढासळल्याखेरीज रहाणार नाहीं. भिकेवर कोठें श्राद्ध होतें? ह्मणून प्रोव्हिंसकारांस आमची अशी शिफारस आहे कीं, त्यानीं राजकारणासारख्या रुक्ष प्रदेशांत धडपडण्यापेक्षां मोहक रमणींच्या रमणीय वर्णनांनीं आपली मधुर लेखणी खुलवून रंगेल वाचकांची रंगेल जिज्ञासा तृप्त करण्याचें संसारी सुख अनुभवावें. गाढवाला गुळाची चव काय माहीत!

उघड्या डोळ्यानें प्राण जात नाहीं:– हिंदु पत्रानी धिटाईनें चालविलेल्या खऱ्या स्वराज्य प्राप्तीच्या चळवळीला 'खो' बसून सरकारकडून त्यांची मुस्कटदाबी व्हावी, हा एकच नीच हेतु प्रोव्हिंसेनें आम्हांविरुद्ध उगारलेल्या चकचकित शस्त्रांत प्रतिबिंबीत होत आहे. हिंदुस्थानांत उगवलेल्या नवजीवन सूर्याच्या तेजस्वी किरणानीं जागा झालेल्या हिंदु गोमांतकाची दिशाभूल होऊन, त्यांत उत्पन्न झालेल्या स्वत्वाची होळी व्हावी व त्यानें सदासर्वकाळ परकीयांची थुंकी झेलावी, असें सि. बातास्यांना वाटत असल्यानें, त्यानीं आमच्याविषयीं सरकारी दरबारांत भलभलते गैरसमज पसरविण्याचा अधर्मग्रंथ स्वीकारला आहे, यांत शंका नाहीं. अशानें हिंदुपत्रें भेदरून जाऊन अंगीकृत कार्यापासून परावृत्त होतील, असें जर प्रोव्हिंसकारांना वाटत असेल, तर ते सपशेल चुकत आहेत, असें त्यांस बजावल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं. पोर्तुगीज सदरांत म्हणा, किंवा मराठी सदरांत म्हणा, एकहि ओळ आह्मीं लिहित नसतों, कीं ती सरकारच्या नजरेखालून जाऊं नये. लोकांप्रमाणेंच सरकारलाहि आपल्यासभोंवार काय शिजत आहे याची यथार्थ कल्पना व्हावी, यासाठीं 'भारताचा' सततोद्योग असतो. सरकारच्या 'गहिरी' नजरेची इच्छा त्याला स्वप्नांतसुद्धां शिवली नाहीं, याची ग्वाहि त्याचा इतिहासच स्पष्टपणें देईल. अशा स्थितींत प्रोव्हिंसकारांची सदर कृति पाहून आम्हांस 'साक्षात पशु पुच्छविषाण हीन' या वाक्याची आठवण होते. असो. चंदुलाल प्रोव्हिंसकारानें आपला निंद्यमार्ग खुशाल चोखळीत रहावें. मात्र 'भारता'वर त्याचा काडीचाहि परिणाम होणार नाहीं, याची त्यानीं आपल्या मनांत पूर्ण खूणगांठ बांधावी, अशी आमची त्यांस सूचना आहे.

वर्तमानसार

—कळंगुटच्या 'ट्रीब्यून' पत्रानें 'भावि हिंदुस्थान' या नावाचें एक सदर उघडलें असून त्यांत मासलेदार व मसालेदार माहिती प्रथीत करण्यांत येत असते. सदर सदरांत नावेलकर नावांच्या एका गृहस्थानें, विष्णु शेणवी नावांच्या आफ्रिकेंत वास्तव्य करणाऱ्या इसमानें तेथील एका निग्रोबाईशीं विवाह करण्याचा आपला निश्चय, श्रुत केल्याचें लिहिलें आहे.

—ह्मापसें व मडगांव येथील पाठशाळांत उघडलेल्या कोंकुर्सांत पुढील हिंदु गृहस्थ पास झाल्याचें प्रसिद्ध झालें आहे:— आत्माराम शंभू पै पाणंदीकर, पंढरी कामत, रामचंद्र श्रीधर पै, श्रीपाद प्रभू लंवदे, व्यंकटेश पुरुषोत्तम प्रभू धारवठकर, विनायक शेणवी शेळडेंकर व शांताराम कृष्ण शेणवी शेळडेंकर.

—ह्मापसेंच्या 'आजील' नावांच्या नूतन लॉटरीचा निकाल तेथील मुनिसिपाल हालांत येत्या ५ आगस्टला लागणार असून, त्यावेळीं या शहरांतील एकंदर अधिकारी वर्ग हजर रहाणार आहे.

—आकाशांतून तरून जाण्याचा पोर्तुगीज वैमानिकांचा उत्कट उद्देश यशस्वी होण्याप्रीत्यर्थ पोर्तुगालांत ठिकठिकाणीं फंड गोळा करण्यांत येत आहेत.

—चालू महिन्यापासून ब्रिटिश इंडीया, दमण, दिव, साष्टी, मुरगांव, काणकोण, सांगें, केपें, पोर्तुगीज पूर्व आफ्रिका, माकाव व तिमोर या ठिकाणीं पाठविलीं जाणारीं पत्रें रात्रीचीं साडेआठ वाजेपर्यंत पणजीच्या मुख्य टपाल आफिसांत स्वीकारलीं जातात. दर बुधवारीं याचवेळीं लिजबोअ येथें जाणारें टपाल बंद करण्यांत येतें.

—नवीन घटनेनुरूप शिक्षण खात्याच्या सल्लागार मंडळाच्या मेंबरांची निवडणूक येत्या २९ तारखेला पार पडेल.

—प्रोव्हिंस पत्राचे गोरे संपादक पेरेर बातास्य यांची नेमणूक, सांतकाज दे मिजेरकोर्द या संस्थेमार्फत चालू असलेल्या सेन्ह नामक शिक्षण गृहांतील अनाथ मुलींस पोर्तुगीज व फ्रेंच शिकविण्याचे कामीं होईल असें ह्मणतात. ही वदंता आह्मांस विश्वसनीय वाटत नाहीं.

—प्रो. आराऊझ मास्कारेंजस यानीं पणजीच्या पाठशाळेंत सातव्या वर्षाची परीक्षा (लेत्रस) दिली. प्रोफेसर साहेबांना परीक्षेंत १९ मार्क मिळाले.

—गोमांतकीय शेतकीखात्यांत नवीन दोन 'तेकनीकां'ची भर पडली असून त्यांच्या वेतनाबावत तिजोरीला सहा हजार रुपयांचा चट्टा बसेल!

—प्राथमिक शिक्षणाच्या खासगी शाळांची नोंद करण्याची मुदत येत्या २० तारखेला संपते ही मुदत वाढविली जाणार नसल्यानें गरजूंनीं आपापल्या शाळा 'रजिस्तार' करण्याचे कामीं तत्परता दाखविणें उचित आहे. नोंदणीचा हा नियम द्विवार्षिक असून तो मराठी शाळेंस लागू होत नाहीं, असें शिक्षणखात्यानें प्रसिद्ध केलेल्या 'आव्हिजा'वरून वाटतें.

प्राथमिक शिक्षण

(ले. उपेंद्र शे. सळावलीकर)

मनुष्याचा समाजाला व राष्ट्राला योग्य उपयोग करून घ्यायाचा असेल किंवा स्वतः मनुष्याला ईश्वरापासून प्राप्त झालेल्या शक्तींचा योग्य फायदा मिळावा अशी इच्छा असेल तर त्या समाजानें, राष्ट्रानें किंवा मानवानें शिक्षणाकडे दुर्लक्ष करणें आत्मघातक होय. कांहीं शतकांपासून आमचीं मनें एका विशिष्ट गुलामगिरींत हळहळू पूर्णपणें गुरफटलेलीं आहेत. आधुनिक जगास माणूस ह्या दृष्टीनें आमचा कितपत उपयोग होऊं शकेल हा प्रश्न बराच वादग्रस्त आहे; किंवा तूर्तच्या संक्रमणावस्थेंत जीवनार्थक लहांत आज ज्याला आपण शिक्षण समजतों त्यानें आपण नामशेष तर होणार नाहीं ना अशीहि एकवेळ शंका आल्याविना राहणें अपरिहार्य होय.

डॉ. रविंद्रनाथ टागोर ह्यांनी शिक्षणासंबंधी एका ठिकाणीं दिलेला आपला अनुभवी शेरा खरोखर अमोल्य आहे. ते ह्मणतात. 'परकी संवयी, परकी रीतिभाती, परकी संस्कृति, परकी इतिहास यांच्या संमिश्रणानें विशेषेंकरून परभाषेंत लहानमुलांस दिलेलें शिक्षण नसून मनुष्याचा स्वाभिमान नष्ट करून राष्ट्रनाश करण्यासाठीं नकळत पाजलेलें जहर होय'. केवळ पोट भरावें व सरकारी नोकरीसाठीं कांहीं गुलाम

अभक्ष्यभक्षण दिसाकरितां आहे समजून
घेण्यास हरकत नाहीं
अस्पृश्य वर्ग किंवा अंत्यज वर्ग
त्यांसंबंधानें चार मतें आहेत.
, अनार्य, चातुर्वर्ण्यभ्रष्टजातकी
र्ण्यांत प्रविष्ट न झालेले लोक
श्य वर्ग होय. अस्पृश्यतेला शा-
हि आहे परंतु परिस्थिति लक्षांत
उद्धार धार्मिक, सामाजिक व
ष्टीनें करणें भाग आहे. अस्पृश्या
रे पाण्याचे अन्याय लवकर
आणि
कारंच नष्टं धीवर मेवच। बुरुडंच
शुद्धेदाचमनात् द्विजः ॥
अंगिरस्मृति
ण्येषु जलेषु वै गिरौ द्रोण्यांजलं
च। श्वपाकचंडालपरिग्रहेषु पीत्वा
येन शुद्धिः ॥ आपस्तंभ
ाहेषु यज्ञप्रकरणेषु च
सर्वेषु स्पृष्टास्पृष्टिर्नविद्यते ॥
अत्रिसंहिता
विषमप्रदेशे सेनानिवेशे भुवनस्य
यज्ञेषु महोत्सवेषु तथैव दोषा न
: ॥ अत्रिः
मृतिवाक्यांचा हेतू पाहून अ-
ची सार्वजनिक व सामुदायिक
घालवावी.
आर्य संस्कृतीवर आज जसा
हल्ला होत आहे तसा आजवर
हता. तेव्हां मिशनऱ्यांचा कावा
ऊन फसगतीनें, अज्ञानानें, व जु
स्ती झाले असतील, त्यांना प-
ला असल्यास व त्यांचें रक्त शुद्ध
देवल स्मृतीच्या आधारें प्राय-
समावेशन केलें पाहिजे.

…वान बुद्धाचें पुण्यस्मरण

…या खास वातमीदाराकडून]

मुंबई, २३ मे १९२४

र ता. १८ रोजीं येथील बुद्ध सोसा-
ग्रमानें बुद्धजयंतीच्या—गौतम बु-
नाची, कार्याची व परनिर्वाणाची
थी साजरी करण्याचा—उत्सव म.
अध्यक्षतेखालीं मुंबईहून फार दूर
व गांधींच्या वास्तव्यानें महत्व आ
द्रकांठाच्या रम्य ठिकाणीं—जुहूस—
तीनें पार पडला. म. गांधींच्या
सम्नंतर व जीवनाच्या दुखण्यानून
त्यावर सार्वजनिक रीतीनें बोलण्याचा
पहिलाच प्रसंग असल्यामुळें व
च्या पोटीं जन्मास येऊन जगास
णाऱ्या भगवान बुद्धाच्या पुण्यस्म-
पवित्र प्रसंगीं प्रतिबुद्ध असलेल्या
यांनीं प्रमुख स्थान स्वीकारण्यानें
तिहासिक महत्वामुळें सर्व जातीच्या
आणि मताच्या माणसांनीं हजर
समारंभास शोभा आणली होती.
वर बुद्धाची सुंदर फुलांनीं सज-
तिमा ठेवलेली होती. म. गांधींची प्र-

(पुरवणी पहा)

हुनि जरि सर्वाचयी सुधारलेली असली तरी ते अशक्त दिसत होते; त्यानीं हलक्या आवाजांत गुजराथींत व नंतर इंग्रजींत भाषण केलें.

प्रथमतः सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्या बद्दल म. गांधीस विनंति करताना श्री. नटराजन ह्यानीं ह्या प्रसंगीं म. गांधी सारखा मा[illegible] लाभल्यामुळें होणाऱ्या बुद्ध सो[illegible] बद्दल व भाग्याबद्दल आदरपूर्वक उल्लेख केला. २५०० वर्षांपूर्वी त्या शाक्य मुनीनें आरंभिलेल्या व त्यासाठीं—अनाथ, पतित व गांजलेल्या जीवांच्या कल्याणासाठीं—केलेल्या कार्याची परंपरा आज गांधी चालवीत असल्याचें त्यानीं सांगितलें. आज धर्माचा लोप झाला आहे असें आपणांस सांगण्यांत येतें:— त्यांच्यामतें असा धर्मलोप होणें हिंदुस्थानांत शक्य नाहीं. म० गांधीच्या कार्यास सुरवात झाल्यापासून आमच्या वागणुकींत, स्मृतींत, अर्थ स्मृतींत, विचारांत, जणुं काय नैसर्गिकच असणारें धर्माचें अस्तित्व— जें वैदिक काळापासूनच्या संस्कृतीच्या मुळाशीं असल्याचें आपण पहात आलों आहोंत—दृश्यमान होत आहे; म. गांधींत सबंध राष्ट्राची संस्कृति एकवटलेली आहे व ह्मणूनच त्यानीं राष्ट्राचें नेतृत्व स्वीकारलें आहे.

म० गांधींचें भाषण

म. गांधी ह्मणाले:— ह्या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्यासाठीं मला आमंत्रण देण्याचें एकच कारण, भगवान बुद्धांनीं ज्या सत्यांच्या प्रस्थापनेसाठीं स्वताचें आयुष्य खर्चीं घातलें त्या सत्यांचा बऱ्याचशा माणसांपेक्षां जास्त प्रसार मी करीत आहें, हें असावें अशी माझी समजूत आहे. बौद्ध धर्माचें पुस्तकी ज्ञान मला फारसें अवगत नाहीं. ३५ वर्षांपूर्वी वाचलेलें सर एडविन अ‍ॅर्नाल्डचें उत्कृष्ट पुस्तक व नंतर थोड्याच दिवसांपूर्वी एरवड्याच्या तुरुंगांत वाचलेलीं १-२ पुस्तकें एवढ्यांवरून मी थोडेसें ज्ञान मिळविलेलें आहे. त्या धर्माच्या अभ्यासांत नैपुण्य मिळविलेले विद्वान प्रो० कोसंबी, [गोमांतकास परिचित असलेले], यांचे अ‍ॅर्नाल्डचें 'लॉइट ऑफ एशिया' वाचून बुद्धाच्या आयुष्याची फक्त अस्पष्ट कल्पना येते व त्या सुंदर काव्यातील निदान एका प्रसंगाचा जुन्या व विश्वसनीय ग्रंथांत उल्लेख असल्याचें मला सांगतात. पुढें मागें प्रोफेसरसाहेब बुद्धाच्या आयुष्याची खरी हकिकत असलेलें एकादें पुस्तक प्रसिद्ध करून आपल्या विद्वत्तेचा फायदा आह्मांस देतील, अशी मला आशा आहे.

गांधी व बौद्ध धर्म

मला बौद्ध धर्म ह्मणजे हिंदुधर्माचा एक भाग वाटतो बुद्धानीं जगांत एकादा नवीन धर्म स्थापन केला नाहीं. त्यांनीं पूर्वींच अस्तित्वांत असलेल्या धर्माचा नवीन रीतीनें अर्थ लावला. बळी दुसऱ्यांचा द्यावयाचा नसून स्वताचाच दिला पाहिजे, हें त्यानें हिंदु धर्मास शिकविलें. बळीच्या वैदिक कल्पनेविरुद्ध हा अर्थ लावण्यांत आल्यामुळें तत्कालीन हिंदूनीं त्याचा निषेध केला. पण शेवटीं त्यानीं वैदिक धर्माविरुद्ध व नवीन समजल्या जाणाऱ्या ह्या धर्मातील बुद्धाच्या शिकवणीचें मुख्य तत्व स्वीकारलें. बौद्ध धर्मातील तत्वांचा स्वीकार केल्यामुळें हिंदुधर्माचा ऱ्हास झाला असें कित्येक ठिकाणीं प्रतिपादण्यांत येतें; असें प्रतिपादणें ह्मणजे जगांत प्रेमाच्या व दयेच्या कल्पना पूर्णपणें प्रचारांत आणल्यास जगाचा नाश होईल असें ह्मणणें होय. वेगळ्या शब्दांत सांगावयाचें ह्मणजे (टीकाकारांच्या ह्मणण्याप्रमाणें) असत्याचा शेवटीं विजयच झाला पाहिजे ! गौतमाच्या तत्त्वांचा स्वीकार केल्यामुळें हिंदुधर्म अधोगतीस गेला नसून, त्या तत्त्वांप्रमाणें त्यानें आपलें आचरण ठेवलें नाहीं ह्मणून तो अधोगतीस गेला असें माझें ठाम मत आहे. वेद खरे ईश्वरप्रणित वेद रहावयाचे असल्यास त्यांत जिवंतपणा असला पाहिजे. त्यांची वाढ वेळोवेळीं झाली पाहिजे; त्यांचें प्रसरण झालें पाहिजे. नवीन उत्पन्न होणाऱ्या परिस्थितीला ते पुरून उरले पाहिजेत. परंतु धर्म—पुरोहितानें फक्त त्यांतील शब्द तेवढेच उचलून उराशीं बाळगले पण त्यांतील तत्वें ग्रहण केलीं नाहींत.

गांधींचा आशावाद

पण आपण निराश होण्याचें कारण नाहीं. ज्या सुधारणेचा प्रसार करण्याचा बुद्धानें प्रयत्न केला त्या सुधारणेचा व्हावयास पाहिजे तेवढा फैलावच मुळीं झालेला नाहीं. जगाच्या आयुष्यांत २५०० वर्षांचा अवधि ह्मणजे कांहींच नाहीं. जर नुसत्या जडाची उत्क्रांति होण्यास युगाचीं युगें लागतात तर बौद्धिक उत्क्रांति थोड्याशा काळांत पूर्ण होईल अशी अपेक्षा आपण कां करावी ? — तरीपण चमत्कृतिच्या अस्तित्वांचे दिवस गेलेले नाहींत. जी स्थिति व्यक्तीची तीच राष्ट्राची—सबंध राष्ट्रांतील लोकांची अचानक रीतीनें उन्नति होणें शक्यतेच्या पलीकडे आहे असें मला वाटत नाहीं. अशा प्रकारचा आकस्मितपणा फक्त वरवर दिसणारा आहे. हा फरक दृश्य होण्यापूर्वी अंतःस्फुर्तीचें वास्तव्य नक्की किती काळ पर्यंत त्याच्या पोटांत होतें हें कोणासहि सांगतां येणार नाहीं, सुधारणेचीं बीजें आपणास सहसा दिसून येत नाहीत. त्यांचें अस्तित्व असल्याचें सुद्धां आपणास कळून येत नाहीं. अदृश्य व परम शक्तीच्या अस्तित्वांत असलेला दृढ विश्वास — ह्यालाच मी धर्म समजतों. त्या शक्तीनें आतां पर्यंत मनुष्यजातीवर मायेचा प्रयोग केलेला आहे व आजसुद्धां आमच्यावर तोच प्रयोग करण्यांत येत आहे. वरवर दिसणाऱ्या गोष्टींवर — भ्रमोत्पादक दृष्यांवर — विश्वास न ठेवतां सत्याच्या व प्रेमाच्या होणाऱ्या अंतिम विजयावर विश्वास ठेवण्यास बुद्धानें आह्मांस शिकविलें; ह्या अतुलनिय सत्याचा त्यानें हिंदु धर्मास व जगास आदेर केला.

जैनमुनी जैनविजयजी ह्यांनीं म० गांधीच्या भाषणाचा अनुवाद करणारें भाषण केल्यावर प्रो. कृपलानी ह्यानीं सी. एफ. अँड्र्युज साहेबांचा संदेश वाचून दाखविला. भगवान, बुद्धाच्या कामगिरीचा त्यांत उल्लेख करून, भिल्ल कॉन्फरन्ससाठीं जुहूहून निघून जावें लागल्यामुळें सभेस हजर रहातां आलें नाहीं ह्या बद्दल त्यानीं दुःख प्रदर्शित केलें होतें. नंतर नाखुषीनें परंतु लोकांच्या आग्रहास्तव दे. ब. दास बोलण्यास उठले.

दे. ब. चित्तरंजन दास.

ते ह्मणाले:— ह्या सभेस हजर रहाताना मला आज बोलावें लागेल अशी मी कल्पना सुद्धां केली नव्हती. मी म. गांधीचा पाठीचा आश्रय केला होता. पण शेवटीं त्यानीं मला सभेच्या हवालीं केलेंच [हंशा]. बुद्धासंबंधीं पूर्वींच्या वक्त्यानीं जें सांगितलें त्यात भर घालण्यासारखें नवीन असें मला कांहींच सांगावयाचें नाहीं. अहिंसेचा व प्रेमाचा प्रसार करण्यासाठीं बुद्ध जन्मास आले होते, हें शाळेंत जाणाऱ्या प्रत्येक मुलास माहीत आहे. मी बौद्ध धर्माच्या वाङ्मयाचा अभ्यास केला नसल्यामुळें फक्त बुद्धासंबंधीची मला ठाऊक असलेली एक गोष्ट सांगून मला माझें समाधान केलें पाहीजे. एकदां बुद्धानें, कांहीं बकरीं एका राजाच्या हुकुमानें बळी देण्याकरितां नेण्यांत येत असल्याचें पाहिलें. तो त्याच्या मागून गेला व त्या मुक्या व निरपराधी जीवांचा बळी देण्याऐवजीं आपला बळी देऊन बळीदानापासून होणाऱ्या पुण्याचा संचय करण्यास त्याने त्या राजास विनंति केली. उदार हृदय बुद्धाच्या ह्या मागणीनें राजा विरघळून गेला व त्यानें ताबडतोब होत असलेली बळीहत्या थांबविली. ही एकच गोष्ट काय ती माझ्या बौद्ध धर्मज्ञानाचें भांडवल आहे. (हंशा) दास बाबू नंतर श्री. लुल्लुभाई सामळदास ह्यानीं बुद्धास हिंदु समजुतीप्रमाणें नववा अवतार मानण्यांत येतो व ह्यावरून बुद्धाचा व हिंदु धर्माचा संबंध ध्यानांत येईल असें सांगितल्यावर प्रो. कोसंबी ह्यानीं अध्यक्षाचें व वक्त्यांचे आभार मानण्याची सूचना पुढें आणली.

प्रो. कोसंबी

प्रो. साहेब ह्मणाले:— हा समारंभ जुहूस पार पाडण्यांत आला ही गोष्ट योग्यच झाली. कारण, अशाच ठिकाणीं भगवान बुद्ध प्राचीन काळीं आपल्या शिष्यांस शिकवीत असत; ते अशा शांत व निसर्ग शोभ सुंदर ठिकाणीं आपला श्रोतृवर्ग जमवीत असत. आज आपण हा उत्सव हिंदुस्थानांतच नव्हे तर सबंध जगांत सर्वांत श्रेष्ट समजल्या जाणाऱ्या एका माणसाच्या अध्यक्षतेखालीं साजरा करीत आहोंत. बौद्ध धर्म ही भूमि सोडून गेलेला नाहीं; सबंध देशांत त्याच्या अस्तित्वाचें द्योतक असलेल्या गुहा व स्तूप पहाण्यांत येत आहेत. ह्याचा अर्थ, बौद्ध धर्मानें ह्या देशाचा त्याग केलेला नाहीं, हाच आहे. (ठाणें जिल्ह्यांतील बोरीवली पासून जवळ असलेल्या] केनेर गुहांचीच दुरुस्ति करावयाची ह्मटली तर आज लाखो रुपयांचा खर्च येईल. पण आपणास दुसरें कांहीं तरी कार्य करतां येईल. मुंबईच्या बुद्ध सोसायटीनें रोमन लिपींत असलेले पाली व जैन ग्रंथ देवनागरींत उतरविण्याचें ठरविलें आहे. ह्या संपादकीय कामासाठीं नेमलेल्या कमिटीवर जैनमुनी, ब. जयकर ह्यांची व माझी नेमणूक करण्यांत आली असून त्या दिशेनें प्रयत्न करण्यासाठीं डॉ. नायर ह्यानीं तीन वर्षेंपर्यंत सालीना १००० रु. देण्याचें कबूल केलें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. ह्या कार्यासाठीं कोणी लहानसहान द्रव्यसहाय्य देऊन मदत केल्यास ती कृतज्ञतापूर्वक स्वीकारण्यात येईल. ब्रह्मदेशांत तेथील राजा पैकीं एकानें पुष्कळ बौद्ध मंदीरांतील स्टटीकांच्या भिंतीवर व कनिष्कानें तर सुवर्णपत्रावर भगवान बुद्धाचा उपदेश कोरून ठेवलेला आहे.

एवढें झाल्यावर सभेचें काम आटोपलें.

Ano 9.º — N. 12

Quinta-feira 12 de Junho de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
ada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegde Dessay
Quepem-Goa

भारत.
BHARAT

वर्ष ९ वें. अंक १२

गुरुवार ता. १२ जून सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केंपें—गोवा.

EMENDANDO ERROS

Naquele seu célebre artigo *Por linhas tortas*, a *Provincia*, para acentuar a importancia dos beneficios dispensados pela República aos hindus grita, alto e bom som:

"A' República e aos republicanos devem os hindus a sua colocação nos lugares públicos dos mais elevados."

Não há duvida que a Republica acabando com diferenças odiosas contribuiu preponderantemente para que a tendencia burccratica hindú atingisse o ponto culminante, o que, porem, não sinifica, de maneira alguma, que o regime democratico tenha colocado os hindús *nos lugares publicos dos mais elevados.*

Quere-nos parecer que a *Provincia* tinha a intenção de dizer "nos lugares publicos dos mais variados;" mas dominada como se achava pela febre de defender as instituições republicanas e os seus apostolos, da *politica disfarçadamente hostil* que lhes é feita pelos que dirigem periodicos hindús, não deu a importante folha europêa com o tal erro, que é, em ultima analise, consequencia lógica duma excitação ultra-patriotica, perfeitamente justificavel.

¿Quem pode ter cabeça no seu lugar, quando vê perigar a existencia dum regime para quem vive e por quem sofreu maiores privações e fez maximos sacrificios?

De admirar, portanto, não é que o referido jornal europeu tivesse falhado no emprego daquela expressão—*dos mais elevados*; porque não é admissivel que a *Provincia* ignore que mesmo na Monarquia houve, entre os hindús, quem tivesse ocupado um lugar o mais elevado de todos os lugares, conquistados por êles na Republica que só—repetimos—*concorreu grandemente para que a tendencia burocratica hindú atingisse o ponto culminamte.*

Isto é: tanto na Monarquia como na Republica houve empregados hindús, com a diferença de que o seu numero se vai multiplicando nêste ultimo regime, graças á sua essencia democratica e liberal.

E' certo que um hindú ornamenta a magistratura judicial, coisa que se não viu na extinta Monarquia. Não é, porem, menos certo que *uma andorinha não faz verão.*

E, depois, a Monarquia nao era a . . Republica, alicerçada na triangular pedra de Igualidade, Liberdade e Fraternidade...

Referindo-se aos lugares *conquistados* pelos hindús, prossegue, ainda a *Provincia*:

"E' certo que os hindús conquistaram esses lugares pelo seu trabalho, pelo seu esforço individual, pelo seu reconhecido merecimento."

E, mais adiante, com a franquesa que lhe é o apanagio, acrescenta:

"Mas não é menos certo que quem tem a faca e o queijo na mão pode talhar a fatia da forma a melhor servir o afilhado e de maneira que, mesmo dentro da lei, outros possam ser os melhores servidos."

Isto quere dizer, noutros termos mais claros, que os republicanos, detentores do Poder, isto é, *da faca e do queijo podiam talhar a fatia da forma a melhor servir o afilhado e de maneira que*, mesmo dentro da lei, *outros pudessem ser os milhores servidos, em preterição dos hindús, a despeito do trabalho, do esforço intelectual e reconhecido merecimento* destes—o que, porêm, não fizeram por *favor*.

Outro erro da *Provincia* mas mais grave do que o primeiro que, qual dardo sinistro, vai, impiedosamente, ferir a Republica no que lhe é mais caro — o prestigio.

¿Com que, então os hindús ocupam os seus lugares por *favor* e não por *justiça* e *lei* cujo imperio pode ser—sobre pujado pela afilhadagem e favoritismo que na nossa ingenuidade reputavamos *extinctos* com a extincção do regime monarquico de compadrio, de injustiças, e ilegalidades e de esbanjamentos?

A *Provincia* que se intitula republicana atingiu, pois, a propria Republica com uma ofensa tão afrontosa que faria baixar a cabeça até a um monarquico dos mais ferrenhos.

¿Como teria manejado a *faca* e o *queijo* o ilustre redactor da *Provincia*, quando director dos correios e telegrafos e de que bitola se servirá, quando novamente, segundo se diz, fôr reintegrado nas mesmas funcções?

Havemos de vê-lo, se Deus quiser.

Mas ¿em que ficou a promessa do *Bharat* de tratar nesta semana do *pior que a Provincia fez*?—perguntar-nos-há nesta altura o leitor.

Por força das *circunstancias supervenientes* responder-lhe-he-mos que fica *adiada a diligencia* para a semana seguinte—vá a linguagem forense.

Ecos & Critica

TUDO ESPECIAL...

O especial é sempre especial; e como o especial é sempre especial, o especial tem suas especialidades que tambem são especiais.

O especial exame que, há dias em que por sinal se sentia um calor insuportavelmente especial, o sr. dr. Araujo Mascarenhas fez especialmente perante um juri especial e por especial autorização do Governo, tem dado margem especial a comentos tambem especiais.

Sobre dois motivos especiais se baseam especialmente os tais comentos especiais. O primeiro motivo especial é que do juri especial do exame especial foram especialmente excluidos sabe Deus por que especialidades os professores especiais srs. dr. Benedito Gomes e Cota Cruz; e o segundo motivo especial é que o exame especial, segundo os rumores especiais, fez-se especialmente por uma forma tão especial que nenhum especialista extranho pudesse no dito exame especial especialisar coisa alguma especial.

Depois dumas especialidades tão especiais não admira—especialmente o especialisamos — que o especial favorecido da sorte sr. dr. Mascarenhas tenha obtido a especial classificação de 19 valores.

O contrario... especial é que seria um especial assunto para especial admiração.

E viva a especialidade que tão especialmente está divertindo o público que é sempre critico especial das especialidades especiais.

Um rôr de especialidades...

RARIDADES

Terra de raridades é a que

देश, बागाइताच्या बाजू इत्यादि ठिकाणी ाळशी, देवकापूस, एरंड यांचें उत्पन्न हो-ण्यासारखें आहे. अशा प्रकारच्या लागवडी-ा गोवाप्रांतात पावसाच्या पाण्याशिवाय असलीहि गरज नसते. केळीं, फणस, आंबे, रू इत्यादि प्रस्तुत उत्पन्नावरून बागाईत जिराईत शेती राखूनहि या बाबी भरीव उत्पन्नदायी कशा होणाऱ्या आहेत हें सहज समजून येणारें आहे. असल्या मालाची गोवा प्रांताला जरुरी तर आहेच पण परदे-शानाहि आहे. म्हणून तेथें पुरून उरणाऱ्या मालाचा आर्थिक परिस्थिति सुधारण्याच्या कामींच उपयोग झाला तर होईल.

कच्चा माल परदेशांत पाठविण्यापेक्षां याचा पक्का माल बनवून तो परदेशांत रवा-ना केला तर त्यापासून अधिक फायदा होतो यांत मतभेद नाहीं. नारळ ज्या स्थितींत आज विशेषेंकरून पर ठिकाणीं जातो त्याचे अवशेष काथ्या येथें शिल्लक रहातो व क्वचित करटीहि शिल्लक रहाते. यांचा सध्या उपयोग जाळण्याकडे व राहिलेल्याचा कुजून जाण्याकडे होत असतो. काथ्यापासून ब्रश चटया व किंमतवान गालीचे बन-वितां येतात व त्याचप्रमाणें करटी नरम करून ती पासून भारी किंमतीच्या नाजूक व नक्षी लहान लहान पेट्या, कप, पेले वगैरे फॅन्सी पदार्थ होण्याजोगे असतात. दुसरें, नारळा पासून अत्यंत उपयोगी पदार्थ बनण्याजोगे आहेत ते ह्मणजे साबण व मेणवत्त्या हे होत. खोबऱ्याच्या तेलांत तीन द्रव्यें असतात; १ घट्ट चरबी (Stearin and palmitin) २ स्निग्ध चरबी (olem) आणि ३ ग्लीसरीन. या पैकीं पातळ चरबी साबण करण्याच्या उपयोगांत आणून घट्ट चरबी मेणवत्त्या करण्याच्या कामीं लाविली तर त्या पासून फार मोठा फायदा होण्याचा संभव असतो. साधारणपणें वरील दोन्ही प्रकारचे पदार्थ एकाच समायिक भांडवलाखालीं झाले पाहिजेत. कारण त्या शिवाय तो धंदा तेवढा फायदेशीर होत नसतो. या शिवाय ग्लीसरीन शिल्लक रहतेंच. याच्या पासून भयंकर स्फोटक द्रवें बनत असतात. इतकेंच नाहीं तर वैद्यकीय बाबतींत ग्लीसरीनचा फार मोठा उपयोग होतो. एका कारखान्यांत वरील तीन प्रकारचे पदार्थ होऊं शकतात. त्या पैकीं खुद्द साबण हा खर्चाप्रीत्यर्थ काढला तर बाकीचे दोन पदार्थ निवळ फायदेशीर आहेत असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं. आज गोवा प्रांतांतून जितका नारळ बाहेर जातो त्याच्या एक चतुर्थांशाचाहि उपयोग अशा बाबतींत झाला तरी त्यापासून कित्येक लाख रुपयांचा व्यापार वाढण्याजोगा आहे. या शिवाय येथें उंडी, तीळ वगैरे जातींचीं तेलें आहेत. त्यांचाहि या कामीं मिश्र करण्यास उपयोग होण्यासारखा आहे. साबण, मेणवती व ग्लीसरीन याच्या कारखान्याला ४० पासून ५० हजार रुपयांचें भांडवल लागतें.

सुपारीमध्यें टॅनिक व कॅटेच्युईक ह्मणजे

काताच्या तेजाबाचा अंश असतो. पाश्चात्य राष्ट्रांत बरीच सुपारी जात असते. तिचा उपयोग बऱ्याच अंशीं हीं द्रव्यें तयार करण्यांत होतो. त्या शिवाय त्यांत पक्क्या पिंगट रंगाचें तत्व असतें. त्या पासून तिकडे तो रंग तयार करितात. सुपारींत जीं द्रव्यें आहेत त्याच सारखीं खैर, आंवळा व हरडा यांतहि आहेत. त्यामुळें हेहि पदार्थ परदेशांत रवाना होत असतात. शिकाकाई या नांवाचाहि एक पदार्थ याच जातीचा आहे. तोहि परदेशांत कच्चा स्वरुपांत बराच जात असतो. तेव्हां गोवा प्रांतानें यद्विषयक प्रयत्न केले किंवा निदान जे पदार्थ आज बिलकूल निरुपयोगी पदार्थ ह्मणून पडून राहिले आहेत त्यांचा योग्य उपयोग केला तर त्या पासून बरेंच उत्पन्न वाढण्याचा संभव आहे.

या शिवाय खाद्य भुस्तर पदार्थ गोवा प्रांतांत पुष्कळ होतात, निदान होण्यासारखे आहेत. ते पेरु आंबे, फणस अननसें, केळीं इत्यादि परक्या ठिकाणीं पाठविण्याजोगे आहेत. हे पदार्थ फार दिवस टिकणारे नाहींत आणि हंगामांनंतर ह्यानां फार किंमत येते ह्मणून ते योग्य प्रकारें राखून (reserved) किंवा बर्फाच्या आवरणांतून (refrigerator) किंवा मुरंब्याच्या रूपानें परदेशांत पाठविले तर असले प्रयत्न एकदम रिकामटेकडेपणाचे होतील असें समजण्याचें कारण नाहीं. दुसरे परदेशांत पाठवितां येण्याजोगे पदार्थ ह्मणजे हरडे, जाफर, शिकाकाई, मुळे, आंवळे व सांवरीचा कापूस [Silk cotton] हे होत. यांपैकीं हरडे, शिकाकाई व आंवळे यांचा उल्लेख मागें आलाच आहे. जाफरचें बीं रंगाच्या उपयोगीं येतें असा समज असून तें बहुतेक जर्मनी मध्यें जातें. सांवरीचा कापूस इटाली, जर्मनी व अमेरिका येथें जात असून तेथें त्याचा रेशीम व लोंकर यांत मिश्र करून किंमतवान कपडे बनविण्याकडे उपयोग होत असतो.

वर्तमानसार

—एका शिक्षकास चोप दिला गेल्याची बातमी 'तेन्हांत' प्रसिद्ध झाली आहे.

— ६ तारखेच्या बोलेतींवर प्राथमिक (पोर्तुगीज) शिक्षकांच्या नेमणुका प्रसिद्ध झाल्या आहेत.

—शिक्षण-सल्लागार मंडळांत भाग घेणाऱ्या सभासदांच्या निवडणुकींत मत देण्याचा अधिकार मिळविण्याची ज्या खासगी मराठी व गुजराथी शाळामास्तरांची इच्छा असेल त्यानीं शिक्षणखात्याच्या दिरेक्तोरास पुढील दाखले जोडून अर्ज केला पाहिजे. जुन्या किंवा नव्या नोर्माल स्कूलचें सेर्तिदांव व लिसेवांतील किंवा दुसऱ्या कोणत्याहि सरकारी मारात-पोर्तुगीज अथवा गुजराथी परीक्षेचें सेर्तिदांव, नोर्मालच्या ऐवजीं लिसेवच्या ५ व्या किंवा ७ व्या परीक्षेचा दिप्लोमा उपयोगी पडेल—इंग्रजी हिंदुस्थानांतील मराठी किंवा गुजराथी सहाव्या इयत्तेचें सर्टिफिकेट व पोर्तुगीज हिंदुस्थानांत एक वर्षपर्यंत शिक्षकाची कामगिरी बजावल्या बद्दलचा मामलेदाराचा आतेस्ताद—या शिवाय सभ्य वर्तणुकीचा व देवी आल्याबद्दलचा किंवा टोंचून घेतल्या विषयींचा, असे दोन दाखले दाखविले पाहिजेत. लिसेव व नोर्मालचा डिप्लोमा असलेल्या प्रोफेसरांची नोंद कायमची समजण्यांत येऊन बाकीच्यांची दोन वर्षांनंतर चालू किंवा रद्द करण्यांत येईल. पण या गोष्टी सरकारी तपासणीवर अवलंबून रहातील.

—दुसऱ्या 'येपोकाच्या' वेळीं लिसेवच्या पांचव्या वर्षाच्या परीक्षेला एकंदर २० विद्यार्थी बसले होते. तितकेहि नापास झाले!

—असोळणेचें 'वे० प्रा० ज्ञानमंदिर' अंतस्थ कलहामुळें बंद असल्याचें कळून फार वाईट वाटतें.

—सरकारी शेतकी पतपेढ्या स्थापन करण्यांत आल्या असून, बेर्नादीन कोस्त, मिनेज ब्रागांस व सिप्रीयान गोमीस या तिघांचाहि चालक मंडळींत समावेश करण्यांत आला आहे.

—ज्या परीक्षक मंडळापुढें आराउज मासकारेंजस यानीं आपली परीक्षा दिली तें मंडळ कायदेशीर नसल्याची कित्येक वृत्तपत्रानीं 'गुप्त' बातमी दिली आहे. आंधळे दळतें व कुत्रें पीठ खातें.

—सदर्न मराठा रेलवे व पोर्तुगीज सरकार यांच्यामध्यें असलेल्या कराराची फेर तपासणी होण्याचें घाटत आहे.

—दीव येथें अनेक सुधारणा करण्याच्या हेतूनें तेथील गव्हर्नर साहेबांनीं डा. जाइम द मोराइस यांची मुलाखत घेतली.

—मुंबईच्या पोलीसांनीं ९०० पठाणांना कैद केल्याची बातमी आहे पठाणांच्या लीलांना आतां तरी आळा पडेल असें दिसतें.

श्रीपीठ सेवक सत्धर्मप्रेमी रंगबोधेच्छु नाट्यसमाज

रा. रा. संपादक 'भारत' यांसः—

आपल्यापाशीं फर्स्ट क्लास कंप्लीमेंटरी पास असल्यामुळें, खालील मजकूर, बाकीच्या विषयांची गर्दी असली तरी श्री दामोदर थिएटरांतील खुर्च्यांप्रमाणें त्यांची खेंचाखेंची करून किंवा एखाद्या सेकंड क्लास कंप्लीमेंटरी पासवाल्यास दुसऱ्या ठिकाणीं अथवा दुसऱ्या वेळेवर ढकलून, आपण तो जरूर प्रसिद्ध करून आभारांत ठेवाल अशी आशा आहे. आमची ही भीड भलतीच आहे असें आपण कृपा करून समजूं नये.

आमचे प्रांतबंधु श्री.सावकार यांच्या व्यवस्थेखालीं चाललेल्या उपरोक्त समाजाकडून झालेले कै० देवलकृत 'सं. संशय कल्लोल' ह्या लोकप्रिय नाटकाचे २ प्रयोग आमच्या अवलोकनांत आले. नाटकाचे शोकी नसतां केवळ एका मित्राची भीड मोडवेना ह्मणून आह्मी नाटक पाहण्यास गेलों होतों व कळविण्यास आनंद वाटतो कीं, समाज नवीन आणि त्याचे व्यवस्थापक हे 'शेजारचें चेडूं' असल्यामुळें त्याच्याकडून होणारे प्रयोग चांगले वठतील कीं नाहीं असा आमच्या मनांत गोंधळ घालीत असलेला संशय, 'संशय कल्लोल'चा प्रत्यक्ष प्रयोग पाहून फिटल्याशिवाय राहिला नाहीं दोन्ही प्रयोग एकापेक्षां एक सरस वठल्याचा पुरावा, 'भोळीं खुळीं' नसून सहज पाशांत सहसा न गवसणाऱ्या अनुभविक व व्यवहारी (वणिक नव्हे) बाळांनीं एकच नाटक दोन वेळां अगदीं आरंभापासून शेवटपर्यंत श्री दामोदर थिएटरांतील खेंचाखेंचींत व [बीन] हवाशीर जाग्यांत करून दाखविलें असल्यानें त्या बाबतींत कोणीहि फाल्गुनराव, आश्विनशेट किंवा कृत्तिका अथवा थोड्या वेळासाठीं तरी मघा नायकिणीची मुलगी रेवती होण्याचें कारण नाहीं अशी खात्री आहे. किंबहुना ह्या बाबतींत आह्मी वैशाखशेट समजले जाण्यास हरकत नाहीं.

ह्या श्री पीठसेवक समाजाच्या म्यानेजरच्या शब्दांनीं सांगावयाचें असल्यास आमच्या गुणग्राही व ललित कलेच्या पूर्ण माहितगार समाजावर इतकी छाप बसल्याचें दिसत आहे कीं तो ह्या सद्धर्मप्रेमी मंडळीच्या पायांवर आपली संपदा अर्पण करून [एकंदर नव्हे हो !] तिला आपलीशी करण्यांत आश्विन शेटीवरहि खास ताण करील हें सांगण्यास उत्तरेकडचे माघ माधेश्वरांचीं मुळींच गरज नाहीं. व समाजाचें खासगी शुद्ध वर्तन, धर्मश्रद्धा व शिस्त अगदीं तंतोतंत त्याच्या एकंदर अभिधानाप्रमाणेच असल्यामुळें आमच्या गुणग्राही समाजाचें हें करणें अयोग्य होईल कीं काय असा संशय शिल्लक राहण्याचें—रेवती नायकिणीची मुलगी असली तरी—मुळींच कारण नाहीं. आणि सांगून ठेवितों कीं, सद्धर्म प्रेमी असल्यामुळें समाजाला तो मुळींच खपणारहि नाहीं.

श्री गुरुगणेशाच्या कृपेस पात्र असलेल्या ह्या समाजाचा उत्तरोत्तर उत्कर्षच होईल. अशी आशा बाळगण्यास जागा असल्यामुळें ह्या बाबतींत नाटकांतील नायिकेच्या किंवा खासी झालेल्या गवई बुवांप्रमाणें (किंवा खानाप्रमाणें ह्मणाना) घोळून घोळून तेंच टेंच पुन्हां पुन्हां लिहून आपल्या पत्रांत फुकट मिळाली ह्मणून जागा अडविण्याची आमची इच्छा नाहीं.

परंतु जातां जातां हेंहि सांगितलें पाहिजे कीं, समाजानें आर्थिक परिस्थिति सुधारली तरी आमच्या बहुतेक मंडळीप्रमाणें हुरळून न जातां आपलें रंग बोधेच्छु हें नांव कायम राखावें. नाहीं तर काय विचारतां ? रंग बोधेच्छु ऐवजीं समाज रंगेच्छूच राहील तर आमच्या ह्या प्रांतापुरतें तरी नाट्यकलेचें थोबाड चांगलेंच रंगून निघेल.

मंडळी गुणी आहे, तिचा उत्कर्ष होवो अशी मनापासून इच्छा करून आणि, संपादक महाराज, वरील मजकूर प्रसिद्ध करण्यांत समाजाच्या म्यानेजरांइतकी तरी मुरवत बाळगा, अशी सूचना करून इथेंच थांबण्याची परवानगी घेतों.

वाचक हो ! "संशय कल्लोल" ऐवजीं माझ्या ह्या लेखन कल्लोलांत बुडूं नका बरें ! नाहीं तर तसबिरी ऐवजीं ह्या लेखणीचाच घोटाळा होऊन त्याचा उलगडा करण्यास कोणातरी मघा नायकिणीस पुढें येण्यास भाग पाडाल.

सु-वि-प्र.

—*—

आमच्या गरजा

(ले० विष्णू रामचंद्र शिरोडकर)

ज्या राष्ट्राची आर्थिक स्थिति सुधारलेली अगर सुधरत चाललेली असते. तें राष्ट्र जरी पारतंत्र्यांत खितपत पडलेलें असलें तरी झपाट्यानें स्वतंत्र होऊं लागतें असा ह्या आर्थिक युगांत राजकारण विशारद व अर्थशास्त्रवेत्ते यांनीं सिद्धांत काढला आहे. व ह्मणूनच ज्या राष्ट्राची आर्थिक स्थिति कनिष्ट दर्जाची असेल तें राष्ट्र जरी स्वातंत्र सुखाचा अनुभव घेत असलें तरी लवकरच परावलंबी बनून स्वातंत्र्य सुखास आचवतें. आर्थिक स्थिति सुधारल्याशिवाय या आर्थिक युगांत कोणत्याहि राष्ट्राचा टिकाव लागणार नाहीं. जेते लोक जीत लोकांचे जितके उद्योग धंदे ठार बुडतील तितके बुड्विण्यास एका पायावर तयार असतात. हल्लींचें उदाहरण घ्यावयाचें झालें तर फ्रान्स व जर्मनीं यांचें दिलें ह्मणजे पुरे ! न्हुर प्रातांत सध्या फ्रेंच लोक कसें धुमाकूळ घालीत आहेत हें पाहिलें ह्मणजे वरील उदाहरणाची सत्यता पटेल. स्वातंत्र्य सुखाची ज्या राष्ट्रास इच्छा आहे तें राष्ट्र अगोदर आपली आर्थिक स्थिति सुधारतां येण्यासारखी एकहि संधी बहुधा ते फुकट घालवित नाहीं.

इच्छा असली ह्मणजे मार्ग दिसतो. प्रयत्न केला ह्मणजे फळ प्राप्त होतें. इच्छेची पूर्ति होण्यास प्रयत्नाची जोड पाहिजे. जपानच्या मनांत स्वावलंबी बनून पुढें यावेसें वाटलें. त्यानें प्रयत्नास सुरवात केली. प्रयत्नाची जोड मिळाल्यानें त्याच्या मनांतील इच्छा अर्ध्या शतकाच्या आंतच पूर्ण झाल्या व जगांतील संपन्न व सामर्थ्यवान राष्ट्रांत त्याची गणना होऊं लागली.

जपानमध्यें यक्षिणीनें कांडी फिरविली नाहीं. जपानी लोकांनींच स्वतःच्या प्रयत्नानें ती फिरवून घेतली. आळसाचा त्याग केला व उद्योगाची कास धरली. लगेच त्यांना त्यांच्या उद्योगाचें फळ मिळालें.

नुसते निरर्थक प्रयत्न करण्यांत त्यांनी कालापव्यय केला नाहीं "अचूक प्रयत्न" करण्यांत त्यांनीं आपली बुद्धिमत्ता खर्च केली. मिळेल त्या संधीचा भरपूर उपयोग करून घेतला. महायुद्धाच्या काळांत त्यानीं कोट्यावधी रुपये आपल्या देशांत नेले. पाश्चात्य राष्ट्राच्या लढालढींत, या चिमकुल्या पौर्वात्य राष्ट्रानें आपलें व्यापारी जाळें मिळेल तेथें पसरण्यास सुरवात केली; व जगांतील संपन्न व सामर्थ्यवान राष्ट्रांत आपली गणना करविली.

दुसऱ्याचें "उत्तम तितुकें घ्यावें" या समर्थोक्तीप्रमाणें ते चालले. परकीयांचें केवळ अंधानुकरण करण्याची दुष्ट खोड त्यांनीं उचलली नाहीं. परकीयांच्या बाह्य पोषाखास व थाटामाटाला ते भूलले नाहींत. त्यानीं त्याच्यांत वसत असलेला दीर्घोद्योगीपणा ध्येयसिद्धीसाठीं श्रम सातत्य, चिकाटी, कामाविषयींची कळकळ, वेळेचें महत्व जाणणें इत्यादि गुण परकीयांपासून उचलले.

रकण्यास वाव न मिळाल्यामुळें अनेक दु र्व्यसनांस बळी पडावें लागत आहे.

आज कितीतरी अनाथ विधवा उदर निर्वाहाचें साधन नसल्यामुळें दुसऱ्यांच्या इथें अपरिचित मंडळींत स्वैंपाकास वगैरे रहाण्यासाठीं जात असतील. यांतील कितीतरी बायका त्यांच्या नवऱ्यांच्या हयातींत सुखानें दिवस काढणाऱ्या असतील. कितीतरी तरुण विधवा इष्टानिष्ट मार्ग न कळल्यामुळें कुमार्गाकडे वळत असतील ! कितीतरी विधवांना आपल्या पांढऱ्या कपाळास दोष देत कजाग सासू, नणंदा, भावजयांच्या इथें दिवस काढावे लागत असतील. कित्येकांची ना घर ना दार ना सासू ना दीर ना आई ना पुत्र अशी स्थिति झाली असेल.

थोडा विचार करून पाहिलें तर आज आपणास लोकहिताचें काम करण्यास काहीं नाहीं असें नाहीं. काम करायला लागलों तर पुरून उरण्याइतकें काम आमच्या पुढें पडलेलें आहे. एकाच कामांत सर्वांनीं लक्ष्य घातलें पाहिजे असें नाहीं. काम करणारांनींच पुढें सरलें पाहिजे. मग आपण काम करतांना लो० टिळक, म० गांधी, दे० दास, अगर प्रो. कर्वे, आपटे, पैसाफंड रानडे, काळे बना; पाहिजे असल्यास रॉय, बोस. दत्त व्हा. तुम्हांला किर्लोस्कर खबर या एका अंकांत म्हटल्याप्रमाणें "जरी शिवाजी सारखी तरवार गाजवतां आली नाहीं तरी हातीं घेतलेल्या कामांत शिवाजी सारखी कर्तबगारी दाखविणें शक्य आहे."

आज गोमांतकांत निःस्वार्थीपणानें काम केल्यास पैसा फंड, समर्थ विद्यालय, कर्वे अनाथ बालिकाश्रम, अनाथ विद्यार्थी गृह सारख्या संस्था लहान प्रमाणावर कां होईना चालवतां येतील. आपल्या दातृत्व शक्तीचा उपयोग जर अशा कामीं खर्च केला जाईल, तर देवाच्या देवळांत लक्षावधी दीपमाला पेटविल्याचें धार्मिकांना श्रेय मिळेल. उदार धनिक, चिकाटीचे कार्यकर्ते, शिक्षण प्रेमी जनता, निःस्वार्थी व राष्ट्रहितदक्ष पुढारी, यांच्या एकीनें गोमांतकाची उन्नति होण्यास उशीर लागणार नाहीं.

Anuncios

O Bharat, ano 9 °, n ° 12
12 de Jumho de 1924.

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivao do 2 ° oficio Barreto vai ser vendido em hasta publica. a porta do tribunal judicial situado em Xeldem ao lado da estrada Nacional que de Quepem se direje a estaçao de Sanvordem, no dia 27 do corrente mez a's 12 horas, e pelo preço superior ao da avaliaçao u seguinte predio. Direito a sexta parte do predio rustico denominado "Gauntona Velpanvaddo' ou Gauntona Aforamento," sito em Sigao, da cultura de arroz, coqueiros e outras arvores discritos na conservatoria predial desta comarca sob o n ° 9566 a fl. 196 v do L. B. 17 avaliado por 500 rupias. Penhorado nos autos civeis de execuçao por custas que o Ministerio Publico nesta comarca promove contra Baiu Naique por outro nome Baem conhecida tambem por Gopica, viuva de Bico' Nunom Naique de Sigao e outros, por apenso aos autos de inventario orfanologico a que se procedeu por obito do dito Bicu Nunom Naique. Sao por este citados todos os credores incertos dos ditos executados Baiu e outros e os co proprietarios e quinhoeiros nos termos e para os fins da lei. A contribuiçao de registo por inteiro ficara' a cargo do arramatante Para ser publico se expediu este.

Xeldem 5 de Junho de 1924.

O escrivao de Direito do 2 ° oficio
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do 1 ° oficio Redcar vai a' praça para venda em hasta publica a porta do tribunal judicial desta comarca situado em Xeldem na estrada nacional que de Quepem se dirije a estaçao de Sanvordem no.dia dezassete do corrente mez as dez horas pela segunda vez e por metade do seu valor uma oitava parte da varzea "Camargale" da cultura de arroz sito na aldeia Caregal da Cotigao avaliada por 100 rupias discrita na conservatoria desta comarca sob o n ° 2548 e penhorada nos autos de execuçao por custas que o Ministerio Publico nesta comarca move a Utoma Bicaro' Camotim de Poinguinim por apenso aos de querela que o dito Magistrado promoveu contra o referido Utoma para pagamento da quantia de 41.02-00 proveniente de custas e selos da segunda instancia e de custas e selos acrescidos da execuçao. O arrematante pagara' a contribuiçao de registo por inteiro e as despesas da praça alem do preço da mesma [illegible] Par este sao citados quaisquer credores e co-proprietarios incertos. O que para ser publico se expediu este.

Xeldem 4 de Junho de 1924.

स्वामी दयानंद हे गुजराथ मधील असून नागर ब्राह्मण कुळांत जन्माला आले. याचें मूळ नांव मुळशंकर असें होतें. याचे बाप कट्टे शिवोपासक होते, शिवरात्रीचें व्रत ते मोठ्या नेमानें करीत व आपल्या घराच्या मंडळीसहि तें नेमानें पाळण्यास लावीत. त्या व्रताच्या दिवशीं प्रत्येकानें अन्नपाणीसुद्धां न घेतां भजन पूजन करावें, असा सक्तीचा नियम होता. मुळशंकर जेव्हां चौदा वर्षांचा झाला तेव्हां त्याच्यावरहि ही पाळी आली. एका शिवरात्रीच्या दिवशीं वरील नियम पाळून रात्रौ पूजन वगैरे करीत असतां मध्यरात्र उलटून गेल्यावर सर्वांना निद्रेच्या डुलक्या येऊं लागल्या. मुळशंकरच्या वडीलांवर सुद्धां निद्रेनें आपला अंमल बजावला; मात्र मुळ शंकर तसाच जाग्रत बसला.

\+ \+ \+

थोड्याच वेळानें त्याला दिसून आलें कीं, एक उंदीर शिवाच्या पिंडीकेच्या डोक्यावर नाचत आहे व प्रसादाकरितां ठेवलेला नैवेद्य हि गट्ट करून टाकलेला आहे. हा प्रकार पाहून त्याला फार आश्चर्य वाटलें. आपला बाप ज्या देवापुढें नाक घांसून व हात जोडून आपणाला धन धान्य समृद्धि मागत होता त्या देवाला स्वतःच्या डोक्यावरील उंदीर घालवितां येत नाहीं. स्वतःचें संरक्षण ज्या देवाला करतां येत नाहीं तो देव आपल्या बापाच्या मागण्या कशा पुरवील. तेव्हां ही पिंडिका देव नाहीं अशी त्याची खात्री झाली.

× × ×

त्यानंतर त्यानें बापाला जाग्रत करून हा प्रकार निवेदन केला आणि विचारलें कीं, श्रुति स्मृतींत वर्णन केलेला परमेश्वर हाच काय ? जर हाच असेल तर याची अशी विटंबना कां व्हावी ? बापानें त्याला सांगितलें कीं, आपण जो मूर्तीपुढें नैवेद्य वगैरे ठेवतों तो या पिंडिकेच्या द्वारें ईश्वराला पोंचत असतो परं तु या उत्तरानें त्याचें समाधान न होतां उलट मूळची जिज्ञासा फारच बळावली. कांहीं काळानें त्याच्या बहिणीवर मृत्यूचा घाला पडला. या प्रकारानें तर त्याच्या मनांत विचारांची कालवाकालव सुरू झाली. मृत्यु ह्मणजे काय ? मृत्यूच्या पुढें काय आहे विगैरेची जिज्ञासा फारच वाढली. याच वेळीं त्याच्या बापानें त्याचें लग्न करण्याचें ठरविलें. वरून त्याला घरांत रहाणें बरें न वाटून त्यानें अज्ञात्मज्ञानाचा व ईश्वराचा शोध लावण्या करतां घरांतून पोबारा केला.

× × ×

घरादाराला रामराम ठोकून मुळशंकर सर्व हिंदुस्थानभर फिरला. ज्यांच्याकडून आपणाला ज्ञान मिळू शकेल असें त्याला दिसत होतें त्याच्यापाशीं त्यानें शिष्यत्व पत्करून ज्ञानाची याचना केली. सर्व तीर्थें पालथीं घातलीं, हिंदुस्थानभर प्रवास केला, हिमालयांत राहून योग विद्येचा अभ्यास केला. कंदमुळांच्या आहारावर राहून पाहिलें हजारों साधूंच्या मेळ्यांत राहून. पाहिलें, जेथें जेथें तत्वज्ञानाची चर्चा होई तेथें राहून पाहिलें. परं तु त्याला मनासारखा गुरू मिळाला नाहीं. यापुढें त्यानें सन्यास घेऊन दयानंद सरस्वती असें नांव धारण केलें.

* * *

त्यानंतर मात्र त्यांना योग्य असे गुरु मिळाले. त्याचें नांव स्वामी विरजानंद होय. स्वामी विरजानंदानीं हिंदुधर्माचा खोल अभ्यास केलेला होता. हिंदुधर्मावर जीं वेडगळ समजुतीचीं पुटें चढलेलीं आहेत, तीं पाहून स्वामीना फार खेद होई. यांतील अनेक वाईट चाली पाहून त्यांचा जीव चडफडे. मूर्तिपूजेवर तर त्यांचा फारच कटाक्ष होता. अशा मताचा गुरू स्वामी दयानंदाना मिळाला हें फार चांगलें झालें. याकडे अडीच वर्षें अभ्यास करून जें काहीं ज्ञान मिळण्याजोगें होतें ते मिळविलें. शेवटीं गुरूनीं आपल्या शिष्याला सागितलें कीं, आपल्या जवळ आणखी शिकविण्याचें कांहीं शिल्लक राहिलेलें नाहीं. तरी तूं जें काय शिकला आहेस त्याच्या योगें सत्य ज्ञानाचा प्रसार कर.

× + +

दयानंद गुरूंचा निरोप घेण्यास गेल्या वेळीं गुरूनीं त्याला सांगितलें कीं, अद्याप आपण गुरुदक्षिणा दिलेली नाहीं. हा प्रश्न ऐकून दयानंदाना आश्चर्य वाटलें. आपले गुरूजी लोभी आहेत कीं काय असा त्यांना संशय आला. गुरूनीं दयानंदाची मुद्रा पाहून त्याच्या मनांतील आशय जाणला व ते त्याला ह्मणाले " वत्सा भिण्याचें कांहीं कारण नाहीं. मला सुवर्ण दक्षिणेची मुळींच गरज नाहीं. आपल्या पासून एका वचनाची मात्र अपेक्षा करतों. तें हें कीं, " आज पासून सत्याचा प्रसार करण्याच्या कामीं आयुष्य खर्च करीन व पौराणिक कालीं शिरलेल्या असत्य कल्पना नाहींशा करून आर्य धर्माचें विशुद्ध स्वरूप जगाच्या दिग्दर्शनास आणीन, अशी प्रतिज्ञा हीच माझी गुरुदक्षिणा होय.

× × +

या नंतर स्वामीनीं आपलें आयुष्य उपदेश करण्यांत घालविलें. हजारों पंडितांशी तसेंच मिशनरींशीं वाद केला. एकदां तर बनारस मध्यें साडेतिनशें पंडितांकडे एकट्यानेंच वाद चालविला होता. त्याच्या उपदेशानें पुष्कळ जुन्या मताचे लोक चिडून जात. एकदा तर एका शैवमतानुयायानें चिडून जाऊन त्याचेवर भयंकर पाळीव नाग घातला व तो स्वामी दयानंदाना ह्मणाला "पहा आतां हा वासुकी देवच आमच्यांतील वादाचा निर्णय करील." नागानें स्वामीच्या पायाला विळखा घातला तोंच स्वामीनी पाय हासडून त्याचे पासून सुटका करून घेतली व त्याच्या डोक्यावर पाय ठेऊन त्याला गतप्राण केलें व तो त्या शैवमतानुयायाला ह्मणाला: हा पहा तुझा देव आतां यमसदनाला जात आहे अशा खोट्या देवानां असेंच मरावें लागतें.

\+ \+ ×

आर्यसमाज कट्टा एकेश्वरवादी आहे, ईश्वराचें अवतारत्व त्याला कबूल नाहीं. कांहीं महात्म्यांच्या आंगी ईश्वरी अंश ज्यास्त असतो परं तु ते ईश्वराचे अवतार आहेत असें आर्यसमाज मानीत नाहीं. ईश्वर व माणसें यांमध्यें तिसऱ्या मध्यस्थांनीं गरज नाहीं असें ते ह्मणतात. स्वामीच्यामतें प्रत्येक व्यक्तीला मग ती कोणत्यांहि जातीची असो, वेदाध्ययन करून त्या द्वारें ईश्वराची आराधना करण्याचा हक्क आहे. ईश्वराची प्रार्थना, उपासना, वगैरे आर्यसमाजाला मान्य आहेत. प्रार्थनेच्या योगें आंगांत नम्रपणा उत्पन्न होऊन मनाला आनंद व शांति प्रात होतात. मात्र प्रार्थना याचा अर्थ असा नाहीं कीं, मिळेल तें ईश्वराकडे मागायाचें.

× + ×

आर्यसमाजानें आपल्या पक्षांत येणाऱ्यां करतां दहा नियम केलेले आहेत ते मान्य केल्यानंतर समाजांत दाखल होतां येतें. त्यांतील दुसऱ्या नियमामध्यें ईश्वराचें स्वरूप खालील प्रमाणें वर्णन केलें आहे:—

परमेश्वर सच्चिदानंद स्वरूप, निराकार, सर्व शक्तिमान, न्यायी, दयाळू, अजन्मा, अनंत, निर्विकार, अनादि, अनुपम, सर्वाधारी सर्वेश्वर, सर्वव्यापक, सर्वांतर्यामी, अजर, अमर, अभय, नित्यपवित्र, सृष्टिकर्ता आहे. त्याचीच उपासना करणें योग्य आहे. या नियमावरून आर्यसमाज कोणत्या प्रकारचा ईश्वर मानतो हें कळून आलेंच असेल. बाकीच्या पंथांचा विचार पुढील लहरींमध्यें करूं.

के. भारती

हिंदुस्थानचें राजकारण

(ले० संजय)

मौ० महंमदअल्लीच्या अध्यक्षतेखालीं अहमदाबादेस आज (शुक्रवार ता. २७–६–२४) भरणारी ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची बैठक राष्ट्रीय सभेच्या संबंध इतिहासांत महत्वाची समजली जाईल यांत शंका नाहीं. ह्या बैठकीस म. गांधी, बारडोलीस दोन वर्षांपूर्वी भरलेल्या बैठकीनंतर, पहिल्यानदांच जातीनें हजर राहून त्या कमिटीचा पुढील कार्यक्रम व घटना ह्या संबंधीं अत्यंत महत्वाच्या काहीं सूचना पुढें मांडणार असल्यामुळें व विशेषतः ह्या सूचनास स्वराज्यपक्षीय सभासदांकडून जोराचा विरोध होणार असल्यामुळें ह्या प्रसंगास ऐतिहासिक स्वरूप येणें सहाजिक आहे. ह्या बैठकींत काय निष्पन्न होतें ह्या संबंधीं बरेंचसें कुतुहल वाटत असलें किंवा या निष्पत्ति संबंधी निश्चितपणाची व [कायद्याचे भाषेंत बोलावयाचें ह्मणजे] शपथेवर विधानें, असहकारी 'कट्टर' 'स्वराजिस्ट' व आमचे दोस्त व हितचिंतक अँग्लो इंडियन मतांचे प्रतिनिधी मुंबईच्या 'टाईम्स' पत्रासारखीं पत्रें करीत असले तरी सुद्धां ह्या ओळी प्रसिद्ध होण्यापूर्वींच ऑ. इ. काँ. कमेटीनें खल करून म. गांधीच्या ठरावासंबंधीं दिलेला निकाल प्रसिद्ध झाला असेल. ह्या एकाच कारणा करितां ह्या वादविवाद निष्पत्तिसंबंधी तर्क करणें निरुपयोगी ठरेल. तेव्हां म. गांधींच्या ठरावांच्या भवितव्यतेच्या वादाच्या भोवऱ्यांत गुरफटले न जातां आपणापुढें असलेल्या ह्या ठरावांचाच विचार करणें योग्य होईल.

म. गांधी मांडणार असलेले: (१) हातानें सूत काढणें हा हिंदी राष्टीय सभेनें

Ano 9 N. 17

Quinta-feira 17 de Julho de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
por cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक १७

गुरुवार ता. १७ जुलै सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष . अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें—गोवा.

ASILO DE MAPUCA'

FALA UM BARDEZANO

Acabei de lêr, sr. Director, o seu mui importante e ponderado editorial de 3 de Julho sobre as *Lotarias* e rialmente fiquei com o coração a sangrar de dôr, vendo o abuso de tanto dinheiro gasto em nome dos pobres.

Não quero ... nem desejo falar das *Lotarias* em geral, sòmente vou tratar da Lotaria do Asilo de Mapuçá e mais o seu célebre Hospital.

Poderá alguem imaginar que um filho de Bardêz vai protestar contra a Lotaria e mais o Hospital de que o meu Concelho carece — Não. Nunca isso podia ser, porque todos estamos convencidos de que Bardez precisa dum Hospital.

Mas é necessário ir paulatinamente, de vagar, sem nenhuns espaventos e luxo para não cairmos em erros e dali resultar um fiasco, ficando tudo reduzido a um sonho, a uma ilusão pura e candida.

Por ora, o que nos basta, é um modesto Hospital dumas cincoenta mil rupias, de modo que haja lugar suficiente para alojamento de doentes estrictamente pobres. Pode-se mesmo ir um pouco mais adiante e construir uns dois quartos bem postos e uma razoavel sala de operações e isto de maneira que caiba tudo dentro da verba subscrita.

Nunca, porêm, dar um salto, atingir o extremo do luxo...do espalhafato sem a previa garantia do necessário para manter a obra feita!

Não só basta construir o Hospital, a sua manutenção hade ser um trabalho muito custôso, demandando verba muito importante.

¡E se amanhã houver uma guerra ás Lotarias, onde iremos procurar o dinheiro?

Para ampliação bastá deixar o lugar suficiente e, por ora, ir lentamente, com muito sossêgo e arranjar as coisas com o dinheiro que temos, pois não vale apena fiar-se no que ha de vir, pois ainda o futuro é muito duvidoso e incerto!

O Hospital que Bardês vai ter, tal como se acha planeado, é um autentico luxo e até a sua realisação não sabemos que voltas o mundo ha de dar. O plano representa uma ousadia singular e já entra nos dominios da psiquiatria — permita-me a expressão. ¡Admiravel dirão todos! e achar-me-hão um pessimista e farão a pregunta natural: ¿Bardês não tem dinheiro? Tem, e demais, mas o que se vê é que, apesar disto, ainda não se apurou quantia suficiente para custear a construcção do Hospital que está orçada em 126 mil rupias, sem os célebres *orçamentos suplementares* que não podem faltar.

Dos subscritores apuraramse umas 80 mil rupias e o resto espera-se que venha das Lotarias.

Mas a Direcção, ou a alma dela, como por lá se diz, o sr. dr. F. Ribeiro pelos modos pouca experiencia tem do mecanismo destes e as suas faculdades de previsão são de fraco alcance, duma *cabeça de alfinete*, pois o *Bharat* diz bem: "De assentada, um plano de Lotaria de 250.000 rupias é, com licença, um salto que pode ser perigoso. E depois, quem assume a responsabilidade? O Presidente da Direcção que é um modesto funcionario ganhando 140 rupias ao mês e cheio de familia? O tesoureiro? Quem?" —E a pergunta que V. dirige é que nós os Bardezanos repetimos perante o peso da calamídade iminente! Dizemos calamidade, porquanto, se o recurso ás *Lotarias* falhar, como há receio de que falhe, dada a lamentavel pressa da Direcção, será muito dificil, quasi impossivel manter o crédito do Asilo, e uma instituição destas, desacreditada, é uma instituição morta!

Há mais e pior. Dizem que para cima de 50.000 cautelas continuam ainda sem ser destinadas, e das destinadas sò Deus sabe quantas virão voltadas! A previsão de tal *rajada de má sorte* que o *Bharat* faz estará proxima da rialdade?

Oxalá que tal não seja, mas se por nossa infelicidade o presagio se realisar, não será dificil apontar o responsavel. Francamente, a *alma* da Direcção apressou demais e os planos tomaram o arrojo que nos faz recordar a façanha mitológica do Icaro!

E, concluindo, aqui fazemos os nossos sinceros votos para que tudo se faça com prudencia e geito e que tudo acabe do milhor modo possivel. Pois, se a ambição dos absorventes da gloria é grande, maior ainda é o prestigio e orgulho do brioso Concelho, que cumpre aos **Bardezanos** de toda a forma salvar!!!

Bardes, Julho de 1924.

UM BARDEZANO

Ecos & Critica

A VELHA LERIA ...

Na sua ediçao de 3 do corrente, respondendo ao nosso 'suelto' "Beija mao" dizia o "Diario" em justificaçao da posse a que ultimamente a Direcçao obrigou os professores de instrucçao primaria, que a Direcçao tal havia feito "no interesse" dos proprios professores, porquanto os processos de aposentaçao dos mesmos tinham que ser instruidos com certidao da "cada posse de cada lugar". Agora o mesmo "Diario", na sua ediçao de 12 pretendendo desembrulhar-se da maeda em que se meteu confessa que houve professores que foram forçados a tomar posse do mesmo lugar por "duas vezes". Onde ficou entao aquela de "cada posse de cada lugar"? Nao ve o "Diario" que graças a' celebrina idea da Direcçao ja' temos professores com "duas posses de cada lugar"?

E o "Diario" a atirar-nos a' cara a velha e safada le'ria de "colheres de pau"!

NAO, DE CERTO

O "Diario" tambem cita, em defesa das celebradas posses, a portaria de colocaçoes dos professores ultimamente publicada na folha oficial. Mas o "Diario" bem deve saber que a intençao do *Bharat* foi, ao redigir o suelto de interpretar as determinantes desta portaria, inspirada pela Direcçao como todos sabem. Entao, que diabo o *Bharat* era um *bebe'* para admitir que a Direcçao tivesse convocado os professores para um "beija mao" assim "carrement" como quem convida a um "five o clock tea"? Nao, de certo

XENCORA R. S. NADKARNI

Consta-nos ter passado o 3° ano do Instituto Superior do Comercio de Lisboa o sr. Xencora Ramachondra Senai Nadkarni que acaba de obter as mais altas classificaçoes nas cadeiras de Operaçoes Comerciaes e de Regimes Aduaneiros. Nesta ultima cadeira o laureado estudante, a convite do distinto economista e Director do Instituto sr. Professor Francisco Antonio Correa, teve o ensejo de apresentar uma dissertaçao intitulada "Relaçoes economicas das Colonias Portuguesas com a Metropole e com o Extrangeiro", que brevemente sera' publicada em Revista do mesmo Instituto.

भल्याबुऱ्या हेतूनें कामों·
क्तिगत विचारांचें आणि
करून लुझियडसचें रत्न
. हें रत्न ह्मणजे,' देशा·
त्वाची आणि स्वातंत्र्याची
त्व तेवत ठेऊन सुखसमृद्धि
असें पोर्तुगीज रक्ताच्या
णवून घेणाऱ्या इसमास खु·
झकाला तर तें जलाल कालु·
ठें चारशें वर्षांचा इतिहास
ट दाखवून सांगतो. त्याकडे
ालण्यासारखें नाही.

देव आणि दैत्य या दोघांनीं
ा करून चवदा रत्नें बाहेर
दा रत्नाचे वांटणींत, शेषानें
चा भाग पदरांत घेण्यास
ोईना. त्यावेळीं, श्री शंकरानें
ा अंगिकार केला. हें पुराणां·
ाहे. त्या प्राशित विषाच्या दा
ाण्यास, शंकरानां रामाचा जप
ा पडलें. सांगण्याचें तात्पर्य
गोष्ट विषाचे बाबतींत शंक
तत्वतः आपणास यापुढें
्या बाबतींत केली पाहिजे.
ा कीं आह्मीं आमचा राम
इतर कामें केलीं पाहिजेत.
लोकानीं कामोंईसचा केलेला
ाहे याबद्दल आमचा मुळींच
च कां? त्यांचे ऐवजीं दुसरे
असते तरी पोर्तुगीजानीं
तेंच त्यानींहि केलें असतें
ाष्ट्रीय ग्रंथ या दृष्टीनें लुझियडची
ा आहे; ती नाकबूल करून
ीं. पण एकाचें राष्ट्रीयत्व तेंच
ा कांहीं कोठें नेम नाहीं. विशिष्ट
कांच्या राष्ट्रीय भावना उद्दीपित
न त्या देशांतील कवीनें आपल्या
खऱ्या खोट्या गोष्टींचा उल्लेख
ल त्याच गोष्टी दुसऱ्या एका दे-
हानीस कारणीभूत होऊं शकतील.
कीं, इतरांचे दोष चव्हाट्यावर
पला गौरव करून घेणाऱ्या व्यक्ति
ळापासून जगांत आहेत; आणि
ा लोकांतील एक मनुष्य अचूक
ास आणि त्यांतलेल्यांत आपल्या
ाचें प्रदर्शन जगापुढें मांडण्याची
ाला स्फूर्ति झाल्यास तो आपल्या
गुणाचा आरोप राष्ट्रावर करून
ची नालस्ती केल्या शिवाय रहाणार
र्कसिद्ध आहे. हीच गोष्ट कामोंईस-
यडसच्या बाबतींत घडली. आपल्या
ा मध्यबिंदूकडून कामोंईसनें नक-
यडसच्या रूपानें राष्ट्राचें ह्मणून ब-
लेंल आहे. त्याच्या या काव्याचा
दूंस दोन दृष्टींनीं विचार करण्याजो·
या काव्याच्या पठणानें हिंदूंच्या
नकळत कोणते परिणाम होणें श-
हें ध्यानांत ठेऊन त्याचा विचार
पहिला प्रकार, आणि तिऱ्हाइतांचे

दृष्टीनें नुसतें काव्य ह्मणून त्याचा विचार करणें हा दुसरा प्रकार. या दोन प्रकारांपैकीं सध्या आपणास पहिल्यावरच भिस्त ठेऊन चाललें पाहिजे. कारण कोणीहि झाला तरी तो राष्ट्रीयत्वाच्या दोरीनें कोणत्या तरी देशाला जखडून गेलेला असतो. हा निसर्गनिर्मित न्याय हिंदूंनाच तेवढा लागू पडत नाहीं असें नाहीं दुर्दैवानें कित्येक जण याचे उलट वस्तुस्थिति मानताद,पण त्याला निरुपाय आहे. हिंदुस्थान हें इंग्लिश लोकांकरितां आहे; इंग्लंडाशिवाय त्याला स्वतःचें अस्तित्वच मुळीं नाहीं, आणि झाल्यास इंग्लिशांचे हाताखालींच त्याला आपलें सर्वस्व साधतां येणार आहे अशा अर्थाचा एक लेख १२ तारखेच्या पणजीच्या Heraldo पत्रांत "India com os ingleses" या सदराखालीं प्रसिद्ध झाला आहे. गोमांतकासंबंधानेंहि कित्येकांचे विचार वरील सारखेच आहेत. पण ते उक्तीचे आहेत. आमचा ह्मणून एक आम्हाला देश आहे. राष्ट्रीयत्व आहे. सर्व कांहीं आहे. ह्मणून जितकें कांहीं आमच्या या राष्ट्रीयत्वाला, स्वतःला बंधनकारक होईल तितक्याचा ऊहापोह नुसत्या तिऱ्हाइतांचे नात्यानें केल्यास पुढेंहि तें तसेंच बंधनकारक राहील. हें बंधन तोडण्यास वर सांगितलेल्या पहिल्या प्रकारचेंच सहाय्य घेतलें पाहिजे. दुसरें असें कीं, कामोंईसनें एक राष्ट्रीय कवि ह्मणून लुझियडस लिहिलें. आपण त्याचा एक राष्ट्रीय हिंदी व्यक्ति ह्मणून समाचार घेतला पाहिजे. राष्ट्रीयत्व डोळ्यांपुढें ठेऊन लिहिलेल्या ग्रंथाचें अध्ययन राष्ट्रीयत्वाची कल्पना मनांत आणूनच व्हावयास पाहिजे. तें इतर दृष्टीनें करून चालणार नाहीं. अस्तु.

लुझियडस काव्यांत इतर कितीहि दोष असले तरी आमच्या मतें दोनच दोष ज्यास्त भयंकर स्वरुपाचे आहेत.नुसत्या हिंदूंचेंच नव्हे तर खुद्द कामोंईसच्या धर्मबंधूंचें देखील सदर काव्य वाचतानां कवीनें एकीकडे अज्ञानानें तर दुसरीकडे बुद्धिपुरस्सर, इतर राष्ट्रांवर व धर्मावर उडविलेले शिंतोडे पाहून कपाळ उठल्याशिवाय रहात नाहीं. इतर धर्मांची जागोजाग केलेली नालस्ती व कुत्सित शब्दांची त्यानां वहाल केलेली पुष्पांजलि, हा त्या काव्याचा पहिला असह्य दोष होय. त्याचा दुसरा दोष असा आहे कीं, इतर लोकांच्या रहाणींसंबंधीं पोषाखासंबंधीं चालीरीतीसंबंधीं, थोडक्यांत सांगायाचें झाल्यास, हिंदुस्थानच्या आर्य लोकांच्या संस्कृतीसंबंधीं देखील कामोंईसनें आपल्या काव्यांत काढलेले उद्गार सपशेल निराधार, खोटे आणि त्या त्या लोकांची बदनामी करणारे आहेत. याचा खरेपणा पहावयाचा असल्यास Lusiadas चा नववा खंड बरवर चाळल्यास पुरे. आपल्या या ग्रंथांत, एक ना दोन, पावलो पावलीं त्यानीं आह्मां हिंदूंना व आमच्या धर्माला उद्देशून काढलेलीं मुक्ताफळें, राष्ट्रीय हृदयाचा चुराडा करणारीं, स्वाभिमानाची राखरांगोळी करणारीं आहेत. अशा प्रकारचा ग्रंथ येथील दुय्यम शिक्षण संस्थांतून हिंदूंना शिकविला जात आहे. ज्यांची बुद्धि अद्याप स्वतंत्र झालेली नाहीं, ज्यानां राष्ट्रीयत्वाची अद्याप ह्मणण्यासारखी कल्पना नाहीं, ग्रंथांतील प्रतिकूल विचार झुगारून देऊन, आपल्या स्वतंत्र विचारशक्तीनें बरें तेंच शोधून काढण्याची त्यांची अजून तयारी नाहीं, अशा कोंवळ्या मनाच्या हिंदु विद्यार्थ्यापुढें चहरा वेडा वांकडा करून सोडणारा लुझियडचा मायावी आरसा सदोदीत धरला गेल्यास, त्याला पुढें आपण खरोखरीच कुरूप नाहीं ना, अशी शंकाच नव्हे तर तशी त्यांची भावना झाल्यास त्यांत त्या विद्यार्थ्यांचा काय दोष? वरील शिक्षण संस्थांतून लुझियडस शिकविलें जात आहे याचें मूळ कारण कोणतें असेल तर वरील हेतु साध्य व्हावा हेंच होय. दुसरें तिसरें कांहीं नाहीं ही गोष्ट जाणत्या विद्यार्थ्यांनीं नवख्या व अज्ञानी विद्यार्थ्यांस दाखवून दिली पाहिजे. जी गोष्ट कायद्याच्या बलावर अथवा शक्तीच्या जोरावर झाली नसती ती गोष्ट आतांपर्यंत लुझियडस सहज लीलेनें करीत होती. पण यापुढें त्याचा हा डाव उदयोन्मुख हिंदु विद्यार्थी साधूं देणार नाहींत, असें मानण्यास बरीच जागा आहे.

स्फुट विचार

यूरोपियन राष्ट्रसंघः—पुण्याच्या 'चित्रमय जगतच्या' शवच्या ह्मणजे जून महिन्याच्या अंकांत 'यूरोपियन राष्ट्रसंघ' या मथळ्याखालीं महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध लेखक महादेव राजाराम बोडस यांचा एक उत्कृष्ट लेख प्रसिद्ध झाला आहे. इतर लेखांप्रमाणें हाहि रा. बोडसांचा लेख नानाविध व उपयुक्त माहितीनें ओतप्रत भरलेला असून परदास्य शृंखलेंतून हिंदुस्थानची मुक्तता व्हावी, अशा उदात्त हेतूनें जे आपल्या हाडांची काडें करीत आहेत, त्यांना तो मननीय आहे. यूरोपियन राष्ट्रें परमुलूख गिळंकृत करण्यास परस्परांस कसकशी मदत पुरवीत असतात हें ऐतिहासिक पुराव्यानिशीं दाखवून, आशियाखंडांतील स्वातंत्र्योत्सुक व स्वातंत्र्यरत राष्ट्रांचा सदरप्रमाणेंच एक मजबूत संघ असणें किती आवश्यक आहे, हें बोडसानीं अत्यंत मार्मिक रीतीनें सिद्ध केलें आहे. महादेवरावांचा हा लेख आमच्या प्रांतबंधूंनीं मनन करावा ह्मणून आह्मीं त्याचा मुद्दाम उल्लेख केला असून, शिवाय सदर लेखांत जी एक ऐतिहासिक चुकी आह्मांस आढळून आली, तिचीहि सहज दुरुस्ति व्हावी, असाहि हेतु या उल्लेखाच्या बुडाशीं आहे. इंग्रज लोक पोर्तुगिजांना परमुलूख पचनार्थ वेळोवेळीं सहाय्याचा टेंकू कसा देत असतात, हें वाचकांना पटवून देण्यासाठीं बोडस लिहितात: "कांहीं वर्षांपूर्वी गोव्यांत झालेलें राण्याचें बंड इंग्रजी गोलिसांच्या मदतीनेंच मोडलें हें पुष्कळांना आठवत असेल.' अनेकदां गोव्यांत राण्याचीं बंडें झालीं असून, बंडाचा मोड किंवा बंडवाल्याशीं तडजोड गोवासरकारच्या मार्फतीनेंच झाली आहे. या कामीं त्याला इंग्रजसरकारची 'उघड' मदत घेणें केव्हांहि भाग पडलें नाहीं, अशीच साक्ष बंडांचा इतिहास देत आहे. नजर चुकीनें घडलेल्या ऐतिहासिक प्रमादाचें क्षालन महादेवराव सवड मिळतांच करतील, अशी आह्मास उमेद आहे.

गोरक्षणः— गेल्या दिवसांमागें पुणें येथें भरलेल्या महाराष्ट्र–हिंदुधर्म–परिषदेच्या चवथ्या अधिवेशनांत जे अनेक ठराव पास झाले त्यांत गोरक्षणविषयकहि एक ठराव पास झाला. 'प्रत्येक हिंदुधर्मीयानें धर्माची पूज्य देवता ह्मणून गाईचें संरक्षण करावें. शक्य तर प्रत्येकानें गाय बाळगावी. वधिकास गोविक्री करूं नये." अशा अर्थाचा तो ठराव असून गोमांतकस्थ हिंदु जनतेकडून तो सहज रीतीनें पाळला जाण्यासारखा आहे. गोमांतकांत गोमातेची हमरस्त्यांत व हरहमेश कशी विटंबना होत असते, याची ज्यानां जाणीव आहे त्यानीं कंबर कसून उपरोक्त ठरावाचें सामुदायिक पालन होण्याप्रीत्यर्थ अविश्रांत झटलें पाहिजे. नुसत्या 'बोलाच्या भातानें' गोरक्षणाचा प्रश्न सोडविण्याचा अट्टाहास धरणें ह्मणजे मुलांच्या कागदी होडींत आरूढ होऊन नदीपार होण्याची अशक्य आशा बाळगण्यासारखें हास्यास्पद होय, हें गोरक्षणाचे कागदीं घोडे नाचविणारांनीं ध्यानांत धरावें. शिवाय गोमांतकाची आर्थिक स्थिति इतकी बिकट नाहीं कीं सदर ठरावानुरूप आचरण करण्यास हिंदु जनतेचा जीव मेटाकुटीस येईल.

अर्थी दान महा पुण्यः—गोवा सरकारनें स्थापिलेल्या शेतकी पतपेढींचा मूर्त फायदा शेतकरी वर्गानें करून घ्यावा, असें सरकारला वाटत असेल तर त्यानें तद्विषयक पोर्तुगीजींत प्रसिद्ध झालेल्या नियमांचा मराठी भाषेंत प्रसार करणें अत्यावश्यक होय, यांत संशय नाहीं. गोमांतकांतील अर्ध्याधिक लोक संख्या हिंदु जनतेनें व्यापिली असल्यानें,उपरोक्त नियमच नव्हे तर मागें झालेले व पुढें होणारे एकंदर कायदे सुद्धां मराठी पेहरावांत लोकांसमोर आणणें सरकारचें कर्तव्य होय. पण हें कर्तव्य पार पाडण्यास सरकारला भाग पाडणें हिंदूंना क्रमप्राप्तच असलें तरी, जोंपर्यंत ज्यांच्यासाठीं उपरिनिर्दिष्ट कायदे तयार करण्यांत येतात, त्यांच्या गळीं मराठी उतरणें शक्य नाहीं किंवा ती उतरून घेण्यास त्यांना सवड नाहीं, तोंपर्यंत लोकसेवकानीं ठिकठिकाणीं हिंडून त्या कायद्याचे ज्ञान अज्ञजनतेला व्याख्यानद्वारा करून देण्याचे कामीं तनु झिजविणें, हाच 'अर्थीदान महापुण्याचा' मार्ग आहे, हें कोणीहि कबूल करील. आमचा शेतकरी वर्ग तर आपल्या कार्य बाहुल्याच्या दडपणानें इतका चेंगरला आहे कीं, स्वयंस्फुर्तीनें मराठीशीं हितगुज करण्यास त्याला पुरेसा वेळच मुळीं नाहीं. अशा स्थितींत व्याख्यानाचीच कल्पना झाल्यास उपयुक्त होईल, हें निर्विवाद होय.

—गेल्या एप्रिल महिन्यांत हिंदुस्थान सरकारच्या रेलवेचें उत्पन्न ८ कोटी ४ लक्षांचें होऊन खर्च ४ कोटी ९५ लक्ष रुपयांचा झाला.

वर्तमानसार

—हिंदुस्थानांत एकंदर बारा कोटी बायका असून, त्यांत तीन कोटी विधवा आहेत.

—पणजी शहराची नवीन रचना सुचविण्यासाठीं सरकारनें एक कमिटी नेमली आहे.

—मुंबईचा अडव्होकेट ऑफ इंडीयाचा छापखाना एक लक्ष पंचवीस हजार रुपयांस विकला गेला.

—इंग्रजी कार्डे, तिकिटें, करन्सी नोटा व स्टॅम्प्स यांची छपाई या पुढें इंग्लंडमध्यें न होतां ती नाशिक येथें होणार आहे.

—आपणास भेटणाऱ्या हिंदु लोकानीं 'कार्ल्स चेपें' घालूनच भेटीस आलें पाहिजे, असें हिंदुस्थानच्या व्हाइसराय साहेबानी फर्माविलें आहे!

—गोपाळ श्रीधर बोरकर हे वकिलीच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाल्याबद्दल आह्मीं त्यांचें अभिनंदन करितों.

—काणकोण मुनिसिपालटीनें माडांची दारू तयार करणाऱ्या भंडारी लोकांवर आठ आणे कर बसविला असून या कराच्या उत्पन्नाचा विनियोग पगार वाढींत होणार आहे.

—ब्राझील येथें उद्भवलेल्या बंडाचा उपशम झाला.

—पोर्तुगीज कविसम्राट लुईज द कामोंईस यांच्या निधनाच्या चतुर्थ शतसांवत्सरिक उत्सवास पोर्तुगाल येथें गेल्या महिन्याच्या ३ तारखेला सुरवात होऊन त्याच महिन्याच्या १० तारखेला त्याची समाप्ति झाली. पुष्कळ व्याख्यानें 'झोडपण्यांत' आलीं.

—मकावच्या कोंबाति नामक पत्रानें येथील पोलीसखात्याकडून अमलांत येत असलेल्या देहदंडन शिक्षेविरुद्ध खरमरीत टीका केली असून, सदर पद्धतीचा शेवट होणें जरूर आहे, अशी आपली इच्छा प्रदर्शित केली आहे.

—आग्रा येथें एक विश्वविद्यालय स्थापन करण्यांत येणार आहे.

—'फासिज्मो' विरुद्ध इटलींत निकराचें युद्ध सुरू आहे.

—ब्रिटिश सरकारनें गोवा सरकारकडे परराष्ट्रीय व्यापार विषयक माहिती मागितली आहे. कारण प्रसिद्ध झालें नाहीं.

—पणजीच्या प्राथमिक शाळांच्या मुलानीं गव्हरनरपाशीं सदर शाळांसाठीं नवीन, विस्तृत व हवाशीर इमारतीची मागणी केली आहे.

—इंग्लिश सरकारनें तिघां जर्मन मिशिनरींना मलबारांत 'धर्मकार्य' करण्यास परवानगी दिली आहे!

—क्षयरोग प्रतिबंधक लस शोधून काढण्यांत आली आहे.

—मोरोक्को येथें स्पेनिश सैन्याची तारांबळ उठली असून स्पेनमधून त्यांच्या सहाय्यार्थ नव्या नव्या तुकड्या रवाना होत आहेत.

—पोर्तुगाल येथें असलेल्या वसाहतींतील सरकारी कामदारांचा पगार चुकता करण्यासाठीं वसाहतींच्या प्रधानानीं त्या त्या वसाहतींच्या गव्हरनरांना पैसे पाठविण्याचा ससेमिरा लावला आहे.

—गोमांतकांत वास्तव्य करणाऱ्या मोसांबिकच्या बैठे नोकरांच्या पगाराची फेड करण्यासाठीं पांच हजार गिनी त्या वसाहतसरकारनें पाठविल्या आहेत.

—पटकीसारख्या रोगानें या बाजूकडील गुरांचा संहार चालविला आहे.

मतें तो बहुतेक अनच होय. हिंदुस्थानांतील लोकांतून, स्वधर्म आणि स्वसंस्कृति, मनापासून पालन करणाऱ्या हिंदूंचें प्रमाण अजमासें शेंकडा काय भरेल ? असें कोणी विचारल्यास खालीं मान घालून गप्प राहण्याची पाळी. पाश्चिमात्य शिक्षणाचा व संस्कृतीचा आमच्या लोकांना विटाळ झाल्या दिवसापासून आत्मस्वरूपाची जाणीव नष्ट होत जाऊन आतां त्या नष्टत्वाचा कळसच होऊं पहात आहे ! कारण आपल्या हिंदूंना जणूं काय आपलेपणाचा कंटाळा येऊं लागला. परकीयांच्या लाथा बसल्या तरी त्याचें कांहीं वाटत नाहीं. पण आपल्यां तील कोणी नम्र–सदुद्देश केल्यासहि त्यांना तो अपमान कारक दिसून मारामारीपर्यंत प्रसंग येतात !

'सर्वेषु गात्रेषु शिर प्रधानम्' परानुकरणांत्व स्वाभिमानहीनपणाला मस्तकापासून प्रारंभ. पाश्चिमात्य धर्तीच्या शिक्षेंत तयार झालेले लोक साहेबी थाटानें मिरवणें हीच त्या शिक्षणाची सिद्धि समजतात. इंग्रेजींत किंवा पोर्तुगिजींत सरासरी अडखळत अडखळत बोलणाऱ्या सामान्य विद्यार्थ्यापासून बड्या वाङ्मयविशारदापर्यंत कम जास्त मानानें एक नमूना ! डोक्यापासून पायांपर्यंत कांहींना कांहीं साहेबी अनुकरण दिसेलच दिसेल. चेरें, कॉलर ऊर्फ गळफांस, पाटलोन, बूट हा पोषाख खर्चे व–आरोग्य यांच्या दृष्टीनें पोषक मुळींच नसतां आधुनिक लोक तो मोठ्या भक्तिपूर्वक मनानें धारण करितात ! मिशा (आईबाप असतांहि) तासून ओंठावर निळा आणणें, शेंडी काढणें, तोंडावर सफेत पावडरचें रोगण. यांत फायदा तर कांहींच नाहीं, मात्र नैसर्गिक मुख शोभा नाहींशी होते. आपल्या आंबट शोकानां बळी पडण्याची प्रवृत्ति आमच्या समाजाला अधिकाधिक होत चालली, हा कशाचा परिणाम ? स्वधर्म प्रियता व संस्कृत्यभिमान व्हावा तसा –नव्हे मुळींच– जागृत झाला नाहीं. असें ह्मणणें भाग आहे.

लष्करी हिंदुकामगार अगर सरकारी अन्य खात्यांतील हिंदु अधिकारी यासाठीं केवळ आपद्धर्म ह्मणून पोषाखी बाब–ती ह निरुपायास्तव–क्षम्य मानतां येईल. परंतु राष्ट्रीय अगर खाजगी स्वरूपाच्या कोणत्याहि कार्यांत तिला बहिष्कार घातला पाहिजे. चेहऱ्याची तर बाजू सदासर्वदा सारखी. तो कुरूप करण्याची जरूरी नाहीं. अशा बहकलेल्यानां 'सुधारक' ह्या निंदाव्यंजक नावानें संबोधिलें जातें, याचा त्यानीं विचार करावा

नवीन प्रभुत्व संपादन करण्याला किंवा दगलबाजपणें परक्यानीं हिरावलेलें परत मिळवण्याला आपलें मूळचें सोंग बिटवून घेण्याचें मुळींच कारण नाहीं. हें इतिहासाव रूनहि समजतें. पूर्वीं झालेल्या व सध्या असलेल्या सत्ताधीशांनीं या देशांत सत्ता गाजविली पण–ती स्वत्व गमावून नव्हे–मूळचा बाणा सोडणाऱ्या स्वजातीयांस ते लोक बहिष्कृत मानितात. असें असून आमच्या हिंदूंतच तेवढी नादान् स्थिति कां ? पाण्या सारखी जणूं काय आमची अवस्था ! पाण्यांत जो रंग घालावा त्या रंगाचें पाणी बनतें ! पण सत्य स्वाभिमानी मात्र अद्याप आह्मी बनत नाहीं, ही खेदाची गोष्ट होय.

हे लोक शेंड्या कां काढतात ? ह्यापुढें, यज्ञोपवीताधिकारी यांनीं – यज्ञोपवीत तोडणें अगर कंबरेला गुंडाळणें हा विषय गौण ठरतो. कारण तेहि शिखानष्ट – दीक्षित बनत असतात ! शिखा–सूत्र हें आर्यधर्माचें मुख्य लक्षण होय. मिशा तासणें, ठेवल्यास उंदरानीं कुरतडल्याप्रमाणें (फ्रेंच कट, ढेंकूण फॅशनच्या) ठेवणें इत्यादि आंबट शोकांचा पगडा समाज आपणावर बसूं देतो, ही शरमेची गोष्ट होय. सभेंत कार्य करणारे धुरंधर मुद्दाम युरोपियनांचीं सोंगें करून सभेला येतात, याचें कारण काय ?

ध्येय प्राप्तीला आणि या युरोपियनीं ढोलक्याच्या तालावर हिंदूंनीं आरंभिलेल्या नृत्याला काय संबंध आहे; त्याच प्रमाणें म० गांधी प्रभृतींच्या कोणत्या तात्विक विचारांचा त्यांत साचार परिपोष केला जात आहे, या बद्दल शहाण्या माणसानीं अगत्य विचार करून आंबट शोकी फ्यॅशन बहाद्दरांची कान उघाडणी करण्यास मुळींच चुकूं नये. पाश्चिमात्य वर्तीच्या हिंदूंची, नामदारी आमदारीची भीड धरावयास नको.

आतां पर्यंतचें वर्णन बहकलेल्या समाज स्थितीचें –तेंहि त्रोटकसेंच–केलें. आणखीहि तें पुष्कळ प्रकारानीं व पुष्कळ बाबतींत करतां येण्यासारखें आहे. परंतु विषय अपरिमित वाढतो ह्मणून शक्य तितकें आटोपशीर केलें. तरी परोपकारीपणाविषयीं थोडक्यांत लिहितों. लोकांचीं अंतःकरणें या दृष्टीनें तरी जागृत आहेत असें ह्मणावें तर आतांचा काळ पराकाष्टेच्या नास्तिकपणाचा. दारांत दोन प्रहरीं आलेल्या भिकाऱ्याला मूठभर दाणे, मोकळ्या मनानें कोणी घालीत असतील किंवा काय याची भ्रांति. कोणी उष्ट्या हातानें कावळा हांकीत नाहीं, कीं कोणी कुणाच्या कातरलेल्या आंगठ्यावर ** सुद्धां करीत नाहींत. एकूण सद्धर्म बुद्धीनें दुसऱ्याचे उपयोगीं पडणारी निःस्वार्थी जनता उत्तरोत्तर कमी निपजत आहे. प्रचलित शिक्षणांत तशी कांहीं जादू असावी किंवा सामाजिक, धार्मिक, स्वदेशी चळवळीचा परिणाम योग्य प्रमाणांत लोकांच्या मनावर होत नसावा, यादोहोंतून कोणतें विधान खरें ई वाचकानींच ठरविलेलें बरें.

देशांतील लोकांत, परस्पर सत्यप्रेम, सत्य सहानुभूति, स्वाभिमान व निष्कपट बुद्धि नांदण्यावर सगळी मदार आहे. आमच्या हातून कार्य किती झालें व आमची कार्यक्षमता कोणत्या स्वरूपांत आहे, याची पुढील लेखांत चिकित्सा केली जाईल. शुद्ध चित्तानें लेख वाचून हंसक्षिर न्यायानें त्यांतील तात्पर्य घ्यावें व प्रसंगोपात खऱ्या सुधारणा दृष्टीनें त्याची अमल बजावणी करावी अशी वाचकांस नम्र विनंति करून तूर्त रजा घेतों.

गणेश रामचंद्र बोडस

Anuncios

O Bharat, ano 9 °, n ° 17
17 de Julho de 1924.

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivao do 1 ° oficio Redcar, a instancia do autor, Usso' Govinda Porobo Dessay de Rivona, correm e'ditos de 60 dias a contar do dia da segunda publicagao deste citando o reu Subraia Gan de Zambaulim de Rivona e ora ausente em Bombaim em parte incerta para acgao do processo ordinario e seus termos da petigao ja' autuada neste juizo e instaurada pelo dito Usso, contra o referido citando Subraia e outros, e na qual o mesmo autor alega que por escritura publica de 24 de Margo de 1916 os reus Mogu' Bailadeira Xeuntem Bailadeira, Gojanona Gan, Subraia Gan e Gocul Cuxem Bailadeira de Zambaulim de Rivona, e bem assim Gonoxama Gan que foi da dita prometeram vender a Govinda Pundolica Hegdo' Dessay de Cusmane a metade do lado sul do dominio util do seu predio Benamola por outro nome Cuntiemola sito em Rivona, e discrito na conservatoria desta comarca sob o n ° 1245. Que essa promessa da venda foi feita pelo prego de trezentas rupias que foram recebidas do dito Hegdo' Dessay, pelos reus e o referido Gonoxama obrigando-se estes a dar verificada a venda dentro dum ano a contar da data escritura sob pena de pagarem ao referido Hegdo' Dessay a quantia de duas mil rupias. Que os reus e o dito Gonoxama apesar de varias vezes pedidos pelo dito Hegdo' Dessay nao realizaram a venda prometida, deixando assim expirar o praso de um ano convencionado para realisagao da venda ajustada. Que desta maneira os reus e o dito Gonoxama ficaram incursos na responsabilidade de pagarem a pena estipulada de 2.000 rupias ao mencionado Hegdo' Dessay Que por escritura publica de 17 de Maio de 1917 o mesmo Hegdo' Dessay cedeu ao autor todos os seus direitos emergentes da citada escriptura de 24 de Margo de 1916 para haver dos reus e do dito Gonoxama a referida pena de 2 mil rupias. Que conclue por pedir no artigo oitavo da petigao inicial que julgada procedente provada a mesma aecgao devem ser condenados os reus a pagarem ao autor a referida importancia de 2 mil rupias da pena estipulada e nas custas e selos do processo e procuradoria Esta citagao findo praso de editos ha-de ser acusada na segunda audiencia deste juizo onde sera' assinado o praso da lei para contestar querendo a mesma acgao. As audiencias deste juizo se fazem em todas as tergas e sextas feiras a's 12 horas no tribunal judicial desta comarca situado em Xeldem ao lado de estrada nacional que de Quepem se dirige a estagao de Sanvordem se nao forem feriados, porque neste caso terao lugar nos dias imediatos se tambem nao o forem e nao estiverem compreendidos nas ferias. *O* que para ser publico se expediu este. Xeldem 13 de Novembro de 1923.

O escrivao de direito do 1 ° oficio
Babu' V. Camotim Redcar

Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de Direito da comarca de Quepem e cartorio do 2 oficio que este assina, correm editos de 30 dias, contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2 ° do art. 197 do Cod. do Proc. Civ. citando todos e quaisquer herdeiros de Baem Durbatcarina, de Calem, ora falecida, para na segunda audiencia posterior ao praso de editos, deduzirem querendo a sua habilitagao, nos termos e para os fins do § 1 ° do art. 691 do citado Codigo, visto que existem no referido cartorio algumas joias apreendidas no processo crime de corpo de delicto instaurado a' queixa digo queixa da dita Baem, pelo Digno Agente do Ministerio Publico nesta comarca, contra Xencora Vamona Patel da dita estando este arquivado. Declara se que as audiencias deste se fazem em todas as tergas e sextas-feiras as dez horas, no tribunal deste juizo situado em Xeldem, ao lado de estrada Nacional que de Quepem se dirige a Curchorem nao sendo feriados porque neste caso tem lugar nos dias imediatos quando os nao sejam tambem ou nao estejam compreendidos nas ferias Para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de Quepem, oito de Junho de 1924.

O Escrivao de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei. O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Ano 9 N. 18

Quinta-feira … Julho de 1924

Por … RA … es rupias

por cada li … ;IOS … ue repetida uma tanga … lso uma tanga

… OR E EDITOR
Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक १८

गुरुवार ता. २४ जुलै सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें—गोवा.

BRAVO, ACADEMICOS

E' desnenessário dizer que nos encheu de maior satisfação e natural orgulho o patriótico artigo com que *Um Grupo de Academicos* honrou a penultima edição do *Bharat*, provando, sem rebuços nem subterfugios, que vontades decididas e energias imaculadas secundam entusiastica e calorosamente o nobre ideal de independencia que o nosso jornal professa.

Os briosos academicos lavaram para sempre pela sua digna atitude o labeu que denegria o prestigio da India, porquanto o seu Pôvo era taxado de *pusilanime* e *falho de patriotismo*, tomada esta palavra no seu rigoroso sinificado.

O futuro da India, como em toda a parte, depende de sua classe academica, e desejando esta que no futuro a India seja do indios, como sempre foi antes da dominação extrangeira, não pode deixar de traduzir-se em facto positivo e palpavel o alevantado desejo dos nossos estudantes que—vá o lugar comum — representam a única esperança de quantos ancêam pela verdadeira prosperidade desta terra, prosperidade que é inadmissivel sem uma índependencia perfeita nem uma liberdade completa.

Bravo, academicos! Pela vossa atitude que é cúmulo de coragem e nobresa, marcastes uma nova era na politica indiana imprimindo-lhe feição á altura dos tempos que estamos atravessando e declarando ao mesmo tempo g u e r r a sem treguas á sujeição inadmissivel e eterna dos *factos consumados*.

Academicos! Honrastes o vosso nome, dignificastes e glorificastes a India, nobilitando-lhe as tradições do passado sem mácula, passado que a História regista com letras de oiro.

Está, pois, traçado o supremo ideal politico da India que é a independencia; é sabido, tambem, o meio de se conseguir êste fim, meio que é despido, por completo, de idêas que nem de longe, traduzem a mais ligeira violencia.

Já não constituem, portanto nenhum segredo politico tanto o nosso desiderato como o meio de o atingir, para que os nossos adversarios façam juizos temerarios sobre a nossa orientação politica e nos malsinem as intenções.

Envidarmos os nossos milhores esforços, desenvolvermos a nossa milhor energia e actividade e sacrificarmo-nos os cómodos em pról duma India nova, duma India independente e livre, numa palavra, duma India feliz — eis o que o nosso patriotismo nos exige.

Avante, academicos?

PROMETE POUCO ...

Mais um trambulhao na politica em Portugal. E mais um ministerio em terra e mais um ministerio la' em cima, no cocuruto.

Cremos que, desta feita, o sr. Rodrigues Gaspar foi quem se arrojou a triste responsabilidade de formar ministerio. O elenco, com que s. exia. vai continuar a *fita*, e' fraco, pouco sensacional, sendo muito de esperar que o espectaculo, em vez de atrair os aplausos da assistencia, so' provoque uma forte *pateada*. E ai nao tarda no cartaz uma nova companhia com um novo repertorio—para em fim' sumir-se tambem entre apupos!

O rumo que leva tudo isso?! Qual quer dia ficara' Portugal sem governo por falta de quem queira dar-se a massada de governar? Pela maneira como'as coisas vao, a *fita* prom te pouco.

Ecos & Critica

E' PEDIR, POIS

O decreto de equiparaçao que produziu um descalabro irremediavel nas finanças desta colonia,—foi e e' ainda condenado por toda a imprensa do pais. So'mente a "A Provincia", orgao da burocracia, tem-se esfalfado em provar a legitimidade daquele "mostrengo", alegando que a equiparaçao era indispensavel, nao so' ai onde a moeda corrente e' o depreciado escudo, mas tambem nas coloniss do Oriente, onde a moeda local mantem hoje a mesma cotaçao que antes da Guerra.

Uma vez ate' lembrou a' "A Provincia" apresentar, em justificaçao do decreto, o argumento de que a vida na India era tanto ou mais cara do que na Metropole, onde a moeda e' em escudos.

Pois bem; agora, para ser coerente, convinha que a "A Provincia" pedisse a duplicaçao dos ordenados dos funcionarios da India, principalmente aos graudos, uma vez que o cambio sobre Lisboa, que ao tempo do decreto era de 5 Esc. e tanto ... esta' agora em quase dobro-10 Esc. e tanto! E' natural, e' de coerencia que "A Provincia" formule o pedido E quem nos diz que nao sera' atendido! E' pedir, pois.

NICHOS E NADA MAIS

Le se na "Tribuna" que a Administraçao das Confrarias de Bardez organisou o orçamento das suas receitas e despezas por anos economicos, o que e' uma inovaçao em Bardez e porventura neste Estado, relativamente a's Administraçoes das Confrarias.

La' e' alguma coisa o que o sr. Administrador das Confrarias fez. Mas o pa's tem direito a esperar e exigir do sr. dr. Valério Sousa, como jornalista ponderado e criterioso que e', mais um serviço, e este de grande alcance, qual o de propor ao Governo a extincçao das administraçoes das Confrarias,—repartiçoes estas despendiosas e dispensaveis fazendo reverter as suas funcçoes para a Administraçao das Comunidades, a' simile do que se ve nas Novas Conquistas.

As Administraçoes das Confrarias, para no's, so' tem uma serventia: constituem magnificos nichos para os Governadores recompensarem com elas os serviços politicos dos seus apaniguados e ... nada mais! E este e' um grande mal para um paiz que disfructa uma Autonomia Administrativa. Ha de concordar o sr. dr. Sousa.

NEM UM PENEDO!

O *Sind National College*, um dos mais considerados institutos, de ensino superior em Hidrabad (notem bem) publica um anuncio no "Indian Daily Mail" convidando os pretendentes para o lugar vago de Reitor do mesmo *College*. O candidato deve ser M. A. com *Honours* na Historia ou Inglez. E' exigida grande experiencia do magisterio superior. O ordenado e' de 400 rupias mensais com aumento ate' 500 rupias depois de completar determinados anos de serviço.

Hidrabad e' um Estado independente da India. Com milhoes de habitantes, tem *crores* de receita; tem industrias; tem comercio. E' progressivo e rico e paga ao director do seu instituto de instrucçao *superior* 400 rupias!

No's aqui que nem temos *condiçoes economicas que justificam a independencia* segundo o insuspeito sr. Pereira Batalha, pagamos ao Reitor do nosso Liceu 700 e tantos rupias. E o sr. Batalha que sabe da nossa miseria economica...esta' mudo e quedo que...nem um penedo!

O RICO TRABALHINHO

A proposito das tais certidoes de *cada posse de cada lugar*, escreve-nos um distincto professor de instrucçao primaria o seguinte:

"Tomada a posse de cada lugar e' esta publicada no Boletim Oficial para os fins legais, e, a seguir langada no livro de assentamento dos professores. Em vista da fe' de oficio, passada pela Direcçao, faz-se a liquidaçao do tempo de serviço no Boletim Oficial, cujo numero bem como a fe' de oficio vao juntos ao processo. Sendo assim nao percebo o motivo de exigencia da certidao da posse de *cada lugar*, posse que, alia's, consta da propria fe' de oficio que e' a bem dizer a biografia da vida funcional do professor".

Pois agora o *Bharat* vai esclarece-lo, caro professor. Esta colonia em peso foi contra a criaçao, *assim desarticulada'* da Direcçao dos Serviços de Instrucçao Eram precisos e urgentemente dois sub-inspectores; mas o Director com as suas atribuiçoes e ordenado faustosos — dispensava se-

दींच होत नाहीं असें नाहीं. वर्षांतून एकदा स्फूट लेख लिहिला जात असेल ! परंतु जनतेचें लक्ष तेवढ्यानें त्या विषयाकडे थोडेच वेधणार ! या करितां त्या विषयाला सर्वस्वी वाहिलेलें एकादें तरी स्वतंत्र पत्र पाहिजे तरी पण गाडा अडतोच ! एका चाकावर तो थोडाच चालणार ! त्याला दुसरें चाक पाहिजे. ह्मणजे लोकांच्या मनांत त्या विषयाची आवड पाहिजे. आवड तरी आपोआप कशी उत्पन्न होणार ! चांगल्या विषयाकडे लक्ष वेधणें ह्मणजे पूर्व पुण्याईच लागते. तीहि आमच्यांत दिसत नाही. पुण्याई असती तर आह्मी दुसऱ्याचे गुलाम कां झालों असतों ! गुलामांतहि कच्चा व पक्का हा भेद आहेच. आह्मीं अद्यापि कच्चे आहोंत ह्मणजे आमचा धर्माभिमान अद्याप नष्ट झालेला नाहीं ह्मणून हीच वेळ आहे. ह्याच वेळीं आह्मीं कांहीं तरी प्रयत्न केले पाहिजेत. ह्याच वेळीं आह्मीं आपल्या समाजास जाणीव देऊन त्यास आवड उत्पन्न केली पाहिजे. ह्मणजे पुढारी लोकांनी व्याख्यान द्वारा वगैरे त्या विषयाचें महत्व जनतेला पटवून दिलें पाहिजे. एकदां महत्व समजलें ह्मणजे कार्याला उशीर लागत नाहीं. कृति घडल्यावर फळ मिळालेंच पाहिजे, असा सिद्धांत आहे. तरी पण प्रत्येक चांगल्या कार्याला अडथळे हे यावयाचेच. अडथळ्यांना झुगारून काम करण्यास शक्ति व तडफ लागते. ती तडफ आमच्या जुन्या पिढींत नाहीं. ह्मणूनच आतांचे पुढारी ह्मणविणारे लोक स्वस्थ आहेत. कायदे कौन्सिलांत आमचे प्रतिनिधी आहेत त्यानीं या बाबतींत कितीसे प्रयत्न केले ? पण त्यांना तरी दोष कां द्यावा ! कारण पक्क्या लोकांचें तेथें बहुमत आहे. ह्मणजे त्यांची संख्या ज्यास्त आहे. या करितां आपण आपल्या खिस्ती बांधवांतहि आर्थिक दृष्टीनें चळवळ सुरू केली पाहिजे. 'प्रयत्ने वाळूचे कण रगडितां तेलहि गळे' असें वचन आहे. त्याप्रमाणें आह्मीं प्रयत्न केला पाहिजे. आर्थिक दृष्टीनें गोमातेचें महत्व आह्मीं त्यानां समजाऊन दिलें पाहिजे. इतक्यानेंहि ते उमजले नाहींत तर नवीन तीक्ष्ण धारेचें सत्याग्रह हें शस्त्र आपल्या हातांत आहेच. पण तशी वेळ यावयाचीच नाही. आलीच तर ती फार उशिरां.त्या गोष्टीचा विचार आतांच कशाला? संकटाच्या वेळं उपाय सुचतोच, मात्र शांति पाहिजे. वरील विवेचनावरून मी गोरक्षण संस्थेच्या विरुद्ध आहे कीं काय ? अशी शंका येईल. मी तिच्याविरुद्ध मुळींच नाहीं हें मथळ्यावरून समजेलच. माझें ह्मणणें एवढेंच कीं, बोट दाखविण्यापुरती एखादी संस्था असली तरी तेवढ्यानें कार्यभाग होत नाहीं. गोरक्षण गुरांची निपज वाढविण्याकरितां अवश्य पाहिजे. पण नुसत्या गोरक्षणानें गोवध थांबणार नाहीं. हल्लींच्या परिस्थितींत गोवध बंद करावयाचा ह्मणजे त्यावर सरकारचेंच नियंत्रण पाहिजे. तें तर बोलून चालून विजातीय ! आतां वर सांगितलेल्या उपायानें खिस्ती बांधवांच्या सहकारितेनें मुळींच नसली तरी कांहीं तरी मर्यादा घालतां येईल. कल्पना करूं कीं, बाजारांत आलेली प्रत्येक गाय द्रव्यबलावर संस्थेनें खरीद केली पण हा क्रम किती दिवस चालणार ? शिवाय कसायांनां लागणारीं गुरें ते बाहेरून आणणारच ! कदाचित तींहि बंद करतां येतील. परंतु तीं नुसत्या गोरक्षण संस्थेच्या अस्तित्वानें नव्हेत.त्याला वर सांगितलेले उपायच अमलांत आणले पाहिजेत. ते अमलांत आणण्याचें काम तरुण पिढीचें आहे. परंतु तें एकट्याच्यानें होणारें नव्हे. त्याना संघच निर्माण केला पाहिजे. व संघामार्फत वर्तमानपत्रद्वारा, वाङ्मयद्वारा व व्याख्यान द्वारा वगैरे प्रयत्न झाले पाहिजेत. ह्मणूनच मी ह्मणतों कीं,गोरक्षण संस्थेबरोबरच गोरक्षण ज्ञानप्रसारक संघाचीहि गोमांतकास आवश्यकता आहे. इकडे आमचे संस्थेचे चालक व उत्साही तरुण लक्ष देतील काय ?

मी ठाणे येतील गोरक्षण ज्ञानप्रसारक संघातर्फेंच कां काम करीत आहें हें वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. असो. विस्तार बराच झाला शेवटीं वरीलप्रमाणें एखादा संघ निर्माण झाल्यास मी आनंदानें त्याचें स्वयंसेवकत्व पत्करीन अशी सूचना करून हा लांबलेला विषय पुरा करितों.

मुर्गाव–हार्बर
१९।७।२४

गोविंद विनायक वरवे
स्वयंसेवक
गोरक्षण ज्ञानप्रसारक संघ, ठाणें

टिळकांची पुण्यतिथी

कामोंईसच्या श्राद्धासंबंधीं गेल्या अंकांत लिहून झाल्यास अद्याप आमच्या लेखणीची शाईहि वाळली नाहीं तोंच आज लो. टिळकांच्या पुण्यतिथीविषयीं दोन शब्द लिहिण्याची संधि प्राप्त होत आहे हें आम्हीं खरोखर भाग्य समजतों. कामोंईस आणि टिळक यांनीं आपल्या गोमांतकांत प्रत्यक्ष रीतीनें नसलें तरी अप्रत्यक्ष रीतीनें केलेल्या कार्यांत भयंकर परस्पर विरोध आहे हें वेगळें सांगण्याची गरज आहे असें नाहीं. पहिल्या व्यक्तीनें लुझियडसच्याद्वारें हिंदूनां स्वत्वशून्य व निस्तेज करून टाकिलें तर दुसरीनें आपल्या 'केसरी'च्या गर्जनेनें त्यानां स्वत्वशील आणि सतेज बनविण्याचें श्रेय घेतलें. कामोंईसनें हिंदुसमाजाला अस्तित्वशून्य बनवून टाकिलें आणि टिळकानीं त्याला अस्तित्वमय करून सोडलें. टिळकानीं निदान गोमांतकाचे बाबतींत तरी आपला हा प्रयत्न बुद्धिपुरस्सर केला नाहीं हें जरी खरें असलें तरी त्यांच्या कार्याचें बीज येथील जमिनींत धरलें जाण्यास, त्यामुळें कोणतीच आडकाठी आली नाहीं. चाळीस वर्षांपूर्वीच्या गोमंतकाकडे जर नजर फेंकली तर आपणास असें दिसून येईल कीं, त्यावेळीं हिंदुसमाज येथें असून नसून सारखाच होता. हें चरें काय, गोमांतक आपला हक्काचा आहे, आपला ह्मणून एक वेगळा आणि स्वतंत्र असा समाज आहे याची देखील त्याला जाणीव नव्हती. स्वतः घर असून नसल्या सारखी त्याची स्थिति होती. राजकारण कशाशीं खातात व आपले राजकीय हक्क काय याची तर त्याला जाणीव नव्हतीच. पण आपण पुढें यावें व मार्ग शोधून काढावा याचें देखील त्याला भान नव्हतें. सध्या गोमांतकांतील अल्पसंख्याक मुसलमानाची जी स्थिति दृष्टीस पडते तशाच स्थितींत त्यावेळीं बहुसंख्याक हिंदुसमाज होता. उपमान हुडकावयाचेंच झाल्यास त्याला धर्मशाळेंत उतरणाऱ्या वाटसरूची उपमा चांगली शोभेल. आतां एकंदर गोष्टी पाहूं जातां हिंदुसमाजाची ही शोचनीय स्थिति अपरिहार्य होती हें कबूल केलें पाहिजे धर्मावर, मालमत्तेवर आणि बायकांमुलांवर होत असलेल्या असह्य जुलूमांत तीन साडेतीन शतकांएवढा काळ काढल्यामुळें हिंदुसमाज मृतप्राय झाला होता. त्याच्यांत पुनरुज्जिवन आणण्याचें काम टिळकांनीं आपल्या केसरीच्या द्वारें केलें. हिंदुसमाजाचे उदयोन्मुखतेला ही एकच गोष्ट कारणीभूत झाली नाहीं, हें जरी खरें असलें तरी राष्ट्री त्याची फुंकर केसरीनेंच घातली हें कबूल केलें पाहिजे. इतर महाराष्ट्रीय वर्तमानपत्रानं हि या कार्यास हात भार लाविला पण केसरीसारखी अप्रतिष्ट कामगिरी कोणीच केली नाहीं. केसरीच्या खालोखाल रिपब्लीकच्या स्थापनेला आपण मान दिला पाहिजे. या एका गोष्टीवरूनच टिळकांच्या उपकाराची कल्पना होण्यासारखी आहे. रिपब्लीकनें गोमांतकाला स्वातंत्र्य दिलें नाहीं किंवा दुसरें कोणतेंच मोठें कार्य केलें नाहीं हें जरी खरें असलें तरी त्यानें हिंदुसमाजाच्या मानेवरील जुलूमाचें दडपण दूर केलें आणि यामुळें त्याला नीट उभें रहाण्यास संधि मिळाली. असो.

यापुढें गोमांतकीय हिंदूंना गीतारहस्य हेंच लुझियडसच्या जागीं असणार. जितक्या आवडीनें आणि प्रेमानें पोर्तुगीज लोक कामोंईसचे लुझियडस हातांत घेतात त्यापेक्षां किती तरी पटीनी हिंदूंना टिळकांच्या रहस्याबद्दल आदर आणि प्रेम वाटतें, हें हिंदूच सांगू शकेल. टिळक गेले पण आपल्या कामगिरीच्या रूपानें ते येथील हिंदूंच्या हृदयांत अमर होऊन राहिले आहेत. प्रस्तुत प्रसंगीं टिळकांचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेऊन चालल्यास हिंदु समाजाला पुढेंमागें सुखाचे दिवस लाभणार आहेत, यांत संशय नाहीं.

—माजोर्डें येथें प्रसिद्ध होणाऱ्या 'आइंदीय पोर्तुगेज' पत्रानें मडगांवचे ग्राम संस्थांचे मामलेदार सि. लोयल यांच्या विरुद्ध निरनिराळ्या भयंकर आरोपांच काहूर केलें आहे.

—सि. मिनेझीस ब्रागांस यांचें लिज्बोअ येथें गोमांतकाच्या परिस्थितीवर एक व्याख्यान झालें. या प्रसंगीं सुप्रेम त्रिबुनालचे जज्ज दो. कायतान गोसाल्व्हीस हे अध्यक्ष होते.

—ठिकठिकाणच्या तालुक्यांत नवीन मामलेदार नेमण्यांत येतील, अशी अफवा आहे.

—दमणचे गव्हर्नर फेर्नांद क्रूझ याना गोवा सरकारचें मध्यवर्ति मंडळ या नवीन स्थापण्यांत येणाऱ्या संस्थचे मुख्याधिकारी नेमण्यांत यईल असें पणजीच्या एका पत्रानें प्रसिद्ध केलें आहे.

वर्तमानसार

—ब्रिटिश हिंदुस्थानांत लोकसंख्या सुमारें २४॥ कोटी आहे व गुरें ढोरें १४॥। कोटी आहेत ह्मणजे माणसांच्या संख्येशीं गुरांचें प्रमाण शेंकडा ६१ पडतें. तेंच डेन्मार्कांत ७४, संयुक्त संस्थानांत (अमेरिका) ७९, कानडांत ८०, केप कॉलनीमध्यें १२०, न्यू झीलंडमध्यें १५०, आस्ट्रेलियांत २५९, अर्जेंटाईनमध्यें ३२३, आणि युरोपमध्यें ५०० या प्रमाणें आहे.

—हिंदुस्थानांतील पशुधनाचा दिवसें दिवस कसा ऱ्हास होत चालला आहे तें खालील आंकड्यावरून दिसून येईल. १९१५।१६ सालीं ३८२८००० बैल, २६५५००० गाई, १३३५०००ह्मशी आणि३३०८००० वासरें व रेडकें होतीं तींच १९१९।२०सालीं३६२२००० बैल २२५३००० गाई, १२४६००० ह्मशी, आणि २६६२००० वासरें व रेडकें होतीं.आणि सबंध हिंदुस्थानांत १९१६।१७ सालीं ४ को. ९४ लक्ष बैल, ३ को. ७५॥ ल. गाई, ५५॥। लक्ष रेडे, १ को. ३७लक्ष ह्मशी व ४को. ३१ल वासरें होतीं, परंतु १९२०—२१ सालीं ही संख्या ४ को. ८९ ल. बैल, ३ को. ७१ लक्ष गाई, ५४ लक्ष रेडे, १ को. ३३ लक्ष ह्मशी, ४ को. ३ लक्ष वासरें इतक्यांवर आली.

—ह्मापशें येथील 'सिमिनारी'च्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे.

—पणजीच्या प्लेगाचें बीज नष्ट झाल्याचें सरकाररीत्या जाहीर झालें आहे.

—निजामच्या हद्दींत सक्तीनें बाटविणाऱ्यांच्या बंदोबस्ताकरितां कोर्टांत काम चालविण्यास वकील मिळत नाहीं ! आणि हें संस्थान ह्मणे वऱ्हाडला स्वराज्य देणार !

—बेळगावीं कॉंग्रेस बरोबर अखिल भारतीय गो–परिषदहि भरणार आहे. गोमांतकीय गोभक्तांनीं सदर परिषदेंत अवश्य भाग घ्यावा.

—टाटा कंपनीच्या 'मुळशी धरणा' खालीं ज्यांच्या जमिनी विरडल्या गेल्या त्यांना भरपूर मोबदला मिळाला नाहीं. सत्याग्रही देशभक्तांनीं या अनिष्ट प्रकाराचें भविष्य पूर्वींच वर्तविलें होतें.

—कऱ्हाड क्षेत्रांतील हिंदूंच्या निरनिराळ्या देवालयांतील सोळा मूर्ति मुसलमानानीं फोडल्या ! अशा आततायी कृत्यानीं हिंदू–मुसलमानांचें ऐक्य, शक्य कोटींत उतरण्याचा संभव आहे काय ?

—ता. १० जून रोजीं पेडणें येथील वजनदार व लोकप्रिय नागरिक श्री. घन:शाम रघुनाथ शे. देसाई ऊर्फ दाजी साहेब देसाई यांचे चिरंजीव श्री. सीताराम घन:शाम शेणवी देसाई यांचा विवाह मोठ्या थाटानें झाला. समारंभाला खुद्द पेडणें महालांतील बहुतेक मंडळी हजर असून, इतर ठिकाणचेहि बरेच सन्मान्य पाहुणे, ब. राव, प्रो॰ डॉ. सिनारी, डॉ. बोरकर, रा. काकासाहेब दणाईत, डॉ. साखरदांडे, रा. पुंडलीक राव केणी, इ॰ इ॰ गेले होते. एकंदर समारंभ श्री. दाजीसाहेब यांच्या लौकिकास व योग्यतेस साजेसाच झाला. वधुवरांचें आह्मीं मनापासून अभिष्ट चिंतन करितों.

ग्राहकांस सूचना

अपरिहार्य अडचणीमुळें प्रस्तुत अंकाचें पुरवणी पत्रक प्रसिद्ध करणें शक्य झालें नाहीं.

मनेजर भारत.

Ano 9o Nº. 19

a 31 de Julho de 1924

ASSINATURA
cada ano tres rupias

ANUNCIOS
ainda que repetida uma tanga
ero avulso uma tanga

ECTOR E EDITOR
. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक १९

गुरुवार ता. ३१ जुलै सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें—गोवा.

A ESFOLA DUM DOUTOR

ही आपली चिकित्सापद्धति प्रथमतः ख्रिस्ती धर्मानें केलेल्या कार्याकडे लाऊन पाहूं कारण याच बाजूनें पोतुगीज लोकांनीं आपलें शक्तिसर्वस्व खर्चिलें आहे. असें करण्यापूर्वी आह्मी करीत असलेल्या टीकेंत दुराग्रहाचा अथवा असद्हेतूचा संशय कोणासहि येऊं नये ह्मणून एवढें सांगून टाकतों कीं आह्मी स्वतः क्याथोलिक धर्मपंथाचे पूर्ण अभिमान असून आमची स्वतःची वागणूक त्या धर्मास धरून आहे. आह्मी आमच्या पूर्वजांस तर गोपायाचा मार्ग शिकविण्याकरितां म्हणून ख्रिस्तच्या नावानें शांतताप्रधान आणि प्रेममय धर्माच्या निशाणाखालीं सर्व प्रकारच्या अत्याचाराचा उपयोग करण्यात आला- वास्तविक विचार करितां एकाद्या क्याथोलिक इसमानें तदितर इसमांस आपल्या धर्मांत आणण्याचा प्रयत्न करणें या सारखी सामान्य बाब कोणतीहि नाहीं. पण धर्म लादण्याकरितां जुलुमाचा उपयोग व्हावा ही बाब मात्र असमर्थनीय होय. धर्म हा श्रद्धेच्या पायावर उभारलेला असून तलवार आणि रक्तपात यांच्या मदतीनें तो लादणें अशक्य होय.

अशा पद्धतीनें विचार करितां पोर्तुगीज लोकांनीं अनेक लोकांस आपल्या धर्मांत घेतलें हें कृत्य चांगलें झालें असें बिलकूल म्हणतां येणार नाहीं. परधर्मी लोकांस आपल्या धर्मांत सामील करून घेऊन ख्रिस्ती धर्मानें कांही एक मिळविलें नसून हिंदु धर्माचा बाह्यतः पाडाव झाल्याचा भास झाला आहे तो नैतिक दृष्ट्या अबाधितच राहिला. क्याथोलिक धर्म ज्यांच्या मतास प्रमाणभूत समजतो, त्यांचे म्हणणें असें आहे कीं ज्या कोणत्याहि धर्माचीं नीतितत्वें ख्रिस्ती धर्माविरुद्ध नसतील त्या धर्मातून मोक्ष संपादन करितां येतो. मात्र अशा प्रकारच्या कोणत्याहि धर्माप्रमाणें वागत असतां प्रामाणिकपणा व श्रद्धा यांचा आश्रय करून, तो एकच सत्यधर्म अशी भावना दृढ पाहिजे. ही आपली कसोटी हिंदु धर्मास लाऊन पाहतां आपल्यास दिसून येईल कीं हिंदु धर्मांतील नीतितत्वें बहुंशी ख्रिस्ती धर्म सदृश असून शिवाय तो धर्म शिस्तीच्या बाबतींत ख्रिस्ती धर्मापेक्षां वरचढ आहे. यावरून आमचें मत असें आहे कीं ख्रिस्ती आणि हिंदु यानीं आक्रमिलेले मार्ग निरनिराळे असले तरी दोन्ही हे धर्म मोक्षप्रद असल्यामुळें ख्रिस्ती धर्मापासून हिंदुस्थानांत वाईट झालें नाहीं असें धरून चाललें तरी चांगलें मात्र झालें नाहीं, हें

आतां आपण आफोंस दे अल्बुकेर्क याच्या चारित्रांपैकीं, आल्बुकेर्क मजकुरानें वसाहतीची स्थापना दृढमूल करण्याकरितां योजिलेल्या मुत्सद्दीगिरीचा विचार करून पाहूं. या कार्यासाठीं त्यानीं अमलांत आणलेली योजना ह्मटली ह्मणजे आपल्या शिपायांचीं लग्नें देशी स्त्रियांशीं लावण्याचा प्रयत्न ही होय. अशा प्रकारें वर्णसंकर साधून घेण्यासाठीं प्रयत्न करण्यांत या मुत्सद्याच्या हेतूची मीमांसा करणें शक्य नाहीं.

यांत एकपक्षीं पोर्तुगीज समाजाच्या होत असलेल्या अधःपातास आळा घालण्यासाठीं देशी स्त्रियांपासून नवीन जात निर्माण करून त्या समाजाची पुनर्घटना करणें किंवा दुसऱ्या पक्षीं इंडियन समाजाच्या रक्तांत पोर्तुगीज उच्च वीर्याची स्थापना करणें, या शिवाय तिसरा अर्थ संभवत नाहीं.

पहिला मुद्दा ग्रहीत धरल्यास असें ठरतें कीं आल्बुकेर्क याणें लढविलेली मुत्सद्दीगिरी इंडियन लोकांस बाधक झाली असून त्या पुढें ओघानेंच आणखी एक गोष्ट सिद्ध होते ती ही कीं त्या काळीं हिंदुस्थानची स्थिति अवल दर्जाची असून तो अवनतीस लागला होता ही गोष्ट खरी नाहीं. आणि दुसरा मुद्दा गृहीत धरल्यास त्यांत दिसून येत असलेल्या मुत्सद्दीगिरीच्या अभावाचें समर्थन फाजील परोपकार बुद्धीच्या कारणाशिवाय होणें शक्य नाहीं.

वर्णाचा श्रेष्ठ कनिष्ठ दर्जाचा प्रश्न मुदतीवर टाकून तूर्त एवढें सांगितलें ह्मणजे पुरे कीं आल्बुकेर्क याणी वसाहतीस सदृढता आणण्यासाठीं केलेले प्रयत्न फसले एवढी गोष्ट निर्विवाद आहे. कारण त्या उपाययोजनेच्या पायीं इंडिया, पोर्तुगाल देशांत सामील होण्या ऐवजीं, पोर्तुगालच इंडियेंत समाविष्ट झाला असता. आलेशांद्र येर्कुलानानें ह्मटलें आहे कीं, पोर्तुगीज जनतेच्या कॉलनी स्थापण्यांतील चुकीच्या धोरणामुळें, ब्राजील देश पोर्तुगालची कॉलनी बनण्या ऐवजीं उलट पोर्तुगालच ब्राझीलची कॉलनी बनली. तसाच प्रसंग येथेंहि ओढवला असता..

याप्रमाणें आल्बुकेर्कच्या मुत्सद्दीगिरीचे दोष ठळकपणें दृग्गोचर होत असतां आलबुकेर्क साहेबांची जयंति इंडियन लोकानी करण्याचें आणखीहि एक कारण शिल्लक राहतें. तें ह्मटलें ह्मणजे युरोपियन संस्कृती पासून हिंदुस्थानास झालेले फायदे लक्षांत घेतां ती संस्कृति प्रथमच आमच्यापर्यंत आणून ज्या व्यक्तीनें भिडविली, त्या व्यक्तीबद्दलचा आमच्या ठिकाणीं वसत असलेला आदर; पण या वज्रप्रमाणें अभंग मानलेल्या संस्कृतीचें दिवाळें वाजल्याचे सुप्रसिद्ध समाजशास्त्रवेत्त्यांनीं जाहीर केलें असून तेव्हा संस्कृतीच्या पायावर रचलें असल्यामुळें ज्या समाजांत स्थैर्य असें कधींच नव्हतें त्या समाजाच्या नाशाचें त्यांच्या अंतःचक्षूस दिसणारें भविष्यहि केव्हांच वर्तऊन ठेवलें आहे.

आधुनिक कालांतील सुप्रसिद्ध समाजशास्त्रवेत्ता जार्जवाल यानें युरोपियन समाजाची पुनर्घटना, ज्या आश्चर्यजनक अशा तत्वांवर पूर्वेकडील, आणि त्यांतहि हिंदुस्थानांतील समाज बनले आहेत, त्याच तत्वांवर करावयाचा उपदेश केला आहे.

इकडे एकाकाळीं उंच शिखर गांठलेली इंडियन संस्कृति, ज्या काळीं शेंकडो वर्षांपासून अचेतन पडलेली दिसते त्याच काळीं तिकडे युरोपियन संस्कृति स्वैर संवाराचा नंगा नाच नाचून आपला आपला नाश करून घेते, यावरून उच्च शिखर गांठून कुंठीत झालेली संस्कृति आणि भीषण अशा जड वादाच्या कच्छपीं लागून क्रौर्य आणि अत्याचार या आसुरी साधनानीं ध्येय गाठू पाहणारी संस्कृति या दोहोंतून श्रेष्ठ कोणती असावी बरें ?

ज्या परिस्थितींत जन्म पावली तेथेंच जिचा पोषणा स्वाधीन झाला ती संस्कृति वज्रलेप्त अर्थात अभंग अशा संस्कृतीशीं एकरूप झालेल्या समाजास फायदेशीर कशी व्हावी ? ह्या एकंदर मुद्यांवरून आमचें मत असें बनलें आहे कीं, आल्बुकेर्क यानें केलेली हिंदुस्थानांतील राज्यस्थापना आणि त्यामुळें आमच्यावर पडलेलें युरोपियन संस्कृतीचें दडपण या गोष्टी फार वाईट अशा झाल्या. इंडियन लोकानीं तर युरोपियन संस्कृति उचलून हिंदुस्थानचें अहितच करून घेतलें आहे.

स्फुट विचार

महत्वाचा प्रश्न.— अग्रलेखात नमूद केलेले विचार प्रदर्शित केल्यानंतर फ्रियस व मिरांद हे पुढें ह्मणतात:— " लिसेव सेंत्रालच्या सुशिक्षित रेतोराकडून छात्रवर्गाच्या साहचर्यानें जी आल्बुकेर्कची जयंती करण्यांत आली ती त्याच्या सोदा व राज्यस्थापक यां पैकीं कोणत्या गुणावर लुब्ध होऊन करण्यांत आली असावी ? कारण जीत समाज जेत्याचे उत्सव स्वयंस्फुर्तीनें कधींच करीत नसतात अशा दृष्टीनें आफोंस दे आल्बुकेर्कची गोमांतकांतील लिसेवावर झालेली जयंती ही राष्ट्राच्या इतिहासांत अश्रुत पूर्व होय, आणि त्या मुळें जी गोष्ट स्पष्ट दिसते ती ही कीं पोर्तुगीज लोकांच्या व साहतींतील धोरणामुळें आमच्या समाजाला नैतिक दृष्ट्या अधःपात होऊन आमच्या राष्ट्रीय सद्गुणाचा व स्वत्वरूपी भावनाचा लोप झाला. याच करितां आमच्या रेतोरच्या देखरेखेखालीं आणि त्याच्याच प्रेरणेनें आपल्या गोमांतकांतील छात्र वर्गानें केलेला उत्सव, हा आह्मी अयोग्य ठरवतों. आमच्या गोमांतकांतील विद्यार्थीवर्गाने आणि त्यांच्या रेतोराने उत्सव आणि जयंत्या करण्यालायक असे दिवंगत झालेले इंडियन कांहीं कमी आहेत असें नाहीं. आदल्यांतील नश्वर जगाचा त्याग केलेल्या अनेक व्यक्ती पैकीं ज्यानीं सद्गुणानें आणि ज्ञानानें दिगंत कीर्ति मिळविली त्या सर्वांचा नामनिर्देश करणें शक्य नसल्यानें त्यां पैकीं

Ano 9° N. 2

a-feira 27 de Março de 1924

ASSINATURA
cada ano tres rupias

\NUNCIOS
Por ... ıda que repetida uma tanga
... vulso uma tanga

...OR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक २
गुरुवार ता. २७ मार्च सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें–गोवा.

A PROPOSITO . . .

O Conselho Legislativo deste Estado numa das suas sessoes, escolheu, por eleigao, dois representantes da India para o Congresso Colonial que se vai reunir em Lisboa.

No's sabemos que o tesouro da Colo'nia esta' pobre, exausto mal podendo fazer face a's despezas ordina'rias do orgamento. Mas, nem por isso, podemos deixar de dar o nosso incondicional aplauso a' idea de a India ter os seus representantes num Congresso em que se vao debater problemas que, sendo do interesse para o dominio ultramarino portuguez afectam tambem a este pais que faz parte do ultramar lusitano.

A India sofre de males que vem de longe uns, e outros que surgiram nestes ultimos tempos, se nao pelo mau uso da autonomia, pelo menos pela insuficiencia da mesma. E' preciso acudir ao doente com medidas eficazes e isto urgentemente, porquanto o mal que se entretem com paliativos e' sempre um mal que se complica, e algumas veses tanto que a cura torna-se impossivel. O regime de panos quentes, de que o governo local bem como o governo central vem desde muitos anos langando mao, e' inadiavel que tenha o seu termo, adoptando se desde logo, sem perda do tempo, bases para uma administragao mais activa, mais eficaz, mais directa e mais local. Em suma, o que se quere e' que na India vigore um regime de Autonomia mais ampla ou mesmo uma Autonomia completa, reservando-se ao poder executivo o direito de *veto* em assuntos que envolvam os direitos de soberania e a politica externa. A nossa opiniao sincera e leal e' esta, pois aquilo que nos mandaram da Metropole com o rotulo de Autonomia nao passa de uma reverenda burla—que mais valia nunca ter existido|

E' esta para no's a missao patriotica que aos nossos representantes cabe desempenhar quer seja dentro do Congresso quer seja fora dele pela imprensa, pela conferencia, pela discussao com homens em evidencia na politica metropolitana. Esta' claro que fora deste, ha outros problemas, mais ou menos importantes, que tratar; mas todos secundarios, cuja solugao em grande parte se nao de todo, depende da forma como for resolvido o problema da nossa organisagao administrativa e fiscal.

Felizmente para o pais, segue para a Metropole, como um dos representantes, o sr. Minezes Braganga. A sua inteligencia fulgurante a sua cultura, o seu conhecimento directo e profundo da vida da colonia em todos os seus variados aspectos, as suas qualidades de verdadeiro parlamentar constituem um penhor seguro, a garantia solida de que a causa de India vai entregue a um patrono quo representa o orgulho desta terra.

Para no's, o sr. Menezes Braganga prestou um relevantissimo servigo a' terra do seu bergo aceitando esta missao, pois ele, sinceramente o dizemos, e' um dos pouquissimos, infinitamente poucos que encontrando-se em condigoes excepcionais de defender os interesses da India de hoje, reune em si igualmente qualidades todas para reatar o fio, interrompido ha' anos, do brilhante passado desta colonia em relagao com Portugal, passado onde fulguram nomes como o de Estevam Jeremias Mascerenhas, Francisco Luis Gomes, Bernardo Frencisco da Costa e mais poucos.

Va, pois, sr. Menezes Braganga que a India o contempla envaidecida e confiada.

* * *

Se o periodo que atravessamos nao fosse da decadencia franca em que tudo de todos os lados nos aparece a cair em bocados, iria para o Congresso, acompanhando o sr. Braganga, alguem que pelos seus servigos a causa publica — ponham de parte o talento que e' um dom natural—se impuzesse a' consideragao publica. Tal nao foi. E foi bem de um lado. Era preciso que ao lado do sr. M. Braganga que representa brilhantemente o passado brilhante desta India, consubstanciando tambem o sonho doirado do seu futuro da luz e grandeza, fosse para Lisboa o representante do nosso presente—presente confuso, incerto, hesitante, sem ideal nem grandeza, mas bem jantado e bem instalado.

X.

Expediente

Pede-se aos srs. assinantes do *Bharat* a fineza de saldarem os seus debitos por via postal, u'nica que e' comoda a todos.

O Administrador

Ecos do Mandovi

(Do nosso correspondente)

A atmosfera politica esta' turvada por densas e caliginosas nuvens, e impetuosas novas extraordinarias geram com uma velocidade de raio. Apos o acto louvavel e heroico dos 8 vogais "vencidos" na sessao de 27 de Dezembro, sessao que deve ser inscrita, nos anais desta terra, em letras de oiro zera-se um silencio desolador e te'trico, as suspeigoes pairavam nos ares a' espera da sua descepagao. E o silencio terminou, a suspeigao la' veiu tacita e terminantemente formulada pelo *Seculo* num artigo editorial, e a suspeita tacita e terminantemente formulada foi, de que na India onde o C. L. tem uma maioria de vogais nao funcionarios, o respectivo governador tem encontrado os maiores embaragos a' aprovagao de medidas que aumentem as receitas e ainda de outras em absoluto necessarias ao exercicio da sua soberania."

Apo's tanta celeuma que atroou os ares, ferindo os nossos timpanos; apo's razoes e manifestos ao *Paiz* que ninguem, absolutamente ninguem teve a coragem de admitir e de desfazer, O *Seculo*, sem fundamento e sem provas, faz-se eco dumas noticias absolutamente comicas e ridiculas! ... E' isto, nao haja duvida, uma autentica *portuguesada*, porque bem disse o Bispo de Madrasta, a terra portuguesa e' terra de *novidades*. E esta e' uma *novidade* genuinamente, estruturalmente portuguesa.

Falando do jornalismo portugues Alfredo Pimenta, um dos mais brilhantes e eruditos escritores escrevia: "A vida jornalistica e' pelo seu lado a consagragao desvairada da mais imprudente imbecilidade. O jornalismo portugues forma uma classe a'parte, no jornalismo do mundo civilisado."

E nao admira, pois, que o *Seculo* tenha-se referido, duma maneira so dele, a um momentoso assunto. Sem escrulo, sem criterio ele faz afirmagoes que caem sob o peso de sua propria inviabilidade!...

"Encontrou o respectivo governador embaragos a' aprovagao de medidas que aumentem as receitas". Que receitas? nao nos diz o *Seculo*. Aumentar as receitas, aumentando destrambelhadamente as Pautas Aduaneiras, que nem a retorica, nem as belas palavras do sr. Jaime de Morais podem justificar. Aumentar as receitas sem comprimir as despesas? Quando a palavra compressao de despesas" esta' por estes dias, estampada em colunas e colunas de jornais metropolitanos com *tipos* de todos os tamanhos e? com o cambio a subir, a subir sempre!...como e' que os vogais podiam aprovar umam edida deste quilate Porque e' que o *Seculo* nao abre uma campanha contra as sinecuras que aqui, nesta nossa desditosa terra, estao a medrar impunes a' sombra de todas as Compressoes preconizadas e preconizaveis?

Porque e' que o *Seculo* que alia's nem sabe da existencia da *India Portuguesa*, que nao ouve os seus gemidos, nem as suas queixas, so' nesta ocasiao, ex-oficio referiu se a' atitude de vogais electivos duma forma que indica o pouco ou nenhum conhecimento da causa? Vao la desfiar a meada os pacientes, mas, cautela Magdalena nao mexa que e' ... pior!

A resposta a esta atoarda infundada e' um aparte picaresco do sr. Governador Geral, na sessao de 25 de Fevereiro, anterior a' chegada da mala de Portugal:

—Realmente votadas, *malgre' tout* sr. Sales de Andrade, e com muita razao diz *O Heraldo* no seu ponderado e criterioso editoral de 13 do corrente "podemos calcular quanta intengao e quanta enfase s. excia teria posto naquela frase curta e simples, que compreende um mundo de ideas".

Agora quanto "as medidas em absoluto necessarias ao exercicio da sua soberania" e' de facto na conceituada frase do *Heraldo* um verdadeiro *puszle* evidentemente criado para langar a confusao no espirito publico. E este foi, afinal, como se ve, o resultado do celebrado acto dos vogais electivos do C. Legislativo!

Mas porque os "vencidos" nao haode chamar a' responsabilidade o *Seculo* que de adrede forja novas para encher papel e Terreiro do Pago fazer os seus calculos de cabo de esquadra.

Aqui fica, pois, a lembranga.

Eis um trecho da sessao do C. Legislativo de 27 de Fevereiro.

"O sr. P. A. de Sousa ... Nao sabe ate' que ponto e' verdadeira a *noticia* que os jornais dao, da *fraca procura da manga para exportagao, devido no gravame aduaneiro. Estes jornais tambem...*

जरा करून स्वस्थ बसत नाहींत, तर देशाच्या, समाजाच्या उन्नतीसाठीं अहोरात्र श्रम करीत असतात. आमच्या सारखी परतंत्रता त्यांची आहे काय? कदाचित ती प्राप्त झाल्यास त्यांतून मुक्त होण्याची त्यांची तयारी नाहीं काय ? शिक्षणा करितां, अनाथ रोग्यांकरितां गरीब विद्यार्थ्यांकरितां, त्यानीं तजवीज केलेली नाहीं काय ? समाजाच्या उन्नती करितां ते किती पैसे खर्च करितात? अशीं शेकडों किंबहुना हजारों अनुकरणीय कामें डोळ्यांपुढें असतांना कार्नव्हालचेंच अनुकरण कां ? दुसरा मुद्दा ख्रिश्चन बांधवांचा होय हे लोक पाश्चात्य संस्कृतीनें पिसाळलेले आहेत. त्यांचें हें वीष उतरणारा कोणीहि 'महात्मा' गोमांतकांत उत्पन्न झाल्याशिवाय उतरणें शक्य नाहीं. त्यानां शिवाजी कोण वाटतो ? हिंदुस्थान ही मातृभूमि वाटते काय ? अशोक युधिष्ठिरचें नांव सुद्धां यांनां माहीत आहे काय ? शेंकडा नव्याण्णव लोकांकडून 'नाहीं' असेंच उत्तर येईल. तर मग यांचा चष्मा बदलेपर्यंत आपण त्यांचें अनुकरण करणें योग्य नाहीं. यांचा कार्नाव्हालचा सण केवळ युरोपचें अनुकरण होय.

तिसरा मुद्दा आपल्या लोकांचा. मनुष्य उत्सव प्रीय आहे हें आम्हीं नाकबूल करीत नाहींत. परंतु हे उत्सव परिस्थितीप्रमाणें बदलले पाहिजेत. सात आठ हजार रुपये केवळ आठ दिवसांच्या चैनींत घालविण्यापेक्षां देशाच्या उन्नतीला पोषक असे दुसरे उत्सव बरेच करितां आले असते. आज ठिकठिकाणीं व्याख्यानमाला होत आहेत. प्रागतिक संघाची बैठक होत आहे. हे नव्या मनूंतील उत्सवच नाहींत काय ? आणखीं उत्सव पाहिजे असल्यास पुष्कळ करितां येतील: साहित्यसंमेलनासारखीं संमेलनें, औद्योगिक किंवा कलाकौशल्याचीं प्रदर्शनें वगैरेसारखीं भरविल्यास पैशांचा योग्य उपयोग होऊन देशाचाहि फायदा झाला असता. तेव्हां सुशिक्षित म्हणविणाऱ्या बांधवांनो, याचा विचार करा. व यापुढें अशी उधळपट्टी बंद करून देशाच्या उन्नतीची कास धरा. 'मन बदलतें अगर मनु बदलतो, कांहीं तरी बदलतें खरें' असें जर आहे, तर बांधवांनो

या पुढें

अशा रीतीनें पैशाची उधळपट्टी करण्याचें बंद केलें पाहिजे. हें नवें युग आहे. आपणावर फार मोठी जबाबदारी येऊन पडलेली आहे. आपणास जेथें पहावें तेथें निराशेचे डोंगर दृष्टीस पडत आहेत. आम्हीं आमच्या देशासाठीं काय केलें आहे ? एकादा गरीब हिंदु व्याधीनें दुखणाईत झाल्यास 'आस्पीस' किंवा 'मिझेरिकोर्दिय' यां सारख्या परधर्मी लोकांच्या संस्थांकडे धांव घ्यावी लागत असून शेवटीं परधर्मांत प्राण सोडण्याची पाळी येत आहे. असें असतां धर्मनिष्ट म्हणविणाऱ्या दांभिकांनो, याची आपण कांहीं तरी तजवीज केली आहे काय ? तर मग तुझांला शिमग्यासारखा चैनबाजीला हजारों रुपये खर्च करण्याचा कसा अधिकार पोंचतो ? आपला समाज आज कोणत्या स्थितींत आहे ? शेंकडों व्यसनाचा सुळसुळाट झालेला आहे. आपण परमेश्वराचे मोठे भक्त आहोत, असें बाहेर दाखवून व्यसनाचा प्रसार करणाऱ्यानों अनीतीचीं कामें करताना आपणास त्या ईश्वराची आठवण होत नाहीं काय ? असल्या दांभिक-सोंगांनी जनता फसली जाणार नाहीं.

आपल्या ब्रिटीश हिंदुस्थानांतील बांधवांकडे पहा. त्यानीं शिमग्याला कसें नवीन तऱ्हेचें स्वरूप दिलेलें आहे. हें डोळ्यासमोर ठेवा. देशाकरितां त्यांचे कसे प्रयत्न चालले आहेत हें पहा आणि नंतर आपल्याकडे पहा. आपणाला आज किती तरी कामें करावयाचीं आहेत. गोमांतकांत स्त्रियांची स्थिति काय आहे ? स्त्रियानां अत्यंत आवश्यक असें नर्सींग, शिवणकाम, विणकाम, स्वयंपाक या प्रकारचीं साधीं पण नित्य व्यवहारांतील शिक्षणाची तरी आपण सोय केली आहे काय?

बांधव हो ! जरा विचार करा. आमच्या लिहिण्याच्या कुत्सित बुद्धीनें कांहीं तरी विपर्यास करूं नका. सगळ्या जगभर नजर फेंका. म्हणजे प्रत्येक राष्ट्र कसें पुढें जात आहे हें दिसून येईल. आपला देश एके काळीं उच्च होता. या आपल्या देशांत सोन्याचा धूर निघत असल्याबद्दल पुष्कळ प्रवाशानीं लिहून ठेविलें आहे. हें लक्षांत आणा. व आजच्या आपल्या देशाकडे पहा. म्हणजे निराशेनें अंतःकरण खिन्न होऊन जाईल. आपण शेंकडों वर्षें शिमग्याचे उत्सव करीत आहोत परंतु त्यामुळें देशाला कांहीं फायदा झाला काय ? उलट व्यसनांत जखडले जात आहोत आपल्या अशा कृत्यानीं मातृभूमीच्या तोंडाला काळिमा फांसला जात आहे. तो धुवून टाकण्याचे ऐवजीं उलट कलावंतीच्या तोंडास रंग फासणें योग्य आहे काय ? स्वतःच्या चैनीची मिरास चालण्यासाठीं देवाचें नांव पुढें करितां काय ? पण हें लक्षांत ठेवा कीं हिंदु धर्मातील देव शिमगे करणारे नाहींत. जुन्या भाविक लोकांच्या अंध श्रद्धेचा हा परिणाम आहे. परंतु या पुढें तरी अशा गोष्टीना फांटा दिला पाहिजे. आतांचा काल निराळा आहे. या कालांत आपण

काय केलें पाहिजे ?

आपण आपला पैसा, आपला वेळ आपले श्रम शक्य त्या तऱ्हेनें देशाच्या कामीं लावले पाहिजेत. गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करणें, स्त्रियांना आवश्यक शिक्षण देणें, प्राथमिक शिक्षणाचें जाळें सर्व देशभर पसरविणें, वाचनालयाचा प्रसार करणें, परधर्मांत गेलेल्या आपल्या बांधवाना परत आपल्या धर्मांत घेणें. भोळ्या समजुतीचा नायनाट करणें, एकादी दुसरी औद्योगिक शिक्षणाची शाळा काढणें, असे एक कीं दोन, शेकडों प्रश्न आपल्या डोळ्यांसमोर आहेत. त्यांकडे ढुंकून सुद्धां न पहातां, आपल्या पैशाचा असा अपव्यय करणें योग्य वाटतें काय ? जन सेवा ही ईश्वर सेवा नाहीं काय ? तेव्हां उच्च शिक्षण घेतलेल्या

तरुण सुशिक्षितानो

केवळ परीक्षा पास होऊन अपटूडेट फिरणें, अथवा एखादी दुसरी नोकरी मिळविणें, म्हणजेच सुशिक्षितपणाचें लक्षण नव्हे- तर जो आपल्याखालीं असलेल्या बांधवाना हात देतो तोच खरा सुशिक्षित होय. ही जबाबदारी आपणावर आहे. हिंदमाता आह्मांकडे दीन वदनानें पहात आहे. अशा वेळीं आपल्या आईला सहाय्य करणें योग्य वाटत नाहीं काय अशा प्रकारची सेवा ही ईश्वरसेवेचेंच एक अंग आहे, असें आपणास वाटत नाहीं काय ? विचार करा, आपली पुढील पिढी आह्मांला या बद्दल जबाबदार धरल्याशिवाय रहाणार नाही. करितां वर उध्दृत केलेल्या थोर पुरुषांच्या वचनाकडे लक्ष द्या, व योग्य मार्गाला लागा. रोम शहर एका दिवसांत झालें नाहीं. हें आह्माला माहीत आहे. आणि त्याच दृष्टीनें केवळ एखादा दुसऱ्या लेखानें, शिमग्यासारखे उत्सव बंद होतील असेंहि आह्मी मानीत नाहीं. हें आमचें कर्तव्य आह्मी बजावित आहों. आज ना उद्यां केव्हां तरी या प्रयत्नानां यश येणारच. त्याची आह्मांला पूर्ण खात्री आहे.

स्फुट विचार

मूर्ख विचारसरणी:- सांप्रत कालीं पोर्तुगीज राज्यसत्तेखालीं धडपडत असलेला गोमांतक देश पुढें मागें परकयांचें जूं झुगारून स्वतंत्रतेचा झेंडा फडकावणार निदान हिंदुस्थानशीं तो एकजीव होणार, असें आह्मीं इतिहासाच्या जोरावर भविष्य वर्तविलें होतें. परंतु हें भविष्य आमच्या कांहीं ख्रिस्ती बांधवांस पटत नसून, प्रसंग आलाच तर आह्मीं गोमांतकचें स्वातंत्र्य मान्य करूं पण हिंदुस्थानशीं समरस होण्याची आमची बिलकुल इच्छा नाहीं, अशा तऱ्हेची विचारसरणी त्यानीं आपल्या मुख पत्रांतून ध्वनित करण्याचा सपाटा चालू ठेविला आहे ! जणू काय या महाशयांची इच्छा म्हणजे एखाद्या इंग्रजी राष्ट्रासारख्या महाबलवान राष्ट्राची इच्छा कीं जिच्यापुढें सर्वांनीं आपल्या कमकुवत माना वांकवित्याच पाहिजेत ! परकीसंस्कृतीच्या मदिरेनें झिंगलेल्या दारुडी डोळ्यांतून वरील प्रकारचे अकलेचे तारे निघावेत, यांत मुळींच नवल नाहीं. उलट स्थिति मात्र आश्चर्यात्पादक बनली असती ! बाकी, कोळसा उगळावा तितका काळाच !

श्री मुखाची शोभा:- गेल्या १७ तारखेच्या कौंन्सिल लेजिस्लातीव्हाच्या बैठकीत मुलकी खात्याचे मुख्याधिकारी नि. स्लिनियु तिनोकु यानीं रागाच्या भरांत नामदार फिग्रेद यांचें श्रीमुख रंगवून काढलें ! तिनोक मजकुरांच्या या अत्याचारामुळें गोमांतकचें एकंदर वातावरण असंतोषाच्या खळबळीनें व्यापून जाईल, अशी किंत्येकांची समजूत होती; पण ती सपशेल निराधार ठरून, उलट जिकडे तिकडे – कांहींशी दिणकस चळवळ खेरीज करून –निःस्तब्ध शांतताच आढळून आली ! या वरून मी मी म्हणविणाऱ्या सुशिक्षितांच्या मनांत सुद्धां अनेक वर्षांच्या परावलंबीपणामुळें भ्याडपणा कसा मुरून राहिला आहे, याची कोणालाहि सहज कल्पना होण्यासारखी आहे. ह्या स्वार्थी भ्याडपणाचें उच्चाटन जों पर्यंत मुळासकट होणार नाहीं व 'ठोशास ठोसा' या तत्वाच्या जोमदार अंमल बजावणीचें तेज जोंपर्यंत सर्वत्र फांकणार नाहीं, तों पर्यंत गोमांतकाच्या अभ्युदयाची आशा बाळगणें व्यर्थ होय. तिनोकांच्या मूर्खपणाबद्दल भारतानें पुरवणीच्या रूपानें आपला निषेध व्यक्त केलाच असल्यानें, यविषयीं आणखी विशेष चर्चा करणें अप्रासंगिक होय.

पत्रव्यवहार

श्री. रा. रा. संपादक 'भारत' केपें गोवा कृ. सा. न. वि. वि. या खालील माझ्या पत्रास आपल्या येत्या 'भारता'च्या अंकीं मुद्दाम जागा द्याल अशी आशा करतों.

श्रीयुत रा. रा. संपादक 'हिंदु मिशनरी' यांस— कृ. सा. न. वि. वि. "माझ्या पत्राचा त्रोटक सारांश आपल्या ता. १०-३-२४ च्या अंकांत दिलेला वाचून त्यांतील कांहीं चुकीची दुरुस्ती तावडतोब व्हावी म्हणून हें लिहीत आहें माझ्या पत्रांतील कित्येक वाक्यें आपण गाळल्यामुळें त्यांची एकमेकांशीं जुळवाजुळव होत नाहीं. व भलताच ग्रह होतो व पुष्कळ अशीं झालेलाहि आहे. उदाहरणार्थ, आपल्या वरील तारखेच्या अंकाच्या १४१ व्या पानावरील दुसऱ्या कालमांतील शेवटचें वाक्य येणें प्रमाणें आहे. 'ते पणजी येथील सरकारी कॉलेजचे परीक्षक आहेत. त्यांत संस्कृत, मराठी, व इंग्रजी शिकवितात, तें तसें नसून खालील प्रमाणें असले पाहिजे. 'ते पणजी येथील सरकारी कॉलेजचे फक्त परीक्षक (मदतनीस) असून ते त्यांत संस्कृत इंग्रजी व मराठी शिकवीत नाहींत' तसेंच आजपर्यंत येथें एकहि मराठी शाळा नव्हती, असें नसून या पूर्वींचीं व नंतरचीं कांहीं वाक्यें गाळल्यामुळें एकमेकांचा संबंध मुळींच जुळत नाहीं त्याचप्रमाणें, कै. श्री. रा. रा. डॉ. पुरुषोत्तम वा. शिरगावकर यांचा मुळीं उल्लेखच न केल्यामुळें, ही सर्व कांहीं दिशाभूलच झाली असें दिसतें. तसेंच पान १४३ पहिल्या कलमांतील शेवटचें वाक्य प्रो. केणी जर येथें आले नसते तर या प्रांतांत मुळींच जागृति झाली नसती हेंहि चुकलेलें आहे. 'पान १४२ दुसरें कलम ओळ चवथी— 'बंद पाडण्यांत आली नसून' कांहींना कांहीं कारणामुळें बंद पडली तसेंच त्यानीं गोव्यांत येण्यापूर्वींच सोडली होती. वगैरे वगैरे. अशा प्रकारें पुष्कळ चुका झाल्यावरून कित्येकांचा वेगवेगळा ग्रह झालेला आहे. म्हणून आपण क्षणभरही विलंब न लावतां या लहानशा पत्रास आपल्या येत्या अंकीं न विसरतां जागा देऊन मला एकदां दोषमुक्त करावें ही विनंति अधिक लिहिणें नलगे. कळावे लोभ असावा ही विनंति. मडगांव, ता. २० । ३ । २४

आपला नम्र

पुरुषोत्तम पां. केणी

Ano 9° N. 3

Quinta-feira 10 de Abril de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rúpias

ANUNCIOS
cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ३

गुरुवार ता. १० एप्रील सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केंपें—गोवा.

"NARRATIVAS ELOQUENTES"

Desiderio Frias e Lucio Miranda, prestimosos filhos de Goa estudando em Coimbra, publicaram em *O Herald* um artigo sob a epigrafe "*Reagindo*, que logrou a rara fortuna de despertar interesse. Uns deram aos autores uma simples reprimenda, outros acudiram-nos com conselhos de prudencia, so' o sr. V. S. dedicou ao trabalho dos rapazes um momento de atençao e critica.

E' no seu artigo "Dominaçao Portuguesa na India" estampado na *Tribuna* de 15 do corrente. Quem escreve estas linhas esta' com o sr. V. S. O sr. V. S. nao torce a orelha aos rapazes, nem lhes arregala o olho. Antes pelo contrario, chama-os para si, e dando-lhes um abraço fraternal presta-lhes o auxilio da sua rara erudiçao e prudente crite'rio.

Efectivamente, no's estamos com o sr. V. S. no seu propo'sito de "Contribuir com um conjunto de informes e consideraçoes" proveitosas "aos estudantes da ala de muitos novos" e porque o estamos, tomamos a liberdade de oferecer algumas observaçoes e factos ao exame do ilustre articulista.

Dizem os rapazes que "a) Os portugueses conseguiram impor a sua religiao a uma grande maioria de indianos; isto, se nao e' mal, tambem nao foi um bem, sendo que tanto o indu' como o cristao podem atingir a salvaçao eterna, embora por vias diversas. A isto replica o sr. V. S. que "As conversoes pela via de espada podem desmerecer o aplauso do bom senso; mas, as conversoes pelo ensinamento e pela pregaçao sao absolutamente correctas. Porisso, deve-se dizer que as conversoes operadas pelos antigos missionarios europeus no Oriente sao um bem".

Vamos agora a ver em face da historia em que consistiram os tais "ensinamento e pregaçao", de que os antigos missionarios se serviram; para isso reportemos a factos, poucos factos.

O sr. V. S., erudito como e', deve conhecer as provisoes firmadas em 1559 pelo governador Francisco Barreto. Estas provisoes resumiu as o autor do "Oriente Conquistado" o Pe. Francisco de Sousa, nas seguintes linhas: "Nelas se proibiam sob graves penas aos infieis vassalos do Estado todos os ritos, cerimonias e festas gentilicas nas nossas terras; todos os oficios da Republica; servirem aos ministros ou oficiais del-Rei; administrarem rendas havendo algum cristao que lançasse nelas outro tanto; mandava se que as mulheres dos gentios fazendo se cristas fossem meeiras nos bens do casal, segundo as leis de Portugal; que os orfaos dos pais gentios antes de terem uso de razao fossem tomados e baptizados, ainda que tivessem mai ou outro qualquer ascendente, e depois de discriçao estivessem sujeitos a tutores cristaos ate os 14 anos".

Estas provisoes nao foram obra da *espada*; mas solicita las e obtidas pelos missionarios, por via de uma deputaçao ao Governador F. Barreto, deputaçao de que faziam parte o Bispo de Etiopia, Pe. provincial Gonçalo de Silveira e o Pe. Anto'nio de Quadros e o Pe. Francisco Rodrigues.

Para que o sr. V. S. nao suponha que este facto e' um caso esporadico, um acto de violencia que uma exaltaçao momentanea justifica, estando porisso muito longe de exemplificar uma norma de conducta por parte dos missionarios, ai damos mais uma prova frisante e clara, do que era a orientaçao dos ..luminares da fe' do tempo

. "Em 1557 reunia-se em Goa o 1° Concilio Provincial, e apezar de no 1° decreto estatuir que hao de trazer os infieis a fe' com exemplo de vida e pregaçao da verdade" logo nos decretos seguintes, leiam-se coisas estupendas como as que seguem "E a esta pregaçao obrigarao a vir todos os infieis que viverem em suas dioceses de 15 anos para cima, com pena de os privar do comercio dos fieis" — "Gravissimo pecado e' ... o da idolatria. O que considerando este Santo Sinodo ...pede a S. A. que se desfaçam todos os idolos, templos, arvores, e qualquer outro lugar em que o demonio e' venerado dos gentios"... e os que fizerem qualquer destas coisas que nestes canones se proibem sejam castigados com grandes penas". Nao para. E conformando-se com os canones manda que em terras de S. A. se nao de oficio, dignidade, honra, preeminencia, nem dominio algum infiel sobre pessoa fiel ... nem haja mocadaes nem rendeiro em suas rendas que sejam infieis."

Ha de concordar o sr. V. S. que estes decretos do Concilio estabeleciam um regimen de *Cres* ou *morres* com a diferença de que, em vez do infiel morrer trespassado pela tal *espada*, morria a' fome.

Para coroar esta obra toda feita do "ensinamento e pregaçao", veiu a Goa o Tribunal do Santo oficio a cerca de cuja obra e feitos tenha a palavra o proprio Arcebispo de Evora: "Se em toda a parte a Inquisiçao foi um tribunal infame, nunca a infamia, por mais baixa, por mais vil, mais eivada e determinada por interesses mundanos do que do Tribunal de Goa, por ironia chamado o Santo Oficio.

Sao dados como estes e muitos mais que a exiguidade do espaço nao permite trasladar para este jornal que nos podem ajudar a explicar o fenomeno de 20.737 conversoes durante 3 anos do governo de D. Constantino de Bragança, e a destruiçao dos pagodes das Velhas Conquistas.

Sao de certo estas as razoes e tiradas dos livros e documentos antigos que dois dos mais notaveis escritores desta terra divulgaram ainda ha' pouco que levaram os jovens estudantes a afirmar que a religiao imposta nao foi um bem. E eles nao estam so' na sua afirmaçao. La' o director de uma missao franceza na India confessou abertamente num relato'rio que a India despensava biblias, o que lhe faltava era trabalho e pao. O muito que resta fica para outro numero.

X.

Ecos & Critica

NAO HAJA DUVIDAS

Cremos que os artigos sobre o futuro de Goa, publicados neste jornal, nao levaram ao ilustre colega da *Terra* a idea nitida do que representa a opiniao nossa perante o momentoso problema.

Para que nao haja duvidas, aqui damos a nossa maneira de ver.

Para o *Bharat*, Goa autonoma dentro da India independente, Goa constituindo um Estado dos Estados Unidos da India, representa uma *fatalidade* historica, embora de uma realizaçao longinqua.

Para o *Bharat*, a Goa autonoma (com a politica administrativa e fiscal interna propria) dentro da India fruindo o *Domini ou Status* e' uma consequencia fatal da Revoluçao politica na India Ingleza, que nao pode demorar muito.

O *Bharat* e' contra o sistema duro e autocratico da administraçao inglesa da India, como e' contra todas as autocracias donde quer que elas venham.

Por hoje vai isto resumidamente. Qualquer dia teremos o prazer de voltar ao assunto com mais vagar e espaço.

DR FONTES

Tomou posse do importante cargo de delegado desta comarca o sr. dr Joao Fontes.

Quem estas linhas escreve, julga-se habilitado a afirmar que o sr. dr. Fontes e' um coraçao bem formado, reunindo todos os requisitos necessarios para enaltecer as elevadas funcçoes em que a Republica o investiu.

Conhecemo-lo desde novo e se umas vezes tivemos a felicidade de admirar as manifestaçoes de sua lu'cida inteligencia, como estudante prestimoso que o foi, outras vezes gosamos a ventura de testemunhar rasgos emocinantes de sua fina nobresa como descendente duma familia honrada a que pertence.

Por todos estes motivos, o *Bharat* considera-se feliz em ver o digno magistrado colocado nesta comarca dando-lhe os cumprimentos de boas vindas com votos pelas crescentes prosperidades.

GANDHISMO

Mahatma' Gandhi e' considerado pelos sabios americanos como o primeiro homem do mundo, opiniao esta que e' reforçada ainda pelos eminentes pensadores da Europa.

Este conceito que Gandhi gosa, la' fo'ra, e' originado, proveniente da excelencia dos principios do *Mahatma'*, principios verdadeiramente santos e angelicos, porque nao admitem na sua pratica *pecado* algum.

Tais principios constituem objecto do culto do *Bharat*, ainda que isto desagrade ao *gandhifago* sr. Pereira Batalha e outros...caudilhos *provincianos*.

...anoa.

लेला आहे, हेंच त्या शब्द तीव्र अर्थव्यापकत्वाचें कारण होय. यावरून एवढेंच लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, असल्या शब्दांची व्याप्ति कमी होणें किंवा वाढणें हें व्यवहारांतील ज्या गोष्टींशीं ते अनुबद्ध असतात त्या गोष्टींच्या कमी अधिक महत्वावर अवलंबून असतें. ज्या प्रश्नासंबंधीं आतां आपण चर्चा करणार आहों त्या प्रश्नाच्या " राजकारण " या निदर्शक शब्दांत देखील असाच फेरफार घडून आलेला आहे. लो० टिळकांच्या राष्ट्रीय कामगिरी पूर्वी या शब्दाची व्याप्ति बरीच संकुचित होती. या शब्दाचे द्वारा विशिष्ट व मर्यादित अशा कल्पनेचाच उल्लेख करीत असत. याचा खरेपणा पहाण्याचें झाल्यास " राजकीय सुधारणा आधीं कीं सामाजिक सुधारणा आधीं " वगैरे झालेल्या वादविवादावरून कळून येण्यासारखें आहे; पण सध्या ही स्थिति बदललेली आहे व कित्येक सामाजिक सुधारणा राजकीय सुधारणांच्या अनुगामी असतात, याबद्दल बहुधा आतां लोकांचें एकमतच बनत चाललें आहे. थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, दिवसें दिवस राजकीय सुधारणांच्या अभावामुळें जनतेला अनेकविध अडचणी भासं लागल्या व स्वातंत्र्य भ्रष्ट देशाचें आत्यंतिक हित साधणें असल्यास राजकारणाचें कंकण हातीं बांधल्याशिवाय गत्यंतर नाहीं, अशी स्वदेशहितरत व बुद्धिवान मनुष्यांची समजूत जिकडे तिकडे झालेली दिसून आल्याशिवाय रहात नाहीं.

सामाजिक सुधारणांचे पूर्वी राजकीय सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत, असें वर ह्मटलें याचें कारण आम्हीं गोमांतकवासी काय किंवा आमचे शेजारचे ब्रिटिश प्रजाजन काय, सर्वजण परकीयांचे राजवटींत आहोंत हेंच होय. स्वतंत्र राष्ट्रांत असले हे प्रश्न उद्भवणेंच मुळीं शक्य नाहीं. व एकादेवेळीं ते उद्भवल्यास देखील त्यांना महत्वहि पण तितक्याच पुरतें असतें. स्वतंत्र राष्ट्राच्या सामाजिक हिताची कोणतीहि गोष्ट तेथील राज्यसंस्था लक्षांत घेतल्याशिवाय रहात नाहीं. व म्हणून कोणतीहि सामाजिक सुधारणा राजकीय सुधारणांवर अवलंबून असत नाहीं. उलट समाज–हिताच्या अनुरोधानेंच राज्य संस्थेंत इष्ट ते फेरबदल होतात. स्वतंत्र देशांत लोकहिताकरितांच राज्यसंस्थेचा उदय झालेला असतो. निदान या संस्थेचें संक्रमण राष्ट्रहितभिलाषी संस्थेंत होत जातें. पण परतंत्र देशांत ही गोष्ट बदलते. जनतेच्या युक्त आकांक्षांच्या अनुरोधानें राज्यसंस्थांचे स्वरूपांत बदल होत नसून लोक समाजाची शेंडी प्रत्येक बाबतींत सरकाराच्या हातांत जाते. व कित्येक सामाजिक सुधारणांना अनुकूल परिस्थितीचे अभावी राजकीय सुधारणाच्या कुबड्या चा आश्रय करावा लागतो. अशा स्थितींत लंगड्या बनलेल्या समाजाला सुधारणेच्या मार्गावर वरील कुबड्यांचे अभावीं एक पाऊल देखील टाकणें शक्य नसतें. व ह्मणूनच पारतंत्र्यांत रुतलेले देश " न चा गंत सुखं त्यजते " हें लक्षांत ठेऊन राजकीय सुधारणेच्या कुबड्यां प्रथम हस्तगत करण्याचे प्रयत्नास लागतात.

राजकारणाचें महत्व, लो० टिळक, म० गांधी वगैरे आधुनिक पुढाऱ्यानींच आम्हांस आजकाल पटविलेलें नसून अडीच शतकांपूर्वी श्री समर्थ रामदास महाराजांनींहि याची महती गायलेली आहे. "मुख्य हरिकथा निरूपण ॥ दुसरें तें राजकारण ॥" या ओंवींत किंवा 'प्रपंची जाणे राजकारण ॥ परमार्थी साकल्य विवरण ' या व इतर कांहीं ठिकाणीं त्यानीं राजकारणाची थोरवी वर्णिलेली आहे. यालाच महाराष्ट्रीय धर्म असें ह्मणतात. प्रपंच (ह्मणजे केवळ कुटुंबाचा संसार नव्हे तर देशाचा–राष्ट्राचा संसार) व परमार्थ याचा मेळ घालणाऱ्या या शिवकालीन महाराष्ट्रधर्माची पुनरावृत्ती सध्या हिंदुस्थानांत झालेली आपण पाहतों. शिवाजी महाराज आपली बुद्धि व शक्ति केवळ सामाजिक सुधारणेकडेच खर्च करते तर स्वराज्य संस्थापनेचें अवघड कार्य त्यांचे हातून झालें असतें कीं नाहीं या बद्दल शंकाच आहे. हिंदुपदपातशाहीची प्रस्थापना करण्यापूर्वी आपल्या जातभाईंच्या निवळ सामाजिक सुधारणेला त्यानीं हात घातला असता तरी देखील त्यानां तसें करणें मुसलमानी कारकिर्दीचे जाचामुळें दुर्घटच नव्हे तर कांहीं अंशीं अशक्य होऊन बसलें असतें. पण तीच गोष्ट स्वराज्य स्थापनेनंतर करणें त्यानां शक्य होऊन आपल्या समाजाची व राज्याची घडी तत्कालीन कल्पनेप्रमाणें त्यानां घालतां आली हें इतिहासज्ञानां ठाऊक असल्याशिवाय रहाणार नाहीं. संसारावर लाथ मारून आत्मशोधनांत गुंतलेल्या श्री समर्थांनीं शिवबाना राजकारणाबद्दल उपदेश कां केला याचें रहस्य वर सांगितलेल्या गोष्टींतच आहे, हें विसरतां कामा नये.

कोणत्याहि शब्दाचा रूढ अर्थ देशकालपरिस्थित्यनुरूप बदलत असतो, हें वर सांगितलेंच आहे. राजकारण हा शब्द एकच खरा परंतु, आपल्या गोमांतकांत या शब्दाचे द्वारा होणारा प्रचलित अर्थबोध ब्रिटीश इंडियंत घेतल्या जाणाऱ्या अर्थापेक्षां निराळाच नव्हे तर विरोधीहि आहे, हें लक्षांत घेतलें पाहिजे. राजकारणाचे ऐवजीं पोर्तुगीज भाषेतील त्याच अर्थाचा पोलीटीक politica हा शब्द इकडे आपल्यामध्यें फारच हीन व संकुचित अर्थानें वापरला जातो. स्वतःचे क्षुद्र हितसंबंधावर दृष्टि ठेऊन राजकीय बाबतींत मन घालणें हाच politica या शब्दाचा रूढ अर्थ होय. कोणत्याहि कमस्सल चळवळ्या प्राण्याला politico हा शब्द क्षुद्र अर्थानेंच बहुतकरून वापरला जातो. या व्याप्तिदोषाचें कारण एवढेंच, कीं, जीव सृष्टींचें प्रतिबिंब शब्द सृष्टींत पडलेलें असतें. आपल्या इकडे राजकारणांत पडणारे पुरुष (बहुतकरून ख्रिश्चन हें सांगणें नकोच.) आपलपोट्या वृत्तीचेच असतात असा कोणी आजपर्यंतच्या इतिहासावरून सिद्धांत काढल्यास तो चुकीचा आहे असें ह्मणण्याचें धाडस अनुभवावरून तरी करतां यावयाचें नाहीं. Beocia देशांतील Helicon नावांच्या डोंगरांत असलेल्या एका झऱ्याचें पाणी पिण्याबरोबर कवि बनत, असें पोर्तुगीज कवि Luis de Camoes यानीं आपल्या Lusiadas नावांच्या जगन्मान्य काव्यांत ह्मटलेलें आहे. त्या प्रमाणें येथील राजकारणाचे आखाड्यात शिरल्याबरोबर मनुष्य स्वार्थी–पूर्ण स्वार्थी बनत असल्यास न कळे! परंतु, वस्तुस्थिति अशी आहे हें मात्र खरें. याचा खरेपणा पहावयाचा झाल्यास ख्रिश्चन पुढाऱ्यानीं चालविलेल्या कित्येक वर्तमानपत्रांच्या बदलत्या धोरणाकडे पहाणें जरूर व मनोरंजकहि होणार आहे.

येथील कित्येक वर्तमानपत्रांचा इतिहास असा आहे कीं, आपल्या जन्मानंतर उणे अधिक दिवस तीं सरकारला त्यांचीं एकूणएक कृष्णकृत्यें प्रकाशांत आणून सळो का पळो करून सोडतात. नोकरशाहींतील वरिष्ठ अधिकाऱ्याचें राज्यकारभारांत पडलेलें वाकडें पाऊल या वर्तमानपत्रांतून कांहीं काळ हटकून दिसावयाचें. या पहिल्या अवस्थेंत वरील नियतकालिकाना लोकाश्रय चांगला भरपूर मिळतो, व गांजलेल्या प्रजेला आपल्या रक्षणाकरितां पुढें सरसावलेल्या योद्ध्याना पाहून जरा हायसें होतें; पण, वरील वर्तमानपत्रकारानां कमी अधिक वेळ या प्रथमावस्थेंत ठेवणें केवळ सरकारी अधिकाऱ्यांवरच अवलंबून असतें हें सांगणें नकोच; पण वर्तमानपत्रकारांची प्रथमावस्थेंत होणारी कुचंबणा–त्याच्या दृष्टीनें–व केविलवाणी स्थिति एकाद्या नोकरीरूपी भाकरीचा तुकडा त्यांच्या तोंडावर येऊन आदळला ह्मणजे बंद होते.देशहिताबद्दल भीष्म प्रतिज्ञा करून सूर्याच्या तेजानें राजकारणाचे समरांगणावर जे वृतपत्रकार येतात न येतात तोंच यक्षिणीची कांडी फिरविल्याप्रमाणें, भाकरीचा तुकडा दृष्टीस पडतांच कुत्र्यापेक्षांहि हीन बनतात, व अशा रीतीनें दुसऱ्या बाजूनें जनतेच्या आकांक्षाना खो बसतो. (आतां मिळालेला भाकरीचा तुकडा ते स्वतःच खातात असें नाहीं. कित्येक वेळां त्याचा उपयोग ते स्वकीयांकडे करून देतात हें त्याच्या मोहबती खातर सांगणें इष्ट आहे.) चोरानें भाकरीचा तुकडा टांकला असतां पाहऱ्यावरून न हालतां धन्याशीं इमानी रहाणाऱ्या इसापनीतींतील कुत्र्यांपासून इकडील वर्तमानपत्रकारानीं उत्तम धडा घेण्या सारखा आहे. वर्तमानपत्रें हीं लोकमताचीं निदर्शक असावयाचीं. पण त्यांचीच जर अशी स्थिति तर " यद्यदाचरति श्रेष्ट स्तत्त देवेतरोजना" या न्यायानें राजकारणांत चिरणाऱ्या इतर पुढाऱ्यांचीहि अवस्था तीच झाल्यास त्यांत नवल तें काय? जी गोष्ट वर्तमानपत्रकारांची तीच गोष्ट कायदेकारी-मंडळांतील लोकनियुक्त सभासदांची. आतां पाण्यात स्खलन झालेल्या तेलाच्या थेंबाप्रमाणें वरील ससर्गजन्य वातावरणाची आपणास बाधा न होऊं देतां आपल कर्तव्य करीत रहाणाऱ्या कांहीं व्यक्ति राजकारणांत भाग घेणाऱ्यांत सांपडणार नाहींत असें नाहीं. पण हा एक अपवाद असणेंच ज्यास्त संभवनीय आहे. एकंदरींत " यथा क्रतुर स्मिन्लोके भवति " या श्रुतिवाक्याप्रमाणें येथील राजकारणाला आपल्या राजकारणी पुरुषांनीं अति हीन स्वरूप आणलेलें आहे. मग राजकारणांत पडणाऱ्या पुढाऱ्याला देशभक्तीची कांहीं गरज लागते असें येथील लोकानां न वाटल्यास त्यांत नवल तें काय? व देशभक्तांची निपज आमच्यांत होत नाहीं ह्मणून तरी का हळहळत बसावें? ही स्थिति बदलण्यास येथील सुशिक्षित वर्गाचे अंगांत " राजकीय दौर्बल्य दूर होण्यास निस्वार्थ होऊन राजकारणाचे आखाड्यांत शिरलें पाहिजे " हें तत्व भिनलें पाहिजे. असो. पुढील लेखांत प्रस्तुत विषयाचें दुसऱ्या बाजूनें विवेचन करण्याचें वचन देऊन, हा लेखांक येथेंच आटोपता घेऊं.

स्फुट विचार

अकलेचे तारेः— मडगांवच्या ' आ तेन्ह ' पत्रानें आपल्या गेल्या महिन्याच्या १९ तारखेच्या अग्रलेखांत जे अकलेचे तारे तोडले आहेत, ते वाचून कोणालाहि सखेदाश्चर्यच वाटेल. " हिंदूंना देशाभिमान अगदीं नकली असून तो स्वार्थमय आहे " –" हिंदूंना गांधीच्या तत्वांचा नीट बोध झालेला नाहीं "–" आपल्या स्वार्थमूलक हेतूंवर कोणत्याहि अधिकाऱ्यानें कुऱ्हाड हाणिली कीं, त्या अधिकाऱ्याविरुद्ध ते निष्कारण व उसन्या त्वेषानें एकच गिल्ला करतात–" अशा अर्थाचीं विधानें आपल्या त्या आक्षेपार्ह लेखांत ' आ तेन्ह ' कारानीं सारासार विचाराचें गांठोडें गहाण टांकून, एकदम दडपून दिलीं आहेत. अशा त्या विषारी लेखामुळें हिंदूंचीं मनें दुखलीं गेल्यास नवल नाहीं. ' हिंदु ह्मणजे कोणत्या झाडाचा पाला' अशी कित्येक खिस्त्यांना जी खोटी कल्पना करण्याची घाईट सवंय जडलेली आहे, तीनें ' आ तेन्ह ' सारख्या देशभक्तावरहि आपला पगडा बसविलेला पाहून, खिस्ती तितके येथून तेथून हिंदु प्रगतीला एक जात विरोध करणारेच महात्मे आहेत, असा सिद्धांत बांधण्यास मन कचरत नाहीं. ज्यानें त्यानें उठावें आणि हिंदूच्या शेंडीची निर्धोकपणें खुशाल थट्टा करावी हा जणुं काय त्यांचा जन्म सिद्ध हक्कच आहे. बदललेल्या मनूंची व फिरलेल्या मनांची त्यांना थोडीच पर्वा वाटते.! " हिंदु तितके कुच कामाचे " या खोट्या तत्वाचा प्रसार करण्यासाठींच जर त्यांचा जन्म झालेला आहे तर बदललेल्या परिस्थितीची क्षिति तरी त्यांना कां वाटावी?

तात्पर्यः— हिंदु व खिस्ती या उभय वर्गांत ऐक्य घडून येणें कसें व किती अ-

करवाढीची तात्विक मीमांसा
लेखांक नं. २
(ले० रामचंद्र त्र्यं. नाईक.)

प्रजासत्ताक राज्यपद्धतीची कार्यकारण मीमांसा व ती अमलांत येण्याच्या मुळाशीं जो एक राजकीय सिद्धांत असतो त्याचा ऊहापोह मी पहिल्या लेखांत केलाच आहे. व आज या लेखांत, त्या तत्वानुसार प्रजासत्ताक राज्यपद्धति प्रस्थापित होऊन तिच्या नावांखालीं गोव्यांत चालेलल्या हैदोसाचा थोडा विचार करून, करवाढीसारखे जाचक कायदे आपणच चालविलेली आपलीच राज्यपद्धति कशी प्रसवते, हें कोडें उलगडवावयाचें आहे.

एकादा मनुष्य किंवा एकादा विवक्षित समाज इतर राहिलेल्या समाजाहून प्रबल असला म्हणजे, तो प्रबल मनुष्य किंवा तो विवक्षित प्रबल समाज, आपल्या इच्छेस येईल त्याप्रमाणें इतर दुर्बल मनुष्यांकडून किंवा बहुसंख्याक इतर दुर्बल समाजाकडून पाहिजे तें हिरावून घेईल किंवा ––न घेईल. हें तत्व उमजल्याकारणानें प्रजासत्ताक राज्यपद्धति अमलांत आली; हें मी गेल्या लेखांत प्रतिपादिलेंच आहे. तेव्हां, जर या तत्वानुरूप प्रजासत्ताक राज्यपद्धति अमलांत आली तर, उघडच आहे कीं एकादा मनुष्य त्या प्रजासत्ताक राज्यांतील सत्ताधारी असला म्हणजेच केवळ त्या मनुष्याचा नैसर्गिक राजकीय स्वभावधर्म, कीं ज्या स्वभावधर्माच्या प्रतिकारार्थ प्रजासत्ताक राज्यपद्धति प्रस्थापित झालेली आहे, तो स्वभावधर्म, पालटला जात नाहीं. म्हणजे एखादा मनुष्य प्रजासत्ताक राज्यपद्धतीनुसार तींत प्रेसिडेंट, मुख्य प्रधान किंवा गव्हर्नर जनरलादि पदाप्रत पोहोंचलेला असला म्हणूनच केवळ तो मनुष्य आपला नैसर्गिक राजकीय गुणधर्म विसरेल असें ग्रहित धरणें म्हणजे ज्या तत्वानुसार प्रजासत्ताक राज्यपद्धति अमलांत आलेली आहे तें तत्व नाकबूल करणें होय. तेव्हां पुढील विचारसरणीच्या किंवा प्रतिपादनाच्या सोईसाठीं राज्यसत्ताधारी अधिकाऱ्यांचाच प्रश्न घेऊं म्हणजे पुढील विचारसरणी अधिक सुगम होऊन उपसंहारहि अधिक व्यवहार्य निघेल.

उत्तम प्रजासत्ताक राज्यपद्धतींतील सत्ताधारी अधिकारी सदोदित लोकमतानुरोधी असे बनलेले असतात. वास्तविक हे सत्ताधारी अधिकारी स्वतःच्या नैसर्गिक गुणधर्मानुसार लोकमतानुवर्ति बनलेले नसतात. प्रजासत्ताक राज्यपद्धतीची आवश्यकता ग्रहित धरिली कीं, ते सत्ताधारी अधिकारी आपल्या सत्तेचा उपयोग प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या ध्येयाचा नायनाट करण्याकडे करितील, हें मानवी गुणधर्मानुसार निघालेलें तत्व मान्य करणें भाग आहे. उलट पक्षीं, प्रजासत्ताक राज्यपद्धतीची अनावश्यकता मान्य केली पाहिजे. अर्थात, प्रत्येक सत्ताधारी मनुष्य, आपल्या नैसर्गिक गुणधर्मानुसार स्वहित साधण्याच्या धुंदींत, लोकमताची पायमल्ली करील; कारण, स्वहित साधण्याच्या गुर्मीत सत्ताधारी मनुष्याकडून परहिताची पायमल्ली होणें हें नैसर्गिकच असतें. व प्रत्येक सत्ताधारी मनुष्य या नैसर्गिक गुणधर्मास अनुसरलेलाच असतो. करितां, जर प्रत्येक सत्ताधारी मनुष्य नैसर्गिक दृष्ट्याच, परहिताची पायमल्ली करितो व गव्हर्नर जनरलादि सत्ताधारी हे या नैसर्गिक स्वभावधर्मास अपवाद असूं शकत नाहींत, तर, गव्हर्नर जनरलादि प्रत्येक सत्ताधारी मनुष्य आपल्या स्वभावधर्मानुसार लोकमताची पायमल्ली करितील, असा सिद्धांत सहज निघतो. व अशी पायमल्ली होऊन विनसत्ताधारी समाज दिवसेंदिवस दुःखित होत जाऊन प्रजासत्ताक राज्यपद्धतीचें ध्येय दिवसेंदिवस दुरावत जाईल. सारांश, उत्तम रीतीनें चाललेल्या प्रजासत्ताक राज्यांतील अधिकारी जे लोकमतानुरोधी असतात ते स्वतःच्या नैसर्गिक गुणधर्मानुसारच केवळ नसून, ते तसे कृत्रिम रीतीनें म्हणजे परिस्थित्यनुसार अगर लोकमताचा त्यांच्यावर असलेल्या दावामुळें तसे बनलेले असतात किंवा तसे बनणें त्यांस भाग झालेलें असतें, असा निश्चितार्थ निघतो.

वरील विचारसरणीनें पाहिलें असतां करवाढीसारखे लोकमतघ्न कायदे कसे अमलांत येतात याची उपपत्ति लागते. वास्तविक गव्हर्नर जनरलासारखे सत्ताधारी अधिकारी प्रत्येक राज्यपद्धतींत, म्हणजे जी राज्यपद्धति वाईट–सामान्य जनविरोधी–म्हणून तिच्या एवजीं प्रजासत्ताक राज्यपद्धति प्रस्थापित झालेली आहे, तींत ते एकसारख्याच अधिकारांनीं युक्त असे असतात. फरक एवढाच कीं, इतर राज्यपद्धतींतील सत्ताधारी अधिकाऱ्यांवर लोकमताचा दाब, प्रजासत्ताक राज्यपद्धतींतील सत्ताधारी अधिकाऱ्यांवर जितका असतो तितका तत्वशःच व व्यवहार दृष्ट्याहि असत नाहीं; व म्हणूनच प्रजासत्ताक राज्यपद्धतींत प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनें आपलाच दाब आपल्याच व्यवहारावर असल्या कारणानें गव्हर्नरसारख्या सत्ताधारी लोकांस आपल्या गुणधर्मानुसार मनःस्वैर वागण्यास मिळत नाहीं; व अर्थात लोकमतघ्न कायदे अमलांत येत नाहींत. उलट पक्षीं, ज्या सत्ताधाऱ्यावर लोकमताचा दाब नसतो किंवा हा दाब नामशेष झालेला असतो किंवा लुला पडलेला असतो, त्या सत्ताधाऱ्यांकडून करवाढीसारखे लोकहितविघातक व लोकमत विरोधात्मक कायदे अमलांत येतात, कारण तसे कायदे करण्यांत, त्यांचा प्रत्यक्ष जरी नसला, तरी अप्रत्यक्ष रीतीनें कोणताना कोणता तरी फायदा असतोच अशा रीतीनें व्यवहार चालला असतां आपण पुरस्कारिलेलें प्रजासत्ताक ऊर्फ लोकहितात्मक तत्व आपल्याच हातून निमलूम चिरडलें जातें. तेव्हां अशा विचारसरणीनें पाहिलें असतां करवाढीसारख्या अमलांत आलेल्या कायद्याची जबाबदारी प्रत्यक्ष रीतीनें कोणावर येते हें स्पष्ट दिसत असून एका धडाडीच्या व जोमदार बाण्याच्या स्वतंत्र वर्तमानपत्रकारानें अशा जबाबदार जनतेस आपल्या जबाबदारीची जाणीव करून देण्याचें सोडून ' करवाढीच्या बुडाशीं कोण आहे ? ' व ' करवाढीसंबंधीं सारासार विचार ' या दोनहि अग्रलेखांत मल्लिनाथी आटापीट करून व वड्याचें तेल वांग्यावर घालून देऊन वर्तमानपत्रकाराची कर्तव्यसांगता झाली असें मानून घेतल्याचें दिसत आहे.

सवलत कीं दहशत ?

श्रीयुत भारत कर्ते यांस:=

महाराज, आपण व आपले सहकारी बंधु 'हिंदु' पत्रकर्ते यांकडून शिमग्याच्या उत्सवास आलेल्या विकृत स्वरूपाविषयीं लोकांच्या मनांत अनादर उत्पन्न करण्याचा कितीहि प्रामाणिक प्रयत्न करण्यांत आला तरी, यंदांचे वर्षीं खरोखर दोन तीन कडच्या शिमग्यांतून विद्याहरण नाटकाचे प्रयोग करण्यांत आल्यामुळें, दैत्यगुरु शुक्राचार्य यांच्या तोंडून निघालेले ब्रह्मशाप, बहुतेक मद्यप्यांस उघड उघड ऐकावयास मिळाले. मद्यपान निषेधक चळवळीच्या ––नें पाहतां अंशतः तरी त्या शापांचा परिणाम आधुनिक शुक्राचार्यांच्या मनावर होणारा नसला तरी निदान त्यांचा नवओढा शिष्यानुशिष्यांवर होईलच होईल. विद्याहरण नाटकाचे कर्ते श्री. खाडीलकर यानीं असलें परिणामकारक नाटक उजेडांत आणून अखिल हिंदुसमाजावर महद् उपकार करून ठेवले आहेत असें म्हणण्यास कोणतीच हरकत नाहीं.

प्रस्तुत नाटकाचें कथानक पौराणिक असलें तरीं तें सजवितांना मद्यपि तर राहोच पण गळ्याभोंवती गळफांस घालणारे, तोंडावर रंगरोगण करणारे यांवर सुद्धां कोरडे ओढले आहेत. प्रत्येक प्रवेशांत कांहीं ना कांहीं तरी परिणामकारक भाषणें ग्रथित केलीं आहेत. त्याच्या तडाक्यातून वर्तमानपत्रकार सुटले असतील असें म्हणावें तर, परवां जांबावलीच्या शिमग्यांत झालेल्या त्याच नाटकाच्या प्रयोगांत असा एक प्रवेश होता कीं, तो पाहून, हा वर्तमानपत्रकारांच्या फायद्याचा आहे कीं त्यास नुकसानकारक आहे हेंच समजत नव्हतें. श्री. खाडीलकर हे स्वतः वर्तमानपत्रकर्त्यांपैकींच असल्यानें आपल्या धंद्यास प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें उत्तेजन मिळेल अशी एखादी कृति त्यानीं त्यांत योजून ठेविली असण्याचा संभव आहे. नाट्यप्रयोगाच्या ऐन मध्यावर, कपाळावर वर्तमानपत्रांचीं नावें डसवून म्हणा अगर रंगवून, दोन पात्रें रंगभूमीवर आणावयाचीं व त्यांकडून त्या त्या पत्राची विरोधभक्ति केलेली दाखवावयाची. ही कुशलता केवळ आयती हजारों लोकांत त्या पत्रांची फुकट्याफुकट जाहिरात लागावी या साटींच योजली गेली नाहीं असें कोण म्हणेल ? कपाळावर–माणसाच्या–जीवंत चालत्या बोलत्या माणसाच्या कपाळावर जाहिराती !! आजपर्यंत कोणी ऐकीलेंच नाहीं ! आगगाडीच्या डब्यांवर, कोठें आगबोटींवर, कुठें मोटारी, गाड्या याच्या रिकाम्या जाग्यांवर, तर कोठें भिंतीवर मालकानां भरपूर भाडें देऊन जाहिराती चिकटविलेल्या पाहण्यांत येतात. असला माणसांच्या कपाळावर जाहिरात देण्याचा हा नवीन उपक्रम गोव्यांत आणि तोहि जांबावलींतच झाला असला पाहिजे; कारण गोव्यांत कपाळाला १० आण्यापेक्ष ज्यास्त किंमत नाहीं. व तीहि खरदीवर. तेव्हां त्याचें खाडीलकरांनां काय म्हणून श्रेय देतां ? असेंहि कोणी म्हणेल. आणि त्यांत कांहींच तथ्य नाहीं असें म्हणण्यास आम्हींहि पण धजत नाहीं. कारण, वरील सारखा प्रवेश जांबावलीशिवाय अन्यत्र कोठें करण्यांत आल्याचें निदान कोणी नाटकांत वाचल्याचें एकिवांत नाहीं. शिवाय त्या प्रवेशांतील पात्रांच्या तोंडीं योजिलेली ग्राम्य व अघळपगळ भाषा खाडीलकरांसारख्या जनतेचे पुढारी म्हणविणाऱ्या गृहस्थाच्या लेखणींतून उतरणें शक्यच नाहीं. कसेंहि असलें तरी त्या भाषणांतून जीं दोन तीन प्रमेयें निघतात तीं हीं:= पहिलें– आपल्या मताविरूद्ध लेख ज्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होतात तीं पत्रें तावडतोब परत करणें; दुसरें = संजीवनी विद्या शिकावयास आलेला गुरुपुत्र कच देवयानीला मद्यपान पराङ्मुख करण्याचा प्रयत्न करतो असें दिसतांच युवराजानें इतर दैत्यांच्या सहायानें ज्यां प्रमाणें त्यास मारून नाहींसें केलें त्याप्रमाणें, लेखकाची– जेथ मोरांची वस्ती आहे त्या नंदनवनांत उचलबागडी करणें आणि तिसरें –इतकेंहि साधलें नाहीं तर कचाला जाळून ज्यां प्रमाणें त्याची राख मद्यातून शुक्रगुरूना पाजण्यांत आली, त्या प्रमाणें, त्या त्या वर्तमानपत्रांचे ते ते अंक जाळून, त्याची राख करून, ज्याणीं ज्याणीं शुक्रगुरूंच्या मागें दारूबाजीची परंपरा चालविली असून आपल्या भोंवतीं हजारों शिष्यानुशिष्यवरांची मालिका तयार केली आहे व करण्याचें कार्य अव्याहतपणें चालविलें आहे त्यास त्यांच्या आवडत्या पेयांत मिसळून पाजणें.

हीं तीनहि प्रमेयें गोमांतकांतीलच नव्हे तर जगांतील वर्तमानपत्रांच्या इतिहासांत कधींना कधीं तरी नमूद होऊन राहतील यांत शंका नाहीं.

दुर्दैवानें म्हणा अगर सुदैवानें म्हणा तीं प्रमेयें अमलांत आणण्याचा कधीं काळीं प्रसंग आला तर, कचाची राख पोटांत गेल्यामुळें शुक्राचार्यांवर जसा मरण प्रसंग आला, तसा प्रसंग, वर्तमानपत्रांची राख पोटांत घालून, आणणारा आधुनिक शुक्राचार्य कोण मिळेल हीच जबरदस्त भीति आहे. देवा महारांगणा, तूंच ती निवारण कर रे बाबा; तुलाएक नव्हे दोन, एकशें एक सुरेचे कळसे दुसऱ्या शिमग्याचे वेळीं देईन. यांत तुझाहि फायदा आणि आमचाहि फायदा. कारण तुझ्या प्रसादांत आम्हाला मनसोक्त पोंहावयाला मिळणार. तथास्तु-

गुढी पाडवा १८४६—मडगांव

आ. नव्हे प्रो. शुक्रांचा खासा शिष्यवर

Ano 9° N. 4

Quinta-feira 17 de Abril de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
Por ... ainda que repetid.
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
P. Hegdo Dessay
Quepem-Goa

वर्ष ८ वें, अंक १

वर्ष ९ वें, अंक ४

भारत
BHARAT

गुरुवार ता. १७ एप्रील सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारे.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

CRONICA DA SEMANA

O calor esbraseante e horroroso, por estes dias, faz suar em bica a todos que nao tem nos seus bolsos alguns reis para ir passear nas praias ou internar se no suave e pacifico viver da aldeia monotona.

वर्णानें आणि धर्मानें भिन्न वधु वरांच्या विवाहाला मिश्र विवाह म्हणतात. उ०— वधु शूद्र आणि वर ब्राम्हण, असल्या विवाह पध्दतीचा पुरस्कार व स्वीकार मोठमोठाल्या प्रतिष्ठित विद्वानांनीं देखील आज पर्यंत केलेला आहे. माहे डिसेंबर सन १९१८ सालच्या "नवयुगांत" डॉ. काशीबाई नवरंगे नांवाच्या एका विद्वान बाईचें व्याख्यान प्रसिद्ध झालें असून विषयही 'मिश्र विवाहच' होता या बाई सदर व्याख्यानांत म्हणतातः-

एकाच जातींतील निरनिराळ्या पोट भेदांमध्यें व भिन्न धर्माच्या तरूण तरूणीमध्येंही विवाह संबंध होणारच, हें जेव्हां कांहीं अध्वर्यूंच्या ध्यान्यांत आलें त्या वेळीं अशा प्रकारचे विवाह म्हणजे कोणत्याही प्रकारानें गैर नव्हत, असें माननारे किंबहुना जातिभेद माननेंच गैर असें प्रतिपादणारे ब्रह्मसमाजीय लोकांनीं हे विवाह कायदेशीर गणले जावेत म्हणून सरकारपाशीं कायदा मागितला. त्यांच्या मागणीप्रमाणें तो कायदा ब्रह्मसमाजिष्टं करतां व्हावयास पाहिजे होता. [!] अर्थात् सरकारी रीतीनें कायदेशीर ठरलेली कोणती तरी गोष्ट धार्मिक. व शास्त्रीय दृष्टीनें बेकायदेशीर [बहिष्कृत] ठरली तरी त्याची मोठीशी फिकीर नाहीं. असें या विदुषी श्रेष्ठ बाईचें, त्यांच्या व्याख्यानावरून ठाम मत उघड होत आहे वाचक हो या बाई, बी. ए. एल्. एम्. एस्., एवढ्या शिकलेल्या वरें? शिवाय प्रो. भाटे, मनोरंजनाचे, संपादक श्री. मित्र हीं उदाहरणें मिश्र विवाहाच्या प्रत्यक्ष स्वीकाराचीं आहेत.

तेव्हां याहून सखेद आश्चर्याची कोणती गोष्ट आहे? माझे मतें असें करण्यांत 'मनःपूतं समाचरेत्' या शिवाय कांहींच उदात्त हेतू नाहीं. मतस्वातंत्र्याचा असा दुरुपयोग करण्याला निवळ अशिक्षितपणाच मी समजतों. पाश्चिमात्य शिक्षणानें व विशेष सुसंस्कृत झालेली–नव्हे निढावलेली बहुतेक मंडळी अशीच आढळते. भलीं मोठीं थोर पदव्यांचीं भांगारें घातलेल्या पदवीवर शहाण्यांनीं झोळयांत भरलेल्या मडमेचें पाणि-ग्रहण करून तिलाही आपली सौभाग्यवती करावयास कमी केलेलें नाहीं! आणखी सुधारणेची कोणती इतिश्री व्हावयाची राहिली? अस्तु.

आतां यावरून असेंही कोणी विचारील कीं, कायहो? प्राचीन काळीं मिश्रविवाह होत नव्हत का? मग त्यांच्याबद्दल आतां तरी तुमची इतकी विरुद्ध कां धडपड? अगदीं बरोबर आहे हा प्रश्न. आणि त्याचें समर्पक उत्तरही थोडक्यांत मिळण्यासारखें आहे. पण प्रांजलपणें विचार करणाराला वितंडवादी उच्छृंखला काय उपयोग? त्यांची खात्री करतां करतां 'ज्ञान लव दुर्विदग्धं ब्रह्मापि तं नरं न रंजयति' हा अनुभव शेवटीं खरा ठरून गप्प बसावें लागणार! तरी पण 'अकरणात् मंद करणं श्रेयः' या न्यायानुरूप यथामति तसें उत्तर देण्याचा मी यत्न करीतआहें.

आर्यांमधील कित्येक ज्ञानी महर्षिंनीं समाजाला नियमित स्वरूप प्राप्त होऊन शिस्त लागावी म्हणून त्याचे चार वर्ण केले. धर्मशास्त्राची उत्पत्ती देखील या साठींच आहे. परंतु ती चातुर्वर्ण्य व्यवस्था व तीं धर्मशास्त्रें मिश्रविवाहाच्या चळवळीला ऊत आल्यानें आज धाब्यावर बसविलीं जात आहे. ऋषिकालीं असले विवाह होत असत. हें मी कबूल करतों. कारण, वसिष्ट–अक्षमाला, जमदग्नि रेणुका ययाति देवयानी, वैश्रावण कैकसी, गौतम–अहिल्या इ. पुराणांतरीं पुरावे आहेत. म्हणून त्यांचें अनुकरण आतांही केलें पाहिजे. असें कोठेंच सांगितलेलें नाहीं. इतकेंच काय पण उलटा त्याचा तीव्र निषेध मात्र केला आहेः—

'शूद्रां शयनमारोप्य ब्राह्मणो यात्यधोगतिम् । जनयित्वा सुतंतस्यां ब्राह्मण्यादेव हीयते.'

शूद्राच्या मुलीशीं [लग्न करून] समागम करणारा ब्राह्मण' ब्राह्मणपणांतून नष्ट होतो. असें वरील श्लोकांत म्हटलें आहे. तेव्हां या बाबतींत नसता बात्रटपणा करणें हा शुद्ध वेडगळपणा होय. आमच्या वर्ण-गुरु ब्राम्हणांनींच आधीं ताळ सोडला मग इतरांची काय कथा! यामुळें सामाजिक घोटाळे किती व कसे होतात पहा—

एकाद्या ब्राह्मण व शूद्री या जोडप्याचे पोटीं झालेल्या संततीला ब्राम्हण म्हणावें शूद्र म्हणावें कीं दोन्हींकडे निमेनिम हिस्सेरेशीनें विभागावीं. या बद्दल मला तरी पेंच पडला आहे खास! शुद्ध धर्माचरणी व सुशील प्रजा उत्पन्न होण्याकरतां शास्त्रोक्त असेच आमच्यांत विवाह झाले पाहिजेत. या बद्दल आपल्या स्मृतिकारांनीं पुढील निर्णय दिला आहेः—

॥ श्लोक ॥

सवर्णाऽग्रे द्विजातीनां प्रशस्ता दारकर्मणि ।
कामतस्तु प्रवृत्तानामिमाः स्युः क्रमशो वराः ।
शूद्रैव भार्या शूद्रस्य सा च स्वाच विशःस्मृते ।
तेच स्वाचैव राज्ञश्च ताश्च स्वा चाग्रजन्मनः॥
न ब्राह्मण क्षत्रीययोरापद्यपि हि तिष्ठतोः ।
कस्मिंश्चिदपि वृतांते शूद्रा भार्योप दिश्यते ॥

(मनुस्मृति. अ० ३ रा श्लो० १२-१४)

ब्राह्मणांनीं पंचमहायज्ञादि नित्यकर्माच्या सिध्दीस्तव आपल्याच वर्णामधील कुलश्री वरणें जरूर आहे. परंतु सृष्टी निर्माणकर्त्या ब्रह्मदेवांचे भागीदार होऊं इच्छिणाऱ्या व आचारविचाराची चाड न बाळगणाऱ्या काम दग्धांनीं, शूद्री, वैश्यानें वैश्या, क्षत्रियानें क्षत्रिया वैश्या व शूद्री अशा स्त्रिया क्रमानें वराव्या. याचप्रमाणें ब्राह्मणांनीं चारी वर्णाच्या स्त्रीया वराव्या असें सांगितलें. यावरून या मिश्र विवाहाला आयतीच सबळ संमती मिळाली असें मुळींच नाहीं. कारण, केवढीही भयंकर आपत्ती असली तरी ब्राह्मण किंवा क्षत्रियांनीं विजातीय ह्मणजे आपल्या वर्णाखेरीज स्त्रीया वराव्या. असें कोणत्याच इतिहासांत सांगितलें नाहीं. हें तिसऱ्या श्लोकांत स्पष्ट सांगितलें आहे. तेव्हां पूर्वकालीन मिश्र विवाहाचे पुरावे पुढें करून ते विवाह सध्यांही व्हावे याबद्दलचे हेकटपणाचें ढुंढुणे ढुंढुणावण्यांत कोणताच शहाणपणा नाहीं. हें आधुनिक सुधारकानीं पक्कें समजून असावें. असो. शेवटीं सुज्ञ वाचकांना, माझी इतकीच प्रार्थना आहे कीं, आतांपर्यंतच्या विवाहमीमांसेच्या माझ्या तीनही लेखांत माझ्या हातून घडलेल्या दोषांची मला क्षमा करावी व तीन्ही लेखांतील माझ्या पवित्र हेतूंचा प्रांजलपणें विचार करावा. इतकें सांगून हा विषय यथामति पुरा झाल्यामुळें आपली रजा घेतों.

गणेश रा. गोडसे.

—काल रोजीं मडगांव येथें एक मोठी सभा भरावयाची होती; पण ती सरकारी हुकुमामुळें रद्दीत करावी लागली.

माझा आंगोलचा प्रवास.

पत्र नं. ६

आजपर्यंत ईश्वरकृपेनें, आपणासारख्या मित्रमंडळीच्या अपेक्षेनें व वडील माणसांच्या आशीर्वादानें आरोग्यानें चांगला आहें. प्रवासांतील सर्व सुखसोई लाभत आहेत व विशेषेंकरून आपल्याच माणसांचा आश्रय मिळत आहे. यांपैकींच आमचे देशबंधु ठाकूर हे एक होत. त्यांचें खातःचें बिऱ्हाड आहे. थाट चांगला असून एकंदर पद्धत युरोपियन तऱ्हेची आहे. त्यासंबंधीं माझे विचार त्यांस समजतांच थोडा फार त्यांत बदल झाला. त्यांकडे मी सुखांत आहें.

येथें येतांना मी येथील लोटरीचें नं. २६८३ चें एक तिकीट घेतलें असून बक्षिसें उघडण्याचा दिवस येत्या १६ तारखेस आहे. त्याची किंमत एक पौंड आणि पहिलें बक्षीस दोन हजार पौंडांचें आहे. वाटेंतच नशिबाची परिक्षा पाहण्यास एक पौंड खर्ची घातला आहे. 'लाभालाभौ जयाजयौ' यापैकीं काय तें समजून येईल.

लोरेंव मार्क्स हें शहर माझ्या पाहण्यांत आलेल्या शहरां पहिल्या प्रतीचें आहे. याची आंखणी अशी कांहीं नामी आहे तेणेंकरून याच भव्यता, व विशेष शोभा आली असून रस्त्यांचीं डांबरी, स्वच्छता घरांची मांडणी, टापटीप, दक्षता, दुकानाची व्यवस्था वगैरेनीं वरीच भर पडली आहे. एके बाजूस बंदर, त्यांस जोडून रल्वेस्टेशन, बंदरांत प्रत्यहीं उभ्या असणाऱ्या दहा पंधरा मोठ्या वजनाच्या बोटी, जिकडे तिकडे व्यापाराची रहदारी, ट्रामवे, मोटारी, मोटारसायकली यांचा सुळसुळाट, सर्व शहरभर विजेची रोषनाई, पाण्याचे नळ, गल्लोगल्लीं सोलजर–पोलीस, मुद्दाम, उंच उंच घरें, दुकानांच्या पुढच्या सगळ्या आरशाच्या भिंती, तऱ्हतऱ्हाच कपाटांतून ठेवलेला तऱ्हेतऱ्हेचा पण नमुन्याचा माल वगैरे पाहून, मला वाटतें, मुंबई सुद्धां फिकी पडेल. तेथील मुख्य प्रेक्षणीय भाग झटला म्हणजे कोटाचा Fort होय. पण अशीं दुकानें तेथें क्वचितच आंढळतील. पोर्तुगीझांचा दिवाळखोरपणा अथवा व्यवस्थेशीरपणा जर पहावयाचा असेल तर इकडेच पहावा. इतकी या शहराची योग्यता आहे. यावरून असें वाटतें कीं, गोवें त्यांच्या लक्षांत नसून त्यानें म्हणण्यासारखा त्याचा फायदाहि पण नाहीं. मुर्जीव भक्याचें काम कंपनीनें आंगावर घेतलें नसतें तर सरकारकडून झालें नसतें. पोर्तुगीझांनीं इकडे मी मोठमोठीं कामें केलीं आहेत व करीत आहेत. तीं पाहिलीं म्हणजे मन थक होऊन व क्षणभर हीं पोर्तुगीजांची नसतील असा सुद्धां भास होतो. येथून रेल्वेचे दोन फांटे गेले असून पहिला ट्रांजवाल पर्यंत व दुसरा बेजरपर्यंत गेला आहे. तिचा मालकी पोर्तुगीझांकडेच असून सर्व देखरेख उत्तम चालली आहे. येथील व्यापारी वर्गांत हिंदी लोकांचा ज्यास्त भरणा नसून पोर्तुगीजच ज्यास्त आहेत. याचें कारण असें दिसतें कीं, हिंदी पद्धतीनें राहणाऱ्यांस पोर्तुगीझांकडून योग्य तऱ्हेनें वागविलें जात

Ano VIII ... 10

Quinta-feira 7 ... de 1923

ASSIN...
Por cada a... ...as

AN...
Por cada linha ain... ...tida uma tanga
Numero ... ...a tanga

DIRE... ...EDITOR
G. P. ... lo Dessay
Quepem-Goa

BHARAT

वर्ष ८ वें. अंक १०

गुरुवार ता. ७ जून सन १९२३

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

Franquesa franca ...

O *Bharat* tem por norma defender os interesses do Povo, cujos inimigos sao tambem inimigos dele. Tudo o que va' de encontro com o bem estar popular, nunca nos merece aprovagao: sempre o reprovamos numa linguagem algo dura mas sempre sincera.

E' desnecessario frisar, portanto que uma administragao politica de que provenha a bancarrota do erario publico e, consequentemente, o aumento de impostos que arranquem ao Povo coiro e cabelo, sera' sempre alvo de nossa campanha.

E' a razao por que o *Bharat* atacou, ataca e atacara' o sr. Prazeres da Costa; e' a razao por que o *Bharat* se insurgiu, se insurge e se insurgira' contra os verdugos do Povo, e, finalmente, e' a razao por que o nosso jornal, sem se preocupar do que outros digam dele fulminou, fulmina e fulminara' todo e qualquer desatino governamental que fira o mais insignificante direito popular.

Com uma franquesa franca dizemo-lo, para que ninguem se atreva a malsinar-nos a pureza de intengoes, a deturpar-nos a sinceridade de critica e a falsificar-nos a lealdade de desejos patrioticos.

Ora tudo isto vem a proposito dalgumas cartas que nos acusam do crime anti-popular da defesa do actual governo por causa do nosso artigo *Politiquice...*, publicado no penultimo numero do *Bharat*.

Francamente, os nossos contendores nao leram bem aquele nosso artigo ou, se leram bem, nao nos alcangaram o espirito; porque, entao, teriam notado, sem esforgo de maior que na referida prosa nem o mais ligeiro vislumbre da defesa oficial, oficiosamente feita, se discobre...

Verdade e' que o *Bharat* nao faz causa comum com aqueles dos nossos presados colegas que atacam, tao so'mente, o sr. dr. Jaime de Morais, quem afinal de contas, e' menos culpado no transtorno de nossas finangas e no exagerado aumento de impostos. Mais culpados do que ele sao os conselheiros, o sr. Prazeres da Costa, o sr. Ministro das Colo'nias e o proprio Governo Central.

O sr. Jaime de Morais e conselheiros sao culpados por que fazem e fizeram, sem protesto, vontadinhas ao sr. Ministro das Colonias, representante do Governo Central e ... ao sr. Prazeres da Costa, representante da India e que como tal nunca perde o casiao para, dominado pelo espirito proteccionista de sua clientela, insuflar *leis* e *decretos* ... anichadores de seus afilhados.

Bem reflectido, o sr. Morais e' o menos culpado de todos, porque na qualidade de delegado do Governo Central nao tinha outro meio senao cumprir as determinagoes de seus superiores hierarquicos.

Mas os conselheiros, estes e' que, sob pena da resignagao de seus mandatos deviam por empecilho aos decretos desorganisadores do nosso erario e reprovar, de qualquer maneira, a atitude impatriotica do sr. Prazeres da Costa, o qual nao tem feito outra coisa senao procurar desgragar, por todos os meios ao seu alcance, o nosso Paiz, sendo, porisso, o mais culpado de todos, repetimos

Todavia os que atacam a torto e direito, a proposito e a desproposito o sr. Jaime de Morais, defendem, a torto e direito e a proposito e a desproposito o sr. Prazeres da Costa...

Justamente com esta *politiquice* que o *Bharat* nao pode de maneira alguma, concordar como nao pode conformar-se com a amisade politica que os inimigos do sr. dr. Morais dispensam ao sr. Alfredo Rodrigues que a titulo da passagem duns seus ausentes pretendeu levantar do tesouro publico uma boa soma de dinheiro do pobre Povo!

Diga agora o leitor imparcial se pode merecer algum valor a campanha *anti-jaimista* dos amigos e admiradores do srs. Prazeres e Alfredo Rodrigues?

Se sao capazes, ataquem os ditos *patriotas*, signifiquem-lhes, como no's que estao, por causa dos interesses privados, cavando a ruina do Povo e pegam-lhes que modifiquem a atitude.

Nada disso querem fazer, mantendo ao contrario, scilencio sepulcral?. Como diabo, nestas condigoes, o Paiz os acompanhara' na guerra sem treguas contra o sr. Jaime de Morais?

O Paiz acolhera', de bragos abertos, qualquer campanha que na sua accao envolva, alem doutros culpados dos principais destes.

Agradecendo

Ao nosso presado colega dO *Anglo Lusitano* agradecemos as referenciás elogiosas que fez ao *Bharat* pela sua entrada no 8.° ano.

Ecos & Critica

Magia, tambem

Diz se que o mundo está civilisado e culto, tendo já desaparecido o direito de força para dar lugar á força de direito

E' um disparate este, porque o direito de força *campeia in frene*. O autocratismo subsiste. O feudalismo terrorista e a escravatura humilhante, *idem* e *na mesma data*.

E contra quem reprova estas imoralidades ... legais criase uma atmosfera de suspeições . . .

Em volta dum comicio

Devia realisar-se em Margão, em 30 do mez p. f. um comicio com o fim de se protestar contra o actual estado de coisas administrativas.

Como, porem, no mesmo dia e na mesma hora, recaisse a festa da inauguração do novo edificio do Hospicio, festa a que devia assistir Sua Excia o sr. Governador Geral, o sr. Administrador do Concelho de Salcete intimou aos promotores do comicio para o adiarem a qualquer outro dia alegando, entre outros motivos o de êle não poder assistir nesse dia ao comicio, porque tinha de ir receber o seu superior noutro lugar.

Bastou isto para arder a Troia e ... a veia patriotica dos pais da Patria...

E em vez de fazer responsavel do adiamento do comicio o dito Administrador, atacam o sr. dr. Jaime de Morais!

Francamente, tudo isto deixa ver que em certos espiritos impera mais a questão pessoal do que a politica.

Isto não quere dizer que o *Bharat* seja amigo do sr. dr. Jaime de quem sempre procurou e procura estar afastado como de toda a burocracia.

O que êle quere é que Sua Excia. seja atacado, quando estiver com a boca na botija, para que a campanha dê resultados positivos...

Palavras sonantes, acusações ao ar, presumpções podem divertir as galerias mas nunca chegarão ao fim...

Taxas...

Foram aumentadas as taxas de todas as carreiras da Navegação Fluvial.

E' caso para dizer: *sobre que da coice*.

¿Quando é que os nossos governantes terão dó de nossa pobre gente? Nunca, talvez

Moratoria

A carestia da vida continua.

Os motivos que noutros anos obrigaram o governo provincial a conceder moratoria para o pagamento do contribuição predial, subsistem.

E' de esperar, portanto, que tambem nêste ano seja concedida a moratoria.

A necessidade não tem lei.

Aos srs. correspondentes

A nossa mez de trabalho está repleta de correspondencias, vindas de diferentes partes e versando sobre diferentes assuntos.

E pena é que estejámos luctando com a falta de espaço...

Ao menos, se os srs. assinantes fizessem a finesa de saldar os seus debitos, poderiamos alargar o formato do jornal.

Espere, pois cada um a sua vez

Ecos de Mandovi

(Do nosso correspondente)

Vai pela Europa fora uma chiadeira doida, porque o Dr. Gewse' Crile com a amolina na mao caminha direitinho aos mortos e diz: *Levanta-te Lazaro!*

E dizem que esta' assim feito, o *fiat lux* na escuridao do alem-tumulo

...Mas nem tanto aterra! Coitadito! Quem sabe se o pobrezinho do Dr. Crile a estas horas andara' a fazer agua na bola e espreitar a palma da victoria! Oh! que todo esse trabalho lhe sai *doce o ledo engano da alma!*

Pois que duvida? Se o Dr. Crile levanta Lazaros, nao lhe fica de esquerdar o mister Morais: rehabilita aoBatalha, ma'gico de Julietas telegrafonicas.

E' pouco?...

Sera' ridiculo, mas e'. alegre.

…महत कार्यार्थीयर्थ पूर्ण एका पायावर …यार आहे. भारतासारख्या सिंाची आ…ळी ऐकून अशा महान्, धर्मकार्यांत …होण पाठिंमाग येईल?

आतां या विषयासंबंधीं पूर्ण तें …ाय आहे तें दर्शित करून अटोपतें घेतों.

गावडे किरिस्तांव हा वर्ग अज्ञाणी असून …चिवर पाद्र्यांचे वर्चस्व बरेंच असल्यामुळें …ची समजूत घालणें बरेंच कठीण गेलें …री त्यांना हिंदुधर्माची ओळख करून …णें तो बरोबर पटवून देणें व धर्मशाल्ला …वें आमच्या अज्ञानानें इतक्या दिवस …हिंदुधर्माचे दरवाजे जे त्यानां बंद केले …लेले ते आतां यापुढें उघडे करणें हें आ…पलें महत्त्वाचें कर्तव्य आपण बजावलें …पाहिजे. त्याबद्दल जीं संकटें प्राप्त होतील …त्यांस तोंड देऊन शांतपणें आपलें अंगि…कृत कार्य झट्टून पार पाडिलें जाणें अवश्य आहे. सद् हू प्रमाणें इतर शिक्षित ख्रि…श्चन लोकांना ही सनातन आर्यधर्माचें र…हस्य काय तें थोडक्यांत योग्य पद्धतीनें त्यां…च्या दरोदार जाऊन समजावून देण्याचें अमोलीक कार्य करण्याचें धाडस केलें पाहिजे. असें सतत कार्य चालू ठेविल्यास आतांच हळूहळू या कार्यांत यश मिळत चाललें आहे आणि फर्नांद आंपोम, मानकु…गद इत्यादि टोपणनावें टाकून–शिवकुमार, ईश्वरचंद्र, जिनेंद्र, नरेंद्र रामचंद्र इत्यादि ना…रायण, मोना दत्त, रविंद्रनाथ इत्यादि आ…र्यांची नावें धारण करून–"सनातन आ…धर्म की जय." इत्यादि जयजयकार आमचे गावडे पवित्र होऊन करीत असल्याचें शुभ चरित्र दिसून येऊं लागेल. मग त्या आनंदास काय पारावार आहे? रस्ता चुकून भटकत असलेलें मूल आपल्या मातेला अवलोकन केल्यावर जसा परस्पर आनंदी आनंद होतो त्याचप्रमाणें परमात्मा करो आणि थोडक्याच दिवसांत भारताचे सुदिवसांस गोडफळें लागोत अशी त्या जगन्नियंत्या जगदीशाकडे नम्र प्रार्थना करून वाचकांची रजा घेतों. तथास्तु तथास्तु–तथास्तु.

आपला

पूर्ण श्रम

मुरगांव–शिक्षण-संघ

[आमच्या खास बातमीदाराकडून]

वरील संस्थेच्या कार्यालयात ता. १३-५-२३ रोजीं संध्याकाळीं मुरगांव-विद्यालयाचा वार्षिक बक्षिस समारंभ साजरा करण्यांत आला. सभास्थानीं शहरांतील कळकळीचीं माणसें हष्टीस पडत होतीं. सभेचें अध्यक्षस्थान प्रसिद्ध व्यापारी श्री. भिकाजी पां. वालावलीकर यानीं मंडीत केल्यावर मुलांमुलींकडून मधूर आवाजांत स्वागतपर व ईशस्तुतिपर पद्यें ह्मणण्यांत आलीं. नंतर संस्थेचे सेक्रेटरी श्री. मुकुंद विठोजी नाईक प्र. सरदेसाई हे ह्मणाले: "मुरगांव शिक्षण संघ" ही संस्था स्थापन होऊन आज तीन वर्षें होत आलीं. संस्थेच्या कार्यांकीं एक वाचनालय व एक मराठी विद्यालय अशीं दोन कार्यें सध्या चालू आहेत. त्यांपैकीं विद्यालयांच्या बक्षीस समारंभा करितां आज आपण एकत्र झाल्या वेळीं सद्यःस्थितीदर्शक असे दोन शब्द सांगणें वावगें होणार नाहीं. आमच्या या गांवीं एका सार्वजनिक विद्यालयाची आवश्यकता आहे ही गोष्ट पटून त्याप्रमाणें ही संस्था स्थापन करण्यांत आली व तीस सज्जनांची पूर्ण सहानुभूति मिळाल्यामुळें संस्थेचें कार्य आज यशस्वी रीतीनें चालू आहे. तथापि संस्थेनें पुढें जो पल्ला गांठावयाचा आहे त्याकडे लक्ष देतां प्रगतिविषयक असे प्रयत्न यापेक्षांही जारीनें सुरू झाले पाहिजेत. आणि तसें होण्याकरितां इतर माणसांनीही यांत लक्ष घालणें जरूर आहे. आजपर्यंत जें काम झालें त्यापेक्षांही उत्साहानें व परिश्रमपूर्वक प्रयत्न करणाऱ्या मंडळीचें जर साह्य संस्थेस मिळालें तर ती यापेक्षांही चांगल्या नावारूपास चढून तिच्या हातून यापेक्षांही व्यापक असें शिक्षणकार्य होईल ह्मणून माझी अशी विनंति आहे कीं, सध्याच्या कमेटींत फेरफार होणें हें अगत्याचें आहे. नवीन माणसांची जोड संस्थेस मिळून तिचा जोम वाढला तर तें आम्हां सर्वांस भूषणास्पद होईल. याकरितां नवी कमिटी नेमून तिच्या हातीं संस्थेचा कारभार द्यावा अशी माझी नम्र सूचना आहे. श्री. सरदेसाई पुढें ह्मणाले: सद्यस्थितींतील मुलांची संख्या इयत्तावार पाहिली असतां पहिल्या इयत्तेंत ५८ मुलें दुसऱ्या इयत्तेंत २५ तिसऱ्या इयत्तेंत १६ चवथींत ४ अशी आहेत या सर्व मुलांची परीक्षा ता. ८ व ९ रोजीं मालवण येथील म्युनिसिपालटीचे शिक्षक व "बालकमित्र" मालेचे संपादक श्री. पांडजी नारायण मिसाळ यांकडून घेण्यांत आल्या. विद्यालयास मे १९२२ ते एप्रील १९२३ पर्यंत फीचें उत्पन्न ४६० रुपये १४ आणे झालें असून संस्थेच्या मेंबरांकडून व आलाहिदा देणगी वगैरे रुपये २४३ २ ७ जमा झालेली आहे. नुसते मेंबरांकडून १२४ रु अजून यावयाचे आहेत. घरभाडें शिक्षकांचा पगार वगैरे एकंदर खर्च ७०१ रुपये ४ आणे ७ पै आहेत. शेवटीं संस्थेच्या सर्व हितचिंतकांना सुखी ठेवून त्यांकडून संस्थेस असेंच साह्य मिळो अशी परमेश्वराकडे प्रार्थना करून व निर्विघ्नपणें गेलेल्या एक वर्षाच्या कालाबद्दल त्याचे आभार मानून मी आपणा सर्वांची रजा घेतों. श्री. सरदेसाई यांच्या भाषणानंतर पास झालेल्या मुलांचीं नांवें वाचण्यांत आलीं. व मुलांना अध्यक्षांच्या हस्तें बक्षिसें वाटण्यांत आलीं. या नंतर मुलांना खाऊ वांटण्यांत आला व अशा रीतीनें हा समारंभ उत्कृष्ट रीतीनें पार पडला. पुढील हकीकत येत्या अंकीं.

ह्मापसेंहून पणजीपर्यंत.

मी:–केशवराव, चूप बसा. आमचें हें बाल, प्रौढ वगैरे विवाहाचं ओरडणें, अस्पृश्य पतित वगैरेंच्या उद्धाराचें ओरडणें निवळ नाटकी आहे. आपल्या समाजाच्या कल्याणाची आतां लोकांना किती चाड आहे हें आजच्या आमच्या वागणुकीवरून चांगलें कळत आहे. आमचा समाज आज पूर्ण बहकलेला दिसतो. आपलें पुढें काय होईल याची बिलकूल पर्वा नाहीं. एखाद्या विलासी क्षयरोग्याप्रमाणं आमचा समाज निरनिराळ्या रंगढंगांत गढून गेला आहे. कांहीं कांहीं वाईट गोष्टी स्पष्ट दिसत असतांना, त्या सुधारण्याऐवजीं पूर्ण उदासीन राहिलेला दिसत आहे पारतंत्र्यांत असतांना स्वतःची सुधारणा घडवून आणण्याची कल्पना सत्य आणि शक्य वाटेनाशी झाली आहे. त्याचं कारण एवढंच कीं, आमची हिंमत, बल, साधी आणि स्वच्छ राहणी आणि त्याकरतांमुळं येणारं मानसिक धैर्य, आमचा निस्पृहपणा, स्वाभिमान वगैरे गुण नष्ट होत चालले आहेत. स्वदेशाविषयीचं प्रेम जितकं उत्कट असावं तितकीच स्वदेशाच्या उद्धाराची ही इच्छा प्रबळ असते. आणि त्या बळकट इच्छेच्या प्रभावावरच तो आपले प्रयत्न नेटानें चालवीत असतो. कधीं कधीं प्रयत्न निष्फळ झालेले दिसतात. पण तिथें त्याचें लक्ष नसतें. कधीं कधीं चूकाही होण्याचा संभव दिसतो पण तो स्वातंत्र्याच्या अभावामुळें परतंत्र मनुष्य एखादी गोष्ट साध्य करण्याकरतां अमुकच प्रयत्न सुरू करतो, पण तें साध्य सिद्ध होईपर्यंत त्याच्याकडून ते प्रयत्न बिनचूक शेवटास जातील असें सांगतां येत नाहीं. पण पुष्कळ अशा गोष्टी आहेत कीं, त्या करताना आह्मांला कधींच दुसऱ्याच्या तोंडाकडे पहावें लागत नाहीं. असें असताना देखील आह्मीं आजपर्यंत बेफिकीर वागत आलों आहोंत. पहाना, स्वदेशी पोषाख वापरणं नुस्तं स्वतःच्या इच्छेवर अवलंबून आहे. पण कोण वापरतो! स्वतःचं शील विघडवून देणं, आपल्या हिंदु संस्कृतीचं संरक्षण करणं, स्वत्व जिवंत राखणं, आपल्या हिंदुधर्मपद्धती प्रमाणं आचरण ठेवणं, वगैरे वगैरे गोष्टी एकट्यालाच करतां येण्यासारख्या नाहींत का? समाजाच्या कल्याणाची खंत बाळगण्याइतकें अडलं आहे कुणाचं? हिंदु संस्था चिरकाल टिकून रहावी असं वाटणार तरी कशाला? ज्या गोष्टींना पाश्चात लोक महत्त्व देतात, ज्या ज्या चाली रीती त्यांना आवडल्या तिकडे आह्मीं भरपूर लक्ष पुरवितों! आणि पुरविलेंहि पाहिजे, कारण हिंदु समाजांतला मोठेपणा युरोपियन समाजातल्या मोठेपणा पुढें कस्पटासमान आहे!! होय ना?

केशवराव:—अहो आह्मांला राजाश्रय नाहीं त्यामुळेंच आमचें हें असं होत आहे. हिंदुसमाजाची भरभराट कशा रीतीनें होईल, हिंदु समाजाचं स्वत्व कसं कायम टिकून राहील, हिंदु समाजाची सर्वांगीण वाढ कोणकोणत्या प्रकारें होईल, वगैरे गोष्टींच्या विवंचनेंत रात्रंदिवस पडलेले व त्यांकरतां खटपटही करीत असलेले महात्मे आपण पहातों, पण फारच विरळा. पण औदासिन्यांत बुडलेले, बेफिकीर, नशीबावर हवाला ठेऊन असलेले स्वाभिमाननष्ट झालेले, केवळ पैसाच सर्वस्व मानणारे अशा प्रकारचे फारच फार. समाजाकरतां स्वार्थत्याग करणं वगैरे गोष्टी चांगल्या असल्याचं कबूल करतात. स्वार्थत्यागी लोकांचा गौरव करतात. पण स्वतःवर मात्र स्वार्थत्यागाची पाळी आणूं देत नाहींत. समाजाच्या कल्याणाप्रीत्यर्थ झटण्याचं स्वतःच्या नशीबांत नसल्याचं उत्तर देऊन दुसऱ्याचं समाधान करण्यांत सुख मानतात त्याचं सगळं आयुष्य लक्ष्मीच्या सेवेंत जात असतं. आतां आपल्या अज्ञान आणि अशिक्षित लोकांबद्दल तर बोलूंच नका. याना समाज काय आणि त्याचं कल्याण काय? ज्याना चांगलें समजलं आहे, आणि जे शक्तिनुसार आपल्या समाजाची सेवा करीत असतात ते तर आपलं कर्तव्य पार पाडीतच असतात. पण जे समजलं असतानां देखील स्वतःचें कर्तव्य विसरतात. त्यांच्याकडून आणि जे अज्ञान अशिक्षित आहेत त्यांच्याकडून सत्तेच्या बळावरच पुष्कळशा गोष्टी करवाव्या लागतात. ह्मणूनच राजाश्रयाची गरज आहे असें मी ह्मणतों.

मी:—केशवराव, सध्या कांहीं आह्मांला राजाश्रयाची आशा नाहीं. कारण राजाच परकी आहे! पण राजाश्रयावांचूनही पुष्कळशा गोष्टी आह्मांला करतां येण्यासारख्या आहेत. कांहीं सामाजिक व राजकीय बाबतींशीं जिथें राजाचा संबंध पोंचतो तिथें नकोच पाहूं. समाजांतील लहान सहान गोष्टी बद्दलच बोलूं. आणि त्या अशा प्रकारच्या कीं, आमच्या स्वार्थत्यागाचा प्रश्न जिथें न येईल. हिंदु स्त्रिया व विधवा बहिणी. आमच्या हल्लींच्या समजुतीप्रमाणं वैधव्य ह्या शब्दांत काय काय भरलं आहे, ह्याची आपणाला कल्पना तरी आहे का? आईबापाच्या घरच्या मंडळीची सेवा चाकरी करून जें कांहीं मिळेल त्यावरच स्वतःच्या गरजा भागवून घेतल्या पाहिजेत. वरीं जातांच तिथें काबाडकष्ट करून जें कांहीं देतील त्याबद्दल आभार मानून त्यांतच संतुष्ट राहिलें पाहिजे. मंगल कार्यांत किंवा चार चौघी जणी जिथें जमतात तेथें तिला मज्जाव ठेवला पाहिजे. कोणत्याच प्रकारचे सुखाचे विचार मनांत न आणूं दिले पाहिजेत. स्वातंत्र्याविषयीं तर त्याच्या वाऱ्याची झुळूक सुद्धां नसली पाहिजे, बोलणं चालणं अजिबात बंद, वगैरे सारख्या दुष्ट आणि मूर्खपणाच्या समजुती सुधारणं शक्य नाहीं का? स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न

... VIII No 11
Qu... ... Junho de 1923
Por cada ...
ANUNCIOS
Por cada linha ainda que repetida uma tanga
Numero a vulso uma tanga
DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ८ वें. अंक ११
गुरुवार ता. १८ जून सन १९२३
वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)
जाहिरातींचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.
संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केंपे—गोवा.

Sobre queda coice

Nao podemos admitir, de maneira alguma, que os governantes nao estejam compenetrados, ainda, da miseravel situagao economica em que o Povo se esta' atormentando.

O critico estado de coisas, criado pela conflagragao mundial nao se acha nada abrandado: continua com a mesma intensidade, com o mesmo rigor e com o mesmo cortejo de c nsequencias tetricas.

Nao falemos dos grandes porque *dos grandes tudo e' grande*. Mas os me'dios e pequnos proprietarios estao arrastando uma vida, cheia de angustias e tristesas.

Ha' quem ignore isto? Ha' quem o nao saiba nas regioes oficiais?

E, todavia, e' certo que discura-se ali, com toda a sem-cerimonia, de procurar uma solugao condigna ao ja' cro'nico mal que nos enferma, dando-se-nos a triste impressao de que a dor do governado nao sensibilisa o governante!

A elevagao de taxas de Navegagao Fluvial corrobora, plenamente, o que acabamos de afirmar.

Pois que! Querem voltar as costas ao pobre Povo a quem a vida se tem tornado *pesado fardo*? Insistem em supor, ainda, que o Povo continua na fase de *eterna criança*? Consideram, finalmente, que o contribuinte continua a ser, ainda, nos actuais tempos democraticos que corremos *massa inerte* de criaturas, dotadas de paciencia socratica ou *tucaramica*?

Se sim, enganam-se, redondamente, que o Povo dhontem nao e' o Povo de hoje. assim como a situagao dhontem nao e'a situagao de hoje.

Torna-se, portanto, forgoso que os governantes subordinem a sua acgao administrativa a' vontade do Povo que pensa e sente.

E como a elevagao de taxas de Navegagao Fluvial tende a ferir sobremaneira o sentimento popular, e' prudente e bem avisado que os governantes a suspendam, de pronto, que *aquilo* representa, nada mais, nada menos que *sobre queda coice*...

Sim, a elevagao das mesmas taxas nao se coaduna com a pobresa que ora esta' oprimindo o Povo que protesta, com a veemencia de que e' capaz, contra ela.

Mas uma pergunta inocente. ¿Se a ...

torna-se, actualmente, onerosa ao Estado, a ponto de ficar este constrangido a langar mao do aumento de taxas respectivas, porque e' que nao ha de ajudica-la aos particulares, impondo lhes entre outras a condigao de nao elevagao das mesmas taxas?

Fartos estamos de aumentos e o das taxas da Navegagao Fluvial representa — repetimos — nada mais nada menos que:—

Sobre queda coice!

Mais uma vez...

Vezes sem conta temos declarado neste mesmo lugar que o *Bharat* nao abriga no seu peito outro sentimento se nao o de ser util a' causa pu'blica, tratando nas suas colunas assuntos que se relacionem, unicamente, com o bem publico.

Nunca o preocupou a idea do engrandecimento pessoal do seu director cujo modo de viver se confunde com o do mais simples cidadao portuguez e cujas opinioes representam o natural e expontaneo producto dos ditames de sua consciencia.

O *Bharat* nao defende ou ofende politica alguma ou antes ele defende toda a politica que tenda ao bem estar publico e ofende toda a politica que tenha por fim deturpagao sistematica da voz de consciencia.

Leis, decretos, co'digos, conveniencias respeita-os o *Bharat*, quando se persuadir, depois duma madura ponderagao de que o tal respeito nao e' incompativel com os ditames de consciencia que presamos sempre, em primeiro lugar.

Vem tudo isto a proposito de interpretagoes variadas que alguns nao poupam ocasiao de dar-lhes a' muita coisa que ca' se escreve, atribuindo-nos ate' intuitos revolucionarios.

Revolugao? ! ... Mas de que? Para que? Com que fim? E com que auxilio? Nao no-lo dirao?

Nao passa de mera calunia e intriguinha de mau gosto essa suspeigao que se pretende criar em volta do *Bharat*, o qual, de resto, nao faz nenhum caso da surda campanha de seus adversarios gratuitos, uma vez que esteja tranqnilo om a sua consciencia.

Verdade e' que o *Bharat* nao sabe disfargar o seu sentir, nao esta' no seu feitio, seja a que titulo for, pronunciar-se da maneira diversa do seu pensar e, finalmente, que se nao educou na escola da chamada politica que a filosofia indiana mui adequadamente compara com uma prostituta profissional...

Isto nao autorisa ninguem a formar juisos temerarios sobre a nossa acgao jornalistica que se cifra toda na defesa de interesses publicos.

Duma vez para sempre fique dito: o *Bharat* nunca faz questao de pessoas que respeita; o seu u'nico desejo e' ver respeitada a voz da consciencia pura.

Tudo isto deixa, claramente, vc que o *Bharat*, por mais que se queira nao pode ser orgao doutro partido que nao seja o de *consciencia*.

Consciencia, sim! ¿Mas impera o seu dominio em toda a parte? Sao respeitados rigorosamente os seus ditames?

That is the question!

Escrevem-nos...

O 3.° Congresso Provincial da India Portuguesa na sua conclusao 22.a votou que os funcionarios que nao tivessem promogao, tivessem direito ao aumento periodico do vencimento, por diuturnidade ate' um certo limite, quando fossem assiduos e nao tivessem nota no seu cadastro devendo, tambem, ter direito a ela os funcionarios que exercessem servigos perigosos, mesmo que tivessem direito a promogao.

Ora na ocasiao da ultima equiparagao de vencimentos nao foi tomada na consideragao pelo Governo provincial esta util proposta e especialmente em relagao ao pequeno funcionalismo mostrou-se completo desprezo como se depreende claramente da citada portaria da equiparagao.

Ja' que agora, segundo consta da fonte segura, o governo da metropole se dignou enviar as bases equitativas para de novo ser revista a equiparagao chamamos a atengao dos ilus'es representantes do povo para o assunto.

\+ × ×

O Codigo Administrativo em vigor aqui fixa o numero do pessoal que deve compreender cada camara e regula os vencimentos desse pessoal segundo as categorias.

Porem, os vencimentos de funcionarios de diversas Camaras da India Portuauesa estao fixados mui atabalhoadamente e parece exquesito este estado de coisas, pois, nota-se por exemplo, que o vencimento do Secretario duma Camara de 1.a ordem (Salcete) e' actualmente, segundo consta, muito inferior ao do Secretario duma Camara de 2.a ordem, cuja receita nem atinge uma 4.a parte da do referido municipio da 1.a ordem.

Ora, a nosso ver, nao convem que isto continue, por quanto deve haver uma norma a esse respeito.

Em 1.° lugar se devem fixar as classes de diversos Municipios desta Colo'nia para depois se poder organisar os quadros do pessoal con venci mentos razoaveis, dando ao mesmo pessoal direito a' promogao a exemplo do que se faz em relagao ao da justiga.

So' desta forma e' que se podera atalhar ou por dique a' desigualidade que se nota na fixagao de vencimentos de va'rios funcionarios dos nossos Corpos Administrativos.

Franco

Ecos & Critica

Chudiem

E' o nome dum prédio que actualmente possue um senhor proprietário de Loutolim.

Ora, o mesmo prédio fez, por anos sucessivos, parte do giro da arrematação das matas nacionais.

¿Como se operou esta brusca mudança de *dominios*?

Responda-nos quem estiver ao facto de tudo isso e mais da historia do *Tolem* que muitos pensam que faz parte integrante das matas de *Sidha*.

Para os fins convenientes aguardamos a resposta com uma ansiosa... ansiedade.

Claro que queremos uma resposta baseada mais na *consciencia* do que nos *marcos* ... legais.

Uma pergunta

Numa administração concelhia deste Estado, procedia-se a uma averiguação sobre qualquer pleito cuja discrição não vem ao caso.

Um jornalista que sabia bem da matéria do pleito, objecto da referida averiguação. fez uma exposição circunstanciada sobre o assunto e remeteu-a á referida administração, *para a sua melhor elucidação* ou antes *para que essa autori-*

विरोधीवर लहान मोठे आरोप करून श्रीमंतांची खुशामत करण्यासाठीं, हें त्याचें पत्र वाचतांच कोणीही सांगू शकेल. त्याबद्दल विरोधीला कांहींच लिहावयाचें नाहीं. कारण त्याला शुद्ध व सुबक मराठी भाषेंत लिहितां येत नसलें किंवा त्याचें लिहिणें व्यक्तिद्वेषाच्या सदरांत कोणी नेऊन घातलें ह्मणून त्याच्या लेखांतील विधानें कांहीं खोटीं ठरणार नाहींत. तीं खोटीं ठरवावयाचीं असतील तर त्याला अन्य कांहीं कारणें दाखविलीं पाहिजेत.

असो. आमच्या लेखांतील पहिलें विधान असें होतें कीं, "श्रीमंतांनीं भरपूर पैसा आहे ह्मणून लग्नकार्यांत अनावश्यक खर्च करून त्याचा धूर करूं नये. कारण इतर लोक जवळ पैसा नसतांही त्याचें अनुकरण करूं लागतात आणि कर्जबाजारी बनून शेवटीं कफल्लक होत असतात. श्री. धेंप्यांचें घराणें प्रसिद्ध असून समाजांत त्यांच्याबद्दल आदर आहे. त्यांच्या येथ नुकत्याच झालेल्या लग्नमुंजीसमारंभांत त्यांणीं हजारों रुपयांचा विनियोग अनावश्यक खर्च करण्याकडे केला तो न करितां जर त्याणीं इतरांस उदाहरण घालून दिलें असतें तर समाजास तें फार फायदेशीर झालें असतें आणि श्री. धेंप्यांनांही लोकांकडून दुवा मिळाला असता इ. इ." यावर क.ल.श ह्मणतात. कीं, 'हे दिवस यद्यदाचरति श्रेष्ट या वाक्याला अनुकूल नाहींत, जिकडे तिकडे स्वतंत्र विचार आणि आचार बोकाळला आहे.... श्रेष्ठांचें आचरण आमच्या समाजांत अनुकरणीय झालें असतें तर आजचे सुधारणेच्या नांवाखालीं चाललेले चोंचले पाहाण्याचा प्रसंग येताना. सारांश थोरवी दाखविण्याची हांव किंवा प्रघात ह्मणाना, आपल्या समाजांतच नव्हे, इतर ठिकाणींहि कदीमकाळापासून ती अव्याहत चालली आहे.' या उताऱ्यांतील वाक्यांचा एकमेकांशीं किती मेळ आहे हें पाहूं. पहिल्या वाक्यांत श्री भगवंतानीं अर्जुनाला सांगितलेलें 'यद्यदाचरति श्रेष्ट तत्तदेवे तरेजनः' हें सदोदीत प्रत्ययाला येणारें वचन क.ल.श खोटें ठरवूं पाहतात आणि त्यापुढें थोरवी दाखविण्याची हांव कदीमकाळापासून अव्याहत चालली आहे असें सांगतात. तेव्हां थोरवी वा. थोरपणा दाखविण्याची हांव सुटण्यास किंवा तसा प्रघात पडण्यास थोरांचें अनुकरण करून थोर होण्याचीच महत्त्वाकांक्षा कारणीभूत असत नाहीं काय ? असलीच पाहिजे. मग भगवंतानीं सांगितलेल्या वचनास हे दिवस अनुकूल नाहींत ह्मणण्यास क.ल. शांना आणखी काय कारणें आहेत तीं त्यानीं स्पष्ट करावीं. श्रेष्ठांनीं आचरलेलीं कृत्यें, [त्यांच्या बरेवाईटपणाकडे दुर्लक्ष करून] इतर लोक आचरण करतात तर तीं समाजहितविघातक आहेत कीं समाजहितवर्धक आहेत, याचा विचार श्रेष्ठांनीं ह्मणजे श्रीमंत धेंप्यासारख्या शिष्टांनीं जाचे छोरके–नेते आहेत व तसा अभिमान श्री. धेंपे स्वतः वागवीत असल्याचें अनेक प्रकरणीं सिद्ध झालें आहे. 'सर्व सोंगें आणितां येतात, परंतु, पैशाचें सोंग आणितां येत नाहीं ' अशी एक जुनी आणि प्रसिद्ध ह्मण आहे. तिचें प्रत्यंतर आजकालच्या जिवनकलहार्थ होणाऱ्या संग्रामांत वरचेवर दिसून येतें. थोरांचें अनुकरण करून थोरवी दाखविण्याचें सोंग कोणीही करील. पण थोरांमोठ्यांकडून खर्च होत असलेला पैसा सोंगानें मिळवितां येत नाहीं हे खरें आहे तितकेंच पैसा नाहीं तर ऋण काढून, असेल नसेल ती चीजवस्तु गहाण टाकून किंवा विकून, लटक्या श्रीमंतीचें प्रदर्शन करण्याकडे लोकांचा कल झुकला आहे, हेंहि खरें आहे. 'गतानुगतिको लोको न लोको पारमार्थिकः' या वचनाचा अर्थ लोक अनुकरण करणारे आहेत, लाभालाभाचा विचार करणारे नाहींत असाच असला पाहिजे. तो जर खरा मानला तर आमच्याच ह्मणण्याला बळकटी येते. आणि त्या बरोबर, ज्यांच्या पावलांवर आपलें पाऊल ठेवण्याची इच्छा बहुजनसमाज करीत असतो, त्यानीं ह्मणजे श्री. धेंप्यासारख्यानीं आपले सर्व व्यवहार अनुकरणीय झाले तर ते समाजहितवर्धक व्हावे, याबद्दल काळजी घेणें जरूर व न्याय्य आहे. मुलाच्या बापाला जबरदस्त हुंडा पदरांत पडत असल्यामुळें क्षणमात्र परवा वाटेनाशी झाली तरी मुलीच्या बापाला मुलीचें लग्न हें एक संकटांतील संकट वाटूं लागलें आहे. यास कारण लग्नकार्यांत वाढलेले खर्चाचे बहुविध प्रकार. वरपक्षाकडून झालेल्या अतिखर्चाचा बोजा बिचाऱ्या वधुपक्षावरच प्रसंगीं पडत असतो. आणि त्यामुळें वर्ष संपण्यापूर्वीच त्यांचें दिवाळें वाजल्याचीं अनेक उदाहरणें दाखवितां येतील. या दुःस्थितीस आळा घालण्याचें सक्रीय कार्य श्री. धेंप्यांना जितकें शक्य आहे तितकें इतरांना नाहीं. व आह्मांस तर कळकळीशिवाय नाहींच नाहीं. कारण आमच्या सारखीं गरीब माणसें खर्चाला कंटाळून क्याथरलॉकला जात असल्याचें दिसतच आहे. श्री. धेंप्यांच्या येथें होणाऱ्या समारंभांत अनेक आवश्यक अनावश्यक खर्चचे प्रकार होत असतात, त्यांतील अनावश्यक प्रकार वगळल्यास धर्मविधीस कोणताच बाध येणार नाहीं आणि लोकांनाही उदाहरण मिळून फायदेशीर होईल यांतच श्रेष्टांचें श्रेष्ठत्व आहे. यांतच श्रीमंतीचें भूषण आहे व यांतच मनाचा मोठेपणा दिसून येणार आहे.

या नंतरचें आमचें विधान खालीलप्रमाणें होतें. तें हें:—

हिंदु लोकांनीं धर्मशास्त्र धाब्यावर बसवून ख्रिस्ती अगर इतर पाहुण्यांस पाहुणचारादाखल दारू देणें अनिष्ट होय. मद्यपी जसा पंचमहापातकी ठरत असतो तसाच मद्योत्पादन, मद्यदान किंवा मद्यविक्रय करणाराहि त्याच दोषास पात्र होत समारंभास आलेल्या ख्रिस्ती पाहुण्यांस दारू अर्पण केली हें फार वाईट केलें, तेहि मद्यपान करणाऱ्या प्रमाणेंच पंचमहादोषी ठरतात, तेव्हां त्याणीं आपल्या धर्मगुरुस जागून श्रीमत्कमलानाथतीर्थस्वामी महाराजांच्या सल्ल्यानें योग्य प्रायश्चितपूर्वक शुद्ध व्हावें व इतरांस धडा घालून द्यावा इ. इ.

या आमच्या विधानावर क.ल. शांनीं विचित्र मल्लिनाथी करून ह्मटलें आहे कीं, 'या प्रांतांतील हिंदु गृहस्थाना समारंभांत ख्रिस्ती लोकांना निमंत्रण करावें लागतें. व त्यांचें जें मुख्य पेय मद्य तें त्यांना द्यावेंच लागतें. हा एक शिष्टाचारच होऊन बसला आहे व तो श्री. धेंप्यांनीं व इतर श्रीमंतांनीं अव्याहत चालविला आहे...... पाहिजे तर विरोधीनीं आपल्या धर्मगुरूकडे समजून घ्यावें कीं, अतिथीला किंवा आमंत्रिताला जें प्रिय असेल तें त्याला देणें हाच गृहस्थाश्रमाचा धर्म असून त्यांत दोष नाहीं वर पुण्य आहे. आणि ख्रिस्ती लोकांचा मद्य हा एक आहारांतर्गत पदार्थ असल्यानें तें त्याना पुरविणें पापकारक नाहीं. पुराणांतरीं अतिथींना अपवित्र असें जें नरमांस तेंहि त्याच्या मागणीमुळें अर्पण केल्याचीं उदाहरणें आहेत, हें दोनशें वर्षांपूर्वीं, ज्या वेळीं गोव्यांत व इतरत्र हिंदु लोक आपलीं धर्मतत्वें अत्यंत श्रद्धापूर्वक पाळीत असत, त्यावेळीं युरोपस्थानां हिंदूंनीं शुभकार्यप्रसंगीं मद्यार्पण केल्याचे जुने पुरावे देतां येतील इ. इ. सरते शेवटीं तर विरोधीस जबरदस्त इशारा दिला आहे तो असाः–श्री. धेंप्यांस प्रायश्चितपूर्वक दोषमुक्त होण्याचा उपदेश करण्यापेक्षां मजूर, भोई, होडीकर वगैरेंस रस्त्यावांस पैसे देऊन मद्योत्पादनास उत्तेजन देणाऱ्या गृहस्थांपासून स्वतः आर्य मदिराविक्रयाला हातभार लावणाऱ्या ब्रह्मपुत्रापर्यंत सर्वांनां सर्वकाल, सर्व ठिकाणीं उपदेश करीत चला, नव्हे पिकेटिंग करा ह्मणजे तुह्मांला आमच्या सारखे चेले अवश्य मिळतील. मात्र श्री. धेंप्यासारख्यानीं दारूशीं कोणताहि व्यवहार ठेवला तरी चकार शब्द काढूं नये, कारण ती व्यक्तिनिंदा होईल वगैरे वगैरे.

सदरील उताऱ्यांत मद्यदानाच्या आणि मद्यदात्याचा पुरस्कार क.ल. शानां चांगलाच साधला आहे. प्रसिद्ध नाट्याचार्य रा. खाडीलकर यांच्या विद्याहरण नाटकांतील शिष्यवरांच्या तोंडीं आणि कै. गडकरी यांच्या एकच प्याला नाटकांतील तळीरामाच्या तोंडीं शोभतील अशाच यांत कोट्या करून प्रमाणेंहि तसलींच देऊन कांहीं पुरावे गुलदस्तांत ठेवण्यांत आले आहेत. पुनरावृत्तीची संधी येतांच उभय नाटकांच्या प्रकाशकांनीं त्या उताऱ्यांचा अवश्य फायदा घ्यावा असी आमची त्यांस कृतज्ञतापूर्वक शिफारस आहे.

सदरील उताऱ्यांत ख्रिस्ती पाहुण्यानां दारू देणें हा एक जनाट शिष्टाचार असल्याचें दाखविलें आहे. गोष्ट खरी असेल. नाहीं कोणी म्हणावें. परंतु, असला हा धर्मविघातक शिष्टाचार जन्मास आला त्यावेळची परिस्थिति लक्षांत घेतली पाहिजे. सर्वस्वी परकी आणि परधर्मी सरकारच्या जुलमानें गांजून भेदरून गेलेल्या आमच्या पूर्वजांनीं एखाद्या ख्रिस्ती पाहुण्यास तो राजकर्त्यांचा जातभाई कींवा धर्मभाई ह्मणून, त्याच्या खुशामतीसाठीं दारूचा पेला अर्पण केला असेल आणि त्याचें पर्यवसान रुढींत झालें असल्याचें गृहीत धरलें तरी सध्याच्या स्वतंत्रतेच्या, जागृतीच्या आणि स्वत्वाभिमानाच्या काळांत पूर्वीच्याच चुका करीत राहणें शहाणपणाचें होईल काय ? कधींच होणार नाहीं. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें सुरादेवीची उपासना करण्यांत कांहीं कमी नव्हतीं. तरी पण तेथें शिष्टाचारासाठींच नव्हे तर औषधासाठीं देखील दारू वापरण्याची सक्त मनाई केली आहे. आणि त्याचीं गोड फळें तेथील जनता आनंदानें चाखीत असतां आर्यावर्तांतील आर्य संस्कृतींत जन्मलेल्या क.ल. श सारख्या गृहस्थांनीं, शिष्टाचाराच्या नावांखालीं मद्यदानाचा पुरस्कार करावा हें हिंदभूमीचें दुर्दैव नव्हे काय ? बरें. एक वेळ शिष्टाचारासाठीं मद्यदान करणें क्षम्य मानलें तर, ख्रिस्ती गृहस्थांचे घरीं लग्न वगैरे प्रसंगीं गेलेल्या हिंदूंना शिष्टाचाराचें उल्लंघन होऊ नये ह्मणून दारूचा स्वीकार करण्याचा प्रसंग येईल त्याचीं वाट काय? असल्या प्रसंगांतून सुस्वरूपपणें निभावणारे रा. काकासाहेब पेडणेंकर यांसारखे किती हिंदु लोक सांपडतील, त्याचा विचार क.ल. शांनीं अवश्य करावा. शिष्टाचाराचें हें भूत समाजाच्या मानगुटींत प्रसिद्ध रीतीनें बसलें तर तें गाडण्यास अमेरिकेंतील पुसीफुट जॅानसारख्या पंचाक्षऱ्यानां देखील हात टेंकावे लागतील. मग त्या आधींच असल्या वर्तनाचा, मग तें श्रीमंत धेंप्याहून श्रीमंत अशा गृहस्थांकडून घडलें तरी, इनकार करणें सर्व हिंदुधर्माभिमान्यांचें पवित्र कर्तव्य आहे. व तें आह्मीं बजावलें ह्मणून वाईट तें काय झालें ! क. ल. श कांहीं ह्मणोत. प्रभेचे आणि भारताचे वाचक आमच्या ह्मणण्यास दुजोरा दिल्याशिवाय राहणार नाहींत.

यानंतर क.ल.शांनीं शिष्टाचाराच्या जोडीला पौराणिक अतिथी सत्कारालाही पुढें केलें आहे. त्यानीं वर्णन केलेला प्रसंग ह्मणजे श्रीयाळ राजानें यतीला, आपल्या एकुलत्या चिलया बाळाला मारून त्याच्या मांसाचें भोजन दिलें हा असावा. शिवाय अतिथीसत्काराचे विशेष पौराणिक प्रसंग ह्मटले तर श्रीशंकरानें रावणाला आपली बायको पार्वतीमाता दिली; राजाधिराज बळीनें वामनाला तीन पावलांत सामावल्यामुळें सर्व राज्य दिलें; सत्वधीर हरिश्चंद्र राजानें विश्वामित्र महर्षींला स्वप्नांत केलेलें राज्यदान जागृतावस्थेंत दिलें वगैरे वगैरे होत. या असल्या आधारां-

Ano VIII No 12
...eira 21 de Junho de 1923
ASSINATURA
...la ano tres rupias
ANUNCIOS:
Por cada ...a repetida uma tanga
...ulso-uma tanga
DI... EDITOR:
G. P. ...gdo Dessay
Quepem-Goa

वर्ष ८ वें, अंक १२
गुरुवार ता. २१ जून सन १९२३
वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)
जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.
संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केंपें—गोवा.

भारत
BHARAT

Um segredo do sr. Alfredo

Em dois numeros seguidos, o *Bharat* acusou solenemente o sr. Alfredo Rodrigues do indevido levantamento de dinheiro, a titulo da passagem duns seus membros que nao passaram senao por cima do ... erario publico.

Ate' a data em que estamos escrevendo o presente artigo, ninguem nos veiu desmentir a referida acusaçao nem apoiar-nos a atitude. So' dois ou tres amigos do sr. Rodrigues manifestaram-nos o seu espanto por aquela acusaçao, numa conversa que casualmente entabolamos com eles, significando-nos ao mesmo tempo que *aquilo* nao passava dum *jesuitismo* dos difamadores gratuitos do sr. Alfredo.

Como dissemos a pouco, o *Bharat* que presa antes de mais e mais do que tudo a sua consciencia que sempre coloca em primeiro lugar na apreciaçao de pessoas e cosias. E para estar tranquilo com a sua consciencia, o nosso jornal permite-se formular o seguinte interrogatorio:—

¿E' falsa a acusaçao por no's feita? Se o e', ¿porque e' que estao calados, como se lhes tivesse sido posta forte mordaça a's patrioticas bocas, os jornais que o apoteusaram, guindando o sr. Rodrigues para as mais altas regioes do patrio Olimpo? Porque nos nao saem ao encontro, pulverisando e reduzindo a *estilhaços* a nossa mencionada acusaçao?

¿E' ela nao falsa, nao impertinente e nao destituida de fundamento?

¿Porque, entao, nao nos acompanham na critica contra uma imoralidade que teria fulminado, de congesto o mais vil dos pecadores desta terra sub-lunar?

O sr. Alfredo Rodrigues saiu de Portugal com a sua ilustre familia ou sem ela. Sua Excia deixou ficar ou nao em Bengalore a sua esposa, a qual acompanhou ou nao o seu marido na sua torna-viagem.

¿Qual destas alternativas e' verdadeira?

Digam-no-lo os que pretendem moralisar *este lindo jardim a' beira-mar plantado*, atacando tao somente outros de quem, de resto, o *Bharat* nao e' defensor nem ofensor... iconoclasta.

Sim, o *Bharat* deseja saber isto para estar bem com a sua consciencia para nao concorrer de qualquer maneira a manchar reputaçao alhea, finalmente, para o remorso duma acusaçao falsa o nao inquietar, continuamente.

Desvendem la, pois, o *segredo* do sr. Alfredo para qué se faça inteira luz sobre o *aureo enigma* da sua ja' celebre passagem.

Pa'-p a' Santa justa, e' o que se quere.

Aconselhando ....

Levanta-te, povo de India

"Basta de sonos, basta de sonhos!!
Basta, inda, de banhos que o tempo não è para tanto"

Do *Bharat* de 24 de Maio de 1923

Neste momento solene em que o Cancer encontra-se de viligiatura nas alturas desta melancolica terra encravada no tranquilo Indico, pondo em girato'ria o maximo do potencial patriotico o qual a' guisa de profusao de jacas, de sazao de mangas tambem faz brotar das personalidades superfinas dos nossos redentores, projectos, interpelaçoes, etc este aviso do *Bharat* deve valer por um fogacho de luz que alumiasse da esperança a nau governamental perdida entre penedias tenebrosas; vale por aviso que nos desviasse das escancaradas fauces do abismo que de ha' muito talhamos por nossas proprias maos; vale por voz misteriosa,decisiva cujo despreso nestas trevas do indiferentismo,do comodismo equivale a nossa aniquilaçao fatal, cuja observancia sera' o sonho de *surge et ambula*!

Sim, na doce visao de Prameteu liberto de Efaisto, pelo advento da autonomia,transformamos nossos pulmoes em foles do ferreiro e clamamos.

Liberdade! Liberdade! Liberdade!
Progresso! Progresso! Progresso!

Limitamo-nos so'mente a entoar hosannas e cedo nos cançamos! E tudo esborou-se neste dilirio! E tudo foi fumo! E tudo foi quimera! E tudo foi *nada*!...

Agora mais do que nunca, reconhecemos o dilema fatal:

A India renasce das propriase cinzas deixando sonos, sonhos e banhos ou rola ao abismo...implacavelmente

Raiou a aurora "do governo do povo" apesar disso, o mesmo povo que ontem ululava sob jugos da *ominosa* e clamava pelos seus direitos e deveres, deixou se tiranisar pelo primeiro aventureiro que surguisse, dobrou a cerviz ante os magnates do poder, escravisou-se aos dirigentes, so' para evitar o fardo da responsabilidade,a fai na de pensar, o trabalho conscienciosa de formar a opiniao publica etc.

E assim riscada na ordem juridica, a escravidao, ela revigorou-se e subsiste na nossa vida social, sob formulas diversas. Encontram-se em grupos de infinitos seres humanos nas maos dos politicantes-acrobaticos em roças com o previlegio de voto a favor dos farçantes; em cooperativas dos *adesviistas*, com a mira na exploraçao de cadeiras liceais, vagas nas auditorias e mais coisas vergonhosas sem que ninguem se disponha a vida rigida de *Quebra-Prazeres*!

E assim a India geme no terrivel sono da morte, merce dos sonos, sonhos e banhos.

Emquanto o diluvio de indiferentismo, do comodismo nos ameaça afogar, retoricamos-nos em sonos sonhos e nos banhos...

Oh! Ceus, misericordia, misericordia!

Quando dos quato ventos se afirma que nas democracias a lei directriz nos problemas relativos a vida social e o sentir colectivo, no's temos no magno *Sinhedrio* onde se baralham os nossos destinos a antitese da opiniao sensata do Paiz!

Nesta materia triste e' dize-lo, somos autenticas pedras...

Ja' la' vao anos que concedemos num impulso de generosidade a nossa representaçao a um ilustre desconhecido do que se chama Prazeres da Costa...

Mas, oh! decepçao.

Mas guindado as cadeiras do Parlamento da Naçao, este homem arvora-se em senhor feudal e reclama o monopolio da representaçao*per omnia saecula seaculorum*.

Em todos os momentos criticos por bue a India passou, o diabo sempre se limitou ... a rir do nosso desacerto—o da sua escolha!

No longo periodo da sua estada no parlamento, este personagem so' tem desempenhado o papel de mero adulador do fraudulento caçador de votos atirando a' sucia dos seus parentes e amigos, a isca de auditorias, liceus, etc. Uma autentica vergonha, que a India, inda consente...

Partiram o braço a um jornalista violaram um domicilio,um lar cresceu a serpente de impostos, realisaram-se comicios e barulheiras na perspectiva de tudo isto sumir-se no sorvedoiro dos mandantes locais, mas ... ele e, sempre o mesmo Conrado do silencio! Nao faria isto um reles facinora!

E para silenciarmos os arrufos namorico-patrioteiros, lembraremos a indifcrença que usamos ligar a escolha dos nossos representantes no Parlamento local, a falha do criterio que se patenteia, o arrefecimento do entusiasmo que se evidencia. Nao quere isto sign ficar, de modo algum, que os nossos actuais sejan ... bolas. Nao lcnge de no's essa idea, porem, o que se quer frisar e' que sempre se podia fazer melhor. Por exemplo, mandassemos la' em maior escala proprietarios sobre quem pesa o jugo de impostos, em vez de burocraticos pançudos que pouco se ralam com estas piquenas questoes. Colocassemos naqueles fauteuils homens com poucas circumvoluçoes cerebrais, mas de rudes peitos, repletos de independencia e nao eramos no's tao desgraçados...

Sim, nao eramos tao desgraçado se todos enveredassemos pelo caminho recto do dever individual com a consciencia na mao e "olhos a olharem a direito" ...

Ecos & Critica

Mal entendidos...

O caso de Canvorem forneceu pasto abundante á conversação publica pelo aspecto extraordinorio de que se revestiu.

Crêmos que tudo aquilo foi obra de mal entendidos; mas, como o assunto està confiado a um portuguès iteligente acalenta-nos a esperança de que será resolvido com a completa justiça, desfazendo-se os mal entendidos.

Intrigas

Urdiu-se a intriga de que o *Bharat* era inimigo dos europeus, tendo havido forte empenho de criar contra quem o dirige más impressões.

Tal intriga é o producto duma malvadez inqualificavel, pois o *Bharat* nunca foi nem nunca será inimigo dos europeus, ele que mais duma vez significou que só devido áquela nobre classe, os hindus estão actualmente a respirar e prosperar. Ele é inimigo, sim, mas duma certa casta dos nativos que nunca poupam ocasião de lhes causar mal por causa dos seus interesses insignificantes.

Pragatica-Sanga

Urdiu-se, tambem, a intriga com dupla força de que o director do *Bharat* era mal visto pela sua classe que êle fôra irradiado da presidencia do *Sanga*.

Porque entao, a classe que o vê mal, substenta o seu jornal, manifestando o interesse que nos comove, pelo progresso do *Bharat*? ¿E por que ela convida o seu director a fazer confe rencias em todos os pontos de Gôa?

Não nos dirão?

E todos sabem que êle, continua sendo presidente do *Sanga* e até contra sua vontade por lhe não terem querido aceitar a exoneração,insistentemente solicitada, por causa dos seus afazeres jornalisticos.

E' que a intriga é cega!

Anno VIII No 13

Q... 28 de Junho de 1923

...RA
Por ... ...ias
ANN...
Por cada lin... ainda qu... ...nga
Numero a vulso u.

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ८ वें. अंक १३

गुरुवार ता. २८ जून सन १९२३

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

Pontos nos i i ...

आॅस्पिसेंतील खेळखंडोबाः—ओस्पिसच्या कारभारासंबंधीं सध्या दोन पक्षांची लढाई चालू असून, ते परस्परांविरुद्ध लेखीं, तोंडी व इतर हरतऱ्हेच्या मार्गांनीं निरनिराळ्या अफवा पसरविण्यांत मारे चूर होऊन गेलेले दृष्टोत्पत्तीस येतात. त्या अफवांवच अनुसरून आम्हीं गेल्याच्या मागील अंकांत कांहीं विचार प्रगट केले होते. व्यक्तिशः कोणालाहि दोषी अगर निर्दोषी ठरविण्याचा त्यांत आमचा बिलकूल मानस नव्हता व नाहीं. मात्र त्या संस्थेसंबंधीं चालत असलेल्या अनिष्ट प्रकारांवरून तीजविषयीं आम्हीं अविश्वास दाखविलेला असून सदरील विचार या अविश्वासाचे अनुवादक आहेत, हें उघड आहे. अर्थात् अर्थाचा अनर्थ करून, दुसऱ्यांच्या सात्विक भावनांचा विपर्यास करणें केव्हांहि न्याय्य होणार नाहीं, हे निराळें लिहिणें नलगे.

"धोक्याची सूचना":—कुडचडें येथें अनीतिवर्धक अशा दारूच्या व्यसनाला ऊत येत चालला असून अवघ्या चारशें हातांच्या औरसचौरस टापूंत नऊ गुत्ते, तळीरामीं यांथ मोठ्या जोमानें पसरविण्यांत, रात्रंदिवस गुंगून गेलेले आहेत! या गुत्त्यांची संख्या कमी व्हाणूनच कीं काय आमच्या अति शहाण्या सरकारनें मुख्य रहदारीच्या दुकानाशेजारीं व रहदारीच्या हमरस्त्यावर दहावा गुत्ता उघडण्यास परवानगी दिली आहे, अशी वदंता आहे. ही अशुभ वदंता खरी असल्यास सरकारच्या स्वार्थलोलुपतेची कोणीहि कींवच करील. अमेरिकेसारख्या राष्ट्रांत दारूला गचांडी दिली जात असतां व त्या मादक पेयाचे अनिष्ट परिणाम प्रत्यही जाणत असतांहि, सरकारनें लोकांच्या नीतिमत्तेकडे दुर्लक्ष करावें, हें आमच्या हतभागी देशाचें दुर्दैव नव्हे काय?

—रा. काशिनाथ दामोदर नाईक व केशव अनंत नाईक यांच्या प्रयत्नानें पुरानें अनाथ बनलेल्या लोकांसाठीं फंड गोळा करण्यासाठीं मडगांव येथें एक सभा भरून रा. नागेशराव सडेकर व बोर्बी नाईक यांच्या सूचनेनें सदहू कार्यासाठीं रा. नरसिंह दामोदर नाईक, पुरुषोत्तम सुकेरकर, भाऊराव दलाल, रामनाथ पै, नयगमकातकर व गुरुपाद मागेवाडी यांची कमेटी नेमण्यांत आली. या कमेटींत सडेकर व नाईक यांचाहि समावेश करण्यांत आला. सभेंतल्या सभेंत ५०० रु. चे आंकडे पडून, फंडाची रकम एक हजारावर गेली आहे, हें मडगांवकर बंधूंस फार भूषणावह आहे.

—मुंबईचे दानशूर व गरिबांचे कैवारी श्रीमंत शांताराम नारायण दाभोळकर यांनीं पुरानें अनाथ बनलेल्या लोकांस दोन हजार रुपयांची मदत केली, हें कळविण्यांस मोठें समाधान वाटतें. श्रीमंतांनीं गोमांतकीयांवर अनेक उपकार केलेले असून, आपल्या परोपकारी अंतःकरणाची साक्ष त्यांना पटविलेली आहे.

—श्रीमंत दाभोळकर ह्यांची श्रीदत्तवाडींतील सारस्वत वेदपाठशाळा आषाढ शुद्ध पौर्णिमेपासून पुनरेव सुरू झाली.

—पणजी येथेंहि अनाथांच्या मदतीसाठीं फंड उभारण्यांत आला असून त्याची रक्कम हजार रुपयांवर गेली असल्याचें कळतें.

—म्हापसेंतहि फंडाला मोठें स्वरूप येण्याचा रंग दिसतो.

—वाळपैच्या मुनिसिपालटीनें अनाथांसाठीं १० हजार रु. ची मंजुरी दिली आहे.

—प्रसिद्ध वैमानिक साकाटुर कावाल व गागु कुतिनु यांस, पणजी मुनिसिपालटीनें, पृथ्वीप्रदक्षणा करतांनां, गोमांतक प्रांताला भेट देण्याविषयीं विनंति केली आहे. सदहू वैमानिकांच्या नवीन धाडसाप्रीत्यर्थ ठिकठिकाणीं फंड गोळा करण्यांत येत असून तो शक्य तितका मोठा होण्यासाठीं सरकारचे जोराचे प्रयत्न चालू आहेत.

—दो. जिऊ शावा फळ देसाई यांस वकिलीची सनद मिळाली असून तिचा उपयोग ते लोक कल्याणार्थ करणार आहेत, हें कळविण्यास आनंद वाटतो. रा. देसाई हे येथील स्थानिक पुढारी असून, लोकहितार्थ स्वार्थत्याग करण्याचा त्यांचा नैसर्गिकच ओढा आहे.

अनाथांस विनंति.

महापुरानें अनाथ बनलेल्या गोमांतकीयांस कोणत्याहि प्रकारची शारीरिक मदत पुरविण्यास भारतकार व भारतप्रेसांत काम करणारे त्याचे प्रेमळ सहाय्यक एका पायानें तयार आहेत. अनाथांची सेवा बजावण्याची सुसंधि लाभत असल्यास, कांहीं काळ भारत ओफीस सुद्धां बंद ठेवण्यांस ते माघार घेणार नाहींत, यद्विषयीं त्या त्या स्थानिक पुढाऱ्यांच्या सूचनांचीच ते मार्गप्रतिक्षा करीत आहेत.

भारत—कार.

प्रासंगिक विचार.

आमची जुनी पुराणी चातुर्वर्ण्य व्यवस्था डळमळली; धार्मिक बंधनें ढिलीं पडलीं, युरोपीय संस्कृति पुढें आली; समता स्वातंत्र्य व बंधुता हीं तत्वें लोकांत वावरूं लागलीं, व आतां कुठेंशीं बोल्शेविझमचें तत्व वर डोकें काढूं लागलें आहे!

* * *

भविष्यकाल ही गतकालाची पुनरावृत्ति असून इतिहासाची पुनरावृत्ति होते, असें म्हणतात. रवीचा उदय होऊन अस्त होतो व पुनः उदय होतो, तद्वत उन्नतीच्या मागें अवनति व अवनतीच्या मागें उन्नति असें हें रहाटचक्राप्रमाणें होत असतें.

* * *

पूर्वी एका कालीं युरोपची अवनति होती, पुढें कांहीं काळ उन्नति झाली, व पुनः उन्नतावस्थेस प्रारंभ होऊन काल परवांपर्यंत तिची मध्यान्हीच्या रवीप्रमाणें पूर्णता झाली व आतां सायंकालास सुरवात झाल्याचें दिसून येतें. भविष्य कालाचा अनुभवच याची जाणीव करून देईल.

× × ×

पूर्वी एकदां हिंदुस्थानची ही उन्नती झाली होती व तें पुढें युरोपप्रमाणें अनेकदां उन्नति-अवनति यांच्या कक्षेंतून जाऊन, कालपरवां अवनतावस्थापंकजांत लोळत पडलें होतें. तूर्तची व पुढें येणारी स्थिति अवनतीचीच आहे किंवा उन्नतीची आहे, हें समजून येत नाही; ती भविष्यतकालीं समजून येईल. तरी 'मुलांचे पाय पाळण्यांत दिसतात' या न्यायानें त्याची अजून अवनतावस्था संपली नसून, पुढेंही कांही कालतें त्याचस्थितींत, पण भग्नमान अस्तंगत युरोपीयन उन्नतावस्थेंत रहाणार असल्याचें दिसून येतें. मग कांहीं कालानें अवनतावस्थेंत असलेलें हिंदुस्थानच चक्रनेमीक्रमानें उन्नत झाल्याशिवाय रहाणार नाही, ही गोष्ट खरी आहे. पण तो त्याचा उन्नतकाल तितका मात्र जवळ नसावा, असें दिसून येतें.

* * *

आज येथें दिसणारी उन्नतावस्था म्हणजे युरोपियन उन्नतावस्थेच्या उतरत्या लागलेल्या कळेची इकडे आलेली लाट असून, ती त्याजबरोबरच नाहींशी होणार, हें स्पष्ट आहे. ह्या आलेल्या लाटेचा इकडे सुपरिणाम होईल किंवा दुष्परिणाम घडेल, हें सूर्य व बिंब या न्यायानें दिसून येणारच त्याबद्दल भविष्य वर्तविण्याची जरूरी नाहीं.

× × ×

मोनार्कीचें रेपुब्लिकांत स्थित्यंतर झालें आणि आतां यापुढें रेपुब्लिकचें बोल्शेविझमांत रूपान्तर होणार. अशी चिन्हें दिसत आहेत. पूर्वी श्रीमान व वजनदार लोकांचें प्राबल्य होतें; मध्यें अधिकारी लोकांचें प्राबल्य झालें; आतां लोकशाहीचें प्राबल्य, असून पुढें गरीब रयतेचें प्राबल्य होण्याचा संभव दिसतो. कालापुढें कोणाचा इलाज नसतो.

"कालायतस्मैनमः" एस. एन.

Ano VIII *No. 19*

Qu... de Agosto de 1923

...TURA

... tres rupias

...OS

Por cada linh... repetida uma tanga

Num... ma tanga

DIRE... ...TOR

G. P. ... Dessay

Quepem-Goa

वर्ष ८ वें, अंक १९

गुरुवार ता. ९ आगष्ट सन १९२३

वर्गणीचे दर.

सालीना रु. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.

समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.

गो. पु. हेगडे देसाई.

केपें—गोवा.

भारत

BHARAT

Para meditar . . .

Esta' exausto o erario publico. Exausta se acha a capacidade contribuitiva do Ze' pagante. A propriedade e o comercio, principal *materia prima* de impostos nao atravessam certamente uma era de prosperidade, estando nas condiçoes identicas as artes e profissoes liberais.

A crise economica que nos assoberba merece ser olhada com grande cuidado. Todo o esforço que se envidar no sentido de a debelar e' pouco. Uma pequena desatençao ou incuria neste tao importante assunto pode originar consequencias fatais, consequencias sem eficaz remedio, consequencias sem possivel salvaçao.

Nao basta *estarmos tristes* porque tristesas nao pagam dividas nem *proferirmos discursos flamantes*, por que nas graves condiçoes a que as coisas tem chegado, a *palavra*, por mais *demostenica* que seja, perde o dom de operar milagres para os quais nao sao, certamente, propicios os dias que correm...

Governantes e governados tem, pois de, numa acçao conjugada, convergir o maximo de sua energia para a sacrossanta empresa de salvaçao desta terra que nos e' tao querida e a' qual tradiçoes as mais honrosas tem ligado o prestigioso nome dos nossos avoengos.

Nao ha' que duvidar. A hora e' de sacrificios e sacrificios sem sombras nem capas do comodismo egoista ou do egoismo comodista. Sera' um indisculpavel crime de lesa patria conservar-se de braços crusados, estando iminente o perigo duma monumental derrocada.

Deixemos em parte as questiunculas personalistas e luctas partidarias; votemos ao secundario plano o exercicio do *dize tu, direi eu*; esqueçamos finalmente, tudo para so' ocuparmonos da nobilissima tarefa da conjuraçao do grande perigo que nos ameaça.

Nada de discussoes, nada de conjecturas, que nem para umas nem para outras o tempo e' propicio, como o vimos.

Convençamo-nos duma ves para sempre, que o nosso esforço em prol da salvaçao do Paiz que estremecemos com todas as veras de nossa alma nao admite delongas. Toda a pressa e' pouca; toda a actividade e' insufici...

A' Janela....

A horrorosa catastrofe...

Em fugidias linhas, com pranto no coraçao, narramos o terrivel sinistro de que foi teatro Sanquelim, Valpol e Candiapar...

Mais uns poucos de episodios desenrolemos agora. Todo o local inundado lembra uma cidade devastada, como a Sadoma ou Gomorra. Tudo nos incute pavor, tristesa, desoloçao. A corrente devastadora e indomita derruiu tudo, casas, arvores animais ... Crianças ficaram sem seus livros: Homens sem seu magro "pe' de meia".

Tudo arrasou a horrenda corrente, qual serpente furiosa sibilando, sibilando sempre ... avançou com uma força inacreditavel...Se fosse de noite...oh! o espectaculo seria mais tragico ainda!...

Deus, porem, nao permitiu que assim fosse.

Oh! como e' consolador, como e' grato, ver essa interminavel e ininterrupta lista de subscriçao que o *Heraldo* publica! Como e' doce ver, abrirem-se espontaneamente todas as bolsas para minorarem a desgraça que a catastrofe causou!...

Ate crianças das escolas, sacrificam os seus miseros *ana's* que os paes lhes tinham entregue para grao" e enviaram aos seus colegas infelizes.., a quem a inundaçao levara a riquesa dos seus livros, penas e lapis...

Os olhos embaciam-se de lagrimas, tam grande e' a alegria que se nos vai pela alma dentro...

Benedito seja, mil vezes, o povo de Goa. Benedito seja!...

Alma Velha

Para n.º imediato

Artigo sôbre

GUERRA JUNQUEIRO

ente; todo o zelo e' incompleto...

Ninguem se desanime e todos concentrem, coglobem a soma das suas forças vivas para salvar o Paiz, ameaçado da formidanda queda da aniquilaçao, do seu fatal arrastamento para o precipicio da queda irremediavel...

Sim, trabalhemos todos, governantes e governados, pela salvaçao da Patria que nos e' tao cara.

Ecos & Critica

Ja' se vai embora..

Dizem os jornais da capital que sua Excia. o sr. Governador Geral dr. Jaime de Morais segue breve para Portugal. E' tempo, portanto, de se apreciar a sua acção governativa, o que prometemos fazer, oportunamente, mas sempre durante a estada de Sua Excia á tes ta da Colónia.

Entretanto diga-se, em pouco, que a governação do sr. dr. Morais, foi assinalada por muitos erros, derivados, em grande parte, do producto das impressões que nêle muito astutamente souberam exercer os *satelites*, cá da terrinha ...

... Mas ... aguardemos.

Novas-Conquistas

A valorização de muitos terrenos das N. Conquistas, hoje votados ao completo abandono depende, como, varias vezes, temos frisado no *Bharat*, de duas condições essenciais: segurança e salubridade.

Quem pretender trazer á cultura pequena ou grande porção deles, tem de ter arraigada no espirito a convicção inabalavel de que, com o seu empreendimento agricola, nada, absolutamente nada terá que sofrer a sua saude e o fruto de sua labuta.

Quanto á seg rança de propriedade, isso pode correr por conta da policia quando e ta se empenhar, a valer, por libertar a sua correspondente jurisdição dos clandestinos atentados.

Resta, agora, a questão de salubridade, até hoje, refractaria á acção dos delegados de saude, *figuras decorativas*, talvez, á mingua de meios e atribuições.

¿Porque é que os nossos governantes não hão de dedicar uma pequena parcela de seus cuidados á saude dos habitantes das N. Conquistas?

Pro vitimas

Apraz-nos registar que vai tomando incremento o movimento em prol das vitimas das inundações, graças á generosidade dos filantropicos do Paiz e de fóra deste como o sr. Shantaram Narayen Dabolcar.

O *Xilonati Samaj* de Pernem despachou para diversas aldeas voluntarios com o fim de angariar fundos para o auxilio dos sinistrados aos quais a camara de Sanguem votou um subsidio de 100 rupias, isto é, o dobre do que lhes deu o municipio das Ilhas.

E' tambem digna de elogios a atitude das autoridades administrativas que não pouparam nem poupam esforços em prol das vitimas.

Os Pereiras

Escrevem-nos—

"A ignobil campanha da *gente ultramarina* coutra os irmãos Pereiras tem por fim tentar diminuir-lhes o incontestavel e incontestado valor no conceito públioo. Tal tentativa, porem, dá em droga por serem sobejamente conhecidos "os processos" da mesma *gente* cujas tenebrosas proesas a historia politica do Paiz regista com letras tintas do sangue das vitimas do *21 de setembro*. Recentemente, pretendeu repetir o *scenario sanguinolento* do passado em Canvorem, procurando exercer represalias nos pobres *Velipos*, não satisfeita de os reduzir á desgraça ... A honra dos srs. Pereiras não pode ser, pois, atingida pela *chicana* da mesma gente cujo patriotismo não vai, como se tem provado á saciedade, para alem do seu bojudo estomago."

Registando a titulo de curiosidade o que se nos escreve sobre a *guerra civil* do Hospicio, o *Bharat* nada mais faz do que contribuir para a completa ilucidação do modo de ser de quem aperta nas suas mãos as redeas da direcção daquela instituição e dos sevs acolitos...

Pragatica-Sanga

Ao sr. Vice-Presidente do *Sanga* em exercicio, frisamos a necessidade de, conforme o deliberado na reunião do Directorio, celebrada em Margão, envidar os seus esforços por forma que se efectue, quanto antes, o Congresso do mesmo *Sanga*, anunciado, aliás para os

मित्र, या सारख्या विद्वान गृहस्थांनीं पुराणेतिहासाचें संशोधन केलेलें आहे. डॉ. भांडारकर हे हिंदभूमींतील एक अमूल्य रत्न आहे. डॉ. भांडारकरांनीं केलेलें कार्य लक्षांत घेऊन त्यांचें नांव कायम राहाण्याकरितां, तेथील लोकांनीं भांडारकर रिसर्च इन्स्टिट्यूट या नांवाची एक संस्था स्थापन केली आहे.

पुण्यांतील भारतेतिहास संशोधक मंडळानें केलेले प्रयत्न लक्षांत घेण्यासारखे आहेत. आपल्या देशाचा जुना इतिहास संशोधन करून लोकांपुढें आणण्याचें काम ही संस्था करीत आहे. राजवाडे, खरे, पारसनीस वगैरे सारखे लोक या कार्यार्थ सतत प्रयत्न करीत आहेत. बंगालचे यदुनाथ सरकार याचे प्रयत्न फार दांडगे आहेत. त्यांनीं मराठ्यांच्या व मुसलमानांच्या इतिहासावर पुष्कळ पुस्तकें लिहिलीं आहेत! व त्या विषयावर त्यांचा व्यासंग सतत चालून आहे.

डॉ. रविंद्रनाथ टागोर यांनीं पौर्वात्य व पाश्चात् संस्कृतिचा मेळ घालण्याकरितां, विश्वभारतीय नांवाचें विश्वविद्यालय काढलें असून, त्यांचा ज्ञानप्रवाह अखंड चालू आहे.

याप्रमाणें ब्रिटिश हिंदुस्थानांत आपले बांधव आपल्या मातृभूमीचें नांव उज्वल होऊन ती पूर्वी प्रमाणेंच सर्व राष्ट्रांना आदर्शभूत व्हावी ह्मणून करीत असलेली खटपट यशस्वी होईल यांत अगदींच शंका नाहीं. आतां पुढील लेखांकांत गोमांतकीय हिंदु समाजानें आपलें कर्तव्य कसें बजावावें त्याविषयीं कांहीं सूचना करून हा विषय पुरा करूं.

स्फुट विचार

"दुतोंडी राजकारण":—हिंदु व ख्रिस्ती या उभय जातींत पूर्ण एकी झाल्याशिवाय गोमांतकाचा राजकीय उद्धार होणें कदापिही शक्य नाहीं, अशी कांहीं ख्रिस्ती पत्रें वेळीं अवेळीं जोरानें प्रतिपादन करीत असतात; परंतु मजा ही की, एकीच्या नांवानें ओरड करणारे हेच ख्रिस्ती महाशय हिंदूंना हितकारक होणाऱ्या प्रत्येक गोष्टीला विरोध करण्याची संधी दवडीत नाहींत! एखाद्या हिंदु हितविषयक प्रश्नाशीं सदरहू लोकांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध असला कीं, त्यांनीं आपला मत्सरी दावा साधलाच ह्मणून समजावें! या विधानांचें सत्यत्व पटविणारीं अनेक उदाहरणें दाखवितां येतील. ओस्पिसचीच गोष्ट घ्या ना. या संस्थेचा मेंबर होण्याची गेल्या वर्षामागें हिंदूंनां पूर्ण मोकळीक होती. परंतु सदर्हू संस्था उन्नति पंथ आक्रमित असल्याचें पाहातांच, खुद्द एकीचे पोवाडे गाणाऱ्यांसच भयंकर पोटदुखीच्या व्यथेनें पछाडलें व ओस्पिसचीं द्वारें हिंदूंनां कायमचीं बंद करण्यांत आलीं! हें दुतोंडी राजकारण—ऊर्फ पोटकारण हिंदु व ख्रिस्ती या उभय जातींचीं अंतःकरणें राजकीय क्षेत्रांत समांतर होतील. याची उमेद बाळगणें निवळ वेडेपणा आहे.

अनाथांस मदतः—जलप्रलयानें अनाथ बनलेल्या लोकास दुःखं निवारण करण्यासाठीं जिकडे तिकडे वर्गण्या गोळा करण्यांत येत असून, त्यानां जनतेकडून मोठ्या उदार अंतःकरणानें हात भार लावला जात आहे, ही समाधानाची गोष्ट होय. प्रत्येक जण आपआपल्या शक्तिनुसार संकटांत पडलेल्या आपल्या बंधुभगिनींस कोणत्या ना कोणत्या रूपानें सहाय्य पुरविण्यांस पुढें सरसावत असल्याचें पाहून कोणाचें अंतःकरण सद्गदित होणार नाहीं ?

काटकसरः— बेसुमार फोफावलेल्या नोकरशाहीच्या वृक्षाची खच्ची केल्याशिवाय, तिजोरीच्या मानगुटीवर धिंगाणा घालणाऱ्या तुटीच्या खवीसाच्या लीलांना आळा पडणार नाहीं, हें तत्त्व आतां हलकें हलकें सरकाराला पटत चालल्याचें दिसून येत आहे. कांकीं, कांहीं कांहीं अनावश्यक जागा कमी करण्यात येत असून कांहीं कांहीं खातीं अजिबात काढून टाकण्यांचें घाटत आहे. काटकसरीची ही प्रवृत्ति मागेंच प्रगट झाली असती तर तिचा परिणाम तत्काळ दृष्टोत्पत्तीस पडला असता. पण ज्या थराला सांप्रत आमची सांपत्तिक स्थिति पोंचली आहे. त्या 'थरांत' सदरहू 'औषधाचा' परिणाम होईल कीं नाहीं व झाल्यास तो कितपत होईल याचें प्रमाण ठरविण्यास बरीच डोकेफोड करावी लागणार, हें उघड आहे.

राष्ट्रीय फंडः—पोर्तुगीज वैमानिकांची पृथ्वी प्रदक्षणेची नूतन कल्पना यशस्वी होण्यार्थ एक 'राष्ट्रीय' फंड उभारण्यांत आला असून, तो शक्य तितका 'अवाढव्य' करण्यासाठीं सरकारचे प्रयत्न चालू आहेत. जनतेची सांपत्तिक स्थिति कितीहि वाईट असली, तरी ज्या अर्थी सरकारचा हेतु वाईट नाहीं, त्या अर्थी ऐपत असलेल्यानीं त्या राष्ट्रकार्यास दोन्हींही हातांनीं मदत करावी, अशी आमची शिफारस आहे मात्र 'राष्ट्रीय' फंडास मदत करीत असतानां जलप्रळयानें उघडे बोडके पडलेल्या लोकांसाटीं उभारण्यांत आलेल्या 'प्रांतिक' फंडाला सहाय्य पुरविण्यास त्यांनीं विसरूं नये. 'आप राखून धर्म करणें' हें तत्त्व लाथाडलें गेल्यास कोटेंही झालें तरी त्याचा परिणाम गोड होत नसतो, असा अनुभव आहे.

जाहीर नोटीस

मी खालीं सही करणार सर्व लोकांस जाहीर करितों कीं, माझी एक सही केलेली सेलाद फोल हरवली असून, त्यावर आमच्या स्थावर जंगम इस्टेटी संबंधीचा कोणत्याहि प्रकारचा लेख कोणत्याहि तारखेनें कोणीहि लिहून घेऊं नये. घेतल्यास तो मला कबूल नाहीं. मी प्रौढ दशेंत आल्यापासून सरकारी खात्याखेरीज (कोर्तारीउ द तावेलियांव) इतर प्रकारें कोणाचेंहि ऋण काढलें नाहीं. ता.-७-८-१९२३

शाबा रामचंद्र गांवस देसाई अवेडेंकर.

जेटी--मराठी शाळा.

मोर्मुगांव-हार्बर.

[खास बातमीदाराकडून]

पुढें श्री. तारकर यांनीं आपणास अध्यक्ष निवडल्याबद्दल आभार मानून शाळेचा हालहवाल वाचून दाखविण्यास सेक्रेटरी यांस विनंति केली. त्याप्रमाणें श्री. दणाईत यांनीं खालील रिपोर्ट वाचून दाखविला.

सभ्य गृहस्थ हो, आमच्या विनंतीस मान देऊन व आपला अमूल्य वेळ खर्चून आपण येथें येण्याची तसदी घेतली याबद्दल आपले सर्वांचे आभार मानून मी या शाळेचा सन १९२२ चा वार्षिक रिपोर्ट आपल्यापुढें सादर करण्याची परवानगी घेतों. हा रिपोर्ट वर्षाच्या अखेरीस डिसेंबर महिन्यांतच सादर करावयाचा. व त्या प्रमाणें योग्य व्यवस्था ठरवून सर्वांना जाहीर विनंतीही केली होती. परंतु, कांहीं अपरिहार्य कारणामुळें त्या वेळां तो बेत रहीत करणें भाग पडून आज ऐन पावसाळ्यांत आपणा सर्वांस तसदी देणें भाग पडत आहे. याबद्दल आपण क्षमा कराल अशी आशा करितों.

मागील वर्षाची शिल्लक कांहीं नसून या वर्षी प्रवेश फी, ५ रु. ८ आ. मुलांची मासिक फी, १४८ रु. मेंबर कडील वर्गणी १४० रु. ४ आणे व देणगी २ रुपये मिळून उत्पन्न २९५ रु. १२ आणे आहे. व खर्च, मास्तरांचा पगार २८७ रु. ८ आणे, बक्षिस पुस्तकें ६ रु. व शाळा खर्च ८१ रु. ४ आ. ९ पै. मिळून ३७४ रु. १२ आणे. ९ पै. इतका आहे. ६५ रुपये ८ आ. मेंबरांकडून यावयाचे आहेत. वरील जमाखर्चाचा हिशेब पहातां जमेपेक्षां खर्च ७९ रु. जास्त झालेला आहे. वरील खर्चांत काटकसर करणें मुळींच शक्य नाहीं. उत्पन्नाच्या बाजूनें जरी अशी शोचनीय स्थिति असली तरी मुलांची संख्या पहिल्यापेक्षां जास्त ह्मणजे जवळ जवळ ८० आहे. हें पाहून कोणासही आनंदच होईल. आणखीही मुलें येण्यासारखीं आहेत परंतु जागेच्या व शिक्षकांच्या अडचणीमुळें मुलें घेण्याचीं बंद करावीं लागत आहेत, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. जागेच्या अडचणीबद्दल कांहीं तरी व्यवस्था करण्यांत येईल, परंतु, मुख्य अडचण ती नसून ८० मुलानां एकाच शिक्षकाकडून योग्य शिक्षण मिळणें शक्य नाहीं, ही होय. मुलांची फी वाढवावयाची तर आतां आहे तीच फी कमालीची जास्त आहे. एवढ्यानेंच भागतें असें नाहीं, तर मुलानां हल्लींच्या सुधारलेल्या पद्धतीप्रमाणें पूर्ण शिक्षण द्यावयाचें ह्मणजे त्याला लागणारीं सर्व तऱ्हेचीं उपकरणेंही पाहिजेत. यावरून आहेत त्याच मुलानां योग्य शिक्षण देण्यास निदान दोन शिक्षकांची अगदीं जरूरी आहे हें कोणीही कबूल करील. तात्पर्य, शाळेची सुधारणा करण्याचें राहोंच. परंतु, आहे त्याच स्थितींत शाळा चालविणें मोठ्या मुष्कीलीचें झालें आहे. हल्लीं येत असलेली मुलांची फी व मेंबर शीप यांतून कसा बसा एक मास्तरचा पगार भागूं शकेल. मास्तरांच्या अडचणी करितां मुलांची संख्या मर्यादित करावी तर तेंही बरोबर नाहीं. सारांश मास्तरांना एकतरी अधिष्ठ देणें भाग आहे. दसकी लकडी एकका बोजा या न्यायानें या सार्वजनिक कार्यास आपसांतील मतभेद बाजूस ठेऊन येथील सुशिक्षित लोकांनीं मनांत आणल्यास एका शिक्षकाच्या पगाराची भर होण्यास कठीण पडणार नाहीं.

वर्तमानसार

—डिचोलीचे दोतोर सखाराम सरदेसाई हे अनाथांसाठीं मोठ्या चिकाटीनें फंड गोळा करीत आहेत. 'परोपकाराय पुण्याय'.

—पोर्तुगालचे आधुनिक कविश्रेष्ठ गेर्र जुंकैर यांचें देहावसान झालें !

—जर्मनींत बंडाळी माजली असून केवळ मिठ भाकरीसाठीं भरदिवसा दरोडे घालण्यांत येत आहेत !

—हिंदूंचे चहाते कापितांव कोस्त आलवीम हे लवकरच पोर्तुगालला रवाना होणार आहेत.

—मडगांवच्या ओस्पिसनें सांखळी व इतर ठिकाणच्या अनाथांस एक हजार रुपये पाठविण्याचा ठराव केला आहे.

—सांत काज द मिजेरकोर्दिय या संस्थेच्या नोकरांचे पगार वाढविण्यांत आले आहेत.

—जंगलखात्यांतील अनेक लहान नोकरांच्या जागा कमी करण्यांत आल्या आहेत.

—कोमिसांव द मिल्योरामेंतच्या जुन्या मोटारींचा लिलांव जाहीर करण्यांत आला आहे!

—पब्लिक वर्क खात्याचे मुख्य सि. आमोरी यांची मुदत संपल्यानें त्यांचे जागीं सि. जुझार्थ मेंदोंस यांची नेमणूक झाली आहे.

—विस्कोंद द पेर्रे यांनीं अनाथांस ५०० रुपयांची मदत पाठविली असून पेडणें मुनिसिपालटीनें २५ रुपयांचें सहाय्य केलें आहे. शिवाय तेथील शीलोन्नति समाजानें निराळा फंड उभारला आहे.

—डॉ. फ्रोइलानु दे मेलु यांनीं आंगोल येथें आरोग्यविषयक अनेक उपयुक्त पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत.

—माकाव येथें एका भयंकर वावटळीनें बरीच नुकसानी आणल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

—मडगांवच्या मुनिसिपाल हॉलांत एक सभा भरून दो. फांचु लोयोल यांस पारतीदु इंदियानाचा सूत्रधार निवडण्यांत आलें.

—काल रोजीं येथील कुशावती नदीला भयंकर पूर येऊन तिच्या तिरांवरील बागायतांस बरीच नुकसानी आली. पारोडेयेथेंहि पुरानें लोकांना हवालदील करून सोडलें.

Ano VIII N.º 20
Quinta-feira 16 de Agosto de 1923
NATURA
no tres rupias
'CIOS
Por cada lin te repetida uma tanga
Nu. uma tanga
DIR. EDITOR
G. P. Dessay
Que,

वर्ष ८ वें, अंक २०
गुरुवार ता. १६ आगष्ट सन १९२३
वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)
जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.
संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

BHARAT

Guerra Junqueiro

Extatica, inanimada a tumba fria sorveu o involucro material da majestosa, da soberba aguia do lirismo luso.

Nesta hora, por certo, as lagrimas da patria inteira lhe tornaram leve a terra dura; em misticas preces ergueram-se a espuma, as vagas; e entre o arvoredo chora o vento em salmos piedosos.

Nao e somente o isocrono fenomeno de "a anarquia da dor a protestar contra o despotismo da morte", mas e tambem a circunstancia especial de nao se nivelar a superficie da campa rasa a carcassa gelida em que reverberaram celeres, os raios santos da Perfeiçao!

A morte!...Oh! A escuridao e' inoxia a's scintilaçoes das estrelas numa noite escura.

No mundo moral, no intelectual tambem estrelas ha', como no sidereo espaço, essas estrelas sao faro'is que guiam as multidoes, no drama tumultuario da nossa existencia, a estes.

Morrer! que serve!

A morte é o prologo da vida!

Positivamente nao tem morte quem de armas na mao clame pela integridade, pela unidade da raça, da patria; quem rompendo os veus das tenebrosas lendas, se erga a' proa das gale's a desafiar a furia dos oceanos entumescidos; quem, a' guisa das aves singre o oceano aerio, pondo em tremulaçoes a bandeira da patria, ao sabor das correntes aerias, ou quem em voos arrojados nas regioes da poesia lave a alma de um povo, da vida comum, banal.

Nao podem morrer estes, nao devem morrer!

A mao negra da Morte atira para a vala comum, de olhos vedados criaturas grandes ou pequenas, grossas ou magras, ricas ou pobres, mas quando elas se chamam Camoes ou Dante, Vasco da Gama ou Newton, Antonio Candido ou Mirabeau, o seu nome tem efeito de pedra lançada na aguas no meio das massas como nas aguas dum tanque, levanta circunvoluçoes e passa de geraçao a' geraçao!

E se a frauta rude dos pastores, se o versejar ambidextro dos primitivos incolas das selvas, foi a sinfonia do progresso universal, se as epopeias dos gregos, dos latinos, dos portugueses sao horas supremas da Humanidade, e se de todas nacionalidades, em todos tempos compete gravar em letras do fulgor intenso os momentos e monumentos psicolo'gicos — esta missao sacrossanta e' dos poetas, porque so' a toada suave dos versos pode domar o eterno *homo homini lupus*, ainda, so' do orquestrar das harpas eo'lias, e' condao especial fazer herois.

E Guerra Junqueiro, a peito nu' rasgou vias de soluçao, a muitos enigmas, a muitos misterios do seu tempo: trovejou, trabalhou, derruiu, sublimou, e, para tudo dizer, ate' foi o ultimo a desaparecer dos *Vencidos da Vida*!.

...Ultimo da luminosa galeria dos *Vencidos da Vida*!

Oh! como se extinguiu essa pleiade de homens que eram sa'bios, ascetas a viver somente, sorvendo os nectares do espiritualismo, misticismo!

Foi em declive para o Nada essa falange de santos, um por um, era ontem Anto'nio Candido, a seguir Marquez de Soveral, depois Conde de Sabugosa e hoje Guerra Junqueiro!

De Portugal se pode dizer, apo's a morte do Junqueiro:

A Deus só pedia água...
Mas o raio caiu em tanta mágua!...
E a Nuvem desabou em dura frágua!...
A Nuvem não tem olhos para vêr...

Oh! Saudade dos tempos em que vinham luzes de Coimbra, "gosto amargo dos infelizes".

No meio da boemia esturdia de Coimbra—o "Cena'culo da Sapiencia"—vinham os rebates das novas fo'rmulas sociaes, scientificas, filosoficas, literarias, artisticas, etc.

No entanto os velhos moldes da naçao iam gastos, o pensamento se debatia na estreita regiao craneana, a gangrena aduladora se alastrava assustadoramente e a inercia era feiçao predominante, em tudo e todos — urgia que fazer.

E neste momento, Junqueiro, despedindo-se das historicas fadas das Nuvens, deixando esse velho tema, cingiu o séu elmo de guerreiro e profeta novo decididamente caminhou a'vante, traçando senda nova, com os seus livros, "Patria" "Finis Patriae", "Musa em ferias", "Os Simples", "A Lagrima", Oraçao a' Luz e ao Pao" etc.

Em tudo novos moldes, revogaçao das obrigatoriedades ficticias, verso espontaneo, musical, variedade ritmica; uma esplendorosa orgia de imagens; esfuziar deslumbrante de antiteses.

Era aurora nova, da Ide'a Nova, na senda nova.

Nao se descreve tudo, nem a minha pena emperrada ousa ao tamanho sacrificio, — o que nos poemas dele ha' e' muita luz e muita luz obscurece a vista e pela prova este pedacito de oiro vai:

Vai despontando o rosiclêr d'aurora;
O azul sereno e vasto
Empalidece e córa
Como se Deus lhe desse
Um grande beijo luminoso e cauto
A' estrela da manhã.
Na altura resplandece;
E a cotovia, e a sua linda irmã,
Vai pelo azul um cantico vibrando
Tão limpido, tão alto, que até parece
Que é estrela no céu que está cantando.

A musa de Junqueiro e' soberba como a e'poca que gerou, tem tempestades, tem o ecoar da metralha da indignaçao, tem o ressoar dos gritos dos Proteus, tem escadas para o infinito e para as regioes subterraneas. Ha' adejos luminosos para o Olimpo, como ha rastejos para a lama. Contudo os seus livros marcam uma e'poca na historia da harmoniosa e doce palavra portuguesa.

Enfim, a sua musa e' duma geraçao opressa que viu em pedaços os grilhoes pesados. Entre estes um ha' que vale por um desvairamento proprio da mocidade ou por efeito do virus ministrado pelos falsos profetas daqueles tempos: e' "Velhice do Padre Eterno" que ele mesmo confessou ser ... *abominavel*, porque o e', sem duvida.

Mas, alem disso, em Guerra Junqueiro, de grande nao sao somente as trovoadas liricas que abalam as abobadas celestes, a expressao singela, cantante que, como o rio entre os arvoredos penetra todas almas; ou ser ele o homem de maior cultura intelectual na peninsula: e' sobretudo a sua figura moral, de asceta puro, dum monge esperando delicias no paraiso, vagueando nos desertos montes, o seu horror as culminancias; o seu desassombro em patentear a Verdade Eterna ser ... Guerra Junqueiro.

Morrer! Morrer e' belo quando se morre como ele, bailando na boca a *Verdade Eterna*, e' isso a suprema eloquencia duma consciencia desassombrada.

Na sua furia devastadora, envoltos nos seus formidaveis versos dardejam setas ao Intangivel e hoje e' o mesmo Junqueiro que voluntariamente enclausurado no "Convento", em extase dum santo embebido em meditaçoes, em comunhao com o universo.

Importa, pois que aqueles que o seguiram, que nortearam pelas teorias do poeta durante a sua vida, tomem por divisa o exemplo da sua morte santa, que gravem na memoria as palavras: "*Vim esperar a morte, vivendo em Deus.*"

"Os triunfos e as conquistas do Napoleao nao valem a lagrima dum santo.
"As pompas das suas vitorias nao va-
"le o burel de S. Francisco. O clamor
"de apoteoses guerreiras e sangrentas
"nao vale o murmurio flebil duma o-
"raçao, voando dos la'bios dum justo
"para Deus."

Nao so' isto:

"Deviamos todos comungar, catolicos e nao catolicos, na essencia profunda da mesma espiritualidade religiosa."

Bela, magnifica morte!

No solo da Patria apagou-se uma lampada, mas la' no ce'u, se acendeu uma estrela. Do alto velara' adejando sobre a Patria, ele apenas como sorriso a bailar nos labios desprendeu-se recitando o hino dos *Vencidos da Vida*:

Na mão de Deus, na sua mão direita,
Descançou afinal o meu coração...
Do Palácio encantado da Ilusão.

Juvenal da Rocha

Uma Verdade ...

Por mais que se pretenda tergiversar nunca pode diminuir do seu valor esta verdade: o peixe pequeno sempre ha' de ser pasto do peixe grande ainda que nem sempre seja mesma a forma cujos aspectos variam conforme o meio grau de civilisaçao e outros factores.

E' que o homem sempre foi *bruto*. Se hontem, foi um *bruto selvagem* hoje e', sem mais nem menos, um *bruto civilisado*.

ण्याकरितां अगर पालखीला किंवा दरवा-ज्याला सोन्या रुप्याचा पत्रा मढविण्याक-रितां, पाहिजे तितकी रकम ओततील; परंतु लोकोपयोगी संस्थांना मदत देण्याचें म-नांत सुद्धां आणणार नाहींत. गोमांतकांत देवळांची व त्यांत चालणाऱ्या उत्सवांची संख्या पुष्कळ आहे. त्यांत आणखी भर घालणें ह्मणजे पोटभर मिष्टान्न जेवलेल्यानां आणखी वाढणें होय. अशा उत्सवांची संख्या खरोखर योग्य ती ठेऊन, बाकीचे कमी करून त्या पैशांचा विनियोग परिस्थितीप्रमाणें लोकोपयोगी अशा कार्याकडे केला पाहिजे. असें केल्यास ईश्वराचा कोप होईल ही सबब पुढें आणणारांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, 'जसे लोक तसे त्यांचे देव' हेंच खरें आहे. अगदीं अशिक्षित लोकांच्या देवांकडे पाहिलें असतां, त्यांचे देव हे त्यांच्या भावनेप्रमाणें अगर गरजेप्रमाणें निर्माण झालेले असतात, व ते कोंबड्या बकऱ्यांचा बळीही घेतात. त्याहून वरच्या पायरीच्या ह्मणजे मध्यम स्थितींतील लोकांचे देव, पालख्यांतून मिरवणारे व पलंगावर निजणारे असे असतात. आणि त्याहूनपुढें गेलेल्यांचा 'सर्व देवो विश्वकर्मा महात्मा सदा जनानां हृदये सन्निविष्टः ह्मणजे 'सर्व विश्वाचा कर्ता महान आत्मा देव मनुष्यांच्या अंतःकरणामध्यें स्थित आहे' अशा तऱ्हेचा देव असतो. यावरून काय सिद्ध होतें ? लोकांच्या भावनाच बदलल्या पाहिजेत हें सिद्ध होत नाहीं काय ? याकरितां आपल्या लोकांनीं धर्मादायाच्या कल्पना बदलून त्यांचा विनियोग योग्य कामाकडे केला पाहिजे.

तिसरा दुर्गुण ह्मणजे प्रातिनिधिक संस्था चालविण्याची आमच्या आंगांत लायकी नाहीं हा होय. एकादी संस्था काढून ती चार चौघांनीं चालवून दाखविण्याची आ-ह्मांस संवय नाहीं. आपल्याकडे पुष्कळ संस्था निघाल्या, हजारों रुपये वर्गणी जमा झाली, परंतु मतभेद व तंटे होतातच. व पुष्कळ वेळां याचा परिणाम फार वाईट होतो. आपली सर्व शक्ति अशा कामीं खर्च होते. आपल्यामध्यें यांचीं, उदाहरणें पुष्कळच आहेत. गोमांतकामध्यें आज ज्या कांहीं संस्था आहेत, त्यांतील पुष्कळशा संस्था अंतःकरणाच्या तळमळीनें उत्पन्न झालेल्या नसून, हमरी तुमरीवरच त्यांची उभारणी झाली आहे. अशा योगानें शेवटीं काय होतें ? पक्ष करतेवेळीं आणलेला उत्साह कमी होतांच या संस्थाही मरूं लागतात. तेव्हां आपण आपलें कर्तव्य काय आहे याचा नीट विचार करून कामाला लागलें पाहिजे.

आपल्या लोकांपुढें कामाचा डोंगर पडला आहे. आज आह्मांस हरएक कामाकरितां दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहावें लागत आहे. सुशिक्षित व कर्त्या लोकांनीं काढलेली प्रागतिक संघासारखी संस्था नीट चालत नाहीं, नव्हे तिची व्यवस्थित रीतीनें सुरुवात करतांही आली नाहीं. आमच्याच एकदा धार्मिक बाबतींतला जरी झगडा असला तरी सुद्धां ख्रिस्ती वकिलांची मनधरणी केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. गोमांतकांत आपल्या लोकांचें एक तरी हास्पिटल आहे काय ? यावरून हिंदु लोकांत भूतदया हा गुणच नाहीं असा आरोप आमच्यावर केल्यास त्यांत वावगें असें कांहींच नाहीं असें वाटत नाहीं काय ? गोमांतकीय बंधूनो, शिमग्यासारख्या निंद्य व सर्वथैव बंद करण्यास योग्य अशा उत्सवां करितां हजारों रुपये खर्चून ते चालवण्याची परिस्थिति आज आहे काय ? आजची परिस्थिति काय आहे, जगाची धडपड कशी चालली आहे, हें आपण पाहातच आहां. अशा भौतिक युगामध्यें आपला निभाव लागला पाहिजे; व ह्या करितां पाश्चात्य देशांतील लोक कशा प्रकारें आपलें कर्तव्य बजावीत आहेत, याचीं उदाहरणें नित्य डोळ्यांपुढें ठेविलीं पाहिजेत. आज जीवनार्थ कलह किती भयंकर वाढलेला आहे, याचा विचार करा. अद्याप चैन करीत बसण्याचे दिवस नाहींत, हें लक्षांत आणा. या करितां गोमांतकीय तरुणानो, आम्हीं बरेच प्रयत्न केले पाहिजेत. स्थानिक कार्यें कितो तरी आहेत. मद्यपानासारख्या निंद्य व भयंकर व्यसनांचा प्रसार तरुणामध्यें जारीनें होत आहे, याची आपण वेळींच खबरदारी घेऊन पिछेहाट केली पाहिजे, व या करतां सुशिक्षित तरुणांनीं मद्यपान निषेधक चळवळी हातांत घेतल्या पाहिजेत. पतितपरावर्तनासारखें कार्य करावयाचें आहे, त्याकरितां अगोदर लोकमत जागृत केलें पाहिजे. हिंदुधर्म व ख्रिश्चनधर्म यांची तुलनात्मक विवेचनपद्धती लोकांपुढें मांडली पाहिजे. याची सर्व जबाबदारी नवीन सुशिक्षित पिढीवर आहे. त्यांनीं प्रथमतः जनतेची भावना जागृत केली पाहिजे. सरकारी नोकरी ह्मणजे सर्वस्व हें तत्व सोडून आह्मीं आपलें कर्तव्य योग्य प्रकारें बजाविलें पाहिजे. तरच आपल्या देशाची उन्नति होईल. आपला भूतकाळ अत्यंत उज्वल होता. पण तो उज्वल होण्यासाठीं जसे प्रयत्न आमच्या पूर्वजांनीं केले, तसेच प्रयत्न आपण आपला भविष्य काळ उज्वळ होण्याकरितां करावयास नको काय ?

शेवटीं, सुप्रसिद्ध हिंदी कवि मैथली शरण गुप्त यांच्या काव्यांतील तरुणास उद्देशून काढलेले उद्गार लिहून, ही विस्तारावलेली लेखमाला पुरी करितों. "हे नव युवाओ. देशभरकी दृष्टि तुमपरही लगी, है मनुज जीवनकी तुह्मीमें जोति सबसे जगमगी। दोगे न तुमतो कौन देगा योग देशोद्धारमें, देखो कहां क्या हो रहा है आजकाल संसारमें ॥"

—श्रीमंत दाभोळकरांच्या दोन हजार पंचायशीं रुपयांची सांखळीतील निराश्रितानां योग्य प्रमाणानें (रोख नाण्याची) विभागणी झाली धान्याच्या अगर कपड्यांच्या रूपानें मदत झाली असती तर खरोखरीच निराश्रित कोण हें समजण्याला मार्ग राहिला नसता.

हिंदुस्थान व कापड

दर माणसीं फक्त १३.४ वार !

ले० मुक्त. मुंबई.

स्वदेशभक्त खालील आंकडेवारीकडे अवश्य लक्ष पुरवितील अशी आशा आहे. ही आंकडेवारी सरकारी व इतर खासगी व खात्रीलायक रिपोर्टावरून मांडली आहे तेव्हां त्यांत विशेष खोटेपणा असण्याचा संभव नाही, हें उघड आहे. गेल्या मार्च महिन्यापासून पुऱ्या झालेल्या १९२२-२३ वर्षाची ही आंकडेवारी आहे.

सरकारी रिपोर्टावरुन असें दिसून येतें कीं, या पुऱ्या झालेल्या एका वर्षांत, हिंदुस्थानांतील सर्व गिरण्या मिळून ७०,५८,४८,००० पौंड सूत कांतलें व त्यापासून ४०,५२,००,००० पौंड कापड तयार केलें यांपैकीं ५६८६१४९० पौंड सूत व १५-६९५१२३५ यार्ड कापड परदेशांत पाठविण्यांत आलें. याच पुऱ्या झालेल्या एका वर्षांत ५९२७४२२९ पौंड सूत व १५९३-२९५०९६ यार्ड कापड विलायतेहून हिंदुस्थानांत आलें. आणि यांतून १४७९८८८ पौंड सूत व ७४५७११४० यार्ड कापड पुनः परदेशांत रवाना झालें. या दिलेल्या आंकड्यावरून खुद्द हिंदुस्थानांत किती कापड तयार झालें व दर वर्षाकांठीं दर मनुष्यास किती कापड लागलें याचें प्रमाणें काढणें विशेष कठीण नाहीं.

हिंदी गिरण्यांत तयार
केलेलें सूत ७०५८४८००० पौंड.
हिंदुस्थानांत आलेलें
विलायती सूत.......५९२७४२२९ ,,

एकंदर ७६५१२२२२९ पौंड
यांतून हिंदी सूत बा-
हेर गेलेलें ५६८६१४५० पौंड
व हिंदुस्थानांत येऊन
परत परदे० पाठ० सूत. १४७९८८८ पौंड,

मिळून एकंदर ५८३४१३७८ पौंड
वजा केले तर ७६५१२२२२९ पौंड
५८३४१३७८

७०६७८०८५१ पौंड

सूत हिंदुस्थानच्या गिरण्यानीं व हातमागांनीं विणलें असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं.

परंतु हिंदुस्थानांतील गिरण्यांमधून ४०५२००००० पौंड कापड तयार झालें. सुतापासून कापड विणताना सुतास खळ देतात व तेणेंकरून त्याचें वजन वाढतें. हें वजन-वाढीचें प्रमाण साधारणपणें १० टक्केप्रमाणें धरलें तर खरेपणीं ४०५२०००० पौंड कपड्याच्या ऐवजीं फक्त ३६४६८०००० पौंड कापड हिंदुस्थानांतील गिरण्यांनीं तयार केलें असें सिद्ध होतें. अर्थांत बाकी राहिलेलें सूत, हातमाग, दोऱ्या, गुंड्या वगैरे कामांत गेलें. हातमागावर कपडा विणावयाचा असला तरी ताण्याला खळ ही द्यावी लागतेच. पण हें प्रमाण दोऱ्या, गुंड्या इत्यादि प्रीत्यर्थ खर्च झालेल्या सुताबद्दल जमेस धरलें तर हिशेबांत विशेष फरक पडण्याचा संभव नाहीं. तेव्हां बाकीचें सर्वच ३४?१००८५४ पौंड सूत हातमागांनीं वापरलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

साधारणपणें गिरणींत १ पौंड सुताचें ३ ४ वार व हातमागावर ४ वार कापड बनतें. त्यावरून हिंदुस्थानांतल्या गिरणींत

१५६८१२४०७० वार.
,, ,, हातमागावर १३६४४०३४१६ वार.
२९३२५२७४१६ वार

कापड तयार झालें हें सिद्ध झालें. पण यांतून १५६९५१२३५ वार कापड परदेशांत पाठविण्यांत आलें. तेव्हां

हिंदुस्थानांत बनलें २९३२५२७४१६ वार
हिंदुस्थानांत बनून बा-
हेर गांवीं गेलें . १५६९५१२३५ वार
बाकी. २७७५५७६१८१ वार

कापड हिंदुस्थानांत शिल्लक राहिलें. हे कापड हिंदुस्थानास पुरणें अगदींच अशक्य असल्यामुळें गेल्या सालीं १५९३२९५०९६ वार विलायती कपडा हिंदुस्थानांत आला पण त्यांतूनहि ७४५७११४० वार कापड परदेशीं गेल्यामुळें हिंदुस्थानांत परदेशी कापड १५१८७२२९५६ वार इतकें राहिलें. हें व देशी मिळून एकंदर ४२९४२९९१३७ वार कापड हिंदी लोकांनीं गेल्या सालात वापरलें.

हिंदुस्थानांतील एकंदर लोकसंख्या ३२ कोटी आहे असें गृहीत धरलें तर दर माणसीं १३.४ वार कापडाचें प्रमाण पडतें.

हिंदु लोकांनीं फक्त अत्यंत जरुरी पुरतें कापड वापरलें तरी दर माणसीं दरसाल, धोतरें, कोट, खमिसें, पंचा, हातरुमाल, उपरणें इत्यादि मिळून कमींतकमी ३०॥ वार लागतें. व ख्रिश्चनादि इतर जातीनाहि तेवढेंच [अंदाजानें] लागतें. पण प्रमाण तर १३.४ आहे. तेव्हां कमींत कमी व जरुरीपुरतें वापरणाऱ्यांची संख्या किती असेल व त्याच्या पोषाखावरून धड वस्त्राला सुद्धां महाग झालेले लोक या भरतखंडांत सुवर्णभूमी ह्मणून नांवाजलेल्या आर्यावर्तांत वस्त्राभावीं शीत उष्ण सहन करीत तळमळणारे मनुष्य जीव किती असतील याची कल्पना वाचकानींच करावी ! !

परदेशी कापडापायीं कित्येक अब्ज रुपयांचा निष्कारण फन्ना उडूनहि धडवस्त्रहि मिळणें कसें अशक्य झालें आहे, इकडे स्वदेशभक्त अवश्य लक्ष पुरवितील अशी आशा आहे. अखिल आर्यावर्ताभिमानी श्रीमंत व भांडवलवाले लोकांनींहि अशा परिस्थितींत भयंकर अतिलोभास बळीं न पडतां ही अडचण दूर करण्याचे प्रयत्न करावे अशी त्यांस सविनय प्रार्थना आहे.

—'मुरगांव-शिक्षण-संघास' मुंबईचे श्रीमंत गणपतराव पुंडलीक धुमटकर यांनीं ता. २७-५-२३ रोजीं घड्याळ अर्पण केलें.

—सांखळी येथील श्रीमती लक्ष्मीबाई वाके या ब्राह्मण बाईनीं तेथील पुरामुळें अनाथ झालेल्या व इतर गरीब लोकांस प्रत्येकीं १० पड तांदूळ, अर्धा नारळ व थोडी डाळ यांची खेरात केली. शाबास ! सत्पात्रीं दान झालें ! धनिक लोक या बाईचा कित्ता गिरवितील काय ?

... VIII No. 21

Qu... 23 de Agosto de 1923

...SINATURA
...ano tres rupias

...UNCIOS
Por cada ... que repetida uma tanga
...uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.

BHARAT

वर्ष ८ वें, अंक २१

गुरुवार ता. २३ आगष्ट सन १९२३

वर्गणीचे दर.
साळीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

Inexplicavel!

Por ter dado cabida nas suas colu nas alguns sueltos, publicados nos periodicos metropolitanos, contra o nosso intemerato colega d *A Terra* foram instaurados alguns processos crimes pelo Agente do M. P na comarca de Salsete.

Acusada de ter cometido o mesmo delicto, mandou-se igualmente, proceder, criminalmente, contra a *A Tribuna* de Calangute

E nao sera' para admirar se na igual *arma d'lha* for, amanha, *colhido* algum outro jornal da India, se tiver *ousadia* de inserir nas suas colunas alguma local de qualquer jornal da Mae-Patria.

E'certo, todavia, que os agentes do M. P dos tribunais judiciais de Portugal nao entenderam que fossem *criminosos* os referidos sueltos, transcritos pelos nossos ja' aludidos jornais!!!

E' inexplicavel, na realidade, esse *desigual* ponto de vistas numa nagao republicana, onde se cantam loas a' *Igualdade* e ao *fraternal* principio de que "a India e' prolongamento de Portugal"!

Se, de facto, o nosso paiz fosse prolongamento da Metropole, coisas que no seio desta sao consideradas como inocentes, nao se reputariam no daquele como crimonosas, nao se observaria ca', com grande pasmo e profunda magua, flexibilidade de criterios sobre um e mesmo objecto; nem finalmente se notaria diversidade sentimental diante dum e mesmo aspecto nos governos que se dizem feitos da mesma massa de sangue...republicano e democratico.

Franquesa franca, e' essa a conclusao que flui, inequivoca e nitida, da atitude *febril* de quem promove,de quando em vez, *por da' ca' aquela palha* processos crimes contra o nosso colega d "A Terra". Afigura-se-nos, mesmo que em relagao ao destemido jornalista que o e' o seu director faz-se "em farrapos" a lei de imprensa...

O "Bharat", quaisquer que sejam as suas relagoes com aquele bissemanario, protesta com toda a veemencia contra a perseguigao que lhe e' movida so porque ele se nao faz adulador ou turibulario do Poder, como por ai se comenta a' boca cheia!

Para que, pois, as instituigoes que felizmente nos regem, nao sofram no seu imaculado prestigio a mais leve sombra de "desigualidade", torna-se necessario que os nossos dirigentes acabem, duma vez para sempre, com as tais flexibilidade de criterios e diversidade sentimental...

Aos bons portugueses impende o dever de desfazer o inexplicavel da orientagao dos nossos agentes do M. P. os quais nao tem razao para adoptar modos de ver, diametralmente,opostos, dos dos seus colegas de Portugal, tendo todos, estes e aqueles, deliciado a pura e cristalina agua duma mesma fonte e adorado o mesmo Deus de sabedoria...

A' "Terra" e a' "Tribuna" desejamos absolvigao nos seus processos, nao so' pela camaradagem que nolas une, mas tambem pela ansia de vermos exaltado o bom nome da Republica Portuguesa.

A' Janela....

Va' em preto a minha coluna do *Bharat*!

Nos Jeronimos, no Panteon da His to'ria, deu a sua ultima entrada quem com maos de marfim tangeu a lira do heroismo da Raga Lusitania—Guerra Junqueiro.

Nao mais veremos orgias diamantinas de versos soberbos que levaram a consupgao, a Redengao da Patria, versos deste ciclopico bardo de nome —Guerra Junqueiro.

Ninguem o negara', a mais nefasta obra da morte foi cintilar essa grandiosa esta'tua da Moralidade, do Civismo, do Patriotismo—Guerra Junqueiro.

Silencio! ... Leitores pios por momentos, remontemos o nosso espirito ante a esquife fria que guarda:

Raio animado de uma luz celeste
A qual a morte a's almas restitue
Restituindo a terra o po' que as veste.

Relanceemos, de joelhos, o olhar pelo livro do Civismo, da abdicagao das grandezas-a vida do grande Guerra Junqueiro.

Nao me cabe a critica da sua vasta, sublime obra literaria, scientifica, filosofica, nao. Eu bem creio que ate' as altivas aguias nao defrontam o sol, eu bem sei que os pigmeus sao sempre piquenos... ante os gigantes.

Nao vai a tanto a nossa pretengao, e' simples, e' modesta: prestar homenagem de respeito a quem em tintas de sangue embora, soube escrever no solo da Patria a epopeia da Liberdade, Igualdade e Fraternidade. Sim as quinas que fulguram no Campo de Ourique; as Cortes de Leiria; o penedo de Sagres; a gloriosa data de 1 de Dezembro; a aboligao de escravatura fizeram com que Portugal na vanguarda das nagoes europeias algas se o estandarte da Civilisagao. Era portanto, mister manter esta heranga inalienavel. Infelizmente na vida dos homens como na das nagoes surgem circunstancias que fazem oscilar; vozes agourentas surdem persistindo as renovagoes que e' a formula do verdadeiro Progresso. Entao so' uma e unica coisa resta: luta: expressao ultima do valor fisico, intelectual, moral.

Nelas retinem-se em fragor conchas solertes a' cuja sombra jazem monturos de interesses individuais ou sejam, tronos ou instituigoes carcomidas pela ferrugem do tempo. Nelas ao indiferentismo criminoso de uns opoe-se o desvario iconoclasta, geral. E' entao inevitavel que o rugir da metralha reboe no espago, o grito da aspiragao colectiva; que o sangue escreva no solo a Epopeia do Ideal. Nesta ordem de ideas os versos de Junqueiro, chama da idea ateiaram fogo no que de podre, de falso, de adulador se erguia impune. E essa mesma fogueira que inconscientemente lambeu tudo desde as Biblias seculares, ate' as Cartas Constitucionais, alumiou-nos a estrada do Progresso. Nesta faina, dever e' confessar, tocou as raias do sacrilegio, aluiu a fe' de um povo: foi um produto de ma' hora, porem duma sinceridade santa e disto temos a prova nas suas ultimas palavras, no seu magnifico *canto de cisne*.

Nao fosse a sua figura moral, nao fosse aquela inge'nua santidade, os seus versos nao possuiriam a forga talismanica de como Amphion ergueu muralhas. Nao seriam de um povo de uma geragao que empurrou para a senda do Progresso a nagao de velhas formas os seus versos:

Rasga-te o peito sem cautela.
Da-lhe o teu sangue todo.
Va'! o' mocidade heroica e bela
Morre a cantar...Morre porque ela
Revivera'

E este homem morreu!

Embora. *Sic transit gloria mundi* ...nao se talhou para os homens do quilate de Guerra Junqueiro, para eles a morte e' o abrir misterioso, de par em par, das portas que se dao para os paramos da Eternidade, para os pinaculos da Imortalidade!

E neste momento em que a crise do caracter e' pavorosa, e neste momento em que todos berramos pelo saneamento moral, urge reviver em nossos coragoes, de grandes e piquenos, de pais e filhos, de mestres e alunos essa figura simbolica da Heroica Patria.

Como prestar esta homenagem-ligao civica para no's todos?

De-se um feriado a todos em geral e em especial a' mocidade escolar porque so'mente assim as colecgoes novas poderao ligar esta concessao ao dever de estudar, recordar, gravar na memoria o nome da Maxima Gloria Patria-GUERRA JUNQUEIRO!

Alma Velha

Ecos & Critica

O sr. Mariano

Està cada vez mais divertido o sr. Mariano, administrador dêste concelho. Farto de troçar da gente com assuntos de madeira, sua excia zomba, agora, dos seus jurisdiscionados, administrando-os de Margão por meio dum *vai-vem* constante dos sipais da sua dependencia.

O sr. Rebelo esteve em Margão sem licença, fazendo companhia à sra sua esposa e crêmos que fez muito bem, porque prova que sabe respeitar a familia em primeiro lugar.

E quem respeita a familia sem prejuiso de sua algibeira, presume-se que saberá tratar, condignamente, os seus jurisdicionados...

Ou então, a logica é uma batata...

India Portuguesa

E' o titulo dum novo semanario que encetou a sua publicação na vila de Margão sob a direcção do festejado escritor sr. José Ignacio de Loiola,como orgão de grande agremeação politica que é o *Partido Indiano*, há pouco reorganisado consolidado.

Prometendo apreciar ope

मदत करणें हें होय. आज गोमांतकामध्यें कांहीं ठिकाणीं या लोकांच्या मदतीकरतां फंड गोळा करण्याचें काम चालू आहे. परंतु वर्तमान पत्रांमधून जे आंकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यावरून पाहतां काम समाधानकारक नाहीं, हें मोठ्या खेदानें कबूल करणें भाग आहे. आपल्या गोमांतकांत पुष्कळ श्रीमंत लोक मोठमोठे उत्पन्नदार आहेत. पुष्कळ देवालयांतून व्याजी लावण्यांकरितां पैसा पडून आहे. धर्मगुरूंकडेही पुष्कळसा पैसा सांठलेला आहे. परंतु या सर्वांनां आपल्या पैशांचा व्यय करण्यास मुळींच समजत नाहीं, असें ह्मणावें लागतें. देवालयांनीं मोठमोठे उत्सव करून आतषबाजीसारख्या निरुपयोगी कामांत पैसा खर्च करावा व धर्मगुरूंनीं मठांतील प्रत्येक उपकरण सोन्यांचें करण्याकडे शिलकेचा उपयोग करावा, या पलीकडे आपलें कांहीं कर्तव्य आहे यांची त्यांस जाणीव होऊं नये, या सारखी कोणतीच खेदाची गोष्ट नाहीं. भूतदया हें धर्माचें मुख्य अंग आहे. या विषयीं सर्व साधु संतांनीं व धर्मग्रंथांनीं टाहो फोडून कंठशोष केला असूनही आमच्या धर्माच्या मुख्य अधिपतीची ही स्थिति ! मग इतरांविषयीं काय बोलावें ? गोमांतकांत बऱ्याच गांवीं जलप्रळयामुळें उडालेल्या दुर्दशेची करुण कहाणी या धर्मगुरूंच्या कानीं गेलीच नाहीं काय ? गेली असणारच. मग लोकांकडून मिळालेल्या देणग्या वर्गण्यातून अस्तित्वांत आलेल्या व चाललेल्या या संस्थानांतून अशा निराधार लोकांना मदत कां होऊं नये ! परमार्थास आड येणारी इतकी स्वार्थबुद्धि, धर्मगुरूनींच दाखविल्यास, त्यांच्या संसार मग्न शिष्यवर्गास तरी कां दोष द्यावा ? संन्यासधर्माचा असा विपरित अर्थ झाल्यामुळेंच हिंदुस्थान अधोगतीला पोहोंचला आहे. हिंदु समाजाच्या धर्मगुरूंनीं पाषाणाच्या निर्जीव मूर्ति सोन्यारुप्यानें मढवून आपल्या डोळ्याचें पारणें फेडण्यापेक्षां या चालत्या बोलत्या जिवंत देवांकडे आधीं पहावें व त्यांसच संतुष्ट करावें. हेच देव आपल्या राष्ट्राच्या उपयोगी पडणारे आहेत. सोमनाथाच्या देवालयांत खंडो गणती संपत्ति एकत्र झाली होती. तिच्या लोभानेंच गजनीच्या महंमुदाचें इकडे आगमन झालें ! हीच संपत्ति त्यावेळीं जनस्वरूप देवांकडे खर्च करण्यांत आली असती तर महंमुदाच्या सेवेचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य या जिवंत देवांच्या अंगीं आलें असतें. मुसलमानांनीं हजारों देवळें बाटविलीं ! खंडो गणती संपत्ति लुटली ! हजारो देवांच्या मूर्ति फोडल्या ! परंतु या देवांनीं त्या दांडग्या लोकांचा प्रतिकार करण्याचें सोडून उलट, आपलें राज्यच दीर्घकाल पर्यंत त्यानां देऊन टाकलें ! यांत परमेश्वराचा उद्देश आपल्या लोकांचे डोळे लौकर उघडून यापुढें तरी अशा संपत्तीचा विनियोग जनरूपी देवांकडे व्हावा हाच असला पाहिजे. परंतु अद्यापही या गोष्टीकडे डोळेझांक केली जाते, हें आपलें दुर्दैव होय. आपल्या धर्मगुरूनीं ख्रिस्ती धर्माच्या मिशनरींकडे पहावें ह्मणजे ते लोक अशा निराश्रित लोकांकडे आपण होऊन कसे धांव घेतात, तें दिसून येईल. भूतदयेचीं तत्वें पोथ्यांत गुंडाळून ठेऊन त्यांचीं पूजा करीत बसण्याकडे त्यांचा कल नसून, तीं तत्वें ते शक्य तितकीं अधिक व्यवहारांत आणीत असल्यानें आज त्यांच्या धर्माला उज्वलता मिळाली आहे. असो.

ही स्थिति पालटण्याकरितां आपण शक्य तितकी अधिक मेहनत घेतली पाहिजे. याची जबाबदारी तरुण पिढीवर आहे. आपले लोक पुष्कळशा निरुपयोगी कामांकडे पैसा खर्च करितात. परंतु अशा लोकोपयोगी व राष्ट्रोपयोगी कामांस पैसा देण्य चें पुष्कळशा जिवावर येतें. आमच्यांतल्या त्यांच्या श्रीमंत लोकांनीं हिंदु देवळांची गोष्ट सोडाच, पण ख्रिश्चन देवळें बांधण्याला सुद्धां भरपूर मदत केली आहे! परंतु त्याच लोकांचे अशा भूतसेवेच्या कामीं पडलेले आंकडे पाहिले ह्मणजे त्यांच्या अज्ञानाची फार कींव येते. ही स्थिति श्रीमंत लोकांचीच नसून मध्यम स्थितींतील लोकांची हीच स्थिति दिसून येते. गोमांतकांतल्या देवळांतून जो पुष्कळसा पैसा व्याजीं लावण्याकरीतां ठेविला आहे, त्याचा विनियोग अशा वेळी व अशा कामीं केला पाहिजे. नुसते तीळ–तांदूळ जाळून अगर मोठमोठे उत्सव करण्यापेक्षां या जनरूपी देवांकडे त्या पैशांचा विनियोग केल्यास खरी ईश्वरसेवा केल्यासारखें होईल. देवाकरितां मनुष्यें नसून, मनुष्यांकरितांच देवांचें अस्तित्व आहे.

गोमांतकीय तरुणांनो ! आपल्या गोमांतकाप्रमणेंच मलबारमध्यें कहर उडालेला आहे; परंतु तिकडे सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटीसारख्या संस्था काम करीत आहेत. आपणांकडे अशी संस्था नाहीं. तरी आपण या कामीं प्रत्येक खेड्यापाड्यांतून फंड गोळा करून या निराश्रित लोकांना मदत केली पाहिजे. हीच खरी ईश्वर सेवा होय. यासारखा दुसरा पवित्र धर्म नाहीं. आपल्यापैकीं पुष्कळ लोकांना अशा कामीं भिक्षांदेही करण्यास लाज वाटते. त्यांनीं जरा बाहेर नजर फेंकून पाहिल्यास सर प्रफुल्लचंद्र राय यांसारखे थोर पुरुष अशा कामाकरितां फिरून कशी मदत मिळवीत आहेत, तें दिसून येईल. त्यांच्या सारखेंच आपण आपलें कर्तव्य बजावण्यास यावेळीं तयार झालेंच पाहिजे.

———०———

—रा० भालचंद्र का० शिरवैकर यानीं आपल्या ब्यारिस्टरच्या कोर्साचें तिसरें वर्ष यशस्वी रीतीनें संपविलें. आणखी दोन वर्षांनीं त्यांचा कोर्स पुरा होईल. रा० शंकर रामचंद्र नाडकर्णी यांचेंहि पोर्तुगालचें शिक्षण फार समाधानकारक चाललें आहे.

—जर्मनींतील अंतःस्थ धुमफुसीला भयंकर स्वरूप येत चाललें आहे!

श्रीमंत दाभोळकर

लेखांक १ ला.

"वनीं विलसती बहू विविध वृक्ष चोहींकडे ॥ तयांत मम चंदनासम न एक ही सांपडे ॥"

वनांत चंदनाचे वृक्ष असतात, त्यांचा इतस्ततः परिमळ सुटतो, परंतु तो चंदन वृक्ष कोणत्या योग्यतेचा आहे हें जवळ गेल्यावरच परिज्ञान होतें. आपल्या भरतखंडांत परोपकारार्थ ज्या विभूतींनीं आजपर्यंत चंदनाप्रमाणें देह झिजविला त्यांतीलच एक श्रीमंत शांताराम नारायण दाभोळकर हे होत. ह्यांची कीर्ति ऐकून माहीत होती प्रत्यक्ष परिचयाचा योग गेल्या एप्रिल–मे महिन्यांत मला आला.

गोमांतकांत दाभोळकरांचें नांव अपरिचित नाहीं, गोमांतकस्थांसंबंधानें त्यांची विशेष आदरबुद्धि दिसून येते. 'श्रीदत्त पद

डॉ० मुकुंद गोविंद कामत

याचा दवाखाना

नवा बाजार–मडगांव.

गुच्छ' ह्या नांवानें त्यांनीं एक चिमुकलें पुस्तक प्रसिद्ध करून त्याच्या शेंकडो प्रती लोकानां नजर केलेल्या आहेत. ह्या पुस्तकाचा आकार लहान; परंतु योग्यता मोठी आहे. ह्यांतील किती एक पद्यावली दाभोळकरांच्या स्वभावाचा आदर्श होत. एका अभंगांत ते ह्मणतातः—

माझी निंदा प्रियमज । स्तुती अ-
प्रिय सहज ॥ १ ॥
याचें कारण शोधावें । मज सम
तुह्मीं व्हावें ॥ २ ॥
अहंस्फूर्ती जी बाधक । निंदुनियां
करा चोख ॥ ३ ॥
मूळ हिता तें पावाल । शांतारा-
मा जैं निंदाल ॥ ४ ॥

'स्वयें सर्वदा नम्र वाचें वदावें' हें दाभोळकरांचें व्रत असून, हे दीनाचे वाली, विद्येचे भोक्ते, गुणाचे ग्राहक आणि देवाचे भक्त आहेत. त्यांच्या द्रव्याचा सद्व्यय अखिल भरतखंडांत विद्यादानाकडे व अन्य परोपकारी कृत्यांकडे अधिकयानें होतो. त्यांची दानशूरता अवर्णनीय आहे. ह्याचें द्योतक गेल्या जुलै महिन्यांत सांखळींतील महापुराच्या योगें निराश्रित झाले त्यांस उदार मनानें पाठविलेली दोन हजार पंचायशीं रुपयांची कळकळीची देणगी होय. नेहमीं पात्रापात्र विचार करून हातभार लागत असतो. सत्पात्र पाहून दान करवें हाच त्यांचा मुख्य नियम समजला पाहिजे.

दाभोळकरांचा साधेपणा, नियमितपण नेमनिष्ठा आणि व्यवहारदक्षता अनुकरणीय असून श्रीमंत, धीमंत आणि विद्वंस ह्या तीनही विशेषणांस ते खरोखरीच पात्र आहेत. परमेश्वरानें त्यांना ही गुणत्रयी एकसमयावच्छेदें बहाल केली आहे.

श्री दत्तभक्त या नात्यानें दाभोळकरांनीं सांखळींतील श्री दत्तवाडींत जी आज तागायत सुधारणा केली त्या मानानें त्यांचें नांव चिरस्मरणीय होऊन राहिलें आहे. एका शब्दांत सांगावयाचें ह्मणजे त्यांनीं आणखी नवीन सुधारणा करण्यांत स्वतःवर आतां बोजा घेतलाच पाहिजे, असें नाहीं; तथापि हजारों रुपये खर्च करून श्री दत्तवाडीची ऊर्जितावस्था व्हावी ही त्यांची उमेद अद्यापि कायम आहे. मूर्त स्वरूपांतीं जनतेची खात्री होईलच.

परवांच्या महापुराचें वर्तमान समजल्याबरोबर श्री दत्तवाडींत न्यूनता काय आहे ह्याचा तारेनें लागलाच तपास करून अग्रशाळादि देवालयांचीं उपांगें पुरास बळी पडल्याचें ऐकून दाभोळकर फार हळहळले. श्री दत्तवाडीस पूर्व स्वरूप प्राप्त करून देण्यास दाभोळकरांशिवाय अन्य कोणी समर्थ असल्याचें तूर्त तरी दिसून येत नाहीं.

अल्प सहवासानें जे त्यांचे सद्गुण माझ्या प्रत्ययास आले, त्यांचेंच येथें दिग्दर्शन केलें आहे, हें यथार्थ असून ह्यांत अतिशयोक्ति मुळींच नाहीं. श्रीमंत गृहस्थांना सर्टिफिकेट देत सुटून त्यांचे पोवाडे गाण्याचा मुत्सद्दीपणा ह्यांत नाहीं. पूज्यबुद्धीचे हे उद्गार होत.

दुसऱ्या लेखांकांत श्री दत्तवाडींत सारस्वतवेदपाठशाळेसंबंधानें विवरण करण्यांत येईल. डि० फंड ४ आणे.

गणेश सदाशिव शिरोडकर.

अनाथांस मदत

सांखळी व इतर ठिकाणीं झालेल्या जलप्रलयामुळें निराश्रित लोकांस बरेच ठिकाणीं फंड वगैरे उभारून मदत करण्यांत येत आहे परंतु ती अपुरीच होणार आहे. तरी पण प्रत्येकानें आपापल्या शक्तीप्रमाणें कांहीं तरी मदत करून पुण्य संपादन करावें अशी विनंति आहे.

आतांपर्यंत पुढील सद्गृहस्थानीं मदत केली आहे.

	रु. आ.
रा. शांताराम काशीनाथ दणाईत	१–८
,, गोविंद विनायक बरवे	१–०
सौ. अन्नपूर्णा गो. बरवे.	१–०
कु. चंपाबाई काशीनाथ दणाईत	१–०
वे.शा.सं श्रीधर नारायण जोशी	१–४
रा. शांताजी नाथाजी चौगुले	१–८
,, सदाशीव यशवंत नाबर.	१·४

Ano VIII *No.* 22

Quinta-feira 30 de Agosto de 1923

ASSINATURA

Por ... tres rupias

...IOS

Por cada linl... e repetida uma tanga

N... o uma tanga

D... E EDITOR

G. ...gdo Dessay

...m-Goa

भारत

BHARAT

वर्ष ८ वें, अंक २२

गुरुवार ता. ३० आगष्ट सन १९२३

वर्गणीचे दर.

सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.

समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.

गो. पु. हेगडे देसाई.

केपें—गोवा.

Em volta do segredo do sr. Alfredo

O que sobre ele diz a Epoca

UM FUNCIONARIO MODELO

O *Bharat* fez em tempo consideraçoes sobre o caso do chamado *segredo* do sr. Alfredo Rodrigues, director interino que foi de Fazenda deste Estado,— a proposito da indevida arrecadaçao do dinheiro do contribuinte esfarrapado.

Houve quem lhe opuzesse argumentos, tentando desvanecer a força do nosso ataque, argumentos que, fiel ao seu programa, o nosso jornal os estampou nas suas colunas e em lugar de destaque.

Vem, agora, a *Epoca*, bem informado e acreditado jornal metropolitano irradiar em jorros luz sobre o mesmo caso, o que representa, mesmo, uma resposta a' letra ao nosso contendor.

Diz a *Epoca*:—

Aquele ministe'rio das Colo'nias esta', ai que nos consta, dando pano para mangas. Ha', la' dentro, certas creaturas que tomaram a' sua conta a *administraçao* colonial e...e' deixa-las. Entao o proteccionismo, o favoritismo desenvolvem-se por la' duma maneira que causa assombros aos menos dados a preocuparem-se com a de *gringolade* que por ai vai. O caso que vamos referir e' simptomatico e foi-nos relatado por pessoa que o conhece bem, sendo prova flagrante da protecçao dispensada a funcionarios delinquentes.

Existe um funcionario que foi director da Fazenda adjunto do Estado da India e que ultimamente nomearam director de Fazenda da Provincia de Guina' ... talvez como recompensa aos seus *primorosos* serviços.

Pois este funcionario, que pretendia passar por meticuloso e zeloso, hostilisando principalmente os europeus, ao que nos dizem, cometeu o delicto de contrabando, tentando passar aos direitos artigos de seda e outros, quando veio ha pouco tempo da India, pelo que foi multado em 22.000$00, quantia que deve ser decuplicada, visto tratar-se de um funcionario do Estado.

Nao contente com isto o mesmo funciona'rio praticou a fraude ao Estado da quantia de 8.000 rupias, ou sejam perto de 60.000$00, fazendo se abonar d...quela importancia para passagem da India para Lisboa a ele e a sua familia, quando esta se encontrava na metropole, desde que ele veio de licença, regressando sozinho a' India, donde agora voltou por motivo da sua promoçao e transferencia para a Guine'.

Alguns parlamentares, patricios do funcionario em questao, trabalham activamente para que nao seja castigado, limitando-se ao reembolso a Fazenda da quantia defraudada, mas julgamos que o sr. Ministro das Colo'nias nao deixara' ficar impunes os crimes do citado funcionario, que perdeu toda a autoridade para exercer o lugar de director de Fazenda, ou outro qualquer, seja onde for.

A nao ser que o sr. Rodrigues Gaspar esteja de cocoras ante creaturas de duvidosa cor.

Ca' tem o sr. Pitagoras e Sousa informaçoes completas sobre o assunto que lhe provocou a carta.

Da leitura delas deve ter concluido que o *Bharat* nao abriga contra quem quere sentimentos menos honestos: patua a sua orientaçao, segundo os ditames de sa e pura consiencia, ainda que na sua esfera critica fiquem abrangidos os seus mais irredutiveis adversarios politicos.

O *Bharat*, como todo o ente mortal, esta' sujeito a errar; mas creiam todos que ele nunca ha de *fingir erro* seja por que motivo for, para criar ou lançar suspeiçoes em volta da reputaçao de quem quere...

Fique isto dito, alto e bom som!

Venham sacrificios!

E' critica a situaçao economica do Paiz. E' precisamente este o unico assunto em que nao ha' divergencia de opinions, no dificil momento que estamos a atravessar.

Governantes e governados acham que o Paiz esta', na realdade, por cima duma montanha de area, bastando-lhe, apenas um sopro de vento para ir parar ao precipicio da irremediavel bancarrota.

Acham isto, sim, mas em tese so', *Teoricamente* concordam que *tudo vai* mal; mas na pratica demonstram absolutamente o contrario, dando-nos a triste impressao de que em ambas as fileiras se procura fazer valer o *comodismo de quem puder...*

E' ma'u; e pior sera' se insistirmos em trilhar a mesma errada senda que arrastara' irremediavelmente o Paiz, para a completa ruina.

Nao basta que cada um lamente so' com lagrimas de crocodilo a sorte do Paiz. Mister se torna que se esforce por traduzir por *actos* a nobresa de seus sentimentoe, prontificando-se a sofrer pelo bem de sua terra natal privaçoes de toda a especie.

So', assim, com um supremo esforço de sacrificios dos governantes e governados, e' que poderemos entrar na *vida nova*. A fase da crise e' terrivel. Palavras e discursos ja' nao tem o condao de abrandar-lhe a gravidade. So' sacrificios a valer poderao curar o mal.

Venham, pois, sacrificios!

Coisas & Loisas

Politica...

Toda a regra tem sua excepçao. Assim, a regra de que cada homem tem seu modo de pensar sobre um certo e determinado assunto tem tambem a sua excepçao.

E' tratando-se da *politica* que se observa o tal fenemeno *excepcional*; pois so' sobre a significaçao da expressao *politica* encontramos uma admiravel uniformidade de vistas em todos os *patriotas* da terrinha os quais sao outros tantos homens com outras tantas cabeças...

Para eles, a *politica* sinifica *barriga*: o politico e' *barre-dou*. Um *patriota politico* que nao pense na sua *barriga* perde duplamente a sua *dubia* qualidade de "patriota" e "politico".

O "Patriotismo" e', pois, um culto devotado a's exigencias da "barriga; a politica, idem" e "na mesma data.

Representando isto uma "verdade axiomatica", nao sabemos porque alguns tipos fogosos pretendem maldizer dos que, sendo "patriotas" e "politicos", afagam com mimos as suas "barrigas"...

Ecos & Critica

O sr. Rebelo

A proposito da nossa local *O sr. Mariano* informam-nos que o sr. Rebelo tinha autorisação do sr. Governador Geral para de Margão administrar a gente do concelho de Quepem.

Não acreditamos nêsse *tendencioso* informe, pôrque reputamos o sr. dr. Jaime de Morais incapaz de conceder a quem quere uma tal regalia que em última analise representa ...*chacina* do prestigio da Republica.

Porque, a ser legal e razoavel uma autorização para um funcionario dirigir as suas funcções dum conceiho, tendo residencia noutro, legal e razoavel seria, tambem, uma regalia que pelo sr. Ministro das Colonias fôsse outorgada ao sr. Governador da India para êste nos governar...da Metropole.

A balela de autorisação não pega, portanto. De resto o sr. Mariano Rebelo pode estar socegado com suas arbitrariedades que, enquanto tiver costas quentes, ninguem se meterá consigo...

Lala Lajpat Rai

Por motivos de doença foi posto em liberdade êste grande paladino das liberdades politicas da India Britanica.

Inda bem que o tiraram da prisão com vida!

Honra lhes seja

O sr Eduardo Pereira, digno administrador de Pondá envidou os seus milhores esfoços em prol dos sinistrados das últimas inundações cujos sofrimentos minorou em grande parte.

Igual empenho desenvolve—

आपल्या श्रीकृष्ण चरित्रांत ह्मणतातः 'पुराण व इतिहास यांमध्यें श्रीकृष्णचरित्र कसें आहे तें पाहाण्याचा मी यत्न यथामति केला; त्यांत मला दिसून आलें कीं, श्रीकृष्णासंबंधीं जे जे आक्षेप घेतले जातात ते सर्व पायाशुद्ध नसल्यानें खोटे आहेत श्रीकृष्णाविषयीं ह्या ज्या कल्पना आहेत, त्या मागाहून केल्या गेल्या असून, त्यांना कशाचाच आधार नाहीं. खरोखर श्रीकृष्णचरित्र हें अत्यंत शुद्ध, पवित्र आणि महत्वाचें आहे. माझा असा अभिप्राय आहे कीं, श्रीकृष्णाचें चारित्र्य सद्गुण संपन्न, सगळ्या पापांपासून अलिप्त व आदर्शभूत असें असून, कोणत्याहि देशामध्यें असा थोर पुरुष उत्पन्न झालेला नाहीं. ख्रिस्त व बुद्ध हे केवळ उदासीन व संसार सोडून कौपिन धारण केलेले केवळ धर्मवेत्तेच होते; पण श्रीकृष्ण तसा नव्हता. तो सर्व गुण संपन्न व सगळ्या वृत्तींमध्यें पूर्णता पावलेला असा होता.'

असो. आतां आपण थोडक्यांतच श्रीकृष्ण चरित्र पाहूं. श्रीकृष्णांचा जन्म मथुरेंत झाला. त्यांचे तीर्थरूप हे कंसाचे मांडलिक होते. कंसानें आपल्या राज्यांत फार अत्याचार सुरू केले होते, व आपल्या बापालाच कैद करून सिंहासन बळकाविलें होतें, अशींच आणखी पुष्कळ अनन्वित कृत्यें करण्याचा सपाटा चालविल्यानें प्रजेंत अत्यंत असंतोष माजला होता. यावरून कंसाला या आपल्या कृत्यांबद्दल शासन करणारा कोणी तरी उत्पन्न होईल अशी भीति वाटत होतीच; तदनुसार त्यानें आपलें गुप्तहेरांचें जाळें सर्वत्र पसरून टाकलें होतें. त्या वेळीं वसुदेव हाच मुख्यत्वें आपल्या विरुद्ध उठेल असें त्याला त्याचेकडून कळलें. शिवाय, उग्रसेनाच्या धाकट्या भावाची मुलगी देवकी ही वसुदेवाला दिली होती. तेव्हां आपल्या सासऱ्याच्या मदतीला हा केव्हां तरी धावून येईल, असें त्याला वाटत होतें. ह्मणून कंसानें वसुदेव व देवकी या दोघांनाही मथुरेंत कैद करून ठेविलें. आपल्यावर कंसाची करडी नजर आहे, हें जाणून आपली दुसरी बायको रोहिणी, हिला, ती गरोदर आहे असें पाहून आपला गोकुळांत राहणारा जिवलग मित्र जो नंद त्याच्या घरीं ठेविलें. तयें तिला बलराम हा मुलगा झाला. कंसानें वसुदेव व देवकी यानां मथुरेस आणून बंदींत ठेवल्यानंतर त्यांच्या पोटीं जी संतती होईल तीस ठार मारण्याचा सपाटा चालविला! परंतु अशा अधिकारानें धुंद झालेल्या राजांचीं कृष्णकृत्यें जेव्हां अनावर होतात, तेव्हां प्रजापक्ष बलावत जातो, व याच पक्षाकडून अशा राजांच्या शत्रूंनां मदत होत असते. राजांचा कितीही कडेकोट बंदोबस्त असला तरीही त्यांतून मार्ग काढण्याची मदत लोकांना मिळत असते, आणि याचमुळें वसुदेवाचा आठवा मुलगा श्रीकृष्ण हा जन्माला येतांच त्याला निर्भय स्थळीं पोहोंचविण्याची मदत प्रजापक्षाकडून मिळाली, व त्यानें आपला मुलगा गोकुळांत यशोदेजवळ ठेवून तिची नुकतीच जन्मलेली मुलगी कंसाच्या वाड्यांत आणून ठेविली. यशोदेनेंही, मथुरेंत कसा कहून होणारा वसुदेवाच्या मुलांसंबंधाचा भयंकर अन्याय माहीत असतांहि—आपली मुलगी वसुदेवाच्या स्वाधीन करण्यांत राष्ट्रीय स्वार्थत्यागाचा हेतु होता. हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांतही राजकुमारांच्या संरक्षणाकरितां स्वतःचा मुलगा बळी दिल्याचीं उदाहरणें पन्नादाईच्या इतिहासावरून आपणास माहीत झालेलींच आहेत.

श्रीकृष्णांचें बाळपण गोकुळांत गेलें. त्यावेळीं दुधासारखा सात्विक आहार, स्वतंत्र वृत्ति, मोकळी हवा, या शिवाय ब्रह्मचर्य व्रताचें पालन यामुळें त्याला शारीरिक बळ उत्तम प्रकारें कमवितां आलें. तेथें त्यानें मल्लविद्येचाही अभ्यास केला. ह्याप्रमाणें त्याच्या अंगीं शारीरिक बळ फारच असल्यानें, त्यास पूतना, धेनुकासूर, वगैरेंचा वध करतां आला. पुराणकारांनीं श्रीकृष्णाचें ईश्वरत्व सिद्ध करण्याकरितां या साध्या गोष्टी सुद्धां फुगवून लिहिल्या आहेत. कालियामर्दनाची गोष्ट भागवतामध्यें कालिया नांवाचा एक महाभयंकर विषारी सर्प यमुनेच्या डोहांत राहून लोकांस व पशुपक्षांदिकास त्रास देत होता, त्यास श्रीकृष्णानें घालवून दिलें, अशा रीतीनें लिहिली आहे. परंतु तो हल्लीं आपण पाहातो तसला सर्प नसून, नाग या नांवानें संबोधिली जाणारी अनार्यांची एक जात त्यावेळीं हिंदुस्थानांत होती, त्यापैकीं होता. याच जातीचें सर्प सत्र ह्मणून पुढें जन्मेजयानें केलें. ह्या नाग जतीचाच कोणी री कालिया नांवाचा पुंड त्या रानांत राहून सर्वांना त्रास देत असल्यानें श्रीकृष्णानें त्यास पारिपत्य करून घालवून दिलें असावें. भागवतांत, कालियाच्या बायकांनीं श्रीकृष्णाची केलेली स्तुति दिलेली आहे. तींत पुष्कळ वेदांत भरलेला आहे. यावरूनही तो सर्प नसून नाग जातीच्या अनार्यांचा एक सरदार होता असें दिसतें.

दुसरी गोष्ट ह्मणजे त्यावेळीं गोकुळांत वर्ष अखेर एक इंद्रयज्ञ करण्याची चाल होती. पावसाची देवता इंद्र ही होय. त्याअर्थीं त्या देवतेला संतुष्ट केल्यानेंच आपणांस फायदा होईल अशी समजूत होती. या त्यांच्या कल्पनेला श्रीकृष्णानें निराळें वळण लाविलें. त्यानें सांगितलें कीं, या विश्वाला चालन देणारी एक निराळीच शक्ति असून तिचें अस्तित्व सर्व वस्तूंमध्यें आहे. यावरून इंद्रयज्ञ करण्यापेक्षां आपणांस गाई व पर्वत यांच्या करितां यज्ञ करणें जरूर आहे; कारण आपला सर्व आधार त्यांच्यावरच आहे; ह्मणून उत्तम प्रकारचें अन्न करून गाईस व ब्राह्मणांस अर्पण करा! नंदानें या प्रमाणें केलें. भागवतामध्यें, यामुळें इंद्राचा गोपाळांवर कोप होऊन, त्यानें एक सारखा मुसळधार पाऊस पाडला! त्याच्या निवारणार्थ श्रीकृष्णाला गोवर्धन पर्वत उचलून धरावा लागला, असें लिहिलें आहे. परंतु ही सर्व कविकल्पना आहे. कारण जुन्या लोकांच्या कल्पनेप्रमाणें पाहिलें तरी सर्व देवांत विष्णू श्रेष्ठ आहे, व त्याचाच अवतार श्रीकृष्ण होय. कंस मदोन्मत्त झाल्या कारणानें इंद्राच्या सभेंत भाषणें होऊन श्रीविष्णूनेंच कृष्णरूपानें अवतार घ्यावा असें ठरलें. यावरून पाहातां श्रीकृष्ण या श्रीविष्णूच्या अवताराहून इंद्राची पायरी खालची असल्यानें तो त्याविरुद्ध जाणें शक्य नाहीं. असो

श्रीकृष्ण चरित्रांवर जे कांहीं आरोप घेतले जातात त्यापैकीं मुख्य आरोप म्हणजे रासलीला हा होय. या आरोपाचें साहित्य सम्राट बंकिमचंद्र व देशभक्त लाला लजपतराय यांनीं आपल्या श्रीकृष्णचरित्रांमध्यें मुद्देसूद खंडन केलेलें आहे; त्याविषयीं सविस्तर प्रमाणें देत बसल्यास लेखविस्तार जास्त होईल. याकरितां पुढें केव्हां तरी एक स्वतंत्र लेखांकांत त्याचें सविस्तर विवेचन करूं. बंकिमचंद्र म्हणतात—"गोपींचा उल्लेख महाभारतांत नाहीं; राजसूयज्ञाच्या वेळीं शिशुपाळानें श्रीकृष्णाची फारच नींदा केली, त्यांतही हा उल्लेख आला नाहीं. शिवाय द्रौपदी वस्त्रहरणाचे वेळीं तिनें केलेल्या धाव्यांत श्रीकृष्णास गोपीजनप्रिय असें ह्मटलें आहे, तें गोपीविषयक श्रृंगारिक कल्पना मनांत आणून ह्मटलेलें नसून तो गोपींचीं संकटें दूर करणारा अशा उदात्त व पवित्र भावनेनें ह्मटलेलें आहे. महाभारतानंतरच्या विष्णुपुराणांतही त्याचा उल्लेख आहे, परंतु तो पवित्र भावानें आहे. हरिवंशांत थोडासा विलासभाव आहे. भागवतामध्यें विलासास ऊत आलेला असून, ब्रह्मवैवर्त पुराणामध्यें तर त्याच्या नद्याच वाहात आहेत!"

श्रीकृष्णावरील गोपींचें प्रेम श्रृंगारिक नसून शुद्ध असलें पाहिजे; कारण या वेळी त्याचें वय १२ वर्षांचें असावें. अशा लहान वयांत त्यांच्या मनांत विलास भाव उत्पन्न होणें शक्य नाहीं. शिवाय त्यानें गोकुळांत शक्तीदर्शक कामें केलीं त्यावरून त्यामध्यें ब्रह्मचर्याचा अभाव होता असें वाटत नाहीं. यानंतर मथुरेस आल्यावर कंसाच्या पदरचे मोठमोठे मल्ल व कंस यांसारख्या बलवानांशीं कुस्ती मारून त्यांना ठार केलें आहे; त्यावरून त्याचें ब्रह्मचर्य कायम होतें असेंच दिसतें.

रासलीलेचा खरा अर्थ म्हणजे त्या लोकांमध्यें स्त्रीपुरुषांनीं एकत्र नाचण्याची व गाण्याची चाल होती. विराट राजाची मुलगी उत्तरा ही अर्जुनापाशीं नृत्य शिकत होती. यावरून अर्जुनसुद्धां त्याविद्येंत पारंगत होता असें दिसतें. आज युरोपियन लोकांमध्यें या चालीचें फार महत्व आहे. हें सांगावयास नकोच. आपल्या हिंदुस्थानांतही सुरत जिल्ह्यांतील चाधरा, नयडा, दुबळा, वगैरे जातींमध्यें ही चाल अद्याप चालू आहे.

—o—

—केपेहून मडगांव येथें जाणारा रस्ता सुधारण्यांचें घाटत आहे.

स्फुट विचार.

गोरक्षक संस्थाः—गोवा-गोरक्षक संस्था या नावांची उपयुक्त संस्था स्थापण्याचे कामीं पणजीकर बंधूनीं पुढाकार घेऊन गोमातेविषयीं आपल्या अंतःकरणांत वसत असलेल्या प्रेमाचें दिग्दर्शन केल्याबद्दल, आम्हीं त्यांचें कौतुक करितों. गोरक्षणासंबंधीं भारतानें अनेक लेख प्रसिद्ध केले असून, वेळीं अवेळीं ठिकठिकाणीं होत असलेल्या गोहत्येबद्दल तीव्र निषेध व्यक्त करण्याची संधी त्यानें वायां दवडलेली नाहीं. यावरून सदरील संस्था स्थापन झाल्यानें, त्याच्या अंतःकरणांत किती आनंदोर्मी उसळत असतील, याची कोणालाहि सहज कल्पना होईल. गोमातेचें हितसंवर्धन करण्यास स्थापण्यांत आलेली ही नूतन संस्था चिरायु होवो, असें इच्छितों.

पोर्तुगीज-भाषा प्रवेशः— मराठीच्या सहाय्यानें पोर्तुगीज भाषेंत प्राविण्य संपादण्यास सोपें जावें, या हेतूनें आमचे मित्र व सुप्रसिद्ध प्रोफेसर दत्तात्रय व्यं० पै यानीं दोन भागांचें सदर्हू उपयुक्त पुस्तक तयार केलें आहे. पोर्तुगीज व मराठी या दोन्हीं भाषांशीं प्रोफेसर साहेबांचा दांडगा परिचय असल्यानें प्रस्तुत पुस्तक उत्तम वठलें असल्यास नवल नाहीं. विशेषतः प्रवेशांत' व्याकरणविषयक तुलनात्मक चर्चा केली गेली असल्यानें, पोर्तुगीज भाषेचें शास्त्रीय ज्ञान मिळविण्याचें बिनचूक साधन या दृष्टीनें प्रवेश संग्राह्य झालेला आहे. 'प्रवेशा' सारख्या पुस्तकांची फारच उणीव होती. ही उणीव दर्शविणारे जिकडून तिकडून उद्गार ऐकूं येत. ती उणीव आतां प्रो० पैंच्या चिकाटीयुक्त असाधारण प्रयत्नांनीं भरून निघाली आहे. याबद्दल प्रोफेसरसाहेबांचें आह्मीं मनःपूर्वक अभिनंदन करून प्रत्येक गोमांतकीय हिंदुगृहस्थानें सदर्हू पुस्तकाची एकेक प्रत तरी आपल्या संग्रहांत ठेवावी अशी शिफारस करितों.

—नोर्माल स्कूलचा संपूर्ण कोर्स असलेले काणकोणचे तरुण रा० गजानन शेणवी नगर्सेकर यांची कुडींच्या प्राथमिक मराठी-पोर्तुगीज शाळेच्या अध्यापकाचे जागीं नेमणूक झाल्याबद्दल त्यांचें आम्हीं अभिनंदन करितों.

—रा० लाडोबा सिवेस्कर हे पणजी येथें 'उ इस्तादु द इंदीय' या नावांचें एक साप्ताहिक पत्र प्रसिद्ध करणार आहेत. अधिकाधिकस्यं फलं!

—मुंबईच्या गोमांतकीय सारस्वतांनीं महापुरानें अनाथ बनलेल्या लोकांस सहाय्य करण्याचा आपला परोपकारी उद्देश जाहीर केला आहे. ठीक!

—जनार्दन उपेंद्र खंवटे हे सरकारच्या खर्चानें उच्च शिक्षण घेण्यासाठीं पोर्तुगालला रवाना होणार आहेत.

—श्री. गोकुळाबाई तळावलीकरीण या गोमांतकीय बाईचें कविताबद्ध श्री सिद्धारूढ चरित्र तयार झालें असून, लवकरच तें आरूढ महाराजांस अर्पण करण्यांत येईल.

Ano VIII No. 23

...ta-feira 6 de Setembro de 1923

ASSINATURA
...a ano tres rupias

SO...
...tida uma tanga
Num... ...tanga

DIRECTOR . EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत

BHARAT

वर्ष ८ वें, अंक २३

गुरुवार ता. ६ सप्टेंबर सन १९२३

वर्गणीचे दर.
साल्दीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

A responsabilidade para com o pais

Nao andariamos longe da verdade se nos permitissemos dizer que no tablado politico da India Portuguesa, nao se ve uma figura humana que em detrimento dos seus interesses particularess se dedique de corpo e alma a' salva'gao deste decantado pais. E a se formular esta afirmagao, nao havera' quem em factos concretos, isentos de palavras melifluas, procure desfaze-la.

Um pais nao se pode chamar progressivo pelos beneficios que dele prove'm a uma certa parcela da sua sociedade, causando ao geral da populagao toda a sorte de privagoes.

A India Portuguesa e' hoje incontestavelmente uma terra a que acorrem milhares de vistas, tanto ca' da casa como la' de fora, como abutres lobrigando de longe o corpo esfacelado dum macro'bio, pouco lhes importando a perda de algumas dezenas de rupias que o seu dono teve de sofrer. Ha' coisas que mesmo deterioradas, e porisso julgadas inuteis, sao de grande lucro para quem souber aproveita-las. Nao se pensa, nas circunstancias actuais da crise financeira, levar algum lenitivo ao estado do moribundo; mas sim, sao todos zelosos em auferir possiveis vantagens que a morte iminente lhes vai proporcionar.

Quem tiver acompanhado, na histo'ria, o estado politico da India Portuguesa, vera' com certo desvanecimento que ela sempre tem caminhado para a frente na conquista dos direitos de cidadao, ainda que a passos de carangueijos. Sem falarmos dos tempos historicos, mesmo nos nossos dias, temos assistido, neste torrao da grandiosa India, a movimentos patrioticos mais ou menos intensos.

Hoje, porem, nada disso vemos Desde que foi decretada a autonomia para a India, ate' o presente, temos experimentado um silencio quase sepulcral. Nao se diga que assim e' porque satisfeitos nas nossas exigencias, nada temos a reclamar dos poderes publicos. E' porque nao ha meios possiveis que possam salvar o pais da derrocada que lhe criaram os que por todos os motivos tinham estrita obrigagao de, ao menos, nao serem os seus algozes.

Sem entrar nos detalhes que sao numerosos, os primeiros dados por que se pode apreciar o avango dum pais politicamente organisado sao os servigos de instrugao e a igualdade dos cidadaos no provimento dos lugares publicos.

Esta igualdade que nos e' garantida pelo diploma constitucional, esta' hoje ao arbitrio dos governantes que moldam as leis a s necessidades pessoais. A igualdade preconisada pela Constituigao politica e' uma letra morta, quando experimentada na pra'tica. A Republica aboliu os privile'gios de nascimento e foros de nobreza; mas a balanga da justiga ainda nao deixa de pender pelo lado de opressor, nao havendo quem vele pelos oprimidos.

Ainda e' misterio como nao nos e' possivel equilibrar as nossas despezas com as receitas, dia a dia, reforgadas pelos impostos sem conta. Temos no Conselho Legislativo individuos de alta envergadura; mas nao ha' memoria de se ter levado avante uma proposta da redugao de despezas, sem nos referirmos a' eliminagao de distribuidores postais, serventes e porteiros. Eliminagoes houve-as, mas precisamente e' somente onde a sua acgao representa a privagao do publico.

Propostas nao faltaram no sentido de grandes redugoes, mas ao serem aprovadas, perseguiu-nos ainda a ma' sorte que e' a nossa fiel companheira.

———O———

A' Janela....

No momento, no instante em que langardes a vossa vista, os vossos olhos pela minha modesta cro'nica, sera' de todos conhecido o nobro, o dignificante gesto dos nossos academicos liceais: a realizagao de uma sessao cinematografica em prol das vitimas das inundagoes de Goa.

Pois bem. Se este facto e' magnifico se e' consolador porque denota que no *futuro do mundo* havera' lugar para a *Caridade*, tambem tem, tambem faz o efeito de um ferro em brasa cu ja luz poe a' nu', a pouca, a nenhuma atengao, a muita incuria que os excelentissimos professores do nosso ensino secundario ligam a's questoes que dizem respeito aos seus alunos, sendo hoje como nunca, em altos berros, em altissonantes gritos, necessario, urgente — *o saneamento moral!* E a prova disso e' o caso do Cinema!

Nos cerebros juvenis as ideas sempre tem a impetuosidade das torrentes todos os seus actos, todos os seus passos sao expontaneos, atingem o alvo, a velocidade de uma seta quer esta seja o Bem, quer seja o Mal, o que importa, portanto, o que urge porisso e' desviar-lhes, arredar-lhes do mal e polariza'-los para o bem, e os ilustrissimos professores do ensino secundario nao se dignaram de observar esta formula comum, banal de bom senso—e' prova disso o caso do Cinema!

A sociedade da' a materia prima, os seus filhos, confia aos professores, a esses obreiros sociais, impondo-lhes a missao sacrossanta de conduzir ao caminho do Progresso, da Perfeigao a lapidar estas pedras diamantinas por forma que se constitua mais solido mais duradouro, mais modelar, mais brilhante *o edificio social de amanha* porem essa divida esqueceram-na, amarfanharam-na realmente, atrozmente — e' prova disso o caso do Cinema!

Nao nos move prurido algum de maldizer de ninguem, e' simplesmente o fito de a propo'sito deste caso de Cinema disfazermos que os meritissimos professores nao se alteraram, nao se buliram nada com isto, antes permitiram, consentiram que as vitimas das inundagoes de Goa, fossem subsidiadas pelo desenrolar das scenas das *vitimas* dos amores deshonestos, em fim, que uma moralidade dos seus alunos fizesse ... as verdadeiras vitimas!

Porque e' facto incontroverso, que nao admite paleios, de que o Cinema influe grandemente, proficuamente nos cerebros juvenis e nos cerebros analfabetos, e' disto a prova, os casos te'tricos, horripilantes a que a imprensa extrangeira se refere; que levam ao subicidio, ao roubo, ao assassinato e por fim a todas miseriasa, todas devassidoes humanas!

Talvez di-lo-hao, que nao lhes com petia intrometer, ingerir no que nao era acto oficial. E na resposta lhes diremos que em todo o mundo nao ha nao pode haver uma so' criatura que saiba que o Cinema foi de caracter extra oficial e *salus populi suprema lex est...*

Ate' parece, que chegaram ao Eden Cinema, porque lhes falhasse o caminho ... da estufa da desinfecgao!

Ante o sucedido, afloram a' granel ideas te'tricas, a visao lugubre, apavorante de o monstro da Desgraga a presentar a sua fance hiante onde os fio alvar dos seus dentes neste caminhar iremos ter, iremos cair nos bragos da nossa Aniquilagao!

Mas paremos!

A cidadela do indiferentismo, do egoismo, da indiferenga, se delira' a' lima destes reparos que sendo de todas as pessoas sensatas chegaram ate aqueles senhores porque feliz nente o meio pensante...ainda nao excluia os professores do Liceu Central "Afonso de Albuquerque."

Quiga', nao se zanguem, nao se amofinem!...

Arlequim Verde

Ecos & Critica

O Bharat processado

Está processado o nosso jornal por causa do seu artigo *Inexplicavel* do n.° 21 da corrente serie.

E' o 5° ou 6° processo que o *Bharat* vai responder e, desta vez, precisamente, por um assunto ... *inexplicavel*, mais *inexplicavel*, ainda, do que o incriminado artigo *Inexplicavel* ...em que explicavamos a *inexplicabilidade* da *desigual* atitude, assumida pelos Agentes do M. P. de Goa para com os nossos colegas da *Terra* e *Tribuna*.

Tudo nos deixa vêr que estamos a navegar no oceano de ... *inexplicações* que, não sendo *explicadas*, acabarão por nos afogar.. em *terra seca*.

Duelo...

Informam-nos que o sr. Roberto Bruto da Costa pretende *partir-nos a cara*, no caso de não aquiescermos ao seu raucoroso desejo de *duelar* conosco—vá o neologismo.

Mas¿ porque, Santo Deus, o sr. Costa nutre ao director do *Bharat* uma tão ferrenha má vontade, à êle que se limita tão sômente a cumprir conscienciosamente os seus deveres, sem se entregar á *ingrata faina* de criar *fitas* de *bolshevismo, sovietismo, vandalismo, revoltas, sediçoes, insubordinaçao* e outras coisas de igual jaez?

Crêia, porem o sr. Roberto que nunca tivemos tamanho apego á vida, a ponto de a que-

श्रीकृष्णाला जास्त आहे, तेव्हां, तोच याचें उत्तर देईल. श्रीकृष्णानें या वेळीं संजयाला सांगितलें कीं, होतां होई तो मी ही लढाई टाळण्याची खटपट करितों. परंतु धृतराष्ट्र व त्याचे मुलगे हे फार लोभी आहेत, म्हणून लढाई टळेल असें वाटत नाहीं. आतां धर्मधर्मा चें लक्षण तूं जाणतच आहेस. जगांतील यच्चयावत प्राणी कर्मानें बांधलेले आहेत. जगांत ज्ञानापेक्षां कर्म श्रेष्ठ आहे. सृष्टीमध्यें मुख्य कर्मच दृष्टीस पडतें. सर्व वस्तु, वायु, सूर्य, चन्द्र हे आपआपलें कर्मच करीत आहेत. शिवाय तुला माहीतच आहे कीं धर्मराज वेद जाणणारा आहे. तो क्षत्रीय आहे. त्यानें राजसूय यज्ञ केलेला आहे. शस्त्र धारण करणें हा त्याचा धर्म आहे. क्षत्रियाचें कर्तव्य म्हणजेच लढाई करणें हें आपणांस माहीत असतां, आपण धर्मराजाला धर्माचा उपदेश करण्याकरितां आलां आहां तेव्हां मी आपणास असें विचारतों कीं, द्रौपदी वस्त्रहरणाचे वेळीं हा आपला धर्म कोठें गेला होता? त्या वेळीं गप्प बसून ... धर्माचीं व्याख्यानें देण्याकरितां आ... काय? तेव्हां आतां आपण परत जा; मीही कौरवसभेंत येऊन संधीबद्दल खटपट करणार.

श्रीकृष्णानें कौरव सभेंत जाऊन केलेली शिष्टाई फुकट गेली. ५ गांवें तरी पांडवाना देण्याबद्दल त्यांनीं सांगितलें. परंतु, सुईच्या अग्रावर राहील इतकी मातीसुद्धां आपण देणार नाहीं असें दुर्योधनानें सांगितलें! या कारणानें लढाई करणें प्राप्त झालें. पांडवांकडे ७ अक्षौहिणी व कौरवांकडे ११ अक्षौहिणी सैन्य लढाईकरितां रणभूमीवर तयार झालें. यावेळीं अर्जुनास मोह उत्पन्न झाला. आपल्यापुढें आपले बांधव, गुरु, वडील वगैरे उभे आहेत, त्यांचा संहार आपण करण्यापेक्षां अरण्यांत जाऊन राहावें हें चांगलें! असें त्याच्या मनानें घेतलें! त्या वेळीं श्रीकृष्णानें त्याला उपदेश करून त्याचा मोह दूर केला. हा उपदेश भगवद्गीता या नांवानें प्रसिद्ध आहे. हा गीता ग्रंथ जगांतील सर्व तत्वज्ञान ग्रंथांत श्रेष्ठ आहे! अर्जुनाला या वेळीं श्रीकृष्णानें असा उपदेश केला कीं, कर्म न करण्यापेक्षां कर्म करणेंच श्रेष्ठ आहे. कर्माचें श्रेय मिळो अगर न मिळो, निष्काम बुद्धीनें कर्म करणें व दोन्ही स्थितींत चित्तवृत्ति एकसारखी ठेवणें यानेंच नांव योग होय. आत्मा अमर आहे, त्याला कोणीही मारूं शकत नाहीं. क्षत्रियाचें मुख्य कर्म म्हणजे लढाई करणें हें होय. लढाईंत मेलास तर स्वर्ग मिळेल व लढाईंत जिंकलास तर राज्य भोगशील. याकरितां लढाई कर. लढाईंतून पळून गेलास तर अपकीर्ती होईल. शूरांना अपकीर्तीसारखें मरण नाहीं. याकरितां "मामनुस्मर युद्धच" माझें स्मरण करून युद्ध कर. या अमूल्य व दिव्य उपदेशानें अर्जुन लढाई करण्यास प्रवृत्त झाला.

कुरुक्षेत्रांत लढाई होऊन पांडवांना जय मिळाला. १८ अक्षौहिणी [४,२३,२०... लाख]सैन्याचा संहार झाला. या युद्धांत फक्त पांडवांकडील ७ व कौरवांकडील ३ असे १० जणच शिल्लक राहिले! पृथ्वीचा भार हलका झाला! श्रीकृष्णाचें वय या वेळीं ८३ वर्षांचें होतें.

यानंतर श्रीकृष्णानें ३६ वर्षें द्वारकेंत काढिलीं. यावेळीं यादवांत अत्यंत अनीति माजलेली होती. दारूचें प्रस्थ भयंकर वाढलें होतें. यादव वीरांमध्यें एकी नव्हती प्रत्येक व्यक्ति आपापलें महत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत होती. या कारणांनींच त्यांचा सर्वस्वी नाश झाला! यादव या वेळीं किती मदोन्मत्त झाले होते याची कल्पना होण्यास आजसुद्धां एखाद्या मस्त झालेल्या माणसाला 'यादव झाला आहेस' असें म्हणण्याचें प्रचारांत आहे, त्यावरून लक्षांत येतें. असो. प्रभास क्षेत्रीं ग्रहणाच्या पर्व स्नानाकरितां सर्व यादव मंडळी गेली होती. त्यावेळीं आनंदोत्सवांत सर्व यादव वीर इतकी दारू प्याले कीं, एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढण्यास सुरवात होऊन, आपापसांत लढाई झाल्यानें, श्रीकृष्ण व बलराम यांशिवाय सर्व ५ लाख यादव वीर मारले गेले!

महाभारत मौसलपर्वांत असें लिहिलेलें आहे कीं, यादवांचा संहार झाल्यानंतर बलराम व श्रीकृष्ण यानां अत्यंत दुःख झालें. नंतर बलराम तेथून निघून वनांत जाऊन योगासन घालून बसला असून, त्याच्या तोंडांतून एक भयंकर नाग निघून समुद्राकडे जात आहे असें श्रीकृष्णास शोधा अंतीं आढळलें." यावरून बलरामानें नागांच्या सैन्यासह समुद्रयात्रा केली असावी असें दिसतें. याशिवाय ग्रीसच्या इतिहासांत असें लिहिलेलें आढळतें कीं जलमार्गानें पूर्वेकडून हेरेक्लायडी व हर्क्युलीस हे ग्रीस देशांत आले. श्रीकृष्णाच्या वंशाला हरिवंश म्हणतात. त्या कुलाचा अधिपति बलराम तोच हरिकुलेश म्हणजे हर्क्यूलीस असावा. बलराम गेल्यानंतर श्रीकृष्णानें आपला आत्मा योग मार्गानें परमेश्वर स्वरूपांत मिळून घेतला. त्यावेळीं त्याचें वय १२० वर्षांचें होतें.

श्रीकृष्णाच्या चरित्रावरून पुष्कळ गोष्टी घेण्यासारख्या आहेत. मुख्य गोष्ट त्याच्या अंगचा स्वार्थत्याग होय. पुष्कळ मदोन्मत्त राजांचें त्यानें निर्दालन केलें, परंतु स्वतः गादी बळकाविण्याचा मोह त्याला झाला नाहीं. उग्रसेनानें स्वतः होऊन मथुरेच्या राज्यावर बसण्याचा आग्रह केला; तसेंच जरासंध हा सार्वभौम राजा होता, त्याला मारल्यामुळें श्रीकृष्णाला सार्वभौमपद प्राप्त करून घेतां आलें असतें. परंतु त्यानें त्याच्याच मुलाला गादीवर बसविलें. या त्याच्या थोर गुणामुळेंच त्याला बहुजन समाजांत मान्यता मिळाली.

दुसरी गोष्ट म्हणजे अरण्यांत जाण्यापेक्षां संसारांतच राहून मोक्ष पद पावतां येतें, याचा उपदेश करणें ही होय. लढाई संपल्यानंतर लढाईंत झालेला एकंदर संहार पाहून धर्मराजालाही उद्विग्नता प्राप्त होऊन अरण्यांत जाऊन राहावेंसें वाटलें होतें. त्या वेळीं त्याला उपदेश करून 'राज्य चालवितांनां सुद्धां मोक्ष साधतां येतो' हें सांगितलें. अरण्यांत गेलों तरी वासना या आहेतच; जोंपर्यंत वासनात्याग झाला नाहीं, तोंपर्यंत अरण्य काय व संसार काय एकच आहे. संसारांत इंद्रियें ताब्यांत ठेवणें, यापेक्षां श्रेष्ठ मार्ग दुसरा नाहीं. **खरा संन्यास म्हणजेच संसारांत राहून लोककल्याणाकरितां झटणें हा होय.** यांतच सर्व धर्मांचा अंतर्भाव होतो असें सांगून धर्मराजाला परत राज्य चालविण्याकरिता प्रवृत्त केलें.

श्रीकृष्णाच्या चरित्रामध्यें अहिंसा तत्वाची योग्य छाननी झालेली आहे. बौध्दांसारखें किंवा जैनांसारखें अहिंसा तत्व त्याला मान्य नव्हतें. तसें तत्व या संसारांत आचरणामध्यें आणणें शक्य नाहीं असें त्याचें मत होतें. जगांत जीवांचें साम्राज्य पसरलेलें आहे. हजारो जीवांचा नाश आपल्या हातून नकळत सुद्धां होत आहे. पाण्यांतसुद्धां हजारों जंतु आहेत ते पोटांत गेल्यानें त्यांची हिंसा होणारच. करितां अहिंसा तत्व म्हणजे गरीब व निरपराधी प्राण्याचा वध न करणें हें होय. दुष्ट, समाजविध्वंसक, ज्यांच्यामुळें शेंकडों लोकांचें अकल्याण होतें, अशा लोकांचा वध केल्यानें हिंसेचें पाप लागत नसून, उलट पुण्याचा वांटा पदरीं येणार. ज्याचा वध केला पाहिजे त्याचा वध करण्यांत पाप नसून उलट वध न करण्यांतच पाप आहे. हें त्यानें बलाक शिकाऱ्याची गोष्ट अर्जुनाला सांगून सिद्ध केलें. त्या शिकाऱ्यानें हजारों माणसें मारणाऱ्या जंगली जनावरांचा वध केल्यानें त्याच्यावर आकाशांतून पुष्प वृष्टी झाली!

या शिवाय श्रीकृष्णानें सत्य असत्य याची व्याख्या केली आहे; जेथें असत्य सत्य स्वरूपामध्यें असतें आणि सत्य असत्य स्वरूपामध्यें असतें. तेथें असत्य बोलण्यांत काहींच पाप लागत नाहीं. ही व्याख्या त्यानें कौशिक ब्राह्मणाची गोष्ट सांगून सिद्ध केली आहे. श्रीकृष्णाचें सत्य असत्याचें स्वरूप थोडक्यांतच सांगावयाचें म्हणजे, ज्याला धर्माचें अनुमोदन आहे तें सत्य, ज्यानें लोकांचें कल्याण होईल तो धर्म. अर्थात ज्यानें लोकांचें कल्याण होईल तेंच सत्य होय. अशा तऱ्हेचें सत्य सर्वकाळीं सांगणें योग्य आहे. या सत्य असत्याच्या व्याख्येवरून आपणांस सत्यासत्याची पूर्ण कल्पना होईल.

उदयोन्मुख भारताला श्रीकृष्ण चरित्राची फार अवश्यकता आहे. आपल्या लोकांना कर्तव्यदिशा दाखविण्याकरितां ह्याच महात्म्याच्या उपदेशाची अत्यंत जरूरी आहे. संसारात राहून इंद्रियजयकरणें, मन ताब्यांत ठेवून सदा कर्मरत होणें हेंच आपल्याला आजच्या प्रसंगीं जरूर आहे. हिंदुस्थानानें धन, राज्य सर्व कांहीं गमावलेलें आहे. या वेळीं देवदेव करीत बसण्यांत कांहींच अर्थ नसून, सदा सर्वदा लोकोपयोगी कर्में करण्यांतच आपल्या देशाचें कल्याण आहे. त्याकरितां पुन्हां पुन्हां श्रीकृष्णचरित्राचें मनन सर्वांनीं करणें योग्य नाहीं काय? शेवटीं,

> यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः। तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥

इतकें लिहून श्रीकृष्ण चरित्र लेखानें पूनित झालेल्या लेखणीस विश्रांति देतों.

नवीन खटला

भारताच्या चालू वर्षाच्या २१ व्या अंकांतील पोर्तुगीज अग्रलेख आक्षेपार्ह वाटल्यावरून, सरकारनें आम्हाविरुद्ध नवीन खटला भरला आहे!

स्फुट विचार.

खटल्यांचें सत्रः—मडगांव येथें आठवड्याला दोनदां प्रसिद्ध होणारें 'आ तेन्द' पत्र, पणजीचें दैनिक 'उ येराल्द', कळंगुटचें साप्ताहिक 'आ त्रिबून' या पत्रांविरुद्ध त्या त्या न्यायखात्यांच्या सरकारी वकिलांकडून क्रिमिनल खटले भरण्यांत आले असून, खुद्द भारताच्या डोक्यावर पांचव्या खटल्याची तरवार लोंबकळत आहे. यासर्व खटल्यांच्या इमारतीचा पाया इतका ढिसूळ आहे कीं, विचारशक्तीच्या नुसत्या फुंकारानें तो जमीनदोस्त होईल! परंतु प्रजेच्या दुर्दैवानें सरकारच्या विचारशक्तीचें दिवाळें वाजलें असल्यावरून, त्यांच्या प्रतिनिधींकडून वरील रसें 'अद्वातद्वा' आचरण झालें नसतें तर आश्चर्यच होतें!

पोरकट कारणें:—सदरहू सत्र निपजविणारीं कारणें किती पोरकट आहेत याचें विवेचन करण्याची जरूरी नाहीं. पोर्तुगालच्या व्यवसायबंधूनीं प्रसिद्ध केलेल्या मजकुरास उपरिनिर्दिष्ट गोमांतकीय पत्रकर्त्यानीं आपल्या पत्रांत थारा दिल्यामुळें, बहुतेक खटल्यांची उभारणी झाली असून तो मजकूर तेथें म्हणजे खुद्द कायद्या नरेंद्रनगरांत आक्षेपार्ह ठरले,

Ano VIII No. 24

Quinta-feira 13de Setembro de 1923

... TURA
... P. ... tres rupias
... OS
Por cada linh... repetida uma tanga
Num... ma tanga

DIRE... DITOR
G. P. ... Dessay
Que... ...ssá

Biblioteca Nacional Panjim

भारत

BHARAT

वर्ष ८ वें. अंक २४

गुरुवार ता. १३ सप्टेंबर सन १९२३

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

Impostos e o seu emprego

Rebelde a todos os esforços da sciencia, inspirando cada vez mais cuidados, sem uma leve esperança de melhoras, uma doença pertinaz obriga os me'diços e pessoas da familia a abandonarem o doente a' merce da sorte! Mas esse abandono nunca se traduziu em falta de amor e dedicaçao por um ente que sempre foi o seu idolo.

A India Portuguesa esta' ao presente numa quietude que lembra o silencio duma cidade assolada pela epidemia e porisso abandonada a's moscas pelos seus habitantes. Farta de trabalhar pela pena e pelo verbo dos seus dedicados homens publicos que a queriam engrandecer, esta', ela votada ao *Deus dara'*. O entusiasmo fervoroso com que acolheram o novo regimen esta' dia a dia fenecendo. Discursos flamejantes e reto'ricas repassadas de sincero patriotismo sao hoje rarissimos nesta terra que lhes foi tao familiar. Espiritos desinteressados e finalmente cultos que sobre si tomaram o encargo de fazer raiar nesta India dias melhores, retraem-se do mandato que pela sua propria vontade se propuzeram a cumprir.

Em troca, no tablado politico em que durante alguns anos brilhantes figuras desempenharam com mao de mestre, o nobilissimo papel de levantamento do nivel desta nossa querida terra, veem-se ao presente individuos nao menos talentosos e que se impoem pelos conhecimentos variados e pela sua situaçao material desafogada. O patriotismo e a abdicaçao foram substituidos pelos interesses particulares e ambiçoes desmesuradas.

Homens publicos, nunca a India os careçeu. A India Portuguesa tem a honra de possuir no seio da sua sociedade individualidades de fino quilate a que nunca tocou a ideá de anichar os seus parentes nos lugares publicos pondo de parte competencias, calcando leis e amoldando-as a seu belo prazer. Sao porem, raras essas individualidades, nao so' no nosso pais, mas ainda em todos os outros. E porisso dizse que e' feliz um pais quando ele tem para representar o seu povo homens desse quilate.

Nao queremos com isso dizer que os individuos que preconisamos devem estar a' testa da representaçao do povo, sejam destituidos de erros e por isso nunca atingidos da critica. Isto se teria lugar numa terra idealmente perfeita de que no's e mesmo os povos no apogeu da civilisaçao andamos muito a distancia.

Exaustos de falar e escrever sobre a situaçao financeira da Provincia, os jornais limitam-se hoje a panfletos noticiarios preenchendo as restantes colunas com transcriçoes de artigos dos jornais metropolitanos e estrangeiros.

Por este modo de proceder e emquanto se nao ponha freio a esse maquinismo novo — ultima novidade da sciencia politica.—de arrançar o joio da seara, lançando nela ao mesmo tempo as suas sementes, a India Portuguesa continuara' a ser um celeiro para os gafanhotos.

O povo que e' o peixe miu'do se nao puder resistir a' voragem dos tubaroes passara' a ser cada vez mais deprimido pelos que defrontam a singular sorte de respirar o ambiente dos governantes.

Impostos, e' necessario lança-los; e o povo tem de os pagar quando tenha a plena certeza de que serao empregados nas suas necessidades. E estas necessidades nao se satisfazem quando o governo o obsequie com criaçoes de inspectores e directores com eliminaçoes fingidas.

Tantos impostos se lançaram! Mas a memoria nao nos ajuda a mencionar com sincero orgulho uma obra de melhoramentos que tenha redundado em beneficio do publico.

A primeira e unica obra de melhoramento na India Portuguesa, da qual o governo quizes e lançar mao, seria uma reforma nos serviços de instruçao do povo e essa reforma nao se faz com criaçao de lugares com chorudos vencimentos, inscrevendo uma cifra grossa na tabela das despezas.

Voltaremos a ser mais claros.

Jenardona Counto'

Seguiu para Portgal este laureado aluno hindù do Liceu Central de Nova-Goa, a fim de cursar a Escola Colonial.

O *Bharat* manifestou, em tempo, a sua franca opinião sobre as qualidades que exornam o sr. Conntó, limitando.se, porisso, agora, a almejar-lhe a boa sorte na sua nova carreira de estudos.

Em farrapos....

Sr. Redactor:

Como ninguem ignora, o Liceu central "Afonso de Albuquerque" neste ano abriu-se em 29 de Junho quando pelo regl. em vigor se devia abrir em 15 do mesmo mes.

Nao se teve cuidado algum em se prevenir os alunos a nao virem em 15 como todo o sempre sucede nesta terra; vieram eles em 15, curtiram 14 bem longos dias na Capital, vagueando e quem sabe, se gastando toda a mesada do mes!

Pois, como todos sabem, a cidade tem divertimentos, tem diversoes a quem tem do seu, a quem dispoe de rendas, de fundos e mundos. Estao os restaurantes, esta' o Eden Cinema, graças a' Deus que e' unico. Eram de longas terras, era impossivel para la' voltar, pois estavam arriscados a ficaram fiascados, abrindo-se de repente as aulas. Se a Reitoria nem anunciava quando e' que elas se abriam! Começaram em 29, tendo os alunos de pagar cotas de todo o mes aos cole'gios! ...

Abriram-se as aulas, acalentavam uma nova era, radiante e bela. Tinhamos, a nossa geraçao, bem formada, bem equilibrada! Haveria desportos, jogos, eu sei la' que mais?

Assim os jornais periodicos capitalenses, todos a uma faziam eco. Mas nem um nem um sequer, bordava, sobre as noticias, umas ligeiras consideraçoes; tudo duvidava...

Haveria dois periodos, diziam eles um de 8. 30 a 11, 30 e outro de 13.30 a 15.30! As duas horas de intervalo seriam gerais sendo uma para ginastica outra para o almoço... Tudo pelos modos, entrava nos seus eixos.

Mas, *malgre' nous*, assim nao sucedeu. Nao houve ginastica, nao houve jogos, nao houve dois periodos. Se acham que exageramos os factos, pergunte-se aos alunos deste estabelecimento, e que eles digam alto e bom som, quantas vezes o seu horario sofreu alteraçoes, quantas vezes tiveram mudanças de professores, quantas! ... Apontaremos para exemplo: A 6.a classe (Letras), 4.a classe (2.a turma), 7.a classe (Sciencias) e tantas outras.

Conheço turmas cujo horario foi, pelo menos, alterado umas 6 ou 7 vezes!... Conheço classes, cujos professores foram mudados uma, duas ou tres vezes durante2 mezes de aulas...

Numa turma da 5.a classe, o professor da matematica, era o prof. Basso Marques, que sabem todos, que e' professor da Escola Me'dica tambem; acumula portanto ambas as funçoes; e esta turma, que tem a aula as 9,30 em dois dias de semana e as 8,30 em um dia, nao mereceu a honra de o sr. professor para la' ir ditar as aulas senao umas 5 ou 6 vezes durante os dois mezes!!...E' isto corrente?...

Que digam os leitores, no's cá que nao nos metemos em confrontos; so' relatamos os factos. Nao vamos a fundo da questao para evitar vinganças que sem tirte nem guarte nos possam ferir, e e' essa a unica razao de para ca' virmos sob a forma de anonimato.

Nao houve o tal intervalo, nem qualquer outro de duas horas, mas sim reduziu-se a 1 hora apenas das 12 30 a 13,30, bem estava; porem, ha dias a taboleta que esta' na Portaria, ostentava um aviso aos alunos, que "de ordem superior anunciava-se" a reduçao de uma hora de intervalo que era para meia hora apenas, das 11,30 a 12.5;!...

Era possivel o aluno almoçar e voltar da sua casa, que as mais das vezes e' nas Fontainhas, em Boca da Vaca, Sta Ignes, Campal e mesmo que fosse perto e' possivel, digam-nos os nossos pais, diga-nos a *elite* pensante digam-nos todos que tem dois dedos de senso, se e' possivel almoçar-se em meia hora?... Porem ha' dois dias um grupo de alunos, foi ate' a' Direcçao da Instruçao, onde o sr. Director os acolheu com aquela sua nunca desmentida amabilidade e lhes prometeu providenciar sobre o caso.

Ainda ha' juizes em Berlim ... e e' isto o que nos consola, alia's desgraçados seriamos no's.

Pela inserçao destas linhas no conceituado semanario de V. muito obrigara' a quem e'

De V. etc.

Um aluno

Ecos & Critica

Babu P Dessai

Obteve provisão para advogar nesta comarca êste simpatico mancebo, um dos principais marechais do Partido Popular do Concelho.

O sr. Babú Porobo é inteligente, activo e nobre; e pela lida que com ele temos podemos garantir que o novo advogado usará de suas qualidades

पात्रता आणून. मिळविलेलें स्वराज्य तें खरें स्वराज्य होय; नपेक्षां मुद्दाम गळ्यांत बांधिलेलें स्वराज्य—autonomia —ह्मणजे कोंबड्यास उकीरड्यांत मिळालेलें रत्न होय.

तरी तिसऱ्या वर्षास ह्मणजे खरें स्वराज्य मिळविण्यास पोषक अशा पहिल्या दोन कार्यां कोणतीं अमावी याचा आमच्या परिस्थित्यनुसार पुढें विचार करूं.

स्फुट विचार.

आणखी कर:— डोईजड डोईजडीनंतर करांची इतिश्री झाली अशी अनेकांची समजूत झाली होती; परंतु नवीन कर लादण्यांत येणार असल्याच्या दाही दिशेनें बातम्या पसरत असल्यानें, जनतेचीहि ज्या कराकानें जनतेची किंमत कमी केली, तें अद्य सरकार आपलें धोरण बदलत नाहीं, असें वाटतें. अशा रीतीनें पावसाच्या अतिवृष्टीनें व अनावृष्टीनें ओढवलेल्या दुर्धर प्रसंगाला सरकारच्या वक्रदृष्टीनें मनमुराद पाठवळ मिळून, आधींच हवालदिल बनलेल्या "कर"वाल्यांस "मर" वा त्यांच्या पत्नीस काळक्षेप घेण्याची संधी अनायासेंच लाभणार आहे !

नवीन कार्यक्रम:—रिपब्लिकचे नवीन अध्यक्ष दो० गोमीस यांनीं रिपब्लिकचा नांवलौकिक जेणेंकरून वाढेल, अशाच धोरणानें आपण पोर्तुगीज राजकारणाचें गाडें हांकणार, असें अभिवचन दिलें आहे. अशाच तऱ्हेचीं किंबहुना याहिपेक्षां जास्त उत्तेजक व आशावादी वचनें पूर्वींच्या अध्यक्षांकडून दिलीं गेलीं होतीं. त्यांपैकीं एकहि गोष्ट मूर्त स्वरूपांत आणण्यास ते अनुकूल परिस्थितीच्या अभावीं, शकले नाहींत. अधिकारारूढ होणाऱ्या अध्यक्षांच्या अंगीं विरुद्ध परिस्थितीशीं झगडून पोर्तुगीज नागरिकांचें कल्याण साधण्याचें 'शौर्य' आहे, हें समजून आम्हांस समाधान वाटत आहे. अध्यक्षमहाराजांचा नवीन कार्यक्रम यशस्वी होवो, अशी परमेश्वरापाशीं आमची अनन्य प्रार्थना आहे.

भारतावरील खटला:—जोगांत आहे. या कठीण प्रसंगीं वर्गणीदारांनीं आपापल्या मागील वर्गणीची फेड करणें, हें त्यांचें कर्तव्य होय. आधींच गोमांतकांत वर्तमानपत्रासारखी संस्था सुरळीत चालविणें, हें निवळ आंतबट्ट्याचा व्यवहार करण्यासारखें आहे. अशा स्थितींत खटल्यांशीं दोन हात करण्याचे अनेक प्रसंग गुजरणें ह्मणजे दुष्काळाच्या वर्षांत 'तेराव्या महिन्याचा' सुखास्वाद अनुभवणें होय. ह्मणूनच आह्मीं पूर्व सूचनेवरून वर्गणीच्या वसूलीसाठीं व्ही. पी. ची पद्धत स्वीकारली. परंतु दुर्दैवाची गोष्ट कीं, 'समजूतदार' समजले जाणारां कडूनच कांहीं व्ही. पी. स्वीकारल्या गेल्या नाहींत. मात्र व्ही. पी. नंतरचे अंक त्यांनीं 'बिनबोभाट' स्वीकारले ! ! ! असो. आतां तरी सर्वांनीं आपापली वर्गणी पाठवून भारताला मदत करावी, अशी आग्रहाची विनंति आहे.

वर्तमानसार

—उपी बाबली कामत हे लॉरेस मार्क्विसहून अंगोलास जातांनां वाटेंत हिंवतापाच्या विकारानें आजारी पडले होते. परंतु अंगोलास पोंचल्यानंतर तेथील ओस्पितालांत कांहीं दिवस घालविल्यानंतर ते बरे होऊन कराराप्रमाणें आपल्या ओब्रास पुब्लिकस खात्यांतील सब्ईंकामगाराच्या कामावर रुजू झाले होते. त्या खात्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांस त्यांचें काम पसंत पडून त्यांच्या शिफारसीनें कामत मजकुरांची त्या जागीं कायम नेमणूक झाल्याचें वर्तमान आलें आहे. लवकरच ते प्रवासाची पुढील माहिती देणार आहेत.

—पणजीच्या गोरक्षकसंस्थेचें कार्य मोठ्या नेटानें चालू आहे.

—गेल्या ९ तारखेला प्रागतिक संघाच्या कार्यकारी मंडळाची एक सभा पणजी येथें भरली होती. या सभेंत परिषदे विषयींच्या अनेक महत्वाच्या गोष्टींचा खल करण्यांत आला.

—दे० महंमद अल्लीची सुटका झाली. नागपुरचे अनेक सत्याग्रही कैदी ही सोडून देण्यांत आले!

—पावसाळा संपतांच अनेक पूल, रस्ते वगैरे बांधण्याच्या कामास सुरवात होणार आहे.

—जपानच्या राजधानींत भूकंप होऊन ५ लाख लोक मरण पावले ४ कोट रुपयांचें नुकसान झालें. २० नामांकित मुत्सद्दी नामशेष झाले! ईश्वरी क्षोभ, दुसरें काय?

—ऐनवेळीं पावसानें दगा दिल्यामुळें जनता हवालदील झाली आहे !

—येथील क्षत्रिय-मराठा समाजाचे एक पुढारू बाबू शिवराम प्रभू देसाई यांस वकिलीची सनद मिळाल्याबद्दल आह्मीं त्यांचें सप्रेम अभिनंदन करितों.

—मडगांवचे तरुण आत्माराम शंभू पाणंदीकर हे वकिलीच्या परीक्षेंत पास झाल्याचें कळविण्यास आनंद वाटतो.

—बांदोड्याच्या नवूबाईनें गोवा विद्या प्रसारक-फंडें या संस्थेला दोन हजार रुपयांची मदत केल्याचें येथें नमूद करण्यास समाधान वाटतें.

— श्रावण वद्य ७ मी रविवार शके १८४५ रोजीं पणजी येथील राष्ट्रीय शाळेंतील विद्यार्थ्यांची परीक्षा मराठी शिक्षक संघातर्फे श्री. गणपतराव सामंत यांकडून घेण्यांत आली. परीक्षेचा निकालहि समाधानकारक लागला. फक्त वहा महिन्याच्या अवधींत मराठी चार इयत्तापर्यंत कोणत्याहि एका इयत्तेचें संक्षिप्त रीतीनें शिक्षण, राहाटावर सूत काढण्याची माहिती, आंखण्या, बटणें, लांकडी पेट्या निरनिराळे देशी रंग, मेंडीचीं फुलें, कागदाच्या रांग्याचीं वगैरे नमूनेदार चित्रें, इत्याद्यनेक धंदे शिक्षणांत अंतर्भाव होण्यासारखी माहिती विद्यार्थ्यांना येथें करून दिली जाते. ह्या शाळेच्या बक्षिस स-

मारंभाप्रीत्यर्थ मुलांनीं तयार केलेल्या अनेक वस्तूंचें एक लहानसें प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. हा गोमांतकीय बाल पुढाऱ्यांनी तयार केलेला "वस्तुभांडार" शाळा उघडी असतांना केव्हांहि शाळेस भेट देण्याऱ्या गृहस्थांस आनंदानें दाखविला जाईल. आजच्या ह्या [illegible] समारंभांत अध्यक्षस्थानीं प्रो० रामचंद्रराव नायक या विद्याभिलाषी नागरिकांची निवडणूक केली गेल्यामुळें समारंभास विशेष रंग आला होता, असें एक प्रेक्षक लिहितात

फसल केल्या !

पूर्व सूचना असतांहि ज्या वर्गणीदारांनीं व्ही. पी. परत करून भारताला नुकसानी आणली त्यांचीं नांवें येत्या अंकापासून—केवळ मजेखातर—प्रसिद्ध करणार आहोंत. व्ही. पी. नंतर पाठविण्यांत आलेले अंक सदरहू गृहस्थानीं 'गूप चूप' 'गडप' केले, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

पत्रव्यवहार

[आमचे मित्र दोतोर व्यंकटेश वि. सूर्यराव सरदेसाई, लेजीजलेटीव कौंसीलचे मेंबर यांकडून प्रसिद्धीकरतां आलेलें पत्र आह्मीं मोठ्या आनंदानें प्रसिद्ध करीत आहों. सं. भारत.]

श्री. रा. रा. भारतकर्ते यांस:—

पुणें येथील फर्ग्युसन कालेजचे होतकरू विद्यार्थी व आमचे प्रांतबंधु श्री. रा. विनायक सदाशीव सुखटणकर यांनीं, गोव्यांत नुकत्याच ओढवलेल्या जलप्रळयामुळें अनाथ व गरीब झालेल्या लोकांस मदत करण्यासाठीं १३६ रुपये कालेजचे प्रोफेसर्स व विद्यार्थी यांकडून गोळा करून आमच्याकडे पाठविले आहेत. ही रकम या शहरांत आह्मीं उभारलेल्या फंडाचे खजीनदार डा. बाळकृष्ण दत्ताराम साखरदांडे यांच्याकडे जमा केली आहे. व तिचा विनियोग योग्य रीतीनें करण्यांत येणार आहे.

श्री. सुखटाणकर यांनीं आपल्या प्रांतबंधूंसाठीं केलेला प्रयत्न व दाखविलेली कळकळ वाखाणण्याजोगी आहेतव त्यांचें याबद्दल आभार मानावे तितके थोडेच आहेत

पोर्तुगीज लोकसत्ताक राज्यपद्धतीची अमदानी या आमच्या प्रांतांत सुरू झाल्यापासून, हिंदु समाजास कोठें आपली मान वर काढण्यास फुरसत सांपडली. पूर्वींची तीं एकमुखी, धर्मवेड्या क्याथोलिक पाद्रींच्या हुकमतीनें चालणारी, पदोपदीं परधर्मीयांस बेमुर्वतरणें चिरडविणारी राजसत्ता नामशेष होऊन तिच्या जागीं लोकमतानुवर्ती, धार्मिक बाबतींत तटस्थ, सर्वांस समतेनें वागविणारी, उदार मताची, लोकसत्ता स्थापन झाल्यावर, कोण सुविचारी मायेचा पूत आपला आळस झाडून जुलमाच्या बर्कानें गारठलेले हातपाय हालविल्यावांचून राहील? पोर्तुगीज लोकांनीं या देशांत आपल्या सत्तेबरोबर वरूणासहि आणल्यानंतर येथील रहिवाशांना धर्माच्या नांवाखालीं जो जुलूम, जी यातायात भोगावी लागली तिची आठवण झाली तर, डोळ्यांत आसवें आणून तें दुःख हलकें करण्यापलीकडे आमच्या हातून कोणतीच कामगिरी झाली नाहीं, व होणेंहि शक्य नव्हती. परंतु सुदैवानें राज्यपद्धतींतच बदल झाल्यामुळें आतां या बारा तेरा वर्षांत कायदेशीर रीतीनें आमचीं नवीं जुनीं गाऱ्हाणीं सरकारापुढें मांडून, दाद लावून घेण्याची सुसंधी, अनायासें प्राप्त झाली आहे. तिचा योग्य फायदा घेतां यावा, सर्व हिंदूंना एका केंद्रांत राहतां यावें, आपल्या गरजा काय आहेत याचा विचारपूर्वक खल करितां यावा, त्या येथील आणि मध्यवर्ती सरकारांत मांडून भागवितां याव्या आणि एकंदरींत इतर समाजांच्या बरोबरीनें राहून, खांद्यास खांदा लावून आपल्या जन्मदात्या मायभूमीची अंशतः पांग फेडितां यावी यासाठीं आम्हांस एका संघटित संस्थेची आवश्यकता होती ती, आज दोन वर्षेंपर्यंत मधून मधून आपलें अस्तित्व प्रगट करणाऱ्या प्रागतिक संघानें दूर केली आहे.

उपरिनिर्दिष्ट संस्था पोर्तुगीज हिंदुस्थानांतील सुशिक्षित व देशहिताकडे नजर देणाऱ्या गृहस्थांस कांहीं अनोळखी नाहीं. या प्रांतांतून पोर्तुगालच्या पार्लमेंटांत व सेनेट सभेंत, निवडून जाणाऱ्या प्रतिनिधींच्या निवडणुकींत भाग घेतल्यामुळें पोर्तुगालपर्यंत तिची ओळख वाढली आहे. या उभय निवडणुकांत तीस यश मिळालें नाहीं, हें जरी खरें असलें तरी त्या दोनहि प्रसंगीं तिला आपल्यामागें असलेलें लोकमत अजमावितां आलें. सरकारी अधिकारी, सदैव आम्हांस पाण्यांत पाहणारी खिस्ती जनता यांसहि आपल्या डोळ्यांवरील भ्रमाचें पटल दूर सारण्यास व हिंदु म्हणजे रानटी लोक, त्यांना शिस्त नाहीं, त्यांना राजकारण समजत नाहीं, त्यांच्या हालचाली निर्जीव आहेत, हा आपला आजवर्यंतचा समज चुकीचा-मूर्खपणाचा होता. ही जाणीव होण्यास याच निवडणुकी कारण झाल्या.

त्या नंतरच्या काळांत संघाकडून कांहींच म्हणण्यासारखी कामगिरी झाली नाहीं. व वरवर जरा शिथीलता आलेली दिसत होती; ही गोष्ट लपवून ठेवण्यांत अर्थ नाहीं. परंतु आलेली शिथीलता जावून संघ कार्यक्षम होण्यास, सर्व हिंदूंची निदान त्याच्या सभासदांची एक परिषद भरविणें अगत्याचें आहे, असें कार्यकारी मंडळास वाटून, गेल्या मार्च महिन्यांत मडगांव येथें भरलेल्या मंडळाच्या सभेंत परिषद भरविण्याचा व त्या कामीं लागणारे सर्व अधिकार मंडळाचे उपाध्यक्ष डॉ० आत्माराम गोविंद बोरकर यांजकडे सोंपविण्याचा, असे दोन ठराव सर्वानुमतें पास करण्यांत आले व त्याप्रमाणें कार्यास सुरवातहि झाली आहे. बहुतकरून येत्या नाताळाच्या सुटींत कवळें येथें परिषदेचें पहिलें अधिवेशन भरणार आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

अशा रीतीनें कार्यकारी मंडळ व डॉ० बोरकर यांनीं आपली जबाबदारी ओळखून, ती पार पाडण्याच्या कार्यास आरंभ केला असून लवकरच जाहीरपत्रकें, आमंत्रण पत्रिका निघणार आहेत. तेव्हां यापुढें आपल्या वांट्यास येत असलेली जबाबदारी शिरावर घेण्यास म्हणजे आपण संघाचे सभासद नसलों तर सभासद होऊन आपल्या आगमनानें परिषदेची बैठक उत्तम रीतीनें पार पाडण्यास, सर्व हिंदुजनतेनें पुढें सरसावलें पाहिजे. संघ ही संस्था सर्व हिंदूंच्या हिताकरितां निर्माण झाली असल्यावरून ती, सार्वजनिक आहे. तिच्या कार्यास सर्वांनीं हातभार लावला नाहीं तर कार्यकारी मंडळानें आरंभिलेलें हें महत्वाचें कार्य लोकमताचा जोर नसल्यामुळें लंगडें राहून, हिंदुसमाजाच्या जीवावर जीव घेऊन राहिलेली ही अत्यंत उपयुक्त संस्था हतबल व पोरकी होऊन, तिची व पर्यायानें एकंदर हिंदुसमाजाची इभ्रत खालावल्यावांचून राहणार नाहीं.

प्रागतिक संघ ही संस्था, कांहीं व्यक्तींनींच स्थापन केली असली तरी, ती जाहीर रीतीनें, राजधानीच्या शहरांत, कोंग्रेस प्रोव्हिंसिआलच्या बैठकीस बहुतेक ठिकाणचे लोक जमलेले असतां, स्थापन झाली असल्यावरून तिच्यावर सर्व हिंदूंची मालकी आहे. याची खात्री सध्याच्या स्थितींत असलेल्या तिच्या नियमावलीवरून कोणासहि करून घेतां येईल. संघाच्या स्थापनेस आपण हजर नव्हतों किंवा सभासदांच्या पटांत आपलें नांव नाहीं म्हणून तो आपला होऊं शकत नाहीं, ही शंका जर कोणाच्या अंतःकरणांत वास करीत असेल तर, ती घालविण्यास त्यांनीं या होऊं घातलेल्या व लवकरच भरणाऱ्या परिषदेच्या पहिल्या अधिवेशनास सक्रीय हजर राहणें अगत्याचें आहे. व आम्ही असेंहि सांगूं शकतों कीं, परिषदेंत जमणाऱ्या सर्व सभासदांत संघाबद्दल कधींहि दुमत राहणार नाहीं.

परिषदेस हजर राहून शंकीतांनीं संघ सर्वांचा आहे, अशी खात्री करून घेतली म्हणजे संघाचा पाया बळकट आहे त्याहून बळकट बसून त्याला आपल्या शिरावर असलेलीं कामें झेलून धरण्यास क्षीति राहणार नाहीं. व सदोदीत असाच आत्मविश्वास वाढत राहिला तर, आपल्यापुढें असलेलें ध्येय साध्य करण्यास संघास एकवटांचाहि अवकाश लागणार नाहीं.

हिंदु बांधव हो, संसार हा एकप्रकारें संशयखोर आहे. त्याच्या नादीं लागून 'काय होईल काय नाहीं' या निराशावादी संशयाचा जर न करितां 'यत्नेकृते यदिन सिद्धति कोत्र दोषः!' या वचनावर विश्वास ठेऊन तुकत्याच रुजलेल्या व लोकमताच्या कुंडींत लहानाचा मोठा होऊन आपल्या फळांपुष्पांनीं समाजाची तहानभूक निवडूं पाहणाऱ्या या संघाच्या रोपट्यास तुम्ही आपला म्हणणार नाहीं काय? तुमच्या आश्रयावरच त्याचें जीवित अवलंबून आहे. त्याला तुमच्या शीतळ छायेंत वाढूं द्या. तुमची पांग फेडण्याची ताकद त्याच्या अंगांत आणण्यास त्याच्या मुळाशीं प्रेमजलाचे सिंचन करून साह्याचें मनमुराद खत द्या. त्याची उपेक्षा करूं नका. त्याची आबाळ झाली तर, तो नेभळा, निर्जीव होऊन जाईल याची कल्पना करा. तुमची अपेक्षा सिद्धीस नेण्यास प्रागतिक संघासारखी एखादी संस्था हवीच होती. तर, तिला दूर लोटून आकाशांतील ताऱ्यांकडे आशापूर्ण दृष्टीनें पाहण्यांत कांहींच साध्य होणार नाहीं, हें लक्ष्यांत आणा. आणि संघाचे सभासद होऊन परिषदेसहि आपल्या बुद्धीचा फायदा द्या. हीच तुम्हांकडे आमची विनंति आहे.

स्फुट विचार

खोड मोडली:--'फाइस्कां'पासून जे अनेक फायदे झाले, त्यांत वेळीं अवेळीं व सकारण अकारण हिंदुधर्माविरुद्ध मिळेल त्यानें तोंडसुख घेण्याची जी कित्येक खिस्ती लोकांत प्रवृत्ति होती, ती समूळ नष्ट होण्याच्या पंथास लागली, हा मुख्य फायदा होय. हा फायदा कांहीं लहान सहान नाहीं. हिंदु लोकांतहि खिस्ती धर्म ओळखण्याचें व त्यावर मनमुराद वादविवाद करण्याचें पाणी मुरत असून, भोळ्याभाबड्या व अश 'कोंकरां'च्या डोळ्यानां पाणी लावण्याचा 'अव्यापारेषु व्यापार' यापुढें नफादायक होणें शक्य नाहीं, अशी खिस्ती 'गुराख्यां'ची समजूत पटावयास लागली, हा 'फाइस्कां'चा फायदा महत्वाचा नाहीं, असें म्हणणारे लोक केवळ जन्मांध असले पाहिजेत!

प्रागतिक संघः—या संस्थेविषयीं बरी वाईट चर्चा भारतांत अनेकदां झालेली असून, संघ कार्यक्षम व्हावा, त्याच्या हातून अखंड लोकसेवा व्हावी व तो लोकप्रिय व्हावा, इतकाच त्या चर्चेचा हेतु होता, हें वाचकांस कळून चुकलेंच आहे. संघाचें अस्तित्व नांवापुरतें नसून, आपल्या पराक्रमानें हिंदुसमाजाचें नांव राजकारणांत अजरामर करण्यासाठीं आहे, याची जाणीव संघचालकांत जीवंत रहावी, असें कोणास वाटणार नाहीं? असो. आजच्या अग्रलेखांत म्हटल्याप्रमाणें, झाल्या गेल्या गोष्टींचा खल न करण्यांत वेळ न दवडतां सर्वांनीं संघाची परिषद यशस्वी होण्यासाठीं तनमनधनानें खटपट करावी, अशी सर्व हिंदुबांधवांस आमहाची विनंति आहे.

वर्तमानसार

—यंदा सांखळी येथें श्रीदत्तजयंतीचा वार्षिक उत्सव तारीख २२ डिसेंबर शनिवार रोजीं साजरा होणार आहे.

—म्हापसें येथें वैश्य समाजाची प्रचंड सभा भरून 'वैश्य भुवन' नांवाची शिक्षण संस्था स्थापण्याचा ठराव पास झाला. गोमंतकांतील वैश्य समाजाची दिवसेंदिवस होत असलेली उन्नति पाहून 'भारताला' अंतःकरणपूर्वक समाधान वाटत आहे.

——सांगेवरील 'निनावीं' कंपू उघडकीस येण्याचीं चिन्हें दिसत आहेत.

——या बाजूनें इंफ्लुएंझाची सांथ पुन्हां डोकाऊं लागली आहे.

—मडगावांत प्लेगचे उंदीर अजून पडतच आहेत.

—दमण व दीव या प्रदेशांतील दौरा संपवून गव्हर्नर साहेबांची स्वारी गेल्या ३ तारखेला परत आली.

—आतांपर्यंत ५ 'फाइस्कें' प्रसिद्ध झालीं असून, खिस्ती समाजांत त्यानीं बरीच आग पाखडली आहे.

——वेंगुर्लें येथें 'किरात' नांवाचें नवीन साप्ताहिक प्रसिद्ध होत असून, त्यांत गोमांतकस्थ लोकांच्या हिताची कधींमधीं चर्चा होत असते.

—येथील नवीन जज्ज कोर्टांतील कामें झपाझप करीत असल्यानें, लोकांस संतोष होत आहे.

—प्रागतिक संघाच्या परिषदेप्रीत्यर्थ दोन हजार रु. निदान खर्च येईल असा अजमास आहे.

—यंदा महाशेल येथील श्री दुर्गादत्तमंदिरांतील श्रीदत्तजयंत्युत्सवासाठीं बेळगांवहून सुप्रसिद्ध कीर्तनकार व 'राष्ट्रधर्म' मासिकाचे संपादक-दे० ह० भ० प० रा. कृष्ण ऊर्फ अण्णा बुवा अर्जुनवाडकर हे येणार असून, शिवाय ह०भ०प० रामकृष्णबोवा महाभागवत यांचेंहि आगमन होणार आहे. उत्सवाच्या समाप्ति दिवशीं वर्षचालीच्या नित्यक्रमाप्रमाणें ह. भ. प. कामत, वे. शा. सं धूपकर, सौ० सीताबाई गोडबोले वगैरे वक्त्यांचीं व्याख्यानें होऊन उत्सव साजरा होणार आहे, असें तेथील व्यवस्थापक कळवितात.

Anno 8° N.° 37

Quinta-feira 13 de Dezembro de 923

ASSINATURA

Por cada ano tres rupias

ANUNCIOS

linha ainda que repetida uma tanga

Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR

G. P. Hegdo Dessay

Quepem-Goa

भारत

BHARAT

वर्ष ८ वें. अंक ३७

गुरुवार ता. १३ डिसेंबर सन १९२३

वर्गणीचे दर.

सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.

समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.

गो. पु हेगडे देसाई.

केपें—गोवा.

COMENTOS...

Hindus e catolicos

O Hinduismo nunca foi inimigo de religiao alguma: acatou e acata todas com uma magnanimidade sem outra igual na Historia.

Para a sua difusao, o Hinduismo andou sempre afastado da terrivel arma do CRE OU MORRES, arma de que usaram e abusaram AD MAJOREM DEI GLORIAM os ferrenhos e intolerantes sectarios deCristo cuja sacrossanta doutrina enlamearam e a cobriram de vergonha por um fanatismo brutal e satanico.

A INDIA PORTUGESA de Majorda', INESPUGNAVEL BALUARTE do catolicismo DI CA' deve conhecer naturalmente os sanguinolentos episodios da fatidica inquisiçao e mais COISAS e LOISAS da debochada vida fradesca que representam autentico desdoiro e eterna aberraçao do sentimento humano.

O Hinduismo viveu alheio a tudo isso e, apesar de perseguido A' OUTRANCE pela cobarde e infame espada do catolicismo intolerante e ferrenho VIVEU BEM, o que denota a sua indomavel resistencia, adquirida, certamente, pela excelencia de seus santos principios.

Esta unica circunstancia seria mais que suficiente para os sectarios de todas as demais religioes deste mundo e de SEU PAI curvarem a cerviz ante a magestade do Hinduismo.

Ou entao a logica e' uma CRIATURA que rendeu a sua alma ao demo inquisitorial...

Um relatorio

Recebemos e agradecemos um magnifiao exemplar do Relatorio sobre os melhoramentos agricolas dos campos comunais de Goa, remetido pela Direcçao dos Serviços Agricolas e Florestais deste Estado.

O referido relatorio que e' uma versao em portuguez do trabalho do sr. Rau Bhahadur G. K. Kelkar, tecnico agricola.

O livro contem muita materia util ao nosso agricultor; mas nao sabemos como ele sabera' tirar partido do que ha' de util no mesmo opusculo, visto a maioriados que se dedicam a' agricultura, deixar muito a desejar no conhecimento da lingua em que se acha escrito o relatorio.

O *BHARAT* combateu a acçao AGRICOLA do sr. Kelkar, chegando ate' a afirmar que, na pratica, o ilustre tecnico nao correspondeu a' expectativa geral.

Sem embargo, manifesta, porem, o seu entusiasmo pelo Relatorio, que na verdade, e' uma obra digna de apreço e apropriada para o elemento ilustrado poder dela tirar vantagens de grande valor.

Nativismo interesseiro

Entre nativos, ha' alguns tipos que sao dominados pela ambiçao da conquista de influencia nas regioes oficiais. Sao variados os manejos que tais tipos poe em pratica para se aproximar de qualquer cavalheiro, investido em alguma autoridade importante, sobretudo, quando esse cavalheiro seja europeu.

Hao de promover em sua honra mil festas; hao de dedicar-lhe nos seus jornais mil adjectivos *emocinantes*; hao de impingir-lhe a importancia de suas relaçoes; numa palavra, hao de exercer tais artes que o convengam de que nem uma folha de arvore deste Paiz se move sem a vontade deles...

Salvo raras excepçoes, o bom europeu a' cuja nobre, sincera e liberal raça devemos tanto se nao deixa fascinar por aquelas provas de falsa amizade, traduzida em manifestaçoes festivas de *alto la' com o chapeu.*

Pois, sim, senhores! Nem o engodo dos mais pitorescos *pic-nic* de Chandranata o atrai para quem os organisa...

E, louvado Deus, nao pega a moda, porque hoje em dia nao ha' entre europeus democraticos e PURO SANGUE ninguem que desconheça o maquiavelico SALAMISMO do nativismo interesseiro...

Jogatina.

Vai desenfreada numa BOTICA de Avedem. As autoridades administrativas nao saberao o que ai vai?

No's lho denunciamos, pois nao podemos tolerar sem protesto que se jogue a's barbas da regedoria da mesma aldeia.

Quem nao deve...

Quem nao deve, nao teme. O nosso director nada deve ao sr. Mariano Rebelo e portanto nao lhe recea a acintosa e impertinente perseguiçao que o sr. Administrador do Concelho lhe move

Decididamente, o sr. Mariano perdeu a bola e no auge do rancar vingativo que nos vota, nao sabe o que faz ou antes faz o que nao sabe.

Dizemos isto a proposito de mais um processo que, a' queixa *oficiosa* do sr. Rebelo, se acha instaurado contra o nosso director, la' porque este deixou de, no entender do mesmo jurisconsulto...*suposto*, cumprir certas formalidades, como proprietario da Empresa tipografica do *Bharat*.

A seu tempo, tera', porem, o simpatico amigo do *babismo* ocasiao de se arrepender da desastrada vingança com que, obcecado pelo odio injustificado, pretende *manibus pedibusque* molestar-nos...em vao.

Quem cança...

Quem cança, alcança. O sr. Mariano se continuar a *cançar* em exercer vingança contra no's, e' possivel que *alcance*, tarde ou cedo, o seu odiento e satanico fim de nos incomodar a *epiderme pecuniari*.

O que, porem, sua excia. nao ha' de lograr - e disto pode estar certo ja' - e' fazer nos trepidar a caneta. Isso nao.

E' que estamos habituados a sacrificar tudo pela defesa da Verdade e dos interesses do Paiz que estremecemos. Nao nos acusa a consciencia de termos feito uso, em nosso proveito, dalgum produto florestal, pertencente ao Estado, nem de termos maltratado jesuiticamente algum pobre diabo por causa de qualquer bufala vendida, nem tao pouco de termos recebido do Estado vencimentos por um trabalho imperfeito ou nao feito.

Mais ainda. Nunca albergamos no nosso coraçao sentimentos menos honestos, como odio, rancor, vingança etc., contra quem quere.

Quem semea...

Quem semea ventos, tempestades colhe. O sr. Mariano que tem semeado ventos de maldades, para, como infeliz administrador deste concelho, ser util ao *babismo* de seus visinhos e causar desgraça dos adversarios destes, nao ha' de tardar que colha tempestades das pragas dos ofendidos.

Creia, sr. Rebelo que Deus nao dorme e, se porventura, os que o protegem conseguirem, por graça da situaçao, acobertar-lhe as faltas, Ele, todavia, o julgara', como merece.

Pense, pois, no caso de aguieiros de Molcornem, na madeira com que se construem grades de Margao, na brincadeira de mau gosto da bufala vendida e, finalmente, na tendenciosa informaçao prestada ao governo na questao dos Velipos de Canvorem, alheando-a da verdade e do bom senso.

O *Bharat* nao trama na sombra; desconhece o sestro de maquinaçoes jesuiticas; nao acusa nem defende *pro domo sua*; nunca procurou amigar-se do Poder por egoismo nem ataca-lo para alardear serviços patrioticos.

No seu modesto viver, cheio de sacrificios, limita-se ele, sem grandes espalhafatos, a ser util a seus concidadaos, que o julgarao como merece.

Quem boa...

Quem boa cama fizer, nela se deitara'. O sr. Mariano Rebelo se fizer *boa cama*, nela se deitara' com tranquila alma. E' o que *oficiosamente* temos a dizer-lhe, por fim, epilogando estes comentos que o odio, disfarçado no cumprimento da lei, do sr. Administrador nos provocou.

Uma coisa e' saber jogar com mestria a *suposta* e outra coisa e' saber admninistrar um concelho.

Mas, se neste Paiz cada um ocupasse a posiçao que merecesse, nao teriamos a lamentar, certamente, tanto desvairo que vai por ai fora.

J. U. Counto'

Apraz-nos registar que este nosso talentoso correligionario hindu obteve a classificaçao de 20 valores no exame da cadeira de matematica, feito ha' pouco em Lisboa.

Nao nos admirou, mas apenas nos entusiasmou sobremaneira a honrosa classificaçao do sr. Counto", que corroborou mais uma vez, o conceito que o *BHARAT* formou dele. O sr. Counto honrou, pois, o seu nome e o da classe a que pertence, provando, exuberantemente, que o hindu e', tambem, *gente* e que, posto no *meio*, sabe brilhar pelo seu proprio valor, como qualquer estrela de primeira grandesa.

Que va' fazendo progressos na sua carreira, eis os nossos sinceros votos. Bravo, sr. Counto'!

De lucto...

Esta' de lucto *pesado* o *Bharat* pelo repentino passamento desta para melhor do seu velho e sexagenario confrade *O Ultramar* de Margao.

O finado que se primava pela sua arte do *salam tipicamente oriental,*

निवडणुकींत प्रागतिक संघानें न पडलेलेंच बरें. कसेंहि असो. निवडणुकींत भाग घेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं. परंतु, तारतम्य ओळखून कोणकोणत्या निवडणुकांत भाग घेणें रास्त आहे हें परिषदेंतच ठरविणें भाग आहे. याशिवाय आर्यवैद्यकावरील बंदी उठवून त्यास प्रोत्साहन देवविणें, विवाह नोंद प्रकरणा संबंधींचीं रेघिस्त कायद्यांतील कांहीं कलमें बदलविणें, ख्रिस्ती धर्मास व ख्रिस्ती धर्मशिक्षणास होत असलेली सरकारी मदत काढविणें; कायदे कौन्सिलांतील लोकनियुक्त प्रतिनिधींच्या जागांची लोकसंख्येप्रमाणें वांटणी करविणें, इ. विषय कांहीं कमी महत्वाचे नाहींत. त्यांचाहि विचारपूर्वक खल होण्यास परिषदेची जागा योग्य आहे. त्या जागेची योग्यता वाढविण्यास आम्हीं आमच्या आगमनानें व धनबुद्धिबलानें झटलें पाहिजे. आमच्या हातून निर्धारपूर्वक कळकळीचे प्रयत्न झाले व प्रांतिक आणि वरिष्ठ सरकारपर्यंत आमच्या गरजा मांडण्यांत आल्या तर स्वतंत्रता, समता व बंधुता या त्रयींवर उभारलेलें व आपण होऊन जमाखर्चाचे व अंतर्गत कारभाराचे अधिकार आमच्या हातीं देणारें पोर्तुगीज लोकसत्ताक सरकार आह्मांस नाखुष करणार नाहीं अशी आमची मनोदेवता साक्ष देते. मात्र सर्व हिंदूंनीं आपसांतील द्वेषभाव विसरून जाऊन, स्थानिक मतभेद बाजूस ठेवून, परिषदेच्या अधिवेशनास हजर राहावें व संघाला जोमदार बनवावें. एकवेळ संघाचें मंदीर ऐक्याच्या पायावर उभारलें गेलें आणि परस्पर सहानुभूतीच्या तत्वानें आकारण्यांत आलें तर पुढील कार्य नेटानें चालविण्यास सर्व शक्तिमान परमेश्वराचें अधिष्ठानहि त्याच मंदिरांत सांपडल्याशिवाय राहाणार नाहीं.

स्फुट विचार

प्रागतिक संघः—कवळें येथें होउं घातलेल्या यासंघाच्या परिषदेपुढें कोणकोणत्या महत्वाच्या विषयांची सांगोपांग चर्चा होणें इष्ट आहे, त्याचें दिग्दर्शन आजच्या अग्रलेखांत झालेंच आहे. त्याशिवाय आणखी कसल्याहि गोष्टींचा विचार होणें कोणालाहि अगत्याचें वाटत असल्यास, त्याला तसें करण्याविषयीं आमची शिफारस आहे. त्याच्या विचारांना भारतांत स्थळ मिळेल, हें अर्थांत् सांगण्याची गरज नाहीं. राष्ट्रहिताकडेच दृष्टीकोण वळविणें सांप्रतच्या आणीबाणीच्या प्रसंगीं सर्वत्रांचें पवित्र कर्तव्य असल्यानें स्थानिक किंवा इतर कसलेहि मतभेद उकरून काढणें सध्या भयंकर पाप होय. घर सुधरून वेळ मिळाल्यास पाहिजे तसले खेळ खेळण्यास सर्वत्रांस पूर्ण मुभा आहेच.

विचार करा !:—'तरुणांनों, पुढें या' या लेखाकडे आमची तरुण मंडळी आपली सत्रीय नजर वळवील, अशी आशा आहे. दारुबाजी व जुवेबाजी, या दोन बाजी प्रकारानीं समाज किती खालावला आहे, याचें नव्यानें वर्णन करण्याचें कारण नाहीं. मदिरेच्या गळ्यावर सुरा ठेवणें व फांस्यांना फांशी देणें हीं कामें तरुणांचीं असल्यानें भारतसेवकानें त्यांचा धांवा केलेला आहे. त्याला 'पावा' इतकें सांगितल्याशिवाय आमच्यानें राहावत नाहीं.

तरुणांनो, पुढें या !

आपला समाज आज शेंकडो वर्षें अवनतावस्थेंत आहे; हजारों अनिष्ट चालीरीति आमच्या समाजांत शिरलेल्या असून, त्या दिवसेंदिवस समाजाचें अंग पोखरून टाकीत आहेत; आणि त्यांतलेल्यांत दुर्दैवाची गोष्ट ही कीं, कित्येक व्यसनांचा प्रसार झपाट्यानें होऊं लागलेला आहे. समाजांतील व्यक्तीच्या शीलास व नीतिमत्तेस अशी ओहोटी लागलेली पाहून आपल्या देशासंबंधीं थोडीसी सुधां कळकळ असणाऱ्यास आमची स्थिति पुढें काय होणार याची चिंता वाटल्यास आश्चर्य कोणतें ?

वर्तमान जगाकडे जर आपण नजर फेरूं तर ज्यांची स्थिति गेल्या शतकांतहि अगदींच रानटी होती ते निग्रोलोक सुधां झपाट्यानें पुढें जात आहेत ! पण ज्याची स्थिति प्राचीन कालीं अत्यंत सुधारलेली होती, व जे ज्ञात जगाच्या गुरुस्थानीं विराजमान झालेले होते, ते आह्मी लोक कर्तव्यपराङमुख होऊन उलट दिवसेंदिवस अधोगतीच्या खोल खड्यांत जाऊन पडत आहोंत ! हें पाहून कित्येक व्यक्ति समाजाच्या उन्नतीप्रीत्यर्थ आपलें कर्तव्य करीत आहेत; परंतु हें काम रेंगाळत न चालतां जोरानें चाललें पाहिजे. तर आपण या अवनतावस्थेंतून वर येऊं.

समाजाची उन्नति होण्यास व्यक्तीची उन्नति झाली पाहिजे. अनेक व्यक्ति मिळूनच समाज होतो व राष्ट्रांत अनेक समाज अंतर्भूत झालेले असतात. या करतां राष्ट्राची उन्नति होण्यास व्यक्तीची उन्नति झाली पाहिजे. ह्मणून व्यक्तीची उन्नति जेणें करून होईल असे प्रयत्न आपण केले पाहिजेत.

कोणाहि व्यक्तीचें शील बिघडण्यास कारणीभूत असणाऱ्या गोष्टींपैकीं मुख्य गोष्ट ह्मणजे ती व्यक्ती व्यसनाधीन होणें ही होय. मनुष्य एकदां व्यसनीं झाला ह्मणजे तो आपला समाज, देश, धर्म कशाचीहि पर्वा करीत नाहीं ! तो स्वतः अधोगतीला जातोच व आपणा बरोबर आपल्या बांधवानांहि त्याच स्थितीला नेतो. मग राष्ट्राच्या उन्नतीची आशा करणें व्यर्थ आहे. या करतां समाजांतील अशा व्यक्ति कशा सुधारतील याचे मार्ग नियोजित करून त्या प्रमाणें इष्ट त्या सुधारणा घडवून आणण्याच्या प्रयत्नास आपण लागलें पाहिजे.

आपल्या समाजाची आजची स्थिति काय आहे, हें कोणाला सांगितलें पाहिजे असें नाहीं. अमेरिका व युरोप या सारख्या देशांतून ज्या दारूची हकालपट्टी करण्यांत आली, व येत आहे तिचा प्रसार तर आपल्या समाजांत फारच झपाट्यानें होत आहे. व या सळीरामी संप्रदायाचा प्रसार करण्याचें व्रत कित्येक पुढारी ह्मणविणाऱ्यानीं धारण केलेलें आहे. व ते लहान थोर, ब्राह्मण ब्राह्मणेतर इत्यादि प्रकारचा भेदभाव न ठेवतां, सर्वांनां या संप्रदायाची दीक्षा देऊन त्याचा प्रसार करण्यास झटत आहेत. तसेंच हें कार्य पूर्णपणें पार पाडावें किंवा यांतहि सोवळ्या ओंवळ्यांचा प्रश्न सोडविला जावा ह्मणून कीं काय कित्येक ब्राह्मणानीं भर रस्त्यावर दारू विकण्याचें बेधडकपणें सुरू केलेलें आहे. ही स्थिति अत्यंत शोचनीय नाहीं काय ? पढना और पढाना हेंच ज्या ब्राह्मणाचें व्रत किंबहुना हें व्रत हजारों वर्षें एकनिष्ठपणानें आचरून ज्या ब्राह्मणानीं आपला देश उच्च पदावर जाण्यास मदत केली, त्याचेच वंशज ह्मणविणाऱ्या ब्राह्मणानों, आपल्या पूर्वजांच्या स्वर्गस्थ आत्म्यांना, आपल्या वंशजाचें हें निंद्य आचरण पाहून काय वाटत असेल बरें ! समाज व देश याच्या कल्याणार्थ ज्यांनीं आपल्या देहाचें समर्पण करून हाडें सुद्धां दिलीं, त्या अत्यंत थोर पूर्वजांच्या वंशजानो, आपणांस ब्राह्मण या नावांची जर कांहीं चाड असेल तर हे प्रकार बंद पाडा! कदाचित् या प्रकारामुळें आपणास थोडा फार फायदा होत असेल किंवा आपला जीवनार्थ कलहाचा प्रश्न थोड्या फार प्रमानें सुटत असेल; परंतु ह्या कृत्यांनीं आपले शेंकडों किंबहुना हजारों बांधव या व्यसनाधीन होऊन आपल्या घरांदाराची राखरांगोळी करीत आहेत. व आपल्या बायका मुलांवर भिक्षांदेही करण्याचा प्रसंग आणीत आहेत. एका व्यक्तीच्या फायद्याकरतां शेकडों लोकांचें नुकसान करणें चांगलें आहे काय ? विचार करून पहा. तसेंच दारू पिण्याच्या व्यसनाचा प्रसार करणाऱ्या ब्राम्हणांनों, आपणांस परमेश्वरानें जो देह दिला आहे व जें बुद्धिश्रेष्ठत्व दिलें आहे तें गरीब लोकांचा सत्यनाश करण्याकरितां नसून, केवळ त्यांना सहाय करण्याकरतांच आहे. तें सोडून उलट त्यांचा सत्यनाश करणें ईश्वराला आवडण्यासारखें नाहीं. आपल्या या कृत्यानीं आज आपली चंगळ उडत असेल, आजचे आपले दिवस सुखांत जात असतील, किंबहुना आपल्या भोवतीं उदो उदो करणाऱ्याचें मंडळ जमलेलें असेल; परंतु हें लक्षांत ठेवा कीं, 'जसें पेरावें तसें उगवतें' आपणाला या कृत्यांचीं फळें भोगल्याशिवाय या संसारांतून जाण्यास मिळणार नाहीं. करतां "आतां तरी पुढें हाचि उपदेश" स्मरून ताळ्यावर या व या नीच कृत्यांपासून परावृत्त व्हा. आपल्या या अशा कृत्यांनीं गावांतील शेंकडो कुटुंबें धुळीस मिळालीं आहेत, त्यांच्या पोराबाळांना एक वेळचें जाडें भरडें अन्नहि मिळण्याची पंचाइत झालेली आहे; हजारो रु. उत्पन्न येतो असलेल्या कित्येक तरुणांना या व्यसनानीं कफल्लक केल्यामुळें बायका मुलांची खरी स्थिति नंतर डोळ्यांपुढें उभी राहून आज वेड लागलेलें आहे. ही स्थिति पाहून आपलें अंतःकरण कळवळत नाहीं काय ? आपला देश आज हजारों वर्षें अवनतावस्थेंत आहे त्याला पूर्व स्थितीवर पोंहचविण्याकरतांच आपणास या पुण्यभूमींत जन्म देऊन आपली कसोटी पहाण्याचा परमेश्वरानें विचार केला आहे. तें आपलें कर्तव्य सोडून अशा नरकांत निमग्न होऊन रहावें हें चांगलें काय ? मानव देहांत जन्म घेऊन पशूंच्या कृति करणें श्रेयस्कर आहे काय ? मानव जन्म हा महत्वाचा जन्म आहे. ज्या स्थानापासून आपण सुटलों त्या स्थानाला परत जाण्याचें एक मोठें थोरलें जंक्शन ह्मणजे मानव जन्म होय. ह्या जंक्शन वरून मागें न जातां पुढें जावें असाच ईश्वराचा उद्देश आहे. पण आपण मात्र अशा कृत्यांनीं पुढें न जातां अत्यंत मागें जाऊन ईश्वराच्या कोपास मात्र पात्र होऊं.

आपला समाज प्राचीन काळीं फार उच्चस्थानीं होता. हें त्या वेळच्या इकडे आलेल्या प्रवाशानीं लिहून ठेवलेल्या हकिकतीवरून आपणास कळून येतें. इ. स. पूर्वी २९२ व्या वर्षी मेग्यास्थानीस नांवाच्या एक ग्रीक राजदूत संम्राट चंद्रगुप्ताच्या दरबारीं आलेला होता. तो ह्मणतो:—"या देशांत चोरी पुष्कळ कमी आहे, लोकांत साधेपणा दिसून येतो व त्यामुळें ते सुखानें रहातात. त्यांच्या ठिकाणीं जो साधेपणा व जी सचोटी दिसून येते त्याचें मुख्य कारण ह्मणजे त्यांचे कोर्टांत जाणें फारच कमी असतें. हे लोक एकमेकांवर इतका विश्वास ठेवतात कीं, तो पाहून फार आश्चर्य वाटतें. आपलें घरदार व संपत्ति यांच्या रक्षणाकरतां त्यांना कायद्याची गरज लागत नाहीं, ते आपल्या वस्तु कडीकुलपांत ठेवीत नसतांहि त्या चोरीस जात नाहींत. लोकांत सदाचार व सचोटी या गुणाची फार प्रतिष्ठा आहे."

बांधवानों, आपल्या समाजाची एकेकाळीं स्थिति काय होती तें अवलोकन करा. त्या काळीं कोर्टांत कज्जेभांडत बसणें हें अत्यंत कमी प्रतीचें समजणारे लोक असल्यामुळेंच अलेक्झांडर सारख्या ग्रीक वीराचें बस्तान नीट जमलें नाहीं. ते आपले पूर्वज कोणीकडे व आज देमांदाचें विकत श्राद्ध घेऊन लोकाच्या घरदारावर वरवंटा फिरवून परत मध्यस्थीच्या रूपानें सभ्यपणानें लोकहिताचा आव घालणारे त्यांचे वंशज कोणीकडे ! ! या बद्दल खरोखर आपणाला लाज वाटली पाहिजे.

आपला समाज पूर्वीच्या उच्चपदावर नेण्याची तजवीज करणें हें आपलें पहिलें कर्तव्य होय. या करतां गोमांतकांतील सर्व तरुणानीं पुढें आलें पाहिजे. आपल्या समाजांत अनीतीचा धिंगाणा घालून सभ्य ह्मणून मिरविणारे बरेच लोक आहेत. अशा

Ano 8° N. 38

Quinta-feira 20 de Dezembro de 923

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
...da que repetida uma tanga
...o uma tanga

DIR...
G. P. Heg... ssay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ८ वें. अंक ३८

गुरुवार ता. २० डिसेंबर सन १९२३

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

COMENTOS...

Pontos nos i i ...

A India Portugueza, de Majorda' teima em insistir que o movimento religioso dos hindu's, determinado, de resto, por um sacerdote catolico e' uma prova de odio que eles votam a' classe crista, desde certo tempo.

E' descabida a insistente insistencia do colega, portanto e' do dominio pu'blico que os hindu's contam no ilustrado seio de cristaos inumeros e prestigiosos amigos, dedicando lhes uma ternura cordeal e respeito reverente, sentimentos que nem de longe se parecem com o tal odio, tao apregoado.

¿Quereria, por ventura, a *India* que os hindu's ofendidos guardassem de Conrado prudente silencio diante das impertinentes investidas do sr. Pe. Campos.

Mas o *Bharat* nao e' responsavel pela liberal e democratica feiçao que o modernismo assumiu, reduzindo a po', cinzas e nada o colossal edificio da temivel e temida inquisiçao e fazendo em caccos o *vitreo ornamento* da monarquia...indo-lusitana.

Sim; os hindu's nao podem ser acusados da culpa da extincçao de amaldiçoada inquisiçao de fogueiras e de malfadada monarquia de adiantamentos.

Quauto a' sua difiniçao do adverbio *essencialmente*, temos a frisar ao nosso catolico colega de Majorda' que nao resiste ao menor sopro de bom senso a sua sofistica argumentaçao *de diminuir*, porque seja pelo numero seja pela fe' religiosa, este trecho de Malabar nao pode ser considerado *essencialmente catolico*.

Contra factos nao ha' argumentos.

Deixemos, pois, em paz a religiao e de braços dados, tratemos de levantar o nosso pobre Paiz da derrocada financeira em que se esta' atormentando.

Olhe que ha' mais de 7 mezes que os funcionarios publicos estao sem vencimentos, por consequencia famintos, merecendo-lhes, porisso, a nossa atençao!

Pragatica Sanga

A uniao faz força. E precisamente para unir todos os hindu's deste Estado e' que se fundou o *Pragatica Sanga*.

Custe o que custar, ao *Sanga* impende, pois, o sacrossanto dever de conseguir a uniao para, com a força que ela lhe ha' de imprimir, pugnar pelo bem do Paiz, patrioticamente.

No Congresso de Queula' que esta' anunciado para os fins do corrente mez, esperamos que os dirigentes da classe hindu', envidarao os seus milhores esforços por atingir o referido ideal que e' o solido alicerce do suntuoso edificio do nosso progresso social, politico e moral.

Grave !

Ha' mais de sete mezes que, como noticiou o nosso presado colega do *Heraldo*, os funcionarios publicos nao recebem seus vencimentos. Nem o Banco Nacional que lhes minorava a sorte com a finesa de adiantamentos esta' disposto a favorece-los com o mesmo *beneficio* por algum tempo.

E', portanto, grave a situaçao economica daqueles que disperdiçaram a sua milhor seiva em prol de serviços publicos, situaçao que nos incomoda sobremaneira por que ela directamente, se relaciona com a fome que e' ma' conselheira...

Dos que nos governam, esperamos uma soluçao pronta e digna do desesperado problema de vencimentos que tao cruciantes tormentos estao causando ao Paiz.

Ao Congresso !

Constou-nos a' ultima hora que as sessoes do Congresso do PRAGATICA SANGA estao designadas para os dias 29, 30, e 31 do corrente.

O dever de todo o hindu que arda em anseo de ver levantado o seu Paiz e' de assistir ao referido Congrsso e de nele tomar parte activa, pondo de parte quaisquer ressentimentos pessoais que, por ventura, nutra pelo SANGA, por mal-entendidos cabidos ou descabidos.

E' que a hora nao e' para tanto, porquanto uma uniao completa dos hindus se impoe para a integridade do seu prestigio politico.

Temos de antepor o patriotismo a's demais questoes doutros *ismos*. A hora e' solene. Tenham todos bem presente isto e acudam pressurosos ao chamamento do Congresso do P. S. em Queula'

Ao Congresso, pois!

Saibam quantos...

O hindu nunca foi inimigo do cristao. O respeito que mutuamente se professam corrobora a nossa asserçao.

E' claro que na palavra *cristao* acima empregada ficam compreendidos todos os membros liberais e tolerantes da classe crista que aos outros que se celebrisaram e se celebrisam pelo fanatismo odiento e inveja diabolica, o hindu votou-lhes e vota uma ma' vontade que, se, hontem, se ocultava nos coraçoes oprimidos pela religiao chamada do Estado, manifesta-se, hoje, francamente sob a forma de *faiscas* dedicadas tao somente ao elemento catolico, ferrenho e intolerante.

¿ Que mal ha' nisso ao liberalismo catolico pelo qual o hindu professa sempre uma veneraçao a toda a prova?

Faisca

Comunicam—nos de Paugim que a proxima *FAISCA* so' se publicara' depois da realisaçao do Congresso do PRAGATICA SANGA cujas sessoes estao designadas para os dias 29, 30 e 31 do corrente.

Naturalmente, o sr. Crisnarao G. Kenim deve estar a preparar-se para assistir dignamente ao referido Congresso.

Chamando ao dever

Todo o hindu' que pense na felicidade desta terra tem o indiclinavel dever de cooperar, de todos os modos a seu alcance, o Congresso do *Pragatica Sanga*.

E' mister que se conglobe em volta do estandarte do *Sanga* todo o esforço hindu' para que esta associaçao se imponha a todos, pela sua força patriotica e politica.

Embainhemos, pois, a espada da diversidade de opinioes e metamos hombros a' obra do levantamento do Paiz, animados da melhor boa vontade.

X. R. Nadkarnim

Este nosso conterraneo hindu' concluiu com feliz exito o 2.° ano de direito na Universidade de Lisboa.

O *Bharat* que imenso se rejubila pelos loiros que o sr. Nadkarnim vai colhendo na sua carreira, honrando a classe a que pertence, felicita, cordealmente, o distincto estudante, almejando-lhe um futuro, cheio de felicidades.

Meditemos!

E' inadmissivel ou antes condenavel a rixa intestina, quando se trata de promover o bem patrio.

A Patria e' sagrada; e, quando Ela exige o nosso sacrificio, temos de dispensar-Lho, relegando ao secundario plano a politica de campanario, as rixas de visinhas comadres, o *dize tu direi eu* e as questoes de *lana caprina*.

Anima-nos, porisso, a esperança de que os hindus dedicarao o maximo de seus esforços a' boa realizaçao do C. P. S. associaçao nascida so' para felicitar esta terra.

¿O *P. Sanga* errou algumas vezes? Mas ¿quem nao erra?

Desculpemo-lo, pois, porque o *Sanga*, se por ventura errou, nao foi isto nunca por qualquer positividade.

E' que a todos os seus actos presidiu a mais pura intençao de benificiar a clase e a Patria.

Meditemos, portanto, nesta circunstancia de valor e movidos pelo mesmo ideal de trabalhar *pro Patria*, auxiliemos o seu Congresso de Queula'!

Mais um processo

Correu um boato e cujos rumores chegaram ate' no's- de que o sr. Mariano Rebelo pretende levantar mais um processo crime contra o *BHARAT*, por julgar-se ofendido com os sueltos que lhe dedicou para lhe punir o intento malevolo.

Nao nos intimidou o boato pelo simples motivo de termos medido bem o alcance do que pomos no papel em letra redonda.

O processo tem sido uma necessidade *vital* do *BHARAT*. Nao lhe causa portanto, nenhum assombro.

Enquanto forças tiver, sabera' defender se da perseguiçao que lhe for movida, mostrando a quatro ventos, que so' trabalhamos pelo Paiz e para o qual vivemos.

Saiba-o o sr. Administrador do Concelho e quantos procuram a seu modo desanimar-nos com boatos terroristas.

¿ O sr. Rebelo acha que o difamamos ?

Pois bem ! Saberemos provar o que a seu respeito acabamos de afirmar nas colunas do *BHARAT* que so' nelas insere o que e' a genuina expressao de verdade.

Saiba-o, duma vez para sempre !

Um apelo

O sr. dr. Antonio Joaquim Va's, digno delegado de Saude de Colem e' um medico que tem coragao generoso e compassivo, o que irrefragavelmente se comprova o seu apelo, publicado em parte a seguir:

प्रागतिक संघाची परिषद

अधिवेशन १ लें.

अध्यक्ष— विस्कौंद द पेडणें

चालू डिसेंबर महिन्याच्या अखेरीस फोंडें महालांतील श्रीसंस्थान कवळें येथें प्रागतिक संघाची पहिली परिषद भरविण्याचें निश्चित झालें असून श्री. रावराजे आत्माराम वासुदेव प्रभू देसाई देशप्रभू [विस्कौंद द पेडणें] यांनीं तिचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें कबूल केलें आहे हें कळविण्यास आम्हांस संतोष वाटतो.

परिषदेच्या नक्की तारखा अजून ठरावयाच्या आहेत व स्वागत कमिटीची रचना होत आहे. ती पुरी झाल्यानंतर आणि एकंदर व्यवस्था ठरल्यानंतर सर्व हिंदू बांधवांना, परिषदेपूर्वी निदान १० दिवस, रीतसर निमंत्रणें रवाना होतीलच.

पण त्यापूर्वी, प्रागतिक संघ व त्याचें कार्य यासंबंधानें विशेष माहिती सर्वांना देणें जरूरीचें वाटल्यानें ती या पत्रकाच्या द्वारें देण्याची परवानगी घेत आहों.

वास्तविक ही माहिती वेळोवेळ देण्यांत आलेलीच आहे. तथापि सर्वांनीं सर्व कांहीं वाचलें असेलच असें मानतां येत नसल्यानें आणखी एकदां खुलासा करणें वावगें होणार नाहीं.

प्रागतिक संघ ही संस्था गेल्या अडीच वर्षांमागें फोंडें येथें भरलेल्या सभेच्या ठरावानुसार स्थापन झाली असून सामान्यतः पोर्तुगीज हिंदुस्थानची व विशेषतः त्यांतील हिंदु समाजाची,सामाजिक, आर्थिक व प्राधान्येंकरून राजकीय उन्नति सनदशीर मार्गांनीं घडवून आणणें हें तिचें ध्येय आहे.

या ध्येयास अनुसरून संस्थेची झालेली उभारणी, तिची ठरविण्यांत आलेली घटना, तींत मागाहून झालेले फेरफार, इ० सर्व कांहीं वृत्तांत मागें सर्वत्र वांटण्यांत आलेल्या संघाच्या छापील पुस्तकांत दिलेलाच आहे.

तथापि वरील फेरफार होऊनही, त्याच पुस्तकांत सांगितल्याप्रमाणें, ही घटना केवळ तात्पुरत्या अमल बजावणीकरितां "स्थूल मानानें"च पसंत करण्यांत आली असून या तात्पुरत्या स्वरूपाला अजून कायमपणा आलेला नाहीं.

हा दोष दूर व्हावा व सर्वसंमत अशा कायम स्वरूपाची घटना तयार व्हावी म्हणून ता० १५–४–९२१ रोजीं मडगांव येथें भरलेल्या सभेंतील ७ व्या ठरावा अन्वयें सर्व लोकांच्या अभिप्रायार्थ ती घटना [वर निर्दिष्ट केलेल्या पुस्तकाच्या रूपानें] छापून वांटण्यांत आली व तींत आणखी फेरबदल सुचविण्याचा अधिकार सभासद होऊं इच्छिणाऱ्या सर्वांस देण्यांत आला.

या योजनेस अनुसरून समाजांतील अनेक बांधवांचे लेखी व तोंडी जे जे अभिप्राय आजवर आले, त्या सर्वांचा विचार करून कायम स्वरूपाची घटना सर्वानुमतें ठरवून संघाला कायमपणा आणणें आणि त्याचबरोबर हिंदुसमाजाचा विशेषें करून राजकीय क्षेत्रांतील कार्यक्रम निश्चित करून तदनुसार कार्याची दिशा आखणें हा प्रस्तुत परिषद भरविण्यांतील मुख्य उद्देश होय.

वास्तविक हा उद्देश यापूर्वींच अमलांत आणावयास पाहिजे होता. पण अनेक अंतर्बाह्य अडचणींमुळें आतांपर्यंत ती गोष्ट शक्य झाली नाहीं. हातीं घेतलेल्या कोणत्याही कार्यांत वेळोवेळ येणाऱ्या अडचणी कार्यकर्त्यांनांच योग्य प्रकारें कळून येतात. इतरांनां त्यांची यथार्थ कल्पना होणें बहुतेक अशक्य असतें.

शिवाय, सर्व समाजबांधवांचे अभिप्राय घेऊन तदनुसार संघाचें कायम स्वरूप विचारपूर्वक निश्चित व्हायाला कांहीं कालवधी जाऊं देणें अपरिहार्यच होतें.

तथापि एवढ्या अवधींत प्रागतिक संघ कांहीं स्वस्थ राहिला असें नाहीं. तात्पुरत्याच संघटनेनुसार, संस्थेनें प्रमुख मानलेल्या राजकीय क्षेत्रांत शक्य तसें काम करून आपलें अस्तित्व त्यानें सर्वांस जाणविलें आहे.

सनदशीर राजकीय चळवळीचा आत्मा म्हटला म्हणजे स्थानिक व सार्वत्रिक निवडणुकांत भाग घेणें हा होय. असा भाग घेऊन काम करण्याची संधि संघाला दोनतीनदां आली, व ती त्यानें साधून घेतलीही.

या चळवळींत संघाचें जें धोरण प्रगट झालें, त्याच्या संबंधानें संघावर बरेच आक्षेप आले; पण त्यांतल्यात्यात समाधानाची गोष्ट ही कीं, कार्याच्या दिशेसंबंधानें मतभेद झाला तरी त्याच्या हेतूंचा विपर्यास कोणीही केला नाहीं. अज्ञानाचा आरोप केव्हांही पत्करेल; पण असद्धेतूचा आरोप पत्करण्यासारखा नसतो.

या आक्षेपांपैकीं मुख्य आक्षेप हा कीं, संघ अजून सर्वांचा झालेला नसल्यामुळें सर्व हिंदुसमाजाच्या प्रतिनिधित्वानें कार्य करण्याचा त्यानें घेतलेला अधिकार वस्तुस्थितिदर्शक नव्हे.

असा आक्षेप केव्हांही झालें तरी असाधारणच; पण अधिकार घेतला असला तरी तो असद्धेतूनें घेतला असें कोणाच्यानेंही म्हणवणार नाहीं.

तथापि हा आक्षेपही पत्करायाला आम्हांकडून मुळींच हरकत नाहीं. मात्र आक्षेपकानां आमचें असें मागणें आहे कीं, हिंदुसमाजाचें जें प्रतिनिधित्व संघाला नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे तें स्वतः संघांत प्रविष्ट होऊन व इतरांना प्रविष्ट करून संघाला त्यांनीं मिळवून द्यावें.

या बाबतींत कदाचित् धोरणासंबंधीं मतभेद व्हायला जागा असेल तर त्यावर आमचें असें मागणें आहे कीं, जें धोरण आम्हीं आंखलेलें आहे, तेंही जर बहुमताविरुद्ध असल्यास बदलायला आम्हीं अवश्यमेव तयार आहों. मात्र नवीन धोरण ज्यांच्या तंत्रानें ठरेल त्यांनीं त्या धोरणानुसार स्वतः काम करायाला व आम्हांकडून करून घ्यावयाला पुढें यावें.

आणि याच्याही पुढें जाऊन आम्ही असेंही सांगून ठेवतों कीं, संघाची कायमची घटना ज्या अर्थीं ठरावयाचीच आहे, त्या अर्थीं केवळ आजपर्यंत झालेल्या सभासदांसच नव्हे तर कोणाही हिंदूंना, स्वागत कमिटीचे अगर खुद्द परिषदेचे सभासद या नात्यानें परिषदेंत भाग घेऊं द्यायला आमची मुळींच हरकत नाहीं. एवढेंच नव्हे तर सर्वांनींच तींत भाग घ्यावा अशी आमची मनापासूनची इच्छा आहे. मात्र तसा भाग घेतल्यानंतर सर्वानुमतें अगर बहुमतानें परिषदेंत जें कांहीं ठरेल, तें मान्य करून तदनुसार संघाचे सभासद व्हावयाला त्यांची एव्हांपासून तयारी असली पाहिजे.

एवढा खुलासा झाल्यानंतर मतभेदाला कांहीं जागा राहूं नये असें वाटतें. तशी ती राहणार नाहीं आणि जिच्या अभावीं आमचें पावलो पावलीं नडतें, जिच्या अभावीं आमचें सामाजिक महत्व नष्टप्राय झालें आहे, ती सर्व हिंदूंची संघटित शक्ती परिषदेंतून निर्माण होण्याच्या कामीं सर्वांकडून आम्हांला मदत होईल अशी आम्ही आशा करितों.

नवीन गोवें ता. ६–१२–१९२३

प्रागतिक संघातर्फे
आत्माराम गोविंद बोरकर 'उपाध्यक्ष

हें पत्रक प्रसिद्ध झाल्यानंतर परिषदेच्या तारखा ठरल्या व स्वागत कमिटीची रचनाहि पुरी झाली, हें निमंत्रण पत्रिकेवरून वाचकांस कळून आलेंच असेल. . सं. भारत

स्फुट विचार

प्रागतिक संघः—प्रागतिक संघ परिषदेची तयारी जारीनें चालली असून, तिचें प्रथम अधिवेशन थाटानें पार पडेल, असा रंग दिसतो. हरेक कारणानें माजलेल्या बेकीचा धुव्वा उडवून, हिंदुसमाजांत ऐक्यसंवर्धन करण्यास प्रागतिक संघाची परिषद कारणीभूत होईल, अशी आमची मनोदेवता आम्हांस साक्ष पटवीत आहे सध्या आम्हांला हरतऱ्हेच्या व भयंकर शत्रूंनीं गराडा दिलेला असून, आपली इभ्रत संरक्षण करण्यासाठीं हिंदुसमाजानें आटोकाट प्रयत्न केले पाहिजेत. या प्रयत्नांची दिशा ठरविण्यास सदरील परिषदेपेक्षां दुसरा एखादा जास्त उपयुक्त मार्ग सांपडेल, अशी आशा करणें निवळ वेडेपणाचें होईल. अर्थात् सर्व देशहितचिंतक हिंदूंनीं परिषदेस हजर राहिलेंच पाहिजे, हें आणखी निराळें सांगण्याचें कारण नाहीं

"धोक्याची सूचना":—'काइस्कांची' चळवळ हिंदूंनीं अशीच पुढें चालू ठेविली तर हिंदूनां खिस्ती वकिलांच्या वकिली सहाय्यास कायमचें मुकावें लागेल, अशी कित्येकांस भीति पडलेली आहे. आमच्यामतें ही भीति निरर्थक आहे; कां कीं सुदैवानें वरील धंदेवाल्यांनीं हिंदूंची वकिली करण्याचें सोडून दिल्यास, एकतर हिंदूनां 'देमांद' सोडून द्यावा लागेल, नाहींतर हिंदू वकिलांना आपलें वकिली सामर्थ्य तरी वाढवावें लागेल. दोन्हीहि गोष्टी हिंदूंच्या हिताच्याच असल्यानें खिस्ती वकिलांनीं हिंदूंची वकिली सोडावी, असीच आमची इच्छा आहे. परंतु अशी परिस्थिति प्राप्त होण्यासारखें हिंदूंचें दैव खास उघडलेलें नाहीं ! कित्येकांकडून देण्यांत येत असलेली वकिली सोडण्याची "धोक्याची सूचना" अर्थात् तितका धोका आणण्याच्या लायकीची नाहीं, हें उघड आहे.

वर्तमानसार

—ता. २०-२१-व २२ डिसेंबर रोजीं कुंकळी येथें कातिकौशल्य, मृच्छकटिक व डाव जिंकला हे प्रयोग करण्यांत येतील, असें एक वाचक कळवितात.

—डॉ. लवंदे यांनीं काणकोण येथील आपल्या हुद्याचा चार्ज घेतला.

—गेल्याच्या मागील आठवड्यांत लिस्बन शहरांत दंगेधोपे झाल्याची वर्दता आहे.

—गव्हर्नर साहेबांची स्वारी लवकरच निजधामास जाणार असल्याची वातमी आहे.

—भारतावर आणखी एक नवीन खटला भरण्यांत येणार असल्याची वोलवा आहे.

—येत्या मार्च महिन्यापासून म्हणजे नवीन वर्षापासून भारत नवीन स्वरूपांत प्रसिद्ध होईल.

जुगारी !

[जुगाऱ्याचें आयुष्य चित्र]

(ले०—"गडकरी चेला.")

"जुगार म्हटला म्हणजे, त्याच्या जोडीस मद्यपानाचें व्यसन मागोमाग तयार असतें. हिंदुलोकांत मद्यपानाचें व्यसन वाढविण्यास जुगारानें जितकी मदत केली आहे तितकी दुसऱ्या कोणी केली नसेल."

भारत.

हं मला जुगार म्हणून का! मी पैशाला भीत नाहीं! पैसा म्हणजे काय गोष्ट आहे! अहा!- लोकांना मी थोडाच भीक घालीत आहें! तुमची तरी मनें कां मोडा? मंडळी; मी तुमच्या आग्रहास्तव एक रुपया लावतों? तोर एक रुपया. वाः! आले पांच रुपये! अच्छा! कुबेर संपत्ति आपल्या घरांत ओढून आणण्याचें "जुगार" हें एक भलें साधन आहे! वाः लाखाची गोष्ट! आले ५० रुपये. तोप! तोप!! अरे अरे सर्व गेले! छे. हें हो काय? मी कुठें वाईट मानून घेतों! जगाचा न्यायच तसा! आले तसे गेले! अंः. काय म्हणतांत? माझा धीर खचला. ही आंगठी १५ रुपये? अरेच्या? तिही गेली! वस. पुरे हा सर्व नाशक भयंकर जुगार!

× * ×

रावसाहेब, हें षष्ठीपूजन आहे! आंगठीचें काय? अहो गेली तशी येईलही! हा आमचा आनंदाचा दिवस! आमच्या आवडीला मुलगा झाला आहे, म्हणून तर ही गंमत! नाहींतर कुणाला पाहिजे जुगार! तुमचें मन अस्वस्थ झालें वाटतें! हरकत नाहीं! ह्या तुमच्या दुखण्यावर मी दिव्य औषधी— स्वर्गीची अमृतवल्ली देतों! रम्या, दे बाबाना भरून. घ्या! विसरलेल्या मनांला हुशारीही येईल? आणि ही तर सही! अवश्य घ्यावीच. मी तरी कुठें घेत असतों? छे बाबा इतका आग्रह केला तरी कांहीं नाहीं, उलथ्या घागरीवर पाणी! तुम्ही बडी मंडळी! यथा राजा तथा प्रजा. गोरे लोकांची ओळख, त्याच्यांतच मानमान्यता मिळण्यासाठीं आपणांला तर ही अवश्य घेतलीच पाहिजे! परवां तर तुम्हांला साकीस्तावांच्या कांजराला आमंत्रण आहेना! तिथें काय कराल? अं! आमची मान खालीं घालायाला लावाल तुम्हीं अशानें! अगदींच हिंदु. कसे वळणावर आलां! घ्या ही. रम्या आणखी ओत थोडी दे ती बाटली इकडे! अर्धी खलास झाली! होऊं दे. लावतोंच तोंडाला!

* * *

करा पुन्हां डाव सुरू. अंः काय पर्वा आहे पैशाची! माझें घड्याळ, हा सोन्याचा छेडा. चल डाव! तोप—तोप! गेलं? आणखी कांहीं नाहीं माझ्याजवळ! छेडाही गेला! वाव, तुमच्या सटीला आम्ही मजा केली, आमच्याकडेही तुम्ही अशीच मजा करायाची अं! लक्ष्यांत ठेवा. चढली केला! एःSSS तळीरामSSS

* * *

मेल्यासारखी ओरड काय करतोस? जिवंत आहे मी. दे तो इकडे कंठा! आज रावसाहेबानीं मला मुद्दाम आमंत्रण केलं आहे! मी नाहीं गेलों, तर ते रागावतील ना! आपल्या घराण्याच्या लौकिकाप्रमाणें चालायला पाहिजे! बघ उद्यां! तुला अशी सोन्यानें मढवून टाकतों कीं यंव! पोरं,—मरूं दे तीं! हरकत नाहीं! तुला काय गाढविला? पहा उद्यां बोलावतों सोनाराला अंSSचल जाव रड? विहीर पाहिजे तर जवळ आहे. कंठा तर मिळालाच? जातों आतां!

* * *

हं आलों, आमचें लाल औषध तयार आहे ना? छान, छान? बोला ५०० रुपयांचा कंठा कोण घेतो. तुम्हालाच योग्य, आहे हा. काय म्हणतां २०० रुपये किंमत याची. अहो मी खोटें कशाला बोलूं? ५०० रुपयांचा कंठा आहे. अरेच्या त्यांनी तर डाव सुरू केला. बरं द्या २०० रुपये. काय? तुमच्या जवळ १५० रुपये आहेत. ज्यास्ती नाहींत? आणखी ५० रुपये पाहिजेत. पहा बोवा. ओः इकडे दुसरा डाव सुरू झाला द्या लवकर इकडे १५० रुपये ...... तूद तोप. गेले, डाव हरला.. अरे, अरे, अरे,. देवा, अरे, थोडी दारू लाव आणखी- एकच तळीराम. दे आणखी एकच प्याला. तूद प्लेव जुगार? तळीराम?

* * *

मी तुमचे पैसे उद्यांला बाकी ठेवीत नाहीं. उद्यां तुम्ही आपला चुकता हिशोब करून घेऊन चला. तोंड वांकडें करूं नका. ही कांही नित्यासारखी थाप नाहीं. तुम्ही या, आपली रकम मोजून न्या. याहो खचीत. काय म्हणतोस दुकानदार आला. बाळ सदु, बाबा घरीं नाहींत म्हणून सांग. चल धर त्यानां थोपवून दारांत, नाहींतर आंत येतील शंखध्वनी करून. कोण देतो यांना पैसे. रड लेका असाच. मी तुझ्या बारशास जेवलों आहें. हे आलेच आतां. आतां पळून जावें मागील दारांतून? धर म्हणावें आतां त्याला.

× + +

हा आणखी गाढव आज कुठें होता! सकाळीं कुणाचें तोंड पाहिलें कोण जाणें. राम राम कसें काय? ठीक. काय म्हणतां मलाच शोधायाला आलांत. तुमचा तो दागिना कुणी मागून घेतला आहे. काय? आत्तांच पाहिजे. उद्यां पाठवून देईन, अगदीं तुमच्या गळ्याची शपथ. तरी आत्तांच पाहिजे? नाहीं देत. चल जा. मी विकून खाल्ला, काय म्हणणें आहे तुमचें ? खुशाल जा चावडीवर. माझ्या हातांत जमल्यावर देईन. रहाणार कीं काय? जा तुझ्यानें होईल तें कर? कसा जातोय पहां पोंवलत.

+ + +

डाव अंगावर आला हरकत नाहीं ! मी खरा जुगारी आहें ! अंतरूज महालांतला प्रसिद्ध खेळगडी पेगू, ह्याना मी चेला आहें ! काय लागून गेली आहे तुमची! राहतें घर तोर ! गेलं हरकत नाहीं. ! थाल्या, तांप, वगैरे सर्व भांडीं घरदाग सकट तूद् तोर ! गेलं, जाऊं दे ! तळिराम दे ती बाटली इकडे !

+ × +

तुम्हीं आमचे नातेवाईक ! माझ्या मामीचे पुतणे ! अगदीं सखे ! मी आलों होतों एका कामाला ! उद्यां जाणार जत्रेला ! तिथें आमची बडी बडी सोयरी मंडळी येणार ! तेव्हां म्हटलं आपणच कां, उघडे जा ? आंगठी जरा पाहिजे होती ! खचीत परवां येईन ! आपले मजवर फार उपकार झाले ! मर लेका. दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये !

× × ×

मी ना, जातों झाडदोळला ! जत्रा आहे मोठी ! बरं यंदा तिथें जुगाराची वगैरे फार चंगळ उडेल नाहीं ? तो देवळा जगतचा गुत्ता आहे तर ! बरं जा तुम्ही ! बोलतां बोलतां पोंचलोंच ! एः रंभाजी ! मी कमचा शेट ! आहे आपला ! बरं तसं हाण ! काय म्हणतां ? आपल्याला ही आंगठी मानवली ? तुला आवडली भाग्य उघडलं आमचं ! घे ही तुला ! हें पहा अशानें मला राग येतो ! आंगठीचं काय ? मला उद्यां करून घेतां येईल ! छेः बुवा, तुला उगाच संकोच वाटतो ! मीच घालतों तुझ्या बोटाला ! हें पहा तुझा दिल खूष असला, म्हणजे मग आमचें त्यांत समाधान!

* * *

सर्व कांहीं गेलें ! कफल्लक झालों ! कुच फिकीर नाहीं ! उठूं आपण. एः रंभा दार उघड ! नाहीं उघडत ! दे माझी आंगठी ! धिःकार असो मला ! तुम्ही रांडा अशाच असायच्या ! जिथं पैसा, तिथं तुमचं प्रेम, आणि सर्व कांहीं ! जावें कुठें ! द्यावी. झुकांडी इकडे !

+ * +

तुम्हांला काय करायचें माझ्या जाण्याशीं ! फारच फाजील तुम्ही ! मी गेलों होतों मू मू मू मू मण्णांत !

—ना. व्यंकटेश सरदेसाई, डॉ. आत्माराम गो. बोरकर, विद्वद्वर्य शांबाराव सरदेसाई, आर्यवैद्य मोरजकर, देशहितचिंतक हिरवा सांवर्डेकर व शिवा फडू आंग्ले, प्रो. गजानन सांवर्डेकर व इतर अनेक देशबांधव प्रागतिक परिषदेच्या चळवळीसाठीं ठिकठिकाणीं दौरा करीत आहेत.

Ano 8.° N. 39

Quinta-fei[ra] [27 de D]ezembro de 923

P[REÇO DA ASSIN]ATURA [...] tres rupias

[ANUNC]IOS

Por cada li[nha] e repetida uma tanga

N[...] o uma tanga

[PROPRIETARIO] E EDITOR

G. [...] ndo Dessay

Quepem-Goa

BHARAT

वर्ष ८ वें, अंक ३९

गुरुवार ता. २७ डिसेंबर सन १९२३

वर्गणीचे दर.

सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.

समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.

गो. पु. हेगडे देसाई.

केपें—गोवा.

Ingenuidades . . .

No artigo "Controversias" publica do no *Bharat* de 6 de Dezembro, o seu ilustre autor, que modestamente se oculta atras da letra *V.*, indica ao padre Campos e Cia. o leal caminho seguido por dr. Andrews numa contro versia religiosa que teve lugar nas co lunas da "Modern Review" entre a quele eminente professor e M. Ghosh.

O V. que pelos modos parece um ingenuo, esquece-se, porem, que Goa nao e' patria de Tagore nem o padre Campos o rev. director do *Vishwa Bharati*.

Nao sao as pole'micas religiosas que preocupam as cabeças pensantes de alem—fronteira. Sao questoes doutra ordem que fazem giro na imprensa e sao doutro estofo os homens que as versam.

Para Bsptista por exemplo, e' indiferente que os irmaos Alis sejam maometanos e hindu's Pandit Neharu' e Dass. Comungam o mesmo ideal tem a mesma fe' nos destinos do seu paiz; e tanto basta para que esteja de perfeita harmonia esse mosaico de algumas religioes.

Pore'm, *nesta terra de S. Francisco, essencialmente catolica, onde o livre pensamento nao medra*, o fanatismo dum padre nao tolera outra religiao que nao seja a que pregou o filho de Maria! Fossem outros tempos o padre Campos, se nao chamasse os fieis a' matança, ao menos conquistaria o lugar de Pedro, o Eremita, pregando uma nova cruzada contra os hindu's e a sua religiao.

Um ja' ganhou esporas de oiro com a sua campanha contra o livre persamento, e nao tardara' quem ofereça a esse novo cirineu ... uma *cabeça de burro* para dele se nao dizer *prius dementat*.

Nao notou o V. como cerraram as fileiras para, por paus e por pedras provar que e' a *unica verdadeira*?

"E' milagre tornar-se o mundo (todo?) cristao; e como milagres so' Deus os faz, existe o Deus do Cristianismo." Depois de tanto jogo malabarico e tanta acrobatica silogistica, a conclusao a que chegaram e' esta, deduzida da existencia do Cristianismo, como se igual nao pudesse tirar do Brahamanismo, Budismo ou Mahometanismo cuja existencia tambem nao ha ninguem que possa por em duvida.

Diz-se que o goez "nao cre sem ver e o hindu, olhando tudo atraves da luz da razao e procurando uma crença raciocinada na religiao desparata, indo crer nos deuses da sua imaginaçao porque nao chega a conhecer o verdadeiro."

Esquecem, porem, os catolicos *di ca'* que os seus avoengos foram goeses e hindus tambem.

Teriam eles abraçado o catolicismo *porque viram?* Nao consta que a segunda pessoa se tivesse separado mais da Trindade, depois que morreu uma vez na cruz, apesar de a propria religiao chamada *revelada* demandar a sua presença com mais insistencia do que *quando se fez homem para a corrigir e remir a culpa original* de que nao poude esquivar-se, sendo alias um ser absolutamente perfeito. A propria lenda de Ourique—alias reduzida a's suas justas proporçoes pelo grande historiador portugues—nao lhes pode valer nos apuros, em razao do espaço e tempo que medeiam entre esta e o facto de conversao dos goeses sob o regime do terror que seguiu a' conquista.

"Te-lo-iam feito por *disparate*? Que o digam os que agora, sendo goeses *nao veem e c eem*.

Querem que a gente va' aprender a vida de Jesus so' nos livros da grei que pelos modos parece passou a declaraçao de *aos costumes disse nada*!

Explorador russo, Renan? Alto la' que sao inimigos da igreja, conquanto pensadores profundos e sabios de renome.

Cristo que *conheceu todas as fraquezas humanas* nao previu com certeza a fraqueza a que podia conduzir o sectarismo dos seus adoradores. Porque, se tal soubesse diria: "bemaventurados os fana'ticos"...assim como disse "bem aventurados os pobres do espirito etc.

Fique pois sabendo o "V." que nao ha de ser o exemplo da nobre atitude do Rev. Andrews que demovera' quem decididamente porfia ... em puxar a sardinha para sua brasa.

Para Andrews e' futil e esteril a questao em que se descute a superioridade desta ou daquela moral religiosa. Espirito culto e desempoeirado do sectarismo acanhado, A n d r e w s compreende o verdadeiro sinificado do "ama o pro'ximo" e, alem disso, sabe que "quem tem telhado de vidro nao atira pedras ao do visinho". Foi por isso que escreveu aquela carta que bem traduz "nao faças a outrem o que nao queres que te façam a ti".

Mas se o *V.* espera da parte dos que "provocaram a controversia a dentro do pais" procedimento analo'go eu lhe digo: moita! O que pode esperar, sem receio de errar, e' mais um arrazoado talvez sobre a origem ... de Jesus e o qualificativo de "joven turco", aposto a' letra com que figurou o artigo.

Ora, .um inge'nuo.

V. Senior

Ecos & Critica

Dr. Antonio de Noronha

O "Bharat" manifestou, mais duma vez, a sua sincera opiniao sobre este formoso talento de primeira grandeza que fulgura no ceu literario e juridico do Paiz, honrando-o sobremaneira.

E devido a' sua superior inteligencia e poderosas faculdades de trabalho que Sua Ex.cia chegou a alcançar o honroso cargo que ocupa na magistratura.

E' o primeiro indio que pela sua inconcussa probidade e imaculada nobresa de caracter enobrece as elevadas funcçoes de Presidente da Relaçao de Nova-Goa. Tem, porisso, incontestavel direito a' homenagem que o Paiz ha' dias lhe rendeu, homenagem com a qual o "Bharat" se associa, fazendo votos pelas crescentes prosperidades de quem levantou bem alto o nome da India, tanto aqui como em Portugal.

O nosso julgamento

No dia 24 do corrente realisou-se no tribunal desta comarca o julgamento do "Bharat," arrastado ao banco dos reus por causa do seu artigo "Inexplicavel," ja' conhecido dos nossos leitores.

Presidiu a' audiencia o integro Juiz sr. dr. A. A. de Brito e Nascimento, sendo a acusaçao representada pelo ilustre Delegado sr. dr. Vasco Camelier. O defensor do re'u era o distincto causidico sr. dr. Lourenço Caitano Monteiro, ornamento do foro indiano.

Cumpridas as formalidades de estilo, deu-se começo ao julgamento com o interrogatorio do re'u que limitou-se a dizer que nao teve nenhum intuito de ofender quem quere com as consideraçoes que bordou no artigo incriminado.

Terminado o interrogatorio, foram inquiridas duas testimunhas de acusaçao, as quais depuzeram sobre a publicaçao e circulaçao do "Bharat" e da sua ediçao que contem o artigo incriminado.

Depois do que o sr. dr. Juiz deu palavra ao digno Agente do M. P., visto o patrono da defesa ter-se renunciado ao inquerito de suas testimunhas.

No seu brilhante discurso acusatorio, o sr. dr. Delegado analisou, largamente, o artigo incriminado, começando por afirmar que nao era ele hostil a' imprensa colonial cuja esfera de acçao, disse, deve, antes de mais e principalmente, circunscrever-se a' ventilaçao de diversos problemas administrativos por forma a que o governo possa orientar bem a sua acçao. Prosseguindo, acentuou que o artigo incriminado encerrava conceitos ofensivos da honra e dignidade da magistratura colonial, sobretudo, desprimorosos ao seu ex-colega da comarca de Salcete. O sr. dr. Delegado deteve-se mais na analise das palavras do artigo incriminado ARMADILHA E FARRAPOS DA LEI DE IMRPENSA, usando de argumentos tendentes a' corraboraçao da materia acusada e concluiu a acusaçao, pedindo condenaçao do re'u.

Apraz-nos registar nesta altura e com verdadeiro desvanecimento que a acusaçao foi dirigida com uma seriedade e correcçao exemplares que muito honram o sr. dr. Camelier.

Foi, em seguida, dada palavra ao sr. advogado de defesa, sr. dr. Lourenço Caitano Monteiro.

E' escusado dizer que o discurso proferido pelo notavel procurador da defesa esteve, sob todos os pontos de vista, a' altura de seus creditos e de justa fama que, sem favor, disfruta no nosso meio, de ser primeiro orador forense.

Defendendo o nosso director, o sr. dr. Monteiro principiou por afirmar que nao podia manter-se a acusaçao que, frisou, nao so' era vaga por nao terem sido especificadas por ela as palavras ofensivas do artigo incriminado mas tambem porque tinha deixado de no decurso do processo, observar-se a formalidade indispensavel de tomar ao arguido a declaraçao sobre se ele teve ou nao intuito de, com o artigo incriminado, ofender alguem. Continuando, bordou varias consideraçoes sobre a materia da acusaçao, demonstrando como esta nao podia substentar-se e como nao eram ofensivas a ninguem as palavras ARMADILHA E FARRAPOS DA LEI DE IMPRENSA, tendo sido

विचार लहरी

लहर–पांचवी.

कवि सम्राट रवींद्रनाथ टागोर, आपल्या आवरण या निबंधांत ह्मणतातः- “आमचा असा समज झालेला आहे कीं, सभ्य समाजामध्यें कपड्यालत्त्यांची व बूट स्टाकिंगची अत्यंत आवश्यकता असल्यावरूनच, त्याची सृष्टि बनलेली आहे. परंतु ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, या कृत्रिम उपकरणांना आपले स्वामी बनवून, स्वतःला संकुचित करून घेणें चांगलें नाहीं. या अव्यापारेषु व्यापारानें केव्हांच फायदा होणार नाहीं. कारण, भारत वर्षाचें हवामान इतकें उत्तम आहे कीं, या उपकरणांच्या आधीन होऊन राहाण्याची जरूरी नाहीं. पूर्वीही आपण त्यांचे दास नव्हतों. कामाच्या वेळींच त्यांचा उपयोग करून इतर वेळीं त्यांना विश्रांति देत होतों. आम्हांला पूर्णपणें माहिती होती कीं, कपडेलत्ते ह्या नैमित्तिक वस्तु आहेत. याशिवाय त्यांना विशेष महत्व नाहीं. जरूरीच्या वेळींच शीतोष्णापासून रक्षण करण्यापुरतेंच त्या वस्तूंचें आमच्यावर स्वामित्व होतें. यामुळेंच आमचें आंग उघडें ठेवण्यांत आम्ही लाज मानीत नव्हतों व दुसऱ्याचें उघडें पाहूनही लज्जित होत नव्हतों.”

\+ + +

“मनुष्याच्या पायाचे तळवे ईश्वरानें असे बनविलेले आहेत कीं, पृथ्वीवर उभे राहून चालण्याची व्यवस्था यासारखी दुसरी होणेंच शक्य नाहीं. परंतु ज्या वेळीं आपण पायतणासारख्या कृत्रिम उपकरणांनीं पायांची पूजा करूं लागलों, त्या दिवसांपासून पायांचें जें मुख्य कार्य तें मातीमोल झालें. ज्या गरजेकरितां ते बनविण्यांत आले, तिचा लोकांना विसर पडत चालला. आजपर्यंत पाय आमच्या देहाचा भार सांभाळीत असत; परंतु आतां पायांचा भार आह्मांला सांभाळणें भाग आहे. कारण, जर आम्ही अनवाणी चालूं लागलों, तर ते आमचें सहाय्यक न होतां उलट त्रासाचे साधन होऊन बसतात, व जरासें पाणी वगैरे लागल्यास थंडी होण्याचें भय असतें, म्हणून बूट स्टाकिंग यांनीं त्यांची पूजा करणें भाग आहे.”

× × ×

“प्राचीन काळाकडे जर नजर फेकूं तर आपणास असें दिसून येईल कीं, कपड्यांना एकाद्या आंधळ्याच्या मुठीप्रमाणें घट्ट धरून ठेवण्याची गरज आमच्या या गरम देशामध्यें नव्हती. एक तर आपण कपड्यांचा उपयोग अगदींच थोडा करीत होतों. लहानपणापासून आमचीं मुलें कपड्या–जुत्याशिवाय नग्न शरिरानेंच या नग्न जगाचा संयोग संकोच न धरतां करीत असत. परंतु आज आपण इंग्रजांचें अनुकरण केल्यापासून मुलांना सुद्धां पाहून लज्जित होण्याचें आरंभिलेलें आहे. विलायतेस जाऊन आलेल्यांचीच ही स्थिति आहे असें नाहीं तर इकडे शहरांत राहाणाऱ्यांची सुद्धां तीच गत आहे.

* * *

डॉ. रवींद्रनाथ म्हणतात तें खरें आहे. मनुष्य प्राणी हा अनुकरणप्रिय असल्याकारणानें आपल्याहून जे श्रेष्ठ आहेत त्यांचें अनुकरण कनिष्ठांकडून होत असतें. यांत शंका नाहीं. परंतु कोणत्याहि गोष्टीचें अनुकरण करतांना त्याबद्दल पूर्ण विचार केल्यावरच तें केलें पाहिजे. नाहींतर नाकापेक्षां मोतीं जड होण्याचा फार संभव असतो.

* * *

हिंदुस्थानची स्वतंत्रता जाऊन त्यावर परकी यांचा अमल सुरू झाला; अर्थांतच आपल्या लोकांना कनिष्ठत्व प्राप्त झालें. मोंगल लोकांचें इकडेच स्थायिकत्व झाल्यामुळें, त्यांना हिंदुस्थान हा स्वदेश वाटूं लागला. शिवाय हिंदुस्थान त्यावेळीं आंजच्या इतका परतंत्र नसल्यामुळें म्हणा अगर आमच्या संस्कृतीचें तेज त्यांच्यावर पडल्यामुळें म्हणा, आम्हींच त्यांचें अनुकरण केलें असें नाहीं, तर त्यांनींही आमच्या पुष्कळशा चालीचें अनुकरण केलें आहे. हिंदूंचीं पागोटीं, भाषा, वंदनाचे प्रकार हे मुसलमानांनीं घेतले, व आम्हीही त्यांच्या कांहीं चालीचें अनुकरण केलें. असा हा अदला बदलीचा प्रकार चालू होता.

× × ×

त्यानंतर त्यांची सत्ता नष्ट होऊन पाश्चात्य युग सुरू झालें त्यावेळची आमची स्थिति अत्यंत अवनत असल्यानें पाश्चात्य संस्कृतीच्या उजेडानें आमचे डोळे अगदीं दिपून गेले. व त्यांचें आपण सरास अनुकरण करूं लागलों. परंतु कांहीं काळानंतर विचारी लोकांच्या मनांत [डोक्यांत] पुन्हां उजेड पडून आपलीहि संस्कृति बरीच उच्च असून तिचें जर आपण पुनरुज्जीवन केलें नाहीं तर ती नामशेष होईल, व आपली दिशाभूल होऊन, आपण भलतीकडेच जाऊं. असें यांना वाटूं लागलें महात्मा गांधी हे याबद्दल प्रमुख होत.

* * *

पाश्चात्यांच्या आंगीं शेंकडों गुण अनुकरण करण्यासारखे आहेत. किंबहुना त्यांचें अनुकरण केल्यावांचून या भौतिक युगांत आमचा तरणोपाय नाहीं. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, ज्या गोष्टीचें अनुकरण केल्यापासून, आमच्या राष्ट्राचा अगर समाजाचा फायदा होईल ती सोडून आम्ही भलतीकडेच वाहात आहोंत. ज्या कांहीं गोष्टींचें विनाकारण अनुकरण करण्याचें आज आपण आरंभिलें आहे, त्यांपैकीं मुख्य गोष्ट म्हटली ह्मणजे पोशाखाची बाब ही होय.

× × ×

आपल्यांतील सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांकडून यांचें अनुकरण होऊं लागल्यामुळें बहुजन समाजही त्याच मार्गानें जात आहे. पुष्कळ सभ्य लोकांची सभ्यत्वाबद्दल अशी भावना झाली आहे कीं, आपण अप् टुडेट असलों तरच सभ्य असें ओळखलों जाऊं. ह्या सभ्यपणाच्या खालीं असभ्यतेचीं कितीही कृत्यें केलीं तरी हरकत नाहीं. तसेंच आपण आज जे पारतंत्र्यांत आहोंत, त्यापासून मुक्त होण्याला म्हणजे स्वतंत्रता मिळविण्याला पोशाखाच्या बाबतींत अनुकरण करणें हें एक साधन आहे. आपल्या राजकर्त्यांसारखें पोशाखांत अप् टुडेट झाल्याशिवाय त्यांची बरोबरी आपण करूं शकणार नाहीं.”

\+ + +

ही विचारसरणी खरी आहे काय? पोशाखाच्या बाबतींत अप् टुडेट झाल्याशिवाय आम्हांला स्वतंत्र होण्यास अडचण येऊन स्वतंत्र होतां येणार नाहीं काय? पाश्चात्य लोकांनीं जे आज मोठमोठे शोध भौतिकशास्त्रांत लाविले आहेत, तसे शोध आपल्याला अपटुडेट झाल्याशिवाय लावितां येणार नाहींत काय? विचार केल्याअंतीं हीं सर्व विधानें खोटीं आहेत असें दिसतें.

* * *

स्वतंत्रतेचा पोशाखाशीं कांहींच संबंध नाहीं. हिंदुस्थान आज जरी परतंत्र असला तरी एकेकाळीं स्वतंत्र होता– उच्च पदावर होता. जगाला ज्ञान देण्याच्या योग्यतेचा होता; हें काम त्यानें—आपल्या परमपूज्य भारतवर्षानें—हजारों वर्षें केलेलें आहे. त्यावेळीं आपला पोशाख कसा होता तें पाहूं.

* * *

हिंदुस्थानचा भरभराटीचा काळ ह्मणजे महाभारताचा काळ होय. या काळीं पोशाखाची तऱ्हा काय होती तें आपण पाहूं: उ अ.१५३–२ मध्यें याचें वर्णन खालील श्लोकांत आहे “उष्णीषाणि नियच्छन पुण्डरीक नाभः करैः। अंतरीयोत्तरीयाणि भूषणानिच सर्वशः॥” यावरून त्याकाळीं दोनच वस्त्रांचा उपयोग करीत असत असें दिसतें. एक वस्त्र नेसावयाचें व दुसरें पांघरावयानें असे. नेसावयाच्या वस्त्राला अंतरीय व पांघरावयच्या वस्त्राला उत्तरीय असें ह्मणत. याशिवाय डोक्याला पागोटें घालीत त्याला उष्णीष असें म्हणत– सर्व साधारण जनतेचा सुद्धां हाच पोशाख होता. मात्र श्रीमंतांचीं धोतरें उंची व बारीक सुताचीं असत व गरीबांचीं जाडी भरडीं असत, हाच फरक होता. उत्तरीय वस्त्रानें अंग नेहमीं झांकलेलेंच असे असें नाहीं तर नेहमींच्या व्यवहाराला अडचण भासूं नये, म्हणून विद्यार्थ्यांकरितां असा नियम होता कीं उजवा हात उत्तरीय वस्त्राबाहेर काढून त्या वस्त्राला डाव्या खांद्यावर गांठ द्यावी. शिवलेले कपडे त्याकाळीं होते किंवा नाहीं याबद्दल मतभेद आहे. परंतु नसावे हेंच मत खरें दिसतें. शिवण्याची कला ग्रीकांच्या स्वारीमुळें प्राप्त झाली असावी हेंच मत खरें दिसते.

\+ × ×

त्यानंत इ.स६०० च्या सुमारास ह्यूएनत्संग हिंदुस्थानांत आला होता. तो आपल्या प्रवासवर्णनामध्यें लिहितो कीं, या लोकांचे आंतले अगर बाहेरचे असे कोणतेच कपडे शिवून तयार केलेले नसतात. त्यांच्या कपड्यांचा रंग पांढरा असून दुसऱ्या रंगीत कपड्यांची यांना आवड नाहीं. पुरुष कमरेभोंवतीं एक लांब वस्त्र गुंडाळतात. तसेंच दुसरें काखेपर्यंत घेऊन उजवा खांदा उघडा ठेवितात. ते डोक्यावर फुलांच्या माळा गुंडाळून गळ्यांत हार घालतात. ह्या वर्णनाची सत्यता पाहावयाची असल्यास बाणभट्ट यानें केलेल्या हर्ष राजाच्या वर्णनाशीं ताडून पाहावें. हर्षराजा दिग्विजयास निघाला त्यावेळचें त्याचें वर्णन करतांना बाणभट्ट लिहितो:– त्यानें बाहेर निघतेवेळीं राजहंस छापाचीं दोन सारखीं वस्त्रें परिधान केलीं होतीं, व चक्रवर्तित्वाची खूण ह्मणून चंद्रकोरें सारखी पांढऱ्या फुलांची माळ मस्तकावर बांधलेली होती.

\+ + +

यावरून ज्या काळीं आम्हीं स्वतंत्र होतों इतकेंच नव्हे तर जगापेक्षां अत्यंत पुढें होतों; त्या काळचा आपला पोशाख किती साधा होता हें दिसून येईलच. अजूनही कित्येक ठिकाणी–विशेषतः खेडेगांवांतील जुन्या मंडळींत ही चाल प्रचलीत आहे; परंतु त्या चालीचा मात्र आपण आज उपहास करीत आहों.

* × *

आजची परिस्थिति निराळी आहे ही गोष्ट खोटी नाहीं. मागील काळापेक्षां आज जगाशीं आपला संबंध जास्त निगडित झालेला आहे. त्याशिवाय पाश्चात्यांचें हरेक बाबतींत आपल्यावर स्वामित्व असल्यामुळें त्यांच्या कांहीं गोष्टीचें अनुकरण होणारच. परंतु त्या अनुकरणानें आपलें नुकसान होतां कामा नये. अप्टुडेटची फ्याशन उचलल्यामुळें आमच्या साध्या राहाणीला फांटा मिळणाचा संभव आहे. त्याशिवाय ती बाब अत्यंत खर्चाची असून, आपणांस एकूणएक बाबतींत परावलंबनांत पाडणारी आहे. त्यांना ती साध्य असेल; कारण, पाश्चात्यांची संस्कृति निराळी आहे. शिवाय ज्या वस्तु त्यांच्या वापरण्यांत येतात, त्या त्यांच्याच देशांतील असल्यामुळें, त्यांकरितां खर्च होणारा पैसा त्यांच्याच देशांत राहातो. एकंदरींत त्यांपासून त्यांना नुकसान नाहीं.

राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनेंही आपल्याला पोशाखाकडे पाहिलें पाहिजे. आज आपल्या गोमांतकांतील हिंदुसमाज नुकताच पुढें सरत आहे. अशा वेळीं कांहीं

Ano 8° N. 40

...ta-feira 3 de Janeiro d- 1924

. ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ८ वें. अंक ४०

गुरुवार ता. ३ जानेवारी सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

Gloria aos "Vencidos"

A sessão de 27 de Dezembro de 1923 do Conselho Legislativo deste Estado marca, incontestavelmente, uma pagina gloriosa nos anais politicos desta terra. Foi aquele um certamen, uma luta larga e vigorosa entre o Poder e a Verdade.

Apresar das democracias, apesar das ideas humanitarias que a *tricolor* desfraldou para o mundo, quando a Revolução Francêsa fechou o periodo longo e doloroso da Idade Média que foi, verdadeiramente, uma Idade de ignominia, apesar de tudo e muito mais, o Poder dos fortes ainda triunfou no mundo e há-de continuar a triunfar, enquanto a Revolução no vocabulário das Constituições nao fôr *pari passu* acompanhado de uma revolução, sublime revolução—a revolução nas consciencias, os povos, sobretudo, as fracas, muitas vezes, muitissimas vezes mesmo, em momentos dificeis, em transes criticos terão como consolação suprema de gritar diante dos conflitos em que a força do Direito suplantar o direito da Força esse grito sublime:

Gloria aos "Vencidos"

Gloria aos "Vencidos" que na sessão de 27 de Dezembro na sua retirada gloriosa salvaram a dignidade do Pais. Gloria aos "Vencidos" que na sessão de 27 de Dezembro ao deixar triunfantes a sala do Conselho mostraram que acima de todas as conveniencias e interesses, colocavam o bem estar do Pais.

Gloria aos "Vencidos" que na sessão de 27 na sua derrota que os exaltou para sempre prestigiaram o eleitorado que os levara para aquela sala, mostrando-se verdadeiros patronos liais e desassombrados, da sua causa que é a Causa do Pais.

O que foi esta sessão?

Não comportam as paginas deste jornal o descreve-la.

Os leitores do *Bharat* se não o sabem ainda, não tarda que conheçam logo e que, uma vez scientes, guardem na memória, que é uma coisa preciosa, para transmitir aos seus filhos—uma preciosa liçao de Dignidade, de Decôro, de Ponderação que os "Vencidos" deram aos Vencedores!...

O governo é provavel, que amanhã decrete os impostos aduaneiros sob que ele pretende agràvar mais a situação do contribuinte, já de si lamentàvel.

E' possivel que os "Vencidos" do Conselho Legislativo não consigam vêr triunfar o seu objectivo qual é de fazer primeiro a compressão que o governo prometera realizar—e depois auxiliar o governo, votando os impostos se é que fossem precisos.

O que, porem, é incontestavel, que vençam os Vencedores ou vençam os "Vencidos" afinal o Pais todo de Norte a sul, de Oriente a Occidente, e ainda ás Praças de Norte, em que pese aos seus ilustres representantes, estará com os "Vencidos" porque, na *Hora Grave* que è a Hora que o Pais atravessa, os "Vencidos" estiveram com o Pais.

E mais uma vez:

Gloria aos "Vencidos"

A SENTENÇA

Por falta de espaço tivemos de reservar para o proximo numero a sentença do julgamento do *Bharat.*

Conciliando?

A religião de cada qual com um seu puro ideal é sublime, é real na Suprema religião espiritual.

Quem estas linhas escreve, se apresenta pela primeira vez na arena da imprensa, e' com o intuito de poder permutar suas ideas com as dos outros, quando as destes sejam aceitaveis no todo ou em parte sem olhar pelo sectarismo e quando nelas haja de mais sublime, ponderavel e convincente.

Induziu o neste proposito a leitura de artigos que ha dias foram publicados em alguns jornais, decididamente, dedicados para, estimulando-a ... de preciar a religiao dos outros, artigos que longe de produzir algum beneficio ao paiz tendem pelo contrario a criar uma atmosfera turva de odios e desprezos entre os professos das duas religioes Hindu' e Catolica, atmosfera que demais a mais se acha infectada pela invasao da peste!

Convem desenfectal a. Como?

Conciliando?

Mas nao ha' maneira de poder conciliar e convencer os que apegadas a sua mania e como ras de fabula julgam o circunscrito poço—sua habitação ser o universo todo!

Paremos contudo o possivel para persuadir os que provocaram a malparada controversia.

¿Por ventura o sr. Patrocino de Andrade tera'cometido um maior erro patrocinando a causa da religiao Hindu, reconhecendo conter ela sublimidades como pensador livre?

Nao, de forma alguma.

Porque o raciocinio de que e' dotado o homem instinctivamente tende a procurar o que e' demais sublime seja onde for, olvidando o fanatismo cego.

¿Entao que razao teria o oponente Pe. Campos para contradizendo-o ofender a religiao hindu'? Nenhuma.

Nao valia a pena se esse oponente so' se tivesse entretido em cantar melo'dias da sua religiao predilecta quando fosse e estivesse guarnecida de telhados de vidro e posto isto nao tinha motivo para atirar pedras nos de outros, ofendendo a religiao Hindu' vilmente habito repugnante e banido por todas as religioes de caracter sublime.

Este mau habito inveterado desde as nefastas datas da horrivel inquisiçao se antes conseguiu pelos adeptos dessa religiao o despovoamento de nao adeptos e consequente fraccionamento da soberania portuguesa neste torrao de oriente como os grandes Estadistas o provaram—aterrorisando a popolaçao com brasas de fogueiras e folhas de espada, por ora nao poupou criar animosidades e consequente desequilibrio entre os cidadaos da Republica Portuguesa com os manejos de aparos de canetal

Mal se pode acreditar que a proveniencia deste habito dimana dos ensinamentos de Jesus Cristo sendo ele justo por excelencia.

Se o reverente Hindu' opta reconhecer deidade em tudo e por tudo que constrangimento pode ter ele em reconhece-la na personagem de Jesus Cristo se o Novo testamento e' documento provado e se nele esta' consignado o seu nome como justo por excelencia?

Do contrario, se o irreverente adepto da religiao alheia decidido para ofender as crenças doutrem, julgando o com direito ser a sua religiao unica verdadeira e com o seu olhar pessimista se atrever a atirar poeira nos olhos da humanidade de grei alheia desprestigiando-a infielmente enganado sera' ele; porque a instantania ilusao que quiz produzir, nao durando se quer um momento, fara' que fique rebaixado o valor moral desse cobarde arremetedor e da sua religiao conjuntamente.

¿Porventura sera' sublime essa religiao cujos adeptos costumam depreciar a uos outros?

¿Havera' necessidade de gritar alto e prestar juramento para provar que ela e' a unica verdadeira?

Prova-se isto so' pelos factos.

Sendo ela unica sublime, iluminaria so' ela o inteiro universo como a luz do sol.

¿E para que serve uma rosa, embora tenha esse belo nome, que foi privada do perfume e aquela cativante elegancia?

Para que servira' aquela religiao embora de caracter sublime que nao fez bem a humanidade quando os professos dela nao sejam aptos para pratica-la ou quando ela propria seja impraticavel? *(Continua)*

त्यांचाच समावेश होतो.) तर नवीन पीढी सुशिक्षित (?). जुने लोक थोडीशी मोडी जाणतात, तर हे नवे आपणांस पाश्चात्य भाषा-शास्त्र कोविद समजतात. यामुळें वंचन नसलेल्या वाफेप्रमाणें, ननमोकाट सुटल्यामुळें नवीन तरुणांची मन प्रवृत्ति स्वैरसंचारी झाली आहे. या दिशाभूल झालेल्या--चुकलेल्या--तरुणांना हाताशीं धरून योग्य पंथावर नेऊन सोडण्याकरितां योग्य कर्णधाराची गोमांतकास फार गरज आहे.

ह्या दिशाभूल झालेल्या तरुणांमध्यें स्वयंसेवककाराचा समावेश करावासा वाटतो. ते कर्मयोगी आहेत, पण सिद्धींचा दुरुपयोग करितात. ते उत्साही, देशहितेच्छु आहेत, पण चुकलेले आहेत. विचारापेक्षां विकारांना बळी पडून मताच्या दुसऱ्यावर मात करण्यांत त्यांनीं दुरुपयोग चालविलेला आहे; त्यांना दुसऱ्यांना युक्तिवाद, बुद्धिवाद देण्याची लालसा उत्पन्न झालेली आहे. त्यानां ठाऊक नाहीं कीं, स्वर्गज्याचा मार्ग जसा तुरुंगांतून जातो तसाच वादाचा मार्ग सेवेंतून जातो. आधीं सेवा मग वाद. तुम्हाला वाद घ्यावयाचा असेल तर सेवा सुरू करा. नायक होण्यापेक्षां अनुयायी होणें चांगलें. जगांत, सर्वांवर आपला ताबा मिळविण्याकरितां चाललेली धडपड, नायक होण्याची मानवाची महत्वाकांक्षा चालू आहे याचें कारण काय? तर त्यानां नायक या शब्दाचा अर्थ, व त्या पदावर चढल्यावर शिरावर येणारी जबाबदारी यांची बरोबर कल्पना नसते; पण खरी स्थिति अशी आहे कीं, नायक हा सत्ताधारी नसून आज्ञाधारी सेवक आहे. जर तुम्हाला मोठेपणा पाहिजे असेल तर तुम्हीं होतां होईतों लहानपण घ्या. अगोदर तुम्हांला संग्राहकाच्या अवस्थेंतून संपादक होण्यास शिकलें पाहिजे.

स्वयंसेवकाच्या चालू अंकांमध्यें, पणजी येथें श्री. वर्णा यानां प्रसिद्ध केलेल्या 'फाइस्कांस' उपद्याप अशी संज्ञा देऊन त्यांस मदत करणाऱ्या हिंदुबांधवांची स्वयंसेवककारानीं कींव केली आहे. मला वाटतें येराल्दु, उ येराल्दु, तेन्द, त्रिबून, आ इंदिया पोर्तुगेज व भारत या पत्रांतून चाललेला वाद त्यानीं मुळींच वाचलेला नसून, न वाचतांच अभिप्राय देण्याच्या, संपादकांच्या वळणावर ते गेले आहेत; अथवा प्रतिस्पर्ध्यानें लिहिलेल्या अभिप्रायावर मात करण्यासाठीं केलेली ही कलमबहादुरी आहे. विशेषतः तेन्द व त्रिबून या पत्रानीं लिहिलेल्या मजकुरांत 'जातिवंत हिंदूला' द्वेष व तिरस्कार येण्यासारखें कांहींच का नाहीं? आतां 'जातिवंत हिंदू' व्याख्या शिकण्याकरितां स्वयंसेवककाराकडे किंवा सदाशिवाजी नाटकातील दवणेवाकडे तरी जाव लागेल. म्हणे, "या श्रेष्ठ धर्मावर आजपर्यंत असंख्य कठोर व निर्घृण हल्ले चढवून तो धर्म जगांतून नामशेष करण्याचे प्रयत्न निरनिराळ्या रीतीनें, निरनिराळ्या वेळीं व निरनिराळ्या स्वरूपानीं करण्यांत आलेले असून त्या सर्वांतून तो सुरक्षीत व निर्धोक बाहेर पडलेला आहे, व या हल्ल्यानीं हिंदुधर्माच्या इमारतीला किंवा स्थैर्याला एका केंसाचाही धक्का बसला जाणार नाहीं." हा यांचा शोध जर श्री भगवान् विष्णूला कळेल तर त्याना 'धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे' करितां कलंकी अवतार घेण्याची मारामार तरी चुकेल.

ते असें लिहितात कीं, 'वस्तुतः हिंदुधर्माची खरी कल्पना दोघांही वावदूकांस झालेली नाहीं.' यानां तरी खऱ्या धर्माची कल्पना झाली आहे काय? नाहीं! धर्मविषयक प्रश्न असे गूढ असतात कीं, त्यांची चर्चा करूं लागल्यास त्यांना अनेक शाखा फुटून चर्चा लांबते व निकाल लावणें कठीण पडतें. खऱ्या धर्मांत जाती नाहींत, भेद नाहींत, द्वेश नाहीं, मत्सर नाहीं. खरा धर्म म्हणजे प्रेमाचा बाजार आहे. धर्माचें अंतरंग प्रेम व बहिरंग परोपकार. धर्माची वाढ म्हणजे प्रेम निर्मितीची वाढ. धर्माचें जीवन शुद्ध प्रेम, त्याचें फळ पवित्र वीर्यकर्म; व त्याचा सुवास म्हणजे निःश्रेयस व शांत सुख. धर्मांतील परमेश्वर पूजा म्हणजे मूर्तिपूजा नव्हे, यो गासन नव्हे कींवा तीर्थाटन नव्हे; तर परोपकारकर्म- पवित्रकर्म- प्रेमकर्म- वीर्यकर्म. धर्माचें बीज प्रेमांत आहे. व प्रेम म्हणजे सर्व भूतांविषयीं आत्मभाव हीच गोष्ट दुसऱ्या शब्दानें सांगावयाची असल्यास प्रेम म्हणजे स्वाभिमान विस्मृती--स्वार्थत्याग--आत्मयज्ञ होय. धर्माचें अंतरंग काबीज करावयाचें असल्यास आत्मप्राप्ती करून घेतली पाहिजे; आत्मप्राप्ती ज्ञानानें, विद्वत्तेनें कींवा तपश्चर्येनें होत नसते तर ती आत्मयज्ञानें प्राप्त होते. धर्माचें बहिरंग परोपकार व परोपकार म्हणजे प्रेमानें प्रेरित होऊन स्वार्थ त्यागपूर्वक जगांतील दुःख, पाप, अज्ञान वगैरे कमी करणें होय. जगांतील हृदयद्रावक दुःखें, प्राणघातक संकटें, अनिष्ट गोष्टी स्वतःला त्रास सोसून कमी करील; आणि स्वाभिमान सोडून व स्वार्थत्याग करून जगांत आहे त्यापेक्षां अधिक सुख आणि आनंद, अधिक सौंदर्य आणि रमणीयता, अधिक ज्ञान, अधिक पवित्र आणि तेज, अधिक उदार बुद्धी आणि उदारता आणील तोच धर्माभिमानी धर्मवीर होय!

स्वयंसेवककार असाच कीं, नाहीं धर्माचा व धर्मवीराचा अर्थ?

वर सांगितल्याप्रमाणें आमच्या सनातन धर्माची ही खरी व्याख्या आहे. अशा प्रकारचे धर्मवीर, हातांच्या बोटांइतके तरी सबंध हिंदुस्थानांत मिळतील काय?

या कलीयुगांत, या मत्सराच्या स्वर्धेच्या-बाजारांत, धर्माची वरील खरी व्याख्या उपयोगी नाहीं. धर्म हा संस्कृतीचा पाया असल्यामुळें आपली आर्य संस्कृति कायम रहाण्यासाठीं ज्या ज्या धारण करण्यायोग्य मानसिक सद्भावना व रूढी त्यांस धर्म व आपल्या धर्माची व संस्कृतीची उन्नति होण्यासाठीं झटणारा मनुष्य म्हणजे धर्मवीर असें समजलें पाहिजे. आम्हाला जर आमची आर्य संस्कृति टिकवावयाची असेल तर तीच्या पायावर--धर्मावर--होत असलेले हल्ले परतविले पाहिजेत. असे हल्ले परतविण्यासाठीं रा. केणी व त्याचे मित्र करीत असलेले प्रयत्न हा उपद्व्यापीपणा नसून, स्वाभिमानाचें द्योतक आहे. आतां आमच्यांतील कांहीं वाईट रूढी बदलिल्या पाहिजेत ही गोष्ट खरी आहे. या वाईट रूढींच्या दुष्परिणामानें जागृत होऊन; त्या नाहिंशा करून टाकण्याचे प्रयत्न दे. कर्वे, म. गांधी, स्वा. श्रद्धानंद, पं. मालवीय आदिमहपुरुष करीतच आहेत. असले प्रयत्न आमच्या गोव्यांतही सुरू झाले पाहिजेत. आमच्यांत कांहीं वाईट आहे, म्हणून आमच्या धर्मास चीत करूं पाहणाऱ्या एकश्चित् धर्मातील गडबडगुंडांना चित न करणें हें नामर्दपणाचें लक्षण आहे. असो.

स्वयंसेवककारानीं रा. केणी आदिकानां केलेला हा हितोपदेश नसून, प्रतिस्पर्ध्यानें लिहिलेल्या मजकूरावर कलमबहादुरी चालविण्यासाठीं लिहिलेले हे द्वेषाचे बोल आहेत. याच अंकांत त्यानीं गोमेदासंबधीं एक स्फुट लिहिलें आहे. हें स्फुट त्यानीं कां लिहिलें? तर त्यांच्या धार्मिक भावनेला धक्का बसला म्हणून. मग दुसऱ्यानीं आपल्या धार्मिक भावनेला धक्का बसल्यावर केलेला प्रतिकार हा गुन्हा होय? गोमेद फोंड्यांत झाल्यास त्यांची धार्मिक भावना दुखवली जाते; व लोटली, राय वगैरे गावीं गोमेव झाल्यास त्यानां चालतो या कोड्याचा उलगडा कोणी करील काय?

—परिषदेच्या स्वयंसेवक मंडळीचे मुख्य धिकारी डॉ० सावरदांडे ज मदतनीस प्रा० सांवर्डेकर व जना कामत यानीं उत्तम कामगिरी बजावली.

—परिषदेचे सभासद प्रो० सुब्राय सामंत, शांबाराव देसाई, व्यंकटेश देसाई, डॉ० आत्माराम बोरकर, रघुनाथ भंडारी, उपी तळावलीकर, वसंतराव दणाईत, रवळू खलप, पेडणेचे दाजींसाहेब, दादासाहेब वैद्य, पुंडलीक विर्जिनकर, प्रो. दत्ता पै इत्यादींनीं चोख काम केलें.

—परिषदेच्या एकंदर प्रतिनिधींची उत्तम रीतीनें बरदास्त राखिली गेली त्यांच्यासाठीं मोटार सर्व्हिस ठेविली होती.

विचार-लहरी

लहर-सहावी.

आपला समाज आज कोणत्या बाबतींत परकीयांचें अनुकरण करीत आहे, त्याचें दिग्दर्शन झालेंच आहे. आतां आपण त्यांच्या कोणत्या गुणांचें अनुकरण केलें पाहिजे त्याचा विचार करूं.

× × ×

चालू युग हें पाश्चात्य युग आहे. चक्रनेमिक्रमानुसार उन्नतिसूर्य आज त्या राष्ट्रांवर प्रकाश पाडीत आहे. म्हणून त्या प्रकाशामुळें त्यांच्या आंगीं वास करीत असलेल्या चांगल्या गुणांचें आपण अनुकरण करणें भाग आहे. ह्यामुळेंच आपण त्यांची बरोबरी करण्यास पात्र होऊं.

× × ×

त्यांच्या आंगीं असलेल्या गुणांपैकीं, मुख्य गुण स्वार्थत्याग हा होय. आपल्या देशाला ज्या ज्या वेळीं गरज लागेल त्या त्या वेळीं श्रीमंतांपासून मजुरांपर्यंत सर्व लोक स्वार्थत्यागपूर्वक मदत करण्यास तयार असतात. स्वतःचा स्वार्थ साधून देशाचें नुकसान करण्यास ते केव्हांच तयार होणार नाहींत. हा गुण त्यांच्यांत प्रामुख्यानें वास करीत असल्यानेंच आज त्यांना जगांत श्रेष्ठत्व प्राप्त झालें आहे. प्रोफेसर बाबु विनय कुमार सरकार हे आज बरींच वर्षें सर्व जगभर प्रवास करीत असून त्यांनीं आपलीं प्रवासवर्णनें 'वर्तमान जगत्' या नांवानें प्रसिद्ध केलेलीं आहेत. त्यांत त्या राष्ट्रांतील बरीचशी उपयुक्त माहिती प्रसिद्ध झालेली आहे. ते "खंड ४ अमेरिका" यांत म्हणतातः— भारती मुलाला इंटरनॅशनल वुइमेन सफ्रेज अलायन्स या संस्थेच्या सेक्रेटरी Mas Catt हीशीं बाईशीं झाली. त्यावेळीं मीं त्यांना प्रश्न केला कीं, अमेरिका हा अलीकडील २०।३०० वर्षांचा देश असतांना तेथें युरोप पेक्षांही स्त्रीजातीला जास्त महत्व कसें आलें? त्यावर त्या म्हणाल्या, अमेरिकेंत आपल्या देशाच्या व समाजाच्या उन्नतिकरितां पुरुषांनींच तेवढा स्वार्थत्याग केला असें नाहीं. तर स्त्रियांनीं सुद्धां त्यांच्या बरोबरीनेंच स्वार्थत्यागाची कमाल केल्यामुळेंच स्त्रीजातीला इतकें महत्व प्राप्त झालें आहे. शारीरिक कष्ट, नैतिक बल, अध्यापन-व्यवसाय इत्यादि कोणत्याच बाबतींत स्त्रीसमाज मागें राहिला नाहीं. आमच्या देशांतील स्त्रीयांच्या स्वार्थत्यागामुळेंच आम्हांला इतकें महत्व प्राप्त झालें आहे." अशा लोकांच्या या गुणाचें आपण सर्वस्वी अनुकरण करण्यास नको काय?

\+ + +

त्यानंतर दुसरा गुण म्हणजे त्यांच्या आंगीं असलेली एक राष्ट्रीयत्वाची भावना ही होय. आपल्या लोकांच्या अंगीं ह्या गुणाची कमतरता हजारों वर्षांपासून आहे, याबद्दलची कबुली हिंदुस्थानच

Ano 8.° N. 41

... Janeiro de 1924

ANUNCIOS
Por cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ८ वें, अंक ४१
गुरुवार ता. १० जानेवारी सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

Ao Governo!

Ha' mais de seis mezes que os funcionarios publicos nao sao pagos nem se sabe quando o erario publico se sentira' com forças suficientes para os libertar, duma vez para sempre, dos tormentos economicos que os inquietam, privando-os da tranquilidade tao necessaria para cabal desempenho de suas funcçoes oficiais.

Por mais pequena que seja a categoria dum funcionario, este tem sua representaçao, tem seu prestigio e o Estado em prol do qual ele despende a sua melhor energia, a sua melhor seiva e o seu melhor esforço vital, e' obrigado a manter intacta a mesma representaçao e incolume o mesmo prestigio.

Parece, porem, que o Estado da India Portuguesa anda esquecido desse duplo dever, nao lhe causando nem frio nem calor, como vulgarmente se diz, a tristissima situaçao financeira dos seus serventuarios no numero dos quais figuram tambem os que pela natureza especial das funcçoes que exercem, tem de conservar-se alheios a uma especie de *dependencia* ou *deferencia* que o emprestimo e compras a credito criam naturalmente, no animo de quem por estes meios satisfaz as suas primeiras necessidades, quando se veja na carencia do dinheiro.

¿Pode, jamais, consentir-se que em volta de quem esta', por exemplo, encarregado de distribuir justiça, se crie a suspeiçao, mesmo que aparente de tal *dependencia* ou *deferencia*?

¿Fica bem aos creditos dum Estado que seus funcionarios se vejam malparados e comprometidos perante os fornecedores?

O nao pagamento regular dos funccionarios publicos redunda, pois, nao so' em prejuizo do Estado mas tambem no de quem lhe presta os seus serviços.

E o que e' prejudicial a todos nao pode substentar-se. E', portanto, insubstentavel o atrazo dos vencimentos dos funcionarios, atrazo que traz alarmado todo o Paiz!

Afigura-se-nos gravissimo o que se esta' passando com o pagamento dos vencimentos dos funccionarios; preocupa-nos sobremaneira a sua situaçao que sabemos ser bem dificil, a ponto de ficarem alguns deles constrangidos a suportar as mais crueis provaçoes, semilhantes a's que perseguem uma pobresa envergonhada.

O Paiz tem muitos problemas a resolver e para isso bem sabemos que precisa de muito dinheiro; mas o que se refere ao assunto do presente artigo merece preferencia a todos os outros.

E' a razao por que chamamos para a intoleravel situaçao dos nossos funcionarios, derivada do atrazo de seus vencimentos, a atençao dos que governam este Paiz, sob pena de, nao o fazendo e a breve trecho, serem considerados como seus desalmados, impoliticos e, mais do que isto, crueis cavadores.

E basta por hoje.

Ecos & Critica

Avante!

No artigo editorial da ediçao passada do *Bharat* demos a nossa desvaliosa mas plena adesao a' patriotica atitude dos vogais eleitos que desassombradamente se abstiveram de votar novos impostos, os quais, dada a precaria situaçao do contribuinte, representam uma verdadeira calamida de, semilhante a uma daquelas dez pragas de que fala o Velho Testamento.

A elevaçao das taxas aduaneiras, um daqueles novos impostos, vai ferir duma maneira cruel o comercio geral do Paiz, dirigido, mormente, pelo capital hindu, desanimando-o sobre maneira.

Ao Paiz em peso impende, pois o dever de manifestar-se dum modo inequivoco e claro a favor do nobilissimo gesto dos eleitos, sobretudo ao *Pragatica Sanga* que, como representante das forças vivas da comunidade hindu, propoe-se felicitar esta linda terra do *Parshuram*.

A hora e' grave e, porisso, a marcha de toda a nossa acçao politica tem de convergir para o unico posto, o da salvaçao do Paiz, ameaçado pelas fauces hiantes da terrivel hidra de tais novos impostos.

Avante, PRAGATICA SANGA!
Avante, Paiz em peso!!
Avante, Patriotas!!!

Ma's linguas

Terrivel e' a influencia de ma's linguas. So' o genio fabulista de Esopo soube descrever-la numa admiravel perfeiçao.

Aprouve, por exemplo, inventar a nao assistencia do eleito sr. Venctexa Dessai a' memoravel sessao do C. L. do dia 27 foi proposita da e que neste *proposito* teve o governo o seu dedo... *minimo*.

O visado pela acçao das *ma's linguas* e', porem, nosso conhecido e porisso, podemos afirmar-lhes que o sr. Dessai, tratando de qualquer assuuto de interesse geral do Paiz e' *dantes quebrar do que torcer*.

A propaganda do Congresso do P. SANGA e' que o distraiu daquela gloriosa sessao, gloriosa para os vencidos e' claro e nao qualquer outro motivo.

Cremos que nao e' preciso ser gran politico para ver um palmo diante do nariz.

O sr. V. Dessai e' um dos marechais do *Pragatica Sanga*. E sendo esta associaçao paladina dos interesses vitais do Paiz e da comunidade hindu, particularmente, seria insulto imperdoavel supor alguem que qualquer dos membros do referido *Sanga* se tivesse manifestado a favor dos tais novos impostos.

Nada de equivocos, nada de juisos temerarios, pois!

Urgente

O problema administrativo mais urgente a solucionar e, como se disse no editorial de hoje, o que se refere ao pagamento de funcionarios publicos que estao arrastando uma vida verdadeiramente dificil e cheia de abrolhos, como se costuma dizer.

Como homem que e', o funcionario e' obrigado a comer, beber, e vestir, o que se nao alcança sem dinheiro, sabendo-se tambem que em regra nao pode produzir trabalho util nem conscienciosо quem estiver privado daquela tripla funçao corporal.

Urgente se torna, portanto, a soluçao do problema do pagamento dos funcionarios.

Cumprimentando

Nossos cumprimentos aos presados colegas d *A India Portuguesa*, de Majorda', *A' Terra*, de Margao *A' Tribuna*, de Calangute e ao *Diario de Noite* pelos seus aniversarios, com votos pelas suas prosperidades.

Agradecendo

Agradecemos as felicitaçoes que nos enviaram pela nossa absolviçao, especialmente ao popular orgao margaonense do grande *Partido Indiano*.

Conciliando?

Seria melhor calar do que ornar com palavreado, dizendo que e' unica verdadeira a sua religiao desde que nao foi cumprida consoante seus preceitos "Nao faças a outrem o que nao queres que outros te façam a ti etc." pelo seus sectarios.

Pergunta-se agora:—

Sera' verdadeira essa religiao cujos adeptos perseguiram a humanidade de grei alheia com massacres e tormentos inexprimiveis?

Sera' verdadeira essa religiao cujos sectarios incitaram criaçao da maldita inquisiçao de desgraçada memoria para fazer render os nao adeptos?

Sera' verdadeira essa religiao cujos ministros promoveram devassa dos templos usurpando-os dos seus haveres em seu proveito?

Finalmente sera' verdadeira essa religiao cujos adoradores sugerem mil alvitres mal planeados para seu proveito em flagrante prejuizo dos outros?

Dir-se— hao talvez que e' este o delicto dos que nao souberam praticar aquela religiao e nao dos dogmas desta; pelo menos digam-nos isso claramente; reprovem aqueles actos; porque e' que se calam os que elogiam aquela religiao?

E qual a vantagem que auferiram com aqueles massacres?

Solidificaçao d'ela? Nunca.

Pois verao que nao alcançarao o fim desejado; porque se os ignorantes de entao a aceitaram a' força da espada, os sabios de hoje atira-la-hao a' força da razao!

Se a inspiraçao da religiao tem por seu ideal a salvaçao da humanidade que justificaçao pode ter aquele massacre a nao ser a significaçao da palavra no dicionario tecnico dessa religiao: Messacre=Salvaçao.?

E se aquele massacre tem a seu modo alguma justificaçao porque entao tantas acusaçoes contra os judeus que crucificaram Jesus Cristo por nao professar a sua religiao?

Quer-nos parecer que aos espoliadores serviu a religiao d'uma arma para assolaçao; alia's ate' os âteus nao se atreveriam a fazer aquilo o que se fez em nome da verdadeira religiao!

Felizmente a historia nao registou semelhantes manchas em nome da religiao hindu porque esta nunca per-

पत्रव्यवहार

रा. रा. भारत कर्ते यांसः–

खालील मजकुरास आपल्या पत्रांत अवश्य स्थळ द्याल अशी आशा करतों.

गेल्या महिन्याच्या २७ तारखेस भरलेल्या कायदेकौन्सिलच्या बैठकींत करवाढीच्या तहकुबीचा जो ठराव १० लोकनियुक्त सभासदांकडून लेखी सादर करण्यांत आला होता, तो ९ विरुद्ध ८ मतानीं नापास झाला, आणि मी बुद्धिपुरःसर या बैठकीस गैरहजर राहिल्यामुळें हा प्रकार घडून येवून करवाढीस अवसर मिळाला असा अलतान समज जिकडे तिकडे पसरलेला माझ्या कानावर आल्यानें मला या ईट वाटतें. वस्तुतः खरा प्रकार असा नाहीं. करवाढीच्या तहकुबीच्या ठरावावर माझी सही होती, व या ठरावाचा पुरस्कार मी अखेरपर्यंत करणार, असें एका सरकार नियुक्त सभासदाकडे झालेल्या संभाषणांत मी स्वच्छ सांगितलेंही होतें. हें माझ्या कित्येक कौन्सिलर व इतर मित्रांना माहीत आहेच. पण या ठरावावर सही करणाऱ्या लोकनियुक्त सभासदांपैकीं एकानें व सही न केलेल्या अशाच्या समासदानें ऐनवेळीं आपलें मत सरकार बाजूस दिल्यामुळें सरकारी बाजूचीं ९ व लोकनियुक्त सभासदांचीं ८ अशा मतांनीं तहकुबीचा ठराव नापास झाला. त्या बैठकीस मी हजर असतों तर लोकनियुक्त पक्षास ९ मतें मिळून दोन्ही बाजूचीं मतें समसमान झालीं असतीं व अकात वाढीचें बिल पुढें आणणाऱ्या कौन्सिलच्या अध्यक्ष साहेबांस आपल्या जादामताचा उपयोग करून तें बिल पसार करतां आलें असतें; अर्थात् मी जरी हजर राहिलों असतों तरी झाला हा प्रकार टळला नसता.

त्या दिवसांत, प्रागतिक संघाच्या दौऱ्यांत इतर मित्रांबरोबर फिरण्याचें काम मला करावयाचें असल्यामुळें मीं वरील बैठकीस हजर असणार नाहीं. हें कौन्सिलांत व कौन्सिलर मित्रांस आगाऊच कळवून ठेविलें होतें. असें असतां संघाच्या चळवळीचा पुरस्कार करण्यांत पुढाकार घेतल्यामुळें असो, अगर दुसऱ्या कोणत्याहि कारणामुळें असो, माझ्या विरुद्ध गैरसमज पसरविण्याकरितां ही सरळ गोष्ट भलत्याच स्वरूपांत कांहीं जणांकडून मांडण्यांत येत आहे, व तिचा इनकार वेळींच करणें मला जरूर वाटतें.

प्रस्तुत आरोप निराधार व विशेषतः द्वेषमूलक आहे हें सांगण्याची यानंतर गरज नाहीं असें वाटतें व माझ्या विषयीं कोणासही संशय वाटल्यास त्याचें निरसन होईल असा भरंवसा आहे.

कळावें हे विनंती

पणजी ता. ४।१।१९२४ आ.

व्यंकटेश वि. राव सरदेसाई

विचार–लहरी

लहर–सहावी. (उत्तरार्ध)

तिसरा गुण म्हणजे व्यवस्थितपणा हा होय. केवळ या गुणामुळेंच एवढ्या मोठ्या पृथ्वीवर ते आज राज्य कारभार चालवीत आहेत. जणूं काय घड्याळाचें यंत्र ! ठरलेलीं कामें ठरलेल्या वेळींच ठरलेल्या लोकांनीं करावयाचीं. त्यांत कोठेंही कसूर होणार नाहीं. अगदीं राज्य कारभारापासून तों एखाद्या समारंभापर्यंत ही व्यवस्था ! अगदीं लहानसा भोजन–समारंभ का होईना. सर्व कांहीं व्यवस्थित. ठरलेल्या लोकांना आमंत्रणें द्यावयाचीं; ज्यांनीं तीं स्वीकारलीं, ते ठरलेल्या वेळींच हजर राहावयाचे ! त्यांचा व्यापार जगभर कां पसरला ? तर केवळ या गुणामुळेंच. त्यांना पाहिजे त्या प्रश्नांचा खुलासा विचारा; उत्तर मिळणार नाहीं असें केव्हांही होणार नाहीं.

तेंच आमच्याकडे पाहा; सगळा सांवळा गोंधळ ! कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं. पुष्कळशा वर्तमानपत्रांची तीन महिन्यांची वर्गणी भरली असतां तेरा महिने पर्यंत तीं वर्गणीदारांस येत असल्याचीं उदाहरणें कांहीं कमी नाहींत. स्वराज्य पाहिजे म्हणून मात्र टाहो फोडीत आहोंत. हीच स्थिति खालपर्यंत. आपला एखादा लग्न-समारंभ म्हणजे अंदाधुंदी कारभाराचा कळस होय. आमंत्रणें कोणास केलीं याचा मालकास पत्ता नाहीं; आमंत्रणें पाठविलीं तितक्यांच्या व्यवस्थेची तरी तयारी मालकानें केली काय ? कांहीं नाहीं ! आव जाव घर तुम्हारा. जितका गोंधळ जास्त तितका समारंभ जास्त उठावदार झाला; अशी आमची समजूत बनून गेली आहे.

इतर व्यवहारांत सुद्धां तीच स्थिति ! जाहिरातींत मात्र त्यांचें अनुकरण; पण व्यवस्थेच्या नांवानें पूज्य ! कित्येक बुकसेलरांच्या जाहिराती " आमच्याकडे संस्कृत, मराठी, इंग्रजी गुजराथी सर्व तऱ्हेचीं पुस्तकें मिळतात' अशा असावयाची; परंतु बऱ्याच वेळां मराठी पुस्तकेंही मिळण्याची मारामार ! म्हणून त्या लोकांचा हा गुणही आपण घेण्यासारखा आहे; हें कोणीही सांगेल.

चौथा गुण म्हणजे धाडस हा होय. त्यांच्यांतील कितीतरी लोक उत्तर ध्रुवासारख्या ठिकाणीं जात आहेत तें कांहीं तेथें ऐषआरामांत तेथें लोळण्यास सांपडेल म्हणून नाहीं ! उलट तेथें थंडीचा कोण मारा; देह गारठून प्राण सुद्धां गेले तरी पण खंड न पडतां कार्य पुढें चालविण्याची तयारी. हिमालयाच्या अत्युच्च शिखरापर्यंत तसेंच आल्प्स पर्वताच्या शेंड्यापर्यंतही जाण्यांत त्यांचा पाय पुढेंच आहे, इष्ट कार्याच्या सिद्धीसाठीं त्यांना प्राणांचीही पर्वा वाटत नाहीं. बोअर सेनापति व प्रेसिडेंट क्रुगर व त्यांचे मित्र चांदण्यांत गप्पा मारीत बसले होते. त्या वेळीं त्यांच्या मित्रानें प्रेसिडेंटना प्रश्न केला कीं, काय हो चांदोबावर सोन्याच्या खाणी आहेत काय? त्यावर प्रेसिडेंटनीं उत्तर दिलें कीं, नाहींत; अशी मला पूर्ण खात्री आहे. त्यावर त्यांच्या मित्रानें विचारलें, कां हो, आपण खात्री कशी देतां? त्याबरोबर प्रेसिडेंटनीं सांगितलें कीं, मित्रा, जर चांदोबावर कांहीं मिळण्यासारखें असतें, तर इंग्लिश लोक त्याचा ताबा घेत त्याशिवाय कदापि राहिले नसते !

यांत पुष्कळ तथ्यांश आहे. आपल्या कार्याकरितां अत्यंत साहस करून तें काम पूर्ण करावयाचें, भ्याडपणानें मागें फिरावयाचें नाहीं. आपल्या कामांत पूर्णता मिळविण्याकरितां धाडसाची कमाल करणें हा गुण त्यांच्या आंगीं पूर्णपणें वास करीत आहे. नाहीं तर आपल्याकडे पाहा; अगदीं लहानपणापासून बाळकडूच असें कीं " बाबा, बाहेर जाऊं नकोस हं. कोणी उचलून वगैरे नेईल !" हीच भावना पुढें वावाची ! मग आमच्या हातून काय पराक्रम होणार ?

पांचवा गुण म्हणजे त्या लोकांचें विद्या-प्रेम हें होय. आपला सबंध जन्म विद्याभ्यासांत घालवून कित्येकांनीं आपलें नांव अमर करून ठेविलें आहे. हजारों लोकांनीं परकीय भाषेचा अभ्यास करून त्या भाषेंतील ज्ञान आपल्या लोकांना सुलभ करून दिलेलें आहे. संस्कृत, पाली इत्यादि भाषांचा अभ्यास ते लोक आस्थापूर्वक करीत असलेले पाहून कोणाला आनंद होणार नाहीं ? सर विलियम जोन्स, विन्सेंट स्मिथ; बौद्ध वाङ्मयाचे परिशीलन करणारे रिस डेव्हिड; जैन वाङ्मयाचें परिशीलन करणारे हर्मन जेकोबी; राजस्थानचा इतिहास लिहिणारे कर्नल टॉड, संस्कृतज्ञ मोक्ष मूल्लर इत्यादिकांचें विद्याप्रेम वाखाणण्यासारखें नाहीं काय? हिंदुस्थानांतील लाखों संस्कृत ग्रंथ आज युरोप खंडांतील लायब्ररींमध्यें सुरक्षित असून बरेच विद्वान त्या ग्रंथांचा आस्थापूर्वक अभ्यास करीत आहेत. अशा लोकांच्या गुणाचें अनुकरण केल्यास वावगें होईल काय?

आणखीही पुष्कळ गुण घेण्यासारखे आहेत. परंतु आपल्या समाजानें इतक्यांचेंच अनुकरण केल्यास पुरें होईल. या अत्यंत उपयुक्त गुणांचें अनुकरण न करतां केवळ पोशाखी अनुकरण करणारांनीं एका संस्कृत कवीच्या खालील श्लोकाकडे जरूर लक्ष द्यावें.

आबद्ध कृत्रिम सटाजटिलांस भीती·
रारोपितो मृगपतेः पदवीं यदि श्वा।
मत्तेम कुंभ तट पाटन लंपटस्य
नादं करिष्यति कथं हरिणाधिपस्य १

[मराठी]

बांधोनि कृत्रिम जटा भरि मान सारी
झाला जरी शुनक सिंह पदाधिकारी
मत्तेभ गंडतट भेदन पंडिताची
ती गर्जना कशि करील मृगाधिपाची ?!–१

के. भारती.

पुस्तकांचा अहेर

" सगुण हरिकथा करावी।
भगवत्कीर्ति वाढवावी।
अखंड वागीश्वरी वदवावी।
यथा योग्य॥ "

एका ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं, "ज्ञानयोग, कर्मयोग व भक्तियोग असे परमेश्वर प्राप्तीचे तीन मुख्य मार्ग असले तरी संसारी जनांनीं भक्तिमार्गाचेंच अवलंबन करावें. भक्तियोग म्हणजे ईश्वराचे ठिकाणीं निश्चल मन ठेवून त्याच्या नामगुणाचें अखंड कीर्तन करणें. कलियुगांत भक्तियोग हाच आज युगधर्म आहे, तसा कर्मयोग आणि ज्ञानयोग नव्हे. भक्ति हेंच सर्वसार आहे. भक्तीवेंच काय तें खरें प्रयोजन आहे."

यंदांच्या श्रीगणेशचतुर्थीचे आणि श्रीलक्ष्मी पूजनाचे संधीस अनुक्रमें "आरत्या पंचक" आणि श्रीगीतावळी" अशीं कविकुशवनवासीकृत दोन पुस्तकें त्यांचे प्रकाशक श्रीयुत आत्माराम हरि केंकरे, मुक्काम केपें, ह्यांजकडून मला प्रेमपुरस्सर अहेरादाखल आलीं. श्रीयुत केंकरे यांचा व माझा पूर्वे परिचय नसतांही हा अमूल्य नजराणा त्यांनीं मला पाठविला ह्याबद्दल फार फार आभारी आहें.

अशा मासल्याच्या पुस्तकप्रकाशनाचा त्यांचा हा क्रम सतत पांच वर्षें चालू असून वरील दोन आनंददायक प्रसंगीं ते आपल्या मित्रमंडळीस भक्तिरसाचा घुटका पाजीत असतात, अर्थात् अहेर करितात.

"बहुत करावें पाठांतर।
कंठीं धरावें ग्रंथांतर।
भगवत्कथा निरंतर।
करित जावी॥"

हा उद्देश कवि कुशवनवासींचा आहे.

"नरदेहाचें उचित।
कांहीं करावें आत्महित।
यथानुशक्त्या चित्तवित्त।
सर्वोत्तमीं लावावें॥"

हा हेतु श्रीयुत केंकरे ह्यांचा दिसून येतो. स्वतःची पदरमोड करून दुसऱ्याला भक्तिमार्ग आंखून देणें हें स्तुत्य कृत्य आहे असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं.

आरत्या पंचकांत श्रीज्ञानदेव, श्री नाम-

—गोभक्त राघवदास चिंतामण रामनामे यांचें कवळें येथें गेल्या १ जानेवारीं शांताराव सरदेसाई यांच्या अध्यक्षतेखालीं गोरक्षणावर व्याख्यान झालें.

—गोरक्षणाला मदत व्हावी ह्या हेतूनें विठोण येथील 'गोवा गोरक्षण संस्थे' मार्फत तेथें एक व्याख्यान सप्ताह होणार आहे. ज्यानां या सप्ताहांत भाषण करण्याची इच्छा असेल त्यानीं सदरील संस्थेच्या सेक्रेटरीपाशीं पत्रव्यवहार करावा, अशी संस्थापकांची विनंति आहे.

—डॉ० फ्रोइलान द मेल हे ब्रकुर्डुविक मायदेशाला पोंचून त्यानीं आपल्या जागेचा चार्ज घेतला.

प्रागतिक संघाची परिषद

कवळें येथें ता. २९-३०-३१ डिसेंबर रोजीं अत्यंत यशस्वी रीतीनें पार पडली !

ठिकठिकाणच्या प्रतिनिधी व प्रेक्षकांचा प्रचंड समुदाय !

अध्यक्षांचें अपूर्व स्वागत ! अभिष्ट चिंतनपर तारा व पत्रें !

सौंदेकर युवराजांची परिषदेस भेट !

स्वयंसेवकांची उत्कृष्ट कामगिरी

पूर्वी ठरल्याप्रमाणें प्रा. संघाच्या परिषदेस ता. २९ रोजीं कवळें येथें सुरवात झाली. सकाळपासून ठिकठिकाणचे डेलिगेट, सन्माननीय पाहुणे व प्रेक्षकांचे थव्याचे थवे श्रीशांतादुर्गा देवीच्या भव्य अग्रशाळांत लोटत होते. अग्रशाळांत व आसपासच्या घरांत ठिकठिकाणच्या प्रतिनिधींसाठीं निरनिराळ्या कॅंपांची चोख व्यवस्था करण्यांत आली होती. संध्याकाळीं साडे सात वाजण्याच्या सुमारास परिषदेचे नियोजित अध्यक्ष नामदार फट्टू बाबू केंकरे व २५० डेलिगेट यांस घेऊन पणजीहून निघालेली स्पेशल बोट दुर्भाटच्या धक्याला लागली. तेथून ही सर्व मंडळी 'दोन खांब' अशा नावानें ओळखल्या जाणाऱ्या जागेवर पोंचतांच तेथें जमलेल्या प्रचंड जन समुहासह अध्यक्षसाहेबांची जयजयकारयुक्त विजेच्या प्रकाशांत मिरवणूक श्रीशांताईच्या देवालयासमोर उभारलेल्या भव्य व सुंदर मंटपांत पोंचल्यावर अध्यक्षसाहेबांनीं सर्वांचे आभार मानून, देवदर्शन घेण्याची आपली इच्छा प्रगट केली व स्वागतमंडळीच्या वतीनें श्रीयुत शांबारावजीनीं जमलेल्या सर्व मंडळीचें सुस्वागत करून, आभारप्रदर्शनाचें काम केलें व परिषदेच्या दुसऱ्या दिवशींचा कार्यक्रम जाहीर केला. मिरवणुकींत शेंकडो लोकानीं भाग घेतला होता. या सारखी मिरवणूक गोव्यांत क्वचित पहाण्यांत येत असते.

दुसऱ्या दिवशीं बरोबर ९ वाजतां परिषदेच्या प्रत्यक्ष कार्यास प्रारंभ झाला. ५०० डेलिगेट व जवळ जवळ तितकेच प्रेक्षक यांनीं सभामंटप गच्च भरून गेला होता. प्लॅटफॉर्मवर बडीबडी संघाभिमानी मंडळी झळकत होती. अध्यक्षांची रीतसर निवड झाल्यावर ईशस्तुतिपर गायन होऊन, परिषदेचीं पुढील कामें यशस्वी रीतीनें पार पडण्यासाठीं वे. शा. सं. रामचंद्र नाईक करंडे यांनीं देवीची मंत्रोक्त प्रार्थना केली. नंतर स्वागताध्यक्ष श्री दुलवा स. ना. प्र मुख्यसरदेसाई यांचें भाषण उपाध्यक्ष श्री. दादासाहेब वैद्य यांनीं वाचून दाखविल्यावर परिषदेचे अध्यक्ष श्री० फट्टू बाबू केंकरे यांनीं आपलें व्याख्यान वाचलें. दोन्हीहि भाषणें अत्यंत सुविचार परिप्लुत, बोधप्रद व उत्साहजनक अशींच वठलीं. स्वागताध्यक्षांचें भाषण चालू असतां सौंदेकर युवराजांची स्वारी सभामंटपांत दाखल होऊन त्यांचें सभेनें टाळ्यांच्या प्रचंड गजरांत व बँडच्या सुस्वर आवाजांत स्वागत केलें. उभय अध्यक्षांचीं भाषणें संपल्यावर करंडेशास्त्री यांनीं 'समेटाचा' प्रश्न दक्षणेच्या रूपानें पुढें आणला. 'समेट' ही भानगड काय आहे, हें भारतांत लवकरच प्रसिद्ध होईल. या भानगडीची निरवानिरव होतांच, विषयनियामक मंडळ निवडण्यांत आलें. याच बैठकींत ठिकठिकाणचे गृहस्थ व संस्था यांकडून आलेल्या शेंकडो तारा वाचण्यांत आल्या. पत्रांचाहि उल्लेख झाला. परिषदेच्या कामास संध्याकाळीं ४ वाजतां पुन्हा सुरवात होऊन अनेक देशहिताचे ठराव पास झाले. डॉ० गोमीस पेरेर यांचें अंतःकरणें थरारून सोडणारें व संघास उत्तेजन देणारें असें हृदयस्पर्शी भाषण झालें. मध्यंतरीं विषयनियामक मंडळाची बैठक होऊन घटनेच्या मसुद्यावर खडाजंगी वाद झाला.

तिसऱ्या दिवशीं सकाळीं विषयनियामक मंडळाची पुन्हां बैठक भरून फिरून संघाच्या घटनेची चर्चा झाली व इतर अनेक ठरावांवरहि वादविवाद झाला. संध्याकाळीं प्रतिनिधी, अध्यक्ष, सन्माननीय पाहुणे, व्हालिंटियरस इत्यादिकांचा फोटो घेण्यांत आल्यावर परिषदेच्या शेवटच्या बैठकीस प्रारंभ होऊन तींत कार्यकारी मंडळ व मध्यवर्तीमंडळ यांची निवडणूक नवीन घटनान्वयें करण्यांत आली. इतर हरेक देशहितविषयक विषयांवर ठराव पास झाले व मध्यरात्रीच्या सुमारास परिषद अत्यंत यशस्वी रीतीनें पार पडली. परिषदेची ही बैठक संपण्यापूर्वींच एक तास आधीं केवळ वाचकानां त्रोटक पण ताजी हकीकत पुरविण्यासाठीं आह्मीं कवळेंतून बाहेर निघालों. तसें जर न करतों तर भारताचा नियमितपणा राखूनहि प्रस्तुत माहिती प्रसिद्ध करणें सर्वथैव अशक्य झालें असतें.

भारताचा स्पेशल परिषद अंक काढण्याचा योग जुळून आल्यास, वाचकानां परिषदेची समग्र हकीकत एकदम कळेलच. तोंपर्यंत वाचकान इतकेंच सांगण्याची आह्मीं परवानगी घेतो कीं, परिषदेच्या प्रचंड प्रतिनिधींच्या समुहांत दिसून आलेला अश्रुतपूर्व उत्साह, परस्परांविषयीं व्यक्त होत असलेलें शुद्ध प्रेम व आपल्या देशाविषयीं त्यांच्यांत दृष्टोत्पत्तीस येत असलेली उत्कट सहानुभूति, इत्यादि गोष्टींमुळें गोमांतकाचें नष्टचर्य संपावयाच्या बेतांत खास आलें आहे, अशी आह्मांप्रमाणेंच कोणाचीहि खात्री झाल्याशिवाय राहिली नसेल, असें आह्मांस वाटतें.

फोंडेकर मंडळीनें आपल्या पाहुण्यांची अगदीं उत्तम व्यवस्था ठेविली होती. स्वयंसेवक मंडळानें कोणालाहि कसलीच उणीव भासूं दिली नाहीं एकंदरींत आमच्या अपेक्षेपेक्षांहि परिषद यशस्वी झाली, हें कळून गोमांतक राजकीय वैभवाच्या शिखरावर विलसावा अशा विषयीं ज्या देशहित चिंतकांची अंतःकरणें सदैव तळमळत आहेत, त्यांस खरेंखुरें समाधान वाटेल, अशी आह्मीं अटकळ केल्यास ती अयोग्य ठरेल असें वाटत नाहीं.

परिषद यशस्वी झाल्यामुळें निंदकांचीं तोंडें बंद पडतील निदान सारखीं रंगतील असें वाटतें.

ctn N. 42
Quinta-feira ... neiro de 1924
... IRA
Por c... ... s rupias
S
Por cada linha a... ...petida uma tanga
Numer... ...a tanga
DIREC... ...EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.

BHARAT

वर्ष ८ वें. अंक ४२
गुरुवार ता. १७ जानेवारी सन १९२४
वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)
जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.
संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई.
केपें—गोवा.

ADORAVEL IMPRENSA!

O nosso presado colega d'*A Terra*, de Margao, sob o titulo acima, publicou um belo artigo no seu n. ° 639 de 10 do corrente mez de janeiro.

E' pequeno o artigo; mas pelas judiciosas consideraçoes que ele encerra sinifica muito.

O Bonaparte nao era dotado de grande estatura fisica; todavia soube dominar pelo valor a grande Europa do seu tempo.

Tal e qual. A extengao do alto significado daquele artigo e' inversamente proporcional a' sua dimensao.

Nao ha' duvida que e' *adoravel* a nossa imprensa que se mantem inabalavel num comodismo *nirvanico*, perante os *contra-tempos* de seus membros!

A nossa imprensa!

Sugerira alguem a idea duma associagao de jornalistas do Paiz; mas tal idea feneceu logo a' nascença, naturalmente por faltar terreno debaixo dos pe's a'quele de cujo cerebro humanitario brotou!

E' significativo tudo isso, sobretudo numa era de *fraternidade* que estamos a atravessar, pregando uniao por toda a parte.

Mas tenha o leitor a bondade de ler o que a popular e imparcial *Terra* de Margao escreve no seu artigo ADORAVEL IMPRENSA! e deduza mentalmente as ilaçoes que dele fluem.

Ei-lo:

Por motivos fu'teis foi autuado o *Bharat*, de Quepem, e acaba de ser absolvido. Parece impossivel que o tivessem submetido a um julgamento! Semelhantes processos-crimes nem devem prosseguir,quando mesmo o M. P. os promova.

O editor do *Bharat* teve tambem que se sujeitar a um outro processo por causa duma exposiçao, em carta dirigida ao administrador do concelho de Quepem, que se vergou a' infeliz ideia de desencantar nela uma infraçao da ... lei. Parece impossivel que esse caso se tivesse dado.

¡Que nao fosse esta uma *terra de raridades*.!

Nao terao—e nao tem—cabimento as arremetidas do *Bharat* contra o administrador; mas, com aquela sua iniciativa desgraçada, a referida auto

Sem "perigo" nem "heresias"

लॉटरी खर्चासाठीं महिना ५० रुपये सहज उडूं लागले ! एकाहि लॉटरीस ३ रु. सुध्दां लागले नाहींत ह्मणून मी उदास झालों नाहीं. ! " अनंत हस्तें कमलाकरानें, देतां किती घेशील दोकरानें " किंवा " अल्ला देईल तर निजल्या ठिकाणीं सुध्दां देईल " ह्या वाक्यांवर माझा पुरा विश्वास आहे ! येत्या नाताळच्या लॉटरीला मला ५० हजार रुपये लागणार नाहींत, असें कोण ह्मणेल ? पण आमची घरची मंडळी इतकी वस्ताद कीं, " लॉटरी घेऊं नकोस " ह्या उपदेशामृतांत मला गटंगळ्या खाईपर्यंत बुडवूं लागली ! इतकें झालें तरी मी लॉटरी घेण्याला कधींच अळंटळं केलं नाहीं. लॉटरी घेऊन फिरणारा जर मारे जहागिरदारासारखा फिरतो, आठ आठ दिवस भाड्याच्या सायकली घरांत बाळगूं शकतो; शिवाय ब्राह्मणीला आठ आणे रोज मुरा ठेवलेलाच, इतकें स्वर्गसुख जर लॉटरी घेऊन विक्रीसाठीं फिरणारेला, तर ती विकत घेणाराला त्याच्या दुप्पटीनें मिळालें पाहिजे, असें माझें ह्मणणें आहे !

लॉटरीमुळें मी जरी स्या कफल्लक झालों, तरी " लॉटरी " " लॉटरी संस्था " " लाटरीवाला " मला प्राणाहून प्रिय आहेत ! इतकेंच नव्हे तर निर्माल्य झालेली लॉटरी मीं गळ्यांत ताईताप्रमाणें बांधली आहे !

जरा करमेनासें झालें ह्मणजे मीं जिवास विरंगुळा करण्यासाठीं शिनुमामाचे घरीं–लॉटरी मठांत जाऊन बसतों ! ते लॉटरींचे ढिग पाहिले ह्मणजे मनाला फार समाधान वाटतें ! पांडुरंग ह्या नामघोषानें जशी साधूंची ब्रह्मानंदीं टाळी लागते, तशीच माझी " सोर्त–प्रेम फोर्त—आयतारा–आवेर्त " हें पालुपद ऐकतांना लागत असते !

श्री नागेश वांदिवडें

जाहीर विनंति

सर्व महाजन, भजक, पूजक, उत्साही वगैरे सर्व लोकांस येत्या "चैत्र पौर्णिमा" या उत्सवास, यंदा सालाबादापेक्षां जास्त (उघड) नीतिमत्ता, धर्मजागृति, आणि ब्राह्मणभोजन अशा धर्तीवर उत्सव करण्याचें ठरलेलें आहे: आमच्या धर्मांत कायकाय लिहिलेलें आहे व त्याची जागृति आबाल वृद्धांस कशी प्राप्त व्हावी ती अशा धर्तीच्या उत्सवांतून कशी सहजासहज प्राप्त करून घेतां येते, हें तत्व, पूर्वजानीं फार बारकाईनें विचार करून ठरविलेलें आहे. तें उक्त रीतीनें आजच्या आधुनिकांना समजून घेण्यास हे, व अशा धर्तीचे राष्ट्रीय उत्सव कसे कारणीभूत होतात, हें पाहण्यास व त्याप्रमाणें वागण्यास बरें पडेल; अशा समजुतीनें ही जाहीर विनंति सादर करण्यांत येत आहे अशा समयी सर्वांनी हजर होऊन लाभ करून घ्यावा:—

१ श्रीच्या उत्सवास चैत्र शु० ११ दर्शानें आरंभ तो पौर्णिमेपुढें द्वितीया पर्यंत एकसारखा चालू राहील; कीर्तन, पुराण, नाटकें, असा हा उत्सव आहे.

२ द्वादशीपासून नित्य दुपारीं व रात्रीं आरत्या होतांच अग्रशाळेवर सर्वांस भोजनें आहेत. आरत्या नंतर मंत्रपुष्प होईल (राष्ट्रांत सर्व शांतता असावी, दाण्यापाण्याची समृद्धि असावी, रोगराई होऊं नये, सर्वत्र आबादी असावी, अशीं उच्च स्वरानें प्रार्थना असते, ती सर्व प्रेक्षकांनीं हात जोडून डोई नम्र करून आपण शरणार्थी आहों अशा भावनेनें ऐकावी, असा मंत्रपुष्पांतील मंत्रांचा अर्थ आहे.)

३ कीर्तन संपून भोजन आटोपल्यानंतर रात्रौ श्रीची पालखी देवालयांतून निघून पेणी व्हावयाची, त्यांत वेदघोष, वाद्यें, दारूसामानाचे बार कलावंतिणीचा नाच–गाणे–व झुला (प्रार्थना) अशा थाटानें थोरल्या शेज्यावर श्रीची मूर्ती स्थापन व्हावयाची, नंतर नाटकास आरंभ होईल (वेद घोषानें पातकांचा नाश व्हावयाचा, वाद्यानें अभद्र शब्द कानावर येणार नाहींत, भूत पिशाच्च दुरावतात. बारानी, जे कोणी ह्मातारे कोतारे, ज्यांच्यानीं देवाच्या उत्सवांत येऊन भाग घेतां येत नाहीं, त्याना बसल्या ठिकाणी राहून देवाच्या पालखी मिरवणूकीची स्मृति होऊन तेथूनच देवास नमस्कार करण्यास जागृति व्हावी असा संदेश आहे.)

४ एकादशी पासून ते द्वितियापर्यंत रात्रौ प्रसिद्ध नटनटी यांच्या सानिध्याचे लोकशिक्षणपर नाटकांचे प्रयोग होतील, (यांत नाजूक कला धिटाई वक्तृत्वें विनयादि अभिनय संपादण्यास सुलभ पडेल)

५ श्रीची स्वारी उत्तम लालखींत आरोहण होऊन जंगी मिरवणूक होईल, त्यावेळीं गांवोगांवचे लोक मिळून एकमेकांचीं प्रीतिबंधनें, बंधुप्रेम व एकमेकांचे हेतूचें समीकरण करून घेण्यास फारच सोईचें होईल (हा मोठा फायदा राष्ट्रहितावह आहे, ह्मणून हे उत्सव आहेत.

६६ श्रीची स्वारी रुप्याच्या पालखींतून तशीच अंबारींतून मिरवत राहील. व थोरल्या रथांतून मिरवणूक होईल.

७ श्रीची स्वारी आरामवायुनांत बसून हुड्यावर जाईल, तेथें वसंत पूजेचा उत्सव ... परत देवालयांत येईल ...

दारूसामान ... बसतील, सर्व व्यापार, तामण, ... राणा व्यापार पटवेकरी वगैरे लोकांच्या ...नाची रेलचेल होईल.

९ हलवाई व ताजी मिठाई यांचीं दुकानें योग्य व्यवस्थेच्या ठिकाणीं असून निर्मळ व स्वच्छ जिनसा मिळतील.

१० सर्व, व्यवस्थेनें चालण्यास व स्वस्थता रक्षण होण्यास, पोलीस शिपाईहि असतील. वरून, कोणत्याच काळजीचें कारण नाहीं.

नागेश वांदिवडें ता० १ आप्रील १९२४

मेज मं. अध्यक्ष

व्यंकटेश रामचंद्र नाईक

वर्तमानसार

—हस्तांदोलनाची पद्धत हाणून पाडण्याच्या उद्देशानें पणजी येथें एक नवीनच संस्थास्थापन झाली असून, या संस्थेचा जो मेंबर हस्तांदोलनाला बळी पडेल, त्याकडून प्रत्येक खेपेला २ आणे दंड वसूल केला जाईल, असें प्रसिद्ध झालें आहे. संसर्गजन्य ... भीति ही सदहू संस्थेची जननी ...

—वसाहतींतील सैनिकांची ... करण्यांत येणार आहे. ... Xeldem

—वसाहत खर्चाबद्दल येथील सरकार ४ लक्ष २९ हजार रु- पोर्तुगालला रवाना करण्याच्या बेतांत आहे.

—मिनेझीस ब्रागांस व रुबेर्त कोस्त हे वसाहत परिषदेला हजर रहाण्यासाठीं गे मंगळवारीं पोर्तुगालला रवाना झाले.

—पेडणेच्या मुनिसिपालटीनेंहि आप बसलीची मदत वाढविली आहे.

—यंदा पणजीच्या पाठशाळेंत ६९९ विद्यार्थ्यांनीं प्रवेश केला होता. त्या ३८५ विद्यार्थी पास झाले. नोर्मल स्कूलच्या ६० मुलांपैकीं अवघे २८ सच पास झाले !

—कानपूर येथें गोळीबार होऊन बरेच लोक मृत्यूमुखीं पडले.

—एक प्रकारची भ्रमोत्पादक तापाची साथ नाकांवरें येथें उद्भवल्याची बोलवा आहे.

साभार स्वीकार

रण–संग्राम (साप्ताहिक):— ' संदेश ' दैनिकाचे कर्ते दे. अ० कोल्हटकर हे ' संग्रामा'चे संपादक ...टकर यावरून सदरहू पत्राच्या जोमदार धोरण कल्पना वाचकांस सहज होईल. ... लेखणींत एक प्रकारचें माधुर्य वसत असतें. कोल्हटकरी भाषाशैली अंतःकरणांत गुदगुल्या उत्पन्न करणारी असते. कोणताहि विषय चित्ताल्हादक कसा करावा, हें कोल्हटकरांना चांगलें समजतें. 'रण–संग्राम'च्या प्रथमांकांत आमच्या उपरोक्त ह्मणण्याची साक्ष जागोजागीं पटते. कोल्हटकरानीं आपल्या 'संग्रामाचें' शिंग नागपूर येथें फुंकण्यास सुरवात केली असून, अवघ्या १ रु. १३ आण्यानें त्याच्या ध्वनीचा मनमुराद फायदा घेतां येतो.

राजहंस (वर्तमानपत्र): — हें पत्र म...हिन्याला ३ दां अकोला येथें प्रसिद्ध होत असून, त्यांत विशेषतः ब्राह्मणेतर पक्षाच्या ...ज्ञाहितविषयक प्रश्नांची चर्चा करण्यात ... लेख वाचनीय असतात.

—"गेल्या २ तारखेला मडगांव येथें दैवज्ञसमाजाची एक जंगी सभा भरली होती. सभेला अध्यक्ष होते व त्यांचें भाषण वक्तृत्वपूर्ण तर झालेंच. शिवाय अनेक व्याख्यात्यांनीं आपापल्या सैल जिभांना पूर्ण संचार करण्यास मुभा दिली होती. त्यांच्या वक्तृत्वपुरांत सभाजन नुसते गटंगळ्या खात होते. व्याख्यात्यांचे बाबतींत 'एक हात मिशां व दीड हात दाढी' असाचप्रकार दिसून येत होता. व्याख्यात्यांची व व्याख्यानांची इतकी गर्दी उसळली असतांहि अखेर सभेंत काय ठरलें याचा ६००/७०० सभाजनांपैकीं एकालाहि मागमूस लागला नाही. सभेला सरकारी अधिकारी हजर होते. विशेष माहिती मागाहून कळवीन", असें "एक 'दैवज्ञ' कळवितात.

—हेलदेर रिबैर हेहि गोव्याच्या गव्हर्नरच्या जागेसाठीं उमेदवार आहेत, असें म्हणतात.

—पणजीच्या कस्टमखात्यांत ज्या वस्तूंचा लिलांव चालू माहेच्या १८, १९ व २० या तारखांस व्हावयाचा होता त्या वस्तूंचा लिलांव येत्या सप्टेंबर महिन्याच्या १, २ व ३ तारखानां होईल, असें आतां प्रसिद्ध झालें आहे.

—पणजी पाठशाळेचे नवे शिक्षक दंतीनु ज़ुनियोर यानीं आपल्या जागेचा चार्ज घेतला.

—पोर्तुगालहून निघालेल्या टपालच्या तिकिटांच्या २२ पेट्या लवकरच मुरगांवला पोंचणार आहेत

—पुण्यांत रेमार्केटांत लोकमान्यांचा पुतळा बसविण्याचे वेळीं जनतेंत अपूर्व उत्साह दिसून येत होता.

—गोव्यांत एकदां प्रसिद्धीस आलेले यौजेवियु द फांसेक यांच्यावरील संकट दूर होऊन, ते फिरून आपल्या नोकरीवर रुजू झाले.

—येथील रेलासावांचे जज्ज डॉ० मेंदीस आनेंात यांची नेमणूक लिज्बोंअ येथील हायकोर्टांत झाली आहे.

—सिंध प्रांतांत एकसारखा पाऊस पडत असल्यानें सिंधू नदीला महापूर आला आहे

—अहमदाबाद येथें एक गिरणी कोसळून, शेंकडो माणसें गारद झालीं.

विचार तरंग

इटलीच्या क्षितिजावर चकाकणारा फासिझमोचा सूर्य मावळण्याच्या पंथास लागला असून, महापदावर आरूढ झालेला त्याचा जनक मुसोलिनी पदभ्रष्ट होण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत याला कारण काय तर फासिस्ट पक्षानें अधिकार मदानें शेफारून माटियोटी यांचा केलेला खून! एकच खून व तोहि देहिक; पण त्यानें इटलीच्या लोकमतांत इतकी खळबळ उडवून दिली आहे कीं, तिला अडवून धरण्याचें सामर्थ्य इटालियन सरकारच्या मनगटांत असलेच, असें वाटत नाहीं.

× × +

आमच्या गोमांतकाचें वातावरणहि खूनी मारख्या आततायी कृत्यांनीं विटाळत नाहीं असें नाहीं; मात्र त्या खुनांचें स्वरूप देहिक स्वरूपीं नैतिक असतें. लोकांच्या नैसर्गिक हक्कांची पायमल्ली करणें ह्मणजेच नैतिक खून मारण्या इतकेंच निंद्य नव्हे काय? व्यक्तींचा देहिक खून क्षणभर दृष्टिआड करण्यास मन धजेल; पण सामुदायिक हक्कांचा नैतिक खून. कोठेंहि झाले तरी, स्वाभिमानशून्य व पौरुषहीन राष्ट्र वगळून, सहज पचनीं पडणें कठीण असतें. जगांतील एकंदर राज्यक्रांत्या हीं सदरील नैतिक खुनाचींच अपत्यें होत, हें इतिहासज्ञांस सांगण्याचें कारण नाहीं.

* * *

खुनानीं सुद्धां ज्या लोकांची शांति ढळत नाहीं, ते लोक खरोखर साधुत्वाच्या मुक्त कोटींत भराऱ्या मारणारे असले पाहिजेत. अर्थात गोमांतकीय लोकांनीं अध्यात्मिक शास्त्रांत परिक्षा देऊन पहिलें बक्षीस पटकावलें असलें पाहिजे. जें मिळविण्यास थोर लोक संसारावर लाथ मारून, नाना तऱ्हेनें देह दंडवितात, तें गोमांतकीय लोकांना जन्मतःच प्राप्त झाल्यानें, 'हरिजनाना' त्यांचा हेवाच वाटला पाहिजे, हें उघड आहे. गोमांतका, तुला प्रणिपात असो!

Anuncios

O Bharat, ano 9°, n° 20
7 de Agosto de 1924.

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.

Numero avulso 1 tanga.

Pelo Juizo de Direito da Comarca le Quepem e cartorio do escrivao de t2 °oficio que este assina, correm edi-os de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio nos ter nos do § 2° do art. 197 do Codig lo Processo Civil, citando a Suriag 'svonta Sinai Odarcar marido da Pa voti Sinainim de Oddar.e ora ausent em parte incerta de Bombaim para as sistir a todos os termos ate a final do nventario orfanologico a que se proce deu p r obito de Anandibai Odorcai que foi de Oddar, sendo inventariant e cabeça de casal Utoma Panduronga Sinai Odorcar da mesma, deduzir, que endo, nele os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento

E para ser publico se expediu est Xeldem 3 de Julho de 1924

O Escrivao de Direito do 2° oficio

Aires Manuel Barreto

Verifiqui

O Juiz de Direito

A. A, de Brito e Nascimento

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do Escrivao de 2° oficio que este assina, correm editos de 60 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos do § 2° do art° 197 do Cod. do Proc. Civ. citando os interessados Francisc Xavier Ramiro da Conceiçao Rodrigues e mulher Ignez Monteiro, Antonio Joao Rodrigues, solteiro, maior e Glaudio Abilio Rodrigues, solteiro, maior, todos de Assolna e ora ausentes, sendo o ultimo em parte incerta de Lisboa e os demais em parte incerta de Africa, para assistirem a todos os termos ate' final do inventario orfanologico a que se procede por obito de Ana Florinda Maria Ignez Monteiro e Rodrigues, moradora que foi de Assolna, sendo inventariante e cabeça de casal o seu filho Renato Monteiro Rodrigues, por outro nome Jose Renato Raimundo de Pompeia Rodrigues, da dita e deduzirem querendo, nele os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento. Para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de uepem, 24 de Julho de 1924

O Escrivao de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito.
A. A. de Brito e Nascimento

श्री खळनाथ विद्या भुवन

पोंवुर्पे येथें ता. एक आगष्टपासून श्री खळनाथ विद्याभुवन ह्या नांवाची मराठी शाळा स्थापन झाली आहे. तेव्हा सर्व पालकांनीं आपल्या मुलांस शिक्षण देववून शाळा उदयास आणण्याची आकांक्षा धरून मुलं पाठवावींत.

शाळचेसक्रेटरी
व्यंकटेश धाकू शेणवीं नावेलकर
कृष्ण ग. प्र. लंवदे

भारतमातेची आळवणी!

(चालः बाजवरे बाळा)

कविः— विनोदराव, मडगांव–गोवा.

उठरे उठ राया। भारतिया। काळ जातसे वाया!॥ ध्रु४॥
निद्रा सोडोनी। जागोनी। करीं पहारा सदनीं!
दुष्टा ही मदिरा! आलि घरा! पसरवि अंधःकारा!
वीषाचें जाळें। पसरीलें। त्यांत जीव जाळीले!
घालुनि मोहीनी। दुष्टानीं। लोटीलें दुर्व्यसनीं!
निश्चय बाणोनी। ठांसोनी। सद्भावा मनि धरुनि—
घालावा हात। कार्यांत। पीक येत जोमात!
कित्ता वडिलांचा! शुभसाचा! ध्यावयास ध्येयांचा!
परी जुनें–सोनें। न ह्मणणें। उत्तम गुण ते घेणें।
ह्मणती आधार। ज्ञाननर। तुझ्यावरी वा भार!
किति तुज सांगावें। 'बाळा, हें। वेगें कार्या झटणें!

Ano 9º N. 21
Quinta-feira 14 de Agosto de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.

BHARAT.

वर्ष ९ वें. अंक २१
गुरुवार ता. १४ आगष्ट सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें—गोवा.

ABAIXO A GREVE!

Nos concelhos das Ilhas, Bardês e Pondá as respectivas camaras *decretaram* umas tabelas de preços para a venda de peixe a peso. A esta medida os vendedores de peixe respondem com a greve que começou no proprio dia 1 de Agosto, dia em que entravam a vigorar as tabelas.

Embora na Metropole, o recurso á greve seja um direito reconhecido pela legislação da República, este direito, porêm, não tem sido, felizmente, até hoje tornado extensivo para a India. Aqui a greve é um acto que bem longe está de merecer a protecção do codigo, e, porque assim é, cumpre aos poderes públicos fazer sentir de todos os modos ao seu alcance, aos grevistas, que o meio proprio de obter o remedio para os males, de alcançar o respeito aos seus direitcs, no caso de estes e aqueles sofrerem alguma lesão, é a reclamação, é a queixa, é ainda um protesto mas não a greve.

A *moda* das greves, como tantas outras modas perniciosas, veiu-nos importada da Europa. Aqui, entre nós, apezar de nossa pobreza de nosso tam decantado atrazo, era desconhecida a greve, e ninguem pode contestar que a gente vivia feliz e satisfeita sem essa *conquista do progresso...*

Ultimamente é que surgiram as greves. A primeira, senão estamos em erro, deram nos os lavradores de palmeiras, e foi bem sucedida. Este triunfo levou os comerciantes e industriais de Bardês a ensaiarem as suas forças. Tambem verificou-se que podiam muito. E assim chegamos, num declive perigoso, a ver arvorada a greve numa arma invencivel—Hoje por coisa de nada fala-se em greves. São *greves* de estudantes, dos fornecedores de carne, e até uma vez já esteve iminente a greve dos funcionarics telegrafo-postais.

Ora, sinceramente, urge que o governo e o povo, porque a todos o problema interessa, se esforcem por estrangular o *bicho* á nacença, nunca se esquecendo de que, pelo ocidente que se blasona de civilisado, não existe uma desordem, uma crise, um problema de qualquer ordem que seja, cuja solução não seja embaraçada sempre, impossibilitada, muitas vezes, pela ameaça da greve.

Tenham em vista a historia politica destes ultimos anos da Republica Portuguesa. Estudem a sua historia economico-financeira, que já cheira á tragedia, e não será dificil a um observador mediano descubrir que o direito á greve, a tal *grande conquista* está no fundo de todas as crises. E' ela uma medida ideal, sim, mas para povos ideais que por ora só encontramos na fantasia dos doutrinarios.

A obra dos governos deve acomodar-se ás verdades de factos, deve ser uma obra positiva. O que nestes ultimos anos a Europa com cs seus filosofos e sonhadores teem feito foi uma teia confusa e perigosa que o Mussolini, na Italia, e Primo de Riviera em Espanha, procuram desfazer, talvez em vão!

Sim. A acção dos pescadores tem que ter a sua reacção forte e solida que sò pode surgir da união do Governo e do Povo, sob a legenda: *abaixo a greve!*

ECOS & CRITICA

SINAL DOS TEMPOS!

Num breve artigo que dedica ao *Caso Matteoti*, a *Terra* de Margao escreve o seguinte:—

"Infelizmente a histo'ria da humanidade e' feita com tantas torpesas! Nem sempre o inocente e' absolvido e o criminoso punido, *por haver julgadores do barro vil de verdadeiros re'os.*"

Nao e' para admirar que *isto* suceda, sabido que nem sempre preside escrupulosa selecçao a' escolha daqueles a quem se confia a sacrossanta missao de julgar.

Constata se, infelizmente, que ja' vai caindo em desuso o principio que dizia: e' preferivel absolviçao de 100 criminosos a' condenaçao dum so' inocente.

Sinal dos tempos!

E' TRISTE

Ha geral e ensurdecedor clamor contra a anormalidade de, ha' mais dum ano, nao aparecerem em circulaçao os bilhetes postais.

Isto do elemento oficial nao ligar importancia a' berrata do *ze-'pagante* nao e' nenhuma novidade nesta pacata terra de *canja* e *arroz-caril.* E' ordem do dia.

Nao somos, por ventura, um povo *conquistado*, sem voz ativa nem passiva?

Se assim nao fora, ha' muito que, de pronto se atenderia a' legitima reclamaçao contra a cro'nica falta de bilhetes postais, reclamaçao de quem deve pagar e nao...*bufar.*

Decididamente, estao semeando espinhos para colher abrolhos!

E' triste!

SEM MAIS NEN MENOS

La' porque o sr. Menezes Bragança se pronunciou hoje a favor da criaçao dos Liceus Municipais que hontem combateu, com manifesto proposito de estar bem com o sr. dr. Couceiro da Costa, entende um nosso colega que tal mudança opinativa do sr. Bragança lhe representa uma cruel expiaçao.

No's porem, lemos por outro breviario. Ca' para no's, o sr. Bragança mudando do seu parecer, a modo de quem muda do seu casaco, amarrotado e sujo, mostrou, apenas, que e' politico, tambem, e de alto coturno, por que a politica nao e' outra coisa se nao uma sciencia que ensina a gente a *virar costas* conforme o vento de interesses do estomago ou da fama.

O director de *O Debate* esta', pois, perfeitamente, dentro do circulo traçado pela politica portuguesa.

Sem mais nem menos.

HONRA LHE SEJA!

A *Provincia* de 4 de Agosto epiloga o seu artigo de fundo da seguinte maneira:

"O sr. Helder Ribeiro cumpriu a lei. A seu favor levantou-se a parte liberal do Paiz que e' a mais numerosa, que e' a mais disposta a dizer aos catolicos—apostolicos — romanos que limitem a sua acçao ao culto, se querem viver socegados a' sombra da Republica.

Senao..."

Este trecho e' do artigo intitulado *Lourdes e a Medicina* com a sub epigrafe de= *O ex-ministro da Instrucao* (Helder Ribeiro) *da' uma merecida censura a' Faculdade de Medicina de Coimbra*=.

Trasladamos para as colunas do "Bharat" o mesmo trecho por afigurar-se nos que ele envolve uma terrivel ameaça ao elemento catolico da Naçao Portuguesa.

Ha tempos e a proposito de umas consideraçoes que um jornal hindu de Margao bordara sobre uma procissao catolica, o jornal do sr. Batalha ameaçava com ferro e fogo o hinduismo, procurando, a seu modo, ser agradavel ao catolicismo do Paiz que agora ameaça.

Nao ha' duvida que o sr. Pereira Batalha e' um jornalista dos mais distintos, sabendo a *fina* arte de *se aclimatar* a' toda a sorte de meios politicos...e religiosos!

Honra lhe seja!

BATE CERTO

No Estado Nativo de Rajkot pretende-se matar a industria de espiritos e o vicio de beber vinhos.

Entre no's, e' outro o cantar.

Aqui pensa-se que os espiritos e os vinhos constituem uma especie de gazolina, indispensavel para o funcionamento do automovel — Estado, isto e', do Estado, comparado com um automovel da Comissao de Melhoramentos.

Bate certo.

स्फुट विचार

गोव्याचें राजकारणः— परसत्तेच्या लत्ताप्रहाराचें पर्यवसान गोमांतकीय जनतेच्या स्वाभिमानशुन्यतेंत कसें झालें, याचें दिग्दर्शन आह्मी गेल्या अंकीं केलेंच आहे. याच स्वाभिमानशुन्यतेचा ठसा आमच्या राजकारणांतहि उमटलेला स्पष्ट दिसून आल्यास त्यांत नवल नाहीं. गोमांतक व पोर्तुगाल या दोन्हीं देशांचे देह निरनिराळे असले तरी या उभयतांत एकच राजकीय आत्मा खेळत असल्याच्या ठाम कल्पनेनें राजकारणांत वावरणाऱ्या बहुसंख्यांक लोकांच्या मनांत आपलें ठाणें बसविलें गेल्यानें, स्वदेश व स्वराज्य, स्वत्व व स्वातंत्र्य, या उच्चतम भावनांचा उदय त्यांच्या फिरंगाळलेल्या अतएव गचाळलेल्या मनांत होणें अशक्य झालें व त्यांच्या राजकारणाच्या ध्येयाची व्याप्ति सरकारी मेहरनजरेच्या मवाळ मदतीनें नोकरशाहींत स्वार्थी बढती कमावणें या पलीकडे जाऊं शकली नाहीं. परसत्तेनें आमच्या सांपत्तिक मत्तेचें मातेरें तर केलेंच, शिवाय नीतिमत्तेचाहि फन्ना उडविला, हें, गोव्याच्या राजकारणाच्या इतिहासावरुन, सिद्ध होत आहे.

विनाश काले विपरीत बुद्धिः—गोमांतकीय राजकारणाची इमारत स्वार्थाच्या दूषित पायावर उभारली गेली असल्यानें, स्वराज्यसुंदरीला तींत पूर्ण मज्जाव असावा, हें अर्थात योग्यच आहे. "पोर्तुगालचें स्वराज्य तेंच गोमांतकाचें स्वराज्य, गोमांतकदेश हा पोर्तुगालचाच एक भाग आहे," ही विचारसरणी ठळक अक्षरानीं त्या इमारतीवर फडकत असलेल्या पताकांवर खोदली गेली असल्यानें स्वतंत्रतेची शुद्ध व आत्मोद्धारक हवा तींत न शिरली तर नवल कोणतें? नवजीवनाच्या सोसाट्याच्या वाऱ्यानें तरी उपरोक्त जुनी इमारत खिळखिळेल, अशी कित्येक आशावादी देशहितचिंतकांस आशा होती; पण तीहि मिनेजीस ब्रागांस व रबेर्त ब्रूत दा कोस्त यानीं, पोर्तुगालांत आपल्या अकलेचे विनाश कालाला योग्यच असे विपरित बुद्धि दर्शविणारे तारे तोडून, सपशेल फोल केली, हें वाचकांच्या स्मरणांतून गेलें नसेल.

स्वभावो दुरति क्रमः— तात्पर्य, गोमांतकीय राजकारण फळाचा स्वार्थाशिवाय दुसरा रसच निघणें परसत्तेनें अशक्य करून टांकलें आहे. इतर देशांतल्याप्रमाणें येथेंहि राजकीय पक्ष आहेत. भेद इतकाच कीं, इतर देशांतील पक्ष देशकल्याणासाठीं आपल्या रक्ताचें पाणी करीत असतात, तर आमचे पक्ष स्वार्थासाठीं आपल्या देशाच्या व देशबांधवांच्या रक्ताचें पाणी करीत असतात! सरकारच्या सहाय्यानें आपलें व आपल्या अनुयायांचें पोट जाळणें, हाच प्रमुख हेतु येथील राजकारणी पक्षानां जन्म देत असतो, असें स्पष्ट विधान केल्यास, तें अतिशयोक्तीच्या दोषास पात्र होईल, असें वाटत नाहीं. स्वार्थ हा आमच्या राजकारणी लोकांचा स्वभावच बनला आहे व याचा अनुभव राजकारणाच्या अगदीं क्षुल्लक गोष्टींत सुद्धां दिसून येत असतो. जी व्यक्ति येथील राजकारणांत शिरून, स्वार्थमूलक हेतूनें स्वताचे खिसे गरम करीत नाहीं, ती व्यक्ति आमच्या राजकारणी मुत्सद्यांच्या उपहासास सदैव पात्र होत असते. यावरून गोमांतकाच्या राजकारणाची खरी कल्पना आमच्या वाचकांस होईल, अशी आशा आहे.

दुःखांत सुखः— दुःखांत सुख एवढेंच कीं, गोव्याच्या राजकारणास जडलेला हा स्वार्थाचा जुना व भयंकर रोग नष्ट करण्यासाठीं आमचीं हिंदु पत्रें व हिंदु लोक आपली शक्तिसर्वस्व वेंचीत आहेत. पोर्तुगाल सारख्या परकीय राष्ट्राचे लत्ताप्रहार बिनबोभाट सहन करण्यासाठीं परमेश्वरानें गोमांतक देश निर्माण केला नसून, इतर स्वतंत्र राष्ट्रांप्रमाणेंच स्वातंत्र्याचा पूर्ण उपभोग घेण्याची त्याची योग्यता आहे, असें हिंदु राजकारणाने जगजाहीर करण्याचें धैर्य प्रगट केलें आहे. व आनंदाची गोष्ट कीं, या ध्येयाला कवटाळून धरण्याला कांहीं खिस्ती तरुणहि पुढें सरसावत आहेत. गोष्ट खरी कीं, ह्या तरुणांचें संख्याबल आज अगदीं कमी आहे; परंतु आमच्या चळवळीला सध्या प्रमाणेंच यापुढेंहि स्वाभिमानी नेटाचा टेकू अप्रतिबंधपणें मिळाला गेल्यास, तें संख्याबल फुगत गेल्याखेरीज खास रहाणार नाही, याची खात्री प्रत्येक हिंदूनें बाळगावी.

विचारानें आचार करा! :—माशेडें येथें गेल्या दिवसांमागें कांहीं खिस्ती लोकानीं आपल्या 'क्रोस' दैवताचीं स्तुतिस्तोत्रें गाइलीं. या समारंभास कांहीं हिंदु लोकहि हजर होते, असें कित्येक खिस्तीं पत्रांत वाचून मन आश्चर्यानें थक्क झालें! केवळ 'दोन घटका मनोरंजन' करण्याच्या इराद्यानें सदरील 'क्रोस' उत्सवास ते हिंदु हजर राहिले असते तर त्यांची हजेरी घेण्याचें कोणासहि कारण पडलें नसतें; पण वर्तमान पत्रांनीं ज्या रीतीनें उत्सवाची हकीकत प्रसिद्ध केली आहे, त्या रीतीचें सूक्ष्म अवलोकन केल्यास उपरोक्त हिंदूंचा मनोरंजनाशिवाय दुसरा एकादा हेतु होता, असें ध्वनित होऊन, ह्या हेतूमुळें त्यांचें आचरण आक्षेपार्ह ठरतें. आह्मांला असें वाटतें कीं, जे हिंदु त्या उत्सवांत सामील झाले, ते मुळीं अस्सल हिंदु धर्माचेच नसले पाहिजेत. ते कोणीं तरी खिस्ती लोकांची 'हां जी हां जी' करून आपला तळीराम गार करणारे अधर्माचरणी नुसते नांवाचे हिंदु असावेत, असा आमचा तर्क वहातो. हिंदु धर्माचे खरे चहाते असे एकाएकीं बहकतील, असा समज करून घेण्यास आमचें मन धजत नाहीं. कसेंहि असो, माशेडेंचे ह्या हिंदु लोक स्वार्थांध बनलेल्या आपल्या धर्मबांधवांस ताळ्यावर आणण्याचें पुण्य संपादून, खिस्ती टीकाकारांचीं बेमुर्वतखोर तोंडें यापुढें तरी बंद पाडतील, अशी आह्मांस उमेद आहे. कोठेंहि झालें तरी विचारविरहित आचार दोषार्हच मानला जातो.

आवतोनोमीः—"आवतोनोमी" ह्मणजेच ज्याला स्वराज्य या पर्याय शब्दानें संबोधण्याची आह्मांस वाईट खोड लागली आहे त्या आवतोनोमीनें येथें सध्या दोन पक्षांस जन्म दिला आहे. एक पक्ष तिचीं स्तुतिस्तोत्रें गाणारा असून, दुसरा तिच्या अस्तित्वावर एक सारखा टीकास्त्राचे जोरदार प्रहार करणारा आहे. एका पक्षाला आवतोनोमी मान्य आहे तर दुसरा पक्ष, गोमांतकाला ज्या आपत्तीनें संकटांच्या समुद्रांत गटांगळ्या खावयास लाविलें आहे, त्या आपत्तीची सगळी जबाबदारी, आवतोनोमीवर लादण्यास मागें पुढें पहात नाहीं. एका पक्षाच्या मतें गोमांतकांत आवतोनोमी आहे, ह्मणून गोमांतकीयानां दुःख नाहीं तर दुसऱ्या पक्षाचें ह्मणणें, गोमांतकाला वरिष्ट सरकारनें आवतोनोमीचा अहेर केला नसता, तर गोमांतकीयांची स्थिति एकदम इतकी दुःखग्रस्त झाली नसती, असें आहे. एवंच दोन बाइलांच्या दादल्याच्या स्थितीप्रमाणें आमच्या आवतोनोमीची प्रस्तुत कष्टद अवस्था झाली आहे. बाकी आमच्या मतें, ज्या परिस्थितींत सांप्रत आवतोनोमीचा पोरखेळ चालू आहे, त्या परिस्थितीची छाननी केली असतां, आवतोनीमी असली काय किंवा नसली काय, मिळून एकच. ज्या आवतोनोमीच्या कार्यक्षेत्रांत पोर्तुगाल सरकारला मन मानेल तसा धिंगाणा घालण्यास वाव आहे, ती मुळीं आवतोनोमीच नव्हे. ती आवतोनोमीची नक्कलसुद्धां नसून बेअकली लोंकानां राजरोस रीतीनें फसविण्याची ती एक अजब शक्कल आहे. असो. आवतोनोमीचा कोळसा जितका उगाळावा तितका काळाच!

पोर्तुगालची राजकीय परिस्थितिः—पोर्तुगालच्या राजकीय परिस्थितीची तुलना कुत्र्याच्या शेंपुटाशीं केल्यास, अतिशयोक्तीच्या दोषारोपास आह्मीं पात्र होऊं, असें वाटत नाहीं. कुत्र्याचें शेंपूट कितीहि काळ नळींत कोंबून ठेविलें तरी जसें तें आपल्या वांकुडपणाला फांटा देण्याला तयार नसतें, तद्वत पोर्तुगालच्या राजकीय परिस्थितीची हुबेहुब अवस्था झाली आहे. कितीहि खंबीर प्रधानमंडळाच्या नळींत पोर्तुगालच्या राजकीय अस्वस्थतेचें वक्र शेंपूट रिपब्लिकच्या अध्यक्षसाहेबानीं दडपून दिलें, तरी अखेर त्याच्या पूर्व व विकृत स्वरूपांत बदल ह्मणून व्हावयाचाच नाहीं, असें बिनदिक्कत ह्मणण्यास कोणतीच हरकत नाहीं. बॅाबचे अत्याचार, जाळपोळ, दंगेधोपे व यत्सम इतर शांतताविघातक गोष्टी रिपब्लिकच्या प्राणप्रतिष्ठेपासून तों आज तागायत एकसारखा धुमाकूळ घालीतच आहेत. त्यांना कायमचा मोक्ष देणारा महात्मा अजून तेथें कोणीच जन्मलेला नाहीं. प्रधानमंडळाच्या जीविताप्रमाणेंच व्यक्तींचेंहि जीवित क्षणभंगुरतेच्या फेऱ्यांत पक्कें गुरफटलेलें असून, घटकेनें परत येण्याच्या इराद्यानें घराबाहेर पडलेला इसम परत आपल्या कुटुंबाला जिवंतपणीं भेटेलच, याची खात्री देणारास खुषाल वेड्याचा हॅास्पिटलांत रवाना करावें. एतावता प्रजासत्ताक राजक्रांतीनें पोर्तुगालच्या राजकीय वातावरणांत उत्पन्न केलेल्या अस्थिरतेचें निर्मूलन करण्यास १३।१४ वर्षांच्या दीर्घ अवधींत नवीन राज्यपद्धतीचे नेते शकले नाहींत, ही दुर्दैवाची गोष्ट होय.

आणखीं एक सत्कृत्यः—डॉ० जाइम द मोराईस यांची येथील कारकीर्द अनेक दृष्टीनीं चिरस्मरणीय होईल, यांत संशय नाहीं करांच्या भयंकर मान्यासारख्या अनेक मत्कृत्याचें तेज फिकें पडेल ह्मणूनच कीं काय मशारनिल्हे प्रांताधिकाऱ्यानीं दमणला घोड्यांच्या शर्यतीचा लाभ करून देऊन, आपली कीर्ति उज्ज्वल राखण्याचा प्रयत्न केला आहे. लॅाटरींच्या मायाजाळांतून एकादा वेडा मुक्त झाल्यास तो अचूक शर्यतीच्या पकडींत सांपडला जाऊन त्याच्या संपत्तीबरोबरच दानतीचेंहि खोबरें व्हावें, असाच या शर्यतेच्या बुडाशीं निःस्वार्थी हेतु नाचत असला पाहिजे कूक—बटलर ॲंड को०, कलावंतिणी व आंबे इत्याद्यनेक चिजानी नावांरूपास आलेली आमची मातृभूमि लॅाटरींच्याच सुकाळानें आपल्या अनुपमेय लौकिकांत भर घालील असें नसून त्याला दमणच्या शर्यतीचीहि मौल्यवान जोड मिळाल्याचें पाहून, कोणत्या पाषाण हृदयी माणसाचें अंतःकरण कृतज्ञतेनें द्रवल्याशिवाय राहील? खरोखर आमचें भाग्यच ह्मणून पो- हिंदुस्थानाला डॉ. जाईम द मोराईस यांच्या सारख्या लोकहितवादी मुत्सद्यांचा अपूर्व लाभ झाला!

दैवज्ञ—प्रकरणः— मडगांवच्या दैवज्ञ प्रकरणासंबंधीं आह्मांकडे प्रसिद्धीसाठीं अनेक पत्रव्यवहार आले असून, त्यांच्या नुसत्या सारांशानेंहि 'भारता'ची बरीच जागा व्यापिली जाण्याचा संभव आहे. प्रत्येक पत्रलेखकानें आपापल्यापरी त्या प्रकरणाविषयीं विचारवैचित्र्य प्रगट केलें असून, तयार दागिन्याच्या दुकानांविरुद्ध करण्यांत आलेल्या गिल्याचें व हल्ल्याचें समर्थन त्यांपैकीं एकानेंहि केलें नाहीं, हें नमूद करण्यास समाधान वाटतें. तयार दागिन्याचें दुकान कोणीहि खुषाल उघडावें. स्वतंत्रतेच्या या चालत्या युगांत, त्याला मज्जाव करण्यास कोणीहि पुढें सरसावणें ह्मणजे एका पवित्र तत्वाविषयी त्यानें आपली नापसंती दर्शवून जाणून बुजून स्वताला वेडेपणाचा शिका मारून घेण्यासारखें अनुचित होय. मडगांवच्या दैवज्ञ—प्रकरणानें उत्पन्न झालेला परस्परांतील द्वेषाग्नी विझून त्यांच्यांत पूर्णैक्य नांदो व त्याची भरभराटी होवो, अशीच भारताची परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

—दमण येथें नवीनच स्थापण्यांत येणाऱ्या घोडयांच्या शर्यतीच्या मक्त्याचा लिलांव येत्या सप्टेंबर महिन्याच्या २९ तारखेला पुकारला जाणार आहे.

—लोकमान्यांच्या गेल्या चतुर्वार्षिक श्राद्धदिना निमित्त आह्मी लोकमान्यांच्या स्मारकाकरितां ह्मणून स्थापण्यांत आलेल्या सार्वजनिक वाचनालयांना फक्त १ रु. ट. खर्च घेऊन आमचें 'लोकपक्ष' साप्ताहिक पत्र काँग्रेस पर्यंत देण्याचें ठरविलें आहे. कर्नाटकांतील सार्यंत माहितीनें भरलेलें राष्ट्रीय पक्षाचें हेंच पहिलें मराठी साप्ताहिक आहे, असें त्या पत्राचे मनेजर कळवितात.

—डिचोली गोवा येथें श्रीशिवतत्वप्रसारक संघ नागपंचमीच्या मुहुर्तावर स्थापण्यांत आला व संघातर्फे श्रीयुत रामराव देसाई यांच्या हस्तें श्री शांतादुर्गा वाचनालय उघडण्यांत आलें.

— डॉ. जाइम द मोराइस हे निजधामास गेल्यानंतर प्रस्तुतचे सेक्रेतारियु दु गोव्हेर्नु डॉ. पेंशोतु व्हियेरू यांची गव्हर्नरचे जागीं तात्पुर्ती नेमणूक होणार आहे.

—राजकोट संस्थाननें दारूच्या आयातीला कडक निर्बंध घातला आहे. आणि इकडे तर दारूला राज्यशकटाच्या मोटारचें 'गाजोलीन' मानलें जातें !

—दुष्काळी प्रदेशांतील दारूचीं सर्व दुकानें बंद करण्यांत यावींत, असा ठराव मद्रास कौन्सिलपुढें येणार आहे.

—सिद्दिक नामक एक मुसलमान आपण चनयसवेश्वराचे अवतार आहोंत, असें सांगून बेळगांवच्या लिंगायतांना चकवित आहेत !

—दे० दास या समवेत त्यांची सहकारिणी वासंतीदेवी याहि विलायतेला जाणार आहेत.

— मि. हजरत मोहानी यांची आगष्टच्या १२ तारखेस येरवडयाच्या तुरुंगांतून सुटका होईल असें ह्मणतात.

— म्हैसूर येथें आंधळे व मुके यांच्याकरितां एक पाठशाळा असून तींत आंधळ्यांना लिहिणें, वाचणें, गाणें व वाजविणें शिकविण्यांत येतें आणि मुक्यांना विणणें, शिवणें वगैरे शिकविलें जातें. हिंदुस्थान सरकार निदान प्रत्येक जिल्ह्यांत एक तरी अशी शाळा उघडील काय?

— बागलकोट येथें भरलेल्या औद्योगिक व शेतकी प्रदर्शनांत श्री. फातर्फेकर यांना आंब्याच्या कलमाच्या कौशल्यावद्दल रौप्य पदक देण्यांत आलें.

— इंग्लंडांतील ट्रेड फॅसिलिटीज अॅक्टच्या अन्वयें तेथील सरकारनें दूध, दहीं ठेवण्याचे व खाण्याचे पदार्थ वगैरेंचा धंदा करणाऱ्या सरकारी सोसायटयांना पैशाची मदत करण्याची योजना प्रसिद्ध केली आहे.

— इटालींत प्रेस अॅक्टाची अमलबजावणी सुरू केल्यामुळें बरींच वर्तमानपत्रें बंद पडलीं.

— चीनमध्यें जलप्रलय होऊन लाखों लोक निराश्रित झाले असून अनेक लोक प्राणास मुकल्याची वार्ता आहे.

—धारवाड जिल्ह्यांतील यमनूरच्या जत्रेंत देवाच्या नानांवर १४।१५ हजार बकऱ्यांचा बळी देण्यांत येत असे; तो जीवदयामंडळीच्या प्रयत्नामुळें चार हजारांवरच आला. अर्थात १०।११ हजार बकऱ्यांचा जीव वचावला गेला, हें उघड आहे.

—वीस वर्षांत पूण दारूबंदी करण्याचें बिल मुंबई-कायदे कौन्सिलांत गेल्या महिन्याच्या ३० तारखेला पास झालें.

—देवी सरोजिनी नायडू या हिंदु-मुसलमानांचें ऐक्य घडवून आणण्यासाठीं सिंध व उत्तर प्रांतांत दौरा काढणार आहेत.

—परलोक विद्या विशारदांची आंतर-राष्ट्रीय परिषद पॅरिस येथें सप्टेंबरच्या २८।२९ तारखांना भरणार असून त्या सभेला हजर राहण्याकरितां रा. ऋषि यांना निमंत्रण दिले आहे.

—आरुमगाह नांवचा बंडखोर कुंभकोण प्रांतांत बरेच अत्याचार करीत आहे. त्यानें एका गांवकुळकर्ण्याचा व आपल्या चुलत्याचा खून केला असून त्याच्या हालचालीची वर्दी देणाऱ्यांचा तो खून करीत असतो! त्यास पकडण्याचा प्रयत्न चालला आहे

—नागपूरच्या युनिव्हर्सिटीला इमारती करितां मेसर्स टाटा अँड सन्स यांनीं १ लाख रुपयांची देणगी दिली.

—मद्रास शहरांत ११४१ पुरुष व ६४६ बायका असे एकंदर १७८७ भिकारी असून त्यांत ११११ हिंदु, ५८४ मुसलमान ८० इंडियन ख्रिश्चन व १ अँग्लो इंडियन अशी वर्गवारी आहे.

एक भयंकर टोळी !

केपें येथील कोमार्कांची सध्या फार चमत्कारिक स्थिति झाली असून, केव्हां कोणावर कसा प्रसंग येईल याचा नेम नाहीं. कांहीं उडाणटप्पू लोकांची एक भयंकर टोळी जमली असून, या टोळीचें मुख्य काम ह्मणजे निरपराधी न निरुपद्रवी लोकांस निर्दयपणें छळण्याचें होय. या टोळींतला एकादा इसम फिर्यादीची कामगिरी पत्करतो, कित्येक साक्षीदारांचें सोंग आणतात व या कपट नाटकाचा शेवट यशस्वी व्हावा या पापी हेतूनें बाकीचे आपल्या पाताळयंत्री सल्यानें आंतून नाटकाचीं सूत्रें हालवीत असतात ! राजरोस रीतीनें 'विजे'च्या प्रकाशांत चालू असलेलीं उपरोक्त टोळीचीं 'कृष्ण'कृत्यें मानवी न्यायाचे तर धिंडवडे उडवितातच. शिवाय तीं समाजाची नीति बिघडविण्यास प्रमुखत्वानें कारणीभूत होत असतात ! नवीन जन्मास आलेली सदरील टोळी ही पहिलीच नसून, तिच्याच सारख्या टोळ्या यापूर्वींहि येथें निर्माण झाल्या होत्या; परंतु येथील काहीं माजी जज्जांच्या निःपक्षपाती व जोरदार धोरणानें त्यांचा तेव्हांच नायनाट झाला. वेळ येतांच प्रस्तुत टोळीलाहि आपल्या अघोर कृत्यांचा जाब देण्यास यमाच्या दरबारीं गमन करावें लागेलच. पण तोंपर्यंत ती किती निरपराधी लोकांचा बळी घेईल, हें समजणें कठीण आहे. न्यायाच्या वर्तुळाबाहेर एकहि पाऊल न टाकणाऱ्या सभ्य गृहस्थांसच प्रस्तुतच्या सोनेरी टोळीपासून ज्यास्त उपद्रव होण्याचा संभव आहे. असें जरी असलें, तरी सत्पक्षानें आपलें धैर्य खचूं न देतां प्राप्त संकटाशीं दोन हात करण्यास समरांगणांत उभें ठाकलें पाहिजे. दुष्ट लोकांच्या पापी कृत्यांचा घडा भरत चालला आहे, असें आह्मी कां समजूं नये ! असो. केवळ सार्वजनिक स्वास्थ्याला ती टोळी धोका आणण्याचा कसून प्रयत्न करीत असल्यावरून आह्मांला या विषयाची माहिती स्थानिक लोकांस करून देणें भाग पडत आहे.

Anuncios

O Bharat, ano 9°, n° 21
14 de Agosto de 1924.

Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida.

Numero avulso 1 tanga.

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 of que este assina, correm éditos de 30 d as contados do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos do § 2 ° do art. 197 do Cod. do. Proc. Civ. citando Madeva Purxotoma Xete, casado, proprietario e residente em parte incerta de Mudguiry de Karvar do territorio extrangeiro para na qualidade de credor hipotecario inscrito com credito registado a seu favor na importancia de setsentos rupias, assistir a todos os termos da execução por custas que o Digno Agente do Ministerio Publico nesta comarca promove contra Naraina Venctexa Xete e mulher e Santoia Venctexa Xete e mulher, todos de Poinguinim de Canacona, por apenso aos autos de embargos de executado deduzidos por este á execuçao hipotecaria contra eles instaurada por Ramachondra Madeva Achári, de Portagale de Canacona e deduzir querendo nela os seus direitos. E para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de Quepem, 2 de Agosto de 1924.

O escrivão de direito do 2 ° oficio.

Aires Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito
A. A de Brito e Nascimento

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do Escrivao de 2 ° oficio que este assina, correm editos de 60 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio nos termos do § 2 ° do art ° 197 do Cod. do Proc. Civ. citando os interessados Francisco Xavier Ramiro da Conceiçao Rodrigues e mulher Ignez Monteiro, Antonio Joao Rodrigues, solteiro, maior e Glaudio Abilio Rodrigues, solteiro, maior, todos de Assolna e ora ausentes, sendo o ultimo em parte incerta de Lisboa e os demais em parte incerta de Africa, para assistirem a todos os termos ate' final do inventario orfanologico a que se procede por obito de Ana Florinda Maria Ignez Monteiro e Rodrigues, moradora que foi de Assolna, sendo inventariante e cabeça de casal o seu filho Renato Monteiro Rodrigues, por outro nome Jose Renato Raimundo de Pompeia Rodrigues, da dita e deduzirem querendo nele os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento. Para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de Quepem, 24 de Julho de 1924

O Escrivao de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei

O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

श्री रवळनाथ विद्या भुवन

पोंत्रुपें येथें ता. एक आगष्टपासून श्री रवळनाथ विद्याभुवन ह्या नांवाची मराठी शाळा स्थापन झाली आहे. तेव्हा सर्व पालकांनीं आपल्या मुलांस शिक्षण देववून शाळा उदयास आणण्याची आकांक्षा धरून मुलें पाठवावींत.

शाळचेसक्रेटरी
व्यंकटेश धाकू शेणवी नावेलकर
कृष्ण ग. म. लंवदे

Ano 9 o N. 22

…ta-feira 21 de Agosto de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
J. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत

BHARAT

वर्ष ९ वें. अंक २२

गुरुवार ता. २१ आगष्ट सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें-गोवा.

DE RELANCE...

INSPECÇOES EM BICHOLIM

No nosso distinto colega "A terra„ aparece sob a epigrafe "Uma gazeta" o seguinte, cujo criterio apoiamos calorosamente:

"De curioso fomos ler o ultimo numero da "Gazeta da Relaçao de Nova Goa".

Lemos o Acordao do Conselho Colonial sobre o recurso do funcionario de fazenda sr. Caetano de Albuquerque. Nao nos espantou, porque a "Gazeta" vem publicando decisoes e arestos. Notamos, porem, que em nota a' redacçao condenava a posterior nomeaçao do sr. Albuquerque para um lugar da Caixa de Credito.

Ficamos entao sabendo que a "Gazeta" passava a ser jornal com esfera mais ampla do que aquela que pelo seu caracter lhe compete—ja' se mete na administraçao publica.

Conviria que de'sse o seu parecer sobre todas as nomeaçoes ilegais e abonos inverossimeis de transportes por causa de inspecçoes do Registo Civil em Bicholim e se manifestasse francamente uma "gazeta politica." contra o programa que se propo's.

—Ca' vao os nossos votos. E vamos de curioso, ler os estatutos da Gazeta."

E' UM CONSELHO...

No ultimo numero da apreciada revista dos novos *A Patria* vem uma aguarela interessante, traçada em linhas cuidadas, em que o conhecido cultor das letras indo. portuguesas sr. Nogar Prudente Lourenço pinta o "Manilheiro", um tipo tam popular e tam atraente da nossa terra.

Bem sabemos que o sr. Nogar dispensa os elogios nossos, mas no's se nos referimos ao trabalho do mesmo e' para chamar a atençao dos novos que colaboram na revista, para o repositorio inexgotavel e impressionavel do *fol-crore* indiano, onde os rapazes podem ir com mais proveito e mais originalidade tirar os motivos para os ensaios literarios, do que reproduzindo as *coisas sabidas* sobre a Inquisiçao, e sobre os ateus que morrem na mao de Deus. na sua mao direita.

E' um conselho, rapazes, e sincero.

APO'S A ABERTURA DA LOTARIA DE MAPUÇA'

FALA UM BARDEZANO

Snr. Director!

Dias de anciedade e de tristeza foram êsses que antecederam á abertura da Lotaria do meu Concelho.

Mais uma vêz se viu a impáfia ser abatida pela eloquencia esmagadora dos numeros e ruir o castelo de cartas engendrado pelas *grandes cabeças financeiras* que querem avançar demais sem primeiro lançar umas bases sólidas, onde erigir o edificio do seu ideal.

Sucedeu o que tinhamos previsto no seu apreciado jornal e se não fosse o nosso rebate, a Lotaria estaria irremediavelmente perdida. Se não foi um desastre, não se atingiu também um triunfo que o povo de Bardês tinha o direito de obter, dadas as tradições mantidas em todos os momentos da sua história cívica. Mas os bardezanos não teem de se envergonhar pelo fiasco da lotaria, pois as responsabilidades cabem únicamente áquele que procurou conglobar em si todas as funcções e atribuições e apesar de longos seis mezes não conseguiu colocar nem metade de cautelas.

Rialmente a *direcção* do sr. dr. F. Ribeiro estava para se sumir e com êle o nosso pundonor mas em frente da vergonha que nos ia encher vimos pessoas sem olhar canceiras nem fadigas, redobrarem de esforços para nos salvar da calamidade iminente! E assim, entre outros, os srs. F. Mascarenhas, J. Menezes, N. Sequeira, o adv. C. F. Saldanha, João Mariano de Almeida, dr. Millot Faria, o farmacêutico F. A. de Noronha e principalmente o administrador deste Concelho sr. P. J. Gomes foram os verdadeiros salvadores da Lotaria, sem os quais a *alma da direcção* teria vendido a alma da Lotaria e do Asilo ao diabo.

Sem embargo deste concurso de pessoas cheias de dedicação e boa vontade pelo Asilo nada menos de quarenta mil cautelas ficaram, segundo nos consta, sem serem vendidas e crêmos que o calculo é quasi exacto a calcular pelo montão de bilhetes que se via na mesa da Direcção no dia da abertura da Lotaria, montão que valia por uma prova mais flagrante e incontestavel da inaptidão do sr. dr. F. Ribeiro.

Não sabemos se a lotaria deixará lucros, mas mesmo que apresente algumas mil rupias a favor do Asilo, bem longe está o dia em que o sr. dr. F. Ribeiro, ávido de uma glória falsa consiga construir o Hospital, sem medir o alcance do seu plano traçado confiando em miragens que só nos trarão vergonha e ruina!

Era inadiavel e de máxima necessidade que todos os bilhetes da Lotaria fossem vendidos e que neste ensaio a casa fôsse acreditada, o que certamente seria se não fosse o silencio propositado e o *plano prudente* do sr. dr. Ribeiro em ocultar tudo para emfim andar em piruetas á aproximação do fiasco.

Depois de tantas lutas e esforços e gastos, os lucros do Asilo serão tão grandes como os seus *mirabolantes planos*, e *promessas* dos fantasistas.

E nem calculamos o que seria da Lotaria se o primitivo plano de quinhentas mil cautelas fôsse aprovado! A catastrofe seria irremediavel se o sr. governador geral, dr. Jaime de Morais não entravasse de pronto o *vôo funambulesco* a que se entregara a *alma* da direcção.

Antes do plano e post-plano aqui ninguem foi consultado e o seu resultado é o que estamos a vêr—um completo desapontamento.

O sr. dr. Ribeiro na ancia de reter tudo nas suas mãos julgou-se capaz de arcar com todas as dificuldades e encontrou-se á ultima hora num labirinto, —tal era a amarga rialidade dos factos e dos números.

Neste transe terrivel houve um sossobro tamanho que muitos não hesitaram, perante o sacrificio, de revender cada cautela @ de 14 e até 12 tangas, sofrendo a diferença com o fim de salvar o Asilo.

Perante o resultado da primeira lotaria que foi pouco satisfatorio por culpas que aos bardezanos não se podem imputar, não sabemos o que pensa a Direcção no que diz respeito á construcção do Hospital. Quanto a nós nem vale a pena desde já meter-se em tais assados sem dantemão preparar os fundos suficientes para a manutenção do mesmo e andar muito confiado em Lotarias, dada a oposição dos patriotas da India Inglêsa.

E' verdade que todos se interessam pelo alto ideal de bem comum, mas aquêle que procura levar avante um fim público ás escuras, não pode inspirar confiança e só irá afugentar intenções puras e bemfasejas.

नतो याबद्दल भगवान सांगतात---

परित्राणाय साधुनां विनाशाय च दुष्कृताम्।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥

"साधूंच्या संरक्षणार्थ आणि दुष्टांचा नाश करण्यास युगीं युगीं, धर्मसंस्थापनेसाठीं मी जन्म घेत असतों."

वरील श्रीकृष्ण पूर्वकालिन परिस्थितीकडे लक्ष्य दिलें असतां या महात्म्यासारखी कोणती तरी एकादी विभूति पाहिजे होती व हें कार्य श्रीकृष्णाकडून झालें याचमुळें त्या महात्म्याचें आपण पूजन करणें इष्ट आहे. श्रीकृष्ण कालाकडे नजर फेकल्यास नुसत्या धार्मिक बाबतींतच नव्हे तर इतर बाबतींत सुद्धां या महात्म्याची अत्यंत आवश्यकता होती. भारतव त्यावेळीं ऐश्वर्याच्या शिखरावर होता व ह्या ऐश्वर्यमदाचा परिणाम बऱ्याचशा राजांवर झालेला होता. कंस, जरासंध, नरकासूर वगैरे राजे मदोन्मत्त होऊन आपल्या प्रजेवर अत्याचार करूं लागले होते. त्याचें पारिपत्य करणारा कोणी तरी पाहिजे होता व हें कार्य श्रीकृष्णाकडून पार पडलें हें श्रीकृष्ण चरित्र वाचकांस अवगत आहेच.

श्रीकृष्ण ही एक जगांतील थोर व सर्वगुणसंपन्न विभूति होती.श्री कृष्णानें सर्व शास्त्रांचा व अस्त्रांचा अभ्यास केलेला होता. त्या काळीं श्री कृष्णाशीं तुलना करणारी दुसरी कोणतीच व्यक्ति नव्हती. सभापर्व अ. ३८ मध्यें भिष्म सांगतातः "कृष्ण वेद व वेदांगें जाणणारा आहे, तसेंच त्यांच्यामध्यें सर्वांपेक्षां ज्यास्त बळ आहे, या जगांतील मनुष्यामध्यें श्री कृष्णापेक्षां दुसरा कोण श्रेष्ठ आहे?". या वरून श्रीकृष्णाच्या श्रेष्ठत्वाची कल्पना होईल. आज कांहीं जण श्रीकृष्णाची तुलना बुद्ध किंवा खिस्त यांच्याशीं करतात. परंतु ही तुलना करतानां त्यानीं एक मुद्दा लक्षांत घेणें जरूरीचें आहे. तो हा कीं, ह्या दोनहि व्यक्ति संसाराविषयीं अत्यंत उदासीन होत्या. संसारांत राहून मोक्ष मिळवितां येतो हें तत्व त्यांना मान्य नव्हतें. बुद्धानें आपल्या बायकोला व मुलाला सुद्धां भिक्षूची दीक्षा दिलेली होती. खिस्ताचेंहि मत तेंच होतें. एकदां त्यांना एका श्रीमंत सावकार पुत्रानें मोक्षाचा मार्ग कोणता,हा प्रश्न करतांच त्यानें सर्व संपत्ति गरिबानां देऊन माझ्या मागें ये ह्मणजेच मोक्ष मिळेल असें उत्तर दिलें होतें. तो असें ह्मणत असे कीं, एकादा उंट सुईच्या नेढ्यांतून पार जाऊं शकेल.परंतु देवाच्या राज्यांत श्रीमंताचा प्रवेश होणें शक्य नाहीं. या वरून यांची मतें संसाराविषयीं उदासीन होतीं.त्याच्या हातीं जर राज्यकारभार दिला असता तर तो चालवितां आला असतां कीं काय याची शंका आहे. याच्या उलट श्रीकृष्णाचें होतें तो जसा धर्म शास्त्रांत पारंगत होता तसाच व्यवहारांतहि निपुण होता. आणि ह्मणूनच त्यानें मोक्षाचा मार्ग ह्मणजे संसारांत राहून निष्काम कर्म करणेंच होय असें सांगितलें व या निष्काम कर्मयोगाचेंच महत्व त्यांच्या गीतेंत सांगितलेलें आहे.

अशा या थोर विभूतीच्या चारित्र्यावर निरनिराळे आरोप केले जातात. ते सर्व निराधार आहेत. त्यांतील बऱ्याचशा मुद्यांचें आम्हीं गेल्या वर्षी खंडण केलेलें आहे. या विषयीं सविस्तर माहिती सुप्रसिद्ध बंगाली साहित्यसम्राट बंकिमचंद्र यांच्या श्रीकृष्ण चरित्रांमध्यें आहे. जिज्ञासूनीं त्याचा मराठी अनुवाद अवश्य वाचावा अशी आम्हीं शिफारस करतों. श्री कृष्णचरित्र अत्यंत निष्कलंक व थोर आहे. श्री कृष्णानें आपल्या चरित्रावरून संसारांत राहून इतकेंच नव्हे तर उत्तम प्रकारचा संसार करून मोक्ष मिळवितां येतो, या मोक्षाकरतां कपड्यांना रंग फासून अरण्यांत जावयाची गरज नाहीं, हें दाखवून दिलेलें आहे ह्मणून त्याच्या तत्वज्ञानाची थोडीशी चर्चा करून हा विषय पुरा करूं.

हें तत्वज्ञान आपल्याला गीतेच्या रूपानें लाभलेलें आहे. कांहीं विद्वानाच्या मतें आज जी गीता आपणा पुढें आहे ती श्रीकृष्णानीं सांगितलेली नसून ती नंतरची आहे परंतु गीतेंत जें तत्वज्ञान सांगितलेलें आहे तें मात्र श्री कृष्णाचें, याबद्दल कोणाचाच मतभेद नाहीं. गीता ग्रंथाचें तत्वज्ञान किती थोर आहे हें आह्मीं सांगण्याची जरूरी नाहीं आज जगामध्यें शास्त्रीय स्वरूपाशीं मेळ घालणारा असा कोणता धर्मग्रंथ असेल तर गीतेकडेच बोट दाखवावें लागेल व ह्मणूनच जगांतील बहुतेक सर्व भाषांमध्यें या ग्रंथाचे अनुवाद झालेले आहेत. असो.

समाजाचें सूक्ष्म दृष्ट्या निरीक्षण केल्यास असें दिसून येईल कीं, चांगल्या कर्माचें फळ नेहमीं चांगलेंच येतें असें नाहीं. धर्मानें वागणाऱ्या लोकांवर नेहमी संकटें येतात तर अधर्मानें वागणारे, दुसऱ्यानां लुबाडणारे अनीतीचा प्रसार करणारे हेच नेहमीं सुखी असतात. तेव्हां याचा मेळ कसा घालावा हा प्रश्न विचारी लोकांपुढें असतो. प्रश्न आजचाच आहे असें नाहीं तर हजारों वर्षांपासून थोड्या फार प्रमाणानें हीच स्थिति होती. महाभारतांत ह्या विषयीं एक मजेदार संवाद आहे. " आपले पति नेहमीं धर्मानें वागत असतां त्यांच्यावर संकटाचे पूर येतात. व दुर्योधन हा नेहमीं अधर्मानें वागत असतां त्याच्या पायाशीं ऐश्वर्य लोळत असतें तुमच्या धर्माचरणाचा फायदा काय?" या द्रौपदीच्या प्रश्नाला तेव्हां धर्मराजानें उत्तर दिलें: " आर्ये,धर्मापासून मला फळ प्राप्त व्हावें अशी इच्छा मनांत धरून मी धर्माचरण करीत नाहीं, तर हे कृष्णे, फळ असो किंवा नसो, पुरुषाचें जें कर्तव्य विशेषतः गृहस्थाचें तें मी यथाशक्ति करीत असतों. फळासाठीं धर्म करावा असा मी धर्माचा विकरा करीत नाहीं "

हा मुद्दा विशद रीतीनें भगवंतानीं आपल्या गीतेंत सांगितला आहे. ते ह्मणतात:--

कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ॥
मा कर्मफल हेतु र्भुमा ते संगोऽस्त्व कर्मणि ॥

"कर्म करण्या पुरताच तुझा अधिकार आहे. फल केव्हांहि तुझ्या अधिकारांतील नाहीं. अमुक फल मिळावें असा हेतु मनांत धरून काम करणारा होऊं नकोस आणि कर्म न करण्याचाहि तूं आग्रह धरूं नकोस", हा संदेश देऊन भगवान सांगतात:"बावानो तुह्मीं सदांसर्वदा कर्मरत रहा; कर्माशिवाय जग चालणें शक्य नाहीं. पृथ्वी, आप, वायु, तेज, हीं सर्व महाभूतें आपापलीं कर्मे करीत आहेत. कर्माचा त्याग करूच अरण्यांत जाण्यांत कोणताच पुरुषार्थ नाहीं. अरण्यांत गेलों तरी कर्म थोडें बहुत केलेंच पाहिजे. करतां संसारांत राहून इंद्रिय जय करा, मन ताब्यांत ठेवा, मनाचा निग्रह करा.हाच मोक्ष आहे. फळाची आशा धरू नका. फळ मिळो अथवा न मिळो. जें ज्या परिस्थितींत योग्य आहे,जें कर्तव्य आहे, तें सदैव करीत रहा. फळ न मिळालें तरी खचूं नका कारण

नियतं कुरू कर्मत्वं ज्यायो ह्य कर्मणा ॥
शरीर यात्रापि च ते न प्रसिद्धेद कर्मणः॥

(तुझ्या धर्माप्रमाणें) नेमलेलें कर्म तूं कर कारण कर्म न करण्यापेक्षां कर्म करणें हें अधिक चांगलें होय. खेरीज [असें पहा कीं कर्म न केलेंस तर [खायाला न मिळतां) तुझा शरीरनिर्वाह सुद्धां चालणार नाहीं.' या श्लोकावरून भगवंताचा कर्म करण्याबद्दल लोकांना किती आग्रह आहे हें कळून येईल. कर्म केल्याशिवाय कांहीं होणें शक्य नाहीं. तुमचा जर उद्धार व्हावयास पाहिजे तर तुह्मीं रात्रंदिवस कर्मरत रहा, ह्मणजेच तुमचा उद्धार होईल. तुमचा उद्धार कोणी करणारा नसून तुमचे तुह्मींच उद्धारक आहांत.

उद्धरेदात्माना नात्मानमवसादयेत ॥
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥

आपणच आपला उद्धार करावा, आपणच आपल्या स्वतःला (कधींहि) खचवूं नये. कारण (प्रत्येक मनुष्य) आपणच आपल्या स्वतःचा बंधु (ह्मणजे मदत करणारा) किंवा आपणच आपला शत्रू ह्मटला आहे. भगवान सांगतात कीं, स्वतःच्या पायावर उभे रहा, धीर खचूं देऊं नका,स्वावलंबनाचा मार्ग अवलंबन करा, परावलंबी होऊं नका, स्वताच्या हिंमतीवर कार्य करा. धीर खचूं देऊं नका. हिंमत धरा व कार्य करा. असें केल्यानें तुमचा उद्धार होईल. स्वतःचा उद्धार स्वतःच केला पाहिजे, दुसरा कोणी करणारा नाहीं हें लक्षांत ठेवा, ह्मणजे तुमची उन्नति होईल.

आपण श्रीकृष्ण जयंति करतों,भगवद्गीतेचें पठन करतों; परंतु श्रीकृष्णाचा कर्मयोग आपल्या आचरणांत अद्याप आलेला नाहीं. आपल्या राष्ट्राला आज याच महात्म्याच्या उपदेशाची गरज आहे. हाच उपदेश आपल्याला मार्गदर्शक होईल. याकरतां हा सण राष्ट्रीयदृष्ट्या साजरा करणें आवश्यक आहे. प्रत्येक गावांत या दिवशीं एक सार्वजनिक रीत्या हा सण साजरा करून त्या दिवशीं श्रीकृष्णचरित्राचें महत्व -कर्मयोगाचा उपदेश- लोकांच्या मनांत बिंबेल असें केले पाहिजे. ह्याच महात्म्याच्या उपदेशानें आपल्या राष्ट्राचें कल्याण होईल.निवळ पूजेनें कांहीहि होणें शक्य नाहीं हें सांगून व श्रीकृष्णाला वंदन करून हा विषय पुरा करतों.

मेघराजाची लीला

कालिकत (मद्रास)महापुरामुळ १२ मनुष्यें मृत्युमुखीं पडलीं व सुमारें ५० लाख रुपयांचें नुकसान झालें. कावेरी नदीवरील एरोडचा पूल मोडला. म्हैसूरसंस्थानांतील होनपूर खेडेगावांतील सर्व घरें वाहून गेलीं. कोइंबतूर जिल्ह्यांतील गोबी तालुक्यांतील ६ खेड्यांतील १८०० घरें, भवानी तालुक्यांतील ३०० घरें, अवानशी तालुक्यांतील ३०० घरें, जमीनदोस्त झालीं. एर्नाड तालुक्यांतील एक डोंगराचा कडा कोसळून त्या खालचें एक खेडेगांव गडप झालें. कडा कोसळण्यापूर्वी थराच मोठा आवाज झाला. या मुळें त्या खेड्यांतील लोक आधींच बाजूला झाले होते. तरी दोन मुलें त्यांत मरण पावलींच ! पोनानी नांवचें खेडेगांव पुराच्या पाण्यानें वाहून गेलें. अमदाबाद येथें गुजराथ जिनिंगमिल अकस्मात कोसळून पडून त्या खालीं ६० माणसें गडप झालीं व २९ लोक जखमी झाले. तुंगभद्रा नदीच्या पुरामुळें नदीवरील पुलाच्या कमानी वाहून गेल्या व हरिहर गावांतील २०० घरें जमीनदोस्त झालीं.' शोरनूर (मद्रास) जवळ असलेली मुलांची शाळा कोसळून त्याखालीं १ शिक्षक व ६४ विद्यार्थी सापडून मरण पावले.

ब्रिटिश न्याय!!!

केसरी पत्रांचे संपादक श्री. न. चिं. केळकर यांनीं ता. ६।५।२४ च्या केसरीच्या अंकांत टीकात्मक स्फुट लेख लिहून हायकोर्टाची बेअदबी केली या आरोपावरून त्यांजवर निघालेल्या नोटिशीचा खटला गेल्या ता. ७।८ रोजीं मुंबई हायकोर्टांत न्या० मू० सर मार्टिन व न्या० मू० किंकेड यांजपुढें चालून श्री. केळकर यांनी सदर अपराधाबद्दल ५००० रु. दंड व २०० रु. कोर्टखर्च द्यावा असा निकाल सांगण्यांत आला. 'विनोद' कर्त्यांवर याच बाबतींत नोटीस निघाली होती. त्यास या कामीं १५०० रु. दंड होऊन २०० रु. कोर्टखर्च द्यावा असा निकाल देण्यांत आला. व सदर पत्राचे मुद्रकास १०० रु. दंड झाला.

अस्पृश्योद्धार

अस्पृश्योद्धाराच्या कार्यासाठी कलकत्ता येथील मारवाडी लोकांनीं ६०००० रुपये ला. ला लजपतराय व पं. मालवीय यांच्या स्वाधीन केले आहेत. व बिडला ब्रदर्स व लाला रघुनाथ यांच्याकडून प्रत्येकीं दरमहा २५०० व १००० रुपये स्वामी श्रद्धानंदाच्या हवालीं केले जातात.

गांधींचा दौरा

महात्मा गांधींजींचा दौरा सिंध प्रांती असतांना नवाबादची कांग्रेस संस्था त्यांस२५००० रुपयांची थैली अर्पण करणार आहे.

गोमांतक हिंदु विद्यार्थी मंडळ

गोमांतक हिंदु विद्यार्थि मंडळ या संस्थेचा पहिला वार्षिक समारंभ या महिन्याचे १४ तारखेला नारळी पोर्णिमेच्या दिवशीं मोठ्या थाटानें व अपूर्व यशस्वी रीतीनें पार पडला. सतत एक वर्ष पर्यंत धिमेपणानें बिनबोभाट व उत्कृष्टपणें आपलें उद्दिष्ट कार्य करीत असलेल्या या संस्थेची माहिती, तिच्या वार्षिक उत्सवानिमित्त जाहीर आमंत्रण देण्याच्या अगोदर फारच थोड्यानां माहीत होती. संस्थेचें अध्यक्षस्थान श्री. यशवंत मं. लाड यानीं मंडित केलें होतें. कार्यक्रमापैकीं ईशप्रार्थना, स्वागतपर भाषणें व पदें, वार्षिक अहवाल वाचन, भावबंधन व संशय कल्लोल नाटकांतील एकेक प्रवेश, गाणें, उपहार कीर्तन व कॉफीपान हे प्रमुख विषय होते. या समयीं संस्थेच्या ध्येयास व कार्यास अनुसरून न्यायशास्त्री भवानी शंकर सुखठाणकर श्री य. मंगेश लाड इत्यादिकांचीं बोधपर भाषणें झालीं. परस्पर स्नेहवर्धन व एक मेकांच्या सहाय्यानें वाङ्मय प्रदेशाचें आक्रमण करणें हें या संस्थेचें ध्येय असून त्यास अनुसरून आजपर्यंत जें कार्य या मंडळाच्या हातून व्याख्यानाच्या व द्विमासिक " गोमांतक हिंदु विद्यार्थी " या रूपानें झालें तें अवर्णनीय झालें असेंच ह्मणावें लागतें. प्रस्तुत हें मासिक आर्थिक मदतीच्या अभावीं हस्त लिखितांतूनच प्रसिद्ध होत असतें. धि गोवा हिंदु असोसियेशनशीं या मंडळाचा अर्थाअर्थी कांहीं एक संबंध नाहीं. व्यर्थ भाराभर-चिंध्या या दृष्टीनें एक संस्था बरोबर चालत नसतानां यांतच दुसऱ्या संस्थेची भर पडली, ही गोष्ट खेदजनक असली तरी त्या संस्थेच्या संपर्काभावीं या मंडळाचें ध्येय अविकृत राहिले व त्यामुळें एकंदर कार्य व सम्मेलन शिस्तवार व व्यवस्थेशीर झालें याबद्दल आनद झाल्यावांचून रहात नाहीं. एकाच गोमांतकीय जनतारूपी मातापितरांचीं हीं दोन्हीहि लेंकरे असल्यामुळें दोन्ही संस्था एकमेकांच्या धीरावर स्वतंत्रपणें आपलें अवतार कार्य उत्कृष्ट प्रकारें बजावून, गोमांतकीय जनतेच्या अंतःकरणांत असूया, अहंकार व परमतासहिष्णुता इत्यादि अज्ञानरूपी अंधःकाराचा नाश करून तेथें परस्पर सहानुकंपा व एकी यांचें तेज फैलावतील अशी पूर्ण आशा आहे. तसेंच " धि गोवा हिंदु असोसिएशन ही संस्था ज्या कारणामुळें कमी कार्यक्षम झाली त्या कारणांचा सूक्ष्मपणें अभ्यास करून ही संस्था आपलें कार्यक्षेत्र ज्ञानप्रकाशांत आक्रमण करील असें गेल्या संम्मेलनांत दिसून आलेल्या एकंदर सभासदांच्या अहंभावाभावीं कार्य करण्यांत तदाकार झालेल्या वृत्तीवरून ह्मणण्यास हरकत नाही. ह्मणून त्यानां माझें अंतःकरणपूर्वक असें सांगणें आहे कीं, अहंकार बाजूला ठेऊन ' चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती ' या तत्वानुरूप चोख वर्तन जोंपर्यंत त्यांच्या हातून होईल तों पर्यंत त्यांची क्रियाप्रतिक्रिया या न्यायानें उत्तरोत्तर भरभराटच होईल. जगचालक या संस्थेस दीर्घायु करो." असें एक सम्मेलनात हजर असलेला निमंत्रित कळवीत आहे.

+ एकाच ध्येयाच्या एकाच शहरीं एकाच तऱ्हेच्या लोकांकडून अनेक संस्था स्थापिल्या जाणें हें एका दृष्टीनें प्रगतिवृद्धीचें चिन्हच आहे. मात्र या अनेक संस्थांचे परस्पर संबंध प्रेमशृंखलेनें निगडीत असले पाहिजेत. उलट पक्षीं उपरोक्त संस्थांच्या अनेकत्वाच्या बुडाशीं द्वेष, हेवा किंवा याचसारखी दुसरी कोणती हि क्षुद्र मनोवृत्ति गुप्त अथवा प्रगट स्वरूपांत खेळत असेल तर तें अनेकत्व प्रगति ऐवजीं अधोगतीच प्रसवेल, हें उघड आहे. गोमांतक हिंदु वि. मंडळ ही संस्था प्रेमाच्या शुद्ध व पवित्र पायावरच उभारली गेली आहे, असें मानण्यास आह्माला भरपूर जागा आहे.

सं. भारत

बाल वाचन मंदिर, नवीन--गोवें

ही संस्था इतर कोणत्याहि संस्थेच्या विरुद्ध नसून उलट शिक्षण प्रसारानें किंवा इतर कोणत्याहि उपयुक्त मार्गानें देशसुधारणेला मदत करणाऱ्या सर्व संस्थांशीं प्रेमभावानेंच वागणारी एक बाळगोपाळांची संस्था आहे. तिच्यांत दोषांचा लवलेश नाहीं, असें चालकांचें ह्मणणें नाहीं. नावांप्रमाणें ती 'बाल' असल्यामुळें 'बालां'च्या या मंदिरांत पुष्कळ सुधारणा करण्यासारख्या असतील. अशी खरी वस्तुस्थिति असतां, कित्येक विघ्न संतोषी लोकानीं जो मंदिराविरुद्ध भलभलत्या व निराधार आरोपांचा मारा सुरू केला आहे, तो कोणत्याहि दृष्टीनें समर्थनीय नाहीं. उदाहरणार्थ "मंदिर, सरस्वति वाचन मंदिर व मुष्टिफंड संस्था यांच्या विरुद्ध आहे" असा गैरसमज पसरविण्याचा जो कोणी उपद्याप केला, तो सपशेल खोटा असून, द्वेषबुद्धीखेरीज त्याला दुसरा कोणताच आधार नाहीं. मुलांच्या बुद्धीचा विकास होऊन, त्यांची नीतित्तमा सुधरली जाण्यास प्रयत्न करणाऱ्या संस्थेला इतर संस्थेशीं तेढ वागविण्याचें कोणतेंच कारण नाहीं, हें उघड आहे. इ. इ. उपरोक्त संस्थेचे अध्यक्ष श्रीपाद नारायण कोलवाळकर व सेक्रेटरी विष्णु गणेश कामत कळवून संस्थेस सिनेमाच्या एका खेळाचें उत्पन्न अर्पण केल्याबद्दल रवळू बळवंत देशपांडे यांचे आभार प्रदर्शित करतात.

× बालमंदिराचें ध्येय देशहिताला पोषक असल्यानें मंदिराला देशहितप्रेमी गृहस्थानीं हातभार लावणें सर्वथैव योग्य आहे, ही येथें निराळी शिफारस करण्याचें कारण नाहीं.

सं भारत

— त्रावणकोर संस्थानांतील कायदे कौन्सिलनें प्राथमिक शाळांतील शिक्षणक्रमांत सूत काढण्याचा सक्तीचा विषय ठेवावा असा ठराव केला असून त्यास संस्थानच्या सरकारनेंहि आपली संमति दिली.

वर्तमानसार

— सर मालकम हेले साहेबानां मानपत्र देणें आपल्याला पसंत नाहीं, असें अमृतसरच्या मुसलमानांनीं ठरविलें आहे.

— लखनौ जिल्ह्यांत अमेथी येथें ता. १२ रोजीं कांहीं मुसलमान लोक जबरदस्तीनें एका हिंदू देवालयांत शिरले. त्यामुळें हिंदू-मुसलमानांत साधारण चकमकी उडाल्या. त्यायोगानें तेथील परिस्थिती उग्र झाली आहे.

— अमृतसरमध्यें खिलाफतवाले व इतर मुसलमान यांमध्यें मोहरमचा सण करण्याच्या बाबतींत खटका उडाला.

— ता. १२ रोजीं मौ. हजरत मोहानी यांस येरवडा जेलमधून आणून मुंबईच्या भायखळ्याच्या हॉऊस ऑफ करेक्शनमध्यें ठेवण्यांत आलें होतें. ता. १३ रोजीं बोरीबंदरवर आणून सोडून देण्यांत आले. पंजाब मेलनें ते कानपूरकडे गेले.

—जुवांव कामोयेजस यांची नेमणूक येथील गव्हर्नरचे जागीं होणार असून, डॉ. जाईम द मोराइस हे आंगोलचा अधिकार गाजविणार आहेत, असें कळतें. येथील गव्हर्नरचे जाग्याला आतांपर्यंत पुष्कळांचीं नांवें सुचविण्यांत आलीं; अखेर कोणाची निवड होईल ती खरी !

—पावसाळ्यानंतर मुंबईहून येणारी पहिली बोट येत्या महिन्याच्या ७ तारखेला तेथून निघेल.

— पणजीच्या प्रोव्हींस पत्रानें कुंडईचे श्रीमंत संतश घनःश्याम शेणवी यांचा फोटो प्रसिद्ध केला आहे.

—अखेर मासळीविक्या लोकांचा संप मोडला जाऊन, ' जळशाके'च्या भक्तांची ' दाद ' लागली !

—दक्षिण हिंदुस्थानांत पटकीचा आजार मनस्वी वाढला आहे.

—सदर्न मराठा रेलवे कंपनीच्या आगगाडीच्या वेळापत्रकांत येत्या सप्टेंबर महिन्यापासून बदल होणार आहे.

— नीलगिरीमधील एका भागांत धरणीकंपाचा धक्का बसून ५० इसम मृत्युमुखीं पडले.

—ह्मापसें येथें 'येपोक' या नावांचें एक पोर्तुगीज साप्ताहिक प्रसिद्ध होणार आहे.

—केवळ आपल्या लोकांच्याच उपयोगासाठीं, ह्मापशें येथील चांभारानीं तेथील कोटीनजीकच एक स्वतंत्र देवालय उभारण्याचा निश्चय केला आहे.

—ठिकठिकाणच्या ग्रामसंस्थांच्या मुखत्यार लोकांची एक सभा पणजीच्या मुनिसिपाल हॉलांत भरून, शेतकी पतपेढींच्या कायद्यानें ग्रामसंस्थांवर लादलेल्या असह्य बोज्याविरुद्ध निषेधाचा ठराव पसार करण्यांत आला.

—ह्मापसें येथें मोटारखालीं एक मूल सांपडलें जाऊन, त्याला जबर दुखापत झाली.

—चालू महिन्याच्या १२ तारखेला पोर्तुगालच्या वातावरणांत बंडाचे ढग जमले होते; पण पोलीस लोकांच्या दक्षतेनें ते लगेच वितळले, असें [illegible]

राष्ट्रीय सभा व परकीय लोकमत

जो दुसऱ्यावरी विश्वासला ।
त्याचा कार्यभाग बुडाला ॥

रामदास

इंग्लंड, दुसरीं युरोपीय राष्ट्रें व अमेरिका ह्या देशांत हिंदुस्थानविषयक खऱ्या व विश्वसनीय माहितीचा प्रसार करण्यासाठीं राष्ट्रीय सभेनें कांहींतरी प्रयत्न करावा ही सूचना [मला वाटतें] अहंमदाबादेस भरलेल्या कॉंग्रेस बैठकीच्या विचारासाठीं पुढें मांडण्यांत आली होती. त्या प्रसंगीं व नंतर वेळोवेळीं म. गांधीनीं अशा प्रकारचा उपद्याप करणें निष्फळ असल्याचें दाखवून दिलेलें आहे. ह्या बाबतींत म. गांधीचें मत ग्राह्य न वाटणाऱ्या कित्येक जबाबदार व्यक्तींनीं गांधीजीच्या निराशावादास त्यावेळीं दोष दिलेला होता. गेल्या थोड्या वर्षांच्या अनुभवानें आपणास कांहीं शिकविलें असल्यास म. गांधीचें ह्मणणें आज खरें आहे हें कबूल करणें भाग आहे. म. गांधीनीं कॉंग्रेस काबीज केल्यानंतर नागपूर कॉंग्रेसच्या बैठकींत पास झालेल्या ठरावाप्रमाणें लंडनमधील 'इंडिया' पत्र बंद पाडून तेथील कॉंग्रेसच्या ब्रिटिश कमिटाचें माहितीखातें व ऑफिस काढून टाकण्यांत आलें ही गोष्ट पुष्कळांस आवडली नाहीं. कॉंग्रेसच्या ह्या शाखेच्या उपयुक्ततेबद्दल कोणताच प्रश्न नव्हता व नाहीं; ह्या शाखेमार्फत बरेंचसें कार्य करण्यांत आलें होतें, ह्यांत शंका नाहीं. पण मुख्य प्रश्न हा आहे कीं, परकीय लोकमत तयार करून आह्मांस कोणता फायदा होणार आहे ? जगाचें लोकमत आपल्या बाजूचें केल्यावरच आपणास स्वातंत्र्य मिळवितां येईल असें मानणाऱ्यानीं 'फॉरीन प्रॉपॅगँडा' यशस्वी करण्यासाठीं पैशाचा व दुसऱ्या साधनांचा व्यय करणें क्षम्य ठरेल परंतु स्वताच्या प्रयत्नावरच सर्वस्वी भिस्त ठेवणाऱ्यांनीं लोकमताची काय ह्मणून पर्वा करावी ? लोकमत 'बनविणें' हें एक पाश्चिमात्य ध्येय आहे; व तें जाहिराती देऊन गिऱ्हाईक मिळविण्याएवढेंच कृत्रिम व स्वस्त आहे, हें आह्मांस कळलें पाहिजे. आमच्या राजकीय मागण्या किंवा आकांक्षा न्याय्य असल्यास त्या न्याय्य नाहींत असें ठरविण्याचा कोणी प्रयत्न केल्यास तो केव्हांहि यशस्वी होणार नाही, हें आपणास माहीत असल्यावर तो निष्फळ ठरविण्याकरितां आपण आपल्या शक्तीचा व्यय कां करावा ?

माझ्यामतें परकीय लोकमताचा व आमच्या राजकीय उन्नतीचा किंवा हक्कांचा (निदान आजच्या परिस्थितींत) कांहीं संबंध आहे असें मानणेंच मुळीं चुकीचें आहे. परकीयांनीं आमचीं दुःखें समजावून घेऊन आह्मांस नैतिक मदत केल्यास त्यानीं स्वतांस सुधारलेलीं माणसें ह्मणविणाऱ्यांचा हक्क शाबीत केल्यासारखें होईल. त्यानीं आपली जबाबदारी व कर्तव्य ओळखल्यास ते नै-

Ano 9 o N. 23

Quinta-feira 28 de Agosto de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
por cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत

BHARAT

वर्ष ९ वें. अंक २३

गुरुवार ता. २८ आगष्ट सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें—गोवा.

C. C. R.

Já o leitor está farto de saborear toda a sorte de *manjares criticos* que a imprensa do Paiz *cosinhou* para satisfazer á *fome* de quantos queriam aprofundar-se na sciencia de Caixas de Crédito Rural.

E' claro que nem todas as *iguarias* podiam ter o mesmo gosto nem exalar o mesmo cheiro, pela natural diversidade de *modus faciendi* que, irevitavelmente, présidiu á sua confecção. Assim, se alguns *pratos* fizeram crescer agua na bôca, houve outros que perturbassem a regularidade orgánica de funcções intestinais, incomodando, por esta forma, a saude pública, isto é, a saude do publico que numa voracidade sófrega ou numa sofreguidão voraz os *engulíu*...

E' verdade. A critica, originada pelo diploma legislativo que criou as Caixas de Crédito Rural demonstra que a Opinião Pública sobre elas se divide, varia, havendo, ao lado dos que as defendem, outros que as condenam *in limine*...

O *Bharat*, conquanto não pertença ao grupo dêstes últimos, não se sente, todavia, livre para desassombradamente apoiar a actual organisação das C. C. R. por notar nesta dois defeitos de capital importancia. O primeiro consiste em ter o governo reservado para si o direito da escolha dos corpos gerentes e da fixação da sua remuneração, direito que, exclusivamente, devia pertencer aos proprietarios, associações e outras entidades obrigadas a contribuirem para o cofre das C. C. R. com o seu rico dinheiro.

E' absurdo insubstentavel que os accionistas não tenham voto na selecção do pessoal encarregado da gerencia do seu capital e qué não sejam ouvidos na fixação da gratificação do mesmo pessoal.

Importa mesmo uma arbitrariedade sem nome isto do governo reservar para si o que a outrem pertence. Em parte alguma se observa um *fenomeno* semilhante.

O segundo defeito reside na obtenção do emprestimo das Caixas em objecto. Já pela elevação de juros, já pelas dificuldades que eriçam de espinhos o cumplicado sistema de aproveitar o dinheiro das C. C. R. a referida obtenção do emprestimo se torna uma *empresa arrojada*.

E agora uma observação.

¿Qual o fim que presidiu á organisação das C. C. R? Suprir a falta de dinheiro com que — se pensa — está luctando o agricultor e livra-lo a êste das garras aduncas da temivel aguia que se chama *usura*.

Pois bem. A nossa experiencia e o nosso estudo ensinuam-nos, porêm, que a decadencia agricola do Paiz não é bem uma consequência da pobresa do agricultor mas sim um corolario da falta do braço. E' esta que esmorece as mais nobres tentativas do fomento agricola. Há dinheiro mas falta braço. Há capitais mas faltam operarios. Há oferta do capital mas não há oferta do trabalho.

Nestas condições ¿que papel benefico poderão desempenhar as C. C. R. no desenvolvimento agricola do Paiz?

Elas só servirão para os *Quelleam Camilo Reprovados* e outros de sua *elite* encherem de dinheiro suas algibeiras e se divertirem com passeatas *automobilistas*!

ECOS & CRITICA

SERVEM PARA TUDO

No *O Heraldo* le-se um estudo sobre a influencia das religioes na natalidade E' um trabalho baseado nos dados que fornece o censo da populaçao de Hungria, e dele se conclue que o catolicismo e' mais favoravel ao desenvolvimento populacional do que o protestantismo.

Infelizmente, porem, os termos de comparaçao sao apenas dois a—populaçao catolica e a protestante—Valia a pena ensaiar na Hungria o budismo e confucionismo e ver a sua influencia no que diz respeito a' natalidade, pois o censo da China e Japao levam-nos a crer que, se as religioes tem algum efeito na natalidade, este e' muito abonatorio destas duas religioes.

Nao ha' duvida que as estatisticas servem para...tudo.

ESTA' TRANSMICRADO

No artigo *A India Portuguesa* publicado na Gazeta das Colonias diz o sr. Menezes Bragança, referindo-sode ao ensino entre no's o seguinte:

"Ha quatro anos, esboçou-se um plano completo de reforma de ensino, com a incalculavel vantagem de crear recursos para que ele pudesse passar do papel. Era porventura este o seu principal merito. Mas o projecto foi dormir o sono dos arquivos do Terreiro do Paço. Porque era mau?

Nunca *se* soube porque."

Dormir o sono dos arquivos?! Nao sr. Menezes Bragança. Ele la' esta' *transmigrado* na pessoa de um Director dos Serviços de Instrucçao, a 1200 rupias mensais! Que mais queria o sr. Bragança? S. exia muitas vezes revela ta ingenuidade que ate' parece ignorar os processos modernos de felicitar os povos!

DESPOJOS HUMANOS

O sr. Radrigues Gaspar, presidente do ministerio, traçou o perfil biografico dos homens que o acompanham no Gabinete. Um, o ministro de marinha, e' *merecedor de toda a consideraçao egualmente prestigioso*. O outro, do comercio, "homem *com inteligencia e faculdades de acçao*. O ministro das colonias tem apreciavel activo de *trabalhos continuos na Africa e grande* "experiencia" (nao se sabe de que). O sr. Xavier da Silva, ministro de trabalho, e' alguem que a "todos os titulos se recomenda para aquela pasta„ (nao dis que titulos sao estes) E assim os mais.

O interessante, porem, e' que o sr. Rodrigues Gaspar nao hesitou em confessar que "nao ha nos despojos humanos onde ir buscar grandes elementos"?

Pelo visto os "despojos humanos' na politica portugueza estam pela hora da morte.

CAUTELA, POIS !

A Direcçao das Obras Publicas, apesar de possuir um pessoal numeroso e bem pago, nem sempre se apresenta zelosa no cumprimento de seus deveres. Assim, por exemplo, a energia que desenvolve na abertura de estradas e construcçao de pontes nao se ve empregada por ela na conservaçao das mesmas estradas e pontes.

A ponte de Quepem e' o vivo exemplo que comprova a' saciedade o que acabamos de afirmar. Ela ja' conta mais de 14 anos de construçao e todavia, durante todo este tempo, foi *oleada* uma vez so' e isto mesmo ha quatro ou cinco anos atraz! Nao admira, portanto, que a ferrugem a tenha carcomido, impiedosamente, deixando-a em um estado verdadeiramente lamentavel. Recea-se mesmo que, cedo ou tarde, ela provoque qualquer fatalidade, se os competentes continuarem a votar-lhe a mesma indiferença que ate' aqui.

Urge, porisso, que as Obras Publicas volvam a atençao para o misero estado da mesma ponte, tratando ja' de repara la ou que quando nao possam, confiem ao menos ao Municipio do Concelho a sua reparaçao. De duas uma. Nao ha' meio termo.

A cautela sempre foi aconselhada nas obras que se ligam a' vida dos mortais que as pagam...Cautela, pois!

NAO PARECE?

Nao atinamos com o motivo por que o sr. Pereira Batalha esta' nalu-

---

¡Não conhecem o *Quelleam Camilo Reprovado*!

Pois leiam a crónica alegre do sr. *J. da S. C.*, publicada na edição da *India Portuguesa* de Margão, n.º 31, ano 1.º.

जमून गुत्त्यांची संख्या अगदीं परिमित करण्याचें ठरविल्यास, हा ठराव अमलांत येण्यास प्रयास पडतील काय ? मोठ्या व वजनदार जमिनदारांनीं आपल्या जमिनींत गुत्ते स्थापण्याची बंदी केल्यास व आपल्या ‘ मुंडकारांस ’ दारूच्या धंद्याची मनाई केल्यास, दारूच्या व्यसनाला आळा पडून गुत्त्यांची संख्या मनस्वी उतरल्याखेरीज रहाणार नाहीं, हें अर्थात स्वयंप्रकाशादतकें स्वच्छ व स्पष्ट आहे.

अशानें दारूचा भाव चढेल. चढेना ? गुत्त्यांचें परस्परांतील अंतर साहजिक रीत्याच जास्त रहाणार असल्यानें व मध्यम व कनिष्ट स्थितीचा मद्यपि जात्याच आळशी असल्यानें, तो मुद्दाम लांब पल्ल्याच्या गुत्त्यांत जाऊन, आपली दारूची तलफ भागविण्यास सहसा उद्युक्त होणार नाहीं; आणि असें झालें ह्मणजे त्याच्या व्यसनी मनोवृत्तीला अर्थात्च पायबंद बसेल. परंतु दारूची किंमत वाढली ह्मणजे मजुरीचीहि किंमत वाढविण्यास मजूर मद्यपि मागें पुढें पहाणार नाहींत, याला उपाय काय ? याला उपाय ह्मणजे जमिनदार लोकांचा दृढ निश्चय. जमिनदार लोकांनीं आपलें सामुदायिक तेज प्रगट केल्यास मजूर लोकांचा मजुरी वाढविण्याचा हेतु तडीस जाणें अगदीं अशक्य होय.

फार दुःखाची गोष्ट कीं, खुद्द देवस्थानच्या जमिनींत सुद्धां गुत्त्यांची स्थापना झालेली दिसून येते. या अनीतिमूलक गोष्टीनें मनाला त्वेष व चिळस आल्याशिवाय रहात नाहीं. देवस्थानच्या लौकिकास गुत्त्यानीं फासलेला हा अनीतीचा काळा कलंक, त्या त्या कारभारी मंडळानीं पुसून काढणें, हें त्यांचें पवित्र कर्तव्य आहे. त्यानीं या आपल्या कर्तव्यपालनांत उत्साह दाखवून, इतरानां उदाहरण घालून देणें वाजवी होय.

जनतेला अधोगतीच्या गर्तेत सदोदित खिचपत ठेवूं पहाणाऱ्या दारूच्या व्यसनाविरुद्ध जोराची मोहीम व तीहि तावडतोब सुरू न झाल्यास, देशाचा भविष्यकाळ भीषण व दुःखद होणार आहे. ह्मणून दारूच्या भयंकर व्यसनाच्या प्रसाराला आळा घालण्यासाठीं उत्साही माणसानीं पुढें सरसावलें पाहिजे, हें उघड आहे.

दारूचें व्यसन ही आह्मावर ओढवलेली मोठ्यांतली मोठी आपत्ति होय. मदिरापानानें गोमांतकीय लोकांची शारीरिक व नैतिक अधोगति दिवसेंदिवस वाढतच आहे. जो ‘कुळंबी’ पूर्वी पैलवानासारखा सशक्त व कणखर असे, तोच आतां दारूबाईच्या कचाट्यांत सांपडल्यापासून, निःसत्व व नेभळट बनला आहे. शेतकरी व इतर कारागीरहि दारूमुळें केवळ काडी पैलवान व पाप्याचे पितर यानां होऊन जाण्याच्या पंथास लागले आहेत. तात्पर्य, शक्तिवान लोकांची संख्या खालावत जाऊन अशक्त माणसांचीच भर समाजांत पडत जात आहे. अप्चन हा रोग जो पूर्वी श्रीमंतांच्याच घरीं ठाणें देऊन बसत असे, तो

आतां सार्वत्रिक स्वरूपाचा झाला असून त्यानें प्रत्येक गरिबाच्या घरांत आपलें बिऱ्हाड ठोकलें आहे ! हा परिणाम निवळ दारूच्या व्यसनाचा आहे, यांत संशय नाहीं.

जर आह्माला दारूच्या व्यसनाचे हात पाय छाटून, त्याचा नायनाट करण्याचें असेल, तर या दिशेनें आह्मीं तावडतोब प्रयत्न करण्याच्या मागाला लागलें पाहिजे. या कामीं नुसतीं व्याख्यानें व तात्विक विवेचनें –प्रवचनें उपयोगाचीं नसून, चिकाटीयुक्त कृतीचीच आवश्यकता आहे.

सर्व जमिनदार व प्रतिष्ठित लोक एकत्र जमून त्यानीं एक संघ स्थापन केल्यास, दारूच्या व्यसनाला ‘ हा हां ’ ह्मणतां आळा पडेल याची खात्री प्रत्येकानें बाळगावी. प्रसंग आणीबाणीचा आहे. आतां हलगर्जीपणा बिलकूल कामाचा नाहीं. शिवाय हें काम एकट्यादुकट्याच्या हातून पार पडण्यासारखेंहि नाहीं. त्याला सामुदायिक प्रयत्नच झाले पाहिजेत व या प्रयत्नाला निर्धाराचा पूर्ण पाठिंबा मिळणें अगत्याचें आहे.

तेव्हां गोमांतकीय जमिनदार हो, कंबरा कसा व एक जुटीनें व एक नेटानें दारूच्या व्यसनरूपी शत्रूवर जोराचा हल्ला चढवा !

स्फुट विचार

दारूबाजीविरुद्ध मोहीमः– आजच्या अग्रलेखांत दारूबाजीचा विचार केला आहे. मदिराराक्षसीचें हृदयद्रावक व भेसूर चित्र गडकऱ्यानीं आपल्या ‘ एकच प्याला ’ नाटकांत उत्कृष्ट रीतीनें रेखाटलेलें आहे. सुरादेवी आपल्या भक्ताच्या वित्ताची व नीतिमत्तेची कशी राखरांगोळी उडवीत असते, हें गडकऱ्यानीं आपल्या काव्यमय व अनुभवसिद्ध वाणीनें जगाच्या निदर्शनास आणलेंच आहे. ‘दारूचें उच्चाटण ह्मणजेच समृद्धीला आमंत्रण ’ हें सत्य नित्य डोळ्यांसमोर ठेऊन, दारूच्या निंद्य व्यसनाला गचांडी देण्यासाठीं गोमांतकीय जबाबदार पुढाऱ्यानीं जिवापाड मेहनत केली पाहिजे. तळिरामी पंथ गार पडेपर्यंत फार खटपट करून, दारूच्या नरकानें विटाळलेलें गोमांतकाचें वातावरण शुद्ध करण्याप्रीत्यर्थ देशभक्तानीं, दिव्य तेज प्रगट केल्याशिवाय गत्यंतर नाही दारूला नरक दाखविल्याशिवाय आमच्या अधोगतींत फरक पाडण्याची इच्छा मनांत बाळगणें ह्मणजे पाया विरहित गगनचुंबित इमारत उभारण्याची हास्यास्पद हौस बाळगण्यासारखा मूर्खपणा होय.

कालक्षेप उपयोगी नाहीं:– दारूच्या व्यसनाविरुद्ध निकराचा हल्ला चढविण्यास मुहूर्त पाहण्याचें कारण नाहीं. वाढलेल्या वधूच्या लग्नाला, आधींच वरसंशोधनाच्या विकट, विकट व तिखट मोहिमेनें आपाद मस्तक थकलेला वधूपक्ष, मुहूर्त शोधण्याच्या भानगडीच्या उलाढालींत पडतोच, असें नाहीं. तद्वत दारूविरुद्ध चळवळीची गोष्ट आहे. दारूबाजीच्या रोगानें गोमांतक इतका पोखरला गेला आहे कीं, मुहूर्त ठरवून चळवळीची रूपरेखा आंखेपर्यंत, रोग्याचें देहावसान होणार नाहींच, याची हमी देणारी व्यक्ति अजून जन्मली नाहीं. तात्पर्य कालक्षेप न करतां, तावडतोब–शुभस्य शीघ्र–हाच सुमुहूर्त मानून प्रस्तुत व्यसनाच्या नाड्या आंखडण्याची अचूक तजवीज केली पाहिजे. आतां व्याख्यानानीं काम भागेल, हें तर मनांत आणतांच कामा नये. कृति पाहिजे. केवळ निरपेक्ष कृतीनेंच मदिरापानाला पडला तर कांहीं आळा पडण्याचा संभव आहे. मात्र या कृतीचें स्वरूप सामुदायिक असणें जरूर आहे. एकाद दुसऱ्याच्या प्रयत्नाला यश मिळण्यासारखी सांप्रतची परिस्थिति नाहीं, हें विसरतां कामा नये.

शेतकी पतपेढ्याः— गरीब शेतकऱ्यांना द्रव्याचें सहाय्य मिळून, त्यांच्या हातून शेतकीची व पर्यायानें गोमांतकाची उन्नति व्हावी, याच हेतूनें शेतकी पतपेढ्या स्थापन करणाऱ्या कायद्याला जन्म दिला आहे. पण हा हेतु कितपत साध्य होईल, हा एक प्रश्नच आहे. कारण आमच्या शेतकी अधोगतीच्या बुडाशीं द्रव्याभाव नसून श्रमाभाव आहे. नवीन काविजादींतील ज्या जमिनी आज ओस व पडित पडलेल्या आढळून येतात, याचें कारण त्या जमिनीच्या मालकांना द्रव्यानुकुलता नाहीं, हें नसून त्यांत पेरणी करण्याला पुरेसे मजूरच मिळत नाहींत, हें आहे. शेतकी पतपेढ्या फार तर शेतकऱ्यांना पैशाचें सहाय्य पुरवितील; पण मजुरांचा प्रश्न कसा सोडवितील ? व जोंपर्यंत हा प्रश्न प्रश्नाच्याच रूपांत राहील तोंपर्यंत नुसत्या पतपेढ्यांमुळें, शेतकीची व शेतकऱ्यांची निकृष्टावस्था दुरावेल, ही कल्पनाच करणें चुकीचें आहे. आधीं मजुरांचा पुरवठा व मग शेतकी पतपेढ्या. असे झालें तरच शेतकी आपले तोंड वर काढील.

मूळ स्वभाव जाईनाः— रिपब्लिकची प्राणप्रतिष्ठा झाल्यास आज जवळ जवळ चवदा वर्षें पुरीं होत आलीं. परंतु इतका हा कालावधी मोनार्कीच्या ‘हम करेसो, अमदानींत कांहीं अहंमन्य अधिकाऱ्यांच्या रक्तांत भिनलेले दुर्गुण नष्ट होण्यास पुरेसा झाला नाहीं, असें कष्टानें ह्मणावें लागतें. कांहीं दिवसांमागें पणजीच्या मुनिसिपाल हॉलांत ठिकठिकाणच्या ग्रामसंस्थांच्या मुखत्यारांची, शेतकीपतपेढ्याच्या कायद्यानें या संस्थावर नाहक लादलेल्या बोज्याविरुद्ध निषेध व्यक्त करण्यार्थ, एक सभा भरली होती. सरकारचे प्रतिनिधी या नात्यानें सभेला पणजीचे मामलेदारसाहेब हजर होते. या साहेबाचें काम ह्मणजे सभेला हजर राहून, सभेची साद्यंत माहिती सरकारला देणें इतकेंच असून, या कार्यखात्याकडे त्यांच्या अधिकार क्षेत्राची व्यापकता विस्तृत पावत नाहीं. असें असतां प्रस्तुत सभा ही सरकारच्या अब्रूची इमारत ढांसळून पाडील, अशा खोट्या समजानें, उपरोक्त अधिकाऱ्यानें जं त्या सभेंत गोंधळ माजविला, त्यामुळें सदर मामलेदाराच्या अक्कलेचें दिवाळें वाजलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. वरिष्ठांची मर्जी संपादण्यासाठीं लोकमत पायाखालीं तुडविण्याची जी वाईट खोड कित्येकानां जडली आहे, तिचा परिणाम अखेर ‘हां जी हां जी, वाल्यानांच भोंवणार, हें पणजीच्या मामलेदारानीं आपल्या स्मरणवहींत टिपून ठेवलेलें बरें, अशी आमची त्यांस मित्रत्वाची सूचना आहे. सरकारची मेहरनजर न गमावण्यास जनतेवर आततायीपणाचा कहर केलाच पाहिजे, असें कोठें कायद्यांत कलम नाहीं. पण स्वभावाला औषध नाहीं त्याला कोण काय करील ? वरिष्ठांची मर्जी राखण्यासाठीं कसलींहि कृत्यें करण्याची जी मोनार्कीच्या अमदानींत कित्येकांना सवय लागली होती ती अजून नष्ट झाली नाहीं, याचें मूर्तिमंत उदाहरण ह्मणजे पणजीचे मामलेदार होत, हें सिद्ध करण्यास, आह्मांला वाटतें, आणखीं विशेष लिहिण्याचें कारण नाहीं.

पोर्तुगालची राजकीय स्थितिः– पोर्तुगालच्या राजकीय वातावरणांत जमलेले अस्वस्थतेचे ढग अजून अस्तंगत झाले नाहींत. उलट त्यांची संख्या वाढत्याच प्रमाणावर आहे. सैन्यांतली शिस्त विस्कळित होत चालली असून, शिस्तीच्या या शैथिल्यामुळें पोर्तुगालांत अंतःकलहास दारूण स्वरूप केव्हां येईल, याचा नेम नाहीं. मोठे व छोटे लोक या उभयतांतहि कलहप्रियतेनें आपलें ठाणें दिलेलें दृष्टोत्पत्तीस येतें. ज० गोमीस द कोस्ताच्या धमकीवजा भाषणानें या कलहप्रियतेची रग थोडी तरी जिरेल, अशी जी कित्येक आशावादी लोकांस उमेद होती, तीहि सपशेल मावळली ! एवंच, पोर्तुगालची स्थिति भविष्यकाळीं काय होईल याचें भविष्य वर्तविणें फार कठीण आहे. असो. पोर्तुगालांत शांतता देवीची स्थापना होईल तो दिवस खरा ! तोंपर्यंत कोणकोणत्या उलाढाली उपस्थित होतील हें एक भविष्यकाळच जाणे ! व भविष्य काळाच्या पोटांत काय आहे हे समजणें कठीण असल्यानें, तूर्त या विषयाची इतक्यांतच रजा घेणें अर्थात क्रमप्राप्त आहे.

साभार स्वीकार

मनोरंजन (मासिक):— या मनोरंजक मासिकाची ओळख नाहीं, असा महाराष्टांत तरी कोणी मराठी जाणणारा वाचक असेल, असें आह्मांस वाटत नाहीं. मनोरंजन मराठी वाचकाप्रमाणेंच, मराठी साहित्य सेवकांच्याहि निकट परिचयाचें आहे. विविध माहितीनें ओथंबलेले, विविध लेखकांनीं लिहिलेले मनोरंजनांतील विविध लेख वाचून कोणाचें मन प्रसन्न होणार नाही ? गोष्टी व कादंबऱ्यांच्या वाचनानें समाधान पावणारे, हरेक शास्त्रीय विषयांवरील नवीन नवीन शोधांच्या माहितीनें आनंदित होणारे, मार्मिक व भारदस्त विनोदानें घटकाभर देहभान विसरणारे काव्यसृष्टींत स्वैर विहार करण्यास भुकेलेले इ० अनेक रुचींच्या वाचकांस झुलविणारें एकादें मासिक असेल, तर तें मनोरंजनच होय. इतकें सांगितलें ह्मणजे ‘मनोरंजनाची उपयुक्तता सहज सिद्ध होते. अशा

(पुरवणी पहा)

श्रीगणेशोत्सव

भाद्रपद शुद्ध चतुर्थी हा दिवस गणेशचतुर्थीच्या सणाचा होय. इतर सणप्रमाणेंच हा सण सर्व वर्णांच्या लोकांकडून पाळण्यांत येतो. मात्र सर्व ठिकाणींहि पाळण्यांत येतो, असें सांगतां येत नाहीं.उदाहरणार्थ बंगाल्यांत हा सण रूढ नाहीं.महाराष्ट्रांत या सणाला विशेष महत्व आहे.

ह्या सणाचा धार्मिक विधी काय आहे हें आम्हीं सांगण्याची जरूरी नाहीं. आपल्या गोमांतकांत कित्येक कागदावर काढलेल्या मूर्तीची तर कित्येक मृत्तिकेच्या मूर्तींची पूजा करीत असतात. शास्त्रोक्त विधी मृतिकेचीच पूजा करावी असा आहे. परंतु कागदाच्या चित्राची पूजा करण्याचें कारण पोर्तुगीजांचा धार्मिक छळ होय, असें दिसतें.

गणपतीची उत्पत्ति कित्येक पुराणांतून मिळते; विशेषत: गणेश पुराण, मुग्दल पुराण हीं होत; हीं उपपुराणें आहेत. मुख्य पुराणें जीं अठरा त्यांतील स्कंदपुराण यांतहि कांहीं कथा आहेत; परंतु या सर्व कथा आहेत, ऐतिहासिक आधार नाहींत,हें वाचकानीं ध्यानांत ठेवावें. गणेशपुराणाचा काल अगदीं अलीकडचा म्हणजे इ.स.१४व्या शतकानंतरचा आहे. असें मत कै. काळे यानीं आपल्या पुराणनिरीक्षण या ग्रंथांत दिलेलें आहे.

ही देवता काल्पनिक असली तरी फार प्राचीन काळापासून ह्या देवतेचें पूजन प्रचारांत आहे.सिद्धि व बुद्धि देणारी ही देवता असून प्रथमारंभीं आपण ह्याच देवतेचें पूजन करतो ह्या देवतेची पूजा केव्हांपासून प्रचारांत आली या बद्दलचा वाद महाराष्ट्रांतील विद्वानांत लागलेला होता. हे सर्व लेख मराठींतील जेष्ट श्रेष्ट अशा विविधज्ञानविस्ताराच्य १९०६ वर्षांत प्रसिद्ध झालेले आहेत. जिज्ञासूनीं ते अवश्य वाचावेत.

या विद्वानांच्या मतें गणपतीचें पूजन इ स.२००–४००सुमारास प्रचलित होतें. कथासरित्सागर या नावांचा जो ग्रंथ आहे त्या ग्रंथांत गणपतिपूजनाचा उल्लेख मिळतो. मूळ ग्रंथ इ. स. ३०० चा आहे, असें बुलर या युरोपीयन पंडिताचें मत आहे. या शिवाय पुष्कळ प्राचीन ग्रंथांत गणपति पूजनाचा उल्लेख मिळतो.

गणपती ह्या देवतेला हत्तीची सोंड कां आली याबद्दल पुराणांत जी कथा सांगितली आहे त्या कथेवर निवळ भाविक लोकांशिवाय विश्वास बसणें शक्य नाहीं. गणेश पुराणांत गणपतीचें ॐ कार स्वरूप अध्याय बारा या मध्यें वर्णन केलें आहे. व या ॐ कार स्वरूपाचीच दर्शक सोंड ही होय. या ॐ कार स्वरूपावरूनच गणपतीच्या मूर्तीची घडवणूक केलेली आहे असें आम्हांस वाटतें.

या देवतेसारखी व नामसादृश्याचीच देवता युरोपांतहि आहे. श्री. सी. म. फडके हे 'मूर्तिपूजा' ह्या आपल्या ग्रंथांत म्हणतात: 'ह्या गणपती सारखा पश्चिमेस जेनस Janeas (मनेश–गणेश) देव होय. त्याचीं नावें व वर्णन सलपिटियसच्या Sulpitius काव्यांत आहे. पिता जेनस, सर्व साक्षी जेनस, वाचस्पति, विद्याधिपति अशीं विशेषणें त्याला लावलेलीं आहेत; कांहीं ठिकाणीं जेनसची मूर्ति दोन तोंडांची आहे, आणि हेटुस्कन 'चालीची फलिशी Falisci येथील मूर्ति चार तोंडांची आहे. असला भिन्न प्रकार दिसला तरी त्यांत उणीव येत नाहीं. आपल्या इकडे घरांच्या दारांवर गणपतीची मूर्ति लाकडांत कोरतात त्याप्रमाणें ह्या जेनस वरून तिकडच्या दारानांच जेनुइ (Janoe) म्हणतात. हा जेनसच्या पूजेचा अवशेष आहे.पूर्वीं रोमन वर्षाचा आरंभ मार्च पासून होत असे तो बदलून (दहाचे ऐवजीं बारा महिन्याचें वर्ष झालें तेव्हां) पहिला महिना जानुवारी (जानस–जेनसचा) झाला. यावरून आपल्या गणेशासारखीच तिकडेहि पूर्वीच्या काळीं मूर्ति होती हें कळून येईलच.

आपल्याकडे गणपतीचें पूजन ज्या दिवशी होतें त्या दिवशीं चंद्रदर्शन घेऊं नये असा जनप्रवाद आहे. आज ह्या चालीचा हळुहळु लोप होत आहे हीं आनंदाची गोष्ट होय. अशा रूढीची खरी उत्पत्ति जोंपर्यंत पुढें आलेली नाहीं, तोंपर्यंत लोकांचा विश्वास त्यावर बसणें शक्य नाहीं. कांहीं विद्वान याचा आत्मिक अर्थ असा लावतात कीं, चंद्र ही मनाची देवता आहे. व मन हें चंचल आहे. चतुर्थ तुर्यावस्थेंत परमात्म्याचा साक्षात्कार होतो, अर्थात चंद्रदर्शन न घेणें म्हणजे मनोलय करणें होय.

गणपतीसारख्या तसेंच इतर देवतांच्या मूर्तींची आपण हिंदु लोक पूजा करतों म्हणून आपणावर इतर धर्मियांचा मोठा आक्षेप आहे. करतां त्याबद्दल दोन शब्द लिहिणें बावगें होणार नाहीं. मूळ वैदिक धर्म मूर्तिपूजक नव्हता. वेदकालीं वेदात मूर्तींचा उल्लेख नाहीं असें आर्य समाजिष्ट लोक म्हणतात तर काही कट्टे 'सनातनधर्मी ओढून ताणून कांहीं ऋचांचा अर्थ करून वेदांत मूर्तींचा उल्लेख सांपडतो असे विधान करतात; परंतु मूर्तिपूजा किंवा मूर्तिपूजेचीं देवळें ही त्या काळीं नव्हती हें मत मात्र सर्वांना मान्य आहे.

इ. स. पूर्वी ६ व्या शतकांत गौतम बुद्ध उत्पन्न झाले. त्यानीं यज्ञयाग वगैरेचा निषेध करून त्यांवर शस्त्र धरलें; परंतु मूर्तिपूजेसंबंधानें त्यांच्या तोंडून कांहींच निघालें नाहीं. यावरून त्या काळीं मूर्तिपूजा प्रचारांत नव्हती हें सिद्ध होतें. जर प्रचारांत असती तर तिचा निषेध केल्याशिवाय ते कदापि राहिले नसते. कारण त्याना देवच मान्य नव्हता. मग त्यांची पूजा कुठली ? परंतु आश्चर्य करण्यासारखी गोष्ट ही कीं ज्यांनें ईश्वराचें अस्तित्व सुद्धां कबूल केलें नाहीं त्याच्यामुळेंच मूर्तिपूजेला ज्यास्त उत्तेजन मिळालें.

बौद्ध धर्मांत कोणालाहि मज्जाव नव्हता अत्यंत हीन जातीच्या मनुष्याला सुद्धां भिक्षूची दीक्षा घेतांच श्रेष्टपणा प्राप्त होई. यावरून मूळ वैदिक धर्मांत हीन जातीच्या इसमाला श्रेष्टपणा प्राप्त करून घेतां येत नसे असें मात्र नाहीं. स्वतःच्या कर्तबगारीपणानें वरची पदवी प्राप्त करून घेण्याचा हक्क सर्वांना होता मात्र तो बौद्धधर्माइतका अगदीं सुलभ नव्हता. बौद्धधर्मांत कोणालाहि मज्जाव नसल्यामुळें मूळच्या रानटी जातीचा त्यांत भराभर प्रवेश होऊं लागला. बहुजन समाज हा बरवर पहाणारा व आचारप्रिय असतो. त्यांचा धर्म बदलला खरा परंतु आचार बदलला नाहीं. हे लोक आचाराचें मूळ गाठोडें पाठीवर घेऊनच या नवीन धर्मांत शिरले व तेथें त्यानीं आपल्या पाठीवरचें गांठोडें सोडून त्यांतील वस्तु आपल्या बरोबरच्यानां देण्यास सुरवात केली. व अशा रीतीनें अनार्य चालींचा हळुहळू शिरकाव त्या धर्मांत झाला.

बौद्ध धर्मांत पुष्कळ प्रकारची सुलभता मिळाल्यामुळें त्या धर्माचा प्रसार वाढला व हिंदु धर्माला उतरती कळा लागली. त्या वेळीं हिंदुधर्म नामशेष होतो कीं काय असा प्रश्न उभा राहिला. व आपणालासुद्धां त्यांच्या सारख्या चाली आपल्या धर्मांत रूढ कराव्या लागल्या. नेहमीं तत्वप्रियतेमुळें धर्मांतर करणारे असे थोडेच. बाह्य सुलभता जितकी ज्यास्त तिकडे बहुजन समाजाचें लक्ष वेधलें याच कारणामुळें आपल्यालाहि तितकी सुलभता देणें भाग पडलें. अशा चाली रूढ केल्या नसत्या तर आपल्या धर्माकडे लोकांचें लक्ष वेधलें नसतें

हिंदुधर्मानें जसें इतर अनेक चालीनां शुद्ध स्वरूप दिलें तसेंच मूर्ति पूजेलाहि दिलें तें कसें याचा थोडासा विचार करूं. आपले खिश्चन बंधूंचेंच उदाहरण घ्या. त्यांच्या मतें हिंदु हे जैतीव–पाखंडी–मूर्तिपूजक आहेत, हे गणपतीसारख्या मातीच्या देवाला हत्ती सारख्या जनावराची मोंड असलेल्या मूर्तिला देव म्हणून समजतात. तेव्हां अशा देवानां मान्यता देणारा त्यांचा धर्म काय असेल हें कळून येतच आहे. हा विचार त्यांच्या डोक्यांत यतानां आपल्या धर्मांतहि दगडाच्या वगैरे [illegible]ख्या चिन्हाला देव मानणारे लोक शेंकडा ९९ आहेत हें कसें येत नाहीं कोण जाणें ! याच्यापेक्षां पुढें जाऊन आम्हीं त्यांना असें बजावतों कीं, हिंदुलोक मूर्तिपूजक नसून मनाचे पूजक आहेत. एकाद्या चित्रशाळेंत शेंकडो गणपतीच्या मूर्ति तयार असतात. त्या वेळीं त्यांना देव असें कोणी [illegible] समजत नाहीं. तसेंच बाजारांत रविवर्म्याचीं [illegible] देवाचीं चित्रें पुष्कळ विकत मिळतात; परंतु अशा चित्रांसहि आपण देव असें समजत नाहीं. तर हीं चित्रें अगर या मूर्ति घरीं आणून त्यांची पूजा केल्यानंतरच आपण त्यानां देव मानतों पूजा केल्याशिवाय कोणत्याच मूर्तींत ईश्वरांश आलेला आहे असें आपण मानण्यास तयार नाहीं. तसेंच या मूर्तींचें विसर्जन करतांच [illegible]पली समजूत दुसरी होते. यावरून [illegible] मूर्तिपूजक नसून मनाचे पूजक कसे आ[illegible] हें सिद्ध होईलच. हिंदु लोकांचा देव मनवास करीत असतो हें तत्व हिंदुधर्मांतील गदीं खालच्या वर्गांत सुद्धां पसरलेलें [illegible] हिंदुधर्मानें मूर्तिपूजेला जें शुद्ध स्वरूप दि[illegible] हेंच होय.

मूर्तिपूजा आज कोणत्या ना कोणत्या तऱ्हेने सर्व धर्मांत आहे. मुसलमानानीं पूजा नाहींसी करण्याकरतां जंगजंग पछा[illegible] जितक्या मूर्ति फोडतां येणें शक्य होतें त्या[illegible] फोडून टाकल्या.पोर्तुगीजानीं तर कहर [illegible] मूर्तिपूजेचें बंड मोडून आकाशांतील बाप[illegible] स्थापना करण्याचा शक्य तितका प्रयत्न [illegible]ला; परंतु कांहींहि झालें नाहीं. उलट क[illegible]डिला तरु फुटे आणखी भरानें ह्या प्रम[illegible] अद्यापि जिवंत आहे.

अशा उत्सवांचा चालू युगांत कांहीं [illegible]यदा करून घेणें अगत्याचें आहे. प्रा[illegible]काळीं अशा उत्सवांमुळें दळणवळण वाढ[illegible] प्रेमसंवर्धन होई. आपण हिंदु लोक धार्मि[illegible] प्रवृत्तीचे आहोंत. धर्म हाच आमचा [illegible] आहे. करतां अशा धार्मिक उत्सवांचा [illegible]ष्ट्रीय दृष्टया फायदा करून घेतला पाहि[illegible]तो असा कीं, निदान एक तरी प्रत्येक [illegible]वांत सार्वजनिक गणपती करणें हें हो[illegible] अशा उत्सवांत व्याख्यानें होणें अत्यंत जरूरीचें आहे. आपल्या राष्ट्राची स्थिति [illegible] काय आहे, समाज कोणत्या स्थितींत [illegible] व ही स्थिति येण्याला काय कारण [illegible] पूर्वकाळीं आपली स्थिति काय होती वगैरे विषय व्याख्यानद्वारा मांडले पाहिजे. अशा वेळीं व्याख्यानें करण्यांत एक फायदा असतो तो हा कीं, उत्सव धार्मिक असल्यामुळें आमची जुनी मंडळी हजर राहील व विचारविनिमय जास्त होईल- दुसऱ्या कोणत्याहि वेळीं व्याख्यानें केल्यास ही मंडळी हजर रहाण्याचा संभव नसतो. याशिवा[illegible] काहीं सुशिक्षित मंडळीचा असा आरो[illegible] आहे कीं, आमचे हरदास पुराणिक कथा कीर्तनाच्या वेळीं नुसत्या भाकडकथा सांगत असतात. ही गोष्ट खोटी नाहीं. परंतु याला उपाय म्हणजे हा कीं, आपल्या [illegible] ग्रंथांचा सुशिक्षितानीं अभ्यास करून [illegible]तील तत्वें नव्या पद्धतीनें लोकानां सांगणें होय. दुर्दैवाची गोष्ट ही कीं, आपली [illegible]क्षित मंडळी आज धर्म विषयाकडे [illegible] करीत आहे. असो. यापुढें या गोष्टी[illegible]रणें अगत्याचें आहे. प्रत्येक जात, राष्ट पुढें जाण्याची तयारी करीत तेव्हां आपणहि तशाच प्रकारची [illegible] करणें रास्त नाहीं काय ?

के.

लक्ष्यांत घेतलें असतां; किंवा, प्राजेरिस दे कोस्त, आल्वेर्त शाव्हियर, आंद्राद, कांस्तां सियु रोकि दे कोस्त, वगैरे सारख्या कैक जित इंडियनाचा दर्जा पोर्तुगालांत सुद्धां, पोर्तुगीजांच्या अव्दैती राजकारणामुळें, केवढ्या जबाबदारीचा आहे व होता याच्यावर जरा नजर फेकिली असतां; किंवा, कै. सूर्याजी आनंदराव हे येथील पाठशाळेच्या रैतोरच्या अत्यंत जबाबदारीच्या व बहुमानाच्या जागेवर अधिकृत होते, ते जित होते कीं जेते होते, याची जाणीव करून घेतली असतां, माझ्या म्हणण्याचें तंतोतंत सत्यत्व पटतें व त्याच बरोबर केसरीकारांच्या म्हणण्याचा पोलपणा दृष्टोत्पत्तीस येतो.

स्पष्टवक्ता.

Ano 9o N. 24
Quinta-feira 11 de Setembro de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
a linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.
BHARAT.

वर्ष ९ वें. अंक २४
गुरुवार ता. ११ सप्टेंबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें—गोवा.

AINDA A LOTARIA DE MAPUÇA'

Factos graves !

...Sr. Redactor.

Cada vez o caso da lotaria de Bardez se complica e custa ouvir os ecos impressionantes que nos chegam.

Um correspondente de Mapuçá no jornal *Tribuna* de 23 do mês corrente, descreve sumariamente vários episódios que passaram durante a abertura e da sua leitura vê se que a Direcção do Asilo praticou irregularídades, dando assim lugar a varios comentos e interpretações.

Diz o referido jornal que a abertura começou nas salas da Camara e outros trabalhos foram concluidos em outra parte —segundo a resolução da *luminosa* Direcção! E temos ai uma abertura *trilobada*, pois, se a segunda parte foi na casa particular, a terceira realisou-se nas dependencias do Asilo; e rematando conclue **F. B:**

> "No nosso modesto entender, a "Direcçao deveria ter procedido es "crupulosamente neste grave nego'. "cio de abertura da Lotaria—**POIS "ESCANDALOS TEM HAVIDO EM "OUTRA PARTE**—e terminado tudo "onde se efectuou o sorteio; pois, "cremos que a edilidade nao nega "ria aquela sala para um fim tao "altruista e alem disso o edificio da "Camara sendo um ponto central "da vila, todos veriam o que ai se "estava a fazer e ninguem ousaria "abordar comentos e historietas "sobre o procedimento posterior da "Direcçao. ¿Por que motivo a Di- "recçao insistiu em levar todos "aqueles papeis naquela mesma "noite da sala da Camara para outro sitio?"

São justas as considerações do sr. F. B., porquanto a Direcção com o seu procedimento imprudente e imprevidente deu logar a que toda a gente achasse a sua atitude condenavel e repetisse o velho rifão: **na arca aberta ate' o santo peca.**

Imaginemos, por momentos, que a Diracção é constituida por uns querubins e serafins; nem, porisso, ela se livra da responsabilidade do ambiente de suspeições que motivam em vôlta da extracção e estamos certo que tudo andaria em paz se os trabalhos fôssem concluidos, onde e pela forma como tinham começado.

Pois, a reforçar nossos argumentos, vão narrados dois casos tipicos que teem sido assunto do dia, cá em Bárdez—Ora como a abertura duma lotaria era um facto novo neste concelho, tinham vindo muitas pessoas para assistir á mesma e, como era natural, seguiam com atenção a marcha dos trabalhos, tomando nota dos números premiados. Entre outros lá estavam os srs. A de Sousa, professor de inglês e A. Sahacary que tiveram a ocasião de verificar as cautelas de que eram portadores, tendo cada um deles alcançado premios de *tres rupias*.

Mas, oh cruel decepção' Quando foram lêr a lista que saiu depois da *gestação de dez dias*, estiveram boquiabertos e com olhos esgazeados perante a realidade que lhes foi desoladora!

Não há dúvida de que este desapontamento dos dois cavalheiros nunca produziria o rebate que produziu, acarretando descredito para a Direcção, se esta procedesse com a cautela que o caso requeria e hoje ninguem se sentiria com a coragem de atirar a lama na reputação de quem quer que fosse.

Poderá alguem preguntar: ¿Então a Direcção e outros terão trocado, de proposito, os numeros, etc?

Não podemos afirma-lo; por que a sua honestidade não foi discutida. Mas tambem não podemos nega-lo, porque a Direcção com os seus actos tirou-nos o direito e o dever de o fazer.

No dia anterior ao da abertura, para inspirar confiança no publico, a Direcção havia convidado todas as autoridades da vila. Foi uma feliz lembrança e todos estavam satisfeitos. Mas lá pelas *vinte e duas horas do dia cinco de Agosto* vieram-lhe á cabeça os fumos da **soberania** e lá se foi ela da Camara, no meio de geral espanto, levando todos os papeis e havendo naquele momento um pequeno *chinfrim.*

Agora com respeito á soberania da Direcção temos conversado e se fôsse assim seria milhor que a mesma, sentada em qualquer parte, arranjasse as coisas como quizesse e não aquilo que se ouve — pois envergonha a todos nós e não abona ninguem... muito menos os créditos da instituição á cuja testa se acha.

Era necessario que se usasse de todo escrupulo e zêlo e que os bilhetes, antes da abertura, fossem cadastrados e fechados com sêlo e lacre, como se faz em outras partes. Vimos durante a abertura, remexer-se muito nos maços das cautelas devolvidas que estavam sobre a mesa, o que não se pode fazer.

Pois bêm diz **F. B.** :— **pois escandalos tem havido em outra parte.**

Indubitavelmente, não podia a Direcção assumir todas as funcções e julgar-se *soberana*, pois, se as coisas não forem abertas e claras, há denuncias, inqueritos, sindincancias e mais complicações que levam dinheiros fabulosos dos cofres das instituições, em nome da *moralidade*, para haver moralidade.

Ora, isto é preciso evitar desde já e dar outro rumo a todos estes negocios e estamos certo que os bardezanos não descançarão, a fim de não haver incidentes lamentaveis e todos se interessarão pelas coisas do Asilo.

¡E' necessário evitar suspeições!!

Praza a Deus, não haja mais escandalos

Bardês, Agosto de 1924

UM BARDEZANO

P. S.

Ao concluirmos esta carta, veiu-nos a' mao *A Verdade*, de Mapuça' a quem, pelos modos, tudo o que nao parir la' em casa—da' *rato.*

E' o menos. Aqui cumpre-nos apenas dizer a' *A Verdade*, que a nossa ancia de abarcar a *gloria do brilhante exito da lotaria* e' tal que demo.la toda aos srs. C. F. Saldanha, Francisco Antonio de Noronha, dr. Milot Faria, Mascarenhas, Menezes, P. J. Gomes e outros. E agora onde a grei e os conselheiros?

Para escrever disparates.........

Bardez, Agosto de 1924

UM BARDEZANO

N. da R. — Apezar da nossa nota feita na ediçao passada, somos obrigados a abrir um parentesis a favor da carta de *Um Bardezano*, porque entendemos que os factos concretos que a mesma contem, devem ser conhecidos do publico e do governo.

त्याला त्या भाकरीचा थोडासा तुकडा सहज जादा अधिकाराच्या जोरावर निर्बंधपणें पार पाडूं शकतो. मग गोमांतकाच्या स्वराज्यांत तो काय अर्थ राहिला वगैरे विचार हिंदूंच्या डोक्यांत तर येत होतेच पण ख्रिश्चनानांहि ते दिवसेंदिवस भंडावूं लागले. याचा खरेपणा पहावयाचा झाल्यास दोन वर्षांमागें O Heraldo पत्रांतून Paulo da Cama या टोपण नावाखालीं एका प्रसिद्ध ख्रिश्चन पुढाऱ्यानें स्वराज्यावर एक लेख माला लिहिली होती ती वाचून पहावी. दुसरें असें कीं बारा तेरा वर्षांच्या अनुभवानें आपलें स्वराज्य फोल असल्याचें लोकानां कळून चुकलें. गव्हर्नमेंट कौन्सिल जाऊन त्याचे जागीं इंग्लिश धर्तीवर एक्झे-क्युटिव्ह कौंसिल आलें व लोकप्रतिनिधीनाहि तेथें पूर्वीपेक्षां जास्त मान देण्यांत आला. परंतु हा मान व घरदनी आपल्या चाकरास देत असलेला मान या दोहोंत मात्र तत्वतः कांहींच अंतर नाहीं नाहीं ह्मणावयास घरधनी आपल्या स्वतःचे घरांत चाकराला कमी वागवितो तर येथील जनतेवर खुद्द आपल्या घरांत चाकराप्रमाणें वागण्याची पाळी, इतकेंच काय ते अंतर! तेव्हां अशा स्थितींत हिंदूंच्या विशिष्ट मागण्या सोडाच पण हिंदु व ख्रिस्ती यांच्या सर्व साधारण इच्छा फळाला येतील अशी आशा धरून बसणें निवळ वेडेपणाचें ठरेल. मूळ कायदाच जेथें दोषपूर्ण, तेथें त्याची अंमलबजावणी सदोष झाल्यास त्यांत नवल असें कांहींच नाहीं. कांहींच्या मतें, गोमांतकाच्या प्रस्तुत दुःखपूर्ण स्थितीला जर कोण ज्यास्त जबाबदार तर कौंसिलांतील लोकनियुक्त सभासदच.इतर कोणी नाहीं.पण येथील लोकनियुक्त सभासदाचे बाबतींत अपवादभूत ह्मणून धरीत असलेला एक प्रकार लक्षांत आणला ह्मणजे वरील समज सर्वांशीं नसला तरी बव्हंशी चुकीचा असल्याचें कळून येईल. हा प्रकार ह्मणजे गेल्या सालीं करवाढीच्या निमित्तानें सरकारनियुक्त व लोकनियुक्त सभासदांत झालेल्या बाचाबाचीमुळें लोकनियुक्त प्रतिनिधीनां कौंसिल हॉल सोडून जाणें प्राप्त झालें हा होय. आतां एकंदर लोकप्रतिनिधींनीं या कार्यात भाग घेतला नाहीं, ही गोष्ट आलाहिदा आहे. कारण सरकारास अनुकूल अशा वाटा राजकीय घटनेनें ठेविलेल्या आहेतच. त्या विसरून चालणार नाहींत. आतां प्रतिनिधि लोकहिततत्पर व निःस्वार्थी असते तर कांहीं किरकोळ सुधारणा त्यानां गव्हर्नरांच्या अनुमतानें करतां आल्या असत्या, नाहीं असें नाहीं. पण असल्या सुधारणांत कांहीं स्वराज्याचें सर्वस्व नाहीं. त्याची गोडी चाखावयाची असल्यास आपल्या राजकीय घटनेंत आमुलाग्र फेरबदल घडवून आणला पाहिजे. एरवीं गत्यंतर नाहीं.

येथील लोक मिळालेल्या स्वराज्यालाच मुळीं अपात्र असा कित्येक.कडून गोमंतकावर दोषारोप करण्यांत येत आहे तर दुसऱ्या बाजूनें आपली पात्रता सिद्ध करण्याची कामगिरी पार पाडतानां कित्येक ख्रिस्तियनाची उडालेली गडबड पाहिली ह्मणजे आह्मांला एका साध्या पण वरील प्रकाराला तंतोतंत लागू पडणारी एक गोष्ट आठवते. एका आईनें आपल्या लहान मुलाला खाऊ देण्यासाठीं ह्मणून लाडू काढिला व मुलाला दिलाहि पण हा सगळा लाडू कांहीं आपणास एकट्यासच नाहीं असें त्याला वाटलें व आपल्या आईशीं तो त्या लाडवाचें अर्धच मागूं लागला. आईनें तर त्याला सगळा लाडू दिलेला पण मुलगाच जर अर्ध मागतो तर तें तिला हवेंच होतें. आईनें अर्ध काढून घेतलें व मुलापाशीं राहिलेलें अर्धेहि 'बाळ तें तुला फार होईल, असें सांगण्यासहि कमी केलें नाहीं. या गोष्टींतील मुलाच्या पंक्तीला येथील कांहीं वर्तमानपत्रकार व ख्रिश्चन पुढारी बसत आहेत, हें पाहून त्यांची कींवच करावीशी वाटते.

कसेंहि असो. पोर्तुगालांत गोमांतकीय लोकांवर करण्यांत येणाऱ्या आरोपाखालीं एक कुटिल धोरण दडी मारून बसलें आहे तें सांगावेंसें वाटतें. हिंदु काय किंवा ख्रिश्चन काय पुढें मागें कांहीं हक्कांची जोराची मागणी करतील ह्मणून हा एकंदर कावा आहे. असलेल्या हक्कांचाच जर तुह्मीं गोमंतकाच्या दुर्दशेकडे उपयोग करतां तर फिरून नवीन हक्क कोणत्या तोंडानें मागतां? असला अर्थ वरील आरोपांत गर्भित होत आहे तिकडे लक्ष दिलें पाहिजे. अद्याप हा प्रश्न वैयक्तिक स्वरूपाचाच ह्मणजे प्रत्येकाचें मत ह्मणून करण्यांत आलेला आहे, हें उघड आहे. पण असले प्रश्न उपस्थित झाले व आपली बाजू ह्मणून त्यांचा जरी नियम करण्यांत आला तरी सहजच ज्यास्त व नवीन हक्कानां आपली अपात्रताच सिद्ध होते, हें कांहीं खोटें नाहीं. पण पोर्तुगीजानीं तरी तसें कां करूं नये. असलेल्या हक्कांचेंच जर येथील कांहीं लोक व विशेषतः वर्तमानपत्रकार निर्लज्जपणें गोडवे गातात तर पोर्तुगीज लोकानींहि दिलेलें परत घेण्यास कां खटपट करूं नये? असो. याला खरे जबाबदार कोण हें पुढें सांगण्याचें ठरवून हा लेख आटोपता घेतों.

स्फुट विचार

माफीचा कायदाः— राजकीय मिलिटरी कैदी, गुन्हेगार वर्तमानपत्रकार व कायद्यानें ज्या इतर गुन्हेगारांना सहा महिन्यापेक्षां जास्ती कैदीची सजा फर्माविली नाहीं, अशा सर्व लोकांना गुन्हे माफ करणारा पोर्तुगीज सरकारनें एक कायदा पास केला असून, एप्रील ता. ४ सन १९२४ पर्यंत ज्यांच्याविरुद्ध वरील प्रकारचे गुन्हे शाबीत झाले असतील किंवा शाबीत करण्यार्थ सरकारी वकिलानें खटले भरले असतील, त्या सर्वांना माफीचा कायदा लागू आहे. मात्र चौर्य, विश्वासघात व लफंगेगिरी या तीन जातीच्या गुन्ह्यांना प्रस्तुत कायद्याचा कोणत्याच प्रकारचा फायदा मिळणार नाहीं. येथील सरकारी बुलेटिनवर उपरोक्त माफीचा कायदा प्रसिद्ध होतांच पणजी व ह्मापशें येथील कोर्टांनीं या कायद्याची तावडतोब अमलबजावणी करून शेंकडो खटले काढून टाकले. इतर ठिकाणच्या कोर्टांत अजून सदरहू कायद्याचें अर्थमंथन चालूच असून, त्यापासून कोणतें 'रत्न' निष्पन्न होईल याकडे लोकांचे, विशेषतः गुन्हेगारांचें, डोळे एकसारखे लागून गेले आहेत. बाकी कायद्याचा अर्थ सरळ असून, त्यांत अर्थविपर्यासाचें गरळ ओतण्याचा जो कित्येक अहंमन्य कायदे पंडितांकडून अघळपघळ प्रयत्न करण्यांत येत आहे, तो निवळ अमंगळ वृत्तीचा द्योतक आहे, असें आमचें स्पष्ट मत आहे.

माफीचे प्रकार :— सरकारकडून गुन्हेगारांना देण्यांत येत असलेल्या माफीचे दोन प्रकार असतात. एका प्रकारानें गुन्हेगारास लागलेला खटल्यांचा कलंक साफ धुतला जाऊन, जणूं काय त्यानें केव्हांच गुन्हा केला नाहीं, असें त्याला मानण्यांत येतें. या प्रकाराला amnistia अशी कायद्यांत संज्ञा असून, जो माफीचा हुकूम सरकारनें प्रसिद्ध केला आहे, त्याचा समावेश आम्नीस्तीयें'तच होतो. दुसऱ्या प्रकाराला, perdao असें नांव असून, गुन्ह्यांचा डाग 'पेरदांवा'नें पुसला न जातां, केवळ शिल्लक राहिलेली भोगण्याची शिक्षा मात्र माफ होत असते. मोनार्कीच्या अमदानींत कोणत्याहि शुभप्रसंगाच्या वेळीं या प्रकाराची माफी देण्याची वहिवाट असे. पण राजकीय कैद्यांना आतांप्रमाणेंच तेव्हांहि 'आम्नीस्तीय'च देण्यांत येत असे. असो. कोणत्याहि कारणानें कां असेना, ज्या आमच्या व्यवसायबंधूंस व इतर लोकांस माफीचा कायदा लागू होऊन दोषमुक्त झाले किंवा होण्याची खात्री आहे, त्यांचें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करण्यास भारताला फार समाधान वाटतें.

राजकीय वातावरणः— पोर्तुगालच्या राजकीय वातावरणांत अस्वस्थतेचे ढग दिवसें दिवस जास्तच जमत आहेत. यामुळें बंडाचें पीक तेथें मुबलक पिकत असल्यास नवल नाहीं. तेथील वर्तमानपत्रांतून उघड उघड बंडास उत्तेजक असे लेख प्रसिद्ध होत असून, सरकारच्या मनगटांत त्यांना मज्जाव करण्याची धमक बिलकूल नाहीं, असें मानण्यास भरपूर आधार आहे. गेल्याच्या मागील आठवड्यांत कांहीं लोकांकडून बंडाचा उपद्व्याप करण्याचा प्रयत्न झाला; पण तो, बहुमताच्या असहानुभूतीमुळें, मुळांतच अयशस्वी ठरला. तरी पण त्याचे अनिष्ट परिणाम सरकारास भोंवले नाहींत असें नाहीं. अनिष्ट परिणामाची आंच तर सरकारी तिजोरीला शांतता प्रस्थापिण्यासाठीं बसलीच. शिवाय दुलैकिकांत भर पडली ती निराळीच!

मोठ्यांचा अनुभव :— मोडकळीस आलेली एखादी संस्था दुरुस्त करण्यासाठीं निरर्थक शक्तिव्यय करण्यापेक्षां ती मोडून तिच्या जागीं दुसरी नवीन स्थापन करणें जास्त हितावह आहे, असें स्वामी विवेकानंद महाराजांसारख्या मोठ्या लोकांचें मत आहे. पोर्तुगालची सांप्रतची नोकरशाहीची 'संस्था' अगदीं मोडकळीस आलेली आहे. आतांपर्यंतचा अनुभव जमेस धरला तर नोकरशाहीचें हें फुटलेलें कांचेचें भांडें फिरून सांधणें मानवी शक्तिबाहेरचें काम आहे. तेव्हां विवेकानंदजींची शिकवण व ज० गोमीस द कोस्तांची सूचना लक्ष्यांत घेऊन, मोडकळीस आलेल्या जुन्या व कर्तव्यशून्य नोकरशाहीच्या समाधीवर नवी व कर्तव्यदक्ष नोकरशाहीची संस्था उभारली गेल्यास मात्र पोर्तुगालची परिस्थिति सुधरणें संभवनीय आहे. नाहींतर 'बुडत्याचा पाय खोलांत' या न्यायानें पोर्तुगालची राजकीय परिस्थिति दिवसें दिवस गुंतागुंतीचीच होईल, हें निर्विवाद आहे.

जाहीर विनंति

" मौजे कवळें येथें बांधण्यांत आलेल्या श्री शंकराचार्य मंदिरांत नास्तिकमतोच्छेदक सकलवैदिकधर्माद्वैततत्त्वज्ञानामृतवेदांत प्रवर्तक पूज्यपाद भगवान् श्रीशंकराचार्यांच्या पादुका व देवताप्रतिष्ठा करण्याकरितां चातुर्वर्ण शिष्यवर्गास दर्शन देण्यास्तव, श्रीमत् जगद्गुरु श्रीशंकराचार्य मठ सं. संकेश्वर व करवीर यांचा येत्या भाद्रपद शु॥ १५ मा १८४६ रोजीं चातुर्मास समाप्ती होऊन गोमांतक प्रांतांत स्वारीसंचार होणार आहे. सदर समारंभाचे वेळीं 'हिंदु धर्मसभेचें' सातवें अधिवेशन श्रींच्याच अध्यक्षतेखालीं भरविण्यांत येणार आहे; सदर सभेंत हिंदुधर्म संरक्षक सुसंघटित कार्योपयोगी अशी मुख्य संस्था येथील हिंदु समाजांत अवश्य त्या धार्मिक सुधारणा घडून येण्याकरितां कायमची स्थापन कशी करतां येईल याचा बहुमतानें योग्य विचार करण्यांत येईल. या सर्व कार्याची पूर्वतयारी अखिल शिष्यवर्गाचे सहाय्यानें जरूर होण्याविषयीं ज्येष्ठ व॥ ३ या १८४६ तारीख १९ जून सन १९२४ वार अंक १७ स्वारी मु। संकेश्वर येथून श्रींची आज्ञा झाली आहे. त्याचप्रमाणें येथील स्थानिक सरकार मेहरबान गव्हर्नर जनरल साहेब बहादुर पणजी यांचेकडे नारायण अनंत शेट वादिवडेकर, कॉलेज फोंडा; भार्गव सगुण कामत वाघ राहणार पानवेल पणजी; रामचंद्र पांडुरंग वैद्य, केरी वगैरे सद्गृहस्थांचें शिष्टमंडळ जाऊन श्री संस्थानचें थैलीपत्र जुलैच्या ९ तारखेस १९२४ समक्ष दाखल करण्यांत आलें.साहेब बहादुरांनीं गेलेल्या शिष्टमंडळाची आदरपूर्वक मुलाखत घेऊन थैलीपत्राप्रमाणें श्री स्वारींचा मानमोतब वगैरे योग्य तऱ्हेनें राहण्याकरतां पूर्व वहिवाटीस अनुसरून सर्वत्र बंदोबस्त व व्यवस्था ठेवण्याकरतां हुकूम केला आहे. तरी सर्व सनातन धर्माभिमानी शिष्यवर्गानें वरील कार्याकरितां शक्य होईल त्या तऱ्हेनें मनःपूर्वक सहाय्य करून हें पवित्र व अपूर्व कार्य घडवून आणून, श्री सेवा व धर्मपीठाचें संरक्षण करणें हें आद्य कर्तव्य आहे. इत्यलं० " इ. इ. र. बा. जो. धर्माधिकारी, कवळें,हे कळवितात.

निजामसरकार व हिंदु

एकीकडे निजाम सरकार पूर्वी एकदां त्याच्या राज्यांत समावेश होत असलेल्या पण सध्या ब्रिटिश सरकारच्या ताब्यांत असलेल्या वऱ्हाड प्रांताची मागणी करून ती न्याय्य आहे हें ब्रिटिश सरकारास पटवून देण्याची खटपट करीत असतांना दुसरीकडे त्याच्या राज्यव्यवस्थेच्या व्यवस्थितपणाविषयीं संशय उत्पन्न करणाऱ्या कित्येक चमत्कारिक गोष्टी घडत आहेत.

वऱ्हाड प्रांतावरील आपला हक्क शाबीत करण्यासाठीं इंग्लंडास पाठविलेल्या व ह्या प्रश्नाची तेथें वाटाघाट करीत असलेल्या त्याच्या प्रतिनिधींचें, सर हसन अल्ली इमाम ह्यांचें कार्य कितपत यशस्वी झालें आहे हें नक्की कळण्याचा मार्ग नाहीं; परंतु सर हसन अल्लीची ह्या वकिली करितां नेमणूक झाल्या दिवसापासून निजामाच्या मुलुखांतील परिस्थितीकडे हिंदुस्थानांतील लोकांचें लक्ष्य वेधून राहिलें आहे. खुद्द वऱ्हाडांत व इतरत्र ह्या मुसलमान राजाच्या ताब्यांत तो प्रांत जाण्याच्या ह्मणजे ब्रिटिश सरकारनें देण्याच्या विरुद्ध असलेल्या लोकमतानें निजामास अप्रिय वाटणारे कित्येक प्रश्न उपस्थित केले आहेत व कित्येक पत्रांतून ह्या विषयावर चर्चाहि सुरू झाली आहे. अर्थातच निजामपादशाहीस हें खपलें नाहीं; त्यानें तावडतोब फर्मानें सोडून मद्रासेंतील 'हिंदु', स्वराज्य' व मुंबईतील 'मराठा','सर्व्हंट ऑफ इंडिया' वगैरे पत्रांवर त्यांच्या अक्षम्य पातकाबद्दल शिक्षा ह्मणून बहिष्कार घातला व तीं त्याच्या राज्यात आल्यास किंवा कोणी मागविल्यास तो गुन्हा ठरवून त्यास जब्बर शिक्षा करण्याचें प्रसिद्ध केलें.

वऱ्हाड निजामशाहींत सामील झाल्यावर त्याला स्वराज्य देण्याचें अभिवचन देणाऱ्या निजामाच्या ह्या कृत्याबद्दलची बातमी प्रसिद्ध होते न होते तोंच त्याच्या हिंदु प्रजेवर होत असलेल्या धार्मिक जुलमाची व छळाची हकीगत ऐकूं येऊं लागली व गेल्या आठवड्यात गुलबर्गा ह्या सोलापूर पासून ६० मैलांवर व मुंबई—मद्रास रेल्वेच्या रस्त्यावर असलेल्या शहरांत झालेल्या दंग्याच्या बातमीनें हिंदूंवर केल्या जाणाऱ्या धार्मिक जबरदस्तीविषयीं मुळींच संशय उरला नाहीं गुलबर्ग्याच्या एकंदर ३५,००० लोकवस्तीपैकीं १९,००० हिंदु असून त्यापैकीं बहुतेक लिंगाईत व मराठे आहेत. गेल्या मोहरमच्या सणाचा फायदा घेऊन तेथील मुसलमानांनीं स्थानिक कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या विशेषत: पोलिसाच्या मदतीनें ता. १६ आगष्ट रोजीं रात्रौ हिंदूंच्या देवालयावर हल्ला चढविला व त्यांच्यावर अत्याचार करण्यास सुरुवात केली. त्यांनीं एकंदर ५० देवळें भ्रष्ट केलीं; त्यापैकीं कित्येकांना आग लावून देवून बाकीचीं मोडून तोडून त्यांचा नाश करून, आंतील मूर्तींची मनास वाटेल तशी बासलात लावून (आमच्या नंदीवर त्यांचा जास्त रोख होता) देवालयांतील उपकरणें वगैरे मालमत्ता लुटली. ह्या देवळांपैकीं लिंगाईतांना व दुसऱ्या हिंदूंनाहीं अत्यंत पूज्य असलेलें शरणबसवेश्वराचें सुप्रसिद्ध देवालय होतें. हिंदु हे अत्याचार चालू असतांना आपल्या भ्याडपणाच्या ब्रिदास जागले व पशू बनलेल्या (ह्या बिचाऱ्या मुक्या प्राण्यांना धार्मिक भावनाचे मशिदीचें व लांब दाढ्यांचें अस्तित्व माहीत नसतें हें ध्यानांत ठेविलें पाहिजे) मुसलमानाच्या 'दिने दिन' च्या रानटी आरोळ्यांना त्यांनीं भीतीच्या आरोळ्यांचें उत्तर देऊन, जागा सांपडेल तेथें ते लपून बसले, हें सांगणें नकोच. ह्या हल्ल्यांत बंदुका, तरवारी वगैरे हत्यारांचा उपयोग करण्यांत आला होता व एका देवालयापुढें मुसलमानांच्या घोळक्याला थोपवून धरण्याचा प्रयत्न करीत असतां पोलीस (सी. आय. डी.) खात्याचे लोकप्रिय व हुशार सुपरिन्टेंन्डेंट मि. अजिझुल्हा ह्यांनां गोळी घालून ठार मारण्यांत आलें.ह्या झटपटींत दंगेखोरांपैकीं तीन जण ठार होऊन सहा जण जखमी झाले. नंतर लष्करानें शहर ताब्यांत घेतल्यावर सुशिक्षित व सधन वर्गापैकीं पुष्कळांनीं आपलीं बायको पोरें सुरक्षिततेसाठीं सोलापुरास पाठवून दिलीं.मुसलमानांनीं दिलेलें दंग्याचें कारण, त्यांच्या मशिदीचा हिंदूंनीं केलेला अपमान हें असलें तरी तें कोणासहि—खुद्द वरिष्ट अधिकाऱ्यांसहि—समाधानकारक वाटत नाहीं. खरें कारण त्यांना हिंदूवर उगवावयाचा असलेला सूड हें होतें. गेले कित्येक दिवस निजामाच्या हद्दींत हिंदूंना जबरदस्तीनें बाटविण्याचा क्रम चालू होता कित्येक हिंदूंनीं ह्या प्रकाराबद्दल निजामाकडे निषेध प्रदर्शित केल्याबद्दल देवाच्या आवडत्या इस्लामियांचा हिंदु काफिरांवर दांत होता. निजामसरकारनें कृपाळू होऊन व एक फर्मान सोडून ह्या दंग्याची चवकशी करण्यासाठीं एक कमिटी नेमली आहे.परंतु तिजवर लोकांच्या प्रतिनिधींपैकीं कोणाचीहि नेमणूक न झाल्यामुळें मुसलमानी पोलीस व दुसरे अधिकारी ह्या सध्याच्या सभासदांवर हिंदूंचा विश्वास नसल्यामुळें त्यांना ह्या कमिटीविषयीं अविश्वास वाटतो.

मोंगलाईतील हिंदूंना पोंचत असलेला मुसलमानाच्या धर्मवेडाचा उपसर्ग गंभीर स्वरूपाचा आहे; कारण, तो थांबविणें किंवा न थांबविणें सर्वस्वी निजामाच्या मर्जीवर अवलंबून आहे. निजामसाहेब स्वत: कर्मठ मुसलमान आहेत व त्यांनीं वाटल्यास सध्या चालू असलेला प्रकार थांबविण्याचा कोणताच प्रयत्न ते करणार नाहींत ! त्यांनीं ह्या बाबतींत पक्षपाती धोरण स्वीकारल्यास निजामासारख्या वरिष्ट संस्थानिकांच्या कारभारांत हात घालण्याची छाती खुद्द हिंदुस्थान सरकारासहि होणार नाहीं. ब्रिटिश हिंदुस्थानांतील हिंदूंना मुसलमानांकडून त्रास झाल्यास त्याची दाद त्यांना हिंदुस्थानसरकारासारख्या ख्रिश्चन सरकाराकडे मागतां येईल. ह्या ख्रिश्चन सरकारची न्यायबुद्धि अगदींच नि:स्वार्थी नसली किंवा कुत्र्यानीं कुत्र्यांना (किंवा शीळपट मेंढ्यांना) फाडून खाणें, त्यांच्या हिताला कदाचित फायदेशीर असलें तरी सुद्धां तें नेहमींच मुसलमानानां प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणें प्रोत्साहनच देतील असें ह्मणवत नाहीं. हिंदुस्थान सरकार पूर्ण जबाबदार नसलें तरी त्या टोकाला जाण्याएवढें तें बेजबाबदार नाहीं. लॉर्ड कर्झन व्हॉइसरॉयाच्या गादीवर लोळत असतांना ते आपल्या मुसलमान बिबीवर फिदा झालेले होते. ते स्वतः ही गोष्ट सांगत असत. लॉर्ड कर्झनसारखा व्यवहारी ओबडधोबड व धूर्त इंग्रज त्याच्या बिबीनें दाढीमिशांची सवलत दिली असतांहि तिच्या बुरख्याच्या पाशांत गुरफटला गेला असेल हें शक्य दिसत नाहीं. खरी स्थिति अशी होती कीं, मुसलमानानां खूप ठेवण्यांत कर्झनचा डाव होता व तो टाळण्यासाठींच त्याची नेमणूक झालेली होती. तें कसेंहि असलें तरी कर्झनच्या वेळीं असलेली परिस्थिति आज राहिलेली नाहीं. कर्झनचा सूर्य केव्हांच अस्तंगत झालेला आहे व कर्झन साहेबांच्या घराण्याच्या चिलखतावर जरी Curson holds what Curson held हें कर्झन कुळाच्या वैभवाच्या चिरकालित्वाचें भविष्य लिहिलेलें असलें तरी तें खरें ठरणें दुर्दैवानें सृष्टिक्रमाविरुद्ध आहे. तेव्हां ब्रिटिश हिंदुस्थानांतील हिंदूंची स्थिति, ह्या बाबतींत, हैद्राबादच्या दुर्दैवी हिंदूंना हेवा वाटण्यासारखी आहे, ही पहा ब्रिटिश राज्याची चांगली बाजू !

वास्तविक, मुसलमानानीं हिंदूंवर केलेल्या अत्याचाराच्या मुळाशीं 'धार्मिक भावना' असणें अशक्य आहे. त्याच्या मुळाशीं धर्माची कल्पना नसून अधर्माची दंडेलीची व क्रौर्याची कल्पना आहे. मुसलमानाना धार्मिक भावना असल्यास त्या हिंदूंकडून दुखविल्या जाणें अशक्य आहे. हिंदुधर्म हिंदुस्थानच्या सात्विक व निरुपद्रवी भूमींत रुजलेला आहे. हिंदुधर्माचा वृक्ष, आज जरी त्याचें आयुष्य कष्टमय दिसत असलें किंवा त्यानें हजारो निर्घृण घाव पूर्वी सहन केले असले तरी, बुद्ध धर्मासारख्या धर्मांना जन्म देणाऱ्या समृद्ध भूमीनें पोसलेला आहे. अरेबियाच्या रुक्ष व अस्वस्थ वाळूनें तो पोसलेला नाहीं. हिंदूधर्माला किंवा तो आचरणाऱ्या हिंदूंना दुसऱ्या धर्मांबरोबर स्पर्धा करून किंवा त्या धर्मांच्या अनुयायांच्या भावना दुखवून काय मिळणार आहे ? हिंदूंनीं दुसऱ्या धर्मानुयायांच्या भावना दुखविण्याचें सोडाच, त्यांनीं स्वतःच्या धार्मिक भावनाची फाजील काळजी केव्हांहि घेतली नाहीं ! आम्हाला धार्मिक भावना नाहींत काय ? आमच्या धार्मिक भावनाविषयीं ह्या मुसलमानानीं किंवा दुसऱ्या कोणी केव्हां व कितीशी आस्था दाखविली किंवा दाखवीत आहेत ? मुसलमान डुकरांना जेवढें निंद्य मानतात तेवढेंच गाईला आह्मी पूज्य मानतों; डुकराच्या उल्लेखानें त्यांचें पित्त जेवढें खवळतें तेवढेंच गाईच्या वधानें आमचें खवळतें. मग, धार्मिक भावनेच्या सबबीवर आम्ही मुसलमानांची कपाळें कां फोडीत नाहीं ? मला मुसलमानाच्या दाढीची अत्यंत चीड आहे. मी एकदां स्वतः दाढी वाढविण्याचा प्रयत्न करून पाहिला होता. पण तो फसला; मग मी रस्त्यावर भेटलेल्यां मुसलमानाची दाढी कां ओढीत नाहीं ? गाई खाणाऱ्या किंवा गलिच्छ दाढ्या वाढविणाऱ्या मुसलमानांवर हिंदु हात टाकीत नाहींत ह्याचें कारण, मी कबूल करतों, आजचे हिंदु—हिंदु नसलेले हिंदु—भ्याड आहेत; पण मुसलमानाच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या आड प्रसंगस हिंदु येत नाहींत किंवा त्यानीं येऊं नये ह्याचें खरें कारण, दाढ्या वाढविणें सोडून दिलें (आमचे प्रो. कोसंबी दाढी वाढवितात) तरी गोहत्तेची जबाबदारी सर्वस्वी हिंदूंवर आहे हें होय. हिंदूंनीं मनांत आणलें तर गोहत्या अशक्य होइल. सामाजिक बहिष्कारानें, संघटनेनें हिंदूंना गाईचें मांस सिंहाच्या मांसाएवढें दुर्मिळ करतां येईल. अस्पृश्यानां दूर ठेवण्यांत ज्या शक्तीचा अपव्यय होत आला आहे ती शक्ति आज एकवटून हिंदूंना गोहत्या थांबवितां येणार नाही काय ?

परंतु एकवेळ धार्मिक भावनाची सबब खरी धरली तरी सुधां, जेव्हां खुद्द मुसलमानच मुसलमानाच्या ह्या भावना दुखवितात तेव्हां त्या बलिष्ट मुसलमानांचें काय पारिपत्य करण्यांत येतें ? तुर्कस्थानांत परवां जेव्हां मुस्ताफा केमाल पाशानें खिलाफतीचें त्या देशांतून कायमचें उच्चाटन केलें; खलिफा हा पैगंबरापासून चालत आलेल्या ओथमानच्या जुन्या (गोंमातकाच्या टेकड्यापेक्षांहि जुन्या) व पवित्र घराण्यातील वंशजाला नास्तिक कुत्र्यांच्या देशांत पळून जावयास लावलें, तेव्हां हिंदी मुसलमानानीं आपल्या दुखविलेल्या भावना कशा नीट केल्या ? केमालनें— त्या शूर सेनापतीनें व हुशार मुत्सद्यानें—स्वदेशहिता करितां तुर्कांच्या दुहीचें, दौर्बल्याचें परतंत्रतेचें व अज्ञानाचें मूळ उपटून टाकलें असेल; युरोपियन जुगाऱ्यांचा अड्डा उठवून लावणें एक, स्वतंत्र राष्ट्राच्या वृद्धीकरितां तुर्की प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष ह्मणून त्याला भाग पडलें असेल; पण इस्लामाची भवितव्यता—सर्व आज्ञाधारक मुसलमानांवर अधिकार गाजविणाऱ्या धर्मगुरूची बासलात लावली जाण्यांत इस्लामांची भवितव्यता कोठें राहिली ? आज सेंकड, निरपराधी हिंदूंची कपाळें फुटलीं जात आहेत; त्या पूज्य पैगंबराचा (जयजयकार असो) पवित्र आज्ञेचा उघड उघड अनादर करून त्यांच्या निर्बल बायकांची इज्जत घेतली जात आहे; केमालचा जबडा शाबूत असून त्याची बायको बुरखा फेंकून देऊन निर्लज्जपणें एका अमेरिकन वर्तमानपत्राच्या बातमीदार कुत्र्याबरोबर सलगीनें स्त्रीशिक्षणाविषयीं, चहा पित पित, गप्पा मारण्यांत गढून गेली आहे. वर्तमानपत्रांत दिलेल्या तिच्या फोटोकडे मेक्सिकोच्या दुसऱ्या टोकावर असलेल्या ठिकाणीं दोन लफंगे तरुण कौतुकानें पहात आहेत; हा सर्व प्रकार चालला असतां गुलबर्ग्याच्या रस्त्यावर वावरल्या जाणाऱ्या गांजलेल्या बंदुका, तरवारी व विटा कोठें आहेत, ते धमक्या देणारे उलेमा कोठें आहेत ? इस्लामाचें स्वातंत्र्य धोक्यांत आहे. पदच्युत व निर्धन खलीफास त्या खऱ्या मुसलमानानें निजामसाहेबानें खर्चासाठीं वर्षासन तोडून दिलें असलें तरी तें स्वातंत्र्य प्रस्थापित होत नाहीं ! मुसलमानांच्या धार्मिक भावना मेल्या काय ?

संजय

Ano 9 o N. 25

Quinta-feira 18 de Setembro de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
por cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत

BHARAT

वर्ष १ ले. अंक २५

गुरुवार ता. १८ सप्टेंबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें-गोवा

CODIGO DE USOS E COSTUMES DE GOA

Dia mais, dia menos entrara' na tela da discussao o projeto deste codigo de tao palpitante interesse vital aos sectarios da religiao hindu', que constitue mais da metade da populaçao de Goa, elaborado pelo eminente orientalista e afamado jurisconsulto sr. Dr. Bragança Pereira, projecto que foi distribuido pelos vogais do Conselho Legislativo.

Os usos e costumes dos hindu's de Goa foram ultimamente codificados pelo Decreto de 16 de Dezembro de 1880; mas como esta lei nao satisfazia, em geral, a' aspiraçao dos sectarios da mesma religiao, exigia-se ha muito a modificaçao desse Decreto.

Em que bases devera' inspirar-se essa modificaçao?

Pertence isto aos competentes.

Entretanto, como um dos obscuros membros daquela seita, entendemos do nosso dever abordar as nossas modestas consideraçoes sobre o mesmo projeto; mas antes desta ardua tarefa vejamos em rapidas linhas o que sejam os usos e costumes hindu's e ate' que ponto convem mante-los dando-lhes a sancçao legal ou restringi-los possivelmente para o bem estar tanto dos interessados como da nacionalidade portuguesa.

Veem a talho estas perguntas porque se notam sobre o assunto duas correntes de opinioes, uma baseada na velha e decrepita civilisaçao indiana e a outra originada nos principios progressivos da evoluçao ocidental; e como nas regioes oficiais predomina o segundo elemeuto, as suas voz e opiniao teem sido de peso e valor.

Para pano de amostra do que dizemos, veja o leitor no relatorio que precede ao Co'digo do Registo Civil promulgado pelo Dec. de 9 de Novembro de 1912, entre outros, os seguintes conceitos.

«Respeitaram neste projecto os usos e costumes dos habitantes nao cristaos.................................»

«E' certo que esses usos e costumes se *nao coadunam com a nossa civilisaçao, mas tambem nao podem banir-se rapidamente, tradiçoes e praticas religiosas ja' muito inveteradas* sem grandes abalos, que neste momento convem muito naturalmente evitar. *Uma educaçao cuidadosa e diplomas* «especiais ponderadamente estudadas e publicadas nao duma so' vez, mas segundo uma conveniente evoluçao levarao os povos da India a modificar ou acabar, aos poucos, com tais usos e costumes.'

HIC JACET LEPUS...

¿Porque haveria tamanha relutancia em ver mantidos estes usos e costumes?

So' porque se nao coadunam eles com a civilisaçao ocidental?

¿Porventura os nossos dirigentes convencem-se de que a civilisaçao ocidental tem atingido o seu maximo topo e nao tem lacunas a preenche-las representando ela a ultima aspiraçao da humanidade inteira?

E se a civilisaçao ocidental esta' no seu auge ¿por que e' que se notam, a cada passo, revoluçoes e anarquismos sociaes nas naçoes europeas com uma velocidade vertiginosa e sem rumo nem prumo?

¿Porque sera', entao, que a *e'lite* intelectual daqueles paizes nao tem uniformidade de vistas sobre os problemas de reformas sociaes que se lhes deparam?

Se uns defendem o regime da propriedade individual, outros preconisam o da sua municipalisaçao ou socialisaçao. Se uns procuram a salvaçao do paiz no socialismo outros pretendem valer-se do bolchevismo, facismo etc.

Em fim uma barafunda caotica e sem saida!

Ha quem raciocine que a emancipaçao dos povos consiste na adaptaçao da civilisaçao ocidental, argumentando outros, com respeito ao nosso paiz, que pela assimilaçao dos costumes ocidentaes e' que devemos procurar a firmeza da soberania portuguesa.

Pura utopia!

Nao somos acerrimo admirador de uma ou de outra civilisaçao o que desejamos e' que o fiel da balança mantenha o equilibrio para o bom funcionamento da maquina social. Nestas condiçoes, e' aceitavel todo o costume ocidental, que nao va' bulir com a essencia da civilisaçao indiana, cabendo tambem aos ocidentais, na igualdade de circunstancias, o papel de aceitar os costumes indianos.

O que se observa porem e' bem contrario! Por quanto os defensores da civilisaçao ocidental tem tamanha aversao por todo o costume indiano, ainda que seja este aconselhado pela sciencia e consciencia, que da' margem a serias criticas.

A sciencia moderna reconhece vantagens da incineraçao dos cadaveres, pratica seguida entre os hindu's desde os tempos remotissimos; mas ¿quantos dos ocidentalisados estarao dispostos a aceitar este uso, banindo o sistema por eles seguido e que e' incompativel com a sciencia?

Temos fresca a memo'ria da guerra movida ao General Machado, quando Governador desta India, por ter publicado uma Portaria determinando incineraçoes dos cadaveres de individuos falecidos pela peste bubonica.

Japao, esta naçao progressiva que se celebrisou no concerto de naçoes e leva a primazia na vanguarda da civilisaçao mundial sem se renunciar aos seus velhos usos e costumes procura reforma-los dentro da orbita das suas instituiçoes nacionais.

Os usos e costumes de cada povo variam segundo o seu temperamento tradiçoes, historia, religiao e varios outros factores distrutivos que sao formados pelo conjuncto das producçoes de longa experiencia.

Ora, estes factores, que criam os usos e costumes, divergindo profundamente na constituiçao de sociedades orientaes e ocidentaes, a enxertia dos costumes ocidentaes nos habitos da maquina social oriental longe de beneficiar esta, redundara' antes em seu prejuizo.

Tambem nao e' verdade que a assimilaçao dos costumes seja a base solida da manutensao da soberania de qualquer naçao. Se assim fosse o Brasil e Estados Unidos cujos habitantes foram da mesma raça, lingua, costumes, e religiao dos metropolitanos nunca se proclamariam independentes.

E' erro politico procurar a fusao de nacionalidades distintas pela assimilaçao de costumes quando, estejam separadas pela situaçao geografica.

Ha' mais ainda.

A sujeiçao vexatoria dum determinado povo a outro pertence a historia.

O progresso das ideas liberais que criou o espirito moderno admite tutela no caso em que um povo nao se julgue apto para reger a sua pessoa e bens mas essa tutela tambem tem limites, porquanto, cessado o motivo, tem de cessar forçosamente o efeito. 'Sublata causa tolitur efectus.'

O entusiasmo dos portugueses pela independencia do Brazil e dos ingleses pela dos Estados Unidos tem origem neste invariavel principio.

¿Porque, pois nao havemos de seguir o exemplo de Japao para formaçao dos nossos costumes, sem perder o relevo da nossa civilisaçao milenaria?

Cada terra com seu uso, cada roca com seu fuso.

G. C. Guddó

Apelo

Chamamos a atençao dos nossos leitores para o seguinte apelo;—

Vai fazer um ano que exalou o derradeiro alento o venerando anciao Padre A'lvares, espirito de abnegaçao, de bondade, de altruismo, de isençao e de patriotismo. Sempre esquecido de si pro'prio so' professou o culto do amor do pro'ximo.

Nos maiores flagelos que assolaram povoaçoes desta terra, nao o acobardaram perigos nem o amolentaram canceiras; guiado pelo sentimento de bem, preocupou-se u'nicamente em levar o'bulo ao pobre, remedio ao enfermo, consolaçao ao aflito. Acalentou a infancia, amparou a senectude, abrigou proscritos, alimentou famintos, saciou sedentos. Carretou mortos nos seus hombros, abriu sepulturas com as suas maos. Orou pelo socego de todos e chorou pela desgraça alheia.

Cidadao esforçado, e denodado campeao das liberdades publicas, a maior aspiraçao de toda a sua vida foi o engrandecimento e o bem estar do seu pais.

A apoteose que representou o se[illegible] ultra-ordinario funeral, ao qu[illegible] acorreu gente de todas as condiçoes sociais, e que de comovida admiraçao e espirito recolhido, acompanhou o feretro ate' a deposiçao na sepultura, e' o irrefragavel depoimento de tudo o que foi e mereceu esse, nunca assa's lembrado homem, de tao invulgar grandeza de coraçao; e bem demonstra como o sentimento popular o sagrou no recondito da sua consciencia.

Desejando, por isso, a comissao constituida apo's o falecimento de Padre A'lvares, perpetuar a memo'ria deste inclito varao, de tao preclaras virtudes, para que a posteridade o traga sempre presente como o milhor modelo de alma singela e humanitaria, apela ao sentimento bemfazejo de todos os concidadaos, cavalheiros e senhoras e roga o seu valioso auxilio pecuniario, para se erigir um padrao comemorativo condigno do valor moral do excelso finado.

(**N.B.**—O produto da subscriçao devera' ser entregue ao Exmo Sr. J. J. da Cunha.)

A comissao,
Antonio Tamauturgo Pereira
Visnum Siuay Dempó
Luis de Minezes
J. J. da Cunha
Milagres Lobo

पाणी— विक्रीचें दुकान मांडलें. तावत्तीव्र एकीनें चहाची लज्जत अनुभवण्यास आरंभहि केला. पण ह्या चहाच्या पाण्यांतहि विषारी द्रव्यांचें मिश्रण केलें गेलें असल्यानें, मृत्यु शिवाय तिला चहाशीं देह विसर्जन करावा लागला!

आपल्या सर्व सोबतीणींच्या शोचनीय निधनानें वैतागून गेलेल्या त्या संघाच्या शेवटच्या मक्षिकेनें आत्महत्या करून या नश्वर व दुःखमय जगाला अखेरचा रामराम ठोकण्याचा निर्धार केला. आपल्या जिवलग मैत्रिणींवांचून सर्व सृष्टि व सृष्टींतील सर्व सुखोपभोग तिला उदासवाणे वाटून, तिनें वरील निर्धार केला असल्यास आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. अस्तु. आत्महत्या करण्याच्या उद्देशानें त्या बिचाऱ्या मक्षिकेनें विष सेवन करण्याचा सपाटा चालविला; पण आश्चर्याची गोष्ट, ह्या विषसेवनामुळें तिला मरण तर आलें नाहींच, उलट मरणालाच मात्र तिला शरण जावें लागलें. या विपरीत प्रकारें तिला परमावधीचा विस्मय वाटला व ती हा अशक्य समजला जाणारा प्रकार प्रसवणाऱ्या कारणांचा शोध करूं लागली. शेवटीं तिला समजून आलें कीं, खुद्द विषांतसुद्धां कमस्सल व नकली द्रव्याची भेसळ करण्यास मानवी स्वार्थपरायणता या नवीन युगांत चुकली नाहीं.

स्फुट विचार

" बिगारीच्या घोड्याला ":— 'बिगारीच्या घोड्याला तरवडाचा फोक' अशी एक ह्मण आमच्यांत प्रचलित आहे. या ह्मणीचा अर्थ असा आहे कीं, भाड्याच्या घोड्याला हांकावयाला तरवडाच्या फोकाचा ह्मणजे फांदीचा सढळ हातानें उपयोग करण्यांत येत असतो. कारण उघडच आहे. बिगारीचा घोडा दुसऱ्यांचा – परक्यांचा असल्यानें, अगदीं थोड्या वेळांत त्याच्याकडून जितकें जास्त काम करून घेणें शक्य असेल तितकें करून घेण्याची स्वार्थी पण निर्दय प्रवृत्ति कोणत्याहि 'व्यवहारज्ञ' माणसाची झाल्यास, त्यांत आश्चर्य मानण्याचें बिलकूल कारण नाहीं. ज्या ज्या प्रवृत्तिपर गोष्टींत परक्यांचा संबंध असतो, त्या त्या गोष्टींत "बिगारीच्या घोड्या"च्या न्यायाची स्पष्ट छटा उमटलेली ठळकपणें दृष्टोत्पत्तीस आल्याखेरीज रहात नाहीं. गोमांतक हा देश तरी परक्यांच्या दृष्टीनें 'भाड्याचेंच घोडें' नाहीं काय? हा प्रांत आमचा नाहीं, तो 'काफरां'कडून आह्मी काबीज केला आहे, अशाच भावनेचा पगडा परक्यांच्या समजुतीवर बसलेला दिसून येत नाहीं काय? तर मग या 'भाड्याच्या घोड्या'चा कररूपी तरवडाच्या फोकानें खरपूस समाचार घेऊन भाडेकरी महात्म्यांनीं स्वतःचे खिशे गरम करण्याचा सरळ व राजमार्ग पत्करला असल्यास, या न्याय्य कृतीविरुद्ध जित लोकांना अकांडतांडव करण्याचें पायाशुद्ध असें कोणतें कारण आहे?! कोणतेंच नाहीं असेंच जगां-

तील यच्चयावत् जेते लोक एकसमयावच्छेदें उद्गारतील, यांत संशय नाहीं.

"नरहरदेवाची पालखी":— उदरगिरीच्या खोल गुहेंत परवित्त व जीवित अदृश्य करण्यास सोकावलेल्या जेते लोकांची पुरातन खोड बिनतोड मोडली जावी असें जित जनतेंतील कांहीं स्वातंत्र्योत्सुक व्यक्तींस वाटत नाहीं, असें नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्या दिशेनें त्यांचे थोडे बहुत प्रयत्नहि चालू असतात. पण या बाबतींत नुसता 'नरहर देवाच्या पालखी'चाच उत्सव साजरा होत असल्यानें, तो सर्व उद्योग केवळ निष्फळ होत असतो. जें काम करावयाला सर्व लोकांच्या मदतीची आवश्यकता आहे व ज्याची जबाबदारी कोणा एका विशिष्ट माणसावर नाहीं, आणि जें काम चांगल्या रीतीनें झाल्याची किंवा न झाल्याची कोणाला पर्वा नसते, अशा कामाला 'नरहरदेवाची पालखी' या अर्थपूर्ण संज्ञेनें संबोधण्याचा प्रचार आहे, हें वाचकांस अवगत असेलच. ही 'नरहर देवाची पालखी' जित लोकांच्या प्रत्येक कृतीच्या आड येत असल्यानें, ती कृति वांजट बनत असल्यास आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं.

"दगडाचा दोर होत नाहीं":— मडगांवच्या 'आ तेन्ह' पत्राच्या संपादकानीं पोर्तुगालच्या 'दियार्यु दे लिजबोअ' नामक दैनिकास एक पत्र लिहून कररूपी तरवडाच्या फोकानें गोमांतकासारख्या बिगारीच्या घोड्याची कशी भंबेरी उडवून दिली आहे, याचें यथार्थ वर्णन केलें आहे. आवतोनोमीच्या प्रथम प्रवेशापासून तों आजतागायत, लोकपक्षीय मेंबरानीं आपल्या सगेसोयऱ्यांचा प्रपंच थाटण्यासाठीं प्रत्येक लोकहितविघातक कार्यांत सरकारशीं कशी अनिष्ट सहकारिता केली, याचें चित्र तर सदर पत्रकारानें इतक्या बेमालुम रीतीनें रंगविलें आहे कीं, त्यांत सत्याच्या झगझगित प्रकाशाशिवाय दुसरें कांहींच दिसून येत नाहीं. नामदारांचीच हजेरी घेऊन तेन्हकार स्वस्थ बसले नाहीत; गव्हर्नरसाहेबांचीहि त्यानीं आपल्या त्या स्पष्टोक्तींत रेवडी उडविली आहे. परंतु या त्यांच्या प्रयत्नापासून जेथें तेथें 'नरहर देवाच्या पालखीच्या' गोंगाटानें कानठाळ्या बसत असल्यानें, सध्यःस्थितींत कोणताहि उपयुक्त फरक होण्याची आशा बाळगणें ह्मणजे दगडाची दोरी तयार करण्याची वांजटी हांव बाळगण्यासारखें आहे, हें कोणीहि कबूल करील.

गर्जेल तो पडेल काय?:— पण तेन्हकारांसारख्यांच्या नुसत्या बोंबलण्यानें काय निष्पन्न होणार आहे! गर्जेल तो पडेल काय? जोपर्यंत त्यांची व त्याच्या इतर जित जातभाईंची जेते लोकांच्या संस्कृतीवरील स्वाभिमानशून्य श्रद्धा ढळणार नाहीं, जोंपर्यंत जेते लोकांच्या हितसंबंधांतच आपले हितसंबंध संलग्न झाले आहेत, ही त्यांची चुकीची समजूत किंवा समजुतीची चूक नष्ट होणार नाहीं व जोंपर्यंत अंधधर्माभिमानाचा सक्रीय त्याग त्यांच्या कडून होणार नाहीं, तोंपर्यंत सुकाणूशिवाय अनिश्चित राजकीय ध्येयाच्या तुफानलेल्या समुद्रांत सांपडलेली आमची गोमांतक राष्ट्र–नौका सुस्थितीच्या किनाऱ्याला सुखरूपपणें लागेल ही आशा करणें व्यर्थ होय. एवंच जित लोकांचें निकट व बळकट एकीकरण झाल्याविना, जेते लोकांनी बनलेलें हें 'कुरण,' खऱ्या मालकांच्या स्वाधीन होणें कदापि शक्य नाहीं, हें उघड आहे.

वस्तुस्थितीचें अज्ञानः – कार्लुस कास्त्रु नावांच्या एका पोर्तुगीज पार्लमेंटच्या सभासदानें 'प्रस्तुतच्या किंमतीनें प्रेदियाल कर वसूल करण्यांत आला असता, तर या कराचें उत्पन्न तिप्पट झालें असतें,' असे उद्गार काढल्याचें प्रसिद्ध झालें आहे. प्रेदियाल करविषयक माहिती त्यानां कोणी पुरविली असेल ती असो, पण ती वस्तुस्थितीशीं कशी विसंगत आहे, हें पुराव्यानिशीं सिद्ध करून देण्याचें काम सि. लिबेरियु पेरेर यानीं चोख रीतीनें बजावलें आहे. 'जर जमिनीचें उत्पन्न वाढल्या प्रमाणावर आहे, तर सरकार आपल्या ताब्यांतील जमिनी माफकदरानें विकण्याचा आंतबट्ट्याचा 'अव्यापारेषु व्यापार' कां करीत असतें? अशा सरळ सवालाचा मारा करून, तेन्हकारानीं त्यांना गप्प बसविलें आहे. तुटपुंज्या ज्ञानावर विशेष भरवसा ठेविला ह्मणजे या 'भरवंशाच्या ह्मशीस टोणगा' अशी स्थिति होऊन जिकडे तिकडे फजिती उडावी, हें योग्यच आहे. त्यांत नवल मानण्यासारखें असें कांहींच नाहीं.

स्वदेशीं प्रयाणः— हो ना ह्मणतां ह्मणता अखेर डा० जाइम द मोराइस हे आपला येथील गाशा गुंडाळतील, असें वाटावयास लागलें आहे. मोराइसची कारकीर्द अनेक दृष्टीनीं येथील प्रजेला सुखकारक झाली नाहीं, असेंच मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें! प्रजेच्या हिताकडे दुर्लक्ष करून स्वतःची तुंबडी भरण्याचीच कोणत्याहि गव्हर्नरनें जास्त काळजी वाहिली असेल तर ती मोराइसनींच, असें खुद्द पोर्तुगालच्या पत्रांतून ओरड चालू आहे. डोईपट्टी, करस्म करांची बेसुमार वाढ, वर्तमानपत्रांची मुस्कट दाबी इ. इ. सारख्या अनुचित कृत्यांनीं डॉ० जाईम साहेबांची कारकीर्द तिरस्करणीयच झाली आहे, असाच बहुजन समाजाचा तिच्या संबंधानें स्पष्ट अभिप्राय पडेल. खुद्द भारतालाहि अनेक गोष्टींत त्यांचें गव्हर्नरी अस्तित्व बरेंच बाधक व अनुपकारक झालेलं आहे. पण असें जरी असलें तरीं त्यांचें ' निजधामी गमन ' सुखरूपपणें होवो, असें इच्छिल्याशिवाय आमच्यानें रहावत नाहीं.

मुनिसिपल निवडणुकाः— येत्या नव्हंबरांत ठिकठिकाणच्या मुनिसिपल निवडणुका पार पडतील, असा ध्वनि उमटूं लागला असून, निवडणुकींच्या रणक्षेत्रांत दंड थोपटून सामना देण्याच्या जय्यत तयारीनें अनेक वीर उभे ठाकणार आहेत, अशा अर्थाच्या वदंताहि प्रसृत पावत आहेत. परंतु या युद्धापासून जनतेला कोणताहि उपयुक्त फायदा घेण्याची संधि लाभणार नसल्यानें, त्याच्या परिणामाकडे आमेंच विशेषेंस लक्ष वेधणें अर्थातच शक्य नाहीं. सध्याच्या मुनिसिपल कायद्यांची अशीच रचना आहे कीं, या रचनेमुळें करवाढीशिवाय दुसरी कसलीहि महत्त्वाची कामगिरी मुनिसिपालटींच्या हातून पार पडण्यासारखी परिस्थिति निर्माण करणें कठीण आहे! मग अनाठायीं शक्तीचा व्यय कां करा! ज्या कामांत लोकहिताचा 'राम' नाहीं, त्या कामांत निरर्थक घाम काढण्यांत कोणता फायदा आहे?

पोर्तुगालः— पोर्तुगालची राजकीय परिस्थिति 'गढूळ'च असून मतभेदाचें पिशाच तेथें निष्कंटक धिंगाणा घालीत असल्याचें दृश्य दिसून येत आहे. खुद्द प्रधान मंडळांतील ऐक्याचीं शकलें झालीं असून, या ऐक्यभंगाचे दुष्परिणाम पोर्तुगीज प्रजेला केव्हां व कसे भोंवतील याचा नेम नाहीं! बंडखोर मिलिटरी लोकांच्या पर ठिकाणीं बदल्या करण्यांत आल्या असून, जनरल गोमीस द कोस्तांचीं 'सन्माननीय' उचलबांगडी लोरेंस मार्कीस येथें होईल असें वाटतें. 'सन्माननीय' ह्मणण्याचें कारण इतकेंच कीं, एकाद्या हलकट दर्जाच्या गुन्हेगाराप्रमाणें त्यांना आफ्रिकेंत कोंबण्यांत येणार नसून, वसाहतींतील मिलटरी खात्याचे सर्वाधिकारी ह्मणून त्यांची आफ्रिकेंत नेमणूक होणार आहे! असो. होईल तें दिसेलच. घोडा मैदान जवळच आहे. अनिश्चित परिस्थितीवर निश्चित स्वरूपाचे विचार प्रदर्शित करण्यांत काय हंशील आहे?

हिंदु समाजाचे सभासद व हितचिंतक यांस

ता. २८ माहे फेब्रुआरी १९१९ रोजीं रिवण–गोवा येथें स्थापन झालेल्या 'हिंदु समाज' या संस्थेचें कार्य मध्यंतरी कार्यकर्त्या पुरुषाच्या अभावीं व फंडाच्या कमतरतेमुळें तसेंच पडलेलें असून; त्या संस्थेनें सुरू केलेलें मासिक 'भारतोदय' बंद पडलेलें आहे. तेव्हां हें संस्थेचें कार्य व मासिक पुनः सुरू करावें असें वाटत असल्यामुळें हिंदुसमाजाशीं संबंध असलेल्या प्रत्येक गृहस्थास या नोटीशीद्वारें अशी सूचना देण्यात येत आहे कीं, ज्या कोणास या संस्थेशीं पूर्वींप्रमाणेंच संबंध ठेवावयाचा असेल तर त्यानीं ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत तसेंच या संस्थेचे जनरल सेक्रेटरी वासुदेव विठ्ठल प्रभू देसाई रिवण–गोवा यांस कळवावें. ज्यांकडून असा लेखी हेतु वरील मुदतींत सेक्रेटरीकडे येणार नाहीं, त्यांचा त्या संस्थेशीं कोणत्याहि प्रकारचा पूर्वसंबंध मानण्यांत येणार नाहीं. तसेंच याद्वारें अखिल हिंदु समाजाला असें कळविण्यांत येत आहे कीं परिस्थित्यनुरूप या संस्थेची पुनर्घटना करण्यांत येणार असून या नवीन घटनेन्वयें सुरू करण्यांत येणाऱ्या संस्थेच्या कार्यांत. जुने व नवे असा भेद न होतां सर्वांना पुनः वर्गणीदार, सभासद व वाली होतां येईल. एक महिन्यानंतर या संस्थेचें ध्येय, मार्ग व नियम याच वर्तमानपत्रांत क्रमशः प्रसिद्ध होतील.

सर्वांचा नम्र सेवक

सेक्रेटरी— हिंदुसमाज

फॅशन

लेः १ ला.

(श्रीपाद् जगन्नाथ देसाई, कुडचडें)

आह्मीं कांहीं कसलेले लेखक नाहींत, कीं कोल्यांची कारवाई करून आरंभलेला विषय वाचकांपुढें–टीकाकारांचें कौशल्य बाजूला फेंकून– मांडूं शकूं. हा विषय साधारण जनसमूहाकरतांच आह्मीं हातांत घेतलेला असला तरी शिकलेल्या शहाण्यासुरल्या सुधारकांनीहि त्याचा उपयोग करून घेऊं नये, असें कोणास कसें ह्मणतां येईल ?

शिक्षित सुधारकांनो ? कोठें कोठें आपल्या चवचाल छिचोर चालचलणूकीवर कडक कोरडे उडविले जातील; पण आमच्या पवित्र उद्देशावर नजर ठेवून हंस क्षीर न्यायानें आपण त्यांतील बोधाचें ग्रहण कराल अशी आशा आहे.

उपद्यापी टीकाकारांनो, संपूर्ण लेख वाचल्याशिवाय नुसत्या एकाच लेखांकावरून स्वतःचें त्याविषयीं मत बनवून घेण्याचा व्यर्थ खटाटोप करूं नका ! प्रस्तावनेनंतर आतांआपण आपल्या विषयाकडे वळूं.

फॅशन हा एक सांसर्गजन्य रोग आहे. पण इतर जंतुजन्य सांसर्गिक रोगांत व ह्या रोगांत पुष्कळ फरक आहे. इतर रोगांचे जंतु श्वासोश्वासाच्या मार्गानें नासिकाद्वारें देहांत प्रवेश करतात व आपलें ठाणें शरीराच्या इतर भागांत बसवतात, तर ह्या असाध्य रोगाचे जंतु दोन्ही डोळ्यांवाटे आपला शरीरांत प्रवेश करून घेतात व आपलें बस्तान डोक्यांतच बसवून सारी मनोभूमि रक्तपाताशिवाय हस्तगत करितात. इतर रोगांवर अचूक औषध तयार करण्यास शिकावें ह्मणून भुरटे लोक परदेशांत जातात, तर परदेशचें पाणी प्यालेल्या तरतरित तरुणांस हा रोग आपलें रजिष्टर्ड Registerd कुळ बनवितो. इतर रोगांतून बरें होण्यास कांचनाचें पाठबळ असावें लागतें, तर ह्या रोगांतून सहीसलामत निभावण्यास लक्ष्मीच्या अभावाचीच अधिक अपेक्षा असते. इतर रोगांची वाढ दोन प्रहरची ददात असलेल्या दैवहीन दरिद्री लोकांतच जास्त होते; पण ह्या रोगाचा फैलाव भोळ्या बापड्या भिकारड्यांपेक्षां 'फजर'ची फिकीर नसलेल्या ऐतखाऊ बडे बापके बेट्यांत विशेष होतो. सरस्वतीच्या सेवनानें संपूर्णतेस [!] पावलेल्या ताज्या दमाच्या तरुणांस इतर रोगांच्या सर्वनाशक जंतूंपासून अलग असावेंसें वाटतें. पण ह्या रोगाच्या सर्वभक्षक जंतूंस तर ते प्रेमानें कवटाळतात. इतर रोगांचें भय चाळीसी चढवून पुढें सरलेल्या व साठीच्या सुमारास आलेल्या तावून सुलाखून निघालेल्या जख्खडांसच जास्त असतें; तर ह्या सर्वव्यापी रोगाचें भय दहांच्या दशेची दहशत ... वेतांत आलेल्या प्रत्येकास भोगतें. इतर रोगांच्या वळीं पडलेला मनुष्य एक पाय स्वर्गात व एक पाय मृत्युभूमीवर अशा अवजड अवस्थेंत असतो; तर ह्या फॅशनच्या फसवणूकीच्या फशीं पडलेल्या मनुष्यास स्वर्ग दोनच बोटें असतो. इतर रोगांनीं ग्रासलेला मनुष्य त्रस्त जीवित असा होतो; पण ह्या रोगाच्या तडाक्यांत आलेल्या मनुष्याला आनंदाचे उमाळेच फुटत असतात. आणि सर्वांत मोठा फरक तो हाच कीं, इतर रोगांच्या वशाखालीं वसरलेल्या जीवास स्वतःच्या रोगाची पूर्ण जाणीव असते पण ह्या सुवारकी रोगाच्या फशीं पडलेला जीव स्वतःस कृतकृत्य समजतो !

वर्तमानसार

— शिर्शी [कारवार] तालुक्यांत हत्तींचा सुळसुळाट फारच वाढला असून ते भाताच्या पिकांचें फारच नुकसान करीत आहेत.

—राजमहेंद्री येथें २५ लक्ष भांडवलावर एक कागदाचा कारखाना उभारण्यांत आला आहे.

—यंदा विलायतेंत आय. सी. एस. च्या परीक्षेस २१ ब्रिटिश व ४६ हिंदी उमेदवार बसले होते.

—तुर्कस्थानला मदत करण्यास फ्रान्स तयार असल्याचें मुख्य प्रधान मि. हेरियत यांनीं एका भाषणांत सांगितलें.

—इंग्लंडच्या पार्लमेंटची नवी निवडणूक येत्या नोव्हेंबरमध्यें होईल. व तींत सर शंकर नायर हे मजूर पक्षाचे एक उमेदवार ह्मणून उभे रहाणार आहेत.

—सबंध जगांत मोठें असें एक मांजर अमेरिकेंत असून त्याचें वजन ६० पौंड आहे, असें ह्मणतात.

—आस्ट्रेलियांतील हिंदी इसमाला मतदानाच्या अधिकार मिळाला.

—मोरोक्कोमध्यें स्पॅनिश लष्कर व नेटिवांच्या टोळ्या यांमध्यें जोराची लढाई चालू असून स्पेननें मोरोक्कोमध्यें ८ पलटणी पाठवल्या आहेत.

—लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत एक स्वतंत्रपक्षाची स्थापना होणार आहे.

—पुणें येथील सेंट्रल टेलिग्राफ ऑफिसांत रात्रौ १॥ वाजतां चार पठाणांनीं दरवडा घातला. रात्रपाळीवर असलेल्या मि. नायडू यांस जखम करून १०५ रुपये लांबविले.

—परराष्ट्रीय हितसंबंध व परचक्रपासून संरक्षण हीं दोन खातीं खेरीज करून बाकीचीं सर्व प्रांतिक सत्ता प्रांतिक सरकारच्या हातीं देण्यांत यावी असा ब्रह्मदेशाच्या कायदेकौन्सिलनें ठराव पास केला.

—दक्षिण हिंदुस्थानांतील निराश्रित मदत फंडास सिलोन सरकारनें १०००० रुपये दिले.

—जो इसम कसावास अगर कसाईखान्यांत पाठविणाऱ्या दलालास जनावर विकील त्यास २० रुपये दंड व दंड न दिल्यास ८ दिवसांची साधी कैद अशी शिक्षा देण्यांत येईल असा फलटणच्या सरकारनें जाहिरनामा काढिला आहे.

—वायकमच्या सत्याग्रहासाठीं तुरुंगांत घातलेल्या इसमांना बंधमुक्त करण्यांत आलें.

—एक रुपायाच्या नोटा काढण्याचें इंग्लिश सरकारनें इतःपर बंद केलें असून व्यवहारांत चालू असलेल्या जुन्या नोटा सरकारी खजिन्यांत जमा होईपर्यंत चालू राहातील.

—भरतपूर येथें एका बदमाष मुसलमानानें एका हिंदु स्त्रीची रस्तांत बेइज्जत केली ह्मणून त्यास पोलीस शिपाई पकडून नेत असतां मुसलमानांनीं त्यास सोडवून घेतलें !

—संबळ येथील एका हिंदु देवालयावर मुसलमानांनीं हल्ला करुन त्यांतल्या पुजाऱ्यास विहिरींत फेंकिलें व मूर्ति फोडून टाकिल्या. या दंग्यांत १७ हिंदु जखमी झाले.

—हरिद्वार येथें एका मुसलमानास, गाईला भाल्यानें ठार मारल्याबद्दल ३ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली.

—असोळणेच्या " श्री वेताळप्रासादिक ज्ञानमंदिराची " नियमावलि सरकारनें पास केल्याची वातमी मागें प्रसिध्द झालीच आहे. आतां या नियमावलीस अनुसरून संस्थेच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक झाली आहे, असें एक वाचक कळवितात.

—वेंगुर्लें येथील अमेरिकन मिशनचे डॉ० गोहेन हे यत्या २५ तारखेला रायबंदर येथें येणार असून, गरजूंनीं त्यांच्या वैद्यकीय ज्ञानाचा फायदा अवश्य घ्यावा.

—नवीन गोवें येथें चालू असलेलें ब्रिटिश टेलिग्राफ खातें पोर्तुगीज लोकांच्या स्वाधीन करण्याचा करार मदार होऊन गेल्या जुलै महिन्यांत त्याची अमलबजावणी व्हावयाची; पण लिजबोअ व लंडन या उभयसरकारांचा त्या करारावर मान्यतेचा शिक्कामोर्तब न झाल्यामुळें, हें घोंगडें अजून भिजतच पडलें आहे !

—ग्रामसंस्थांच्या कार्यात महत्वाच्या सुधारणा लवकरच घडून येतील, असा रंग दिसत आहे.

—"सांवर्डेहून जांबवलीच्या बाजूनें सरळ रिवणास आलेल्या मार्गास जांबावली व रिवण यांच्या हद्दीजवळ रस्त्याच्या बरोबर मध्यभागीं प्रथमतः एक लहानसें भोंक पडलें व तें आतां हळुहळू एवढें मोठें झालें आहे कीं, तें गाड्यांना तर ओलांडणें कठीणच व माणसांनीहिपण तिकडून सावधगिरीनेंच पलीकडे गेलें पाहिजे. परवां रिवणचेच एक गृहस्थ रात्रीच्यावेळीं तिकडून जातांना एकदम त्यांत पडले. सुदैवानें त्यांवरुन आणखी माती कोसळली नाहीं ह्मणून! नपेक्षां सहजच त्यांत ते जीवंत गाडले गेले असते ! ह्या दिवसांत तर दुसऱ्या गांवचीं अनोळखी माणसें त्यांत बहुशः पडत असून एकसारख्या त्यांच्या कागाळ्या ऐकूं येतात- गांवच्या रजिदोरांनीं पुष्कळांच्या कागाळ्यांवरुन Administração कित्येक वेळां लिहून कळविलें असें त्यांकडून कळतें. परंतु अजून कांहीं Administração तर्फे अगर कामरा तर्फे किंवा गांवकऱ्यांतर्फे वरील गोष्टीचा मुळींच विचार होत नाहीं. व इकडे तर तें भोंक मोठें होत चाललें असून रात्रीच्यावेळीं अनोळखी माणूस त्या बाजूनें आल्यास त्यांत पडल्यावांचून त्याला दुसरी बाजूच मिळत नाहीं. तेव्हां अशी भयंकर स्थिति प्रत्यहीं घडत असतांना सगळ्यांचीच अशी ही घोर निद्रावस्था कां ! " अशी एक "रिवणकर" पृच्छा करितात.

दैवज्ञ बंधूंशीं हितगुज

अखिल गोमांतकस्थ दैवज्ञ बंधूंनो ! आज ह्या सर्व जगावर कायकाय चळवळी, कोणकोणते नवीन शोध, आणि कोणकोणते विलक्षण ज्ञान व्यवसाय चालू आहेत, हें तुह्मांस माहीतच आहे. ह्मणूनच या सध्याच्या युगास 'ज्ञानयुग' असें ह्मटलें आहे. ज्ञान हेंच अंतिम ध्येय व विज्ञान हेंच साधन होय. ह्या विज्ञानावांचून ज्ञान प्राप्त करून घेतां येणार नाहीं. भगवंतांनीं गीतेंत ह्मटलें आहे: "ज्ञान विज्ञान मास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजं ।' आणि ह्मणूनच आह्मींहि हेंच ध्येय डोळ्यांपुढें ठेऊन, सर्व प्रकारचे धंदे केले पाहिजेत. केवळ एकाच व्यवहारांत निमग्न राहून शिल्पकामाशिवाय आह्मांत इतर कांहींच रुचूं नये हें दुर्दैव होय. निदान सध्याच्या परिस्थितीकडे लक्ष देऊन आह्मीं व्यापक दृष्टि केली पाहिजे व इतर समाजाबरोबर उन्नति करून घेतली पाहिजे. पुरातन कालापासून गोमांतकांत, आमच्या ज्ञातींत केवळ सोन्यारुप्याचे दागिने करण्याशिवाय दुसरा धंदाच नाहीं असें होऊन बसलें आहे. हाच जणूं काय आमचा जन्मसिद्ध हक्क ! बाकी कोणतेहि धंदे करण्यास मज्जाव. अशी बहुतेकांनीं 'कूपमंडुक वृत्ति' स्वीकारल्यानें आम्हीं सर्व गोमांतकस्थ दैवज्ञ, एकदेशीपणास पात्र झालों आहोंत. हें प्रत्येकास समजत असलें तरी उमजत मात्र नाहीं ! ह्मणून याची कटु फळें अनेक वेळां दृष्टोत्पत्तीस येतात. तूर्त कालचेंच उदाहरण घ्या. ५|६ शॉपवाले व अखिल स्वज्ञातीय समाज यांचा सामना कोठें ? परंतु त्या दुकानांनीं आपणाकडे इतकें सामर्थ्य आणलें आहे कीं, सर्व समाज त्यांना वचकूं लागला आहे. समाज बंधूंनो, या अनिष्ट प्रकाराचें कारण हेंच कीं, प्रत्येकाच्या हातांत हातोडा व पुढें ऐरण आमच्या वडिलांनीं ठेवल्यानें सर्वांचा एकच धंदा होऊन परस्परांत तंटे बखेडे होऊं लागले आहेत. आमच्या लोकांनीं जरा बाहेर नजर फेंकून पाहिलें असतें तर थोडा बहुत तरी चांगला परिणाम झाला असता. ह्मणजे आस्ते आस्ते नवीन वळण लागून पुढची पिढी तरी इतर ज्ञानशिक्षणानें व्यवहारसंपन्न झाली असती. याचा काहीं तरी विचार करा. आमच्यांत अनेक तऱ्हेचे धंदे शिक्षण व्यापार इत्यादि निर्माण होऊन उपरोक्त दुकानांपासून कोणाचेंहि नुकसान झालें नसतें. तरी 'नारायण विठ्ठल शॉप' या नावांचीं पारायणें न करितां, जेणें करून समाजांत अनेक धंदे उत्पन्न होतील, अशा सदिच्छेनें हातपाय हलवा ! कारण ते दुकानवाले कांहीहि करोत, त्यांच्याशीं आह्मांस कर्तव्य नाहीं. उद्योग हा श्रेष्ठ. तो 'शॉपा'चा असो वा अन्य असो. तुह्मीं तसा धंदा काढा किंवा शक्य नसल्यास इतर उद्योग करा. नेभळे होऊन नारायणाचें पारायण करण्यांत तथ्य नाहीं. कारण प्रस्तुतच्या परिस्थितींत दुसऱ्यावर अवलंबून राहणें योग्य नाहीं. ह्म-

Ano 9o N. 26

Qui[illegible] 26 de Setembro de 1924

ASSINATURA
cada ano tres rupias

ANUNCIOS
Linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegde Dessay
Quepem-Goa

भारत

BHARAT

वर्ष ९ वें. अंक २६

गुरुवार ता. २५ सप्टेंबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

UMA ENTREVISTA... INFELIZ

O sr. Roberto Bruto da Costa, do seu regresso de Portugal, concedeu em Bombaim, no dia 15 de Agosto ultimo, uma entrevista a "Associated Press" que teve repercussao na imprensa da visinha cidade bem assim nos jornais do pais.

O sr. Costa, e' preciso que se diga antes de entrarmos no assunto, aprensentou-se ao jornalista da "Press" na sua qualidade de Presidente da Associagao Comercial da India Portugueza, ex-vogal do Conselho Legislativo, representante da colo'nia no 2 º Congresso Colonial Portuguez, e — iamos esquecendo— como *lawyer-journalist*.

Deixando de parte o *lawyer journalist*, e outras prebendas a no's o que nos chamou a atengao para a entrevista, foi o facto de o sr. Costa ter falado na sua qualidade de *representante da India* no Congresso Colonial, porquanto, se a constituigao garante a livre expressao do pensamento, esta expressao tem que ser exacta, cautelosa e comedida, quando se fala em nome de um pais.

O sr. Costa na sua *interview*, depois de fazer em breves palavras, o relatorio de sua missao em Portugal, missao cujo resultado negativo se fez sentir ja como se ve do projecto da alteragao para pior de alguns preceitos, da legislagao concernente a' autonomia colonial, — afirmou imprudentemente que:—

"Os indo-portugueses, ao contrario dos "indo-britanicos", nao tinham motivos de queixas contra o governo, porque eram cidadaos da Republica Portuguesa com iguais direitos aos dos cidadaos portuguezes."

Os indo-portuguezes nao tem motivos de queixas—disse o sr. Costa. E, entretanto, o mesmo sr. Costa a' custa do tesouro da India foi a Portugal defender a primeira prestagao — prestagao insignificante, ridicula — que a' India foi concedida e da qual nos pretendem privar ao mesmo tempo que na India inglesa, naquela India onde o *povo tem motivos de queixas contra o seu Governo*, o mesmo Governo prometeu ja' e vai preparando-se a instalar o *Home Rule* tendo ainda para dar a prova antecipada de sua sinceridade, anunciando a nomeagao do Principe Arthur de Canaugth para futuro Vice-Rei.

Os indo portuguezes nao tem motivos de queixas e tem-nos a India Inglesa, onde as obras de fomento, seja agricola, seja industrial ou seja comercial, tem atingido um progresso tal que para no's, isto e', para o nosso atrazo,—tudo aquilo paira nas regioes do impossivel.

Os indo portuguezes nao tem motivos de queixas e todos nos, inclusive' o sr. Costa, condenamos noite e dia o nosso sistema de ensino como improprio, contraproducente, ao mesmo tempo que nao cessamos de apontar os metodos seguidos na visinha India como dignos de serem imitados e os seus estabelecimentos de ensino como simplesmente modelares.

Os indo-portugueses nao tem motivos de queixas e entretanto nos aguentamo nos aqui pelo dinheiro que nos vem, por via dos nossos 60.000 e tantos filhos que lutam pela vida por faltar trabalho aqui naquela India Inglesa que o sr. Costa tanto lamenta.

Os indo-portuguezes nao tem motivos de queixas ...... Mas basta que seria loucura da nossa parte querer comprimir num artigo do jornal, um assunto que reclama a estensao de um livro, de alguns livros talvez.

Pelos modos, o sr. Costa baba-se pelas palavras. Ouviu que eles eram "subjects" e no's gozamos os foros de "citizens" e pronto, atirou aquela. Nao se lembrou, porem, que os pretos selvagens e incultos da Africa eram tambem cidadaos perante a Constituigao, e que ser cidadao e' nada, o que vale e' o poder exercer os direitos de cidadao como os exercem os cidadaos portuguezes de Portugal, sobretudo os direitos politicos.

Concluindo o sr. Costa foi de uma leviandade unica, quando pretendeu estabelecer o confronto entre no's e os habitantes da outra India — pois ao mesmo passo que afirmava um disparate acerca da situagao do seu paiz, o que era menos, — nao reflectiu que a sua afirmagao ia ferir profundamente os melindres da Inglaterra. Sinceramente o sr. Costa prestou-nos um mau servigo.

CODIGO DE USOS E COSTUMES DE GOA

Ja' demonstramos no numero passado que nas reformas a introduzir nos nossos usos e costumes, devemos ter em vista o relevo do caracter da nossa civilisagao oriental, que mantem o nosso individualismo, atrave's de vicissitudes e contratempos sem numero. So' nao e' de aceitar o costume que se oponha a' moral e a' ordem publica.

Para se aquilatar o grau da civilisagao de qualquer povo basta principalmente analisar a sua constituigao de familia e o seu sistema matrimonial por eles constituirem o alicerce sobre o qual se assenta o edificio sumptuoso das sociedades civilisadas.

Ora a constituigao familiar indiana e o seu sistema matrimonial que rivalisam com as instituigoes similares doutros paizes adiantados na civilisagao nao deixam de ser mais ou menos perfeitos.

Coscuvilha-se, porem, amiudadas vezes, entre os admiradores da civilisagao ocidental, que a mulher indiana carece de emancipagao, urgindo por isso no entender deles, eleva la ao nivel que de direito lhe pertenga.

Nao ha' duas correntes de opinioes sobre a necessidade da emancipagao da mulher, nem negamos em princip o a exatidao deste conceito; mas ¿em que bases se devera' proceder a esta emancipagao? Atendendo ao criterio ocidental ou oriental? Eis o problema que fica por solver.

Nao padece duvida que a reforma dos costumes deve acompanhar a evolugao social; mas como a constituigao das sociedades ocidentais nao e' vasada nos moldes das sociedades orientais a evolugao produzida nestas nao e' a mesma que a operada naquelas.

Nestas condigoes, e porque a civilisagao de cada povo representa o conjunto de nogoes da ordem psicologica, o dever que incumbe a quem acalenta a idea da nossa reforma social, e' de procurar, de preferencia, os elementos necessarios para vingar o seu *desideratum*, nas criagoes do conjunto dessas nogoes que nos foram legadas pelos nossos antepassados, langando mao doutras fontes no caso da necessidade extrema.

Ja' passaram epocas ominosas para nunca mais voltarem, de intolerancia em que predominava a orientagao sectarista de exterminar tudo o que fosse indiano, tido como um entrave no caminho do progresso da humanidade. O espirito moderno porem, sem do' nem paixao por qualquer crenga ou preconceito esforga-se por joirar o bem do mal e adoptar tudo o que seja adequado ao meio e a indole das populagoes e que seja aconselhado pela tecnica sociologica.

O que se disse com respeito a quaisquer reformas sociais e' aplicavel, igualmente, por forga das razoes ao sistema de sucessoes, pelo facto do regime da propriedade indiana nao ter os carateristicos que se notam no regime ocidental, o que e' manifestado ainda pelo seu instituto da "sociedade familiar," patrimonio legado pelos nossos antepassados e que conservamos ate' aos nossos dias como uma reliquia sagrada.

Pelos modos parece que, estao todos de acordo quanto a' manutenga da instituigao das sociedades familiares, divergindo se, apenas no campo de sucessoes. Temos de ver, porem, ao mesmo tempo, que uma e outra coisa sao tao ligadas entre si por afinidade de ideas que nao se pode conceber a nogao da primeira sem o auxilio da segunda.

Admite-se a evolugao de direitos, quando ela se justifique em face da hermeneutica sociologica de cada povo.

Objetar se ha talvez dizendo que o regime da propriedade indiana nao e' perfeito. Mas se os sociologos de outros paizes nao tem uniformidade de vistas sobre a sua individualisagao ou socialisagao ¿por que e' que havemos de introduzir a inovagao nos nossos costumes sem que sejamos impelidos para isso por necessidades imperiosas?

O regime da propriedade individual tem ainda o inconveniente de sua pulverisagao, o que e' antieconomico numa terra onde esta pulverisagao tem atingido proporgoes colossais ! ! !

G. C. Guddó

No 1 º artigo desta serie lea-se *factores distintivos*, em vez de *factores distructivos* como por um erro tipografico saiu.

तरुण माता !

[खालीं दिलेलें गद्य भाषांतर एका पोर्तुगीज कवीच्या [J oven me] ‘ तरुण माता ’ नांवाच्या एका कवितेचें आहे. कै. गडकरी यांच्या “राजहंस माझा निजला” या लोकमान्य कवितेशीं या भाषांतरित कवितेचें केवढें साम्य आहे हें ती वाचल्यावर सहज कळून येईल.]

* * *

आपल्या निद्रिस्त बालकाच्या सुंदर पाळण्याकडे बसून अनिमीष नेत्रानीं, त्याल पहात असलेल्या तरुण मातेला आपण पाहिलीत का ! आपलें गोजिरवाणें बालक खेरीज करून इतर जगाची तिला काय पर्वा ? परमेश्वरानें साऱ्या विश्वाला बहाल केलेल्या हरएक चमत्कारांचें बीजभूत दृश्य त्या पाळण्यांत तिला दिसत आहे. त्या नवयौवन गतभर्तिकेला आणखीं दुसरें काय पाहिजे ?

\+ \+ \+

जगांतील राष्ट्रांत तुंबळ युद्धें सुरू आहेत. तृषार्त वसुंधरा वहात्या रक्तानें न्हात आहे. जीवनकलहाचा घनघोर संग्राम प्रत्येक मर्त्य प्राण्याला भेडसावीत आहे. परंतु, या एकंदर चळवळींचें वारें, त्या मातापुत्रांच्या पवित्र वातावरणांत प्रशांत स्वरूप धारण करीत आहे. इतकेंच नव्हे, तर जगानें मांडिलेल्या आकांतामुळें, त्या एकांताला पावित्र्ययुक्त गांभीर्य प्राप्त झालें आहे.

\+ × +

सायंकाळची वेळ. भगवान सूर्यनारायण आपलें किरणरश्मिजाल आवरीत आहे. अशा समयीं, ती मुग्ध बाला आपल्या तान्हुल्याचे पाळण्याला झोके देत होती. आपले नयनद्वय तिनें पाळण्यांत स्थिर केले होते, हें खरें. पण तिचें मन मात्र भावी सुख स्वप्नांत विहरत होतें. व आपल्या दुःखमय वर्तमानकालाचा व भूतकालाचा लय आशायुक्त भविष्यकालात करण्यांत ती गढून गेली होती. बाळानें डोळे उघडून क्षणभर आपल्या मातेला पाहिलें; आणि आपल्या मृदु हास्याची एक शीतल चंद्रिका आईकडे फेकली ! पण तें कसलें हास्य ? बाळाच्या चाळ्यांना ती परकी नव्हती. त्याच्या एकुणएक क्रियेचें तिला पूर्ण ज्ञान होतें. तें हास्य पहातांच ती दचकली, विमूढ झाली. कारण, तें आनंदाचें नव्हतें ! हाय ! तें तसलें नव्हतें ! तें शेवटचें होतें !

× + ×

तिचें हृदय दुःखानें, भयानें धडधडूं लागलें. पण दुर्दैव बिचारीचें ! तिला काय शक्य होतें ? हळुच तिनें बाळाचें चुंबन घेतलें ! पण, त्या प्रेमयुक्त चुंबनांत आपल्या निष्पाप, पवित्र अर्भकाची प्राणज्योत स्वर्गात विलीन होत असल्याचें मात्र तिला दिसून आलें !

\+ × +

वालुकामय प्रदेशावरा बागडणारा शांत पण गंभीर दर्या आपण कधीं पाहिला आहे का ? पण तुफान–वायु सुरू होतांच, आयाळ उभारलेल्या क्रुद्ध, घायाळ सिंहाप्रमाणें, पुळणी ओलांडून सर्पाप्रमाणें धांवणाऱ्या त्याच दर्याला आपण कधीं पाहिला आहे काय !

\+ × +

पर्वताचे दरींतून मंजुळ स्वर काढीत फिरणारा शांत व शीतल वायु आपण कधीं पाहिला नाहीं का ? परंतु, तोच वायु भयंकर रूप धारण करून दऱ्याखोऱ्यांची उलथापालथ करतो; शहरांची नासधुस करितो; आणि सर्वभक्षक काळाप्रमाणें, जगाचा नायनाट करण्यास सिद्ध होतो, हें आपण पाहिलें आहे का ?

\+ × +

पाहिलें असल्यास तीच स्थिति या गतभर्तिकेची झाली ! बसलेल्या जागेवरून, वेड्याप्रमाणें ती ताडकन उठली, आणि तिनें दुःखाचा हुंबरडा फोडला ! पिंजऱ्यांत अडकलेल्या क्रूर श्वापदाप्रमाणें आपल्या हृदयभेदक किंकाळ्यानीं तेथील वातावरण तीनें दुमदुमवून सोडलें. दुर्दैवी माता मिळेल तेथें सैरावैरा धांवूं लागली. तिची दृष्टि आकाशाकडे वर लागलेली होती!

\+ × ×

कोणती तरी अतिमानुष शक्ति तिला कुठें तरी लोटीत आहे असें पहाणाऱ्यास वाटे. शत्रूच्या तावडींतून सुटण्याकरितां, धडपडणाऱ्या हरणापेक्षां ती जास्त जलद धांवत होती.

× + ×

पण मध्येंच, मंजुळ गायन ऐकल्यासारखें करून ती थांबली. मिनिटा मिनीटाचे दरम्यान एक चमत्कारिक कांति तिच्या गुलाबी गालांवर झळकत होती. आणि त्यावरून पहाणारास असें वाटे, कीं कोणतें तरी उच्चतम व सात्विक समाधान त्यावेळेपुरतें तिला मिळे.

* * *

पण, तो पहा मृत बाळाच्या पाळण्याकडे परत फिरली ! आणि तेथें पोंचल्यावर स्थिर झाली. डोळे भरून तिनें त्याला पाहून घेतलें व कसल्याशा विचारांत ती घटकाभर गढून गेली. कांहीं वेळानें तिनें त्या मृत देहाला पाळण्यांतून बाहेर काढलें आणि आपल्या जळत्या हृदयाशीं त्याला आंवळून धरलें ! इतकेंच करून ती थांबली नाहीं. आपल्या बाळासह तिनें समुद्राकडे निर्वाणीची धांव घेतली ! यावेळी समुद्र खवळला होता.

\+ \+ \+

नच जाई वरी एकला । मीहि येतें तुजशीं बाळा ॥ इतकें म्हणून तिनें आपल्या बाळाला ज्यास्त कवटाळून धरिलें आणि उसळत्या लाटांत ती त्याच्यासह अदृश्य झाली

* * *

जगावर लाथ मारून मृत्युशय्येवर–आपल्या बालकाला हृदयाशीं घट्ट धरून–सुखानें, शांतीनें, समाधानानें, आनंदानें, पहुडलेली ती बाल माता आपण पाहिलीत काय ? ज्या विश्वांत तिला आपला राजहंस दिसत नव्हता त्या विश्वाची तिला काय किंमत ? पूर्वीप्रमाणेंच, ती आतांहि आपल्या बाळाला हलवीत झोंपी गेली होती ! पण कुठें ? काळाच्या जबड्यांत ! मृत्यूच्या शयेवर ! !

वर्तमानसार

—मुंबईच्या मौज पत्रावर बीभत्स जाहिरात प्रसिद्ध केल्याबद्दल ५० रु. दंड अथवा १४ दिवसांची सक्तमजुरीची शिक्षा मजिस्ट्रेटनीं दिली.

—अहमदाबाद म्युनिसिपालिटीच्या नवीन दिवाणखान्यास ‘ गांधी हॉल ’ असें नांव देण्याचा त्या म्युनिसिपालिटीनें ठराव पास केला.

—कराची म्युनिसिपालिटीला महात्मा गांधींनां मानपत्र देण्याकरतां २००० रुपये खर्च करण्यास सिंधच्या कमिशनरांकडून मंजुरी मिळाली.

—तुर्कस्थान सरकारचें तंबाखूचें वार्षिक उत्पन्न १६॥ कोटी रुपयांचें आहे.

– पारीस येथें नुकत्याच झालेल्या ऑलिंपीक गेम्सचें, खर्चाचे ४० लाख फ्रॉंक वजा जातां, २० लाख फ्रॅंक उत्पन्न झालें.

– फ्रेंचांनीं जर्मन सरहद्दीवर बसविलेलें जकातीचें नाकें उठविलें.

—इंग्लंडांतील बेकार लोकांची संख्या गेल्या दोन महिन्यांत १३७००० नें वाढली आहे

—कोलंबो येथील एका चहाच्या दुकानास आग लागून ४ लाख रुपयांचें नुकसान झालें.

—दक्षिण हिंदुस्थानांत जलप्रलयानें झालेली नासाडी भरून काढण्यास अदमासें १ कोट रुपये लागतील असें मद्रास सरकारनें हिंदुस्थान सरकारास सुचविलें आहे.

—हुबळी, गदग वगैरेच्या गुजराथी समाजाकडून महात्मा गांधीच्या थैलीसाठीं १२००० रुपये जमले.

—नंदीदुर्ग येथील सोन्याच्या खाणींत भयंकर स्फोट होऊन त्यामुळें अनेक इमारतींची नासाडी झाली व कांहीं माणसें जखमी झालीं.

—कळंगुट येथें एका २० वर्षे वयाच्या तरुणानें दारूच्या निशेंत खुद्द आपल्या आईच्या खुनास मान्यता दिली ! सदरील तरुण व इतर खुनी इसम म्हापशेंच्या कैदखान्यांत पापाचें प्रायःश्चित भोगीत आहेत. खुनी माणसानीं कसल्याहि शस्त्राचा उपयोग न करतां, केवळ गळा दाबून त्या बिचाऱ्या बाईचा जीव घेतला ! खून उघडकीस येऊं नये म्हणून प्रेत एका गोणांत घालून पुरलेलें होतें; पण तें कुत्र्यानीं उघडकीस आणलें ! खुनाला वाचा फुटते म्हणतात, हें कांहीं खोटें नाहीं !!!

—शेतकी पतपेढ्यांविरुद्ध येथील पोर्तुगीज पत्रांत अजून विरुद्ध टीकात्मक लेख प्रसिद्ध होत आहेत.

—मडगांव पाठशाळेचे माजी शिक्षक बारबोज हे एकाएकीं ऐन तारुण्यांत ख्रिस्तवासी झाले !

—कलकत्याच्या युनिव्हर्सिटींत फ्रेंच व जर्मन भाषांप्रमाणेंच पोर्तुगीज भाषाहि शिकविण्यांत यावी, असें ठरविण्यांत आलें आहे.

—पोर्तुगीज पार्लमेंटचा इंडियेच्या वतीनें देपुताद ’ निवडून येण्यासाठीं, येत्या नवीन ‘निवडणुकींतहि प्राजेरीस द कोस्त उभे रहाणार आहेत !

—असोळणेच्या श्री वेताळ प्रासादिक ज्ञानमंदिराची पोर्तुगीज नियमावलि स्वतंत्र पुस्तकाच्या रूपानें वांटण्यांत आली आहे.

–वसाहतींतील ‘आवर्दातोरींवर’ गदा येईल असें वाटतें.

—परमुलुखांत जीवितरक्षणार्थ वावरणाऱ्या गोमांतकीय लोकांचे हितसंबंध योग्य रीतीनें संभाळले जावे या हेतूनें एक म्हापसें येथें संस्था स्थापण्यांत आली आहे.

—येथील कित्येक ख्रिस्ती धर्माधिकाऱ्यानीं ख्रिस्ती बायांच्या ‘ लांडया साडया’ व ‘फॅशनच्या इतर खोडया’ म्हणून पाडण्याचा जोराचा प्रयत्न चालविला आहे.

—यंदाचें नाट्यसंमेलन कोलापूर येथें भरविण्याची वाटाघाट चालू आहे.

—अमेरिकेंतील ‘ धुम्रपानी ’ बायांच्या वाढत्या संख्येला आळा घालण्याच्या हेतूनें एक नवीन संस्था जन्मास आली आहे.

—पणजी येथील कांपालच्या किनाऱ्यावर एक प्रेत आढळून आलें असून तें कोणाचें तें अजून समजलें नाहीं .

—पोर्तुगालांत नवीन प्रधान मंडळ अधिकारारूढ होईल व त्याचें अध्यक्षत्व डॉ. आफोंस कोस्त हे स्वीकारतील असें, तेथील पत्रांनीं ध्वनित केलें आहे.

=पूर्वी प्रसिद्ध झाल्याप्रमाणें, म्हापसें येथे आ थेपोक नावाचें साप्ताहिक पोर्तुगीज पत्र सुरु झालें.

—पारीस येथे एक शीळ घालणारे झाड आणण्यांत आलें आहे.

—एक लक्ष पंचवीस हजार वर्षांमागें मरण पावलेल्या पांच माणसांच्या हाडांचे सांपळे मिळाले आहे !

— आजच्या अंकाचा पोर्तुगीज भाग तयार झाल्यावर, आमच्या हातांत ‘प्रोव्हींस’ पत्राचा शेवटचा अंक आला. या अंकांत सि. पेरेर बातात्यानीं कांवेरें प्रकरणासंबंधानें आमच्या संपादकांस उद्देशून आपल्या अकलेचे भरपूर तारे तोडले आहेत. त्यांना आमचें उत्तर प्रसिद्ध झाल्यावर वरील प्रकरणांत उपरोक्त युरोपियन गृहस्थाची मदत आमच्या संपादकांस कशीं भोवली व पेरेर बातात्याच्या वजनाचा सरकारी भोपळा कसा फुटला हें सविस्तर कळून येईल. पेरेर बातात्य मराठी वाचवितात, म्हणून त्याच्या खोडसाळपणाचा ओझरता उल्लेख येथें करणें भाग पडत आहे.

त्यांचे आभारी होतील.

सरस्वत्युत्सवांत भाग घेणाऱ्या सर्व वक्त्यांनीं एक दिलानें व एक नेटानें डॉ० केतकरांच्या बहुमोल शिकवणीनुरूप ‘ सामुच्चयिक जबाबदारीचा’ प्रश्न अंशतः तरी सोडविण्याचा प्रयत्न करावा, अशी ‘भारता’ची त्यांस प्रेमाची सूचना आहे. व ‘सामुच्चयिक जबाबदारीच्या’ जागृतीवर आमच्या जातीचें भवितव्य अवलंबून आहे, हें सतत दृष्टीसमोर ठेवून, ते येत्या उत्सवांतील व्याख्यान मालांचें ध्येय आंखतील, अशीं आह्मांला उमेद आहे.

सुधारणेची मीमांसा

पाश्चात्यांचें विशेषत: इंग्रजांचें हिंदुस्थानांत आगमन झाल्यापासून ह्या देशांत एक विशिष्ट प्रकारची अभ्युदयात्मक अशी क्रांति घडून आली.

आपली भारतीय संस्कृति बरीच उच्च दर्जाची होती यांत शंका नाहीं. व तिनें बरेंच कार्यहि केलेलें होतें. असें जरी असलें तरी पण चक्रनेमिक्रमानुळें तिला उतरती कळा लागली. हिंदुस्थानावर संपत्तीच्या आशेनें अनेक आडदंड लोकांच्या स्वाऱ्या झाल्या; पुष्कळशी जाळपोळ झाली; हजारों ग्रंथ अग्नीला अर्पण केले गेले व अशा प्रकारें देशांतून शांततेचें उच्चाटन झालें. मुसलमानीं संस्कृति भारतीय संस्कृति पेक्षां फार उच्च दर्जाची नव्हती व तिचा ह्मणण्यासारखा प्रभाव आपल्या संस्कृतीवर पडलाहि नाहीं.

कालांतरानें ह्यादि लोकांचें राज्य हिंदुस्थानांत टिकले नाहीं. जिकडे तिकडे अशांतता माजलेली होती. अशा वेळीं इंग्रज लोक नुकतेच व्यापाराकरितां ह्मणून ह्या देशांत आलेले होते. त्यांपैकीं बहुतेक धोरणी बुद्धिमान, व्यवहारी, राष्ट्राचा अभिमान बाळगणारे, स्वतःच्या फायद्याकडे लक्ष न देतां राष्ट्राचें हित साधणारे असे होते. त्यानीं येथील परिस्थितीचें सूक्ष्म अवलोकन करून आपले पाय पसरविण्यास सुरवात केली व त्यांचें धोरण तडीस जाऊन हळुहळू सर्व देश त्यांच्या ताब्यांत गेला.

राजकीय बाबतींत जशी अंदाधुंदी माजलेली होती तशीच सामाजिक बाबतींतहि पण माजली होती. बाह्य आचारांनां महत्व होतें; सती सारख्या क्रूर चाली प्रचारांत होत्या; अगदीं लहान अशा बाल विधवानां सुद्धां खुषी नसतां धगधगित जळणाऱ्या चितेंत ढकलून दिलें जाई; कित्येक आपणाला स्वर्ग मिळावा ह्मणून गंगेंत उड्या घेऊन प्राण देत, तर कित्येक जगन्नाथाच्या रथाखालीं आपण होऊन वाढून घेत व मरण स्वीकारीत. बालविवाह प्रचारांत होता. यामुळें पुष्कळशा बालविधवा होत असत. यांनां सगळा जन्म वैधव्यांत घालावा लागल्यामुळें त्यांची साहजिकच अनाचारांकडे प्रवृति होई. ब्राह्मणानां आपण ईश्वराचे लाडके पुत्र आहोंत असें वाटे व यामुळें ते वेळीं अवेळीं आपला अधिकारहि इतर जातींवर गाजवीत. अशा अनेक विचित्र चालीमुळें बजबजपुरी माजून राहिली होती. इंग्रजांच्या राज्यस्थापनेनंतर त्यानीं हळुहळू त्यांपैकीं अनेक चालींना कायद्यानें बंदी केली. "१८४० पासून १८६० पर्यंत वीस वर्षांत तर हिंदुसमाज रचनेमध्यें हजारों वर्षांच्या परंपरेनें ढळत पावलेली व समाजाच्या नैतिक आरोग्याचा फन्ना उडविणारीं कितीं तरी बाडगुळें इंग्रज राज्यकर्त्यांनीं छाटून काढलीं." (पहा– रा. फाटककृत न्या० रानडे चरित्र पान. १०२)

परंतु सर्वच चाली कायद्यानें बंद करणें शक्य नव्हतें. कांहीं चाली समाजानें आप खुषीनें बंद करणें योग्य होतें. परंतु समाज तितका विचारी नव्हता. वरून पुष्कळशा अनिष्ट चालींचा हैदोस उजळ माथ्यानें चालत होता. विधवांचें वपन केल्याशिवाय मृत्यु आल्यास त्यानां स्वर्गद्वार खुलें होणार नाहीं असा समज होता व अशा विधवांच्या प्रेतालासुद्धां स्पर्श करीत नसत. १८५९ सालीं सोलापूर जवळ माटें गावांत एका गरीब ब्राह्मणाचें घर पावसामुळें पडून त्यांत त्याची विधवा बहीण प्राणास मुकली. या विधवेचें वपन झालें नव्हतें. यामुळे तिच्या प्रेताला कोणीच शिवेना. शेवटीं तें प्रेत शुद्रांकडून नेणें भाग पडलें. यावरून वाचकांनां त्या काळच्या सामाजिक चालींची कल्पना होईल. धर्मगुरूंनां आपण एक समाजाचे मोठे अधिकारी आहोंत असें वाटे व वेळीं अवेळीं ते आपला अधिकारहि गाजवीत, परतु इंग्रजी अमलामुळें हे त्यांचे अधिकारहि संपुष्टांत आलेले होते. "१८५४ सालीं शंकराचार्यांची स्वारी नगरास आली असतां त्या वेळीं त्यांच्यापुढें व्यभिचारिणी स्त्रियांबद्दल पुष्कळसे अर्ज दाखल करण्यांत आलेले होते. त्यांपैकीं एका विधवेच्या बापाला गोमूत्र वगैरे पाजून व १९ रुपये दंड घेऊन त्याचा उद्धार केला; पण जेव्हां त्या बापानें आपल्या मुलीबद्दलची गोष्ट काढली त्या वेळीं शंकराचार्यांनीं फर्मावलेलें प्रायश्चित मासलेवाईक आहे! शंकराचार्यांनीं सांगितलें कीं, एका आंब्याच्या झाडाचा बुंधा पोखरून त्या ढोलींत तिला बसवावी व बाहेर जवळपास गवत पेटवावें; अशा रीतीनें तिला बरीच धग लागल्यावर बाहेर काढून वपन करावें व सहस्र भोजन घालावें ह्मणजे शुद्ध होईल! (पहा न्या० रानडे चरित्र पा. ११७). हें विचित्र प्रायश्चित इंग्रजी अमलामुळें अमलांत आलें नाहीं ही गोष्ट निराळी; परतु यावरून त्या काळच्या समाजस्थितीचें स्वरूप चांगलें लक्षांत येतें.

अशा कित्येक चालींचा थयथयाट उजळ माथ्यानें समाजांत चालू होता. कित्येक लोक धर्माचा दांभिक आव आणून आपण मोठे धर्मनिष्ट आहोंत असें भासवीत व गरीब लोकानां त्रास देत. ह्या गरीब लोकानां इंग्रजी अमल सुरू झाल्याबद्दल समाधान वाटलें व आतां अशा लोकांनां भिण्याचें कारण नाहीं असें वाटूं लागलें. या निर्भयतेचा परिणाम अबला ह्मणून समजणाऱ्या बायकांवर सुद्धा कसा झाला होता, हें खालील उदाहरणावरून कळून येईल. एकदां कांहीं विधवांवर ब्रह्मवृंदानीं व्यभिचाराचा आरोप ठेऊन शंकराचार्यांकडे फिर्याद केली. शंकराचार्यांनीं त्यानां वपनाची शिक्षा दिली; परंतु आपली आज्ञा आह्मीं जुमानीत नाहीं असा स्पष्ट जबाब त्या स्त्रीयानीं त्यांच्या तोंडावर दिला. तेव्हां शंकराचार्यांनीं मुसक्या बांधून त्यांचें वपन करण्याबद्दल सांगितलें. तेव्हां त्या बायानीं निर्भयपणें सांगितलें कीं, ही मोंगलाई नाहीं. अत्याचार कराल तर फिर्याद होईल हें पूर्ण लक्षांत ठेवा. हें उत्तर ऐकून शंकराचार्यांची घमेंड जिरली व त्यानां आपलें गंजलेलें बहिष्काराचें शस्त्र बाहेर काढणें भाग पडलें. असो.

वरील विवेचनावरून इंग्रजी अमल सुरू झाल्यावेळींसुधां समाजाची स्थिति कशी होती हें दिसून येईलच. अनीतीचा प्रसार कांहीं कमी नव्हता, हें वेळीं अवेळीं शंकराचार्यांकडे व्यभिचारिणी स्त्रियांबद्दल जे अर्ज जात,त्यांवरून सिद्ध होतें. पाश्चात्य शिक्षणामुळेंच समाजांत अनीति पसरली असें ह्मणणाऱ्या पुराणमतवादी लोकानीं उपरोक्त उदाहरणाकडे जरूर लक्ष पुरवावें.

या वेळीं धर्माचें मुख्य आंग जें आंतरिक स्थिति सुधारणें त्याकडे कोणाचेंच लक्ष्य न व्हतें. बाह्य आचारांकडेच सर्व लक्ष्य देत. तत्पूर्वी ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम यां सारखे धर्मसुधारक उत्पन्न होऊन जरी त्यानीं शुद्ध धर्माचें स्वरूप लोकांत पसरविण्याचा प्रयत्न केलेला होता, तरीपण तीं तत्वें सर्व साधारण लोकांच्या पचनीं पडण्यासारखी परिस्थिति उत्पन्न झालेली नव्हती, यांत शंका नाहीं.

अशा स्थितींत मिशनरी लोकांचें आगमन हिंदुस्थानांत झालें. त्यानीं वरील स्थितीचें सूक्ष्म अवलोकन करून आपल्या धर्माचें बीं रोवण्याचा प्रयत्न केला. ठिकठिकाणीं शाळा काढणें, वर्तमानपत्रें काढणें, लोकानां - स हा य्य पुरविणें वगैरे कार्यांच्या द्वारा त्यानीं आपल्या धर्माचा प्रसार सुरू केला. व या त्यांच्या प्रयत्नाला थोडें फार यशहि येत गेलें. हळुहळू आपल्यांतील बरेच सुशिक्षित लोक हिंदुधर्माचा त्याग करून परधर्मात जाऊं लागले. मिशनरी लोकांच्या प्रयत्नानें लोकांचा असा समज झाला कीं, त्यांचा धर्म ह्मणजे उदारमतवादी; सर्व उदात्त तत्वांचा सांठा त्यांच्या धर्मात; आपल्या सारख्या दगडा धोंड्यांची पूजा त्यांच्या धर्मात नाहीं. असे समज दृढ होऊन लोकांचें लक्ष्य त्यांच्या धर्माकडे वेढलें गेलें व आतां थोडक्याच काळांत हिंदुस्थान ख्रिस्ताचा अनुयायी होणार अशीं भविष्यें मेकाले साहेबासारखे इंग्रज लोक करूं लागले; परंतु आनंदाची गोष्ट ही कीं, हीं सर्व भविष्यें फोल ठरून आज कोणताहि सुशिक्षित हिंदवासी सहसा परधर्मात जात नाहीं.

या पाश्चात्य शिक्षणामुळें आपल्याकडे एक विचारी वर्ग तयार झाला. या वर्गाला आपल्या समाजांतील सुशिक्षित लोक परधर्मात जाणें इष्ट नाहीं असें वाटूं लागलें व त्यानीं आपल्या धर्मांतील उच्च तत्वें लोकांपुढें मांडून त्यांच्याहिपेक्षां आपला धर्म किती श्रेष्ट आहे हें सिद्ध करून दाखविलें; तसेंच आपल्या समाजांतील चाली रीतींचें सूक्ष्म निरीक्षण करून असें ठरविलें कीं, ह्या चाली रीति सुधारल्याशिवाय आपल्या देशाची उन्नति होणें शक्य नाहीं. व या प्रमाणें समाजसुधारण्याचें कार्य हातांत घेतल्यानें या वर्गाला सुधारक असें नांव मिळालें. सुधारकानीं समाजांतील चालीनां योग्य वळण देण्याचें कार्य हातांत घेतलें. महाराष्ट्रांत सुधारकांची गर्जना सिंहाप्रमाणें होऊं लागली व या नवीन पक्षाच्या निशाणाखालीं न्या. रानडे, भांडारकर, आगरकर, गोपाळराव देशमुख, विष्णुशास्त्री पंडित यांसारखे वीर एकत्र होऊन त्यांची मोहीम सुरू झाली. ही मोहीम जेव्हां यशस्वी होऊं लागली, तेव्हां पुराणमतवाद्यांच्या तोंडचे पाणी पळालें त्यांना आपल्या हक्कांवर गदा आली असें वाटून जो तो आपापलें शस्त्र घेऊन त्यांच्यावर फेकूं लागला. बहिष्काराचीं ब्रह्मास्त्रेंसुद्धां कित्येक वेळां फोल ठरूं लागलीं, कारण अशा शस्त्रांना भिणारी आमची सुधारक मंडळी नव्हती. एका बाजूला बाजारबुणग्यांसारखे पुराणमतवादी लोक, शंकराचार्यांसारखे धर्मगुरू तसेंच कित्येक राजेरजवाडे तर दुसऱ्या बाजूला, थोडकी परंतु खंबीर अशी सुधारक मंडळी, असा त्यांचा सामनाहि कित्येक ठिकाणीं झाला. पैकीं पुण्यास सन १८७० सालीं शंकराचार्यांसमोर मार्च महिन्यात झालेला पुर्नविवाह विषयावरील वाद महत्वाचा होता. हा वाद नऊ दिवस चाललेला होता. दोनहि बाजूला पंच या नात्यानें नामांकित शास्त्र्यांची योजना झालेली होती. मंडन पक्षाच्या बाजूनेंच कृष्णशास्त्री चिपळूणकर यांची पंचांत योजना झाली; परंतु त्यानीं मागें एकदां युरोपियनाबरोबर नुसतीं फळें खाल्लयाच्या आरोपावरून त्यानां, पांचशें रुपये दंडासह सक्षौर प्रायश्चितानंतरच, हा अधिकार देण्यांत आला. रा. भांडारकरानां हा अधिकार केवळ सारस्वत ज्ञातींत जन्माला आल्यामुळें देण्यांत आला नाहीं! असो. या वादांत मंडण पक्षाच्या एका शास्त्र्याला विरुद्ध बाजूच्या लोकानीं फूस दिल्यामुळें बहुमत विरुद्ध दिसलें तरीपण मंडन पक्षाची बाजू किती जोरदार आहे हें बाहेर आलें. हळूहळू परिस्थिति सुधारत चालली व सुधारणेच्या वृक्षाला गोड फळें येऊं लागलीं. स्त्रिशिक्षणाचा बराच प्रसार झाला; बालविवाहाची मर्यादा वाढली; पुनर्विवाह प्रचारांत येऊं लागला; धर्माधिकाऱ्यानां आतां आपले अधिकार काय आहेत व ते कितपत अमलांत आणणें योग्य आहे हें कळून आलें; ज्ञातिभेदाचें बंड मोडलें; परदेशगमनाची आडकाठी राहिली नाहीं. अशा रीतीनें समाजाची स्थिति सुधरत चालली.

सुधारक वर्गाच्या प्रयत्नाला यश आलें, परंतु कोणत्याहि सैन्यांत जसे शूर शिपायांच्या बरोबरच बाजारबुणगेहि असतात, त्याचप्रमाण सुधारक वर्गात दुसरा एक बेगडी सुधारकांचा वर्ग आपणास सामील करून घेऊं लागला. त्यानें केवळ पोपाकापुरतेंच पाश्चात्याचें अनुकरण केलें; परंतु त्यांची गणना कोणीहि खऱ्या सुधारकांत करणार नाहीं.

आपल्या गोमांतकांत नुकतेच सुधारणारूपी उषेचे किरण फांकत आहेत. अशा वेळीं पुराणमतवादी लोक आपलीं शस्त्रें घेऊन पुढें सरसावत आहेत व निरनिराळ्या प्रकारचे खोटे आरोप सुधारणेवर करून जुन्या मताचें समर्थन करीत आहेत. तरी त्यांचे आरोप काय आहेत व ते कितपत समर्थनीय आहेत, याची मीमांसा पुढल्या लेखांकांत करूं.

के० भारती

Ano 9 N.° 27

...-feira 1 de Outubro de 1924

ASSINATURA
...r cada ano tres rupias

ANUNCIOS
pe... ainda que repetida uma tanga
...ero avulso uma tanga

DIRECTOR E P...
G. P. Hege...
Quepem-Go...

भारत

BHARAT

वर्ष ९ वें. अंक २७

गुरुवार ता. १ अक्टोबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें-गोवा

PELA POLICIA

Foi o *Bharat* que primeiro manifestou o seu entusiasmo pelo estabelecimento dos Comandos de Policia nas Novas Conquistas onde a sua acçao se fazia precisa para manutençao de ordem publica e segurança de propriedade, amiudadas vezes alterada por alguns tiporios, propensos ao vandalismo.

¿Conseguiu a Policia coibir, dum modo eficaz, o vandalismo destas paragens, consequencia de ociosidade, mae de vicios de toda a sorte e...morte?

Nao, certamente, ainda com o forte freio que lhe esta' pondo pela sua incansavel e exemplar actividade. Nem e' para admirar que isto suceda, dada a curta idade que alguns daqueles comandos contam de sua instalaçao e a norma pouco aprovavel que seguem em algumas partes.

Chegam-nos aos ouvidos, por exemplo, ecos de Ponda' e Canacona, comentando pouco agradavelmente a acçao policial dos seus comandos. Em Ponda' faz-se abuso da palmatoria e em Canacona acrescenta-se a este abuso o de rapar *xendi*, sobrancelhas e bigodes.

A serem verdadeiros os informes, o *Bharat*, conquanto apologista sincero da Policia, nao pode todavia deixar de exteriorisar o seu desprazer por uns actos que destoam da seriedade humana, fazendo, ao mesmo tempo, lembrar as horripilantes scenas dos ominosos tempos inquisitoriais.

A Policia nao pode nem deve abusar a palmatoria nem rapar cabelos e pelos, principalmente o *xendi*, daqueles que lhe cairem nas garras; porquanto, se e' mais que suficiente o uso de prisao ou detençao a quem tenha vergonha para nao repetir a imprudencia, o expediente duplo do abuso da palmatoria e corte de c belos nao possui o condao de corrigir um desenvergonhado a quem importa bem pouco qualquer conceito desprimoroso que o publico dele forme.

Nestas condigoes¿ em que ficou a palmatoria cangada e o *xendi*...desligado?

Ha' a notar se, tambem, que o criterio policial, humano como e', esta' sujeito a errar, sendo natural, porisso que, entre os criminosos, paguem igualmentas as *favas* os inocentes, o que convem evitar-se para o bom nome e prestigio da Policia.

E quanto ao *xendi*, e' bem avisado que se nao toque nele que pelo geral dos hindus e' considerado como emblema de sua religiao. Cortar o *Xendi* representa melindrar o sentimento religioso hindu'.

Esperamos, porisso, que a nossa Policia pora' de parte tais praticas, empregando, apenas, o poder de persuasao e se necessario for, o de prisao para preencher cabalmente o fim que tanto ela como no's temos em vista.

UM 'FAVOR' DO SR. BATALHA

O sr. Pereira Batalha foi muito infeliz em alardear o *favor que prestou* ao nosso director "intercedendo por êle junto das autoridades para que a policia lhe não lançasse as garras, quando foi da questão dos Velipos e do ataque armado aos soldados." [*A Provincia*, n.° 336, ano X]

Desgraçadamente, porêm, o *favor* do sr. Batalha, longe de ser útil á causa dos Velipos, foi-lhe antes prejudicial, como o leitor vai vêr.

Quando constou ao nosso director que por maquinações engendradas por um *satelite* do sr. dr. Jaime de Morais fôra expedida para Canvorem uma força de cem soldados com ordens de fazer fogo, se necessário fôsse, contra os submissos e pacatos Velipos, pintados como *rebeldes* pelo dito *satelite* de *costas quentes*, o sr. Hegdó Dessai dirigiu-se a Pangim para elucidar a verdade do *casus beli*... Trocou sobre o assunto impressões com varios dos seus amigos e tambem com o sr. Pereira Batalha por recomendação do sr. Emilio da Costa Martins de Assolnã, um dos procuradores dos referidos Velipos.

O sr. Batalha prontificou-se a acompanhar o nosso director ao Comando Geral do Corpo de Policia e disfazer ali a rêde de intrigas, astutamente tecida pelo *figurão* governamental. E, de facto, o sr. Pereira Batalha, então *desprovinciado* e o sr. Hegdó Dessai foram falar ao sr. Coronel Craveiro Lopes, sobre a maroteira de quem, segundo o tradicional costume *politiqueiro* dos da grei estava apegado á sola dos sapatos do sr. Governador Geral.

O sr. Craveiro Lopes, comandante geral, recebeu, porem, nesse dia só ao sr. Batalha, o qual, depois da conversa que entabolou com aquela autoridade, disse ao sr. Hegdó Dessai, em tom de tristeza mesclada de laivos de compaixão, que nas regiões oficiais estava tudo contra o nosso director que era considerado como inimigo figadal dos europeus e da República, de de a publicação no *Bharat* da local, referente ao centenario de Vasco da Gama, que êle, *o sr. Batalha nada podia no entretanto fazer em prol dos Velipos*, mas que faria o que estivesse ao seu alcance, quando o caso fôsse afecto aos tribunais competentes.

Foi isto ao pé do Liceu Central. E' aqui que o sr. Batalha se despediu *para sempre* do sr. Hegdó Dessai que nunca mais lhe falou sobre o caso de Canvorem.

A isto se resume o *importante favor* do sr. Batalha. Mas não acabou a historia...

Depois do que se passou no Comando de Policia, o nosso director, resolvido a pedir justiça ao Governo de Portugal por telegramas, dispunha-se a voltar para Quepem. Precisamente nêste momento foi-lhe transmitido por parte do sr. Craveiro Lopes que êste senhor desejava ouvi-lo no dia imediato sobre o malfadado caso de Canvorem.

Efectivamente, o sr. Hegdó Dessai entrevistou-se com aquela autoridade no dia imediato. Na entrevista, o director do *Bharat* desfez, uma por uma, todas as acusações que circulavam contra êle e os seus constituintes, instando, finalmente, com o sr. Coronel Craveiro Lopes para êle proprio, como arbitro, dicidir o tão falado caso, o que, porêm, não foi possivel por circunstancias cuja narração não vem a proposito.

Só, após a entrevista, é que graças ao espirito justiceiro do digno comandante geral, os Velipos, injusta e arbitrariamente presos, foram postos em liberdade, *concluindo então o nosso director no decurso da conversa tida com o sr. Craveiro Lopes que ele não lograra ser recebido por Sua Excia no dia anterior por causa da companhia do sr. P. Batalha*, o que, mau grado nosso, somos forçados a trazer á luz, já que o sr. director de a *A Provincia* nos provocou sem motivo plausivel.

Como o leitor vê, *o favor* do sr. Batalha em vez de favorecer a causa dos Velipos, só a prejudicou!

E é um *favor* desses que o sr. Batalha, hoje *provinciado*, está alardeando!!!

Não há dúvida que o sr. Batalha é um *favoreiro* dos quatro costados. Se não fôra seu *favor* o director do *Bharat* estaria, a estas horas, reduzido a *poeira*, *cinsas* e *nada*, em consequência do fusilamento a que a Policia havia de proceder por seu grave crime de ter-se revoltado contra a prepotencia dos *sobas* de Canvorem ... e o que o *influente* jornalista euro

…े त्या मंडळाकडून अव्याहत सुरू आहे. या उत्सवाची कल्पना बहुजन समाजास प्रिय होऊन त्याचें अनुकरण गोमांतकांतील बऱ्याच भागांत झालें आहे. व अल्पावधींत ह्या उत्सवास राष्ट्रीय स्वरूप येईल, असें वाटावयास लागलें आहे.

श्री गणपत्युत्सवापेक्षां श्री सरस्वत्युत्सव सार्वजनिक करण्यांत अनेक फायदे असून यांत जास्त सुलभता आहे. एक तर विद्यार्थी वर्गाकडे या उत्सवाचा जास्त संबंध, दुसरें कोणत्याहि गांवीं कसलीहि स्थानिक अडचण असली तरी प्रत्येक शाळेच्या जागीं –जेथें तसा प्रघात नसेल तेथें– श्री सरस्वतीच्या मूर्तीची स्थापना करून व्याख्यानें, प्रवचनें वगैरे करण्यास प्रत्यवाय येणार नाहीं. तिसरें हा उत्सव गणपत्युत्सवाप्रमाणें खाजगी रीतीनें साजरा होत नसल्यामुळें या समारंभास हजर राहण्यास लोकांस कोणतीच अडचण पडत नाहीं. सारांश या उत्सवाचा गोमांतकांत अशा प्रकारें प्रसार झाला म्हणजे प्राथमिक शिक्षणाची खेड्यापाड्यांतूनहि उन्नति होण्यास अवकाश लागणार नाहीं. व समाज सुशिक्षित होऊं देणें हें नव गोमंतकाचें आज आद्य कर्तव्य आहे, याबद्दल दुमत नाहीं.

श्रीयुत ऋग्वेदीहि आपल्या एका ग्रंथाच्या शेवटीं अशी कळकळीची प्रार्थना करतात कीं, "जनतेंत प्रेमसंवर्धन करून एकोपा घडवून आणण्यास उत्सवासारखा दुसरा रामबाण उपायच नाहीं. नागरिकांचे व खेडवळांचेहि उत्साहवर्धक उत्सव राहिलेच पाहिजेत; मात्र त्यांच्यांतील अनाचार व अनीति काढून टाकून त्यांस शुद्ध वळण देण्यास सुशिक्षितांनीं शैथिल्य टाकून कंबर बांधली पाहिजे. आमचे गृह्यसंस्कार शुद्ध झाले, उत्सवांतील शिष्टसंमत नसलेला भाग नाहींसा झाला, बंधुत्व भावनेचा विकास झाला व परमात्म्याची ओळख पटूं लागली म्हणजे आम्हीं खास उन्नतिपथ आक्रमूं लागलों असें म्हणावयास हरकत नाहीं. उपदेशामृतानें सर्वतोपरी आमची कायिक, वाचिक व मानसिक प्रगति व्हावी हेंच आमच्या कथाकीर्तनें, जत्रा, पूजासमारंभ, प्रवचनें इत्यादिकांचें उद्दिष्ट आहे"

नवगोमंतका, आज या परिस्थितींत ही प्रार्थना तुला आजेच्या ठिकाणीं आहे असें समजून श्री सरस्वतीच्या सान्निध्यांत आपल्या शुद्ध भावनेला जागृत करून व मतभेदाची द्वैत भावनेस तिलांजली देऊन सर्व प्रकारच्या देशोन्नतीच्या कार्यास लागण्याची हिंमत धर, एवढेंच तुला सांगणें आहे!

—हिंदुस्थानच्या पोष्ट खात्यांतून सन १९२२–२३ सालीं १५१२० लक्ष रुपये किंमतीच्या विमा उतरलेल्या पार्सलांतून १२२ हजार रुपये किंमतीचीं पार्सलें गहाळ झालीं, ४६० लक्ष रजिस्टर्ड नगांपैकीं हरवलेल्या नगांबद्दल १२००० रुपये भरावे लागले व १२०८० लक्ष रुपये किंमतीच्या मनीआर्डरींत ८९००० रुपयांची तूट आली.

स्फुट विचार

महात्माजींचा उपवास:— गेल्या च्या मागील गुरुवारीं म्हणजे गेल्या १८ रोजीं सकाळीं दोन वाजतां महात्माजींनीं आपल्या खासगी कारभाऱ्याकरवें पुढील पत्रक प्रसिद्ध केलें आहे: " हल्लीं होत असलेल्या उद्वेगजनक गोष्टी मला असह्य झाल्या आहेत व त्यांत ही माझी झालेली निर्भेळ निराशा सहन करणें मला अगदीं दुरापास्त आहे. माझ्या धर्माची मला अशी शिकवण आहे कीं जेव्हां जेव्हां एखादा मनुष्य संकटाच्या वेळीं जाळ्यांत अडकतो व जेव्हां जेव्हां त्या परिस्थितीच्या फेऱ्यांतून पार पडणें त्याला अगदीं अशक्य होतें तेव्हां तेव्हां प्रायोपवेशनाचा व प्रार्थनेचा मार्ग स्वीकारावा आणि म्हणूनच मीहि तसेंच करण्याचें योजिलें आहे. मी जें कांहीं लिहितों किंवा बोलतों त्यानें ह्या दोन संस्कृतींचें एकीकरण होऊं शकत नाहीं. ह्याचकरितां मी स्वत:ला एकवीस दिवसांच्या उपवासाची शिक्षा देत आहें. ह्या अवधींत मी जीव संरक्षणार्थ अंतिम साधन म्हणून फक्त पाणीच पीत जाईन व जरूरच पडल्यास थोडेंसें मीठहि खाईन. प्रायश्चित व प्रार्थना ह्या दुहेरी दृष्टीनें मी हा मार्ग स्वीकारला आहे. प्रायश्चित या दृष्टीनें माझा नवीन निश्चय लोकसमाजापुढें मांडण्याची मला जरी कांहींच जरूरी नसली तर आजपर्यंत परस्परांशीं गुण्यागोविंदानें वागलेल्या हिंदु मुसलमान या दोघांसहि असा अत्याचार न करण्याबद्दल विनंति व प्रार्थना करण्याचा मला हक्क पोहोंचतो व म्हणून हा निश्चय तुम्हांपुढें जाहीर करणें मला भाग आहे. मी इंग्रजांसहित सर्व ज्ञातींच्या व वर्गांच्या पुढाऱ्यांना एकत्र जमवून ह्या धर्माच्या पवित्र तत्वांस व माणुसकीस लाजविणाऱ्या अमानुष प्रकारांस आळा घालण्याचे उपाय योजण्याबद्दल नम्र विनंति करतों. ह्या प्रकारचे दंगे म्हणजे परमेश्वर या साम्राज्य सत्तेचा ऱ्हास होय. आपण सर्व मिळून त्या परमशक्ति परमेश्वराचा आपल्या हृदय कपाटांत अधिष्ठान देऊं या!!!" हा अशा प्रकारचा निर्दय निश्चय करतांना त्यानीं कोणाचाच–त्यांच्या दिलजान दोस्त महंमद अल्लीचाहि – विचार घेतला नाहीं, नव्हे त्यांना एका शब्दानेंहि सुचविलें नाहीं. कोहाटमध्यें घडलेल्या भयंकर अत्याचाराची बातमी त्यांच्या कानांवर जातांच त्यांच्या फुलापेक्षांहि कोमल व लोण्यापेक्षांहि मऊ अंत:करणाला आत्यंतिक दु:ख झालें. हिंदु मुसलमानच्या टिकाऊ एकीकरितां त्यानीं केलेली अविश्रांत मेहनत निष्फळ झालेली पहातांच त्यांना कसेंसेंच वाटलें; त्यांचें हृदय हादरूं लागलें; डोळ्यांत अश्रु उभे राहिले. ब्रिटिश न्याय कोर्टानें राजद्रोहाबद्दल ठोकलेली सहा वर्षांची शिक्षा ऐकतांना ज्यांचें मुखकमल हांसरें दिसलें ते महात्माजी त्यावेळ रडले. आपल्या अपूर्व स्वार्थत्यागानें दधिची ऋषीस लाजविणारा तो हिंदुस्थानचा हिंमतदार आत्मा रडला. हें सारें कां?

एकी पाहिजे:— त्या महात्म्याची काया कोणाकरितां इतकी झटत आहे! त्यांचा अमोलिक जीव कोणाकरितां तिळतिळ तुटत आहे! त्या कृशदेही मोहन लालाचें रक्त कोणाकरितां शेंगशेरानें आटत आहे? ह्या सर्व प्रश्नांचें उत्तर एकच. हिंद देशाकरितां! ह्या हिंदभूमीचा अभिमान बाळगणाऱ्या प्रत्येक प्राण्याकरितां! ह्या आर्यावर्तांत वास करणाऱ्या हिंदु, मुसलमान, पारशी, यहुदी, ख्रिश्चन वगैरे सर्व धर्मांतील लोकांकरितां! त्या महात्म्याला हिंदु-मुसलमानाच्या कामचलाऊ एकींत आनंद नाहीं! दिलसफाईशिवाय दिलजमाई कशी होऊं शकेल? त्यानां सर्व ज्ञातींची टिकाऊ एकी पाहिजे. ज्या चार भर भक्कम पायावर ते आपल्या स्वराज्याची इमारत उभी करू शकतात त्यांतील खादीच्या खालोखाल दुसरें महत्वाचें तत्व म्हणजे हिंदुमुसलमान एकी. ह्या एकीच महत्व त्यांना फारच वाटतें. आजपर्यंत दोनदां उपोषण करण्याचें जाहीर केलें होतें. व दोन्हीदां ते खऱ्या आर्यबाण्याला स्मरून वागले. पहिला चौदा दिवसांचा उपवास दक्षिण आफ्रिकेंत त्यानीं जाहीर केला व तोहि पाशवी शक्तीशीं झुंज देण्याकरितां. दुसरा पांच दिवसांचा उपवास त्यानीं चौरिचौऱ्याच्या दंग्याच्या वेळीं व तोहि आपल्या देशबांधवांकरितांच. त्यांच्या पहिल्या उपवासाची मुदत चौदा दिवसांची व दुसऱ्या उपवासाची पांच दिवसांची होती; पण ह्या तिसऱ्या उपवासाची कालावधीतर एकवीस दिवसांची ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, त्या दोन्हींहि अन्यायापेक्षां हा अत्याचार अधिक असह्य झाला. नोकरशाहीच्या आपस्वार्थी कृत्यांपेक्षां आपल्या लोकांचे अनन्वित अत्याचार त्यांना अधिक असह्य होतात. आपसांत बेबंदशाही माजली असतां परकीयांच्या सोटेशाहीचा प्रतिकार कसा करितां येईल. आपसांतील झगडे आधीं निवडावयाचे व मग सर्वांनीं मिळून परकीयांस तोंड द्यावयाचें! नाहीं तर चौरीचौऱ्यास घडलेल्या प्रसाराप्रमाणें आपले लोकच आयत्यावेळीं आपणाला दगा देतील अशी त्याना भीति वाटते.

हिंदु मुसलमान:— पण हिंदु मुसलमानाचे झगडे आजकालचेच नाहींत कीं ते महात्माजींच्या उपदेशानें चटकन मिटविले जातील. कित्येक शतकें त्यानीं परस्परांच्या नरड्यांचा घोंट घेण्यांत घालविलीं आहेत व त्या द्वेषाग्नीं पाळेंमुळें दोन्हीहि धर्माच्या लोकांच्या अंत:करणांत इतकीं खोल पसरलीं आहेत कीं महात्माजींच्या मध्यस्थीनें जरी त्या दोन्हीहि संस्कृतींची एकी केली गेली तरीहि तो द्वेषाग्नी त्यांच्या हृदयांत धुमसतच राहील व तो केव्हां फिरून पेट घेईल ह्याचा निश्चित नियम नसल्यानें त्यांची केली जाणारी एकी अल्पकालीन अतएव निरुपयोगीच ठरेल. पण महात्माजी निग्रही आहेत. व त्या एकी करितां आज ते आपल्या जिवाचें मोल तोलण्यास तयार आहेत. त्यांचे प्राण हिंदु इतकेच मुसलमानानांहि प्रिय आहेत व ह्मणूनच गेल्या महिन्याच्या सव्वीस तारखेस दिल्ली येथें भरली जाणाऱ्या हिंदुमुस्लीम परिषदेंत दोन्हींहि समाजांच्या धार्मिक तत्वांची तोंडमिळवणी केली गेलीच असेल कांहींहि असो; गुलबर्गा, लखनौ, कोहाट वगैरे ठिकाणीं घडलेले अत्याचार जितके मुसलमानांना तितके हिंदूंनाहि लाजिरवाणे होत हें कोणासहि नाकबूल करतां येणार नाहीं व महात्माजीनें आपलें अर्धेंअधिक आयुष्य खर्चून जो हिंदुमुसलमानांची एकी करण्याचा प्रयत्न केला व आपल्या प्रयत्नेंस तपोबलाची जोड मिळावी म्हणून जी दोन वर्षें खडतर तपश्चर्या केली ती निष्फळ होऊन त्यांना आणखीहि एकवीस दिवसांची तपश्चर्या करण्याची जरूरी भासावी.ही गोष्ट दोन्हीहि संस्कृतींना लज्यास्पद व खालीं मान घालण्यास लावणारी आहे.

वर्तमानसार

—पेडणें येथील शीलोन्नति समाजाच्या वार्षिक व्याख्यानमालेस ता० ७ रोजीं आरंभ होईल.

—सांगें येथील विठ्ठलसेवक मंडळाचा सरस्वत्युत्सव ता० ७ व ८ रोजीं साजरा होईल.

—दुष्काळामध्यें गुरांना चारा पुरविण्याकरितां मुंबई सरकारनें दक्षिण भागांत करजगी (धारवाड) व मध्यप्रांतांत कोपरगांव आणि नागपूर येथें गवताचे डेपो उघडले आहेत.

—दरमहा ५ रुपये भाडें देणाराला म्युनिसिपालटींत मत देण्याचा बडोद्याच्या रहिवाश्यांना अधिकार मिळाला आहे.

—दरवडेखोर बावरदेव यांस पकडल्याच्या कर्तबगारीबद्दल ब्रिटिश सरकारनें बडोद्याच्या पोलीसाना बक्षिसाकरितां ९००० रुपये दिले.

—नागपूर येथें १२ वर्षें वयाच्या एका मुलीचा खून होऊन तिचें प्रेत मेहदी बागेंत सांपडलें. या बागेच्या आसपास मुसल्मानाची वस्ती आहे.

—'खुदीराम' या नावांचें बंगाली पुस्तक जप्त करण्यांत आलें.

—बेळगांव येथें भरणाऱ्या खिलाफत परिषदेच्या अध्यक्षस्थानाकरितां मौ. झाफरअल्लीखान यांची निवडणूक करण्यांत आली.

—इब्न सय्यद हा मक्का आपल्या ताब्यांत घेण्याच्या विचारांत आहे.

—एका इटालियन कामकऱ्यानें फॅसिष्ट कर्पोरेशनचे अंडर सेक्रेटरी डे. कामालिनी यांस ठार मारिलें.

—जर्मनीनें २ कोटी सुवर्ण मार्कांचा दुसरा हप्ता भरला.

—बंगालचे प्रसिद्ध कायदेपंडित व प्रागतिक पक्षाचे एक सन्मान्य पुढारी भूपेंद्रनाथ वसू यानीं इहलोकची आपली यात्रा संपविल्याचें कळविण्यास आम्हांस फार वाईट वाटतें.

बालोन्नति समाज, केपें–गोवा

या संस्थेचा वार्षिक सरस्वत्युत्सव येत्या अक्टोबर ता. ४।५।६ रोजीं समाजाच्या दिवाणखान्यांत साजरा होणार असून त्या प्रसंगीं मास्तर दळवी, ना. अ. पाटणकर वगैरे गृहस्थांचीं भाषणें होणार आहेत. तरी सदरील उत्सवास सर्वांनीं अगत्यपूर्वक येऊन, संस्थेस आभारांत ठेवावें अशी नम्र विनंति आहे.

से. बा. समाज, श्रीपाद नी. भेंडे

श्रीमहालक्ष्मी प्रासादिक बाल समाज संस्था, तळावली–दुर्भाट,

या संस्थेचा वार्षिक सरस्वतीपूजनोत्सव येत्या, अष्टमी नवमी आणि दसमी (ता० ५ ६–७) रोजीं श्रीमहालक्ष्मीच्या आलयांत साजरा होणार असून, त्या तीन्हीं दिवस पूजा, आरत्या, कीर्तन वगैरे होणार आहे. तेव्हां सदरहू उत्सवास सर्वांनीं अगत्य येऊन संस्थेस आभारांत ठेवावें अशी विनंति आहे.

सर्वांचा नम्र | सदाशिव विठ्ठल सांवत

राष्ट्रीय शिक्षण

---*---

असहकारितेच्या कार्यक्रमाविषयीं विशेषतः त्याच्या विधायक बाजूविषयीं लिहितांना राष्ट्रीयशिक्षणाचा सरकारी शिक्षणसंस्थांवरील बहिष्काराशीं असलेल्या संबंधाचा उल्लेख ह्या पत्रांतून कित्येक महिन्यापूर्वी करण्यांत आला होता. आज त्यावेळीं असलेल्या परिस्थितीहून अगदीं भिन्न अशी परिस्थिति उत्पन्न झालेली आहे. असहकारितेच्या उत्पादकानें पूर्वी वेळोवेळीं फेरफार केला गेलेल्या बहिष्काराचा कार्यक्रम बदलण्याचा आपला निश्चय जाहीर केला असून येत्या कॉंग्रेसच्या बैठकीच्या विचारासाठीं मांडण्यांत येणार असलेल्या कांहीं नवीन योजनाहि त्यानें जाहीर केल्या आहेत म० गांधींच्या नव्या योजनांविषयीं दुसऱ्या प्रसंगीं लिहिण्याचा माझा विचार आहे. आपणांस सध्यां फक्त त्यांतील राष्ट्रीय शिक्षणाचा भाग पूर्वीच्या स्वरूपाहून वेगळा आहे किंवा काय हें पहावयाचें आहे. म० गांधीचा त्यांच्या कार्यक्रमावर असलेल्या अढळ विश्वासाविषयीं, त्याच्या लेखांवरून पहातां, प्रश्नच उरत नाहीं. त्यानीं आपला 'पराजय' कबूल केलेला आहे. पण त्यांच्या ह्या पराजयानें त्यांच्या कार्यक्रमाची व असहकाराच्या तत्वाची निष्फलता सिद्ध होत नाहीं. सध्या अस्तित्वांत असलेल्या राष्ट्रीय शिक्षणसंस्था कॉंग्रेसनें चालवाव्या व शक्य असल्यास नवीन संस्था उघडण्यांत येऊन त्या सरकारच्या मदती पासून व संसर्गापासून दूर रहातील ह्याची काळजी घेण्यात यावी, असें त्यानीं सुचविलें आहे. असहकारितेच्या कार्यक्रमाचा बराच मोठा भाग राष्ट्रीय ऐक्यासाठीं गाळीत असतांहि गांधीनां राष्ट्रीय शिक्षणाचा तपशील पूर्वीच्याच स्वरूपांत कायम ठेवण्याची गरज वाटते. सरकारी शिक्षणसंस्थांवरील बहिष्कार उठविल्यानें राष्ट्रीय शिक्षणसंस्थांचें महत्व किंवा त्यांची जरुरी कमी न होतां उलट या संस्था योग्य रीतीनें चालवून उर्जितावस्थेस आणल्यानें सरकारी संस्थांवरील बहिष्कार आपोआपच यशस्वी होतो, हें सहज दिसून येईल. गांधींच्या ह्या सूचनेस कॉंग्रेसमध्ये विरोध होईल असें मला वाटत नाहीं. कॉंग्रेस मध्यें व बाहेर असलेल्या वेगवेगळ्या पक्षपैकीं कोणताहि पक्ष राष्ट्रीय शिक्षणाच्या तत्वाविरुद्ध नाहीं व त्या सवांस भाग घेतां येईल अशा विधायक कार्यांत राष्ट्रीय शिक्षणाचा प्रामुख्यानें समावेश होतो.

वास्तविक दुसऱ्या देशांत शिक्षणसंस्था स्थापण्यासाठीं किंवा त्या चालविण्यासाठीं त्या त्या देशाच्या राज्यव्यवस्थेवर अवलंबून रहावें लागत नाहीं; एवढेंच नव्हे तर त्या संस्था सर्वस्वीं स्वतंत्र असतात व त्याच्या चालकाना त्यांच्या व्यवस्थेसंबंधीं वाटेल ती सुधारणा अमलांत आणण्यांत कोणतीच अडचण उत्पन्न होत नाहीं. अमेरिकेंतील उच्च शिक्षणसंस्था त्या त्या संस्थांचे 'ट्रस्ट' चालवीत असतात. पण हिंदुस्थानांत सर्व शिक्षणसंस्थांच्या कारभारांत सरकारचा हात असतो व क्वचित् प्रसंगीं एखाद्या म्युनिसिपालिटीनें किंवा लोकल बोर्डानें स्वतेच्या इच्छेवरून परंतु सरकारी संमतीखेरीज त्यांत सुधारणा घडवून आणण्याचें मनांत आणलें तर सरकारास त्याच्या नैतिक अधिकारांत वाटेल ती ढवळाढवळ करतां येते हें सुरत किंवा अहमदाबाद म्युनिसिपालिटीच्या उदाहरणानें दाखवून दिलेलें आहे. लोकांना स्वतःच्या संस्था उघडतां येत नाहींत ह्याचें दुसरें व मुख्य कारण पैशांची अडचण हें होय. येथें फक्त खासगी खर्चानें चाललेल्या दुसऱ्या अत्यल्प संस्था आहेत; पण त्यांच्या क्षेत्रांत स्वतंत्र शिक्षणसंस्थानां जागा नाहीं शिक्षणासारख्या अत्यंत महत्वाच्या विषयांत सरकारी मदतीशिवाय चालत नाहीं म्हणून नव्हे किंवा शिक्षणसंस्था चालविण्यास आर्थिक मदत देणारे रॉकफेलर कार्नेजी येथें नाहींत म्हणूनहि नव्हे, तर राष्ट्रीय शिक्षणसंस्था स्थापणें किंवा त्या पूर्वीच अस्तित्वांत असल्यास त्यांना कोणत्याचप्रकारें हिंदी धनिकांनीं मदत करणें सरकारास संमत नाहीं म्हणून राष्ट्राला सरकार व सदोष संस्थांच्या शिक्षणावरच समाधान मानून रहावें लागतें. आमचे रॉकफेलर एकाद्या व्हाइसरॉयच्या किंवा गव्हर्नरच्या सहीनें निघालेल्या 'अपीलाच्या' यादीवर लक्षांचें आंकडे टाकून अमेरिकन रॉकफेलरला लाजवतात; पण राष्ट्रीय शिक्षणाकडे एक पैचाहि व्यय करण्याचें पाप करीत नाहींत. ह्यावरून अमेरिकेसारख्या स्वतंत्र देशांतील धनिक व तेथील राज्यव्यवस्था राष्ट्रीय शिक्षणास मदत करणें राजद्रोह समजत नाहींत, हें उघड आहे.

हिंदुस्थानांत आतांपर्यंत स्वतंत्र शिक्षणसंस्था स्थापण्याचे झालेले प्रयत्न स्वावलंबनाच्या तत्वावर केले गेले आहेत. डॉ. टागोरचें शांतिनिकेतन, म० गांधींचा सत्याग्रह आश्रम, प्रो० कर्व्यांची संस्था, दयानंद वैदिक कॉलेज, गुरुकूल संस्था व इतर राष्ट्रीय शिक्षण संस्था वगळल्यासहि सर्वांगी शिक्षणाची सोय करण्यासाठीं कॉंग्रेसनें असहकारितेचा ठराव १९२० त पास झाल्यानंतर यशस्वी प्रयत्न केला, त्यावरून राष्ट्रीय शिक्षणाच्या आवश्यकतेच्या जाणीवेची कल्पना येईल. गुजराथ विद्यापिठ व टिळक विद्यापिठ स्थापन करण्यानें ह्या देशांत राष्ट्रीय शिक्षणाचा पाया घालण्यांत आला आहे. ह्या पिठाच्या विद्यमानें चालणारीं प्राथमिक, दुय्यम व वरिष्ठ शिक्षणाचीं विद्यालयें,जीं दोन तीन वर्षांपूर्वी चालत होतीं तेवढ्या जोमानें आज चालत नसलीं किंवा त्यांपैकीं कांहीं निरुपायास्तव उद्यां बंद करावीं लागलीं तरी तीं उघडण्यांत दिसून आलेलें धैर्य व उत्साह ह्यांचें महत्व कमी होत नाहीं; ज्या अशक्य परिस्थितींत तीं उघडण्यांत आलीं, ज्या उदात्त ध्येयासाठीं व ज्या स्फूर्तीमुळें तीं चालविणें शक्य झालें त्या सर्वांचा विचार केल्यास, राष्ट्रानें स्वातंत्र्यासाठीं केलेल्या प्रयत्नांत किती प्रगति झाली हें कळून येईल. राष्ट्रीय शिक्षणसंस्थांचें महत्व त्या सरकारीसंस्थांबरोबर स्पर्धा करण्यासाठीं उभारलेल्या आहेत म्हणून प्रस्थापित होत नाहीं; राष्ट्रीय शिक्षणाच्या तत्वांत स्पर्धेची कल्पनाच अस्तित्वांत नाहीं. राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें योग्य व उपयुक्त असें शिक्षण देण्याचा राष्ट्रीय शिक्षणाचा उद्देश आहे व राष्ट्रीय शिक्षण संस्थांतील शिक्षणपद्धति हा उद्देश डोळ्यांसमोर ठेऊन आंखण्यांत आलेली आहे. सबंध शिक्षणाचा प्रश्न हा एक वादग्रस्त प्रश्न आहे. व त्याचा समाधानकारक निकाल लागण्याच्या मार्गांत बऱ्याचशा अडचणी आहेत. आज कोणत्याहि देशांतील विशिष्ट शिक्षण–पद्धति निर्दोष अशी नाहीं. त्यांत सुधारणेला वाव आहे. परंतु हिंदुस्थानांतील शिक्षणपद्धति एवढी सदोष व एकांगी शिक्षणपद्धति जगांत कोठेंहि आढळणार नाहीं. परकीयानीं आपली राजसत्ता चिरस्थायी करण्यासाठीं व हें राष्ट्र नेहमींच गुलामगिरींत रहावें ह्या उद्देशानें स्थापलेल्या शिक्षणसंस्थांत सुधारणा होणें ब्रिटिशांच्या आर्थिक फायद्यास अनुकूल नसल्यानें सरकारी संस्थांत सुधारणेचे प्रयोग होणें सोडाच पण त्यांतील उघडउघड दोष नाहींसे होणें किंवा करणें अशक्य आहे. म्हणून राष्ट्रीय संस्थांतील शिक्षणक्रम आज जरी पूर्ण नसला तरी त्यांत आमच्या उन्नतीला पोषक अशाच गोष्टींचा भरणा असल्यानें सरकारी संस्थांतील शिक्षणक्रमापेक्षां लाखों पटीनीं चांगला आहे.

कॉंग्रेसचा संबंध असलेल्या वेगवेगळ्या ठिकाणच्या व मुंबईतील मराठी व गुजराथी राष्ट्रीय शाळा, इंग्रजी महाविद्यालय व मेडिकल कॉलेज ह्या संस्था राष्ट्रीय शिक्षणाच्या तत्वावर चालविण्यांत आलेल्या आहेत; त्यांतील शिक्षणक्रम त्या तत्वास अनुसरणारा असाच आहे. परंतु त्याचा फायदा घेणें, सरकारी शिक्षण संस्थांचा तिटकारा वाटत असतांहि, सर्वांनाच शक्य होत नाहीं. सध्याच्या आर्थिक स्थितींत साधारण तरुण माणसास राष्ट्रीय विद्यापिठाचा पदवीधर होऊन स्वतःच्या व कुटुंबाच्या उदरनिर्वाहाच्या शक्याशक्यतेवर अवलंबून रहाण्यापेक्षां जास्त सुरक्षिततेचा मार्ग अवलंबावा लागतो. हा त्याचा दोष नाहीं; हा राष्ट्रीय शिक्षणाचाहि दोष नाहीं. जोंपर्यंत आपल्या आजूबाजूची प्रतिकूल परिस्थिति बदलली जाणार नाहीं; जोंपर्यंत हिंदुस्थानचें सरकार राष्ट्रीय सरकार होणार नाहीं, तोंपर्यंत राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार व्हावयास पाहिजे तेवढ्या प्रमाणावर होणार नाहीं. ती विशिष्ट स्थिति उत्पन्न करण्यासाठीं राष्ट्रीय सभेनें प्रयत्न चालविलेला आहे; राष्ट्रीय शिक्षण हा या प्रयत्नाचा एक भाग आहे. राष्ट्रीय शिक्षण कार्याची मर्यादा आज आकुंचित असली तरी तें कार्य चालविण्यानें अत्यंत जरुरीच्या राष्ट्रीय जागृतीच्या कार्यास मदत होणार आहे. परंतु राष्ट्रीय शिक्षणाच्या बाबतींत पुरुषांना नसलें तरी स्त्रियांना बरेंच काम करतां येईल. त्यांच्या सुदैवानें किंवा दुर्दैवानें आमच्या सामाजिक व्यवस्थेंत स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य नाहीं; त्यांना उपजीविकेसाठीं पुरुषांप्रमाणें कोणताच व्यवसाय करण्याची जरुरी वाटत नसते. निदान अशा स्त्रियांनीं राष्ट्रीय संस्थांतूनशिक्षण घेतल्यास त्यांना योग्य व त्यांच्या कर्तव्यांतून उत्तम रीतीनें पार पडण्यास मदत करणारें असें शिक्षण मिळून प्रसंग आल्यास परावलंबनहि टाळतां येईल. मुंबईत उच्च शिक्षण संपादन करण्याची सोय पुरुषांबरोबर कॉलेजांत करण्यांत आली आहे. प्राथमिक व दुय्यम शिक्षणाकरितां त्यांनीं श्री लोकमान्य राष्ट्रीय कन्या शाळेसारख्यासंस्थेचा उपयोग करतां येईल. ह्या शाळेंत देण्यांत येत असलेलें शिक्षण सरकारी, निम सरकारी किंवा सरकारनें मंजूर केलेल्या संस्थांत मिळणाऱ्या शिक्षणाहून किती उच्च प्रकारचें असतें हें कळण्यासाठीं त्यांतील शिक्षणक्रमाचें थोडक्यांत वर्णन करणें अप्रस्तुत होणार नाहीं. ह्या शाळेंतील शिक्षण पद्धतीकडे पहातां स्त्री शिक्षणाची आदर्श संस्था कशी असावी ह्याची चांगलीच कल्पना येईल; हिंदुस्थानांत स्त्रीशिक्षण यशस्वी, उपयुक्त व लोकप्रिय करावयाचें असल्यास ह्या संस्थेसारख्या संस्था उघडून त्याचा प्रसार व्हावयास पाहिजे.

ह्या शाळेची स्थापना २२ जून १९२१ रोजीं म. गांधींच्या हस्तें करण्यांत आली व लो. टिळकांची स्मृति कायम राखण्यासाठीं तिला त्यांचें नाव देण्यांत आलें. शाळा उघडण्यास मुंबईच्या कांहीं गुजराथी व्यापाऱ्यांनीं २२००० रु.ची सुरवातीस मोठ्या औदार्यानें मदत केली असून तिला जागेच्या रूपानें नंतर वेळोवेळीं ह्याच वर्गानें मदत केलेली आहे; सध्या तिची व्यवस्था स्वराज्य सभेमार्फत पहाण्यांत येत असून ती चालविण्याची सर्व जबाबदारी श्रीमती कृष्णाबाई तुळसकर प्रिन्सिपॉल, यांच्यावर सोंपविलेली आहे व गेलीं तीन वर्षें ती उत्कृष्ट रीतीनें चालविल्याचें बरें चसें श्रेयहि अडचणींस न जुमानणाऱ्या त्यांच्या एकनिष्ट कर्तृत्वास दिलें पाहिजे. श्री. तुळसकर अमेरिकेंतील कोलंबिया युनिव्हर्सिटीच्या एम. ए. आहेत. त्यांच्यासारख्या पदवीधर स्त्रीनें सरकारी नोकरीच्या आमिषास बळी न पडतां ह्या शाळेच्या चालकत्वाचें जबाबदारीचें निःस्वार्थी काम पत्करावें ह्याचें खरोखर कौतुक केल्याखेरीज राहवत नाहीं. विशेषतः ह्या दिवसांत कॉंग्रेससारख्या संस्थेच्या आंतील कारभाराच्या स्वरूपाची ज्यांना ओळख आहे, त्यानांच श्री. तुळसकरांच्या स्वार्थत्यागाची खरी किंमत कळेल. शाळेंत गुजराथी व मराठी असे दोन विभाग असून मॅट्रीकपर्यंतचा अभ्यासक्रम १० वर्षांचा आहे. सर्व मुख्य विषय मातृभाषेंत शिकविले जाऊन त्या त्या विषयांत अपुरेपणा किंवा दोष रहाणार नाहींत अशा प्रकारची काळजी क्रमिक पुस्तकांच्या व इतर बाबतींत घेण्यांत येते. इंग्रजी दुसरी भाषा म्हणून शिकविण्यांत येते. हिंदी चांगलें समजतां व बोलतां येईल, एवढें ज्ञान करून देण्यांत येतें. शास्त्रीय संगीत शिकविण्याची व्यवस्था केली असून तो विषय शिकविण्यासाठीं येथील गांधर्वमहाविद्यालयांतील प्रो. पटवर्धन यांची नेमणूक झालेली आहे. घरगुती धंद्यांपैकीं, सूत

Ano 9 N.º 28

Quinta-feira 9 de Outubro de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
Por cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegde Dessay
Quepém-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक २८

गुरुवार ता. ९ अक्टोबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें-गोवा

PENSAMENTOS DUM DESVAIRADO

O' India, tu que foste o bergo da civilisagao e epitome de todo o mundo o enlevo de poetas nac onais e estrangeiros, que possuias, a par de uma in finidade de cidades histo'ricas, ouro e outras preciosidades, uma nagao cujo espirito audaz cortava com o voo langoroso espagos ignotos no momento em que o resto do mundo dormitava na sua letargia de obscurantisimo, a nagao nobre de filosofos na expressao de Max Muller, descendente dum povo o mais valente que espalhou par o mundo inteiro a sua lingua e litera tura, a sua sciencia e arte e ainda as suas leis!

O' India, seres tu governada por um povo idolo,esmagado sob um prin cipio que em nada se conforma com o que tens por alvo! Tu, esse filtro de poesia e be'esa de quem o amor e mo ral constituem o verdadeiro e unico apanagio, s.res governada por entes subjugados por materialismo e violen cia organisados! Compares o divorcio da civilisagao ocidental, infanticidios frequentes, prostituigao clandest na abortos vulgares, dangas, matine'es, e todas essas patranhas de disparates que se praticam em nome da civilisa gao, com o teu amor, a tua moral, a SATI que hoje todos combatem, mas que continua a ser ainda uma prova do acrisolado amor que no coragao da mulher indiana germina raiz.s tam ar raigadas que procura ate' acompanhar o marido para o alem tumulo, a candura, a castidade e o pudor, e essa pedra triangular em que se assenta a dignidade de mulher indiana, o respei to que o filho tributa ao pai, e tanta coisa que orna a tua grandeza e mag nificencia...Mas onde foram agora to dos teus sagrados principios, a beles de outros tempos, os usos e custumes tam belos e tam singelos que passam de admiraveis a's nagoes entregues a' cultura?

O' India, todo esse manancial de quanto tinha de mais belo e sublime foi ja' derrubado por um povo fer z e dogmatico que acaba de te violar e co nspurcar com a influencia duma civilisagao nova, uma civilisagao corrup e superficial, a civilisagao ocidental. Tu propria acabas de ser...ocidentali sada!!!

ECOS & CRITICA

UMA DISCRIGAO HIPERMINUNCIOSA

Em *A Provincia* de 22 de setembro lê-se o seguinte *Conto Relampago*:

"O sr. alferes Duarte fracturou um braço, resultado da queda de um cavalo.

O animal seguia a trote pela estrada de Ribandar. Encontrando um automovel assustou-se e passou rapidamente de trote a galope, sendo com dificuldade que o sr. alferes Duarte conseguiu evitar que um individuo de idade fosse atropelado já perto da igreja de Ribandar.

A barbela desprendeu-se, e o animal passou a galopar livremente, sendo com muito custo que o sr. alferes Duarte destribado de um dos lados, se aguentava.

Ao passar junto de um prestito funebre o animal deu de repente um salto, e o sr. alferes Duarte, caiu indo bater com o corpo de encontro a uma escada, ferindo-se na cabeça e quebrando um braço."

O India, tu e's grande, infinitamente grande! mae fecunda dum povo cujos p e n s a m e n t o s irradiam ate' ao infinito, os seus claroes to dos cheios de Moral, todos aromatisados de sublimidade, todos carrega dos de verbo fluente de eloquencia! Tu tens posto a' evidencia bradando alto e bom som a imperfeigao de materia ante o espirito. Rompe, pois, esses ferros que te prendem os ocidentais e entra de novo no concerto de nagoes que tem diante de se um pro blema a solucionar, um destino a pre encher. Ou entao, se te julgares alquebrada com a fadiga do delirio ma vale que precipites ao abismo e acabes o ciclo da existencia, que eu tarei ta', a' beira do teu tumulo a desfolhar um punhado de goivos sobre a tua campa, dizendo como todos REQUISCAT IN PACEM:

S. R.

E esqueceu-se *A provincia* de um detalhe importante: que o prestito funebro com que o sr. Duarte topou foi na ponte de Linhares, e a queda desastrada foi aquem da casa do dr. Mota, medico do Hospital. Portanto a causa da queda não foi o prestito funebre. E ensine depois lições de escrupulo e exactidão aos outros jornais! E nós a supormos que a discrição era do *Heraldo* do dr. A M. da Cunha!

SUSPENSAO DOS JORNAIS

A proposito da suspensão em Lisboa, dos jornais: *A Patria*, *A Vanguarda*, *O País*, *A República*, *O Radical* e *O Jornal* diz *A Provincia* que foi consequencia das dificuldades financeiras das respectivas emprezas." Batalha amigo! Quem lhe mandou essas informações? Mas só estes jornais ficariam afectados com a carestia do papel, tinta e mais apreстos da imprensa? E que é doutros jornais que dão emprezas ainda mais fracas do que as dos suspensos?

Para mais todos os suspensos são jornais retintamente republicanos ... Aqui é que está o *busilis*. Informe-se melhor, Batalha do coração! E não meta o seu nariz respeitavel, oudo não é chamado!

PALAVRAS QUE NAO SE PERDEM...

O delegado da India Portuguesa, Roberto Bruto da Costa, escreve para o seu jornal um artigo interessante sob a epigrafe *Conversando*...do qual extraimos o seguinte trecho que vale oiro, porque é dele:

"E, após uma laboriosa pesquisa, apuramos que o projecto A. dormia profundamente na gaveta do sr. Fulano, ilustre vogal do Conselho Colonial, á espera de que sua excia se resolve-se a dar o seu parecer; que o projecto B. tinha já nada menos de uma duzia de apensos com informação, pró e contra, de outras tantas entidades, desde o Chefe da Repartição até ao amanuense, e todavia ficara incompleto porque lhe faltava o luminoso parecer não sabemos de quem, talvez do erudito continuo do sr. Ministro, que é uma figura imponente e simpatica e em inteligencia fica de certo superior a muitos ministros cerebralmente esvasiados e a cuja passagem pelo gabinete êle tem cerimoniosamente saudado com um sorriso desdenhoso e irónico; que o projecto C. está *encravado* na pasta de um chefe da secção, porque mão misteriosa lhe lançou á margem, a lapis azul, a seguinte nota preventiva: *este projecto visa a excluir o elemento europeu do quadro respectivo*."

O italico é do autor do artigo Não anotamos, não comentamos...porque tudo, tudo absolutamente inutil!...

As ultimas palavras então falam bem alto, muito alto e é bom que o sr. Pereira Batalha as atarrache fortemente ao nó de sua memória!

LAMENTAÇOES ROBERTACEAS...

Leiam, leitores amigos, a lamentação do Jeremias, dizemos mal, do Conselheiro, negociante, representante das forças vivas etc. sr. Roberto:

E', rialmente, triste que os processos de sapa e mexerico prevaleçam tão triunfantemente no Terreiro do Paço onde a par de funcionarios madraços e neurastenizados no ambiente empostado em que vivem, existem tambem funcionarios inteligentes e competentissi-

मात्र 'डिलीव्हरी घेतानां मालधन्यानें चोरीचा प्रकार कंपनीच्या नोकराचे नजरेस आणला पाहिजे' अशी एक शर्त यांत घातली आहे. आग, थांबल्या गाडींतील चोरी अगर इतर एकादी अकल्पित गोष्ट अथवा अपघात घडला तर पूर्वी कंपनीवर मुळींच जोखम नसे. आतां हे शब्द काढून त्या ऐवजीं आग व गाडीस अपघात असे शब्द घातले आहेत व ह्यामुळें नुकसान झालें तर तें नुकसान कसें झालें हें मालधन्यास दाखविण्याचा बोजा कंपनीवर नाहीं. 'बी' रिस्कनोट असली ह्मणजे पूर्वी अंशतः होणाऱ्या नुकसानीचा (Partial..shortage) दावा करतां येत नसे व ह्यामुळें गुळाच्या भेल्यांची निव्वळ धुडकी मिळाली किंवा धान्य जाऊन निव्वळ पोतें हातांत आलें तरी त्याबद्दल मूग गिळून व्यापाऱ्यास गप्प बसावें लागे ! हल्लीं हें नुकसान कंपनीच्या नोकरांच्या गैरशिस्त वर्तनामुळें झालें असे कंपनीच्या पुराव्यावरूनच योग्य रीतीनें जर अनुमानीत होत असेल तर अशा अंशत: नुकसानीचाहि दावा लागू होऊं शकेल. कोर्टासमोर आलेल्या वस्तुस्थितीवरून कंपनीच्या नोकरांच्या गैरवर्तनाबद्दल अनुमान काढतां येणार नाहीं. अशा वेळींच वादीनें त्यांच्या गैरवर्तनाचा पुरावा केला पाहिजे अशी सवलत नवीन नमुन्यांत आहे. बी रिस्कनोट भरून घेताना पॅकिंग कसें होतें व गैरे शेरा कंपनीच्या नोकरानें तीवर मारावा असाहि नियम केला आहे.

'बी' प्रमाणेंच 'एच' रिस्कनोटमध्यें सुधारणा झाली आहे. पण ह्या सुधारणांचा फायदा घ्यावयाचा असेल तर व्यापाऱ्यांनीं हि जास्त काळजीनें माल पाठविण्यास शिकलें पाहिजे व डिलिव्हरी घेतानांहि खबरदारी ठेविली पाहिजे. गुळाची प्रत्येक भेली किंवा तेला तुपाचा प्रत्येक डबा किंवा धान्याचें प्रत्येक पोतें अगर कापडाची किंवा कापसाची प्रत्येक गांठ ह्यावर आपलें नांव निशाणी घातली पाहिजे व हातानें सहज निघेल असें पॅकिंग करतां कामा नये. तसेंच मालाचें डिलिव्हरी घेतांना झालेलें नुकसान कंपनीच्या नोकरांचे नजरेस आणलें पाहिजे.

प्रागतिक संघ व गोवा हिंदु मंडळ

गुदस्तच्या डिसेंबरांत या राजकीय म्हणविल्या जाणाऱ्या संस्थांच्या परिषदेंत किती तरी ठराव पास झाले होते. परंतु हे सभेंत पास झालेले ठराव सरकारकडून कोणत्या रीतीनें निकालांत काढले गेले व या कार्यार्थ नेमिले ल्या कमिशन मंडळाचा त्यासाठीं कितीसा प्रयत्न झाला, याची माहिती आतां २च्या डिसेंबरांत २ च्या सालच्या परिषदा जवळ येत चालल्या तरी अद्याप कळत नसल्यानें लोक साशंक आहेत. तेव्हां त्यांनीं आपापल्या कामाचा त्रोटक रिपोर्ट वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध करून लोकांस आपल्या कार्याची माहिती द्यावी अशी माझी सूचना आहे.

आ. नम्र,
एक गोमांतकीय

भारताची भालाफेंक

फेंकणार–निःपक्षपाती

आमची पुण्यनगरी ह्मटली कीं, अलम दुनियेंत असलेल्या नसलेल्या सर्व पक्षांचें माहेर घर. तेथें मवाळ आहेत, जहाल आहेत, फेरवाले आहेत, नाफेरवाले आहेत, सुधारक आहेत, उद्धारक आहेत, सत्यशोधक आहेत, गचाळ आहेत व टवाळहि आहेत. या सर्व पक्षांच्या फोफाट्यांतून एखादी सार्वजनिक हिताची बाब पार पडणें केवळ अशक्यच. पण परिस्थितीचा फेरबदल होतांच जगांत अशक्य कोटींत गणल्या जाणाऱ्या गोष्टींहि कशा चुटकीसरशीं शक्यतेच्या आवारांत येतात ह्याचें उदाहरण पहावयाचें असल्यास परवां तेथें रेमार्केटच्या मैदानांत भरलेल्या सभेकडे लक्ष देणें अवश्य आहे. ही सभा ता. २३ रोजीं शंकरराव लवाट्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती; व तिला पुण्यांतील सर्व पक्षांचे निमंत्रित पुढारी हजर होते. स्वपराक्रमाच्या बळावर स्वातंत्र्यपक्षाच्या धुरीणत्वास पोंहोचलेल्या प्रो. परांजप्यानीं जेव्हां आपल्या रसाळवाणींत 'हिंदुमुसलमानाची एकी प्रस्थापित करण्याचा व महात्माजीनां उपवासाचें उद्यापन करण्याविषयीं विनंति करण्याचा' ठराव सभेपुढें मांडला तेव्हां प्रत्येक पक्षाच्या पुढाऱ्यांचें त्यावर अनुकूल असें भाषण होऊन तो महत्वाचा ठराव एकमतानें पसार झाल्याचें जाहीर झालें. पुण्यनगरींत आजपर्यंत भरलेल्या सर्व सभांत सुवासमाधानानें तंट्याभांडणाशिवाय पार पडलेली ही एकच नमूनेदार सभा होय. रण ह्या सभेंत विशेष मजा ती हीच कीं, प्रो.परांजप्यांस एके वेळीं परान्नपें ह्या कपोलकल्पित कडु नावांनें संबोधणारे कलम बहाद्दर त्यांचीच कालाचा अजब तडाखाबसतांच आज भरजोर स्तुति करूं लागले ! कालाय तस्मै नमः!

\+ + +

कोणी कांहींहि ह्मणो, स्वराज्यपक्षानें महात्माजींच्या जयजयकारांत जो कायदे कौंसिलांत पाय ठेवला त्याचें त्यांनीं होतां होईल तो हंसें होऊं दिलें नाहीं ही गोष्ट कोणालाहि आपल्या डोळ्यां पुढून काढून टांकतां येणार नाहीं. स्वराजिष्ट परांच्या मऊ गाद्यागिरद्यांनां भुलले नाहींत, लांचलुचपतीस लाळचावून बसले नाहींत, कीं त्यांना मानमरातबाचा मोह सुटला नाहीं. महात्माजींच्या अतुल स्वार्थत्यागाच्या भयंकर दिव्यांतून पार पडून पवित्रतम बनलेल्या खादीचें वेष्टन डोक्यांस असतां कोणत्या नादान नराधमाला स्वतःचा सैतानी स्वार्थ सुटेल? पण सुराज्येच्छु स्वराज्यपक्षानें तर सर्वत्र बहारच उडवून दिली. जेव्हां त्यांना नोकरशाहीचा पाडाव करणें इष्ट व शक्य पडे तेव्हां तेव्हां त्यांनीं सरकारला हिंदुस्थानचा कारभार कसा हांकावयाचा हें शिकविल्याशिवाय सोडलें नाहीं. असेंब्लींत जेव्हां त्यांना स्वपक्षाच्या बहुमताचा अभाव भासला, तेव्हां त्यानीं जरा नमतें घेऊन असेंब्लींतील स्वतंत्र पक्षाला आपलेंसें करून घेतलें व हिंदुस्थानची प्रजा ही केवळ मेंढरीं व वरिष्ट युरोपियन अधिकारी हे त्यास वळविणारे मेंढपाळ आहेत अशी आज कित्येक वर्षे होऊन बसलेली परकीयांची समजूत फोल ठरविली. प्रतिपक्षाचा पुरा पाडाव करून हा पक्ष त्याच्या छातीवर बसला. व त्यानें भीषण सिंह गर्जना करून सर्व जगाला जाहीर केलें कीं "आजपर्यंत निद्रितावस्थेंत घोरत पडलेला हिंदुस्थान आज पूर्णपणें जागा झाला आहे ह्या जाग्या केसरीला दुखविण्याचा यत्किंचितहि प्रयत्न जर तुह्मांकडून होईल तर त्याचा घोर परिणाम आपणास भोगावा लागेल. ह्या पुढें हिंदुस्थान आकाशांतल्या देवशापानें आपल्या पृथ्वीवरील पुत्रास खुपाल चरण्याकरितां केलेलें एक कुरण न राहतां जगांतील इतर राष्ट्राच्या बरोबरीचें एक राष्ट्रच राहील. शाबास ! भलेगाजी ! चिरायु भव!

× + ×

जगांतील प्रत्येक मनुष्याप्रमाणें राष्ट्रालाहि महत्वाकांक्षा अत्यंत आवश्यक आहे; इतकेंच नव्हे तर तीजशिवाय कोणत्याहि राष्ट्राचें राष्ट्रीयत्व स्थापन होऊं शकत नाहीं. आतां ती महत्वाकांक्षा राक्षसी लालसेच्या कक्षेंत न उतरूं देणें हें प्रत्येक उदयगामी राष्ट्राचें कर्तव्य आहे ही गोष्ट निराळी. इजिप्त व इंग्लंड या दोन्हीं राष्ट्रांचा सुदान विषयीं सध्या चाललेला लढा ह्मणजे त्या दोन्हीं राष्ट्राच्या वाढत्या महत्वाकांक्षेचें एक उत्कृष्ट उदाहरण होय ! हा लढा सुदान देशावर इंग्लंडची सत्ता रहावी कीं इजिप्तचा अधिकार असावा ह्याविषयीं परस्परामध्यें सध्या चालला असून इजिप्तचे पुढारी झगलुलपाशा त्या बाबतींत तडजोड सुचविण्याकरितां इंग्लंडचें मुख्य मंत्री रॅम्से मॅक्डोनोल्डची मुलाखत घेण्याच्या गडबडींत सध्या आहेत. पण सुदानच्या बाबतींत आपलें असलेलें 'खंबीरपणाचें धोरण' बदलण्यास आज इंग्लंड एक तसूभरहि तयार नाहीं. त्या दोघां मुत्सद्यांच्या भेटीचा निष्कर्ष काय निघणार तो निराळा; ह्या दोन्ही राष्ट्रांना सुदानच्या सत्तेची हांव कां सुटावी हा प्रश्न मोठा मजेदार आहे. इंग्लंडची सुदान सरकारकडे आज एक कोटी दहा लक्ष पौंड बाकी निघत आहे व मकवारचें धरण बांधल्यास होणारी कापसाची लागवड इंग्लंडला जपान, अमेरिकेशीं हवी तशी स्पर्धा Compitition मांडण्यास बरीच मदत करणार आहे. आतां इजिप्तनें सुदानचा अधिकार सोडल्यास मकवारचें धरण बांधलें जाईल व त्यानें नाईल नदीस महापूर येऊन इजिप्तचें कापसाचें पीक बुडून जाईल. ह्याच कारणानें तीं दोन्हीं राष्ट्रें सुदानचा अधिकार सुखासुखी सोडल्यास ती आपली राजकारणांतील घोडचूक political blunder होईल ह्मणून भीत आहेत. पण सुदानने तरी ह्या दोन्हीं शिरजोर सत्ता पार फेंकून देऊन स्वतःचें स्वातंत्र्य कां प्रस्थापित करूं नये? स्वभावो दुरति क्रमः

—काशीचे प्रख्यात पुढारी बाबु शिवप्रसाद गुप्त यांनीं आपल्या भावाच्या स्मरणार्थ दहा लक्ष रुपये किंमतीची मिळकत ट्रस्टच्या ताब्यांत दिली आहे. या मिळकतीच्या व्याजांतून बिन-सरकारी शाळांत भाषाविषय व यांत्रिक शिक्षण यांना मदत करावयाची आहे.

साभार स्वीकार

ब्राह्मण–अब्राह्मण–बोधः— इसलामपूर (सातारा) येथें प्रसिद्ध होत असलेल्या "ब्राह्मण-मासिक-पत्रिके"च्या विद्वान संपादकानीं–वा० दा० मुंडले–यानीं प्रस्तुत पुस्तक प्रकाशित करून ब्राह्मण्यसेवेचें पुण्य जोडलें आहे, यांत संशय नाहीं. ब्राह्मण व ब्राह्मण्य यांवर उठल्यासुटल्या यथेच्छ तोंडसुख घेणारे, नाना दुरुत्तरांनीं वेळीं अवेळीं ब्राह्मणाचीं मनें दुखविण्यास न कचरणारे व खुद्द हिंदुस्थानच्या अवनतीचें खापर ब्राह्मणाच्या डोक्यावर फोडण्यांत समाधान मानणारे इ० लोक जर सदरील ग्रंथ निर्विकार चित्तानें वाचून, त्यांतील विचारांचें मनन करतील, तर त्यांचे बरेच गैरसमज दूर होण्याचा संभव आहे. ब्राह्मण अब्राह्मण हा विषय वादग्रस्त असून, तो कोणालाहि सहज, शास्त्रग्रंथांच्या भरीव अध्ययनाखेरीज, आकलन होणें शक्य नाहीं, हें उघड आहे. अशा या कठिण व नाजूक विषयावर मुंडले यानां आपले लेख तयार करण्यास किती परिश्रम पडले असतील, याचीं वाचकानींच कल्पना करावी. दामोदर विश्वनाथ गोखले, शंकर दत्तात्रेय जावडेकर, महादेव राजाराम बोडस, महादेव शास्त्री दिवेकर, रामचंद्र पांडुरंग वैद्य [गोवा] व एक समाजसुधारक इ० लेखकांचेहि लेख प्रस्तुत पुस्तकात झळकत असून, 'बोधां'तील हे व इतर सर्व लेख पूर्वी 'पत्रिकें'त छापले गेले होते, असें त्याच्या एकदर रोखावरून स्पष्ट सिद्ध होतें. ब्राह्मण ह्मणजे काय, ब्राह्मण्याचा काय अर्थ होतो, या गोष्टींचा ज्यांना बोध करून घेण्याची इच्छा असेल, त्यानीं निदान एकदां तरी मुंडले यांचा हा ग्रंथ वाचावा, अशी आमची शिफारस आहे. पुस्तकाची किंमत अवघी २ रु. असून, "वा० दा० मुंडले, पोष्ट इसलामपूर, (सातारा)" या पत्त्यावर लिहिलें असतां तें मिळेल.

क्याटलॉगः— मुंबई स्वदेशी स्टोअर्सचा क्याटलॉग आह्मीं समग्र अवलोकन केला. त्यांतील माहितीवरून हिंदुस्थानांत किती उत्तम प्रकारच्या मालाची निपज होत असते, हें सहज कळून येतें. स्वदेशी मालाला नाकें मुरडणारांनीं हा क्याटलॉग पाहून, आपल्या विलयती चोचल्यानां आळा घालण्याचा प्रयत्न करावा अशी आमची त्यांना सूचना आहे. स्वदेशी मालाला उत्तेजन देण्याचा हा समय असल्यानें, ते आमच्या सदिच्छेचा कानाडोळा करणार नाहींत अशी उमेद आहे.

बेळगांव राष्ट्रीय सभेच्या कार्यकारी मंडळास प्रेमाची विनंति

येत्या बेळगांव कॉंग्रेसच्या प्रेक्षकांकरितां तिकीट चार्ज तीस रुपये ठेवल्याचें वर्तमान 'भारत' पत्रावरून वाचकांस कळलेंच असेल बेळगांवची कॉंग्रेस, यंदां अनेक दृष्टींनीं अद्भूत होणार आहे, ह्यांत संशय नाहीं; पण ह्या सर्व अद्भूतपणांत जर अत्यंत अद्भूत अशी एखादी गोष्ट असेल तर ती प्रेक्षकांसाठी तीस रुपये फी ठेऊन हजारो रुपये उत्पन्न करणें ही होय. अद्भूत रसाची ह्या एका गोष्टींत कमाल झालेली आहे आणि यापुढें दुसरी कितीहि आश्चर्यकारक गोष्ट घडली तरी तिला ह्या गोष्टीची सर कधींहि येणार नाहीं.

पण त्याबद्दल कॉंग्रेसला नांवें ठेवायास आह्मीं तयार नाहींत. व ज्यांच्या हातांत बेळगांव कॉंग्रेसचीं सूत्रें आहेत त्यांच्या संबंधानेंहि आह्मांस वाईट हेतूचा आरोप करावयाचा नाहीं. सार्वजनिक काम ही पैशांचीं असतात. व पैशांच्याच जिवावर तीं चालावयाचीं असतात. तेव्हां यंदां लोकांत कॉंग्रेसे संबंधानें उत्पन्न झालेल्या विलक्षण जिज्ञासेचा फायदा घेऊन कॉंग्रेसनें प्रेक्षकांचें तिकीट जर पन्नास रुपये ठेवलें तर तें स्वाभाविक पणाचेंच झालें, असें ह्मणावें लागेल. मात्र ह्या स्वाभाविक पणाबरोबर ज्या आणखी कित्येक गोष्टींचा कॉंग्रेसनें विचार करावयास पाहिजे, त्या गोष्टी लोकांच्या वतीनें कॉंग्रेससमोर मांडणें, हें आह्मीं आमचें कर्तव्य समजतों. आणि ह्मणूनच कॉंग्रेसच्या व्यवस्थापकांविषयीं मनांत पूर्ण आदर बाळगून आह्मीं त्या गोष्टींचा येथें निर्देश करीत आहोंत.

पहिली गोष्ट ही कीं, कॉंग्रेसला प्रेक्षक ह्मणून येणें किंवा कॉंग्रेसमध्यें काम चाललेलें प्रत्यक्ष पहाण्याची इच्छा करणें कोणत्याहि प्रकारें गुन्हा नाहीं. कॉंग्रेसमध्यें कांहीं गोष्टी गुप्त चर्चेच्या असतात व सर्वेच राजकारण चवाट्यावर नेऊन उघडें केल्यास त्यांत गूजहि रहात नाहीं. तथापि अशा चर्चेच्या ज्या गोष्टी असतात, व जेथें सामान्य जनतेनें न येणें योग्य असतें, त्या करितां ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी किंवा विषय नियामक कमिट्या ह्या असतात! पण त्या चर्चेतून राजकीय प्रश्न तावून सुलाखून निघाल्यानंतर त्या वरील नाविन्य पहाण्याची जनतेनें पहाणें हा जनतेचा हक्कच आहे व त्यासाठीं जनतेस येऊं देणें हें कॉंग्रेसचें कर्तव्य आहे पण पार्लमेंट सभेंतसुद्धां ह्या सारख्या प्रसंगीं कोणालाहि मज्जाव करण्यांत येत नाहीं. कॉंग्रेसनें हें उदाहरण लक्षांत ठेवायाला नको काय?

दुसरी गोष्ट अशी आहे कीं, लोकांच्या उत्सुकतेचा फायदा घेऊन त्यांवर पैसा कमावणें हें व्यापारी पेशांत सुद्धां अयोग्य समजलें जातें. 'नफाबाजी' हें असल्याच वर्तनास नाव आहे. असल्या वर्तनाचा धडा बेळगांवच्या सुज्ञाण कार्यकर्त्यांनीं घालूं नये. कारण कॉंग्रेसला पैसा द्यावयाला लोक केव्हांहि [illegible]

गांधीच्या हुकमाबरोबर मर्गो केल्याचीं पेपरे दिलेले आहेत. तेव्हां ही इतकी अभिमानास्पद गोष्ट कॉंग्रेसला माहीत असतां व देशबांधवांच्या सदिच्छेचें एवढें रम्य उदाहरण समोर असतां नफेबाजीच्या अप्रत्यक्ष ग्राम्य उपायाचा कॉंग्रेसनें आश्रय करावा हें चांगलें नाहीं. गरीब लोकांकरितां निराळीं व्यवस्था ठरविण्यांत येणार आहेत, असाहि एक मुद्दा या संबंधानें सांगण्यांत येतो; पण कॉंग्रेसमध्यें कोण काय बोलतात व कोणाच्या प्रतिपादनाचा कसा परिणाम होतो, हें पाहण्याची लोकांची उत्सुकता असल्या व्यवस्थेमुळें भागणें शक्य नाहीं, हें उघड आहे. कॉंग्रेस प्रत्यक्ष पाहूं देण्यांत एक महत्वाचें राजकीय शिक्षणहि लोकांस मिळत असतें तें मिळूं देण्याचीं द्वारें बंद करणें हें लोकशिक्षणाच्या दृष्टीनें अतिशय घातक आहे.

शेवटीं एक नाजूक गोष्टीचा आह्मांस भितभित उच्चार करावयाचा आहे, व त्याबद्दल कॉंग्रेस कमिटीचे अधिकारी आपला गैरसमज करून घेणार नाहींत अशी आह्मांस आशा आहे. ती नाजूक गोष्ट ही कीं, आमचा महाराष्ट्रीय समाज इतर समाजापेक्षां आणि गोमांतकीय हिंदुसमाज त्याहिपेक्षां निर्धन आहे इतर समाजांना जी गोष्ट सहज वाटते ती महाराष्ट्रीय समाजास तशी वाटत नाहीं. ती त्यास पर्वतप्राय वाटते. यद्यपि ३० रुपये हा प्रेक्षकांकरितां सर्वांत हलका दर ह्मणून जरी ठेवलेला असला तथापि तो आमच्या गोमांतकीय बांधवांस अत्यंत जड आहे. शिवाय प्रवासखर्चास आणखी तीस रुपये खर्च करणें ही जिवावरची गोष्ट आहे. करितां ह्या अमोल्य संधीचा फायदा परप्रांतीय स्वजनांस मिळवून देण्यासाठीं सदरील तिकीटें ठेवण्याचा विचार टाकून देऊन प्रेक्षकांसाठीं नेहमीचीच फी ठेवावी, किंबहुना मोठ्या आतुरतेनें येणाऱ्या गोमांतकीय तरुणाकरितां सवलतीचे तरी दर ठरवावेत अशी त्यांना आमची प्रेमाची विनंति आहे. कारण अनेक प्रांतीय प्रमुख पुढाऱ्यांचें दर्शन घेण्यास व प्रियतम भूमातेच्या उद्धारार्थ चाललेल्या चळवळीचें केंद्र जी कॉंग्रेस ती इतक्याजवळ आल्यानें वाढलेली गोमांतकीय तरुणांची जिज्ञासा वरील फीच्या धोंडीनें विफळ होऊं नये, ह्मणून केलेल्या विनंतिबद्दल कार्यकारी मंडळी राग मानणार नाहीं अशी आशा बाळगतों.

डिचोली-गोवा. १-१०-२४ — वामन नारायण पालेकर.

वर्तमानसार

—सरकारच्या संमतीनें वर्धा म्युनिसिपल हद्दींत ता. १ सप्टेंबरपासून गोवध बंद करण्यांत आला असून गायरानासाठीं २०००० रुपये खर्च करून दहा वर्षांपर्यंत जनावरांची सोय करण्याचें ठरविलें आहे.

—रंगून येथील बर्मा ऑईल कंपनीच्या मातीच्या तेलाच्या टाकीवर वीज पडून २० [illegible]

बालोन्नति समाज, केपें

या समाजाचा सरस्वत्युत्सव फार थाटानें पार पडला. यंदांची व्याख्यानमालाहि निर्विघ्न रीतीनें तडीस गेली. मालेचें पहिलें पुष्प आमच्या संपादकांकडून गुंफलें गेलें. आपल्या भाषणांत यानीं ऐतिहासिक पुराव्यानिशीं जगाच्या उत्पत्तीपासून तों आज पर्यंत "धर्म व राजकारण" या उभय गोष्टींतील परस्पर संबंधाचें पर्यालोचन केलें. दुसऱ्या दिवशीं सांवर्डेचे तरुण गृहस्थ श्री. ज. देसाई यांचें 'आजचें हिंदीस्थान व आमचें कर्तव्य' या विषयावर वक्तृत्वपूर्ण भाषण झालें. आपल्या रसाळ, मधूर, चित्ताल्हादक, सार्थ उपमालंकारानीं युक्त व मुद्देसूद वाणीनें देसाई यानीं श्रोत्यांचीं मनें तल्लीन करून सोडलीं. देसाई यांचें वय १६-१७ वर्षा पेक्षां जास्त नाहीं इतक्या अल्पवयांत मराठी साहित्य व हिंदीराजकारण यांवरील त्यांचें प्रभुत्व पाहून श्रोतृवृंदास सानंद कौतुक वाटलें असल्यास नवल नाहीं. प्रतिपादित विषयाचा ओघ न बदलतां, त्यांनीं गोमांतकाच्या परिस्थितीचेंहि चित्र मार्मिक रीतीनें रेखाटलें. एकंदरींत त्यांच्या भाषणाचा परिणाम श्रोत्यांच्या मनावर उत्कृष्ट असाच झाला. 'गोरक्षण' या विषयावर तिसऱ्या व शेवटच्या दिवशीं सांगे येथील ज्योतिषी नारायण अनंत पाटणकर यांचें व्याख्यान झालें. नेहमीप्रमाणेंच त्यांचें भाषण अनेक उपयुक्त माहितीनें ओतप्रत भरलेलें असेंच झालें. त्यांच्याहि भाषणाचा परिणाम श्रोत्यांवर योग्य असाच झाला. व अशा रीतीनें तीन दिवस चाललेली समाजाची व्याख्यानमाला यशस्वी स्वरूपांत संपली.

COMUNIDADE DA PROVINCIA DE BALI

No dia 19 do corrente mês, pelas 11 horas, serão novamente levad s á praç as avença de despesa do seguinte ano, com aumento de 1/5 sobre o preço do respectivo calculo; no lugar das suas sessões da mesma comunidade.

Aos 6 de outubro de 1924.

O escrivão da Comunidade

Ramacrisna Venea Sinai Regó

—देशभक्त लाला लजपतराय यानीं कोहट रिलिफ फंडास २००० रुपयांची देणगी दिली

—जांबावली येथें ता. ६-१०-२४ रोजीं रात्रौ, वे. शा. सं. केशव भट्ट सावैकर यांच्या घरीं वार्षिक श्रीसरस्वत्युत्सव साजरा करण्यांत आला. अध्यक्षस्थानीं ज्योतिषी ना. अ. ना. पाटणकर यांची योजना होऊन, शाळेंतील विद्यार्थ्यांचीं भाषणें, एकदोन वक्त्यांचीं समयोचित भाषणें वगैरे झाल्यानंतर श्री. पाटणकर यानीं "सरस्वतीचें त्रिविधस्वरूप" या विषयावर विस्तृत भाषण केलें व ज्ञानदेवीचें अध्यात्मिक, दैविक व भौतिक स्वरूप कसें आहे आणि पाश्चात्यांच्या कल्पनेहून भारतीय पूर्वजांच्या सरस्वतीबद्दल कल्पनेंत वैशिष्ट कोणतें व कसें इ. सप्रमाण सिद्ध केलें, असें एक प्रेक्षक कळवितात.

एक खुलासा

गेल्या अंकांतील अग्रलेखांत श्री सरस्वत्युत्सवाची हकीकत सांगतांना मडगांव येथील 'श्री सरस्वतीसेवकमंडळ' व 'श्री दामोदर विद्याभुवन' या दोन्ही संस्थाचा ओझरता उल्लेख आला आहे. या उल्लेखासाठीं जी भाषा सरणी वापरली गेली आहे, तिच्या रोखावरून त्या उभय संस्थांचा परस्पर संबंध ध्वनित होण्याचा संभव आहे. अशा अर्थाच्या तक्रारी आल्यावरून, आह्मी जाहीर रीतीनें खुलासा करितों, कीं, त्या दोन्हीं संस्था पृथक पृथक अशा असून, प्रत्येकीचे संस्थापकहि निरनिराळे आहेत. विशेष चौकशी अंतीं असें कळतें कीं, सरस्वतीमंडळाच्या उत्सवास व त्याच्या वाचनमंदिरास भुवनाच्या विद्यमान व्यवस्थापकानीं केवळ जागाच दिली असून, त्याबद्दल भाडेंहि आकारण्याचा त्यांचा विचार आहे. ज्यांच्या कल्पनेनें, परिश्रमानें व द्रव्यानें भुवनाची इमारत उभारण्यांत आली त्या मंडळीचा सरस्वत्युत्सवाशीं अगर भुवनांत होणाऱ्या इतर गोष्टीशीं कांहींच संबंध नाहीं. सरस्वतीमंडळाची स्वतःची इमारत नाहीं व ती असण्याविषयीं त्यांची उघड खटपटहि झालेली दिसून येत नाहीं इतकें सांगितल्यावर कोणाच्याहि गैरसमजास जागा रहाणार नाहीं, असा भरंवसा आहे.

बी रिस्कनोटचा नवा कायदा

(ले: विश्वनाथ गणेश जावडेकर, वकील धुळें)

कमी दरानें माल चढविला असतां 'बी रिस्कनोट भरून घेतात. ही रिस्कनोट ह्मणजे कसायाची सुरीच होय. ती भरून दिली असतां कोणी फिर्याद केली तर पुराव्याचा सर्व बोजा वादीवर [व्यापाऱ्यावर] पडे व तो त्यास निस्तारतां येणें अशक्य असल्यानें दावे बुडत. परंतु नवीन नमुन्यानें ही स्थिति बरीच पालटली आहे. पहिलींतील बुद्धिपुरस्सर हयगय [Wilful reglect हे शब्द काढून त्या ऐवजीं साधा 'गैरवर्तन (Misconduct) हा शब्द घातला आहे. एखादें संपूर्ण कनसाइनमें अगर त्यांतील पूर्ण डाग नाहींसे झाले, तरी ते कसे नाहींसे झाले अगर त्यास कसें नुकसान पोंहचलें हें दाखविण्याचा बोजा पूर्वीं कंपनीवर पडत असे. हल्लीं तो बोजा कंपनीवर टाकला आहे व माल कंपनीच्या ताब्यांत दिल्यापासून तिनें त्याचें काय काय केलें हें सर्व मालधन्यास सांगितलें पाहिजे व प्रसंग विशेषीं त्याबद्दल पुरावाहि केला पाहिजे असा फरक केलेला आहे. पूर्ण डाग न जातां चोरीमुळें, (Pillerage) अंशतः नुकसान पोहोंचलें' असेलतर पूर्वीं कंपनीवर नुकसानीची मुळींच जोखम पडत नसे. हल्लीं ही जोखम बऱ्याच अंशांनीं तरी कंपनीवर टाकली आहे. टारिफमध्यें लिहिल्याप्रमाणें पॅकिंग असलें किंवा ज्या ठिकाणी पॅकिंग कसें असावें हें सांगितलें नसेल तेथें कागद अगर हातानें सहज निघणाऱ्या पदार्थानें पॅकिंग केलें नसेल, व 'प्रत्येक डागावर पूर्ण पत्ता असला तर अशा वेळीं अशा डागांतून चोरी झाली हें मालधन्याला कंपनीनें दाखविलें पाहिजे असा हल्लींकायदा केला आहे.

Anno 9 N.° 29

Quinta-feira 16 de Outubro de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
Por cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत

BHARAT

वर्ष ९ वें. अंक २९

गुरुवार ता. १६ अक्टोबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारे.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

UM CRIME HORRIVEL!

E' já do dominio público o celebre telegrama que de Vengurlá foi, em nome de todas as municipalidades da India, dirigido para Portugal pelo Vice presidente da edilidade das Ilhas, solicitando conservação do sr. dr. Jaime de Morais no governo deste Estado.

Quem está ao facto dos *segredos* governativos de Sua Excia, sabe bem que durante a sua estada nesta colónia, o sr. dr. Morais trabalhou mais por milhorar as suas economias pessoais e dos seus aulicos do que as da India que, devido aos desatinos do sucessor do sr. Freitas Ribeiro, está hoje arrastando uma vida, repleta de dificuldades de toda a ordem e ... desordem.

E' na governação do sr. dr. Morais que os funcionários não são pagos regularmente. E' o governo de Sua Excia que se celebrisa pelo imposto *capital* e outros que em nada o honram. E', devido á falta de bom senso politico de Sua Excia, que a hidra do nativismo e o esquecido caitanismo chegaram a exercer predominio na sua acção administrativa. E', finalmente, aos desmandos repreensiveis e favoritismo...legalisado de Sua Excia. que a India deve a sua derrocada, a sua bancarrota, a sua ruina.

Pedir, nestas condições, que o sr. dr. Jaime de Morais seja reconduzido por mais cinco anos para timonear a esfrangalhada nau da India é cometer o mais hediondo crime de lesa-patria. Não pode haver duas opiniões sobre esta verdadeira significação do pedido de manutenção de Sua Excia nesta colónia.

O dito Vice-Presidente perpetrou, pois, com o seu infeliz telegrama, o mais grave crime de lesa-patria, tornando se só merecedor da consideração que despensamos aos vendedores de suas patrias, traidores.

Só a indolencia dos indios consentiu que pela sua pouca vergonha, o sr. Fermino Dias não lhe sofresse na integridade fisica. Em qualquer outra parte diversa teria sido a sua situação.

O *Bharat* não protesta contra o abominavel telegrama, porque entende que ele nem é digno dessa honra. Desprezamo-lo como qualquer coisa em que é defeso tocar sob pena de abluções...e penitencias.

Mas será, de facto, obra *colectiva* a vergonhosa messagem? Não. E' uma obra pessoal, sugestionada, como se diz, pelo proprio detentor das redeas do governo da India, pois a êsse proposito lê-se no *Diario da Noite* de 13 do corrente o seguinte:

"Com efeito, cada dia que passa e cada vez que se pensa com mais serenidade sobre o telegrama em questao a indignagao e' mais profunda, quanto e' certo que o abuso mais avulta.

E' verdade. O vice presidente das Ilhas fez o telegrama em nome de todas as municipalidades pedindo a recondugao do actual governador.

Em virtude de que?

Houve alguma deliberagao da Municipalidade das Ilhas? Nao houve.

Mas o vice presidente das Ilas para falar de papo por todas as Municipalidades, teve presentes as deliberagoes de outras municipalidades? De uma se quer?

Podemos afirmar que nao.

Teriam, pelo menos, estado presentes os representantes dessas outras Municipalidades, em nome de quem falou o vice-presidente das Ilhas?

Tambem nao!

Quere dizer, o vice-presidente das Ilhas, no memento em que deu a sua assinatura para telegrafar em nome de todas as Municipalidades, nao teve deante de si nem as actas dessas Municipalidades (nao a tendo nem, se quer, a das Ilhas,) nem os representantes de cada uma delas, em cujo depoimento possa agora justificar o arrojo que tomou, arrastado certamente na sua boa fe'.

Deante de si, sim, teve presente so' – o sr. Cipriano da Cunha Gomes?

O unico apoio em que confiou foi a declaragao verbal do – presidente da Camara de Bardez.

Mas perguntamos no's. Em virtude de que o sr. Cunha Gomes falou por todas as Municipalidades? Como e' què garantiu o conselho de todos o presidente da Camara de Bardez que todos sabem como ai chegou nao podendo, por isso, garantir pelo proprio Conselho ao menos enquanto a sua situagao nao seja definida pelas estagoes competentes?

E' que o sr. Cunha Gomes—o presidente da Camara de Bardez—atraz de si tinha alguem? Quem sera?

Quem seria capaz de lhe ter dado tamanha coragem?

Sera' o mesmo que, na tarde de e de Outubro, pelas 17 horas aguardava comunicagao e que a'quela hora recebendo o facto – estar consumado?

Não queremos prosseguir mais, porque o exposto aclara mais do que *claramente* a interrogação que paira sobre êste misterio...desvendado.

ECOS & CRITICA

NOVOS RICOS

A fortuna do Governador da India monta a 2.000 contos! Agora e' que se compreendem as constantes perseguigoes a' imprensa da India, que num justo queixume, disse do sr. dr. Jaime de Morais, mais ou menos o seguinte:

"...gastou e gasta, nao como deve gastar um estadista, mas ridiculamente, como um pandego, um frascario, um libertino!..."

Tudo vai na mesma cegueira das ambigoes. Homens que nao tinham ainda ha dias onde cair morto, possuem hoje uma fortuna avultada, enquanto as finangas portuguesas se vao arruinando, sem cotagao na praga, a ponto de chegar a um acordo clandestino: A VINDA DA PRATA!

Isto vai mal, muito mal, senhores!

Nas colonias a situagao financeira e pe'ssima! As receitas sao inferiores, a's despesas. O *deficit* aumenta e o dinheiro da receita nao chega para pagar os juros da divida adquirida

Para onde vamos senhores? So' o Governador da India tem uma fortuna de 2 mil contos! Isto ja' arrepia o cabelo do Ze' Povinho, que de todos os lados sente se ludibriado.

O' India misteriosa, o' terra do Brama, erguei-vos contra os que te exploram!

Arrastai ate' os Ganges, estes tiranos que arrazam os teus bens, sem dar em troco a minima parcela do seu trabalho.

O' incompreensivel Xavier, o' inesquecivel Albuquerque, erguei-vos do seu tumulo para ouvir os clamores dum povo que pede:

Justiga!...

Fala-Rudé

(Do *Emancipador*, de Lourengo Marques). (*A Terra*)

ELES QUE FAZEM ...

"Aquila", num artigo ao *O Heraldo* tratando da nossa fantastica autonomia, escreve:

"*Os* eleitos nao podem ter iniciativa alguma sem criagao da previa receita e tudo deve ser decidido afinal pelo Poder Executivo, E enquanto vai e vem, fica tudo como dantes quartel general em abrantes".

Fosse assim, Aquila amigo, e Goa teria muito a lucrar. O *Bharat*, apezar de sua pobreza, nao regatearia mesmo uma festa de acgao de graga pelo *quartel em abrantes*. Mas o que sucede e' ...... o diabo Cada mala sao decretos e decretos em que os Amanuenses criam contas para no's as pagarmos por todos os meios possiveis... impostos, emprestimos, penhoras, vendas...

Quem nos mandou pagar? Perguntara' o Aquila. Mas isto e' la' com os conselheiros. Eles que fazem sabem...

DE REMISSA

Temos ja' em nosso poder mais dois artigos do nosso ilustrado colaborador sr. G. C Guddo', da serie com que esta' honrando as modestas colunas do nosso jornal.

Recebemos tambem de Canacona uma extensa carta do sr. *X.* refutando algumas das consideragoes do artigo *Pela Policia*, publicado no *Bharat* de 2 do corrente.

Iremos publicando tudo.

भारत

आश्विन व० ४ थी शके १८४६

ऐक्य–दिन–समारंभ

दिल्ली येथें भरलेल्या ऐक्यपरिषदेनें आज्ञा केल्याप्रमाणें ता. ८ हा महात्माजींचा उपवासोद्यापनाचा व ऐक्यवर्धनाचा दिवस अखिल हिंदीस्थानांत मोठ्या उत्साहानें व समारंभानें पार पडला. हिंदीस्थानच्या भविष्यकालीन इतिहासांत हा दिवस सुवर्णाक्षरांनीं कोरला जावा इतका हा दिवस महत्वाचा आहे. हिंदु मुसलमानांसाठीं जिवाचें रान करून रक्ताचें अर्घ्यादक सोडणारा तेजस्वी व तपोनिधि महात्म्यानें त्या दिवशीं ह्या दोन संस्कृतींची चिरकालीन एकी व्हावी, हें आपलें गाऱ्हाणें आपले देशबंधु ऐकत नाहींत असें पाहून ती आपली मागणी देवाजींच्या पायांकडे रुजू करण्याकरितां केलेल्या त्रिसप्तक तपश्चर्येची सांगता व प्रायश्चित्ताकरितां केलेल्या उपवासाचें उद्यापन केलें. हिंदुमुसलमानामधील अविचारानें माजलेली तेढ मोडून त्याच दिवशीं तिच्या जागीं एकीची मुहूर्तमेढ रोवली गेली आहे, ह्मणून तो दिवस समारंभानें साजरा करण्याविषयीं आह्मांस परिषदेकडून आज्ञा झाली होती व ती आज्ञा पार पाडलीहि गेली आहे.

ह्या समारंभोत्सव दिनास खालील आशयाचे आशीर्वाद हिंदुस्थानच्या हितशत्रूप्रमाणें दिलजान दोस्तांकडूनहि मिळाले आहेत.

“ एकी हीच आजची सर्व श्रेष्ठ देवता होय ” *Mahatmá Gandhi*

“ ऐक्य परिषदेनें ऐक्यवर्धनाकरितां केलेल्या सर्व श्रमांचें चीज होवो ”. *Lord Reading*

“ ऐक्य दिनाचें मी प्रेमपूर्वक स्वागत करितों. एके काळीं इग्लंडहि ह्या धर्मांच्या नांवाखालीं दुभंग केलें गेलें होतें. पण ‘ मानसिक औदार्य व विवेक स्वातंत्र्य ’ ह्या सार्वजनिक स्वास्थ्याच्या मूलतत्वांचा धडा मिळतांच हा गोंधळांचा गोंधळ बंद पडला ”. *Lord Oliver*

“ मानसिक औदार्याशिवाय आह्मांस जगांतील इतर सुधारलेल्या व स्वतंत्र राष्ट्रांच्या पंक्तीस बसण्याची आशाच करावयास नको”. *Yakub Hussain*

या एकंदर गोष्टींवरून, हिंदी राजकारणाची इमारत एकीच्या भक्कम पायावर उभारली गेल्याशिवाय स्वराज्याचा सोनेरी कळस तिला लटकावण्याचा कितीहि प्रयत्न झाला तरी तो कदापि यशस्वी होणार नाहीं, या तत्वाची व्यवहारिक जाणीव आतां सर्व रंगांच्या व पंथांच्या हिंदी लोकांस होऊं लागली आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. एकीच्या या अत्यंत महत्वाच्या आंसाभोंवतीं आतां सर्व स्वराज्योन्मुख चळवळींची पृथ्वी फिरूं लागली असून, ती महात्मा गांधींसारख्याच्या सूर्यप्रकाशानें चमकत आहे, हें हिंदुस्थानचें भाग्यच होय.

म० गांधींच्या तपश्चर्येचा शेवट ऐक्य निर्माण होण्यांत झाला ही आनंदाची गोष्ट तर खरीच. पण आतां हें ऐक्य रक्षण करण्यासाठीं पुढाऱ्यांनीं अविश्रांत झटलें पाहिजे. ऐक्यरक्षणाचें कार्य करण्याची जबाबदारी त्यांनीं कोणाच्या रागालोभाची किंवा इतर विकृत भावनांची परवा न करतां आपल्या शिरावर घेतलीच पाहिजे. मात्र हा ऐक्यरक्षणाचा मार्ग आक्रमित असतां त्यांनीं लोभाविष्ट बनून भोगरत होऊन राहतां कामा नये. त्यांनीं सर्व चळवळी निष्काम कर्मयोगाच्या वृत्तीनें केल्या पाहिजेत. कार्यसिद्धि यशस्वी रीतीनें होण्यासाठीं, पाहिजे तितकें ऐश्वर्य, संपत्ति अथवा इतर साधनसामुग्री जमविण्याचा व्याप पुढाऱ्यांनीं करावा; परंतु त्याचा उपयोग त्यांनीं आपली सुखलालसा तृप्त करण्याकडे करूं नये. अशा धोरणानें पुढारी वर्तूं लागल्यास वाऱ्याची मोट बांधण्यापेक्षांहि जास्त कठिण वाटणारा हा ऐक्यरक्षणाचा प्रश्न सहज रीतीनें सुटणार आहे.

नव गोमांतका ! त्वां महात्माजींच्या आयुरारोग्य व ऐक्यवर्धन प्रयत्नाला यश चिंतीलेंच पाहिजे.

स्फुट विचार

चूक कोणाची ? :— प्रायोपवेशनाच्या दिव्यांतून म० गांधी सुखरूपपणें निभावल्याबद्दल आनंद प्रदर्शित करण्याच्या सात्विक हेतूनें महात्माजींच्या फोटोची मिरवणूक काढण्याचा मडगांवच्या कांहीं गांधीभक्त देशप्रेमी नागरिकांनीं निरुपद्रवी निश्चय केला व या निश्चयाच्या आड कसलेंहि सरकारी कुलंगडें उपस्थित होऊं नये ह्मणून त्यांनीं तेथील मामलेदारांची मिरवणुकीसाठीं परवानगी मागितली; पण निर्जिव फोटोच्या मिरवणुकींत कदाचित् सजीव राजकारण दडून बसल्याचा संशय आला ह्मणून असो किंवा इतर कोणेत्याहि साधारनिराधार कारणामुळें असो, मामलेदारसाहेबांनीं परवानगीची विनंति फेटाळून दिली व मिरवणूकवाल्यांचा बेत मनः सृष्टींतच विरून गेला ! येथील राज्यसूत्रचालकांच्या अंतःकरणाचा ज्यांनीं ठाव घेतला आहे, ज्यांनीं गोमांतकीय राजकीय परिस्थितीचें सूक्ष्म अवलोकन केलें आहे व ज्यांनी पोर्तुगीज बड्या व छोट्या नोकरशाहीच्या मनोधर्माचें गौप्य ओळखिलें आहे, त्यांच्यामतें, झाला तो प्रकार अवास्तविक झाला, असें मुळींच नाहीं. चूक झाली ती मिरवणूकवाल्यांची. त्यानीं परवानगीशिवाय मिरवणुकीची ‘स फेडून घेण्याची तजवीज केली असती, तर त्यांना या कामीं सरकाररीत्या कोणीच मज्जाव केला नसता नव्हे कोणी विचारलें सुद्धां नसतें. केवळ परवानगीच्या विनंतीनें परवानगी धुडकावली गेली, असें मानण्यास भरपूर आधार आहे.

वस्तुस्थितिदिग्दर्शन:— गोमांतकांत पुष्कळ ठिकाणीं उत्सवानिमित्त देवादिकांच्या मिरवणुकी काढण्यांत येत असतात. कित्येक ठिकाणच्या सप्ताहोत्सवांत राष्ट्र पुरुषांच्या चित्रांच्या किंवा फोटोंच्याहि मिरवणुकी निघत असतात, हें वाचकांस अपरिचित असेल, असें आह्मांस वाटत नाहीं. या सर्व मिरवणुकींना सरकारी परवानगीची आवश्यकता असते काय ? व ती मिळविण्यासाठीं उत्सवप्रवर्तक मामलेदार कचेरींचे उंबरठे झिजवितात काय ? जर नाहीं तर मग मडगांवच्या मिरवणूकवाल्यांची गांधी फोटोच्या मिरवणुकीसाठीं तेथील मामलेदारांपाशीं परवानगी मागण्यांत चूक झाली, असेंच ह्मणावें लागतें, हें कोण नाकबूल करील ? अंधेर नगरींत कुठें सुविचारबुद्धीचा प्रकाश पडतो ! जेथें तेथें कुविकाराचा धिंगाणा व अविचाराचा हैदोस ! करील त्याचा कारभार व मारील त्याची तरवार ! कोणत्याहि सत्कृत्याला परवानगी मागायाला जा, कीं ती कसल्याना कसल्या निमित्तानें धुडकावून दिलीच ह्मणून समजावें. उलट कोणतेंहि आक्षेपार्ह कृत्यसुधां कोणीहि उजळमाथ्यानें व विनपरवानगीनें अमलांत आणलें असल्यास त्यालाहि कोणी विचारीत नाहीं. एवंच पोर्तुगीज राज्यव्यवस्था कित्येक बाबतींत सतरा गुणांचा खंडोबा आहे, असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

मूर्खपणाची कमाल ! :— पणजी मुनिसिपालटीच्या व्हाइस–प्रेसिडेंटनें वेंगुर्लें येथील ब्रिटीश तार ऑफिसांतून गोव्यांच्या सर्व मुनिसिपालटीच्या नावानें सध्याचे गव्हर्नर जाइम द मोराईस यांस आणखीं पांच वर्षे येथें कायम करण्यांत यावें, अशा अर्थाची पोर्तुगाल सरकारला तार केल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे! मोराईस यांच्या कुटील व पाताळयंत्री कारस्थानाची मख्खी ज्यानीं ओळखिली आहे, त्यांना हा तारेचा लाजिरवाणा उपद्याप पाहून मनस्वी तिटकारा वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. उपरोक्त चंदुलालनीं, येथील तार ऑफिसें सोडून, वेंगुर्लेंच्या ब्रिटीश तार ऑफिसाकडे धाव मारली, या एकाच कारणामुळें त्यानाच स्वतःचे कृत्य किती अनुचित वाटलें असेल, याची ठळक कल्पना होते. आपण करतों तें कृत्य देशहितविघातक आहे, आपलें हें कृत्य चव्हाट्यावर आल्यास लोक आपल्या तोंडावर राजरोस रीतीनें थुंकतील, शेणमारानें आपली बोळवण करितील, या खात्रीनेंच त्यानीं वेंगुर्लेंचा रस्ता सुधारला, हें उघड आहे. आपल्या वात्रटपणास लोकमान्यतेचा लेप काढण्याचा शिवराळ प्रयत्न कधीं तरी उघडकीस येईल, याचें भान स्वार्थांध बनल्यानें त्यांनां मुळींच राहिलें नाहीं. पण अखेर बिंग बाहेर पडलेंच ! व्हाइस–प्रेसिडेंटच्या कृष्ण कारस्थानाचा गवगवा होऊन स्वतःचें निंद्य कृत्य लोकांच्या नावानें विकण्याचें त्यांचें मूर्खपण शेवटीं त्यानांच भोंवलें व या मूर्खपणाचें प्रायश्चित्त ते एकाद्या नवविवधूप्रमाणें घरांतील एका अप्रकाशित कोंपऱ्यांत दडून भोगीत आहेत, अशी दाट वदंता आहे !

स्वभावाला औषध नसतें :— उपरिनिर्दिष्ट अनर्थावह व अधोगामी प्रयत्नांचीं कडु फळें येथील लोकांनीं वाटेल तितकीं चाखलेलीं आहेत. वर्तमानपत्रांतूनहि वरचेवर असल्या हानिकारक कृत्यांविरुद्ध टाहो फोडण्यांत येत असतो; परंतु खरी स्थिति अवगत असूनहि स्वार्थामुळें ती झांकून ठेवण्यांत कित्येक आपमतलबी देशबुडव्यांना भूषण वाटत असल्यानें, ते त्या दुष्ट व अनिष्ट प्रयत्नांपासून परावृत्त होत नाहींत, हें खास देशाचें दुर्दैव होय ! मावळते राज्यसूत्रधार यामुळें त्यांच्यावर फिदा होत असतील; राजसत्तेच्या चक्रांतील दुय्यमपणा त्यांस संपादन करतां येत असेल; डोळ्यांवर झांपड घेऊन पोर्तुगीज राज्ययंत्राचा घाणा दमेपर्यंत ओढण्याचें भाग्य त्यांनां लाभत असेल; त्या मोटभरू यंत्राच्या सावलींत निरालस्यपणें त्यांना गुरफटून घेतां येत असेल. पण यांत देशाचें हित कांहींच नाहीं. उलट त्यापासून देशाच्या चिंधड्याच उडत असतात. देश अधोगतीच्याच गर्तेत एकसारखा लोळत पडत असतो. ह्मणून वरीलसारख्या देशद्रोही कुत्र्यांची ‘री’ ओढली न जाणें यांतच आमच्या देशाचें कल्याण आहे, हें आमचे लोकप्रतिनिधि यापुढें तरी विसरणार नाहींत, अशी आह्माला आशा आहे.

वर्तमानसार

—बनारस येथील सेंट्रल हिंदुस्कूलमध्यें गेल्या ता. २० रोजीं महात्मा गांधीजींच्या तसबिरीचा अनावरण समारंभ झाला.

—संयुक्त प्रांतांतील १९ म्युनिसिपालटयांकडून सक्तीचें प्राथमिक शिक्षण लौकरच अमलांत आणलें जाणार आहे.

—फ्रान्स व रशिया यांचा संबंध पूर्ववत् जोडण्याविषयींच्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां फ्रान्सच्या सरकारनें एक कमिशन नेमिलें आहे.

—हौरा म्युनिसिपालटीच्या हद्दींतून दारूचीं दुकानें उठविण्यांत यावीं, असा सदर म्युनिसिपालटीनें ठराव पास केला.

—बंगालचे पंडित मोतिलाल नेहरू यांचे चिरंजीव पंडित रतन कुमार नेहरू हे विलायतेंतील सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेत पहिले आले.

—हिंदुस्थान सरकारच्या मालकीच्या आगगाडीचें उत्पन्न गेल्या सप्टेंबरच्या तेरा तारखेस पुऱ्या झालेल्या एका आठवड्यांत १ कोटी ६८ लक्ष रुपये झाले. गत सालीं या आठवड्यांत आलेल्या उत्पन्नापेक्षां हें उत्पन्न २२ लाखानीं जास्त आहे.

—कालिकत येथें ता. २७ सप्टेंबर पासून पाऊस जोराचा पडून समुद्र खवळला व त्यामुळें एक बोट गडप झाली. खलाशी कसे बसे बचावले.

पहाण्यासाठीं पाहुणे मंडळी गेली होती ह्मणून थोडा वेळ झाला. बेळगांवहून गंगाधरराव देशपांडे यांचें सहानुभूतिपर व गोमांतकीयांना कांग्रेसला निमंत्रणपर आलेलें पत्र फाटक यांनीं वाचून दाखविलें. सर्वांनीं या आमंत्रणाबद्दल आदर व्यक्त केला व दलाल यांना देशपांडे यांकडे पत्रव्यवहार करून तिकिटांचे फीबद्दल गोमांतकीयाना सवलत मिळवण्याबद्दल सूचना केल्या नंतर दा. सा. यंदे याचें 'ग्रंथ प्रकाशनाचे द्वारें सरस्वती देवीची उपासना या विषयावर विचार परिप्लुत, स्फूर्तिदायक व लहान थोरांच्या अंतःकरणांस पटणारें असें सुंदर भाषण झालें. या दिवशीं दामोदर वाचनमंदिराच्या सातव्या वर्षाचा त्रोटक रिपोर्ट द. पा. दलाल यानीं वाचून दाखविला. तो मंजूर होतांच मसुरेकर, सडेक व आठल्ये यांचीं समयोचित भाषणें झालीं. शेवटीं अध्यक्षांच्या वतीनें फाटक यांनीं समारोप केला. शेवटीं मसुरेकर यांनीं सर्व पाहुण्याचे व दलाल यांनी अध्यक्षांचे आभार मानले. या वेळी रामनाथ विष्णू पै रायतुरकर यानीं उत्सवाची परिसमाप्ति न करतां उत्सव आणखी एक दिवस वाढवावा अशी सूचना केल्यानें दलाल यानीं पाहुणेमंडळीस एक दिवस जास्त रहाण्याबद्दल विनंति केली. पण रा. व. खोपकर आणि भोंडे यांना निकडीचीं कामें असल्यावरून त्यांनीं याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करून सर्वांची माफी मागून पाहुणचाराबद्दल मडगांवकरांचे आभार मानले व दुसऱ्या दिवशी हे उभयतां पुण्यास जाण्यास गेले. रात्रौ पुराण कीर्तन वगैरे कार्यक्रम झाला.

दिवस चौथा

या दिवशीं सभेचें अध्यक्षस्थान फाटक यांचे सूचनेनें व दलाल यांच्या अनुमोदनानें आठल्ये यांनीं स्वीकारलें होतें. त्यांनीं आजचा उत्सवाचा दिवस ह्मणजे श्री सरस्वतीच्या कृपेचें दर्शक चिन्ह होय असें सांगून ज्या नवसासाठीं ही उत्सवाची रात्र वाढविली त्याबद्दल देवीची आराधना केली. नंतर नरहर र. फाटक यांनीं "राष्ट्रोद्धाराचीं मूलतत्वें" या विषयावर स्व.ना थक करून सोडणारें मुद्देसूद एक तासपर्यंत भाषण केलें. यंदे यांनींहि याच विषयावर सोपपत्तिक अशा माहितीनें परिपूर्ण असें १। तासपर्यंत भाषण करून लोकमान्य व महात्मा यांच्या राष्ट्रोद्धाराची महती वर्णन केली. मसुरेकर यांनीं, खोपकर व यंदे यांनीं प्रत्येकीं ५० रुपयांची देणगी संस्थेस दिल्याचें जाहीर करून या उभयतांकडून संस्थेच्या वाचनमंदिरास पुस्तकरूपानेंहि मदत मिळणार असें आश्वासन दिलें गेलें आहे ह्मणून सांगितलें. नंतर सडेकर यांकडून गोमांतकीय प्रमुख सारस्वतांच्या कामगिरीबद्दल कौतुक करण्यांत येऊन गोमांतकांतील गेल्या व चालू शतकांतील वृत्तपत्रांचाहि नामनिर्देश करण्यांत आला. अध्यक्षांनीं योग्य शब्दांनीं थोडक्यात समारोप केल्यानंतर दलाल यांनीं सदर देणगीबद्दल उभय पाहुण्याचे, ज्यांनीं ज्यांनीं संस्थेस मासिकें व वृत्तपत्रें मोफत दिलीं त्याचे, अध्यक्षांचे, सभाजनांचे, स्वयंसेवकाचे वगैरे सर्वत्रांचे आभार मानले व शेवटीं कोंकणी भाषेत एक गोष्ट सांगून समाजात विध्वंसक शक्तीचा दुरुपयोग करूं नका अशी कळकळीची विनंति केली व श्री सरस्वती देवीच्या जयजयकारांत उत्सवाची समाप्ति करण्यात आली. रात्रौ कीर्तन वगैरे झालें.

पाहुणे मंडळीनीं कवळेंपासून मंगेशपर्यंत सर्व देवालयें पाहिलीं. त्याचप्रमाणें मडगांवच्या शाळा, वाचनालयें, देवस्थानें, हॉस्पीटल व मुख्य इमारती पाहिल्या. पाचव्या दिवशीं मंडळी पणजी शहर, जुनें गोवें, तेथील चर्चेस, पणजींतील मुख्य ऑफिसें, इमारती पाहून सर्व मंडळी गोव्याचें सृष्टिसौंदर्य व एकंदर राहणी वगैरेची तारीफ करीत ता. १२ सोमवार रोजीं आनंद पावून व मडगांवकरांच्या आदरातिथ्याचें कौतुक करीत पुण्यास जाण्यास निघाली. सारस्वत ब्राह्मण समाज व नी. वि. दळवी यानीं मध्यंतरीं पाहुणे मंडळीस टी पार्टी देऊन त्यांचा सन्मान केला, असेंहि समजतें.

—शिरोडें येथें आनंद विद्यालयांत रविवार ता. ५ रोजीं सरस्वतीपूजन झालें. सोमवारीं संध्याकाळीं ४ वाजतां गणेश वा. गुडे यांच्या अध्यक्षतेखालीं गोपाळ कृष्ण गुडे, श्रीपाद गो. हेदे, प्रो. शंकर र. कुडचडेकर, गणेश सदाशिव गुडे, विष्णू गो. हेदे, विठ्ठल नी. गुडे, सखाराम गो. गुडे व आठले यांचीं शिक्षण या विषयावर भाषणें झालीं. शाळेचे मास्तर बापुराव भि. प्रभु यानीं सर्वांचे आभार मानल्यावर लक्ष्मण बुवा जोग यांचें कीर्तन होऊन दुसऱ्या दिवशीं उत्सवसमाप्ति झाली.

—पूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणें सांगें येथील श्री विठ्ठल सेवक मंडळामार्फत चालू असलेल्या मराठी शाळेंत ता० ७ मंगळवार रोजीं दुपारीं श्री सरस्वत्युत्सवास प्रारंभ झाला. पूजा, आरती, वगैरे उरकल्या नंतर संध्याकाळीं ६ वाजतां पुराण झालें; रात्रौ सात वाजतां हेगडे देसाई, संपादक भारत, यांचें प्रवचन झालें. प्रवचन दीड तास चालू होतें. नंतर आरती प्रसाद होऊन या दिवसाचें काम संपलें. दुसऱ्या दिवशीं पूर्व दिवसाप्रमाणेंच इतर कार्यक्रम होऊन संध्याकाळीं सात वाजतां दोतोर जयवंत घनःश्याम मळकर्णेकर यांच्या अध्यक्षतेखालीं सभेस सुरवात झाली. प्रथमतः अध्यक्षांनीं प्रास्ताविक भाषण केल्यावर सदाशिव सांवळोबा प्रभू भाटीकर यांनी 'सरस्वतीचें महत्व' या विषयावर सुश्राव्य व्याख्यान केलें. नंतर विद्यार्थी श्री. कंसरकर, मडगांव यांनीहि समयोचित असा एक निबंध वाचला व नंतर, अध्यक्ष मळकर्णेकर यानीं 'शाळेंतील शिक्षण' या विषयावर विद्वत्ताप्रचुर व सुंदर असें भाषण केलें व या दिवसाचा कार्यक्रम संपला. तिसऱ्या दिवशी, ता. ९ गुरुवार रोजीं नित्याचा कार्यक्रम होऊन रात्रौ सात वाजतां वे० शा० सं० अनंत शास्त्री सद्कारी, सांवर्डे यांच्या अध्यक्षतेखालीं व्याख्यानास सुरवात झाली. व्याख्याते बाळुबुवा पुर्णेकर यांनी 'सरस्वतीचें वास्तविक स्वरूप' या विषयावर सुश्राव्य भाषण केल्यानंतर मर्नो यशवंत सिगांवकर यानी एक निबंध वाचला. या नंतर ना. अ. ना. पाटणकर यानी उत्सवाचा समारोप केला व सर्वांचे आभार मानल्यावर कार्यक्रम समाप्त झाला.

—पोंबुर्पे येथील श्री रवळनाथ विद्याभुवन शाळेंत यंदां श्री सरस्वत्युत्सव थाटानें पार पडला. उत्सव अष्टमी, नवमी व दसमी असा तीन दिवस चालू होता.

—ता. ८ बुधवार रोजी मडगांव येथील श्री दामोदराच्या सालांत, महात्मा गांधींस दीर्घायुष्य देण्याबद्दल प्रार्थना करण्याकरतां, सभा भरली होती. सभेस सुमारें ३०० मंडळी जमली होती. सभेचें अध्यक्षस्थान वैद्य पुंडलीक वामन विर्जिनकर यांनीं मंडित केलें होतें भोंडे वकील, मसुरकर, सडेकर वगैरे गृहस्थांचीं भाषणें झालीं.

—गणेश चतुर्थीच्या मंगल दिवसापासून मोरजी येथील सर्व हिंदु जातींतील पुढारी मंडळीनें गावांत फिरून येथें शिक्षण विषयक चळवळ व्हावी ह्मणून प्रयत्न करण्यास सुरवात केली. गावांतील सर्व मंडळीनें या कामीं सहानुभूति दर्शविल्यावर ता. ११–९–२४ रोजीं रामचंद्र दामोदर नाईक यांच्या अध्यक्षतेखालीं असनोडें येथील श्रीशांतादुर्गा विद्यालयाचे हेडमास्तर एस. व्ही. राव यांचें "शिक्षणापासून फायदे' या विषयावर मोरजाय देवीच्या देवालयांत व्याख्यान झालें, व या गावांत शिक्षण विषयक संस्था असणें किती अगत्याचें आहे, व ती कशी चालवावी वगैरे मुद्दे त्यानीं सोप्या भाषेत मांडले. नंतर नारायण नाईक बुरये, के. रा. पत्की वगैरे यांचीं भाषणें झाल्यावर अध्यक्षांनीं समारोप केला. सर्व जातींतील पुढाऱ्यांचा कार्यकारी मंडळींत समावेश करण्यांत आला. गावांतील भाटीकर गांवकर मंडळीनें समाजास इमारत बांधण्यास जागा मोफत दिली आहे. गावांत एकंदर पांच हजार रुपयांवर आंकडे पडले असून त्यांतील चवथा हसा वसूल करण्यांत आला आहे. या गांवच्या लोकांनी तात्पुरत्या उभारलेल्या इमारतींत ता. ३ अक्टोबर सन १९२४ रोजीं विद्याप्रसारक समाज मोरजींत स्थापन करण्यांत आला. सदर प्रसंगीं येथील पोर्तुगीज शाळेचे प्रोफेसर पु. वि धेंपे यांच्या अध्यक्षतेखालीं असनोडचे हेडमास्तर एस. व्ही. राव यांचें "समाजाची कामगिरी" या विषयावर जाहीर व्याख्यान झालें. नंतर वाद्यांच्या गजरांत के. रा. पत्की यांच्या मार्फत मराठी शाळेंतील मुलांचें गणपती पूजन झाल्यावर शाळा सुरू करण्यांत आली. त्या वेळीं १०५ मुलें या शाळेंत आलीं. सध्या तीन शिक्षक नेमण्यांत आले असून लवकरच मुलांची वरील संख्या वाढण्याचा संभव आहे. सध्या शाळेची इमारत साधी उभारली असून लवकरच मोठी इमारत वरील जागेंत बांधण्याचें काम सुरू करण्यांत येणार आहे. ही शाळा फुकट ठेवण्यांत आली आहे. या शाळेंत ता० ७ पासून ९ पर्यंत पहिला सरस्वत्युत्सव साजरा करण्यांत आला. सध्या गावांत हिरू नाईक, भिवा गांवकर, आत्माराम गांवकर, विठ्ठल जोशी वगैरे मंडळी फार मेहनत घेऊन समाजकार्य करीत आहेत. लवकरच अनुभविक शिक्षक असनोडचे एस. व्ही. राव हे ह्या समाजाच्या शाळेचे हेडमास्तर होणार आहेत. इ. 'मोरजी विद्याप्रसारक मंडळाचे सेक्रेटरी लिहितात.

—पणजीचे तरुण रेसेबदोर विश्वनाथ अनंत केणी हे आकस्मिक रीतीनें वैकुंठवासी झाल्याचें कळविण्यास आह्मांस अत्यंत दुःख वाटते. अनेक सद्गुण समुच्चयामुळे विश्वनाथराव यानीं अल्पवयांत बरीच लोकप्रियता संपादन केली होती. मृताच्या आत्म्यांस चिरशांति लाभो!

—येथील दर्यासात्याचे मुख्याधिकारी सिं. तितु मोराइस यांची येथील गव्हर्नरचे जागीं तात्पुरती नेमणूक झाल्याची वदंता आहे.

वर्गणीदारांस विनंति

भारताचा वसूलदार फिरतीवर निघाला आहे. त्याकडे आश्रयदात्यांनीं वर्गणी चुकती करावी, अशी विनंति आहे

म. भारत.

फॅशन

लेखांक ३ रा.

(लेः—श्रीपाद ज. देसाई.)

त्या तीन बाजींतील पहिल्या जुवेबाजीची व ह्या फॅशनची परस्पर तुलना करण्याचें, कोणकोणत्या गोष्टींत त्यांचें एकमेकांशीं पटतें व कोणकोणत्या बाबतींत ह्या दोन्ही बाजी परस्परांपासून विलग आहेत हें आमच्या सारासार विचार शक्तीनें पण निस्पृह मनानें ताडून पहाण्याचें काम आह्मीं द्वितीय लेखांकांत उरकून घेतलेंच आहे व ह्या त्रितीय लेखांकांत तीच फॅशन आह्मांस व्यभिचार बाजीशीं ताडून पहावयाची आहे.

पण त्यापूर्वी आह्मांस एक खुलासा करणें अत्यंत आवश्यक झालें आहे. तो खुलासा हाच कीं, स्वसमाजांतील सर्व साधारण जनसमुहावर ह्या आमच्या लेखणीरूपी चाबकाचे चुणचुणीत फटकारे ओढण्याचें काम अवघड असतां आवश्यक ह्मणून जें आह्मीं हातांत घेतलें आहे त्या आमच्या कृत्याच्या मुळाशीं कोणत्याच प्रकारचा व्यक्तिद्वेषाचा किंवा ज्ञातीद्वेषाचा हराम हेतु नसून अज्ञ जनतेला लोकशिक्षणाचा व सुज्ञ जनांला व्यवहारिक ज्ञानाचा धडा घालून देण्याचा आदर्श उद्देशच त्यांत आहे.

चमकत्या चंद्रमाच्या चांदण्याचा निशाचरांना राग येत असतो; पण त्या त्यांच्या रागाबद्दल किंवा जळफळाटाबद्दल शहाणे लोक रजनीकांताला जबाबदार न धरतां त्या

दान्‍धर्माचे वेळीं आठवण ठेवा !
...णें अनाथ विद्यार्थी गृह
१५ वर्षे झालीं. गरीब मुलांचें
...ण–शिक्षण करणें हा उद्देश
... अन्नखर्च दरमहा रु. १००० ...
...रितां मासिक रु. १ (अथवा
१२ = १ मुलाचा मासिक
...गारें २००० वर्गणीदार पा-
...त्यांपैकीं आपण व्हावें अशी
है. नांव पत्ता कळवावा.
...वा पुणें, वि. नं. केतकर

ANUNCIOS

O *Bharat*, ano 9 ° n ° 29 de 16 de outubro de 1924

Anuncics cada linha uma ... ainda que repetida. ...nero avulso 1 tanga

... Juizo de Direito da Co... ...e Quepem e cartorio ...rivão do 2 ° oficio cor... ...itos de 30 dias, conta... ...dia em que se publicar ...mo anuncio, nos termos ... 2 ° do art. 197 do Cod. ... legitimos ... mae ... ausen... professe qualiá e Belgaum parte incerta ... ritorio Bri... ...to, para ... habilitação ...va deduzida por João Fer... ... e mulher Sebastiana ... Mulem, de Pa... ...nso aos autos de partilha ... instaura... contra ... por Agosti... ...ernanda dita de Mu... ... pela qual podem os ...nos João e m... habilita... se como unic... univer... herdeiros do filho o re... ...o Agostinho artes legi... ...s para com prosseguir ulteriores deferida exe... ...o, e para na audiencia ...rior ao p... de editos ... citações e art. ... tes d... ncias ime... vos querendo a ... Co seguindo ... xer Declara-se ...s deste juizo ...is as terças e ...io sendo feria... ...e caso se fazem ...tos não sendo ... quando não

estejam compreendidas nas ferias, no tribunal judicial situado em Xeldem ao lado da estrada nacional que de Quepem se dirige a Curchorem, por dez horas, para ser publico se expediu este. Xeldem da comarca de Quepem, 2 de outubro de 1924

O Escrivão de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo Juizo de Direiro da Comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2 ° oficio, correm éditos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anúncio, nos termos do § 2 ° do artigo 197 do Cod. do Proc. Civ, citando Quensoa Moturem Zambaulícar, de Zambaulim, de Rivona e ora ausente em parte incerta da India Inglesa, para em dez dias posteriores ao referido praso de éditos, pagar á mesa administrativa do Pagode de Sri Deus Damodar de Zambaulim a ... e quatro rupias, tres tangas e cinco reis e dezasete vinte e dois avos, proveniente de custas liquidadas a favor do mesmo Pagode nos autos de justificação de mera posse por este instaurada contra incertos e em que o dito citando e outros contestaram e para haver as quais foi instaurada a competente execução, alem de custas desta, ou nomear no mesmo praso bens suficientes á penhora para pagamento da mencionada importancia e o mais que acrescer, sob pena de ser devolvido este direito á dita exequente a mesa administrativa e seguir a execução os ulteriores. Para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de Quepem, 29 de Setembro de 1924.

O Escrivão de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do Escrivão do 2° oficio que este assina correm éditos de 30 dias, contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2° do art. 197 do Cod. do Proc. Civ citando Babagi Deuli e Butó Essó Deúli, solteiros de Maina e ora ausentes em parte incerta do territorio Ingles, para em dez dias posteriores ao praso de editos, pagarem a Ramacrisna Ananta Narcornim, residente em Cusmane, a quantia de quatrocéntas e cinquenta rupias de que os citandos e outros se constituiram devedores solidarios de Babnó Vamona Sirvoicar, da dita de Cusmane, por escritura publica de 2 de Março de 1911 das notas do tabelião desta comarca Dolvi, tendo sido essa importancia no inventario prestado por obito do dito Babnó, aplicada a sua viuva Muctabai Sirvoicar e por esta cedida ao referido Narcornim, seus juros vencidos e registados como credito distincto desde 2 de Março de 1918 até igual data de 1923, os posteriores e os vincendos a razão de dez rupias por cada cento ao ano, pena de rupia diaria ... integral pagamento de tudo quanto é devido, custas e mais responsabilidades constantes da citada escritura, sob pena de seguir a execução instaurada contra os ditos citandos e outros pelo nomeado Narcornim os ulteriores com penhora dos bens sobre que foi registada a hipoteca. Para ser publico se expediu este. Xeldem da Comarca de Quepem, 9 de Outubro de 1924

O Escrivão de Direito
Aires Manuel Barreto

Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de direito da Comarca de Quepem e cartorio do primeiro oficio Redcar á instancia do exequente Datatria Sadassiva Boto Dessai de Xeldem, vão ser vendidas em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca no dia 24 do Outubro proximo pelas 10 horas, pelo preço de avaliação tres quintas partes do predio palmar e arecal denominado "Rasambó", cultivado de coqueiros e arequeiras situado em Molcornem, discrito na Conservatória do Registo Predial desta comarca sob o n ° 1275 e avaliadas por 1550 rupias, nos autos de execução hipotecaria promovida pelo dito exequente contra Naraina Chondru Porobo Velguencar e Rucminim viuva de Rama Chondrú Porobo Velguencar, de Molcornem. Quem quizer arrematar compareça nos indicados dia, horas e local, correndo por conta do arrematante as despesas da praça e a contribuição de registo por inteiro Por este são citados todos os credores incertos bem como os co-proprietarios nos termos e para os fins da lei, assim como ficam citados os representantes do credor falecido Diogo Caitano Rodrigues, de Molcornem, que tem a seu favor uma hipoteca registada para segurança da quantia de 250 rupias. E para ser publico se expediu este.

Quepem, 26 de Setembro de 1924.

O Escrivão de Direito do 1 ° oficio
Babú V. Camotim Redcar

Verifiquei a exatidão
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

PAGODE DE SRI CHAMUNDESVORY DE SIRVOY

No dia 25 de Outubro ás 15 horas no referido Pagode irão á praça as avenças da receita para o trienio de 1925 a 1927 e as da despesa para o ano de de 1925 pelo preço do respectivo calculo. Os concorrentes deverão comparecer no local do Pagode no referido dia e horas onde serão presentes os calculos com as respectivas condições.

Aos 12 de Outubro de 1924.

O escrivão de moza
Naraina Xembú Sinai Sirvoicar

Visto
O presidente suplente em exercio
Quessova Sinai Sirvoicar

...ando.o ... Opi... ...festo ...clara ...itica ...nais ...nea ...re... ...ovo ...stao ...be n ...izer ...ido ...oso ...nga para de ... anas feliz ... na sua Comer... uma nosso ... De. ... sem... ...itada ...e se... ...eiredo, magico em oleos ...senta ... alem o "va... m inte... gas ao servi... o defi... a visita ...ita em ...rogado ...ecebe... ...o inte... Bardez. ...idades ... o hindu... tambem motivos ...os.

Anno 9 N.° 30

Quinta-feira 23 de Outubro de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
Por cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegde Dessay
Quepem-Goa

भारत.

BHARAT

वर्ष ९ वें. अंक ३०

गुरुवार ता. २३ अक्टोबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें-गोवा

CODIGO DE USOS E COSTUMES DE GOA

Pelos escritos precedentes ja' os leitores devem ter feito a idea da nessa orientagao sobre a reforma a introduzir na legislagao dos usos e costumes dos hindu's.

Nao querendo mais abusar lhes a paciencia resolvemos entrar hoje na apreciagao do projecto que motivou esses escritos, o que fazemos nao com o prurido de abrir polemica num assunto juridico que fica muito alem da nossa competencia mas unicamente com o fim de deixar consignado o nosso modo de pensar para os competentes tomarem em consideragao se encontrarem nele qualquer cousa digna de nota.

* * *

"Art. 3 º. Ficam sujeitos a's disposigoes do presente Codigo os filhos ilegitimos de mae oriunda de Goa, que professe qualquer religiao nao cristam, salvo os que se tenham convertido ao cristianismo."

Nao esta' declarado no projecto o motivo que ditou o presente artigo, mas de modo como ele se acha redigido, afigura se nos que tem o defeito de dar lugar a interpretagoes sobre a aplicagao dos direitos a' sucessao e partilhas. Pois o artigo 38 do presente projecto do Codigo diz: Os filhos ou descendentes das bailadeiras, das mulheres solteiras, das viuvas e das separadas ou divorciadas por adulterio, sucedem a's suas maes e parentes maternos, bem assim estas ou aquelas."

A doutrina substentada neste artigo com respeito aos descendentes ilegitimos do sexo feminino nao passara por diferenga alguma, emquanto estes levarem a vida de so'teiros; mas estarao os mesmos ao abrigo deste artigo tambem sendo casados? Parece-nos que nao, por ser expresso do art. 36 do projecto que "os descendentes do sexo feminino, casados ou viuvos nao teram direito a' legitima".

Ora uma filha de bailadeira, por exemplo, sendo casada e convertida ao cristianismo por estar sujeita a's disposigoes da lei geral e nao a's privativas, ressalvadas no Codigo de usos e costumes, podera' exigir a legitima materna, a que nao tinha direito, antes da sua conversao ao cristianismo o que, necessariamente, dara' lugar constantes discordias e mal estar geral no gremio da sociedade hindu'.

O mesmo sucedera' no instituto das sociedades familiares, admitido pelos usos e costumes, por o direito desse socio tornar-se incompativel com os dos outros, pela motivo ja' exposto.

Para obviar a este inconveniente, o direito hindu' considera o convertido inteiramente extranho a' familia. E por isso somos de opiniao que ao mesmo artigo 3 º devem ser aditadas as seguintes palavras:

"Considerando-se o convertido inteiramente extranho a' familia a que pertencer antes da sua conversao".

Entendemos mais aditar ao mesmo artigo 3 º o seguinte paragrafo:

"§ unico — Nao e' permitido aos hindu's varoes a perfilhagao de filhos ilegitimos de qualquer qualidade."

O paragrafo supra e' a transcrigao do art 9 do Decreto de 16 de Dezembro de 1880.

Art. 8 º "E' permitida a poligamia com consentimento das primeiras mulheres manifestado no acto do Registo Civil do casamento, pessoalmente ou por procuragao especial."

Este artigo que substitui o art. 3 º do Dec de 1880 amplia a liberdade da poligamia, restringida alias no cit. Dec. de 1880 o que e' irrisorio!

Salvo o devido respeito, nao nos parece aceitavel a justificagao que fez o ilustre autor do projecto, do mesmo seu artigo 8 tanto do lado moral como do do senso comum.

Pela redacgao do mesmo parece que tamanha e' a liberdade do marido para contrair casamentos por poligamia que ate' uma mulher excessivamente obediente sera' vitima dos deseios ilicitos dele!

Entende o ilustre autor do projecto que "o consentimento das primeiras mulheres ja' limita o arbitrio do marido.

Aceitemos, por momentos, como regra este alvitre enquanto nao houver quem nos apresente o reverso da medalha com as suas cores hediondas, mas nos casos excecionais ¿quem nos garante que nao havera' abusos?

Nao so' isso, ainda ha mais.

Quem tiver lida com a sociedade hindu' ha de convencer se que a obediencia da mulher ao marido e muitas vezes tao cega que ha' mulheres que preferem sacrificar o seu bem estar a contrariar os desejos do marido. "Que destino sera' destas criaturas inocentes consentindo aos maridos casamentos por poligamia, unicamente para entrarem lhe na graga? Convem que estas, embora em numero limitado expiem pecados da sua imprevidencia, implorando misercordia?

Nao negamos que o direito hindu' admite a poligamia, mas esta tambem com certas restrigoes, por motivos justificados e nos casos extremos.

ECOS & CRITICA

PELA POLICIA

E' do seguinte teor a carta do sr. X., missiva a que nos referimos na edigao transacta:

"E' certo que o castigo a que se refere o *Bharat* foi aplicado pelo dito comando a uns bebados *cronicos* e so' depois de esgotados todos outros meios de os corregir.

Esse castigo que foi aplicado pela Policia—so' depois que se convenceu de que a simples prevengao, detengao e ainda a palmatoria se tornaram impotentes para os corrigir – tem dado posso afirmar a V., magnificos resultados, nao so' na sede do concelho — os tais bebados que mereceram o castigo sao todos de Chaudi —onde ja' nao se vem agora os tristes espectaculos produzidos pelos adoradores fervorosos do Baco, mas ainda em outras aldeias, a ponto de nao se exibir nenhum bebado em qualquer via publica.

O actual comandante de Policia, sr. tanente Coelho, com pouco tempo da sua estada neste concelho alem de reprimir o abuso de alcoolismo, tem procurado e conseguido por freio a' voracidade das ambigoes e grosserias dos actos de certos graudos, verdadeiros sugadores da sociedade; o que, como era de esperar, tem dado em resutado os despreitados procurarem difamar o sr. tenente e ao que consta pensam em dirigir-se e' que nao dirigiram ainda – uma representagao contra o mesmo oficial.

Nao quero arvorar me em defensor do sr. Coelho que nao precisa certamente da defesa de ninguem; mas, como filho da terra, enteado dever erguer a minha voz, embora muito debil—sempre que o torne necessario para desfazer a atmosfera de calunias urdidas contra quem so' e' merecedor de louvores por parte do concelho".

* * *

A referida carta vem acompanhada dum longo artigo doutrinario justificando a necessidade daplicagao do castigo de corte de cabelos, como ultimo recurso, artigo que oportunamente, publicaremos circundando-o de nossas consideragoes.

Entretanto esperamos que a Opiniao Publica de Canacona se manifeste sobre o assunto por uma forma clara e insuspeita, para que a nossa critica jornalistica seja a mais justa, a mais desassombrada e a mais consentanea com a rialdadade dos factos a apreciar...em recurso.

Pronuncie se, pois, antes o Povo canaconense sobre a presente questao para depois o *Bharat* dizer tambem da sua justifica nao va' ninguem dizer que impera por ca' facciosismo.

De resto, o sr. X. que e' devotado amigo do *Bharat* e do seu desvalioso director, merece nos inteira confianga pessoalmente – diga se tambem para evitar malentendidos e equivocos de qualquer ordem.

TUDO LIQUIDADO ...

A nossa admiragao pelas *Aduanas* comegou, quando, por um acaso feliz tivemos o prazer delicioso de ler na sua colossal obra "Estatistica"—Comercio e navegagao—Ano de 1920— uma discrigao deveras saborosa do nosso Brindoeiro e de seu fruto-brindao. Depois ela foi crescendo, crescendo, sempre crescendo. Agora e' ilimitada porque foram as "Aduanas" que segundo o sr. Pedro S. de Figueiredo, transformaram, gragas ao seu magico criterio, os extratos liquidos em oleos essenciais, o que em si representa uma mina inexgotavel,—fixando alem disso, segundo o "Ze' Pagante" o "valor da unidade" duma forma tam interessante que qualquer dia, gragas ao poder creador daqueles nossos servigos — estara' tudo liquidado;— o deficit e o paiz.

A EPOCA

Recebemos e agradecemos a visita deste novo semanario que se edita em Mapuga'. E' seu editor o sr. advogado Manuel Nascimento de Abeu.

A julgar pelos numeros que recebemos, *A Epoca* promete ser orgao intemerato da opiniao sensata de Bardez.

Longa vida e muitas prosperidades

हून टांकणें आवश्यक आहेत, नवीन कर बसविण्याचा प्रसंग आल्यास ते लोकांस न दुखतील आणि झाले तर परिणामीं हित करच होतील अशा जातीचे कोणते कर बसविणें शक्य आहे, वगैरे अनेक विचारांचें काहूर त्यांच्या मनांत उठावयाचें, पण यांतील एकहि विचार त्यांच्या मनाला स्पर्श करील तर शपथ ! येऊन जाऊन लोकांकडून मिळालेल्या अधिकाराच्या तोऱ्यांत झाला तर गरीब लोकांचा छळ करावयाचा; नवीन नवीन खर्चाचीं कलमें पास करून त्यांची तोंडमिळवणी करण्याकरितां नवीन कर बसवावयाचे; करांची वसुली, रस्ते दुरुस्तीचे लिलांव, मुनिसिपल कचेरींत सटरफटर कामदारांच्या जागा निर्माण करणें या बाबतींत आपल्या सोयसंबंधीयांकडे लक्ष ठेवणें अथवा मिळाला तर आपला हात भिजवून घेणें कसें साध्य होईल हीच विवंचना त्यांच्या डोक्यांत घोळत असली तर ती मानवी स्वभावाच्या विरुद्ध नाहीं. फिरंगणांतील मुनिसिपालिट्यांचा इतिहास काढून पाहिला तर शिक्षणप्रसार करणें, आरोग्यसंवर्धन करणें, व्यापार धंदे वाढविणें, शेतीस हरतऱ्हेची मदत करणें, शेतकीचें मुख्य साधन जीं गुरें त्यांचें रक्षणसंवर्धन करणें, अनाथ, दीन, दुबळे, रोगी यांची योग्य सोय करणें, मद्यपान, जुगार, रंडीबाजी आदि घातक व्यसनांस आळा घालण्याविषयीं प्रयत्न करणें, जनतेच्या खऱ्या गरजा सरकारांत वेळोवेळ मांडून तिच्या योग्य मागण्याची दाद लावून घेणें हीं कामें त्यानीं कधीं तरी आपल्या कर्तव्यांपैकीं आहेत असें मानल्याचें दिसून येत नाहीं. एखादा प्रसंग आला तर लोकांच्या अडचणीपेक्षां सरकारच्याच अडचणी यांना लवकर कळून येतात. सरकारची मर्जी राखण्याकडे त्यांचा विशेष कल असल्यानें जनतेची पर्वा त्यांना थोडीच असते. मुनिसिपालटींत एकवेळ निवडून आल्यानंतर लोकांकडे त्यांची पाठ फिरणें व सरकारच्या पदकमलांकडे आशाळभूतपणानें दृष्टि लागणें साहजिकच असतें. अशा वेळीं ती नजर परत आपणांकडे वळविण्याचें सामर्थ्य जनतेला असलें तरी त्याचा अनुभव पाहण्याचें मुनिसिपल किंवा इतर दुसऱ्या कोणत्याहि सभासदाच्या नशिबीं अद्याप आलें नाहीं. मग तिच्या गुप्त व लुप्त सामर्थ्याची पर्वा कोणीच करणार नाहीं, हें उघड आहे.

मुनिसिपालट्यांच्या सभासदांकडून आपल्या कर्तव्याची ओळख नसल्यामुळें ह्मणा किंवा आपली निवड होतांच आपणास निवडून देणाऱ्या जनतेची पर्वा करण्याची यांस सवयच नसल्यामुळें ह्मणा, आजपर्यंत लोकहिताची हेळसांड झाली हें कोणीहि सांगेल. त्याचप्रमाणें वेळोवेळ त्यांस जागृत राखण्याचें काम जनतेकडूनहि झालें नाहीं हेंहि तितकेंच खरें आहे. "पोटांत नाहीं तें ओंटात कसें येणार" असें ह्मणतात. त्याप्रमाणें जनतेंत जी कर्तव्याची ओळख नाहीं ती जनतेनें आपल्यांतूनच निवडलेल्या सभासदांत तरी कशी असेल ? या सभासदानीं तरी मुनिसिपल उमेदवार होण्यापूर्वी कोणतीं लोकहिताचीं कामें केलीं आहेत; निदान लोकहिताविषयीं तरी कोणती व केव्हां आस्था दाखविली आहे कीं जिच्या बळावर त्यानीं लोकांकडे आपणास निवडून द्या ह्मणून याचना करावी आणि लोकांनीं ती मान्य करावी ? कांहीं नाहीं. मागील पुण्याच्या जोरावर मुनिसिपालटीच्या सभासदत्वाचा दरवाजा उघडा होण्याची अट असल्याखेरीज, " मला निवडून द्या " "मला निवडून द्या " ह्मणून कोणीहि उठावें व आपलें नांव उमेदवारींत दाखल करावयाचें हा क्रम बंद पडणार नाहीं. जनतेनें या बाबतींत यापुढें जरा स्पष्टवक्तेपणानें वागलें पाहिजे. शतकेंच्या शतकें आंगांत मुरलेलें नेभळटपणाचें, हांजी हांजीखोरपणाचें व निराशावादीपणाचें विष घालवून दिलें तरच आमच्या मुनिसिपालिट्यांतून कर्तव्यदक्ष व इमानी सभासद चमकूं लागतील. नाहींतर पुढचे मागल्यांस बरे ह्मणवितील यांत संशय नाहीं.

स्फुट विचार

पक्षभेद व जातिभेदः— हा आजच्या सुधारकी काळांतहि जगांतील प्रत्येक राष्ट्रांत कमी अधिक प्रमाणांत आहेच; नाहीं असें नाहीं, पण त्या पक्षभेदाला पक्षद्वेषाचें व जातिभेदाला जातिद्वेषाचें स्वरूप येणें किंवा येऊं देणें हें कोणत्याहि देशाच्या किंवा राष्ट्राच्या प्रगमनशील ध्येयाला समूळ विघातकच ठरतें हें निःसंशय आहे. एका पक्षानें दुसऱ्या पक्षाचा व एका जातीनें दुसऱ्या जातीचा हेवा करून परस्परांशीं चुरशीचा सामना खेळण्याकरितां आपसांतील बंडाळी मोडून स्वरक्षाची जय्यत तयारी करून ठेवणें हें जरी आत्मनिरीक्षणाच्या दुहेरी दृष्टीनें राष्ट्राला प्रगतिकारकच— निदान परिणामीं तरी— होत असलें तरी त्या चढाओढीच्या चुरशींत चेंगरून जाऊन त्यांनीं परस्परांचा निष्कारण मत्सर करणें व स्वतःच्या कोत्या समजुतीनें स्वपक्षाची प्रतिष्ठा वाढविण्याकरितां प्रतिपक्षाची कुचेष्टा करण्यासाठीं अहर्निश झटणें ह्या सारख्या वेडेचारांचा उपयोग त्या राष्ट्राला उन्नतिमार्ग दर्शनापेक्षां अधःपतनाकडेच विशेष होतो हें आतां बहुतेकांस कळून चुकलें आहे. पण आह्मांस आश्चर्य वाटतें तें ह्याचेंच कीं आजपर्यंतच्या इतिहासावरून व आतापर्यंत मिळालेल्या अनुभवावरून स्वतःच्या इष्ट मार्गाची रूपरेषा आखण्याचें काम त्यापैकीं फारच थोड्यांकडून—एका हाताच्या बोटावर मोजल्या जाणाऱ्या व्यक्तींकडूनहि नव्हे— होत आहे, तर बहुजन समाजाची प्रवृत्ति प्रतिपक्षाच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्यांतच स्वतःच्या कर्तृमशक्तीची इतिकर्तव्यतां समजण्याकडेच आहे, हें डोळ्यांपुढचें दृश्य कठोरपणानें काढून टाकणें कोणास कसें शक्य व्हावें ? पक्षद्वेषाचा व जातिद्वेषाचा परिणाम ह्मणून आजकाल आमच्या समाजांत वरचेवर दृष्टीस पडणारीं अनर्थावह उदाहरणें पाहून ह्या सेतानाच्या सोटशाही साम्राज्याचा सत्यानास लवकरच होवो, ह्यां सारखे हळहळणाऱ्या हृदयाच्या तळमळीचे निदर्शक उद्गार कोणत्या कार्यकर्त्या निस्पृह पुरुषाच्या तोंडून निघणार नाहींत ?

विवेक बुद्धीचा ऱ्हासः— परावलंबनाच्या पारतंत्र्यांतील काळ्याकुट्ट काळोखांतून बाहेर पडून स्वातंत्र्योद्यानांत स्वैरसंचार करण्यास सध्या आमच्या हिंदीस्थानाला जर कशाची आडकाठी येत असेल तर ती जातिद्वेषाचीच होय. तशांतहि बुद्धिसामर्थ्यासारखी अजब संजीवनी मात्रा संग्रहीं असतांहि आम्हां हिंदूंना जागच्या जागीं दाबून ठेवण्यास व प्रगतीची अव्याहत चालणारी गति अधोगतीस मिळवण्यास हा एकच एक जातिद्वेष कारण होय हा तर स्वयंसिद्ध सिद्धांत आहे. आमच्या महाराष्ट्र देशांत तर ह्या जातिद्वेषापासून जन्मास आलेला ब्राह्मण—ब्राह्मणेतर वाद फारच निकरास पोंहचल्याचें आढळून येतें. कांहीं ब्राम्हण समाज आज ब्राह्मणेतरांस अज्ञानांधःकारांत पूर्वील प्रमाणेंच दाबून ठेवूं पहात आहे, तर ब्राह्मणेतर समाज आपल्या कोशांतील शेलक्या शिव्यांची लाखोली वाहून ब्राह्मणाची पाद्यपूजा करीत आहेत व सावल्यास लाठ्यांचा नैवेद्यहि भक्तिभावानें त्यांस समर्पण करण्याकरितां तयार झाला आहे. एकीकडे ब्राह्मण समाज आपल्या पवित्र ब्राह्मण्यावर पाणी सोडूनहि ब्राह्मणेतरांवरील आपलें अनादिकालीन वर्चस्व श्रुतीस्मृतीच्या आधारानें सिद्ध करण्याच्या कसून उद्योगास लागला आहे, तर दुसरीकडे ब्राह्मणेतर समाजाचे निवडक पुढारी परम दयाळु नोकरशाहीच्या कच्छपीं लागून सत्तेच्या सामर्थ्यावर ब्राह्मणाचा नसता छळ करून त्यांस ' त्राहि सत्यशोधक ' ह्मणण्यास लावण्याचा प्रसंग आणण्यास पहात आहेत. खुद्द ब्राह्मणांतहि निरनिराळे वर्ग आहेत व ब्राह्मणेतर समाजांतर्गत वर्गांप्रमाणेंच ते एकमेकांच्या डोळ्यांतील कुसळें शोधून काढण्याकरितां नसतीं भांडणें उपस्थित करीत आहेत. मद्रास इलाख्यांतहि महाराष्ट्राप्रमाणें सध्या ब्राह्मण ब्राह्मणेतर वादाचें प्रस्थ प्रमाणाबाहेर वाढलें आहे. व त्यानींहि महाराष्ट्रांतील ब्राह्मणेतरांचा कित्ता हुबेहुब गिरविण्याचें काम पत्करलें आहे. लोकमान्याचा राष्ट्रीय पक्ष काँग्रेसमधून फुटून कौन्सिलांत शिरलेला पहातांच महाराष्ट्रांतील ब्राम्हणेतर पक्षानें बहुरुप्याच्या तालमींतून माकडासारखी उलटी लाग मारली व तो चटकन कौन्सिलविरोधी गांधीपक्षाला जाऊन मिळाला व त्यानीं अशा रीतीनें ब्राम्हणाचा पुरा डाव साधला. अर्थातच मद्रासेंतील ब्राम्हणेतरांनीं त्यांचीच री ओढली, व एकदम ब्राम्हणेतर समाजाचें सातवें सम्मेलन परवां तारीख ११ रोजीं दि. ब. कृष्णन् नायर च्या अध्यक्षतेखालीं भरवून त्यानीं ब्रिटिश सरकारास एकदम हुकूम फर्माविला कीं,'दयाघन सरकार ! ब्राम्हणेतर समाजाची सर्वांगीण सुधारणा झाल्याशिवाय हिंदीस्थानाला स्वराज्य देऊं नका ! थोडा वेळ थांबा. आम्हीं समाजसुधारणा करण्यास घालीत आहोंत, तयार झाल्यावर कळवूं ! ! !'

"शफरी फुर्फुरायते"—काव्यप्रतिभा व तर्कशास्त्र ह्यांचें परस्परांशीं विळ्या भोंपळ्या एवढेंच सख्य असतें, अशी पुरातनकालापासून आजपर्यंत आमच्या लोकांत समजूत बाबरत आहे; पण ही वेडी (?) समजूत पार बदलून टांकण्याचें महत्कार्य उमरावतीच्या राष्ट्रीय पक्षाभिमानी 'उदय' पत्राच्या संपादकानीं आनखुषीनें लोकसमाजाकरितां स्वीकारलें आहे. ह्या कविभूषण व तर्कशास्त्रज्ञ संपादकांनीं ता. ७ च्या 'उदय' पत्रांत 'उपास.परिषद' ह्या मथळ्याखालील अग्रलेखांत आपल्या नवउपार्जित तर्क ज्ञानाचे तारे तोडले आहेत. महात्माजीनीं जाहीर केलेल्या त्रिसप्तक उपवासावर स्वतःचें तर्कशास्त्र लढवतांना हे कविभूषण संपादक लिहितात. "गांधीजीना लोकांचें लक्ष राजकारणांतून काढून तें आपल्या व्यक्तीकडे सर्वस्वीं वेधून घ्यावयाचें आहे; अहमदाबादेला ढसढसां रडूनहि तें जमलें नाहीं ह्मणून लोकांच्या मनांत स्वतः विषयीं दया उत्पन्न करण्याकरितां त्याच रडण्याची ही उपवास ह्मणजे सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति होय * * * गांधीजींना लोकांच्या व काँग्रेसच्या हातून राजकारण अजिबात सोडवावयाचें आहे + + + व म्हणून कसेंबसें करून लोकांची नकळत दिशाभूल त्यांनां करवून घेणें आहे.' हा त्यांच्या कविकल्पनेचा एक मासला असता तर त्याबद्दल आह्मीं कांहीं ह्मटलें नसतें पण ह्या निरीक्षणांत त्यांचा तात्विक हेतु आहे असा आह्मास संशय येतो. महात्माजींच्या अहमदाबादच्या रडण्याची हा उपास ह्मणजे सुधारून वाढलेली [वाढविलेली नव्हे !] दुसरी आवृत्ति होय. या उदयकारांच्या मताशीं आमचेंहि मत जुळतें आहे;पण लोकांच्या मनांत स्वतःविषयीं दया उत्पन्न व्हावी ह्मणून त्यांनीं हा उपवास अंगिकारिला हें त्यांचें तत्वज्ञान आह्मांस मुळींच पसंत नाहीं. मृत पुत्राला पुरे दिवस उलटण्यापूर्वींच स्वपत्नीला मरणाच्या दारांत सोडूनहि कर्तव्याला जागण्याकरितां ज्या महात्म्यानें आफ्रिकेच्या रणकुंडांत उडी घेतली, व लोकसेवेकरितां आपल्या उच्च कुलास व शिक्षणास विसरून ज्या अजात शत्रू पुरुषसिंहानें रोग्यांचें मलमूत्र वाहिलें त्या लोकोत्तर पुरुषावर वरील प्रमाणें आरोप करणें हें आपल्या कुत्र्या मनाचें व हलक्या हृदयाचें प्रदर्शन होय असें कोणत्या निर्भीड टीकाकाराला वाटणार नाहीं. काँग्रेसमध्यें फाटाफूट होऊन ती दुभंग होऊं नये ह्मणून ज्या कोमलहृदयी महात्माजीनीं आपल्या बहिष्कार चतुष्टयांतील कौन्सिल बहिष्कारास व कोर्ट बहिष्कारास फांटा दिला व आपल्या स्वातंत्र्य पक्षांतील इतर पुढाऱ्यांच्या रागाची पर्वा न धरतां जनापवादाकरितां कौन्सिलवाल्यांपुढें नमतें घेतलें त्या मोहनलालाला काँग्रेसच्या हातून राजकारण काढून घेण्याच्या प्रयत्नाबद्दल दोषी ठरविण्यास पुरेसें कारण आहे काय महाराज ! कविभूषण ही पदवी ह्मणजे कोणासहि सारासार विचार न करितां दूषण देण्याचें License नव्हे ! जाणून असा !

वृत्तपत्रें व वाङ्मय

मुंबई शहरांतील 'इंदुप्रकाश' या जुन्या दैनिकाचे सन्माननीय संपादक न. र. फाटक बी. ए. यांनीं मडगांवच्या श्रीसरस्वत्युत्सवाचे व्याख्यान मालेंत जें वरील विषयावर व्याख्यान दिलें, त्याचा सारांश वाचकांकरितां आज खालीं देत आहों.

कै० चिपळूणकरच्या पूर्वींहि ब्रिटिश हिंदुस्थानांत वास करीत असलेल्या गोमांतकीय सारस्वतांकडून मराठी भाषेच्या अभिवृध्यर्थ प्रयत्न झालेले होते, याचा इतिहास एका अधिकारी कोंकणस्थ ब्राह्मणानें सांगितला गेला, हा त्यांतील विशेष असून तो कोंकणस्थ व सारस्वत यांच्या मधील पुरातन दुजाभाव लयास पावल्याचा दर्शक नव्हे असें कोण ह्मणेल ? सन १९१९ सालीं प्रो. शि. म. पराजपे यांनींहि सदर व्याख्यानमालेंत 'कोंकणस्थ व सारस्वत यांनीं खांद्यास खांदा लावून कार्य करण्याची आवश्यकता असून या सरस्वत्युत्सवाचे निमित्तानें आज तो सुयोग आलेला आहे व यापुढें तो चिरकाल टिकेल' असे उद्गार काढले होते. एकंदरींत महाराष्ट्रीय विद्वानांच्या या स्नेहसंवर्धनापासून कोणा गोमांतकस्थास स्वाभिमान कौतुक वाटणार नाहीं ?

सरस्वत्युत्सवाचे उपक्रमाबद्दल संतोष व्यक्त करून व्याख्याते ह्मणाले: 'मडगांवच्या ह्या सरस्वती सेवक मंडळाचें मला व्याख्यानाकरितां आमंत्रण आल्याबरोबर मला एक अडचण आली. ती ही कीं, गोव्यांतील आपणासारख्या मित्रांस आमच्या तिकडील राजकारणाची माहिती सांगणें योग्य नाहीं, कारण आपण इकडे खुद्द रिपब्लीकचाच उपभोग घेत आहांत. म. गांधींची चळवळ सांगावी तर त्यांतील तत्वें येथें लागू नाहींत. कारण सरकारच मुळीं लोकसत्ताक असल्याने लोकानीं लोकांच्या राजसेवेशीं असहकारिता ती काय करावयाची ? त्याचप्रमाणें सामाजिक सुधारणेचें सध्याचें तीव्र अंग ह्मणजे ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद, त्याचीहि येथें आवश्यकता नाहीं. अनेक दृष्टीनीं विचार करून मी हा वाङ्मयात्मक विषय घेतला आहे. या विषयाचें नांव 'वृत्तपत्रें व वाङ्मयवृद्धि' हें आहे. महाराष्ट्रांत व विशेषतः मुंबईत ज्यांनीं नवीन ज्योत पेटविली त्यांत सारस्वत गृहस्थच प्रमुख होत. त्यांच्या आडनावावरून ते याच गावचे असावेत असें दिसतें. ते गोविंद नारायण माडगांवकर हे होत. यांनींच इ. स. १८४० च्या सुमारास मराठी उत्तमोत्तम पुस्तकें लिहून वाङ्मयाभिवृद्धीस आरंभ केला. सन १८८० च्या सुमारास विष्णुशास्त्री चिपळूणकर यानीं मराठी वाङ्मयांत क्रांति केली; पण त्याच्यामागें ४० वर्षें जाऊन आपण जर पाहिलें, तर मराठीची जोपासना गोविंद नारायण मडगांवकर यांनींच केली असें कबूल केलें पाहिजे. सन १८४० तील ज्ञानोदय वृत्तपत्राच्या एका अंकांत 'मराठी भाषेचा ऱ्हास' या विषयावर निबंध लिहिला आहे; त्यांत त्यांची मराठी भाषेविषयींची कळकळ चांगलीच व्यक्त होते. त्यानंतर युनिव्हर्सिटीच्या पहिल्या भट्टींतून निघालेल्या लोकांची गोष्ट पाहिली असतां, त्यांत गुरुवर्य सर गो. भांडारकर, शंकर पांडुरंग पंडित, न्या. काशीनाथ त्र्यंबक तेलंग ही सारस्वत मंडळीच वाङ्मयाभिवृद्ध्यर्थ प्रयत्न करण्यांत प्रामुख्यानें दिसून येईल. ही सारस्वत मंडळीची माहिती सांगण्याचें कारण, याच लोकांनीं वृत्तपत्राद्वारें वाङ्मयाभिवृद्धीस सुरवात केली. सन १८४८ त 'ज्ञान प्रसारक सभा' सुरू झाली. त्या सभेमार्फत निघणाऱ्या 'ज्ञानप्रसारक' मासिक पुस्तकांत गोविंद नारायण माडगांवकर यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. ते लेख उत्कृष्ट होते. वृत्तपत्र हा जो शब्द मी उपयोगांत आणीत आहें, तो निवळ बातमी पुरविणारें पत्र अशा अर्थी नाहीं. त्यास ह्यापेक्षां 'नियतकालिक' ह्मटल्यास बरें होईल. त्यावेळीं छापखान्याच्या सोयी आतांसारख्या नसल्या कारणानें 'दैनिक वर्तमानपत्र' काढतां येत नसे. रावबहादुर गोपाळराव हरि देशमुख यांचें नांव मराठी वाचकांच्या पूर्ण परिचयाचें आहे. त्यानीं लोकहितवादी नांवाचें मासिक सुरू करून त्याच्याद्वारें वाङ्मयवृद्धिस अत्यंत मोठेंच साह्य केलें आहे. आज जगांत जो ज्ञानाचा प्रसार इतका झपाट्यानें होत आहे, त्याचें कारण ही मुद्रणकला होय. ज्यावेळीं मुद्रणकलेचा शोध लागून तिच्यांत सुधारणा होऊं लागली, त्या वेळीं ज्ञानप्रसार युरोपखंडांतसुद्धां फारच झपाट्यानें होऊं लागला, हें सर्वांस ठाऊक आहेच. नंतर १८४९ सालीं 'ज्ञानप्रकाश' पत्र निघालें. त्यावेळीं 'लोकहितवादीनीं' त्यांतून आपले विचार लोकांपुढें मांडले. हल्लीं लोकहितवादींच्या लेखांचें एक पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. त्यांत स्वदेशीचें धोरण प्रसिद्ध झालेलें आहे; त्यांत इंग्रज लोकांच्या कावेबाज व धूर्त स्वभावाची माहिती दिली आहे, व त्यांचें हिंदुस्थानच्या व्यापाराचें धोरणहि त्यांत सांगितलें आहे; यावरून स्वदेशीच्या चळवळीला आतांचें स्वरूप आहे, तें जरी त्यावेळीं नव्हतें तरी त्याबद्दल इशारत मात्र पूर्वींच दिली गेली होती असें यावरून दिसतें. त्यांनं सामाजिक सुधारणेकरितां समाजांत जी जागृति केली, ती वर्तमानपत्रांतूनच केली. १२०० वर्षेंपर्यंत सामाजिक गुलामगिरींत दडपला गेलेला हा देश वर यावा ह्मणून प्रयत्न करावा असें १८५० नंतर पुढाऱ्यांना वाटूं लागलें व त्या दिशेनें त्यांचे प्रयत्न चालू झाले. 'इंदुप्रकाशाचा' जन्म या धोरणानुसार सामाजिक सुधारणेकरितां झाला. त्यावेळीं त्याचे एडिटर रानडे हे होते. ते इंग्रजींत लेख लिहीत असत. विष्णुशास्त्री पंडित मराठींतून लिहीत असत. त्यांनीं इंदुप्रकाशांतून पुनर्विवाहाबद्दल फार जोराची चळवळ केली. तें त्यांचे लेख इतके उत्तम आहेत कीं, त्या वरून वृत्तपत्रें हीं वाङ्मयवृद्धीस कशीं पोशक होतात, हें कळून येईल. सन १८४३ सालीं पहिला पुनर्विवाह झाला त्यावेळीं मसुरकरांनीं थोड्यावेळापूर्वीं ठार मारण्याविषयीं धमक्या दिल्या वगैरे हकीगत सांगितली, तशीच स्थिति विष्णुशास्त्री पंडितांविषयीं झाली. कृष्णशास्त्री चिपळूणकरांसारखी मंडळीं त्या पुनर्विवाहित जोडप्याच्या [वधुवरांच्या] वर घोड्याची कुचेष्टा करण्यास प्रवृत्त झाली होती. त्या वेळच्या परिस्थितीनें अंतःकरणास पीळ पडून विष्णुशास्त्री पंडितांनी त्या विषयावर जो लेख लिहिला आहे, तो वाङ्मय या दृष्टीनें अत्यंत वरचें स्थान पावलेला आहे. सन १८४८ त 'इंदुप्रकाश' पत्र निघालें, तेव्हां पासून तें आतांपर्यंत वाङ्मयाच्या अभिवृद्धीस मदत करीत आहे. टिळक व आगरकर या अद्वितीय जोडीचे गुरु विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी १८८० सालीं 'निबंधमाला' सुरू केली. पण तें मासिक अगदींच अनियमित निघत असे; त्या निबंधमालेच्या द्वारें चिपळूणकरानीं जें कार्य केलें तें महाराष्ट्राल ठाऊक आहे. नंतर सन १८८१ सालीं केसरी निघाला; केसरींत बाळ गंगाधर टिळक व गोपाळ गणेश आगरकर ही बाळ–गोपाळांची जोडी लेख लिहीत असे. पुढें आगरकरांचे सामाजिक बाबतींत तीव्र मतभेद होऊन केसरींत भांडणें सुरू झालीं. त्यांचा परिणाम या बाळगोपाळांची जोडी फुटून त्यांतून सामाजिक सुधारणेकरितां 'सुधारक' पत्राचा जन्म होण्यांत झाला व केसरींत राजकारणात्मकच लेख येऊं लागले. लोकमान्य टिळकांचे लेख हल्लीं प्रसिद्ध झाले आहेत व आगारकरांचा लेखसंग्रहहि प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून लेखांनीं वाङ्मयाभिवृद्धीस केवढी मोठी मदत केली आहे, हें समजून येतें. या सर्व लेखांचें महत्व अत्यंत मोठें आहे. त्यापूर्वीं मराठींतून बखरी इत्यादिकांच्या रूपानें गद्य वाङ्मय प्रसिद्ध होत असे; व त्यांत प्रतिभा नव्हती. तिच्या कारणासंबंधानें मतभेद आहेत. त्या वेळची राजकारणाची कल्पना अगदीं संकुचित होती. कारण एखाद्या कोणी व्यक्तीनें सर्व देशावर किंवा देशाच्या एका भागावर राज्य करावें व लोकांनीं राज्य करणाराच्या धोरणावर अनुकूल असावें, अशी त्यावेळीं स्थिति होती. इंग्रजी राज्यानंतर राजकारणाचें ध्येय बदललें. आतां लोकांसहि आपण राजकारणांत आपल्या प्रतिनिधींच्या द्वारें हक्क असावेत असें वाटूं लागलें. तदनुसार चळवळहि जोरानें सुरू झाली. त्याबरोबरच पूर्वीं भाषेंत रूढ असलेले शब्द योग्य अर्थ दर्शित करण्यास अपुरे पडूं लागले. व त्यामुळें नव्या नव्या विशेषार्थ दर्शक शब्दांची भर पडूं लागली. नोकरशाही ह्मणजे ब्युरॉक्रसी. हा नोकरशाही शब्द लो० टिळकांना वऱ्हाडांत एके ठिकाणीं व्याख्यान देत असतांना सूचला. व तोच सन्मार्थ दर्शक व योग्यार्थ दर्शक असल्यानें सर्वत्र कायम रूढ झाला आहे. त्यापूर्वीं ब्युरॉक्रसी या शब्दाला गोरा अधिकारी, सनदी अधिकारी हे शब्द वापरीत असत. व राजधोरणाला राजकीय संविधानक किंवा राजकीय व्यवहारिक स्वरूप असें ह्मणत असत. पण जसजसे नवीन नवीन विचार लोकांत जागृत होऊं लागले, तस तसे नवीन नवीन शब्द प्रचारांत रूढ करून ते विचार कायम ठेवण्याची कामगिरी वृत्तपत्रानींच केली आहे. नवीन पिढीचें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयाविषयीं फारसें मत अनुकूल नाहीं. परंतु वर्तमानपत्रांची जबाबदारी एवढी मोठी आहे कीं, त्यांस २० । २५ वर्षांनंतर येणारी परिस्थिति लक्षांत घेऊन आज लेख लिहावे लागतात. त्यावरून समाजांत भविष्यकालानुसारी विचार जागृति होत असते. केसरीमध्यें आठ दहा वर्षांमागें संस्कृत भाषेचें पुनरुज्जीवन ह्मणून प्रसिद्ध झालेली लेखमाला आपल्या वाचनांत आलीच असेल. ती लेखमाला नरखोंत केळकरांनीं लिहिलेली आहे. तिचें महत्व मराठी भाषेच्या वाङ्मयाच्या दृष्टीनें फारच मोठें आहे. १८९३ सालीं लो० टिळकांनीं 'एक्चेंज' या विषयावर एक लेख केसरींत लिहिलेला प्रसिद्ध आहे. निरनिराळ्या इंग्लिश शब्दांस योजलेले नवे नवे मराठी किंवा संस्कृत प्रतिशब्द त्यांतील भाषेचा मार्मिकपणा, यामुळें तो लेख मराठी भाषेंत एक कायमचाच झाला आहे. नवील नवीन शब्द भाषेंत रूढ होत असतांना योग्यायोग्यतेकडे लक्ष द्यावें लागतें उदाहरणार्थ डोळे असलेल्या माणसास डोळस ह्मणतात. त्याचप्रमाणें कानानें चांगलें ऐकूं येणाऱ्या माणसास कानस हा शब्द आगरकर यांनीं उपयोगांत आणिला. त्यावेळीं बूट घालणाऱ्या माणसास बूटस असें कां ह्मणूं नये, अशा प्रकारें विष्णुशास्त्री चिपळूणकरांसारख्यानीं पृच्छा केल्यानें, त्या शब्दाचें अर्थ निदर्शकत्व कमी ठरल्यानें तो शब्द वाङ्मयांतून अगदींच नाहींसा झाला. त्याचप्रमाणें हरिभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्या वाचल्या असतां आपणांस आढळून येईल कीं, त्यानीं पुष्कळशीं नामसाधित क्रियापदें तयार केलीं आहेत. [उदाहरणार्थ उद्गार शब्दावरून उद्गारला हें क्रियापद] अशा प्रकारचे हे नवीन शब्द नवार्थ दर्शक असल्यानें कायमचे रूढ होऊन बसले आहेत. हरिभाऊ आपट्यांचें चरित्र बापुराव आंबेकर यानीं लिहिलें आहे; त्यांत या कादंबऱ्याविषयीं असें लिहिलें आहे कीं, ज्यावेळीं आतां छापवयाचा मजकूर अगदीं शिल्लक नाहीं, टैप जुळविणारे रिकामे बसताहेत अशी स्थिति आल्यामुळें म्यानेजरांनीं हरिभाऊंकडे जाऊन बसावयाचें. तेव्हां त्यांनीं एक दोन प्रकरणें तेथेंच लिहून देऊन त्यांना रवाना करावयाचें. हें नवें प्रकरण लिहितांना त्यांना पूर्वींचीं कोणतींच प्रकरणें वगैरे पहावीं लागत नसत. इतकें त्याचें अवधान व संदर्भ ग्रहणशक्ति पूर्णत्वास पोंहोंचली होती. तात्पर्य लेख, विष्णुशास्त्री पंडितासारख्या कार्यस्फूर्तीनें लिहिला जावो किंवा निवळ कर-

Ano 9 N.º 31

Quinta-feira 30 de Outubro de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
Por cadalinha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत

BHARAT

वर्ष ९ वें. अंक ३१

गुरुवार ता. ३० अक्टोबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. खं. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

CODIGO DE USOS E COSTUMES DE GOA

"Art. 12 º. Os contractos antenupciais dos menores impuberes devem ser celebrados pelos pais, na falta dos pais pelo maioral, e na falta deste, pelo tutor".

"§ unico. Sao permitidos pactos sucessorios nas escritaras antenupciaes."

"Art. 13 º. Na falta de escritura antenupcial o regime matrimonial sera' o de separagao dos bens, sem comunhao dos adquiridos, nao sendo aplicaveis os artigos 1.130 º a 1133 º do Codigo Civil, e tendo a mulher direito ao usufruto da metade dos bens do marido apoz a morte deste, salvo no caso do adulterio dela, provada na acgao da separagao ou divorcio."

"§ No caso da poligamia o usufruto dos bens do marido pertencera' em partes iguais, a's mulheres, aos filhos varoes e a's filhas solteiras.

"Art. 14 º. Presumem-se do marido, salvo prova em contrario, todos os bens do casal."

O Codigo de usos e costumes de 1880 permitia o casamento dos impuberes, mas nao prescrevia a forma de suprir a incapacidade dos menores nas escrituras antenupciaes. O art. 12 º do projecto era indispensavel portanto para preencher esta lacuna.

A doutrina do paragrafo unico do artigo 12 º e do 13 º revoga os principios contidos na nossa legislagao comum, o de "nao ser permitido, nem se quer por contrato antenupcial, renunciar a' sucessao de pessoa viva ou alienar ou obrigar os direitos que eventualmente possa ter a sua heranga (art. 2042 do Codigo Civil), e o de entender-se que, na falta de qualquer acordo ou convengao, o regime matrimonial sera' da comunhao dos bens (art 1098) e parece-nos mais sensata quer por tender mais a aproximar-se dos habitos e costumes dos hindu's, desde ha' seculos inveterados, quer por procurar o meio termo, entre os principios expendidos nos usos e costumes de 1853 e os adoptados nos de 1880 exigido pelas necessidades nos periodos da transigao de qualquer sociedade de dum estado a outro.

A missao do legislador e' tao melindrosa e complicada quando tenha por objecto a reforma social, que todo o seu cuidado e' empenho se torna esteril se a sua obra nao for acomodada ao grau da civilisagao dos povos.

Os inglezes por serem mais praticos que teoricos nos assuntos coloniais, ao contrario do que se pratica no nosso meio, quando tenham em mira qualquer medida tendente a reformas sociaes, antes de promulgar a lei procuram estudar de perto as sociedades, adquirem conhecimentos dos seus habitos, usos e costumes, aus-

As petas do sr. Batalha

Positivamente, o sr. Pereira Batalha perdeu as estribeiras, vendo-se colocado em mau terreno no assunto do tal *favor* que o *Bharat* demonstrou n o passar duma... *caganifancia*. E pretendendo desembaraçar-se da séria entalação em que se embrulhou pela sua própria prosápia, o atrapalhado di e tor de *A Provincia* tenta agora, mas sem exito, empanar, a seu modo, o brilho da verdade que resplandece na historia d mesmo *alardeado favor* que narramos, sem rebuços nem ambages.

Pois é verdade. O sr. Batalha não sabe o que escreve nem escreve o que sabe...tal é o estado de *sitio* que o *Bharat* lhe criou na cabeça ... respeitavel.

Alardeando o seu *favor* o director de *A Provincia* disse, pela primeira vez, que prestara o favor ao nosso director, *intercedendo ele junto das autoridades para que a policia lhe não lançasse as garras, quando foi da questão dos Velipos e do ataque armado aos soldados*. Agora, porêm, desdizendo o que disse, afirma:

"E (o sr. Craveiro Lopes) recebeu-o (o nosso director) depois por motivos que o sr. Dessai conhece, mas que, por conveniencia propria ou por desmemoriado, omite como omitiu as declaragoes e promessas que fez para justificar que era digno de nao ir para o calabougo como instigador das proesas dos Velipos..."

O sr. Batalha emporcalhou se, portanto, na lama da mais abjecta mentira, quando arvorou-se em *libertador* do nosso director das garras da policia, quando o sr. Hegdó Dessai se livrou delas, como agora a *A Provincia* rectifica, á força das suas proprias declarações e promessas!

E que "mais depressa se apanha um mentiroso que um coxo"!

Mas ¿Que declarações e promessas haveria feito o sr. Hegdò Dessai ao sr. coronel Craveiro Lopes para justificar que era digno de não ir ao calabouço como instigador das *proesas* dos Velipos? Convinha que o sr. Batalha as relatasse para a sciencia e consciencia do publico e para o que o aprasamos para ainda esmagar-lhe a basofia.

O que o sr. Hegdó Dessai fez no comando de Pangim, é relatar as peripecias de que se revestiu o caso de Canvorem pela *intrujice bajulatoria* dum proprietario dessa aldêa, ao tempo capacho reles da governação do sr. dr. Jaime de Morais, aproveitando, tambem, incidentalmente, do ensejo para irradiar em jorros a luz sobre certos pontos obscuros da politica hindú e da modesta pessoa dele, como ficou dito no artigo *Um "favor" do sr. Batalha*.

Autorisado pelo sr. Coronel Craveiro Lopes declara o sr. Pereira Batalha *ser absolutamente errada a "conclusão"* a que o director do *Bharat* chegou na entrevista entabolada com aquela autoridade.

Não acreditamos na autorisação que o jornalista europeu invoca para, a seu modo, salvar o seu comprometimento de eximio ... *favoreiro*, porquanto o sr. Hegdó Dessai nunca procurou entrevistar-se com o sr. Craveiro Lopes, na qualidade de advogado dos Velipos, mas sim como um jornalista conhecedor da verdadeira situação duns pobres diabos, vitimas da prepotencia do já referido *capacho governamental*, o tal do *costas quentes*! Se o director do *Bharat* quizesse falar com o sr. Comandante Geral, como advogado, dispensaria a ajuda da companhia do sr. Batalha: falo-ia por si.

A relutancia do sr. coronel Craveiro Lopes em receber o sr. Dessai resultou, portanto, não deste sr. se apresentar como advogado dos Velípos mas sim porque foi acompanhado do sr. Pereira Batalha que é, como se soube depois, um tipo sem consideração no meio europeu da colónia por causa de certas aventuras e habitos que o celebrisam tristemente.

¿Quem não conhece a *tetric[a]* influencia de *má* companhia[?] [O] proprio sr. Batalha sabe [a] melhor do que nós pela [a]... de que mantem com o s... *Jesus* que é o tal negro Af...

Pelo exposto se vê que o *Bharat* disse a verdade e só esta quanto ao *favor* do sr. Batalha, que para salvar o seu rubicundo nariz, atribui, de novo, á Policia propositos que nunca albergou, como os da prisão, sem culpa formada, do sr. Hegdó Dessai que lhe não dera causa, no caso de Canvorem. E se êla quizesse prende-lo como criminoso te-lo-ia feito e não seria a *intercedencia* do... *favoreiro universal* que o evitaria...

Mas é inutil gastar cera com um ruim defunto como o sr. Batalha.

भारत

कार्तिक शु० ३ या शके १८४६

ऐक्य परिषदेचें कार्य

दिल्लीची ऐक्य परिषद कितपत यशस्वी झाली, तिच्या कार्यांत व वादविवादांत भाग घेणाऱ्या प्रतिनिधींपुढें असलेले प्रश्न किती बिकट होते व ते सोडविण्याच्या मार्गांत असलेल्या अडचणींतून त्यानीं किती कुशलतेनें व धैर्यानें आपला मार्ग काढला ह्याची योग्य कल्पना आणण्यास परिषदेनें मोठ्या परिश्रमानें व बराच खल करून शेवटीं पास केलेल्या ठरावाकडे लक्ष देणें जरूरीचें आहे. पहिल्या ठरावांत धार्मिक मतभेदांच्या नांवाखालीं होणाऱ्या अत्याचारांचा निषेध करण्यांत आला आहे. कोणत्याहि प्रकारच्या धार्मिक समजुतीमुळें उत्पन्न झालेल्या कारणांचा निकाल बेकायदेशीरपणानें व दंडेलीनें न करतां तो प्रातिनिधिक पंचायतीकडून व तें शक्य नसल्यास सरकारी कोर्टांतून करण्यांत यावा असें परिषदेनें ठरविलें आहे. दुसऱ्या ठरावांत अशा प्रकारची पंचायतीची व्यवस्था करण्यासाठीं हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन व शीख समाजांच्या प्रतिनिधींची एक मध्यवर्ती पंचायत स्थापून त्याचा कार्यक्रम निश्चित केला आहे. तिसऱ्या ठरावांत वेगवेगळ्या जातींच्या व धर्मांच्या माणसांत ऐक्य उत्पन्न करण्यासाठीं व धार्मिक,व सामाजिक बाबतींत प्रत्येकाचें स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यासाठीं एका धर्माच्या माणसानें दुसऱ्या धर्माच्या माणसांशीं वागतांना कोणत्या ढोबळ तत्वांचा अवलंब केला पाहिजे ह्या विषयींचा विस्तृत खुलासा करण्यांत आला आहे. एकमेकांच्या धर्माची नालस्ती, देवस्थानांवर हल्ले, गोवध, मशिदीपुढें वाद्यें वाजविणें, धर्म परिवर्तन वगैरे वगैरे दंग्यास कारणीभूत होणाऱ्या गोष्टींचा विचार ह्या ठरावांत करण्यांत येऊन त्यासंबंधींचें परिषदेचीं मतें नमूद करण्यांत आलीं आहेत. ठराव चार पांच व सहाचे विषय अनुक्रमें पक्षांध वृत्तपत्रांतील मजकूर आणि अत्याचारांसंबधींची त्यांची जबाबदारी मशिदी, देवळें इत्यादि इमारतींचा नाश व आर्थिक व सामाजिक जाति बहिष्कार हे आहेत. सातव्या ठरावांत ता. ८ हा ऐक्य दिवस मानून परिषदेच्या उपरिनिर्दिष्ट ठरावांना हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं दुजोरा मिळून ते स्वीकारण्यांत यावे, अशी विनंति करण्यांत आलेली आहे. ह्या एकंदर ठरावांत म. गांधींच्या ऐक्याच्या तत्वाला प्रमुख स्थान मिळालें आहे हें सहज दिसून येईल. ऐक्य परिषदेच्या कार्यास भारत मंत्री लॉर्ड ऑलिव्हीयर, व्हायसरॉय साहेब प्रांताधिपति व दुसरे बडे अधिकारी यानीं प्रसंगोचित संदेश पाठवून मदत केलेली आहे, हें आह्मीं मागें नमूद केलेंच आहे.

दिल्लीस जमलेले वेगवेगळ्या धर्मांचे व मताचे पुढारी हिंदुस्थानांतील लोकांचे योग्य व जबाबदार पुढारी होते हें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेली त्यांच्या नावाची यादि व त्यांच्या बैठकींतील वादविवादांच्या हकिगती वाचल्यास कळून येईल.परिषदेस हजर राहण्यासाठीं हकिम अजमलखान,स्वामी श्रद्धानंदजी व मौलाना महंमद अली ह्यानीं अशाच व्यक्तींची निवड केली होती, कीं कोणत्याहि विशिष्ट जातीच्या किंवा संप्रदायांच्या लोकांस आपलीं मतें पुढें मांडतां आलीं नाहींत किंवा परिषदेच्या कार्यांत आपणास भाग घेतां आला नाहीं अशी तक्रार करण्यास मुळींच जागा राहूं नये. निमंत्रित मंडळीपैकीं सर्वांनीं त्यानां देण्यांत आलेल्या या संधीचा फायदा घेऊन देशांत शांतता उत्पन्न करण्याच्या प्रयत्नाच्या ह्या सत्कृत्यास हातभार लावला ही समाधानाची गोष्ट होय. ख्रिस्ती धर्माच्या प्रतिनिधींनीं विशेषतः हिंदुस्थान व ब्रह्मदेशच्या मुख्य बिशपानीं व ' स्टेट्समन ' सारख्या ॲंग्लो इंडीयन पत्राच्या संपादकानीं आपल्या ज्ञानाच्या व कळकळीच्या सल्लयाचा व प्रत्येक प्रकारच्या दुसऱ्या मदतीचा परिषदेस वेळोवेळीं जो फायदा दिला व ती यशस्वी करण्यास प्रामुख्यानें जो भाग घेतला त्याचा थोड्याशा शब्दानीं पुरेसा उल्लेख करणें अशक्य आहे. जाति जातींतील सलोखा वाढणें हिंदुस्थानांतील ख्रिस्ती धर्मानुयायांस व इंग्रजास आवश्यक वाटत असून हें घडवून आणण्यास मदत करणें त्यांना आपलें कर्तव्य वाटलें हें बिशप वेस्टकॉट, मि. मूर, मि. जेम्स वगैरे गृहस्थानीं त्या प्रसंगीं दाखवून दिलें. ख्रिस्ती व इंग्रज समाजास ही गोष्ट भूषणास्पदच आहे. आपल्या मुलाखतींत व पत्रांत म. गांधींविषयीं प्रेम व आदर व्यक्त करण्यांत त्यानीं क्षुल्लक भेदाभेद बाजूस ठेऊन ख्रिस्तीधर्माचें मूलभूत तत्व प्रस्थापित केलें. " ह्या देशांतील प्रत्येक माणसाचे व आपल्या धर्माच्या शिकवणीस जागणाऱ्या खऱ्या ख्रिस्ती माणसाचें अंतःकरण आपण चालविलेल्या ह्या प्रायश्चित्तव्रताच्या दृश्यानें हालवून गेल्या खेरीज राहणार नाहीं " ह्या वाय. एम्. सी. ये च्या मि. जेम्स् ह्या इंग्रजाच्या एका वाक्यांत इंग्रज समाजाच्या अंतःकरणाचें व भावनाचें प्रतिबिंब पडलेलें आढळेल.

ह्या देशाच्या प्रत्येक भागांतून परिषदेस हजर राहिलेले पुढारी ते दंग्यांत सामील झालेले नसल्यामुळें दंग्यांत भाग घेणाऱ्या लोकांचे खरे प्रतिनिधीच नव्हते व ह्मणून ह्या उप्पर दंगे होण्याची शक्यता कायमच राहते. ह्या दृष्टीनें पहातां परिषदेनें कोणतें उपयुक्त कार्य केलें ? हा प्रश्न परिषदेचे शत्रू आज विचारीत आहेत. ह्या प्रश्नाचें उत्तर आपणास असें देतां येईल:-

हिंदु मुसलमानाच्या दंग्याचीं कारणें एवढीं क्षुद्र असतात कीं, त्यांना कारणें ह्मणणें प्रत्येक समंजस माणसास लाजिरवाणें वाटतें. दंग्यांचें एकंदर स्वरूप पाहतां त्यांच्या मुळाशीं धार्मिक भावना किंवा मतभेद असणें कोणत्याहि धर्माच्या कीर्तीस काळिमा आणणारें आहे तरीपण हे दंगे फक्त बदमाष किंवा अशिक्षित लोकांकडून केले जातात असें ह्मणणें धाडसाचें होईल. आतांपर्यंत झालेल्या दंग्यांच्या हकिगतीवरून असें दिसून येतें कीं, दंग्यांची सुरवात जरी दोन्ही जातींच्या बदमाष वर्गांकडून करण्यांत येत असली तरी दंग्याचा संबंध समाजाच्या बऱ्याच मोठ्या भागाकडे पोंचतो. सुशिक्षित पांढरपेशा व जबाबदार वर्गाची अप्रत्यक्षपणें मदत मिळत असल्याखेरीज नुसत्या बदमाषानां लखनौ, दिल्ली, कोहाट वगैरे ठिकाणीं झालेल्या दंग्यासारखे भयंकर दंगे करून शांतता भंग करणें शक्य होणार नाहीं. विशेषतः हिंदुस्थानाच्या लोकवस्तींतील मोठ्या प्रमाणाला आर्थिक, राजकीय व धार्मिक सत्वाची जाणीव नसल्यामुळें व ह्या विषयासंबधीं स्वतः विचार करून त्याप्रमाणें वागण्याएवढी जागृति त्यांच्या बाबतींत झाली नसल्यामुळें ते पूर्णपणें परावलंबी बनलेले आहेत. ह्मणून त्यांच्या वर्तनाची जबाबदारी बव्हंशीं समाजाच्या स्तंभावर सुशिक्षित व पुढारी ह्मणविणाऱ्या लोकांवर राहते. ही जबाबदारी प्रस्थापित करणें दिल्ली या परिषदेला आवश्यक वाटलें. दिल्लीच्या परिषदेनें जबाबदार पुढाऱ्यांस एकत्र जमवून त्यांना आपापसातील मतभेदांचा विचार करण्याची व वेगवेगळ्या जातीच्या हिताकडे दुर्लक्ष न करतां व्यापक अशी ऐक्याची योजना तयार करण्याची संधी आणून दिली. ह्या पुढाऱ्यानीं त्यांच्यापुढें असलेल्या प्रश्नाची चर्चा मोकळ्या मनानें केली वती संपण्यास जवळजवळ ७–८ दिवस लागले. ह्यावरून परिषदेचें प्रातिनिधिक स्वरूप दिसून येतें. परिषदेची उपयुक्तता सुद्धां ह्यावरून सिद्ध होते. दंग्यासंबंधींच परिषदेचें क्षेत्र नियमित होतें, हें अगोदरच कबूल केलें पाहिजे. दंगे होणें किंवा न होणें परिषदेच्या निकालावर अवलंबून आहे, असें ह्मणणें मूर्खपणाचें होईल. दंगे एकदम थांबविणें परिषदेच्या हातांत नाहीं. तें अशक्य करण्यासाठीं जरी परिषद बोलावलेली होती व ती यशस्वी झाल्यास शांततेच, सहिष्णुतेचें, ऐक्याचें कार्य चालू राहण्यास मदत मिळेल अशी जरी सर्वांची अपेक्षा होती तरी तीनें पास केलेले ठराव सर्वत्र अमलांत येऊन एकदम शांतता प्रस्थापित होईल अशी आशा करणें धाडसाचें झालें असतें. ऐक्य परिषदेनें ऐक्य घडवून आणलें नाहीं. तीनें ऐक्य घडवून आणण्याचा फक्त मार्ग आंखून दिला. तिनें ऐक्याच्या इमारतीची उभारणी केली नाहीं; तीनें फक्त त्या इमारतीचा पाया घातला. ऐक्याच्या मार्गांत प्रगति करण्याचें ऐक्याची इमारत उभारण्याचें काम अजून व्हावयाचें आहे. त्याला बराच अवधि लागण्याचा संभव आहे.

ह्या संयुक्त व प्रातिनिधिक परिषदेनें पास केलेले ठराव अंतःकरणपूर्वक व निर्भयपणें व्यवहारांत आचरणें हें समाजाच्या पुढाऱ्यांचें व प्रत्येक जबाबदार व विचारी माणसांचें कर्तव्य होऊन बसलें पाहिजे. परिषदेस सामील झालेल्या पुढाऱ्यांस व लोकप्रतिनीधींस व्यक्ति स्वातंत्र्याच तत्व सामाजिक व धार्मिक गोष्टींत लागू करण्यांत शक्य तो मदत प्रत्येक व्यक्तीनें दिल्यानेंच परिषदेनें सुरू केलेलें कार्य यशस्वी होईल. एरवीं हे ठराव कितीहि उत्कृष्ठ व संपूर्ण असले तरी निरुपयोगी ठरतील हें ध्यानांत ठेवणें अत्यांत जरूरीचें आहे. ह्या ठरावांच्या स्वरूपाचा विचार केल्यास त्याच्या व्यापकतेमुळें ते व्यवहारांत आणणें कोणत्याहि माणसाला मग त्याची धार्मिक मतें कितीहि कर्मठ व आकुंचित असोत, सोपें आहे एकंदर सातहि ठरावांत कायद्याची भाषा किंवा कायद्याची सक्ति ह्यापैकीं एकहि गोष्ट नाहीं. त्यांत कोणत्याहि धर्माच्या किंवा मताच्या माणसाला आक्षेपार्ह वाटणारी अशी कोणतीच गोष्ट नाहीं, हें न्यायाची व सत्याची थोडीशी तरी कल्पना असणाऱ्या प्रत्येक माणसास कबूल करणें भाग आहे. किंबहुन ह्या ठरावांत उल्लेख केलेली अशी एकहि गोष्ट नाहीं कीं जी सामान्य आचरणांत विशेष महत्वाची समजली जाण्याची किंमतीची ठरेल. माणसा माणसांतील वागणुकींत उपयोगांत आणावयाचे साधे नियम ह्या ठरावांत क्रमवार मांडण्यात यावेत ह्यापेक्षां आमच्या नैतिक व मानसिक दैन्याच्या अधोगतीचें दुसरें कोणतें उदाहरण देतां येईल ! आमच्या भ्याडपणाकडे, गुलामगिरीकडे, स्वातंत्र्याची किंमत न ओळखणाऱ्या बुद्धिमंदतेकडे बोट दाखवून सुधारलेल्या जगानें आमचा उपहास करण्याचें दुसरें कोणतें सबळ कारण असूं शकेल ? सध्याच्या परिस्थितींत अस्वस्थतेच्या अज्ञानाच्या अत्यंत निराशाजनक स्थितींत ह्या गर्द अंधःकारांत व अधोगतीच्या ह्या खोल गर्तेत उजेडाची, दिव्य स्फुर्तीची, आशेची एक ज्योत एका कोपऱ्यांत तेवत आहे. भगवान श्री कृष्णानें, बुद्धानें, पावन केलेल्या आमच्या ह्या अभागी देशात अंधःकाराचें राज्य पूर्णपणें पसरण्यास अजून वेळ आहे. आजच त्याची पुण्याई संपलेली नाहीं अशी आपण आशा बाळगूं या !

—कौंसल्य लेजिस्लातीव्हाच्या मेंबरांच्या नवीन निवडणुका पुढें नमूद केलेल्या तारखांस होणार आहेत. गोवें, दमण, ग्रामसंस्था व जास्त कर भरणारे ९० ठिकाणदार यांच्यातर्फे होणारी— ७ डिसेंबर. व्यापारी मंडळ,शेतकरी व जमिनदारांची संस्था व इतर याचं नमुन्यांच्या संस्थांतर्फे होणारी—१४ डिसेंबर. मुनिसिपाल निवडणुकांचे दिवस मात्र अजून प्रसिद्ध करण्यांत आले नाहींत. ते कां ?

श्रीशारदोत्सवांतील व्याख्यानें

विजयादशमी व सरस्वतीची आराधना

या विषयावर दामोदर सां. यंदे यांचें रा. ब. खोपकर यांचे अध्यक्षतेखालीं मडगांवच्या श्रीदामोदर विद्याभुवनांत पुढील प्रमाणें भाषण झालें. व्याख्याते ह्मणाले: आपण मडगांवकर मंडळीनें आपल्या या समारंभास आमंत्रण करून मला बोलण्याची सुसंधि आणून दिली ह्मणून मुंबईकरांतर्फे मी आपले आभार मानीत आहें. मित्रहो, सर्व उत्सवांत हा शारदोत्सव महत्वाचा कां, याचा आपण विचार करूं लागलों व तसेंच शारदोत्सव प्रचारांत कसा आला इकडे लक्ष पुरविलें तर आपणास काय दिसतें ? प्रभूनें आपणास मानव जन्मास घातलें आहे, त्याचें कार्य मोक्षप्राप्ति करून घेणें ह्मणजे पुन्हा ईश्वरास जाऊन मिळणें, हें आहे. ती मोक्षप्राप्ति कशी करून घेतां येईल, आयुष्य उत्तम प्रकारें कसें पार पाडतां येईल, याच साठीं आमच्या ऋषींनीं व पूर्वजांनीं असले हे उत्सव घालून दिले आहेत. देवीपुराणांत व भविष्य पुराणांत असें वर्णन आलें आहे कीं, महिषासूर नांवाचा एक राक्षस शंकराच्या वरानें फार माजला; त्यास वर असा होता कीं, त्याला कोणाकडूनहि मृत्यु येऊं नये. त्यांत त्यानें स्त्रीजातीचाच मात्र उल्लेख केला नव्हता, कारण त्याला स्त्रीजात हा कःपदार्थ वाटत होता. शेवटीं दैत्याचा त्रास सहन न होऊन सर्व देव जमून देवीची प्रार्थना करूं लागले; तेव्हां देवीनें महिषासुराचा वध केला व सर्व लोकांस त्रासमुक्त केलें. देवीपुराणांत अशी कथा आहे कीं, सर्व देवांनीं आपापली शक्ति एकवटून ही शारदादेवी निर्माण केली आहे; अर्थात् ही शारदा ह्मणजे शक्तीच असल्यानें ही सर्व कांहीं आहे असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. अशा या देवीची आराधना वेगवेगळ्या ठिकाणीं वेगवेगळ्या पद्धतीनें होते. बंगालमध्यें हा उत्सव फार मोठ्या प्रमाणानें पाळला जातो, हें आपणास ठाऊक आहेच. आपल्या महाराष्ट्रांत हा उत्सव आपण अशा प्रकारें पाळीत असल्यानें त्याची माहिती मी आपणास सांगितली पाहिजे असें नाहीं. अशा या उत्सवापासून काय शिकावयाचें, हें आपण आपल्या ऋषींनीं घालून दिलेल्या नियमाशीं सांगड घालून पाहिल्यास आपणास यांत कोणते योग्य विचार केल्याचें आढळून येईल तें आपण पाहूं. आपल्या चातुर्मासांत मुख्य महिना श्रावण हा होय. या महिन्यांतील रविवार, सोमवार, मंगळवार इत्यादि वारांत सूर्य, शंकर, देवी इत्यादि देवतांची आराधना करून एकभुक्त राहाण्यास सांगण्याचा हेतु काय ? मनुष्यास देवाची आराधना करावयाची तर त्यानें सात्विक आहार केला पाहिजे; व त्यानें आपलें पोट रिकामें ठेविलें पाहिजे. खादाड मनुष्य आळशी होतो व आळशी मनुष्य ईश्वरप्राप्ति करून घेण्यास अयोग्य ठरतो. आपणास शर्यतींच्या घोड्यांची व स्वारांची गोष्ट माहीत असेलच. जो घोडा शर्यतीवर नेण्याचा असतो त्यास व त्याच्या स्वारास त्या दिवशीं अन्न मुळींच न देतां थोडेंथोडें दूध मात्र देतात. त्यामुळें त्याची सुस्ती झडून ते पळण्यास व पळविण्यास लायक होतात. त्याप्रमाणेंच जें पात्र रंगभूमीवर यावयाचें असतें, तें त्या दिवशीं जेऊन केव्हांच रंगणार नाहीं. कार्य झाल्यानंतर जेवील हें सर्वांस ठाऊक आहेच. आपल्या आंगांत जागृति राहिली पाहिजे तर आपण अल्पसेवन केलें पाहिजे. या अल्पसेवनाच्या वैद्यकीय दृष्टीनेंहि एक उपयोग आहे. वर्षाऋतूंत अन्न पचन होण्यास जड जातें ह्मणून या रीतीनें एकभुक्त रहाण्यास सांगितलें आहे. पारमार्थिक व व्यवहारिक अशा दोन्हीं दृष्टीनीं मागं सांगितल्याप्रमाणें याचा उपयोग आहे. श्रावण महिन्यानंतर आपला भाद्रपद मास आला. या महिन्यांत मुख्य आराधना श्रीगणपतीची होय. ॐकार स्वरूप जो परमेश्वर तोच गणपति होय. त्याच्याठायीं मन स्थिर करावें, असा हा उत्सव करण्यांत व सण नेमून ऋषींचा हेतु आहे; पण आतां ह्या उत्सवप्रसंगीं एकमेकांच्या चढाओढीनें फाजील व वाष्कळ खर्च होतो. त्यानें १० हंड्या लावल्या तर आपण आपल्या गणपतीसमोर २० हंड्या लावणार. त्यानें एक नायकीण नाचविली तर आपण दोन दोन नाचविणार, अशा प्रकारें मौजेंत, चढाओढींत व चैनींत उत्सव साजरा केला जातो. ज्या उत्सवानें एकमेकांत द्वेष, मत्सर, ईर्ष्या वगैरे उत्पन्न होत असेल, तर आमच्या आर्यऋषींनीं घालून दिलेला नियम फुकट गेला नाहीं काय ? या नंतर पितृतिथी आल्या. गाय, कावळ्यांना या दिवसांत आपण घांस घालतों त्याचा हेतु काय? सर्व प्राण्यास समान लेखा. कारण सर्वांच्या अंतर्यामीं एकच ईश्वर वास करीत आहे. पण ही पितृतिथीसुद्धां व्हावी तशी ऋषींनीं घालून दिलेल्या नियमांप्रमाणें साजरी होत असल्याचें दिसत नाहीं. पितृतिथींनंतर घटस्थापना आली. घटस्थापना ह्मणजे घटाची स्थापना करणें, इतकाच अर्थ नसून या औपचारिक प्रकारांत गर्भितार्थ आहे, तो हा कीं, जर ईश्वरप्राप्ति करून घ्यावयाची असेल तर मन एकाग्र करा. मन किंवा बुद्धि याची स्थिरता एकाच दिवसांत होत नसून ती क्रमाक्रमानें झाली पाहिजे व होते; ती होण्यास हा नऊ दिवसांचा अवधि ठेविला आहे. या नऊ दिवसांत मन व बुद्धि हीं परमेश्वराकडे एकाग्र करून आदिशक्ति जी देवी जगन्माता तिची उपासना करा. बुद्धीस चलन देणारी ही शारदा देवीच आहे. तिची आराधना केल्याशिवाय आपल्या बुद्धिशक्तीची वाढ कशी होईल ? या दिवसांत कोंबडीं, बकरीं, रेडे वगैरे गरीब प्राण्यांचा बळी देण्याची चाल कित्येक ठिकाणीं आहे; पण खरोखर देवीपुढें आळस, द्वेष, मत्सर, संताप वगैरे रूपी जे राक्षस समाजांत धुडघूस घालतात त्यांचा देवीपुढें बळी दिला पाहिजे. तो देऊन देश, समाज, प्रपंच व स्वतः यांच्याविषयीं कर्तव्य करण्यास आजच्या मुहुर्तानें जागृत व्हा. आज विजयादशमी. हा मोठा मुहूर्त समजला जातो. याचें कारण या दिवशीं आपल्या आर्यांच्या थोर थोर पूर्वजांनीं अत्यंत महत्वाच्या कार्यास आरंभ करून तीं सिद्धीस नेलीं आहेत. उदाहरणार्थ, श्रीरामचंद्रांनीं याच दिवशीं रावणाचा वध केला. पांडव अज्ञातवासास होते, ते याच दिवशीं ज्ञात झाले. याच दिवशीं गाई घेऊन जाण्या करितां आलेल्या कौरवांना विजय ह्मणजे अर्जुन ह्यानें हांकून देऊन विजय मिळविला. आमचे मराठे राजेरजवाडे ह्याच शुभ मुहुर्तावर स्वारी शिकारीस निघत असत. आतां आपणास कांहीं पूर्वीसारख्या लढाया वगैरे करण्याकरितां स्वारी शिकारीस जाण्याचें कारण नाहीं. आज आपणावर पोर्तुगीज सरकारचें राज्य आहे. त्या सरकारशीं सहकारिता ठेवून शिक्षण वाढवून, आळस, द्वेष, मत्सर टांकून या श्रीसरस्वतीची आराधना करा. व एकमेकांना साह्य करून राष्ट्र, समाज, प्रपंच व आपण स्वतः यांचा उद्धार करून घ्या. एवढी विनंति करून मी आपली रजा घेतों.

धर्म आणि अधिभौतिक शास्त्रें

रा. ब. खोपकर यांचे अध्यक्षतेखालीं मडगांवच्या सरस्वत्युत्सवांत रा. ना. वि. भोंडे वकील यांनीं वरील शास्त्रीय विषयावर जें भाषण केलें, त्याचा सारांश येणें प्रमाण आहे: आज या शारदादेवीच्या उत्सवांत शारदा देवीविषयक एकादा विषय व्याख्यानास घेतला पाहिजे होता. परंतु हा विषय ह्मणजे आधिभौतिक शास्त्रें हीं शेवटीं धर्मालाच ह्मणजे ईश्वरालाच जाऊन मिळतात. तर त्यांचा एकमेकांशी असणारा संबंध मी दाखविणार आहें. आज ५०० वर्षें पूर्वींचा एकादा माणूस समाधींतून उठून युरोपियन लोकांनीं केलेल्या सुधारणाकडे पाहूं लागला तर त्याला काय दिसेल. जिकडे तिकडे आगगाड्या, आगबोटी, मोटार ट्राम, वगैरे प्रकार त्याच्या नजरेसमोर आल्यास तो अगदीं थक्कच होऊन जाईल. आमच्या जर इतक्या सुधारणा तर आधुनिक सुधारणेचें माहेर असें ज्या अमेरिका युरोप खंडास ह्मणतात तेथें किती सुधारणा झालेल्या असतील ? त्या पाहून तो तर थक्कच होऊन जाईल. हें जरी खरें आहे, तरी या आधुनिक सुधारणेमुळें मनुष्य ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं साशंक होतो ! हा एक महत्वाचा प्रश्न आहे. आह्मीं हिंदुस्थानांतले लोक धर्मभावना प्रधान असल्या कारणानें या सुधारणांचा परिणाम आह्मांस ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं शंकित करण्याकडे होत नाहीं. पण तिकडील लोक हे प्रत्यक्षवादी असल्यानें या आधुनिक शोधांमुळें त्यांची मनोवृत्ति ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं साशंक बनली आहे. या दोन्हीं ह्मणजे पाश्चात्य व पौर्वात्य मनोवृत्तीची छाननी करून पाहिलें तर शेवटीं ईश्वराचें अस्तित्व मानावेंच लागेल, हें मी आपल्या व्याख्यानांत दाखविणार आहें. जें शास्त्र पंचमहाभूतांवर कमी अधिक ताबा चालवून, तसेंच जगांत गुप्त असलेली शक्ति उपयोगांत आणून त्या मानवी जातीस अधिकाधिक सुखी करण्याचा प्रयत्न करतें, त्यास आधिभौतिकशास्त्र असें साधारणपणें मानतां येईल. आगगाड्या, आगबोटी, विमानें वगैरे ज्या आपण गोष्टी पहात आहोंत, त्या सर्व आधिभौतिक शास्त्राचेंच दृश्य फल होय ! या आधिभौतिक शास्त्राचें किंवा ज्ञानाचें रसायन, पदार्थविज्ञान, वनस्पती, प्राणी व भूस्तर इत्यादि भाग, त्या त्या भागांचा पूर्णपणें अभ्यास केला जावा अशा उद्देशानें पाडले आहेत. कारण सर्व भागांचा अभ्यास कोणत्याहि एका माणसाकडून एका जन्मांत पुरा होणार नाहीं; मग त्यात नवीन नवीन शोधांची भर तो कशी घालूं शकेल? पदार्थ विज्ञानशास्त्राचें निरिंद्रीय पदार्थ विज्ञान व सेंद्रिय पदार्थ विज्ञान असे आणखीं दोन भाग पाडले आहेत. असा फरक करतां करतां, शास्त्रज्ञांनां असें दिसून आलें कीं कोणत्याहि शास्त्राची सीमा निश्चित करतां येणें शक्य नाहीं. पदार्थांत कांहीं पदार्थ पारदर्शक व कांहीं अपारदर्शक असे आहेत कीं, त्यांतून वीज वहातें व कांहींतून वहात नाहीं; पण पुढें शोधांतीं ही विचारसरणीहि चुकीची ठरली. ज्या पदार्थांचें पृथःकरण होत नाहीं, असे मूलतत्वरूप पदार्थ ७० असल्याचें रसायन शास्त्रज्ञानीं शोधून काढलें आहे. पण त्याचें अधिक सूक्ष्मतेनें पृथःकरण केलें असतां ते पदार्थ ७० नसून खरा मूलतत्वरूप पदार्थ एकच आहे, असें आढळून आलें. उदाहरणार्थ पाणी हें पृथःस्खलित केलें असता त्यांत हैड्रोजन व अक्सिजन असे दोन वायु सांपडतात. त्या वायुचें आणखी कांहीं पृथःकरण केलें असतां त्यात इलेक्ट्रॉन हा परमाणू सांपडतो. हे जे वर वायु सांगितले ते त्या सत्तर पदार्थांतलेच होत. हा इलेक्ट्रॉन परमाणूपेक्षां १/१००० नीं लहान आहे. हा सर्व जगांत सर्वत्र भरलेला पदार्थ आहे. यास अप्न असेंहि ह्मणतात. दिवा लागणें, आवाज उत्पन्न होणें, इत्यादि क्रिया ईथरच्या लहरीपासून होतात. ह्मणजे यास ईथरची अनर्जी खर्च व्हावी लागते. लॉर्ड केल्विन या शास्त्रज्ञानीं असें सिद्ध केलें आहे कीं, जगत् मूलभूत असे दोनच पदार्थ आहेत. एक ईथर व दुसरा ॲट्म. आज आपणास जगांत निरनिराळे प्राणी दिसत आहेत ते सर्व वरील मूलभूत अशा अत्यंत सूक्ष्म तत्वांपासून झालेले असल्यानें सामान्यतः एकरूपच आहेत, असा सामान्य सिद्धांत निघतो.

ANUNCIOS.

EDITAL

CAMARA MUNICIPAL DE QUEPEM

Madeva Manguexa Sirvoicar, presidente da Câmara Municipal do Concelho de Quepem.

Faço saber que estando generalisada a venda de peixe a peso quasi em todos os Concelhos deste Estado, principalmente no de Salcete de que depende em maior parte o mercado deste Concelho, e convindo que se adopte tambem neste o mesmo sistema, deliberou a Câmara que a venda de peixe neste Concelho seja feita a peso, a partir de 15 de Novembro seguinte, devendo, para tanto os vendedores apresentar.se munidos de necessarias balanças e pesos. O preçario será provisóriamente o constante da tabela infra.

Faço saber mais que a Camara deliberou tambem que seja gratuita a aferição de pesos, destinados para a venda de peixe até o fim de Dezembro do corrente ano, devendo cobrar-se as respectivas taxas, a partir de Janeiro de 1925.

Tabela de preços de peixe no Concelho de Quepem

Esmargal [morsó], robalo (rauns), serra (visvono), mugem grande	arratel	0 : 03 : 03
Mugem grande do rio	,,	0 : 04 : 06
Mugem piqueno	,,	0 : 01 : 09
Dito do rio	,,	0 : 03 : 03
Garopa (gobró), truta (thigur) panpano grande (pampla), peixe-espada ou carlim (corli), peixe pedra (palú), saltão (golxi), savel (quer), tainha (chaó), naire (goli), peixe madama ou murd xi (muddoxi, caboz (korchi ou korchandi) e similar (anim assoli massoli)	,,	0 : 02 : 09
Doirada (daina), corvina grande (odló dodiaró)	,,	0 :02 : 03
Arraia ou raia (vagolem), bagre (sangota), cação (mori) e similar (anim assoli)	,,	0 : 01 : 03
Bordalo (pittól), cavala), bangdó) peixe agulha (tonqui), sardinha (tarló), pedvó e similar, incluindo *topó* e calandur (peixe-escrivão)	,,	0 : 00 : 09
Peixe leite (velhiô)	,,	0 : 01 : 09
Peixe miudo de qualquer especie (barica massoli) ou corbota	,,	0 : 00 : 09
Lagostas (sinvôs)	duzia	0 : 03 : 06
Lagostins (vaguios)	,,	0 : 02 : 06
Camarão grande (mottim sunotã)	arratel	0 : 02 : 03
Dito do rio	,,	0 : 03 : 00
Camarão fresco (givim suncta)	,,	0 : 02 : 03
Dito do rio	,,	0 : 02 : 06
Camarão sêco (suquim sunctã)	medida	0 : 02 : 06
Camarão fino fresco (givô galmó)	arratel	0 : 01 : 03
Camarão fino sêco (sucó galmó)	,,	0 : 01 : 00
Cambadas de peixe do rio	,,	0 : 04 : 00
Caranguejos brancos grandes [olêo culeo dovêo]	duzia	0 : 02 : 03
Ditos piquenos [dactêo cullêo dovêo]	,,	0 : 01 : 09
Ditos pretos grandes com coral (odliô caliô cullëo laquichô)	,,	0 : 06 : 00
Ditos pretos grande (odliô caliô culliô)	,,	0 : 05 : 00
Ditos pretos piquenos, [dactiô culliô caliô)	,,	0 : 03 : 00
Ostras grandes de 1.a sorte (odlim calvã, poili sort)	cento	2 : 04 : 00
Ditas de 2.a sorte	,,	1 : 08 : 00
Ditas finas de 3.a sorte (dactim calvã tisri sort)	arratel	0 : 02 : 06
Mexilhões [sinanêo]	cento	0 : 06 : 06
Lulas grandes (odliô manquio)	duzia	0 : 04 : 03
Ameijoas grandes (khubé)	cento	0 : 01 : 09
Ditas piquenas (tisrêo)	,,	0 : 01 : 00
Pampanos salgados [karim pamplã]	,,	0 : 08 : 06
Cavalas salgados grandes (odlê karé bangddé)	,,	0 : 08 : 00
Ditas piquenas [dacté karé bangdé]	,,	0 : 03 : 00
Fodquiôs salgados grandes	,,	1 : 00 : 00
Corvinas e soundoliós grandes salgados (odló karé dodiaré anim soundaliô)	,,	0 : 08 : 06
Corvin s e sound liôs salgados pequenos (dacté karé doddiaré anim soundoliô)	,,	0 : 03 : 00
Sardinhas (tarlé) pedvés, peixe-eite (verliô), rabo de galo [vinong] e peixe miudo salgado	,,	0 : 01 : 00
Cação sêco grande (odli mori suqui)	duzia	3 : 08 : 00
Dito piqueno (dacti mori suqui)	,,	2 : 04 : 00
Cação sêco (su ui mori)	arratel	0 : 06 : 00
Tiras de cação (moriche solvé)	cento	2 : I2 : 00
Tiras de arraia grande (odlea vagoliaché solvé)	,,	1 : 08 : 00
Peixe miudo de qualquer especie sec (uquem) corbot	arratel	0 : 0I : 00
Caracol (kongó)	,,	0 : 00 : 06

Quepêm, 15 de Outubro de 1924.

O Presidente da Câmara,

Madeva Manguexa Sirvoicãr

Ano 9 N.° 32

ta-feira 6 de Novembro de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
adalinha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegde Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ३२

गुरुवार ता. ६ नव्हेंबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. खं. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

BOA VIAGEM!

Daqui a poucos dias, o sr. dr. Jaime de Morais deixa o governo da India. Sua Excia. vai finalmente e — diga-se a verdade — sem deixar saudades.

Não ha' duvida que, durante a sua estada nesta Colónia, o sr. dr. Morais revelou uma inteligencia invulgar e mostrou ser dotado de prodigiosas faculdades de trabalho e actividade. Mas, por mal dos nossos pecados, Sua Excia. que podia ser um excelente e modelar governador, criou só em volta de si uma aureola, *nimbada* duma oposição a mais franca e a mais desassombrada, por ter posto ao exclusivo serviço dos seus interesses e dos da sua grei, tanto a decantada inteligencia invulgar como as festejadas prodigiosas faculdades de trabalho e actividade.

O *Bharat* prometera fazer balanço dos actos governativos de Sua Excia. Não é dificil o cumprimento da promessa, porque com uma meia duzia de palavras se pode coustruir o edificio do tal balanço.

Divide et regna foi o desastrado principio que presidiu á sua politica administrativa, tendo-se divertido a valer á custa de dissensões que entre indigenas provocou, protegendo uns contra outros.

O entendimento de Sua Excia. com a fracção *ultramarina* e o *caitanismo* que não tinham podido exercer durante trinta anos a sua politiquice odienta e interesseira, é uma prova frisante de que o sr. dr. Jajme de Morais *governou dividindo* ou *dividiu governando*, em flagrante prejuizo da politica patriotica e sensata do Paiz.

Numa palavra: Sua Excia empregou mal a sua invulgar inteligencia e, pior ainda, as suas prodigiosas faculdades de trabalho e actividade, tornando-se, porisso, principal cumplice de todas as calamidades que contra a India se desencadearam no seu governo de funestas consequencias e tristes recordações.

A *avalanche* de impostos, o nepotismo, o egoismo, o europeismo e outros *ismos* que substentaram uma dança macabra, enquanto o sr. dr. Morais esteve governando *este jardim á beira-mar plantado*, carateri sam, numa admiravel sintese, o balanço dos actos governativos de Sua Excia.

Mas, agora que Sua Excia nos deixa, não lhe queremos nenhum mal. Apagamo-nos, mesmo, da memória todos os agravos que nos infligiu, ou para nos paralisar a lingua ou para favorecer a prepotencia escandalosa dos nossos inimigos e do nosso Paiz. Sim, agora que Sua Excia. nos deixa, almejamos-lhe sò: **Boa Viagem!**

ECOS & CRITICA

UMA AUTOPSIA

O *Bharat*, em numeros sucessivos, criticou, em tempo, desfavoravelmente certas atitudes do sr. dr. Araujo Mascarenhas que como professor liceal assumira. Foi por *dever de oficio* que o fizemos.

A campanha, algo dura, que entao lhe movemos, nao obsta, porem, a que hoje rendamos a Sua Excia. a nossa sincera homenagem pelos serviços de altissimo valor, prestados a' jurisprudencia e literatura portuguesas, quere como advogado intemerato e de mao cheia, quere como jornalista dum estilo superfino e emocinante.

A recente obra do sr. dr. Mascarenhas, *Uma Autopsia*, e' o mais vivo testemunho do que afirmamos. Ela constitui, ao mesmo tempo, a dupla glorificaçao do autor como jurisperito fluente e literato importante.

Individualidades como o sr. dr. Araujo Mascarenhas so' honram o seu nome, elevando "pari passu" o prestigio do Paiz onde nascem e dignificando a Naçao a que pertencem.

Eis o que ao *Bharat* se oferece registar nas suas modestas colunas, acusando e agradecendo a = *Uma Autopsia* = da brilhante lavra do sr. dr. Mascarenhas.

AMIGO DA VERDADE

No dia 25 de outubro estiveram suspensas todas as carreiras de lanchas a' excepçao das de Mormugao e Verem. O motivo? Deveras simples e profundamente lo'gico: — *nao havia lanchas capazes para navegar*. E, no meio desta *beleza de hortaliça*, o governo da Metropole a insistir que para milhor garantia de bons serviços ao publico, a nossa Navegaçao Fluvial continue a ser administada pelo Estado, como e' agora. Quem teria sido o informador do Governo de Lisboa? Convinha conhece-lo.

Ha de ser forçosamente um grande amigo da verdade.

E PARA NADA MAIS...

O governo consta que resolveu que o produto da venda dos bens nacionais fosse depositado na Caixa Economica Postal e que esta caixa fosse autorisada a emprestar aos funcionarios 80% do valor dos seus titulos de vencimento. E' uma operaçao esta que tem o aspecto de uma coisa mais simples e natural do mundo.

Mas se alguem se lembrasse de exprimir a transacçao em formula mais resumida e dissesse que *o Governo deliberou vender os bens nacionais para pagar o funcionalismo publico*, ja' haveria clamor geral. Nao ha duvida. A palavra foi feita para disfarçar o pensamento. E e' para isso que os notaveis estadistas tem prestimo e para nada mais.

E' O ... PALEIO!

Na sessao do C. Legislativo, no dia 22 de Outubro, o sr. dr. Jaime do Morais, falando, em resposta ao sr. P. A. Sousa, desenvolveu largamente a tese de que "o progresso agricola do meu pais em relaçao a outro, tem a sua razao de ser nas condiçoes privativas de cada regiao" e, referindo-se ao progreso economico de Scandinavia e Alemanha, afirmou que "*tambem no's ai chegaremos, a bom termo.* E' verdade, sr. Governdor, No's com os nossos engenheiros agronomos, silvicultores, tecnicos agricolas que multiplicam-se como cogumelos, a razao de 250 rupias o cogumelo—havemos de chegar nao so' la' mas muito alem muito alem ao ... *polo norte*. O que nos salva e' o ... *paleio*.

PELA POLICIA

Sao cada vez mais crescentes as queixas e reclamaçoes que estamos a receber de Canacona contra a acçao policial do sr. tenente Coelho.

Se umas o acusam de sua intervençao nas questoes de propriedade, outras o atacam pelas prisoes arbitrarias a que esta' afeito, violando por esta forma a portaria provincial n.° 741 de 12 de Setembro, criadora do Corpo da Policia de Goa.

Uma carta, entao, relata pormenores duma scena de pugilato que se travou entre os srs. Comandante Militar e Secretario da Administraçao daquele concelho, scena cuja provocaçao se atribui ao primeiro.

Sabemos que, em Canacona como em algumas outras partes das Novas Conquistas, campea infrene o espirito da chicana cuja destruiçao cabe ao esforço conjugado das respectivas administraçoes concelhias e comandos militares.

O que, porem, esta' a suceder em Chaudi, sede do concelho de Canacona, nao e' de molde a que seja de agrado geral, sobretudo depois daquela scena que se desenrolou.

Tudo e' bom para exterminaçao do mal social, quando as medidas empregadas para este fim nobre nao ultrapassem o ambito da Lei, Bom Senso e Moral.

Mas, como ja' acabamos de dizer, limitamo nos, por emquanto, a registar factos e colher dados e documentos para, dada a ocasiao, utilisarmos deles para emitir o nosso imparcial parecer sobre o assunto policial de Canacona, esperando que nos ajudara' nesta delicada tarefa a Opiniao Publica dali, que se encontra, ao que parece, dividida em duas correntes, diametralmente opostas, claramente antagonistas.

णांत भरपूर आहे असें उमेदवारांनीं समजूं नये. तशी पात्रता येण्यास लोकांसाठीं झीज सोसणें दुष्काळ रोगराई यांसारख्या कठिण प्रसंगीं जनतेस हरएक तऱ्हेची मदत आपहस्तें परहस्तें पुरविणें, जनतेच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठीं खासगी, सार्वजनिक किंवा सरकारी रीतीनें खटपट करणें; अर्ज, विनंत्या, डेपुटेशनें, प्रसंगीं निषेध यांच्या द्वारा सरकार व सरकारी पुढ्यांतील संस्था यांस लोकमत कळविणें; एकंदरींत जनतेच्या हिताकडे कळकळीनें नजर पुरवून आपल्या हातून होईल ती कामगिरी करण्यास पुढें येणें वगैरेंची गरज आहे. तशी कामगिरी आपल्या हातून झाली आहे कीं काय याचा विचार करूनच उमेदवारांनीं पुढें यावें; आणि अशी कामगिरी ज्यांच्या हातून घडली नाहीं त्यांस मतदारांनीं निवडून देऊन मागें पुढें अपशकून करून घेऊं नये. यांत उभयतांचें हित आहे. मतदारी मिळणें हा या कालांतील फार मोठा लाभ होय. त्याचा सदुपयोग करून आपण सुखी होऊन उदार मन करून देणाऱ्या सरकारनेंहि कृतकृत्य व्हावें असेंच धोरण यापुढें मतदारानीं ठेवलें पाहिजे. मुनिसिपाल्ट्या व जुंत लोकालें यासंबधीं सरकारी धोरण काय आहे हें वरील कलमांवरून मतदारानीं व उमेदवारांनीं समजून घेऊन सरकार व सरकारी प्रभावळींतील लोकनियुक्त संस्था यांच्याशीं सहकारित्व करण्यास मुनिसिपाल्ट्या व जुंत लोकालें यांच्या द्वारा काय करणें शक्य आहे तें पाहूं.

"शरीर संरक्षणार्थ लागणाऱ्या अन्नवस्त्राची तरतूद झाली कीं त्याच्यामागून शिक्षित होणें ही एक जनतेची फार मोठी गरज आहे" अशी एक पोर्तुगीजींत म्हण आहे व ती कोणत्याहि देशांतील रहिवाश्यांना लागू आहे. अन्नवस्त्राची तरतूद करण्याचें काम प्रत्येक व्यक्ति किंवा अनेक व्यक्तींचें बनलेलें कुटुंब आपापल्या पुरतें पाहात असतें यांत संशय नाहीं. तरीपण प्रत्येक व्यक्तीला किंवा कुटुंबाला त्या तरतुदीसाठीं ज्या कमी अधिक हाल अपेष्टा सोसाव्या लागतात त्या झाल्यातर कमी जाचक व्हाव्या आणि त्यासंबंधींचे परस्परांमधील व्यवहार सुरळीत व सुव्यवस्थीत चालावे म्हणून मुनिसिपाल्ट्यांकडून कांहीं प्रयत्न होणें जरूर आहे. जनता अधिकाधिक सुशिक्षित व्हावी, कोणताहि मनुष्यप्राणी निरक्षर राहूं नये, आरोग्यसंरक्षण, शेतकी, व्यापार किरकोळ उद्योग धंदे यांचें निदान व्यवहारापुरतें ज्ञान मिळावें म्हणून ठिकठिकाणीं प्राथमिक व इतर शाळा उघडून लोकांची शिक्षणाची सोय करणें आवश्यक ठरतें. देशी भाषेचा प्रसार करणें, जनतेस मिळणारें शिक्षण देशी भाषांतूनच मिळावें यासाठीं खटपट करणें, स्वतःच्या खात्यांतील किरकोळ पावत्या, जाहिराती, आज्ञापत्रें, आमंत्रणपत्रें इ. चे लेखनव्यवहार देशी भाषेंत ठेवणें हीं कामें मुनिसिपाल्ट्या व जुंत लोकालें यांत सहज साध्य आहेत. सरकार देत असलेल्या शिक्षणाची आणि त्या शिक्षणक्रमाची येथील परिस्थितीस अनुसरून पाहणी करून त्यांत सुधारणा सुचवून त्या घडवून आणण्याविषयीं प्रयत्न करणें त्यांना सोपें आहे. सरकारी टांकसाळेंतून वरचेवर निघणारे कायदे लोकांना जाचक आहेत कीं सुखदायक आहेत या विषयीं लोकमत अजमावून तें कायदेशीर रीतीनें सरकारास वरचेवर कळविणें हेंहि एक सरकारशीं सहकारित्व केल्यासारखेंच होऊन जनतेचे जाच निवारण होण्यास यामुळें बरीच मदत होईल. सरकारी कायद्यांवर व सरकार वेळोवेळ बसवीत असलेल्या करांवर सडकून टीका करणारे अनेक वृद्ध तरूण प्रत्येक गावांत आढळल्याशिवाय राहणार नाहींत. परंतु अशा रीतीनें विस्खळीत असलेलें हें लोकमताचें गवत सरकाररूपी हत्तीवर बंधन घालण्यास उपयोगी पडत नाहीं. त्याची वळीव व सुसंघटीत दोरीच केली पाहिजे. तरच त्याचा थोडाबहुत परिणाम दिसून येईल. आपापल्या महालांतील सुज्ञ, व तज्ञ, विचारी व व्यवहारनिपूण लोकांचें मत घेऊन त्याचा रिपोर्ट आपल्या म्हणण्यासह ठिकठिकाणच्या मुनिसिपाल्ट्यानीं वरचेवर सरकारास कळविण्याचा क्रम ठेविला तर आज ना उद्यां सरकारास लोकमतापुढें नमतेंच घ्यावें लागेल. शिवाय लोकांनाहि राजकीय शिक्षणाचा धडा मिळून वाचाळपणास आळा पडणार असल्यामुळें, आणि पूर्ण विचारांतींच मत देणें भाग होणार असल्यामुळें राज्यकारभाराचें ज्ञान अधिकाधिक करून घ्यावें लागेल. जनतेला सरकारी लहान मोठ्या कारभाराचें ज्ञान असणें ही गोष्ट फार महत्वाची व आह्मां लोकसत्ताक राज्याच्या नागरिकांस तर अत्युपयुक्त आहे. या गोष्टीकडे दुर्लक्ष होऊं देतां कामा नये. सरकारचे कायदे परक्या भाषेंत म्हणजे पोर्तुगीज भाषेंत प्रसिद्ध होत असतात. यामुळें लोकांना त्याचें ज्ञान करून घेण्यास अवघड होत असतें. त्या कायद्यांचीं देशी भाषेंत भाषांतरें झालीं असतीं तर सुलभ तऱ्हेनें लोक कायदा समजून घेतल्याशिवाय राहिले नसते. ही उणीव दूर करण्याविषयीं सरकारांत खटपट करणें न पेक्षा स्वत: दूर करणें मुनिसिपालिट्यानीं आपल्या आंगावर घेतलें पाहिजे.

—अखेर डॉ० जाइम द मोराइस यांची येथून उचलबांगडी होऊन त्यांचे जागीं डॉ० जुवांव कामोयेजस यांची नेमणूक होईल, असें निश्चित झालें आहे.

—काणकोणच्या आदमिनिस्त्रासांवाचे सेक्रेतारीयु· वैकुंट प्रभू चोडणेकर व तेनेंत कुयेल्य पोलीस अधिकारी या उभय सरकारी अलमदारांची हमरस्त्यांत व हमदिरसा लठ्ठालठ्ठी झाली!

—दमण येथें चोऱ्यांना ऊत आला आहे! मग घोरत पडलेल्या पोलिसांची घोरपड तरी कां पाहिजे!

स्फुट विचार

शुभं भवतु:— गेल्या महिन्याच्या २९ तारखेस कार्तिक शुद्ध १ दा रोजीं गोमांतकाच्या सीमशेजारीं सांवतवाडी संस्थानचे सर्वाधिकार राज्यकर्त्यां ब्रिटिश पार्लमेंटकडून संस्थानच्या गादीचे वारस हीजहायनेस राजे साहेब खेम सांवत भोंसले ह्यांस समर्पण करण्यांत आले आहेत. श्री छत्रपति शिवाजी महाराजानीं स्थापन केलेल्या हिंदी पातशाहीचा वाडी संस्थान हा एक घटक असून भगव्या झेंड्याचें वर्चस्व वाढविण्यास सत्ताधारी मध्यवर्ती मंडळास ज्या ज्या संस्थानानीं स्वार्थत्याग करूनहि मदत दिली, तीं तीं संस्थानें एका मालिकेंत गोंवल्यास सांवतवाडीचा नंबर नि:संशय बराच वर लागेल. कालाच्या फिरत्या फेऱ्यांत सांपडून व कंपनी सरकारच्या घटोत्कची बाजारास भुरळून हें संस्थान जरी शिरजोर ब्रिटिश सत्तेच्या संरक्षणाखालीं आज कितीएक वर्षें चालत आहे, तरी महायुद्धांत सध्याचे राजे बापूसाहेब भोंसले ह्यांनीं गाजविलेली तर बारबहाद्दरी इंग्रज सरकारास फारच पसंत पडून त्यांनीं राजे बहादुरांस संस्थानचीं अधिकार सूत्रें सप्रेम बहाल केलीं आहेत. मेसॉपोटोमियांत राजे साहेबांनीं केलेले पराक्रम पाहून बडोदें सरकारांनीं त्यांचा विवाह आपल्या पौत्रीशीं करून त्यांस आपले नातजांवई केलें. वाडी संस्थानच्या राणीसाहेबहि सुशिक्षित असून त्यांचें संस्कृत अध्ययन चालू आहे. गायकवाड सरकारच्या मोहब्बती खातर म्हणा, किंवा राजे साहेबांच्या कर्तबगारीकडे पाहून म्हणा, राजेसाहेबांच्या हातांत अधिकार देऊन इंग्लिश सरकार संस्थानच्या प्रजेचा दुवा घेत आहे. ह्या मंगल प्रसंगीं आह्मींहि गोमांतकातर्फे हीजहायनेस खेम सावंत भोंसले ऊर्फ बापूसाहेबांचें अभिनंदन करून त्यांची कारकीर्द प्रजेस सुखकर होवो असें इच्छितों.

लॉर्ड रेडिंगचें जादापत्रक!:— आपल्या जादापत्रकान्वयें बंगाल सरकारास विशिष्ट जादा अधिकार देतांना व्हाइसराय साहेब आपल्या कठोर कृत्याचें खालील प्रमाणें समर्थन करीत आहेत. "क्रांतिकारक चळवळ जोरांत चालत असून तीचें दृश्यमान होणारें स्वरूप फारच भयानक आहे; ह्या बद्दल समाधानकारक पुरावा माझ्याकडे दाखल करण्यांत आला आहे. व त्या बद्दल प्रजेची मी खात्री करतों. १९२३ सालीं ह्या सारखीच भयंकर परिस्थिति उत्पन्न झाली होती, व सुरू केले गेलेले इतर सर्व सनदशीर उपाय निष्फल ठरे पर्यंत हा निर्वाणीचा उपाय योजण्याची माझी खुषी नव्हती. पण सध्या अत्याचार प्रवर्तक कृत्यांचा उपक्रम फारच झपाट्यानें केला जात असल्याचें प्रमाण सिद्ध झाल्यानें हे जादा अधिकार बंगाल सरकारास बहाल करणें मला अत्यंत आवश्यक झालें आहे. ह्या परिस्थितिला तोंड देण्याचे टिकाऊ उपाय बंगाल सरकार योग्य वेळीं आचरणांत आणीलच. ह्या जादा अधिकाराचा उपयोग शांततावादी लोकांचें स्वातंत्र्य हरण करण्यांत होणार नाहीं ह्या बद्दल मी हमी घेतों. सार्वजनिक सुरक्षिततेवरच राजकीय प्रगतीचा अवलंब असल्यानें ती सुरक्षितता राखणें सरकारचें प्रथम कर्तव्य आहे. अत्याचाराच्या बलावर कायम टिकणारी राजकीय उन्नति काबीज होणें अशक्य असल्यानें त्या उन्नतीस अत्याचाराचा अडथळा होणार नाहीं अशी खबरदारी सरकारनें घेतलीच पाहिजे. आणि ह्याच कारणास्तव मी हें जादा अधिकार पत्रक काढीत असून हिंदुस्थानच्या फायद्याची व राजकीय प्रगतीची आशा व इच्छा बाळगणाऱ्या सर्व जनतेचें सहकार्य सरकारास मिळेल असा भरंवसा वाटत आहे; ह्या पत्रकान्वयें व्हाइसराय साहेबांतर्फे हिंदुस्थान सरकारनें बंगाल सरकारास दोन सेशन्स किंवा ॲडिशनल सेशन्स जजांची मसलत घेऊन विशिष्ट वहिमी लोकांसंबंधी योग्य वाटेल तें करण्यास व वॉरंटाशिवाय धरपकड करण्यास अधिकार अर्पण केले असून चांगल्या उद्देशानें केल्या गेलेल्या सर्व सरकारी कृत्यांस परवानगी देण्यांत आली आहे. ह्या हिंदुस्थान सरकारच्या दडपशाही धोरणाविरूद्ध जिकडे तिकडे खळबळ उडून गेली असून प्रागतिक वृत्तपत्रेंहि ह्या सरकारी कृत्यावर कडक टीकेचा भडिमार करण्यास आपखुषीनें प्रवृत्त झालीं आहेत.

व्यावहारिक कीं अव्यावहारिक!:— जादा अधिकाराचा आश्रय घेऊन व्हाइसरायानीं बंगाल सरकारास दिलेले वरील जादा अधिकार जनतेच्या मनोभूमीवर कोणत्या प्रकारचा परिणाम करतील व त्या योगें हिंदुस्थान सरकारचें इष्ट साधेल कीं डोळ्यांपुढून पळून पलीकडे जाईल, यतद्विषयक वादास आजकाल चोहींकडे ऊत आला आहे. बंगालचें लोकमत तर व्हाइसराय साहेबांच्या ह्या हडेलहप्पी विरुद्ध अतिशय खवळून गेलें असून हें त्याचें अनन्वित कृत्य मात्र खरोखरच एखाद्या गर्भितावस्थेंत असलेल्या लाल बंगालच्या क्रांतिकारक चळवळीस जन्म दिल्याचें श्रेय घेईल असा कित्येकांचा समज बनत चालला आहे व तो बऱ्हंशीं खराहि आहे. दडपशाहीचा हा पहिला रामराम बंगाल ऐवजीं महाराष्ट्रास ठोकण्यांत आला असता तर कदाचित् आजच्या महाराष्ट्रानें तो जुलमी खुषीनें — आनंदानें नव्हे— स्वीकारला असता; पण जात्याच हूड, अविचारी व अभिमानी अशा तरुण बंगालला तो सहन न होतां त्याच्याकडून ह्या सरकारी कृत्यास अत्याचारानें प्रतिकार होण्याचा संभव आहे. देशबंधु दासांनीं एकदां कौन्सिलांत उल्लेखिलेल्या क्रांतिकारक चळवळीच्या गुप्त कृत्यांचा आधार घेऊन हिंदुस्थान सरकारनें हें दडपशाहीचें एकदां तीस हजार हिंदी लोकांचा जीवंत बळी घेऊन निरुपयोगी ठरलेलें शस्त्र उगारून हवेंत गोळीबार करण्याच्या मिषानें लोक समाजावर गोळी झाडण्याचें काम सुरू केलें आहे. व

श्रीसरस्वती व सदोष शिक्षण पद्धति

मडगांवच्या श्रीसरस्वतीसेवक मंडळाच्या आठव्या सरस्वत्युत्सवाच्या पहिल्या दिवशीं वरील विषयावर महाराष्ट्रभाषाचित्र मयूर कृष्णाजी नारायण आठल्ये यांचें रा. ब. अण्णासाहेब खोपकर यांचे अध्यक्षतेखालीं व्याख्यान झालें. व्याख्याते ह्मणालेः आजच्या या समारंभास हजर राहाण्याच्या योगाची अपूर्वता दर्शित करण्यास खरोखरच माझ्याजवळ शब्द नाहींत. आज माझी जुनी स्नेही मंडळी भेटली आहे, असें मी समजतों. मी मागें एकदां गोमांतकांत आलों होतों. त्या वेळीं मी काढीत असलेल्या 'केरळ कोकिळ' मासिकाचे सर्वांत ज्यास्त वर्गणीदार या प्रांतांतच होते. आतां या उत्सव प्रसंगीं मला बोलण्यास संधि दिल्याबद्दल मी फार आभारी आहें. श्री ज्ञानेश्वरांनीं एके ठिकाणीं असें सांगितलें आहे कीं, जर तुह्मांस सर्व झाडांस पाणी पोंचवावयाचें असेल तर त्याचे मुळास तें घाला. ह्मणजे तें सर्वत्र पोंचेल. प्रत्येक प्राण्यास सुख पाहिजे व मनुष्यासहि पाहिजे. तर तें मिळविण्याचें बीज श्रीसरस्वती देवीची आराधना हें होय. यावर कोणी असें ह्मणेल कीं, घरांत मीठ तेल नसेल तर श्रीसरस्वती देवीची आराधना करून काय फायदा होईल? त्या करितां लक्ष्मीच नको का प्रसन्न व्हायला? हें जरी खरें असलें तरी लक्ष्मी ही सरस्वतीच्या पाठी मागून येणारी आहे. अर्थात लक्ष्मी ही सरस्वतीची दासी आहे. आमच्या संस्कृत वाङ्मयांत छंदविवृत्ति ह्मणून ग्रंथ आहे. तो सर्व सूत्रबद्ध आहे. आतांच्या सारखा पाल्हाळ त्या वेळच्या ग्रंथांत नसून ते सर्व सूत्रबद्ध असत. व त्यांत सर्व व्याख्या दर्शविलेली असे त्यांत एका सूत्रांत गणांचीं नांवें त्याच्या पुढच्या पासून प्रत्येक गणांत ऱ्हस्वदीर्घाक्षरें कशा रीतीनें आलीं पाहिजेत तें सांगितलें आहे. ह्याच पुस्तकावर कै० परशुराम तात्या गोडबोले यांनीं आपलें वृतदर्पण हें पुस्तक केलें आहे. त्यांत अनेकार्थ गर्भ सूत्रमय भाषेची गंमत सांगतों; त्यांत गणांची तीनहि अक्षरें दीर्घ असलीं तर मगण ह्मणावें, 'अशा अर्थाचें एक सूत्र आहे; त्याची धी, श्री, स्त्री मगण अशी रचना आहे. हें सूत्र आपणास काय शिकवितें? यांत अशी खुबी आहे कीं, धी ह्मणजे बुद्धि वाढविली पाहिजे, मग श्री ह्मणजे लक्ष्मी मिळते व नंतर स्त्री ह्मणजे संसार सुखानें थाटावा. हें सूत्र किती खुबीदार आहे बरें? सर्व संस्कृत ग्रंथांत आपणास असाच मासला पहावयास मिळेल! पण हल्लींच्या सरस्वत्याराधन पद्धतीकडे पहा! सर्वच कांहीं विचित्र! गोव्यांतल्या मराठी शिक्षणाची पद्धति कशी काय आहे, हें मला ठाऊक नाहीं. पण तिकडील ह्मणजे महाराष्ट्रांतील पद्धति मला ठाऊक आहे. त्यांतल्या क्रमिक पुस्तकांतील कवितांचा मासला आपणास सांगतों. 'लंकुडतोड्या रोज कसा तोड तोड तोडितो (हंश्या) धोबी कपडे रोज कसा बडव बडव बडवितो (हंश्यावर हंश्या) वाहवा वाहवा चेंडु हा सुंदर किती तरी खचित अहा!! (हंश्या) अशा मासल्यांच्या कवितानीं विद्यार्थ्यांस वाङ्मयाची गोडी कशी लागणार? हा झाला पद्य वाङ्मयाचा नमूना. आतां गद्य वाङ्मयाकडे पाहिलें तर त्या विषयींहि हीच रड. त्यामुळें विद्यार्थी हिंदु नें यवनः असे घेड गुजरी बनत आहेत. घेड गुजरी भाषेच्या नमून्याची एक आर्या आपणास ह्मणून दाखवितों. 'मिस्तर नानाभाई तुह्मी जो पाठविलांत सर्व्हंट, गुडफॉर नथींग आहे आणखीं कोणाचीहि मला वॅांट, या दोन ओळींत मिस्टर सर्व्हंट, गुड, नथींग आणि वॅांट हे पांच शब्द इंग्रिश आहेत. हा झाला घेड गुजरी भाषेचा नमूना. आतां लहान विद्यार्थ्यांवर ओझें केवढें मोठें लादताव त्याचा नमूना पहा. एकदां म्यट्रिकच्या परीक्षेंत असा प्रश्न आला होता कीं कवीच्या आंगांत प्रतिभा उत्पन्न होण्यास परिस्थिति काय असावी लागते? असला प्रश्न त्या १५।१६ वर्षांच्या पोरांनीं सोडवावयाचा कसा? तसेंच युक्लिडचीं पुस्तकें मारे सहा सहा शिकवितात. पण त्यांचा उपयोग व्यवहारांत कांहीं होत नसल्यानें शेंकडो नव्हे हजारों दाखले देण्यांत येतील. तर अशा पद्धतीचें हें शिक्षण जें निष्फळ होत आहे, तें परिणामकारक होण्यास असे समारंभ होऊन तद्वारेंच वाङ्मयसेवा झाली पाहिजे. ती होण्याविषयीं श्रीसरस्वतीदेवीची प्रार्थना करून मी आपलें भाषण संपवितों.

मुंबईत चाललेला एक अपूर्व सोहळा

भगवंताच्या घरची व्यवस्था ह्मणजे सृष्टीची योजना अशी आहे कीं तिची कल्पना मानव बुद्धीस होणें शक्य नाहीं. हा सिद्धांत सामान्य व्यवहारिक बाबतींत जेवढा खरा आहे तेवढाच तो धर्मोद्धार व राष्ट्रोद्धार या बाबतींतहि खरा आहे. ज्या वेळीं विद्या व बुद्धिमता यांच्या कमताईमुळें इतरांचा पगडा आह्मावर वसूं लागला त्या वेळीं श्रीशंकराचार्य मध्वाचार्यांसारखे बुद्धिमान व विद्वान धर्मवीर उत्पन्न झाले. ज्या वेळीं तलवारीच्या बळावर आमचें राष्ट्र व धर्म रसातळास जाण्याची भीति पडली तेव्हां श्रीशिवरायांसारखा जणुं तलवारीचाच अवतार झाला. ज्या वेळीं इंग्रजी राज्याच्या अवल अमदानींत आंग्ल भाषाकोविदांच्या परानुकरण शीलामुळें आमच्या संस्कृतीचा लोप होऊं लागला, त्या वेळीं त्याच भाषेंत व पाश्चात्य विद्येंत प्रवीण झालेले कै० चिपळूणकर, लो० टिळक, स्वामी विवेकानंद, रामतीर्थ यांच्या व निःपक्षपातबुद्धीनें ह्मणणेस हरकत नाहीं कीं अस्सल युरोपियन बेझंटबाई व तदनुयायी झालेले आमचे अनेक विद्वान यांच्याहि व्याख्यानानीं व लेखांनींच आमच्या तरुण पिढीस स्वधर्माकडे व स्वकीय आचारविचारांकडे खेंचून आणिलें. त्याचप्रमाणें थोडक्यांत आजच्या परिस्थितीचें स्थुलमानानें मुळ कारण शोधून काढण्याचा यत्न करणाऱ्याच्या दृष्टीनें विचार केला तर असें ह्मणतां येईल कीं मुंबई शहरीं जाणें येणें नोकरी व्यापारासंबंधीं कारणपरत्वें मुंबईत रहिवास घडूं लागल्यानें धर्म कर्महीनता लोकांत वाढूं लागली. मुंबईतील आचार हीनतेचा संसर्गजन्य रोग जणु गोव्यांपर्यंतहि पोंचला!! हा आक्षेप सर्वथैव खरा नसला तरी अगदींच खोटाहि ह्मणतां येणार नाहीं. यावर कांहीं उत्तर असो नसो; पण आज मितीस मुंबईसारख्या 'धर्मलंड' वाटणाऱ्या शहरांत ही इतर सर्व ठिकाणच्या धर्माभिमानी व देवभक्त व देशभक्त यानां लाजविणारी अशी एक महत्वाची गोष्ट चालली आहे — अशी एक नवीन लाट उसळली आहे. तिची हकीगत आजपर्यंत सविस्तर रीतीनें गोरक्षण पत्रांत व त्रोटक रीतीनें इतर कांहीं पत्रांतून या तीनचार महिने पर्यंत येत असते. त्या गोष्टीचा अनुवाद तरी आमच्या 'भारत' पत्राच्या वाचकांच्या कानावर घालावा अशी माझी इच्छा आहे. ती गोष्ट ह्मटली ह्मणजे सर्व चळवळी यशस्वी होण्यास अत्यावश्यक असलेली दैवी कृपाशक्ति जी, ती उत्पन्न होण्याच्या संकल्पानें चाललेला त्रयोदशाक्षरी राममंत्राच्या तेरा कोटी जपानुष्ठानाचा अपूर्व सोहाळा होय.

त्या संबंधी प्रत्यक्ष पाहून लिहिलेली हकीगत फारच श्रवणीय आहे. पण ती एका अंकांतूनच प्रसिद्ध करणें शक्य नसल्यामुळें 'भारत' वाचकांना मी हात जोडून प्रार्थना करितों कीं विशेष अडचणीमुळें अशक्य नसेल त्यांनीं होतां होईल तो यत्न करून येत्या कार्तिक पौर्णिमेपूर्वी चार दिवस तरी मुंबईस जावें. तो अपूर्व सोहाळा कार्तिक पौर्णिमे पर्यंत खचित संपणार. पुराण काळीं विशेष राष्ट्रीय आपत्तीचे समयीं ज्याप्रमाणें देवमुनि–यक्ष गंधर्वादि समुदाय भगवंतास आळविण्यास क्षीरसागराचे तीरावर जाऊन अनेक दिवस तपश्चर्या करीत असत असें सांगतात, तो व तसा सोहळा आणि भजन पूजन प्रवचन कीर्तनादि गोष्टींचा अदृष्टपूर्व सोहळा कुणास पाहावयाचा असेल तर त्यानें याच दिवसांत मुंबईस जावें, आणि सुप्रसिद्ध श्री चौंडे महाराजांच्या देखरेखेखालीं होत असणारा हा जपयज्ञ पाहून तरी यावा. कांदेवाडी (गिरगांव) तील चंदारामजी हायस्कूल समोर श्रीराधाकृष्णमंदिराच्या भव्य महाजन वाडींत पहिल्या मजल्यावर हा आनंद चालला आहे

एक गोमांतकस्थ

आजचें पोर्तुगीज सदर

अग्रलेखः—

मावळत्या गव्हर्नरसाहेबांच्या कारकीर्दीवर सणसणीत टीका; डॅा० जाइम द मोराइस यांच्या कुटील धोरणाचें संक्षिप्त समालोचन, 'फोडा व झोडा' या तत्वाचें स्पष्टिकरण.

स्फुट विचारः—

दो० आराउज मास्कारेंजस यांच्या 'उम आवतोप्सीय' या नवीन पुस्तकावर अभिप्राय; सत्यमित्र; केवळ वासाठीं...; नुसती जाहिरात; काणकोण–पोलीस–प्रकरण; तिळामळ–प्रकरण; बंगालचें गौडबंगाल; व्हाइसराय व त्यांचा परिवार [ऐतिहासिक उतारा] व कांवरें–प्रकरण.

वर्तमानसार

—बार्देसची मुनिसिपालटी ह्मापसेंच्या पाठशाळेसाठीं नवीन इमारत बांधणार आहे.

—गोमांतकीय ग्रामसंस्थांच्या लेखक मंडळीची एक सभा पणजी येथें पगार वाढ करून घेण्यासाठीं भरली होती.

—म० गांधींनां कोहट येथें जाण्याला ब्रिटिश सरकारनें बंदी केली.

—काकोडें येथें 'प्रागतिक बाल समाज' या नांवाची एक संस्था जन्मास आली असून शिक्षणप्रसार व ज्ञानवृद्धि असें या उपयुक्त संस्थेचें दुहेरी ध्येय आहे.

—इंग्लंडच्या पार्लमेंटच्या सभासदांची निवडणूक होऊन तींत कांझरवेटिव्ह पक्षाचा विजय झाला. बाकीचे सर्व पक्ष एकवटले तरीहि कांझरवेटिव्ह पक्षाच्या बाजूस अधिक प्रतिनिधि होतील, इतका हा विजय 'भरींव' आहे.

—सांवतवाडी दरबारच्या गॅझीटाचा जादा अंक काढून ज्यांत श्री. सरदेसाई हे राज्याधिकारारूढ झाल्याबद्दल जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत आला आहे, त्यांतच तेथील अखिल प्रजाजनांना सन १९२५ च्या मे महिन्यांतील पहिल्या हप्त्याची जमीन साऱ्याची माफी व कैद्यांना शिक्षेची माफी करण्यांत आल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे.

—पणजीच्या बाल वा. मंदिरातर्फे एक व्याख्यानमाला गुंफण्यांत येणार असून तिला येत्या २२ नव्हंबरला सुरवात होणार आहे. माला एकसारखी ५ दिवस चालू राहील.

—हळदुणें (बार्देस) येथील ग्रामसंस्थेंतील वाढता कलह शमविण्यासाठीं सरकारनें तिचे दोन विभाग केले असून, या विभागांची इमारत जातिभेदाच्या तत्वावर उभारली गेली आहे. पहिला विभाग ख्रिस्ती ब्राह्मण व ख्रिस्ती सोनार या दोन वर्गांचा बनविला गेला असून त्याचें नांव 'फ्रातेर्नाल' (बंधुतादर्शक) व दुसरा विभाग चाड्डी (ख्रिस्ती क्षत्रीय) व ख्रिस्ती शूद्र यांचा केला गेला असून त्याचें नांव 'दे बोअ यस्पेरांस' (शुभाशादर्शक) असें आहे. चार शतकांचा दीर्घकाळ लोटला असतांहि फिरंगाळलेल्या ख्रिस्ती समाजांत सुद्धां जातिभेदाचीं तत्वें नष्ट झालीं नाहींत, याचें हें एकराजमान्य प्रत्यंतरच ह्मणायाचें!

लोकपक्ष, केपें.

येत्या कोंसेल्य लेजिस्लातीव्हच्या मेंबरांच्या निवडणुकींच्या बाबतींत आपलें धोरण निश्चित करण्यासाठीं येथील लोकपक्षाची एका सभा येत्या १५ तारखेस १६ तारखेवर येथील मुनिसिपॅाल हॅालांत भरणार आहे. तरी सदरहू पक्षाच्या अभिमान्यांनीं या सभेस हजर राहून, आपापलें मत स्पष्ट रीतीनें व्यक्त करावें, अशी विनंति आहे.

ता० ४ माहे नव्हंबर सन १९२४

अनंत राया शिरवईकर
आविलीयु दा से. सौझ
रामा बोंबे गांवस देसाई

लेखकांस सूचना

मार्जीन सोडून एकाच बाजूनें लिहिलेल्या लेखांची ताबडतोब वासलात लावण्याचें काम सोपें असतें, हें लेखकांनीं विसरूं नये, अशी विनंति आहे.

म. भारत

Ano 9 N.° 33

[Qu]inta-feira 13 de Novembro de 924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
[C]adalinha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Onepem-Goa

भारत.

BHARAT.

वर्ष ९ वें, अंक ३३

गुरुवार ता. १३ नव्हंबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें-गोवा

SEJAMOS FRANCOS

Já não constitui segredo a ninguem o modo como o *Bharat* encara a personalidade historica de D. Vasco da Gama. Para nós, que representamos um povo cujos antepassados fôram vitimas da mais furiosa perseguição religiosa e politica do Gama que os privou, *ad majorem Dei et regis gloriam* do mais precioso bem que a humanidade almeja, a liberdade, e do valioso fruto do seu aturado trabalho, a propriedade,—para nós, como iamos dizendo, o descobridor do caminho maritimo para a India não pode, naturalmente representar *objecto* de culto patrio.

¿Foi Vasco da Gama guerreiro destemido, almirante insigne e navegador glorioso que descobriu o caminho maritimo para a India, sulcando mares nunca dantes navegados, numa palavra, foi êle um heroi portuguez que enalteceu a gloria de Portagal no conceito mundial?

Perfeitamente de acôrdo. E tanto não contestamos as excelsas qualidades do Gama que no número de seus admiradores ocupamos o primeiro lugar. Isto, porem, não obsta a que o consideremos como causador da desgraça dos que eram senhores desta terra que foi por êle conquistada.

E não é, porisso, para admirar que os *conquistados* em cujos cerebros se não apagou ainda, de vez, a tétrica lembança dos agravos, inflingidos aos seus avoengos, reduzidos á extrema miseria, se nao entusiasmem por uns festejos a serem dedicados ao seu *conquistador*; antes se sintam vexados polos mesmos.

Nestas condições o *Bharat*, conquanto fiel ao regime republicano, como cidadão portuguez, á força da vontade do insondavel Destino, não pode, contudo, contentar-se, pois, com os projectos das festas do dia 24 do proximo dezembro para os preparativos das quais o Governo local acaba até de nomear uma magna comissão composta, de resto, dos cavalheiros que nos merecem respeito.

ÃO VEIO DO TEMPO ...

Porque ha' dias os estudantes do Liceu Central Afonso de Albuquerque venceram por duas vezes, nos desafios do *Foot ball*, os nossos jornais a' uma, entre cabriolas de satisfaçao e de alegria, aplaudiam delirantemente com um *Bravo rapazes*...retumbante e festivo,

Porem, o que os jornais ignoram e' que entre os jogadores que tomaram parte na *equipe* da A. A. havia tres jogadores estranhos ao Liceu. Nao so' isto; os melhores jogadores desta *equipe* exceptuando a defesa, Luis Costa, tinham sido alunos das escolas inglesas—note-se que falo so' dos alunos.

Apo's estes esclarecimentos, naturalmente ocorre preguntar ao leitor benevolo que me le. Pois entao no Liceu Central, entre 600 a 700 alunos nao se consegue arrebanhar 11 rapazes para se formar uma "equipe", dum jogo tam facil como o "foot ball"? E' isto mesmo que interrogo a mim proprio e nao obtenho resposta. E' isto mesmo que ha muito, me esta' admirando sobremaneira.

Os jornais aplaudiram o entusiasmo que, "por estes tempos se nota, entre os nossos estudantes pelo, "sport" mas, jornalistas divinos da minha terra, nao vos admireis da verdade que vos vou dizer reverente e respeitosamente: Nunca entre os nossos estudantes se notou um entusiasmo pelo "sport" e pela ginastica. Alias tenham, os nossos jornalistas a bondade de entrevistar o prof. de ginastica do Liceu, o sr. Alberto Martins, alma dos exercicios ginasticos, e perguntar-lhe qual e' a percentagem dos alunos que frequentam a aula da ginastica semanal. Verdade seja que a aula semanal nao traz nenhum efeito, verdade seja que esta aula nao pode produzir nada, conquanto de resto, a aula diaria seja obrigatoria! Se fosse uma nova cadeira de anatomia ou filologia haveria um enxame de pretendentes habilitados no marata e grego quem havia de requerer e ficar servido com os empenhos e cunhas que sao ordem do dia. Mas, como e' uma aula util e necessaria nao se gratifica o prof. de ginastica que existe ou nao se nomeia outro que e' necessario. Como estou com a mao na massa, permitam-me os leitores, que lhes narre um facto deveras significativo que se deu no ano passado.

Foi o caso; projectava-se um grande "sport" entre os alunos de todos os tres liceus de Goa, a Escola Normal, o Instituto Comercial etc. Os professores srs. Alvaro de Miranda e ten. Antonio Paulino adestravam varios alunos, todas as manhas antes de principiar a aula, em variados exercicios fisicos como o salto de trampolim, trapezio, barra etc. Mas ... esta desinteressada iniciativa gorou! A causa vao la' averiguar os que tenham paciencia para isso!

Vou passar agora a provar a minha segunda assergao, os alunos do Liceu de Pangim nunca tiveram gosto nem entusiasmo pelo "sport" nenhum. *H*a' tantos campos do jogo na cidade de Nova-Goa, mas todos eles andam a's moscas exceptuando uns 40 rapazes que se adestram no jogo de "foot ball". Tam insignificante percentagem para 600 a 700 alunos, e' uma miseria!

A re'les gloriola de vencerem duas "e'quipes" as mais fracas de Bardes deu-lhes, aos jornalistas, uma satisfaçao sem limites. Nao escoara muito tempo sobre o retumbante triunfo das medalhas ganhas no torneio em Mapuga' quando uma "e'quipe" do afamado "Lusitania Club," derrotava a "e'quipe" mixta do C. C. e da A. A que era a flor dos jogadores de ambos os partidos, por 3 "goals" e dizia o "Heraldo" que a "e'quipe," do Lusitania desenvolveu um jogo de tactica admiravel apesar de serem pequenos na corpulencia. "Isto e' que se chama jogar, meus caros jornalistas. E tanto e' que o capitao da "e'quipe" da A. A" dizia a um "reporter" de "O Heraldo que naquele jogo triunfal de Mapuga preferia perder a jogar tam mal!...

A educaçao fisica esta' muitissimo atrazada nos nossos liceus. E dai a geraçao actual, que sera' a sociedade de amanha, sair dos nossos liceus dessorada fisica e mental e moralmente. Acresce a isto a ma' disposiçao do horario que neste ano dizem estar sofrivel. Ja' se lhes deram mais salas e ainda nao se podera' deixar a quinta-feira livre.

No ano transacto pelos festejos do Liceu houve um medonho amontuado de discursos sobre a educaçao fisica dos professores, Governador etc. e a isto se cifrou a' decantada educaçao fisica no nosso Liceu Central.

Nao e' este o caminho que se deve enveredar, nao de forma nenhuma. Enquanto pelos paises que se dizem civilizados a educaçao fisica ocupa um lugar preponderante, no's, aqui vivemos nessa modorra "non vali pena ..."

Apresentamos a opiniao de alguns conspicuos na materia. Veja se por exemplo Max Muller; diz ele que "a força e inteligencia duma raça dependem de sua saude fisica". Ramalho Ortigao nas suas masculas Farpas escrevia estas verdades: "A educaçao do corpo cultivada pela ginastica e' a primeira condiçao do vigor da saude nos individuos, e e' do vigor dos individuos que procede a energia das sociedades."

Quando hoje em dia ja' esta' absoluta e individualmente confirmado de que os exercicios ginasticos servem para a formaçao da alma, e' que o desenvolvimento do corpo influi poderosamente no do espirito, e' um crime nao se lhe ligar a importancia que merece, deixa'-la absolutamente a' margem como uma coisa inutil e prejudicial. Todos os paizes civilizados carinhosamente e desveladamente tornam na obrigatoria nos colegios, nas Escolas e nos quarteis.

Citando opinioes em louvor da ginastica teria que encher paginas e paginas de jornais e porisso pego a todos que se compenetrem da grave situaçao a que estamos sujueitos e nao continue a pairar sobre no's o triste conceito do Grande e inolvidavel Ega que dizia que "o indio era duma debilidade gelatinosa."

Crispim

भारत

कार्तिक व० ३ या शके १८४६

वेळ आली, सांभाळा वरें !

राजानें मारलें व पावसानें भिजविलें तर त्याची तक्रार दुसऱ्याकडे घेऊन जाण्यांत अर्थ काय ? त्या विपयीं स्वतःचीच सारासार विचारशक्ति लढवून पुढील मार्ग– पावलेल्या परिस्थितींतून पाय काढण्याचा उपाय – शोधून काढला पाहिजे. व हेंच शहाणपणाचें लक्षण होय.

व्हाइसराय साहेबानीं आपल्या वट हुकुमान्वयें बंगाल सरकारास बहाल केलेले अप्रस्तुत अधिकार व त्याच्या अनियंत्रित बळावर बंगाल सरकार घालीत असलेला नंगानाच व तोहि मनसापेक्ष–ह्या विपयां छाननी करीत बसून उगाच शद्बच्छलाचें अवडंबर वाढविण्याची ही परिस्थिति व वेळ नसून सरकारनें उभारलेल्या ह्या सरसकट दंडपशाहीस सक्रीय प्रत्युत्तर तरुण बंगालानें कसें द्यावयाचें व त्या बाबतींत आह्मीं महाराष्ट्रीयानीं कोणत्या मार्गानें आक्रमण करून आपद्ग्रस्त बंगालास सहानुभूति द्यावयाची ह्या महत्वपूर्ण प्रस्तुत प्रश्नाचा विवेक बुद्धीनें विचार करणें सध्या इष्ट आहे.

महात्माजीच्या मतें आपल्या हृदयांत अंशतः अधिष्ठित झालेल्या परमेश्वरी सर्वव्यापि शक्तीला हृदय सिंहासनावरून खालीं लोटण्याचा आत्मघातकी प्रयत्न करून आपसांत झगडे व प्रसंगीं लट्टालट्टीहि खेळण्यास प्रवृत्त झालेल्या हिंदी प्रजेला बंगाल सरकारच्या ह्या नवीन सोटेशाही कृत्यांस जर कृतीनें उत्तर द्यावयाचें असेल तर त्यांनीं परस्परांतील झगडे मोडून ऐक्य प्रस्थापित केलें पाहिजे. सत्तेच्या मदाची गुंगी चढून बहकलेल्या नोकरशाहीनें अधिकाराच्या पाशवी शक्तीच्या जोरावर सुरू केलेला हा दडपशाहीचा कसावखाना जर अखिल हिंदीवासियांना मोडावयाचा असेल तर त्यांनीं एकमेकांमध्यें दिनेदिने पसरत चाललेली बेकीची तिरसट तेढ आळेबंधास आणून– व्यक्तीव्यक्तींमधील विघातकारी वैमनस्याला तात्पुरता तरी फाटा देऊन– एकजुटीनें व एक दिलानें काळ कंठण्यास शिकलें पाहिजे. ‘ फोडा व राज्य करा ’ (Divide and rule) ह्या एकाच चाणाक्य-नीतींतील अस्सल राजकारणी तत्वावर ‘ जलचरांचें ’ कंपनी सरकार ’ व ‘ कंपनी सरकार’चें ‘हिंदुस्थान सरकार’ झालेलें राजकारणपटु ब्रिटिश गव्हर्नमेंट जर कद्यापुढें झुलें पडत असेल तर तें निंद्य एकीपुढें ! आणि ह्मणूनच सबंध हिंदुस्थानानें निश्चयाच्या बळावर जर त्याला एकमुखी व एकमती प्रत्युत्तर दिलें तरच हिंदुस्थान सरकार नाइलाजानें नमतें घेईल ! नाहीं तर.........

ही दडपशाही आजच्या दिवसास नुसती बंगालांतच – ताला माला पाहून– सुरू करण्यांत आली आहे, पण ह्या बाबतींत दुर्दैवें व आमच्या मतविषयक फाजील हट्टानें बंगाल हतवीर्य झाल्यास स्वराज्यवाद्यांचा पुरा निःपात करून ‘ निःप्रतिपक्षी हिंदुस्थान करण्याकरितां आरंभिलेल्या ह्या ‘ स्वातंत्र्यवादी सत्रांत’ प्रत्येक प्रतिपक्षाच्या पुढाऱ्यांची आहुती घेतली जाण्याचा प्रसंग अखिल आर्यावर्तावर येऊन ठेपणार. आज बंगाल्यांतच रुजत घातलेल्या ह्या विषवृक्षाच्या बीजांतून अंकूर फुटून वाढीस लागणारा हा सोटेशाही वृक्ष आपल्या जगड्व्याळ फांद्यांनींशीं उद्यां इतका फैलावेल कीं त्यानें सबंध हिंदुस्थान व्यापून जाईल व मग त्या वृक्षाची वाढ आकुंचित करणें अर्थातच हाता बाहेरचें होऊन राहील. आणि शेवटीं त्या वृक्षाचीं विषारी फळें चाखण्याचा प्रसंग येतांच मागाहून पश्चात्ताप करण्याची वेळ येऊन ठेपेल; त्या पेक्षां ह्या विषवृक्षाची मुळी आजच – एका प्रांतिकांचा अनुभव घेत असतांच – छेदून टाकणें सोपें व श्रेयस्कर होईल. अखिल हिंदुस्थानाला उलथून पाडण्याकरितां ह्या दडपशाहीचीं पाळेंमुळें भुईंत जाऊन खोल रुजेपर्यंत मौजेनें वाट पाहत राहून मग लगट होतांच हवालदील होण्यापेक्षां आतांच सर्वांनीं एक होऊन तीं खणून काढून ह्या वृक्षाचा नायनाट करणें इष्ट नाहीं काय ?

आपण कोणत्याहि मताचे असा ! मवाळ असा ! जहाल असा ! सत्यशोधक असा ! प्रार्थनासमाजिष्ट असा ! ब्राह्मण्यरक्षक असा ! सुधारणावादी असा ! स्वतंत्र असा ! कोणत्याहि मताचा मार्ग आपणास पसंत असो ! सर्व मार्गांचें इष्ट ध्येय एकच ना ? उन्नतिमार्गाकडे जाण्याकरितांच तुमची सर्वांची धडपड आहे ना ! तें साध्य गाठण्याचे तुमचे प्रत्येकाचे आक्रमित मार्ग निरनिराळे असूं शकतील ! ते परस्परांपासून विरुद्ध दिशेसहि निघाले असतील ! कित्येकांस स्वदेशोन्नतीस स्वराज्याची जरूर भासत असेल ! कित्येकांस सुराज्यानेंच उन्नति शिखरावर चढणें सोपें दिसत असेल ! कित्येकांस याचक वृत्तींतच संतुष्टता वाटत असेल ! पण देशोन्नतीसाठींच आपण एवढी घटपटादि खटपट करीत आहां ना ? स्वदेशोन्नति तर तुमच्यापैकीं कोणासच नकोशी नाहीं ना ? मग ?

बंगाल सरकारनें उगारलेल्या ह्या दडपशाहीच्या सर्वग्रासी अस्त्रानें देशोन्नतीस ‘खो’ बसेल असें आपणांस वाटत नाहीं काय ? तुमच्याचकरितां कौन्सिलांत घुसून नोकरशाहीचे ‘बारा वाजविण्याकरितां’ बोलक्या देशभक्तीस फांटा देऊन पुढें सरसावलेल्या स्वराज्य पक्षाच्या सभासदांनीं अंधार कोठडीची हवा खावी, हमदिवस खडी फोडीत बसावें व तुमच्याच हिताचें चिंतन करीत झुरत जावें, असें आपणांस वाटतें काय ? हिंदुस्थानच्या जनतेचें मत स्पष्ट करून सनदशीरपणानें प्रतिपक्षास चारी मुंड्या चीत केल्याबद्दल त्यांची जेलांत रवानगी व्हावी, व ज्यांच्याकरितां त्यानीं सरकाराचा रोपहि पत्करला त्या आह्मीं त्यांस उलट गोत्यांत आणून त्यांच्याकडे पहात ‘फिदी’ ‘फिदी’ हंसावें व हें चित्र हिंदीस्थानाच्या भावी इतिहासांत रक्तवर्णांत हृदयस्पर्शी रीतीनें कोरलें जावें हें कोणासच पसंत पडणार नाहीं ! त्या चित्राकडे पाहून भावी तरुण अश्रु ढाळतील तें कोणाच्या हृदयास झोंबणार नाहीं ? स्वर्गांतून छत्रपति शिवाजी महाराज, गोखले, आगरकर, लोकमान्य आदिकरून महाराष्ट्राचे लोकोत्तर पुरुष आह्मांकडे अभिमानानें पहात आहेत. ज्यांच्याकरितां आपण सारा जन्म रावविला त्या आपल्या देशबंधूनीं मराठ्यांच्या धवल यशास काळिमा लावलेला पहातांच त्यांच्या हृदयास धक्का बसेल हें कोण जाणून नाहीं ! हें दृश्य आमच्या डोळ्यांपुढें दिसत असतां एकमेकांच्या मागील गोष्टी स्मरून कर्में वर्में काढीत बसणें अधमपणाचें होणार हेंहि आह्मीं जाणतच आहों! आपसांतील उखाळ्या पाखाळ्या वर काढून त्यांवर बाष्कळ वादविवाद करीत बसणें ह्या वेळीं अप्रस्तुत आहे.

आजची परिस्थिति अशी आहे कीं, ह्यावेळीं विसरा व क्षमा करा [forget and forgive] ह्या तत्वाचा पुरस्कार करून संकटांत सापडलेल्या स्वराज्य पक्षाला सप्रेम मदत करून आज स्वराज्य पक्षावर उगारलेला पण उद्यां सर्व प्रगमनशील व प्रतिपक्षाच्या धोरणास बाध आणणाऱ्या पक्षांवर उगारला जाणारा दडपशाहीचा लिटनशाही टोला परतवून लावणें व आत्मिक बलाबरोबर झुंज खेळण्याचा प्रसंग पाशवी शक्तीस आल्यास त्यांत निश्चयेंकरून होणारा पाशवी शक्तीचा पराजय जगाच्या निदर्शनास आणून देणें हें प्रत्येक पक्षाच्या लोकांचें आद्यकर्तव्य आहे ! मात्र एकीच्या भरजोर बळावर आह्मां महाराष्ट्रीयांकडून बंगालीयांकडूनहि दडपशाहीच्या प्रतिकारार्थ आचरणांत आणले जाणारे सर्व मार्ग अनत्याचारी असहकारिते वरूनच आंखून घेतले गेले पाहिजेत ! अत्याचारांचा त्या प्रतिक्रियादर्शक प्रयत्नांस मागमूसहि लागतां कामा नये ! सरकार तर आतां उघड उघडपणें धरपकडीचा मार्ग स्वीकारीत आहे; अशा तऱ्हेनें चारीहि बाजूनीं झपाट्यांत सांपडलेल्या आह्मांला जर ह्यांतून सुटावयाचें असेल तर आपसांतील तंटेबखेडे सध्यां सोडून देऊन एकजुटीनें सरकारच्या ह्या दडपशाही धोरणाचा प्रतिकार केला पाहिजे.

उदयोन्मुख महाराष्ट्रीयांनो ! ज्या परिस्थितीची महात्माजी औत्सुक्यानें वाट पहात होते ती परिस्थिति आली. स्वदेशास्तव मरणें हेंच शिववांच्या मराठ्यांचें ब्रीद ! वेळ आली, संभाळा बरें !

स्फुट विचार

बेळगांवची राष्ट्रीय सभाः— येत्या डिसेंबर महिन्याच्या चौथ्या आठवड्यांत इंडियन नेशनल कॉंग्रेसची ३८ वी बैठक बेळगांवास भरविण्याचें मुक्रर झालें असून तद्विषयक जय्यत तयारी मोठ्या जोरांत चालली आहे. राष्ट्रीय सभेच्या खास बैठकीखातर एक खादी . मंदिर उभारण्याचें काम जारीनें चालू झालें असून उतारूंच्या सोयीसाठीं सदर्न मराठा रेल्वेहि कॉंग्रेसच्या कॅंपाजवळच एक तात्पुरतें स्टेशन बांधण्याच्या तयारींत आहे. राष्ट्रीय सभेचें काम जास्त सुलभ रीतीनें चालावें ह्मणून कॉंग्रेसचे स्वागताध्यक्ष कर्नाटकीय केसरी दे. गंगाधरराव देशपांडे हे सध्या जातीनें तेथें हजर असून आपल्या देखरेखेखालीं सर्व कामें निर्विघ्नपणें पार पाडीत आहेत. उदयोन्मुख गोमांतकीयांस ही राष्ट्रीय सभेची बैठक शेजारीच वाटत असल्यानें तेहि राष्ट्रीय सभेस पाठवावयाच्या प्रतिनिधींची निवडणूक करण्यांत दंग होऊन गेले आहेत. पण यंदांच्या राष्ट्रीय सभेची अपूर्वाई एवढ्यांतच सांठवलेली नसून तीजविषयीं कुतुहलपूर्ण नाविन्य दाखविणारीं कारणें याहूनहि फार निराळीं आहेत. ह्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान महात्माजी सारख्या तपोभास्कर व त्यागी पुरुषाकडून मंडित होणार असून हिंदुस्थानांतील सर्व पंथांच्या व पक्षांच्या लोकप्रतिनिधींचाहि समावेश होणार असून ऑल इंडियन नशनल कॉंग्रेस हें नांव सार्थ करण्यांत येणार आहे. बंगाल सरकारकडून चांगलाच चोप बसल्यानें स्वराज्यपक्ष आतां नरमाईस आला असून यंदांची कॉंग्रस यशस्वी व्हावी ह्मणून त्या पक्षाचे अध्वर्यु श्री. दास बाबूनीं स्वपक्षाच्या कार्यक्रमांत योग्य व शक्य ते फेरबदल करण्यास स्वराज्यपक्ष तयार असल्याचें नुकतेंच जाहीर केलें आहे.

ऐक्य होईलः– ह्यावरून अहमदाबादेंत केल्याप्रमाणें बेळगांवांसहि अश्रु ढाळण्याचा प्रसंग महात्माजींवर येणार नाहीं ह्या बद्दल खात्री बाळगण्यास बराच आधार मिळतो. स्वतः महात्मा गांधीहि अखिल हिंदुस्थानची एकच मागणी तयार व्हावी ह्मणून आपल्या बहिष्कार चतुष्टयांतील कापड बहिष्कार शिवाय बाकीच्या तीनहि बहिष्कारांचें अवलंबन तात्पुरतें आंखडून धरण्यास तयार असून परदेशांतून धुडकावून लावल्यानें गलितवीर्य बनलेला बिझंट पक्षहि आपखुशीनें ह्या अधिवेशनास हजर राहणार आहे. बिझंट बाईस महात्माजींच्या मार्गाची खात्री पटून तीहि दिवसांतून अर्धा तास सूत नियमानें काढीत असलेली पाहून लज्जेने खालीं मान घालणारे ‘ कट्टर स्वराजिष्ट ’ त्या बाबतींत तडजोड सुचविण्यास आज तयार झाले असून महात्माजींचीं तत्वें साधारणतः पटत चालल्यानें श्री. मालवीयांचा स्वतंत्र पक्षहि ह्या सभेंत आनंदानें व आपखुशीनें भाग घेणार आहे. तीन वर्षें ‘ बोला-

यंदांचें लक्ष्मी पूजन

उद्योगिनं सिंह मुपैति लक्ष्मी
दैवेन देयमिति का पुरुषा वदन्ति
॥ पंचतंत्रम् ॥

यंदां सालाबादापेक्षां थोडें अधिक लक्ष्मीं पूजनाचे उत्साह गोवा प्रांतांत निरनिराळया ठिकाणीं साजरे करण्यांत आले. विशेषत: अष्टग्रहार प्रांतांत तर ते अधिकच करण्यांत आले हें एक समाधान मानण्याजोगें कृत्य घडून आलेलें आहे.

हिंदी व्यापारी जगांत आपापल्या दुकानावर व पेढ्यांवर लक्ष्मीपूजन करण्याची वहिवाट पडून गेलेली आहेच. आणि त्यांत विशेष संतोष प्रगट करण्याचें कारणहि नाही. पण सार्वजनिक रीत्या असले उत्साह होणें यांत विशेष अर्थ असतो. स्वार्थ हा प्रत्येक मनुष्याला असतो. तदनुसार एकेकट्यानें किंवा विशिष्ठ समुदायानें हें पूजन करणें हें ठीकच असतें; परंतु असले उत्साह होणें सार्वजनिक रीत्या होतात तेथील जनतेमधील स्वार्थपरायणता अधिक विरल झालेली असते असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय आहे, असें वाटत नाहीं.

लक्ष्मीपूजन हें कोणत्याहि हेतूनें अस्तित्वांत आलेलें असलें तरी आजच्या परिस्थितींत हे उत्साह होतील तितके कमीच आहेत. आज जरी नुसत्या मृण्मय मूर्तींचें पूजन होत असलें तरीं कालांतरानें त्याचें पर्यवसान प्रत्यक्ष लक्ष्मीपूजनांत होणार नाहीं, असें कशावरून ह्मणावें ? बुद्धि, विचार व आचार या त्रयींचा एकमेकाशीं इतका निकटतेचा संबंध असतो कीं, बुद्धीप्रमाणें विचार येतात व विचाराप्रमाणें हातून कामें होत असतात. सार्वजनिक रीत्या हा उत्सव साजरा करण्यांत, एकी, संघ याचें महत्व आपणास दिसून येतें; आणि हा उत्सव साजरा करण्याच्या इच्छेनें आपली लक्ष्मी–संपत्ति–नाहींसी होऊन, निकृष्टावस्थेच्या जाळ्यांत कसे सांपडलों आहोंत ही जाणीव प्रादुर्भूत होत असते.

एकदां असा काल येऊन गेला कीं त्या वेळीं संपत्तींत सुख नाहीं, किंबहुना ऐश्वर्य हें दु:खाचें मूळ आहे असें वाटून भारत निवासी लोक लक्ष्मीविषयीं अनुत्सुक राहिले.

मानवी इतिकर्तव्य ह्मणजे अंत:करणाला शांति, सुख किंवा धार्मिक भाषेंत ह्मणायाचें तर मोक्ष हें असलें तथापि अखिल जग लक्ष्मीचे उपासक बनलेलें असल्यामुळें हिची कृपादृष्टी ज्याच्यावर नाहीं त्याचे सर्व ऐहिक व्यवहार सुरळीत चालत नाहींत. जगांतील इतर राष्ट्रांच्या बरोबरीनें आपलें स्वत्व न विसरतां ऐहिक कर्म करावयाचें असेल, जगांतील इतर लोकांच्या बरोबरीनें चालून आपलें कर्तव्य करावयाचें असेल तर लक्ष्मी सेवेचें व्रतच अगोदर सर्वांनीं यथासांग पार पाडण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. लक्ष्यांत बाळगिलें पाहिजे कीं, ज्या काळीं लक्ष्मी सरस्वतीस मान वाकवीत होती तो काल जाऊन सरस्वतीच लक्ष्मीची सेविका बनली आहे. लक्ष्मी पुत्रांचेंच आज चलती असून सरस्वतीसेवक दारोदार फिरत असतात. ज्ञानापेक्षां संपत्तीचें महत्व आज तरी अधिक आहे. 'नहि ज्ञानेन सदृशं पवित्र मीह विद्यते' असें तोंडानें मात्र ह्मणतात पण 'सर्वे गुणाः कांचन माश्रयंती' या वाक्याचा जप अंत:करणपूर्वक सदासर्वकाळ करीत असतें. आजचें जग हें असें आहे. न्यायकोर्टांत एखादा आपला अर्ज न्यायाधीशाला सादर करावयाचा असला ह्मणजे त्याला जशी वेलीफाची पांग धरावी लागते तद्वत लक्ष्मीची–संपत्तीची नजर आपणकडे खेंचून घेण्यापूर्वीच सरस्वतीचा विद्येचा ज्ञानाचा उपयोग होत असतो. आज जग विद्येचें महत्व गात असलें तरी त्याचें कारण हेंच, असें जगांतील घडामोडीवरून दिसून येतें. संपत्ति ही मुख्य असून विद्या हें उपांग आहे. लक्ष्मी हें साध्य बनून सरस्वती हें साधन बनलें आहे. तेव्हां लक्ष्मीची आराधना करतांना तिच्याकडे जाण्याला मध्यें सरस्वतीचा पहारा असतो. तिला प्रसन्न केल्यावांचून लक्ष्मीची प्राप्ती होणें शक्य नाहीं. हें आज स्पष्ट दिसून आल्याखेरीज रहात नाहीं.

आमच्या गोवा प्रांतांत लक्ष्मीचें अधिष्ठान नाहीं असें नाहीं. परंतु तिच्या भोंवतीं सरस्वतीचा पहारा असल्यामुळें, विद्या, ज्ञान संपादन केल्याशिवाय तिच्यावर नजर पडणें मुष्कील आहे. इतका जरी यंदाचे लक्ष्मीपूजनावरून गोमांतकीयांनीं बोध घेऊन त्या दिशेनें प्रयत्न करण्याचा निश्चय करून सुरवात केली तरच हा उत्सव यथासांग पार पाडल्याचें श्रेय मिळणार आहे. उद्यमेन हि सिध्यंति कार्याणि न मनोरथैः । न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशान्ति मुखे मृगाः ।

मुक्तेशचंद्र

वर्तमानसार

—'मालवणच्या लोकमान्य शिक्षण संस्थेस निधि जमविण्यासाठीं फिरणारे प्रचारक श्री. कमलाकांत गोविंद व त्यांचे स्नेही श्री. गंगाधर कृष्णाजी राऊत सह संपादक रामकृष्ण निकेतन मालवण ह्यांना वरील संस्थेसाठीं झाराप व पेडणें मुक्कामीं अनुक्रमें २३ व २९ रुपयांची वर्गणी तेथील सद्‌गृहस्थांकडून मिळाली. व त्यांत श्रीमंत रावराजे व्हॅायकॅाउंट ऑफ पेडणें आत्माराम वासुदेव प्रभू देसाई देशप्रभू ह्यांनीं उदार हस्तानें १० रुपयांची देणगी देऊन संस्थेस ऋणी केलें आहे, असें एक गृहस्थ कळवितात.

—सांवर्डें (कुडचडें) येथील श्री महादेवाच्या देवालयांत गेल्या रविवार ता. ९-११-२४ पासून भजनी सप्ताह चालू असून येत्या रविवारीं १६-११-२४ रोजीं समाप्ति होणार आहे. तरी मेहरबानी करून एकंदर भजन प्रेमी मंडळीनें येऊन आह्मांस आभारांत ठेवावें, अशी समस्त रहिवाशी, कुडचडें हे विनंति करितात.

—स्वराज्य पक्षाच्या कार्यकारी मंडळाची सभा ता. ४ रोजीं कलकत्ता येथें भरलेली होती. सभेस महात्माजीहि हजर होते. ह्या सभेची चर्चाविषयक वातमी जरी सर्वस्वीं गुप्त राखण्यांत आली असली तरी, ह्या सभेंत 'सर्व पक्षांनीं महात्माजींच्या पुढारीत्वाखालीं काम करण्यांचें घाटून बेळगांवच्या राष्ट्रीय सभेस

साभार स्वीकार

पुढारी:— हें एक नवीन साप्ताहिक शांताराम सां. मिरजकर ह्यांच्या अधिकारी संपादकत्वाखालीं ह्या महिन्याच्या २ तारखेपासून निघूं लागलें असून त्याचा प्रथमांक आह्मांकडे भेटीस आला आहे. सारासार विचारशक्तीच्या ताजव्यांतून सद्यःस्थिति तोलून पाहून 'उत्कट भव्य तेंचि घ्यावें । मळमळीत अवघेंचि टांकावें । निस्पृहपणें विख्यात व्हावें । भूमंडळीं ॥' या समर्थांच्या बहुमोल शिकवणीस अनुसरून आजच्या पुढाऱ्यांचे कर्तव्य आंखून देतांना दाखविलेलें निर्भिडत्व असेंच 'व्यक्तिद्वेषाची बाधा न होतां, कायमचें टिकेल तर हा 'पुढारी' अल्पावधींत बराच पुढारून निघेल असें अनुमान निघतें. 'गडबड गुंडाची घाबरगुंड, उडविण्यांत ह्या पत्रकारानें दाखविलेलें लेखन कौशल्य बरें आहे. वा. व. ३ रु. १२ आणे वाजवी आहे. पत्ता:— २२७ न्यु फोरास रोड, मुंबई नं. ७.

वैनतेय:— ह्या नांवाचें एक नवरुचिर साप्ताहिक मे. द. शिरोडकर ह्यांस संपादक पदावर राखून प्रसिद्ध होऊं लागलें असून त्याचे दोन अंक आमच्या भेटीस आले आहेत. सांवतवाडी संस्थानचें असें आजच्या सुधारकी काळांत एकहि वृत्तपत्र नसल्यानें अशा एखाद्या नियतकालिकाची फारच उणीव भासत होती. ती उणीव यथाशक्ति भरून काढण्याचा प्रयत्न वैनतेयाकडून होणार असून 'व्यक्तिविषयक कुचेष्टेची काकदृष्टी, उदरंभरणास्तव बक ध्यान, डाळींबाच्या दाण्यास्तव होणारी पोपटपंची' ह्यां पासून सर्वथैव अलिप्त रहाणें, हेंच त्याचें ह्रद्‌गतांत ध्येय ठरवण्यांत आलें आहे. संपादक होतकरु तरुण असल्यानें नुसतें वाचिविरत्व न दाखवितां वैनतेय भरारीच्या भरांत कुठच्या कुठेंच वहकून जाण्याच्या भरीस पडणार नाहीं, असें अनुमान काढण्यास बरीच जागा आहे इष्ट मार्गानें स्वसमाजाची सर्वांगीण सुधारणा करण्याचें 'वैनतेयाचें' साध्य सनदशीर साधनांनीं साधून जावो असें आह्मीं इच्छितों. वा. व. ट. हं. सह ३ रु. पत्ता— 'वैनतेय' ऑफिस, सांवतवाडी.

सर्वमान्य असा एक कार्यक्रम ठरत असल्याची वातमी आहे.' त्याविषयीं एक 'संयुक्तपत्रक' लवकरच प्रसिद्ध करण्यांत येणार आहे.

—बेळगांवास भरणाऱ्या खिलाफत परिषदेचें अध्यक्षस्थान डॅा० किश्लु यांस अर्पण करण्यांत आलें आहे.

—ह्या महिन्याच्या १ ल्या तारखेस मलबार येथें भयंकर वादळ उपस्थित होऊन वीज पडल्यानें कित्येक माणसांचा संहार झाला.

—अमेरिकेंतील टेक्ससच्या गव्हर्नरच्या जागेवर मिसेस फर्ग्युसन ह्या एका स्त्रीची नेमणूक झाली. 'स्त्रीयांचें राज्य'!

—येथील जज्जांची प्रोकुरादोर जेरालचे जागीं तात्पुरती नेमणूक होणार असून, प्रोकुरादोर जेरालची तात्पुरती नेमणूक गव्हर्नरचे जागीं होईल असें ह्मणतात.

O *Bharat*, ano 9° n° 33 de 13 de Novembro de 1924
Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida
Numero avulso 1 tanga.

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do primeiro oficio Redcar, vão ser vendidos, em hasta publica á porta do Tribunal judicial desta comarca no dia 28 do corrente pelas 10 horas, pela preço da sua avaliação, os seguintes bens: Predio rustico denominado Aforamento vulgarmente conhecido como Vadolagali, da cultura de arroz discrito na conservatoria desta comarca sob o n° 12909 a fl 83 do livro B. 36 avaliado por duzentas rupias e predio donominado Aforamento vulgarmente conhecido como Gala, tambem da cultura de arroz, discrito na conservatoria sob o n° 12910 a fl 83 v. do livro B. 36 avaliado por duzentas rupias, ambos situados em Parodá. Estes predios foram penhorados na execução hipotecaria que Luis Carvalho de Ambaulim, promove contra Conceição Oliveira, viuva de Miguel Carvalho de Quepem. Quem os quizer comprar compareça nos indicados dia, horas e local, correndo por conta do arrematante as despesas da praça e a contribuição de registo por inteiro. Por este são citados todos os credores incertos da dita executada nos termos e para os efeitos da lei E para ser publico se espediu este.

Quepem 4 de novembro de 1924.

O escrivão de Direito do 1° oficio.

Babú V. Camotim Rédcar

Verifiquei a exactidão
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

SOCIEDADE PATRIOTICA DOS BALDIOS DAS NOVAS CONQTISTAS

Em Sanvordem (Curchorem) no hotel do sr. Crispino Dantas, se procederá no domingo 30 do corrente pelas 11 horas á venda do bate desta Sociedade e da lenha do desbaste dos compos em Colem. As condições e outras informações, presta o abaixo assinado em Pangim e o administrador dos Campos em Sanguem.

Nova-Goa, 11 de novembro de 1924.

O secretario da Direcção
Francisco Sales d'Abreu

Ano 9 N.o 36

Q[uint]a 4 de Dezembro de 1924

[A]SSINATURA
[Ca]da ano tres rupias

[A]NUNCIOS
por cad[a] ... a que repetida uma tanga
... ulso uma tanga

[PROPRIETARIO] E EDITOR
G. ... Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ३६
गुरुवार ता. ४ डिसेंबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें-गोवा

A NOSSA ATITUDE

A sra. Politica é, segundo a filcsofia hindú, uma verdadeira bailadeira, uma autentica prostituta de quem se espera toda a casta de *surpresas*. E' esta a sua principal se não única caracteristica, o seu *especial* distinctivo.

Não admira, portanto, que em se tratando de eleições, ligadas áquela sra. pelos indissoluveis laços de consanguenidade, surjam por aí novidades em tropel, pondo tudo numa agitação tremenda.

E' o que, justamente, sucedeu com a eleição a ser realisada no domingo proximo dos vogais efectivo e suplente do C. Legislativo pelas Novas Conquistas, cargos para que se apresentaram varias listas, tendo cada uma seus defensores incançaveis e incondicionais.

Bem longe estava o *Bharat* de prever o desenrolar dum tão cumplicado fenomeno politico eleiçoeiro, quando se apressou a apresentar ás urnas os nomes dos srs. Bandorcar, Borcar e Dessai, pelas Novas Conquistas, maiores contribuintes e procuradores das Comunidades respectivamente, sobretudo, porque a mesma apresentação fôra feita, depois que o *Pragatica Sanga* e o *Partido Popular* do concelho tinham acabado de, nas suas reuniões realisadas para difinição de suas atitudes nas eleições resolverem a não apresentação dos seus candidatos privativos, — associações politicas com as quais simpatisamos, ainda que não sejamos orgão nem duma nem doutra.

Desejavamos que tivessem assento no Legislativo os cavalheiros indicados na nossa edição de 20 do mez findo; mas pelo que se vê, não há maneira de se conseguir isto, não só porque o sr. Borcar não pretende entrar no Concelho mas tambem, porque tanto o sr. Sacarama Dessai como o sr. Bandorcar disputam o mesmo cargo de representante das Novas Conquistas.

Os factos politicos, posteriores á apresentação por nós feita modificaram, como se vê, profundamente, o estado das coisas politicas, modificação a que necessariamente, dentro da coerencia e bons principios, tivemos de moldar-nos a atitude a assumir na proxima eleição do vogal pelas Novas Conquistas. E fizemo-lo, resolvendo assumir u m a atitude completamente passiva no acto eleitoral do proximo domingo, não vá a nossa intervenção nêle criar malentendidos que prejudiquem a disciplina e integridade partidarias, que colocamos acima de todas as conveniencias pessoais.

Sim. Sacrificamo-nos a opinião em holocausto do *Pragatica Sanga* e *Partido Popular*. E, sobretudo, porque tanto o candidato, recomendado por estas associações politicas como o candidato independente sr. Bandorcar nos merecem igual estima.

O *Bharat* conservar-se-há, neutro na eleição do vogal das Novas Conquistas, deixando, porem, campo livre a todos os seus amigos que podem votar em quem lhes fôr do agrado e assumir atitudes que entenderem.

A nossa atitude jornalistica nas proximas eleições é, pois, absolutamente neutra, indiferente e passiva.

ECOS & CRITICA

UMA NOVA...

Na ve'spera da festa de S. Francisco Xavier correu na capital de Goa a nova de que o sr. Messias Gomes recebera um telegrama de Alves — capitao Costa Alves? — dizendo que esta' assente a nomeagao do sr. Joao Camoezas para a Governo da India.

E' uma nova bem velha. A nova que continua, ainda, sendo *nova* apesar de ter decorrido um periodo suficiente de tempo, e a que diz respeito a' "continuagao" do sr. dr. Jaime de Morais no mesmo Governo, depois de se provar a ilegitimidade das tais "instrugoes" do sr. Bulhao Pato.

Deslocou se o "instrutor"; mas o "instruido" esta' no seu lugar, consolidado pelas "instrugoes" do mesmo instrutor...

A NOSSA OPINIAO

Alguem que nos merece consideragao deseja saber o que pensamos sobre o banquete de 12 de Novembro. A nossa opiniao e' a mesma do pais, porquanto, em volta do banquete — caso raro — so'mente houve uma e unica opiniao: — de que o banquete resultara num tremendo desastre para o prestigio do sr. dr. Jaime de Morais como governador e dos seus aulicos e turibularios que fartam-se de louvar a acgao administrativa de s. exia. — tal vez porque a mesma lhes tem garantido a fartura.

Efectivamente o banquete, apesar de pressao de cima: — a dos chefes do servigo, e a pressao dos lados: — a dos amigos de s. excia. apenas logrou atrair 127 adesoes, sendo destes 100 funcionarios publicos e os restantes 27 pertencendo a' classe dos tais que nao podem, por forga da sua situagao especial, apesar do modo diferente do que pensa o Governo. Ha' quem diga que a inscrigao nao foi publica, alia's ... alia's seria o flasco mais confrangedor, creiam. Nao ha' retorica que salve o sr. dr. Jaime de Morais da confusao, ruina e descalabro em que deixa a India.

KOLOSSAL !

A calcular pelo que certos periodicos comegaram a propinar aos seus ingenuos leitores sobre as proximas festas de Vasco da Gama, e' de esperar que a homenagem ao grande portuguez venha a ser uma manifestagao publica KOLOSSAL .... so' no papel.

Anunciam se festas nos pagodes Ha' quem consinta *admisso ao publico* nas conferencias que o professorado e' convidado a fazer nas escolas primarias do pais acerca de obras e feitos do Argonauta, E ... assim para diante. Quando as classes dirigentes vivem de semelhantes expedientes, de astucia e de burla, nao sabemos se ha direito de exigir e esperar a fe' no que quer que seja por parte do povo.

Nao ha' duvida, isto vai afundar e sem dignidade—miseravelmente.

FESTA DE RENOVAGAO...

O *Diario da Noite* lamentando a ausencia de brilho com que decorreu este ano o aniversario de reconquista de Goa, que bem se pode classificar de uma festa de renovagao da nossa sugeigao ao dominio de Portugal, verbera a atitude do Governo, alto funcionalismo etc. que foi nesta data, de um significativo ou vergonhoso indiferentismo para nao dizermos coisa pior.

Que o povo se alheiasse da festa pouco seria de espantar, pois que os tempos nao sao proprios para os *dominios*! Mas o funcionalismo, o alto e o baixo. o governo!...isso convida nos a' meditagao. Que sinal *sera'* este ? O *Diario* lembra o patriotismo e muitas coisas assim excelentes. Tolice, presado colega. Proponha uma gratificagao aos funcionarios que assistirem a' festa de 25 de Novembro, e ... mande alargar a Se' Patriarcal. E veja o resultado. Talvez seja preciso um barracao mais! ...

DIZ-SE...

Que o sr. Antonio de Noronha Rodrigues, aluno da 7a classe (Letras) do Liceu Central e vogal da comissao magna vai fazer conferencias, desde o 1 ° do corrente, a proposito dos centenarios de Camoes e Vasco da Gama nas escolas primarias da Capital.

N. da Redacgao: Esta informagao obriga-nos a bordar uns ligeiros comentarios, tomando no's a liberdade de formular estas inocentes perguntas:

¿Que autoridade tem o sr. Noronha Rodrigues para fazer conferencias em escolas oficiais primarias, onde de resto existem professores competen-

ao mundo. Sublimes palavras aquelas de Deus, Sim, nao podia ser uma

ऱ्या मुळाशीं लॉर्ड लिटन साहेबांची सूडाची सैतानी भावना दडी देऊन बसल्याचा आतां कित्येक पुढारी लोकांस खात्रीलायख संशय येत असून त्यांत सत्यांशाचा बराच भाग असल्याचें कोणासहि अल्पविचारांअतीं कळून येण्याजोगें आहे. उपरिनिर्दिष्ट गोष्ट जरी खरी नसली तर आरोपित इसमांची चौकशी न्याय सभेच्या भर चव्हाट्यांत करण्याचें सोडून देऊन तिघां न्यायनिपूण (?) कमिशनरांच्या खासगी चौकशीच्या बुरख्या आड अंग चोरून बसण्याचें बंगाल सरकारास कोणतें कारण होतें व आहे हें समजत नाहीं. धारवाडी कांट्यानें तोलल्या जाणाऱ्या इंग्रज सरकारच्या न्यायाला जाहीर न्याय कचेरींत वेगळें व खासगी न्यायसभेंत वेगळें स्वरूप दिलें जाण्याचें महापाप हें नीतिविशारद ब्रिटिश सरकार मुद्दाम होऊन केव्हांच डोक्यावर लादून घेणार नाहीं हें कोण जाणत नाहीं? पण ज्या अर्थी बंगाल सरकारनें आपण होऊन हा नवीन घाट घातला आहे त्या अर्थी त्यास जाहीर न्याय देणाऱ्या कोर्टांत व ह्या खासगी न्यायसभेंत कांहीं तरी भेद वाटत आहे हें निर्विवाद आहे. लॉ. लिटन साहेबानां भेदरून सोडणारा हा भेद तीन प्रकारचा असू शकेल. १ जाहीर न्यायदान करणाऱ्या कोर्टाची न्याय करण्यांत कांहीं तरी चूक होत असते हा एक. २ न्याय कचेरींत दिला जाणारा निकाल सरकारच्या कदाचित् विरुद्ध होईल हा दुसरा व ३ खासगी ह्मणून करविल्या जाणाऱ्या न्यायाचें न्यायसभेचें पारडें जनसमुहाच्या दृष्टिआड असल्यानें आपणास हवें तेव्हां आपल्या बाजूस जड करतां येण्या सारखें आहे हा तिसरा.

ह्यांतील पहिल्या भेदास भिऊन बंगाल-सरकारनें ह्या १८१८ च्या तिसऱ्या रेग्युलेशन ॲक्टच्या बाबतींत जाहीर न्यायकोर्टाची फारकत करून घेतली असेल हें संभवत नाहीं कारण न्यायकोर्टांच्या जाहीर न्यायदानांत सरकारास जर कांहीं चूक आढळून येत असेल तर त्यांतून अजिबात शक्य तों लवकर काढून टाकणें वाजवी असतें; नाहीं तर त्याच कोर्टांकडून न्यायाचा फायदा दिल्या गेलेल्या इतर अपराध्यांस– त्यांतील कांहीं बिनअपराधीहि असू शकतील – खोटा न्याय देवविल्याचें सरकारच्या माथीं येऊन बसेल. तेव्हां हा पहिला भेद अप्रस्तुत ह्मणून सोडून दिला पाहिजे. दुसरा व तिसरा फरक लक्ष्यांत घेतां कोणाहि समतोलवृत्तीच्या मनुष्यास असें आढळून येईल कीं, ज्या अर्थी निःपक्षपाती न्याय देण्याकरितां ब्रिटिश सरकारनें स्थापन केलेल्या कोर्टांकडून दोन्ही बाजूंकडील पुराव्याची ज्यूरीच्या प्रगतीनें सूक्ष्म व न्याय दृष्टीनें वाटाघाट करून दिला जाणारा निकाल आपणास खो घालील असा संशय बंगाल सरकारास येत आहे त्या अर्थी कायदा सरकारच्या बाजूनें भांडण्यास तयार असला तरी न्याय व न्यायांतर्गत सत्यांशाच्या विरुद्ध बाजूस असल्याची लिटन साहेबास पुरी जाणीव आहे; तिसऱ्या भेदानें तर न्यायाची विटंबना करून इतरांवर कडीच होणार आहे. इतिहासाची आवृत्ति वरचेवर होत असते असें ह्मणतात व ह्या गोष्टीनें त्याचें प्रत्यंतरहि पटतें. चारशें वर्षांपूर्वी जी गोष्ट खुद्द इंग्लंडांत घडली तीचीच ही हिंदुस्थानांत पुनरावृत्ति होत जाते. ह्या सर्व गोष्टींचा विचार करतांच नवल विशेष तें इतकेंच कीं आज बंगाल सरकार अधरक्षानें प्रजेवरोबर हटवाद खेळत आहे. सूर्यप्रकाशाइतकी सत्य दिसणारी ही गोष्ट क्षणभर बाजूलाच ठेवून आपण दुसऱ्या गोष्टीकडे वळूं. ज्या क्रांतिकारकांचं नांव पुढें करून बंगाल सरकारनें ही सोटेशाही सुरू केली आहे त्या लोकांना क्रांतीची आवश्यकता कां भासली ह्याचा हिंदुस्थान सरकारनें थोडातरी विचार केला आहे काय ? इंग्रज सरकारच्या राज्यांत काठीला सोनें बांधून काशीपासून रामेश्वरपर्यंत एकटें जावें अशी आमच्या पूर्वजांची हकजूत होती. पण आतां क्षुधाव्यथेनें पोट पाठीस मिळालें असतांना त्याचें प्रत्यंतर पहाण्यास काठीस बांधण्यासाठीं सोनें कुठून आणावें.

१९१८ । १९ सालीं दयाळु सरकारच्या कृपाकटाक्षानें ज्या क्रांतिकारकांची तुरुंगांतून सुटका झाली त्यांनीं आपल्या उदरंभरणाचे इतर धंदे सोडून देऊन क्रांतिकारक कट उभारून आपला जीव धोक्यांत कां घालावा? ‘ कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें ’ ह्या ह्मणीची साक्ष पटविण्याकरितांच कीं काय एकदां अधार कोठडीची ह्या क्रांतिकारकानां हवा दाखवून त्यांच्या कार्यांवर कुठार प्रहार केला असतांहि पुन्हां तुरुंगांतून सुटतांच इतकी जोराची चळवळ करावी कीं त्यामुळें सरकारास सारें पिनलकोड, क्रिमिनल प्रोसेजर कोड, लॉ ॲमेंडमेंट ॲक्ट धुंडाळून टाकून शेवटीं कुंपणी सरकारच्या १०० वर्षांमागील कायद्याकडे धांव घ्यावी लागली व ज्याचा उपयोग १९२१ सालांतील आणिबाणीच्या वेळीहि सरकारास करणें प्रशस्त वाटलें नाहीं त्या निर्वाणीच्या ब्रह्मास्त्राचा उपयोग करणें भाग पडावें ह्याचा अर्थ काय ? महायुद्धांत ज्यांनीं आपला जीव व देह इंग्रजांखातर राबविला व ब्रिटिश सरकारास कल्पनेच्याहि बाहेर साह्य करून स्वतःस त्यावेळच्या लोकाग्रणींकडून देशद्रोही ह्मणवून घेतलें ते महात्मा गांधी इंग्रज सरकारच्या राज्यपद्धतीवर आज उलटण्याचें कारण काय ? दोन वर्षांपूर्वी हिंदमातेनें क्रि. प्रो. कोडास जे आपले ३० हजार लाडके पुत्र बळी दिले व स्वातंत्र्याच्या लढ्यास धैर्यानें तोंड देऊन सरकारास pro. tect me Christe करून सोडलें त्याचा अर्थ काय ? पंडित नेहरूं सारख्या समंजस व सहनशील गृहस्थालाहि भर कौन्सिलांत नोकरशाहीस ‘ शुद्धीवर न याल तर कटाच्या भोंवऱ्यांत गोते खाल ’ ही सूचना देणें भाग पडावें व परवांच्या समेट परिषदेंत ‘ सरकारचा कारभार असाच चालू राहिल्यास मीहि बंड करीन, ह्या सारखा हृदयभेदक व भयसूचक उद्गार त्यांच्या तोंडून निघावे ह्याचा अर्थ काय ? मुंबईच्या सर्व पक्षीय ऐक्य परिषदेंत जो सरकारच्या दंडुकशाहीचा एक दिलानें व एकमतानें जाहीर निषेध केला त्याचा उद्देश काय ?

ह्या सर्वांचा अर्थ एकच कीं इंग्रजसरकारच्या सध्याच्या सदोष न्यायपद्धतीविरुद्ध अखिल हिंदुस्थानांतील जनतेचीं मतें खवळून गेलीं असून सरकारच्या कल्पनेनें बंगालांत अवतरलेले क्रांतिकारकांचे कट ही त्याचेंच प्रत्यंतर होय.! लॉर्ड कर्झन साहेबानीं केलेला वंगभंग, सरकारनें केलेला वचनभंग, डायर साहेबानीं नाहक ४०० हिंदी प्रजेचे घेतलेले प्राण, खिलाफतीची केली गेलेली खिराफत, धारवाडातील गोळीबार, ह्यांसारख्या हिंदुस्थानांतील प्रजेला अपमानास्पद अशा घडलेल्या इतर कित्येक गोष्टी कोणा देशाभिमान्याच्या मनांत त्वेष उत्पन्न करणार नाहींत ? हिंदी स्त्रियांच्या पातिव्रत्याविषयीं लिटन साहेबानीं काढलेले अत्यंत किळसवाणे उद्गार ऐकून कोणाहि हिंदी ह्मणविणाऱ्याच्या शिरानशिरा तडाडणार नाहींत ? कोणा आर्य तरुणांचें रक्त उसळी खाणार नाहीं ? हिंदी लोक नामर्द नाहींत हें नोकरशाही जाणत नाहीं काय ?

तसें तात्विक दृष्टीनें पाहूं गेल्यास आज अखिल आर्यावर्त अराजक बनून गेलें आहे. कारण ब्रिटिश सरकारनें अराजकतेची केलेली व्याख्याच तितकी व्यापक आहे. मग सर्व भारतवर्षास अराजक (सरकारच्या दृष्टीनें) बनवून सोडणाऱ्या ह्या द्विदल राज्यकारभारास व सदोष न्यायपद्धतीस फांटा देऊन अराजकतेचें ‘बीं’च मोडून टाकण्याचें सात्विक श्रेय न घेतां सरकार आपल्या अरेरावीचें पाणी ओतून हा जो अराजकतेचा वृक्ष नकळत फोंफावून सोडीत आहे तो वृक्ष त्याची एखादी खांदी तोडली ह्मणुन मरून जाईल असें नोकरशाहीस वाटत असल्यास तो तिचा मूर्खपणा होय !

ब्रिटिश सरकारच्या राज्यकारभारांत होत असलेल्या ह्या चुकीवर आह्मीं जो धोक्याचा बावटा रोविला आहे त्या विषयीं आमच्या पोर्तुगीज सरकारनें सावध राहून आपलें कारभाराचें तारूं ह्या कळ्या खडपास आपटूं न द्यावें अशी आमची त्यास आग्रहाची सूचना आहे.

—पणजी येथील ‘ बाल वाचन मंदिरा’च्या व्याख्यान मालेचा रिपोर्ट येत्या अंकांत प्रसिद्ध व्हावयास लागेल.

—पणजीच्या “ बाल–वाचन–मंदिरा”चा कारभार चालविण्यासाठीं नवीन व्यवस्थापक मंडळ निवडण्यांत आलें असून त्यांत सदाशिव मं. सरदेसाई, अध्यक्ष, शांताराम के. कामत, उपाध्यक्ष, श्रीपाद ना. कोलवाळकर, सेक्रेटरी, पुरुषोत्तम रा. केणी, दु. सेक्रेटरी, अनंत वि. कणी, खजिनदार, दत्ताराम ला. रेगे व चिंतामण शा. सरदेसाई, हिशेब तपासनीस, व शांबा रा. सौदागार, पुस्तकें देणारा चिटणीस, यांचा समावेश होतो.

— नारायण अनंत बांदोडकर यानींहि आपणांला मतें देण्याविषयीं मतदारांस विनंति करून एक मानिफेस्टो प्रसिद्ध केला आहे.

औद्योगिक क्रांति

लेखांक १ ला.

इसापनीतींतली ‘ खेडे गांवचा उंदीर व शहरांतला उंदीर ’ ही गोष्ट पुष्कळांनीं वाचली असेल. एका खेड्यांतला उंदराला गांवच्या शेतांतल्या बाजरी जोंधळ्यांची कणसें खाऊन कंटाळा आला. व तो आपल्या शहरच्या मित्राबरोबर शहरास गेला. शहरांत आल्याबरोबर तिकडील वैभव पाहून त्याचे डोळे दिपले. तो आपल्या मित्राबरोबर एका श्रीमंत गृहस्थाच्या वाड्यांत शिरून स्वयंपाकघरांत उंची पक्कान्नें खात बसला. पण त्या खेड्यांतल्या उंदराचे दिवस गांवच्या शेतांतल्या निसर्ग सौंदर्याचा व स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यांत गेलेले त्याला शहरांतील जागेचा आकुंचितपणा व धांवपळ कशी सोसणार. स्वयंपाक्याचा आवाज ऐकल्याबरोबर शहरच्या उंदरानें टुणकन उडी मारून दडी दिली. खेड्यांतल्या उंदराला तें जमेना. बोका आल्याबरोबर त्याला उडी मारून कसें फसवावें हें शहरच्या उंदराला माहीत. खेड्यांतल्या उंदराची आरोळी ऐकतांच गाळण उडाली. थोडक्याच अवकाशांत खेड्यांतल्या उंदराला शहरनिवासाचा कंटाळा आला व तो परत आपल्या खेड्यांत गेला.

वरील गोष्ट लहानच आहे पण त्यांत एक मोठें सामाजिक व आर्थिक उत्क्रांतीचें तत्व दडी मारून बसलेलें आहे. वरील गोष्टींत ‘ उंदराच्या ’ ऐवजीं ‘ माणूस ’ हा शब्द घातला तरी त्यापासून आपणास वेगळ्या अर्थानें बराच बोध प्राप्त होण्यासारखा आहे. वरील गोष्टींतला उंदीर ज्याप्रमाणें शहरांतल्या रहाणीला कंटाळला त्याप्रमाणें कित्येक माणसेंहि कंटाळतांना आपण नेहमीं पहातों. खेड्यांत मिळणाऱ्या शुद्ध व स्वच्छ हवेचा शहरांत नेहमीं अभाव असतो. खेड्यांत कित्येक बाबतींत स्वस्ताई तर शहरांतील राहाणी फार महागाईची. खेडयांत जीवनकलहासाठीं कराव्या लागणाऱ्या परिश्रमाचें व आथापिटीचें स्वरूप शहराइतकें तीव्र नसतें. तात्पर्य अशा अनेक कारणानीं मुंबईसारख्या शहरांतली रहाणी पुष्कळांस आवडत नाहीं व यामुळें पुष्कळ जण खेडयांतल्या उंदराप्रमाणें शहरास कंटाळून-परत जातात. परंतु सर्वच माणसें कांहीं अशीं नसतात. समाजाचा बराचसा मोठा भाग वितभर पोटाची खळगी भरण्यासाठींच ह्मणून केवळ नव्हे तर कांहीं कामधंदा करून अर्थ साधण्यासाठीं ह्मणून शहरांत नित्य ठाणें देऊन राहिलेला असतो. अशांना शहरांत होणाऱ्या हालांची पर्वा नसते व असून देखील कांहीं चालत नाहीं. आज आपणाला या वर्गाचा विचार करावयाचा आहे. या शहरवासीयांची सद्यःस्थितीची अगर भावी परिस्थितीची चर्चा करणें ह्मणजे खेडेगांव व शहर यांची प्रथम तुलना

पत्रव्यवहार

रा. रा. भारतकर्ते यांस:—

मडगांव येथील "हिंदु" पत्राच्या ता.१४ मे माहेच्या अंकांत गं. दे. खानोलकर या नांवाच्या कोणी गृहस्थानीं सदर पत्राच्या ता.३१ आक्टोबरच्या अंकांत "विश्वभारती युनिव्हर्सिटी" या विषयावर ह्मापसें येथील शारदोत्सवांत झालेल्या माझ्या व्याख्याना-संबंधीं टीकात्मक पत्र प्रसिद्ध केलें आहे.

रा. खानोलकर यानीं आपल्या पत्रांत असें विधान केलें आहे कीं, व्याख्यानविषयाची मी सांगोपांग माहिती करून घेतली नाहीं व डॉ० टागोर यांच्या चरित्रांतील कांहीं गोष्टी सांगतानां मी "अक्षम्य हलगर्जी-पणा" करून भलत्याच "विचित्र गोष्टी" दडपून दिल्या. अर्थातच हें मत माझ्या व्याख्यानाचा "हिंदूंत" प्रसिद्ध झालेला गोषवारा वाचून त्यानीं बनविलेलें आहे. आणखींहि त्यांचे मजवर बरेच आरोप आहेत. तरी त्यासंबंधीं खुलाशादाखल पुढील मजकुरास आपल्या पत्रामध्यें जागा द्याल अशी आशा आहे.

विषयाची सांगोपांग माहिती करून घेऊन व्याख्यान द्यावें ही गोष्ट सर्वथैव मान्य. पण कोणत्याहि विषयाची माहिती "सांगोपांग" झाली असें केव्हां समजावयाचें? माहिती कितीहि असली तरी तींत भर घालण्यासारखी असतेच. अशा स्थितींत जिज्ञासू मनुष्याला आपली माहिती "सांगोपांग" [पुरी] झाली असें केव्हांहि वाटावयाचें नाहीं. तेव्हां जेवढी माहिती आपल्याला असेल तेवढी (अपुरी ह्मणून) लोकांनां देऊं नये कीं काय? ज्यांनां ती अपुरी वाटेल त्यांनीं तिचा अपुरेपणा अवश्य भरून काढावा. उगीच अपुरी माहिती दिली ह्मणून दुसऱ्याला दोष देत सुटूं नये. खुद्द खानोलकरानीं आपल्या पत्राच्या शेवटीं "कार्यबाहुल्यामुळें वेळ नाहीं" या सबबीवर आणखी लिहावयाच्या गोष्टी लिहिल्याशिवाय ठेवल्या कीं नाहीं?

ह्मापशेंच्या व्याख्यानमालेंतील व्याख्यानें निर्णायक स्वरूपाचीं नसून चर्चात्मक असतात. व्याख्यानानंतर चर्चा होत असते हें वाचलेल्या रिपोर्टावरून खानोलकरांना कळून आलेंच असेल. अशा व्याख्यानांचा हेतु श्रोत्यांपुढें एखादा विषय ठेवून त्याकडे त्यांचें लक्ष्य वेधावें एवढाच असतो. चर्चेस मांडण्यांत येणारें व्याख्यान, अर्थात त्यांत चर्चा करावयाला जागा असते. ह्मणजे एका दृष्टीनें अपुरेपणा असतोच. अशा व्याख्यानांनां "सांगोपांग" माहितीचें बंधन कांटेकोर दृष्टीनें लावावयाचें नाहीं. बाकी विषयाची मांडणी होईल तिवक्या पुऱ्या स्वरूपांत असावी हें उत्तमच.

रा. खानोलकर यानीं केवळ आपली टीकाच करण्याची आवड भागविली आहे असें दिसतें. माहिती अपुरी आहे तर ती त्यांनीं पुरी करावयाची होती. पण तसें कांहीं न करतां आपले दोन लेख, डॉ० रवींद्रनाथाचें Creative Unity पुस्तक व अजित कुमार चक्रवर्ती यानीं बंगालींत लिहिलेलीं पुस्तकें यांचा केवळ त्यानीं हवाला दिला आहे. अशानें वाचकांचें (विशेषत: इंग्रजी व त्यांतहि बंगाली न समजणाऱ्या गोव्यांतील वाचकांचें) समाधान होणार नाहीं. व हीं पुस्तकें वाचण्याच्या कामीं "कार्य बाहुल्यानें वेळ नसणाऱ्या" मलाहि माझ्या व्याख्यानांतला अपुरेपणा कळून येणार नाहीं. तथापि वाचकांची गैरसमजूत होऊं नये यासाठीं एवढा खुलासा करणें भाग आहे कीं, ह्मापशें येथील व्याख्यानाला जरूर तेवढी विश्वभारतीविषयीं व तिच्या संस्थापकाविषयीं माहिती खुद्द डॉ० रवींद्रनाथ व रे. सी. एफ. अंड्रूज यानीं लिहिलेल्या व मद्रास येथील नटेशन कंपनीनें प्रसिद्ध केलेल्या Vishva Bharati या पुस्तकावरून, खुद्द विश्वभारतीमार्फत वेळोवेळ प्रसिद्ध होणाऱ्या Bulletin वरून व Modern Review वगैरे मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांवरून आणि Thompson व अय्यर या ग्रंथकारांचीं टागोर चरित्रें वाचून गोळा केली होती. व ह्मापशें येथील माझ्या व्याख्यानाच्या विषयाचें प्रतिपादन करण्यास तीं केवळ अपुरीं होतीं असें ह्मणता येणार नाहीं.

व्याख्यानें विश्वभारतीविषयींचीं अर्थात डॉ. रवींद्रनाथासंबंधाची माहिती त्यांत आनुषंगिकत्वानें यावयाची. ती पुरेपूर यावी हा आग्रह कां? खानोलकरानीं उल्लेखिलेल्या 'जिवनस्मृतींत' तरी ती माहिती पुरी कोठें आहे? अर्थात 'गुरुदेवावरहि' तें तसाच आरोप करणार काय? रवींद्रनाथाच्या विद्यालयीन शिक्षणाविषयीं मीं केलेला उल्लेख 'विद्यालयांतील पद्धतशीर (!) शिक्षण त्यानां मिळालें नव्हतें, अर्थात त्यांचें शिक्षण पुस्तकी नसून स्वतंत्र स्फूर्तीचें आहे' एवढें दाखविण्याकरितां होता. व रा. खानोलकर तें नाकबूल करीत नाहींत तर मग अक्षम्य हलगर्जीपणा कोठें आहे? मोर्लेच्या ऐवजी मॅकाले एवढ्यांतच ना? पण ही चूक व्याख्यानाचा घोषवारा घेणाऱ्याकडून झालेली आहे हें रा. खानोलकर यांच्या लक्ष्यांत, सदर गोषवारा 'एवढें लिहिले आहे तरी काय' अशा प्रकारच्या आढ्यतेच्या दृष्टीनें न पहातां 'काय लिहिलें आहे' अशाच निर्विकार बुद्धीनें त्यानं तो वाचला असता तर सहज लक्ष्यांत आलें असतें.

त्याच प्रमाणें अवनींद्रनाथांच्या ऐवजी अरविंद्रनाथ आले ही चूक रिपोर्टर अगर कंपोझीटर यांची असावी. ती माझी नव्हे. अवनींद्रनाथ हे रवींद्रनाथांचे पुतणे आहेत, बंधु नव्हेत, हें खानोलकरांचें विधान माझ्या पेक्षां ते जास्त माहितगार आहेत, या समजुतीनें मी अवश्यमेव मान्य करतों. बाकी, विश्वभारती मार्फत प्रसिद्ध झालेल्या Bulletin नं० ४ मध्ये कलाभवनाविषयीं A School of Indian Painting with distinctive features of its own is developing at Santiniketan under the super vision of Abanindranath Tagore and the direct guidance of Nandalal Bose and Surendranath Kar, the resident teachers अशी जी माहिती देण्यांत आली आहे तिजवरून अवनींद्रनाथांचा विश्वभारतीशीं मी जोडलेला संबंध केवळ निराधार नव्हता हें वाचकांच्या तावडतोब लक्ष्यांत येईल.

तात्पर्य अपुरी माहिती, अक्षम्य हलगर्जीपणा, भलत्याच विचित्र गोष्टी, किती तरी चुका, निष्काळजीपणाचीं विधानें, इत्यादि शद्बांचें अवडंबर माजवून रा. खानोलकर यानीं 'पराचा कावळा' किंवा राईचा पर्वत करण्याचे वृथा श्रम घेतले आहेत. रवींद्रनाथ आपले 'गुरुदेव' आहेत आणि त्यांच्या विषयीं आपण लेख लिहिले आहेत एवढें सांगावयाला इतक्या पाल्हाळाची जरूरी नव्हती.

पणजी २४-११-९२४ आ. नम्र सेवक कृष्णराव ग. केणी

वर्तमानसार

—येथील पार्तीद पोपुलारनें एक जाहीर पत्रक प्रसिद्ध केलें असून त्यांत नवीन कार्बिजादीतर्फे उभे राहिलेले मुख्य व दुय्यम उमेदवार अनुक्रमें दो० सखाराम सदाशिव सूर्यराव देसाई, डिचोली, व दो० बाबू शिवराम प्रभू देसाई यांसच येत्या रविवारीं होणाऱ्या निवडणुकींत मतें देण्याची मतदारांस विनंति केली आहे.

—पोर्तुगालचें जुनें प्रधानमंडळ बदलून त्या जागीं नवीन अधिकारारूढ झालें. या नवीन मंडळांत हेलदेर रिबेर यांची युद्ध मंत्र्याचे जागीं योजना झाली आहे. सि. रिबेर हे प्रागतिक संघाचे अभिमानी आहेत.

— मुंबईचें जुनें दैनिक 'इंदुप्रकाश' बंद पडलें.

—बेळगांवच्या राष्ट्रीय सभेला येत्या ता० २६ रोजीं प्रारंभ होईल. दोन दिवस पूर्वी विषयनियामक कमिटीच्या बैठका भरतील.

—इजिप्त-इंग्लंड प्रकरण विकोपास जाईल, असा एकंदरीत रोख दिसतो.

—सास्ट व इल्यस या उभय तालुक्यांतर्फे लेजिस्लातीव्ह कौंसिलांत जाणाऱ्या मेंबरांच्या निवडणुकांस गंभीर स्वरूप प्राप्त होत आहे. ब्रादेंसलांतहि हीच परिस्थिति निर्माण होण्याचा संभव आहे.

—२७ तारखेच्या लोकमान्यांत एक गोवावृत्त प्रसिद्ध झालें असून त्यांत गोमांतकांतील प्रचलित विषयांवर निर्भिड टीका केली आहे. कांहीं दिवसांपासून गाजत असलेल्या बटस्फोटाचाहि त्यांत उल्लेख आहे.

—सांखळीच्या दत्तवाडींत येत्या १० तारखेला श्री दत्तजयंतीच्या वार्षिकोत्सवास प्रारंभ होईल. भारताचे सन्माननीय मित्र सारस्वत यांचा प्रस्तुत उत्सवासंबंधीं आलेला लेख येत्या अंकीं प्रसिद्ध होईल.

—कोमुनीदादींतर्फे सि. दियोगु वाल्हेत हे एक उमेदवार असल्याची बातमी आहे.

--=--

भारत व येत्या निवडणुका

दो० सखाराम देसाई व नारायण बांदोडकर हे दोघेहि गृहस्थ कोन्सिलांत जाण्याला पात्र आहेत व त्या उभयतांचा कौन्सिलांत प्रवश झाला तर देशसुधारणेच्या गाड्यास चालना मिळेल, या खात्रीनेंच भिन्नभिन्न मतदार संघातर्फे त्यांची निवडूक व्हावी, अशी 'भारता'नें आपली इच्छा व्यक्त केली होती. पणजीचा 'प्रागतिक संघ' व येथील 'लोकपक्ष'— की ज्या संस्थांशीं भारत संपादकांचा संबंध आहे —यानीं आपले स्वतंत्र उमेदवार दाखविण्याचा हेतु नसल्याचें जाहीर करतांच 'भारतानें' आपली उपरोक्त इच्छा व्यक्त केली होती, हे विसरतां कामा नये.

आतां अशी परिस्थिति निर्माण झाली आहे कीं, एकाच मतदार संघातर्फे— नवीन कार्बिजादींतर्फे—उपरिनिर्दिष्ट गृहस्थ मुख्य उमेदवार निवडून येण्याकरितां उभे राहिले आहेत. 'भारताला' तर ते दोघेहि सारखेच आदरणीय आहेत. व यामुळें त्याची स्थिति चमत्कारिक झाली असल्यास नवल नाहीं. या चमत्कारिक स्थितींतून स्वतःची मुक्तता करून घेण्यास त्याला एकच उपाय सूचला व तो हा कीं, येत्या निवडणुकापासून अगदीं अलिप्त रहावें. 'भारत' अर्थात येत्या निवडणूकींत भाग घेणार नाहीं. तसेंच भारताभिमानी मतदारांनां जें धोरण योग्य वाटेल तें त्यानीं आपापल्या मताप्रमाणें खुशाल स्वीकारावें. त्यापासून भारताला किंचित् सुद्धां वाईट वाटणार नाहीं हेंहि जातां जातां सुचविलेलें बरें.

...ao mundo. Sublimes palavras aquelas de Deus. Sim, não podia ser dada...

Ano 9 N.° 38

-feira 18 de Dezembro de 924

ASSINATURA
'or cada ano tres rupias

ANUNCIOS
a ainda que repetida uma tanga
ro avulso uma tanga

CTOR E EDITOR
Hegdo Dessay
ucpem-Goa

भारत
BHARAT.

वर्ष ९ वें. अंक ३८

गुरुवार ता. १८ डिसेंबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें-गोवा

QUARTO CENTENARIO DE VASCO DE GAMA

O BHARAT, jornal hindú independente, abstem-se de tomar parte nos festejos dos dias 23, 24 e 25, porque se persuade de que o Discobridor do caminho maritimo para India contribuiu, como disse CUNHA RIVARA, *para nosso infortunio e para o dos nossos antepassados!*

Cunha Rivara deixou escrito: "No primeiro fogo da conquista derrubaram-se os pagodes, esmigalharam-se todos os emblemas do culto gentilico e queimaram-se todos os livros escritos na lingua vernacula, como convictos ou suspeitos de conterem os preceitos de idolatria. O desejo era exterminar tambem toda a parte da população que se não convertesse logo, e não só era este o desejo de então mas ainda, passados dois seculos, havia quem com gravidade magistral aconselhasse ao Governo esta providencia."

SECULOS DEPOIS...

Nos dias 23, 24 e 25 do corrente mês o Governo e os que dele dependem directamente ou indirectamente vão comemorar a morte do Vasco da Gama, portugues que aos olhos dos europeus passa por ter descoberto o caminho da India.

As festas vão ser custeadas pelo tesouro da Colónia que votou, para o fim, 14 mil e tantas rupias. Eis aqui, pela milionessima vez talvez, os dominadores esbanjando o dinheiro dos dominados em expansões de um sentimento ou de uma convicção que os dominados não partilham ou a que são inteiramente indiferentes.

Efectivamente, apesar de tantos programas, variados, interessantes, curiosos que das juntas locais e municipios vem vindo á luz de publicidade, — o povo mantem-se longe das festas. Este é um facto que dispensa provas porque é claro e evidente de mais.

Nós, porêm, emquanto o Governo e os seus apaniguados folgam, relembrando a data da morte de quem foi o pioneiro da civilisação europeia na India, nós convidamos o povo a meditar, no seu recolhimento, sobre os efeitos da mesma civilisação em relação ao progresso de Goa que todos o sabem, quando a Europa apoderou-se dela, era uma terra que pelo seu comercio industria e situaçao geografica sem par merecera ser escolhida como capital, centro de suas operações pelo maior Colonial que Portugal teve— *Afonso de Albuquerque*.

Passam mais de 4 séculos que Portugal faz progredir este rincão do Malabar— *Goa*, e, depois de todos os esforços dos administradores, os sacrificios feitos muitas vezes de privações, dos administrados, o que nos dias 23, 24 e 25 de Dezembro de 1924 o povo pode ver é o seguinte:

O individuo moral e fisicamente dessorado. A familia sem estabilidade nem coesão. A sociedade em deliquecencia, sem as grandes virtudes que tornam os povos fortes e amados. A industria não existe. O comercio negativo,—importando mais do que exporta. A riqueza agricola cada vez mais decrescente. A emigração despovoando os campos, acossado o povo pelas incertezas do dia de amanhã.

O alcool e tabaco, estes dois flagelos da humanidade, o paiz absorve em dose aterradora. Não existe por todo este imenso Oriente povo que nos leve a dianteira nesta corrida para o abismo. Lá se fazem sentir as consequencias destes *instrumentos civilisados*. Os crimes aumentaram. Temos os assassinatos, envenenamentos, os roubos, os atentados contra o pudor etc. etc.

A tuberculose que é a companheira fatal da miseria, assentou os seus arraiaes entre nós, e faz as suas vitimas aos centos. A siflis encontra-se espalhada. Em certos concelhos é tam frequente como o paludismo, embora viva encuberta.

O analfebetismo existe em proporção desoladora, não obstante as escolas instaladas em pardieiros ministrarem um ensino de resultados negativos que custa ao povo bem caro. A contrabalançar a ignorancia das massas não temos sequer as *elites*, Existe a praga dos *diplomados* fazendo mais dano ao pais que o *mundolim* ao coqueiro.

Temos estradas, pontes grandiosas; mas só no papel. As que existem de facto encontram-se intransitaveis — A Navegação Fluvial a vapor passou a ser um perigo para a vida de quem serve-se dela.

As obras de engenharia—os monumentos arquitectonicos e literarios dos tempos da civilisação puramente indiana desapareceram totalmente ou porque os distruiram num momento de furia iconoclasta ou porque não souberam conserva-los.

A lingua originaria do pais moribunda, se não morta já.

Em suma estamos moral, economica, intelectual e fisicamente arrasados.

Não há duvida, pois, que um paiz nestas condições é uma arena magnifica para o Governo com os seus apaniguados gastar dinheiros aos milhares, comemorando o inicio de um periodo historico em que este povo tam superiormente dotado— entrou numa fase de estagnação.

---

ao mundo .Sublimes palavras aquelas de Deus. Sim, não podia ser dada

तुला नाहीं मला, घाल कुत्र्याला ' अशा प्रकारचा प्रकार होऊन त्यापासून सत्ताधारी व सर्वस्वी परकी अशा पोर्तुगीज सरकारला मात्र हवी तशी पोळी पिकविण्यास व स्वतः-च्या पोळीवर हवें तितकें तूप ओतून घेण्यास मदत होते. आमच्या ख्रिश्चन बांधवांस ह्या सर्व गोष्टी समजत नाहींत किंवा आपल्या ह्या कृत्यानीं देशद्रोहाची निपज व वाढ होते ह्याची जाणीव त्यांस मुळींच नसते असें नाहीं; पण पाश्चात्यानुकरणाची व त्यांचें हित तेंच आपलेंहि हित समजण्याची. त्यांची तयारीच इतकी शिखरास पोंहचली असते कीं, तात्पुरती तरी कां होईना, त्यांची सद्सद्विवेकबुद्धि नष्ट होऊन त्यांना आपण युरोपियनच आहोंत हा भास उत्पन्न होतो. जातीचे युरोपियन जरी ह्या काळ्या (?) युरोपियनची गणना आपल्यांत करून घेण्यास तयार नसले तरी ह्यांना मात्र आपण युरोपियनच आहोंत असें वाटतें. एकीकडे कलकत्यास ॲंग्लो इंडियन असोशियशनचे अध्यक्ष आपल्या अनुयायांस काळ्या हिंदु व हिंदी प्रजेबरोबरच कांहींहि आड पडदा न ठेवतां सहकार्य करण्याचा व हिंदी लोकांच्या राजकीय चळवळींत भाग घेण्याचा जीव तोडून उपदेश करीत आहेत, तर दुसरीकडे आह्मा हिंदूंतीलच कांहीं वर्षेपूर्वीं बाटून ख्रिस्ती झालेले आमचे ' बाटगे ' प्रांतबंधू ' जितीव ' ह्या अपमानास्पद नावानें हिंदूंस हिणविण्यांत व पोर्तुगीझापुढें लांगूलचालन झालें तरी करून राजकीय सुधारणेच्या मार्गावरून गोमंतकाला समजून सवरून मागें खेंचीत, गोमांतक हा यावचंद्रदिवाकरौ पोर्तुगीजाचाच अविभाज्य विभाग रहावा यद्विषयक अविरत प्रयत्न करीत आहेत. अर्ध्या हळकुंडानें पिवळे झालेले हे आमचे गोमांतकीय ख्रिश्चन सहकारी बांधव अशा रितीनें आमच्या सुधारणेच्या व प्रगतीच्या कारणविरहीत आड येत असतां कोणा खऱ्या कळकळीच्या देशहितपक्षाला त्यांच्या विषयीं आपलेपणा वाटणें शक्य आहे ?

ह्या प्रकारचें हरामपणाचें वर्तन करून गोमांतकीय ख्रिश्चनानीं हिंदूंच्या आपल्यावरील विश्वासास जलसमाधी दिल्यावर आह्मांला मदतीच्या अपेक्षेचें ब्रिटिश हिंदुस्थान हें एकच ठाणें उरतें. तेथील प्रजा ही आह्मासारखीच अडलेली व गांजलेली आहे खरी, पण स्वदेशदास्य शृंखलेंतून मुक्त करण्यासाठीं धडपडण्यात व आचारविचारांची सुसंगत सांगड घालण्यांत त्यानीं आह्मा गोमांतकीयांपेक्षां बरीच पुढें मजल मारली आहे. त्यांचा देशसेवाविषयक धडाडी व स्वार्थावर लाथ मारण्याची तयारी ध्यानांत घेतां तरुण व प्रगमनशील गोमांतकानें त्यांचाच धडा बेदरकार गिरवावा व त्यांच्याच पाउलावर पाऊल टांकून गोमांतकाची चालू नष्टचर्यावस्थेंतून सोडवणूक करावी असें कोणासहि वाटल्याशिवाय रहाणार नाही.

ह्या महिन्याच्या तारीख २६ पासून पुढें दोन दिवस अखिलभारत राष्ट्रीय सभेची एकुणचाळिसावी बैठक बेळगावांस विजयनगर कॉंग्रेस कँप मध्यें भरणार आहे. राष्ट्रीयसभेची यंदांची बैठक अनेक दृष्टी नें महत्वाची आहे. आज जवळ जवळ सात वर्षें परस्परांपासून विभक्त असलेले प्रागतिक विझंट, वगैरे नेमस्त ह्या राष्ट्रीय सभेच्या एक छत्री अमलाखालीं जमण्याचा प्रयत्न करणार आहेत. आज तीन वर्षें कॉंग्रेसमध्यें थैमान व हैदोस घालीत असलेली बेकीची तेढ मोडून त्या ठिकाणी यंदां ऐक्याची मुहूर्तमेढ रोवली जाणार आहे. व सर्वांत महत्वाची गोष्ट ती हीच कीं ह्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान महात्माजीसारख्या पुण्यश्लोक महात्म्याकडून मंडित होणार आहे. खुद्द राष्ट्रीय सभेला जरी २६ तारखेपासून सुरवात होणार असली तरी अंतरराष्ट्रीय इतर परिषदांच्या बैठकी भरण्यास नाफेरवा त्यांच्या २० तारखे दिवशीं भरविल्या जाणाऱ्या परिषदेपासून सुरुवात होईल.

ह्या पुढें गोमांतकानें आपला मार्ग ब्रिटिश इंडियाच्या लोकशाहीच्या मार्गावरूनच आंखून घ्यावयाचा असल्यानें गोमांतकांतील राष्ट्रहितेच्छु तरुणानीं ह्या राष्ट्रीय सभेस प्रतिनिधि ह्या नात्यानें हजर राहून गोमांतक हा हिंदुस्थानचाच एक विभाग आहे हें सक्रीय सिद्ध करावें अशी आमची प्रगतिपर गोमांतकास सूचना आहे.

गामाच्या मरणाचा आनंद

बरोबर चारशें वर्षें झाली, कोची येथें व्हास्कु द गाम या फिरंगी व्हायसरायांचा अंत झाला. त्यावेळीं त्याच्या मरणाची बातमी ऐकून ज्यांना ज्यांना त्यांच्या जीवंतपणीच्या क्रूर कृत्यांची ओळख स्वानुभवानें किंवा पाहून अथवा ऐकून माहीत होती त्यांना आपणावरचें हें अरिष्ट परामव झालें ह्मणुन फार मोठा आनंद झाला असेल. गामाच्या पायगुणानें ज्या हिंदी स्त्रियांच्या सौभाग्यावर आणि ज्या हिंदी मुलांबाळांच्या मातृपितृसुखावर घाला पडला होता त्यांना, गामा मरण पावला ह्मणून कांहीं आपलें सौभाग्य आणि मातृपितृसुख परत मिळणार नव्हतें. परंतु मनुष्य स्वभावच असा आहे कीं ज्यांच्या क्रूर कृत्यांस आपलीं प्रिय माणसें बळी पडलीं किंवा ज्यांच्या दुष्ट आचरणानें आपण आपल्या सर्वोत्तम अशा सैभाग्यास मातृपितृसुखास अथवा इतर कोणत्याहि सुखास आंचवतों त्यांना आपला शत्रू मानून साधल्यास त्यांचें अनिष्ट करणें निदान मनांतल्या मनांत तरी चिंतीत राहणें हा होय. या स्वभावास अनुसरून गामानें ज्यांचें अहित केलें किंवा गामापासून ज्यांचें अहित केलें किंवा गामापासून ज्यांचें अहित घडलें त्यांना गामाला यमाजी भास्करानें मृत्युलोकांतून नाहींसें केल्याबद्दल हर्ष होणें साहाजिक आहे. गामा मेला आणि त्याच्या अनान्वित अशा जुलमापासून आपण सुटलों असा जरी त्यांचा प्रामाणिक समज झाला होता तरी गामाची फिरंगी परंपरा चालविणारे अनेक फिरंगी सरदार पाद्रींचे थव्यांचे थवे घेऊन हिंदुस्थानांत एकसारखे येतच होते. आपलें कार्य अव्याहत पुढें पिढ्यानुपिढ्या चालू राहावें ह्मणूनच गामानें तेव्हां पासून असाध्य होऊन बसलेला हिंदुस्थानचा जलमार्ग शोधून काढण्याचें धाडस केलें. हिंदुस्थानचें हें पश्चिमद्वार एकदां गामाच्या प्रयत्नानीं मोकळें होतांच युरोपांतील अनेक राष्ट्रांतील सरदार, व्यापारी, पाद्री यांच्या झुंडी आंत घुसूं लागल्या. कोणाच्या हातांत तरवार कोणाच्या हातांत तराजू तर कोणाच्या खांद्यावर क्रूझ आणि हातांत बायबल अशीं त्रिविध तऱ्हेनें सज्ज होऊन हे लोक आले होते. यांच्या आगमनानें हिंदुस्थानांत बऱ्याच क्रांत्या झाल्या व त्याचीं कडू फळें आह्मी हिंदी लोक आजपर्यंत भोगीत आहोंत.

हिंदुस्थानचा जलमार्ग शोधून काढून गामानें युरोपियन राष्ट्रावर बरेच उपकार करून ठेवले आहेत. हिंदुस्थानसारखें अफाट कुरण त्यांना आज चरण्यास मोकळें मिळालें आहे. तें नसतें तर युरोपियन राष्ट्रांचें वैभव आज जेमतेमच दिसलें असतें यात शंका नाहीं. आपलें पोट भरण्याची कोणतीहि युक्ति युरोपियन लोकानीं काढली कीं तिचा खप हिंदुस्थानांतच व्हावयाचा. इतरत्र तो क्वचित होण्यासारखा असतो. आज चारशें वर्षेपर्यंत युरोपियन पायगुणाचा प्रताप इतका दिसूं लागला आहे कीं हिंदी लोक विशेषेंकरून गामाच्या वंशजांच्या हातीं असलेल्या पोर्तुगीझ हिंदुस्थानांतील हिंदी लोक युरोपियन सुधारणेच्या कडक तेजानें दिपून जाऊन स्वत्वभावनांस पारखे झाले आहेत; आपला धर्म, आपला देश, आपले रीतिरिवाज यांची त्यांना ओळख नाहींशी झाली आहे; आपण कोण आमचे पूर्वज कोण होते, त्यानीं आपल्या धर्मासाठीं किती हाल सोसले, गामानें व त्याच्या मागून आलेल्या फिरंगी सरदारानीं चालविलेल्या धार्मिक जुलमास त्याना कसें तोंड द्यावें लागलें याकडे त्यांचें लक्ष जावें तितकें जात नाहीं. एकंदरीत हे आमचे लोक काया वाचा मनानें फिरंगीच होत चालले आहेत. ह्मणूनच आमच्या लोकांना गामाविषयीं यत्किंचितहि तिरस्कार वाटत नाहीं. गामानें आणि त्याच्या मागून आलेल्या फिरंग्यानीं आमच्या पूर्वजांस दिलेले त्रास, त्यांची केलेली विटंबना, अनेक तऱ्हेनें केलेला छळ याची आठवण होतांच या सर्वांस कारणीभूत झालेल्या या गामाचें नांव घेणेंसुद्धां कठीण वाटावयास पाहिजे होतें. पण तें तसें वाटत नाही याचें कारण आम्हास स्वतःविषयींचा अभिमान जागृत नाहीं हेंच होय.

आज जिकडे तिकडे सारा गोमांतक गामा गामाच्या शब्दांनीं दुमदुमून गेला आहे. गामाचा प्रत्येक नामोच्चार आम्हास पागील इतिहासाची आठवण करून देत आहे. गामा इकडे आल्यामुळेंच आमचे लाखों भाईबंद फिरंग्याच्या त्रासांस कंटाळून परागंदा झाले; लाखोंजणानीं खुषी नसतां परधर्म स्वीकारिला; लाखोंजणास स्वधर्मच्युत होऊन देण्यास स्वतःला जिवंत जाळून घ्यावें लागलें गामा इकडे आल्यामुळेंच हजारों देवळें मोडण्यांत येऊन, त्यांतील देवाच्या मूर्ति छिन्नविछिन्न झाल्या, अगणीत संपत्ति पाद्र्यांच्या भक्षस्थानीं पडली, हिंदूंचे ग्रामहक्क नाहींसे झाले, लपून छपून धार्मिक कृत्यें करण्याचा दुर्धर प्रसंग आला, देशी भाषा बोलणाऱ्यांवर शेंडी धरणाऱ्यांवर कर बसूं लागले, सरकारांत मान मान्यता नाहींसी झाली वगैरे जुलूम सुरू झाले आणि त्यांचे दुष्परिणाम अद्यापपर्यंत आह्मी हिंदु लोक भोगीत आहोंत. गामाचा पायगुण आह्मांस किती बाधक झाला हें सविस्तर कोणास पहावयाचें असेल तर त्यानीं कृपा करून सध्याचे चीफ जस्टीस न्याफ्लोरियान नोगेज्य यांचें 'आ रेपुब्लिक पोर्तुगेझ इ उस हिंदूस' हें पुस्तक अवश्य वाचावें. त्याच्या जोडीस दुसरें पुस्तक पाहिजे असल्यास सि. मिनेझिस ब्रागांस यांचें 'आ इंस्त्रुसांव ना इंदिय पोर्तुगेझ' हें पुस्तक घेण्यास हरकत नाहीं. या उभय ग्रंथकारांनीं आह्मांस फिरंग्यानीं आमच्या पूर्वजांवर केलेल्या भयंकर जुलुमांची व त्यामुळें त्यानीं भोगलेल्या, हाल अपेष्टांची, माहिती देऊन आम्हावर बरेच उपकार करून ठेवले आहेत. याबद्दल आम्हीं त्यांचे सदैव ऋणी असलें पाहिजे.

आमच्या सकल दुःखांस कारण झालेला हा गामा मरण पावला तेव्हां आमच्या पूर्वजानां बराच आनंद झाला असला पाहिजे असें आम्हीं वर म्हटलेंच आहे व गामाची ओळख जितकी अधिक होईल तितकें आमच्या म्हणण्याचें सत्यत्व लोकानां अधिक पटेल. गामा मेल्यास आज चारशें वर्षें झालीं तेव्हां कुठें आम्हांस म्हणजे, गामाच्या मरणाचे वेळीं ज्यांना आनंद झाला होता त्यांच्या वंशजास, गामाच्या मरणाचा आनंद प्रदर्शित करण्याची संधी मिळाली आहे. धन्य आमची कीं, ज्या गोष्टीमुळें आमच्या पूर्वजानीं आनंद मानला त्याच गोष्टीमुळें आनंद प्रदर्शित करण्यांचा सुयोग नव्हे राजयोग चारशें वर्षांनीं आम्हास प्राप्त झाला आहे. फरक इतकाच कीं, आमच्या पूर्वजांनीं केलेला आनंद खरांखुरा पण लपत छपत होता आणि आम्ही त्यांचे या स्वतंत्रता युगांतील त्यांचे वंशज राजरोस, दिवसाढवळ्या, दिव्यांच्या रोषनाईंत, गर्नालांच्या आवाजांत, बेंडच्या सुस्वर गजरांत, गामाच्या जयजयकारांत हा आनंद साजरा करणार आहोंत. त्यावेळीं आमच्या पूर्वजांनीं गामासारख्या राक्षसांच्या तडाक्यांतून आपण एकदांचे सुटलों ह्मणून आनंदातिशयानें नेत्रकमलांतून दोन टिपें गाळलीं असतील आणि आह्मास त्यांच्या वंशजानां हा गामाच्या मरणाचा चतुस्शांवत्सरिक दिन साजरा करण्याकरितां स्वत्वाचें दान देऊन वरती कांहीं रुपयांची दक्षणा वर्गणीदाखल देणें भाग झालें आहे. हा फरक फार मोठा दिसत असला तरी चारशें वर्षांच्या दीर्घ कालावर नजर देऊनच आह्मीं समाधान मानून घेणें प्राप्त आहे. गामाचे वेळीं आमचे पूर्वज शेंडीसाठीं जीव

ao mundo .Sublimes palavras aquelas de Deus. Sim, nao pode ...

बाल-वाचन-मंदिर संस्थेच्या व्याख्यानमालेचा रिपोर्ट

[मागील अंकावरून]

राष्ट्राची किंवा देशाची आर्थिक व भौतिक उन्नति व्हावयाची असल्यास बौद्धिक उन्नतीची गरज आहे. " India est una " हाच मंत्रघोष प्रत्येकाच्या अंतःकरणांत चालला पाहिजे. गोवें व हिंदुस्थान एक होतील! त्याचवेळीं आमची उन्नति होईल. बरेच लोक असें ह्मणतात कीं, आज पुष्कळ वर्षें गोवें हिंदुस्थानापासून स्वतंत्र असल्यामुळें यापुढेंहि तें स्वतंत्र असावें; अशा प्रकारची तर्कशास्त्राची लीला उपयोगी नाहीं. आह्मीं आहोंत तो बिंदु होतो. तो बिंदु व जाणार तो बिंदु यांचा मिलाफ करणारें ध्येय ठरवून आमच्या विद्यार्थ्यांनीं काय केलें पाहिजे हा आज प्रश्न आहे. आमचें ध्येय गांठण्याच्या बाबतींत ख्रिस्तीसमाज निरुपयोगी आहे. आह्मी हिंदुस्थानाशीं एक होऊं असें जर त्यांना सांगितलें तर आह्मांला कैद करण्यास ते मागें पुढें पहाणार नाहींत. मागें एका प्रसिद्ध ख्रिस्ती मनुष्यानें असें सांगितलें होतें कीं महार चांभार चालतील पण स्वराजिष्ठ नकोत. गोव्याच्या उन्नतीची सर्व जबाबदारी आमच्यावर पडते. आमच्या ख्रिस्ती बांधवांना आह्मीं आमच्या बाजूला वळविले पाहिजेत. येत्या २५ डिसेंबरला व्हास्को डी गामाचा चतुर्थ शत सांवत्सरिक वाढदिवस आहे. ज्यानें आमच्या पूर्वजांचे हालहाल केले, देश नागविला त्याच्या कीर्तीची ध्वजा फडकविण्याची आमचेच ख्रिस्ती बंधू तयारी करीत आहेत. वाढदिवस समारंभासाठीं जी कमिटी नेमली आहे त्यांत आमचे देसाई (अध्यक्षांकडे बोट दाखवून) आहेत. त्यांना याबद्दल फार वाईट वाटतें अशी माझी समजूत आहे. परंतु बेधडकपणें राजीनामा देण्यासारखी आज स्थिति नाहीं. पुष्कळ लोक असें ह्मणतात कीं, आमच्या तरुणांनीं नोकऱ्या धरून सत्ता पटकाविली पाहिजे. मी सुद्धां याच मताचा आहें. परंतु आज जे सरकारी नोकरीवर आहेत ते आमच्या गरजांची सरकारांतून दाद लावून घेण्याचा मुळींच प्रयत्न करीत नाहींत. ते आपली जबाबदारी विसरतात. परवांच्या गामाच्या वाढदिवशीं जाहीर सभा भरवून आह्मीं निषेध केला पाहिजे. आमच्यांत पोर्तुगीज पत्रें आहेत, स्वाभिमान आहे पण प्रयत्न झाला नाहीं. आमच्यांत पोर्तुगीज जाणणारे आहेत पण ख्रिस्तीसमाजाला आमच्यांत काय आहे हें सांगण्यालायक नाहींत. पण आमच्यांत काय आहे याची आमच्याच लोकांना मुळीं माहितीच नाहीं. नंतर अध्यक्षांनीं विषयाकडे वळण्याची सूचना दिल्यावर ते ह्मणाले:– आतां आमच्या विद्यार्थ्यांनीं काय केलें पाहिजे तें पाहूं:त्यानीं पोर्तुगीज भाषेंत प्राविण्य मिळविलें पाहिजे. इतर भाषेंत पुष्कळ ज्ञान असेल. आह्मांला भाषा ज्ञानाकरितां शिकावयाची नाहीं. तर ख्रिस्ती बांधवाना हाताशीं धरून आमच्या उन्नतीचा प्रयत्न केला पाहिजे. तेव्हां आमच्या कल्पनेचा त्यांच्यांत फैलाव करण्याकरितांच ती भाषा संपादन केली पाहिजे. आज त्यांची प्रवृत्ति अशी झाली आहे कीं, मराठींतून किंवा कोंकणींतून बोलून दाखविलेली कल्पना चुकीची आहे असें समजतील. उत्तम पोर्तुगीज बोलणाऱ्याला किंवा लिहिणाऱ्याला प्रागतिक संघानें अगर देशाची कळकळ असलेल्यांनीं चांगलींशीं बक्षिसें ठेवावीं. तसेंच संस्कृतांत व इंग्रजींत प्राविण्य संपादिलें पाहिजे. गोव्याचा इतिहास लिहिला पाहिजे. पोर्तुगीज–मराठी–कोश केले पाहिजेत. कोणाला स्वतःच घरीं पोर्तुगीज शिकावयाचं झाल्यास इंग्रजीवरून शिकावें लागतें. संस्कृत अध्यात्मा करितां शिकावयाचें नाहीं, तर आमच्या आर्य संस्कृतीची उज्ज्वलता ख्रिस्तीसमाजाला पटविण्याकरितांच शिकावें. सध्या जगांत जें अंतिम ध्येय आहे तें आमच्या प्राचीन हिंदु संस्कृतींत होतें. हेंच त्यांना दाखविलें पाहिजे. मूर्तिपूजा करितात ह्मणून आह्मांला ते त्याज्य समजतात ह्मणून मूर्तिपूजेची आवश्यकता त्यांना पटविली पाहिजे. त्यानां आर्यसंस्कृतीकडे वळविले पाहिजेत. आमच्या उज्ज्वल शास्त्रांचा व संस्कृतीचा उगम कसा, व आज त्याचा विपर्यास कसा झाला याचा विचार आह्मीं केला पाहिजे. आज लिसेवांत आमच्या इतिहासाचें नांव नाहीं. इतिहासानें अभिमान वाढतो. पोर्तुगीजानीं आमचा इतिहास नाहींसा करून अभिमानाच्या मुळावरच घाला घातला आहे. पोर्तुगीज वर्तमानपत्रें चालविण्यांत हिंदु लोक पटाईत आहेत असें ख्रिस्तीसमाजाला आह्मीं दाखविलें पाहिजे. विद्यार्थ्यांनीं राजकारणांतहि अवश्य भाग घ्यावा. आमचा गोमांतक पारतंत्र्यांत आहे, करांनीं गांजलेला आहे. आमच्या लोकांच्या आकांक्षा पार लयाला गेल्या आहेत. आज जरी नाहीं तरी विद्यार्थी दशा संपल्यावर मुलांनीं राजकारणांत पडावें. पोर्तुगीजानीं आमच्या भाषेच्या उन्नतीसाठीं कांहींच प्रयत्न केला नाहीं. आमच्या पुढाऱ्यांनीं हिंदु पोशाख वापरिला पाहिजे. देसाई आदि आमच्या पुढाऱ्यानीं परकी पोशाख करून समाजाला कमीपणा आणला आहे. साधारणतः पुढारी जो पोशाख करितात तो मानाचा आहे असें सामान्य लोक समजतात. आमचे पुढारी परकी पोशाख वापरून हिंदु पोशाख हीन आहे असें अप्रत्यक्षपणें कबूल करितात. उद्यां जर हिंदु पुढारी कोंसेल्यांत जुतें घालून जाऊन अस्खलीत पोर्तुगीजींत काम करूं लागेल तर ही कल्पना नष्ट होईल. राजकारणांत पडून स्वत्व विसराल तर वाईट. मातृभाषा मराठी त्यागूं नका. आमच्या ह्मताऱ्या आईकडे आम्हीं कसे पाहतों, ती सुंदर गोरी ह्मणूनच नव्हे. तर ती माझी ह्मणून! त्याचप्रमाणें मराठी-कडे पहा. तिला अंतर देऊं नका, तिच्या उन्नतीप्रीत्यर्थ झटा. इतकें जोराजोरानें सांगून व्याख्यात्यांनीं भाषण संपविलें. नंतर अध्यक्षांनीं उपवक्त्यांना बोलावयास परवानगी दिल्यावर श्री. खांडेकर बोलावयास उठले. ते ह्मणाले:– आजच्या व्याख्यानास गोमांतकीय विद्यार्थ्यांचें राष्ट्रकार्य हें नांव योग्य होतें. या विषयाचा राजकारणाशीं अति निकट संबंध आलेला आहे. गोमांतकाच्या राजकारणाशीं मी अपरिचीत असल्यामुळें उपवक्ता या नात्यानें येथें बोलणें अयोग्य होय. गोमांतक आज जरी महाराष्ट्रापासून अलग असलें तरी उद्यां तें तसेंच रहाणार नाहीं वाङ्मयिक, औद्योगिक व धार्मिक बाबतींत गोवा व महाराष्ट्र एक आहेत. गोमांतकांत हरिभाऊ, गडकरी जरी निपजले नाहींत तरी बाहेरचें ज्ञान आणून गोमांतकाची उन्नति केली पाहिजे. राष्ट्ररूपी मंदिराचा विद्यार्थी हा पाया असल्यामुळें प्रत्येक राष्ट्र त्यांच्या उन्नति करितां झटत असतें. विद्यार्थ्यांच्या पालकांस मला एवढीच सूचना करावयाची आहे कीं, विद्यार्थ्यांमध्यें शरीर सामर्थ्य वाढविलें पाहिजे. कोश, इतिहास वगैरे कामें शरीर सामर्थ्याशिवाय होत नसतात. शरीरसामर्थ्य संपादण्याला व्यायामाची आवश्यकता आहे. या करितां व्यायामाचे आखाडे स्थापिले पाहिजेत. माझ्या मनाच्या उड्या पुष्कळ आहेत पण शरीराच्या उड्या कमी. शरीरसामर्थ्याशिवाय जगाच्या स्पर्धा क्षेत्रांत आह्मीं निरुपयोगी ठरू. शरीर हें साधन साध्य नव्हे, शरीराचा उपयोग स्वार्थाकडेच मात्र करूं नये. आमच्या पुष्कळ पदवीधरांनां मराठी येत नाहीं. स्वदेश स्वभाषा– स्वधर्म या त्रयींच्या वाढी विषयीं तीव्र इच्छा धरून त्यांच्या कामींच शरीर वेंचलें पाहिजे. व अशा तीव्र इच्छा उत्पन्न करणाऱ्या शिक्षणाचा फैलाव झाला पाहिजे. सध्याचें युग यांत्रिक आहे. शास्त्रीयशिक्षण संपादन करून मातृभूमीच्या उन्नतीचे प्रयत्न केले पाहिजेत व शक्तिसर्वस्वाचा मनोभावनेच्या वाढीकडे उपयोग केला पाहिजे. नंतर श्री पै थोडासा खुलासा करावयास उठले. त्यानीं सांगितलें कीं, शास्त्रीय विषय सर्वांनीं शिकावा. सर्वांनीं रँगलर व्हावें पण एकाच विषयाकडे त्यानीं आपलें तनमन वेंचावें. लिसेवांतील शास्त्र शिकूनच जर कार्य करणार असाल तर तें न केलेलेंच बरें. शास्त्रीय शोधानां वाहून घेणाऱ्यांनां ही गोष्ट लागू नाहीं. शेवटीं अध्यक्ष समारोपास उठले. ते ह्मणाले, कांहीं आकस्मिक कारणानें व्याख्यानास वेळ झालाच आहे. मीं विशेष बोलून आपला वेळ घेऊं इच्छित नाहीं. आजच्या व्याख्यानास श्री. पै. यानीं विद्यार्थ्यांचें देशकार्य हें नांव ठेविलें होतें. श्री. खांडेकर यांचा सार्वत्रिक विद्यार्थ्यांच्या देशकार्याचा ऊहापोह होईल असा समज होता. माझाहि असाच समज होता. आजच्या व्याख्यानास गोमांतकीय हिंदु विद्यार्थ्यांचें राष्ट्रकार्य हें नांव अधिक योग्य झालें असतें. कांहीं ख्रिस्ती विद्यार्थी येथें जमलेले आहेत त्यांच्या करितां असें कांहींच सांगितलेलें नाहीं. व्याख्यात्यानीं कॉ. प्रो. नें एक खुळचट विधान केलें असें ह्मटलें. मीं कॉ. चालू वर्षाचा सेक्रेटरी असल्यामुळें थोडीशी माहिती देतों. गोव्याच्या जिवनास आवश्यक असणारें सर्व धान्य गोमांतकांतच उत्पन्न करतां येईल असें विधान कॉ. कधींच केलें नाहीं. लढाईच्या वेळीं ब्रिटिश हिंदुस्थानात कंट्रॉल असल्यामुळें गोव्यांत ज्या वेळीं धान्याचा तुटवडा पडला तेव्हां गोव्यांचें उत्पन्न किती पर्यंत वाढवितां येईल हा प्रश्न कॉ. पुढें उभा राहिला होता. त्या वेळीं बेर्नार्दीन कोस्त यानीं सध्याच्या दुप्पट धान्य गोव्यांत कसें उत्पन्न करितां येईल या विषयीं एक साधार निबंध वाचून दाखविला होता. एवढेंच. व्हा. डी गामाच्या समारंभ कमिटींत मी काम करावें कीं नाहीं हा प्रश्न आजच्या सभेचा नाहीं. पोर्तुगीजानीं आह्मांला जी स्थिति दाखविली आहे त्याबद्दल सध्या फक्त नाखुषी दाखवावयाची. फक्त बोलावयाचें. प्रत्यक्ष कृति करावयाची नाहीं. आज फक्त आम्हीं आमचें सामर्थ्य वाढविण्यासाठीं तयारी करीत राहिलें पाहिजे. आमच्यांत धीराचे प्राणी फारच थोडे आहेत. कोणत्याहि खऱ्या खोट्या गोष्टी योग्यायोग्यतेचा विचार करूनच ठरविल्याशिवाय उगाच दुसऱ्याच्या माथीं अपराधाचें खापर फोडूं नये. श्री. पै. यानीं जीं कांहीं बेजबाबदारपणाचीं विधानें केलीं तीं अमलांत आणल्यास समाजाचें फारच नुकसान होण्याचा संभव आहे. पोशाखाचें विवेचन हा आजचा विषय नसल्यामुळें मी त्याविषयी विशेष विवेचन करीत नाहीं. गोमांतकांतील एक पुढारी ह्मणून मला जें त्यानीं आव्हाहन केलें त्याबद्दल मी त्यानां इतकेंच सांगतों कीं, मी कोणत्याहि पोशाखाला सारखाच मान देतों. हिंदु पोशाखाचा मला फारच अभिमान आहे. कोणत्याहि समारंभास मीं हिंदु पोशाखानेंच जात असतों. आजचे उपवक्ते श्री. खांडेकर यानीं शरीर सामर्थ्य विषयीं फारच उपयुक्त विवेचन केलें. स्पर्धा क्षेत्रातील शत्रूशीं टक्कर देण्यासाठीं आमच्या विद्यार्थ्यांनीं शरीर सामर्थ्य संपादन केलें पाहिजे. इतकें सांगून अध्यक्षानीं आपलें भाषण संपविलें. नंतर आभार प्रदर्शन हारतुरे झाल्यावर व्याख्यानमालेचा पहिल्या दिवसाचा कार्यक्रम संपला.

ao mundo .Sublimes palavras aquelas de Deus, Sim, não pode ser dada

Ano 9 N. 39

...ta-feira 25 de Dezembro de 1924

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
a linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ३९

गुरुवार ता. २५ डिसेंबर सन १९२४

वर्गणीचे दर.
सालीना रु. स. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातींचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

A SEMANA DO GAMA

Estamos na semana do Gama e não será, porisso, despropositado reduzir a justas proporções a sua arcaica fama que a inflexibilidade historica compara com a ... lama ou com a má dama.

*

¿Quem é, afinal, o descobridor do caminho maritimo da ou para a India? E' o tal piloto, como bem afirma o nosso ilustrado colaborador *Crispim* estribado em dados historicos cuja originalidade é flagrante, é irrefutavel, e clarividente.

Quem criou, portanto *jús não só á gratidão dos nacionais mas á admiração de todos quantos bemdizem da Luz*, foi o mesmo piloto africano, que *ipso facto* se torna merecedor dos pomposos festejos que ora se solenisam em honra do trama ... do Gama.

*

A *Terra* de Margão censura a atitude abstencionista do *Bharat* nos festejos comemorativos do Gama, dizendo ser este figura que pertence á Humanidade, constituir o patrimonio da Civilisação. E compara o seudo argonauta com os eminentes sabios Bose e Kitasato.

E' descabido o reparo, como mal feito é o paralelo. O nosso artigo *Seculos depois*... prova-o á saciedade, demonstra-o exuberantemente.

¿Pulverisou a *Terra* os nossos argumentos? Evidenciou-lhes a inanidade?

Não. Alonga-se, apenas, em considerações que, nem de perto nem de longe, se aplicam ao *Bharat*.

*

A obra do Gama, como berra a Historia, contribuiu para o infortunio, para a desgraça, para o aniquilamento dos povos conquistados, os quais, por culpa que não era deles, ficaram privados da sua religião, dos seus pagodes, das suas propriedades, da sua liberdade, da sua Patria e até da sua vida.

O proprio portuguez Eça de Queiroz sente-se horrorisado deante da obra de ... perdição do Gama. A História não o endeusa, antes o condena com a severidade que a caracterisa.

¿Será a *Terra* capaz de nos apresentar alguma proesa deste jaez dos sábios Bose e Kitasato?

¿Poderá ela citar algum exemplo dêstes grandes homens terem concorrido, com suas importantes descobertas, para a privação da religião, pagodes, propriedades, liberdade, Patria e vida dos povos estranhos?

Não. ¿Para que, então, o reparo descabido e para que o paralelo mal feito?

*

Não há a independencia politica sem a independencia de caracter—diz a *Terra*.

O *Bharat* está, perfeitamente de acordo com esta autorisada opinião do colega e, porisso, não poupa o ensejo de verberar *dominantes* que se fartam de cuspir sobre *esta gente* o seu despreso—de causticar municipios que solicitam a conservação dum governo que com os seus apaniguados produz uma sociedade em deliquêscencia, sem as grandes virtudes que tornam os povos fortes e amados, — e de censurar os *principais hindus que prodigalisam ás suas aclamações e salamas orientais aos nossos verdugos*.

¿Ha municipios hindús que se unem ao governo, coadjuvando-o na sua obra anti-popular? ¿Há hindús que lhe fazem *salamas*, turibulando-o a proposito e desproposito de tudo e de nada?

Pois bem!

¿Poderá o *Bharat* ser consi-

AO VEIO DO TEMPO...

Quem descobriu o Caminho maritimo a' India?

Em todos os momentos solenes em que os corações patriotas vibram de emoção e de entusiasmo dizem-se dislates, escrevem-se falsidades, deturpando a verdade dos factos, a grande verdade historica. Compulsando-se vários livros referentes á história da descoberta do Caminho Maritimo á India todos os escritores são concordes e unanimes em afirmar que V. da Gama ao vir descobrir este caminho tomara em Melinde pilotos que o guiassem á terra que ele queria descobrir o Eldorado a que ardente e cubiçosamente desejava lançar as suas garras — a India: terra rica, faustosa e imensa.

E todos eles afirmam e nisto inclua se igualmente o inclito principe dos poetas, que o piloto chamado Amad Ibns Musjid, um homem muito erudito e sabedor do seu oficio, avistando terra bradára: 'Terra, terra de Calecut." E', pois, pela razão historica absolutamente falsa a denominação de descobridor de Caminho maritimo á India concedida a V. da Gama, quando quem deveria ser coberto de gloria, apoteosado pelos portugueses, era o pilolo que sem armas, sem espirito de ambição nem de honrarias, apresentára ao Gama a terra que tanto eles suspiraram por possuir. E para mais diz G. Ferrand, socio d'Academia das Sciencias, que os roteiros portugueses são copia dos roteiros árabes.

Outros ditirambos elevam-se em côro á memoria do Gama, e estes são, atribuindo-se á sua façanha um espirito scientifico. Eis o que a este respeito escreveu Edgar Quinet no seu celebre livro *Les revolutions da Italie*:" Quereis medir o que separa o espirito scientifico do espirito revelador? Vêde quão diferente é o metodo dos portugueses para descobrir o caminho maritimo á India e a marcha de Cristovam Colombo á America. Os portugueses avançam, voltam pelo mesmo caminho, recomeçam o seu ensaio, tacteiam durante 50 anos as costas desconhecidas da Africa; é o método prudente da experiencia. Bordejam as margens, buscam, contornam, esperam; depois retiram se novamente com precipitação, marcham duvidando. Olhai, ao contrario, a direcção do navio de Colombo; marcha com linha recta, sem desviar, como se ele visse o seu fim com olhos de alma."

Esta opinião insuspeita e valiosa dum frances coloca as coisas no seu devido pé e restabelece a verdade pura e honesta dos factos.

Para que dar-se proporções de Himalaias a um feito que não passa dum Chandarnate, para que atribuir-se-lhe a força dum Niagara quando não passa dum açude do Canal de Parodá!! ...

CRISPIM

भारत

मार्गशीर्ष व० १४ शी शके १८४६

समर्थांचें राजकारण

[ले० ३ रा.]

नाना जनाचें हृदय। मृदु शब्दें उकलावें। ही समर्थांची आणखी एक शिकवण होय. राजकारणी पुरुषाला या गोष्टीची केवढी गरज आहे हे सांगणें नकोच. जनतेला मित्र करावयाचें तर तें तिचा सेवक होऊनच साध्य होणार, धनी ह्मणून होणार नाहीं. उंच नीच ह्मणों नये। सकळांचें निववावें हृदय। इतकें थोर अंतःकरण पुढाऱ्यांचें असलें पाहिजे. आपली योग्यता मोठी ना? मग आपण अज्ञान जन समुदायाशीं संबंध ठेवावयाचा ह्मणजे काय? असला प्रश्न त्याचे मनांत मुळींच उद्भवतां कामा नये. समर्थ ह्मणतातः– वेड्यासी वेडें ह्मणूं नये। वर्म कदापि बोलूं नये। तरीच घडे दिग्विजये। निस्पृहासी। हें ध्यानांत धरलें पाहिजे. कड्यावरून दरींत पडणारा धबधबा भयंकर व वाईट ना? पण त्याचा उपयोग मनुष्य करून घेतोच कीं नाहीं! दोन वस्तूंच्या घर्षणानें उत्पन्न होणारी वीज प्राणघातक व वाईट खरी; पण तिच्यापासून मनुष्य आपलें केवढें हित साधूं शकतो! तीच गोष्ट वेड्यांची अगर अज्ञान मनुष्यांची. पुढाऱ्यानें असल्या मनुष्यांस देखील आपल्या कार्यांत सहाय्यभूत केलें पाहिजे. शिवाय, फड नासोंचि न द्यावा। पडिला प्रसंग सांवरावा। अतिवाद न करावा। कोणी एकाशीं।. या तत्वाचाहि वरील शिकवणींत अंतर्भाव होतो. आपण ज्या संघांत अगर संस्थेंत होतों, त्या संघाशीं आपलें पटत नाहीं ह्मणून, तो संघ समूळ नाहींसा करावयाचा, असलें अधोगामी कृत्य पुढाऱ्यानें केव्हांच करूं नये. तर, त्यांतच राहून व शक्य तर आपण पटतें घेऊन करावयाचें कार्य करून दाखवावें, असा वरील ओंवीचा अर्थ आहे; त्यापासून, वर्तमानकालीन पुढाऱ्यांनीं पुष्कळ घेतां येण्याजोगें आहे. येथें काय, किंवा ब्रिटिश इंडियेंत काय, बहुतेक राजकीय पक्षांची शक्ति, दुष्ट सरकारच्या अधम कृत्यांना आळा घालण्यांत खर्च होण्याचे ऐवजीं परस्परांचें बळ कमी करण्यांतच खर्च होते हें कांहीं खोटें नाहीं ही. गोष्ट टळणें असल्यास, समर्थांच्या वरील शिकवणीकडे लक्ष गेलें पाहिजे.

राजकारणी पुरुष क्षमाशील, शांत, सहिष्णु असा असला पाहिजे. उदंड धिक्कारून बोलती। तरी चळों नेदावी शांति। दुर्जनास मिळोन जाती। धन्य ते साधु॥ अशी त्याची वृत्ति असली पाहिजे. जनतेला कित्येक वेळा, त्र्याच गोष्टी वाईट भासतात. अशा वेळीं पुढाऱ्याला तिच्याकडून उणे अधिक शब्द मिळण्याचा बराच संभव असतो. खऱ्या पुढाऱ्यानें शांतीच्या जोरावर असले प्रसंग निभावून नेले पाहिजेत. ह्मणजे प्रथम आपल्याचे विरुद्ध खवळणारी जनता कांहीं काळानें आपल्याच मागें आल्याशिवाय रहाणार नाहीं, असें त्यास आढळून येईल. समर्थ ह्मणतातः– धके चपाटे सोसावे। नीच शब्द साहात जावे। पस्तावोन परावे। आपले होती। आज लोकमान्य झालेल्या प्रत्येक पुढाऱ्याला, वरील ओवीचा कमी अधिक प्रमाणावर अनुभव आलेला आहे. आपलीं मतें, मग तीं खरींच कां असेना, इतरांना पटत नाहींत ह्मणून विनाकारण त्रागा करणारे अंहमन्य पुढारी, कमी अधिक प्रमाणांत प्रत्येक समाजांत असतातच, त्यांनीं समर्थांची वरील शिकवण आपलीशी करावी.

महंताचे काय किंवा निव्वळ राजकारणी पुरुषांचे काय, अंगांत वरील गुण असले पाहिजेत हें निर्विवाद होय. समर्थ महंत लक्षण नामक एका समासांत ह्मणतातः— तस्मात लौकिकीं वर्ततां नये। त्यास महंती कामा नये। परत्र साधनाचा उपाये। श्रवण करून असावे। अभ्यासें प्रगट व्हावें। नाहीं तरी झांकोनी असावें। प्रगट होऊनी नासावें। हें वरें नव्हे. गुणाचे दृष्टीनें स्वतःची योग्यता दीड दमडीचीहिं नसतांना, केवळ नांवासाठीं पुढाऱ्यांचें कवच धारण करून, देशाचें नासें व आपलें हासें करून घेणाऱ्या व्यक्तींनां वरील समासाचीं पारायणें अवश्य आहेत. स्वतःची सुधारणा करण्याचे पूर्वी, इतरांची सुधारणा करण्याच्या भरीस पडण्याचा मोह कित्येक तरुणांस आवरत नाहीं. त्यांनींहि वरील ओव्यांपासून धडा घेण्याजोगा आहे.

समर्थांनीं आपल्या दासबोधांत राजकारणाचा पुष्कळ ठिकाणीं विचार केलेला आढळतो. नुसत्या राजकारणाकरितां त्यांनीं दोन संबंध समास खर्ची घातलेले आहेत. याशिवाय, दासबोधाच्या उत्तरार्धांत तर प्रत्येक समासांत राजकारणावर एक दोन ओंव्या आढळतात. वर्तमानकालीन राजकारणाला लागू पडतील अशीं रत्नें काढावयाचींच तर तीं दासबोधांतून पुष्कळ काढतां येतील. परंतु असल्या लेखांत तसें करणें शक्य व इष्टहि नाहीं. त्याकरितां मूळ ग्रंथच प्रत्येकानें पहाणें अवश्य आहे.

दासबोधाची महति पारमार्थिकाला तर आहेच. पण शिवाय, इतर संतांच्या दृष्टोत्पत्तीस न येणारा ऐहिक वादहि त्यांत आहे. आत्मौन्नति हा तर दासबोधाचा हेतु आहेच. याबद्दल संशय नाहीं. पण, आत्मौन्नति साधतानांच राष्ट्रोन्नति कशी साधावयाची व दुसरी पहिलीला किती पोषक आहे हें दाखवावयाचें हेंच त्याचें वैशिष्ट्य होय. देशसेवा व धर्मसेवा या दोन भावनांचें दिवसें दिवस दुरीकरण होत चाललेलें आहे, तें समर्थांनीं नाहींसें केलें व प्रथम त्यांच्यांत साध्य साधनभाव घडवून आणला. हिंदु धर्माचें ध्येय आध्यात्मिक उन्नति साधणें, एवढेंच नसून, राष्ट्रोन्नतीचाहि त्यांत अंतर्भाव होतो. इतर धर्मांची गोष्ट तशी नाहीं. आत्मौन्नति हेंच त्यांचें उद्दिष्ट. मग त्याकरितां स्वजनानां हालांत लोटलें तरी हरकत नाहीं. इतर धर्मांत, राष्ट्राच्या कल्पनेचा मागमूसहि मिळत नाहीं. हिंदु धर्माची गोष्ट तशी नाहीं. खुद्द हिंदु धर्माचे प्रणेते ऋषी, राष्ट्रसंस्थापक व राष्ट्रोद्धारक होऊन गेले. हिंदु राष्ट्रानंतर हिंदुधर्म जन्मास आला; हिंदु राष्ट्राकरितां हिंदुधर्म जन्मास आला. आणि ह्मणूनच त्यानें व्यक्तीबरोबर समाजाचें व राष्ट्राचेंहि नियमन केलेलें आहे. नैसर्गिक सीमानीं स्वतंत्र असलेल्या हिंदुस्थानाकरितां, हिंदुधर्म स्थापन झाला होता. सबब, त्याचीं तत्वें अगर आचार स्वतंत्र हिंदुस्थानांतच उपभोगावयाचे; इतरत्र नव्हे. मग, देश जर दुसऱ्याचे ताब्यांत तर, धर्म तरी आपणांस शांततेंत कुठून लाभणार? व्यक्ति व समष्टि या दोनहि दृष्टीनीं आपले धर्मांत विचार केलेला आहे. हें वेदांतील कांहीं भागांवरून कळून येतें. ह्मणून, हिंदुधर्मीय ह्मणून घेणें असल्यास, त्या धर्मांत सांगितल्याप्रमाणें आत्मौन्नति व राष्ट्रोन्नति या दोनहि कार्यांत आपण आपली शक्ति खर्ची घातली पाहिजे.

समर्थ पूर्वकालीन अगर तत्कालीन संतांनीं हिंदूंच्या आध्यात्मिक उन्नतीस हातभार लावला असेल व त्याचा परिणाम टिकाऊ झाला असेल; कदाचित् नसेलहि. पण, ऐहिक साधनाकडे त्यांनीं निखालस दुर्लक्ष केलें होतें. यामुळें, परमेश्वरावर हवाला ठेवून फार तर पोटापुरतें मिळवायाचें; अशी लाजिरवाणी वृत्ति हिंदुसमाजांत शिरली, ती अजून ह्मणण्यासारखी गेलेली नाहीं. आह्मीं पुष्कळ मनुष्य असे पाहिलेले आहेत कीं, त्यांना देशसेवा ही एक निरर्थक चळवळ वाटते. व मोठमोठ्या स्वार्थत्यागी देशभक्तांच्या गोष्टी निघतांच, यांचीं नाकें आपोआपच मुरडतात. जणूं काय देशभक्त करीत असलेली चळवळ ह्मणजे शुद्ध पोरखेळ! देशरक्षण व धर्मरक्षण, देशपालन व धर्मपालन या दोन भावना भिन्न किंबहुना परस्पर विरोधी आहेत अशी त्यांची खोटी समजूत झालेली असते. असल्या व्यक्तींचाच आमच्या समाजांत भरणा फार झटल्यास चालेल. त्या राष्ट्रौन्नतीबद्दल उदासीन असतात. या बिकट परिस्थितीला तोंड देणें असल्यास, एकंदर हिंदूंना राष्ट्रकार्याभिमुख करणें असल्यास समर्थांचें राजकारण प्रचारांत व प्रसारांत आलें पाहिजे. सोळाव्या शतकांतल्याप्रमाणें, धार्मिक पायावर आपण देशोन्नतीची इमारत उभारली पाहिजे. कारण ही इमारत उठल्याशिवाय धर्मपालन व धर्मरक्षण कसें होणार? आमच्या धर्मांचें संवर्धन आमच्याच घरांत होणार. पण, मुळीं आमचें ह्मणून जर स्वतःच्या मालकीचें घर नाहीं, तर तें शक्य तितक्या लवकर बांधावयास नको काय? तें कसें काय बांधावयाचें हें पहाणें असल्यास, तें आपणांस पाहिलेंच पाहिजे समर्थकालीन परिस्थितीच्या इतिहासाचें अवलोकन केलें पाहिजे, व समर्थांचा राजकारण–विशिष्ट महाराष्ट्र धर्म आचरणांत आणला पाहिजे–एरवीं गत्यंतर नाहीं.

स्फुट विचार

मतदारीचा हक्क सांभाळाः— येत्या ता. २ ते ११ जानेवारीपर्यंत मतदारांच्या यादींत नांवें नोंदून घेण्यासाठीं ठिकठिकाणच्या नोंदणीकामगारांकडून जाहीर झालें आहे. कोणत्याहि सज्ञान, पोर्तुगेझ भाषेंत लिहावयाला वाचावयाला येणाऱ्या येथील रहिवाशी पुरुषांस मतदार होण्याचा हक्क आहे. त्यास जागून वेळींच आपलें नांव नोंदून घेण्याची तयारी एव्हांपासूनच ठेवलेली बरी असें आह्मांस वाटतें. पोर्तुगेझ राष्ट्राच्या फाजील स्वभाषाध्येयानें असो किंवा इतर भाषाभिज्ञांस मतदारीचा हक्क दिल्यास हिंदुमतदारांचें डोईजड प्रमाण पुढें मागें आपणास नडणार या भीतीनें घाबरून गेलेल्या बावळटांच्या कारवाईमुळें असो, मराठी जाणणाऱ्यांचा मतदारीचा हक्क काढून घेतल्यामुळें हिंदु समाजाचें राजकीय वजन बरेंच कमी झालें आहे. हा विषमतेचा दोष घालवून रेतुब्लिकसरकाराचा समतेचा आव कायम रहावा ह्मणून ना. व्यंकटेश देसाई यांनीं मागें कायदेमंडळांत तशा अर्थाचा ठराव आणून तो पासहि करून घेतला होता. तरी तो पोर्तुगाल सरकारकडून अद्याप मंजूर होऊन येत नाहीं. प्रागतिक संघाच्या १ ल्या परिषदेंतहि मराठी जाणणाऱ्यांस मतदारीचा हक्क मिळावा ह्मणून एक ठराव घेऊन तो इतर ठरावांबरोबर सरकारांत दाखल करण्यांत आला होता, हें सर्वांस माहीत आहेच. याची वासलात लोकसत्तेच्या अधिकाऱ्यांनीं कशी लाविली हें मात्र अद्याप समजलें नाहीं. असो. गेलें तें गेलें; कधीं तरी तें मिळेल किंवा मिळवून घेऊं अथवा मिळविल्याशिवाय राहणार नाहीं असा आशावादीपणा बाळगून राहिलेले हक्क सांभाळण्याची खबरदारी घेतली पाहिजे. पोर्तुगेझ भाषा जाणणारे अद्याप आमच्या समाजांत किती तरी सज्ञान नागरिक हलगर्जीपणानें आपल्या मतदारीच्या हक्कांस जाणून बुजून मुकले आहेत! त्यांची कींव करावी तितकी थोडीच आहे! यापुढें त्यांस तसेंच राहूं देणें समाजहिताच्या दृष्टीनें आत्मघातकीपणाचें होईल. हें लक्षांत ठेवून प्रत्येकानें आपलें व आपल्याबरोबर इतर समाजबांधवांचें, मग ते कोणत्याहि पक्षाचे असोत, नांव मतदारांच्या यादींत मुदतींत दाखल करून घेण्याचें दाक्षिण्य दाखवावें. ' प्रागतिक संघानें ' या बाबतींत चालू सालीं बराच प्रयत्न केला व कांहीं अंशीं तो फलद्रूप झालाहि. येत्या सा-

'ददतु ददतु गालिर्गालिमन्तो भवंतः वयमपि तदभावात् गालिदानोऽसमर्थः' असें ह्मणून या विषयावरील वादाला इथेंच कायमचा विराम देऊं इच्छितों. आत्मसमर्थनपर एकहि ओळ यापुढें लिहिण्याची आमची इच्छा नाहीं. क. प्रमोद ऑफिस, मालवण. आ. नम्र,

ता. ८-१२-२४ गं. दे खानोलकर.

राशीनकरांची कथा

श्री. रा. रा. भारतकर्ते यांसः—

वि. वि. पत्राचें कारण आपल्या वर्तमानपत्राच्या ता. २०।११ च्या अंकांत कीर्तनांतील शिमगा या मथळ्याखालीं एक लेख प्रसिद्ध झाला असून त्यास 'कीर्तनांतील श्रोता' या मथाळ्याखालीं ता. ११।१२ च्या अंकांत उत्तरवजा लेख प्रसिद्ध झाला आहे. दोन्ही लेख वाचून जें कांहीं वाटलें तें या पत्रानें वाचकांपुढें ठेवण्याची इच्छा असल्यानें हें पत्र आपण प्रसिद्ध कराल अशी आशा करितों.

दोन्ही लेखांचा न्यायी नजरेनें विचार केला तर एक गोष्ट स्पष्ट दिसून येते ती ही कीं पहिल्या लेखांतील कोणतेंहि विधान दुसऱ्या लेखांत खोडून काढलेलं नाहीं. 'कीर्तनकर राशीनकर बोवा हे अडाणी समाजाला येऊन मिळाले, सुशिक्षित समाजांत मिसळले नाहींत' असें दर्शविण्याचा प्रयत्न पहिल्या लेखकानें केला आहे असें दुसऱ्या लेखकानें स्पष्ट लिहितानां असें दर्शविणारीं वाक्यें कोणतीं आहेत हें दाखविलें असतें तर त्रयस्थ माणसाला पहिला लेख मत्सरी वृत्तीनें लिहिला आहे असें समजायाला बरें पडलें असतें; परंतु जोंपर्यंत तसें दाखविलें गेलें नाहीं तोंपर्यंत उलट्या स्वल्पविरामांची रेलचेल करून उलट्या काळजाचें धाडस कितीहि दाखविलें तरी तें वाचकांच्या न्याय बुद्धीला पटणार नाहीं. फीच्या पंचवीस रुपयांच्या विधानासंबंधींहि अशीच गोष्ट झाली आहे. पहिल्या लेखकानें पंचवीस रुपयांचा निर्देश करतानां त्याच्या संख्यावाचकत्वाचें महत्व दाखविलें नसून त्याचें विशिष्ट गुरुत्व दाखविलें आहे. परंतु ही साधी गोष्ट समजण्याची पात्रता नसल्यानें २४ रुपये १२ आणेच कां नसावे असा अप्रत्यक्ष प्रश्न उपस्थित करून विधानांचा खोटेपणा दुसरे लेखक सिद्ध करूं पहातात. व स्वतः मात्र ते किती हें सांगत नाहींत हें आश्चर्य आहे.

टोपण नावांनें पत्रव्यवहार केल्याबद्दल पहिल्या लेखकाला नांवें ठेवतानां स्वतःचें तोंड लपवून तें दाखविण्याचें धाडस आपल्या अंगांत किती आहे हें त्यानीं सर्वांस दाखविलें आहे. स्वतःच्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं, दुसऱ्याच्या डोळ्यांतलें कुसळ दिसतें ह्मणतात तें असें!

असो. एकाद्या परकी माणसानें वाटेल तीं विधानें बेधडकपणें करावीं व आमच्या बांधवांनां त्याचें मुळींसुद्धां वाईट न वाटतां उलट आपल्याच मंडळींशीं भांडण्याला तयार व्हावें हा न्याय खासा आहे यांत शंका नाहीं. व यावरूनच मात्र एखाद्याला असें वाटेल कीं राशीनकर बोवा योग्यच बोलले व अडाणीपणाच्या संसर्गानेंच त्यांनां हें धाडस झालें असावें.

दुसऱ्या लेखकानें आपल्या अंतःकरणांतील मत्सर इतक्या तीव्रतेनें दाखविला आहे कीं, त्या मत्सरावर पांघरूणच घालायाचें झालें तर 'मुरलीधराच्या तर्फे ××× असें धारण केलेलें नांव बदलून 'विठोबाच्या तर्फे + + +' असें तें बदलावें लागेल. खरोखरच जर पहिल्या लेखकानें मत्सरी वृत्तीनें पत्र लिहिलें आहे व त्या संबंधीचा 'भरपूर पुरावा' त्यांजकडे आहे तर त्यानीं भ्याडासारखें मागें कां रहावें? तो अलवत प्रसिद्ध करावा. समाजांतील हे अभिमान शून्य चाळे जनतेसमोर यावे ह्मणून मीं हें पत्र पाठवीत आहें. त्रयस्थ

प्रागतिक संघवार्ता

[आमच्या खास बातमीदाराकडून]

ठरल्याप्रमाणें पणजी येथें श्री. काकुले यांच्या वाड्यांत गेल्या ता. ३० रविवार रोजीं 'प्रागतिक संघाच्या' म. मंडळाची सभा भरण्यांत आली. बहुतेक सर्व सभासद हजर होते. हजर नसलेल्यांनीं पत्रद्वारें आपली सहानुभूति दाखविली होती. श्री. फटू बाबू केंकरे, मंडळाचे अध्यक्ष हे हजर होते. तरी त्यांनां लवकरच निघून जावयाचें असल्यानें त्यांच्याच अनुमतीनें मि. रामचंद्र पांडुरंग वैद्य यांची अध्यक्षाचे जागीं योजना होऊन सभेच्या कामास सुरवात झाली. अनेक विषयांचा खल होऊन खालील ठराव घेण्यांत आले:—

१ ला. दो. काशीनाथ घ. शिर्वेकर, यांच्या आकस्मिक तऱ्हेनें झालेल्या निधनाबद्दल या संघाला फार दुःख होत आहे. कै० शिर्वेकर यानीं संघाबद्दल वारंवार दाखविलेली सहानुभूति, चालकांस दिलेलें प्रोत्साहन व केलेली मदत या मुळें संघानें त्यांच्याशीं कृतज्ञ असणें हें त्याचें कर्तव्य आहे असें ही सभा समजते. त्याच्या मरणानें मृताच्या कुटुंबियांवर आलेल्या दुःख प्रसंगांत संघहि वाटेकरी आहे असें त्यांस कळविण्यास संघाचे अध्यक्ष व सेक्रेटरी यांस ही सभा अधिकार देते.

२ मध्यवर्ति कमिटीच्या सभासदांपैकीं ज्यानीं नवे प्रतिज्ञालेख भरून दिले नाहींत त्यानीं ते भरून, आपापल्या महालांत महालकमिटी स्थापन झाली नसल्यास ती स्थापण्याचा उपक्रम करावा. येथ हजर असलेल्यानीं तरी लगेच कामास आरंभ करण्यास चुकूं नये. तसेंच येत्या जानुवारी, फेब्रुवारी महिन्यापर्यंत मिळतील तितके नवीन सभासद मिळविण्याची खटपट करावी. या कामीं कार्यकारी कमिटीचे सभासद, संघाचे प्रचारक व स्वयंसेवक यांची मदत हवी असल्यास मागावी व त्यानीं ती अवश्य द्यावी.

३ रा. संघाची दुसरी परिषद येत्या डिसेंबरांत भरणें अनेक कारणानीं शक्य नसल्यानें व ठिकठिकाणच्या महालकमिट्या स्थापण्यास व नवीन सभासद मिळविण्यास येत्या फेब्रुवारीपर्यंतची मुदत घातली असल्यानें सध्या सासष्टी महालकमिटीच्या परिषदेचा काल निश्चित करण्यासंबंधीच्या प्रश्नास उत्तर देतां येत नाहीं. उक्त मुदत संपतांच कार्यकारी कमिटीची व सा. म. कमिटीची संयुक्त सभा बोलावण्यांत येऊन परिषदेसंबंधीचा विचार करावा. पाहिजे असल्यास मध्यवर्ति मंडळाची सभा बोलवावी.

ठराव ४ व ५ हे निवडणुकांसंबंधानें असल्यानें, त्यांचा गोषवारा येथें देत नाहीं.

६ वा. येत्या डिसेंबरांत बेळगांव येथें अ. भा गो परिषदेचें ५ वें अधिवेशन भरणार आहे. त्यांत भाग घेऊन त्या उपयुक्त संस्थेशीं सहकारित्व करणें हे संघाच्या कार्यांपैकींच असल्यानें ही सभा, त्या अधिवेशनास प्रतिनिधि या नात्यानें हजर रहाण्यासाठीं संघाचे सभासद श्री. जनार्दन वि. कामत, पारोडें व श्री यशवंतराव सरदेसाई, मडगांव यांस निवडीत आहे. मात्र परिषदेंत आंतरराष्ट्रीय भानगडीचे प्रश्न उपस्थित झाल्यास त्यानां संघाच्या सल्ल्याशिवाय मान्यता देतां येणार नाहीं.

७ वा. ना. व्यंकटेश वि. सरदेसाई व ना. फटू बाबू केंकरे यानीं तूर्तच्या कायदेकोन्सिलांत, सभासद या नात्यानें केलेल्या कामगिरीबद्दल ही सभा संतोष व्यक्त करीत आहे. तसेंच ना. देसाई यांची निवडणूक येत्या सालाकरितां त्रिबुनाल कोंतेंसिओझच्या सभासदाच्या जागीं झाली असल्यावरून आपला आनंद व्यक्त करून त्यांचें अभिनंदन करीत आहे.

या सर्व ठरावांवर बऱ्याच वक्त्यांचीं भाषणें झालीं; कांहींजणांनीं सूचना उपसूचना आणल्या किल्येकानीं दुरुस्त्या सुचविल्या त्या सर्व लक्षांत घेऊन वरील ठराव एकमतानें पास झाले. जमलेल्या मंडळीनीं ना. देसाई यांच्या गौरवार्थ त्यानां चहापार्टी देण्याचें ठरवून सर्वांस रात्रो ८ वाजतां सभेच्या जागीं येण्यास आमंत्रण दिलें. कार्यक्रमाप्रमाणें काम उरकल्यावर श्री. जनार्दन विष्णू कामत यानीं केवळ नवीन कावेजादींतील सभासदांच्या एका जागेवरच असलेली आमची नजर जरा विस्तृत करून ती जमिनदारवर्ग, ग्रामसंस्थांचे अखत्यार यांच्या मतदार संघाकडेहि वळवावी व कायदेमंडळांत हिंदूंच्या ध्येयावर ह्मणजे प्रा. संघाच्या ध्येयावर दृष्टि ठेवूनच काम करणारे सभासद निवडून येतील अशी खटपट करण्याची सर्वांस विनंति केली. डॉ. बोरकरानीं उत्तरादाखल सांगितलें कीं, संघ आस्ते आस्ते या गोष्टीचा विचार करील. जमीनदारवर्गांतील बहुमत आमचेंच आहे. ग्रामसंस्थांचे अखत्यार आमचे कांहीं कमी नाहींत. या नाहीं पुढल्या निवडणुकांत आमचा हात तेथेंहि शिरकेल याबद्दल खात्री बाळगावी. शेवटीं अध्यक्षानीं संमत पास झालेले ठराव अमलांत आणण्यास कुचराई होऊं देऊं नका अशी गोड पण थोडक्याच शद्बांत विनंति करून सभेचें काम आटपल्याचें जाहीर केलें.

स्वतःचें अंतःकरण शोधून पहा !

(ले० विरोधी)

भारताच्या २७ नव्हेंबरच्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या माझ्या लेखांतील 'कुंकळ्ळी येथील एका वैदिकास आपल्या दत्तक मुलाच्या मुंजीसमारंभास आलेल्या हिंदु पाहुण्यास दारूचा पाहुणचार देण्यास बरेच रुपये खर्च झाले असल्याचें सर्व विश्रुत आहे' या विधानानें चिडून जाऊन, वे. पांडुरंग शाणु कामत या कुंकळ्ळीच्या एका वैदिकानें, त्या बद्दल भारतांतूनच खुलासा करण्याविषयीं लेखकास जाहीर आव्हान भारताच्या गेल्या अंकांत केलें आहे. तें वाचून भारताच्या प्रत्येक वाचकास उक्त वैदिकाची बरीच कींव येईल यांत संशय नाहीं. आपल्या हातून कळत नकळत घडलेल्या गोष्टीचा खुलासा मागतानां त्यांना इतकें वर्दळीवर येऊन लिहावयाला नको होतें. लेखकाकडून खुलासा करून घेतल्यानंतरच त्यानीं आव्हानांत वापरलेली भाषा वापरणें घटकाभर शोभलें असतें. परतु तितका दम त्याच्यानें धरवला नाहीं त्याचें कारण केवळ बऱ्या पाहुण्यांच्या भीडेखातर केलेलें मद्यदानाचें कृत्य जगजाहीर झाल्यामुळें त्यांनां नखशिखांत उठलेली तिडीक हेंच होय. त्याच भरांत 'शेंप कोपेन पूरयेत' या न्यायाचा त्यांच्याकडून अवलंब झाला. याची जाणीव लेखकाला असल्यावरून तिकडे दुर्लक्ष्य करणें भाग आहे.

वे. कामत यांच्या लिहिण्याचा मुख्य आशय् "आपल्या येथें झालेल्या मुंजीसमारंभांत हिंदु पाहुण्यास दारूचा पाहुणचार केला असल्यास त्यास पुरावा काय" हाच असावा. इतक्या थरावर हें प्रकरण येऊं नये ह्मणून आह्मींहि आमच्या लेखांत जाणून बुजून यजमानाचा नामनिर्देश केला नव्हता. तथापि खुनाला वाचा फुटते असें ह्मणतात त्या प्रमाणें या पातकाला स्वयंस्फूर्तीनें वाचा फुटली त्यास कोण काय करणार? झांकलें पातक किती काळ दडून राहील! तें उघड हें झालेंच पाहिजे. व ह्मणूनच त्यानां हा खुलासा मागण्याची बुद्धि सुचली. त्यानीं जरी हें आव्हान करितानां दूरदर्शीपणा दाखविला नाहीं तरी तें स्वीकारतानां सभ्यतेस अनुसरून वागणें लेखकास भाग आहे. हिंदुसमाजांत दारूचें व्यसन फारच बोकाळत असतां कान असून ऐकावयाचें नाहीं, डोळे असून पहावयाचें नाहीं, जीभ असून बोलावयाचें नाहीं, अशा तऱ्हेचें वर्तन बहुजनसमाजाकडून होत आहे. मग मुंजीसमारंभांत आणि तोहि एका प्रसिद्ध वैदिकघराण्यांत झालेल्या मुंजीसमारंभांत झालेल्या दारूच्या पाहुणचाराचा उघड पुरावा देणारे रामशास्त्री प्रभुण्यासारखे निस्पृह कितीसे मिळतील याची वानवाच आहे.

समाजाच्या या मनोदौर्बल्याचा फायदा घेण्यासाठींच कामतमजकूर पुढें आले आहेत. त्यांच्या इच्छेप्रमाणें पुराव्याचें माप त्यांच्या पदरांत आह्मीं घातलें असतें; परंतु पुरावा उलट पुरावादेतां घेतां दारूचा पाहुणचार घेणाऱ्या अनेक दारूबाजांचा नामनिर्देश हटकून होणार असल्यामुळें तितक्या पुरती

ANUNCIOS

O *Bharat*, ano 9 ° n ° 39 de 25 de Dezembro de 1924
Anuncios cada linha uma tanga, ainda que repetida
Numero avulso 1 tanga

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio que este assina, a requerimento de Maria Felicia Siqueira, viuva de Sanguem, na execução hipotecaria que ela move a Xamba Sazú Sinai Salelcar e mulher e outros, da dita, vão ser vendidos em hasta judicial á porta do tribunal situado em Xeldem ao lado da estrada nacional que de Quepem se dirige á Curchorem, no dia 9 do seguinte mez de Janeiro, ás 10 horas e pelo preço superior ao da avaliação os seguintes bens: Direito a dois quintos da metade do predio denominado Cautor; Direito a um quinto do predio denominado Gundibato; E direito a um quinto da 1.a adição e a dois quintos da 2.a adição do predio denominado Zambapar, estes dois sitos em Cotarli e o 1 ° em Caccorá, todos da cultura de coqueiros, discritos na conservatoria do registo predial desta comarca, respectivamente, sob os n ° s. 6312, 3190, e 6740 e avaliados em 300, 600 e 500 rupias, tambem respectivamente penhoardos na referida execução ficando por este citados todos os credores incertos dos ditos executados e os herdeiros do credor falecido Xamba Nagbá Saunto Dessai, casado proprietario que foi de Colem e o qual tem a seu favor creditos de 250 rupias e 70 rupias e 5 tangas assegurados por inscrições hipotecarias n ° s. 1922 e 3513, bem como os co-proprietarios e quinhoeiros, para deduzirem querendo, os seus direitos nos termos e para os fins da lei. E para ser publico se expediu este.

Xeldem da Comarca de Quepem, 10 de Dezembro de 1924
O Escrivão de Direito
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento.

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 1 ° oficio Redcar vai á venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca, no dia 9 de Janeiro proximo pelas 10 horas pelo maior lanço que se oferecer acima da avaliação o predio da varzea denominado Catorlem da cultura de arroz, coqueiros e outras arvores, situado em Sirvoi discrito na conservatoria desta comarca sob o n ° 3380 da copia avaliado por mil e quinhentas rupias, nos autos da carta precatoria vinda do Juizo de direito da comarca de Salcete e extraida dos autos de execução comum, que nesse juizo Pedro Antonio Alvares, morador em Lisboa, promove contra Agostinho da Piedade dos Santos Alvares e mulher de Margão e ora ousentes em parte incerta de Brazil. Quem o quizer arrematar compareça nos indicados dia, hora e local, correndo por conta do arrematante as despezas da praça e a contribuição de registo por inteiro. Por este são citados, nos termos e para os efeitos de lei, todos os credores incertos e os co-proprietarios. E para ser publico se expediu este. Xeldem 10 de dezembro de 1924.
O Escrivão de Direito do 1 ° oficio
Babú V. Camotim Redcar
Verifiquei
O juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem, e cartorio do escrivão do 1 ° oficio Redcar, a requerimento da inventariante Etermina Henriques que é mãe administradora da sua filha menor Maria Antonieta Eronia Anastasio das Dores Fernandes, a quem foi autorisada á venda em hasta publica por deliberação do respectivo conselho de familia e ouvido o sr. Dr. Curador dos Orfãos, vai á venda em hasta publica a porta do tribual judicial desta comarca no dia nove de Janeiro proximo pelas dez horas pels respectivo preço da sua avaliação, a metade do predio denominado Queloxiachi nomoxi, que fica ao nascente com metade sul do terreno que fica ao nascente denominado Soucreachem mola, da cultura de arroz, coqueiros, jaqueiras e outras arvores, sito em Cola de Cabo da Rama, discrito na conservatoria desta comarca sob o n ° 5495 a folhas 146 do livro B. 17 avaliado por 1250 rupias, nos autos da carta precatoria vinda a este juizo e extraida dos autos de inventario orfanologico a que se procedeu no juizo de Direito da comarca de Salcete por obito de Faustino Aleluia Fernandes, que foi de Cavelossim, sendo inventariante a sua viuva dita Etermina Henriques. Quem a quizer comprar, compareça nos indicados dia, horas e local correndo por conta do arrematante as despesas da praça e a contribuição de registo por inteiro. Por este são citados nos termos e para os efeitos da lei todos os credores incertos, co-proprietarios, contra quaisquer preferentes. E para ser publico se expediu este. Quepem, 10 de Dezembre de 1924
O escrivão de Direito do 1 ° oficio
Babú V. Camotim Redcar
Verifiquei
O Juiz de Direito,
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio que este assina, correm editos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2 ° do art. 197 do Cod. do Proc. Civ. citando a Socorro Rodrigues de Cavelossim, de Salcete e ora ausente em parte incerta de Bombaim do territorio Britanico, para na qualidade de marido da interessada Inacinha Rodrigues assistir a todas os termos até final do inventario orfanologico que o regedor de Cola, Govinda Visnum Porobo Dessai, presta por obito de Filomena Fernandes, moradora que foi de Cabo de Rama e deduzir querendo nelé os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento. E para ser publico se expediu este. Quepem, 10 de Setembro de 1924.
O escrivão de Direito
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de Direito da comarca de Quepem, e cartorio do escrivao do 1 ° oficio Redcar, correm editos de trinta dias a contar da segunda publicagao deste no Boletim Oficial, citando do Caxinata Sadassiva Sinai Gudo marido da interessada Siulem por outro nome Tarabai, residente actualmente em Bombaim, em parte incerta para assistir, querendo a todos os termos do inventario orfanologico a que se procede neste juizo por obito de Xembu' Sadassiva Odarcar que foi de Odar, sendo invetariante e cabeça de casal o seu filho Ramachondra Xembu' Sinai Odarcar da dita e deduzir os seus direitos sem prejuiso do andamento regular do mesmo inventario.
E para ser publico se expediu este Quepem, 2 de outubro de 1924
O Escrivao de Direito do 1 ° oficio
Babu' V. Camotim Redcar.
Verifiquei a Exactidao
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem, e cartorio do escrivão do 1° oficio Redcar á instancia do exequente cessionario Roque Piedade Pinto de Assolná, correm éditos de trinta dias a contar da segunda publicação deste no Boletim Oficial, citando a executada Locximi bai, mulher de Datarama Vitola Sinai Volvotcar, de Cuncolim, ora ausente em Narsobá-vadi, do territorio britanico, para a renovação da instancia dos autos civis de execução hipotecaria que o dito Roque promove contra a mencionada citanda e outros. E para ser publico se expediu este. Quepem, 16 de Dezembro de 1924.
O escrivão de Direito do 1 ° oficio,
Babú V. Camotim Redcar
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

ao mundo (Sabemos palavras aquelas de Deus, ...

Ano 9 N. 40

Quinta-feira 1 de Janeiro de 1925

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
Por cada linha ainda que repetida uma tanga
Numero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
P. Hegde Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४०

गुरुवार ता. १ जानेवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें-गोवा

DEPOIS DA FESTA...

ESCREVE DEUS...

O Povo de Gôa desinteressou-se, completamente, das festas comemorativas do Gama cuja personalidade historica é-lhe desconhecida. Um nosso *reporter* que cuidadosa e escrupulosamente auscultou a opinião das camadas populares sobre os festejos...*gamicos* — vá o neologismo festivo— chegou a convencer-se de que o Zé-povinho se absteve de tomar neles parte, excepção feita dalguns patuscos que, obrigados pelas respectivas autoridades, condescenderam em organisar, cá e là, alguns *brincos* barulhentos mas sem gosto, em honra do *rei pescador de Gôa*.

Os festejos do quarto centenario de D. Vasco da Gama revestiram-se, pois, apenas, de caracter oficial, não se tendo importado com eles o Povo cuja alma não vibrou, nem mesmo ao som da música dos *içares* e *arreares* de bandeiras...

Não há duvida. Os festejos do Gama foram um verdadeiro fiasco. Nem doutra coisa era merecedora a alma de quem foi cruel dos crueis.

Sim. Vasco da Gama — *o rei pescador* como lhe chama o nosso Povo — celebrisou-se pelas crueldades, *a ponto de causarem pessima impressão na Corte em Lisbôa*.

E' caso para dizer: escreve Deus direito por linhas tortas...

*

UMA CARTA

A proposito datitude do *Bharat* nos festejos do Centenario recebemos uma carta, escrita a lapis e á pressa. E' assinada por um *Dessai* e resa o seguinte:

"A atitude que V., sr. Redactor, manifestou nos festejos do Centenario é louvavel mas os nossos *leaders* occidentalisados *(não diz quem são)* que como tais se arvoram, ambicionando só a graça do Governo, fizeram uma declaração verbal com uma autoridade que os jornais hindús não eram responsaveis, eram antipatrioticos e petulantes e que êles, os *leaders* apoiavam os festejos etc...."

O autor da carta relata tambem certas particularidades que omitimos, não vá alguem supôr que alimentamos má vontade a quem quere. E, se trasladamos para as colunas do *Bharat* o trecho acima, é para o leitor se orientar sobre os ventos que por aì sopraram...em volta dos festejos do Gama, que, repetimos, foram um tremendo fiasco, a despeito de todo o aparato oficial e semi oficial que se lhes imprimiu.

*

DEVER DE OFICIO

Como se disse, o Povo se não importou com os festejos do Gama e, como se viu tambem, muitos dos que se entusiasmaram por êles, fizeram-no menos sinceramente e mais por *dever de oficio...politico*.

*

PONTO FINAL

Os principais jornais da India Britanicá, jornais de maior tiragem e de não menor circulação aconselharam aos hindús de Gôa completa abstenção nas festas do Centenario, tendo bordado varias considerações sobre os feitos historicos de D. Vasco da Gama que, tambem no entender dêles, foi o nosso verdugo,

Mas, como se desfez já o último éco do foguetorio do Centenario da morte do Gama, inutil será expraiarmo-nos em mais considerações...festivas.

Ponhamos, pois, ponto final a elas.

ECOS & CRITICA

TAL ARVORE, TAL FRUCTO

Muitos patricios nossos, na sua maioria hindu's, foram assistir a's sessoes do Congresso Nacional Indiana em Belgao onde tambem se realisaram varias outras Conferencias. A concorrencia foi aos milhares, tendo nela figurado todas as forças vivas do Indostao, anciosas pela independencia politica da sua Patria.

Na Semana do Congresso, Belgao oferecia um espectaculo magestoso, deslumbrante e emocinante. Tudo ai vibrava, tudo ardia em desejos de ver a India desjungida do opressivo jugo da burocracia britanica.

Na escola do patriotismo que ai funcionou durante os dias do Congresso, os nossos patricios devem ter tido a opertunidade de aprenderem muito, sobretudo os que porfiam em substentar que a politica nao passa da conquista de lugares ou empregos de pingues vencimentos, apoiando a torto e direito, mas sempre incondicionalmente a situaçao, isto e', o governo e que o patriotismo nao significa outra coisa senao o *barriguismo*...

A Semana do Congresso Nacional de Belgao nao so' excedeu a *Semana de Vasca da Gama*, quanto a' imponencia, mas tambem a primeira suplantou a segunda, quanto aos resultados.

E nao e' para admirar, porquanto, ao passo que a Semana do Gama foi de *morte*, a do Congresso foi de *vida* Como eram de naturezas diametralmente opostas, produziram tambem efeitos diametralmente opostos.

Tal arvore, tal fructo.

FESTAS DE ... PROTESTO

A comunidade hindu' e' apologista de tudo o que seja bom, venha donde vier. La' porque um bem provem dalguma individualidade ou naçao, extranha a' sua raça ou ao credo, ela nao o deprecia, desde logo: aprecia-o, antes, com todo o calor, entusiasmase com ele sinceramente.

Quanto ao mal, opera-se nela um fenomeno de consequencias, diametralmente opostas.

O sr. dr. Antonio Jose' de Almeida, defendendo, quando do caso Chandarnate, um direito hindu', praticou um bem. A classe hindu', la' porque o autor do bem fosse um europeu, nao apoucou a importancia do beneficio dispensado liberal e magnanimamente pelo eminente republicano portuguez. Este exemplo generalisa-se a tudo quanto ha' de bom em todos os mundos deste Universo.

Isto, porem, nao impende a que os hindu's se insurjam contra as crueldades do Gama e se indignem contra as barbaridades inquisitoriais.

¿Foi D. Vasco da Gama um europeu portuguez? Foram os algozes inquisidores europeus portuguezes?

Tanto um como os outros foram europeus portugueses ma'us e, porisso os hindus nunca simpatisarao com eles, so' por pertencerem a' Naçao que por insondavel vontade do Destino nos governa.

E' que o mau e' sempre maŭ e o ma'u so' merece festas de...protesto.

ESPEREMOS, POIS

No jornal do sr. Pereira Batalha— o tal *favoreiro universal*, cognominado *Piolho Branco* — P. B. — zumbe um gracioso Mosquito, que a's vezes nao deixa de ter graça, pelas *piadas poeticas* que, a torto e a direito, atira.

Sim. As vezes o Mosquito tem pilhas de graça, o que quere dizer que o referido diptero nem sempre e' divertido e inofensivo.

Assim, as venenosas piadas com que o insecto pretende aguilhoar alguns hindu's, escolhidos para o novo Conselho Legislativo demonstram a sua ma' vontade a' classe a que os eleitos pertencem.

¿Mas donde sera' o tal diptero? Da Europa ? Da India?

Da Europa, cremos que nao, porque sao ai raros, muito raros insectos tao mortiferos. O *Mosquito* da *Provincia* deve ser portanto, pelo que parece um animal indiano. ¿Quem sera' ele, porem?

Tudo se sabera', terminada a situaçao e chegada a nova eleiçao. Esperemos, pois.

OLITICA DO ... JADU'

O sr. dr. Jaime de Morais naquele seu celebre discurso de despedida provou que havia um colossal *superavit* no orçamento da India, graças a seu tino administrativo—*superavit* de que Sua Excia foi progenitor ilustre.

Perguntamos agora: ¿Se ha tanto

पोर्तुगेज हिंदुस्थानवासी हिंदु बांधवांस नम्र विनंति

बांधव हो, आपल्या पोर्तुगेज राष्ट्राची राज्यपद्धति " रेपुब्लिकान " ह्मणजे लोकशाहीची आहे. आणि वरिष्ठ सरकारकडून पोर्तुगेज हिंदुस्थानास " आवतोनोमीय " ह्मणजे साम्राज्यांतर्गत स्वराज्याची देणगी बहाल करण्यांत आली आहे.

प्रचलित युरोपीय साम्राज्यें, त्यांच्या राज्यपद्धति व अंतीम आकांक्षा यांशीं आपल्या पोर्तुगेज सरकारची निर्विकारमनानें तुलना केली तर सहज लक्षांत येणार आहे कीं, पोर्तुगेज हिंदुस्थानवासी स्वतंत्र नागरिकांनीं ध्येयोन्मुख होऊन जुटीनें प्रयत्न करीत राहिल्यास आपल्या प्रांतापुरतें पूर्ण स्वराज्य गांठणें शक्य असून शिवाय पोर्तुगेज नागरिकत्वाच्या जोरावर खुद्द पोर्तुगालवासी पोर्तुगेज नागरिकांस कोणत्याहि पोर्तुगेज प्रांतामध्यें व इतरत्र जे हक्क आहेत आणि जसें वावरतां येतें तसेंच वावरणें आणि सर्व ठिकाणीं तेच हक्क मिळणें आपणांस खात्रीनें शक्य आहे.

परंतु कल्पना करा कीं, एखाद्या यजमानानें आपणांस सुग्रास भोजनाचें आमंत्रण देऊन बोलावून नेलें; पाटावर बसवून घेतलें आणि आपल्या अपेक्षेप्रमाणें चांगले व पाचक असे कांहीं जिन्नस ठरवून ते ताटांतून पुढें केले. यजमानाची आपल्या शक्तीप्रमाणें यथेच्छ भोजन घालण्याची मनीषा होती असें गृहीत धरणें प्राप्त आहे. कारण, त्यानें आपण होऊन भोजन देण्याची तयारी दाखविली होती. इतकेंहि असून, जर त्यांतून चांगल्या जिन्नसांची निवड करून आपण खाल्लें नाहीं, पाचक व पौष्टिक अशा आणखी जिन्नसांची मागणी करून, पूर्वीं ताटांतून वाढून ठेवलेले जिन्नस आपली भूक शमविण्यास अपुरे होते असें दाखवून दिलें नाहीं, तर आपणांस अर्धपोटीं उपवाशीं राहावें लागणार हें निश्चित आहे. पण त्यांत यजमानाचा अपराध नसून आपलाच हलगर्जीपणा आहे, हें कबूल केलें पाहिजे.

तेव्हां पोर्तुगेज हिंदुस्थानच्या राजकीय हलाखीचें खरें कारण " रेपुब्लिक " अगर " आवतोनोमीय " नव्हे. पोर्तुगेज हिंदुस्थानचे नागरिकच आपल्या हलाखीस कारणीभूत आहेत, हें कोणीहि तिऱ्हाईत सहज सांगू शकेल.

बांधव हो, कोणत्याहि देशामध्यें राजकारणी पक्ष देशांतील सर्वसामान्य जनतेच्या हिताचें रक्षण करण्यासाठींच झटत असतात. परंतु या आपल्या दुर्दैवी प्रांतामध्यें, सर्वसामान्य जनतेचें हित साधणें हेंच मुख्य ध्येय मानणारा राजकारणी पक्ष एकहि नाहीं. पोर्तुगेज शिक्षणांत पुढारलेले आपले खिस्ती बांधव अशोत- अथवा त्या शिक्षणाच्या बाबतींत मागसलेले असे आपले हिंदु बांधव अशोत. मिळून सारखेच. कांहीं विवक्षित खिस्ती बंधूनीं आपापले पक्ष बनवून आज शेंकडों वर्षेपर्यंत वेळीं अवेळीं सरकारला एकंदर जनतेच्या मताचा बाऊ दाखवून वरिष्ठ कनिष्ट जितक्या नोकऱ्या पटकावण्यासारख्या होत्या त्या तर पटकावल्याच, शिवाय गरजे बाहेरच्या नव्या जागा निर्माण करवून त्याहि पचनीं पाडून, कोरी ठणठणीत केलेल्या सरकारी तिजोरीच्या भरतीसाठीं कराच्या दिवसें दिवस वाढत्या भोवऱ्यांत जनतेचें हित सोडून देण्याचें कार्य मात्र सफाईनें साधलें आहे. हल्लीं हिंदूंचे पक्ष झाले आहेत, पण अत्यंत खेदाची गोष्ट ही कीं, खरें राजकारण गौण मानून, साध्याच्या बाबतींत ते अहमहमिकेनें खिस्ती पक्षांच्याच कार्याची री ओढण्यापलीकडे आपली निराळी प्रवृत्ति दाखवीत नाहींत !...

साधारणत: अशा परिस्थितींत आपला देश सांपडला आहे. करितां, बांधव हो, आपणांपैकींच कांहीं सुविचारी, निरपेक्ष, स्वतंत्र आणि बाणेदार अशा नागरिकांची मनीषा आहे कीं, खालीं सही करीत असलेल्या या आपल्या नम्र सेवकानें पुढाकार घेऊन, हिंदुसमाजांतर्गत ज्ञाति आणि प्रमुख उपज्ञाति पैकीं एकैक कामचलाऊ स्वतंत्र अर्थात सरकारी नोकर नसलेल्या नागरिकाची निवड करून, १५–२० असामींचें तात्पुरतें कार्यकारी मंडळ बनवून एका "रेपुब्लिकॉनु इंदेपेंदेंत" ह्मणजे लोकसत्तावादी स्वतंत्र पक्षाची स्थापना करावी. आणि पूर्ण समतेच्या तत्वावर स्वराज्यप्रेमी सर्व दर्ज्याच्या सर्व धंद्यांतील हिंदु लोकांचा समावेश त्याच्या मध्यें होईल अशी घटना ठरवून कामास लागावें. सर्व साधारण जनतेचें हित साधणें हेंच या पक्षाचें मुख्य ध्येय असावें. अशी सामान्यत: सद्‍हृदय गृहस्थांची अपेक्षा आहे.

बांधव हो, स्वतंत्र विचारांच्या कांहीं खिस्ती नागरिकांनींहि अशीच इच्छा दाखविली आहे. परंतु, पूर्ण विचारांतीं आह्मीं असें ठरविलें आहे कीं, पहिल्यांदा फक्त हिंदुसमाजापुरतेंच या नवीन पक्षाचें कार्यक्षेत्र आंखून, तो चांगला सुदृढ,सुटसुटीत आणि कार्यक्षम होऊन स्वत:च्याच पांयांवर मजबूतपणें उभा राहण्यासारखा तयार झाल्या नंतर, ध्येयाशीं जुळतें घेतील अशा सर्व खिस्ती बंधूंचा आणि मुसलमान बंधूंचाहि त्यांत समावेश करून घेणें इष्ट व योग्य आहे.

तेव्हां, प्रस्तुत विनंतीद्वारें पोर्तुगेज हिंदुस्थानवासी हिंदु नागरिकांस कळविण्याची परवानगी घेतों कीं, या नवीन होऊं घातलेल्या पक्षासंबंधीं ज्या कोणास साधक बाधक योग्य सूचना करावयाच्या असतील, त्यांनीं त्या येत्या जानेवारी अखेरपर्यंत, खालील पत्त्यावर लेखी पाठविण्याची मेहरबानी करावी.

सर्वांचा न. से.

बांदिवडें, फोंडा, गोवा
२३–१२–१९२४

नारायण अ. बांदोडकर

जीवनार्थ कलह

" O talento sem o caracter, em vez de irradiar todas as belezas, pode deflagrar todas as infamias " *Alves Mendes*

वरील विषयाचा भावार्थ हाच कीं, शीलावांचून बुद्धि किंवा विद्वता लंगडी असून तदंगभूत सद्गुण प्रकाशमान होण्याचे जागीं दुष्कीर्तीचा मात्र प्रसार होण्याचा संभव असतो.

जीवनार्थ कलहाला Luta pela existencia असें पोर्तुगीज भाषेंत व The struggle for life असें इंग्रजींत ह्मणतात. जीवनाचा अबाधित चालण्यास शीलाची आवश्यकता आहे. विद्वान असला तरी शीलावांचून प्रतिष्ठा पावत नाहीं. विद्वानास द्रव्यापेक्षां अब्रू प्रीय असावी हें तत्व सर्वमान्य आहे.

हे विचार चालू १९२४ सालांत नागपूर येथें ' रणसंग्राम ' नांवाचें साप्ताहिक पत्र निघत असे त्यावरून सुचले. ह्या पत्राचा ' स्वराज्य, स्वधर्म व स्वातंत्र्य ' ह्या त्रयींचे उन्नतीप्रीत्यर्थ उदय झाला. ह्याचे संपादक श्रीयुत अच्युत बलवंत कोल्हटकर हे होत. साप्ताहिक रणसंग्रामाचे थोडे अंक निघून झाल्यावर त्याला एकाएकीं पाल्याहिकाचें स्वरूप आलें, इतकेंच नव्हें, स्वत:च्याच संपादकत्वाखालीं ' युगांतर ' नांवाच्या नियतकालिकाचीहि जाहिरात उजेडास आली व ' चाबूक ' चे कमअस्सल व भोंदू देशभक्तांवर ' खुसखुशीत तडाखे ' देण्यास देखील सज्ज झाले. एवढ्यानेंच ते थांबले नाहींत, ' चोरी कशी करावी ' (दिवसाढवळ्या !) ह्या पुस्तकाची जाहिरात फडकावून दिली.

' रणसंग्राम ' पत्र दैनिक झालें, पण साप्ताहिकाच्या वर्गणीदारांची व्यवस्था कशी काय झाली ह्याकडे संपादकांनीं लक्ष्य पुरविलें नाहीं. निदान गोव्यांतल्या वर्गणीदारांकडे तरी कानाडोळा झाला असें ह्मणावें लागतें. त्यास पुरावा सांखळींतील एक गृहस्थ पुरे आहेत. ह्यांनीं सुरवातीस दोन रुपयांची व्ही. पी. भरली असतांहि ह्यांच्या हातांत अंक २ पासून ७, ९ व १० आणि १८ (असे अवघे नऊ अंक) हातांत पडले व पुढें साप्ताहिक रणसंग्रामानें ह्यांच्याकडे पाठ फिरविली. मध्यंतरीं आठवा अंक दुसऱ्यानदां व्ही. पी. नें आला तो परत केला. हा अव्यवस्थेचा परिणाम होय. दोनदां व्ही. पी. येणें हें व्यवस्थित कचेरींतून घडणें शक्य नाहीं. संपादकांस त्या सांखळींतील वर्गणीदाराची विचारपूस करून अनेक पत्रें गेलीं असतां उत्तर महाग झालें !

' युगांतर ' आणि ' चाबूक ' ह्यांची उठाठेव करण्यापेक्षां साप्ताहिक रणसंग्राम चालू ठेविला असता तर वर्गणीदारांचीं मनें कलुषित झालीं नसतीं. चाबकाचे फटकारे लगावणारा देशभक्त न्यायप्रीय असला पाहिजे. देशसुधारणा करणारा पुढारी सत्यप्रीय असला पाहिजे. अर्थात स्वधर्म स्वराज्य आणि स्वातंत्र्य ह्या त्रयीला वाहिलेल्यांनीं प्रथमत: स्वत: नीतिमान, सत्यशील आणि व्यवहारज्ञ बनणें फार अगत्याचें आहे. शास्त्रकोविदांचा असा अभिप्राय आहे कीं " Better to correct omissions than to add to the number of commissions " ह्मणजे कर्तव्य गोष्टींच्या संख्येंत उगीच भर घालीत बसण्यापेक्षां (सनातन व सर्वमान्य ठरलेल्या) कर्तव्याचरणांत होत असणाऱ्या चुका सुधारणें हें बरें ' असा अभिप्राय कांहीं वर्षांमागें ' श्रुतिबोध ' आणि ' उषा ' ह्या नांवाचीं मासिक पुस्तकें एकाच संपादकांकडून इंग्रजी अमलांत चालू होतीं, तीं ' कागद नाहीं ' या सबबीवर महायुद्धाच्या संधीस समाविष्ट झालीं, परंतु प्रत्येकीं सरासरी १० अंकांची वर्गणी संपादकांच्या खिशांत झोंपत राहिली. एवढें खरें कीं, ' संदेशकारांची लबाडी ' हा लेख केसरीकारांसारख्यांस लिहावा लागला. तेथें रणसंग्रामकारांच्या शिताफीबद्दल नवल नाहीं.

इंग्रजी हिन्दुस्थानांतील कित्येक धंदेवाल्यांना गोवाप्रांत फॉरिन Floreign परदेश) असल्यानें गोवेकराशीं इमानें इतबारें वागण्याचें भैय होत नाहीं. ह्या धंदेवाल्यांत कांहीं पुस्तकसेलरांचा आधिक्यानें नंबर वरती येईल. यांद्दपर्यी लिहूं गेल्यास एका स्वतंत्र लेखाची भरती होईल. बुकडेपो नसलेले व विद्वानांत मोडणारे देखील कांहीं ग्रंथकार गोवेंकराशीं बेइमानानें वागण्यास कचरत नाहींत. निर्णयसागर व या मासल्याचे क्वचित बुकडेपो सोडून इतरांकडे आज मितीस व्ही. पी. नें अगर आगाऊ मनिऑर्डरनें पुस्तकें मागविणें फार धाडसाचें आहे, या विषयीं नांवांची जिम्मेवारी देण्या इतका प्रत्यक्ष अनुभव आहे. जाहिराती ह्मणजे भपका होय.

" ग्लाडस्टन साहेब ह्मणतात त्याप्रमाणें मनुष्यांची काय आणि राष्ट्रांचीं काय धनतृष्णा वाढत चालली आहे, त्यामुळें जीवनार्थ कलहाच मान फार वाढतें आहे. प्रत्यक्ष लढाया फार थोड्या होवोत; परंतु ह्या धनतृष्णेच्या लढाया आपणाभोंवतीं पदोपदीं चालल्या आहेत. देशहिताची सबब पुढें करून एनकेनप्रकारेण दुसऱ्याचा तोटा करणें ह्याला ' जीवनार्थ कलह ' असें ह्मणावें कीं नाहीं ?

दोन दरडींवर हात ठेवण्याची शकल ही मुत्सद्दीगिरी कोणाला वाटेल ती वाटो. मुत्सद्दीगिरी ह्मणजे डोळ्यांत धूळ फेंकण्याची एक कला असें मला वाटतें. मुत्सद्दीगिरीच्या पायींमोठमोठालीं राष्ट्रें तोंडघशीं कशीं पडतात हें जर आपल्या अनुभवास येतें तर स्वराज्य, स्वधर्म आणि स्वतंत्रता ह्या त्रयींची उन्नति करणाऱ्यानें सरळपणाचा मार्ग रोखून सालसपणा दाखविणें श्रेयस्कर आहे. आंधळा आडांत पडल्याचें नवल नाहीं, डोळस जाणून बुजून उडी टाकितो ह्यापासून दुष्कीर्ति पदरांत पडते हें 'स्वधर्म' शिकवीत नाहीं काय ? 'उषा' मासिकांतील संतसुवेचा आणि डॉक्टर वॉलेसच्या Social environment and moral progress [सामाजिक परिस्थिति आणि नैतिक प्रगति] ह्या पुस्तकांत 'परिपक्क विचाराचें अमृत भरलें आहे.' त्याचा आस्वाद श्रीयुत कोल्हटकरांनीं घेतला नसेल.

साप्ताहिक रणसंग्रामाच्या असंतुष्ट स्थितींत ठेविलेल्या वर्गणीदाराचें 'युगान्तर' अगर 'चाबूक' ह्यांच्या अंकांनीं श्री. कोल्हटकर हे नुकसान भरून काढितील तर ह्या चालेलेला सांवळागोंधळ ह्मणजे कोल्हाट्याचें भारूड किंवा गारुड्याचें गारूड आहे असें मानण्यास जागा उरणार नाहीं. शहाण्यास एकच शब्द पुरा आहे.

डि. फं. ४ आणे. सारस्वत

...que ... aquele! 'ao mundo'. Sublimes palavras aquelas de Deus. Sim, nao podia ser dada

विजया नगरी विजयी झाली !

मिति पौष शु० ७ मी शके १८४६

भारताच्या प्रतिनिधीनीं बेळगांव येथें महात्मा गांधी, लाला लजपतराय, मालवीय, देवी सरोजनी व श्री. प्रकाशम यांच्या मु ाखती घेतल्या. मुलाखतींचा गोषवारा येत्या अंकीं प्रसिद्ध होईल. सं. भारत.

बेळगांव कॉंग्रेस

हो ना ह्मणतां ह्मणतां व यशापयशाचें विविधरंगी कल्पनाचित्र रेखाटतां रेखाटतां गेल्या महिन्याच्या २६ तारखेस ३ वाजतां महात्मा गांधींच्या अध्यक्षतेखालीं विजया नगरांतील कॉंग्रेससाठीं उभारलेल्या पॅंडल मध्यें राष्ट्रीय महासभेच्या कार्यास सुरवात होऊन दुसऱ्या दिवशीं ह्मणजे ता- २७ रोजीं ६ वाजतां तें संपलेंहि. विजयानगरांतील कॉंग्रेसच्या अवाढव्य पसाऱ्यानें एकंदर ८५ एकर जमीन व्यापून टाकिली होती निरनिराळ्या परिषदांसाठीं उभारलेल्या तंबूंवरील व प्रतिनिधींसाठीं बांधलेल्या कॅंपांवरील त त्यांच्या पांढूर वर्णानें तेवढ्या भूप्रदेशाला एक प्रकारची अवर्णनीय शोभा प्राप्त झाली होती. महासभेच्या पॅंडल समोर 'गोपूर', [महादरवाजा] ह्या नांवाची टॉवर उभारली असून कर्नाटकाच्या कलाकौशल्याचें उंच मान करून प्रत्यंतर व उदाहरण दाखविणाऱ्या ह्या गोपूराची एकंदर उंची अंदाजें ७२ फूट होती. ह्या महादरवाजांतून आंत प्रवेश करतांच एक लहानशी फुलबाग होती. तींत लोकमान्य टिळकांचा पुतळा ठेवला असून त्याच्या मागें एक कारंजें उदकाचे फवारे उडवीत असलेलें दृष्टीस पडत होतें. कॉंग्रेसचा तंबू आंत १५०००लोक बसतील एवढा मोठा असून वक्त्यांचें भाषण सर्वांस सारखेंच ऐकूं येण्याजोगी मध्यस्थानीं व्यासपिठाची उभारणी केली होती. बड्या बड्या पुढाऱ्यांना रहाण्यासाठीं बंगल्यांची सोय केली होती पण महात्माजी मात्र एका झोंपडींतच रहात होते.

डॉ० हर्डीकरांच्या तडफदार तालमींत तयार झालेल्या हिंदुस्थानीं सेवादलानें विजयानगरींत राखलेली शिकस्तीची शिस्त खरोखरीच अवर्णनीय होती. अलोट गर्दीनें अलोटलेल्या लोकसमुदायाची जिज्ञासुवृत्ति अतृप्त न ठेवतांहि त्यांनीं शिस्तीस धोका दिला नाहीं. खुद्द विजयानगरींत तर सोडाच पण तिच्या आसपास ३|४ फर्लांग काळा डगलावाले सरकार दूत फिरकले नाहींत व अभिमानाची गोष्ट ती हीच कीं, त्यांची तेथें काहीइतर्कीहि जरूर भासली नाहीं. एकंदरींत लिहावयाचें ह्मणजे भावी हिंदी स्वराज्याचें मूर्तिमंत चित्र व त्यांतील राज्यकारभाराची हुबेहुब ठेवण जणुं काय रानटी हिंदी प्रजेचा जीव व मालमत्ता सुरक्षित राखण्याकरितांच केवळ सप्तसमुद्रपार वस्तींतून ७ हजार मैलांचें अंतर तोडून हिंदुस्थानांत आलेल्या गोऱ्या येशुभक्तांचा नक्षा उतरण्यासाठींच तेथें अवतरली असल्याचा शोधक दृष्टीनें त्या पांढऱ्या समुद्रावर नजर फेंकणाऱ्यास भास होत होता.

महात्माजींनीं आपल्या भाषणांत स्वराज्य योजनेची रूपरेखा खालीलप्रमाणें रेखाटली:–

चरका, हिंदु–मुसलमानांचें ऐक्य आणि अस्पृश्यता निवारण हीं फक्त एका साध्याच्या प्राप्तीसाठीं उपयोगांत आणण्याचीं साधनें आहेत. साध्य काय आहे, हें आपणांस माहीत नाहीं. मला साधनें कळलीं ह्मणजे पुरे. माझ्या जीवन तत्वज्ञानांत साधनें व साध्य हे एकमेकांचे पर्याय शब्द आहेत. पण मी पूर्वीच प्रसिद्ध केलें आहे कीं, बाबू भगवान दास यांच्या मताप्रमाणें लोकांना आपण कशाकरितां खटपट करीत आहों, हें कळणें जरूर आहे. साध्य त्यांच्या दृष्टीसमोर अगदीं स्वच्छपणें असलें पाहिजे. त्यांना स्वराज्याची योजना समजली पाहिजे. सुदैवानें सर्व-पक्षीय परिषदेनें नेमलेल्या राजकीय ऐक्य कमिटीकडे हें काम सोपविण्यांत आलेलें आहे आणि अशी आशा करणें वावगें नाहीं कीं, सर्व पक्षांना मान्य होईल अशा तऱ्हेची योजना ही कमिटी तयार करील. या कमिटीनें विचार करावा ह्मणून मी पुढील मुद्दे मांडीत आहें.

(१) मतदानाचा हक्क जिंदगी किंवा सामाजिक दर्जा यांजवर अवलंबून न राहतां शारीरिक कष्टाच्या मानानें प्राप्त व्हावा. उदाहरणार्थ, कॉंग्रेसच्या मताधिकारासाठीं सुचविलेली सूत काढण्याची अट. विद्वत्ता किंवा मालमत्ता यांनीं उत्पन्न होणारी लायकी फसवणूक करणारी आहे. सरकारच्या व राज्याच्या हिताला उपयुक्त होईल असें काम करण्याची संधि शारीरिक कष्टाचें काम देते.

(२) सामान्यतः जीवित आणि मालमत्ता यांचें रक्षण होईल इतक्या पुरताच लष्करी खर्च करण्यांत यावा.

(३) न्यायदानानें काम स्वतः करण्यांत यावें. अखेरचें न्यायकोर्ट लंडन येथें न राहतां दिल्लीस असावें. पंचायती किंवा लवाद या मार्फतच शक्य तितके तंटे तुटतील अशी सत्तीची योजना असावी. पंचायतींचे निकाल होतां होईतों बंधनकारक असावे. मधलीं बरीच कोर्टें नाहींशीं करावीं. 'केस लॉ' ह्मणजे पूर्वींचे खटल्याचे निकाल अनुसरण्याची पद्धत बंद व्हावी व न्यायदानाचें काम सोपें करावें. इंग्रजी कायद्याचे प्रघात आपण आंधळ्या दास्य वृत्तीनें पाळले आहेत. वसाहतींत ही प्रवृत्ति नाहींशी करण्यांत येत असून वादीप्रतिवादींनीं आपले खटले चालवावे अशा करितां उत्तेजन देण्यांत येत आहे.

(४) मादक द्रव्यें व आसवें, शराब वगैरेपासून होणारें उत्पन्न एकदम रद्द करावें

(५) देशाला खरोखर सोसेल इतक्याच प्रमाणांत मुलकी व लष्करी पगार बांधून देण्यांत यावे.

(६) प्रांतरचना भाषांवार व्हावी आणि अंतर्गत प्रगति व कारभार या बाबतींत प्रांतांना शक्य तितकें स्वातंत्र्य प्राप्त होईल असें करावें.

(७) परदेशाच्या लोकांना जे हक्क प्राप्त झाले आहेत, त्यांची एका कमिशनकडून चौकशी व्हावी आणि ते न्याय्य तऱ्हेनें प्राप्त झाले असल्यास त्यांच्या संरक्षणाबद्दल सरकारी रीतीनें जिम्मेदारी पत्करण्यांत यावी.

(८) संस्थानिकांना त्यांची स्थिति आहे अशीच व मध्यवर्ती सरकार त्यांत कांहीं बदल करणार नाहीं अशी खात्री देण्यांत यावी; मात्र संस्थानीं प्रजेला तिनें पीनल कोडाखालीं कांहिं गुन्हा केला नसेल, तर स्वराज्योपभोगी हिंदुस्थानांत येऊन राहण्याची मोकळीक असावी.

(९) सर्व सुलतानी व अरेरावी अधिकार रद्द व्हावे.

(१०) लायकीप्रमाणें कोणतीहि जागा कोणालाहि मिळावी. मुलकी व लष्करी नोकऱ्यांच्या परीक्षा हिंदुस्थानांत व्हाव्या.

(११ ; सर्व धर्मांच्या व पंथाच्या लोकांना पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य असावें.

(१२) प्रांतिक सरकारें, कायदेमंडळें व कोर्टें यांची भाषा त्या त्या प्रांताची देशी भाषा असावी. प्रिव्ही कौन्सिल ह्मणजे अखेरची अदालत; त्याची भाषा हिंदुस्थानी असावी. लिपि देवनागरी किंवा पार्शियन. मध्यवर्ती सरकारची व कायदेमंडळाची भाषा हिंदुस्थानी असावी., आंतरराष्ट्रीय पत्रव्यवहाराची भाषा इंग्रजी असावी.

अखिल हिन्दुस्थानाच्या पुढील कार्याची दिशा आंखून देण्याकरीतां भरलेल्या ह्या राष्ट्रीय महासभेच्या ३९ व्या अधिवेशनात खालील ठराव पास झाले आहेतः—

१ ही राष्ट्रीय सभा बी. अम्मा, चौधरी, मुकर्जी, बसू, अय्यर, गिरी, याळगी, महारीर, गोपालस्वामी, शिवम् गोरखदु, नायडु व भुग्री ह्यांच्या मृत्युबद्दल दुःख प्रदर्शित करीत असून मृताच्या कुटुंबावर कोसळलेल्या आपत्तीबद्दल त्यांच्याशीं सहकार्य करीत आहे.

२अ]कलकत्त्यास झालेल्या गांधी–दास–नेहरू तहनाम्याला ही सभा पसंति दर्शवीत असून राष्ट्रीय सभेंतील दोन्ही पक्षांत एकी घडवून आणण्यांत व इतर राजकीय पक्षांस कॉंग्रेसला येउन मिळण्यांत ह्या पक्टाचा उपयोग होईल असें हीला वाटतें. बंगालमध्यें जादा वटहुकुमान्वयें पकडलेल्या स्वराजिष्ट व तदितर मंडळीचें ही सभा अभिनंदन करीत असून ह्या प्रकाराला स्वायत्तसेच्या हक्कांशिवाय आळा घालणें शक्य नसल्यानें ते हक्क मिळविण्यास परदेशी कापडावर बहिष्कार घालणें इष्ट होय. राजकीय हक्कांविषयीं आपली उत्सुकता दाखविण्यास हातसुताची खादी हीच खूण प्रत्येकानें वापरावी. एतदर्थ सर्व विदेशी कापडांवर बहिष्कार टाकून हातसुती व हातविणीची खादी प्रत्येकानें वापरावी अशी हीची इच्छा आहे. ही राष्ट्रीयसभा राजपुत्रानां, इतर लक्ष्मीपुत्राना व राजकारण खेळणाऱ्या गड्यानां विनंति करते कीं त्यांनीं खादीचा प्रसार करून खादीवर नकशी काम करणाऱ्या व सुंदर खादी विणणाऱ्या देशबंधूंस पारितोषक देण्याची व्यवस्था करावी. देशांतील व्यापाऱ्यानीं विदेशी कापडाचा व्यापार तहकूब ठेऊन स्वदेशोन्नतीस मदत करावी, गिरणीवर कापड विणून तें शुद्ध खादीच्या नावांखालीं विकणाऱ्या व्यापाऱ्यानीं व गिरणीवाल्यानीं हा अनिष्ट प्रकार बंद करून हिंदुस्थानांतील प्राचीन उद्योगधंद्यास सक्रीय उत्तेजन द्यावें. सर्व पक्षाच्या, धर्माच्या पुढाऱ्यानीं आपल्या अनुयायांस विदेशी कपडा टाकून खादीच वापरण्याविषयीं उपदेश करावा.

ब] प्रत्येक वर्षास २४००० वार आपल्या हातांनीं काढलेलें सूत कॉंग्रेसला दिल्याशिवाय कोणासच कॉंग्रेसचा सभासद होतां येत नाहीं. सिकपणा, नाखुषी किंवा असलेंच एकादें कारण असल्यास दुसऱ्याकडून काढून घेतलेलें तितकेंच सूत दिल्यास चालेल. ह्या सभासदत्वाचा वर्षारंभ १ जानुवारी पासून धरला जात असल्यानें प्रत्येक महिन्याच्या आगाऊ त्या महिन्याचें सूत द्यावें लागेल. येत्या वर्षाची सूत वर्गणी २०००० यार्ड सूतच ठेवली असून ती १ मार्चपर्यंत किंवा वर ठरविलेल्या मुदतीनें द्यावी. ही सूत वर्गणी न दिल्यास कोणासच कॉंग्रेसच्या व प्रांतिक समित्यांच्या कसल्याहि कामांत भाग घेतां येणार नाहीं. प्रत्येक प्रांतिक समितीनें सभासदांची संख्या व सूताची आयात प्रत्येक महिन्यास ऑ. इं. कॉं. कमिटीस कळवावी व उत्पन्नांतील शेंकडा दहा टक्के तीस रवाना करावें.

२ हिन्दुस्थानाबाहेर वसाहतींत रहाणाऱ्या हिन्दीगृहस्थांस भोगावे लागणाऱ्या कष्टांत ही सभा भाग घेत आहे.

४ श्रीमती सरोजनीबाई व श्री. वझे व चतुर्वेदी ह्यांनीं केलेल्या समुद्रपार चळवळीबद्दल ही राष्ट्रीय सभा पसंती व्यक्त करीत आहे.

५ ब्रह्मदेशस्थ लोकांस भोगाव्या लागणाऱ्या दुःखांबद्दलहि ही सभा खेद प्रदर्शीत करीत आहे.

६ हिन्दु मुसलमानांत दंगा होऊन झालेले कोहाट व गुलबुर्गा येथील अत्याचार या सभेला दुःख देत असून त्यांत दुःख भोगणाऱ्या वर्गाच्या कष्टांतहि ती भाग घेत आहे.

७ राष्ट्रैक्यास व हिंन्दुधर्मोन्नतीस अस्पृश्यता विघातक असल्यानें ती घालवून देण्याचा प्रयत्न प्रत्येकानें करावा असें ह्या राष्ट्रीय सभेचें मत आहे.

राष्ट्रीय महासभेंत पास झालेले ठराव हे असून त्यावर झालेलीं हृदय हालवून सोडणारीं भाषणें, हिंदु महासभेंतील ठराविक भाषणें, भारताच्या प्रतिनिधीमार्फत महात्माजींनीं 'भारत'कारांस पाठविलेला संदेश तसेंच इतर मोठमोठ्या पुढाऱ्यानीं भारताच्या प्रतिनिधीद्वारें दिलेले गोमांतकाला संदेश येत्या अंकीं प्रसिद्ध होतील.

Pelo juizo de Direito da Comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio que este assina, a requerimento de Maria Felicia Siqueira, viuva de Sanguem, na execução hipotecaria que ela move a Xambà Sazú Sinai Salelcar e mulher e outros, da dita, vão ser vendidos em hasta judicial á porta do tribunal situado em Xeldem ao lado da estrada nacional que de Quepem se dirige á Curchorem, no dia 9 do seguinte mez de Janeiro, ás 10 horas e pelo preço superior ao da avaliação os seguintes bens: Direito a dois quintos da metade do predío denominado Cautor; Direito a um quinto do predio denominado Gundibata; E direit a um quinto da 1.a adição e a dois quintos da 2 a adição do predio denominado Zambapar, estes dois sitos em Cotarli e o 1 ° em Caccrá, todos da cultura de coqueiros, discritos na conservatoria do registo predial desta comarca, respectivamente, sob os n ° s. 6312, 3190, e 6740 e avaliados em 300, 600 e 500 rupias, tambem respectivamente penhoardos na referida execução ficando por este citados todos os credores incertos dos ditos executados e os herdeiros do credor falecido Xamba Nagbá Saunto Dessai, casado proprietario que foi de Colem e o qual tem a seu favor creditos de 250 rupias e 70 rupias e 5 tangas as segurados por inscrições hipotecarias n ° s. 1922 e 3513, bem como os co-proprietarios e quinhoeiros, para deduzirem querendo, os seus direitos nos termos e para os fins da lei. E para ser publico se expediu este.

Xeldem da Comarca de Quepem, 10 de Dezembro de 1924

O Escrivão de Direito
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de rito e Nascimento

Pelo juizo de Direito da Comarca de Quepum e cartorio do escrivão do 1 ° oficio Redcar vai á venda em hasta publica á porta do tribunal judicial desta comarca, no dia 9 de Janeiro proximo pelas 10 horas pelo maior lanço que se oferecer acima da avaliação o predio da varzea denominado Catorlem da cultura de arroz coqueiros e outras arvores, situado em Sirvoi discrito na conservatoria desta comarca sob o n ° 3380 da copia avaliado por mil e quinhentas rupias, nos autos da carta precatoria vinda do Juizo de direito da comarca de Salcete e extraida dos autos de execução com mum, que nesse juizo Pedro Antonio Alvares, morador em Lisboa, promove contra Agostinho da Piedade dos Santos Alvares e mulher de Margão e ora ousentes em parte incerta de Brazil. Quem o quizer arrematar compareça nos indicados dia, hora e local, correndo por conta do arrematante as despezas da praça e a contribuição de registo por inteiro. Por este são citados, nos termos e para os efeitos de lei, todos os credores incertos e os co-proprietarios. E para ser publico se expediu este. Xeldem 10 de dezembro de 1924

O Escrivão de Direito do 1 ° oficio
Babú V. Camotim Redcar
Verifiquei
O juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem, e cartorio do escrivão do 1 ° oficio Redcar, a requerimento da inventariante Etermina Henriques que é mãe administradora da sua filha menor Maria Antonieta Eronia Anastasio das Dores Fernandes, a quem foi autorisada á venda em hasta publica por deliberação do respectivo conselho de familia e ouvido o sr. Dr. Curador dos Orfãos, vai á venda em hasta publica a porta do tribunal judicial desta comarca no dia nove de Janeiro proximo pelas dez horas pels respectivo preço da sua avaliação, a metade do predio denominado Queloxia chi nomoxi, que fica ao nascente com metade sul do terreno que fica ao nascente denominado Soucreachem mola, da cultura de arroz, coqueiros, jaqueiras e outras arvores, sito em Cola de Cabo da Rama, discrito na conservatoria desta comarca sob o n ° 5495 a folhas 146 do livro B. 17 avaliado por 1250 rupias, nos autos da carta precatoria vinda a este juizo e extraida dos autos de inventario orfanologico a que se procedeu no juizo de Direit da comarca de Salcete por obito de Faustino Aleluia Fernandes, que foi de Cavelossim, sendo inventariante a sua viuva dita Etermina Henriques. Quem a quizer comprar, compareça nos indicados dia, horas e local correndo por conta do arrematante as despesas da praça e a contribuição de registo por inteiro. Por este são citados nos termos e para os efeitos da lei todos os credores incertos, co-proprietarios, contra quaisquer preferentes. E para ser publico se expediu este. Quepem, 10 de Dezembre de 1924

O escrivão de Direito do 1 ° oficio
Babú V. Camotim Redcar
Verifiquei
O Juiz de Direito,
A. A: de rito e Nascimento

Pelo juizo de direito da comarca de Quepem e cartorio do escrivão do 2 ° oficio que este assina, correm editos de 30 dias contados do dia em que se publicar o ultimo anuncio, nos termos do § 2 ° do art. 197 do Cod. do Proc. Civ. citando a Socorro Rodrigues de Cavelossim, de Salcete e ora ausente em parte incerta de Bombaim do territorio Britanico, para na qualidade de marido da interessada Inacinha Rodrigues assistir a todas os termos até final do inventario orfanologico que o regedor de Cola, Govinda Visnum Porobo Dessaî, presta por obito de Filomena Fernandes, moradora que foi de Cabo de Rama e deduzir querendo nele os seus direitos sem prejuizo do seu devido e regular andamento. E para ser publico se expediu este. Quepem, 10 de Setembro de 1924.

O escrivão de Direito
Aires Manuel Barreto
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo juizo de Direito da comarca de Quepem, e cartorio do escrivao do 1 ° oficio Redcar. correm editos de trinta dias a contar da segunda publicaçao deste no Boletim Oficial, citando Caxinata Sadassiva Sinai Gudo marido da interessada Siulem por outro nome Tarabai, residente actualmente em Bombaim, em parte incerta para assistir, querendo a todos os termos do inventario orfanologico a que se procede neste juizo por obito de Xembu' Sadassiva Odarcar que fo de Odar, sendo invetariante e cabeça de casal o seu filho Ramachondra Xembu' Sinai Odarcar da dita e deduzir os seus direitos sem prejuiso do andamento regular do mesmo inventario E para ser publico se expediu est, Quepem, 2 de outubro de 1924

O Escrivao de Direitc do 1 ° oficio
Babu' V. Camotim Redcar.
Verifiquei a Exactidao
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

Pelo Juizo de Direito da Comarca de Quepem, e cartorio do escrivão do 1° oficio Redcar á instancia do exequente cessionarío Roque Piedade Pinto de Assolnã, correm éditos de trinta dias a contar da segunda publicação deste no Boletim Oficial, citando a executada Locximi bai, mulher de Data rama Vitola Sinai Volvotcar de Cuncolim, ora ausente em Narsobá-vadi, do territorio britanico, para a renovação da instancia dos autos civis de execução hipotecaria que o dito Roque promove contra a mencionada citanda e outros. E para ser publico se expediu este. Quepem, 16 de Dezembro de 1924.

O escrivão de Direito do 1 ° oficio,
Babú V. Camotim Redcar
Verifiquei
O Juiz de Direito
A. A. de Brito e Nascimento

स्फुट विचार

चोकाळणच दुर्लभः— … सरकारच्या निर्जीवित ज्या दुर्धर अशा रोगानें ज … करून टाकलें आहे, त्याच दुर्धर रोगानें मकाववालेहि जीवित करतर बनविलें आहे. पन मकावसरकारनें गोवासरकारच्या मिळेल त्या गोष्टीवर सारासारविचार-विरहीत कर लादण्याच्या अश्लाघ्य व लोकघातक धोरणाचें अनुकरण न करितां, या वस्तु सार्वजनिक नीतीला व आरोग्याला बाधक आहेत, अशांतूनच करांच्या रूपानें तूट भरपाईला आवश्यक इतकें उत्पन्न काढण्याचा बेत केला आहे. दारू व तंबाकू या दोन गोष्टींकडेच मकाव येथें करांचा मोर्चा वळणार असून, येथील प्रमाणें त्यांची बाधा तांदळांसारख्या गरीब लोकांच्या अन्नाला शिवणार नाहीं, ही समाधानाची गोष्ट होय. गार्नियें, स्मीथ, मिल इत्यादिकांचीं अर्थशास्त्रांतील तत्वें तोंडपाठ म्हणून जनतेला गारीगार करून सोडणारे पण प्रसंग येतांच 'शेपटी पकडली गेलेल्या' पोराप्रमाणें मूळ स्वभावावरच जाऊन, तिच्या पोटावर कररूपी तीक्ष्ण तरवारीचे निर्दय प्रहार करणारे आमचे शहाणे मुत्सद्दी व कसलेले राजकारणी मकाव सरकारच्या उपरोक्त त्यापासून धडा घेतील काय ?

दुसरें उदाहरणः— बोकाळलेल्या चैनबाजीला पायबंद घालण्याच्या हेतूनें जपान … चहा, दारू, सेंट व इतर मौल्यवान पदार्थांवर १००टक्के कर बसविण्याचा … केला असून, विचारी लोकांचें याला पूर्ण पाठबळ आहे, अशा अर्थाची एक तार आली आहे. या वरून सुधारलेल्या जपानला चैनीचा कंटाळा आला आहे, असें सहज सिद्ध होतें. प्रत्येक बाबतींत नखशिखांत युरोपियनांचें अनुकरण करण्यास सढळ हातानें निढळाच्या घामानें मिळविलेल्या संपत्तीचा चकाचूर करण्यास पुढें न पहाणाऱ्या 'कंट्री साहेबानां' … च्या उदाहरणानें, तरी साधा पेहराव … याची सद्बुद्धि होवो, असें इच्छितों. … त्यानुरूप आचरणांत फरक हा झाला पाहिजे. त्या शिवाय निभाव लागणें … होय. सध्याची परिस्थिति चैनबाजीला … अत्यंत प्रतिकूल असून, जो अभागी तिच्यावर दंड थोपटून झगड्याला उभा राहील त्याला दांतीं तृण घेऊन शरण यावेंच लागेल. हें पूर्ण लक्षांत धरून, … लोकांनीं स्वसंरक्षणार्थ सावधगिरी … हेंच त्यांस उचित आहे.

…वाचें शिक्षणः— आमच्या पाठ… देण्यांत येणारें शिक्षण एकांगी, अ… गळट असून, या अशा सदोष … तून तयार होणारे नागरिक दे… त उज्ज्वल राखण्यास किंवा मातृ… श्रतींत भर घालण्यास सर्वथैव … नतात, हें आज कोणास नव्यानें … असें नाहीं. लिसेवचें शिक्षण देशभक्तांची निपज तर करीत नाहींच: उलट स्वतःच्या पायावर उभें राहून दुपारची वेळ निभावून नेण्यांपुरती सुद्धां त्यांच्यांत पात्रता तयार करण्याची शक्ति लिसेवांत नाहीं, असा अनुभव आहे. शारीरिक ऱ्हासाचें तर वर्णन करण्याचें कारण नाहीं. याची साक्ष खुद्द त्यांची निःसत्व, गलित व विवळटलेली देहयष्टिच देत आहे. तात्पर्य लिसेवचें शिक्षण राष्ट्र व भावी 'राष्ट्रवीर' या उभयतांसहि बिलकूल तारक नसून उलट मारक आहे, असेंच कबूल करणें भाग आहे.

'घरोघरीं मातीच्याच चुली':— पण गोमांतकांत जें लिसेवच्या शिक्षणाचें भेसूर व हृदयविदारक दृश्य दृष्टिगोचर होत आहे, त्याच तऱ्हेचें किंबहुना त्याहि पेक्षां जास्त तापदायक स्वरूप इंग्रजी हिंदुस्थानांतील शिक्षणसंस्थांत अजूनहि आढळून येत आहे, हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. डोळे खोल गेलेले, नाकाच्या टहूवर 'चाळीसी' खिजविणारे, फिकटलेले व लांबटलेले 'पाण्याचे पितर' इतस्ततः विहार करतांना शेजारच्या प्रांतांत दिसून येत नाहींत, असें नाहीं. ही झाली शारीरिक अधोगतीची बाबत. ज्ञानसाधनाच्याहि गोष्टींत दोहींकडे जवळ जवळ एकच मासला. म्हणण्यासारखा फरक नाहीं. व या फरकाच्या अभावामुळें अथवा दोहोंकडे शिक्षणाच्या अधोगतींत दिसून येणाऱ्या साम्यतेमुळें नवल वाटण्याचें वास्तविक कारण नाहीं. कां कीं, पोर्तुगीज हिंदुस्थानांतील शिक्षण काय, किंवा इंग्रजी हिंदुस्थानांतील शिक्षण काय, दोन्हीहि परक्यांच्या देखरेखेखाल दिलीं जात असल्यानें, 'पोटतिडीके'च्या अभावीं दोन्हीकडच्या शिक्षणसंस्थांत एकाच प्रकारच्या दोषसमुच्चयानें धागडधिंगा व तोहि निष्कंटकपणें चालावा, यांत आश्चर्य तें कोणतें ? 'सातसमुद्र ओलांडून' आलेल्या स्वार्थी लोकानां जर आमच्या देशाच्या अभ्युदयाच्या काळजीनें डचचिलें असतें, तर पूर्वेचा सूर्य कधींच स्थानत्याग करून पश्चिमेला उदय पावला असता किंवा समुद्रानें आपल्या पाण्यांतील नैसर्गिक खारटपणाचें रूपांतर गोड्या पाण्यांत केलें असतें, हें उघड आहे.

'राजा कालस्य कारणम्':— लिसेवच्या शिक्षणांत नादानपणा बोकाळण्याचें कारण अर्थात परकीयांचा एकसूत्री अंमल हें होय. गोमांतकप्रांत जोपर्यंत पोर्तुगालच्या मत्तेंत गणला गेला जाईल, तोंपर्यंत आम्हीं शिक्षणखात्यांत सत्ता गाजविण्याचा किती हि प्रयत्न केला तरी तो निष्फळच होईल, हें उघड आहे. खाजगी प्रयत्न यशस्वी होण्यासारखी … ची परिस्थिति असती तर त्यांतल्यात्यांत शिक्षणांत शक्य तितके फेरफार करून, त्याच्या नेभळट पणाची तीव्रता कमी करण्यास सोपें झालें असतें. परंतु सरकारी शिक्का नसलेल्या शिक्षणाची आवडच मुळीं बहुजन समाजाला नाहीं! अशा चमत्कारिक स्थितींत, एक तर सरकारच्या मेहरबानीनें दिला जात असलेला निरस व वेचव शिक्षणरूपी भाकरीचा तुकडा चघळीत समाधानवृत्तींत दिवस कंठणें भाग आहे, नपेक्षां अपहारलेल्या सत्तेचें माणिक परत मिळविण्याचे सामुदायिक प्रयत्न तरी झाले पाहिजेत. तिसरा मार्ग नाहीं. सदरील दोन मार्गांपैकीं दुसराच पंथ आक्रमिण्याची भावना जनतेंत प्रसृत करण्याची जबाबदारी पुढाऱ्यांवर येऊन पडते, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

अहोरूप महोध्वनिः—ब्रागांस व कोस्त हे गोमांतकातर्फे प्रतिनिधी या नात्यानें गेल्या मे महिन्यात लिस्बोअ येथें भरलेल्या वसाहत परिषदेला हजर राहिले होते, हें वाचकांस माहीत आहेच. परस्परांचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यांतच आमच्या शब्दशूर प्रतिनिधींची सर्व शक्ति गमावली गेल्यामुळें त्यांना इतर महत्वाची कोणतीच गोष्ट साध्य करणें अर्थात शक्य झालें नाहीं. नाहीं म्हटल्यास त्यांनीं वर्तमानपत्रांवर लेख खरडून व क्वचित् प्रसंगीं व्याख्यानेंहि झोडून गोमांतकांच्या गरजांची जाणीव पोर्तुगालला करून देण्याचा योग पदरांत घेतला. पण 'पोर्तुगाल गोमांतकाला पित्रस्थानीं आहे' या मुख्य तत्वाच्या पायावर उपरोक्त लेखांची व व्याख्यानांची इमारत उभारली गेली असल्यानें, त्यांच्या त्या चित्ताकर्षक लेखाचा व वक्तृत्वपूर्ण व्याख्यानांचा गोमांतकाला कितपत फायदा होईल, हें दिसतेंच आहे! एवंच तिजोरीच्या हलक्या … शतभार लादण्याच्या शतकृत्याखेरीज, आमच्या प्रतिनिधींकडून दुसरी नांव घेण्यासारखी कसलीच कामगिरी पार पडली नाहीं, हें आमचें दुर्भाग्य होय!

सुखंच मे शयनंच मेः— 'कष्टेंवीण फळ नाहीं' या समर्थांच्या बहुमोल शिकवणाचें विस्मरण सामाजिक प्रगतीच्या गाड्याला खीळ घालीत असलेलें पाहून, कोणालाहि सखेदाश्चर्य वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. 'खाना पिना मजा मारना' या आळशी तत्वाचा पगडा बहुतेक तरुणांवर बसला असल्यानें, त्यानां सरकारी नोकरीचा व्यामोह इतका चिकटून राहिला आहे कीं, त्यांना त्या व्यतिरिक्त दुसरी बुद्धितेज फांकविणारी कोणतीच गोष्ट सूचत नाहीं! जो उठतो तो कोणाचीहि कास धरून नोकरीची आपली आस पुरविण्याचे कामीं शक्तिसर्वस्व वेचण्यांत गढून गेलेला दिसतो! वकील, डॉक्टर, जमिनदार हे लोकसुद्धां आपल्यां स्वतंत्र धंद्यांस दरवाजा फांसून नोकरीच्या बेगडी सत्तेनें स्वतःचें अस्तित्व विभूषित करण्याच्या कार्यांत चूर झालेले आढळून येतात. तात्पर्य, 'सुखंच मे शयनं च मे,' या मवाळ तत्वानें सुशिक्षित म्हणून मानला गेलेल्या वर्गाला अगदींच गचाळ बनविलें असून त्यानें राष्ट्रीय जिवास ज्ञहागिरी केलें आहे, ही दुःखाची गोष्ट होय. जिवाचा धडा करून, जिवानिशीं अधोगतीस जाऊं पहात असलेल्या तरणपिढीचा जीव संरक्षण करणें, हें पुढाऱ्यांचें कर्तव्य होय.

साभार स्वीकार

मासफळ शिक्षण क्रमः— ज्योतिष विषयक कोर्साचें हें एक लहानसें पुस्तक असून यांत मासफल शिक्षण क्रम आधुनिक शास्त्रीय पद्धतीनें आंखला गेला असल्यानें, जिज्ञासूंस सदर विषयाचें ज्ञान सुलभ व सहज रीत्या होण्या जोगें आहे.

मुहूर्त दीपिकाः— हेंहि एक ज्योतिष विषयक माहितीनें भरलेलें पुस्तक असून, यांत 'मुहूर्तकालसाधन' नावांचें एक प्रकरण आहे. विषयरचना सोपी आहे.

विवाह ज्योतिषः— या पुस्तकांत कोणत्या विषयाचा ऊहापोह केला असेल, हें वाचकांस त्याच्या नावांवरूनच समजण्यासारखें आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या आधारानें वधुवरांचीं नक्षत्रें जुळविण्यास डोक्यास त्रास देण्याचें कारण पडत नाहीं.

आकाश-ज्योतिषः—'ज्योतिष शिक्षण कोर्सा' करितां लिहिला गेलेला हा निबंध जिज्ञासूंच्या सोईकरितां लेखकानें मुद्दाम स्वतंत्र छापण्याची परवानगी देऊन, ज्योतिषशास्त्रावर एक प्रकारें उपकारच केला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांतील माहितीहि फार उपयुक्त आहे.

ग्रहयोगः— हर्शल-नेपच्यून ग्रहयुति आणि कुंडली गुणनिर्णय हेंहि पुस्तक वरील मालेचेंच असून, ज्योतिषशास्त्र … ज्यांना प्रगति करून घेण्याची आकांक्षा असेल, त्यांनीं त्याचा अवश्य उपयोग करावा. वरील सर्व पुस्तकांचे प्रकाशक पुणें येथील 'ज्योतिर्भूषण'चे संपादक पंडित रघुनाथ शास्त्री पटवर्धन हे असून ज्योतिष शास्त्राच्या अभ्युदयासाठीं त्यांनीं चालविलेली चळवळ अभिनंदनीय आहे.

संध्याविधिः— ऋग्वेदी संध्याविधि भाग १।२ हें धार्मिक पुस्तक वा० ज० सिद्धये-किरात ऑफिस, वेंगुर्लें— यांकडून भेटीदाखल आलें आहे. पुस्तकाच्या पहिल्या भागांत त्रिकाल संध्येच्या समंत्रक प्रयोगाची माहिती दिली असून दुसऱ्यांत संध्येची उपयुक्तता वगैरे विवेचन आलें आहे. … णानां संग्राह्य आहे. किंमत ४ आणे.

हितबोधः— बापाचा सासुरवासिनीस हितबोध हें पद्यमय पुस्तक कवि द. तु. पणशीकर, पेडणें, यांकडून 'भारताला' नजर आल्यास बरेच दिवस लोटले. केवळ स्थळसंकोचास्तव आजपर्यंत सदर पुस्तकाची पोंच देतां आली नाहीं, याबद्दल आम्हीं फार दिलगीर आहों. 'हितबोध' आम्हीं समग्र वाचला व लिहिण्यास आनंद वाटतो कीं, पणशीकरांची साधी पण रसाळ व हृदयांत आनंदाच्या गुदगुल्या उत्पन्न करणारी कविता आम्हांस मनापासून आवडली. पणशीकरांचा कवितेचा नाद फार जुना असून, त्यांचा नैसर्गिक कलहि काव्योत्पादनाला पोषक असल्यानें, दत्तात्रयपंतांची कविता नेहमींच गोड व चित्ताल्हादक असते, असें नमूद करण्यास …

que o Himmala … outro que … aquele! … "ao mundo". Sublimes palavras aquelas … fosse a propria parte da Verdade ou de Deus. Sim, nao podia ser dada

स्फुट विचार

योगक्षेमत्र दुर्लभः—गोव्या सरकारच्या तिजोरीला ज्या तुटीच्या असह्य रोगानें जर्जर करून टाकलें आहे, त्याच दुर्धर रोगानें मकावलाही जीवित कष्टतर बनविलें आहे. पण मकावसरकारनें रोगपरिहारार्थ गोवासरकारच्या मिळेल त्या गोष्टीवर नारामारविचारविरहीत कर लादण्याच्या अश्लाध्य व लोकमताविघातक धोरणाचें अनुकरण न करितां, ज्या वस्तु सार्वजनिक नीतीला व आरोग्याला बाधक आहेत, अशांतूनच करांच्या रूपानें तूट भरपाईला आवश्यक इतकें उत्पन्न काढण्याचा बेत केला आहे. दारू व तंबाकू या दोन गोष्टींकडेच मकाव येथें करांचा मोर्चा वळणार असून, येथील प्रमाणें त्यांची बाधा तांदळासारख्या गरीब लोकांच्या अन्नाला शिवणार नाहीं, ही समाधानाची गोष्ट होय. गार्नियें, स्मीथ, मिल्ल इत्यादिकांचीं अर्थशास्त्रांतील तत्वें तोंडपाठ म्हणून जनतेला गारीगार करून सोडणारे पण प्रसंग येतांच 'शेपटी पकडली गेलेल्या' पोरटाप्रमाणें मूळ स्वभावावरच जाऊन, तिच्या पोटावर कररूपी तीक्ष्ण तरवारीचे निर्दय प्रहार करणारे आमचे शहाणे मुत्सद्दी व कसलेले राजकारणी मकाव सरकारच्या उपरोक्त कृत्यापासून धडा घेतील काय ?

दुसरें उदाहरणः—बोकाळलेल्या चैनबाजीला पायबंद घालण्याच्या हेतूनें जपाननें चहा, दारू, सेंट व इतर मौल्यवान पदार्थांवर १०० टक्के कर बसविण्याचा निश्चय केला असून, बिचारी लोकांचें या करावाला पूर्ण पाठबळ आहे, अशा अर्थाची एक तार आली आहे. या वरून सुधारलेल्या जपानला चैनीचा कंटाळा आला असावा, असें सहज सिद्ध होतें. प्रत्येक बाबतींत नखशिखांत युरोपियनांचें अनुकरण करण्यास सढळ हातानें निढळच्या घामानें कमावलेल्या संपत्तीचा चक्काचूर करण्यास मागें पुढें न पहाणाऱ्या 'कंट्री साहेबानां' जपानच्या उदाहरणानें, तरी साधा पेहराव करण्याची सद्बुद्धि होवो, असें इच्छितों. परिस्थित्यनुरूप आचरणांत फरक हा झालाच पाहिजे. त्या शिवाय निभाव लागणें अशक्य होय. सध्याची परिस्थिति चैनबाजीला अत्यंत प्रतिकूल असून, जो अभागी तिच्या समोर दंड थोपटून झगड्याला उभा राहील, त्याला दांतीं तृण घेऊन शरण यावेंच लागेल. हें पूर्ण लक्षांत धरून, आज लोकांनीं स्वसंरक्षणार्थ साधेपणा स्वीकारावा, हेंच त्यांस उचित आहे.

लिसेवचें शिक्षणः—आमच्या पाठशाळांतून देण्यांत येणारें शिक्षण एकांगी, अपुरें व नेभळट असून, या अशा सदोष शिक्षणांतून तयार होणारे नागरिक देशाची कीर्ति उज्ज्वळ राखण्यास किंवा मातृभूमीच्या प्रगतींत भर घालण्यास सर्वथैव असमर्थ बनतात, हें आज कोणास नव्यानें सांगावयास [illegible] असें नाहीं. लिसेवचें शिक्षण देशभक्तांची निपज तर करीत नाहींच; उलट स्वतःच्या पायावर उभें राहून दुपारची वेळ निभावून नेण्यापुरती सुद्धां त्यांच्यांत पात्रता तयार करण्याची शक्ति लिसेवांत नाहीं, असा अनुभव आहे. शारीरिक ऱ्हासाचें तर वर्णन करण्याचें कारण नाहीं. याची साक्ष खुद्द त्यांची निःसत्व, गलित व निवळटलेली देहयष्टिच देत आहे. तात्पर्य लिसेवचें शिक्षण राष्ट्र व भावी 'राष्ट्रवीर' या उभयतांसहि बिलकूल तारक नसून उलट मारक आहे, असेंच कबूल करणें भाग आहे.

'घरोघरीं मातीच्याच चुली':—पण गोमांतकांत जें लिसेवच्या शिक्षणाचें भेसूर व हृदयविदारक दृश्य दृष्टिगोचर होत आहे, त्याच तऱ्हेचें किंबहुना त्याहि पेक्षां जास्त तापदायक स्वरूप इंग्रजी हिंदुस्थानांतील शिक्षणसंस्थांत अजूनहि आढळून येत आहे, हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. डोळे खोल गेलेले, नाकाच्या टक्कर 'चाळीसी' खिजविणारे, फिकटलेले व लांबटलेले 'पाण्याचे पितर' इतस्ततः विहार करतांना शेजारच्या प्रांतांत दिसून येत नाहींत, असें नाहीं. ही झाली शारीरिक अधोगतीची बाबत. ज्ञानसाधनाच्याहि गोष्टींत दोहोंकडे जवळ जवळ एकच मासला. म्हणण्यासारखा फरक नाहीं. व या फरकाच्या अभावामुळें अथवा दोहोंकडे शिक्षणाच्या अधोगतींत दिसून येणाऱ्या साम्यतेमुळें नवल वाटण्याचें वास्तविक कारण नाहीं. कां कीं, पोर्तुगीज-हिंदुस्थानांतील शिक्षण काय, किंवा इंग्रजी हिंदुस्थानांतील शिक्षण काय, दोन्हीहि परक्यांच्या देखरेखेखाल दिलीं जात असल्यानें, 'पोटतिडीके'च्या अभावीं दोन्हीकडच्या शिक्षणसंस्थांत एकाच प्रकारच्या दोषसमुच्चयानें धागडधिंगा व तोहि निष्कंटकपणें घालावा, यांत आश्चर्य तें कोणतें ? 'सातसमुद्र ओलांडून' आलेल्या स्वार्थी लोकांनां जर आमच्या देशाच्या अभ्युदयाच्या काळजीनें डांचिलें असतें, तर पूर्वेचा सूर्य कधींच स्थानत्याग करून पश्चिमेला उदय पावला असता किंवा समुद्रानें आपल्या पाण्यांतील नैसर्गिक खारटपणाचें रूपांतर गोड्या पाण्यांत केलें असतें, हें उघड आहे.

'राजा कालस्य कारणम्':—लिसेवच्या शिक्षणांत नादानपणा बोकाळण्याचें कारण अर्थात परकीयांचा एकसूत्री अंमल हें होय. गोमांतकप्रांत जोपर्यंत पोर्तुगालच्या मर्जींत गणला गेला जाईल, तोंपर्यंत आम्हीं शिक्षणखात्यांत सत्ता गाजविण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी तो निष्फळच होईल, हें उघड आहे. खाजगी प्रयत्न यशस्वी होण्यासारखी लोकांची परिस्थिति असती तर त्यांतल्यात्यांत शिक्षणांत शक्य तितके फेरफार करून, त्याच्या नेभळटपणाची तीव्रता कमी करण्यास सोपें झालें असतें. परंतु सरकारी शिक्का नसलेल्या शिक्षणाची आवडच मुळीं बहुजन समाजाला नाहीं! अशा चमत्कारिक स्थितींत, एक तर सरकारकडून मेहरबानीनें दिला जात असलेला निरस व बेचव शिक्षणरूपी भाकरीचा तुकडा चघळीत समाधानवृत्तींत दिवस कंठणें भाग आहे, न पेक्षां अपहारलेल्या सत्तेचें माणिक परत मिळविण्याचे सामुदायिक प्रयत्न तरी झाले पाहिजेत. तिसरा मार्ग नाहीं. सदरील दोन मार्गांपैकीं दुसराच पंथ आक्रमिण्याची भावना जनतेंत प्रसृत करण्याची जबाबदारी पुढाऱ्यांवर येऊन पडते, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

अहोरूप महोध्वनिः—ब्रागांस व कोस्त हे गोमांतकातर्फे प्रतिनिधी या नात्यानें गेल्या मे महिन्यांत लिस्बोअ येथें भरलेल्या वसाहत परिषदेला हजर राहिले होते, हें वाचकांस माहीत आहेच. परस्परांचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यांतच आमच्या शब्दशूर प्रतिनिधींची सर्व शक्ति गमावली गेल्यामुळें त्यांना इतर महत्त्वाची कोणतीच गोष्ट साध्य करणें अर्थात शक्य झालें नाहीं. नाहीं म्हटल्यास त्यानीं वर्तमानपत्रांवर लेख खरडून व क्वचित् प्रसंगीं व्याख्यानेंहि झोडून गोमांतकाच्या गरजांची जाणीव पोर्तुगालला करून देण्याचा योग पदरांत घेतला. पण 'पोर्तुगाल गोमांतकाला पित्रस्थानीं आहे' या मुख्य तत्वाच्या पायावर उपरोक्त लेखांची व व्याख्यानांची इमारत उभारली गेली असल्यानें, त्यांच्या त्या चित्ताकर्षक लेखांचा व वक्तृत्वपूर्ण व्याख्यानांचा गोमांतकाला कितपत फायदा होईल, हें दिसतेंच आहे! एवंच तिजोरीच्या हलाखींत दातभार लावण्याच्या शतकृत्याखेरीज, आमच्या प्रतिनिधींकडून दुसरी नांव घेण्यासारखी कसलीच कामगिरी पार पडली नाहीं, हें आमचें दुर्भाग्य होय!

सुखंच मे शयनंच मेः—'कष्टेंवीण फळ नाहीं' या समर्थांच्या बहुमोल शिकवणीचें विस्मरण सामाजिक प्रगतीच्या गाड्याला खीळ घालीत असलेलें पाहून, कोणालाहि सखेदाश्चर्य वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. 'खाना पिना मजा मारना' या आळशी तत्वाचा पगडा बहुतेक तरुणांवर बसला असल्यानें, त्यांना सरकारी नोकरीचा व्यामोह इतका चिकटून राहिला आहे कीं, त्यांना त्या व्यतिरिक्त दुसरी बुद्धितेज फांकविणारी कोणतीच गोष्ट सूचत नाहीं! जो उठतो तो कोणाचीहि कास धरून नोकरीची आपली आसु पुरविण्याचे कामीं शक्तिसर्वस्व वेंचण्यांत गढून गेलेला दिसतो! वकील, डॉक्टर, जमिनदार हे लोकसुद्धां आपल्यां स्वतंत्र धंद्यांस दरताळ फांसून नोकरीच्या बेगडी सत्तेनें स्वतःचें अस्तित्व विभूषित करण्याच्या कार्यांत चूर झालेले आढळून येतात. तात्पर्य, 'सुखंच मे शयनंच मे,' या मवाळ तत्वानें सुशिक्षित म्हणून मानला गेलेल्या वर्गाला अगदींच गचाळ बनविलें असून त्यानें राष्ट्रीय जिवास जहानगिरी केलें आहे, ही दुःखाची गोष्ट होय. जिवाचा धडा करून, जिवानिशीं अधोगतीस जाऊं पहात असलेल्या तरुणपिढीचा जीवसंरक्षण करणें, हें पुढाऱ्यांचें कर्तव्य होय.

साभार स्वीकार

मासफल शिक्षण क्रमः—ज्योतिर्विषयक कोर्साचें हें एक लहानसें पुस्तक असून यांत मासफल शिक्षण क्रम आधुनिक शास्त्रीयपद्धतीनें शोधून घेतला असल्यानें, जिज्ञासूंस सदर विषयाचें ज्ञान सुलभ व सहज रीत्या होण्या जोगें आहे.

मुहूर्त दीपिकाः—हेंहि एक ज्योतिर्विषयक माहितीनें भरलेलें पुस्तक असून, यांत 'मुहूर्तकालसाधन' नावाचें एक प्रकरण आहे. विषयरचना सोपी आहे.

विवाह ज्योतिषः—या पुस्तकांत कोणत्या विषयाचा ऊहापोह केला असेल, हें वाचकांस त्याच्या नावांवरूनच समजण्यासारखें आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या आधारानें वधुवरांचीं नक्षत्रें जुळविण्यास जोश्यास त्रास देण्याचें कारण पडत नाहीं.

आकाश-ज्योतिषः—'ज्योतिष शिक्षण कोर्सा' करितां लिहिला गेलेला हा निबंध जिज्ञासूंच्या सोईकरितां लेखकानें मुद्दाम स्वतंत्र छापण्याची परवानगी देऊन, ज्योतिर्शास्त्रावर एक प्रकारें उपकारच केला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांतील माहितीहि फार उपयुक्त आहे.

ग्रहयोगः—हर्शल-नेपच्यून-ग्रहयोग आणि कुंडली गुणनिर्णय हेंहि पुस्तक वरील मालेचेंच असून, ज्योतिषशास्त्रांत ज्यांना प्रगति करून घेण्याची आकांक्षा असेल, त्यानीं त्याचा अवश्य उपयोग करावा. वरील सर्व पुस्तकांचे प्रकाशक पुणें येथील 'ज्योतिर्भूषण'चे संपादक पंडित रघुनाथ शास्त्री पटवर्धन हे असून ज्योतिषशास्त्राच्या अभ्युदयासाठीं त्यांनीं चालविलेली चळवळ अभिनंदनीय आहे.

संध्याविधिः—ऋग्वेदी संध्याविधि भाग १।२ हें धार्मिक पुस्तक वा० ज० सिद्धये-किरात ऑफिस, वेंगुर्लें—यांकडून भेटीदाखल आलें आहे. पुस्तकाच्या पहिल्या भागांत त्रिकाल संध्येच्या समंत्रक प्रयोगाची माहिती दिली असून दुसऱ्यांत संध्येची उपयुक्तता वगैरे विवेचन आलें आहे. ब्राह्मणानां संग्राह्य आहे. किंमत ४ आणे.

हितबोधः—बापाचा सासुरवासिनीस हितबोध हें पद्यमय पुस्तक कवि द. तु. पणशीकर, पेडणें, यांकडून 'भारताला' नजर आल्यास बरेच दिवस लोटले. केवळ स्थलसंकोचास्तव आजपर्यंत सदर पुस्तकाची पोंच देतां आली नाहीं, याबद्दल आम्हीं फार दिलगीर आहों. 'हितबोध' आम्हीं समग्र वाचला व लिहिण्यास आनंद वाटतो कीं, पणशीकरांची साधी पण रसाळ व हृदयांत आनंदाच्या गुदगुल्या उत्पन्न करणारी कविता आम्हांस मनापासून आवडली. पणशीकरांचा कवितेचा नाद फार जुना असून, त्यांचा नैसर्गिक कलहि काव्योत्पादनाला पोषक असल्यानें, दत्तात्रयपंतांची कविता नेहमींच गोड व चित्ताल्हादक असते, असें नमूद करण्यास

9 ... 48

Quint... ...le Fevereiro de 1925

...INATURA
...ano tres rupias

...UNCIOS
Por ca... ...a que repetida uma tanga
...uiso uma tanga

...OR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत

BHARAT

वै. ... . अंक ४८

गुरुवार ता. २६ फेब्रुवारी सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

AO VEIO DO TEMPO...

O Ultramar tem, por estes tempos desvelado a sua atengao pelos problemas que afeiam, profundamente, a epiderme da India, pela pena dum dos seus ilustres colaboradores que assistiu a's sessoes do Congresso de Belgao, o sr. Sebastiao de Figueiredo. Em tres primeiros artigos o sr. Figueiredo pos os leitores ao corrente do que se passara em Belgao com mais verdade do que o diario *Times of India* que, ninguem ignora, e' uma porta-voz do sentir e pensar do Governo britanico.

Todos os aplausos sao devidos ao sr. S. de Figueiredo pelo grande servigo que prestou aos leitores que nao sabem ler o ingles ou nao leem jornais escritos em ingles.

Porem, no seu ultimo artigo *"Satyagraha"*, saltaram-nos a' vista alguns deslises que antes parecem filhos de uma errada interpretagao.

Vejamos, pormencrisadamente, quais sao eles:

"...o seu ideal, luminoso sim, mas vertiginoso, ala se pelas culminancias ideologicas e transcendentais, nao se dedignando de baixar para os dominios das realisagoes praticas."

Nao podemos concordar com esse modo de ver. Pois nao ignora,' com certeza, o sr. Figueiredo os triunfos alcangados pelo Mahatma' na Africa do Sul. Que mais realisagoes praticas queria o sr. Figueiredo, alem da *boycotage* a's escolas e a's repartigoes publicas, de directamente intrometer-se em questoes de mais vital interesse a' India. Incessantemente incitando-os, por meio de discursos, conferencias e artigos ponderados no seu excelente jornal *Young India*.

Que mais queria o sr. Figueiredo que Gandhi fizesse?

Mais adiante encontram-se estas linhas: "mas dificilmente sera' o libertador da India."

E' uma afirmagao muito ousada. Se Gandhi nao pode ser o libertador da India quem acha o sr. Figueiredo que tenha dotes e qualidades suficientes para arcar com as tremendas responsabilidades de um libertador? Quem ha que tenha uma alma tao limpa, uma consciencia tao tranquila, enfim, que seja um homem perfeito para ser um mentor dos povos da India?

Sem duvida, so' Mahatma', "o homem identificado com Deus, a *Alma Grande*, pode com plena certeza, aspirar um tao enorme triunfo. Apesar de divergencias as mais desencontradas, apesar de a India estar dividida e fracionada em inumeros partidos, que grande nao sera' o poder dominador de Gandhi, para, apesar de tudo isto, Gandhi ser eleito Presidente do Congresso Nacional de Belgao, por uma maioria esmagadora?...

Depois disto o sr. Figueiredo assaca a Gandhi erros tao grandes como os Himalaias e cre' que o futuro lhe acarretara' maiores ainda. Julgamos que o sr. Figueiredo nao tenha, talvez tido nogao da altura do Everest, ou que o Himalaia do sr. Figueiredo seja outro que nao a...uele!

Mas o que desejava o sr. Figueiredo que Gandhi fizesse? Seguisse uma politica diversa daquela que ele, tao ardentemente, segue? Onde estara' pois, entao a sua bondade que e' a faceta mais brilhante e mais simpatica do espirito humano?...

Que maiores erros nao teria Gandhi, que resultados mais tristes nao adviriam se ele, ao contrario do que hoje prega, ensinasse a todos a doutrina perigosa da violencia, da guerra que e' arma estupida da carnificina sangrenta de que foi teatro a Europa durante os horrendos e terrificos quatro anos!

A *ahinsa'* ou a *nao violencia*, bem a definiu Romain Rolland, "palavra magica, sublime mensagem da India ao mundo". Sublimes palavras aquelas de Rolland no prefacio do ultimo livro *La Jeune Inde*, repositorio de todos os artigos publicados por Gandhi no seu *Young India*, trasladados a frances macisso por Hetene Hart "Gandhi nao diz que ela (a Nao-Violencia) salvara' hoje a Humanidade. Ele nao sabe se a Humanidade actua - sera' salva. Mas se ela o for, nao pod ser senao pela Nao-*V*iolencia." E o proprio Gandhi diz: "A nao-violencia compreende, assim, a inocencia absoluta A nao violencia absoluta e' uma ausencia total de mau querer contra tudo o que vive..." A nao-violencia, e' desejar o bem a tudo oqui existe. E' o amor puro. Eu *o* li na Escrioura santa hindu', na Biblia e no Alkorao. "A nao-violencia e' um estado perfeito."

Depois o sr. Figueiredo analisa este trecho do magistral discurso de Gandhi, muito de animo leve, sem querer prescrutar o sentido oculto e as entrelinhas, pois, tudo tem de ser interpretado segundo duplo criterio, e fazer o possivel para se ser capaz de aproximar-se da idea do autor:

"Satyagraha is search for Truth and God is Truth. Ahimsa or non-violence is the light that reveals that truth to me. Swaraj for me is part of that truth."

Analisa este periodo da seguinte maneira:

"O sr. Gandhi diz, e diz muito bem que Deus e' a verdade. Mas, infelismente, obcecado pelo amor da patria diz a seguir que o Swaraj, para ele e' parte daquela Verdade. Com o que temos que o Swaraj e' parte de Deus! O unico sentido que se pode espremer dessa assergao e' que a formula do Swaraj e' tao universal e necessaria como a propria existencia de Deus."

Nao e' esta a unica ilagao que se pode tirar deste periodo; nao. "Ahinsa' ou nao-violencia e' a luz que me revela esta verdade. O *Swaraj* para mim, e' a parte desta verdade" diz Gandhi; Quer isto dizer que o Swaraj e' a parte de Deus? Nao, de forma alguma. Gandhi, o mistico, o religioso nunca podia interpretar deste modo. O que, naturalmente, dimana daquelas palavras e' que sendo a *Ahinsa'* a luz por meio da qual ele fica sciente da Verdede, e que o *Swaraj* para' ele e' tao precioso, tao querido como se fosse a propria parte da Verdade ou de Deus, Sim, nao podia ser dada

RECORDANDO...

Diz o *Bharat* que o sr. Dr. S. Rau, que falou das colunas da *Provincia* perdeu uma bela ocasião de estar calado.

Eu não conheço o Dr. Rau nem o seu artigo estampado no semanario do Batalha, nem preciso conhece-lo. Basta, para fazer as minhas notas, que saiba que o Dr. Rau é burocrata e o assunto do artigo é a *politica hindú*. Podia o burocrata Dr. Rau exprimir em letra de forma, com o seu nome por baixo, opinião diversa da que manifestou? Não, de certo, porque, nos tempos que vão correndo, tal não é permetido. Hoje em Gôa, a norma é–"Se não é por nós é contra nós"–a mesma dos *saudosos* tempos da Santa Inquisição. Porventura o Dr. Rau, porventura os leitores estarão esquecidos da sorte do prof Palondicar? Na verdade o Dr. Rau podia continuar calado. Quem não pode ter sinão uma certa opinião, milhor faz de não ter nenhuma. O Dr. Rau taxa de subversiva a politica hindú, o que è mesmo que dizer agentes subversivos aos que a dirigem, como o H. Dessai.

Ha dias, quando soube esta opinião do Dr. Rau, lembrei-me de um outro magistrado, então delegado, que no plenario, afirmara -"que em outra parte quem nada tem a fazer faz colheres de pau e aqui faz jornal"– e isto referindo-se a Siurama Rau, director de um jornal *Opinião Hindú* em N. Gôa, como hoje sucede com H. Dessai, em Quepêm.

Passaram anos. Siurama Rau tornou-se Dr. S. Rau, magistrado colega daquele magistrado, e a merecida reparação veio por sinal numa memória ultimamente publicada.

¿Quere H. Dessai uma reparação igual? O caminho está indicado –Portugal–Bacharel–Magistrado. E' facil e o cambio é favoravel. Peço, porém, que não me chame *colher de pau* nem *subversivo* depois de bem jantado e bem instalado. Isto é em paga do conselho. Doutros pode dizer mal--fomenta o *bacharelismo*!

Zé—Zé

समाज सुधारणा

विवाह

लेखांक ५ वा.

बालविवाहाचें कारण हिंदुस्थानची उष्णता नाहीं

आमच्या नव्या धर्मशास्त्रानें बहुतेक सुशिक्षितांवर सुद्धां असा पगडा बसविलेला आहे कीं, आपल्या देशांत मुलीला बऱ्याच लवकर रजोदर्शन होत असतें व याचें कारण भारत वर्षाची उष्णता होय. व याला उदाहरणा दाखल ते बंगालमधील १२-१३ वयाच्या बाल मातांकडे बोट दाखवीत असतात. लोकांचा असा दृढ विश्वास झालेला आहे कीं, जरी सर्वंच हिंदुस्थानांमध्यें असा प्रकार दिसून येत नसला तरी बंगाल व संयुक्त प्रांत यांमध्यें प्रकृति दहा वर्षाच्या मुलींना विवाहाला किंवहुना माता होण्याला तयार करीत असते. ते ह्मणतात दहा वर्षांच्या स्त्रियांना मुलें झालेलीं असून त्यांतील बहुतेक मुलें व त्यांच्या आया अद्याप जीवंत आहेत.

डॉ० चक्रवर्ती ह्मणतात: "जिला दहा वर्षांवर मूल झालें अशा एका स्त्रिला मी लहानपणापासून ओळखीत आहें". डॉ० राबर्टसन ह्मणतात: "एका कारखान्यामध्यें काम करणारी ११ वर्षाची स्त्री गर्भवती झाली." डॉ० बेली ह्मणतात "कलकत्त्यांतील एका जमीनदाराच्या मुलीला अकरा वर्षे ५ महिने वर्षांच्या वयावर मुलगा झाला". याशिवाय आणखी कांहीं जमीनदारांच्या स्त्रियांची नांवें त्यांनीं दिलेलीं आहेत. डॉ० ग्रीन ह्मणतात "डाकामध्यें एका स्त्रीला १२ वर्षांच्या वयावर मुलगा झाला पण तिला आपला देह ठेवावा लागला. डॉ० कन्यालाल ह्मणतात: "बंगालमध्यें बहुतेक स्त्रिया बाराव्या वर्षी माता होत असतात.'

[पहा Medical G. For India पा.६७३]

याप्रमाणें एक दोनच नाहींत तर हजारों बालमाता आपल्या हिंदुस्थानामध्यें आहेत. आतां आपणाला हें पाहिलें पाहिजे कीं, ही स्थिति येण्याला हिंदुस्थानामधील उष्णता कारण आहे कीं काय? नसल्यास दुसरीं कारणें कोणतीं? तसेंच दुसऱ्या देशामध्यें काय स्थिति आहे?

जगप्रसिद्ध डॉ० हालिक ह्मणतात "पुष्कळ शोधाअंतीं असें दिसून आलें आहे कीं, जगांतील सर्व जातीच्या मुलींना एकाच वेळीं रजोदर्शन प्राप्त होत असतें. आफ्रिकेसारख्या उष्ण देशांतील काफ्री मुलगी व युरोपसारख्या थंड देशांतील गोरी मुलगी या दोन्हीहि जर एकाच परिस्थितींत असल्या तर दोघांनाहि एकाच वेळीं रजोदर्शन प्राप्त होणार.

(पहा The Origin Of Life पा. ३६३)

मिस्टर राब'सन यांनीं पुष्कळ शोध करून असें मत ठरविलेलें आहे कीं, जगांतील सर्व देशांतील मुलींना लगभग एकाच वेळीं रजोदर्शन प्राप्त होत असतें. ते ह्मणतात कीं हिन्दुस्थानांतील मुली प्राकृतिक नियमानुसार रजस्वला होत नसतात तर कांहीं चालींतील परिस्थितीच त्यांना ही स्थिति लवकर प्राप्त करून देते. ते ह्मणतात "हिन्दुस्थानांतील राजकीय व सामाजिक परिस्थिति अतिशय बिघडलेली आहे. येथील कायदे व रीतिरिवाज अशा स्थितींत आहेत कीं, त्यानीं हिन्दुस्थानांतील स्त्रियांना मूर्ख बनवून टाकलेलें आहे. येथील विवाहसंबंधीं धार्मिक पुस्तकें असा उपदेश देत असतात कीं, हिन्दुस्थानांतील मुली लवकर रजस्वला होत असतात. जर अमेरिका व इंग्लंड या देशामध्येंहि अशीच परिस्थिति असती तर तेथील मुलीनाहि हीच स्थिति प्राप्त झाली असती. अमेरिकेंतील ११-१२ वर्षांच्या वाईट चालीच्या Prostitutis मुली सुद्धां १७-१८ वर्षांच्या स्त्रियांसारख्या दिसत असतात. कोणत्याहि देशांतील मुलींनां जर वाईट परिस्थितींत ठेवलें तर त्यांना इतरांपेक्षां लवकर रजोदर्शन प्राप्त होणार. खेडेगावांतील मुलीपेक्षां शहरांतील मुली जास्त लवकर रजस्वला होत असतात. याचें कारण शहरांतील परिस्थिति होय.

(The Origin Of Life पान 378)

तारुण्यावस्था अकालीं प्राप्त होण्याचा एक मार्ग ह्मणजे प्रेमाच्या गोष्टी करणें हा होय. अशा प्रकारच्या गोष्टींनीं लहान मुलांमुलीच्या मनावर वाईट परिणाम होत असतो. भगवान धन्वंतरी आपल्या सुश्रुतमध्यें ह्मणतात: "हिन्दुस्थानांत कन्या बारा वर्षांच्या वयावर रजस्वला होत असते व हा रजोधर्म पन्नास वर्षे वयाच्या दरम्यान बंद होत असतो."

जगांतील सर्व देशामध्यें रजस्वला होण्याचा हाच नियम आहे. अत्यंत थंड प्रदेश अशा इंग्लंडमध्यें सुद्धां तेथील मुली इतक्याच वयावर रजस्वला होत असतात. तेथेंहि बारा ते सतरापर्यंत, केव्हां केव्हां तर नऊ वर्षांच्या वयावर त्यांनां रजोदर्शन प्राप्त होऊन ४५ ते ५० पर्यंत बंद होत असतें.

इंग्लंडमधील "मँचेस्टर लाइंग इन" या हॉस्पिटलमध्यें ३४० मुलींची परीक्षा घेतली त्यांत १० मुलींनां अकराव्या वर्षी, १९ मुलींनां बाराव्या वर्षी, ५३ मुलींनां तेराव्या वर्षी, ८५ मुलींनां चौदाव्या वर्षी, ९७ मुलींनां पंधराव्या वर्षी व ७६ मुलींनां सोळाव्या वर्षी रजोदर्शन प्राप्त झालें.

हिंदुस्थानांमध्येंहि २७ युरोपियन मुलींची परीक्षा केली त्यांत खालील प्रमाण आढळून आलें:

४	मुलींना	१२ - १३	वयामध्यें
८	,,	१३ - १४	,,
९	,,	१४ - १५	,,
५	,,	१५ - १६	,,
१	,,	१६ - १७	मुलींनां रजोदर्शन प्राप्त झालें.

डॉ० हाटकिन्स ह्मणतात "दोघां युरोपियन मुलींनां इतक्या लवकर रजोदर्शन प्राप्त झालें कीं, त्या ११ वर्षे ७ महिने वयावर माता झाल्या असत्या. डॉ० राबर्टसन ह्मणतात "हिंदुस्थान व इंग्लंड या दोनहि देशांमध्यें नऊ वर्षांच्या मुली रजस्वला होत असतात."

या थोर पुरुषांच्या शोधांवरून असें दिसून येतें कीं, जगामध्यें रजस्वला होण्याची वेळ प्रकृतीनें एकच ठेवलेली आहे. आतां आपणाला दुसऱ्या देशांमध्यें बालविवाहाची चाल होती किंवा काय हें पाहिलें पाहिजे.

बाल विवाहाची चाल सर्व देशांमध्यें —ज्या वेळीं ते देश असभ्यतावस्थेंत होते त्या वेळीं—होती. इंग्लंडमध्यें अठराव्या शतकाच्या सुरवातीला सुधां ही वाईट चाल प्रचारांत होती. फ्रान्समधील फिलीप राजानें इंग्लंडांतील बारा वर्षांच्या राजकुमारीकडे लग्न केलेलें होतें. तसेंच दुसऱ्या राजकुमारीचा विवाह नवव्या वर्षी झालेला होता. ज्यावेळीं इंग्लंडमधील राजा रिचर्ड याचा विवाह फ्रान्सच्या राजकन्येकडे झाला त्या वेळीं तीचें वय आठ वर्षांचें होतें. श्रीमती एलिझाबेत हार्डविकचा विवाह तेराव्या वर्षी झाला. इंग्लंडचा राजा सातवा हेनरी अति दुर्बल होता. याचें कारण त्याची आई लेडी मार्गारेट इचा विवाह नवव्या वर्षी झाला होता. व ज्या वेळीं हेनरीचा जन्म झाला त्यावेळीं तिचें वय केवळ दहा वर्षांचें होतें. त्याकाळीं इंग्लंड मधील उच्च लोकांची स्थिति अशी होती. ते बहुतेक लहान वयांत आपल्या मुलांमुलींचा विवाह करीत असत.

मॉरिस (Maurice 23, Lord Berkly Edward 1) चा विवाह आठ वर्षांच्या वयावर झालेला होता. त्यानां चवदावें वर्ष लागण्यापूर्वी मुलगा झाला. बरजीनीया मधील एका मुलीला तेराव्या वर्षी कोणतेहि कष्ट न पडतां मुलगा झाला. इंग्लंड मधील एका तरुण स्त्रीनें दहा वर्षांच्या मुलाकडे पापकर्म केलें. हें कर्म करते वेळीं तिच्या मनांत आपणाला गर्भ राहील अशी अंधुकशी सुधां कल्पना नव्हती परंतु तिचा तर्क चुकला. तसेंच एका दहा वर्षे तेरा दिवस वयाच्या मुलीला मुलगा झाला. त्याचें वजन ७ पौंड होतें. टेलर साहेब ह्मणतात 'कोणत्याहि देशांतील नऊ वर्षांच्या मुली सुधां गर्भवती होऊं शकतात, यांत आश्चर्यकारक असें कांहीं नाहीं.'

जग प्रसिद्ध डाक्टर हालिक लिहितात "मी एक सात वर्षांचा मुलगा विषय सेवन करण्यास योग्य असा पाहिलेला आहे. सात वर्षाच्या मुलाकडून गर्भधारणा होऊं शकते, हें पाहून प्रकृतीच्या अद्भुत नियमाबद्दल फार आश्चर्य वाटतें.

वरील प्रमाणावरून असें सिद्ध होतें कीं, अतिशय थंड प्रदेशांत सुधां हिंदुस्थानसारख्या उष्ण प्रदेशाप्रमाणेंच स्त्रियांना रजोदर्शन व गर्भधारणा होऊं शकते. अर्थातच हिंदुस्थानांतील या चालीचा उष्णतेशीं कांहींच संबंध नाहीं.

मुसलमानांमध्यें सुद्धां ही वाईट चाल प्रचारांत होती. त्यांच्या कायदे कानूच्या पुस्तकावरून असें दिसून येतें कीं, सात वर्षे वयाच्या पुढें मुलीकडे संभोग करणें नियम बाह्य नाहीं. मुसलमानाच्या नबी मुहम्मद साहेबांनीं सात वर्षे वयाच्या आयेशेशीं लग्न केलेलें होतें व जेव्हां ती आठ वर्षांची झाली त्यावेळीं तिच्याकडे स्त्रियेसारखें वर्तन ठेवलें. जर कोणत्याहि मुलीला नवव्या अगर दहाव्या वर्षी तारुण्याचीं चिन्हें प्राप्त झालीं तर ती स्त्री झालेली आहे असें समजलें जातें. पुष्कळशा उदाहरणावरून मिन्न अशा देशांमध्यें ही ज्या अर्थी एकसारखी स्थिति आहे त्या अर्थी हिंदुस्थानांतील बाल विवाहाची चाल येथल्या हवामानावरून रुढ झालेली आहे, हा मुद्दा टिकत नाहीं. जगांतील सर्व देशांमध्यें व जातीमध्यें प्रकृतीचा एकच नियम आहे. हिंदुस्थानामध्यें प्रकृति देवीनें तो नियम बदललेला नाहीं. बालविवाहाचें खरें कारण इतकेंच कीं, देशाची अधोगति व अज्ञान हें होय व याच वेळीं त्या चालीचा फैलाव समाजांत होतो.

प्रकृतीचं अद्भुत रहस्य

वर आह्मीं नऊ वर्षांच्या स्त्रिया सुद्धां गर्भवती होऊन मुलांना जन्म देऊं शकतात हे दाखविलेंच आहे. आतां याची दुसरी बाजू पुढें मांडून हा लेखांक पुरा करूं.

टामस पार हे १५२ वर्षेपर्यंत वांचले. त्यानीं आपल्या वयाच्या १२० व्या वर्षी विवाह केला व १४० व्या वर्षी त्यानां मुलगा झाला. फेलिक्स प्लेटर लिहितात कीं, आपल्या बापाला १०० वर्षी सुद्धां मुलें झालेलीं होतीं. सीज शहरांतील एक पाद्री लिहितात कीं, त्या शहरांतील एका ९४ वर्षे वयाच्या पुरुषानें ८३ वर्षे वयाच्या स्त्रीशीं लग्न केलें व तिच्यापासून त्याला मुलगा झाला. मारशल धी एस्ट्रीनें आपलें दुसरें लग्न ९१ व्या वर्षी केलें. मारशल डी रिचेलनें मडम डीराथ इच्याकडे ८४ व्या वर्षी लग्न केलें. सर स्टीफन फ्राक्सचें लग्न ७७ व्या वर्षी झालें होतें व त्यानां ७८ व्या वर्षी मुलगा नंतर एकाच खेपेस दोन मुलगे व शेवटचा चौथा मुलगा ८१ व्या वर्षी झाला. मिमायर्स डी आर्मीननर (Memoires de Armionrer) यानें ८० व्या वर्षी विवाह केला. व त्यानां चांगले शक्तिमान मुलगे झाले. वेगन साहेब ह्मणतात "माझे एक मित्र ७५ व्या वर्षी एका स्त्रिच्या मोहजालांत सापडून तिच्याशीं विवाह केला"

याप्रमाणें दोनहि बाजू पुढें आलेल्या आहेत. आतां विवाहाच्या काल निर्णयाबद्दलची चर्चा पुढच्या लेखांकांत करूं.

नेमलेले गव्हर्नर व व्हाइसराय असूं शकत नाहींत. लोकसत्तेनें चालविलेलें; लोकमताचें निदर्शक असलेलें व लोकांच्या कल्याणाचा विचार करणारें, तेंच खरें स्वराज्य होय'

(In swarajya there should be no Kings or Governors and Viceroys appointed by Kings There should be a Government of the people by the people for the people.)

मौलाना साहेबांची ही 'स्वराज्याची योजना' कोणा हिंदी तरुणाच्या अंतःकरणांत ठाणें घेऊन बसणार नाहीं? अमृतसरास ३०० गरीब हिंद पुत्रांचे नाहक प्राण घेऊन बंदूक बहाद्दर डायर साहेबांनीं ज्यांच्या अंतःकरणास क्षत पाडलें आहे, खिलाफतीची खिराफत करून ब्रिटिश सरकारानें ज्यांचीं अंतःकरणें निर्दयपणें लाथाडलीं आहेत, स्वराज्याच्या तहानेनें व्याकूळ झालेल्या प्रजेच्या प्राणांची चिता पेटवीत बंगालचा वटहुकूम पास करून लॉर्ड रेडिंग साहेबांनीं ज्यांचीं हृदयें पायांखालीं तुडविलीं आहेत त्या ब्रिटिश हिंदुस्थानवासी जनतेस भावी हिंदवी स्वराज्याची ही व्याख्या पसंत पडेल ती पडेलच पण आमच्या तरुण गोमांतकीयांस या 'संपूर्ण स्वातंत्र्याची' किंमत अधिक पटण्याजोगी आहे.

भारताचें राजकीय ध्येय हेंच असल्यामुळें ह्या स्वराज्याच्या योजनेकडे गोमांतकीय तरुणाचें जितकें जितकें लक्ष वेधेल तितकें तितकें त्यास हवेंच आहे. जोंपर्यंत परक्यांचा हात हिंदुस्थानच्या राजकारणांत राहील तोंपर्यंत हिंदुस्थाननें जगांतील इतर राष्ट्रांच्या पंक्तीस बसण्याची आशा धरणें मूर्खपणाचें होय असें त्यास वाटतें. पाश्चात्यानां आपल्या औदार्याच्या हव्या तितक्या बढाया मारूं द्यात पण आमचें कल्याण करण्याकरतां नव्हे तर आह्माकडे असेल नसेल तें लुबाडून घेऊन नारळाची आई आमच्या हातांत देण्याकरतां सात हजार मैलांवरून व सप्त समुद्र ओलांडून हे परदेशी पाहुणे आमच्या घरीं आले व त्यांचे 'खावयाचें दांत निराळे व दाखवावयाचे निराळे' हें क्षणोक्षणीं प्रत्ययास येत असतांहि त्यांच्या केवळ भूलथापांस भुलून आह्मी आमच्या पायांवर धोंडा मारून घेण्यास तयार झालों. पण इतउत्तर तसें रहाणें अशक्य झाल्यामुळें भारतानें राजकारणाच्या आखाड्यांत उडी घेतली व मिळालेले हक्क पदरात घेऊन आणखी मिळविण्याकरितां पोर्तुगीज सरकारशीं झगडणें हेंच आपलें राजकीय ध्येय ठरवून टांकलें. लोकशाहीच्या नैसर्गिक हक्कांची पायमल्ली करण्यास सरकार जेव्हां जेव्हां पुढें सरसावतें, तेव्हां तेव्हां त्यांच्या हक्कांसाठीं झगडण्यास भारतानें आजपर्यंत केव्हांच कसूर केलेली नाहीं, सध्या करीत नाहीं व पुढेंहि शक्यतोंवर करणार नाहीं हें त्याच्या राजकीय ध्येयाची पृच्छा करणाऱ्या ख्रिस्ताच्या लालानीं पुरें जाणून असावें।

स्फुट विचार

१ होळीला आळाः– गायकवाड नांवाचे एक गृहस्थ होळीसंबंधानें लिहितातः – जो तो आपल्या शक्तीप्रमाणें चार पैसे कर्जाऊ अगर स्वकष्टानें जमवून कुटुंबांतील चार माणसांत आणि मित्रांत कोणताहि सण आनंदात पार पाडण्यासाठीं चूर होऊन जातो. अशा रीतीनें सणांतील आनंदाचा स्वाद घेतेवेळीं कोणाचें कर्ज किती झालें, कोणा पठाणाचा कसा दंडुका भररस्त्यावर पाठीवर बसेल ह्याची कल्पनासुद्धां आमच्या कांहीं समाजास राहात नाही. अडाणी आणि भोळसर रूढीला चिकटून असणारे या भोळ्या भावड्यांना सणांची महति न उमजतां सुमुहूर्तीं आलेल्या मंगल सणांच्या दिवशीं या लोकांच्या घरांतून आनंदाच्या उकळ्या बाहेर न येतां, अकाळविकाळ आरोळ्या मात्र ऐकायला येतात; अज्ञानमय गडद अधःकारांत खितपत पडल्यामुळें हा कष्टमय आणि भेसूर देखावा दिसावा यांत नवल तें काय? आपण जे सण साजरे करीत असतों, ते एवढ्याच करितां कीं त्यांपासून आपणांस कांहीं ना कांहीं बोध व्हावा. सणांची योजना जी पूर्वीपासून चालत आली आहे; ती एवढ्याचकरितां. रागरंग आणि दारूच्या पिपा रिकाम्या करण्याकरितां नव्हे. हें ध्यानीं येईल तेव्हां ना? हां हां ह्मणतां लौकरच पुरुषस्त्रियांचा आनंदाचा दिवस "गोजिरवाणा शिमगा!" येणार!! आणि रूढीच्या अजब लीलेनें लीला करुन अज्ञान समूहाचा पैसा बराच व्यर्थ दवडणार!!! नवीन एकादी नाटक कंपनी येणार–येऊन रसिक मंडळींच्या पैशांचा खेळ करून लौकरच (५–६ महिन्यांनीं) हें जसें खरें, तसेंच त्याहिपेक्षां कांकणभर जास्त हा शिमगा येणार ह्मणून एक महिना अगोदर जाहिराती (बोंबा!) लहान कोमल बालकांच्या त्यांच्या पालकांच्या आज्ञेवरून भीष्म प्रतिज्ञेप्रमाणें चालू असतात, दोन्ही ओंठ सुजून आपल्या मातापितरांचा उद्धार, आणि सोज्ज्वल शिमग्यास आव्हान गल्लोगल्लींनें करीत असतात, या लहानग्या गुंड्यानें [!] अशा तऱ्हेनें उरकलेली कामगिरी पाहून त्यांच्या [अज्ञानी] पालकांस पराकाष्ठेचा आनंद होतो."

पुढें चालूः– ते पुढें ह्मणतातः "नाटक कंपनीप्रमाणें शिमगा येणाऱ्या दिवशीं येणारच. त्या दिवशीं ह्यांच्याहि भिकार आणि बेकार शौकांचा त्यामध्यें मिलाफ होऊन त्या आनंदाच्या सणांत ह्या विभत्स प्रकाराला अतिशय जोम येतो. आणि मग त्या सणाची खरी भडकेबाज होळी शीलाची राखरांगोळी पाहण्याचें आमच्या नशिबीं देवें, कोण हा अडाणीपणा!! मग सांगा माझ्या प्रिय बंधूंनो, या आपल्या अमूल्य आयुष्याचा अशा तऱ्हेनें शिमगा करून नरकवासी होणार काय? माय बहिणीची उकळावकळी काढून त्यानां भरचव्हाट्यावर लज्जेनें मान खालीं घालण्यास लावणार काय? गलिच्छ चिंध्या, गटरांतील दुर्गंधीचें पाणी आपल्या आणि दुसऱ्याच्या अंगावर राजरोसपणें ओतून आपल्या अकलेचें प्रदर्शन दाखविणार काय? आहे नाहीं त्या पैशांचा व्यर्थ चुराडा करून सुरा देवीचा विजयी (!) झेंडा शिमग्याच्या दुसऱ्या तिसऱ्या दिवशीं कोर्टांत फडकविणार कां?"

३ तात्पर्यः– उपरोक्त विवेचनापासून निष्पन्न होणारा उपदेश आपल्या गळीं उतरविण्याचा शहाणा प्रयत्न गोमांतकीय जनता करील, अशी आह्मांस आशा आहे. राष्ट्रपुरुष अनेक दुःखद आपत्तींनीं ग्रासला गेला असतां, आपल्या अवास्तव उत्सवप्रियतेचे घोडे दामटण्याच्या दंगलींत गुंग असण्याचा कोणाहि देशहितचिंतकाला अधिकार नाहीं. आपला आवडता गोमांतक दुःखार्णवांत गटंगळ्या खात असतां, तिकडे कानाडोळा करून, होळी–शिमग्याची मजा अनुभवण्याची उत्सुकता दाखविणाराचें अंतःकरण खास कठोर असलें पाहिजे. तात्पर्य हेंच कीं, गायकवाड यानी धिःकारलेल्या प्रकारांचा इकडेहि निषेध होणें सर्व दृष्टीनीं योग्य आहे.

४ परीक्षकांची उचलबांगडीः– गुरु-शिष्यांचें नातें किती पवित्र असतें हें हिंदवी संस्कृति ज्यांच्या अंगीं पूर्णपणें भिनली आहे अशा आह्मां हिंदुस्थानवासीयांस सांगण्याचें कारण नाहीं. परंतु उपरोक्त नात्याचा युरोपांत राजरोस रीतीनें चुथडा उडविला जात असल्याचें पाहून, त्या संबंधीचा पवित्रपणा तेथील उल्लू समाजाच्या मनांत बिंबविण्यासाठीं कित्येक उपदेशकांची गरज आहे, असें भासावयास लागलें आहे. पुढील चमत्कारिक गोष्ट कळतांच, आमच्या लिहिण्यांत कशी अतिशयोक्ति नाहीं, हें वाचकांच्या ध्यानांत लवकरच येईल. पोर्तुगालच्या कोइंब्र येथील विश्वविद्यालयांत विद्यार्थ्यांच्या परीक्षा चालू होत्या. हवा पालट करण्याच्या तांतडीमुळें यंदा परीक्षक मंडळानें मामूल वहिवाटीप्रमाणें चारचार विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याऐवजीं आठआठांच्या परीक्षा घेण्याचा नवीनच उपक्रम अमलांत आणला होता. शिवाय परीक्षा घेण्यालाहि बऱ्याच आधीं सुरवात केली होती. या दोन्हीं गोष्टींमुळ विद्यार्थीवर्गांत असंतोषाचा वणवा पेटला. व त्यानीं परीक्षकांची रग जिरविण्यासाठीं एक कट–अर्थात गुप्त तयार करून, त्यानें परीक्षक मंडळाच्या अध्यक्षांसच 'लांबविलें'! तीन चार दिवसपर्यंत त्या कटानें अध्यक्षांचा पत्ताच लागूं दिला नाहीं. अखेर पोलीसानीं 'चोरीस गेलेला माल' मोठ्या शहाणपणानें 'उघडकीस' आणला व कटवाल्यांस कोर्टाच्या स्वाधीन केलें. खटल्याचा शेवट कसा होईल तो होवो, पण वरील एकंदर प्रकारावरून गुरुशिष्यांचें नातें, इतर अनेक नात्यांप्रमाणेंच युरोपांत गोते खात आहे, हें उघड होत नाहीं काय?

—श्री सरस्वती विद्यालय वेलिंग या संस्थे मार्फत ता. १२।२।२५ रोजीं साधुवर्य श्री नरहरी महाराज यांची पुण्यतिथी श्री. रामकृष्ण शिवराम तळवडेकर वकील रत्नागिरी यांच्या अध्यक्षतेखालीं साजरी करण्यांत आली होती.

—अमेरिकेंत २० लक्ष डॉलरचें सोनें हिंदुस्थानांत पाठविण्याचें ठरलें आहे. सोनें थोडें स्वस्त होणार तर.

वर्तमानसार

—ह्मापशें येथील मुनिसिपालटीनें गोमांस विक्रीची जागा मासळी मार्कीटाला व भाजी मार्कीटाला अगदीं भिडवून ठेवण्याचें ठरविलें असून, तदनुसार बांधकाम चालू आहे!

—भंडारी ज्ञातींतील गेल्या एक दोन वर्षांपूर्वीं उपस्थित झालेलें चांभार प्रकरण चालू लग्नसराईंत पुन्हां डोकावून पहात आहे. धर्मगुरू किंवा त्यांचे प्रतिनिधि या बाबतींत पूर्ण शांतता करायला कां असमर्थ आहेत हें कळत नाहीं. प्रकरण धार्मिक स्वरूपाचें असलें तरी समाज शांततेकरितां सरकारला यांत हात घालण्याचा प्रसंग न आला ह्मणजे पुरे.

—ह्मापशें येथें गौड सारस्वत ब्रह्मवृन्दांकडून श्री लक्ष्मीनारायणाच्या बांधण्यांत येत असलेल्या देवालयाचें काम जवळ जवळ अर्धें होत आलें असून पुरें व्हावयाला उदार भाविक धनिकांच्या मदतीची अपेक्षा आहे.

—विलायतेंतल्या शिक्षणासाठीं द्यावयाच्या शिष्यवृत्तींत हिंदूंना एक चतुर्थांश दिलाच पाहिजे असें निजाम सरकारनें ठरविलें आहे.

—बेंगळूर येथील एका सोल्जरानें दुसऱ्याचीं बनावट सही करून पोस्टाच्या सेव्हिंग बंकेंतून १५० रूपये उपटिले व दुसऱ्या सोल्जरानें त्यास मदत केली याबद्दल मद्रास हायकोर्टनें त्या दोघांस अनुक्रमें १८ महिन्यांची व १२ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा दिली. इंग्रजांचीहि दानत १५० रुपये किंमतीपर्यंत खालीं उतरली काय?

—महाराष्ट्र पत्रावरील कटोलच्या तहशीलदारांच्या अब्रू नुकसानीबद्दल १५००० रुपयांच्या दिवाणी दाव्यास गेल्या गुरुवारापासून सुरुवात झाली आहे.

—बहार प्रांताचे माजी दिवाण श्री. मधुसूदन दास यांची कन्या कुमारी शैलाबाई दास यांना पाटणा जिल्ह्यांत ३ ऱ्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटचे तीन वर्षांच्या मुदतीनें अधिकार देण्यांत आले आहेत.

—पुणें येथें जनी नांवाच्या एका बाईनें आपल्या नवऱ्याला भाकरींतून कांचेचे तुकडे दिल्याबद्दल, तिच्यावर खटला होऊन १ वर्ष सक्तमजुरीची शिक्षा झाली!

—लाहोरच्या स्टँडर्ड ब्यांकेचे मॅनेजिंग डायरेक्टर सरदार किसनसिंग यांनीं बँकेच्या २ लाख रुपयांची अफरातफर केल्याबद्दल, पकडण्यांत आलें आहे.

—रशियाच्या तुरुंगांत सध्या ९० हजार राजकीय कैदी असून त्यांपैकीं ८९ हजार कैद्यांनां चौकशीशिवाय तुरुंगांत टाकलें असल्याचें समजतें! मग चौकशीशिवाय केवळ ६६ लोकच तुरुंगांत टाकिलेल्या आमच्या बंगाल सरकारला काय ह्मणून नांव ठेवावयाचें!

—तुर्कस्थाननें मँचेस्टरला कापसाचे १ लक्ष गठ्ठे पाठविण्याचें ठरविलें असून त्यांपैकीं १००० गठ्ठे मँचेस्टरला जाऊन पडले! हिंदी कापसापेक्षां तुर्की कापूसच बरा असें तिकडील लोक ह्मणतात.

—जर्मनीच्या राजकारणांत माजी जर्मन युवराजांचें प्रस्थ माजत चाललें आहे व त्याला उठावणी देणाऱ्यांत मेजर मुलीनेर यासारखेहि कांहीं प्रसिद्ध पुढारी आहेत.

—नेपाळच्या महाराजांची त्यांनी गुलामगिरी बंद करण्यासाठीं जाहीर विनंति केल्याबद्दल, ब्रिटनमधील वृत्तपत्रें प्रशंसा करीत आहेत.

Ano 9 N. 49

Quinta-feira 5 de Março de 1925

ASSINATURA
Por cada ano tres rupias

ANUNCIOS
...inha ainda que repetida uma tanga
...mero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत

BHARAT

वर्ष ९ वें. अंक ४९

गुरुवार ता. ५ मार्च सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे देसाई
केपें–गोवा

O "CONSEGUE-TUDO"

Nós o conhecemos, conhecem-no os poderosos, conhece-o toda a gente. Humilha-se perante os grandes. Curva-se gentil perante todo o mundo.

O que faz? Qual é o seu modo de vida? Pode ser que exerça uma funcção ou oficio qualquer. Isto, porem, não passa de um ornamento, um mero pretexto, uma simples taboleta. A sua verdadeira ocupação é outra.

Ele é ignorante; mas astuto. Ele não tem cultura; mas possui uma meia duzia de vocabulos e frases em portugues. E com este arsenal ele governa tão bem e com tanta habilidade que è, sem faver, um triunfador! Os grandes não lhe regateam a mão. Os outros tiram-lhe o chapeu! Qual o segredo de sua nulidade triunfante? E' nada para ele—que é um anormal. E' o impossivel para outros dotados de noção de honra e dignidade. Sim, o seu segredo é a audacia e a sem-vergonha.

Foi nomeado F. Vem ocupar uma situação de distaque na Colonia. Lá está ele a procurar saber a hora em que Sua Excia chega, o lugar onde desembarca. E, solicito, lá está no caís de Alfandega ou da Navegação o nosso homem, á espera do *grande*. O *grande* desce e passa de alto sem olhar por ele. Tira o seu chapeu e não desanima. Amanhã fica aguardando o *grande* á porta da Secretaria ou da Repartição que vai dirigir. Sua Ecia vem. Sua Excia vai entrando. O nosso homem tira o chapeu. Sua Excia leva a mão ao chapeu—por mera delicadeza.

Está dado o primeiro passo no caminho da conquista. Vem depois o segundo, logo o terceiro. Um dia, por mero esquecimento, alem da chapelada, dá ao nosso homem *a sua elevada mão* e sorri.

Está o sucesso garantido mas não completo. Dias depois, o nosso homem cumprimenta Sua Excia e anda ao lado dêle alguns passos pela cidade. E' o dia da victoria para o nosso homem. E' o conquistador. Mas conquistador sempre supõe uma conquista e um conquistado. No caso, quem é conquistado? E' Sua Excia? Enganam-se. E' o provinciano! E a conquistada é algibeira do pobre diabo.

Todos sabem, nosso homem melhor do que ninguem, que quem vem da aldeia para Capital, vem com alguma pretenção. Uns querem emprego, outros um despacho, certos uma licença... em fim todos tem uma dependencia neste ou naquele ramo da administração. O nosso homem—que fez a conquista — não poupa a ocasião de falar com Sua Excia na rua, entrar de quando em vez no seu gobinete, postar-se mesmo á janela do mesmo — que o parvo veja, verifique e admire —E depois é ali que consegue todos os empregos, todos os despachos, todas as resoluções que dependem de Sua Excia Todas, sim. Se êle num litigio patrocina a causa de ambos litigantes?!!

E Sua Excia ingenuamente o atura supondo que é ele, apenas, um pobre diabo que lhe maça a paciencia.

E, agora, é natural que alguem queira saber quem é ele. Ele é o *Consegue-tudo*. Hoje será uma trivialdade. Amanhã —se fôr tolerado— converter-se-há numa legião.

Ao veio do tempo...

Prosseguindo nas nossas considerações em volta das cerebrinas opiniões do sr. Sebàstião de Figueiredo, naturalmente, temos que coucluir a refutação que ficou em meio, pois, ela dá ainda para mangas...

Quanto aos erros assacados a Gandhi de alturas descomunais dum Himalaia, temos que repetir mais uma vez que se não fôsse a sua sublime doutrina de não violencia e do sacrificio de si proprio consequencias mais funestas ainda teriamos que lamentar, contratempos mais insúperaveis se antolhariam e a deteriam no caminho.

Se o ideal de Gandhi fôsse outro que nao êsse, quando ele foi preso, todo o povo da India como um só homem esbravejaria de indignação, despedaçaria com plena certeza, as grades da sua prisão. E muitos mortos e feridos e poças de sangue seria a consequencia, triste e fatal deste acontecimento. Pois, o seu poder de seduçao sobre o povo indiano é fenomenal, colossal. Só o pode ignorar ou fingir ignorar quem ande obcecado pelas idêas ministradas, em pilulas amargas, dificeis de engulir, pelos orgãos da opinião britanica. Dizer em frases balôfas e sem apoio na Verdade, que o poder e a supremacia de Gandhi decresceram é léria, é mentira. A sua figura espiritual, apostolica, até hoje, gosa duma influencia extraordinaria. Quem sabe o que será para o futuro?

Prevendo que ia ser preso, Gandhi escreveu para o seu *Young India*, um magistral artigo que é uma sentida evocação do seu amor pela India e uma salutar lição aos vindouros: naquelas linhas, breves mas eloquentissimas, exorta e aconselha os seus conterraneos a não perderem o sangue frio nas circunstancias as mais criticas, as mais tremendas: a serenidade é a melhor arma para enfrentar os mais imprevistos acidentes. Vem, por ultimo, a resposta, a sua ultima afirmação que ficou em branco de que a India não podia ser independente da Inglaterra.

Os nossos leitores podem, perfeitamente, fazer uma idea nitida e precisa dos contrasensos em que o sr. S. de Figueiredo vai deslisando. E' um ponto mais que assente que a campanha nacionalista de Gandhi não é anti-Inglaterra, as suas sêtas pacificas não se dirigem à Inglaterra mas á Europa inteira que está a desagregar se a olhos vistos.

Se a India pode ser independente á ilharga da Grã-Bretanha não percebemos como não poderá sê-lo sobre si, sem mais apendice de especie alguma.

A necessidade e a urgencia de se conceder independencia a India foi já, larga e elogiosamente abonada por homens de mais rara envergadura. Henri Cotton escreveu: "Homens que falam o ingles melhor que muitos ingleses, que leem Mill e Comte, Max Muller e Maine, que ocupam um lugar no tribunal judicial, que administram os negocios dos Estados indigenas de muitos milhões de habitantes, que gerem as fabricas de algodão e dirigem as mais complicadas operações do comercio, que redigem jornais em inglez e se correspondem em perfeita igualdade com os escritores da Europa— não podem ser tratados como raça inferior"

Citar outras opiniões que

"स्त्रीशिक्षण"

(ले:— दिलशाद सैयाद.)

शिक्षण हा शब्द शिक्ष् ह्या धातूवरून झाला आहे. स्त्रीशिक्षण ह्मणजे स्त्रियांना जें शिकविलें पाहिजे तें आपल्या देशांत काय किंवा परदेशांत काय, स्त्रियांना शिक्षण द्यावें किंवा नाहीं व दिल्यास कशा प्रकारचें द्यावें याबद्दलचा वाद पुष्कळ दिवसांपासून चालला आहे. त्याचा निकाल लागेल तेव्हां खरें. सध्याच्या काळांत पाश्चात्य देशांत स्त्रियांना व पुरुषांना समसमान शिक्षण देण्यांत येत आहे. व आपल्या देशांत त्यांचेंच अनुकरण करण्याची रीत पडल्यामुळें आपल्याकडेहि स्त्रियांना व पुरुषांना जवळ जवळ सारखेंच शिक्षण देण्यांत येत आहे. त्या शिक्षणापासून किती फायदे होतात व किती तोटे होतात याबद्दल निरनिराळ्य लोकांचीं निरनिराळीं मतें आहेत. परंतु तसल्या शिक्षणानें कितीहि भयंकर तोटे होत असले तरी त्यांत फरक करणें आपल्या हातीं नसल्यानें आपल्या स्त्रियांना व मुलींना पाश्चात्य पद्धतीचेंच शिक्षण द्यावें लागतें. ही एकंदर आपल्या देशांतील शिक्षणाची स्थिति आहे. असो. ह्या स्त्रीशिक्षणावर माझ्या अल्प मतीला सुचलेले कांहीं विचार ह्या निबंधांत लिहीत आहें.

अगदीं प्राचीन काळीं आपल्या देशांतील स्त्रिया साध्वी, विद्वान ह्मणून प्रसिद्धीस आल्या होत्या. ह्याचें मुख्य कारण ह्मणजे त्यावेळीं त्यांना मिळणारें योग्य शिक्षण त्या वेळच्या आपल्या स्त्रियांना आपल्या घरचा व्यवहार जाणण्यापुरतें शिक्षण देण्यांत येत होतें. त्यावेळीं त्यांना गृहशिक्षण, पोथ्यापुराणें वाचण्याइतकें लिहिणें वाचणें, हिशेब ठेवण्यापुरतें गणीत इत्यादि शिकवीत असत. तें शिकावयास त्यांना शाळेंत जावें लागत नसे. त्यांच्या मातांनीं त्यांच्या आत्मवृक्षाला उत्तम शिक्षणाचें अन्न व सद्विचारांचें अमृत पाजल्यामुळेंच त्या इतक्या प्रसिद्धीस आल्या. त्यांना योग्य तें शिक्षण मिळाल्यामुळें त्या स्वावलंबी, धाडशी, साध्वी, सुविचारी, गृहकृत्यांत निपूण अशा बनल्या. त्यांनीं आपल्या बालकांना उत्तम शिक्षण देण्याचें सामर्थ्य आपणांमध्यें आणिलें. त्यांनीं आपली गृहव्यवस्था नीट ठेविली. त्यांची मनें सुविचारांनीं प्रगल्भदशेस पोंचल्यामुळें त्यांनीं आपल्या बालकांस सुविचारांचें बाळकडू पाजिलें. "ज्यानें त्यानें आपणां स्वतःस सुधारण्याचा प्रयत्न केला कीं, जग सुधारेल" असें ह्मटलें आहे, त्याप्रमाणें त्याकाळच्या स्त्रियांनीं आपणां स्वतःस सुधारण्याचा प्रयत्न करून आपला देश भरभराटीस आणला. ही त्यावेळची शिक्षणाची स्थिति झाली.

आतां आपण मध्यकालीन स्त्रीशिक्षणाची स्थिति पाहूं. त्यावेळीं हिंदुस्थानावर परकीयांच्या स्वाऱ्या होत असल्याकारणानें, आपल्या स्त्रियांस घरीं बसून रहावें लागत असे, ह्मणून स्त्रियांना शिक्षण घेतां येत नसे. ज्या कांहीं स्त्रिया शिक्षण घेत असत, त्यांनाहि चांगलें शिक्षण मिळत नसे. घरींच बसून शिवणें, टिपणें वगैरे कामें करावीं लागत असत. बाहेरचें शिक्षण त्यांना मुळींच मिळत नसे. त्यामुळें पुनः आपला देश अवनतीस पोंचूं लागला. त्यावेळच्या पुरुषांस उत्तम शिक्षण मिळत होतें, तरी संसार शकटाचीं दोन्हीं चक्रें सारखीं असलीं तरच तो नीट चालतो. ह्याचा अर्थ स्त्रियांना व पुरुषांना सारखेंच शिक्षण द्यावयास पाहिजे असा नव्हे. तर पुरुषांना व स्त्रियांना जें योग्य असेल तें शिक्षण दिलें तर शकट नीट चालेल, व उन्नतीच्या डोंगराच्या शिखरावर जाईल. परंतु एक चक्र मोठें व एक लहान असें असलें ह्मणजे पुरुष सुशिक्षित व स्त्री अशिक्षित तर शकट अवनतीच्या खोल दरींत जाऊन पडेल ह्मणून स्त्री ही केव्हांहि सुशिक्षित असलीच पाहिजे. असो. त्याकाळीं योग्य तें तर दूरच राहो. पण कसलेंहि शिक्षण न मिळाल्यामुळें त्या परावलंबी, भित्र्या बनल्या. त्यांच्यांतील आपल्या बालकांना चांगलें शिक्षण देण्याचें सामर्थ्य नाहींसें झालें; त्यांच्या मनामध्यें कुविचारांचें प्राबल्य सुरू झालें; त्यांना बाहेरच्या जगाविषयीं कांहींच ज्ञान न मिळाल्यामुळें त्या व्यवहारांत फसूं लागल्या. आपल्या देशाविषयीं त्यांना कांहींच अभिमान वाटेनासा झाला. आपलें राष्ट्र ह्मणजे काय हें सुद्धां त्यांना समजेना. त्यावेळची त्या स्त्रियांची दुःस्थिति फारच भयंकर! ह्या स्त्रिया अशा सर्व बाजूंनीं दुर्बल बनल्यामुळें, "जैशी माता तैशीं बाळें" ह्याप्रमाणें त्यांचीं बालकेंहि त्यांच्याचप्रमाणें दुर्बल बनूं लागलीं, व असें होतां होत त्यांच्या पुढील पिढ्या अवनतीस पोंचल्या. इतकी त्यांची स्थिति झाल्यावर कांहीं वर्षांनीं थोड्या फार स्त्रियांना शिक्षण घेण्याची आवड उत्पन्न झाली. परंतु त्या जुन्या काळच्या जुन्या स्त्रियांच्या मनांमध्यें जो कांहीं शिक्षणासंबंधानें तिटकारा उत्पन्न झाला होता, त्यामुळें त्या स्त्रियांना शिक्षण घेण्यास फारच त्रास होऊं लागला. असो. आतां आपण हल्लींच्या शिक्षणाविषयीं विचार करूं.

हल्लींचें शिक्षण सर्व पाश्चात्य पद्धतीचें. मुलींला थोडेंसें इंग्लिश आलें कीं झालें. मग तिला गृहकृत्यें न कां येइनात? तिला सुविचारांचें वळण न कां लागेना? तिचें शील सुशील न कां बनेना? तिला इंग्लिश आलें कीं झालें. ती सर्वगुण संपन्न बनली अशी वेडी समजूत झालेली. सध्या जरी मुली शिकतात, तरी त्यांना योग्य तें शिक्षण तर मिळत नाहींच, परंतु भलतेंच अयोग्य शिक्षण मात्र मिळतें. त्यामुळें ज्या जुन्या काळच्या स्त्रिया असतात, त्यांना असें वाटतें कीं, मुली शाळेंत जाऊं लागल्या कीं, उद्दट बनतात. त्या शिक्षणामुळें मुलींना गृहशिक्षणाची यत्किंचित्‌हि माहिती होत नाहीं, त्या दांडग्या बनतात.व त्यांना फार गर्व झालेला असतो. "अल्प ज्ञान परि गर्व शिरोमणी" अशी त्यांची स्थिति झालेली असते. त्यांना स्वावलंबनाचें तर वारेंहि लागलेलें नसतें. त्या पाश्चात्य लोकांचें सर्व गोष्टींत अनुकरण करतात. त्यांना इतकें शिक्षण मिळ लेलें असतें तरी त्यांत देशाभिमानाचा लवलेशहि नसल्यामुळें मुलींना त्याचें नांवहि ठाऊक नसतें. आपल्या देशांत सध्या काय चाललें आहे, दयाळु सरकारानें (?) चालविलेला जुलूम कसा जाचक होत आहे ह्याची तर त्यांना कल्पना सुद्धां नसते. त्यांना त्या शिक्षणापासून फायदे न होतां उलट तोटेच होत असतात.

आतां आपण स्त्रिशिक्षणाविषयीं इतर लोकांचें काय मत आहे ह्याकडे दृष्टि फेंकूं. पहिल्या मताचे लोक ह्मणतात, स्त्रियांना शिक्षण मुळींच नको. स्त्रियांना शिक्षण दिल्यामुळें त्या उद्दट बनतात. व त्यांची संसारांतील गोडी जाऊन त्या मुलांप्रमाणें स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करतात. आपल्या देशांतील पूर्वीच्या स्त्रियांना शिक्षण देत नसत ह्मणून त्या इतक्या प्रसिद्धीस आल्या आहेत. शिक्षणानें स्त्रिया पाश्चात्य स्त्रियांप्रमाणें निरनिराळे चाळे करूं लागतात. स्त्रियांना शिक्षण घेऊन नोकऱ्या कां करावयाच्या आहेत! त्या नोकऱ्या करूं लागल्यावर पुरुषांनीं भाकऱ्या भाजीत बसलें पाहिजे. दुसरा वर्ग स्त्रियांना सर्व पाश्चात्य पद्धतीचें शिक्षण द्यावें ह्मणणारांचा. ते ह्मणतातः पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणानें स्त्रिया स्वतंत्र, धाडशी, व स्वावलंबनी बनतात. ते ह्मणतात कीं, मुलांचा व मुलींचा पक्षपात कां असावा? शिक्षण दिल्यानें स्त्रियांचें पुरुषांशिवाय अडत नाहीं. वेळ पडली तर ह्मणजे स्त्रिया जास्त शिकलेल्या असल्या तर पुरुषांनींहि भाकऱ्या भाजाव्या. तिसरा वर्ग स्त्रियांना जें योग्य तें शिक्षण द्यावें असें ह्मणणाऱ्यांचा. स्त्रियांना प्रथम गृहशिक्षण द्यावें. व नंतर त्यांना व्यवहारापुरतें शिक्षण द्यावें. जास्त शिकून स्वतंत्र होऊं इच्छिणारांस अडथळा करूं नये व शिकण्याची आवड नसणारांवर जुलूम करूं नये ह्यावरून पहिल्या वर्गाचें ह्मणणें जितकें मूर्खपणाचें आहे तितकेंच दुसऱ्या वर्गाचेंहि आहे. तिसऱ्या वर्गाचेंच ह्मणणें जास्त संयुक्तिक आहे.

एखाद्या स्त्रिला जर लिहितां वाचतां येत नसेल तर तिचे किती हाल होतात हें आपण नेहमीं पहातोंच. व अशा तऱ्हेच्या स्त्रिया आपल्या समाजांत पुष्कळ आहेत. त्यांना शिक्षणाची खरोखरीच जरूरी आहे. परंतु तें शिक्षण अशा तऱ्हेचें असलें पाहिजे कीं, त्यापासून पदोपदीं फायदा झाला पाहिजे. स्त्रियांना मुख्य गोष्ट ह्मणजे गृहशिक्षण अवश्य पाहिजे. हल्लींच्या कांहीं मुलींना स्वयंपाक सुद्धां करतां येत नाहीं. त्यांना देशाभिमान, स्वावलंबन, शालीनता, ऐक्यता वगैरेचें शिक्षण दिलें पाहिजे. ह्या सर्व तऱ्हेचें शिक्षण हल्लीं ठिकठिकाणीं उघडण्यांत आलेल्या राष्ट्रीय शाळेंत मिळतें. प्रत्येक मुलीला सुशील बनविणें हें तेथील आद्यकर्तव्य होय. त्यानंतर तेथें मातृभाषेचें उत्तम ज्ञान दिलें जातें. हल्लींच्या मुलींना कोठल्याहि वाक्यामध्यें एखादा इंग्लिश शब्द घातल्याशिवाय बोलतांच येत नाहीं. ह्यामुळें मराठी भाषेचें फार नुकसान होत आहे. राष्ट्रीय शाळांतून मातृभाषेचें संपूर्ण ज्ञान, खरा इतिहास व धर्माची खरी व उत्तम माहिती देण्यांत येते. इतिहासापासून पूर्वीच्या सर्व गोष्टी कळतात व धर्मापासून आपली आत्मिक उन्नति कशी करावी हें समजतें. किती शिकविणें हीहि एक तेथील महत्वाची गोष्ट होय. ह्यानंतर सध्याच्या काळांत सूत काढणें व कापड विणणें ह्या गोष्टी प्रत्येक स्त्रिला व मुलीला यावयास पाहिजेत. ह्याहि गोष्टी राष्ट्रीय शाळेंत शिकविल्या जातात. हें शिक्षण घेतानां कितीहि त्रास पडला तरी तो सहन केलाच पाहिजे. वर सांगितलेलें राष्ट्रीय शिक्षण जर स्त्रीशिक्षण होईल तर लौकरच आपल्या स्त्रियांमध्यें कै० डॉ० आनंदीबाई जोशी, कै० रमाबाई रानडे ह्यांसारख्या स्त्रिया निर्माण होतील. व आपल्या राष्ट्र शकटास दोन्हीं चक्रें समतोल मिळून तो सरळ मार्गानें लौकरच उन्नतीच्या डोंगरावर चढूं लागेल. वाचक हो, हे जे विचार लिहिले आहेत, त्याचा आपण अल्पबहु फायदा करून घ्याल अशी आशा आहे.

नोटीस

नं.–२००

प्रागतिक संघाचा १९२४ सालाचा एकंदर व्यवहार पुरा करण्याकरितां या नोटीशीच्या द्वारें संघाच्या महाल कमिट्यांस व इतर प्रचारकांस विनंति करण्यांत येत आहे कीं, त्यानीं केलेल्या कामाचा आढावा, तसेंच सभासदांचे प्रतिज्ञा लेख पावत्या पुस्तकें व त्यांच्याकडे झालेला वसूल तां. ३१ मार्चपर्यंत संघाच्या सेक्रेटरीकडे पाठविण्याची मेहेरबानी करावी. पावत्याचीं पुस्तकें तपासल्यानंतर परत करण्यांत येतील व कामाचा आढावा प्रसिद्ध केला जाईल

पणजी–प्रागतिक संघाची कचेरी

ता.१ मार्च सन १९२५

संमत-अध्यक्ष — बाळकृष्ण दत्ताराम
आत्माराम गो. बोरकर. — साखरदांडे
से. प्रा. सं. का. मंडळ

॥ श्रीग्रहरूपिणेनमः ॥

जन्मकुंडली अगर नक्की जन्मवेळ पाठविली असतां साऱ्या आयुष्यातील महत्वाच्या गोष्टींचें विवेचन व हयातीपर्यंतचें स्थूल भविष्य आणि ५ वर्षांचें निरनिराळें प्रत्येक वर्षांत घडणाऱ्या महत्वाच्या गोष्टीचें व भाग्योदय काळ व अनिष्ट काळाचें भविष्य वर्तविलेली पत्रिका ६॥ रुपयांच्या व्ही. पी. नें पाठवूं. दशा स्पष्ट केलेलें जन्म टिपण ८ आणे.

रामचंद्र लक्ष्मण प्रभु गांवकर.
मु. लोलियें पो० काणकोण–गोवा.

—डॉ० जाइम द मोराइस हे येत्या महिन्याच्या ६ व्या तारखेस निजधामास जाणार असल्याची बदंता आहे. ही तरी बातमी खरी कां?

Ano 9 N. 50

[illegible]feira 12 de Março de 1925

[illegible]NATURA
[illegible] tres rupias
Por cada linha [illegible] uma tanga
Numero [illegible]

DIRECTOR E E[illegible]
G P. Hegdo Dessay
Quepem-Goa

भारत.

BHARAT.

वर्ष ९ वें. अंक ५०

गुरुवार ता. १२ मार्च सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगंड दसाई

NA MESMA...

O ilustre bacharel sr. dr. S. Rau, defendendo as considerações expendidas no seu artigo sobre a *Politica Hindú*, publicado no jornal europeu— *A Provincia*, artigo que notulamos com ligeiros e fugitivos reparos, dá-nos a grata noticia de que *conhece bem qual deveria ser a orientação politica dos jornais hindús e qual a aspiração dos jovens ou velhos hindús*, porisso que Sua Excia não emprega todo o seu tempo em estudar apenas processos e resolver os mais intrincados problemas juridicos, mas utilisa tambem de hores vagas para *acompanhar a politica geral do paiz* da qual *não está excluida a politica hindú*.

E', sim, grata a noticia que o sr. dr. Rau estampa no jornal de sua predilecção; mas sentimos dizer-lhe que ela não pode constituir uma defesa tão forte que o desembarace da séria entalação em que a extemporaneidade da sua prosa o envolveu.

¿Ignora, porventura, o nosso contendor que *acompanhar uma coisa não significa estuda-la* e que *sem estudar uma coisa não ha maneira de conhece-la?*

O sr. dr. Rau acompanha a politica geral do paiz? Não se segue, porem, dai que Sua Exa pôi a sua inteligencia ao serviço do *estudo*, portanto, do *conhecimento profundo* dela.

E depois, o conhecimento da politica geral não abrange, em regra, *o conhecimento profundo* da politica particular que no caso é a politica hiudú, conquanto êle compreenda uma *tintura incidental* ou *superficial* da mesma politica particular.

Nunca afirmamos ser ao dr. Rau *indiferente* a prosperidade ou a decadencia da classe hindú. O que dissemos e continuamos a substentar é que o digno magistrado não conhece a politica hindú, por andar atarefado sempre no exercicio de suas funcções oficiais.

Quanto ao testimunho que cita em sua defeza—a opinião do nosso colega *Luz do Oriente*, só temos a frisar-lhe, alto e bom som, que tal testimunho não nos vale nem caracol, promanado como o foi duma entidade semioficial, *autoridade* que o *Bharat* apreciou em tempo, devidamente.

Lembra-nos o sr. dr. Rau que o director do *Bharat* não deve esquecer-se de que é cidadão portuguez.

Mas ¿ que tem a sua qualidade de cidadão partuguez com a atitude abstencionista e desfavoravel nas festas do centenario do Gama?

¿ Entende, acaso, Sua Excia. que o director do *Bharat* pelo facto de ser cidadão portuguez deve defender *incondicionalmente* tudo o que seja portuguez, abdicando o direito da critica e abstendo-se de tomar conhecimento das historicas *barbaridades* lusitanas?

Se sim, engana-se redondamente. ¿ O sr. Rau não leu o que escreveu a proposito do Gama o jornal *A Batalha* de Lisbôa, redigido pelos insuspeitos cidadãos portuguezes de Portugal? Pois *A Batalha* aprecia da seguinte forma a personalidade historica do Gama:

"Vasco da Gama foi um pirata—um dos muitos piratas de que está cheia a historia dos portugueses, dos hespanhoes, dos holandezes.

Ele descobriu o caminho maritimo pära a India não por amor á humanidade, não pela anciedade do incognito, do misterio fabuloso.

Ao contrario...

Seu heroismo, como o da maioria dos navegadores de antanho, provinha duma idéa baixa— a ambição, a rapacidade.

Ah! Se pudessem falar os espectros dos Samorins que os descobridores portuguezes expoliaram e massacraram!

A flamula de suas caravelas não representava um ideal belo mas sim tres elementos de servidão e de ampliação: Deus Patria e Rei."

A Batalha
(Dezembro de 1924)

¿ Que diz a isso o distincto colaborador de *A Provincia*?

Não diz nada, limitando-se apenas a, escandalisado e talvez horrorisado, pôr dedo na bôca.

E saiba o sr. dr. Rau que não consta ter a *Batalha* sido processada pela sua atitude *sediciosa* e *revolucionaria* contra um heroi que pertenceu á sua raça.

Já vê, portanto, o antigo editor do extincto jornal *Opinião Hindú* que com o seu reaparecimento na imprensa perdeu uma bôa ocasião de estar calado.

Quanto ao convite que nos faz, para transcrevermos da *O. H.* e *Chitacarxana tudo o que for contrario ás afirmações contidas no seu artigo*, aceitamo-lo, prometendo-lhe dar, *serenamente*, conta do *recado*, logo que tenhamos à mão as colecções das mesmas publicações que já solicitamos.

ECOS & CRITICA

O SR. BRAZ EM SCENA

O sr. Braz da Costa que esta' habituado a considerar o Hospicio como feudo seu, do sr, Bernardino da Costa e Cia, fica aterrorisado com a idea de ter de deixa—lo algum dia.

Eis a razao por que receando que se lhe escapasse da mao a *gamela*, nao se dedignou por ao serviço desta o seu *Ultramar* no qual, de lança em riste, pretendeu quixotescamente criar uma falsa atmosfera de antipatias em volta do integro magistrado sr. dr. Brito Santos, tendo ate' chegado o seu atrevimento a' culminancia de o apodar de falho de serenidade.

Ora, o sr. Costa devia ser o ultimo falar na deficiencia de *serenidade* e outras *dades virtuosas* nos outros, ele que tem a sua portentosa personalidade so' repleta de *maldade, inimisade, hostilidade, perversidade, vacuidade, indignidade* e outras *dades* que nascem do estomago insatisfeito.

Pode faltar serenidade ao sr. dr Brito Santos? Mas diga la', sr. Costa; ¿ Supoe que a serenidade e' qualquer coisa parecida com o resto de *beefes, neurios* e *ladu's* que come aos seus constituintes bogais e simplorios?

Engana-se entao. E creia que nao e' dado conhecer a SERENIDADE a quem durante toda a sua vida politica e privada nao contraiu outra MANIA se nao a de encher o papo, PER FAS ET NEFAS...ora intrujando o governo ora enganando o povo.

O meio em que nos agitamos e' pequeno e todos se conhecem maravilhosamente.

¿ Que valor tera' nestas condiçoes a farça do sr. Braz da Costa?

FEIRA EM DABAL

A aldeia de Dabal conquanto tradicionalmente assaz conhecida e votada em grande parte a pouco desvelo da parte das autoridades dirigentes, se ve hoje, graças ao natural iufluxo do progresso e dispertar geral, no relativo grau de aperfeiçoamento que lhe nao permite em grande parte deixar-se arrastar a's antigas e tacanhas peias como e' natural.

Varias circunstancias felizes para esta aldeia, sobretudo a louvavel iniciativa da Camara *Municipal* do Concelho de Sanguem, da presidencia

कायदेभंग करा

(ले:— मुक्त.)

स्नेहं दयां तथा सौख्यमपि वा जानकीमपि ।
आराधनाय लोकस्य मुंचतो नास्तिमे व्यथा ॥
उत्तररामचरीत्

'कायदेभंग करा' आणि तो काय ह्मणून? वरील मथळा वाचून कित्येक जनांशीं नाहीं तरी आपल्या मनाशीं साश्चर्य प्रश्न विचारण्याचा संभव आहे. एकतंत्रीय राजकीय सत्तेच्या तुफानीं वाऱ्यांतून मुक्त होऊन जीनें प्रशांत व गंभीर प्रजासत्ताक पद्धतीच्या महासागरांत प्रवेश केला आहे आणि जीवर स्वयंनिर्णय पद्धतीचें सोज्वल किरण पसरल्याचा भास होत आहे, त्या गोमांतकीय नौकेंतील जनतेपुढें 'कायदेभंग करा' असें ह्मणणें किती मूर्खपणाचें व धाष्टर्याचें आहे? हे शब्द मूर्खपणाचे किंवा धाष्टर्याचे आहेत असेंहि कोणाला वाटो, पण ते शब्द आह्मीं स्वयंस्फूर्तीनें उच्चारीत आहों, अशांतला मात्र भाग नाहीं. हे शब्द आह्माला बोलायाला, लिहायाला आणि लोकानां सांगावयाला सुचविलेले आहेत, त्याप्रमाणें आमचें आह्मीं कर्तव्य करीत आहोंत.

प्रस्तुतच्या राजकीय घडामोडी व व्यवस्था पाहिली ह्मणजे आह्मीं कोणत्या पद्धतीच्या राष्टात आहों याचें भान रहात नाहीं. धड एकतंत्री सत्ता नाहीं, नाधड लोकसत्ताक राज्य नाधड न्याय तर कायदे, अंमल बजावणीहि धड नाहीं, अशा कोणत्याशा राष्टात आह्मीं जीवन कंठीत आहोंत. या पद्धतीला 'झोटींग पाच्छाई' असें जरी स्पष्ट ह्मणतां येत नाहीं तरी असें ह्मणतां येतें कीं जेथें जातों तेथें हत्तीसुद्धा जातो, नाहीं तेथें मुंगीचासुद्धां शिरकाव होत नाहीं. अशा तऱ्हेची ही एक पद्धत आहे. एक राजरोस दुसऱ्याच्या घरांवर नाहक कुर्‍हीं चढवून स्वतःचा तळीराम गार करून घेत असतो तर आपण बरा व आपलें काम बरें असें ह्मणुन वागणारा सर्दहि नागविला जातो. या सर्वांच्या मुळाशीं पाहूं गेलें तर आह्माला एकच तत्व आढळून येतें. व तें आमच्यातील 'राष्टीयत्वाभाव' हें होय. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं. अशा प्रकारच्या व्यवस्थेनें जनतेंत असावयास पाहिजे असलेली राष्टीय भावना इचा येथून अस्त झालेला असल्यामुळें आह्मीं कोण हें आह्मींच स्वतः विसरून गेलेले आहोंत. आमची जन्मभूमि, आमची अन्नदाती भूमि, आमचे बांधव या सर्वांना आह्मी विसरून गेलेलों असल्यामुळें सत्ताधाऱ्यानीं आमचें अस्तित्वहि क्षुल्लक मानल्यास त्याचा दोष कोणाकडे?

या दृष्टीनें आमच्यापेक्षां आमच्या ख्रिश्चन बंधूंचें अधिक अधःपतन झालेलें आहे. आज हिंदूंतील हिंदुत्व कायम राहून नुसतें चैतन्यच अव्यक्त असलेलें दिसतें तर आमचे किरिस्ताव लोक, धर्म व चैतन्य ही दोन्हीं घालवून बसले आहेत. आपल्या तीन चार शतकांपूर्वीच्या पूर्व स्थितीकडे यांनीं नजर फेंकून तें दृष्य अवलोकन करावें अशी आमची त्यानां आग्रहाची विनंति आहे. आयावहिणीवर झालेले अत्याचार, दोरखंडाप्रमाणें रहाटावर ताणणें, तप्त तव्यावर उभें करणें, हात, पाय, जीभ इत्यादि फक्त अवयव जीवंत असतां छाटणें, अंगाची कातडीं सोलणें, डागणें, कढत तेलाचे थेंब अंगावर टाकणें, उपवासी ठेवणें, लहान अर्भकांची त्यांच्या मातापितरांसमोर कत्तल करणें इत्याद्यनेक अनन्वित छळ त्यांच्या पूर्वजानीं सोसलेले त्यांच्या स्मरणांतून इतक्या लवकर जाणें शक्य होतें काय? पण आजची वस्तुस्थिति काय दर्शविते? त्याचेच वंशज हे बाटके ख्रिश्चन आज आपलें राष्ट विसरले आहेत, पोर्तुगाल हीच त्याना आपली जन्मभूमि वाटत आहे!! ज्यांनीं आपल्या आयावहिणींचे धिंडवडे काढले ज्यानीं आह्माला परतंत्र व केवळ दास बनविलें, ज्यानीं आमचें वैभव हिरावून नेलें ज्यानीं संस्कृति नष्ट केली, धर्म बुडविला, राष्टीयत्वास निर्मुल केलें. त्यांच्या पुढें लागून चालन करून आनले इतर भाई जे हिंदु त्यांच्या चुगल्या गामोत्सवासारख्या प्रसंगीं करण्यास ते चुकत नाहींत! राष्टाचें दुसरें दुर्दैव तें कोणतें? वास्तविक गामा हा कांहीं गोमांतकाचा काका लागत नाहीं. याच्याकडून गोमांतकाला फायदा होण्याऐवजीं तोटाच अधिक झाला आहे. अखिल गोमांतक वासियानीं—मग ते बाटके असोत, हिंदु असोत अगर मुसलमान असोत—याची स्मरण तिथि पाळगायलाच पाहिजे असें असेल तर ती हरताळाच्याच रूपानें पाळायला पाहिजे होती. परंतु हे आमच्यांतीलच राष्टबुडवे बाटके, 'मी पोर्तुगीज नागरिक आहें' या भावनेनें स्वत्व विसरून गामाच्या भजनीं लागल्यावर हिंदूंना चूप बसण्यापलिकडे गत्यंतर नव्हतें. बरें असें करण्यापासून त्यांचा विशेष फायदा झाला किंवा होणार असें नाहीं. चतुःसांवत्सरिक उत्सवाप्रीत्यर्थ खर्च झालेल्या रकमेची भरपाई होण्याकरितां जो पोस्टेज वाढविण्यांत आला तो या ख्रिश्चनानां तेवढा माफ अशांतलाहि प्रकार दिसला नाहीं. येऊन जाऊन कायती नोकरशाहींत जरा ऐस पैस जागा यानां मिळेल; पण त्यामुळें हिंदूंचें नुकसान न होतां झाला तर फायदाच होईल असें मानण्यास भरपूर आधार आहे. जो उठे तो दोन अक्षरें आलीं रे आलीं नोकरीच्या मागें लागे. त्यामुळें कृषिकर्माकडे दुर्लक्ष होऊन जात असे आणि पगाराचें मानहि जिवनकलहार्थ जेमतेमच पोषक होत असल्यामुळें अशांची प्रवृत्ति लांचलुचपतीकडे झुकत असे. ह्मणून सरकारनें एकाहि नोकरी हिंदुकडे सोंपविली नाहीं तरीहि फारच नामी गोष्ट होणार आहे. हिंदूंतील ऐदीपणा नष्ट होण्यास सरकारकडून ही एकप्रकारची मदतच होणार आहे. पण नोकरीचा एथें प्रश्नच नाहीं. आहे तो राष्ट्रीयत्वाचा आणि आमचे ख्रिश्चनबंधु तो साफ विसरून गेले आहेत. यामुळें गोमांतकीय राष्ट्रीयत्व, गोवा प्रांत आणि पोर्तुगाल यांच्या दरम्यान असलेल्या सागरांत गटंगळ्या खात आहे!

अर्थात स्वत्व नाहीं, स्वाभिमान नाहीं राष्ट्रीयत्व नाहीं तेथल्या लोकांवर घरदार नसल्यामुळें पोर्तुगालांत स्वस्त अशा पांचव्या मजल्यावर उदक पाण्याची हालअपेष्टा सोसून रहाणाऱ्या, व ज्यांची नजर स्वार्थापलीकडे गेलेली नाहीं अशा हलक्या दर्जाच्या मनुष्यांच्या हातांत सत्ता यावी व त्यानीं मनमुराद बिनधोक गोंधळ घालून आपला तळीराम गार करून घ्यावा यांत नवल तें काय? येथें जर राष्ट्रीयत्व असतें तर त्याच्या चैतन्यानें परकी लोकांचे डोळे दिपले असते. नोकरी ह्मणजे सुळावरची पोळी, याची जाणीव विसरून कायद्याची पायमल्ली झाली नसती आणि कदाचित अशा परिस्थितींत सध्याच्या सारखे स्वार्थसाधु व भित्रे गव्हर्नर आणि इतर अधिकारी इकडे येण्यास गांगरले असते.

पण येथला राष्ट्रीय मृतपणाचा परिचय पूर्णपणें त्यानां झालेला असल्यामुळेंच त्याना फावतें! राष्ट्रीय भावना उद्दीपीत व्हावयाला कालावधी पाहिजे. अशा परिस्थितींत या अधिकारी वर्गानें दाखविलेल्या मार्गानें जाणें उचित आहे एवढें जरी आमचे लोक समजले तरी आमच्या राष्ट्राला बरीच मदत होणार आहे. आह्मी कोण व आमचें ध्येय काय यांची ज्यानां जाणीव नाहीं त्यानीं निदान सरकारनें आपल्या सोदाहरण कृतीनें कसें वागावें याचा कित्ता घालून दिला व देत आहे तिकडे तरी अवश्यमेव लक्ष्य देऊन तसें वागणें न्याय्य नाहीं काय? राजा कालस्य कारणंम् हें तत्व जर खरें आहे तर सरकारच्या वागणुकीप्रमाणें आमची वर्तणूक व्हावयाला नको काय? सरकारनें जर रयते बरोबर जुवा खेळण्याचें आरंभलें तर प्रजेनें त्याच्याबरोबर खेळावयाला नको काय? गव्हर्नरनें एखादा खेळ आरंभावा व त्यांत भाग घेण्याची नाखुषी दर्शविल्यास प्रो. आत्माराम पैपाळंदीकर यांच्यासारख्याची उचलबांगडी व्हावी. सांगे मुनिसिपालिटीसारख्या स्थानिक स्वराज्यात ढवळाढवळ करतानां कायदेभंग गव्हर्नरनी जाणून बुजून करावा, स्वतःची अब्रू चव्हाट्यावर येण्याचा संभव असल्यावरून लोकमत व तेंहि नुसतें लोकमतच—दर्शविल्यास 'भारत' व 'हिंदु' सारख्या वर्तमानपत्रांवर खटले भरावे— मिलिटरी खात्याच्या ऐदी लोकानां फुकटचा विनगरजे शिवाय पगार वाढविल्याबद्दल तक्रार वर्तमान पत्रकर्त्यांनीं केल्यास त्यांच्या संपादकानां शेंकडो लोकांसमोर मरपर्यंत मारावें व सरकारनें अशानां शिक्षा न करतां त्यांच्या कृत्याची उलट स्तब्धतेनें कौतुक करावें हें सर्व आह्मांला काय सांगतें? वरील गोष्टी आह्माला काय सुचवितात? वरील प्रकारच्या कृति आह्माला कोणता धडा देतात? अश प्रकारांत काय संभवतें? वरील सर्वांत एकच गोष्ट आह्मांला दाखविली जाते आणि ती 'कायदेभंग' ही होय. सरकार स्वकृतीनें 'कायदेभंग करा' असेंच सांगत आहे. तेव्हां स्वतःची अक्कल नसली तरी सरकार जी बहुमोल अक्कल देत आहे, जो धडा त्यानें घालून दिला आहे, त्यांत किती पारंगतपणा मिळविला आहे, तो धडा किती दक्षतेनें पाठ केला आहे हे आह्मीं त्यानां दाखवावयाला नको काय? सरकारनें आमच्याशीं कायदेभंग केला, आह्मीं सरकारशीं कायदेभंग केला पाहिजे. असाच 'जशास तसें' या राजमान्य राजकीय नीतीस अनुसरून नाहीं काय? खुनास खून, अपराध्यास शिक्षा, शठंप्रति शाठ्यंम ही राजन्यायाचीं अंगें नाहींत काय? ह्मणुनें सरकारनें सुचविलेला कायदेभंगाचा उघड संदेश जनतेस कळविण्याची कामगिरी आह्मीं स्वखुषीनें पत्करली आहे आणि या परोपकाराबद्दल सरकार आमचें सदैव ऋणी राहील यांत शंका नाहीं.

सारस्वत ब्राह्मण समाज–मडगांव

जाहिर विनंति

सालाबादप्रमाणें शिवजयंत्युत्सव तारीख १३–३–२५ फाल्गुत वद्य ३ या शुक्रवार रोजीं संध्याकाळीं ७॥ वाजतां समाज-गृहांत साजरा होणार असून, तन्निमित्त निरनिराळ्या वक्त्यांचीं भाषणें होतील. तरी सर्वांनीं वेळेवर हजर राहण्याची कृपा करावी.

सेक्रेटरी
केशव अनंत नायक.

हुशार व गरीब विद्यार्थ्यांची सोय !

पुणें अनाथ विद्यार्थीगृह

१ पुणें अनाथ विद्यार्थी गृहात नवीन विद्यार्थी घ्यावयाचे आहेत. विद्यार्थ्यांचें वय १२–१५ असून तो निदान मराठी ४ थी इयत्ता पास असावा. बुद्धीनें हुशार, शरीरानें सुदृढ, व स्वभावानें सुशील असेच विद्यार्थी घेतले जातील.

२ संस्थेचें स्वतःचें महाराष्ट्र हायस्कूल असून त्यांत बौद्धिक शिक्षणाबरोबर धंदे शिक्षणहि दिले जातें. होतकरू मुलाच्या कॉलेज शिक्षणाचीहि व्यवस्था होते.

३ फक्त गरीब विद्यार्थीच या संस्थेंत घेतले जातात. पैसे घेऊन सुखवस्तु विद्यार्थी घेतले जात नाहींत घरीं आपल्या ताब्यांत रहात नाहींत ह्मणून उनाड मुलें सुधारण्याकरितां पालक आणितात; तसेंच शाळेंत बुद्धि चालत नाहीं ह्मणून बुद्धिमंद मुलें कांहीं पालक आणितात; पण अशा मुलांची या ठिकाणीं सोय होऊं शकत नाहीं. उभयतांना विनाकारण पत्रव्यवहाराचा व गाडीभाड्याचा त्रास पडूं नये, ह्मणून या सूचना दिल्या आहेत.

४ संस्थेंत येऊं इच्छिणाऱ्या मुलांनी ०)= च्या पोस्टेजसह छापील अर्ज नमुने मागवून घ्यावेत व ते १७ मार्चचे आंत भरून पाठवावेत.

६१७ कसबा पुणें. { वि. गं. केतकर. व्य.अ.वि.गृह,पुणें.

भारत

मिति फाल्गुन व० २ या शके १८४६

आक्षेपार्ह लेखाचें मराठींत भाषांतर

ज्या पोर्तुगीझानें हिंदुस्थानचा मार्ग शोधून काढला असें युरोपियन नजरेस दिसतें; त्या वास्कॅडिगामाची पुण्यतिथी सरकार व सरकारावर प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष अवलंबून असलेले बगलबच्चे येत्या ता. २३, २४ व २५ रोजीं पाळणार आहेत. ह्या समारंभास लागणारा सर्व पैसा वसाहतीच्या तिजोरींतून—गोमातकीय गंगाजळ तून—खर्च केला जावयाचा असून सरकारनें त्यासाठीं १४ हजारांवर कांहीं रुपये मंजूरहि केले आहेत.

ज्यांच्याविषयीं जित लोकांच्या अंतःकरणांत तिलमात्रहि आदर वसत नाहीं, उलट जित वर्ग ज्याच्याविषयी निर्भेळ उदासीनत्वच धारण करतो अशा आपल्या कांहीं भावनासाठीं—विकार शांततेसाठीं ह्मटल्यासहि चालेल—जित लोकांच्या पैशाची उधळपट्टी आजपर्यंत लाखों खेपा जेत्यांनीं केलेली असून ही तदनंतरची खेप होय ! खरेंच ! लोकलबोर्डें, मुनिसिपालिट्या ह्यांसारख्या संस्थाकडून आज दिवस ग्रामोत्सवाच्या तऱ्हेवाईक, कौतुकास्पद, चटकदार, व औत्सुक्य वर्धक कार्यक्रमाच्या जाहिराती फडकविल्या जात असतां लोकसमाज ह्या उत्सवापासून शक्य तितका दूरच रहात आहे. ह्या गोष्टीवरून आमच्या वरील विधानाची सत्यता पटते. आणि ह्मणूनच जिज्ञासु जीवाच्या समाधानार्थ आणखी पुरावे पुढें करण्याचें कारणच उरत नाहीं, हें स्पष्ट व उघड ठरतें.

पाश्चात्य सुधारणा आर्यावर्तास बहाल करणारा पहिला विजयी वीर ह्या नात्यानें वास्कोडिगामाच्या नावें त्याची मृत्युतिथी आठवून सरकार व त्याचा बगलबच्चा अगर जो हुकूमवर्ग चैन, चंगळ व पैशांचा धुगडा उडवीत असतां आह्मी मात्र ज्या भूमीची औद्योगिक, भौगोलिक व व्यापारविषयक उपयुक्तता नव्हे अनुपमता पाहून पोर्तुगालचा जाडा मुत्सद्दी आल्फोन्सो ऑल्बुकेर्क ह्यास ती आपैली राजधानी करावीसें वाटलें. आपल्या राजकारणाचें केंद्रस्थान करावेंसें वाटलें त्या गोमातकाच्या उन्नतीवर पाश्चात्य सुधारणेचा कोणता परिणाम कसा झाला ह्याचा एकांतात बसून विचार करण्यास सर्व लोकांस आम्हीं आव्हान देतों.

गोमांतक—मलबार किनाऱ्यावरील हा तुकडा सुधारण्याचें कंकण पोर्तुगालनें हातीं बांधल्यास आज चार शतकांहून अधिक वर्षें लोटलीं. इतकीं वर्षें पोर्टुगाल ही भूमि उन्नतावस्थेस नेण्याची खटपट करीत आहे. तरीहि कारभारी लोकांच्या धडपडीनंतर व प्रजेचे अनंत हाल होऊनहि चालू २३, २४ व २५ या तारखांस जें दृश्य दिसतें तें पुढीलप्रमाणें होय.

मनुष्यें नैतिक व शारीरिक बाबतींत धुळीस मिळालेलीं कुटुंबें, स्थितिस्थापकता किंबहुना आधार नसून लंगडीं झालेलीं, सर्व समाज विरघळण्याच्या-अधःपाताच्या स्थितीस पोंचलेला, प्रेम व शक्ति हीं ज्यांच्यापासून उत्पन्न होतात अशा उच्च सद्गुणांनीं रहीत, कलाकौशल्य शून्यवत, व्यापारधंद्यांचा पूर्ण अभाव व निर्गत मालापेक्षां आयात मालाचा भरणा जास्त, शेतीभातीचें उत्पन्न कमी प्रमाणावर व उद्यांचा दिवस कसा ढकलेल ह्याची खात्री नसल्यामुळें जमीन जुमले पाड टाकून परदेशगमनाची वीतभर पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठी मातृभूमि वियोगाची प्रवृत्ति दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणांत आहे. मनुष्य जातीचीं जीं दोन घोर दैन्यें दारू व तंबाकू ह्यांचें लोक बेसुमार सेवन करीत सुटले आहेत. अधःपतनाच्या ह्या खोल गर्तेंतून वर येण्याची दिशा आह्मांस दाखवून देणारा एखादा महात्मा ह्या पौर्वात्य देशांत सध्या कुठें दिसत नाहीं; पण हे सुधारणेचे परिणाम मात्र आमच्या उघड्या डोळ्यांस दिसत आहेत.

गुन्ह्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. खून होत आहेत. विषप्रयोग तर 'मी मी' ह्मणतच आहेत. चोऱ्या व स्त्रियांची अब्रू हानि ह्यांच्या विषयीं तर बोलूंच नये. दारिद्र्याच्या सहकारी क्षयावस्थेनें तर आपलीं पाळें मुळें आमच्या ह्या देशांत बरींच पसरलीं आहेत व शेकडों, हजारों लोकांचा बळी ती रोजरोज घेतच आहे. उपदंश तर जिकडे तिकडे बोकाळलेला दिसत आहे. कांहीं तालुक्यांनीं तर त्याचें प्रमाण लपून छपून कां होईना हिंवज्वराबरोबर आहे.

लोकांनां महाग झालेलें व शाळांनीं दिलें जाणारें परिणामशून्य शिक्षण मिळत असतांहि निरक्षरतेचें प्रमाण भयंकर स्थितींत आहे. ज्ञानहिन लोकांच्या नुकसान भरतीसाठीं ह्मणून आह्मांपाशीं चांगल्यापैकींहि कांहीं निवडक मंडळी नाहीं. ग्रॅज्युएट लोकांच विध्वंसक पथक मात्र भरपूर आहे व मुंडली [एक प्रकारचा कीडा] माडाचा जसा नाश करिते त्याचप्रमाणे हे लोक देशाचें नुकसानच करीत आहेत. बंडे रस्ते व मोठे पूल कागदी नकाशावर मात्र दिसतात; बाकी जे कांहीं वस्तुस्थितींत टिकाव धरून आहेत ते जाण्यायेण्याला निवळ निरुपयोगी आहेत. नद्यांतून सफर करणाऱ्या वाफेच्या बोटींत बसणें, प्रवाशानां एक जीवावरचें संकटच वाटत आहे. हिंदी कलाकौशल्याची, जुन्या इमारतींची व ग्रंथाची इतिश्री केली गेली आहे. मग ती मूर्तिभंजक आवेशामुळें असो किंवा रक्षण करण्यास असमर्थ ह्मणून असो, पण प्राचीन कलाकौशल्य लुप्त झाले मात्र खरें.

देशाची मूळ भाषा मेली मात्र नाहीं पण मरण्याच्या पंथास लागली आहे.

ह्या सर्वांचें तात्पर्य हेंच कीं, आह्मी आज नैतिक, सांपत्तिक, शारीरिक व बौद्धिक दृष्ट्या खालावलेले आहोंत.

खरोखर, आज आमचा देश अशा करुणास्पद स्थितींत असतां स्मारकासाठीं हजारों रुपयांची उधळपट्टी करून आपल्या बगलबच्चांसह मजा मारण्यास ही परिस्थिति उत्कृष्ट आहे ! ह्याचें कारण हें कीं जे लोक एका काळीं उच्चतम स्थितींत होते, ते पूर्वकालीन एका घोड चूकीचा परिणाम ह्मणून बिघडण्याच्या पंथास लागले आहेत.

[भारत, अंक ३८ वर्ष ९]

स्फुट विचार

महात्मा गांधी व एक क्रांतिकारकः— गेल्या महिन्याच्या ता. १२ च्या 'यंग इंडियां'त महात्मा गांधींनीं आपणास आलेलें एका क्रांतिकारकाचें पत्र समग्र छापिलें असून त्याच्या खालीं त्या पत्रास आपलें उत्तरहि प्रसिद्ध केलें आहे. त्या पत्रलेखकानें महात्माजीस आपलें नांव कळविलें आहे, पण पत्ता मात्र दिलेला नाहीं. आपल्या पत्रांत त्या पत्रलेखकानें महात्माजींस इतउत्तर 'तुह्मीं राजकारणांतून आपलें अंग अजिबात काढून घ्यावें एक; अगर क्रांतिकारकानां अडथळा न होतां उलट मदतच होईल अशा रीतीनें आपल्या चळवळींचा मोर्चा फिरवावा एक, अशी विनंतिवजा ताकीद दिली आहे. त्या पत्राच्या उत्तरांत आपल्या नित्याच्या गोडपण हृदय थरारून सोडणाऱ्या शद्बांत महात्माजी लिहितात "माझा संदेश देशाला न पटतां रक्ताच्या नद्या वाहविणाऱ्या क्रांतीचीच हिन्दी जनतेस लालसा असल्याचें जर मला आढळून येईल, तर तत्क्षणीं राजकारणाच्या आखाड्यांतून मी निघून जाईन.×××× क्रांतिकारकांची चळवळ हिंदुस्थानांत यशस्वी होणें अशक्य आहे असें माझें ठाम मत आहे, कारण त्या चळवळीला बहुजनसमाजाचा कौल मिळणें शक्य नाहीं. आणि यदाकदाचित या चळवळीच्या वांट्यास यश आलेंच तर बहुजन समाजाला मात्र तें जास्तच जाचक होईल. ज्या चळवळींत बहुजनसमाजाला सामील होतां येत नाहीं, त्या चळवळीनें मिळालेलें स्वराज्य हें त्यांच्या वांट्याला पराज्यच होय. कारण बहुजन समाजाला असल्या प्रकारांचा परिणामार्तीं परकीय सत्तेसारखाच जाच होईल.

महात्माजींचें शत्रुत्व कोणाशीं ?:— "धर्मासाठींच मी राजकारणाच्या आखाड्यांत उतरलों आहें, धर्मासाठींच जगण्याची माझी इच्छा आहे, व जरूर पडल्यास धर्मासाठींच देह ठेवण्याची माझी तयारी आहे" अशा तऱ्हेचे वेळोवेळ उद्गार काढून "धर्म व राजकारण" ह्यांची सांगड घालणाऱ्या विसाव्या शतकांतील समर्थ रामदासांच्या – शांतिसम्राट महात्म्याच्या लेखणींतून उतरलेल्या वरील विचारांचें निर्विकार मनानें मनन करणाऱ्यास त्यांत गोवल्या गेलेल्या दुहेरी सत्याचा साक्षात्कार झाल्यावांचून रहात नाहीं. ज्याच्यासाठीं ते एवढे झटताहेत त्या भावी हिन्दवी स्वराज्याचें निशाण प्रतिस्पर्ध्याच्या लाल रक्तानें माखलेलें असणें त्यास मुळींच नको आहे. धर्म व सत्य ह्या जगांतील दोन श्रेष्ठतम तत्वांचें जर हिन्दी जनतेस पाठबळ आहे तर सत्याच्या जोरावर आपल्या प्रतिस्पर्ध्यास जिंकणें त्यांस केव्हांहि अशक्य नाहीं असें त्यांचें ह्मणणें आहे. स्वातंत्र्यासाठीं दुसऱ्याचे प्राण घेण्यापेक्षां स्वधर्मासाठीं स्वतःचे प्राण देण्यानेंच अधिक उज्वल स्वार्थत्याग व्यक्त होत असतो. ही त्यांची विचारसरणी कोणाहि हिंदुधर्मानुयायांस सहज पटण्याजोगी आहे, कारण आह्मां हिंदूंच्या चळवळीला व्यक्तिविशिष्ट स्वरूप असें कधींच येत नसतें. ब्रिटिश लोक युरोपांतून येऊन आह्मावर सत्ता गाजवितात—आमच्या नैसर्गिक स्वातंत्र्यावर घाला घालतात ह्मणून त्यांचा व्देश करणें महात्माजींस अर्थातच पसंत नाहीं. इंग्रजांस आपले राजकारणातील प्रतिस्पर्धी किंवा शत्रू मानण्यास ते तयार नसून सध्यांच्या द्विदल राज्यपद्धतीशींच ते शत्रूत्व करितात हें ह्यावरून सिद्ध होतें.

महात्माजींच्या मार्गांचा मूल सिद्धांतः— त्या क्रांतिकारकानें आपल्या पत्रांत केलेलीं विधानें खोडून काढण्याच्या भरांत महात्माजीनीं खरोखरच आपलें हृदय खुलें करून दाखविलें आहे. ते ह्मणतात "ज्या चळवळींत बहुजन समाजाला सामील होतां येत नाहीं, त्या चळवळीनें मिळालेलें स्वराज्य हें त्याच्या वाट्याला पराज्यच होय" स्वतः महात्माजीनीं आजपर्यंत असा कोणताच कार्यक्रम आंखलेला नाहीं कीं, ज्यांत बहुजन समाजाला भाग घेतां येत नाहीं. दक्षिण आफ्रिकेंतील त्यांची चळवळ घ्या, सामुदायिक कायदेभंग घ्या, असहकारिता घ्या, बहिष्कारपंचक घ्या; व कायदेभंगाची कल्पना नैराश्याच्या वातावरणांत साफ वितळून गेल्यावर विजयानगर कॉंग्रेसींत त्यांनीं लोकसमाजापुढें फेंकलेलीं चरखा, हिंदु–मुसलमान ऐक्य व अस्पृश्यता निवारण हीं विधायक कार्यक्रमाची तीनहि अंगें घ्या—आपणास असेंच आढळून येईल कीं, राष्ट्रापुढें ठेवावयाच्या कार्यक्रमाची उभारणी व जुळवणी महात्माजी, त्यांत बहुजन समाजाला हक्कानें भाग घेतां येईल, अशाच रीतीनें करीत असतात. स्वराज्य हें ज्याचें साधन तें सुराज्य जर हिंदी जनतेला उपभोगावयाचें असेल तर स्वायत्ततेची इमारत उभारण्यांत हिंदी ह्मणविणाऱ्या प्रत्येकास भाग मिळणें इष्ट व वाजवी आहे हें कोणीहि कबूल करील. स्वराज्य मिळविण्यास किती परिश्रम पडतात हें समजून आल्याशिवाय तें राखावें कसें, हें समजणें दुरापास्त आहे. नाहीं तर आमच्या गोमांतकासारखी कदाचित स्थिति व्हावयाची !

———

Ano 9 N. 51

C[illegible]ra 19 de Março de 1925

ASSINATURA
[illegible] cada ano tres rupias

ANUNCIOS
[illegible]ha ainda que repetida uma tanga
[illegible]amero avulso uma tanga

DIRECTOR E EDITOR
G. P. Hegdó Dessay
Quepem-Goa

भारत
BHARAT

वर्ष ९ वें. अंक ५१
गुरुवार ता. १९ मार्च सन १९२५

वर्गणीचे दर.
सालीना ट. ख. सह ३ रु. (आगाऊ)

जाहिरातीचे दर.
समक्ष अगर पत्रद्वारें.

संपादक व प्रकाशक.
गो. पु. हेगडे दसाई

ETERNO CARNAVAL

Estamos no mez de *Xigmó*, isto é, na época do *carnaval hindú*, periodo destinado a divertimentos públicos entre os sectarios do *Bramá*.

Quem, como nós, conhece, porém, a fundo o nosso divertido meio, propenso a pandegas de toda a sorte e .. morte, desde logo se persuade, sem esforços de maior, de que estamos num entrudo que não tem limites—num carnaval eterno—numa orgia sem fim.

Isto de dizer, portanto, que "estamos no mez de Xigmó" não passa duma expressão pleonastica, porquanto temos aqui sempre, durante os doze mezs de que o ano se compõe, o tal periodo destinado a divertimentos públicos...

Não faltam entre nós bailes de desusada pompa, ladainhas brilhantes, entronisações concorridas, *natocas*, sessões extra ordinarias e ordinarias do Conselho Legislativo; não se sente a falta do *circus*, de eleições das juntas locais, camaras municipais, dos deputados, dos senadores e do... Hospicio do *Sagrado Coração de Jesus*; há, finalmente, entre nós uma *cornucópia* alegre de diversões fantasticas, *aclimataveis* a todos os sabores...e *rubores*, entrando no seu n° a batota e o alcoolismo.

Era desnecessario fazer-se, pois, menção especial do *Xigmó*. E, se apezar disso, a fazemos, é simplesmente para que o zé-povinho não se julgue numa época especial, numa fase particular do ano.

Se não digam:

¿ Quando nos sentimos mal aqui, apesar de *avalanche* de impostos, criação desnecessaria de mil e um encargos e tantos outros atentados contra os mais sacrossantos interesses, contra as mais legitimas aspirações do nosso Paiz ?

Pelo contrario, sempre nos sentimos bem, sem despreocupações de especie alguma, como filosofos da antiga Grecia.

Carnaval ! Xigmó !

Pense cada um na sua vida de cidadão e veja se lhe assiste o direito de se divertir, estando o Paiz sob o jugo indomavel de opressões e desatinos administrativos que lhe asfixiam o progresso, enlameando-o no lodaçal da miseria.

DE RELANCE...

A' PROVINCIA

O jornal europeu— *A Provincia* estampando nas suas colunas a fotogravura do sr. dr. Siurama Rau dedica a este ilustre magistrado o seguinte elogio, de mistura com uma adjectivação biliosa e fedorenta á imprensa que se absteve de tomar parte no centenario do Gama:

"Dr. Siurama Rau — *E' uma individualdade que marca na India Portugueza. Desempenha o cargo de delegado do M. P. na comarca de Baadez. Amigo de Portugal, conhecendo o nosso paiz metropolitano onde fez a sua formatura, revoltou se contra individuos desorientados que feriram uma nota anti-patriotica por ocasião do 4° centenario da morte de Vasco da Gama, e rompendo com a popularidade que o tem aclamado, veio á imprensa açoutar os que sem titulos que os recomendem atrairam sobre uma classe digna de respeito, como a hindú, as más vontades dos verdadeiramente patriotas.*"

Pelo visto, o sr. Pereira Batalha é um eminente advogado—de causas perdidas. A sua pericia juridica consiste em es tragar *artisticamente a* defeza da causa que lhe fôr confiada.

Não admira, por tanto, que Sua Excia. que pretendeu defender a *causa* do sr. Rau, lha tivesse comprometido e duma maneira completamente desastrada

Ora diga-nos, sr. Batalha. Se o sr. dr. Rau *rompeu com a popularidade que o aclamara, pelo facto de ter ele vindo á imprensa açoutar os que atrairam sobre uma classe digna de respeito, como a hindú as más vontades dos verdadeiramente patriotas,* ¿ fes bem ou mal o delegado do M. P. na comarca de Bardez ?

Quem tem um pouco de bom senso, inclina-se logo a responder que o sr. dr. Rau fez mal, *rompendo com a popularidade* por sua prosa tão extemporanea quão inconveniente.

Dum lado confessa a *Provincia* que o sr. Rau perdeu a popularidade com a sua vinda á imprensa e doutro lado o elogia por esse facto !

E' bico ou cabeça ?

De resto, a caneta do sr. Pereira, Batalha, escrevendo o que escreveu, só fugiu para a verdade.

O sr. dr. Rau gosava de *popularidade* na sua classe, porque esta o supunha indiferente aos festejos do centenario do Gama; mas, quando a mesma classe se persuadiu de que andava iludida, porisso que aquele distincto magistrado vinha á imprensa *açoutar* os seus verdadeiros representantes, colocando-se ao lado do centenario retirou lhe, desde logo, a simpatia, ficando *ipso facto* o constituinte do *advogado* sr. Batalha *rompido* com a popularidade *que o aclamara*.

Na politica, nem sempre triunfa a *intrujice*. Saiba o o jornal—*A Provincia* e saibam-no todos quantos se distinguem pela veleidade de pensar como êle.

Para a gente ser lógica, não lhe bastam apenas *titulos que a recomendem*. Necessário é ter o que precisamente falta ao sr. Batalha: inteligencia e sinceridade.

PREMIO AO MERITO

O sr. Pandurongá Sacarama Sinai Sirvoicar, ilustre secretario de Fazenda do concelho de Salsete foi transferido para o identico cargo de Pernem.

Naturalmente, o governo deve ter colocado o sr. Sirvoicar no concelho de Pernem em atenção aos relevantes e *altissonantes* serviços por ele prestados ao centenario de Vasco da Gama.

A transferencia do sr. Pandurongá indica bem, pois, que o Governo nunca olvida os funccionarios que o servem a valer.

Nossas calorosas felicitações tanto ao beneficiado sr. Sirvoicar como ao benfeitor agradecido do Governo.

"O LIBERTADOR"

Recebemos a visita deste brilhante semanário republicano de Lisbôa de que é fundador o intemerato e desinteressado jornalista sr. Martins Junior.

Tanto material como moralmente, o jornal— *O Libertador* é um verdadeiro primor e, porisso, entendemos, tambem, que todo o sincero republicano deve lêr o referido jornal e fazê-lo circular.

Agradecendo a visita, desejamos ao simpatico colega longa dura e perene ventura.